Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

श्री एकनाथ महाराज कृत

श्री भावार्थ रामायण

हावभाव कटाक्षप्रदेशीं। नृत्य करिती देखोनि श्रीरामासी।
अनागत भाष्य वदला ऋषी। त्या रामायणासी पैं गाती ॥

निर्णयसागर शताब्दि प्रकाशन

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

CC-0. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

CC-0. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

श्रीएकनाथ महाराजकृत

श्रीभावार्थरामायण

शृण्वन् रामायणं भक्त्या यः पादं पदमेव वा ।
स याति ब्रह्मणः स्थानं ब्रह्मणा पूज्यते सदा ॥

प्रथमावृत्तीचे संपादक

श्री. रा. रा. भालचंद्र शंकर शास्त्री देवस्थळी

शताब्दि आवृत्तीचे संपादक

ज्योतिर्विद् कृष्णाजी विठ्ठल सोमण

निर्णयसागर शताब्दि प्रकाशन

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

दुसरी निर्णयसागर शताब्दि आवृत्ति

शके १८९०; सन १९६९

किंमत पन्नास रुपये

मुद्रक व प्रकाशकः—श्रीमती लक्ष्मीबाई नारायण चौधरी,
निर्णयसागर मुद्रणालय, २६-२८ डॉ. एम्. बी. वेलकर स्ट्रीट, मुंबई २.

CC-0. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations



Copy Right Reserved by Publisher

RAM DARBAR 816

HARNARAYAN & SONS.
335, Kalbadevi Road BOMBAY 2

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

प्रथमावृत्तीची प्रस्तावना

जगामध्यें मनुष्यास केवळ प्रापंचिक गोष्टींचाच विचार कर्तव्य नसून, त्याचें येथील आद्य व पवित्र कर्तव्य म्हटलें म्हणजे पारमार्थिक गोष्टींचा विचार करणें हें होय. आणि हें मुख्य व अत्यंत महत्त्वाचें कर्तव्य पार पाडण्यास उत्तमोत्तम साधन म्हणजे आत्मज्ञान, परोपकार, धर्मनिष्ठा, नीतिमत्ता इत्यादि आपल्या अंगच्या अलौकिक गुणांनीं पृथ्वीतलावर गाजलेल्या साधुपुरुषांच्या ग्रंथांचें अहर्निश मनन करून त्यांत उपदेशिलेल्या मार्गाचें अवलंबन करणें हेंच एक होय.

साधुपुरुष आजवर अनेक होऊन गेले आहेत; परंतु त्यांमध्यें संसाराचा त्याग करून व एकांतवास स्वीकारून आपलें स्वतःचें कल्याण करून घेणारे असेच बहुतेक असल्यामुळें अर्थातच ते लोककल्याणार्थ सर्वस्वी आदर्श असे झाले नाहींत. त्यांहून प्रपंची जनांच्याच सांनिध्यांत राहून त्यांस 'प्रपंच साधुनि परमार्थाचा लाहो' करून देणारे असे जे थोडेसे साधुपुरुष होऊन गेले आहेत, तेच जनतेस विशेष वंदनीय व आदरणीय झाले असल्यास त्यांत नवल नाहीं.

अशा प्रकारच्या साधुपुरुषांमध्यें प्रमुखपणें गणना करण्यासारखे म्हटले म्हणजे एकनाथस्वामी हे होत. गृहस्थाश्रमांत राहून व आपली ब्रह्मस्थिति कायम ठेवून जनतेच्या कल्याणार्थ निरपेक्षतेनें झटणारे एकनाथस्वामीं-सारखे सत्पुरुष विरळाच आढळून येत असल्यामुळें ते जनांच्या आदरास विशेष पात्र व्हावे व त्यांची कीर्ति सर्वत्र पसरून रहावी हें साहजिकच आहे. एकनाथांचा कोणताही ग्रंथ घ्या, त्यांत आत्मज्ञान, धर्म, नीति इत्यादि उदात्त तत्त्वें जनांच्या हृत्पटलावर उत्तम वठतील अशा तऱ्हेनें वर्णिलीं असल्यामुळें त्यांचे ग्रंथ आबालवृद्धांस सारखेच प्रिय झाले आहेत. असे ग्रंथ म्हणजे लोककल्याणार्थ खुलीं करून ठेविलेलीं उपदेशामृताचीं भांडारेंच होत, व त्यांचें वाचन हाच आम्हां संसारी जनांस उत्तम तरणोपाय होय.

एकनाथांचे उपलब्ध असे सात ग्रंथ आहेत. त्यांत एकनाथी भागवत व भावार्थरामायण हे दोन मोठे ग्रंथ आहेत. ह्यांतील पहिला—एकनाथी भागवत—अध्यात्मविषयक असल्यामुळें अर्थातच तो सामान्य जन-समूहाच्या आटोक्याबाहेरचा झाला आहे. दुसरा ग्रंथ भावार्थरामायण हा चरित्रविषयक आहे. त्याचा विशेष गुण हा आहे कीं, तो ऐतिहासिक असूनही अध्यात्मविषय त्यांत मोठ्या खुबीनें व अत्यंत सुलभतेनें ग्रथित केला असल्यामुळें भोळ्या भाविकांपासून तों मोठ्या विद्वानांपर्यंत हा ग्रंथ सर्वांच्या आदरास पात्र झाला आहे. एकनाथी भागवत ह्यापूर्वींच प्रसिद्ध केलें असून नाथांचा दुसरा मोठा ग्रंथ भावार्थरामायण हा आज आम्ही आमच्या रसिक वाचकांपुढें ठेवीत आहों.

भावार्थरामायण हा एकनाथस्वामींचा उतारवयांत लिहिलेला—अगदीं शेवटला ग्रंथ आहे. हा वाल्मीकि-रामायणावरील टीकाग्रंथ आहे. आधींच वाल्मीकिरामायण म्हणजे भक्तिज्ञानवैराग्यादिवर्णनांनीं परिपूर्ण असून त्यांत नाना रसालंकारांचा उत्तम परिपोष झालेला, आणि त्याला एकनाथमहाराजांसारख्या रसिक कवीच्या प्रासा-दिक टीकेची जोड. मग त्या अपूर्व ग्रंथाची थोरवी कोठवर म्हणून वर्णावी ? भावार्थरामायणाशिवाय श्रीराम-चरित्रकथनाचे दुसरेही अनेक ग्रंथ असून त्यांत तुलसीदासजींचें व्रजभाषेंतील तुलसीरामायण व श्रीधरस्वामींचा

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

मराठी भाषेंतील रामविजय हे ग्रंथ मुख्य आहेत. ते अत्यंत प्रासादिक उतरले असून विद्वज्जनांस रंजविणारे असे झाले आहेत.

भगवान् श्रीरामचंद्रांचें अवतारचरित्र (रामायण) ठाऊक नाहीं असा मनुष्य भरतखंडामध्यें क्वचितच आढळून येईल. महर्षि वाल्मीकीनें रामावतार होण्यापूर्वींच रचून ठेविलेल्या या आध्यात्मिक व ऐतिहासिक काव्याची आर्यावर्तांत केवढी श्रेष्ठता आहे हें सांगण्याची येथें आवश्यकता नाहीं. हा रामायण ग्रंथ मानवी समाजास केवळ आदर्शभूत असा आहे. हा संस्कृतांत असल्यामुळें त्यांतील रसास्वाद घेणें संस्कृतभाषा न जाणणाऱ्या जनसमाजास अशक्य होतें. परंतु ही उणीव एकनाथमहाराजांनीं आपल्या ह्या भावार्थरामायणरूप टीकाग्रंथानें उत्तम रीतीनें भरून काढिली आहे. संस्कृत भाषेंतील गूढार्थ प्राकृतांत तंतोतंत स्पष्ट करून दाखविण्याची एकनाथांची हातोटी या त्यांच्या भावार्थरामायण ग्रंथावरून उत्तम समजून येण्यासारखी आहे. अशा रीतीनें प्राकृतांत ग्रंथरचना करण्यांत सामान्य जनसमाजास धर्मज्ञान देऊन त्याची प्रवृत्ति ईश्वरभक्तिमार्गाकडे करणें हाच स्तुत्य उद्देश एकनाथमहाराजांचा होता हें उघड आहे.

बहुजनसमाज केवळ प्राकृत भाषेवरच अवलंबून असल्यामुळें एकनाथमहाराजांनीं प्रस्तुत भावार्थरामायण ग्रंथ निर्माण करून प्राकृत भाषेचाच नव्हे, तर संस्कृताचाही उद्धार केला आहे असें म्हटल्यास तें चुकीचें होणार नाहीं.

असो. महाराष्ट्रांतील अनेक साधुसंतांचे ग्रंथ होतां होईल तों अल्प किंमतींत प्रसिद्ध करून धर्म, नीति, ईश्वरनिष्ठा, सदाचारता इत्यादि सद्गुणांकडे सामान्य जनतेची मनःप्रवृत्ति वळविण्याचे कामीं यथाशक्ति झटावें व अशा रीतीनें स्वार्थ व परमार्थ दोन्ही साधावे, या उद्देशानें आजवर आम्हीं तुकारामाची गाथा, दासबोध, ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, श्रीधरादिकांचे पांडवप्रताप इत्यादि ग्रंथ प्रसिद्ध केले आहेत. त्यांपैकींच प्रस्तुतचा भावार्थरामायण ग्रंथ आज आम्ही लोकसेवेस सादर करीत आहों. ही प्रत अनेक ठिकाणच्या हस्तलिखित प्रती संपादन करून त्यांतील शुद्ध व सरस पाठ घेऊन तयार केलेली आहे. भावार्थरामायणाच्या आजवर कित्येक आवृत्त्या निघाल्या आहेत, परंतु त्यांच्या भारी किंमतीमुळें त्यांचा लाभ सामान्य जनांस व्हावा तसा झाला नाहीं. ही उणीव लक्षांत आणून लढाईमुळें कागद वगैरेंचा भाव अनावर वाढला असतांही शक्य तेवढी माफक किंमत ठेवून हा ग्रंथ आम्हीं प्रसिद्ध केला आहे. प्रत्येक कांडाचे आरंभीं पुढील विषयास अनुसरून सुंदर चित्र दिलें आहे. आरंभीं एकनाथस्वामींचें चरित्रही जोडिलें आहे. अशा रीतीनें हा ग्रंथ अंतर्बाह्य सर्वांगसुंदर करण्याविषयीं शक्य तो प्रयत्न केला आहे. तरी आमचे रसिक वाचक हा आमचा प्रयत्न गोड करून घेऊन त्याचा आदरपूर्वक स्वीकार करितील अशी आशा आहे.

ग्रंथशुद्धीचे कामीं शक्य तितकी काळजी घेतली आहे, तरी नजरचुकीनें अथवा अज्ञानानें राहून गेलेले दोष कोणास आढळून आल्यास ते त्यांनीं कृपा करून दाखवावे अशी त्यांस सविनय प्रार्थना आहे.

प्रकाशक.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations



श्रीसंत एकनाथ महाराज

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

एकनाथमहाराजांचें संक्षिप्त चरित्र

नमिला शमिलास्यप्रद शांतिजलधि एकनाथ तो भावें ।
शोभावें ज्याचें यश विश्वीं ज्या देववृंद लोभावें. ॥

—मोरोपंत

शुकसम जेणें केले विकाररिपु हे अनाथ संतत सा, ।
भवसिंधुसेतु तो कां न ध्यावा एकनाथ संत तसा ? ॥

—बाळाजीपंत वराडकर.

महाराष्ट्रीय संतमंडळांत अलौकिक साधुत्वानें व कवित्वानें ज्यांची प्रामुख्यानें गणना केली जाते, अशांपैकीं एकनाथ महाराज हे एक होत. ह्यांच्या पणजापासूनची पुढील माहिती हल्लीं उपलब्ध आहे. मागील पूर्वजांविषयीं विशेष माहिती कोठें मिळत नाहीं. एकनाथांचा पणजा भानुदास. हा आश्वलायनसूत्री देशस्थ ब्राह्मण महान् भगवद्भक्त होता. ह्याचा जन्म शके १३७०च्या सुमारास पैठणक्षेत्रीं झाला. ईश्वरनिष्ठा, सदाचारप्रियता, सत्यता इत्यादि सद्गुण भानुदासाचे अंगीं लहानपणापासूनच दृष्टोत्पत्तीस येत असत. हा सुमारें दहा वर्षें वयाचा असतांनाच यास पूर्वपुण्येंकरून प्रत्यक्ष सूर्यनारायणानें ब्राह्मणवेषानें दर्शन देऊन " तूं विद्वान् व महान् भगवद्भक्त होऊन याच जन्मीं कृतार्थ होशील " असें वरप्रदान दिलें होतें. तेव्हांपासूनच याची भानुदास या नांवानें प्रसिद्धी झाली. यानें प्रपंचांत राहूनच परमार्थ साधिला. भानुदास पंढरीची आषाढी—कार्तिकी वारी नित्यनेमानें करीत असे. भगवद्भजन व कीर्तन यांच्या योगें लोकांस भगवद्भजनाची गोडी लावून भागवतधर्माची महती त्यांच्या मनावर बिंबेल अशा रीतीनें त्यांस विठ्ठलभजनीं प्रवृत्त करण्यांत त्यानें आपलें सर्व आयुष्य घालविलें. तो मोठा परोपकारी होता. त्यामुळें तत्कालीन संतमंडळींत त्याची श्रेष्ठत्वानें गणना झाली आहे. शिवाय तुंगभद्रातटाकींच्या विजयानगर (अनागोंदी) येथील त्या वेळच्या राजानें पंढरपुरच्या विठोबास आपल्या राजधानींत नेऊन ठेविलें होतें. त्यामुळें विठ्ठलभक्तांस मोठीच काळजी लागली होती. तेव्हां भानुदासानें आपल्या भक्तिबळानें देवास पुन्हां पंढरपुरीं आणिलें. ह्यामुळें संतमंडळींस अत्यंत समाधान वाटून त्यांनीं भानुदासाचे धन्यवाद गाइले. हे भानुदासाचे संतमंडळावरच नव्हे, तर सर्व भाविक मंडळीवर अत्यंत थोर उपकार आहेत. सारांश, भानुदास हा एक महान् भगवद्भक्त व साधु पुरुष होऊन गेला. अशा कुलीन, पवित्र व सत्कुलांत एकनाथ महाराजांसारख्या सत्पुरुषाचा जन्म व्हावा हें साहजिकच आहे.

शुद्ध बीजापोटीं । फळें रसाळ गोमटीं ॥ तुकाराम.

भानुदासांनीं कांहीं भक्तिज्ञानवैराग्यपर असे अभंग केलेले आहेत. त्यांपैकीं हल्लीं १०० प्रसिद्ध आहेत. भानुदासाला चक्रपाणि नांवाचा मुलगा झाला. हा एकनाथमहाराजांचा आजा होय. हाही आपल्या पित्यासमान परम भगवद्भक्त व परोपकारी होता. चक्रपाणीस सूर्यनारायण नांवाचा मुलगा झाला. भानुदासांनीं हा नातू जन्मल्यानंतर थोडकेच दिवसांनीं म्हणजे शके १४३५ च्या सुमारास आपला देह ठेविला.

एकनाथांनीं ह्या आपल्या पणजोबांविषयीं आपली पूज्यबुद्धि खालीलप्रमाणें व्यक्त केली आहे :—

वंदूं भानुदास आतां । जो कां पितामहाचा पिता ।
ज्याचेनि वंश भगवंता । झाला सर्वथा प्रियकर ॥
जेणें बाळपणीं आकळिला भानु । स्वयें झाला चिद्भानु ।
जिंतोनि मायामिमानु । भगवत्पावनु स्वयें झाला ॥
जयाची पदबंधप्राप्ती । पाहों आली श्रीविठ्ठलमूर्ती ।
कानीं कुंडलें जगज्ज्योती । करिता रातीं देखिला ॥
तया भानुदासाचा चक्रपाणी । तयाचाही सुत सुलक्षणी ।
सूर्य नाम ठेवूनी । निर्जी निज होऊनि भानुदास ठेला ॥

एकनाथी भागवत.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सूर्यनारायण व त्यांची पत्नी रुक्मिणीबाई हीं एकनाथ महाराजांचीं मातापितरें होत. यांचे पोटीं एकनाथ महाराज शके १४५० च्या सुमारास पैठण येथें जन्मास आले. नाथ जन्मतांच नाथांचे वडील व माता हीं थोडक्याच दिवसांच्या अंतरानें निवर्तलीं. एकनाथ हा भानुदासाच्या वंशांतील एकटा एकच तंतु असल्यामुळें नाथांचा आजा चक्रपाणि ह्यानें आपल्या ह्या नातवाचें एकनाथ असें सार्थ नांव ठेविलें होतें. जन्मतःच आईबाप निवर्तल्यामुळें एकनाथांचें पालनपोषण त्यांच्या आजाआजींनीं केलें. एकनाथांची बुद्धि लहानपणापासून अत्यंत तीव्र असल्यामुळें व बाल्यावस्थेंतच त्यांस भगवद्भजन व कीर्तनपुराणश्रवणाचा फार नाद असल्यामुळें आपल्या ह्या सद्गुणी नातवाचे दैवी गुण पाहून नाथांच्या आजाआजींस मोठें कौतुक व धन्यता वाटत असे.

एकनाथांचें मौंजीबंधन सहाव्या वर्षीं झालें, व येथूनच नाथांच्या अध्ययनास प्रारंभ झाला. नाथांच्या घरीं रोज पुराणिकबुवा पुराण सांगण्यास येत असत, त्यांजवळ नाथांच्या संस्कृत शिकण्याची व्यवस्था केली होती. संस्कृत भाषेचें अध्ययन थोडक्याच अवकाशांत संपविल्यावर नाथांनीं आपल्या ह्या गुरुस अध्यात्मविषयावरील निरनिराळ्या शंका काढून अनेक प्रश्न विचारावे व त्यास त्यांचा उलगडा करितां न आल्यामुळें कुंठित होणें भाग पडावें असें कित्येक वेळां झालें होतें. त्यावरुन नाथ हे एक असामान्य कोटींतील अवतारी पुरुष आहेत याबद्दल पुराणिकबोवांची खात्री झाली होती. बरोबरच आहे, लौकिकी गुरु लौकिकी विद्या शिकवितील. पराविद्याज्ञान अर्थात् अनुभवजन्य ज्ञान त्यांस नसल्यास तेथें काय इलाज ? आत्मानुभवजन्य ज्ञान तेंच खरें ज्ञान. हा आत्मानुभव सद्गुरूवांचून होणें नाहीं, व त्याशिवाय निरतिशयानंदाचा लाभ होणें नाहीं, हा सिद्धांत आहे.

तें ज्ञान पैं गा बरवें । जरी मनीं आथि जाणावें ।
तरी संतां या भजावें । सर्वस्वेंसीं ॥
जे ज्ञानाचा कुरुठा । तेथ सेवा हा दारवंटा ।
तो स्वाधीन करीं सुभटा । वोळगोनी ॥
तरी तनुमनजीवें । चरणांसी लागावें ।
आणि अगर्वता करावें । दास्य सकळ ॥
मग अपेक्षित आपुलें । तेंही सांगती पुसिलें ।
जेणें अंतःकरण बोधलें । संकल्पा न ये ॥
जयाचेनि वाक्यउजिवडें । जाहलें चित्त निधडें ।
ब्रह्माचेनि पाडें । निःशंकु होय ॥

ज्ञानेश्वरी–अ. ४, ओं. १६५–१६९

एकनाथांची ह्या वेळची स्थिति म्हणजे मुमुक्षुदशा होय. परमार्थ-मंदिरास जाण्याच्या चार पायऱ्यांपैकीं पहिल्या श्रवण व मनन ह्या ओलांडून ते निदिध्यासनरूपी तिसऱ्या पायरीवर आरुढ झाले होते. सद्गुरुदर्शनाविषयीं एकसारखी उत्कंठा व तळमळ त्यांच्या चित्तांत लागून राहिली होती. ती पुरी न झाल्यामुळें ते नेहमीं उद्विग्न असत. फक्त कीर्तनपुराणश्रवणाचे वेळीं मात्र त्यांस समाधान वाटत असे. बाकीचा वेळ गांवाबाहेरील एकान्त देवालयांत बसून कीर्तनपुराणांत ऐकलेल्या गोष्टींचें चिंतन करण्यांत घालवावयाचा असा त्यांचा नित्यक्रम असे. एके दिवशीं तर त्यांस ही सद्गुरुदर्शनविषयक उत्कंठा इतकी अनावर झाली कीं, ते नेहमीं गांवाबाहेरील ज्या एका दूरच्या शिवालयांत जाऊन एकांतांत बसत असत, तेथें प्रहररात्र उलटून गेली तरीही ते तसेच ध्यानस्थ बसले होते. तेथें त्या ध्यानस्थितींत अत्यंत मंजुळ अशी दिव्यवाणी त्यांस ऐकूं आली कीं, ‘ देवगडास जनार्दनस्वामीनामक एक सत्पुरुष आहेत, त्यांचें दर्शन घे. ते तुझे इष्ट हेतु पुरवून तुला कृतार्थ करतील.’ नाथांच्या कर्णपुटांत हे शब्द पडल्याबरोबर त्यांचा आनंद काय वर्णावा ? देवगडावर जाऊन जनार्दनस्वामींस गुरु करावयाचें हा एकनाथांचा दृढ संकल्प तर झालाच परंतु आजोबा चक्रपाणींचें वार्धक्य, आपल्या विरहानें आपल्यामागें त्यांची होणारी दीनदशा, त्यांचें आपल्यावरील अपरिमित प्रेम इत्यादि गोष्टी मनांत येऊन आपलें हेतु सिद्धीस कसे जाणार ह्याविषयीं त्यांस मोठी काळजी लागून राहिली. तरी आपला दृढनिश्चय यत्किंचितही ढळूं न देतां एकनाथ एके दिवशीं जे घर सोडून निघाले, ते तिसरे दिवशीं प्रातःकाळीं देवगडावर जाऊन पोहोंचले, व त्यांनीं जनार्दनस्वामींचें दर्शन घेऊन त्यांचे चरणांवर लोळण घेतली. जनार्दनस्वामींनीं त्यांस प्रेमालिंगन देऊन राहवून घेतलें. ही गोष्ट शके १४६२ च्या सुमारास घडली असावी.

एकनाथ एकाएकीं नाहींसे झाल्यामुळें त्यांच्या वृद्ध आजाआजींस फारच दुःख झालें. त्यांनीं अनेक ठिकाणीं नाथांचा शोध चालविला, परंतु नाथ कसचे मिळणार ? आपल्या वंशांतील एकुलता एक कुलदीप आणि त्याची ही अवस्था पाहून तीं दोघें अत्यंत दुःखी होऊन नाथभेटीची वाट पहात व शोध करीत कालक्रमणा करीत राहिलीं. कर्मधर्मसंयोगानें चक्रपाणी यांनीं आपले घरीं ठेविलेले पुराणिक व नाथांचे लौकिक गुरु हेही कोठें घरगुती कामाकरितां ह्याच सुमारास निघून गेले होते, त्यांचाही पत्ता नव्हता. ही गोष्ट अर्थातच ह्या सज्जन पुराणिकाविषयीं

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

नाना प्रकारचे कुतर्क लोकांच्या तोंडीं निघण्यास कारण झाली होती.

इकडे नाथांनीं जनार्दनस्वामींची अनन्यभावें सेवा करून त्यांची कृपा संपादन करण्याचा आपल्या मनांतील कृतनिश्चय चालू ठेवून ते त्यांच्याजवळ राहिले होते. जनार्दनस्वामी (जन्म शके १४२६ फाल्गुन वद्य ६), ऋग्वेदी आश्वलायनसूत्री देशस्थ ब्राह्मण, हे मूळचे चाळीसगांवचे देशपांडे असून देवगड ऊर्फ दौलताबाद येथील त्या काळचा मुख्य अधिकारी व यवन पादशहा ह्याचे पदरीं विश्वासू मुतसद्दी होते. ह्यांच्या अंगीं शूरत्व, करारीपणा, तेजस्विता वगैरे गुण असून ते महान् साधु व साक्षात्कारी पुरुष होते. त्यामुळें त्यांची कीर्ति त्या वेळीं चहूंकडे पसरली होती. हे दत्तोपासक असून त्यांस दत्तमहाराजांचें प्रत्यक्ष दर्शन रोज होत असे अशी प्रसिद्धी आहे. ते आपलीं नित्यनैमित्तिक कर्मे वेळचे वेळीं आटपून व दोन प्रहरीं कचेरीचें काम उरकून राहिल्या वेळांत ध्यानानंदांत निमग्न होत असत. रात्रीं अमृतानुभव, ज्ञानेश्वरी वगैरे ग्रंथांवर ते निरूपण करीत असत. एकनाथांस सद्गुरुमुखानें हे ग्रंथ ऐकावयास सांपडल्यामुळें अत्यंत धन्यता वाटूं लागली. जनार्दनस्वामींकडे श्रवणास व त्यांच्या दर्शनास हिंदु, मुसलमान वगैरे सर्व जातींचे लोक येत असत व ते त्यांचें त्यांच्या त्यांच्या अधिकारानुरूप समाधानही करीत असत. भेदभावास ह्या ठिकाणीं मुळींच थारा नव्हता. जनार्दनस्वामी पूर्णयोगी असून, समाधियोग त्यांस उत्तम प्रकारें साधला होता. त्यांची एकांतांत बसण्याची जागा अत्यंत गुप्त होती. सारांश, प्रपंच साधून परमार्थाचा लाहो करणारे असे हे एक सत्पुरुष होते. अशा केवळ परमज्ञानी महात्म्याच्या सहवासाचा व सेवेचा लाभ नाथांस घडला हें त्यांचें पूर्वपुण्यच म्हणावयाचें. एकनाथांनीं जनार्दनस्वामींची एकनिष्ठपणें सेवा सहा वर्षे केली. एकनाथ आपल्या गुरूच्या सेवेंत कसे तन्मय झालेले होते हें त्यांच्याच खालील अभंगावरून दिसून येत आहे.

सेवेची आवडी । विराम नाहीं अर्धघडी ॥ १ ॥
नित्य करितां गुरुसेवा । प्रेमपडिभार होत जीवा ॥ २ ॥
आळस येवोंचि सरला । आराणुकेचा ठावो गेला ॥ ३ ॥
तहान विसरली जीवन । भूक विसरली मिष्टान्न ॥ ४ ॥
जांभईसी वाव पुरता । सवड नाहींचि तत्त्वता ॥ ५ ॥
ऐसें सेवे गुंतलें मन । एका जनार्दनीं शरण ॥ ६ ॥

गुरुसेवारूपी खडतर तपश्चर्येनें एकनाथ गुरुकृपेस सर्वस्वी पात्र झाले. गुरुगृहीं असतां त्यांनीं जनार्दनस्वामींसंनिध ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, श्रीभागवत वगैरे ग्रंथांचें अध्ययन केलें व ध्यानयोग साधून अनुभवजन्य ज्ञान संपादन केलें. ज्ञानदेवांच्या ग्रंथांची अनुपम गोडी जी त्यांस एव्हांपासूनच लागली होती, ती त्यांचें देहावसान होईपर्यंत तशीच कायम होती. त्यांचें ह्या ग्रंथांचें अध्ययन अव्याहत चालू होतें. एकनाथांच्या ह्या एकनिष्ठ सेवेमुळें जनार्दनस्वामी त्यांच्यावर प्रसन्न होऊन त्यांनीं त्यांस श्रीदत्तमहाराजांचें प्रत्यक्ष दर्शन करविलें व त्यांच्यावर आपला पूर्ण अनुग्रह केला. एकनाथमहाराजांनीं आपली गुरुपरंपरा व सद्गुरुकृपानुभव एका अभंगांत असा सांगितला आहे—

जो निर्गुण निराभास । जेथून उद्भव शबल ब्रह्मास ।
आदिनारायण म्हणती ज्यास । तो आदिगुरु सर्वांस ॥ १ ॥
तयाचा ब्रह्मा अनुग्रहित । ब्रह्मा अत्रीस उपदेशीत ।
अत्रिपाद प्रसादीत । श्रीदत्तात्रेय अवधूत ॥ २ ॥
दत्तात्रेयपरंपरा । सहस्रार्जुन यदु दुसरा ।
जनार्दन शिष्य तिसरा । केला कलियुगीं खरा ॥ ३ ॥
जनार्दनकृपेस्तव जाण । समूळ निरसलें भवबंधन ।
एका जनार्दना शरण । झाली परंपरा संपूर्ण ॥ ४ ॥

पुढें गुर्वाज्ञेवरून नाथांनीं काशी, बद्रिनाथ उत्तरमानससरोवर, रामेश्वर इत्यादि सर्व तीर्थयात्रा केल्या. जनार्दनस्वामी त्यांच्याबरोबर नाशीक—त्र्यंबकेश्वरापर्यंत आले होते. अशा रीतीनें यात्रा करीत करीत बारा वर्षांपूर्वी पैठण येथील ज्या शिवालयांतून ते बाहेर पडले होते त्याच शिवमंदिरांत पुनः एकदां नाथांची स्वारी येऊन तेथें त्यांनीं डेरा दिला.

इकडे नाथांच्या आजोबांच्या घरीं असणारे पुराणिक जे अकस्मात् नाहींसे झाले होते तेही ह्याच संधीस कर्मधर्मसंयोगानें पैठण येथें नाथांच्या आजोबांच्या घरीं परत बारा वर्षांनीं आले होते. नाथांस ह्यांनींच फुसलावून नेलें असावें असा लोकांचा झालेला गैरसमज ह्या पुराणिकबोवांनीं चांगलीच खातरजमा देऊन दूर केला, व चक्रपाणीच्या विनवणीवरून ते एकनाथांच्या शोधार्थ निघाले. शोधाअंतीं त्यांस जनार्दनस्वामींकडे एकनाथ आहेत अशी बातमी लागल्यावरून ते तत्काल देवगडास जाऊन जनार्दनस्वामींस भेटले. जनार्दनस्वामींनीं त्यांस एकनाथांविषयीं सविस्तर हकीकत सांगून त्यांचें समाधान केलें. ह्या पुराणिकबोवांस नाथांच्या घराण्याविषयीं फारच कळकळ व प्रेम असल्यामुळें त्यांनीं जनार्दनस्वामींस नाथांनीं गृहस्थाश्रम स्वीकारावा अशाबद्दल आपल्या हातचें आज्ञापत्र देण्याविषयीं विनंती

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

केली. जनार्दनस्वामींनीं तत्काल तें संतोषानें देऊन पुराणिकबुवांची रवानगी केली. पुराणिकबोवा पैठणास आले, व त्यांनीं ही सर्व हकीकत चक्रपाणीस निवेदन करून आपल्याजवळील आज्ञापत्रही दाखविलें. त्या वेळचा त्यांचा आनंद काय वर्णावा !

इकडे नाथ शिवालयांत 'यदृच्छालाभसंतुष्ट' वृत्तीनें जें काय मिळेल त्यांत रोज निर्वाह करून रहात असत. त्यांचें तें योगाभ्यासानें तेजःपुंज झालेलें शरीर, काळा कुळकुळीत जटाकलाप, दीर्घ त्रिशूळ, भस्मचर्चित शरीर, सदाप्रसन्न मुखकमल पाहून हा कोणी महान् योगी असावा, असें वाटून त्यांच्या दर्शनास गांवांतील लोक येऊं लागले. वरील पुराणिकबोवाही एके दिवशीं त्या शिवालयांत आले व त्यांनीं नाथांस ओळखून ताबडतोब त्यांच्या आजाआजींस तेथें आणिलें. अशा विलक्षण रीतीनें आपल्या नातवाची पुन्हां भेट झाली, त्यावेळीं त्या वृद्ध आजाआजींस जो आनंद झाला असेल तो कल्पनातीत होय ! नंतर पुराणिकबोवांनीं नाथांस त्यांच्या सद्गुरूंचें आज्ञापत्र दिलें. नाथांनीं तें शिरसामान्य करून, तेथेंच राहण्याचा निश्चय केला व त्या शिवालयाजवळ लहानशी झोंपडी बांधून नाथ आपल्या वृद्ध आजाआजींसह तेथेंच राहूं लागले. नाथांचा मोठा वाडा पुढें ह्या ठिकाणींच बांधण्यांत आला.

कांहीं दिवसांनीं विजापूर येथील एका कुलीन व संपन्न अशा गृहस्थाच्या सुशील कन्येबरोबर नाथांचें लग्न मोठ्या थाटांत झालें. ह्या पैठणकर गृहस्थांनीं भानुदासांच्या कुलीन व थोर कुळाचा संबंध लक्षांत आणून मोठ्या हौसेनें सालंकृत कन्यादान केलें. एकनाथांच्या पत्नीचें नांव गिरिजाबाई होतें. ही सुशील व पतिभक्तिपरायण अशी होती. संसारांत अत्यंत दक्ष असून नाथसेवेस ती सर्वदा तत्पर असे. नाथांचा उद्धव या नांवाचा एक आप्त होता, तो ह्याच सुमारास नाथगृहीं शिष्यत्वाच्या नात्यानें राहिला होता. नाथांच्या लग्नाचे वेळीं ह्यानें फार खटपट केली होती. तेव्हांपासून त्यास आपला आश्रय देऊन नाथांनीं घरीं ठेविलें होतें. प्रपंचासंबंधीं सर्व व्यवस्था तो पहात असे. त्यामुळें नाथांस आपलीं नित्यनैमित्तिक प्रातःस्नान, स्मार्तहोम, देवपूजा, नैवेद्य, वैश्वदेव इत्यादि गृहस्थाश्रमांतील कर्में, त्याचप्रमाणें भगवद्भजन, भाविक जनांस आपल्या प्रेमळ वाणीनें कीर्तनपुराणरूपानें उपदेश वगैरे करण्यास चांगलीच सवड मिळत असे. नाथांचे घरीं सदावर्त असे, तेथें कोणी अतिथी, अभ्यागत आल्यास त्यास कधींच मज्जाव होत नसे. त्यामुळें पुष्कळ लोकांस नाथांच्या येथें उपदेशश्रवणाबरोबर दधिकुल्ल्या मधुकुल्यांचा लाभ प्राप्त होत असे. नाथांकडे वाटेल त्या जातीचा माणूस आला तरी ते त्याचें समाधान करीत. हा उच्च, हा नीच हा भेदभाव परमार्थांत ते कधींच मानीत नसत. त्यामुळें त्यांच्या ज्ञानेश्वरीवरील निरूपणास महार, मांग सुद्धां येत असत. नाथ हे उत्तम कीर्तनकार होते. त्यांची प्रासादिक वाणी ऐकून श्रोते तत्काल समाधिसुखांत रंगून जात असत. नाथांच्या घरची प्रापंचिक स्थितीही चांगलीच होती. सारांश, नाथांचा प्रपंच व परमार्थ उत्तम तऱ्हेनें चाललेला पाहून त्यांच्या वृद्ध आजाआजींस जी धन्यता वाटे ती वर्णन करतां येणार नाहीं.

नाथ पैठणास गुरुपत्रिका हातीं आली त्याच जागीं राहिल्याचें मागें सांगितलें आहे. येथें विवाह झाल्यानंतर थोडेच दिवसांनीं गोकुळाष्टमी आली, तेव्हां त्यांनीं मोठ्या थाटाचा उत्सव करण्याचें योजून उत्सवास आपल्या पूज्यपाद सद्गुरूंस मुद्दाम देवगडाहून विनंती करून आणिलें होतें. एकनाथ जे गुर्वाज्ञेवरून तीर्थयात्रेस निघाले, त्यानंतरची गुरुशिष्यांची ही पहिलीच भेट होय. जनार्दनस्वामींनीं गडावरून पैठणास येतांना आपल्याबरोबर उत्सवास लागणारी विपुल सामुग्री आणिली होती. चौदा दिवस उत्सव मोठ्या थाटाचा झाला. अन्नदानही विपुल झालें. नाथांचीं आजा व आजी हींही हा उत्सव पहाण्यास होतीं. ह्या उत्सवांत नाथांनीं आपल्या परमपूज्य सद्गुरूपुढें व हजारों भाविक श्रोत्यांसमोर प्रेमळ कीर्तन केलें. श्रोते त्या वेळीं कीर्तनांत अत्यंत तल्लीन झाले, व जनार्दनस्वामींसही आपल्या शिष्याचा हा अधिकार पाहून अत्यंत समाधान व धन्यता वाटली. असो. जनार्दनस्वामी नाथगृहीं उत्तम सन्मान पावून संतुष्ट झाले व उत्सवसमाप्तीनंतर परत देवगडास निघून गेले.

कांहीं वर्षांनीं नाथांची आजी व तिच्या मागून आजा यांचें देहावसान झालें. आजाआजींच्या मागें प्रपंचाचा सर्व भार अंगावर पडला असतांही एकनाथ महाराजांचा भाविक लोकांस कीर्तनपुराणरूपानें सदुपदेश करण्याचा क्रम अव्याहत चालूच होता. त्यामुळें नाथांच्या साधुत्वाची ख्याति चोहोंकडे होऊन दूरदूरचे लोक त्यांच्या दर्शनास येत असत.

कांहीं दिवसांनीं नाथांचा पंढरीस जाण्याचा बेत ठरला व ते उद्धवास बरोबर घेऊन पंढरीच्या यात्रेस निघाले. पंढरपुरांतील लोकांस नाथांचा लौकिक आधींच समजला होता व तेथील एका बडव्यास 'मी पैठणास एकनाथांची कीर्तनांत साथ करतों' असें स्वप्नांत येऊन देवानें सांगितलें

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

होतें. एकनाथमहाराज हे उद्धवास बरोबर घेऊन पंढरीच्या यात्रेस निघाले तेव्हां त्यांच्याबरोबर आसपासच्या गांवांतील शेंकडों वारकरीही निघाले. पायवाटेनें भजनानंदांत निमग्न होऊन ही सर्व भक्तमंडळी पंढरीस चालली, तेव्हां वाटेंत निरनिराळ्या गांवांतील विठ्ठलभक्त वारकरी त्यांच्याबरोबर निघून हा मोठा संतसमुदाय पंढरीस आला. त्या वेळीं पंढरपुरांतील सर्व भक्तमंडळी त्यांस सामोरी जाऊन त्यांनीं त्यांचा फारच गौरव केला व वाजतगाजत एकनाथमहाराजांस व त्यांच्याबरोबर असलेल्या हजारों लोकांस गांवांत नेलें. एकनाथमहाराज आधींच हरिरूपीं तन्मय झालेले, त्यांत 'सुंदर तें ध्यान उभें विटेवरी। कर कटावरी ठेऊनियां' असें प्रत्यक्ष विठ्ठलदर्शन झालेलें. त्या वेळीं एकनाथ भक्तिप्रेमसागरांत जे तरंगूं लागले तें काय वर्णावें! त्या सुखाची गोडी जाणणारे तेच होत.

अनुभवी खूण जाणती हे.—तुकाराम.

पंढरपुरांत गरुडपारापुढें नाथांचीं तेथील मंडळीच्या विनंतीवरून चार कीर्तनें झालीं. भानुदासांचें चरित्र नाथांनीं बडव्यांच्या विनंतीवरून मुद्दाम लाविलें होतें. आधींच भानुदासांविषयीं श्रोत्यांच्या मनांत अत्यंत प्रेमभक्ति, त्यांत त्यांच्या प्रत्यक्ष पणतवानें लाविलेलें त्यांचें प्रेमळ चरित्र, मग काय विचारावें? श्रोते आनंदानें डोलूं लागले. कित्येकांची तर त्या वेळीं समाधी लागून राहिली. एकनाथमहाराजांची कीर्ति तेथील भक्तांना फक्त ऐकून माहिती होती, परंतु विठ्ठलकृपेनें त्यांचें दर्शन व उपदेश यांचा लाभ झाला तेव्हां सर्व संतमंडळीस थोर आनंद वाटून त्यांनीं नाथांचा फारच गौरव केला व तेव्हांपासून नाथ हे जरी दत्तसांप्रदायी होते, तरी त्यांनीं पंढरीची आषाढी कार्तिकी वारी पतकरिली. ज्ञान्यांस सर्वत्र अभेदभावच असावयाचा.

एकनाथ जरी दत्तसांप्रदायी होते, तरी त्यांस आपल्या संप्रदायाचा अभिमान असा मुळींच नव्हता. ज्ञानदेवांच्या ग्रंथांचें त्यांनीं अनुभवी सद्गुरूजवळ सांगोपांग अध्ययन केलें असल्यामुळें त्यांची दृष्टि सर्वत्र व्यापक अशी झाली होती. विश्वव्यापी प्रेम त्यांचे ठायीं प्रगल्भतेस पावलें होतें. अशा प्रकारें ज्ञानदेवांनीं महाराष्ट्रांत भागवतधर्ममंदिराचा पाया घातला व एकनाथ हे त्याच भागवतधर्माची ध्वजा फडकाविणारे झाले. तुकोबा म्हणतातः—

ज्ञानदेवें रचिला पाया। उभारिलें देवालया ॥ १ ॥
नामा तयाचा किंकर। तेणें केला हा विस्तार ॥ २ ॥
जनार्दन एकनाथ। ध्वज उभारिला भागवत ॥ ३ ॥
तुका झालासे कळस। भजन करा सावकाश ॥ ४ ॥

प्राकृत ग्रंथरचना करून एकनाथांनीं भागवतधर्मप्रसारार्थ जे अव्याहत परिश्रम केले आहेत, त्याबद्दल केवळ भाविक जनच नव्हेत, तर सर्व जग त्यांचें अत्यंत ऋणी आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. खरोखर ह्या संतमंडळीचे महाराष्ट्रावर फार उपकार आहेत व त्यांचे गुणानुवाद भाविक मंडळींत गायिले जावे हें अगदीं साहजिक आहे.

एकनाथ महाराजांना शके १५०५ मध्यें आळंदीस जाण्याचा योग आला होता. तेथें त्यांचा गळा सुजून आला व औषधोपचार करूनही बरा होईना. तेव्हां एके दिवशीं ज्ञानेश्वरमहाराजांनीं त्यांच्या स्वप्नांत येऊन असा दृष्टांत दिला कीं, 'माझ्या मानेला अजानवृक्षाच्या मुळीचा गळफांस लागला आहे तो काढ, म्हणजे तुझा घसा बरा होईल.' एकनाथांना ज्ञानेश्वरांचें दर्शन झालें त्या वेळचा त्यांचा आनंद काय वर्णावा? त्यांनीं ज्ञानेश्वरांच्या पायीं लोटांगण घातलें. अजानवृक्षाची मुळी मस्तकाला लागल्याचें निमित्त करून एकनाथांची भेट ज्ञानेश्वरमहाराजांनीं घेतली व आपला ज्ञानेश्वरी ग्रंथ प्रसिद्ध करण्याची त्यांस आज्ञा केली. पुढें नाथ पैठणास येऊन त्यांनीं शके १५०६ मध्यें ज्ञानेश्वरीमध्यें लेखकप्रमादांनीं आलेले अशुद्ध व अबद्ध पाठ काढून टाकून ज्ञानेश्वरीची शुद्ध प्रत तयार केलीः—

श्रीशके पंधराशें साहोत्तरीं। तारणनाम संवत्सरीं।
एकाजनार्दनें अत्यादरीं। गीताज्ञानेश्वरी प्रति शुद्ध केली ॥
ग्रंथ पूर्वींच अतिशुद्ध। परी पाठांतरीं शुद्ध अबद्ध।
तो शोधूनियां एवंविध। प्रतिशुद्ध सिद्ध ज्ञानेश्वरी ॥
नमो ज्ञानेश्वरा निष्कळंका। जयाची गीतेची वाचितां टीका
ज्ञान होय लोकां। अतिभाविकां ग्रंथार्थियां ॥
बहुकाळपर्वणी गोमटी। भाद्रपदमास कपिलाषष्ठी।
प्रतिष्ठानीं गोदातटीं। लेखनकामाठी संपूर्ण जाहली ॥
ज्ञानेश्वरीपाठीं। जो ओंवी करील मऱ्हाटी।
तेणें अमृताचे ताटीं। जाण नरोटी ठेविली ॥

सध्यां आपणास अत्यंत प्रतिभासंपन्न, भक्तिरसानें ओथंबलेला व नाना अलंकार, दृष्टांतांनीं थबथबलेला असा अपूर्व ज्ञानेश्वरी ग्रंथ लाभला आहे, हे एकनाथमहाराजांचे आम्हां महाराष्ट्रीयांवरच नव्हेत, तर सर्व जगतावर थोर उपकार झाले आहेत. त्यांनीं ज्ञानेश्वरीचें जें उत्कृष्ट संशोधन आणि प्रसार केला आहे, त्यावरून ज्ञानेश्वरीसंबंधीं एकनाथांची केवढी निष्ठा व पूज्यबुद्धि होती हें समजण्यासारखें आहे. या

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

एकनाथांच्या पूज्यबुद्धीवरुनच त्यांना ज्ञानदेवाचा अवतार म्हणतात. ' ग्यान्याचा एका, नाम्याचा तुका ' ही म्हण प्रसिद्धच आहे.

एकनाथांच्या काळीं बहुतेक सर्व विद्वानांचा ओढा संस्कृत भाषेंत ग्रंथरचना करण्याकडे होता. त्या वेळीं प्राकृत भाषेंत ग्रंथरचना करणें कमीपणाचें वाटत असे. इतकेंच नव्हे, तर तसें करणारास त्या काळीं फारच त्रास व निंदा लोकांकडून सहन करावी लागत असे. त्यामुळें त्या काळीं मराठी ग्रंथ-रचनेकडे फारसें कोणी मन घालीत नसत. एकनाथांना कित्येक आपमतलबी व परोत्कर्षासहिष्णु लोकांचा त्यांच्या प्राकृत काव्यरचनेबद्दल भयंकर छळ सोसावा लागत असे. परंतु अखेर नाथांचें अप्रतिम वक्तृत्व, त्यांची रसाळ वाणी, त्यांची थोर नीतिमत्ता, त्यांची तात्कालिक कवित्वस्फूर्ति, अपार भक्तिप्रेम आणि निःसीम परमेश्वरनिष्ठा इत्यादि अनेक सद्गुणांनीं त्या स्वार्थी लोकांवर नाथांचाच पगडा बसून त्यांचा जय होत असे यांत आश्चर्य नाहीं.

एकनाथमहाराजांचा छळ करणाऱ्या वर लिहिलेल्या निंदक, मत्सरी व ढोंगी लोकांमध्यें कित्येक कर्मठ ब्राह्मणही होते. ह्या लोकांनीं एकनाथानें हें ढोंग माजविलें आहे, वैदिक कर्मकांडाचा यानें उच्छेद आरंभिला आहे, हा जाति-भेद वगैरे कांहीं न पाहतां सर्वांस सारखाच उपदेश करीत आहे, नामस्मरणाचें फाजील स्तोम ह्यानें माजविलें असून हा प्राकृत भाषेंत कवित्व करूं लागला आहे, वगैरे अनेक आरोप एकनाथांवर करून त्यांनीं त्यांचा छळ मांडिला होता; परंतु—

तरी सिंधूचेनि माजें । जळचरां भय नुपजे ।
आणि जळचरीं नुभजे । समुद्र जैसा ॥
तेवीं उन्मत्ते जगें । जयासी खंती नलगे ।
आणि जयाचेनि आंगें । न शिणे लोक ॥
जो निंदेतें नेघे । स्तुती न श्लाघे ।
आकाशा न लागे । लेपु जैसा ॥
हें विश्वचि माझें घर । ऐसी मति जयाची स्थिर ।
किंबहुना चराचर । आपणचि जाहला ॥

—ज्ञानेश्वरी.

या ज्ञानदेवांच्या शब्दांत वर्णिल्याप्रमाणें नाथांची वृत्ति असल्यामुळें त्यांस त्यापासून कांहींच त्रास न होतां दिवसें-दिवस त्यांची कीर्ति सर्वत्र पसरतच चालली. पुढें ह्या स्वार्थी लोकांस कांहीं काळानें एकनाथांच्या साधुत्वाविषयीं खात्री पटून कृतकर्माबद्दल पूर्ण पश्चात्ताप झाला हें सांगावयास नकोच.

एकनाथांस एक मुलगा व दोन मुली अशीं तीन अपत्यें होतीं. त्यांचीं अनुक्रमें नांवें गोदावरी, हरि व गंगा. पहिली कन्या गोदावरी ही पैठणांतच रहाणाऱ्या चिंतामणिशास्त्री ऊर्फ विश्वंभरबावानामक विद्वान् व सुशील गृहस्थास दिली होती. चिंतामणिशास्त्री हे व्युत्पन्न व सद्गुणसंपन्न होते, परंतु तारुण्यभरांत ते विषयी निघाल्यामुळें त्यांची पत्नी गोदावरीबाई हीस फारच त्रास होत असे, व त्यामुळें गृह-कृत्यांत तीस कांहींच सुचत नसे. ती आपल्या पतीच्या ह्या वर्तनामुळें दिवसेंदिवस खंगत चालली. एकनाथांचे कानांवर ही गोष्ट बरेच दिवसांनीं गेली. त्यांनीं आपले जामात यांस एके दिवशीं भेटून असा बोध केला कीं, ' आपण करतां हें ठीक नाहीं. संसारांत स्त्रीपुरुषांनीं एकविचारें चालावें हेंच श्रेयस्कर होय. तरी आपण आपल्या मर्जीस येईल तसें वागण्यास मुखत्यार आहां. पण सांगतों हें लक्षांत ठेवा कीं, आपण रात्रौ कोठेंही बाहेर जाण्यापूर्वीं श्रीमद्भगवद्गीतेचा एक तरी अध्याय रोज आपले पत्नीस वाचून दाखवून त्याचा अर्थही तीस नीट समजावून सांगावा. एवढें तरी करीत जावें.' शास्त्रीबुवांनीं तें मान्य केलें व रोज तसा क्रम सुरू ठेविला. थोडक्याच दिवसांत त्यांचा विषयछंद सुटून ते भगवद्भजनीं लागले, व पुढें कवित्वही करूं लागले. ध्रुवा-ख्यानावरील हल्लीं प्रसिद्ध असलेल्या दिंड्या व पदें वगैरे चिंतामणिकवि ह्या नांवावर आपण पहातों त्या ह्यांच्याच असाव्या असें वाटतें. चिंतामणिशास्त्री ऊर्फ विश्वंभरबोवा यांचा पुत्र सुप्रसिद्ध कवि मुक्तेश्वर यानें भारत, रामायण व भागवत यांवर सर्वोत्कृष्ट काव्यग्रंथरचना केली आहे.

हरिपंडितांच्या पाठीवर झालेली एकनाथांची दुसरी मुलगी गंगाबाई ही कर्नाटकांत एका कुलीन घराण्यांत दिली होती. याप्रमाणें एकनाथांना दोन कन्या आणि एक पुत्र अशीं तीन अपत्यें होतीं.

एकनाथांचा मुलगा हरि हा लहानपणापासून तीव्र बुद्धीचा होता. अल्पवयांतच सर्व अध्ययन पुरें करून तो सर्व शास्त्रांत व्युत्पन्न झाला होता. संस्कृत भाषेचा त्यास फार अभिमान वाटत असे. त्यामुळें नाथांनीं प्राकृत भाषेंत पुराण सांगणें त्यास पसंत नव्हतें. नाथ प्राकृत जनांस पुराण सांगून उपदेश करितात व प्राकृत कविता करितात, ही गोष्ट त्यांच्या कीर्तीस बट्टा लावणारी आहे अशा हरि-पंडिताच्या समजुतीवरून कित्येक वेळां पितापुत्रांचे वाद होत असत व नाथांच्या स्वानुभवापुढें हरिपंडितांचें बोलणें फिकें पडत असे. नाथांचा अवतार प्राकृत भोळ्या-बापड्यांचा उद्धार करण्यासाठींच असल्यामुळें नाथ हे

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

दिवसेंदिवस हजारों लोकांस प्रिय होत जावें व त्यांची सर्वत्र कीर्ति व्हावी हें उघड आहे.

एकनाथ व हरिपंडित यांचें वरील बाबतींत पटेनासें झाल्यामुळें हरिपंडित आपली पत्नी व दोन पुत्र यांस घेऊन काशीक्षेत्रीं जाऊन राहिला. त्याचा तिसरा मुलगा हा मात्र एकनाथांजवळ राहिला. एकनाथ कीर्तनास उभे राहिल्यावर हा त्यांचे मागें ध्रुवपद धरीत असे. हरिपंडित काशीस गेल्यावर तेथें फारच मानमान्यता पावला. नाथांनीं पुढें कांहीं वर्षांनीं काशीस जाऊन हरिपंडिताची समजूत केली व त्यास पैठणास परत आणिलें. मोठें पांडित्य व गीर्वाणभाषाभिज्ञत्व असूनही हरिपंडिताचें अखेरपर्यंत एकनाथांप्रमाणें जनसमूहावर कधींही वजन पडलें नाहीं. यावरून आपल्या पित्यास सर्वत्र परमपूज्य व महान् साधु कां समजतात या गोष्टीविषयीं त्याचे मनांत पूर्ण व कायमचा प्रकाश पडला, व नाथ हे अवतारी पुरुष आहेत अशी त्याची दृढ भावना झाली. एकनाथांचा भागवतधर्मप्रसाराचा क्रम अव्याहत चालू होता. त्यामुळें पैठणभर सर्व लोकांस त्यांनीं विठ्ठलभजनीं लाविलें.

एकनाथमहाराजांच्या जीवनचरित्रांत पाखांड्यांचीही त्यांच्या साधुत्वाविषयीं खात्री होईल व त्यांचें मन भगवद्भजनाकडे लागेल अशा अनेक गोष्टी आहेत. त्यांपैकीं श्राद्धदिनीं पितरांसाठीं तयार केलेलें अन्न दयार्द्रदृष्टीनें महारांस वाढणें, चोरांस भोजन घालणें, चुकलेल्या व उन्हांत तळमळत असलेल्या महाराच्या पोरास कडेवर घेऊन त्याच्या आईकडे पोंचतें करणें, कावडीचें पाणी तृषित गाढवास पाजून त्यास सावध करणें, स्वस्त्रीच्या पाठीवर उडी मारून बसणाऱ्या ब्राह्मणास पुत्रवत् लेखणें, कित्येक वेळां अंगावर थुंकणाऱ्या यवनास यत्किंचितही क्रोधमुद्रा न दाखवितां निमूटपणें त्या त्या वेळीं गंगेवर जाऊन स्नान करणें, वगैरे अनेक आहेत. त्या त्यांच्या प्रसिद्ध असलेल्या चरित्रांतून वर्णिलेल्या असल्यामुळें येथें न सांगतां त्यांचें दिग्दर्शन मात्र केलें आहे.

एकनाथमहाराजांनीं केलेले ग्रंथ

एकनाथ व त्यांचे परमपूज्य गुरु जनार्दनस्वामी हे तीर्थयात्रेच्या निमित्तानें त्र्यंबकेश्वरास गेले असतां तेथें चंद्रभटनामक ब्राह्मणाच्या घरीं त्यांचें बिऱ्हाड होतें. तेथें आपल्या गुरुसंनिध नाथांनीं आपला पहिला ग्रंथ चतुःश्लोकी भागवत, ओंवीसंख्या १०००, हा रचिला. नाथांचा हा आरंभींचाच ग्रंथ असून तो फारच उत्कृष्ट उतरला आहे. भागवत, द्वितीय स्कंध, अ० ९ मधील चतुःश्लोकीवर ही प्राकृत टीका आहे. वरील ग्रंथांत नाथांनीं मूळ श्लोकांतील रहस्य प्राकृत भाषेंत अत्युत्कृष्ट रीतीनें आणिलें आहे. गुरुकृपेचें सामर्थ्य किती आहे हें हा ग्रंथ शांत मनानें एकदां वाचल्यास कळून येणारें आहे. यानंतर हस्तामलक, शुकाष्टकटीका, स्वात्मबोध, चिरंजीवपद, आनंदलहरी, अनुभवानंद, मुद्राविलास, लघुगीता, वसिष्ठानुभव, वगैरे ग्रंथ नाथांनीं पैठणास आल्यानंतर लिहिले. हे सर्व ग्रंथ संख्येनें लहान आहेत तरी त्यांत अद्वैतसिद्धांतांचें प्रतिपादन फारच बहारीनें केलेलें असून नाथांच्या स्वानुभवाची साक्ष ते उत्तम रीतीनें पटवीत आहेत. ह्यांशिवाय नाथांचे मोठे असे ग्रंथ म्हटले म्हणजे रुक्मिणीस्वयंवर, एकनाथी भागवत व भावार्थरामायण हे असून ते अत्यंत लोकप्रिय झाले आहेत. त्यांपैकीं रुक्मिणीस्वयंवर, ओंवीसंख्या १७००, व दुसरा एकनाथी भागवत, ओंवीसंख्या २००००, ह्या दोन्ही ग्रंथांची समाप्ति काशीक्षेत्रीं झाली. एकनाथी भागवताविषयीं नाथांनीं स्वतः असें लिहिलें आहेः—

ग्रंथारंभ प्रतिष्ठानीं । तेथ पंचाध्यायी संपवूनी ।
इतर ग्रंथाची करणी । आनंदवनीं विस्तारिली ॥
शालिवाहन शक वैभव । संख्या चौदाशें पंचाणव ।
श्रीमुख संवत्सराचें नांव । टीका अपूर्व तैं जाहली ॥
महामंगल कार्तिकमासीं । शुक्लपक्ष पौर्णिमेसी ।
सोमवार शिवयोगेंसीं । टीका एकादशी समाप्त जाहली ॥

ह्या ग्रंथाची पहिली पंचाध्यायी पैठणास संपवून बाकीचा ग्रंथ शके १४९५ कार्तिक शुद्ध १५ पौर्णिमा सोमवार रोजीं काशीक्षेत्रांत यतीच्या मठामध्यें नाथांनीं पुरा केला. काशी येथील क्षेत्रस्थ कर्मठ ब्राह्मणांनीं या वेळीं नाथांचा फारच छळ करून, हा ग्रंथ गंगेंत फेंकून दिला होता. परंतु गंगेनें तो स्वहस्तानें वर उचलून धरला! एकनाथांनीं या ग्रंथांत आपल्या परमपूज्य गुरुचा महिमा जागोजाग वर्णिलेला असून या ग्रंथाचें कर्तृत्वही त्यांनीं आपल्या गुरुकडेच सोंपविलें आहे.

एकनाथी भागवत हा ग्रंथ मूळ भागवताच्या अकराव्या स्कंधावरील प्राकृत टीका होय. एकनाथांनीं हा ग्रंथ आपल्या वयाच्या सुमारें पंचविसावे वर्षी केलेला आहे. तरी एवढ्या अल्पवयांत त्यांनीं जी ग्रंथरचना केली आहे, ती सर्वांगपरिपूर्ण व फार उत्तम साधलेली आहे. एकनाथमहाराजांच्या कालींच ह्या ग्रंथाची प्रसिद्धी व प्रशंसा चोहोंकडे झाली होती, व त्यांच्या पश्चात् अद्यापि आम्हां महाराष्ट्रीय भाविकांची या ग्रंथाविषयीं अत्यंत पूज्य भावना असून ती पुढेंही तशीच कायम राहील, यांत शंका नाहीं. तुकारामबुवांनीं भंडारा

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

डोंगरावरील गुहेंत एकांतीं बसून ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत वगैरे ग्रंथांचीं अनेक पारायणें केलीं व त्यामुळें त्यांस त्वरित कवित्व करण्याची स्फूर्ति झाली, हें सर्वत्र महशूर आहेच.

एकनाथमहाराजांनीं आपल्या उतारवयांत केलेला व शेवटचा ग्रंथ भावार्थरामायण हा होय. भावार्थरामायण हा ग्रंथ वाल्मीकिरामायणावरील प्राकृत टीकाग्रंथ आहे. ह्यांत जवळजवळ ओंवीसंख्या ४०००० आहे. हा ग्रंथ फारच मोठा असून प्रेमळ भगवद्भक्तांचीं मनें भक्तिरसांत तल्लीन करून सोडणारा असा आहे. मूळ संस्कृतांतील वाल्मीकिरामायणाप्रमाणेंच एकनाथांचा हा भावार्थरामायण ग्रंथही चरित्रात्मक व ऐतिहासिक असून त्यांत जागोजाग अध्यात्मविषय अत्यंत खुबीनें ग्रथित केला असल्यामुळें तो विशेष मनोरंजक व बोधप्रद झाला आहे. त्यामुळें मूळ संस्कृत ग्रंथावर टीकाग्रंथानें ताण केली आहे असें म्हटल्यास तें चुकीचें होणार नाहीं. ज्ञानदेवांच्या भगवद्गीतेवरील मराठी भावार्थदीपिका (ज्ञानेश्वरी) टीकेप्रमाणेंच हा नाथांचा वाल्मीकिरामायणावरील टीकाग्रंथ प्राकृत जनांस परमार्थाचा उत्तम प्रकारें लाभ करून देणारा असा झाला आहे. ज्ञानदेवांच्या ग्रंथांचें अध्ययन एकनाथमहाराजांच्या अगदीं रोमरोमांत भिनून गेलें होतें, हें त्यांचा एकनाथी भागवत हा ग्रंथ पाहिल्यास दिसून येणारें आहे. एकनाथी भागवतांत ज्ञानेश्वरींतील कित्येक ओंव्या पाठभेदानें किंचित् भिन्न अशा आल्या आहेत. बहुतेक शब्दरचना तर कित्येक ठिकाणीं जशीच्या तशीच आढळून येते. प्रस्तुत भावार्थरामायण ग्रंथांतही कित्येक ठिकाणीं हा प्रकार आढळून येणारा आहे. ह्या ग्रंथाच्या आरंभीं तर एकनाथांनीं ज्ञानदेवांचें अगदीं अनुकरणच केलें आहे. पहिल्या अध्यायास आरंभ करतांना आरंभीं गणेशस्तवन, शारदास्तवन व श्रीगुरुस्तुति ह्यांत ज्ञानेश्वरीचीच पद्धति एकनाथांनीं स्वीकारली आहे. ज्ञानेश्वरीची अगदीं पहिली ओंवी—

ॐ नमो जी आद्या । वेदप्रतिपाद्या ।
जय जय स्वसंवेद्या । आत्मरूपा ॥ १ ॥

आतां भावार्थरामायणाची पहिली ओंवी पहा :-

ॐ नमो अनादि आद्या । वेदवेदांतवेद्या ।
वंद्यांही परमवंद्या । स्वसंवेद्या श्रीगणेशा ॥ १ ॥

ह्या ग्रंथाच्या परिशीलनानें ईशभक्ति, वेदान्त आणि इतिहास या अपूर्व त्रिवेणीसंगमस्नानाचा लाभ वाचकांस होणारा आहे. एकनाथांनीं ह्या ग्रंथांत वाल्मीकिरामायण, आनंदरामायण, योगवासिष्ठ इत्यादि ग्रंथांचे जागोजाग आधार घेतले असून ठिकठिकाणीं अध्यात्मविषयावर रूपकें, दृष्टांत वगैरे दिले आहेत. त्यांवरून रामकथा व अध्यात्मज्ञान यांचा अपूर्व मिलाफ यांत झाला आहे. ग्रंथरचना अगदीं स्वतंत्र असून एकनाथांचे ठायीं असलेले भक्ति, ज्ञान, वैराग्य, परोपकारबुद्धि, दया, प्रेम वगैरे अनेक सात्त्विक गुण या ग्रंथांत ठिकठिकाणीं दृग्गोचर होत आहेत. आपलें निरहंकारित्व व अकर्तृत्व हीं नाथांनीं जागोजाग ह्या ग्रंथांत व्यक्त केलीं आहेतः—

तूं कैसा झालासी वक्ता । पुसाल माझी योग्यता ।
तेही मी सांगेन तत्त्वता । सावध श्रोतां परिसावी ॥
मी नेणें मूळींच्या संस्कृतासी । मूर्खपण माझी मिरासी ।
त्या मूर्खाच्या मुखासी । श्रीराम ऐसी कथा वदवी ॥
माझे अंगीं मूर्खपण । माझें मी जाणें संपूर्ण ।
न करीं म्हणतां रामायण । श्रीराम आपण कथा प्रेरी ॥
प्रेरितांही मी न करीं जाण । तंव स्वप्नामाजी रामायण ।
श्रीराम विस्तारी संपूर्ण । ऊणखूण ग्रंथाची ॥
जागृतीमाजी वर्ततां । पुढें प्रकाशे रामकथा ।
दुश्चितपणें ठेवों जातां । राम तत्त्वतां रामायण दावी ॥
करूं जातां फुकट गोष्टी । त्यांमाजी रामकथा उठी ।
रामें पुरविली पाठी । खिळिली दृष्टी रामायणीं ॥
ऐसियांत न करीं म्हणतां । राम चढे मीपणाचे माथां ।
मग तो आपुलिया निजसत्ता । वदवी कथा बलात्कारें ॥
मी निजलों असतां जाण । राम थापटी आपण ।
म्हणे उठीं करीं रामायण । तेथें मी कोण न करावया ॥

बालकांड अ० ४. ओंव्या ८–१५.

वरील ओंव्यांत एकनाथमहाराजांनीं आपणास प्रत्यक्ष श्रीरामचंद्रानें हा भावार्थरामायण ग्रंथ रचण्यास आज्ञा दिली आहे, इतकेंच नव्हे, तर तो बलात्कारेंकरून माझ्याकडून हा ग्रंथ वदवीत आहे असें स्पष्ट नमूद केलें आहे. यावरून नाथांची वृत्ति कशी हरिरूपीं रंगलेली होती हें पूर्णपणें दिसून येतें आणि म्हणूनच त्यांच्याकडून असा प्रासादिक ग्रंथ निर्माण झाला आहे. ग्रंथकार पुष्कळ असतात, परंतु भगवत्प्रेरणेनें लिहिणारे विरळा. भगवद्भक्तींत सर्वदा लीन होऊन जाणाऱ्या या वृत्तींतच नाथांच्या ग्रंथाचें श्रेष्ठत्व आहे हें कोणाच्याही लक्षांत आल्यावांचून रहाणार नाहीं.

ज्यांना प्रपंच साधून त्यांतच परमार्थाचा लाभ प्राप्त करून घ्यावयाचा आहे, अशा भाविक प्राकृतभाषाभिज्ञांस तर प्रस्तुत ग्रंथ म्हणजे केवळ कामधेनु होय, एकनाथ म्हणतातः—

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

ग्रंथीं राखोनियां गुह्यार्थ । मुख्यत्वें दावावा परमार्थ ।
ह्याचि कवित्वाचा निजस्वार्थ । येणें रघुनाथ संतुष्ट ॥ ९५ ॥

बालकांड, अ० २७.

एकनाथमहाराज स्वतः प्रपंच साधून परमार्थ साधणारे असल्यामुळें साहजिकच त्यांस प्रापंचिकांस परमार्थमार्ग सुलभ रीतीनें कसा साधून देतां येईल ही चिंता होती व त्यामुळें त्यांनीं अशा लोकांकरितां हा भावार्थरामायण व दुसरा रुक्मिणीस्वयंवर असे दोन ग्रंथ केले आहेत. ज्यांस केवळ अध्यात्मविषयक ग्रंथांत प्रवेश करितां येत नाहीं, व घटपटादिखटपट ज्यांच्या मतीस तोलत नाहीं अशा भाविकांकरितां परमेश्वराच्या सगुणलीला ज्यांत वर्णिलेल्या आहेत असे हे अत्यंत बोधदायक व मनोरंजक ग्रंथ लिहिले असून त्यांत जागोजाग अध्यात्मविषय उत्तम रीतीनें गोंविले आहेत. यांतील प्रसंग नाथांनीं इतक्या चटकदार रीतीनें वर्णिलेले आहेत कीं, ते वाचतांना हर्ष, शोक, आनंद, आश्चर्य, करुणा, प्रसन्नता, गांभीर्य, इत्यादि वृत्तींचे ठसे लागोलाग वाचकांच्या मनावर उमटतात व तत्क्षणींच रामदर्शनसुखाचा त्यांस लाभ घडून मन सुप्रसन्न होतें.

भावार्थरामायण हा ग्रंथ युद्धकांड अ० ४४ पर्यंत नाथांनीं केल्यानंतर त्यांस आपलें देहावसान आतां लवकरच होणार असें समजल्यावरून त्यांनीं ह्या ग्रंथाची परिपूर्ति करण्याचें काम आपल्या गावबानामक एका प्रिय शिष्याकडे सोंपविलें होतें.

गावबा हा गंगातीरीं रहाणाऱ्या एका ब्राह्मण कुळकर्ण्याचा मुलगा होता. हा लहानपणीं अगदीं मूढवृत्ति असा होता. त्यास धड बोलतांही येत नसे. पूर्वपुण्योदयानें तो पैठणास येऊन नाथांकडे राहिला होता. एकनाथ व त्यांची पत्नी गिरिजाबाई ह्यांनीं त्याचें प्रतिपालन पोटच्या मुलाप्रमाणें केलें व त्यास परकीपणा वाटूं न देतां वागविलें. नाथांच्या घरीं हा पंधरा वर्षें होता. तो अत्यंत सेवातत्पर असे. नाथगृहीं त्यास सत्संगति, कथापुराणश्रवण वगैरे लाभ लाभल्यामुळें व नाथांचा वरदहस्त त्याच्या मस्तकावर असल्यामुळें हा मोठा विद्वान् व आत्मानुभवी साधुपुरुष होऊन गेला. भावार्थरामायणाचें पुढील काम नाथांचा महत्प्रसाद असें समजून गावबानें आनंदानें स्वीकारिलें व तत्काल पंचेचाळिसावा अध्याय रचून तो नाथांच्या समोर ठेविला. त्या वेळीं नाथांस परमानंद होऊन त्यांनीं गावबास 'तूं कृतार्थ होशील' असा आशीर्वाद दिला. एकनाथमहाराज समाधिस्थ झाल्यानंतर गावबानें केलेली पुढील ग्रंथरचना नाथांच्या मूळ ग्रंथास शोभेशीच उतरली आहे. मार्मिक वाचकाशिवाय ही कृति एकनाथांची नव्हे, असें कोणाच्याही लक्षांत येणार नाहीं. त्यांनीं जागोजाग आपल्या परम श्रेष्ठ अशा गुरु एकनाथांची महती वर्णिलेली असून त्यांत आपला नामनिर्देशही कोठें केलेला नाहीं. भावार्थरामायण युद्धकांड अध्याय ४५ पासून पुढील सर्व ग्रंथरचना गावबानेंच केली आहे, हें ह्या अध्यायाचे शेवटीं असलेल्या खालील ओंवीवरून स्पष्ट होत आहे.

यापरी मी अनाथ । भवदरिद्रें होतों पीडित ।
एका जनार्दनीं येथ । केला सनाथ त्रिजगतीं ॥ १८७ ॥

युद्धकांडाच्या शेवटींही गावबानें यासंबंधाचा उल्लेख पुढीलप्रमाणें केला आहे :–

माझी मिरासी मूर्खपण । नेणें पदबंधव्याख्यान ।
माथां हात ठेवोनि जनार्दन । वदवी रामायण निजसत्ता ॥
जनार्दनाची कृपा ऐसी । मूर्खाहातीं रामायणासी ।
वदविलें रामकथेसी । कृपा ऐसी संतांची ॥
सद्गुरूची कृपा घडे । तैं पांगुळा पर्वत चढे ।
एकनाथें तेणें पाडें । केलें रोकडें मज सरतें ॥

युद्धकांड अ० ९२, ओं. ६९–७१.

वरील ओंव्यांत 'जनार्दन' हा शब्द फक्त गुरुपरंपरेचा दर्शक आहे. गावबानें पुढील ग्रंथरचना अगदीं इतकी बेमालूम केली आहे कीं, गावबा हा प्रतिएकनाथच कीं काय असें त्याच्या कवित्वशक्तीवरून दिसतें. संतसहवास, श्रवण-मनन व सद्गुरुकृपा या परमार्थास लागणाऱ्या तीन अवश्य गोष्टी गावबास बालवयापासून लाभल्या असल्यामुळें एकनाथांप्रमाणेंच रामकथा वर्णन करण्यास तो समर्थ झाला व तदनुसार त्यानें ह्या ग्रंथाची परिपूर्ति केली. एकनाथांच्या पश्चात् हा ग्रंथ गावबानें पूर्ण करून भाविक जनांस सन्मार्गाचा लाभ करून दिला, हे त्याचे प्राकृत जनांवर एकनाथांप्रमाणेंच थोर उपकार झाले आहेत.

ही गावबाची कृति इतकी सरस व सुबोध झाली आहे कीं, ती पाहून मार्मिक वाचकांस आनंद वाटल्यावांचून रहावयाचा नाहीं. हा केवळ गुरुकृपेचा महिमा आहे, असेंच म्हटलें पाहिजे. 'आपणासारिखे करिती तत्काळ' हें तुकोबांचें वचन सार्थ आहे यांत तिळमात्र संशय नाहीं. असो. भावार्थरामायणासंबंधानें जितकें लिहावें तितकें थोडेंच होणार आहे. त्यांतील प्रसादगुणच तसा आहे.

वरील सर्व ग्रंथांशिवाय एकनाथमहाराजांनीं केलेले भक्तिज्ञानवैराग्यपर व सगुणनिर्गुणस्वरूपपर हजारों अभंग, पदें, आणि निरनिराळ्या रूपकांनीं परिप्लुत असें भजनी भारूड

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

म्हणून त्यांचें कवित्व प्रसिद्ध आहे. एकनाथमहाराजांनीं हा जो मराठी भाषेचा उद्धार केला त्याबद्दल त्यांचे उपकार मानावे तेवढे थोडेच होणार आहेत. आम्हां महाराष्ट्रीयांचा भाग्योदय होण्यास व आमचें पूर्वकालीन पारमार्थिक वैभव प्राप्त करून घेण्यास जर कोणतें सुलभ साधन असेल तर तें ज्ञानदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास यांसारख्या महान् साधुसंतांच्या ग्रंथांचें अध्ययन करणें, तसेंच त्यांचीं चरित्रें मनोभावानें वाचून त्यांच्या दैवी गुणांचा शतांश तरी आपल्या आचरणांत आणणें हेंच एक होय.

एकनाथांच्या कवितेचा प्रसादगुण किती उच्च प्रकारचा होता हें समजण्याकरितां त्यांच्या भावार्थरामायणांतील कांहीं सरस वेंचे येथें दिल्यास अप्रासंगिक होणार नाहीं, असें समजून ते खालीं देत आहों.

राजा दशरथ कौसल्येस दोहदलक्षण विचारीत असतां तत्काळ तिचे नेत्र आरक्त होऊन भृकुटी वर चढल्या, अंगांतील कंचुकी ताडकन फाटली, व भिल्लिणीप्रमाणें कांसोटा मारून ती उभी राहिली व मोठ्या वीरावेशानें बोलत आहेः–

नांव ऐकोनि रावण । येरी म्हणे दे दे धनुष्यबाण ।
करूं लंकेचें निर्वाण । मारूं दारुण राक्षस ॥
पाचारा वनींचे वनचर । मुकुट कुंडलें द्या अलंकार ।
राज्य देवोनि धरा छत्र । वानरभार चालवा ॥
केउता गेला रे हनुमंत । अंगद सुग्रीव जांबवंत ।
अझूनि रावणाची मात । जगाआंत उरलीसे ॥
अहो वज्रदेही निजगडा । पुच्छें घालोनियां वेढा ।
लंका जाळा रे भडभडां । पाडा तडतडां राक्षस ॥
अमित पाचारा वानर । शिळीं बुजा रे सागर ।
पाडा पाडा रे नगर । निशाचरवस्ती जे ॥
केउते गेले रे जुत्पती । लंका उलथा रे हातोहातीं ।
पाडा पाडा चारी भिंती । दुर्गें किती आम्हांसी ॥
आगड भेदा रे चोहटा । पाडूं लंकेच्या त्रिकूटा ।
मारूं रावणा अति दुष्टा । स्वधर्मवाटा रुंधित ॥
बाण घेवोनि स्वांगें । छेदूं कुंभकर्णाचें टांगें ।
भेदूं रावणाचीं सर्वांगें । भिडतां मागें मी न सरें ॥
राक्षसांच्या शिरकमळीं । खेळूं लंकेपुढें चेंडूफळी ।
साजुक रुधिरांच्या कल्लोळीं । तृप्त कंकाळीं करूं आजी ॥

बालकांड अ. ५, ओं. १०–१८.

भावार्थरामायणामध्यें वीररस प्रधान आहे व वरील ओंव्यांत कौसल्येच्या मुखानें एकनाथमहाराजांनीं तो किती बहारीनें वर्णन केला आहे पहा !

ज्यानें तेहतीस कोटी देवांस बंदिवासांत घातलें, सर्व पृथ्वीवर धुमाकूळ मांडिला, ज्याच्या अनुचरांनीं प्राचीन आर्य ऋषींचे आश्रम उध्वस्त करून त्यांस दुःसह ताप दिला व त्यांचे यज्ञयाग विध्वंसिले अशा केवळ तमोगुणी रावणाच्या नाशार्थ ज्या वेळीं अयोध्येंत श्रीरामचंद्रप्रभूचा जन्म झाला त्या वेळीं रावणराज्यांत (लंकेंत) अनेक अपशकुन झाले. त्याचें सुरस वर्णन एकनाथांनीं खालीलप्रमाणें केलें आहेः–

श्रीराम जन्मला अयोध्यापुरीं । तंव वीज पडे लंकेवरी ।
भूस्फोटन नगरद्वारीं । भूकंप नगरीं त्रिकूटेंसीं ॥
रावण जंव भद्रीं चढे । तंव मुकुट पायरीवरी पडे ।
वायुघातें छत्र मोडे । सभेचे हुडे खचोनि पडती ॥
कुंभकर्णाच्या घरावरी । दिवाभीत घूं घूं करी ।
इंद्रजित आरशाभीतरीं । देखे अशिर शरीर ॥
मंदोदरीची गळसरी । तुटोनि पडे अग्निभीतरीं ।
तीतें काढी जंव सुंदरी । तंव भस्म करी हुताशन ॥

बालकांड अ. ७, ओं. ४–७.

एकनाथमहाराजांनीं राम, लक्ष्मण, सीता इत्यादि नामाभिधानांत अध्यात्मविषय कसा गोंविला आहे तो पहाः–

आत्मप्रबोध तो लक्ष्मण । भावार्थ तो भरत जाण ।
निजनिर्धारी तो शत्रुघ्न । आनंदविग्रही पूर्ण श्रीराम ॥
ब्रह्मात्मा तोचि दशरथ । उत्पत्तीसी मुख्य हेत ।
दूर गेलिया श्रीरघुनाथ । निवर्तत ब्रह्मात्मा ॥
आतां विवेक आणि निजविचारू । तैसे वसिष्ठ विश्वामित्र गुरु ।
ज्यांपासोनि अति साचारू । शस्त्रास्त्रविद्या दृढ केली ॥
कौसल्या ते सुविद्या । सुमित्रा ते शुद्ध मेधा ।
कैकेयी ते अति अविद्या । मंथरा कुविद्या तीपासीं ॥
कुविद्या क्षोभवोनि अविद्येसीं । श्रीराम केला वनवासी ।
तंव सीता अनन्यभावेंसीं । श्रीरामासरसी निघाली ॥

अयोध्याकांड अ. १, ओं. १८–२२.

श्रीरामचंद्राच्या राज्याभिषेकनिमित्तानें अयोध्यानगरी शृंगारली जाऊन सर्व नागरिक अत्यानंदांत निमग्न आहेत हें पाहून मंथरा कैकेयीचे महालांत आली व तिनें कैकेयीची अत्यंत निर्भर्त्सना करून रामचंद्रास वनवासास पाठविण्याविषयीं तिला उद्युक्त केलें, त्या वेळचें वर्णनः–

मंथरा अति क्रोधेंसीं । काय बोले कैकेयीसी ।
उठीं मूढे काय निजसी । सुख मानिसी तें दुःख ॥
रामराज्याचें मानिसी सुख । गुढिया तोरणें अति हरिख

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

तेंचि तुज होय महादुःख । परी तूं मूर्ख नेणसी ॥
मी रायाची पढियंती । तेणें गर्वें तुज पडिली भ्रांती ।
सौभाग्य गेलें कौसल्येप्रती । तें तूं निश्चितीं नेणसी ॥
राजा दशरथ आपण । तुज छळितो संपूर्ण ।
त्याचें तूं नेणसी लक्षण । पढियंतीपणें अतिगर्वी ॥
तूं गर्वित जे राज्यवैभवेंसीं । तें राज्य राजा देतो श्रीरामासी
वैभव गेलें कौसल्येपासीं । तूं नेणसी मूर्खत्वें ॥

अयोध्याकांड, अ. ३, ओं. ५०-५२, ६०-६१

मथरेच्या मुखांतील वरील उद्गार नाथांचें मानवी स्वभावाचें ज्ञान किती परिपूर्ण होतें व निरनिराळ्या स्थितींत बदलणारे मनुष्याचे मनोविकार दाखविण्याची त्यांची हातोटी किती सरस होती, हें उत्तम प्रकारें दाखवीत आहेत.

श्रीरामचंद्रास वनवास व भरतास राज्याभिषेक ह्यांसंबंधीं आपलें वचन पूर्ण करण्यास राजा दशरथ कांकूं करतो असें पाहून त्या वेळीं कैकेयीनें केलेलें भाषणः—

नपुंसक तूं सूर्यवंशीं । राम न धाडवे वनवासासी ।
उणें आणिलें पूर्वजांसी । दिधले भाकेसी नेदूनी ॥
अति दीन हीन तूं होसी । लाज लाविली सूर्यवंशासी ।
बोलिला बोल पैं सांडिसी । कृपण होसी नृपनाथा ॥
पायां पडलियासाठीं । मी न सांडीं वरदगोष्टी ।
देणें नाहीं तुझे पोटीं । महाहट्टी होसी राया ॥
तूं तंव न देसी वरदान । मज म्हणसी महाविघ्न ।
तरी मी आपुला देईन प्राण । सुख संपूर्ण हो तुम्हां ॥

अयोध्याकांड, अ. ४, ओं. ९४, ११६-११८

असो. स्थलसंकोचास्तव अधिक उतारे देतां येत नाहींत, तरी शितावरून भाताची परीक्षा या न्यायानें नाथांची कविता किती प्रासादिक, सुलभ व सरस आहे हें वरील थोड्याशा उताऱ्यांवरून समजण्यासारखें आहे.

एकनाथमहाराजांस आपलें देहावसान अमुक दिवशीं होणार हें कळून चुकलें होतें. त्याचप्रमाणें शके १५२१ चा फाल्गुन मास उगवला व नाथांनीं आपण लवकरच देह ठेवणार असें जाहीर केलें. ही बातमी जिकडेतिकडे पसरली व त्यांच्या दर्शनास हजारों लोकांच्या झुंडीच्या झुंडी येऊं लागल्या. स्वतःच्या वाड्यांत एकनाथांचीं कीर्तनें सुरू झालीं व सर्व पैठणभर ठिकठिकाणीं नामसप्ताह सुरू झाले. सर्वत्र नामघोष होऊन पैठण नगरी केवळ भूवैकुंठ भासूं लागली. अशा हरिनामानंदकल्लोळांत एकनाथमहाराज शके १५२१ विकारी नाम संवत्सर फाल्गुन वद्य ६ रविवार रोजीं समाधिस्थ झाले. त्यांचा स्थूल देह जरी ह्या लोकांतून अदृश्य झाला आहे, तरी आपल्या मनोहर व सुरस महाराष्ट्रवाङ्मयमूर्तीनें ते आजही विद्यमान असून भाविक जनांस दर्शनलाभ व ज्ञानलाभ देत आहेत यांत तिळमात्र संशय नाहीं.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

निर्णयसागरशताब्दि आवृत्तीची प्रस्तावना

प्राचीन संस्कृत व धार्मिक ग्रंथांच्या प्रकाशनानें दिगंत कीर्ति संपादन केलेल्या निर्णयसागर मुद्रणालयाचे महान् प्रतिभासंपन्न आद्य संस्थापक शेठ जावजी दादाजी यांचें चरित्र निर्णयसागर शताब्दीनिमित्त विस्तृत स्वरूपांत प्रकाशांत आल्यानंतर अनेक ऋणानुबंधी मित्रांनीं अशी इच्छा प्रदर्शित केली कीं, जावजीशेठजींच्या लौकिकाला साजेसें कांहीं कार्य आजच्या निर्णयसागर संस्थेनें सुरू करावें. त्यांच्या या सदिच्छेला इतक्या लवकर, अल्प प्रमाणांत कां होईना, मूर्त स्वरूप येईल अशी कोणालाच कल्पना नव्हती. परंतु शेठजींच्या पंचाहत्तराव्या पुण्यतिथीच्या निमित्तानें संस्थेचे सध्यांचे तरुण, तडफदार व कर्तव्यनिष्ठ व्यवस्थापक श्री. पांडुरंगराव मोरे यांनीं स्वयंप्रेरणेनें असें ठरवूनच टाकलें कीं, महाराष्ट्रांतील वारकरी सांप्रदायाची प्रस्थानत्रयी म्हणजे श्री ज्ञानेश्वरी श्री एकनाथी भागवत व श्री तुकाराम महाराजांची गाथा, आणि तिच्याच जोडीला श्री एकनाथांचें भावार्थरामायण या चार पवित्र ग्रंथांचें पुनर्मुद्रण याच वर्षांत पूर्ण करावयाचें व आगाऊ ग्राहकांना हे ग्रंथ जवळजवळ खर्चाच्या, मोबदल्यांतच द्यावयाचे. त्याप्रमाणें यंदांच्या श्रीरामनवमीला शेठजींच्या पावन पुण्यतिथीच्या दिवशीं मोठ्या समारंभानें श्री एकनाथी भागवताचा मुद्रणमुहूर्तही झाला. संकल्प तर जाहीर झाला. परंतु सात आठ महिन्यांत त्याची पूर्तता करणें ही सोपी गोष्ट नव्हती. यासाठीं व्यवस्थापकांनीं ज्योतिषभास्कर श्री. कृष्णाजी विठ्ठल सोमणशास्त्री व संतवाङ्मयाचे गाढे अभ्यासक वैकुंठवासी बंकटस्वामी महाराज यांचे शिष्य आणि तापीतीरावरील मेहूण येथील श्रीसंत मुक्ताबाई समाधि मंदिर संस्थेचे कार्यवाह हरिभक्तिपरायण श्री. काशिनाथ रामचंद्र पाटील या दोघांवर या कार्याची संपादकीय जबाबदारी सोंपविली.

प्रत्यक्ष कामाला सुरुवात केल्यानंतर ग्रंथांच्या शुद्धस्वरूपनिश्चितीच्या बाबतींत अनेक अडचणी आल्या. त्यांचें निराकरण कसें केलें याचा खुलासा त्या त्या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत स्वतंत्रपणें केलेला आहे.

जावजीशेठजींच्या पुण्याईनें व सकल संतांच्या कृपेनें या ग्रंथांचें प्रकाशन अल्पकालावधींत होऊं शकलें ही अत्यंत समाधानाची गोष्ट. 'क्लेशः फलेन हि पुनर्नवतां विधत्ते,' या महाकवि कालिदासोक्त न्यायानें संस्थेच्या चालकांना अशाच प्रकारचीं महत्त्वाचीं प्रकाशनें सादर करावयाला व जावजीशेठजींची थोर परंपरा चालवावयाला हुरूप येईल असा विश्वास वाटतो. या चारही ग्रंथांच्या प्रचारात्मक, संपादकीय व मुद्रणविषयक कामगिरींत श्री. स. ह. मोडक यांनीं आपुलकीनें भाग घेतला, हें अवश्य साभार नमूद केलें पाहिजे.

या ग्रंथांना आगाऊ ग्राहक मिळण्याच्या दृष्टीनें चांगलेंच यश लाभलें. ग्रंथवितरणाची मुख्य भिस्त व्यावसायिक पुस्तकविक्रेत्यांवर ठेवलेली होती, तरीही अनेक संतवाङ्मयप्रेमी सज्जनांनीं उत्स्फूर्तपणें या ग्रंथांचे ग्राहक मिळविण्याच्या कामीं अत्यंत आपुलकीनें पुढाकार घेतला, याबद्दल त्यांना द्यावेत तेवढे धन्यवाद थोडेच होतील. शेवटीं या चारही ग्रंथांची सजावट करण्याच्या कामीं मुंबईचे नामांकित छायाचित्रकार श्री. हरिभाऊ सावळाराम शेजवळ यांनीं वारकरी सांप्रदायाच्या प्रेमाखातर जी बहुमोल सेवा केली तिचाही साभार उल्लेख केला पाहिजे.

प्रकाशक

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

निर्णयसागर शताब्दि प्रकाशनांचे संपादक : ह. भ. प. काशिनाथभाऊ व सामणशास्त्री

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

श्रीभावार्थरामायण

श्रीएकनाथमहाराजांच्या श्रीभावार्थरामायणाची ही निर्णयसागरशताब्दि आवृत्ति होय. १९१७ सालीं पहिली आवृत्ति प्रसिद्ध झाल्यानंतर ५२ वर्षें लोटलीं. मध्यंतरींच्या काळांत या महान् ग्रंथाचें मुद्रण निर्णयसागर-कडून न झाल्याबद्दल अनेक संतवाङ्मयप्रेमी सज्जनांना जी रुखरुख लागून राहिलेली होती, ती या शताब्दि आवृत्तीच्या प्रकाशनानें दूर होत आहे ही आनंदाची गोष्ट होय. प्रथमावृत्तींत मूळ संपादकांनीं श्रीभावार्थ-रामायणाची संपूर्ण संहिता संशोधन केलेली होतीच. या शताब्दि आवृत्तींत त्यांतील किरकोळ मुद्रणदोष दुरुस्त करण्याचा प्रयत्न केला आहे आणि उपलब्ध अन्य प्रतींच्याही अवलोकनानें आवश्यक त्या दुरुस्त्या मूळ संहितेंत आणि टीपांतूनही करण्याचा प्रयत्न केला आहे. श्रीएकनाथमहाराजांच्या या ग्रंथाविषयीं व निर्णयसागर शताब्दीच्या निमित्तानें प्रकाशांत आलेल्या अन्य तीन ग्रंथांविषयीं महाराष्ट्राच्या श्रद्धाशील संतभक्त जनतेला केवढा नितांत आदर आहे याचा एकच दाखला या प्रसंगीं नमूद करणें आम्ही आमचें कर्तव्य समजतों. या ग्रंथांना कुणा थोर व्यक्तींच्या प्रस्तावना घेण्याबाबत वारकरी संप्रदायांतील एका महान् सत्पुरुषाचा सल्ला आम्हीं विचारला, तेव्हां त्यांनीं आस्थापूर्वक असें सांगितलें कीं, निर्णयसागरच्या या ग्रंथांच्या आवृत्त्या ह्याच आम्ही प्रमाण मानीत आलों आहोंत; त्या जशाच्या तशाच प्रकाशांत आणणें हेंच औचित्याला धरून होईल. त्यांची ही सूचना शिरोधार्य मानून आम्ही ही आमची अल्पस्वल्प सेवा निर्णयसागरच्या वतीनें जनता-जनार्दनाला सादर करीत आहोंत.

श्रीएकनाथमहाराजांनीं लिहिलेल्या वेदांतविषयक आणि चरित्रविषयक अन्य ग्रंथांचा उल्लेख प्रारंभीं दिलेल्या श्रीएकनाथांच्या चरित्रलेखांत आलाच आहे. त्याशिवाय त्यांचे अभंग, गवळणी, भारुडें वगैरे अनेक काव्यप्रकारही अत्यंत लोकप्रिय असून त्यांचें गायन मोठ्या श्रद्धेनें महाराष्ट्रांत व मराठी भाषा प्रचलित आहे तेथेंही सर्वत्र होत असतें. श्रीएकनाथमहाराजांचें हें सर्व वाङ्मय संशोधनपूर्वक वाचकांना सादर केलें जाईल, तर मराठी भाषेला अनेक बहुमोल लेण्यांचा लाभ होईल. संतवाङ्मयप्रकाशनाची निर्णयसागरची ही परंपरा यापुढेंही अशीच अखंडपणें चालत राहो एवढीच श्रीएकनाथमहाराजांच्या चरणीं प्रार्थना आहे.

श्रीसंतांचा नम्र सेवक,

कृ. वि. सोमण

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

श्रीभावार्थरामायणाची विषयानुक्रमणिका

अध्याय	विषय	पृष्ठ
	बालकांड	
१	दशरथाचें विजयाभिगमन ...	३
२	पुरोडाशविभाग ...	७
३	पिंडप्राशन ...	११
४	कौसल्यादोहदनिरूपण ...	१३
५	,, ,, ...	१७
६	श्रीरामजन्मप्रसंगनिरूपण ...	१८
७	श्रीरामतीर्थयात्रागमन ...	२३
८	विश्वामित्रागमन ...	२५
९	श्रीरामाचें वैराग्यनिरूपण ...	२७
१०	शुकजनकसंवाद ...	३०
११	वसिष्ठरामसंवाद ...	३५
१२	ताटिकानिर्दलन ...	४६
१३	सुबाहुनिर्दलन ...	५०
१४	अहल्योद्धरण ...	५४
१५	जानकीजन्मकथा ...	६०
१६	परशुरामयुद्धप्रभाव ...	६५
१७	चापनिरूपण ...	७२
१८	चापकथानिरूपण ...	७५
१९	श्रीरामस्वरूपवर्णन ...	७९
२०	धनुर्भंग व सीतावरण ...	८३
२१	दशरथागमन ...	८६
२२	सूर्यवंशनिरूपण ...	८९
२३	सीमांतपूजन व रुखवतभोजन ...	९२
२४	श्रीराममंडपागमन ...	९६
२५	जानकीपाणिग्रहण ...	१००
२६	परशुरामाचें एकात्मबोधनिरूपण ...	१०३
२७	श्रीरामजानकींचा अयोध्याप्रवेश ...	१०६
	अयोध्याकांड	
१	श्रीरामलक्ष्मणांना शस्त्रास्त्रविद्यादर्शन ...	११३
२	श्रीरामाभिषेकप्रारंभ ...	११६
३	कैकेयीला मंथरेचा उपदेश ...	१२०
४	कैकेयीदशरथसंवाद ...	१२५
५	श्रीरामाचें दशरथदर्शनार्थ आगमन ...	१२९
६	कौसल्यासांत्वन ...	१३३
७	जानकी-लक्ष्मणांचा वनाभिगमननिश्चय ...	१३८
८	श्रीराम-सीता-लक्ष्मणांचें वनाभिगमन ...	१४२
९	श्रीराम-सीता-लक्ष्मणचित्रकूटगमन ...	१४७
१०	दशरथप्राणोत्क्रमण ...	१५०
११	श्रीरामपादुकापट्टाभिषेक ...	१५४
१२	भरतवनाभिगमन व गुहकसंवाद ...	१५८
१३	भरताचें भरद्वाजाश्रमगमन आणि चित्रकूटप्रवेश ...	१६३
१४	श्रीरामकृत काकनिग्रह ...	१६७
१५	श्रीरामभरतशत्रुघ्नसंयोग ...	१७०
१६	श्रीरामाचें दशरथसपिंडीकरण ...	१७५
१७	भरतसमाधान ...	१७७
१८	भरतअयोध्यागमन व नंदिग्रामवास ...	१८१
	अरण्यकांड	
१	श्रीराम-सीता-लक्ष्मणांचें दंडकारण्या-गमन ...	१८७
२	विराधवध ...	१९०
३	शरभंगोद्धरण ...	१९५
४	श्रीरामकृत पंचाप्सरा-मंदकर्ण्युद्धरण ...	१९७
५	अगस्ति-श्रीरामदर्शन व अस्त्रग्रहण ...	२०२
६	कश्यपवंशवर्णन व गरुडपरमामृताभिगमन ...	२०६
७	श्रीराम-सीता-लक्ष्मण-जटायु-पंचवट्यागमन ...	२१०
८	शूर्पणखाविरूपकरण ...	२१४
९	खरदूषणश्रीरामयुद्धप्रारंभ ...	२२०

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

अध्याय	विषय	पृष्ठ
१०	दूषणवध ...	२२५
११	खरमर्दन ...	२२९
१२	शूर्पणखा-रावणसंवाद ...	२३५
१३	मारीच व रावणाचें पंचबव्यागमन ...	२३९
१४	मारीचकपटमृगवध ...	२४३
१५	श्रीराम-लक्ष्मणानुवाद ...	२४६
१६	रावणकृत जानकीहरण ...	२५१
१७	जटायुच्छलनवध ...	२५५
१८	सीतेचा अशोकवनप्रवेश ...	२६१
१९	श्रीरामाचें सीताशोकविलपन ...	२६६
२०	उमा-रामसंवाद ...	२७१
२१	जटायूद्धरण ...	२७७
२२	कबंधोद्धरण ...	२८१
२३	शबरीउद्धरण ...	२८६

किष्किंधाकांड.

अध्याय	विषय	पृष्ठ
१	हनुमद्दर्शन ...	२९५
२	वालि-सुग्रीवजन्मकथन ...	२९९
३	सुग्रीवसख्यनिरूपण ...	३०२
४	वालि-सुग्रीवविरोधकथन ...	३०७
५	सुग्रीवभंग ...	३१२
६	वालिवध ...	३१७
७	सुग्रीवराज्याभिषेक ...	३२३
८	सुग्रीवाचें रामाकडे आगमन ...	३२८
९	सर्वसुग्रीवसेनाश्रीरामदर्शन ...	३३३
१०	हनुमज्जन्मकथन ...	३३५
११	सीताशुद्ध्यर्थ वानरप्रेरण ...	३४०
१२	सीताशुद्ध्यर्थ वानरप्रेषण ...	३४५
१३	श्रीराम-हनुमत्संवाद ...	३४९
१४	वानरबिलप्रवेश ...	३५३
१५	तापसी-हनुमंतसंवाद ...	३५७
१६	संपातिउद्धरण ...	३६१
१७	हनुमंतसमुद्रमध्यगमन ...	३६७
१८	हनुमंतलंकाप्रवेश ...	३७२

सुंदरकांड

अध्याय	विषय	पृष्ठ
१	लंकाशोधन ...	३८१
२	सीताशोधन ...	३८५
३	रावणसभालुंठन ...	३८९
४	हनुमद्रावणशयनभवनशोध ...	३९३
५	हनुमदशोकवनप्रवेश व जानकीदर्शन ...	३९७
६	मंदोदरीजन्मकथन ...	४००
७	रावणाशोकवनाभिगमन ...	४०५
८	सीता-रावणसंभाषण ...	४०९
९	दशरथ-कौसल्याविवाहकथन ...	४१४
१०	सीताअनुताप ...	४१८
११	सीता-हनुमद्दर्शन ...	४२२
१२	सीता-हनुमत्संवाद ...	४२६
१३	हनुमद्वनविध्वंस ...	४३२
१४	हनूमदक्षवध ...	४३६
१५	हनुमंताकडून इंद्रजितअपमान ...	४४२
१६	हनूमत्कृत रावणसैन्यवध ...	४४७
१७	रावणसभेंत हनूमदागमन ...	४५१
१८	रावणाचें खांडमिशादहन ...	४५७
१९	हनुमंतलंकादहन ...	४६०
२०	हनुमंताचें सीतेला आश्वासन ...	४६८
२१	गजेंद्रोपाख्यान ...	४७३
२२	हनुमंताचें श्रीरामदर्शनागमन ...	४७८
२३	सीताशुद्धिकथनार्थ हनुमदागमन ...	४८७
२४	वानरकृत मधुवनविध्वंस ...	४९२
२५	अंगद-श्रीरामसंवाद ...	४९८
२६	ब्रह्मपत्रहनुमत्प्रतापवर्णन ...	५०३
२७	ब्रह्मलिखितहनुमंतपराक्रमवर्णन ...	५०७
२८	जानकी-हनुमंतसंवादकथन ...	५१२
२९	हनुमत्प्रतापब्रह्मलेखनपत्रवर्णन ...	५१६
३०	ब्रह्मलिखितहनुमन्नसाळीवध ...	५२१
३१	,, इंद्रजितअपमान व हनुमंतपराक्रम	५२६
३२	हनुमद्रावणगर्वहरण ...	५३१
३३	ब्रह्मलिखितहनुमत्प्रतापकथन ...	५३६
३४	श्रीरामाचें समुद्रतीरागमन ...	५४३
३५	बिभीषणकृत रावणप्रधाननिर्भर्त्सन ...	५४९
३६	बिभीषणापमान ...	५५५
३७	बिभीषणाचें रामाकडे आगमन ...	५६२
३८	बिभीषणलंकाराज्याभिषेक ...	५६७
३९	श्रीरामसमुद्रशरणगमन ...	५७१
४०	सेतुबंधनसमाप्ति ...	५७७
४१	श्रीरामसैन्यसिंधुपरपारप्रवेश ...	५८२
४२	श्रीरामलंकागमन ...	५८६

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

अध्याय	विषय	पृष्ठ
	युद्धकांड	
१	चारप्रेरण ...	५९३
२	रावणच्छत्रभंग ...	५९७
३	जानकीच्छलन व कपटशिरोदर्शन ...	६०१
४	प्रथमयुद्धकथन ...	६०६
५	सुग्रीव-रावणयुद्धप्रसंग ...	६१२
६	अंगदशिष्टाईगमन ...	६१६
७	अंगदकृत रावणच्छलन ...	६२०
८	अंगदशिष्टाईनिरूपण ...	६२५
९	द्वंद्वयुद्धनिरूपण ...	६३१
१०	शरबंधहोमविधान ...	६३६
११	श्रीरामशरबंधन ...	६४१
१२	जानकीश्रीरामदर्शन ...	६४४
१३	रामशरबंधननिर्मुक्ति ...	६५०
१४	धूम्राक्षवध ...	६५६
१५	वज्रदंष्ट्र-अकंपनांचा वध ...	६६०
१६	प्रहस्तवध ...	६६८
१७	सुग्रीवमूर्च्छापतन ...	६७३
१८	नील-रावणयुद्धप्रसंग ...	६७७
१९	रावणपराजय ...	६८१
२०	कुंभकर्णप्रबोधन ...	६८९
२१	रावण-कुंभकर्णसंवाद ...	६९५
२२	,, ,, ...	७०१
२३	रावण-मंदोदरीसंवाद ...	७०६
२४	नारद-रावणसंवाद ...	७०९
२५	कुंभकर्णयुद्धप्रारंभ ...	७१५
२६	हनुमंत-कुंभकर्णयुद्धवर्णन ...	७२०
२७	सुग्रीवविजयप्राप्ति ...	७२४
२८	कुंभकर्णवध ...	७२८
२९	नरांतकवध ...	७३४
३०	देवांतक-त्रिशिरादिवध ...	७३९
३१	अतिकायवध ...	७४४
३२	रामलक्ष्मणशरबंधन ...	७५०
३३	शरबंधमोचन ...	७५४
३४	कुंभवध ...	७५८
३५	मकराक्षवध ...	७६३
३६	मायिकसीतावध ...	७६९
३७	निकुंभिलाबिलप्रवेशन ...	७७४
३८	इंद्रजिन्मेघपृष्ठगमन ...	७८१
३९	इंद्रजितवध ...	७८६
४०	लक्ष्मणसावधानीकरण ...	७९१
४१	सुलोचनाग्निप्रवेश ...	७९६
४२	रावणरथभंग व अपजय ...	८०२
४३	लक्ष्मणशक्तिभेद ...	८०६
४४	औषध्यर्थ हनुमत्प्रार्थना ...	८०९
४५	अप्सराउद्धरण ...	८१५
४६	हनुमंतनंदिग्रामगमन ...	८२१
४७	भरतहनूमद्दर्शन ...	८२६
४८	श्रीरघुनाथक्रोधोपशमन ...	८३१
४९	लक्ष्मणोत्थापन ...	८३७
५०	हनुमद्गिरिस्थापन ...	८४२
५१	अहिरावण-महिरावणसंवाद ...	८४८
५२	हनुमंत-मकरध्वजदर्शन ...	८५३
५३	महिरावणवध ...	८५८
५४	अहिरावणवधार्थ श्रीरामगमन ...	८६३
५५	सीता-मंदोदरीसंवाद ...	८७३
५६	सौमित्र-बिभीषणविज्ञापन ...	८७७
५७	राक्षसावरणभेद ...	८८२
५८	रावणयज्ञविध्वंसन ...	८८७
५९	रावणयुद्धागमन ...	८९२
६०	रघुनाथध्वजच्छेदन ...	८९७
६१	श्रीराम-रावणयुद्धप्रसंग ...	९०२
६२	रावणशिरश्छेदन ...	९०७
६३	रावणवध ...	९१२
६४	रावणवनिताविलपन ...	९१६
६५	मंदोदरीसहगमन ...	९२२
६६	बिभीषणराज्याभिषेचन ...	९२७
६७	जानकीआगमन ...	९३२
६८	सीतादिव्यनिरूपण ...	९३७
६९	दशरथसमाधान ...	९४३
७०	देवभक्तआनंदयोग ...	९४८
७१	त्रिजटादर्शन ...	९५४
७२	सौमित्रि-जानकीसमाधान ...	९५९
७३	पुष्पकारूढगमन ...	९६४
७४	हनुमंत-शंकरदर्शन ...	९६९
७५	आत्मलिंगानयन ...	९७५

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

अध्याय	विषय		पृष्ठ
७६	रामेश्वरमहिमाकथन	...	९८०
७७	श्रीरामअयोध्यादर्शन	...	९८८
७८	हनुमंतनंदिग्रामाभिगमन	...	९९५
७९	भरत-हनुमंतदर्शन	...	१०००
८०	श्रीराम-गुहकदर्शन	...	१००५
८१	श्रीराम-भरतदर्शन	...	१०१०
८२	श्रीरामाभिषिंचननिर्णय	...	१०१६
८३	श्रीरामराज्याभिषेक	...	१०२०
८४	श्रीरामस्वरूपवर्णन	...	१०२६
८५	सौमित्रविरक्तिकथन	...	१०३२
८६	भरताभिषेक	...	१०३७
८७	हनुमद्विनोदचरित	...	१०४२
८८	श्रीरामशेषहनुमत्प्राप्तिनिरूपण	...	१०४७
८९	हनुमत्प्रेमनिरूपण	...	१०५२
९०	बिभीषणप्रयाण	...	१०५६
९१	वानरनिर्याण	...	१०६०
९२	श्रीरामचरितकथन	...	१०६३

उत्तरकांड

अध्याय	विषय		पृष्ठ
१	हनुमंतस्त्रीराज्यप्रेरण	...	१०६९
२	पौलस्त्यजन्माख्यान	...	१०७२
३	पौलस्त्य (वैश्रवण) आख्यान	...	१०७५
४	सुकेशजन्मकथन	...	१०७६
५	सुमालि-माल्यवंत-मालि यांचें जन्मकथन	...	१०७८
६	राक्षस-विष्णुयुद्ध	...	१०८०
७	मालिराक्षसवध	...	१०८३
८	राक्षसपातालगमन	...	१०८६
९	रावणकुंभकर्णशूर्पणखाबिभीषणउत्पत्ति	...	१०८७
१०	रावणादिवरप्रदान	...	१०८९
११	रावणलंकाप्राप्ति	...	१०९२
१२	रावणादिपाणिग्रहण, इंद्रजिज्जन्मकथन	...	१०९५
१३	रावणाचें अलकावतीस गमन	...	१०९७
१४	रावणसैन्यभंग	...	१०९९
१५	वैश्रवणभंग	...	११००
१६	रावणशिववरद	...	११०२
१७	वेदवत्याख्यान	...	११०५
१८	मरुत्तयज्ञगमन	...	११०७
१९	अनरण्यनृपस्वर्गगमन	...	११०९
२०	रावणरेवातीरगमन	...	११११
२१	रावणबंधन	...	१११३
२२	रावणबंधमुक्ति	...	१११६
२३	रावण-वालिमित्रत्व	...	१११७
२४	नारदप्रेतपुरीआगमन	...	१११९
२५	रावणकृत यमसैन्यविध्वंस	...	११२०
२६	यमविधातृसंवाद	...	११२२
२७	रावणवपनविटंबन	...	११२४
२८	शूर्पणखा-खर-दूषणदंडकारण्यप्रवेश	...	११३१
२९	मधुराबणदर्शन	...	११३२
३०	रावण-रंभासंगम, नलकूबरशाप	...	११३५
३१	सुमालिवध	...	११३७
३२	इंद्र-रावणयुद्धप्रारंभ	...	११३८
३३	रावणकृत इंद्रबंधन व लंकाप्रवेश	...	११४०
३४	इंद्र-अहल्याख्यान	...	११४१
३५	हनुमंतप्रतापवर्णन	...	११४४
३६	हनुमंतवरद	...	११४६
३७	श्रीरामगुणवर्णन	...	११४९
३८	श्रीरामनृपदर्शनोत्सव	...	११५०
३९	वानरराक्षससुखसंपन्नता	...	११५१
४०	समस्तवानरादिकांचें स्वदेशगमन	...	११५२
४१	भरतस्तवन	...	११५४
४२	अशोकवाटिकावर्णन	...	११५५
४३	श्रीराम-भद्रसंवाद	...	११५७
४४	श्रीरामबंधुदर्शन	...	११५८
४५	श्रीरामसहबंधुविचार	...	११५९
४६	सीतालक्ष्मणवनाभिगमन	...	११६१
४७	जानकीवनाभिगमन	...	११६२
४८	सीताशोकनिरूपण	...	११६३
४९	सीतावाल्मीकिदर्शन	...	११६५
५०	सुमंतसारथिसंवाद	...	११६६
५१	लक्ष्मणसारथिसंवाद	...	११६७
५२	श्रीराम-लक्ष्मणदर्शनसंवाद	...	११६८
५३	नृगराजकथन	...	११६९
५४	नृगराजशापसमय	...	११७०
५५	निमिनृपवसिष्ठशापोक्ति	...	११७१
५६	ययातिकथन	...	११७२
५७	लवणासुराख्यान	...	११७५
५८	मधुपुरीशत्रुघ्नराज्याभिषेक	...	११७६

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

अध्याय	विषय		पृष्ठ
५९	शत्रुघ्नलवणपुरीप्रवेश	...	११७८
६०	श्रीरघुनाथशत्रुघ्नदर्शन, लवणासुरवध	...	११८१
६१	श्रीरामअगस्त्याश्रमगमन	...	११८४
६२	अगस्ति-रामसंवाद	...	११८७
६३	वृत्रासुरवध	...	११८९
६४	ऐलाख्यान	...	११९२
६५	अश्वमेधप्रकरण	...	११९४
६६	लहुबंधन	...	११९७
६७	लहु-कुशकृत भरतशत्रुघ्नबंधन	...	१२०१
६८	लक्ष्मण-हनुमंत-जुत्पतिबंधन	...	१२०३
६९	श्रीरामजानकीपुत्रदर्शन	...	१२०८
७०	कैकयीलंकावलोकन	...	१२१२
७१	बिभीषणपराभव-मूळकासुरलंकाराज्य पटप्राप्ति	...	१२१५
७२	मूळकासुरवध	...	१२१९
७३	जानकीपातालगमन	...	१२२२
७४	भरतगंधर्वविजय	...	१२२६
७५	लक्ष्मणपातालगमन	...	१२३१
७६	श्रीरामशरयूतीरप्रस्थान	...	१२३६
७७	श्रीरामाचा अयोध्याजनसमवेत वैकुंठप्रवेश	...	१२३९

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations



श्रीएकनाथ महाराजकृत

श्रीभावार्थरामायण

बालकांड

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations



रामजन्म व बालक्रीडा

अहिल्योद्धार व सीतास्वयंवर

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

श्रीसद्गुरवे रामचंद्राय नमः

श्रीएकनाथ महाराजकृत

श्रीभावार्थरामायण

—*—

बालकांड

अध्याय पहिला

॥ श्रीसद्गुरवे रामचंद्राय नमः ॥

जातो वंशे रघूणां मुनिवरवचनात्ताटकां ताडयित्वा
कृत्वा पुण्यामहल्यां त्रुटितहरधनुर्मैथिलावल्लभोऽभूत्।
प्राप्यायोध्यां नियोगात्पितुरटविमगान्नाशयित्वा च वालिं
बध्वाब्धिं रामचंद्रो दलितदशमुखः सीतया युज्यमानः॥१॥

चरितं रघुनाथस्य शतकोटिप्रविस्तरम्।
एकैकमक्षरं पुंसां महापातकनाशनम्॥ २ ॥

ॐनमो अनादि[1] आद्या। वेदवेदांतवेद्या। वंद्यांही परमवंद्या। स्वसंवेद्या[2] श्रीगणेशा ॥ १ ॥ तुझें निर्धारितां रूप। केवळ अरूपाचें[3] स्वरूप। तेथें अवयव कल्पितां अमूर्प[4]। तंव कल्पनेचा लोप स्वरूपीं तुझ्या ॥ २ ॥ यालागीं जैसा अससी तैसियासी। नमन साकार निराकारासी। तंव अंगत्व मुकलें अंगासी। भज्यभजकासी अद्वैतें[5] ॥ ३ ॥ ज्ञानतेजें सतेज फरश। नित्यस्मरणाचा अंकुश। आनंदमोदकाचा सुरस। मुखीं देसी घांस निजभक्तां ॥ ४ ॥ ऐसें ऐकोन स्तवन। संतोषला गजानन। माझें वसवूनियां वदन। वक्ता वचन स्वयें झाला ॥ ५ ॥ ऐसा झाला सुप्रसन्न। तेणें विघ्नचि केलें निर्विघ्न। उन्मेखेंसीं[6] बोलिला आपण। भावार्थरामायण चालवीं वेगीं ॥ ६ ॥ आतां वंदूं सरस्वती। जे चित्तचेतना चैतन्यशक्ती। जे सकळ स्फूर्तीची स्फूर्ती। अमूर्ताची मूर्ति स्वरूप जिचें ॥ ७ ॥ हंसवाहिनी हा शब्द रूढ[7]। परी ते परमहंसीं आरूढ। गुह्यार्थ जे अति गूढ। ते दावी उघड ग्रंथार्थीं ॥ ८ ॥ परमहंस अंशाअंशीं। शोभा शोभे अहर्निशीं। सत्त्वातीत शुद्धतेसीं। तोचि निजांगासी शुभ्रवर्ण ॥ ९ ॥ ॐकार तो तिचा वीणा। त्रिमात्रा तिन्ही तंती[8] गहना। वेदोपनिषद पुस्तक जाणा। अर्थवी अर्थना परमार्थता ॥ १० ॥ ऐसी अगाधत्वें अति सुंदर। प्रभा परमार्थें मनोहर। जेणें प्रकाशे चराचर। तो मिथ्या जगडंबर[9] स्वप्रभा करी ॥ ११ ॥ ऐसी ऐकोनि स्तुती। सुप्रसन्न सरस्वती। स्वभावें तिची वदनीं वस्ती। या वचनोक्ती ते वदवी ॥ १२ ॥ ते म्हणे गा रामकथेतें। वेगीं चालवीं भावार्थें। सद्भावें होईल सरतें[10]। प्रिय संतांतें मी करीन ॥ १३ ॥ आतां वंदूं संतसज्जन। जे आर्तचातकां[11] चिद्घनें[12]। त्रिविधतापां[13] उपशमनें[14]। जे निजजीवन साधकां

---

१ ज्याचे आरंभाचा थांग लागत नाहीं अशा. २ स्वतःसच स्वतः जाणणाऱ्या. ३ निराकाराचें, ज्याला रूप नाहीं अशाचें. ४ पुष्कळ, निरनिराळे. ५ ऐक्य.

६ ज्ञानस्फुरणानें. ७ प्रसिद्ध. ८ तारा. ९ जगदाभास. १० मान्य. ११ दुःखपीडित लोक हेच चातक त्यांना. १२ चिच्छक्तिरूप पर्जन्य. १३ आध्यात्मिक, आधिदैविक आणि आधिभौतिक तापांना. १४ शांत करणारे, नाहींसे करणारे.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ १४ ॥ ज्यांची सहज झाल्या संगती । सकळ कर्मां होय निवृत्ती । स्वधर्म सच्छांती येती । भावार्थें प्राप्ती परमार्था ॥ १५ ॥ सत्संगाचे निज-मेळीं । परमार्थ जाय पाल्हाळीं । लगडोनि[1] ये स्वानंदफळीं । सर्वकाळीं सफळित॥१६॥ बीजत्वा-चा ना फेडिजे देंठ । आदि मध्य नाकळे शेवट । स्वानंद रसाळ फळघोंट । अनुभव स्पष्ट सत्संगें ॥ १७ ॥ ऐसिया संतांचें महिमान । आकळे ऐसें कैंचें ज्ञान । बालत्वें बोलिलों तें न्यून । द्यावें अव-धान कथेसी ॥ १८ ॥ ऐसें ऐकोनि वचनस्तवन । सुखावले संतसज्जन । तुझे मनोगतीं आमुचें मन । सदा सावधान ग्रंथार्थीं ॥ १९ ॥ आम्हांसी आवडे रामकथा । तेथेंही तूं रसाळ वक्ता । तरी स्तुति सांडोनि आतां । वदें ग्रंथार्था अर्थान्वयें ॥ २० ॥ आतां वंदूं कुळदेवता । जे नामरूपें एकनाथा । एकपणाचेही माथां । नांदवी निजभक्तां निजान्वयें ॥ २१ ॥ ऐकोनि सद्गुरूची बोली । बोधपरशुरामें निवटिली । अनेकत्व सांडोनि वहिली । स्वयें उठली एकत्वें ॥२२॥ ते एकरूपें एकनाथा । मूळान्वयें कुळ-देवता । एकाकारावांचूनि सर्वथा । द्वैताची कथा करूं नेदी ॥ २३ ॥ एकपण जनीं वनीं । एकपण मनीं नयनीं । एकपण त्रिभुवनीं । नांदवी म्हणोनि कुळदेवता ॥ २४ ॥ ब्रह्मा आणि हरि हर । त्रिगुणी तीन्ही अवतार । मी त्रिगुणांचा परी प्रियकर । केलों साचार एकात्मता ॥ २५ ॥ ब्रह्मा आणि हरि हर । तियेचें खेळणें जगडंबर । मज खेळावया चिदंबर[2] । देवोनि प्रियकर कुळदेव्या[3] केलों ॥ २६ ॥ ते जय जय जगदंबा । उदो म्हणे ग्रंथारंभा । श्रीरामकथेची शोभा । अति वल्लभा[4] मजलागीं ॥ २७ ॥ तेंचि भावार्थरामायण । तुज करितां निरूपण । न्यून तें तें करीन पूर्ण । कथा संपूर्ण संपादीं ॥ २८ ॥ आतां वंदूं सद्गुरू । जो स्वानंदबोधवज्रपंजरू[5] । ज्याचेनि हा संसारू । होय सुखकरू तरणोपाया ॥ २९ ॥ जेणें मस्तकीं ठेवितां हात । अहंभावा[6] होय घात । सोहंभावें[7] होय प्राप्त । दावी अप्राप्त अद्वयानंद ॥ ३० ॥ जन तोचि जनार्दन । जनार्दन सकळ जन । एका जनार्दना शरण। मीतूंपण विरालें चिर्दन्वयें ॥ ३१ ॥ जनार्दना पढिये एकपण । एका पढिये जनार्दन । स्वरूप एक नामें भिन्न । अनन्य शरण या नांव ॥ ३२ ॥ जनार्दन माझें मन । जनार्दन माझे नयन । जनार्दन वदतें वदन । वक्ता वचन श्रीजनार्दन ॥ ३३ ॥ जनार्दन गतीची गती । जनार्दन मतीची मती । जनार्दन स्फुरे स्फूर्ती । सकळ व्युत्पत्ति जनार्दन ॥ ३४ ॥ निजांगें जो सकळ जन । यालागीं नांवें जनार्दन । लिंग[10]-देहा करी मर्दन[11] । यालागीं जनार्दन व्युत्पत्ति-व्याख्या ॥ ३५ ॥ येथें तो कर्ता मी अकर्ता । हेंही बोलणें अति मूर्खता । मी कर्ता तो अकर्ता । हे परम मूर्खता सोलींव[12] ॥ ३६ ॥ यापरी मीतूंपण । दूरी दवडी जनार्दन । बोलवी भावार्थरामायण । कथानिरूपण चालवी ॥ ३७ ॥ अजापासोनि उत्पत्तिहेत । दशेंद्रियें अति समर्थ । जन्मला राजा दशरथ । अति विख्यात तिहीं लोकीं ॥ ३८ ॥ मूळचें अजत्व लक्षोनि दृष्टी । अजन्मा राम जन्मेल पोटीं । हे रामायणींची मूळ गोष्टी । शास्त्रपरिपाटी[13] परमार्थ ॥ ३९ ॥ रावणाचे नित्यांकित । सुरवर झाले जी समर्थ । ब्रह्मादिकां चिंता अद्भुत । तिहीं रमानाथ प्रार्थिला ॥ ४० ॥ करावया राक्षसांचा घात । मी अवतरेन रघुनाथ । रमा मुख्य कलहा हेत । इचेनि अंत निशाचरां ॥४१॥ तुम्ही सकळही सुरवर । वेगीं व्हावें वानर । आम्ही दोघे धरोनि अवतार । सत्य करूं वचनार्थ ॥ ४२ ॥ फेडावया देवांची सांकडी[14] । स्वधर्म वाढवावया वाढी । नामें मोक्षाची उभवावया गुढी । सूर्यवंशा गाढी[15] दशा आली ॥ ४३ ॥ ते सूर्यवंशीं अजाचा सुत । अह-मात्मा[16] जन्मला दशरथ । ऐका त्याचा वृत्तांत । धर्मयुक्त स्वधर्मीं ॥ ४४ ॥ त्यासी तिघी राणिया प्रबुद्धा[17] । लोकोत्तर अति प्रसिद्धा । धर्मपत्न्या विशुद्धा । नामानुवादा अवधारा ॥ ४५ ॥ ज्येष्ठ कौसल्या ते सद्विद्या । सुमित्रा ते शुद्ध मेधा[18] । कैकेयी ते अविद्या । मंथरा कुविद्या तीपासीं ॥४६॥ उदरा येईल आदिमूर्ती । त्यां आधीं नव्हती संतती।

१ भरास येतो. २ चैतन्यरूप आकाश. ३ कुलदेवीनें. ४ आवडती, प्रिय. ५ आत्मज्ञानरूपी वज्राचा पिंजराच. ६ मीपणाला. ७ तोच परमात्मा मी अशी भावना. ८ ज्ञानाच्या योगानें. ९ आवडतें. १० पांच कर्मेंद्रियें, पांच ज्ञानेंद्रियें, पांच विषय आणि मन यांचा जो समुदाय तो लिंगदेह. ११ नाश. १२ निवळ. १३ शास्त्राची परिना-ळिका, क्रम. १४ संकट, दुःख. १५ मोठी. १६ मीच आत्मा (ब्रह्म) ह्या भावनेनें युक्त. १७ शहाण्या. १८ बुद्धि.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

अपुत्रपणें नृपती। पुत्रार्थीं उद्यत ॥ ४७ ॥ सुख नेदी राजभुवन। सुख नेदी सिंहासन। सुख नेदी भोगस्थान। मान सन्मान सुख नेदी ॥४८॥ सुख नेदी अलंकार वस्त्र। सुख नेदी भोग कलत्र। सुख नेदी छत्र चामर। स्तुतिस्तोत्र सुख नेदी ॥ ४९ ॥ राजा पोटांतून भोगीं विरक्त। यालागीं पोटा येईल रघुनाथ। जो अत्यंत विषयासक्त। त्यासी भगवंत स्पर्शेना ॥ ५० ॥ जैंवी आंधळें न देखे पिता। तैंवी विषयी नेणती भगवंता। तोच त्यांचा प्रतिपाळिता। देखणी अवस्था त्यां नाहीं ॥ ५१ ॥ दशरथा न गमे जनस्थानीं। निघाला पारधीलागीं वनीं। विचरे एकाकी होऊनी। आवडे विजनीं रहिवास ॥ ५२ ॥ दुसरियाचा सहसा घात। सर्वथा न मानी दशरथ। हृदयीं कळवळला रघुनाथ। झाला विरक्त सर्वार्थीं ॥ ५३ ॥ वनीं एकाकी विहार। करी वनफळांचा आहार। नावडे राजोपभोग उपचार। पुत्रार्थीं थोर सांक्षेपी ॥ ५४ ॥ होणारासारिखी बुद्धी। मांडली निशि अवस्था पारधी। अंधारीं श्रावणातें वधी। मातापिता खांदीं कावडीसीं॥५५॥ लौकिकाची लोकवार्ता। श्रावणें पितरें कावडी ठेवितां। हे तंव समूळ अवद्ध कथा। तो मातापिता न विसंबे ॥ ५६ ॥ अंधारीं अंध मातापिता। झाडीं ठेवी हे मिथ्या वार्ता। खांदीं घेवोनि ताता। जीवनार्थ तो आला ॥ ५७ ॥ बुडबुड कमंडलूच्या शब्दीं। ध्वनी उठली जळसंनिधीं। दशरथ केवळ शब्दवेधी। बाण वेधीं विंधिला ॥ ५८ ॥ घाव लागतां संपूर्ण। काय बोलिला श्रावण। कोणा सभाग्याचा बाण। रामस्मरणेंसीं आला ॥ ५९ ॥ श्रावणासी बाण लागतां। नाठवेचि मातापिता। नाठवेचि देहममता। राम स्मरतां देह त्यागी ॥६०॥ अंतरीं श्रीरामस्मरण। परम भाग्य हें कल्याण। बाण नव्हे तो ब्रह्म पूर्ण। स्मरणेंसीं प्राण त्यागिला ॥ ६१ ॥ दशरथ बोलिला आपण। कोण्या साधूचें हें वचन। माझ्या पापाचें निर्दळण। केलें संपूर्ण रामनामें ॥ ६२ ॥ श्रीरामनाम स्वयें ऐकतां। रायासी न बाधे ब्रह्महत्या। रामस्मरणें देह त्यागितां। नित्य मुक्तता श्रावणासी ॥ ६३ ॥ रामनामें नित्य निर्धूत। एक मुक्त एक पापातीत। ब्रह्महत्येसीं दशरथ। अति अलिप्त रामनामें ॥ ६४ ॥ दशरथ जंव येवोनि पाहे। तंव श्रावण बाणें विंधिला आहे। त्याच्या पितरें पुत्रमोहें। राजा लवलाहें शापिला ॥ ६५ ॥ आम्हांसी दिधलें पुत्रदुःख। तूंही पावसी पुत्रशोक। शापें रायासी परम हरिख। मी पुत्रमुख देखेन ॥ ६६ ॥ ब्राह्मणशाप नव्हे वृथा। मी पुत्र पावेन सर्वथा। परम आल्हाद दशरथा। आनंद चित्ता वोसंडे ॥ ६७ ॥ शाप नव्हे परमामृत। उल्हासे रायाचें चित्त। पोटीं प्रकटेल रघुनाथ। शाप दशरथा सुखरूप ॥ ६८ ॥ पुत्र झाले इत्थंभूत। ऐसा मानिला निश्चितार्थ। हृदयीं संचरला रघुनाथ। उद्वेगरहित यालागीं ॥ ६९ ॥ शाप देवोनि दारुण। तिंहीं दोघीं सांडिला प्राण। तिघांसी देवोनि दहन। उत्तरविधान करविलें रायें ॥ ७० ॥ जळचर पक्षियांचें युग्म। त्यांसी एका मीनासी मित्रत्व परम। तयां समकाळें मरणधर्म। झाला तो जन्म मागील ॥ ७१ ॥ आटतां देखोनि सरोवरा। शीतळ निशिये चंचुभारा। धरोनियां तया मकरा। अगाध नीरा स्नेहें नेत ॥ ७२ ॥ तंव मार्गीं वन तें नवखंड। तेथोनि उसळलें वेळुकांड। तें मत्स्यातें लागतां चंड। पडिला दुखंड धरणिये ॥ ७३ ॥ तेणें दुःखें गृध्रीं दोघीं। देह ओपिले तयालागीं। तेचि ऋणानुबंधयोगीं। धरिले तिघीं नरदेह ॥ ७४ ॥ मत्स्य तोचि श्रावण जनीं। पक्षिये ते जनक जननी। एके अवसरीं निमाले तिन्ही। ऐसी पुराणीं मूळ कथा ॥ ७५ ॥ राजा रामनामें दोषातीत। तरी लोकप्रवृत्तिशास्त्रार्थ। अश्वमेध करी दशरथ। वसिष्ठयुक्तविधानें ॥ ७६ ॥ फेडावया ब्रह्महत्याडाग। केला अश्वमेधयाग। राजा शुद्ध झाला साङ्ग। परी राष्ट्रीं भंगें मांडला ॥ ७७ ॥ जे राज्यीं ब्रह्महत्या घडे। तें राज्यीं पर्जन्य न पडे। शुक्रें धरियलें पाणियांडें। अवर्षण पडे बहुकाळ ॥ ७८ ॥ तृणाची काडी न मिळे। उष्णें झाडोरे करपले। वृक्ष शेंडियास वाळले। सरितांचे शोषिले जळस्रोत ॥ ७९ ॥ प्रजा घरोघरीं आक्रंदती। गाई हंबरडा फोडिती। द्विजांचीं

१ उत्कंठित असलेला. २ जाणीव. ३ एकांतांत. ४ यत्न करणारा. ५ शब्द ऐकूनच लक्ष्य वेधणारा. ६ लक्ष्यावर. ७ निरसन, नाश. ८ शुद्ध, पवित्र. ९ हर्ष. १० दुःखविरहित. ११ उत्तरक्रिया. १२ जोडपें. १३ सोडिले. १४ अवर्षण. १५ मेघ. १६ पाण्याचे ओघ.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

नित्यकर्मे राहती । हाहाभूत क्षितीं प्राणिमात्र ॥ ८० ॥ देखोनि भूतांची दशा ऐसी । राजा कळवळला मानसीं । शुक्रें धरिलें पाणियाडासी । त्यासीं युद्धासी निघाला ॥ ८१ ॥ दशरथाची शक्ति कैसी । रथ चालविला स्वर्गासी । कैकेयी चालली रायासरसी । राहवितां तिसी न राहे ॥ ८२ ॥ तुम्ही जाल स्वर्गाप्रती । मी पाहीन स्वर्गसंपत्ती । वसिष्ठ म्हणे न्यावें निश्चितीं । भविष्यस्थिती जाणोनी ॥ ८३ ॥ रायासीं तिची अति प्रीती । प्रीतीनें बैसविली रथीं । क्षणार्धे शक्रलोकाप्रती । आला भूपति संग्रामा ॥ ८४ ॥ परम योद्धा श्रीरामजनक । देखोनि शुक्रें घेतला धाक । साह्य दैत्यसेना अनेक । दशरथें एकैक खिळिले बाणीं ॥ ८५ ॥ वृषपर्वा तेजोराशी । रायें विरथ केलें त्यासी । मुकुट पाडोनि भूमीसीं । मोकळे केशीं पळविला ॥ ८६ ॥ वृषपर्वा जो दैत्यनाथ । युद्धीं झाला हताहतं । देखोनि दैत्यसेना समस्त । पळे कुंथत रणघायीं ॥ ८७ ॥ शुक्रें युद्ध केलें अनेक । दशरथ योद्धा अति अचूक । सिंहनाद करोनि देख । शुक्रासंमुख लोटला ॥ ८८ ॥ शुक्रें केलें अलोलिकें । अचुक छेदिला रथाचा आंख । कैकेयीनें बाहु घातला देख । तेणें पराङ्मुखं नव्हेचि राजा ॥ ८९ ॥ रामप्रताप दशरथपोटीं । तेणें झांकली शुक्राची दृष्टी । धाकें पळे उठाउठीं । दिधली पाठी संग्रामीं ॥ ९० ॥ ब्राह्मण म्हणोनि राखिला हात । येरवीं तत्काळ करिता घात । विजयी झाला जी दशरथ । हर्ष अद्भुत सुरनरां ॥ ९१ ॥ मोकळें झालें पाणियाडें । तत्काळ तेथें पर्जन्य पडे । फिटलें गाईचें सांकडें । ब्राह्मणीं रोकडे मांडिले याग ॥ ९२ ॥ चालिले स्वाहास्वधाकार । हरिखले देव पितर । दशरथावरी अपार । सुमनसंभार वर्षले ॥ ९३ ॥ अवघे करिती जयजयकार । इंद्रासी आल्हाद अपार । दैत्य पराभविले थोरथोर । तेणें अमरेंद्र संतोषला ॥ ९४ ॥ दिव्यांबरें अलंकार । रायासी दिधले अपार । इंद्रें सन्मान केला थोर । अवघे सुरवर संतुष्ट ॥ ९५ ॥ पराभविलें दैत्यगुरूसी । अति आनंद बृहस्पतीसी । तेणें सन्मानिलें दशरथासी । धरिला पोटासीं स्वानंदें ॥ ९६ ॥ देवगुरु वरद वदत । जे जे तुझे मनोरथ । सिद्धि पावतील समस्त । जाण निश्चित नृपनाथा ॥ ९७ ॥ तुज होईल पुत्रसंतती । ते मी सांगेन श्रेष्ठ युक्ती । याग करावा अयोध्येप्रती । विभांडकाहातीं पुत्रेष्टी ॥ ९८ ॥ विभांडक नित्य वनवासी । तो भेटी न देईल तुम्हांसी । मृगीसुत पुत्र त्यासी । ऋष्यशृंग तया नाम ॥ ९९ ॥ तो प्रमदामदें वेधवोन । नगरा आणावा छळून । येतांच त्याचें आपण । करावें लग्न निजकन्येसीं ॥ १०० ॥ तुज नाहीं गा संतान । यालागीं तुझा निजमित्र शांतन । तेणें तुज दिधलें कन्यारत्न । ते शांतनेसीं लग्न करावें ॥ १ ॥ इंद्र म्हणे दशरथासी । आणावया ऋष्यशृंगासी । अप्सरा धाडीन तुजपासीं । त्या तत्काळ त्यासी आणतील ॥ २ ॥ युद्धीं रथीं सूदलें बाहूसी । राजा तुष्टला कैकेयीसी । म्हणे देईन जें जें मागसी । ऐसी भाक तिसी दिधली ॥ ३ ॥ तंव ते बोलली आपण । तुझेनि मज काय अपूर्ण । स्वर्गादि दिव्य भूषण । मी भोगीं आपण तुझेनि ॥ ४ ॥ कल्पतरुपारिजातमाळा । तुझेनि शोभती माझिये गळां । स्वर्गसुखाचा सोहळा । भोगिजे स्वलीळा तुझेनि ॥ ५ ॥ येणेंचि शरीरें आपण । तुझेनि भोगीं स्वर्गभुवन । तुझेनि आम्हां काय न्यून । मी सुखसंपन्न तुझेनि ॥ ६ ॥ हांसोनी बोलली रायासी । तुम्हीं मज दिधलें भाकेसी । तें मी मागेन काळविशेषीं । यथाकाळेंसीं अनुकूळ ॥ ७ ॥ राजा म्हणे सत्य वचन । हें माझें भाष्यवरदान । जेव्हां तूं मागसील आपण । तत्काळ जाण मी देईन ॥ ८ ॥ ऐसी दशरथाची ख्याती । स्वर्गीं देव वानिताती । दिग्गज वर्णिती दिगंतीं । कीर्ति त्रिजगतीं विस्तारली ॥ ९ ॥ यश कीर्ति औदार्य । गुणगांभीर्य अति धैर्य । दशरथाचें वीर्य शौर्य । स्वर्गीं सुरवर वानिती ॥ ११० ॥ देवां दैत्यगुरु अदंट । त्याचा हरितला प्रताप श्रेष्ठ । वीर दशरथ सुभट । प्रवाद पाठ तिहीं लोकीं ॥ ११ ॥ उदरा येईल रघुनाथ । सकळ संपदा आलिया तेथ । श्रिया विराजमान होत । श्रीमंत दशरथ यालागीं ॥ १२ ॥ स्वर्गी दशरथ भूपाळ । इंद्रें राहविला बहुकाळ । अति प्रीतीचा कल्लोळ । दिव्य भोग सकळ भोगविले

१ जर्जर. २ अपूर्व. ३ माघारा. ४ देवपितृयज्ञ. ५ पुष्पवृष्टि, ६ स्त्रियांच्या लीलांनीं. ७ घातलें. ८ वचन. ९ पुढें योग्य काळीं. १० अजिंक्य असा. ११ लौकिक.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ १३ ॥ येवढेनि बहुमानैश्वर्येंसीं । राजा आला अयोध्येसी । मखरें तोरणें चौपासीं । नरनारींसी आल्हाद ॥ १४ ॥ घरोघरीं गुढिया उभारिती । पदोपदीं आरत्या करिती । बंदिजन कीर्ति गाती । ओंवाळिती धनधान्यें ॥ १५ ॥ ब्राह्मण जपती शांतिपाठ । भाट गर्जती उद्भट । नरनारी पाहती घनदाट । पायवाटे नेती घडिया ॥ १६ ॥ दशरथाचा प्रताप गहन । मी बोलिलों अल्प जाण । सकळ आकळितां निरूपण । कथा असाधारण वाढेल ॥ १७ ॥ अफाट न करावा ग्रंथ । ग्रंथीं बोलावा मुख्यार्थ । पदीं दावावा परमार्थ । हा निजस्वार्थ कवित्वाचा ॥ १८ ॥ एका जनार्दना शरण । दशरथप्रतापलक्षण । कथा झाली हे संपूर्ण । श्रीरामागमन अवधारा ॥१९॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे बालकांडे एकाकारटीकायां दशरथविजयाभिगमनं नाम प्रथमोऽध्यायः ॥ १ ॥ ओंव्या ॥ ११९ ॥ श्लोक ॥ २ ॥

अध्याय दुसरा

श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ राजा पाहे राष्ट्र सकळ । तंव फिटलें द्वंद्वदुःखदुष्काळ । पाहिला सर्वत्र सुकाळ । अफळ ते सफळ वृक्ष झाले ॥ १ ॥ प्रजा स्वानंदें निर्भर । गोगोधनां[2] आनंद थोर । अग्निहोत्रें घरोघर । याग[3] द्विजवर यजिती सुखें ॥ २ ॥ पृथ्वी धनधान्यें परिपूर्ण । कोणा नाहीं दुःख दैन्य । घरोघरीं वेदाध्ययन । हरिकीर्तन हरिभक्ती ॥ ३ ॥ भूतळा येईल राघव । यालागीं वैकुंठींचें वैभव । पुढें धाडिलें जी सर्व । तेणें शोभा अपूर्व अयोध्येसी ॥ ४ ॥ राजा शोभे सिंहासनीं । अति आल्हाद राजभुवनीं । आनंद न माये त्रिभुवनीं । तंव स्वर्गाहूनि आल्या देवांगना ॥ ५ ॥ नमन केलें रायासी । इंद्रें पाठविलें तुम्हांपासीं । काय अनुज्ञा[4] आम्हांसी । त्या कृतकार्यासी प्रेरावें[5] ॥ ६ ॥ राजा म्हणे तया अप्सरांसी । प्रलोभोनि[6] आणावें ऋष्यशृंगासी । कळों न द्यावें विभांडकासी । अचुक कार्यासी साधावें ॥ ७ ॥ विभांडक गेला अनुष्ठानासी । एकला ऋष्यशृंग गुंफेसी । प्रमदा[7] पातल्या तयापासीं । हावभावेंसीं उद्यत ॥ ८ ॥ त्यांसी देखतांचि दृष्टी । ऋष्यशृंगें सांडिली पर्णकुटी । होतां डोळियां डोळेभेटी । पळे उठाउठीं मृगभावें[8] ॥९॥ मुख मुरडी मागिलीकडे । परतोनि पाहे तयांकडे । सवेग पाउलीं पळे पुढें । राहों राहों उडे सत्राणें ॥१०॥ दुरोनि पाहे दृष्टी । मा कैसेनि होईल भेटी । बोलण्याच्या खुंटल्या गोष्टी । नातुडे दृष्टी मृगभावें ॥ ११ ॥ झाली विभांडकाची वेळ । प्रमदा गेल्या सकळ । ऋष्यशृंग अति विकळ । आला तत्काळ गुंफेसी ॥ १२ ॥ करितां पितयाचे सेवेसी । त्या आठवती मानसीं । कैसे आले होते तापसी । अति विव्हळे ऋषीश्वर ॥ १३ ॥ पिता पुसे पुत्रासी । आजि दुश्चित कां मानसीं । तो म्हणे आले होते तापसी । तुमचे भेटीसी अति साधु ॥ १४ ॥ त्यांच्या जटांसी मवाळी । मनोहर अंगें सोज्ज्वळीं । मज पळतां तत्काळीं । अदृश्य ते वेळीं ते झाले ॥ १५ ॥ मी न घें त्यांचें दर्शन । व्यर्थ केलें पलायन । क्षणक्षणां होय आठवण । उद्वेगी पूर्ण त्यांचेनि मी ॥ १६ ॥ येरू न सांगे जीवींची गोष्टी । त्यांची लागली आवडी पोटीं । केव्हां होईल त्यांची भेटी । जीवीं चटपटी मोठी लागली ॥ १७ ॥ आश्रमा आले अतिथी । ते पूजावे अति प्रीतीं । मी वंचलों देहभयअशक्ती । मज त्यांची भक्ति न घडेचि ॥ १८ ॥ नाहीं पुसिलें आगमन । नाहीं दिधलें अभ्युत्थान । न करींच पूजाविधान । विमुख सज्जन म्यां केले ॥१९॥ त्यांसी म्यां केलें नाहीं नमन । नाहीं बोलिलों मृदु वचन । देहलोभें ठकलों पूर्ण । विमुख सज्जन म्यां केले ॥ २० ॥ त्यांची मागुती होईल जरी भेटी । तरी पुसूं त्यांसी गुह्य गोष्टी । हृदयीं आवडी बैसली मोठी । केव्हां ते दृष्टी देखेन ॥२१॥ ऐसी करितां तळमळ । तंव झाला प्रातःकाळ । विभांडक अनुष्ठानशीळ । गेला तत्काल स्नानासी ॥ २२ ॥ एकाकी पुत्र पर्णकुटीं । देखोनि प्रमदा आल्या उठाउठीं । त्यांसी देखोनियां दृष्टी । करितां गोष्टी साशंक ॥ २३ ॥ धैर्य धरोनि उभा ठाके । मृगस्वभावें मागें चवके[9] । आवडीचेनि भावें खुडके[10] । सर्वेचि फडके गजबजिला ॥ २४ ॥ तिंहीं झणत्कारिला वीणा । नाद संचरला श्रवणां । मोह उपजला अंतःकरणा । गमनागमना[11] विसरला ॥ २५ ॥ घंटी[12]-

१ भाट. २ गाईंना आणि गवळ्यांना. ३ यज्ञ. ४ आज्ञा. ५ पाठवावें. ६ भुलवून, नादीं लावून. ७ अप्सरा.

८ हरिणस्वभावानें. ९ चकाकी. १० मागें फिरे. ११ जाणें येणें. १२ फांसेपारधी.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

पारधी जैसा । मधुरनादें मृगमानसा । भुलवोनियां पाडी फांसां । तैसी दशा पावला ॥२६॥ टवकारली कर्णकुटी । उचलोनियां ग्रीवा[1]गांठी । प्रमदा लक्षोनि दृष्टी । मान त्यांच्या कंठीं घातली ॥ २७ ॥ मृगाचा स्वभाव पूर्ण । व्हावें नादाधीन । जंव जंव ऐके गायन । तंव तंव आपण नाचत ॥ २८ ॥ कोण तुमचें वस्तीचें स्थान । कोण्या अर्थे येथें आगमन । तुमचे हृदयीं व्यथा कोण । गंडें अति तीक्ष्ण दिसताती ॥ २९ ॥ तुझे माथां शृंग तीक्ष्ण । तुज ऋष्यशृंग अभिधान[2] । आमचे हृदयीं गंडें तीक्ष्ण । गंडऋषि जाण आम्हांसी म्हणती ॥ ३० ॥ आमचें रतिरमणें[3] स्थानें[3] । चाख पां येथील जीवनें[4] । म्हणोनि करविती रसपान । देती चुंबन अधरामृतें ॥ ३१॥ आमचें सर्वांगसिद्ध अनुष्ठान । आमच्या गंडांचें स्पर्शन । करितां सुखसमाधान । म्हणोनि आलिंगन त्यासी देती ॥ ३२ ॥ आमचे वनींचा फळपाडु । म्हणूनि देती साकरेचे लाडु । ये वनीं नाहीं हा सुरवाडु[5] । अति दुर्वाडु[6] अनुष्ठान ॥ ३३ ॥ ही आमुची समाधिस्थिती । म्हणोनि रतिमुद्रा लाविती । रत्यासनीं बैसविती । झाला वँश[7]वर्ती तयांसी ॥३४॥ विसरला आश्रमस्थिती । विसरला आपुली गती । यावें परतोनि मागुती । हें निश्चितीं विसरला ॥३५॥ विसरला संध्यास्नान । विसरला अनुष्ठान । विसरला जप ध्यान । गमनागमन विसरला ॥३६॥ विसरला स्थितिगती । विसरला प्राप्ति अप्राप्ती । विसरला पितृभक्ती । स्त्रियांनुवर्ती[8] वर्तत ॥ ३७॥ विसरला निजावस्था । विसरला निजस्वार्था । विसरला तो निजपिता । स्त्रियां तत्त्वतां वश्य केला ॥ ३८ ॥ विसरला वेदाध्ययन । विसरला शास्त्रपठन । विसरला मीतूं कोण । स्त्रियांधीन तो झाला ॥ ३९ ॥ क्षणार्धे स्त्रियांची संगती । वनवासी होय वशवर्ती । जे नित्य स्त्रियांतें सेविती । त्यांची निर्गति[9] कैसेनि होय ॥ ४०॥ स्त्रियां वश्य केले वनवासी[10] । स्त्रियां केले किंकर[11] ग्रामवासी[12] । अपभ्रंशता[13] स्त्रियांपासीं । घात मुक्तीसी स्त्रीसंगें ॥४१॥ स्त्रियांचें दर्शन स्पर्शन । स्त्रियांचें जें भाषण । स्त्रियांची जी आठवण । अपभ्रंश संपूर्ण स्त्रीसंग ॥ ४२ ॥ नको स्त्रियांसीं संगत । नको स्त्रियांसीं एकांतमात[14] । नको स्त्रियांसीं हेत । होय अपघात[15] पुरुषासी ॥ ४३ ॥ एवं स्त्रियांची संगती । ऋष्यशृंग झाला वशवर्ती । भुलोनियां स्त्रियांप्रती । आणिला निश्चितीं नगरासी ॥ ४४ ॥ आणिलें देखोनि ऋष्यशृंगासी । परम आल्हाद दशरथासी । शृंगारिलें नगरासी । गुढिया चौपासीं उभविल्या ॥ ४५ ॥ मखरें तोरणें ठिले माळा । वस्त्रें भूषणें लोकां सकळां । शृंगारिलें गाई गोवळां । विभांडकें सोहळा देखावया ॥ ४६ ॥ मेळवोनि ऋषि सज्जन । वसिष्ठें निर्धारिलें लग्न । ऋष्यशृंगासी कन्यादान । केलें सुलग्न शांतनेसीं ॥४७॥ शांतनेचा पिता शांतन । राजाचा मित्र जीवप्राण । तो आणिला पाचारून । लग्नालागूनी शांतनेच्या ॥ ४८ ॥ राजा दशरथ भाग्यनिधी । वसिष्ठ कुलगुरु सद्बुद्धी । विवाहहोम लग्नसिद्धी । कार्य त्रिशुद्धीं साधिलें ॥ ४९ ॥ विभांडक आला आश्रमासी । न देखे ऋष्यशृंग पुत्रासी । ठकवूनि दशरथें नेलें त्यासी । अति क्रोधेंसीं चालिला ॥ ५० ॥ आला अयोध्या प्रांतासी । देखे शृंगारिलें नगरासी । गाई गोवळे शृंगारेंसीं । मार्गीं त्यासी पैं भेटले ॥ ५१ ॥ चाळवोनि[16] आणिलें माझ्या बाळा । कायसा ये नगरीं सोहळा । पुसता झाला गोवळां । भेटला सकळां मार्गस्थां ॥ ५२ ॥ ते ऐसा सांगती वृत्तांत । ऋष्यशृंग मृगीसुत । त्यासी कन्या दे दशरथ । सोहळा नगरांत लग्नाचा ॥ ५३ ॥ मूळ धाडिलें विभांडकासी । तो त्यांतें न भेटे वनवासी । विधियुक्त लाविलें लग्नासी । उल्हासेंसीं दशरथें ॥ ५४ ॥ ऐकतां पुत्रविवाहासी । विभांडक अति उल्हासी । संतोष झाला मानसीं । प्रसन्नतेसीं तो आला ॥ ५५ ॥ राव वेगें सामोरा आला । धांवोनियां चरणां लागला । अति प्रीतीनें आलिंगिला । म्हणे भला भला दशरथा ॥ ५६ ॥ सर्वालंकारभूषणेंसीं । वाहिलीं देखोनि वोहँरांसी[17] । विभांडक सुखसंतोषी । दशरथासीं तुष्टला ॥ ५७ ॥ राया जे जे तुझे मनोरथ । ते ते पुरवीन मी समस्त । म्हणोनि आल्हादयुक्त । पुत्रप्रीतीं दशरथा प्रिय झाला ॥५८॥

१ मान. २ नांव. ३ विलास भोगण्याचें स्थान. ४ रस, अमृत. ५ सुख. ६ दुर्लभ. ७ वश, अनुकूल. ८ स्त्रियांना वश होऊन. ९ मुक्तता, सुटका. १० वनांतील तपस्वी वगैरे. ११ चाकर. १२ गांवांत रहाणारे. १३ नाश, भ्रष्टता. १४ एकांतांत भाषण. १५ अरिष्ट, नाश. १६ फसवून. १७ वधूवरांना.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

विष्टरोक्त[1] वरासन । षोडशोपचारें पूजन । केलें चरणतीर्थप्राशन । ऋषि प्रसन्न रायासी ॥ ५९ ॥ शांतन अति मित्र रायासी । लोमपाद म्हणती तयासी । अवर्षण त्याच्या देशीं । तेणें दशरथासी प्रार्थिलें ॥ ६० ॥ विभांडक द्यावा मजपासीं । करवीन पर्जन्येष्टियागासी[2] । पीडा निवारेल भूतांसी । गोब्राह्मणांसी सुख करील ॥ ६१ ॥ दशरथाची उदारस्थिती । अवंचक[3] मित्रकार्यार्थी । लोमपादाचे कार्याप्रती । प्राथिला निश्चितीं विभांडक ॥ ६२ ॥ विभांडक प्रेमें आपण । म्हणे भावार्थेसीं मी तुज अधीन । राया तुझें नुलंघीं वचन । करीन यज्ञ लोमपादाचा ॥ ६३ ॥ विभांडकें करितां यज्ञ । राष्ट्रीं वर्षला पर्जन्य । तृणधान्यें मेदिनी[4] पूर्ण । गोब्राह्मणां आल्हाद ॥ ६४ ॥ पूजोनियां विभांडकासी । आणिला दशरथापासीं । ऋषि येतांचि अयोध्येसी । रायें यागासी आरंभिलें ॥ ६५ ॥ वसिष्ठ श्रेष्ठ कुळगुरु । दुजा विभांडक ऋषीश्वरू । ऋष्यशृंग हर्षनिर्भरू । यज्ञांगीकारू तेणें केला ॥ ६६ ॥ ऋष्यशृंग म्हणे रायासी । मी पुत्र देईन तुम्हांसी । म्हणोनि अति उल्हासेंसीं । स्वयें यागासी प्रवर्तला ॥ ६७ ॥ नमूनियां निजपिता । वसिष्ठ वंदोनि तत्त्वता । दशरथाच्या निजस्वार्था । यज्ञ करी ऋष्यशृंग ॥ ६८ ॥ कुंड मंडप वेदिका[5] सुलक्षण । इध्मा[6] बर्हि[7] त्रिसंधान[8] । करोनियां परिस्तरणं[9] । अग्निस्थापन तेणें केलें ॥ ६९ ॥ प्रणीतापात्रें[10] परिपूर्ण । आज्यस्थाली[11] बर्हिआस्तरण[12] । स्रुक्स्रुवा[13] परिमार्जन[14] । केलें प्रोक्षण[15] यज्ञोपचारां ॥ ७० ॥ ऋष्यशृंगाचें अनुष्ठान । अतिशयें श्रेष्ठ संपूर्ण । होम करितां प्रधान । यज्ञपुरुष आपण प्रकट झाला ॥ ७१ ॥ गगन झालें देदीप्यमान । परी त्या तेजाचें लक्षण । नव्हे अति शीत ना उष्ण । स्वानंदपरिपूर्ण निजतेजें ॥ ७२ ॥ वसिष्ठासी विस्मय पूर्ण । विस्मय पावे विभांडक आपण । विस्मय पावले ऋषिगण । अयोध्येचे जन तटस्थ ॥ ७३ ॥ खुंटली श्वासोच्छ्वासाची गती । लवीं विसरलीं नेत्रपातीं । ऋष्यशृंगतपाची ख्याती । यज्ञमूर्ति प्रकटली ॥ ७४ ॥ मागें यज्ञ केले बहुतीं । तेणें पावले फळप्राप्ती । परी यज्ञीं प्रकटे यज्ञमूर्ती । हे केली ख्याती ऋष्यशृंगें ॥ ७५ ॥ उदरा येईल रघुपती । यालागीं यज्ञीं यज्ञमूर्ति । पायसपात्र[16] घेवोनि हातीं । ऋष्यशृंगाप्रति देता झाला ॥ ७६ ॥ हा यज्ञपुरोडाश संपूर्ण । द्यावा राजपत्नियांसी विभागून । येणें पुरोडाशें जाण । पुत्रसंतान होईल ॥ ७७ ॥ येणें प्रसादें पुत्रप्राप्ती । त्याचेनि पावन त्रिजगती । ऐसी निर्माण पुत्रसंतती । होईल निश्चितीं रायासी ॥ ७८ ॥ विलंब न करावा अर्ध क्षण । तत्काळ करावा प्राशन । विलंबीं उपजेल विघ्न । हें सांगोनि आपण अदृश्य झाला ॥ ७९ ॥ अदृश्य जालिया यज्ञमूर्ती । तें पायसपात्र घेवोनि हातीं । ऋष्यशृंग दे रायाप्रती । पुत्रार्थी प्रसाद ॥ ८० ॥ गुह्य सांगे वसिष्ठासी । विलंबू करूं नये यासी । समभाग दे राणियांसी । विलंबासी अति विघ्न ॥ ८१ ॥

फलं मूलं तथा तीर्थं प्रसादो राघवस्य च ॥
शीघ्रमेवानुसेवेत विलंबः कार्यनाशकः ॥ १ ॥

यालागीं तुझें नांव वसिष्ठ । कुळगुरु अति श्रेष्ठ । कार्य साधावें उद्भट । विभागीं इष्टविभागें ॥ ८२ ॥ जाणोनी भविष्याची स्थिती । वसिष्ठें पायस घेऊनि हातीं । भाग केले यथानिगुती । विभागस्थिती अवधारा ॥ ८३ ॥ कौसल्याभाग परब्रह्म । सुमित्रा भाग भजनोत्तम । कैकेयीभाग परमधर्म । भागानुक्रम विभागें ॥ ८४ ॥ कौसल्या ते धर्मपत्नी । सुमित्रा वरिली साध्वी म्हणोनी । कैकेयी वरिली सुंदरपणीं । रूपयौवनीं गर्विष्ठ ॥ ८५ ॥ कैकेयी म्हणे वसिष्ठाप्रती । मी रायाची पढियंती[17] । ज्येष्ठ भाग देईं मजप्रती । येरें निरुती वारिली ॥ ८६ ॥ ज्येष्ठ भाग ज्येष्ठेप्रती । तो केवीं ये कनिष्ठेप्रती । जेवीं गजाची भूषणस्थिती । अजेप्रति अतिभार ॥ ८७ ॥ जरी अमोलिक हिरे होती । ते शालिग्रामासम पूज्य न होती । तूं जालियाही पढियंती । ज्येष्ठ भागाप्रती अयोग्य ॥ ८८ ॥ ज्येष्ठ भाग दिधला कौसल्येसी । दुजा दिधला सुमित्रेसी । तिजा दिधला कैकेयीसी । तिच्या मानसीं अति

१ आसनविधीनें. २ ज्याच्या योगानें पाऊस पडेल असा यज्ञ. ३ निष्कपट. ४ पृथ्वी. ५ यज्ञकुंडाजवळील ओटा. ६ समिधा. ७ दर्भ. ८ तीन सांध्यांच्या दर्भाचा रज्जू. ९ चारी बाजूंना दर्भ पसरणें. १० यज्ञपात्रें. ११ तुपाचें भांडें. १२ दर्भाचें आसन. १३ यज्ञांतील लांकडाच्या पळ्या वगैरे. १४ स्वच्छ करणें. १५ मंत्रोक्त उदकसिंचन. १६ यज्ञप्रसादाचें भांडें. १७ प्रिय, आवडती.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

क्रोध ॥ ८९ ॥ कांहीं न चाले वसिष्ठावरी । क्रोधें द्वेष गुरूचा करी । विभाग आलियाही करीं । सुख जिव्हारीं[1] असेना ॥ ९० ॥ मी गेलें होतें स्वर्गाप्रती । म्यां भोगिल्या स्वर्गसंपत्ती । ज्येष्ठ पिंड न ये माझे हातीं । तो द्वेष चित्तीं गुरूचा ॥ ९१ ॥ करावया पिंडप्राशन । दोघीं केलें शुद्धाचमन । कैकेयी पाहे रायाचें वदन । तों विलंबीं विघ्न वोढवलें ॥ ९२ ॥ जे न मानिती गुरुवचन । त्यांसी तत्काळ होय विघ्न । तेचि अर्थीचें निरूपण । कथानुसंधान अवधारा ॥ ९३ ॥ सुवर्चसा अति नाचणी[2] । नाचों आली मद्य सेवूनी । ताल चुकतां तत्क्षणीं । तिसी ब्रह्मयानें शापिलें ॥ ९४ ॥ सत्यलोकीं मद्यपान । अत्यंत पैं निंद्य जाण । ताल चुकली आपण । हें लक्षण मद्याचें ॥ ९५ ॥ निर्लज्जे उन्मत्ते सुंदरी । नष्ट पापिणी होय घारी । ताल चुकोनि जासी चांचरी । तैसें तूं करीं परिभ्रमण ॥ ९६ ॥ शाप ऐकोनि दारुण । उःशाप मागे अति दीन । प्रसन्न केला चतुरानन[3] । वरदवचन तो वदला ॥ ९७ ॥ दशरथयाग पुत्रजन्य । तेथें यज्ञपुरोडाश परमान्न । त्रिधा भागें विभागिती अन्न । एक भाग प्राशन करावा ॥ ९८ ॥ ज्येष्ठभागीं तुज नाहीं गती । मध्यमभागीं न पावे शक्ती । कनिष्ठा कनिष्ठभागप्राप्ती । तेणें निर्मुक्ती निजशापा ॥ ९९ ॥ हें होईल अयोध्यानगरीं । यालागीं ते जाणावी खरी । मोक्षाची प्रथम पुरी । वेदशास्त्रीं निजगजर ॥ १०० ॥ काशी मुक्तिक्षेत्र होय पाहीं । मेल्या मुक्ती तियेच्या ठायीं । सकळ वैकुंठा गेली नाहीं । अयोध्येची नवाई अपूर्व ॥ १ ॥ काशीहूनि ते वहिली[4] । अयोध्येची उदारता भली । त्रिवार नगरी वैकुंठा नेली । न मरतां केली सकुटुंब मुक्त ॥ २ ॥ प्रथम रुक्मांगदें नेली । दुजी शिबीनें ख्याति केली । तिजी श्रीरामें वहिली । वैकुंठा नेली निजगजरें ॥ ३ ॥ आणि चौथेनिही मागुती । अयोध्या जाईल वैकुंठाप्रती । ऐसी वसिष्ठादिकांची ख्याती । अयोध्येप्रति असे पैं ॥ ४ ॥ यालागीं मुक्तिक्षेत्राच्या शिरीं । अयोध्या जाण प्रथम पुरी । जडजीवांतें उद्धरी । शाप निवारी स्नानमात्रें ॥ ५ ॥ ते अयोध्येसी भागप्राशन । केलिया तुज शापमोचन । ऐसें बोलिला चतुरानन । अप्सरा आपण घारी जाली ॥ ६ ॥ ते ऐशीं सहस्र वर्षेंवरी । भोंवे अयोध्येच्या महाद्वारीं । यज्ञभाग देखतां करीं । झडप मारी तत्काळ ॥ ७ ॥ कौसल्या सत्य पतिव्रता । तीवरी न घालवेचि सर्वथा । सुमित्रा शुद्ध सात्त्विकता । तीहीवरी तत्त्वता न घालवेची ॥ ८ ॥ कैकेयी अति क्रोधायमान । निजभागीं नाहीं मन । रागें पाहे रायाचें वदन । तंव घारीनें हिरोन भाग नेला ॥ ९ ॥ तोंडावरी हाणी पाखीं । हात ओरखाडिला नखीं । भाग घालोनियां मुखीं । गेली एकाएकीं गगनासी ॥ ११० ॥ लोक करिती हाहाकार । एक सवेग विंधिती तीर । अवघे पाहती ऊर्ध्वशिर । थोर चमत्कार सर्वांसी ॥ ११ ॥ लागतां पांखाची झडे । कैकेयी उलथोनि क्षितीं पडे । भाग गेला मग रडे । रायाकडे पाहोनी ॥ १२ ॥ रायास म्हणे पाहतां काय । येरू म्हणे मी करूं काय । तुझा गर्व तुज आडवा होय । येथें उपाय न चालती ॥ १३ ॥ घारी भाग करितां प्राशन । तुटलें तिचें देहबंधन । खुंटलें गमनागमन । सुखसंपन्न ती जाली ॥ १४ ॥ तोचि भाग उपेक्षितां । कैकेयीसी परमावस्था । बाप गर्वाची अतिगर्वता । निजस्वार्थी अति घात ॥ १५ ॥ जेवीं उपेक्षितां आत्मज्ञान । अंगीं आदळे अज्ञान । विषयी पावती अधःपतन । ते दशा परिपूर्ण कैकेयीसी ॥ १६ ॥ काय मायबाप बहुत दिवस जितां । पुत्र उपेक्षी हेळसितां । रडे मेल्यामागें तर्पण[6] करितां । पिंड देतां सद्गति ॥ १७ ॥ तैसी दशा कैकेयीसी । उपेक्षिलें निजभागासी । गेलिया भागें कुसमुसी । उकसाबुकसीं स्फुंदत ॥ १८ ॥ जे मी रायाची पढियंती । ते मी जालें अभाग्य क्षितीं । मज नव्हेचि पुत्रसंतती । निंद्य सर्वार्थीं मी जालें ॥ १९ ॥ माझें रायासी अति कोड[7] । तें कोणासी नव्हेची गोड । जळो माझें काळें तोंड । लोक वितंड निंदिती मज ॥ १२० ॥ ज्येष्ठ भाग मागतां आवडी । तंव कनिष्ठासीच आली धाडी । मज हे थडी[8] ना ते थडी । निंद्य रोकडी मी जालें ॥ २१ ॥ स्वार्थी नाडलें मी संपूर्ण । जिवों न लाहें लोकांमेण । मज येतें कां वो मरण । रडे दारुण संतापें

१ मनांत, अंतःकरणाला. २ नाचणारी अप्सरा. ३ ब्रह्मदेव. ४ अधिक,

५ फार चिंता. ६ पाणी देतां. ७ कौतुक, आवड, प्रीति. ८ ही बाजू किंवा ती बाजू.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ २२ ॥ स्वर्गी जे मी सुरवरां वंद्य । ते मी मृत्युलोकीं निंद्य । विभागीं भाग्य माझें मंद । पाषाणवत मी झालें ॥ २३ ॥ जे मी रायाची आवडती । तेणेंचि जगा नावडती । पाषाणवत माझी स्थिती । देवपितरार्थी अति निंद्य ॥ २४ ॥ अंधाहातींचें रत्न पडे । तें त्याचें त्यास न सांपडे । कैकेयीही तेणेंचि पाडें । रडे पडे अति दुःखी ॥ २५ ॥ केश सुटले मोकळे । गडगडां पृथ्वीवरी लोळे । अश्रुधारा स्रवती डोळे । अति तळमळे तळमळीं ॥ २६ ॥ देखोनि कैकेयीचें दुःख । कौसल्या कळवळली देख । हरूनि तिचें असुख । प्रवर्तें देख उपकारार्थीं ॥ २७ ॥ श्रीभावार्थरामायण । एका जनार्दना शरण । जालें येथवर निरूपण । पिंडप्राशन अवधारा ॥ २८ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे बालकांडे एकाकारटीकायां पुरोडाशविभागो नाम द्वितीयोऽध्यायः ॥ २ ॥ ओंव्या ॥ १२८ ॥ श्लोक ॥ १ ॥

अध्याय तिसरा

श्रीसद्गुरवे रामचंद्राय नमः ॥ कैकेयी धरोनि पोटेंसीं । कौसल्या संबोखी[1] तियेसी । तूं कां व्यर्थ दुःखी होसी । आम्हां दोघींसी दुःख एक ॥ १ ॥ एकोदरा सख्या बहिणी । दोघी परणिजे दोघींजणीं । त्यांसी कांहीं नाहीं मिळणी । दुस्तर पाटणीं नांदती सख्या ॥ २ ॥ दोघीं नाहीं नित्य भेटी । दोघीं नाहीं नित्य गोष्टी । दोघीं नाहीं नित्य दृष्टी । मिथ्या चावटी सख्यत्वाची ॥ ३ ॥ दोघीं नाहीं नित्य संबंध । दोघीं नाहीं नित्य संवाद । दोघीं नाहीं नित्य बोध । तो सख्यसंबंध अतिमिथ्या ॥४॥ दोघीं नाहीं एक सुख । त्या सख्या मानिती मूर्ख लोक । तूं करिसी व्यर्थ दुःख । आम्हां निजसुख एकत्वें ॥ ५ ॥ आम्हां तुम्हां एक आहेवपण[2] । आम्हां तुम्हां एक निजभूषण । आम्हां तुम्हां एक निजमंडन । सख्यपण एकत्वें आम्हां तुम्हां ॥ ६ ॥ आम्हां तुम्हां एक सांगात । आम्हां तुम्हां एक भोगार्थ । आम्हां तुम्हां एक कांत[3] । सख्य सख्यार्थ आम्हां तुम्हां ॥ ७ ॥ आम्हां तुम्हां एक नाहो[3] । आम्हां तुम्हां एक सद्भावो । आम्हां तुम्हां एकात्मस्नेहो । सत्य सख्यान्वयो[4] तुम्हां आम्हां ॥८॥ आम्हां एक निवासस्थान[5] । आम्हां एक भोगभुवन[6] । आम्ही एकें सुखें संपन्न । सत्य सखेपण आम्हां तुम्हां ॥ ९ ॥ आम्हां एक नित्यत्वें चाळिता । आम्हां एक नित्यत्वें प्रतिपाळिता । आम्हां एक नित्यत्वें न्याहाळिता । हे नित्य सख्यता आम्हां तुम्हां ॥ १० ॥ आम्हां तुम्हां एक गोसाँवी । आम्हां तुम्हां एक निववी । आम्हां तुम्हां एक जीववी । हे सत्य पदवी सख्याची ॥ ११ ॥ आम्हां तुम्हां एक पांचभौतिक । एकचि हस्तपादादिक । आम्हां तुम्हां देखणें एक । हें अलोलिक निजसख्य ॥ १२ ॥ आम्हां तुम्हां एक नाथ । सत्यत्वें जाण दशरथ । तूं खेद करितेसी व्यर्थ । ऐक वृत्तांत साजणी ॥ १३ ॥ पुढिलांचें देखोनि दुःख । सुख मानिती परम मूर्ख । परांचें निरसोनि असुख[11] । द्यावें सुख शुद्धत्वें ॥ १४ ॥ परदुःखें होय सुखी । तो ब्रह्मराक्षस तिहीं लोकीं । सदा निंद्य शास्त्रमुखीं । शुद्ध सात्त्विकी तो नव्हे ॥ १५ ॥ तूं राहसी अपुत्रपणीं । आम्ही सुख पावों पुत्रपणीं । तैं पूर्वज पडती पतनीं । तो दोष त्रिभुवनीं न समाये ॥ १६ ॥ उपजला पुत्र देऊं जातां । तो पोसणा[12] म्हणती तत्त्वता । साधूं दोघींच्या निजस्वार्था । अवंचकता परमार्थ ॥ १७ ॥

उदकस्य रसः शैत्यमन्नस्य स्वादरो रसः ।
आनुकूल्यं रसः स्त्रीणां मित्रस्यावंचको रसः ॥ १ ॥

उदकाची गोडी शीतळता । अन्नाची गोडी आर्द्रता । स्त्रियांची गोडी अनुकूलता । अवंचकता मित्रगोडी ॥ १८ ॥ आम्ही तुम्ही सख्या बहिणी । ऐसी बोलिजे कहाणी[13] । ते करून दावावी करणी । येर बोलणीं अति मिथ्या ॥ १९ ॥ जैसें बोले तैसें करी । त्यातें वंदिजे हरहरीं । येर ते व्यर्थ बोलाची ज्ञानफरारी । तो संसारीं पढतमूर्ख ॥ २० ॥ जैसा बोले तैसा क्रियार्थ । या नांव मुख्य परमार्थ । येर बोलणें तें व्यर्थ । विषयस्वार्थ परमार्थी ॥२१॥ माझें बोलणें सत्य सांग । माझ्या भागाचा अर्धभाग । साजणी घेईं वो सवेग । दोघींचें अभंग सख्यत्व येणें ॥ २२ ॥ ऐकतां कौसल्येचें वचन । कैकेयीस जालें समाधान । करूनि शुद्धाचमन ।

१ समाधान करी. २ सौभाग्य. ३ पति. ४ सख्यसंबंध. ५ रहाण्याची जागा. ६ सुखोपभोग भोगण्याचें स्थान. ७ स्वामी, पति. ८ शरीर. ९ अपूर्व गोष्ट. १० दुसऱ्यांचें, ११ दुःख. १२ दत्तक. १३ गोष्ट.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

भागार्ध आपण घे स्वानंदें ॥ २३ ॥ मृत पावे अमृतपान । तृषिता मुखीं निज जीवन । अंधा उघडले लोचन । तैसें वचन कौसल्येचें ॥ २४ ॥ रंका[1] लाधलें निधान[2] । अकर्मी पावे ब्रह्मज्ञान । दुष्काळिया मिळे मिष्टान्न । तैसें वचन कौसल्येचें ॥ २५ ॥ कौसल्येची बुद्धि समान । समत्वें भागविभाग आपण । कैकेयीसी दे विभागून । सुखसंपन्न समत्वें ॥ २६ ॥ भाग देतां कैकेयीसी । कौसल्या अति उल्हासी । सवतीभाव नाहीं मानसीं । देत उल्हासीं निजभाग ॥ २७ ॥ जैसी कौसल्येची विधी । तैसीच सुमित्रेची सद्बुद्धी । वाप सत्संगाची सिद्धी । दे अर्धार्ध निजभाग ॥ २८ ॥ सत्संगाचें निजमहिमान । कौसल्या देत आपणासमान । कौसल्येसंगें सुमित्रा जाण । दे आपण भागार्ध ॥ २९ ॥ सुष्ठु[3] मैत्री कौसल्येसीं । म्हणोनि सुमित्रा म्हणणें तियेसी । तेणें सुमित्रा भावेंसीं । दे कैकेयीसी भागार्ध ॥ ३० ॥ जैसा संग होय ज्यासी । तैसी बुद्धि होय त्यासी । कौसल्यासंगें सुमित्रा तैसी । दे कैकेयीसी भागार्ध ॥ ३१ ॥ ऐकोनि कौसल्येचा वचनार्थ । देखोनि भागदानींच निज स्वार्थ । वसिष्ठ आनंदें नाचत । स्वयें डुल्लत स्वानंदें ॥ ३२ ॥ करितां भागप्राशन । उदरा आला रघुनंदन । धन्य अयोध्याराजभुवन । तेथें स्वानंदघन क्रीडेल ॥ ३३ ॥ उभवोनी स्वानंदाची गुढी । नारदाची पडे उडी । नाचूं लागे आवडी । सूर्यवंशा गाढी दशा आली ॥ ३४ ॥ सुटेल देवांची बांधवडी[4] । तुटेल नवग्रहांची बेडी । मुक्ति सुरवाडेल[5] गाढी । सुख सुरवाडी पाल्हेजेल[6] ॥ ३५ ॥ माझ्या वाल्मीकाचें वचन । जालें प्रत्यक्षप्रमाण । राम प्रकटला निजनिधान । धन्य जन अयोध्येचे ॥ ३६ ॥ लंकेपुढें युद्ध दारुण । राम करील रणकंदन । तें मी देखेन आपण । हरिखें उड्डाण करी नारद ॥ ३७ ॥ जेवित्याची चवी जेविता जाणे । तेवीं वसिष्ठनारदांचें नाचणें । तें सुख तिहींच भोगणें । येरीं पाहणें टकमकां ॥ ३८ ॥ विभांडक आनंदे मनीं । कौसल्या सत्त्वशिरोमणी । इचेनि पावन जाली अवनी । धन्य त्रिभुवनीं कौसल्या ॥ ३९ ॥ ऋष्यशृंग तये वेळीं । सुखावला सुखकल्लोळीं । उड्डाण करोनि दे आरोळी । कौसल्या भूतळीं आणील राम ॥ ४० ॥

कौसल्येचा शुद्ध भावो । ते भावीं प्रकटला रामरावो । धन्य दशरथ महाबाहो । गर्भान्वयो[7] अलोलिक ॥ ४१ ॥ विस्मय करिती ऋषीश्वर । तटस्थ ठेले सुरवर । अवघे करिती जयजयकार । भागिला रघुवीर चतुर्थ भागीं ॥ ४२ ॥ मुख्य द्वेष सवतीमत्सरासी । तो मत्सर नाहीं कौसल्येसी । म्हणोनि श्रीराम आला कुसी । त्या गर्भासी अवधारा ॥ ४३ ॥ सवतीमत्सर कैकेयीसी । म्हणोनि हरविलें निजभागासी । शुद्धभाव कौसल्येसी । तिच्या गर्भासी श्रीराम ॥ ४४ ॥ एक ताट आलें यज्ञशेषीं । तेथेंचि भर्ग निश्चयेंसीं । तो विभागिला चतुर्थ भागेंसीं । चतुर्विध त्यासी बोलिजे ॥ ४५ ॥ मुख्यार्ध कौसल्येपासीं । तद्भजनार्ध जाणा सुमित्रेसी । दोनी अर्धार्ध कैकेयीसी । स्वतंत्र भाग तिसी असेचिना ॥ ४६ ॥ पुढां पोटीं होती पुत्र । ते तिचे नव्हती स्वतंत्र । यालागीं बोलिजे परतंत्र । कैकेयीचरित्र नावडे त्यांसीं ॥ ४७ ॥ असो पुढील कथेसी । वसिष्ठें पाचारोनि तिघींसी । देवोनि भागविभागांसी । म्हणे विलंबासी करूं नये ॥ ४८ ॥ दोघीं निजभागप्राशन । केलें न लगतां दर्शन । कैकयी भागप्राशन । करितां उद्विग्न ते जाली ॥ ४९ ॥ दोनी अर्ध जंव घोंटी । तंव ते बैसले कंठीं । गिळूं जातां अति संकष्टीं । घोंटितां घोंटीं घोंटेना ॥ ५० ॥ भाग तिचे नव्हते स्वतंत्र । परभाग गिळूं न शके वक्त्र । पांढरे जाले तिचे नेत्र । वमनोद्गार ते जाली ॥ ५१ ॥ पराचें ओझें वाहणें । तें आपणासी होय उबगवाणें । तेवीं परभाग घोंटितां तिणें । जीवें प्राणें घोंटेना ॥ ५२ ॥ विभागें रोधली तिची घांटी । ऐसें वसिष्ठें देखिलें दृष्टी । मंत्रोदक देऊन उठाउठी । तेणें घोंटी विभाग ॥ ५३ ॥ सेवितां तें मंत्रोदक । फिटली शंका पावली सुख । पुत्रगर्भाचा संतोष । आत्यंतिक ते पावे ॥ ५४ ॥ साधु असतां निजनिकट । भलतें निवारे संकट । गर्भमंडित जालें पोट । सुख उद्भट कैकेयीसी ॥ ५५ ॥ हरपलें सांपडे रत्न । मरत्या घडे अमृतपान । तेवीं वसिष्ठोदकें जाण । सुख परम कैकेयीसी ॥ ५६ ॥ यालागीं सत्संगतीं । दुःख नव्हे ना अधोगती । सत्संगाची परम ख्याती । नेणों किती उद्धरले ॥ ५७ ॥

---

१ भिकाऱ्याला. २ ठेवा. ३ उत्तम. ४ बंधन. ५ सुख पावेल. ६ पालवी फुटेल. ७ गर्भसंबंध. ८ दांत. ९ त्रासदायक. १० फार.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सत्संगेन हि दैतेया यातुधानाः खगा मृगाः ।
गंधर्वा राक्षसा नागाः सिद्धचारणगुह्यकाः ॥ २ ॥

दैत्य दानव[1] राक्षससृष्टी । गण गंधर्व मृग पक्षी पुष्टी । सिद्ध चारण गुह्यक कोटी । उद्धरले सृष्टीं सत्संगें ॥ ५८ ॥ मनुष्यलोकींची गोष्टी । सत्संग लाधल्यापाठीं । उद्धरले कोट्यनुकोटी । सभाग्य सृष्टी सत्संगें ॥ ५९ ॥ धन्य धन्य तो दशरथ । ज्यासी सत्संग पुरोहित । त्याची काठी[3] मानी आदित्य । तो घरांत निजसखा ॥६०॥ तेणें वसिष्ठें आपण । तिर्वीस करविलें पिंडप्राशन । एका विनवी जनार्दन । गर्भावधारण अवधारा ॥ ६१ ॥ इति श्रीभावार्थरामायण । एका जनार्दना शरण । पिंडभाग पिंडप्राशन । जालें संपूर्ण अवधारा ॥ ६२॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे बालकांडे एकाकारटीकायां पिंडप्राशनं नाम तृतीयोऽध्यायः ॥ ३ ॥ ओंव्या ॥ ६२ ॥ श्लोक ॥ २ ॥

अध्याय चौथा

श्रीरामचंद्राय नमः ॥ ऐकोनियां कथाश्रवण । ज्ञाते म्हणती अप्रमाण । नव्हे हें मूळींचें निरूपण । तिंहीं शिवरामायण पहावें ॥ १ ॥ स्कंदें पुसे अगस्तीप्रती । शिवभवानी राम जपती । राम कोण तो त्रिजगतीं । यथास्थिती मज सांगा ॥ २ ॥ तो म्हणे श्रीराममहिमान । सांगावया मी अति दीन । जेथें वेदां पडे मौन । तें वदावया वदन मज नाहीं ॥ ३ ॥ तुझ्याचिऐसा प्रश्न । सदाशिवाप्रति जाण । पार्वती पुसे आपण । श्रीराम कवण मज सांगा ॥ ४ ॥ श्रीरामाची कोण स्थिती । कोण श्रीरामाची कीर्ती । समूळ सांगा मजप्रती । पुसे अति प्रीतीं जगदंबा ॥ ५ ॥ कोण श्रीरामाची ख्याती । श्रीरामाची कोण गती । श्रीरामाची कोण उत्पत्ती । कोण त्रिजगीं श्रीराम ॥ ६ ॥ जेथें सदाशिव स्वयें वक्ता । मुख्य पार्वती स्वयें श्रोता । तेही शिवरामायणी कथा । संदेहार्था पहावी ॥ ७ ॥ तूं कैसा झालासी वक्ता । पुसाल माझी योग्यता । तेही मी सांगेन तत्त्वता । सावध श्रोतां परिसावी ॥ ८ ॥ मी नेणें मूळींच्या संस्कृतासी । मूर्खपण माझी मिरासी । त्या मूर्खाच्या मुखासी । श्रीराम ऐसी कथा वदवी ॥ ९ ॥ माझें अंगीं मूर्खपण । माझें मी जाणें संपूर्ण । न करीं म्हणतां रामायण । श्रीराम आपण कथा[10] प्रेरी ॥ १० ॥ प्रेरितांही मी न करीं जाण । तंव स्वप्नामाजी रामायण । श्रीराम विस्तारी संपूर्ण । ऊण खूण ग्रंथाची ॥ ११ ॥ जागृतीमाजी[11] वर्ततां । पुढें प्रकाशे रामकथा । दुश्चितपणें ठेवों जातां । राम तत्त्वता रामायण दावी ॥ १२ ॥ करूं जातां फुकट गोष्टी । त्यांमाजी रामकथा उठी । रामें पुरविली पाठी । खिळिली दृष्टी रामायणीं ॥ १३ ॥ ऐसियांत न करीं म्हणतां । राम चढे मीपणाचे माथां । मग तो आपुलिया निजसत्ता । वदवी कथा बलात्कारें ॥ १४ ॥ मज निजलों असतां जाण । राम थापटी आपण । म्हणे उठीं करीं रामायण । तेथें मी कोण न करावया ॥ १५ ॥ यालागीं कथादूषण[12]भूषण[13] । माझे अंगीं न लागे जाण । कर्ता श्रीराम आपण । माझें मीपण तो जाला ॥ १६ ॥ ग्रंथ निंदिती अथवा वंदिती । ते दोघे आम्हां ब्रह्ममूर्ती । हें श्रीजनार्दनाची युक्ती । उपदेश एकांतीं निजगुह्यार्थ ॥ १७ ॥ असो अवद्धही रामकथा । पवित्र करी गातां ऐकतां । हें न माने ज्यासी विकल्पता । त्यासी तत्त्वता लोटांगण ॥ १८ ॥

यद्वाग्विसर्गो जनताघविप्लवो
यस्मिन्प्रतिश्लोकमबद्धवत्यपि ॥
नामान्यनंतस्य यशोंकितानि यच्-
छृण्वंति गायंति गृणंति साधवः ॥ १ ॥

अवद्ध[14] रामकथा श्रवणीं । वक्ता पावन तत्क्षणीं । श्रोत्यांच्या पापा होय धुणी[15] । अवद्ध वाणी पढतांही ॥ १९ ॥ अवद्धही रामचरित्र । महापातकियां करी पवित्र । तो राम गातां माझें वक्त्र[16] । केवीं अपवित्र ज्ञाते म्हणती ॥ २० ॥ कथा निंदिती वंदिती जनीं । ते माउली माझे दोनी । निंदक ते सखी जननी । मजलागूनी कृपाळु ॥ २१ ॥ जैसे जननीचे करतळ । वरीवरी क्षालिती बाह्य मळ । निंदक सबाह्य कलिमळ । करी निर्मळ निजवदनें ॥ २२ ॥ यालागीं निंदकचि तत्त्वता । साह्य सखा परमार्था । त्या

१ दनूचे मुलगे. २ प्राप्त झाल्यावर. ३ दंड. ४. खोटें. ५ कार्तिकस्वामी. ६ पार्वती. ७ कीर्ति. ८ ऐकणारा. ९ वतनदारी. १० स्फूर्ति देई.

११ जागेपणीं. १२ डाग, कलंक. १३ शोभा, अलंकार. १४ असंबद्ध, विसंगत, असंदर्भ. १५ शुद्धता. १६ मुख.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

निंदकातें निंदितां । दोषी सर्वथा स्वयें होय ॥ २३ ॥ निंदा म्हणिजे परमामृत । निंदा निर्द्वंद्व[1] सुखस्वार्थ । निंदक न पाहे निजस्वार्थ । अति समर्थ परोपकारी ॥ २४ ॥ जेथें निंदा सुखरूप समाये[2] । त्याचे मस्तकीं वंदूं पाय । धन्य धन्य त्याची माय । जो निंदा साहे निर्द्वंद्व ॥ २५ ॥ आतां किती सुचवूं परिहार[3] । परिहार तोचि अहंकार । मी होऊं पाहें कवीश्वर । हा अपराध थोर मजमाजी ॥ २६ ॥ आतां रामकथा रामायणीं । तो मी अपराध न गणीं । झणीं[4] निवाराल तुम्ही कोणी । घेऊं द्या धणी[5] कथामृताची ॥ २७ ॥ तंव श्रोते म्हणती नवलाहो । ग्रंथीं साधिला शुद्धान्वयो । परिहारमिषें पहा हो । केला निःसंदेहो ग्रंथार्थ ॥ २८ ॥ याचे मराठी बोल । परी अमृतातें करिती फोल[6] । क्षीराब्धीहूनि अति सखोल । नित्य नवी बोली स्वानंदसुखाची[7] ॥२९॥ श्रवणीं ऐकतांचि कथा । सुख उपजतसे चित्ता । धन्य धन्य तूं रसाळ वक्ता । कथापरमार्थ निजपूज्य ॥ ३० ॥ तुझेनि मुखें रामायण । श्रीराम वदविताहे आपण । परिहारें जालें ब्रह्म पूर्ण । कथानिरूपण चालवीं ॥ ३१ ॥ हें ऐकोनि संतवचन । निवाला एका जनार्दन । मस्तकीं वंदोनियां चरण । ग्रंथनिरूपण अवधारा ॥ ३२ ॥ पुढील कथेचें अनुसंधान । केलिया पिंडप्राशन । तिघी जणी सुखसंपन्न । गर्भसमाधान तिघींसी ॥ ३३ ॥ वसिष्ठ म्हणे रायासी । धर्ममर्यादा आहे ऐसी । डोहळे पुसावे स्त्रियांसी । मागती त्यांसी तें द्यावें ॥ ३४ ॥ शिरीं वंदोनि ब्रह्मवाक्यासी । राजा निघाला वेगेंसीं । आला कैकेयीभुवनासी[8] । अति उल्लासीं पुत्रार्थी ॥ ३५ ॥ कैकेयी गर्भविलासीं । बैसली होती मंचकासी । येतां देखोनि रायासी । निजसेजेसी पहुडली[9] ॥ ३६ ॥ जेथें भ्रतारा स्त्रियेसी वर्चस्वपण । तेथें मर्यादा राखे कोण । बरवेपणाचा गर्व पूर्ण । त्याहीवरी जाण गर्भिणी ते ॥३७॥ अमावास्ये अंधारी रात्री पाहीं । त्याहीवरी दाटे धुंई[10] । गंडदपणें[11] न दिसे कांहीं । ते दशा पाहीं कैकेयीसी ॥ ३८ ॥ राजा पुसे डोहळे तिसी । ते हांसोनि म्हणे रायासी । जरी पुरवाल निश्चयेंसीं । तरी मी तुम्हांसी सांगेन ॥ ३९ ॥ राजा बोले अति प्रीती । तुझी नुलंघितां वचनोक्ती[12] । तुज म्यां नेलें स्वर्गाप्रती । इंद्रादिकां हातीं गौरविलें ॥ ४० ॥ ऐसें मागें तुझें वचन । नाहीं उल्लंघिलें आपण । आजिचा प्रात काळ पूर्ण । डोहळे संपूर्ण करीन तुझे ॥ ४१ ॥ येरी म्हणे रायासी । डोहळे माझ्या निजमानसीं । राज्य द्यावें कनिष्ठासी । ज्येष्ठा वनवासीं धाडावें ॥ ४२ ॥ दवडावें दूरी दुरंतरता । जेथें नायके अयोध्येची वार्ता । आणि या ज्येष्ठाची कथा । न ये सर्वथा अयोध्येसी ॥ ४३ ॥ ऐसें विपरीतें[13] करितां । तुम्ही म्हणाल हे अधर्मता । तो अधर्म ठेवा माझिये माथां । जो वेदशास्त्रार्थी अति निंद्य ॥४४॥ अति निंदेची निंद्य टाळी । ते वांजो[14] माझिये कपाळीं । मज निंदिजे लोकीं सकळीं । ही आवडी नेव्हाळी[15] डोहळियां ॥ ४५ ॥ ऐकोनि तिचे डोहळे । राजा सर्वांगें कंटाळे । अश्रुपूर्ण[16] जाले डोळे । होय तत्काळें कंपायमान ॥ ४६ ॥ मन बुद्धि चित्त चांचरे । निश्चयासी आले शहारे । बैसलीं इंद्रियांचीं द्वारें । प्रळयमहापूरें धैर्य गेलें ॥ ४७ ॥ इचे डोहळे पुरवितां । नाश होईल स्वार्थपरमार्था । शेखीं[17] नुरे उरी जीविता । सर्वी सर्वथा अति घात ॥ ४८ ॥ ऐसी रायासी जाली व्यथा । मग तिसी न बोलेचि मागुता । अत्यंत वचकोनि चित्ता । होय निघता कंटाळोनी ॥ ४९ ॥ सर्वेचि[18] निघे सुमित्रेमंदिरीं । तंव ते आली सामोरी । मस्तक ठेविला चरणांवरी । आरती करी निंबलोण[19] ॥ ५० ॥ आला देखोनि प्राणनाथ । जीवीं उल्हास[20] अति अद्भुत । आनंदें पूर्ण भरित । प्रेमाचा अत्यंत पूर आला ॥ ५१ ॥ घालोनियां वरासन[21] । भक्तिभावें चरणक्षाळण । करी चरणतीर्थप्राशन । सुमनादि चंदन यथोक्त पूजा ॥ ५२ ॥ सुगंध सुवास सुमनमाळा[22] । घाली निजनाथाचिया गळां । जोडल्या[23] करीं त्या काळा । उभी वेल्हाळा[24] निकट[25] ना दुरी ॥ ५३ ॥ गर्भ टवटवीत मुखकमळ । शोभे सर्वांग सोज्ज्वळ । गर्भतेजें निजनिर्मळ । मिरवे वेल्हाळ भक्तिभावें ॥५४॥

१ कलहरहित, वादविवादरहित. २ रहाते, मावते. ३ निवारणाचा उपाय. ४ कदाचित्. ५ तृप्ती. ६ फुकट, व्यर्थ. ७ आत्मसुखाची. ८ कैकेयीच्या मंदिरांत. ९ निजली. १० धुकें. ११ अंधारामुळें. १२ बोलणें. १३ विलक्षण. १४ बसो, लागो. १५ अपूर्वता. १६ आंसवांनीं भरलेले. १७ शेवटीं. १८ लागलाच. १९ कुरवंडी. २० आनंद. २१ उत्तम बैठक. २२ फुलांचे हार. २३ हात जोडून. २४ प्रिया. २५ जवळ.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

जोचि भावो निजनाथेंसीं । तोचि भावो समस्तेंसीं । तेणेंचि भावें नृपनाथासी । पूजी उल्लासीं समसाम्यें ॥ ५५ ॥ भक्तिभावो तिचा वांटा । त्याचा उदरीं केला सांठा । तैशाच रीतीच्या बाह्य चेष्टा । देखे द्रष्टा[1] होवोनि रावो ॥ ५६ ॥ देखोनि सुमित्रेचा भावो । अत्यंत सुखावला रावो । तिचे गर्भाचा निर्वाहो । देवाधिदेवो प्रतिपाळी ॥५७॥ कैकेयीडोहळियांचें दुःख । राजा विसरला निःशेष । तिचें चुंबोनियां मुख । पुसे कौतुक डोहळियांचें ॥ ५८ ॥ कोण आवडी तुझ्या पोटीं । ते सांगावी जीवींची गोष्टी । येरी सलज्ज अधो-[2]दृष्टी । न करी चावटी बहुबोल ॥५९॥ ज्येष्ठाची जे ज्येष्ठसेवा । ते मज द्यावी नरदेवा । हेंचि आवडी माझिया जीवा । सत्यस्वभावाप्रीत्यर्थ ॥ ६० ॥ ज्येष्ठसेवेचें निजसुख । मज आहे आत्यंतिक[3] । तुम्हीं द्यावें हेंचि एक । नावडे आणिक विषय मज ॥ ६१ ॥ नावडे वस्त्र दिव्यान्न । न आवडे राज्य त्रिभुवन । नावडे स्वर्ग ब्रह्मसदन[4] । ज्येष्ठसेवेवांचूनी ॥ ६२ ॥ ऐसे स्वामी प्राणपती । तुझे पाय सेव्य असती । ज्येष्ठसेवेची अति प्रीति । डोहळे निश्चिती हे माझे ॥ ६३ ॥ ऐकोनि ऐसें वचन । रायाचें विस्मित मन । इचे डोहळे विलक्षण । दिसे सुलक्षण सर्वार्थीं ॥ ६४॥ एक पायसाचें[5] ताट । वसिष्ठें भाग केले चोखट । तिचे डोहळे कां विकट । इचे अति श्रेष्ठ परमार्थीं ॥ ६५ ॥ तिचे भाग नव्हती स्वतंत्र । पोटींचा गर्भ तो सावत्र । यालागीं ते अपवित्र । डोहळे होती कैकेयीसी ॥ ६६ ॥ सावत्र छळिती मातेसी । शनि लाता हाणी छायेसी । ठावकें[6] पडलें सूर्यासी । तूं माता नव्हेसी सर्वथा ॥ ६७ ॥ तैसे सावत्र गर्भ तियेसी । यालागीं अधम डोहळे इयेसी । निंद्य व्हावें मी जगासी । वदे गर्भवासी सावत्र ॥ ६८॥ सुमित्राभाग स्वतंत्र । यालागीं डोहळे अति पवित्र । रायाचें निवालें जिव्हार । हर्षें निर्भर तो जाला ॥ ६९ ॥ मग उठोनि उल्लासेंसीं । सुमित्रा आलिंगी हृदयेंसीं । जे जे डोहळे निजमानसीं । ते ते पावसी मदनुग्रहें ॥ ७० ॥ नाना अलंकारभूषण । राजा त्यागी ओंवाळून । तिसी करवी निंबलोण । द्विजां दे दान नाना वस्त्रें ॥ ७१ ॥ आतां रायाची ज्येष्ठ राणी । कौसल्या जे कां धर्मपत्नी । न समाये त्रिभुवनीं । तो गर्भाधानीं श्रीराम ॥ ७२ ॥ जो त्रिभुवनीं न समाये जाण । तो भावार्थी सांठवे आपण । सद्भाव जालिया संपूर्ण । ब्रह्म परिपूर्ण हृदयाकाशीं ॥ ७३ ॥ तेथोनि राजा तत्क्षणीं । उत्कंठा कौसल्यादर्शनीं । भुवनीं न देखे राजपत्नी । न देखे शेजशयनीं पर्यंकीं ॥ ७४ ॥ ऐका कौसल्यासंभ्रम । उदरीं संभवला[11] श्रीराम । पुसतां डोहळियांचें काम । आनें आन वर्तलें ॥ ७५ ॥ ऐका कौसल्येची स्थिती । अखंड वसे पैं एकांतीं । न साहे संग सांगाती । गर्भप्रतीति श्रीराम ॥ ७६ ॥ नावडे वस्त्रभूषण । नावडे सुमन चंदन । नावडे भोग दिव्यासन । नावडे शयन पर्यंकीं ॥ ७७ ॥ देहीं निर्लोभलक्षण[12] । हेंचि वैराग्य दृढ दारुणें[13] । उदरा आला श्रीरघुनंदन । ब्रह्म परिपूर्ण पूर्णत्वें ॥ ७८ ॥ आस्था सांडोनियां जाण । आवडी वसवी विजन[14] । लेइली गर्भ दिव्यांजन । राम निधान[15] उदरातें ॥ ७९ ॥ करोनि कल्पनेसी मारू । सेविला निर्विकल्प[16] कल्पतरु । तयातळीं अति आदरू । सहजासनीं सुंदरू बैसलीसे ॥ ८० ॥ गर्भोदरीं बैसली दृष्टी । यालागीं वृत्ति झाली उफराटी । आपल्यासमान देखे सृष्टी । गर्भपुष्टी स्वभावें ॥ ८१ ॥ यावरी ते राजबाळा[17] । वसवी शुद्ध सुमनशाळा । द्वैतदृष्टी[18] न लगे डोळां । सुखसोहळा अद्वैतीं ॥ ८२ ॥ राजा पाहे भोगभुवनीं । तेथें नातुडे[19] राजपत्नी । पाहे अति लोभें अवलोकोनी । परी ते नयनीं न दिसे ॥ ८३ ॥ पाहतां वैखरीभीतरीं[20] । तेथें न देखे ते सुंदरी । मध्यमेच्या माजघरीं । पाहतां दुरी दृष्टीसी ॥ ८४ ॥ शोधितां पश्यंतीवोवरीं । तेथें न देखे निजसुंदरी । चढला परेच्या उपरी । शुद्धि निर्धारीं न लभेची ॥ ८५ ॥ काढोनि द्वैताचा अर्गळा[21] । फेडूनि शब्दाची शृंखळा[22] । उघडी अद्वैतसुमनशाळा । गुरुवाक्यमेळा निर्धारें

१ पहाणारा. २ खालीं नजर करून. ३ अतिशय. ४ ब्रह्मलोक. ५ खिरीचें. ६ कळलें. ७ अंतःकरण. ८ परिपूर्ण. ९ पलंगावर. १० कौसल्येंचा आवेश. ११ राहिला. १२ आशारहित चिन्ह. १३ मोठें. १४ एकान्त.

१५ ठेवा. १६ कल्पनारहित. १७ राजकन्या. १८ भेददृष्टि. १९ न मिळे. २० (१) परा, (२) पश्यंती, (३) मध्यमा (४) आणि वैखरी या चार वाणी आहेत. २१ आडसर. २२ सांखळी, कडी.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ ८६ ॥ तेथें रिघतां[1] अति सांकडीं । फेडिलीं रजतमांचीं लुगडीं । शुद्ध सत्त्वाचीं भूषणें आवडीं । तींही काढी तत्काळ ॥ ८७ ॥ ऐसा एकाकी एकला । राव प्रवेशे सुमनशाळा । पाहे स्वयें सगर्भ बाळा । तंव तेथेंही डोळां दिसेना ॥ ८८ ॥ मग नेत्र भरोनि विवेक । देखे निर्विकल्प निजसुख । तयातळीं बैसली देख । अति सुरेख कौसल्या ॥ ८९ ॥ राजा पाहे निजें[2]तन्वंगी । तंव तेज न समाये अंगींचें अंगीं । धन्य हेचि जगीं । [3]गर्भलिंगीं सलिंग ॥ ९० ॥ कैसी बैसली सहजासनीं । जैसी योगिया लागली [4]उन्मनी । पाहतां निवाला लोचनीं । धर्मपत्नी [5]सगर्भा ॥ ९१ ॥ तिसी देखतांचि दृष्टीं । आनंदें वोसंडे[6] सकळ सृष्टी । तिसी करितां सुखगोष्टी । पडे मिठी स्वानंदीं ॥ ९२ ॥ मग बैसवोनि पैं नेहटीं । हातीं धरोनि हनुवटी । झणीं माझी लागेल दृष्टी । जे डोहळे पोटीं ते सांग ॥ ९३ ॥ येरी न पाहे वरती । [8]दृश्य [9]द्रष्टा न देखे स्थिती । रामरूपीं [10]रंतली वृत्ती । व्यक्ताव्यक्ती न देखे ॥ ९४ ॥ राजा वोसंडला अति प्रीतीं । आलिंगिली दोहीं हातीं । येरीस लागली विदेहस्थिती । देहें[11]अहंकृति नाठवे ॥ ९५ ॥ उदरीं संभवला विदेही । यालागीं आठवू नाठवे देहीं । सबाह्य अंतरीं उरली नाहीं । तटस्थ पाही श्रीराम ॥ ९६ ॥ राजा म्हणे कटकटा[12] । कैसेनि ही [13]अवचटली [14]बरवंटा । कीं महद्भूत आलें पोटा । नयनीं ताठा चढलासे ॥ ९७ ॥ कैसें करील मेघश्याम । केवीं पुरेल पुत्रकाम[15] । सिद्धि पाववील पुरुषोत्तम । आत्माराम रघुवीर ॥ ९८ ॥ रामनाम कर्णपुटीं । ऐकतांचि गोरटी । उघडोनि पाहे दृष्टीं । देखे सृष्टी राममय ॥ ९९ ॥ जंव सादरें राव पाहे । नयनीं निजतेज न समाये । मी एक गर्भिणी येथें आहें । हा आठवू देहें नाठवे ॥ १०० ॥ जंव [16]तळवटीं पृथ्वी पाहे । तंव ते रामरूप जाली आहे । फिटली पार्थिवाची सोये । देहीं विदेह श्रीराम ॥ १ ॥ जंव [17]अवलोकी दाही दिशा । तंव पडला रामरूपें ठसा । पाहतां न दिसे आकाशा । श्वासोच्छ्वासामाजी राम ॥ २ ॥ वृक्ष वल्ली आणि मंडप । अवघें देखे रामरूप । अशोक नाग चंपक । पाहतां एक श्रीराम ॥ ३ ॥ जो उदरीं संभवला । तोचि सर्वेंद्रियीं वोसंडला[18] । देहाचा पांग[19] फिटला । प्रपंच जाला ब्रह्मरूप ॥ ४ ॥ देखे क्रीडेचें पाडसें । पाहतां रामचि प्रकाशे । जें जें देखावया बैसे । तें तें देखे श्रीराम ॥ ५ ॥ दोरू सर्प नाहीं जाला । दोरा सर्प नाहीं भेटला । दोरें सर्प नाहीं देखिला । भ्रमें भाविलें[20] भुजग ॥ ६ ॥ तेवीं ब्रह्मीं प्रपंच नाहीं देखिला । ब्रह्मीं प्रपंच नाहीं चाखिला । ब्रह्मीं प्रपंच नाहीं ऐकिला । भ्रमें भाविला अति भ्रांती ॥ ७ ॥ प्रपंच एक आला होता । हे समूळ मिथ्या वार्ता । पुढें होईल मागुता । हेंही कल्पांतीं घडेना ॥ ८ ॥ याविषयींचा श्लोक । वसिष्ठ बोले अलोलिक । त्याचा अर्थ तात्त्विक । परिसोत सात्त्विक सज्जन ॥ ९ ॥

भ्रमेणाहं भ्रमेण त्वं भ्रमेणोपासको जनः ।
भ्रमेणेश्वरभावत्वं भ्रममूलमिदं जगत् ॥ २ ॥

भ्रमें श्रेष्ठत्वें ईश्वर । भ्रमें कर्म धर्म सदाचार । भ्रमें वाढला व्यवहार । भ्रममूळ संसार निजसत्य ॥ ११० ॥ जनकादिक मुक्त असती । तेही प्रपंचीं वर्तती । त्यांच्या प्रपंचाची स्थिती । वसिष्ठ श्लोकोक्ति वदे तें ऐका ॥ ११ ॥

ब्रह्मत्वं ब्रह्मभवनं ब्रह्मभूतपरंपरा ।
ब्रह्माहं ब्रह्म मच्छत्रुर्ब्रह्म सन्मित्रबांधवाः ॥ ३ ॥

जैसा सोन्याचा रवा घेतां । तो अलंकार समस्तां । सोनेपणें घे तत्त्वता । तेवीं व्यवहार मुक्ता परब्रह्मत्वें ॥ १२ ॥ मुक्ता ब्रह्मरूप मीतूंपण । शत्रु मित्र ब्रह्मपूर्ण । ब्रह्मरूप त्रिभुवन । भूतें सनातन[21] ब्रह्मरूप ॥ १३ ॥ ऐसिया ब्रह्मस्थिती । मुक्त संसारीं वर्तती । जिण्यामरण्याची भ्रांती । नाहीं त्यां चित्तीं ब्रह्मरूपत्वें ॥ १४ ॥ कौसल्या रामगर्भत्वें निभ्रांत । राजा पुत्रधर्में कर्मभ्रांत । डोहळे तिसी पुसतां तेथ । विनोद विस्मित परमार्थी परिसा ॥ १५ ॥ स्वस्ति श्रीरामायण । एका

---

१ शिरतां. २ आपली सुंदर स्त्री. ३ गर्भचिन्हानें. ४ जेथें मनाचा लय होतो अशी पांचवी अवस्था. ५ गरोदर. ६ भरून गेली. ७ कदाचित्. ८ पहाण्याची वस्तु. ९ पहाणारा. १० रत झाली, मुराली. ११ देहाचा मीपणा. १२ हाय, हाय. १३ झपाटली. १४ सुंदरी. १५ मुलांविषयींची इच्छा. १६ खालीं. १७ पाही. १८ भरला. १९ हीनपणा. २० कल्पना केली, मानला. २१ शाश्वत, अविनाशी.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

जनार्दना शरण । डोहळ्यांचें निरूपण । विनोद पूर्ण परब्रह्म ॥ ११६ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे बालकांडे एकाकारटीकायां कौसल्यादोहदनिरूपणं नाम चतुर्थोऽध्यायः ॥ ४ ॥ ओंव्या ॥ ११६ ॥ श्लोक ॥ ३ ॥

अध्याय पांचवा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ पूर्वकथेचें[1] अनुसंधान । कौसल्यें उघडिले नयन । डोहळे पुसावया जाण । राजा सावधान स्वयें जाला ॥ १ ॥ कौसल्या रामगर्भें स्वरूपस्थिती । राजा प्रवृत्ति[2]धर्में पुत्रार्थी । दोहींच्या संवादाची प्रीती । डोहळे निश्चिती अवधारा ॥ २ ॥ राजा म्हणे स्वमुखें कांते[3] । काय आवडी आहे तूतें । वेगीं सांग डोहळ्यांतें । सांडीं परतें श्रमासी ॥ ३ ॥ येरी म्हणे मी अवघा राम । मजमाजी तव कैंचा श्रम । अवतरलों पुरुषोत्तम । देवांचे श्रम फेडावया ॥ ४ ॥ ऐकोनि शंकिजे रायें । म्हणे इसी जाहलें तरी काये । आप आपणियातें पाहें । सावधान[4] होय प्रिये तूं ॥ ५ ॥ [5]येरी म्हणे मी नव्हें स्त्री ना पुरुष । नर वानर ना राक्षस । ईशाचा[6] जो निज ईश । परम पुरुष श्रीराम ॥ ६ ॥ राजा म्हणे तन्वंगी[7] । काय झालें तुजलागीं । कैंचा भ्रम भरला आंगीं । पाहें वेगीं मी कोण ॥ ७ ॥ येरी म्हणे माझ्या ठायीं । मी तूं ऐसें उरलें नाहीं । अधिष्ठान[8] जो विदेही । आत्मा पाहीं श्रीराम ॥ ८ ॥ दशरथ म्हणे कौसल्ये । माझें तुझें जैं लग्न झालें । तैं रावणें अति विघ्न केलें । तें विसरलीस कैसेनी ॥ ९ ॥ नांव ऐकोनि रावण । येरी म्हणे दे दे धनुष्य बाण । करूं लंकेचें निर्वाणें[9] । मारूं दारुण[10] राक्षस ॥ १० ॥ पाचारा[11] वनींचे वनचर । मुकुट कुंडलें द्या अलंकार । राज्य देवोनि धरा छत्र । वानरभार चालवा ॥ ११ ॥ केउता[12] गेला रे हनुमंत । अंगद सुग्रीव जांबवंत । अझूनि रावणाची मात[13] । जगाआंत उरलीसे ॥ १२ ॥ अहो वज्रदेही निजगडा । पुच्छें घालोनियां वेढा । लंका जाळा रे भडभडां । पाडा तडतडां राक्षस ॥ १३ ॥ अमित पाचारा वानर । शिळीं बुजा रे सागर । पाडा पाडा रे नगर । निशाचरवस्ती जे ॥ १४ ॥ केउते गेले रे जुंत्पती[14] । लंका उलथा रे हातोहातीं । पाडा पाडा चारी भिंती । दुर्गें[15] किती आम्हांसी ॥ १५ ॥ आगड भेदा रे चोहटा । पाडूं लंकेच्या त्रिकूटा । मारूं रावणा अति दुष्टा । स्वधर्मवाटा रुंधित ॥ १६ ॥ बाण घेवोनि स्वांगें । छेदूं कुंभकर्णाचें टांगें[16] । भेदूं रावणाचीं सर्वांगें । भिडतां मागें मी न सरें ॥ १७ ॥ राक्षसांच्या शिरकमळीं । खेळूं लंकेपुढें चेंडूफळी । साजुक[17] रुधिरांच्या कल्लोळीं । तृप्त कंकोळीं[18] करूं आजी ॥ १८ ॥ तोडा नवग्रहांची बेडी । सोडा देवांची बांधवडी[19] । उभवा रामराज्याची गुढी । आज्ञा धडफुंडी[20] तिहीं लोकीं ॥ १९ ॥ पाचारा बिभीषण पवित्र । करा राज्याभिषेक धरा छत्र । लंका दिधली स्वतंत्र । यावच्चंद्रसूर्यपर्यंत ॥ २० ॥ नासा रे जगाचीं दुःखें । त्रैलोक्य भरा रे हरिखें । दुमदुमित विश्व सुखें । परम पुरुषें श्रीरामें ॥ २१ ॥ नामें कळिकाळासी शिकें[21] । यमदूतां न घाला भीक । दों अक्षरीं लाविला धाक । यम पराङ्मुख कांपती ॥ २२ ॥ जो वाचे उच्चारी रामनाम । त्याचे पुरवावे सकळ कांम[22] । हरावे जन्ममरणश्रम । सहज सम करावें ॥ २३ ॥ नित्य जपे जो नाम । तो जाणावा मजचि सम । पुरुषांमाजी पुरुषोत्तम । सकळ नेम तेणें केले ॥ २४ ॥ रायासी पडली आशंका । पोटीं विवसी[23] आली देखा । कीं गर्भींच उठली ताटका । स्थितिया सुखा अंतरलों ॥ २५ ॥ येरी म्हणे रे सुमित्र नेटका । अझूनि कैंची रे ताटका । छेदूनियां बाणें एका । जनाच्या सुखा अवरोधी ॥ २६ ॥ राजा म्हणे न चले मंत्र । गुणिया[24] पाचारा विश्वामित्र । येरी म्हणे केउता गेला सुमित्र । आला विप्र यागासी[25] ॥ २७ ॥ वेगें बाण दे कां बहुवस । विंधूनि मारूं मारीचसुबाहूंस । आणि राक्षसां करूं नाश । हाहाहूहू करिताती ॥ २८ ॥ राजा करिताहे स्मरण । परशु-

१ मागील कथेचें. २ संसारी वृत्तीनें. ३ स्त्रिये. ४ सावध शाश्वत, अविनाशी. ५ ती. ६ परमेश्वराचा. ७ नाजुक, सुंदर स्त्रिये. ८ आश्रय. ९ शेवट. १० भयंकर. ११ बोलवा. १२ कोठें.

१३ गोष्ट. १४ वीर, योद्धे. १५ किल्ले. १६ कपाळ, डोकें. १७ ताज्या रक्ताच्या. १८ रानटी, क्रूर १९ पशू. बंध. २० सत्य. २१ शिक्षा. २२ इच्छा. २३ भूत. २४ ज्ञानी, मंत्री. २५ यज्ञाला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

राम अवतार जाण । त्याचेनि नांवें हरो दारुण । महद्भूत जाण संचार ॥ २९ ॥ येरी म्हणे ऐकें गा जामदग्न्या। धनुष्य भंगिलें स्यां प्राज्ञा । विचारीं ब्राह्मणा सर्वज्ञा । जाईं तूं अज्ञा तपासी ॥ ३० ॥ हिचिये देहीं संचाराचा ताठा । मुखीं सुटलासे फांटा[1] । कायसे डोहळे कटकटां । नेणों पोटा काय आलें ॥ ३१ ॥ वेगीं पाचारा वसिष्ठा । पंचाक्षरी तो अदटा[2] । परीक्षा करील तो श्रेष्ठा । सकळ वरिष्ठां तो गुरु ॥ ३२ ॥ येवोनि वसिष्ठ जंव पाहे । तंव ते राममय जाली आहे । म्हणे धन्य धन्य वो माये । वंदावे पाय इयेचे ॥ ३३ ॥ आदरें पाहूं गेला दृष्टी। चित्तचैतन्या पडली मिठी । हर्षें बाष्पें[3] दाटे कंठीं । पडिला सृष्टीं मूर्च्छित ॥ ३४ ॥ नेत्रीं अश्रूंचिया धारा । रोमां[4] फरकती स्वेदांकुरां[5] । अंग कांपतसे थरथरां । अवस्था मुनीश्वरा अनिवार ॥ ३५ ॥ राजा म्हणे कांहीं न चाले येथें । गुणिया ग्रासिला भूतें । कोण सोडवील यातें । म्हणोनि चित्तें व्याकुळ ॥ ३६ ॥ म्हणे मी कौसल्ये आवरूं । कीं वसिष्ठा सावध करूं । ऐसा जाजावे[6] नृपवरू । धांवा थोर पोकारी ॥ ३७ ॥ श्रावणवधाचे क्लेश । सोसिले स्यां असोसें[7] । पुढां तेचि बहुवस । वसिष्ठदोषहत्येचे ॥ ३८ ॥ अगा विर्धातिया[8] श्रेष्ठा । काय लिहिलें अदृष्टां[9] । भूतें ग्रासिलें वसिष्ठा । दोष मोठा मज घडला ॥ ३९ ॥ यज्ञ केला स्यां पवित्र । कुळीं पावेन सुपुत्र । तंव माझारीं हें चरित्र । कैंचें विचित्र वोढवलें ॥ ४० ॥ ती अवस्था[10] जिरवोनि पोटीं । वसिष्ठें उघडिली दृष्टी । राव झोंबला कंठीं । सृष्टि उफराटी पैं जाली ॥ ४१ ॥ स्वामी वसिष्ठा तुजही बाधा । हे तों गोष्टी न घडे कदा । पुत्रसुखाआड आपदा । भाग्यमंदां आम्हांसी ॥ ४२ ॥ वसिष्ठ म्हणे भाग्य श्रेष्ठ । पोटीं आलें वैकुंठपीठ । पुरुषोत्तम जाला रे प्रकट । दैवें उत्कट कौसल्या ॥ ४३ ॥ जें जें कांहीं हे वदली । ते जाण पां ब्रह्मबोली । ते ते ख्याती करील भली । सुदशा आली सूर्यवंशा ॥ ४४ ॥ मुनिजनांचें ध्येय ध्यान । कीं देवांचें देवतार्चन । जगाचा जगज्जीवन । राम निधान प्रत्यक्ष ॥ ४५ ॥ राया तुज नकळे सर्वथा वर्म । उदरा आलें परब्रह्म । धन्य धन्य आमचें कर्म । पुरोहितधर्म[11] ये वंशीं ॥ ४६ ॥ चरणीं उद्धरील शिळा । परणील जनकाची बाळा । आनंदवील लोकां सकळां । राम जिव्हाळा जीवाचा ॥ ४७ ॥ याचेनि नामें मुक्ति फुकटा । नगरी नेईल वैकुंठा । राम म्हणतां पापिष्ठा । गति उत्कृष्टा देईल ॥ ४८ ॥ धन्य धन्य सूर्यवंश । धन्य धन्य अयोध्येचा देश । धन्य धन्य कौसल्यागर्भवास । जगन्निवास पैं आला ॥ ४९ ॥ धन्य धन्य एथींचे जन । धन्य धन्य दशरथा तुझें मन । धन्य धन्य आमचे नयन[12] । राम निधान[13] देखती ॥ ५० ॥ ऐसें वसिष्ठ सांगतां । टक[14] पडिलें दशरथा । आठवू नाठवे चित्ता । पुत्रकथा ऐकोनि ॥ ५१ ॥ ऐकतां ज्याचेनि श्रवणें । पडलें तनमना भुलवणें । काय होईल त्याचेनि दर्शनें । तें सुख जाणे तो एक ॥ ५२ ॥ रामनामेंवीण कथा । जाल्या होत्या अनाथा । त्या केलिया सनाथा । कौसल्यासुताचेनि नामें ॥ ५३ ॥ ऐकतां कौसल्येचे डोहळे । दशरथासी सुखडोहळे । तेणें परमानंद उचंबळे । वंदी तत्काळें वसिष्ठासी ॥ ५४ ॥ एका जनार्दन विनवी संतां । ऐसी डोहळियांची वार्ता । ऐकतां उल्लास होय चित्ता । त्याची जन्मकथा अवधारा[15] ॥ ५५ ॥ एका जनार्दनीं परम । डोहळियांचा अति संभ्रम । अजन्मा जन्मेल श्रीराम । तो जन्मसंभ्रम अवधारा ॥ ५६ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे बालकांडे एकाकारटीकायां कौसल्यादोहदनिरूपणं नाम पंचमोऽध्यायः ॥ ५ ॥ ओंव्या ॥ ५६ ॥

अध्याय सहावा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ श्रीरामाचा जन्मप्रभाव[16] । अजन्मा जन्मेल रामराव । पाहूं आला सुरनरसमुदाव[17] । तो नवलाव[18] पाहूं आले ॥ १ ॥ प्रसूतिसमय[19] कौसल्येसी । तंव अयोध्येच्या चौपासी । विमानें दाटलीं आकाशीं । विबुधें[20] वेगेंसी

---

१ बडबड. २ वस्ताद, दांडगा. ३ गळा भरून आला. ४ लव, केश. ५ घामाचे बिंदु. ६ कष्ट पावला. ७ दुःसह. ८ ब्रह्मदेवा. ९ प्रारब्धा. १० लहर. ११ उपाध्येपणा.

१२ डोळे. १३ ठेवा. १४ ताटस्थ्य, तटस्थता. १५ ऐका. १६ जन्मकाळाची कीर्ति. १७ देवांचा आणि मनुष्यांचा समुदाय. १८ नवल, आश्चर्य. १९ बाळंतपणाची वेळ. २० देव.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

पैं आले ॥ २ ॥ सूर्यवंशा येईल रघुनाथ । यालागीं मध्यान्हीं आला आदित्य । लग्नीं साधिला अभि-जित[1] । जन्ममुहूर्त राघवा ॥ ३ ॥ वक्री[2] अतिचार[3] होऊन । वेगीं चालोनि आपण । केंद्रीं[4] आणि उच्चस्थान[5] । तेथें ग्रहगण स्वयें आले ॥ ४ ॥ शुद्ध-सुमनीं वसंत ऋतु । मधुमास[6] अति विख्यातु । शुक्ल पक्ष नवमीआंतु । जन्म रघुनाथु पावला ॥ ५ ॥ श्रीराम स्वयें अयोनी । तो स्पर्शला नाहीं जन्म-योनी । कौसल्या सन्मुख देखे नयनीं । आश्चर्य मनीं विस्मित ॥ ६ ॥ नाहीं लागली वेण[7] उद्भट । नाहीं दुखिनलें गर्भपोट । स्वयें राम जाला प्रकट । अति उद्भट[8] निजतेज ॥ ७ ॥ स्वप्रकाशें स्वलीला । निजतेजें अति सोज्वळा । घवघवित घनसांवळा । देखे डोळां कौसल्या ॥ ८ ॥ जेणें निजतेजविलासें । मीतूंपणाचा ठावचि पुसे । जग आत्मत्वें प्रकाशे । सोहाळा उल्लासे परमानंदें ॥ ९ ॥ ज्या तेजाचे निजनिर्धारें । अहं सोहं समूळ विरे । त्रैलोक्य ब्रह्मत्वें अवतरे । सर्वांगीं भरे स्वानंद ॥ १० ॥ ज्या तेजाचे निजनिष्ठे । विषयांचें विषयत्व आटे । बंधमोक्षाचें विरडें[9] फिटे । स्वयें कोंदाटे[10] परब्रह्म ॥ ११ ॥ ज्या तेजाचिये दीप्ती । रवि चंद्र हे स्वयें हरपती । तें तेज प्रकाशे ब्रह्मस्फूर्ती । निर्विषयस्थिती सुख कोंदे ॥ १२ ॥ ऐसें स्वाभाविक सहज । तेजाचें जें निजतेज । त्याची मूर्ति चतुर्भुज । देखतसे चोजें[11] कौसल्या ॥ १३ ॥ देखे ठकाराचें निजठाण । दों हातीं धनुष्यबाण । करावया राक्षसनिर्दळण[12] । ओढी काढोनि विन्यासें ॥ १४ ॥ करावया बंदि-मोचन । सुरनरग्रहां अभयदान । अभयहस्तें संपूर्ण विराजमान रघुवीर ॥ १५ ॥ करितां रामनाम-स्मरण । जीवांस करावया ब्रह्मपूर्ण । स्वयें कृपाळू आपण । वरदहस्तें पूर्ण आश्वासीत[13] ॥ १६ ॥ चरणां-तळीं आरक्त शोभा । लोपित बाळसूर्याची प्रभा । जगातें भुलवी जगदंबा । तीही चरणरंगा भूलली ॥ १७ ॥ माया अतर्क्य सर्वांसी । वेदशास्त्रीं प्रसिद्धी ऐसी । तीही भुलली चरणांसी । जाली दासी सर्वदा ॥ १८ ॥ सनकादिक अति विरक्त । तेही चरणारविंदीं[14] आसक्त[15] । भ्रमर[16] होवोनियां संतत । आमोद[17] घेत स्वानंदें ॥ १९ ॥ चरणांचिया सामुद्रिका । न वर्णवे वेदशेषादिकां । ध्वजवज्रांकुश ऊर्ध्व रेखा । पायीं पद्म देखा यवांकित ॥ २० ॥ चरणांतळीं आरक्त शोभा । वरवंटी[18] शुद्ध श्याम प्रभा । इंद्र-धनुष्य मिरवे नभा । ऐसी शोभा शोभत ॥ २१ ॥ उपासकां यंत्र पूर्ण । तैसी घोंटी पैं त्रिकोण । दोहीं पायीं नीळवर्ण । विराजमान शोभती ॥ २२ ॥ यंत्र-पीठीं वर्ण प्रबळा । तैशा पोटरिया सरळा । अक्षर-रूपें त्या निसळा[19] । अति निर्मळा सकुमारा ॥ २३ ॥ जानुचक्रें[20] अति वर्तुळ । जैसे आरसे निज निर्मळ । निजात्मरूप सकळ । तेथें तत्काळ प्रतिबिंब ॥ २४ ॥ कर्दळीस्तंभाचें[21] शुद्ध सार । त्याहूनि मांडिया सुकुमार । लागतां खुपती चंद्रकर[22] । ऐसें अरुवार[23] जघनद्वय[24] ॥ २५ ॥ श्रुति[25] आणि स्मृती । दोहीं पायीं वांकी गर्जती । अंदुवा[26] जाण निश्चिती । उपवेद स्थितिविभागें ॥ २६ ॥ वेदांत शुद्ध शास्त्र थोर । चरणीं गर्जती तोडर[27] । धन्य दैत्यांचे शरीरभार । चरणीं निरंतर रुळती तोडरीं ॥ २७ ॥ जगाचें गुह्य श्रीराम पूर्ण । त्या गुह्याचें गुह्य लक्षण । तेथें पावों शके कोण । तें सुख संपूर्ण जानकी भोगी ॥ २८ ॥ स्वयें अच्छिद्रत्वें[28] मनोहर । आणि पुढिलांचें आच्छादी छिद्र । तोचि कांसेसी पीतांबर । तेजें दुर्धर देदीप्यमान ॥ २९ ॥ पीतांबर श्रीरामकांसेसी । लागला निजभावेंसीं । तेणेंचि तो अनायासीं । गुह्यगुह्यासीं पावला ॥ ३० ॥ नाभी सखोल अति-शयेंसीं । सहस्राब्द[29] बुडतां ब्रह्मयासीं । ठावो[30] न निघे तयासी । होवोनि कासाविसी वरता आला ॥ ३१ ॥ तेव्हां श्रीरामें आश्वासोनी । बैसविला कमळासनीं । त्यासी चतुःश्लोकी उपदेशूनी ।

१ दिवसाचा आठवा मुहूर्त, म्हणजे मध्यान्हाच्या पूर्वी २४ मिनिटें आणि मध्यान्हानंतर २४ मिनिटें. २ मागच्या राशीस येऊन. ३ वेगवृद्धि होऊन. ४ कुंडलींतील १ लें, ४ थें, सातवें आणि दहावें स्थान केंद्र. ५ ग्रहांचीं उच्चस्थानें. जसें:- मेषेचा सूर्य, वृषभेचा चंद्र आणि मकरेचा मंगळ इत्यादि. ६ चैत्र महिना. ७ प्रसूतिकाळच्या वेदना. ८ मोठें. ९ फांस, कानी, गुळखी. १० भरतें. ११ कौतुक. १२ राक्षसांचा नाश. १३ धीर देत. १४ पदकमळीं. १५ तल्लीन, लुब्ध. १६ भुंगे. १७ सुवास, सुगंध. १८ सुंदर. १९ निखालस, निस्तूक. २० गुडघे. २१ केळीचें. २२ चंद्राचीं किरणें, चांदणें. २३ मऊ, नरम. २४ कटिप्रदेश, श्रोणी. २५ वेद. २६ सांखळ्या. २७ पायांतल्या घागऱ्या. २८ दोषरहितपणानें, निखोडपणें. २९ हजार वर्षे. ३० तळ, बुड.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

श्रेष्ठ करोनि स्थापिला ॥ ३२ ॥ तें श्रीरामाचें नाभिस्थान । बैसला देखे कमळासन[1] । त्याचे हृदयींचें महिमान । बोलतां मौन श्रुतिशास्त्रां[2] ॥ ३३ ॥ ज्याचे हृदयचिदाकाशीं । आकाश हरपे स्वकार्येंसीं । सिद्ध पावले त्या ठायासी । चिदंशासीं एकत्वें ॥ ३४ ॥ तेथें अनन्यत्वें मुनिजन । जडोनि जाले अभिन्न । तेंचि हृदयीं पदक पूर्ण । गुणेंवीण ल्यालासे ॥ ३५ ॥ सूक्ष्म माजाची जी अति थोरी । अभिमान होता केसरीं[3] । देखोनि[4] राममध्यकुसरी । लाजें रानभरी ते जाले ॥ ३६ ॥ पहावया श्रीराममध्यरचना । अभिमानत्याग पंचानना[5] । मेखळा अंगवूनि अंगवणा । मध्यभागीं जाणा चित्रत्वें जडले ॥ ३७ ॥ जो अपरंपार अनंत । त्यास अनुभवीं आकळित । तेवीं मेखळेमाजि[6] रघुनाथ । दिसे समस्त आकळिला ॥ ३८ ॥ जालिया निजवस्तुप्राप्ती । सकळ वृत्ति उपशमती[7] । तेवीं क्षुद्रघंटिकांची पंक्ति । जे मेखळेप्रती अधोमुख ॥ ३९ ॥ नाना मतांचा निजमेळा । त्याचि किंकिणी[8] ज्वाळमाळा । यापरी विचित्र लीळा । कटीं मेखळा शोभत ॥ ४० ॥ पीतांबराचे उभय भाग । दोन्ही भागीं मुक्तलग[9] । तेणें अंगाचा फिटला पांग । अंगींची अव्यंग[10] निजांगशोभा ॥ ४१ ॥ ज्याचें पाहतां वक्षस्थळ[11] । सबाह्य भरित समूळ । तेथें वसती विजनशील[12] । जन वन सकळ समसाम्य ॥ ४२ ॥ पाहतां ज्याचा कंबुकंठ[13] । वेदांची ते वाहती वाट । तेथोनियां होती प्रकट । स्वरवर्ण वरिष्ठ मर्यादा ॥ ४३ ॥ ॐकारामाजी वर्णव्यक्ति । तेवीं मुखामाजी दंतपंक्ति । चौकीचे चारी मिरवती । चिदानंददीप्ती सोलींव ॥ ४४ ॥ जीव शिव विभाग जनीं । तैसे देखा अधर[14] दोनी । ऐक्या आले श्रीरामवदनीं । मिनले[15] मिळणीं एकत्वें ॥ ४५ ॥ निवटोनियां[16] नास्तिक्य[17] । अवक्र[18] जें कां आस्तिक्य[19] । तेंचि श्रीरामाचें नासिक । शोभेचें बिकें[20] शोभवी ॥ ४६ ॥ चालता जितुका वायु जाण । तोचि श्रीरामाचा मुख्य प्राण । तेंचि वेदाचें जन्मस्थान । त्रिकांड पूर्ण प्रतापें ॥ ४७ ॥ चैतन्याचें[21] देखणेपण । त्याच्या डोळां आलें शरण । देखणें देखे देखणा होऊन । देखणेपण सबाह्य ॥ ४८ ॥ स्वानंदें निडारली[22] दृष्टी । चिन्मात्रैक[23] देखे सृष्टी । देखणेपणा आणिली पुष्टी । दृश्य पाठी पोटीं द्रष्टाच देखे ॥ ४९ ॥ दीपामागें पडसाई[24] । तैशा डोळयांमागें भोंवई । व्यंकटी[25] सांडोनिया पाहीं । श्रीरामदेहीं विनटल्या ॥ ५० ॥ जयाची विक्षेपभृकुटी[26] । रची ब्रह्मांडांच्या कोटी । तेथेंचि राहे व्यंकटी । अगाध दृष्टी श्रीरामाची ॥ ५१ ॥ पूर्व उत्तर मीमांसा पूर्ण । तेंचि मुख्य श्रीरामश्रवण[27] । श्रवणें श्रवणाचें भूषण । जें निर्जमंडण[28] वेदांता ॥ ५२ ॥ कुंडलें म्हणती साकार । एक म्हणती मकराकार । परी ते सत्यत्वें निर्विकार । श्रवणें विकार नासती ॥ ५३ ॥ श्रवणासी संपूर्ण । सावधानता निजभूषण । सावधानतेवीण जाण । भूषण तें दूषण श्रवणासी ॥ ५४ ॥ श्रीरामाचें निजश्रवण । वेदशास्त्रांसी निज भूषण । तेथें रिघों[29] न शके दूषण । पावना पावन श्रीराम ॥ ५५ ॥ जैसें अधिष्ठान[30] निर्मळ । तैसें देखा विशाळ भाळ[31] । ज्याच्या कपाळाची वेळ । सुर सकळ वांछित ॥ ५६ ॥ उगाळोनि अहंपण । सोहं काढिलें शुद्ध चंदन । तेंही केलें रामार्पण । चंदनार्चन लल्लाटीं ॥ ५७ ॥ आधींच तो घनसांवळा । वरी टिळक रेखिला पिंवळा । शोभा शोभली कपाळा । सुरां सकळां स्वानंद ॥ ५८ ॥ सच्चिदानंद एकमेळीं । तैसी लल्लाटींची त्रिगुण त्रिवळी । बोधचंदनाचे परिमळीं । पूजिला निर्मळीं निजसज्जनीं ॥ ५९ ॥ वानूं[32] मुकटाची महिमा । कैंची उपमा निरुपमा । मुकुटमणींची गरिमा[33] । नेणे ब्रह्मा आकळूं तो ॥ ६० ॥ राम मिरवी लेवूनि लेणें । तो श्रीराम लेणियांचें[34] लेणें । जेवीं सोनेंसरे सोनटकेपणें । कीं सोनटका सोनेपणें सर्वत्र सरे ॥ ६१ ॥ लेणें मिरवे सगुणपण । निर्गुण भूषणाही भूषण । मुळीं निर्गुणें शोभे सगुण । जेवीं लेणें सुवर्ण एकत्वें ॥ ६२ ॥ ऐसिया श्रीरामाच्या पोटीं ।

१ ब्रह्मदेव. २ वेदशास्त्रांला. ३ सिंहाला. ४ रामाच्या कमरेचें कौशल्य. ५ सिंहाला. ६ कमरपट्ट्यांत, करगोट्यांत. ७ नाहींशा होतात, शांत होतात. ८ लहान लहान घंटा. ९ मोत्यांचे घोंस—सर. १० दोषरहित. ११ छाती. १२ अरण्यांत रहाणारे, तपस्वी. १३ शंखासारखा गळा. १४ ओंठ. १५ मिळाले. १६ नाहींसें करून. १७ अनीश्वरत्व. १८ सरळ. १९ ईश्वराच्या ठायीं श्रद्धा. २० तेज, बळ. २१ आत्म्याचें. २२ परिपक्व झाली. २३ शुद्ध ज्ञानरूप. २४ पडछाया. २५ वांकडेपणा. २६ दृष्टीचें फेंकणें. २७ रामाचे कान. २८ निजभूषण. २९ शिरूं. ३० ज्यावर कोणतीही वस्तु रहाते तें, आश्रय. ३१ कपाळ. ३२ वर्णन करूं. ३३ मोठेपणा. ३४ दागिन्यांचें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

रामरूप देखे सृष्टी । सृष्टी सबाह्य संपुटीं । देखे सृष्टी श्रीरामू ॥ ६३ ॥ ऐसिया देखोनि श्रीरामा । कौसल्येसी आला प्रेमा । त्या सुखाच्या सुखसंभ्रमा । देहधर्मा विसरली ॥ ६४ ॥ अंग सर्वांगीं रोमांचित । स्वेद[1]बिंदू स्वरवीत । चित्त चैतन्यीं विरमत । नेत्रीं स्र[2]वत आनंदाश्रु ॥ ६५ ॥ स्वानंद न समाये पोटीं । सुखोर्मि बाष्प दाटे कंठीं । उन्मीलित जाली दृष्टी । पडली सृष्टीं मूर्च्छित ॥ ६६ ॥ जेंवि केळीतें झगटे पवन । तैसें शरीर कंपायमान । वाचेसीं पडिलें महामौन । देहाभिमान विसरली ॥ ६७ ॥ सत्त्वगुणाचें भरितें भरे । तें आपोआप ओ[3]सरे । होवोनि सावध चमत्कारें । रामनिर्धारें निर्धारीं ॥ ६८ ॥ येणें स्वरूपें रघुनाथा । तुज येथें प्रगट होतां । माझा पुत्र तूं हे कथा । लोकीं सर्वथा मानेना ॥ ६९ ॥ होईन कौसल्येचा नंदन । तें आठवीं पूर्ववचन । ऐकोनि हांसे रघुनंदन । चमत्कारें पूर्ण तुष्टला ॥ ७० ॥ वचन ऐकोनि तत्काळ । श्रीराम स्वयें जाला बाळ । बालार्कप्रभा सुनीळ । सुखकल्लोळ जननयनां ॥ ७१ ॥ भक्त माझे ऐश्वर्यें वोसंडी । परी चरणामृतीं पडे उडी । तेथें कैसी आहे गोडी । ते आवडी चाखों गेला ॥ ७२ ॥ चरणकमळींचा अंगु[4]ष्ठ । करकमळीं धरोनि स्पष्ट । मुखकमळीं करितां प्रविष्ट । गोडी उद्भट लागली ॥ ७३ ॥ आपुली आपणियां गोडी । स्वभावें फा[5]वली धड[6]फुडी । तोंडींचा अंगुष्ठ न काढी । चोखी आवडी चुरचुरां ॥ ७४ ॥ माझ्या स्वरूपाची गोडी । भक्तीं भोगिली धड[6]फुडी । चरणामृतीं सुखाच्या कोडी । चोखी आवडी अंगुष्ठ ॥ ७५ ॥ तेंचि लक्षण बालकाचे ठायीं । अद्यापि भासतसे पाहीं । निजांगुष्ठ मुखाचे ठायीं । चोखी लवलाहीं स्वानंदें ॥ ७६ ॥ यापरी रघुनंदना । देखोनि बाळ[7]भावना । कौसल्येसी आला पान्हा । जीवीं निंवलोंणा[8] करूं पाहे ॥ ७७ ॥ सुरीं दुंदुभी त्राहाटिल्या[9] भेरी । देव गर्जती जयजयकारीं । वर्षती सुमनांच्या[10] हारी । चराचरीं आल्हाद ॥ ७८ ॥ आनंदाचे लवडसवडीं[11] । नारदाची पडे उडी । सनकादिकांची आडोडी[12] । स्वानंदें तांतडी नाचती ॥ ७९ ॥ सिद्ध आले श्रेष्ठश्रेष्ठ । ऋषि आले झडझडाट । वेद होवोनियां भा[13]ट । अति उद्भट वानिती ॥ ८० ॥ योगी संन्यासी घनदाट । पुण्यकाळाचे दाटले थाट । तीर्थासी तेथें न फुटे वाट । तिहीं शरयूतट वसविलें ॥ ८१ ॥ अयोध्येच्या हा[14]टबिदी । स्वयें झाडिती महासिद्धी । रंगमा[15]ळा घालिती सिद्धी । गुढिया समाधी स्वानंदें उभविल्या ॥ ८२ ॥ महासामें सुरस गाणीं । चारी मुक्ति त्या नाचणी । साही शास्त्रांची पेख[16]णी । श[17]ब्दश्रेणी स्वपक्षें ॥ ८३ ॥ धर्माची पहिली पहांट । स्वानंदाची मोकळी वाट । सुखाची पिकली पेंठ । समयो श्रेष्ठ साधूनी ॥ ८४ ॥ कौसल्येसी पुत्र जाला । स्वधर्में वा[18]धावा आणिला । राजा हर्षें निर्भर जाहला । वोसंडला[19] स्वानंदें ॥ ८५ ॥ त्र्यां[20]हाटिल्या निशा[21]ण भेरी[22] । गगन गर्जे मंगळतुरीं । त्रैलोक्य गर्जे जयजयकारीं । घरोघरीं उल्लासु ॥ ८६ ॥ मंगळजळीं निजनिवाडें । राजा स्नान करी वाडेंकोडें । तो शिंतोडा लागे जिकडे जिकडे । पूर्वज तिकडे सुखरूप होती ॥ ८७ ॥ पूर्वज स्वयें सुखी होती । हेंचि आश्चर्य सांगों किती । तेणें जळें त्रिजगती । उल्लासती स्वानंदें ॥ ८८ ॥ पुत्रानंदें उदार दृष्टी । सवत्स गो[23]धनांच्या थाटी । अश्व रथ गज धन कोटी । वांटितां सृष्टी मागता सरे ॥ ८९ ॥ जन्म पावला रघुनाथ । उदार दानें दे दशरथ । मागते मागणें हरपत । होवोनि कृतार्थ मागणें विसरे ॥ ९० ॥ दशरथ म्हणे ये समयीं । जो जें मागेल तें देईन पाहीं । तंव मागतेचि जाले नाहीं । याचकां देहीं संतृप्ति ॥ ९१ ॥ ऐसें श्रीरामपुत्रमुख । देखतां रायासी परम हरिख । द्विज निर्भर केले देख । तृप्त या[24]चक अति दानें ॥ ९२ ॥ श्रीरामाचें जातक । दशरथ करी अलोलिक । तंव द्वितीय पुत्राचा हरिख । सद्भावें देख आणिली गुढी ॥ ९३ ॥ सुमित्रा देखे स्वप्न । मज झालें पुत्ररत्न । जागृतीं पाहे सावधान । तंव पुत्रनिधान सेजेसीं ॥ ९४ ॥ क्षीरसागरींहूनि निघाला । राम कौसल्यागर्भा आला । पाठीचा शेष पाठीं पावला । पाठीचा झाला सुमित्र ॥ ९५ ॥

१ घाम. २ वाहूं लागले. ३ उतरलें. ४ आंगठा. ५ प्राप्त झाली. ६ खरी. ७ बाळस्वरूप. ८ कुरवंडी. ९ वाजविल्या. १० फुलांच्या. ११ गडबडीनें. १२ धांदल. १३ स्तुतिपाठक. १४ बाजार आणि रस्ते. १५ रांगोळ्या. १६ पाहणें. १७ शब्दसमुदाय. १८ बातमी, निरोप. १९ भरला, परिपूर्ण झाला. २० वाजविल्या. २१ एक प्रकारचें वाद्य. २२ नगारे. २३ गाईचे समुदाय. २४ भिकारी.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

श्रीरामासी सुष्ठु मैत्री। चालवील निजनिर्धारीं। सुमित्र म्हणणें यापरी। सुमित्राउदरीं जन्मला ॥ ९६॥ कौसल्येसीं सुष्ठु मित्रा। चालवी यालागीं सुमित्रा। हाही आला तिच्या उदरा। सुमित्र खरा येणेंही ॥ ९७ ॥ लक्ष्मण शेषावतार। अयोनि जन्मला निर्धार। तोही नातळे योनिद्वार। जन्मव्यवहार स्वलीला ॥ ९८ ॥ तें देखोनि पुत्रवदन। अष्टांगीं पावली समाधान। मन जालें आनंदघन। सुमित्रा संपूर्ण सुखरूप जाली ॥ ९९ ॥ यावरी आनंद चढोवढीं। हर्षाचिया लवडसवडीं। सद्भावें उभविली गुढी। रायासी आवडी पुत्रसुख सांगे ॥ १०० ॥ द्वितीय पुत्राचा प्रभाव। ऐकोनि सुखें सुखावे राव। घेवोनियां ऋषिसमुदाव। जातकार्था पाहों स्वानंदें आला ॥ १ ॥ फोडिलीं धनाचीं भांडारें। मुक्त केलीं धान्यकोठारें। त्यागिलीं गाईचीं खिल्लारें। लुंलु दानभारें मूर्च्छित जालीं ॥ २ ॥ याचत्रा[३] बुडाली दानसमुद्रीं। दरिद्र बुडालें दातृत्वपुरीं। मागत्यांचा दुष्काळ नगरीं। घरोघरीं आनंद ॥ ३ ॥ कैकेयी पुत्रवंती दो पुत्रीं। तिची प्रसूतीची थोरी। अतिशयेंसीं नवलपरी। निजनिर्धारीं अवधारा ॥ ४ ॥ कैकेयीसीं लागली सुषुप्ती। पुत्र जन्मले कैशा रीती। त्या पुत्रजन्माची ख्याती। तिसीं ते स्थिती अलक्ष ॥५॥ एक श्रीरामाचा भाग। एक लक्ष्मणाचा विभाग। दोन्ही लीलाविग्रही सांग। योनीचें अंग नातळती ॥ ६ ॥ सख्या प्रबोधिती कैकेयीसी। दोघे पुत्र जन्मले कुशी। तुझी झोंप पेसी कैसी। पुत्रसुखासी अनोळख ॥ ७ ॥ कैकेयी पाहे पुत्रमुख। हृदयीं वोसंडेनां हरिख। सापत्नभावाचें सुख। लोकदृष्टी देख पावती जाली ॥ ८ ॥ पूर्ण कळवळा नाहीं मना। स्वानंदस्नेह नयेचि पान्हा। दाईच्यापरी स्तनपाना। लाविले स्तना पुत्र दोनी ॥ ९ ॥ स्वपिंडगर्भ तिचा नव्हे। परभाग गर्भ सापत्नमाये। तिचे स्तनपानें पाहें। स्वभावें दायी हे जाली ॥ ११० ॥ पुढें सहजचि सापत्न। पुत्र नायकती तिचें वचन। पुत्रांचें निजसमाधान। कैकेयी जाण पावेना ॥ ११ ॥ कैकेयीची गर्भस्थिती। पुत्रद्वयाची उत्पत्ती। यापरि जाली प्रसूती। वाधावा रायाप्रति धाडिला तिणें ॥ १२ ॥ स्नेहाचिया लवडसवडी। सकामकामाचिया आवडी। पुत्रद्वयाची गर्वगोडी। कैकेयी धाडी रायापासीं ॥ १३ ॥ पुत्रद्वयाचें प्रिय जन्म। तेणें रायासी सुख परम। उदारहस्तें करोनि धर्म। जातककर्म तेणें केलें ॥ १४ ॥ जैंवि कां चारी पुरुषार्थ। एके काळें घरा येत। तैंवि चारी पुत्र दशरथ। जाले प्राप्त समकाळें ॥ १५ ॥ चहूं मुक्तींचें सुख एक। तेंचि चतुर्विध होवोनि देख। दशरथासी द्यावया सुख। चारी अलोलिक पुत्र जन्मले ॥ १६ ॥ सच्चिदानंद तिन्ही जाण। तिहींचें प्रकाशक वस्तु चिद्घन। तेंवि चारी पुत्र परिपूर्ण। पावला आपण स्वयें राव ॥ १७ ॥ प्रणव तेचि वेद चारी। तेवीं एक वस्तु चौं प्रकारीं। पुत्रत्वें दशरथाचे घरीं। सुखकारी सर्वांसीं ॥ १८ ॥ एक सुख नित्य निश्चितीं। त्यासी बहुविध चतुष्टय म्हणती। तेचि हे चारी मूर्ती। पुत्रसुखार्थी दशरथ ॥ १९ ॥ जो सकळ जगाचा निजविश्राम। सकळ सुखाचा आराम। जो निष्कामाचा पूर्ण काम। तो श्रीराम दशरथात्मज ॥ १२० ॥ सकळ लक्षां आलक्षण। जो सकळ लक्षणीं संपूर्ण। तोचि तो लक्ष्मण जाण। सुमित्रानंदन दशरथात्मज ॥ २१ ॥ ज्याचेनि सकळही पदार्थ। सदासर्वदा संपूर्ण भरित। ते वस्तूसी म्हणती भरत। कैकेयीसुत दशरथात्मज ॥ २२ ॥ मनुष्य शत्रूचें हनन। करी तो अल्प शत्रुघ्न। भवशत्रुचें निर्दळण। करी तो शत्रुघ्न दशरथात्मज ॥ २३ ॥ कनिष्ठ कैकेयीचे नंदन। त्यांचें नाम भरत शत्रुघ्न। वसिष्ठें केलें नामाभिधान। चौघे जण दाशरथि ॥ २४ ॥ श्रीवसिष्ठें आवश्यक। केलें चौघांचें जातक। जन्मपत्रिका केली देख। नाम निर्दोष जगद्वंद्य ॥ २५ ॥ यापरि श्रीराम आणि लक्ष्मण। भरत आणि शत्रुघ्न। चौघे दशरथनंदन। नामाभिधान जगद्वंद्य ॥ २६ ॥ यापरी श्रीरामाचें जन्म। सांगितला अनुक्रम। निरूपिलें जन्मकर्म। चरित्रानुक्रम अवधारा ॥ २७ ॥ येथोनि श्रीरामाचें चरित्र। अगाध अनुपम्य पवित्र। धन्य वाल्मीकाचें वक्त्र[१२]। कथा पवित्र शतकोटी ॥ २८ ॥ एका

१ उत्तम. २ लोभी. ३ याचना. ४ आपल्या इच्छामात्रानें जन्म घेणारे. ५ जाग्या करतात. ६ मावेना, ७ सावत्र आई. ८ निरोप. ९ धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष. १० ॐकार. ११ संसाररूपी शत्रूचें. १२ मुख, तोंड,

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

जनार्दना शरण । पूर्ण जालें जन्मकथन । पुढें स्वानंदनिरूपण । श्रोतीं अवधान मज द्यावें ॥१२९॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे बालकांडे एकाकारटीकायां श्रीरामजन्मप्रसंगनिरूपणं नाम षष्ठोऽध्यायः ॥ ६ ॥ ओंव्या ॥ १२९ ॥

अध्याय सातवा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ धन्य रामायण सृष्टीं । धन्य वाल्मीकाची वाग्वृष्टी । अक्षरीं [1]अक्षरपरिपाटी । दोष कोट्यनुकोटी नासती ॥१॥ नासती महापातकें । नासती [2]द्वंद्वें दुःखें । रामकथा ऐकतां हरिखें । सुख महासुखें थोरावे ॥ २ ॥ येथोनि श्रीरामचरित्र । अपवित्रा करी अति पवित्र । कथाकौतुक अति विचित्र । श्रोतीं सादर परिसावें ॥३॥ श्रीराम जन्मला अयोध्यापुरीं । तंव वीज पडे लंकेवरी । [3]भूस्फोटन नगरद्वारीं । भूकंप नगरीं त्रिकुटेंसीं ॥ ४ ॥ रावण जंव [4]भद्रीं चढे । तंव मुकुट पायरीवरी पडे । वायुघातें छत्र मोडे । सभेचे हुडे [5]खचोनि पडती ॥ ५ ॥ कुंभकर्णाच्या घरावरी । दिवाभीत घूं घूं करी । इंद्रजित आरशाभीतरीं । देखे अशिर शरीर ॥ ६ ॥ मंदोदरीची गळसरी । तुटोनि पडे अग्निभीतरीं । तीतें काढी जंव सुंदरी । तंव भस्म करी हुताशन ॥ ७ ॥ ऐसा विघ्नांचा [6]आवर्त । तेणें [7]रांणिवसां आकांत । येणें राक्षसकुळा घात । हाहाभूत निशाचर ॥ ८ ॥ रावण सांगे भयंकरीं । दृढपणें असा रे नगरीं । येथोनि कोणीं न जावें दूरी । अहोरात्रीं सावधान ॥ ९ ॥ प्रधानादिक सभानायक । तिहीं थोर घेतला धाक । रावणा लागली धुकधुक । अरिष्ट [8]आत्यंतिक देखोनी ॥ १० ॥ येरीकडे अयोध्येसीं जाण । श्रीवसिष्ठ आपण । चौघां कुमारांचें विधान । संस्कारपूर्ण करविता जाला ॥ ११ ॥ जातकर्म [9]नामाभिधान । कटिसूत्र अन्नप्राशन । चौलकर्म वायनदान । केलें संपूर्ण विधियुक्त ॥ १२ ॥ ऐश्वर्याचे [10]आविष्कारें । व्रतबंधाचेनि गजरें । दानें सन्मानें सत्पात्र । सुखी नृपवरें यापरी केले ॥ १३ ॥ रामाचा व्रतबंध । सुखी केले [11]विप्रवृंद । स्वानंदें निघालें दोंद । डोलत परमानंद पावले ॥ १४ ॥ श्रीरामाचें व्रतबंधन । सुखी केले [12]अकिंचन । [13]वणवण निमाली पूर्ण । [14]मागतेपण मुक्त जालें ॥ १५ ॥ जालिया व्रतबंधन । वसिष्ठापासीं चौघे जण । आरंभिलें वेदाध्ययन । शास्त्रव्याख्यान वेदांत ॥ १६ ॥ श्रीराम वेदाचें जन्मस्थान । त्यासी संस्कारमंत्रें जाण । पठन जालें शास्त्र संपूर्ण । अगाधपण [15]प्रज्ञेचें ॥१७॥ यापरी रघुनाथासी जाण । जालीं षोडश वर्षें संपूर्ण । कराया [16]तीर्थाभिगमन । रघुनंदन [17]उद्यत ॥ १८ ॥ प्रार्थूनि वसिष्ठातें । त्या सद्गुरूच्या अनुमतें । आज्ञा मागोनि दशरथातें । श्रीराम तीर्थातें निघाला ॥ १९ ॥ मग पाहोनियां सुदिन । स्वस्तिवादु पुण्याहवाचन । सवें देवोनियां सैन्य । सुबुद्धिप्रधानसमवेत ॥ २० ॥ दिधलीं अक्षयी भांडारें । सवत्स गाईचीं खिल्लारें । नाना प्रकारचीं वस्त्रें । तीर्थीं रघुवीरें वांटावया ॥ २१ ॥ [18]सरें [19]सरिता सिंधुसंगम । पुण्यभूमि पुण्याश्रम । केले प्रयागादि पंचग्राम । मार्ग दुर्गम हिमालया ॥ २२ ॥ बदरीमार्गीं पंचप्रयाग । वेदप्रयाग शिवप्रयाग । कर्णप्रयाग ब्रह्मप्रयाग । अतिगुप्तप्रयाग पांचवा ॥ २३ ॥ शरयू गंगा सुवर्णभद्रा तिन्ही । हे पूर्व प्रयाग त्रिवेणी । कार्तिक मासीं कृष्णा वेणी । मुख्य त्रिवेणी माघस्नान ॥ २४ ॥ वनें तपोवनें [20]शैलशिखरें । परम पावन जें जें [21]उखरें । तीर्थादि तिन्हीं पुष्करें । तीर्थक्षेत्रें विधियुक्त ॥ २५ ॥ नैमिषारण्य धर्मारण्य । चंपकारण्य ब्रह्मारण्य । महापंथाचें वेदारण्य । ऋषि वेदज्ञ जेथें असती ॥ २६ ॥ मंदराद्रि आणि विंध्याद्रि । मूळपीठींचा सह्याद्रि । गंगातीरींचा ब्रह्माद्रि । लोकोत्तरीं अति श्रेष्ठ ॥ २७ ॥ प्राची सरस्वती बिंदुसर । धर्मालय कुरुक्षेत्र । ज्वाळामुखी ज्वाळा दुर्धर । अति पवित्र तीर्थोदकीं ॥ २८ ॥ केलें तिन्हीं गयेंचें दर्शन । धर्मस्तंभाचें स्पर्शन । ब्रह्मयोनीचें अवलोकन । गायत्रीचें ध्यान संध्यावटीं ॥ २९ ॥ ब्रह्मावर्त गोमतीतीर ।

---

१ अक्षरांची रचना. २ सुख दुःख, हर्ष शोक, शीत उष्ण इत्यादि द्वंद्वें. ३ पृथ्वीचें फाटणें–विभागणें. ४ सिंहासनावर. ५ घुबड. ६ विघ्नांचा भोंवरा. ७ अंतःपुरांत, जनानखान्यांत. ८ अपरिहार्य. ९ नांवें ठेवणें. १० बळानें, जोरानें.

११ ब्राह्मणसमुदाय. १२ अतिदरिद्री, भिकारी. १३ दगदग. १४ याचना. १५ बुद्धीचें. १६ तीर्थयात्रा. १७ तयार. १८ सरोवरें. १९ नद्या. २० पर्वतांचीं शिखरें. २१ भरड, नापीक जमीन, माळजमीन.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

हिरण्यासहित सागर । सागरावर्तीं शंखोद्धार । जेथें वेदोद्धार करी हरि ॥ ३० ॥ सप्तपुरी तीर्थमार्गें । केलीं बाराही ज्योतिर्लिंगें । प्रभासेंसीं सोमनाथयोगें । पंचकृष्णाप्रयोगें मूळमाधव ॥ ३१ ॥ द्वारकेचा कल्याणकृष्ण । दुजा शंखनारायण । तिजा पिंडारकीं काळकृष्ण । चौथा तो जाण गडदामोदर ॥ ३२ ॥ मूळचें निज मूळस्थान । मूळमाधव पांचवा कृष्ण । हें तंव यात्रामंडळगमन । पुण्य पावन सर्वांसी ॥ ३३ ॥ गंडकी यमुना सुरसरी । तापी नर्मदा मत्स्योदरी । कृष्णा भीमा गोदावरी । दुरितें[1] दुरी ज्यांचेनी ॥ ३४ ॥ मत्स्यतीर्थ पक्षितीर्थ । शिवकांची विष्णुकांचीयुक्त । त्रिकोण हस्ति तीर्थभूत । तीर्थ विख्यात कुंभकोण ॥ ३५ ॥ प्रतीची कावेरी ताम्रपर्णी । कृतमाला पयस्विनी । या पंचनद्यांच्या स्नानीं । भगवद्भजनीं दृढभाव ॥ ३६ ॥ कन्याकुमारी जनार्दन । शेषशायी अनंतशयन । उभय कावेरी श्रीरंगस्थान । परम पावन अगस्त्याश्रम ॥ ३७ ॥ दर्शनें मुक्ति चिदंबरीं पाहीं । जन्ममुक्ति कमलालयीं । मरणमुक्ति काशीच्या ठायीं । स्मरणें मुक्ति देई अरुणाचळ ॥ ३८ ॥ श्रीराम तीर्थां तीर्थभूत । मोक्षा मुक्ति श्रीरघुनाथ । तोही तीर्थयात्रा करित । लोकसंग्रहार्थ[2] स्वलीला ॥ ३९ ॥ जे तीर्थीं जें विधान । जे तीर्थीं जें स्नान । तैसें करोनि दान सन्मान । सुखी जन श्रीरामें केले ॥ ४० ॥ श्रीरामें सुखी केले महाऋषी । रामें सुखी केले संन्यासी । रामें सुखी केले तीर्थवासी । सुखी वनवासी श्रीरामें केले ॥ ४१ ॥ रामें सुखी केले त्यागी । रामें सुखी केले भोगी । रामें सुखी केले विरागी । सुख संभोगी श्रीराम ॥ ४२ ॥ रामें सुखी केले ब्रह्मचारी । रामें सुखी केले व्रतधारी । रामें सुखी केल्या नरनारी । राम सुखकारी सर्वांसी ॥ ४३ ॥ रामें सुखी केले तपी । रामें सुखी केले जपी । रामें सुखी केले निर्विकल्पी । सुखरूप श्रीराम ॥ ४४ ॥ रामें सुखी केले दिगंबर[3] । रामें सुखी केले वल्कलधर[4] । रामें सुखी केले सदाचार । सुख साचार श्रीराम ॥ ४५ ॥ रामें सुखी केले अयाचित[5] । रामें सुखी केले अति विरक्त[6] । रामें सुखी केले धर्मासक्त । राम समस्तां सुखकारी ॥ ४६ ॥ रामें सुखी केले अकिंचन[7] । रामें सुखी केले अति दीन । रामें सुखी केले अज्ञान । राम सकळसुजनसुखकारी ॥ ४७ ॥ रामें सुखी केले कार्पडी[8] । रामें सुखी केलीं बापडीं । रामें सुखी केलीं सावंडीं[9] । सुखाची कुळवाडी श्रीराम ॥ ४८ ॥ रामें सुखी केले सेवक । रामें सुखी केले केवळ रंक । रामें सुखी केले लोक । जे भावें सन्मुख भेटों आले ॥ ४९ ॥ रामें सुखी केले विवेकी । रामें सुखी केले एकाकी । रामें सुखी केले त्रैलोक्यीं । यात्रानुलोकीं स्वलीला ॥ ५० ॥ यात्रा विधियुक्तप्रकारें । स्वलीला रघुवीरें । नाना जनां दानप्रकारें । चहूं समुद्रा सुखी केले ॥ ५१ ॥ द्वारका पश्चिमसमुद्र । जगन्नाथ पूर्वसमुद्र । मानससरोवर उत्तर समुद्र । दक्षिणसमुद्र श्रीसेतुबंध ॥ ५२ ॥ यापरि समुद्रवलयांकित[10] । तीर्थें करोनियां समस्त । अयोध्ये आला रघुनाथ । सुमुहूर्तें स्वानंदें ॥ ५३ ॥ नगर शृंगारिलें नृपवरें । गुढिया तोरणें मखरें । गगन गर्जे जयजयकारें । आणिला गजरें रघुनाथ ॥ ५४ ॥ भाट गर्जती गहिरावचनीं[11] । पुढें नाचती नाचणी[12] । कीर्ति वर्णिजे बंदिजनीं[13] । अयोध्याभुवनीं उल्लास ॥ ५५ ॥ पदोपदीं ओंवाळणी । पदोपदीं सुवासिनी । पदोपदीं अक्षयवाणी[14] । मंत्रध्वनी स्वरयुक्त ॥ ५६ ॥ वसिष्ठासी घातलें लोटांगण । दशरथा साष्टांग नमन । चौघांसी दिधलें आलिंगन । परम समाधान रायासी ॥ ५७ ॥ अभिवंदिल्या तिघी माता । हर्ष दशरथाचे चित्ता । उत्संगीं[15] बैसविलें रघुनाथा । सुख समस्तां अपार ॥ ५८ ॥ चौघां करविलें मंगळस्नान । दिव्यांबरें[16] परिधान[17] । दिव्यालंकार चंदन । सुमनीं सुमन शृंगारिलें ॥ ५९ ॥ वसिष्ठवचन प्रमाण । केलें व्रतविसर्जन । द्विजां दिधलें भोजन । दानसन्मानसमारंभें ॥ ६० ॥ यापरी तीर्थाभिगमन[18] । करूनि आला रघुनंदन । येथोनि वैराग्य पूर्ण । श्रीराम आपण विन्यासें[19]

---

१ पापें. २ लोकांची कर्माचे ठायीं प्रवृत्ति होण्याकरितां, लोकाचाराकरितां. ३ नग्न. ४ वल्कलें (झाडांच्या साली) धारण करणारे. ५ कोणापाशीं न मागतां ईश्वरेच्छेनें जें मिळेल त्यावर चरितार्थ चालविणारे. ६ निरिच्छ, ७ अति दरिद्री, ८ तीर्थयात्रा करणारे. ९ गरीब, दुबळीं. १० समुद्रानें वेष्टिलेल्या सर्व पृथ्वीवरील. ११ गंभीर वचनानें. १२ कलावंतिणी. १३ भाटांनीं. १४ आरत्या. १५ मांडीवर. १६ उत्तम वस्त्रें. १७ नेसणें. १८ तीर्थयात्रा, १९ आचरण करून, कर्मेंकरून,

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

दावी ॥ ६१ ॥ येथोनि कथा मनोहर । गुह्य ज्ञानें ज्ञानगंभीर । स्वयें निरूपील रघुवीर । वैराग्य-विचार मुमुक्षुहेतु ॥ ६२ ॥ मुमुक्षु तारावया संसार । दावी वैराग्य निजसार । धर्मलक्षणीं अवतार । सत्य साचार श्रीराम ॥ ६३ ॥ एका जनार्दनीं एक । कवीश्वराचें अति रंक । त्या मूर्खाचेनि मुखें देख । कथा अलोलिक श्रीराम वदवी ॥ ६४ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे बाल-कांडे एकाकारटीकायां श्रीरामतीर्थयात्रागमनं नाम सप्तमोऽध्यायः ॥ ७ ॥ ओंव्या ॥ ६४ ॥

अध्याय आठवा

॥ श्रीरामचंद्राय नमः ॥ श्रीराम सच्चिदानंद-घन । तोही वैराग्यलक्षण । लोकलक्षणार्थ दावी आपण । दीन जन तारावया ॥ १ ॥ सकळ वैरा-ग्याचें फळ । स्वयें श्रीराम केवळ । तोही वैराग्याचें शीळ । दावी प्रबळ लोकोपकारा ॥ २ ॥ तीर्थाहून आलिया रघुनाथ । नावडे राज्य राज्यार्थ । नावडे लोक लोकार्थ । विषयस्वार्थ नावडे ॥ ३ ॥ नावडे इंद्रियांचा संग । नावडे इंद्रियांचा भोग । नावडे इंद्रियप्रयोग । अति विराग अनुतापी ॥ ४ ॥ नावडे प्रवृत्तिक्रियाकर्म । नावडे देहादि देहधर्म । नावडे विलाससंभ्रम । वैराग्य परम अनुतापी ॥५॥ नावडे स्त्रियांची भेटी । नावडे स्त्रियांसीं गोष्टी । नावडे स्त्रिया पाहों दृष्टी । वैराग्य पोटीं विषयांचें ॥ ६ ॥ नावडे शाब्दिक चावट । नावडे चातुर्य वटवट । नावडे अतिवाद खटपट । मौननिष्ठ अनुतापी ॥ ७ ॥ नावडे कळा कौतुक चांग । नावडे गीत नृत्य शुभांग । नावडे पारधी राजरंग । वैराग्य साङ्ग अनुतापी ॥ ८ ॥ नावडे संग्रहो धनधान्य । नावडे संपदा पदाभिमान । नावडे मान सन्मान । वैराग्य पूर्ण अनुतापी ॥ ९ ॥ नावडे तया कल्पतरू । तो तंव कल्पनेचा सागरू । कल्पना सबळ संसारू । अति दुस्तरू जन्ममरण ॥ १० ॥ केवळ चिंतायुक्त चिंतामणी । चिंता चिता समान दोनीं । चिता निर्जीवा दाहिनी । चिंता अनुदिनीं जित्यातें जाळी ॥ ११ ॥ नावडे परिस धातु अर्थ । अर्थ तितुका होय अनर्थ । ज्याचे पोटीं अर्थस्वार्थ । त्यासी पर-मार्थ कदा न भेटे ॥ १२ ॥ कामधेनु नावडे मनींहून । तें कामनेचें अधिष्ठान । कामकामें भवबंधन । वैराग्य पूर्ण नावडे तेंही ॥ १३ ॥ ऐसे दिव्य भोग समस्त । त्यांसी श्रीराम अनासक्त । सदा वसवी एकांत । अनंत अव्यक्त रहिवासी ॥ १४ ॥ दशर-थाचे सुपुत्र । ऐकोनियां विश्वामित्र । ऋषीश्वरां-माजि पवित्र । आला सत्वर यज्ञसिद्ध्यर्था ॥ १५ ॥ आला ऐकोनि विश्वामित्र । सामोरा धांवे नृपवर । लोटांगणीं नमस्कार । हर्षें निर्भर गृहा आणी ॥ १६ ॥ घालोनियां वरासन । मधुपर्क विधिवि-धान । सुवर्णसुमनें केलें पूजन । सुखसंपन्न ऋषि जाला ॥ १७ ॥ वसिष्ठविश्वामित्रां भेटी । आलिं-गनीं पडली मिठी । दोघांची एकत्वें एक दृष्टी । दोघांचें पोटीं सुख एक ॥ १८ ॥ दोघांचें एक कर्मा-चरण । दोघांचें एक अनुष्ठान । दोघांचें एक ब्रह्म-ज्ञान । एकत्वें पूर्ण दोघे जण ॥ १९ ॥ दशरथाचे सभास्थानीं । दोघे बैसले एकासनीं । तेणें शोभली ते अवनी । जेवीं गगनीं शशिसूर्य ॥ २० ॥ दशरथ म्हणे विश्वामित्रा । तूं होसी प्रतिसृष्टीचा धात्रा । उद्धरावया कुळगोत्रा । परम पवित्रा आलासी ॥ २१ ॥ धन्य भाग्याचे आजी आम्ही । धन्य अयो-ध्येची भूमी । जे कृपेनें आलेती तुम्ही । जे व्रत जपें तपें न भेटां ॥ २२ ॥ जेथें संतोषोनि साधु आले । तेथें कल्याण मुसावलें । तीर्थांचें फळ तेंही पावलें । भवाब्धीचें भलें पार उतारू ॥ २३ ॥ जेथें तुमची कृपादृष्टि पाहे । तेथें भगवंत अवश्य आहे । जग-द्वंद्य तुझे पाय । बहु मी काय अनुवादूं ॥ २४ ॥ संतो-षोनि बोले दशरथ । विश्वामित्रा तुझें मनोगत । सिद्धी पाववीन समस्त । हें निश्चितार्थ मद्वाक्य ॥ २५ ॥ जे जे तुझे मनोरथ । ते ते जाण म्यां केले कृ-तार्थ । तेणें वाक्यें संतोषयुक्त । स्वयें बोलत विश्वा-मित्र ॥ २६ ॥ दशरथा तुझें औदार्य । धैर्य वीर्य गुण गांभीर्य । तुझ्या पुरुषार्थाचें शौर्य । सुरवर स्वर्गीं वानिताती ॥ २७ ॥ रणीं जिंकोनि शुक्रासी । सुखी केलें देवगुरूसी । यश दिधलें इंद्रासी । तूं सूर्यवं-शासी मंडन ॥ २८ ॥ ऐकोनि ऋषीची वचनोक्ती ।

१ मोक्षाची इच्छा करणारे. २. लोकसंग्रहाकरितां. ३ आचरण. ४ संसारांतील कर्मे. ५ पश्चात्तापी, विवेकी, वैराग्यशील. ६ चावटपणा, उलाढाली, ७ जाळणारी, ८ दररोज. ९ वस्तिस्थान. १० विमनस्क, पाठमोरा, पराङ्मुख. ११ भूमि. १२ उत्पत्तिकर्ता. १३ प्राप्त झालें, एकत्र झालें. १४ संसारसमुद्राचें. १५ बोलूं. १६ मोठे देव. १७ वर्णन करतात.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

राजा सुखावला चित्तीं। त्या सुखाची सुखस्फूर्तीं। काय ऋषीप्रती बोलत ॥ २९ ॥ होवोनि अति विनीतें[1]। जोडोनियां दोनी हस्त। ऋषीचा कृतकार्यार्थ। असे पुसत स्वानंदें ॥ ३० ॥ गायत्रीमंत्र कृतकार्या। विश्वामित्रा ऋषिवर्या। तूं आलासी कोणा कार्या। महाधैर्या मज सांग ॥ ३१ ॥ म्हणे सूर्यवंशी महावर्या। ऐकें नृपा परोपकारिया। सुरसिद्धकृतकार्या। मागणें राया अवधारीं ॥ ३२ ॥ माझें मागणें नव्हे वित्त। माझें मागणें नव्हे प्राकृत। माझें मागणें रघुनाथ। यज्ञसिद्ध्यर्थ कृतकार्या ॥ ३३ ॥ ऐकोनि ऋषीचें वचन। गजबजिलें रायाचें मन। वीर्य गेलें हरपोन। कंपायमान सर्वांगीं ॥ ३४ ॥ सर्पकपाळीं कांटा नेहटे[2]। कां सापसुरळीचें[3] पुच्छ तुटे। मासा जळावेगळा फुटे। तैसें दुःख वाटे रायासी ॥३५॥ चणे वानरा गालींचे। कां धन जैसें कृपणाचें। भाणें[4] नेलें भणगांचें[5]। तैसें मन रायाचें श्रीरामीं ॥ ३६ ॥ प्राण जातां देह विकळ। मन मूर्च्छित इंद्रियें बरळ[6]। राम जातांचि तत्काळ। रायासी केवळ दैन्य तैसें ॥ ३७ ॥ वाचेसी पडलें दृढ मौन। ऋषीसी नेदी प्रतिवचन। समयाचें चातुर्यज्ञान। विचारून बोलत ॥ ३८ ॥ म्हणे यज्ञा विघ्न करिती राक्षस। मनुष्यमारक कर्कश[8]। राम केवळ बाळवेष राजस। धनुर्विद्याभ्यास नाहीं केला ॥ ३९ ॥ नाहीं रणांगण[7] देखिलें। नाहीं पूर्वीं युद्ध जालें। त्यासी राक्षसासी पहिलें। युद्ध करविलें केवीं जाय ॥ ४० ॥ मी केवळ पुत्रकृपण। श्रीराम माझें निजनिर्धान। श्रीराम माझें जीवन धन। तो न देववे दान राक्षसभक्षा ॥ ४१ ॥ श्रीरामाचा प्रथम संबंध। तोही राक्षसांसी द्वंद्वयुद्ध। तुम्ही विचारविशारदें[9]। ज्ञानप्रबुद्ध[10] तुम्ही आहां ॥ ४२ ॥ श्रीराम केवळ बाळ। नाहीं शस्त्रविद्या प्रबळ। नाहीं मंत्रास्त्रशुद्धशीळ। त्यासी युद्ध प्रबळ राक्षसांसी केवीं ॥ ४३ ॥ जें जें मागाल तुम्ही समर्थ। देईन राज्य राजपदार्थ। शेखीं[11] देईन जीवित्व। परि रघुनाथ न देववे ॥ ४४ ॥ ऐकोनि रायाचें वचन। विश्वामित्र जाला कोपायमान। अत्यंत क्षोभोनियां जाण। काय वचन आपण बोलत ॥ ४५ ॥ अरे मी भेटलों दशरथ। द्विजा तुझे मनोरथ। आजीच जाले कृतकार्यार्थ। ऐसें सभेआंत जल्पसी[12] ॥ ४६ ॥ तेंचि मागतां दान। न देववे म्हणसी आपण। हेंचि मुख्यत्वें कुळदूषण। दिधलें दान न देववे म्हणसी ॥ ४७ ॥ सूर्यवंशीं राजे जाण। जे जे जाले धर्मभूषण। त्यांमाजी तूं धर्मदूषण। दिधलें दान न देववे म्हणसी ॥ ४८ ॥ हरिश्चंद्र स्वप्नदान। जागृतीं सत्य केलें संपूर्ण। आपणा विकिलें आपण। दक्षिणावचनसत्यत्वें ॥ ४९ ॥ त्या वंशीं तूं जन्मलासी। दिधलें दान तें न देसी। हें सामर्थ्य तुजचिपासीं। सूर्यवंशासी निंदका ॥ ५० ॥ येच वंशीं शिबी जाण। पक्षियाचेनि समसमान। मांस तुकिलें[13] आपण। परी मिथ्या वचन न करीच ॥ ५१ ॥ येचि वंशीं मुचकुंद जाण। इंद्रा साह्य केलें आपण। तेणें युद्ध केलें दारुण। रणकंदन तारकेंसीं ॥ ५२ ॥ ते वंशीं तूं जन्मोनि जाण। दान न देववे म्हणसी आपण। ते वंशींच्या यशासी पूर्ण। तुवां दूषण[14] लाविलें ॥ ५३ ॥ रुक्मांगद येच वंशीं। मोहिनीनें छळितां त्यासी। पुत्राचें शीर देवोनि तिसी। व्रत एकादशी उद्धारु ॥ ५४ ॥ तूंही तेचि वंशीं जन्मलासी। पुत्र न देववे स्वयें म्हणसी। लाज लाविली पूर्वजांसी। उणें सूर्यवंशासी तुझेनि ॥ ५५ ॥ ककुत्स्थ बैसला इंद्राचे स्कंधीं। दैत्य पराभविले युद्धीं। ते वंशींचा तूं त्रिशुद्धी। म्हणसी पुत्र नेदीं युद्धार्थ ॥ ५६ ॥ तूं रामासी म्हणसी बाळ। हे मूर्ख बुद्धि अति स्थूळ। श्रीराम अवतार निर्मळ। जाण केवळ सुरसाह्या[15] ॥५७॥ श्रीराम नव्हे बाळक। राक्षसकुळासी अंतक[16]। स्वधर्माचा संस्थापक। साधूंचा आवश्यक साहाकारी ॥ ५८ ॥ धनुर्विद्या नेणे रघुनंदन। हें वचनचि अति अप्रमाण। राम सकळ विद्यां जन्मस्थान। शस्त्रास्त्रजीवन निजबीज राम ॥ ५९ ॥ श्रीराम रणरंगधीर। गुणागुणगुणगंभीर। वीराधिराज महावीर। परम शूर श्रीराम ॥ ६० ॥ श्रीराम मनुष्य नव्हे पाहीं। राम देहींच विदेही। श्रीराम चैतन्य[17] विग्रही। राम स्वदेहीं परब्रह्म ॥ ६१ ॥ राया तूं नेणसी निश्चित। श्रीरामा मानिसी प्राकृत। वसिष्ठासी पुसें हा वृत्तांत। तो यथार्थ सांगेल ॥ ६२ ॥ आतां स्वस्ति असो

१ नम्र. २ वेगानें शिरावा, टोंचावा. ३ चोपईचें. ४ ताट, पात्र. ५ भिकाऱ्याचें. ६ विकळ. ७ युद्धस्थान. ८ ठेवा, ९ विचारी, १० ज्ञानी, शहाणे. ११ शेवटीं.

१२ बोलतोस. १३ तोललें, वजन केलें. ३ कलंक. ४ देवांना साह्य करण्यासाठीं. ५ काळ. ६ ज्ञानस्वरूप.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

तुम्हांसी । सकळ कल्याण श्रीरामासी । मी जाईन स्वाश्रमासी । म्हणोनि ऋषि निघाला ॥ ६३ ॥ तंव वसिष्ठ म्हणे नृपवरा । क्षोभवूं नको विश्वामित्रा । हा प्रतिसृष्टीचा धात्रा । भस्म कुळगोत्रा क्षणार्धें करील ॥ ६४ ॥ धन्य वसिष्ठाचा भाव । सूक्ष्म सुचिवला निर्वाह । जेणें सुखावे ऋषि आणि राव । तैसा उपाय चिंतिला ॥ ६५ ॥ वसिष्ठ गुह्य सांगे रायासी । शांत करीं विश्वामित्रासी । दोघे पुत्र द्यावे त्यासी । दोघे पुत्र तुम्हांपासीं क्रीडनार्थ ॥ ६६ ॥ गुरुआज्ञा वंदूनि शिरसीं । लोटांगण विश्वामित्रासी । रामलक्ष्मण दिधले तुम्हांसी । दोघे मजपासीं राहूं द्या ॥ ६७ ॥ विश्वामित्र म्हणे भलें जालें । एकें रामें काय नव्हे केलें । सवें लक्ष्मणासी दिधलें । भाग्य फळलें पैं माझें ॥ ६८ ॥ विश्वामित्र म्हणे वसिष्ठासी । तूं सत्य सद्गुरु सूर्यवंशीं । रक्षिलें दोहींच्या धर्मासी । ज्ञाता होसी सज्ञानत्वें ॥ ६९ ॥ वसिष्ठ विश्वामित्र आणि रावो । स्वस्थानीं बैसले पाहा हो । गाधिसुत[1] झाला निःसंदेहो । परम उत्साह स्वानंदें ॥ ७० ॥ राजा म्हणे जिवलगासी । राम पाचारा ऋषिभेटीसी । येरु पातला राजाज्ञेसीं । अति वेगेंसीं विनीतें[2] ॥ ७१ ॥ लोटांगण वसिष्ठासी । साष्टांग नमन रायासी । चरणीं माथा विश्वामित्रासी । येरें हृदयासी आलिंगलें ॥ ७२ ॥ ऋषि रामा जाली भेटी । आनंद विश्वामित्राच्या पोटीं । जयजयकारें गर्जतां उठी । श्रीराम दृष्टी देखोनि ॥ ७३ ॥ एका जनार्दना शरण । जालें गुरुशिष्यदर्शन । येथोनि श्रीराम आपण । वैराग्य पूर्ण निरूपी ॥ ७४ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे बालकांडे एकाकारटीकायां विश्वामित्रागमनं नाम अष्टमोऽध्यायः ॥ ८ ॥ ओंव्या ॥ ७४ ॥

अध्याय नववा

॥श्रीरामचंद्राय नमः॥ सन्मुख देखोनि श्रीराम । विश्वामित्राचा मनोधर्म । सुखावोनि सप्रेम । आनंदें परम बोलत ॥ १ ॥ आजी माझें सार्थक कर्म । आजी माझा सफळ धर्म । आजी माझें पूर्ण काम । रायें श्रीराम यज्ञार्थ दिधला ॥ २ ॥ ऋषि म्हणे श्रीरामासी । चाल जाऊं माझ्या आश्रमासी । सिद्धि पावसी स्वधर्मासी । तूं सर्व कामासी निजमोक्ष[3] ॥ ३ ॥ राम म्हणे ऋषि समर्था । कांहीं पुसेन मनोगता[4] । कृपा करावी कृपावंता । मी तत्त्वतां वचनार्थी ॥ ४ ॥ देह तंव अत्यंत अशक्त । देहकर्म तेंही नाशवंत । कर्मफळ तें क्षयभूत । सुख कोण येथ देहसंगें ॥ ५ ॥ देहलोभें आर्तभूत[5] । जो विषय सेवीत । तो तत्काळ विष्ठा होत । सुख कोण येथ देहसंगें ॥ ६ ॥ देहीं काळ लागला नित्य । क्षयो करी अहोरात्र । शेखीं भोगवी जन्ममरणावर्त[6] । सुख कोण येथें देहसंगें ॥ ७ ॥ देहा क्षुधेचा मारा नित्य । तृष्णा[7] पीडी जीवनार्थ । देहीं देहभय निभ्रांत । सुख कोण येथ देहसंगें ॥ ८ ॥ ऐकें स्वामी साचार । देह तंव दुःखाचा डोंगर । देह विकल्पाचा[8] सागर । देह तो महापूर अति तृष्णेचा[9] ॥ ९ ॥ देह नित्य मूत्राची न्हाणी । देह तंव नरकाची खाणी । देह तंव पोहंणघाणी[10] । रोगांची[11] श्रेणी हा देह ॥ १० ॥ देह संदेहाचें सोलींव । देह अहंकाराचें ओतींव । देह विषयांचें भरींव । कृमींचें पेंव[12] तो देह ॥ ११ ॥ देह द्वंद्वाची निजधरणी । देह दुःखाची निजनिशाणी । देह विकल्पाची पूर्ण भरणी । अरिष्टांची ओरणी[13] तो देह ॥ १२ ॥ देह आशेचा कळवळा । देह अहंकाराचा अंगवळा[14] । देह अहंममतेचा सोहळा । विकाराचा मळा तो देह ॥ १३ ॥ देह अविद्येचें अधिष्ठान । देह संकल्पाचें साजिरें वन । देह मोहकाचें मोहन । मुख्यत्वें अज्ञान तो देह ॥ १४ ॥ देह कामाचा पर्वत गूढ । देह क्रोधाचा अवघड गड । देह लोभाचा दुस्तर आगड[15] । विनाशाचा मठ तो देह ॥ १५ ॥ देह अपवित्रतेचें मूळ । देह कुश्चळां[16] अति कुश्चळ । देह अमंगळां अमंगळ । मुख्य विटाळ तो हा देह ॥ १६ ॥ पहा जो उत्तम पदार्थ आहे । देहलोभें तो भोक्ता खाये । याममात्रें[17] विष्ठा[18] होय । हा देहाचा पाहें परिपाक ॥ १७ ॥ याममात्र न लागतां देख । तत्काळची होतो वमक[19] । नरकाहूनियां[20] अधिक । चिळसदायक[21] देहसंग ॥ १८ ॥ नित्य विषय सेवितां पूर्ण । नित्य नवी वाढे वणवण । कल्पांतीं तृप्ति

१ विश्वामित्र. २ नम्र. ३ मुक्ति. ४ इच्छित. ५ दुःखित. ६ जन्ममरणरूपी भोंवरा. ७ तहान. ८ संशयाचा, भेदाचा. ९ आशेचा, १० घाणेरडें डबकें. ११ पंक्ति, १२ कोठी.

१३ रांग. १४ संबंधी. १५ डोंगरी किल्ला. १६ संचय. १७ घाणेरड्यांत. १८ प्रहरानें. १९ नरक. २० ओकारी. २१ शिसारी आणणारा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

नव्हे जाण । सुख कोण देहसंगें ॥१९॥ क्षुधा नित्य पीडी शरीरीं । तृषा पीडी तेचिपरी । निद्रा सर्वथा मूढ करी । ऐशा देहसंगामाझारी सुख कोण ॥ २० ॥ त्या देहाची उत्पत्ती । ते मी सांगेन स्वामीप्रती । अपवित्रा अपवित्रमूर्ती । देहसंगती सर्वार्थीं ॥२१॥ रजस्वलेचा लागतां पालव[1] । सचैल स्नानाचा उत्सव । त्या अशुद्धाचा[2] ओतींव देह । अपवित्र पहा हो समूळीं ॥ २२ ॥ रजस्वला शुद्ध चवथे दिवसीं । तो विटाळ राहिला गर्भासीं । तोचि वाढोनि नवमासीं । करी गोत्रासी सूतकी ॥ २३ ॥ विटाळें देहाची संभूती[3] । विटाळें देहाची उत्पत्ती । विटाळें देहाची शांती । देहभस्मांतीं सूतक राहे ॥ २४ ॥ देहाच्या अस्थि आणि राख । गंगोदकीं घालितां देख । देतां पिंड तिळोदक । तरी देहसूतक सुटेना ॥ २५ ॥ एवं देह तो मुख्यत्वें विटाळ । देह तेंचि दुःख प्रबळ । आतां गर्भदुःखाचे कल्लोळ । विशद[4] विकळ[5] अवधारा ॥ २६ ॥ रजस्वलेचें पूर्ण रुधिर[6] । तेथें पित्याचें रेतमात्र । तेंचि गोठोनि होय शरीर । मुख्य अपवित्र देहसंग ॥२७॥ जननीजठरीं[7] अग्निमाझारीं । विष्ठेच्या दार्थरावरी[8] । मूत्राच्या आधणाभीतरीं । नवमासवरी उकडिजे ॥ २८ ॥ जठराग्नीच्या तोंडीं । उकडतां गर्भाची उंडी । रस मुसावोनि होय पिंडी । अष्टांगांचीं कांडीं व्यक्ती येती ॥ २९ ॥ विष्ठालेप चहूंकडे । नाकीं तोंडीं जंतु किडे । तें दुःख भोगितां जीव रडे । अति चरफडे तळमळी ॥ ३० ॥ त्वचा नाहीं गर्भखोळे[9] । तंव मातेसी होती डोहळे । कट्वम्ललवण[10] सेवी ते वेळे । सर्वांग होरपळे गर्भाचें ॥ ३१ ॥ त्रिकाळ भोजन मातेसी । त्रिकाळ दुःख तें गर्भासी । भोगितां होय कासाविसी । कोणापासीं सांगेल ॥ ३२ ॥ तेथें नाहीं वायूचें आगमन । नाहीं मायदाईचें शांतवन । नाहीं स्वजनाचें समाधान । दुःखें संपूर्ण अति दुःखी ॥ ३३ ॥ ते काळची त्याची व्यथा । नेणती ते माता पिता । तेथें नाहीं नैंभी[11] म्हणतों[12] । आपली दुःखिता आपण भोगी ॥ ३४ ॥ प्रसूतिकाळ अति अटकें[13] । गुदद्वारीं अधोमुख । योनिद्वारा आणावया देख । परम दुःख उत्पादी ॥ ३५ ॥ प्रसूतिवात अति प्रबळ । सर्वांगीं लागे एकीचि कळ । योनिद्वारीं करी तळमळ । प्रसूति तत्काळ होईना ॥ ३६ ॥ वेणेवरी येतां वेणा । दुःख होय दोघांजणां । मातेसी न साहवे वेदना । गर्भघोळणा[14] ते काळीं ॥ ३७ ॥ ते काळीं विचार करी पूर्ण । आतां जन्मल्या आपण । विषय सेवितां गर्भीं गमन । तें विषय सेवन करीं ना ॥ ३८ ॥ सद्गुरूसी रिघोनि शरण । निर्दाळोनियां अभिमान । निवारीन जन्ममरण । तेहि आठवण विसरे देही ॥ ३९ ॥ गर्भ जन्मे बाहेर पडे । सोहंभाव तत्काळ उडे । कोहंभावें दीर्घ रडे । जन्मल्यापुढें सुख काय ॥ ४० ॥ जन्मकाळापासोनि देख । आयुष्य जातसे अमोलिक । यालागीं जो तो पुसे जातक । कोणी रहातक पुसेना ॥ ४१ ॥ देहासवेंचि जातक । अखंड लागलें आवश्यक । यालागीं सकळ लोक । मरणधाक[15] वाहती ॥ ४२ ॥ मरणा मर्यादा नाहीं देख । गर्भीं गर्भपाताची धुकधुक । उपजतांचि सटवीचा धाक । कोण सुख जन्माचें ॥ ४३ ॥ बाळपणींच्या दुःखशोका । असंख्यत्वें नये लेखा । तेंही सावधान ऐका । निजनरका स्वयें भक्षी ॥ ४४ ॥ ज्या ठायाचें घेऊं नये नांव । जो दाखवूं नये स्वयमेव । त्या योनिद्वारें संभव । कोण गौरव जन्माचा ॥ ४५ ॥ लाळ थुंका विष्ठा मूत्र । त्यांमाजी सदा सदा पचत[16] । तोचि श्लेष्म भक्षित । बाळपणीं येथें सुख कोण ॥ ४६ ॥ उदरव्यथा[17] करी रुदन । माता मुखीं घाली स्तन । निजव्यथा न सांगवे पूर्ण । सुख कोण बालकत्वीं ॥४७॥ दांत दोन्हीं दाढा डोळे । निघती सात सात महिन्यांकाळें[18] । तान्हेपणीं दुःखउमाळे । बाळपणीं फळे सुख कोण ॥ ४८ ॥ बाळपणीं दुःख असोसें[19] । तेथें नाहीं सुखाचा लेश । तैसेंचि तारुण्यही देख । दुःखदायक पुरुषासी ॥ ४९ ॥ तारुण्याचा अति आघात । निःशेष बुडवितो निजस्वार्थ । कांहीं नाठवे परमार्थ । अति उन्मत्त विषयार्थीं ॥ ५० ॥ शिणोनि विषय करितां पूर्ण । नित्य नवी वाढे वणवण । इंधनीं खवळे हुताशन[20] । तेवीं विषय दारुण दुर्भरत्वें[21] ॥ ५१ ॥ नित्य विषय

१ पदर. २ रक्ताचा. ३ होणें, संभव. ४ स्पष्ट. ५ शांतपणें. ६ रक्त. ७ आईच्या पोटांत ८ उकाड्यांत. ९ गर्भाच्या वेष्टनाला. १० कडू, आंबट व खारट. ११ भिऊं नको, १२ म्हणणारा, १३ प्रतिबंध. १४ गर्भाचा गोंधळ. १५ मरणाची भीति. १६ कढत, शिजत. १७ पोट दुखण्यानें. १८ महिन्यांच्या शेवटीं. १९ हांवरेपणा. २० अग्नि. २१ तृप्त करण्यास कठीण असल्यामुळें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सेविती । परी कदाकाळीं नव्हे तृप्ती । आयुष्य गेलें हातोहातीं । हें तो तारुण्याप्रति लक्षेना ॥ ५२ ॥ वाढवितां विषयसोस । नित्य आयुष्याचा होय नाश । परमार्थ पडे ओस । नाहीं सुखलेश तारुण्यामाजी ॥ ५३ ॥ आयुष्याचा नित्य घात । निःशेष नासे परमार्थ । तो हा विषयांचा संघात[1] । तारुण्यांत मुसमुसी ॥ ५४ ॥ तारुण्याच्या पोटीं । अनेक दुःखांचिया कोटी । लावी योषितां[2] पाठी । धनधान्यदृष्टी लोलुपत्वें[3] ॥ ५५ ॥ तारुण्याचिया वाटा । अभिमानाचा चढे ताठा । अकर्माचा फुटे फांटा । गर्वाचा मोठा फुगारा ॥५६॥ मी एक चातुर्यसंपन्न । मी एक स्वयंपाकी सुब्राह्मण । मी एक समर्थ सधन । पवित्र पूर्ण मी एक ॥५७॥ जग अवघें अपवित्र । मीच एक श्रेष्ठ पवित्र । हा तारुण्यामाजी विचित्र । घातकसूत्र अभिमानें ॥ ५८ ॥ स्त्री तरी अस्थि[4]मांसाचा कोथळा । स्त्री केवळ विष्ठेचा गोळा । स्त्री वसतिस्थान विटाळा । नरकसोहळा विषयसंगें ॥५९॥ ऐसिया स्त्रीसंगापासीं । तारुण्य पुरुषा करी दासी । अखंड सेवी तियेसी । त्याची दशा ऐसी अवधारा ॥ ६० ॥ तारुण्यमाकड स्त्रियेपुढें । ती नाचवी तैसें उडे । ती पाडी तेथें पडे । नाचवी रोकडें निजछंदें ॥ ६१ ॥ तारुण्यरासभ[5] स्त्रियेपासीं । तिचा घरोबा वाहे शिसीं । तारुण्य श्वान स्त्रीआज्ञेसी । लाविल्या वसवसी सुहृदांतें ॥६२॥ तारुण्यमांजर स्त्रीगृहवासी । मियो मियो करी पायांपासीं । चाटावया स्त्रीअधरामृतासी । अहर्निशीं टोकत ॥६३॥ तारुण्यउंदीर स्त्रियेच्या घरीं । अष्टौ प्रहर छिद्र कोरी । देखतां लपे छिद्राभीतरी । तारुण्यावरी सुख काय ॥६४॥ तारुण्य लोलुप विषयापासीं । तारुण्य स्त्रीकामाची दासी । तारुण्य गर्वें मुसमुसी । तारुण्यासीं सुख काय ॥ ६५ ॥ तारुण्याची ऐसी गती । सुख कैंचें होईल वार्धक्या[6]प्रती । त्या वार्धक्याची निजस्थिती । ऐका निश्चिती सांगेन ॥ ६६ ॥ वार्धक्यीं नाथिल्या[7] व्याधी । वार्धक्यीं नाथिल्या आधी । वार्धक्यीं भ्रंशे बुद्धी । सुख त्रिशुद्धीं तेथें कैंचें ॥ ६७ ॥ जरेचें[8] भय बहुवस । जरा नाशी शरीराभास । धाकें पालटती केश । सुखाचा लेश तेथें नाहीं ॥ ६८ ॥ वार्धक्य तें केवळ पाप । तेणें सर्वांगीं उठे कंप । भेणें बोची हाले लपलप । शब्दाचा पोंचट प्रलाप[9] होय ॥ ६९ ॥ वार्धक्य देखोनि येतां । समूळ पळणी होय दांता । क्षीण होय इंद्रियसत्ता । सुखाची वार्ता तेथें नाहीं ॥७०॥ तारुण्यापासीं समस्त वित्त । जें कांता भोगी समस्त । तेचि विमुख होय वार्धक्यांत । हा वार्धक्याचा येथें बडिवार[10] ॥ ७१ ॥ वार्धक्यीं जिरेना अन्न । तरी खावयाची तृष्णा गहन । वृद्धाचें सदा सचिंत मन । सुख कोण वार्धक्यीं ॥७२॥ वार्धक्यीं शोकसमूहु । वार्धक्यीं ममता बहु । वृद्धातें बाळें म्हणती बाऊ । हा सुखगौरवू वार्धक्यीं ॥ ७३ ॥ बाईल नायके बोला । बाळें दाविती वांकुल्या । जो तो चेष्टवी मुला । जरठा[11] खवळविती विनोदें ॥७४॥ जरेचें बळ बहुवस । जवळ बैसेना माणुस । खोकला लागे बहुवस । भोंवतें बळसचिंडोणी[12] ॥७५॥ जराजर्जरकल्लोळें । शरीराची शक्ति पळे । डोळे होती सरंकाळे[13] । तोंडींहूनि लाळ गळे उरावरी ॥७६॥ मरणें व्यापिलें शरीर । तरी म्हणे माझी स्त्री माझें घर । माझे नातु माझे पुत्र । ही ममता फार सोडीना ॥ ७७ ॥ जरी घातला अर्धजळीं । तरी स्त्री पुत्र न्याहाळी । नातवंडें आणा रे मजजवळी । ममतेमेळीं देहांत ॥ ७८ ॥ नरदेहींचा आयुष्यसारा । विषयलोभें केला मातेरा । परलोका पडला चिरा । नरकद्वारा करी गमन ॥ ७९ ॥ देहबुद्धीच्या कल्लोळीं[14] । मोहममतेच्या महाज्वाळीं । परमार्थाची जाली होळी । वृथा रवंदळी[15] नरदेहा ॥ ८० ॥ देहीं व्यर्थ विषयसुख । देहें नाशिलें स्वर्गसुख । देहें वंचिलें[16] मोक्षसुख । केवळ दुःख देहसंगें ॥ ८१ ॥ शतवर्षें विषयासक्ती । एकाही इंद्रिया नव्हे तृप्ती । उत्तमा आयुष्या जाली माती । केवळ अधःपाती देहसंग ॥ ८२ ॥ देहसंगामाजी सुख । मानिती ते केवळ मूर्ख । देहसंग तें केवळ दुःख । गर्भनरक भोगवी ॥ ८३ ॥ श्रीराम म्हणे गुरुनाथा । अंगीं देहअहंता नांदतां । सुख कोण राज्यभोगार्था । विषयस्वार्थी सुख काय ॥ ८४ ॥ अहं-

१ समुदाय. २ स्त्री. ३ लोभानें. ४ हाडें व मांस यांची पिशवी. ५ तारुण्यरूपी गाढव. ६ म्हातारपणीं. ७ नसत्या. ८ वृद्धावस्थेचें. ९ उच्चार. १० मोठेपणा. ११ म्हाताऱ्याला. १२ ओंगळपणा. १३ अशक्त. १४ लाटांत. १५ तुडवातुडवी, चेंगरणूक. १६ नाहींसें केलें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

कारा‌ऐसा वैरी । बैसला असतां उरावरी । सुख नाहीं हो संसारीं । निजनिर्धारीं निश्चयो ॥ ८५ ॥ अहंकार जडला जीवीं । तो साधनीं रिघोनि गोवी । अहंकार हा जीवभावीं । उघड नागवी जगातें ॥ ८६ ॥ मुख्य बाधक अहंता । तिसी साह्य जालीया ममता । अहंममता न जिणतां । सुख सर्वथा असेना ॥ ८७ ॥ जालिया शुद्ध शास्त्रश्रवणें । उभय भोग ऐसा देखणें । जे भक्षोनियां वमनें । आतांचि का सुणें वमोनि गेलें ॥ ८८ ॥ वमनातें स्वयें भक्षी श्वान । तैसा इह-भोग संपूर्ण । तो भोग वांछिती सज्ञान । तें ज्ञातेपण लौकिकीं सटवलें ॥ ८९ ॥ अहंकार तो मुख्य वैरी । विषयलोभ चढला शिरीं । तेणें संसार दुस्तर भारी । निजनिर्धारीं ऋषिवर्या ॥ ९० ॥ यालागीं न निरसे अभिमान । तंव मी न करीं रसपान । न करीं मिष्टान्नभोजन । न करीं परिधान दिव्यांबरें ॥ ९१ ॥ मी न करीं क्रियाकर्माचार । कर्म केवळ शरीराधार । तेथें संचरे अहंकार । मी पवित्र अति श्रोत्री ॥ ९२ ॥ जेणें पाविजे ब्रह्मप्राप्ती । ऐसी असेल जरी युक्ति । ते सांगावी मजप्रती । कृपामूर्ति ऋषिवरा ॥ ९३ ॥ मज नसेल अधिकार । तरी तुम्ही संत सर्वाधार । सत्संगती दीनोद्धार । हें ब्रीद साचार संतांचें ॥ ९४ ॥ चंदनाचे संगतीं । खैर धामोडे चंदन होती । तेवीं संतांचे संगतीं । ब्रह्मप्राप्ती दीनासी ॥ ९५ ॥ ऐसें बोलोनि रघुनाथ । उगाच राहिला तटस्थ । ऋषि राजा आणि लोक समस्त । जाले विस्मित ते काळीं ॥ ९६ ॥ श्रीरामवैराग्य-समेळीं । ऋषीश्वर दाटले भूतळीं । सिद्ध दाटले नभोमंडळीं । मुमुक्षु ते काळीं चातक जाले ॥ ९७ ॥ वैराग्यें बोलिला रघुनाथ । तेणें जाले सुर नर तटस्थ । सिद्ध चाकाटले समस्त । जाले विस्मित सुरवर ॥ ९८ ॥ ऐकोनि श्रीरामाची गोष्टी । सुख जालें सिद्धांच्या पोटीं । तिहीं केली पुष्पवृष्टी । श्रीराम-मुकुटीं स्वानंदें ॥ ९९ ॥ नभीं सिद्धांचा जयजय-कार । भूतळीं गर्जती ऋषीश्वर । जयजयकार करिती नर । सुखे निर्भर सभा जाली ॥ १०० ॥ सिद्ध बोलती स्वानंदता । ऐसी न ऐकों हे वैराग्यवार्ता । आम्हीं त्रैलोक्यीं हिंडतां । श्रीरामें तत्त्वता सुखी केलें ॥ १ ॥ एवं सिद्ध स्वानंदेंसीं । आले दशरथाचे सभेसी । ऋषिरामसंवादेंसीं । त्या गुह्यासी परिसावया ॥ २ ॥ वसिष्ठ विश्वामित्र दोन्ही । आणि सिद्ध साधक मुनी । रायें पूजिले संतोषोनी । हर्षे मनीं निर्भर ॥ ३ ॥ स्वयें येऊनि रघुनाथ । सिद्ध सिद्ध पूजिले श्रद्धायुक्त । ऋषि पूजिले समस्त । पूजिला दशरथ परमार्थबुद्धी ॥ ४ ॥ सुर नर ऋषि सिद्धगण । सभा बैसली सावधान । एका विनवी जनार्दन । श्रोते ब्रह्म-ज्ञान अवधारा ॥ १०५ ॥ स्वस्ति श्रीभावार्थ-रामायणे बालकांडे एकाकारटीकायां श्रीरामवैरा-ग्यनिरूपणं नाम नवमोऽध्यायः ॥ ९ ॥ ओंव्या ॥ १०५ ॥

अध्याय दहावा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥

विश्वामित्र उवाच—
न राघव तवास्त्यन्यज्ज्ञेयं ज्ञेयवतां वर ॥
स्वयैव सूक्ष्मया बुद्ध्या सर्वं विज्ञातवानसि ॥ १ ॥

विश्वामित्र म्हणे रघुनाथा । तूं सूक्ष्मबुद्धि अति तीक्ष्णता । ज्ञान ज्ञेय परमार्था । स्वभावता परिपूर्ण ॥ १ ॥ ज्ञात्यांमाजी ज्ञानवरिष्ठ । त्यांचा अनुभव जो चोखट । तो तुजमाजी दिसे प्रकट । वैराग्य उद्भट ज्ञानगर्भा ॥ २ ॥ वैराग्य जें ज्ञानसगर्भ । तोचि ज्ञानाचा समारंभ । वैराग्यें-वीण ज्ञान दुर्लभ । तें तुज सुलभ स्वभावता ॥ ३ ॥

भगवद्व्यासपुत्रस्य शुकस्येव मतिस्तव ।
विश्रांतिमात्रमेवैतज्ज्ञाता ज्ञेयमपेक्षते ॥ २ ॥

जैसा शुक व्याससुत । जन्मापासोनि स्वभाव-मुक्त । तैसाचि तूं रघुनाथ । प्राप्त परमार्थ स्वभावें ॥ ४ ॥ त्या शुकाचा ज्ञानार्थ । विकल्पें पावला घात । तोचि गुरुवाक्यें निश्चित । निज-परमार्थ पावला ॥ ५ ॥

श्रीराम उवाच—
भगवन्व्यासपुत्रस्य शुकस्य भगवन् कथम् ।
ज्ञेयेऽप्यादौ न विश्रांतं विश्रांतं च भिया पुनः ॥ ३ ॥

---

१ जिंकितां. २ कुत्रें. ३ ओकून. ४ व्यर्थ गेलें, फुकट झालें, मेलें. ५ सर्वांला आधार. ६ निवांत, स्तब्ध. ७ आकाशांत. ८ चकित झाले. ९ परिपूर्ण. १० श्रेष्ठ.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

राम म्हणे ऋषिवर्या । ऐकिलें वाक्य परमाश्चर्या । ज्ञान पावोनि शुकवर्या । विकल्प धरावया काय कारण ॥ ६ ॥ त्या शुकाची समूळ कथा । मज सांगावी स्वामिनाथा । ज्ञान पावोनि विकल्पता । शुकाच्या चित्ता बाणली कैसी ॥ ७ ॥ तोचि विकल्प पुढती । कैसेनि मावळला चित्तीं । कैसेनि पावला विश्रांती । हें मजप्रति सांगावें ॥ ८ ॥

विश्वामित्र उवाच–

आत्मोदंतसमं राम कथ्यमानमिदं मया ॥

शृणु व्यासात्मजोदंतं जन्मनामंतकारणम् ॥४॥

विश्वामित्र म्हणे श्रीरामा । व्यासपुत्राची ज्ञानगरिमा । अगाध विचाराची महिमा । नाहीं सीमा अनुपम्य ॥ ९ ॥ त्या श्रीशुकाचा निजविचार । त्याही विचाराचें निजसार । तुज मी सांगेन साचार । सविस्तर अवधारीं ॥ १० ॥ जन्मस्वभावें शुक मुक्त । विवेकवैराग्यपूर्णभरित । तो श्रीव्यासास न पुसत । स्वेच्छा वनांत निघता झाला ॥ ११ ॥

यं प्रव्रजंतमनुपेतमपेतकृत्यं
द्वैपायनो विरहकातर आजुहाव ॥
पुत्रेति तन्मयतया तरवोऽभिनेदु-
स्तं सर्वभूतहृदयं मुनिमानतोऽस्मि ॥ ५ ॥

शुकें न करितां पाणिग्रहण । न घेतां संन्यास संपूर्ण । व्यासासी न पुसतांचि जाण । निघाला आपण सर्वस्वत्यागें ॥ १२ ॥ त्या शुकाची पूर्ण स्थिती । देखोनि व्यासासी अति प्रीती । तेणें सुखें शुकाप्रती । पुत्रासक्ती धांविन्नला ॥ १३ ॥ पुत्रप्रातीचें व्यासासी सुख । त्याचें पहावया मुख । व्यासासी अत्यंत हरिख । ये गा आवश्यक शुकासी म्हणे ॥ १४ ॥ मी शुक नव्हें एकदेशी । तो मी सर्वभूतनिवासी । हे प्रचीती यावया व्यासासी । वृक्ष त्यासी ओ देती ॥ १५ ॥ व्यास बोभाये पुत्रवचनीं । वृक्ष वदती प्रतिवचनीं । तेणें व्यास सुखावोनी । पुत्रागमनीं उद्यत ॥ १६ ॥ शुका म्हणतांचि जाण । वृक्ष ओ देती आपण । तेणें शुकाचें पूर्णपण । व्यासासी पूर्ण कळों आलें ॥ १७ ॥ ऐसें असतां पूर्णपण । त्यामाजी विकल्पाचें विंदान । मुख्यत्वें स्त्रीवाक्याचें श्रवण । तेणें विकल्प पूर्ण श्रीशुकासी ॥ १८ ॥ शुकें स्त्रिया नाहीं देखिल्या दृष्टी । नाहीं स्त्रियांची घेतली भेटी । त्यांची अन्योक्ति ऐकतां गोष्टी । विकल्प पोटीं शुकाच्या ॥ १९ ॥ प्रमदा परमार्थ पुसों आली । हे गुरुत्वा भुली पडली । प्रमदा केवळ प्रमादीं घाली । तिचे बोलीं विकल्प ॥ २० ॥ प्रमदांप्रति परमार्थ । हा गुरुत्वा अति अनर्थ । त्या अनर्थाचा निजघात । श्रीशुकांत विकल्पू ॥ २१ ॥ परमार्थ गुरुत्वाचा अति अनर्थ । त्या अनर्था अति घात । तो श्रीशुकाआंत । असे नांदत सावकाश ॥ २२ ॥ सिद्धसरोवराप्रती । नग्न अप्सरा स्नान करिती । शुक जातां आत्मस्थिती । त्या स्वइच्छा खेळती निर्लज्ज ॥ २३ ॥ मागूनि व्यास येतां देखती । अप्सरा अति सलज्ज होती । एकी वस्त्र आड करिती । एकी बैसती उदकांत ॥ २४ ॥ शुक तरुण नग्नगती । जातां अप्सरा न लाजती । मी वृद्ध यांचे आज्याचे स्थिती । मज कां लाजती देवांगना ॥ २५ ॥ शुकाचे ठायीं त्यांची आसक्ती । त्यासी निर्लज्जा अवयव दाविती । मी वृद्ध नावडें चित्तीं । यालागीं लाजती स्वर्गांगना ॥ २६ ॥ हा अप्सरांचा भावो । हें त्यांचे पासीं पुसों जावों । हा व्यासाचा अभिप्रावो । तो प्रश्नपर्याव पूसत ॥ २७ ॥ श्रीशुकासी कां नाहीं लाजल्याती । मज लाजल्याती कोण्या अर्थीं । हें परम प्रमाण निश्चितार्थीं । माझी प्रश्नोक्ती सांगावी ॥ २८ ॥ ऐकोनि व्यासाची प्रश्नोक्ती । हांसोनि अप्सरा बोलती । जैसी ज्याची अंतरवृत्ती । तैसें त्याप्रती वर्तों आम्ही ॥ २९ ॥ मुने तुझें ज्ञान भेदानुवृत्ती । शुकासी सदा अभेदगती । अभेदीं लाजेची अप्राप्ती । भेदा प्राप्ती सलज्ज ॥ ३० ॥ शुक अभेद कैसा कळला । माझा भेद कोठें देखिला । जेव्हां लज्जेचा प्रश्न केला । तेणेंचि दाविला भेद तुझा ॥ ३१ ॥ तुज स्त्रीपुरुषभेदव्यक्ती । यालागीं तूं केली प्रश्नोक्ती । शुकाची सूक्ष्म अभेदगती । स्त्रीपुरुषव्यक्ति देखेना ॥ ३२ ॥ ऐसें ऐकतां स्त्रियांचें वचन । मी ज्ञाता व्यास अज्ञान । ऐसा शुकासी ज्ञानाभिमान । हृदयीं संपूर्ण प्रविष्टला ॥ ३३ ॥ बाप स्त्रीवाक्याची ख्याती । ब्रह्मज्ञानाची केली शांती । विकल्प वाढविला चित्तीं । उठली

१ प्रतीतीस आली, ठसावली. २ संशय, भेद. ३ ज्ञानाचा मोठेपणा. ४ लग्न, गृहस्थाश्रम. ५ हर्ष, आनंद. ६ सर्व भूतांचे ठिकाणीं रहाणारा. ७ हाका मारी. ८ कौशल्य. ९ ब्रह्मस्थितीनें, ब्रह्मभावनेनें. १० भेदभावनेनें भरलेलें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

स्फूर्ति[1] मी ज्ञाता ॥ ३४ ॥ मी ज्ञाता मी अज्ञान । ऐसें जेथें स्फुरे स्फुरण । तेथोनि पळे ब्रह्मज्ञान । ज्ञानाभिमान उरे देहीं ॥ ३५ ॥ हिंग पडतांचि रांजणीं । गोडवणी होय हिंगवणी । तेंवी विकल्प प्रवेशतां ज्ञानीं । ज्ञानाभिमानीं उडे ज्ञान ॥ ३६ ॥ दुग्धीं कांजीचा थेंबू पडे । तेणें दुग्धाचे होती कवडे । तेंवि ज्ञानीं विकल्प वाढे । तैं ज्ञान उडे ज्ञानाभिमानें ॥ ३७ ॥ सावध [2]कनकबीज खाय । तो क्षणार्धें भ्रमित होय । तेंवि विकल्पाच्यानि अन्वयें । ज्ञात्या होय ज्ञानाभिमानु ॥ ३८ ॥ व्यास अज्ञान भेददृष्टी । मी सज्ञान ऐक्यपुष्टी । ऐसा विकल्प शुकाचे पोटीं । स्त्रीवाक्यासाठीं दृढ झाला ॥ ३९ ॥ दीप मालवल्यापाठीं । काजळीची पो[3]हेंणी उठी । तेंवि ज्ञान जातांचि शेवटीं । अति गर्वे उठी ज्ञानाभिमानें ॥ ४० ॥ स्वयंबुद्धीचें विवेकज्ञान । विकल्पमात्रें होय क्षीण । गुरुवाक्यें अति निपुण । तें ज्ञान पूर्ण निश्चयें ॥ ४१ ॥ जो ज्ञानानुभव गुरूचे ठायीं । तें ज्ञान अति अक्षयी । विकल्प न रिघे ते ठायीं । अति [4]अनपायी गुरुज्ञान ॥ ४२ ॥ गुरुवाक्येंवीण जें ज्ञान । तें क्षयरोगी जन्मलें जाण । विकल्पमात्रें सांडी प्राण । अति क्षीण अपायी ॥ ४३ ॥ आचार्यवान् पुरुषो वेद । हें वेदवाक्य प्रसिद्ध । गुरुवाक्यें ज्ञानविशुद्ध । प्रजा प्रबुद्ध गुरुवाक्यें ॥ ४४ ॥ गुरुवाक्येंवीण सर्वथा । ज्ञान नासे विकल्पता । हेचि शुकाची व्यवस्था । व्यासासी सर्वथा कळों आली ॥ ४५ ॥ शुकाचें ब्रह्मज्ञान । विकल्पवाक्यें जालें क्षीण । शुक जाहला ज्ञानहीन । तें व्यासासी चिन्ह [6]कळों सरलें ॥ ४६ ॥ व्यास जाणे भेदज्ञान । तोचि भेदीं अभेद सर्वज्ञ । हें शुकासी नकळे चिन्ह । तेणें विकल्प पूर्ण दृढ धरिला ॥ ४७ ॥ व्यास शुकालागीं अति आसक्त । क्षणक्षणां म्हणे परत । तोचि जालिया विकल्पयुक्त । त्यावरी परत न म्हणे व्यास ॥ ४८ ॥ व्यास अंतर्यामीं आपण । जाणोनि शुकाचें ज्ञान ज्ञानें क्षीण । जेणें पावे ज्ञान संपूर्ण । तो कृपेनें आपण सत्संग सांगे ॥ ४९ ॥

जनको नाम भूपालो विद्यते वसुधातले ।

व्यास म्हणे श्रीशुकासी । तूं तंव स्वइच्छा जातोसी । अवश्य जाई जनकापासीं । निश्चय पावसी त्याचेनी ॥ ५० ॥ जनक राजा पृथिवीचे ठायीं । राज्य करोनि तो विदेही । ज्ञान वि[7]ज्ञान त्यासी सर्वेही । परिपूर्ण पाहीं पूर्णत्वें ॥ ५१ ॥ जो संदेह निजमानसीं । त्याचेनि निःसंदेह होसी । समाधान जनकापासीं । परमार्थासी परमार्थ ॥ ५२ ॥ आपण ज्ञान सांगावें त्यासी । व्यास अज्ञान हें शुकाचे मानसीं । यालागीं धाडी जनकापासीं । श्रीशुकासी निश्चयार्थ ॥ ५३ ॥ श्रीशुकाची मनोवृत्ती । म्हणे कळली व्यासाची ज्ञानस्थिती । आतां जनकाची ज्ञानोक्ती । तेही निश्चिती पाहूं पां ॥ ५४ ॥ ऐसें विचारोनि मनीं । मेरुगिरी उतरोनी । जनकनगरी ठाकोनी । तत्क्षणीं तो आला ॥ ५५ ॥ नग्न नगरांत जातां । होईल लोकोपहासकर्ता । पथीं चीरांची तत्त्वतां । लोकलज्जार्थ कौपीन केली ॥ ५६ ॥

रिक्तहस्तेन नोपेयाद्राजानं देवतां गुरुम् ॥ ६ ॥

केवळ रिक्तहातेंसीं । भेटों नये रायासी । तैसेंचि देवालयासी । रिते हस्तेंसीं न जावें ॥ ५७ ॥ सद्गुरु जो कां कृपामूर्ती । त्यासीही भेटूं नये रिते हातीं । हेंचि वृद्ध वृद्ध शिकविती । धर्मशास्त्रीं नीति निश्चयें हेची ॥ ५८ ॥ जनक गुरुत्वें जगद्गुरु । तोचि नरेंद्रां नरेंदु । त्यासीं रिक्त हस्तें नमस्कारू । करी तो नर स्वधर्ममंद ॥ ५९ ॥ जनक निर्लोभद्रव्यदृष्टी । ऐसा निश्चय धरोनि पोटीं । हातीं घेतली [10]राखोटी । जनकभेटीलागोनी ॥ ६० ॥ चीर कटीं सूत्र कंठीं । कौपीन हातीं राखोटी । राजद्वारा आला उठाउठी । द्वारपाळें देखिला ॥ ६१ ॥ ब्रह्मसूत्रेंवीण नव्हे ब्राह्मण । संन्यासी नव्हे दंडेंवीण । दिगंबर नव्हे हा संपूर्ण । अति विलक्षण वेषधारी ॥ ६२ ॥ यालागीं श्रीशुकासी । द्वारपाळ निवारी त्यासी । तो म्हणे सांग रायापासीं । मी शुक भेटीसी आलों असें ॥ ६३ ॥ त्या श्रीशुकाचें मनोगत । मी आलों असें ब्रह्मसुत । राजा सामोरा येईल येथ । सन्मानयुक्त नेईल ॥ ६४ ॥ ऐशा ज्ञानाभिमानें थोर । श्रीशुकामाझारी बांधलें घर । तें कळलें रायासी अंतर । शुकविकार हृदयस्थ ॥ ६५ ॥ शुकाची स्वयें घेतां भेटी । तो विकल्प धरील पोटीं । व्यास बोलिला जे गोष्टीसाठीं । त्या विकल्पपुष्टी शुक

१ स्फुरण. २ धोतऱ्याचें बीज. ३ घाण, दुर्गंधी. ४ वाईट न करणारें, दुःख न देणारें. ५ शहाणी. ६ कळून आलें, समजलें. ७ अनुभवज्ञान. ८ लोकांमध्यें उपहास, हांसें. ९ वल्कलांची, वस्त्रांची, चिंध्यांची. १० राखुंडी.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

नांदे ॥ ६६ ॥ आपण न घेतां भेटी । जेणें विरे विकल्पाची गांठी । त्या त्यागाची सांगूं गोष्टी । जेणें निजात्मदृष्टी[1] शुक पावे ॥ ६७ ॥ भेटी न घेतां आपण । शुक पावे समाधान । ऐसें साधोनि विंदान । द्वारपाळासी वचन राव बोले ॥ ६८ ॥ द्वारीं उभा महानुभाव[2] । संगत्यक्त्वा सुखी भव । हा त्यासी सांगावा अभिप्राव । तो निजानुभव[3] पाहील ॥ ६९ ॥ द्वारपाळ म्हणे श्रीशुकासी । संगत्यागें सुखी होसी । हें रायें सांगितलें तुम्हांसी । येरू निजमानसीं क्षोभला ॥ ७० ॥ मी काय राजभारू वाहें । मज काय स्त्रीसंग आहे । मी निःसंग निजनिर्वाहें । सांग जाय पाहें रायासी ॥ ७१ ॥ हातींची टाकिली राखोटी । तोडोनि टाकिली लंगोटी । निःसंग मी एक सृष्टीं । मज पहावया दृष्टी येऊं दे राजा ॥ ७२ ॥ द्वारपाळें रायाप्रती । सांगितल्या शुकोक्ती । राजा तेंचि सांगे तयाप्रति पुंढती[4] । संगत्यागस्थितीं सुखी होय ॥ ७३ ॥ संगत्यागें सुखप्राप्ती । द्वारपाळ सांगे राजोक्ती । आतां कोण संग मजप्रती । ते येऊनि नृपति पाहो सुखें ॥ ७४ ॥ संगत्याग पुढतपुढती । राजा सांगे कोण्या अर्थी । कोण संग आहे मजप्रती । तें पाहूं निश्चितीं आदरिलें ॥ ७५ ॥ मी शुक तों येथें कोण । माझ्या शुकत्वा काय कारण । वस्तु नामरूपातीत[5] पूर्ण । शुकीं शुकपण देहत्वें ॥ ७६ ॥ देहाचे माथां शुकपण । तो देह येथें किंलक्षण । देह पांचभौतिक[6] पूर्ण । माजी मी कोण तें शोधूं[7] पां ॥ ७७ ॥ देह पंचभूतआभास । त्या पंचभूतांचा विलास । विवंचूं पां सावकाश । स्वस्वरूप साधावया ॥ ७८ ॥ पृथ्वी नव्हें मी जडत्वें । जवळ नव्हें मी अधोगमनत्वें । तेज नव्हें मी दाहकत्वें । मी चंचळत्वें वायु नव्हें ॥ ७९ ॥ रितें दिसे जेथें जेथें । तें नभ नव्हें मी शुकत्वें । मी नव्हें पंचभूतें । त्याहूनि परतें तें मी स्वयें ॥ ८० ॥ अहं नव्हें मी देहममत्वें । सोहं नव्हें मी मायिकत्वें । अहंसोहंहूनि परतें । तें मी निश्चितें निजरूप ॥ ८१ ॥ ऐसी विवंचितां उपपत्ती[8] । स्वरूपीं पावली वृत्ती । तेणें तटस्थ जाली स्थिती । इंद्रियवृत्ति निचेष्टित ॥ ८२ ॥ ऐसा निचेष्टित सात रात्री । उभा होता राजद्वारीं । दंश मशक मत्कुणांमाझारी । सप्तरात्री अचंचळ[9] ॥ ८३ ॥ शुकासी निर्विकल्पसमाधी । द्वारपाळ रायासी सांगती आधीं । शुक पूर्ण जाला त्रिशुद्धी । अहंबुद्धी हारपली ॥ ८४ ॥ ऐसें सांगतां द्वारपाळ । विदेही हरुषला प्रबळ । सामोरा जावोनि तत्काळ । अंतरगृहासी आणी ॥ ८५ ॥ रायें उचलोनियां त्यासी । ठेविला पैं राणिवंसीं[10] । श्रीशुकाची दशा कैसी । पुसे राणियांसी स्वयें राव ॥ ८६ ॥ नानाभोगविलासीं । शुकासी निर्द्वंद्व राणिवसीं । विदेहत्व बाणलें त्यासी । ऐसा रायासी निश्चयो जाला ॥ ८७ ॥ ब्रह्मत्व बाणलें योगिराजा । जाणोनि उल्लास भूभुजा । सिंहासनीं बैसवोनि वोजा । श्रीशुकाची पूजा ब्रह्मत्वें केली ॥ ८८ ॥ स्वमुखें सांगे श्रीशुकासी । मी जनक आलोंसें भेटीसी । वचनें शुक जाला उल्लासी । सर्वभावेंसी नृप नमियेला ॥ ८९ ॥ नमूनियां श्रीरायाचे चरण । शुक तटस्थ झाला संपूर्ण । त्याचें देखोनियां लक्षण । तें ज्ञान अपूर्ण नृप मानी ॥ ९० ॥ सर्वेंद्रियीं निरत । ज्ञान नाहीं नित्यमुक्त । तें ज्ञान साशंकित । पूर्णत्व तेथें असेना ॥ ९१ ॥ आंब्यां पाड लागल्या झाडीं । सेजेनें[11] न मुरतां न ये गोडी । निःशंक ज्ञान न होतां जोडी । तटस्थ गोंढी[12] अपक्वता ॥ ९२ ॥ दधि मंथूनि काढिजे लोणी । तें ठेवितां धरी खवट घाणी । तेंचि अग्निसंगें तावूनी । सुगंधपणीं सुस्थिर ॥ ९३ ॥ तेंवी तटस्थ अति संपूर्ण । तेचि मुख्यत्वें अपक्वता जाण । सर्वेंद्रियीं चित्तसमाधान । तें ज्ञानविज्ञान अति शुद्ध ॥ ९४ ॥ शुकाची तटस्थता मोडे । त्यासी शुद्ध ज्ञान जोडे । ऐसें विचारोनि धडफुडें[13] । निजनिवाडें[14] नृप बोले ॥ ९५ ॥ राजा म्हणे तटस्थ स्थिती । शुका कोठें आहे तुझी वृत्ती । येरु म्हणे आत्मप्रतीती । वृत्ति निश्चितीं सुखरूप ॥ ९६ ॥ ऐसी आत्मस्थिती आहे । त्याची स्थिति डोळां पाहे । तेव्हां दृश्य[15] द्रष्टा[16] चिन्मात्र[17] होय । हा अनुभव पाहे आत्मत्वाचा ॥ ९७ ॥ शुक जंव आत्मस्थिती पाहे । विस्मयें चाकाटला[18] ठाये । निजदेह नाहीं होये । वश्यत्वें राहे ब्रह्मपूर्णत्वें ॥ ९८ ॥ जें जें देखों जाय दिठीं । तें तें आत्मत्वेंचि

१ आत्मज्ञान. २ महाप्रतापी. ३ आत्मानुभव. ४ पुन्हां. ५ नामरूपरहित. ६ पांच भूतांपासून झालेला. ७ कोणत्या लक्षणाचा तें शोधून पाहूं. ८ उद्देश, कारण. ९ स्थिर. १० राण्या रहाण्याच्या जागेत, जनानखान्यांत. ११ आंब्याच्या आडींत. १२ मोठी. १३ नीट. १४ आत्मनिश्चयानें. १५ जें पहावयाचें तें. १६ पाहणारा. १७ पूर्ण ज्ञान. १८ चकित झाला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

उठी । बाप गुरुवाक्याची कसवटी । दृश्याचिये
पोटीं परब्रह्म नांदे ॥ ९९ ॥ स्त्रीपुरुषांचिये व्यक्ती ।
पूर्णब्रह्मत्वें प्रचीती । पशु पक्षी नाना जाती । आत्म-
स्थिती जग नांदे ॥१००॥ जें जें पाहे तें तें आत्म-
स्थिती । तंव तंव सर्वेंद्रियां ब्रह्मप्राप्ती । गुरु-
वाक्याची परम ख्याती । सभाग्य पावती स्वानंदें
॥ १ ॥ अगाध सद्गुरुगरिमा[1] । ब्रह्मत्व आलें इंद्रिय-
कर्मा । सहज भेटी परब्रह्मा । देहधर्म चिदत्वें ॥२॥
निद्रेचें निजशेजार । तळीं धरा ना वरी अंबर ।
पहुडणें अति अरुवार[2] । चिदचिन्मात्रस्वभावें ॥ ३॥
विसरोनि शेष निमाला । आठवाचा ठावो पुसिला ।
सहज सुखें सुखाळु जाला । दुष्काळ पडिला देह-
भावा ॥ ४ ॥ जागृती आली ब्रह्मपूर्ण । स्वप्न जालें
चैतन्यघन । सुषुप्ती जाली सुखसंपन्न । हा प्रताप
पूर्ण गुरुआज्ञेचा ॥५॥ गुरुआज्ञेचा चमत्कार ।
श्रवणीं पडतांचि अक्षर । सुखरूप जाला
संसार । चराचर ब्रह्ममय ॥ ६ ॥ गुरुवाक्याचा
गौरवो । शुकासी जाला सहजानुभवो । तेणें अति
आल्हादें पहा हो । साष्टांगीं राव सद्भावें नमिला
॥ ७॥ रायें दिधलें आलिंगन । दोघांचें गेलें दोनी-
पण । मुसावलें[3] चैतन्यघन । पूर्णत्वें पूर्ण परिपूर्ण
जाला ॥ ८ ॥ पूर्णत्वें पावोनि समाधान । सहज
अंगीं सुटलें आलिंगन । तरी न दिसे दोनीपण ।
अखंडत्वें पूर्ण आत्मत्वा ॥ ९ ॥ शुक म्हणे जनका-
प्रती । नकळोनि हे सहजस्थिती । म्यां विकल्प
धरिला चित्तीं । मुख्य पूज्य मूर्ति श्रीव्यास ॥११०॥
व्यासासी स्त्रीपुरुषभेद भिन्न । ऐसें अप्सरांचें
वचन । ऐकोनि विकल्पें भरलें मन । व्यास अज्ञान
निश्चयें मानीं ॥ ११॥ ऐसिया विकल्पाचा समूळ
दाहो। तुझेनि वचनें केला पाहा हो। धन्य ज्ञानाचा
अनुभवो । निःसंदेहो भवद्वाक्यें[4] ॥ १२ ॥ द्वार-
पाळाच्या निरोपावरी । माया अविद्या विकल्पा
बोहरी[5] । तुझ्या वैभवाची थोरी । वंद्य सुरवरीं
सर्वत्र ॥ १३ ॥ बाप वाक्याचे तिखट बाण । घायें-
वीण छेदिला प्राण । जीव मारोनिया संपूर्ण ।
पूर्णत्वीं पूर्ण मज केलें ॥ १४ ॥ ऐकोनि शुकाचें
वचन । जनक जाला सुखसंपन्न । येथोनि शुक
जाला सुखपूर्ण । संतोषोनि आपण काय बोले
॥ १५ ॥ जनक म्हणे धन्य धन्य । जें तुज जालें
समाधान । तेंचि गुह्याचें गुह्य ज्ञान । ब्रह्मसमा-
धान तया नांव ॥ १६ ॥ पूर्वींच तूं ज्ञाननिधी ।
वस्तु आकळिली निजात्मबुद्धी । गुरुवाक्य तेंचि
त्रिशुद्धी । निजात्मसिद्धी निश्चित ॥ १७ ॥ जे तूं
पावलासी समाधी । यावरी ज्ञानसिद्धी । नाहीं
नाहीं गा त्रिशुद्धी । निजात्मबुद्धी याचि नांव
॥ १८ ॥ जे तुज जाली आत्मप्राप्ती । तेचि नारा-
यणाची ज्ञानोक्ती । तेंचि ज्ञान श्रीकृष्णनाथीं ।
तेचि स्थिती नारदाची ॥ १९ ॥ तेचि स्थिती
याज्ञवल्क्यासी । तेचि स्थिती व्यासासी । तेचि
स्थिति मजपासीं । निश्चयेंसीं निश्चित ॥ १२० ॥
स्नेहें[6] सूत्रें[7] दीप भिन्न । प्रभा एकत्वें अभिन्न ।
तेवीं ज्ञात्याचें विचित्र कर्मचिन्ह । परी ज्ञेय ज्ञान
एकची ॥ २१ ॥ नारदासी नित्य लंगोटी । कृष्ण
वैभवें संपन्न सृष्टीं । दोहींची ज्ञानैकसवटी[8] ।
एकत्वें पुष्टी समसाम्य ॥ २२ ॥ जडभरत म्हणती
जड । याज्ञवल्की ज्ञानारूढ । दोहींचें ज्ञान एकत्वें
गोड । ज्ञानीं पडिपांड[9] असेना ॥ २३ ॥ देह देखतां
दोष कोटी । आत्मत्वें पाहातां निर्दोष सृष्टी ।
यालागीं देहीं न ठेवावी दृष्टी । दोषांची कोटी
देहात्मता ॥ २४ ॥ ऐकोनि जनकाची गोष्टी ।
सुख जालें शुकाच्या पोटीं । संशय गेला उठाउठीं ।
स्वानंदपुष्टी सदोदित ॥ २५ ॥ यापरी जनकें श्री-
शुकासी । सांगितलें शुद्ध ज्ञानासी । तेणें विश्रांति
जाली रायासी । तें सुख वाचेसी न बोलवे ॥ २६ ॥
सुख उलंथलें[10] संपूर्ण । सकळ संशयां जालें दहन ।
वाचेसी पडिलें महामौन । भय शोक पूर्ण माव-
ळले ॥ २७ ॥ निमाली हृदयाची आधी[11] व्याधी ।
इंद्रियें निवालीं सुखावबोधीं[12] । विश्रांति पावली
त्रिशुद्धी । सुख सुखावबोधीं संतुष्ट ॥ २८ ॥ शुक
म्हणे रायाप्रती । मज जाली परम विश्रांती । ते
विश्रांती भोगावया एकांतीं । मेरुगिरीप्रति शुक
गेला ॥ २९ ॥ निर्विकल्प निरहंकारी । आसन
घालोनि योगमुद्रीं । शुक बैसला समाधिवरी ।
मेरुशिखरीं स्वानंदें ॥ १३० ॥ स्नेहेंवीण प्रकाशरूप ।
निर्वातींचा[13] जैसा दीप । तैसें शुकाचें समाधि-
स्वरूप । निर्विकल्प या नांव ॥ ३१ ॥ शुक म्हणे

१ सद्गुरूचा मोठेपणा. २ नरम. ३ एकत्र झालें, ओतलें. ४ तुझ्या वाक्यानें. ५ नाश, भस्म. ६ तेलानें. ७ वातीनें.
८ ज्ञानाचा अनुभव. ९ न्यूनाधिक. १० उत्पन्न झालें. ११ मानसिक व्यथा. १२ सुखज्ञानानें. १३ निवाऱ्यांतला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

मी क्षणभरी । सुखें बैसलों मेरुशिखरीं । बाहेर संख्या शास्त्रांतरीं । दशसहस्त्रीं जालीं अब्दें ॥३२॥ एवं स्वरूपाचे ठायीं । मुळीं उदय अस्त नाहीं । काळा तेथें अटक पाहीं । ठेवितां ठायीं टिकेना ॥ ३३ ॥ ऐकें श्रीरामा कृपामूर्ती । यापरी शुकाची ब्रह्मप्राप्ती । जनकें आणिली यथास्थिती । आत्मप्रतीती समाधिस्थ ॥३४॥ समाधि आणि उत्थान । दोनी अवस्था बोळवून । करोनियां श्रीशुक जाण । जाला संपूर्ण पूर्णत्वें ॥ ३५ ॥ एका जनार्दना शरण । शुक सुखें जाला ब्रह्मसंपन्न । पुढें श्रीरामातें पूर्णपण । वसिष्ठ आपण निरूपील ॥ ३६ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे बालकांडे एकाकारटीकायां शुकजनकसंवादो नाम दशमोऽध्यायः ॥ १० ॥ ओंव्या ॥ १३६ ॥ श्लोक ॥ ६ ॥

अध्याय अकरावा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥

विश्वामित्र उवाच—

तस्य व्यासतनूजस्य मलमूत्रापमार्जनम् ॥
यथोपयुक्तं तद्राम तावदेवोपयुज्यते ॥ १ ॥

श्रीव्यासाचा विरक्त पुत्र । सांगितलें शुकाचें चरित्र । जनकें त्याचा विकल्पमात्र । केला निरहंकार द्वारपाळद्वारें ॥ १ ॥ सज्ञानाचें कृपावचन । द्वारपाळद्वारें जाण । करोनि विकल्पाचें दहन । पूर्ण समाधान श्रीशुकासी ॥ २ ॥ जैसी विरक्ती शुकासी । तैसी विरक्ती श्रीरामासी । राज्यवैभव नावडे त्यासी । नित्य विषयासीं विरक्त ॥ ३ ॥ श्रीरामा तुझें ध्यान गंभीर । शुकाच्या ऐसा निजविचार । त्वांही करावा श्रीगुरु साचार । विश्रांतीचें घर विवेकापासीं ॥ ४ ॥

वासनासंक्षयो नाम मोक्ष इत्युच्यते बुधैः ॥
पदार्थवासनासक्तिर्बंध इत्यभिधीयते ॥ २ ॥

सकळ वासनेची शांती । या नांव मुख्य मुक्ती । विषयवासनाउत्पत्ती । बद्धता निश्चितीं या नांव ॥ ५ ॥ देहीं असोनि विदेहस्थिती । ज्यासी नाहीं विषयासक्ती । त्यासी बोलिजे जीवन्मुक्ती । जाण निश्चितीं रघुनाथा ॥ ६ ॥ यावरी श्रीरामाचें मनोज्ञान । शुकाच्या ऐसें संपूर्ण । विश्वामित्रें सांगावें ज्ञान । तें जाणोनि चिन्ह ऋषि बोले ॥ ७ ॥

रघूणामेष सर्वेषां प्रभुः कुलगुरुः सदा ॥
सर्वज्ञः सर्वसाक्षी च त्रिकालामलदर्शनः ॥ ३ ॥

रामा तुज द्यावया समाधान । उपदेशावया ब्रह्मज्ञान । वसिष्ठ कुळगुरु सज्ञान । सदा संपन्न षड्गुणैश्वर्यें ॥ ८ ॥ भूत भविष्य वर्तमान । त्रिकाळज्ञाता सर्वज्ञ । अंतर्यामीं साक्षी पूर्ण । गुरुत्वें गहन श्रीवसिष्ठ ॥ ९ ॥ सूर्यवंशीं जे जे उत्पन्न । त्यांसी वसिष्ठ सांगे ज्ञान । श्रीवसिष्ठाचें ज्ञानमहिमान[1] । हरि हर आपण वंदिती स्वयें ॥ १० ॥ तुजऐसा कुळगुरु असतां । मी उपदेशूं नये रघुनाथा । तरी वसिष्ठासी अनन्यता । ज्ञानप्राप्त्यर्थ शरण रिघें ॥ ११ ॥ पुढीलाचा शिष्य अति वरिष्ठ । त्यासी चाळवी तो गुरु भ्रष्ट । उपदेशी तो ज्ञाननष्ट । अति पापिष्ठ प्रैलोभें[2] ॥ १२ ॥ कुळीं असतां सज्ञान गुरु । त्यासी त्यागी तो पापिष्ठ नरू । स्वयें उपदेशी तो पापाचारू । हा निजनिर्धारू ज्ञानोपदेशीं ॥ १३ ॥ वसिष्ठ ज्ञानगुरु सूर्यवंशीं । त्याच्या शिष्यासी जो उपदेशी । तेणें जोडिल्या पापराशी । गुरुत्वें शिष्यासी उपदेशितां ॥ १४ ॥ यालागीं गा रघुपती । पावावया ब्रह्मप्राप्ती । वसिष्ठ ज्ञानगुरूसी प्रार्थीं । तेणें तूं विश्रांति पावसी सुखें ॥ १५ ॥ ऐसें सांगोनि श्रीरामासी । विश्वामित्र बोले वसिष्ठासी । पूर्णाधिकार रघुनाथासी । तूं कां उपदेशीं उदास ॥ १६ ॥ वसिष्ठा तूं कांहीं स्मरतोसी । पूर्वीं वैर आम्हां तुम्हांसी । तें वैर शांत करावयासी । ब्रह्मा उपदेशी निजगुह्यज्ञान ॥१७॥ त्या गुह्यज्ञानाच्या पोटीं । मीतूंपणाची मावळे गोष्टी । वैर निमालें उठाउठीं । स्वानंदपुष्टी आम्हां दोघां ॥ १८ ॥ ज्या स्वानंदाचिये स्थिती । आम्हां तुम्हां जाली अति प्रीती । विकल्प नुपजे कल्पांतीं । तेंचि श्रीरामाप्रती उपदेशीं ॥ १९ ॥ तें ज्ञान विसरलों म्हणसी । आठव विसरातें स्वयें ग्रासी । नाठवतां आठव अहर्निशीं । विसरू त्यापासीं असेना ॥ २० ॥ ज्ञानाची ज्ञानगंभीरी[3] । विरक्त शिष्याचे सुक्षेत्रीं । उपतिष्ठे[4] निजनिर्धारीं । ते गुरूची खरी गुरुगरिमा ॥ २१ ॥ कामक्रोधादि-

१ ज्ञानाचा महिमा. २ अति लोभानें. ३ ज्ञानाची सखोलता. ४ राहते, नांदते.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

महाज्वाळें। ज्याचे शिष्याचें ज्ञान न पोळे। तेणें गुरुत्वें अति प्रांजळें। अदग्ध सोज्ज्वळें तें ज्ञान ॥ २२ ॥ शिष्याचे विकल्प समस्त। खंडोनि निर्विकल्प करीत। तेंचि ज्ञान अखंडित। शुद्ध शास्त्रार्थ या नांव ॥ २३ ॥ शुद्ध शास्त्रार्थ प्रतिपादिती। तेचि सद्गुरु उपदेशिती। ज्या शिष्यासी होय प्रतीती। त्या गुरुत्वाची ख्याती हरिहरां वंद्य ॥ २४ ॥ शिष्यांसी नाहीं ब्रह्मप्रचीती। शब्दज्ञानें सतेज युक्ती। मनीं विषयांची आसक्ती। ते जाण निश्चिती अशिष्य ॥ २५ ॥

अशिष्यायाविरक्ताय यत्किंचिदुपदिश्यते ।
तत्प्रयात्यपवित्रत्वं गोक्षीरं श्वदृताविव ॥ ४ ॥

मनुष्यदेहाचिया प्राप्तीं। संसार तरावया गुरुभक्ती। ऐसा भाव नाहीं ज्याचे चित्तीं। तो जाण निश्चितीं अशिष्य ॥ २६ ॥ ज्यासी विषयवासना चित्तीं। ज्यासी संसारावर आसक्ती। लोकैषणेची[1] अति प्रीती। तो जाण निश्चितीं अविरक्त ॥ २७ ॥ ऐशियातें जे उपदेशिती। ते अपवित्र उपदेशस्थिती। जेवीं श्वानचर्मपात्राप्रती। गोक्षीर भरिती धारोष्ण ॥ २८ ॥ परशिष्यासी उपदेशन। तें गुरुत्वासी अति दूषण। अशिष्यासी सांगावें ज्ञान। तें निंद्य पूर्ण सर्वार्थीं ॥ २९ ॥ सच्छिष्यासी सद्गुण। देखोनि सांगावें गुह्य ज्ञान। त्या गुरूचें गुरुत्व धन्य। परम पावन परमार्थी ॥ ३० ॥ हें विश्वामित्राचें वचन। ऐकोनियां अति गहन। सिद्ध साधक ऋषिजन। करिती स्तवन धन्य धन्य ॥ ३१ ॥ व्यास नारद याज्ञवल्की। शुकप्रमुख शौनकीं। विश्वामित्रातें निजमुखीं। सकळिकीं पुनः पुनः स्तविजे ॥ ३२॥ जो ब्रह्मज्ञानाचा महामेरू। जो स्वानंदाचा सुखसागरू। तो बोले वसिष्ठ ऋषीश्वरू। चित्तचमत्कारू वचन ज्याचें ॥ ३३ ॥ ब्रह्मयापासोनी ब्रह्मप्राप्ती। परी ब्रह्मयासमान ज्ञानशक्ति। वचनमात्रें ब्रह्मप्राप्ती। सच्छिष्य पावती स्वानंदें ॥ ३४॥ ज्ञान वैराग्य औदार्य ख्याती। यश श्री ऐश्वर्यस्थिती। हे साही गुण वसिष्ठासी असती। भगवंत म्हणती तेणें त्यासी ॥३५॥ सूर्यवंशीं निजसन्मानीं। गुरुत्वें जो मुकुटमणी। रायें पूजिला अनुदिनीं। जो वरासनीं उपविष्ट[3] ॥ ३६ ॥ वसिष्ठ करितां उपदेश। शिष्य तत्काळ होय निरास। त्या निरासतेची कास। जेणें सावकाश धरिली असे ॥ ३७ ॥ श्रीराम अधिकारिशिरोरत्न। परी न पुसतां ब्रह्मज्ञान। सांगों नये गा आपण। हें मुख्य लक्षण उपदेशीं ॥ ३८॥ वसिष्ठाची महाख्याती। सूर्य जिंतिला दंडशक्ती। तो विश्वामित्राप्रती। उपदेशस्थिती सांगत ॥ ३९॥ सद्गुरूतें न प्रार्थितां। शिष्य आदरें न पुसतां। ज्ञान सांगों नये गा सर्वथा। सांगे तो तत्त्वतां गुरु मूर्ख ॥४०॥ गुरु स्वयें म्हणे शिष्यास। तूं घे माझा उपदेश। तेव्हांच गुरुत्व पडिलें ओस। वाढला असोसें[4] गुरुत्वलोभें ॥ ४१ ॥ यालागीं शिष्यें न पुसतां जाण। आपण सांगों नये ब्रह्मज्ञान। जरी राम अधिकारिरत्न। तरी अप्रश्नीं[5] ज्ञान सांगों नये॥ ४२ ॥ शिष्य उपदेशी उदासभूत[6]। गुरु साक्षेपी उपदेशार्थ। तेणें गुरुत्वा जाला घात। अविवेकें लोलुप[7] शिष्यार्थीं ॥ ४३ ॥ विश्वामित्रा तुझी आज्ञा। माझेनि न करवे अवज्ञा। आतां सांगेन ब्रह्मज्ञाना। साधूची आज्ञा मज वंद्य ॥ ४४ ॥ विश्वामित्रा तूं साधुरत्न। सुरवरां वंद्य महिमान। क्षत्रिय होत्साता ब्राह्मण। स्वयें ज्ञानें संपूर्ण वश्य केलें ॥ ४५ ॥ त्या तुज साधूची निजाज्ञा। हरिहरां न करवे अवज्ञा। यालागीं मी रघुनंदना। गुह्यज्ञाना सांगेन ॥ ४६॥ माझे तुझे वैरा शांती। जें उपदेशिलें प्रजापतीं। तें अखंड स्मरे स्फूर्ती। संसारप्रवृत्तिनिवर्तक[8] ॥४७॥ तेणें ज्ञानें मी आपण। उपदेशीन रघुनंदन। ज्या उपदेशासी विघ्न। कल्पांतीं जाण बाधेना ॥ ४८ ॥ विघ्नचि होय निर्विघ्न। प्रपंच होय चैतन्यघन। शिष्य होय ब्रह्म पूर्ण। अज्ञान तें ज्ञान होवोनि ठाके ॥ ४९ ॥ ऐसी हे गुह्य स्थिती। उपदेशीन श्रीरामाप्रती। हे वसिष्ठाची वचनोक्ती। ऐकोनि निश्चितीं सुखावे राम ॥ ५० ॥ मग वसिष्ठासी श्रीराम आपण। सद्भावें घाली लोटांगण। अनन्यभावें तुज मी शरण। मी शिष्य पूर्ण गुरुवर्या ॥ ५१ ॥ ऐसा सद्गदित कृपावचन। करुणा भाकी दीनवदन। स्वामींनीं कृपा करावी आपण। मज दीना उद्धरावें ॥ ५२ ॥ जेवीं दीपें गवाक्षांसी[9] दीप्ती। तीं गवाक्षें दीपासी नेणती। तेवीं तुझेनि

१ लोकांस प्रिय होण्याची. २ कुत्र्याच्या कातड्यावर. ३ बसलेला. ४ हांवरेपणा. ५ विचारल्यावांचून. ६ विरक्त. ७ आग्रही, खटपटी, तत्पर. ८ संसारापासून निवृत्त करणारें. ९ खिडक्यांना.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सूर्यवंशा ज्ञानप्राप्ती। ते तुझी ज्ञानस्थिती मी नेणें ॥ ५३ ॥ तुझें अगाध ब्रह्मज्ञान। तें मी नेणेंचि अज्ञान। तूं कुलगुरु सनातन। म्हणोनि चरण दृढ धरिले ॥५४॥ श्रीराम स्वयें चैतन्यघन। देवकार्यार्थ अवतार पूर्ण। करावया धर्मसंरक्षण। मनुष्यपण नटनाट्य ॥ ५५ ॥ तेणें पैं म्हणवितां अज्ञान। ब्रह्म ब्रह्मत्व न्यून। अथवा म्हणवितां सज्ञान। ब्रह्म ब्रह्मत्व पूर्ण अधिक नव्हे ॥ ५६ ॥ एवं ज्ञानाज्ञानातीत। श्रीराम स्वयें सदोदित। तोही लोकसंग्रहार्थ। गुरुत्वें वंदित वसिष्ठातें ॥ ५७ ॥ देवोनि सद्गुरूसी सन्मान। श्रीराम न पुसता ब्रह्मज्ञान। तैं ज्ञानमार्ग विच्छिन्न। स्वयें आपण केलासें होय ॥ ५८ ॥ करावया दीनोद्धारा। गुरुशिष्यपरंपरा। स्थापावया रघुवीरा। कळवळा पुरा ज्ञानमार्गीं ॥ ५९ ॥ यालागीं श्रीराम आपण। केवळ होवोनि अज्ञान। गुरुत्वें वसिष्ठासी सन्मान। देवोनि ब्रह्मज्ञान विनीतत्वें पुसे ॥ ६० ॥ घेवोनि अज्ञानत्वाची बुंथी। केवळ अज्ञानप्रश्नोक्ती। स्वयें पुसताहे रघुपती। तेही उपपत्ती अवधारा ॥ ६१ ॥

श्रीराम उवाच–

प्राक्तनं वासनाजालं नियोजयति मायया।
मुने तथैव तिष्ठामि कृपणः किं करोम्यहम् ॥ ५ ॥

ऐकें मुनि सावधान। जैसें माझें पूर्व प्राक्तन। मी त्या प्रारब्धाधीन। स्वयें कर्तेपण मज नाहीं ॥ ६२ ॥ पाहतां प्रारब्धाकडे। मी तंव केवळ बापुडें। म्यां काय करावें पुढें। हें धडपुढें लक्षेना ॥ ६३ ॥ देह असतां प्रारब्धाधीन। जेणें होय ब्रह्मज्ञान। तैसी कृपा करावी परिपूर्ण। ज्ञानविज्ञानपरिपाकें ॥ ६४ ॥

वसिष्ठ उवाच–

अंते वयसि हे राम श्रेयः प्राप्नोति शाश्वतम्।
स्वप्रयत्नोपनीतेन पौरुषेणैव नान्यथा ॥ ६ ॥

मनुष्यदेहीं ब्रह्मप्राप्ती। तो देहभाव नसावा चित्तीं। विदेहत्वें परमार्थगती। विवेकसद्युक्ति निजपुरुषार्थ ॥ ६५ ॥ नरदेहाऐसें गोमटें। शोधितां त्रैलोक्यीं न भेटे। आणि देहाऐसें वोखटें। अत्यंत खोटें आन नाहीं ॥ ६६ ॥ वोखटें म्हणोनि त्यागावें। तरी मोक्षसुखा नागवावें। गोमटें म्हणोनि भोगावें। तैं अवश्य जावें अधःपाता ॥ ६७ ॥ हें भोगवे ना त्यागवे। निजपुरुषार्थलाघवें। भगवन्मार्गी लावावें। तरीच पावावें परम सुख ॥ ६८ ॥ ऐकें बापा रघुनाथा। या युक्तीच्या पुरुषार्था। साधूनियां पावावें परमार्था। उपाव अन्यथा असेना ॥ ६९ ॥

शुभाशुभाभ्यां मार्गाभ्यां वहंती वासनासरित्।
सा मनःपुरुषार्थेन योजनीयेति मे मतिः ॥ ७ ॥

मनोरथ नानावृत्ती। या नांव वासनासरिता म्हणती। इयेमाजी बुडाले नेणों किती। बळी ते तरती निजपुरुषार्थें ॥ ७० ॥ शुभाशुभ वासनाओघ। सबळ बळें वाहती अनेगं। ते विवेकें मोडोनि साङ्ग। परमार्थीं चांगं पुरुषार्थ कीजे ॥ ७१ ॥ त्या पुरुषार्थाचें लक्षण। अशुभ वासना त्यागून। परमार्थीं दृढ राखावें मन। हें मुख्य लक्षण परमार्थाचें ॥ ७२ ॥ बाळक लाविजे अभ्यासीं। शनैः शनैः योग्यता होय त्यासी। तेवीं आत्मअनुसंधानें चित्तासी। सावकासीं राखावें ॥ ७३ ॥ अनुसंधान सांडितां चित्ता। वळवून लावावें परमार्था। येविषयीं करावें पुरुषार्था। चित्तजयार्थी सांटोप ॥ ७४ ॥ दांत खावोनियां नेहटीं। लागावें मनोजयाच्या पाठीं। हात चुरोनियां उठाउठी। मनोजय दृष्टीं लक्षावा ॥ ७५ ॥ अंगें आवरोनियां अंग। मनोजय करावा साङ्ग। हाचि परमार्थाचा मार्ग। अति अव्यंग रघुनाथा ॥ ७६ ॥ सावधान अहोरात्र। चित्तें लक्षावें चिन्मात्र। हेंचि परमार्थाचें सूत्र। अति पवित्र निजनिष्ठा ॥ ७७ ॥ मनें मना सावधान। मनें मना निर्दाळण। मनें मना अनुसंधान। या नांव पूर्ण पुरुषार्थ ॥ ७८ ॥ सकळांच्या वित्पत्ती। अनभ्यासें शांत होती। तैसी नव्हे ज्ञानस्थिती। क्षणार्धें प्राप्ती प्रबळे स्वयें ॥ ७९ ॥ वेदशास्त्र श्रुति पुराण। नाना कळा

१ लोकाचाराकरितां. २ मोडला, बंद पाडला. ३ नम्रतेनें. ४ आवरण, आच्छादन. ५ नीट, चांगलेंसें. ६ वाईट. ७ फसावें, नाहींसें करून घ्यावें, ८ चांगलें, ९ नरकास.

१० पुष्कळ. ११ चांगला, उत्तम. १२ वाईट. १३ हळुहळु. १४ लक्ष्य, संदर्भ. १५ प्रयत्नासहित. १६ जोरानें. १७ परिपूर्ण. १८ अर्थज्ञान, १९ नाहींशा होतात, २० वाढते,

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

अति विंदान । अनभ्यासें होय क्षीण । ज्ञानाचें लक्षण ऐसें नव्हे ॥ ८० ॥ ज्ञान प्राप्तकाळीं जाण। अभ्यासेंविण वाढे पूर्ण । जन्ममरण करी क्षीण । तंव तंव प्रबळपण[1] ज्ञानाचें ॥ ८१ ॥ साधक ज्ञान सांडूं पाहे । सांडूं जातां अधिक होय । ऐसी ज्ञानकळेची सोय । सुलभत्वें आहे सुखरूप ॥८२॥ ज्ञानसुलभत्वें सुखप्राप्ती । तरी कां साधक सदा शिणती । त्यांसी अनुताप नाहीं चित्तीं । अवैराग्यें प्राप्ती ज्ञानाची नव्हे ॥ ८३ ॥ यालागीं आपण । महत्त्व सांडोनियां पूर्ण । रंकाचे रंक होऊनि जाण । ज्ञानगवेषण[2] करावें ॥ ८४ ॥ भूक नाहीं ज्याचे पोटीं । तो पंचामृत पायें लोटी । तेवीं अवैराग्यें करंटीं । शुद्ध ज्ञानेंसीं भेटी शिणतां नोहे ॥ ८५ ॥

वरं शरावहस्तस्य चांडालागारवीथिषु ।
भिक्षार्थमटनं राम न मौर्ख्यं हंत जीवितम् ॥ ८ ॥

हातीं घेवोनि खापर । ज्ञानार्थ चांडाळाचे घरोघर । भीक मागणें श्रेष्ठ सधर[3] । परि मूर्ख शरीर त्याहूनि निंद्य ॥ ८६ ॥ मूर्खत्वें सार्वभौम पूर्ण । तें सोलींव दुःख दारुण । जो ज्ञान पावोनि अकिंचन[4] । तो वंद्य जाण ब्रह्मादि देवां ॥ ८७ ॥ तें पावावया निजज्ञान । विवेकवैराग्यज्ञानसंपन्न। सद्गुरूसी रिघतां शरण। तैं मूर्खपण मावळे ॥८८॥

श्रीराम उवाच--
एवंस्थिते बद्धमुक्ते कथमेतज्जने स्थिते ॥
क्रमो गुरूपदेशस्य स्वात्मज्ञानस्य कारणम् ॥ ९ ॥

ऐसिया स्थितीं आचार्या । वर्ततां जगज्जाळमाया । कैसेनि तरिजे गुरुवर्या । सांग त्या उपाया आत्मप्राप्तीलागून ॥ ८९ ॥ गुरुवाक्यें ब्रह्मप्राप्ती । ऐसीं श्रुतिशास्त्रें गर्जती । ते प्राप्तीची निजस्थिती । पावेन निश्चितीं गुरुराया करीं ॥९०॥

वसिष्ठ उवाच--
उपदेशक्रमो राम व्यवस्थामात्रपालनम् ।
ज्ञप्तेस्तु कारणं शुद्धा शिष्यप्रज्ञैव केवलम् ॥ १० ॥

गुरूपदेशाचिया गोष्टी । नाहीं ज्ञानाची भरली वाटी । जे शिष्याचे लावी होटीं । ब्रह्मज्ञान पाठीं पावेल ॥ ९१ ॥ गुरूपासीं नाहीं ज्ञानाचा गोळा । जो गिळवी शिष्यासी तत्काळा । गुरुरूपें नाहीं ज्ञानधनमोटळा[5] । जे शिष्याजवळां स्वयें दे ॥९२॥ गुरूनें देइजे आपण । शिष्यें घेइजे अंजुळीपूर्ण । तैसें नव्हे ब्रह्मज्ञान । अतर्क्य विंदान ज्ञानप्राप्तीचें ॥ ९३ ॥ उपदेशक्रम रघुनाथा । गुरु न सांगोनि सांगता । शिष्य कानेंवीण ऐकता । प्राप्ति परमार्था तैं लाभे ॥ ९४ ॥ दृष्टीनें देखिजे सावधान । तेंचि कूर्मीच्या[6] पिल्यां अमृतपान । दृष्टि तंरळतांचि[7] जाण । पडे लंघन तयांसी ॥ ९५ ॥ तेवीं श्रीगुरुशिष्येंसी एकात्मता । तेणें शिष्य लाभे परमार्था । अणुमात्र भाव पालटतां । उपदेशरिता पडे शिष्य ॥ ९६ ॥ गुरु सांगे गुह्य ज्ञान । शिष्य तें त्यजूनी सेवी गुण वर्ण । वर्णावर्णदेहाभिमान । गेलिया मग ज्ञान स्वयें लाभे ॥ ९७ ॥ सच्चिदानंदनिजवार्ता । गुरु सांगे शिष्यस्वार्था। शिष्य स्वार्थीं सांडोनि चिंता । तरीच परमार्था पाविजे ॥ ९८ ॥ ज्या शिष्याचे चित्तीं चिंता । देहगेहादि[8] अति ममता । तो गुरूपदेशीं नित्य रितां[9] । प्राप्ति परमार्था कधीं नव्हे ॥ ९९ ॥ विषयस्वार्थ ज्याचे पोटीं । तो आस्थेच्या सांगे दोन चार गोष्टी । ते प्रज्ञा[10] अतिशयें चोरटी । परमार्थभेटी होवों नेदी ॥ १०० ॥ यालागीं तत्काळ । पावावया ब्रह्म प्रबळ । एकी शिष्यप्रज्ञाचि गा केवळ । परमार्थफळ तेणें लाभे ॥ १ ॥ शिष्यासी नाहीं चित्तशुद्धी । त्यासी शास्त्रें नव्हे आत्मबुद्धी । तो शास्त्र विकूनियां विषय साधी । हित त्रिशुद्धी नव्हेचि शास्त्रें ॥ २ ॥ शिष्या चित्तीं विषयासक्ती । गुरूपदेशें नव्हे परमार्थप्राप्ती । तो उपदेश जाय व्यर्थ अंतीं । करी विपरीत ज्ञानगर्वें ॥ ३ ॥ उपदेश स्वयें व्यर्थ गेला । सर्वेंचि ज्ञानगर्व घेवोनि आला । ज्ञातेपणें ताठा चढला । नायके बोला श्रेष्ठांच्या ॥ ४ ॥ स्वयें उपदेश केला व्यर्थ । परी वाढला अति अनर्थ । चित्तशुद्धी नाहीं सत्य । तेथें परमार्थ कदा न घडे ॥५॥ चित्तशुद्धि ज्याचे मनीं । तो परमार्थ पावे पाषाणीं । कळे चित्तशुद्धीची करणी । दावी जनीं वनीं जनार्दन ॥ ६ ॥

राम उवाच--
इयतो दृश्यजातस्य ब्रह्मांडस्य जगत्स्थितेः ।
मुने सत्ता कथं तत्र क मेरुः सर्षपोदरे ॥ ११ ॥

साधकभावनेच्या पोटीं । दृश्यजाळेंसीं ब्रह्मांड-

१ मोठी वाढ. २ ज्ञानाचा शोध. ३ अधिक. ४ भिकारी, दरिद्री. ५ ज्ञानरूपी धनाचें पुडकें—गांठोडें.

६ कांसवीच्या. ७ चंचळ होतांच. ८ देह, घर इत्यादि. ९ रिकामा, निरुपयोगी, १० बुद्धि, ज्ञान.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

कोटी । हरपती उठाउठी । राईच्या पोटीं मेरु जेवीं न मावे ॥ ७ ॥ ब्रह्मभावना सूक्ष्म संपूर। तीमाजी दिसे तें चराचर। केवीं हरपे जगडंबर। मशक गिरिवर गिळील कैसा ॥ ८ ॥

वसिष्ठ उवाच–

साधुसंगमसच्छास्त्रपरो भवसि राम चेत्।
तद्दिनेनैव नो मासैः प्राप्तोसि परमां धियम्॥१२॥

साधुत्वें पाहतां साधूसी। मुख्य साधुत्व सद्गुरूसी। तो जें स्वात्मत्व उपदेशी। सच्छास्त्र त्यासी बोलती ज्ञाते ॥ ९ ॥ त्या गुरुवाक्यीं एकात्मता। शिष्य जालिया सर्वात्मता। तो दिवस मास न लागतां। योग्य परमार्था तत्काळ होय ॥ ११० ॥ तत्काळ होय योग्यता। हाही विलंबू न साहे सर्वथा। हृदयीं सिद्धचि निजात्मता। गुरुवाक्य पाहतां नैराश्य लाभे ॥ ११ ॥ केवळ तंतु पाहतां दृष्टी। वस्त्र लोपे उठाउठी। सूक्ष्मब्रह्म लक्षितां दृष्टी। ब्रह्मांडकोटी मावळती ॥ १२ ॥ मरोनियां जो मेला। तो मागुतेन जन्मा आला। जो जितांचि जिवें निमाला। तो सुखी जाला सत्संगें ॥ १३ ॥ पाहातां सूक्ष्मदृष्टी सावधान। शून्याचें हरपे शून्यपण। तें जो होय ब्रह्म पूर्ण। साधुसज्जनसमागमें ॥ १४ ॥ जंव जंव नाहीं होय नश्वर देहो। तंव तंव सुखाचा उत्सव। निःशेष होय देहाचा अभाव। परमानंद पहा हो सत्संगें ॥ १५॥ सत्संगें ज्या अकिंचनता। तो ब्रह्मादिकां वंद्य सर्वथा। त्रैलोक्यवैभवा हाणोनि लाथा। ऐसी प्रसन्नता सत्संगें ॥ १६ ॥ ऐसिया सत्संगापरतें। श्रेष्ठ साधन नाहीं येथें। त्या सत्संगमहिमेतें। ऐक निश्चितें सांगेन ॥ १७॥ सत्संगें नाहीं द्रष्टेपण। पुढें दृश्य नाहीं जाण। देखतेवीण दर्शन। तें ब्रह्म पूर्ण रघुनाथा ॥ १८ ॥ दृश्य द्रष्टा दोहींतें। दर्शन प्रकाशे निश्चितें। तें दर्शन आकळे जयातें। ब्रह्मस्थिती त्यातें अभंग ॥ १९ ॥ साकरकणिका भिन्न भिन्न। परी त्या कणिका साकरचि आपण। तेवीं चराचर दृश्यमान। तें ब्रह्म पूर्ण पूर्णत्वें ॥ १२० ॥ उंच नीच अलंकार। परी तें एकचि भांगार। तेवीं पाहतां चराचर। वस्तु परात्पर परब्रह्म ॥ २१ ॥ म्हणती घटाकाश मठाकाश। परी तें सहजचि महदाकाश। तेवीं दृश्य दर्शनीं द्रष्टाभास। भासतो चिद्विलास चिन्मयत्वें ॥ २२॥ या निजात्मदृष्टि पाहतां। विषयीं विषयो ब्रह्मरूपता। तेचि उपपत्ती तत्त्वतां। ऐकें रघुनाथा सांगेन ॥ २३ ॥ मुख्य विषयो पंचविध। शब्द स्पर्श रूप रस गंध। यांची गोडी तो परमानंद। आत्मविद जाणती ॥ २४ ॥ विषयांचें गोडपण। ते गोडीच ब्रह्म पूर्ण! ते गोडीचें जें ज्ञातेपण। तें चैतन्यघन जाणावें ॥ २५ ॥ यस्यानंदस्य मात्रा जीवंति। विषयगोडी ते ब्रह्मस्फूर्ती। भोक्ता भोगी स्वयें चिच्छक्ती। जाणीव ते निश्चितीं परब्रह्म ॥ २६ ॥ यालागीं गा रघुनाथा। जेणें जाणिजे विषयस्वादता। ते जाणीव आली ज्याच्या हाता। तो जाण तत्त्वता स्वदेहीं ब्रह्म ॥ २७ ॥

श्रीराम उवाच–

येनैव भगवन् धीरा निश्चयेन महाधिया।
विशोकाः संस्थितास्तन्मे ब्रह्मन् प्रब्रूहि तत्त्वतः ॥ १३ ॥

मागील धीर वीर परमार्थी। पावले विशोक ब्रह्मप्राप्ती। ते विशोकतेची स्थिती। मज कां निश्चितीं प्रकटेना ॥२८॥ ऐसी उपदेशीं ज्ञानपदवी। जे धैर्यातें धैर्यचि आंगवी। अंग अंगातें स्वयें हरवी। विशोक सर्वभावीं जेणें मी होय ॥२९॥ ब्रह्मज्ञानाच्या उपपत्ती। सांगितल्या नाना युक्ती। जेणें सद्यः पावें ब्रह्मप्राप्ती। ते मज निश्चितीं सांगा स्वामी ॥ १३० ॥

वसिष्ठ उवाच–

श्रूयतां ज्ञानसर्वस्वं श्रुत्वा चैवावधारयेत्।
भोगेच्छामात्रको बंधस्तत्त्यागो मोक्ष उच्यते ॥ १४ ॥

ऐकें बापा रघुवीरा। सांगेन ज्ञानाच्या सर्व सारा। जो श्रवणार्थी चातक खरा। तो वाक्यसुखसारा झेलोनि घे ॥ ३१ ॥ ज्ञानकथा अवघेची ऐकती। परी ऐकिलें तें नाचरती। यालागीं श्रवणाची होय माती। परमार्थप्राप्ति त्यां कैंची ॥ ३२ ॥ पावन कथा ज्ञानगर्भोक्ती-। -अनवधानें ते श्रवण न निवती। मा ते चित्तामाजी केवीं पावती। त्यांची मननाची वस्ती उद्वस सदा ॥ ३३ ॥

१ परिपूर्ण. २ जगाचा विस्तार. ३ दारिद्र्य. ४ साखरेचे कण. ५ सोनें. ६ पांच प्रकारचा. ७ आत्मज्ञानी. ८ विषयांची गोडी. ९ जोडी, अंकुरित करी. १० तत्काळ, तत्क्षणींच. ११ बोलण्यांतील तात्पर्य. १२ ज्ञानानें परिपूर्ण भरलेलें भाषण. १३ लक्ष न दिल्यानें. १४ मग. १५ ओस, शून्य.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

ऐसी निजकथा ऐकती। ते ऐकतांचि नायकती। त्यांसी परमार्थाची प्राप्ती। कदा कल्पांतीं घडेना ॥ ३४ ॥ ऐकें श्रीरामा सावधान। येथें भोगेच्छा मुख्य बंधन। ते त्यागी तो ज्ञाता पूर्ण। तेथें मुक्तपण सहजची ॥ ३५ ॥ इच्छात्याग अति कठिण। जो त्यागी तोचि विचक्षण। त्याही त्यागाचें लक्षण। निर्वाण खूण अवधारीं ॥ ३६ ॥ मनें मनातें आवरावें। मनें मनातें निग्रहावें। मनें मनातें धरावें। मनें मारावें मनातें ॥ ३७ ॥ मनें मनाचा निग्रहो ऐसा। तेथें समूळ [१]निमे आशा। चैतन्याचा ओते देहठसा। प्रपंच आपैसा[२] परब्रह्म होय ॥ ३८ ॥ ऐसिया सूक्ष्म अति युक्तीं। परब्रह्माची सद्यःप्राप्ती। स्वयें परब्रह्मची आहाती। प्राप्ती अप्राप्ती भावाभावें ॥ ३९ ॥ स्वयंभू हृदयीं ब्रह्मस्थिती। ब्रह्मप्रभा इंद्रियवृत्ती। तें अभावें ब्रह्म नव्हे म्हणती। सद्भावें होती परब्रह्म ॥ १४० ॥ या सद्भावाची उपपत्ती। निश्चयें सांगेन रघुपती। दृढ धरावी सावधानवृत्ती। हे ब्रह्मस्थिती अभंग ॥ ४१ ॥ जेथें कामक्रोधां सलोभता। निःशेष नाहीं ते ब्रह्मशांतता। ते शांति ब्रह्म स्वभावता। सबाह्य पूर्णता सर्व देहीं ॥ ४२ ॥ ज्यासी मी म्हणिजे आपण। तें मीपणेंचि वपु चैतन्य। इंद्रियांचें कर्माचरण। तेंही आचरण पूर्ण परब्रह्मत्वें ॥ ४३ ॥ काया वाचा मनसा आचरण। तें तें सहजें ब्रह्म पूर्ण। हे ज्यासी [३]आकळली खूण। तो तत्काळ जाण परब्रह्म जाला ॥ ४४ ॥ तो तत्काळ परब्रह्म जाला। म्हणतां लाज लागली पैं बोला। स्वयें ब्रह्मरूपें संच[४]ला। जाला न जाला ज्ञानाज्ञानें ॥ ४५ ॥ यालागीं गा रघुनाथा। स्वतःसिद्ध ब्रह्मरूपता। स्वयें स्वयंभू ये हाता। या श्लोकार्था वि[५]नटोनी ॥ ४६ ॥ इन्द्रियांचें कर्माचरण। सर्व देहीं समसमान। तें कर्मयोगीं सावधान। ब्रह्मानुसंधान निजनिष्ठा ॥ ४७ ॥ योगी स्वधर्मकर्म करिती। कर्मीं स्फुरे ब्रह्मप्रचीती। तेचि परमात्मयाची निजभक्ती। नित्य मुक्ती सावधानत्वें ॥ ४८ ॥ योगी जागृतीं सावधान। चित्सावधानत्वें देखती स्वप्न। सुषुप्तिसुखें समाधान। चिद्रूप पूर्ण भोगिती सदा ॥ ४९ ॥ ऐसा [६]अवस्थात्रयीं सावधान। हेंचि भगवंताचें भजन। हेंचि परमात्मयाचें पूजन। हेंचि समाधान जीवशिवांचें ॥ १५० ॥ ऐसा सद्भावें साचार। जो सावधान निरंतर। त्यासी ब्रह्मरूप चराचर। विषयमात्र चिद्रूप ॥ ५१ ॥

> यदिदं किंचिदाभाति जगज्जालं प्रदृश्यते।
> तत्सर्वममलं ब्रह्म बहिरंतर्व्यवस्थितम् ॥ १५ ॥

जें जें दिसे दृश्य दर्शन। जें जें विषय[७]भोगायतन। तें तें निर्मळ ब्रह्म जाण। सबाह्य पूर्ण परब्रह्म ॥ ५२ ॥ मा हें एकैक सांगों किती। त्यासी ब्रह्मरूप त्रिजगती। सहज ठसावे रघुपती। तेही उपपत्ती अवधारीं ॥ ५३ ॥ ब्रह्म दृश्य द्रष्टा दर्शन। ब्रह्म चतुर्दश भुवन। भूतपरंपरा ब्रह्म पूर्ण। मी म्हणणें तें मीपण परब्रह्मत्वें ॥ ५४ ॥ ब्रह्मरूपें भासती मित्र। ब्रह्मरूपें भासती पुत्र। शत्रु भासती चिन्मात्र। सुहृद समग्र सद्रूपत्वें ॥ ५५ ॥ शत्रु मित्र सखे बंधु। हा परब्रह्म अपवादु। ब्रह्म केवळ स्वानंदकंदु। परमानंदु परिपूर्ण ॥ ५६ ॥ ब्रह्मीं प्रपंच नाहीं ऐकिला। ब्रह्मीं प्रपंच नाहीं आथिला। ऐसा प्रपंच नाहीं स्पर्शला। भ्रांतीं भाविला निजभावना ॥ ५७ ॥ भ्रांतासी जग दुःखप्रतीती। ज्ञात्या सुखरूप विश्वमूर्ती। अंधा गडद पडे त्रिजगती। देखणे देखती स्वप्रकाशकत्वें ॥ ५८ ॥ यालागीं ज्यां परमार्थबुद्धि। ते तोडिती भेदाची विधी। भेदू तोडावया त्रिशुद्धी। भगवद्भक्त सर्वत्र ॥ ५९ ॥ ज्यां ब्रह्मभावो सर्वभूतीं। ते स्वयें परब्रह्म होती। ते पूर्वींच ब्रह्म आहेती। भावनाभ्रांतिच्छेदक ॥ १६० ॥ जो करी अमृतपान। तो अमर होय आपण। ज्यां सर्वभूतीं भगवद्भजन। ते परब्रह्म पूर्ण स्वयें होती ॥ ६१ ॥ ऐकें श्रीरामा जगाची स्थिती। परब्रह्म कां परम भ्रांती। तिसरियाची नाहीं वस्ती। जाण निश्चितीं रघुनाथा ॥ ६२ ॥ नानाकारें जगाची प्रचीती। तेचि मुख्यत्वें सोलींव भ्रांती। ते भ्रांतीची निजस्थिती। ऐक तुजप्रती सांगेन ॥ ६३ ॥

> भ्रमेणाहं भ्रमेण त्वं भ्रमेणोपासका जनाः।
> भ्रमेणेश्वरभावत्वं भ्रममूलमिदं जगत् ॥ १६ ॥

अहमात्मा जें मीपण। तें मुख्य भ्रमाचें निजकारण। तूं म्हणणें हा भ्रम दारुण। मीतूंपण

१ मरते, नाहींशी होते. २ आपोआप. ३ कळली, साधली. ४ भरला, झाला. ५ लक्षून. ६ जागृति स्वप्न व सुषुप्तींत. ७ विषयभोगाचें स्थान. ८ झाला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

भ्रममूळ ॥ ६४ ॥ देव भक्त दोनी भिन्न । ऐसें जें कां उपासन । तें ज्ञानाचें मुख्य अज्ञानपण । सूक्ष्म भ्रम पूर्ण अतर्क्यत्वें ॥ ६५ ॥ ब्रह्म अखंडत्वें पूर्णस्थिती । तेथें देव भक्त भिन्न मानिती । हें ज्ञानगुह्य अति भ्रांती । अतर्क्य निश्चितीं सज्ञाना ॥ ६६ ॥ ईश्वर तो अति वरिष्ठ । येरें भूतभौतिकें[1] अति कनिष्ठ । हें भ्रमाचें अति कैंचाट[2] । येथें श्रेष्ठ श्रेष्ठ भुलविले भ्रमें ॥ ६७ ॥ दोरीं सर्प जन्मला नाहीं । तो उपजे भ्रांतीचे ठायीं । तेवीं ब्रह्मीं जग नाहीं । आभासे पाहीं भ्रममूळें ॥ ६८ ॥ जग देखणें हा परम भ्रम । जग न देखणें तें परब्रह्म । हें जाण गुह्य निजवर्म[3] । तूं पुरुषोत्तम परमात्मा ॥ ६९ ॥ मी तुज सांगों तरी तूं परमात्मा । तुझा तूंच पाहें महिमा । तुझ्या स्वरूपासी नाहीं सीमा । अपार अप्रमेय[4] रघुनाथ ॥ १७० ॥ तूं आत्मा आत्मत्वें परिपूर्ण । तूं कर्माकर्मविहीन । तुज नाहीं स्थान मान । तें निजलक्षण अवधारीं ॥ ७१ ॥ तुझ्या स्वरूपाच्या निजस्थानीं । आकाश लोपे कोणे कोणीं । पाहतां न दिसे नयनीं । गेलें हरपोनी मिथ्यात्वें ॥ ७२ ॥ पाहतां स्वरूप शुद्धत्वें । लाजिले पैं शोधितां सत्त्वें । स्वयें सामावलें महत्त्वें । मायेचें सत्त्व असत्त्वा आलें ॥ ७३ ॥ राईच्या कोटीच्या अंशाप्रती । वस्तु सावकाशें नांदती । अणुमाजी सुखस्वरूपस्थिती । वस्तुविश्रांति सावकाशें ॥ ७४ ॥ सूक्ष्माहूनि सूक्ष्म सार । जें नित्यत्वें नित्याक्षर[5] । तें तुझें स्वरूप साचार । जीवशिवत्वें विचार अव्ययीं विरे ॥ ७५ ॥ वस्तूसी नाहीं माता पिता । यालागीं न घडे जन्मकथा । जन्मेंवीण मरणवार्ता । आत्मत्वीं सर्वथा असेना ॥ ७६ ॥ एवं जन्ममरणातीत । अपार सुखें सदोदित । त्या स्वरूपा नांव रघुनाथ । जाण निश्चित श्रीरामा ॥ ७७ ॥ वेद वेदांग पुराण । श्रुति स्मृति शास्त्र विज्ञान । इतिहासाचें गुह्य ज्ञान । तें हें निरूपण रघुनाथा ॥ ७८ ॥ सर्व साराचें मुख्य सार । तो हा इतिहास साचार । सकळ ज्ञानाचें ज्ञानगव्हर[6] । अति उदार मुक्तत्वें ॥ ७९ ॥ हें निरूपण जीवीं घोटे[7] । तैं विषयांचें लाहाणें फिटे । जन्ममरणाचें खतं[8] फाटे । भवभय आटे मृगजळत्वें ॥ १८० ॥ या इतिहासाचें निजवर्म । कर्मचि होय परब्रह्म । साधक होय आत्माराम । नित्यत्वें परम निजमोक्ष जोडे ॥ ८१ ॥ म्यां निरूपिलें जें निरूपण । तें जीवन्मुक्ताचें लक्षण । तूं आत्माराम आपण । पूर्णत्वें पूर्ण परमात्मा तूं ॥ ८२ ॥ ऐकोनि वसिष्ठाचें वचन । श्रीराम स्वयें आपण । आपुलें देखे पूर्णपण । स्वानंदघन सुखरूप ॥ ८३ ॥ होतां स्वरूपीं भेटी । चित्तचैतन्या पडली मिठी । हर्षबाष्प दाटलें कंठीं । आनंद पोटीं न समाये ॥ ८४ ॥ आनंद हृदयीं न माये । तो नेत्रीं उंलथूं पाहे । पूर्ण दाटला विस्मयें । देहाची सोय स्फुरेना ॥ ८५ ॥ प्राण पांगुळली[11] जेथींचा तेथ । कंठ जाहला सद्गदित । इंद्रियें उपरमलीं[12] समस्त । पाडिलें ताटस्थ्य चिद्रूपत्वें ॥ ८६ ॥ सर्वांगीं रोममूळीं । आली स्वेदकणिका[13] निर्मळी । मुक्तमोतियांची जाळी । पांघुरविली निजसत्त्वें ॥ ८७ ॥ निःशेष नाठवे मीतूंपण । खुंटली वाचा पडिलें मौन । जीवशिवांचें पुसिलें भान । चित्त समाधान पावलें ॥ ८८ ॥ श्रीराम चैतन्यघन । जाला स्वस्वरूपीं निमग्न । त्यासी व्यवहारप्रवीण । श्रीवसिष्ठें केवीं आपण केलें ॥ ८९ ॥ ऐसें भरद्वाजें वाल्मीकाप्रती । स्वयें पुसिलें अति प्रीतीं । वाल्मीकीही तदर्थीं । कथासंगती सांगतु ॥ १९० ॥

वालमीकिरुवाच—

यदा परिणतः साधुः स स्वरूपे महात्मनः ।
विश्वामित्रस्तदोवाच वसिष्ठं ऋषिसत्तमम् ॥ १७ ॥

तटस्थ देखोनि श्रीरामासी । विश्वामित्र जाला कासाविसी । तो कळवळोनि वसिष्ठासी । निजकार्यासी सांगत ॥ ९१ ॥

विश्वामित्र उवाच—

हे वसिष्ठ महाभाग ब्रह्मपुत्र महामुने ।
गुरुत्वं शक्तिपातेन तत्क्षणादेव दर्शितम् ॥ १८ ॥

स्वामी वसिष्ठा तूं ब्रह्मपुत्र । तुझ्याच गुरुत्वाचें चरित्र । ब्रह्मप्राप्तीं तूं अति पवित्र । अति विचित्र अनुपम्य ॥ ९२ ॥ तुझ्या गुरुत्वाचें वर्म । मिथ्या

१ पंचमहाभूतांपासून झालेलीं. २ कुलंगडें. ३ ज्ञानांतील गुप्त वर्म. ४ निश्चय करण्यास अशक्य असा. ५ नित्य व अविनाशी, ६ ज्ञानाचें गुहा, ज्ञानाचें स्थान.

७ ठसावेल. ८ कर्ज, देणें. ९ रोखा. १० बाहेर येऊं लागला. ११ कुंठित झाला. १२ विश्रांति पावलीं, स्थिर झालीं. १३ घामाचा बिंदु.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

देहादि इंद्रियकर्म । शिष्य होय पूर्ण ब्रह्म । ते समाधि परम श्रीरामीं ॥ ९३ ॥ शक्तिपातें शिष्योत्तमा । पावविलें न करितां श्रमा । हे तुझ्या गुरुत्वाची गरिमा[१] । अगाध महिमा तिहीं लोकीं ॥ ९४ ॥ शिष्याच्या सकळ वृत्ती । वचनें लाविसी ब्रह्मस्थिती । शिष्य पावे ब्रह्मस्थिती । शक्तिपात निश्चितीं या नांव ॥ ९५ ॥ लव निमिष घटिका मुहूर्त । शिष्यासी बाणली हे स्थिती । शक्तिपात हा निश्चितीं । ऐसी ख्याति गुरुवाक्यें ॥ ९६ ॥ वचनें छेदिसी संशयातें । निःशब्दें बोधिसी शब्दार्थें । हस्तमस्तकसामर्थ्यें[२] । शिष्य परमार्थें सुखी करिसी ॥ ९७ ॥ असो दर्शन स्पर्शन । मुख्य तुझें कृपावलोकन । शिष्यासी सहज समाधान । चैतन्यघन चित्सुखें ॥ ९८ ॥ चित्सुखें सुखसंपन्न । हें तुझ्या कृपेचें आयतन[३] । तुझे कृपेस्तव पूर्ण । ब्रह्मसमाधान श्रीरामीं ॥ ९९ ॥ श्रीरामीं पूर्ण समाधि अवस्था । ठेली[४] कर्मक्रियाकर्तव्यता । पुढील अवतारकार्यार्था । वसिष्ठा वृथा होऊं नेदीं ॥ २०० ॥ स्वामी वसिष्ठा अवधारीं । कृपा करीं आम्हांवरी । श्रीराम ये देहावरी । ते युक्ती विवरीं स्वसत्ता ॥ १ ॥ सर्व इंद्रियीं सदा उद्बोध । कर्मकर्तव्या नित्य सावध । माझा यज्ञ होय सिद्ध । तैसा प्रबोध[५] करीं रामा ॥ २ ॥ समाधि आणि उत्थान । दोहीं अवस्थांचें तुज ज्ञान । शिष्यासी देसी समाधान । सर्वेंचि प्रयोजन बोधिसी ॥ ३ ॥ करावया सुरकार्यार्थ । अवतार श्रीरघुनाथ । तो त्वां केला समाधिस्थ । ठेला तटस्थ निर्व्यापारें ॥ ४ ॥ श्रीराम होतां तटस्थ । खुंटला अवतारकार्यार्थ । माझेंही कार्य तेथ । यज्ञसिद्ध्यर्थ राहिलें ॥ ५ ॥ माझ्या कार्याचें स्मरण । वसिष्ठा धरीं आठवण । ज्यालागीं येवोनि आपण । केलें प्रार्थन दशरथाचें ॥ ६ ॥ वसिष्ठा तूंच आपण । दशरथासी प्रार्थून । मज दिधले रामलक्ष्मण । यज्ञरक्षण करावया ॥ ७ ॥ हें तुझें वाक्य होईल मिथ्या । देवकार्यार्थ राहील सर्वथा । यालागीं श्रीरघुनाथा । कृतकार्यार्थी प्रवोधीं ॥ ८ ॥ अनागत[६] भाष्य ऋषि वाल्मीकें आपण । केलें शतकोटि रामायण । तें मिथ्या होऊं नेदीं वचन । श्रीरघुनंदन प्रवोधीं ॥ ९ ॥

सिद्धाश्रमं मया नीतो रामो राक्षसमर्दनम् ।
करिष्यते ततोऽहल्यामुक्तिं च जनकात्मजाम् ॥ १९ ॥

अनागत भाष्य अति पवित्र । वदलें वाल्मीकाचें वक्त्र । श्रीरामाचें चरित्र । अति विचित्र अवधारीं ॥ २१० ॥ ताटका अति विकंटक[७] । रामें निर्दाळिली अति कंटक[८] । जनवन केलें निष्कंटक । सिद्धाश्रमीं लोक सुखें वसती ॥ ११ ॥ ते सिद्धाश्रमीं माझें स्थान । तेथें आणिला रघुनंदन । करूनि राक्षसमर्दन । जयो संपूर्ण श्रीरामें ॥ १२ ॥ करील अहल्योद्धारण । शिवचापप्रभंजन । जानकीचें पाणिग्रहण । चहूं बंधूंचें लग्न जनकालयीं स्वानंदें ॥ १३ ॥ जामदग्न्य श्रीराम । युद्धीं पावती सुख परम । परशुरामासी उपरम[९] । जाला परम श्रीरामें ॥ १४ ॥ श्रीरामाचें वनाभिगमन । तेणें दंडकारण्य पावन । तीर्थां पवित्रता पूर्ण । श्रीरामचरण शिववंद्य ॥ १५ ॥ समुद्रीं शिळा स्वयें तरती । बिभीषणा लंकाप्राप्ती । रामनामाची ख्याती । त्रिजगती उद्धरील ॥ १६ ॥ सीताशुद्धीचेनि छंदें[१०] । निर्दळील राक्षस कुळें । राम वंदिजे कळिकाळें । तें चरित्र प्रांजळें वसिष्ठा करीं ॥ १७ ॥

यैर्दृष्टो यैः स्मृतो वापि बोधितो यैः श्रुतोपि यैः ।
सर्वावस्थागतानां तु जीवन्मुक्तिं प्रदास्यति ॥ २० ॥

जिहीं अत्यंत आदरेंसी । ऐकिलें श्रीरामचंद्रचरित्रासी । जे राम स्मरती अहर्निशीं । मुक्ति त्यांसी अनायासें ॥ १८ ॥ जो सार्थकें करी रामस्मरण । जो सार्थकें परिसे नित्य आपण । ते दोघे जीवन्मुक्त जाण । इंद्रियाचरण करितांही ॥ १९ ॥ ज्यांचे मुखीं रामनामाची वस्ती । जे सदा रामनाम जपती । त्यांसी स्वदेहेंसी नित्य मुक्ति । इंद्रियार्थीं रमतांही ॥ २२० ॥ जे अवस्थात्रयीं[११] नित्यमुक्त । जे सदा राम जपत । श्रीराम स्वयें तेथ । असे क्रीडत स्वानंदें ॥ २१ ॥ ऐसी त्रैलोक्याची गती । श्रीरामचरित्रें तरती । श्रीवसिष्ठा कृपामूर्ती । माझी कार्यसिद्धी श्रीरामें ॥ २२ ॥ श्रीराम पुरुषोत्तम । श्रीराम परात्पर[१२]

१ मोठेपणा. २ डोक्याला हस्तस्पर्श होतांच. ३ स्थान. ४ बंद राहिली. ५ उपदेश, जागृति. ६ भविष्य काळाविषयीं सांगितलेलें. ७ भयंकर. ८ रानटी, क्रूर. ९ शांति, विश्रांति. १० मिषानें, निमित्तानें. ११ जागृति, स्वप्न आणि सुषुप्ति ह्या तीन अवस्थांत. १२ सर्वांत श्रेष्ठ.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

परम । श्रीराम तो पूर्ण ब्रह्म । नित्य निष्कर्मसिद्ध श्रीराम ॥ २३ ॥ त्या श्रीरामाची स्थिती गति । श्रीवसिष्ठा तुझे हातीं । आमुचिया कृपास्थिती । श्रीराममूर्ति प्रबोधीं ॥ २४ ॥ श्रीराम सदोदित दैवहीन । परी रामापाशीं नाहीं दैन्य । जगाचेनि भाग्यें आपण । श्रीरघुनंदन प्रबोधीं ॥ २५ ॥ दैवें-वीण भाग्यवंत । जगीं एक श्रीरघुनाथ । तो वृत्ति पावोनियां येथ । चरित्रार्थ संपादू ॥ २६ ॥ सर्व जगीं विजयी पूर्ण । ऐसा जो कां रघुनंदन । त्यासी माझें निजमन । जो जगज्जीवन जगाचा ॥ २७ ॥ वसिष्ठा आमुचे कृपेंवारीं । श्रीरघुनाथासी प्रबोध करीं । तो अवतारचरित्र करी । तो ये व्यवहारीं प्रवर्तवीं ॥ २८ ॥

वालमीकिरुवाच–

इत्युक्त्वा स स्थितस्तूष्णीं विश्वामित्रो महामुनिः ।
वसिष्ठस्तु महातेजा रामचंद्रमभाषत ॥ २१ ॥

वाल्मीकि सांगे भारद्वाजासी । तटस्थ देखोनि श्रीरामासी । विश्वामित्र वसिष्ठासी । रामप्रबोधासी प्रयोजी ॥ २९ ॥ तंव विश्वामित्र आपण श्रीरामानुवाद बोलोन । निजकार्यार्थीं धरोनि मौन । तें वसिष्ठ सर्वज्ञ जाणोनि बोले ॥ २३० ॥

राम राम महाबाहो महापुरुष चिन्मय ।
नायं विश्रांतिकालो हि लोकानंदप्रदो भव ॥ २२ ॥

ऐकें बापा रघुनाथा । तुज कायसी समाधी अवस्था । तूं काळाचा आकळिता । चिदानंदता स्वरूपें ॥३१॥ परिसें आंजानुबाहु[1] महाभुजा । हा समाधिकाळ नव्हे तुझा । तूं त्रैलोक्याधिराजा । देवसमाजा समग्रा सुखी करीं ॥ ३२ ॥ सुखी करीं साधुसंत । सुखी करीं निजभक्त । सुखी करीं लोक समस्त । अवतारचरित्रानुक्रमें ॥ ३३ ॥ केवळ निष्कर्म राहणें । तें जीवसमाधीचें लक्षण । तेंही केवळ अपक्वपणें । परिपक्व चिन्ह तें ऐक ॥ ३४ ॥ सर्व भूतांचे गुणागुण । जगाचें दोषदर्शन[2] । दिसतां न मोडे ब्रह्मपण । ते समाधि पूर्ण पूर्णत्वें ॥ ३५ ॥ भूतांचें विकर्माचरण । भासतां भासे चैतन्यघन । त्या नांव शुद्ध समाधान । समाधि संपूर्ण त्या नांव ॥ ३६ ॥ ऐसें न होतां समाधान । केवळ जें तटस्थपण । तें मुग्धावस्थेचें लक्षण । समाधि संपूर्ण ते नव्हे ॥ ३७ ॥ भूतांचे सकळ मळ । ज्याचे दृष्टीं होती निर्मळ । ते समाधिसुखकल्लोळ[3] । येर समूळ भूतादिभाव ॥ ३८ ॥ आशंका—म्हणती संसार मिथ्याभूत । तुवांचि करून दिधला येथ । तेथें कैंचा देव कैंचा भक्त । अवतारचरित्र तें कैंचें ॥ ३९ ॥ जेथें नाहीं मीतूंपण । तेथें नाहीं कर्मक्रियाचरण । समूळ लौकिक नाहीं जाण । लोकसंरक्षण म्हणसी कैंचें ॥ २४० ॥ अवधारीं गा रघुनाथा । ब्रह्मअवतारींची निजसत्ता । नये जीवांचिये हाता । जरी यथार्थता मुक्त जाले ॥ ४१ ॥ जयां त्रिगुणमेळें[4] जीवपण । भ्रमें भुलोनि आपण । ब्रह्म म्हणती कैंचें कोण । तयां उद्धरण तुझेनी ॥ ४२ ॥ अवताराचें सामर्थ्य पूर्ण । प्रपंचपरमार्थी सावधान । उभयतां दिसों नेदी न्यून । तें निजचिन्ह अवधारीं ॥ ४३ ॥

अंतरेको बहिर्नाना अंतर्बोधो बहिर्जडः ।
अंतस्त्यागी बहिःसंगी लोके विहर राघव ॥२३॥

अंतरीं आत्मा अद्वैत एक । तेणें मिथ्या समूळ लोक । बाह्य कर्म जाणोनि संपादी लौकिक । विधिपूर्वक वेदोक्त ॥ ४४ ॥ अंतरीं केवळ शुद्ध-बुद्धे । बाह्य दिसे जैसा विषयबद्ध । जडत्वें भासे जैसा मुग्ध । दिसे शुद्ध विषयार्थी ॥ ४५ ॥ अंतरीं निःशेष विषयत्याग । बाह्येंद्रियां विषयभोग । भोगितां दिसे जरी सांग । तरी विषयाचें अंग आतळेना[6] ॥ ४६ ॥ अंतरीं पूर्ण निराश[7] । बाह्य लोलुपत्वें[8] करी आस । जेंवि मसकेमाजी[9] आकाश । फुगल्या आभास अडकलें दिसे ॥ ४७ ॥ अंतरीं निरपेक्ष[10] निर्मळ । बाह्य नाना अर्थी तळमळ । लाघवी लोक झकवी सकळ । तैसी कळवळ मुक्तासी ॥ ४८ ॥ अंतरीं काम क्रोध निमाले । शांतीचें कल्याण पाहिलें[11] । बाह्य क्रोधानळें खवळले । जेवीं मृगजळें मासेमारी ॥ ४९ ॥ बाह्य कार्यकारणावेशा । गुरगुर करी व्याघ्र जैसा । अंतरीं मृदु लोणी तैसा । कोणाही सहसा खुपेना ॥ २५० ॥ बाह्य दिसे कार्यकरिता । परी अंतरीं शून्य.

१ गुडघ्यांपर्यंत ज्याचे हात पोंचतात असा. २ दोष दिसणें. ३ समाधिसुखाची लाट, ४ त्रिगुणांच्या मिश्रणानें, ५ विचार-शून्य. ६ शिवेना. ७ त्यागी, आशारहित. ८ लोभानें, लुब्धतेनें. ९ कातड्याच्या पिशवीमध्यें. १० निरिच्छ, ११ उजाडलें, झालें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

अकर्ता निजात्मता । माशी कुलाल¹चक्रीं भवतां । दिसे परी तत्त्वतां हलेना ॥ ५१ ॥ प्रपंच आणि परमार्थी । उभयतां सावधस्थिती । हे अवताराची अवतारशक्ती । ते तुज निजमूर्ति रघुनाथा ॥ ५२ ॥ ऐसिये गा स्थितीवरी । तूंही निजात्मचरित्रीं । स्वानंदें क्रीडें संसारीं । लोकाचारीं अविकळत्वें ॥ ५३ ॥ जेवीं बुद्धिबळें वाडेंकोडें । मिथ्या राजा मिथ्या प्रधान हत्ती घोडे । हें जाणोनि खेळ खेळती पुढें । तेवीं मुक्ताकडे भवभावें ॥ ५४ ॥ सोंकटियां जीवभाव नाहीं । तरी मारिलें म्हणती पाहीं । तेवीं मुक्त देहींच विदेही । भय नाहीं मरणाचें ॥ ५५ ॥ सोंकटी निमालियाही पाठीं । कोण धर्मात्मा चढे वैकुंठीं । कोण पडिले नरकसंकटीं । तेवीं निजात्मदृष्टी भव मिथ्या ॥ ५६ ॥ ऐसिया स्थितीवरी । तूंही सुखें संसारीं । स्वानंदें क्रीडा करीं । भय न धरीं श्रीरामा ॥५७॥ राजा प्रधान पशु प्यादा कटक । बुद्धिबळीं अवघें काष्ठ येक । तरी करिती खेळाचें कौतुक । तैसे सांसारिक मुक्तासी ॥ ५८ ॥ ऐसिया योगाची वृत्ती । रघुनाथा रघुपती । त्वांही सुखें संसाराप्रती । स्वानंदस्थितीं क्रीडावें ॥ ५९ ॥

तस्माद्राज्यादिविषयान् पर्यालोच्य विनश्वरान् ।
देवकार्यादिसंभारांस्त्यज पुत्र सुखी भव ॥ २४ ॥

वोडंबे³रीचा आंबा सफळ । रस गोड परी मिथ्या मूळ । तेवीं मिथ्या लौकिक सकळ । जाणोनि अवि⁴कळ लोक संरक्षीं ॥ २६० ॥ बहुरूपियाची राव राणी । नसोनि करिते संपादणी । तेवीं तूं श्रीराम राजा राजपणीं । मर्यादारक्षणीं वेदोक्त ॥ ६१ ॥ तुवांही निजअवतारवृत्तीं । सुखें असावें संसाराप्रती । धर्ममर्यादा पुराणोक्ती । स्वानंदस्थितीं क्रीडावें ॥ ६२ ॥ तोडीं नवग्रहांची बेडी । सोडवीं देवांची बांधवडी । उभवीं रामराज्याची गुढी । आज्ञा धडफुडी तिहीं लोकीं ॥ ६३ ॥ सांडीं समाधीची भ्रांती । धनुष्य बाण घेवोनि हातीं । रामनामाची ख्याती । त्रिजगतीं उद्धरीं ॥ ६४ ॥ ऐसें वसिष्ठ सांगतां । रामा परमानंदीं तल्लीनता । त्याच्या प्रबोधाची कथा । होय सांगता वाल्मीक ॥ ६५ ॥

वाल्मीकिरुवाच—

इत्युक्तोपि यदा रामः किंचिन्नोचे लयं गतः ।
तया सुषुम्नया सोपि प्रविष्टो हृदयं शनैः ॥ २५ ॥

यापरी श्रीरघुनाथा । वसिष्ठें स्वयें प्रबोधितां । रामा परमानंदीं ल⁶यंगता । कार्याकार्यार्थ स्फुरेना ॥ ६६ ॥ ऐसें जाणोनियां पूर्ण । तेव्हां वसिष्ठ आपण । सुषुम्ना नाडीं प्रवेशोन । करी प्रबोधन श्रीरामा ॥ ६७ ॥ वसिष्ठ चैतन्यरूप आपण । तेणें चेतना चेतविली पूर्ण । चेतनें चेतविला प्राण । सावधान हृदय करणें ॥ ६८ ॥ प्राण प्रवेशे सोळा सवडी । तेणें चेतविल्या सर्वेही नाडी । तेणें नेत्रांची झांपडी । शनैः शनैः गाढी उघडिता जाला ॥ ६९ ॥ उ⁹न्मीलित दोनी नयन । श्रवण जालें शब्दा¹⁰यतन । शरीर जालें सावधान । परी जीवपण असेना ॥ २७० ॥ श्रीरामाच्या निजदेहीं । मुळींच जीवपण नाहीं । तो देहींच विदेही । चैतन्यविग्रही श्रीराम ॥ ७१ ॥ ना¹¹तळतां जीवशिवपण । यापरी श्रीरघुनंदन । स्वयें जाला सावधान । वसिष्ठें पूर्ण बोधिला ॥ ७२ ॥ प्रबोधोनि श्रीरघुनंदन । वसिष्ठें उन्मीलित केले लोचन । विश्वमित्रा आनंद घन । सुरगण संतोषले ॥७३॥ सुखावले ऋषीश्वर । आनंदले मुनिवर । अवघे करिती जयजयकार । श्रीरामचंद्रप्रबोधें ॥ ७४ ॥ न देखे गुणदोषदर्शन । न देखे विधिनिषेधलक्षण । न देखे कर्माकर्मपण । श्रीरघुनंदनप्रबोधीं ॥ ७५ ॥ यापरी श्रीरघुनंदन । स्वयें जाला सावधान । तो बोलिला विधिविधान । तेंचि कथन अवधारा ॥ ७६ ॥

श्रीराम उवाच—

न विधिर्न निषेधश्च त्वत्प्रसादादहं पुनः ।
तथापि तव वाक्यं तु करणीयं हि सर्वदा ॥ २६ ॥
सर्वे शृणुत भद्रं वो निश्चयेन सुनिश्चितम् ।
आत्मज्ञानात्परं नास्ति गुरोरपि च तद्विदः ॥२७॥

ऐकें गा वसिष्ठा महामुनी । तुझें वाक्य प्रतापकरणी । विधि निषेध हे दोनी । मी मनीं नयनीं देखें ना ॥ ७७ ॥ ऐकें स्वामी मुनिनाथा । तुझी गुरुवाक्यसमर्थता । कर्मे क्रिया कर्तव्यता । मज

१ कुंभाराच्या चाकावर. २ संसारी स्थिति. ३ जादुगिरीचा. ४ अविकृत, विकाररहित. ५ बंधन. ६ तल्लीनता. ७ जागृति. ८ हलु हलु. ९ अर्धवट उघडलेले, १० शब्दांचें स्थान, ११ न शिवतां,

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सर्वथा उरली नाहीं ॥ ७८ ॥ कर्म कार्य कर्तव्यता[1]। मज उरली नाहीं तत्त्वता । तरी तुझें वाक्य गुरुनाथा । मज सर्वथा अनुलंघ्य ॥ ७९ ॥ तुझेनि वाक्यें जैसें तैसें । जें बोलसी अनायासें । तें मज सर्वथा आयासें । अति विश्वासें करणीय ॥२८०॥ सद्गुरूचें निजवचन । प्राणांतींही नुलंघी पूर्ण । तेंचि शिष्याचें निजलक्षण । जें परिपाळण गुरुवाक्य ॥ ८१ ॥ वेद शास्त्र स्मृति पुराण । तेथें हेंचि मुख्य लक्षण । जें गुरुवाक्याचें परिपालन । हेंचि विधान विधियुक्त ॥ ८२ ॥ गुरुवाक्योलंघन[2]। हेंचि महापाप दारुण । महापापा प्रायश्चित्तविधान । वज्रपाप पूर्ण गुरुवाक्यावज्ञा[3] ॥ ८३ ॥ गुरुअवज्ञापरिपाटीं । महापातकें ज्याच्या अंगुष्ठीं[4]। ऐशिया पापांच्या उठती कोटी । वज्रपापांच्या कोटी गुरुअवज्ञा ॥ ८४ ॥ गुरुअवज्ञेची मात । स्वधर्मकर्मा करी घात । अंगीं रोकडा वाजे अनर्थ । नरकपात अनिवार ॥८५॥ सूक्ष्म साराचा सार गुण । सकळ निश्चयां निश्चयो पूर्ण । अवघे ऐका सावधान । आत्मज्ञान महालाभ ॥ ८६ ॥ आत्मज्ञानेंवीण सकळा । चवदा विद्या चौसष्टी कळा । त्या दुःखरूपें अवघिया विकळा । सुखसोहळा आत्मज्ञानीं ॥८७॥ सकळसिद्धांतमर्यादा । मुख्यज्ञान आत्मविद्या । येरी अवघिया अविद्या । ज्या प्रसिद्धा चवदाही ॥ ८८ ॥ त्या आत्मज्ञानाचा निजज्ञाता । सद्गुरूहूनि अधिकता । नाहीं अधिक दैवता । मुख्य गुणातीत[5] तो वंद्य ॥ ८९ ॥ ब्रह्मा आणि हरि हर । तेही सद्गुरूचे किंकर[6]। सद्गुरूहूनि थोर । नाहीं सत्पात्र तिहीं लोकीं ॥ २९० ॥ ऐसें बोलतां आपण । प्रेमें वोसंडला[7] रघुनंदन । वसिष्ठाचे श्रीचरण । शिरीं पूर्ण वंदिले ॥ ९१ ॥ श्रीरामपादाभिवंदन । वसिष्ठें दिधलें आलिंगन । एका जनार्दना शरण । पूर्ण समाधान गुरुशिष्यां ॥९२॥ ऐकोनि रघुनाथाच्या गोष्टी । चवदा भुवनेंसी वैकुंठीं । टाळी पिटिली उठाउठीं । गुरुमहिमा गोमटी ऐकोनी ॥ ९३ ॥ तेणें सुखी जाले सिद्ध ऋषीश्वर । सुखी जाले सुरवर । अवघे करिती जयजयकार । सुमनसंभार[8] वर्षले ॥ ९४ ॥ दिव्यसुमनांचा सडा । तो विराजे चहूंकडां । तेणें श्रीराम शोभला गाढा[9]। चिन्मात्र चोखडा सालंकृत ॥९५॥

वाल्मीकिरुवाच—

एतत्ते सर्वमाख्यातं रामचंद्रकथानकम् ।
अनेकक्रमयोगेन भारद्वाज सुखी भव ॥ २८ ॥

वाल्मीक सांगे आपण । भारद्वाजा तूं सावधान । रघुनाथाचें आत्मज्ञान । प्रबोधलक्षण[10] अवधारिलें ॥९६॥ जें जालें ज्ञानश्रवण । त्याचें धरोनि अनुसंधान । तुवांही आपणा आपण । सुखी संपूर्ण करावें ॥९७॥ ऐसें सांगोनि भारद्वाजासीं । वाल्मीक जाला संतोषी । त्या वसिष्ठाच्या वचनासी । अति उल्हासें स्तवीत ॥ ९८ ॥ धन्य वसिष्ठाची लीला । वंद्य सुरनरां सकळां । तेणें चिद्रत्नांची वचनमाळा । श्रीरामाचे गळां बाणली[11] ॥ ९९ ॥ तिचिया चिद्गंधासी । लाधोनियां[12] अहर्निशीं । कवि भ्रमर जाले तिसी । रसआमोदासी सेविती ॥ ३०० ॥ तिचिया पावोनियां योगासी । योगी पावले योग्यतेसी । तेणें सुखावोनि अहर्निशीं । देहभावासी विसरले ॥ १ ॥ बाप गुरुवाक्यकटाक्षें । अलक्ष लक्षेंवीण लक्षे । वसिष्ठें निजगुरुपक्षें । निजमोक्ष नांदवी ॥ २ ॥ रामवसिष्ठकाहणी । हे मोक्षमार्गीची निशाणी[13]। मोक्ष रिघे येवोनि श्रवणीं । कथा सावधानीं अवधारीं॥३॥

य इदं शृणुयान्नित्यं गुह्यं रामवसिष्ठयोः ।
सर्वावस्थोपि श्रवणान्मुक्तिमार्गं निगच्छति ॥ २९ ॥

वेदांतवार्तिकां निजजीवन । उपनिषदांचें सार पूर्ण । ॐकारअर्धमात्रालक्षण । तें हें गुह्यज्ञान वासिष्ठ[14] ॥ ४ ॥ श्रीरामवसिष्ठगुह्यज्ञान । त्याचें नित्य सावधान । जो सादर करी श्रवण । तो मुक्तत्वें पूर्ण सर्वावस्थीं ॥ ५ ॥ ज्यांसी सार्थवासिष्ठश्रवण । ते प्रपंचीं वर्ततां जाण । नभाऐसे अलिप्त पूर्ण । त्यांसी कर्मबंधन बाधीना ॥ ६ ॥ वासिष्ठश्रवणनित्यवस्ती । ज्यासी जागृतिस्वप्नसुषुप्तीं । त्यासी सर्वदा वरी मुक्ती । हे गुरुत्वें ख्याती वासिष्ठाची ॥ ७ ॥ जागृतीं वासिष्ठाचें श्रवण । तेंचि स्वप्नीं मनन । तेणें सुषुप्तीं समा-

१ कर्तव्य. २ गुरूच्या शब्दाचें उल्लंघन. ३ गुरूची आज्ञा न पाळल्यानें. ४ लागतो. ५ गुणांवेगळा. ६ चाकर. ७ भरला. ८ पुष्पवृष्टि. ९ बळकट.

१० ज्ञानाचें लक्षण. ११ ठसावली, प्रतीतीस आणली. १२ प्राप्त करून घेऊन. १३ जिना. १४ योगवासिष्ठ.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

धान । हें अगाध ज्ञान वासिष्ठाचें ॥ ८ ॥ वासिष्ठग्रंथशतसहस्री । त्यांतील श्लोकसत्त्याहत्तरी । एकाजनार्दनें त्यांवरी । ज्ञानार्थकारी टीका केली ॥९॥ श्लोकान्वयें सत्यार्थ । कर्ता जनार्दन समर्थ । तेथील जो ग्रंथार्थ । अर्थ विशद करी जनार्दनस्वामी ॥ १० ॥ कथा ग्रंथार्थें अर्था आली । श्रीरामनामें पाल्हेजली । निजमोक्षमार्गीं ठेवी झाली । ज्ञानकांडा केली समाप्ति ॥ ११ ॥ पदप्रमेय[1]उथळखोली । हे जनार्दन चालवी चाली । कवित्वाची सखोल बोली । बोलविता अविकळ जनार्दनु ॥ १२ ॥ एका जनार्दना शरण । वसिष्ठाचें ज्ञाननिरूपण । त्याचे कृपेस्तव जाण । जालें संपूर्ण पूर्णत्वें ॥ १३ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे बालकांडे एकाकारटीकायां श्रीवसिष्ठरामसंवादो नाम एकादशोऽध्यायः ॥ ११ ॥ ओंव्या ॥ ३१३ ॥ श्लोक ॥ २९ ॥

अध्याय बारावा

श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ हे रामायणी [2]निजकथा । जें आदरें ऐके श्रोता । तें पापपुण्यांच्या करी घाता । स्वभावता नित्यमुक्त ॥ १ ॥ कथाश्रवणें नित्यमुक्त । हाही नवलाव नव्हे येथ । अक्षरीं [3]अक्षर अक्षरार्थें । श्रीरघुनाथकथार्थें ॥ २ ॥ पढतां रघुनाथचरित्र । श्रोते वक्ते नित्य पवित्र । धन्य ऐकती त्यांचें श्रोत्र । धन्य वदे वदत्याचें ॥ ३ ॥ धन्य धन्य वाल्मीकिमुनी । श्रीरामकथा वदली वाणी । कथा त्रैलोक्यपावनी । [4]भवमोचनी चरित्रार्थ ॥ ४ ॥ रामनाम दों अक्षरीं । कुंटिणी वंदिजे सुरवरीं । ऐशी कथेची अगाध थोरी । ते कोणें वैखरीं वानावी ॥ ५ ॥ हें असो पूर्वकथासंबंधीं । श्रीरामासी लागे समाधी । ते स्वयें वसिष्ठ [5]उद्बोधी । ते कथाविधी अवधारा ॥ ६ ॥ श्रीराम जाला सावधान । प्रपंचपरमार्थस्थितीं समान । हें वसिष्ठाचें पूर्णपण । श्रीरामीं संपूर्ण बिंबलें ॥७॥ सर्वेंद्रियीं चित्तसमाधान । मिथ्या [6]समाधि[6]व्युत्थान । कर्म क्रिया ब्रह्मपूर्ण । ऐसा सावधान । श्रीराम ॥ ८ ॥ देखोनि श्रीराम सावधान । विश्वामित्रा आनंद गहन । सुखावोनि सुरगण । केली संपूर्ण पुष्पवृष्टि ॥ ९ ॥ सुरीं दुंदुभी [7]त्राहाँटिल्या भेरी । [8]निशाण त्राहाटिलें राजद्वारीं । गगन गर्जे जयजयकारीं । पूर्ण सुरनरीं आल्हाद ॥ १० ॥ विश्वामित्राच्या यज्ञार्थ । स्वयें जाईल रघुनाथ । वसिष्ठें पाहोनि सुमुहूर्त । आल्हादें दशरथ प्रयाण करवी ॥ ११ ॥ करोनियां पुण्याहवाचन । राजा सर्वें सैन्य दे संपूर्ण । तें वसिष्ठें निवारून । रामलक्ष्मण रथारूढ करवी ॥ १२ ॥ राजा म्हणे विश्वामित्राप्रती । मीं आत्मा दिधला तुझे हातीं । यावरी तूं कृपामूर्ती । जाणसी त्या रीतीं संरक्षीं ॥ १३ ॥ वसिष्ठ म्हणे विश्वामित्रासी । तुज गुरुत्व यात्रें सूर्यवंशीं । धनुर्विद्या सर्वांजेंसी । श्रीरामासी उपदेशीं । ॥ १४ ॥ ऐकोनि वसिष्ठाचें वचन । विश्वामित्रें केलें नमन । तूं अंतरात्मा आपण । मनोगत पूर्ण जाणसी माझें ॥ १५ ॥ जाणोनी माझें मनोगता । शिष्य करात्रें म्हणसी रघुनाथा । तुजहीपरता ज्ञाता । आणिक सर्वथा असेना ॥१६॥ आपुलिया सच्छिष्यासी । कोणीं न द्यात्रें उपदेशासी । हें वसिष्ठा साजे तुजपाशीं । इतर ऋषींसी अति अभिमान ॥ १७ ॥ वसिष्ठ म्हणे विश्वामित्रासी । मी तूं नाहीं आम्हां तुम्हांसी । यालागीं तूं श्रीरामासी । अवश्य होसी गुरुत्वें गुरु ॥ १८ ॥ दोघां मुनींच्या वचनार्थां । ऐकोनि आल्हाद रघुनाथा । दोहीं मुनींचे निजऐक्यता । उल्हासें रघुनाथ रथारूढ ॥ १९ ॥ जीवासवें जैसा प्राण । तैसा रामासवें लक्ष्मण । तेणेंही केलें रथारोहण । धनुष्यबाणतूणीरेंसी ॥ २० ॥ श्रीराम करितां प्रयाण । स्वयें दशरथ पाहे शकुन । दोघे द्विज प्रसन्नवदन । फळेंसिं पूर्ण भेटले ॥ २१ ॥ पूर्णकलशीं सालंकृता । पुढें भेटल्या पंच [9]योषिता । दधि क्षीर नवनीत माथां । [10]गोपवनिता भेटल्या ॥ २२ ॥ अपूर्व अमृतफळें क्षीरघागरी । दध्योदनेंसीं वायन करीं । हातीं कुमर कडे नोवरी । पुढें एक नारी भेटली ॥ २३ ॥ सव्य जाती वायस । अपसव्य जाती तास । सन्मुख भेटले राजहंस । मुक्ताफळांचे घोंस मुखीं धरूनी ॥ २४ ॥ दक्षिणे जाती मृग कृष्णवर्ण । वामांगगामी मृगी पूर्ण । भारद्वाजाचें वाम उड्डाण । नकुळही आपण वामांगीं सरके ॥ २५ ॥ दशरथ

१ पदलालित्य आणि प्रमेय (सिद्धांत) हे सोपे असूनही गंभीर. २ अध्यात्मकथा. ३ नित्य. ४ संसारापासून मुक्त करणारा. ५ उतरी. ६ व्युत्थान=समाधिविसर्जन. ७ वाजविल्या. ८ वाद्यविशेष (नौबद). ९ स्त्रिया. १० गौळणी.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

जातां बोळवून । श्रीरामशकुनांचें शुभ चिन्ह । ब्रह्मरूपी वसिष्ठ आपण । मार्गीं व्याख्यान करून सांगे ॥ २६ ॥ प्रथम भेटल्या ब्राह्मण । ब्रह्मसृष्टीमाजी जाण । तो विजयी होय संपूर्ण । सुरासुरगण वंदिती ॥ २७ ॥ पूर्णकलश जैं भेटती । तैं सदा पूर्णत्व मनोरथीं । दधि क्षीर भेटलिया नवनीतीं । तैं पूर्ण प्राप्ती ऐश्वर्याची ॥ २८ ॥ सव्य गेलिया वायस । तो सर्वत्र पावे यश । अपसव्य गेलिया तास । शत्रु निःशेष नासती ॥ २९ ॥ मुक्तघोंसीं सन्मुख । हंस भेटलिया देख । तो सर्वत्र पावे सुख । स्वप्नींही दुःख देखेना ॥ ३० ॥ सव्य गेलिया मृगगण । अलभ्य लाभ पावे पूर्ण । मृगीचें वामगमन । तें नववधू आपण माळ घाली ॥ ३१ ॥ नकुळ गेलिया वामभागीं । तो विजयी होय रणरंगीं । शत्रु निर्दाळील वेगीं । यश त्रिजगीं न समाये ॥ ३२ ॥ डावा गेलिया भारद्वाजें[1] । तो करी सिद्ध काज । वैरियांसी लावोनि लाज । आनंदाचें भोजें[2] नाचवी ॥ ३३ ॥ ऐसी सांगतां शकुनगती । स्वयें संतोषला नृपती । विजयी होईल रघुपती । हा निश्चय चित्तीं दृढ झाला ॥ ३४ ॥ दीडँ[3] गांवें[3] शरयूतीरीं । कामाश्रमाची अति थोरी । विश्वामित्रें तेथवरी । रथ चमत्कारीं कुमरेंसीं नेला ॥ ३५ ॥ कामाश्रमीं श्रीरामवस्ती । तेणें सकळ काम सिद्धीस जाती । हे विश्वामित्राची निजयुक्ती । कार्यसिध्द्यर्थीं राहविला राम ॥ ३६ ॥ श्रीराम आणि लक्ष्मण । निजतेजें विराजमान । करीं गोधांगुळित्राणें[4] । धनुष्यबाण सन्नद्ध[5] ॥ ३७ ॥ काकपक्ष[6]शिखाधर । कवँची[7] खड्गी महावीर । बाळपणीं अति दुर्धर । जेंवी वैश्वानर तेजस्वी ॥ ३८ ॥ त्यांचें देखोनि स्वरूप । विश्वामित्रा सुख अमूप । श्रीराम लावण्याचा दीप । चित्स्वरूप सुखकारी ॥ ३९ ॥ ऋषि म्हणे तयांप्रती । येथें वसावें आजिचे रातीं । राम म्हणे आज्ञा निश्चितीं । सुखरूपें वस्ती करिते जाले ॥ ४० ॥ विश्वामित्राचे संगतीं । सुखशयनीं क्रमिली राती । उदय होतां गभस्ती । ऋषि प्रबोधी[8] श्रीरामा ॥ ४१ ॥ विधियुक्त करोनि स्नान । संध्या गायत्री जपावर्तन । करूनि विश्वामित्रा नमन । स्वानंदें चरण वंदिले ॥ ४२ ॥ देखोनि श्रीरामं[9]-विनीतता । उल्लास विश्वामित्राचे चित्ता । आलिंगोनि श्रीरघुनाथा । कृपेनें बोले तो कृपाळु ॥ ४३ ॥ ऐकें बापा रघुनाथा । तुम्हांसी सिद्ध मंत्र देईन आतां । दोघीं चरणीं ठेविला माथा । सावधानता मंत्रार्थीं ॥ ४४ ॥ दृढ बाणल्या[10] मंत्रार्था । राक्षसभय नुपजे चित्ता । श्रम बाधेना सर्वथा । तिन्ही अवस्था सावधान ॥ ४५ ॥ या मंत्रार्थाचिया प्रौढीं । रणांगणीं राक्षसकोडी । मारितां न लगे अर्ध घडी । तो मंत्र निरवडीं[11] सांगेन ॥ ४६ ॥ क्षुधा तृषा निद्रा आळस । बाधूं न शके देहकार्श्य[12] । ऐशिया मंत्राचें मंत्ररहस्य । तुम्हांसी मी अवश्य सांगेन ॥ ४७ ॥ परम तपाची निरवडीं । जे म्यां जोडिली सिद्धार्थजोडी । ते तुज देईन रोकडी । म्हणोनि आवडीं आलिंगी ॥ ४८ ॥ ऐसी कृपा देखोनि पूर्ण । दोघीं धरिले दृढ चरण । सर्वभावें सावधान । सद्गुरुवचनग्रहणार्थीं ॥ ४९ ॥ मंत्राक्षर पडतां कानीं । सिद्धि[13]परिपाक अंतःकरणीं । मंत्रशक्ती लागे चरणीं । मंत्रशिरोमणि श्रीराम ॥ ५० ॥ श्रीराम मंत्रीं मंत्राक्षर । श्रीराम क्षराक्षरातीत पर । श्रीराम स्वयें ॐकार । मंत्रार्थसार श्रीराम ॥ ५१ ॥ श्रीराम मंत्राची निजशक्ती । श्रीराम मंत्राची मंत्रमूर्ती । त्यासी मंत्रार्थ बाणला चित्तीं । हें नवल किती सांगावें ॥ ५२ ॥ मंत्रीं मंत्रार्थनिजबीज । श्रीरामचि स्वयें सहज । तो वंदोनी सद्गुरुचरणरज । शिष्यत्वाची वोजें[14] सेवकत्वें दावी ॥ ५३ ॥ सद्गुरूची निजसेवा । तेंचि निजबीज सकळ देवां । तें कळलेंसे राघवा । गुरुआज्ञें जीवा विक्रीतें[15] केलें ॥ ५४ ॥ दोघां मंत्रार्थ बाणला पूर्ण । विश्वामित्रा कळली खूण । दोघांची पाठी थापटून । सुखसंपन्न स्वयें झाला ॥ ५५ ॥ रघुनाथानें म्हणे आपण । येथोनि करावें प्रयाण । राम म्हणे आज्ञा प्रमाण । रथीं तिघे जण बैसले ॥ ५६ ॥ कथाकौतुक मार्गानुक्रम । शरयूतीर मनोरम । पुढें भागीरथीसंगम । उत्तमोत्तम देखिला ॥ ५७ ॥ मानससरोवरीं जन्मली । यालागीं शरयू नाम पावली । अयोध्यानगरीं रूढ झाली । संगमा

---

१ कुकुडकुंभा. २ सुख. ३ दीडगांव म्हणजे सहा कोस. ४ धनुष्याच्या दोरीचा घट्टा न पडावा म्हणून हातांत अंगुस्तान घालतात तें. ५ तयार. ६ झुलपें व शेंडी असलेले. ७ अंगांत कवच-चिलखत असलेले. ८ जागा करी, उठवी. ९ रामाची नम्रता. १० ठसावल्यावर. ११ युक्तीनें. १२ शरीर कृश होणें. १३ मंत्रसिद्धि. १४ रीति. १५ गुरुआज्ञेला जीवाला वाहून घेतलें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

आली शरयू गंगेच्या ॥ ५८ ॥ देखोनि संगमदर्शन । साष्टांग केलें नमन । स्नान संध्या जप ध्यान । मंत्रावर्तनप्रयोगें ॥ ५९ ॥ तये संगमासंगतीं । राम राहविला एक राती । प्रभात जालिया परतीराप्रती । जाणें निश्चितीं नेमिलें ॥ ६० ॥ मग प्रातःकालीं उठोन । नावेसीं रामलक्ष्मण । विश्वामित्र बैसवोनी जाण । घेवोनि आपण परतीरा गेला ॥ ६१ ॥ परतीरींचें विधान । केलें स्नान संध्या जप ध्यान । तीरीं वनाचें विपरीत भान । रघुनंदन स्वयें देखे ॥ ६२ ॥ उग्र पक्ष्यांची चावटी । क्रूर श्वापदांची दाटी । दिवांभीतांची[1] घुंघाटी । शिवां[2] भुंकत भयानक ॥ ६३ ॥ भृंगीझुंगींचे झणत्कार । वनीं वाजती भयंकर । राम पुसे हें वन कां घोर । ऋषि प्रत्युत्तर समूळ सांगे ॥ ६४ ॥ भयानक भासे वन । येथें आहे ताटिकाभवन[3] । ते राक्षसी अति दारुण । प्राणिगणभक्षक ॥ ६५ ॥ तिचेनि वन हें उद्ध्वस । मालव केशिक कारूष । हे क्षणार्धें देश केले ओस[4] । अति दुर्धर कर्कश राक्षसी ॥ ६६ ॥ दशदिशा मार्ग रोधून[5] । तिचे भेणें वागों न शके कोणी जन । तेणें मार्गें आपण । सर्वथा गमन न करावें ॥ ६७ ॥ येथोनि अर्ध योजन । आहे ताटिकेचें भवन । ती मार्गीं करील प्राणहरण । सर्वथा गमन न करावें ॥ ६८ ॥ राम म्हणे ऐसी कैंची । कोठोनि आली हे कोणाची । येवढी शक्ति तिला कैंची । ऋषि तियेची कथा सांगे ॥ ६९ ॥ सुकेतु यक्ष अति पावन । त्यासी नव्हतें संतान । तेणें करोनि अनुष्ठान । ब्रह्मा प्रसन्न स्वयें केला ॥ ७० ॥ तो मागे पुत्रसंतान । ब्रह्मयानें दिधलें कन्यारत्न । अनल्पवीर्य कन्या जाण । कार्यकारण प्रवृत्तीचें ॥ ७१ ॥ तुज नव्हे पुत्रसंतती । सहस्रबळनागशक्ती[6] । कन्या होईल निश्चितीं । ब्रह्मा वरदोक्ती वदोनि गेला ॥ ७२ ॥ ते हे ताटिका कन्यारत्न । सुंदोपसुंद बंधु दोघे जण । त्यांत ज्येष्ठ सुंदेंसीं केलें लग्न । अति शोभन समारंभें ॥ ७३ ॥ सुंदापासोनि गर्भसंभवु । मारीच आणि सुबाहु । ताटिकेच्या पोटीं दोघे भाऊ । जन्मोद्भवु पावले ॥ ७४ ॥ त्या उभय बाळकांची जाळी । लागली पित्याचे मूळीं । पित्याची बुद्धि ते काळीं । मरणोन्मेळीं बळावली ॥ ७५ ॥ सुंदोपसुंद महावीर । परम योद्धे अति दुर्धर । तिहीं पराभवोनि सुरवर । त्यांचे अधिकार स्वयें घेतले ॥ ७६ ॥ त्यांचा करावया वधू । विधाता रची विचित्र बोधूं । तिलोत्तमा सुंदर वधू । दोघे बंधू देखती ॥ ७७ ॥ ती देखतांचि सुंदर । दोघे उठिले सत्वर । तिच्या वर्णीं अति तत्पर । तत्कामीं दुर्धर सकामी ॥ ७८ ॥ कनिष्ठ म्हणे ज्येष्ठासी । भावजयी मानीं तूं इसी । येरु म्हणे ज्येष्ठपत्नीऐसी । निश्चयेंसीं तूं मानीं ॥ ७९ ॥ कनिष्ठाचे लळे । ज्येष्ठें पाळावे सोहळे । भावजयी मानीं ये वेल्हाळे । कृपामेळें कृपाळुवा ॥ ८० ॥ ज्येष्ठआज्ञेची थोरी । कनिष्ठें मानावी शिरीं । हे ज्येष्ठपत्नी खरी । निजनिर्धारीं मानावी ॥ ८१ ॥ कनिष्ठें कामिली[7] जी कांता । ती भावजयी मानीं दुहिता । ज्येष्ठपत्नी ते तुज माता । तुवां तत्त्वतां मानावी ॥ ८२ ॥ ऐसिया करितां विवादा[8] । दोघे दुर्धर चढले क्रोधा । परस्परें घेवोनि गदा । निर्वाणयुद्धा प्रवर्तले ॥ ८३ ॥ दोघे युद्धीं अति दुर्धर । दोघे गदाविंदानीं[11] अति चतुर । अति मांडिला निकुंर[12] । येरयेरां नाटोपती ॥ ८४ ॥ कनिष्ठें कळालाघवांत । केला ज्येष्ठाचा घात । पडतां गदा क्षोभें हाणित । कनिष्ठाचा घात ज्येष्ठें केला ॥ ८५ ॥ बंधुबंधूंच्या घाईं[13] । दोघे जण पडिले ठाईं । हे स्त्रीकामाची नवाई । [14] दृष्टिक्षेपें पाहीं देहांत दोघां ॥ ८६ ॥ नाहीं स्त्रीशीं कामें एकांतू । नाहीं स्त्रियेसीं केली मातू । नाहीं स्त्रियेसी लाविला हातु । परी अपघातु स्त्रीदृष्टीं ॥ ८७ ॥ एवं स्त्रियांसीं न व्हावी भेटी । स्त्रियांसीं न करावी गोष्टी । स्त्रियांसी पाहतांच दृष्टीं । उठाउठीं[15] आत्मघात ॥ ८८ ॥ सखे आत्मबंधु दोनी । तिहीं स्त्री देखतां नयनीं । निजघातें निमाले रणीं । स्त्रीदर्शनीं अपघात ॥ ८९ ॥ स्त्रीदर्शनीं देहघात । स्त्रीस्पर्शनीं नरकावर्त[16] । एवं स्त्रियांची संगत । अति अनर्थ पुरुषांसी ॥ ९० ॥ कथाकथनीं सुंदोपसुंद । हा कथेसी लागला संबंध । म्हणोनि केला अनु-

१ घुबडांची. २ कोल्ही. ३ ताटिकेचें घर. ४ ओसाड. ५ रोखून, अडवून. ६ हजारों बलवान् हत्तींच्या शक्तीची. ७ युक्ती. ८ बायको म्हणून स्वीकारण्यास. ९ इच्छिली.

१० भांडण. ११ गदायुद्धकौशल्यामध्यें. १२ आवेश. १३ घायांनीं. १४ फक्त कामदृष्टि ठेवल्यानें. १५ त्वरित. १६ नरकरूप भोंवरा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वाद। श्रोतीं जल्पानुवाद[1] न म्हणावा ॥ ९१ ॥ स्त्रीसंगापासीं अति अनर्थ। हा बोलिलों परमार्थ। पुढील कथेचा कथार्थ। सादर वृत्तांत परिसावा ॥ ९२ ॥ मारीच सुबाहु सुत। त्यांसी इंद्र मारूं टपत। तद्भयें भयचकित। ताटका तदर्थ या वना आली ॥ ९३ ॥ मग बोले रघुनंदन। तीस कां आलें राक्षसपण। तेविषयींचें निरूपण। ऋषि संपूर्ण सांगतु[2] ॥ ९४ ॥ अगस्तीच्या आश्रमासी। ताटका वसे वनवासीं। घेऊनि दोघां पुत्रांसी। ती परदेशीं विचरत ॥ ९५ ॥ ते नागायुत[3]निजशक्ती। त्या बळाची अंगीं मस्ती। तेणें बळें ते दुर्मती। अगस्तीप्रती छळूं गेली ॥ ९६ ॥ पुत्रांसमवेत आपण। विक्राळ करोनियां वदन। अगस्तीस छळितां जाण। तेणें दारुण शाप दिधला ॥ ९७ ॥ विक्राळ करोनि वदनासी। जे तूं मज छळूं आलीसी। ते तूं सपुत्र राक्षसी। विक्राळ देहासीं विटंकें[4] होसी ॥ ९८ ॥ ते हे अगस्तिशापदग्ध। राक्षसी अति विरुद्ध। प्राणिगणां करी बाध। मार्गनिरोध[5] केला असे ॥ ९९ ॥ जे मार्गी असे ते राक्षसी। ते मार्गी जातां नये आम्हांसी। ऐसें ऐकतां ऋषिवाक्यासी। हासें रामासीं पैं आलें ॥ १०० ॥ स्त्रीव्यक्ति ताटिकाभेणें[6]। जैं करावें पलायन। तैं तुमच्या यागीं संरक्षण। केंवी आपण करावें ॥ १ ॥ आज्ञा देसी स्वामिनाथा। राक्षसी वधीन मी आतां। ऐसें विश्वामित्र ऐकतां। उल्हासें तत्त्वतां आलिंगी ॥ २ ॥ तुझा पहावया पुरुषार्थ। म्यां सूचिला मार्ग भयार्थ। तंव तूं निधडा रघुनाथ। निर्भयार्थ निजयोद्धा[7] ॥ ३ ॥ इसी मारावें रघुनाथा। स्त्री मारूं नये शास्त्रार्था। दुष्टदमनीं हें वाक्य वृथा। इसीं सर्वथा मारावें ॥ ४ ॥ स्वामी करूं नये गुरुअवज्ञा। हे सकळशास्त्रप्रतिज्ञा। वसिष्ठदशरथांची आज्ञा। तुझी अवज्ञा न करावी ॥ ५ ॥ सकळ शास्त्रार्थ आपण। गुरुचरणां येती शरण। गुरूचें अपार महिमान। अन्यथा कोण करूं शके ॥ ६ ॥ ऐसें बोलोनि रघुनंदन। नमूनियां सद्गुरुचरण। चाप सज्जोनियां जाण। साटोपें ठाण मांडिलें ॥ ७ ॥

ते काळीं श्रीरामस्वरूप। पाहतां काळासी सुटे कंप। वीर्यधैर्याचा सांटोप। परम प्रताप युद्धाचा ॥ ८ ॥ करितां धनुष्यीं टणत्कार। दुमदुमिले मेरुमांदार। खळवळले सप्त सागर। पाताळीं विखार[10] खळबळिले ॥ ९ ॥ धनुष्यनादें कांपे सृष्टी। न्याहीं उठला वैकुंठीं। ध्यानीं दचकला धूर्जटी। हडबड मोठी सुरवरां ॥ ११० ॥ नादें कोंदलें अंबर। दिशा जाल्या नादाकार। तेणें ताटिकेचें जिव्हार[12]। कांपे थरथरां सनादें ॥ ११ ॥ तेणें गजबजुनी उठी। दोघे कुमार देखे दृष्टी। गिळावया आवळी[13] चाटी। सक्रोध उठी साटोपें ॥ १२ ॥ विकट[14] देवोनियां हाक। विक्राळ पसरोनियां मुख। धांविन्नली श्रीरामासन्मुख। येरु तो निःशंक तद्धार्थी ॥ १३ ॥ श्रीराम म्हणे लक्ष्मणा। पाहें भ्यासुर राक्षसी पूर्णा। देखतां प्राणी सांडिती प्राणा। इजसमोर कोणा न राहवे ॥ १४ ॥ आतां पाहें माझें विंदानें[15]। हस्तलाघवीं अनुसंधान। एके घाईं घेईन प्राण। म्हणोनि बाण सोडिला ॥ १५ ॥ कानाडी[16] ओढितां आपण। आकर्षिला ताटिकेचा प्राण। हृदयीं आदळला बाण। जिव्हारीं पूर्ण भेदला ॥ १६ ॥ बाणाच्या सबळ मेळीं। ताटिका देवोनि आरोळी। नेटें आदळली भूतळीं। न्याहा पाताळीं ऊठिला ॥ १७ ॥ ताटिकेचे निज-शरीरभारें। दुमदुमिलीं गिरिकंदरें। डळमळलीं मेरुशिखरें। भयें वनचरें मूर्च्छागत ॥ १८ ॥ तळीं पाषाण जाले रांगोळी। वृक्ष उपडिले समूळीं। पक्षी भ्रमती अंतराळीं। बैसलीं टाळीं दिग्गजांचीं ॥ १९ ॥ ताटिकापातें भूकंप होत। समुद्रजळ उचंबळत। नरनारी हाहाभूत। असुर कांपत थरथरां ॥ १२० ॥ तिचे छेदिले त्रिविध ताप। छेदिले संकल्पविकल्प। छेदोनियां पुण्यपाप। निर्विकल्प मारिली ॥ २१ ॥ छेदिला देहेंसीं अभिमान। जीवपणेंसीं जीवबंधन। समूळ छेदोनि मीपण। ताटिका संपूर्ण मारिली ॥ २२ ॥ ताटिका पडतांचि सृष्टीं। देवांचीं कोट्यानुकोटी। विमानें दाटलीं दाटीं। पुष्पवृष्टी तिहीं केली ॥ २३ ॥ निशाणें[17] त्राहाटिलीं सुरवरीं। शंख दुंदुभि

१ अप्रस्तुत पाल्हाळ. २ कथन करता झाला. ३ दहा हजार हत्तींच्या शक्तीची. ४ प्रचंड. ५ रस्ता अडवणें. ६ ताटिकेच्या भयानें. ७ जातिवंत योद्धा.

८ निश्चळ उभा राहिला. ९ नेट. १० सर्प. ११ प्रतिध्वनि. १२ अंतःकरण. १३ जिभोळ्या. १४ भयंकर. १५ कुशलता. १६ कानापर्यंत धनुष्याची दोरी ओढून. १७ नगारे.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

निशाण भेरी । गगन गर्जे जयजयकारीं । कीर्ति सुरवरीं वानिजे ॥ २४ ॥ योगी छेदी निजकल्पना । तेणें सुख होय जीवा मना । ताटिका निर्दाळितांचि जाणा । सुख त्रिभुवना श्रीरामें ॥ २५ ॥ भक्त निर्दाळी आशंका । तेणें तो पावोनि निजात्मसुखा । तेंवि वधितांचि ताटिका । सकळ लोकां आल्हाद ॥ २६ ॥ विश्वामित्राचे निजगुण । अमरेंद्र वानी आपण । तुझेनि धर्में जाण । दुष्टनिर्दळण श्रीरामें ॥ २७ ॥ ताटिका वधिली तत्काळीं । कौशिक नाचे आनंदमेळीं । श्रीरामातें जीवें ओंवाळी । पिटिली टाळी ऋषिवृंदें ॥ २८ ॥ इंद्र सांगे विश्वामित्रासी । अस्त्रविद्या द्यावी श्रीरामासी । हा साह्य सुरकार्यासी । तुमच्याही यागासी सिद्धयर्थ ॥ २९ ॥ श्रीरामासारिखें पात्र । यासी सांगातें सच्छास्त्र । विद्या सांगावी सबीजमंत्र । तुवां विश्वामित्रगुरुवर्या ॥ १३० ॥ ऐकोनि देवांचें वचन । विश्वामित्र संतोषोन । श्रीरामा दे आलिंगन । करी निंबलोण सर्वस्वें ॥ ३१ ॥ तो म्हणे ताटिका वधितां येथ । सुरवरां सुख जालें अपरिमित । मार्गस्थां मार्ग निर्मुक्त । हा प्रताप समर्थ श्रीरामाचा ॥ ३२ ॥ हें रघुनाथाचें प्रथमचरित्र । लोकत्रयीं अति विख्यात । पुढारीं कथा परम अद्भुत । श्रोतीं सावचित्त परिसावी ॥ ३३ ॥ जे कथेचेनि अवधानें । जन्ममरणांचें उठे धरणें । विषयांचें खत फाडणें । गुढी उभवणें वैकुंठीं ॥ ३४ ॥ वैकुंठींचे मुक्तवासी । तेहि येती रामकथेसी । कथेचि महिमा आहे ऐसी । कथा सर्वांसी प्रियकर ॥ ३५ ॥ एका जनार्दना शरण । जालें ताटकानिर्दळण । पुढें धनुर्विद्याअस्त्रग्रहण । यज्ञसंरक्षण ऋषींचें ॥ ३६ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे बालकांडे एकाकारटीकायां ताटिकानिर्दलनं नाम द्वादशोऽध्यायः ॥ १२ ॥ ओंव्या ॥ १३६ ॥

अध्याय तेरावा

विश्वामित्र उवाच—

एह्येहि रजनीं राम वसाम शुभदर्शन ।
अयं सिद्धाश्रमो नाम त्वत्प्रसादाद्भविष्यति ॥ १ ॥

विश्वामित्र म्हणे रामासी । सिद्धाश्रम नाम यासी । येथें राहात्रें आजिचे निशीं । सिद्धाश्रमासी निजसिद्धी ॥ १ ॥ आम्हीं तुम्हीं केलिया वस्ती । या सिद्धाश्रमाची सिद्ध ख्याती । विस्तारेल त्रिजगतीं । मम आश्रमाप्रति प्रभाते[१] गमन ॥ २ ॥ येथें सुखें निशा क्रमून । प्रभाते[२] स्नानसंध्या करून । विश्वामित्र म्हणे आपण । अस्त्रग्रहण करीं रामा ॥ ३ ॥ वसिष्ठाज्ञेचा निर्धारु । धनुर्विद्येसी तूं सद्गुरू । तदर्थी आल्हाद थोरू । श्रद्धासादरू रघुनाथ ॥ ४ ॥ वंदोनि सद्गुरुचरण । कृतांजलि[३] रामलक्ष्मण । त्यांसी विश्वामित्र आपण । अस्त्रप्रदान प्रारंभी ॥ ५ ॥ तो म्हणे हें अस्त्राभिग्रहण । त्रिशुद्धी व्हावें सावधान । सबीजमंत्रावें मंत्रोद्धारण । प्रेरणावरण[४] अस्त्रांचें ॥ ६ ॥ अस्त्र सोडिलें तत्काळ जाय । कार्य साधूनि हातासी येय । ऐसीं बीजें निःसंदेह । ऋषि सांगताहे सवर्म ॥ ७ ॥ पन्नगास्त्र[५] गरुडास्त्र । अग्न्यस्त्र पर्जन्यास्त्र । वायव्यास्त्र पर्वतास्त्र । वज्रास्त्र दुर्धरत्वें ॥ ८ ॥ सोमास्त्र हिमास्त्र । क्रोधास्त्र नंदिकास्त्र । गंधर्वास्त्र आदित्यास्त्र । हयशिरोस्त्र दारुण ॥ ९ ॥ वीरघ्नास्त्र विरोधास्त्र । दुर्मनास्त्र सर्पघ्नास्त्र । घोरास्त्र अघोरास्त्र । घोरघोरास्त्र अतितापी ॥ १० ॥ संतापास्त्र अतितापास्त्र । घोषणास्त्र दानवास्त्र । पिशाचिकास्त्र पिपीलिकास्त्र । विद्याधरास्त्र मारक ॥ ११ ॥ वृकास्त्र जंबुकास्त्र । जृंभकास्त्र शुचिकास्त्र । मानवास्त्र वृश्चिकास्त्र । त्वष्ट्रास्त्र[६] तडित्प्राय ॥ १२ ॥ कंकाळास्त्र कालिकास्त्र । सूचिकास्त्र विषूचिकास्त्र । चंडास्त्र प्रचंडास्त्र । वितंडास्त्र दाहक ॥ १३ ॥ संवर्त्तकास्त्र शलभास्त्र । विखंडास्त्र दंडनास्त्र । शीतकास्त्र वातास्त्र । वंशिकास्त्र विध्वंसी ॥ १४ ॥ मायास्त्र मोहनास्त्र । पातनास्त्र घातनास्त्र । मातंगीदहनास्त्र । ब्रह्मकपालास्त्र रुधिराशी[७] ॥ १५ ॥ भीमास्त्र भयानकास्त्र । शृंगास्त्र भृंगास्त्र । क्रूरास्त्र भैरवास्त्र । करालास्त्र उग्रत्वें ॥ १६ ॥ वारुणास्त्र दारुणास्त्र । काळरुद्रास्त्र कार्तिकेयास्त्र । कपालास्त्र भद्रास्त्र । वामनास्त्र विघाती ॥ १७ ॥ संकर्षणास्त्र नारायणास्त्र । शंकरास्त्र नृसिंहास्त्र । वामनास्त्र प्रद्युम्नास्त्र । मदनास्त्र प्रतापी ॥ १८ ॥ ईषीकास्त्र तृणशलाका । दोर्दुर्गी[८]

---

१ कुरवंडी. २ सकाळीं. ३ हात जोडून. ४ सोडणें आणि माघारें घेणें. ५ लांडग्याचें अस्त्र.

६ विजेसारखें. ७ रक्ताचें प्राशन करणारें. ८ प्रचंड.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

जिणोनि अस्त्रें अनेका। पाशुपताची महिमा देखा। तिहीं लोकां अनिवार ॥ १९ ॥ ब्रह्मशिरोस्त्राचा मंत्र। प्रेरिलिया छेदी चराचर । याचा ऐसा असे विचार। यालागीं हें अस्त्र राखिजे जतन ॥ २० ॥ मांडल्याही निर्वाण। या अस्त्राचें प्रेरण। सर्वथा न करिती विचक्षण। परम दारुण अनिवार ॥ २१ ॥ हें अस्त्र जो पाळूं जाणे। सकळां अस्त्रां सामर्थ्य येणें। यालागीं हें अस्त्र शहाणे । अति यत्नें पाळिती ॥ २२ ॥ जाली अस्त्रांची अवधी। आतां सांगेन शस्त्रविधी । जे स्मरतांचि त्रिशुद्धी। युद्धसमयीं येती स्वयें ॥ २३ ॥ वायुचक्र विष्णुचक्र। कूर्मचक्र काळचक्र। नक्रचक्र अतिवक्र। अतिदुर्धर कंदनाकार ॥ २४ ॥ शूळ त्रिशूळ महाशूळ पाहें। घाई खोंची चारी देहें। तया समोर कोण राहे। धाकें कांपताहे कळिकाळ ॥ २५ ॥ कौमोदकी शिवोदकी। दोन्ही गदा अलौकिकी। मोहममतेच्या छेदकी। तिहीं लोकीं अति धाक ॥ २६ ॥ दोनी खड्ग अति चोख। एक जीवाचा छेदक। दुजा कल्पनेचा घातक। यासी लोकालोक कांपती ॥ २७ ॥ शिव-शक्ती विष्णुशक्ती। अनादि आदिशक्ती। संदेहें लिंगदेह छेदिती। याचिया दीप्तीं पळे कळिकाळ ॥२८॥ टणत्कारें ओढितां कानाडी[3]। नादें निमती[4] राक्षसकोडी। माया सकुटुंब प्राण सांडी । हे धनुर्विद्या गाढी दृढ धरीं ॥ २९ ॥ निजतेजें तिखट सदा। अशेष आशेच्या करी छेदा । तो दिव्य बाण हे प्रबुद्धा। तूंणीरबद्धा[5] निर्बंधु ॥ ३० ॥ जालिया शस्त्रास्त्रविधी। मल्लविद्याविंदानसिद्धी। गुरुकृपा उपजे त्रिशुद्धी । कृपानिधी सच्छिष्या ॥ ३१ ॥ उपदेशितां विश्वामित्रें । धनुर्विद्या शस्त्रास्त्रें । ते विद्या श्रीरामचंद्रें। निमिषमात्रें निजबोधिली ॥ ३२ ॥ मंत्रांच्या मंत्रशक्ति तत्त्वतां। आणि मंत्रमूर्ति समस्ता। स्वयें वंदिती रघुनाथा। आमची समर्थता तुझेनी ॥ ३३ ॥ आमचा स्वभाव छेदक भूतीं। ते छेदकता तुझे हातीं। मरत्या मारित्या अमृतप्राप्ती । ऋषि वंदिती पावनत्वें ॥ ३४ ॥ तूं अधर्मातें निर्दाळिसी। स्वधर्मातें प्रतिपाळिसी। तेचि कीर्ति पैं आम्हांसी। तुझेनि हस्तेंसीं पावन ॥ ३५ ॥ तुवां आम्हांसी धरितां हातीं। आम्ही पावन तुझिया ख्यातीं । तुझिया युद्धाची कीर्ती। कवि वानिती पुराणीं ॥ ३६ ॥ आमचें कर्म भूतघातीं। घातामाजी तूं देसी मुक्ती। तेणें आमची पावन कीर्ति। स्वयें वंदिती द्विज देव ॥ ३७ ॥ ऐसी करोनि स्तुतिवादना। रामचरणीं लागल्या जाणा । मग करूनियां प्रदक्षिणा। रामहृदयीं जाणा प्रवेशल्या ॥ ३८ ॥ शस्त्रदेवता अहर्निशीं। जोडोनि हात ठेल्या श्रीरामचरणांसी। घोकणी चिंतन न लगे त्यासी। अनायासीं प्राप्त सर्वज्ञा ॥ ३९ ॥ यालागीं संग्रामासी। जें जें शस्त्र पाहिजे त्यासी। तें तें येतें हातापासी। शत्रुघातासी स्वभावें ॥ ४० ॥ शस्त्रास्त्रांसी श्रीरामभक्ती । रामहृदयीं शस्त्रांची वस्ती । ऐसिया अभिनवा गतीं। संग्रामस्थिती श्रीरामीं ॥४१॥ एवं श्रीराम-सौमित्रां। उपदेशितां विश्वामित्रा। उल्लास जाला शस्त्रास्त्रां। निशाचरां वधावया ॥ ४२ ॥ ऋषीनें [illegible]त ठेवितां माथां। विद्या वार्णली रघुनाथा। [illegible]णें उल्लास तत्त्वतां। ऋषि स्वानंदता स्वयें नाचे ॥ ४३ ॥ विद्या वाणतां शिष्याचे पोटीं। गुरूसी आनंदाच्या कोटी। हे शाब्दिक न कळे गोष्टी। बोधकँसवटी[7] अनुपम्य ॥ ४४ ॥ शाब्दिकाचें शब्दज्ञान। तेंचि सोलींव अज्ञान। तेंचि साधकां निजबंधन। रघुनंदन तैसा नव्हे ॥ ४५ ॥ रघुनाथ विद्याधिष्ठान[8]। हे विश्वामित्रा कळली खूण। तेणें आनंदें बोले आपण । येथोनि प्रयाण करावें ॥ ४६ ॥ ऐकोनि गुरूचें वचन । रथारूढ रामलक्ष्मण । उल्लासें करितां गमन । पुढें शोभायमान वन देखे ॥ ४७ ॥ राम म्हणे ऋषि निर्मळा। ही कोणाची शोभनशाळा। येरू म्हणे घननीळा। आश्रम सोज्ज्वळा पैं माझा ॥ ४८ ॥ आश्रमा आले रघुपती। आनंदल्या ऋषिपंक्ती। विश्वामित्रें धर्मस्थितीं। रामा अति प्रीतीं पूजिलें ॥ ४९ ॥ आणोनि श्रीरामा सुभटा । पाचारोनी मुनिश्रेष्ठां। आदरें अग्निप्रतिष्ठा। केली स्वधर्में पैं ॥ ५० ॥ गर्ता[9] वेदी कुंड मंडप। विधियुक्त तोरणें पतांकारोप[10]। यालागीं मुख्य रघुनाथ यूप[11]। तो निजरूप यज्ञाचें ॥ ५१ ॥ अग्निप्रतिष्ठा[12] पूजन ।

१ खरोखर. २ धनुष्याची दोरी. ३ मरतात. ४ भाता बांधून सिद्ध अशा. ५ राहिल्या. ६ बिंबली, ठसावली. ७ बोधाची कसोटी. ८ विद्येचें स्थान. ९ यज्ञांतील कुंडाजवळील ओटा. १० ध्वजा उभारणें. ११ स्तंभ. १२ अग्निस्थापना.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

परिसमूहन[1] परिस्तरण[2]। प्रणीता[3]पात्रें करोनि पूर्ण। इध्मा[4]विसर्जन होमार्थ ॥ ५२ ॥ बर्हि[5]चें आस्तरण[6]। आज्य[7]स्थालीसंस्थापन। ज्वलना[8]ज्य आघारून[9]। होमप्राधान्य मंत्रोक्ती ॥ ५३ ॥ ॐकारवषट्कारेंसी करिती यज्ञ। ऋषींस पुसे रघुनंदन। राक्षस यज्ञ-विध्वंसन। कोठोनि येवोन ते करिती ॥ ५४ ॥ ऐसें पुसतां रघुनाथा। उल्लास मुनिवरां समस्तां। कौशिकें आश्वासोनि माथा। राक्षसकथा स्वयें सांगे ॥ ५५ ॥ आरंभापासोनि साहावे रातीं। अलक्ष[10]लक्षें राक्षस येती। रिघोनियां यागाप्रती। विध्वंसिती दुर्धर ॥५६॥ जो निर्विकार निजनेटासीं। सहा दिवस अहर्निशीं। सावध राहे निद्रेसीं। राक्षस त्यासी वध्य होती ॥ ५७ ॥ ऐसें ऐकतां गुरुवचन। श्रीराम नित्य सावधान। वेगें घेवोनि धनुष्यबाण। राहिला आपण यज्ञद्वारीं ॥ ५८ ॥ कर्मयागीं कर्ता विश्वामित्र। क्षात्रधर्मयागीं रघुवीर। दोहीं यागांचा विचार। श्रोतीं साचार परिसावा ॥ ५९ ॥ कर्मयागीं कुंडसाधन। क्षात्रयागीं रणरंगण। कर्मयागीं वेदविधान। अपलायन[11] क्षात्रयागीं ॥ ६० ॥ ऋषियागीं ब्रह्मा श्रेष्ठ। रणयागीं सत्त्ववरिष्ठ। यज्ञयागीं कर्मखटपट। तेथें खणखणाट शस्त्रांचा ॥ ६१ ॥ येथें स्रुक्[12] स्रुवा[12] परिमार्जन[13]। तेथें धनुष्यीं लाविले बाण। बाणांचें परिस्तरण। परिसमूहन धैर्याचें ॥ ६२ ॥ कर्मयागीं अग्निस्थापन। येथें काळानळ-हुताशन। तेथें स्रुवेनें होमिती अन्न। येथें मांसावदान बाणाग्रें ॥ ६३ ॥ ऋषियागीं वसोर्धारा[14]। येथें प्रवाहो रुधिरा। तेथें ॐकारवष-ट्कारा। येथें हाहाकार वीरांचे ॥ ६४ ॥ कर्मयागीं ज्वाला उद्भट। येथें शस्त्रांचा खणखणाट। यागीं धूम्र निघे अचाट। येथें स्वेद श्रम कष्ट वीरांचे ॥ ६५ ॥ यागीं वाढल्या हुताशन। पृषदाज्यें[15] अभि-षिंचन। राक्षस वाढल्या दारुण। अस्त्रीं सिंचन तयांसी ॥ ६६ ॥ यागीं सदीप बलिदान। येथें जीव-बळि संदीप्तज्ञान। बळि नेती सलोभ हीन। येथें जीवपण देहलोभें ॥ ६७ ॥ श्रीरामासी विमुख होऊन। जे युद्धीं करिती पलायन। त्यांचें न तुटे देहबंधन। जीवबळिभक्षण अधःपात ॥ ६८ ॥ या यागीं पूर्णाहुति नारिकेळें। येथें पूर्णाहुति शिर्साळें[16]। तेथें प्रदक्षिणा मंत्रमेळें। येथ रणकल्लोळें प्रदक्षिणा ॥ ६९ ॥ कर्मयागीं दक्षिणा धन। येथें दक्षिणा निजपद पूर्ण। तेथें अभिषिंचितां ब्राह्मण। येथें देवगणपुष्पवृष्टि ॥ ७० ॥ या यागीं श्रेय संपाद्य विश्वामित्रा। संग्रामश्रेय श्रीरामचंद्रा। श्रेयें उल्लास स्वगोत्रा। येथें चराचरा उल्लास ॥ ७१ ॥ कर्मयागीं ब्राह्मणभोजन। रणयागीं भूतसंतर्पण। दोनी यागीं समसमान। सिद्धी संपूर्ण रघुवीरें ॥ ७२ ॥ यज्ञांतीं अग्निविसर्जन। तैसें न करी रघुनंदन। पूर्ण द्यावया भोजन। नवें निमंत्रण काळानळा ॥ ७३ ॥ ताटिकावधें पात्रप्रोक्षण। चित्राहुति सुबाहु संपूर्ण। त्रिशिरा आणि खर दूषण। प्रथम जाण प्राणाहुति ॥ ७४ ॥ कढीभात तो कुंभकर्ण। इंद्रजित पक्वान्नें पूर्ण। रावण तो दध्योदन[17]। उत्त-रापोशन रणत्याग ॥ ७५ ॥ प्रधान आणि राक्षस-गण। हे भोजनीं शाखा आणि लवण। अखयादि पुत्र पूर्ण। ते लोणचीं जाण सर्वस्त्रें ॥ ७६ ॥ इतुकें जालिया संपूर्ण। काळानळा तृप्तिभोजन। हें द्यावया रघुनंदन। सावधान युद्धार्थी ॥ ७७ ॥ विश्वामित्रयज्ञरक्षण-। -कथा सांडोनि रामायण। मध्येंचि केलें व्यर्थ कथन। तें श्रोतीं संपूर्ण क्षमा कीजे ॥ ७८ ॥ मी तंव संतांचें लळिवाड[18]। माझ्या बोलांचें त्यांसी कोड। यालागीं माझी बडबड। लागो गोड साधूंसी ॥ ७९ ॥ साधूंचें मी तान्हें बाळक। अगुणपणें समूळ मूर्ख। रामकथा वदे ज्याचें मुख। हें कृपापीयूष साधूंचें ॥ ८० ॥ तंव संत म्हणती नवलाव। उभययागअभिप्राव। शुद्ध साधिला आत्मानुभव। अविरुद्ध भाव वेदोक्तीं ॥ ८१ ॥ श्रीरामीं प्रेम गहन। हें निरूपणीं कळलें चिन्ह। आतां चालवीं रामायण। मूळनिरूपण ग्रंथार्थ ॥ ८२ ॥ ऐकोनि साधूंचा अनुवाद। कवित्वा जाला परम आल्हाद। एका-जनार्दनीं बोध। कथासंबंध अवधारा ॥ ८३ ॥

१ अग्नीच्या आजूबाजूंस पाणी शिंपडणें. २ चारी बाजूंस दर्भ पसरणें. ३ यज्ञपात्रें. ४ समिधा सोडून ठेवणें. ५ दर्भांचें. ६ पसरणें. ७ तुपाचें भांडें ठेवणें. ८ अग्नि पेटविण्यास घालावें लागणारें तूप. ९ आघार आहुति घालून. १० न समजतां, एकाएकीं. ११ न पळणें. १२ यज्ञांतील लांकडांच्या पळ्या. १३ स्वच्छ करणें. १४ तुपाची धार. १५ दधियुक्त घृतानें. १६ मस्तकें. १७ दहींभात. १८ लाडका.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

विश्वामित्रयज्ञरक्षण। करावया श्रीराम स्वयें साव-
धान। रिघों न शकती राक्षसगण। सुबाहु स्वयें
आपण आला ॥ ८४ ॥ यज्ञद्वारीं श्रीरघुपती। तेथें
राक्षसांची न चले गती। अंधारीं छळावया येती॥
तंव श्रीराममूर्ति सावधान॥ ८५॥ दिवसा करावया
छळण। तेथें श्रीराम सावधान। स्वयें सुबाहु
भोंवे आपण। तरी रघुनंदन छळेना[1] ॥ ८६ ॥
अंधाराचें निजतेज। स्वयें श्रीरामचि सहज।
दिवसाचें निजबीज। दशरथात्मज निजांगें॥ ८७॥
यज्ञरक्षक रघुनाथ। न चले छळाचें छळमत। हा
बाळपणीं प्रतापवंत। ठेला तटस्थ सुबाहु॥ ८८॥
दावूं दुर्धरत्वें[2] दरारा[3]। तंव श्रीराम नेघे भेदरा[4]।झांपडें
पडिलें निशाचरां। सर्वथा अध्वरां[5] शिरों नेदी॥८९॥
श्रीराम नित्य सावधान। सर्वांगदेखणा संपूर्ण।
सुबाहूचें तळमळी मन। ऋषीनें संपूर्ण गांजिलों
॥ ९० ॥ आतां संग्राम करूं सुदृढ। घेऊं ताटिकेचा
सूड। म्हणोनि असुर[6] पडिपाड। गगनीं गडगड
गर्जत ॥ ९१ ॥ वर्षती रुधिराचिया[7] धारा। भयें
भेडसावीत द्विजवरां। सांभाळीं म्हणत रघुवीरा।
आला सामोरा सुबाहु॥ ९२॥ हांसें आलें रघुवीरा।
बाणीं त्रासिला सुबाहु पुरा। तंव मारीच धांवि-
न्नला कैवारा। तेणें रामचंद्रा हाकिलें ॥ ९३ ॥
बावरझोटिया समस्तक। घोर नादें दिधली हाक।
विक्राळ पसरोनियां मुख। श्रीरामासन्मुख धावि-
न्नला ॥ ९४॥ ऐकतां राक्षसआरोळी। भयें
द्विज पडिले भूतळीं। एकांच्या बैसल्या दांतखिळी।
एक ते चळचळीं कांपत ॥ ९५॥ एकांचीं धोत्रें
गळती। एक ते धोत्रांत मुतती। एकां अधो-
वात सरती। एक करिती महाशब्द ॥ ९६॥ एक
आरडती ओरडती। एक दीर्घस्वरें रडती। एक
उघडे पडती। एक चरफडती अति धाकें॥ ९७॥
एकांचे खुटखुटती दांत। एकांचे फुटले ओंठ।
एकांचें भयें फुगलें पोट। अति संकट ब्राह्मणां
॥ ९८॥ राम म्हणे लक्ष्मणासी। वेगीं नाभिकार दे
द्विजांसी। थोर होती कासाविसी। मी राक्षसांसी
निवटीन ॥ ९९ ॥ तंव समुदायें निशाचर। करीत
आले हाहाकार। विक्राळ दुर्मद अति दुर्धर। अति
भयंकर संग्रामीं ॥ १०० ॥ कातिया त्रिशूळ तोमर।
गदा मुद्गल चंड चक्र। बाण खड्गें लहुडी
थोर। शस्त्रभार सूटले ॥ १ ॥ महाशस्त्रांचा
खलखलखाट। थोर खड्गांचा खणखणाट।
बाण सुटती सणसणाट। घाय उद्भट
हाणिती ॥ २ ॥ राहें साहें वीर शूर।
घायें निर्बळ केले असुर। पळूं नको धरीं धीर।
क्रोधें वीर गर्जती ॥ ३॥ तंव रामें सोडिला बाण।
सकळ शस्त्रें केलीं चूर्ण। तिळप्राय केलें वोढण।
बळसंपन्न रघुवीरें॥ ४॥ निवारावयास रामबाण।
शस्त्रें सोडितां तीं होती चूर्ण। वीर खोंचले दारुण।
सुबाहु पूर्ण क्षोभला ॥ ५ ॥ मग हातीं वेंसवोनि
गदा। सुबाहु धांविन्नला मल्लयुद्धा। तंव श्रीराम
नित्यसावध। राक्षसद्वंद्वातें कळलें ॥ ६॥ सुबाहूची
गदा केली पीठ। मारीचाचा मुद्गल केला कूट।
शूळ त्रिशूळ अति तिखट। ते करी सपाट श्रीराम
॥ ७ ॥ बाणीं योजिलें अग्निअस्त्र। घायें सुबाहु
केला पुरा। मारीच पळविला माघारा। त्यासी
पिसारा लागला ॥ ८॥ पिसारा लागला ब्रह्मांडीं।
तेणें त्यासी आली भोंवंडी। हातपायां वळली
मुरकुंडी। सुटल्या तोंडीं रुधिरधारा ॥ ९ ॥ बाण-
पिसारियाचा पवन। मारीचास उडवी जैसें तृण।
वाहुटळीमाजी भोंवे पान। तैंवी परिभ्रमण
आकाशीं ॥ ११० ॥ बाणपिसारियाचा वारा।
मारीच उडविला अंबरा। शतयोजन समुद्रतीरा।
तेथें निशाचरा टाकिलें ॥ ११ ॥ राम लक्ष्मणासी
म्हणे आपण। मारीचास नाहीं लागला बाण।
यालागीं त्याचा न वचे प्राण। पिसारें पूर्ण उडविला
॥ १२ ॥ मारीचास मूर्च्छा उद्भट। वटारिले
नेत्रवाट। घुरघुरीत वाजे कंठ। प्राणसंकट मांडलें
॥ १३ ॥ मारीच दैवें जाला सावध। परी धाक
घेतला सुबद्ध। पिसारियाचा येवढा बाध।
मा सन्मुख युद्ध कोण साहे॥ १४॥ राम देखतांचि
जीव जाय। त्याचे निर्वाणाचे घाय। देहवंत कोण
साहे। महाभया भय श्रीराम॥ १५॥ देखोनि
श्रीरामाचे चरण। युद्धाभिमान गेला पळोन।
संग्राम न करीं आपण। वाहोनियां आण
निजाश्रमीं शांत॥ १६ ॥ श्रीरामाचा निजबाण।
सुबाहूचें निवटी मन। चित्त बुद्धि अभिमान।
छेदूनि संपूर्ण मारिला ॥ १७॥ येणें नेटें मारिला
देख। जे मरणाचें नाठवे दुःख। पुढें जन्माचें न

१ फसला नाहीं, २ भयंकर स्वरूपानें, ३ धाक, ४ भय. ५ यज्ञांत. ६ राक्षस, ७ रक्तान्त्या, ८ ढाल, ९ घेऊन,

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

देखे मुख। ऐसा निःशेष मारिला ॥ १८ ॥ मारीच-सुबाहूंचे अनेक सेवक। राक्षस जे आले अनेक। रामें मारिले एक एक। राक्षसांतक श्रीराम ॥ १९ ॥ राक्षसांचीं महाधेंडीं। आश्रमीं पडलीं मढीं। शिष्य धाकती बापुडीं। हीं कोण काढी अति दीर्घ ॥ १२० ॥ त्या शिष्यांची सांकडी। न लागतां अर्धघडी। श्रीरामें फेडिली रोकडी। घेवोनि भूतकोडी जगदंबा आली ॥ २१ ॥ औटकोटी[1] भूतावळी। सहित आली भद्रकाळी। आरती घेवोनि सोज्ज्वळी। स्वयें ओंवाळी श्रीरामा ॥ २२ ॥ येतां भूतांचा मेळा। प्रेतें नेली देखतां डोळां। आश्रम जाला अति सोज्ज्वळा। सडे रंगमाळा घातल्या भूतीं ॥ २३ ॥ ऋषि राक्षसभयें भयभीत। पडले होते पैं मूर्च्छित। ते लक्ष्मणें करूनि सावचित्त। शीघ्र स्नानार्थ पाठ-विले ॥२४॥ वेगीं आले करूनि स्नान। आश्रम दिसे शोभायमान। बाप प्रतापी रघुनंदन। स्वानंदें स्तवन ऋषि करिती ॥ २५ ॥ विजयी जाला रघुवीर। सुखी जाले ऋषीश्वर। विष्णु पूजिती सुरवर। तैसा रामचंद्र पूजिला ॥ २६ ॥ रामप्रताप देखोनि दृष्टीं। विश्वामित्रा आनंद कोटी। श्रीरामाची पाठी थापटी। उल्लास सृष्टीं न समाये ॥ २७ ॥ गुरुआज्ञा तुवां पाळली। गुरुसेवा तुजचि फळली। गुरूची चिंता तुवां हरिली। गुरुपूजा केली यथार्थ ॥ २८ ॥ तूं गुरुत्व सद्गुरूचें। तूं गुरुज्ञान निश्चयाचें। तूं निजबीज गुरुवाक्याचें। गुरुत्व साचें तुझेनी ॥२९॥ श्रीराम गुरुत्वाची गरिमा[2]। श्रीराम गुरुत्वाची महिमा। श्रीराम गुरुत्वाची सीमा। ब्रह्मत्व ब्रह्मा श्रीरामें ॥ १३० ॥ श्रीराम गुरुत्वाचें निजवीर्य[3]। श्रीराम गुरूचें निजधैर्य। श्रीराम गुरुत्वा गुरुवर्य। गुरुगांभीर्य श्रीराम ॥ ३१ ॥ श्रीराम गुरुत्वाचें निजतेज। श्रीराम गुरुत्वाचें निजबीज। श्रीराम गुरुत्वाचें गुह्य गुज। स्वानंद[4]भोज श्रीराम ॥ ३२ ॥ श्रीराम गुरूची निजउत्पत्ती। श्रीराम गुरुत्वाची निजशांती। श्रीराम गुरूची निजमूर्ती। श्रीराम निश्चित गुरुगम्य[5] ॥ ३३ ॥ श्रीराम गुरुत्वा निज-प्रताप। श्रीराम गुरूचें सद्रूप। श्रीराम स्वयें ब्रह्म-रूप। चित्स्वरूप[6] श्रीराम ॥ ३४ ॥ ऐसें श्रीरामाचें निजस्तवन। कौशिकें करोनि आपण। आनंदें दिधलें आलिंगन। समाधान गुरुशिष्यां ॥ ३५ ॥ विश्वामित्र आनंदें निर्भर। द्विजां दे गौ सहस्रासहस्र। सुवर्णशृंगी रौप्यखूर। पृष्ठींस ताम्र कांस्यदोही ॥ ३६ ॥ गोपुच्छींचीं प्रवाळें। लेवविलीं रत्नें मुक्ताफळें। ऐसीं विश्वामित्रें गोकुळें। देवोनि द्विजकुळें सुखी केलीं ॥ ३७ ॥ सुवर्णाचे संभार। दक्षिणांचे सहस्रासहस्र। याचक केले हर्षनिर्भर। मागते अँभर कौशिकयागीं ॥ ३८ ॥ रामें निवटिले राक्षसगण। ऋषींचा सिद्धि[7] पावला यज्ञ। जालें ब्राह्मणभोजन। रघुनंदन निजविजयी ॥ ३९ ॥ विजयी जाला रघुनाथ। पवाडा केला त्रैलोक्यांत। ऐकोनि रावण विस्मित। आनंद अद्भुत सुरवरांसी ॥ १४० ॥ एका जनार्दना शरण। जालें सुबाहुनिर्दळण। सिद्धि पावला गुरूचा यज्ञ। अहल्योद्धरण अवधारा ॥ १४१ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे बालकांडे एकाकार-टीकायां सुबाहुनिर्दलनं नाम त्रयोदशोऽध्यायः ॥ १३ ॥ ओंव्या ॥ १४१ ॥ श्लोक ॥ १ ॥

अध्याय चवदावा

एवमुक्ते तयोर्वाक्ये सर्व एव महर्षयः।
विश्वामित्रं पुरस्कृत्य राघवं वाक्यमब्रुवन् ॥ १ ॥
मैथिलस्य नरश्रेष्ठ जनकस्य भविष्यति।
यज्ञः परमधर्मिष्ठो यास्यामस्तत्र वै वयम् ॥ २ ॥
त्वं चापि नरशार्दूल सहास्माभिर्गमिष्यसि।
अद्भुतं च धनूरत्नं तत्र त्वं द्रष्टुमर्हसि ॥ ३ ॥

ऋषिसभे प्रसन्नोन्मुख। बैसले वर्णिती रघु-कुळटिळक। तंव जनकाचे दोघे सेवक। पत्र कुंकुमांकित घेवोनि आले ॥ १ ॥ विश्वामित्रें निजयागार्थ। ऋषी मेळविले समस्त। स्वामीनें त्यांसमवेत। यावें यज्ञार्थ स्वयंवरा ॥ २ ॥ तंव रामलक्ष्मणांलागुनी। कौशिक[8] बोलावी सन्मानोनी। दोघीं साष्टांग नमूनी। कर जोडोनी बोलत ॥ ३ ॥ आम्ही तुझे निल्यांकित। निजसेवक निश्चित। सिद्धी पावला यज्ञार्थ। पुढील कार्यार्थ सांगावा ॥ ४ ॥ स्वामी जे तूं आज्ञा देसी। तें कार्य करूं क्षणार्धेंसीं। गुरुकृपेची महिमा ऐसी। सर्व

१ साडेतीन. २ मोठेपणा. ३ मोठें बळ. ४ स्वानंदसुख. ५ गुरुकडूनच समजला जाणारा. ६ परिपूर्ण.

७ संपन्न. ८ विश्वामित्र.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

कार्यासी निजसिद्धी ॥ ५ ॥ बाळपणीं धीर शूर । मारिले उद्भट निशाचर । परी गर्व न धरी रघुवीर । तेणें विश्वामित्र सुखी झाला ॥ ६ ॥ वीर्यधैर्येंसीं ज्ञान प्रांजळें[1] । ऐसा निगर्वी शिष्य मिळे । तेणें गुरूसी सुखसोहळे । त्या सुखासी कांटाळें[2] असेचिना ॥ ७ ॥ ऐसा सुखावोनि विश्वामित्र । आलिंगिले श्रीरामसौमित्र । सांगे जनकाचें आलें मूळपत्र[3] । जाणें सत्वर मिथिलेसी ॥ ८ ॥ जनक मिथिलेचा नृपवर । धनुर्याग सीतास्वयंवर । तेथें मिनले[4] सुरनर । तेणें ऋषीश्वर बोलाविले ॥ ९ ॥ देशोदेशींच्या भूपाळां[5] । मूळ[6] पाठविलें सकळां । दशरथासी धाडिलें मूळा । तो नयेचि विव्हळा श्रीरामविरहें ॥ १० ॥ आम्ही ऋषिवर्य समस्त । अवश्य जाऊं गा तेथ । तुम्हींही यावें आम्हांसमवेत । आज्ञा समर्थ म्हणे श्रीराम ॥ ११ ॥ गुरुआज्ञापरिपाळण[7] । हें सकळ भाग्या निजभूषण । सकळ कल्याणाचें कल्याण । गुरुवचन शिष्यासी ॥ १२ ॥ तुझेनि शिष्यत्वें माझी थोरी । तुवां अवश्य यावें तेथवरी । सकळ राजे सभेमाझारीं । तूं मुख्य मुर्खरण होसील ॥ १३ ॥ ऐसें ऐकोनि गुरुवचन । सद्गुरुसमवेत आपण । रथारूढ रामलक्ष्मण । मिथिलेसी प्रयाण महोत्साहें ॥ १४ ॥ रथारूढ रामचंद्र । अवघे करिती जयजयकार । ऋषीसमवेत रघुवीर । अति सत्वर निघाला ॥ १५ ॥ मिथिलेआंरते[9] पंचयोजनीं । मुनि राहिले कुशोपवनीं । बैसल्या ऋषींचिया श्रेणी[10] । राम सुखासनीं उपविष्ट[11] ॥ १६ ॥ तेचि उपवनीं एके कोनीं । श्रीराम आश्रम देखे नयनीं । वृक्ष खांकरले[12] फळीं पानीं । आश्रमीं कोणी असेना ॥ १७ ॥ ऐसें देखोनि रघुनाथ । पुसे ऋषींस वृत्तांत । म्हणे हें कां दिसे वन उपहत[13] । हा वृत्तांत सांगा मज ॥ १८ ॥ येथें वस्ती नाहीं मनुष्यासी । पक्षीं वोळिलें[14] वृक्षांसी । आश्रमीं नाहीं मुंगी माशी । उपहती ऐसी कां दिसे ॥ १९ ॥ ऐसें पुसतां श्रीरामासी । पूर्वकथा सांगे ऋषी । ये आश्रमीं अहल्येसीं । आश्रमवासी गौतम ॥ २० ॥ इंद्रें छळिलें अहल्येसी । गौतमें शापिलें दोहींसी । तैंपासोनियां आश्रमासी । वस्ती कोणासी असेना ॥ २१ ॥ राम पुसे अहल्या ती कोण । इंद्रें छळावया काय कारण । हें समूळ मूळींचें कथन । कृपा करून सांगावें ॥ २२ ॥ ऐकोनि श्रीरामाचें वचन । विश्वामित्र म्हणे आपण । अहल्येचें उद्धरण । प्रसंगें पूर्ण ओढवलें ॥ २३ ॥ त्रैलोक्यींचें बरवेपण । ब्रह्मयानें एकवटोनि आपण । स्वयें कन्या केली निर्माण । अहल्या जाण तीस नांव ॥ २४ ॥ शरीर अत्यंत सुकुमार । खुपों शकती चंद्रकर[15] । पन्नगपद्मिणी[16] तीपुढें निबर[17] । निजांगें अरुवार[18] नभापरिस ॥ २५ ॥ तिचें होतांचि स्पर्शन । मनआदि इंद्रियां गुदगुल्या पूर्ण । फिकें अमृताचें गोडपण । तिचें बरवेपण देखोनी ॥ २६ ॥ देखोनि तिचिया मुखासी । अत्यंत सुख डोळयांसी । ते मुखीं झाले[19] क्षेत्रसंन्यासी । आन पहावयासी नावडे ॥ २७ ॥ अत्यंत सौंदर्याची शोभा । चंद्र लोपे अंगप्रभा[20] । देखोनि लावण्याचा गाभा । विवेकाचा उभा प्राण जाय ॥ २८ ॥ तिसीं होतां डोळेभेटी । धैर्याची विरे गांठी । बरवेपणें अत्यंत लाठी[21] । देखिल्या दृष्टी उपडेना ॥ २९ ॥ ऐसी अत्यंत सुंदर । दिवसेंदिवस जाली थोर । कन्या देखोनि उपवर । वरविचार ब्रह्मयासी ॥ ३० ॥ इंद्र साक्षेपी[22] करावया राणी । चंद्र साक्षेपी करावया पत्नी । सूर्य स्वयें तिच्या वरणीं । अनुदिनीं उपार्जी[23] ॥ ३१ ॥ वरुण वायु यम कुबेर । स्कंदादि सकळ सुरवर । अहल्यावरणीं अति सादर । पडला विचार ब्रह्मयासी ॥ ३२ ॥ विधाता करी विचार । अहल्यावरणीं सर्व सादर । मी कोणाचा करूं निर्धार । प्रकारांतर[24] उपपादी ॥ ३३ ॥ ब्रह्मयानें योजिलें विंदान[25] । दों प्रहरीं पृथ्वीप्रदक्षिण । जो करून येईल आपण । त्यासी कन्यादान अहल्या ॥ ३४ ॥ ऐकोनि ब्रह्मयाचें वचन । इंद्र ऐरावतीसीं करी गमन । चंद्र मृगेंसीं

१ पवित्र, शुद्ध. २ तोड, तुलना. ३ आमंत्रणपत्रिका. ४ जमले. ५ राजांना. ६ बोलावणें, आमंत्रण. ७ गुरूची आज्ञा मानणें. ८ मुख्य, श्रेष्ठ. ९ मिथिलेच्या अलीकडे. १० पंक्ति, समुदाय. ११ बसलेला. १२ ओसाड झालेले. १३ निस्तेज. १४ त्यागिलें, टाकलें. १५ चंद्रकिरण. १६ नागस्त्रिया. १७ कांतिहीन, राकट. १८ नाजूक, मऊ. १९ इतर वस्तु पहाणें सोडून ते डोळे अहल्येच्या मुखाचे ठिकाणींच रममाण झाले. २० अंगकांतीनें. २१ मोठी. २२ यत्न करी. २३ झटे. २४ निराळाच मार्ग योजी. २५ युक्ति.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

निघे आपण। मे[1]षारोहणें निघे अग्नि ॥ ३५ ॥ यम नियंता सकळ जगा। तोही कामाच्या लगबगां। पौ[2]लाणूनियां टोणगा। लागवेगां निघाला ॥ ३६ ॥ स्कंदें पालाणिला मयूर। कामें पालाणिला मकर। एवं अवघेचि सुरवर। निघाले सत्वर प्रदक्षिणे ॥ ३७ ॥ ऋषीश्वर धाकटे मोठे। धांवती मेरुतळवटें। आम्ही आपुलिये तपोनिष्ठें। करूं निजनेटें प्रदक्षिणा ॥ ३८ ॥ गौतम करितां अनुष्ठान। गोप्रसूतिकाळ जाण। उभयतोमुखी देखोनि पूर्ण। त्रिवार प्रदक्षिणा तेणें केली ॥३९॥ उभयतोमुखीप्रदक्षिण। पृथ्वीप्रदक्षिणेसमान। हें ब्रह्मयानें जाणोनि ज्ञान। करी कन्यादान गौतमासी ॥ ४० ॥ इंद्र आला प्रथमप्रहरा। तंव अहल्येसी गौतम नोवरा। बोहलीं देखोनि वधूवरां। अभ्यंतरीं संतप्त ॥ ४१ ॥ जे जे प्रदक्षिणा करूनि येती। ते तेही श्वास टाकिती। गौतमासी अहल्याप्राप्ती। कैशा रीती जाली पां ॥ ४२ ॥ इंद्र पुसे ब्रह्मयासी। अहल्या देणें होती गौतमासी। तरी कां छळिलें आम्हांसी। प्रदक्षिणेसी धाडुनी ॥ ४३ ॥ ब्रह्मा बोलिला आपण। त्रिवार पृथ्वीप्रदक्षिण। गौतमासी घडली संपूर्ण। मग कन्यादान मीं केलें ॥ ४४ ॥ इंद्र म्हणे आम्हांहूनि गौतमासी। अधिक शक्ति चालावयासी। त्रिवार प्रदक्षिणा यासी। घडली कैसी नेणवे ॥ ४५ ॥ ब्रह्मा म्हणे न करीं छळण। उभयतोमुखीचें प्रदक्षिण। पृथ्वीप्रदक्षिणेसमान। हें जाणोनि कन्यादान म्यां केलें ॥ ४६ ॥ वचन पाहिलें वेदोक्तीं। परि अति संताप वाढला चित्तीं। म्हणे मी नाना छळणोक्तीं। अहल्या अ[3]पैती स्वयें करीन ॥ ४७ ॥ चंद्रें भोगिलें गुरुपत्नीसी। तेवीं मी भोगीन अहल्येसी। यापरी इंद्रें निजमानसीं। निश्चयासी दृढ धरिलें ॥ ४८ ॥ ब्रह्मा सांगे गौतमासी। इंद्र अभिलाषी अहल्येसी। तरी तुम्हीं अहर्निशीं। अति यत्नेंसीं राखावी ॥ ४९ ॥ गौतम तपें तेजोराशी। अहल्या आणिली आश्रमासी। इंद्र कष्टतां वर्षानुवर्षी। अहल्या त्यासी अप्राप्त ॥ ५० ॥ पूर्ण खग्रास सूर्यग्रहण। अहल्येसहित गंगास्नान। करावया जाय गौतम आपण। अति सावधान इंद्रार्थीं ॥ ५१ ॥ जालें ग्रहणविधिविधान। अहल्या करोनि मुक्तिस्नान। आश्रमासी आली आपण। द्विज[4]भोजनपाकार्थ ॥ ५२ ॥ गौतम स्वधर्मे संपन्न। करावया राहिला दानतर्पण। तेचि संधि साधोनि पूर्ण। इंद्र आपण संचरला ॥ ५३ ॥ गौतमाच्या स्वरू[5]पस्थितीं। इंद्र आला अहल्येप्रती। तिसी नेवोनि एकांतीं। सवेग रति स्वयें मागे ॥ ५४ ॥ ते म्हणे नवलगती। दिवसा केवीं मागां रती। आजि पर्वकाळ पितृतिथी। काम सर्वार्थी निषिद्ध ॥ ५५ ॥ भलतैसें पतीचें वचन। पाळिती पतिव्रता पूर्ण। पतिवचनालागीं दूषण। अधःपतन तें स्त्रियेसी ॥ ५६ ॥ पतीचिया वचनार्था। अनुसरावें सर्वथा। हे मर्यादा वेदशास्त्रार्था। दोष सर्वथा देखों नये ॥ ५७ ॥ पतिवाक्या दोष[6]दर्शन। [6]देखे तिसी आकल्प अधःपतन। आतां तूं जाहलीस सज्ञान। पतिवचन न मानिसी ॥ ५८ ॥ जें जें माझें विरुद्धाचरण। तें तें आपुलेनि तपें मी आपण। तत्काळ करीन निर्दळण। येथें तुज कोण संदेह ॥ ५९ ॥ संकोचली स्वधर्मता। कांहीं न बोलवे सर्वथा। मग जावोनियां एकांता। त्यासीं रत्यर्था अनुसरली ॥ ६० ॥ इंद्र अहल्यासेजेवरी। तंव गौतम आला बाहेरी। परपुरुषा रतली नारी। जाणोनी द्वारीं गुप्त राहे ॥ ६१ ॥ अहल्या म्हणे एकांतवासीं। घेवोनि भ्रताररूपासी। तूं कोण येथें आलासी। कपटें भोगिसी परदारा ॥ ६२ ॥ अहल्यें इंद्र धरिला हातीं। घेवोनि भ्रताररूपाची [7]बुंथी। तूं कोण पापमूर्ती। छळोनि रती मागितली ॥ ६३ ॥ तो म्हणे मी अमरपती। येरी म्हणे पूर्ण जाली रती। आतां तूं जाईं शीघ्रगतीं। दोघांची उपहती ऋषि करील ॥ ६४ ॥ मर मर पापिष्ठा चांडाळा। नाहीं पापाचा कंटाळा। विटाळविलें दोहीं कुळां। दुष्टा दुःशीळा नीघ वेगीं ॥ ६५ ॥ जळो तुझें महिमान। निंद्य कर्म काळें वदन। येथोनि शीघ्र करीं गमन। देखिल्या दहन ऋषि करील ॥ ६६ ॥ जो तूं देवांचा देवाधिपती। तो तूं पर[8]दारकामासक्तीं। अचुक गेलासी अधोगती। नीघ मागुतीं मुख न दाखवीं ॥ ६७ ॥ लाजा इंद्र निघे बाहेरी। तंव गौतम देखिला

१ मेंढ्यावर बसून. २ सजवून, जिन घालून. ३ आपलीशी, प्राप्त. ४ ब्राह्मणभोजनाकरितां स्वयंपाक करण्यासाठीं. ५ स्वरूपानें. ६ दोष ठेवते. ७ बुरखा, आच्छादन, सोंग. ८ परस्त्रीची इच्छा केल्यानें,

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

द्वारीं। भयें कांपोनि जिव्हारीं । इंद्रगोपाकारीं पळोनि गेला ॥६८॥ तंव गौतमें खुंटविली गती। जावों न शके निजशक्तीं। अद्यापि इंद्रगोपांप्रती। शीघ्रगती असेना ॥ ६९ ॥ जेणें करिसी परदार-रमण। ते झडती तुझे वृषण। परभगीं आसक्त मन। भगें सर्वांगीं संपूर्ण होती ॥ ७० ॥ इंद्र शापिला यापरी। गौतम पाहे भीतरीं। तंव अहल्या वस्त्रें सांवरी। म्हणे दुराचारी रमलीस केवीं ॥७१॥

क्षणो नास्ति रहो नास्ति नास्ति प्रार्थयिता नरः।
तेन नारद नारीणां पातिव्रत्यं हि जायते॥ ४॥

स्मृतिवेदांतवेदोक्तीं। धीर धरूं न शके सती। परपुरुषें प्रार्थिल्या एकांतीं। पतिरूपोक्तीं छळिलें मज ॥ ७२ ॥ तुमचिया स्वरूपेंस्थितीं। तेणें मज मागितली रती। मीं रमलें तुम्हांप्रती। कपट निश्चितीं मी नेणें ॥ ७३ ॥ तुमचिया वचनार्था। ना न म्हणवे तत्त्वतां। याच्या कपटाची वार्ता। मी सर्वथा जाणेंना ॥ ७४ ॥ स्वामींच्या वचना उल्लंघन। तेंचि मज अधःपतन। येणें भयें मी आपण। स्वधर्माचरण विचरलें ॥७५॥ इंद्रअहल्या-एकांतवार्ता। गौतमें ऐकिल्या निजगुप्ता। तेंचि सांगतसे तत्त्वतां। तूं निजकामार्था रमलीसी ॥ ७६ ॥ संभोगीं परपुरुष जाणतां। जरी तूं उठतीस हाणोनि लाथा। तरी मी मानितों पतिव्रता। तूं पूर्णकामता रमलीसी ॥ ७७ ॥ ओळखोनि परपुरुषता। तूं बोलिलीसी भोग भोगितां। तुझी जाली पूर्णकामता। ऋषि न येतां तूं जाय ॥ ७८ ॥ जाणोनि परपुरुषाचें ज्ञान। भोगीं कंटाळेना तुझें मन। ते तूं होसी पाषाण। शिळा जाण जडत्वें ॥ ७९ ॥ परपुरुषीं कामाचा सोहळा। ते तूं होसी महाशिळा। तुज कोणी न देखे डोळां। भूतें विटाळा मानिती तुझ्या ॥ ८० ॥ वृक्ष फुलां फळां न येती। छायेसी नव्हे विश्रांती। आश्रमीं प्राणी न वसती। पापोपहती भोगिसी ॥ ८१ ॥ येरी बोलली आपण। पतिश्रमें लागलें दूषण। स्वामीनें कृपा करावी पूर्ण। शापमोचन वदावें ॥ ८२ ॥ ऐकोनि तिचें दीन वचन। कृपेनें कळवळला संपूर्ण। म्हणे लागल्या श्रीरामचरण। तैं तूं जाण उद्धरसी ॥ ८३ ॥ तुज जंव भेटती रामचरण। तंववरी करावें रामस्मरण। रामनामापरतें आन। प्रायश्चित्त जाण असेना ॥ ८४ ॥ रामनामाच्या आवृत्तीं। जळती पापांचिया पंक्ती। शिळारूपें तुझी लोपेल मती। तरी राम चित्तीं न विसंवें ॥ ८५ ॥ ऋषि पाठिमोरा जाला। तंव अहल्या जाली शिळा। आश्रम पावला अवकळा। प्राणी तत्काळ पळाले ॥ ८६ ॥ कैसें शापाचें अति बळ। मुंगी माशी सांडी स्थळ। पक्षी पळाले सकळ। श्वापदांचे मेळे सवेग गेले ॥ ८७ ॥ शाप देवोनि कोपदृष्टीं। गौतमें सांडिली पर्णकुटी। सर्वेचि अनुताप जाला पोटीं। म्हणे क्रोधें उठाउठी जिंकिलें मज ॥ ८८ ॥ अहल्या इंद्रा अति प्रीतीं। सुखभोग भोगितां एकांतीं। तेव्हां कां मज नुपजे शांती। स्त्रीकामासक्तीं नाडिलों क्रोधें ॥ ८९ ॥ रतिसंभोगएकांतवासी। इंद्र असतां अहल्येपासीं। अनुद्वेगें त्यागोनि त्यांसी। मी कां तपासी न वचेंचि ॥ ९० ॥ सर्वांतरात्मा भोक्ता एक। ऐसा जाणता जो मी देख। त्या मज इंद्रसंभोगाचें दुःख। ज्ञानेंसीं विवेक गिळिला क्रोधें ॥९१॥ माझी स्त्री माझें घर। हें कामक्रोधांचें निजमंदिर। येथें ठकले थोर थोर। मजही साचार नाडिलें क्रोधें ॥ ९२ ॥ माझी स्त्री हा जो अभिमान। हें सकळ दुःखाचें भांजन। हेंचि क्रोधाचें जन्मस्थान। तेणें मी संपूर्ण नाडलों ॥ ९३ ॥ गौतम पावन त्रिजगतीं। ऐसी पुराणीं प्रसिद्ध वदंती। तो मी स्त्रीलोभानुवृत्तीं। विवेकसंपत्ती नाडिलों क्रोधें ॥९४॥ म्यां गौतमें मध्यान्हकाळीं। नित्य पिकवोनियां साळी। ऋषी वांचविले दुष्काळीं। तो मी तत्काळीं नाडिलों क्रोधें ॥ ९५ ॥ मुख्यत्वें स्त्रीकामापासीं। क्रोध सर्वदा मुसमुसी। तेणें नाडिलें मज गौतमासी। म्यां कोणापासीं सांगावें ॥ ९६ ॥ मातेवरी गालिप्रदान। भलता साहे करोनि हेळण। स्त्रीवरोनि शिवी देतां जाण। तत्काळ मरण शस्त्रें कां शापें ॥ ९७ ॥ बाप क्रोधाची निजख्याती। त्या दोघांची केली उपहती। मज

१ मोराच्या रूपानें. २ तुमच्या स्वरूपानें, तुमचें रूप धारण करून. ३ पापापासून होणारी पीडा. ४ उश्शाप. ५ शांतपणानें. ६ पात्र. ७ वार्ता, चर्चा. ८ स्त्रीच्या लोभानें. ९ क्रोधामुळें विवेकापासून भ्रष्ट झालों. १० भरून येतो. ११ आईवरून शिव्या देणें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

नाडिलें ज्ञानविरक्तीं । क्रोध परमार्थी घातक ॥ ९८ ॥ क्रोध केवळ महामांग । जिवें मारिलें वैराग्य । सकळ योगा होय भंग । क्रोधें सर्वांग अति अपवित्र ॥ ९९ ॥ मातंगविटाळा जळें निवृत्ती । क्रोधाची चित्तामाजी वस्ती । त्याचे क्षाळणीं न चले युक्ती । क्रोध सर्वार्थी घातक ॥ १०० ॥ का ते कांता कस्ते पुत्रः । ऐसें म्यां वाचिलें शास्त्र । तें वृथा गेलें पुराणपत्र । क्रोधें अपवित्र मज केलें ॥ १ ॥ कामासी जे वश होती । ते काही तरी भोग भोगिती । जे आंतुडले क्रोधाहातीं । ते वृथा नागवती भोगमोक्षां ॥ २ ॥ क्रोधाऐसा वैरी । बैसला असतां जिव्हारीं । जो तयाची मानी थोरी । तोचि चराचरीं अति मूर्ख ॥ ३ ॥

अपकारिणि कोपश्चेत्कोपे कोपः कथं न ते ।
धर्मार्थकाममोक्षाणां प्रसह्य परिपंथिनि ॥ ५ ॥

अपकारियावरी कोप करिती । परी कोणी कोपावरी कोप न करिती । क्रोध वाटपाडा निश्चितीं । चहूं पुरुषार्थी नागवी ॥ ४ ॥ त्या क्रोधाची होय शांती । तैसें आचरेन तपस्थितीं । ऐसा निश्चय करोनि चित्तीं । ऋषि तपार्थी निघाला ॥ ५ ॥

एवमुक्त्वा महातेजा गौतमो ऋषिसत्तमः ।
पुण्यदेशं समासाद्य सिद्धचारणसेवितम् ॥ ६ ॥

सिद्धचारणलोकावरी । मेरुगिरीच्या पाठारीं । हिमाचलाच्या शिखरीं । तपातें आदरी गौतम ॥ ६ ॥ गौतम बैसोनि निर्विकारी । अगाध निष्ठेतें आदरी । कामक्रोधांची नुरे उरी । त्या तपाची थोरी थोरावे ॥७॥ ब्रह्मशाप अति दारुण । इंद्राचे झडले वृषण । भगें बिंबलीं संपूर्ण । तेंही लक्षण अवधारा ॥ ८ ॥ परदारनिरीक्षण । भगांकित जाले नयन । परदारमुखचुंबन । भगांकित वदन तेणें झालें ॥ ९ ॥ परदारालिंगन । हृदयीं भगें पडलीं जाण । बाहु भगांकित जाले जाण । अंगुल्या संपूर्ण भगांकित ॥११०॥ परदाराधरपान । जिव्हा भगांकित जाली जाण । भृकुटिया खुणाविली खूण । त्या भृकुटी संपूर्ण भगांकित ॥ ११ ॥ परदारप्रतिगमन । भगांकित जाले चरण । खालें तळवांही जाण । भगें संपूर्ण बिंबलीं ॥ १२ ॥ परदारेंसीं कामगोष्ठी । भगांकित जाला दोहीं होटीं । भगें पडलीं ललाटीं । भगीं पाठी पुरविली ॥ १३ ॥ इंद्र पावला उपहती । सर्वांगें भगें स्त्रवती । निजकर्माची मानोनि खंती । अधोगती विलपत ॥ १४ ॥ इंद्र सर्वांगीं भगांकित । तो पक्षियांमाजी राहिला गुप्त । पाहतां देव ऋषी समस्त । तें अभिव्यक्त लक्षेना ॥ १५ ॥ इंद्रें सांडिलें अमरमंडळ । मेघ जाले उच्छृंखळ । पृथ्वी झाली मंदफळ । स्वधर्म सकळ खुंटले ॥ १६ ॥ यालागीं साक्षेपें इंद्रासी । शोधिते जाले देव ऋषी । बृहस्पति सांगे तयांपासीं । गौतमासी उःशाप मागा ॥ १७ ॥ मग मिळोनि देवऋषी । अवघे आले गौतमापासीं । उद्धरण करावया इंद्रासी । समस्तीं त्यासी प्रार्थिलें ॥ १८ ॥ गौतमें अनुतापें जाण । केलें क्रोधाचें निर्दळण । देव प्रार्थितांचि जाण । कृपेनें संपूर्ण कळवळिला ॥१९॥ इंद्र पावला उपहती । त्याची पुर्वविल्यापरिस महंती । अतिशयें करीन वाढती । स्वयें वरदोक्ति वदता झाला ॥ १२० ॥ इंद्र होता मयूरवेषें । उःशाप होतांचि डोळसें । सर्वांगीं उभारोनि पिसें । अति उल्लासें नाचत ॥ २१ ॥ इंद्र होता भगांकित पूर्ण । तीं भगें होतील लोचन । तैंपासोनि सहस्रनयन । इंद्र अभिधान पावला ॥ २२ ॥ इंद्र म्हणे जय जय जी गौतमा । पुरुषांमाजी उत्तमोत्तमा । न कळे तुझा महिमा । अगाध महिमा पैं तुझा ॥ २३ ॥ त्वां शाप नाहीं दिधला । माझा कर्मभोग म्यां भोगिला । जो दुराचारी तो सरतां केला । हे महत् लीला पैं तुझी ॥ २४ ॥ ऐसी इंद्रें केली स्तुती । तेथें देवही गौतमातें स्तविती । अलोलिक तुझी ख्याती । अपराधी निश्चित त्वां उद्धरिला ॥२५॥ इंद्रपणाची ते खूण । मयूरीं आभासे पूर्ण । तैं त्यासी नव्हते वृषण । मयूरासी स्त्रीरमण असेना ॥ २६ ॥ मयूर आनंदें नृत्य करी । वीर्य स्त्रवे नेत्रद्वारीं । तें झेलोनि ने मयूरी । तेणेंचि उदरीं गर्भ तिसी ॥२७॥ पूर्ण महत्त्व आलें इंद्रासी । परी ठाव नाहीं पुरुषत्वासी । तेव्हां गजाचे वृषण देवोनि त्यासी । पुरुषत्वासी पूर्ण केलें ॥ २८ ॥ गजदेहीं नाहीं वृषण । तेणें तो झाला वीर्यक्षीण । त्यासी दिधले इंद्रें वृषण । तेणें मस्तकीं संपूर्ण

१ मांगाचा विटाळ झाला असतां. २ सांपडले. ३ मर्मस्थानीं. ४ दुसऱ्याच्या स्त्रीकडे वाईट इच्छेनें पाहाणें. ५ आक्रोश करीत. ६ स्पष्ट. ७ दुःख. ८ पूर्वीच्याहून. ९ नांव. १० श्रेष्ठ.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वंदिले ॥२९॥ यालागीं गजाचे देहीं। अद्यापी लिंगीं वृषण नाहीं। ते भासती मस्तकाचे ठायीं। कुंभेभ[1] पाहीं यालागीं म्हणती ॥३०॥ रतिकाळीं आपण। लिंगापासीं येती वृषण। येऱ्हवीं ते मस्तकीं जाण। कुंभेभ पूर्ण यापरी भासे ॥३१॥ गजाचिया वृषणस्थितीं। इंद्रासी जाली ऐश्वर्यप्राप्ती। यालागीं त्यासी ऐरावती। देवीं समस्तीं ठेविलें नांव ॥३२॥ इंद्रापासीं गजाचे वृषण। तेणें त्यासी बळ संपूर्ण। गजापासीं इंद्रवृषण। शक्रें समान बळ त्यासी ॥३३॥ गजास बळ शक्रासमान। शक्रें वाढविलें गजमहिमान[2]। गजदळें दळ[3] शोभायमान। येरवीं ते जाण रुंडमुंड ॥ ३४ ॥ गजेंद्रासी राज्यप्राप्ती। यालागीं गजांतलक्ष्मी म्हणती। समस्त प्रजा नमस्कारिती। ते पूर्णस्थिती लक्ष्मीची ॥ ३५ ॥ एवं ऋषिवाक्यकृपास्थितीं। इंद्र पावला उपहती। त्यासी वाहून ऐरावतीं। नेला स्वर्गाप्रती जयजयकारें ॥ ३६ ॥ इंद्रअहल्याआख्यान। ऋषीनें सांगितलें संपूर्ण। अहल्येचें पाषाणपण। करीं उद्धरण श्रीरामा ॥ ३७ ॥ ऐकोनि सद्गुरूचें वचन। वेगीं उठला रघुनंदन। करावया अहल्योद्धरण। आश्रमीं आपण प्रवेशला॥ ३८ ॥ हातीं धरोनि ऋषिवर्यासी। आश्रमीं पाहे अहल्येसी। ते लक्षेना सकळां ऋषींसी। पाहतां चौंपासीं दिसेना ॥ ३९ ॥ आश्रमीं करितां परि[4]भ्रमण। अवचट लागला रामचरण। जालें अहल्योद्धरण। साष्टांगीं नमन त्या केलें ॥ १४० ॥ मस्तकीं धरिले श्रीरामचरण। आनंदाश्रू चालिले पूर्ण। जालें श्रीरामचरणप्रक्षाळण। प्रेम संपूर्ण अहल्येसी॥ ४१ ॥ म्हणे जय जय रामचंद्रा। शिळा तारिली पदमुद्रा। तुझा चरण तारक जगदुद्धारा। भवसागरा लागतां ॥ ४२ ॥ तुझा लागतांचि श्रीचरण। शिळा उद्धरे हें नवल कोण। कर्माकर्माची बोळवण। प्रपंच तो पूर्ण परमार्थ होय ॥ ४३ ॥ न होतां तुझी चरणभेटी। प्रपंचाची सबळ गोष्टी। तुझे चरण देखतां दृष्टी। प्रपंच उठी ब्रह्मत्वें ॥ ४४ ॥ तुझा लागतांचि श्रीचरण। स्थूळ लिंग आणि कारण। महाकारणेंसीं जाण। होय परिपूर्ण परब्रह्म ॥ ४५ ॥ तुझे लागतांचि पाय। देह तो होय विदेह। संदेह होती निःसंदेह। जीव तो होय शिव साक्षी ॥ ४६ ॥ अगाध चरणांची ख्याती। वानितां मौनावल्या श्रुती। चरणां शरण चारी मुक्ती। कथानुवृत्तिअनुवादें ॥ ४७ ॥ अनुवादतां[6] रामकथा। कलिकाळ वोढवी माथा। तीर्थें वंदिती चरणतीर्था। कथा ऐकतां देव निवती ॥ ४८ ॥ आवडीं गातां रामायण। श्रीराम सुखावे आपण। वक्त्यांचें निरसे जन्ममरण। श्रोते संपूर्ण ब्रह्म होती ॥ ४९ ॥ ऐसी हे तुझी निजकथा। पावन करी लोकां समस्तां। असो कथानुवादवार्ता। नाम स्मरतां निजमुक्ति ॥ १५० ॥ नित्य स्मरतां रामनाम। सकळ पातकां करी भस्म। चहूं[9] पुरुषार्थांचें काम। होय सुगम हरिनामें ॥ ५१ ॥ करितां रामनामस्मरण। जन्ममरणासी ये मरण। समूळ विरे मीतूंपण। भवबंधन बाधेना ॥ ५२ ॥ बाधेना मायामोहन। बाधेना कर्मबंधन। बाधेना त्रिविधविंदान। रामस्मरण करितांचि ॥ ५३ ॥ दृश्य द्रष्टा आणि दर्शन। ध्येय ध्याता आणि ध्यान। ज्ञेय ज्ञाता आणि ज्ञान करितां रामस्मरण। त्रिपुटीचें भान असेना ॥ ५४ ॥ असेना देहीं अहंभाव। असेना जीवीं जीवभाव। मीतूंपणा नाहीं ठाव। नामनिर्वाह श्रीरामें ॥ ५५ ॥ रामनामाच्या गदांरोळें। स्मरत्या शरण रिघिजे काळें। भवभय समूळ पळे। सुखसोहळे श्रीरामें ॥ ५६ ॥ श्रीरामनामगजरें। ब्रह्म स्वानंदें डुंबरे। जेवीं धेनु वत्सा अनुसरे। तेवीं नामोच्चारें श्रीराम ॥ ५७ ॥ श्रीराम हें नामाक्षर। क्षराक्षरातीत[11] पर। नाम परब्रह्म परात्पर। नाममंत्र शिवसेव्य ॥ ५८ ॥ नामापासीं सद्यः मुक्ती। पंडित बोलती पुराणोक्तीं। मी बोलिलों ते माझी प्रतीती। नाम निश्चितीं तारक ॥ ५९ ॥ नामें भुक्ति नामें मुक्ती। नामापासीं ब्रह्मप्राप्ती। रामनाम जे जपती। वंद्य त्रिजगतीं तेचि पैं ॥ ६० ॥ रामनाम परम जप। रामनाम परम तप। रामनाम निरसी[12] पुण्य पाप। नाम निर्विकल्प समाधि ॥ ६१ ॥ नामीं नाहीं अनध्याय[13]। नामीं सर्वदा स्वाध्याय[14]। नाम प्रत्यक्ष परब्रह्म पाहें। अभाग्या भाव उपजेना ॥ ६२ ॥

१ गंडस्थलयुक्त हत्ती. २ हत्तींचें माहात्म्य, मोठेपणा. ३ सैन्य. ४ फिरणें. ५ श्रीरामचंद्राचे पाय धुणें. ६ बोलतां. ७ पुढें करतो, वांकवितो. ८ नाश पावतें. ९ धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या चार पुरुषार्थांचें. १० महाघोषानें. ११ क्षर-विनाशी, अक्षर-अविनाशी, या दोहींच्याही पलीकडील. १२ नाहीसें करतें. १३ अभ्यास न करण्याचा दिवस. १४ अभ्यास करण्याचा दिवस.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

नामीं नाही अनध्ययन। नामीं नाहीं विधि-विधान। नामीं नाहीं कर्मबंधन। नामें पावन महापापी ॥ ६३ ॥ जरी जाला दुराचारी। तो जैं भरे अनुतापभरीं[1]। रामनामें जपे जिव्हारीं। तो साधु संसारीं भगवद्वाक्यें ॥ ६४ ॥ श्रीरामकृपानिजदीप। अहल्येचें गेलें आकल्पपाप। तिच्या तपाचा प्रताप। पाप तें निष्पाप करूनि दावी ॥ ६५ ॥ इंद्र न करिता व्यभिचार। शाप न देता ऋषीश्वर। तैं मी कैंचा पावतें रामचंद्र। भाग्य माझें थोर ऋषिशापें ॥ ६६ ॥ गौतमाचा निजशाप। तो मज जाला अमृतरूप। माझें जावोनि पुण्यपाप। शुद्ध स्वरूप पावलें ॥ ६७ ॥ इंद्रें केला नाहीं व्यभिचार। केला माझा जन्मोद्धार। गौतमशाप नव्हे तो वर। तेणें रघुवीर भेटविला ॥ ६८ ॥ गौतम माझा निजभ्रतारू। गौतम माझा निजसद्गुरू। गौतम माझा निजनिर्धारू। तेणें रघुवीरू भेटविला ॥ ६९ ॥ जगीं उदंड आहेत वीर। परी छेदूं न शकती अहंकार। परम योद्धा श्रीरामचंद्र। मारिला सहपरिवार अहंभाव[2] माझा ॥ १७० ॥ ऐसी अहल्या करितां स्तुती। गौतमा कळलें ज्ञानशक्तीं। तेणें येवोनि शीघ्रगतीं। स्वयें रघुपति पूजिला ॥ ७१ ॥ कामक्रोधां निर्दाळी गौतम। अहल्या श्रीरामें निष्काम। दोहींची वृत्ति सहजें सम। रामें परब्रह्म पावलीं ॥ ७२ ॥ श्रीरामें देवोनि भेटी। दोहींची सोडिली लिंगगांठी। सच्चिदानंदें आली पुष्टी। दोघां समदृष्टी समत्वें ॥ ७३ ॥ दोहींचें एक देखणेपण। दोहींचें एक सावध श्रवण। दोहींचें एक मन उन्मन। दोन्ही चैतन्यघन श्रीरामें ॥ ७४ ॥ दोहींचा एक आत्मा एक प्राण। दोहींचें एक अंतःकरण। दोहींचें एक निजज्ञान। दोघें सुखसंपन्न एकात्मता ॥ ७५ ॥ दोहींची एक शब्दसिद्धी। दोहींची एक इंद्रियविधी। प्रपंचीं परमार्थी समान बुद्धी। दोघां समाधी एकचि ॥ ७६ ॥ ऐसीं एकात्मतानिष्ठ। दोघां भरिला शेंसपाट[3]। गौतम ऋषिवर्य वरिष्ठ। अहल्या श्रेष्ठ पतिव्रता ॥ ७७ ॥ ऐशी एकात्मता पूर्ण। स्वयें श्रीराम आपण। केलें अहल्योद्धरण। गौतम संपूर्ण सुखी केला ॥ ७८ ॥ सुखी संपन्न ऋषीश्वर। हर्षें निर्भर सुरवर। वर्षती सुमनांचे संभार। जयजयकार प्रवर्तला ॥ ७९ ॥ एकात्मता तरलों म्हणती। शेखीं[4] भेददृष्टी विषयासक्ती। ऐसी ऐकोनियां मुक्ती। श्रोते हांसती सज्ञान ॥ १८० ॥ कवित्व करिती धीटपाठ। मेळविती कर्मकचाट[5]। तेंवि कवित्वाची कटकट। श्रोते वीट मानिती ॥ ८१ ॥ जे कवित्वीं शब्दचातुर्यशोभा। ते शाब्दिकासी[6] अतिवल्लभा। जे कथा परमार्थज्ञानगाभा[7]। ते कथाजगदंबा जग निववी ॥ ८२ ॥ ज्ञानी निवती परमार्थबोधें। पंडित निवती पदबंधें। लोक निवती कथाविनोदें। ग्रंथसंबंधें जग निवे ॥ ८३ ॥ मुख्यत्वें ग्रंथींचें राखावें प्रेम। प्रतिपदीं प्रतिपादावें[8] परब्रह्म। हाचि कवित्वाचा कवित्वधर्म। श्रोते सप्रेम होती सुखी ॥ ८४ ॥ कथा रम्य रामायण। एका जनार्दना शरण। जालें अहल्योद्धरण। जानकीवरण तें ऐका ॥ १८५ ॥

स्वस्ति श्रीभावार्थरामायणे बालकांडे एकाकारटीकायां अहल्योद्धरणं नाम चतुर्दशोऽध्यायः ॥ १४ ॥ ओंव्या ॥ १८५ ॥ श्लोक ॥ ६ ॥

अध्याय पंधरावा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥

पदकमलरजोभिर्मुक्तपाषाणदेहा
त्वियमभवदहल्या गौतमे धर्मपत्नी ।
त्वयि चरति विशीर्णग्रावविंध्याद्रिपादे
कति कति भवितारस्तापसा दारवंतः ॥ १ ॥

लागतां श्रीरामपादरजःकण। जावोनियां पाषाणपण। जाहलें अहल्योद्धरण। तें दारग्रहण गौतमें केलें ॥ १ ॥ चरणरजांचा प्रताप। अहल्या जाहली निष्पाप। हरून गौतमाचा विकल्प। स्त्री अनुरूप पतिव्रता ॥ २ ॥ अगाध पदमहिमा देखोन। विस्मत जाले ऋषिजन। स्वर्गीं सुरवर करिती स्तवन। नाम पावन तिहीं लोकीं ॥ ३ ॥ पुढें विंध्याद्रीचे ठायीं। जे पाषाण लागती रामपायीं। ते निःशेष विरोनि पाहीं। उठतील स्त्रीदेहीं सुंदरत्वें ॥ ४ ॥ तयां स्त्रियांतें देखोन। बहुसाल तपस्विजन। ब्रह्मचर्य विसर्जून। दारग्रहण[11] करितील ॥ ५ ॥ एवं ऋषिवर्यमंडळी। रामकीर्तनाचे समेळीं।

---

१ पश्चात्ताप पावतो. २ मीपणा. ३ शेंस. ४ शेवटीं. ५ कर्माची कटकट, त्रास. ६ शब्दशास्त्रज्ञास, व्याकरणपंडितास. ७ पारमार्थिकज्ञान जींत पूर्ण भरलें आहे अशी. ८ सिद्ध करून दाखवावें. ९ पुष्कळ. १० टाकून. ११ स्त्रीचें पाणिग्रहण.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

चालती आनंदकल्लोळीं । पुढें मिथिला देखिली ॥६॥ विदेहाची विदेहपुरी । पताका झळकती चिदंबरीं । रविचंद्रांची लोपोनि थोरी । रत्नकळसांच्या हारी शोभती ॥ ७ ॥ वनश्रियेचिया शोभा । पूर्णत्वें पूर्ण करी नभा । प्राण स्तब्ध[1] राहे उभा । होय प्रवेशारंभा आल्हाद ॥ ८ ॥ वृक्ष समूळीं सपत्रीं गोड । बीजेंवीण फळांचे घड । देखतां पांथिकांचें पुरे कोंड[2] । छाया सेवितां चाड निचाड[3] होय ॥९॥ नवल त्या छायेची विश्रांती । कामक्रोधां होय शांती । त्रिविध ताप स्वयें शमती । भ्रांति ते चिच्छक्ती स्वयें होय ॥१०॥ सेवितां त्या फळांचा स्वाद । क्षुधेतृषेचा निमे बाध । सबाह्य कोंदे परमानंद । अति सुस्वाद विटेना ॥ ११ ॥ जाणोनि त्या फळांची गोडी । शुकांची सवेग पडे उडी । तृप्ती लाहोनियां गाढी । उडण्याची ओढी विसरोनि गेली ॥ १२ ॥ विदेहवनींच्या हंसांसी । नवलीला दिसे त्यांसी । सांडोनि उभय पक्षांसी । चिदाकाशीं उड्डाण ॥ १३ ॥ देखोनि ते वनस्थळी । मुमुक्षुमयूर स्वानंदमेळीं । पिच्छें पसरोनि रोमावळी । सुखसुकाळीं नाचती ॥ १४॥ विदेहवनींचा सुगंध । पावतां प्रकटे परमानंद । देही पावे आनंद । होय निजबोध स्वानंदें ॥ १५ ॥ स्वानंदें मयूर गर्जती । तेणें वेदार्थ चवकैती[4] । सांडोनि कर्मवादवृत्ती । निश्चल राहती निःशब्दें ॥ १६ ॥ वनीं पारवे ते घुमती । तेणें गंधर्वगाणीं वेडावती । सामवेदाची उपरमे वृत्ती । पक्षी बोलती अनुपम्य ॥१७॥ प्रवेशतां रामचरण । ऐसी स्थिति पावे उपवन । हें विदेहाचें विदेहवन । अगाध महिमान कोण वर्णी ॥ १८ ॥ स्वधर्मै वसतां नगरीं । पिंगळा वेश्या समाधी वरी । ते विदेहाची विदेहपुरी । कोणें थोरी वर्णावी ॥ १९ ॥ ज्याचे द्वारपाळांचें वचन । शुकासी दे समाधान । हें जनकाचें अति महिमान । अगाध लक्षण परमार्थी ॥ २० ॥ तेचि नगरबाह्यप्रदेशीं । राम देखे जनकयागासी । जो सीतास्वयंवरोद्देशीं[5] । बहुक्लेशेंसीं योजिला ॥ २१ ॥ धैर्याचा स्तंभ निर्धारीं । धर्माचे आडवळे[6] तयावरी । शांतीनें सेविला कुसरी । त्या मंडपामाझारी यज्ञवाट[7] ॥ २२ ॥ निर्धूम अग्नि अति उद्भट । इंधनेंविण अति लखलखाट । ज्वाळा अतिशयें चोखट । सुखस्वादिष्ट प्रकाश ॥२३॥ ॐकारअर्धमात्रा निजार्थें । जे जाणती पैं परमार्थें । तेचि होते[8] पोते उद्गाते । अक्षरार्थें द्वारपाळ ॥ २४ ॥ निर्गुणेंसीं वळिलें त्रिगुण । तेंचि तेथींचें त्रिसंधानें[9] । विवेकाचें परिस्तरण । परिसमूहन नैराश्यें ॥ २५ ॥ निष्कंटक इध्मा[10] पूर्ण । भूतां ऐक्यें बर्हिबंधन । श्रद्धा आज्यस्थाली स्थापून । स्रुक्स्रुवामार्जन प्रत्यगावृत्ति ॥ २६ ॥ वक्रबुद्धीच्या वक्रोक्ती । त्याचि आघाराज्याहुती । पाठीं प्रधानहोम होमिती । सहित प्रकृतिमहत्तत्त्वेंसीं ॥ २७ ॥ युक्तिप्रयुक्तीं ज्ञानाभिमान । द्रव्य दारा ममता मान । गुरुमंत्रें त्यांचें केलें हवन । विनियोगविधान न ममेति ॥ २८ ॥ सावधानतासादृश्य । कर्मीं ब्रह्मतारहस्य । अवभृथस्नानसामरस्य[11] । निमज्जनीं उल्लास परमानंदें ॥ २९ ॥ क्षेत्रा प्रतिपाळी संपूर्ण । क्षेत्रपाळ जो चिद्धन । त्यासी देती विषयांचें बळिदान । वासनास्मरणसमवेत ॥३०॥ यालागीं त्या बळिदानासीं । परतोनि पाहों नये त्यासी । स्मरण उरों नये मानसीं । एवं शुद्धविधीसीं बळिदान ॥ ३१ ॥ अखंडत्वें नित्यस्थिती । तेचि वसुधारा अहोरातीं । अहंकाराची पूर्णाहुती । फळसंयुक्तीं होमिली ॥ ३२ ॥ स्वयें सांडणें मीतूंपण । हेंचि श्रेयःसंपादन[12] । आत्मत्व देणें हें अगाध दान । समाधान स्वानंदें ॥ ३३ ॥ परमानंदें अभिषिंचन । सर्वेचि भवभयविसर्जन[13] । ऐसा विदेहाचा यज्ञ । रामें आपण देखिला ॥ ३४ ॥ नाना देशींचे ब्राह्मण । नाना भाषा अति प्रवीण । वेदशास्त्रार्थीं अति संपन्न । देदीप्यमान तेजस्वी ॥ ३५ ॥ ऐसिया ब्राह्मणांच्या थाटी । विदेहाच्या यज्ञवाटीं । श्रीरामें देखोनियां दृष्टीं । अत्यंत पोटीं सुखावला ॥ ३६ ॥ श्रीराम म्हणे विश्वमित्रासी । स्वामीनें रहावें यज्ञवाटापासीं । वचन मानलें कौशिकासी । तेचि प्रदेशीं निवास केला ॥ ३७ ॥ महीवतीचें स्वच्छ जीवन । तीरीं अगाध उपवन । सदाफळीं शोभायमान । तें निवासस्थान

१ चलनवलनरहित. २ इच्छा. ३ निरिच्छ. ४ विस्मित होती. ५ सीतेच्या स्वयंवराच्या उद्देशानें. ६ तुळया इत्यादि. ७ यज्ञभूमि. ८ यज्ञांतील ऋत्विज. ९ शुल्बनामक रज्जु. १० सर्पण. (पंधरा समिधा.) ११ यज्ञाच्या अखेरीचे स्नानाचा आल्हाद. १२ श्रेय घेणें. १३ संसारभय टाकणें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

श्रीरामाचें ॥ ३८ ॥ घेवोनि ऋषिवरांचा संभार । आला ऐकोनि विश्वामित्र । जनक धांवला सत्वर । केला नमस्कार सद्भावें ॥ ३९ ॥ हर्षें दिधलें शत-गोदान । केलें मधुपर्कपूजन । तैसेच पूजिले ऋषि-जन । साधुसज्जन आल्हादें ॥ ४० ॥ राजा बोलिला हरिखें जाण । आजि सुफळ माझा यज्ञ । आजि माझे सुफळ नयन । साधुदर्शन देखोनी ॥ ४१ ॥ साधूंसी क्षेमआलिंगन । तेणें शरीर होय पावन । साधूंसी मृदु भाषण । वाचा पावन तद्योगें ॥ ४२ ॥ साधूंचें चरणतीर्थ । सेवितां अंतर पुनीत । साधु-संगें सुनिश्चित । ब्रह्मप्राप्ति भाविका ॥ ४३ ॥ बहु-काळ याग यजितां विधीं । यज्ञीं नव्हेचि यज्ञ-सिद्धी । तूं आलासि कृपानिधी । यज्ञाची त्रिशुद्धी सिद्धी झाली ॥ ४४ ॥ कौशिक रायातें पुसत । स्वस्थ राज्य स्वस्थ चित्त । येरू म्हणे हे कृपा-समर्थ । स्वस्थ सुनिश्चित सर्वार्थभावें ॥ ४५ ॥ राजा पुसे दोघे जण । अग्नितेजें विराजमान । हेही उपमा यांसी गौण । तेंहीं लक्षण अवधारीं ॥ ४६ ॥ अग्निसान्निध्य सर्वांतें तावी । यांची सन्निधि सर्वांतें निववी । यांची पाहतां पैं पदवी । जीवींच्या जीवीं आल्हाद ॥ ४७ ॥ यांचें देखिलिया दर्शन । डोळियांस नावडे आन । यांच्या स्वरूपीं जडलें मन । चित्त चिंतन विसरूनी ॥ ४८ ॥ सुंदर आणि सुकुमार । रूपरेखा मनोहर । ठाणमाण अति गंभीर । हे कोणाचे कुमार नृप पुसे ॥ ४९ ॥ दुर्गम मार्ग अति दारुण । यांचें कैसेनि आगमन । तुजसी यांसी कां सन्निधान । हें समूळ कारण मज सांग ॥ ५० ॥ ऋषि म्हणे हे दशरथाचे कुमार । रामलक्ष्मण महावीर । ऐक राया यांचें चरित्र । अति पवित्र सांगेन ॥ ५१ ॥ माझा याग न पवे सिद्धी । मारीच सुबाहु सदा बाधी । ताटिका सर्व मार्ग विरो[1]धी । आश्रमा त्रिशुद्धी [2]उपहती करी ॥ ५२ ॥ यालागीं म्यां अनुष्ठान । करूनि हर केला प्रसन्न । तेणें मज करूनि सावधान । हें गुह्य ज्ञान सांगितलें ॥ ५३ ॥ साक्षात् पूर्ण परब्रह्म । अवतरलें दाशरथि राम । त्याचेनि सिद्धि पावेल होम । राक्षसां भस्म तो करील ॥ ५४ ॥ शिववचनविश्वासीं । म्यां जावोनि दशरथापासीं । मागून आणिलें श्रीरामासीं । निजयागासी सिद्ध्यर्थ ॥५५॥ मार्गीं ताटिका छेदिली । मार्गस्थां मार्गनिर्मु[3]क्ती केली । सिद्धाश्रमीं वस्तू जाली । ख्याती लाविली राक्षसां ॥ ५६ ॥ सुबाहु निवटिला बाणधारा । मारीचास लागला पिसारा । तो उडविला समुद्रतीरा । येरां निशाचरां निर्दाळिलें ॥ ५७ ॥ अवचट लागतां चरणीं । अहल्या उद्धरली तत्क्षणीं । अगाध श्रीरामाची करणी । वेदपुराणीं जगद्वंद्य ॥ ५८ ॥ तो हा [4]हरचाप-दर्शनेच्छा । आला असे आम्हांसरिसा । देखोनि श्रीरामाचा ठसा । जनकमानसा उल्लास ॥ ५९ ॥ सीतेसी अनुरूप नोवरा । श्रीरामचि निजनिर्धारा । परी धनुर्धारणीं महावीरां । अति द[5]रारा बळिष्ठ ॥ ६० ॥ जनक म्हणे ऋषिराजा । सीता माझी निजात्मजा । परी ते मुख्य अयोनिजा । ऐक महा-द्विजा तो भाव ॥ ६१ ॥

> अपवाहयतः क्षेत्रं हलाग्रादुत्थितामिमाम् ।
> सर्वलक्षणसंयुक्तां नाम्ना सीतेति विश्रुताम् ॥ २ ॥

नांगर वाहतां शेतीं । पेटी लागली [6]हलाचिये दांतीं । ती उघडितां त्यामाजी हे आंत होती । रूपवंती ममात्मजा ॥ ६२ ॥ ऐकोनि रायाचा शब्द । अहल्याकुमार शतानंद । जनकपुरोहित प्रसिद्ध । तेणें पूर्वा[7]नुवाद आरंभिला ॥ ६३ ॥ ब्रह्मशापाचें क्रूर अज्ञान । त्यामाजी माझी माता निमग्न । तिसी लागतां श्रीरामचरण । जाली उद्धरण जगद्वंद्य ॥ ६४ ॥ लागतां श्रीरामचरण । स्वयें उद्धरती पाषाण । हेंही नवल नव्हे जाण । जगदुद्धारण श्रीराम ॥ ६५ ॥ अगाध श्रीरामाचें नाम । नाम निर्दाळी क्रोध काम । नाम निवारी मरण जन्म । नाम तें ब्रह्म निर्द्वंद्व ॥ ६६ ॥ अबद्ध पढतां वेद । तत्काळ बाधी निषेध । अबद्ध नामें प्रसिद्ध । होती शुद्ध महापापी ॥ ६७ ॥ अबद्ध मंत्राच्या आवर्ती । जपक चळले नेणों किती । अबद्ध नामाच्या नामोक्ती । अगाध कीर्ति वाल्मीकाची ॥ ६८ ॥ अबद्ध नामें नारदोक्ती । मारा मारा या वचनोक्तीं । रामनामीं लागली वृत्ती । पाँप-निष्कृति वाल्मीकाची ॥ ६९ ॥ करितां अबद्ध नाम-पठन । वाल्मीक उद्धरला आपण । वदला शतकोटी

१ अडवून ठेवी. २ त्रास. ३ रस्त्याची मोकळीक. ४ महादेवाचें धनुष्य पाहण्याच्या इच्छेनें. ५ धाक, भय.

६ नांगराच्या. ७ पूर्वींच चरित्र. ८ पठणानें. ९ विसंगत. १० पापापासून मुक्तता.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

रामायण। कथा पावन शिववंद्य ॥ ७० ॥ ते देखतां श्रीराममूर्ती। हर्षें विरे चित्तवृत्ती। आनंद ओसंडेचि त्रिजगतीं। हे स्वरूपस्थिति श्रीरामाची ॥ ७१ ॥ रामनामीं अभेदस्थिती। यालागीं जड उद्धरती। राम केवळ ब्रह्ममूर्ती। आद्यशक्ती ते सीता ॥ ७२ ॥ ते सीतेची उत्पत्ती। ते मी सांगेन पूर्ववृत्ती। जे म्यां ऐकिली नारदोक्ती। तेचि तुम्हांप्रति सांगेन ॥ ७३ ॥ पूर्वी पद्माक्षराजा अति पावन। त्याणें करोनि अनुष्ठान। रमा केली सुप्रसन्न। माझे कन्यारत्न तूं होईं ॥ ७४ ॥ येरी म्हणे गा नृपनाथा। मज न घडे जन्मकथा। भगवंतीं अन्वयो न लाभतां। जाण तत्त्वतां नरवर्या ॥ ७५ ॥ ऐसें ऐकोनियां वचन। रायें धरूनि दृढ ध्यान। भगवंत केला सुप्रसन्न। मागे वरदान कन्यार्थी रमा ॥ ७६ ॥ विषयांचिये विषयपुष्टी। रमा गोड प्रथमदृष्टीं। लक्ष्मी विमुख जालिया पाठी। दुःखकोटी श्रीमंता ॥ ७७ ॥ लक्ष्मी आलिया जें सुख। सुख नव्हे तें केवळ दुःख। सुख मानिती ते केवळ मूर्ख। जाण निश्शंक नृपनाथा ॥ ७८ ॥ राजा म्हणे श्रीहरी। रमा खेळे मांडीवरी। ऐसीच मज कृपा करीं। म्हणोनि निर्धारीं धरिले पाय ॥ ७९ ॥ ऐसें रायाचें मनोगत जाण। जाणोनियां विष्णु आपण। देता जाला मातुलिंग पूर्ण। येणें कन्या जाण पावसी रमा ॥ ८० ॥ तें मातुलिंग द्विधा करितां। कन्या देखिली अतिरूपता। रायासी उपजली ममता। माझी दुहिता म्हणोनी ॥ ८१ ॥ पद्माक्षाचे घरीं जन्म। यालागीं पद्मावती हें नाम। तिचें रूप देखोनि उत्तम। उल्लास परम रायासी ॥ ८२ ॥ जन्मली मातुलिंगाप्रती। तीं दोनीं शकलें एक होती। तेंचि मातुलिंग शक्तीच्या हातीं। स्वयें सप्तशती बोलत ॥ ८३ ॥ कन्या सर्वांगमनोहर। रूपें अत्यंत सुंदर। सवेंचि जाली उपवर। तिसी नृपवर भाळले ॥ ८४ ॥ कन्या स्वयंवरायोग्य। रायें विवाह आरंभिला साङ्ग। भाळोनि आले ऋषिवर्ग। योग्यता योग्य मिरविती ॥ ८५ ॥ आले देव दानव मानव। नर किन्नर गंधर्व। राजे पावले सर्व। दैत्यसमुदाव बळेंसीं ॥ ८६ ॥ कन्या देखोनि रूपस। सवेग पावले राक्षस। स्वरूप देखोनि बहुवस। अति कर्कश संग्रामा ॥ ८७ ॥ रायें पण केला क्षोभदृष्टीं। आकाशाची सुनीळ उटी। ज्याचे आंगीं शोभे गोमटी। त्यासी हे गोरटी वरील ॥ ८८ ॥ पण ऐकोनि दुर्धर। क्षोभले अवघे सुरासुर। कन्याहरणार्थ तत्पर। जाले नरवीर सन्नद्ध ॥ ८९ ॥ धरूं धांवले यक्ष राक्षस। देखोनि क्षोभला पद्माक्ष। बाणीं साधोनियां लक्ष। विपक्षपक्ष त्रासिला ॥ ९० ॥ घायीं त्रासिले निशाचर। रायें पळविले संभार। आकाश लंघिती सुरवर। दैत्यीं दुर्धर युद्ध केलें ॥ ९१ ॥ तेही पळविले दैत्यगण। रायासी खडतरले बाण। तेणें रणांगणीं प्राण। सांडिला आपण क्षात्रवृत्तीं ॥ ९२ ॥ जाली रणाची निरवंडी। कन्या धरितां तांतडी। तिणें उठोनि लवडसवडी। अग्निमाजी उडी घातली ॥ ९३ ॥ नोवरी नव्हेचि प्राप्त। राक्षस क्षोभले अत्यद्भुत। घरें पाडोनियां समस्त। नगर उपहत तिहीं केलें ॥ ९४ ॥ सुरनरां असुरां कंदन। करोनि रायें दिधला प्राण। राणियां केलें सहगमन। लक्ष्मी तें विघ्न श्रीमंतांसी ॥ ९५ ॥ प्रतिपाळिते प्राणा मुकले। अभिलाषिते रणीं पडिले। उरले ते रडत गेले। लक्ष्मीचें केलें असें आहे ॥ ९६ ॥ ते आदिशक्ती नोवरी। निघाली अग्निकुंडाबाहेरी। तंव बाहेर भोंवली बोहरी। मग कुंडाच्या तीरीं एकाएकी बैसे ॥ ९७ ॥ विमानीं विचरतां रावण। त्यासी प्रधान सांगे सारण। जियेलागीं जालें रणकंदन। ते हे जाण नोवरी ॥ ९८ ॥ इसी धरूं जातां सुरासुरीं। उडी घातली अग्निमाझारी। ती हे निघोनि बाहेरी। कुंडाच्या तीरीं बैसलीसे ॥ ९९ ॥ तिचें देखोनि बरवेपण। रावण अभिलाषी संपूर्ण। धरूं जातां आपण। अग्निप्रवेशन नोवरीयें केलें ॥ १०० ॥ तंव रावण बोले हांसोनी। अग्नीमाजी तुझी लपणी। ते सुरवर नेणती कोणी। तरी मी शोधूनी धरीन आतां ॥ १ ॥ तेथें अति क्षोभें रावण। कुंड विझवी आपण। शोधितां नोवरी न लभे जाण। तेथें पंचरत्नें जाण सांपडलीं ॥ २ ॥ त्या रत्नांची पाहतां शोभा। लपोनि जाय सूर्यप्रभा। महातेजाचा निजगाभा। रावण उभा विस्मित ॥ ३ ॥ सावध करोनियां निजमना।

१ संबंध. २ विषयांच्या वृद्धीकरितां. ३ महाळुंगाचें फळ. ४ भुलून. ५ तयार, सज्ज. ६ शत्रूची साह्यकारी मंडळी. ७ शेवट. ८ अति त्वरेनें. ९ उध्वस्त. १० नाश.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

मग तयां दिव्यरत्नां। करोनियां अतियत्ना। चढोनि विमाना लंकेसी आला ॥ ४ ॥ तीं रत्नें अति गोमटीं। मंदोदरीस द्यावया भेटी। ते देव्हारां ठेवोनि पेटी। आपण उठाउठीं सेजारां[1] आला ॥ ५ ॥ स्त्रियेसी सांगे गुह्य गोष्टी। रत्नें अत्यंत गोमटीं। तुज शोभती कंठीं मुकुटीं। ते देव्हारां पेटी ठेविलीसे ॥ ६ ॥ ते पेटी तिसी उचलितां। नुचलेचि पैं सर्वथा। रावणें उपहासोनि कांता। आपण तत्त्वतां उचलूं आला ॥ ७ ॥ त्यासी उचलितां विसां हातीं। नुचलेचि पैं सर्वशक्तीं। बळाची मावळली गती। रावण चित्तीं चळकांपे ॥ ८ ॥ तेथें मिनले[2] प्रधान। वेगें आले सुहृज्जन[3]। पेटीमाजी कोण निधान[4]। काढोनि आपण पाहूं गेला ॥ ९ ॥ ते उघडतांचि पेटी। तेजें झांकल्या त्यांच्या दृष्टी। अनर्घ्यरत्न कन्या गोमटी। देखोनि गोरटी साशंकित ॥ ११० ॥ सावध होवोनि लंकानाथ। कन्येचा सांगे पूर्ववृत्तांत। मंदोदरी म्हणे हे कृत्या निश्चित। करावया कुळघात कां आणिली ॥ ११ ॥ पाळितां निर्दाळिलीं पिता जननी। सुरासुर भुलोनि निमाले रणीं। दानवमानवांच्या श्रेणी[5]। पडिल्या रणांगणीं इचेनि ॥ १२ ॥ भविष्य बोले मंदोदरी। हे प्रतिपाळित्यातें संहारी। उद्यां आपणा भोंवडील बाहेरी। हे राष्ट्राबाहेरी सांडावी ॥ १३ ॥ इचा करितां बाळघात। आतांचि उपजेल अनर्थ। हे न ठेवावी राज्यांत। त्यागावी निश्चित राष्ट्रांतरीं[6] ॥ १४ ॥ आतांचि हे इची पेटी। रावणा नुचलवे संकटीं। इसी मारितां कडकडाटीं। अनर्थकोटी होईल ॥ १५ ॥ अचेतन खांब हाणितां लाथा। हिरण्यकशिपु पावला घाता। येथेंही होईल तेचि कथा। इसी तत्त्वतां त्यागावें ॥ १६ ॥ वचन मानलें लंकानाथा। युक्ति मानली समस्तां। पेटी त्यागावया सर्वथा। सवेग दूतां बोलावी ॥ १७ ॥ कन्यात्यागा शीघ्रवंत। विमान आणिलें त्वरित। मंदोदरी दूतांसी सांगत। हे पेटी भूमिगत[7] करावी ॥ १८ ॥ प्रकट पेटी ठेवाल जेथें। तत्काळ अनर्थ उपजेल तेथें। यालागीं करावी भूमिगत। अति गुप्त निक्षेप ॥ १९ ॥ जो गृहस्थाश्रमी ब्रह्मचारी। हे वाढेल त्याचे घरीं। जो आत्मतत्त्वें वर्तेल चराचरीं। त्याच्या घरीं नांदेल ॥ १२० ॥ पेटी घालितांचि विमानीं। तियेमाजी उठली ध्वनी। मी मागुतीं येईन लंकाभुवनीं। राक्षसदहनीं दहनार्थ ॥ २१ ॥ माझें करितांचि अभिलाषण। रावणासी येईल मरण। माझें निमित्त संपूर्ण। निर्दळण राक्षसां ॥ २२ ॥ ऐसा ऐकतांचि शब्द। रावण झाला अति स्तब्ध। राक्षस धाकतीं सुबद्ध। भविष्य विरुद्ध ऐकोनि ॥ २३ ॥ दूतीं पेटी घालोनि विमानीं। पाहत पाहत आले या वनीं। विदेहाची[9] सीमा लक्षूनी। पेटी निक्षेपूनी ते गेले ॥ २४ ॥ ते भूमि जनकें धर्मार्थी। द्विजासी दिधली क्षेत्रवृत्ती[10]। तोही नांगर धरावया शेतीं। अति निगुतीं[8] मुहूर्त पाहे ॥ २५ ॥ वेळ साधोनि सुमुहूर्तीं। नांगर धरितांचि शेतीं। प्रथम तासाचे उपहती। फाळाच्या दांतीं पेटी लागली ॥ २६ ॥ द्विजासी सांगे क्षेत्रदूत[11]। धन्य धन्य तुझा सुमुहूर्त। पीक पिकलें अद्भुत। निधि निश्चित पहा स्वामी ॥ २७ ॥ द्विजें पेटी देखतांचि जाण। म्हणे गुप्त ठेवा तें राजधन। मज क्षेत्रें[12] दिधलें दान। ठेवा आपण घेऊं नये ॥ २८ ॥ ते पेटी घेवोनि हातीं। द्विज आला राजसभेप्रती। हा गुप्त ठेवा होता तुमचे शेतीं। तो त्वां भूपति घेइजे स्वयें ॥ २९ ॥ राजा बोले धर्मवचन। तुम्हांसी दिधलें भूमिदान। तेथील जें धनधान्य। तें ब्रह्मार्पण द्विजवर्या ॥ १३० ॥ द्विज धर्मार्थी अति प्रवीण। मज समर्पिलें क्षेत्र दान। नाहीं दिधलें गुप्तधन। हें मी आपण स्पर्शेना ॥ ३१ ॥ धनलोभ नाहीं द्विजा। धनलोभ नाहीं भूभुजा[13]। परम संकटीं पडिला राजा। हें साधुसमाजा कळों आलें ॥ ३२ ॥ तेथें साधु बोले वचन। यामाजी कोण आहे धन। तें काढोनि पहावें आपण। मग शास्त्रविधान विचारूं ॥ ३३ ॥ ते उघडितांचि पेटी। सौंदर्याची दीप्ती दृष्टीं। कन्या देखिली गोरटी। आश्चर्य पोटीं सर्वांच्या ॥ ३४ ॥ कन्या दृष्टीं देखतांची देख। डोळियां लागली टकमक। विस्मयें दाटले सकळिक। अलोलिक सौंदर्य ॥ ३५ ॥ देखोनि लावण्यनिधान। जनकें उचलिली

१ निद्राग्रहांत, शय्यागारांत. २ मिळाले, जमले. ३ आप्त ४ ठेवा. ५ पंक्ती, समुदाय. ६ दुसऱ्या देशांत. ७ जमिनींत पुरून ठेवावी. ८ अत्यंत. ९ जनक राजाच्या नगराची सीमा. १० शेतकीकरितां. ११ शेतकरी. १२ शेत. १३ राजाला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

आपण । म्हणे हें माझें कन्यारत्न । भेरी निशाण त्राहाटिलें ॥ ३६ ॥ गगन गर्जे मंगळतुरीं । सभा गर्जे जयजयकारीं । शांतिपाठ पढिजे ऋषीश्वरीं । वेदोक्तमंत्रीं अभिव्यक्त ॥ ३७ ॥ जनकें पाळिली म्हणोनि जनकात्मजा । धरेनें राखिली अति ओजा । यालागीं म्हणती धरणिजा । परी ते अयोनिजा जगदंबा ॥ ३८ ॥ नांगर वाहतां लागली दांतीं । सीता जन्म पावली शेतीं । ते सांगितली पूर्वस्थिती । हे नारदोक्ती यथार्थ ॥ ३९ ॥ सीतेचें जन्मलक्षण । यासी मूळ स्कंदपुराण । कालिकाखंडीं हें निरूपण । समूळ संपूर्ण लिहिलेंसे ॥ १४० ॥ अहल्येचा ज्येष्ठ सुत । जनकाचा जो पुरोहित । शतानंदस्वामी समर्थ । तेणें हा वृत्तांत सांगितला ॥ ४१ ॥ सांगितली सीतेची उत्पत्ती । आतां सीतास्वयंवरार्थी । जनकासी हरचापप्राप्ती । झाली कैशा रीतीं तें ऐका ॥ ४२ ॥ एका जनार्दना शरण । जालें सीताजन्मकथन । पुढें हरचापप्रकरण । सज्जनीं सावधान परिसावें ॥ १४३ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे बालकांडे एकाकारटीकायां जानकीजन्मकथा नाम पंचदशोऽध्यायः ॥ १५ ॥ ओंव्या ॥ १४३ ॥ श्लोक ॥ २ ॥

अध्याय सोळावा

॥ श्रीरामचंद्राय नमः ॥ सीतास्वयंवरासी जाण । शिवचापासी लावावा गुर्ण । हा जनकें करावया पण । काय कारण तें ऐका ॥ १ ॥ पूर्वी परशुराम कैलासीं । धनुर्विद्या शिवापाशीं । परशुविद्या गणेशापाशीं । लघुलाघवेंशीं शिकला ॥ २ ॥ परशुराम कैलासीं । राहिला असे शिवसेवेसी । तत्परता अहर्निशीं । श्रद्धा गणेशीं समसाम्य ॥ ३ ॥ तंव आक्रंदे आत्यंतिक । ऐकिली रेणुकेची महाहाक । परशुरामें एकाएक । ऐकोनि साशंक तो जाला ॥ ४ ॥ येवोनि सांगे शिवापाशीं । रेणुका बोंभात आक्रंदेंसीं । आज्ञा पुसतों स्वामींसी । मज मातेपासीं जावया ॥ ५ ॥ ऐका रेणुकापुराण । जें कां अति पावन । दोष नासती दारुण । कथा श्रवण करितांची ॥ ६ ॥ ऐकतांचि तें वचन । रुद्र जाला कोपायमान । जगीं अधर्म वाढला पूर्ण । दानवीं ब्राह्मण वधिला दर्पें ॥ ७ ॥ शिव म्हणे जामदग्न्या । मी तुज प्रसन्न सर्वज्ञा । वेगीं दुष्ट वधीं प्रतिज्ञा । विद्यासंपन्ना परशुरामा ॥ ८ ॥ त्यासी देवोनि निजत्र्यंबक । निर्दाळीं म्हणे ब्रह्मघातक । क्षत्रिय श्रीमदें उन्मादक । तेही एकैक निर्दाळीं ॥ ९ ॥ या त्र्यंबकाच्या बाणीं । निःक्षत्रिय करीं धरणी । गणेशें परशु देवोनी । परशुपाणि पाठविला ॥ १० ॥ तैंपासुनी परशुरामाभिधान । वरद गणेशाचें पूर्ण । ज्या कार्या प्रवर्तसी जाण । तें निर्विघ्न करीन मी ॥ ११ ॥ वेगीं येतां परशुरामासी । मार्गीं भेटले आश्रमवासी । तिहीं सांगितलें त्यापासीं । अति कंदनेंसीं पितृघात ॥ १२ ॥ परशुरामें केला प्रश्न । पितृघाता काय कारण । त्या विग्रहाचें मूळ कथन । आश्रमींचे जन सांगती ॥ १३ ॥ सहस्रार्जुन वनक्रीडेसी । आला जमदग्निआश्रमासी । रेणुका प्रार्थोनियां पतीसी । राजा कटकेंसीं निमंत्रिला ॥ १४ ॥ ऋषि म्हणे राजासी केवळ । आणोनि घालूं फळमूळ । स्त्री म्हणे आश्रमधर्म विकळ । अन्नें सकळ तृप्त कीजे ॥ १५ ॥ आश्रमा आले ते ते अतीत । तृप्त करावे समस्त । तुम्हीं सामर्थ्यें अति समर्थ । विकळ परमार्थ न करावा ॥ १६ ॥ यावी मात्र कामधेनु । आणोनि द्यावें दिव्यान्न । राजा विभूति श्रीभगवान । यथोक्त पूजन करावें त्याचें ॥ १७ ॥ निजपत्नीचें धर्मवचन । ऐकोनि ऋषि सुखायमान । मग कामधेनूलागून । विजनीं अनुष्ठान आरंभिलें ॥ १८ ॥ रायें पाहों पाठविलें दूतांसी । अन्नसिद्धि केली ऋषीं । तंव वैश्वानर नाहीं चुलीसी । पाकाची कायसी कथावार्ता ॥ १९ ॥ त्या ऋषीची ऋषिकांता । वदान्य अति उदारता । नवल तिची अगाधता । चित्तीं चिंता असेना ॥ २० ॥ ते ऋषिपत्नी राजबाळा । विचित्र घालिते रंगमाळा । राजपूजेचा सोहळा । अति आगळा उत्साह ॥ २१ ॥ राजदूत गेले परतोन । तंव ऋषीनें आणिली कामधेनु । तेणें रेणुकेचे हातीं देवोन । राजभोजन संपादी ॥ २२ ॥ मज न

१ वाजविलें. २ मंगलवाद्यांनीं. ३ पृथ्वीनें. ४ चांगल्या रीतीनें. ५ त्र्यंबकधनुष्याचा लाभ. ६ दोरी. ७ ओरडत आहे. ८ परशुरामा. ९ आपलें धनुष्य. १० नाहींसे कर.

११ मोठी मारामार करून. १२ भांडणाचें. १३ एकांतांत. १४ अग्नि. १५ उदार.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सोसे खटपट । राजोपचार अति चोखट । जें जें मागसी वरिष्ठ । तें तें यथेष्ट देईल धेनु ॥ २३ ॥ धेनु प्रसवली कृपासंतुष्टीं । पहिलें एक ताट देखिलें दृष्टीं । त्याचि ताटाच्या पोटीं । ताटें कोट्यनुकोटी प्रसवलीं ॥ २४ ॥ ऋषीनें सांडिला निजकोप । त्यासी नाहीं संकल्पविकल्प । लौकिक-क्रियाखटाटोप । नाहीं साटोप तयासी ॥ २५ ॥ राजभोजनकर्तव्यता । घातलें रेणुकेच्या माथां । पुढें काय वर्तली कथा । सावधानता अवधारीं ॥ २६ ॥ कोणा कार्यार्थ जमदग्नीनें । कोप सांडिला आपण । ऐसा श्रोतीं केला प्रश्न । तेंही कथन अवधारा ॥ २७ ॥ ब्रह्मांडखंडपुराणीं । वदली मार्कंडेयाची वाणी । तेचि कथा निरूपणीं । साधुसज्जनीं परिसावी ॥ २८ ॥ वध करावया सहस्रार्जुनासी । इंद्र आला जमदग्नीपासीं । धरोनियां दीन वेषासी । अति तृष्णेसीं तृषित ॥ २९ ॥ पाहोनियां विहित काळ । साधून अतिथीची वेळ । मागों आला जी तत्काळ । केवळ जळ ऋषीपाशीं ॥ ३० ॥ तोंड कोरडें पैं जालें । दोनी ओंठ पैं वाळून गेले । कांहीं न बोलवे बोलें । कराग्रीं दाविलें उदकासी ॥ ३१ ॥ ऋषि म्हणे रेणुकेसी । शीघ्र उदक देई अतिथीसी । येरी जाणोनि कपटवेषासी । निजमानसीं शंकली ॥ ३२ ॥ मज यासी देतां उदक । हा करील कडु विख । ऋषि कोपेल आत्यंतिक । जीवीं धुकधुक लागली ॥ ३३ ॥ अतिथी छळील उदक देतां । जमदग्नि कोपेल न देतां । थोर ओढवली संकोचता । कांहीं कर्तव्यता स्मरेना ॥ ३४ ॥ जमदग्नि अति समर्थ सर्वज्ञ । जाणे आश्रमधर्मसंरक्षण । हातींचें अग्रोदकजीवन । करवी प्राशन अतिथीसी ॥ ३५ ॥ जमदग्नीनें आपण । करविलें अतिथीसी उदकपान । रेणुका म्हणे मीं छळिलें पूर्ण । विघ्न दारुण मज आलें ॥ ३६ ॥ कोपें ऋषि म्हणे रेणुकेसी । तूं केवळ कृत्या कर्कशी । उदक न देवोनि अतिथीसी । पतिवचनासी पराङ्मुख[2] ॥ ३७ ॥ चोर चांडाळ कपटवेषी । आश्रमा आला समयासी । जें जें मागेल तें तें त्यासी । अवश्यतेसीं अर्पावें ॥ ३८ ॥ केवळ निमोल उदक । नेदूनि झालीस विमुख । जळो तुझें काळें मुख । तुझें सुख मज नाहीं ॥ ३९ ॥ गृहिणीस्तव[3] गृहस्थाश्रम । ते जैं पाळीना आश्रमधर्म । तिचा मग कोण संभ्रम[4] । अति दुर्गम कोपला ॥ ४० ॥ कोप नावरे ऋषीसी । पाचारोनियां पुत्रांसी । वेगीं तुम्ही वधा इसी । ममाज्ञेसीं अति शीघ्र ॥ ४१ ॥ पुत्र म्हणती स्वामिनाथा । जैसा पिता तैसीच माता । आम्हांसी वध्य[5] नव्हे सर्वथा । हें तत्त्वतां विचारिजे ॥ ४२ ॥ पुत्र न मानिती पित्याचें वचन । पांचही तुम्ही समसमान । आतांचि जावोनि प्राण । प्रेतत्व पूर्ण पावाल ॥ ४३ ॥ ऐसें ऐकतां ऋषिभाषण । तत्काळ ते पांचही जण । प्रेतत्व पावले संपूर्ण । ऋषिभयें प्राण पळाले ॥ ४४ ॥ प्राण म्हणती आयुष्य असतां । आम्हांसी जावों नये म्हणोनि राहतां । तैं ऋषिशाप बैसेल माथां । तेणें धाकें तत्त्वतां पळाले प्राण ॥ ४५ ॥ ऋषिभयें पळाले प्राण । प्रेतत्व पावले पांचही जण । तरी ऋषीचा कोप दारुण । क्षोभलेपण सांडीना ॥ ४६ ॥ तेचि समयीं परशुधर । सुमनें घेवोनि आला सत्वर । ऋषीस केला नमस्कार । त्यासही दुर्धर आज्ञापी ॥ ४७ ॥ करीं रेणुकेच्या घाता । येरें तत्काळ छेदिला माथां । तेणें आल्हाद ऋषीचिया चित्ता । प्रसन्नता संतुष्ट ॥ ४८ ॥ ऋषि गर्जे प्रसन्नता । मागसी तें देईन आतां । रामें चरणीं ठेविला माथा । विनंति स्वामिनाथा अवधारीं ॥ ४९ ॥ माझी उठवावी हे माता । बंधूंची दवडावी निजप्रेतता । हेंचि मागतों गुरुनाथा । दिल्हें तत्त्वतां ऋषि म्हणे ॥ ५० ॥ तुझा लागतांचि हात । बंधू प्रेतत्वा होती निर्मुक्त । चेतनासुखें सावचित । यथास्थित वर्तती ॥ ५१ ॥ रेणुकेचीं दुखंडें । तुझेनि हातें होती अखंडें । शांतिसुखाचेनि सुरवाडें[6] । वाडेंकोडें उठतील ॥ ५२ ॥ म्यां छेदिली निजमाता । हें नाठवो मातेच्या निजचित्ता । ऐसी मज द्यावी वरदता । चरणीं माथा ठेविला ॥ ५३ ॥ तुझें नाठवे छेदिलेपण । अंगीं घायाचे न दिसती वण । निद्रेपसूना उठिली आपण । ऐसें लक्षण पावेल ॥ ५४ ॥ ऐकोनि पित्याचें वरद भाषण । पुढती पित्याचे वंदोनि चरण । करावया मातेचें उद्धरण । हर्षें[7] संपूर्ण उठिला ॥ ५५ ॥ रेणुकेच्या छेदाच्या अंतीं ।

१ स्वस्थतेनें. २ विमुख, पाठमोरी. ३ पत्नीमुळें. ४ मोह, ममता. ५ मारण्यास योग्य. ६ विपुलतेनें. ७ आनंदानें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

तिसी भेटों आली आदिशक्ती । तूं जन्मलीस ज्या कार्यार्थी । कां तदर्थी उदास ॥ ५६ ॥ तुवां वधावा सहस्रार्जुन । हें तूं गेलीस विसरून । त्याची द्यावया आठवण । इंद्रें आपण तुज छळिलें ॥ ५७ ॥ रेणुका म्हणे कार्यसिद्धी । साधावी लागेल गुह्यबुद्धी । कळों नेदावें जनापवादीं । विरोधसंधि लक्षेना ॥ ५८ ॥ कळों न द्यावें पैं जनीं । कळों न द्यावें जमदग्नी । ऐसें मज लक्षितां अनुदिनीं । विरोधकरणी लाधेना ॥ ५९ ॥ तंव बोलिली आदिशक्ती । परशुरामाची वरदोक्ती । तूं पावसी देहप्राप्ती । येचि कार्यार्थी साधावया ॥ ६० ॥ रेणुका बोलली वचनोक्ती । तूंचि कार्य तूंचि कर्ती मज सांगसी जैसी युक्ती । त्या त्या गती साधीन ॥ ६१ ॥ जगदंबा सांगे रेणुकेसी । सहस्रार्जुन पारधीसी । येईल तुझ्या आश्रमासी । तैं कार्यसिद्ध्यर्थी पूजावा ॥ ६२ ॥ सकळ सैन्येंसी नृपती । निमंत्रवी ऋषिहातीं । कामधेनु आणावी तदर्थी । ऋषिप्रती सांगोनी ॥ ६३ ॥ दुर्लभ उपचार त्रिजगतीं । ते ते मागून धेनूप्रती । साधावया निजकार्यार्थी । आदरें नृपति पूजावा ॥ ६४ ॥ करितां दोन्ही शक्ति भाषण । तंव परशुरामें आपण । लाहोनि पित्याचें वरदान । केलें सावधान मातेसी ॥ ६५ ॥ परशुरामें लावितां हात । बंधु जाले सावचित । ते नेणती मातेचा घात । तिसीही निजघात नाठवे ॥ ६६ ॥ पुत्र सोडविले शापापासून । रेणुकेसी आल्हाद पूर्ण । परशुरामातें आलिंगून । वदे वरदान रणविजयी ॥ ६७ ॥ रामें ऐकतां ते वरद गोष्टी । पुढ बांधिली शकुनगांठी । पुढील कथेची परिपाटी । सावध गोष्टी अवधारा ॥ ६८ ॥ स्त्रीपुत्र जालिया सावधान । जमदग्नि जाला अति उद्विग्न । केवढें क्रोधाचें विंदान । अधःपतनदायक ॥ ६९ ॥ स्त्रीपुत्रांचा करितां घात । मज होतें अधःपतन येथ । धन्य धन्य परशुराम सुत । अति अनर्थ चुकविला ॥ ७० ॥ माझें घेवोनि वरदान । माझें चुकविलें अधःपतन । क्रोधें ठकविलें मज संपूर्ण । त्याचें निर्दळण मी करीन ॥ ७१ ॥ क्रोध म्हणिजे केवळ मांग । तो मजमाजि वसे सांग । जळो माझा योग याग । क्रोध डाग अपवित्र ॥ ७२ ॥ क्रोधाएवढा महावैरी । बैसला असतां जिव्हारी । जो ज्ञानाची मानी थोरी । तो संसारी महामूर्ख ॥ ७३ ॥ अल्प अन्याय देखिल्यावरी । त्यावरी जो तो कोप करी । क्रोधाएवढा अपकारी । क्रोध क्रोधावरी न करिती ॥ ७४ ॥ क्रोध अपराधाची थोरी । अतर्क्य रिघोनि जिव्हारी । चहूं पुरुषार्थांची करी बोहरी । नानापरी विभांडी ॥ ७५ ॥ क्रोध आलिया कडकडाडी । काम पळे उठाउठी । धर्म जाय बारा वाटी । क्रोधें तुटी अर्थस्वार्थी ॥ ७६ ॥ क्रोध रिघोनि अंतरा । मुख्य मोक्षा जीवें मारी । ऐसा क्रोध पैं निजवैरी । तो मी संहारीन पैं सत्य ॥ ७७ ॥ ऐसें बोलोनि ऋषि आपण । दृढ घालोनि आसन । आवरोनि प्राणापान । क्रोधदहन करूं पाहे ॥ ७८ ॥ क्रोध म्हणे ऋषि विचारी । मज निघाल्या देहाबाहेरी । वृथा जाईल तुझी थोरी । तृणावारीं न पुसती ॥ ७९ ॥ एक माझे वस्तीची थोरी । म्यां प्रवेशोनि नृसिंहशरीरीं । हिरण्यकशिपूयेवढा वैरी । नखाग्रीं निवटला ॥ ८० ॥ म्यां शिवरूपी घालोनि ठाणें । त्रिपुर निवटिला एक्या बाणें । माझेनि योगें त्रिनयनें । जीवें मारणें जालंधर ॥ ८१ ॥ म्यां रिघोनि विष्णुदेहीं । मधुकैटभ मारिले ठायीं । म्यां संचरोनि कुमाराच्या देहीं । मर्दिला पाहीं लवणासुर ॥ ८२ ॥ ऐसें माझेनि योगें जाण । देवांहीं केलें दुष्टनिर्दळण । बिचारा ऋषिराया तूं आपण । मजविण तूं तृणप्राय ॥ ८३ ॥ तूं मज दवडिल्या ऋषी । तुझी दशा होईल कैसी । ते मी सांगेन तुजपासीं । सावधानेंसां अवधारी ॥ ८४ ॥ मज निघाल्या देहाबाहेरी । बाइला घेती टोलेवारी । तुज मारिल्या तोंडावरी । सांटोप शरीरीं तुज नाहीं ॥ ८५ ॥ ऐसी ऐकोनि त्याची कथा । कोपावरी अति क्षोभता । पूर्ण वाणली ऋषिनाथा । तुज मी आतां मारीन ॥ ८६ ॥

त्रिविधं नरकस्येदं द्वारं नाशनमात्मनः ।
कामः क्रोधस्तथा लोभस्तस्मादेतत्त्रयं त्यजेत् ॥ १ ॥

भगवंताचिया वाक्यथोरी । काम क्रोध लोभ ज्याचे शरीरा । त्याची वस्ती नरकाभीतरा । त्याच्या घरीं नित्य नरक ॥ ८७ ॥ नरका जाणें न लगे

१ निरपेक्ष, निष्काळजी. २ परिनालिका, क्रम. ३ नरकवास. ४ पराभव करतो. ५ गवतासमान होऊन. ६ माझ्या राहण्याचा थोरपणा. ७ शंकरानें. ८ अहंकार, नेट. ९ बिंबली.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

त्यासी । तोचि स्वयें नरकरासी । क्रोधा तुझी गति ऐसी । व्यर्थ जल्पसी वांढिवां ॥ ८८ ॥ क्रोध कामाचा कैवारी । क्रोध अभिमानाचा साहाय्यकारी । क्रोध लोभा सबाह्याभ्यंतरीं[2] । पापकारी निजक्रोध ॥ ८९ ॥ क्रोध संचरल्या[3] देहीं । अणुमात्र हित नाही । पापाच्या कोटी पाहीं । क्रोधाच्या पायीं तोडॅरी ॥ ९० ॥ ऐसें बोलोनि जमदग्नी । चेतवू पाहे जंव योगाग्नी । तंव क्रोध निघाला गजबजोनी । देह त्यागूनी ऋषीचा ॥ ९१ ॥ क्रोध म्हणे ऋषिनाथा । तुझी आज्ञा वंदूनि माथां । मी निघालों जी तत्त्वतां । कोठें आतां म्यां राहावें ॥ ९२ ॥ ऋषि होय विचारिता । माझ्या क्रोधाची दुर्धरता । यासी वस्ती न दिसे सर्वथा । म्यां काय आतां सांगावें ॥ ९३ ॥ ऐसी जमदग्नी करितां चिंता । परशुधरा कळलें तत्त्वतां । चरणीं ठेवोनियां माथा । होय बोलता अति नम्र ॥ ९४ ॥ स्वामीचा कोप अति दारुण । हा सर्वत्र करील दहन । यासी करावें मदर्पण । कृपा करोनि स्वामिया ॥ ९५ ॥ जमदग्नि विचारी आपण । माझ्या क्रोधा अति सांठवण । परशुधर शुद्ध संपूर्ण । हा रामार्पण करावा ॥ ९६ ॥ ऋषि सांगे नित्यब्रह्मचारी । धन-लोभ नाहीं ज्याभीतरीं । जो द्विजांचा द्वेष न करी । क्रोध त्यामाझारी शांतत्वें वसे ॥ ९७ ॥ याहूनि अन्यथा पैं होतां । क्रोध करील त्याच्या घाता । जरी तुज टाकेल तत्त्वतां । तरी मी आतां अर्पीन ॥ ९८ ॥ द्रव्यदारलोभ ज्यापासीं । क्रोध तेथें सदा मुसमुसी । ज्ञानगर्व ज्याचे मानसीं । क्रोध त्यापासीं चाँविरा ॥ ९९ ॥ ज्ञानगर्व द्रव्य दारा । इहीं द्वारीं क्रोधाचा मारा । हे जिंकिलिया परशुधरा । क्रोध कामारा तयाचा ॥ १०० ॥ परशुराम म्हणे ताता । तुझे चरणींचें तीर्थ घेतां । तेणें तीर्थें मज सामर्थ्यता । क्रोध राखतां भय नाहीं ॥ १ ॥ पित्यासी करोनि नमन । घेतलें चरणतीर्थ प्रार्थून । तेणें तीर्थेंसीं आपण । केलें प्राशन क्रोधाचें ॥ २ ॥ क्रोध बोलिला आपण । भार्गवा करितां दुष्टनिर्दळण । संग्रामीं साहाय्यकारी आपण । तुज मी होईन भृगुवीरा ॥ ३ ॥ परशुराम जंव क्रोध घोटी । अंगीं बाणली पुष्टि तुष्टी । चौगुणीं वाढीव पोटीं । संग्रामीं लाठी वीरवृत्ति ॥ ४ ॥ करितां क्रोधाचें प्राशन । परशुरामासी समाधान । अंगीं बाणली आंगवण । दुष्टनिर्दळण[10] करावया ॥ ५ ॥ क्रोध त्यागिला जमदग्नीनें । त्याचें सांगितलें निरूपण । एका जनार्दना शरण । कथानुसंधान अवधारा ॥ ६ ॥

कामधेनु आणोनि ऋषीं । स्वयें दिधली रेणुकेपासीं । तिणें पूजोनि धेनूसी । राजोपचारांसी मागितलें ॥ ७ ॥ जे रायें देखिले ना ऐकिले । जे रायें नाहीं चाखिले । ते ते उपचार भले भले । धेनूनें दिधले तत्काळ ॥ ८ ॥ दिव्यान्नें लेणीं लुगडीं । एके ताटें प्रसवली आवडीं । निघालीं ताटें लक्षकोडी । निघाल्या चवडी[11] ताटांच्या ॥ ९ ॥ राजदूत सांगे रायापासीं । अन्नसामग्री कैंची ऋषी । वैश्वानर नाहीं चुलीसी । कथा कायसी पाकाची ॥ १० ॥ रायें पाठविला प्रधान । आश्रमीं पाहें अन्नसदन । नसेल तरी द्यावें आपण । अन्नधन ऋषीसी ॥ ११ ॥ ऐसें ऐकोनि वचन । ऋषिआश्रमा प्रधान । स्वयें पातला आपण । तंव ऋषि बोलावणें पाठवितु । ॥ १२ ॥ प्रधान म्हणे लागला उशीर । शिष्यवर्ग म्हणती धरा धीर । संपादिला अन्नप्रकार । आतां सत्वर चलावें ॥ १३ ॥ प्रधानें जाणविलें रायासी । ऋषीनें पाठविलें बोलवायासी । रायें सिद्ध करोनि सर्वांसी । आला कटकेंसीं[12] भोजना ॥ १४ ॥ आले देखोनि रायासी । ऋषि सामोरा येवोनि प्रीतीसी । रायासी पूजिलें उपचारेंसीं । मधुपर्कीं[13]सी सिद्ध केलें ॥ १५ ॥ पाहती राजा आणि प्रधान । तंव दिव्य मंदिरें शोभायमान । सुवर्णताटीं दिव्यान्न । समसमान सर्वांसी ॥ १६ ॥ ऋषीनें बैसविली पंक्ती । राजा अति विस्मित चित्तीं । धन्य ऋषीची संपत्ती । अगाध स्थितिसामर्थ्य ॥ १७ ॥ सकल बैसले भोजनपंक्तीं । मागणें नाहीं मागुती । वाढणें न लगे पुढती । अवघ्यां तृप्ती एकची ॥ १८ ॥ दिव्या-लंकारभूषणें । दिव्यांबरें[14] परिधानें । सर्व गौरविले सन्मानें । अवघेही मनें विस्मित ॥ १९ ॥ राजा

१ बडिवारानें. २ आंतून बाहेरून जडलेला. ३ शिरल्यावर. ४ पादभूषण. ५ माझा क्रोध धारण करण्यास अत्यंत कठीण. ६ जागृत, डसणारा. ७ सेवक.

८ हे परशुरामा! ९ पराक्रम. १० दुष्टांचा नाश. ११ ढीग. १२ सैन्यासह. १३ दधि, घृत, जल, मध आणि साखर यांनीं केलेला पूजेचा उपचार. १४ उंची वस्त्रें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

म्हणे प्रधानाप्रती । आम्ही राजे चक्रवर्ती । आम्हां ऐसी नाहीं संपत्ती । ते ऋषीप्रती कैसेनी ॥ १२० ॥ पुरोहित सांगे ऋषीची थोरी । कामधेनु आहे त्याचे घरीं । तिचेनि प्रभावेंकरीं । दिव्य उपचारीं वर्षत ॥२१॥ ऋषीपासीं आहे कामधेनु । ऐसें ऐकतां सहस्रार्जुन । ते आम्हीं घ्यावी मागून । ऐसा अभिमानु दृढ धरिला ॥ २२ ॥ राजा म्हणे जमदग्नीसी । थोर सुखी केलें आम्हांसी । कांहीं एक मागेन तुजपाशीं । तें अवश्यतेसीं मज द्यावें ॥ २३ ॥ ऋषि म्हणे तुम्ही राजे आत्यंतिक । येरु म्हणे मी तुझा याचक । तुज मागेन कांहींएक । तें अवश्यक मज द्यावें ॥ २४ ॥ आश्रमीं आहे कामधेनु । ते मज द्यावी कृपा करोन । वचन ऐकोनि जमदग्न । अति उद्विग्न स्वयें जाला ॥ २५ ॥ कामधेनु स्वर्गभूषण । मृत्युलोकीं नाहीं जाण । गाय आणली इंद्रापासून । परवस्तुदान केवीं द्यावें ॥ २६ ॥ राया तुझे पूजेचे अंतीं । धेनु न्यावी इंद्राप्रती । ऐसें करोनियां निगुतीं । आश्रमाप्रती आणिली ॥ २७॥ राजा विचारी मानसीं । बलात्कारें नेऊं धेनूसी । इंद्र येईल धांवण्यासी । शिक्षा मी त्यासी लावीन ॥ २८ ॥ सोडावया कामधेनु । रायें धाडिला प्रधान । आडवा राहिला जमदग्न । देदीप्यमान तेजस्वी ॥ २९ ॥ जमदग्नीच्या तेजापुढें । प्रधान पळे मागिलीकडे । योद्धे पळाले निधडे । सैन्य बापुडें तें किती ॥ १३० ॥ ऐसें देखोनियां जाण । राजा धांविन्नला आपण । पुढें उभा जमदग्न । तो अणुप्रमाण ढळेना ॥ ३१ ॥ ऐसें देखोनियां त्यासी । राजा मोकली शस्त्रांसी । तीं लागों न शकती ऋषीसी । मग हातवसी निर्वाणखड्ग ॥ ३२ ॥ जेथें विषयाचा अति स्वार्थ । तेथें नाठवे कर्तव्यार्थ । राजहस्तें ऋषिघात । ऐसा अनर्थ ओढवला ॥ ३३ ॥ राजा अत्यंत क्रोधयुक्त । निर्वाणशस्त्रें टाकित । तेणें ऋषीचा केला घात । पडिला अचेत जमदग्नि ॥ ३४ ॥ जमदग्नीनें सांडिला कोप । यालागीं त्यासी न देववे शाप । तेणें रायाचा प्रताप । शस्त्रसाटोप चालिला ॥ ३५ ॥ जमदग्नीचा गेला प्राण । पळाले आश्रमींचे ब्राह्मण । राजा बोलिला आपण । आतां कामधेनु आणा रे ॥ ३६ ॥ धेनु सोडूं आले सेवक । रेणुका क्षोभली आत्यंतिक । चक्र करोनियां ताटंक । युद्धासन्मुख ते जाली ॥ ३७ ॥ ताटंकचक्रासेणें । उठाउठी पळाले प्रधान । सेना निघे जीव घेऊन । पळालें सैन्य बारा वाटीं ॥ ३८ ॥ ताटंकचक्राची तिखट धार । निधडे पाडिले महावीर । वाहती रुधिराचे पूर । तिजसमोर कोण राहे ॥ ३९ ॥ कामधेनूतें लवलाहो । सोडूं धांविन्नला स्वयें रावो । रेणुकेनें आसुडितां बाहो । पडे सहस्रबाहो मूर्च्छित ॥ १४० ॥ त्या सहस्रार्जुनाचे सुत । धांविन्नले क्रोधयुक्त । तिहीं युद्ध केलें अत्यद्भुत । तंव सावचित्त नृप जाला ॥ ४१ ॥ निर्वाणशस्त्रांचे घाये । राव सोडी लवलाहें । तिसी न लागती पाहें । देखोनि राव गजबजिला ॥ ४२ ॥ मज सहस्रार्जुनाचा यावा । न साहवे देवां दानवां । मा मनुष्यांचा कोण केवा । त्या मज लघुत्वा आणिलें स्त्रियें ॥ ४३ ॥ चामुंडास्त्राचा प्रळयघात । बळें सहस्रार्जुन हाणित । साहोनि एकवीस आघात । पडे मूर्च्छित जगदंबा ॥ ४४ ॥ जमदग्निआज्ञेचें बंधन । कामधेनूसी होतें पूर्ण । ऋषि निमेतांचि जाण । धेनु निर्बंधन स्वयें झाली ॥ ४५ ॥ रेणुका रणीं पडलियावरी । राजा धांवोनि धेनु धरी । थडका हाणोनि निघे बाहेरी । सहस्र करीं नाटोपे ॥ ४६ ॥ राजा खुरावरी हाणे घात । तेणें खुरीं निघालें रक्त । तेचि खुरासनी जाले आरक्त । आले युद्धार्थ रायासीं ॥ ४७ ॥ खुरासनी पळवूनि पाहें । राजा शृंगीं हाणी घाय । जाला सिंगोळांचा उद्भव । तिहीं सहस्रबाहो हांकिला ॥ ४८ ॥ आक्रंदें दे हंबरड्यासी । ते ठायीं झाले कालेमंसी । जन्म पावले हबसी । तिहीं सहस्रबाहु हांकिला ॥ ४९ ॥ इतुकें करोनियां कंदनें । स्वर्गा गेली कामधेन । राजा जाला अति उद्विग्न । म्लानवदन अनुतापी ॥ १५० ॥ म्हणे स्वार्थ ना परमार्थ । उगाच केला शस्त्रघात । मज घडला ब्रह्मघात । सैंद्यः अनर्थ स्वलोभें ॥ ५१ ॥ राजा अनुतापी मानसीं । कांहीं न बोले कोणासीं । घेवोनि सकळ सैन्यासी । निजनगरासी तो गेला ॥ ५२ ॥ रणीं रेणुका मूर्च्छापन्न । ती स्वयें होवोनि सावधान । ठायीं ठेवोनियां प्राण । चेतना संपूर्ण पावली ॥ ५३ ॥

१ सामर्थ्यामुळें. २ मोठे, श्रेष्ठ. ३ धैर्याचे. ४ सोडी. ५ हातांत घेई. ६ निकराची तलवार. ७ एक कर्णभूषण. ८ आवेश. ९ मग. १० मरतांच. ११ बंधनरहित, स्वतंत्र. १२ या नांवाचे लोक. १३ नाश. १४ तत्काल. १५ मूर्च्छित.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

कंदन देखोनि आत्यंतिक। आक्रंदें दिधली हाक। परशुरामा पाव आवश्यक। माझें निजदुःख निवारावया ॥ ५४ ॥ तो मातेचा महाध्वनी। कैलासीं पडे तुझ्या कानीं। तूं आलासी तत्क्षणीं। मातृवचनीं अति भक्ती ॥ ५५ ॥ हे पूर्वकथा इतिहासीं। जाली होती जैसी तैसी। ते सांगितली परशुरामासी। आश्रमवासी ब्राह्मणीं ॥ ५६ ॥ ऐसी ऐकोनि वार्ता। सवेग पाहूं आला माता। तिसी घायवट देखतां। आक्रंदतां गहिंवरला ॥ ५७ ॥ रेणुका म्हणे पुत्रासी। तूं कां येथें रडों आलासी। पुरुषार्थ नाहीं तुजपासीं। कैवारी होसी तूं काय ॥ ५८ ॥ ऐकोनि मातेच्या वचना। परशुराम लागे चरणां। शीघ्र मज द्यावी अनुज्ञा। सहस्रार्जुना छेदीन ॥ ५९ ॥ क्षोभें आज्ञा दिधली दुर्धर। सहस्रार्जुनाचे सहस्र कर। छेदोनि निर्वटीं त्याचें शिर। दानव समस्त ⁴निर्दळीं ॥ १६० ॥ युद्धामाजी शस्त्रास्त्रीं। मज घायवट केलें क्षत्रीं। तरी त्वां पृथ्वी करावी निःक्षत्री। धुंडमारी करोनियां ॥ ६१ ॥ सहस्रार्जुनासहित राजसुत। शोधोनि मारावे समस्त। दैत्य मातले उन्मत्त। तरी समूळ घात करीं त्यांचा ॥ ६२ ॥ माझें शरीर ते धरित्री। एकवीस घाय केले क्षत्रीं। एकवीस वेळां निःक्षत्री। पृथ्वी करीं ममाज्ञा ॥ ६३ ॥ वंदोनि मातेचे चरण। घेवोनियां धनुष्यबाण। परशु धरोनियां दारुण। कोपायमान चालिला ॥ ६४ ॥ मातेची आज्ञा निःसीम। मूळपीठ पवित्र परम। तेथें मी करीन सहगम। मग उत्तरकर्म तूं करीं ॥ ६५ ॥ ऐसें बोलतांचि पाहीं। रेणुका प्रवेशे जमदग्निदेहीं। तिचें प्रेत उरलें नाहीं। ते देहींच विदेही जगदंबा ॥ ६६ ॥ परशुराम ललाट पिटी। माते मज दे कां हो भेटी। येरीं वो दिधली मूळपीठीं। सांगितली गोष्टी करावी ॥ ६७ ॥ मग सिंहाद्रीसीं परशुरामू। करोनि दोघांचें उत्तरकर्मू। पुढें आरंभिला युद्धधर्मू। परम संग्रामु रायासीं ॥ ६८ ॥ जेथें वसे सहस्रार्जुन भूपती। तेथें ठाकोनि आला महिकावती। धनुष्यबाण घेवोनि हातीं। नगराप्रती पैं आला ॥ ६९ ॥ म्हणे विभांडूं राजनगरी। तैं प्रजा पीडिती समग्री। राजा निघालिया बाहेरी। सहपरिवारीं मारीन ॥ १७० ॥ बाहेर येवोनि करावें रण। सांगून धाडूं धर्मवचन। नगरीं भिडतां आपण। होईल कंदन प्रजेसी ॥ ७१ ॥ ऐसें ऐकोनि जाण। राजा न येईल मर्जभेणें। तैं नगरीं प्रवेशों आपण। राजभवन लक्षोनी ॥ ७२ ॥ प्रजेसी देऊनियां अभयदान। स्वस्थ राखून गोब्राह्मण। राजभवनीं प्रवेशोन। सहस्रार्जुन वधीन ॥ ७३ ॥ युद्धास यावें मजप्रती। सांगून धाडूं कोणाहातीं। ऐसें विचारितां चित्तीं। पुँष्पहस्ती भेटला ॥ ७४ ॥ रायाचे देवपूजेचा माळी। पुष्पें घेवोनियां करतळीं। ब्राह्मणाची अभिनव शैली। देखोनि जवळीं पाहूं आला ॥ ७५ ॥ परशुराम पुसे त्यासी। फुलें नेतोसी कोणासी। तो म्हणे मी रायाचा विश्वासी। देवपूजेपासीं पुष्पधारी ॥ ७६ ॥ राम सांगे पुष्पधाऱ्यासी। जावोनि सांग रायापासीं। मजसीं यावें युद्धासी। सकळ सैन्येंसीं सन्नद्ध ॥ ७७ ॥ ऐकोनि रामवचनासी। माळी त्यातें उपहासी। मरणा धरणें कां बैसलासी। युद्ध रायासीं वांछिसी ॥ ७८ ॥ अंगीं दिसे ब्राह्मणपण। तुज कां आले धनुष्यबाण। परशु धरावया काय कारण। त्वां वेदपठण करावें ॥ ७९ ॥ राजा सैन्येंसी सन्नद्ध सबळ। तूं एकाकी ब्राह्मणबाळ। तूं त्यासी युद्ध प्रबळ। रणकल्लोळ घडे केवीं ॥ १८० ॥ जे जे मार्गस्थ देखती। ते ते म्हणती द्विज अंपघाती। रायासी युद्धप्राप्ती। हा मरणार्थी आतुर ॥ ८१ ॥ क्षत्रियासी युद्धाचें बळ। ब्राह्मण शापबळें सबळ। तें तूं वांछिसी युद्ध प्रबळ। पूर्ण केवळ अविवेकी ॥ ८२ ॥ फुलारी म्हणे मज सांगतां। राजा करील तुझ्या घाता। ब्राह्मणहत्या बैसेल माझे माथां। मी सर्वथा सांगें ना ॥ ८३ ॥ मग परशुराम म्हणे मनीं। साधुत्वें येथें कोणी न मानी। पुरुषार्थ देखोनि जनीं। वचन मानी भलताचि ॥ ८४ ॥ ऐसें परशुराम अवधारी। मग धुमसिलां फुलारी। फुलें हिरोनि घेतलीं करीं। जायें शंख करीत राजसभेसी ॥ ८५ ॥ आघातें पीडिला फुलारी। तो शंख करी राजद्वारीं। ऐकोनि धाकती नरनारी। राजा भीतरीं जीत कीं मेला ॥ ८६ ॥

१ जखम. २ पराक्रम. ३ तोंड. ४ मारून टाक. ५ पृथ्वी. ६ मला भिऊन. ७ फुलें हातांत घेऊन. ८ सज्ज होऊन. ९ आपल्याच हातानें आपला घात करून घेणारा. १० चोपून काढला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सहस्रार्जुनाच्या राज्याभीतरीं । बोंब नाइकों स्वप्नांतरीं । ते बोंब पडली राजद्वारीं । राजा भीतरीं निमाला[1] ॥८७॥ ऐसी विश्वतोमुखीं[2] वार्ता । भविष्य वदे वाग्देवता । ती बोंब रायें ऐकतां । चळकांप चित्ता सुटला ॥ ८८॥ त्यां गाईस केला शस्त्रपात । आणि ब्राह्मणा केला घात । पाप आचरलों बहुत । जय निश्चित मज नये ॥ ८९ ॥ फुलारियासी पुसे प्रधान । तुझे बोंबेसी काय कारण । तो म्हणे एक आलासे ब्राह्मण । धनुष्य-बाणपरशूसीं ॥ १९० ॥ तो रायासीं समदळीं । युद्ध करूं पाहे बळी । तो म्हणे सांग राया-जवळी । त्याची वचनावळी छेदिली[3] त्यां ॥ ९१ ॥ रायासीं ब्राह्मणासीं युद्ध । बोलणें तुझें अति अवद्ध । तेणें त्या ब्राह्मणासी आला क्रोध । मज सुबद्ध घुमसिलें ॥ ९२ ॥ फुलें हिरोनियां करीं । मज प्रहारिलें[4] मुखावरी । तेणें मज आलें जिवा-वरी । यालागीं मी करीं महाशब्द ॥ ९३ ॥ प्रधानें बोलाविला सेनांनी[5] । ब्राह्मण आणावा धरोनी । तेणें ठाणांतरी[6] पाचारोनी । म्हणे ब्राह्मण बांधोनि आणावा ॥९४॥ नगर नागरिक लोक । तेथें आले स्वाभाविक । हे बहुत तो एकला एक । युद्धकौतुक पाहूं पां ॥ ९५ ॥ बाहेर निघाला ठाणांतरी । पुढें पायिकांच्याँ[7] हारी । एक गर्जती हाहाकारीं । एक शस्त्रें करीं झेलिती ॥ ९६ ॥ परशुराम म्हणे हे दीन । मारिलिया पुरुषार्थ कोण । यांचा रायासी अपशकुन । होय तैसें चिन्ह करूं यांसी ॥ ९७ ॥ ऐसें म्हणोनि सोडिला बाण । अवघियांचीं शस्त्रें छेदून । सवेंचि नाक कान सरकटून । बाण परतोन भातां रिघे ॥ ९८ ॥ कोणाचा व्याही जांवई । कोणाचा भेदूं आला भाई । कौतुक पाहतां तेही । नाककानांस पाहीं मुकले ॥९९॥ कोणाचा पाहुणा मेहुणा । जांवई आणिला दिवाळसणा । ते ते मुकले नाका काना । दावितां वदना सलज्ज ॥ २०० ॥ शंख करिती आक्रंदोनी । नाक कान गेले दोनी । फें फें करितां निघे ध्वनी । हे विटंबणी युद्धाची ॥ १ ॥ सन्मुख घाईं गेलिया प्राण । तें वीरांसी उत्तम मरण । परि जितां गेलिया नाक कान । तें चौगुण मरण निंद्यत्वें ॥ २ ॥ वीर विटंबिले अनेक । नगरामाजी पडली हाक । कोपले राजपुत्र विटंक । सन्नद्ध कटकें तिहीं केलें ॥ ३ ॥ साठी प्रयुतें[10] कुंजर । कोट्यनुकोटी रहँवर[11][12] । अमित चालिले असिवार । पायाचे मोगँर गर्जती ॥ ४ ॥ सेनामुखीं सेनानी । राजपुत्र मध्यमानी । दक्षिणे राजे मुकुटमणी । चंड प्रचंड दोनी वामभागीं ॥ ५ ॥ वेगें निघे सहस्रार्जुन । कुमर आणि प्रधान । तिहीं राहविला प्रार्थून । ब्राह्मण बांधोन आणूं आम्ही ॥ ६ ॥ आम्ही असतां इतुके जण । एकला एक ब्राह्मण । तयावरी निघावें आपण । हें समरांगण नव्हे राया ॥ ७ ॥ यापरी मंत्री आणि कुमरीं । राजा राहवोनियां नगरीं । आपण येवोनियां दळभारीं । नगराबाहेरी निघाले ॥ ८ ॥ पुढें भेटले निर्नासिक । तो अपशकुन आत्यंतिक । मुख्य रायासीच घातक । हा आवश्यक शास्त्रार्थ ॥ ९ ॥ जळो तुमचें निंद्य मुख । मुहूर्तीं कां आलेति सन्मुख । अवघे निर्भर्त्सित लोक । तें अति दुःख घायाळां ॥ २१० ॥ घायाळ बोलती आपण । ब्राह्मण कोणाचा न घे प्राण । तुम्ही वांचवाल नाक कान । तें दांडुलेपण जाणवेल ॥ ११ ॥ प्रधान बोलिला आपण । परतों नये अपशकुनाँभेणें[16] । परतणें हाचि अपशकुन । अति निंद्य जगामाजी ॥ १२ ॥ युद्ध करितां परस्परीं । एका जय एका हारी । हें न चुके भलत्यापरी । शकुनाची थोरी मूर्खांप्रती ॥ १३ ॥ अंगीं नाहीं आंगवँण[17] । त्यासी काय जय देईल शकुन । हें मानिती ते मूर्ख पूर्ण । शूरांचें लक्षण ऐसें नव्हे ॥ १४ ॥ देव असे शकुनाचे ठायीं । तो काय अपशकुनीं नाहीं । शकुन अपशकुनाचें कांहीं । निर्धिडे[18] पाहीं न मानिती ॥ १५ ॥ ऐसें बोलोनि प्रधान । त्राहाटिलीं भेरी निशाण । सैन्य चालविलें संपूर्ण । पुढें ब्राह्मण लक्षूनी ॥ १६ ॥ एका जनार्दना शरण । दांनवांचें[19] युद्ध दारुण । राम करील निर्दळण । तें रणकंदन अवधारा ॥ २१७ ॥

स्वस्ति श्रीभावार्थरामायणे बालकांडे एकाकारटीकायां परशुरामयुद्धप्रभावो नाम षोडशोऽध्यायः ॥ १६ ॥ ओंव्या ॥ २१७ ॥ श्लोक ॥ १ ॥

१ मरण पावला. २ सर्वांच्या तोंडीं. ३ उपहास केला. ४ मारलें. ५ सेनापति. ६ पहारेकरी, ठाणेदार. ७ पायदळाच्या. ८ अत्यंत ९ सैन्य. १० सहा कोटी. ११ हत्ती. १२ रथ. १३ स्वार. १४ पायदळ. १५ सामर्थ्य. १६ अपशकुनाच्या भयानें. १७ सामर्थ्य. १८ धैर्यवान्. १९ राक्षसांचें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

अध्याय सतरावा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ परशुराम पाहे दुरून । निर्नायकी दिसे सैन्य । राजा नाहीं आला आपण । राजपुत्र पूर्ण देखिले ॥ १ ॥ रायाचे राजसुत । शोधोनि मारावे समस्त । हे मातेची आज्ञा समर्थ । तो मी कार्यार्थ साधीन ॥ २ ॥ केला त्र्यंबकाचा टणत्कार । नादें मूर्च्छित झाले सुर । दुमदुमलें गिरिकंदर । राजकुमर धाकिन्नले[1] ॥ ३ ॥ धाकें दचकला प्रधान । उभा ठेला धैर्य धरून । सैन्यें उभ्या उभ्या सांडिती प्राण । टणत्कारें पूर्ण नभ कोंदलें ॥ ४ ॥ बाण सोडिला सिंहमुख । तेणें गज मारिले निःशेष । रथांचे छेदोनि आंख । वाजींचीं[2] मस्तकें फोडिलीं ॥ ५ ॥ बाणपिसारा सुटला वारा । कोटी कोटी रहंवरां । उडवोनि नेलें अंबरा । वरिल्या वीरां आवर्तु[3] ॥ ६ ॥ वरील वीर तळीं पडत । तळीं धुरा चुर होत । रथ अंगभारें आदळत । तेणें पीठ होत शूरांचें ॥ ७ ॥ बाण सोडिले संपूर्ण । आवर्तीं पडिलें सैन्य । जो जिकडे सरे चुकवोन । तिकडेचि बाण खडतरती ॥ ८ ॥ धाकें धाकें घायाभेणें । आडवीं वोडवती[4] वोडणें[5] । वोडणें फोडोनियां बाणें । सर्वांग संपूर्ण भेदिलें ॥ ९ ॥ रामें मांडिली रणकळी । शिरांची केली चेंडुफळी । राजे मारिले अतुर्बळी[6] । रुधिरांजुळी[7] प्राशिती भूतें ॥ १० ॥ सैन्या देखोनि महामार । खळबळिले राजकुमर । प्रधान धांविन्नले समोर । अति दुर्धर निजयोद्धे ॥ ११ ॥ बाणाचिया झडाडां । प्रधान उडविला रोकडा । नेऊन टाकिला रायापुढां । मस्तकीं तडा पडोनि मेला ॥ १२ ॥ चंड आणि प्रचंड । तिहीं युद्ध केलें वितंड[8] । त्यांचे छेदोनियां बाहुदंड । दोहींचें मुंड[9] पाडिलें ॥ १३ ॥ दोघे पाडिले अति दुर्धर । रणीं उठला हाहाकार । हाकें दैत्यांचें[10] छेदी वक्त्र । वीरें वीर आटिले ॥ १४ ॥ मग लक्षिले राजकुमर । तेही चालिले अति दुर्धर । युद्ध चाले घोरांदर । शस्त्रास्त्रलाघवें ॥ १५ ॥ बाणें बाणांतें तोडित । शस्त्रें शस्त्रांतें झोडित । अस्त्रें अस्त्रांतें मोडित । मन्त्रें ओढित निर्वाणशस्त्रें ॥ १६ ॥ रामें छेदिलें त्यांचे रथ । सारथी मारिले शतानुशत । वीर मारोनियां तेथ । अवघे विरथ रणीं केले ॥ १७ ॥ अंतकांतक[11] अर्धचंद्रें[12] । निःशेष छेदिलीं त्यांचीं शस्त्रें । सर्वेचि निवटिलीं[13] शिरें । अवनीं रुधिर प्रवाहे ॥ १८ ॥ राजपुत्र पडतां क्षितीं[14] । पडल्या वीरांच्या पांथी[15] । रामें रणीं लाविली ख्याती । केली शांति सर्वांची ॥ १९ ॥ रणांगणा जे जे आले । ते ते निःशेष निर्दाळिले । बोंब सांगावया नाहीं उरले । रामें केले निःक्षत्री ॥ २० ॥ अश्व गज रथ पदपदाती[16] । अतिरथी महारथी । जे जे आले युद्धाप्रती । त्यांची समूळ शांति भार्गवें[17] केली ॥ २१ ॥ प्रधान पाडिला राजभवनीं । पुत्र पडिले रणांगणीं । राजा क्षोभला ऐकोनी । युद्धालागोनि उठावला ॥ २२ ॥ सैन्य निमालें समस्त । उरले पार्षद[18] पांच शत । राजा एकाकी युद्धार्थ । बैसला त्वरित रथावरी ॥ २३ ॥ राजा मनीं करी विचार । म्यां गाई ब्राह्मणां लाविलें शस्त्र । तेणें मी जाहलों अपयशःपात्र । आतां करावें क्षात्र[19] क्षात्रधर्में ॥ २४ ॥ दावीन क्षात्रधर्म रणीं । परशुराम त्रासीन बाणीं । कटाक्षें भिडेन रणांगणीं । निजनिर्वाणीं युद्धार्थी ॥ २५ ॥ तो सूड मागेल पित्याचा । मी सूड घेईन पुत्रांचा । पाहों पराक्रम दोहींचा । गर्जोनि वाचा उठावला ॥ २६ ॥ परशुराम सतेज बोले । जेवोनियां घर घेतलें । तें तुवांचि दुष्टा साच केलें । निर्वैरा मारिलें जमदग्नी ॥ २७ ॥ जमदग्नीनें सांडिला कोप । त्यावरी त्वां केला प्रताप । वृथा करिसी बळाचा जल्प[20] । तूं अति अल्प लघुत्वें ॥ २८ ॥ स्त्रियांवरी तुझा पुरुषार्थ । माझी माता पडली मूर्च्छित । तो तूं सांपडलासी येथ । तुझा निःपात मी करीन ॥ २९ ॥ ऐसा ऐकतां वचनपुंज । कोपें चालिला सहस्रभुज । त्यावरी लोटला द्विभुज । धरावया गज केसरी जैसा ॥ ३० ॥ जमदग्नीचा अति क्रोध । होता परशुरामीं प्रसिद्ध । तो खवळला अति विरुद्ध । राजाचा कंठू छेदावया ॥ ३१ ॥

१ दचकले, भ्याले. २ घोड्यांची. ३ फेरा. ४ पुढें करिती. ५ ढाला. ६ शक्तिमान्. ७ रक्ताच्या ओंजळी. ८ मोठें. ९ मस्तक. १० ओरड करणाऱ्यांचें. ११ काळालाही मरील असा. १२ अर्धचंद्राकार बाणानें. १३ तोडलीं. १४ पृथ्वीवर. १५ पंक्ति. १६ पायदळ. १७ मारले. १८ सेवक. १९ क्षत्रियाचें कर्तव्यः– शौर्यं तेजो धृतिर्दाक्ष्यं युद्धे चाप्यपलायनम् । दानमीश्वरभावश्च क्षात्रं कर्म स्वभावजम् ॥ भ. गीता १८–४३. २० बडबड.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

कोपें धनुष्या वाहिला गुण । काढिले अति तीक्ष्ण बाण । सरसावला सहस्रार्जुन । युद्ध दारुण मांडिलें ॥ ३२ ॥ दोहींचे बाण तिखट । बळें पिच्छांचा झुंझाट । गगनीं बाणांचा खणखणाट । हंव्यवाट उठिला ॥ ३३ ॥ बाणें बाणातें निवारी । शस्त्रें शस्त्रातें संहारी । अस्त्रें अस्त्रातें स्वयें वारी । शस्त्रास्त्रीं प्रवीण ॥ ३४ ॥ सहस्र भुजांचा धनुर्वाडा । द्विभुजें लावियेला वेढा । बाणांचिया झडाडां । कांहीं कैवाडा स्मरेना ॥ ३५ ॥ त्याचि लाघवामाजि देख । रामें रथाचा छेदिला आंख । सारथि मारिला निःशेष । वारू अमोलिक पाडिले रणीं ॥ ३६ ॥ मागूनियां रथांची भरणी । तेही वीर छेदिले रामें बाणीं । साहाय्यकारी नाहीं कोणी । एकला रणीं उरे राव ॥ ३७ ॥ विरथी राजा उरे आपण । क्रोधें मांडिलें निर्वाण । अस्त्रें अनिवार योजून । त्यांचें निवारण नेणती कोणी ॥ ३८ ॥ दंडास्त्र आणि चंडास्त्र । सर्वेचि सोडिलें प्रचंडास्त्र । वेगें मोकली वितंडास्त्र । घोर घोरास्त्र अनिवार ॥ ३९ ॥ देखोनि शस्त्रांचा संभार । राम नेटका धनुर्धर । शस्त्रें शस्त्रांचा संहार । करी तो प्रकार अवधारा ॥ ४० ॥ दंडें दंडिलें दंडास्त्रा । खंडें खंडिलें खंडास्त्रा । चंडें छेदिलें प्रचंडास्त्रा । छेदिलें घोरास्त्र अघोरास्त्रें ॥ ४१ ॥ निर्वाणास्त्रें समस्त । रामें केलीं वाताहत । मग अनिवार अति अत्यंत । तें चामुंडास्त्र घेतलें रायें ॥ ४२ ॥ पूर्वी मर्दिलें चंडमुंडांसी । तें चामुंडास्त्र हातवसी । राम आव्हानी काळिकेसी । चामुंडा दासी तियेची ॥ ४३ ॥ चामुंडेसी म्हणे काळिका । माझें स्वरूप तें रेणुका । तिच्या पतीच्या घातका । तूं आवश्यक निर्दाळीं ॥ ४४ ॥ चामुंडा काळिकेची दासी । हें सत्य न मानेल ज्यांसी । तिहीं पहावें सप्तशतीसी । चंडमुंडांसी जेथें वधिलें ॥ ४५ ॥ काळिकेसी करोनियां नमन । घेवोनि तिचें आज्ञापन । चामुंडा परतली आपण । करावया निर्दळण रायाचें ॥ ४६ ॥ चामुंडा वळली उफराटी । सहस्रार्जुन देखे दृष्टीं । माझीं अस्त्रें लागती मजचिपाठीं । धाकें पोटीं गजबजिला ॥ ४७ ॥ चामुंडेचें निवारण । माझें मी नेणें आपण । अवश्य मज आलें मरण । धाकें संपूर्ण कांपत ॥ ४८ ॥ रामें त्याचि क्षणामाझारीं । परशु घेवोनियां करीं । सहस्र बाहूंचीं कांडोरीं । धरणीवरी पाडिलीं ॥ ४९ ॥ साधोनि निर्वाणींचा आंवो । मग मस्तकीं घातला घावो । तेणें घायें महाबाहो । पडिला पहा हो क्षितितळीं ॥ ५० ॥ शिर उडालें अंतराळीं । जीवें परशुरामासी ओंवाळी । मग उतरलें पायांजवळी । चरणांची धूळी वंदावया ॥ ५१ ॥ सद्भावें आदरिली स्तुती । मी गोब्राह्मणपरमघाती । त्या मज शस्त्रधारातीर्थी । पापनिष्कृती निजकरें केली ॥ ५२ ॥ छेदिला सहस्र भुजांचा भार । छेदिला माझा अहंकार । छेदिला वासनासंभार । जीवोद्धार तुवां केला ॥ ५३ ॥ छेदिलें माझें कर्माकर्म । छेदिले माझे धर्माधर्म । छेदोनि माझा मोहभ्रम । ब्रह्म परम मज केलें ॥ ५४ ॥ छेदिलें माझें नांवरूप । छेदिलें माझें पुण्यपाप । छेदूनियां संकल्पविकल्प । ब्रह्म निर्विकल्प मज केलें ॥ ५५ ॥ छेदिलें अहंसोहंपण । निःशेष छेदिलें मीपण । छेदोनि एकत्वाचें एकपण । ब्रह्म परिपूर्ण मज केलें ॥ ५६ ॥ ऐसें करितां स्तवन । प्रेमें पूर्ण जाले नयन । मस्तकीं वंदूनि चरण । सांडिला प्राण सहस्रार्जुनें ॥ ५७ ॥ मातेची आज्ञा अति सधर । पहिले छेदावे सहस्र कर । मग छेदावें त्याचें शिर । तोचि प्रकार रामें केला ॥ ५८ ॥ सहस्रार्जुन पडिला रणक्षेत्रीं । सवेंचि तीनें सप्तकें धरित्री । परशुरामें केली निःक्षत्री । आज्ञेवरी मातेच्या ॥ ५९ ॥ एका जनार्दना शरण । जालें रेणुकापुराण । आतां जानकीचें लग्न । सावधान अवधारा ॥ ६० ॥ सांगतां धनुष्यप्रकरण । प्रसंगें आलें रेणुकाआख्यान । कथेसी जालें विलक्षण । श्रोतीं संपूर्ण क्षमा कीजे ॥ ६१ ॥ रामें निःक्षत्री पृथ्वी करितां । मिथुळेसी आला अवचितां । ऋषिवृंदासी होय पुसता । येथें राज्यकर्ता कोण होय ॥ ६२ ॥ ऋषि सांगती परशुरामा । हा चक्रवर्ती धर्मात्मा । देही असोनि विदेहीधर्मा । अगाध महिमा पैं याचा ॥ ६३ ॥ ऐसें ब्राह्मण बोलिले उत्तर । तंव जनक

१ अग्नि. २ धनुर्धर. ३ युक्ति. ४ निकराचें युद्ध. ५ हातांत घेतलें. ६ डौल, अवसान. ७ आकाशांत. ८ आदरपूर्वक स्तुतीस आरंभ केला. ९ पापाचा परिहार. १० एकंदर वासना. ११ बळकट. १२ एकवीस वेळां. १३ सार्वभौम राजा. १४ विदेही स्थितीनें वर्तन करणारा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सामोरा आला सत्वर । आलिंगोनी परमादर । रामासहित ऋषीश्वर गृहा नेले ॥ ६४ ॥ जनक राजा ब्रह्माधिकारी । परशुराम त्यातें न मारी । एकात्मता प्रीतीकरीं[1] । त्याचे घरीं राहिला ॥ ६५ ॥ जनकें परशुरामासी । राहविलें भोजनासी । रामासवें अपार ऋषी । जनकें त्यांसी निमंत्रिलें ॥ ६६ ॥ रामें ठेवोनि धनुष्यबाण । स्वयें केलें संध्यास्नान । भीतरीं करावया भोजन । ऋषिपंक्ति पूर्ण बैसली ॥ ६७ ॥ ताटें वाढिलीं चोखंडीं[2] । अवघ्या रसां एकचि गोडी । जनकें अत्यंत आवडीं । केली परवडी[3] भृगुवर्या[4] ॥ ६८ ॥ ते देखतांचि परिपक्वान्न । देखणे देखती निजनयन । दृश्य द्रष्टा आणि दर्शन । समरसें लोचन सुखी जाले ॥ ६९ ॥ स्वानंदीं भोजना देतां मिठी । शब्दीं निःशब्दता श्रवणीं उठी । तेणें श्रवणाचिये पोटीं । सुखसंतुष्टी स्वानंदें ॥ ७० ॥ यापरी पक्वान्नांचा वास । सबाह्य समरसीं परेश । तो येतांचि सुवास । सुखउल्लास घ्राणासी[5] ॥ ७१ ॥ तें सदन्न स्पर्शतां । हाता आली अकर्मात्मता । क्षुधा तृषा नित्यतृप्तता । क्रिया चित्सत्ता स्वयें जाली ॥ ७२ ॥ तो सेवितांचि रसस्वाद । रसनेमाजी[6] निजानंद । उदरीं कोंदला परमानंद । सबाह्य स्वानंद रसौस्वादीं[7] ॥ ७३ ॥ ऐसें करितां भोजन । मनें मनचि उन्मन । समाधीसी समाधान । अन्नचि चैतन्य स्वयें जालें ॥ ७४ ॥ सकळ साधनेंसीं वरी लवण[8] । तंव तृप्ति जाली संपूर्ण । श्रीरामाचे पंक्तीस जें भोजन । अपूर्णपण असेना ॥ ७५ ॥ यापरी स्वयें तृप्त जालें । स्वयेंचि संसारा आंचवले[9] । तृप्तिसुखें सुखी जाले स्वस्थ राहिले स्वस्थानीं ॥ ७६ ॥ फळाशा फोडोनियां फोडी । वासनाशिरा काढोनि बुडीं । शांतिपरिपक्व पानाची विडी । स्वलीला तोंडीं घातली ॥ ७७ ॥ जाळूनि अहंकारकठिणपणा । सोहं गाळींव शुद्ध चुना । लागोनि शांतिपरिपक्व पाना । तांबूलस्वादना सुस्वादु ॥ ७८ ॥ सर्व साराचें निजसार । तेंचि सेविती खदिरसार[10] । श्रीरंगरंगाकार । अति पवित्र तांबूल ॥ ७९ ॥ अर्पिलें सुमन[11] चंदन । दीपावली नीराजन । यथोक्त करितां पूजन । सुखसंपन्न भार्गव ॥ ८० ॥ परशुरामाचा निजमेढा[12] । सीतेनें स्वयें करोनि घोडा । सीताचा[13] करोनि वोढा । बाणाचा गाढा जाणा केला ॥ ८१ ॥ त्या धनुष्यावरी बैसोनी । घोडा नाचवी राजांगणीं । स्वेच्छा क्रीडे राजभवनीं । राजबिदींतूनि[14] धांवडी ॥ ८२ ॥ ठेविले ठायीं धनुष्यबाण । राम न देखे आपण । मग रायावरी कोपायमान । काय वचन बोलिला ॥ ८३ ॥ माझ्या धनुष्याची चोरी करी । ऐसा बळिया कोण क्षत्री । तुवां लपविला आहे घरीं । तो झडकरीं मज दावीं ॥ ८४ ॥ पांच शत महावीरीं । धनुष्य नुचले तिळभरी । त्याची जेणें केली चोरी । तो झडकरीं मज दावीं ॥ ८५ ॥ ऐकोनि क्रूर रामवचन[15] । राजा जनक कंपायमान । आजि मज आलें पूर्ण विघ्न । राम क्षत्रघ्न[16] कोपला ॥ ८६ ॥ राजा त्या धनुष्याचा लाग । स्वयें गिवसूं[17] लागला चांग । राजांगणीं देखोनि रेघ । तोचि माग घेत आला ॥ ८७ ॥ तव धनुष्याचा करोनि घोडा । सीता खेळतां देखे पुढां । राजबिदीं घेतला दवडा[18] । बाळक्रीडा क्रीडत ॥ ८८ ॥ राजा म्हणे अगे कुवांरी[19] । हा त्वां अन्याय केला भारी । तें धनुष्य सांडीं क्षितीवरी । तें रायां करीं उचलेना ॥ ८९ ॥ मग राजा अति प्रीतीकरीं । सीतेतें पोटासीं धरी । म्हणे बैस या घोड्यावरी । ते हरिखें[20] वरी बैसली ॥ ९० ॥ करोनि धनुष्याचा घोडा । नाचवीत तडतडां । आली परशुरामापुढां । देखोनि गाढा तो विस्मित ॥ ९१ ॥ तो म्हणे ही आदिशक्ती । आणिकां धनुष्य नुचले हातीं । इसी आदिपुरुष होईल पती । आणिकासी प्राप्ति नव्हे इची ॥ ९२ ॥ राम रायासी पुसे विचार । इसी कोण नेमिला वर । तो म्हणे नाहीं केला निर्धार । इचें स्वयंवर करणें आहे ॥ ९३ ॥ परशुराम म्हणे रायासी । स्वयंवर करणें सीतेसीं । मी सांगेन त्या प्रकारासी । जो सर्वांसी दुर्घट ॥ ९४ ॥ हे आदिईश्वरीचा[21] अवतार । आदिपुरुष इसी वर । मी सांगेन जो पणप्रकार । तो सादर अवधारी ॥ ९५ ॥ स्वयंवरीं हाचि पण । जो या

१ प्रीतिपूर्वक. २ निर्मळ. ३ उपचार. ४ परशुरामाला. ५ नाकाला. ६ जिव्हेमध्यें. ७ रसाच्या चाखण्यानें. ८ मीठ. ९ विरक्त झाले. १० कात. ११ फूल. १२ स्वतःचें धनुष्य. १३ धनुर्गुणाचा. १४ राजमार्गांतून. १५ परशुरामाचें बोलणें. १६ क्षत्रियांना मारणारा. १७ शोधूं लागला. १८ धांव. १९ कुमारी. २० हर्षानें. २१ आदिशक्तीचा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

धनुष्यासी वांहील गुणं । त्यासीच द्यावी हे आपण । आज्ञा संपूर्ण भार्गवाची ॥ ९६ ॥ तेणें सीतेच्या स्वयंवरासी । धनुष्य ठेविलें जनकापासीं । जेणें धनुष्यें त्रिपुरासी । एके बाणेंसीं छेदिलें ॥ ९७ ॥ शिवें येणेंची धनुष्येंसीं । विध्वंसिलें दक्षयागासी । पळवूनी सुरनरऋषी । यज्ञभंगासी पैं केलें ॥ ९८ ॥ हेंचि शिवचाप घेवोनि करीं । एकवीस वेळां निःक्षत्री । परशुरामें केली धरित्री । तें हें स्वयंवरीं ठेविलें चाप ॥ ९९ ॥ हे धनुष्याची मूळवार्ता । अतिशयेंसी रसाळ कथा । शतानंद जाला सांगता । ऐकोनि समस्तां आश्चर्य ॥ १०० ॥ आतां जनकाच्या निजघरीं । स्वयंवरसभेची परी । जे महासभेमाझारी । रामप्रतापथोरी धनुर्भंगें ॥ १ ॥ त्या स्वयंवराचें निरूपण । रसाळ कथेचें गोडपण । एका जनार्दना शरण । श्रोते सज्ञान अवधान देत ॥ २ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे बालकांडे एकाकारटीकायां चापनिरूपणं नाम सप्तदशोऽध्यायः ॥ १७ ॥ ओंव्या ॥ १०२ ॥

अध्याय अठरावा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः । स्वयंवरसभेची स्थिती । स्वर्गीं देव विमानीं पहाती । शहाण्णव कुळींचे भूपती । दाटले क्षितीं सन्मानें ॥ १ ॥ आले तपस्वी ऋषीश्वर । आले यक्ष गंधर्व किन्नर । स्वयंवरा आले निशाचर । दैत्य महावीर तेही आले ॥ २ ॥ धैर्य वीर्य महाशौर्य । रूपगुणी गुणगांभीर्य । धर्माधर्म अति औदार्य । ऐसे नृपवर्य येते झाले ॥ ३ ॥ जे गोब्राह्मणां साह्यार्थी । ज्यांची यशकीर्ती महाख्याती । ज्यांचे पवाडे स्वर्गीं गाती । स्वयंवरार्थीं येते जाले ॥ ४ ॥ जे दान देती सर्वस्व । ज्यांची वैकुंठीं वर्णिती वाँढिव । ज्यांचें त्रैलोक्यीं प्रसिद्ध गौरव । तेही राजे येते जाले ॥ ५ ॥ ज्यांच्या शस्त्रांचा महामार । साहों न शकती सुरासुर । जे दानीं नित्य तत्पर । ते नृपवर येते जाले ॥ ६ ॥ दानें दळें बळें प्रबळ । शहाण्णव कुळींचे भूपाळ । येते जाले सकळ । सीतार्थीं केवळ स्वयंवरा ॥ ७ ॥ स्वयंवरीं धनुष्याचा पण । तें जनकें आणावें आपण । ज्यासी असेल आंगवण । तो त्यासीं गुण लावील ॥ ८ ॥ ऐसें ऐकोनि रायांचें वचन । जनकें बोलाविला प्रधान । धनुष्य आणावें आपण । आज्ञापन स्वयें केलें ॥ ९ ॥ तंव बोलिले महाऋषी । आधीं आणावें नोवरीसी । मग आणावें धनुष्यासी । वचन सर्वांसी मानलें ॥ १० ॥ सीता नाकळे कर्मबंधासी । नाहीं जन्मली गर्भवासीं । स्रष्टा सृजूं नें शके जीसी । रामप्रभावेंसी समप्रभाव ॥ ११ ॥ श्रीराम चैतन्याची कळा । चिच्छक्ति ते जनकबाळा । तिच्या स्वरूपाचा सोहळा । सभाग्य डोळां देखती ॥ १२ ॥ सालंकृत गजावरी । सीता बैसली नोवरी । तिच्या सौंदर्याची थोरी । चराचरीं अनुपम्य ॥ १३ ॥ शून्यत्वें वाँळिलें आकाश । तें शरण आलें सीतेस । राम वंदावया सावकाश । मस्तकीं केश तें जालें ॥ १४ ॥ शून्यत्व सांडोनि तत्काळ । जालें मस्तकीं केश कुरळ । तेंचि आकाश सुनीळ । जेथें चंद्रमंडळ मुखचंद्र ॥ १५ ॥ चंद्र पूर्णिमेसीच पूर्ण । मुखचंद्र सदा संपूर्ण । चंद्रा राहूचें पर्वी ग्रहण । येथें नित्य ग्रहण श्रीरामें ॥ १६ ॥ चंद्रबिंबास कळंक । मुखचंद्र नित्य निष्कलंक । देखतां सीतेचें श्रीमुख । होती निर्दुःख भावार्थी ॥ १७ ॥ चंद्रीं नक्षत्रें पुढेंमागें । तैसीं तानवडें मोतिलगें । कुंकुम सुरंग रामरंगें । तोचि निजांगें मळवट ॥ १८ ॥ श्रीराम देखलियावरी । घालूं विसरली ते भोंवरी । भंवऱ्या निजमायेच्या करीं । राजे भ्रमचक्रीं पाडिले तिणें ॥ १९ ॥ सीताभ्रमाचिया भंवरीं । रावण पडला भ्रमचक्रीं । जानकीभ्रमें स्वयंवरीं । आपदा थोरी भोगील ॥ २० ॥ भंवरीभ्रमाचा निजनाश । करावया श्रीरामचि कळस । त्याचेनि नांवें भ्रमाचा नाश । होय सावकाश श्रीरामें ॥ २१ ॥ रामनामें निरसे भ्रम । यालागीं भंवऱ्याचा संभ्रम । जानकीसी नाहीं परम । भंवरीचें नांव ते नेघे ॥ २२ ॥ जानकीचें निजनिढळ । रामचरणें सदा सफळ । तिचेंचि धन्य कपाळ । वानिती सकळ ऋषिवर्य ॥ २३ ॥

---

१ दोरी चढवील. २ त्रिपुर या नांवाच्या असुराला. ३ पृथ्वी, ४ आले, जमले. ५ राक्षस. ६ पराक्रम. ७ सामर्थ्य, बळ. ८ मोठेपणा. ९ सीतेकरतां. १० ब्रह्मदेव. ११ निर्माण करण्यास. १२ टाकिलें. १३ अलंकारविशेष. १४ कपाळ.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

चंद्रबिंबीं काळिमेचा[1] काट । तैसा कस्तूरीचा मळवट । मुखचंद्रीं सिरवे चोखट । त्यावरी बोट कुंकुमाचें ॥ २४ ॥ श्रीरामरंग अति सुरंग । तेणें रंगें रंगलें कुंकुम चांग । अहेवपण[2] अति अभंग । निढळींचें अंग शोभवी शोभा ॥ २५ ॥ चंद्र सदा क्षयरोगी । तेणें व्हावया नित्य निरोगी । जडला जानकीच्या अंगीं । जाला सवेग अर्धचंद्र ॥ २६ ॥ सेवावया श्रीरामअधरामृत । अर्धचंद्र होवोनि तेथ । चंद्रमा राहिलासे टपत । पाहे एकांत प्रकृतिपुरुषां ॥ २७ ॥ तया अर्धचंद्रावरती । भांगीं सेंदूराची आरक्ती । भावें भाळावया रघुपती । प्रेमाच्या प्रीतीं पूजिली माया ॥ २८ ॥ माया विकल्पें दे अविद्या । भाविकां हे शुद्ध सद्विद्या । जानकीची श्रीरामीं मेधा[3] । त्याच्या निजपदा विनटेल[4] ॥ २९ ॥ भांगींची नव्हे सेंदुरस्थिती । तेणें ओघें आली सरस्वती । भावें भेटावया रघुपती । विरक्तीच्या प्रीतीं अनुरक्त ॥ ३० ॥ तिच्या दोहीं तटीं हंसळिया[5] । श्रीरामध्यानें बैसलिया । म्हणोनि मुक्ताफळीं शोभलिया । बाह्या जालिया सीतेसी ॥ ३१ ॥ जेवीं नक्षत्रें नभोमंडळीं[6] । तेवीं मस्तकीं मोतियांची जाळी । श्रीरामानुसंधानें ओंविली[8] । मस्तका आली मुक्तत्वें ॥ ३२ ॥ त्यावरी भक्तिफरा झळकत । नवविधरत्नविराजित । स्वर्गस्थां वांकुल्या दावित । भजा रघुनाथ अक्षयार्थ ॥ ३३ ॥ श्रीराम लक्षितां दृष्टीं । सुटली भवयांची गांठी । सहज सांडोनियां व्यंकटी[7] । अवलोकोनि उठी स्वरूपता ॥ ३४ ॥ जगाची जे डोळसता । सदा शिणली दृश्य देखतां । सीतेच्या डोळ्यां शरणागता । आली रघुनाथा पहावया ॥ ३५ ॥ श्रीरामाचें पूर्णपण । देखतां डोळे सुखसंपन्न । यालागीं जगाचें देखणेपण । सीतेसी शरण स्वयें आलें ॥ ३६ ॥ जगाची देखणी अवस्था । तीही डोळां डोळसता । श्रीरामाची सुखस्वरूपता । पहावया तत्त्वतां अति सादर ॥ ३७ ॥ यापरी सीतेचे नयन । देखणेपणें सुलोचन । त्यावरी सूदलें अंजन । रामनिधान[9] साधावया ॥ ३८ ॥ साधूचें अवक्र आस्तिक्य । तैसें शोभे सरळ नासिक । नाकें निवटोनि नास्तिक्य । प्राणांसी सख्य श्रीरामें ॥ ३९ ॥ सदा सैरांट[10] विचरे प्राण । तेणें वसविलें जानकीचें घ्राण । होतां श्रीरामसन्निधान[11] । समाधान प्राणांसी ॥ ४० ॥ सेवावया श्रीरामअधरामृत । सीतेचे अधर अति आरक्त । त्याचिया आर्तीं अति आसक्त । लाजवीत प्रवाळा[12] ॥ ४१ ॥ उपमे प्रवाळें अति कठिण । अधर मृदु गगनाहून । तें सीतेचें अधरपान । रघुनंदन स्वयें जाणे ॥ ४२ ॥ सकळांच्या मुखींचे दांत । रसाविषयीं अति अदांत[13] । जानकीमुखींचे ते दांतें[14] । यालागीं रघुनाथ भाळला[15] मुखा ॥ ४३ ॥ अधरतळींची[16] चिबुका[17] । रामरंगें गोंदिली देखा । श्यामतेज वर्ण नेटका[18] । रघुकुळटिळका भाळवी ॥ ४४ ॥ मुक्त रिघोनि सुवर्णपाशीं । वनिताधरीं[19] आलें नाकासीं । जानकीनाकें मुक्तिसुखासी । श्रीरामासी देखिलिया ॥ ४५ ॥ लाजवोनि बारा सोळा । तेज सिरवे गंडस्थळा । देखतां ठकें पडे डोळां । लागली सकळां टकमक[20] ॥ ४६ ॥ देखोनि जानकीमुखचंद्र । लाजिन्नला रजनीकर[21] । लाजा होवोनियां अर्धशरीर । जाला अर्धचंद्र जानकीभाळीं ॥ ४७ ॥ चंद्रासी गति नित्य नक्षत्रें । मुखचंद्रा गति रामचंद्रें । चंद्र प्रतिपाळी चकोरें । येणें मुखचंद्रें जीव शिव ॥ ४८ ॥ चंद्रीं उदयास्त अहर्निशीं । मुखचंद्र उदयास्ततें ग्रासी । उद्यतप्रभा मुखचंद्रासी । जीवशिवांसी प्रकाश ॥ ४९ ॥ शुद्ध श्यामता श्रीरामा । तेचि सुनीळ नभोपमा । तेथें सिरवे मुखचंद्रमा । श्रीरामव्योमामाझारीं[22] ॥ ५० ॥ स्मरणाची गळसरी गोमटी । ऐक्यभावें पडिली गांठी । न तुटतां धरिली कंठीं । लोकदृष्टीं अलक्ष ॥ ५१ ॥ जे कंठीं रामनामठसा । तेथें चितांक रिघे कैसा । चितांकलेणें ते दुर्दशा । सीतेच्या मानसा शृंगार श्रीराम ॥ ५२ ॥ जीवशिवपद सांडोनि देख । श्रीरामपदींचा पदांक । तेंचि हृदयींचें पदक । केलें आवश्यक जानकीया ॥ ५३ ॥ हृदयपदकाचें महिमान । चिद्रत्नीं जडित पूर्ण । मुक्तमौक्तिकें

१ कलंकाचा. २ सौभाग्य. ३ बुद्धि. ४ आसक्त होईल. ५ अलंकारविशेष. ६ आकाशांत. ७ वक्रता. ८ घातलें. ९ रामरूपी ठेवा. १० स्वच्छंदपणानें. ११ श्रीरामाचा सहवास. १२ पोंवळ्याला. १३ अतृप्त. १४ तृप्त. १५ भुलला. १६ ओंठाच्या खालची. १७ हनुवटी. १८ सुरेख. १९ स्त्रीच्या (जानकीच्या) ओष्ठभागीं. २० तटस्थपणा. २१ चंद्र. २२ रामरूपी आकाशांत.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

ओंवून । गुणेंविण त्यालीसे ॥ ५४ ॥ त्रिगुण आणिले निर्गुणेंसीं । तेचि बाहुवटे सीतेसी । रामकीर्तिमुखें जडोन त्यांसी । उभयबाहूंसी भूषण ॥ ५५ ॥ ओंकारामाजिल्या श्रुती । कर्मकांडींच्या उपपत्ती । वेदार्थकंकणें सीतेच्या हातीं । रुणझुणती स्वानंदें ॥ ५६ ॥ दशांगुळीं दशमुद्रिका । चढत्या वाढत्या जडल्या टीका । दशावतारांच्या माणिका । जीवाच्या जीविका जडित केल्या ॥ ५७ ॥ पंचभूतें पंचांगुळिका । सीतेच्या मुष्टी होती एका । श्रीराम सीतेची धनरेखा । तिहीं लोकीं जगद्वंद्य ॥ ५८ ॥ गुणीं गोंविलें मुक्तफळां । न पवती मुक्तीचा जिव्हाळा । येवोनि पडती जानकीच्या गळां । श्रीराम स्वलीला सेवावया ॥ ५९ ॥ सुमनें विमनें जालीं फळा । राम जीवींचा जिव्हाळा । सेवावया सूत्रीं बांधोनि गळा । सीताकंठीं माळा सुमनें जालीं ॥ ६० ॥ सीता होती धरणीतळीं । त्या धरित्रीच्या स्नेहमेळीं । निजांगें सुनीळ कांचोळी । जनकबाळी लेइली ॥ ६१ ॥ भक्ति सकामत्वें अति गांजली । निष्काम राम सेवावया वहिली । सीतेचे अंगीं रिघाली । कांचोळी जाहली नवखंड ॥ ६२ ॥ भक्ति सर्वदा नवखंड । नवखंडें ते अखंड । सीता सांडवूनि नवविध बंड । केली अखंड श्रीरामभजनें ॥ ६३ ॥ पृथ्वी नवखंडें नांदली । तेही जडजाड्यत्वा उबगली । भक्ति नवखंडें अखंडली । सीतेची जाली कांचोळी ॥ ६४ ॥ येणेंचि स्वार्थें धरित्रीं । सीता धरिली होती उदरीं । हे निघालिया बाहेरी । धरा उद्धरी श्रीरामसंगें ॥ ६५ ॥ भक्तिभावाचें बिरडें । कांचोळिये घातलें फुंडें । श्रीराम फेडील सांकडें । आणिका नवखंडीं नुगवे हें ॥ ६६ ॥ आंगींचे अंगीं भिन्नअभिन्नीं । जीव शिव वाढले हृदयस्थानीं । तेणेंचि कुचभारें कामिनी । व्यंजनस्तनी शोभत ॥ ६७ ॥ विद्या अविद्या पाखें दोनी पाहीं । दोनी आच्छादी दोहीं ठायीं । एक देहीं एक विदेही । गुणागुणान्वयीं बांधल्या कसण्या ॥ ६८ ॥ त्रिगुणांचे गोंडे नागर । पाठीवरी रुळती सुंदर । श्रीराम व्हावया तत्पर । शोभती मनोहर जानकीसीं ॥ ६९ ॥ त्रिगुणांची ग्रंथी दारुण । छेदील श्रीराम आपण । आणिकांचें

१ ताबडतोब. २ कंटाळली. ३ सत्य. ४ बांधावयाच्या दोऱ्या. ५ प्रकाश. ६ संन्यासी. ७ पदरावर. ८ पेटी.

न चले जाणपण । ते गिळिती गुण गर्वाभिमानें ॥ ७० ॥ भक्तिवैराग्यनित्यदीप्त । रामअनुरागें अनुरक्त । तेचि सेंदुरी साडी आरक्त । हर्षयुक्त नेसली ॥ ७१ ॥ शोधित सत्वाचा सात्विक । क्षीरसागरींचा क्षीरोदक । वैरणा शोभे अति चोख । तेजें आलोकें लोपत ॥ ७२ ॥ परिधानेंसीं समसूत्र । तेंचि जानकीचें कटिसूत्र । तेणेंचि महत्त्व अपार । शोभे सुंदर कटिसूत्रें ॥ ७३ ॥ किंकिणीजालमाळा । कटिसूत्रीं सिद्धी सकळा । क्षुद्रघंटिका ऋषि प्रबळा । कटिमेखळा शोभत ॥ ७४ ॥ पृष्ठभागीं रुळे वेणी । माजी अनर्घ्य श्याम मणी । मूद मिरवताहे चिद्रत्नीं । शोभे कामिनी सौभाग्यें ॥ ७५ ॥ तिच्या वैराग्यपल्लवासीं । मुक्तमोतियें झळकती कैसीं । तें देखून भाळले संन्यासी । अहर्निशीं अनुलक्ष ॥ ७६ ॥ यालागीं सीतास्वयंवरीं । अपार मिनले मस्करी । भुलले तिच्या पालवावरी । अहोरात्रीं अनुलक्ष ॥ ७७ ॥ सामवेदीचा नाद गंभीर । तेंवी अंदुवांचा गजर । नादें भुलले राजकुमर । वरणीं तत्पर भूपाळ ॥ ७८ ॥ देव म्हणती हे सीता । व्हावी आमुची देवकांता । दैत्यदानवांच्या चित्ता । आमच्या हाता हे यावी ॥ ७९ ॥ यक्ष राक्षस गंधर्वगण । नर किन्नर सिद्ध चारण । सीतास्वयंवरीं कोण पण । अवघे जण पुसती ॥ ८० ॥ विश्वामित्र म्हणे रायासी । आतां आणावें धनुष्यासी । रायें प्रेरिलें प्रधानासी । तो परिवारेंसीं निघाला ॥ ८१ ॥ धनुष्या मांदुस अष्टचक्र । पांचशतें महावीर । ओढितां न ओढे अणुमात्र । मागें गजभार लोटिती ॥ ८२ ॥ जे जे मार्गीं भेटती त्यांसी । ते ते लाविती ओढावयासी । एवं अत्यंत प्रयासीं । धनुष्य सभेसी आणिलें ॥ ८३ ॥ बाहेरी काढितांची चाप । दैत्य दानव सकंप । राजीं सांडिला प्रताप । वाढिवेचा दर्प सांडिला सकळीं ॥ ८४ ॥ जनक सांगे सकळांसी । हरें येणेंचि त्र्यंबकेंसीं । बाणें भेदिलें त्रिपुरासी । आणि दक्षयागासी विध्वंसिलें ॥ ८५ ॥ येणेंचि धनुष्येंकरीं । एकवीस वेळां धरित्री । परशुरामें केली निःक्षेत्री । तें हें स्वयंवरीं आणिलें पणा ॥ ८६ ॥ या धनुष्यातें

९ कीर्तीचा, मोठेपणाचा. १० धनुष्याच्या मुळें. ११ क्षत्रियरहित.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

उचलोन । जो पुरुषार्थें वाहील गुण । त्यासी सीतेचें पाणिग्रहण । घडेल जाण त्रिशुद्धी[1] ॥ ८७ ॥ ऐकोनियां रायाचें वचन । तटस्थ ठेले सकल जन । त्यामाजी पुरुषपंचानन[2] । वहावया गुण उठिले ॥ ८८ ॥ ज्यांची वाढीव अति प्रबळ । जे रणांगणीं रणकल्लोळ । राजे उठिले सबळ । नांवें सकळ अवधारा ॥ ८९ ॥ शिखिध्वज कुशध्वज । ताम्रध्वज गजध्वज । राम आलासे गरुडध्वज । भूभुजां[3] लाज लावावया ॥ ९० ॥ सुरथ भरत विदूरथ । विचित्ररथ चैत्ररथ । गुप्त आलासे रघुनाथ । सीताकांत व्हावया ॥ ९१ ॥ वीरसेन वीरघ्न । भारसेन भद्रघ्न । तेथें आलासे रघुनंदन । सीतावरण करावया ॥ ९२ ॥ जयपाळ अजयपाळ । वीरपाळ विजयपाळ । राम आलासे प्रणतपाळ[4] । धनुर्बळ भंगावया ॥ ९३ ॥ चित्रकेतु विचित्रकेतु । श्वेतकेतु धूम्रकेतु । राम आलासे भक्तकेतु । गर्वघातु रावणाचा ॥ ९४ ॥ केशी कारुष कलिंग । मद्र माथुर अंग वंग । राम आलासे श्रीरंग । धनुर्भंग करावया ॥ ९५ ॥ राजे धरोनि आंगवण[5] । धनुष्या वाहूं पाहती गुण । तंव तेथें आला रावण । मूळेंवीण[6] अति गर्वी ॥ ९६ ॥ देखोनी रावणाचा यावा[7] । कंप सुटला रायां सर्वां । धाक देवां दैत्यां दानवां । हा लग्नीं मानवां अरिष्ट ॥ ९७ ॥ लोक जाले हाहाभूत । जनक झाला साशंकित । राम बैसला सावचित । रावणांतक कृतकारी ॥ ९८ ॥ गर्वें बोले रावण । मज करितां सीताहरण । येथें निवारूं शके कोण । परी पुसूं पण स्वयंवराचा ॥ ९९ ॥ रावण पुसे जनकासी । कोण पण या स्वयंवरासी । येरु म्हणे जो गुण वाहील धनुष्यासी । सीता त्यासी वरील ॥ १०० ॥ धनुष्य वाहणें गोष्टी थोडी । महारण करूं तांतडीं । अंगा न येतां परवडी[8] । जानकी रोकडी पर्णीन[9] ॥ १ ॥ ऐसी बोलोनि वचनप्रौढी । मग रावण उठिला लवडसवडी । सभांगणीं घातली उडी । धनुष्य तांतडीं धरूं गेला ॥ २ ॥ तंव तळीं राहिला माथा । तळवट वरी आला हाता । गर्वें न कळे लंकानाथा । पाहे सभोंवता सभेसी ॥ ३ ॥ म्हणे म्यां वाहिला गुण । सीता आणा हातीं धरून । सभेसी रावणें जिंकिला पण । वळंगोनि आपण गर्जत ॥ ४ ॥ तें देखोनियां सीता । थोर गजबजली चित्ता । म्हणे अगा हे उमाकांता । तुझें चाप सर्वथा न उचलो यासी ॥ ५ ॥ माते धरित्री ये वेळीं । रावणा नेट नेदीं पायांतळीं । त्यासी तीं न्यावें रसातळीं । धनुष्याच्या मुळीं घालीं भार ॥ ६ ॥ आपुला धराभार समस्त । घालावया धनुष्याआंत । रावणाचा चेंके[10] हात । तैसा कार्यार्थ साधावा ॥ ७ ॥ रावणातें पूर्ण छळीं । ते वेगीं पावो कंकाळी । आमची कुलदेवता भद्रकाळी । धनुष्य समूळीं धरून राखो ॥ ८ ॥ इंद्रियाधिष्ठात्री देवता । मज साह्य होवोत समस्ता । धनुष्य नुचलो लंकानाथा । ऐसी अशक्तता यासी यावी ॥ ९ ॥ रावणाच्या शरीरींचे प्राण । मज साह्य व्हावे संपूर्ण । यासी न चढे चापगुण । तैसा क्षीण करावा ॥ ११० ॥ आपलें चाप विसरोन । केउता गेला त्रिनयन । रावणाचें काळें वदन । करावें संपूर्ण श्रीशंकरें ॥ ११ ॥ सीता निजशक्ति आदिमाता । तिचा स्तुतिवाद ऐकतां । साह्य जाल्या इंद्रियदेवता । रावणा क्षीणता आणिली प्राणें ॥ १२ ॥ ऐशा औट कोटी[11] भूतावळी[12] । घेवोनि आली भद्रकाळी । महादेव जटा मोकळी । धनुष्याजवळी तो आला ॥ १३ ॥ म्हणे माझ्या स्वामीची कांता । केंवि जाय रावणाच्या हाता । क्रूर काळाग्नीच्या सत्ता । धनुष्याआंतौता प्रवेशला ॥ १४ ॥ रावणाचेनि अदृष्टें[13] । धनुष्य जालें उफराटें । माथां बैसले तळवटे । तळ तो गर्विष्टें धरिला हातीं ॥ १५ ॥ जेथें गर्व आणि अभिमान । तेथें अवश्य वसे अपमान । तेणें गर्वेंचि रावण । धनुष्या गुण वाहूं गेला ॥ १६ ॥ तंव तें पूर्वींच पालथें । बळें करूं जातां उलथें । भोंवंडितां न भोंवे विसां हातें । रावणा-भोंवतें भोंविन्नलें ॥ १७ ॥ धरितां न धरवे महाभारी । लोटितां न लोटवे विसांही करीं । येऊनि आदळे उरावरी । पालथा शिरीं पडियेला ॥ १८ ॥ रावण

१ खरोखर. २ पुरुषश्रेष्ठ. ३ राजांना. ४ शरणागतांचा प्रतिपाळ करणारा. ५ आवेश, बळ. ६ आमंत्रणावांचून. ७ येणें. ८ दुर्दशा. ९ तांतडीनें, घाईनें.

१० मोह पावेल, चुकेल. ११ साडेतीन कोटी. १२ भूतसमुदाय. १३ प्रारब्धकर्मानें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

आदळतां भूतळीं। न्याहा[1] उठिला पाताळीं। दाही मुखीं भरली धुळी। रावण तळमळत पडियेला ॥ १९ ॥ सभारंगण तोचि पाटा। धनुष्य तोचि वरवंटा[2]। ऐसा रावण लाटा[3]। सभेचे चोहटां लाटिला ॥ १२० ॥ रावण पडतां अधोगती[4]। धुळी उधळली सभेप्रती। रायांच्या तोंडीं पडली माती। जानकीच्या चित्तीं आल्हाद ॥ २१ ॥ दहाही घरघरती गळे। वीसही वटारिले डोळे। मुखींहूनि लाळ गळे। गात्रें विकळें पडलीं पैं ॥ २२ ॥ प्रधान धांविन्नला कैवांडें[5]। धनुष्य काढूं जातां कडे। रावणाचीं रगडती हाडें। अति चरफडे आक्रंदे ॥ २३ ॥ तुम्ही साह्य नव्हां सांगाती। प्रधान नव्हेती माझे घाती। रागें क्षोभला प्रधानांप्रती। क्षीणशक्ती जल्पत ॥ २४ ॥ जनकासी म्हणे रावण। धनुष्यें माझा गेलिया प्राण। इंद्रजित आणि कुंभकर्ण। कुळनिर्दळण करिती तुझें ॥ २५ ॥ मी रावण अति कृतांत[6]। धनुष्यें केलें गर्वहत। जनका आतां तुझें उचित। तें त्वां निश्चित करावें ॥ २६ ॥ जनकासी भूतदया भारी। घायीं सांपडलिया वैरी। त्यासीही व्हावें परोपकारी। तोचि संसारीं परमार्थिक ॥ २७ ॥ महावीर सहपरिवारीं। जनक धांविन्नला त्वरेंकरीं[7]। चाप काढिलें वरचेवरी। रावणातें करी सावध ॥ २८ ॥ उदकें शिंपिलें मुखकमळा। तेव्हां तो उठोनि बैसविला। आणोनियां शुद्धजळा। केला गुळणा[8] रावणें ॥ २९ ॥ करोनियां शुद्धाचमन। मग केलें उदकप्राशन। होवोनियां सावधान। बैसला आपण निजासनीं ॥ ३० ॥ मज जाला अपमान। आतां धनुष्य वाहील कोण। तें पहावया विंदान[9]। क्रोधें रावण बैसला ॥ ३१ ॥ धनुष्या गुण न चढवितां। जनक कोणासी देईल सीता। तरी मी त्याच्या करीन घाता। क्रोधें क्षुद्रता पाहूं ठेला ॥ ३२ ॥ देखोनि रावणाची दुर्दशा। मग राजींही सकळीं सांडिला धिंवसा। सांडिली जानकीची आशा। चांपवळसा अनिवार ॥ ३३ ॥ सर्वथा चापा न चढे गुण। चढवूं जातां जाईल प्राण। मग जानकी भोगील कोण। जाल्या अपमान सभेसी ॥ ३४ ॥ एवं नरवीर राजे समस्त। धनुष्यार्थीं जाले विरक्त। आतां उठोनि श्रीरघुनाथ। चापाचा अंत पुरवील ॥ ३५ ॥ एका जनार्दना शरण। चापें अपमानिला रावण। त्यासी श्रीराम वाहील गुण। [12]शेखीं घेईल प्राण चापाचा ॥ ३६ ॥ रामकथा अति रसाळ। श्रवणांच्या मुखा येतसे लाळ। सुखाची जिव्हा करी लळलळ। जीवें मुखकमळ पसरिलें अर्था ॥ ३७ ॥ रामकथाक्षर पावावया। नेत्रीं सांडिल्या व्यंकट भंवया। तें कथाक्षर आलिंगावया। स्फुरती बाह्या अष्टांगें ॥ ३८ ॥ रसैना[13] चाखतां कथारस। इतर रस होती विरस। ऐसी श्रीरामकथा सुरस। श्रोतीं अवकाश मज द्यावा ॥ ३९ ॥ रामकथेचा प्रताप। वर्णावया मी अति अल्प। श्रीजनार्दनकृपादीप। कथा सुखरूप स्वयें दावी ॥ १४० ॥ एका जनार्दना शरण। अति रमणीय रामायण। सज्जनीं द्यावें अनुसंधान। चापभंजन श्रीरामें ॥ १४१ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे बालकांडे एकाकारटीकायां चापकथानिरूपणं नाम अष्टादशोऽध्यायः ॥ १८ ॥ ओंव्या ॥ १४१ ॥

अध्याय एकोणिसावा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः। सीतेसी सांगती सखीजन। टळलें रावणाचें विघ्न। तूं भाग्याची सभाग्य पूर्ण। आवडे तो आपण नृप लक्षीं ॥ १ ॥ दळें बळें अति संपत्ती। धैर्य वीर्य यश कीर्ती। सखिया दाविती भूपती। सीता ते नृपती मानीना ॥ २ ॥ श्यामसुंदर निजमूर्ती। पति तो एक रघुपती। सीतेनें निश्चय केला चित्तीं। वरकड निश्चितीं मानीना ॥ ३ ॥ सभेसी बैसला रावण। धनुष्या न चढवेचि गुण। राम करूं न शके वरण। जनकें पण कठिण केला ॥ ४ ॥

कमठपृष्ठकठोरमिदं धनुर्मदनमूर्तिरसौ रघुनंदनः।
कथमधिज्यमनेन विधीयतामहह तात पणस्तव दारुणः॥ १॥

जो धनुष्यीं वाहील गुण। त्याचें म्यां करावें पाणिग्रहण। हा जो जनकें केला पण। अति दारुण निष्ठुर ॥ ५ ॥ धनुष्य कमठपृष्ठीं[14]सम कठोर[15]। राम अत्यंत सुकुमार। त्यासी कैंवी होय

१ पडशब्द. २ दांडगा. ३ चव्हाट्यावर. ४ खालीं. ५ कैवारानें. ६ काळ. ७ त्वरेनें. ८ चूळ. ९ कौशल्य.

१० धैर्य. ११ धनुष्याचा झपाटा. १२ शेवटीं. १३ जिव्हा. १४ कांसवाच्या पाठीसारखें. १५ कठिण.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

स्वयंवर । चिंता थोर सीतेसी ॥ ६ ॥ रावण अपमानल्यापाठीं । नृपनरवीरां धाक पोटीं । धनुष्य वहावया कोणी उठी । सभेची दृष्टी टकमक ॥ ७ ॥ तटस्थ देखोनी सभामंडळ । जनक बोलिला भूपाळ । शिवचापधारी नाहीं प्रबळ । क्षितिमंडळ निर्वीर ॥ ८ ॥ ऐकोनि रायाचें वचन । उठावला रघुनंदन । करावया धनुर्भंजन । पुसे आज्ञापन गुरूसी ॥ ९ ॥ निर्वीर पृथ्वीतळ । हें वाक्य न साहे रामभूपाळ । गुर्वाज्ञा जाल्या सबळ । धनुष्य तत्काळ सज्जीन ॥ १० ॥ ऐकतां आल्हाद विश्वामित्रा । वेगीं चाप चढवीं रामचंद्रा । निंचावीं सुरां वीरां नृपवरां । धनुर्धरां सकळांसी ॥ ११ ॥ गुर्वाज्ञा होतां रोकडी । रामचंद्रें घातली उडी । लक्ष्मणें अति तांतडी । कांस गाढी घातली ॥ १२ ॥ चाप एक आम्ही दोघे जण । राजे हांसतील संपूर्ण । सीताही हांसेल आपण । वीरलक्षण हें नव्हे ॥ १३ ॥ राम म्हणे सौमित्रा राहें सावधान । जेणें चापें गांजिला रावण । त्या चापा निमेषार्धें वाहीन गुण । राजारावणादेखतां ॥ १४ ॥ ऐकतां श्रीरामाचें वाक्य । वचकले रावणादिक । पाहतां दिसताहे बाळक । अलोलिक निजधैर्य ॥ १५ ॥ हर[3]चाप देखतां दृष्टीं । सर्वांगीं कांटा उठी । तें सज्जावया जगजेठी । धैर्याचा पोटीं निर्धारु ॥ १६ ॥ एक म्हणती ऋषीश्वर वेडे । आपुले प्रतिष्ठेचे चाँडें । लोकांचीं बाळें लळिवाडें । चापापुढें घालिती ॥ १७ । एक म्हणती श्यामसुंदर । शोभा अत्यंत मनोहर । सांडून चापारोपणप्रकार । सीता सुंदर यासी द्यावी ॥ १८ ॥ बोलती नरनारी समस्ता । यासी अवश्य द्यावी सीता । धनुष्य वाहावयाची कथा । कोणीं सर्वथा न करावी ॥ १९ ॥ श्रीरामसीतेचा जोडा । देवें मेळविला चोखँडा[6] । जनक आहे केवळ वेडा । धनुष्याचा तडाँ गोंवितो ॥ २० ॥ सीता कृतनिश्चयेंसी । स्वयें रातली श्रीरामासी । जनकमन गुंतलें रामापासीं । राम जनकासी आवडला ॥२१॥ बापलेकींचें मनोगत । श्रीरामापासीं एक होत । त्याच्या स्वरूपाचा इत्यर्थ । दोघें लक्षित एकत्वें ॥ २२ ॥ त्या श्रीरामाची निजस्थिती । चिन्मात्रैकचैतन्यमूर्ती । अव्यक्त आलासे व्यक्ती । भक्तभावार्थी साकार ॥ २३ ॥ जैंवी कंपिलेचें शुध्द क्षीर । आळोनि करिती दध्यांकार । तेंचि मथूनि साचार । काढिती सार नवनीत ॥ २४ ॥ तें ठेवितां नवनीत । होऊं पाहे विकारवंत । तें अग्नीनें करूनि संतत । साधिती घृत परिकर ॥ २५ ॥ तें थिजोनि अविकारता । स्वयें भासे साकारता । कणिकारूपें अनेकता । दिसे स्वभावता घृत घृतीं ॥ २६ ॥ तेंवी वैराग्यविवेकचतुर । नित्यानित्य निजविचार । करूनि साधिती शुतुसार । चिदचिन्मात्रस्वरूप ॥ २७ ॥ तेंचि स्वरूप स्वभावेंसी । आलें साकार दशेसी । सद्गुण मूर्ति भासे कैसी । चिद्विलासी श्रीराम ॥ २८ ॥ श्रीराम कौसल्येच्या उदरीं । कीं तो सबाह्य अंतरीं । राम परमात्मा चराचरीं । तो दशरथाघरीं अवतार ॥ २९ ॥ राम अवतारींचा अवतारी । तो स्वयें आला स्वयंवरीं । सीता निजशक्ति नोवरीं । पर्णावया कलरीं उल्लास ॥ ३० ॥ नोवरीची इच्छा स्वभावता । सुंदर वर यावा हाता । ते श्रीरामाची सगुणता । निर्धारी सीता सांगोपांग ॥ ३१ ॥ श्रीरामाचें पूर्णपण । सीताच जाणे संपूर्ण । यालागीं त्याचें सगुणपण । पाहे आपण सर्वांवयवीं ॥ ३२ ॥ श्रीरामाची श्रीमूर्ती । वर्णितां मौनावल्या श्रुती । वेद म्हणती नेति नेती । राम शब्दार्थीं अर्थवेना ॥ ३३ ॥ चाटू[11] मधुर रस वाढी । तो चाटू खातां न लाभे गोडी । तेवीं सांडून शब्दांचिया वोढी । पहावी रोकडी श्रीरामशोभा ॥ ३४ ॥ शब्दीं बोलतां राम परेश । बोलत्याचे बोल पडती ओस । मोटे बांधितां आकाश । ये हातास चौपालेंवी[12] ॥ ३५ ॥ आकाशाची बांधितां मोट । कर्त्यांचे व्यर्थ जाती कष्ट । करितां शब्दाची खटपट । श्रीराम स्पष्ट न बोलवे ॥ ३६ ॥ राम सद्गुण तोचि निर्गुण । राम परमात्मा परिपूर्ण । राम चिन्मात्रैकचैतन्यघन । जगज्जीवन श्रीराम ॥ ३७ ॥ त्या श्रीरामाचें सद्गुणपण । बोलावयासि मी अति दीन । वाचावाचक[13] श्रीजनार्दन । आपुलें आपण स्वरूप वदवी ॥ ३८ ॥ राम सर्वांगें निजनिर्मळ । ते

---

१ कमीपणा आणावा. २ चकित झाले. ३ शिवधनुष्य. ४ प्रतिष्ठेकरतां. ५ धनुष्यावर दोरी चढविण्याचा प्रकार. ६ उत्तम. ७ पण. ८ रतली, रममाण झाली. ९ काळ्या गाईचें. १० दहीं. ११ पळी. १२ चौपदरी. १३ वाचा वदविणारा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

निर्मळीं बिंबलें नभ[1] सुनीळ । यालागीं श्यामता सोज्ज्वळ । भासे निर्मळ निजभक्ता ॥ ३९ ॥ राम श्यामता मेघश्याम । त्या श्यामता गर्जे अहंब्रह्म । यालागीं राम मेघश्याम । बोलती निगम[2] श्रुतिशास्त्रें ॥ ४० ॥ राम निर्मळत्वें परम । हें सुरवरां न कळे वर्म । अंगीं बिंबलें देखोनियां व्योम । राम मेघश्याम म्हणताती ॥ ४१ ॥ यापरी स्वयें श्रीराम । शोभा शोभे मेघश्याम । त्याचे पदींचा पराक्रम । त्रिविक्रम आक्रमे ॥ ४२ ॥ शेषासी सुखें उदंडें[3] । चरण वर्णावया धरिलीं बंडें । त्याचिया जिव्हा जालिया दुखंडें । शेषाचेनि तोंडें न वर्णवे ॥ ४३ ॥ तेथें माझी युक्ति केउती[4] । [5]सैरों शके कैसा रीतीं । बाळभावें बोबडी स्थिती । संतोषती सुखें साधु ॥ ४४ ॥ ध्वज वज्रांकुश रेखा । दोहीं पायीं पद्म देखा । पाहतां पायींच्या सामुद्रिका । महापातक्यां उद्धार ॥ ४५ ॥ चहूं मुक्ती लावोनि लाज । चरणीं शोभे भक्तीचा ध्वज । वज्रें निर्दाळी[6] कर्मबीज । स्मरणाचा सहज नित्यांकुश ॥ ४६ ॥ शोधितां सत्त्वाचेनि आक्रमें । दोहीं पायीं झळकती पद्में । तळवे आरक्त संध्यारागप्रेमें । त्या शोभा कुंकुमें लाजिजे ॥ ४७ ॥ जडजाड्या निस्तरावया त्रिगुण । वेगीं ठाकले श्रीरामचरण । घोटी जाली जी त्रिकोण । चरणीं संपूर्ण जडोनी ॥ ४८ ॥ कळावया कळँसल्या[7] चित्कळा । सरळ शोभती सोज्ज्वळा । भक्तांची ते जीवनकळा । निजजिव्हाळा साधकां ॥ ४९ ॥ तोडरू ना प्रळयगंघाळ । गजरें कांपे कळिकाळ । वांकी अंदुवांचा खळाळ । सुखकल्लोळ अहं सोहं ॥ ५० ॥ कंदनें कर्दर्थलें काळचक्र । तें जालें रामाचें जानुचक्र । चरणीं पावोनि सुखसार । सुरासुर स्वयें वंदिती ॥ ५१ ॥ रामाचीं जानुचक्रें देखतां । काळचक्र वंदी भक्तां । चरणसामर्थ्य रघुनाथा । वेदशास्त्रां अलक्ष ॥ ५२ ॥ लागतां रामचरणकमळा । सवेग उद्धरली अहल्या शिळा । चरणप्रसाद जिहीं घेतला । ते कळिकाळा नागविती ॥ ५३ ॥ ऊरू[9] मृदुत्वें सरळ शोभा । तेणें लाजविलें कर्दळीस्तंभा[10] । केळीच्या पोटीं वक्र गर्भा । अवक्रशोभा श्रीरामांकीं ॥ ५४ ॥ श्रीरामाचें गुह्य स्थान । पावावया सीताच संपन्न । वेद तेथें लज्जायमान । शास्त्रें संपूर्ण कचकचती ॥ ५५ ॥ त्यजोनि वासनावासासी । जे निर्लज्ज लोकलाजेसी । ते पावती रामगुह्यासी । अहर्निशीं सुखरूप ॥ ५६ ॥ श्रीरामासी एकपत्नीव्रत । भक्त पतिपत्नी स्वयें होत । त्यासीच गुह्याचें गुह्य प्राप्त । भक्तभावार्थ अलोलिक ॥ ५७ ॥ क्षणक्षणां उदयास्त विजेसी । ते लागली रामकांसेसी । गिळोनियां निजवस्तूसी । अहर्निशीं तेजस्वी ॥ ५८ ॥ यालागीं तडतडीत पीतांबर । कांसे रविरश्मिचंद्र । रामसौंदर्या निजसौंदर्य । मनोहर सर्वांगीं ॥ ५९ ॥ ज्यामाजी राम सांपडे सगळा । ते लेइला भक्तिभाव मेखळा । त्यासी किंकिणीजाळमाळा । शोभती सकळा सद्विद्या ॥ ६० ॥ पावोनि श्रीरामाचें मुख । क्षुद्रघंटिका अधोमुख । मुक्तलग अलोलिक । शोभे निर्दोष कटिमेखळा ॥ ६१ ॥ अति सूक्ष्म मध्यमान[11] । होता पंचानना अभिमान । तेही राममध्य देखोन । गेले पळोन वनवासा ॥ ६२ ॥ पहावया श्रीराममध्यासी । शाहाडे जडले मेखळेसी । शेखीं भुलले श्रीरामासी । गमनागमनासी विसरले ॥ ६३ ॥ नाभीं निमग्न निजनाभीं । पूर्वीं ब्रह्मा शिणला पद्मगर्भीं । तो देवोनि स्थापिला नाभी[12] । उदरारंभीं वर्तुळ ॥ ६४ ॥ ज्ञेय ज्ञाता ज्ञान नव्हाळी । हेचि उदरोदरीं त्रिवळी । सत्कर्में रेखिल्या रोमावळी । हृदयकमळीं शोभती ॥ ६५ ॥ श्रीरामहृदयींचा अवकाश । घनानंदें निरवकाश । संत जडले सावकाश । त्यांसी नाश नाहीं कल्पांतीं ॥ ६६ ॥ समाधीचें सोलींव सुख । तेंचि रामहृदयींचें पदक । संत माणकुली अनेक । जडले देख सत्कोंदणें ॥ ६७ ॥ अनन्यभावाच्या सत्प्रीतीं । रुळे तेथें वैजयंती । सुमनमनाच्या रघुपती । माळा शोभती सहिततुळसी ॥ ६८ ॥ मुक्तसद्भाव मुक्ताफळी । पूर्णानुसंधानें ओंविली । श्रीरामकंठीं शोभली । एकावळी मुक्तांची ॥ ६९ ॥ श्रीरामाचा कंबुकंठें[13] । तेंचि वेदांचें मूळपीठ । स्वरवर्णांची वाहती वाट । तेथोनि प्रकट परमार्थ ॥ ७० ॥ मुख्य मुळीं तो अवाहु । त्यासी शोभती

१ आकाश. २ वेद. ३ पुष्कळ. ४ किती. ५ कशी समर्थ होईल ? ६ नाहींसें करी. ७ चातुर्यसंपन्न झाल्या. ८ कष्टदशा पावलें. ९ मांड्या. १० केळीच्या खांबाला. ११ कमरेचें प्रमाण. १२ भिऊं नको असें अभयदान. १३ शंखाकार गळा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

आजानुबाहु । बाहूंचा पराक्रम बहु । दैत्यांचा ठाऊ निर्दाळी ॥ ७१ ॥ वामहस्तींचें निजचाप । निःशेष निर्दळी पुण्यपाप । निवटी संकल्प विकल्प । कंदर्पाचा[1] दर्प समूळ छेदी ॥ ७२ ॥ बाण लखलखीत दक्षिण करीं । घायें समान भक्तवैरी । अहंममता जीवें मारी । द्वैताची उरी उरों नेदी ॥ ७३ ॥ चैतन्यतेजें अति तेजिष्ठ । अहं सोहं निःशेष आटे । तेचि श्रीरामाचे बाहुवटे । कीर्तिमुखें चोखट उपनिषदें ॥ ७४ ॥ वीर्य धैर्य जाणें । तींचि श्रीरामाचीं निजकंकणें । करीं बाणलीं पूर्णपणें । लेणियां लेणें श्रीराम ॥ ७५ ॥ राममुद्रा बाणल्या हातीं । तो वंद्य होय त्रिजगतीं । कळिकाळ पायां लागती । चारी मुक्ती आंदण्या ॥ ७६ ॥ ऐशा दशांगुळीं दशमुद्रा । करी प्रतिपाळ दशावतारां । करीं धरील सीता सुंदरा । लंकानाथा नोकोनी[2] ॥ ७७ ॥ आजानुबाहु पंचानन । राम त्र्यंबकभंजन[3] । सभेसि रावणा गांजून । पाणिग्रहण सीतेचें ॥ ७८ ॥ श्रवणीं कुंडलें मकराकार । हा लौकिक बाह्यविचार । तेचि आकारीं निराकार । श्रवणें विकार निर्दाळी ॥ ७९ ॥ गाळींव आनंदाची मूस देख । कीं सोलींव सुखाचें हें सुख । तेंचि श्रीरामाचें श्रीमुख । जें करी निर्दोष देखत्यांसी ॥ ८० ॥ नवल शोभा ते श्रवणांसी[4] । नित्य मिळणी निजात्मयासी । श्रवणें देखणें निर्दोषी । अंशाअंशीं समरस ॥ ८१ ॥ श्रीरामाचा मुखमृगांक[5] । पूर्णत्वें नित्य निष्कळंक । तो देखोनियां शशांक[6] । लाजे अधोमुख स्वयें जाला ॥ ८२ ॥ पक्षा वाढे पक्षा मोडे । हें चंद्रासी दुःख गाढें । येवोनि चरणांगुष्ठीं जडे । जग पायां पडे नखचंद्रीं ॥ ८३ ॥ जडतां श्रीरामांगुष्ठीं । चंद्रासी जाली पुष्टितुष्टी । रामचरणीं सुखाच्या कोटी । देखतां दृष्टीं आल्हाद ॥ ८४ ॥ देखतां श्रीरामाचें श्रीमुख । समूळ निर्दळे जन्मदुःख । परमानंदें कोंदे सुख । हरिखें हरिख ओसंडे ॥ ८५ ॥ अकार उकार मकार स्थिती । ओंकारीं कर्मनिष्कर्म श्रुती । तैशा मुखीं दो भागीं दंतपंक्ती । चतुर्वेदोक्ती चौकीचे चारी ॥ ८६ ॥ जगाचे अधर ते अधर । राममुखींचे अधर सधर । परमामृतासी निजमाहेर । निजजिव्हार सीतेचें ॥ ८७ ॥ श्रीरामाची हनुवटी । देखतां सुख ओसंडे सृष्टी । धन्य देखत्याची दृष्टी । ते जाणे हनुवटी हनुमंत ॥ ८८ ॥ जगीं सौंदर्या शोभनिक । तेंचि श्रीरामाचें निजनासिक । ते नासिकीं निर्नासिक । करील आवश्यक शूर्पणखा ॥ ८९ ॥ श्रीरामाचेनि प्राणें जाण । जगाचे विंचरती[9] प्राण । तेथें वसतां समाधान । निजजीवन वायूसी ॥ ९० ॥ चैतन्याचें विश्रांतिस्थान । तेंचि श्रीरामाचें श्रीनयन । सबाह्य डोळस संपूर्ण । आपणा आपण देखणें ॥ ९१ ॥ देखतां श्रीरामाची दृष्टी । ब्रह्मानंदें जीव उठी । दृश्य द्रष्टा न दिसे त्रिपुटी । हेलांवे[10] सृष्टी स्वानंदें ॥ ९२ ॥ श्रीरामाची भ्रुकुटी । रची ब्रह्मांडांच्या कोटी । भ्रूविक्षेप कळिकाळ घोटी । छेदी गांठी चहूं देहांची ॥ ९३ ॥ श्रवणातें देखणे नयन । याचें नांव डोळसपण । पदार्थीं परमार्थदर्शन । तें समाधान नयनांसी ॥ ९४ ॥ श्रेष्ठ श्रीरामाचें निढळ । तेणेंचि अधिष्ठान सबळ[8] । सच्चिदानंदरेखा सरळ । शोभे कपाळ त्रिवळिया[11] ॥ ९५ ॥ गाळूनि अहंकठिणपण । सोहं काढिलें शुद्ध चंदन । तेंचि केलें रामार्पण । गंधार्चन श्रीरामा ॥ ९६ ॥ श्रद्धाकेशराचा मेळा । टिळक रेखिला पिंवळा । सप्रेमें रंगे सुरंगकळा । अक्षता निढळां शोभत ॥ ९७ ॥ श्रीराम सकळां मुकुटमणी । राम शिरोरत्न राजस्थानीं । त्याचे माथ्याचा मुकुटमणी । ऐसा कोणी दिसेना ॥ ९८ ॥ राममुकुटीं निजशोभा । राम शिरोरत्ननिजगाभा । त्या श्रीरामाची मुकुटप्रभा । वचनारंभा दुर्लभ ॥ ९९ ॥ श्रीरामाच्या शिरावरतें । कांहीं उरलें असतें रितें । तरी मुकुट वर्णावया तेथें । अवकाश वाचेतें सुखें असता ॥ १०० ॥ श्रीरामावरतें कांहीं । सर्वथा रितें उरलें नाहीं । मा मुकुट वानावा कोणे ठायीं । वाचेनें कायी बोलावें ॥ १ ॥ श्रीरामाचा निजप्रताप । नित्यत्वें निर्विकल्प । तोचि शिरीं मुकुट सद्रूप । चित्स्वरूप शोभत ॥ २ ॥ यालागीं रामाचे माथां । लेणियाचें लेणें सर्वथा । श्रीमुकुटत्वें श्रीरघुनाथा । अंगें निजांगता शोभवी ॥ ३ ॥ जेंवी सोनियाचें सोनेंचि कोंदणें ।

१ मदनाचा. २ पराभवून. ३ शंकराच्या धनुष्याचा भंग करणारा. ४ कानाला. ५ मुखचंद्र. ६ चंद्र.

७ मोठें. ८ बळकट. ९ वागतात. १० झोके खाते. ११ कपाळ.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

तेंवी श्रीरामा श्रीरामचि लेणें । हें स्वयें सीताचि लक्षूं जाणे । इतराचें जाणणें दिवा खद्योतें ॥ ४ ॥ सीतेचें सद्रूपपण । स्वयें श्रीराम जाणे आपण । श्रीरामाचें पूर्णपण । जाणे संपूर्ण स्वयें सीता ॥ ५ ॥ येरयेरांची ऊणखूण । दोघें जाणती संपूर्ण । एका जनार्दना शरण । चापनिर्दळण अवधारा ॥ १०६ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे बालकांडे एकाकारटीकायां श्रीरामस्वरूपवर्णनं नाम एकोनविंशतितमोऽध्यायः ॥ १९ ॥ ॥ ओंव्या ॥ १०६ ॥ श्लोक ॥ १ ॥

अध्याय विसावा

॥ श्रीरामचंद्रगुरवे नमः ॥ श्रीरामाचें पूर्णपण । रूपरेखागुणलावण्य । देखोनि सीतेचें वेधलें मन । सर्वथा आन नावडे ॥ १ ॥ सांडोनियां चंद्रामृत । चकोर अन्य न सेवित । तेंवी सांडूनि रघुनाथ । सीतेचें चित्त आन न मानी ॥ २ ॥ जनकें देखोनियां रघुनाथ । चित्तीं आल्हाद अत्यंत । जानकी द्यावी निश्चितार्थें । सारांकित धनुष्यार्थीं ॥ ३ ॥ सभास्थितांचे नयन । रामरूपीं अति निमग्न । रावणासी पडलें मोहन । तटस्थ जन श्रीरामें ॥ ४ ॥ श्रीराम देखोनि ऋषिपंक्ती । अवघे आश्चर्य मानिती । सीता द्यावी रघुपतिप्रती । मानलें चित्तीं सर्वांसी ॥ ५ ॥ पुढील कार्य अति कठिण । कैंवी धनुष्यासी वाहील गुण । कळवळती सकळ जन । चाप बंधन लग्नासी ॥ ६ ॥ सत्य सीतेचा भावार्थ । राम अंतर्यामीं समर्थ । करावया सकळांचें मनोगत । चापभंगार्थ चालिला ॥ ७ ॥ मागें ठेवोनि लक्ष्मण । राम चालिला सत्राण । देखोनि दचकला रावण । हा धनुष्या गुण वाहील ॥ ८ ॥ हा तंव दिसताहे बालक । याचा पराक्रम अलोकिक । घायें मारीचास लाविली शीकं । मारिला निःशेष सुबाहू ॥ ९ ॥ म्लान देखोनि दशवँक्त्रा । उल्लास थोर विश्वामित्रा । वेगु करीं रामचंद्रा । धनुर्धरां लाजवीं ॥ १० ॥ तेणें हरिखला रघुनंदन । विश्वामित्रा केलें नमन । द्विजांचें घेवोनि आशीर्वचन । दिधला सन्मान सभेसी ॥ ११ ॥ जनक अतिशयें सज्जन । रामें त्यासी केलें नमन । बाहूंसी आलें स्फुरण । चापग्रहण करावया ॥ १२ ॥ हेळसोनि सभा समस्त । मी एक सामर्थ्यें समर्थ । रावणाऐसा अति गर्वार्थ । श्रीरघुनाथ न करीतसे ॥ १३ ॥ देवोनि सकळांसी सन्मान । वृद्धवृद्धां करोनि नमन । अति विनीत रघुनंदन । चापग्रहण करूं आला ॥ १४ ॥ धनुर्ष्यी अत्यंत जडपण । तेंही सांगेन मी निरूपण । श्रोतीं द्यावें अवधान । पूर्वलक्षणपर्यावो ॥ १५ ॥ चाप सदाशिवाचे हातीं । त्यासी जडत्वा शिवशक्ती । चापें चापजडत्वप्राप्ती । जे बोलती ते महापापी ॥ १६ ॥ चाप अति दुष्ट निर्दळी । तें पाप न ये चापाजवळी । शिव रामनामें पाप जाळी । मग निर्दळी दुष्टांतें ॥ १७ ॥ चापें बहुत केलें तप व्रत । म्हणोनि पावलें शिवाचा हात । शिवहस्तें अति पुनीतें । यालागीं रघुनाथ हातीं धरी ॥ १८ ॥ शिवाचें शिवचाप अपूर्व । तें कैंवी उचलूं शकती जीव । तेथें अधिष्ठानें वसे शिव । चापीं जडभाव शिवशक्तीं ॥ १९ ॥ शास्त्रमर्यादा ते ऐसी । जो जड तोचि पापराशी । तें जडत्व नाहीं चापासी । धन्यत्व त्यासी शिवशक्तीं ॥ २० ॥ धनुष्य उचलितां रावण । चापीं प्रवेशे त्रिनयन । तेणें तो अपमानिला पूर्ण । चापीं जडपण शिवशक्तीं ॥ २१ ॥ कोदंडाचा निजभावार्थ । शिवहस्तें मी अति पुनीत । श्रीरामहस्तें परममुक्त । होईन निश्चित स्वयंवरीं ॥ २२ ॥ राम सदाशिवातें ध्याय । शिव वंदी श्रीरामपाय । तेणें चापाचें जडत्व जाय । पुष्पप्राय तें जालें ॥ २३ ॥ असो हे धनुष्याची कथा । स्वयंवरीं वरावी सीता । हेंचि कार्य रघुनाथा । तत्कार्यार्थी चाप पाहे ॥ २४ ॥ रामें अवलोकितां चाप । चाप जालें निष्पाप । हरला जडजाड्यसंताप । स्वयें सुखरूप उचललें ॥ २५ ॥ श्रीराम पाहे जयाकडे । त्याचें आकल्प जडत्व उडे । तेथें काय धनुष्य बापुडें । जडत्व पुढें उरावया ॥ २६ ॥ श्रीराम म्हणतां वाचे । जड संसार तरती साचे । दर्शन जालिया त्या रामाचें । जडत्व कैंचें धनुष्यासी ॥ २७ ॥ धनुष्याचेंही मनोगत । लागल्या श्रीरामाचे हस्त । मी होईन

---

१ दिवसाला. २ काजवा. ३ इतर गोष्ट. ४ आडकाठी. ५ वेगेंकरून. ६ शिक्षा. ७ रावणाला. ८ नम्र. ९ पवित्र. १० धनुष्याचा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

कृतकृतार्थ । कर्मनिर्मुक्त[1] श्रीराम ॥ २८ ॥ चापासी उपजे अनुताप[2] । ऐसा श्रीरामप्रताप । अनुतापें जडत्व गेलें पाप । रामें सद्रूप पाहिलें ॥ २९ ॥ यापरी श्रीरघुनाथें । अवलोकोनि धनुष्यातें । आकळिलें वामहस्तें[3] । सज्ज त्वरितें करावया ॥ ३० ॥

विश्वामित्रस्तु धर्मात्मा श्रुत्वा जनकभाषितम् ।
अभ्यभाषत काकुत्स्थं प्रहृष्टेनांतरात्मना ॥ १ ॥

धनुष्य श्रीरामें धरितां हातीं । थोर आशंका जनकाचे चित्तीं । तो येवोनि मुनीप्रती । अति काकुळती बोलत ॥ ३१ ॥ राजा म्हणे महाऋषी । राम सौकुमार्याची राशी । जेणें घोळविलें रावणासी । तें चाप यासी केंवी सज्जे ॥ ३२ ॥ ऐकतां रायाचें शंकावचन । विश्वामित्र निःशंक पूर्ण । काय बोलिला गर्जोन । सभेचे जन ऐकतां ॥ ३३ ॥ ऐकें बापा रघुनंदना । पुरुषांमाजीं पंचानना[4] । धनुष्य चढवीं आंगवणा । सावधाना निजवृत्तीं ॥ ३४ ॥ तूं तंव पुरुषार्थी[5] रघुनाथ । धनुष्य वाहावें निमेषार्धांत । जनकजानकींचा मनोरथ । कृतकार्यार्थ करावा ॥३५॥ ऐकोनि सद्गुरूचें वचन । धनुष्य पाहे रघुनंदन । वामहस्तें आकळून । चढवावया गुण सज्ज जाला ॥ ३६ ॥ राम म्हणे ऋषीप्रती । तुझिया वचनें कृपाप्राप्ती । धनुष्य वाहणें कार्य किती । वृथा कुंथती नरवर्य ॥ ३७ ॥ हें शंकराचें दिव्य चाप । गुण वाहणें कार्य अल्प । आतां पहा माझा प्रताप । करीन आरोपण शरांकर्षणेंसीं[6] ॥ ३८ ॥

बाढमित्यब्रवीद्राजा मुनिश्च समभाषत ।
लीलया स धनुर्मध्ये जग्राह वचनान्मुनेः ॥ २ ॥
पश्यतां नृसहस्राणां बहूनां रघुनंदनः ।
आरोपयत्स धर्मात्मा सलीलमिव तद्धनुः ॥ ३ ॥

ऐसें बोलतां रामचंद्र । हर्षें उल्लासे विश्वामित्र । म्हणे धन्य धन्य तुझें वक्त्र[7] । तूं प्रतापसमुद्र रविवंशीं ॥ ३९ ॥ तुझिया वचनासाठीं । मज दिधलिया अयुतकोटी । म्हणोनियां पाठी थापटी । धनुष्य मुष्टीं आकर्षी ॥४०॥ जनक म्हणे रघुनाथा । मजही ऐसा भ्रम होता । हरधनुष्य[8] आकळिता[9] । वीर सर्वथा असेना ॥ ४१ ॥ तो त्वां वाढिवेंचीं[10] माथा । उजळ केला सभेदेखतां । किती वानूं पैं पुरुषार्था । धन्य रघुनाथा वाढिव ॥ ४२ ॥ बोलिलासी प्रतापगरिमा । ते सत्य करावी श्रीरामा । संपादीं शीघ्र चापकर्मा । पुरुषोत्तमा रघुवीरा ॥४३॥ गुरु श्वशुर उभयवचन । ऐकोनियां रघुनंदन । धनुर्ष्यी वाहावया गुणं[11] । चाप संपूर्ण आकळिलें ॥ ४४ ॥ अति अतुर्बळी[12] रघुनाथ । न लावितां दुसरा हात । एकेंचि हातें वाहिलें शीतें[11] । जाले विस्मित सुरासुर ॥ ४५ ॥ चाप टणत्कारितां करतळीं । नादें रावणा दांतखिळी । राजे मूर्च्छित भूतळीं । बैसलीं टाळीं दिग्गजांचीं ॥ ४६ ॥ धनुष्य ओढितां न पुरे ओढी । तें मुष्टिमाजी तडाडी । ओढितां पूर्ण कानाडी । अति कडाडीं भंगलें ॥ ४७ ॥ नादाचेनि घन घर्घरारीं । बैसलीं वीरांचीं दांतेरीं । कीरकरोनि वाजिकुंजरीं[13] । उभीं शरीरें उलंडलीं ॥४८॥ धनुर्भंगाचे कडकडाटीं । नादें दुमदुमिली सृष्टी । तडा पडूं पाहे मेरुपृष्ठीं । निमेटे[14] दृष्टी काळाची ॥ ४९ ॥ कोटिविजू तुटोनि पडे । चाप कडाडी तेणें पाडें[15] । सुर नर किन्नर जाले वेडे । वायु उडे तेणें नादें ॥५०॥ नादाचिये अत्यंत प्रौढीं । पृथ्वी गेली चिरढोविरढी । नभीं नक्षत्रां पातझाडी । पडिलीं बुडीं डळमळिती ॥ ५१ ॥ उद्भट नादाची गति कैसी । पक्षी विसरले पळावयासी । भ्रमें भ्रमती ते आकाशीं । गति सर्वांची खुंटली ॥ ५२ ॥ काळें प्राण्यांचा घ्यावा प्राण । काळ पळाला नादभेणें[16] । आतां येथें मारिता कोण । काळा आकर्षण श्रीरामें ॥५३॥ चापखंड पडतां बुडीं । शेष अत्यंत तडफडी । वराहाची दाढी तडाडी । कूर्मे गाढी पृष्ठी केली ॥ ५४ ॥ ऐसीं दडपलीं सप्त पाताळें । उचंबळलीं समुद्रजळें । शेषशयन पैं आंदोळे । मेरु कुळाचळें पैं कांपती ॥५५॥ दिवि[17] कंप भूमिकंप । सत्यलोकीं चळकांप । रामें भंगिलें शिवचाप । अति प्रताप तिहीं लोकीं ॥५६॥ जनक आणि विश्वामित्र । राम आणि सुमित्र । यांचेचि सावधान नेत्र । येर सर्वत्र मूर्छित ॥५७॥ या चौघांही वेगळी । सावधान पाहे

१ कर्मापासून मुक्त. २ पश्चात्ताप. ३ डाव्या हातानें. ४ सिंहा, श्रेष्ठा. ५ पराक्रमी. ६ बाण ओढून. ७ तोंड. ८ शिवधनुष्य. ९ उचलणारा. १० कीर्तीचा. ११ दोरी. १२ महाबलवान्. १३ घोडे व हत्तींनीं. १४ बंद होई. १५ त्यासारखें. १६ त्या नादाच्या भयामुळें. १७ स्वर्गांत.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

जनकबाळी । देखोनि रामप्रताप बळी । उतावीळी वरावया ॥ ५८ ॥ शिवचापाचें मनोगत । रामहस्तें मी परम मुक्त । कडकडाट नव्हे व्यर्थ । चाप गर्जत स्वानंदें ॥५९॥ आनंदनाद अति उद्भट[1] । नादें दुमदुमिलें वैकुंठ । तेणें कोंदलें कैलासपीठ । नादें नीळकंठ[2] डुल्लत ॥ ६० ॥ चापनिर्मुक्त आनंदगहिंवर । तेणें उलथला क्षीरसागर । शेषशायींना[3] आनंद फार । स्वर्गी जयजयकार देवांचा ॥ ६१ ॥ रामप्रतापआनंदद्वारा । अकार उकार मकारा । आनंद कोंदला अर्धमात्रा । राया रघुवीरप्रतापें ॥ ६२ ॥ लागतां श्रीरामाचा हस्त । शिवचाप झालें परम मुक्त । तोही मुक्तीचा अर्थ । श्रीरघुनाथप्रतापें ॥ ६३ ॥ लागतां श्रीरामाचे चरण । सद्यः[4] मुक्त होती पाषाण । त्याचेनि हस्तें चापग्रहण । मुक्ति संपूर्ण श्रीरामें ॥ ६४ ॥ करितां रामनामस्मरण । जडासी मुक्ति वरी आपण । त्याचेनि हस्तें चापग्रहण । मुक्ति संपूर्ण श्रीरामें ॥ ६५ ॥ शिवचापा परम मुक्ती । जनकसंशया विनिर्मुक्ती । जानकीलोचना नित्यतृप्ती । ते श्रीराममूर्ति स्वयंवरीं ॥ ६६ ॥ रावणगर्वाची निर्मुक्ती । आशापाशनिःशेषनिवृत्ती । राजाभिमाना नित्यमुक्ती । ते राममूर्ति स्वयंवरीं ॥ ६७ ॥ वेदानुवादा वचनानुमुक्ती । शास्त्रानुवादा युक्तिप्रयुक्ती । जानकीलोचन दृश्यनिर्मुक्ती । ते श्रीराममूर्ति स्वयंवरीं ॥ ६८ ॥ जनसमुदाया संदेहनिर्मुक्ति । सुरसमुदाया बंधमुक्ति । भक्तसंतापनिजात्ममुक्ति । ते श्रीराममूर्ति स्वयंवरीं ॥ ६९ ॥ श्रीरामप्रतापाचा सोहळा । देखावया भाग्य कैंचें सकळां । अंध पडिलें त्यांच्या डोळां । जनकबाळा सुख भोगी ॥ ७० ॥ श्रीरामसुखाचा सोहळा । देखोनि जानकी निवाली डोळां । त्याचे कंठीं घालावया माळा । उताविळी भावार्थें ॥७१॥ चापभंगाचे नाद कोटी । शनैः शनैः शमले नभाचे पोटीं । चेतनोपलब्ध जाली सृष्टी । उघडली दृष्टी जनांची ॥ ७२ ॥ जन जाले सावधान । सभा बैसली स्वस्वस्थान । देखोनियां धनु भग्न । विस्मित मन सर्वांचें ॥७३॥ गेला जनकाचा संदेहो । राम अनुर्बळी महाबाहो । जाला सर्वांथीं निःसंदेहो । जाणोनि राव बोलत ॥७४॥ जनक अत्यंत उल्लासेंसीं । हरिखें बोले विश्वामित्रासी । राम दाशरथि सूर्यवंशीं । पूर्वी बहुतां ऋषीं सांगितलें मज ॥ ७५ ॥ निजतेजें अत्यद्भुत । अचिंत्यानंत अति समर्थ । दृष्टीं देखिलें इत्थंभूत । प्रतापवंत श्रीराम ॥ ७६ ॥ जेणें शिवाचें कोदंड । अवँलीळा केलें दुखंड । श्रीरामप्रताप प्रचंड । काळें तोंड रावणाचें ॥ ७७ ॥ पूर्ण न भरतां कानाडी । हरचाप भंगलें कडाडीं । त्याच्या प्रतापाची प्रौढी । कोणें केवढी वानावी ॥ ७८ ॥ जनककुळींची कुळात्मजा । होईल श्रीरामाची भांजा । तेणें वंश सार्थक माझा । हा धर्म तुझा ऋषिवर्या ॥७९॥ विश्वामित्रा तूं धर्मात्मा । तुझेनि धर्में भेटी श्रीरामा । तुझेनि निष्कृति सर्वां कर्मां । राम परमात्मा मज सुहृद ॥ ८० ॥ तझें रूढें नाम विश्वामित्रें[11] । परी तूं माझा परम मित्र । राम परमात्मा परम पवित्र । सुहृद स्वतंत्र तुझेनि ॥८१॥ माझा पूर्वकृत संकल्प । सीता अमूल्य प्रतापचाप । तो त्वां केला निर्विकल्प । सत्यसंकल्प श्रीराम ॥ ८२ ॥ स्वयंवरींचा पण कठीण । राजे भंगले सहरावण । त्यासी श्रीरामें वाहिला गुण । सीतावरणप्रतापीं ॥ ८३ ॥ सीतेसी श्रीराम भ्रतार[12] । कार्यकरिता विश्वामित्र । भलें जाणसी ब्रह्मसूत्र । अति पवित्र ऋषिवर्या ॥ ८४ ॥ विश्वामित्राचे चरणीं माथा । ठेवोनि जनक होय बोलता । प्राणापरीस पढियंती[13] सीता । ते म्यां रघुनाथा अर्पिली ॥ ८५ ॥ आजि माझा याग सफळ । आजि माझें पावन कुळ । आजि सीतेचें भाग्य अनुकूळ । सुखकल्लोळ[14] श्रीरामें ॥ ८६ ॥ माझी कन्या अगुण सगुण । सीता केली रामार्पण । विश्वामित्रा तूं सज्ञान । वेगीं लग्न लावावें ॥ ८७ ॥ ऐसी जनकाची विनवणी । विश्वामित्रें ऐकोनी । बरवें म्हणोनि प्रतिवचनीं । उल्हासोनी बोलिला ॥ ८८ ॥ ऐकोनि ऋषिरायाची गोष्टी । सीतागज प्रेरिला घडघडाटीं । माळा घालावया श्रीरामकंठीं । आली गोरटी उल्लासें ॥ ८९ ॥ जें सीतेचे मनीं होतें । तेंचि केलें रघुनाथें । वेगीं वरावया त्यातें । आनंदें अद्भुतें पैं आली ॥९०॥ घेवोनि चिद्रत्नांची माळा । आनंदें आली जनकबाळा । देखतां सकळिकां भूपाळां । घाली गळां

१ मोठा. २ शंकर. ३ विष्णूला. ४ सत्काळ. ५ संतोषली. ६ सावध झाली. ७ सहज. ८ वर्णावी. ९ स्त्री. १० अखिल.

११ विश्वाचा अमित्र-शत्रु. १२ पति. १३ प्रिय, आवडती. १४ सुखाच्या लाटा, अत्यंत सुख.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

श्रीरामाच्या ॥ ९१ ॥ होतां डोळियां डोळेभेटी। लाज विराली उफराटी। आनंदें बोसंडली सृष्टी। सुटल्या गांठी चहूं देहां ॥ ९२ ॥ सवेंचि पाहे सावधान। डोळियां डोळे जाले वरण। प्राणें प्राणा परिणयनें[२]। लागलें लग्न जीवीं शिवा ॥ ९३ ॥ चापें वीराभिमाना अस्तु। मध्यान्हीं तपे आदित्यु[३]। सीता वरावया रघुनाथु। आला अभिजितु सुमुहूर्तीं ॥ ९४ ॥ लग्नघटिका पाहे भास्वत[४]। वाचा राहिल्या निजमौनांत। स्वबोध सावधान सांगत। काळ सावचित दोहीं भागीं ॥ ९५ ॥ धनुर्भंगाच्या गजरांत। अंतःपट निर्मुक्त। भावार्थ ॐपुण्या सांगत। वेगीं रघुनाथ वरावया ॥ ९६ ॥ ऐसा समय साधूनि उचित। सांडोनि उभयपक्षार्थ। करोनि अभिमानाचा अंत। सीता रघुनाथ वरियेला ॥ ९७ ॥ येरयेरां पाहतां अति प्रीतीं। सुटल्या चिदचिन्महाग्रंथी। निजऐक्याच्या बहुल्याप्रती। दोघें बैसती एकात्मता ॥ ९८ ॥ वोहरें[६] पाहतां परस्परां। नोवरीमाजी दिसे नोवरा। नोवरियाआंगीं दिसे सुंदरा। वरिलें वरा या स्थितीं ॥ ९९ ॥ सीता श्रीरामीं घालितां माळा। तेचि क्षणीं त्याचि काळा। रावणा वरिलें अवकैंळा। निढळीं टिळा काळिमेचा ॥ १०० ॥ अवकळा बैसतां पाठीं। रावण अपमानिला सृष्टीं। रामप्रताप देखतां दृष्टीं। रावणाच्या पोटीं धुकधुक ॥ १ ॥ विजयी जाला रामचंद्र। हरिखें नाचे विश्वामित्र। घेवोनि ऋषींचा संभार। तृप्तितत्पर स्वानंदें ॥ २ ॥ एक रोडके एक बोडके। एक ते केवळ सुडके। अवघे नाचती हरिखें। सीता रघुटिळकें पर्णिली ॥ ३ ॥ आनंदें नाचती आघवे। झेलिती गोपीचंदनाचे रवे। धोत्रें झोलिती घडिपालवे। सीता राघवें पर्णियेली ॥ ४ ॥ एक ओंवाळिती अंगवस्त्रें। एक ओंवाळिती जुनीं धोत्रें। एक ओंवाळिती दर्भपवित्रें। सीता रामचंद्रें जिंकिली ॥ ५ ॥ एक ओंवाळिती कौपीन। एक ओंवाळिती कुंशासन। एक ओंवाळिती कृष्णाजिन[११]। रघुनंदन निजविजयी ॥ ६ ॥ मंत्रीं गर्जती ऋषीश्वर। स्वर्गीं सुरवरीं जयजयकार। सुमनांचे[१२] वर्षती संभार। रामचंद्र निजविजयी ॥ ७ ॥ सुखाचिया अति तांतडीं। देव उठिवले लवडसवडी। उभविती हरिखाची पैं गुढी। राम बांधवडी[१३] सोडवील ॥ ८ ॥ जनकाच्या महाद्वारीं। त्राहाटिल्या निशाणभेरी। गगन गर्जे मंगळतुरीं[१४]। जयजयकारीं निजगजरें ॥ ९ ॥ विश्वामित्रें उल्लासता। रथीं वाहोनियां रामसीता। भेटावया दशरथा। होय निघता सवेग ॥ ११० ॥ सीता जिंकिली आपण। उल्लासें नाचे लक्ष्मण। अश्ववाग्दोर[१५] धरोनि पूर्ण। रथारोहण तेणें केलें ॥ ११ ॥ विश्वामित्राचे अधीन। श्रीरामसीतेचें गमन। देखोनि जनक झाला लीन। घाली लोटांगण ऋषिराया ॥ १२ ॥ विश्वामित्रा तूं गुरुत्वें पूर्ण। स्वयंवरीं केलें सीतावरण। आतां करावें पाणिग्रहण। विधियुक्त लग्न ऋषिवर्या ॥ १३ ॥ जनक म्हणे विश्वामित्रा। उभयपक्षीं तूं सोयरा। जाणोनि शास्त्रविचारा। येथें वधूवरां राहवावें ॥ १४ ॥ जनकाची निजकांता। सुमेधा सती पतिव्रता। तीही पाहूं धांवे रघुनाथा। वामांगीं सीता बैसवोनी ॥ १५ ॥ आणावें दशरथ भूपाळा। करावा संभ्रमें[१६] सोहळा। सुख द्यावें दोहीं कुळां। ऋषिनिर्मळा कृपाळुवा ॥ १६ ॥ ऐकोनि जनकाची विनंती। कौशिक सुखावला चित्तीं। राहविला सीतापती। ऋषिपंक्तिसमवेत ॥ १७ ॥ धनुर्भंगें सीतावरण। समूळ जालें निरूपण। आतां रामसीतापाणिग्रहण। लग्नविधान अवधारा ॥ १८ ॥ एका जनार्दना शरण। प्रकृतिपुरुषां पाणिग्रहण। पुढें रसाळ निरूपण। श्रोते सज्ञान परिसोत ॥ ११९ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे बालकांडे एकाकारटीकायां धनुर्भंगसीतावरणं नाम विंशतितमोऽध्यायः ॥ २० ॥ ओंव्या ॥ ११९ ॥ श्लोक ॥ ३ ॥

अध्याय एकविसावा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ सीतेचें रामासीं लग्न। वचन ऐकोनि रावण। न दाखवीच काळें वदन। गेला निघोन अधोमुखें ॥ १ ॥ देखोनि श्रीरामप्रताप। राजे जाले सकंप। तिहीं सांडोनियां

---

१ भरली. २ लग्न. ३ सूर्य. ४ फिटला. ५ सीतेनें. ६ वधूवरें. ७ अवकळेनें, दुर्दशेनें. ८ समुदाय. ९ लंगोटी.

१० दर्भासन. ११ हरिणाचें कातडें. १२ फुलांचे. १३ बंधन. १४ मंगलवाद्यांनीं. १५ लगाम. १६ उत्साहपूर्वक.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

दर्प । गेले नृप निजनगरा ॥ २ ॥ यापरी राजे राक्षस अनेक । रामप्रतापें केले विमुख । तेणें जनकासी अत्यंत सुख । परम हरिख लग्नाचा ॥ ३ ॥ राजा म्हणे विश्वामित्रासी । शीघ्र आणावया दशरथासी । मी धाडितों प्रधानासी । परी तो त्यासी मानीना ॥ ४ ॥

जनक उवाच—

भवतोऽनुमतेर्ब्रह्मन् शीघ्रं गच्छंतु मंत्रिणः ।
मम कौशिक भद्रं ते त्वयोध्यां त्वरिता रथैः ॥ १ ॥
जनकेन समादिष्टा दूतास्ते शीघ्रवाहनाः ।
त्रिरात्रमुषिता मार्गे तेऽयोध्यां प्राविशन्पुरीम् ॥ २ ॥

ऐक ऋषिवर्या कौशिका । तुझी नसतां पत्रिका। दशरथ न मानी ब्रह्मादिकां । तेथें या मशका कोण पुसे ॥ ५ ॥ तुझी न[1] लभतां संज्ञा[2] । वसिष्ठ कदा न ये लग्ना । ऐसें जाणोनि सर्वज्ञा । द्यावी अनुज्ञा पत्रैसीं ॥ ६ ॥ आमच्या तुमच्या एकात्मता । पत्र लिहावें विनीततां[3] । सीता देऊं केली रघुनाथा । अति पुरुषार्थी देखोनी ॥ ७ ॥ रामप्रतापें अति श्रेष्ठ । पत्र लिहावें अति स्पष्ट । जेणें सुखावे श्रीवसिष्ठ । नृप संतुष्ट अजात्मज[4] सुखें ॥ ८ ॥ ऐकोनि जनकाचें वचन । विश्वामित्र सुखसंपन्न । पाचारोनियां प्रधान । अनुज्ञापन-पत्रिका ॥ ९ ॥ आणिकांचें तें निर्जीव पत्र । येथें सचिव तोचि सजीव पत्र । लिहिता वरिष्ठ विश्वामित्र । परम पवित्र त्याचेनि ॥ १० ॥ क्षराक्षराहूनि परती । श्रीरामाची निजमूर्ती । करोनि पत्रिकासमाप्ती । प्रधानाहातीं दिधली ॥ ११ ॥ पत्रिकेचा अर्थ श्रेष्ठ । वाचूं जाणे एक वसिष्ठ । आणिकां आकळितां अति कष्ट । होईल स्पष्ट अयोध्येसी ॥ १२ ॥ प्रेमकुंकुमें अति प्रीतीं । पत्रिका शोभे शोभनस्थितीं । ज्याचें प्राधान्य त्रिजगतीं । त्या प्रधानाहातीं दिधली ॥ १३ ॥ बैसला मनोरथरथीं । चारी वारू चहूं पुरुषार्थीं । मनासी ज्याचेनि निजगती । तोचि सारथी धुरेसी ॥ १४ ॥ ऐसिया सन्नद्ध निजस्थितीं । पाठविला शीघ्रगतीं । तो पावला तिसरे वस्ती । वस्तीची स्थिती अवधारा ॥ १५ ॥ प्रथम वस्ती श्रवण-मननपुरीं । दुजी निदिध्यासनगरीं । तिसरी वस्ती साक्षात्कारीं । अयोध्यापुरीं पावला ॥ १६ ॥ अयोध्या प्रथममोक्षपुरी । अजाचा पुत्र राज्य करी । ते श्रीरामाची निजनगरी । प्रधान तेथवरी पावला ॥ १७ ॥ दशरथसभा वसिष्ठें गाढी । तीपुढें इंद्रसभा बापुडी । प्रधानें देखोनि आवडीं । उभविली गुढी विजयाची ॥ १८ ॥ सीता अत्यंत सुंदरी । हरचापभंगें श्रीरामा वरी । प्रधान वाधावा फोकारी । घरोघरीं आल्हाद ॥ १९ ॥ हरधनुष्य न पुरे ओढी । ओढितां भंगलें कडाकडीं । धाकें रावण पडिला बुडीं । सभा बापुडी मूर्च्छित ॥ २० ॥ धनुष्याची कडाडी । मूर्च्छित रायांचिया कोडी । कृतांताची वळली मुरकुंडी । धाके पोटीं कळिकाळ[6] ॥ २१ ॥ सद्गुरु कौशिकें अभ्यासिले । रामलक्ष्मण सुविद्य[8] भले । दादुल्याचे ते दादुले । यश पावले तिहीं लोकीं ॥ २२ ॥ जनकनेम अति प्रबळ । सीतेचे लग्नीं शिवचापबळ । जो कोणी सज्जील सबळ । त्यासी जानकी माळ घालील ॥ २३ ॥ त्याही जनकाच्या नेमातें । सिद्धि पावविलें त्या समर्थें । सभेसी गांजोनि समस्तांतें । सीता रघुनाथें जिंकिली ॥ २४ ॥ प्रधानाचे सुखोत्तरीं । सभा गर्जे जयजयकारीं । त्राहाटिल्या[9] निशाणभेरी । मंगळतुरीं आल्हाद ॥ २५ ॥ गुढिया उभविती घरोघरीं । परमानंदें बोलती नरनारी । श्रीरामें जनकाच्या स्वयंवरीं । सीता सुंदरी पर्णियेली ॥ २६ ॥ सांगोनि श्रीरामाची ख्याती । वर्णूनी श्रीरामाची कीर्ती । प्रधानें त्या सभेप्रती । घातलें क्षितीं लोटांगण ॥ २७ ॥ अति आल्हाद दशरथासी । सन्मानिलें प्रधानासी । मुकुट कुंडलें देवोनि त्यासी । वसिष्ठापासीं बैसविला ॥ २८ ॥ रायें फोडोनियां भांडारें । दान देतो उदार करें । दिधलीं गाईचीं खिल्लारें । कणकोठारें[10] द्विजांसी ॥ २९ ॥ राजा निमग्न परमानंदीं । वसिष्ठ सुखावला त्रिशुद्धी । प्रधान अत्यंत सुबुद्धी । पत्र ते संधीं ओपिलें ॥ ३० ॥ विश्वामित्राची निजयुक्ती । सर्व सिद्धींच्या सिद्ध्यर्थीं । आधीं सद्गुरूसी विनंती । मग भूपतिकार्यार्थ ॥ ३१ ॥ वसिष्ठें वाचितां पत्र ।

१ मिळाल्यावांचून. २ खूण. ३ नम्रतेनें. ४ अज-राजाचा पुत्र दशरथ. ५ आमंत्रण आल्याची सूचना. ६ काळाची. ७ विश्वामित्रानें. ८ चांगले, विद्वान्. ९ वाजविल्या. १० धान्याचीं पेवें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

रामप्रताप अति विचित्र । तेणें सजल झाले नेत्र। धन्य विश्वामित्र तो म्हणे ॥ ३२ ॥ धन्य दशरथाचें भाग्य । आम्ही भाग्याचे सभाग्य । धन्य जानकीचें अष्टांग । रामअर्धांग पावली ॥ ३३ ॥ पूर्ण अवतार बाळलीळा । बाळपणीं प्रताप आगळा । धन्य जानकी जनकबाळा । ब्रह्मपुतळा निजकांत ॥ ३४ ॥ ऐसी पत्रिकेची स्तुती । वसिष्ठें केली अति प्रीतीं । काय लिहिलेंसे पत्रार्थीं । सावधान श्रोतीं परिसावें ॥ ३५ ॥ ॐ नमो स्वामी वसिष्ठा । निजज्ञानें ज्ञानश्रेष्ठा । परमानंदें अति प्रतिष्ठा । विनंती वरिष्ठा अवधारीं ॥ ३६ ॥ तुझी आल्हादें व्हावी भेटी। हे जनकाची उत्कंठा मोठी । वोहरें पहावीं कृपादृष्टीं । लग्नसंतुष्टी तुझेनि ॥ ३७ ॥ सीता श्रीरामें धनुर्वेधीं । स्वयंवरीं जिंकिली त्रिशुद्धी । तूं आलिया कृपानिधी । लग्नसिद्धी होईल ॥ ३८ ॥ प्रकृति-पुरुषां पाणिग्रहण । तुझेनि होतसे संपूर्ण । तूं कारणा निजकारण । लग्न सुलग्न तुझेनि ॥ ३९ ॥ दशेंद्रियदशरथा । तूंचि कर्ता तूंचि नियंता । पाणिग्रहणीं रामसीता । तूं मुख्य कर्ता कुळगुरु ॥ ४० ॥ तुझी आज्ञा अति समर्थ । गगनीं छाटी[1] वंदी आदित्य । तुझेनि रघुवंश सनाथ । लग्न समाप्त तुझेनि ॥ ४१ ॥ यापरी वसिष्ठासि विनंती । विश्वामित्रें लिहिली स्वस्थिती । जनक दशरथ भूपती । पत्रयुक्तीं प्रार्थित ॥ ४२ ॥ स्वस्ति श्रीअजात्मजा । सूर्यवंशवंशध्वजा । दशरथा महाराजा । श्रीराम तुझा निजविजयी ॥ ४३ ॥ श्रीराम प्रतापें आगळा । स्वयंवरीं वरिली जनकबाळा । त्यांच्या लग्नाचा सोहळा । यावें भूपाळा पहावया ॥ ४४ ॥ श्रीरामाच्या निजजननी । आणाव्या सुखासनीं । भरत शत्रुघ्न पैं दोन्ही । गजारोहणीं आणावे ॥ ४५ ॥ सेवक सुहृद लहानथोर । सेनापति सहपरिवार । सोयरे आणावे समग्र । सोहळा स्वयंवर पहावया ॥ ४६ ॥ देखोनि जनकाचें मूळपत्र । दशरथासी आल्हाद थोर । प्रधान प्रेरिला सत्वर । रथ कुंजर शृंगारावया॥ ४७॥ धन्य सद्गुरु विश्वामित्र। धनुर्विद्या अति विचित्र । त्याचेनि प्रतापें रघुवीर। कृतोपकार आम्ही केलों ॥ ४८ ॥ ताटिका वधिली अति दुस्तर । यागीं मारिले राक्षस घोर । चापभंगें सीता सुंदर । वरी रामचंद्र गुरुविद्या ॥ ४९ ॥ यापरी प्रतापी रघुनाथा । विश्वामित्रें सुविद्यता। ऋषीची आज्ञा यावें लग्नार्था । आम्हां सर्वथा तेथें जाणें ॥ ५० ॥

ततो रात्र्यां व्यतीतायां सोपाध्यायः सबांधवः ।
राजा दशरथो हृष्टः सुमंतमिदमब्रवीत् ॥ ३ ॥
अद्य सर्वे धनाध्यक्षा धनमादाय पुष्कलम् ।
व्रजंत्वग्रे सुविहिता नानारत्नसमन्विताः ॥ ४ ॥

रायें नगरीं क्रमोनि[3] निशी । सांगे सुमंत प्रधानासी । श्रीरामसीतेच्या लग्नासी । जाणें मिथिलेसी अति शीघ्र ॥ ५१ ॥ भांडारें उघडावीं उठाउठीं । काढाव्या द्रव्याच्या कोट्यनुकोटी । भरावें गजवाजींच्या[4] पृष्ठीं । उरलें शकटीं भरावें ॥ ५२ ॥ मुकुट कुंडलें अलंकार । रत्न मुक्ताफळें संभार । सूत्र पटसूत्र रोमसूत्र । वस्त्रें विचित्र सवें घ्यावीं ॥ ५३ ॥ राजपत्न्या अति सुकुमार । सुखासनीं सालंकार । वस्त्रें पालवछत्रें गजर । अति शीघ्र चालों देईं ॥ ५४ ॥ रायासी आल्हाद फार । भरत शत्रुघ्न निजकुमर । सालंकृत मनोहर । रथीं सत्वर बैसविले ॥ ५५ ॥ सेनापति वीरें वीर । शृंगारिले सैन्यसंभार । टकेपताकानिजगजर । रथ कुंजर घडघडिले ॥ ५६ ॥ सेना चालिली एकसरें । वाजती नानापरींचीं तुरें[6] । गज गर्जती गँहिरे[5] । भाट गजरें गर्जती ॥ ५७ ॥ वीरीं दिधली आरोळी । सिंहनादें पिटिली टाळी । पर्णावया जनकबाळी । राजकुळी चालिली ॥ ५८ ॥ आणोनि उत्तम रथांसी । रथीं बैसविले महाऋषी । वसिष्ठ वामदेव कश्यपासी । मार्कंडेय ऋषि जावाली ॥ ५९ ॥ कात्यायनादि ऋषीश्वर । रायापासीं जे निरंतर । रथीं बैसविले अपार । ज्ञानगंभीर निजनिष्ठा ॥ ६० ॥ ज्यांच्या वचनाचेनि पडिपाडें । कळिकाळ तोही पायां पडे । ऐसे ऋषिवर्य निधडे । रामवऱ्हाडा तेही आले ॥ ६१ ॥ ऐसे

१ एकदां सूर्याच्या जागीं वसिष्ठानें आपली छाटी ठेवून तिजकडून सूर्याचीं उदय व अस्त हीं कामें करविलीं अशी कथा पुराणांत आहे. २ घालवून. ३ रात्र.

४ हत्तीघोड्यांच्या. ५ गाड्यांत. ६ मंगलवाद्यें. ७ चांगले खुललेले. ८ मोठेपणानें. ९ मोठें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

दोहीं भागीं ऋषीश्वर । मध्यें राजा सहितकुमर । पृष्ठभागीं सैन्यसंभार । आले सत्वर मिथिलेसी ॥ ६२ ॥ नामकीर्ति विरक्ती भक्ती । इहीं तीन पेणां वस्ती । चौथें पेणें रघुपती । निजात्मप्रीतीं भेटले ॥ ६३ ॥ अहंसोहंकोहंगती । त्याचि तिहीं पेणां तीन वस्ती । तेथवरी ज्याची स्थिती । त्यासी राम निश्चितीं भेटेल ॥ ६४ ॥ दृश्य द्रष्टा दर्शन-स्थिती । या तिहीं पेणां तीन वस्ती । तीन्ही क्रमोनियां चौथी । राम निश्चितीं भेटेल ॥ ६५ ॥ विदेहनगरीं विदेहगतीं । राम राहिलासे सहज-स्थितीं । तेथवरी ज्याची वस्ती । राम निश्चितीं भेटेल ॥६६॥ विदेहीं[१] श्रीराम भेटेल सत्वर । साधन-चतुष्टय[२] शृंगार । चारी पुरुषार्थ[३] अलंकार । निधडे वीर लेइले ॥६७॥ यापरी पेणोपेणीं सत्वर । ठाकिलें[४] विदेहाचें नगर । अति सत्वर मनोहर । नगरी सुंदर शोभत ॥ ६८ ॥ मुळींचे पदीं वस्ती चाऱ्ही । करोनि पावले विदेहपुरी । तैंचि म्यां वर्णिलें ग्रंथाधारीं । श्रोतीं कुंसरी[५] न करावी ॥ ६९ ॥ दशरथा जनकासीं भेटी । जानकी कन्या ज्याची गोमटी । दोघांचे भेटीची गोड गोष्टी । सुख-संतुष्टीं आल्हाद ॥ ७० ॥ रामायणाचें निजसार । तें हें सीतास्वयंवर । प्रकृतिपुरुषां एकाकार । होती साचार सुलग्नीं ॥ ७१ ॥ जयाचेनि पावन पृथ्वी नवखंड । जयाचेनि पावन पिंडब्रह्मांड । त्याचिया लग्नाचें पैं कोड[६] । कथा अति गोड निरूपणीं ॥ ७२ ॥ एका जनार्दना शरण । प्रकृति-पुरुषां पाणिग्रहण । श्रीरामसीतेचें लग्न । समाधान जीवशिवां ॥ ७३ ॥ स्वस्ति श्रीभावार्थ-रामायणे बालकांडे एकाकारटीकायां दशरथा-गमनं नाम एकविंशतितमोऽध्यायः ॥ २१ ॥ ओंव्या ॥ ७३ ॥ श्लोक ॥ ४ ॥

अध्याय बाविसावा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः । जीवशिवांचें समा-धान । ते हे कथा रामायण । पवित्र परिकँर पावन । जगदुद्धरण जडजीवां ॥ १ ॥ श्रीरामीं संलग्नता । सर्वांगें समरसे सीता । याचि नांव सुलग्नता । ते लग्नकथा अवधारा ॥ २ ॥ मार्गीं वसोनि चारी वस्ती । राजा दशरथ शीघ्रगतीं । आला विदेहपुराप्रती । जेथें रघुपति निजविजयी ॥ ३ ॥ विदेहपुरा वस्ती आले । ते त्रिभुवनीं विजयी जाले । विश्वामित्रें मित्रत्व केलें । गुरुत्व दिधलें वसिष्ठें ॥ ४ ॥ श्रीवसिष्ठें विश्वामित्रु । केला श्रीरामीं धनुर्विद्यागुरु । आपण ब्रह्मविद्या-सद्गुरु । विजयी रामचंद्र यांचेनि ॥ ५ ॥ वसिष्ठ-निष्ठानिजनिर्धारीं । दशरथ पावला विदेहपुरी । रत्नकळसांचिया हारी । तेजें अंबरीं रवि लोपे ॥ ६ ॥ दशरथ आला निजनगरीं । छत्रें पल्लवछत्रें वरी । निशाणें त्राहाटिल्या भेरी । मंगळतुरीं गर्जत ॥ ७ ॥ आला ऐकोनि दशरथ । जनक सामोरा धांवत । शतानंद पुरोहित । सवें समस्त प्रधान ॥ ८ ॥ पुढें वसिष्ठ देखिला दृष्टीं । धांवोनि चरणीं घातली मिठी । जगदुद्धार स्वचरणांगुष्टीं । सभाग्य सृष्टीं मी एक ॥ ९ ॥ वसिष्ठचरण जाले प्राप्त । आजि माझें कुळ पुनीत । आजि माझे पितर तृप्त । वंश सनाथ आजि माझा ॥ १० ॥ वसिष्ठ भेटल्या अभीष्ट । वसिष्ठ भेटल्या अनिष्ट इष्ट । वसिष्ठ भेटल्या भाग्य वरिष्ठ । वसिष्ठें श्रेष्ठ निजदास ॥ ११ ॥ वसिष्ठ अत्यंत सज्ञान । जनक सद्भाव संपूर्ण । देखोनि दिधलें आलिंगन । समाधान दोघांसी ॥ १२ ॥ दोनी दीप एक होती । द्वैतलोपें एकचि दीप्ती । तैसें आलिंगन देती । अभेदवृत्तीं आल्हाद ॥ १३ ॥ वसिष्ठ देहींच विदेही । जनक सहजची विदेही । दोघे निःसंदेह विदेही । दिधलें पाहीं आलिंगन ॥ १४ ॥ जनक-वसिष्ठांचे भेटी । आल्हाद न माये सृष्टीं । पुढें दशरथ देखिला दृष्टीं । उठाउठीं आलिंगी ॥ १५ ॥ जानकीजनका श्रीरामजनका । आलिंगन पडलें देखा । तेणें संतोष सकळिकां । तिहीं लोकां आल्हाद ॥ १६ ॥ एक जनक एक दशरथ । समर्थ आलिंगी समर्थ । तेणें सुखावे रघुनाथ । पुरला मनोरथ सीतेचा ॥ १७ ॥ दोघां अति प्रीतीं

---

१ जनक. २ वस्तुविवेक, वैराग्य, शमादि (शम, दम, दया, तितिक्षा, उपरति आणि समाधान) व मुमुक्षुत्व हें साधनचतुष्टय. ३ धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे चार पुरुषार्थ. ४ गांठलें. ५ तिरस्कार. ६ कौतुक. ७ सुंदर. ८ ऐका. ९ अत्यंत इष्ट, कल्याण.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

आलिंगन । दोघे राजे सुखसंपन्न । सीता-रघुनाथांचें लग्न। वेगीं सुलग्न करावें ॥ १८ ॥ देखोनि भरत आणि शत्रुघ्न । राजा प्रधान विस्मयापन्न । विस्मित मिथिलेचे जन । रामलक्ष्मण कैंवि आले ॥ १९ ॥ कांहीं जाला अपमान । किंवा चुकलें विधिविधान । दोघे आले हे रुसोन । अति उद्विग्न विदेही ॥ २० ॥ पुसोनि येतां कौशिकासी । दोघे होते गुरुसेवेसी । तेचि दोघे दशरथापासीं । शीघ्रवेगेंसीं कां आले ॥ २१ ॥ जनक वसिष्ठासी पुसे आपण । रामलक्ष्मण दोघे जण । येथें कां आले रुसोन । कोण विधान मी चुकलों ॥ २२ ॥ विदेहासी सांगे वसिष्ठ । रामलक्ष्मण ते ज्येष्ठ । भरतशत्रुघ्न हे कनिष्ठ । सांगतां स्पष्ट कळेना ॥ २३ ॥ रूपरेखा समसमान । ठाणमाण गुण लावण्य । हे दोघे रामलक्ष्मण । भरतशत्रुघ्न ते कवण ॥ २४ ॥ ऐसें बोलतां विदेहासी । हांसें आलें वसिष्ठासी । मग बैसवोनि सावकाशीं । पूर्ववृत्तांतासी सांगत ॥ २५ ॥ भरत रामपिंडाचा अर्धभाग । तो रामरूपी दिसे सांग । शत्रुघ्न सौमित्राचा भाग । त्याचें सर्वांग तद्रूप ॥ २६ ॥ हे चतुर्विध चारी मूर्ती । एकरूपें चतुर्धा भासती । ऐसें ऐकोनि भूपती । विस्मयें चित्तीं तटस्थ ॥ २७ ॥ तेचि समयीं विश्वामित्र । घेवोनि आला रामसौमित्र । दशरथाचे चारी पुत्र । शोभा विचित्र एकत्वें ॥ २८ ॥ देखतां चतुर्मूर्ति चतुरर्क[1] । पाहणें पाहतां अवघे एक । ऐकोनि जनका परम सुख । परम पुरुष हे चारी ॥ २९ ॥ कुशध्वज माझा कनिष्ठ बंधू । त्याच्या कन्या स्वरूपसिंधू[3] । भरतशत्रुघ्नां करूं वधू । उर्मिलासंबंधू लक्ष्मणासी ॥ ३० ॥ ऐसा जनकाचा मनोरथ । चवघां बंधूंसहित । जामाता जोडला रघुनाथ । उल्लासत स्वानंदें ॥ ३१ ॥ घेवोनी श्रीरामलक्ष्मण । विश्वामित्र आला आपण । दशरथ घाली लोटांगण । हर्षें चरण वंदिले ॥ ३२ ॥ आनंदें दशरथ बोलत । तुझी धनुर्विद्या समर्थ । तुझेनि विजयी श्रीरघुनाथ । कीर्ति विख्यात तुझेनि ॥ ३३ ॥ तुझेनि ताटिकेसी अंत । तुझेनि सुबाहूसी घात । तुझिये कृपें जानकी प्राप्त । तूं अति समर्थ ऋषिवर्या ॥ ३४ ॥ माझें अत्यंत कृपणपण । नेदीं म्हणें रामलक्ष्मण । ते त्वां आणोनि आपण । यशभूषण आपण दिधलें ॥ ३५ ॥ तुझेनि निजशिष्यपणें । तिहीं लोकीं मिरवे लेणें । ऐसीं लेवविलीं भूषणें । कंठाभरणें शिवासी ॥ ३६ ॥ ऐसें ऐकतां स्तुतिस्तोत्र । हांसोनि बोले विश्वामित्र । रामचंद्रें मी पवित्र । ब्रह्मीं ब्रह्मसूत्र श्रीराम ॥ ३७ ॥ श्रीरामाचेनि शिष्यपणें । तिहीं लोकीं माझें गुरुत्व वंदणें । श्रीरामें माझें सनाथ जिणें । जिणें मरणें मज नाहीं ॥ ३८ ॥ पूर्वीं यागीं मी अनाथ । तो श्रीरामें केलों सनाथ । कर्माकर्मा करोनि घात । श्रीरघुनाथ तुष्टला ॥ ३९ ॥ श्रीरामशिष्यत्वाची[6] नवाई । मज देहवंता वंदी विदेही । रामकीर्ति सांगों काई । पाषाण पायीं पुनीत ॥ ४० ॥ ज्याचेनि पायें तरती पाषाण । त्याचेनि गुरुत्वें मी धन्य । माझेंही यज्ञाचें फळ जाण । ब्रह्म परिपूर्ण श्रीराम ॥ ४१ ॥ ऐसें बोलतां विश्वामित्र । सुर सिद्ध करिती जयजयकार । वर्षती सुमनांचे संभार । प्रेमें विश्वामित्र मूर्छित ॥ ४२ ॥ वसिष्ठ येवोनियां तेथ । विश्वामित्रा करी सावचित । जें बोलिलासी तें इत्थंभूत । श्रीरघुनाथ परब्रह्म ॥ ४३ ॥ आल्हादें दशरथ उठोन । आलिंगी श्रीरामलक्ष्मण । रत्नें धन धान्य ओंवाळून । चौघेही जण बैसविले ॥ ४४ ॥ वसिष्ठविश्वामित्रवचन । श्रीराम ब्रह्म परिपूर्ण । तेणें जनकासी आल्हाद पूर्ण । करावया लग्न उद्यत[7] ॥ ४५ ॥ शतानंद पुरोहितासी । जनक धाडी कुशध्वजापासीं । तो धाकटा बंधु आम्हांसी । शीघ्र त्यासी आणावें ॥ ४६ ॥ संकाश नाम नगरीसी । ज्यां राज्यीं स्थापिलें प्रतिष्ठेसीं । दोघी कन्या आहेत त्यासी । लावण्यराशी सुंदरा ॥ ४७ ॥ श्लाघ्य संबंधु रघुनंदना । दोघी द्याव्या भरतशत्रुघ्नां । यालागीं त्यासी शीघ्र आणा । लग्नीं सुलग्नां साधावया ॥ ४८ ॥ ऐकोनि जनकाचें आकारण[8] । शीघ्र कुशध्वज आला आपण । रायासी करोनि नमन । आलिंगन दिधलें ॥ ४९ ॥ जनकसभा सावकाशीं । मूळ धाडिलें दशरथासी । वेगीं बोलवूनी त्यासी । लग्नदिवसासी नेमावया ॥ ५० ॥ दशरथ आला ऋषिमेळीं । वसिष्ठ वामदेव राया-

१ दुःखी, कष्टी. २ चार सूर्य. ३ अत्यंत सुंदर. ४ क्रिया. ५ पूर्ण, सफल. ६ श्रीरामाच्या शिष्यत्वाचें मोठें नवल. ७ उद्युक्त, तयार. ८ बोलावणें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

जवळी । कश्यप कात्यायन जाबाली । तपोबळी मार्कंडेयो ॥ ५१ ॥ आले सखे सुहृज्जन । जनकें दिधला सन्मान । अवघे बैसविले सावधान । लग्न-दिन नेमावया ॥ ५२ ॥ विवाह करावया सत्कुळीं । दोहीं वंशांची वंशावळी । शोधोनि पहावी समूळीं । ऋषि सकळी नेमिले ॥ ५३ ॥ वराचें कुळ समस्त । सांगावया वसिष्ठ कुळदैवत । तेणें सांगावा आद्यंत । इत्थंभूत रविवंश ॥ ५४ ॥ ऐकोनि ऋषींचें उत्तर । वसिष्ठें केला नमस्कार । ऐका सूर्यवंश-विस्तार । अति पवित्र भूपती ॥ ५५ ॥ सूर्यवंशा चिये ख्याती । महापातकी मुक्त होती । एक एक चक्रवर्ती । त्रिजगतीं भूषण ॥ ५६ ॥ सूर्याचा मुख्य मनु पुत्र । मनूचा इक्ष्वाकु पवित्र । तेणें अयोध्या मुक्तक्षेत्र । केलें नगर निंजवासा ॥ ५७ ॥ यालागीं सूर्यवंशीं जाण । म्हणती इक्ष्वाकुनंदन । म्हणावया हेंचि कारण । पदव्याख्यान याचि स्थितीं ॥ ५८ ॥ येच वंशीं पृथु चक्रवर्ती । रसातळा जातां क्षिती । पृथूनें धरिली आत्मशक्तीं । पृथ्वी म्हणती त्याचेनि ॥ ५९ ॥ तेणें केलें पृथ्वीचें दोहन । सुखी केले सकळ जन । पूजाभक्तीनें पावन पूर्ण । अनर्घ्य रत्न सूर्यवंशीं ॥ ६० ॥ येच वंशीं उत्तानचरण । त्याचा पुत्र ध्रुव जाण । बाळपणीं देव सुप्रसन्न । करोनि आपण अढळ जाला ॥ ६१ ॥ योनिद्वारें न जन्मतां । पित्याचे कुशीं जन्म पावतां । परी मरों नेदीच निजधांता । तो मांधाता रविवंशीं ॥ ६२ ॥ शिबी चक्रवर्ती येच वंशीं । पक्ष्यासाठीं तुकी मांसासी । नगरी नेली वैकुंठासी । सत्त्वराशि शिबी देखा ॥ ६३ ॥ सूर्यवंशीं अति पवित्र । जन्म पावला हरिश्चंद्र । स्वप्नदानविधिउपचार । केला साचार जागृतीं ॥ ६४ ॥ दक्षिणा द्यावया समग्र । डोंबाघरीं होय परतंत्र । विकोनियां स्त्रीपुत्र । विश्वामित्र सुखी केला ॥ ६५ ॥ रुक्मांगद येच वंशीं । व्रत पाळोनि एकादशी । नगरी नेली वैकुंठासी । व्रतें जगासी उद्धार ॥ ६६ ॥ सुरासुरां नागवे वैरी । धूमांकित पाताळविवरीं । त्यातें शोधोनियां मारी । तो धुंधुमार रविवंशीं ॥ ६७ ॥ त्याचा पुत्र धर्मांगद । एकादशीव्रतीं आल्हाद । शिर देतां न मानी खेद । परमानंद पावला ॥ ६८ ॥ सूर्यवंशींचे भूपती । एका चढी एकाची ख्याती । श्रवणें जन पावन होती । वंशोत्पत्ती अवधारा ॥ ६९ ॥ येच वंशीं अंबऋषी । व्रत साधोनि द्वादशी । देव आणिला गर्भवासासी । दुर्वासासी वांचविलें ॥ ७० ॥ येच वंशीं राजे सगर । ज्यांचेनि नांवें जाले सागर । कपिलशापें जळतां शूर । करी उद्धार भगीरथ ॥ ७१ ॥ भगीरथें निजात्मशक्तीं । आणोनियां भागीरथी । पूर्वज तारिले नेणों किती । त्रिजगतीं उद्धार ॥ ७२ ॥ भगीरथसुत प्रवीण युद्धीं । देवां दैत्यां युद्धसंधीं । इंद्रें बैसवोनियां खांदीं । नेला त्रिशुद्धी युद्धासी ॥ ७३ ॥ बैसला इंद्राच्या ककुदीं । यालागीं ककुत्स्थ म्हणती । त्याच्या नामाची निजख्याती । काकुत्स्थ म्हणती श्रीरामा ॥ ७४ ॥ रविवंशीं अति निष्पाप । राजा जन्मला दिलीप । कामधेनु उपासी नृप । अति सांक्षेपें पुत्रार्थी ॥ ७५ ॥ कामधेनु प्रसन्न पूर्ण । रघु पुत्र पावला सुलक्षण । ज्याचेनि नांवें रघुनंदन । वंशींचा जाण म्हणताती ॥ ७६ ॥ रघूचा अज अतुर्बळी । अति प्रतापी भूमंडळीं । वैरी अजप्राय बळी । पायांतळीं मेंमाती ॥ ७७ ॥ त्या अजाचा दशरथ । शुक्र जिंकिला युद्धांत । स्वर्गीं जाला यशवंत । सन्मानिला अमरेंद्रें ॥ ७८ ॥ पराभविलें दैत्यगुरूंसी । अति आल्हाद बृहस्पतीसी । आलिंगूनियां हृदयेंसीं । निजनगरासी धाडिला ॥ ७९ ॥ त्याचे पुत्र चौघे जण । श्रीराम आणि लक्ष्मण । धाकुटे भरत शत्रुघ्न । आदिकारण हे चारी ॥ ८० ॥ केला ताटिकेचा निर्वाळा । सुबाहु मारिला राक्षसमेळां । रावण अपमानिला बळा । चरणीं शिळा उद्धरिली ॥ ८१ ॥ सूर्यवंशींचें वर्णन । वसिष्ठ गर्जे आल्हादोन । सुमनें वर्षती सुरगण । हर्षत मन जनकाचें ॥ ८२ ॥ ऐकोनि सूर्यवंशावळी । महासिद्धीं पिटिली टाळी । धन्य धन्य जनकबाळी । भाग्यें सत्कुळीं सुलग्न ॥ ८३ ॥ परिसोनि निजवंशवर्णन । दशरथासी आल्हाद पूर्ण । वसिष्ठावरी ओंवाळून । देत गोदान लक्षकोटी ॥ ८४ ॥ मग उठोनि महाऋषीं । बैसविलें वसिष्ठासी । तूं सूर्यवंशाचा सद्गुरु होसी । रविवंशासी भूषण ॥ ८५ ॥ सूर्यवंशीं जे जे भूप ।

१ सार्वभौम राजा. २ आपणास राहण्यास. ३ उत्तानपाद. ४ आपला उत्पन्नकर्ता. ५ तोली, वजन करी. ६ वशिण्डावर. ७ तत्परतेनें. ८ मोठा पराक्रमी. ९ बोकडाप्रमाणें बेंबें करून ओरडतात. १० शुक्राचार्याला. ११ नाश.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सांगितलें अतिप्रताप । ते तुझेनि निष्पाप । तूं सद्रूप सद्गुरु ॥ ८६ ॥ जेंवी सूर्य निजतेजेंसीं । सूर्यकांतीं तेज प्रकाशी । तेंवी तुझेनि अनुग्रहेंसीं । सूर्यवंशासी प्रताप ॥ ८७ ॥ अचेतन तुझिया कृपादृष्टीं[1] । सूर्यमंडळीं तपे छाटी । तुझा अनुग्रह जाल्यापाठीं । शिष्य सृष्टीं निजविजयी ॥ ८८ ॥ वसिष्ठ वक्ता सुखस्वानंद । सभेसी जाला परमानंद । जनक भाग्याचा अगाध । लग्नसंबंध श्रीरामीं ॥ ८९ ॥ एका जनार्दना शरण । जालें सूर्यवंशव्याख्यान । जनकवंशानिरूपणचें । सावधान अवधारा ॥ ९० ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे बालकांडे एकाकारटीकायां सूर्यवंशनिरूपणं नाम द्वाविंशतितमोऽध्यायः ॥ २२ ॥ ओंव्या ॥ ९० ॥

अध्याय तेविसावा

श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ सूर्यवंशींचे भूपती । असंख्य आणि अगाधकीर्ती । ते म्यां सांगितले संकळितीं[2] । क्षमा श्रोतीं करावी ॥ १ ॥

एवमुक्तोऽथ जनकस्तमुवाच कृतांजलिः ।
श्रोतुमर्हसि धर्मज्ञ मत्कुलं शृण्वतां वर ॥ १ ॥
प्रधानेश्वर वक्तव्यं कुलं निरवशेषतः ।
वक्तव्यं कुलजातेन तन्निबोध नरेश्वर ॥ २ ॥

वसिष्ठें सूर्यवंशावळी । वर्णिली अति प्रांजळी[3] । जनक उठोन तये वेळीं । कृतांजळी[4] विनवीत ॥ २ ॥ माझिये कुळींचे भूपाळ । ख्यातिवंत अति प्रबळ । राउळें[5] परिसावे सकळ । सकळकुळपर्यावो[6] ॥ ३ ॥ कन्यादानीं सकळ कुळ । सांगावें लागे समूळ । पहिले कुळीं निमी भूपाळ । त्याची कीर्ति प्रबळ तिहीं लोकीं ॥ ४ ॥ वसिष्ठाचे शापस्थितीं । जगाचें देखणें ज्याची वस्ती । ज्याचेनि डोळे देखणे होती । यालागीं म्हणती निमी त्यातें ॥ ५ ॥ निमिषानिमिषाची गती । ज्याचेनि चाले अहोरात्रीं[7] । यालागीं त्यातें निमी म्हणती । जाण निश्चितीं नरनाथा ॥ ६ ॥ निमीचा सुत मिथी सोज्ज्वळा । नगरी वसविली स्वलीळा । यालागीं ईतें म्हणती मिथिला । स्वनामें सोहळा निजनगरीं ॥ ७ ॥ मिथिपुत्र प्रथम जनक । जो कां अत्यंत सात्त्विक । पुत्रप्राय पाळिले लोक । यालागीं नांव जनक त्यासी ॥ ८ ॥ त्याचा पुत्र धृष्टकेतु । जनकवंशीं अति विख्यातु । दळें बळें प्रतापवंतु । धर्मसेतु निजधर्मा ॥ ९ ॥ त्यापासोनि अनेक । जनक नामाचे नृप देख । ते सांगतां असती असंख्य । कथा आत्यंतिक वाढेल ॥ १० ॥ बहुलाश्वजनक स्वकीर्तिजनक । स्वदेहजनक विदेहजनक । त्यांमाजि मीही एक जनक । निजसेवक तुमचा ॥ ११ ॥ वंशावळी वाढवितां । अपार वाढेल ही कथा । लग्नीं साधावें रघुनाथा । हे परमावस्था[8] जनकासी ॥ १२ ॥ घ्यावया आमुच्या निजराज्यासी । हिरोन न्यावया सीतेसी । सुधन्वा आला अति क्रोधेंसीं । तेणें मिथिलेसी वेढिलें ॥ १३ ॥ मग मीं युद्ध केलें त्यासीं । रणीं वधिलें सुधन्व्यासी । मग त्याचिया राज्यासी । कुशध्वजासी म्यां स्थापिलें ॥ १४ ॥ कुशध्वज माझा धाकटा बंधू । राजप्रतापें प्रतापसिंधू । त्याच्या कन्या दोघी वधू । वरसंबंधू करूं इच्छीं ॥ १५ ॥ सीता दिधली श्रीरामासी । ऊर्मिला दिधली लक्ष्मणासी । मांडवी दिधली भरतासी । शत्रुघ्नासी श्रुतकीर्ती ॥ १६ ॥ चौघे बंधू चारी वधू । ऋषी म्हणती श्लाघ्य[9] संबंधू । अवघीं केला निश्चयशब्दू । लग्नविधि अवधारा ॥ १७ ॥ वसिष्ठ विश्वामित्र वामदेव । अवघे म्हणती अति अपूर्व । श्लाघ्यसंबंधगौरव । भाववैभव समसाम्य ॥ १८ ॥ आजिचे तिसरे दिवशीं । उत्तराफल्गुनी सुदिनेंसीं । अभिजित साधून मध्यान्हेंसीं । लग्न चौघांसीं लावावें ॥ १९ ॥ वसिष्ठविश्वामित्रांचें वचन । दशरथें मस्तकीं वंदून । तुमचें वाक्य परम प्रमाण । करणें लग्न चौघांचें ॥ २० ॥ जनक कुशध्वज नृपती । दोघेही व्याही परमार्थी । विजयी जाला रघुपती । ते अति कीर्ति तुमचेनि ॥ २१ ॥ लग्न करणें हें प्रमाण । भेरी त्राहाटिलें निशाण । दोहीं रायां हर्ष पूर्ण । सुहृज्जन आल्हादी ॥ २२ ॥ दशरथें पुसोनि जनकासी । सवें घेवोनी महाऋषी । वेगें आला जानवशासी । देवकासी आरंभ ॥ २३ ॥ जनक बोळवीत ये सर्वांसी । हात जोडोनि ऋषिरायांसी । शिष्य सेवक मी तुम्हांसी ।

१ कृपेनें. २ संक्षेपानें. ३ स्पष्ट. ४ हात जोडून. ५ राजानें. ६ सर्व कुलाचा विस्तार. ७ रात्रंदिवस.

८ अत्यंत उत्कंठा. ९ स्तुत्य, उत्तम.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

बांधवांसीं ससैन्य ॥ २४ ॥ श्रीरामलग्नाचा महोत्साह । दोहीं मांडवीं उत्साह । मिनला ऋषिसमुदाव । नवल नवलाव लग्नाचा ॥ २५ ॥ रामविवाहा मंडपस्तंभ । चारी वेद जाले स्वयंभ[1] । आडवळे धैर्याचे सलंब[2] । वांसे निर्कोंभ विवेकाचे ॥ २६ ॥ त्यावरी शाकार स्मृतिपुराणें । चारी पुरुषार्थ तोरणें । धर्मद्वारें शोभती तेणें । सलंबपणें मुक्तघोसीं ॥ २७ ॥ धर्मद्वार नित्यमुक्त । द्वारनिरोध[3] नाहीं तेथ । दीनें वरापासीं पावत । सुखी होत तत्काळें ॥ २८ ॥ वसिष्ठ पुरोहित सुबुद्धी । मंडप कापडिला उपनिषदीं । शोभा शोभे त्रिशुद्धी । चिदानंदी मंडप ॥ २९ ॥ मंडपशोभा शोभे कैसी । पताका शोभती चिदाकाशीं । देखतां सुख होय दृष्टीसी । मंडपवासियां आल्हाद ॥ ३० ॥ कन्यामंडपीं स्तंभ भावाचे । आडवळे शुद्धसत्त्वाचे । वरी शाकार विधीचे । सद्भक्तीचे दारवंटे ॥ ३१ ॥ कन्यामंडपीं चांदवा धर्म । वरमंडपीं वितान[4] ब्रह्म । कन्यागृहीं दाटुगें कर्म । कर्म निष्कर्म वरगृहीं ॥ ३२ ॥ कन्यागृहीं साधन पंक्ती । वरगृहीं साधन शांती । कन्यागृहीं रत्नज्योती । निजदीप्ती वरगृहीं ॥ ३३ ॥ कन्यागृहीं नवरसप्रीती । वरगृहीं नवविधा भक्ती । कन्यागृहीं विधि सर्वार्थी । विधिनिर्मुक्ति वरगृहीं ॥ ३४ ॥ कन्यागृहीं नृत्यचाचरी । वरगृहीं कीर्तनगजरी । कन्यागृहीं भाट[5] कैवारी । वेदनागरी वरगृहीं ॥ ३५ ॥ कन्यामंडपीं नोवऱ्या चारी । वरमंडपीं मिथ्या नरनारी । दोहीं मंडपांमाझारी । अगाध थोरी सामर्थ्य ॥ ३६ ॥ वसिष्ठें दशरथासी बैसवोन । देवकविधि पुण्याहवाचन । नांदीश्राद्ध करवोन । बहु हिरण्य[6] वांटिलें ॥ ३७ ॥

स गत्वा निलयं राजा श्राद्धं कृत्वा च पुष्कलम् ।
पुत्रार्थी प्रियपुत्रस्य चक्रे गोदानमुत्तमम् ॥ ३ ॥
गवां शतसहस्राणि विधास्य इति चाब्रवीत् ।
आपृच्छ्य जनकं राजा पुत्रानुद्दिश्य धार्मिकः ॥ ४ ॥
सुवर्णशृंगीः सुच्छन्नाः सवत्साः कांस्यदोहनाः ।
वित्तमन्यद्बहुवसु द्विजेभ्यो रघुनंदनः ॥ ५ ॥

श्रीवसिष्ठें आँव्हानितां[7] । नलिनी नंदिनी उमादि समस्ता । मंडपीं समस्त मंडपदेवता । मूर्तिमंता पैं आल्या ॥ ३८ ॥ नवग्रहादि ग्रह समस्त । मंडळें सोडोनियां त्वरित । अवघे आले मंडपांत । श्रीरघुनाथलग्नार्थीं ॥ ३९ ॥ मंडपदेवता ग्रहपरवडी[8] । श्रीरामा वंदिती आवडीं । आमुची तोडील हा बेडी[9] । सोडवील बांधवेडी लंकेची ॥ ४० ॥ क्षेत्रपाळ अहोरातीं । मंडपद्वारीं नित्य जागती । रावणें हरिल्या क्षेत्रवृत्ती । त्या रघुपती सोडवील ॥ ४१ ॥ देवकप्रतिष्ठा ऐसिया रीतीं । श्रीवसिष्ठें विधानोक्तीं । करविली रायाहातीं । आल्हाद चित्तीं दशरथा ॥ ४२ ॥ पाचारोनियां[10] ब्राह्मण । शतानुशतें करी गोदान । श्रीरामें लक्षोनियां दान । दानविधान अवधारा ॥ ४३ ॥ नेदीच लीतरिया[11] डिवरिया[12] । नेदीच अत्यंत बुजेरिया[12] । चोरपान्हा[12] खांधेरिया[12] । मरळा[12] कुचरिया[12] नेदीच ॥ ४४ ॥ ऐसिया गाई दान देतां । अवचटें[13] घडे ब्रह्महत्या । दानीं दुभाळुवा[14] अतिशांता । होय देता नृपनाथ ॥ ४५ ॥ नेदीच फळवटा प्रथमविताच्या । नेदीच वृद्धा बहुवितांच्या । तरुण सुदोही सुस्तनांच्या । बहुमोलाच्या उत्तमा ॥ ४६ ॥ सुवर्णशृंगी रौप्यखुरी । कांस्यदोही क्षौमांबरी[15] । रत्नपुच्छा सुकुमारी । सालंकारी शोभत ॥ ४७ ॥ जैशा गाई तैशीं आभरणें[16] । तैसीच दक्षिणा संपूर्ण । पुत्रोद्वाहीं[17] देतसे दान । सुखी ब्राह्मण तेणें केले ॥ ४८ ॥ तिळपात्रें घृतपात्रें । क्षीरसहित भोजनपात्रें । द्विजांसी दिधलीं नृपवरें । श्रीरामचंद्रें उत्साहो ॥ ४९ ॥ श्रीरामभावना भावून । सकळ लोक करिती दान । प्रत्यक्ष श्रीरामें निजदान । भाग्यसंपन्न दशरथा ॥ ५० ॥ देवकप्रतिष्ठा अतिगजर । हर्षें दान दे नृपवर । तेचि समयीं युधाजित शूर । आला ज्येष्ठ सहोदर[18] कैकयीचा ॥ ५१ ॥ तो भरताचा निजमातुळ । सुहृत्संबंधी अति कुशळ । स्वसापुत्र[19] स्नेहाळ । रायें तत्काळ आलिंगिला ॥ ५२ ॥ श्यालक[20] बोले दशरथासी । भेटावया दोहीं पुत्रांसी । प्रीति

१ स्वतःसिद्ध. २ लांब. ३ प्रतिबंध, मज्जाव. ४ छत. ५ स्तुतिपाठक. ६ द्रव्य. ७ बोलावतांच. ८ निरनिराळे ग्रह. ९ बंधन. १० बोलावून. ११ लाथ मारणाऱ्या. १२ मारकुटया, बुजऱ्या, पान्हा चोरणाऱ्या वगैरे, खोडकर.

१३ अकल्पित रीतीनें. १४ दुभत्या, दूध देणाऱ्या. १५ रेशमी वस्त्र पाठीवर ज्यांच्या त्या. १६ अलंकार. १७ मुलाच्या लग्नांत. १८ बंधु. १९ बहिणीचा मुलगा. २० मेहुणा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

कैकयरायासी । मज तुम्हांपासीं पाठविलें ॥ ५३ ॥ मी जंव आलों अयोध्येसी । तंव तुम्ही आलेती लग्नासी । ऐकोनि लग्नोत्साहासी । अति त्वरेंसीं मी आलों ॥ ५४ ॥ अवघीं केलें अभ्युत्थान । रायें दिधला अति सन्मान । दिधलें सुमनचंदन । वरासन बैसावया ॥ ५५ ॥ अभ्यंग करितां वरासी । मंगळतुरध्वनि आकाशीं । अलंकारीं दासदासी । महाऋषि पूजियेले ॥ ५६ ॥ वस्त्रें भूषणें विचित्रलीला । गंधाक्षता सुमनमाळा । देती परिमळतांबूला । दानलीला शोभत ॥ ५७ ॥ केळवला रघुनंदन । कोणी नाहीं हीन दीन । अवघेचि दिसती प्रसन्नवदन । सुप्रसन्न दशरथ ॥ ५८ ॥ वस्त्रें अलंकार अति चोखट । सभा बैसली घनदाट । रायें रचिलें वैकुंठ । अति उद्भट निजशोभा ॥ ५९ ॥ श्रीरामाच्या निजतेजेंसीं । शोभा आली मंडपासी । रमेहूनि वरिष्ठ दासी । श्रीरामापासीं शोभती ॥ ६० ॥ हातीं धरोनि वसिष्ठा । रायें केली यागप्रतिष्ठा । होम दिधला हव्यवाटा । ज्येष्ठश्रेष्ठां पूजिलें ॥ ६१ ॥ जनकें अत्यंत गजरेंसीं । आणिलें सीमांतपूजेसी । सभा शोभताहे कैसी । वैकुंठवासी नरनृप ॥ ६२ ॥ वैकुंठींचें निजसामर्थ्य । येथें आणिलें समस्त । जनक निजभाग्यें समर्थ । श्रीरघुनाथ जांवई ॥ ६३ ॥ चारी मुक्ती ते चवाई । तीवरी बैसविला जांवई । तेणेंचि सन्मानें तिघेही । ठायींच्या ठायीं बैसविले ॥ ६४ ॥ सत् चित् आनंद तिन्ही जाण । गुणातीत शोभायमान । तैसेचि हे तिघे जण । श्रीरामें पूर्ण शोभती ॥ ६५ ॥ मुकुट कुंडलें रत्नमेखळा । करीं मुद्रिका रत्नमाळा । निजभावाचें पदक गळां । हृदयकमळावरी शोभे ॥ ६६ ॥ जानकीजनकें विदेहवीरें । आणिलीं शुद्ध चिदंबरें । तीं वेष्टिलीं रामचंद्रें । अत्यादरेंकरूनियां ॥ ६७ ॥ येरही वर याचि रीतीं । गौरविले अति प्रीतीं । देखोनि विदेहनृपतीची भक्ती । श्रीरघुपति उल्हासे ॥ ६८ ॥ वसिष्ठ म्हणे गा विदेहेंद्रा । आधीं पूजावें विश्वामित्रा । वचन मानलें राजेंद्रा । पूजी ऋषीश्वरा अग्रपूजा ॥ ६९ ॥ पूजिले वसिष्ठ वामदेव । कश्यपादि ऋषिसमुदाव । पूजिला मातुळ महाबाहो । पूजिला राव दशरथ ॥ ७० ॥ अत्यंतश्रद्धा जानकीजनक । तेणें पूजिला श्रीरामजनक । सोयरे सुहृद एक एक । सेवकेंसेवक बुझाविले ॥ ७१ ॥ ऋष्यशृंगाची निजकांता । मुख्य करवली ते शांता । जनक पूजी दिव्यांबरता । नानारत्नालंकारीं ॥ ७२ ॥ सुविद्या अविद्या श्रद्धा पत्नी । तैशा वरमाया तिघी जणी । सुमेधा लागली त्यांचे चरणीं । रत्नभूषणीं पूजियेल्या ॥ ७३ ॥ जनकाची स्त्री पतिव्रता । सुमेधा सीतेची निजमाता । भावें वंदिलें रघुनाथा । चरणीं माथा ठेविला ॥ ७४ ॥ वृद्धपरंपरा पूर्ण । वोहंमाय उटी वराचे चरण । शुद्धमेधेनें पैं आपण । श्रीरामचरण पूजियेले ॥ ७५ ॥ लाज सांडोनि रोकडी । सुमेधा विनवी अति आवडीं । माझी रुखवंतपरवडी । स्वामीनें गोडी चाखावी ॥ ७६ ॥ तुझेनि उद्देशें सतत । परिपाक केले बहुत । भावाचा भोक्ता रघुनाथ । मनोरथ पुरवावे ॥ ७७ ॥ तिचा जाणोनि मनोरथ । भावें तुष्टला रघुनाथ । जनकें प्रार्थिला दशरथ । भोजनार्थ रुखवतीं ॥ ७८ ॥ मध्यें श्रीराम केवळ । आवरणपंक्तीं राजे सकळ । स्वप्रकाशें दीप प्रबळ । भाग्य सुफळ सुमेधेचें ॥ ७९ ॥ चैतन्यतेजें अति चोखटें । समभावें सुवर्णताटें । पूर्णरसें भरिलीं वाटे । अपूर्ण कोठें असेना ॥ ८० ॥ एकीं शाखा ते खाणिवा । एकी केवळ खुडिवा । एकी सदेंठी तोडिवा । एकी सुरेख सोलिवा सुवास ॥ ८१ ॥ एक कडुवटे खणुवाळी । एक तिखटे तोंडाळी । एक सलंब सरळी । एक वाटोळी गडबडिजे ॥ ८२ ॥ एक हिरवी कर्कंरिते । एक टणक जारसे कचकचितें । एक बहुबीजें बुचबुचिते । एक हसहसिते कोरडी ॥ ८३ ॥ एक अत्यंत आंवट । एक सबाह्य तिखट । एक सर्वांगें कडुवट । एक तुरट समसमिते ॥ ८४ ॥ एक वाटोळी जारठली । एक सपुष्ट सारठली । एक मुरडी मुरकुठली । एक तुटली अनुवाये ॥ ८५ ॥ ऐशा फळावळीफळभारें । केलें समरस सांबारें । अवघ्या वाघरी वोघारे । निज थावरे श्रीरामें ॥ ८६ ॥ ऐशा नाना परींच्या शाका । परवडी केली रघुनायका । एकचि स्वादें जेविती देखा । अति नेटका जेवणार ॥ ८७ ॥ एक परिपाकें उतटली । स्नेहदेंठींहून सुटली ।

---

१ उभें राहाणें. २ अग्नींत. ३ चौरंग. ४ आंगट्या. ५ चैतन्यरूपी वस्त्रें. ६ एकंदर सेवक. ७ समजाविले,सत्कारिले. ८ सुंदर वस्त्रें देऊन. ९ वधूमाता. १० रुखवताचे उपाहार. ११ समोवतीं पंक्तीनें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वनिताहातून निसुटली । स्वादा आली शिखरणी ॥ ८८ ॥ झाडीं पिकलीं देंठकेणें । तरी आंबे आंवटपणें । सेजे मुराल्या एकांतपणें । न चाखतां घ्राणें चवी फावे ॥ ८९ ॥ रूपें दृष्टीतें बुझावी । वासें घ्राणातें समजावी । वाचा श्रवणातें बरा म्हणवी । स्पर्शें निववी त्वचेतें ॥ ९० ॥ रसना सेवितां रसमात्र । गोडिया सुखावे अंतर । सेवितां रामचंद्रवीर । सबाह्याभ्यंतर सुखरूप ॥ ९१ ॥ एकलें एक चूतफळ । निववी इंद्रियें सकळ । श्रीरामपंक्ती अच्युतफळ । जग सकळ सुखरूप ॥ ९२ ॥ वैराग्यतापें तापलिया । त्याचि संतत काचरिया । अनुतापतैलीं तळलिया । चवी आलिया श्रीरामें ॥ ९३ ॥ एकें भोजनीं अविचारितें । सेविती निंदेचें राइतें । चवी चाखतां कुसमुसितें । कपाळ हातें पिटिती ॥ ९४ ॥ नाकीं तोंडीं धूर उठी । तळमळूनि कपाळ पिटी । राम त्यातें नातळे दृष्टीं । हे परिपाटी भोजनीं ॥ ९५ ॥ लोणचीं वाढिलीं अनेकें । रंगलीं भक्तिप्रेमरंगें । एकें सलवणें सर्वांगें । स्वाद श्रीरंगें सेवावा ॥ ९६ ॥ अहं कडुवट कुहिरी । सोहं लोणच्यांत रंगली खारीं । वैराग्यभोकरें खारलीं सारीं । त्याहीमाझारी मुक्त मिरवे ॥ ९७ ॥ स्वबोधआलेंसीं आंवळा । भोजनें चवी अति आगळा । मुळींच्या मुळेंसीं रंगला । स्वयें सेविला श्रीरामें ॥ ९८ ॥ त्रिगुणाचें निजत्रिकूट । निर्गुणें भरिलें त्याचें पोट । घमघमीत उद्भट । अति स्वादिष्ठ श्रीरामें ॥ ९९ ॥ ऐसीं लोणचीं नेणों किती । मुख्य स्मरण आलें नेपतीं । तो स्वाद जाणे रघुपती । बैसले पंक्तीं ते धन्य ॥ १०० ॥ सूक्ष्म सेवेच्या सेवया । मोडोनि देतां सगळिया । क्षीरसाखरेशीं आळलिया । स्वयें सेविल्या श्रीरामें ॥ १ ॥ पोकळ वळवटें सरळीं । एकें वाटोळीं लांबोळीं । सेवेमाजी अवघीं आलीं । ठायीं पावलीं रघुनाथा ॥ २ ॥ परम स्वादाची साखर । पंचरस पंचधार । घृत वाढिलें सर्वसार । स्वादें रामचंद्र डुलत ॥ ३ ॥ अनुतापें सद्यस्तप्त । निजसाराचें सार घृत । अखंडधारा स्वयें वाढित । श्रीरघुनाथ निजभोक्ता ॥ ४ ॥ शास्त्रपरिपाडें पापड । नानायुक्ती अति तडफड । जळजळेचे आले फोड । तेणें कडकड मोडती ॥ ५ ॥ यालागीं घातले होते मागें । ते ओढोनि भजनमार्गें । विरवोनियां सर्वांगें । रामभोगें स्वादिष्ठ ॥ ६ ॥ श्रीरामसीतेची प्रीती सदा । त्यामाजी सांडया अवद्धा । यालागीं न करीच सुमेधा । वृद्धानुवादा जाणोनी ॥ ७ ॥ समूळ गुंतली कुरवंडी । स्वयें नुगवेचि बापुडी । शांतिदांतीं केली कुडकुडी । आली रोकडी रामसुखा ॥ ८ ॥ विषयलालसाचे पैं लाड्डू । विवेकें वाढिले फोडफोडू । तेणें पडिपाडें तिळव्याचा जोडू । स्वाद गोडू श्रीरामें ॥ ९ ॥ वैराग्यकढें कढविली कढी । तीमाजी माया मुगवडी । विरोनि स्वादा आली गाढी । तिची गोडी राम जाणे ॥ ११० ॥ त्यामाजी जिरें मिरें कापुरा । तेणें सुवास चढे अंबरा । रसज्ञ सेविती फरफरा । श्रीरामचंद्राचेनि धर्मे ॥ ११ ॥ भजनभावाच्या मांडेपुरिया । क्षीरसागरींच्या क्षीरधारिया । सबाह्य गोड गुळवरिया । पूर्णपुरिया परिपूर्ण ॥ १२ ॥ भजनभेदें सफेद फेणी । प्रेमशर्करा भरली भरणी । अमृतफळातें लाजवोनी । वाढले आयिणी आंबवडे ॥ १३ ॥ दुसधी गोडियेची घडियेली । तैसी खांडवी वाढिली । चंद्रबिंबींची काढिली । घडी मांडिली मांडियांची ॥ १४ ॥ मांडियांची ऐका नवलपरी । चतुर्वेद घडिया चारी । कर्म कानवले उत्तरी । श्रीरामचंद्रीं निजस्वाद ॥ १५ ॥ विवेकसडणीं अति सोज्ज्वळे । उभय भागीं निजतेजाळे । तांदूळ वेळियेले आणियाळे । भावबळें अरुंवार ॥ १६ ॥ सोहं ओगराळें सनाथ । अलिप्तपणें भरिला भात । ठायीं वाढिला न फुटत । श्रीरघुनाथ निजभोक्ता ॥ १७ ॥ अन्ना वर्णांचें श्रेष्ठता । सबाह्य कोंडा सांडिला परता । चढलें मध्यनायकाचे माथां । प्रिय रघुनाथा यालागीं ॥ १८ ॥ सर्व स्वादाचें कारण । स्वयें श्रीराम आपण । यालागीं वाढिलें वरी लवण । अपूर्ण तें पूर्ण करील ॥ १९ ॥ श्रीरामपंक्तीं रस पीयूष । ज्यासी श्रद्धेची अति भूक । ग्रासोग्रासीं चढतें सुख । हे परवडी देख त्यालागीं ॥ १२० ॥ न्यून नाहीं श्रीरामपंक्तीं । जेवितां जेविते चवी जाणती ।

१ आंबा. २ मूर्खपणानें. ३ नाकांत भरतें. ४ क्रम, प्रकार. ५ पंक्तीला. ६ अणकुचीदार. ७ नाजुक. ८ वरणानें. ९ मीठ. १० अमृत.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

रुचलेपणे जाणे वाढती । जनक नृपति सावध ॥ २१ ॥ सुमेधा सदा सावधान । जाणे तृषितांचें लक्षण । सबाह्य निववीतसे पूर्ण । जीवा जीवन देतसे ॥ २२ ॥ सुमेधा स्वयें खुणाविती । चारी मुक्ति स्वयें रावती । जें जें ज्याचे मनोगतीं । तें तें देती त्या ठायीं ॥ २३ ॥ पहिल्या नवजणी[1] वाढत्या । चवधी जणी पूर्ण कर्त्या । जे पंक्तीस श्रीराम भोक्ता । तेथें अतृप्तता असेना ॥ २४ ॥ एवं तृप्त अभ्यंतर । देती स्वानंदउद्गार । स्वानंदें कोंदले जेवणार । श्रीरामचंद्र निजभोक्ता ॥ २५ ॥ सुमेधा सावधान वाढी । राजे धाले निजपरवडीं । ब्राह्मणतृप्ति जाली गाढी । धोत्रें बुडीं ढिलाविती ॥ २६ ॥ तृप्ति जाली सकळिकां । उष्टावणी रघुकुळटिळका । रामनामीं निजमुद्रिका । ठायीं देखा ठेविली ॥ २७ ॥ श्रीरामनाममुद्रा देखतां । उल्लास सुमेधेच्या चित्ता । चरणीं लागली रघुनाथा । लाज सर्वथा विसरली ॥ २८ ॥ संतोषोनि रघुपती । सुमनमाळा तिसी देती । हर्ष न समाये त्रिजगतीं । सीता सती सभाग्य ॥ २९ ॥ जे जे जेविले श्रीरामपंक्तीं । ते ते संसारा आंचवती । श्रीरामनामें सुखीं रंगती । विडे शोभती सुरंग ॥ १३० ॥ फोडफोडूनि फळाशा । शांतिपक्वपानाची देशा[3] । वासना शिरा काढोनि निःशेषा । तांबूल परेशा श्रीरामा ॥ ३१ ॥ अहं जाळोनियां कठिणपणा । सोहं गाळींव काढिला शुद्ध चुना । लागोनि शांतिपरिपक्व पाना । श्रीरामवदना सुस्वाद ॥ ३२ ॥ सर्वसाराचें निजसार । तोचि सेविती खदिरसार[4] । श्रीराममुखीं रंगाकार । अधरीं सधर शोभत ॥ ३३ ॥ श्रीरामप्रसाद हाता येतां । सुमेधा लाहे उल्लासता । स्वयें सीतेचे हातीं देतां । तिनेंही माथां वंदिली ॥ ३४ ॥ वंदूनियां श्रीरामचंद्रा । हृदयीं धरिली राममुद्रा । प्रसाद सेवितां ते भद्रा । नरा नरेंद्रा विपुलांगें ॥ ३५ ॥ श्रीरामाच्या निजदीप्तीं । उदय अस्त नाठवती । उपाध्ये रायातें सांगती । उदया गभस्ति येऊं पाहे ॥ ३६ ॥ मांडवा चाला लवडसवडीं । आधीं प्रतिष्ठावी घडी । दशरथें निजनिरवडीं । फळ तांतडीं आणावें ॥ ३७ ॥ एका जनार्दना शरण । जालें रुखवत संपूर्ण । पुढें सीतापाणिग्रहण । सावधान अवधारा ॥ १३८ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे बालकांडे एकाकारटीकायां सीमान्तपूजनरुखवत-भोजनं नाम त्रयोविंशतितमोऽध्यायः ॥ २३ ॥ ओंव्या ॥ १३८ ॥ श्लोक ॥ ५ ॥

अध्याय चोविसावा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः । श्रीरामप्रसाद सेवितां । समाधिसुख फिकें आतां । ऐसी उल्लासली सीता । श्रीरघुनाथाचेनि शेषें ॥ १ ॥ सद्गुरु-परात्पर उपरी । सर्वांतें सावधान करी । घटिका प्रतिष्ठिली अंतरीं । जीवनावरी संख्येची ॥ २ ॥ अक्षरें अक्षर पळेंपळ । घडी भरतां न लगे वेळ । लोक व्यापारें विकळ । काळ गेला नेणती ॥ ३ ॥ घडी झेंगटातें[6] हाणित । काळ जावों न द्यावा व्यर्थ । तेणें काळें काळ अंत आणित । मुद्गल तेथें बुडालें ॥ ४ ॥ नवल लोकांची नवाई । काळें गिळिलें न पडे ठायीं । दुमाही चौमाही गणिता वही । तेणें पाहीं नागवले ॥ ५ ॥ सद्गुरु सांगे भरली घडी । उगेंच पाहताती वऱ्हाडी । ज्यांसी निजकार्याची तांतडी । ते घडिया घडी साधिती ॥ ६ ॥ श्रीरामसेवक सावचित्त[7] । क्षणक्षण जावों न देती व्यर्थ । फळ विस्तारी रघुनाथ । तेणें सकळार्थ सफळित ॥ ७ ॥ सीतेसी नेसावया चिदंबर । नानारत्नांचे अलंकार । हृदयपदकीं नीळ मनोहर । विचित्र हार मुक्तलग[8] ॥ ८ ॥ अहंकाराचें बीज भरडी । मोहममतेचा कोंडा दवडी । सोलींव डाळीची परवडी । भरली दुरडी[9] भावाची ॥ ९ ॥ घेवोनि विवेकाची चाळणी । कणीक चाळिली सुगरणीं । फोलकट[10] त्यागिलें सांडोनी । गूळ गोडपणीं त्यामाजी ॥ १० ॥ समूळ देंठींहून सुटलीं । निजपरिपाकें उतटलीं[11] । प्रमदास्पर्शें नाहीं स्पर्शिलीं । फळें आणिलीं फळार्थी ॥ ११ ॥ रंभाफळें[12] परम पवित्रें । वक्राकृति अपवित्रें । सोलून सांडिलीं रामचंद्रें । केलीं अवक्रें श्रीरामें ॥ १२ ॥ लोकांचे फळीं चूतफळ[13] । तेंही माझारी गांठियाळ[14] । राम विस्तारी अच्युतफळ । फळें सफळ विदेही ॥ १३ ॥ सौभाग्यद्रव्य ठेविलें आधीं । धणे आणि

१ नवविध भक्ति. २ चार मुक्ति. ३ अग्रें. ४ कात. ५ पाण्यावर. ६ घड्याळाला, तासाला. ७ तत्पर.

८ मोत्यांचे. ९ पाटी. १० कोंडा. ११ भरलेलीं, परिपूर्ण. १२ केळीं. १३ आंबा. १४ गुठळ्या असलेलें, कोईनें युक्त.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

हळदी। जिरें मेळविलें त्यामधीं। जेंवी सद्बुद्धीं विवेक ॥ १४ ॥ श्रीराम मुख्य अहेवतंतु। श्याममणि स्वयें ओंवितु। त्यामाजी रामनामसंकेतु। कंठीं एकांतु गळसरी ॥ १५ ॥ तोडूनि सांडिल्या गांठ्याळ गांठी। स्मरणमणी सीतेच्या कंठीं। वांधावया गळसरी गोमटी। राम जगजेठी स्वयें ओंवी ॥ १६ ॥ विमन त्यजोनि सर्वत्र। शुद्ध सुमनांचे हार। गुणेंवीण गुंफी रामचंद्र। सीता मनोहर तेणें शोभे ॥ १७ ॥ नाहीं मध्यमध्य गांठ्याळ। सबाह्य रसें अति रसाळ। इक्षुदंडें अति सोज्ज्वळ। आणिले सफळ फळांसीं ॥ १८ ॥ कांटे पुढें काळे नेवाळे। चहूं वर्णींही वेगळे। ऊंस आणिले प्रेमसमेळें। सफळ फळें सीतेसी ॥ १९ ॥ एकें बीजेंवीण फळें। एकें त्वचेवीण रसाळें। एकें सबाह्य निर्मळें। सफळफळें सीतेसी ॥ २० ॥ चहूं मुक्तींच्या सेवया कुसरी। श्रद्धेच्या परड्या दुरड्या भरी। देवोनि नवविधींच्या करीं। फळ बाहेरी काढिलें ॥ २१ ॥ ऋष्यशृंगाची कांता अलंकारें। शांता करवली सौभाग्यभरें। मिरवताहे अति गजरें। मंगळतुरें गर्जती ॥ २२ ॥ सूर्यवंशींच्या राजवल्लभा। जैसी सूर्याची निजप्रभा। तैशा शोभती निजांगशोभा। वेदगर्भा श्रुतिव्यक्ती ॥ २३ ॥ लक्ष्मी पहावया रघुपती। वऱ्हाडिणी आल्या श्रुतिस्मृती। कर्मकांडींच्या घेवोनि बुंथी[४]। मिरवताती निजगजरें ॥ २४ ॥ घेवोनि ऋषिवर्गाचा मेळ। निघाला दशरथ भूपाळ। राजे चालिले सुहृद सकळ। तुरें बंबाळ लागलीं ॥ २५ ॥ जनक आला जी सामोरा। नमस्कारिलें ऋषीश्वरां। मंडपीं बैसविलें नृपवरा। ऋषीश्वरांसमवेत ॥ २६ ॥ कन्या बैसावया मूळपीठ। निजप्रकृतीचें धुवट। वरी अंथरिलें चोखट। पुरोहित श्रेष्ठ शतानंद ॥ २७ ॥ कन्या आणिल्या बाहेरी। वस्त्रें अर्पून त्यांचे करीं। सवेंचि नेल्या जी भीतरीं। त्या चमत्कारीं नेसल्या ॥ २८ ॥ फेडून मायामलिनांबरें। रामनामें चूण मनोहरें। चौघी नेसल्या चिदंबरें। जयजयकारें आणिल्या ॥ २९ ॥ वरावया निजात्मपती। चारी मुक्ति शृंगारिती। तैशा चौघी जणी येती। सीता सती मुख्यत्वें ॥ ३० ॥ सीतेचा पँल्लव झळकत। उजेड पडला मंडपांत। सून देखोनि दशरथ। अति विस्मित पैं जाला ॥ ३१ ॥ ते तंव लेणियाचें लेणें। तिचेनि शोभती भूषणें। सीतेचेनि निजगुणें। अवघ्या सगुण भासती ॥ ३२ ॥ सीताअंगप्रभाकिरणें। लाजलें अंधाराचें जिणें। लोपलें उष्ण आणि चांदणें। प्राणी प्राणें तटस्थ ॥ ३३ ॥ न कळे दिवस ना राती। लवीं विसरलीं नेत्रपातीं। समूळ शब्दांची जाली शांती। अवघीं पाहती टकमकां ॥ ३४ ॥ वसिष्ठ म्हणे सावधान। दशरथें देखिली सून। वेगीं करी फल अर्पण। श्रीरामलग्न साधावया ॥ ३५ ॥ लावावया श्रीरामलग्न। नाहीं उरलें व्यवँधान। सीता साधावया निधान। फल अर्पण करी वेगीं ॥ ३६ ॥ पहिलेनि अर्पितां फळ। कार्य न साधे तत्काळ। निःशेष अर्पिल्या फळ सकळ। खूण भूपाळ पावला ॥ ३७ ॥ वसिष्ठाच्या निजवचना। सन्मुख बैसवोनि चारी सुना। निःशेष फळ अर्पिलें जाणा। वस्त्रभूषणांसमवेत ॥ ३८ ॥ पुरोहित जनकवंशीं। शतानंद धनउदासी। दशरथें आणोनि त्यासी। घातलीं कलशीं कोटिद्रव्यें ॥ ३९ ॥ तो म्हणे राया दशरथा। देखिलिया रघुनाथा। द्रव्यलोभ नाहीं आतां। रायें चरणीं माथा ठेविला ॥ ४० ॥ द्विजां अग्रपूजासन्मान। दिधलें सुमनचंदन। सकळां तांबूल संपूर्ण। फलार्पण पैं जालें ॥ ४१ ॥ वसिष्ठ सांगे जनकासी। शीघ्र मूळ यावें वरासी। दशरथासहित ऋषी। जानवशासी स्वयें आले ॥ ४२ ॥ बोलती वराडणी वेल्हाळा। कन्या देखतांचि डोळां। तहान भूक नाठवे सकळां। अपूर्व कळा सौभाग्यें ॥ ४३ ॥ अत्यंत सुरूपा चौघी जणी। समूळ सौंदर्याच्या खाणी। लावण्यपीठींच्या दिव्य योगिनी। सगुणगुणी गुणांच्या ॥ ४४ ॥ साधावया नवविधान। स्वयें श्रीराम सज्ञान। त्र्यंबक भंगोनियां जाण। दिव्यरत्न पर्णिलें ॥ ४५ ॥ येवोनि आद्या शक्ति जाण। स्वयें श्रीरामासी आपण। अदृश्यीं बांधलें दृश्यकांकण। जीवें

१ सौभाग्याचा दोरा. २ दोरीवांचून. ३ ऊंस. ४ आवरण, अच्छादन. ५ मायारूपी मळकट वस्त्रें. ६ पदर. ७ आडकाठी. ८ धनाविषयीं निरिच्छ. ९ आमंत्रण, बोलावणें. १० ब्रह्माचे ठिकाणीं. ११ जडसृष्टिरूप कांकण.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

निंबलोण करोनि गेली ॥ ४६ ॥ जनक अति संभ्रमेंसीं । मूळ निघाला वरासी । सुमेधा अत्यंत उल्लासीं । तेलवणासी विस्तारी ॥ ४७ ॥ सूक्ष्म सेवेचे पैं लाडू । श्रीरामासी अत्यंत कोडू । वैराग्य शर्करा अति गोडू । तिळव्या जोडु सुस्वादु ॥ ४८ ॥ शाब्दिकशब्दाची खसखस । धुऊन सांडिली कसकस । लाडू वळले सुरस । शुद्ध चिदंश गुळगोडिया ॥ ४९ ॥ चार्वाकचारें फोड-फोडू । चैतन्यचारोळ्या पडिपाडू । चित्साकरा वळले लाडू । सुखसुरवाडू श्रीरामा ॥ ५० ॥ अष्टांगयोगींचें अष्टदळबीज । त्याचेंही सोलूनि काढिलें निज । सुमेधा लाडू वळिले सहज । दाखवी वोज तेलवणा ॥ ५१ ॥ सप्रेम सर्वांगीं कांटे । फणसाअंतरीं गोड गोमटे । त्याचेंही बीज काढूनि नेटें । लाडू गोमटे वळियेले ॥ ५२ ॥ अति सज्ञान विदेहभोज । गंगांफळाचें[३] निजबीज । सोलून लाडू वळिले सहज । निजवोज तेलवणा ॥ ५३ ॥ कंटकांमाजी दांभिक बोरें । आंत आंबट वरी साजिरें । त्याचेंही बीज फोडून निजनिर्धारें । काढी बाहेर निजबीज ॥ ५४ ॥ सद्भावाचा गूळ गोडू । घालोनि वळिले लाडू । श्रीराम जाणे चवी निवाडू । पडिपाडू तेलवणा ॥ ५५ ॥ वैराग्य कडकडित कडकणें । सुमेधा आणी तेलवणें । श्रीरामउद्देशाचेनि गुणें । फुटणें तुटणें त्या नाहीं ॥ ५६ ॥ निजप्रपंचा उंबगले । तेचि वांकडे कानवले । मुरडी सद्भावें मुरडले । ते आवडले श्रीरामा ॥ ५७ ॥ संदेहाचें तेलवण । बोलावया बहुतां आंगवण । परी तें विदेहाचें तेलवण । अति कठिण अर्थितां ॥ ५८ ॥ वरासी मूळ गज गंहिरे । जनक आला अत्यादरें । सुमेधा सुवासिनीसंभारें । निजगजरें पैं आली ॥ ५९ ॥ देवोनि दशरथें सन्मान । दोहीं पक्षींचे सुहृज्जन । सभे बैसविले प्रसन्नवदन । समाधान मंडपीं ॥ ६० ॥ वर उपविष्ट सर्वांतरीं । भावें आणावया समेभीतरीं । वसिष्ठ सद्गुरु हातीं धरी । राम बाहेरी तैं प्रकटे ॥ ६१ ॥ श्रीराम लावण्याची राशी । फेडी वेडी नाहीं त्यासी । त्याचेनि सुंदरत्व जगासी । सीमा रूपासी न करवे ॥ ६२ ॥ वसिष्ठगुरुवचनीं । श्रीराम आला सभास्थानीं । तेजें कोंदलीं नभमेदिनी । वरांसनीं बैसविला ॥ ६३ ॥ देखतां श्रीरामाचें मुख । तटस्थ जाले सकळ लोक । डोळयां लागली टकमक । अंतरीं सुख कोंदलें ॥ ६४ ॥ श्रीरामाचेनि दर्शनें । होत डोळियां पारणें । इंद्रियें सुखावलीं संपूर्ण । बोलणें चालणें तटस्थ ॥ ६५ ॥ वसिष्ठ म्हणे सावधान । वेगीं समर्पा तेलवण । सुमेधा येवोनि आपण । पाहे वदन वराचें ॥ ६६ ॥ देखोनि श्रीरामाचें वक्त्र । परमानंदें धाले नेत्र । देतात तृतीचे ढेंकर । तरी अपार भुकेले ॥ ६७ ॥ वारंवार मुख न्याहंरी । हरिखें निंबलोण उतरी । राम देखोनि सर्वांतरीं । जीवें करी कुरवंडी ॥ ६८ ॥ सर्वांतरीं राम परिपूर्ण । कवणा वाहूं तेलवण । वसिष्ठ येवोनि आपण । श्रीराम खुणेनें प्रबोधी ॥ ६९ ॥ ज्याचें देखतां दर्शन । सर्वांतरीं दिसे परिपूर्ण । तोचि श्रीराम मुख्य जाण । त्यासी तेलवण अर्पावें ॥ ७० ॥ ऐकतां वसिष्ठाचें वचन । सुमेधा जाली सावधान । श्रीरामासी तेलवण । वस्त्रें भूषणें अर्पिलीं ॥ ७१ ॥ वऱ्हाडी बोलती नवाई । मुख्य वोहंमाय नोळखे जांवाई । आतां आम्हीं करावें काई । वर लवलाहीं चालूं द्या ॥ ७२ ॥ जैसें श्रीरामासी तेलवण । तैसेचि भरतशत्रुघ्नलक्ष्मण । देवोनि दिव्यांबरें भूषण । समसमान पूजिले ॥ ७३ ॥ शुद्धसत्त्वाचा श्वेत वारू । त्यावरी चढला रघुवीरू । सत्त्वाथिला अत्यंत धीरू । श्रीरामभारू तो साहे ॥ ७४ ॥ चौघांसीही समसमान । बैसावया श्वेतवाहन । चौघेही वर शोभायमान । जननयन आल्हादी ॥ ७५ ॥ लक्षूनि पूर्ण परमानंदु । प्रकटे सच्चिदानंदु । तैसे रामासमेत तिघे बंधु । निजात्मबोधु एकात्मता ॥ ७६ ॥ जेंवी कां ॐकार मुख्य वेदु । तोचि भासे चतुर्विधु[११] । तैसेच हेही चौघे बंधु । निजबोधु एकात्मता ॥ ७७ ॥ एकाचि साधूच्या शरीरीं । भासती पुरुषार्थ चारी । तैसीच या चौघांची परी । एकाकारीं निजबोधु ॥ ७८ ॥ जेवीं एक श्लोकीं चरण चारी । तैसीच या चौघांची परी । श्रीराम अर्थ श्लोकाक्षरीं । तेवीं चौघां-

---

१ कुरवंडी. २ जनकस्त्री. ३ भोपळ्याचें. ४ कंटाळले. ५ गंभीर. ६ आकाश व पृथ्वी. ७ मुख्य आसनावर. ८ तृप्त झाले. ९ निरखून पाहे. १० वधूची माता. ११ चार प्रकारचा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

भीतरीं एकत्व ॥ ७९ ॥ वर मिरवती एकत्रें । धरिलीं तन्मयाचीं निजछत्रें । निजबोधाचीं ढळती चामरें । दशविध तुरें लागलीं ॥ ८० ॥ घंटाकिंकिणींचे शब्द । मधुर शब्दांचे अनुवाद । वीणा वेणु मृदंगनाद । शुद्ध शब्दचि काहळा ॥ ८१ ॥ तुरें काहळा गर्जती भारी । निशाण त्राहाटिलें गजरीं । दुमदुमलिया मंगळ मोहरी । नादांतरीं मन निवे ॥ ८२ ॥ जैसा अनुहताचा गजर । तैसीं तुरें अपार । नादें कोंदलें अंबर । शब्दाकार नभ जालें ॥ ८३ ॥ श्रीरामवर्णनीं चतुर । चौघे भाट अति गंभीर । अठरा मागध विचित्र । वंशींचे वीर वर्णिती ॥ ८४ ॥ शब्दानुवादें अत्यंत प्रबळ । साही जणां वाद सबळ । शब्द करिती सळें । अभिमान प्रबळ ज्ञानाचा ॥ ८५ ॥ आठही भाव अत्यंत प्रीतीं । सत्त्वाचा रू धरोन हातीं । श्रीरामासवें नित्य चालती । अन्यथा गति त्यां नाहीं ॥ ८६ ॥ सुखछायेचीं आतंपत्रें । चिदंबरींचीं पालवछत्रें । झळकताती तेजाकारें । श्रीरामचंद्रें उल्लास ॥ ८७ ॥ अनुभवस्वानंदें दुर्धर । भाट गर्जती अति गंभीर । दोहीं बाहीं कुंजरभार । चालती स्थिर श्रीरामें ॥ ८८ ॥ श्रीरामें त्यजिल्या त्याग देऊनी । अष्टही महासिद्धि नाचणी । नाचती चपळपणीं । जनांलागूनी भुलवावया ॥ ८९ ॥ सिद्धि जेथें नाचतां देखती । योगी साधक तेथें ढेसंती । शेखीं संन्यासी भुलती । पाहणें रघुपती विसरोनी ॥ ९० ॥ चैतन्य बुका घाली रघुनाथ । ज्यासी लागे तो धन्य जगांत । याचकाचें निवे चित्त । तैसें देत संज्ञेनें ॥ ९१ ॥ शतानंद जगजेठी । घेवोनि विवेकवेताटी । दृश्याची मांदी मागें लोटी । श्रीराम दृष्टीं पहावया ॥ ९२ ॥ श्रीरामरूपीं अत्यंत प्रीती । वैष्णव पुढें नाचती । अहं सोहं सोडोनि वृत्ती । नित्य करिती स्वानंदें ॥ ९३ ॥ श्रीरामासवें सुवासिनी । ब्रह्मविद्येच्या ब्राह्मणी । बोधपुत्राच्या जननी । सुखासनीं मिरवती ॥ ९४ ॥ ऐसिया सुवासिनी समस्ता । निजबोधाच्या अक्षता । घालिती रघुनाथाचे माथां । लक्ष सर्वथा न चुकती ॥ ९५ ॥ श्रीरामाचे सोयरे आप्त । योगी अनुभवी ज्ञानी मुक्त । त्यांसी वहनें रघुनाथ । जें जें देत तें ऐका ॥ ९६ ॥ एका सलोकता घोडे । एका समीपता रथ चोखडे । एका स्वरूपता गज गाढे । भंवभंगडे रणरंगीं ॥ ९७ ॥ सायुज्य चवरडोलावरी । बैसविले निजाधिकारी । त्यांसी जवळोनियां दुरी । क्षणभरी जाऊं नेदी ॥ ९८ ॥ भरून रज तम औषध । अग्नियंत्रें करोनि सिद्ध । श्रीरामासीं अति विनोद । एक प्रबुद्ध दाविती ॥ ९९ ॥ चैतन्याग्नि देवोनि देहीं । ममता जाळिली हॅंवाई । गगनास उसळोनियां पाहीं । ठायींच्या ठायीं निवाली ॥ १०० ॥ सलोभ लोभाच्या चिचुंदरी । विवेकें जाळोनि टाकिल्या दुरी । त्या पडती जनांवरी । उरीं शिरीं जाळिती ॥ १ ॥ देवोनि उपशम अनळा । जाळिला क्रोधाचा भुइनळा । भडभडां निघोनि ज्वाळा । तोही तत्काळा निमाला ॥ २ ॥ श्रीरामयुक्तीच्या स्वलीळा । जाळित कामाचा हातनळा । जाळूं नेणती त्या अबळा । जीवीं जिव्हाळा पोळितू ॥ ३ ॥ पाहतां अत्यंत कठीण । चिन्मात्र अग्नि लावून पूर्ण । जाळिला अहंकारबाण । पळे जीवपण दचकोनी ॥ ४ ॥ अहंममताकामक्रोधशांती । करीत येतसे रघुपती । वृथा वाढविली युक्ती । ऐसें संतीं न म्हणावें ॥ ५ ॥ जाहल्या अहंममतादिशांती । उजळोनि निजात्मचंद्रज्योती । प्रकटली परमदीप्ती । तेही स्थिति अवधारा ॥ ६ ॥ समूळ अंधार नुरेचि तेथ । उष्ण चांदणें घोंटी समस्त । तेज प्रकटलें अत्यद्भुत । सुखें डुल्लत श्रीरामें ॥ ७ ॥ एवं नाना परींचे त्याग । पदोपदीं जी अनेग । ओंवाळिती जीवभाग । स्वयें श्रीराम पैं आला ॥ ८ ॥ कन्येचिया द्वारापासीं । एके भागीं सिद्धिदासी । शकुनालागीं श्रीरामासी । पूर्ण कॅलशेंसीं तिष्ठती ॥ ९ ॥ दुसरे भागीं द्वाराप्रती । श्रद्धा कीर्ति धृति विरक्ती । जीवें ओंवाळावया रघुपती । स्वयें तिष्ठती सर्वदा ॥ ११० ॥ एकीं त्याग दिधला निःशेष । एकीं दिधला परम हर्ष । एकीं दिधलें अनंत सुख । एकीं आवश्यक निजवास ॥ ११ ॥ जीवभावाचिया मुदी । ओंवाळूनि सांडी सुमेधा ।

१ वाजंत्रें. २ नगारा. ३ छळ. ४ घोडा. ५ अबदागिरें. ६ हत्तींचे समुदाय. ७ फसतात. ८ विवेकरूपी वेताची काठी. ९ संसारनाश करणारे. १० चंद्रज्योत. ११ पाण्यानें भरलेल्या घागरी घेऊन. १२ भाताच्या मुदा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सोहळा देखोनि निर्वेदा । परमानंदा ते पावे ॥ १२ ॥ द्वारीं प्रवेशला रघुनाथ । चौघां बंधूंसमवेत । अवघे जयजयकार करीत । मंडपाआंत आणिले ॥ १३ ॥ छेदावया हृदयबंधु । गुरुवाक्येंसीं रिघे बोधु । तैसे घेवोनि तिघे बंधु । राम प्रसिध्दु स्वयें आला ॥ १४ ॥ दशेंद्रियें अति समर्थ । दशेंद्रियांसीं अति अलिप्त । तोचि महाराज दशरथ । सोहळा समस्त त्याचेनि ॥ १५ ॥ एका जनार्दना शरण । मंडपा श्रीरामआगमन । पुढें मधुपर्कविधान । श्रोतीं सावधान परिसावें ॥ १६ ॥

स्वस्ति श्रीभावार्थरामायणे बालकांडे एकाकारटीकायां श्रीराममंडपागमनं नाम चतुर्विंशतितमोऽध्यायः ॥ २४ ॥ ओंव्या ॥ ११६ ॥

अध्याय पंचविसावा

॥ श्रीरामचंद्राय नमः ॥ श्रीराम मंडपाआंत । आला चहूं वरांसमवेत । जनकासी आल्हाद बहुत । आला दशरथ ऋषियुक्त ॥ १ ॥ जनकें दिधला सन्मान । गाद्या पडगाद्या वरासन । मृदुलिया ओटंगण । ऋषिसंपन्न सभेसी ॥ २ ॥ मधुपर्काचें विधिविधान । चारी पुरुषार्थ चैवाई जाण । त्यावरी समाधिसुखासन । वरासन चौघांसी ॥ ३ ॥ सदोदिता आवाहन । अधिष्ठानासी आसन । कर्मरहितासी आचमन । चरणक्षाळण अचरणा ॥ ४ ॥ श्रीराम भूषणां भूषण । त्यासी अलंकार आभरण । निरावरणासी प्रावरण । सर्वगता आगमना वाहनादिक ॥ ५ ॥ सहजासी पाठीपोट । अखंडासी वस्तिपीठ । निःशब्दा शब्द स्पष्ट । निरंतरा अंतःपट लग्नार्थ धरिती ॥ ६ ॥ श्रीराम परब्रह्म स्वतंत्र । तोही धरी ब्रह्मसूत्र । वेदविधान आचार । श्रीरामचंद्र प्रतिपाळी ॥ ७ ॥ असो हा अगाध परमार्थ । जनक आला मधुपर्कार्थ । त्याचा जाणोनि भावार्थ । श्रीरघुनाथ अंगीकारी ॥ ८ ॥ सर्व समता समसमान । तेंचि श्रीरामासी आसन । आशानैराश्यासी अर्घ्यदान । तेणें श्रीचरण समर्घ्य जाले ॥ ९ ॥ पाद्यार्घ्यालागीं तीर्थ । त्रिगुणत्रिवेणी गुणातीत । चैतन्यप्रवाहें पुनीत । यथोचित चिद्गंगा ॥ १० ॥ स्वयें सुमेधा घाली उदक । चरण प्रक्षाळी विदेह जनक । तळीं तीर्थें सकळिक । आलीं आवश्यक चरणतीर्था ॥ ११ ॥ श्रीरामाचें चरणतीर्थ । सेवितां तीर्थें होती पुनीत । सुर नर सिद्ध आले तेथ । लग्नीं रघुनाथ पहावया ॥ १२ ॥ सुमेधा शुद्ध निर्जीवन । घाली श्रीरामासी आचमन । चोविसां नामांसीं संपूर्ण । सर्वापोशन कर्माचें ॥ १३ ॥ परब्रह्मींचा अधिष्ठात्रा । त्यासीही देती ब्रह्मसूत्रा । मान देतो वृद्धाचारा । श्रुतिव्यवहारा संरक्षी ॥ १४ ॥ टिळे माळा शुद्ध सुमनें । चिद्रत्नादि दिव्यभूषणें । भावें पूजिलें चौघांकारणें । परिधानें पीतांबरें ॥ १५ ॥ उदक घालितां मूळांत । शाखा पल्लव टवटवित । तेंवी पूजिल्या रघुनाथ । सालंकृत बंधु चारी ॥ १६ ॥ रसस्वाद रसना घोंटी । तेणें इंद्रियां पुष्टितुष्टी । राम पूजियेल्या जगजेठी । बंधुत्रिपुटी संपूज्य ॥ १७ ॥ मुख्य स्थानीं अग्नौकरण । तेणें सुखी देवब्राह्मण । तेंवी पूजिल्या रघुनंदन । चौघे जण संपूज्य ॥ १८ ॥ एका मनासी संबोधन । तेणें इंद्रियां समाधान । तैसें अधिष्ठान रघुनंदन । तेणें बंधु आपण संतुष्ट ॥ १९ ॥ दधि मधु एकत्रंता । घातलें चौघांचिया हातां । विदेहाच्या निजभावार्था । श्रीरघुनाथा अति प्रीती ॥ २० ॥ विपरीत वेदविधान । दधि मधु प्राशी रघुनंदन । निष्कर्मासी कर्मबंधन । विस्मित जन सुर सिद्ध ॥ २१ ॥ जनक म्हणे प्रतिगृह्यतां । प्रतिगृह्णामि म्हणविती रघुनाथा । विदेहें सोडिलिया अहंता । प्रतिग्राह्यता सर्वांची ॥ २२ ॥ संकल्प सांडितां नरेंद्र । दधि मधु सेवितां रामचंद्र । सुमेधा घालीतसे पैं नीरें । प्रक्षाळी कर श्रीराम ॥ २३ ॥ सर्वेचि केलें शुद्धाचमन । सद्गुरु म्हणती सावधान । नाहीं विलंबु व्यवधान । वेगीं सुलग्न साधावें ॥ २४ ॥ श्रीरामपद रितें न पडे । पूर्णता पायीं पायीं मांडे । दोन्ही सद्गुरु दोहींकडे । वरू वाडेंकोडें चालविले ॥ २५ ॥ गौरीहरीं सीता सती । गौरीहरातें शिंपिती । शिवासी श्रीरामाची प्रीती । आला लग्नार्थी भवानीसीं ॥ २६ ॥ मुख्य माया अंतःपट । तिसी

---

१ गिरद्या. २ लोडें. ३ चौरंग. ४ प्रार्थनापूर्वक बोलावणें. ५ पवित्र. ६ पवित्र उदक. ७ यज्ञोपवीत. ८ श्राद्धामध्यें साग्निक अग्नींत, व निरग्निक ब्राह्मणाच्या हातावर आहुती देतात त्या. ९ एकत्र करून. १० अंगीकार करा. ११ अंगीकार करतों. १२ उदक. १३ पार्वतीसह.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

श्रीरामें शेवट । जनक निजभाग्यें वरिष्ठ । सोयरा श्रेष्ठ श्रीराम ॥ २७ ॥ श्रीरामनामाचें नित्य स्मरण। अंतःपटनिवारण । त्यासीही अंतःपट जाण। धरिती ब्राह्मण वेदार्थी ॥ २८ ॥ सुटावया देवांचें बंधन । मुख्य सीताचि कारण । तिचें साधावया सुलग्न । रवि सावधान घडी राखे ॥ २९ ॥ घडी भरतांचि न लगे क्षण । म्हणती नित्यसावधान। सत्य सवेगें चढे जीवन । नाहीं व्यवधान शब्दाचें ॥ ३० ॥ सांडा चौघींची चावटी । महामौनीं पाडा मिठी । घटिका भरताहे उठाउठीं । राहा निजदृष्टीं सावधान ॥ ३१ ॥ अंतःपट आहे ज्यासी । आधीं सावध करा त्यासी। अक्षर निमिष श्वासोच्छ्वासीं । घडी वेगेंसीं भरताहे ॥ ३२ ॥ यालागीं नित्यसावधान। सद्गुरु म्हणताहे आपण । वचना न द्यावें प्रतिवचन । सावधान निजरूपीं ॥ ३३ ॥ शब्दार्थें महामौन । धरी तो नित्यसावधान । ज्यासी शब्दार्थी अभिमान । असावधान तो सदा ॥ ३४ ॥ अंगीं जाणिवेचें जाणपण । वचना न देती प्रतिवचन । तेणें वचनें त्यांसी दूषण। सावधपण त्यां नाहीं ॥ ३५ ॥ अति समयो सन्निध लग्न । उभय भागीं सावधान। अच्युतचिंतनें राखावें मन । अति सुलग्न स्वानंदें ॥ ३६ ॥ ॐपुण्याहं वचन । पूर्णतेचें पूर्णपण । त्या पूर्णता रघुनंदन । निजात्मलग्न स्वयें साधी ॥ ३७ ॥ ॐपुण्याहं मुळींची गोष्टी । तेणें शब्द विरे प्रणवाच्या[२] पोटीं । अंतःपट फिटला उठाउठीं। सीता गोरटी वरी राम ॥ ३८ ॥ नयनीं नयन संलग्न[३] । एकचि जालें देखणेंपण । प्राणपती वरितां पूर्ण । प्राणें प्राण एक जाले ॥ ३९ ॥ वसिष्ठाच्या लग्नाक्षता । एकात्मता पंचभूतां। श्रीरामें वरिली सीता । एकात्मता निजलग्नीं ॥ ४० ॥ एक अवयवीं एक अवयव । एक जाले सीताराघव । एक जाले जीवभाव । लग्न अपूर्व श्रीवसिष्ठें ॥ ४१ ॥ सीतेचिये निजमाथां । श्रीराम घाली लग्नाक्षता । तोचि हस्त पावे सीता। सुखरूपता स्वानंदें ॥ ४२ ॥ श्रीरामाचे निजमाथां। अक्षता घालूं जातां सीता । सर्वांभूतीं देखे रघुनाथा । कर्तव्यता सलज्ज ॥ ४३ ॥ पाणिग्रहणीं रघुनाथा । पावोनियां जा सर्वथा । क्रिया[४] पारुषल्या समस्ता । निष्कर्मता श्रीरामें ॥ ४४ ॥ अर्धनारीनटेश्वरीं । जो पुरुष तोचि नारी। श्रीरामही तैशाच परी । सीता वरी निजात्मता[५] ॥ ४५ ॥ श्रीराम स्वयें चैतन्यमूर्ती । सीता तंव ते चिच्छक्ती । लग्न लागलें एकात्मप्रीतीं । चतुरोक्ती चहूं ठायीं ॥ ४६ ॥ सीतेनें वरिला श्रीरामचंद्र । ऊर्मिलेनें वरिला सौमित्र । मांडवीनें वरिला भरत वीर । शत्रुघ्न शूर श्रुतकीर्तीनें ॥ ४७ ॥ चौघी कन्या चौघे वर । लग्न लागलें सविस्तर । वोहरें शोभती मनोहर । जयजयकार प्रवर्तला ॥ ४८ ॥ ऋषी करिती जयजयकार। सुमनें वर्षती सुरवर । मंगळतुरांचा गजर । नादें अंबर कोंदलें ॥ ४९ ॥ सुरीं दुंदुभित्राहाटी । भेरीमृदंगकिंकाटी । नाद न समाये नभाचे पोटीं। निर्घो वैकुंठीं उठत ॥ ५० ॥ रंभा उर्वशी नाचणी। नाचती जनकाच्या रंगणीं । गंधर्व मधुर गाती गाणीं । ओंवाळणी दोहीं भागीं ॥ ५१ ॥ असो हें जालें पाणिग्रहण । वोहरां बांधावया कंकण। वसिष्ठ येवोनि आपण । सूत्र परिधान सूतवी ॥ ५२ ॥ गगनगर्भीचा सूक्ष्म तंतु । तोचि अष्टधा वेढितु । स्थूळाभिमानें दृश्य होतु । मग तोडितु दों ठायीं ॥ ५३ ॥ अखंड खंड केलें जाण । घालोनि त्रिगुणाचें वळण । अर्ध स्त्रीनामें कांकण । अर्ध परिपूर्ण पुरुषत्वें ॥ ५४ ॥ फेडिलीं मायेचीं वधूवस्त्रें । श्रीराम मेचुनि अच्छिद्रें । अष्टपुत्र्या पीतांबरें । नेसलीं वोहरें स्वानंदें ॥ ५५ ॥ मायामळिण वधूवस्त्रासी । न घे शतानंद उदासी । वसिष्ठ न घे वरवस्त्रासी । दोघे उदासी पुरोहित ॥ ५६ ॥ घ्यावया मायामळिण वासासी[११] । कलहो सलोभ सगोत्रजांसी। विसरोनियां निजात्मत्वेंसीं । देहलोभासीं भांडती ॥ ५७ ॥ कोट्यनुकोटी निजधना । जनकें दिधली वरदक्षिणा । सौभाग्यद्रव्यें देतां वाणा । निंबलोणा उतरिती ॥ ५८ ॥ जीवीं जीवा पडली मिठी । बाह्य पौलवा[१२] बांधिली गांठी । राम देखोनियां दृष्टीं । उल्लास पोटीं जानकीच्या

१ ज्ञानाचें. २ ओंकाराच्या. ३ मिळालेले. ४ खुंटल्या. ५ एकरूपतेनें. ६ देवांच्या मंडळीमध्यें. ७ नगारे वाजविणें. ८ प्रतिशब्द. ९ नृत्यांगना. १० सभागृहामध्यें. ११ वस्त्राला. १२ पदराला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ ५९ ॥ विवाहहोम निजनिर्धारीं । वोहरें[1] आणावीं बोहल्यावरी । श्रीराम वेढिला नरनारीं । कडे नोवरी तुम्हीं घ्यावी ॥ ६० ॥ हांसें आलें रघुनाथासी । विपरीत विधि लौकिकासी । वसिष्ठ म्हणे श्रीरामासी । वृद्धाचारासी प्रतिपाळीं ॥६१॥ स्वयें श्रीराम विचारी । माजी प्रकृति मजमाझारी । न घेतां बैसली कडेवरी । मजहूनि दुरी होऊं नेणे ॥ ६२ ॥ न बैसवितां बैसली कडिये । जीवें भावें मज हे पैढिये[2] । नांवरूपाचें मज मंढियें[3] । उभवोनि गुढिये हे नांदे ॥ ६३ ॥ हे माझेनि शोभे रूपवंती । माझेनि इसी नित्यस्थिती । माझेनि इसी गमनगती । लाजूं किती लौकिका ॥ ६४ ॥ तिसी न लावितां हात । नोवरी उचली रघुनाथ । अलिप्तपणें घेवोनि येत । तेणें विस्मित ऋषिसमूह ॥ ६५ ॥ चहूं पुरुषार्थीं चारी मुक्ती । तैसीं चारी वोहरें शोभती । कडे घेतल्या कवण्या रीतीं । तेही स्थिती अवधारा ॥ ६६ ॥ सायुज्यता सीता सती । तीसी उचली रघुपती । ऊर्मिला स्वरूपता शोभती । उचलिली प्रीतीं सौमित्रें ॥६७॥ मांडवी स्वयें समीपता । भरतें उचलिली तत्त्वतां । श्रुतकीर्ति सलोकता । होय उचलिता शत्रुघ्न ॥ ६८ ॥ एवं वोहरें आलीं वेदिकेप्रती[4] । शतानंदें विधिवेदोक्तीं । केली विवाहहोमसमाप्ती । द्विजां देती धनधान्य ॥ ६९ ॥ जनकें केला अनुक्रम । येथें करावा चतुर्थ होम । चारी दिवस संभ्रम । सोहळा परम करावा ॥ ७० ॥ धेंडा नाचवावा येथ । तें पहावया जन आर्तभूत[5] । वचन न मानीच रघुनाथ । भविष्यार्थ जाणोनी ॥ ७१ ॥ धनुर्भंगाचा अनुक्रम । क्रोध पावेल परशुराम । दारुण होईल संग्राम । अति दुर्गम दुर्धर ॥ ७२ ॥ जमदग्नीचा क्रोधानळ । परशुरामाचा क्रोध तुंबळ । उभय क्रोधें गर्वप्रबळ । नगरी तत्काळ जाळील ॥ ७३ ॥ प्रजा पीडती समस्त । हें श्रीरामाचें मनोगत । वसिष्ठ जाणे इत्थंभूत । आणिक ह्रद्गत रामाचें ॥ ७४ ॥ वऱ्हाडाहूनि अधिक । पुढें कार्य आहे अधिक । आणि अयोध्येसी जातां आवश्यक । जाणें एकाएक वनवासा ॥ ७५ ॥ येथें जालें पाणिग्रहण । लंकेसी मारिल्या रावण । तैं सीतेचें माझें होईल लग्न । सोहळा संपूर्ण युद्धाचा ॥ ७६ ॥ तेथें नाचेल रणधेंडा । ओंवाळणी राक्षसमुंडां[6] । पडतील अति उदंडा । बाणप्रचंडासमवेत ॥ ७७ ॥ जानकीविवाह अल्प सोहळा । सोडणें आतां देवांची बंदिशाळा । तोडणें आहे ग्रहांची शृंखळा । तो आगळा उत्साह ॥ ७८ ॥ श्रीरामाच्या निजभावासी । वसिष्ठें जाणोनि सावकाशीं । तेणें सांगितलें जनकासी । वेगीं वोहरांसी बोळवीं ॥ ७९ ॥ श्रीराम नव्हे गा प्राकृत । याचें वचन ब्रह्मलिखित । जनकें मानोनि निश्चित । हर्षयुक्त बोळवी ॥ ८० ॥ वधूवरांसी आंदणें । दिव्यालंकारभूषणें । नानापरींचीं आभरणें । बहु सुवर्ण गजपृष्ठीं ॥ ८१ ॥ अति सूक्ष्में रोमांबरें । पट्टकूलें[7] पीतांबरें । अति मोलाचीं नानाकारें । वस्त्रें[8] विचित्रें दिधलीं ॥ ८२ ॥ मुक्ताफळांच्या झालरी । दिधल्या रथांच्या हारी । गज गर्जती दळभारीं । अलंकारीं डुलती ॥ ८३ ॥ रत्नालंकारीं मनोहर । अमित दिधले असिवार[9] । पदक कंठ्या दासी अपार । नवसर हार शोभती ॥ ८४ ॥ जनकासी अति उल्लास । सेवा करावया श्रीरामास । मुकुटकुंडलांचे घोंस । दिधले बहुवस विश्वासीं ॥ ८५ ॥ सुमेधा बोले भाववचन । अनन्यभावें आम्ही शरण । जीव श्रीरामासी दिधला आंदण । बाह्य आभरणां कोण पाड[10] ॥ ८६ ॥ जनक बोले हर्षयुक्त । देह गेहें[11] वित्त जीवित । केलें रामार्पण समस्त । जाण निश्चित सुमेधे ॥ ८७ ॥ ऐसीं दोघें अति उल्लासीं । आंदणें देवोनि वोहरांसीं । जनक बोळवीत रामासी । बहुमार्गासी स्वयें आला ॥ ८८ ॥ विश्वामित्रें तंई आपण । करूनियां वसिष्ठासी नमन । दोहीं रायांसी पुसोनि जाण । करी गमन स्वाश्रमा ॥ ८९ ॥ रामलक्ष्मण दोघे जण । करिती साष्टांग नमन । ऋषीनें देवोनि आशीर्वचन । करी गमन स्वाश्रमा ॥ ९० ॥ श्रीराम म्हणे मिथिलानाथा । येथोनि आपण रोहावें आतां[12] । येरें वसिष्ठचरणीं ठेविला माथा । होय पुसता व्याह्यासी ॥ ९१ ॥ दशरथें अति सन्मान । करूनि दिधलें आलिंगन । जनक श्रीरामासी आपण ।

---

१ वधूवरें. २ आवडती. ३ आवरण. ४ बोहल्याजवळ. ५ उत्सुक. ६ राक्षसांच्या शिरांना. ७ लोंकरीचीं वस्त्रें, शाली वगैरे. ८ रेशमी वस्त्रें. ९ स्वार. १० किंमत, परवा. ११ घर. १२ आतां पुढें येऊं नये, आपण परतावें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

घाली लोटांगण सद्भावें ॥ ९२ ॥ कुशध्वजासमवेत। आलिंगूनी चारी जामात। जनक अत्यंत हर्षयुक्त। निघे त्वरित निजनगरा ॥ ९३ ॥ करितां अयोध्यागमन। परशुरामाचें आगमन। ज्याचेनि विश्व कंपायमान। अति दारुण भयानक ॥ ९४ ॥ रामें श्रीरामा पडिपाडु। रामा श्रीरामा युद्ध दृढु। रामें श्रीरामा प्रेम गोडु। कथाकैवाडु अवधारा ॥ ९५ ॥ एका जनार्दना शरण। जालें जानकीपाणिग्रहण। श्रीरामें रामा समाधान। कथा गहन अति गोड ॥ ९६ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे बालकांडे एकाकारटीकायां जानकीपाणिग्रहणं नाम पंचविंशतितमोऽध्यायः ॥ २५ ॥ ओंव्या ॥ ९६ ॥

अध्याय सव्विसावा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ चौघी बहिणींसहित जाण। जालें जानकीपाणिग्रहण। जनकें केली बोळवण। सुख संपूर्ण दशरथासी ॥ १ ॥ चौघे पुत्र चौघी सुना। कीर्ति न समाये त्रिभुवना। येव्हढे आल्हादें जाणा। अयोध्याभुवना निघाला ॥ २ ॥ संनद्ध केलिया दळभार। महामदें गर्जती कुंजर। घंटाकिंकिणीं सालंकार। पताकीं अंबर शोभत ॥ ३ ॥ घोडे नाचविती वीर। जी जी मा मा थीर थीर। तीपायीं असिवार। अति अरुवार नाचती ॥ ४ ॥ अढाऊ झेली सावळधर। कोयतेकार धनुर्धर। चालती पायांचे मोगर। अळंगाइत बाणाइत ॥ ५ ॥ वोढणिये थैकार देत। जेठिये तळपत चमकत। ऐसें सैन्य पुढें चालत। भाट गर्जत कैवारें ॥ ६ ॥ राजे मुकुटाचे वरिष्ठ। पाठीसीं चाले घनदाट। अतिरथी घडघडाट। सुख उद्भट दशरथा ॥ ७ ॥ राजा वसिष्ठ सकळ जन। समानरथीं समसमान। चालती सुखसंपन्न। तों पुढें अपशकुन देखती ॥ ८ ॥ सव्य जातातिपैं तास। अपसव्य जाती वायस। मयूरें गाळिती पीस। सर्प मुंगुस भांडती ॥ ९ ॥ भालुवा भुंकिती सन्मुख। पक्षी करकरिती अग्निमुख। युद्ध होईल अचुक। थोर धुकधुक रायासी ॥ १० ॥ श्रीराम शकुन अपशकुन। दोनी देखे समसमान। नाहीं भय कंपायमान। नित्य सावधान निर्भयत्वें ॥ ११ ॥ राजा सांगे वसिष्ठासी। अपशकुन कां होती आम्हांसी। दिशा धुमधुमित चौपासीं। शशिसूर्यांसी प्रभा मंद ॥ १२ ॥ दिवसा ग्रहगण गगनस्थ। एक पूर्वे एक पश्चिमे जात। रवि चंद्र परिघ करित। अति उत्पातदायक ॥ १३ ॥ सन्मुख गगनाचे पोटीं। अंधकारलिया दिठी। वसिष्ठा तूं सर्वज्ञ सृष्टीं। हे यथार्थ गोष्टी सांग मज ॥ १४ ॥ राया जीं जीं चिन्हें दिसती। तेणें दुस्तर विघ्नप्राप्ती। परी आम्हांसवें चालती शांती। विघ्नें आम्हांप्रती विमुख ॥ १५ ॥ अपशकुन पूर्वे जात्यासी। तेचि शकुन पश्चिमेच्यासी। तैंवी भूतीं भगवद्भाव ज्यासी। विघ्नें त्यासी निजविजयो ॥ १६ ॥ येरवीं विघ्नांचें सूचक। युद्ध होईल ठाकठोक। विजयी होईल रघुकुळटिळक। हें आवश्यक निजभावीं ॥ १७ ॥ रामनामाच्या नामोक्तीं। विघ्नें चरणां शरण येती। तो श्रीराम असतां सांगाती। विघ्नांची प्राप्ती निजविजयो ॥ १८ ॥ ऐसे दोघे बोलत बोली। तंव उठली वाहुटळी। नभ व्यापिलें धुळीं। संज्ञा मोडली सैन्याची ॥ १९ ॥ लागतां त्या वायूची झडप। सप्त सागर सप्त द्वीप। तेणेंसीं पृथ्वी सकंप। सुटे चळकांप मेरूसी ॥ २० ॥ त्यामाजी उठली विकट हाक। सैन्य मूर्च्छित पडे निःशेष। दशरथें घेतला धाक। राम निःशंक निजनिधडा ॥ २१ ॥ विद्युत्प्राय जटा शिरीं। सतेज परशु खांद्यावरी। धनुष्यबाण घेवोनि करीं। श्रीरामावरी चालिला ॥ २२ ॥ परशुरामातें देखून। वसिष्ठें केलें पूजन। ते पूजा भार्गवें अंगीकारून। चालिला आपण श्रीरामावरी ॥ २३ ॥ अत्यंत पराक्रम देखोन। दशरथ जाला कंपायमान। घालोनियां लोटांगण। दीनवदन बोलत ॥ २४ ॥ परशुरामा तुझी थोरी। तीन सप्तकें पृथ्वी निःक्षत्री। करून दिधली द्विजकरीं। शस्त्र त्वां करीं संन्यासिलें ॥ २५ ॥ तूं क्षत्रियांचा कर्दनकाळ। हें तुझिया ब्रीदाचें शीळ। श्रीराम माझें केवळ बाळ। त्यावरी प्रबळ क्रोध न करीं ॥ २६ ॥ श्रीरामातें मारिसी। तेंचि मरण आम्हां सर्वांसी। येव्हढे करावया कंदनासी। उचित तुम्हांसी

---

१ थोरीव, मोठेपणा. २ कथावैचित्र्य. ३ पाठवणी. ४ स्वार. ५ मनोहर. ६ वीरविशेष. ७ भाला धरणारे. ८ पायदळ. ९ पुढें धांवणारे. १० भयंकर. ११ मोठ्या धैर्याचा. १२ विजेप्रमाणें. १३ ठेविलें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

नव्हे स्वामी ॥ २७ ॥ मी पुत्रार्थी अति दीन। पुत्रभयें अति कृपण। मज द्यावें पुत्रदान। घाली लोटांगण नृपनाथ ॥ २८ ॥ ऐसें दशरथभाषित। तें उपेक्षोनियां समस्त। जेथें होता रघुनाथ। भार्गव तेथें स्वयें आला ॥ २९ ॥ रामा श्रीरामा झुंजारी। श्रीराम रामातें निवारी। रामा श्रीरामा प्रीति पुरी। ऐक्य करी निजबोध ॥ ३० ॥ त्या दोघांचा निजसंग्राम। सुरनरवीरां अति दुर्गम। युद्धीं पावोनि निजवर्म। उपरम निजबोधें ॥३१॥ देखोनियां रघुनंदन। भार्गव सोडी दारुण बाण। श्रीरामें सांडिले तोडून। क्रोधें परिपूर्ण जामदग्न्य ॥ ३२ ॥ परशुराम सोडी दिव्यास्त्रें। श्रीराम निवारी क्षणमात्रें। कोपें सोडिलीं निर्वाणशस्त्रें। तींही रघुवीरें निवारिलीं ॥ ३३ ॥ रेणुका दिधल्या भार्गवाहातीं। दोनी आपुल्या निजात्मशक्ती। सकळ शस्त्रास्त्रांच्या अंतीं। त्या निर्वाणार्थी सोडाव्या ॥ ३४ ॥ त्या काळी कराळी उभय शक्ती। जाणोनि राहिल्या रामाप्रती। तिहीं ओंवाळून रघुपती। श्रीरामभात्याप्रती प्रवेशल्या ॥ ३५ ॥ भार्गव म्हणे नवल आतां। माझ्या शक्ति याव्या माझे हाता। त्या प्रवेशल्या श्रीरामभात्या। साह्य रघुनाथा त्या जाल्या ॥ ३६ ॥ माझ्या निर्वाणनिजशक्ती। जावोनि राहिल्या श्रीरामाप्रती। हें आश्चर्य मानोनि चित्तीं। छळणें वचनोक्ती बोलत ॥ ३७ ॥ जीं जीं शस्त्रें म्यां प्रेरिलीं। तीं तीं स्वयें त्वां निवारिलीं। परी आपुलीं नाहीं सोडिलीं। हे उणीव आली रघुनाथा ॥ ३८ ॥ जाणसी शस्त्रांचें निवारण। परी नेणसी शस्त्रांचें प्रेरण। हेंचि तुज उणेपण। शौर्य संपूर्ण तुज नाहीं ॥ ३९ ॥ ऐकोनि परशुरामवचन। श्रीरामें केलें नमन। ब्राह्मणापुढें उणेपण। सर्वथा जाण आम्हांसी ॥४०॥

श्रीराम उवाच–

अयं कंठः कुठारस्ते कुरु राम यथोचितम्।
निहंतुं हंत गोविप्रान्न शूरा राघवा वयम्॥

भार्गवा परशु तुझ्या हातीं। म्यां कंठ ओपिलासे तुजप्रती। जें करणें असेल तुझे चित्तीं। तें त्वां निश्चितीं करावें ॥ ४१ ॥ गाई ब्राह्मण करावया घात। स्वप्नीं नुपजे मनोरथ। त्यांवरी उचली शस्त्रहात। ऐसा सूर्यवंशांत शूर नाहीं ॥ ४२ ॥ गाई आणि ब्राह्मणांपुढें। आमुचें शौर्य बापुडें। तुझे निवारावया कुन्हाडे। धनुष्यबाण पुढें म्यां धरिले ॥ ४३ ॥ ऐकोनि श्रीरामाचें वचन। परशुराम हास्यवदन। परिसोनि हरचापभंजन। तुज ठाकूनि जाण मी आलों ॥ ४४ ॥ असो युद्धाची अटाटी। सांडिली शस्त्र धरावयाची गोष्टी। विष्णुचाप आहे माझे मुष्टीं। तें तूं जगजेठी सज्जीं पां ॥ ४५ ॥ जरी तूं हें सज्जिसी संपूर्ण। तरी तुवां मज जिंतिलें जाण। श्रीराम म्हणे हें भाषण। मज दूषण द्विजविषयीं ॥ ४६ ॥ तूं अगाध ब्राह्मण ब्रह्मचारी। पितृसेवेची परम थोरी। तुझी आज्ञा वंद्य शिरीं। विष्णुचाप करीं धरिता जाला ॥ ४७ ॥ श्रीराम म्हणे भार्गवरामा। तुझेनि तीर्थें प्रताप आम्हां। तेणें प्रतापें द्विजोत्तमा। धनुर्वर्मा सज्जीन ॥ ४८ ॥ शिवचापपरीस भारी। विष्णुचापाची पैं थोरी। श्रीरामें धरोनि करीं। क्षणामाझारीं सज्जिलें ॥ ४९ ॥ भार्गवाचे दृष्टीपुढां। श्रीरामें सज्जिला विष्णुमेढा। ठाण मांडोनि निधडा। बाण गाढा जोडिला ॥ ५० ॥ जैसा अंतकां अंतक। समूळ कळिकाळा घातक। देखोनि भार्गवें घेतला धाक। अलोलिक श्रीराम ॥ ५१ ॥ श्रीरामाच्या प्रतापप्रौढीं। तेजें भार्गवा पडे झांपडी। धनुष्य ओढितां कानाडी। चाप कडाडी वैष्णवी ॥ ५२ ॥ परशुरामें अति तांतडी। लागवेगें घालोनि उडी। श्रीराम धरिला लवडसवडी। चाप न मोडीं वैष्णवी ॥ ५३ ॥ शिवचाप मोडिलें क्षणामाझारीं। तैसें वैष्णवचापा न करीं। तुझ्या पराक्रमाची थोरी। चराचरीं अतुल्य ॥ ५४ ॥ तुझें बळ अति अद्भुत। कळिकाळ तुझे नित्यांकित। तूं अवतार श्रीरघुनाथ। मज निश्चित मानलें ॥ ५५ ॥ मी तुझा करूं आलों छळ। तुझें पाहतां स्वभावशीळ। माझी निमाली खळबळ। तूं केवळ परमात्मा ॥ ५६ ॥ ऐसें बोलोनियां आपण। प्रेमें दिधलें आलिंगन। दोघां जाहलें समाधान। मुळींची खूण पावोनि ॥ ५७ ॥ श्रीरामें रामा समाधान। श्रीरामें राम सुखसंपन्न। श्रीरामें

१ दशरथाचें बोलणें. २ दुर्लक्ष करून. ३ शांति. ४ दांडगी खटपट. ५ दोरी चढविली. ६ विष्णूचें धनुष्य.

७ धैर्याचा. ८ काळाला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

रामा आनंद पूर्ण । चैतन्यघन श्रीरामें राम ॥ ५८ ॥ श्रीरामें रामा अति आल्हाद । श्रीरामें रामा परमानंद । श्रीरामें रामा निजात्मबोध । जाला अभेद रामें रामा ॥ ५९ ॥ मी एक राम दाशरथी । हें नाठवे श्रीरामाप्रती । मी एक भार्गव भृगुपती । नाठवे चित्तीं परशुरामा ॥ ६० ॥ ऐसें पडिलें आलिंगन । निघोट[1] कोंदलें चैतन्य घन । खुंटला बोल तुटलें मौन । जाले परिपूर्ण पूर्णत्वें ॥ ६१ ॥ अवतारकृतकार्यार्थ । साधावया श्रीराम सावचित्त । भार्गवातें श्रीरघुनाथ । उद्बोधित[2] निजबोधें ॥ ६२ ॥ तो जंव होय सावधान । सावध करितां रघुनंदन । देखोनि विस्मयसंपूर्ण । शिरोरत्न श्रीराम ॥ ६३ ॥ कर्मब्रह्मस्थिति समसमान । श्रीराम अवतारशिरोरत्न[3] । भार्गवें जाणोनि संपूर्ण । सुखसंपूर्ण श्रीरामें ॥ ६४ ॥ श्रीराम म्हणे अमोघ बाण । धनुर्ष्यीं करविला आरोपण । तो मागें काढितां न ये जाण । कोठें प्रेरण करूं स्वामी ॥ ६५ ॥ ऐसें पुसतां रघुनाथ । परशुराम अति विस्मित । बाणाचें लक्ष सावचित्त । विचारितां अनुलक्षी ॥ ६६ ॥ श्रीरामाचा निजशर । अतिशयेंसीं अति दुर्धर । तेणें निवटीं माझें गत्यंतर । ऐसें परशुधर सांगत ॥ ६७ ॥ श्रीरामाचा निजबाण । जेथें पडे तेथें करी कंदन । येणें निवटावा माझा अभिमान । गमनागमन मग कैंचें ॥ ६८ ॥ मी तपस्वी अति श्रेष्ठ । तपें जिंकिले लोक वरिष्ठ । ते लोकांतराची वाट । करीं सपाट येणें बाणें ॥ ६९ ॥ मी वीर धीर महाशूर । रणांगणीं अति दुर्धर । शत्रुर्दळनीं[4] एकांगवीर । हाही अहंकार निर्दाळीं ॥ ७० ॥ माझा निवटल्या अहंकार । कैंचें लोकलोकांतर । सहजें खुंटलें गत्यंतर । हें करीं साचार श्रीरामा ॥ ७१ ॥ झुंझार बाह्य शत्रू संहारी । श्रीराम निवटी अंतरवैरी । अहंममता जीवें मारी । धनुर्धारी श्रीराम ॥ ७२ ॥ श्रीरामाचें अनुसंधान । वीरां शूरां न कळे जाण । शिव चाप धरी आपण । त्यासी संपूर्ण लक्षेना ॥ ७३ ॥ अहंकारातें छेदिता । आणिक नाहीं रघुनाथा । येणें बाणें तूं आतां । अहंममता छेदावी ॥ ७४ ॥ मी कश्यपास पृथ्वी दिधली दान । तेथें मी वसेन निरभिमान । लोकलोकांतरअभिमान[5] । त्याचें छेदन करीं श्रीरामा ॥ ७५ ॥ निरभिमान वसतां क्षितीं । दोष नाहीं गा रघुपती । लोकलोकांतरगती । माझी निश्चितीं निर्दाळीं ॥ ७६ ॥ ऐसें बोलिला परशुराम । तेंचि करूं पाहे श्रीराम । कैसें आश्चर्य केलें परम । गत्यंतराचें वर्म श्रीराम छेदी ॥ ७७ ॥ अलक्ष लक्षोनि श्रीरामचंद्रें । बाण जोडोनि निजनिर्धारें । अर्धमात्रा अर्धचंद्रशरें । अहं रघुवीरें निवटिलें ॥ ७८ ॥ जेव्हां गुण वाहिला विष्णुचापासी । तेव्हांचि बोळवण[6] अहंकारासी । मागुता येईल भार्गवापासीं । तो अर्धमात्रेंसीं निवटिला[7] ॥ ७९ ॥ निवटितांचि अहंकार । कैंचें लोकलोकांतर । कैंचें गतिगत्यंतर । केला स्थिर परशुराम ॥ ८० ॥ यापरी श्रीरामचंद्र । सोडोनियां निजशर । सुखी केला परशुधर । स्वर्गादि गत्यंतर खुंटोनी ॥ ८१ ॥ कथांतरीं निरूपण । भार्गवाचें स्वर्गगमन । श्रीरामें खुंटिलें आपण । विंधोनी बाण क्षणमात्रें ॥ ८२ ॥ श्रीरामें स्वर्गवाटेसी । काये कूड घातला बाणेंसीं । कां भिंती घातली चौपासीं । स्वर्गगति खुंटली ॥ ८३ ॥ ऐसिया पाहतां सूक्ष्म गतीं । तेथींची न कळे अंतर्वृत्ती । बाह्य लौकिक पंडितयुक्ती । रामें स्वर्गगती खुंटविली ॥ ८४ ॥ बाणें खुंटे स्वर्गगती । हे लौकिक कथावर्दती[8] । अहं निवटून रघुपतीं । लोकांतरगती खुंटविली ॥ ८५ ॥ ज्यासी अनुलक्षी[9] रामचंद्र । त्याचा गळे अहंकार । सहजें खुंटे गत्यंतर । यापरी रघुवीर स्वर्गगती खुंटी ॥ ८६ ॥ श्रीरामें ऐसिया रीतीं । परशुरामाची स्वर्गगती । खुंटविली यथार्थ निश्चितीं । हें ग्रंथार्थी निजगुह्य ॥ ८७ ॥ श्रीरामें जिंतिला परशुधर । गगनीं सुरवरांचा गजर । भूतळीं गर्जती ऋषीश्वर । विजयी रघुवीर निजात्मवीर्यें ॥ ८८ ॥ शिवचाप आणि विष्णुचाप । दोहीं चापांचा दुर्धर दर्प । राघवें केला निर्वीर्यरूप । श्रीरामप्रताप निजविजयी ॥ ८९ ॥ श्रीरामपरशुरामांचें क्रीडितें[10] । ब्रह्मादिदेव विमानांत । कौतुक पाहूं आले समस्त । दोघे अद्भुत महावीर ॥ ९० ॥ ते

१ घनदाट. २ समजावीत. ३ अवतारांमध्यें श्रेष्ट. ४ शत्रूंचा नाश करण्यांत. ५ इहलोकींहून परलोकीं जाण्याची गति. ६ दवडणें, निरोप. ७ नाहींसा केला. ८ वार्ता. ९ पाहतो. १० क्रीडा, युद्ध.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

देव गर्जती अंबरीं। श्रीराम निजविजयी निर्धारीं। वर्षती सुमनांच्या संभारीं। ऋषि जयजयकारीं गर्जती ॥ ९१ ॥ परशुराम म्हणे श्रीरघुनाथा। त्वां मज जिंतिलें तत्त्वतां। हे मज लाज नाहीं सर्वथा। अधिक श्लाघ्यता मज तुझेनि ॥ ९२ ॥ जेंवी गूळ गोडी द्विविध नाम। परी स्वरूपीं नाहीं द्विविध धर्म। तेंवी मी तूं आत्माराम। लज्जा परम कोणाची ॥ ९३ ॥ देह लाजेना अवयवा। रूप लाजेना देहभावा। तेंवी मज तुज राघवा। असेना हेवा लाजेचा ॥ ९४ ॥ ऐसें बोलोनि तत्त्वतां। मग म्हणे गा रघुनाथा। धर्मरक्षण तुझे माथां। लोकपाळण त्वां कीजे ॥ ९५ ॥ होता जमदग्नीचा कोप। आणि आपुला निजसाटोप। तो श्रीरामीं केला निक्षेप। जाला सुखरूप परशुराम ॥ ९६ ॥ श्रीराम लागला रामचरणां। रामें श्रीरामा केली प्रदक्षिणा। रामनामें गर्जोनि जाणा। गेला स्वस्थाना परशुराम ॥ ९७ ॥ श्रीराम विजयी अलोलिक। वसिष्ठासी आल्हाद अधिक। तेणें आलिंगिला रघुकुळटिळक। गेली धुकधुक दशरथाची ॥ ९८ ॥ श्रीरामें वसिष्ठासी लोटांगण। दशरथासी साष्टांग नमन। येरें दिधलें आलिंगन। निर्वालें मन रायाचें ॥ ९९ ॥ विजयी जाला श्रीरामचंद्र। ऋषिरायांसी आल्हाद थोर। अवघे करिती जयजयकार। चालिले भार स्वानंदें ॥ १०० ॥ एका जनार्दना शरण। जाली परशुरामाची बोळवण। आतां अयोध्याप्रवेशन। स्वानंदें गमन श्रीरामा ॥ १०१ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे बालकांडे एकाकारटीकायां श्रीरामपरशुरामएकात्मबोधनिरूपणं नाम षड्विंशतितमोऽध्यायः ॥ २६ ॥ ओंव्या ॥ १०१ ॥ श्लोक ॥ १ ॥

अध्याय सत्ताविसावा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ परशुराम गेला स्वस्थाना। स्वस्थता दशरथाचे मना। आनंद वाढला चौगुणा। रघुनाथ जाणा निजविजयी ॥ १ ॥ सांडोनि वैष्णवचापासी। भार्गव गेला स्वाश्रमासी। धनुष्य दिधलें श्रीरामासी। तेणें वरुणासी तें दिधलें ॥ २ ॥ मी आपुलिया निजात्मशक्तीं। रणीं जिंकोनि राक्षसपंक्ती। वैष्णवचाप हें असतां हातीं। लोक म्हणती धनुष्यबळ ॥ ३ ॥ माझ्या यशाची निजपुंष्टी। अवघी जाईल धनुष्यासाठीं। यालागीं तें उठाउठीं। राम जगजेठी स्वयें त्यागी ॥ ४ ॥ स्वसामर्थ्य नाहीं ज्यासी। धनुष्यें यश कैंवी होईल त्यासी। यालागीं श्रीराम नव्हे अभिलाषी। म्हणोनि वरुणासी दिधलें ॥ ५ ॥ अयोध्ये प्रवेशावया सत्वर। उल्लास करी नृपवर। आनंदें गर्जती गजभार। सैन्यसंभार आल्हादी ॥ ६ ॥ निशाण भेरी मृदंग शंख। ढोल चौंडकी काहळा अनेक। जयजयकारें सकळिक। नगरोन्मुख निघाले ॥ ७ ॥ ऋषी पढती शांतिपाठ। ब्रीदें गर्जताती भाट। सिंहनाद करिती वीर वाट। घडघडाट रथांचा ॥ ८ ॥ वसिष्ठें दूत धाडिले पुढें। नगर शृंगारावया वाडेंकोडें। रंगमाळा कुंकुमसडे। मखरें तोरणें ठायीं ठायीं ॥ ९ ॥ गुढिया उभविल्या घरोघरीं। पताका झळकती अंबरीं। दिव्यभूषणें दिव्यांबरीं। नरनारी शोभती ॥ १० ॥ कुंकुम केशर सुमनमाळा। कंठीं रत्नपदक रत्नमेखळा। नवरत्नहार रुळे गळां। जनलीला शोभत ॥ ११ ॥ पूर्णकलश द्वारोद्वारीं। दधि दूर्वा सुमनें त्यांभीतरीं। प्रदीप्त दीप ठेविले हारीं। घरोघरीं आल्हाद ॥ १२ ॥ राजगृहीं अति उत्सावो। गुढिया मखरें उभविती पाहो। विजयी जाला श्रीरामरावो। आजानुबाहो प्रतापी ॥ १३ ॥ श्रीरामें शिवचाप भंगुनी। परशुरामातें जिंकोनी। सीता आणिली पर्णोनी। जनवदनीं हे वार्ता ॥ १४ ॥ एक म्हणती गुरूच्या यागीं। राक्षस मारिले रणरंगीं। सुबाहु छेदिला सर्वांगीं। मारीचालागीं घाय केले ॥ १५ ॥ आणिक म्हणती दुष्ट ताटिका। नित्य पीडीतसे लोकां अनेकां। श्रीरामें देखतांचि देखा। बाणें एका निवटिली ॥ १६ ॥ एक म्हणती श्रीरामें अवलीळा। चरणें उद्धरिली अहल्या शिळा। श्रीराम परब्रह्मपुतळा। सच्चित्कळा साचार ॥ १७ ॥ साकार आणि निराकार। स्वयें श्रीराम चिन्मात्र। धन्य धन्य लोकांचे नेत्र। श्रीरामवक्त्र देखती ॥ १८ ॥ देखतां श्रीरामाचें मुख। निःशेष जाय तहान भूक। परमानंदें कोंदाटे

---

१ राशींनीं, समुदायानें. २ दोन प्रकारचा गुणधर्म. ३ स्वतःचा अभिमान. ४ शांत झालें. ५ मोठेपणा. ६ शहराकडे. ७ सुंदर वस्त्रांनीं. ८ फुलांच्या माळा. ९ पाण्यानें भरलेल्या घागरी. १० मारली.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सुख । हरिखें हरिख ओसंडे ॥ १९ ॥ ऐसी श्रीरामाची कीर्ती । घरोघरीं अनुवादती[१] । आला ऐकोनि रघुपती । सामोरे येती नगरस्थ ॥ २० ॥ छत्रचामरें गजभारें । वाजती नानाविध तुरें । शोभायमान चारी वोहरें[२] । आला गजरें रघुवीर ॥ २१ ॥ चारी पुत्र चारी सुना । देखतां धणी[३] न पुरे मना । पाहतां पारणें होतसे नयनां । भाग्यभावना दशरथा ॥ २२ ॥ श्रावणपितयाचा शाप । दशरथासी सुखस्वरूप । पुत्र पावला सद्रूप । चित्स्वरूप श्रीराम ॥ २३ ॥ जैसा मातेचा निजकोप । वरी कठिण आंत सुखरूप । तैसा ब्राह्मणाचा शाप । शापें निष्पाप सुख देत ॥ २४ ॥ श्रावणपितयाचिया शापासाठीं । दशरथा श्रीरामभेटी । भोगीत आनंदाच्या कोटी । सभाग्य सृष्टीं दशरथ ॥ २५ ॥ नगरीं प्रवेशे रघुपती । चारी मुक्ती पुढें नाचती । पायघडियांचे गतीं । पायीं लोळती पुरुषार्थ ॥ २६ ॥ अनुहताचिया[४] संगतीं । नानाविधें तुरें वाजती । नादें कोंदाटे चिच्छक्ती । नभस्थिति चिन्मात्र ॥ २७ ॥ श्रीराम पहावया प्रेमपडिभरीं[५] । एक चढली परेच्या उपरी । एक चढोनियां गोपुरीं । एक जनांभीतरीं राम पहाती ॥ २८ ॥ एक सलज्ज एकांतीं । गवाक्षद्वारें[६] राम पहाती । एक एकातें धरोनि हातीं । राम दाविती अनुलक्षीं ॥ २९ ॥ हा नव्हे तो नव्हे पैल तो तो । ऐसें देखणें जो दावितो । तोचि अनुभव एका होतो । पाहणें पाहविती श्रीराम ॥ ३० ॥ एक चढोनि जीवाचे माथां । सादरें पाहाती श्रीरघुनाथा । एक सांडोनि जीवभावता । श्रीरघुनाथा भेटती ॥ ३१ ॥ नावडे जीवशिवसांगात । एकाकी एकपणाआंत । परिपूर्ण पाहती रघुनाथ । आल्हादयुक्त स्वानंदें ॥ ३२ ॥ एक प्रेमाचेनि पडिपाडें । आनंदें नाचती रामापुढें । एक ते अत्यंत निधडे । पाहाती चहूंकडे श्रीराम ॥ ३३ ॥ एकातें श्रीराम सांगाती । एकासी श्रीराम नित्यगती । एक श्रीरामाच्या निजस्थितीं । स्वयें वर्तती सर्वदा ॥ ३४ ॥ एक निःसंग निश्चितीं । लोकांचिये लोकस्थितीं । स्वयें श्रीराम पाहती । आशंकावृत्ति त्यां नाहीं ॥ ३५ ॥ एकाची नवलनवाई । गजबजेंसीं[७] भिणें नाहीं । श्रीराम पाहती ठायीं ठायीं । आडवें कांहीं येवों न शके ॥ ३६ ॥ ऐसिया लोकांचिया पंक्ती । श्रीरामासी पाहूं येती । मंडपघसणी जनासी होती । श्रीराममूर्ती पहावया ॥ ३७ ॥ पायघड्या पदवाहणें । दीपावळी नीराजनें । ओंवाळिती धनधान्यें । राम पहावया उल्लास जनासी ॥ ३८ ॥ श्रीराम जातां निजनगरीं । पाहों न येती अग्निहोत्री । पाहतां विटाळ होईल भारी । तंव राम दुरी अंतरला ॥ ३९ ॥ श्रोत्री स्वयंपाकी केवळ । श्रीराम पाहतां होय विटाळ । आधणीं टाकावया तांदूळ । चांटु[९] तत्काळ विसरले ॥ ४० ॥ ऐशिया विटाळाची परी । श्रीराम अंतरला दुरीच्या दुरी । धुपधुपित पाकाभीतरीं । कर्मअहंकारीं गुंतले ॥ ४१ ॥ आम्ही उत्तम आश्रमवासी । श्रीराम जातो जनप्रदेशीं । पाहतां स्पर्श होईल आम्हांसी । दुरून संन्यासी पाहूं म्हणती ॥ ४२ ॥ विटाळाभेणें दुरूनि पाहतां । श्रीराम न दिसे सर्वथा । आश्रमाभिमानें पाहूं जातां । राम तत्त्वतां लक्षेना ॥ ४३ ॥ अनुलक्षोनि श्रीरामासी । पिंगळा वेश्या धांवे उल्लासीं । मार्गीं झगटली संन्याशासी । हें लक्ष तिसी असेना ॥ ४४ ॥ मज कां झगटली हे रांड । रागें संन्यासी ठोकी दंड । येरी पाहतां श्रीरामाचें तोंड । दंडें उदंड सुखी जाली ॥ ४५ ॥ स्वामी तुमच्या दंडाचा घाव । तेणें दंडिलें[११] माझा अहंभाव । तो दंडीना तुम्हांसी पाहाहो । पाहतां रामराव विटाळ देखा ॥ ४६ ॥ श्रीराम पाहतां विटाळ उडे । तो विटाळ संन्याशामाजी दडे । म्हणोनि विटाळाचें सांकडें[१२] । संन्याशाकडे सर्वदा ॥ ४७ ॥ श्रीराम पाहतां विकल्पविटाळ । भक्तभावीं न राहे तीळ । तो सद्बंध संन्याशामाजी सैंळ[१३] । आश्रमीं केवळ राहिला ॥ ४८ ॥ मी आत्मा सर्वांभूतीं परिपूर्ण । ऐसें भूतां देवोनि अभयदान । स्वयें केलें संन्यासग्रहण । तोचि आपण विटाळ देखे ॥ ४९ ॥ श्रोत्री स्वयंपाकी संन्यासी । हे निजमाहेर विटाळासी । त्यांमाजी तो सदा मुसमुसी । देखती जगासी अपवित्र ॥ ५० ॥ ऐसी विवादतां

१ बोलतात. २ वधूवरें. ३ तृप्ति. ४ योगसाधनानें दशनादांचा ऐकूं येणारा ध्वनि, त्याच्या संगतीं. ५ अति प्रेमानें. ६ खिडकींतून. ७ मोठ्या गडबडीनें. ८ सभामंडपांत एकच गर्दी होऊन गेली. ९ चघळपणा करणारे. १० पाहून. ११ नाहींसा केला. १२ संकट. १३ अभिमान.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वेश्या संन्याशासीं । श्रीराम गेला स्वयें स्वाश्रमासी । संन्यासी करितां मृत्तिकास्नानासी । आली हातासी मृत्तिका ॥ ५१ ॥ मी पवित्र जग अपवित्र। हें स्वयंपाकाचें मुख्य सूत्र। तेणें विटाळे श्रीरामचंद्र। दुरी दूरतर अंतरला ॥ ५२ ॥ वर्णाभिमान स्वाश्रमाभिमान। कर्माभिमान धर्माभिमान। नं वंचितां सर्वाभिमान। रघुनंदन भेटेना ॥ ५३ ॥ वेश्या बोलतां सद्युकीसी। पिंगळा वेश्या कोण म्हणसी। जे अवधूतें चोविसां गुरूंसीं। यदूपासीं सांगितली ॥ ५४ ॥ श्रीराम पावला राजभवन। शांति येवोनि आपण। जीवभावाचें निंबलोण। सांडी ओंवाळून वोहरांसी ॥ ५५ ॥ चारी पुत्र सुना चारी। वसिष्ठें धरोनियां करीं। प्रवेशला राजमंदिरीं। उल्लास भारी राणिवसां[३] ॥ ५६ ॥ वाजती मधुर मंगळतुरें। द्विज गर्जती जयजयकारें। वोहरें देखोनि मनोहरें। राण्या आदरें पाहों आल्या ॥ ५७ ॥ पहिलें कौसल्येसी नमन। चारी सुना अंकीं वाहून। फेरा[४] कंकण पदकभूषण। दे आपण स्वानंदें ॥ ५८ ॥ लागतां सुमित्रेच्या चरणां। अति हरिखें आलिंगी चारी सुना। कटिमेखळा करकंकणा। दे आपण स्वानंदें ॥ ५९ ॥ कैकयीसी करितां नमन। चहूं सुनांसी दे चुंबन। त्यांत आपुल्या दोघी सुना जाण। त्यांसी घाली आपण सुमनमाळा ॥ ६० ॥ आणखी राणिवसांच्या नारी। वोहरें आलिंगिती प्रीतीकरीं। ओवाळिती नानापरी। आल्हाद भारी राणिवसां ॥ ६१ ॥ करावया गृहप्रवेशासी। कृत्रिम लक्ष्मी भाणवसीं[५]। देखोनि श्रीरामसामर्थ्यासी। लक्ष्मी पूर्णांशेंसीं प्रकटली तेथें ॥ ६२ ॥ कृत्रिम लक्ष्मीचें अंतर। तेथें प्रवेशली लक्ष्मी साचार। तिणें तिचें रूप मनोहर। अति सुंदर आभासे[६] ॥ ६३ ॥ सीता आणिली धनुर्भंगेंसीं। दुसरी सीता कैंची भाणवसीं। हें आश्चर्य ज्यात्यासीं। ऋषिही मनासीं विस्मित ॥ ६४ ॥ ते देखतां लक्ष्मीयेसी। सीता साशंकित मानसीं। हे स्त्री असतां गृहवासी। रामें कां मज सीतेसी पर्णिलें ॥ ६५ ॥ आम्ही दोघी स्त्रिया असतां। केंवी एकपत्नीत्व रघुनाथा। असो ते एकपत्नीत्वकथा। सवती तत्त्वतां मज जाली ॥ ६६ ॥ सवती ओढवली कपाळासी। म्हणोनि क्षोभें पाहतां तिसी। लक्ष्मी लागली पायांसी। मी तुझी दासी जानकीये ॥ ६७ ॥ प्रेमें देतां आलिंगन। दोहींचें मोडलें दोनपण। दोहीं ठायीं एकत्व पूर्ण। आपणा आपण देखती ॥ ६८ ॥ लक्ष्मी तेचि सीता आपण। सीता तेचि लक्ष्मी जाण। श्रीरामाचें एकपत्नीपण। सीतेसी पूर्ण कळों[८] सरलें ॥ ६९ ॥ सीतालक्ष्मींचें एकपण। त्या दोघी जाणती आपण। हें ब्रह्मादिकां न कळे विंदान[९]। कीं जाणे पूर्ण वसिष्ठ ॥ ७० ॥ तेणें वसिष्ठें आपण। केलें लक्ष्मीचें पूजन। गृहप्रवेशाचें विधान। केलें संपूर्ण यथोक्त ॥ ७१ ॥ शुद्ध विद्या जोडली शस्त्रास्त्रीं। स्त्रिया आणिल्या अति गजरीं। कीर्ति फार जाली लोकांतरीं। येवढी सामग्री श्रीरामा ॥ ७२ ॥ तेही चौघे बंधु चौघी स्त्रियांसीं। दशरथाचे सेवेसीं। सावधान अहर्निशीं। वसिष्ठापासीं किंकरत्वें[१०] ॥ ७३ ॥ त्यांमाजी श्रीराम जाण। वसिष्ठासी प्रिय संपूर्ण। तो दशरथाचा जीवनप्राण। आवडे संपूर्ण सर्वांसी ॥ ७४ ॥ राम आवडे सर्व भूतां। रामें सर्वांसी सुखरूपता। तोही वसिष्ठाच्या वचनार्था। होय वंदिता किंकरत्वें ॥ ७५ ॥ गुरुमहिमा अति थोर। तो संरक्षी रामचंद्र। लोकसंग्रहणार्थ साचार। दावी विचार भजनाचा ॥ ७६ ॥ श्रीरामाच्या मनोगता। अनुकूल वर्ते सीता। सीतेचिया मनोरथा। परिपूर्णता श्रीरामें ॥ ७७ ॥ सीतेचा भाव श्रीरामीं पूर्ण। राम सीतेसीं संपूर्ण। सीता रामें सुखसंपन्न। सुखी रघुनंदन सीतेचेनि ॥ ७८ ॥ रामरसें रसज्ञ सीता। सीतेच्या रसने श्रीराम भोक्ता। श्रीराम देखणें सीता डोळसता। तिचेनि देखता श्रीराम ॥ ७९ ॥ श्रीरामें सीता सुंदर पूर्ण। सीतेनें राम शोभे सगुण। श्रीरामें सीता सुलक्षण। सीतेचेनि लक्ष्यलक्षण श्रीरामा ॥ ८० ॥ श्रीराम सीतेचा निजभोग। सीतेचेनि श्रीराम सुरंग। श्रीरामें सीता शोभे सांग। सीता सर्वांग श्रीराम ॥ ८१ ॥ सीता रस श्रीराम स्वाद। सीता सुमन श्रीराम सुगंध। सीता बुद्धि श्रीराम बोध। अनन्यसिद्धि येरयेरां ॥ ८२ ॥ सीता वचन

१ न टाकतां. २ दत्तात्रेयानें. ३ जनानखान्यांत. ४ बाहुभूषण. ५ अंतर्गृहांत. ६ शोभे. ७ रागानें.

८ कळून आलें, समजलें. ९ चमत्कार. १० सेवक होऊन.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

श्रीराम वचनार्थ। सीता पद श्रीराम पदार्थ। सीता मुक्ति श्रीराम मुक्त्यर्थ। परम स्वार्थ येरयेरां ॥ ८३ ॥ सीता जीव राम जीवन। सीता मन राम मनोज्ञ। सीता चित्त श्रीराम चैतन्य। आनंदघन येरयेरां ॥ ८४ ॥ सीता धरा श्रीराम धारक। सीता चाळण श्रीराम चाळक। सीता व्याप्य श्रीराम व्यापक। सुखसंतोष येरयेरां ॥ ८५ ॥ सीता क्रिया राम कर्ता। सीता भोग्य राम भोक्ता। सीता ज्ञान राम ज्ञाता। एकात्मता अतिप्रीतीं ॥ ८६ ॥ सीता शर्करा राम गोडी। सीता व्यवसाय राम जोडी। एकात्मता अति आवडीं। न कळे फुडी श्रुतिशास्त्रां ॥ ८७ ॥ येरयेरांविण जाण। न करिती उदकपान। येरयेरांविण न खाती पान। प्रीति अनन्य येरयेरां ॥ ८८ ॥ येरयेरां वेगळेपण। होऊं न शकती अर्धक्षण। अणुमाजी दोघेजण। नांदती पूर्ण पूर्णत्वें ॥ ८९ ॥ ऐसीऐसिया अनन्यगतीं। श्रीराम भोगी सीता सती। सीतेचिया निजात्मप्रीतीं। श्रीराममूर्ति उल्लासे ॥ ९० ॥ सीतेचा भावार्थ संपूर्ण। देखोनि उल्लासे रघुनंदन। सीता भाव धरी द्विगुण। प्रीति चतुर्गुण श्रीरामीं ॥ ९१ ॥ सीता भाव धरी अधिकाधिक। तंव तंव श्रीरामीं ओसंडे सुख। कैसी अति प्रीति अलोलिक। एकएकां अनन्य ॥ ९२ ॥ जैसी ज्यासी श्रीरामीं भक्ती। तैसी त्यावरी रामप्रीती। हें बोलिलेंसे बहुतां ग्रंथीं। मीच किती अनुवादों ॥ ९३ ॥ जैसा भाव तैसी प्रीती। जैसी प्रीती तैसी प्राप्ती। जैसी प्राप्ती तैसी स्थिती। हाचि परमार्थी मुख्यार्थ ॥ ९४ ॥ ग्रंथीं राखोनियां गुह्यार्थ। मुख्यत्वें दावावा परमार्थ। हाचि कवित्वाचा निजस्वार्थ। येणें रघुनाथ संतुष्ट ॥ ९५ ॥ संतुष्ट होती श्रोते। संतुष्ट होती वक्ते। संतुष्ट होती कथाकर्ते। श्रीरामचरित्र रामायण ॥ ९६ ॥ कथा परिसतां रामायण। पूर्वज उद्धरती जाण। पूर्वजांचें नवलाव कोण। उद्धरे संपूर्ण त्रिजगती ॥ ९७ ॥ श्रीरामकथेची नव्हाळी। हे सदाशिवाची जपमाळी। मणिकर्णिका अंतकाळीं। जपे कर्णमूळीं तें हें ब्रह्म ॥ ९८ ॥ सावधान करणें निजमना। तेचि मणिकर्णिका सत्य जाणा। आदरें परिसतां रामायणा। तें तारक पूर्ण परब्रह्म ॥ ९९ ॥ आदरें रामकथाश्रवण। तें तारक ब्रह्म रामायण। काशी मणिकर्णिका आपण। हात जोडून उभ्या तेथें ॥ १०० ॥ यालागीं रामकथेपासीं। तीर्थें तिष्ठती अहर्निशीं। चारी मुक्ति होती दासी। कथाउल्हासीं परमानंद ॥ १ ॥ कथा रामायणी अगाध। पदोपदीं परमानंद। श्रवणें ओसंडे आनंद। निजात्मबोध श्रीरामें ॥ २ ॥ रामायणाच्या निजकीर्तीं। सुखें शिवादिक डुल्लती। तेणें पावन त्रिजगती। कथाश्रवणार्थी श्रीराम संतोषे ॥ ३ ॥ यापरी अयोध्येप्रती। सीतेचे अनन्य प्रीतीं। वसता झाला रघुपती। जाली समाप्ती बाळकांडा ॥ ४ ॥ वश्य करोनि वैराग्य वितंडें। साधिलें ब्रह्मज्ञान अखंड। ऐक्या आणोनि पिंडब्रह्मांड। बाळकांड संपविलें ॥ ५ ॥ साधिली शस्त्रास्त्रविद्या उदंड। गुरुयाग सिद्धी नेला प्रचंड। झाडोनि अहल्यापापबंड। बाळकांड संपविलें ॥ ६ ॥ ताटिका सुबाहु केलीं दुखंड। राजे लाजवूनी उदंड। मारीचाचें ठेंचोनि तोंड। बाळकांड संपविलें ॥ ७ ॥ भंगोनि शिवाचें कोदंड। सीतासंशया देवोनि दंड। अहंरावणाचें काळें तोंड। करूनि बाळकांड संपविलें ॥ ८ ॥ परशुरामप्रताप प्रचंड। तो करोनि खंडविखंड। विष्णुचापाचें दमूनि बंड। बाळकांड संपविलें ॥ ९ ॥ यापरी संपलें बाळकांड। पुढें रामप्रताप प्रचंड। राक्षस वधिजेतील वितंड। तें कांडें कांड अवधारा ॥ ११० ॥ एका जनार्दना शरण। कथा रम्य रामायण। जालें बाळकांड संपूर्ण। कृपा पूर्ण संतांची ॥ ११ ॥ संतकृपा परिपूर्ण। अगाध कथा रामायण। तें मी वदावया अति दीन। श्रीजनार्दन स्वयें वदवी ॥ १२ ॥ स्वयें श्रीरामचि ग्रंथ कथिता। श्रीरामचि ग्रंथकर्ता। श्रीराम ग्रंथ लिहविता। वदनीं वदविता श्रीराम ॥ १३ ॥ एका जनार्दना शरण। यापरी श्रीराम आपण। कथा करवी रामायण। केलें संपूर्ण बालकांड ॥ ११४ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे बालकांडे एकाकारटीकायां श्रीरामजानकीअयोध्याप्रवेशो नाम सप्तविंशतितमोऽध्यायः ॥ २७ ॥ ओंव्या ॥ ११४ ॥

१ खरेपणानें. २ वेदशास्त्रांना. ३ जलप्राशन. ४ एकात्मतेनें. ५ वाहूं लागतें, उतास येतें. ६ बोळं. ७ नवल, चमत्कार. ८ उभीं राहतात. ९ कडकडीत. १० स्थावरजंगमात्मक सर्व सृष्टी.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

CC-0. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations



श्रीएकनाथ महाराजकृत

श्रीभावार्थरामायण

अयोध्याकांड

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations



वनवासगमनकालीं श्रीराम आणि कौसल्या यांची भेट

श्रीराम, लक्ष्मण आणि सीता नौकेंतून गंगा उतरून जातात

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

श्रीसद्गुरवे रामचंद्राय नमः ।

श्रीएकनाथ महाराजकृत

श्रीभावार्थरामायण

अयोध्याकांड

अध्याय पहिला

॥ श्रीरामचंद्राय नमः ॥

गजाननाय महते प्रत्यूहतिमिरच्छिदे ।
अपारकरुणामूर्त्यै सर्वज्ञानदृशे नमः ॥ १ ॥
चरितं रघुनाथस्य शतकोटिप्रविस्तरम् ।
एकैकमक्षरं पुंसां महापातकनाशनम् ॥ २ ॥

श्रीरामकथेची नव्हाळी । शेष वंदी पाताळीं । शिव वंदी प्रेम[1]समेळीं । कथा भूतळीं जगद्वंद्य ॥ १ ॥ तरी तें शतकोटी रामायण । आळवूं श[2]केल कोण । तेथें मी अपुरतें दीन । परी तो जनार्दन स्वयें वदवी ॥ २ ॥ तरी श्रीरामस्वरूप चिद्रूपता । चैतन्यशोभांकित सीता । तरी देवभक्तांच्या कृतकार्यार्था । मानुष्यजा[3]ड्यता अवतारू ॥ ३ ॥ अर्धनारीनटेश्वरी । जो पुरुष तेचि नारी । तेंवी ते सीता निर्धारीं । एकात्मतेवरी स्त्रीपुरुष ॥ ४ ॥ जैसीं बहुरूपी रा[4]वराणी । परी स्त्रीपुरुषभाव नाहीं मनीं । तरी तेचि संपादणी । लोकसंरक्षणीं सत्यत्वें दावी ॥ ५ ॥ 'एकाकी न रमते' या श्रुती । सवतीमत्सरू स्वयें म्हणती । तरी हे बृहदारण्यवेदोक्ती । द्वैतीं कल्पिती अद्वैतभावो ॥ ६ ॥ परब्रह्म जें अतिरिक्त । 'सहैतावानास' द्विधांग पावत । तरी हा वेदांतींचा इत्यर्थ । द्वैत कल्पित अद्वैतत्वें ॥ ७ ॥ यापरी सुखें श्रीरामसीता । दोनी नांदती एकात्मता । ऐसिया स्थितीची व्यवस्था । जे अवतारता नटनाट्यें ॥ ८ ॥ तरी व्यवस्था पावे अधिकारविधी । आणि भक्तां नांदवावें निजपदीं । म्हणोनि याचिलागीं त्रिशुद्धी । अवतारसिद्धि श्रीराम ॥ ९ ॥ ऊंस गाळून काढिजे रस । मग तोही जाळून असोस । शर्करा कीजे अति सुरस । तिचाही निर्मळांश नाबद कीजे ॥ १० ॥ मग नाबदेचीं अति निगुतीं । फळें नारळें चतुर करिती । आणि तेथेंही कवठें काढिती । ते करंटे निश्चितीं निजस्वादा ॥ ११ ॥ तेंवी परब्रह्मतेचि रसें । देहाकृतीचिये मुसें । ओतींव रामरूपाचे ठसे । आले आपैसे चित्स्वरूपा ॥ १२ ॥ ऐसी श्रीरामाची शुद्धमूर्ती । शोभा शोभवी त्रिजगती । तरी तेथें स्थूलत्व भाविती । ते करंटे निश्चितीं अभागी ॥ १३ ॥ जे मनुष्य मानिती श्रीरामा । ज्याचेनि नामें नाश भवभ्रमा । त्यासी मानवी महिमा । बोलोंचि नये ॥ १४ ॥ श्रीरामाची निजस्थिती । शिवभवानी नाम जपती । आणि त्यासी लक्ष्मण अनुवर्ती । सखा सांगाती सर्वस्वें ॥ १५ ॥ तरी लक्ष्मण एकात्मता रामांकित । केवळ भावार्थ तो भरत । शत्रुघ्न तो धैर्यवंत । हा व्यूह-

१ मोठ्या प्रेमानें. २ वर्णूं शकेल. ३ जड मानवदेह धारण करून. ४ खडीसाखर. ५ संगतीं राहणारा. ६ मथितार्थ.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वृत्तांत चतुष्टयाचा ॥ १६ ॥ मुख्य मुळीं एक मूर्ती। तेचि चतुर्धा[1] अभिव्यक्ती। या नांव व्यूहचतुष्टय म्हणती। एक निश्चितीं विभाग ॥ १७ ॥ आत्मप्रबोध तो लक्ष्मण। भावार्थ तो भरत जाण। निजनिर्धारी तो शत्रुघ्न। आनंदविग्रही पूर्ण श्रीराम ॥ १८ ॥ अहमात्मा तोचि दशरथ। उत्पत्तीसी मुख्य हेत। दूर गेलिया श्रीरघुनाथ। निवर्तत अहमात्मा ॥ १९ ॥ आतां विवेक आणि निजविचारू। तैसे वसिष्ठविश्वामित्र गुरू। ज्यांपासोनि अति साचारू। शस्त्रास्त्रविद्या दृढ केली ॥२०॥ कौसल्या ते सुविद्या। सुमित्रा ते शुद्ध मेधा[2]। कैकेयी ते अति अविद्या[3]। मंथरा कुविद्या तीपासीं ॥ २१ ॥ कुविद्या क्षोभवोनि अविद्येसीं। श्रीराम केला वनवासी। तंव सीता अनन्यभावेंसीं। श्रीरामासरसी निघाली ॥ २२ ॥ सूर्यासवें जैसी प्रभा। वसंतासवें शोभे वनशोभा। तेंवी जानकी जगदंबा। प्राणवल्लभासवें निघे ॥ २३ ॥ जेंवी साकरेतें न सांडी गोडी। तेंवी सीता रामा न सोडी। केवळ सेवेची आवडी। वनीं रोकडी दासत्वाची ॥ २४ ॥ राज्यीं असतां रघुनंदनासी। सेवा वांटिली सेवकांसी। तरी ते मी एकली वनवासीं। सर्व सेवेसी पात्र होईन ॥ २५ ॥ श्रीरामसेवा जरी ये हाता। ऐसें भाग्य दुर्लभ सर्वथा। ते सेवावया तत्त्वतां। चरणचालीं सीता वना आली ॥ २६ ॥ ऐसी हे सीतेची गती। तैसीच लक्ष्मणाची स्थिती। श्रीरामसेवे वनाप्रती। आला निश्चितीं सर्वभावें ॥ २७ ॥ जैसा आत्म्यापासीं निजबोधु। तैसा श्रीरामासवें निजबंधु। दोघांचा एक संवादु। परम आल्हादु वनवासीं ॥ २८ ॥ जैसे बोध विरक्ति परमार्थासीं। तैसे सीता लक्ष्मण श्रीरामासरसीं। ऐसे तिघे निघाले वनवासीं। कृतकार्यासी लक्षोनी ॥ २९ ॥ लक्षोनि पुढील कार्यार्थ। वना निघाला श्रीरघुनाथ। येथोनि चालिला ग्रंथार्थ। तो श्रोतीं भावार्थ अवधारिजे ॥ ३० ॥ रामायणींचा ग्रंथार्थ। त्यामाजी जो निजभावार्थ। श्रोतीं पाहावा सावधानार्थ। अर्थे परमार्थ सहज जोडे ॥ ३१ ॥ एका जनार्दना शरण। हें भावार्थरामायण। श्रीरामाचें निरूपण। दावी लक्षण व्यूहचतुष्टयाचें ॥ ३२ ॥ श्रीरामकथेचें अक्षर। तें क्षराक्षरातीत[4] पर। सभाग्य भाग्याचे जे नर। ते कथा सादर परिसिती ॥ ३३ ॥ कथाश्रवणें उपजे विरक्ती। कथाश्रवणें वाढे शांती। कथाश्रवणें परमानंदप्राप्ती। महापापी उद्धरती कथाश्रवणें ॥ ३४ ॥ चोरटा वाल्मीक महापापी। तो रामनामें जाला निष्पापी। त्याची कथा नित्य जपी। कथा वाग्जल्पीं[5] शिवाच्या ॥ ३५ ॥ तें हें शिवसेव्य रामायण। श्रवणें मरणासी ये मरण। सर्वेचि जन्मा ये बोळवण[6]। श्रवणें परिपूर्ण ब्रह्मप्राप्ती ॥ ३६ ॥ नित्य जपतां रामनाम। वक्ता होय पूर्ण ब्रह्म। त्याचिया कथेचा अनुक्रम। कर्माकर्मा छेदक ॥ ३७ ॥ कथा निर्दळी कर्माकर्म। श्रोते स्वयें होती परब्रह्म। वाल्मीकाचा उपकार परम। केला सुगम परमार्थ ॥ ३८ ॥ सुगम परमार्थ रामकथा। बाळकांड स्वयें संपतां। विजयगजरें श्रीरघुनाथा। अयोध्येआंतौता[7] आणिला रायें ॥ ३९ ॥ ते अयोध्येआंतौता दशरथ। सुखें स्वानंदें नांदत। नित्य सेवा करी रघुनाथ। हर्षयुक्त बंधूंसीं ॥ ४० ॥ मातुळकुळीं न्यावया भरत। मातुळ जो कां युधाजित। तो रायासी साक्षेपयुक्त[8]। असे पुसत एकांतीं ॥ ४१ ॥ भरताचें मनोगत। मातुळगृहा जावया उद्यत। तें जाणोनियां दशरथ। स्वयें धाडित उल्हासें ॥ ४२ ॥ अश्व गज रथ पदाती। चतुरंग सेना सहसंपत्ती। भरतशत्रुघ्न मातुलाप्रती। धाडी नृपती निजगजरें ॥ ४३ ॥ दोघे जावोनि उल्लासीं। भेटले कैकेयीसुत मातामहासी। वेगीं नमोनि मातामहीसी। मातुळवासी स्वानंदें ॥ ४४ ॥ नित्य नवे नाना भोग। कौतुकसोहळे उपभोग। दोघे वसती अनुद्वेगें[9]। वैभवभाग्यउल्लासें ॥ ४५ ॥ येरीकडे अयोध्येसी। वसिष्ठाचे निजसेवेसी। रामसौमित्र अति उल्लासीं। सर्वस्वेंसीं सादर ॥ ४६ ॥ तैसेचि दशरथसेवेसी। निकटवर्ती[10] अहर्निशीं[11]। जें जें मनोगत रायासी। त्या त्या कार्यासी प्रवीण ॥ ४७ ॥ न सांगतां मनोगत। हृदयींचा निजकार्यार्थ। तो तो संपादी रघुनाथ। अति समर्थ मनोज्ञ ॥ ४८ ॥ रायाचा अति

१ चार प्रकारांनीं. २ धारणाशक्ति, बुद्धि. ३ अज्ञान. ४ विनाशी व अविनाशी या सर्वांपलीकडील. ५ भाषणामध्यें.

६ पाठवणी. ७ अयोध्येमध्यें. ८ आग्रहानें. ९ दुःखरहित. १० जवळ राहणारे. ११ रात्रंदिवस.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

पढियेंता । वसिष्ठाचा आवडता । राम आवडे समस्तां । भूतमहाभूतां वल्लभ ॥ ४९ ॥ जैसें जीवन कां जीवासी । तैसा श्रीराम सर्वांसी । अखंडता अहर्निशीं । जीवोल्हासी श्रीराम ॥ ५० ॥ जैसा चंद्रकर चकोरां । तैसा श्रीराम चराचरां । आवडे सर्व नारीनरां । जीवां समग्रां अति प्रिय ॥ ५१ ॥ वसिष्ठ सांगे रायापासीं । राम शस्त्रास्त्रविद्याराशी । तेंचि पहावया रायासी । निजमानसीं उल्हास ॥ ५२ ॥ जाणोनि रायाचें मनोगत । वसिष्ठ आज्ञापी श्रीरघुनाथ । विद्या पाहूं इच्छी दशरथ । आज्ञा समर्थ राम म्हणे ॥ ५३ ॥ गुरुवचन पितृवचन । साधुसज्जनआज्ञापन । उल्लंघी तो अभागी पूर्ण । तो पाषाण नरदेही ॥ ५४ ॥ गुरुआज्ञेचें उत्तर । ऐकतां करावें सत्वर । मुहूर्त पाहे तो पामर । करी विचार तो मूर्ख ॥ ५५ ॥ मी तंव केवळ आज्ञाधार । ऐसें बोलिला रघुवीर । कांस घातली सत्वर । आला सौमित्रासन्निध ॥ ५६ ॥ गुरुआज्ञेचें विंदान । दोहीं बाह्यांस आलें स्फुरण । अंगीं न समाये स[२]त्राण । प्रतापपूर्ण गुरुवाक्यें ॥ ५७ ॥ गुरुवाक्याचा उल्हासु । ज्या नाहीं तो केवळ पशु । शिष्यांमाजी तो [३]रासभवेषु । ज्यासी आळस गुरुवाक्यीं ॥ ५८ ॥ देखोनि [४]साटोप रघुवीरू । वसिष्ठासी उल्हास थोरू । जेंवी देखोनि पूर्ण चंद्रू । क्षीरसमुद्र हेलावे ॥ ५९ ॥ तैसें जालें वसिष्ठासी । थोर आल्हाद दशरथासी । देखोनि साटोप पुत्रासी । रंगभूमीसी शृंगारी ॥ ६० ॥ रायें रंग शृंगारिला । देखोनि विश्वकर्मा शंकला । स्वर्ग तेणें फिका केला । लाजविला कैलासु ॥ ६१ ॥ अलकावतीची सौभाग्यथोरी । रंगीं न सरे लोणावारी । तैसिया रंगामाझारीं । रंगधारी श्रीराम ॥ ६२ ॥ धनुर्विद्या अलक्षविद्या । छत्तीस दंडायुधविद्या । संमुखीविमुखीकरणविद्या । मल्लविद्या लघुविद्या लाघवी ॥ ६३ ॥ गजवाजिरथारोहण । निराधारीं युद्धकरण । आकाश खोंचोनि परतें जाण । मेरु उडवणें तृणप्राय ॥ ६४ ॥ ऐसिया विद्या अलोलिक । गुरुआज्ञें दावी आवश्यक । पाहूं आले नागरिक । साधु लोक ठेंसले ॥ ६५ ॥ रंगीं उभा रघुवीर । विद्या दावी समग्र । पाहूं आले सुरवर । विमानीं अंबर दाटलें ॥ ६६ ॥ ते काळीं रामलक्ष्मण । धनुर्विद्येचें लक्षण । वीरश्रियेची आंगवण । स्वयें संपूर्ण दाविती ॥ ६७ ॥ देखोनि श्रीरामाचें ठाण । सुरासुर कंपायमान । नरांचे झांकोळले नयन । देदीप्यमान तेजस्वी ॥ ६८ ॥ बाणतेजें छेदी गगन । गगनोदरींची अलक्ष खूण । स्वयें लक्षूं जाणे आपण । अचुक संधान श्रीरामाचें ॥ ६९ ॥ बाणपिसारियाचा वारा । शत्रूसहित उडवी रहंवरा । गगनीं भोवंडी गरगरां । जेंवी तृणांकुरां वाहटुळी ॥ ७० ॥ श्रीरामबाणाचा प्रताप । मेरुमांदारां चळकांप । मेणें सहस्रमुखा लागे धाप । कूर्म साटोप तडतडों लागे ॥ ७१ ॥ त्या सिंहनादाचा अति गजर । तेणें शत्रूचें भेदे जिव्हार । परदळीं हाहाकार । वीर धीर मूर्च्छित ॥ ७२ ॥ परशु पट्टिश तोमर । गदा मुद्गर लहुडी चक्र । या शस्त्रांचा महामार । दावी अनुकार शत्रुदमनीं ॥ ७३ ॥ असि पाश शूळ शक्तिधर । छत्तीस दंडायुधचमत्कार । दावी शस्त्रांचे महामार । शत्रुसंभारनिर्दळणीं ॥ ७४ ॥ वोढण खर्गाचा धारकु । दावी थरक सरकु । वोढण धडके लावोनि धाकु । पाडी एकैकु मूर्च्छित ॥ ७५ ॥ पुढील वेगाचेनि उड्डाणें । शत्रुसमुदावो मर्दणें । तेचि पाठिमोरे किरींगें । निर्दळणें अरिवीरां ॥ ७६ ॥ पुढिल्या घायीं मागिल्या पाडी । मागिल्या घायीं पुढील तोडी । ऐसिया माराच्या परवडी[११] । रणीं निर्वेडी[१२] दावितु ॥ ७७ ॥ निर्वाणयुद्धाचा निर्वाहो । मागीलपुढिल्या एकचि घावो । तो तो यावा[१३] दावित पहाहो । ऋषि आणि रावो विस्मित ॥ ७८ ॥ जाणे मल्लविद्याकुसरी । उरीं शिरीं हाणी कोंपरीं । तळील आणोनियां वरी । चक्राकारीं उपडितु ॥ ७९ ॥ अष्टांगींच्या कळा जाणे । कळा लावोनि प्राण घेणें । एकांगुष्ठाचेनि चेपणें । जीवें मारणें महावीर ॥ ८० ॥ [१४]तँडवा हाणोनि तांतडी । गजेंसहित वीर पाडी । रथ मोडोनि कडाडीं । रण रगडी पायवाटा ॥ ८१ ॥ जाणे रथीं आरोहणें । रणीं माराचें प्रेरणें ।

१ आवडता, प्रिय. २ बळ. ३ गाढवरूप धारण करणारा. ४ उद्योगी, उत्साही. ५ उचंबळून येतो. ६ सभामंडप. ७ हीन होते. ८ भरले. ९ रथाला. १० उड्डाणानें. ११ प्रकार. १२ कौशल्यानें. १३ पराक्रम. १४ तडाका मारून.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

गति विगति परिभ्रमणें । चक्रावर्तन रथाचें ॥ ८२ ॥ रथाचिया सवेगता । शत्रुरथ अपसव्यता । घालोनि चालवी निजरथा । रथयोग्यता दावितु ॥ ८३ ॥ निरालंबींचिया गमना । रथ चालवूं शके जाणा । दावितां रथगतिलक्षणा । विस्मयो मना सुरसिद्धां ॥ ८४ ॥ गज गर्जोनि आलियावरी । उडोन बैसे कुंभांतरीं । मग वागवी युद्धाचारीं । महामारी गजयोद्धा ॥ ८५ ॥ गजें परसैन्य आकळी । गज रगडी गजातळीं । गजें गजदळ निर्दळी । रणरांगोळी गजयोद्धा ॥ ८६ ॥ बैसों जाणे अश्वावरी । वागवी युद्धाच्या महामारी । नाचवी चौं पायांवरी । रणांगणीं विचरतु ॥ ८७ ॥ अश्वखुरांचे महारजें । वैरी पावती निर्बुजें[3] शस्त्रें विसरती गजबजें । वारु रघुराजें प्रेरितां ॥ ८८ ॥ लागतां अश्वांची महाझड । सैन्य होय जी दुखंड । तोडित वीरांचें रुंडमुंड । वैरी दुखंड रणरंगीं ॥ ८९ ॥ ऐसे नाना अनुकार । अश्वगजरथांचे संचार । शस्त्रास्त्रांचे महामार । दावी चमत्कार रघुनाथ ॥ ९० ॥ युद्धादियावा अनुकरण । श्रीरामाचा अतिदारुण । देखोनि एक मूर्च्छापन्न । एक ते प्राण सांडूं पाहती ॥ ९१ ॥ एकीं घेतलें परम धाका । एकासी लागला धुकधुका । एक करिती लघुशंका । एक देखा नागवे पडती ॥ ९२ ॥ देखोनि श्रीरामाचा प्रताप । सुरसिद्धां सुटे कांप । दैत्यदानवां अहा कंप । दुर्धररूप श्रीराम ॥ ९३ ॥ भूतभविष्य वर्तमान । जाणते जे सज्ञान । तेही धाकें कंपायमान । यावा दारुण देखोनी ॥ ९४ ॥ श्रीरामयावा अति दुर्धर । देखोनि राजा सुखनिर्भर । विद्यानिपुण जाले कुमर । हा दृढ निर्धार रायासी ॥ ९५ ॥ राजा अत्यंत हर्षनिर्भर । ओंवाळी वस्तुजात अपार । सुरवर करिती जयजयकार । सुमनसंभार वर्षले ॥ ९६ ॥ देखोनियां दुर्धर यावा । हर्ष वसिष्ठाचिया जीवा । आनंदें आलिंगी राघवा । प्रेमसद्भावें आल्हादे ॥ ९७ ॥ शस्त्रास्त्रविद्येचा साटोप । तुवां दाविला सद्रूप । धन्य धन्य विजयाचा प्रताप । कृपा सकृप तुष्टला ॥ ९८ ॥ माझ्या वरदाचे द्विपंचं बाण । यत्नें राखा दोघे जण । युद्ध मांडिलिया निर्वाणं । जय संपूर्ण इंहीं बाणीं ॥ ९९ ॥ याचिया बाणांच्या पैं पोटीं । शस्त्रास्त्रें कोट्यनुकोटी । सुटोनि शत्रुसमुद्र आटी । हे गुह्य गोष्टी सांगितली ॥ १०० ॥ यापरी अपत्यत्वें सन्मान । दोघां देवोनि आश्वासन । निजगजरें अवघे जण । राजभवन प्रवेशले ॥ १ ॥ श्रीराम सर्वगुणीं संपन्न । हें रायासी कळलें लक्षण । तेंचि वसिष्ठासी आपण । गुह्य संपूर्ण पूसतु ॥ २ ॥ राज्यीं अभिषेकावा रघुनाथ । हा दृढ माझा मनोरथ । स्वामीनें सांगावा इत्यर्थ । तोचि कार्यार्थ मी करीन ॥ ३ ॥ वसिष्ठ सांगेल आपण । श्रीरामासी अभिषेचन । एका विनवी जनार्दन । कथा मनोज्ञ अवधारा ॥ १०४ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे अयोध्याकांडे एकाकारटीकायां श्रीरामलक्ष्मणशस्त्रास्त्रविद्यादर्शनं नाम प्रथमोऽध्यायः ॥ १ ॥ ओंव्या ॥ १०४ ॥ श्लोक ॥ २ ॥

अध्याय दुसरा

॥ श्रीरामचंद्राय नमः ॥ राज्याभिषेक श्रीरामासी । करावया उल्हास दशरथासी । बोलावोनि ज्येष्ठां श्रेष्ठांसी । गुह्य त्यांपासीं सांगतु ॥ १ ॥ उदार वसिष्ठादि महाऋषींसी । पृथ्वीपाळ नृपवरांसी । सेनापती समग्रांसी । गुह्य त्यांपासीं सांगत ॥ २ ॥ अष्टादश निजप्रजांसी । बोलावोनि अति प्रीतीसीं । बैसवोनि सन्मानेंसीं । त्यांपासीं काय मग बोले ॥ ३ ॥

परिश्रान्तोऽस्मि लोकस्य गुर्वीं धर्मधुरं वहन् ।
सोऽहं विश्राममिच्छामि पुत्रं कृत्वा प्रजाहिते ॥ १ ॥
भवद्भिरपि तत्सर्वमनुवर्तध्वमद्य वै ।
अनुजातो हि मां सर्वैर्गुणैः श्रेष्ठो ममात्मजः ॥ २ ॥
पुरंदरसमो वीर्ये रामः परपुरंजयः ।
तं चन्द्रमिव पुष्येण युक्तं धर्मभृतां वरम् ॥ ३ ॥
यौवराज्ये नियोक्तास्मि प्रातः पुरुषपुंगवम् ।
अनुरूपः स वो नाथो लक्ष्मीवाँल्लक्ष्मणाग्रजः ॥ ४ ॥
त्रैलोक्यमपि नाथेन येन स्यान्नाथवत्तरम् ।
अनेन श्रेयसा सद्यः संयोक्ष्येऽहमिमां महीम् ॥ ५ ॥

---

१ गंडस्थलावर. २ दणाणून सोडी. ३ घाबरून जातात. ४ अनेक वस्तू. ५ पुष्पांच्या राशी. ६ आवेश. ७ दहा. ८ निकराचें. ९ राजवाडा. १० सुंदर, मनोहर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

गतक्लेशो भविष्यामि सुते तस्मिन्निवेश्य वै ।
इति ब्रुवंतं मुदिताः प्रत्यनन्दन्नृपा नृपम् ॥ ६ ॥
वृष्टिमन्तं महामेघं नर्दंत इव बर्हिणः ।
तस्य तद्वचनं श्रुत्वा सर्वकल्पस्य धीमतः ॥ ७ ॥

समस्तांसी सांगे दशरथ । राज्यीं अभिषेकावा रघुनाथ । हा माझा दृढ मनोरथ । तुम्हांसी अर्थ मानला कीं ॥ ४ ॥ समस्तांसी संमत । जो कीजे तो दृढ कार्यार्थ । तुम्ही माझे परम आप्त । निश्चितार्थ मज सांगा ॥ ५ ॥ ऐकें वसिष्ठा विशेषज्ञा । ममांगीं बाणली वार्धक्यसंज्ञा । अझूनि राज्यभोगाची प्रज्ञा । कायसी सर्वज्ञा मज आतां ॥ ६ ॥ दुष्टनिर्दळणीं अति पुरुषार्थ । गोब्राह्मणादि प्रजा समस्त । नित्य राखितां सुखस्वार्थ । राज्यभारें श्रांत मी झालों ॥ ७ ॥ ते श्रांततेसी विश्रांतता । राज्याभिषेक श्रीरघुनाथा । त्या श्रीरामाची योग्यता । तुम्हां समस्तां विदित असे ॥ ८ ॥ श्रीराम माझा ज्येष्ठांत ज्येष्ठ । श्रीराम वरिष्ठां वरिष्ठ । श्रीराम बळिष्ठां बळिष्ठ । श्रीराम वरिष्ठ वंदनीय ॥ ९ ॥ श्रीराम सर्वगुणीं संपूर्ण । राज्यलक्षणीं सुलक्षण । साधुसेवेसी आल्हाद पूर्ण । गुरुवचन ब्रह्मतुल्य ॥ १० ॥ श्रीरामाचे प्रौढीचेनि पँडिपाडें । यम इंद्र वरुण बापुडे । श्रीरामप्रतापतेजापुढें । खद्योतपाडे शशिसूर्य ॥ ११ ॥ श्रीरामाची सुंदर शोभा । लाजें मदन विरे उभा । श्रीराम वल्लभियां वल्लभा । लावण्यगाभा श्रीराम ॥ १२ ॥ श्रीराम निधडा रणरंगधीर । सुबाहु मारिला अति दुर्धर । त्र्यंबकभंगाचा अति बँडिवार । शूरवीर श्रीराम ॥ १३ ॥ श्रीरामभुजांचा प्रतापपुंज । जिंतिला प्रतापी भार्गव द्विज । श्रीरामभयेंचि निर्भय मज । होईन पूज्य त्रैलोक्यीं ॥ १४ ॥ चैत्रमासीं पुष्यनक्षत्र । राज्याभिषेक श्रीरामचंद्र । त्रैलोक्य भोगिजे तेणें नरेंद्र । हें भाष्य निर्धार गुरुवाक्याचें ॥ १५ ॥ माझा गुरु वसिष्ठ । तो त्रैलोक्यीं परम श्रेष्ठ । त्याचें वचन मज वरिष्ठ । रामा राज्यपट्ट प्रभाँते ॥ १६ ॥ प्रातःकाळीं श्रीरघुनाथ । अँभिषिंचणें हा निश्चितार्थ । गर्जोनि बोले दशरथ । तेणें समस्त आल्हादले ॥ १७ ॥ राजे प्रजा सेना प्रधान । नगर नागरिकजन । ऐकोनि रायाचें वचन । उल्लासपूर्ण रामराज्यें ॥ १८ ॥ ऐकोनियां घनगर्जित । मयूर थैकारें नाचत । तेंवि रामराज्यें समस्त । उल्लासत जन अवघे ॥ १९ ॥

रामस्य पुरुषो लोके सत्यधर्मवतो गुणैः ।
समो न विद्यते कश्चिद्विशिष्टः कुत एव तु ॥ ७ ॥
बहुश्रुतानां वृद्धानां ब्राह्मणानामुपासिता ।
तेनास्येहातुलाकीर्तिर्यशस्तेजश्च वर्धते ॥ ८ ॥

सुखावोनि संपूर्ण । अवघे बोलती आपण । श्रीराम रायां शिरोरत्न । गुणनिधान श्रीराम ॥ २० ॥ राम सत्यवादी पवित्र परम । असत्यवादी जपतां रामनाम । तेही पावन होती निःसीम । सत्यासी विश्राम श्रीरामें ॥ २१ ॥ श्रीराम धर्मात्मा धीर परम । श्रीराम धर्माचें विश्रामधाम । धार्मिकी धर्मात्मा श्रीराम । धर्माश्रम श्रीराम ॥ २२ ॥ गुणी गुणातीत श्रीराम । श्रीराम गुणांचें निजधाम । अप्रमेय आत्माराम । पुरुषोत्तम श्रीराम ॥ २३ ॥ श्रीरामाची नवलस्थिती । नित्य नवी ब्राह्मणभक्ती । तेणें षड्गुण शरण येती । यश कीर्ति अतुलत्वें ॥ २४ ॥ श्रीरामासी समसमान । तिहीं लोकीं न दिसे आन । मग त्याहूनि अधिक कोण । प्रमाणीं प्रमाण नव्हे राम ॥ २५ ॥ ऐसें जाणोनियां श्रीरामातें । श्रीराम राजा जी आमुतें । आम्हीं अभिषिंचिला चित्तें । जाण निश्चितें पूर्वींच ॥ २६ ॥ त्या अभिषेकाची सत्यता । घरोघरीं हेचि कथा । श्रीराम राजा जी तत्त्वतां । जनीं वार्ता रामराज्याची ॥ २७ ॥ प्रातः अभिषेकी रघुनाथ । सुमुहूर्तें सोहळा वेदोक्त । तोही पहावया उल्लासयुक्त । रामानुगत सर्वस्वें ॥ २८ ॥ ऐसें बोलतां सकळां । त्यांचीं वाक्यें सुमनमाळा । रायें आवडीं घातली गळां । पुत्रसोहळाउत्साहें ॥ २९ ॥

इति प्रत्यर्चितान् राजा ब्राह्मणानिदमब्रवीत् ।
वसिष्ठं वामदेवं च तेषामेवोपशृण्वताम् ॥ ९ ॥

---

१ म्हातारपण. २ थोरवीपुढें. ३ काजव्यासारखे. ४ धैर्यवान्. ५ मोठेपणा. ६ प्रतापाची रास. ७ सकाळीं. ८ अभिषेक करणें. ९ विश्रांतिस्थान.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

चैत्रः श्रीमानयं मासः पुण्यः पुष्पितकाननः ।
यौवराज्याय रामस्य सर्वमेवोपकल्प्यताम् ॥ १० ॥
राज्ञस्तूपरते वाक्ये जनघोषो महानभूत् ।
शनैस्तस्मिन्प्रशांते च जनघोषे जनाधिपः ॥ ११ ॥
वसिष्ठं मुनिशार्दूलं राजा वचनमब्रवीत् ।
अभिषेकाय रामस्य यत्कर्म सपरिच्छदम् ॥ १२ ॥
तदद्य भगवन् सर्वमाज्ञापयितुमर्हसि ।
तच्छ्रुत्वा भूमिपालस्य वसिष्ठो मुनिसत्तमः ॥ १३ ॥
आदिदेशाग्रतो राज्ञः स्थितान्युक्तान् कृतांजलीन् ।
सुवर्णादीनि रत्नानि बलीन् सर्वौषधीरपि ॥ १४ ॥

दशरथ बोले हर्षनिर्भर[1] । वसिष्ठवामदेवादि ऋषीश्वर । तुम्ही अवधारा[2] समग्र । निजनिर्धारें[3] अभिषेका ॥ ३० ॥ चैत्रमास अति पवित्र । वसंतें वनशोभा विचित्र । गुरुपुष्य शुभनक्षत्र । श्रीरामचंद्रा अभिषेक ॥ ३१ ॥ ऐसा माझा निजनिर्धार । तुम्हांस मानेल साचारें[4] । तरी प्रातःकाळीं श्रीरामचंद्र । तुम्ही समग्र अभिषेका ॥ ३२ ॥ ऐकोनि रायाचें उत्तर । राजे प्रजा आणि नगरनर । मनें वचनें राजा रघुवीर । आम्हीं साचार अभिषिंचिला ॥ ३३ ॥ ऐसें बोलोनि समग्र । उल्लासें करिती जयजयकार । नादें कोंदलें अंबर । शब्द सर्वत्र सुखें गर्जे ॥ ३४ ॥ नादें सुखेंसीं सुलीन होत । अवघे बैसले हर्षयुक्त । ते वेळीं उठोनियां दशरथ । अभिवंदित सद्गुरूसी ॥ ३५ ॥ वंदोनि वसिष्ठाचे पाये । म्हणे रामाभिषेका पाहिजे काये । तें सांगावया पाहें । सामर्थ्य आहे तुजपाशीं ॥ ३६ ॥ राजे प्रजा प्रधानयुक्त । मजसकट समस्त । आम्ही तुझे आहों आज्ञांकित । तुम्हीं रघुनाथ अभिषिंचावा ॥ ३७ ॥ ऐकोनि रायाचें वचन । वसिष्ठ उठिला संतोषोन । अवलोकिती सभेचे जन । ठेले[5] उठोन कृतांजळी[6] ॥ ३८ ॥ देशोदेशींचे भूपती । मुकुटकुंडलें छत्रपती । रायें आणिले अभिषेकार्थीं । ते ते नृपती अवधारा ॥ ३९ ॥ पूर्वपश्चिमनृपती । उत्तरराजे चक्रवर्ती । दक्षिणदिशेचे भूपती । आले रघुपतिअभिषेका ॥ ४० ॥ पर्वतवासींचे पर्वती । म्लेच्छराजे नेणों किती । द्वीपद्वीपींचे भूपती । आले गडपती गडपाळ ॥ ४१ ॥ देखोनि श्रीरामसाटोप । भार्गवजयाचा प्रताप । तेणें धाकें सकळही नृप । आपेंआप पैं आले ॥ ४२ ॥ तेही राजे अवघे जण । करावया वसिष्ठवचन । ठेले अंजलिपुट जोडून । सावधान वचनार्थीं ॥ ४३ ॥ वसिष्ठमुखींचें वचन । काय देईल आज्ञापन । तें तें करावया सावधान । नृप संपूर्ण वचनार्थीं ॥ ४४ ॥ आणिकही देशोदेशिक । प्रजा प्रधान सकळिक । वसिष्ठवचनाचे चातक । रघुकुळटिळकाभिषेका ॥ ४५ ॥ समस्त देखोनि सावधान । वसिष्ठ बोले अति गर्जोन । अवघे आणा उपायँन[7] । पट्टपूजन[8] रघुनाथा ॥ ४६ ॥ शतानुशत कुंभ सुवर्ण । नानारत्नीं परिपूर्ण । रायांहीं आणावे आपण । पट्टपूजन रघुनाथा ॥ ४७ ॥ श्वेतवारू श्वेतहस्ती । श्वेतचामरें घेवोनि हातीं । दशरथादि सकळ नृपती । पूजेप्रती उभे असा ॥ ४८ ॥ प्रजा प्रधान देशोदेशिक । तिहीं यथानुशक्ती देख । आणावें जी निजकनक । रघकुळटिळकपट्टपूजे ॥ ४९ ॥ सपुच्छ सनख व्यांघ्रचर्म[9] । सुवर्णश्रृंगी वृषभोत्तम । छत्र पांडुर मनोरम । अति उत्तम आणावें ॥ ५० ॥ प्रातःकाळीं सुमुहूर्ते । जे जे उपचार वेदोक्त । ते ते आणावे समस्त । अभिषेकार्थ श्रीरामा ॥ ५१ ॥ ब्राह्मणां द्यावें निमंत्रण । उत्तम निपजंवावें[10] मिष्टान्न । सर्वकर्मीं ब्राह्मणभोजन । नित्य निर्विघ्न कार्यार्थीं ॥ ५२ ॥ रथ गज वांजी[11] सालंकार । सेना शृंगारावी विचित्र । देवालयें अति पवित्र । राममंदिर शृंगारा ॥ ५३ ॥ स्वयें वसिष्ठें ऐसी । आज्ञा दिधली समस्तांसी । तें तें कार्य शीघ्रतेसीं । अति उल्लासीं पैं केलें ॥ ५४ ॥ वैकुंठींची पूर्ण प्रतिभा[12] । राजमंदिरीं आणिली शोभा । चैतन्यतेजें मिरवे सभा । लाजे उभा कैलास ॥ ५५ ॥ देवालयीं मूळारंभा । स्वप्रकाशें प्रकाशगर्भा । चिदानंदें शोभे शोभा । गर्भीं पद्मनाभा महापूजा ॥ ५६ ॥ राजमंदिरीं अगाध थोरी । ध्वजा पताका प्रासादशिखरीं[13] । महोत्साह घरोघरीं । द्वारोद्वारीं रत्नदीप ॥ ५७ ॥ राजांगणीं वांडेंकोडें[14] । कुंकुमचंदनाचे सडे । नाना रंगमाळा चहूंकडे । लाजे

१ मोठ्या हर्षानें. २ ऐका. ३ माझा कृतनिश्चय. ४ खरोखर. ५ राहिले. ६ हात जोडून, ७ नजराणे. ८ राज्याभिषेक.

९ वाघाचें कातडें. १० तयार करवावें. ११ घोडे. १२ प्रतिच्छाया. १३ राजवाड्याच्या शिखरावर, १४ आनंदानें,

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

त्यांपुढें वसंत ॥ ५८ ॥ राजसभा शोभायमान। शोभेसी नंदनवन शरण। लोटांगणीं ये चित्ररथवन। विराजमान श्रीरामें ॥ ५९ ॥ वैकुंठींचा श्रीरामरावो। त्याच्या अभिषेकीं उत्साहो। वैकुंठींचा सर्व समुदावो। आला पहा हो अयोध्येसी ॥ ६० ॥ रामदासी नगरजन। राजे सेना प्रजा प्रधान। वस्त्रीं भूषणीं शोभायमान। वैकुंठभुवनसम शोभा ॥ ६१ ॥ राजविदीं दोहीं हारीं। शोभा शोभे नानाकुसरीं। ध्वजा पताका शृंगारीं। रचिल्या वेळी दीपमाळा ॥ ६२ ॥ कस्तूरीचंदनकर्दमयुक्त। मार्ग शिंपिले सुवासित। वासें वसंत होतसे मूर्च्छित। श्रीरघुनाथनिजशोभा ॥ ६३ ॥ हांटवाटियाभागीं दोहीं। चिद्रत्नें जडित शोभा पाहीं। हरिकीर्तनें ठायीं ठायीं। गर्जती देहीं[3] हरिनामें ॥ ६४ ॥ मखरें शोभती कुसरीं। मुक्ताफळांचिया हारी। सुमनमाळा चूतांकुरीं[4]। द्वारोद्वारीं तोरणें ॥ ६५ ॥ पूर्ण कलश द्वारोद्वारीं। सदीप शोभा तयांवरी। गुढिया उभविल्या घरोघरीं। नरनारीउत्सावो ॥ ६६ ॥ कोठें अभिषेकाची वार्ता। कोठें करिती रामकथा। एकां अत्यंत एकाग्रता। श्रीरघुनाथा पहावया ॥ ६७ ॥ निजनगर शोभायुक्त। सकल जन उल्लासत। तें देखोनियां दशरथ। जाला शंकित निजमानसीं ॥ ६८ ॥ श्रीरामाभिषेकाचा सोहळा। मी काय देखेन आपुले डोळां। हें भाग्य दुर्लभ कपाळा। म्हणोनि डोळां अश्रु आले ॥ ६९ ॥ पाचारोनि श्रीरामासी। गुह्य सांगे तयापासीं। म्हणे प्रातःकाळीं गुरुपुष्यासी। तूं यौवराज्यासी अंगीकारीं ॥ ७० ॥ येरें चरणीं ठेविला माथा। तंव गाहींवरू आला दशरथा। ऐक बापा श्रीरघुनाथा। गुह्य तत्त्वतां सांगेन ॥ ७१ ॥ तुझे अभिषेकाचा निर्धारें[5]। जैंपासोनि केला साचार। तैंपासोनि ग्रह क्रूर। गगनीं अत्युग्र[6] भासती ॥ ७२ ॥

अवष्टब्धं च मे राम नक्षत्रं दारुणग्रहैः।
आवेदयंति दैवज्ञा जन्मस्थो मां शनैश्चरः ॥ १५॥
अपि चाद्याशुभान्राम स्वप्नान् पश्यामि राघव।
सनिर्घाता दिवोल्काश्च पतंति हि महास्वनाः ॥ १६ ॥
प्रायेण च निमित्तानामीदृशानां समुद्भवे।
राजा हि मृत्युमाप्नोति घोरां चापदमृच्छति ॥१७॥

माझे राशीस शनैश्चर। सांगती ज्योतिर्विद नर। तोही लागत अति क्रूर। पीडा दुर्धर तयाची ॥ ७३ ॥ माझें जें कां जन्मनक्षत्र। तेथें वक्री भौम शनैश्चर। तयांसीं मिनला अतिचारें[7]। अति सत्वर गुरु देखा ॥ ७४ ॥ मृग नक्षत्रीं माझी उत्पत्ती। पुनर्वसूसीं तुज जन्मप्राप्ती। दोघांस दिसताहे ग्रहगती। जाण निश्चितीं रघुनाथा ॥ ७५ ॥ सूर्ययुक्त राहु रोहिणीसीं। केतु बैसला असे विशाखेसीं। ते दोघे वैरी सूर्यासी। रविरोहिणींसी ग्रासूं पाहती ॥ ७६ ॥ मृग मिथुन माझी राशी। बारावा रवि राहु वृषभासीं। क्रूर ग्रहगति दिसे ऐसी। विनाशासी निजमूळ ॥ ७७ ॥ शनि भौम दोनी वक्री। तेथेंचि गुरु आला अतिचारी। हे क्रूर माझे राशीवरी। तेचि रामचंद्रीं बारावे ॥ ७८ ॥ आणिकही एक दुश्चिन्ह। म्यां देखिलें दुष्ट स्वप्न। पुढील भांणें वाढिलें संपूर्ण। नेलें झडपोन घारीनें ॥ ७९ ॥ अभ्रेंवीण[9][10] अति बोभांटें[11]। विजा पडती अति नेटें। जीव जाऊं पाहे कडकडाटें। येणें उद्धटें अति निःपातु ॥ ८० ॥ सहित मेरु कुलाचळ। भूकंप जाहला अति प्रबळ। श्रीरामा या चिन्हांचें फळ। जाण केवळ अनिष्ट ॥ ८१ ॥ या चिन्हांचा निजविलास। राज्यभ्रंश कां वनवास। अवश्य होय जीवनाश। परम त्रास सुहृदांसी ॥ ८२ ॥ यालागीं गा रघुनाथा। यौवराज्यअभिषेकता। अंगीकारीं अति शीघ्रता। प्रातः पुष्यता साधूनी ॥ ८३ ॥ श्रीराम म्हणे आज्ञा प्रमाण। म्हणोनियां वंदिले चरण। रायें संतोषोनि जाण। पाठविला आपण निजधामा[12] ॥ ८४ ॥ रामें पुसोनि नृपवरा। आला कौसल्येच्या निजमंदिरा। येरी देखोनि श्रीरामचंद्रा। नयनद्वारा निवाली ॥ ८५ ॥ श्रीराम सांगे कौसल्येसी। प्रातःकाळीं यौवराज्यासी। रायें नेमिलें अभिषेकासी। तेणें उल्लासी कौसल्या ॥ ८६ ॥ श्रीरामराज्याभिषेक। तेणें कौसल्येसी परम हरिख। गोभूक्षौमांबरें[13] कनक। विप्रां अनेक

१ रांगेनें. २ बाजारविदींत. ३ देहधारी प्राणी. ४ आम्रपल्लवांनीं. ५ निश्चय. ६ भयंकर, प्रतिकूल. ७ ग्रहांचें अतिशीघ्र गतीनें पुढेंपुढें परिभ्रमण होणें. ८ ग्रहांचें भ्रमणमार्गांत मागें येणें. ९ पात्र. १० पावसावांचून. ११ कडकडाटानें. १२ आपल्या मंदिराला. १३ गाई, जमीन, शालू वगैरे वस्त्रें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

देती जाली ॥ ८७ ॥ हरिखें आला लक्ष्मण । त्यासी राम बोलिला आपण । माझें राज्य तें तुझें जाण । मीतूंपण आम्हां नाहीं ॥ ८८ ॥ गोडी गुळाचा विवेक । नांवें दोन स्वरूप एक । तैसी आम्हां तुम्हां देख । वेगळीक असेना ॥ ८९ ॥ अलंकार आणि कनकें । आकार विकार दोनी एक । तैसे आम्ही तुम्ही देख । सर्वदा ऐक्य सर्व कर्मी ॥ ९० ॥ जैसा जीव आणि प्राण । तैसे राम आणि लक्ष्मण । ऐकोनि श्रीरामाचें वचन । केलें निंबलोण कौसल्यें ॥ ९१ ॥ सुमित्रेसी आल्हाद पूर्ण । तिनें देखोनि रामलक्ष्मण । ओंवाळोनि दोघे जण । हरिखें आपण धन वांटी ॥ ९२ ॥ श्रीरामासी लोटांगण । घालोनियां लक्ष्मण । तुझे सेवेचें सुख संपूर्ण । यास प्रमाण चरण तुझे ॥ ९३ ॥ श्रीरामा तुझे सेवेवीण । त्रैलोक्याचें राज्य पूर्ण । तें मज ब्रह्मस्वासमान । तुझी आण वाहतसें ॥ ९४ ॥ ऐकोनि लक्ष्मणाचें वचन । रामें दिधलें आलिंगन । म्हणे तूं जिवलग संपूर्ण । सखा सज्जन सर्वस्वें ॥ ९५ ॥ याउपरी रघुनंदन । कौसल्यासुमित्रेसी नमन । करोनि लक्ष्मणाची बोळवण । स्वधामा आपण येता जाला ॥ ९६ ॥ प्रातःकाळीं अभिषिंचन । रामसीतेसी उपोषण । सांगावया वसिष्ठ श्रेष्ठ पूर्ण । रायें आपण पाठविला ॥ ९७ ॥ सद्गुरु आला निजभवनासी । श्रीराम अत्यंत उल्हासीं । लोटांगण घालोनि तयासी । मग पायांसी लागला ॥ ९८ ॥ पूजामधुपर्कविधान । सालंकृतशतगोदान । देवोनि केलें चरणक्षाळण । तीर्थप्राशन केलें रामें ॥ ९९ ॥ ते वेळीं वसिष्ठें आपण । करविलें पुण्याहवाचन । श्रीरामसीतेसी उपोषण । केला संपूर्ण संकल्प ॥ १०० ॥ अभिषेकार्थ होमविधान । होमशेषघृतप्राशन । कुशास्तरणीं भूमिशयन । दोघांलागून करविलें ॥ १ ॥ वसिष्ठ सांगे रायापाशीं । प्रातःकाळीं अभिषेकासी । उपोषण श्रीरामसीतेसी । कुशास्तरणीं भूमिशयन ॥ २ ॥ राजा वसिष्ठासी करी नमन । म्हणे केल्या रामासी अभिषिंचन । ऋणत्रयापासून मी उत्तीर्ण । सत्य जाण गुरुवर्या ॥ ३ ॥ वसिष्ठ बोले आल्हादेंसीं । श्रीरामराज्याभिषेकासीं । स्वर्गसुख राया देखसी । या वाक्यें उल्हासी दशरथ ॥ ४ ॥ राज्याभिषेक रघुनाथा । तेणें इंद्रादिदेवां समस्तां । मांडलीसे कल्पांतचिंता । तिहीं विधाता प्रार्थिला ॥ ५ ॥ श्रीरामअभिषेकासी विघ्न । घरचेघरीं उपजेल पूर्ण । ते युक्ती सांगेल चतुरानन । दशवदनवधार्था ॥ ६ ॥ एका जनार्दना शरण । ब्रह्मरसें नवरस संपूर्ण । विघ्नें सुखावे रघुनंदन । तें निरोपण अवधारा ॥ १०७ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे अयोध्याकांडे एकाकारटीकायां श्रीरामाभिषेकप्रारंभो नाम द्वितीयोध्यायः ॥ २ ॥ ओंव्या ॥ १०७ ॥ श्लोक ॥ १७ ॥

१ सोनें. २ ब्राह्मणाचे धनासारखें, सर्वस्वीं अग्राह्य. ३ सालंकृत अशा शंभर गाईंचें दान. ४ दर्भांच्या शय्येवर. ५ मुक्त. ६ ब्रह्मदेव. ७ रावणाच्या वधाकरितां.

अध्याय तिसरा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ श्रीरामराज्याभिषिंचन । तेणें इंद्रादिकां चिंता गहन । समस्त देवीं मिळोनि जाण । चतुरानन विनविला ॥ १ ॥ देव म्हणती ब्रह्मयासी । तुझें आश्वासन आम्हांसी । राम अवतरला सूर्यवंशीं । तो रावणासी वधील ॥ २ ॥ सपुत्र सबंधु सप्रधान । राम करील राक्षसकंदन । तेणें देवांस बंधमोचन । तें मिथ्या वचन होऊं पाहे ॥ ३ ॥ सत्य करीं आपुलें वचन । आमुचें करीं बंधमोचन । आमचे आपत्तीचें विंदान । सावधान अवधारीं ॥ ४ ॥ इंद्र बारी चंद्र छत्रधारी । यम पाणी वाहे घरीं । वायु सर्वदा पूजे ओसरी । विधि तेथें करी दळकांडा ॥ ५ ॥ अश्विनीसूनू दोनी । तिहीं परिमळें धावे स्त्रियांलागुनी । विलंब होतां अर्ध क्षणीं । दासी धांवोनि धुमसिती ॥ ६ ॥ माको असे तराळी । सटवी बाळंतीं प्रक्षाळी । रात्रीं जागर घाली कराळी । मेसको वळी शोभेंनिका ॥ ७ ॥ मैराळ देव कानडे । करिती राक्षसांच्या दाढयाखाडें । आरसा न दाविती जयापुढें । तोचि रोकडें बुकाळी ॥ ८ ॥ नवग्रहांची पीडा गाढी । ते रावणें घातले बांधवेडीं । पायीं घालोनियां

८ मोठी. ९ राक्षसांचा वध. १० कारागृहवासापासून मुक्तता. ११ गोष्ट, युक्ती. १२ अश्विनीकुमार. १३ सुगंधद्रव्यें. १४ मारतात. १५ श्रेणी, १६ बंदीत.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

बेडी । पायरीबुडीं अडकविले ॥ ९ ॥ राहू केतू शनि अंगारी । त्यांची पीडा सुरासुरीं । रावणें करूनियां पायरी । मंचकावरी वेंघतू ॥ १० ॥ विघ्न राहूं न शके जयापुढें । तो गणेश होवोनि बापुडें । गाढवांचे कळप गाढे । चहूंकडे वळी-तसे ॥ ११ ॥ अग्नीस आपदा बहुवस । रावणाचे मैळे असोसे³ । नानापरींचे स्पर्शदोष । धूत अह-र्निशीं धुपधुपित ॥ १२ ॥ उदकक्रिया⁴ वरुणा-हातीं । व्यजनसेवा⁵ नित्य वसंतीं । निरोप सांगावया बृहस्पती । प्रजापति शांतिपाठक ॥ १३ ॥ ऐसे आम्ही देव समस्त । रावणाचे नित्यांकित । लंकेसि आलिया रघुनाथ । बंधनि-र्मुक्त करील ॥ १४ ॥ राघवासी राज्याभिषिंचन । तैं त्यासी न घडे लंकागमन । आमुचें नव्हे बंधमोचन । अति दीन वदताती ॥ १५ ॥ ऐकोनि देवांची विनंती । ब्रह्मा विचारी निजचित्तीं । राज्याभिषेकासी विघ्नप्राप्ती । ते दृढयुक्ती योजिली ॥ १६ ॥ अविद्येचा अति लाडका । कार्यनाशासी अति नेटका⁶ । विघ्न करावया रामाभिषेका । विकल्प देखा धाडिला ॥ १७ ॥ विकल्प म्हणे ब्रह्म-देवा । पट्टाभिषेक श्रीराघवा । तेथें माझा कोण केवा । सर्वथा रिघावा नव्हे माझा ॥ १८ ॥ जेथें श्रीरामाचें नाम । तें स्थान मजसी अति दुर्गम । रामराज्यासी विघ्न परम । तें कर्म मज ठाकेना ॥ १९ ॥ श्रीरामाचें राज्य जेथ । विकल्प केंवी रिघे तेथ । श्रेष्ठा सर्वज्ञा तूं समर्थ । श्रीरामीं पुरुषार्थ न चले माझा ॥ २० ॥ ब्रह्मा सांगे गुह्य गोष्टी । न पडोनि श्रीरामाचे दृष्टी । रिघावें मंथ-रेचे पोटीं । विकल्पपुष्टी तीमाजी⁷ ॥ २१ ॥ मंथरा कैकेयीची आंदणी दासी । ते दासी भरतराज्या अभिलाषी । ते सदा श्रीरामातें द्वेषी । सापत्न-भावेंसीं अति दुष्ट ॥ २२ ॥ जेथें श्रीरामाचा द्वेष । तेथें विकल्पवस्ती सावकाश । तीमाजी करो-नियां प्रवेश । करीं विध्वंस अभिषेका ॥ २३ ॥ विध्वंसोनि अभिषेकासी । राज्याभिषेक भर-तासी । श्रीराम करावा वनवासी । या कार्या-र्थासी शीघ्र करीं ॥ २४ ॥ विकल्प म्हणे वचन सत्य । मंथरा वसे अयोध्येआंत । माझा प्रवेश नव्हे तेथ । कैंवी कार्यार्थ साधेल ॥ २५ ॥ ब्रह्मा सांगे विकल्पासी । नगराबाहेर वनक्रीडेसी । मंथरा येईल आरामासी⁸ । तुझ्या प्रवेशासी तेथें संधी ॥ २६ ॥ विकल्प लागे ब्रह्मयापायीं । प्रवेशेन मंथरादेहीं । वश्य करीन कैकेयी । तरी राज्य नाहीं भरतासी ॥ २७ ॥ श्रीराम ज्येष्ठ भरत कनिष्ठ । कैसेनि घडेल राज्यपट । वचन न मानिती वरिष्ठ । ज्येष्ठ श्रेष्ठ निजज्ञाते ॥ २८ ॥ ब्रह्मा म्हणे विकल्पासी । तूं सर्वज्ञ ज्ञाता होसी । भरत पावे रघुराज्यासी । त्या वर्मासी मी सांगेन ॥ २९ ॥ दशरथें निजभाकेसीं । दोन वर दिधले कैकेयीसी । एकें वरें श्रीराम वनवासी । एकें भरतासी राज्यपट ॥ ३० ॥ ऐकोनि ब्रह्मयाची गोष्टी । विकल्प बांधी शकुनगांठी । संचरावया मंथरेपोटीं । अति संकटीं चालिला ॥ ३१ ॥ अयोध्या देखोनि रामप्रतापें । विकल्प धाकें चळीं कांपे । जेथींचा तेथें स्वयें लपे । श्रीरामदर्पें⁹ साशंक ॥ ३२ ॥ गुप्त रहावया बुडीं । लपे हिंव-राचिया खोडीं । निळीची सुनीळ झाडी । देवोनि दडी स्वयें राहे ॥ ३३ ॥ म्हणोनि तीं झाडें जाण । अपवित्र म्हणती सज्जन । तें तें विक-ल्पाचें स्थान । विध्वंसन शुभकार्या ॥ ३४ ॥ या झाडावेगळें कांहीं । विकल्प स्पर्शावया ठाव नाहीं । यालागीं तीं निंद्य पाहीं । सर्वकार्यासी अपवित्र ॥ ३५ ॥ कलिंगैफळीं¹⁰ अपवित्र वस्ती । जे सेविती त्यां विकल्पप्राप्ती । मंथरेसी त्या फळाची प्रीती । देखे अवचितीं आरामीं ॥ ३६ ॥ मंथरा आली आरामासी । देखोनि कलिंग-फळासी । ते जाली अति उल्हासी । सेवावयासी सादर ॥ ३७ ॥ कलिंगफळ आवडे भारी । सेवितां अति प्रीतिकरीं । विकल्प संचरला भीतरीं । क्षणामाझारी व्यापिली ॥ ३८ ॥ मग विचारी हृदयांत अर्थ । पढियंतीचा¹¹ सुत भरत । तो सांडोनियां रघुनाथ । राज्य पावत हें कुडें ॥ ३९ ॥ धाकुटा मातुळा दवडोनि भरत । मागें अभिषेकी रघुनाथ । केवळ कुंडा¹² हा दशरथ । अति अनर्थ हा आम्हां ॥ ४० ॥ राज्य आल्या श्रीरामासी । भरत होईल परदेशी ।

१ मोठे. २ मळ. ३ अतिशय. ४ पाणी भरणें. ५ वारा घालणें. ६ उत्तम, हुशार. ७ सवतीमत्सरानें. ८ बागेमध्यें.

९ श्रीरामाच्या भयानें. १० कलिंगण फळाचे ठिकाणीं. ११ आवडतीचा. १२ वाईट, दुष्ट.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

कैकेयी होईल कौसल्येची दासी । मग आम्हांसी सुख कैंचें ॥ ४१ ॥ ऐसी भावना भावूनी । रामराज्याचा द्वेष मनीं । मंथरा क्रोधाग्नि होऊनी । कैकेयीभवनीं प्रवेशली ॥ ४२ ॥ मंथरा सहज श्रीरामातें द्वेषी । आंगण झाडी द्वेषभावेंसीं । पुढें असतां श्रीरामासी । रजॅ त्यापासीं लोटिलें ॥ ४३ ॥ श्रीराम म्हणे मंथरेसी । द्वेषें वरतें कां न पाहासी । ते तूं अधोमुखी कुब्जा होसी । श्रीरामें तिसी शापिलें ॥ ४४ ॥ त्या शापाचे प्रातीसीं । पावली सत्वर आघातासी । यालागीं कुब्जा हो तिसी । स्वभावेंसीं निजनाम॥४५॥ रामराज्याचा सोहळा । जंव जंव मंथरा देखे डोळां । तंव तंव क्रोध चढे बळा । द्वेषाचा आगॅळा आक्रोश ॥ ४६ ॥ कैकेयीचे निजभवनीं । रामराज्याचा उल्लास मनीं । गुढिया तोरणें ध्वजा सुमॅनीं । मंथरा देखोनि अति तप्त ॥ ४७ ॥ श्रीरामराज्यें उल्लासोनी । कैकेयी अलंकारभूषणीं । पर्यॅकीं विश्रॅांत ओटॅांगणीं । दोघी जणी विडिया देती ॥ ४८ ॥ एकी घालिती विंजणवारा । तंव तेथें आली मंथरा । क्रोधें नेत्र भोवंडी गरगरां । द्वेषें थरथरां कांपत ॥ ४९ ॥

मंथरोवाच—

उत्तिष्ठ मूढे किं शेषे सौभाग्यबलगर्विते ।
उपप्लुतमघौघेन नात्मानमवबुध्यसे ॥ १ ॥
अनिष्टे सुभगाकारे सौभाग्येन विकत्थसे ।
चलितं तव सौभाग्यं नद्याः स्रोत इवोष्णगे ॥ २ ॥

मंथरा अति क्रोधेंसीं । काय बोले कैकेयीसी । उठीं मूढे काय निजसी । सुख मानिसी तें दुःख ॥ ५० ॥ रामराज्याचें मानिसी सुख । गुढियातोरणें अति हरिखें । तेंचि तुज होय महादुःख । परी तूं मूर्ख नेणसी ॥ ५१ ॥ मी रायाची पॅढियंती । तेणें गर्वें तुज पडिली भ्रांती । सौभाग्य गेलें कौसल्येप्रती । तें तूं निश्चितीं नेणसी ॥ ५२ ॥ जळें केळीं पोफळी वाढती । ते जळॅस्रोत आलिया मूळाप्रती । तेणेंचि ते वृक्ष उलथती । ते नाशस्थिति तुज आली ॥ ५३ ॥ ऐकोनि मंथरेची उग्रवाणी । कैकेयी सौभाग्यशिरोमणी । तिसी पुसे आश्वासोनी । क्रोध कैसेनि तुज आला ॥ ५४ ॥

कैकेय्युवाच—

कैकेयी त्वब्रवीत् कुब्जां कश्चित् क्षेमं न मंथरे ।
विषण्णवदनां हि त्वां लक्षये भृशदुःखिताम् ॥ ३ ॥

कोणें तुज काय अपमानिलें । तुज कोणें काय गांजिलें । तुज कोणी काय बोलिलें । तें मज वहिलें सांग पां ॥ ५५ ॥ तूं माझी जिवलग होसी । कधीं क्रोध न देखें तुजपासीं । क्रोध सांडावा मज सांगसी । ते तूं दुःखी होसी अति क्रोधें ॥ ५६ ॥ तुझे ठायीं चिंता दारुण । चिंतेनें मुख दिसे मळिण । ऐसें तुज दुःख कोण । तें मज संपूर्ण सांग पां ॥ ५७ ॥ तुज कोण बोलिलें दुष्ट मात । कोणें तुजकडे उचलिला हात । त्याचा करीन मी घात । समूळ वृत्तांत मज सांगें ॥ ५८ ॥

मंथरा तु वचः श्रुत्वा कैकेय्या मधुराक्षरम् ।
उवाच क्रोधसंयुक्ता वाक्यं वाक्यविशारदा ॥ ४ ॥
सास्म्यगाधे भये मग्ना दुःखशोकसमन्विता ।
दह्यमानानलेनेव त्वद्धितार्थमिहागता ॥ ५ ॥

ऐकोनि कैकेयीचें वचन । मंथरा जाली क्रोधायमान । तुज आलें हो दॅारुण विघ्न । तें तूं आपण नेणसी ॥ ५९ ॥ राजा दशरथ आपण । तुज छॅळितो संपूर्ण । त्याचें तूं नेणसी लक्षण । पढियंतीपणें अति गर्वी ॥ ६० ॥ तूं गर्वित जे राज्यवैभवेंसीं । तें राज्य राजा देतो श्रीरामासी । वैभव गेलें कौसल्येपासीं । तूं नेणसी मूर्खत्वें ॥ ६१ ॥ तुज आलें दुःख गहन । त्यामाजी मी अति निमग्न । तुझेनि दुःखें दह्यॅमान । तुझें मूर्खपण देखोनी ॥ ६२ ॥ तुझिया वृद्धीं मी वर्धमान । तुझेनि सुखें मी सुखसंपन्न । तुझेनि दुःखें दुःखायमान । तुझेनि जाण अति संतप्त ॥ ६३ ॥ राजा वैभवलोभें तुजशीं । तेणेंचि रायें तूं ठकिजेसी । भरत दवडोनि मॅातुॅळासी । मागें रामासी राज्यपट ॥ ६४ ॥ राज्य दिधलिया श्रीरामासी । दास्यभोग तो भरतासी । सत्तासामर्थ्य कौसल्येसी । तूं श्लॅाघसी मूर्खत्वें ॥ ६५ ॥ तूं माझें वाक्य विवेकें विवरीं । होईं भरतासी साहा-

१ कल्पना. २ कल्पून. ३ केर. ४ विशेष. ५ पुष्पयुक्त. ६ पलंगावर. ७ स्वस्थ पडून, ८ तक्क्याला टेंकून.

९ आनंद. १० आवडती, प्रिय. ११ पाण्याचे ओघ. १२ मोठें. १३ ठकवितो. १४ जळत्यें आहें. १५ आजोळीं. १६ मुरडतेस.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

कारी । आपलें हित आपण करीं । गर्वावारी ठकूं नको ॥ ६६ ॥ ऐकोनि मंथरेचें वचन । कैकेयी झाली सुखसंपन्न । रत्नखचित कंठाभरण । दिधलें दान मंथरेसी ॥ ६७ ॥ कंठींचें पदक अमोलिक । मंथरेसी देवोनियां देख । रामराज्याचें सर्वांसी सुख । तूंचि कां दुःख मानिसी ॥ ६८ ॥

रामे वा भरते वाहं विशेषं नोपलक्षये ।

तस्मात्तुष्टास्मि यद्राजा रामं राज्येऽभिषेक्ष्यति ॥ ६ ॥

भरताहुनियां अधिक । राम प्रिय मज आत्यंतिकें[1] । तूं मूर्खत्वें मानिसी दुःख । मज महासुख रामराज्यें ॥ ६९ ॥ भरत इष्टं[2] राम अनिष्ट । ऐसें मानिती ते महापापिष्ट । राम ज्येष्ठां अति श्रेष्ठ । राज्याभीष्ट[3] श्रीराम ॥ ७० ॥ जैसा भरत तैसाचि राम । मज तंव दोन्ही समसमान । कुब्जे[4] तूं कां मानिसी विषम । मूर्ख परम तूं एकी ॥ ७१ ॥ ऐकोनि कैकेयीचें वचन । कुब्जा क्रोधें मूर्च्छापन्न । कंठींचें काढोनि आभरण । दिधलें टाकोन अति रागें ॥ ७२ ॥ राज्य गेलें श्रीरामासी । वैभव गेलें कौसल्येसी । ठकिलें दशरथें तुजसी । सुख मानिसी मूर्खत्वें ॥ ७३ ॥ कुब्जा अति क्रोधें बोलत । कैकेयी तीतें संबोखितें[5] । राम रायाचा ज्येष्ठ सुत । अधिकार प्राप्त राज्याचा ॥ ७४ ॥ राम गुणी गुणगंभीर । त्रैलोक्यामाजी महाशूर । त्यासी राज्याचा अधिकार । तूं पामर रामद्वेषी ॥ ७५ ॥ राम भरतासी करील वोखटें[6] । हें तंव काळत्रयीं न घटे । कुब्जे बोलसी तितुकें खोटें । श्रीराम तूं हट्टें द्वेषिसी ॥ ७६ ॥ ऐकोनि कैकेयीची गोष्टी । कुब्जा रागें कपाळ पिटी । तूं एक मूढ या सृष्टीं । राम राज्यपटीं बैसविसी ॥ ७७ ॥ कैकेयी नायके आपुले बोला । ऐसा मंथरेनें निश्चय केला । तुझें दुःख न देखवे मजला । प्राण आपुला मी त्यागीन ॥ ७८ ॥ म्हणोनि गडबडां लोळे । केश सुटले मोकळे । कैकेयी उठवोनि तये वेळे । भाववळें आलिंगी ॥ ७९ ॥ क्षेम देतां नवलपरी । विकल्प होता मंथरेउदरीं । तो रिघाला कैकेयीमाझारीं । क्षणाभीतरीं अति वेगें ॥ ८० ॥ हृदया हृदय लागतां देख । दोहीं ठायीं विकल्प एक । वाढिन्नला आत्यंतिक । रामाभिषेकदृढद्वेषी ॥ ८१ ॥ मंथरा बोले कैकेयीप्रती । रामराज्य तुज अपघाती । तें तूं न मानिसी चित्तीं । म्यां तुज किती शिकवावें ॥ ८२ ॥ दास दासी तुज अनेक । परी ते दाशरथिसेवक । तुज आप्तत्वें मीच एक । मजही मूर्ख तूं म्हणसी ॥ ८३ ॥ सापत्न[7] ते केवळ शत्रु । तूं हा न मानसी माझा मंत्रू[8] । येचविषयीं शास्त्रविचारू । पूर्वापारू सांगेन ॥ ८४ ॥ कश्यपापासूनि संभूत । सापत्नबंधु देवदैत्य । ते येरयेरांचा करिती घात । पुराणार्थ गर्जती ॥ ८५ ॥ येचि अर्थीं वेदोक्ती[9] । याज्ञवल्की महामूर्ती । बोलिला उपनिषदाप्रती । ते प्रचीति अवधारीं ॥ ८६ ॥

देवासुरविमर्दाश्च श्रुता बहुविधा त्वया ।

स्वार्थास्वार्थं स्वमुद्दिश्य भ्रात्रा भ्राता बहिष्कृतः ॥ ७ ॥

भ्रातॄणामेकजातानामेकद्रव्याभिलाषिणाम् ।

पिशुनानां न पश्यामि सौभ्रात्रं क्वचिदप्यहम् ॥ ८ ॥

एवं वेदशास्त्रविचारीं । सापत्न ते मुख्य वैरी । तुवांही पुराण परिसिलें[10] घरीं । तें तुज गर्वेंकरीं[11] नाठवे ॥ ८७ ॥ देव आपले स्वार्थसिद्धी । दैत्यांतें मारिती महायुद्धीं । दैत्य आपले हितावबोधीं[12] । देवां ग्रासूं पाहती ॥ ८८ ॥ पाहें पां श्वानाचियेपरी । भांडूं लागती एकाहारी । तैसा कलहो राजपुत्रीं । कैंची मैत्री सापत्नीं ॥ ८९ ॥ दिति देवांची सापत्नमाता । तिसी गरोदर असतां । तिच्या गर्भाच्या करावया घाता । इंद्र विनीतें[13] सेवा करी ॥ ९० ॥ पाहोनियां विषम संधी । इंद्र तिचा गर्भ वधी । वज्रें सप्तसप्तधा[14] छेदी । केले विशुद्ध मरुद्गण[15] ॥ ९१ ॥ यालागीं सापत्नांसी थोर । स्वभावें सदा नित्य वैर । हा नेणसी तूं विचार । मजचि पामर तूं म्हणसी ॥ ९२ ॥ ऐकोनि मंथरेचिया बोला । कैकेयीसी उल्हास जाला । राज्याभिषेक नव्हे भला । श्रीरामीं धरिला दृढ द्वेष ॥ ९३ ॥ राम ज्येष्ठ भरत कनिष्ठ । कनिष्ठासी राज्यपट[16] । वचन न मानी हें स्वयें वसिष्ठ । तोही अति श्रेष्ठ निजज्ञानें ॥ ९४ ॥ जरी म्यां राजा वश्य केला । तरी वसिष्ठ नायके

१ अत्यंत. २ आवडता. ३ राज्याचें हित. ४ मंथरे. ५ समाधान करते. ६ वाईट. ७ सवतीचे पुत्र. ८ मसलत. ९ वेदवाणी. १० ऐकिलें. ११ गर्वामुळें. १२ हित व्हावें म्हणून. १३ नम्रपणें. १४ एकूणपन्नासदां. १५ देवसमुदाय. १६ राजगादी.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

माझ्या बोला । कनिष्ठा राज्यपट वहिला । नाहीं बोलिला शास्त्रार्थें ॥ ९५ ॥ वसिष्ठ सांगेल शास्त्रार्थ । तेथें काय करील दशरथ । अटक[1] पडलिया वेदोक्त । राज्य भरत केवीं पावे ॥ ९६ ॥ मंथरा सांगे कैकेयीसी। जरी तूं माझा बोल करिसी। राज्य साधीन भरतासी । क्षणार्धेंसीं मी एक ॥ ९७ ॥ कैकेयी बोले पुढती । कोणे युक्तीं राज्य भरतीं । साधिसील ते उपपत्ती[2] । यथानिगुतीं मज सांगें ॥ ९८ ॥ वसिष्ठवामदेवादि ऋषी । राज्या मानितील भरतासी । ते तुज युक्ती आहे कैसी । यथार्थेंसीं मज सांगें ॥ ९९ ॥ मंथरा बोले आपण । तुझी तुज नाहीं आठवण । रायें करूनि भाषप्रमाण[3] । दोन वर पूर्ण दिधले ॥ १०० ॥ ते दोन वर रायापासीं । मागावे ये संधीसी । एकें राम वनवासी । एकें भरतासी राज्यपद ॥ १ ॥ पूर्वदत्त मागतां आम्हांसी। कांहीं न बोलवे वसिष्ठासी। नेदीं न म्हणवे दशरथासी । निर्जभाकेसी[4] गुंतला ॥ २ ॥ ऐकोनि मंथरेचें वचन । कैकेयीसी विस्मय पूर्ण । कुब्जे तूं तंव अति सज्ञान । वरदस्फुरण[5] तुज आलें ॥ ३ ॥ मज रायाचें वरदान । परी माझी मज नाहीं आठवण । त्याचें समयीं स्फुरलें ज्ञान । अति सज्ञान तूं कुब्जे ॥ ४ ॥ मंथरा म्हणे कैकेयीसी । तुझेनि विजयो दशरथासी । हात घातला रथांकांसी[6] । केंवी दुःखासी साहवलें ॥ ५ ॥ संग्रामीं रथचक्राचा लोट । तुझा बाहु व्हावा पीठ । कैसेनि धरवला नेट । तें मज स्पष्ट सांग पां ॥ ६ ॥ ऐकतां मंथरेचा प्रश्न । कैकेयी उल्लासे संपूर्ण । सांगे ऋषीचें शापवचन । आणि वरदान तयाचें ॥ ७ ॥ पितृगृहीं मज बाळपण । तेथें आला ऋषि सज्ञान । कुशासन कुशावरण । आणि आभरण कुशांचें ॥ ८ ॥ वृद्ध जटिल[7] रोमांचित । म्यां तेथें केलें वो अनुचित । वांकुल्या दाविल्या अति निंदित । तरी क्षमायुक्त महाऋषि ॥ ९ ॥ उगें देखोनियां ऋषीसी । म्यां त्याचिये नाकीं लाविली मसी[8] । क्षोभ पावोनियां तापसी । अति आवेशीं शापिलें ॥ ११० ॥ नानापरी तूं मज निंदिसी । ते तूं जगीं निंद्य होसी । उश्शाप मागावया त्यासी । बाळभावेंसीं मी नेणें ॥ ११ ॥ मसी लाविली माझे तोंडीं । ते तूं जगीं होसील काळतोंडी । अपेशाची उभवोनि गुढी । निंद्यत्वें रोकडी नांदशील ॥ १२ ॥ देवपूजा विसरला क्षोभोक्तीं । ते म्यां दिधली त्याचे हातीं । तेणें वदला तो वरदोक्ती । ऐक तुजप्रती सांगतें ॥ १३ ॥ येणेंचि हातें भ्रतारासी । संग्रामीं तूं साह्य होसी । वरदद्वय पतीपासीं । तूं पावसी राजबाळे ॥ १४ ॥ रथचक्रीं तुझा हात । संग्रामीं न होईल व्यथाभूत । होईल विजयी तुझा कांत । ऐसा वरदार्थ वदला ऋषि ॥ १५ ॥ याउपरी मज आतां । पुढें काय कर्तव्यता । मंथरे सांगसी ज्या ज्या अर्था । तो तो तत्त्वतां मी करीन ॥ १६ ॥ ऐकोनि कैकेयीचे बोल । कुब्जा विचार सांगे सखोल । तुवां कोप करावा प्रबळ । मुख्यत्वें केवळ रायावरी ॥ १७ ॥ सांडोनियां दिव्याभरणांसी । मुक्तकेश मळिणवासी । तुवां रिघावें[10] प्रायोपवेशीं[11] । वरद्वयासी मागावया ॥ १८ ॥ राजा येईल तुजपासीं । मुख न दाखवावें तयासी । कांहीं न बोलावें तयासीं । अति निश्चयेंशीं क्षोभवावें ॥ १९ ॥ राजा देईल सुवर्णमेरू । अथवा रत्नांचा सागरू । तें तूं न करींच अंगीकारू । वरदविचारू सांडोनी ॥ १२० ॥ राज्यपट द्यावा भरता । वनवास द्यावा श्रीरघुनाथा । त्याही वनवासाची कथा । ऐक आतां सांगेन ॥ २१ ॥ अयोध्येनिकट वनाआंत । वनवासी जालिया श्रीरघुनाथ । प्रजा समस्त जातील तेथ । उद्वसीं भरत केवीं राजा ॥ २२ ॥ राम अति प्रिय प्रजांसी । राम आवडे प्रधानांसी। अवघे जातील तयापासीं । मग भरतासी राज्य कैंचें ॥ २३ ॥ दंडकारण्य दूर देशीं । गंगातीरीं राम वनवासी । श्रीरामाची वार्ता अयोध्येसी । कदाकाळेंसीं न यावी ॥ २४ ॥ अयोध्येची कथावार्ता । रामें नायकावी सर्वथा । ऐसें जालिया तत्त्वतां । राज्य भरता भोगेल ॥ २५ ॥ ऐकोनि मंथरेची युक्ती । उल्लास कैकेयीच्या चित्तीं । आलिंगिली दोहीं हातीं । अति प्रीतीं सद्भावें

१ बंदी. २ सयुक्तिक सिद्धी. ३ शपथवचनाला. ४ शपथ देऊन. ५ वरांची आठवण. ६ रथाच्या कण्याला, आंसाला. ७ जटाधारी. ८ काळें. ९ मळकट वस्त्र नेसलेली. १० मरणाच्या निश्चयानें त्वां अन्नत्याग करावा. ११ ओसाड प्रदेशांत.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ २६ ॥ रागें सांडिलें होतें पदक । तें स्वयें लेवविलें देख । कानींचीं कुंडलें अमोलिक । दिधलीं आवश्यक अति प्रीतीं ॥ २७ ॥ भरता अभिषेकिलियापाठीं । सुवर्णें मढीन तुझी पृष्ठी । रत्नखचित टिळक ललाटीं । घालीन कंठीं मुक्तामाळा ॥ २८ ॥ अनुमोदूनि मंथरेसी । कैकेयी निघाली प्रायोपवेशीं । सांडोनि अलंकारवस्त्रांसी । मळिणवासासीं भूमिशय्येंं ॥ २९ ॥ आतां येवोनि दशरथ । पुसेल कैकेयीचा स्वार्थ । वना निघेल रघुनाथ । तोही कथार्थ अवधारा ॥ १३० ॥ एका जनार्दना शरण । देवकार्यार्थ संपूर्ण । वना निघेल रघुनंदन । दशवदनवधार्थ ॥ १३१ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे अयोध्याकांडे एकाकारटीकायां कैकेय्या मंथरोपदेशो नाम तृतीयोऽध्यायः ॥ ३ ॥ ओंव्या ॥ १३१ ॥ श्लोक ॥ ८ ॥

अध्याय चवथा

॥ श्रीरामचंद्राय नमः ॥

आज्ञाप्य तु महाराजो राघवस्याभिषेचनम् ।
उपस्थानमनुज्ञाप्य प्रविवेश निवेशनम् ॥ १ ॥
प्रियार्हां प्रियमाख्यातुं विवेशांतःपुरं वशी ।
स कैकेय्या गृहं श्रेष्ठं प्रविवेश महायशाः ॥ २ ॥
न ददर्श स्त्रियं राजा कैकेयीं शयनोत्तमे ।
स कामबलसंयुक्तो रत्यर्थी मनुजाधिपः ॥ ३ ॥
अपश्यन् दयितां भार्यां पप्रच्छ विषसाद च ।
नहि तस्य पुरा देवी तां वेलामत्यवर्तत ॥ ४ ॥
प्रतिहारी त्वथोवाच संत्रस्ता तु कृतांजलिः ।
देव देवी भृशं क्रुद्धा क्रोधागारमभिद्रुता ॥ ५ ॥

श्रीरामासी अभिषेकार्थ । प्रातःकाळीं पुण्य सुमुहूर्त । सिद्ध सामग्री करावया समस्त । आज्ञा नेमस्त रायें केली ॥ १ ॥ मग रतिकामसंभोगासीं । आला कैकेयीभवनासी । गृहीं न देखोनियां तिसी । पुसे समस्तांसी प्रिया कोठें ॥ २ ॥ तेथें दास दासी सेवक । कोणी न बोलती रायासन्मुख । अवघीं राहिलीं अधोमुखं । तेणें साशंक नृप जाला ॥ ३ ॥ कुब्जा राहोनियां दुरी । खुणाविली छत्रधारी । ते रायातें नमस्कारी । भयभीत भारी बोलावया ॥ ४ ॥ तिसी नाभीकारयुक्त । राजा पुसतसे वृत्तांत । ते म्हणे कैकेयी क्रोधें मूर्च्छित । अति संतप्त भोगत्यागें ॥ ५ ॥ सांडोनि वस्त्राभरणांसी । भूमिशय्या मळिणवासासीं । कैकेयी होती तमःप्रदेशीं । तेथें रायासी तिणें नेलें ॥ ६ ॥ देखोनि कैकेयीची अवस्था । परम दुःख झालें दशरथा । तुज काय कोणें केलें आतां । तें तत्त्वतां मज सांगें ॥ ७ ॥ तुज कोणें दाविला हात । त्याचा समूळ करीन घात । तुज बोलती जे विरुद्धार्थ । जिव्हा सदंत छेदीन त्यांची ॥ ८ ॥ ज्यासी म्हणसी करा समर्थ । गजांतलक्ष्मी देईन तेथ । करावें म्हणसी ज्यासी निर्मुक्त । बंधनिर्मुक्त करीन मी ॥ ९ ॥ मी असतां शिरावरी । त्वां कां तोडिली गळसरी । भूमिशय्या प्रेतापरी । अशुभकारी हें चिन्ह ॥ १० ॥ तिसी लावूं जातां हाता । तिणें झांजडिलें नृपनाथा । तिचें मुख पाहूं जातां । मुख सर्वथा ते दावीना ॥ ११ ॥ प्रिया पाहों नेदी वदन । रायासी आलें जी रुदन । धांवोनि तिचे धरिले चरण । प्रिये तुजवीण मी परदेशी ॥ १२ ॥ येरीं अंसुडिले पाये । उठीं येथोनि परता जायें । मुख दाविसी काये । निर्लज्ज पाहें तूं एक ॥ १३ ॥ सुणा येतां सुणी वसवसी । कैकेयी दशरथासी तैसी । स्त्रीलोभाची दशा ऐसी । अधःभ्रंशी स्त्रीलोभु ॥ १४ ॥ राजा दशरथ सूर्यवंशी । त्याची स्त्रीलोभें पदवी ऐसी । इतर पुरुष स्त्रियांच्या दासी । स्त्रीलोभापासीं हा बडिवारू ॥ १५ ॥ मज कायसी गळसरी । तूं मज कैंचा शिरावरी । प्राण सांडीन उपराउपरी । तुझी मजवरी अति प्रीती ॥ १६ ॥ राजा बोले प्रीतियुक्त । सांगें तुझें मनोगत । तें मी करीन समस्त । तुज कां अत्यंत क्रोध आला ॥ १७ ॥ दोघी स्त्रियांचा जो पती । त्यासी सत्यत्व नाहीं शास्त्रार्थीं । त्याची साक्ष साधु न मानिती । तुज मज प्रीती सत्य कैंची ॥ १८ ॥ दोहीं स्त्रियांचा पति तो शठ । तूं तिघींचा अति पापिष्ठ । माझा

---

१ अलंकार. २ मळकट वस्त्र नेसून. ३ जमिनीवर निजणें. ४ खालीं तोंड घालून. ५ भिऊं नको म्हणून सांगून. ६ अंधाऱ्या जागेंत. ७ वांकडें. ८ दांतांसह. ९ बंधनापासून मोकळा. १० झाडले. ११ कुत्रा. १२ अधःपात करणारा. १३ मोठेपणा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

अपमान करोनियां स्पष्ट। राज्यपट[1] कौसल्ये ॥ १९ ॥ मज तुझिया अति प्रीतीं। स्वर्गीं इंद्रादिक पूजिती। ते माझी करोनि अप्रीती। कौसल्येप्रती राज्यपट ॥ २० ॥ तुवां मांडिलें मजसीं वैर। मातुळा[2] धाडूनि माझे कुमर। श्रीराम करिसी राज्यधर। कपटी साचार तूं एक ॥ २१ ॥ राजा म्हणे कैकेयीसी। तुवांचि करोनि आग्रहासी। पुत्र धाडिले मातुळासी। शेखीं म्हणसी मज कपटी ॥ २२ ॥ राज्याधिकार ज्येष्ठ पुत्रासी। तो केंवी लाभे कनिष्ठासी। विवेक नाहीं तुजपासीं। व्यर्थ कां करिसी अति क्रोध ॥ २३ ॥ अनधिकारीं[3] राज्याधिकारू। ब्रह्मा आलिया न शके करूं। तुज काय जाला भूतसंचारू। अति अविचारू क्रोध तुझा ॥ २४ ॥ क्रोध पित्यापुत्रांतें बाधी। क्रोध स्त्रीपुरुषांसी विरोधी। क्रोध पित्याची प्रीती छेदी। क्रोध त्रिंशुद्धीं[4] अनर्थ ॥ २५ ॥ क्रोध निजज्ञाना निर्दाळी। क्रोध तापातें छळी। क्रोध स्वार्थाची करी होळी। क्रोध महाबळी अनर्थी ॥ २६ ॥ क्रोध साहाकारी कामासी। शेखीं[5] क्रोध आलिया काम नाशी। क्रोध विवेकातें ग्रासी। तो तुजपासीं अति क्रोध ॥ २७ ॥ तुज श्रीरामीं प्रीती त्रिशुद्धी। ते तुझी कोणें छळिली बुद्धी। दारुण उपजली दुर्बुद्धी। अति विरोधी श्रीरामीं ॥ २८ ॥ विरोध करितां श्रीरामासीं। ऐहिकपर-[6]त्रातें मुकसी। जगीं अत्यंत निंद्य होसी। हितोपदेशीं तुज सांगों ॥ २९ ॥ माझी तुज समक्षा[7] भारी। वचन नुल्लंघिसी तिळभरी। ते तूं आजी मजवरी। अति धिक्कारीं जल्पसी[8] ॥ ३० ॥ तुझा झाला बुद्धिपालट। येथून तुज मज शेवट। अति दुःखाचा राज्यपट। पावसी स्पष्ट अति क्रोधें ॥ ३१ ॥

उदकस्य रसः शैत्यमन्नस्य स्वादरो रसः।
आनुकूल्यं रसः स्त्रीणां मित्रस्यावंचनं रसः ॥ ६ ॥

शीतळता ते उदकगोडी। मिष्टान्ना आदरें चवी गाढी। अनादरें कोटि परवंडी[9]। लागती पींडी[10] विषाचिया ॥ ३२ ॥ अवंचकता[11] परिपूर्ण। तेंचि मित्रत्वें गोडपण। वंचकता[12] जालिया जाण। मित्रीं मित्रपण विटंबिलें ॥ ३३ ॥ अनुकूलता स्त्रियांसी गाढी। तंव तंव स्त्रीपुरुषांची अति गोडी। जालिया विकल्पाची सवंडी[13]। तुटी रोकडी स्त्रीपुरुषां ॥ ३४ ॥ कैकेयी विकल्प धरिल्या पोटीं। स्त्रीपुरुषां पडे तुटी। तुझ्या कळवळ्याकरितां सांगतों गोष्टी। विवेकदृष्टिविचारें ॥ ३५ ॥ तुझी नव्हे ही स्वबुद्धी। नेणों कोणें दिधली दुर्बुद्धी। क्रोध सांडोनियां त्रिशुद्धी। भोगसमृद्धी सुखें भोगीं ॥ ३६ ॥ श्रीराम सर्वांचा आवडता। तुज रामासी एकात्मता। कोणें विकल्प घातला चित्ता। तो सांडीं सर्वथा कैकेयी ॥ ३७ ॥ तुझी मज प्रीती पूर्ण। जें मागसी तें देईन जाण। वाहतों श्रीरामाची आण। परम प्रमाण हें माझें ॥ ३८ ॥ ऐकोनि रायाची हे गोष्टी। कैकेयी विकल्प सांडी पोटीं। भरत अयोग्य राज्यपटीं। मागतां सृष्टीं मी निंद्य ॥ ३९ ॥ अयोग्य मागतां राज्यभार। मज निंदितील ऋषीश्वर। मरमर[14] करितील लहान थोर। हा विचार अति निंद्य ॥ ४० ॥ तें चिन्ह कळलें मंथरेसी। म्हणे काय जालें इयेसी। घालोनियां विवेकासी। केली पिशाची नृपनाथें ॥ ४१ ॥ म्यां तंव शिकविला हितार्थ। परी ईस न कळे निजस्वार्थ। माझें शिकविलें गेलें व्यर्थ। अति चरफडित मंथरा ॥ ४२ ॥ दुष्टासी ऐकतां धर्मवार्ता[15]। अति क्रोध उपजे चित्ता। कैकयीमन द्रवलें देखतां। मंथरा तत्त्वतां कुसमुसी[16] ॥ ४३ ॥ आंतचे आंत हात चुरी। म्हणे आतां काय करी। राज्य दिधलें रामाकरीं। आम्हां रोकडी देशोंवटा[17] ॥ ४४ ॥ रामासी नाहीं माया जाण। आम्हांवरी निष्ठुर पूर्ण। त्यासी जालिया राज्याभिषिंचन। पुनरागमन नाहीं आम्हां ॥ ४५ ॥ ते संधी खुणावी मंथरा। म्हणे सोडूं नको पूर्वनिर्धारा। अन्यथा न करीं वो विचारा। दोहीं वरां मागें वेगीं ॥ ४६ ॥ मंथरा देखतांचि दृष्टीं। विकल्प बळावला पोटीं। मग रायासीं मांडिल्या गोष्टी। क्रोधदृष्टीं पाहूनी ॥ ४७ ॥ वाहिली श्रीरामाची आण। तें मज मानलें प्रमाण। मागेन तें द्यावें आपण। अन्यथा वचन न करावें ॥ ४८ ॥ तुम्हींच मज पूर्वीं दिधलें। तेंचि

१ राज्याधिकार. २ आजोळीं. ३ अनधिकारी मनुष्याला. ४ निश्चयेंकरून. ५ शेवटीं. ६ भूलोकींचे व स्वर्गलोकींचे सुखाला. ७ मर्यादा. ८ बडबडतेस. ९ उपचार. १० तुलनेला.

११ सरळ व्यवहार. १२ लबाडी. १३ संधि. १४ उपहास. १५ विचाराची गोष्ट. १६ चरफडूं लागली. १७ देशोधडी, देशत्याग.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

मी मागेन आपुलें। राजा सुखावला येणें बोलें। मागें वहिलें म्हणे तिसी ॥ ४९॥ तुम्हींच युद्धीं सुखावोन। दिधलें दों वरीं वरदान। तें मी मागेन आपण। कृपणपण न करावें ॥ ५०॥ राजा म्हणे आवश्यक। जें जें मागसी अलोलिक[2]। तें तें मी तुज देईन देख। पूर्ण भाक[3] पैं माझी ॥ ५१॥ सत्य न करितां पूर्वभाक। हांसतील हरिश्चंद्रादिक। पूर्वज शापितील आवश्यक। मजही नरक होईल ॥ ५२॥ कल्पतरु कामधेन। पाताळींचें अमृतपान। जें जें मागसील तें देईन। सत्य संपूर्ण करीन मी ॥ ५३॥ असतां साह्य श्रीराम मजसी। काय दुर्लभ मज द्यावयासी। मग दशरथ अति उल्लासेंसीं। कैकेयीसीं तुष्टला ॥ ५४॥ भोळेपणाचेनि लवलाहें। राजा गर्जे उभवोनि बाहे। स्त्रियांचें कृत्रिम हृदय आहे। तें ठावें नव्हे पुरुषांसी ॥ ५५॥ संवचोराचा सांगात। तैसा स्त्रियांचा वृत्तांत। सर्वस्वें ठकोनि करावा घात। नरकपात स्त्रीसंगें ॥ ५६॥ ऐकोनि रायाची वचनोक्ती। कैकेयी बोले रायाप्रती। मागेन माझिया वरदोक्ती। ऐकें निश्चितीं मागतें ॥ ५७॥ एकें वरदें भरतासी। स्वयें द्यावें निजराज्यासी। जैसा उल्लास रामाभिषेकासी। तेणें उल्लासीं अभिषेकीं ॥ ५८॥ दुसऱ्या वरदें श्रीरामासी। धाडावें दंडकारण्यासी। गोदातीरीं वनवासी। चवदा वर्षें वनवास ॥ ५९॥ मज नाहीं अति स्वार्थ। चवदा वर्षें नेमस्त। राज्य करील माझा भरत। पुढें रघुनाथ राज्य करो ॥ ६०॥ चवदा वर्षांमाझारी। चवदा भुवनें भरत आंवरी। राम आलियाहीवरी। मग कैशापरी राज्य पावे ॥ ६१॥ वनीं दंडकारण्यांत। राक्षसांचा अति घात। ते गिळतील रघुनाथ। मग राज्यीं भरत अक्षयी ॥ ६२॥ रामासवें गेल्या लक्ष्मण। त्याचेंही राक्षस करितील भक्षण। तेव्हां निष्कंटक राज्य पूर्ण। भरत आपण भोगील ॥ ६३॥ दृढ विचार हा पोटांत। संबोखोंवया दशरथ। चवदा वर्षें जीं नेमस्त। स्वयें सांगत मर्यादा ॥ ६४॥ अयोध्यानिकटप्रदेशीं। श्रीराम जालिया वनवासी। अयोध्या जाईल त्यापासीं। मग भरता उद्वसीं राज्य कैंचें ॥ ६५॥ राम आवडे प्रजांसी। राम आवडे प्रधानांसी। राम आवडे सर्व सैन्यासी। ते त्यापासीं जातील ॥ ६६॥ रामापासीं जातील समग्र। मग अयोध्या ओस नगर। तेथें भरत राज्यधर। हा मिथ्या विचार समूळ ॥ ६७॥ यालागीं दंडकारण्यासी। अवश्य धाडावें श्रीरामासी। गोदातीरीं वनवासीं। वल्कलांबरेंसीं रहिवांसु ॥ ६८॥ राज्यामधील अणुप्रमाण। श्रीरामासी न द्यावें आपण। जटाधारी वल्कलपरिधान। करावें गमन गोदातीरीं ॥ ६९॥

असंगसंगदोषेण साधवो यांति विक्रियाम्।
एकरात्रप्रसंगेन काष्ठघंटाविडंबना ॥ ७॥

ओढाळ धेनूच्या संगतीं। धर्मधेनु चरतां शेतीं। ओढाळ पळे अतर्क्यगतीं। धर्मधेनूप्रती लोढणें ॥ ७०॥ तैसें कैकेयीपाशीं जाण। मंथरेचें आतपण। भरतराज्याचें भूषण। लोढणें संपूर्ण वैधव्याचें ॥ ७१॥ अवर्गणोनियां निजपती। द्वेष करितां श्रीरघुनाथीं। पावेल वैधव्याची प्राप्ती। दुष्टसंगतीचें ऐसें फळ ॥ ७२॥ असो हा अति कथार्थ। ऐकतां कैकेयीवचनार्थ। दशरथ धरणीं पडे मूर्च्छित। अवस्था प्राणान्त ओढवली ॥ ७३॥ श्रीरामवियोगाचे बाण। हृदयीं खडतरले[11] दारुण। अर्धकंठीं धरिला प्राण। श्रीरामदर्शन घ्यावया ॥ ७४॥ कैकेयीचें वचन वज्र। रामवियोग सतेज धार। मरणान्त घाव लागला थोर। घायें नृपवर मूर्च्छापन्न[12] ॥ ७५॥ ऐसा अंतरीं विव्हळ। रामवियोगाची तळमळ। नेत्रांवाटे वाहे जळ। स्वेद[13] प्रबळ चालिला ॥ ७६॥ अंगीं घाव न देखे वैद्य। यालागीं न चले औषध। अंतरीं खोंचला सुबद्ध[14]। पोटीं अशुद्ध[15] दृढ पडिलें ॥ ७७॥ राजा होवोनि सावधान। म्हणे मी काय देखतों दुष्ट स्वप्न। श्रीराम सर्वांचें जीवन। त्यासी वनप्रयाण कोण नेमी[16] ॥ ७८॥ कैकेयीची मज आवडी। तेचि मोहक मद्य उघडी। श्रीराम वनवासा दवडी। प्रिया प्रियधाडी मज आली ॥ ७९॥ स्त्री वल्लभा आतपण। जो मानी तो मूर्ख पूर्ण। श्रीरामासी वनवासप्रयाण। आली नागवण स्त्रीलोभें ॥ ८०॥ पुरुषें प्रलोभें[17] न द्यावी भाक। स्वयें मागणें नाहीं

१ लवकर. २ अपूर्व. ३ वचन. ४ सोबती. ५ समजुतीसाठीं. ६ ओसाड प्रदेशीं. ७ वस्ती. ८ न जुमानून. ९ कैकेयीचें बोलणें. १० पृथ्वीवर. ११ रुतले. १२ मूर्च्छित. १३ घाम. १४ अत्यंत. १५ रक्त. १६ ठरविणार. १७ मोहास गुंतून.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

तें देख। संधि साधोनियां अटक। नरकदायक मागणें ॥ ८१ ॥ दुष्ट दुर्धर स्त्रीचरित्र। सर्वदा बोलतें वेदशास्त्र। तें मी न मानोनि पामर। जालों पात्र अति दुःखा ॥ ८२ ॥ जेंवी उच्छिष्टें पाळिजे श्वानें। तैसा मी जालों स्त्रियांचे अधीन। तें फळ पावलों संपूर्ण। वनाभिगमन श्रीरामा ॥ ८३ ॥ पाहोनि कैकेयीचें वदन। रायासी आला क्रोध दारुण। नष्टे दुष्टे दुर्भगे जाण। द्वेषी संपूर्ण श्रीरामीं ॥ ८४ ॥ रामें काय केला अपराध। त्यावरी तुझा दुर्धर क्रोध। दंडकारण्य अति विरुद्ध। भाषनिर्बंध वनवासा ॥ ८५ ॥ भरतापरिस अति प्रीती। श्रीरामावरी तुझी होती। कोणें विकल्प घातला चित्तीं। श्रीरामाप्रति अति द्वेष ॥ ८६ ॥ कौसल्येपरिस अधिक। श्रीराम तुझा निजसेवक। सेवा करोनि अवंचक। त्यासी तूं दुःख देवों पाहसी ॥ ८७ ॥ माझी घेवोनियां भाक। मजचि देवों पाहसी दुःख। जळो तुझें काळें मुख। दुःख तें सुख मानिसी ॥ ८८ ॥ श्रीराम परमात्मा परेश। त्याचा तूं करितां द्वेष। होईल सर्वस्वाचा नाश। पावसी त्रास निंदेचा ॥ ८९ ॥ ना भरत ना श्रीराम। ऐसें होईल विरुद्ध कर्म। यालागीं करीं वो उपशम। द्वेष दुर्गम सांडोनी ॥ ९० ॥ श्रीरामीं सांडीं दुष्टपण। यालागीं धरितों तुझे चरण। वरदानाचें दृढपण। क्षमा संपूर्ण मज कीजे ॥ ९१ ॥ ऐकोनि रायाचें वचन। कैकेयी म्हणे होसी सर्वज्ञ। सूर्यवंशीं वरदान। मिथ्यावचन नाहीं केलें ॥ ९२ ॥ स्वप्नींचें वरदान नरेंद्रें। सत्य केलें हरिश्चंद्रें। आपणासकट स्त्रीपुत्रें। विकोन खरें वरद केलें ॥ ९३ ॥ नपुंसक तूं सूर्यवंशीं। राम न धाडवे वनवासासी। उणें आणिलें पूर्वजांसी। दिधले भाकेसी नेदूनी ॥ ९४ ॥ कपोताच्या वरदानासी। शिबीनें तुकिलें निजमांसासी। सत्य करोनि वचनासी। वैकुंठासी नेली नगरी ॥ ९५ ॥ राजा रुक्मांगद अयोध्येसी। धर्मांगद पुत्र तयासी। तेणें जिंकोनि सप्तद्वीपांसी। नाना अर्थ पितयासी सद्भावेंसीं अर्पिले ॥ ९६ ॥ पृथ्वी समुद्रवलयांकित। धर्मांगद पितयासी एकचि सुत। पितृसेवनार्थ अति उदित। आणि हरिभक्त सर्वस्वें ॥ ९७ ॥ मोहिनीच्या वरदासीं। पिता वधी धर्मांगदासी। नगरी नेली वैकुंठासी। एकादशीव्रताच्या प्रतापें ॥ ९८ ॥ तेचि वंशीं तूं दशरथा। वना न धाडवे रघुनाथा। वरद न देववे म्हणसी आतां। हे नपुंसकता तुजचि साजे ॥ ९९ ॥ स्त्रीवाक्य अति तीक्ष्ण। ऐकतां निवटे जीव प्राण। राजा पडला मूर्च्छापन्न। संज्ञा संपूर्ण बुडाली ॥ १०० ॥ स्त्रीविषय विष संपूर्ण। दुर्धरत्वें अति दारुण। सेविलिया अवश्य आणी मरण। तें संपूर्ण कैकेयीनें केलें ॥ १ ॥ राजा अति दुःखें मूर्च्छापन्न। तो स्वयें पावोनि संज्ञा संपूर्ण। कैकेयीप्रति आपण। विनीत कारुण्यें बोलत ॥ २ ॥ श्रीरामीं तुझी कृपा पूर्ण। तेथें अत्यंत कठिणपण। धरावया तुज काय कारण। अति दारुण निर्दयत्वें ॥ ३ ॥ सुंदर सुकुमार सुखैकघन। श्रीराम हा राजीवनयन। त्यासी चरणचालीं गमन। दुर्धर वन केंवि कंठे ॥ ४ ॥ सुखवासी श्रीरघुवीर। त्यासी पँरिधान वल्कलांबर। शीत उष्ण अति दुर्धर। श्रीरामचंद्र केंवि साहे ॥ ५ ॥ मृदु अरुवार सुखसेजेसीं। सुमनें खुपती श्रीरामासी। तृणंपर्णीं शयनासी। कैसेनि सोसील श्रीराम ॥ ६ ॥ पंचामृत अति चोखंटें। सेवितां श्रीरामाचें मन विटे। त्यासी तिखट आंबट तुरटें। फळें मुळें कडवटें कैंवि खाये ॥ ७ ॥ सेना प्रधान सेवक आप्त। तेणेंसीं विचरे श्रीरघुनाथ। तो एकला वनांत। चौदा वर्षें कैंवि राहे ॥ ८ ॥ जळो माझें काळें वदन। प्रमादी प्रमदागुप्तवरदान। श्रीरामा लागलें दृढ बंधन। म्हणोनि रुदन करी रावो ॥ ९ ॥ श्रीरामाचें वनप्रयाण। त्यासांगातें जाईल लक्ष्मण। त्यासवें जाईल माझा प्राण। सत्य जाण कैकेयी ॥ ११० ॥ दुःखें कौसल्या त्यजील प्राण। सुमित्रा मरेल सत्य जाण। येवढें जालिया कंदन। सुखसंपन्न तूं होसी ॥ ११ ॥ दुर्धर करोनियां आकांत। राज्यीं स्थापूं पहासी भरत। येवढा न करीं तूं अनर्थ। शरणागत मी तुझा ॥ १२ ॥ म्हणोनि चरणीं ठेविला माथा। क्षमा करीं मज दशरथा। न मागावी हे वरदकथा। वना रघुनाथा न दवडावें ॥ १३ ॥ राम असों दे मज-

१ प्रतिबंधक. २ सोसण्यास अत्यंत कठीण. ३ कुत्रा. ४ निष्कपट रीतीनें. ५ तोललें. ६ जाई. ७ नेसावयाला. ८ नाजूक. ९ गवत, पानें यांवर. १० उत्तम. ११ मोह पाडणारें. १२ स्त्रियांना गुप्त वचन देणें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

पासीं । राज्य देतों मी भरतासी । प्रतिभू देतों वसिष्ठासी । तो आम्हांसी नियंता ॥ १४॥ म्हणोनि घातलें लोटांगण । धरिले मस्तकीं तिचे चरण । तंव ते क्षोभली दारुण । म्हणे शठा नम्रपण कां करिसी ॥ १५ ॥ अति हीन दीन तूं होसी । लाज लाविली सूर्यवंशासी । बोलिला बोल पैं सांडिसी । कृपण होसी नृपनाथा ॥१६॥ पायां पडलियासाठीं । मी न सांडीं वरदगोष्टी । देणें नाहीं तुझे पोटीं । महाहट्टी होसी राया ॥ १७ ॥ तूं तंव न देसी वरदान । मज म्हणसी महाविघ्न । तरी मी आपुला देईन प्राण । सुख संपूर्ण हो तुम्हां ॥१८॥ माझा हाचि परमार्थ । सुखी व्हावा निजकांत । माझा करोनियां घात । सुखी दशरथ हो येथें ॥ १९ ॥ वरदभाष्य करितां मिथ्या । माझी तुजवरी पडेल हत्या । मग तूं अभिषेकीं रघुनाथा । सुख समस्तां होईल ॥ १२० ॥ अति उग्र कैकेयीचें वचन । तेणें रायासी आलें रुदन । सवेंचि पडे मूर्च्छापन्न । भ्रमे मन रायाचें ॥ २१ ॥ देशोदेशींचे भूपती । आणिले रामाभिषेकार्थी । ते मज दिगंतीं निंदिती । स्त्रीवश स्त्रीजित दशरथ ॥ २२ ॥ प्रधानादि जन समस्त । घरोघरीं निंदिती बहुत । निंदापात्र मी निश्चित । वना रघुनाथ दवडितां ॥ २३ ॥ कैकेयीचें परम सुख । इहलोक ना परलोक । जगा द्यावया परम दुःख । सुंदरी परम विख कैकेयी ॥ २४ ॥ कैकेयी केवळ काळराती । म्यां पाळिली अति प्रीतीं । ते माझी भोंवली मजभोंवतीं । म्यां कोणाप्रती सांगावें ॥ २५ ॥ राम धाडावया वनाप्रती । वचनें तळमळितां भूपती । दुःख सोसितां सरली राती । उदयप्राप्ती होऊं पाहे ॥ २६ ॥ प्रबोधितां श्रीदशरथ । कैकेयी करील विपरीत । वधावया राक्षस समस्त । वना श्रीरघुनाथ निघेल ॥ २७ ॥ एका जनार्दना शरण । कथारम्य रामायण । श्रोतीं द्यावें अवधान । वनप्रयाण श्रीरामा ॥ १२८ ॥

स्वस्ति श्रीभावार्थरामायणे अयोध्याकांडे एकाकारटीकायां कैकेयीदशरथसंवादो नाम चतुर्थोऽध्यायः ॥ ४ ॥ ओंव्या ॥ १२८ ॥ श्लोक ॥ ७ ॥

अध्याय पांचवा

श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ।

प्रभाते शर्वरीं दृष्ट्वा चंद्रनक्षत्रमंडिताम् ।
ततः सूतो यथाकालं पार्थिवस्य निवेशनम् ॥ १ ॥
प्रविवेश प्रबोधार्थं सुमंतो मतिसत्तमः ॥ २ ॥

अभिषेकावया श्रीरघुनाथ । प्रातःकाळीं सुमुहूर्त । चंद्र देखोनि गुरुपुष्ययुक्त । वेगीं सुमंत ऊठिला ॥ १ ॥ सुमंत प्रधान बुद्धिमंत । प्रबोधावया श्रीदशरथ । आला राजभवनांत । कैकेयीयुक्त नृप जेथें ॥ २ ॥ अभिषेकावया रघुनंदन । राया होईं सावधान । ऐकोनि प्रधानाचें वचन । मूर्च्छापन्न दशरथ ॥ ३ ॥ राम जाईल वनांत । कोणते तोंडीं बोलूं मात । हातींचा जाईल रघुनाथ । दुःखें मूर्च्छित दशरथ ॥ ४ ॥ वना धाडितो दशरथ । ऐसी ऐकतांचि मातें । वचन नुलंघीच रघुनाथ । जाईल वनांत तत्काळ ॥ ५ ॥ रामासी नाहीं राज्यचाड । नाहीं विषयांचें कोड । माझें वाक्य अति गोड । घेईल ओढें वनवासा ॥ ६ ॥ वना धाडितों ऐसी गोष्टी । काना वचना होतां भेटी । वना निघेल तो उठाउठीं । जगजेठी श्रीराम ॥ ७ ॥ वनवासाची हे कथा । कानीं ऐकतां रघुनाथा । वना निघेल तत्त्वतां । त्यासी मी आतां काय करूं ॥ ८ ॥ विशेषें माझी भाक । मिथ्या न करील रघुकुळटिळक । वना जाईल आवश्यक । दुःखशोक दशरथा ॥ ९ ॥ कैकेयी तंव आहे खोटी । हट्टें विस्तारील हे गोष्टी । पाडील श्रीरामासीं तुटी । दुःखें सृष्टी मूर्च्छित ॥ १० ॥ कैकेयी म्हणे सुमंताप्रती । रायासी लागली सुषुप्ती । वेगीं आणावा रघुपती । आज्ञा मजप्रति रायाची ॥ ११ ॥ ऐसी कैसी हे सुषुप्ती । क्षितितळीं लोळे भूपती । मिथ्या मानोनियां चित्तीं । निघे मागुती सुमंत ॥ १२ ॥ तंव अभिषेकसामग्री । सभामंडपाच्या द्वारीं । स्वयें वसिष्ठ विस्तारी । नानापरी उपचार ॥ १३ ॥ वसिष्ठ म्हणे सुमंतासी । सर्व सामग्री सांगें रायापासीं । वेगीं बोलावीं तयासी । अभिषेकासी सुमुहूर्त ॥ १४ ॥ सदाफळी औदुंबर । त्याचें भद्रपीठ

---

१ जामीन. २ चोहींकडे. ३ जागा करतांच. ४ कथांनीं रमणीय. ५ गोष्ट. ६ राज्याची इच्छा. ७ धांव. ८ सिंहासन.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

मनोहर। केलें असे अति सुंदर। श्रीरामचंद्र-अभिषेका ॥ १५ ॥ भद्रीं व्याघ्रचर्म अहत। समग्रही नखपुच्छयुक्त। सिंहासनीं विराजित। वरासनार्थ श्रीरामा ॥ १६ ॥ सुवर्णकुंभ शतानुशत। दीर्घ वेसंडे वृषभ श्वेत। सुवर्णशृंगी क्षीरयुक्त। वस्त्रें अहत अति शुद्ध ॥ १७ ॥ सिंधुसंगम सुधासंगम। गंगायमुनात्रिवेणीसंगम। जळें आणिलीं पवित्र परम। रघूत्तमअभिषेका ॥ १८ ॥ सप्त कुशैं सप्त मृत्तिका। सप्त ऋषी आणिले देखा। चतुःसमुद्रींच्या उदका। अभिषेका आणिलें ॥ १९ ॥ श्वेताश्वशार्दूळ रथ। चंद्रोपम छत्र श्वेत। श्वेत चामरें रत्नजडित। सुशोभित व्यंजनें ॥ २० ॥ गोरोचनहरिद्रागौरव। क्षीरचूतपल्लव पञ्चपल्लव। तोरणें बांधिलीं अति अपूर्व। राजे सर्व तिष्ठती ॥ २१ ॥ दधिमधुघृताक्षतायुक्त। पूर्ण कलश सालंकृत। अष्टकन्या दानार्थ। उभ्या तिष्ठती अभिषेका ॥ २२ ॥ मुकुट कुंडलें रत्नमेखळा। बाहुअंगदें कंठमाळा। सिद्धसामग्री या सकळा। ब्राह्मणमेळा तिष्ठतसे ॥ २३ ॥ बाहेरी येवोनि आपण। अभिषेकावा रघुनंदन। हे वसिष्ठाची आज्ञा पूर्ण। केलें नमन सुमंतें ॥ २४ ॥ ऐकोनि वसिष्ठाचें वचन। राजा जाला अति उद्विग्न। केवीं दावूं काळें वदन। मूर्च्छापन्न अति दुःखी ॥ २५ ॥ देखोनि रायाची अवस्था। कंप सुटला सुमंता। कैकेयी सांगे समूळ वार्ता। म्हणे राव कां वृथा दुःख मानी ॥ २६ ॥ पूर्वी दिधलें मज भाकेसी। भरता राज्य राम वनवासी। तेंचि मागतां रायासी। अति दुःखासी कां मानी ॥ २७ ॥ निश्चय जाण तूं सुमंता। राज्यपट माझिया भरता। दंडकारण्य श्रीरघुनाथा। भाक अन्यथा मी न करीं ॥ २८ ॥ ऐकतां कैकेयीची वाणी। सुमंत मूर्च्छित पडे धरणीं। कपाळ पिटी आक्रंदोनी। काय पापिणी वदलीस ॥ २९ ॥ राम परम प्रिय समस्तां। जीवाहूनि आवडता। त्या तुज द्वेषितां रघुनाथा। अभाग्यता पैं आली ॥ ३० ॥ इचें वचन अति अनर्थ। इसी रायें करावा घात। वना दवडितां रघुनाथ। अति आकांत होईल ॥ ३१ ॥ येरी म्हणे पूर्वींची भाक। न देतां रायासी होय नरक। सुमंता ओढवलें अति दुःख। अधोमुख विलपत ॥ ३२ ॥ तयासी संबोखी दशरथ। म्हणे हे बाहेर कळों नेदीं मात। वेगीं पाचारीं श्रीरघुनाथ। मग वृत्तांत कळेल ॥ ३३ ॥ सुमंत वेगें राजाज्ञेसीं। आला श्रीरामभवनासी। शोभा शोभे वैकुंठासीं। लाजे त्यासी कैलास ॥ ३४ ॥ भवनीं मयूर नृत्य करिती। तेणें तांडव विसरे उँमापती। मधुर पारवे घुमघुमती। चमके चित्तीं सामवेद ॥ ३५ ॥ पारव्यांच्या पीयूषवाणीं। गंधर्व ठेले वेडावोनी। चारी वेद जाले मौनी। श्रीरामभवनीं आल्हाद ॥ ३६ ॥ श्रीरामाच्या भवनाप्रती। शुक सुभाषित बोलती। वेदांत वेडावले किती। रस सेविती उपनिषदें ॥ ३७ ॥ सारिका गोड बोलती। तेणें लाजे सरस्वती। विस्मयो मानी बृहस्पती। पक्षी पक्षार्थी परमार्थी ॥ ३८ ॥ रस स्रवती द्राक्षघड। तो रस सर्वांहूनि गोड। सँचाड तेणें होय निचाड। पुरे कोड मुमुक्षूंचें ॥ ३९ ॥ रामांगणींच्या कमळिणी। कमळा लाजे त्यांतें देखोनी। माझा रहिवास चरणीं। हृदयाभरणीं शोभती ॥ ४० ॥ श्रीराम-भवनींचें सुमन। सुवासें होय मन उन्मन। तेणें सुवासें पांगुळे पवन। राहे मिळोन चिद्रूपीं ॥ ४१ ॥ पताका श्रीराममंदिरीं। झळकताती चिदंबरीं। जो कां लक्ष्मी त्यांची थोरी। चराचरीं तो धन्य ॥ ४२ ॥ चूतवृक्ष राजभवनांत। अवघे जाले जी अच्युँत। सफळ जाले अति विनीत। फळें त्यागीत परिपाकें ॥ ४३ ॥ पारिजात स्वर्गसुवासें। पायीं लोळती कोणी न पुसे। श्रीराममंदिरींचीं माणसें। अवघीं उदासें तयांसीं ॥ ४४ ॥ सप्तावरण सप्त द्वारवंठे। द्वारपाळ सज्ञान मोठे। कळिकाळातें मारिती सोटे। ऐसे लोंठे प्रतापी ॥ ४५ ॥ देखोनि द्वारपाळाचा वेत। कृतांत चळचळां कांपत। काळ कामारा पैं होत। श्रीरघुनाथ सेवावया ॥ ४६ ॥ श्रीराममंदिर देखतां देख। सुमंतासी परम हरिख। मागील

१ अखंड. २ वर्शिंडाचे. ३ सात प्रकारचे दर्भ. ४ उत्तम शुभ्र घोडे जोडलेला. ५ पंखे. ६ वड व आंबे यांचे टाळे. ७ कमलपत्रें. ८ शांतवन करी. ९ रामाच्या मंदिरांत.

१० शंकर. ११ अमृतासमान मधुर वाणीनें. १२ मैना. १३ सलोभ. १४ लक्ष्मी. १५ आम्रवृक्ष. १६ नाशरहित. १७ वांकलेले. १८ बलवान्. १९ दास, कामकरी.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

विसरला दुःख । परम सुख पावला ॥ ४७ ॥ रथ सांडोनि पहिले द्वारीं । छत्रचामरें दुसरे द्वारीं । पादत्राणादि सामोग्री । तिसरे द्वारीं पैं राहे ॥ ४८ ॥ चौथे द्वारीं सांडित अर्थ । पांचवे द्वारीं निःशेष स्वार्थ । सहावे द्वारीं साधनें समस्त । स्वयें राहती सर्वही ॥ ४९ ॥ सांडोनि मीतूं-पणाचा सांगात । रिघावें द्वाराआंत । तैंचि भेटे श्रीरघुनाथ । मुख्य परमार्थ या नांव ॥ ५० ॥ भावार्थ तें राजभवन । प्रथम दारवंटा तें श्रवण । दुसरे द्वारीं तें साधन । नित्यानित्य ज्ञान तें तिजें ॥ ५१ ॥ चौथा दारवंटा तें मनन । पांचवा तो निदिध्यासन । सहावा तो वैराग्य पूर्ण । सातवा तो जाण साक्षात्कार ॥ ५२ ॥ याचि मार्गाचे परि-पाटी । श्रीरामासीं होय भेटी । भरलिया जीवां आव्हांटी । वाजती पाठीं यमदंड ॥ ५३ ॥ असो अतिशयें हा कवितार्थ । पुढें चालवावा ग्रंथ । पाचारावया श्रीरघुनाथ । आला सुमंत सवेग ॥ ५४ ॥ अंतरशुद्ध तो सुमंत । आला सातवे द्वाराआंत । तेणें देखिला श्रीरघुनाथ । स्वरूपार्थे अनुपम्य ॥ ५५ ॥ राजीवलोचन घनसांवळा । आजानुबाहु अति विशाळा । मुकुटकुंडलें विचि-त्रमाळा । अनर्घ्य गळां निजपदक ॥ ५६ ॥ वीज लागोनि कांसेसी । जावों विसरली अस्तासी । तैसा पीतांबर तेजेंसीं । कटिप्रदेशीं लखलखित ॥ ५७ ॥ सांवळे अंगीं सुगंधी उटी । बाहुभूषणें बाहुवटीं । टिळक पिंवळा ललाटीं । देखतां दृष्टीं मन निवे ॥ ५८ ॥ पीतांबर परिधान । कटीं मेखळा विराजमान । देखतां हरे भूकतहान । आनंदघन श्रीराम ॥ ५९ ॥ वांकी अंदुवांचा गजर । चरणीं गर्जती तोडर । सुवर्णपर्यंकीं श्री-रघुवीर । आल्हाद थोर सुमंता ॥ ६० ॥ सौंद-र्याची निःसीम सीमा । सीता सेवी श्रीरामा । लक्ष्मीकांता जैसी रमा । तैसी प्रतिमा शोभत ॥ ६१ ॥ ऐसा देखोनि रघुवीर । सुमंतें केला नम-स्कार । तुझे भेटीसी नृपवर । अति सादर एकांतीं ॥ ६२ ॥ ऐकोनि सुमंताचें वचन । सीता बोले सुहास्यवदन । करावया राज्याभिषिंचन । रायें प्रधान पाठविला ॥ ६३ ॥ ऐकोनि पितयाचें आज्ञावचन । शीघ्र उठिला रघुनंदन । सीतेनें करोनियां नमन । निरांजन त्यासी केलें ॥ ६४ ॥ श्रीराम द्वारांतरीं येत । सुमंतें शीघ्र आणिला रथ । त्यावरी बैसविला रघुनाथ । जैसा भास्कर तेजस्वी ॥ ६५ ॥ लक्ष्मण जाला छत्रधारी । चामरें सुमंताचे करीं । श्रीराम निघाला बाहेरी । जयजयकार घन गर्जे ॥ ६६ ॥ पुढां वीर वेत्र-पाणी । लागल्या वाजंत्र्यांच्या ध्वनी । राजे जे कां मुकुटमणी । लागती चरणीं श्रीरामाचे ॥ ६७ ॥ पाठीशीं रथांचे घडघडाट । वरी युवराजे श्रेष्ठ श्रेष्ठ । दोहीं बाहीं कुंजरथाट । पुढें उद्भट महा-वीर ॥ ६८ ॥ असिवारांचे पैं थवे । वारु नाचती अति लाघवें । महामांडलिकांचे यावे । जयजय-कारें गर्जती ॥ ६९ ॥ अश्वगजरथांचे भार । चालती पायांचे मोगर । हैकार थैकार जयजय-कार । सेनासंभार चतुरंग ॥ ७० ॥ ध्वजा पताका अपार । डोलती श्रीगिरिसंभार । सिंहनाद करिती वीर । भाट कैवार वानिती ॥ ७१ ॥ नगर-नागरिक लोक । हर्षें बोलती सकळिक । रायें श्रीराम पाचारिला देख । राज्याभिषेक करावया ॥ ७२ ॥ हेचि वार्ता घरोघरीं । स्वयें बोलती नरनारी । राम जातो निजगजरीं । राज्याधिकारी व्हावया ॥ ७३ ॥ मार्ग शिंपिले सुगंधें । तोरणें मखरें नानाविधें । नगर शृंगारिलें विनोदें । पर-मानंदें आल्हाद ॥ ७४ ॥ मुंडपर्धसणी होत भारी । एक चढले माडियागोपुरीं । एक पाहाती गवाक्ष-द्वारीं । आवडी भारी श्रीरामीं ॥ ७५ ॥ आल्हाद नगरामाझारीं । गुढिया उभविल्या घरोघरीं । सदीप बलिदानें करीं । नरनारी ओंवाळिती ॥ ७६ ॥ पाहतां श्रीरामाचें मुख । परमानंदें होतसे सुख । डोळियां लागली टकमक । नावडे आणिक दृष्टीसी ॥ ७७ ॥ लवों विसरलीं नेत्रपातीं । प्राण पांगुळ झाला निजगती । सर्व इंद्रियां एक-वृत्ती । श्रीराममूर्ती देखोनि ॥ ७८ ॥ सादरें पाहतां रघुपती । आनंदें कोंदली त्रिजगती । नाठवे देहगेहस्फूर्ती । श्रीराममूर्ती देखोनी ॥ ७९ ॥ देखतां श्रीरामाचें मुख । निःशेष निमालें पैं दुःख । तिहीं लोकीं न माये सुख । हर्षें हरिख

१ क्रमानें. २ आडमार्ग. ३ घागऱ्यांचा. ४ ओंवाळणी. ५ शूर. ६ घोडेस्वारांचे. ७ घोडे. ८ पायदळ. ९ स्तुतिपाठक. १० लोक चेंगरण्याइतकी गर्दी. ११ शरीराचें व घराचें स्मरण.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

कोंदाटे ॥ ८० ॥ देखोनियां श्रीरामवदन । जीव विसरे भूकतहान । आनंदें निवती नयन । रघुनंदन देखोनी ॥ ८१ ॥ पाहतां श्रीरामस्वरूप । नाम निरसी पुण्यपाप । तत्काळ जाती त्रिविध ताप । सुखस्वरूप श्रीराम ॥ ८२ ॥ नाना ध्वनींचीं वाजंतरीं । श्रीराम येतां निजगजरीं । ऐकोनि राजा रुदन करी । म्हणे कैसेपरी मुख दावूं ॥ ८३ ॥ जगासी श्रीरामाचें सुख । तेणें दशरथा परम दुःख । त्याचें पाहूं न शके मुख । पाडिली अटक[१] कैकेयीयें ॥ ८४ ॥ श्रीराम निववी सर्वांसी । तेणें अति ताप दशरथासी । कैकेयीनें पाडिलें अति भ्रांतीसी । निजभाकेसीं गोंवोनि ॥ ८५ ॥ स्त्रीचरित्र अगम्य सृष्टीं । निजवरदाचे नेटेंपाटीं[२] । पित्यापुत्रां पाडिली तुटी । उठाउठीं कैकेयीनें ॥ ८६ ॥ दारुण स्त्रियांचें विंदान[३] । श्रीरामासी वनप्रयाण । तेंचि दशरथासी मरण । नाडिली आपण वैधव्यें ॥ ८७ ॥ ऐसें जाणोनि दशरथ । अतिशयेंसीं विलपत । तंव तेथें पातला श्रीरघुनाथ । समवेत सौमित्र ॥ ८८ ॥ नमस्कारोनि दशरथा । कैकेयीचरणीं ठेविला माथा । म्हणे विजयी होईं वा रघुनाथा । वाग्देवता सत्य वदे ॥ ८९ ॥ कैकेयीआशीर्वादगोष्टी । रामें बांधिली शकुनगांठी । विजयी जालों मी सृष्टीं । बाहे थापटी स्वानंदें ॥ ९० ॥ उल्लास देखोनि रघुनाथा । दारुण मूर्च्छा आली दशरथा । श्रीरामवियोगाची अवस्था । कांहीं सर्वथा बोलवेना ॥ ९१ ॥ छेदावया दशकंठ । मुहूर्त सांगे वसिष्ठ । अयोध्याराज्य तें कनिष्ठ । रामराज्य श्रेष्ठ तिहीं लोकीं ॥ ९२ ॥ श्रीरामासीं संभाषण । रायास न करवे जाण । कैकेयीनें केलें मुखमुद्रण[४] । वनाभिगमन न सांगवे ॥ ९३ ॥ न बोलवे येथें राहें । न बोलवे वनासी जायें । देखोनि श्रीरामाचे पाये । दुःखी होये अति दुःखें ॥ ९४ ॥ बाष्पें रोधिला निजकंठ । घोर वाजे घरघराट । टवकारिले[५] नेत्रवाट । व्यथा उद्भट रायासी ॥ ९५ ॥ राजा देखोनि व्यथाभूत । कैकेयीसी पुसे रघुनाथ । कैसेनि ताप जाला अद्भुत । किंवा भूतसंचारु ॥ ९६ ॥ अथवा माझी अपराधता । घडली असे मज नकळतां । कीं कांहीं भरतें धाडिली वार्ता । कीं शत्रुघ्नें बोलतां अन्याय केला ॥ ९७ ॥ तरी नव्हे देहतापाची निष्ठा । नव्हे भूतसंचाराचा ताठा । नव्हे त्रिदोषाचा फांटा । नृपवरिष्ठा कोण व्यथा ॥ ९८ ॥ दैविक दैहिक[६] किंवा मानसिक । अथवा कांहीं आहे अलौकिक । रायासी कवणेपरी दुःख । तुज सम्यक पुसतों ॥ ९९ ॥ धाडोनि सुमंत प्रधान । रायें बोलाविलें जाण । त्या मज कोण आज्ञापन । तेंही आपण पुसावें ॥ १०० ॥ कैकेयी म्हणे रघुनाथा । तुझेनि रायासी पूर्ण व्यथा । तेही तुज सांगेन आतां । कोप सर्वथा न करावा ॥ १ ॥ माझें ऐकतांचि वचन । तुज कोप येईल पूर्ण । यालागीं धाके माझें मन । पूर्वकथन सांगावया ॥ २ ॥ ऐकोनि कैकेयीचें वचन । रामें तिचे धरिले चरण । ऐसा महापापी कोण । जो मातृवचन विरोधी ॥ ३ ॥ त्रिसत्य सत्य हें जाण । तुझें वचन मज प्रमाण । वाहतों वसिष्ठाची आण । विकल्प पूर्ण सांडीं माये ॥ ४ ॥ ऐकोनि श्रीरामाचें निर्वाण । कैकेयी उल्हासली आपण । रामें करावया वनप्रयाण । धर्मवचन उद्बोधी ॥ ५ ॥ कैकेयीची युक्ती कैसी । राम करावा वनवासी । धर्मवचनाचे पाशीं । श्रीरामासी दृढ बांधावें ॥ ६ ॥ दृढ वराचें वरबंधन । जेणें दशरथासी दुःख संपूर्ण । तें निवारील रघुनंदन । प्रतिज्ञा प्रमाण वनवासा ॥ ७ ॥ राज्य सांडोनि वना जातां । दुःख नाहीं श्रीरघुनाथा । वर्नाभिगमन[७] उल्हासता । लंकानाथवधार्थी ॥ ८ ॥ एका जनार्दना शरण । जालें श्रीरामागमन । पुढां करावया वनाभिगमन[८] । सावधान अवधारा ॥ १०९ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे अयोध्याकांडे एकाकारटीकायां श्रीरामागमनं नाम पंचमोऽध्यायः ॥ ५ ॥ ओंव्या ॥ १०९ ॥ श्लोक ॥ २ ॥

---

१ बंदी. २ बळानें. ३ कर्तृत्व. ४ मुखबंधन. ५ नेत्रगोलक. ६ शारीरिक. ७ प्रकट करी, सांगूं लागली. ८ वनांत जाणें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

अध्याय सहावा

॥ श्रीरामचंद्राय नमः ॥

कैकेय्युवाच–

राजा न कुपितो राम व्यसनं नास्य किंचन।
किंचिन्मनोगतं त्वस्य त्वद्भयान्नानुभाषते ॥ १ ॥
प्रियं त्वामप्रियं वक्तुं वाणी नास्य प्रवर्तते।
तदवश्यं त्वया कार्यं यदनेन श्रुतं मम ॥ २ ॥
एष मह्यं वरं दत्वा पुरा मामभिपूज्य च।
पश्चात् संतप्यते राजा यथान्यः प्राकृतस्तथा ॥ ३ ॥

पूर्वप्रसंगीं आपण। रामें वाहिली वसिष्ठाची आण। तेणें कैकेयी सुखसंपन्न। पूर्वकथन तें सांगे ॥ १ ॥ रायासी नाहीं ज्वरादि अवस्था। नाहीं भूतसंचारता। आणिक कांहीं नाहीं व्यथा। तुझी ममता बहु बाधी ॥ २ ॥ तें रायाचें मनोगत। सांगतां तुझें पोळेल चित्त। यालागीं पैं नृपनाथ। साशंकित सांगावया ॥ ३ ॥ तूं रायाचा प्रिय पूर्ण। प्रियापाशीं अप्रिय वचन। सर्वथा न बोलवे जाण। यालागीं मौन धरी रावो ॥ ४ ॥ रायाची पूर्व भाक। ते त्वां करावी आवश्यक। पितृवचनपरिपाळक[1]। तिन्ही लोक वंदिती ॥ ५ ॥ रुक्मांगद सूर्यवंशीं। व्रत भंगतां एकादशी। धर्मांगद शिर दे त्यासी। वैकुंठवासी जगद्वंद्य ॥ ६ ॥ तूं तंव सत्यवादी[2] रघुनाथ। जगीं तुझा थोर पुरुषार्थ[3]। पित्याची भाक तूं करीं सत्य। पितृवचनार्थ प्रतिपाळीं ॥ ७ ॥ रायाचें मज वरदान। माझें मज नेदितां[4] जाण। तुज देवों केंवी आपण। लज्जायमान तेणें रावो ॥ ८ ॥ देऊं केलें तुजप्रती। तें नेदीं[5] न म्हणे भूपती। काय बोलावें तुजप्रती। सलज्ज चित्तीं नृपनाथ ॥ ९ ॥ ऐकोनि कैकेयीची वाणी। श्रीराम श्रीसत्य[6]-शिरोमणी। लागोनि मातेच्या चरणीं। काय गर्जोनी बोलत ॥ १० ॥

राम उवाच–

अहं हि वचनाद्राज्ञः पतेयमपि पावके।
भक्षयेयं विषं तीक्ष्णं मज्जेयमपि चार्णवे ॥ ४ ॥
नियुक्तो गुरुणा पित्रा नृपेण च हि तेन च।
तद् ब्रूहि वचनं देवि राज्ञो यदभिकांक्षितम् ॥ ५ ॥
प्रतिजाने करिष्येऽहं रामो द्विर्नाभिभाषते ॥ ६ ॥

गुरुवचन पितृवचन। न करी तो पापी पूर्ण। मनुष्यवेषें तो श्वान। काळें वदन तयाचें ॥ ११ ॥ गुरुवाक्य विषम[7] वितंड। न करीं म्हणे जयाचें तोंड। तें तोंड नव्हे रौरवकुंड। पापी प्रचंड तो एक ॥ १२ ॥ गुरुवचन अविश्वासी। जिताचि तो नरकवासी। प्रेतें आतळों भीती त्यासी। महापापराशी तो एक ॥ १३ ॥ यालागीं पितृवचन अन्यथा। मी न करीं वो सर्वथा। त्रिसत्य सत्य हें तत्त्वतां। विकल्प चित्ता धरूं नको ॥ १४ ॥ तुज कैसें कैसें वरदान। रायें दिधलें आपण। त्याचें समूळ कथन। कृपा करोन मज सांगिजे ॥ १५ ॥ ऐकोनि श्रीरामसत्यवाणी। कैकेयी उल्हासली मनीं। वरदप्रतापाची काहणी। हरिखें[8] गर्जोनी सांगत ॥ १६ ॥

पुरा देवासुरे युद्धे पित्रा ते मम राघव।
रक्षितेन वरौ दत्तौ सशल्येन महारणे ॥ ७ ॥
तत्र मे याचितो राजा भरतस्याभिषेचनम्।
गमनं दंडकारण्ये तव चाद्यैव राघव ॥ ८ ॥

पूर्वीं शुक्राचे युद्धार्थ। दशरथ गेला मजसमवेत। शुक्रासी साह्य दैत्य समस्त। देवसाह्यार्थ दशरथ ॥ १७ ॥ देवां दैत्यां युद्ध पूर्ण। थोर जालें रणकंदन[9]। दशरथें दैत्यां दारुण। बाणीं संपूर्ण निर्वटिलें[10] ॥ १८ ॥ वृषपर्वा दैत्यनाथ। रायें रणीं केला विरथ। पायीं पळतां रणांत। बाणीं मूर्च्छित तो पाडिला ॥ १९ ॥ रायें मारिलें वृषपर्व्यासी। म्हणोनि शुक्रें पाठी घातलें त्यासी। निर्वाणयुद्ध दशरथेंसीं। अति क्रोधेंसीं मांडलें ॥ २० ॥ शुक्रें बाणलाघवाआंत। आंख[11] छेदोनि राजा केला विरथ। युद्धीं विचंबला[12] दशरथ। म्हणोनि बाहु चक्रांत सूदला[13] म्यां ॥ २१ ॥ माझे बाहूचा निजनेट। रथ चालिला घडघडाट। शुक्राचा रथ करोनियां पीठ। शिरींचा मुकुट पाडिला ॥ २२ ॥ युद्धीं निवटावें[14] शुक्रासी। ब्राह्मण

१ पित्याचें वचन पाळणारा. २ खरें बोलणारा. ३ पराक्रम. ४ न देतां. ५ मी देत नाहीं. ६ मोठा सत्यवचनी. ७ विरुद्ध, प्रतिकूल. ८ हर्ष पावून. ९ लढाई. १० मारलें, नाहीसें केलें. ११ रथाचा आंस. १२ कष्ट पावला. १३ घातला. १४ ठार मारावें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

म्हणोनि रक्षिलें त्यासी । यश आलें दशरथासी । जयो रायासी माझेनि ॥ २३ ॥ ते वेळीं रायें अति संतोषीं । दोन वर दिधले भाकेसीं । एकें राज्यपट भरतासी । एकें वनवासी श्रीराम ॥ २४ ॥ रामा रहिवास वनांतरीं । दंडकारण्यामाझारीं । वल्कलांबरें जटाधारी । गौतमीतीरीं[1] रहिवासू ॥ २५ ॥ ज्येष्ठ सांडोनियां दुरी । भरत सर्वथा राज्य करी । तैसी मी नव्हें पापाचारी । ऐक निर्धारीं नेमा माझ्या ॥ २६ ॥ मज नाहीं अत्यंत स्वार्थ । चौदा वर्षें नेमस्त । राज्य करील माझा भरत । पुढें रघुनाथा निजराज्य ॥ २७ ॥ ॥ राज्यांतील अणुप्रमाण । स्वयें न न्यावें आपण । पितृवचन जरी प्रमाण । तरी वनप्रयाण आजीच ॥ २८ ॥ अजिन[2] वल्कलें जटाधारी । वना निघावें झडकरी । कंदमूळफळाहारीं । गौतमीतीरीं[1] रहिवासू ॥ २९ ॥ ऐकोनि कैकेयीचें उत्तर । श्रीराम जाला हर्षें निर्भर । वना निघावया सत्वर । हृदयीं अपार आल्हाद ॥ ३० ॥ कैकेयी हे एक खोटी[3] । हा विकल्प नाहीं रामाच्या पोटीं । तिची सत्य मानोनि गोष्टी । विश्वासें जगजेठी वना निघे ॥ ३१ ॥ राज्य गेलियाचें नाहीं दुःख । वना जायाचें परम सुख । बाहुस्फुरणीं चालिला हरिख । प्रसन्नमुख वनाभिगमनीं ॥ ३२ ॥ सवेंचि पुसे मातेसी । रावो कां न बोले मजसीं । येरी म्हणे अतिशयेंसीं । लज्जा त्यासी जालीसे ॥ ३३ ॥ पहिलें तुज राज्य देऊं केलें । आतां वना जाय हें कैंवी बोले । या लाजा मौन पडलें । मुख आपुलें दाखवीना ॥ ३४ ॥ मानावें पित्याचे वचनार्था । तूं तंव माझी निजमाता । तुझें वचन न मानितां । वेदशास्त्रार्थां मी निंद्य ॥ ३५ ॥ पित्यापरीस माता श्रेष्ठ । हे संन्यासपद्धति निर्दुष्ट । तुझें वचन मज वरिष्ठ । सुख उद्भट वनवासीं ॥ ३६ ॥ संन्यास घेतलियावरी । पिता पुत्रातें नमस्कारी । संन्यासी माता वंदी शिरीं । आज्ञाधारी तियेचा ॥ ३७ ॥ जें तुज मातेसी होय सुख । आणि पित्याची प्रतिपाळे भाक । तें मज करणें आवश्यक । श्रीराम निःशंक बोलिला ॥ ३८ ॥ पितयाची पंढियेंती तत्त्वतां । ते तूं माझी सखी माता । विकल्प न धरीं वो चित्ता । तुझिया वचनार्था अनुकूल ॥ ३९ ॥ ऐसें ऐकतां श्रीरामवचन । कैकेयी जाली सुखसंपन्न । आनंदाश्रु लोटती नयन । दिधलें आलिंगन श्रीरामा ॥ ४० ॥ श्रीरामासी आलिंगितां । विकल्प निघाला आंतौता[10] । कैकेयीस उपजे सद्भावता[11] । त्याचि वचनार्था बोलत ॥ ४१ ॥ ते म्हणे तूं निर्मळ रघुनाथा । येर तंव न बोलवे आतां । तुज वनवासीं असतां । पूर्ण विजयता मद्वाक्यें ॥ ४२ ॥ आतां राम न बैसे राज्यपटीं[12] । म्यां व्यर्थ कां करावी गोष्टी । हा पित्याच्या भाकेसाठीं । वना उठाउठीं जाईल ॥ ४३ ॥ राम सत्यवादी निजनिर्धारीं । आजि मज कळली थोरी । हा पितृवाक्यावरी[13] । जाईल वनांतरीं दंडकारण्या ॥ ४४ ॥ श्रीरामवनाभिगमन । ऐकतां राय पडे विसंज्ञें[14] । त्याचे श्रीरामें वंदोनि चरण । निघे आपण वनवासा ॥ ४५ ॥ कैकेयीच्या चरणीं ठेविला माथा । म्हणे तुवां पूर्ण कृपा केली आतां । शांतवावी कौसल्या माता । चिंता दशरथा करों नेदीं ॥ ४६ ॥ दोघां करोनि प्रदक्षिण । राम करी वनाभिगमन । कैकेयी गहिंवरली पूर्ण । दीर्घ स्वरें रुदन राव करी ॥ ४७ ॥ ऐकतां रायाची ग्लानी । राम निघे धैर्य धरोनी । वना जावया उल्हास मनीं । सापत्नवचनीं विश्वासु ॥ ४८ ॥ क्रोध लक्ष्मणाचे पोटीं । भोंवयांसी घालोनि गांठी । निघाला श्रीरामाच्या पाठीं । क्रोधदृष्टी संतप्त ॥ ४९ ॥

गमने च मतिं चक्रे वनवासाय लक्ष्मणः ।
अनुचिंत्य विना रामं न हि जीवितुमुत्सहे ॥ ९ ॥

लक्ष्मणाचें मनोगत । वना गेलिया रघुनाथ । मीही जाईन त्यासमवेत । हा निश्चितार्थ सौमित्रीं ॥ ५० ॥ रामावेगळें जीवें प्राणें । अर्ध क्षण नाहीं राहणें । ऐसा निश्चयो लक्ष्मणें । स्वांतःकरणें दृढ केला ॥ ५१ ॥ उल्लंघोनि राजभवना । अभिषेकपात्रां प्रदक्षिणा । करोनि राम निघाला वना । हाहाकार जना होंसरला[15] ॥ ५२ ॥

तस्मिंस्तु पुरुषव्याघ्रे निष्क्रामति कृतांजलौ ।
आर्तशब्दो महाञ्जज्ञे स्त्रीणामंतःपुरे तदा ॥ १० ॥

१ गोदावरीच्या कांठीं. २ मृगचर्म. ३ दुष्ट, मत्सरी. ४ पवित्र. ५ अलंत. ६ राखली जाईल. ७ वचन. ८ आवडती. ९ खरोखर. १० मनामधील. ११ पूर्ण भक्ती. १२ राज्याधिकारावर. १३ पित्याच्या वचनावरून. १४ बेशुद्ध. १५ प्राप्त झाला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

कैकेयीचे निजमंदिरीं । अति आक्रंदें रडती नारी । राम दवडिला वनांतरीं । दृढ दुराचारी कैकेयी ॥ ५३ ॥ एकी कान केश तोडिती । एकी अति दुःखें आरडती । स्त्रीजित जाला भूपती । बाळ वनाप्रति धाडिला कैंवी ॥ ५४ ॥ तयांचें ऐकोनि रुदन । वेगें निघे रघुनंदन । ठाकूनियां आला मातृभवन । वनाभिगमन सांगावया ॥ ५५ ॥ न घेतां मातेचें आज्ञापन । कार्य साधेना निर्विघ्न । ऐसें जाणोनि रघुनंदन । आला आपण मातृभवना ॥ ५६ ॥ जन बोलती समस्त श्रेष्ठ । दशरथा नियामक वसिष्ठ । तेणें श्रीरामासी राज्यपट । करावा वरिष्ठ गुरुप्रतापें ॥ ५७ ॥ वसिष्ठाचिया आज्ञेपुढें । कैकेयी कायसें बापुडें । राजा बोलों न शके तोंडें । त्यासीही निंवाडें सांगा कोणीं ॥ ५८ ॥ वना गेलिया रघुपती । त्याची थोर वाढेल कीर्ती । वसिष्ठें जाणोनि निश्चितीं । जातां वनाप्रति ना न म्हणे ॥ ५९ ॥ आपण शीघ्र वनाभिगमनी । हें मातेसी सांगावयालागूनी । राम प्रवेशला मातृभवनीं । उल्हास मनीं गमनाचा ॥ ६० ॥ रामें नमस्कारिली निजजननी । येरी आलिंगी उल्हासोनी । गुरुपुष्याच्या अभिषेचनीं । राजा त्रिभुवनीं तूं होसी ॥ ६१ ॥ गुरुपुष्याचा सुमुहूर्त । सभाग्यासी होय प्राप्त । तेणें मुहूर्तें अभिषिंची दशरथ । राजा रघुनाथ तिहीं लोकीं ॥ ६२ ॥ त्या मुहूर्ताचें ऐसें काज । जगीं होईल रामराज्य । सुरनर नाचती आनंदभोजें । निश्चय मज कळलासे ॥ ६३ ॥ वसिष्ठ-अभिषेकाचें जळ । त्याचें ऐसें आहे बळ । तिहीं लोकींचें राज्य अढळ । होईल सकळ श्रीरामा ॥ ६४ ॥ ऐसें बोलतां कौसल्येसी । श्रीराम सांगे तियेपासीं । जाला अभिप्राव तूं नेणसी । सावकाशीं अवधारीं ॥ ६५ ॥ पूर्वीं रायें निजभाकेंसीं । दोन वर दिधले कैकेयीसी । एकें राज्यपट भरतासी । एकें वनवासी श्रीराम ॥ ६६ ॥ भाके गोविलें दशरथा । कैकेयीनें साधिलें निजस्वार्था । राज्याभिषेकीं नेमिलें भरता । मज वनांत धाडिलें ॥ ६७ ॥ मर्यादा नेमूनि चौदा वर्षीं । दंडकारण्यीं विजनदेशीं । गोदावरीं रहिवासीं । फळमूळांसी सेवूनी ॥ ६८ ॥ राज्यांतील नेवों नये अणुमात्र । त्यजोनि वस्त्रें अळंकार । कृष्णाजिन वल्कलांबर । जटाधारी वनवासी ॥ ६९ ॥ रायें नेमिलें नेमस्त । वनप्रयाणा सुमुहूर्त । आजीच निघावें त्वरित । पुसावया येथ मी आलों ॥ ७० ॥ ऐकोनि श्रीरामाची वाणी । जीवा मना अति आर्टणी । मूर्च्छापन्न पडली धरणीं । खुंटली वाणी अति दुःखें ॥ ७१ ॥ गरगरिती नेत्रवाटे । बाष्पें रोधिला पैं कंठ । श्वासें फुटों पाहे पोट । प्राणसंकट मांडलें ॥ ७२ ॥ पुत्रवियोगाचा घावो । दृढ जिव्हारीं खोंचला पहा हो । पुत्रशोकें पूर्ण विरहो । पडला देहो मूर्च्छित ॥ ७३ ॥ माता मूर्च्छित भूतळीं । रामें उचलूनि ते वेळीं । झाडोनियां धूसरधूळी । हृदयकमळीं आलिंगिली ॥ ७४ ॥ तीस रामें सावधान करितां । म्हणे मज मरूं दे रघुनाथा । पुत्रवियोगें जिणें जितां । परम व्यथा मातेसी ॥ ७५ ॥ येथोनि श्रीरामाचें मुख । मागुती कैं देखेन देख । तेणें आक्रंदें दिधली हांक । हृदयीं दुःख दाटलें ॥ ७६ ॥ कांटा रुतला फणिकंपाळीं । पुच्छ तुटल्या सांपसुरळी । जैसी जळावेगळी मासोळी । तैसी तळमळी कौसल्या ॥ ७७ ॥ कपटी म्हणों जातां रावो । माझें पातिव्रत्य होईल वावो । पतिअवज्ञा थोर अन्यावो । विकिला देहो पतिवाक्या ॥ ७८ ॥ कैकेयी भर्तारप्रियकर । तिसीं मज करितां मत्सर । माझा अपराध मी देखें थोर । अति दुस्तर मज रामा ॥ ७९ ॥ कैकेयीचा आजिवरी । मज द्वेष नाहीं तिळभरी । भर्तारकृपा जियेवरी । ते निर्धारीं मज पूज्य ॥ ८० ॥ घारीं झडपोनियां कैकेयीसी । गर्भप्रसाद नेतां आकाशीं । अर्धपिंड दिधला तिसी । निजपतीसी संतोषा ॥ ८१ ॥ तैंपासोनि दशरथ । मजवरी कृपा करी अत्यंत । अन्यायी नव्हे नृपनाथ । अभागी येथ मी रामा ॥ ८२ ॥ कैकेयीचा कोण अन्यावो । तीस निजपुत्राचा मोहो । वना जातां रामरावो । अभागी पहा हो मी एकी ॥ ८३ ॥ रायाचें वचन वंदोनि माथां । वना रिघतोसी रघुनाथा । माझें वचन पाळिसी आतां । अति गुह्यार्था सांगेन ॥ ८४ ॥ रायाचें वचन सिद्धी जाय । माझें वचन पाळिलें होय । ऐसें कांहीं एक वर्म आहे । तें तुज मी

१ आक्रोशानें. २ कौसल्येच्या मंदिरांत. ३ निश्चयात्मक. ४ अत्यानंदानें. ५ गोष्ट. ६ गुंतविलें. ७ निर्जन प्रदेशांत. ८ क्लेश. ९ डोळ्यांतील बुबुळें. १० सर्पाच्या मस्तकीं. ११ पाल, चोपई. १२ व्यर्थ.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

पाहें सांगेन ॥ ८५ ॥ पित्याच्या प्रतिपाळावें वाक्यार्थां । तेणेंचि सुखावे निजमाता । तें मज करणें वो सर्वथा । चरणीं माथा ठेविला रामें ॥ ८६ ॥ राज्य देवोनि भरतासी । तुवां रहावें मपासीं । माझिये शृंगारवाटिकेसीं । चौदा वर्षें वनवास ॥ ८७ ॥ दवडोनि सेवकां सर्वांसी । राज्य सांडोनि वैभवासी । माझ्या शृंगारवाटिकेसी । चौदा वर्षें वनवास ॥ ८८ ॥ न भेटावें प्रधानांसी । न भेटावें निजप्रजांसी । माझिये शृंगारवाटिकेसी । चौदा वर्षें वनवास ॥ ८९ ॥ न भेटावें गृहस्त्रियांसी । न भेटावें निजप्रियांसी । वसोनि शृंगारवाटिकेसी । चौदा वर्षें वनवास ॥ ९० ॥ न भेटावें दशरथासी । न भेटावें वसिष्ठासी । माझिया शृंगारवाटिकेसी । चौदा वर्षें वनवास ॥ ९१ ॥ रायाची आज्ञा अति सधर । त्यजोनि वस्त्रें वल्कलांबर । अलंकार सांडोनि जटाभार । फळाहार करूं दोघें ॥ ९२ ॥ तुजशीं असोनियां एक । तृण सेवितां परम सुख । तुजवेगळें पीयूख[3] । केवळ विखें[4] मज होय ॥ ९३ ॥ ऐकोनियां मातेच्या वचनासी । श्रीराम लागला पायांसी । आश्वासूनि कौशल्येसी । निजधर्मासी सांगत ॥ ९४ ॥ रायाची आज्ञा आहे ऐशी । जावें दंडकारण्यासी । राहतां शृंगारवाटिकेसी । पितृवचनासी विरोध ॥ ९५ ॥ तूं बोलसी मोहेंसंभ्रम । मज पितृवाक्य पूज्य परम । सांडोनि मोह ममता भ्रम । आज्ञा परम मज देईं ॥ ९६ ॥ तुझी आज्ञा पैं न होतां । मज यश न ये सर्वथा । म्हणोनि चरणीं ठेविला माथा । प्रसन्नता मज प्रेरीं[6] ॥ ९७ ॥ पित्याचें वचन तुळंघितां । याहूनि अधिक जाण माता । सावध परिसें रघुनाथा । वेदशास्त्रार्थां अनुमत ॥ ९८ ॥

दशविप्रानुपाध्यायो गौरवेणातिरिच्यते ।
उपाध्यायाद्दश पिता गौरवेणातिरिच्यते ॥ ११ ॥
पितॄन् दश च मातका सर्वां वा पृथ्वीमपि ।
गौरवेणाधिका लोके न मातृसदृशो गुरुः ॥ १२ ॥

कौसल्या बोले आपण । ऐकें श्रीरामा सावधान । सांगेन मातेचें महिमान । अति गहन वेदोक्त ॥ ९९ ॥ स्वधर्मकर्मी अति निपुण । दहा ब्राह्मण अति सज्ञान । एक आचार्य त्यांसमान । ऐसें महिमान आचार्याचें ॥ १०० ॥ दश आचार्य श्रेष्ठ कर्मप्रवृत्तीं । त्यांहूनि ज्याची अधिक शक्ती । पुत्रविक्रयीं का दूरीकार्यार्थीं । नियामकत्वें निश्चितीं पिता अधिक ॥ १ ॥ दशाचार्यविशेषीं । गुरुत्वें गौरव पित्यासी । पित्याहूनि दशगुणेंसीं । गुरुत्वें मातेसी भजावें ॥ २ ॥ गर्भधारणपोषणेंसीं । मातेसी गुरुत्व विशेषीं । पृथ्वीपरीस मातेसी । पूज्यत्वेंसीं गौरव ॥ ३ ॥ पिता जालिया पतित । पुत्रें त्यागावा निश्चित । माता जालिया पतित । पूज्यत्व शास्त्रार्थ प्रतिपादी ॥ ४ ॥ पुत्र जालिया संन्यासी । अवश्य त्यागावें पितयासी । भिक्षा मागोनि मातेसी । पोसावें संन्यासविधीं शास्त्रार्थ ॥ ५ ॥ यापरी गा रघुनाथा । पित्यापरीस पूज्य माता । माझिया भजावें वचनार्था । वना सर्वथा न जावें ॥ ६ ॥ मातृवाक्य मानोनि गौण । करिसी पितृवाक्याचें परिपाळण । हें तुज गा परम दूषण । माझें वचन उलंघितां ॥ ७ ॥ श्रीराम म्हणे कौसल्येसी । तूं श्रेष्ठत्वें पूज्य होसी । येचिविषयीं पूर्वधर्मासी । ऐक तुजपासीं सांगेन ॥ ८ ॥ पूर्वी पितृवाक्यें तत्त्वतां । परशुरामें छेदिली माता । तुळंघीच पितृवचनार्था । पूज्य पिता म्हणोनी ॥ ९ ॥ पुत्रें वधिलें निजमातेसी । रेणुका नँ[8] क्षोभेचि रामासी । प्रतिपाळिलें पतिवचनासी । तूंही जाणसी हे कथा ॥ ११० ॥ मज पितृवाक्य पूज्य पूर्ण । तुजही पतिवचन प्रमाण । त्याचें करितां उल्लंघन । अधःपतन दोघांसी ॥ ११ ॥ ऐकोनि पुत्राच्या वचना । म्हणे तुझा वियोग रघुनंदना । मरणाहूनि चौगुणा । तरी सवें वना मज नेईं ॥ १२ ॥ या तरी पाळीं माझ्या वचना । मज सवें न्यावें वना । म्हणोनि लागली श्रीरामचरणां । अति करुणा विलंपत[9] ॥ १३ ॥ काय करूं रे रघुनाथा । मज तंव मरण न ये आतां । न साहवे वियोगव्यथा । वना सर्वथा मज न्यावें ॥ १४ ॥ पुत्रासवें वनवासासी । सर्वथा जातां न ये मातेसी । ऐकतां क्षोभेल वसिष्ठ ऋषी । कैंवी वनवासासी म्यां न्यावें ॥ १५ ॥ ऐसियापरी

१ शृंगारवनांत. २ श्रेष्ठ, बळकट. ३ अमृत. ४ विष. ५ मायेचें भाषण. ६ पाठीव. ७ क्रोध पावली नाहीं.

८ नरकवास. ९ शोक करूं लागली.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

निजधर्मता । रामें संबोखिली माता । तिच्या चरणीं ठेविला माथा । क्षमा सर्वथा मज कीजे ॥ १६ ॥ ऐकोनि कौसल्याकरुणावचन । लक्ष्मण क्षोभला आपण । म्हणे श्रीरामा ऐक माझें वचन । वनप्रयाण करूं नको ॥ १७ ॥ परम सुख दशरथासी । कौसल्या पावे निजसुखासी । जाणें न लगे तुज वनासी । तें मजपासीं वर्म आहे ॥ १८ ॥ आज्ञा देशील रघुनाथा । तरी मी सोधीन[1] कार्यार्थी । ऐक तेही व्यवस्था । तुज मी आतां सांगेन ॥ १९ ॥ कैकेयीच्या करीन घाता । तैं परम सुख दशरथा । सुखावेल कौसल्या माता । राज्यीं रघुनाथा अभिषेक ॥ १२० ॥ कैकेयीच्या निजकैवारा । आलिया निवटीनें[2] सुरवरां । रणीं निर्दाळीन असुरां । भरीन सागरा अशुद्धें[3] ॥ २१ ॥ लोहें[3] घोटीन पैं मांस । पृथ्वी करीन निर्मनुष्य । यमलोक पाडीन ओस । लावीन त्रास कळिकाळा ॥ २२ ॥ पाठीसी असलिया रघुनाथ । कृतांताचे[4] पाडीन दांत । मजला भय नाहीं निश्चित । दुष्ट समस्त निर्दाळीन ॥ २३ ॥ तूं म्हणसी हें अप्रमाण । माझें वचन परम प्रमाण । दुष्टां करावया निर्दळण । अवतार पूर्ण श्रीराम ॥ २४ ॥ दुष्टांमाजि दुष्ट संपूर्ण । मुख्यत्वें अति कैकेयी जाण । सुहृदश्रिये विध्वंसन । प्रियाच प्राणघातकी ॥ २५ ॥ सुमुहूर्तें दुष्टदळणीं । पहिली कैकेयीची बोहणी[5] । मातापुत्रविघडणी । महापापिणी पतितापी ॥ २६ ॥ दुःखें रडे तो दशरथ । त्याचा न मानी हे वचनार्थ । पायां लागतां नृपनाथ । पतिवचनार्थ मानीना ॥ २७ ॥ पित्यापुत्रां करावया तुटी[6] । दृढ दुष्टत्व कैकेयीच्या पोटीं । रामा घालवी दिक्पटीं[7] । परम खोटी हे एकी ॥ २८ ॥ इचा करितां पैं घात । सुख होईल जगाआंत । कौसल्येसी दशरथ प्राप्त । राज्यीं रघुनाथा अभिषेक ॥ २९ ॥ भर्तृवचन नाणी दृष्टीं । श्रीराम द्वेषी महाहट्टी । इसी मारिल्या पुण्यकोटी । स्वानंदपुष्टी तिहीं लोकीं ॥ १३० ॥ येचि विषयीं रघुनाथा । मज आज्ञा देइंजे आतां । म्हणोनि चरणीं ठेविला माथा । क्षोभकत्व अनिवार ॥ ३१ ॥ देखोनि सौमित्राचें चिन्ह । श्रीराम त्यासी दे समाधान । तुझें बळ आंगर्वण[8] संपूर्ण । मी आपण स्वयें जाणें ॥ ३२ ॥ वाटीव[9] लांठीव[10] वीरवृत्ती । चारी पुरुषार्थ तुझे हातीं । येवढें असोनि अपकीर्ती । आपणाप्रति येवों नेदीं ॥ ३३ ॥ आतुर्बळी[11] पुरुषार्थेंसीं । तेणें मारावें मातेसी । दुःख द्यावें पितयासी । हेचि आम्हांसी अपकीर्ति ॥ ३४ ॥ पित्यासी पढियंती सर्वथा । ते तंव आपली सखी माता । तिच्या करितां निजघाता । अधर्मता शास्त्रार्थीं ॥ ३५ ॥ पित्यानें हात घातला दासीसी । ते तंव माता होय पुत्रासी । विरुद्ध करूं नये तियेसी । मीं[12] कैकेयीसी केंवि मारूं ॥ ३६ ॥ पितृवचनउल्लंघन । त्यावरी मातेचें हनन । तें तंव होय जगीं जघन्य[13] । निंदा पूर्ण तिहीं लोकीं ॥ ३७ ॥ येवोनि सूर्यवंशाप्रती । येवढी जोडावी अपकीर्ती । सौमित्रा घडे ऐसी युक्ती । पूर्वज क्षोभती स्वर्गस्थ ॥ ३८ ॥ सा मास सुरी पैं[14] रिजिली । घरची म्हातारी खोंचिली । ते अपकीर्ति आम्हींच केली । जरी वधिली कैकेयी ॥ ३९ ॥ आंगीं बळ आहे पूर्ण । स्त्रिये मारणें पुरुषार्थ कोण । पित्यासी दुःख देणें दारुण । अधःपतन तैं आम्हांसी ॥ १४० ॥ आंगीं बळाची दृढ प्रौढी । वना जातां कोण सांकडी । मारूं राक्षसांच्या कोडी । सोडवूं बांधवडी[15] देवांची ॥ ४१ ॥ बांधोनि स्वधर्माचा सेत । दुष्ट निर्दाळूं लंकानाथ । कीर्ति न समाय त्रैलोक्यांत । हा पुरुषार्थ साधावा ॥ ४२ ॥ ऐकोनि श्रीरामाचें वचन । सौमित्र करी साष्टांग नमन । रामें दिधलें आलिंगन । तेणें समाधान दृढ जालें ॥ ४३ ॥ पुढती घातलें लोटांगण । पुढती वंदी श्रीरामचरण । तुझे सेवे मी वना येईन । दुष्टकंदन करावया ॥ ४४ ॥ पुढती नाचे पुढती गाये । पुढती वंदी श्रीरामपाये । तूंचि बाप तूंचि माये । गर्जताहे स्वानंदें ॥ ४५ ॥ श्रीरामा देई निजभाकेसी । मज न्यावें वनासी । सेवा करावया वनवासीं । निजमानसीं उल्हास ॥ ४६ ॥ ऐकून श्रीरामाच्या युक्ती । कौसल्या सुखावली चित्तीं । वना नवजावा रघुपती । आग्रहस्थिती

१ करीन. २ ठार मारीन. ३ रक्तानें. ४ काळाचे. ५ आरंभ. ६ ताटातूट. ७ देशांतराला. ८ पराक्रम. ९ घडलेली, अनुभवास आलेली. १० दांडगी. ११ महाबलाढ्य. १२ मग. १३ नीच. १४ धार लावली. १५ बंधन. १६ आपलें वचन.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सांडिली ॥ ४७ ॥ श्रीरामाचें निजवचन । तेणें सुखसमाधान । सुखी जाला लक्ष्मण । सुखसंपन्न कौसल्या ॥ ४८ ॥ माता आणि सौमित्रबंधु । दोघां जाहला सुखसंवादु । एका जनार्दनीं विनोदु । परमानंदु श्रीरामा ॥४९॥ एका जनार्दना शरण । शोकामाजी सुख संपूर्ण । कौसल्या सुखावोनि आपण । करवी वनप्रयाण श्रीरामा ॥ १५० ॥ करोनियां पुण्याहवाचन । श्रीरामासी वनप्रयाण । कौसल्या करवी आपण । स्वस्तिवाचन अवधारा ॥ १५१ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे अयोध्याकांडे एकाकारटीकायां कौसल्यासांत्वनं नाम षष्ठोऽध्यायः ॥ ६ ॥ ओंव्या ॥ १५१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ १२ ॥

अध्याय सातवा

श्रीरामचंद्राय नमः । झाली कौसल्या सुप्रसन्न । श्रीरामासी वनाभिगमन । करावया करी पुण्याहवाचन । स्वस्त्ययन अवधारा ॥ १ ॥

निश्चितं तं तथा रामं विज्ञाय गमनोत्सुकम् ।
प्रास्थानिकं स्वस्त्ययनं कर्तुमेवोपचक्रमे ॥ १ ॥
सा विनीय तमायासमुपस्पृश्य जलं शुचि ।
चकार माता रामस्य मंगलानि मनस्विनी ॥ २ ॥
गंधैश्चापि समालभ्य राममायतलोचना ।
ओषधीं च सुसिद्धार्थां विशल्यकरणीं शुभाम् ॥३॥
चकार रक्षां कौसल्या मंत्रैरभिजजाप च ।
देवानभ्यर्च्य विधिवत् प्रणम्य च शुभव्रता ॥ ४॥

वनीं व्हावया वनवासी । अति उल्हास श्रीरामासी । कौसल्या जाणोनि निश्चयेंसीं । धाडी वनासी स्वस्त्ययनें ॥ २ ॥ करोनि करचरणक्षाळण । कौसल्या करी शुद्धाचमन । करविलें देवतार्चन । रघुनंदननिजविजया ॥ ३ ॥ सुमनचंदनीं अति ओजा । पूजा केली अधोक्षजा । लोटांगणीं गरुडध्वजा । वनीं राम माझा तूं संरक्षीं ॥ ४ ॥ नानाजळें सेवितां पाहें । रोग उपजोंचि न लाहे । त्या ओषधी आणोनि लवलाहें । बांधिल्या बाहे श्रीरामा ॥ ५ ॥ ज्या ओषधी देखिल्याप्रती । राक्षस जीव घेवोनि पळती । त्याही आणोनि निश्चितीं । बांधिल्या हातीं श्रीरामा ॥ ६ ॥ वनवासीं नित्य निर्विघ्न । विजयी व्हावया रघुनंदन । सर्वीं सर्वांचें प्रार्थन । करी आपण कौसल्या ॥ ७ ॥ जगद्गुरु जो कां ब्रह्मा । तेणें रक्षावें श्रीरामा । सदाशिवासहित उमा । माझ्या श्रीरामा संरक्षू ॥ ८ ॥ विष्णु जो कां त्रैलोक्यनाथ । तेणें रक्षावा माझा रघुनाथ । विचरतां वनाआंत । साह्य संतत अहर्निशीं ॥ ९ ॥ साह्य होऊत ऋषिगण । साह्य होऊत सिद्ध चारण । साह्य होऊत मरुद्गण । रघुनंदनवनवासीं ॥ १० ॥ पूषा भगार्यमा धाता । मित्र चंद्र यम आदित्या । वरुण सुविधी विधाता । वनीं रघुनाथा रक्षावें ॥ ११ ॥ अकरा रुद्र चौदा इंद्र । पदोपदीं रक्षो उपेंद्र । साह्य होऊत सप्त सागर । क्षीरसमुद्रशेषशायी ॥ १२ ॥ चारी वेद चौदा विद्या । श्रीरामा साह्य होऊत सदा । मंत्रमूर्ति मंत्रानुवादा । राम सर्वदा रक्षावा ॥ १३ ॥ वेदांमाजी अथर्वण । त्याचे मंत्र अति दारुण । श्रीरामा साह्य होऊत संपूर्ण । वनीं निर्विघ्न करावया । ॥ १४ ॥ सप्त ऋषी आणि ब्रह्मऋषी । रामा रक्षोत देवऋषी । नारदा लागतें पायांसी । माझ्या रामासी तूं रक्षीं ॥ १५ ॥ शनि भौम महाक्रूर । राहु केतु गुरु शुक्र । श्रीरामासी न व्हावे वक्र । अहोरात्र रक्षावें ॥ १६ ॥ नक्षत्रें आणि नक्षत्रपती । ध्रुवें रक्षावा श्रीरघुपती । सप्तऋषींसीं अरुंधती । श्रीराममूर्तीं तुम्ही रक्षा ॥ १७ ॥ विजांसि येतें काकुळती । तुम्हीं न पडावें श्रीरामाप्रती । नानाविधा दिव्यदीप्ती । तुम्हीं रघुपती रक्षावा ॥ १८ ॥ वृक जंबुक सिंह व्याघ्र । आश्वलें तरस गौर तगर । सर्प शार्दूळ आणि वानर । तिंहीं रामचंद्र रक्षावा ॥ १९ ॥ मातले म्हैसे उन्मत्त गज । मृग वराह आणि दिग्गज । वनदेवता नाचती भोज । तिंहीं रघुराज रक्षावा ॥ २० ॥ महापक्षी अति दुर्धर । अग्निमुख नखें क्रूर । श्येन गीध उलूक घार । तिंहीं रामचंद्र रक्षावा ॥ २१ ॥ जळींचे क्रूर जळचर । मत्स्य मगर महामकर । माझा रक्षावा रामचंद्र । निरंतर

१ कल्याण होवो म्हणून आशीर्वाद. २ भक्तिपूर्वक. ३ हाताच्या बाहीला. ४ पार्वती. ५ पूषा, भग, अर्यमा, धाता ह्या देवता. ६ स्वच्छंदानें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वनवासीं ॥ २२ ॥ यक्ष राक्षस पिशाचक। जे कां शिवाचे सेवक। तिंहीं माझा रघुकुळटिळक। आवश्यक रक्षावा ॥ २३ ॥ मार्गीं चालतां रघुकुळटिळक। कंटक होवोनि निष्कंटक। दंश[1] मशाक गांधिलें वृश्चिक। तें विख निर्विख हो रामा ॥ २४ ॥ गमन शयन अशना[2]। पृथ्वी साह्य होऊन रघुनंदना। स्नाना प्राशना मार्जना[3]। श्रीरामा साह्य जाणा आपूं[4] ॥ २५ ॥ तमें[5]निरासीं प्रकाशघन। जठराग्निप्रदीपन। वनीं शीतनिवारण। अग्नि संपूर्ण साह्य श्रीरामा ॥ २६ ॥ करितां वनवासा प्रयाण। श्रीरामा साह्य पंचप्राण। करितां संग्राम दारुण। बळें संपूर्ण साह्य वायु ॥ २७ ॥ श्रीरामाच्या वनवासा। साह्य संपूर्ण आकाशा। हृदयीं चिंतेचा पैं वळसा[6]। अल्पही ऐसा रिघों नेदीं ॥ २८ ॥ दिशा आणि विदिशा। साह्य होऊत श्रीराम परेशा। हृदयीं दावोनि चिद्विलासा[7]। चिंतेचा घसा निवटावा ॥ २९ ॥ ऋतु मास संवत्सर। लवनिमेषादि तिथिवार। होरा मुहूर्त अहोरात्र। श्रीरामचंद्र रक्षावा ॥ ३० ॥ यांहीवेगळे अरण्यवासीं। जे जे असती सामर्थ्यैंसीं। ते ते साह्य होऊत रामासी। तुमची दासी मी झालें ॥ ३१ ॥ इंद्र निघतां वृत्रवधासी। गुरूनें मंगळें केलीं त्यासी। तीं तीं मंगळें तुजपासीं। अहर्निशीं तिष्ठोत ॥ ३२ ॥ गरुड जातां अमृतासीं। विनतेनें मंगळें केलीं त्यासी। तीं मंगळें तुजपासीं। अहर्निशीं तिष्ठोत ॥ ३३ ॥ हरें मर्दावया त्रिपुरासी। उमेनें मंगळें केलीं त्यासी। तीं तीं मंगळें तुजपासीं। अहर्निशीं तिष्ठोत ॥ ३४ ॥ हरीनें मर्दितां मुरासी। रमेनें मंगळें केलीं त्यासी। तीं तीं मंगळें तुजपासीं। अहर्निशीं तिष्ठोत ॥ ३५ ॥ जळचर भूचर खेचर[9]। उग्र रुद्र महाक्रूर। तेणेंसीं साह्य करो श्रीशंकर। दासी किंकर मी त्यांची ॥ ३६ ॥ वनीं रक्षो तुज वामन। जनीं रक्षो जनार्दन। निरंजनीं मधुसूदन। तुज संपूर्ण संरक्षो ॥ ३७ ॥ जळीं रक्षो तुज नारायण। स्थळीं रक्षो संकर्षण। रणीं रक्षो सिंहवदन[10]। विदारण अभक्तांसी[11] ॥ ३८ ॥ शयनीं रक्षो शेषशायी। शिव रक्षो श्मशानाचे ठायीं। सुषुप्तीमाझारी[12] विदेही। चित्सुख पाहीं तुज रक्षो ॥ ३९ ॥ वनीं वसतां रघुनाथ। वीर्य धैर्य नव्हे च्युत। तो तुज राखो अच्युत। वनाआंत विचरतां ॥ ४० ॥ तुज रक्षो आगमनिगम[13]। तुज रक्षो स्थावर जंगम। तुझें संकट दुर्गम। पुरुषोत्तम निवारो ॥ ४१ ॥ जनवनां जो जीवन। निरंजना जो निजजीवन। तो तुज रक्षो जनार्दन। लोटांगण त्यासी माझें ॥ ४२ ॥ म्यां प्रार्थिलें देवदेवतां। म्यां प्रार्थिलें भूतां समस्तां। म्यां प्रार्थिलें आदिअच्युता। वनीं रघुनाथा रक्षावया ॥ ४३ ॥ राम जगाचा निजजिव्हाळा। त्याहीवरी मातेचा कळवळा। अश्रु पूर्ण भरले डोळां। वेळोवेळां आलिंगी ॥ ४४ ॥ धणी[14] न पुरे आलिंगितां। धणी न पुरे मुख पाहतां। धणी न पुरे गुज बोलतां। निजमाता कृपाळु ॥ ४५ ॥ धणी न पुरे मुख मर्दितां। धणी न पुरे मुख चुंबितां। धणी न पुरे हृदयीं धरितां। ऐसी निजमाता कृपाळु ॥ ४६ ॥ धणी न पुरे वदनीं गातां। धणी न पुरे नयनीं पाहतां। धणी न पुरे हृदयीं ध्यातां। निजमाता कृपाळु ॥ ४७ ॥ श्रीरामें येवोनि आपण। त्रिवार करोनि प्रदक्षिण। वंदोनि मातेचे चरण। वनप्रयाण करियेलें ॥ ४८ ॥ देखोनि जननीचें वदन। पुढती नमन पुढती गमन। पुढती घाली लोटांगण। प्रेम पूर्ण मातेचें ॥ ४९ ॥ देखोनि मातेचा कळवळा। श्रीराम कृपेचा कोंवळा। आनंदाश्रु आले डोळां। बाष्पें गळा रोधिला[15] ॥ ५० ॥ तें देखोनि उठाउठीं। कौसल्यें राम धरिला पोटीं। ललाट मर्दोनि ललाटीं। घातली मिठी दृढ चरणीं ॥ ५१ ॥ वनाहूनि रघुनाथा। अयोध्येसी तूं येसील विजयता। कैं मी डोळां देखेन मागुता। श्रीमुखता[16] श्रीरामा ॥ ५२ ॥ मागुतेनि श्रीमुख देखेन। तैं होय डोळयां पारण। म्हणोनि आलिंगी जीवें प्राण। वियोगगमन न साहवे ॥ ५३ ॥ माउलीचें प्रेम पूर्ण। तेणें अश्रु लोटले संपूर्ण। जालें श्रीरामचरणक्षाळण। प्रक्षाळण निजदुःखा ॥ ५४ ॥ तंव गर्जली आकाशवाणी। श्रीरामा निजविजयो

१ डांस. २ भोजनास. ३ मार्जनविधीला. ४ उदकें. ५ अंधकार दूर करण्यास. ६ फेरा, भोंवरा. ७ परमात्मस्फूर्ती. ८ रात्रंदिवस. ९ आकाशांत संचार करणारे. १० नरसिंह. ११ दुष्टांला. १२ गाढ झोंपेमध्यें. १३ वेदशास्त्रें. १४ इच्छा, तृप्ती. १५ भरून आला. १६ सुंदर मुख.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वनीं । दुःख नको करूं जननी । राम त्रिभुवनीं महाराजा ॥ ५५ ॥ श्रीराम वंद्य ब्रह्मादि देवां । श्रीराम वंद्य दैत्यदानवां । श्रीराम वंद्य सर्व मानवां । श्रीराम स्वयमेव परब्रह्म ॥ ५६ ॥ श्रीराम स्वयें परात्पर । श्रीराम स्वयें स्वतंत्र । श्रीराम स्वयें चिन्मात्र । श्रीरामचंद्र परब्रह्म ॥ ५७ ॥ श्रीराम गुणी गुणातीत । श्रीराम जीवशिवांतीत । श्रीराम स्वयें सदोदित । श्रीराम निश्चित परब्रह्म ॥ ५८ ॥ श्रीरामा नाहीं सुखदुःख । जे मानिती ते केवळ मूर्ख । ऐकतां कौसल्ये जालें सुख । हृदयीं हरिख कोंदाटला ॥ ५९ ॥ ऐसी आकाशवाणी ऐकतां । परम सुख मायपुतां । मावळली द्वंद्वदुःखतां । उल्हासता वना धाडी ॥ ६० ॥ मावळले संकल्प विकल्प । मावळलें द्वंद्वदुःख । श्रीराम वना जातां देख । परम हरिख कौसल्ये ॥ ६१ ॥ एका जनार्दना शरण । कौसल्या करोनि नीरांजन । श्रीरामाचें वनप्रयाण । आल्हादें आपण करविलें ॥ ६२ ॥ जें स्वस्त्ययन रघुनंदना । तेंचि स्वस्त्ययन लक्ष्मणा । कौसल्येनें करोनि जाणा । दोघे वना धाडिले ॥ ६३ ॥ लागोनि मातेच्या चरणा । तीसी करोनि प्रदक्षिणा । वेगें निघावया वना । निजभवना राम आला ॥ ६४ ॥ राज्याभिषेका श्रीराममूर्ती । गजरें येईल रघुपती । ओंवाळावया सीता सती । घेवोनि आरती तिष्ठत ॥ ६५ ॥ तंव देखिला रामचंद्र । नाहीं छत्र ना चामर । नाहीं द्विजांचा जयजयकार । नायके गजर वाद्यांचा ॥ ६६ ॥ चरणां लागोनियां सीता । आदरें पुसे श्रीरघुनाथा । राज्याभिषेक न देखूं माथां । विलंबता कां जाली ॥ ६७ ॥ अभिषेक नाहीं तत्त्वतां । राज्यावीण उल्हासता । देखतसें मी रघुनाथा । हे मज कथा सांगावी ॥ ६८ ॥ राहिलें राज्याभिषिंचन । अति दूर वनाभिगमन । तरी रघुनाथ नव्हेचि दुर्मन । उल्हास पूर्ण पितृवाक्यें ॥ ६९ ॥ एकाकी राम वना जातां । तेणें सुखावे कैकेयी माता । भाके उत्तीर्णता दशरथा । तोचि रघुनाथा उल्हास ॥ ७० ॥ श्रीराम म्हणे ऐक सीते । कैकेयीसी श्रीदशरथें । दोनी वरद दिधले होते । शुक्रविजयार्थें युद्धसंधीं ॥ ७१ ॥ शुक्रें रायाचा भंगिला रथ । कैकेयीनें चक्रीं सूदला हात । तेणें विजयी जाला दशरथ । तैं वरदार्थ वदला रावो ॥ ७२ ॥ तेचि कैकेयीनें वर दोन । आजि मागितले आपण । एक मजला वनाभिगमन । शीघ्र प्रयाण आजीच ॥ ७३ ॥ राज्यांतील अणुप्रमाण । कांहीं न घ्यावें आपण । हे रायाची आज्ञा प्रमाण । शीघ्रप्रयाण आजीच ॥ ७४ ॥ दुसरे वरदें रायापासीं । राज्याभिषेक भरतासी । तेही मर्यादा नवपंचवर्षी । मग आम्हांसी रामराज्य ॥ ७५ ॥ ऐसी जानकीये जाली कथा । मज वनवासीं निघणें आतां । गुरुपुष्य या सुमुहूर्ता । तुज तत्त्वतां पुसों आलों ॥ ७६ ॥ तूं कौसल्येपासीं । द्वेष न करावा कैकेयीसीं । हें गुह्य सांगतों तुजपासीं । तिचेनि आम्हांसी अति कीर्ति ॥ ७७ ॥ कैकेयीचें वरदान । तें मज जालें सुप्रसन्न । समुद्रीं तरतील पाषाण । हें महिमान तिचेनि ॥ ७८ ॥ इनें वना न दवडिलें । प्रतापभांडार मज दिधलें । त्रिभुवनीं रामराज्य जालें । इचेनि बोलें वनवासीं ॥ ७९ ॥ जाणोनियां ऐशा स्वार्था । मज उल्हास वना जातां । हें त्वां जाणोनि तत्त्वतां । कैकेयी सर्वथा द्वेषूं नको ॥ ८० ॥ जैसीं लक्ष्मीनारायण । तैसें सासूसासऱ्यां भांवून । सेवा करावी आपण । सावधान सद्भावें ॥ ८१ ॥ सौमित्राची सखी जननी । कौसल्येहूनि अधिक मानीं । सुखी करावी सेवा करूनी । अनुदिनीं निजभजनें ॥ ८२ ॥ माझी आज्ञा प्रमाण जैसी । भरताची आज्ञा मानीं तैसी । विकल्प न धरावा मानसीं । वैरा देवैरासीं भेद न मानीं ॥ ८३ ॥ माझी आज्ञा आहे ऐसी । तुवां न जावें माहेरासी । वेगळें न रहावें निजमंदिरासी । कौसल्येपासीं नित्य वस्ती ॥ ८४ ॥ जंव होय माझें पुनरागमन । तंववरी करावें माझें ध्यान । मुखीं माझें नामस्मरण । विस्मरण येवों नेदीं ॥ ८५ ॥ माझें ध्यान अहर्निशीं । उपमा नाहीं त्या सुखासी । माझेनि नामस्मरणें सुखी होसी । वियोगासी विसरोनी ॥ ८६ ॥ ऐकोनि श्रीरामाचें वचन । हृदयीं लागला तो वाग्बाण ।

१ जीवात्मा आणि परमात्मा यांहून वेगळा. २ शीतोष्ण, सुखदुःख इत्यादिकांपासून दुःख होण्याची स्थिति. ३ आरती. ४ कल्याणदायक आशीर्वाद. ५ एकटा. ६ उतराई होणें. ७ घातला. ८ चवदा वर्षांची. ९ मोठेपणा. १० कल्पून. ११ प्रेमपूर्वक. १२ पतीला. १३ दिराला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

अश्रुपूर्ण झाले नयन । अधोवदन जानकी ॥ ८७ ॥ पतिवियोगाचें दुःख । तेणें कोरडें जालें मुख । हारपलें सकळ सुख । परम दुःख ओढवलें ॥ ८८ ॥ दुःखें जाली कासाविसी । मग लागली पतिपायांसी । काय बोलली श्रीरामासी । तें सावकाशीं अवधारा ॥ ८९ ॥ राज्यीं असतां श्रीरामासी । सेवा वांटिली सेवकांसी । ते मी एकली वनवासीं । सर्वस्वेंसीं सेवीन ॥९०॥ सर्व सेवेचा निजस्वार्थ । मज लाभेल वनाआंत । सर्वज्ञ श्रीरघुनाथ । माझा मनोरथ पुरवावा ॥ ९१ ॥ मग बोलिला रघुनंदन । नेणसी वनवासाचें चिन्ह । वनवासीं दुःख दारुण । सावधान अवधारीं ॥ ९२ ॥ राज्यांतील अणुप्रमाण । घेवों नये वो आपण । त्यागोनियां वस्त्राभरण । पादत्राणें त्यागावीं ॥ ९३ ॥ वल्कलांचें वस्त्राभरण । कृष्णाजिन प्रावरण । तूं तंव सुकुमार पूर्ण । दुःख दारुण वनवासीं ॥ ९४ ॥ दंडकारण्य दुर्धर[1] वन । तेथें वसावें आपण । पायीं चालतां कंटक पूर्ण । दुःख दारुण वनवासीं ॥९५॥ सिंह शार्दूळ व्याघ्र वृक । तरस तेंगर[2] मृग जंबुक । रीस वानर सर्प वृश्चिक । परम दुःख वनवासीं ॥ ९६ ॥ पतंग भृंग दंष्ट्री क्रूर । मकर सुसरी मत्स्य मगर । कंक बक पक्षी घोर । दुःख दुर्धर वनवासीं ॥ ९७ ॥ वनीं वनफळांचा आहार । तृणपर्णांचा सेजार[3] । शीत उष्ण निरंतर । दुःख दुर्धर वनवासीं ॥ ९८ ॥ तूं तंव रायाची राजबाळा । अतिशयेंसीं वेल्हाळा । वनीं द्वंद्व[4]दुःखउमाळा । तूं अबळा केंवि साहसी ॥ ९९ ॥ ऐकोनि द्वंद्वबाधावचन । सीता झाली हास्यवदन । जवळी असतां रघुनंदन । द्वंद्वबंधन बाधीना ॥ १०० ॥ करितां तुझें नामस्मरण । द्वंद्वदुःखाचें निर्दळण । तो तूं जवळी असतां जाण । द्वंद्वबंधन मज कैंचें ॥ १ ॥ वृक व्याघ्र पंचानन । त्यांचा आत्मा रघुनंदन । तो तूं जवळी असतां जाण । द्वंद्वबंधन मज कैंचें ॥ २ ॥ जवळी असतां रघुटिळक । कंटक होती निष्कंटक । विष तें होय पीयूख[5] । परम सुख वनवासीं ॥ ३ ॥ तुजसांगातें वनवास । तो मज वैकुंठ कैलास । तुजवेगळा संसार ओस । दुःख असोसें[6] मज तेव्हां ॥ ४ ॥ माझा स्वामी तूं रघुनाथ । ऐक माझें मनोगत । तुजवेगळें जीवित । दुःखाभिभूत संसारू ॥ ५ ॥ पति प्रियेचें निजजीवन । पति प्रियेचें निजनिधान[7] । पति प्रियेचें निजभूषण । तेणेंवीण ते अति दीन सुंदरा ॥ ६ ॥ पति प्रियेची निजमूर्ती । पति प्रियेची निजात्मगती । पति प्रियेची मुक्ती । होय उपहती[8] त्यावीण ॥ ७ ॥ पति प्रियेचें निजशोभन । पति प्रियेचें निजमंडण । पति प्रियेचें सौजन्य । तेणेंवीण ते अति दीन ॥ ८ ॥ पति प्रियेचें निजवैभव । पति प्रियेचें सुख स्वयमेव । पति प्रियेचें नित्य गौरव । तेणेंवीण पहा हो अति दीन ॥ ९ ॥ तूं तंव माझा प्राणनाथ । तुजवेगळा मज प्राणान्त । माझा परमात्मा रघुनाथ । हृदयस्थ अवधारीं ॥ ११० ॥ जेव्हांचि तुझें वनप्रयाण । तुजसवें येती माझे प्राण । मागें मज राहवितां जाण । अचूक मरण मज रामा ॥ ११ ॥ कृपाळु तूं हृषीकेशी । ऐसीं विरुदें तूं स्वयें वाहसी । तरी मज न्यावें वनासी । निजसेवेसी दासत्वा ॥ १२ ॥ म्हणोनि धरिले दोन्ही चरण । गहिंवरें गळताती नयन । जालें पतिपादप्रक्षाळण । श्रीराम पूर्ण तुष्टला ॥ १३ ॥ कोणासही न पुसतां । तुज म्यां सवें वना नेतां । म्हणतील स्त्रीजित कामलोलुपता । वना सीता राम नेतो ॥ १४ ॥ जेणें चुके लोकनिंद्यता । जेणें स्वार्थ साधे परमार्था । ऐसिया सांगेन निजस्वार्था । तें तुवां शीघ्रता करावें ॥ १५ ॥ लौकिकें मानिजे सर्वांसी । स्वार्थ पाविजे परमार्थासीं । ऐसिया सांगेन निजगुह्यासी । त्या कार्यासी तूं साधीं ॥ १६ ॥ भूत भविष्य वर्तमान । वसिष्ठाचें आहे ज्ञान । त्यासी रिघावें तुवां शरण । वनाभिगमन करावया ॥ १७ ॥ रिघालिया सद्गुरूसी शरण । विघ्न तेंचि होय निर्विघ्न । गुरुवचन उल्लंघी ऐसा कोण । हरिहर पूर्ण वंदिती ॥ १८ ॥ आज्ञा पुसलिया वसिष्ठासी । ना न म्हणवे दशरथासी । मजही नुलंघवे आज्ञेसी । गुरुवाक्य जगद्वंद्य ॥ १९ ॥ जयाचिया जाण वचनासाठीं । सूर्यमंडळीं तपे छाटी । येवढा गुरु आमुचे गांठीं । हे गुह्य गोष्टी त्यासी पुसें ॥ १२० ॥ ऐकोनि श्रीरामाचें वचन । सीता हरिखली संपूर्ण । धरिले वसिष्ठाचे चरण । वनाभिग-

१ भयंकर कठीण. २ रानडुकर वगैरे पशु. ३ शय्या, अंथरूण. ४ शीतउष्ण इत्यादींचा त्रास. ५ अमृत. ६ सोसण्याला कठिण. ७ दुःखानें परिपूर्ण. ८ मोठा ठेवा. ९ नाश. १० विषयासक्तीनें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

मनआज्ञार्थ ॥ २१ ॥ मज न्यावया वनवासासी । आज्ञा द्यावी श्रीरामासी । तूं तंव हृदयस्थ जाणसी । सर्वज्ञ होसी गुरुवर्या ॥ २२ ॥ वसिष्ठ म्हणे श्रीरघुनाथा । वना अवश्य न्यावी सीता । इचेनि पावसी पुरुषार्था । यश सर्वथा इचेनि ॥ २३ ॥ सुरनर वानितील पवाडे । येवढी कीर्ति इचेनि जोडे । इयेसी घालोनियां पुढें । वना रोकडें निघावें ॥ २४ ॥ कौसल्या म्हणे वनवासासी । श्रीरामा सीता न्यावी सरसी । येथें ठेवितां आम्हांपासीं । देखतां इसी नित्य दुःख ॥ २५ ॥ स्त्रीपुरुषां वेगळेपण । हें तंव मरणापरीस मरण । हेंचि स्त्रियेसी दुःख दारुण । पृथक् शयन पुरुषेंसीं ॥ २६ ॥ अयोध्येचे जनांची वार्ता । जे श्रीरामें वनासी न्यावी सीता । वचन मानलें श्रीरघुनाथा वना निजकांता नेऊं इच्छी ॥ २७ ॥ बाप श्रीरामाची करणी । सद्गुरुआज्ञा लाहोनी । लौकिक स्वयें संपादोनी । वना निजपत्नी नेऊं पाहे ॥ २८ ॥ श्रीराम म्हणे सीतेसी । त्यजोनि वस्त्रांभूषणांसी । वल्कलांबरें परिधानेंसीं । वेगीं वनासी निघावें ॥ २९ ॥ वस्त्राभरणें त्यागितां । उल्हास सीतेच्या निजचित्ता । धनधान्यादि वस्तुं[2]जाता । आणोनि रघुनाथापुढें ठेवी ॥ १३० ॥ लक्ष्मण म्हणे रघुनाथा । तुम्हीं सवें घेतली सीता । मीही वना येईन आतां । निजस्वार्था सेवावया ॥ ३१ ॥ श्रीराम म्हणे सौमित्रा । तूं मज निजां[3]चा सोयरा । मागें धरावया राज्यभारा । जवळी तिसरा दिसेना ॥ ३२ ॥ ऐकोनि श्रीरामाचें वचन । लक्ष्मणें मांडिलें निर्वाण । तुजवेगळा सांडीन प्राण । तुझी आण श्रीरामा ॥ ३३ ॥ वाहोनियां निर्वाणआण । दृढ धरिले श्रीरामचरण । सोडवितां न सोडी जाण । कळवळोन बोलत ॥ ३४ ॥ तुम्ही दोघें वनवासी । आश्रमीं सांडोनि सीतेसी । तूं जाशील वनफळांसी । मागें इसी कोण रक्षी ॥ ३५ ॥ स्त्रियेसी मुळींहूनि रक्षण । माता संरक्षी बाळपण । कुमारपणीं पिता रक्षण । लग्न लाविलिया रक्षण सासूसासरे ॥ ३६ ॥ सासूसासरा भावे दीर । नणंदा जावादिकादि अपार । मुख्य रक्षण भ्रतार[4] । तेणें निरंतर रक्षावी ॥ ३७ ॥ अरक्षणता[5] स्त्रियेसी । अनर्थ आला त्या घरासी । लांछ[6]न लावील त्या कुळासी । प्रमदा तिसी निजनाम ॥ ३८ ॥ प्रमादीं[7] पाडी पतिपुत्रांसी । प्रमादीं पाडी कुळगोत्रासी । यालागीं प्रमदा नाम तिसी । वेदशास्त्रांसी संमत[8] ॥ ३९ ॥ तुम्ही दोघें वनवासी । मी असलिया तुम्हांपासीं । आणीन फळमूळपुष्पांसी । अहर्निशीं रक्षण ॥ १४० ॥ तुझें वाहीन धनुष्यबाण । काष्ठें आणीन जीवन । तुम्हांसी करावया शयन । शेज करीन तृणपर्णीं ॥ ४१ ॥ तुझिया रंकाचाही रंक । मोलेंवीण मी सेवक । वनवासींचा पाइक[9] । विश्वासुक आंगवणा[10] ॥ ४२ ॥ वनीं एकली सांडितां सीता । अनर्थ होईल रघुनाथा । हा विचार पुसावा समर्था । श्रीगुरुनाथा वसिष्ठासी ॥ ४३ ॥ लक्ष्मणाची निजयुक्ती । सत्य मानिली समस्तीं । एकली सीता वनाप्रती । ठेवितां निश्चितीं अनर्थ ॥ ४४ ॥ ऐकोनि लक्ष्मणाचें वचन । वसिष्ठ आज्ञा दे सर्वज्ञा सर्वज्ञ । तेणें खुणाविला रघुनंदन । वना लक्ष्मण स्वयें न्यावा ॥ ४५ ॥ ऐकोनि श्रीगुरुसंज्ञा । श्रीराम म्हणे लक्ष्मणा । जरी तुज येणें आहे वना । तरी धनधान्या वांटावें ॥ ४६ ॥ परिसतां श्रीरामाचें वचन । हर्षें निर्भर लक्ष्मण । एका जनार्दना शरण । वनप्रयाण अवधारा ॥ १४७ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे अयोध्याकांडे एकाकारटीकायां जानकीलक्ष्मणवनाभिगमनं नाम सप्तमोऽध्यायः ॥ ७ ॥ ओंव्या ॥ १४७ ॥ श्लोक ॥ ४ ॥

अध्याय आठवा

॥ श्रीरामचंद्रगुरवे नमः ॥

रामस्त्वनेन वाक्येन सुप्रीतः प्रत्युवाच तम् ।
व्रजापृच्छस्व सौमित्रे सर्वमेव सुहृज्जनम् ॥ १ ॥
ये च राज्ञे ददौ दिव्ये महात्मा वरुणः स्वयम् ।
जनकस्य महायज्ञे धनुषी रौद्रदर्शने ॥ २ ॥
अभेद्ये कवचे दिव्ये तूणी चाक्षय्यसायकौ ।
सर्वमायुधमादाय क्षिप्रमाव्रज लक्ष्मण ॥ ३ ॥
स सुहृज्जनमामंत्र्य वनवासाय निश्चितः ।
इक्ष्वाकुगुरुमागम्य जग्राहायुधमुत्तमम् ॥ ४ ॥

---

१ मोठी, अद्भुत. २ वस्तुसमूहाला. ३ जिव्हाळ्याचा, अंतरीचा. ४ पति. ५ असंरक्षण, स्वातंत्र्य. ६ दूषण. ७ मोहांत. ८ मान्य. ९ चाकर. १० स्वाभाविक.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

तद्दिव्यं राजशार्दूलः सत्कृतं माल्यभूषितम् ।
रामाय दर्शयामास सौमित्रिः सर्वमायुधम् ॥ ५ ॥

श्रीराम म्हणे सौमित्रासी । जरी तूं वनवासासी येसी । तरी पुसोनि ये निजमातेसी । आणि पत्नीसी भेटोनी ॥ १ ॥ आणिकही सुहृदसंबंधे । त्यांसी पुसोनि यावें यथावबोधें । माझीं आणावीं दिव्यायुधें । तीं अति शुद्धें युद्धार्थीं ॥ २ ॥ मज दिधलें दशरथें । वरुणदत्त धनुष्यातें । तेणेंसीं आणावे अक्षय भाते । अभेद्य कवचातें आणावें ॥ ३ ॥ शत्रुघातीं अति खडतर । अतिशयेंसीं सतेज धार । तेंही खंर्ग आणावें अति शीघ्र । आज्ञा गंभीर रामाची ॥ ४ ॥ सद्गुरु वसिष्ठाचे घरीं । माझे आयुधांची सामग्री । ते आणावी त्वरा करीं । वनांतरीं जावया ॥ ५ ॥ लक्ष्मण सांगे सुमित्रेसी । राम सीता जाताती वनासी । मीही जातों त्यांचे सेवेसी । म्हणोनि मातेसी वंदिलें ॥ ६ ॥ सुमित्रा म्हणे रामसेवा । करितां सुख माझे जीवा । वनीं सुखी केलिया राघवा । धन्य कुसवा तैं माझा ॥ ७ ॥ ज्येष्ठ बंधु सद्गुरु परम । ज्येष्ठबंधु पित्यासम । ज्येष्ठ बंधु आत्माराम । पुरुषोत्तम ज्येष्ठ बंधु ॥ ८ ॥ श्रीरामसेवा परम दान । श्रीरामसेवा परम ध्यान । श्रीरामसेवा परम समाधान । ब्रह्मज्ञान श्रीरामसेवा ॥ ९ ॥ श्रीरामसेवेचा करी आदर । तो सुखरूप नित्य नर । ऐसा मातेनें देवोनि वर । वना सौमित्र पाठविला ॥ १० ॥ यापरी वंदोनि जननी । निजपत्नीतें आश्वासुनी । दिव्यायुधें सर्वें घेवोनी । आला धांवोनी सौमित्री ॥ ११ ॥ आला देखोनि सौमित्रासी । अति उल्हास स्वयें सीतेसी । परम सुख श्रीरामासी । धरिला पोटासीं आल्हादें ॥ १२ ॥ जो त्यागी निजकांतेसी । जो त्यागी वित्तविषयांसी । तोचि पढियंता श्रीरामासी । जीवीं अहर्निशीं आवडता ॥ १३ ॥

तमुवाचात्मवान् रामः प्रीत्या लक्ष्मणमागतम् ।
काले त्वमागतः सौम्य कांक्षिते मम लक्ष्मण ॥ ६ ॥
अहं प्रदातुमिच्छामि यदिदं मामकं धनम् ।
ब्राह्मणेभ्यस्तपस्विभ्यस्त्वया सह परंतप ॥ ७ ॥

श्रीराम म्हणे लक्ष्मणासी । यथाकाळीं शीघ्र आलासी । मी निजधन देईन दीनांसी । तूं त्या कार्यासी संपादीं ॥ १४ ॥ तूं सखा साह्य वनवासी । तूं सखा निजधर्मासी । तूं सखा साह्य निजकर्मासी । सहाकारी होसी सर्वार्थी ॥ १५ ॥ माझें निःशेष निजधन । मी धर्मार्थ करितों दान । तें वांटावयाचें विधान । सावधान अवधारीं ॥ १६ ॥ सर्वार्थी सखा साह्यातें । आधीं पुजावें वसिष्ठातें । सर्वस्व अर्पावें श्रीगुरूतें । हा मुख्य आमुतें स्वधर्म ॥ १७ ॥ धन धान्य असंख्याक । धाडावे गाईंचे कळप अनेक । वस्त्रें अर्पावीं अमोलिक । रथ वारु अलोलिक अर्पी श्रीगुरूसी ॥ १८ ॥ अनर्घ्य रत्नांचिया कोडी । भरोनि धाडाव्या कावडी । सद्गुरु पूजावा आवडीं । निजपरवडी धर्माची ॥ १९ ॥ तुवां जावोनि सांगातें । स्वयें अर्पावें सद्गुरूतें । सुयज्ञ ज्येष्ठपुत्र त्यातें । आणीं येथें प्रार्थोनि ॥ २० ॥ वसिष्ठासी द्यावें धन । ऐकोनि श्रीरामाचें वचन । लक्ष्मणासी हर्ष पूर्ण । जावोनि आपण गुरु पूजी ॥ २१ ॥ वसिष्ठ बोले उल्हासेंसीं । त्रैलोक्यविजय श्रीरामासी । म्हणोनि त्याची सुबुद्धि ऐसी । पूर्णभाग्यासी प्रकाशक ॥ २२ ॥ मग जावोनि सुयज्ञघरासी । सौमित्र वंदी सुयज्ञासी । श्रीराम जातो वनासी । तेणें भेटीसी बोलाविलें ॥ २३ ॥ ऐकोनि श्रीरामाचें गमन । सुयज्ञ जाला उद्विग्नमन । लावोनियां दोनी नयन । ठेला आपण तटस्थ ॥ २४ ॥ मग करोनियां संध्यावंदन । सुयज्ञ आला जी आपण । देखतांचि रघुनंदन । घाली लोटांगण सद्गुरुपुत्रा ॥ २५ ॥ मधुपर्क विधिविधान । केलें यथोर्क्त पूजन । आपलीं भूषणें रघुनंदन । करी समर्पण गुरुपुत्रा ॥ २६ ॥ जडित कुंडलें रत्नमेखळा । बाहुभूषणें अनर्घ्य माळा । करकंकणें मुद्रिका सकळा । शृंगारिला गुरुपुत्र ॥ २७ ॥ श्रीराम स्वयें सांगे सीतेसी । म्हणे तूंही पूजीं सुयज्ञासी । तिनेंही अनर्घ्य अलंकारांसी । दिधलें त्यासी उल्हासें ॥ २८ ॥ वना जातां श्रीरामासरिसी । परम आल्हाद सीतेसी । सर्वस्व देतां सुयज्ञासी । निजमानसीं उल्हास ॥ २९ ॥ अमूल्य वस्त्रें सीतेपाशीं । तींही दिधलीं सुयज्ञासी । जडित-

१ खड्ग. २ समाधान करून, संतोषवून. ३ आपल्या स्त्रीला. ४ प्रिय. ५ दुःखित. ६ विधिपूर्वक. ७ उत्तम, बहुमूल्य.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

शय्या आस्तरणेंसीं । सहित दासी अर्पिल्या ॥ ३० ॥ मातुळदत्त गज रामापासीं । तो शृंगारोनि अलंकारेंसीं । त्यावरी बैसवोनि सुयज्ञासी । गज गजरेंसीं बोळविला ॥ ३१ ॥ उल्हासें पूजीना गुरूसी । जो भजेना सत्पात्रासी । तेंचि दूषण दात्यांसी । आम्हीं महाऋषी पूजावे ॥ ३२ ॥ श्रीराम सांगे सौमित्रासी । अगस्त्या शांडिल्या गार्ग्यऋषींसी । वामदेवादि कौशिकांसी । बहु धनराशी पाठवाव्या ॥ ३३ ॥ वेदपाठक अग्निहोत्री । सत्कर्माचार नित्यश्रोत्री । आगमिक महामंत्री । द्रव्यसंभारीं पूजावे ॥ ३४ ॥ ऐसियांसी दिधल्या दान । तें तव अतिशयेंसीं पावन । सत्पात्र तें आहे आन । सावधान अवधारीं ॥ ३५ ॥ अयाचित भगवद्भावें । अवश्य दान त्यासी द्यावें । आपण जावोनियां सवें । धन अर्पावें याचकां ॥ ३६ ॥ कुटुंबवत्सल आणि निर्धन । बहु अपत्य अत्यंत दीन । त्याचें सुखी होय मन । इतुकें धन अर्पावें ॥ ३७ ॥ शिलवृत्ति आणि उंच्छवृत्ती । जावोनि त्यांच्या गृहाप्रती । जितुकें द्रव्य ते मागती । तितुकें चतुर्गुणीं तूं त्यां देईं ॥ ३८ ॥ त्यांसी कैचें साधन शाक । गोसहस्र सवत्सक । त्यांसी द्यावें आवश्यक । घृत दधि तक्र भोजनार्थ ॥ ३९ ॥ धन धान्य कौसल्येघरीं । आधीं द्यावें धर्माचारीं । संन्यासी मधुकरी करपात्री । ब्रह्मचारी भिक्षार्थी ॥ ४० ॥ कौसल्येचे निजसेवक । आणि तिचे उपासक । तैसेच सुमित्रेचे देख । धन अनेक त्यां देईं ॥ ४१ ॥ आमचे सुहृद आणि सेवक । परिचारिक आणि प्रेषक । कथाकथक पुराणिक । द्रव्य अनेक त्यां द्यावें ॥ ४२ ॥ वार्तासूचक आणि गंधलेपक । सभास्थानीं हास्यभाषक । ते पावती परम सुख । त्यां आवश्यक धन देईं ॥ ४३ ॥ छत्रकार चामरधारी । हडपी बारी आणि व्यवहारी । जळप्राशक धूपी फुलारी । सुखी करीं द्रव्यदानें ॥ ४४ ॥ मल्ल दर्शनी नटनाटक । अश्ववाहक वस्त्रप्रक्षाळक । रायविनोदी उपहासक । शिल्पकारक सुखी करीं ॥ ४५ ॥ माझा सारथि चित्ररथ । त्यासी अर्पी अपार अर्थ । दीन दरिद्री जे जे समस्त । अर्थवंत ते करीं ॥ ४६ ॥ आमचे सखे सुहृद भक्त । जे कां आमचे नित्याश्रित । जे जे आम्हांसी आर्तभूत । ते धनें समस्त सुखी करीं ॥ ४७ ॥ द्रव्य कांहीं ठेवणें नाहीं । निःशेष वेंचीं धर्मी सर्वही । आणिक जें जें लागेल कांहीं । तें तें पाहीं मी देईन ॥ ४८ ॥ मग पाचारोनियां भांडारी । म्हणे निःशेष द्रव्य काढीं बाहेरी । त्याचिया विनियोगाची परी । ऐक निर्धारीं सौमित्रा ॥ ४९ ॥ कृपण अनाथ अति दीन । अंध पंगु वृत्तिहीन । जे जे मागती तें त्यां द्यावें धन । अति सन्मानें सुखी करीं ॥ ५० ॥ सुख उपजे दिधल्या दान । त्याहूनि सुख दे सन्मान । तेणें सुखें सुखावे भगवान । ये विधीं दान अति श्रेष्ठ ॥ ५१ ॥ वृद्ध ब्राह्मण स्त्रिया तरुण । बहु बाळकेंसीं निर्धन । त्यांसीं सन्मानें द्यावें धन । सूक्ष्मदान या नांवें ॥ ५२ ॥ ऐशिया ब्राह्मणांचे ठायीं । सवत्सा आणि सुदोही । सहस्र सहस्र अर्पी गाई । खिलारीं कांहीं उरों नेदीं ॥ ५३ ॥ माझें होय पुनरागमन । तंववरी खावया पुरे धन । ऐसें दीनांसी द्यावें दान । सनातन हा धर्म ॥ ५४ ॥ मज वना गेलियापाठीं । कोणीं न व्हावें कष्टी । कोणीं न पडावें संकटीं । अगाध तुष्टीं धन देईं ॥ ५५ ॥ श्रीरामें आज्ञा दिधली जैसी । लक्ष्मण दे त्याहूनि विशेषीं । दान देतां लक्ष्मणासी । चौगुणा मानसीं उल्हास ॥ ५६ ॥ निःशेष वांटोनि धन । सीता श्रीराम आणि लक्ष्मण । करावया वनप्रयाण । निघालीं आपण राया पुसों ॥ ५७ ॥ राम सीता निघालीं बाहेरी । पाहों धांविन्नल्या नरनारी । एक चढले उपरीवरी । माडिया गोपुरीं पैं एक ॥ ५८ ॥ राम चालतां राजबिर्दी । सवें दाटली जनांची मांदी । कैकेयीची दुष्ट बुद्धी । राजा निर्बुद्धि कां आयके ॥ ५९ ॥ रथ गज चतुरंगश्रेणी । राम गजरें जाय प्रतिदिनीं । तो श्रीराम आजि अनवाणी । जातो चरणीं वनवासा ॥ ६० ॥ राम देखतांचि निवती नयन । राम देखतांचि निवे मन । राम देखतांचि निवे जन । जगज्जीवन श्रीराम ॥ ६१ ॥ राम

१ मोठ्या थाटानें. २ वेदज्ञ. ३ न मागणारा, याचना न करणारा. ४ शेत, मार्ग, वगैरे ठिकाणीं पडलेलें धान्य जमवून त्यावर निर्वाह करणारे. ५ कर हेंच पात्र ज्यांचें ते. ६ हरिदास. ७ बातमी सांगणारे. ८ विडा देणारे. ९ छत्रधर. १० धोबी. ११ नकल्ये, मस्कऱ्ये. १२ निश्चयपूर्वक. १३ दुभत्या. १४ संतोषानें. १५ समुदाय.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

जगाचें जीवन । त्या जीवनीं जन मीन । तो श्रीराम जातांचि जाण । जनांचे प्राण जातील कीं ॥ ६२ ॥ ऐसिया सुखरूप श्रीरामासी । दशरथ धाडितो वनासी । कैकेयीग्रहें घेतलें त्यासी । लागलें रायासी स्त्रीपिसें ॥ ६३ ॥ सीता सुकुमार महासती । इंद्रादि देव पाहों न शकती । तेही चरणीं चालतां क्षितीं । लोक देखती मार्गस्थ ॥ ६४ ॥ ऐसें बोलतां जनांसी । तिवें अनुद्विग्न मानसीं । वेगीं आलीं राजगृहासी । दशरथासी पुसावया ॥ ६५ ॥ सुमंत प्रधान अति विश्वासी । तेणें सांगितलें रायासी । श्रीराम जातो वनवासासी । आज्ञा तुम्हांसी पुसों आला ॥ ६६ ॥ रामें वांटिलें निजधन । सेवक सुहृद आणि ब्राह्मण । सुखी केले दीन जन । वनप्रयाण सुमुहूर्तीं ॥ ६७ ॥ ऐकोनि सुमंताचें वचन । रायासी आलें पैं रुदन । जळो कैकेयीचें वदन । धाडी राम वनवासा ॥ ६८ ॥ श्रीराम देखतां दृष्टीं । राजा मूर्च्छित पडला सृष्टीं । रामें उठविला उठाउठीं । स्वयें थापटी पर्यंकीं ॥ ६९ ॥ राजा होवोनि सावधान । श्रीरामासी बोले आपण । नको करूं वनप्रयाण । माझा प्राण जाऊं पाहे ॥ ७० ॥ कैकेयी ते मशक कोण । तुज मी राज्य देतों संपूर्ण । आतांचि करितों अभिषिंचन । ऋषिगणसमवेत ॥ ७१ ॥ श्रीराम लागला पायांसी । नको करूं अभिषेकासी । मिथ्या करितां भाकेसी । दोघे दोषी वेदोक्तें ॥ ७२ ॥ आतां मज राज्य घेतां । जग निंदील सर्वथा । तुझी भाक मिथ्या करितां । अधःपाता मी जाईन ॥ ७३ ॥ वेदवचन गुरुवचन । त्याहूनि अधिक पितृवचन । यावज्जन्म जो करी पाळण । त्याचें वचन अनुल्लंघ्य ॥ ७४ ॥ तुझे वचनें त्यागीन सीता । तुझे वचनें त्यागीन जीविता । परी वनवासाचिया निश्चितार्था । मी सर्वथा त्यागींना ॥ ७५ ॥ माझा जरी जाईल प्राण । तरी त्यागींना वनप्रयाण । राया तुझी वाहतों आण । म्हणोनि चरण दृढ धरिले ॥ ७६ ॥ देखोनि रामाचें निर्वाण । राजा करी दीर्घ रुदन । कैकेयीनें नागविलें पूर्ण । राम निधान अंतरलें ॥ ७७ ॥ न विचारितां निजकार्यासी । भाक देवों नये स्त्रियांसी । तेणें भाकें गोंवोनि आम्हांसी । केला वनवासी श्रीराम ॥ ७८ ॥ श्रीरामाचें दृढपण । वनाभिगमनीं अति निर्वाण । रायें वृत्त जाणोन आपण । निजप्रधान आज्ञापिला ॥ ७९ ॥ सन्नद्ध चतुरंगसेना । रामासवें द्यावी वना । वनीं वेंचावया रघुनंदना । असंख्य धना सवें देईं ॥ ८० ॥ उष्णें पीडेल श्रीरामचंद्र । सवें देइजे छत्रचामर । कापडगृहें अति विचित्र । देईं खिल्लार धेनूंचें ॥ ८१ ॥ ऐकोनि रायाचें वचन । कैकेयी जाली क्षोभायमान । आरक्त करोनियां नयन । काय आपण बोलिली ॥ ८२ ॥ घेवोनि उंसाच्या रसासी । बाकस देइजे जेवीं दीनासी । लक्ष्मी देवोनियां रामासी । भरता देसी शून्य राज्य ॥ ८३ ॥ दावोनि गज भद्रजाती । दानसंकल्प द्विजाहातीं । त्यासी दीजे चित्रींचा हस्ती । ते गतीं राज्य देणें ॥ ८४ ॥ माझें म्हणतां काळें मुख । तुम्ही दुष्ट नष्टविवेक । मिथ्या करितां आपली भाक । निश्चयें नरक भोगाल ॥ ८५ ॥ कैकेयीचें कठिण वचन । ऐकोनि राजा कोपायमान । नष्ट दुष्ट तूं अति कठिण । वर्मीं वाग्बाण विंधिसी ॥ ८६ ॥ श्रीराम म्हणे स्वामी दशरथा । सेनासंपत्ति सांगातें घेतां । राज्यभार आला माझे माथां । तो सर्वथा मी नेघें ॥ ८७ ॥ गंगोदक अति शुद्ध । त्यामाजि पडलिया मद्यबिंद । अवघेंचि होय अविशुद्ध । तेवीं विरुद्ध दुष्टसंगें ॥ ८८ ॥ तुम्हीं राज्य दिधलें भरता । त्यांतून अणुमात्रही घेतां । माझ्या वनवासाच्या व्रता । दोष तत्त्वतां लागेल ॥ ८९ ॥ ऐसें बोलतां श्रीरामासीं । कैकेयी वल्कलें दे त्यांसी । वेगीं वेढोनि यांसी । शीघ्र वनासी निघावें ॥ ९० ॥ सांडोनि वस्त्रें अलंकार । परिधान करावें वल्कलांबर । माथां धरोनि जटाभार । होईं वनचर वनवासीं ॥ ९१ ॥ स्वयमेव देखतां दशरथ । वल्कलें वेढी श्रीरघुनाथ । लक्ष्मण येवोनि शीघ्र तेथ । स्वयें वेष्टित वल्कलें ॥ ९२ ॥ वल्कलें दिधलीं सीतेसी । तीं वेढितां न ये तिसी । श्रीराम येवोनि तीपासीं । सुयुक्तीसीं नेसविलीं ॥ ९३ ॥ रामसौमित्रसीतेच्या वस्त्रांसी । कैकेयी घे आपणा-

१ मासे. २ जमिनीवरून. ३ खेदरहित. ४ सत्वर. ५ वचनाला. ६ निर्धार. ७ सिद्ध. ८ उन्हानें. ९ तंबू. १० चोयट्या. ११ उत्तम हत्ती. १२ मर्मस्थानीं. १३ नेसावें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

पासीं। देखोनि क्षोभ आला रायासी। अति निर्भर्त्सी कोपयोगें ॥९४॥ कोप आला वसिष्ठासी। निर्भर्त्सिलें कैकेयीसी। नष्ट दुष्ट शठ तूं होसी। न लाजसी अति स्वार्थें ॥९५॥ तुझिया वरदाच्या नेमासीं। एकला एक राम वनवासी। तूं कां वल्कलें देतेसी सीतेसी। दुष्ट होसी दुर्भगा[1] ॥९६॥ वस्त्रें अळंकार त्यांचीं आतां। तूं कां घेसी सभेदेखतां। काळें वदन तुझें तत्त्वतां। मुख दावितां लाजसी ना ॥९७॥ दुस्तर कोप दशरथा। कैकेयीसी मारूं धांवे लाता। तूं नव्हेसी माझी कांता। तुझा भर्ता मी नव्हें ॥९८॥ माझ्या बाळांचीं घेसी लुगडीं। तूं तंव रांमा[2] हाटींची धगडी[3]। घरीं घातलीसे धांगडी[4]। जाय रोकडी बैस हाटीं ॥९९॥ ऐसें क्रोधें बोलतां। गहिंवर आला दशरथा। पोटासीं धरोनियां सीता। होय अर्पिता आभरणें ॥१००॥ चौदा वर्षें वनवासीं। वस्त्राभरणें पुरती ऐसीं। तितुकीं द्यावीं सीतेसी। सुमंतासी आज्ञापिलें ॥१॥ वस्त्रें भूषणें सीतेजवळी। सुमंतें दिधलीं ते काळीं। दशरथा वंदी जनकबाळी। वंदी वेल्हाळी वसिष्ठासी ॥२॥ वसिष्ठें दिधलें आशीर्वचन। वनीं सतीत्वा पाळिसी पूर्ण। विजयी होईल रघुनंदन। तुज त्रिभुवन वंदील ॥३॥ राजा आज्ञापी सुमंता। शीघ्र आणीं माझिया रथा। बैसावया श्रीरघुनाथा। समेतें[5] सीतासौमित्र ॥४॥ रामलक्ष्मण प्रदक्षिणा। करोनि लागती पित्याचे चरणा। सात शतें माता जाणा। अभिवंदना तिंहीं केलें ॥५॥ तंव तिंहीं केला कोल्हाळ। अवघियांनीं एकचि आरोळ। तंव राम निघाला तत्काळ। अति विव्हळ समस्तही ॥६॥ जातां देखोनि रघुनंदन। राजा पडिला मूर्च्छापन्न। रुदन करिती सकळही जन। दीनवदन अयोध्या ॥७॥ एकी माता कपाळ पिटिती। एकी दीर्घस्वरें हांका देती। एकी वक्षःस्थळें[6] ताडिती। पडल्या बहुती मूर्च्छिता ॥८॥ श्रीराम म्हणे येथें राहतां। अधिक वाढेल ममता। रथीं वाहोनियां[7] सीता। होय निघता तत्काळ ॥९॥ आक्रंदोनि आरडे निजमाता। म्हणे मुख पाहों दे रघुनाथा। केंवी मी देखेन मागुता। वदन श्रीरामा दाखवीं ॥११०॥ येईं येईं रे माझ्या श्रीरामा। मनमोहना मेघश्यामा। विव्हळ सांडोनियां आम्हां। वना दुर्गमा केंवी जासी ॥११॥ तुज निघतां बा रे वना। मज आला प्रेमाचा पान्हा। कोणासी पाजूं रघुनंदना। निजवदना मज दावीं ॥१२॥ वना जातां रघुनंदन। गाईंचे गळती लोचन। अश्व गज करिती रुदन। दुःखें पाषाण उलताती ॥१३॥ डोहींचें आटतां जीवन। जेंवी तळमळती मीन। तेंवी अयोध्येचे जन। श्रीरामेंवीण तळमळती ॥१४॥ कैकेयी ते अति कठिण। सीतेचें हरी वस्त्राभरण। तीर्थाळें येथें राहे कोण। करूं प्रयाण वनवासा ॥१५॥ निघाले ज्योतिषी वेदपाठक। निघाले अग्निहोत्री साग्निक। त्यांचिये समागमें देख। एक एक निघाले ॥१६॥ सुतार कुंभार नापिक। निघाले ते नटनाटक। रजक रंगारी चार्मिक[9]। अनामिक[10] निघाले ॥१७॥ निघाले भुसी साळी माळी। चौटी[11] भाटी तेली तांबोळी। कोष्टी[12] सोनार शिंपी गोवळी। कोळी माळी निघाले ॥१८॥ कैकेयी ती दुष्टबाधा। ती आम्हांसी पीडील सर्वदा। जिकडे राम तिकडे अयोध्या। सर्वांची श्रद्धा वनवासीं ॥१९॥ श्रीराम जंव मागें पाहे। तंव नगरजन धांवती लवलाहें। राम सुमंतासी म्हणे राहें। जनसमुदाय केंवी येती ॥१२०॥ श्रीराम स्वयें विनवी जन। दंडकारण्या मज गमन। दूरस्थ पंथ अति कठिण। तुम्हां आगमन तेथें नव्हे ॥२१॥ कृपा करोनियां मजवरी। तुम्हीं राहावें निजनगरीं। राजा दशरथ आहे शिरीं। सुखोद्गारीं[13] नांदावें ॥२२॥ माझी आज्ञा पाळील भरत। तुम्हीं राहावें सुनिश्चित। ऐसें सांगोनि रघुनाथें। जन समस्त राहविले ॥२३॥ माझें स्मरण जया अहर्निशीं। मी अखंड तयापासीं। मज न विसरावें निजमानसीं। मी तुम्हांपासीं सर्वदा ॥२४॥ यापरी राहवोनियां जन। श्रीराम करी वनाभिगमन। एका जनार्दना शरण। पुढें निरूपण रसाळ ॥२५॥ रसाळ कथा रामायणी। वदली वाल्मीकाची वाणी। एका शरण जनार्दनीं। कृपा सज्जनीं

१ भाग्यहीन. २ स्त्री. ३ वाजारवसवी. ४ गोंधळ. ५ बरोबर. ६ छात्या. ७ घेऊन. ८ तिच्या हुकुमाखालीं. ९ चांभार. १० महार. ११ कापडाचे व्यापारी. १२ कापड विणणारे. १३ आनंदानें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

करावी ॥ १२६ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे अयोध्याकांडे एकाकारटीकायां श्रीरामवनाभिगमनं नाम अष्टमोऽध्यायः ॥ ८ ॥ ओंव्या ॥ १२६ ॥ श्लोक ॥ ७ ॥

अध्याय नववा

॥ श्रीरामाय जगदानंदकंदाय नमः ॥ वना निघतां श्रीरघुनाथ । राजा महामोहें मूर्च्छित । तो होवोनियां सावचित्त । पुसे दशरथ राम कोठें ॥ १ ॥ त्यासी स्त्रिया सांगती मात । तुम्हीं दिधला निजरथ । त्यावरी बैसोनि रघुनाथ । गेला निश्चित वनवासा ॥ २ ॥ एक सांगती रायासी । राम आश्वासीत जनांसी । आहे नगरद्वारापासीं । तंव राव वेगेंसीं धाविंनला ॥ ३ ॥

अथ राजा वृतः स्त्रीभिः सद्विजो दीनमानसः ।
निर्जगाम प्रियं पुत्रं द्रक्ष्यामि च वनं गतम् ॥ १ ॥

सातशें राणियांसमवेत । धाविंनला दशरथ । कोठें कोठें माझा रघुनाथ । स्वयें पुसत सर्वांतें ॥ ४ ॥ मग आक्रंदें दिधली हाक । श्रीरामा दाखवीं रे निजमुख । तुज जालिया विमुख । परम दुःख सर्वांसी ॥ ५ ॥ कैकेयीनें घेवोनि भाक । मज दिधलें महादुःख । तुझें देखिलिया श्रीमुख । परम सुख मज होय ॥ ६ ॥ श्रीराम स्मरतां हृदयांत । सकळ दुःखांचा होय अंत । भाग्यें अभागी मी दशरथ । वना रघुनाथ धाडिला ॥ ७ ॥ धांव पावें गा राघवा । भेटी देईं परम करुणेवा[३] । सुख होईल माझ्या जीवा । म्हणोनि धांवा[४] पोकारिला ॥ ८ ॥ गेला गेला रे रघुनाथ । म्हणोनि आक्रंदें गर्जत । रडत पडत स्वयें धांवत । पडे मूर्च्छित अति दुःखी ॥ ९ ॥ राम म्हणे येथें राहतां । दृढ वाढेल मोहममता । रावो मजपासीं न येतां । वेगीं सुमंता रथ हांकीं ॥ १० ॥ श्रीराम न येचि परतोनी । दशरथ रथ देखे नयनीं । दृष्टी मुरडेना तेथोनी । ठेली जडोनी रामरूपीं ॥ ११ ॥

यावत्तु निर्यतस्तस्य रजोरूपमदृश्यत ।
तावद्व्यवर्धतेवास्य धरण्यां पुत्रदर्शने ॥ २ ॥
तदार्तश्च विषण्णश्च पपात धरणीतले ।

श्रीराम देखतां दृष्टीं । दृष्टी लागली रामापाठीं । श्रीराम न देखतां दृष्टीं । बैसली शेवटीं ध्वजस्तंभीं ॥ १२ ॥ दृष्टी अंतरलिया ध्वज । राजा पाहे रथाचें रँज । न देखतां श्रीरामाचें रज । पडे भूभुज मूर्च्छित ॥ १३ ॥ आठवितां श्रीरामासी । राजा विसरे निजदेहासी । तेणें मूर्च्छा आली त्यासी । देहभावासी विसरला ॥ १४ ॥ स्त्रिया करिती दीर्घ रुदन । रुदन करिती सकळ जन । गाई न सेविती तृणजीवन[६] । वत्स स्तनपान न करिती ॥ १५ ॥ अश्व न खाती चारापाणी । गज निजकवळ न घालिती वदनीं । आहार त्यजिला पौरजनीं । अयोध्याभुवनीं आकांत ॥ १६ ॥ दिवस गेला अस्तमानीं । राजा सावध केला राणियांनीं । प्रवेशतां अयोध्याभुवनीं । सुख स्वप्नीं दिसेना ॥ १७ ॥ दीपदीपिका नाहीं कोठें । ओस हाँटवटिया चौहटे । जो तो रडतचि वाटे । श्रीराम कोठें पुसताती ॥ १८ ॥ श्रीराम प्रवेशलिया वनीं । घरोघरीं दीर्घ रडणी । अरंदोळ पडला अयोध्याभुवनीं । अन्न कोणी न खाय ॥ १९ ॥ न साहवे श्रीरामवियोगदुःख । राजा राणिया सकळ लोक । अवघे म्हणती घेवों विख । वसिष्ठें देख निवारिलें ॥ २० ॥ चौदा वर्षें वनवासीं । राम क्रमील निमेषार्धेंसीं । लांहोनि[१०] त्रिभुवनयशासी । अयोध्येसी येईल ॥ २१ ॥ मारोनि राक्षसांच्या कोडी । सोडवोनि देवांची बांदवडी[११] । उभवोनि रामराज्याची गुढी[१२] । येईल तांतडी[१३] श्रीराम ॥ २२ ॥ माझें वचन माना प्रमाण । वाहतों श्रीरामाची आण । विष घेवोनि देतां प्राण । अधःपतन पावाल ॥ २३ ॥ ऐकोनि वसिष्ठाची वाणी । राजा प्रवेशला राजभवनीं । श्रीराम आठवितां मनीं । पडला धरणीं मूर्च्छित ॥ २४ ॥ येरीकडे श्रीराम आपण । शीघ्र करितां वनप्रयाण । पाठीं लागले ब्राह्मण । राहविल्या जाण न राहती ॥ २५ ॥ रामें रथ पेलिले[१४] उठाउठीं । द्विज धांवती पाठोपाठीं । श्रीरामाची प्रीती मोठी । प्रेम पोटीं अनिवार ॥ २६ ॥

चकर्षेव गुणैर्बद्धं जनं पुरनिवासिनम् ॥ ३ ॥
ते द्विजास्त्रिविधं वृद्धा ज्ञानेन वयसौजसा ।
वयःप्रकंपशिरसो दूराद्दूचुरिदं वचः ॥ ४ ॥

---

१ हकीकत. २ कृपेनें. ३ करुणा भाकली, आक्रोश केला. ४ धुराळा. ५ (दशरथ) राजा. ६ गवत आणि पाणी. ७ बाजार. ८ चवाठे. ९ आरडाओरड. १० मिळवून. ११ बंधन. १२ ध्वज. १३ सत्वर. १३ चालविला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वहंतो जवना रामं भो भो जात्यास्तुरंगमाः ।
उपवाह्यस्तु वो भर्ता नापवाह्यः पुराद्वनम् ॥ ५ ॥
एवमार्तप्रलापांस्तान् वृद्धान् प्रलपतो द्विजान् ।
अवेक्ष्य सहसा रामो रथादवततार ह ॥ ६ ॥

श्रीरामाच्या संगतीं । वनवासीं करावया वस्ती । दृष्टी ठेवोनियां रथीं । ब्राह्मण धांवती लवलाहें ॥ २७ ॥ वृद्ध वृद्ध वेदपाठक । तपस्वी अग्निहोत्री याज्ञिक । आणिकही बहुसाल लोक । मोठेनि हांक तिहीं दिधली ॥ २८ ॥ शीघ्र नेतां श्रीरामासी । शरण रथाच्या वारुवांसी[१] । राम आणावा आम्हांपासीं । वेगीं वनवासीं न न्यावा ॥ २९ ॥ रथ चालवितो अलोलिक । त्या सारथियासी नमन देख । रथ पेलावा नगरासन्मुख । वना श्रीराम न न्यावा ॥ ३० ॥ श्रीराम जंव मागें पाहे । तंव जनसमुदाय धांवताहे । उडी टाकोनि लवलाहें । वंदोनि पाये बोलत ॥ ३१ ॥ स्वामी कष्टलेती बहुत दुरी । म्हणोनि द्विजांचे चरण चुरी । वनवास दंडकारण्यामाझारी । तुम्ही कैशापरी याल तेथें ॥ ३२ ॥ श्रीरामा तुझिया संगतीं । आम्ही पावों ब्रह्मप्राप्ती । वनवास तो बापुडा किती । भय निश्चितीं आम्हां नाहीं ॥ ३३ ॥ परतोनि जाणें मागुती । निश्चय आम्हां नाहीं रघुपती । स्वामीनें न्यावें वनाप्रती । वनसांगाती वनवासीं ॥ ३४ ॥ तूं जैं सांडोनि जासील दुरी । तैं आम्ही होऊं रानभरी । आम्हांवरी कृपा करीं । दीनोद्धारीं चालावें ॥ ३५ ॥ ऐकोनियां द्विजोक्ती । श्रीराम विचारी पैं चित्तीं । हे निजनगरासी स्वयें जाती । ऐसी युक्ती योजावी ॥ ३६ ॥ श्रीराम लक्ष्मणा आज्ञा करी । म्हणे चालतां द्विज शिणले भारी । आजि वस्ती तमसातीरीं । सीता उतरीं वृक्षातळीं ॥ ३७ ॥ श्रीराम नेघेचि पैं अन्न । अवघीं केलें अंबुप्राशन[२] । सीतेसहित आपण । केलें शयन तृणशय्ये ॥ ३८ ॥ श्रीराम सांगे लक्ष्मणाप्रती । ब्राह्मण राहवितां न राहती । हे जंव निजेले आहेती । तंव शीघ्रगतीं निघावें ॥ ३९ ॥ सुमंत रथ सिद्ध करी । मार्ग दाविला अयोध्यामोहरीं[३] । रिघोनि तमसेमाझारीं । परतीरीं उतरले ॥ ४० ॥ ब्राह्मण प्रातःकाळीं पाहती । माग देखिला अयोध्येप्रती । उल्हासें अवघे नगरा येती । तंव रघुपति पुढें गेला ॥ ४१ ॥ तयांसी पुसती नगरस्थ । कोठें आहे श्रीरघुनाथ । ते म्हणती राम आला येथ । जन हांसत ब्राह्मणांसी ॥ ४२ ॥ बहुतां पाडोनियां भ्रांती । श्रीराम गेला हातोहातीं । श्रीरामाची अगम्य गती । न कळे वेदोक्ती ब्राह्मणां ॥ ४३ ॥ हृदयीं असतां आत्माराम । जनांसी पडला मोहभ्रम । अवघे जाले विषयकाम[४] । कल्पांतीं राम न भेटे ॥ ४४ ॥ फुकाचें जें रामनाम । नुच्चारिती ते अभागी परम । असो ते पावती अंधतम[५] । जे आत्माराम नाठविती ॥ ४५ ॥ असो हें येरीकडे रघुपती । दुसरे दिवसीं दिनांतीं[६] । इंगुदीवृक्षीं केली वस्ती । निकट भागीरथीप्रवाहो ॥ ४६ ॥ वना आलिया श्रीराममूर्ती । ऐकोनि गुहक निषादपती[७] । भेटों आला अति प्रीतीं । घातलें क्षितीं[८] लोटांगण ॥ ४७ ॥ देखतां श्रीरामाचें मुख । गुहका जाला परम हरिख । रामें आलिंगितां देख । द्वंद्वदुःख विसरला ॥ ४८ ॥ विसरला धर्म अधर्म । विसरला अधम उत्तम । सद्भावें देखतां श्रीराम । मरणजन्म विसरला ॥ ४९ ॥ विसरला कर्मकर्तेपण । विसरलासे मीतूंपण । देखतां श्रीरामाचे चरण । समाधान गुहकासी ॥ ५० ॥ करितां श्रीरामनामस्मरण । समूळ निर्दळे जन्ममरण । त्याचे देखतां श्रीचरण । बोळवण[९] भवभावा[१०] ॥ ५१ ॥ गुहकें आणिला फळसंभार । राम न करीच फळाहार । करोनि जळाचा जळाहार । केला सेजार[११] वृक्षमूळीं ॥ ५२ ॥ केला सीतेसी सेजार । निद्रा न करीच सौमित्र । सावधान अहोरात्र । सेवेसी तत्पर श्रीरामीं ॥ ५३ ॥ श्रीराम गुहक एकांतीं । संवाद करिती अति प्रीतीं । निमेषार्धें गेली राती । जाली प्राप्ती अरुणोदया ॥ ५४ ॥ श्रीराम म्हणे गुहकासी । वेगीं आणवीं नौकेसी । जाणें आहे परतीरासी । आजि वस्ती प्रयागीं ॥ ५५ ॥ सुमंतें सज्ज केला रथ । तयासी बोले श्रीरघुनाथ । आतां येथोनियां परत । जावें त्वरित अयोध्ये ॥ ५६ ॥ तमसातीरींहूनि रथ । परतवावा हा निश्चितार्थ । ब्राह्मणसंगाच्या त्यागार्थ । तुज येथपर्यंत आणिलें ॥ ५७ ॥

१ घोड्यांना. २ उदकप्राशन. ३ अयोध्येकडे. ४ विषयेच्छु. ५ या नांवाचा नरक. ६ संध्याकाळीं. ७ कोळ्यांचा राजा. ८ पृथ्वीवर. ९ पाठवणी. १० प्रापंचिक उपाधींना. ११ शय्या.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

ऐकोनि श्रीरामाचें वचन। सुमंत पडला मूर्च्छापन्न। दीर्घ आक्रंदें करी रुदन। राम सच्चिद्धन अंतरला ॥ ५८ ॥ रिता देखोनियां रथ। होईल अयोध्येसी आकांत। प्राण सांडील दशरथ। नको तेथें मज धाडूं ॥ ५९ ॥ तुज सांडोनि रघुनाथा। अयोध्येमाजि मज जातां। सुख न पवें गा सर्वथा। चरणीं माथा ठेविला ॥ ६० ॥ कृपा करीं श्रीरघुपती। मी येईन वनाप्रती। सेवा करीन अहोरात्रीं। विघ्नें रथगतीं वारीन ॥ ६१ ॥ श्रीराम म्हणे गा सुमंता। गुज सांगेन मी तुज आतां। तुज अयोध्येसी नवजातां। कैकेयी दशरथा पीडील ॥ ६२ ॥ रायें देखोनियां रथ। कोठें धाडिला रघुनाथ। माझेनि रागें दशरथ। करवील घात भरताचा ॥ ६३ ॥ पायीं जावें वनवासासी। सौक्षेपें रथ कां दिधला त्यासी। मारावया भरतासी। रायें रामासी पाठविलें ॥ ६४ ॥ भरता मारविलियापाठीं। राम बैसवावा राज्यपटीं। विकल्पें कैकेयीच्या पोटीं। तो तूं गेलियापाठीं सांडील ॥ ६५ ॥ रितें देखोनियां रथासी। राम जाला वनवासी। सत्य मानेल कैकेयीसी। या कार्यासी तूं जायीं ॥ ६६ ॥ माझी आज्ञा आहे ऐशी। तुवां जावें अयोध्येसी। दशरथ आणि कौसल्येसी। सुख उपदेशीं ब्राह्मणां ॥ ६७ ॥ वचन ऐकोनियां सांकडें। सुमंत संकोचला रडें। कांहीं न बोलवेचि पुढें। रथेंसीं सुरडे अति दुःखी ॥ ६८ ॥ श्रीराम बोलिला उत्तर। गुहका आणवीं न्यग्रोधक्षीर। वेगीं बांधावा जटाभार। रामसौमित्र वनवासी ॥ ६९ ॥ गुहकें आणोनियां क्षीर। जटामुकुट अति सुन्दर। दोघांचे बांधिले मनोहर। राम सौमित्र शोभती ॥ ७० ॥ आज्ञा देवोनि सुमंतासी। श्रीराम आला नावेपासीं। वेगीं बैसवोनि सौमित्रासी। सीता त्यापासीं बैसविली ॥ ७१ ॥ श्रीराम नावेसीं बैसतां। आक्रंदें गर्जे निषादमाता। आम्हां समस्तांच्या घाता। श्रीरघुनाथा करूं नको ॥ ७२ ॥ तुझी लीला अगाध गहन। नेणों श्रीराममहिमान। चरणीं उद्धरिले पाषाण। जडतारण श्रीराम ॥ ७३ ॥ नावेवरी आमुचें जिणें। ते उद्धरेल तुझेनि चरणें। मग आम्हीं काय करणें। येणें जाणें खुंटलें ॥ ७४ ॥

क्षालयामि तव पादपंकजं नाथ दारुदृषदोः किमंतरम्।
मानुषीकरणचूर्णमस्ति ते पादयोरिति कथा प्रथीयसी ॥७॥

ऐसे अगाध तुझे चरण। तुझे पदींचे रजःकण। लागतां जडाचें उद्धरण। त्यांचें क्षाळण करीन मी ॥ ७५ ॥ देखोनि निषादीचा भावो। संतोषला श्रीरामरावो। दीन उद्धरावया पहाहो। वनीं निर्वाहो श्रीरामा ॥ ७६ ॥ करावया दीनोद्धारण। श्रीरामाचें वनप्रयाण। एका जनार्दना शरण। भवतारण श्रीराम ॥ ७७ ॥ यापरी श्रीरामचंद्र। उतरोनियां गंगापार। श्रीराम सीता सौमित्र। तिघे एकत्र निघालीं ॥ ७८ ॥ पुढें पद्मपुष्करिणी। तेथें त्रिरात्री वसोनी। कमळकिंजल्क सेवूनी। प्रभातीं त्रिवेणी पावतीं जालीं ॥ ७९ ॥ राम लक्ष्मण सीता तिन्ही। देखोनियां श्रीत्रिवेणी। उल्हास गंगेच्या मनीं। श्रीरामचरणीं विनटावयां ॥ ८० ॥ गंगा म्हणे माझें भाग्य गहन। यमुना म्हणे मी अति पावन। सरस्वती म्हणे मी धन्य। श्रीरामचरणस्पर्शनीं ॥ ८१ ॥ लागतां श्रीरामाच्या चरणीं। आम्ही पावन तिघी जणी। म्हणोनि आनंदली त्रिवेणी। तिघी जणी सनाथ ॥ ८२ ॥ प्रयाग करोनियां पावन। सीतासमवेत लक्ष्मण। श्रीराम करी संध्यास्नान। जपविधान यथोक्तं ॥ ८३ ॥ श्रीराम लक्ष्मण सीतेसहित। भारद्वाजाश्रमा येत। ऋषीनें देखोनि श्रीरघुनाथ। आला धांवत सामोरा ॥ ८४ ॥ स्वयें श्रीराम आपण। केलें साष्टांगीं नमन। सौमित्रें घातलें लोटांगण। वंदिले चरण जानकीनें ॥ ८५ ॥ आला देखोनि रघुनाथ। आनंद भारद्वाजा अद्भुत। आजि माझें कुळ पुनीत। पितर तृप्त आजि माझे ॥ ८६ ॥

अद्य नः पितरस्तृप्ता अद्य नः पावितं कुलम्।
अद्य नो वंशजाः सर्वे यद्भवान् गृहमागतः ॥ ८ ॥

आजि माझा वंश धन्य। आजि माझा आश्रम पावन। आजि माझे याग संपूर्ण। सफळ ध्यान आजि माझें ॥ ८७ ॥ आजि माझे धन्य नयन।

१ मला मिळणार नाहीं. २ न जातां. ३ लोभानें. ४ संशय. ५ वटवृक्षाचा चीक. ६ जडांना उठविणारा. ७ कमलपुष्पांतील ततु. ८ लीन होण्यास, स्पर्शण्याला. ९ मोठें. १० यथासांग.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

आजि विश्रांतीस आलें समाधान । झालीं ध्येय ध्याता ध्यान संपन्न । श्रीरामचरण देखोनी॥ ८८ ॥ स्वभावें देखतां रघुपती । ज्ञानेंसीं विज्ञानाची प्राप्ती । आजि जीवशिवांसी विश्रांती । श्रीराममूर्ती देखोनी ॥ ८९ ॥ हर्षें करितां स्तवन । अश्रुपूर्ण जाले नयन । हृदयीं धरितां रघुनंदन । समाधान ऋषिवर्या ॥ ९० ॥ ऋषि पावोनि समाधान । केलें अर्घ्यपाद्यादि पूजन । फळें आणोनि संपूर्ण । दिधलें भोजन फळाहार ॥ ९१ ॥ ऋषि सद्भावें निर्मळ । श्रीरामीं अर्पितां फळ । देहगेह रामचि केवळ । सुफळीं सकळ श्रीराम ॥ ९२ ॥ ऐसी सर्वे समाधि असतां । धणी न पुरे ऋषीच्या चित्ता । श्रीरामसेवासुख सेवितां । समाधिअवस्था ते तुच्छ ॥ ९३ ॥ ऋषि म्हणे श्रीरामासी । दूरी वनवासा तूं कां जासी । प्रयाग तीर्थरावो सर्वे तीर्थांसी । चौदा वर्षें येथेंच राहें ॥ ९४ ॥ श्रीराम म्हणे ऋषिनाथा । मज निश्चयें येथें राहतां । अयोध्येच्या प्रजा समस्ता । देखोनि समीपता धांवतील ॥ ९५ ॥ चुकवोनि आलों मी द्विजगण । अवश्य येतील ते ब्राह्मण । स्त्रिया वृद्ध अति दीन । समस्त जन येतील ॥ ९६ ॥ येतील पुरोहित प्रधान । येतील नटनाटकगण । वारांगना येतील संपूर्ण । सेवक जाण येतील ॥ ९७ ॥ श्रीरामभेटी आणि प्रयागस्नान । पर्वकाळ अति पावन । जनक येईल धांवोन । सीतााभिगमन माहेरा ॥ ९८ ॥ सीता कां नेतां वनवासीं । इसी धाडावें माहेरासी । म्यां काय बोलावें जनकासी । वनवासासी मुख्य विघ्न ॥ ९९ ॥ येथें येईल दशरथ । तेव्हां भाक होईल व्यर्थ । यालागीं येथोनियां गुप्त । जावें दूर वनवासा ॥ १०० ॥ ऋषि म्हणे सत्य वचनार्थ । येथोनि चित्रकूट पर्वत । पुष्पीं फळीं प्रफुल्लित । त्या वनांत तुम्हीं राहावें ॥ १ ॥ तो पर्वत पुण्यशीळ । जननिवासापरीस निर्मळ । वृक्ष तेथें सदाफळ । सुख पावाल सर्वेही ॥ २ ॥ मार्गीं सिद्धवट विख्यात । त्यासी वंदावें भावयुक्त । त्याचेनि सफळित पुरुषार्थ । निर्विघ्नार्थ वंदावा ॥ ३ ॥ मग करोनि भारद्वाजा नमन । तिघीं जणीं केलें प्रयाण । ऋषि बोळवीत आपण । अर्ध योजन स्वयें आला ॥ ४ ॥ रामें ऋषीस राहवोनी । तिघें यमुनेतें उतरोनी । पाहत शोभा नवकाननीं । आलीं ठाकोनी सिद्धवटा ॥ ५ ॥ अनंत शाखा अति सरळी । तिघें आलीं तयातळीं । रामसौमित्रें वंदिला निढळीं । सीता वटातळीं स्वयें बोले ॥ ६ ॥ वनीं विजयी रघुनंदन । निर्विघ्न आमुचें पुनरागमन । जालिया देईन लक्ष गोदान । द्विजां भोजन लक्षसंख्या ॥ ७ ॥ वटीं वसे वटसावित्री । तिसी पूजीन अलंकारवस्त्रीं । ऐसें बोलोनि सीता सुन्दरी । नमस्कारी वटातें ॥ ८ ॥ तेथोनियां शीघ्रवत । पावलीं चित्रकूट पर्वत । शोभा देखोनि अत्यद्भुत । श्रीरघुनाथ सुखावला ॥ ९ ॥ पर्वत देखोनि शोभायमान । मार्गश्रमा जाली बोळवण । तीं तिघें जालीं सुखसंपन्न । येथें आपण राहावें ॥ ११० ॥ राम म्हणे सौमित्रासी । वेगीं रचावें आश्रमासी । आणोनि गैंजभग्नवृक्षांसी । पर्णशाळेसी निर्मावें ॥ ११ ॥ श्रीरामाचें निजसेजार । रचिलें अति मनोहर । दुसरी शाळा सविस्तर । ऋषीश्वररहिवासा ॥ १२ ॥ आणोनियां जळफळांसी । सौमित्र अर्पी सीतेपासीं । जागृत राहे अहर्निशीं । रामसेवेसी विनटला ॥ १३ ॥ मुखीं नित्य श्रीरामनाम । सर्वे इंद्रियीं श्रीराम कर्म । हृदयीं परमात्मा श्रीराम । भक्तोत्तम सौमित्र ॥ १४ ॥ श्रीरामसेवा अति निर्वाणी । लक्ष्मणासी फावली पूर्ण । एका जनार्दना शरण । भरतागमन अवधारा ॥ ११५ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे अयोध्याकांडे एकाकारटीकायां श्रीरामसीतालक्ष्मणचित्रकूटपर्वतगमनं नाम नवमोऽध्यायः ॥ ९ ॥ ओंव्या ॥ ११५ ॥ श्लोक ॥ ८ ॥

अध्याय दहावा

श्रीसीतारामाभ्यां नमः ॥ येरीकडे सुमंत गुहक । श्रीराम गेलियावरी देख । रामविरहें पावले दुःख । तोचि श्लोक अवधारा ॥ १ ॥

कथयित्वा तु दुःखार्तः सुमंत्रेण चिरं सह ।
गंगापारे गते रामे जगाम स्वपुरं गुहः ॥ १ ॥
भरद्वाजाभिगमनं प्रयागे च सभाजनम् ।
आगिरेर्गमनं तेषां तत्रस्थैरभिलक्षितम् ॥ २ ॥

१ अनुभवज्ञानाची. २ तृप्ति. ३ जवळपणा. ४ ब्राह्मणसंमुदाय. ५ वेश्या. ६ सीतेचें जाणें. ७ नगरापेक्षां. ८ या नांवाचा वटवृक्ष. ९ मस्तकानें. १० हत्तींनीं मोडलेले वृक्ष. ११ निश्चयाची, निर्धाराची.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

अनुज्ञातः सुमंत्रोथ योजयित्वा हयोत्तमान् ।
अयोध्यामेव नगरीं प्रययौ गाढदुर्मनाः ॥ ३ ॥

पुसोनि सुमंता गुहकासी । श्रीराम बैसोनि नावेंसी । गेलिया गंगापरतीरासी । लागली दोघांसी टकमक ॥ २ ॥ न लागतां पातया पातीं । दोघे श्रीरामासी पाहती । दृष्टी अंतरल्या रघुपती । दोघे पडती मूर्च्छित ॥ ३ ॥ जरी दोघे जाले सावधान । तरी रामविरहें अति दुर्मन । अश्रुधारा वाहती नयन । करिती स्मरण रामनामें ॥ ४ ॥ वाचे रामनामस्मरण । रामरूपीं जडले नयन । हृदयीं धरिलिया रघुनंदन । दुर्मन तें सुमन होय श्रीरामें ॥ ५ ॥ गुहक म्हणे सुमंतासी । राम भेटल्या एक निशीं । आम्हांसी अवस्था जाली ऐसी । मग अयोध्येसी काय होय ॥ ६ ॥ गुहकें धाडिलें दूतासी । श्रीराम कोणे वनवस्तीसी । स्थिर होईल वनप्रदेशीं । त्या वार्तेसी आणावया ॥ ७ ॥ गुहकें आपुलिया ग्रामासी । आदरें आणिलें सुमंतासी । दूत आणितील वार्तेसी । तोंवरी त्यासी राहविलें ॥ ८ ॥ दूत सांगती गुहकासी । श्रीराम जावोनि प्रयागासी । भेटी देवोनि भारद्वाजासी । स्थिरनिवासी चित्रकूटीं ॥ ९ ॥ सुमंतें ऐकोनि वार्ता । वेगीं संजोगोनी रथा । गुहका पुसोनि तत्त्वतां । होय निघता अयोध्येसी ॥ १० ॥

सुमंत्रमभिधावंतः शतशोऽथ सहस्रशः ।
क्व राम इति पृच्छंतः सूतमभ्यद्रवन्नराः ॥ ४ ॥

सुमंत आला देखोन । धांविनले नागरिक जन । सांग रामा कोणे स्थळीं सोडून । तुझें आगमन सुमंता ॥ ११ ॥ सुमंत एकासी सांगे गोष्टी । तंव आले शतसहस्र लक्षकोटी । रिता रथ देखोनि दृष्टीं । पडिले सृष्टीं मूर्च्छित ॥ १२ ॥ नरनारी आक्रंदत । सुमंत नव्हे हा कुमंत । वनीं सांडोनि रघुनाथ । आला येथें काळतोंडा ॥ १३ ॥ सुमंत आलियावरी । आकांत मांडिला नगरीं । चरफडित नरनारी । घरोघरीं आरडती ॥ १४ ॥ जळो याचें काळें मुख । आला नगरा द्यावया दुःख । निंदिती सकळ लोक सन्मुख । अधोमुख सुमंत ॥ १५ ॥ राजपत्न्या शतें सात । रिता देखोनियां रथ । त्याही सुमंतातें निंदीत । सोडोनि रघुनाथ हा कां आला ॥ १६ ॥ रामापासून उफराटा । मी कां आलों करंटा । दुःखें पिटीत ललाटा । धिक् धिक् अदृष्टा निर्लज्जा ॥ १७ ॥ श्रीराम सांडियापाठीं । निंद्य होइजे सकळ सृष्टीं । रामरूपीं चळंल्या दृष्टी । पापें कोटी पदोपदीं ॥ १८ ॥ निजनिंद्यत्वें स्वयें निंदीत । तेणेंचि दुःखें अति दुःखित । महाद्वारीं सोडून रथ । आला सुमंत राजभवना ॥ १९ ॥ पुत्रदुःखें दुःखी पूर्ण । गेली कळा हीनदीन । कृष्णवर्ण दिसे विवर्ण । अति उद्विग्न नृपनाथ ॥ २० ॥ एकला देखोनि सुमंत । म्हणे न येचि कां रघुनाथ । ऐसें बोलोनियां दशरथ । पडे मूर्च्छित धरणीये ॥ २१ ॥ मग सुमंतें आश्वासोन । राजा केला सावधान । आला सुमंत देखोन । काय आपण बोलत ॥ २२ ॥

राजा तु रजसा सूतं ध्वस्तांगं समुपस्थितम् ।
अश्रुपूर्णमुखं दीनमुवाच परमार्तवत् ॥ ५ ॥
क्व नु वत्स्यति धर्मात्मा वृक्षमूलमुपाश्रितः ।
किमुवाच वचो रामः किमुवाच च लक्ष्मणः ॥ ६ ॥
सुमंत्र वनमासाद्य किमुवाच च मैथिली ।
आसितं शयितं भुक्तं सूत रामस्य कीर्तय ॥ ७ ॥

राजा म्हणे सुमंतासी । कोणे ठायीं कोणे वस्तीसी । रामें काय बोलुनी तुजपासीं । तुज मजपासीं पाठविलें ॥ २३ ॥ काय बोलली सती सीता । श्रीरामाची अति पढियंता । लक्ष्मण काय जाला बोलता । ते समूळ कथा मज सांगें ॥ २४ ॥ सांडोनि राजभोग निजकांता । सांडोनियां मातापिता । वनीं सेवूं गेला रघुनाथा । त्या लक्ष्मणापरता धन्य नाहीं ॥ २५ ॥ धन्य ते सती सीता । धन्य तो लक्ष्मण भ्राता । धन्य जन्म श्रीरघुनाथा । पितृवचनार्था प्रतिपाळी ॥ २६ ॥ त्यांसी कोठें मिळालें अन्न । तिहीं कोठें केलें भोजन । अश्रुधारा गळती नयन । मूर्च्छापन्न पुनः पुनः ॥ २७ ॥ तिहीं कोठें केलें शयन । काय आस्तरण प्रावरण । कोणें केलें चरणसंवाहन । प्रतिबोधन कोणें केलें ॥ २८ ॥ त्यांची समूळ सांगें वार्ता । मी काय करूं रे सुमंता । धीर न

१ नावेमध्यें. २ गंगेच्या पलीकडे. ३ उद्विग्न. ४ एका रात्रींत. ५ कायम रहाणारा. ७ जोडून. ८ प्रारब्धा. ९ परावृत्त झाली असतां. १० तेजोहीन. ११ आंथरूण. १२ पांघरूण. १३ पाय रगडणें. १४ सकाळीं जागृत करणें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

धरवे माझ्या चित्ता । श्रीरघुनाथावांचोनी ॥ २९ ॥ श्रीराम सीता चालती चरणीं । हे म्यां विरुद्ध केली करणी । म्हणोनि गडबडां लोळे धरणीं । कैकेयीवैरिणीं वैर केलें ॥ ३० ॥ जंव जंव आठवी रघुनाथा । तंव तंव उंभड न धरवे चित्ता । धीर न धरवे सर्वथा । हृदयस्फोटता होऊं पाहे ॥ ३१ ॥ त्यांचे वनवासाची वार्ता । वेगीं सांग रे सुमंता । कांहीं सुख होईल चित्ता । श्रीरामकथा परिसोनी ॥ ३२ ॥

उत्तीर्णायां तु गंगायामहमामंत्र्य राघवम् ।
अनुज्ञातो निवृत्तोऽस्मि धार्मिकेण महात्मना ॥ ८ ॥

सुमंत सांगे रायासी । श्रीराम उतरतां गंगेसी । रथ पाठविला तुम्हापासीं । आपण वनवासी पदाभिगमनें[3] ॥ ३३ ॥ माझा पिता अति वृद्ध जाण । माझे वियोगें दुःखें अति निमग्न । सुमंता त्यासी द्यावें आश्वासन । शीघ्र आगमन नेमांतीं ॥ ३४ ॥ चवदा वर्षें वनवासांतीं । मी येईन शीघ्रगतीं । ऐसें सांगविलें तुम्हांप्रती । मजहातीं श्रीरामें ॥ ३५ ॥ त्यांचें वनवासलक्षण । तृणपर्णांचें आस्तरण । वल्कलांचें प्रावरण । प्रातर्बोधन पक्ष्यांचें ॥ ३६ ॥ तिंहीं नाहीं केलें भोजन । नाहीं केलें फळभक्षण । त्रिरात्रीं तिघें जण । केलें जळपान दिनांतीं ॥ ३७ ॥ ऐसी ऐकतांचि गोष्टी । राय मूर्च्छित पडिला सृष्टीं । दुःखें होत हृदयस्फोटी । ललाट पिटी आक्रोशें ॥ ३८ ॥ गळीं अडकला जेंवी मासा । तो जीवें न मरे चरफडी जैसा । दशरथाची तैसी दशा । मोहफांसीं विलपत ॥ ३९ ॥ सुमंता माझा पूर्वोपकार । तुज झाला असेल साचार । तरी रथीं घालोनि रघुवीर । आणीं सत्वर मजपासीं ॥ ४० ॥ श्रीराम भाक न सांडी सर्वथा । तो परतोनि न ये मागुता । मजचि वाहोनियां रथा । नेईं तत्त्वतां वनवासा ॥ ४१ ॥ काय करूं मी सुमंता । श्रीरामासी न देखतां । जीव जाईल तत्त्वतां । मज अति अवस्था होतसे ॥ ४२ ॥ श्रीरामासवें गेली गती । श्रीरामासवें गेली चित्तवृत्ती । श्रीरामासवें गेली मती । प्राण रामाप्रती जाऊं पाहे ॥ ४३ ॥ रामरूपीं जडले नयन । रामरूपीं जडलें मन । रामापासीं जातील प्राण । सत्य जाण सुमंता ॥ ४४ ॥ श्रीरामाचें रूप गुण । आठवितां मूर्च्छा आली पूर्ण । मूर्च्छेसवें गेला प्राण । रामस्मरण करीतचि ॥ ४५ ॥ राम राम करितां स्मरण । स्वयें दशरथें सांडिला प्राण । मन बुद्धि इंद्रियें जाण । रामार्पण तेणें केलीं ॥ ४६ ॥ आवडी श्रीरामीं धरोनि पोटीं । राम राम जपतां वाक्पुटीं । देह त्यजोनि श्रीरामसृष्टीं । रिघे वैकुंठीं दशरथ ॥ ४७ ॥ सप्रेम आवडीं धरिला राम । दृष्टी न सोडी श्रीरामप्रेम । वाचे स्मरतां श्रीरामनाम । मरणधर्म दशरथा ॥ ४८ ॥ मनीं राम ध्यानीं राम । नयनीं राम वदनीं राम । ऐसा स्मरतां राम राम । प्राणोत्क्रमण रायासी ॥ ४९ ॥ करितां श्रीरामाचें स्मरण । विस्मरणासी आलें स्मरण । तंव श्रीरामीं जडला प्राण । देहनिर्वाण दशरथा ॥ ५० ॥ श्रीरामाच्या अति प्रीतीं । देह त्यागिला भूपतीं । कौसल्या सुमित्रा जंव पाहती । तंव मरणप्राप्ती दशरथा ॥ ५१ ॥ जेंवी आरसा पालथा करितां । प्रतिरूप न दिसे पाहतां । तेंवी श्रीराम वना जातां । राया दशरथा निजमृत्यु ॥ ५२ ॥ निःशेष पाझरलिया घटजळ । जेंवी घटचंद्र लोपे तत्काळ । न देखतां श्रीराममुखकमळ । मरे तत्काळ दशरथ ॥ ५३ ॥ सूर्य पावतां अस्तमाना । जेंवी अंधकार कोंदे गगना । तेंवी अंतरतां रघुनंदना । पावला मरणा दशरथ ॥ ५४ ॥ रामविरहें उठाउठीं । दशरथें सांडिली सृष्टी । राणिवसां बोंब उठी । कपाळ पिटी कौसल्या ॥ ५५ ॥ राम धाडिला वनसंकटीं । राय रिघाला वैकुंठीं । कैकेयी पावली सुखसंतुष्टी । राज्यपटीं ते बैसो ॥ ५६ ॥ वना दवडिला श्रीरघुनाथ । निःशेष निमाला दशरथ । कैकेयीचा मनोरथ । सुखस्वार्थे पावला ॥ ५७ ॥ राज्यलोभें परम दुःख । त्याचा कैकेयीस हरिख । क्षुरें अभिषेका समस्तक । राज्यसुख भोगावया ॥ ५८ ॥ पतिअंतकाळीं काळें वस्त्र । त्यावरी मस्तकीं धरा छत्र । शीसें बोडोनि साचार । युग्मचामरें ढाळावीं ॥ ५९ ॥ पतीस आगीं घालोनि आधीं । कैकेयी बैसवावी गजस्कंधीं । हांका बोंबांचिये पैं

१ जमिनीवर. २ गहिंवर. ३ पायीं चालणें. ४ खरोखर. ५ प्राणांतिक क्लेश. ६ वाचेनें. ७ मरण. ८ प्रतिबिंब. ९ घागरींतील पाण्यांत पडलेलें चंद्राचें प्रतिबिंब. १० जनानखान्यांत. ११ वस्तऱ्यानें. १२ डोकें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

नादीं । राज्यपदीं अभिषेका ॥ ६० ॥ पुत्र भोंवंडूनी दोन्ही । कैकेयी बैसवावी सिंहासनीं । रायासी पिंडदान देऊनी । राजभवनीं कैकेयी ॥ ६१ ॥ रायासी करोनि घटस्फोट । कैकेयीस विस्तारावें ताट । बत्तिसा वाटियांचें उद्धट । चोखट षड्रसीं ॥ ६२ ॥ रायासी देतां तिळोदक । गोत्रकुटुंबासी दुःख । तंव तंव कैकेयीस हरिख । राज्यसुख भोगावया ॥ ६३ ॥ असो हें कैकेयीचें कथन । वना गेला रघुनंदन । राजा पावलासे निधन । सहगमन करीन मी ॥ ६४ ॥ कैकेयी राहील राज्यभोगासी । मी जाईन पतीसरसी । क्षणार्ध राहतां वैधव्यासीं । पापरासी पदोपदीं ॥ ६५ ॥ पति जळतां धडधडां । आगीं न रिघती रांडवा मूढा । तोडावी गळसरी फोडावा चुडा । सुखभोग पुढां तो ऐका ॥ ६६ ॥ काजळ कुंकू नाहीं चंदन । दावूं नये काळें वदन । मासमासासी मुंडन । अति दंडण लाजेचें ॥ ६७ ॥ विधवा शोभनीं अशोभन । जीतप्रेत ते विधवा जाण । विधवा मुख्य अपशकुन । सुख कोण जिण्याचें ॥ ६८ ॥ केवळ देहलोभासाठीं । जे जे बैसे रांड पटीं । स्वप्नीं सुखासी नाहीं भेटी । दुःखकोटी अनिवार ॥ ६९ ॥ वैधव्याचें महादुःख । सोसूं शके कैकेयी एक । भोगावया राज्यसुख । अति कौतुक वैधव्या ॥ ७० ॥ वैधव्याचें दुःख दारुण । तें मी न साहें अर्धक्षण । करितां राजदेहदहन । सहगमन करीन मी ॥ ७१ ॥ देखोनि कौसल्येचें रुदन । राजपत्न्या घेती वदन । दुःखें तोडिती केश कान । मूर्च्छापन्न पैं एकी ॥ ७२ ॥ एकी कपाळ स्वयें घेती । एकी वक्षःस्थळ पिटिती । एकी अति दुःखें पडती । एकी रडती अति शोकें ॥ ७३ ॥ एक दुःखवियोग रघुनाथा । दुसरें मरण राया दशरथा । तिसरें वैधव्य आलें माथां । मूळ अनर्था कैकेयी ॥ ७४ ॥ भोगावया राज्यपटा । कैकेयीची वरदनिष्ठा । तिघां केलिया तीन वाटा । या मुख्य चेष्टा मंथरेच्या ॥ ७५ ॥ श्रीरामासी वनप्रयाण । दशरथासी त्वरित मरण । यासी मंथरा मुख्य कारण । तिचें कान नाक छेदावें ॥ ७६ ॥ राजपत्न्या अति प्रबळ । दुःखें करिती हलकल्लोळ । आले नागरिक सकळ । अति कोलाहल नगरांत ॥ ७७ ॥ आक्रंदोनि नरनारी । शोक करिती घरोघरीं । बोंब पडली राजद्वारीं । सेनानी मंत्री चरफडती ॥ ७८ ॥ श्रीराम घालितां बाहेरी । अवदसा आली नगराभीतरीं । राजा निमाला दुःखेंकरीं । घरोघरीं आकांत ॥ ७९ ॥ कैकेयीचें काळें तोंड । तिणें वाढविलें वरदबंड । तीस मंथरा मिळोनि लंड । दुःख वितंड वाढविलें ॥ ८० ॥ जिचेनि निमाला निजकांत । ते कैकेयीचा करावा घात । मंथरा घालोनि चुनखडियांत । राज्यीं रघुनाथ अभिषेकावा ॥ ८१ ॥ वेगीं लक्ष्मण आणा येथ । तो साधील सर्व कार्यार्थ । ऐसें बोलती जन समस्त । तळमळीत अति दुःखें ॥ ८२ ॥ निर्लज्ज कैकेयीचा वृत्तांत । ना राम ना दशरथ । शेखीं ईसी त्यजील भरत । वृथा अनर्थ इणें केला ॥ ८३ ॥ भरत स्वधर्मशीळ सात्त्विक । सप्रेम श्रीरामाचा सेवक । तो न पाहे इचें काळें मुख । त्यासही दुःख इनें दिधलें ॥ ८४ ॥ कैकेयीनें केलें जें चरित्र । भरत मानील अपवित्र । पति निमाला त्यजील पुत्र । सखे सावत्र दुःखी केले ॥ ८५ ॥ श्रीराम गेला वनांतरीं । हे वार्ता ऐकिल्यावरी । भरत न राहेल क्षणभरी । तोही रानभरी इनें केला ॥ ८६ ॥ जळो तिचें काळें मुख । निजपति मारिला निःशेख । पुत्र दुराविले निर्दोख । जगासी दुःख इचेनि ॥ ८७ ॥ कैकेयी पाहे ज्यां समोर । ते म्हणती झांकीं मुख अपवित्र । सन्मुख थुंकती सर्वत्र । करिती मरमर नरनारी ॥ ८८ ॥ अवो रांडे अवो मूढे । अवो कैकेयी काळतोंडे । म्हणोनि तिचे नांवें फोडिती धोंडे । अति उदंड निंदिती ॥ ८९ ॥ कैकेयी पावली परम दुःख । जगीं दाखवूं न शके मुख । दिवाभीताऐसी देख । लपे निःशंक अंधारीं ॥ ९० ॥ राजगृहीं कोलाहल । नरनारी दुःखी प्रबळ । तेथें पावले सुहृद सकळ । आले तत्काळ ऋषिवर्य ॥ ९१ ॥

मार्कंडेयोऽथ मौद्गल्यो वामदेवश्च कश्यपः ।
कात्यायनस्तु जाबालिर्गौतमश्च महायशाः ॥ ९ ॥

१ वाढावें. २ मृत्यु. ३ शुभकार्यांत. ४ सेनानायक. ५ प्रधान. ६ मृत्यु पावला. ७ दुःखेंकरून. ८ पुष्कळ.

९ घुबडासारखी.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

दशरथें थोर थोर । नगरीं राहविले ऋषीश्वर । ते समस्त आले सत्वर । अति पवित्र ते ऐका ॥ ९२ ॥ मार्कंडेय मौद्गल्य उत्तम । कात्यायन जाबालि गौतम । कश्यप वामदेव परम । पवित्र नामें जयांचीं ॥ ९३ ॥ ते समस्तही ऋषी । वेगीं आले राजसभेसी । प्रधान आले तयांपाशीं । राजदेहासी दहनार्थ ॥ ९४ ॥ एक म्हणती करावें दहन । एक म्हणती पुत्रेंवीण । कोण देईल दाहो जीवन । अधिकार पूर्ण पुत्रासी ॥ ९५ ॥ रायाचे जे प्रधान । ते राजपुत्रासमान । निःसंतानियाचें दहन । अयोग्य प्रधान सपुत्रिका ॥ ९६ ॥ सिद्ध असतां धर्मपत्नी । तीस योग्यता पतिदहनीं । हा अधिकार वंध्येलागोनी । नाहीं पुत्रजननीस पैं योग्य ॥ ९७ ॥ ऋषी बोलती सज्ञान । येथें वसिष्ठाचें प्राधान्य । तो कांहीं न बोले वचन । राजदहनसंस्कारा[1] ॥ ९८ ॥ बुद्धिवंत बोलती गाढे । कैकेयीपुत्र येईल पुढें । तंव राजदेहा पडती किडे । दहन रोकडें करावें ॥ ९९ ॥ ऐसे ऋषींचे अनुवाद[2] । करिती संवाद-विवाद । वसिष्ठमर्यादा अगाध । कार्यावबोध तो जाणे ॥ १०० ॥ जाणे कर्मधर्मज्ञान । जाणे वेदशास्त्रविधान । जाणे ब्रह्मसमाधान । त्यासमान आन नाहीं ॥ १ ॥ जयाच्या वचनासाठीं । सूर्यमंडळीं तपे छाटी । त्याचे ज्ञानाची अगाध गोष्टी । दुजा सृष्टीं असेना ॥ २ ॥ तेणें वसिष्ठें येवोनि आपण । तैलद्रोणींत राजा घालोन । जेणें देह निर्विकार जाण । केलें रक्षण अति यत्नें ॥ ३ ॥ शीघ्र भरताचें आगमन । यदर्थीं सुमंत अति सज्ञान । वसिष्ठें देवोनि सन्मान । त्वरें प्रयाण करवित ॥ ४ ॥ सुमंता तुवां येचि काळीं । तूं आप्त एक रायाजवळी । भरत आणावा तत्काळीं । मायामातुळीं जो आहे ॥ ५ ॥ शीघ्र बैसोनियां रथासीं । जावें गिरिव्रज नगरासी । भेटोनि केकय भूपतीसी । भरत रातोरातीं आणावा ॥ ६ ॥ करोनि वसिष्ठासी नमन । सुमंतें शीघ्र केलें गमन । मार्गीं आठवितां श्रीरामाचे गुण । करी रुदन पुनः पुनः ॥ ७ ॥ श्रीरामाचें रूप गुण । आठवितां विरह पूर्ण । एका जनार्दना शरण । पुढील निरूपण अवधारा ॥ ८ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे अयोध्याकांडे एकाकारटीकायां दशरथप्राणोत्क्रमणं नाम दशमोऽध्यायः ॥ ओंव्या ॥ १०८ ॥ श्लोक ॥ ९ ॥

१ राजाच्या देहसंस्कारसंबंधीं. २ बोलणीं. ३ धोब्याच्या विटाळाचें. ४ जोडे. ५ रामाचें गमन. ६ तीव्रतेनें.

अध्याय अकरावा

॥ श्रीरामचंद्राय नमः ॥ श्रीरामाचें वनप्रयाण । ते काळींचें निर्लोभपण । सुमंत आठवी आपण । श्रीरामीं मन दृढ जडलें ॥ १ ॥ त्या त्यागाची निजगती । दावोनि गेला श्रीरघुपती । ते सुमंत स्मरे अति प्रीतीं । त्यागस्थिती ते ऐसी ॥ २ ॥ असत्य त्यजिजे जेंवी पवित्रें । तेंवी त्यागी राज्यालंकार वस्त्रें । वना निघतां श्रीरामचंद्रें । केलें वल्कलांबर परिधान ॥ ३ ॥ जेंवी निंदा त्यजिजे साधुसंतीं । तेंवी राज्यवैभवसंपत्ती । सर्वेही त्यजोनि रघुपती । निघे वनाप्रती वल्कलांबरीं ॥ ४ ॥ रजकस्पर्शाचें[3] जीवन । जेंवी नातळती साधुजन । तेंवी सांडोनि राज्यादि धनमान । निघे रघुनंदन वनवासा ॥ ५ ॥ राज्यांतील अणुप्रमाण । श्रीराम कांहींच नेघे जाण । त्यजोनियां पादत्राण[4] । निघाला आपण वनवासा ॥ ६ ॥ देखोनि श्रीरामनिर्याण[5] । त्यापूर्वींच सीता लक्ष्मण । करोनि वल्कलें परिधान । वनाभिगमनीं उल्हासी ॥ ७ ॥ जंव जंव तपे सूर्य तीव्रतां[6] । तंव तंव कमळीं शोभा अधिकता । तेंवी एकाकी राम वना जातां । लक्ष्मण सीता उल्हासी ॥ ८ ॥ देखोनि पूर्णिमा-पूर्णचंद्र । चकोरां आल्हाद अपार । तेंवी वना निघतां श्रीरामचंद्र । सीता सौमित्र उल्हासी ॥ ९ ॥ एकाकी राम वना जातां । सफळ सेवा आमची आतां । येणें भावार्थें लक्ष्मण सीता । उल्हासता वना गेलीं ॥ १० ॥ जेंचि रघुनाथाचें गमन । तेंचि दशरथाचें प्राणोत्क्रमण । स्थळींचें आटतां जीवन[7] । प्रतिबिंब पूर्ण हारपे ॥ ११ ॥ पुढोनि नेतांचि दर्पण[8] । स्वयें हारपे प्रतिवदन[9] । तेंवी वना जातां रघुनंदन । दशरथें प्राण सोडिला ॥ १२ ॥ निःशेष आटतां जळ । मीनें[10] मरे न लागतां पळ । तैसा राम वना जातां केवळ । दशरथें तत्काळ प्राण सांडिला ॥ १३ ॥ श्रीराम

७ उदक. ८ आरसा. ९ मुखाचें प्रतिबिंब. १० मासा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

जगाचें जीवन। तोचि दशरथा मृत्युकारण। राम राम म्हणतां जाण। रायें निजप्राण सांडिला ॥ १४ ॥ राम प्रवेशतां वनस्थळीं। भरत शत्रुघ्न मायामातुळीं। तेही जरी असते जवळी। जाते तत्काळीं वनवासा ॥ १५ ॥ मीच अभाग्यें अभाग्य पूर्ण। श्रीरामनिजसेवा सांडून। कां अयोध्ये आलों परतोन। म्हणोन रुदन करी मार्गीं ॥ १६ ॥ श्रीरामसेवा होय प्राप्त। त्याचें भाग्य अति समर्थ। मी अभागी घेवोनि आलों रथ। म्हणोनि रडत मार्ग क्रमी ॥ १७ ॥ पुढील कथानुसंधान। मातुळीं भरत शत्रुघ्न। भरतासी जालें दुष्ट स्वप्न। तेंही कथन अवधारा ॥ १८ ॥ भरतें मातुळीं देखिलें स्वप्न। अंशिरीं[1] तैलाभ्यंजन। भरत स्वप्नलक्षणाचें जाणे चिन्ह। आक्रंदें रुदन मांडिलें ॥ १९ ॥ गजबजोन आला मातुळ। पुसे व्यर्थ रुदना काय मूळें[2]। येरु म्हणे अति प्रबळ। दुःखमूळ आम्हां झालें ॥ २० ॥ जें म्यां देखिलें आजि स्वप्न। त्याचें आहे ऐसें लक्षण। आम्हां पांचांमाजि एक जण। निश्चयें मरण पावेल ॥ २१ ॥ माझें स्वप्न नव्हे व्यर्थ। राजा अथवा रघुनाथ। लक्ष्मण शत्रुघ्न कां मी भरत। एकाचा जीवघात होईल ॥ २२ ॥ आणि निजसज्जनांची भेटी। बहुकाळ होईल तुटी। बोलतां बाष्प दाटे कंठीं। पडिला सृष्टीं मूर्च्छित ॥ २३ ॥ कैसेनि राम देखेन दृष्टीं। आक्रंदें हांक दिधली मोठी। केंवी दशरथेंसीं होईल भेटी। म्हणोनि पिटी ललाट आक्रंदोन ॥ २४ ॥ मातुळ म्हणे सुमुहूर्तें[3]। पाहोनि तुज पाठवूं तेथ। येरु म्हणे मृत्यु आला निश्चित। सुमुहूर्त कुमुहूर्त कवणातें ॥ २५ ॥ तंव अयोध्येसी श्रीवसिष्ठ। कुळगुरु अति वरिष्ठ। अर्थ परमार्थ जाणे श्रेष्ठ। विचार चोखट[4] तेणें केला ॥ २६ ॥ भरतासी राज्याभिषिंचन। न करितां नव्हे राजदहन। यालागीं भरताचें आगमन। अति त्वरेनें पाहतसे ॥ २७ ॥ न सांगावें राजमरण। विशेषें श्रीरामाचें गमन। अवचटें ऐकतांचि जाण। तत्काळ प्राण सांडील ॥ २८ ॥ उत्तम वस्त्रें अलंकारांसी। देवोनि सुमंत प्रधानासी। त्वरेनें भेटावें भरतासी। अति

शीघ्रतेसीं आणावें ॥ २९ ॥ भरतासी रसिक वचनीं। मातुळ करी संबोखणी। तंव सुमंत पावला तेच क्षणीं। अयोध्यापाटणीं कुशल सर्वां ॥ ३० ॥ भरतें पाहिलें सुमंताकडे। तुझी शोभा कां क्षीण पडे। हृदयीं दुःख दाटलें गाढें। तें मुखापुढें दिसतसे ॥ ३१ ॥ अश्रुपूर्ण तुझे नयन। मार्गीं आलासी करीत रुदन। वार्ता सांगसी लज्जायमान। हीन दीन मुख तुझें ॥ ३२ ॥ अंगुष्ठ धरूनि मस्तकावरी। तुज सुख नाहीं तिळभरी। बुडालासी दुःखसागरीं। चांचरी वैखरी दुःखाभिभूत ॥ ३३ ॥ असो तुझ्या दुःखाची कथा। मजचि जाणें आहे आतां। विलंब करूं नये सर्वथा। शत्रुघ्नेंसीं रथारूढ जाला ॥ ३४ ॥ रथ प्रेरिला त्वरेंसीं। ठाकोनि आले अयोध्येसी। अयोध्या पाहतां चौपासीं। दुःख भरतासी ओसंडलें ॥ ३५ ॥ जेथें श्रियेसीं श्रीरामनिवास। जेथें दशरथ वसे क्षितीश। ते अयोध्या दिसे उद्वस। जैसें कां ओस शकुंतनीड ॥ ३६ ॥ पाहतां अयोध्येची शोभा। आरक्त धुंई[9] दाटली नभा। रोहिणी मृग भेदोनि वृषभा। ग्रहचक्रीं उभा शनि भौम वक्र ॥ ३७ ॥ अयोध्यामंडळीं असाधारण। क्रूर भासती ग्रहगण। तेणें अयोध्येचें लक्षण। अति विलक्षण दुर्भगत्वें ॥ ३८ ॥ तंव राजद्वारीं छत्रभंग। मृत्युप्राय लोकलिंग[10]। राजभवनीं अति उद्वेग[11]। सौभाग्यभंग राजपत्न्यां ॥ ३९ ॥ पुढें पाहे राजभवनीं। राजा देखिला तैलद्रोणीं। थोर गजबजला मनीं। अश्रु नयनीं लोटले ॥ ४० ॥ राजा गेला सांडोनि सृष्टी। आतां श्रीरामीं घालीन मिठी। म्हणोनि धांवला उठाउठीं। तंव तोही दृष्टी दिसेना ॥ ४१ ॥ मंत्री गुह्य सांगे कानीं। कैकेयीनें राम दवडिला वनीं। हे मुख्यत्वें मंथरेची करणी। सीता चरणीं धाडिली वना ॥ ४२ ॥ मग आक्रंदें दिधली हांक। श्रीरामा दाखवीं रे निजमुख। माझें सुखाचें तूं निजसुख। मज वंचोनि देख गेलासी ॥ ४३ ॥ म्यां सांडोनियां तुझी संगती। गेलों मायामातुळाप्रती। हे देखोनि माझी अभक्ती। मज तुवां निश्चितीं त्यागिलें ॥ ४४ ॥ सांडोनि

१ डोकें नसलेल्याला. २ कारण. ३ चांगला. ४ शांतवन. ५ मोठें. ६ वाणी. ७ पृथ्वीपति. ८ पक्ष्याचें घरटें.

९ धुकें. १० लोकांचें चिन्ह. ११ खेद.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

तुझा निजसंग । मायामातुळीं भोगितां भोग । तेणें तुजसी जाला वियोग । मी परम अभाग्य श्रीरामा ॥ ४५ ॥ जितुकी विषयांची आसक्ती । तितुकीं विघ्नें श्रीरामप्राप्ती । विषय तेचि भवबंधनप्राप्ती । नरकगती निजविषयें ॥ ४६ ॥ विष विषय समानस्थिती । परंतु विषया अधिक शक्ती । विष भक्षिल्या एकदां मरती । जन्ममरणपंक्ती विषयेंचि ॥ ४७ ॥ विषयांचे जे विषयभोग । तोचि इंद्रादिकां पदभंग । विषय तोचि मुख्य क्षयरोग । नित्य आघात तो विषय ॥ ४८ ॥ असो इतरांची इतर गती । मीच ठकलों विषयासक्तीं । राम अंतरला हातोहातीं । मायामातुळस्थितीं विषयत्वें ॥ ४९ ॥ मायामातुळविषयस्थिती । श्रीरामें त्यजिली निश्चितीं । जेथवरी विषयप्रीती । त्या रामप्राप्ती कदा न घडे ॥ ५० ॥ जेथवरी मानाभिमान । जयासी ज्ञानगर्व गहन । त्यासी न भेटती श्रीरामचरण । प्रत्यक्ष प्रमाण मज घडलें ॥ ५१ ॥ मज घडलें अति दूषण । अंगीं आदळलें लांछन । जळो माझें बंधुपण । श्रीरामचरण अंतरले ॥ ५२ ॥ जो मी होतों निजआत्मबंधु । तो मी जालों अति अबंधु । राम अंतरला कृपासिंधु । मी भाग्यमंदु अतिदुःखी ॥५३॥ कैकेयी अविद्येचा बाधु । बंधु तें केले अबंधु । लाविला सापत्नसंबंधु । राम कृपासिंधु अंतरला ॥ ५४ ॥ अंतरला सुखावबोधु । अंतरला स्वानंदकंदु । अंतरला निजात्मबंधु । राम परमानंदु अंतरला ॥ ५५ ॥ दशरथें केलें परलोकप्रयाण[३] । श्रीरामासवें दिधला प्राण । मी वांचलों असें पाषाण । अति कठिण उलंडेना[४] ॥ ५६ ॥ वना जातां श्रीरामरावो । राजा गेला सांडूनि देहो । मी महापातकी उरलों पहाहो । देहमोहो[५] छेदवेना ॥ ५७ ॥ दूरी जातां रघुनाथ । तत्काळ देह त्यागीत दशरथ । मी पापी उरलों भरत । अद्यापि मृत्यु मज न ये ॥ ५८ ॥ दूरी जातां श्रीरामासी । दशरथें सांडिलें देहासी । मी उरलों पापराशी । द्वंद्वदुःखासी भोगावया ॥ ५९ ॥ अद्यापि मज न ये मरण । तरी मृत्यु निमाला आपण । काळाचें जालें काळें वदन । माझें देहबंधन छेदवेना ॥ ६० ॥ रामविरहें घडफुडा । मृत्यु निमाला बापुडा । मी राहिलों काळाचा कांकडा । दुःखाचा हुर्डा अतिदुःखी ॥ ६१ ॥ श्रीराम वना जातां जाण । मृत्यूनें सांडिला आपुला प्राण । आतां मजला मारील कोण । मी पापी पूर्ण उरलोंसें ॥ ६२ ॥ जितां जीववेना रामाविण । काळ निमाला न ये मरण । माझें अतिशयें दुःख दारुण । निवारी कोण रघुनाथा ॥ ६३ ॥ ऐशी बोलत बोलतां बोली । धरणीवरी अंग घाली । श्रीराम माझी निजमाउली । केउती गेली चुकवोनी ॥ ६४ ॥ श्रीरामा मजला देईं भेटी । सांगेन जीवींच्या गुह्यगोष्टी । श्रीरामचरण न देखें दृष्टीं । म्हणोनि पिटी ललाट ॥ ६५ ॥ राम माझा निजात्मा । राम माझा जीवात्मा । राम माझा परमात्मा । तो कां आम्हां विसरला ॥ ६६ ॥ केउता गेलासी श्रीरामा । भेटी देइंजे मेघश्यामा । धांव पाव पुरुषोत्तमा । माझ्या भवभ्रमा निवारीं ॥ ६७ ॥ श्रीरामा धांव पाव तांतडी । वेगीं पावें लवडसवडी । मजलागीं घालोनि उडी । माझ्या दुःखकोडी निवारीं ॥ ६८ ॥ राघवा वेगें येरे येरे । मजलागीं तूं कडिये घेरे । मी तुझें लडिवाळ कीं रे । अतिदुःखभरें पीडिलों ॥ ६९ ॥ राम माझी गतीची गती । राम माझी स्थितीची स्थिती । राम माझी मुक्तीची मुक्ती । तो हातोहातीं अंतरला ॥ ७० ॥ श्रीरामसंगति अति गोड । लक्ष्मण परिपाकें अति सुरवाड[११] । मी रामसंगतीवांचून मूढ । उरलों कांकडेंमूग[१२] जैसा ॥ ७१ ॥ रघुनाथाचा निजसांगाती । धन्य लक्ष्मण त्रिजगतीं । मी मायामातुळसंगतीं । दुःखावर्ती अति दुःखी ॥ ७२ ॥ लक्ष्मण बंधुत्वें अति सभाग्य । मी बंधुत्वें अति अभाग्य । सकळ दुःखीं व्यापिलें अंग । तरी अंगभंग नव्हे माझा ॥ ७३ ॥ तुंबिणीच्या[१३] फळाची स्थिती । एका होती यंत्रीपात्र[१४] हातीं । एका दुस्तरीं तारक होती । एक प्राशिती रुधिरातें ॥ ७४ ॥ एक शुद्धसंगती । मधुरवचनीं देती विश्रांती । तैसी अशुचिही गती । संगप्राप्तिपरिपाक ॥ ७५ ॥ लक्ष्मण शुद्धसंगती । तारक विश्रांती त्रिजगतीं । मी मायामातुळस्थिती । दुःखप्राप्ती रुधिरप्राय ॥ ७६ ॥ राम

१ आपल्या स्थानापासून अधोगति. २ अज्ञानाचा. ३ परलोकगमन. ४ फुटत नाही. ५ देहावरील प्रेम. ६ खरा. ७ मृत्यु पावला. ८ बुरुज. ९ कोठें. १० लौकर. ११ अति सुखदायक. १२ मुगांतला चहाड. १३ भोपळीच्या. १४ भिक्षापात्र.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

जीवशिवांचा गोसावी । राम सुखानंदजान्हवी । कैकेयीनें अवघी कोरडी केली ॥ ७७ ॥ राम मज निजीं निजवी । राम जीवेंवीण जीववी । राम माझी स्वानंदपदवी । तें कैकेयीनें अवघी वंचिली मेदें ॥ ७८ ॥ राम माझें मुख्य मुदल । राम माझें नित्य भांडवल । राम माझें निजबळ । तें कैकेयीनें केवळ मेदें वंचिलें ॥ ७९ ॥ राम माझें निजजीवन । राम माझें निजअंजन । राम माझें निजनिधान । तें कैकेयीनें चोरोन नेलें मेदें ॥ ८० ॥ आम्ही सखे निजात्मबंधु । ते कैकेयीनें केला व्यर्थ भेदु । मुख्यत्वें सापत्नविरोधु । मंथरें सुबुद्धु वाढविला ॥ ८१ ॥ भोळी कैकेयी बापुडी । मंथरें बुद्धी दिधली कुडी । श्रीराम केला देशोधडी । अयोध्या रोकडी घाली दुःखीं ॥ ८२ ॥ तिच्या करीन मी घातासी । म्हणोनि धाविन्नला वेगेंसीं । मंथरा धरोनि आणिली केशीं । क्रोधें हातवसी[3] खँर्गातें ॥ ८३ ॥ इचेनि वनवासी रघुनाथ । इचेनि निमाला दशरथ । इचेनि अयोध्येसी आकांत । जगा दुःखावर्त इचेनि ॥ ८४ ॥ सवती-मत्सराचें बंड । इणें वाढविलें प्रचंड । इचेनि कैकेयीचें काळें तोंड । इसी दुखंड करीन मी ॥ ८५ ॥ हे सूर्यवंशासी दुःखाची आगी । हे सख्यां सुहृदां योगभंगी । इचेनि कैकेयी निंद्य जगीं । ते मी वेगीं छेदीन ॥ ८६ ॥ इणें चरण-चालीं दवडिली सीता । इचेनि अंतरला लक्ष्मण भ्राता । इणें दशरथ गिळिला पिता । ते मी आतां छेदीन ॥ ८७ ॥ इणें केलें थोर अनर्था । इचेनि वैधव्य मायेच्या माथां । मजही घातलें दुःखावर्ता । ते मी आतां छेदीन ॥ ८८ ॥ इचेनि आम्हां रामीं तुटी । इचेनि आम्ही पोरें पोरटीं । इचेनि आम्ही दीन सृष्टीं । ते मी उठाउठीं वधीन ॥ ८९ ॥ तिचा करावया प्राणान्त । भरत सवेंसीं उद्यत । वसिष्ठें धांवोनि धरिला हात । म्हणे स्त्रीघात करूं नये ॥ ९० ॥ करूं नये स्त्रियेच्या घाता । उपेक्षूं नये निजमाता । मूर्ख म्हणों नये पिता । जरी तत्त्वतां अपंडित ॥ ९१ ॥ मानों नये द्विजाचा विटाळ । अतीत दवडूं नये भुकाळ । साधूसी करूं नये छळ । नये करूं शस्त्रकल्लोळ स्त्रियेसी ॥ ९२ ॥ गो ब्राह्मण स्त्री बंधू । वधायोग्य केलिया अपराधू । तरी करूं नये यांचा वधू । तूं भरता प्रसिद्धु विवेकी ॥ ९३ ॥ गुरुवाक्य तुळं-घावें सर्वथा । नावरेचि क्रोधावस्था । मंथरे हाणितल्या लाथा । अति निघता निष्ठुरत्वें ॥ ९४ ॥ लाथेसरसी तळीं पडे । निघातें तिचा मांज मोडे । शरीर तीं ठायीं वांकडें । तेणें त्रिवक्रा पडे नाम तीस ॥ ९५ ॥ जिणोनियां राक्षसांसी । राम आलिया अयोध्येसी । मंथरा लागेल पायांसी । मज दशा ऐशी श्रीरामस्वामी ॥ ९६ ॥ राम म्हणेल तुज उजू करितां । विषम वाटेल बंधु भरता । स्वभावें मज मथुरे जातां । तुझ्या मनोगता मी करीन ॥ ९७ ॥ ते राम जपे अहर्निशीं । तेणें सुवा-सिक आणिलें चंदनासी । कृष्णें चर्चोनियां निजां-गासी । कुब्जा नीचदासी उद्धरिली ॥ ९८ ॥ हें बोलिलों प्रसंगता । मंथरा ते कुब्जा तत्त्वतां । पुढें काय वर्तलें भरता । तेही कथा अवधारा ॥ ९९ ॥ वसिष्ठ बोलिला वचन । करितां राज्या-भिषिंचन । करूं न ये राजदहन । राज्याभिषिंचन तुज करूं ॥ १०० ॥ ऐसें ऐकतांचि वचन । भर-तासी चालिलें रुदन । दुःखभरितें आलें दारुण । तत्काळ प्राण त्यजूं पाहे ॥ १ ॥ श्रीराम गेलिया-पाठीं । जरी मी बैसेन राज्यपटीं । अवघ्या ब्रह्म-हत्या ज्या सृष्टीं । त्या माझ्या ललाटीं निक्षेपोत ॥ २ ॥ वना गेलिया रघुनाथा । पट्टाभिषिंचन होय भरता । महादोषाच्या ज्या ज्या वार्ता । त्या त्या समस्ता म्यां केल्या ॥ ३ ॥ रामचंद्र गेलिया वना । जरी मी घेईन अभिषिंचना । तरी शूद्र भोगी द्विजविधवांगना । त्या गर्भस्थाना मी जाय ॥ ४ ॥ सकळ रजस्वलेचें रुधिर । तेणें अभिषेका माझें शरीर । परी राज्याभिषेकाचें नीर[12] । तें मी अणुमात्र स्पर्शेंना ॥ ५ ॥ श्रीरामाची राजधानी । ते जाणा माझी जननी । ते जैं भोगिजे अभिषिं-चनीं । तैं मातृगमनी मी जालों ॥ ६ ॥ वसिष्ठा स्पर्शतों तुझे चरण । वाहतों रघुनाथाची आण । राज्याचें अभिषिंचन । प्राणांतींही करूं नेदीं ॥ ७ ॥ वसिष्ठ पाहे शत्रुघ्नाकडे । तंव तो बोलेना पैं रडे । श्रीरामविरहें झाले वेडे । मागें पुढें सरेना ॥ ८ ॥

१ स्वामी, सत्ताधारक. २ खोटी. ३ हातांत घेतलें. ४ तरवार. ५ तयार. ६ हयगय करूं नये. ७ कमर. ८ सिंहासनावर. ९ येऊन पडोत. १० राज्याभिषेक. ११ ब्राह्मणाची विधवा स्त्री. १२ उदक.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

विसरला तो घरदार। विसरला तो इंद्रियव्यापार। विसरला निजशरीर। तदाकार होवोनि ठेला ॥ ९॥ आठवितां श्रीरामचंद्रा। शत्रुघ्ना लागली योगमुद्रा। विसरला तो निद्रा तंद्रा। कृपा रामचंद्रस्वामीची ऐशी ॥ ११० ॥ दृश्य द्रष्टा आणि दर्शन। कर्म क्रिया कर्तेपण। शत्रुघ्नासी नाठवे जाण। आपणा आपण विसरला ॥ ११ ॥ करणें न करणें कांहीं। उठेना शत्रुघ्नाचे ठायीं। धैर्यें श्रीराम स्मरतां पाहीं। देहीं विदेही तो जाला ॥ १२ ॥ बोलिला भरत तो भावार्थ। त्याचा भाव दाविला यथार्थ। शत्रुघ्न तो धैर्य मूर्त। तो धैर्यवृत्तांत निरूपिला ॥ १३ ॥ शत्रुघ्नाची ऐसी स्थिती। भरताची तैसी गती। आतां राज्याची कोण गती। वसिष्ठ चित्तीं विचारी ॥ १४ ॥ वसिष्ठ म्हणे भरतातें। व्यर्थ खेद कां करिसी येथें। जें मी सांगेन यथार्थें। तें त्वां निश्चितें करावें ॥ १५ ॥ अभिषेक रामपादुकांसी। करूनि दहन द्यावा रायासी। मग आम्ही रामापासीं। जाऊं वनासी भेटावया ॥ १६ ॥ ऐकोनि वसिष्ठाचें वचन। भरता जालें अमृतपान। मग साष्टांगें करोनि नमन। मस्तकीं चरण वंदिले ॥ १७ ॥ भरतें करितां राजदहन। कौसल्या करूं पाहे सहगमन। मग वसिष्ठें येवोनि आपण। निवारण तीस केलें ॥ १८ ॥ सहगमन पतिसंकटीं। त्याहूनि अधिक श्रीरामभेटी। येरी म्हणे चवदा वर्षांपाठीं। जिण्याची गोष्टी दुर्लभ ॥ १९ ॥ नगरा न येतां रघुनाथ। मध्येंचि मजला आलिया मृत्य। ना श्रीराम ना दशरथ। ऐसा अपघात मज होईल ॥ १२० ॥ ऐकोनि कौसल्येची गोष्टी। वसिष्ठ कळवळला पोटीं। रायाचे उत्तरकर्मापाठीं। करीन भेटी श्रीरामा ॥ २१ ॥ कौसल्या म्हणे जी गुरुनाथा। अवश्य भेटवीन रघुनाथा। ऐसी मज भाक द्यावी आतां। तरी मी जीविता राखीन ॥ २२ ॥ श्रीराम देखतांच दृष्टीं। मावळती द्वंद्वदुःखाच्या कोटी। आनंद न समाये सृष्टीं। सुखसंतुष्टी श्रीरामें ॥ २३ ॥ श्रीरामासी होय भेटी। तें भाग्य दुर्लभ अति संकटीं। तें पाविजे सद्गुरुकृपादृष्टीं। तैं मी सृष्टीं अति धन्य ॥ २४ ॥ कौसल्येचें सत्त्व चोख। देखोनि वसिष्ठासी परम सुख। उल्हासें देवोनियां भाक। राहविली निःशंक राममाता ॥ २५ ॥ भरतें उठोनि आपण। रामपादुका अभिषिंचून। करोनि रायाचें दहन। और्ध्वदेहिकें पूर्ण तेणें केलें ॥ २६ ॥ भरताचें अयोध्येसी गमन। तंव श्रीरामाचें दूरी गमन। एकाजनार्दना शरण। रसाळ निरूपण अवधारा ॥ १२७ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे अयोध्याकांडे एकाकारटीकायां श्रीरामपादुकापट्टाभिषेको नाम एकादशोऽध्यायः ॥ ११ ॥ ओंव्या ॥ १२७ ॥

अध्याय बारावा

श्रीरामचंद्राय नमः। जालिया जननिवृत्ती। पुन्हां प्राप्ती मध्यरात्री। कैकेयी येवोनि भरताप्रती। बोले उपपत्ती ते ऐका ॥ १ ॥

उत्थापयित्वा कैकेयी पुत्रं वचनमब्रवीत्।
उत्तिष्ठ पुत्र भद्रं ते राजपुत्र निबोध मे ॥ १ ॥
त्वद्विधा नैव शोचंति सतां सदसि संमताः।
गृहाणेदं स्वकं राज्यं सफलं कुरु मे श्रमम् ॥ २ ॥
मनो नंदय मित्राणां मम चाभीष्टदर्शन।
त्वत्कृते हि मया सर्वमिदमेवंविधं कृतम् ॥ ३ ॥
तत्पुत्र शीघ्रं विधिना विधिज्ञैर्वसिष्ठमुख्यैः सहितो द्विजेंद्रैः।
संकाल्य राजानमदीनसत्वमात्मानमुर्व्यामभिषेचयस्व ॥४॥

उठवोनियां पुत्रासी। कैकेयी बुद्धि सांगे त्यासी। राम गेला वनवासासी। तूं कां करिसी शोक त्याचा ॥ २ ॥ रांडवे बायलेचे परी। रडतां न लाजसी सभेमाझारीं। ऊठ वेगीं धीर धरीं। अयोध्येचें करीं निजराज्य ॥ ३ ॥ मुख्य ज्येष्ठाचें निजराज्य। तें म्यां संकटें साधिलें तुज। शेखीं न मानिसी तूं मज। नाचसी भोंजें वना जावया ॥ ४ ॥ आयुष्य सरल्या निमाला पती। पितृआज्ञेनें वनवास रघुपती। तो दोष ठेविसी मजप्रती। निजस्वार्थ नेणसी ॥ ५ ॥ मुळीं लागोनि संसारीं। सापत्न ते तव मुख्य वैरी। तें तुज सांगेन निर्धारीं। वेदशास्त्रसंमत ॥ ६ ॥ दिति अदिति दोघी सवती। एक पित्याची संतती। देवां दैत्यां वैरप्राप्ती। निज-

१ अग्निसंस्कार. २ निश्चयेंकरून. ३ उत्तरक्रिया. ४ मसलत. ५ हर्षेकरून. ६ वेदांना मान्य.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

घाती येरयेरां ॥ ७ ॥ येचि अर्थी वेदोक्ती । बृहदारण्यप्रथमश्रुती । देव दैत्य वैरी होती । श्रुतिसंमती अवधारा ॥ ८ ॥ सापत्नांमाजि अति प्रीती । कांहींच नाहीं वेदशास्त्रार्थीं । गरुडसर्पां वैरप्राप्ती । ते काय नव्हेती निजबंधु ॥ ९ ॥ ऐक माझी निजयुक्ती । तुवां न जावें वनाप्रती । आणोनि वसिष्ठादि ऋषिपंक्ती । घेई राज्यप्राप्ती अभिषेकें ॥ १० ॥ भरता तूं तंव सभाग्य पूर्ण । अभाग्य वनवासा गेला लक्ष्मण । तो जरी येथें असता जाण । करिता कंदन राज्यलोभें ॥ ११ ॥ मी सांगतें हित देखोन । तूं होई राजा संपूर्ण । युवराजा करीं शत्रुघ्न । माझें वचन प्रतिपाळीं ॥ १२ ॥ ऐकोनि मातेचें वचन । भरत कोपला संपूर्ण । कोपामाजी आलें रुदन । अतिउद्विग्न अनुतापी ॥ १३ ॥ घायावरी[1]हा णिजे लाता । तैसा पाड जाला भरता । म्हणे तूं तंव नव्हेसी माझी माता । पापरूपता संपूर्ण ॥ १४ ॥ निजपति निमाल्याचें तुज । अणुमात्र दुःख ना लाज । राज्यभोगाचें सुखभोज[2] । अति निर्लज्ज नाचसी ॥ १५ ॥ तुझ्या ऐकोनि वचनार्था । म्यां द्वेषावें श्रीरघुनाथा । जावें स्वजना देवोनि दुःखवार्ता । नरकपाता स्वयें जावें ॥ १६ ॥ निजमातेचें हितोपदेशवाक्य । रौरवा[3] जावें आवश्यक । पूर्वजां न्यावें नरका देख । द्यावें दुःख जनासी ॥ १७ ॥ निजपतीची घातकिणी । श्रीरामद्वेषाची संवर्दणी[4] । सुहृदांसी दुःखकारिणी । जाय पापिणी अति निंद्य ॥ १८ ॥ जळो तुझें काळें मुख । श्रीरामासी दिधलें दुःख । तुझें मजला नाहीं सुख । जगा असुख तुझेनि ॥ १९ ॥ वधूं नये निजमाता । यालागीं चुकलों तुझ्या घाता । तुझेनि मज दुःखावस्था । श्रीरामदशरथा विघडिलें ॥ २० ॥ तुज पाहतां सन्मुख । मज वाटे परम दुःख । नको दाखवूं काळें मुख । निंद्य निःशेष अति नष्टे ॥ २१ ॥ भरत कोपोनियां भारी । निर्भर्त्सूनि नानापरी । कैकेयी घातली बाहेरी । तिचेनि[5] करीं अतिदुःखी ॥ २२ ॥ जिचेनि अंतरला राघव । ते माता नव्हे महालांव[6] । जगीं निंद्य इचें नांव । दुःख ओतींव कैकेयी ॥ २३ ॥ श्रीरामभरतांचा पिंड एक । एका पिंडाचे दोघे देख । येरयेरांचें मानिती दुःख । परम सुख येरयेरां ॥ २४ ॥ येरयेरांचा जीवप्राण । येरयेरांचें जीवन । येरयेरां समाधान । सुखसंपन्न रामभरत ॥ २५ ॥ भरतासी श्रीरामाचें सुख । श्रीरामीं भरताचा हरिख । एकमेकां दोघे एक । कैकेयी मूर्ख तें नेणे ॥ २६ ॥ आठवितां श्रीरघुनाथ । परम सुखें सुखावे भरत । नाहीं राज्यलोभाचा स्वार्थ । परमामृत श्रीरामीं ॥ २७ ॥ श्रीरामाच्या पायांपरतें । परम सुख नाहीं भरतातें । यालागीं त्यजोनि निजराज्यातें । श्रीरामातें भेटों निघे ॥ २८ ॥ देवदैत्यां वैर वितंड । त्यांचा नव्हे एक पिंड । राज्यलोभें दुःख उद्दंड । वैर अखंड येरयेरां ॥ २९ ॥ भिन्नभिन्न पिंडोत्पत्ती । गरुडसर्पां वैरप्राप्ती । तैसें नाहीं श्रीरामभरतीं । चवघेही होती एक पिंड ॥ ३० ॥ सौमित्र भरत आणि शत्रुघ्न । चवथा जाण रघुनंदन । चारी मूर्ति श्रीराम पूर्ण । व्यूह संपूर्ण या नांव ॥ ३१ ॥ चवघेही बंधु भिन्नभिन्न व्यक्ती । चारी मिळोनि श्रीराममूर्ति । व्यूहचतुष्ट्य यातें म्हणती । आगमार्थी वेदोक्त[8] ॥ ३२ ॥ ऐसिया एकात्मता अति प्रीतीं । भेटों पाहे श्रीराममूर्ती । उदया येतांचि गभँस्ती[7] । निजगमनार्थी उद्यत ॥ ३३ ॥ पाचारोनियां प्रधाना । म्हणे सिद्ध वेगीं करा सेना । भेटावया रघुनंदना । जाणें वना निश्चित ॥ ३४ ॥ वसिष्ठ येवोनि आपण । पहावया भरताचें मन । म्हणे पुत्रधर्माचें लक्षण । निजवचन बोलत ॥ ३५ ॥ तुम्ही तरी चौघेही पितृभक्त । आज्ञा नेमूनि गेला दशरथ । राज्या अभिषेकावा भरत । श्रीरघुनाथ वनवासी ॥ ३६ ॥ तुझे मातेचें वरदान । तिचेंही मागणें हेंचि जाण । भरतासी राज्याभिषिंचन । रघुनंदन वनवासी ॥ ३७ ॥ श्रीराम पितृवचनविश्वासी । वेगीं गेला वनवासासी । तूंही पाळीं पितृवाक्यासी । अभिषेकासी अंगीकारीं ॥ ३८ ॥ श्रीरामा अभिषेकावया निर्धारीं । पूर्वी केली होती सामग्री । ते सिद्ध आहे माझ्या घरीं । तूं अंगीकारीं अभिषेक ॥ ३९ ॥ पितृवचन उल्लंघितां । अवश्य पाविजे नरकपाता । आग्रह न करावा भरता । तुज मी आतां

१ अत्यंत दुःखी. २ सुखाची आवड. ३ नरकाला. ४ संवर्दणी = धोब्याचें वस्त्रें साफ करण्याचें पात्र.

५ तिच्यामुळें. ६ घातक. ७ सूर्य. ८ निश्चयात्मक.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

अभिषेकीं ॥ ४० ॥ ऐकोनि वसिष्ठाचें वचन । भरत पडिला मूर्च्छापन्न । दीर्घ मांडिलें रुदन । आक्रंदें पूर्ण बोलत ॥ ४१ ॥ कैकेयी हरिखें जाली रांड । जळो तिचें काळें तोंड । वनवासाचें पाखांड । तिणेंचि वितंडें वाढविलें ॥ ४२ ॥ कैकेयी केवळ परम नष्ट । भाके गोंविला पति वरिष्ठ । तिचें मागणें पाप स्पष्ट । तो राज्यपट मी नेघें ॥ ४३ ॥ वसिष्ठा तुज करितों नमन । किती पाहसी माझें मन । वांचोनियां रघुनंदन । अभिषिंचन मी नेघें ॥ ४४ ॥ श्रीरामासी सांडोनियां वनीं । जरी मी बैसलों अभिषिंचनीं । तरी मी जालों मद्यपानी । मातृगमनी अति नष्ट ॥ ४५ ॥ तुझे शिवोनियां चरण । पूर्वी वाहिली श्रीरामाची आण । तेंचि माझें अति प्रमाण । पुढती आपण न पुसावें ॥ ४६ ॥ म्हणोनि चरणीं ठेविला माथा । येथोनि मागुती गुरुनाथा । राज्याभिषेकाची कथा । मजही आतां न पुसावी ॥ ४७ ॥ ऐकोनि भरताचें वचन । वसिष्ठ जाला सुखसंपन्न । हृदयीं धरिला आलिंगून । म्हणे अति सज्ञान तूं होसी ॥ ४८ ॥ तुझ्या सर्वे घेवोनि माता । भेटी येईन मी रघुनाथा । भरतें चरणीं ठेविला माथा । सभाग्यता आजि माझी ॥ ४९ ॥ सद्गुरु जाला सुप्रसन्न । भरतें त्राहाटिलें निशाण । सेना सँन्नद्ध करा संपूर्ण । शीघ्र गमन वनवासा ॥ ५० ॥ हरिखें नाचत भरत । आजि देखेन श्रीरघुनाथ । माझे पुरतील मनोरथ । कृतकार्यार्थ मी होईन ॥ ५१ ॥ श्रीराम भेटावया तत्काळीं । भरत निघालासे सदळीं । नगरीं हर्षें पिटिली टाळी । वना सकळीं निघावया ॥ ५२ ॥ होईल श्रीरामदर्शन । उद्यमी चालती संपूर्ण । उभयलाभीं ठेवोनि मन । निघाले जन अयोध्येचे ॥ ५३ ॥

पौराश्च निर्ययुः सर्वे समवायेन नैगमाः ।
रामदर्शनसंहृष्टाः सर्वाः प्रकृतयस्तदा ॥ ५ ॥

वाणियें सिद्ध केले पसारे । सोवनी सोनार जोहरी वेव्हारे । दुसी दिंडें घेतलीं थोरें । गौळीं खिल्लारें थापटिलीं ॥ ५४ ॥ चालिल्या पक्वान्नेंपरवडी । दुधा दह्यांच्या कावडी । तेलियें घेतल्या तेलाच्या जोडी । कापडघोडीं चौठ्यांचीं ॥ ५५ ॥ तांबोळीं बांधिलीं आटकीं । ब्राह्मणीं बांधिलीं धोटकीं । मायबापां न पुसतां एकी । चोरोनि मार्गी लागलीं एक ॥ ५६ ॥ पुत्रालागीं धांवे माता । स्त्रीपुत्रालागीं निघे पिता । पुतण्यालागीं धांवे चुलता । श्रीरघुनाथा पहावया ॥ ५७ ॥ भाडाईत भारवाहक । धोबे शिंपी नटनाटक । मणिकर रजक नापिक । जळतारक निघाले ॥ ५८ ॥ सुतार शस्त्रकार रज्जुकार । मार्गी विकरा होय अपार । घेवोनि चालिले पायतणांचे भार । मोची चांभार चालिले ॥ ५९ ॥ सकुटुंब निघाले समस्त । भाडें न मिळे देतां अर्थ । एक म्हणती निघा त्वरित । दुरी भरत अंतरला ॥ ६० ॥ घरीं राखण न राहे कोणी । निघती येरयेरांवरी रुसोनी । श्रीराम पहावया नयनीं । उल्हास मनीं सर्वांच्या ॥ ६१ ॥ खरांवरी वळंघोनी । हर्षें निघाल्या कुलालपत्नी । श्रीराम देखावया नयनीं । अपमान मनीं सुखें साहिती ॥ ६२ ॥ अवघियांही पुढें । भाडेकरीं नेले गाडे । राजस ठणकती बापुडे । त्यापाशीं भाडें जोडावया ॥ ६३ ॥ निघाले द्विजांचे संभार । संन्यासी चालिले अपार । नागवे चालिले दिगंबर । श्रीरामचंद्र पहावया ॥ ६४ ॥

ततः श्वेतैर्हयैर्युक्तमास्थाय स्यंदनोत्तमम् ।
प्रययौ भरतः श्रीमान् रामदर्शनकांक्षया ॥ ६ ॥
शतं सहस्राण्यश्वानां समारूढानि राघवम् ।
षष्टी रथसहस्राणि धन्विनो विविधायुधाः ॥ ७ ॥
अग्रतः प्रययुस्तस्य सर्वे मंत्रिपुरोहिताः ।
अधिरुह्य हयैर्युक्तान् रथान् सूर्यरथोपमान् ॥ ८ ॥
नवनागसहस्राणि कल्पितानि यथाविधि ।
अन्वयुर्भरतं यांतं राजपुत्रं यशस्विनम् ॥ ९ ॥

श्वेतवारुयुँक्त रथ । त्यावरी हर्षें बैसे भरत । शत्रुघ्नेंही प्रेरिला रथ । श्रीरघुनाथ भेटावया ॥ ६५ ॥ पालकीमाजी कौसल्या वाहनी । आणि सुमित्रा दुसरी जननी । निघाल्या येरही राजपत्नी । श्रीरामदर्शनीं उद्यत ॥ ६६ ॥ कैकेयी माता न ये निःशेष । तीस झालें परम दुःख । ना राम-

१ आनंदानें. २ खोटी गोष्टी. ३ मोठें. ४ राज्याधिकार. ५ शहाणा. ६ वाजविलें. ७ तयार. ८ आनंदानें. ९ सैन्यासह. १० व्यापारी, धंदेवाले. ११ वाण्यांनीं. १२ शिंपी.

१३ पक्वान्नांचे प्रकार. १४ कापडाच्या दुकानदारांची. १५ धोबी. १६ गाढवावर बसून. १७ पांढऱ्या घोड्यांचा. १८ चालविला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

राव ना भरत देख । काळें मुख केंवी दावूं ॥ ६७ ॥ वसिष्ठादि ऋषि समस्त । महंत प्रधानादि सुमंत । यांसी देवोनि उत्तम रथ । त्यांसमवेत निघाले ॥ ६८ ॥ षष्टिहायन[1] भद्रजाती । दहा सहस्र मत्त हस्ती[2] । घंटा घागऱ्या पताका बहुती । दोहीं भागीं शोभती भरताच्या ॥ ६९ ॥ अतिरथी महारथी । साठी सहस्र भद्रजाती । भरतापाठीसीं धांवती । रथ घडघडती सायुधीं ॥ ७० ॥ रथांचिया गति विगती । एकापरीस एक दाविती । त्यांमाजी धनुष्यांची वित्पत्ती । शस्त्रगती साटोपा ॥ ७१ ॥ शतसहस्र सुजाती वारू । निघाला वीरांचा संभारू । नाना अलंकारीं मनोहरू । करिती दुर्धरू सिंहनाद ॥ ७२ ॥ वारुवां बाणली मोहाळी[3] । अंगटोप रागावळी । पाखेरा[4] झळकती तेजाळी[5] । वीर महाबळी आरूढले ॥ ७३ ॥ वारू तीन पायांवरी नाचती । हो हो मा मा जी जी करिती । दावोनियां अंतराळीं गती । वारू थापटिती महावीर ॥ ७४ ॥ कातिया[6] त्रिशूळ तोमर । भिंडिमाळ[7] चेंडू[8] चक्र । गदा मुद्गल लहुडी थोर थोर । आले मोगर पायांचे ॥ ७५ ॥ खेटक भालेजी अपार । पिलंगती पायांचे मोगर । गर्जत आले परशुधर । मल्ल दुर्धर तळपती ॥ ७६ ॥ सेळी सावळी शक्तियुक्त । अलंगाईत बाणाईत । कोइतेकार अद्भुत । कटारहस्त लघुवेगी ॥ ७७ ॥ आडाऊ वोडणें थडकती । तळवे त्यांमाजी तळपती । हैकार थैकार पैं देती । वीर गर्जती पायांचे ॥ ७८ ॥ चतुरंगसेनासंभार । राघवसेना अति दुर्धर । भरत चालिला सत्वर । लागला गजर वाद्यांचा ॥ ७९ ॥ कुऱ्हाडे कात्या कोइते हस्तीं । भारापुढें वनें छेदिती । मातीकामें नेणों किती । भूमि सज्जिती चालावया ॥ ८० ॥ भार चालिला अति दुर्धर । ठाकले भागीरथीतीर । देखोनि भरताचा भार । गुहक थोर क्षोभला ॥ ८१ ॥ कैसा राज्यलोभ अति दुर्धर । सख्या बंधूस पाडिलें वैर । भरतें सज्जोनियां भार । श्रीरामचंद्रा मारूं जातो ॥ ८२ ॥ माझा स्वामी श्रीरघुनाथ । तयाचा हा करूं पाहे घात । मी रणीं विभांडीन भरत । सेना समस्त छेदीन ॥ ८३ ॥

अनु दाशरथिं रामं पित्रा राज्याद्विवासितम् ।
सामात्यो राज्यलोभेन हंतुं भरत उद्यतः ॥ १० ॥
अद्य मे शरसंघातो मत्कार्मुकविनिःसृतः ।
निष्पतिष्यति गात्रेषु नरेषु गजयोधिषु ॥ ११ ॥
निविष्टा यत्र सेना सा सवाजिरथकुंजरा ।
तां च भूमिं करिष्यामि शरैः शोणितकर्दमाम् ॥ १२ ॥
मम दाशरथी रामो भर्ता बंधुः सुहृद्गुरुः ।
अहं तस्य हितार्थाय करिष्यामि सुदुष्करम् ॥ १३ ॥

श्रीराम माझी माता पिता । श्रीराम माझा सुहृद भ्राता[11] । श्रीराम सद्गुरु निजात्मता । श्रीराम तत्त्वतां आत्मा माझा ॥ ८४ ॥ त्याचा करावया घात । सैन्येंसीं जातो भरत । त्याचा करीन मी निःपात । श्रीरामभक्त तैं सत्य ॥ ८५ ॥ श्रीरामाचा मी मेटकरी[12] । ठेविला आहे गंगातीरीं । भरत येवोनि कैसेपरी । परतीरीं उतरेल ॥ ८६ ॥ निषादांसी सांगे गुहक । जरी भरत येईल सैंकटक[13] । दृढ राखावें गंगातटाक । गंगोदक शिवों नेदा ॥ ८७ ॥ हे जरी आले युद्धासी । तरी मी ख्याती लावीन त्यांसीं । धडमुंडांकित पृथ्वीसी । क्षणार्धेंसीं मी करीन ॥ ८८ ॥ मारीन रथ वाजी[14] कुंजरें । रणीं मारीन नरवीर । वाहतील असृग्धांचे[15] पूर । तैसें क्षात्र करीन ॥ ८९ ॥ श्रीरामाच्या निजकार्यार्था । निःशेष वेंचीन जीविता । येथोनियां पुढें भरता । त्या सर्वथा जाऊं नेदीं ॥ ९० ॥ निधडे[16] निषाद निःशंक । मेळवोनियां निजकटक । सन्नद्ध स्वयें गुहक । सेनासन्मुख पैं आला ॥ ९१ ॥ भरतासी सांगती सैनिक । युद्धासी आलासे गुहक । धरोनियां गंगेचें तटाक । गंगोदक शिवों नेदी ॥ ९२ ॥ एक म्हणती राजा निमाला निःशंक । म्हणोनि आम्हांसी पारिखा[17] जाला गुहक । ताहना फुटताती लोक । गंगोदक स्पर्शों नेदी ॥ ९३ ॥ गुहक बापुडें तें किती । त्यासी क्षणार्धें लावीन ख्याती । आज्ञा द्यावी आम्हांप्रती । कोपें दळपती[18] पूसत ॥ ९४ ॥ विचारें बोलिला भरत । गुहक रामाचा अति आप्त । त्याचा न घेतां वृत्तांत । युद्धकंदनार्थ करूं नये ॥ ९५ ॥ भरत

१ साठ वर्षांचे. २ हत्ती. ३ मोहोरकी. ४ घोड्यावरील झालर. ५ तेजस्वी. ६ कोयते. ७ गोफीण. ८ शस्त्रविशेष. ९ पायदळ. १० पुढें जाती. ११ बंधु. १२ चौकीदार. १३ सैन्यासह. १४ घोडे. १५ रक्ताचे. १६ धैर्याचे. १७ परकी. १८ सेनापति.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

पुसे गुहकासी । तूं कां युद्ध करूं पाहसी । येरू म्हणे तूं अति बळेंसीं । मारूं कां जाशी श्रीरामा ॥ ९६ ॥ माझा स्वामी वनवासी । सबळ बळें मारूं पाहसी । हेंच वैर आम्हां तुम्हांसी । अति युद्धासी कारण ॥ ९७ ॥ तो म्हणे सद्गुरूचा द्वेष करी । तोचि आमुचा मुख्य वैरी । त्यासी निर्वटीन शस्त्रधारीं । प्रतिज्ञा खरी हे माझी ॥ ९८ ॥ ऐकोनि गुहकाचा वचनार्थ । रथावरोनि पडिला भरत । दुःखें गडबडां लोळत । अवस्था प्राणान्त ओढवली ॥ ९९ ॥ भरत म्हणे गुहकासी । वेगीं मज वधीं पापियासी । कैकेयीनें जोडिल्या पापराशी । केलों जगासी अति निंद्य ॥ १०० ॥ कैकेयी राज्यलोभाची थोरी । तेणें मी केलों रामाचा वैरी । तिचेनि मी निंद्य चराचरीं । दुःखसागरीं निमग्न ॥ १ ॥ जो श्रीरामासी स्वयें द्वेषी । त्यासी उतरती तिन्ही मसी। ते कैकेयी आर्जवाची मसी । माझ्या मुखासी लागली ॥ २ ॥ तेणें मी झालों काळमुखा । मुख दाखवूं न शकें लोकां । कैकेयीनें दिधलें परम दुःखा । तें कोणासी गुहका मी सांगूं ॥ ३ ॥ गुहका तुझे मी धरितों चरण । वेगीं सोडोनि निर्वाणबाण । छेदीं माझें देहबंधन । पापा पुरश्चरण होईल ॥ ४ ॥ तूं श्रीरामाचा परम आप्त । तरी माझाही सखा निश्चित । माझा करावा वचनार्थ । प्रायश्चित्तार्थ देह छेदीं ॥ ५ ॥ ऐकोनि भरताचें वचन । गुहकें घातलें लोटांगण । मस्तकीं धरिले सुदृढ चरण । पडिलें आलिंगन आप्तत्वें ॥ ६ ॥ दोघांसही प्रेम पूर्ण । नयनीं स्वानंदजीवन। गुहकें घातलें लोटांगण । काय आपण बोलत ॥ ७ ॥ श्रीरामीं ज्यासी पूर्णभक्ती । तो मज आप्त त्रिजगतीं । तोचि माझा निजसांगाती । मी चरणार्थी तयाचा ॥ ८ ॥ तंव गुहकासी सांगे सुमंत । राज्य देतां न घे भरत । राज्यीं अभिषेकावा रघुनाथ । वना असे जात आणावया ॥ ९ ॥ ऐकोनि सुमंताची गोष्टी । भरताचें प्रेम देखोनि दृष्टीं । गुहकें चरणीं घातली मिठी । म्हणे धन्य सृष्टीं भरता तूं ॥ ११० ॥ गुहका सांगातें घेवोन । भरतें केलें संध्यास्नान । करोनियां पितृतर्पण । गुहकासी आपण पूसत ॥ ११ ॥ गंगातीरीं एक राती । श्रीरामें केली होती वस्ती । शयन केलें कोणे स्थितीं । तें मजप्रती दाखवीं ॥ १२ ॥ गुहक जो निषादपती । तेणें भरता धरोनि हातीं । जेथें श्रीरामें केली वस्ती । त्या स्थळाप्रती आणिला ॥ १३ ॥ गुहक सांगे भरताजवळी । याचि इंगुदीवृक्षातळीं । श्रीराम राहिला महाबळी । ये गंगाजळीं स्नान केलें ॥ १४ ॥ याचि तृणसेजे रघुनंदन । सीतेसहित केलें शयन । निद्रा न करीच लक्ष्मण । बहु प्रार्थना म्यां केली ॥ १५ ॥ तो म्हणे श्रीरामसेवा समाधान । न करीं जडमूढशयन । ऐकतां भरतासी आलें रुदन । मूर्च्छापन्न तो पडिला ॥ १६ ॥ भरत पडिला मूर्च्छापन्न । शत्रुघ्न जाला अति उद्विग्न । कौसल्या सुमित्रा हडबडोन । आल्या धांवोन राजपत्न्या ॥ १७ ॥ वनवासींची ऐकिली वार्ता । तेणें अति दुःख शत्रुघ्नभरतां । वनीं क्षेम रघुनाथा । लक्ष्मण सीता सुखें असती ॥ १८ ॥ काय वनवासाची कथा । वेगीं सांगावी गुहका तत्त्वतां । दुःखें रुदन करिती माता । श्रीरघुनाथाचेनि विरहें ॥ १९ ॥ गुहक सांगतां करी रुदन । ये वृक्षीं राहिला रघुनंदन । श्रीरामें सीतेसहित केलें शयन । हे पावन तृणशय्या ॥ १२० ॥ वृक्ष वंदितों मी ओजा । नित्य पूजितों तृणशेजा । पंथींच्या वंदितों पैं रजा । श्रीरघुराजपदनिष्ठा ॥ २१ ॥ ऐकोनि गुहकाची वाणी । भरत लागे त्याचे चरणीं । म्हणे गुहका तूं धन्य त्रिभुवनीं । श्रीरामभजनीं शुद्ध प्रेम ॥ २२ ॥ श्रीरामभावें गा संपूर्ण । तूं वंदिसी वृक्ष तृण । याहीपरता लाभ कोण । सूक्ष्मभजननिष्ठा ॥ २३ ॥ धन्य धन्य गुहका तुझा भाव । तुज तुष्टला श्रीरामराव । फिटला देहबुद्धिसंदेह । निःसंदेह रामभजनीं ॥ २४ ॥ गुहक निषाद अति अपवित्र । श्रीरामभजनें जाला पवित्र । दीनदयाळ श्रीरामचंद्र । नामें पवित्र महादोषी ॥ २५ ॥ गुहकाची अनन्य भक्ती । देखोनि भरता अति प्रीती । विषाद सांडोनियां चित्तीं । जाले सांगाती जिवलग ॥ २६ ॥ श्रीरामसीतातृणशेजार । कौसल्या देखोनि साचार । दुःख दाटलें दुर्धर । काय उत्तर बोलली ॥ २७ ॥ सीता सती अति सुकुमार । राम

१ ठार करीन. २ जगामध्यें. ३ काजळी. ४ आनंदाश्रु. ५ चरणसेवेची इच्छा करणारा. ६ भिल्लांचा राजा. ७ भक्तांच्या अंथरुणावर. ८ भक्तिपूर्वक. ९ एकनिष्ठ.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सुकुमारां अति सुकुमार । सुमन[1]शेज खुपे साचार । तृणसेजार त्यांसी देखा ॥ २८ ॥ राजान्नें सेविती पवित्र । त्यांसी लंघनें[2] त्रिरात्र । कैकेयीनें केलें हें विचित्र । सखे सावत्र दुःखी केले ॥ २९ ॥ ऐसी चालतां उपपत्ती[3] । निमेषामाजी गेली राती । उदया आला पैं गभस्ती[4] । निषादांप्रती गुहक बोले ॥ १३० ॥ भरत उतरेल पैलपार । नावा आणा रे अति सत्वर । घंटा पताका सालंकार । मृदु अरुवार[5] वैसणिया ॥ ३१ ॥ रथवाजिहस्तियुक्त । स्तोम[6] स्तोम जेथींचा तेथ । कटक[7] उतरेल समस्त । अति विस्मित तेणें भरत ॥ ३२ ॥ गुहक जो कां निषादपती । नावा घेवोनियां हातीं । स्वयें आला भरताप्रती । करी विनंती आरूढा[8] जी ॥ ३३ ॥ वसिष्ठाचे चरणांवरी । गुहक लोटांगण करी । तुम्ही तारक भवसागरीं । स्वामी नावेवरी बैसावें ॥ ३४ ॥ वसिष्ठें देखोनि गुहकासी । निजात्मप्रीतीं आलिंगी त्यासी । आजिचा तारक तूं आम्हां होसी । परपारासी न्यावया ॥ ३५ ॥ गुहक म्हणे श्रीगुरुनाथा । तारक तुझी कृपा तत्त्वतां । कृपेनें हात ठेविजे माथां । मग मी समस्तां तारीन ॥ ३६ ॥ ऐसी गुहक बोलतां बोली । वसिष्ठासी निजखूण पावली । हरिखें[9] पिटोनियां टाळी । नावेजवळी तो आला ॥ ३७ ॥ वसिष्ठादि महंत थोर । त्यांसी नाव दिधली स्वतंत्र । ते नव्हेती पैं परतंत्र । भवसमुद्रतारक ॥ ३८ ॥ राजपत्न्या अति सुकुमार । त्यांसी नाव दिधली थोर । मृदु आस्तरण परिकर[10] । तेथें समग्र बैसविल्या ॥ ३९ ॥ भरत शत्रुघ्न नावेवरी । निशाणें त्राहाटिल्या[11] भेरी । नाना वाद्येंसीं जयजयकारीं । वेगीं परपारीं उतरले ॥ १४० ॥ भरत पुसे गुहकातें । सैन्य लावावें कोणें पथें । तो म्हणे मी येतों सांगातें । भुयाळांतें[12] घेवोनी ॥ ४१ ॥ गुहक अति हर्षयुक्तें । चालिला भरताचे सांगातें । दृष्टीं पहावया श्रीरामातें । बाह्य स्वार्थातें सांडूनी ॥ ४२ ॥ मुमुक्षुवा साधनीं अति प्रीती । तैसी गुहका श्रीरामभक्ती । भुयाळ घेवोनि सांगातीं । मार्ग शोधिती अतिनिष्ठा ॥ ४३ ॥ भरतगुहकांचा विवाद । दोघां अनुतापसंवाद । एका जनार्दनीं निजबोध । परमानंद रामकथा ॥ ४४ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे अयोध्याकांडे एकाकारटीकायां भरतवनाभिगमनगुहकसंवादो नाम द्वादशोऽध्यायः ॥ १२ ॥ ओंव्या ॥ १४४ ॥ ॥ श्लोक १३ ॥

अध्याय तेरावा

श्रीरामचंद्राय नमः ॥ भरतें गंगा उतरोन । केलें स्नान संध्या तर्पण । आजींची वस्ती प्रयागस्थान । म्हणोनि निशाणें त्राहाटिलीं ॥ १ ॥ रथ गज वाजी वीर[13]श्रेणी । चालतां मार्ग न पुरे धरणी । पुढें देखिली त्रिवेणी । दूत गर्जोनी सांगती ॥ २ ॥ देखोनि त्रिवेणी भरत शत्रुघ्न । दोघीं घातलें लोटांगण । त्यजोनियां पादत्राण[14] । चरणचालीं निघाले ॥ ३ ॥ वसिष्ठादि ऋषीश्वर । चरणीं चालती सत्वर । देखोनि त्रिवेणीचें तीर । जयजयकार तिंहीं केला ॥ ४ ॥ देवोनि लक्षानुलक्ष गोदानें । भरतशत्रुघ्नें केलीं स्नानें । तीर्थश्राद्ध पिंडदानें । पितृतर्पणें तिंहीं केलीं ॥ ५ ॥ तीर्थ उपवास मुंडनें[15] । रायासी नाहीं हें बंधन । वसिष्ठ गुरु सज्ञान । तीर्थविधान तो करवी ॥ ६ ॥ मागतयांचें निवे मन । तैसें वांटविलें धन । सुखी केले तीर्थवासी ब्राह्मण । दीनजन सुखी केले ॥ ७ ॥ द्रव्य वांटितां भरत । मागते जाले कृतार्थ[16] । सुखी केले तीर्थस्थ । श्रीरघुनाथ भेटो मज ॥ ८ ॥ द्विज बोलती द्विजांपासीं । श्रीराम आला होता तीर्थासी । निःशेष द्रव्य नाहीं त्यापासीं । वल्कलवासी जटाधारी ॥ ९ ॥ त्याचें देखतां श्रीमुख । तीर्थां सकळां जालें सुख । त्यापुढें द्रव्य तुच्छ देख । अलोलिक सुख रामीं ॥ १० ॥ भरद्वाज येवोनि साउमा[17] । तेणें आश्रमा नेलें श्रीरामा । तोचि जाणे श्रीराममहिमा । मूर्खां आम्हां न कळेचि ॥ ११ ॥ तीर्थींचे ब्राह्मण लोलुप[18] बहुत । वल्कलधारी श्रीरघुनाथ । द्रव्य वांटील हा राजसुत । असेल गुप्त धन यापासीं ॥ १२ ॥ अति समर्थ श्रीरघुपती । वना नेंवचे[19] रित्या हातीं ।

---

१ पुष्पशय्या. २ उपोषणें. ३ अनुमानाच्या गोष्टी. ४ सूर्य. ५ नाजूक. ६ थवा. ७ सैन्य. ८ बसावें. ९ आनंदानें. १० सुंदर, सुखदायक. ११ वाजविल्या. १२ वाटाड्यांना.

१३ वीरांचे समुदाय. १४ पादरक्षा (जोडे, खडावा वगैरे) १५ क्षौरविधि. १६ धन्य. १७ सामोरा. १८ लोभी. १९ जाणार नाहीं.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

द्रव्य वांटील हा तीर्थी। द्रव्यलोभार्थी ब्राह्मण ॥ १३ ॥ जेथवरी द्रव्यद्वाराअभिमान। जेथवरी ज्ञानगर्व गहन। त्यासी श्रीरामाचें महिमान। स्वप्नींही जाण लक्षेना ॥ १४ ॥ लोभेंही श्रीरामाचें मुख। पाहतां जालें आम्हां सुख। परी महिमा आम्ही नेणों मूर्ख। सुखदायक श्रीराम ॥ १५ ॥ वाल्मीकीपाशीं संपूर्ण। ज्ञानकांडाचें श्रवण। भरद्वाजें केलें आपण। अति सावधान श्रद्धेनें ॥ १६ ॥ जालिया श्रवणनिष्पत्ती। श्रीराम देखे सर्वांभूतीं। यालागीं त्याची श्रीरामीं भक्ती। भावें श्रीरघुपति स्वाश्रमा नेला ॥ १७ ॥ ऐसिया ब्राह्मणांची कथा। ऐकोनि भरताची अवस्था। श्रीराम सर्वांसी सुखदाता। मज अभाग्यता मायेची ॥ १८ ॥ करोनि वसिष्ठासी नमन। भरत बोलिला आपण। भरद्वाजें पूजिला रघुनंदन। त्याचें दर्शन आम्ही घेऊं ॥ १९ ॥ वसिष्ठ म्हणे धन्य वाणी। हेंचि होतें माझे मनीं। भरद्वाज ऋषिशिरोमणी। चला तत्क्षणीं भेटीसी ॥ २० ॥ कटक ठेवोनि गंगातीरीं। भरतवसिष्ठादिऋषी-श्वरीं। भरद्वाजआश्रमाभीतरीं। आले झडकरी भेटीसी ॥ २१ ॥ भरद्वाज उठोनि आपण। वसिष्ठा घातलें लोटांगण। वसिष्ठें दिधलें आलिंगन। समाधान दोघांसी ॥ २२ ॥ इतर ऋषिजन। भर-द्वाज वंदी आपण। भरत आणि शत्रुघ्न। घालिती लोटांगण भरद्वाजा ॥ २३ ॥ भरद्वाजें त्या दोघांसी। आलिंगिलें हृदयासीं। स्वागत पुसोनि तयांसी। काय त्यांपासीं बोलत ॥ २४ ॥

भरद्वाज उवाच–

कच्चिन्न तस्य रामस्य धार्मिकस्य क्षमावतः॥
त्यक्तस्नेहो राज्यलोभान्न निहंतुमिहागतः ॥ १ ॥
कच्चिन्न तस्यापापस्य पापं कर्तुमिहेच्छसि।
अकंटकं भोक्तुमना राज्यं तस्यानुजस्य च ॥ २ ॥
न खल्वकार्यं कार्यं ते पाप तस्मिन् महात्मनि।
यदसौ त्वद्य ते पित्रा वनवासे विवासितः ॥ ३ ॥

भरद्वाज म्हणे भरता। सज्जूनियां सेना समस्ता। वनीं वधूं जासी रघुनाथा। राज्य-लोभार्थी लक्षोनी ॥ २५ ॥ राज्य भोगावया निष्कंटक। वधूं पाहसी रघुकुळटिळक। पापकारी तूं अति मूर्ख। परम दुःख पावसी ॥ २६ ॥ मिळाल्या देवदैत्यदानव। यक्ष राक्षस आणि मानव। रणीं न जिंके श्रीराघव। तो तूं बाळें-भावें केंवी वधिसी ॥ २७ ॥ श्रीरामाची क्रोध-भ्रुकुटी। रणीं आटील सकळ सृष्टी। तेथें तुझी कायसी गोष्टी। रुद्र संकटीं राहूं न शके ॥ २८ ॥ सैन्य श्रीरामाचें संपूर्ण। तें तंव युद्ध न करी जाण। क्षोभलिया लक्ष्मण। घेईल प्राण दोघांचा ॥ २९ ॥ भरता मानीं माझें वचन। तूं अयोध्येसी जाय परतोन। चवदा वर्षें राज्य करोन। रिघावें शरण श्रीरामा ॥ ३० ॥ भरद्वाजाचें वचन। वज्र-प्राय अति तीक्ष्ण। हृदयीं भेदलें दारुण। भरत प्राण सोडूं पाहे ॥ ३१ ॥ ऐकतां भरद्वाजाचें वचन। भरत पडे मूर्च्छापन्न। म्हणे मज कां न ये मरण। करी रुदन अति दुःखें ॥ ३२ ॥ कैकेयी राज्यलोभाची थोरी। जगीं मी केलों रामाचा वैरी। भरत जावोनि वनांतरीं। श्रीरामातें मारी जग बोले ॥ ३३ ॥ कैकेयी मातेचा अति अनर्थ। वना जावोनियां भरत। करील श्रीरामाचा घात। जगाआंत अपवादु ॥ ३४ ॥ तुम्हांसारिखे साधुसंत। म्हणती वना जावोनियां भरत। करील श्रीरामाचा घात। तरी देहान्त नव्हे माझा ॥ ३५ ॥ मी काय वज्राचा घडियेलों। कीं अपेशाचा ओतियेलों। दुःखाचा दुर्धर जन्मलों। निंदेचा जालों मेरु जैसा ॥ ३६ ॥ मी तंव अपेशाचें आयतन। अपकीर्तीचें अधिष्ठान। जळो माझें काळें वदन। देहबंधन छेदवेना ॥ ३७ ॥ श्रीरामद्वेषी पापी परम। राज्य-लोभी अति अधम। शाप देवोनि दुर्गम। मज भस्म करीं वेगीं ॥ ३८ ॥ ऐसें म्हणोनि भरतें आपण। धरिले भरद्वाजाचे चरण। माझिया पापा पुरश्चरण। शाप दारुण स्वामीचा ॥ ३९ ॥ ऐसें बोलतां आलें रुदन। भरत पडिला मूर्च्छा-पन्न। देखोनि भरताचें प्रेम पूर्ण। आलें स्फुंदन भरद्वाजा ॥ ४० ॥ सर्वांग जालें रोमांकित। प्रेमें चळचळां कांपत। म्हणे धन्य धन्य तूं भरत। प्रेम अद्भुत श्रीरामीं ॥ ४१ ॥ उचलोनियां दोन्ही हातीं। आलिंगिला अति प्रीतीं। रामभक्ताचे

१ सैन्य. २ निर्वैर. ३ बालकाप्रमाणें अज्ञानी होऊन. ४ नाशाला नेईल. ५ शंकर. ६ आळ. ७ भयंकर. ८ स्थान. ९ आश्रय. १० नीच. ११ समाप्ति.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

पायींची माती । अहोरातीं[1] मी वंदीं ॥ ४२ ॥ श्रीरामीं ज्याची अनन्य[2] प्रीती । श्रीरामीं ज्याची अनन्य गती । श्रीरामीं ज्याची परम भक्ती । निजसांगाती तो माझा ॥ ४३ ॥ श्रीरामीं ज्याचें अनन्य भजन । त्याचें आम्ही करूं ध्यानपूजन । त्याचेनि आम्हां समाधान । सत्य वचन हें माझें ॥ ४४ ॥ भरता भरद्वाजा प्रेम पूर्ण । देखोनि हर्षले ऋषिगण । जयजयकारें केलें गर्जन । सुख संपूर्ण वसिष्ठा ॥ ४५ ॥ वसिष्ठ बोलिला आपण । भरता राज्य मी देतां जाण । तेणें शिवोन माझे चरण । निर्वाणें[3] आण वाहिली ॥ ४६ ॥ सांडोनियां रघुनाथा । राज्याभिषेक होय भरता । तैं म्यां वधिलीं निजमातापिता । सद्गुरुघाता म्यां केलें ॥ ४७ ॥ श्रीरामाची जे राजधानी । ते तंव माझी सखी जननी । ते जैं भोगीं अभिषिंचनीं । तैं मातृगमनी मी जालों ॥ ४८ ॥ ऐसी वाहोनियां आण । भरत राज्य न घेचि जाण । शीघ्र करावया वनप्रयाण । तेंही कारण अवधारा ॥ ४९ ॥ भरत जावोनि रामाप्रती । राज्य द्यावया रघुपती । अयोध्ये आणावा मागुती । ऐशा प्रीतीं जातसे ॥ ५० ॥ ऐकोनि भरताचें निर्वाण । भरद्वाजा विस्मय पूर्ण । हरिखें नाचोनि आपण । दिधलें आलिंगन भरतासी ॥ ५१ ॥ पुढती नमन पुढती आलिंगन । पुढती त्याचे वंदी चरण । भरद्वाजासी प्रेम पूर्ण । आपणा आपण विसरला ॥ ५२ ॥ वाल्मीकिगुरूची आज्ञा पूर्ण । भगवद्भक्ता द्यावें आलिंगन । तेणें शरीर अति पावन । समाधान जीवशिवां ॥ ५३ ॥ ऐसिया अनन्य प्रीतीं । भरतपूजनीं वाढली भक्ती । वसिष्ठ पूजावा ब्रह्ममूर्ती । उल्हास चित्तीं भरद्वाजा ॥ ५४ ॥ वसिष्ठ केवळ ब्रह्म पूर्ण । परम भाग्यें त्याचें आगमन । भरत रामभक्त अनन्य । करूं पूजन यथोक्त ॥ ५५ ॥ केलें वसिष्ठासी नमन । आजी माझें घ्यावें पूजन । माझे आश्रमीं निजभोजन । ऋषिजनसमयोगें[4] ॥ ५६ ॥ वसिष्ठासवें ऋषिगण । आले असती कोण कोण । ज्यांचें करितां नामस्मरण । पुरश्चरण महादोषां ॥ ५७ ॥ कश्यप कात्यायन वामदेव । जाबालि मुद्गल मार्कंडेय । गौतम ऋषि महानुभाव[5] । ऋषिसमुदाव निमंत्रिला ॥ ५८ ॥ मग बोलिला भरताप्रती । भोजना यावें तुम्हीं समस्तीं । आम्ही दोघे येऊं ऋषिपंक्ती । चाड बहुतीं तुज काय ॥ ५९ ॥ भरता जितुकें तुजें कटक । अश्व गज अवघे रामसेवक । ते मज पूजापूज्य आवश्यक । त्या समस्तां देख आणावें ॥ ६० ॥ समग्र सेना उतरावयासी । माझे आश्रमीं अवकाश त्यांसी । प्रेमें आज्ञापी भरतासी । अति उल्हासीं भरद्वाज ॥ ६१ ॥ करावया ऋषींचें पूजन । जरी आणावी कामधेनु मागोन । तरी होईल जमदग्नीचें चिन्ह । राजे देखोनि अभिलाषिती ॥ ६२ ॥

समाधिमवलंब्याथ भरतस्य तु पूजने ।
वसिष्ठप्रमुखा विप्राः संप्राप्ता मेऽद्य चाश्रमम् ॥ ४ ॥
परमं रत्नमासाद्य दिव्यज्ञानान्वितो मुनिः ।
अतिथ्यर्थे भरद्वाजः स्वर्गभोगान् समानयत् ॥ ५ ॥

भरद्वाज महामुनी । बैसोनियां अनुष्ठानीं । स्वर्ग आणिला आकर्षूनी । पूजेलागोनी आश्रमा ॥ ६३ ॥ घरें चैत्वरें[6] पट्टशाळा । अश्वशाळा गजशाळा । जनां बैसावया विश्रामशाळा । अति विशाळा विचित्र ॥ ६४ ॥ चित्रवन नंदनवन । तेथें आणिलें खांडववन । तेणें आश्रम शोभायमान । राजे ऋषिजन विस्मित ॥ ६५ ॥ घृतकुँल्या मधुकुँल्या[7] । आम्ररसें[8] वापी भरल्या । द्राक्षारसें नद्या[9] वाहूं लागल्या । सरिता भरिल्या दधिदुग्धें ॥ ६६ ॥ नानापरींच्या शिखरिणी । तेणें भरल्या पुष्करिणी । शर्करेचे पर्वत धरणीं । फळश्रेणी स्वादिष्ठ ॥ ६७ ॥ चंपक कल्पद्रुम मांदार । पारिजातादि विचित्र हार । पूजावया ऋषि राजकुमर । सुमनसंभार सुवासी ॥ ६८ ॥ उगाळोनि शुद्ध चंदन । भरिले कनकाचे रांजण । षड्रसेंसीं दिव्यान्न । नानापक्वान्नपरवडी ॥ ६९ ॥ ऐसीं दिव्यान्नें पूर्ण सुवर्णताटीं । नानारसीं भरिल्या वाटी । परमानंदें पडे मिठी । शाखा गोमटीं लोणचीं ॥ ७० ॥ ठायीं ठायीं अति निर्मळ । सुवासिक शीतळ जळ । सेवितांचि पैं तत्काळ । सबाह्य सकळ निवताती ॥ ७१ ॥ दिव्यांगना अति सुंदरी । विंझणे घेवोनियां करीं । वीजिं[10]-

---

१ रात्रंदिवस. २ एकनिष्ठ. ३ निर्धाराची. ४ ऋषिजनांसह. ५ पूजेनें सन्मान करण्यास योग्य. ६ चवाठे. ७ दुधाची व मधाची परिपूर्णता. ८ आंब्याच्या रसानें. ९ नद्या. १० वारा घालतात.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

ताती ढाळें करीं । त्यांसी जेवणारीं भाळिजे ॥ ७२ ॥ पाहतां त्यांच्या तोंडाकडे । जेवणें अंतरलें पुढें । जेवणार झाले वेडे । अंगनांकडे पाहतांचि ॥ ७३ ॥ त्यांच्या मुखाची पाहतां वींस[2] । देखतां हावभावविलास । हातींचे हातीं राहिले घांस । जाला स्पर्श वायसाचा ॥ ७४ ॥ जेवण अंतरलें पुढें । सचैल स्नान करणें घडे । सकामी ठकले रोकडे । अति तडफडें तडफडती ॥ ७५ ॥ श्रीरामाचे निजभक्त । अंगनामुखीं नव्हेती आसक्त । ग्रासोग्रासीं राम स्मरत । जाले तृप्त स्वानंदें ॥ ७६ ॥

कवले कवले रामं स्मृत्वा भुंजंति योगिनः ।

तत्र भोक्ता हरिः साक्षान् मुक्तः स्यान्नात्र संशयः ॥ ६ ॥

ग्रासोग्रासीं श्रीराम स्मरत । त्या भोजनीं भोक्ता श्रीरघुनाथ । जेवणार ते नित्यमुक्त । श्रुतिसंमत शास्त्रार्थें ॥ ७७ ॥ ऐसिये भोजनाची स्थिती । सकाम हे निष्कामप्रयुक्ती । जे जे रसीं जी जी आसक्ती । तो तो रस सेविती ॥ ७८ ॥ वसिष्ठताटीं परवडी चोख । तैसेंचि ताट सेविती रंक । उंच नीच नाहीं देख । जेविलें कटक समतृप्ती ॥ ७९ ॥ नलगे मागणें नाहीं वाढणें । ठायींचीं सरों नेणती अन्नें । जें जें आवडे ज्याकारणें । तें तें सेवणें तेणें गोडी ॥ ८० ॥ क्षुधा हरपली तेथ । तृष्णा तृष्णेसीं जाली तृप्त । तृप्त जालें सैन्य समस्त । कोणी अतृप्त असेना ॥ ८१ ॥ अश्व गज न खाती तृण । त्यांसीही ओगरिलें[3] मिष्टान्न । कोरडें न पाजिती जीवन । करिती क्षीरपान स्वादिष्ट ॥ ८२ ॥ चांटे[4] भाटे उदमी लोक । वाणी वेव्हारे सकळिक । रजक अदिकरूनि चर्मक । एकैक तृप्त जाले ॥ ८३ ॥ वसिष्ठ भरत आणि शत्रुघ्न । ऋषींनीं केलें शुद्धाचमन । सभा बैसली प्रसन्न वदन । सुख संपूर्ण सर्वांसी ॥ ८४ ॥ टिळे माळा गंधाक्षता । विडे दिधले समस्तां । पूजितां श्रीरामाच्या भक्तां । उल्हासता भरद्वाजा ॥ ८५ ॥ वनश्री[5] मघमघीत मनोहर । परागें उधळती सपूर[6] । सामगायनें अति मधुर । तैसे भ्रमर रुणझुणती ॥ ८६ ॥ कोकिळा वेदवादें कूजती । वेदान्त पारवीं घुमघुमिती । तांडवें नाचे उमापती । तैसीं नाचती मयूरें ॥ ८७ ॥ ब्रह्मज्ञानाच्या निजयुक्ती । फळाशा सांडोनि शुक बोलती । पिंगळे त्यांसीं संवादती । संतोषती सारिका ॥ ८८ ॥ विवेकद्राक्षांचे पैं घड । देखतां डोळयांचें पुरे कोड । सकळ गोडियां ते गोड । सुखसुरवाड[7] सेविलिया ॥ ८९ ॥ हाहाहूहू गंधर्व दोन्ही । मधुरस्वरें गाती गाणीं । रंभा उर्वशी विलासिनी । रंगीं नाचणी[8] नाचती ॥ ९० ॥ प्रकाश न लोपेल सूर्यापुढें । ऐसे रत्नदीप चोखडे । उजळले वांडेंकोडें । चहूंकडे लखलखित ॥ ९१ ॥ ज्या दीपांची जळजळ । पुढें काजळी माथां काजळ । ते मालवोनि सकळ । चिद्रत्नांचे उजळिले दीप ॥ ९२ ॥ प्रतिपुरुषीं भिन्न ओवरी[10] । रत्नमंचक त्यामाझारीं । पुरुषाप्रती पांच नारी । सेवेवरी तिष्ठती ॥ ९३ ॥ एकी करिती चरणक्षाळण । एकी त्या चरणां संवाहन । एकी चंदन एकी दिव्यव्यंजन[11] । विडिया जाण एकी देती ॥ ९४ ॥ अप्सरा पुरुषांसीं बोलती । आम्ही न येऊं अयोध्येप्रती । आजींची क्रमिलिया राती । जाऊं मागुती स्वर्गासी ॥ ९५ ॥ भरद्वाजाचे ध्यानज्ञानें । आमचें येथें आगमन । दिवस उगवतांचि जाण । स्वर्गगमन आम्हांसी ॥ ९६ ॥ जवळी असतां अप्सरांसी । श्रीरामभक्त उदास त्यांसी । भूतीं देखतां भगवंतासी । स्त्रीपुरुषांसी अभावो ॥ ९७ ॥ मुळीं आत्मा आत्मीं नाहीं । तेथें स्त्रीपुरुष मिथ्या पाहीं । स्त्रीपुरुषभास भासे देहीं । ते देहबुद्धि नाहीं हरिभक्तां ॥ ९८ ॥ विषयी पुरुष सहितनारी । स्वर्ग भोगिती घरोघरीं । भरद्वाज ऐसियेपरी । पूजा करी भरताची ॥ ९९ ॥ कोणी नाहीं मळिन[12]वास । कोणी नाहीं मळिनकेश । कोणी नाहीं मळिन[13]भास । स्वर्गउल्हास सर्वांसी ॥ १०० ॥ अश्व गज खर उष्ट्र । मिष्टान्नें भक्षिती तृणचर । जळप्राशनीं प्राशिती क्षीर । केलें विचित्र भरद्वाजें ॥ १ ॥ वाल्मीकिरामायणाआंत । स्वर्गभोग लिहिले बहुत । तितुका नाहीं वाढविला ग्रंथ । संकलितार्थ[14] बोलिलों ॥ २ ॥ भरद्वाजाचें परम ज्ञान । स्वगृहीं क्षणैक धरोनि ध्यान । स्वर्गभोगा आकर्षून । केलें पूजन समस्तां ॥ ३ ॥ राव रंक समसमान । भरद्वाजें केलें पूजन । आश्चर्य करिती सकळ जन । भरत शत्रुघ्न विस्मित ॥ ४ ॥

१ हळू हळू. २ ठेवण. ३ वाढिलें. ४ कापडवाले. ५ वनशोभा. ६ भरपूर. ७ सुखाचा सुकाळ. ८ नृत्यांगना. ९ हर्षानें. १० खोली. ११ उत्तम पंखे. १२ मळकट वस्त्रांचा. १३ मळिन कांतीचा. १४ संक्षेपानें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

स्वर्गीं केवळ अमृतपान । देवांसी स्वर्गीं न मिळे अन्न । अमृतासहित मिष्टान्न । दिधलें भोजन भरद्वाजें ॥ ५ ॥ नाहीं आणिली कामधेनू । नाहीं वेंचिलें संचित धनू । स्वर्ग आणिला आकर्षूनू । क्षणार्धे ध्यान धरोनियां ॥ ६ ॥ ऐसें ऋषिवर्य बोलती । भरत शत्रुघ्न चकित चित्तीं । संवाद करितां सरली राती । उदयप्राप्ती होऊं आली ॥ ७ ॥ भरत पुसे भरद्वाजासी । स्वामींनीं आज्ञा द्यावी आम्हांसी । जाऊं श्रीरामभेटीसी । म्हणोनि पायांसी लागला ॥ ८ ॥ भरद्वाजें आल्हादयुक्त । प्रीतीनें आलिंगिला भरत । चित्रकूटीं श्रीरघुनाथ । तुज निश्चित भेटेल ॥ ९ ॥ ऐकोनि भरद्वाजाची गोष्टी । भरतें बांधिली शकुनगांठी । चरण वंदिले ललाटीं । पाठी थापटी भरद्वाज ॥ ११० ॥ भरद्वाजें येवोनि आपण । वसिष्ठादि ऋषिगण । त्यांसी घातलें लोटांगण । वंदिले चरण वसिष्ठाचे ॥ ११ ॥ वसिष्ठाचे निजचरण । स्वर्गासी बोळंगे [१]पाकशासन । तुझेनि चरणप्रभावें जाण । केलें पूजन भरताचें ॥ १२ ॥ वसिष्ठ म्हणे भरद्वाजासी । सकळसिद्धि निगर्वापासीं । तेणें निगर्वें तूं नांदसी । वंद्य सर्वांसी तिहीं लोकीं ॥ १३ ॥ [३]अनुमोदोनि भरद्वाजासी । ऋषि निघाले पुसोनि त्यांसी । भरतें रथीं बैसवोनि समस्तांसी । निजसैन्यासी सिद्ध केलें ॥ १४ ॥ [४]शिबिके बैसवूनियां जननी । रथीं बंधु बैसले दोनी । लागली वाजंत्रांची ध्वनी । [५]गडगर्जनीं निघाले ॥ १५ ॥ उतरोनियां यमुनातीर । ठाकिला चित्रकूट गिरिवर । अवघीं केला जयजयकार । हर्षनिर्भर श्रीरामें ॥ १६ ॥ देखोनि चित्रकूट पर्वत । भरत आनंदें नाचत । आजि भेटेल रघुनाथ । उल्हासयुक्त शत्रुघ्न ॥ १७ ॥ भरता श्रीरामदर्शन । तें सुख बोलूं शकेल कोण । एका जनार्दना शरण । जीवप्राण येरयेरां ॥ १८ ॥ भरता श्रीरामासीं भेटी । हरिखें ओसंडेल सृष्टी । तें सुख न बोलवे गोष्टी । पडे मिठी परब्रह्मीं ॥ १९ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे अयोध्याकांडे एकाकारटीकायां भरद्वाजाश्रमगमनभरतचित्रकूटपर्वतप्रवेशो नाम त्रयोदशोऽध्यायः ॥ १३ ॥ ओंव्या ॥ ११९ ॥ श्लोक ॥ ६ ॥

१ सेवी. २ इन्द्र. ३ आनंदवून. ४ पालखीमध्यें. ५ मोठ्या गर्जनेनें. ६ भरेल. ७ वेदांत सांगितल्याप्रमाणें.

अध्याय चवदावा

श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ॥ येरीकडे श्रीरघुनाथ । चित्रकूट पर्वताआंत । अग्निहोत्र सीतासमवेत । नित्य [७]वेदोक्तें प्रतिपाळी ॥ १ ॥ श्रीरामसेवेसी सौमित्र । पर्णशाळा केली विचित्र । श्रीरामाचें अग्निहोत्र । अहोरात्र संरक्षी ॥ २ ॥ विचित्र आणी फळें मूळें । नित्य निर्वाह पुरवी जळें । काष्ठें आणोनियां प्रबळें । अग्नि सोज्ज्वळ स्वयें रक्षी ॥ ३ ॥ रामसीतेचें चरणक्षाळण । नित्य नेमें करी लक्ष्मण । जैसीं लक्ष्मीनारायण । या बुद्धीं पूर्ण पूजित ॥ ४ ॥ विधिविधान जाणे श्रीराम । दर्शपौर्णमासिक होम । मृगमांसें होम[८]संभ्रम । चालवी नेम सौमित्र ॥ ५ ॥ श्रीरामाचे सेवेवरी । शरीर [९]वंचीना तिळभरी । धनुष्यबाण घेवोनि करीं । मृगें मारी होमार्थ ॥ ६ ॥ धन्य त्या मृगांचें जीवित । त्यांचे मांसें होम करी श्रीरघुनाथ । ज्यांचीं फळें स्वयें सेवित । ते वृक्ष नित्यमुक्त श्रीरामें ॥ ७ ॥ [१०]इध्मा[९]बर्हिकुशास्तरण । श्रीरामें उद्धारलें तृण । पायांतळीं येती पाषाण । तेही जाण नित्यमुक्त ॥ ८ ॥ स्नान करितां निर्मळ [११]नीरें । तेथें उद्धरिलीं मत्स्य मगरें । वनवासी श्रीरामचंद्रें । वनीं वनचरें उद्धरिलीं ॥ ९ ॥ करावया जगदुद्धारण । श्रीरामाचें वनप्रयाण । ज्या ज्या घडलें रामदर्शन । ते ते जाण उद्धरिले ॥ १० ॥ श्रीराम देखावया दृष्टीं । पाहिजेत भाग्याचिया कोटी । धन्य धन्य तेचि सृष्टीं । ज्यांसी भेटी श्रीरामीं ॥ ११ ॥ श्रीरामकथा नित्य श्रवण । सावध परिसे तो धन्य धन्य । निर्लोभ रामकथापठन । त्याचेनि पावन जडमूढ ॥ १२ ॥ ज्याचे मुखीं श्रीरामनाम । धन्य धन्य त्याचा जन्म । भक्तीनें नित्य स्मरती नाम । त्यांसी श्रीराम उद्धरी ॥ १३ ॥ ऐसा श्रीराममहिमा गहन । बोलतां वेदां पडे मौन । तें मी केंवी बोलों दीन । कथानुसंधान अवधारा ॥ १४ ॥ श्रीरामाचें अग्निहोत्र । चालवावया अति तत्पर । मृग मारोनि अति पवित्र । आणिले सत्वर लक्ष्मणें ॥ १५ ॥ पूर्णिमाअमावास्यादि याग । श्रीराम ते वधी मृग । यागार्थ केले विभाग । मांसार्थी [१२]कैंग तेथें

८ होमसंबंधी खटपट. ९ चुकवीना. १० समिधा, दर्भ आणि दर्भासन. ११ उदकानें. १२ कावळे.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

आले ॥ १६ ॥ लक्ष्मण आणावया गेला फळें। मांसार्थी टपती कावळे। राम सीतेसी म्हणे अबळे। हीं पक्षिकुळें निवारीं ॥ १७ ॥

तद्रामवचनात् सीता काकेभ्यः पर्यरक्षत ।
इतश्चेतश्च तां काको वारयंतीं पुनः पुनः ॥ १ ॥
यस्या हारांतरचरः कामचारी विहंगमः ।
काकेनारोध्यमानां तां सा मुमोह तदातुरम् ॥ २ ॥
पक्षतुंडनखाग्रैश्च कोपयामास कोपनाम् ।
सीतामभिपपातैव ततश्चुक्रोध राघवः ॥ ३ ॥

सीता श्रीरामाचे आज्ञेवरी। सवेग येवोनि बाहेरी। स्वयें कागातें निवारी। राजकुमरी सुकुमार ॥ १८ ॥ सुंदर देखोनियां तिसी। सुदसुव गंधर्व अभिलाषी। धरोनियां कागवेषासी। सीतेपासीं तो आला ॥ १९ ॥ स्वयें हांकितां सीता सती। इतर काग तत्काळ पळती। तो पळेना कामासक्ती। पुढतपुढती झेंपावे ॥ २० ॥ काग हांकितां सरोखें। सुटलें कंचुकीचें पाखें। पालव चळला अंगझोकें। तंव हृदय देखे तो काग ॥ २१ ॥ मुक्तकच दिसे सुंदरी। हार रुळे कुचांवरी। देखोनि काग कामाचारी। हृदयावरी झेंपावे ॥ २२ ॥ पांखें झडपोनियां तिसी। नखें ओरबडिलें कुचासी। चंचूनें चुंबोनि मुखासी। केली कासावीस जानकी ॥ २३ ॥ कागपक्षझडपेचे ऊर्मी। सीता आक्रंदोनी पडे भूमीं। काग कामाचारी अधर्मी। हृदयआरामीं विचरत ॥ २४ ॥ काग बैसला हृदयावरी। सीता कराग्रें निवारी। चंचुक्षतें करितां करीं। हांक मारी आक्रोशें ॥ २५ ॥ ऐकोनि सीतेची दीर्घ हांक। वेगीं आला रघुकुळटिळक। दुष्ट देखोनियां काक। दर्भशिखा देख मोकलिली ॥ २६ ॥

सोऽभिमंत्र्य शरैषीकामैषीकास्त्रेण वीर्यवान् ।
काकं तमभिसंधाय ससर्ज पुरुषर्षभः ॥ ४ ॥
स तेनाभिहतः काकस्त्रींल्लोकान् पर्यगात्ततः ।
यत्र यत्रागमत्काकस्तत्र तत्र ददर्श ह ॥ ५ ॥
इषीकां भूतसंकाशां स रामं पुनरागमत् ।
सीतायास्तत्र पश्यंत्या मानुषीमैरयद्गिरम् ॥ ६ ॥

ते श्रीरामाची दर्भशिखा। इषीकामंत्रें मंत्रोनि देखा। सोडितां पाठी लागली काका। धगधगीत अर्कसमप्राय ॥ २७ ॥ सवेग पळतां काका। पाठी लागली इषीका। परिभ्रमतां तिहीं लोकां। पाठीलाग देखा सोडीना ॥ २८ ॥ श्रीरामइषीका देखोन। इंद्र सांडी सिंहासन। तेथें काकासी राखे कोण। करी पलायन देवांपाशीं ॥ २९ ॥ श्रीरामइषीका देखोन। इंद्र कुबेर वरुण। धाकें करिती पलायन। यमही आपण चळीं कांपे ॥ ३० ॥ श्रीरामइषीका देखोन। कुळाचळ कंपायमान। इषीका वंदी चतुरानन। घाली लोटांगण शिव भवानी ॥ ३१ ॥ काग जाय जे जे ठायीं। इषीका पावे लवलाहीं। काक हिंडतां लोकीं तिहीं। ठाव नाहीं रहावया ॥ ३२ ॥ धाकें काक रिघे पाताळीं। तेथें दैत्यदानव कांपती चळीं। श्रीरामइषीका करील होळी। तिंहीं तत्काळीं दवडिलें ॥ ३३ ॥ काक हिंडतां दशदिशी। अत्यंत जाला कासाविसी। कोठें न लभे आश्रय त्यासी। तेणें नारदासी देखिलें ॥ ३४ ॥ धरिलें नारदाच्या पायासी। म्हणे इषीका निवारीं देवऋषी। तो म्हणे शरण रिघें रामासी। तो शरणागतासी न मारी ॥ ३५ ॥ ऐकोनि नारदाचें वचन। काकें केलें पुनरागमन। श्रीरामा तुझ्या चरणां शरण। माझे प्राण वांचवीं ॥ ३६ ॥ वंदोनि श्रीराम लोटांगणीं। काक बोले मनुष्यवाणी। इषीका धगधगीत देखोनी। आश्चर्य मानी जानकी ॥ ३७ ॥ काक म्हणे गा रघुनाथा। थोर अपराध माझे माथां। शरण आलों मी तुज सर्वथा। न मारावें आतां राघवा ॥ ३८ ॥ नारदसद्गुरूचें वचन। तेणें मी तुज आलों शरण। शरणागताचें रक्षण। माझें मरण तें निवारीं ॥ ३९ ॥ मरणाभेणें जी पळतां। थोर शिणलों गा रघुनाथा। सद्गुरूनें हात ठेविला माथां। म्हणोनि आतां शरण आलों ॥ ४० ॥ नारदें सांगितलें कानीं। जानकी माता जगज्जननी। ते म्यां अभिलाषिली कामेंकरूनी। मातृगमनी महादोषी ॥ ४१ ॥ महापातकें ज्याच्या माथां। तोही श्रीराम स्मरतां। पातकें जावोनि तत्त्वतां। होय सरता वैकुंठीं ॥ ४२ ॥ श्रीराम दों अक्षरांसाठीं। पातकें जळती

१ रागानें. २ चोळीचें. ३ विरडें, गांठ. ४ पदर. ५ बलात्कारानें. ६ सूर्याप्रमाणें प्रखर. ७ फिरतां. ८ श्रेष्ठ.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

कोट्यनुकोटी । तो नर स्मरता होय वैकुंठीं । बैसे पाटीं ब्रह्मयाच्या ॥ ४३ ॥ श्रीरामनामाचा प्रताप । पापें निर्दळती आकल्प । माझें तंव पाप अल्प । मी निष्पाप श्रीरामें ॥ ४४ ॥ श्रीरामनाम स्मरतां वाक्पुटीं । कलिकल्मषा होय तुटी । तो श्रीराम देखतां दृष्टीं । पापाची गोष्टी मज नाहीं ॥ ४५ ॥ श्रीराममूर्ति आणितां ध्यानीं । सकळ पापा होय धुणी । तो श्रीराम देखिला नयनीं । पाप त्रिभुवनीं मज नाहीं ॥ ४६ ॥ ऐसें बोलोनि आपण । काकें वंदिले श्रीरामचरण । सीतेसी घातलें लोटांगण । म्हणे कृपा पूर्ण मज करीं ॥ ४७ ॥ म्हणे कुचाग्रीं लावितां हात । बाळकाची सत्ता बहुत । तैसें मी तुझें ज्येष्ठ अपत्य । जाण निश्चित जानकी ॥४८॥ एक कुच धरोनि हातीं । दुजा घाली मुखाप्रती । बाळसत्तेची ख्याती । तें तुजप्रती म्यां केलें ॥ ४९ ॥ पतीस कुचसत्ता एकांतीं । बाळकासी कुचसत्ता लोकांतीं । तें म्यां केलें तुजप्रती । जाण निश्चितीं जानकिये ॥ ५० ॥ पतीस कुचसत्ता मध्यरात्रीं । बाळकाची सत्ता अहोरात्रीं । तें म्यां केलें तुजप्रती । जाण निश्चितीं जानकिये ॥ ५१ ॥ रजस्वला जालिया कांता । पतीनें शिवों नये सर्वथा । तेथेंही बाळक होय झोंबतां । तैसें तत्त्वतां म्यां केलें ॥ ५२ ॥ करेंकरोनियां जाण । बाळक करी कुचप्राशन । म्यांही करेंकरोनि पूर्ण । केलें स्तनपान तुझें माते ॥ ५३ ॥ गाईचा गोरा गाईवरी उडे । तरी मातेसी कोप न चढे । ते म्हणे तान्हें बाळक वेडें । तैसें मजकडे पाहीं माते ॥ ५४ ॥ तूं तंव चराचरजननी । आम्ही अपत्यें पशुसमानी । क्षोभ न धरावा मनीं । सखी जननी तूं आम्हां ॥ ५५ ॥ ऐकोनि काकाचें बोलणें । सीता कळवळिली निजमनें । यासी राखावें जीवें प्राणें । कृपा करणें श्रीरामा ॥ ५६ ॥ तुझेनियां बोलें । म्यां यावरी निर्वाण केलें । तें नवचे निवारिलें । अटक पडिलें जानकिये ॥ ५७ ॥ ऐकें स्वामी रघुनाथा । मारूं नये शरणागता । कैसेनि याच्या करिसी घाता । यासी सर्वथा रक्षावें ॥ ५८ ॥ सर्वशक्ती सर्वसत्ता । स्वयें रक्षावें शरणागता । ऐसीं ब्रीदें तुझीं रघुनाथा । कैसापरी आतां या वधिसी ॥ ५९ ॥ इषीका अनिवार निश्चित । तरी राखावा शरणागत । तैंच तुझें सत्य व्रत । प्रताप यथार्थ पैं तुझा ॥ ६० ॥ जिणें मारविलें कागातें । तेचि म्हणे वांचवा त्यातें । ऐसें लाघव केलें रघुनाथें । स्वयें कर्मातें अलिप्त ॥ ६१ ॥ कळला काकाचा वृत्तांत । जाणोनि सीतेचें मनोगत । काय बोलिला श्रीरघुनाथ । सावचित्त अवधारा ॥ ६२ ॥

अमोघं क्रियतामस्त्रमेकमंगं परित्यज ।
किमंगं शातयतु ते शरैषीका ब्रवीहि मे ॥ ७ ॥
एतावद्धि मया शक्यं तव कर्तुं प्रियं खग ।
एकांगहीनं ह्यस्त्रेण जीवितं मरणाद्वरम् ॥ ८ ॥

ऐकोनि सीतेचा वचनार्थ । काकासी नाभीं म्हणे श्रीरघुनाथ । तुझें वांचावया जीवित । ऐक हितार्थ सांगेन ॥ ६३ ॥ इषीका अनिवार निश्चित । तिणें करावा तुझा प्राणान्त । परी तूं जालासी शरणागत । यालागीं तिष्ठत राहिलीसे ॥ ६४ ॥ इषीका अनिवार दारुण । तुवां वांचवावया प्राण । एकांग देसी आपण । तेणें निवारण चालेल ॥ ६५ ॥ तुझ्या हितालागीं जाण । तुज मी सांगतों आपण । एकांग करोनि क्षीण । आपुला प्राण वांचवीं ॥ ६६ ॥ काक म्हणे श्रीरघुनाथा । तुझी आज्ञा मी वंदीन माथां । एकांग घे सुखरूपता । इषीकाघाता चुकवावें ॥ ६७ ॥ श्रीराम म्हणे काकासी । कोण अंग तूं देतोसी । तें देवोनि इषीकेसी । तुज निश्चयेंसीं राखीन ॥ ६८ ॥ काक म्हणे ऐक आतां । माझे इंद्रियांची व्यवस्था । अपराध असेल ज्याचे माथां । त्याचे करीं घाता इषीकास्त्रें ॥ ६९ ॥ उजव्या डोळां जानकी माता । डावेनि अभिलाषिली तत्त्वतां । इषीका घालोनि त्याचे माथां । त्यासी रघुनाथा दंडावें ॥ ७० ॥ ऐसी ऐकतांचि वाणी । इषीका प्रवेशे वामनयनीं । काक मूर्च्छित पडे धरणीं । रामें तत्क्षणीं सावध केला ॥ ७१ ॥ घेतला माझा वाम नयन । हें कागासी नाहीं ज्ञान । मी जालों अंगहीन । हेंही चिन्ह तो नेणे ॥ ७२ ॥ मागें पाहतांचि त्या काका । न देखतांचि इषीका । हर्षें वंदी रघुकुलटिळका ।

१ बरोबरीला. २ नाहींशीं होतात. ३ कलियुगांतील पापाला. ४ नाश. ५ सर्व लोकांदेखत. ६ स्तनपान. ७ बाणा. ८ युक्ति. ९ भिऊं नको.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

माझ्या मरणदुःखा निवारिलें ॥ ७३ ॥ अद्यापि काकदेहीं नवलाहो । जराजर्जरित न पवे क्षयो । श्वापदीं धरितां कां लागला घावो । तोचि पहाहो मृत्यु काका ॥ ७४ ॥ यावरी श्रीरामराव । काकाचा वारिला मृत्युभाव । समस्तां वाटला नवलाव । कृपाळु पहा हो श्रीराम ॥ ७५ ॥ जो तो म्हणे काक काणा । हें दुःख काकाचिये मना । जग निंदितें मज जाणा । श्रीरामें व्यंकणा[१] मी केलों ॥ ७६ ॥ कृपेनें वांचविलें संपूर्ण । ते कृपेस आलें व्यंकणपण । ऐकोनि हांसला रघुनंदन । काय वचन बोलिला ॥ ७७ ॥ सामर्थ्य देतों उजव्या बुबुळा । एकचि बुबुळ दोहीं डोळां । तुझी वाढेल देखणी कळा । देखणां[२] सकळांमाजि होसी ॥ ७८ ॥ कृपेचें जें व्यंकणपण । तें रामें निवारिलें जाण । काकाचें देखणेपण जाण । जो तो जाण स्वयें वानी ॥ ७९ ॥ दशाहाच्या[३] पिंडासी । देखणेपण आहे काकासी । ज्यातें देखे पापराशी । त्या पिंडासी नातळे ॥ ८० ॥ श्रीरामकृपेस्तव जाण । पापपुण्याचें देखणेपण । काकासी पावलें संपूर्ण । दशाहचिन्ह जग देखे ॥ ८१ ॥ चंचूनें चुंबिलें सीतेसी । तेणें मुखें भक्षितो निर्यांसी । रामें देखणें दिधल्या डोळ्यासी । पापपुण्यासी तेणें देखे ॥ ८२ ॥ ऐसियापरी रघुनंदनें । काकाचें निवारिलें मरणें । वांचविला देखणेपणें । समाधानें सुखी केला ॥ ८३ ॥ शरण आणोनी काकासी । श्रीरामें सुखी केलें सीतेसी । काका वांचवोनि कृपेसीं । महादोषियासी सुखी केलें ॥ ८४ ॥ तंव येरीकडे निजभरत । श्रीरामभेटीसीं उद्यत । गजभारेंसीं असे येत । तोही कथार्थ अवधारा ॥ ८५ ॥ श्रीरामभरतां आलिंगन । तेणें जीवशिवां समाधान । एका जनार्दना शरण । आनंदघन श्रीरामकथा ॥ ८६ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे अयोध्याकांडे एकाकारटीकायां काकनिग्रहो नाम चतुर्दशोऽध्यायः ॥१४॥ ओंव्या ॥८६॥ श्लोक ॥८॥

अध्याय पंधरावा

श्रीरामचंद्राय नमः ॥ देखोनि चित्रकूट पर्वत । अत्यंत हरिखला भरत । देखावया श्रीरघुनाथ । उल्हास अद्भुत सर्वांसी ॥ १ ॥ सेना शृंगारिली मनोहर । वीरीं केले नाना शृंगार । गर्जत घेवोनि गजभार । भरत सत्वर चालिला ॥ २ ॥ कोइते कातिया कुऱ्हाडे । वन छेदिती सैन्यापुढें । वेगीं भूमि सज्जिती मा[५]तियेडे । गज रथ घोडे चालावया ॥ ३ ॥ अश्वगजांचा कडकडाट । रथ चालिले घडघडाट । सैन्य चालतां न पुरे वाट । रजें वैकुंठ व्यापिलें ॥ ४ ॥ चरणरज अति उद्भट । लोकलोकांतर त्यजोनि स्पष्ट । ठाकोनि जावें वैकुंठ । हा नेटपाट[६] रजाचा ॥ ५ ॥ गज गर्जती गँहिरे[७] । वारू हिंसती एकसरें । तुरें वाजती अपारें । गिरा गंभीर वीर गर्जती ॥ ६ ॥ निशाण भेरी वाजंतरें । डोल ढमके बुरंगे घोरें । तडक फुटले एकसरें । गिरिकंदरें दुमदुमलीं ॥ ७ ॥

अथ रामे तदासीने लक्ष्मणे चाभिवीक्ष्यति ।
तस्य सैन्यस्य महतो रौद्र आसीन् महास्वनः ॥ १ ॥
तेन शब्देन महता वर्धता विप्रबोधिताः ।
गुहां संत्यज्य वै व्याघ्रा निलिल्युर्बिलवाससि ॥ २ ॥
ऋक्षाश्चोत्ससृजुर्वृक्षान् प्रपेतुर्हरयो गुहाम् ।
खमुत्पेतुः खगास्तत्र मृगाश्चापि विदुद्रुवुः ॥ ३ ॥

ऐकतां श्रीराम सौमित्र । भरतसेनेचा नाद थोर । दुमदुमलें गिरिकंदर । श्वापदें क्रूर गजबजलीं[८] ॥ ८ ॥ नाद न समाये गगनीं । नादें कंपायमान अवनी[९] । श्वापदें पळती जीव घेवोनी । पक्षी त्रासोनी कलकलती ॥ ९ ॥ व्याघ्र पळाले सांडोनि जाळी । वराहँ[१०] दडाले महीबिळीं । सर्प रिघाले वारुळीं । दडी पाताळीं तिंहीं दिधली ॥ १० ॥ तगर मृग मुंगुसें । धाकें पळती आँपैसें[११] । जळींचे खळबळले मासे । भूतें आक्रोशें धुगधुगती ॥ ११ ॥ ऐकतां धाकाची दणदण । आस्वलें विसरलीं गुणगुण । तिंही पळालीं जीव घेवोन । कंदरारण्य[१२] टाकिलें ॥ १२ ॥ धाकें पळती नरवानर । पळती वनगजांचे भार । सिंहांसी धाक लागला थोर । मारूं कुंजरें[१३] विसरले ॥ १३ ॥ धाकें पळती रानम्हैसे । पळतां मागें पुढें न दिसे । रानगाई पळती आक्रोशें । हाणिती वत्सें हंबरडे ॥ १४ ॥

१ काणा. २ पहाणारा. ३ दहाव्या दिवसाच्या. ४ नस्काला. ५ जमीन साफ करणारे. ६ निश्चय.

७ गंभीर. ८ खिकाळतात. ९ पृथ्वी. १० डुकर. ११ आपोआप. १२ गुहा व अरण्य. १३ हत्ती.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

विलीना विविशुर्भीताः स्ववस्तिपु द्विजातयः ।
विद्याधराः खमुत्पेतुः किन्नरा भेजिरे दिशः ॥ ४ ॥
तमभ्यासमनुप्राप्तं तस्य देशस्य लक्ष्मणः ।
सैन्यस्य चागतं शब्दमिति रामे न्यवेदयेत् ॥ ५ ॥

वनौकें[1] कांपती चळचळीं । वडवाघुळें रिघती ढोलीं । वृक्ष उन्मूळती समूळीं । देती आरोळी भयाची ॥ १५ ॥ द्विजवरांचे शिष्य बहुत । धाकें चळचळां कांपत । एक धोत्रामध्यें मुतत । एकां अधोवात होंसरले[2] ॥ १६ ॥ धाक घेतला उद्भट । दांत वाजती खटखट । एकांचें धाकें फुगलें पोट । एकांचे कंठ शोकले ॥ १७ ॥ ब्राह्मण शांतिपाठ जपती । तरी धीर धरूं न शकती चित्तीं । सांडोनियां श्रीरघुनाथाप्रती । पळाले समस्त गुहेमाजी ॥ १८ ॥ विद्याधर आणि किन्नर । धाकें लंघिती दिशांचे पार । नादें त्रासिले दुर्धर । वनींचे वनचर पळाले ॥ १९ ॥ नादें भिल्ल पळाले धाकेंसीं । ते सांगती श्रीरामासी । वेगीं पळवा सीतेसी । आलें वनासी परचक्र ॥ २० ॥ जानकी देखोनि सुंदरी । हिरोनि नेतील क्षणामाझारीं । इसी तुम्हीं धरोनि करीं । गिरिकंदरीं रिघावें ॥ २१ ॥ तुम्ही अवघे दोघे जण । जरी आहेती धनुष्यबाण । तरी कितीक कराल आंगवण[3] । सैन्य दारुण आलेंसे ॥ २२ ॥

हंत लक्ष्मण पश्येह सुमित्रा सुप्रजास्त्वया ।
भीमस्तनितगंभीरं तुमुलः श्रूयते स्वनः ॥ ६ ॥

श्रीराम म्हणे गा लक्ष्मणा । कोण्या रायाची हे सेना । करीत आलीसे गर्जना । आणोनि मना मज सांगें ॥ २३ ॥ चतुरा सुमित्रानंदना । तूं ओळखिसी राजचिन्हां । कोण राव आला वना । आणुनी मना मज सांगें ॥ २४ ॥ ये वनीं वाल्मीकाश्रमासी । राजे भेटों येती त्यासी । अथवा आले पारधीसी । आणोनि मनासी मज सांगें ॥ २५ ॥ ऐकोनि श्रीरामाच्या वचना । वंदोनियां त्याचे चरणां । सवेग पाहूं आला सेना । राजचिन्हां लक्षित ॥ २६ ॥ देखे ध्वजांकीं[4] दशरथ । हे तंव राघवसेना समस्त । वनीं वधावया रघुनाथ । सेनेसीं भरत आलासे ॥ २७ ॥ कैसा राज्यलोभाचा स्वार्थ । सखा बंधु जो आमचा आप्त । तो वैराकारां[5] पेटला भरत । वनीं रघुनाथा बधूं आला ॥ २८ ॥ पहिलें श्रीरामीं दावी प्रेम । डोळां आंसू अंगीं रोम । तोचि मारावया श्रीराम । वना अधम स्वयें आला ॥ २९ ॥ श्रीरामाचा अनन्य भक्त । मी जीवें असतां पैं जीत । कैसेनि मारील रघुनाथ । ससैन्य भरत निवटीन ॥ ३० ॥ आजि माझे तिखट बाणीं । धडमुंडांकित करीन धरणी । भरत शत्रुघ्न हे दोनी । अर्धक्षणीं मारीन ॥ ३१ ॥ श्रीरामाचा निजघातकी । तो बंधु मारितां नव्हे पातकी । यश मिरवेल तिन्ही लोकीं । मनीं निश्चर्क[6] नेम केला ॥३२॥ रागें धनुष्या वाहिला गुंण[7] । आरोळी देवोनि लक्ष्मण । सैन्यासन्मुख आला आपण । निर्वाणबाण सज्जोनी ॥ ३३ ॥ सौमित्राचेनि गिरागजरें[8] । दुमदुमलीं गिरिकंदरें । डळमळलीं मेरुशिखरें । धरा भारें कांपत ॥ ३४ ॥ आधींच शेषाचा अवतार । श्रीरामविरहें कोपला थोर । नेत्रीं ज्वाळा निघती दुर्धर । तंव सुरनर कांपती ॥ ३५॥ सन्मुख देखोनि सौमित्रासी । सेनासैनिक कासाविसी । परस्परें बोलती येरयेरांसी[9] । हाही आम्हांसी स्वामी होय ॥ ३६॥ जैसे भरत आणि शत्रुघ्न । तैसेचि श्रीराम आणि लक्ष्मण । येथें कोणासी झुंजेल कोण । विषम[10] पूर्ण ओढवलें ॥ ३७ ॥ पुढें झुंजतां स्वामी संपूर्ण । मागें पळतां उणेपण । सौमित्रें सज्जिला धनुष्यबाण । काय आपण करावें ॥ ३८ ॥ राहिली श्रीरामाची भेटी । युद्ध मांडलें उठाउठीं । सरली संग्रामाची गोष्टी । शस्त्रें पोटीं घालावीं ॥ ३९ ॥ सन्मुख झुंजतां स्वामीसी तुटी । संग्रामीं देवों नये पाठी । क्षात्रधर्माची अटक[11] मोठी । शस्त्रें पोटीं घालावीं ॥ ४० ॥ आतां श्रीराम न दिसे दृष्टी । विचाराची खुंटली गोष्टी । क्षात्रधर्माची अटक मोठी । शस्त्रें पोटीं घालावीं ॥ ४१ ॥ ऐकोनि सौमित्राचा सिंहनाद । श्रीराम जाला सन्नद्ध[12] । दारुण मांडिलेंसे युद्ध । म्हणोनि सक्रोध चालिला ॥ ४२ ॥ श्रीराम योद्धा निरीक्षी नयना । तंव देखे दशरथसेना । मग तो म्हणे गा लक्ष्मणा । आपआपणा युद्ध केंवी ॥ ४३ ॥ आमची सेना आमचे प्रधान । आमचे बंधु भरतशत्रुघ्न ।

१ रानांतील घरें. २ प्राप्त झाले, निघाले. ३ पराक्रम. ४ ध्वजावरील चिन्हाचे ठायी. ५ वैर करण्यास. ६ निश्चयपूर्वक. ७ दोरी, प्रत्यंचा. ८ वाणीच्या गर्जनेनें. ९ एकमेकांस. १० संकट. ११ प्रतिबंध. १२ तयार.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

तुज युद्धासी काय कारण। निर्वाणबाण कां घेसी ॥ ४४ ॥

संपन्नं राज्यमिच्छंस्तु व्यक्तं राज्याभिषेचनम्।
आवां हंतुं समभ्येति कैकेय्या भरतः सुतः ॥ ७ ॥

सौमित्र म्हणे रघुनंदना। सन्नद्ध बाहे करोनियां सेना। भरत आला असे वना। आम्हां दोघां जणां मारावया ॥ ४५ ॥ माझ्या रुक्मपुंखबाणीं[2]। मारीन वीरांच्या श्रेणी[3]। भरत शत्रुघ्न पाडीन रणीं। रुधिरें[4] धरणी न्हाणीन ॥ ४६ ॥ जो श्रीरामासी दे संताप। तो बंधु मारितां नाहीं पाप। श्रीरामकार्यार्थी साटोपें[5]। पाहें प्रताप रणरंगीं ॥ ४७ ॥ मी तंव तुझा अनन्य भृत्य[6]। जवळी असतां जीतें जितँ। कैसेनि तुज मारील भरत। करीन घात समस्तांचा ॥ ४८ ॥ ऐसें बोलोनि लक्ष्मण। करूं निघाला युद्धकंदन। तंव श्रीरामें धरिला धांवोन। म्हणे ऐसें आपण करूं नये ॥ ४९ ॥ त्यांचे युद्धासी आले कोण। नाहीं तिंहीं सोडिला बाण। तंववरी जाण आपण। युद्ध दारुण करूं नये ॥ ५० ॥

सुसंरब्धं तु भरतं लक्ष्मणं क्रोधमूर्च्छितम्।
रामस्तु परिसांत्व्याथ वचनं चेदमब्रवीत् ॥ ८ ॥
किमत्र धनुषा कार्यमसिना वा सचर्मणा।
महाबले महोत्साहे भरते स्वयमागते ॥ ९ ॥
विप्रियं कृतपूर्वं ते भरतेन कदा नु किम्।
ईदृशं वा भयं तेऽद्य भरतं यद्विशंकसे ॥ १० ॥
नहि ते निष्ठुरं वाच्यो भरतो नाप्रियं वचः।
अहं ह्यप्रियमुक्तः स्यां भरतस्याप्रिये कृते ॥ ११ ॥

लक्ष्मणा तुजला काय जालें। कैंचें भय सांगसी बोलें। भरत आमुचें तान्हुलें। सैन्य आलें तें आमचेंचि ॥ ५१ ॥ येथें पारखें[8] आहे कोण। कोणाचा घेऊं पाहसी प्राण। युद्ध करीन म्हणसी दारुण। हें मूर्खपण क्रोधाचें ॥ ५२ ॥ भरत आम्हांसी पूर्वीपासूनी। विरुद्ध वदला नाहीं स्वप्नीं। तो वधील वना येवोनी। हे मिथ्या वाणी जल्पसी ॥ ५३ ॥ येथें काय धरिसी धनुष्यबाण। कोणावरी घेतोसी खर्गवोढण[9]। भरत माझा जीवप्राण। त्यावरी निर्वाण करूं नको ॥ ५४ ॥ सैन्य आमचें अंकित। त्याचा तूं करूं नये घात। क्रोध सांडोनि होईं शांत। ऐक वचनार्थ पैं माझा ॥ ५५ ॥ भरत वधील आम्हांलागुनी। हा भयसंकोच तुझे मनीं। भरतापासूनि विरुद्ध करणी। जागृती स्वप्नीं घडेना ॥ ५६ ॥ लक्ष्मणा तुज नाहीं ज्ञान। म्हणोनि होसी क्रोधायमान। तुज मी सांगेन मुळींची खूण। ते सावधान अवधारीं ॥ ५७ ॥ एक पिंडांचे नित्योद्भूत। भरत आणि मी रघुनाथ। तुवां भरताचा करितां घात। मजही अनर्थ होऊं पाहे ॥ ५८ ॥ आम्हां दोघांचा एक प्राण। यालागीं गा विरुद्ध वचन। भरता न बोलावें आपण। माझी शिकवण मानावी ॥ ५९ ॥ विरुद्ध जें बोलसी भरता। तें चढेल माझिया माथां। ऐसें जाणोनि तत्त्वतां। विरुद्ध वार्ता न वदावी ॥ ६० ॥ याचिपरी गा सज्ञान। भूतीं[11] देखतां गा भगवान। विरुद्ध न बोलती वचन। समाधान तेणें त्यांसी ॥ ६१ ॥ आणिक एक आहे चिन्ह। आम्हां चवघांचा एक प्राण। तेंही सांगेन लक्षण। सावधान अवधारीं ॥ ६२ ॥ पुत्रेष्टियागीं[12] करी दशरथ। ऋष्यशृंग कर्ता तेथ। एक ताट पायसयुक्त। दिधलें निश्चित अग्निपुरुषें ॥ ६३ ॥ त्याचे केले चारी भाग। एका पिंडाचे आम्ही दोघ। सापत्नभागाचा विभाग। विकल्प दोघां आम्हां नाहीं ॥ ६४ ॥ प्रथम पायसाचे तीन भाग। घारीनें नेला कैकेयीचा भाग। दो भागांचे केले चार भाग। ते आम्ही चवघे एकपिंडी ॥ ६५ ॥ पांचवा भाग घारी नेत। तेणें ती जाली शापमुक्त। तिसी अंजनीजन्म प्राप्त। भाग उदरांत तियेच्या ॥ ६६ ॥ त्या भागाचा जाण निश्चित। जन्म पावला हनुमंत। यालागीं म्हणती अंजनीसुत। वायुसुत तोही एकें ॥ ६७ ॥ अंजनीउदरीं भाग संपूर्ण। यज्ञपुरुष जाण आपण। तिसीं विचरला[13] त्याचा प्राण। वायुनंदन या हेतू ॥ ६८ ॥ अर्धभागें आम्हां जन्म प्राप्त। सगळ्या भागाचा हनुमंत। यालागीं तो बळें

१ बोलावी. २ स्वर्णमय (सोन्याच्या) पिसाऱ्याच्या बाणांनीं. ३ पंक्ती, समूह. ४ रक्तानें. ५ आवेशयुक्त. ६ सेवक. ७ जीवंत ८ परकी. ९ तरवार व ढाल.

१० शरीराचे. ११ प्राणिमात्राचे ठायीं. १२ पुत्रप्राप्त्यर्थ यज्ञ. १३ प्रविष्ट झाला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

अद्भुत । तिहीं लोकांत आतुर्बळी ॥ ६९ ॥ हा एक पिंडींचा पांचवा कां । सौमित्रा तुज असावा ठाउका । पुढें भेटेल पांचवा सखा । हनुमंत देखा सहकारी ॥ ७० ॥ पिंडभागांचें गुह्य ज्ञान । तें मी जाणें श्रीरघुनंदन । वेदशास्त्रां अटक पूर्ण । म्यां हें कथन सांगितलें ॥ ७१ ॥

तथोक्तो धर्मशीलेन भ्रात्रा तस्य हिते रतः ।
लक्ष्मणः प्रविवेशेव स्वानि गात्राणि लज्जया ॥ १२ ॥
इति संभाष्यमाणस्तु रामः सौमित्रिणा सह ।
तां चमूं हर्षसंपूर्णां ददर्श सहसा तथा ॥ १३ ॥
अवतीर्य धनुर्बाणं लक्ष्मणो लज्जयान्वितः ।
रामस्य पार्श्वमभ्येत्य परितस्थावधोमुखः ॥ १४ ॥

ऐकोनि श्रीरामाचें वचन । लक्ष्मण जाला विस्मैयापन्न । म्हणे आम्हां चौघांचा एक प्राण । भरत शत्रुघ्न भिन्न नव्हेती ॥ ७२ ॥ ऐसें विचारितां आपण । लक्ष्मण जाला लज्जायमान । युद्धक्रोध अति दारुण । हें मूर्खपण पैं माझें ॥ ७३ ॥ एवं अति लज्जायमान । उतरोनियां धनुष्याचा गुण । वंदोनि श्रीरामाचे चरण । जाला लक्ष्मण अति शांत ॥ ७४ ॥ विचार करी आपणा आपण । केवढें माझें मूर्खपण । भरत शत्रुघ्न आमचा प्राण । त्यांसीं म्यां रण कां साधावें ॥ ७५ ॥ धन्य धन्य श्रीरामाचें ज्ञान । जाणे भूत भविष्य वर्तमान । माझें निरसोनि अज्ञान । समाधान मज दीधलें ॥ ७६ ॥ विरुद्ध कर्माचें अति दुःख । सांडोनि क्रोध निःशेख । श्रीरामाचे पाठीसी देख । अधोमुख राहिला ॥ ७७ ॥ श्रीरामें वारिला सौमित्र । सेनेनें देखोनि साचार । अवघीं केला जयजयकार । हर्षनिर्भरें सैन्यासी ॥ ७८ ॥ आम्ही न करितों रण । मागें न वचों परतोन । साहोनि सुमित्राचे बाण । त्यजितों प्राण क्षात्रधर्मे ॥ ७९ ॥ येवढा आमचा अनर्थ । चुकवावया राम समर्थ । स्वधर्म रक्षी श्रीरघुनाथ । कृपावंत दीनांचा ॥ ८० ॥ युद्धें स्वामिद्रोही समस्त । मागें पळतां नरकपात । क्षात्रधर्माचा अनर्थ । रामें निश्चित चुकविला ॥ ८१ ॥ करितां रामनामाचें स्मरण । सद्यः अनर्थाची निर्दळण । तो राम देखिलिया जाण । जन्ममरण आम्हां नाहीं ॥ ८२ ॥ ऐसें सैनिक बोलती । श्रीरामाची करूनि स्तुती । अवघे आनंदें नाचती । श्रीरघुपति कृपाळु ॥ ८३ ॥ भरत भेटों आला वना । हर्ष सीतेचिया मना । देखोनियां निजसेना । तिसी चौगुणा आल्हाद ॥ ८४ ॥ येथें भेटोनियां भरत । श्रीरामा नेईल अयोध्येआंत । स्वराज्य पावेल रघुनाथ । हा भावार्थ सीतेचा ॥ ८५ ॥

निविष्टायां तु सेनायामागतो भरतस्तदा ।
ददर्श भ्रातरं हृष्टं शत्रुघ्नसहितो विभुः ॥ १५ ॥

आला ऐकोनि रघुनाथ । सैन्य राहवोनि समस्त । रथ सांडोनियां भरत । पायीं धांवत अनवाणी ॥ ८६ ॥ धनालागीं जेंवी कृपण । दुंकाळियालागीं मिष्टान्न । देखावया श्रीरामदर्शन । तैसें मन भरताचें ॥ ८७ ॥ चकोरा जैसें चंद्रकिरण । जीवनालागीं जैसा मीन । देखावया रघुनंदन । तैसें मन भरताचें ॥ ८८ ॥ चुकलिया निजबाळ । मातेसी भेटीची कळवळ । श्रीराम भेटावया तत्काळ । तैसी तळमळ भरतासी ॥ ८९ ॥ बहुकाळें आलिया भर्ता । आल्हादें भेटे पतिव्रता । तैसें भेटावया रघुनाथा । उल्हास चित्ता भरताचे ॥ ९० ॥ वानरा आवडती चणे । गट करोनि गालीं भरणें । तैसेंचि निजप्रेमें संपूर्णें । भेटे धांवोन श्रीरामा ॥ ९१ ॥ देखोनियां सोलींव केळें । वानर उडी घाली तत्काळें । तैसा आनंदकल्लोळें । सप्रेम आला भरत ॥ ९२ ॥ जीवासवें जैसा प्राण । तैसा भरतासवें शत्रुघ्न । भेटावया श्रीरघुनंदन । उदित मन दोघांचें ॥ ९३ ॥ साकरेसवें जेंवी गोडपण । सुमनासवें सुवास संपूर्ण । तैसा भरतासवें शत्रुघ्न । रघुनंदन पहावया ॥ ९४ ॥ उदकासवें जैसें शीतपण । चंद्रासवें प्रभा पूर्ण । तेंवी भरतासवें शत्रुघ्न । रघुनंदन पहावया ॥ ९५ ॥

अथोपविष्टमासीनं सीतया लक्ष्मणेन च ।
ददर्श भरतः श्रीमान्दुःखशोकभयप्लुतः ॥ १६ ॥
पादावप्राप्य रामस्य पपात भरतस्तदा ।
शत्रुघ्नश्चैव रामस्य ववंदे चरणे गुरुम् ॥

१ महाबलाढ्य. २ आश्चर्यचकित. ३ मोठा आनंद. ४ गेलों नसतों. ५ तत्काल. ६ चौपट. ७ दुष्काळांत सांपडलेल्याला. ८ उल्हासयुक्त मन. ९ फुलावरोबर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

तावुभौ च समालिंग्य रामोऽप्यश्रूण्यवर्तयत् ॥ १७ ॥

श्रीराम सौमित्र आणि सीता । भरत जालासे देखता । उल्हास न संडे निजचित्ता । प्रेमावस्था नावरे ॥ ९६ ॥ धांवोनि धरिले दृढ चरण । सर्वेचि घातलें लोटांगण । अश्रुधारा स्रवती नयन । प्रेमें शत्रुघ्न लागला पायीं ॥ ९७ ॥ त्या दोघांचे गळती नयन । श्रीरामाचे स्रवती लोचन । तिघां पडिलें आलिंगन । त्रिवेणी पूर्ण होऊं सरली ॥ ९८ ॥ श्रीराम पूर्ण स्वयें गंगाजीवनं[1] । भरत यमुना अति पावन । सरस्वती तो शत्रुघ्न । त्रिवेणी पूर्ण होऊं सरली ॥ ९९ ॥ संगमीं दिसे त्रिवेणीरूप । पुढें गंगोदक निष्पाप । भरतशत्रुघ्न निर्विकल्प । श्रीरामरूप तेंवि जाले ॥ १०० ॥ लवणजळां[2] जाली भेटी । तैसी खेंवां[3] पडली मिठी । विरोनि ते येरयेरांच्या पोटीं । ऐक्यसंतुष्टी सुखरूप ॥ १ ॥ अग्निकर्पूरां[4] आलिंगन । परम प्रेमें देदीप्यमान । सर्वेचि दोनी हरपोनं[5] । होती गगन निर्विकारी ॥ २ ॥ तैसे भरत आणि शत्रुघ्न । श्रीरामा देतां आलिंगन । दोघां नाठवे दोनीपण । जाले परिपूर्ण श्रीरामें ॥ ३ ॥ अग्नीसी काष्ठें खेंवं[6] देती । तींही अग्निरूप स्वयें होती । भरतशत्रुघ्नांची तैसी स्थिती । स्वयें होती श्रीराम ॥ ४ ॥ त्यांचें देखोनि आलिंगन । सीता आणि लक्ष्मण । ऐक्यें पडिलें आलिंगन । भिन्नपण दिसेना ॥ ५ ॥ भरत आणि शत्रुघ्न । तिहीं वंदितां लक्ष्मण । ऐक्यें पडिलें आलिंगन । भिन्नपण दिसेना ॥ ६ ॥ एक पिंडें जन्मले सृष्टीं । त्यांसी खेंवा पडली मिठी । विसरोनियां दुःखकोटी । सुखसंतुष्टी श्रीरामें ॥ ७ ॥ जवळी असतां रघुकुळटिळक । पूर्वी हेळणां[7] स्वाभाविक । वियोगसंगमाचें सुख । द्वंद्वदुःख विसरले ॥ ८ ॥ नित्य निकट असतां जाण । स्वभावें उपजे हेळण । हेळणासवें दोषगुण । सहजें संपूर्ण देखती ॥ ९ ॥

अतिपरिचयादवज्ञा संततगमनादनादरो भवति ।
मलये भिल्लपुरंध्री चंदनतरुकाष्ठमिंधनं कुरुते ॥ १८ ॥

चंदनासभोंवते समस्त । आरीबोरी चंदन होत । त्यांसी द्विजं[8] देव माथां वंदीत । घेती श्रीमंत बहु मोलें ॥ ११० ॥ येवढा चंदनीं अति प्रेमा । द्वीपोद्वीपीं अगाध महिमा । त्यांसी भिल्लांगना अति अधमा । आणिती अधर्मा कोळसा करूनी ॥ ११ ॥ तो मुख्य चंदन मलयाद्रीं[9] । तेथें भिल्लांच्या अधमा नारी । त्यासी जाळोनि अग्नीमाझारीं । रांधिती त्यावरी कांजी भाजी ॥ १२ ॥ निकट वासें उबंग[10] आला । सुवास हेळसोनि सांडिला । विषय साधावया आपुला । चंदन जाळिला विषयार्थी ॥ १३ ॥ चंदनाचा गुण कैसा । जाळित्याही दे सुवासा । तो नयेचि भिल्लीच्या मानसा । त्याचेनि काष्ठीं शिजवी कांजी ॥ १४ ॥ तैसें साधूपासीं एक आहेती । गुण देखिला तो हेळसिती । मग आपुले विषयस्वार्थी । जाळूं जैं धांवती वर्मस्पर्शें ॥ १५ ॥ अहोरात्रीं असोनि संगती । जे साधूचा दोष न देखती । ते ते धन्य त्रिजगतीं । त्यांतें वंदिती शिवशक्र[11] ॥ १६ ॥ साधूसंगती अहर्निश । असोनि न देखती गुणदोष । त्यांपासीं अवतारपुरुष । घ्यावया उपदेश स्वयें येती ॥ १७ ॥ अवतारमूर्ती श्रीवामन । त्यासी कश्यप उपदेशी ज्ञान । अगाध साधूचें महिमान । पूज्य सज्जन तिहीं लोकीं ॥ १८ ॥ याचि श्रीरामायणाआंत । वसिष्ठापासीं श्रीरघुनाथ । विनीततां[12] उपदेश घेत । साधु संत अति पूज्य ॥ १९ ॥ जावया गुणदोषहेळणासी । वियोग जालिया साधूसीं । त्याचा अनुताप दोष निरसी । पुढें भेटीपासीं स्वानंद ॥ १२० ॥ राम त्यजोनि मातुळीं भरत । वियोगानुतापें तो सुस्नात । पुढती भेटतांचि श्रीरघुनाथ । सद्यः[13] सुख प्राप्त भरतासी ॥ २१ ॥ वियोगाचा जो संयोग । पापभंगें होय सुखभोग । भरत सुखी जाला सांग । निवालें सर्वांग शत्रुघ्नाचें ॥ २२ ॥ श्रीराम भरत आणि शत्रुघ्न । ऐक्यें पडिलें आलिंगन । खेंवांमाजी[14] सुखसंपन्न । स्वानंदघन श्रीराम ॥ २३ ॥ दीपीं अनेक दीप लाविती । सकळ दीपीं एकचि दीप्ती । भरत शत्रुघ्न ऐसा रीतीं । अभिन्नस्थितीं भिन्न जाले ॥ २४ ॥ जें सुख जालें श्रीरामभेटी । तें सुख बोलतां न ये गोष्टीं । एका जनार्दनीं पडिली मिठी । सुखसंतुष्टी श्रीराम ॥ २५ ॥ भरतश्रीरामअनुवाद । संवादें

१ गंगेचें उदक. २ मीठ व उदकाला. ३ आलिंगनानें. ४ विस्तव आणि कापुरास. ५ नाहींशीं होऊन. ६ भेट, आलिंगन. ७ हयगय, ८ ब्राह्मण. ९ मलय पर्वतावर.

१० कंटाळा. ११ शंकर इंद्र वगैरे. १२ नम्रतेनें. १३ तत्काल. १४ आलिंगनांत.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

ओसंडेलें परमानंद । एका जनार्दनीं निजबोध । कथानुवाद सुखसेव्य ॥ २६ ॥ स्वस्ति श्रीभावार्थ-रामायणे अयोध्याकांडे एकाकारटीकायां श्रीराम-भरतशत्रुघ्नसंयोगो नाम पंचदशोऽध्यायः ॥ १५॥ ॥ ओंव्या ॥ १२६ ॥ श्लोक ॥ १८ ॥

अध्याय १६ वा

॥ श्रीगणेशाय नमः ॥

श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः

आघ्राय रामस्तं मूर्ध्नि परिष्वज्य च राघवम् ।
अंके भरतमारोप्य पर्यपृच्छत सादरम् ॥ १ ॥
क्व नु तेऽभूत् पिता तात यदरण्यं त्वमागतः ।
नहि त्वं जीवतस्तस्य वनमागंतुमर्हसि ॥ २ ॥
किंनु वीर महारण्ये तवागमनकारणम् ।
कच्चिद्दशरथो राजा कुशली सत्यसंगरः ॥ ३ ॥
तात कच्चिच्च कौसल्या सुमित्रा च प्रजावती ।
सुखिनी कच्चिदार्या च देवी नंदति कैकयी ॥ ४॥

अति प्रीतीं रघुनंदन । भरत आणि शत्रुघ्न । हृदयीं धरिले आलिंगोन । सुखसंपन्न तेणें दोनी ॥ १ ॥ हृदया हृदय एक जालें । तेणें सुखाचें भरतें आलें । दुःख निःशेष निमालें । सागर भरिले स्वानंदें ॥ २॥ परमानंदें तृप्ति गाढी । द्वंद्वदुःखें देशोधडी । होत हरिखाचिया कोढी । जोडिला जोडी श्रीराम ॥ ३ ॥ मग भरतासी रघुनंदन । मस्तकीं करोनि अवघ्राण । अंकीं बैसवोनि जाण । काय आपण पूसत ॥ ४ ॥ तुज राज्याचें अभिषिंचन । न व्हावया काय कारण । तेथें पडिलें कोण विघ्न । तेंही संपूर्ण मज सांगें ॥ ५ ॥ दशरथ आमुचा पिता । सुखी आहे कीं स्वस्थचित्ता । मज वनवासी निघतां । बहु अवस्था तेणें केली ॥ ६ ॥ मज निघतां वनस्थळीं । तूं तेव्हां नव्हतासी जवळी । जळावेगळी मासोळी । तैसी तळमळी मजलागीं ॥ ७ ॥ देखोनि रायाच्या दुःखकोटी । मी निघालों उठाउठीं । नाहीं घेतली पुरती भेटी । नाहीं गोष्टी सांगितली ॥ ८ ॥ ऐसा राजा दुःखाभिभूत । तूं सांडोनि वना आलासी येथ । हें तंव तुझें गा अनुचित । बुद्धिवंत तूं नव्हेसी ॥ ९ ॥ दुःखित राजा स्वयें सांडून । दूरी पंथ अतिक्रमोन । तुम्ही कां दोघे आलेति जाण । तेंही कारण मज सांगा ॥ १० ॥ एक एकल्यावेगळे नव्हतां जाण । तुम्ही कां दोघीं घेतलें रान । कां राहिलें राज्याभिषिंचन । तेंही कारण मज सांगा ॥ ११ ॥ माझी तुझी सखी माता । आहेत कीं सुखें स्वस्था । सुमित्रा जे पतिव्रता । ते सुखरूपता आहे कीं ॥ १२ ॥ स्वामी वसिष्ठ असतां तेथ । तुम्ही कां आलेति येथ । हा तुमचा निजवृत्तांत । इत्थंभूत मज सांगा ॥ १३ ॥ ऐसें पुसतां रघुनंदन । ऐकतां भरता आलें रुदन । कांहीं नेदवे प्रतिवचन । मूर्च्छापन्न तो पडिला ॥ १४ ॥ शत्रुघ्न सांगे दुःखावस्था । आम्ही अयोध्येसी न येतां । तुज वनवासी जातां । प्राणांतव्यथा रायासी ॥ १५ ॥ सुमंतें आणिला रिता रथ । देखोनि अति दुःखी दशरथ । श्रीरामा तुझी वार्ता पुसत पुसत । पडे मूर्च्छित धरणीये ॥ १६ ॥ श्रीरामीं नव्हेचि गोष्टी भेटी । श्रीराम न देखेचि दृष्टी । श्रीराम आठवितां कंठीं । पडिला सृष्टीं मूर्च्छित ॥ १७ ॥ मूर्च्छेमाजि म्हणे आपण । श्रीरामा दाखवीं वदन । श्रीराम स्मरतां संपूर्ण । स्मरणें प्राण सांडिला ॥ १८ ॥ राम नयनीं राम वदनीं । राम मनीं राम ध्यानीं । श्रीराम धरोनि अनुसंधानीं । देह त्यजोनि गेला राव ॥ १९ ॥ तुवां केलें वनप्रयाण । आम्ही जवळी नसतां जाण । करितां श्रीरामस्मरण । रायें प्राण सांडिला ॥ २० ॥ ऐसें सांगतां शत्रुघ्न । दुःखें मूर्च्छित पडिला पूर्ण । ऐकोनि पितयाचें मरण । मूर्च्छापन्न श्रीराम ॥ २१ ॥ दुःखें सीता रुदनपर । दुःखें मूर्च्छित सौमित्र । चवघेही राजाचे राजपुत्र । जाले पात्र अतिदुःखा ॥ २२ ॥ पडतां श्रीरामाचे अश्रुबिंदु । दशरथासी सुखस्वानंदु । श्रीरामासी सुखावबोधु । परमानंदु दशरथा ॥ २३ ॥ श्रीराम सुखरूप स्वतंत्र । करुणारूप उद्धरी पितर । दशरथ सुखी केला साचार । सुखसागर श्रीराम ॥ २४ ॥ श्रीराम जाला सावधान । त्यांसी सांगती भरत शत्रुघ्न । आम्ही केलें रायाचें विधान । स्नान पिंडदान तूं करीं ॥ २५ ॥ तुवां करावें शीघ्र स्नान । पिंडदान तिळतर्पण । सपिंडी करोनियां जाण । कर्म पूर्ण करावें ॥ २६ ॥ तुझी

---

१ भरून येईल. २ मोठी. ३ आक्रोश, दुःख. ४ दुःखानें व्यापिलेला. ५ अंतःकरणवृत्तीमध्यें. ६ उत्तरक्रिया.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

आवडी रघुनाथा । अत्यंत होती गा दशरथा । तुझेनि हातें पिंड देतां । सुखरूपता पावेल ॥ २७ ॥ श्रीरामें करितां रुदन । समस्त पितर सनातन । अवघे जाले सुखसंपन्न । हें गुह्यज्ञान कळेना ॥ २८ ॥ श्रीरामाचें गुह्यज्ञान । नेणती कर्मवादी सज्ञान । त्यासी सांगती कर्मविधान । स्नान पिंडदान करीं श्रीरामा ॥ २९ ॥ अगाधज्ञानी श्रीरघुपती । कर्मीं ब्रह्मनिजप्रतीती । कर्मक्रिया जे वेदोक्तीं । ब्रह्मस्थिती प्रतिपाळी ॥ ३० ॥ कर्मी ब्रह्म ब्रह्मीं कर्म । ऐसें बोलती ते मूर्ख परम । कर्म तेंच निखिल परब्रह्म । तें जाणे वर्म श्रीराम ॥ ३१ ॥ श्रीरामें कर्मी कर्मगती । श्रीरामें कर्मी ब्रह्मस्थिती । श्रीरामें कर्मी नित्यमुक्ती । श्रीराम निश्चितीं परब्रह्म ॥ ३२ ॥ ऐसा स्वयें श्रीराम ब्रह्ममूर्ती । तोही स्वधर्म पाळी वेदोक्तीं । ऐकतां दशरथनिधनोक्ती । मंदाकिनीप्रति स्नानार्थ आला ॥ ३३ ॥ राम लक्ष्मण सीतेसहित । सवें शत्रुघ्न आणि भरत । दशरथक्षयविधानार्थ । आले समस्त स्नानासी ॥ ३४ ॥ वसिष्ठ अत्यंत निजज्ञाता । तेणें कौसल्यासुमित्रादि श्रीरामाच्या माता । तेथें आणिल्या समस्ता । दुःखस्नानार्थी एकत्र ॥ ३५ ॥ तिंहीं देखतां रघुनाथा । दीर्घ रुदनें आक्रंदतां । श्रीरामा भेटलिया समस्ता । दुःखाभिभूत अतिदुःखी ॥ ३६ ॥ कौसल्येसी केलें नमन । तिणें दिधलें दीर्घ आलिंगन । अश्रुधारा स्रवती नयन । प्रेम संपूर्ण मातेसी ॥ ३७ ॥ सुमित्रेचे चरणीं माथा । तिनेंही आलिंगिलें श्रीरघुनाथा । तैसियाचि माता समस्ता । होय वंदिता श्रीराम ॥ ३८ ॥ कौसल्येसी नमितां लक्ष्मण । तिणें सप्रेम दिधलें आलिंगन । तुझे केशीं झाडीन चरण । तूं संरक्षण करीं श्रीरामा ॥ ३९ ॥ सांडोनियां निजमातापिता । सांडोनि स्वभोग सुंदर कांता । वनीं रक्षिसी श्रीरघुनाथा । दासी सर्वथा मी तुझी ॥ ४० ॥ श्रीरामीं अर्पिसी स्वादिष्ट फळें । नित्य मस्तकीं वाहसी जळें । काष्ठें पुरविसी प्रबळें । दासी केवळ मी तुझी ॥ ४१ ॥ लक्ष्मण म्हणे अवो माते । मी तंव तुझें पोसणें येथें । मज उद्धरिलें श्रीरघुनाथें । पुढती चरणांतें वंदिलें ॥ ४२ ॥ सौमित्रें वंदिली सुमित्रा । तिणें आलिंगिलें निजपुत्रा । ते म्हणे तुवां उद्धरिलें उभय पितरां । श्रीरामचंद्रा सेवोनी ॥ ४३ ॥ सौमित्रें निजमाता । स्वयें वंदिल्या समस्ता । कौसल्यें आलिंगिली सीता । पतिव्रता होसी सर्वथा तूं माये ॥ ४४ ॥ सीतेनें घातलें लोटांगण । वंदिले सुमित्रेचे चरण । तिणें दिधलें आलिंगन । आक्रंदें रुदन त्या करिती ॥ ४५ ॥ आलिंगितां श्रीरघुनाथा । दुःख विसरल्या निजमाता । देखोनि वल्कलें जटा माथां । अति विस्मिता तटस्थ ॥ ४६ ॥ देखतां श्रीरामाचें मुख । विसरोनियां सकळ दुःख । माता पावल्या परम सुख । सुखदायक श्रीराम ॥ ४७ ॥ वसिष्ठ म्हणे श्रीरघुनंदना । शीघ्र करोनियां स्नाना । द्यावें दशरथासी पिंडदाना । ज्येष्ठविधान पितृप्रिय ॥ ४८ ॥ चवघे बंधु समस्त माता । सवें घेवोनियां सीता । श्रीराम झाला स्नान करिता । श्रीदशरथा उद्धरावया ॥ ४९ ॥ श्रीरामें करावया पिंडदान । तिळ तांदूळ यव तूर्ण । भरतें आणिले आपण । ते रघुनंदन न घेचि ॥ ५० ॥ मी नाहीं सेवीत अन्न । करितों वनफळांचें भक्षण । त्या फळांचें पिंडदान । करीन आपण पितरार्थ ॥ ५१ ॥ मज वनवासाचें दृढव्रत । अन्न हातीं नाहीं स्पर्शित । इंगुदी पुन्नाग अतिपवित्र । पिंड पितरार्थ देईन ॥ ५२ ॥

स्मृति—यदन्नः पुरुषा लोके तदन्नास्तस्य देवताः ॥

जे काळीं पुरुषासी जें जें अन्न । तेणें करावें देवतायजन । तेणेंचि पितरांसी पिंडदान । स्मृतिवचन वेदोक्त ॥ ५३ ॥ सौमित्रें इंगुदीफळें मर्दून । सीता दे पिंड वळून । श्रीराम करी पिंडदान । कुशास्तरण याम्यांग्र ॥ ५४ ॥ आणोनियां आरण्यतिळीं । अवघीं दिधल्या तिळांजुळी । तर्पण करितां कृष्णतिळीं । जालें ते काळीं अपूर्व ॥ ५५ ॥ आब्रह्मादिभुवन सर्व । देव ऋषि पितृ मानव । ऐसें उच्चारितां राघव । अति अपूर्व तेथें जालें ॥ ५६ ॥ पिंड देतां श्रीरघुनाथ । गयागदाधर ओढँवी हात । आब्रह्मादि कुळ समस्त । जालें नित्यतृप्त श्रीरघुनाथें ॥ ५७ ॥ तुवां देतां तिळोदक । आब्रह्मभुवनींचे लोक । तेही झाले नित्यमुक्त । परम सुख पावले ॥ ५८ ॥ ऐसें बोलोनि उत्तर । अदृश्य जाला गदाधर । वसिष्ठें

१ शाश्वत. २ ब्रह्मानुभव. ३ दुःखानें परिपूर्ण. ४ त्वरित. ५ देवांची पूजा. ६ दक्षिणेकडे अग्रें करून. ७ पुढें करी.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

केला जयजयकार । तारिले पितर श्रीरामें ॥ ५९ ॥ श्रीराम स्वयें आत्माराम । त्याचें कर्म तें परब्रह्म । तो उच्चारी जयाचें नाम । विश्रांमधाम तो पावे ॥ ६० ॥ जपतां रामनामोक्ती । चारी पुरुषार्थ पायां लागती । चारी मुक्ती आंदण्या येती । एवढी ख्याती नामाची ॥ ६१ ॥ श्रीरामाचें वनप्रयाण । करावया दीनोद्धारण । एका विनवी जनार्दन । पितृतर्पण सिद्ध जालें ॥ ६२ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे अयोध्याकांडे एकाकारटीकायां श्रीरामदशरथसपिंडीकरणं नाम षोडशोऽध्यायः ॥ १६ ॥ ओंव्या ॥ ६२ ॥ श्लोक ॥ ४ ॥

अध्याय सतरावा

श्रीरामचंद्राय नमः ॥ श्रीरामें उद्धरिले पितर । ते गगनीं करिती जयजयकार । सुमनीं वर्षती सुरवर । जगदुद्धार श्रीराम ॥ १ ॥ मार्गी चालतां देखती डोळां । मनोहर पर्णशाळा । सौमित्रें रचिल्या विशाळा । जनकबाळा स्वयें सांगे ॥ २ ॥ तें देखोनि म्हणती माता । धन्य जीवित्व सुमित्रासुता । वनीं सुखरूप श्रीरामसीता । जाणा तत्त्वतां याचेनि ॥ ३ ॥ याची सेवा अति निर्वाण । श्रीरामचरणीं विकिला प्राण । मस्तकीं जळ वाहे आपण । काष्ठें संपूर्ण हा आणी ॥ ४ ॥ श्रीरामसीतेचें चरणक्षाळण । स्वादिष्ट फळें पुरवी संपूर्ण । नित्य नेमस्त करी आपण । आणि जागरण अहर्निशीं ॥ ५ ॥ वनीं वसतां श्रीरघुनाथा । येणें विसरविलीं मातापिता । विसरविली राज्यभोगता । सुख रघुनाथा याचेनि ॥ ६ ॥ एकोनि लक्ष्मणाची स्थिती । आश्रम देखोनि समस्तीं । पर्णशाळा शोभा देती । विचित्रयुक्तीं मनोहर ॥ ७ ॥ सडे चौक रंगमाळा । वृंदावनें सुमनशाळा । आश्रम देखोनियां डोळां । सुख सकळां पैं जालें ॥ ८ ॥ वसिष्ठें सुखावोनियां चित्तीं । आलिंगिला परम प्रीतीं । धन्य लक्ष्मणा तुझी भक्ती । श्रीरामाप्रती सद्भावो ॥ ९ ॥ लक्ष्मणें स्वयें आपण । वंदिले वसिष्ठाचे चरण । तुझेनि तीर्थें परम पावन । अनन्य भजन श्रीरामीं ॥ १० ॥ तुझी कृपा अति समर्थ । कृपेनें जोडला श्रीरघुनाथ । ऐसेनि स्वानंदें डुल्लत । आश्रमाआंत बैसले[1] ॥ ११ ॥ ऐकोनियां जयजयकार । प्रधानसेनानी[3]संभार । भेटावया श्रीरामचंद्र । अवघे सत्वर चालिले ॥ १२ ॥ अश्वगजांचे कडकडाट । रथ चालिले घडघडाट । सेना चालली घनदाट । श्रीराम वसिष्ठ वंदावया ॥ १३ ॥ देखोनि श्रीरामाचें मुख । सुखी जाले एकएक । अयोध्येचे सकळ लोक । परम सुख पावले ॥ १४ ॥ श्रीराम देखतांचि दृष्टीं । हरिख न समाये पोटीं । आनंदें ओसंडली सृष्टी । डोळेभेटी होतांचि ॥ १५ ॥ उठोनियां श्रीरघुनंदन । प्रधानादि सकळ जन । त्यांसी दिधलें आलिंगन । आदिकरोन गोरक्षकां ॥ १६ ॥ श्रीरामालागीं आर्तभूतें । वना आले उत्कंठित । त्यांसी आलिंगीना रघुनाथ । ऐसा ग्रंथार्थ न मानावा ॥ १७ ॥ श्रीराम सर्वांचा हृदयस्थ । श्रीराम सर्वां हृदयीं नित्य व्याप्त । तो दीनांसी न भेटे रघुनाथ । ऐसा ग्रंथार्थ न मानावा ॥ १८ ॥ आश्रम देखोनि समस्त । अतिशयें जाले विश्रांत । वंदोनियां श्रीरघुनाथ । सभा तटस्थ बैसली ॥ १९ ॥ बोलावया कृतकार्यार्थ । कोणाही नव्हे सामर्थ्य । तेथें उठोनियां भरत । श्रीरघुनाथ वंदिला ॥ २० ॥ भरत म्हणे श्रीरघुनाथा । अयोध्येसी चालिजे आतां । राज्यभार घेवोनियां माथां । आम्हां समस्तां प्रतिपाळीं ॥ २१ ॥ त्वरेनें मज यावया येथ । हेंचि माझें मनोगत । तूं सर्वज्ञ श्रीरघुनाथ । सत्य अनृत जाणसी ॥ २२ ॥ ऐसें बोलतांचि भरत । हांसिनला श्रीरघुनाथ । म्हणे भार्गें नेमून गेला दशरथ । तो वचनार्थ प्रतिपाळीं ॥ २३ ॥ तुज अयोध्येचें राज्याभिषिंचन । मज नेमिलें वनप्रयाण । पितृवाक्य परम प्रमाण । अन्यथा कोण करूं शके ॥ २४ ॥ पित्याचे निजवाक्यें जाण । म्यां केलें वनप्रयाण । तुवां करावें राज्यग्रहण । प्रतिपाळणें पितृवाक्य ॥ २५ ॥ जितां पाळिली पित्राज्ञा । मेलिया करूं नये अवज्ञा । विचारीं भरता सर्वज्ञा । तूं पित्राज्ञा प्रतिपाळीं ॥ २६ ॥ वेदवचन पितृवचन । जो पाळीना गुरुवचन । त्यासी होय अधःपतन । तैसें आपण न करावें ॥ २७ ॥ पित्राज्ञा मानोनि माथां । राज्य अंगीकारीं गा

---

१ विश्रांतीचें स्थान. २ दासी. ३ प्रधान, सेनापति, इत्यादि मंडळी. ४ भरून गेली. ५ दुःखी होत्साते. ६ कार्य.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

भरता । तुज मी अभिषिंचितों आतां । आग्रह सर्वथा न करावा ॥ २८ ॥ माझेनि हातें अभिषिंचना । करूं आवडे तुझिया मना । यालागीं आलासी तूं वना । सत्य सर्वज्ञा भरता तूं ॥ २९ ॥ ऐकोनि श्रीरामाचें वचन । भरत सांडूं पाहे प्राण । राज्य नव्हे हें महाविघ्न । मज संपूर्ण ओढवलें ॥ ३० ॥ मज वनालागीं येतां । जो तो म्हणे मारूं जातो रघुनाथा । शेखीं[1] श्रीरामही आतां । मजचि भोंवता लागला ॥ ३१ ॥ राज्य आलियाचें सुख । जो मानी तो अति मूर्ख । राज्यलोभाचें महाविख । तें कैकेयीनें देख मज दीधलें ॥ ३२ ॥ श्रीरामसेवासुखसंतुष्टी । सांडोनि राज्यलोभाची दृष्टी । ते अभाग्य जन्मले सृष्टीं । दुःखकोटी भोगावया ॥ ३३ ॥ भरत मारूं जातो रघुनाथा । हे जगीं पावलों अति निंद्यता । वनवासीं आलों शरणार्थी । अभिषेकार्था तूं म्हणसी ॥ ३४ ॥ तुझेनि हातें राज्याभिषेक । जो वांछी तो अनामिक[2] । अंत्यजांमाजी अंत्यज एक । आत्मघातक महापापी ॥ ३५ ॥ तुजवांचोनि रघुनाथा । राज्याभिषेक ज्याचे माथां । तो महापापी तत्त्वतां । सत्य सर्वथा श्रीरामा ॥ ३६ ॥ वृद्धपरंपरा राज्यपट । राज्याभिषेक मुख्य वरिष्ठ । तो केंवी लाभे कनिष्ठ । विचारीं श्रेष्ठ श्रीरामा ॥ ३७ ॥ जो भार शोभे गजा । तो भार वाहतां मरे अजा[3] । तेंवी तुझे राज्यीं रघुराजा । अभिषेकितां माझा प्राणान्त ॥ ३८ ॥ माझा करणें आहे घात । तरी आतांचि अभिषेकावा भरत । तुज देखतां जालिया प्राणान्त । परम मुक्त मी होईन ॥ ३९ ॥ ऐसें जालिया अभिषेकार्थ । सहज भेटेल श्रीदशरथ । त्यासी हा सांगेन वृत्तांत । अभिषेकीं मृत्यु मज आला ॥ ४० ॥ ऐसें तूं म्हणसी आपण । राज्याभिषेकीं पितृवचन । तें मी न मानीं गा प्रमाण । तेंही लक्षण अवधारीं ॥ ४१ ॥ तुज वनवास मज राज्यता[4] । वांटे करितां श्रीदशरथा । तेव्हां मीही जवळी नव्हतां । श्रुत सर्वथा मज नाहीं ॥ ४२ ॥ जें म्यां देखिलें ना ऐकिलें । तें मज न वचे राज्य केलें । तूं म्हणसी मायेनें दिधलें । तेंही नाथिलें[5] अवधारीं ॥ ४३ ॥ मज राज्य दिधलें म्हणसी माया । ते माया मिथ्या गा रघुराया । साच शिवतों तुझिया पायां । मायाकृतकार्या मी करीं ना ॥ ४४ ॥ ऐकें मायेचा कृतकार्यार्थ । वना दवडिला श्रीरघुनाथ । जीवें घेतला दशरथ । दुःखी भरत पैं केला ॥ ४५ ॥ मायेचें केलें[6] ऐसेंचि घडे । एकपिंडी बंधूंसी वैर पडे । सुने पुत्रा करोनि उघडें । वना रोकडें दवडिलें ॥ ४६ ॥ मायेमाजी अति निष्ठुरता । दुःखी केलें श्रीरघुनाथा । चरणचालीं दवडली सीता । केलें समस्तां अति दुःखी ॥ ४७ ॥ अति विपरीत माया मांगी । आपुलें सौभाग्य आपण भंगी । निंद्यत्व पावोनियां जगीं । तरी ते उगी न राहे ॥ ४८ ॥ अवघड मायेचें लक्षण । आपणासी आणिलें रांडपण । आपलें करोनि काळें वदन । सखे सज्जन दुःखी केले ॥ ४९ ॥ ऐसी माया बाधक भारी । तिच्या निजराज्याची थोरी । मी तरी सर्वथा न करीं । निजनिर्धारीं श्रीरामा ॥ ५० ॥ ऐसें बोलोनि आपण । सर्वें घातलें लोटांगण । मस्तकीं धरिले श्रीरामचरण । अश्रु पूर्ण पैं आले ॥ ५१ ॥ देखोनि भरताचें लक्षण । श्रीराम बोलिला आपण । दशरथाचें अंतींचें वचन । अन्यथा आपण कदा न करावें ॥ ५२ ॥ राम राम करितां स्मरण । रायें मजलागीं दिधला प्राण । तेणें करविलें वनप्रयाण । तें अन्यथा आपण कांहीं न करीं ॥ ५३ ॥ वनवासाचें दृढ व्रत । म्यां घेतलें दशरथादेखत । तें मी अन्यथा न करीं यथार्थ । जाण निश्चित भरता तूं ॥ ५४ ॥ ऐकोनि श्रीरामाचें वचन । भरतें मांडिलें निर्वाण । देऊं पाहे आपुला प्राण । प्रायोपवेशन[7] करोनियां ॥ ५५ ॥

> इह तु स्थंडिले शीघ्रं कुशानास्तर सारथे ।
> आर्यं प्रत्युपवेक्ष्यामि यावन्मे संप्रसीदति ॥ १ ॥
> निराहारो निरालोको धनहीनो यथा द्विजः ।
> शये पुरस्ताच्छालायां यावन्मां प्रतियास्यति ॥२॥
> स तु राममवेक्षंतं सुमंत्रं प्रेक्ष्य दुर्मनाः ।
> कुशोत्तरमुपस्थाप्य भूमावेवास्थितः स्वयम् ॥३॥

अयोध्ये न ये श्रीरघुनाथ । ऐसा जालासे इत्यर्थ । तेणें दुःखी जाला भरत । प्राणत्यागार्थ सिद्ध जाला ॥ ५६ ॥ सुमंतासी सांगे आपण । मंदाकिनीतीर पावन । तेथें करीं कुशास्तरण । मज

१ शेवटीं. २ महार. ३ शेळी. ४ राज्याधिकार. ५ मिथ्या.

६ करणी. ७ अन्नत्याग करून मरणाच्या निश्चयानें बसणें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

निजप्राण त्यागावया ॥ ५७ ॥ श्रीरामावेगळें राहणें। तें सर्वथा निंद्य जिणें। देह त्यागून रामादेखतां मरणें। तरी ब्रह्म पावणें परिपूर्ण ॥ ५८ ॥ राम न्यावया अयोध्येसी। येथें मी आलों प्रतिज्ञेसीं। राम न पाळी माझिया लाडासी। मी प्राणांसी त्यागीन ॥ ५९ ॥ सुमंताचें मनोगत। प्राण त्यागूं रिघतां भरत। अयोध्येसी येईल रघुनाथ। येणें लोभें पसरीत कुशांतें ॥ ६० ॥ ते मी कुशास्तरणीं आपण। नेघें अन्न नेघें जीवन। एकाकी जैसा दीन ब्राह्मण। तैसा जाण पडेन मी ॥ ६१ ॥ जंववरी कृपा करीना रघुनाथ। तंववरी मी पडलों असेन येथ। कृपा न करितां निश्चित। तोचि प्राणान्त पैं माझा ॥ ६२ ॥ श्रीरामाचें लडेवाळ। रामचि न पुरवी माझें कोड। तैं मज नाहीं देहाची चाड। त्यजून धड निधड होईन॥ ६३ ॥ श्रीरामीं प्रेम ज्याचें येथ। रामध्यानें निमालिया नित्यमुक्त। परलोक पावलिया तेथ। कृपा दशरथ मज करी ॥ ६४ ॥ ऐसें श्रीरामादेखतां जाण। भरतें करोनियां शुद्धाचमन। कुशास्तरणीं घालोनि आसन। नेत्र लावोन बैसला ॥ ६५ ॥ तें देखोनि समस्त। अवघे जाले हाहाभूत। असत्यवादी नव्हे भरत। प्राण निश्चित त्यागील ॥ ६६ ॥ श्रीरामाचे कृपेवीण। भरत न वांचे अर्ध क्षण। श्रीरामध्यानीं होवोनि लीन। सांडील प्राण निमेषार्धें ॥ ६७ ॥ ऐसें देखोनि रघुनाथ। स्वयें भरतासी बोलत। म्हणे तुज हें कर्म अनुचित। नव्हे निश्चित राजधर्म ॥ ६८ ॥ अंध पंगु कुष्ठशुभ्रे[२]। रोगी दुःखी सकामी दुर्धर। देह त्यागिती ऐसे नर। ज्ञानविचार हा नव्हे ॥ ६९ ॥ भरत म्हणे कृपा न होतां। कैंची आम्हांसी ज्ञानकथा। कोटी अधर्म बैसोत माथां। परी सर्वथा वांचेंना ॥ ७० ॥ देखोनि भरताचें निर्वाण। श्रीरामेंही वाहिली आण। वसिष्ठचरणाचें प्रमाण। दंडकारण्य त्यजींना ॥ ७१ ॥

लक्ष्मीश्चंद्रादपेयाद्वा हिमवान् वा हिमं त्यजेत्।
अतियात् सागरो वेलां न प्रतिज्ञामहं पितुः ॥ ४ ॥

पूर्ण चंद्राची जावो शोभा। मेरु पृथ्वीमाजी विरो उभा। सुवर्ण पावो काळिमा प्रभा। तरी व्रतारंभा त्यजींना मी ॥ ७२ ॥ पश्चिमे उगवो दिनकर। एक होवोत सप्तसागर। आतां प्रळय करो रुद्र। तरी राजोत्तर नुलंघीं ॥ ७३ ॥ दीपाचा पतंग घोट भरू। नभाची मोट बांधो लेंकरूं। रुद्रातें सुखें गिळो उंदिरू। तरी व्रतविचारू त्यागींना ॥ ७४ ॥ सूर्य अडखळोनि आडीं पडो। मृगजळामाजी मेरु बुडो। मक्षिकापाखीं आकाश उडो। तरी मागें मुरडों मी न शकें ॥ ७५ ॥ रामें वाहिली निर्वाण आण। भरत कुशास्तरणीं निर्वाण। हाहाकारें गर्जती जन। करिती रुदन अवघेही ॥ ७६ ॥ बोंब सुटली एकसरी। आक्रंदें रडती नरनारीं। येथें सावाधावा[३] कोण करी। वनांतरीं आकांत ॥ ७७ ॥ अयोध्ये न्यावया रघुनाथ। वना उल्हासें आला भरत। प्रतिज्ञापणें दोहींचा अंत। महा अनर्थ ओढवला ॥ ७८ ॥ बुडाली सूर्यवंशाची कीर्ती। थोर ओढवली अपकीर्ती। येवढी कैकेयीची ख्याती। केली शांती सर्वांची ॥ ७९ ॥ राजा निमाला[४] रामस्मरणें। रामभरत निमती प्रतिज्ञापणें। प्राण सांडिजे लक्ष्मणें। सीताशत्रुघ्नें निमिजेल ॥ ८० ॥ मग येथोनि मागुती। कोण जाईल अयोध्येप्रती। जाली अवधियांची शांती। कैकेयीयुक्ती निजराज्या ॥ ८१ ॥ भविष्य जाणोनि संपूर्ण। वसिष्ठ न बोले वचन। जनासी अति दुःख दारुण। कोणासी कोण संबोखी[६] ॥ ८२ ॥ दोघे सत्यवादी संपूर्ण। दोघांचाही दुस्तर पण[७]। त्या दोघां बुझावी[८] कोण। दुःख दारुण सर्वांसी ॥ ८३ ॥ उपाय न चले निःशंक। अवघियां पडिलें थोर अटक। तेथें जालें अलोलिक। आला वाल्मीक द्विजवरेंसीं ॥ ८४ ॥

अथ तत्र समागम्य वाल्मीकिः सहितद्विजः।
भ्रातरौ तौ महावीर्यौ काकुत्स्थौ प्रशशंसिरे ॥ ५ ॥
धन्यौ युवां राजपुत्रौ धर्मज्ञौ सत्यविक्रमौ।
श्रुत्वा वयं हि संभाषामुभयोः स्पृहयामहे ॥६॥

श्रीरामभरतांपासीं। वाल्मीकि येवोनि वेगेंसीं। बोलता जाला उल्हासेंसीं। म्हणे तुम्ही पुण्यराशी पुण्यपुरुष ॥ ८५ ॥ धन्य धन्य दशरथ पिता। धन्य धन्य तुमच्या माता। धन्य धन्य तुमच्या कथा। लोकां समस्तां तारक ॥ ८६ ॥ तुमचेनि

१ मेल्यामुळें. २ पांढरे कोड ज्याचे अंगावर आहे असा. ३ समजूत. ४ प्राप्त झाली. ५ मेला. ६ समजावी; कोणाचें कोण सांत्वन करणार ? ७ नियम. ८ समजूत घाली.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

धैर्यासी धैर्यता । तुमचेनि वीर्यासी वीर्यता । तुमचेनि शौर्यासी शौर्यता । सत्यासी सत्यता तुमचेनि ॥ ८७ ॥ धन्य धन्य सूर्यवंशीं । कीर्ति जोडिली वंशानुवंशीं । राज्यलोभ नाहीं दोघांसी । यालागीं भेटीसी मी आलों ॥ ८८ ॥ वाल्मीकाश्रम चित्रकूटीं । परी न घेचि श्रीरामभेटी । देखोनि दोघे बंधु संकटीं । आला उठाउठीं समाधाना ॥ ८९ ॥ दोघां द्यावया समाधान । वाल्मीक आलासे आपण । जाणोनि अनागतज्ञान । काय वचन बोलिला ॥ ९० ॥ ऐक स्वामी रघुनाथा । अग्रधारीं धर्मज्ञा तूं भरता । कांहीं सांगेन तुमच्या हिता । श्रीरामचरित्रा अति गुह्य ॥ ९१ ॥

ततस्त्वृषिगणाः क्षिप्रं दशग्रीववधैषिणः ।
भरतं राजशार्दूलमित्यूचुः संगता वचः ॥ ७ ॥
भो भो त्वं व्रतसिद्ध्यर्थं निवर्तस्व इतो लघु ।
देवकार्यं हि कर्तव्यं राघवेग महात्मना ॥ ८ ॥
एतावदुक्त्वा वचनं गंधर्वाः समहर्षयः ।
राजर्षयश्चैव तथा सर्वे स्वां स्वां गतिं गताः ॥ ९ ॥

मजसांगातें ऋषिगण । यावया जाण हेंचि कारण । श्रीरामचरित्र गुह्यज्ञान । तुज संपूर्ण सांगावया ॥ ९२ ॥ भूत भविष्य वर्तमान । जाणोनि अतिशयेंसीं सज्ञान । तें सांगों आले तपोधन । श्रीरामगुह्य सांगावया ॥ ९३ ॥ देवऋषी राजऋषी । आणि आले तपोनिधि ऋषी । श्रीरामगुह्यज्ञानासी । तुजपासीं सांगावया ॥ ९४ ॥ तुम्ही दोघे महाहट्टी । बैसलेती प्राणसंकटीं । हें देखोनि ऋषी कृपादृष्टीं । आले गुह्य गोष्टी सांगावया ॥ ९५ ॥ ऐकें भरता सावधान । सीता श्रीराम लक्ष्मण । वनीं वसावया हेंचि कारण । जें श्रीरामें रावण वधावा ॥ ९६ ॥ हेंचि देवांचें मनोगत[3] । हेंचि ऋषींचें संमत । रामें वधावा लंकानाथ । हाचि सिद्धांत सर्वांचा ॥ ९७ ॥ श्रीरामराज्यासी विघ्न । पडावया हेंचि कारण । तूं हें नेणसी गुह्यज्ञान । प्राणान्त दारुण आग्रह करिसी ॥ ९८ ॥ अनागतें गुह्यज्ञान । सत्य मानीं माझें वचन । आग्रह सांडूनियां आपण । करावें गमन अयोध्येसी ॥ ९९ ॥ देवकार्यार्थालागीं जाण । श्रीराम सीता लक्ष्मण । वनीं ठेवोनि आपण । करावें गमन अयोध्येसी ॥ १०० ॥ ऐसें तूं म्हणसी आपण । कोठें राम कोठें रावण । त्यासी वधावया काय कारण । तेंही कथन अवधारीं ॥ १ ॥ तुवां केलिया अयोध्यागमन । मागें राम सेवील दंडकारण्य । गंगातीरीं अति पावन । निवासस्थान नासिक ॥ २ ॥ गंगातटीं पंचवटी । वनवासीं पर्णकुटी । श्रीरामलक्ष्मण जगजेठी । सीता गोरटी समवेत ॥ ३ ॥ तेरा वर्षें सा मासांवरी । सुखें वनवास श्रीराम करी । अंतींच्या सहा मासांभीतरीं । करील वोहरी[6] श्रीराम राक्षसां ॥ ४ ॥ लक्ष्मण देखोनियां दृष्टी । पुत्रविरोधें छळावयासाठीं । शूर्पणखा वधू गोमटी । कपटें पाटीं बैसों येईल ॥ ५ ॥ तिसी नाशिकीं निर्नासिक । सौमित्र करील आवश्यक । तिचे कैवारी त्रिशिरादिक । त्यांसी रघुकुळटिळक वधील ॥ ६ ॥ राम लागोनि मृगापाठीं । रावण येवोनि पंचवटीं । सीता चोरोनि गोमटी । लंकात्रिकूटीं ठेवील ॥ ७ ॥ सीताशुद्धीचे कार्यार्थ । पंपेसी येईल श्रीरघुनाथ । तेथें भेटेल हनुमंत । परम आप्त निजसखा ॥ ८ ॥ श्रीरामसुग्रीवां सौजन्य । करील हनुमंत आपण । अमित घेवोनि वानरसैन्य । लंकागमन श्रीरामा ॥ ९ ॥ वानर मिळतील महाबळी । समुद्र बांधोनियां शिळीं । लंकेपुढें रणखंदळी । आतुर्बळी करील ॥ ११० ॥ एकें निजकरें सौमित्र । अनेक वीर मारील चतुर । छेदोनि रावणाचें शिर । श्रीरामचंद्र निजविजयी ॥ ११ ॥ सोडवील देवांची बांधवडी । तोडील नवग्रहांची बेडी । उभवोनि श्रीरामराज्याची गुढी । येईल तांतडी अयोध्येसी ॥ १२ ॥ वनीं वसतां श्रीरामासी । त्रैलोक्यपावन कीर्ति त्यासी । यालागीं ठेवोनि वनासी । शीघ्र अयोध्येसी तूं जाय ॥ १३ ॥ वाल्मीकाचें ऐकोनि वचन । भरतासी हर्षाचें स्फुरण । सांडोनियां कुशांचें आस्तरण[7] । केलें नमन ऋषीसी ॥ १४ ॥ भरत म्हणे वाल्मीकमुनी । सुखी जालों मी तुझ्या वचनीं । श्रीराम ठेवोनियां वनीं । शीघ्रगमनीं मी जातों ॥ १५ ॥ उल्हास भरताचा देखोन । वाल्मीकें दिधलें आलिंगन । भरतें केलें साष्टांग नमन । सुखसंपन्न तेणें राम ॥ १६ ॥

१ भविष्यज्ञान. २ तपस्वी मुनी. ३ इच्छा. ४ प्रिय. ५ पुढें होणाऱ्या गोष्टींचें गुप्त ज्ञान. ६ नाश. ७ अंथरूण.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

आह्लादितस्तदा तेन वाक्येन शुभदर्शनः ।
रामः संहृष्टवदनस्तानृषीनभ्यवादयत् ॥ १० ॥

वाल्मीकें येवोनि आपण । भरतासी दिधलें समाधान । वनवासी रघुनंदन । भरतें वचन मानिलें ॥ १७ ॥ तें ऐकोनि रघुनंदन । अत्यंत झाला सुखसंपन्न । एकला आंकळी त्रिभुवन । येवढें स्फुरण त्या आलें ॥ १८ ॥ सुख दाटलें संपूर्ण । बाहु थरकती उल्हासोन । हँरिखें नाचे लक्ष्मण । वाल्मीकवचन ऐकोनी ॥ १९ ॥ परमानंदें रघुनंदन । केलें वाल्मीकासी नमन । येरें देवोनि आशीर्वचन । केलें गमन स्वाश्रमा ॥ १२० ॥ एका जनार्दना शरण । ऐकोनि वाल्मीकाचें वचन । भरत पावला समाधान । अयोध्यागमन अवधारा ॥ १२१ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे अयोध्याकांडे एकाकारटीकायां भरतसमाधानं नाम सप्तदशोऽध्यायः ॥ १७ ॥ ॥ ओंव्या ॥ १२१ ॥ श्लोक १० ॥

अध्याय अठरावा

श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ भरतें धांवोनि आपण । दृढ धरिले श्रीरामचरण । अश्रु चालिले संपूर्ण । तेणें चरणक्षाळण श्रीरामा ॥ १ ॥

स्वस्थगात्रस्तु भरतो वाचा संसज्जमानया ।
कृतांजलिरिदं वाक्यं राघवं पुनरब्रवीत् ॥ १ ॥

स्वेद[३] रोमांच रवरवित । तेणें सर्वांग डवडवित । हरिखें उत्कंठित जालें चित्त । सद्गदित पैं वाचा ॥ २ ॥ विकळ वाचा होवोनि ठायीं । विनटोनि श्रीरामाच्या पायीं । अंजळिपुट जोडोनि पाहीं । भरत लवलाहीं विनवीत ॥ ३ ॥ करोनियां कुशास्तरण । तुजवरी देत होतों प्राण । हा माझा अपराध दारुण । क्षमा संपूर्ण करीं स्वामी ॥ ४ ॥ भूतीं पृथ्वी नांगरून । दाँढी घालोनि करिती दहन । जीवनेंसहित लाताऊन । कर्दमकंदन जन करिती ॥ ५ ॥ तो अपराध धरा न मनून । पाळिल्या पोळिल्या देवोनि दिव्यान्न । जना सुखी करी संपूर्ण । तैसें आपण क्षमा कीजे ॥ ६ ॥ श्रीराम आमची जननी । आम्ही तुझीं लेंकरें तान्हीं । माझा अपराध न मानीं । म्हणोनि लोटांगणीं तुज आलों ॥ ७ ॥ तुझे वंदोनि चरण । मी करितों अयोध्यागमन । ऐसें बोलोनि करी रुदन । मूर्च्छापन्न तो पडला ॥ ८ ॥ भरताचें प्रेम देखोन । कळवळिला श्रीरघुनंदन । धांवोनि उचलिला आपण । समाधान स्वयें वदे ॥ ९ ॥ आम्ही तुम्ही चवघेजण । एका पिंडाचे उत्पन्न । कोणाचा अपराध मानी कोण । वृथा उद्विग्न तूं कां होसी ॥ १० ॥ जीभ रगडलिया दांतांबुडीं । कोप आलिया कडाडी । जीभ तोडी कीं दांत पाडी । तैसी पँरवडी आम्हां तुम्हां ॥ ११ ॥ टाळी पिटतां हातोहात । दुःख वाटे कां सुख होत । तैसें तुम्हां आम्हां येथ । एकात्मता अद्भुत आल्हाद ॥ १२ ॥ ऐसें आश्वासून पूर्ण । श्रीरामें दिधलें आलिंगन । म्हणे भरता अयोध्ये करीं गमन । येरें वचन वंदिलें ॥ १३ ॥ श्रीरामाज्ञा अतितांतडीं । भरत निघाला लवडसवडी । पायीं वळलीसे वेंगडी । पडे मुरकुंडी मूर्च्छित ॥ १४ ॥ मन विगुंतलें रामापासीं । नयन विगुंतले रामरूपासीं । पाय ओढिती रामदर्शनासी । गति भरताची खुंटली ॥ १५ ॥ वाचा विगुंतली रामनामासीं । श्रवण विगुंतले रामकीर्तनासीं । क्रिया विगुंतली रामभक्तीसीं । गति भरताची खुंटली ॥ १६ ॥ प्राण पांगुळलाँ रामापासीं । जीव विनटला श्रीरामासीं । इंद्रियें पारँखीं जालीं त्यासी । गति भरताची खुंटली ॥ १७ ॥ श्रीरामाची अनँन्य प्रीती । भरताची अगाध स्थिती । देखोनि श्रीराम सुखावे चित्तीं । काय त्याप्रती बोलत ॥ १८ ॥ भरता ऐकें गुह्य गोष्टी । माझें प्रेम तुझ्या पोटीं । तेचि पोटीं कैकेयी खोटी । हृदयीं गांठी न धरावी ॥ १९ ॥ मज धाडिलें वनवासासी । सीता पायीं धाडिली वनासी । हें शल्य अहर्निशीं । तुझ्या मानसीं सलताहे ॥ २० ॥ जे हृदयीं माझें पूर्ण प्रेम । तेथें नसावा द्वेष विषम । ऐसें बोलतां श्रीराम । भरत निभ्रम पडे पुढती ॥ २१ ॥

एवं ब्रुवाणं रामं तु वसिष्ठो वाक्यमब्रवीत् ।
प्रयच्छ पादुके पुत्र भरताय महात्मने ॥ २ ॥

---

१ स्वाधीन ठेवील. २ आनंदानें. ३ घाम. ४ गवत. ५ शरीराचे. ६ प्रकार. ७ पांगळा झाला. ८ परकीं, विन्मुख. ९ एकनिष्ठ प्रीति.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

एवमुक्त्वा वसिष्ठेन राघवः प्राङ्मुखः स्थितः ।
पादुके हेमविकृते मम राज्याय ते ददौ ॥ ३ ॥
रामाज्ञां शिरसि स्थाप्य पादुके भरतस्तदा ।
अयोध्यामेव गच्छामि गृहीत्वा पादुके शुभे ॥ ४ ॥

श्रीरामप्रेमें प्रेमळ । रामविरहें अति व्याकुळ । भरत देखोनियां विकळ । तंव वसिष्ठ कृपाळू बोलत ॥ २२ ॥ सांडोनियां श्रीराममूर्ती । भरतासी गमनीं नाहीं शक्ती । देखोनि गुरु कृपायुक्ती । काय रामाप्रती बोलत ॥ २३ ॥ अति आल्हादें अयोध्येप्रती । भरत जाय शीघ्रगती । ऐसी श्रीरामा आहे युक्ती । ते त्वां निश्चिती करावी ॥ २४ ॥ तुझ्या पादुका रघुनाथा । ठेवीं भरताचिये माथां । तेणें जाण आल्हादें तत्त्वतां । अयोध्ये जातां उल्हास ॥ २५ ॥ श्रीराम न घाली पायतंन[१] । करावया दीनोद्धारण । तारावया वृक्षवल्लीपाषाण । वनीं विहरण[२] अनवाणी ॥ २६ ॥ रामासी कांटे न रुपती पाहीं । कंटक[३] उद्धरती रामपायीं । अडखळतां ठायींचे ठायीं । पाषाण तेही उद्धरती ॥ २७ ॥ रामपादुका सुवर्णभूषण । आवडीं वागवी लक्ष्मण । त्याही केल्या भरतार्पण । गुरुवचन वंदोनी ॥ २८ ॥ रामपादुका आलिया हाता । उल्हास भरताच्या चित्ता । पादुका प्रतिष्ठूनि[४] माथां । आल्हादता काय बोले ॥ २९ ॥ श्रीरामपादुका ठेवितां माथां । जगीं हरपली द्वेषविषमता । ते मी कैंची आणूं आतां । निजमाता द्वेषावया ॥ ३० ॥ कैकेयीवरदें वनप्रयाण । दूषण नव्हे तें रामा भूषण । वाल्मीकवचनें कळली खूण । आतां कोण द्वेषील ॥ ३१ ॥ भरत आणि स्वयें शत्रुघ्न । वंदोनि वसिष्ठाचे चरण । करोनि श्रीरामासी नमन । काय आपण बोलत ॥ ३२ ॥ तुझ्या पादुका ठेविल्या माथां । तुज भेटल्याविण रघुनाथा । नाहीं उतरणें सर्वथा । तिन्ही अवस्था त्रिकाळीं ॥ ३३ ॥ पादुका माझें निजजीवन । पादुका माझें देवतार्चन । पादुका माझें निजपूजन । नित्य ध्यान चरणांचें ॥ ३४ ॥ तुझ्या पादुका जी श्रीरामा । त्या तंव माझा परमात्मा । वर्णूनि पादुकांचा महिमा । वंदोनि श्रीरामा निघाला ॥ ३५ ॥ जातां घालोनि लोटांगण । भरत काय बोले आपण । वसिष्ठादि रामलक्ष्मण । अवघे जण अवधारा ॥ ३६ ॥

नंदिग्रामं गमिष्यामि मातरं भ्रातरं विना ।
तत्र दुःखमिदं सर्वं सहिष्ये राघवं विना ॥ ५ ॥
गतश्चाहो दिवं राजा वनस्थः स गुरुर्मम ।
रामागमं प्रतीक्षेऽहं पालयिष्यन् वसुन्धराम् ॥ ६ ॥

श्रीरामाचे अनुज्ञेन[५] । मी करितों अयोध्ये गमन । परी तेथें श्रीरामावांचोन । मी अयोध्याभुवनीं वसेंना ॥ ३७ ॥ निजराज्यातें त्यागुनी । पिता प्रवेशे वैकुंठभुवनीं । श्रीरामा सांडोनिया वनीं । मी राजभवनीं राहेंना ॥ ३८ ॥ विनंती करितों मी समस्तां । मी नंदिग्रामीं राहीन आतां । अयोध्याराज्यभार तत्त्वतां[६] । होईन चालविता तेथोनी ॥ ३९ ॥ भद्रीं[७] न देखतां रघुनाथा । मज नावरे दुःखावस्था । यालागीं अयोध्ये नवजातां । राज्यभार माथां शत्रुघ्ना ॥ ४० ॥ रामेंवीण अयोध्या दृष्टीं । देखतां मज दुःखकोटी । यालागीं तिची न घें भेटी । ते वस्तीची गोष्टी रुचेना ॥ ४१ ॥ नंदिग्रामीं करोनि वस्ती । अयोध्येसी निजराज्याची स्थिती । माझिया जाण अनुमतीं । शत्रुघ्नाहातीं करवीन ॥ ४२ ॥ श्रीरामपादुकांपुढें जाण । भरत शत्रुघ्न दोघे जण । अयोध्यानिजराज्यलक्षण । करिती संपूर्ण पादुका ॥ ४३ ॥ पादुकांचा प्रताप पूर्ण । अयोध्येकडे पाहील कोण । कळिकाळ नोळंगती[८] आंगवर्ण । राज्यलक्षण पादुका ॥ ४४ ॥ रामपादुका ऐकतां कर्णीं । यम काळ येती लोटांगणीं । इंद्रादिक लागती चरणीं । राज्यलक्ष्मणीं पादुका ॥ ४५ ॥ पादुकासामर्थ्यें सामर्थ्यता[९] । त्या भाग्यें आलिया माझ्या हाता । त्या म्यां दृढ ओपिल्या माथां । कृपावंता श्रीरामा ॥ ४६ ॥ श्रीरामवियोगाचें दुःख । पादुका पावतां गेलें निःशेख । पादुका पाहतां स्वानंदसुख । आत्यंतिक श्रीरामा ॥ ४७ ॥ पुढती भेटे श्रीरघुनाथ । तंववरी माझें हेंचि व्रत । मस्तकीं पादुका सतत । स्वानंदयुक्त वाहीन ॥ ४८ ॥ राम राहिला वनवासीं । विसरलों त्या दुःखासी ।

१ खडावा इत्यादि. २ फिरणें. ३ कांटे. ४ ठेवून घेऊन. ५ आज्ञेनें. ६ खरोखर. ७ सिंहासनावर. ८ सेवीत नाहींत. ९ शक्ती.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

पादुकारूपें मजपासीं । अहर्निशीं श्रीराम ॥ ४९ ॥ तुजसीं वियोग रघुनाथा । येथोनि मज नाहीं आतां । उल्हास भरताचिया चित्ता । स्वानंदता गर्जत ॥ ५० ॥ ऐकोनि भरताचें वचन । श्रीराम झाला सुखसंपन्न । दोघांही दिधलें आलिंगन । भरतशत्रुघ्न सुखरूप ॥ ५१ ॥ चौदा वर्षी चौदा दिवसीं । मी येईन नेमेंसीं । संदेह न धरावा मानसीं । मी तुजपासीं निभ्रांत[1] ॥ ५२ ॥ ऐसें बोले श्रीरघुनंदन । यथार्थ मानी भरत शत्रुघ्न । दोन्ही करसंपुट जोडून । साष्टांगीं नमन त्यांहीं केलें ॥५३ ॥ बंधुबंधूंस जाला ऐक्यभाव । बंधुबंधूंसीं प्रेम अपूर्व । यालागीं चित्रकूटासी बांधव । ठेविलें नांव श्रीरामें ॥ ५४ ॥ चवघां बंधूंसी एकात्मता । चित्रकूटीं आली हाता । यालागीं बांधव हें नाम तत्त्वतां । स्वभावतां चित्रकूटा ॥ ५५ ॥ लागोनि श्रीरामाच्या चरणा । वंदोनि जानकीलक्ष्मणां । तिघां करोनि प्रदक्षिणा । भरतशत्रुघ्नां उल्हास ॥ ५६ ॥ रामपादुका ठेवोनि शिरीं । दोघे बैसले रथावरी । निशाणें त्राहाटिल्या भेरी । निजगजरीं[2] निघाले ॥ ५७ ॥ श्रीरामें निजमाता । संबोखिल्या[3] सुखरूपता । त्यांच्या चरणीं ठेवूनि माथा । त्याही समस्ता बोळविल्या ॥ ५८ ॥ सैन्य सेनानी[4] प्रधान । तिंहीं वंदोनि रघुनंदन । होवोनियां सुखसंपन्न । अयोध्यागमन तिंहीं केलें ॥ ५९ ॥ निजगजरीं अति उल्हासीं । भरत आला प्रयागासी । भेटोनियां भरद्वाजासी । वृत्तांत त्यापासीं सांगीतला ॥ ६० ॥ श्रीरामाच्या निजपादुका । देखोनि भरताचे मस्तका । भरद्वाज पावला हरिखा । म्हणे धन्य तिहीं लोकीं भरता तूं ॥ ६१ ॥ परमानंदें परिपूर्ण । भरता दिधलें आलिंगन । देवोनियां आशीर्वचन । अयोध्ये गमन करविलें ॥ ६२ ॥ गंगा उतरोनि झडकरी । गुहकाचे निजनगरीं । भरत आला शृंगवेरपुरीं । गजभारें गर्जत ॥ ६३ ॥ रामपादुका देखोनि शिरीं । गुहक लोटांगण करी । भरतचरण वंदोनि शिरीं । हर्षें निर्भर नाचत ॥ ६४ ॥ रामपादुका आल्या हाता । त्या तुवां प्रेमें ठेविल्या माथां । धन्य भाग्य तुझें भरता । तूं पढियंता[5] श्रीरामा ॥ ६५ ॥ भेटी देवोनि गुहकासी । परम सुख जालें त्यासी । भरत निघाला अयोध्येसी । निजसैन्येंसीं सत्वर ॥ ६६ ॥ अयोध्या देखोनि भरता । सुख नुपजे त्याच्या चित्ता । तेथें माता ठेवोनि समस्ता । होय निघता नंदिग्रामा ॥ ६७ ॥

रथस्थः स तु धर्मात्मा भरतो भ्रातृवत्सलः ।
पादुके शिरसि स्थाप्य नंदिग्राममुपाविशत् ॥ ७ ॥

भ्रातृवत्सल भरतवीर । रथीं बैसोनियां शीघ्र । रामपादुकीं मंडित[6] शिर । आला सत्वर नंदिग्रामा ॥ ६८ ॥ नंदिग्रामीं बाह्यप्रदेशीं । रामपादुका स्थापोनि शिर्शी । भरतराजा राज्यऋषी । जाला तापसी अनुतापें ॥ ६९ ॥ नगरीं त्यजोनि समस्त माता । अनुकूल त्यजोनि निजकांता । राज्यभोगा नातळतां । श्रीरामव्रता अनुसरला ॥ ७० ॥ वनवासीं श्रीरघुनाथ । जें जें व्रत आचरत । तें तें अंगीकारी भरत । तोही शोकार्थ अवधारा ॥ ७१ ॥

जटावल्कलधारी च मुनिवेषधरः प्रभुः ।
नंदिग्रामेऽवसद्वीरः ससैन्यो भरतस्तदा ॥ ८ ॥
सवालव्यजनं छत्रं धारयामास स स्वयम् ।
रामभक्तः सदा नित्यं रंजयन् विविधाः प्रजाः ॥९॥

राज्यवैभव त्यजोनि दूरी । जटावल्कलचीरधारी । रामपादुका स्थापोनि शिरीं । जळफळाहारीं निर्वाहो ॥ ७२ ॥ जंव होय श्रीरामाचें आगमन । तंववरी करणें नाहीं भोजन । दृष्टीं पाहणें नाहीं अन्न । देहवर्तनें जळफळीं ॥ ७३ ॥ श्रीरामपादुकांचें भजन । श्रीरामपादुकांचें पूजन । श्रीरामपादुकांचें निजध्यान । स्मरण चिंतन श्रीरामाचें ॥ ७४ ॥ रामपादुकीं छत्र धरी । आतपत्र मुक्तझलरी । कनकदंड घेवोनि करीं । निरंतरीं ढाळीत ॥ ७५ ॥ श्रीरामनाम स्मरतां । आराणुक नाहीं भरता । मेळवोनि साधुसंतां । श्रीरामकथा अनुवादे ॥ ७६ ॥ श्रीरामाज्ञा मानोनि माथां । भरत अयोध्ये आला मागुता । त्याच्या पादुका एकाग्रता । होय भजता अति प्रीतीं ॥ ७७ ॥ श्रीरामाचें निजवचन । त्यासी सर्वस्वें विकिला प्राण । अयोध्याराज्यसंरक्षण । करी शत्रुघ्न भरताज्ञे ॥७८॥ भरताज्ञे अति सादर । शत्रुघ्न आठही प्रहर । आज्ञाधारी निरंतर । अणुमात्र नुलंघी ॥ ७९ ॥

१ निःसंशय. २ मोठ्या थाटानें. ३ समजाविल्या. ४ सेनापति. ५ प्रिय. ६ शोभिवंत.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

बहु तापस अनुष्ठानी । त्यांमाजी भरत महामुनी । विनटलासे श्रीरामभजनीं । अनुदिनीं तन्निष्ठ ॥८०॥

विविधजनसमूहैः संवृतो ग्राम आसीत्
प्रतिदिननिशि पूजां पादुकानां च कुर्वन् ।
विविधनृपतिकृत्यं रामपादानुरूपं
विधिवदतिवरेण्यो रामबंधुः कनीयान् ॥ १० ॥

नंदिग्रामीं बाह्यप्रदेशीं । भरत राहिला मुनिवेषेंसीं । तेथें योगी दिगंबर संन्यासी । येती त्यापासीं दूरस्थ ॥ ८१ ॥ आले तपोराशी ऋषिगण । आगमी निगमी अति सज्ञान । जपी ध्यानी मुमुक्षुजन । साधु सज्जन तेथें आले ॥ ८२ ॥ देशोदेशींच्या प्रजा प्रधान । श्रवणीं श्रद्धाळु बहुत जन । अंजलिसंपुट जोडून । उभा शत्रुघ्न वचनार्थी ॥ ८३ ॥ भरतमुखें रामायण । श्रवणें होतसे समाधान । देखोनि पादुकांचें भजन । विस्मित जन अवघेही ॥ ८४ ॥ भरताचे नित्यसंगतीं । श्रवण स्मरण अहोरातीं । देखोनि श्रीरामाची भक्ती । सुखी होती समस्त ॥ ८५ ॥ श्रीरामपादुका ठेवोनि माथां । भरत अयोध्ये आला असतां । राज्यीं नाहीं अधर्मकथा । अकर्मवार्ता असेना ॥ ८६ ॥ कैसी राजाज्ञा समर्थ । प्रजा सत्यवादी समस्त । स्वधर्मकर्मीं नित्य रत । श्रीरामभक्त श्रद्धाळु ॥ ८७ ॥ राज्यामाजील निजजन । स्वभावेंसीं श्रीरामनाम स्मरण । करितां जीविकावर्तन । रामचिंतन अहर्निशीं ॥ ८८ ॥ ऐकोनि भरताचें शीळ । देशोदेशींचे भूपाळ । उपायनें घेवोनि प्रबळ । येती सकळ भेटीसी ॥ ८९ ॥ रत्नधनगजवाजींसीं । राजे आणिती भेटींसी । भरत नातळे पैं त्यांसी । निजमानसीं निरपेक्ष ॥ ९० ॥ स्मरतां श्रीरामाचें नाम । मावळले क्रोध काम । निघोनि गेला लोभसंभ्रम । भरत निष्काम श्रीरामें ॥ ९१ ॥ भेटी परतवोनि समस्त । राजे सन्मानें स्वयें गौरवीत । रामप्रतापें अति विख्यात । उदार भरत तिहीं लोकीं ॥ ९२ ॥ श्रीरामस्मरणें प्रज्ञाप्रबुध्दु । श्रीरामाचा कनिष्ठ बंधु । भरत भजनीं अगाधबोधु । वसे स्वानंदु नंदिग्रामीं ॥ ९३ ॥ ऐसिया अगाधस्थिती । भरता नंदिग्रामीं वस्ती । वनवासीं श्रीरघुपती । करील ख्याती ते ऐका ॥ ९४ ॥ निजराज्याची लोभप्राप्ती । निःशेष त्यजूनि रघुपती । अयोध्याकांडा केली समाप्ती । करोनि वस्ती वनवासीं ॥ ९५ ॥ सापत्न मातेची वचनोक्ती । श्रीरामें पाळोनि अति प्रीतीं । अयोध्याकांडा केली समाप्ती । करोनि वस्ती वनवासीं ॥ ९६ ॥ देह त्यागितां नृपती । भाक न सांडी श्रीरघुपती । अयोध्याकांडा केली समाप्ती । करोनि वस्ती वनवासीं ॥ ९७ ॥ कौसल्यामातेचिया काकुलती । श्रीरामें मौन धरोनि निश्चितीं । अयोध्याकांडा केली समाप्ती । करोनि वस्ती वनवासीं ॥ ९८ ॥ सीता चरणीं चाले वनाप्रती । दुःख न मानूनि सीतापती । अयोध्याकांडा केली समाप्ती । करोनि वस्ती वनवासीं ॥ ९९ ॥ लक्ष्मणाच्या क्षोभोक्तीं । क्षोभ न मानूनि रघुपती । अयोध्याकांडा केली समाप्ती । करोनि वस्ती वनवासीं ॥ १०० ॥ भरत नेऊं आला अतिप्रीतीसीं । त्यासी बोळवूनि सुखस्थितीं । अयोध्याकांडा केली समाप्ती । करोनि वस्ती वनवासीं ॥ १ ॥ त्यजोनि निजराज्य प्रचंड । वैभवासी देवोनि दंड । नानाभोगांचें ठेंचूनि तोंड । अयोध्याकांड संपविलें ॥ २ ॥ दुःख ओढवलें वितंड । तें स्वयें केलें खंडविखंड । मोहाचें करोनि काळें तोंड । अयोध्याकांड संपविलें ॥ ३ ॥ अभिमान अति अवघड । भरडिला जैसा मूग कांकड । परिपाकीं करोनि गोड । अयोध्याकांड संपविलें ॥ ४ ॥ दुस्तर वन भय दुर्घड । त्या भयाचें ठेंचोनि तोंड । वनवास करोनियां गोड । अयोध्याकांड संपविलें ॥ ५ ॥ याउपरी रघुनंदन । सेवोनि दंडकारण्य । वधील त्रिशिरा खर दूषण । राक्षसदळण श्रीराम ॥ ६ ॥ एका जनार्दना शरण । अगाध कथा रामायण । परमानंदें रसाळ पूर्ण । दंडकारण्यरहिवासु ॥ १०७ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे अयोध्याकांडे एकाकारटीकायां भरत अयोध्यागमननंदिग्रामवासो नाम अष्टादशोऽध्यायः ॥ १८ ॥ ॥ ओंव्या ॥ १०७ ॥ श्लोक ॥ ११० ॥

अयोध्याकांड समाप्त

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations



श्रीएकनाथ महाराजकृत

श्रीभावार्थरामायण

अरण्यकांड

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations



सीताहरण

जटायू आणि रावण यांचें युद्ध; राम आणि लक्ष्मण जटायूला भेटतात.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

श्रीसद्गुरवे रामचंद्राय नमः ।

श्रीएकनाथ महाराजकृत

श्रीभावार्थरामायण

*

अरण्यकांड

अध्याय पहिला

श्रीगणाधिपतये नमः ।

चरितं रघुनाथस्य शतकोटिप्रविस्तरम् ।
एकैकमक्षरं पुंसां महापातकनाशनम् ॥ १ ॥
कूजन्तं रामरामेति मधुरं मधुराक्षरम् ।
आरुह्य कविताशाखां वंदे वाल्मीकिकोकिलम् ॥ २ ॥

श्रीराम चूत[1]वृक्ष प्रबळ । त्यावरी वाल्मीक कवि कोकिळ । नारदवसंतें फुटली कीळ[2] । मधुराक्षरीं सरळ आला[3]पु केला ॥ १ ॥ त्या मधुराक्षरांमाजी मधुर । श्रीरामनाम हें सुखसार । सुखी केलें चराचर । सुखें शंकर डुल्लत ॥ २ ॥ उफराटें राम ये अक्षरीं । मरा मरा या उत्तरीं । नारद वाल्मीका उपदेश करी । दों अक्षरीं उद्धरला ॥ ३ ॥ नाम शुद्ध हो अथवा अशुद्ध । जो जपे तो पावन शुद्ध । श्रीरामनाम जगद्वंद्य । परमानंद हरिनामें ॥ ४ ॥ चोरटा वाल्मीक तरे संसारीं । हेही नामाची कोण थोरी । नाम पावन जगदुद्धारी । नाम उद्धरी महापातक्यां ॥५॥ इतर कवी गज गजरी । वाल्मीक कवि वनगर्[4]जकेसरी । श्रीरामनामें सिंहनाद करी । रानभरी नवरसां ॥ ६ ॥ नवरसांचा रसिक । नवरंगडा रघुकुळटिळक । श्रीरामनामाचा एकैक श्लोक । सुखदायक नवरसां ॥ ७ ॥ हास्यादि नवरसवृत्तीं । श्रीरामरसें त्यांसी सुखप्राप्ती । वाल्मीकनामाच्या नामोक्तीं । पावन होती कविकुळें ॥ ८ ॥ श्रीरामनामेंवीण जें तोंड । तें केवळ जाणा चर्मकुंड । भीतरीं जिव्हा चाम[5]खंड । कवित्वकाटें काटली ॥ ९ ॥ ऐकतां कथा रामायणी । नवरसपापां होय धुणी । नामें उद्धरली कुंटणी । पवित्र वाणी श्रीरामनामें ॥ १० ॥ श्रीरामकथेची नव्हा[6]ळी । शेष वंदी स्वयें पाताळीं । शिव वंदी प्रेमसमेळीं । कथा भूतळीं जगद्वंद्य ॥ ११ ॥ तें शतकोटी रामायण । येथें आकळूं शके कोण । तेथें अपुरतें मी दीन । कथा जनार्दन स्वयें वदवी ॥ १२ ॥ करितां लिंगदेहाचें[8] मर्दन । तेंचि जन मानितो [7]अर्दन । यालागीं नांवें श्रीजनार्दन । निजव्याख्यानशास्त्रार्थें ॥ १३ ॥ असो काय काज बहु शास्त्रार्थें । मुख्य श्रीरामकथा येथें । तेंचि श्रवण मनन करावें ग्रंथें । सावध चित्तें अवधारा ॥ १४ ॥ भरत आलिया अयोध्येसी । मागें श्रीराम वनवासीं । काय वर्तलें एके दिवसीं । ते कथेसी अवधारा ॥ १५ ॥

---

१ आंब्याचें झाड. २ तेज. ३ स्वर. ४ वन्य गजांना सिंह असा. ५ निवळ चामड्याचा तुकडा. ६ अपूर्वता. ७ दुर्बल. ८ पांच ज्ञानेंद्रियें, पांच कर्मेंद्रियें, पांच प्राण, मन आणि बुद्धि मिळून सूक्ष्मदेह. ९ नाश. १० लाभ.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

प्रतियाते तु भरते वसन् रामस्तपोवने ।
लक्षयामास सोद्वेगांस्तत्रारण्यनिवासिनः ॥ ३ ॥
राममासाद्य निरतांस्तानलक्षयदुत्सुकान् ॥ ४ ॥

भरत अयोध्ये गेलियावरी । मागें चित्रकूटवासी ऋषीश्वरीं । अति उद्वेगचित्तेंकरीं । परस्परीं बोलती ॥ १६ ॥ ते येवोनि श्रीरामाप्रती । खुणावोनियां गुजबुजती । तें देखोनियां श्रीरघुपती । साशंकित चित्तीं स्वयें जाला ॥ १७ ॥ भरत आला होता सैन्येंसीं । कांहीं उपद्रव जाला ऋषींसी । किंवा कांहीं मजपासीं । अधर्मासी देखिलें ॥ १८ ॥ अथवा लक्ष्मणें यांसी । कांहीं दिधलें अपमानासी । किंवा कांहीं सीतेपासीं । अधर्मासी देखिलें ॥ १९ ॥ ऐसी अति चिंता श्रीरामासी । तंव तें कळों सरलें जाबाली ऋषीसी । तो येवोन श्रीरामापासीं । सत्वरेंसीं बोलत ॥ २० ॥

कृतांजलिरुवाचेदमृषिर्जाबालिकस्तदा ।
अथर्षिर्जरया वृद्धस्तपसा नियतेंद्रियः ॥ ५ ॥
चलनं तात वैदेह्यास्तपस्विषु विशेषतः ।
त्वन्निमित्तमिदं तावत्तापसान् प्रतिवर्तते ॥ ६ ॥

जाबाली ऋषि अति वृद्ध । तापसांमाजी अति प्रसिद्ध । इंद्रियनेमीं अति अगाध । प्रज्ञाप्रबुद्ध[१] ऋषिवर्य ॥ २१ ॥ ऐसा जो कां ऋषि जाबाली । तेणें करोनियां कृतांजळी । मृदु मधुर वाक्यें मंजुळी । श्रीरामाजवळी बोलत ॥ २२ ॥ श्रीरामापासोनि दुश्चरित । न घडे जागृतिस्वप्नसुषुप्तींत । तुझेनि नामें दुष्कृती तरत । तो तूं साशंकित कां होसी ॥ २३ ॥ तुझेनि मुखचंद्रें चंद्र निष्कळंक । त्या तुझें देखतां श्रीमुख । कोटिजन्मांचें हरे दुःख । परम सुख कोंदाटे[२] ॥ २४ ॥ लक्ष्मणापासोनि अनुचित । मूर्खेही सत्य न मानीत । तुझिया भक्तापासोनि अकृत्य[३] । न घडे निश्चित श्रीरामा ॥ २५ ॥ निजभक्ताचें अनुचित । तें तूं करिसी अति पुनीत । प्रल्हादें करविला पितृघात । कीर्ति लोकांत अति पावन ॥ २६ ॥ प्रल्हादाचा पितृघात । वंद्य केला त्रैलोक्यांत । जे निजमायेचा करिती अंत । ते तूं अति आप्त मानिसी ॥ २७ ॥ मातृघात पितृघात । जे जे करिती तुझे भक्त । ते ते मानिसी परम आप्त । अति पुनीतें[४] तिहीं लोकीं ॥ २८ ॥ मातृघातकी परशुराम । पितृघातकी प्रल्हाद परम । या दोघांचें स्मरतां नाम । भेटे श्रीराम स्वानंदें ॥ २९ ॥ प्रल्हाद भक्तमुकुटमणी । पढविला प्रातःस्मरणीं । दुजा ब्रह्मचारिशिरोमणी । वेदीं पुराणीं वानिजे[५] ॥ ३० ॥ यांहूनि सौमित्र परम भक्त । सखा आणि अति पुनीत । यापासोनि अनुचित । न घडे निश्चित श्रीरामा ॥ ३१ ॥ सीता तुझी धर्मपत्नी । अयोनिजा[६] जनकनंदिनी । अधर्म तियेपासोनी । जागृतीं स्वप्नीं घडेना ॥ ३२ ॥ अधर्माची आशंकता । तुम्हांमाजी नाहीं श्रीरघुनाथा । ऋषी बोलती जे वार्ता । ते ऐक आतां सांगेन ॥ ३३ ॥ जनस्थानीं वसते जे जन । त्या तापसांचें अति कंदन । राक्षसीं केलें अन्योन्य । तें भय संपूर्ण सांगती ऋषिवर्य ॥ ३४ ॥ त्या महाभयाची वार्ता । ऋषि शंकले तुज सांगतां । मजहातीं तुज श्रीरघुनाथा । तिहीं हे कथा सांगविली ॥ ३५ ॥ तापसां करी कोण बाधु । ऐसा पुससी संबंधु । रावणाचा धाकटा बंधु । खर नामें अगाधु राक्षस तो ॥ ३६ ॥ त्रिशिरा आणि खर दूषण । हे तिघे बंधु सखे जाण । चवदा सहस्र राक्षससैन्य । जनस्थानीं वसविलें ॥ ३७ ॥ त्या राक्षसांभेणें[७] भयभीत । तुझा आश्रय करोनि येथ । ऋषी राहिले समस्त । त्या राक्षसां अंत श्रीराम ॥ ३८ ॥ परी आजि आली असे नवी वार्ता । तेणें भय भारी ऋषींतें समस्तां । तुज सांडोनि श्रीरघुनाथा । आणिका पर्वता जाऊं पाहती ॥ ३९ ॥ राक्षस खराप्रति सांगत । श्रीरामासवें ऋषी समस्त । राहिले चित्रकूटांत । तो स्वयें येथ येऊं इच्छी ॥ ४० ॥ ससैन्य बंधु तिघे जण । रातोरातीं घाला घालून । मारोनि रामलक्ष्मण । सीता आपण नेऊं पाहती ॥ ४१ ॥ सन्मुख यावें तुम्हांप्रती । तंव तुम्ही परशुरामपुरुषार्थी । हा धाक सदा वाहती । तुमची ख्याती कळली असे ॥ ४२ ॥ ताटका वधिली एके बाणें । सुबाहु घेतला प्राणें । मारीच उडविला सत्राणें[८] । त्यासीं झुंझणें प्राणान्त ॥ ४३ ॥ धनुष्यें रावणा लाविली ख्याती । तें मोडिलें

१ बुद्धिवान्. २ दाटून जातें. ३ वाईट कर्म. ४ पुण्यवान्. ५ वर्णावा. ६ शुक्रशोणितापासून उत्पत्ति नव्हे अशी. ७ राक्षसांच्या भीतीनें. ८ मोठ्या वेगानें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

घेवोनि हातीं । त्यासीं युद्ध न घडे निश्चितीं । निद्रिस्थ रातीं मारावें ॥ ४४ ॥ हा राक्षसीं केला ईत्यर्थ । तेणें ब्राह्मण चळीं कांपत । तुज सांगावया साशंकित । तें म्यां समस्त श्रुत केलें ॥ ४५ ॥ ऐकें श्रीरामा निश्चित । येथें वन आहे अति गुप्त । धाकें ऋषी जाताती समस्त । तुम्हींही तेथें शीघ्र यावें ॥ ४६ ॥

बहुमूलफलं चित्रमविदूरादितो वनम् ।
सबांधव इतो गच्छ यदि चित्तं प्रवर्तते ॥ ७ ॥

निकट वन अति गहन । अतर्क्य तर्कैना गुप्तस्थान । फळ मूळ गंगाजीवन । विश्रामस्थान वस्तीसी ॥ ४७ ॥ तेथें यावें तुम्हीं तिघेजणीं । ऐसें ऋषीश्वरांचे मनीं । तें गुह्य बोलतां कानीं । जाली तुझ्या मनीं आशंका ॥ ४८ ॥ हात जोडोनि समस्तांसी । श्रीराम विनवी ऋषीश्वरांसी । सुखें असावें आश्रमांसी । त्या राक्षसांसी मी जाणें ॥ ४९ ॥ संरक्षावे गोब्राह्मण । हेंचि व्रत स्वधर्माचरण । मी श्रीराम असतां रक्षण । भय तुम्हांलागून पैं नसे ॥ ५० ॥ बाणीं मेदीन मेरुगिरी । मारीन राक्षसांच्या हारी । मी रघुवीर असतां सेवक घरीं । कैसियापरी भय तुम्हां ॥ ५१ ॥ ऐसें बोलतां श्रीरामासी । विचार करिती अवघे ऋषी । तिन्ही धुरा दळवळेंसीं । कैंवी दोघांसी आकळती ॥ ५२ ॥ एक घेवोनि पळेल सीता । एकला उरेल श्रीराम झुंजतां । समस्त राक्षसांच्या घाता । कैसा साहता तो होय ॥ ५३ ॥ सुबाहु मारिला तत्त्वतां । तैं जवळी नव्हती सीता । दोघे बंधु एकात्मता । केलें घाता सुबाहूच्या ॥ ५४ ॥ स्त्रियेचे चिंतेकरितां । धैर्य नुरे पुरुषार्था । स्त्रीलोभ हृदयीं असतां । जयो सर्वथा न पाविजे ॥ ५५ ॥ तीन्ही धुरा भद्रजाती । श्रीराम झुंजेल एकला किती । चारी शर निरसोनि जाती । मग पळती माघारे ॥ ५६ ॥ हृदयीं स्त्रीलोभ असतां । युद्धीं नुरे एकाग्रता । मंत्रबीज गिळी चिंता । जयो सर्वथा न पाविजे ॥ ५७ ॥ हे तिघे वनीं गुप्त होती । मग राक्षस आम्हांसी भक्षिती । यांची सांडोनियां संगती । निघा निश्चितीं अवघेही ॥ ५८ ॥ युक्ति सांगती श्रीरामाप्रती । तुम्ही दोघे जण पुरुषार्थी । तरी न रहावें येथिले वस्ती । यावें निश्चितीं आम्हांसवें ॥ ५९ ॥ राक्षस धर्मयुद्धी नव्हेती । छळणें पळणें त्यांची शक्ती । सिंतँरोनियां नाना युक्तीं । मग मारिती सुरवरांतें ॥ ६० ॥ राक्षस निशाचर होती । येवोनियां रातोरातीं । निदसुरां तुम्हां मारिती । तुमची शक्ति ते काय ॥ ६१ ॥ ऐसें बोलतां ऋषीश्वर । राम नेदीच प्रत्युत्तर । ब्राह्मणांमाजी विकल्प थोर । धैर्यनिर्धार असेचिना ॥ ६२ ॥ विश्वास नाहीं ब्राह्मणांसी । माझी संगति न घडे यांसी । त्यागोनियां श्रीरामासी । निघाले ऋषी तत्काळ ॥ ६३ ॥ राहावया एकरात्री । धीर न धरवे ब्राह्मणांप्रती । त्यागोनियां श्रीरघुपती । अन्यत्रगती निघाले ॥ ६४ ॥ अधैर्यें ते कंपायमान । आज्ञा पुसती ब्राह्मण । श्रीरामें करोनियां नमन । म्हणे आपण सुखें जावें ॥ ६५ ॥ अविश्वासी द्विजवरें । हातीं स्त्रिया कडिये लेंकरें । माथां घेवोनि यज्ञपात्रें । आश्रमांतरा ऋषी गेले ॥ ६६ ॥

सचिंतेषु प्रयातेषु तपस्विषु विशेषतः ।
विवृद्धं राक्षसं दृष्ट्वा रामोऽपि गमनोत्सुकः ॥ ८ ॥
लक्ष्मणोऽपि प्रयातेषु तपस्विषु विशेषतः ।
न तत्रारोचयद्वासं वैदेही च सुमध्यमा ॥ ९ ॥

मग श्रीराम विचारी निजमनीं । राक्षस वाढले जनस्थानीं । तयांच्या बीजनिर्दळणीं । आजि येथोनि निघावें ॥ ६७ ॥ सीता म्हणे श्रीरघुनाथा । समस्त ऋषी गेले असतां । येथें राहणें रुचेना आतां । आजचि तत्त्वतां निघावें ॥ ६८ ॥ मग बोलिला लक्ष्मण । ऋषीश्वर गेले भयभीतमन । तें भय निर्दळावया आपण । शीघ्र प्रयाण करावें ॥ ६९ ॥ करावें राक्षसनिर्दळण । तेणें श्रीरामा उल्हास पूर्ण । तेणें सर्वांगा आलें स्फुरण । दंडकारण्य शोधावया ॥ ७० ॥ बाहु थरकती समूळीं । पिंजारल्या रोमावळी । करावया राक्षसांची होळी । महा आंतुर्बळी श्रीराम ॥ ७१ ॥ उल्हास श्रीरामाचे चित्ता । सौमित्रासी होय सांगता । घेवोनियां आयुधां समस्तां ।

१ बेत. २ जवळ. ३ गंगोदक. ४ समुदाय. ५ धुरंधुर, पराक्रमी (खर, दूषण, त्रिशिरा) ६ हत्तीसारखे बलवान्. ७ फसवून. ८ दुसऱ्या आश्रमाला. ९ समूळ नाश करण्यासाठीं. १० अति बलाढय.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सहितसीता निघे वेगीं ॥ ७२ ॥ एका जनार्दना शरण । चित्रकूटवस्ती त्यागोनि जाण । केलें श्रीरामें प्रयाण । दंडकारण्यप्रवेशा ॥ ७३ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे अरण्यकांडे एकाकारटीकायां दंडकारण्यगमनं नाम प्रथमोऽध्यायः ॥ १ ॥ ओंव्या ॥ ७३ ॥ श्लोक ॥ ९ ॥

अध्याय दुसरा

श्रीसीताकांताय नमः ॥ अत्रिऋषि वसे जेथ । आतुरश्रांतिपर्वत[१] । तेथें आला श्रीरघुनाथ । समवेत स्त्रीबंधू ॥ १ ॥ देखोनि अत्रीचे चरण । श्रीरामें घातलें लोटांगण । ऋषीनें दिधलें आलिंगन । समाधान ध्येयध्याना ॥ २ ॥ सीता आणि लक्ष्मण । दोघीं घातलें लोटांगण । दृढ मस्तकीं धरिले चरण । सुखसंपन्न ऋषि जाला ॥ ३ ॥ श्रीरामें अति उल्हासता । अनसूयाचरणीं ठेविला माथा । अत्रि म्हणे श्रीरघुनाथा । तुझी हे माता पुरातन ॥ ४ ॥ ऐकोनि अत्रीचें वचन । सौमित्रें वंदिले तिचे चरण । सीतेनें घातलें लोटांगण । दिधलें आलिंगन अनसूये ॥ ५ ॥ सीतेसी देखतांचि दृष्टीं । अनसूयेसी सुखानंद पोटीं । धन्य धन्य तूं गोरटी । पतिसंनिष्ठी[२] पतिव्रता ॥ ६ ॥ तुझे अंगीं बालपण । पतीच्या व्रता अनुलक्षून । चरणचालीं वनाभिगमन । तूं संपूर्ण पतिव्रता ॥ ७ ॥ पतीचें वचन उल्लंघितां । जे अनुसरे पतीच्या व्रता । तेचि सती पतिव्रता । ते तूं सीता सभाग्य ॥ ८ ॥ ऐसी करोनियां स्तुती । उचलोनियां दोहीं हातीं । आलिंगिली अति प्रीतीं । सतियां[३] सती[३] स्वानंदें ॥ ९ ॥ जाणोनि सीतेचें हृद्गत । अनसूया जाली कृपायुक्त । आपुलें पतिव्रतेचें व्रत । सीतेसी देत स्वानंदें ॥ १० ॥ देवोनि पतिव्रतेचें व्रत । अनसूया उल्हासयुक्त । दिव्य वस्त्रें अंगरागेंयुक्त[४] । स्वानंदें देत तें ऐका ॥ ११ ॥

अब्रवीच्चापि सकलं हर्षं सीते करोम्यहम् ।
इदं दिव्यांबरं माल्यं वस्त्रमाभरणानि च ॥ १ ॥
अंगरागं च वैदेहि महार्हं च विलेपनम् ।
मया दत्तमिदं सीते तव गात्राणि शोभयेत् ॥ २ ॥

अनसूया कृपायुक्त । सीतेसी दिव्य वस्त्रें नेसवीत । आणि दिव्य चंदनें चर्चित । माळा घालीत दिव्यसुमनीं ॥ १२ ॥ सीतेचें पुरवावया कोड । घातला ताडांचा पैं तोडें[५] । अहर्निशीं पडेल उजेड । सरली चाड शशिसूर्या ॥ १३ ॥ तोडाचिया दिव्यदीप्तीं । शशिसूर्य खद्योत होती । अनसूयेची निजख्याती । पतिसामर्थ्यें पतिव्रता ॥ १४ ॥ जिचा लागतांचि हात । तिन्ही देव जाले अपत्य । तिचें सामर्थ्य अत्यद्भुत । स्वयें अर्पीत सीतेसी ॥ १५ ॥ माझिया दिव्यवस्त्रांची थोरी । मलिन नव्हेती परिचारीं[६] । जाऊं नेणती रजकद्वारीं[७] । निजतेजाकारीं निर्मळ ॥ १६ ॥ उटी धुतां ओहंळेना[८] जाण । देहीं दिव्य चंदनाचें महिमान । करितां अभ्यंगमर्दन । सुगंधपण उडेना ॥ १७ ॥ दिव्य सुमनांची माळा । सुकों नेणे कदाकाळा । नित्य टवटवीत गळां । सुपरिमळा मघमघित ॥ १८ ॥ सीते सावध परियेसीं । तूं माझा प्रसाद पावलीसी । तुज भय नाहीं राक्षसांपासीं । निःशंक होसी निर्भय ॥ १९ ॥ वियोग जालिया रघुनाथा । वियोग न बाधी तुझिये चित्ता । पूर्वापर पूर्वकथा । होय सांगता श्रीरामें[९] ॥ २० ॥ म्हणोनि हात ठेविला माथां । अनसूयें अनुग्रहिली[१०] सीता । तोचि उपदेश पावोनि तत्त्वतां । सुखस्वानंदता सीता जाली ॥ २१ ॥ अनसूया महापतिव्रता । पुढें पाहूनियां कार्यार्था । वधावया लंकानाथा । कृपेनें सीता अनुग्रहिली ॥ २२ ॥ श्रीराम सौमित्र सीता । देखोनि उल्हास अत्रीच्या चित्ता । पूर्वापर पूर्वकथा । होय सांगता श्रीरामा ॥ २३ ॥

अनसूया महाभागा तापसी धर्मचारिणी ।
दशवर्षसहस्राणि यया तप्तं महातपः ॥ ३ ॥
दशवर्षाण्यनावृष्ट्या दग्धे लोके निरंतरम् ।
यथा मूलफले सृष्टे जान्हवीव प्रवर्तिता ॥ ४ ॥

अनसूया महापतिव्रता । तपस्विनी अति वृद्धता । चंद्रकिरणांसम शोभे माथा । पतिध-

१ दुःखितांचें विश्रांतिस्थान. २ अत्यंत पतिनिष्ठ. ३ पतिव्रतांमध्यें पतिव्रता. ४ उटीनें युक्त. ५ अलंकारविशेष. ६ वापरण्यानें. ७ परिटाच्या द्वारीं. ८ पुसून जात नाहीं. ९ श्रीरामच पूर्ण सिद्धि. १० उपदेशिली.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

मार्थी अनुकूळ ॥ २४ ॥ न रिघतां गिरिकंदरीं[१]। बैसोनियां घरच्या घरीं । दहा सहस्र वर्षेंवरी । इचिया तपाची थोरी अगाध ॥ २५ ॥ घरचे घरीं कोण तप । ऐसा पुसावया करिसी संकल्प । ऐक त्या तपाचें स्वरूप । अति निष्पाप सांगेन ॥ २६ ॥ कोणाची न करी असूया[२]। यालागीं नांवें अनसूया । काम क्रोध लोभ न बाधी जया । तें रघुवर्या महातप ॥ २७ ॥ तपें करकरोनि तापस । कोपें केलें अतिशयें कर्कश । दंडमुंडन वृथा वेष । पडली ओस तपश्चर्या ॥ २८ ॥ काम क्रोध तिसरा लोभ । सांडणें हें तप दुर्लभ । तें घरचे घरीं जालें सुलभ । अति निर्लोभ तेथें अनसूया ॥ २९ ॥ जेथें लोभ तेथें असूया । निर्लोभ तेथें अनसूया । याचें नाम तपश्चर्या । जाण रघुवर्या निश्चित ॥ ३० ॥ नुलंघणें पतिवचनासी । हें परम तप स्त्रियांसी । तें दहा सहस्र वर्षें इयेसी । अनसूयेसी फावलें[३] ॥ ३१ ॥ उलंघितां पतीचें वचन । पतिव्रतांसी पडिलें खान[४]। नाहीं सामर्थ्य ना समाधान । स्त्रीपुरुष श्वानप्राय वसवसती ॥ ३२ ॥ दहासहस्र वर्षेंपर्यंत । माझा नुलंघी वचनार्थ । तेणें तपें हे समर्थ । ऐक सामर्थ्य इयेचें ॥ ३३ ॥ दहा वर्षें अनावृष्टी । दुर्भिक्ष[५] पडिलें इया सृष्टीं । तृण नाहीं पृथ्वीचे पोटीं । वृथा गोष्टी तेथें कैंची ॥ ३४ ॥ ते काळीं फळमूळयुक्त । इणें वांचविले जन समस्त । [६]पराङ्मुख नव्हे अहोरात्र । जन संतृप्त फळमूळीं ॥ ३५ ॥ गौतम पेरी प्रातःकाळीं । मध्यान्हीं आणोनि दे साळी । तेणें पाकें अहल्याबाळी । ऋषिमंडळी वांचविली ॥ ३६ ॥ गौतमें वांचविले ब्राह्मण । इणें वांचविले वर्णावर्ण । पशुपक्षी सूकरें[७] श्वान । तृप्तिभोजनें अनुद्वेगें[८] ॥ ३७ ॥ जंव जंव मागते येती द्वारासी । तंव तंव उल्हास अनसूयेसी । तृप्ति देतां समस्तांसी । अहर्निशीं उल्हास ॥ ३८ ॥ वृक्ष नाहीं पृथ्वीसी । तरी पुरवी फळमूळांसी । अगाध सामर्थ्य इयेपासीं । द्विजदेवांसी अतर्क्य ॥ ३९ ॥ जेंवी प्रवाहो गंगाजळा । तैसें पुरविलें फळमूळां । इचिया सामर्थ्याची कळा । अतर्क्य सकळां द्विजदेवां ॥ ४० ॥ अवर्षणीं तृप्तिभोजन । यावें हें इचें व्रत संपूर्ण । ऐकोनि तिन्ही देव आपण । इचें छळण करूं आले ॥ ४१ ॥ ब्राह्मणवेषें याश्वा करून । इचें घेऊनियां वचन । म्हणती नग्न होवोनि आपण । इच्छाभोजन यावें आम्हां ॥ ४२ ॥ ऐकोनि त्यांची वचनोक्ती । शंका नाहीं इचे चित्तीं । हो म्हणत स्वानंदस्थितीं । ऐक रघुपती विनोद ॥ ४३ ॥ माझें चरणतीर्थ घेवोन । त्यांसी केलें अभिषिंचन । तंव ते तिन्ही बाळकें जालीं जाण । अति अज्ञान षाण्मासिक ॥ ४४ ॥ मग होवोनियां नग्न । पायांवरी अभ्यंगून । तिघां देवोनि स्तनपान । करी [९]परियंदण पालखीं[१०] ॥ ४५ ॥ लक्ष्मी सावित्री पार्वती । तिघी सामर्थ्यें विवादती । त्यांसी दावावया इची स्थिती । तिन्ही मूर्ती छळूं आल्या ॥ ४६ ॥ पुढिलासी करूं जातां छळण । छळिताचि छळे आपण । तिन्ही देवां आलें बाळपण । अति अज्ञान स्वयें जाले ॥ ४७ ॥ दश मासांची अहोराती । अनसूयेनें केली निश्चितीं । तात्काळ तिहींची प्रसूती । अपत्यप्राप्ती पावले ॥ ४८ ॥ अतिशयें भोगिती आपत्ती । यालागीं अपत्य म्हणती । स्वविष्ठा स्वयें चिवंडिती[११] । ते बाळत्वप्राप्ती तिन्ही देवां ॥ ४९ ॥ लक्ष्मी सावित्री पार्वती । देखोनि तिघी कुसमुसती । पति अडकले अनसूयेहातीं । सामर्थ्य तीप्रति चालेना ॥ ५० ॥ जैसे सूर्यापुढें खद्योत[१२] । तैशा तिघी जाल्या गर्वहत । अनसूयेसी लोटांगण घालीत । पति निर्मुक्त[१३] करीं माये ॥ ५१ ॥ ती म्हणे पुसावें ऋषीप्रती । त्या मग येती काकुळती । ऋषिराया कृपामूर्ती । पतिनिर्मुक्ति सांगावी ॥ ५२ ॥ अनसूया पतिव्रताशिरोरत्न । माझें लाहोनि आज्ञापन[१४] । तिघांचें हारोनि अज्ञान । केले सावधान सुखरूप ॥ ५३ ॥ केलें अनसूयेचें स्तवन । तिघे पुत्र झाले जाण । अत्रिगोत्रीं उत्पन्न । ब्रह्मा आपण चंद्र जाला ॥ ५४ ॥ नंद्रें[१५] दुर्वास जाला कोपाग्नी । विष्णु जाला दत्तात्रेय मुनी । ते हे श्रीरामा तुझी जननी । जुनाट[१६] जुनी अनसूया ॥ ५५ ॥ ते हे तुझी आदिमाता । सत्य मानीं श्रीरघुनाथा । इचे चरणीं ठेवितां

१ पर्वताच्या गुहेंत. २ हेवा. ३ मिळालें. ४ न्यून. ५ दुष्काळ. ६ पाठमोरी. ७ डुकर. ८ खेदरहित अंतःकरणानें.

९ झोंके देणें. १० पाळण्यांत. ११ कालविती. १२ काजवे. १३ मोकळे. १४ आज्ञा. १५ शंकर. १६ नवीनपणा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

माथा । तुम्हां निर्भयता वनवासीं ॥ ५६ ॥ अनसूया परम पतिव्रता । इणें अनुग्रहिली सीता । तुम्हांसी वनवासीं असतां । भय सर्वथा असेना ॥ ५७ ॥ ज्या ज्या पावाल भयासी । तेथें तेथें निर्भय तुम्हांसी । ज्या ज्या पावाल अपेशासी । अपेशीं यशी जगद्वंद्य ॥ ५८ ॥ तिथें राहोनि त्रिरात्र । फळमूळांचा अति आदर । देखोनि सीतेचा निर्धार । सुख अपार अनसूयेसी ॥ ५९ ॥ अभिवंदोनि अत्रिऋषी । नमस्कारोनि अनसूयेसी । श्रीराम निघाला दंडकारण्यासी । राक्षसांसी अंतक ॥ ६० ॥ ऋषिआश्रम वनसमेळीं । अग्निहोत्राची नव्हाळी । पाहतां यागाची शुद्ध शैली । श्रीराम वनस्थळीं विचरत ॥ ६१ ॥ कोठें त्रिरात्र कोठें पंचरात्र । कोठें वस्ती सप्तरात्र । कोठें राहोनि एकरात्र । गमनीं तत्पर श्रीराम ॥ ६२ ॥ तंव पुढें देखिलें दुर्गम वन । पळती गज सिंह व्याघ्र हरिण । ससे साळया वृंक जंबुकगण । घेवोनि प्राण पळताती ॥ ६३ ॥ सिंहें मारावे गजथाट । ते कां पळती एके वाट । व्याघ्र फोडिती हरिणकंठ । ते कां समसगट पळताती ॥ ६४ ॥ श्रीराम म्हणे लक्ष्मणासी । महद्भय दिसे श्वापदांसी । विसरोनियां वैरभावासी । अति आक्रोशीं पळताती ॥ ६५ ॥ यांसी भयाचें काय कारण । ऐसें विचारितां रघुनंदन । तंव विराधें धांवोन । सीताहरण पैं केलें ॥ ६६ ॥ पुढें श्रीरामलक्ष्मण । सीता मागें होती आपण । सीतेचें देखोनि सुंदरपण । विराधें हरण तात्काळ केलें ॥ ६७ ॥ सीता धरोनि दोहीं हातीं । बैसविली अंकाप्रती । मी होईन तुझा पती । चिंता चित्तीं करूं नको ॥ ६८ ॥ तूं अप्सरा कीं खेचरी । वनदेवता कीं सुरेश्वरी । भाग्यें सांपडलीस हो सुंदरी । सुखें माझ्या घरीं नांदावें ॥ ६९ ॥ तुजसारिखी सुंदर । जरी रिघसील माझें घर । गजमुक्ताफळांचे अलंकार । उत्तम शृंगार तुज करीन ॥ ७० ॥ मज जोडली सुंदर कांता । उल्हास राक्षसाचे चित्ता । परी त्यासी शंकेना सीता । श्रीरघुनाथाचेनि वळें ॥ ७१ ॥ श्रीरामाच्या बाणांपुढें । विराध राक्षस केवळ बापुडें । मज नेईल कोणीकडे । मरण रोकडें पावेल ॥ ७२ ॥ वन अत्यंत गूढ गहन । पुढें गेले श्रीराम लक्ष्मण । त्यांसी विराध न देखे आपण । सीता दोघेजण न देखती ॥ ७३ ॥ अनसूयें अनुग्रहिली सीता । तीस भय नाहीं सर्वथा । ते स्मरे श्रीरघुनाथा । पाव कृपावंता श्रीरामा ॥ ७४ ॥ ऐकतां श्रीरामस्मरण । राक्षस जाला कंपायमान । म्हणे हें नको करूं स्मरण । वचन तीक्ष्ण मज बाधी ॥ ७५ ॥ ऐसें ऐकोनि सीतेचें वचन । परतले श्रीराम लक्ष्मण । परी गूढ गहन महावन । सीतादर्शन नव्हे त्यांसी ॥ ७६ ॥ लक्ष्मण कोपला उद्भट । बाण सोडोनि घनदाट । वन छेदोनि केलें सपाट । देखिला पापिष्ठ विराध ॥ ७७ ॥

ददर्श गिरिशृंगाभं पुरुषादमवस्थितम् ।
वक्रनासं विरूपाक्षं विकृतं घोरदर्शनम् ॥ ५ ॥

राक्षस देखिला अति क्रूर । पर्वतोपम महाथोर । वक्र नासिक वक्र वक्त्र । कपाटोदर दुर्धर्ष ॥ ७८ ॥ अष्ट महासिंहांचीं मढीं । शूळीं खोंचोनि खांदीं कावडी । मृग व्याळ चितळे बापुडीं । मारी कोडी श्वापदांच्या ॥ ७९ ॥ सदंत गजांचीं शिरें । गजचर्में थबथबिती रुधिरें । मारोनि पंच पंच व्याघ्रें । खांदीं क्रूरें बाहिजेती ॥ ८० ॥ जिव्हा तांबडी लखलखित । नेत्र दिसती अति आरक्त । भूतां करावया अंत । सर्वें धांवत वनासी ॥ ८१ ॥

सरामं लक्ष्मणं दृष्ट्वा सीतां च शुभलक्षणाम् ।
अभ्यधावत्सुसंक्रुद्धो लेलिहान इवांतकः ॥ ६ ॥

विराधें देखोनि श्रीराम लक्ष्मण । मग सीतेसी पुसे हे दोघे कोण । श्रीराम भर्तार दीर लक्ष्मण । माझी सोडवण करूं आले ॥ ८२ ॥ मग तो म्हणे तूं माझी कांता । तुज तंव न सांडीं सर्वथा । या दोघांसी मी भक्षीन आतां । तूं कांहीं चिंता करूं नको ॥ ८३ ॥ ऐसें बोलोनियां देख । विकट देवोनियां हांक । धांवोनि श्रीरामासन्मुख । काय तो मूर्ख बोलत ॥ ८४ ॥ तुम्हांसवें

१ लांडगे. २ कोल्ह्यांचा समुदाय. ३ आकाशांतून गमन करणारी. ४ सीता त्याला डगमगली नाहीं. ५ खोल, दुर्गम्य. ६ दरवाजाप्रमाणें विशाळ हृदय ज्याचें असा. ७ अजिंक्य. ८ स्वतः ९ भयंकर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सुंदर सीता। ते तंव जाली माझी कांता। तुम्हांसी मी न मारीं आतां। पळावें जीविता वांचवोनी ॥ ८५॥ तुम्ही म्हणाल युद्ध करीन। तरी मी क्षणार्धें मारीन। तुमचें रुधिर प्राशीन। मांस भक्षीन स्वानंदें ॥ ८६ ॥ अरे मी विराध महाबळी। वसताहें ये वनस्थळीं। तुम्ही दोघे मूर्ख समूळीं। जे भार्यासमेळीं आलेती ॥ ८७॥ तुम्हां दोघां तापसपण। तरी कां वाहतां धनुष्यबाण। तुम्ही कोठील कोणाचे कोण। हें मज संपूर्ण सांगावें ॥ ८८ ॥ मग त्यासी सांगे श्रीराम आपण। धनुष्यें गांजिला रावण। तें भंगिलें वाहोनि गुण। तो मी जाण श्रीराम ॥ ८९॥ सुबाहूचा घेतला प्राण। मारीच उडविला संपूर्ण। ताटिका वधिली निजबाणें। तो मी जाण श्रीराम ॥ ९० ॥ एकवीस वेळां धरित्री। जेणें भार्गवें केली निःक्षत्री। तोही लाजविला शौर्यैंकरीं। तो मी निर्धारीं श्रीराम ॥ ९१ ॥ सूर्यवंशींचा विख्यात। श्रीराम दाशरथी काकुत्स्थ। करावया राक्षसांचा अंत। वना निश्चित मी आलों ॥ ९२ ॥ सीता माझी निजवधू। आणि लक्ष्मण माझा धाकटा बंधू। तूं कोण राक्षस संबंधू। मूळानुवादू मज सांगें ॥ ९३॥ तंव राक्षस म्हणे श्रीरघुनाथा। जगाद नामें माझा पिता। शतरदा माझी निजमाता। विराध मी तुमच्या घाता करीन ॥ ९४॥ ऐसें ऐकतां वचन। लक्ष्मण क्षोभला दारुण। धनुर्ष्यी वाहोनियां गुण। तीक्ष्ण बाण सोडिले ॥ ९५॥ कंकपत्री बर्हपत्री। सुवर्णपुंखें चौधारी। भेदले राक्षसाचे जिव्हारीं। तेणें तो भारी क्षोभला ॥ ९६ ॥ घ्यावया लक्ष्मणाचा प्राण। शूळ सोडिला गर्जोन। श्रीरामें विंधिला बाण। मध्येंच जाण तोडिला ॥ ९७॥ सवेंचि श्रीरामें पैं जाण। विराधासी पाचारून। रुक्मपुंख सोडिला बाण। अति तीक्ष्ण धगधगीत ॥ ९८॥ विराधा झांपडी पडिली तेणें। मागें पळणें कां पुढें होणें। नाठवे करणें न करणें। येणें जाणें खुंटलें ॥ ९९॥ श्रीरामबाणाची लखलख। विराधासी एकाएक। पाडोनि ठेलें जी ठक। क्रिया निःशेष विसरला ॥ १००॥ विसरला राक्षसधर्म। विसरला युद्धसंभ्रम। विसरला क्रियाकर्म। घायें निर्भ्रम विराध केला ॥ १॥ श्रीरामाचा निजबाण। घेवोनि आला श्रीरामस्मरण। धाकें निमाला देहाभिमान। गर्वबंधन घेवोनी ॥ २॥ ऐसी हृदयशुद्धी देखोन। हृदयीं भेदला श्रीरामबाण। बोध पावोनि संपूर्ण। राक्षसें प्राण सोडिला ॥ ३॥ धन्य श्रीरामाचा बाण। लागतां राक्षसें सोडिला प्राण। बोध पावला संपूर्ण। तेंचि निरूपण अवधारा ॥ ४॥

उवाच रामं संहृष्टः प्रांजलिश्चलितेंद्रियः।
कौसल्या सुप्रजास्तात रामस्त्वं विदितो मया ॥ ७॥
वैदेही च महाभागा लक्ष्मणश्च महारथः।
अभिशापादहं घोरां प्रविष्टो राक्षसीं तनुम् ॥ ८॥

बाणें भेदिलें जिव्हार। वाहती रुधिराचे पूर। विकळ पडतां शरीर। हर्षें निर्भर विराध ॥ ५॥ भेदतां श्रीरामाचा बाण। विकळेंद्रिय चलितप्राण। घायें सुख पावला संपूर्ण। दुःखनिर्दळण श्रीरामबाणें ॥ ६॥ घाव लागतां व्हावें दुःख। दुःख जावोनि पावला सुख। विराधा जाला परम हरिख। बाणें अलोलिक सुखी केलें ॥ ७॥ धन्य धन्य हे श्रीराममूर्ती। धन्य धन्य हे बाणाची सुखशक्ती। धन्य धन्य हे सीता सती। स्पर्शें निर्मुक्ति राक्षसत्वा ॥ ८॥ लक्ष्मणें कोपोनि उद्भट। घोरारण्य केलें सपाट। माझ्या मोक्षाची ते वाट। केली निर्दुष्ट सौमित्रें ॥ ९॥ जो कां करी शुद्ध मित्र। त्यासी म्हणती सौमित्र। लक्ष्मण सुमित्र सांचार। निशाचर मी सुखी केलों ॥ ११०॥ मी राक्षस अति अपवित्र। श्रीरामबाणें केलों पवित्र। मज वंदिती सुरनर। सुखी साचार केलों बाणें ॥ ११॥ बाणीं कैंचा सुखसंभ्रम। बाणीं सुखरूप श्रीराम। बाणीं सबाह्य श्रीराम परम। सुखसंभ्रम तेणें मज ॥ १२ ॥ शापें राक्षसतनु अधम। त्या शापाचें करोनि भस्म। श्रीरामें सुखी केलें परम। निजात्मधाम ठाकावया ॥ १३॥ जन्ममरणाचा महा-

१ स्त्रीसहित. २ परशुरामानें. ३ शौर्यानें. ४ सोन्याचा आहे पिसारा ज्यांचा असे बाण. ५ मोह. ६ आनंद. ७ अपूर्व. ८ फार. ९ दोषरहित. १० खरोखर. ११ पावण्याकरितां.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

धाक। घायें फोडील निःशेख। जितां मरतां नाहीं दुःख। ऐसें निजसुख दिधलें श्रीरामें ॥ १४॥ कैंचा शाप तूं येथें कोण। ऐसा श्रीरामें पुसिला प्रश्न। तेही विषयींचें निरूपण। समूळ कथन अवधारीं ॥ १५॥

अभिशापादहं घोरां प्रविष्टो राक्षसीं तनुम्।
तुंबुरुर्नाम गंधर्वः शप्तो वैश्रवणेन वै ॥ ९॥
प्रसाद्यमानश्च मया सोऽब्रवीन्मां महायशाः।
यदा दाशरथी रामस्त्वां वधिष्यति संयुगे ॥ १०॥
तदा प्रकृतिमापन्नो भवान् स्वर्गं गमिष्यति।
इति वैश्रवणो राजा रंभासक्तं शशाप ह ॥ ११॥

धनद[1] कुबेर तूं जाणसी। तेणें पाचारिलें गावयासी। मी तुंबुरु आसक्त रंभेसीं। मद्यपानेंसीं उन्मत्त ॥ १६॥ बळें मज नेलें तेथ। देखोनियां मदगर्वित। तूं राक्षस होसी उन्मत्त। घोर वनांत अघोरा ॥ १७॥ शाप ऐकतां अद्भुत। मी जालों भयभीत। लोटांगण घालोनि तेथ। उःशापार्थ प्रार्थिलें ॥ १८॥ श्रीराम सीता लक्ष्मण। वनवासा जातां जाण। तूं करिसी सीताहरण। युद्ध दारुण होईल ॥ १९॥ लागतां श्रीरामाचा बाण। तूं तत्काळ सांडिसी प्राण। तेव्हां जावोनि शापबंधन। निजात्मभुवन पावसी ॥ १२०॥ ऐसी उःशापाची निजकथा। ते आजि जाली तत्त्वतां। तुझा बाण लागतां श्रीरघुनाथा। अलौकिकता सुखप्राप्ति ॥ २१॥ तुझ्या बाणाची होतां भेटी। अहं कोहं त्रिपुटी। छेदोनियां उठाउठीं। स्वानंदपुष्टी सुखी केलें ॥ २२॥ लागतांचि तुझा निजबाण। माझें निवटिलें जन्ममरण। शाप बापुडें तें कोण। सुख संपूर्ण पावलों ॥ २३॥ जे जाहली सुखप्राप्ती। त्यासी कधीं नव्हे विकृती। कल्पांतीं नव्हेचि च्युती[2]। ऐसी सुखप्राप्ती श्रीरामबाणें ॥ २४॥ मज उःशापें गंधर्वप्राप्ती। गंधर्वदेहीं करितां वस्ती। मज बाधेना देहअहंकृती[3]। ऐसी नित्यमुक्ति श्रीरामबाणें ॥ २५॥

विराधोक्तिः —

तव प्रसादान्मुक्तोऽहमभिशापात्सुदारुणात्।
भवनं स्वं गमिष्यामि स्वस्ति तेऽस्तु महाभुज ॥ १२॥
अध्यर्धयोजने तात महर्षिः सूर्यसन्निभः।
इतो वसति धर्मात्मा शरभंगः प्रतापवान् ॥ १३॥
तं शीघ्रमभिगच्छ त्वं स ते श्रेयोऽभिधास्यति ॥ १४॥

ऐसें बोलोनि आपण। श्रीरामासी केलें नमन। तंव विराधासी विमान। देदीप्यमान उतरलें ॥ २६॥ राक्षसदेह सांडोनि क्षितीं[4]। विराध बैसतां विमानाप्रती। श्रीरामाचे वसतीची स्थिती। गमनोक्ती सांगत ॥ २७॥ येथोनियां अर्धयोजन। शरभंग वसे तपोधन। तपस्तेजें देदीप्यमान। तेथें आपण अवश्य जावें ॥ २८॥ तो तुम्हां वनवासाची गती। सांगेल वनवासाची स्थिती। तुझेनि त्यासी निजमुक्ती। जाण निश्चितीं[6] श्रीरामा ॥ २९॥ इंद्र आला शरभंगापासीं। त्यासी न्यावया सत्यलोकासी। तो राहिलासे तुझे भेटीसी। सत्यलोकासी नवचोनी[7] ॥ १३०॥ श्रीराम दंडकारण्या आला। तेणें विराध मारिला। तुझा प्रताप जाणोनि भला। असे राहिला भेटीसी ॥ ३१॥ श्रीरामाच्या भेटीपुढें। सत्यलोक तें बापुडें। ऐसें ज्ञान त्यासी धडफुडें। भेटीचे चाँडें तिष्ठत ॥ ३२॥ मज सुखी केलें राक्षसासी। तैसेंचि सुखी करीं शरभंगासी। विराधें सांगोनि श्रीरामासी। पुढती तिघांसी वंदिलें ॥ ३३॥ मग बैसोनि विमानीं। प्रवेशला निजात्मभुवनीं[8]। श्रीरामचरित्र देखोनी। विस्मित मनीं सुरवर ॥ ३४॥ मग करिती जयजयकार। वर्षती सुमनांचे[9] संभार। विराध वधोनि दुर्धर। श्रीरामचंद्र निजविजयी ॥ ३५॥ विराधाचें घोर वन। तेथें रिघों शके कोण। तोही तारिला विंधोनि बाण। कृपाळु पूर्ण श्रीराम ॥ ३६॥ एका जनार्दना शरण। जालें विराधउद्धरण। पुढें शरभंगाचें दर्शन। कथा पावन अवधारा ॥ ३७॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे अरण्यकांडे एकाकारटीकायां विराधवधो नाम द्वितीयोऽध्यायः ॥ २॥ ओंव्या ॥ १३७॥ श्लोक ॥ १४॥

---

१ देवांना धन पुरविणारा, धनाचा स्वामी. २ भ्रंश, पतन. ३ देहाचा अभिमान. ४ पृथ्वीवर. ५ न जातां. ६ सत्य, प्रत्यक्ष. ७ इच्छेनें. ८ आपल्या स्वतःच्या लोकाला. ९ फुलांचें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

अध्याय तिसरा

श्रीसच्चिदानंदाय नमः ॥

हत्वा तु तं भीमबलं विराधं राक्षसं वने ।
आश्रमं शरभंगस्य राघवौ तौ प्रजग्मतुः ॥ १ ॥
तस्य देवप्रभावस्य तपसा भावितात्मनः ।
समीपे शरभंगस्य ददर्श महदद्भुतम् ॥ २ ॥

महाभयानक विराधु । त्याचा क्षणार्धे केला वधु । प्रतापें शोभती दोघे बंधु । परम आल्हादु सीतेसी ॥ १ ॥ मग तिघे जणें वेगेंसीं । निघालीं शरभंगआश्रमासी । मार्ग क्रमितां दो कोशीं । त्या आश्रमासी देखिलें ॥ २ ॥ तैं शरभंग तपोराशी । तो न्यावया ब्रह्मलोकासी । ब्रह्मयानें धाडिलें इंद्रासी । विमानेंसीं हंसयुक्त ॥ ३ ॥ हंसयुक्त विमानेंसीं । बैसावया सामर्थ्य नाहीं इंद्रासी । पुढें घालोनि विमानासी । इंद्र रथेंसीं आश्रमा आला ॥ ४ ॥ जे विमानीं बैसवेना इंद्रासी । तें विमान धाडिलें शरभंगासी । शरभंगाची निष्ठा कैसी । ब्रह्मयादिकांसी निजपूज्य ॥ ५ ॥ इंद्रादिक देव समस्त । येवोनि त्या आश्रमाआंत । अवघे लोटांगणें घालीत । मग विनवीत शरभंगा ॥ ६ ॥ इंद्र प्रार्थी मधुरवचनीं । आम्ही आलों ब्रह्माज्ञें-करोनी । बैसोनि हंसयुक्त विमानीं । ब्रह्मभुवनीं प्रवेशावें ॥ ७ ॥ तंव त्यासी शरभंग सांगत । या वना आला श्रीरघुनाथ । विराध वधोनियां निश्चित । आतांचि येथ येईल ॥८॥ न घेतां श्रीराम-दर्शन । मज न लगे ब्रह्मसदन । तुम्हीं घेवोनि जावें विमान । मी येईन निजसत्ता ॥ ९ ॥ श्रीरा-माच्या भेटीपुढें । ब्रह्मभुवन तें कायसें बापुडें । मज तेथें येणें न घडे । ब्रह्मयापुढें सांगावें ॥ १० ॥ ऐसें शरभंग बोलत । कर जोडोनि इंद्र ऐकत । तंव पातला श्रीरघुनाथ । तोही देखत इंद्रातें ॥ ११ ॥

विभ्राजमानं वपुषा सूर्यवैश्वानरप्रभम् ।
असंस्पृशंतं वसुधां ददर्श विबुधाधिपम् ॥ ३ ॥

झोलींव सूर्याची प्रभा । कीं तो अग्नीचा निज-गाभा । तैशी इंद्राची अंगप्रभा । निजशोभा शोभत ॥ १२ ॥ धरा नातळोनि अधर । रथ शोभे वारु विचित्र । मस्तकीं चंद्रप्रभेंछत्र । युग्मँचार ढळताहे ॥ १३ ॥ देवगण मरुद्गण । इंद्रासवें सिद्ध चारण । सवें बृहस्पति गुरु सज्ञान । तिहीं रघुनंदन देखिला ॥ १४ ॥ सीता सौमित्र श्रीरघुनाथ । देखतां अवघे जाले खद्योत । श्रीराम-प्रभा अत्यद्भुत । देखोनि विस्मित सुरसिद्ध ॥ १५ ॥ देखतांचि श्रीराघवा । सूर्यप्रकाशीं जैसा दिवा । तैशी दशा आली देवां । देवस्वभावा लाजिले ॥ १६ ॥ तिहीं देखोनि श्रीरघुनाथ । सुख पावले अत्यद्भुत । नभीं जयजयकार करीत । निघाले समस्त निजधामा ॥ १७ ॥ शरभंग सांगे देवांप्रती । ब्रह्मसदनीं पुनरावृत्ती । श्रीरामदर्शनें अक्षयप्राप्ती । तेंही ब्रह्मयाप्रति पुसा तुम्ही ॥ १८ ॥ श्रीराम देखतांचि दिठी[१०] । जन्ममरणां होय तुटी । खुंटली पुनरावृत्तीची गोठी । ऐसी सुखभेटी श्रीरामीं ॥ १९ ॥ इंद्रादि देवां उपेक्षून । ओसंडोनि ब्रह्मसदन । ध्यावया श्रीरामदर्शन । अति सज्ञान शरभंग ॥ २० ॥ ऐकोनि ऋषीचें वचन । इंद्रादि देव गेले निघोन । आश्रमा आला रघुनंदन । केलें नमन शरभंगासी ॥ २१ ॥

तस्य पादौ च संगृह्य रामः सीता च लक्ष्मणः ।
निषेदुस्तदनुज्ञाता लब्धवासा निमंत्रिताः ॥ ४ ॥

श्रीरामें वंदिले ऋषीचे चरण । सीता आणि लक्ष्मण । दोघीं घातलें लोटांगण । मस्तकीं चरण वंदिले ॥ २२ ॥ ऋषीनें दिधलें आलिंगन । मधुपर्कविधीनें पूजन । पूजोनियां श्रीरघुनंदन । सावधान बैसले ॥ २३ ॥

ततः शक्रोपयानं तु पर्यपृच्छत राघवः ।
शरभंगस्तु तत्सर्वं राघवाय न्यवेदयत् ॥ ५ ॥
अहं ज्ञात्वा नरश्रेष्ठ वर्तमानमदूरतः ।
ब्रह्मलोकं न गच्छामि त्वामदृष्ट्वा प्रियातिथिम् ॥ ६ ॥
अक्षया नरशार्दूल जिता लोका मया शुभाः ।
ब्राह्म्याश्च नाकपृष्ठ्याश्च प्रतिगृह्णीष्व मामकान् ॥ ७ ॥

श्रीराम पुसे ऋषीप्रती । इंद्रादिक देवपंक्ती । आले होते आश्रमाप्रती । कोणे अर्थी ऋषिवर्या ॥२४॥ ऐकोनि श्रीरामाचें वचन । शरभंग विस्मयापन्न । न करितां जप तप ध्यान । दिव्यदर्शन श्रीराम

---

१ अत्यंत भयंकर. २ अत्यंत पूज्य. ३ ब्रह्मलोक. ४ न स्पर्शतां. ५ घोडा. ६ चंद्रकांतीप्रमाणें शोभणारें छत्र. ७ दोन चवऱ्या. ८ भाट. ९ काजवे. १० दृष्टीनें. ११ अतिथीची मध, घृत, दहीं, गंधपुष्पादिकांनीं पादप्रक्षालनपूर्वक पूजा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

देखे ॥ २५ ॥ दिव्यचक्षु श्रीरामाचे पोटीं । श्रीराम देखे अखिल सृष्टी । श्रीरामें दीठुगी ब्रह्मदृष्टी । देखोनियां पोटीं श्रीराम ॥ २६ ॥ वेदशास्त्रांचें निजवर्म । श्रीराम केवळ परब्रह्म । दीन तारावया वनोद्गम । विश्रामधाम श्रीराम ॥ २७ ॥ ऐसी श्रीरामाची कीर्ती । ते मज आली अति प्रतीती । ऋषि आपुली धर्मस्थिती । श्रीरामाप्रती सांगत ॥ २८ ॥ म्यां साधिली जे जे प्राप्ती । अति दुस्तर ते जनांप्रती । त्या त्या धर्माची निजस्थिती । यथानिगुती सांगेन ॥ २९ ॥ साङ्ग अविकळ कर्में देख । म्यां आसाधिला पितृलोक । त्याचें न मानेच सुख । तो म्यां निःशेख त्यागिला ॥ ३० ॥ करोनि शत सोमयाग । म्यां साधिला स्वर्गभोग । तंव तो वाटे क्षयरोग । तोही म्यां साङ्ग उपेक्षिला ॥ ३१ ॥ महर्लोक जनलोक । आदिकरोनि तपोलोक । साधिल्या मज नव्हेचि सुख । ते म्यां निःशेष त्यागिले ॥ ३२ ॥ ब्राह्मणभक्ति सत्यव्रत । तेणें सत्यलोक प्राप्त । इंद्रादिदेव समस्त । मज न्यावया येथ स्वयें आले ॥ ३३ ॥ हंसयुक्त निजविमान । स्वयें धाडी चतुरानन । परी तुझें देखोनि आगमन । म्यां ब्रह्मसदन त्यागिलें ॥ ३४ ॥ लोकलोकांतर प्राप्त । ऐसें पुण्य केलें अद्भुत । परी तें तुज अर्पिलें समस्त । श्रीरघुनाथ प्रीति पावो ॥ ३५ ॥ कर्म न करितां ब्रह्मार्पण । तरी तें वाढवी जन्ममरण । तुझे देखतां निजचरण । श्रीरामार्पण सर्व कर्में ॥ ३६ ॥ मज पूर्वी होती भ्रांती । जे पुण्यें होय ब्रह्मप्राप्ती । पुण्यपापक्षयाअंतीं । श्रीराममूर्ती तैं भेटे ॥ ३७ ॥ लोकलोकांतरपुण्यें देख । न तुटे दुःख नव्हेचि सुख । तुझें देखतांचि श्रीमुख । अलौलिक सुखप्राप्ति ॥ ३८ ॥ साच श्रीराम देखिल्या दृष्टीं । समूळ संसारासी होय तुटी । निष्काम पुण्याच्या कोटी । तैं तुझी भेटी श्रीरामा ॥ ३९ ॥ तुझे भेटीलागीं जाण । सांडिलें सत्यलोकगमन । जालिया श्रीरामदर्शन । समाधान जीवशिवां ॥ ४० ॥ देखतां श्रीराममूर्ति । सर्वेंद्रियां नित्य विश्रांति । हे तंव माझी निजप्रतीति । सत्य निश्चितीं श्रीरामा ॥ ४१ ॥ ऐसी ऐकोनि ऋषिवचनोक्ती । संतोषला श्रीरघुपती । ऋषीची देखोनि अद्भुत शक्ती । स्वयें त्याप्रती पूसत ॥ ४२ ॥ दंडकारण्य महावन । ये वनवासीं निवासस्थान । कोठें म्यां करावें आपण । आज्ञापन मज देईं ॥ ४३ ॥

शरभंग उवाच—

> सुतीक्ष्णमभिगच्छ त्वं राम शीघ्रं तपस्विनम् ।
> रमणीये वनोद्देशे स ते वासं विधास्यति ॥ ८ ॥

शरभंग म्हणे श्रीरामासी । येचि वनीं वनवासीं । सुतीक्ष्ण वसे महाऋषी । शीघ्र त्यापासीं तुम्हीं जावें ॥ ४४ ॥ तो तुम्हांसी वनवासीं वस्ती । सांगेल पैं यथास्थिती । जेणें वासें श्रीरामकीर्ती । यश त्रिजगतीं वाढेल ॥ ४५ ॥

> एष पंथा महाप्राज्ञ मुहूर्तं स्थीयतामिह ।
> यावज्जहामि गात्राणि जीर्णां त्वचमिवोरगः ॥ ९ ॥

येणेंचि पंथें महाप्राज्ञा । जावें सुतीक्षणऋषिदर्शना । परी कांहीं एक असे विज्ञापना । ऐकें सर्वज्ञा श्रीरामा ॥ ४६ ॥ तुझे देखतांचि चरण । दृश्य द्रष्टा नाहीं दर्शन । खुंटलें भवभयाचें भान । गमनागमन मज नाहीं ॥ ४७ ॥ तरी प्रारब्ध बळी ये सृष्टीं । अनिर्वाच्य त्याची गोष्टी । तें मज येथें दाटोवाटी । नेतें उठाउठीं सत्यलोका ॥ ४८ ॥ माझें अदृष्ट देखोन । ब्रह्मयानें धाडिलें विमान । तें म्यां निवारिलें जाण । तुझें दर्शन घ्यावया ॥ ४९ ॥ तुजसीं जंव होय भेटी । तंव प्रारब्धदेहाची गांठी । तुज देखतां जगजेठी । उठाउठीं देह पडेल ॥ ५० ॥ तुज देखतां सावधान । करूनि निजदेहाचें दहन । करीन सत्यलोका गमन । तंव आपण स्थिर व्हावें ॥ ५१ ॥ क्षणैक राहावें रघुपती । सर्प सांडी जैसी कांती । तैसी स्थूळ देहाची निवृत्ती । करीन निश्चितीं श्रीरामा ॥ ५२ ॥ स्थूळ देह होती जाती । परी पालटेना आत्मस्थिती । मग योगाग्नीं दाहोनि देहाकृती । जाईन निश्चितीं सत्यलोका ॥ ५३ ॥ तुझिया कृपें श्रीरघुनाथा । भय नाहीं जन्म धरितां । भय नाहीं कर्म करितां । देह मरतां भय नाहीं ॥ ५४ ॥ दोराअंगीं सर्प जन्मला । नांदोनियां स्वयें निमाला । त्यासी दोर नाहीं भ्याला । तैसा जाला देहसंग

---

१ सर्व. २ विशाल. ३ मिळविला. ४ ब्रह्मदेव. ५ इहलोक आणि परलोक ६ अपूर्व. ७ बोलण्यास कठीण. ८ प्रारब्ध. ९ निरास.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ ५५ ॥ जैसी देहासवें मिथ्या छाया । तैसी मुक्तांसवें मिथ्या काया । राहिलीसे श्रीरघुराया । भोगावया अदृष्ट ॥ ५६ ॥ ऐसें बोलोनियां जाण । श्रीरामादेखतां आपण । शरभंगानें घालोनि आसन । केलें दहन योगाग्नियोगें ॥ ५७ ॥

स च पावकसंकाशः कुमारः समपद्यत ।
उत्थायाग्निचयात्तस्माच्छरभंगो व्यरोचत ॥ १० ॥

करितां योगाग्नीं देहदहन । सत्यलोक भोगायतन । कुमारदेह पावला आपण । देदीप्यमान तेजस्वी ॥ ५८ ॥ याज्ञिक साधिती स्वर्गभुवन । त्याहून याचें महत्त्व गहन । अश्वमेध राजसूययज्ञ । त्याहून गहन महिमा याची ॥ ५९ ॥ क्रमोनियां पितृस्थान । क्रमोनि स्वर्ग महर्जन । क्रमोनियां देवसदन । विराजमान सत्यलोकीं ॥ ६० ॥ सत्यलोकीं शरभंगासी । श्रीरामकृपा फळली कैसी । तेथेंही देहबुद्धि[1] नाहीं त्यासी । पूज्य सर्वांसी जरी जाला ॥ ६१ ॥ ब्रह्मयानें सन्मानितां त्यासी । श्लाघ्यता न धरी देहबुद्धीसी । श्रीरामकृपा फळली ऐसी । भोगी प्रारब्धासी विदेहत्वें ॥ ६२ ॥ करितां श्रीरामनामस्मरण । बाधूं न शके देहबंधन । ते देखिलिया श्रीरामचरण । देहीं विदेही आपण शरभंग ॥ ६३ ॥ दीन तारावया जाण । श्रीरामाचें वनप्रयाण । एका जनार्दना शरण । जगदुद्धारण श्रीराम ॥ ६४ ॥ विदेहकैवल्याचें ताट । शरभंगासी केलें चोखट । सेवितां देशभाषा उच्छिष्ट । जालों अवचट शेषभागी ॥ ६५ ॥ परमामृत रामायण । तेथें भोक्ते वसिष्ठ वाल्मीक पूर्ण । त्यांचें उच्छिष्ट सेवितां जाण । एकाजनार्दन विदेही ॥ ६६ ॥ इति श्रीभावार्थरामायणे अरण्यकांडे एकाकारटीकायां शरभंगोद्धरणं नाम तृतीयोऽध्यायः ॥ ३ ॥ ॥ ओंव्या ॥ ६६ ॥ श्लोक ॥ १० ॥

अध्याय ४ था

श्रीसीतापतये नमः ॥

शरभंगे दिवं प्राप्ते मुनिसंघाः समंततः ।
अभ्यगच्छंत काकुत्स्थं रामं ज्वलिततेजसम् ॥ १ ॥

विराध वधिला अति दारुण । केलें शरभंगोद्धरण । तें देखोनि मुनिगण । आले ठाकून श्रीरामा ॥ १ ॥ वैखानस[2] वालखिल्य[3] । अग्निहोत्री शुद्धशीळ । राक्षसभयें अति व्याकुळ । आले सकळ श्रीरामापासीं ॥ २ ॥ जळाहारी फळाहारी । जटाधारी ब्रह्मचारी । पत्राहारी वायुआहारी । निराहारी ऋषी आले ॥ ३ ॥ एक भगवे एक नागवे । वल्कलधारी मळिन लेवे[4] । राक्षसभयें आले आघवे । आम्हां राघवें रक्षावें ॥ ४ ॥ एकांगुष्ठव्रत एकांसी । एक ते वृक्षाग्रनिवासी । एक ते एकपाद तापसी । भयें संन्यासी येवों सरले ॥ ५ ॥ जळवासी आकाशवासी । विवरवासी अहर्निशीं । एक ते सदा श्मशानवासी । तेही धाकेंसीं येवों सरले ॥ ६ ॥ राक्षसधाकाची धुकधुक । सपत्नीक अपत्नीक । विधुर आले पैं अनेक । रघुकुळटिळक संरक्षी ॥ ७ ॥ वृद्धवृद्धें श्रीरामाप्रती । अतिशयें येती काकुळती । राक्षसमहामार अती । आम्हां रघुपती रक्षावें ॥ ८ ॥ एक बोचरे[5] उखळें हातीं । फळें ठेंचठेंचोनि खाती । तेही आले श्रीरामाप्रती । राक्षसभयें महाभीत ॥ ९ ॥ ज्ञानी ध्यानी समाधानी । राक्षसभयें भिवोनी । आले श्रीरामा ठाकोनि । अवघे मुनी एकत्र ॥ १० ॥

एवं वयं न मृष्यामो विप्रकारं तपस्विनाम् ।
क्रियमाणं वने घोरं रक्षोभिर्भीमकर्मभिः ॥ २ ॥
ततस्त्वां शरणार्थं च शरण्यं समुपस्थिताः ।
परिपालय नो राम वध्यमानान्निशाचरैः ॥ ३ ॥

सांगती राक्षसांच्या कडोविकडी[6] । मारिल्या तापसांच्या कोडी । मांस खावोनि सांडिलीं मढीं । लोळती बापुडीं असंस्कारें ॥ ११ ॥ जे संस्कार करूं जाती । त्यांसी राक्षस येवोनि खाती । ऐसीं मढीं नेणों किती । लोळती क्षितीं श्रीरामा ॥ १२ ॥ आम्ही आलों तुजपासीं । राक्षसीं बहुत केली कासाविसी । शरण आलों तुझ्या चरणांसी । आतां संरक्षीं श्रीरामा ॥ १३ ॥ आम्हांसी रक्षिता नाहीं कोणी । दैवें आलासी तूं धनुष्यपाणी । आम्ही घालितों लोटांगणी । आमच्या रक्षणीं सँज[7] होईं ॥ १४ ॥ आम्ही तुझे शरणागत । शरण

---

१ देहाभिमान. २ तृतीयाश्रमीवानप्रस्थ जन. ३ पार्वतीविवाहसमयीं तिला पाहून ब्रह्मदेवाचें वीर्य पतन पावलें, त्यापासून अंगुष्ठप्रमाण साठ हजार ऋषि झाले ते. ४ वेष. ५ दांत पडलेले. ६ पराक्रम. ७ तयार.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

आलों गा समस्त। तूं कृपाळु श्रीरघुनाथ। दीननाथें अनाथ रक्षावे॥ १५॥ आम्ही केवळ गोब्राह्मण। काया वाचा मनसा शरण। आमचें करावें संरक्षण। अवघे जण प्रार्थिती॥ १६॥ ऐसें ब्राह्मणांचें दीन भाषण। ऐकोनियां श्रीरघुनंदन। कळवळोनियां संपूर्ण। काय आपण बोलत॥ १७॥

रामस्तेषां वचः श्रुत्वा तापसानां तपस्विनाम्।
इदं प्रोवाच धर्मात्मा सर्वानेव तपस्विनः॥ ४॥
नैवमर्हथ मां वक्तुमहमेवं सलक्ष्मणः।
तपोवृद्धान्वयोवृद्धान्शरण्यान्शरणागतः॥ ५॥
भवतामर्थसिद्ध्यर्थमागतोऽहं यदृच्छया।
तस्य मेऽयं वने वासो भविष्यति महाफलः॥ ६॥
तपस्विनां रणे शत्रून्हन्तुमिच्छामि राक्षसान्।
पश्यंतु वीर्यमृषयः सभ्रातुर्मे तपोधनाः॥ ७॥

श्रीराम म्हणे मी किंकर[1] कोण। नव्हें तुमच्या दासासमान। त्या मज म्हणां आलों शरण। हें नव्हे वचन तुम्हां योग्य॥ १८॥ तुम्ही वयोवृद्ध तपोवृद्ध। सज्ञान ज्ञानी अति प्रबुद्ध[2]। ज्येष्ठ श्रेष्ठ महासिद्ध। सन्मानवाद[3] न वदावा॥ १९॥ तुम्हांपासूनि घ्यावा मान। तेंचि आम्हांसी विषप्राशन। तुम्ही माझें देवतार्चन। साधुसज्जन मज पूज्य॥ २०॥ आमुचा धर्म द्विजरक्षण[4]। वना आलों याचि कारण। खरदूषणनिर्दळण। संरक्षण साधूंसी॥ २१॥ तुमचे आशीर्वादजोडीं। रणांगणीं निजपरवडीं[5]। मारीन राक्षसांच्या कोडी। अर्धघडी न लागतां॥ २२॥ ऐसी ऐकोनि श्रीरामवाणी। जयजयकार केला ब्राह्मणीं। हर्ष पावोनि मुनिगणीं। आशीर्वचनीं अभिषेक॥ २३॥

स राघवः सह भ्रात्रा वैदेह्या च परंतपः।
सुतीक्ष्णस्याश्रमपदं जगाम सहितो द्विजैः॥ ८॥

सीता लक्ष्मण रघुनाथ। सांगातें मुनिगण समस्त। शरभंगानें धाडिले जेथ। त्या आश्रमा जात सुतीक्ष्णाच्या॥ २४॥ सुतीक्ष्ण ऋषि महाश्रेष्ठ। तपस्तेजें अति तेजिष्ठ। त्याचा आश्रम सुखोदिष्ट[6]। दुःखसंकट असेना॥ २५॥ नवल आश्रमाची लीला। सुवास सुस्वाद फळमूळां। आचमन करितां तेर्थीच्या जळा। श्रमा सकळा निवारी॥ २६॥ आश्रमा येतांचि देख। अवघ्यां जालें परम सुख। सुखावोनि रघुकुळटिळक। ऋषिसन्मुख तो आला॥ २७॥ आला देखोनि रघुनंदन। ऋषीनें सांडिलें आसन। सांडोनियां जप ध्यान। अति सावधान भेटीसी॥ २८॥ ज्यालागीं कीजे जप ध्यान। ज्यालागीं कीजे तपःसाधन। ज्यालागीं कीजे अनुष्ठान। तें हें चिद्रत्न श्रीराम॥ २९॥ ज्यालागीं कीजे वेदपठण। ज्यालागीं कीजे शास्त्रश्रवण। ज्यालागीं कीजे योगसाधन। तें हें चिद्रत्न श्रीराम॥ ३०॥ ज्यालागीं कीजे व्रत तप। ज्यालागीं कीजे रुद्रजप। ज्यालागीं कीजे धैर्य आकल्प। तें हें चित्स्वरूप श्रीराम॥ ३१॥ ज्यालागीं शिवभवानी। नित्य चिंतिती अनुदिनीं[7]। तो हा श्रीराम देखिला नयनीं। जो त्रिभुवनीं परमात्मा॥ ३२॥ ज्यालागीं आम्ही नित्य तापसी। ज्यालागीं आम्ही वनवासी। तो हा श्रीराम अनायासीं। भाग्यें आश्रमासी स्वयें आला॥ ३३॥ ऐसें ऋषींचें मनोगत। जाणोनियां सुनिश्चित। श्रीराम उल्हासयुक्त। चरण वंदीत ऋषींचे॥ ३४॥ श्रीराम ऋषींचें मनोगत। हृदयीं जाणतो हृदयस्थ। श्रीराम परब्रह्म निश्चित। ऋषि जाणत निजज्ञानें॥ ३५॥ देखणें देखोनि अति तीक्ष्ण। यालागीं नांवें सुतीक्ष्ण। त्याचे श्रीरामें वंदिले चरण। दिधलें आलिंगन ऋषीनें रामा॥ ३६॥

स निरीक्ष्य ततो धीरं रामं दशरथात्मजम्।
मूर्ध्न्यवघ्राय चाश्लिष्य बाढं वचनमब्रवीत्॥ ९॥
उपजिघ्रन्ततो मूर्ध्नि वचनं चेदमब्रवीत्।
मत्प्रसादात्सभार्यस्त्वं विहरस्व सलक्ष्मणः।
रामस्तु सहसौमित्रिः सुतीक्ष्णेनाभिपूजितः॥ १०॥

स्वयें सुतीक्ष्णें आपण। आलिंगोनि श्रीरामलक्ष्मण। करोनि मस्तकीं अवघ्राण[8]। आल्हादें वचन बोलत॥ ३७॥ माझा आश्रम दंडकारण्य। येथें नाहीं भयबंधन। श्रीराम सीता लक्ष्मण। सुखसंपन्न वसावें॥ ३८॥ माझिया निजआश्रमाआंत। न चले राक्षसांचा घात। सुखें वसावें श्रीरघुनाथ। सीतासमवेत स्वानंदें॥ ३९॥ अति

१ अगदीं कमी प्रतीचा चाकर. २ विद्वान्, बुद्धिमान्. ३ मोठ्या मानाच्या गोष्टी; तुमच्या मानास मी पात्र नाहीं, ४ ब्राह्मणांचें संरक्षण. ५ स्वपराक्रमेंकरून. ६ सुखदायक. ७ प्रतिदिवशीं, ८ मस्तक हुंगून.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

प्रेमें सुतीक्ष्ण । पूजोनियां श्रीरामलक्ष्मण । देवोनि वनफळीं भोजन । षण्मास पूर्ण राहविले ॥ ४० ॥

तमुग्रतपसा दीप्तं महर्षिं सत्यवादिनम् ।
आवासं त्वहमिच्छामि प्रदिष्टमिह कानने ॥ ११ ॥
एवमुक्तस्तु रामेण महर्षिर्लोकविश्रुतः ।
अब्रवीन्मधुरं वाक्यं हर्षेण महता युतः ॥ १२ ॥

सुतीक्ष्ण तपस्तेजोराशी । श्रीराम पुसे स्वयें त्यासी । मज रहावया आश्रमासी । स्थान नेमेंसीं सांगावें ॥ ४१ ॥ शरभंगाची आज्ञा ऐसी । सुतीक्ष्ण सत्यवादी तापसी । स्थाननेम पुसोनि त्यासी । त्या आश्रमासी वसावें ॥ ४२ ॥ ऐकतां श्रीरामाचें वचन । ऋषि झाला सुखसंपन्न । दिधलें श्रीरामा आलिंगन । सर्वांगीं पूर्ण निवाला ॥ ४३ ॥ हर्षें सांगे श्रीरामासी । दंडकारण्यनिवासी ऋषी । पाहें त्यांच्या आश्रमांसी । देखतां तुम्हांसी आल्हाद ॥ ४४ ॥ जे जे आश्रमीं तुम्हांसी । विश्रांति वाटेल अतिशयेंसी । त्याचिया निवासस्थानासी[1] । नेमस्तेंसीं नेमीन ॥ ४५ ॥ करोनि ऋषिआश्रमदर्शन । शीघ्र येथें यावें आपण । मग मी निवासाचें स्थान । नेमस्त जाण नेमीन ॥ ४६ ॥ ऐकोनि ऋषीचें वचन । श्रीराम सीता लक्ष्मण । तिघीं करोनियां नमन । केलें गमन दंडकारण्या ॥ ४७ ॥ तंव बोलिला लक्ष्मण । मागें सीता चालतां जाण । विराधें केलें होतें हरण । तैसें आपण न करावें ॥ ४८ ॥ पुढें श्रीराम मागें सौमित्र । मध्यें घालोनियां सीता सुंदर । वेगीं निघाले सत्वर । धनुर्धर महाबळी ॥ ४९ ॥ सीतेपासीं ऋषिगण । तापस ब्रह्मचारी ब्राह्मण । श्रीरामासवें निघाले जाण । त्यांसही रक्षण श्रीराम ॥ ५० ॥ वनें उपवनें शुभकाननें । ऋषीआश्रम अगाध स्थानें । तापस करिताती अनुष्ठानें । वेदाध्ययनें अग्निहोत्रें ॥ ५१ ॥ पाहतां ऋषींचें महिमान । आलोडिती[2] दंडकारण्य । तंव पुढें तडागीं[3] सुगायन । श्रीराम लक्ष्मण ऐकताती ॥ ५२ ॥ श्रेष्ठ तडाग अति पुनीत । त्यामाजी मनोहर नृत्यगीत । परी गातें नाचतें न दिसे तेथ । तेणें विस्मित श्रीराम ॥ ५३ ॥ सवें चालती ऋषिगण । त्यांसी श्रीराम पुसे आपण । येथें गीत नृत्य करी कोण । मग ते पूर्वकथन सांगती ॥ ५४ ॥

ऋषय ऊचुः—

इदं पंचाप्सरो नाम तटाकं पूर्वकालिकम् ।
निर्मितं तपसा राम मुनिना मांडकर्णिना ॥ १३ ॥
स हि तेपे तपस्तीव्रं मांडकर्णिर्महामुनिः ।
दशवर्षसहस्राणि वायुभक्षो जलाशये ॥ १४ ॥

या तडागा नाम पंचाप्सर । पुरातन हें सरोवर । निर्मिता मांडकर्णि ऋषीश्वर । तेणें तप तीव्र केलें ॥ ५५ ॥ येथें दहासहस्र वर्षीं । निराहारी वायुभक्षी । त्याची स्थिर बुद्धी कैसी । काम मानसीं स्पर्शेना ॥ ५६ ॥ कमठ म्हणती स्वर्ग चांग । ऋषि म्हणे तो क्षयरोग । सत्यलोकींचे जे जे श्रेष्ठ भोग । तो मरणमार्ग तयाचा ॥ ५७ ॥ जेथवरी विषयासक्ती । तेथवरी पुनरावृत्ती । ऐसें जाणोनि निश्चितीं । तीव्रतपःस्थिती[4] मांडकर्णी ॥ ५८ ॥ त्याच्या देखोनि तीव्र तपासी । स्वर्गीं हाहाकार सुरवरांसी । इंद्रें विघ्न मांडिलें त्यासी । पंचाप्सरांसी धाडिलें ॥ ५९ ॥ रूपयौवन मनोहर । गीत नृत्य सालंकार । तें देखोनियां ऋषीश्वर । कामतत्पर[5] पैं जाला ॥ ६० ॥ त्याची देखोनि कामासक्ती । अप्सरा नागव्या नाचती । तोही लिंग धरोनियां हातीं । निजकामार्थी नाचत ॥ ६१ ॥ त्यांसी झोंबोनि मागतां रती । त्या निघाल्या ऊर्ध्वगती । त्यांसीं ऋषि येत काकुळती । कृपेनें रती मज द्यावी ॥ ६२ ॥ मज रत्यर्थी अतीतासी[6] । विमुख होतां न ये तुम्हांसी । मी लागतों तुमच्या पायांसी । कृपेनें रतीसी मज द्यावें ॥ ६३ ॥ मी तुमचा धर्मसांगाती । परमार्थी मज द्यावी रती । त्यांचें अंगुष्ठ धरी दांतीं । तंव त्या जाती उपेक्षोनी ॥ ६४ ॥ तंवचि वैराग्याच्या गोष्टी । जंव सुंदर वनिता[7] न देखे दृष्टीं । एकांतीं तीस जालिया भेटी । विरक्ती उठी भोगार्थी ॥ ६५ ॥ हो कां कामिनी एकदां मनीं । एकांतींच देखतां नयनीं । धांवोनि झोंबती जपी ध्यानी । तपोनिर्दळणी[8] स्त्रीसंग असा।

१ रहाण्याचे जागीं. २ संचार करतात. ३ सरोवरावर. ४ कडकडीत तपश्चर्येच्या ठायीं निष्ठा ज्याची असा. ५ काममोहित. ६ अतिथीला. ७ स्त्री. ८ तपाचा नाश करणारा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ ६६ ॥ जंव पुरुषासी अति विरक्ती । तंवचि सिद्धी ओळंगती । पुरुष जालिया कामासक्ती । सिद्धी जाती थुंकोनी ॥ ६७ ॥ स्त्रीगीत पडतां कानीं । वैराग्य गेलें हरपोनी । यालागीं नांवें मंदकर्णी । श्रुतिपुराणीं अभिधान ॥ ६८ ॥ प्रमदागाणें ऐकोनि कानीं । प्रमाद पावला तत्क्षणीं । वैराग्य विवेक गेलिया दोनी । मंदकर्णी तेणें नाम ॥ ६९ ॥

नीतो मदनवश्यत्वं सुराणामर्थसिद्धये ।
ताश्चैवाप्सरसः पंच मुनिपत्नीत्वमागताः ॥ १५ ॥
तटाके निर्मितं तासां तस्मिन्नंतर्हितं गृहम् ।
तत्रैवाप्सरसः पंच निवसंत्यो यथासुखम् ॥ १६ ॥
रमयंति तपोयोगान्मुनिं यौवनमास्थितम् ।
तासां संक्रीडमानानामेष वादित्रनिस्वनः ॥ १७ ॥
तडागे निर्मितं तासां तस्मिन्नंतर्हितं गृहम् ॥ १८ ॥

तिहीं अप्सरीं पांचां जणीं । सुरकार्यार्थ[1] साधोनी । ऋषि मोहिला स्त्रीमोहनीं । कामबाणीं संतप्त ॥ ७० ॥ इंद्रें करविलें विघ्नासी । ऐसें कळलिया तया ऋषीसी । होय कोपोनि देईल शापासी । तेणें इंद्रासी महाभय ॥ ७१ ॥ भूत भविष्य वर्तमान । ऋषीसी होय त्रिकाळज्ञान । अपूर्ण कामें कोपायमान । शाप दारुण देईल ॥ ७२ ॥ ऋषि तापसी महाक्रूर । दहा सहस्र वर्षें तप अत्युग्र । शाप देईल अति दुर्धर[2] । धाकें सुरेंद्र कांपत ॥ ७३ ॥ शापभयें अति सत्वर । ऋषीपासीं आला इंद्र । मागसी तो देईन वर । आज्ञाधर मी स्वामी ॥ ७४ ॥ तंव ऋषि म्हणे इंद्रासी । पंचाप्सरा लावण्यराशी । त्या मज द्याव्या नित्यभोगासी । इंद्रें ऋषीसी दीधल्या ॥ ७५ ॥ दहासहस्र वर्षीं । तपें जरठ जर्जर ऋषी । तो नावडे अप्सरांसी । म्हणोनि त्यासी उपेक्षिती[3] ॥ ७६ ॥ जाणोनि अप्सरांचें मन । ऋषी सामर्थ्यें अति संपन्न । जाला स्वरूपें मदनमोहन । विराजमान तारुण्यें ॥ ७७ ॥ देखोनि ऋषीच्या रूपासी । अप्सरा भुललिया सर्वस्वेंसीं । आन पुरुष नावडे त्यांसी । जीवेंभावेंसी विनटल्या ॥ ७८ ॥ ऋषी सामर्थ्यें अत्यंत थोर । ते तडागजळीं जळांतर उभारोनि निजमंदिर । क्रीडातत्पर पंचाप्सरीं ॥ ७९ ॥ त्यांचे गीतनृत्यध्वनी । श्रीरामा पडिले तुझे श्रवणीं । ऐसें सांगती सकळ मुनी । विस्मित मनीं श्रीराम ॥ ८० ॥ तेथील करितां आचमन । श्रीराम देखे ऋषिभुवन । मंदकर्णीस आल्हाद पूर्ण । श्रीरघुनंदन देखोनि ॥ ८१ ॥ अति आदरें करोनि ऋषीं । श्रीराम नेला निजभवनासी[6] । सीता राम लक्ष्मण त्रिवर्गासी । वर्षानुवर्षीं राहविलें ॥ ८२ ॥ मंदकर्णी ऋषीश्वर । श्रीरामसेवेसी तत्पर । पंचाप्सरा अति सादर । श्रीरामचंद्रनिजभजना ॥ ८३ ॥ पूर्वीं निष्काम तपोवृत्ती । त्या तपाची फलप्राप्ती । घरा आली श्रीराममूर्ती । ऋषि निश्चितीं सभाग्य ॥ ८४ ॥ त्याचें भाग्य वानूं किती । चढती वाढती नित्यप्रीती । श्रीरामाची आवडे भक्ती । अहोरात्रीं उल्हास ॥ ८५ ॥ जपतां श्रीरामनामा वाक्पुटीं । उद्धरले कोट्यनुकोटी । श्रीरामप्रेम धरितां पोटीं । ब्रह्मसंतुष्टी ऋषिवर्या ॥ ८६ ॥ करितां श्रीरामाची भक्ती । मंदकर्णि पावला मुक्ती । पंचाप्सरा त्याचे संगतीं । निजात्ममुक्ती पावल्या ॥ ८७ ॥ श्रीरामनामें जड तरती । तो श्रीराम देखतां अति प्रीतीं । चारी मुक्ती दासी होती । श्रीरामभक्तीप्रतापें ॥ ८८ ॥ ऋषीस ब्रह्मसमाधान । अप्सरा जाल्या सुखसंपन्न । करोनियां दीनोद्धरण । रघुनंदन निघाला ॥ ८९ ॥

उषित्वा स सुखं तत्र पूज्यमानो महर्षिभिः ।
जगाम चाश्रमांस्तेषां पर्यायेण तपस्विनाम् ॥ १९ ॥
क्वचित्परिदशान् मासानेकसंवत्सरं क्वचित् ।
क्वचिच्च चतुरो मासान् पञ्च षट् च परान् क्वचित् ॥ २० ॥
अपरत्राधिकान् मासानध्यर्धमधिकं क्वचित् ।
त्रीन्मासानष्टमासांश्च राघवो न्यवसत्सुखम् ॥ २१ ॥
तत्र संवसतस्तस्य मुनीनामाश्रमेषु वै ।
रमतश्चानुकूल्येन ययुः संवत्सरा दश ॥ २२ ॥
परिसृत्य च धर्मज्ञो राघवः सह सीतया ।
सुतीक्ष्णस्याश्रमपदं पुनरेवाजगाम ह ॥ २३ ॥

मंदकर्णीचें देखोनि प्रेम । त्या आश्रमीं सुखी जाला श्रीराम । ऋषीही सुखी जाला परम ।

१ देवांचा कार्यभाग, २ कठिण. ३ तिरस्कार करतात, ४ रमल्या, ५ सरोवराच्या उदकामध्यें, ६ आपल्या मंदिरांत.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सुखसंभ्रम[1] अप्सरां ॥ ९० ॥ सुखी जालीं लक्ष्मण सीता । मग ऋषीस पुसोनि तत्त्वतां । पहावया आश्रमां समस्तां । होय निघता श्रीराम ॥ ९१ ॥ ऋषीआश्रम सावकाश । कोठें मास कोठें दोन मास । कोठें नेमस्त पंचमास । कोठें षण्मास श्रीराम राहे ॥ ९२ ॥ कोठें वर्ष दीड वर्षी । कोठें राहे चतुर्मासीं । ऐसा विचरता[2] वनवासीं । सुतीक्ष्णापासीं राम आला ॥ ९३ ॥ श्रीरामाचें पुनरागमन । तेणें हरिखला[3] सुतीक्ष्ण । आलिंगिले श्रीरामलक्ष्मण । आल्हाद पूर्ण ऋषिवर्या ॥ ९४ ॥ नित्य श्रीरामपूजन । देवोनि वनफळें भोजन । राहविला श्रीरघुनंदन । किंचिन्न्यूनें[4] अर्धाब्दें ॥ ९५ ॥ श्रीराम बैसोनि सावकासीं । सादरें पुसे सुतीक्ष्णासी । अगस्त्याश्रम जये प्रदेशीं । तेथें आम्हांसी धाडावें ॥ ९६ ॥ ऐकोनि श्रीरामाचें वचन । सुतीक्ष्ण म्हणे धन्य धन्य । अगस्त्याश्रम परम पावन । अवश्य गमन तेथें कीजे ॥ ९७ ॥ वन लागलेंसे घनदाट । सहसा मार्ग न कळे स्पष्ट । स्वामींनीं दाखवावी वाट । अवस्था उत्कट गमनार्थी ॥ ९८ ॥ श्रीरामा मी सांगूं किती । तूं आमुच्या गतीची गती । मार्ग पुससी आम्हांप्रती । आश्चर्य किती सांगावें ॥ ९९ ॥ येथोनि असे अर्धयोजन । अगस्तीचें आश्रम-स्थान । येणें मार्गें करावें गमन । ऐसें सुतीक्ष्ण बोलिला ॥ १०० ॥ सीता राम लक्ष्मण । ऋषीसी करोनियां नमन । करू पाहती पुढें गमन । अगस्ति-स्थान लक्षूनी ॥ १०१ ॥ अगस्तीचें निजमहिमान । ऐकें श्रीरामा सावधान । वातापी इल्वल ब्राह्मणघ्नें । त्यांचें निर्दळण तेणें केलें ॥ २ ॥

इहैकदा किल क्रूरो वातापिरपि चेल्वलः ।
भ्रातरौ सहितावास्तां ब्राह्मणघ्नौ महासुरौ ॥ २४ ॥
वातापी ब्राह्मणं रूपमिल्वलः संस्कृतौदनम् ।
आमंत्रयति विप्रान्स श्राद्धमुद्दिश्य निर्घृणः ॥ २५ ॥

वातापी ब्राह्मण होय आपण । इल्वल कपटें होय अन्न । ब्राह्मण निमंत्रोनि जाण । श्राद्धभोजन संतृप्त देती ॥ ३ ॥ वातापी बोभायँ[5] बंधूसी । येरू निघे फोडोनि द्विजकुशी । यापरी तिंहीं ब्राह्मणांसी । छळोनि राक्षसीं मारिजे ॥ ४ ॥ ऐसे जाणोनि ब्राह्मणघाती । त्यांपासीं स्वयें आला अगस्ती । इल्वलओदनान्नप्रयुक्तीं[8] । दिधलें संतृप्त भोजन ॥ ५ ॥ अगस्ती प्रतिग्रासोग्रासीं । भस्म करी जठराग्नीसी । ठाव नाहीं इल्वलासी । कवण कुशी फाडावी ॥ ६ ॥ वातापी बोभाय इल्वलासी । तंव अगस्ती म्हणे त्यां जिरविलें त्यासी । कोप आला वातापीसी । अगस्तीसी गिळूं धांवे ॥ ७ ॥ विकट[9] धरोनि राक्षसवेष । दारुण देवोनियां हांक । धांवला अगस्तीसन्मुख । विक्राळ मुख पसरोनि ॥ ८ ॥ अगस्तिनेत्रींचा कोपाग्नी । वातापी सांडिला जाळोनी । भस्म केला अर्धक्षणीं । जो कां ब्राह्मणीं छळघाती ॥ ९ ॥ ऐसे पापी राक्षस दोनी । अगस्तीनें सांडिले जाळोनी । ऐसा प्रतापी महामुनी । अवश्य दर्शनीं जावें तुम्हीं ॥ ११० ॥

अयमाख्यामि ते राम यत्रागस्त्यो महामुनिः ।
योजनान्याश्रमात्तात याहि चत्वारि वै ततः ॥ २६ ॥
दक्षिणेन महान् श्रीमानगस्त्यभ्रातुराश्रमः ।
तत्रैकां रजनीं व्युष्य प्रभाते राम गम्यताम् ॥ २७ ॥

स्वयें सांगे सुतीक्ष्ण । पुढें वन अति गहन । सहसा न टाकीं अगस्तिस्थान । सांगेन खूण[10] ते ऐका ॥ ११ ॥ ज्येष्ठ बंधु नांवें अगस्ती । कनिष्ठा नाम महामती । तेथोनि अर्धयोजनांतीं । आश्रम-स्थिति तयाची ॥ १२ ॥ जावोनि त्याच्या आश्र-माप्रती । आजिची तेथें क्रमोनि राती । प्रातः-काळीं श्रीरघुपती । तुम्हां अगस्ती भेटेल ॥ १३ ॥ महामतीची वनस्थळी । न पेरितां साळी केळी । पिंपळी नागवेली पोफळी । आश्रमाजवळी शोभती ॥ १४ ॥ ऋषिसत्तम महामती । तुम्हांसी भेटावया अगस्ती । ज्या ज्या सांगेल गमनगंती । त्या त्या स्थितीं तुम्हीं जावें ॥ १५ ॥ सुतीक्ष्णा करोनि नमन । तिघीं जणीं केलें गमन । वनें उपवनें[11] शोभायमान । वसतिस्थान महामतीचें ॥ १६ ॥ आश्रमा आला श्रीरघुपती । परम आल्हाद महामती । राहवोनियां अति प्रीतीं । सीतापति पूजिला ॥ १७ ॥ एका जनार्दना शरण । वधावया त्रिशिरा खर दूषण । अगस्तीसी श्रीरा-

१ अत्यंत सुख. २ फिरत असतां. ३ आनंद पावला. ४ अर्ध्या वर्षांत थोडे कमी दिवस. ५ ब्राह्मणांस ठार मारणारे. ६ बोलावून. ७ हांक मारी. ८ इल्वलरूपी भात जेववून. ९ भयंकर. १० जावयाचे मार्ग. ११ बागबगीचे.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

मदर्शन । अस्त्र[1]ग्रहण ऋषिवरदें ॥ १८ ॥ इति श्रीभावार्थरामायणे अरण्यकांडे एकाकारटीकायां श्रीरामपंचाप्सरामंदकर्ण्युद्धरणं नाम चतुर्थोध्यायः ॥ ४ ॥ ओंव्या ॥ ११८ ॥ श्लोक ॥ २७ ॥

अध्याय ५ वा

श्रीरामचंद्राय नमः ॥ श्रीराम म्हणे महामती । तुझा ज्येष्ठ बंधु अगस्ती । तयाचिया दर्शनार्थी । तुम्हांप्रती मी आलों ॥ १ ॥ करावया ज्येष्ठाचें दर्शन । अति [2]उंदित माझें मन । कोणें मार्गें करावें गमन । कृपा करोनि सांगावें ॥ २ ॥

यदि बुद्धिः कृता राम द्रष्टुं तं मुनिपुंगवम् ।
अद्यैव गमने बुद्धिं रोचयस्व महामते ॥ १ ॥

जरी अगस्तीचें दर्शन । करावया वांछी तुझें मन । तरी आजचि करावें गमन । विलं[3]बव्यवधान न करावें ॥ ३ ॥ जे मार्गीं करितां गमन । सर्वथा न चुकिजे आपण । तैसें सांगेन मार्गचिन्ह । सावधान अवधारा ॥ ४ ॥ जे चालतां निजपंथ । सीता श्रीराम सुखी होत । सौमित्राचें सुखावे चित्त । तो पंथें[4] [5]संकेतें अवधारा ॥ ५ ॥ अगस्त्याश्रम अति पावन । शिवादि देवीं निर्मूनि भुवन । करिताती अनुष्ठान । नित्यश्रवण श्रीरामकथा ॥ ६ ॥ देवांचे भूमी न लगती पाये । अगस्त्याश्रमीं तेंही पाहें । बैसोनियां देवसमुदाये । श्रवण होताहे श्रीरामकथा ॥ ७ ॥ पावन श्रीरामायणी कथा । श्रीअगस्ति अति रसाळ वक्ता । देव बैसोनि तत्त्वतां । श्रीरामकथा परि[6]सती ॥ ८ ॥ अगस्त्याश्रमीं देवस्थानें । उभ[7]विलीं आहेत कोणकोणें । तेंही ऐका सावधानें । मार्गचिन्हें लक्षावया ॥ ९ ॥

स तत्र ब्रह्मणः स्थानं शिवस्थानं तथैव च
अग्नेः स्थानं महेन्द्रस्य स्थानं चैव विवस्वतः ॥ २ ॥
स्थानं धातुर्विधातुश्च वायुस्थानं तथैव च ।
कार्तिकेयस्य च स्थानं धर्मस्थानं तथैव च ॥ ३ ॥

मार्ग सुचिन्ह नित्य निर्विघ्न । त्या मार्गाची ऐका खूण । सौब्रह्मण्य ब्रह्मस्थान । शिवस्थान शिवशक्ती ॥ १० ॥ इंद्रचंद्रकुबेरस्थान । अग्निस्थान भृगुस्थान । यमस्थान धर्मस्थान । नित्य सावधान श्रवणार्थीं ॥ ११ ॥ धाता विधाता आपण । रामायण सुखसंपन्न । वायु सांडोनि चंचळपण । अति तल्लीन श्रवणार्थी ॥ १२ ॥ स्वामिकार्तिक शिवसुत । तोही तेथें नित्य वसत । ऋषीस परमार्थ पुसत । ऋषि सांगत स्वानंदें ॥ १३ ॥ काशीखंड केदारखंड । सांगितलें श्रीशैलखंड । श्रीरामायणकथा अति गोड । सुखसुर्[8]वाड सर्वांसी ॥ १४ ॥ अनागत[9]भाष्यरामायण । ते कथेचें करावें श्रवण । आश्रमीं वसती देवब्राह्मण । रम्य रामायण परिसावया ॥ १५ ॥ अगस्त्याश्रममहिमान । देव दानव द्विज पावन । श्रीरामा शीघ्र करीं गमन । मार्ग सुचिन्ह लक्षोनि ॥ १६ ॥

ततस्तद्वचनं श्रुत्वा सह भ्रात्राभिवाद्य च ।
प्रतस्थेऽगस्त्यमुद्दिश्य सानुजः सह सीतया ॥ ४ ॥

ऐकोनि ऋषीचें वचन । श्रीराम झाला सुखसंपन्न । अगस्त्याश्रम अति पावन । स्वानंदें गमन करूं रिघे ॥ १७ ॥ श्रीराम सीता लक्ष्मण । अगस्त्यानुजा वंदोनि जाण । सन्मार्गाचें लक्षोनि चिन्ह । शीघ्र गमन तिंहीं केलें ॥ १८ ॥ अगस्ति ज्ञानें अति समर्थ । स्वानंदें शिष्यांसी सांगत । आतां येईल श्रीरघुनाथ । सीतासहित सौमित्र ॥ १९ ॥ गुढिया मखरें आश्रमांत । ऋषि उभवी आल्हादयुक्त । परब्रह्म मूर्तिमंत । आतां येथें येईल ॥ २० ॥ माझ्या भाग्याच्या फळल्या [10]कोडी । आजि श्रीराम देखेन आवडीं । उभवावया श्रीरामराज्याची गुढी । वना [11]तांतडी आलासे ॥ २१ ॥ मारोनि राक्षसांच्या कोडी । तोडावया नवग्रहांची बेडी । फेडावया देवांची बांधवडी । वना तांतडी आलासे ॥ २२ ॥ निजधर्माचें संरक्षण । करावया दुष्टनिर्दळण । श्रीराम अवतार परिपूर्ण । कृपेनें आपण येथें आला ॥ २३ ॥ आजि मी सभाग्य त्रिजगतीं । जो वेदशास्त्रां नव्हे व्यं[12]क्ती । तो राम केवळ कृपामूर्ती । सीतापति कृपाळु ॥ २४ ॥ माझें भाग्य बापुडें किती । श्रीराम केवळ कृपामूर्ती । आश्रमा आला श्रीरघुपती । कृपामूर्ति श्रीराम ॥ २५ ॥

---

१ अस्त्रविद्येचा. स्वीकार. २ उत्सुक. ३ विलंबरूप अडथळा. ४ मार्ग. ५ खुणेनें. ६ ऐकतात. ७ उभारलीं.

८ अतिशय सुख. ९ भविष्यवाणींनीं युक्त रामायण. १० कोटी (संख्या). ११ त्वरेनें. १२ उघड, ठाऊक.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

ततः शिष्यैः परिवृतो निश्चक्राम महामुनिः ।
तं ददर्शाग्रतो रामो भ्रातरं चेदमब्रवीत् ॥ ५ ॥
बहिर्लक्ष्मण निष्क्रामत्यगस्त्यो भगवानृषिः ।
औदार्येणावगच्छामि निधानं तपसामिदम् ॥ ६ ॥
एवमुक्त्वा महाबाहुरगस्त्यं सूर्यवर्चसम् ।
अभिवाद्य तु धर्मात्मा तस्थौ रामः कृतांजलिः ॥ ७ ॥

ऐसी करोनि रामस्तुती । मेळवोनि ऋषींच्या पंक्ती । शिष्यसमुदायेंसीं अगस्ती । आला अतिप्रीतीं सामोरा ॥ २६ ॥ येतां देखोनियां ऋषी । श्रीराम म्हणे लक्ष्मणासी । अगस्ति तपस्तेजोराशी । येतो आम्हांसी सामोरा ॥ २७ ॥ समुद्र शोषिला आचमनीं । तो हा जाण अगस्तिमुनी । कृपाळु कैसा आम्हांलागोनी । येतो धांवोनी सामोरा ॥ २८ ॥ ऐसें बोलोनि आपण । श्रीरामें घातलें लोटांगण । मस्तकीं धरिले दृढ चरण । दिधलें आलिंगन ऋषीनें रामा ॥ २९ ॥ विदेहतनया[1] लक्ष्मण । नमस्कारिती मुनिचरण । तिघे जण सावधान । कर जोडोन राहिलीं ॥ ३० ॥ देखोनियां श्रीरामचंद्र । ऋषीस आल्हाद अपार । आश्रमा आणितां गजरें । जयजयकार ऋषिमंत्रीं ॥ ३१ ॥ अगस्ति ऋषि स्वयें सज्ञान । ब्रह्ममूर्ति श्रीरघुनंदन । केलें मधुपर्कें पूजन । दिधलीं गोदानें शतसंख्य ॥ ३२ ॥ श्रीराम म्हणे मी नीच सेवक । तुझ्या शिष्याचे रंकाचा रंक । येवढी पूजा अलोलिक । योग्य देख मज नोहे ॥ ३३ ॥

अगस्त्य उवाच—
राजा सर्वस्य लोकस्य धर्मचारी दृढव्रतः ।
पूजनीयश्च मान्यश्च भवान्प्राप्तः प्रियातिथिः ॥ ८ ॥

ऐकोनि श्रीरामाचें वचन । अगस्ति बोले उल्हासोन । श्रीराघवा तुझें निजमहिमान । अगम्य जाण वेदशास्त्रां ॥ ३४ ॥ वेदशास्त्रांच्या निजयुक्ती । त्या परतल्या नेति[2] नेति । श्रीराम केवळ ब्रह्ममूर्ति । त्रिजगतीं निजपूज्य ॥ ३५ ॥ जें कां परब्रह्म अक्षर[3] । तें तूं श्रीराम साचार । भक्तकृपाळु होसी साकार । भाग्य थोर आजि माझें ॥ ३६ ॥ वरकड राजे ते भूपती । श्रीरामराजा त्रिजगतीं । तुझेनि भूतें वाहे क्षिती । शशिसूर्यां गति तुझेनि ॥ ३७ ॥ तुझी आज्ञा अति दुर्धर । मर्यादा नुल्लंघीच सागर । इंद्रादिक तुझे किंकर । तुझेनि भूभार शेष वाहे ॥ ३८ ॥ काळ आज्ञा वंदी शिसीं । प्रळयो करी मर्यादेसीं । भूतें भूतात्मा तूं होसी । पूज्य सर्वांसी श्रीरामा ॥ ३९ ॥ अवतार झाले उत्तमोत्तम । त्यांमाजी तूं आत्माराम । तूं तंव केवळ परब्रह्म । पूज्य परम परमार्थी ॥ ४० ॥ ऐसी निजस्थिति तुजपासीं । तो तूं धर्मव्रत चालविसी । पित्राज्ञा प्रतिपाळिसी । निर्दाळिसी दुष्टांतें ॥ ४१ ॥ माता पिता गुरु देवता । त्यांहूनि पूज्य तूं श्रीरघुनाथा । ब्रह्मादि देवांहीवरता । परम पूज्यता श्रीरामा ॥ ४२ ॥ चारी वेद तुज वर्णिती । शास्त्रें चरणां शरण येती । शिव विरिंचि पायां लागती । पूज्य परमार्थी श्रीरामा ॥ ४३ ॥ तुज द्यावा जो जो मान । तो तो तुजलागीं होय न्यून । तुझें अगाध महिमान । मानापमान तुज नाहीं ॥ ४४ ॥ श्रीरामा तुझें निजमहिमान । वर्णितां[6] वेदां पडिलें मौन । तो तूं आलासी कृपा करून । आजि मी धन्य स्वाश्रमेंसीं ॥ ४५ ॥ कांहींएक तुझी पूजा । मी करीन रघुराजा । ते अंगीकारीं अधोक्षजा । राक्षससमाजवधार्थी ॥ ४६ ॥ तूं आत्माराम प्रिय अतिथी । आश्रमा आलासी कृपामूर्ती । तुझी पूजा जे न करिती । ते अधःपाती अभाग्य ॥ ४७ ॥ विमुख होतांचि अतिथी । गृहस्था कोटिपापप्राप्ती । अतिथी ने पुण्यसंपत्ती । उरे अधोगति यजमाना ॥ ४८ ॥ यालागीं श्रीरघुराजा । करावी अतिथीची पूजा । तूं केवळ आत्मा माझा । माझी निजपूजा अंगीकारीं ॥ ४९ ॥ अमृतोपम फळमूळें । पुष्पें आणोनि सुँपरिमळें[7] । मधुपर्कविधानबळें[8] । श्रीराम सुखमेळें पूजिला ॥ ५० ॥ जयजयकाराच्या गजरीं । वेदोक्त महामंत्रीं । श्रीराम पूजिला ऋषीश्वरीं । चराचरीं परमात्मा ॥ ५१ ॥ अगस्ति म्हणे श्रीरघुराजा । पुढती करीन तुझी पूजा । दिव्यायुधीं अधोक्षजा । शत्रुसमाजा निवटावया[9] ॥ ५२ ॥

१ जनककन्या सीता. २ हें नाहीं, तें नाहीं असें म्हणून. ३ ज्यास नाश नाहीं असें. ४ पृथ्वी. ५ ब्रह्मदेव. ६ वर्णितां. ७ सुवासिक. ८ मधुपर्कादि विधिपूर्वक. ९ नाश करण्याकरितां.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

इदं दिव्यं महच्चापं तूणी चाक्षय्यसायकौ।
इदं च मे तनुत्राणमभेद्यं भगवान् ददौ ॥ ९॥
अमोघः सूर्यसंकाशो ब्रह्मदत्तः शरो मम।
महाराजतकोशोऽयमसिर्हेमविभूषितः ॥ १०॥
अनेन धनुषा राम हत्वा संख्ये महासुरान्
आजहार श्रियं दीप्तां पुरा विष्णुर्दिवौकसाम् ॥ ११॥
एवमुक्त्वा महातेजाः समस्तं तद्वरायुधम्।
दत्वा रामाय भगवानगस्त्यः पुनरब्रवीत ॥ १२॥
राम प्रीतोऽस्मि भद्रं ते परितुष्टोऽस्मि लक्ष्मण।
अभिवादयितुं यन्मां प्राप्तौ स्थः सह सीतया ॥ १३॥

दिव्य चाप अक्षयी भाते। अनिवार शर पूर्ण तेथें। सुवर्णसंनाह खड्गातें। रणीं शत्रूतें निवटावया ॥ ५३ ॥ शस्त्रास्त्रीं अभेद्य पूर्ण। सूर्यतेजें विराजमान। तें घेई गा अंगत्राण। देदीप्यमान तेजस्वी ॥ ५४ ॥ कवच लेत्यासी दे विश्रांती। शत्रुसंतापी निजतेजोदीप्ती। ऐसी हे कवचाची गती। रिपुदळणार्थीं अंगीकारीं ॥ ५५ ॥ रणीं मर्दावया लंकानाथ। रथापेक्षा करील चित्त। ते काळीं इंद्राचा रथ। मातलि त्वरित आणील ॥ ५६ ॥ ऋषीचें ऐकोनि वचन। श्रीरामें सौमित्रें केलें नमन। ऋषीनें दिधलें आलिंगन। सुप्रसन्न ऋषि जाला ॥ ५७॥ संतोषोनि श्रीरामासी। रणीं निर्दाळावया राक्षसांसी। उल्हासोनि अगस्ति ऋषी। दिव्यायुधांसी अर्पिलें ॥ ५८॥ देवोनियां दिव्यायुधें। ऋषि म्हणे अति आल्हादें। रणीं राक्षसांचीं कबंधें। शस्त्रसंबंधें नाचविसी ॥ ५९॥ ऐकोनि ऋषीच्या वरदासी। श्रीराम संतोषला मानसीं। तंव लोपामुद्रेनें सीतेसी। अति उल्हासीं पूजिलें ॥ ६०॥ लक्षोनियां श्रीरघुनंदन। चरणचाली वनाभिगमन। तूं पतिव्रता धन्य धन्य। आम्ही पावन तुझेनि ॥ ६१॥ तंव श्रीराम म्हणे अगस्तीसी। दंडकारण्य या वनासी। कां म्हणताती महाऋषी। तें मजपाशीं सांगावें ॥ ६२॥ मग अगस्ति म्हणे श्रीरामासी। दंडक राजा या प्रदेशीं। अति गर्विष्ठ अहर्निशीं। राज्यमर्देंसीं उन्मत्त ॥ ६३ ॥ पारधी करितां दंडकासी। भृगुवंशींचा च्यवन ऋषी। अपमानिला अतिशयेंसीं। तेणें त्यासी शापिलें ॥ ६४॥

दण्डकेन परित्यक्तः स्वयं देशो महात्मना।
भार्गवस्य तु शापेन निर्मनुष्यो मृगोऽभवत् ॥ १४॥
योजनानां सहस्रे तु विन्ध्यपादप्रदक्षिणम्।
नाति वर्षति पर्जन्यो न च वाति सुखोऽनिलः ॥ १५॥

शाप दिधला कोपेंसीं। भस्म होय स्वराज्येंसीं। ऐसें बोलतांचि ऋषी। स्वदेशेंसीं भस्म जाला ॥ ६५॥ विंध्याद्रिदक्षिणभागेंसीं। जंव पाविजे सेतुबंधासी। तंव दंडकारण्य नाम यासी। ऋषिशापेंसीं भस्म जालें ॥ ६६ ॥ राजा भस्म जाला ससैन्य। भस्म जाले मनुष्यगण। भस्म जाले वृक्ष तृण। पशु पक्षी पूर्ण भस्म जाले ॥ ६७॥ भस्म जालीं सरितातडाग। भस्म जाले मृग पन्नग। भस्म जालें तद्देशी जग। दुर्धर राग ऋषीचा ॥ ६८॥ दंडकाचेनि शापें जाण। असंख्य अब्दें ओस वन। यालागीं म्हणती दंडकारण्य। नामाभिधान राजशापें ॥ ६९॥ भार्गवाच्या शापभयेंसीं। पर्जन्य वर्षेना तया देशीं। प्रकाशेना सूर्य शशी। अहर्निशीं अंधकार ॥ ७०॥ ऐसेनि अंधकारेंसीं। लोटल्या वर्षानुवर्षी। पुढती वस्ती झाली कैसी। श्रीराम ऋषीसी पूसत ॥ ७१॥ अगस्ति सांगे श्रीरामासी। वसावया दंडकारण्यासी। नारदें विंध्याद्रीपासीं। महामेरूसी विनविलें ॥ ७२॥ चराचरासी आधारू। स्वयें जाला महामेरू। मेरूहूनि सधरू। पर्वत थोरू असेना ॥ ७३॥ ऐकोनियां नारदोक्ती। मेरूचिया स्पर्धास्थितीं। खुंटली शशिसूर्यांची गती। विंध्याद्री ऊर्ध्वपंथीं वाढला ॥ ७४॥ राहिले स्वाहास्वधाकार। राहिले स्वधर्मकर्माचार। राहिले जपतपोविचार। रविचंद्र नुगवती ॥ ७५॥ लोपले स्वाहास्वधाकार। मरों टेंकले देव पितर। भुकें तळमळती ऋषीश्वर। संध्येवीण आहार सेवूं न ये ॥ ७६॥ गोधनें राना न वचती। वत्सें हंबरडा हाणिती। आकांत मांडला त्रिजगतीं। विंध्याद्रि गभस्ती उगवों नेदी ॥ ७७॥ मग ऋषीश्वर ब्रह्मयाप्रती। अवघे गाऱ्हाणें

१ सुवर्णाचें म्यान असलेलें. २ कवच. ३ धारण करणाऱ्याला. ४ रथाची इच्छा. ५ स्वर्गीय शस्त्रें. ६ धडें, मस्तक तुटलेलीं शरीरें. ७ नद्या व तळीं. ८ सर्प. ९ वर्षें १० बळकट. ११ उंचीनें, १२ देवपितृकर्में, १३ वांसरें, १४ सूर्याला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सांगती। तेव्हां तिन्ही देव विचारिती। जे दक्षिणे अगस्ती धाडावा ॥ ७८॥ देव सांगती अगस्तीसी। त्यजोनियां वाराणसीसी। नेमावया[1] विंध्याद्रीसी। शीघ्र दक्षिणेसी तुम्हीं जावें॥ ७९॥ नेमोनियां विंध्याद्री। तो निजवावा पृथ्वीवरी। अहोरात्रें वाहतीं करीं। शशिसूर्यां करीं मोकळा मार्ग ॥ ८०॥ थोर पुण्य होईल ऋषी। देव पितर पावती तृतीसी। ब्राह्मण चालविती स्वधर्मासी। हें तुजपासीं सामर्थ्य ॥ ८१॥ तुझें सामर्थ्य वानावें किती। आचमनें प्राशिला अपांपती[2]। विंध्याद्रि बापुढें तें किती। परोपकारार्थीं तुवां जावें ॥ ८२॥ पुढती न करीं उत्थान। तैसा विंध्याद्रि नेमून। संस्थापावया देवब्राह्मण। दक्षिणे गमन तुवां कीजे ॥ ८३॥ ऐकोनि देवांचें वचन। म्यां जाणोनि नारदाचें मन। वसवावया दंडकारण्य। माझें आगमन दक्षिणेसी ॥ ८४॥ ऐकें बापा श्रीरघुपती। माझें आगमन या रीतीं। आलों कोणकोण्या स्थिती। तेंही तुजप्रती सांगेन ॥ ८५॥

कस्यचित्त्वथ कालस्य दैवयोगादहं नृप।
वाराणसीं परित्यज्य इह प्राप्तोऽस्मि मानद ॥ १६ ॥

मी पर्जन्योदकेंशीं मेघ। आलों घेवोनि अमोघ। सुरकार्थ साधावया चांग। आलों सवेग विंध्याद्री ॥ ८६ ॥ ऐकें राजचूडामणी। मज येतां तेणें देखोनी। विंध्याद्रि आला लोटांगणीं। यथोक्तपूजनीं पुसता होय ॥ ८७॥ कोण पां वार्ता उत्तरेसी। ते मज सांगा जी महाऋषी। तूं येथोनि केउता[3] जासी। तेंही मजपासीं सांगावें ॥ ८८॥ कोणते धरोनि अपेक्षेसी[4]। तूं आलासी मजपासीं। तें म्यां दिधलें निश्चयेंसीं। भाक मजपासीं दीधली ॥ ८९॥ त्यासी उत्तरेची वार्ता। म्यां सांगितली श्रीरघुनाथा। तेही तुज मी सांगेन आतां। यथार्थता अनुवादु[5] ॥ ९०॥ विंध्याद्रि तुझा प्रताप। देखोनि मेरूसी महाकंप। सुरासुरां[6] महासंताप। तुझें स्वरूप अति श्रेष्ठ ॥ ९१ ॥ पाहतां या पृथ्वीमाझारीं। विंध्याद्रि तुझी थोरी। वानिजे गा सुरासुरीं। तुझी सरी मेरू न पवे ॥ ९२ ॥ ऐसें ऐकोनियां वचन। विंध्याद्रि उल्लासला आपण। पुढतीं घालोनि लोटांगण। मस्तकीं चरण दृढ वंदिले ॥ ९३॥ तूं आलासी भाग्येंकरीं। तुझें गमन कोठवरी। तें मज सांगावें जी निर्धारीं। तेणें अत्यादरीं पूसिलें ॥ ९४ ॥ दक्षिणतीर्थयात्राविधान। करावया करितों गमन। मज द्यावें मार्गदान। अधरशयन[9] करोनियां ॥ ९५ ॥ तुझी निर्धारितां थोरी। वाढी चंद्रसूर्यांउपरी। मज वेंघवेना[10] तेथवरी। शयन करीं गमनार्थ ॥ ९६॥ माझें ऐकोनियां वचन। विंध्याद्रीनें केलें शयन। म्यां केलिया दक्षिणे गमन। तुवां उत्थान न करावें॥ ९७॥ तीर्थें करोनि मी यें मागुता। तंववरी त्वां नुठावें पर्वता। भाष्यबंधें[11] नियामकता। करोनि रघुनाथा मी आलों ॥ ९८ ॥ रविचंद्रां मोकळी वाट। द्विजदेवांचे चुकले कष्ट। दिनमान वाहे स्पष्ट। दिधली वाट विंध्याद्रीं ॥ ९९ ॥ माझें होतांचि आगमन। भृगुशाप गेला पळून। देशीं वर्षला पर्जन्य। तृण वृक्ष धान्य वाढलें ॥ १०० ॥ महामेरूच्या वृक्षांसी। म्यां चिंतितां निजमानसीं। तेही वाढले ये देशीं। फळभारेंसीं सफळित ॥ १ ॥ वाहती सरितांचे[13] ओघ। पद्मपुष्पीं[14] पूर्ण तडागें[15]। नाना पक्षिगण अनेग। गज सिंह मृग क्रीडती ॥ २ ॥ मजसवें येवोनियां ऋषी। जाहले दंडकारण्यवासी। कोणी राजा नाहीं या देशीं। म्हणोनि राक्षसीं व्यापिलें ॥ ३ ॥ दंडकशापें दंडकारण्य। तें करावया अति पावन। तूं आलासी श्रीरघुनंदन। राक्षसघ्न[16] प्रतापी ॥ ४ ॥ तुझें जालिया आगमन। राक्षस निर्दाळिसी संपूर्ण। येथोनि आतां वस्ती जाण। वन पावन श्रीरामें ॥ ५ ॥ श्रीरामक्षेत्र दंडकारण्य। ऐसें गर्जेल पुराण। हाचि प्रयोग ब्राह्मण। अति सज्ञान पढतील ॥ ६ ॥ राक्षसनिर्दळणीं विचित्र। श्रीराम करील दुर्धर क्षेत्र। यालागीं म्हणती श्रीरामक्षेत्र। पुराणपवित्र श्रीरामें ॥ ७ ॥ ऐसी ऐकतांचि कथा। परमाश्चर्य श्रीरघुनाथा। ऋषिचरणीं ठेविला माथा। होय पुसता वनवस्ती ॥ ८ ॥ दंडकारण्यवनीं वसतां। सौमित्रासहित सीता। म्यां वसावें कोठें आतां।

१ नियमन करण्याकरितां. २ समुद्र. ३ कोठें. ४ इच्छेला. ५ भाषण. ६ देवांना आणि राक्षसांना. ७ पुनः. ८ मोठ्या दैवानें, भाग्यानें. ९ खालीं निजून. १० खरोखर पाहातां. ११ चढवत नाहीं. १२ वचनाच्या बंधनानें. १३ नद्यांचे. १४ कमलांनीं व फुलांनीं. १५ सरोवरें. १६ राक्षसांस ठार मारणारा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

तेंही तत्त्वतां मज सांगें ॥ ९ ॥ तुझें वचन ब्रह्मलिखित। तें म्यां करणें निश्चित। ऐसें पुसतां श्रीरघुनाथ। कृपायुक्त ऋषि बोले ॥ १० ॥ गंगातीराचे निकटीं। अति पावन पंचवटी। तेथें बांधोनि पर्णकुटी। सुखसंतुष्टीं वसावें ॥ ११ ॥ पंचवटी गंगातटीं। ऐकतां उल्हास सीतेच्या पोटीं। श्रीरामासी सुखसंतुष्टी। पंचवटी ऐकोनी ॥ १२ ॥ पंचवटीं करितां वस्ती। त्रैलोक्यपावन निजकीर्ती। तूं पावसी गा रघुपती। जाणें निश्चितीं मद्वाक्यें ॥ १३ ॥ ऐकोनि अगस्तीची गोष्टी। श्रीरामें बांधिली शकुनगांठी। लक्षोनियां पंचवटी। उठाउठीं निघाले ॥ १४ ॥ श्रीरामें केलें नमन। ऋषीनें दिधलें आलिंगन। सीतासहित लक्ष्मण। अगस्ति वंदोन निघाले ॥ १५ ॥ आश्रम करावया पंचवटीं। उल्हास लक्ष्मणाचे पोटीं। वेगीं निघाला जगजेठी। श्रीराम दृष्टीं लक्षोनी ॥ १६ ॥ एका जनार्दना शरण। अगस्तीपासोनि शस्त्रास्त्रग्रहण[3]। श्रीरामें केलें आपण। वनीं निर्दळण राक्षसां ॥ १७ ॥ इति श्रीभावार्थरामायणे अरण्यकांडे एकाकारटीकायां अगस्तिश्रीरामदर्शनं अस्त्रग्रहणं नाम पंचमोऽध्यायः ॥ ५ ॥ ओंव्या ॥ ११७ ॥ श्लोक ॥ १६ ॥

अध्याय ६ वा

॥ श्रीविश्वंभराय नमः ॥

अथ पंचवटीं गच्छन्नंतरा रघुनंदनः।
आससाद महाकायं गृध्रं भीमपराक्रमम् ॥ १ ॥
तं दृष्ट्वा तौ महाभागौ वनस्थौ रामलक्ष्मणौ।
मेनाते राक्षसं गृध्रं ब्रुवाणौ को भवानिति ॥ २ ॥
ततो मधुरया वाचा सौम्यया प्रीणयन्निव।
उवाच वत्स मां विद्धि वयस्यं पितुरात्मनः ॥ ३ ॥

पंचवटीं परम प्रयाण। श्रीराम सीता सहलक्ष्मण। अगस्तीसी करोनि नमन। शीघ्र गमन तिहीं केलें ॥ १ ॥ रम्य रमणीय गंगातटीं। पंचक्रोश पंचवटीं। उल्हास तिघांच्याही पोटीं। उठाउठीं निघालीं ॥ २ ॥ अरुणावारुणासंगमप्राप्ती। मीनली प्राची सरस्वती। तीर्थ पावन त्रिजगतीं। आवडे वस्ती श्रीरामा ॥ ३ ॥ सुंदर आणि कपाळेश्वर। दोहीं तीरीं मनोहर। तीर्थें पावन परिकर। श्रीरामचंद्रहिवास ॥ ४ ॥ पद्मपुरीं निशाचर। वसताती अति दुर्धर। तेणें भयें ओस नगर। तीर्थपरिचार खुंटला ॥ ५ ॥ त्रिशिरा आणि खर दूषण। ओस करोनियां जनस्थान। राक्षस वसताती दुर्जन। तीर्था कोणी जाऊं न शके ॥ ६ ॥ तेथें करावया वस्ती। पंचवटिके सीतापती। स्वयें धाडिला अगस्तीं। राक्षसघाती श्रीराम ॥ ७ ॥ राक्षसांचें कुळनिर्दलन। समूळ करील रघुनंदन। यालागीं पंचवटीस्थान। दिधलें नेमून अगस्तीनें ॥ ८ ॥ पंचवटीवनांतर। श्रीराम चालिला सत्वर। पुढें जटायु गृध्र पर्वताकार। देखिला समोर श्रीरामें ॥ ९ ॥ डोळे आरक्त धगधगित। चांचुवडें[8] समसंमित। हा तंव राक्षस असे अद्भुत। दोहीं निश्चित मानिला ॥ १० ॥ धनुष्य सज्जोनि मुष्टीं। दोघे चालिले जगजेठी। रामें हाकिला शौर्यदृष्टी। बाण मुष्टीं ओढी सज्जोनी ॥ ११ ॥ राहें साहें धरीं धीर। गृध्ररूपिया तूं निशाचर। मार्ग रोधिसी अति दुर्धर। बाणीं सत्वर छेदीन ॥ १२ ॥ माझें सुटलिया कुऱ्हांडें। तुझें पक्षबळ बापुडें। केउता पळसील मजपुढें। रणीं रोकडें पाडीन ॥ १३ ॥ गृध्ररूपी तूं येथें कोण। मार्ग रोधावया काय कारण। समूळ सांगावें निजकथन। प्राण घेईन न बोलतां ॥ १४ ॥ मी दाशरथी श्रीरघुनंदन। सीता कांता बंधु लक्ष्मण। पंचवटिके करितों गमन। मार्गरोधन कां केलें ॥ १५ ॥ ऐकोनि श्रीरामाचें वचन। जटायु घाली लोटांगण। तूं दाशरथी रघुनंदन। तुझें महिमान मी जाणें ॥ १६ ॥ तुझें घ्यावया दर्शन। पंचवटिके वनसेवन। करूं येईल श्रीरघुनंदन। बहुकाळ जाण मी तिष्ठत ॥ १७ ॥ तुझा पिता जाण दशरथ। युद्धसखा माझा आप्त। स्वर्गा गेला इंद्रसाह्यार्थ। नमुचिघात[11] जें केला ॥ १८ ॥ मी आकाशीं झडपोनि जाण। दैत्यांचें उडविलें शिरस्त्राण[12]। दशरथें विंधोनियां बाण। दैत्य दारुण निर्दळिले ॥ १९ ॥ त्याचा तूं तंव ज्येष्ठ सुत। पूर्णब्रह्म श्रीरघुनाथ। तुझी सेवा करावया येथ। आलों निश्चित श्रीरामा ॥ २० ॥

---

१ खरोखर. २ त्वरित. ३ शस्त्रास्त्रविद्येचें ज्ञान. ४ मिळाली. ५ सुंदर. ६ तीर्थाला जाणें येणें. ७ गिधाड.

८ चोंच. ९ विकाळ. १० बाण. ११ नमुचिनामक दैत्याचा नाश. १२ मस्तकावरील कवच.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

तूं स्वामी मी तुझा दास । दृढ मानावा विश्वास । मज न म्हणावें राक्षस । माझा वंश काश्यपी[1] ॥ २१ ॥ काश्यपवंशीं माझी उत्पत्ति । त्या कश्यपाची वंशस्थिति । मी सांगेन श्रीरघुपती । विश्वासार्थी[2] माझिया ॥ २२ ॥ तूं मज म्हणसी राक्षस । मी राक्षस नव्हें गा कश्यपवंश । माझी वंशावळी बहुवस । सावकाश अवधारीं ॥ २३ ॥ मनूपासाव उत्पत्ति जाण । क्षत्रिय वैश्य शूद्र ब्राह्मण । वरकड ही सृष्टि कश्यपी जाण । तेंही लक्षण ऐकें तूं ॥ २४ ॥ अदितीपासाव झाले देव । दितीचे दैत्य दनूचे दानव । मनूपासूनि झाले मानव । मानवी वैभव मनूचें ॥ २५ ॥ स्वसेपासाव रुद्रोत्पत्ती । जे कां रुद्रगण रुद्रानुवर्ती । भद्रेपासाव गंधर्व जन्मती । जे गायन गाती अति मधुर ॥ २६ ॥ उभयसंध्यामैथुनस्थितीं । येथ राक्षसां जन्मप्राप्ती । यालागीं संध्येपासाव उत्पत्ती । ज्ञाते बोलती राक्षसांची ॥ २७ ॥ जे वेदशास्त्रीं अति व्युत्पत्ती । वादीं ब्राह्मण निर्भर्त्सिती । ते ब्राह्मणद्वेषी ब्रह्मराक्षस होती । जाण निश्चितीं श्रीरामा ॥ २८ ॥ रावणा ब्रह्मराक्षसपण । व्हावया हेंचि कारण । तेणें शतसहस्र वेद विभागून । ऋषि सज्जन निर्भर्त्सिले ॥ २९ ॥ ज्ञानगर्वाची अति गती । ब्रह्मद्वेषाच्या अति युक्ती । ब्रह्मराक्षसत्वाची प्राप्ती । जाण निश्चितीं श्रीरामा ॥ ३० ॥ क्रोधवशेपासाव देख । सिंहव्याघ्रवराहादिक । मृग ससे वृक जंबुक । गौरादि अनेक श्वापदें जालीं ॥ ३१ ॥ वारणीपासाव उत्पत्ती । जन्म पावला ऐरावती । गजदिग्गजांची प्रसूती[3] । जाण निश्चितीं तिचेनि ॥ ३२ ॥ शरमेचे ज्येष्ठ सुत । श्याम शवल यमाचे दूत । श्वानमार्जारादि समस्त । तिचेनि होत श्रीरामा ॥ ३३ ॥ वृतेपासाव बहुवस । विद्याधर किन्नर किंपुरुष । तरस्वी दुर्धर असोस । बळें गेंहिस[4] गरिष्ठ ॥ ३४ ॥ जागळेपासाव जाण । वनें उपवनें कंटकी विपिन । वीरुंध[5] वल्ली ओषधी तृण । दुर्धर वन ते व्याली ॥ ३५ ॥ उत्पत्ती सुरभीपासोन[6] । तेथें जन्मली कामधेन । गाई बैल आदिकरोन । उत्पत्तिस्थान पशूंचें ॥ ३६ ॥ वडवेपासाव[7] अश्वसंभूती । उच्चैःश्रवा स्वर्गसंपत्ती । श्यामकर्णादि नाना जाती । अश्वोत्पत्ति तिचेनि ॥ ३७ ॥ तिचे ठायीं दुर्धर । भारवाहक खरोष्ट्र[8] । जन्म पावले अपार । वेसंर खराश्वयोगें ॥ ३८ ॥ गृध्री श्येनी धृतराष्ट्री । शुकी क्रौंची ऐशा पंच नारी । पक्षी जन्मले यांच्या उदरीं । मत्स्यादि मगरी जळचरें ॥ ३९ ॥ गृध्रीपासाव गीध घार । उंलूक[9] वाघुळा अपार । गंडभैरवादि दुर्धर । अति क्रूर प्रसवली ॥ ४० ॥ श्येनीपासाव जन्मले देख । श्येन तित्तिर लावक । कपोता कोकिळ कुकुट काक । सरड बेडूक जन्मले ॥ ४१ ॥ जन्मला क्रौंचीच्या उदरीं । ढोंक टिटवी कांकणघारी । भोरड्या जन्मलिया घुमरी[10] । अहोरात्रीं किळकिळती ॥ ४२ ॥ शुकीपासाव शुक सारिका । चाष भारद्वाज मयूर देखा । चिड्या काळचिड्या अनेका । पिंगळा बोलला भविष्योत्तरीं ॥ ४३ ॥ धृतराष्ट्रीचे पुत्र चोख । हंस बक कारंडक । चकोर आणि चक्रवाक । मत्स्यादि अनेक जळचरें व्याली ॥ ४४ ॥ कद्रूपासाव अनेक । काळ कर्कोटक भुजंग । शेष वासुकि नाना नाग । पाताळपन्नग ते व्याली ॥ ४५ ॥ कश्यपापासाव सुरासुर । कश्यपापासाव नर किन्नर । कश्यपापासाव चराचर । सृष्टि समग्र कश्यपी ॥ ४६ ॥ अंडज[11] स्वेदज[12] जरायुज[13] । जे कां जन्मले उद्भिज्ज[14] । ते हे कश्यपाचें निजबीज । दुर्धर तेज कश्यपीं ॥ ४७ ॥ जळचर भूचर खेचर । जें जें भासे चराचर । तें तें कश्यपी चरित्र । परम पवित्र श्रीरामा ॥ ४८ ॥ ज्यांचें नाठवे कुळगोत्र । त्यां कश्यपांत लावीत । ते तत्काळ होती पुनीत । जगीं विख्यात कश्यप ॥ ४९ ॥ जो कश्यपीं लागला । तो मुक्तीच्या घरासी आला । भुक्तिमुक्तींचा दादुला । वाखाणिला कश्यप ॥ ५० ॥ सृष्टीचा कर्ता सृष्टीचा हर्ता । येव्हढी कश्यपाची सत्ता । यालागीं भुक्तिमुक्तींचा दाता । जाण तत्वतां कश्यप ॥ ५१ ॥ कश्यपी सृष्टी वर्णी । ऐसा वक्ता नाहीं कोणी । मी बोलिलों संकळोनी[15] । क्षमा सज्जनीं करावी ॥ ५२ ॥ त्या कश्यपाचा

१ कश्यपाचा. २ विश्वास पटावा म्हणून. ३ उत्पत्ति. ४ अडाणी. ५. डहाळ्या. ६ कामधेनूपासून. ७ घोडीपासून. ८ गाढवें व उंटें. ९ खेचर. १० घुबड. ११ अंड्यापासून झालेले. १२ घामापासून झालेले. १३ वारेपासून झालेले. १४ वनस्पति. १५ संक्षेपानें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

मी नातू । जटायुनामें विख्यातू । ऐक माझा वृत्तांतू । समूळ[१] साद्यंतू सांगेन ॥ ५३ ॥ कश्यपासी बहुत पत्नी । मुख्य अदिती दिती दनी । चौथी माझ्या पित्याची जननी । विनतानाम्नी पतिव्रता ॥ ५४ ॥ विनतेचे दोघे कुमर । अरुण आणि गरुड सुपुत्र । भगवद्भजनीं अति पवित्र । त्यांचें चरित्र अवधारीं ॥ ५५ ॥ अरुण रविरथीं सावधान । गरुड श्रीविष्णूचें वाहन । गरुडाची ख्याति अति गहन । अमृत हिरोन आणितां ॥ ५६ ॥ गरुडें जावोनि आपण । कां केलें अमृतहरण । ऐसें पुसतां श्रीरघुनंदन । समूळ कथन जटायू वदे ॥ ५७ ॥ विनता कद्रू दोघी सवती । सवतीमत्सराच्या छळणोक्तीं । कद्रु पुसे विनतेप्रती । सूर्याचे रथीं वारू कैसे ॥ ५८ ॥ विनता म्हणे वारू धवळ[२] । कद्रु म्हणे वारू सुनीळ । बोलतां बोलतां वाढलें कळ[३] । पैजेचा प्रबळ पण केला ॥ ५९ ॥ कद्रु म्हणे श्वेत वारू जरी । तरी घडा घेवोनियां शिरीं । दिव्य[४] सहस्र वर्षेंवरी[५] । पाणी तुझ्या घरीं वाहीन ॥ ६० ॥ विनता बोले तये काळीं । जैं वारुवांची प्रभा निळी । तैं मी घेवोनि घागरी चुंबळी । दिव्याब्दमेळीं[६] जळदासी तुझी ॥ ६१ ॥ दोघींचें परम प्रमाण । भाषा[६]बंधें केला पण । कद्रूनें करावया छळण । कपट संपूर्ण मांडिलें ॥ ६२ ॥ अरुणें सांगितलें विनतेसी । श्वेत वारू सूर्यरथासी । त्याचा अति विश्वास तिसी । विकल्प मानसीं असेना ॥ ६३ ॥ कद्रु सर्पांतें पुसे । सूर्यरथीं वारू कैसे । ते सांगतां शुभ्र वेषें । मग कद्रू मानसें अति दुःखी ॥ ६४ ॥ पुत्रांसी सांगे पणाची थोरी । दिव्य सहस्र वर्षेंवरी । मी दासी जालें विनतेघरीं । जळपरिचारी जळदासी ॥ ६५ ॥ नकळतां निजनिर्धारू । त्वां कां नेमिले निळे वारू । करितां सवतीमत्सरू । मत्सरें दुस्तरू भोग आला ॥ ६६ ॥ विनता सती पतिव्रता । तूं कां मत्सरू करिसी वृथा । मत्सरें दासीत्व बैसलें माथां । त्यासी काय आतां चालेल ॥ ६७ ॥ न करा मातेचा कैवार । पुत्र जन्मलेति तुम्ही पाथर । अवघे झोंबोनि विखार । निळे सत्वर करा वारू ॥ ६८ ॥ सर्प म्हणती करितां कपट । होईल अवघियांचें तळपट[८] । वंश होईल सपाट । करितां कपट भलें नव्हे ॥ ६९ ॥ ऐकोनि पुत्रांचें वचन । कद्रु झाली कोपायमान । मग शाप दिधला दारुण । अग्निदहनें भस्म व्हाल पैं ॥ ७० ॥ तंव सर्प झोंबोनि सकळ । विषें वारू केले सुनीळ । मग मातेसी सांगती उतावेळ । दावीं तूं तत्काळ विनतेसी ॥ ७१ ॥ विलंब करितां या कार्यासी । सूर्य शोषील त्या विषासी । मग दाविल्या विनतेसी । जयो आम्हांसी पैं न ये ॥ ७२ ॥ कापट्याच्या कृतकार्यासी । तत्काळ साधावें वेगेंसीं । विलंब करितां कपटासी । जयो आम्हांसी पैं नाहीं ॥ ७३ ॥ पुत्रवचनें उतावेळ । कद्रु विनता आणी तत्काळ । सूर्यरथींचे वारू सुनीळ । देखे समूळ नीळवर्ण ॥ ७४ ॥ कद्रु म्हणे विनतेसी । स्यां जिंकिलें निजपैजेसी । तूं जालीस माझी दासी । अति उल्लासीं आली घरा ॥ ७५ ॥ आल्हाद देखोनि मातेसी । सर्प मागती उःशापासी । कद्रु हरिखली मानसीं । उःशापासी स्वयें वदे ॥ ७६ ॥ कन्या जरत्कारीचे उदरीं । जरत्कारुं[९]वीर्येंकरीं । आस्तीक जन्मेल ब्रह्मचारी । तो शापा[१०]जोहरीं रक्षील ॥ ७७ ॥ दुर्धरशापाग्नीआंत । सर्प जळतां समस्त । आस्तीक पावोनियां तेथ । देह दहनांत[११] रक्षील ॥ ७८ ॥ मातृपक्षाचें कुळ सकळ । शापाग्नींत जळतां मातुळ । आस्तीक रक्षील तत्काळ । तपोबळप्रतापें ॥ ७९ ॥ उःशापें तुष्टली माता । तेणें आल्हाद सर्पां समस्तां । कद्रूसी परम चिंता । सुख सर्वथा असेना ॥ ८० ॥ कपटें जिंतिली विनता । कपट करील पुत्रघाता । ते कद्रूसी दुस्तर चिंता । सुख सर्वथा असेना ॥ ८१ ॥ जरी कपटें जय पावला कपटी । तरी धाकें धुकधुकी पोटीं । कपटघातकी शेवटीं । कपटें कपटी अति दुःखी ॥ ८२ ॥ निजकपटाची अति चिंता । बैसली कद्रूचिया माथां । पुढें विनतेची कथा । बंधमोचनता अवधारा ॥ ८३ ॥ विनता पुसे अरुणाप्रती । श्वेत वारू सूर्याचे

१ मूळापासून शेवटपर्यंत. २ पांढरे. ३ भांडण. ४ देवांच्या. ५ देवांचें वर्ष होईपर्यंत (एक हजार मानवी वर्षें) ६ शपथ देऊन. ७ ठरविले. ८ नाश.

९ जरत्कारुपासून. १० शापरूपी अग्निप्रलयांत. ११ अग्नीमध्यें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

रथीं । त्वां कां सांगितलें मज निश्चितीं । नीळप्रतीति[1] मज आली ॥ ८४ ॥ नीळिमा[2] चढला अश्वांसी । तेणें मी जालें कद्रूची दासी । घडा घेवोनियां शिसीं । अहर्निशीं जळ वाहीं ॥ ८५ ॥ तंव अरुण म्हणे सर्पी देख । चढवोनियां निजविख । निळे वारू केले निःशंक । परी कपटें दुःख पावती ॥ ८६ ॥ सुनीळ देखोनि वारूंसी । कोप आला सूर्यासी । मग उपटोनि सर्पांच्या पंखांसी । आणि पायांसी निवटिलें[3] ॥ ८७ ॥ पूर्वी पक्ष होते सर्पांसी । गोमीच्या ऐसे पाय त्यांसी । सूर्य कोपोनि मानसीं । पक्षपायांसीं छेदिलें ॥ ८८ ॥ पाय निवटिल्या मग । उरें चालों लागले नाग । यालागीं त्यांसी उरग । हा दुःखभोग कपटाचा ॥ ८९ ॥ सूर्यें शापिलें सर्पांसी । उदरीं धरिलें कपटासी । तोचि उदरशूळ तुम्हांसी । अहर्निशीं[4] भोगाल ॥ ९० ॥ मुकले पक्षां आणि पायांसी । उदरीं शूळ अहर्निशीं । कपटाची दशा ऐसी । कपटापासीं अति दुःख ॥ ९१ ॥ इतुकें जालें उठाउठीं । तरी कपट न सोडी पाठी । आगीं घालील शेवटीं । कपटें कपटी अति दुःखी ॥ ९२ ॥ सूर्यें अश्वविष आकर्षून । कर्णी राखिलें निर्विष करून । तेणें जाले शोभायमान । श्यामकर्ण जगद्वंद्य ॥ ९३ ॥ तैंपासोनियां जाण । वारू जाले श्यामकर्ण । जगीं यागीं अति पावन । शोभायमान । तिहीं लोकीं ॥ ९४ ॥ अरुण सांगे मातेप्रती । मजअधीन सूर्याची गती । मी जावोनियां बैसेन रथीं । बंधनिर्मुक्ति गरुडाधीन ॥ ९५ ॥ आकळावया त्रिजगती । गरुडापासीं सामर्थ्यशक्ती । त्याचे अंगीं सहिष्णुता[5] शांती । बंधनिर्मुक्ती तो करील ॥ ९६ ॥ सूर्याची आज्ञा मज तत्त्वतां । उदयीं वंदावीं मातापिता । म्हणोनि आलों मी वंदनार्था । जाईन मागुता रथगती ॥ ९७ ॥ बंधमोचन गरुडाहातीं । बुद्धि सांगोनि मातेप्रती । अरुण बैसला सूर्यरथीं । मातृभक्ति गरुडा गाढी[6] ॥ ९८ ॥ विनता सांगे गरुडापासीं । कपटें जिंतोनि पैजेसीं । कद्रूनें मज केलें दासी । सहस्र वर्षी जळ वाहीं ॥ ९९ ॥ अरुणें सांगितलें मजप्रती । बंधमोचन गरुडाहातीं । तरी करिसील कैसी युक्ती । ते यथार्थ गती मज सांगें ॥ १०० ॥ तेव्हां गरुड क्षोभला उद्भट । तुज जिंतिलें करोनि कपट । कपटें कपटियांचें तळपट । करीन सपाट सर्पांचें ॥ १ ॥ मातेसी द्यावया समाधान । कोप केला उपशमन[7] । वंदोनि मातेचे चरण । काय वचन बोलत ॥ २ ॥ तुझ्या बंधमोचनासी । पालट[8] पुसें तूं कद्रूसी । जरी मागेल उत्तम पदार्थासी । तरी मी आणून तिसी देईन ॥ ३ ॥ मातृबंधमोचनार्थ । अति दुर्लभ मागेल अर्थ । तो तो देईन पदार्थ । मोचनार्थ पुसें वेगीं ॥ ४ ॥ मग विनता सांगे स्वयें कद्रूसी । गरुडें पाठविलें तुजपासीं । पालट्ट[9] बंधमोचनासी । जें मागसी तें देईन ॥ ५ ॥ निजमातेच्या बंधमोचनीं । कल्पतरु चिंतामणी । देईन कामधेनु आणोनी । आवडे मनीं तें मागें ॥ ६ ॥ मग कद्रू विचारी चित्तीं । परम सामर्थ्य गरुडाप्रती । अति उद्भट याची शक्ती । अमृतप्राप्ती त्या मागूं ॥ ७ ॥ माझेनि माझ्या पुत्रां शापबंधन । तिहीं केलिया अमृतपान । मग न बाधी जरा जन्ममरण । निर्धारोन[10] तेंचि मागूं ॥ ८ ॥ कद्रु सांगे विनतेपासीं । निश्चयें पुसावें गरुडासी । परमामृत देवविसी । तैं तूं होसी बंधमुक्त ॥ ९ ॥ माझे पुत्र पाताळवासी । अखंड राखण अमृतासी । तरी प्राप्ति नाहीं त्यांसी । तैं तूं देसी तैं मुक्त ॥ ११० ॥ स्वादामृत उन्मादामृत । सुप्तामृत तृप्तामृत । यें अमृतें प्रलोभार्थ[11] । परमामृत पांचवें ॥ ११ ॥ स्वादामृत अप्सरांसी । तेणें त्या स्वादिष्ठ सर्वांसी । तृप्त्यामृत तें देवांसी । क्षुधा त्यांसी बाधेना ॥ १२ ॥ उन्मादामृत दैत्यांसी । तेणें ते उन्मत्त अहर्निशीं । सुषुप्त्यामृत[12] तें दिग्गजांसी । तेणें सुखेंसीं डुलत ॥ १३ ॥ डुकल्या येती निद्रिस्थांसी । तेंवी डुलणें दिग्गजांसी । ये तंव अमृतें वायसी[13] । देवें सर्वांसी चाळविलें ॥ १४ ॥ समुद्र मथिला समस्तीं । जाली अमृताची प्राप्ती । कलहो करितां देवीं दैत्यीं । मोहिनीहातीं दीधलें ॥ १५ ॥ मोहिनीरूपें श्रीविष्णु जाण । तेणें अमृत

१ निळे असल्याचा अनुभव. २ काळेपणा. ३ नाहींसें केलें. ४ रात्रंदिवस. ५ सहनशीलता. ६ भारी, अतिशय. ७ शांति. ८ बदली पदार्थ. ९ सुटकेबद्दल द्यावयाची वस्तू. १० निश्चयेंकरून. ११ ठकविण्याकरितां. १२ झोंप आणणारें अमृत. १३ लटक्या.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

विभागून । इतरां अमृत वाढोन । राखिलें आपण परमामृत ॥ १६ ॥ जेणें चुके जरा मरण । तें परमामृत विष्णुअधीन । तें जैं देसील आणून । बंधमोचनता तैं तुज ॥ १७ ॥ ऐकोनि कद्रूची कथा । गरुडापासीं आली विनता । आणोनि द्यावें परमामृता । बंधमोचनता तैं मज ॥ १८ ॥ परिसोनि मातेचें वचन । तिचें करावया बंधमोचन । वंदोनि मातेचे चरण । अमृतार्थी आपण उडों पाहे ॥ १९ ॥ तंव कृपा उपजली मातेसी । मग हातीं धरिलें गरुडासी । आणिलासे कश्यपापासीं । वृत्तांत त्यासी सांगितला ॥ १२० ॥ मातृभक्ति गरुडासी । देखोनि सुख कश्यपासी । कृपें अभिषेकून त्यासी । धरी पोटीं स्वानंदें ॥ २१ ॥ हरिखें वर देत त्यासी । प्रतापें पावसी परमामृतासी । युद्धीं विष्णुभक्त होसी । मुक्त करिसी निजमाता ॥ २२ ॥ परमामृत विष्णुआधीन । त्याचें करावें नामस्मरण । नामापासीं विजय पूर्ण । निश्चयें जाण हरिभक्तां ॥ २३ ॥ अच्युतनामाच्या आवृत्ती । तयां प्रळयीं[1] नव्हे च्युती[2] । अच्युतपदाची निजप्राप्ती । युद्धसामर्थ्यी पावसी ॥ २४ ॥ ऐसी कश्यपें परम कृपा करूनी । अच्युतनाम उपदेशूनी । गरुड धाडिला अमृतहरणीं । नामस्मरणीं निजविजयो ॥ २५ ॥ मातापित्यांसी करोनि नमन । तीर्थ घेतलें प्रार्थून । हरिनामीं नित्य सावधान । क्रमावया गगन आल्हाद ॥ २६ ॥ नकुळा दासी विनतेघरीं । नकुळ[3] जन्मला तिचे उदरीं । तो गरुडासी साहाकारी । होऊनि सर्पारि चालिला ॥ २७ ॥ आरंभूनि त्या दिवसासी । वैर सर्पांमुंगसांसी । भेटी होतां येरयेरांसी । निजप्राणांसी सर्प सांडी ॥ २८ ॥ मुखीं नामाची आवृत्ती । गरुड निघाला अमृतार्थी । कश्यपउपदेशाची युक्ती । विष्णुप्राप्ती संग्रामीं ॥ २९ ॥ एका जनार्दना शरण । करितां श्रीरामनामस्मरण । भगवत्प्राप्ति अॅलोट[4] ज्ञान । हें महिमान नामाचें ॥ १३० ॥ नामापासीं भुक्तिमुक्ति । नामापासीं यश कीर्ति । नामापासीं विजयप्राप्ति । कर्मनिर्मुक्ति हरिनामें ॥ ३१ ॥ नामापासीं नित्य निवृत्ती । नामापासीं नित्य शांती । नाम वंदिजे सर्वां मतीं । ब्रह्मप्राप्ति हरिनामें ॥ ३२ ॥ एका जनार्दना शरण । नामें पातकी परम पावन । नामें प्रपंच ब्रह्मपूर्ण । नाम तें जाण परब्रह्म ॥ ३३ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे अरण्यकांडे एकाकारटीकायां काश्यपवंशवर्णनगरुडपरमामृताभिगमनं नाम षष्ठोऽध्यायः ॥ ६ ॥ ओंव्या ॥ १३३ ॥ श्लोक ॥ २ ॥ एवं १३५ ॥

अध्याय ७ वा

श्रीरामकृष्णाय नमः ॥ अच्युत नाम धरोनि मानसीं । गरुड निघाला अमृतासी । भावें वंदितां कश्यपासी । साह्य सप्तऋषी त्यासी जाले ॥ १ ॥ गरुडें अतिक्रमोनि गगन । सूक्ष्मरूप धरोनि जाण । परमामृत लक्षितां पूर्ण । तंव बहु रक्षण अमृतासी ॥ २ ॥ प्रथम सर्पांचें संपूर्ण । दुसरें रक्षण वरुण । तिसरें जाण यक्षगण । मरुद्गण तें चवथें ॥ ३ ॥ पांचवें रक्षण यमदूत । सहावें रक्षण शिवदूत । सातवें रक्षण विष्णुदूत । सावचित्त सर्वदा ॥ ४ ॥ गरुडें साधोनियां सवडी । कुंडीं घालोनियां उडी । अमृत शोषोनियां तांतडीं । अति झडाडी[5] निघाला ॥ ५ ॥ तंव झाला हाहाकार । पक्षी नव्हे हा अमृतचोर । क्रोधें उठिले विखार । शस्त्रसंभार सूटले ॥ ६ ॥ गरुडपंखांच्या झडाडीं । राखणीं मूर्च्छित बापुडीं । शस्त्रें पडती उबडीं[6] । सर्प कडाडी धांविन्नले ॥ ७ ॥ रागें क्षोभतां विखारीं । नखाग्रघायीं त्यां विदारी । नकुळ पावला साहाकारी । सर्प माझारीं छेदीत ॥ ८ ॥ तंव वरुणें घालोनि पाशासी । गरुड आकळिला पक्षेंसीं । नकुळें करँडूनि[7] पाशासी । केलें गरुडासी निर्मुक्त ॥ ९ ॥ गरुडें झडपोनियां वरुणासी । उडविला तो आकाशीं । भोंवंडोनि दाही दिशीं । पडे पृथ्वीसीं मूर्च्छित ॥ १० ॥ राखणाईत आपापरी । सर्प विदारिले नखाग्रीं । नकुळ केवळ सर्पारी[8] । नानापरी छेदिले ॥ ११ ॥ ऐसें करोनि रणकंदन । गरुड वळंघला[9] गगन । करोनियां अमृतपान । बळवाहन[10] चालिला ॥ १२ ॥ हांक वाजिन्नली वैकुंठीं । कोपें चालिला धूर्जटी[11] । देवांच्या कोट्यनुकोटी । अमृतासाठीं धांविन्नल्या ॥ १३ ॥ वेगीं बैसोनि सुरगजासीं । इंद्र धांविन्नला वेगेंसीं । वज्र हाणितलें गरुडासी ।

---

१ सर्व जगाच्या नाशसमयीं. २ नाश. ३ मुंगूस. ४ अमर्याद. ५ संसारापासून सुटका. ६ उपडीं. ७ तुकडे पाडून. ८ सर्पशत्रु. ९ चढला. १० बळ हेंच वाहन ज्याचें तो. ११ शंकर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

येरें वज्रासी गिळियेलें ॥ १४ ॥ गरुडपंखांच्या झडाडीं । इंद्राची वळली मुरकुंडी । गज पळाले कडाडीं । देवांच्या कोडी पळाल्या ॥ १५ ॥ गरुडपंखांचा पवन । देवां नाठवे निजस्थान । वाहुट्ळीमाजी रजःकण । तैसे सुरगण भ्रमचक्रीं ॥ १६ ॥ यम धांविन्नला कोपेंशीं । दंडें हाणितलें गरुडासी । तेणें गिळिलें यमदंडासी । मग यमासी दंडिलें ॥ १७ ॥ यमें जाचिलें बहुतांसी । गरुडें गांजिलें यमासी । करोनियां कासाविसी । यम धुळीसीं मेळविला ॥ १८ ॥ यम गांजिला नानापरी । कोणी धांवेना कैवारी । देखोनि कुबेर पळे दूरी । सौजन्य करी गरुडासीं ॥ १९ ॥ बंधमोचन मातेसी । अमृत द्यावया कद्रूसी । धाडीन मणिमय कलशासी । अमृतासी सांठवण ॥ २० ॥ गरुडपंखांचे झडाडीं । दिग्गजें रानीं पळालीं बापुडीं । सुरासुरांचिया कोडी । देशोधडी केलिया ॥ २१ ॥ दैत्य दावन महाबळी । तेही मारिले रणकल्लोळीं । धाकें सर्प गेले पाताळीं । आतुर्बळी विनतात्मज ॥ २२ ॥ मंत्रपूतजळशक्ती । युद्धा आला प्रजापती । तंव कमंडलु हिरोनि हातीं । अच्युतशक्तीं गिळियेला ॥ २३ ॥ पित्याच्या पित्याचा पिता । भीड राखिली धर्मार्था । येरवीं गरुड घोळसिता । घडी न लगतां ब्रह्मयासी ॥ २४ ॥ महादेवें क्रोधानळीं । गरुड हाणितला त्रिशूळीं । गरुड त्रिशूळातें गिळी । शिव ते वेळीं विस्मित ॥ २५ ॥ त्रिशूळ गिळावयाची शक्ती । हे कैंची या गरुडाप्रती । सदाशिव पाहे निश्चितीं । हृदयस्थित श्रीराम ॥ २६ ॥ श्रीरामनामाच्या निजस्थितीं । गरुडें जिंतिली त्रिजगती । त्रिशूळ गिळावया ती शक्ती । जाली निश्चितीं श्रीरामनामें ॥ २७ ॥ हृदयीं अमृत मुखीं रामनाम । त्यासीं कोण करी संग्राम । खुंटला शिवाचा पराक्रम । श्रीरामनाम परिसोनी ॥ २८ ॥ ऐकतां श्रीरामाचें नाम । सदाशिवासी आलें प्रेम । मूर्च्छित पावला विश्राम । युद्धसंग्राम विसरला ॥ २९ ॥ गरुडें कश्यपाच्या उपदेशीं । नामें जिंतिलें सदाशिवासी । कळिकाळाची गति कायसी । हरिभक्तांसी बाधावया ॥ ३० ॥ निजभक्तासी द्यावया भेटी । विष्णु पावला उठाउठीं । चक्र हातवसूनियां मुष्टीं । कृपादृष्टी पैं आला ॥ ३१ ॥ लौकिकीं दावी युद्धक्रम । परी भक्ताचें आवडे प्रेम । गरुड स्मरे नित्य नाम । पुरुषोत्तम तुष्टला ॥ ३२ ॥ जो सप्रेम स्मरे नाम । त्याअधीन पुरुषोत्तम । नामें संतुष्ट आत्माराम । भक्तकाम कृपाळु ॥ ३३ ॥

श्रद्धया हेलया नाम स्मरंति मम जंतवः ॥
तेषां नाम सदा पार्थ वर्तते हृदये मम ॥ १ ॥

श्रद्धें हेलयाँ जो स्मरे नाम । त्याचें मी हृदयीं वाहें नाम । नामनिष्ठाचे पुरवीं काम । नामें सुगम मत्प्राप्ती ॥ ३४ ॥ अमृत सोडवावया बळी । चक्र मोकली वनमाळी । गरुड चक्रातेंही गिळी । विस्मय सकळीं मानिजे ॥ ३५ ॥ दैत्यदानवमंडळीं । विष्णुचक्र सगळें गिळी । ऐसा कोणी नाहीं बळी । आतुर्बळी हा गरुड ॥ ३६ ॥ विष्णुचक्राचा महामार । घायें निर्दाळीत असुर । चक्र त्रैलोक्यीं दुर्धर । गरुडें तें चक्र गट्ट केलें ॥ ३७ ॥ स्मरतां राम हरि गोविंद । नामापासीं परमानंद । त्यासी बाधूं न शके द्वंद्व । द्वंद्व निर्द्वंद्व हरिनामें ॥ ३८ ॥ नित्य नामाचा निजगजर । त्याअधीन चक्रधर । भक्तां बाधूं न शके चक्र । हरि साचार त्यांपासीं ॥ ३९ ॥ नाम स्मरतां निरंतर । तयापासीं अहोरात्र । घरटी करी विष्णुचक्र । विघ्न दुर्धर निवटावया ॥ ४० ॥ देवा भक्ता नाहीं अंतर । त्यापासीं तो निरंतर । यालागीं बाधूं न शके चक्र । चक्र दुर्धर अभक्तां ॥ ४१ ॥ माझें निजचक्र गिळोन । गरुडा विजयी तूं संपूर्ण । विष्णु म्हणे मी सुप्रसन्न । माग वरदान वेगेंसीं ॥ ४२ ॥ ज्या ज्या वरदाना मागसी । तें तें देईन अति उल्हासीं । ऐकोनि हांसें आलें गरुडासी । काय विष्णूसी बोलत ॥ ४३ ॥ तुवां जिंतिलें नाहीं मातें । वर देसी कोण्या अर्थें । मीच प्रसन्न जालों तूतें । मागसी तें देईन मी ॥ ४४ ॥ कश्यपगुरूचा हात माथां । तुझें अच्युत नाम नित्य स्मरतां । मज काय आहे अपूर्णता । मागसी आतां तें देईन मी ॥ ४५ ॥ ऐसें ऐकोनि गरुडवचन । भाष्यबंधेंसीं गोंवून । विष्णु मागे वरदान । सावधान अवधारा ॥ ४६ ॥ तरी गरुडा होईं माझें वाहन । नुलंघावें माझें वचन । नित्य व्हावें मजअधीन ।

१ महाबलाढ्य. २ गरुड. ३ हातांत घेऊन. ४ लीलेनें, सहज. ५ नामावर भक्ति ज्याची त्याचे. ६ सोडी. ७ शीतउष्ण, सुख-दुःख इत्यादि परस्परविरुद्ध गोष्टी. ८ वचनांत.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

हें वरदान मज देईं ॥ ४७ ॥ ऐकतां विष्णूचें मागणें । गरुड विचारी निजमनें । भाग्य देवोनियां न देणें । निंद्य जिणें तिहीं लोकीं ॥ ४८ ॥ मिथ्या करितांचि भाक[1] । देव पितर नित्य विमुख । ऐहिकीं[2] परत्रीं[3] काळें मुख । नरकदुःख मिथ्यात्वें ॥ ४९ ॥ मिथ्या बोलती वितंड । नरका वचती ते षंढ । त्यांचें मुखचि नरककुंड । पाहों नये तोंड तयांचें ॥ ५० ॥ मिथ्या अनुवादाची घाणी । तिहीं लोकीं उठे पोहँणी[4] । पितर विमुख मुख देखोनी । मिथ्या वाणी तो नरक ॥ ५१ ॥ ऐसऐसिया उपपत्ती । गरुडें विचारोनि चित्तीं । जीवित्व द्यावें विष्णूच्या हातीं । केवळ निश्चितीं निर्धारू ॥ ५२ ॥ शरीर विष्णूचें वाहन । जीवें नुल्लंघी विष्णुवचन । काया वाचा मनें विष्णुअधीन । तेणें पावन तिहीं लोकीं ॥ ५३ ॥ ऐसा करितां निर्धारू । हृदयीं प्रकटला सद्गुरू । विवेक प्रकाशिला सधरू[5] । कृपाळु गुरु तो ऐका ॥ ५४ ॥ स्मरतां कश्यपाचें वचन । विष्णु परमात्मा ब्रह्म पूर्ण । हे गरुडासी बाणली खूण । समाधान गुरुवाक्यें ॥ ५५ ॥ गुरुवाक्यबोधस्थितीं । सकळ भयांची निवृत्ती[6] । गुरुवाक्यें यश कीर्ती । विजयप्राप्ति गुरुवाक्यें ॥ ५६ ॥ तें गुरुवाक्य निर्धारितां । विष्णु चालकु निजचित्ता । विष्णु इंद्रियांतें नेमिता । सर्व सत्ता विष्णूची ॥ ५७ ॥ जगीं विष्णूचि एकात्मता । तेथें मी देता तो मागता । हें तंव न घडे तत्त्वतां । सर्व सत्ता विष्णूची ॥ ५८ ॥ ऐसें विचारोनि चित्ता । विष्णुचरणीं ठेविला माथा । मज अर्पितां नार्पितां । तुज अधीनता सर्वस्वें ॥ ५९ ॥ माझें सत्त्व तूं आपण । माझें जीवन तूं परिपूर्ण । माझें जें कां मीपण । तेंही तूं संपूर्ण महाविष्णु ॥ ६० ॥ गोडी साखर दोनी एक । तैसा तूं स्वामी मी सेवक । मज तुज नाहीं वेगळिक । भिन्नत्व देख वर्ततां ॥ ६१ ॥ श्रीविष्णूचा निजसेवक । म्हणतां गरुडासी परम हरिख । मज तुझे सेवेचें परम सुख । दृष्टिसन्मुख मज राखावें ॥ ६२ ॥ पाहतां तुझें श्रीमुख । फिकें होय समाधिसुख । चरणीं ठेविला मस्तक । दृष्टिसन्मुख मज ठेवीं ॥ ६३ ॥ ऐकोनि गरुडाचें वचन । विष्णु झाला संतुष्टमान । दृष्टीपुढें नित्यस्थान । दिधलें नेमून गरुडासी ॥ ६४ ॥ गरुडें पृष्ठी दिधली देवासी । देवें दृष्टी दिधली गरुडासी । उल्हास देवभक्तांसी । गरुड हरिसेवेसी विनटला ॥ ६५ ॥ गरुड विनटोनि श्रीहरी । काया वाचा मनेंकरीं । जाला विष्णूचा आज्ञाधारी । जोडिल्या करीं तिष्ठत ॥ ६६ ॥ देवा भक्ता जालें युद्ध । युद्ध नव्हे तो महाबोध । एका जनार्दनीं विनोद । परमानंद रणरंगीं ॥ ६७ ॥ विष्णु म्हणे खगेश्वर । तूं माझा आज्ञाधर । तरी गिळिला जो शस्त्रसंभार[8] । तो द्यावा सत्वर शिवादिकां ॥ ६८ ॥ जीं शस्त्रें त्रैलोक्यीं दुर्धर । साहूं न शकती सुरासुर । काळ कांपे अहोरात्र । तीं त्वां समग्र गिळियेलीं ॥ ६९ ॥ दंड त्रिशूळ वज्र चक्र । शस्त्रें गिळिलीं अति दुर्धर । जाले यशाचे डोंगर । कीर्तिसागर त्वां भरिले ॥ ७० ॥ शूर वीर तूं धैर्यलाठा[9] । श्रेष्ठ यश तुझा वांटा । त्याही यशाच्या बांधल्या मोटा । सुरवरिष्ठां देईं शस्त्रें ॥ ७१ ॥ उभय पक्षांचा[10] आक्रम । तुज शस्त्रांचें नाहीं काम । अंदट[11] दाटुगा पराक्रम । शस्त्रें सुरोत्तम गौरवीं ॥ ७२ ॥ यशःकीर्तींच्या उत्तरीं । गरुड गौरविला श्रीहरीं । तेणें तो लोळे पायांवरी । आज्ञा शिरीं वंदिली ॥ ७३ ॥ यमासी दंड इंद्रासी वज्र । त्रिशूळें पूजिला श्रीशंकर । चक्रें पूजिला चक्रधर । गरुडें समग्र सुखी केले ॥ ७४ ॥ पाचारोनियां प्रजापती । कमंडलु दिधला त्याचे हातीं । अवघे जयजयकार करिती । आलिंगिती गरुडातें ॥ ७५ ॥ पुढील अमृताची कथा । इंद्र सांगे विव्हलता । सर्पां अमृत पाजितां । होईल तत्त्वतां तें विष ॥ ७६ ॥ सर्पांसी पाजिलिया पीयूष[12] । तेंही परतें होय विष । अमृतावांचोनियां देख । अमर निःशेख[13] मरतील ॥ ७७ ॥ सुरवरांची हरावया भूक । देवें निर्माण केलें पीयूष । तें सर्पांमुखीं होतांचि विष । अमर निःशेष मरतील ॥ ७८ ॥ अमृत दिधलिया सर्पांसी । स्वर्गस्थ मरतील उपवासीं । यालागीं युद्ध केलें गरुडासीं । बळें अमृतासी हरावया ॥ ७९ ॥ तंव येणें उभयपक्षमेळीं । मर्दोनि सुरासुरांची फळी । शस्त्रें गिळोनियां

१ वचन. २ इहलोकीं. ३ परलोकीं. ४ चर्मकुंड. ५ बळकट. ६ नाश. ७ तत्पर झाला, लागला. ८ शस्त्रसमूह. ९ धैर्यानें मोठा दांडगा. १० पंखांचा. ११ अकुंटित. १२ अमृत. १३ सर्व.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सगळीं । निघे तत्काळीं अमृतासी ॥ ८० ॥ तंव विष्णु सुबुद्धि तत्त्वतां । युद्धीं गरुड न जिंकितां । त्यासीं केली दृढ आप्तता । सुरकार्यार्थी साधावया ॥ ८१ ॥ विष्णूनें थोर ख्याति केली । गरुड जो कां आतुर्बळी । तो आकळोनि निजबोलीं । शस्त्रें देवविलीं आम्हांसी ॥ ८२ ॥ यालागीं बोलावया निश्चितीं । आम्हांसी जाली उपपत्ती । तोचि श्रीविष्णु अमृतार्थी । सांगेल युक्ती गरुडासी ॥ ८३ ॥ अमृतावांचोनि निश्चितीं । अमर मरणातें पावती । तेव्हां गरुडाची यशःकीर्ती । तेचि अपकीर्ति होईल ॥ ८४ ॥ ऐकोनि इंद्राच्या वचनासी । विष्णु बुद्धि सांगे गरुडासी । जेणें साधे दोहीं कार्यांसी । तें तुजपासीं सांगेन ॥ ८५ ॥ मातेचें व्हावया बंधमोचन । सर्पां न घडे अमृतपान । तैसें सांगेन विंदान । सावधान अवधारीं ॥ ८६ ॥ सर्पांसी कळों न देतां । कद्रूसी द्यावें अमृता । अशुचिदोषें होईल गुप्तता । होवोनि सुस्नाता अमृत घेई ॥ ८७ ॥ अमृतकलश गंगातीरीं । म्यां ठेविलासे दूर्वांकुरीं । मातृबंधमोचन करीं । भात्रें नमस्कारीं कद्रूतें ॥ ८८ ॥ तुवां करितांचि नमन । कद्रु सर्वेंचि संतोषोन । करील मातेचें बंधमोचन । उत्तीर्ण म्हणोन तूं जाई ॥ ८९ ॥ पुढें सर्पांसी अमृतपान । करूं न देती सुरगण । काकस्वरूपें झडपोन । नेती आपण अमृतकुंभा ॥ ९० ॥ ऐसी विष्णूची युक्ती । गरुडासी सांगे दैवी गती । तेचि गरुडें धरोनि चित्तीं । कद्रूप्रती पैं आला ॥ ९१ ॥ कुबेर दे रत्नकुंभासी । अमृतें भरोनियां त्यासी । गरुड आला कद्रूपासीं । कद्रु गरुडासीं तुष्टली ॥ ९२ ॥ गरुडें पाचारोनि माता । कद्रूपासीं अमृत देतां । बंधनिर्मुक्त विनता । उल्हासतां करी कद्रु ॥ ९३ ॥ कद्रु म्हणे धन्य विनतेसी । गरुड जन्मला तुझिये कुशीं । घेवोनि आला अमृतासी । मुक्त मातेसी येणें केलें ॥ ९४ ॥ ऐकोनि कद्रूचें वचन । गरुड साष्टांगें करी नमन । कद्रूनें गरुडा आलिंगून । दे आशीर्वचन निजविजयी ॥ ९५ ॥ अशुचि स्पर्शतां हें अमृत । जेथींचें तेथें होय गुप्त । यालागीं होवोनि सुस्नात । स्वीकारा समस्त अमृतातें ॥ ९६ ॥ अमृतकुंभ गंगातीरीं । मीं ठेविला दूर्वांकुरीं । स्नान करोनियां समग्रीं । अमृताहारीं बैसावें ॥ ९७ ॥ अमृतकलश ठेवून । गरुडें आक्रमिलें गगन । विनता निर्मुक्त होवोन । आली आपण निजधामा ॥ ९८ ॥ अमृत सेवावया प्रीतीं । सर्प आल्हादें स्नानें करिती । तंव कावळे अमृतार्थी । नेणों किती मिळाले ॥ ९९ ॥ इंद्रासी अमृताचा कळवळा । होवोनि आला डोमकावळा । अमृतकलश झडपोनि नेला । सर्पीं केला हाहाकार ॥ १०० ॥ अमृत नेतां झडकरीं । तें सांडलें दूर्वांकुरीं । तेणें दूर्वा अमर महीवरी । अद्यापिवरी टवटविती ॥ १ ॥ अमृत नेतां पैं डोमकावळा । सर्प सोडिती विषाच्या गरळा । नकुळ सुरसाह्या पावला । सर्पां केला महामार ॥ २ ॥ गरुडगति ते आकाशीं । नकुळगति ते विवरासीं । वेगीं येवोनि सर्पांपासीं । युद्धकंदनासी मांडिलें ॥ ३ ॥ सविख उभारोनि फडा । सर्प धांवती अमृतचाडा । गरुडें नकुळ धाडिला गाढा । सर्पांसीं झगडा तेणें केला ॥ ४ ॥ केले दुखंड तिखंड पंचखंड । एक सर्प केले नवखंड । जे जे आतुर्बळी प्रचंड । ते ते शतखंड नकुळें केले ॥ ५ ॥ सर्पीं कवळोनि चौपासीं । मारूं जाती नकुळासी । गरुड पाठिराखा आकाशीं । तेणें तो सर्पांसी नाटोपे ॥ ६ ॥ घारी गीध गरुडाची सेना । सर्पां झडपोनि नेती गगना । एवं पन्नग पावोनि कंदना । अमृतपानातें मुकले ॥ ७ ॥ नकुळ मार करी भूतळीं । गरुड गीध घारी अंतराळीं । रणीं सर्पां केली रवंदळी । भेणें पाताळीं रिघाले ॥ ८ ॥ गरुडें कैसी केली युक्ती । साधोनि मातेची निर्मुक्ती । आम्हां मारविलें नकुळाहातीं । अमृतप्राप्ती कागांसी ॥ ९ ॥ काग नव्हेति ते सुरवर । यालागीं गरुडें केला कैवार । नकुळें केला महामार । अति दुर्धर सर्पांसी ॥ ११० ॥ दर्भीं सांडलें अमृत उदंड । सर्प चाटिती लावोनि तोंड । दर्भें जिव्हा जाल्या दुखंड । दुःख प्रचंड तेणें त्यांसी ॥ ११ ॥ अमृतस्वादाचिये भुली । दर्भें चाटितां जिव्हा चिरिली । शेखीं काकुळती

१ महापराक्रमी. २ आधार. ३ युक्ति. ४ सर्पांच्या मातेला. ५ अपवित्रपणाचे दोषानें. ६ उत्तम स्नान केलेली. ७ देवसमुदाय. ८ आनंदानें. ९ आपल्या घरीं. १० अमृताच्या इच्छेनें. ११ शूर, पराक्रमी. १२ सर्प. १३ आकाशामध्यें. १४ नाश, चुराडा. १५ शेवटीं.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

उरली । शीखं लाविली निजकपटें ॥ १२ ॥ पितृभक्ति मातृभक्ती । तेणें गरुडासी अमृतप्राप्ती । कद्रुकपटाचिये गतीं । सर्प पावती अति दुःख ॥ १३ ॥ सद्भावें भगवत्प्राप्ति । असद्भावें अधोगति । भगवद्भक्तां सुखप्राप्ति । दुःखप्राप्ति अभक्तां ॥ १४ ॥ सर्पापासोनि परमामृत । गरुडाचेनि देवां प्राप्त । इंद्रादि देव समस्त । गरुडें निश्चित सुखी केले ॥ १५ ॥ देव पावोनि परमामृत । कुंडें भरलीं पाताळगत । राखण ठेवोनि इत्थंभूत । सुर समस्त सुखी केले ॥ १६ ॥ त्रैलोक्यविजयी महावीर । धीर शूर अति उदार । हा गरुडाचा बेंडिवार । सविस्तर सांगितला ॥ १७ ॥ गरुडें सुखी कश्यप पिता । सुखी केली विनता माता । सुखी केलें सुरां समस्तां । विष्णुही तत्त्वतां सुखी केला ॥१८॥ ऐसी गरुडाची ख्याती । तो पितृव्य मजला श्रीरघुपती । आणि आम्ही अरुणाची संतती । जटायु संपाती दोघे बंधु ॥ १९ ॥

द्वौ पुत्रौ विनतायास्तु कथितौ गरुडारुणौ ।
तस्माज्जातोऽहमरुणात्संपाती च ममाग्रजः ॥ २ ॥
जटायुरिति मां विद्धि श्येनीपुत्रमरिंदम ।
सीतां च तात रक्षिष्ये त्वयि याते सलक्ष्मणे ॥ ३ ॥

विनतेचे गरुड अरुण । त्यांचें सांगितलें कथन । अरुणाचे आम्ही दोघे जण । जटायु आणि संपाती ॥१२०॥ अरुणा पित्याची आज्ञा चोख । सूर्यवंशीं व्हावें सेवक । तेथें जन्मेल रघुकुळटिळक । विश्वतारक जगद्वंद्य ॥ २१ ॥ याचिलागीं सूर्यवंशीं । सख्य केलें दशरथासीं । त्याचा तूं श्रीराम भेटलासी । आजि भाग्यासी सभाग्यता ॥ २२ ॥ ऐसें बोलोनियां जाण । जटायु घाली लोटांगण । श्रीरामें दिधलें आलिंगन । समाधान तेणें त्यासी ॥ २३ ॥ तुज पंचवटीं वसतां । सेवा सांगावी श्रीरघुनाथा । म्हणोनि चरणीं ठेविला माथा । निजसेवकता मज द्यावी ॥ २४ ॥ पंचवटीस सीता ठेवून । श्रीराम आणि लक्ष्मण । मृग मारूं गेलिया दोघे जण । सीतासंरक्षण मी कर्ता ॥ २५ ॥ श्रीराम असतां नसतां । मी रक्षीन नित्य सीता । तेथें राक्षसभयाची कथा वार्ता । मज असतां ते कैंची ॥ २६ ॥ माझिया पराक्रमापुढें । राक्षसबळ तें बापुडें । कोण पाहील आश्रमाकडे । चहूंकडे मी रक्षीन ॥ २७ ॥ मी तराळ आश्रमापासीं । घरटी करीन अहर्निशीं । सुखें राहावें आश्रमासीं । मी विघ्नांसी नेदीं रिघों ॥२८॥ करितां श्रीरामनामस्मरण । विघ्न तेंचि होय निर्विघ्न । तेथें मी काय रक्षीन दीन । सेवा करीन सद्भावें ॥ २९ ॥ पंचवटीस जावें आवश्यक । मार्गद्रंष्टा मी सेवक । सीता सौमित्र रघुकुळटिळक । आल्हादें देख नेईन ॥ १३० ॥ ऐसी ऐकोनि जटायूची गोष्टी । श्रीराम चालिला जगजेठी । मग तिघे जणें उठाउठीं । पंचवटीं पावलीं ॥ ३१ ॥ गंगाजळतटनिकटीं । देखोनियां पंचवटी । आल्हाद तिघांचिया पोटीं । गंगातटीं वसावया ॥ ३२ ॥ श्रीरामें वसविली पंचवटी । श्रीरामासन्मुख दृष्टी । जटायु राहे पर्वतपृष्ठीं । करीत घरटी अहर्निशीं ॥ ३३ ॥ एका जनार्दना शरण । श्रीराम सीता लक्ष्मण । केलें पंचवटिके आगमन । राक्षसदळण येथोनि ॥३४॥ राक्षस वधावया बोहणी । श्रीराम करील येथूनी । सुरस कथा रामायणी । श्रोतीं सज्जनीं परिसावी ॥ ३५ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे अरण्यकांडे एकाकारटीकायां श्रीरामसीतालक्ष्मणजटायुपंचवट्यागमनं नाम सप्तमोऽध्यायः ॥ ७ ॥ ओंव्या ॥ १३५ ॥ श्लोक ॥ ३ ॥

अध्याय ८ वा

॥ श्रीरामचंद्राय नमः ॥

स तां पंचवटीं गत्वा नानाशकुनिनादिताम् ।
उवाच भ्रातरं रामो लक्ष्मणं शुभलक्षणम् ॥ १ ॥
अयं देशः समः श्रीमान् पुष्पितैस्तरुमिर्वृतः ।
इहाश्रमपदं रम्य यथावत्कर्तुमर्हसि ॥ २ ॥

पंचवटीं गंगातटीं । श्रीराम सुखावे देखोनि दृष्टीं । सुखावली सीता गोरटी । आल्हाद पोटीं सौमित्रा ॥ १ ॥ श्रीरामा देखोनि आल्हादें । कोकिळा कूजती पंचमशब्दें । घुमरी घुमघुमती स्वानंदें । सुखानुवाद अति मधुर ॥ २ ॥ श्रीरामा तूं तूं सीते तूं तूं । धन्य धन्य सुमित्रा तूं तूं ।

१ शिक्षा. २ मोठेपणा. ३ खरोखर. ४ काका, चुलता. ५ धन्यता. ६ बिगारी करणारा, सेवक. ७ फेरी, प्रदक्षिणा. ८ रात्रंदिवस. ९ मार्ग शोधक, मार्ग दाखविणारा. १० गंगेच्या कांठीं.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

ऐसें कपोत कूजतू । पुण्यपुरुषार्थी ये वनीं ॥ ३ ॥ स्वतःप्रमाण कीं परतःप्रमाण। प्रयोगोपाधीनें व्यावर्तित कोण । जहद[१]जहल्लक्षणेचें काय प्रयोजन। शुक सारिका आपण विवादती ॥ ४ ॥ जेथें शुक बोले विचक्षण । आत्मा येथें स्वतःप्रमाण । तो जहदजहत् नेणे। श्रीराम पूर्ण लक्षावा ॥ ५ ॥ ऐसें पक्षी विवादती । तेणें सुखावे श्रीराममूर्ती । लक्ष्मण चमत्कारे चित्तीं । सीता सती स्वानंदें ॥ ६ ॥ मयूर आनंदें नाचत । शुक पिंगळे अनुवादत । ये वनीं वसल्या श्रीरघुनाथ । पुण्यपुरुषार्थ पावेल ॥ ७ ॥ अति पावन पंचवटी । श्रीराम वसल्या जगजेठी । मारील राक्षसांच्या कोटी । सुखसंतुष्टी तिहीं लोकीं ॥ ८ ॥ ऐकोनि पक्ष्यांचें कूजितें । संतोषला श्रीरघुनाथ । सौमित्रासी स्वयें सांगत । आश्रम येथें निर्मावा ॥ ९ ॥ अरुणावरुणासंगम सार । प्राची सरस्वती पवित्र। लक्षूनि सुंदर कपालेश्वर। करीं सत्वर स्वाश्रम ॥ १० ॥ गंगातीर सम सुशीळ । वृक्ष पुष्पित सफळ । [३]मलयानिळ सुपरिमळ । सुख प्रबळ ये वनीं ॥ ११ ॥ तूं तंव निजसखा लक्ष्मण । सर्वांगें सुंदर सुलक्षण । येथें वसतां सुख संपूर्ण । करीं निर्माण आश्रम ॥ १२ ॥

एवमुक्तस्तु रामेण लक्ष्मणः परवीरहा ।
अचिरेणाश्रमं भ्रातुश्चकार सुमहाबलः ॥ ३ ॥
पर्णशालां सुविपुलां चकार सुनरोत्तमः ।
उपास्यां राघवस्यार्थे प्रेक्षणीयामनुत्तमाम् ॥ ४ ॥

लक्ष्मणाचें शुभ लक्षण। ना म्हणों नेणे आपण। शिरीं वंदोनि श्रीरामचरण । करी निर्माण आश्रम ॥ १३ ॥ यज्ञशाळा द्विजशाळा । जीवनशाळा शयनशाळा । निर्मिलिया पर्णशाळा । अति विशाळा ऋषिवासा ॥ १४ ॥ वृंदावनें सुमनवनें । शोभताती वनें उपवनें । बिल्व अश्वत्थ मधुवनें । आम्रवनें मघमघित ॥ १५ ॥ पंचपंच वृक्षांची दाटी । गंगातीरीं निकटानिकटीं । त्यांमाजी शोभे पंचवटी । देखतां दृष्टीं मन निवे ॥ १६ ॥ अरुणा वरुणा सरस्वती । त्रिवेणी वाहे आश्रमाप्रती । सुंदर कपालेश्वरस्थिती । सन्मुख भासती आश्रमीं ॥ १७ ॥ पंचवटीं आश्रम सुहा[४]वा। हेचि श्रीरामाची निजसेवा । लक्ष्मणें केली सद्भावा । श्रीराघवसुखार्थी ॥ १८ ॥ उत्तमोत्तम आश्रमस्थिती । देखोनि सुखावे श्रीरघुपती । लक्ष्मणासी अति प्रीतीं। सुखानुभूतीं आलिंगी ॥ १९ ॥ स्वयें श्रीरामसुखसमेळीं । नानापुष्पीं नानाफळीं । निजाश्रमीं दिधला बळी । जनकबाळीसमवेत ॥ २० ॥ श्रीरामसीताआश्रमस्थिती । तेणें लक्ष्मणा सुखसंपत्ती । सेवा करावया अहोरातीं । उल्हास चित्तीं चौगुणा ॥ २१ ॥ कु[५]श पुष्पें सुस्वाद फळें । शीतळ जळें सु[६]परिमळें । लक्ष्मण पुरवी सर्वकाळें। सेवाबळें उल्हासी ॥२२॥ श्रीरामसेवेचें निजसुख । लक्ष्मणासी आत्यंतिक । विसरला द्वंद्वदुःख । परम हरिख सेवेचा ॥ २३ ॥ श्रीरामसीतेचें चरणतीर्थ । सौमित्र नित्य सेवीत । सेवेसी विकिलें जीवित । सावचित्त सर्वार्थी ॥ २४ ॥ सीतेपासीं संरक्षण। श्रीरामें ठेवूनि लक्ष्मण। आपण करूं गेला स्नान । अति[७]विंदान तेथें जालें ॥ २५ ॥ श्रीरघुनाथासी देखतां । कदा निद्रा न करी सीता । श्रीराम स्नाना गेला असतां । विश्रामता निजेली ॥ २६ ॥ लक्ष्मणाचे दृष्टीसमोरी । सीता स्वभावें निद्रा करी । वस्त्र उडालें गुह्यावरी । कुचांतरीं निर्मुक्त ॥ २७ ॥ सुमित्रासी श्रीरामध्यान । न देखे कुच न देखे जघन । सीता दिसताहे नग्न । हेंही ज्ञान तो नेणे ॥ २८ ॥ श्रीराम करोनि आला स्नान । सीता दिसताहे नग्न । लक्ष्मणासी स्वयें आपण । काय वचन बोलत ॥ २९ ॥

अग्निकुंडसमा नारी घृतकुंभसमो नरः ।
दृष्ट्वा गुह्यं परस्त्रीणां कस्य नो चलितं मनः ॥ ५ ॥

स्त्री तंव अग्निकुंड केवळ । नर घृ[८]तकुंभ तो विव्हळ । देखोनि नारीगुह्यस्थळ । मन निश्चळ कोणाचें ॥ ३० ॥

लक्ष्मणोक्तिः—

पिता यस्य शुचिर्भूतो माता चापि पतिव्रता ।
श्रीरामसेवानिरतस्तस्यैवं निश्चलं मनः ॥ ६ ॥

पिता ज्याचा शुचिर्भूत । माता पतिव्रता निश्चित । श्रीरामसेवे नित्य रत । त्याचें चित्त चळेना ॥ ३१ ॥ श्रीरामभक्तांची निजस्थिती । गुह्यगुह्यार्थ देखती। तेणें चळेना चित्तवृत्ती। जाण

१ एकाच वस्तूचे ठायीं स्थलपरत्वें किंवा कालपरत्वें फरक झाला असतां तीच पहिल्या वस्तूहून भिन्न भासूं लागते, तेव्हां भेदभासक चिन्हें काढून टाकून वस्तूंचें ऐक्य करणें.

२ घुमणें. ३ मलय पर्वतावरील सुगंधिक वारा. ४ सुशोभित. ५ दर्भ. ६ सुगंधित. ७ अद्भुत गोष्ट. ८ तुपाची घागर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

निश्चितीं श्रीरामा ॥ ३२ ॥ देहींचिया विकारवृत्ती । स्त्रीपुरुषत्वा अभिव्यक्ती । देह देहातीत[1] देखती । त्यांची वृत्ति चळेना ॥ ३३ ॥ सीता जगदंबा स्वयें सृष्टीं । पाहोनि लक्ष्मणाची कसवटी[2] । ऐकोनि दोघांचिया गोष्टी । स्वयें उठी सलज्ज ॥३४॥ लक्ष्मणाची स्थिती देखतां । सीतेनें चरणीं ठेविला माथा । स्वयें श्रीराम जाला वंदिता । परमपूज्यता सौमित्रीं ॥ ३५ ॥ लक्ष्मणें घालोनि लोटांगण । दोहींचे मस्तकीं धरिले चरण । सेवासुख द्यावें मज आपण । पूर्ण पूज्यपण श्रीरामीं ॥ ३६ ॥ ऐकोनि सौमित्रवचन । श्रीरामें देतां आलिंगन । दोघां नाठवे दोनीपण । जालें परिपूर्ण परब्रह्म ॥ ३७ ॥ पावोनियां पूर्ण बोध । लक्ष्मणा सेवेचा आल्हाद । सेवेलागीं जाला सावध । कथानुवाद अवधारा ॥ ३८ ॥ लक्ष्मण जावोनि वनासी । नित्य आणी वनफळांसी । तंव तेणें वनीं एके दिवशीं । आश्चर्यासी देखिलें ॥ ३९ ॥ लाडका शूर्पणखेचा सुत । सांब राक्षस विख्यात । काळखर्गाचे[3] प्राप्त्यर्थ । करी वनांत तपश्चर्या ॥ ४० ॥ तपस्तेजें आतुर्बळी । ध्यानीं मंत्रमूर्ति आकळी । तंव त्यावरी वाढली वृक्षजाळी । जालें बहु काळीं वारुळ ॥४१॥ सांबतपश्चर्या अति अद्भुत । खर्गार्थी एकाग्रचित्त । काळखर्ग होतां प्राप्त । जालें विपरीत अदृष्टें ॥ ४२ ॥ खर्ग उतरतां सत्वर । तंव शस्त्रदेवता करी विचार । सांब महापापी दुर्धर । खर्गें अघोर करील ॥ ४३ ॥ निर्दाळील गोब्राह्मणां । वध करील दीनजनां[4] । त्याच्या हाता मी स्पर्शेना । शरण लक्ष्मणा मी होईन ॥ ४४ ॥ हा तंव धर्माचा साहाकारी । अकिंचनांचा[5] कैवारी । दीनजनांतें उद्धरी । याच्या करीं मी पावेन ॥ ४५ ॥ सांब जे जाळींत तप करीत । लक्ष्मण फळें तोडी तेथ । खर्ग येवोनियां त्वरित । होय हस्तगत सौमित्रा ॥ ४६ ॥ वनफळें आंसुडितां[6] । अवचटें[7] काळखर्ग आलें हाता । लक्ष्मण पाहे सभोंवता । तंव खर्गदाता न दिसेचि ॥ ४७ ॥ खर्गें सुखावला करतळीं । हरिखें वेळोवेळां तुळी । वाहों[8] पहावया तोडी जाळी । सांब ते वेळीं निवटिला[9] ॥ ४८ ॥ घावो अतिशयें दुर्धर । जाळीसहित तुटलें शिर । भडभडां वाहे रुधिर । चिंतातुर सौमित्र ॥ ४९ ॥ कोण तपस्वी होता तेथ । मज घडला ब्रह्मघात । स्वर्गीं क्षोभेल दशरथ । सत्य श्रीरघुनाथ क्षोभेल ॥ ५० ॥ कैंचें खर्ग आलें हाता । तेणें हत्या बैसली माथां । कैसेनि भेटों श्रीरघुनाथा । चित्तीं चिंता अनिवार ॥ ५१ ॥ ब्रह्महत्यान्याचें सुख । श्रीराम न पाहे सन्मुख । जीवीं लागली धुकधुक । परम दुःख सौमित्रा ॥ ५२ ॥ माता पिता बंधु गोत । माझा श्रीराम समर्थ । त्यासी सांगों वृत्तांत । प्रायश्चित्तार्थ पुसेन ॥ ५३ ॥ करितां श्रीरामनामस्मरण । कोटि दोषां होय दहन । त्यासी जालिया अनन्य शरण । हत्याहरण निमेषार्धें ॥ ५४ ॥ मुखीं श्रीरामनामावृत्ति । हृदयीं श्रीरामाची मूर्ति । पावलापावलीं श्रीरामस्थिति । दोषंनिवृत्ति[10] श्रीरामें ॥ ५५ ॥ श्रीरामस्थितीं पाउल पडे । तेणें समाधिसुख गाढें । प्रायश्चित्त जालें बापुडें । श्रीरामाकडे पाहतांचि ॥ ५६ ॥ हत्याभयें श्रीरामस्थिती । दृढ धरोनियां चित्तीं । पुसावया प्रायश्चित्तार्थी । आला निश्चितीं सौमित्र ॥ ५७ ॥ श्रीरामा सीता पुसे आपण । स्त्रियेवांचूनि लक्ष्मण । दिसताहे अति उद्विग्न[11] । दीनवदन आभासे[12] ॥ ५८ ॥ श्रीराम म्हणे सीतेप्रती । सौमित्र नव्हे विषयार्थी । दिसे नूतन खर्गाची प्राप्ती । कांहीं वनाप्रती प्रवर्तलें[13] ॥ ५९ ॥ तंव लक्ष्मणें येवोनि आपण । साष्टांग घातलें लोटांगण । दोष घडला जी संपूर्ण । कृपा आपण करावी ॥ ६० ॥ जयजयाजी श्रीरघुनाथा । अनाथबंधो दीननाथा । कृपा करीं गा भगवंता । मज रक्षिता आन[14] नाहीं ॥ ६१ ॥ तळीं धरित्री[15] पाहतां । वरी आकाश न्याहाळितां । दाही दिशा धांडोळितां । मज श्रीरघुनाथा आन नाहीं ॥ ६२ ॥ मी तंव नेणें माता पिता । बंधु भगिनी तूंचि तत्त्वतां[16] । कौसल्येनें निरूपिलें वना येतां । मज रक्षिता तूंचि तूं ॥ ६३ ॥ लक्ष्मणाचें दीन

१ देहापलीकडील. २ परीक्षा. ३ कालखड्ग मिळविण्याकरितां. ४ गरीबांचा. ५ दरिद्र्यांचा. ६ ओढितां. ७ अकस्मात्. ८ धार चालवून पाहण्याकरितां. ९ मारिला गेला.

१० दोषांचें निवारण. ११ उदासीन, कष्टी. १२ वाटतो, दिसतो. १३ घडलें, १४ दुसरा, १५ पृथ्वी, १६ खरोखर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वचन । ऐकोनियां श्रीरघुनंदन । मग संकेत[1] पुसे आपण । येरु मस्तक खालवून सांगता होय ॥ ६४ ॥ वनीं वनफळें तोडितां । अवचित खर्ग आलें हाता । त्याचा घावो पाहूं जातां । जाळी त्या अर्थी[2] तोडिली ॥ ६५ ॥ तंव जाळींत तप करीत । तपस्वी होता वारुळांत । त्याचा मज घडला घात । प्रायश्चित्तार्थ मज सांगा ॥ ६६ ॥ ऐकोनि सौमित्राचें वचन । मग बोलला श्रीरघुनंदन । वैश्य क्षत्रिय कीं शूद्र ब्राह्मण । वधिला कोण जाळीमाजी ॥६७॥ न करितां हा इत्यर्थ[3] । सांगतां न ये प्रायश्चित्तार्थ । लक्ष्मण धाडिला त्वरित । परीक्षार्थ प्रेताच्या ॥ ६८ ॥ लक्ष्मण तें शरीर पाहे डोळां । भ्यासुर मुख दाढा विक्राळा । खापराऐसा सबाह्य[4] काळा । नेत्र अनलोसारिखे[5] ॥ ६९ ॥ लक्ष्मण सांगे इत्यर्थ । मज घडला राक्षसघात । ऐकोनि हांसे श्रीरघुनाथ । मुख्य धर्मार्थ हा आम्हां ॥ ७० ॥ तुज नाहीं निजज्ञान । शस्त्रदेवता अति सज्ञान । तिणें जाणोनि आपण । दुष्टनिर्दळण स्वयें केलें ॥ ७१ ॥ तो जरी सावध असता । तरी करिता तुझिये घाता । तुज प्रसन्न शस्त्रदेवता । न झुंजतां निर्दाळिला ॥ ७२ ॥ राक्षस आतुर्बळी[6] होता । दुर्धर तपी शस्त्रप्रात्यर्थी । दुष्टावरी क्षोभोनि शस्त्रदेवता । त्याच्याचि घाता तिणें केलें ॥ ७३ ॥ तपस्व्याच्या केलें घाता । दोष बैसला माझे माथां । ऐसें न म्हणावें तत्त्वतां । दोष सर्वथा न मानावा ॥ ७४ ॥ करावया राक्षसांचे घात । आम्ही आलों असों या वनांत । शस्त्रें धरोनि तुझा हात । केला प्राणान्त दुष्टाचा ॥ ७५ ॥ तूं तंव नव्हेसी कर्मकर्ता । तुझ्या धरोनियां हाता । दुष्ट दमिला शस्त्रदेवता[7] । दोष सर्वथा तुज नाहीं ॥ ७६ ॥ दोष नाहीं तुझे माथां । पुसणें न लगे प्रायश्चित्ता । ऐसें श्रीराम बोलतां । उल्हासता सौमित्रा ॥ ७७ ॥ धन्य ज्ञान श्रीरघुनाथा । शोधोनि काढिलें इत्यर्था । मी तंव नव्हे कर्मकर्ता । दोष सर्वथा मज नाहीं ॥ ७८ ॥ धन्य धन्य श्रीरामकृपा । म्यां घेतलें दोषसंकल्पा[8] । तोचि केला निर्विकल्पां[9] । पुण्य पाप मज नाहीं ॥ ७९ ॥ ऐसें बोलोनि लक्ष्मण । मस्तकीं धरिले श्रीरामचरण । श्रीरामें दिधलें आलिंगन । समाधान सुबंधू ॥ ८० ॥ श्रीरामाचे निजभक्त । कर्में करोनि अलिप्त[10] । हरिभक्तांचें पढतां चरित्र । नित्यमुक्त महादोषी ॥ ८१ ॥ करावया राक्षसांच्या घाता । काळखड्ग आलें हाता । श्रीरामें पूजिलें सद्भावता[11] । काळ सर्वथा साह्य आम्हां ॥ ८२ ॥ काळ साह्य जाला स्वभावतां । काळखर्ग आलें न प्रार्थितां । राक्षसनिर्दळणीं आतां । जाण तत्त्वतां सौमित्रा ॥ ८३ ॥ राक्षस वधावया रणीं । आजिपासूनि जाहली बोहणी । येथोनि विचरतां वनीं । सावधानीं वर्तावें ॥ ८४ ॥ याचा सूड घ्यावयासी । राक्षस येतील कपटवेषी । योगी संन्यासी तापसी । विश्वास त्यांसीं न करावा ॥ ८५ ॥ अगत्य मानेल कर्तव्यता । ते मज पुसावी तत्त्वतां । मज पुसल्याविण सर्वथा । अल्पही कार्यार्थी न करावें ॥८६॥ शिरीं वंदूनि श्रीरामवचन । सौमित्र सदा सावधान । तंव तेथें करावया पुत्रशोधन । होईल आगमन शूर्पणखेचें ॥ ८७ ॥ शूर्पणखा स्वयें लंकेसी । देखती जाली दुष्ट स्वप्नासी । पट्टाभिषेक होतां सांबासी । चरणघातेंसीं लोटिला ॥ ८८ ॥ मस्तकीं शेंदुराचा टिळा । गळां आरक्त कण्हेराच्या माळा । मुख माखिलें काजळा । भोंवता पाळा गोळांगुळांचा[12] ॥ ८९ ॥ सर्वांगीं तैलमर्दन[13] । नग्न गर्दभावरी आरोहण । दक्षिणदिशे करूनि गमन । गोमयऱ्हदीं प्रवेशला ॥ ९० ॥ शूर्पणखा सांगे रावणासी । दुष्ट स्वप्न देखिलें सांबासी । मी जाईन पद्मपुरासी । विमानेंसीं ते आली ॥ ९१ ॥ भेटोनि त्रिशिराखरदूषणांसी । मग पाहूं आली ते सांबासी । देखोनि त्याच्या शिरश्छेदासी । आक्रंदेंसीं आरंबळे[14] ॥ ९२ ॥ काय विंदान[15] जालें यासी । कोण उठली गे विवसी[16] । काळ कृतांत भीती ज्यासी । तेणें भूमीसी स्वीकारिलें ॥ ९३ ॥ हा स्वभावें उघडी दृष्टी । तैं सुरासुर पळती दिक्पुटीं[17] । कळिकाळाची निवटे[18]

---

१ निमित्त, कारण. २ त्या उद्देशानें, खड्गाची धार पहाण्याकरितां. ३ निश्चय. ४ आंत बाहेर. ५ विस्तवाप्रमाणें. ६ मोठा पराक्रमी, ७ शस्त्रदेवतेनें, ८ दोषाची कल्पना, ९ विकल्परहित, शंकारहित. १० स्पर्शरहित. ११ अति निष्ठेनें. १२ वानरांचा. १३ तेल चोपडणें. १४ आक्रोश करू लागली. १५ प्रकार. १६ राक्षसी. १७ दाही दिशांस. १८ नाश पावे.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

दृष्टी। तो हा हठी पडला भूमीं ॥ ९४ ॥ तुज स्यां नवस केले बहुवस। अश्वत्थसेवा आणि उपवास। थोर धरिली तुझी आस। तो तूं उदास जालासी ॥ ९५ ॥ तुझिया देखोनि मुखकमळा। मज तंव पान्हा सुटला बाळा। तो सांब परलोकासी गेला। मजसीं अबोला धरोनियां ॥ ९६ ॥ ऐसे विलाप अनेक। मुखावरी ठेवी मुख। हा हा कोणें वधिला बाळक। थोर दुःख मज दिधलें ॥ ९७ ॥ रडोनि काय करूं येथ। कोणें केला पुत्रघात। त्यासी पहावया निश्चित। वन समस्त ते शोधी ॥ ९८ ॥ तंव सहितखड्गधनुष्यबाण। वनीं देखिला लक्ष्मण। सांबजीवघाती हाचि संपूर्ण। त्याचें भक्षण मी करीन ॥ ९९ ॥ सांब वधिला करितां ध्यान। तो जरी असता सावधान। तरी याचें करिता सगट प्राशन। बळ संपूर्ण सांबासी ॥ १०० ॥ सांब माझा अतुर्बळी। येणें वधिला ध्यानसमेळीं[१]। यासी मी सगळेंचि गिळीं। करीन रांगोळी हाडांची ॥ १ ॥ माझा सांब वधिला येणें। सांगों खरादिकां गाऱ्हाणें। तें तंव मज लाजिरवाणें। मारूनि नेणें त्यांपासीं ॥ २ ॥ याचे अंगीं बळ संपूर्ण। सबळ बळाचें लक्षण। डोळां दोनी सहस्रनयन[२]। आणि नागचिन्ह बाहूंसी ॥ ३ ॥ डोळयांमाजी कूर्मदृष्टी। कळिकाळा न चळे पुष्टी। शेषशयनचिन्ह[३] पृष्ठीं। अदृष्ट सृष्टीं आंगवण[४] ॥ ४ ॥ यासी बळें गिळूं जातां। हा करील माझ्या घाता। छळून मारावा सर्वथा। याची कांता होवोनी ॥ ५ ॥ स्वरूपरूपें अति सुंदर। अलंकार ल्याली मनोहर। वांकी अंदुवांचा गजर। उभी समोर सौमित्रा ॥ ६ ॥ शीसफूल राखडी फरा गोंडा। पोफळ चांपेकळी केतकी दांडा। दोहीं हातीं जडित चुडा। मुखीं विडा सुरंग ॥ ७ ॥ अंगीं मंदुवीची[५] कांचोळी। गळां हार एकावळी। पाठीवर वेणी मोकळी। गोंडा दुफुलीसहित ॥ ८ ॥ नेसली क्षीरोदकंपाटोळा[६]। मध्यभागीं जडित कटिमेखळा। हळदी उटिली मुखकमळा। काजळ डोळां भळभळीत ॥ ९ ॥ डोळे मोडी लक्ष्मणाकडे। दुंडीपीडी[७] करूनि पायां पडे[८]। लाजोनि पाठिमोरी मुरडे। पाहे देहुंडे लक्ष्मणासी ॥ ११० ॥ मी तरी कुबेराची भगिनी। तुमचे प्रातीलागोनी। बैसलें होतें अनुष्ठानीं[९]। धर्मपत्नी मी होईन ॥ ११ ॥ सुंदर आवडे डोळयांसी। परी रामाज्ञा आठवे लक्ष्मणासी। राक्षस येती कपटवेषीं। विश्वास त्यांसीं न धरावा ॥ १२ ॥ ती घेवोनि कमळमाळा। घालूं आली लक्ष्मणाच्या गळां। येरू मानोनि विटाळा। परता सरला सक्रोध ॥ १३ ॥ मजसारिखी सुंदर कांता। वनीं मिनंलिया[१०] एकांता। नपुंसकही न सरे मागुता। तुझी पुरुषता सभय कां ॥ १४ ॥ मी तंव तुझी केवळ चरणदासी। सेवा करीन अहर्निशीं। शयन करूं पर्णशेजेसी। शंका मानसीं न धरावी ॥ १५ ॥ माझा भोगिल्या गुह्यार्थ। कळेल सर्वही भावार्थ। माझेनि संगें पुरुषार्थ। जगीं विख्यात पावाल ॥ १६ ॥ सौमित्र म्हणे ऐक आतां। श्रीराम माझा ज्येष्ठ भ्राता। त्याची आज्ञा मज न होतां। तुज सर्वथा नांगीकारीं ॥ १७ ॥ श्रीराम ज्येष्ठ बंधु तो कैसा। कोण पुरुषार्थ कैसी दशा। समूळ आणावया मानसा। मार्गजिज्ञासा[११] पूसत ॥ १८ ॥ येणेंचि मार्गें गंगातटीं। श्रीरामाश्रम पंचवटीं। श्रीराम वसे जगजेठी। सीता गोरटीसमवेत ॥ १९ ॥ माझ्या पुत्राचे हे वैरी। रम्याश्रम गंगातीरीं। नांदताती बरव्या परी। सीता सुंदरी प्रियतमा ॥ १२० ॥ श्रीराम आणि लक्ष्मण। दोघे छळून मी मारीन। सीता सुंदरी नेऊन। स्वयें अर्पीन लंकानाथा ॥ २१ ॥ मग पंचवटीस जाऊन। श्रीरामा घालोनि लोटांगण। भाऊजी वंदितें श्रीचरण। बाईसी शरण सर्वभावें ॥ २२ ॥ मी तंव तुमची धाकटी जाऊ। मजवरी कृपा करावी बहू। भावे साचे धाकटे भाऊ। लग्नगौरवू न मानिती ॥ २३ ॥ भावे साचे आज्ञेवीण। माझें न करिती पाणिग्रहण। भाऊजींसी तुम्हीं सांगून। लावावें लग्न सौमित्रासीं ॥ २४ ॥ सीता म्हणे श्रीरामासी। सौमित्र कष्टताहे अहर्निशीं। सुंदर कांता जोडिली त्यासीं। मज वनवासीं सांगा-

१ ध्यानयुक्त असतां. २ इंद्र. ३ विष्णूचें चिन्ह. ४ पराक्रम. ५ उंची रेशमी वस्त्राची. ६ चित्रविचित्रांकित रेशमी वस्त्र. ७ हावभाव. ८ एका पायावर उभा राहिलेल्या.

९ अनुष्ठान करीत. १० मिळाली असतां. ११ मार्ग जाणण्याच्या इच्छेनें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

तिणी ॥२५॥ श्रीराम पाहे जंव सुंदरी । उलट बाहुल्या देखे नेत्रीं । तंव केवळ निशाचरी । छळणावारीं आलीसे ॥ २६ ॥ तिचा जाणोनि भावार्थ । हांसोनि बोले श्रीरघुनाथ । माझा सौमित्रीं संकेत । असे विपरीत एक सुंदरी ॥ २७ ॥ पाठीसीं लिहिल्या अक्षरासी । आज्ञा माने सौमित्रासी । पत्र न माने वो तयासी । मुखवचनासी मानीना ॥ २८ ॥ आज्ञा मागतां एकाएक । मुहूर्तीं श्रीरामीं विमुख । पतीसी पत्र दावितां देख । तेथेंही विमुख स्यां व्हावें ॥ २९ ॥ विमुखपणाचा सोहळा । मुळींच आला माझ्या कपाळा । लग्नपत्रिका न दिसे डोळां । श्रीराम भोळा म्हणों नये ॥ १३० ॥ दोघां छळावें हें माझें मत । परी श्रीराम छळणासी नव्हे प्राप्त । आपलें कळों नेदी वृत्त । पत्र गुप्त पृष्ठभागीं ॥ ३१ ॥ पृष्ठभागीं आज्ञा लग्न । वनीं लक्ष्मण निर्दळीन । मग निर्दाळावया श्रीरघुनंदन । खर दूषण आणीन ॥ ३२ ॥ पद्मपुरा निकटानिकटीं । श्रीराम मारिजेल राक्षससुभटीं[२] । सीता हिरोनि गोरटी । नेईन भेटी लंकानाथा ॥ ३३ ॥ श्रीराम दुबाहु माणूस । खर दूषण उग्र राक्षस । श्रीरामा मारितां न लगे निमेष । सीता लंकेश भोगील ॥ ३४ ॥ पुत्रवैरी वधावा पुढें । विचार केला निजनिवाडें[३] । सलज्ज बोले सीतेपुढें । मज सांकडें ओढवलें ॥ ३५ ॥ नेम केलासे भावेंसीं । लग्नपत्रिका ते पाठीसीं । पाठिमोरी मी बैसूं कैसी । भाउजींसी तुम्ही सांगा ॥ ३६ ॥ पाठिमोरी बैसतां जाण । लाजें जाईल माझा प्राण । बाइजी सांगोनि आपण । पत्र लिहोन करीं द्यावें ॥ ३७ ॥ स्त्रियांचें जिणें लज्जायुक्त । बाइजी जाणां तुम्ही समस्त । प्रार्थोनियां श्रीरघुनाथ । पत्रलिखित करीं द्यावें ॥ ३८ ॥ श्रीरामाचा निजभावार्थ । पत्र दिधलिया वाचील अर्थ । मग करूं धांवेल अनर्थ । केला विपरीतार्थ यालागीं ॥ ३९ ॥ सौमित्रातें वरूं पाहसी । तरी पत्र लिहूं दे पाठीसीं । नाहीं तरी जावोनि वनासी । येईल मनासी तो वरीं ॥ १४० ॥ ऐसें ऐकोनि श्रीरामवचन । उकसाबुकसीं करी रुदन । जळो तें आणिकाचें वदन । श्रीलक्ष्मण निजपति ॥ ४१ ॥ भाऊजी शिवतें तुमचे चरण । मी तंव पतिव्रता संपूर्ण । प्राणपति श्रीलक्ष्मण । तुम्हीं कठिण न वदावें ॥ ४२ ॥ मग श्रीराम बोले धर्मवचन । ज्येष्ठ भावजयी मातेसमान । कनिष्ठ तें लेंकरूं जाण । लाजेसी कारण असेना ॥ ४३ ॥ मग श्रीरामापुढें पाठिमोरी । येवोनि बैसली झडकरी । पत्र लिहावें पाठीवरी । आज्ञाधारी मी तुमची ॥ ४४ ॥ शूर्पणखेची न पडे दृष्टी । पत्र लिहिलें कटिपृष्टीं । पत्रीं लिही विकट गोष्टी । सावधानदृष्टीं अवधारा ॥ ४५ ॥ सहनासिक सगटओष्ठ । वेगें करावें सरसपाट । हाचि इचा शेंसपाट । आज्ञा वरिष्ठ हे माझी ॥ ४६ ॥ करूं नये स्त्रीहनन[४] । यालागीं इचा राखावा प्राण । करावें नासिकाच्छेदन । हेंचि सुलग्न पैं इयेचें ॥ ४७ ॥ काय लिहिलें पाठीसी । हें तों न कळे शूर्पणखेसी । वंदोनि श्रीरामसीतेसी । लक्ष्मणापासीं ते आली ॥ ४८ ॥ वेगीं येवोनियां माळेसी । वरूं आली लक्ष्मणासी । तो कोपला अतिशयेंसीं । निर्लज्ज होसी तूं एक ॥ ४९ ॥ श्रीरामाचे आज्ञेवीण । मी न करीं पाणिग्रहण[५] । जळो तुझें काळें वदन । आज्ञेविण वरूं येसी ॥ १५० ॥ भाऊजी बाइजी कृपाळु पूर्ण । तिहीं दिधलें आज्ञापन । परी तुम्हांपासीं कठिणपण । सांगेन खूण ते ऐका ॥ ५१ ॥ भाऊजी श्यामसुंदर जगजेठी । बाइजी चांपेकळी गोरटी । मज भेटलीं पंचवटीं । आज्ञा वाक्पुटीं वरावें तुम्हां ॥ ५२ ॥ तोंडींचे तोंडीं आज्ञापन । सौमित्र म्हणे मानी कोण । तोंडींचें तोंडीं होईल वरण । सत्य जाण सुंदरी ॥ ५३ ॥ माझा विश्वास नाहीं तुम्हांसी । जन्म कंठणें पायांपासीं । लटिकें बोलिल्या चरणांसी । मुख श्रीरामासी कैंवी दावूं ॥ ५४ ॥ थोर श्रमलेति वनांतीं । चरण तळहातीन[६] हातीं । दोघे शयन करूं एकांतीं । तेणें विश्रांति पावाल ॥ ५५ ॥ लक्ष्मण म्हणे तूं तंव लंड । बोलाची बडबड उदंड । घाय हाणोनि फोडीन तोंड । तूं वेश्या रांड व्यभिचारिणी ॥ ५६ ॥ श्रीरामाचें हस्तलिखित । देखिल्यावीण न लावीं हात । जवळी आलिया करीन घात । म्हणोनि खर्गी हात घातला ॥ ५७ ॥ म्हणे मी कपाळकरंटी । सत्य न माने माझी गोष्टी । श्रीरामलिखित पहा दृष्टीं । म्हणोनि पृष्ठी दाविली ॥ ५८ ॥

१ राक्षसीण. २ राक्षसांतील महावीरांनीं. ३ स्वनिश्चयानें. ४ स्त्रीहत्या. ५ स्वीकार. ६ रगडीन, चेपीन.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

श्रीरामाचीं हस्ताक्षरें। सार्थक वाचिलीं सौमित्रें। वेणी दंड धरोनि करें। बलात्कारें पाडिली ॥ ५९ ॥ मी काय धाकुटी कर्णकुमारी। मज झोंबोनि पाडितां पृथ्वीवरी। मीच पडतें धरणीवरी। पुरुषार्थ करीं प्राणनाथा ॥ १६० ॥ पाय देवोनि उरावरी। सओष्ठ[१]नासिका शस्त्रधारीं। सरसकटूनि[२] क्षणामाझारीं। राहिला दुरी शस्त्रेंसीं ॥ ६१ ॥ घायें उडविलें कपटपण। क्रूर राक्षसी अति दारुण। बारा हस्त एकैक स्तन। नाकेंवीण विक्राळ ॥ ६२ ॥ शंख करी सुबद्ध। फें फें करीत निघे शब्द। नाकेंवीण अति विरुद्ध। धरिला क्रोध सौमित्रीं ॥ ६३ ॥ जैसें म्यां केलें कपट। तैसेंचि जालें सपाट। याचा मी भरीन घोंट। मुख अचाट पसरिलें॥६४॥ मुख पसरी गिळावयासी। तंव लक्ष्मण शस्त्रातें हातंवसी[३]। घाव घालावा जों शिर्सी। तंव राक्षसी पळाली ॥ ६५ ॥ सौमित्र आला पंचवटीं। श्रीरामासी सांगितली गोष्टी। समूळ राक्षसी ते खोटी। टाळी पिटिती परस्पर ॥ ६६ ॥ धन्य श्रीराम सूर्यवंशीं। कपटी ओळखिली राक्षसी। पत्र लिहिलें पाठीसी। तेणें म्यां तिसी दंडिलें ॥ ६७ ॥ पत्र पडतें तिच्या हातीं। तैं ते भोंवती आम्हांभोंवतीं। भली श्रीरामें केली युक्ती। पृष्ठपत्रार्थी दंडविली ॥ ६८ ॥ तुझी आज्ञा आत्यंतिक। आज्ञेनें तिसी लाविली सीक[४]। सओष्ठ छेदोनि नासिक। विरूप देख ते केली ॥ ६९ ॥ सुपायेवढीं नखें देखा। यालागीं म्हणती शूर्पणखा। सौमित्रें छेदोनि नासिका। टाकिलें उदकामाझारीं ॥ १७० ॥ शूर्पणखेचें छेदिलें नाक। ते तीर्थीं मासे निर्नासिक। अद्यापि देखती लोक। ऐसी सुटंक[५] दंडिली ॥ ७१ ॥ तिचा न घ्यावा निजप्राण। ऐसी तुझी आज्ञा पूर्ण। यालागीं ते राखिली जाण। गेली पळोन पद्मपुरा ॥ ७२ ॥ तंव सीतेसी म्हणे रघुनंदन। सुमित्रपत्नीचें लग्न। नासिका लावोनि सुलग्न। आला सावधान सौमित्र ॥ ७३ ॥ रणबोहलें सोहळियाकारणें। होईल बाणाचें उटणें। अशुद्धें[६] आंबा शिपणें। तळीं बसविणें शस्त्राचें ॥ ७४ ॥ येथें नाचेल रणघेंडा। ओंवाळणी पडती राक्षसमुंडा। आयणी पायणी दोहीं कडां। शस्त्रें भडभडां पडतील ॥ ७५ ॥ श्रीराम बोलिला आपण। झालें कलहासी कारण। त्रिशिरा आणि खर दूषण। निर्दळीन रणकंदनें ॥ ७६ ॥ ऐसें बोलतांचि जाण। बाहूंसी आलें स्फुरण। करावया अरिमर्दन। धनुष्यबाण उचलिले ॥ ७७ ॥ एका जनार्दना शरण। आलें श्रीरामा स्फुरण। निर्दळील खरदूषण। श्रोतीं अवधान मज द्यावें ॥ ७८ ॥ इति श्रीभावार्थरामायणे अरण्यकांडे एकाकारटीकायां शूर्पणखाविरूपकरणं नामाष्टमोऽध्यायः ॥ ८ ॥ ओंव्या ॥ १७८ ॥ श्लोक ॥ ६ ॥

अध्याय नववा

श्रीसीतापतये नमः ॥ घेवोनि लक्ष्मणाचा दरारा। शूर्पणखा आली पद्मपुरा। निर्नासिकी विरूपाकारा[११]। रुधिरधारा लागलिया ॥ १ ॥ राक्षससभेचिये मेळीं। शूर्पणखा आतुर्बळी। ते सरकटली समूळीं। राक्षसकुळीं गांजिली ॥ २ ॥ शूर्पणखा अति दुर्धर। तीतें विटंबिलें तो महावीर। राक्षसां धाक लागला थोर। निशाचर चळीं कांपती ॥ ३ ॥ शूर्पणखेचें विरूपकरण। देखोनियां खर दूषण। कोपा चढले अति दारुण। क्रोधें गर्जोन पूसत ॥ ४ ॥

> तां तथा पतितां दृष्ट्वा विरूपां शोणितोक्षिताम्।
> भगिनीं क्रोधसंतप्तः खरः पप्रच्छ राक्षसः ॥ १ ॥
> बलविक्रमसंपन्ना कामगा कामरूपिणी।
> इमामवस्थां नीता त्वं केनांतकसमागता ॥ २ ॥

शूर्पणखा शंख करून। दुःखें पडली मूर्च्छापन्न। तिचें देखोनि विरूपकरण। खर आपण विस्मित ॥ ५ ॥ सओष्ठ नासिका छेदोनि मुळीं। उघडी पाडिली दांताळी। ऐसा कोण बळियां बळी। रक्तें[७] हाणिली शूर्पणखा ॥ ६ ॥ बळियां बळी शूर्पणखा। इचा चळकांप इंद्रादिकां। इचा धाक अंतका। हे तिहीं लोकां दुर्धर ॥ ७ ॥ ऐसी हे अति बळिष्ठ। कामरूपी कपटें वरिष्ठ। इचें केलें सरसपाट। ऐसा वीर उद्भट[८] कोण आहे ॥८॥

---

१ ओंठासकट नाक. २ कापून काढून. ३ हातांत घेतलें. ४ मस्तकावर. ५ त्रासदायक झाली असती, ६ मोठी.

७ शिक्षा. ८ उत्तम प्रकारें. ९ रक्तानें. १० वधूवरांना उचलून घेऊन नाचणें, ११ विरूप, विद्रूप.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

इति भ्रातुर्वचः श्रुत्वा क्रुद्धस्स च विशेषतः ।
ततः शूर्पणखा वाक्यं सबाष्पमिदमब्रवीत् ॥ ३ ॥
तरुणौ रूपसंपन्नौ सुकुमारौ महाबलौ ।
पुंडरीकविशालाक्षौ चीरकृष्णाजिनांबरौ ॥ ४ ॥
इमामवस्थां नीताहं यथाऽनाथा सती तथा ।
तस्मात्तयोश्च रुधिरं पिबेयमहमाहवे ॥ ५ ॥

भगिनीचेनि कैंवाडें । खर बंधु पुसे वांडेंकोडें । तंव ते सक्रोध रडे । तापसीं गाढें गांजिलें ॥ ९ ॥ तरी ते तापसी नव्हती ब्राह्मण । क्षत्रिय नव्हेति साधारण । वैश्य शूद्र नव्हेति जाण । योद्धे दारुण महावीर ॥ १० ॥ दोघे दारुण राजकुमर । गौर श्याम अति सुंदर । चीरकृष्णाजिनांबर । राजीव नेत्र राजस ॥ ११ ॥ ज्येष्ठा नांव रघुनंदन । कनिष्ठा नाम लक्ष्मण । अति सुंदर ते दोघे जण । त्यांऐसा आन असेना ॥ १२ ॥ इंद्रादि देव मदनमूर्त । श्रीरामापुढें ते खद्योत । दानव मानव मशक तेथ । शोभा अद्भुत श्रीरामीं ॥१३॥ ज्येष्ठा श्रीरामाची नारी । लावण्यराशी सीतासुंदरी । रमा न पवे तिची सरी । तीऐसी दुसरी असेना ॥ १४ ॥ होतां सीतेचें दर्शन । निवले माझे दोनी नयन । देखतांचि श्रीरघुनंदन । काया वाचा मन निवालें ॥ १५ ॥ देखतां श्रीरामलक्ष्मण । मी पावलें समाधान । पुत्रद्वेषें त्यासी आपण । कपटें छळण करूं गेलें ॥ १६ ॥ त्यांसीं न चले कपटाचा छळ । त्यांसीं न चले क्रोध सबळ । सिद्धी न पवेचि माझें सैंळ । तिहीं तत्काळ विटंबिलें ॥ १७ ॥ पाय देवोनि उरासी । लक्ष्मणें छेदिलें नासिकेसी । जाय सांगें म्हणे बळियापासीं । तें मी तुम्हांपासीं सांगूं आलें ॥ १८ ॥ यापरी गांजिलें तापसीं । करा माझ्या कुडाव्यासी । म्हणोनि लागली पायांसी । उकसाबुकसीं स्फुंदत ॥ १९ ॥ त्यांसी तूं पाडिसी रणीं । त्यांचें नळीं मी बैसोनी । घटघटां रुधिरप्राशनीं । नवस मनीं दृढ केला ॥ २० ॥ ऐकोनि भगिनीचें वचन । कोपा चढले खर दूषण । निघडे राक्षस चौदा जण । अति दारुण धाडिले ॥ २१ ॥ तुम्हीं पंचवटीं जाऊनी । श्रीराम लक्ष्मण मारोनी । सीता आणावी धरोनी । रुधिरप्राशनीं शूर्पणखे ॥ २२ ॥ शूर्पणखेचें मनोगत । त्या दोघांचें प्राशावें रक्त । तें ईस द्यावया आतृप्त । दूत त्वरित पाठविले ॥ २३ ॥ राक्षस सत्राणें गर्जत । दोघांवरी चवदा दूत । बापुडें कायसें रघुनाथ । निमेषार्धांत माराया ॥ २४ ॥ रुधिर प्राशावया देखा । सवें दिधली शूर्पणखा । तिणें दाखविली पंचवटिका । रघुकुळटिळकासमवेत ॥ २५ ॥ कातिया त्रिशूळ तोमर । झेलिती शस्त्रांचे संभार । चवदा राक्षस अति दुर्धर । श्रीरामासमोर लोटले ॥ २६ ॥ एक म्हणे श्रीरामासी । मी मारीन मुद्गलेंसीं । एक म्हणे मी लक्ष्मणासी । पट्टिशेंसीं मारीन ॥ २७ ॥ एक म्हणे मी दोघांसी । शस्त्रेंसहित गिळीन त्यांसी । एक म्हणे तूंचि खासी । वांटा आम्हांसी पाहिजे ॥ २८ ॥ एक म्हणे हे मारोनि वीर । शूर्पणखा प्राशील रुधिर । मांस विभागूनि समग्र । अति अरुंवार आरोगूं ॥ २९ ॥ एक म्हणे या दोघांसी । धरोनि नेईन खरापासीं । तो रक्त देईल भगिनीसी । मांस त्यासी भोजना ॥ ३० ॥ ते दोघे आम्ही बहुत । विचार कायसा येथ । म्हणोनि राक्षस पिलंगत । आश्रमांत निघाले ॥ ३१ ॥ श्रीराम सीता लक्ष्मण । आश्रमीं नित्य सावधान । तंव चवदा राक्षस देखोन । श्रीरघुनंदन हांसिला ॥ ३२ ॥ श्रीराम म्हणे रे लक्ष्मण । राक्षस आले चवदा जण । एकेंचि बाणें घेईन प्राण । धनुष्यबाण दे वेगीं ॥ ३३ ॥ माझ्या बाणाचा महामारू । तुम्ही दोघे पहा सादरू । म्हणोनि उठिला श्रीरघुवीरू । धनुर्ध्यी शरू सज्जिला ॥ ३४ ॥ श्रीराम म्हणे राक्षसांसी । आम्ही गंगातीरीं तापसी । तुम्ही कां आलेति मारायासी । कोणें तुम्हांसी धाडिलें ॥ ३५ ॥ अरे तुम्ही दोघे जणीं । विटंबिली खराची भगिनी । तापसी म्हणोनि करितां ग्लानी । तुम्हांसी कोणी सोडीना ॥ ३६ ॥ तापसी आणि धनुष्यबाण । परस्त्रियेचें करावें विटंबन । धन्य धन्य तुमचें तापसपण । आपणा आपण लाजाना ॥ ३७ ॥ ऐसें बोलोनि समस्तीं । शस्त्रें सांडिलीं नेणों किती । बाप धनुर्वाडा श्रीरघुपती । हातींचे

१ कैवारानें. २ मोठ्या कौतुकानें. ३ कमलनेत्र. ४ काजवे. ५ लक्ष्मी. ६ तुलना, बरोबरी. ७ वैर. ८ रक्षणास. ९ रक्त पिण्याकरितां. १० मौजेनें, हौसेनें. ११ जेवूं. १२ पुढें पुढें धांवत.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

हातीं छेदिली ॥ ३८ ॥ श्रीरामबाणाच्या कडाडीं। राक्षसां वळली मुरकुंडी। डोळयां पडली झांपडी। केलीं बापुडीं क्षणामाजी ॥ ३९ ॥ हाटकपत्री घेवोनि बाण। चतुर्दशविधींचें विधान। अभिमंत्रोनि सोडितां बाण। घेतला प्राण चवदांचा ॥ ४० ॥ आतुर्बळें सोडिला शर। भेदोनि चवदांचें शरीर। धरणीं पाडिले महावीर। श्रीरामचंद्र निजविजयी ॥ ४१ ॥ भेदोनि चवदांचें शरीर। गगनीं परिभ्रमे शर। केउता त्रिशिरा दूषण खर। तेही सत्वर वधावया ॥ ४२ ॥ खर दूषण नाढळतां। बाण रिघाला श्रीरामभातां। हस्तलाघव श्रीरघुनाथा। देखोनि सीता विस्मित ॥ ४३ ॥ विस्मय करिती सुरवर। विस्मय करिती खेचर। श्रीराम स्वयें रणरंगधीर। एकांगवीर श्रीराम ॥ ४४ ॥ तंव चवदाजणांचे पाठीसीं। देखिलें नकटे शूर्पणखेसी। लक्ष्मण धांवला मारावयासी। तंव ते अति आक्रोशीं पळाली ॥४५॥ हा कां पडला माझे हटीं। मारूं धांवे देखतां दृष्टीं। धाकें पळतां उठाउठीं। धाक पोटीं न माये ॥ ४६ ॥ नकटें मुख घेवोनि येथ। प्रांशूं आमचें आली रक्त। बाणें करितां तिचा घात। धरिला हात श्रीरामें ॥ ४७ ॥ करूं नये स्त्रियेचा घात। हा तंव मुख्यत्वें शास्त्रार्थ। आणिक एक आहे वृत्तांत। सावचित्त अवधारीं ॥ ४८ ॥ जैसा सांडस भात्याजवळी। तापला घाली घायातळीं। तैसी शूर्पणखा कंकोळी[१]। राक्षसकुळीं घातकी ॥ ४९ ॥ इचेनि योगें जाण। वधिजेति रावण कुंभकर्ण। ईस न मारावें आपण। राक्षसदळण इचेनि ॥ ५० ॥ जेंवी दळणारी[२] जांत्यापासीं। वैरण घाली घांसोघांसीं। तेंवी शूर्पणखा आम्हांपासीं। राक्षसांसी वैरील ॥ ५१ ॥ पहिलें वैरण खर दूषण। दुसरें लंकेशप्रधान[३]। तिसरें वैरण कुंभकर्ण। चवथें जाण इंद्रजित[४] ॥ ५२ ॥ पांचवें वैरण जाण। सपुत्र सैन्येंसीं रावण। यासी शूर्पणखा कारण। सत्य जाण सौमित्रा ॥ ५३ ॥ ऐकोनि श्रीरामाचें वचन। सौमित्रें ठेविलें धनुष्यबाण। मस्तकीं वंदिले श्रीरामचरण। ज्ञान विज्ञानें[५] श्रीराम ॥ ५४ ॥ चवदा विद्यांसीं अविद्याच्छेद[६]। करोनि चवदाही परमानंद। श्रीरामाचा बाणबोध। परमात्मबोध प्रबोधी ॥ ५५ ॥ श्रीरामाचा निजबाण। देह छेदी हें नवल कोण। छेदोनियां जरा जन्म मरण। चवदाही जण सुखी केले ॥ ५६ ॥ संकल्पविकल्पें मन। छेदिलें चित्त चिंता चिंतन। छेदोनियां मानाभिमान। चवदाही जण सुखी केले ॥ ५७ ॥ छेदोनियां विषयज्ञान। छेदोनियां भवभान। छेदोनियां देहबंधन। चवदा जण सुखी केले ॥ ५८ ॥ छेदोनिया कर्माकर्मबंधन। छेदोनियां कार्य कारण। छेदोनियां सीतूंपण। चवदाही जण सुखी केले ॥ ५९ ॥ शूर्पणखेचें अभाग्य पूर्ण। नव्हेचि श्रीरामबाणें मरण। पळाली देहलोभा भेण। शंखस्फुरण[७] करीतचि ॥ ६० ॥ श्रीराम मोक्षाचें भरित। वैरी मारोनि करी मुक्त। नामें जडजीव उद्धरत। स्मरण निर्मुक्त श्वपचादि[८] ॥ ६१ ॥ एका जनार्दना शरण। यापरी मारिले चवदा जण। शूर्पणखा पळाली आपण। खर दूषण वधावया ॥ ६२ ॥

खरोक्तिः—

स पुनः पतितां दृष्ट्वा क्रोधाच्छूर्पणखां खरा।
उवाच व्यक्तया वाचा भगिनीं पुनरागताम् ॥ ६ ॥
मया त्विदानीं शूरास्ते राक्षसा रुधिराशिनः।
त्वत्प्रियार्थं विनिर्दिष्टाः किमर्थं रुद्यते पुनः ॥ ७ ॥

शंखस्फुरणें मारितां हांका। पळोनि आली शूर्पणखा। आड पडली खरादिकां। अधिकाधिक गांजिलें ॥ ६३ ॥ खरासी आला अति आवेश। चवदा आतुर्बळी राक्षस। रणरंगडे[९] रणकर्कश। तुज साह्यास म्यां दिधले ॥६४॥ कोपलिया चवदा जणीं। सुरनर कांपती चवदा भुवनीं। ते न येती माझ्या वचनीं। त्यांलागोनी तूं रडसी ॥ ६५ ॥ सांगतां चवदांचें गाऱ्हाणें। पुढती रडणें आड पडणें। तूं कां रडसी मजकारणें। येरी सांगे वृत्तांत ॥ ६६ ॥ तुझे चवदाही राक्षस। आतुर्बळी अति कर्कश। कातिया त्रिशूळ झेलती फरश। घेवोनि पट्टिश[१०] चालिले ॥ ६७ ॥ एक म्हणती गिळूं रामासी। एक म्हणती मारूं लक्ष्मणासी। एक मांसासी एक रुधिरासी। एक दोघांसी गिळूं पाहाती ॥६८॥

१ सोन्याच्या पिसाऱ्यांचा. २ राक्षसी. ३ रावणाचे प्रधान. ४ रावणाचा पुत्र. ५ अनुभवज्ञान. ६ अज्ञानाचा नाश. ७ शंख करीत. ८ चांडाळादि. ९ लढाईत मोठा पराक्रम करणारे. १० आयुधविशेष, ज्यास पट्टा म्हणतात.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

म्हणती शूर्पणखेसी । पाजूं दोघांच्या रुधिरासी । मग भक्षावें मांसासी । ऐसा राक्षसीं विवादू ॥ ६९ ॥ राहें साहें धीर वीर । घाय साहें परम शूर । ऐसा करिती गिरागजर । निशाचर लोटले ॥ ७० ॥ राक्षसां देखोनियां दिठीं । श्रीराम उठिला जगजेठी । धनुष्य वाहोनियां मुष्टीं । बाण गुणीं सज्जिला ॥ ७१ ॥ निर्दाळावया नक्षत्रांसी । सूर्य उगवे आकाशीं । तैसा चालिला सूर्यवंशी । राक्षसांसी निवटावया ॥ ७२ ॥ आम्ही बहुत श्रीराम एकला । क्षणार्धें मारूं रंकाला । ऐसें बोलोनि एक हेळां । श्रीरामासन्मुख लोटले ॥ ७३ ॥ श्रीराम देखोनि सबळ । शस्त्रें सोडिलीं प्रबळ । श्रीरामें छेदिलीं तत्काळ । केले सकळ निःशस्त्री ॥ ७४ ॥ विकट देवोनियां हांक । विक्राळ पसरोनियां मुख । श्रीरामा गिळावया देख । अवघे सन्मुख धांवले ॥ ७५ ॥ श्रीराम धनुर्धरशिरोमणी । एक बाण लावोनि गुणीं । चवदाही ओंविले बाणीं । न मागतां पाणी निमाले ॥ ७६ ॥ लक्ष्मण पडिला माझे हठीं । द्वंद्व चाळवूं आली नकटी । शस्त्र घेवोनि लागला पाठीं । आलें संकटीं पळोनि ॥ ७७ ॥ बाप लाघवी श्रीरघुनाथ । जिणोनि सकळ तुम्ही समस्त । तुमचा करोनियां घात । घेईल निश्चित जनस्थान ॥ ७८ ॥ श्रीरामाचा बाणक्रम । करील राक्षसांचें भस्म । तुमचे वाढिवेचा[3] भ्रम । करील निर्भ्रम श्रीराम ॥ ७९ ॥ ऐसें ऐकतांचि वचन । खर दुर्धर[4] कोपायमान । पाचारोनियां दूषण । रणनिशाण त्राहाटिलें ॥ ८० ॥ अति उद्भट निशाचर । सेनासंख्या चवदा सहस्र । रथीं बैसोनियां खर । अति सत्वर युद्धार्थी ॥ ८१ ॥ दक्षिणबाहूसीं दूषण । त्रिशिरा वामबाहूसीं जाण । खरापुढें चवघे जण । रणप्रवीण[5] महायोद्धे ॥ ८२ ॥ चवदा सहस्र निशाचरां- । -माजी निधडे वीर बारा । ज्यांचा सुरासुरां दरारा । इंद्र थरथरां ज्यांसी कांपे ॥ ८३ ॥ जे भ्यासुरत्वें जग दाटीत । क्रोधदृष्टीं वीर आटीत । लोहेंसीं मांस जे घोंटीत । आंवाळीं चाटीत रक्तपाना ॥ ८४ ॥ हाकें कांपती लोकालोक । विक्राळ दाढा विकट[6] मुख । जे भयानका भयानक । तिन्ही लोक गिळूं पाहती ॥ ८५ ॥ ऐसे दुर्धर्ष[7] दारुण । रणवेताळ रणप्रवीण । अवघियांपुढें बारा जण । कोण कोण ते ऐका ॥ ८६ ॥

दुर्गगामी पृथुबलो यज्ञशत्रुर्महाविषः ।
दुर्जयः परवीरघ्नः परुषः कालकार्मुकः ॥ ८ ॥
मेघमाली महाबाहुर्महास्यो लोहितांबरः ।
द्वादशैते महावीराः प्रतस्थुरमितः खरम् ॥ ९ ॥

पहिला दुर्गगामी तत्त्वतां । पृथुबळ आणि यज्ञभोक्ता । महाविष नामें चवथा । दुर्जय तो पांचवा ॥ ८७ ॥ परवीरघ्न आणि परुष । मेघमाली आणि काळकार्मुक । तैसा महाबाहु देख । अवघे अलोलिक महायोद्धे ॥ ८८ ॥ महास्य आणि लोहितांबर । दुःसह दुर्धर जुंझार वीर । यांचेनि बळें खर दुर्धर । सुरासुर गणीना ॥ ८९ ॥ यांचा भरंवसा खरासी । हे खराचे अति विश्वासी । यांचेनि बळें रावणासी । खर दृष्टीसीं आणीना ॥ ९० ॥ श्रीरामें मारिलें चवदा जणांसी । त्यांचे घ्यावया सूडासी । बाराही जण अति आवेशीं । युद्ध श्रीरामासीं करूं पाहती ॥ ९१ ॥ नराचें अंग खराचें मुख । यालागीं खर म्हणती देख । नाक पांढरें निःशेख । तेणें आवश्यक दूषण म्हणती ॥ ९२ ॥ दूषणाचे दुष्ट सांगाती । चौघे युद्धार्थी अनिर्वर्ती[8] । दूर पाहाती दूराकृती । विश्वासघाती ते ऐका ॥ ९३ ॥

महाकपालः स्थूलाक्षः प्रमाथस्त्रिशिरास्तथा ।
चत्वार एते सेनाग्रे दूषणं पृष्ठतोऽन्वयुः ॥ १० ॥

महाकपाल स्थूलनयन । प्रमाथी त्रिशिरा त्रिदशार्दन[9] । हे दूषणाचे जीवप्राण । चौघे जण विश्वासी ॥ ९४ ॥ यांचेनि बळें संपूर्ण । यमासी दृष्टी नाणी दूषण । घातपातीं रणप्रवीण । चौघे जण चालिले ॥ ९५ ॥ तिघे पुत्र एक समयेंसीं । जन्मावे आपुले कुशीं । एक बाण दिधलें तिघींसी । त्रिशिरा तिसी पुत्र जाला ॥ ९६ ॥ एवं त्रिशिरा खर आणि दूषण । एकत्र मिळोनि तिघे जण । श्रीरामासीं करावया रण । रथ संपूर्ण संजिले[10] ॥ ९७ ॥ सेनासंख्या चवदा सहस्र । त्यांत अनावर बारा वीर । चौघे रणघाती अति दुस्तर[11] । भार दुर्धर चालिला ॥ ९८ ॥ निशाणें त्राहाटिल्या भेरी । चोडकीं काहळा रणमोहरी । बुरंगांचे नादगजरीं ।

१ तोंडाची बडबड. २ मारावयास. ३ पराक्रमाचा. ४ अत्यंत. ५ रणशूर. ६ भयंकर, मोठें. ७ अनिवार. ८ मागें न हटणारे. ९ देवांचा नाश करणारे. १० तयार केले. ११. जिंकण्यास कठीण.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

केला वीरीं सिंहनाद ॥ ९९ ॥ हयकार थयकार जयकार । भाट गर्जती कैवार । खरासी उल्लास अपार । रथ सत्वर प्रेरिला ॥ १०० ॥ सुभूमीसी समस्थळी । घोडे अडखळले महाबळी । नेटें वळलीं भूतळीं । सारथी तळीं उलंडले ॥१॥ तंव त्याच गजबजे माझारीं । दिवाभीत ध्वजस्तंभावरी । बैसोनियां घूं घूं करी । हांकितां वरी उडेना ॥ २॥ अपशकुन आत्यंतिक । खर जाला साशंक । दचकलें त्याचें कटक । अवघे लोक गजबजिले ॥ ३ ॥ ध्वजींचे उलूकें झडपोनि तेथ । खराचे कपाळीं केलें क्षत । भूकंप भूस्फोट उल्कापात । अशनिर्घात होंसरला ॥ ४ ॥ ऐसा जाला चमत्कार । निशाचरीं केला हाहाकार । एकाएकीं चिंतातुर । जाले समग्र एकभूत ॥ ५ ॥ खर होवोनि सावचित्त । सांवरोनियां निजरथ । आपुला पुरुषार्थ बोलत । महोत्पात मज मिथ्या ॥ ६ ॥

तानेवौत्पातिकान् रामः सह भ्रात्रा ददर्श ह ।
महोत्पातानिमान् घोरानुत्थितान् घोरदर्शनान् ॥ ११ ॥

अपशकुन देखोनि दृष्टीं । मागें सरों दों मनुष्यांसाठीं । हे सर्वथा बुद्धि खोटी । आम्ही जगजेठी दृढ योद्धे ॥ ७ ॥ नाहीं परचक्र दारुण । राजकुमर दोघे जण । त्यांसाठीं अपशकुन । मानी कोण आम्हांमाजी ॥ ८ ॥ ऐसें बोलोनियां खर । रथ प्रेरिला सत्वर । उल्लासले निशाचर । भार दुर्धर चालिला ॥ ९ ॥ शूर्पणखेसी म्हणे खर । श्रीरामलक्ष्मणांचें रुधिर । तुज मीं पाजीन अपार । हर्षें निर्भर ते जाली ॥११०॥ द्वंद्व साधावयाच्या कैवाडें । अशुद्ध प्राशावयाचे चाडें । शूर्पणखा बंधुलळिवाडें । अवघियांपुढें निघाली ॥ ११ ॥ देखोनियां पंचवटी । राक्षसवीर जगजेठी । शस्त्रें सज्जोनियां मुष्टीं । सक्रोधदृष्टी चालिले ॥१२॥ श्रीरामासवें ऋषिजन । वनवासी तपोधन । राक्षसभयें गेले पळोन । जाले सुलीन गुंफेमाजी ॥ १३ ॥ मग श्रीराम म्हणे लक्ष्मणासी । सावधान राहें सीतेपासीं । मी वधीन राक्षसांसी । बाण सपिच्छी भेदून ॥ १४ ॥ माझे सुटलिया कुन्हाडें । राक्षस पळतील कवणीकडे । घायें विभांडीन बापुडे । रणीं रोकडे पाडीन ॥ १५ ॥ वायु अनुकूळ आम्हांसी । प्रतिकूळ राक्षसांसी । शिवा सन्मुख भुंकती त्यांसी । जयो आम्हांसी वदताती ॥ १६ ॥ ऐसें बोलोनियां जाण । वेगीं धनुर्ष्यीं वाहिला गुण । सन्मुख होवोनि आपण । सीतीं बाण सज्जिला ॥ १७ ॥ विदारावया गजगण । एकला उठे पंचानन । तैसें विध्वंसावया राक्षससैन्य । श्रीरघुनंदन चालिला ॥ १८ ॥ निर्दाळावया खद्योतासी । सूर्य उगवे आकाशीं । तैसा श्रीराम सूर्यवंशीं । राक्षसांसी अंतक ॥ १९ ॥ सूर्योदयीं खद्योत मावळती । शशी चंद्र नक्षत्रें अस्ता जाती । तेंवी सेना निर्दाळितां श्रीरघुपती । रणीं निमती खरादिक ॥१२०॥ सीता पाहे श्रीरामझुंज । तिचें लक्ष्मणासी चोज । चढविली श्रीरामसेज । रणसमाज देखावया ॥ २१ ॥ कवित्वमुद्रा अनारिसी । सीता सौमित्र धाडिलीं गुंफेसी । श्रीराम न भी राक्षसांसी । तो कां तियेसी लपवील ॥ २२ ॥ श्रीराम बाण ओढितां ओढी । राक्षससेना ते हडबडी । एकामागें एक दडी । देवोनि बापुडीं राहिलीं ॥ २३ ॥ श्रीराम देखतांचि दृष्टीं । थरकांप सुटला पोटीं । मूत्रप्रवाह तळवटीं । शस्त्रें मुष्टीहूनि गळताती ॥२४॥ व्याघ्र देखोनियां डोळां । भयें अजा होती गोळा । तैसें जालें राक्षसां सकळां । श्रीराम मरगळा देखोनी ॥ २५ ॥

सैन्यं तु स्थितमालोक्य निश्चलं पर्वतोपमम् ।
पार्श्वस्थं दूषणं क्रुद्धं खरो वचनमब्रवीत् ॥ १२ ॥

राक्षससैन्य दुर्धर प्रबळ । राहिलें देखोनि निश्चळ । खरासी कोप आला प्रबळ । बोले तत्काळ दूषणासी ॥ २६ ॥ आमचा सैन्यसंभार । निश्चळ दिसे पर्वताकार । पुढें न दिसतां दुस्तर । सैन्य एकत्र कां जालें ॥ २७ ॥ सावज देखोनियां दृष्टीं । जेंवी अजा होती एकवटी । तेंवी सैन्य थोकलें पृष्टीं । पुढें वाट कां फुटेना ॥ २८ ॥ ऐसें खरवचन ऐकोनि स्पष्ट । मग दूषण चालिला घडघडाट । त्याच्या रथासी न फुटे वाट । सैन्य सकट कोंदलें ॥ २९ ॥ रथीं वीर गर्जती पूर्ण । परी पुढें न चालती गेलिया प्राण । सेनामुखीं येतां दूषण । तंव श्रीरघुनंदन देखिला ॥ १३० ॥ मुकुट कुंडलें रत्नमेखळा । टिळक रेखिला पिंवळा । आजानु-

१ पृथ्वी दुभंगणें. २ तारे पडणें. ३ विजा पडणें. ४ हेतूनें, कैवारानें. ५ रक्त. ६ लपले. ७ मारीन. ८ कोल्ही. ९ दोरी चढविली. १० धनुष्यावर. ११ संहारक, मोठा शूर. १२ सेनासमुदाय.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

बाहु घनसांवळा । कमळमाळा शोभती ॥ ३१ ॥ तडित्प्राय[1] कांस गोमटी । अंगीं चंदनाची उटी । धनुष्यबाण सज्जोनि मुष्टीं । उभा जगजेठी रणरंगीं ॥ ३२ ॥ पाउलें आरक्त सुकुमार । वांकी अंदुवांचा गजर । नादें कांपती सुरासुर । त्यासमोर कोण राहे ॥ ३३ ॥ देखतां चळीं कांपे दूषण । सुटलिया श्रीरामाचा बाण । अवश्य घेईल माझा प्राण । आला पळोन खरापासीं ॥ ३४ ॥ सेनामुखीं श्रीरघुनाथ । जैसा कोपला कृतांत । सैन्य चळचळां कांपत । त्यासीं पुरुषार्थ चालेना ॥ ३५ ॥ प्रळयाग्नीच्या जैशा शिखा[2] । तैसे त्याचे बाण देखा । दृष्टीनें जाळूं पाहे कटका[3] । श्रीराम नेटका झुंजार ॥ ३६ ॥ दृष्टीनें देखतांचि जाण । जीवासी जीवें मारी संपूर्ण । त्यापुढें राहील कोण । अरिमर्दन श्रीराम ॥ ३७ ॥ श्रीराम देखतांचि जाण । आपभयें पळे प्राण । मग तेथें केउती आंगवण । रणगर्जन श्रीराम ॥ ३८ ॥ ऐकोनि दूषणाची मात । पहावया श्रीरघुनाथ । खरें प्रेरिला पैं रथ । अति गर्वित युद्धार्थी ॥ ३९ ॥ एका जनार्दना शरण । श्रीरामराक्षसां घोर रण । राम करील राक्षसकंदन । श्रोतीं अवधान मज द्यावें ॥ १४० ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे अरण्यकांडे एकाकारटीकायां खरदूषणश्रीरामयुद्धप्रारंभो नाम नवमोऽध्यायः ॥ ९ ॥ ओंव्या ॥ १४० ॥ श्लोक ॥१२॥

अध्याय दहावा

श्रीरामचंद्राय नमः ॥ युद्धार्थी चालिला खर । देखोनि उभा श्रीरघुवीर । अवघे खवळले निशाचर । शस्त्रसंभार सूटले ॥ १ ॥

ततस्ते क्रूरकर्माणं क्रुद्धाः सर्वे निशाचराः ।
रामं नानाविधैः शस्त्रैरभ्यवर्षन्त दुर्जयम् ॥ १ ॥

श्रीराम रणरंगधीर । क्रूरकर्मी निशाचर । मिळोनि समग्र सैन्यसंभार । शस्त्रें अपार वर्षले ॥ २ ॥ गदा मुद्गल तोमर त्रिशूळ । परशु पट्टिश महाशूळ । कातिया कुऱ्हाडी परिघ मुसळ । लहुडी स्थूळ महाघात ॥ ३ ॥ खड्ग हाणिती खणखणां । बाण सुटती सणसणां । वोडणें[4] वाजती दणदणां । लागली निशाणां एक घाई ॥ ४ ॥ श्रीराम एकाकी एकला । गेला तुटला निवटला । शस्त्रसंपातीं[5] आटला । म्हणती निमाला निःशेष ॥ ५ ॥ एक म्हणती खंडविखंड[6] । एक म्हणती नवखंड । एक म्हणती शतखंड । शस्त्रीं उदंड दंडिला ॥ ६ ॥ महावीरांचा घडघडाट । आणि शस्त्रांचा कडकडाट । नाहीं पळावयालागीं वाट । झाला सपाट श्रीराम ॥ ७ ॥ रुधिर प्राशावया अति प्रीतीं । शूर्पणखा तेथें आली होती । तिच्या तोंडीं पडली माती । अशुद्ध[7] क्षितीं आटलें ॥ ८ ॥ श्रीराम निमाला निःशेष । वृथा घाय हाणिती राक्षस । रणकांविरें[8] लागलें त्यांस । ऐसें बहुवस जल्पती ॥ ९ ॥ जेंवी पर्जन्याच्या धारा । झांकोळती गिरिवरा । तेंवी झांकिलें श्रीरामचंद्रा । शस्त्रसंभारीं राक्षसीं ॥ १० ॥ श्रीराम चित्पर्वत अमोघ । राक्षस मंडळी महामेघ । शस्त्रधारांनीं झांकोळलें सर्वांग । लौकिकीं साङ्ग दिसेना ॥ ११ ॥ श्रीराम चिदादित्य तेज गाढें । राक्षससेना तें महामेहुडें[9] । झांकोळला चहूंकडे । तें यश मूढें मिरविती ॥ १२ ॥ जेंवी हृदयीं आत्मा गुप्त । कीं अभ्रांमाजी[10] भास्वंत । तेंवी शस्त्रांमाजी श्रीरघुनाथ । सावचित्त धनुष्येंसीं ॥ १३ ॥ झांकोळिल्या अभ्रघन । जेंवी तोडी प्रभंजन । तेंवी राक्षसशस्त्रांतें छेदोन । राम चिद्भानु प्रकटला ॥ १४ ॥ देखोनि राक्षसांचें बळ । रामें सोडिलें शरजाळ । त्यांचीं शस्त्रें छेदोनि सकळ । वीर प्रबळ खोंचले ॥ १५ ॥ एक बाण ओढितां ओढी । बाण सुटती लक्षकोडी । शत्रूंचीं शस्त्रें छेदोनियां गाढीं । वीरमुरकुंडी पाडिल्या ॥ १६ ॥ उरीं शिरीं दोहीं करीं । बाण भेदले भुजांवरी । सपिच्छी बुडाले शरीरीं । वीरां महामारी श्रीराम ॥ १७ ॥ वल्गती मेला गेला निमाला । तंव तो श्रीराम दादुल्यांचा दादुला । वीरां निवटीत उठिला । अंत पुरला राक्षसांचा ॥ १८ ॥ करूं जातां राक्षस घाता । शस्त्रें छेदोनि तोडी हाता । वीर मिरविती पुरुषार्था । तंव करी निःपाता बाणाग्रें ॥ १९ ॥ मागें वीर सरों जातां । तंव बाण वाजती त्यांचे

---

१ विजेसारखी. २ ज्वाळा. ३ सैन्याला. ४ ढाली. ५ शस्त्रप्रहारांनीं. ६ तुकडे तुकडे. ७ रक्त. ८ रणसंबंधीं वेड. ९ मोठा मेघ. १० ढगांत. ११ सूर्य. १२ वारा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

माथां। सन्मुख होतां श्रीरघुनाथा। जीवघाता करीतसे ॥ २० ॥ राहें साहें वीर गर्जत। त्यांची जिव्हा छेदी सदंत। ऐसा बाणें मांडिला आकांत। वीर विख्यात श्रीराम ॥ २१ ॥ कंकपत्र बर्हपत्र। हंसपत्र सुवर्णपत्र। बाणीं भेदिले वीर विचित्र। रणीं मयूर नाचती ॥ २२ ॥ भोंवता बाणांचा वळसा। सैन्य पाडिलें धारसा। महावीर पावले त्रासा। उरी राक्षसां उरों नेदी ॥ २३ ॥ श्रीरामाचा निजबाण। राक्षसरुधिरीं करोनि स्नान। देतसे मोक्षाचें दान। पापी पावन त्याचेनि ॥ २४ ॥ श्रीराम रणरंगधीर। राक्षससैन्या केला मार। रणीं उठिला हाहाकार। देखोनि खर कोपला ॥ २५ ॥

तं दृष्ट्वा सगुणं चापमुद्यम्य खरनिःस्वनम्।
रामस्याभिमुखं सूतं चोद्यतामित्यचोदयत् ॥ २ ॥
स खरस्याज्ञया सूतस्तुरगान् समचोदयत्।
यत्र रामो महाबाहुरेको धुन्वन् धनुः स्थितः ॥ ३ ॥

देखोनि श्रीरामपुरुषार्थ। खर सारथियातें म्हणत। वेगें प्रेरीं गा माझा रथ। जेथें रघुनाथ रणरंगीं उभा ॥ २६ ॥ कोप चढला चतुर्गुण। वेगें धनुष्या वाहिला गुण। आजी रामासीं करीन रण। आंगवण पहा माझी ॥ २७ ॥ देखोनि धुरेचा कडकडाट। सारथियें वारुवां दिधला साट³। रथ चालिला घडघडाट। तंव देखिला पुढें उद्भट श्रीराम ॥ २८ ॥ आजानुबाहु धनुर्धारी। वीरांतें करीत महामारी। असो खर देखोनि रेंहंवरीं। श्रीराम टणत्कारी धनुष्यातें ॥ २९ ॥ श्रीरामधनुष्याच्या टणत्कारें। दुमदुमिलीं गिरिकंदरें। नादें कोंदलें अंबर। निशाचरें भयभीत ॥ ३० ॥ एक नादें जालीं वेडीं। एक तीं केवळ बापुडीं। एकांची वळली मुरकुंडी। नादें पाडापाडी मांडिली ॥ ३१ ॥ ऐसा देखोनि श्रीरघुवीर। खरासी ओढवलें दुस्तर। त्याचे कैवारी अति दुर्धर। बाराही वीर धांविन्नले ॥ ३२ ॥ नांवानिगे राक्षसांत। ज्यांसी नित्य कांपिजे कृतांत। तिंहीं पडँखळिला रघुनाथ। स्वामिकार्यार्थ दृढयोद्धे ॥ ३३ ॥ वोडण खांडे घेवोनि जाण। उग्रनामा आला आपण। स्वामिकार्यीं वेंचावया प्राण। रणप्रवीण बाराही ॥ ३४ ॥ पृथुलव यज्ञभंक्ता। महाविष दुर्जय चौथा। धनुष्यबाण सज्जोनि हातां। युद्धीं रघुनाथा सन्मुख ॥ ३५ ॥ परवीरघ्न पुरुषबळी। काळकार्मुक मेघमाळी। चवघे वीर आर्तुर्बळी। शूळत्रिशूळी महायोद्धे ॥ ३६ ॥ महाबाहु लोहितांबर। महाआस्य अति दुर्धर। गदा मुद्गल घेवोनि तोमर। रणीं रघुवीर पडँखळिला ॥ ३७ ॥ गदा मुद्गल परशु पट्टिश। बाण मोकलिले बहुवस। शस्त्रें सोडिलीं असमसाहस। श्रीराम राजस देखोनी ॥ ३८ ॥ बारा जण कपटराशी। म्हणोनि आवडती खरासी। कैसें कपट तयांपासीं। सावकासीं अवधारा ॥ ३९ ॥ गुप्तघाती आकाशपाती। एक ते अतर्क्यविघाती। एक मारक निमेषस्थिती। प्राणवृत्ति पांचवी ॥ ४० ॥ संचरोनि नेत्रांतरीं। शूळें जिव्हार विदारी। एक रिघोनि कर्णकुहरीं। वर्मीं मारी शस्त्रातें ॥ ४१ ॥ एक तो खड्ग हातवंसी। अंतरीं संचरे मनोवेगेंसीं। शस्त्रें हाणोनि हृदयासी। मारी वीरांसी अति दुष्ट ॥ ४२ ॥ तों चौघे उरले कपटराशी। वीर वेढोनि चौपासीं। गुप्तशस्त्रें कासाविसी। करोनि वीरांसी मारिती ॥ ४३ ॥ ऐसे हे वीर बारा जण। कपटयोद्धे प्रवीण। रामासी मारावया जाण। अवघे जण चालिले ॥ ४४ ॥ त्यांचा धरोनि आधार। चालिला राक्षसांचा संभार। धरा मारा गर्जती थोर। श्रीरामासमोर लोटले ॥ ४५ ॥ श्रीराम धनुर्धारी विचक्षण। मारावया बारा जण। दमनी निजशक्ती दारुण। अभिमंत्रोन सोडिली ॥ ४६ ॥ कपटी निर्दाळावया निश्चितीं। अनिवार शस्त्र दमनी चिच्छक्ती। रामें सोडिली अलक्षगती। शस्त्रें ख्याती लाविली ॥ ४७ ॥ दमनी चिच्छक्ति देखोनी। कपटियां पडिली मोहिनी। जाली बाराही जणां भंगाणी। प्रताप रणीं चालेना ॥ ४८ ॥ बाण भरले नाकीं वदनीं। बाण भरले कानीं नयनीं। बाण भरले हृदयभुवनीं। बाणीं खिळोनी पाडिले ॥ ४९ ॥ श्रीरामाच्या बाणांपुढें। केउते

१ तीव्र बाणांनीं. २ हांक, सोड. ३ चाबुक. ४ रथांत. ५ प्रसिद्ध नांवाजलेले. ६ यम. ७ गांठला. ८ अति बळवान्. ९ हातांत घेतो. १० ज्ञानशक्ति. ११ नाश.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

पळतील बापुडे । वाट न दिसे मागेंपुढें । जीवीं कुऱ्हाडे पैं भेदिले ॥ ५० ॥ वोडणें[1] खिळिलीं उरांसीं । कटी छेदिल्या कटारांसीं । शिरें छेदिलीं मुकुटांसीं । हात शस्त्रेंसीं छेदिले ॥ ५१ ॥ छेदिले स्थूळ लिंग[2] कारणें । श्रीरामें छेदिले महाकारण । जीवें मारोनि संपूर्ण । बाराही जण निर्दळिले ॥ ५२ ॥ कपटें जिंतितां श्रीरामासी । कपटें मारिलें कपट्यांसी । श्रीराम प्रतापाची राशी । राक्षसांसी नाटोपे ॥ ५३ ॥ करोनि वारांचा निःपात । मग मिसळला सैन्यांत । भोंवता बाणांचा आवर्त[3] । आला अंत राक्षसांसी ॥ ५४ ॥ रणीं खवळला श्रीरघुनाथ । अनिवार बाणसंपात[4] । जेथींचा तेथें राक्षसघात । रणीं आवर्त वीरांसी ॥ ५५ ॥ एक खोंचले सन्मुख घायीं । एक पडिले ठायींच्या ठायीं । एक सपाट छेदोनि पायीं । पडिल्या भुई वीरश्रेणी ॥ ५६ ॥ शिरें छेदोनी चेंडूफळी करणें । खेळतु रुधिराचें शिंपणें । रणवसंतु माजवणें । किंशुकें[5] फुलणें बाणांचें ॥ ५७ ॥ वीर कुंथती अपार । तेचि कोकिळापंचमस्वर । श्रीरामें केला महामार । लहान थोर कुंथती ॥ ५८ ॥ न साहवती श्रीरामबाण । राक्षससेना पलायमान । देखोनि धांविन्नला दूषण । आश्वासून सैन्यातें ॥ ५९ ॥

तान् सर्वान् धनुरादाय समाश्वास्य च दूषणः ।
अभ्यधावत् सुसंक्रुद्धः क्रुद्धं क्रुद्ध इवान्तकः ॥ ४ ॥
निवृत्तास्तु पुनः सर्वे दूषणाश्रयनिर्भयाः
राममेवाभ्यधावन्त सालतालशिलायुधाः ॥ ५ ॥

दूषण म्हणे राक्षसदळा । रण देखोनि केंवी पळा । आश्वासोनियां सकळां । सन्नद्ध केला दळभार ॥ ६० ॥ दूषण अवलोकी राक्षसांसी । म्हणे तुम्हीं राहावें माझे पाठीसीं । मी वधीन श्रीरामासी । अति आवेशीं धांविन्नला ॥ ६१ ॥ धरोनि दूषणाचें बळ । परतलें राक्षसदळ । श्रीरामशस्त्रें छेदावया सकळ । शाळतालशिळायोद्धे[6] ॥ ६२ ॥ श्रीरामासीं युद्ध करी दूषण । राक्षस वर्षती पाषाण । शाळतालवृक्ष जाण । अति सत्राणें हाणिती ॥ ६३ ॥ श्रीराम रणरंगीं प्रवीण । लाघवें[7] वर्षे बाण । तोडून शाळ ताळ पाषाण । बाणें दूषण केला कासाविस ॥ ६४ ॥ एक निवारी जंव बाण । तंव लक्ष येती आन । धनुष्य पाडिलें तोडून । भाते झाडून पाडिले ॥ ६५ ॥ बाणांमागें येती बाण । घेतला राक्षसांचा प्राण । मूर्च्छित पाडिला दूषण । रणकंदन वीरांसी ॥ ६६ ॥ केव्हां भात्याचा बाण काढी । केव्हां जोडी केव्हां सोडी । अलक्ष्य लक्ष्यांची पॅरवडी । रणीं कॅरवडी पाडिली ॥ ६७ ॥ वीर खोंचले वितंड । मिथ्या दूषणाचें बळ बंड । एकही साहों न शके कांड[9] । काळें तोंड दूषणाचें ॥ ६८ ॥ ऐकोनि वीरांचें वचन । दूषण झाला लज्जायमान । सामर्थ्यें मूर्च्छा सांवरोन । रथारोहण तेणें केलें ॥ ६९ ॥

राक्षसांस्तात्रणे भग्नान् दृष्ट्वा रामेण धीमता ।
रथस्थो दूषणो रामं शरवर्षैरवाकिरत् ॥ ६ ॥

राक्षससेना देखोनि भग्न । दूषण झाला कोपायमान । रागें रथावरी वैसोनि जाण । वर्षे बाण अनिवार ॥ ७० ॥ शतसहस्र लक्षकोडी । बाणामागें बाण सोडी । श्रीराम निमेषार्धें तोडी । धनुष्य पाडी छेदोनी ॥ ७१ ॥ क्रोधें तप्त झाला दूषण । शक्ति गदा पडताळोन । सवेंचि रामें दहा बाण । अति दारुण सोडिले ॥ ७२ ॥ चारी वारू चहूं बाणीं । विंधोनि पाडिले धरणीं । तोडोनि सांटें चाकें दोनी । तीन बाणीं छेदिलीं ॥७३॥ एकें ध्वज पाडिला क्षितीं[11] । एकें रथ एकें सारथी । श्रीरामें लाविली ख्याती । केला विरथी दूषण ॥ ७४ ॥ छेदोनियां रथ सारथी । रणीं दूषण केला पदाती[12] । कोपें गदा घेवोनि हातीं । श्रीरामाप्रती धांविन्नला ॥ ७५ ॥ जाणोनि राक्षसांच्या अति मदा । मिरविशी यशाच्या आनंदा । माझी साहें पाहें गदा । तरी मी योद्धा तुज मानीं ॥ ७६ ॥ दूषणासीं करितां रण । रणीं रामाचा घेईन प्राण । झाडीन वाढिवेचा[13] अभिमान । गदा घेवोन चालिला ॥ ७७ ॥ श्रीराम म्हणे नांव दूषण । सांगतां न लाजसी आपण । दूषण खरासी भूषण । निंद्य वदन दोघांचें ॥ ७८ ॥ धर्मै दूषण कर्मै

१ ढाला. २ चार प्रकारचे देह. ३ वेढा. ४ बाणप्रहार. ५ पळस. ६ शाळवृक्ष, ताळवृक्ष व पाषाण घेऊन लढणारे. ७ बाणविषय राक्षसांची रांग. ८ कचरा.

९ बाण. १० धुरा. ११ पृथ्वीवर. १२ पायीं चालणारा. १३ पराक्रमाच्या मोठेपणाचा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

दूषण । नामें दूषण कामें दूषण । दूषणासी बळ दूषण । आंगवण तुज कैंची ॥ ७९ ॥ दूषण म्हणे जल्पसी किती । गदा घेवोनियां हातीं । पतंग धांवे दीपाप्रती । तैसे गर्ती धांवला ॥ ८० ॥ गदा हाणितांचि दारुण । विंधोनि सुवर्णपत्री बाण । श्रीरामें गदा केली शतचूर्ण । रागें दूषण दांत खाय ॥ ८१ ॥ दांत खावोनि करकरां । शूळ घेवोनि धांवे सामोरा । घायें मारीन रघुवीरा । क्रोधें थरथरां कांपत ॥ ८२ ॥ बाण सोडोनि तिधारा । शूळ उडविला अंबरा । करोनियां शकलें बारा । श्रीराम निशाचरावरी पाडी ॥ ८३ ॥ श्रीरामें सर्व शस्त्रें केलीं मोघें[1] । देखोनि दूषणा आला राग । वज्रप्राय घेतला परिघ । अति दुर्धर रणमारा ॥ ८४ ॥ वीरभद्राचें वरेंद[2] पूर्ण । परिघ सोडिल्या हरी प्राण । त्यासी न चले निवारण । तें निर्वाण शस्त्राचें ॥ ८५ ॥ अष्टौ घंटा घवघवीत । वीररक्तें अति आरक्त । दूषण धांवे परिघहस्त । श्रीरघुनाथ वधावया ॥ ८६ ॥ परिघ देखोनि अनिवार । स्वर्गीं देवां हाहाकार । सुरनरांलागीं विचार थोर । कैंवी रघुवीर वांचेल ॥ ८७ ॥ श्रीराम धनुर्वाडा निजगडी । दूषण परिघ जंव सोडी । तंव परिघैंसीं[3] बाहु खुडी । बाण निर्वेडीं विंधोनी ॥ ८८ ॥ परिघासह बाहु खुडून । तोचि परतोनियां बाण । हृदयीं भेदोनियां पूर्ण । रणीं दूषण पाडिला ॥ ८९ ॥ दूषण पडतां भूमिगत । परिघें वरिला श्रीरघुनाथ । येवोनि राहिला भात्याआंत । रणीं प्रमाथ वधावया ॥ ९० ॥ वीरभद्रशस्त्रदेवता । तीही प्रसन्न श्रीरघुनाथा । अमोघ[4] परिघ आला हाता । रणीं प्रमाथा वधावया ॥ ९१ ॥ दूषण पडतांचि रणीं । हाहाकार गर्जे गगनीं । धाकें कांपती वीरश्रेणी । श्रीराम रणीं रणरुद्र ॥ ९२ ॥ रणीं पडतां दूषण । त्याचे कैवारी तिघे जण । श्रीरामासीं करावया रण । अति दारुण चालिले ॥ ९३ ॥ महाकपाळ आणि स्थूळाक्ष । तिसरा प्रमाथी राक्षस । युद्धीं हांकिंती[5] श्रीरामास । अति कर्कश चालिले ॥ ९४ ॥ राक्षसांमाजी अति दुर्धर । शूळ पट्टिश परशु थोर । तिघां हातीं हतियार । श्रीरामासमोर लोटले ॥ ९५ ॥ आम्हुचा स्वामी पाडिला ठायीं । तुजही पाडूं शस्त्रघायीं । शस्त्रें सोडिलीं लवलाहीं । त्रिपुटी पाही तिघांची ॥ ९६ ॥ एक तो चालिला सन्मुख । एक पाठीसी हाणी विमुख । एक तो आकाशीं देख । शस्त्रें अनेक वर्षती ॥ ९७ ॥ श्रीराम पाठिमोरा देखणा । हें विंदान न कळे कोणा । विंधोनियां विकट बाणा । आणिला रणा प्रमाथी ॥ ९८ ॥ हातीं घेवोनियां शूळ । सन्मुख आला महाकपाळ । शूळ छेदोनि तत्काळ । कंठनाळ निर्वटिलें[6] ॥ ९९ ॥ गगनीं गर्जतां स्थूळाक्ष । त्याचे बाणीं छेदोनि अक्ष[7] । तळीं पाडोनियां देख । घायीं निःशेख मारिला ॥ १०० ॥ वक्री शनि भौम केतु । सूर्योदयीं होती अस्तु । तैसा राक्षसांसी अंतु । श्रीरघुनाथु रणरंगीं ॥ १ ॥ गृहस्थ अतिथी दे सन्मान । तैसेंचि श्रीराम आपण । तिघां देवोनि शरासन । तिघे जण सुखी केले ॥ २ ॥ सुवर्णपत्री सोडोनि शर । प्रमथा मथन केलें थोर । दहा बाणीं त्रासिले महावीर । निशाचरें पळताती ॥ ३ ॥ एके बाणें शतानुशत वीर । पांच बाणीं मारी सहस्र । दहा बाणीं दहा सहस्र । घोरांदर राक्षसां ॥ ४ ॥ सकुंडल छेदोनि शिर । आयुधांसहित तोडिले कर । कवचेंसीं भेदिलें शरीर । पाडिले वीर ब्रीदाचे ॥ ५ ॥ बाबरझोटीचे अपार । बाणीं पाडिले महावीर । वाहती रुधिराचे पूर । श्रीरामचंद्र क्षोभला ॥ ६ ॥ श्रीरामबाणांच्या कडाडीं । राक्षसें पळती भयें बापुडीं । अति दीन होवोनि वेडीं । बाणझडाडीं चरफडती ॥ ७ ॥

चतुर्दशसहस्राणि रक्षसां भीमकर्मणाम् ।
हतान्येकेन रामेण मानुषेण पदातिना ॥ ७ ॥

रथेंवीण पायीं रघुवीर । चवदा सहस्र निशाचर । रणीं मारिले अति दुर्धर । जयांसी सुरनर कांपती ॥ ८ ॥ राक्षसांमाजी[8] बळी दूषण । त्यासी भीतसे रावण । परिघ अनिवार दारुण । रामें आपण निर्दळिला ॥ ९ ॥ रणीं निर्दळिले निशाचर । दूषण मारिला महावीर । श्रीराम धनुर्वाडा[9] दुर्धर । कोण समोर राहील ॥ ११० ॥ राक्षसां जाला थोर मार । कोपें चालिला पैं खर । त्रिशिरा

१ निष्फळ. २ वरदान. ३ कौशल्यानें. ४ निष्फळ न होणारा. ५ बोलाविती. ६ तोडून टाकिलें. ७ डोळे. ८ राक्षस. ९ धनुर्विद्यानिपुण.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

कोपला दुर्धर। तेणें रघुवीर पडखळिला ॥ ११ ॥ करोनियां राक्षस घाता। केउता जासील तूं आतां। राहें साहें श्रीरघुनाथा। शस्त्रसंपाता पेटला ॥ १२ ॥ निर्दळोनियां निशाचरां। रणीं पाडोनियां मुख्य धुरा। गर्वें धरिसी श्रीरघुवीरा। तो मी त्रिशिरा झाडीन ॥ १३ ॥ श्रीरामत्रिशिरां झाली भेटी। दोघे महा क्रोधदृष्टी। दोघीं धनुष्य वाहोनियां मुष्टीं। दोघेही हट्टी महावीर ॥ १४ ॥ एका जनार्दना शरण। त्रिशिऱ्याचें युद्ध दारुण। श्रीरामरण अति पावन। मोक्षसाधन साधका ॥ १५ ॥ श्रीरामकथेचें अक्षर। क्षराक्षरातीत पर। मुक्त करावया निशाचर। कृपेनें दुर्धर कोपला श्रीराम ॥ १६ ॥ श्रीरामकथा पवित्र तीर्थ। श्रोते वक्ते नित्यमुक्त। एका जनार्दनीं निर्मुक्त। कथामृत श्रीराम ॥ ११७ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे अरण्यकांडे एकाकारटीकायां दूषणवधो नाम दशमोऽध्यायः ॥ १० ॥ ओंव्या ॥ ११७ ॥ श्लोक ॥ ७ ॥

अध्याय अकरावा

श्रीरामचंद्राय नमः। श्रीरामें मारिल्या ससैन्य धुरा। तेणें दुर्धर कोप आला खरा। त्यासी पुसोनियां त्रिशिरा। श्रीरामचंद्रावरी आला ॥१॥ खर म्हणे त्रिशिऱ्यासी। रणीं मर्दिलें दूषणासी। म्हणोनि भिवों नको रामासी। तुझे पाठीसीं मी आहें ॥ २ ॥ मनुष्य खाँजें राक्षसांसी। त्याचें भय काय आम्हांसी। कांटे देखोनि फणसासी। खाणारासी भय नाहीं ॥ ३ ॥ चिरोनि फणसाचे कांटे। काढोनि अमृताचे सांठे। मग सेविती घटघटें। युद्धसंकटें तेंवी श्रीराम ॥ ४ ॥ श्रीराम बाणकंटकेंसीं। अति दुर्धर राक्षसांसी। तो गोड भक्षितां आम्हांसी। रणीं रामासी निर्दाळीं ॥ ५ ॥ ऐकोनि खराचें वचन। दुसरा खर भुंके जाण। तैसा त्रिशिरा आपण। करी गर्जन तिहीं मुखीं ॥ ६ ॥ वेगीं बैसोनियां रथा। राहें साहें म्हणे रघुनाथा। धनुष्य मर्दोनियां हाता। होय वर्षता बहु बाण ॥ ७ ॥

ततः प्रहृष्टस्त्रिशिराश्चापमुद्यम्य वीर्यवान्
गच्छ युद्धचेत्यनुज्ञातो राघवाभिमुखो ययौ ॥ १ ॥

खरासी म्हणे त्रिशिरा। कोण पाड रणीं रघुवीरा। बाणीं खिळोनि करीन पुरा। शस्त्रसंभारा तूं पाहें ॥ ८ ॥ मग त्रिशिरा म्हणे श्रीरघुनाथा। वधोनि राक्षसां बहुतां। पळों नको गा मागुता। तुज मी आतां वधीन ॥ ९ ॥ लहाना मत्स्या मत्स्यु आकळी। तेंवी राक्षसां केली त्वां होळी। त्या तुज मी सगळेंचि गिळीं। रामा तुज मी गिळूं आलों ॥ १० ॥ श्रीराम म्हणे त्रिशिराप्रती। खराश्वयोगें जन्मप्राप्ती। तो तूं खराचा सांगाती। वेसरउत्पत्ती भारवाही ॥ ११ ॥ तूं भारवाही वेसर खरा। वाहसी त्रिशिरांच्या भारा। तिहीं मुखीं जल्पसी सैरा। नाहीं विचारा एक मुख ॥ १२ ॥ त्रिजात त्रिशिरांचा तूं राक्षस देख। त्रिमुखा युद्धीं नव्हे एक मुख। पळोनि जासी खराभिमुख। वल्गना भुंकभुंकसी ॥ १३ ॥ ऐकोनि श्रीरामाचें वचन। त्रिशिरा वर्षे अमित बाण। आच्छादोनि श्रीरघुनंदन। बाणीं गगन व्यापिलें ॥ १४ ॥ देखोनि श्रीराम बाणीं आच्छन्न। राक्षसांचें शेष सैन्य। अवघें परतलें गर्जोन। रघुनंदन निर्दळिला ॥ १५ ॥ त्रिशिरा तूं योद्धा भला भला। रणीं श्रीराम निवटिला। राक्षसीं गजबजु पैं केला। तेणें क्षोभला श्रीराम ॥ १६ ॥ श्रीरामें विंधितांचि जाणा। बाण आदळती बाणां। भाळीं वाजती खणखणा। ठिणग्या गगना न माती ॥ १७ ॥ श्रीरामबाणांचा कडकडाट। राक्षसबाणांचा अति नेट। घायीं उठला हव्यवाट। दोघे सुभट महायोद्धे ॥ १८ ॥ गरुड नखें सर्प चिरी। तेंवी श्रीराम बाणें बाण विदारी। तोडोनियां भूमीवरी। भुजंगाकारीं पसरिले ॥ १९ ॥ राक्षसांचें बाणजाळ। वायु तोडी जेंवी आभाळ। तेंवी श्रीरामें तोडिलें सकळ। त्रिशिरा प्रबळ कोपला ॥ २० ॥ त्रिशिरा तीं बाणीं रघुनाथा। लागवेगीं विंधिलें माथां। तेणें श्रीरामा नव्हेचि व्यथा। म्हणे गंधाक्षता मज केली ॥ २१ ॥ तीं बाणांची मऊ मवाळी। रणीं आर्पिली पुष्पांजुळी। तुज पूजीन बाणजाळीं। श्रीराम

---

१ गांठिला. २ शस्त्रें सोडण्याकरितां. ३ जडाजडाहून विलक्षण. ४ खाद्य. ५ घोडा व गर्दभ यांपासून झालेला (खेचर). ६ ओझें वाहणारा. ७ झांकलेला. ८ अग्नि. ९ त्रिशिऱ्यानें. १० मृदु.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

महाबळी क्षोभला ॥ २२ ॥ तुझे म्यां साहिले तीन बाण । माझे तूं साहें शर दारुण । ऐसें बोलोनि श्रीरघुनंदन । चौदा बाण सोडिले ॥ २३ ॥ चौदा विद्यांची अति गती । तैसी बाणांची निजशक्ती । निवारणाची न चले युक्ती । धनुष्य हातींचें छेदिलें ॥ २४ ॥ चहूं बाणीं चारी वारू । एकें सारथियासी मारू । एकें ध्वज तोडिला सत्वरू । एकें रहंवरू छेदिला ॥ २५ ॥ विरथ त्रिशिरा आणिला भुयीं । श्रीरामावरी धांवला पायीं । त्यासी सामर्थ्य न चले कांहीं । निर्वाण पाहीं मांडलें ॥ २६ ॥ कुमारवरदाचे[1] निजप्राप्तीं । त्रिशिऱ्यापासीं निर्वाणशक्ती । ते तंव सज्जूनियां हातीं । श्रीरामाप्रति धांविन्नला ॥ २७ ॥ कुमारशक्ति त्रिशिऱ्याहातीं । देखोनि सुरवर कांपती । भूतळीं ऋषीश्वर धांवती । कैंवी रघुपती वांचेल ॥ २८ ॥ कुमारशक्तिमारां भेणें[2] । इंद्र चळीं कांपे आपण । धाकें कांपती रुद्रगण । यम वरुण कांपती ॥ २९ ॥ धाकें कांपती सुरासुर । धाकें कांपती यक्ष किन्नर । शक्ति अतिशयेंसीं दुर्धर । कैंवी श्रीरघुवीर साहेल ॥ ३० ॥ शस्त्र दुर्धर त्रिजगतीं । त्रिशिरा क्षोभोनियां चित्तीं । श्रीरामाच्या निजघातीं । सक्रोध शक्ती मोकलिली[3] ॥ ३१ ॥ सर्वशक्तींची श्रीराम शक्ती । त्यावरी न चले शक्तीची गती । शक्तीनें वंदोनि श्रीराममूर्ती । चरणीं विश्रांति पावली ॥ ३२ ॥ शस्त्रदेवता म्हणे आपण । होतां श्रीरामदर्शन । माझें झालें बंदीमोचन । काळें वदन त्रिशिऱ्याचें ॥ ३३ ॥ करावया राक्षसघात । शक्ति रिघाली श्रीरामभात्यांत । देखोनि त्रिशिऱ्यासी चिंता अद्भुत । विपरीत अवस्था ओढवली ॥ ३४ ॥ माझी जे कां निजशक्ती । ते वश्य झाली श्रीरामाप्रती । आतां आमुची खुंटली गती । राक्षसशांति श्रीरामें ॥ ३५ ॥ रणीं मारणें कां मरणें । हा निश्चयो करोनि तेणें । खर्ग तुळोनि तळपणें । हांकी[4] सत्राणें श्रीरामा ॥ ३६ ॥ श्रीरामें सोडिला त्रिधारा । तेणें तोडिल्या खर्गधारा । त्रिशिऱ्यासी लागला पिसारा । तेणें अंबरा उडविला ॥ ३७ ॥ पिसाऱ्याचें प्रबळ बळ । रविचंद्रादि ऋषिमंडळ । दाखविलें ध्रुवमंडळ । रणकल्लोळ श्रीराम ॥ ३८ ॥ घायेंवीण आली भोंवंडी[5] । तळीं पडली मुरकुंडी । रुधिर[6] वाहे नाकीं तोंडीं । बाणार्धखंडीं दंडिला ॥ ३९ ॥ त्रिशिरा सावध होवोनि पाहे । अंगप्रत्यंगीं न देखे घाये । म्हणे मजला जालें काये । मिथ्या भय रामाचें ॥ ४० ॥ जाला सर्वांगीं सावध । शस्त्रास्त्रीं सन्नद्ध बद्ध । करावया श्रीरामाचा वध । अति सक्रोध चालिला ॥ ४१ ॥ जेंवी पतंग दीपासीं । मागें सरणें नाहीं त्यासी । तेंवी गिळावया श्रीरामासी । अति क्रोधेंसीं[7] निघाला ॥ ४२ ॥ हांक देवोनियां तवकें । पसरोनियां तिन्ही मुखें । आला श्रीरामासन्मुखें । जेंवी अंतक[8] प्रळयांतीं ॥ ४३ ॥ श्रीराम गिळावया एकसरें । काम क्रोध लोभ दरें[9] । मुखें पसरिलीं तदाकारें । अति दुर्धरें समसमितें ॥ ४४ ॥ नातरी गिळावया निर्गुण । जेंवी खवळती तिन्ही गुण । तैसीं तिन्ही मुखें जाण । श्रीरामनिधान गिळावया ॥ ४५ ॥ ऐसें देखोनि त्रिशिरा । हांसें आलें श्रीरघुवीरा । धनुष्यीं सज्जोनियां शरा । निजनिर्धारा उद्यत ॥ ४६ ॥ तीन बाण घेवोनि हातां । त्रिशिरा विंधिलासे माथां । तो म्हणे हे पुष्पाक्षता । बाणीं रघुनाथा बळ नाहीं ॥ ४७ ॥ बाण रुतले फुलांऐसे । त्रिशिरा खदखदां हांसे । श्रीरामबाणीं बळचि नसे । अति आवेशें नाचत ॥ ४८ ॥ हांसोनि उपडितां बाण । तंव ते अतिशयेंसीं कठिण । सरली त्रिशिऱ्याची आंगवण[10] । माथींचे बाण नुपडती ॥ ४९ ॥ जंव जंव बाण उपडीत जाये । तंव तंव घायें घुसती पाहें । तरी तें विपरीत जालें आहे । म्हणे म्यां काय करावें ॥ ५० ॥ पहिलें म्हणे फुलांऐसे । त्रिशिरा खदखदां हांसे । श्रीरामबाणीं बळचि नसे । अति आवेशें नाचत ॥ ५१ ॥ पहिलें बाण अहींचगती[11] । आणि उपडूं जातां खडतरती[12] । श्रीरामबाणांची हे ख्याती । जीवघाती श्रीराम ॥ ५२ ॥ बाण उपडितां दारुण । भेणें पळाली आंगवण । सपिच्छ बुडाले संपूर्ण । भेदले पूर्ण ब्रह्मांडीं ॥ ५३ ॥ लागतां वज्राचा पैं घात ।

१ कार्तिकस्वामीच्या वराचे. २ भेणें = भयानें. ३ सोडिली. ४ बोलावी. ५ घेरी, भोंवळ. ६ रक्त. ७ आवेशानें. ८ यम. ९ गुहा. १० सामर्थ्य. ११ उगीच, वरवर. १२ घुसती.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

उलथोनि पडे जैंवी पर्वत। तैंवी त्रिशिरा रणाआंत। पाडी रघुनाथ निजवाणीं ॥ ५४ ॥ त्रिशिरा पडतांचि भूतळीं। निधा[1] उठिला पाताळीं। बैसलीं दिग्गजांचीं टाळीं। राक्षसदळीं थरकांप ॥ ५५ ॥ श्रीराम आला जीवघाती। एकापुढें एक पळती। बाणीं लाविली ख्याती। प्रळयप्राप्ती राक्षसां ॥ ५६ ॥ चौदा सहस्त्र राक्षससैन्य। उरलें शतेक किंचिन्न्यून। श्रीरामबाणांच्या माराभेण। पलायमान सकंप ॥ ७ ॥

हतशेषास्तथा भग्ना राक्षसाः खरसंश्रयाः।
तान् खरो द्रवतो दृष्ट्वा निवार्य च ततः स्वयम् ॥ २ ॥

श्रीरामें राक्षसां केला नाश। सैन्य निर्दाळिलें निःशेष। उरलें तिंहीं घेतला त्रास[2]। दशदिशा पळताती ॥ ५८ ॥ एक सांगती एकासी। कोण निवारी श्रीरामबाणांसी। तरी ठाकोनि जावें खरापाशीं। तो आम्हांसी रक्षील ॥ ५९ ॥ धाकें पळती निशाचर। देखोनि परतलासे खर। सैन्या देऊनि नाभीकार। श्रीरामासमोर तो आला ॥ ६० ॥ श्रीराम देखतांचि दृष्टीं। खरासी कांप सुटला पोटीं। दूषण मारिला जगजेठी। त्रिशिरा हठी निर्दळिला ॥ ६१ ॥ एकला पायउतारा रघुवीर। धुरा मारिल्या थोर थोर। सेना मारिली चौदा सहस्त्र। श्रीराम दुर्धर धनुर्वाडा ॥ ६२ ॥ निधडा[3] होय योद्धा श्रीरघुनाथ। युद्ध करितां अति अद्भुत। म्हणोनि खरें पेलिला[4] रथ। धनुष्य हस्तें सज्जोनि ॥ ६३ ॥ धीरा वीरा राहें साहें। बळ तुझें मजसी काये। माझे लागलिया घाये। कोण माय राखेल ॥ ६४ ॥ अवचटें लागोनियां बाण। मारिला त्रिशिरा आणि दूषण। माझे सन्मुख साहसी बाण। तैं आंगवण[5] मी मानीं ॥ ६५ ॥ रणीं समोर जाल्या खर। अंतकासी न धरवे धीर। म्यां मर्दिले सुरासुर। तूं रघुवीर तो किती ॥ ६६ ॥ माझे सुटल्या शरसंधान। कोदंड खंडीन सबाण। तुझा घेईन मी प्राण। रणांगण पाहें माझें ॥ ६७ ॥ तंव हांसोनि म्हणे श्रीरामचंद्र। खराचा पराक्रम थोर। मी जाणतों समग्र। ऐक साचार महावीरा ॥ ६८ ॥ संवदर्णी[6] तिमिंले[7] रजकहस्तीं। जगाचीं मळें खर वाहती। नातरी कुलाल वाहे माती। हे मुख्य ख्याती खराची ॥ ६९ ॥ काळे कोळसे वाहती खाती। कुलालपल्लयां[8] लगडां[9] वाहती। जगाचे उकिरडे घोळिती। हे एक ख्याती खराची ॥ ७० ॥ खर पालाणिती वोडं[10]। त्यावरी वाहती स्वेच्छा दगड। पाठीं खटीं सोललें बूड। थोर सुरवांड[11] माशांचें ॥ ७१ ॥ खंरी[12] देखोनियां दुरी। खर भुंके दीर्घस्वरीं। लाथा हाणी ती उरावरी। तें सुख भारी खरासी ॥ ७२ ॥ मुख्य खराचें भूषण। थोर करी नित्य लोळण। जगाची विष्ठा प्रियभोजन। हें महिमान खराचें ॥ ७३ ॥ ऐसी खराची प्रतिष्ठा। प्रिय भोजन जगाची विष्ठा। मर मर दुःशीळा पापिष्ठा। ऋषिवरिष्ठां मारिलें ॥ ७४ ॥ त्यांचा घेवोनि सूड कैवांडें[13]। बाणीं फोडीन चांभोंडें[14]। तूं पळसील कोणीकडे। बाणांपुढें पैं माझ्या ॥ ७५ ॥ खरासी लागतां गोमासी। तडफडित पळे चौंपासीं। माझे बाण लागतां सपिच्छी। तूं पळसी खरु जैसा ॥ ७६ ॥ ऐसें ऐकोनि श्रीरामाचें वचन। खर जाला कोपायमान। धनुष्यीं वाहोनियां गुण। अमित बाण वर्षला ॥ ७७ ॥ खर वर्षला बहुत बाण। दिशां विदिशीं[15] शर संपूर्ण। तें देखोनि क्षोभला रघुनंदन। चाप सज्जोन चालिला ॥ ७८ ॥ जेंवी गजावरी केसरी। तेंवी श्रीराम राक्षसांवरी। प्रळयांबुद[16] धारावर्षभारीं। तेंवी शरधारीं वर्षत ॥ ७९ ॥ बाण वर्षतां श्रीरघुवीरा। बाणपिसारें सुटला वारा। तेणें चळकांप निशाचरां। बाणीं भेदरा लाविला ॥ ८० ॥ बाणीं रणीं खिळिला वारा। बाणीं खिळिली मुख्य धुरा। रणीं उठिला धुळोरा। बाणें अंबरा व्यापिलें ॥ ८१ ॥ खररामबाणीं खणखणाट। घायीं उठिला हव्यवांट। तेणें बाणपिसारा पेटे। धूम्रांकित खरनेत्र ॥ ८२ ॥ बाणीं कोंदलें भूतळ। बाणीं कोंदलें नभोमंडळ। श्रीरामाचें बाणजाळ। रविमंडळ झांकिलें ॥ ८३ ॥ बाणीं कोंदलें आकाश। तिळभरी नाहीं अवकाश। बाणीं राक्षसां

१ शब्द. २ भय. ३ धैर्यवान. ४ प्रेरिला. ५ पराक्रम. ६ चर्मकुंडांत. ७ भिजलेले. ८ कुंभारांच्या घरांकडे. ९ कावडी. १० पाथरवट. ११ सुकाळ. १२ गाढवी. १३ कैवारानें. १४ थोबाड. १५ उपदिशांना. १६ प्रळयकाळचा मेघ. १७ अग्नि.

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

लाविला त्रास । कासाविस खर तेणें ॥ ८४ ॥ रणीं पडली आंधारी । श्रीरामाच्या प्रभेकरीं[१] । युद्ध कीजे दोघीं वीरीं । महामारीं पेटले ॥ ८५ ॥

ततोऽस्य सशरं चापं मुष्टिदेशे महाबलः ।
खरश्चिच्छेद रामस्य दर्शयन् पाणिलाघवम् ॥ ३ ॥

खर कोपोनि निर्वाण । सोडिताहे वरद बाण । श्रीरामा तुझा घेईन प्राण । हस्तविंदान[२] पाहें माझें ॥ ८६ ॥ ऐसें बोलोनि महाहठी । बाणवरदाचिया निजनेटीं । श्रीरामधनुष्य छेदिलें मुष्टीं । पाडिलें सृष्टीं लघुहस्तें ॥ ८७ ॥ निजनिर्वाणाचे पूर्ण । सवेंच घेवोनि सात बाण । श्रीरामहृदय लक्षोन । वेगीं गर्जोन विंधिले ॥ ८८ ॥ श्रीरामकवच अभेद्य पूर्ण । अभेद्यकवचीं न रुते बाण । वरदें केलें निजनिर्वाण । सावधान अवधारा ॥ ८९ ॥ कवच न भेदे बाणांसी । वरदशक्तीची क्रिया कैसी । छेदोनि बंधन विरड्यासी । कवच भूमीसी पाडिलें ॥ ९० ॥ चाप कवच छेदितां देख । कांपिन्नले तिन्ही लोक । गगनीं देवांसी असुख । परम दुःख इंद्रासी ॥ ९१ ॥ कवच पडतांचि धरणीं । अभ्रांमधूनि निघे तरणी[३] । तैसा श्रीराम शोभे रणीं । गिरा गर्जोनी बोलत ॥ ९२ ॥ वरद बाण तुझे समस्त । क्रोधें सांडोनि केले व्यर्थ । तुझा संपला पुरुषार्थ । आतां घात करीन तुझा ॥ ९३ ॥ मग जें चाप अगस्तिदत्त । तें सज्जोनियां श्रीरघुनाथ । रणीं चालिला गर्जत । शरसंपात सूटला ॥ ९४ ॥ खराचे बाण प्रबळ । श्रीरामें निवटिले सकळ । जेंवी गुर्डे[४] पाडी कृषीवलें[५] । तेंवी बाणजाळ छेदिलें ॥ ९५ ॥ हेमपत्री बाण सबीज । सोडोनि खर केला निर्बुजे[६] । रथीं छेदोनियां ध्वज । रणीं रघुराज क्षोभला ॥ ९६ ॥ जैसा स्वर्गभोगच्युत[७] । पुण्यक्षयें होय पतित । तैसा ध्वज लखलखित । पताकायुक्त पाडिला ॥ ९७ ॥ बाण सोडोनि वरिष्ठ । पाडिला शिरींचा मुकुट । धनुष्य छेदिलें उद्भट । रणसंकट खरासी ॥ ९८ ॥

तं चतुर्भिः खरः क्रुद्धो रामं गात्रेषु मार्गणैः ।
विव्याध हृदि मर्मज्ञो मातंगमिव तोयदैः ॥ ४ ॥

खरें देखोनि रणसंकट । श्रीराम वधीन मी वरिष्ठ । शक्तिवरदाचे बाणीं श्रेष्ठ । वधावया दुष्ट चालिला ॥ ९९ ॥ चाप सज्जोनि आकर्ण । शक्तिवरदाचे निर्वाणबाण । घायें घेती पराचे प्राण । अति दारुण अनिवार ॥ १०० ॥ तेचि बाण घेवोनि चारी । शक्ति आवाहूनि बीजमंत्रीं । खरें मोकलिले श्रीरामावरी । सतेजधारी धगधगित ॥ १ ॥ भूतळीं गजबजले ऋषीश्वर । स्वर्गीं कांपती सुरवर । शक्तिवरद अति दुर्धर । श्रीरामचंद्र केंवी वांचे ॥ २ ॥ बाण सुटतां कडाडी । पडली सुरवरांसी झांपडी । दुर्धर तेजाची प्रौढी । ऋषि बापुडीं मूर्च्छित ॥ ३ ॥ बाण लागतां हृदयावरी । शास्त्रदेवता श्रीरामोदरीं । तिणें बाण धरितां चारी । श्रीरामतूणीरीं रिघाले ॥ ४ ॥ खर म्हणे झालें विपरीत । वरदशक्ति श्रीरामा भजत । तिनें मांडिला आमुचा घात । श्रीरघुनाथ नाटोपे ॥ ५ ॥ श्रीरामाची अगाध थोरी । बाण निवारिले वरद चारी । जयजयकार ऋषीश्वरीं । केला सुरवरीं महानाद ॥ ६ ॥ बाण निवारिले चारी । श्रीराम कोपलासे भारी । तीन बाण खरावरी । महामारीं मोकलिले ॥ ७ ॥ श्रीरामबाण देखोनि दृष्टीं । निवारणीं चिंता पोटीं । तंव एकें धनुष्य छेदोनि मुष्टीं । पाडिलें सृष्टीं दुखंड ॥ ८ ॥ ध्वज छेदिला बाणें एकें । आंखं[१०] छेदी एकें तवकें[११] । दों बाणीं छेदिलीं दोन्ही चाकें । त्रिवेणू[१२] आणिकें छेदिले ॥ ९ ॥ चहूं बाणीं चारी वारू । तीन बाणीं छेदिला रहंवरू[१३] । एकें बाणें विंधिला खरू । रुधिरोद्गारु प्रवाहे ॥ ११० ॥ हत वारू हत सारथी । खर रणीं केला विरथी । मग गदा घेवोनि हातीं । श्रीरामाप्रति धांविन्नला ॥ ११ ॥ गदा घेवोनियां हातीं । म्हणे घायें मारीन श्रीरघुपती । सरक थरक दावी दीप्ती । गती विगती तळपत ॥ १२ ॥ हतरथ हतसारथी । नष्टलासी सैन्यसंपत्ती । श्रीराम म्हणे तूं निर्लज्ज चित्तीं । कासया गदागती दाविसी ॥ १३ ॥ तुजपासोनि गेली शक्ती । वृथा वल्गसी गदाहस्ती । गदेसहित पाडीन क्षितीं । तूं पापमूर्ति पापात्मा ॥ १४ ॥ ऋषी मारिले श्रेष्ठ श्रेष्ठ । तापस भक्षिले वरिष्ठ । त्याचें फळ भोगिसी स्पष्ट । बाणीं यथेष्ट दंडीन

१ तेजानें, प्रभेनें. २ हस्तकौशल्य. ३ सूर्य. ४ फडेरें निवडुंग. ५ शेतकरी, ६ घाबरा. ७ स्वर्गातील सुखापासून भ्रष्ट झालेला. ८ स्थापना करून. ९ श्रीरामाच्या भात्यांत. १० रथाचा कणा, ११ आवेशानें, १२ धुरा, १३ रथ,

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ १५ ॥ ब्राह्मण भक्षिले बहुत । ब्रह्महत्येचा दोष अद्भुत । बाणधारीं प्रायश्चित्त । मी निश्चित तुज देईन ॥ १६ ॥ दंडकारण्यीं तूं कंटक । बाणीं छेदीन आवश्यक । वन करीन निष्कंटक । ऋषी निःशंक विचरावया ॥ १७ ॥ निर्नासिक देखतां दृष्टीं । तेथें यशाची कायसी गोष्टी । ससैन्य धूरे[१] मरे शेवटीं । भेटल्या नकटी फळ ऐसें ॥ १८ ॥ ते नकटी तुम्हांसांगातें । तुम्हांसी यश कैंचें येथें । नकटियें निर्देळिलें निश्चितें । हें खरातें लक्षेना ॥ १९ ॥ नांवें खर रूपें खर । शस्त्रभार वाहे खर । न कळे बुद्धीचा विचार । ऐसा मूर्ख थोर तूं होसी ॥ १२० ॥ वर्मभेदी श्रीरामवचन । खर दुर्धर कोपायमान । भूमीस हात पाय घांसोन । गदा घेवोन धांवला ॥ २१ ॥ किती जल्पसी सैरावैरा । बोलों नको श्रीरामचंद्रा । बहु वडबड न साजे वीरा । रणनिर्धारीं पाहें पां ॥ २२ ॥ राहें साहें श्रीरघुवीरा । तुवां मारिल्या बहुत धुरा । तुझ्या घेवोनियां रुधिरा । मारिल्या धुरा तर्पीन[३] ॥ २३ ॥ तुझिया रुधिराचें तर्पण । तृप्त होतील राक्षसगण । गदाघायें घेईन प्राण । सत्य संपूर्ण पण माझा ॥ २४ ॥ सावध पाहें श्रीरामचंद्रा । एकेंचि घायें करीन पुरा । दांत खातसे करकरां । गदा गरगरां भोवंडी ॥ २५ ॥ धूम्र निघे नेत्रद्वारा । रागें कांपत थरथरां । डसों धांवे श्रीरामचंद्रा । कंठींच्या रुधिरा प्राशावया ॥ २६ ॥ तुझे नळीचें करीन रक्तपान । तेव्हां मी संतृप्त होईन । वटारिले दोनी नयन । श्रीरघुनंदन देखोनी ॥ २७ ॥ निःशेष मारावया रघुवीरा । आव्हानिलें[४] मातंगशस्त्रा । बीजें जपोनि घातकमंत्रा । शस्त्रीं अस्त्रा योजिलें ॥ २८ ॥ ऐसें साधोनि निर्वाण । तेणें उन्मूळत[५] वृक्ष तृण । पृथ्वी होय कंपायमान । मूर्च्छापन्न पशुपक्षी ॥ २९ ॥

सा क्षिप्ता बहुवेगेन प्रदीप्ता महती गदा ।
भस्म वृक्षांश्च गुल्मांश्च कृत्वागात्तत्समीपतः ॥ ५ ॥

गदा खराची तेजें दारुण । भस्मभूत केलें तृण । गुल्म पर्वत कंपायमान । वृक्ष उन्मळोन पडताती ॥ १३० ॥ गदा उसळतां अंबरा । विमानीं पळणी सुरवरां । चळकांप रविनक्षत्रां । अस्त्रमंत्राचेनि धाकें ॥ ३१ ॥ अस्त्र दुर्धर देखोन । श्रीराम नित्य सावधान । अघोर रुद्रमंत्र जपोन । बाण दारुण सोडिले ॥ ३२ ॥ बाण देखोनि दारुण । अस्त्रमातंगी आली शरण । माझा वांचवावा प्राण । श्रीरामचरण तियें धरिले ॥ ३३ ॥ बाण लागतां उद्भट । गदा जाली शतकूट । घायें दुमदुमिलें वैकुंठ । करोनि पीठ पाडिली ॥ ३४ ॥ खर जाला रणोन्मत्त । निर्वाणगदा जाली व्यर्थ । चिंता विसरलें चित्त । श्रीरघुनाथ देखोनी ॥ ३५ ॥ बाणें गदेचा जाला निःपात[६] । अशेष सैन्या केला घात । शस्त्रसामोग्री करोनि व्यर्थ । श्रीरामभात्यांत बाण आला ॥ ३६ ॥ एकला खर उरला रणीं । श्रीरामें जर्जर केला बाणीं । परी खर बाणांतें न गणी । श्रीराम लक्षोनी लोटला ॥ ३७ ॥ सगळा राम मी खाय घोंटीं । हेंचि धरोनियां पोटीं । धांविन्नला महाहठी । निर्वाणदृष्टी लक्षोनी ॥ ३८ ॥

रणे प्रहरणस्यार्थे सर्वतो ह्यवलोकयन् ।
स ददर्श महाशालमविदूरे निशाचरः ॥ ६ ॥
स तमुत्पाटयामास संदष्टदशनच्छदम् ।
राममुद्दिश्य चिक्षेप हतस्त्वमिति चाब्रवीत् ॥ ७ ॥

श्रीरामें छेदिली शस्त्रसामोग्री । हातेरँ[७] न दिसे चौफेरीं । विशाल वृक्ष उपडोनि करीं । श्रीरामावरी धांविन्नला ॥ ३९ ॥ येणें वृक्षाचेनि घातें । श्रीरामा मारिलें जाण म्यां तूंतें । ऐसें गर्जोनि अत्यद्भुतें । वेगीं वृक्षातें सोडिलें ॥ १४० ॥ वृक्ष देखोनि प्रचंड । श्रीरामें बाण सोडिला वितंड[८] । दुखंड तिखंड नवखंड । करोनि शतखंड पाडिला ॥ ४१ ॥ वृक्ष निवटोनि दुर्धर । अंगप्रत्यंगीं खोंचला खर । वाहत रुधिराचे[९] पूर । रणीं रघुवीर क्षोभला ॥ ४२ ॥ रणीं निर्दळावया खर । बाणीं योजिलें अंतकशस्त्र । प्रळयरुद्र महामंत्र । जपोनि शस्त्र सोडिलें ॥ ४३ ॥ देहबुद्धीस मुकला खर । झुंजण्या पळण्या पडे विसर । धरणें मारणें धैर्यनिर्धार । हाही विचार विसरला ॥ ४४ ॥ जेंवी कां ज्ञाता नित्यात्मसिद्धी । निश्चयें राहे रामपदीं । तेंवी श्रीराम देखतां त्रिशुद्धी । रणसमाधी खरासी ॥ ४५ ॥ निरसोनि तत्त्वांचा विकार । समाधि पावे मुनीश्वर । तेंवी लक्षितां श्रीरामचंद्र । निर्विकार खर जाला ॥ ४६ ॥ येवोनि श्रीरामाचा बाण ।

१ मुख्य योद्धा. २ लढण्याचा निश्चय. ३ संतोषवीन, तृप्त करीन. ४ बोलाविलें, आमंत्रण दिलें. ५ मूळासहित उपटून पडूं लागले. ६ नाश. ७ शस्त्र. ८ अनिवार. ९ रक्ताचे.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

माझा घेईल निजप्राण। हेही नाहीं आठवण। श्रीराम रणसुखकारी ॥ ४७ ॥ श्रीरामबाण अति दुर्धर। खराचें उडविलें शिर। रणीं पाडिला महावीर। धन्य रघुवीर खर म्हणे ॥ ४८ ॥ देहापासोनि सुटल्या देख। स्तुति वदे खराचें मुख। श्रीरामें छेदोनि द्वंद्वदुःख। दिधलें निजसुख शरघातें ॥ ४९ ॥ छेदोनियां जन्ममरणदुःख। छेदोनियां तहान भूक। छेदोनि जीवींची धुकधुक। दिधलें निजसुख शरघातें ॥ १५० ॥ छेदोनियां माझें मन। छेदोनियां देहाभिमान। छेदोनियां ज्ञानाज्ञान। सुखसंपन्न शरघातें ॥५१॥ श्रीरामबाणाचा प्रताप। छेदिलें माझें पुण्यपाप। छेदोनियां संकल्पविकल्प। केलें सुखरूप शरघातें ॥ ५२ ॥ श्रीरामाचा सतेज बाण। छेदिलें स्थूळ लिंग कारण। छेदोनियां मीतूंपण। सुखसंपन्न शरघातें ॥ ५३ ॥ छेदोनि माझा राक्षसविधी। छेदोनि माझी आधिव्याधी। छेदोनि माझी देहबुद्धी। श्रीरामें त्रिशुद्धी सुखी केलें ॥ ५४॥ श्रीराम रणयोद्धा निकुरेंसीं। परी तो सुखरूप घायेंसीं। ऐसें वदोनियां स्तुतीसी। पायांपासीं शिर आलें ॥ ५५ ॥ जे गती नव्हे तापसांसी। जे गती नव्हे योगिसंन्याशांसी। ते गती दिधली खरासी। घायासरसी श्रीरामें ॥५६॥ जे गति न लभे योगयागीं। जे गति न लभे सर्वत्यागीं। ते गति दिधली खरालागीं। रणरंगीं श्रीरामें ॥ ५७ ॥ जे गति न लभे वेदविधी। जे गति न लभे शास्त्रसिद्धी। ते गति दिधली बाणवेधीं। घायें त्रिशुद्धी खरासी ॥ ५८ ॥ जे गति न लभे कर्म करितां। जे गति न लभे ध्यान धरितां। ते गति आली खराच्या हाता। बाणाग्रता श्रीरामें ॥ ५९ ॥ जो जो श्रीरामदृष्टीं रणीं पडे। तो तो सायुज्यासी चढे। राक्षसांचें भाग्य चोखडें। रणीं रोकडें सायुज्य ॥ १६० ॥ सुरनरां खर दुर्धर। खरासी शंके दशशिर। तो श्रीरामें रणीं हाणिला खर। जयजयकार द्विजदेवां ॥ ६१ ॥ युद्ध पहावया सुरवरीं। गगनीं विमानांच्या हारी। वर्षती सुमनांच्या संभारीं। जयजयकारीं गर्जती ॥ ६२ ॥ युद्ध पाहों आला ब्रह्मदेव। युद्ध पाहों आला सदाशिव। जयजयकार करिताती सर्व। रणीं श्रीराघव निजविजयी ॥ ६३ ॥ गगनीं वाजे सिद्धांची टाळी। जयजयकार ऋषींचा भूतळीं। श्रीरामें मर्दिले राक्षस बळी। भूमंडळीं आल्हाद ॥ ६४ ॥ श्रीरामप्रतापाचें पूर्ण। स्वर्गीं लागलें निशाण। हरिखें नाचती सुरगण। श्रीराम रावण निर्दाळील ॥ ६५ ॥ श्रीरामाचें युद्ध देखोन। श्रीरामसेज उतरून। सीतासौमित्र येवोन। लोटांगणें श्रीरामा ॥ ६६ ॥ हरिखाचे उल्हासता। सीता आलेंगी श्रीरघुनाथा। श्रीरामें आश्वासोनि सीता। होय आलेंगिता सौमित्रा ॥ ६७ ॥ पाचारोनि ऋषिगण। श्रीराम घाली लोटांगण। राक्षसीं गांजिले ब्राह्मण। तें मी उत्तीर्ण पैं जालों ॥ ६८ ॥ राक्षसभयातें निवारीं। ते म्यां आज्ञा वंदोनि शिरीं। तुमचिये कृपेंकरीं। केली बोहरी राक्षसां ॥ ६९ ॥ तुमचिया कृपायुक्तीं। मज जाली यशःप्राप्ती। राक्षस मारिले जाली कीर्ति। सत्संगतिनिजबळें ॥ १७० ॥ जयाचे पाठीसीं द्विजवर। देवोनि असती नाभीकार। एकला जिंके तो चराचर। कृपा सधर द्विजांची ॥ ७१ ॥

> समस्तसंपत्समवाप्तिहेतवः
> समुत्थितापत्कुलधूमकेतवः।
> अपारसंसारसमुद्रसेतवः
> पुनन्तु मां ब्राह्मणपादपांसवः ॥ ८ ॥

सद्गुणसंपत्तीचें कारण। ब्राह्मणांचा चरणरेणु प्रमाण। परमापत्तिकुळनिर्दळण। द्विजचरणप्रसादें ॥ ७२ ॥ अपार भवसागराआंतु। द्विजपदरज सन्नद्ध सेतु। पडणें बुडणें नाहीं आवर्तु। सुखस्वार्थु द्विजचरणीं ॥ ७३ ॥ ब्राह्मणांचे चरणतीर्थीं। गंगादितीर्थें पवित्र होती। दास्य करिती चार्‍ही मुक्ती। सभाग्य भजती द्विजचरणीं ॥ ७४ ॥ त्या तुमची नित्यसंगती। भाग्यें मज जाली प्राप्ती। तेणें पावलों अगाध कीर्ती। वानूं किती द्विजमहिमा ॥ ७५ ॥ तुम्हांसी कांहीं द्यावें दान। ब्रह्मार्पण जनस्थान। करोनि स्वधर्मानुष्ठान। सुखसंपन्न असावें ॥ ७६ ॥ अरुणा वारुणा सरस्वती। ब्रह्मगिरी अष्टतीर्थीं। करितां शंकों नका चित्तीं। आज्ञानुवर्ती मी तुमचा ॥ ७७ ॥ ऐसें बोलोनि

१ कठिण, तीक्ष्ण. २ सुखदुःख, पापपुण्यादि अवस्थाद्वय. ३ कृपेंकरून, कृपेनें. ४ नाश. ५ सर्व दुःखांचा नाश. ६ संसारसमुद्रांत. ७ बळकट. ८ भोंवरा (पुनरावृत्ति).

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

श्रीरघुनंदन । पुढती घाली लोटांगण । सुखी जाहले ब्राह्मण । श्रीरामगुण वर्णिती ॥ ७८ ॥ वानिती श्रीरामाची कीर्ती । वंदिती श्रीरामाची मूर्ती । श्रीरामगुण गीतीं गाती । द्विज गर्जती श्रीरामनामें ॥ ७९ ॥ द्विजीं घेतलें जनस्थान । राक्षसपत्न्या पलायमान । हिरोनि घेतलें धनधान्य । वस्त्रभूषण ते हरिती ॥ १८० ॥ गंगातीरींचे ब्राह्मण । अतिशयेंसीं महाकठिण । आम्हांसी नागविती संपूर्ण । त्यांसी कोण निवारी ॥ ८१ ॥ पुरुषांची जातिव्यक्ती । श्रीरामें रणीं लाविली ख्याती । आम्हां रांडांतें द्विज नागविती । धाकें मुतती सांगती शूर्पणखे ॥ ८२ ॥ राक्षसपत्न्या पैं विमानीं । त्यांमाजी नकटी मुखरणी। मेंडसावितां ब्राह्मणीं । जीव घेवोनि पळाल्या ॥ ८३ ॥ ऋषी राहिले जनस्थानीं । श्रीराम राहिला स्वस्थानीं । एका शरण जनार्दनीं । रामायणीं सुखस्वादु ॥ ८४ ॥ रामायणीं भुक्ति मुक्ती । रामायणीं अगाध कीर्ती । रामायणीं ब्रह्मप्राप्ती । असे तिष्ठत श्रवणार्थें ॥ ८५ ॥ एका जनार्दना शरण । जीवां रमणीय रामायण । खरादिराक्षसमर्दन । श्रीरघुनंदन निजविजयी ॥ ८६ ॥ इति श्रीभावार्थरामायणे अरण्यकांडे एकाकारटीकायां खरमर्दनं नाम एकादशोऽध्यायः॥११॥ ओंव्या॥१८६॥ श्लोक॥८॥

अध्याय बारावा

श्रीरामचंद्राय नमः ॥ खरत्रिशिरादि बळावंतीं । राक्षसांची जातिव्यक्ती । रामें रणीं पाडिले क्षितीं । शरसंपातीं निवटोनियां ॥ १ ॥

ततः शूर्पणखा दृष्ट्वा सहस्राणि चतुर्दश ।
हतानि रामेणैकेन मानुषेण पदातिना ॥ १ ॥

एकला श्रीराम धनुष्यपाणी । युद्धीं विचरतां चरणीं । चवदा सहस्र वीरश्रेणी । पाडिले रणीं शरघातें ॥ २ ॥ बोंब सांगावया पुरती । राक्षसांची पुरुषव्यक्ती । नाहीं उरली रणाप्रती । बाणावर्तीं निवर्तले ॥ ३ ॥ बोंब सांगावया देख । उरली शूर्पणखा एक । घेवोनि लक्ष्मणाचा धाक । मारोनि हांक पळाली ॥ ४ ॥ रणीं विमर्दाची धुक । अति आक्रोशें करी शंख । जनस्थाना आली देख । नकटें मुख घेवोनी ॥ ५ ॥ खरादिकांच्या पत्नी । हांसती शूर्पणखेतें देखोनी । वोहिनीस गौरवीत रणीं । नाकीं सुपाँणी वाणलें ॥ ६ ॥ दोघें माणसें तीं किती । खरादिक मारोनि येती । हा निश्चयो स्त्रियांचे चित्तीं । तेणें हांसती शूर्पणखे ॥ ७ ॥ फें फें करीत सांगे मात । रणीं क्षोभोनि रघुनाथ । सोडोनि बाणांचा आवर्त । केला निःपात राक्षसां ॥ ८ ॥ त्रिशिरा खर दूषण । चवदा सहस्र राक्षसगण । श्रीरामें मारोनि आपण । दिधलें जनस्थान द्विजांसी ॥ ९ ॥ ऐसी ऐकतांचि गोष्टी । जनस्थानीं बोंब उठी । वीर निर्दाळोनि जगजेठी । निर्लज्ज नकटी कां आली ॥ १० ॥ करितां नकटीचा कैवार । त्रिशिरादूषणादि खर । चवदा सहस्र निशाचर । सहपरिवार मारिले ॥ ११ ॥ नकटें भेटलिया ख्याती । पुरुषांच्या जातिव्यक्ती । इयें गिळिले अपशकुनार्थीं । आम्हांभोंवतीं रडों आली ॥ १२ ॥ बोंब उठिली घरोघरीं । दीर्घ स्वरें रडती नारी । कोण कोणातें निवारी । समर्भरीं समदुःखी ॥ १३ ॥ आम्ही रडों घरोघरीं । राखता नाहीं कोणी कैवारी । द्विज निघोनि घरोघरीं । क्षणामाझारी नागविती ॥ १४ ॥ राक्षसीं भक्षिलें द्विजांसी । हाडवैर ब्राह्मणांसीं । ते येवोनि अति आवेशीं । सर्वस्वेंसीं नागविती ॥ १५ ॥ ब्राह्मणांचें दादुलेपण । माहेवणियांभोंवतें पूर्ण । त्यांसी दिधलें जनस्थान । आली नागवण रांडांसी ॥ १६ ॥ ब्राह्मणांचा ब्रह्मदंड । रांडादंडणीं अति प्रचंड । शूर्पणखेचें काळें तोंड । केली रांड अवघियांची ॥ १७ ॥ ऐसिया रडती पडती । एकी कान केश तोडिती । एकी अत्यंत हडबडती । एकी आरडती आक्रोशें ॥ १८ ॥ शूर्पणखा बोले पुढती । तुम्ही येथें रडाल किती । लागवेगें ब्राह्मण येती । ते नागविती समस्तां ॥ १९ ॥ पडलिया ब्राह्मणांचे बंदीं । सुटका नाहीं कल्पांतसंधीं । मग कांहीं न चले बुद्धी । निघावें त्रिशुद्धी लंकेसी ॥ २० ॥ येथें मारविले महाबळी । निघाली करावया लंकेची होळी । नकटी लागली राक्षसमूळीं । रावण

१ वर्णन करितात. २ मुख्य. ३ सैन्यसमूहासह. ४ जातिमात्र, ५ वीरांच्या पंक्ती. ६ नाशाची, ७ नथ, ८ सारख्या भारानें. ९ हाडवैर. १० रजस्वला स्त्रियांजवळ. ११ खरोखर,

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

संकुळीं निर्दाळावया ॥ २१ ॥ द्विजां दिधलें जनस्थान। शिष्यांसह धांवले ब्राह्मण। राक्षसी गजबजिल्या पूर्ण। पलायमान समुदायें ॥ २२ ॥ द्विज धांवले पूर्वद्वंद्वार्थी। विमान हिरोनि सहसंपत्ती। तेणें राक्षसी बहुत भीती। मग येती काकुळती शूर्पणखे ॥ २३ ॥ ब्राह्मण येती दाटोदाटी। विक्राळरूपें धांवे नकटी। तुम्हां अवघियांतें मी घोटीं। म्हणोनि पाठीं लागली ॥ २४ ॥ ब्राह्मण पळती उपराउपरी। शंख करिती दोहीं करीं। एक मुतती धोत्रांतरीं। एकां बोहेरी होंसरली ॥ २५ ॥ एकापुढें एक पळे बळी। पळतां बैसली दांतखिळी। नागवे आले श्रीरामाजवळी। धोत्रें फिटलीं शुद्धि नाहीं ॥ २६ ॥ मागें राहिलियापाठीं। शूर्पणखा गिळील नकटी। शंख करिती तये संकटीं। धांव जगजेठी श्रीरामा ॥ २७ ॥ धाप न समाये पोटीं। मार्ग लक्षेना भयें दृष्टीं। ब्राह्मण अतिशय संकटीं। पंचवटी पावले ॥ २८ ॥ श्रीरामा धांव पाव झडकरी। शूर्पणखेनें गांजिलें भारी। गिळिलों गिळिलों निशाचरीं। भय निवारीं श्रीरामा ॥ २९ ॥ निर्भय दे गा ब्राह्मणां। दान दिधलें जनस्थाना। रामराज्या आलें विघ्न। गोब्राह्मणा गांजिलें ॥ ३० ॥ श्रीराम म्हणे लक्ष्मणासी। म्यां निर्दळिलें राक्षसांसी। कोणें भेडसाविलें ब्राह्मणांसी। त्या भयासी निवारीं ॥ ३१ ॥ पहिले ब्राह्मण पळवूं गेली। लोभें शूर्पणखे आली भुली। ब्राह्मणांचें मांस खाऊं धांवली। तीतें देखिली लक्ष्मणें ॥ ३२ ॥ निजनासिका विटंबिली। राक्षसांची समाप्ति जाली। शूर्पणखा तें विसरली। भक्षूं आली द्विजमांस ॥ ३३ ॥ जेंवी कां मत्स्य आमिषा गिळी। गळ ओढिलिया तो तळमळी। त्याहूनि शूर्पणखेसी भुली। भक्षूं आली द्विजमांस ॥ ३४ ॥ बाप विषयांचे आवडी। नाठवती दुःखकोडी। विसरोनि मरणओढी। विषयगोडी वाढविती ॥ ३५ ॥ तैसी शूर्पणखा जाण। भक्षूं धांवे ब्राह्मण। लक्ष्मणें सोडोनियां बाण। दोनी कान छेदिले ॥ ३६ ॥ करूं नये स्त्रियेचें हनन। तें पाळिलें श्रीरामवचन। तिचे छेदितां दोनी कान। पलायमान शूर्पणखा ॥ ३७ ॥ राक्षसपत्न्या सर्वे घेवोनी। शूर्पणखा बैसे विमानीं। लंकाभुवन अनुलक्षोनी। जीव घेवोनि पळाली ॥ ३८ ॥ शूर्पणखा मुख्य विमानीं। माशा घोंगाती नाकीं कानीं। संगें स्त्रियांची शंखध्वनी। आक्रंदोनी जल्पती ॥ ३९ ॥ येथें मारविल्या राक्षसथाटी। पुढें मारवील कोट्यनुकोटी। नकटी परतली उफराटी। रावणा संकटीं घालावया ॥ ४० ॥ पहिली ख्याती नकटीची। नळीं निमटिली खरादिकांची। आतां नकटी जाली बुची। उरी रावणाची केंवी उरे ॥४१॥ इणेंचि वाढविली कळी। चवदा सहस्रां केली होळी। नकटी लागली राक्षसमूळीं। रावण सकुळीं निर्दाळावया ॥ ४२ ॥ दुःख न समाये पोटीं। रागें बोलती विरोधगोष्टी। रडतां जालिया हिंपुटी। तंव लंका दृष्टीं देखिली ॥ ४३ ॥

जगाम परमोद्विग्ना लंकां रावणपालिताम्।
सा ददर्श विमानाग्रे रावणं दीप्ततेजसम् ॥ २ ॥
उपोपविष्टं सचिवैर्मरुद्भिरिव वासवम्।
आसीनं सूर्यसंकाशे कांचने परमासने ॥ ३ ॥

लक्षोनियां लंकाभुवन। शीघ्रगतीं आलें विमान। शूर्पणखा आली उद्विग्नमन। विरुद्धवचन स्त्रीवाक्यें ॥ ४४ ॥ रावण देखिला लंकाभुवनीं। जैसा इंद्र मरुद्गणीं। तैसा परिवारित प्रधानीं। सिंहासनीं शोभत ॥ ४५ ॥ ऐसा रावण देखतां दृष्टीं। विमानीं एकचि बोंब उठी। रावणें विमान देखतां दृष्टीं। देखिली नकटी शूर्पणखा ॥ ४६ ॥ शूर्पणखा स्वयें आपण। दीर्घस्वरें करी रुदन। रावणाचे धरोनि चरण। मूर्च्छापन्न अति दुःखें ॥ ४७ ॥ ऐसा कोण महाबळी। नासिका छेदोनि समूळीं। उघडी पाडिली दांतावळी। केली कर्णमूळीं बुचाटें ॥ ४८ ॥ शूर्पणखेचे विटंबन। देखोनि गजबजिला रावण। प्रधानसेना कंपायमान। चकित जन लंकेचे ॥ ४९ ॥ रावणाचे निजदळीं। शूर्पणखा महाबळी। तेही विटंबिली समूळीं। ऐसा अतुर्बळी तो कोण ॥ ५० ॥ तूं ज्येष्ठ असतां रावण। मज शूर्पणखे विटंबन। त्रिशिरा मारिला खर दूषण। रणकंदनें श्रीरामें ॥ ५१ ॥ चवदा

१ कुळासकट. २ मारण्यासाठीं. ३ वारंवार. ४ नाश. ५ गळाला लाविलेल्या मांसाला. ६ कंठ, गळे, ७ नाक व कान यांविरहित. ८ बाकी, शिल्लक. ९ कष्टी. १० कासावीस झालेली. ११ वेष्टिलेला. १२ कान कापलेली. १३ महाबलवान्.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सहस्त्र वीर अनिवर्ती । रामें मारिले बाणांवर्ती । राक्षसांची जातिव्यक्ती । रणसमाप्ती श्रीरामें ॥ ५२ ॥ रणीं राक्षसां रणसमाप्ती । वार्ता सांगावयापुरती । मी एक उरलें प्रमदाजाती । रामें शास्त्रोक्तीं सोडिलें ॥ ५३ ॥ श्रीराम शास्त्रार्थी सर्वज्ञ । करूं नये स्त्रियेचें हनन । म्यां छळितां रामलक्ष्मण । तेणें नाक कान छेदिले ॥ ५४ ॥ करितां पुढिल्यांसी छळण । छळणें छळे स्वयें आपण । तें मज जालें प्रमाण । विटंबन मुख्य मुखा ॥ ५५ ॥ छळें छळिलें मी कैसी । मुख दाखवूं न ये कोणासी । श्रीरामाची ख्याती ऐसी । राक्षसांसी अंतक ॥ ५६ ॥ माझें घेवोनि नाक कान । द्विजां दिधलें जनस्थान । ब्राह्मणीं सर्वस्व घेतां हिरोन । मी पळोन येथें आलें ॥ ५७ ॥ श्रीराम निर्लोभी संपूर्ण । घेवोनियां जनस्थान । स्वयें द्विजांसी दिधलें वरदान । श्रीराममहिमान अगाध ॥ ५८ ॥ प्रतापतेजें श्रीरघुनंदन । तुझें घेवोनि लंकाभुवन । तेंही सर्वेचि देईल दान । ऐसें चिन्ह दिसताहे ॥ ५९ ॥ तुझ्या राज्या आलें विघ्न । गर्वें नेणसी तूं अज्ञान । माझें ऐकोनि वचन । सावधान हो वेगीं ॥ ६० ॥

ततः शूर्पणखां दृष्ट्वा वदंतीं परुषं वचः ।
अमात्यमध्ये संक्रुद्धः परिपप्रच्छ रावणः ॥ ४ ॥
कश्च रामः कथंवीर्यः किंरूपः किंपराक्रमः ।
किमर्थं दंडकारण्यं प्रविष्टश्च सुदुस्तरम् ॥ ५ ॥

ऐकतां शूर्पणखेची गोष्टी । स्वयंवरीं देखिला श्रीराम दृष्टीं । तो राम आठवितां पोटीं । थरकांप उठी रावणासी ॥ ६१ ॥ धनुष्यें घोळैसिलें मातें । तें भंगिलें श्रीरघुनाथें । तैं त्यासी बाळपण होतें । आतां पुरतें तारुण्य बाणलें ॥ ६२ ॥ याचा तारुण्यबाणप्रताप । सहावया चवदा सहस्त्र अल्प । त्रिशिरा खर दूषण स्वल्प । महाकंप रावणा ॥ ६३ ॥ वार्ता वदतांचि नकटी । रावणें धाक घेतला पोटीं । बाह्य लौकिकाचारदृष्टी । गर्जत उठी अति क्रोधें ॥ ६४ ॥ माझी भगिनी प्रिय पूर्ण । दंडोनि केलें विटंबन । श्रीराम कोठिला कोणाचा कोण । समूळ लक्षण सांग त्याचें ॥ ६५ ॥ कोण वीर्य कैसी शक्ती । किती सैन्य कोण सारथी । दंडकारण्यीं कां केली वस्ती । आयुधें किती श्रीरामा ॥ ६६ ॥ त्रिशिरा आणि खर दूषण । मारावया काय कारण । तुझें कां केलें विटंबन । समूळ कथन मज सांगें ॥ ६७ ॥

इत्युक्ता राक्षसेंद्रेण राक्षसी क्रोधमूर्च्छिता ।
राम तस्मै यथातत्त्वमाख्यातुमुपचक्रमे ॥ ६ ॥
दीर्घबाहुर्विशालाक्षश्चीरकृष्णाजिनाम्बरः ।
कंदर्पसमरूपश्च रामो दशरथात्मजः ॥ ७ ॥
शक्रचापनिभं चापं विकृष्य कनकांगदम् ।
दीप्तान् क्षिपति नाराचान् सर्पानिव महाविषान् ॥ ८ ॥
आददानं शरान् घोरान् विमुंचंतं महाबलम् ।
रक्षसां भीमवीर्याणां सहस्राणि चतुर्दश ॥ ९ ॥
निहतानि शरैस्तीक्ष्णैस्तेनैकेन पदातिना ।
अर्धाधिकमुहूर्तेन खरश्च सहदूषणः ॥ १० ॥

रावण जो कां लंकानाथ । तेणें पुसिला श्रीरघुनाथ । त्याचें स्वरूप इत्थंभूत । असे सांगत शूर्पणखा ॥ ६८ ॥ शूर्पणखा व्यथाभूत । विटंबिली क्रोधयुक्त । श्रीरामाचें निजवृत्त । असे सांगत यथान्वयें ॥ ६९ ॥ श्रीराम श्याम अति सुंदर । रमारमणीय मनोहर । सुखरूप सुखसार । ब्रह्म साकार श्रीराम ॥ ७० ॥ कमलनयन कमलपत्र । सुखैकघन श्रीरामवक्त्र । मुख देखिल्या निवती नेत्र । सुखशृंगार श्रीराम ॥ ७१ ॥ जटा मुकुट मनोहर । चीरकृष्णाजिनांबर । आजानुबाहु धनुर्धर । बाणतूणीर अक्षय्य ॥ ७२ ॥ कर्पूरयुक्त पिंवळा टिळा । कर्णीं कुंडलें कमळमाळा । कांसे मिरवे सोनसळा । वीर मंगळ श्रीराम ॥ ७३ ॥ ध्वजवज्रांकुशरेखा । दोहीं पायीं पद्में देखा । पाउलें सुकुमार रघुकुळटिळका । अति नेटकें पदांबुजें ॥ ७४ ॥ सांवळे अंगीं शुभ्र उटी । ते देखतां न पुरे दृष्टी । मना नयनां आनंदकोटी । वीर जगजेठी श्रीराम ॥ ७५ ॥ अंगीं खुपती चंद्रकर । ऐसा श्रीराम अति सुकुमार । रणरंगीं रणरंगधीर । परमशूर श्रीराम ॥ ७६ ॥ शक्रचापासम चाप । सुवर्णभूषणीं भासे सद्रूप । श्रीरामाचा निजप्रताप । सत्यसंकल्प

१ मागें न हटणारे, पुरुषार्थी. २ बाणसमूहांनीं. ३ स्त्रीजातीची. ४ स्त्रियांचें हनन करूं नये असें धर्म. शास्त्रांत सांगितलें असल्यामुळें. ५ दुसऱ्याला. ६ शेवट करणारा. ७ पाडिलें. ८ लोकांस पुरुषार्थ दाखविण्यासाठीं. ९ वल्कलें व हरिणाचे कातडें हींच वस्त्रें आहेत ज्याचीं असा. १० सुरेख.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

श्रीराम ॥ ७७ ॥ पाहतां श्रीरामाचें रूप । कोटी कंदर्पा[1] हरे दर्प । लावण्याचा परम दीप । सुखस्वरूप श्रीराम ॥ ७८ ॥ केव्हां ओढी केव्हां जोडी । केव्हां बाण सवेग सोडी । मारिल्या राक्षसांच्या कोडी । रणनिर्वेडी[2] श्रीराम ॥ ७९ ॥ श्रीरामासी नाहीं रथ सारथी । नाहीं सैन्य साह्यसंपत्ती । श्रीराम एकला एक पदाती । राक्षसघाती अंतक ॥ ८० ॥ त्रिशिरा खर दूषण शूर । अनुवर्ती[3] चवदा सहस्र । श्रीराम न घेतां दुसरें शस्त्र । केला संहार बाणाग्रें ॥ ८१ ॥ पुरुषांची[4] जातिव्यक्ती । रणीं श्रीरामें केली समाप्ती । बोंब सांगावया पुरती । तुम्हांप्रती मी आलें ॥ ८२ ॥ जैसा सांगितला श्रीरामचंद्र । तैसाचि सखा सौमित्र । तोही रणरंगधीर । परमशूर अति योद्धा ॥ ८३ ॥ समान बळ समान शीळ । दोघे समानरूपें निर्मळ । दोघे सर्वार्थी अति कुशळ । दोघे प्रवळ रणमारा ॥ ८४ ॥ प्रतिपाळावया पितृवचन । दोघीं सेविलें दंडकारण्य । सवें सीता सती जाण । बळवाहन[5] पैं दोघे ॥ ८५ ॥ लक्ष्मण श्रीरामाचा भक्त । अनन्यभावें अनुरक्त । सेवेलागोनि नित्य रत । सावचित्त सर्वस्त्रें ॥ ८६ ॥ विटंबोनि मजकारणें । तुमचें उठविलें ठाणें । तुम्ही काय जितां जिणें । करा धांवणें ससैन्य ॥ ८७ ॥ धांवणें करूं जातां खर । मारिले चवदा सहस्र वीर । तैसी येथें मी नव्हें पामर । श्रीरामचंद्र नाटोपे ॥ ८८ ॥ ऐसें विचारोनि रावणें । नाहीं केलें धांवणें । शूर्पणखेचें गाऱ्हाणें । जीवें प्राणें उपेक्षिलें ॥ ८९ ॥ देखोनि रावणाचें चिन्ह । शूर्पणखा अति उद्विग्न[6] । प्रलोभावया त्याचें मन । काममोहन प्रतिपादी ॥ ९० ॥

रामस्य तु विशालाक्षी धर्मपत्नी यशस्विनी ।
सीता नाम वरारोहा पूर्णेंदुसदृशानना ॥ ११ ॥
नैव देवी न गंधर्वी न यक्षी नैव किंनरी ।
तथारूपा मया नारी दृष्टपूर्वा महीतले ॥ १२ ॥
सा सुशीला वपुःश्लाघ्या रूपेणाप्रतिमा भुवि ।
तवानुरूपा भार्या सा त्वं च तस्याः पतिर्वरः ॥१३॥

श्रीरामापासीं सीता सुंदरी । तैसी नाहीं दुसरी नारी । मज पाहतां या चराचरीं । तिची सरी न पवती ॥ ९१ ॥ रमा उमा न पवे सरी[7] । तेथें[8] कोण पुसे सावित्री । देवी गंधर्वी ना असुरी । तिच्या घवकारीं खद्योत ॥ ९२ ॥ पद्मिनी स्त्रिया मृदुशरीर । त्यांहूनि तिचीं नखें अरुवार[9] । ऐसी सुंदर सुकुमार । मनोहर जानकी ॥ ९३ ॥ ठाणमाण गुणलक्षण । घवघवित निजलावण्य । तिचें देखतांचि वदन । मूर्च्छापन्न कंदर्प ॥ ९४ ॥ वर्तुळ वदन विशाळ नयन । देखतां जाय भूक तहान । तिचें देखतां बरवेपण । मनमोहन विरक्तां[10] ॥ ९५ ॥ सीता देखतां सौभाग्ययुक्त । फिकें होय पंचामृत । तीपासोनि न उठे चित्त । लोलंगत तत्कामें ॥ ९६ ॥ तिचें देखतां श्रीमुख । दशेंद्रियां होय हरिख । मनाची खुंटे चकमक । लागे टकमक डोळियां ॥ ९७ ॥ श्रीराम वनवासी वीतरागी योगी । सीता न शोभे त्याचे अंगीं । ते तंव भार्या तुजजोगी । तीसी तूं भोगीं लंकानाथा ॥ ९८ ॥ ते तुवां देखिलियापाठीं[11] । सत्य मानिसी माझी गोष्टी । ते पडावी तुझ्या दृष्टी । हें माझ्या पोटीं वर्तत ॥ ९९ ॥ बुद्धिपूर्वक आपण । सीता पहावी अनर्घ्य रत्न । तेव्हां मानिसी माझें वचन । साक्षेपें प्रयत्न करशील ॥ १०० ॥ सीता सांगतां शूर्पणखेसी । स्वयंवरीं देखिली होती जैसी । चांफेगोरटी लावण्यराशी । तैसी मानसीं ठसावली ॥ १ ॥

ततः शूर्पणखावाक्यं श्रुत्वा तद्रोमहर्षणम् ।
सचिवानभ्यनुज्ञाय जगाम स्वं निवेशनम् ॥ १४ ॥
मत्कार्यार्थं विदित्वा च यथावदुपलभ्य च ।
दोषाणां च गुणानां च संप्रधार्य बलाबलम् ॥ १५ ॥
इति कर्तव्यमित्येव कृत्वा निश्चयमात्मनः ।
स्थिरबुद्धिस्ततो रम्यां यानशालां जगाम ह ॥ १६ ॥

ऐकतां शूर्पणखेचें वचन । आणि होतां सीतेची आठवण । शरीरीं रोमांचित रावण । लागलें ध्यान सीतेचें ॥ २ ॥ करितां गमनागमन[12] । सीतामय त्याचें मन । करितां भोजन शयन । अखंड ध्यान सीतेचें ॥ ३ ॥ रावण निजल्या शेजेवरी । स्वप्नीं देखे सीता सुंदरी । तिची अवस्था लागली थोरी । कैसिया परी आतुडे[13] ॥ ४ ॥ श्रीराम प्रतापी परिपूर्ण । त्यासीं न करवे

१ मदनांचा. २ युद्धकुशल. ३ पाठिराखे. ४ पुरुषमात्र. ५ बळवान्. ६ कष्टी. ७ बरोबरी. ८ तेजामध्यें. ९ नाजूक. १० विरक्त. ११ पाहिल्यावर. १२ जातां येतां. १३ प्राप्त होईल.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

मज रण । तरी त्यासीं करोनियां छळण । सीता आपण आणावी ॥ ५ ॥ छळोनियां रघुनंदना । त्याची आणावी अंगना । कळूं देऊं नये जनां । गोष्टी प्रधाना सांगू नये ॥ ६ ॥ मग विसर्जोनियां सभास्थाना । रावण आला निजभुवना । सीताप्रातीची विवंचना । निजमना विवंची ॥ ७ ॥ निद्रा न लागे शेजेआंत । आतां सारथि पाचारूं त्वरित । पिशाचखरीं योजिला रथ । निघे लंकानाथ मारीचापासीं ॥ ८ ॥ मारीचरावणां भेटी गोष्टी । मायामृगाची कामिकदृष्टी । दोघे येती पंचवटीं । सीतागोरटीहरणार्थ ॥ ९ ॥ लागतां श्रीरामाचा बाण । मारीच पावेल मरण । मरतमरतां करील छळण । धांव लक्ष्मणा गर्जोनी ॥ ११० ॥ मोडोनि धनुष्येंसीं रथा । जटायु जिणोनि लंकानाथा । त्यापासोनि सोडवील सीता । अपूर्व कथा अवधारा ॥ ११ ॥ एका जनार्दना शरण । पुढें अपूर्व निरूपण । कथा कल्मषविध्वंसन । सावधान अवधारा ॥ १२ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे अरण्यकांडे एकाकारटीकायां शूर्पणखारावणसंवादो नाम द्वादशोऽध्यायः॥१२॥ ओंव्या ॥११२॥ श्लोक ।१६॥

अध्याय तेरावा

॥ श्रीरामचंद्राय नमः ॥ सीताप्राप्त्यर्थ उद्विग्न । रथारूढ रावण । मारीचाश्रमा ठाकोन । आला आपण सवेग ॥ १ ॥

तत्र कृष्णाजिनधरं जटामंडलधारिणम् ।
ददर्श नियताहारं मारीचं नाम राक्षसम् ॥ १ ॥
तं रावणः समागम्य विधिवत्स्वेन तेजसा ।
कुशलं परिपृच्छ्याथ ययाचे तेन पूजितः ॥ २ ॥

मारीचातें देखे रावण । जटाधारी वल्कलाजिन । आणि नेमस्त फळभोजन । एकांतस्थान वनवासी ॥ २ ॥ ऐसा मारीच रावणें देखोन । दोघीं दिधलें आलिंगन । मग त्यासी कुशळ पुसोन । केलें पूजन यथाविधि ॥ ३ ॥ मग बैसवूनि एकांतीं । रावण सांगे मारीचाप्रती । रामें गांजिलें बहुतां रीतीं । सांगू किती तुजपासीं ॥ ४ ॥ पद्मपुरीं माझें ठाणांतर । दूषण त्रिशिरा आणि खर । चवदा सहस्र निशाचर । अति दुर्धर तिहीं लोकीं ॥ ५ ॥ श्रीरामें वर्षोनि शर । मारिला खर दूषण त्रिशिर । चवदा सहस्र निशाचर । बाणधारा निवटिले ॥ ६ ॥ आणि शूर्पणखा भगिनी धाकुटी । सकर्णनासिकें ते केली नकटी । लाजविल्या राक्षसकोटी । लाज मोठी हे आम्हां ॥ ७ ॥

कर्णनासापहारेण भगिनी मे विरूपिता ।
अस्य भार्यां जनस्थानात् सीतां सुरसुतोपमाम् ॥ ३ ॥
आनयिष्यामि विक्रम्य सहायस्तत्र मे भव ।
त्वया ह्यहं सहायेन पार्श्वस्थेन महाबल ॥ ४ ॥
भ्रातृभिश्चासुरान् सर्वान्नाहमत्राभिचिंतये ।
तत्सहायो भव त्वं मे समर्थो ह्यसि राक्षस ॥ ५ ॥
एतदर्थमहं प्राप्तस्त्वत्समीपं निशाचर ।
शृणु तत्कर्म साहाय्ये यत्कार्यं वचनान् मम ॥ ६ ॥
सौवर्णस्त्वं मृगो भूत्वा चित्रो रजतबिंदुभि ।
आश्रमे तस्य रामस्य सीतायाः प्रमुखे चर ॥ ७ ॥

शूर्पणखेचें नासिक कर्ण । छेदोनि केलें विरूपपण । तीतें मी व्हाया उत्तीर्ण । करीन हरण श्रीरामकांता ॥ ८ ॥ सीतासौंदर्याची थोरी । मज पाहतां चराचरीं । तीसमान नाहीं दुसरी । परम सुंदरी श्रीरामप्रिया ॥ ९ ॥ सीता लावण्यमंजरी । उमा रमा न पवे सरी । माझ्या अंतरंगींची नारी । तिच्या नखाग्रीं खद्योत ॥ १० ॥ मुख्य मंदोदरी जाण । नव्हे तिच्या अंगुष्ठासमान । तिचें मी करूं पाहें हरण । तरी सहाय आपण मज व्हावें ॥ ११ ॥ तुजपासीं विचित्र गती । धरूं जाणसी नानाव्यक्ती । सुवर्णमृगाची आकृती । धरूनि सीतेप्रती त्वां जावें ॥ १२ ॥ सीता सांडोनि पंचवटी । सुवर्णमृगवधार्थदृष्टी । राम धांवेल पाठोपाठीं । ऐसी गोष्टी साधावी ॥ १३ ॥ दूरी नेवोनियां राघव । हांक मारावी अति अपूर्व । लक्ष्मणा वेगीं धांव पाव । हेंही लाघव साधावें ॥ १४ ॥

मारीच श्रूयतां तात वचनं मम भाषतः ।
आर्तोऽस्मि मम चार्तस्य भवान्हि परमा गतिः ॥ ८ ॥

---

१ कपट. २ विसर्जित करून . ३ विचार करूं लागला. ४ पापाचा नाश करणारी. ५ दुसरें स्थान. ६ धरावयास कठीण. ७ नाहीसे केले. ८ कोट्यवधि राक्षस. ९ उतराई. १० अंतःपुरांतील.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

मारीचा तूं माझा निजमंत्री । तुझी मी जाणें अगाध थोरी । तूं मज जालिया सहाकारी । मी चराचरीं निजविजयी ॥ १५ ॥ सीताहरणीं मी अति आर्त । तरी आर्त पुरवावया तूं समर्थ । माझे पुरवावे मनोरथ । कृतकार्यार्थ साधावा ॥ १६ ॥ तूं साह्य जालिया संपूर्ण । देव दानव दैत्यगण । जिणों शकें मी रावण । तेथें श्रीराम कोण बापुडें ॥ १७ ॥ तरी पर्णकुटिका सांडोन । तुवां नेलिया रामलक्ष्मण । मागें मी करीन सीताहरण । मग नको कोण मज म्हणे ॥ १८ ॥ राहु ग्रासी चंद्रकळा । तैसी हरीन जनकबाळा । मारीचसाह्याचा सोहळा । मी कळिकाळा नाटोपें ॥ १९ ॥ ऐकतां[1] श्रीरामाचें नांव । मारीचाचा दचकला जीव । विसरला वाग्वैभव[2] । भयोद्भव[3] अनिवार ॥ २० ॥

तस्य रामकथां श्रुत्वा मारीचस्य महात्मनः ।
शुष्कमासीच्च वदनं परित्रस्तो बभूव सः ॥ ९ ॥

वना आला रघुनंदन । ऐकतां मारीच भ्रांतमन । तोंडींचें पाणी गेलें पळून । मूर्च्छापन्न तो पडिला ॥ २१ ॥ नांव ऐकोनि रघुनाथा । मारीचासी प्राणांतावस्था[4] । मग बोलणें चालणें खुंटली वार्ता । तेणें लंकानाथा आश्चर्य ॥ २२ ॥ मारीच महावीर शूर । रणामाजी रणरंगधीर । योद्धयांमाजी मुख्य जुंझार । विचारसमुद्र पैं मारीच ॥ २३ ॥ भय ओढवल्यां[5] थोर । मज मारीचाचा आधार । याचेनि बळें म्यां सुरासुर । चराचर जिंकिलें ॥ २४ ॥ कार्य मांडल्या अति अवघड । समूळ साधी अर्थ गूढ । तैसाचि निर्धिडा[6] योद्धा दृढ । विचारप्रौढ विवेकी ॥ २५ ॥ घावो फार न लागतां । केवळ श्रीरामनाम ऐकतां । मारीचासी मरणावस्था । भयकंपता कां जाली ॥ २६ ॥ श्रवणीं ऐकतां श्रीरघुनंदन । धाकें चेतना गेली पळोन । निर्जीव भासे प्रेतवदन । प्राणस्फुरण पळालें ॥ २७ ॥ जैसा जड मूढ पाषाण । तैसा मारीच मूर्च्छापन्न । त्यासी वेगीं दशानन । सावधान स्वयें करी ॥ २८ ॥ मारीचास पुसे लंकानाथ । न लागतां घावो ना आघात । नांव ऐकतां श्रीरघुनाथ । मूर्च्छा मरणान्त कां आली ॥ २९ ॥ मग मारीच होवोनि सावधान । रावणासी घाली लोटांगण । श्रीरामासीं विरुद्धपण । सर्वथा आपण न करावें ॥ ३० ॥ क्षोभलिया श्रीरामचंद्र । ससैन्य सबंधु सपुत्र । सप्रधान निशाचर । तुजसहित निर्दळील ॥ ३१ ॥ सहितसैन्य चवदा सहस्र । जैसे वधिले त्रिशिरा खर । तैसें तुम्हांसी समग्र । बाणीं रघुवीर वधील पैं ॥ ३२ ॥ सुटल्या श्रीरामाचा बाण । तुम्हांमाजी निवारील कोण । राक्षसकुळाचें निर्दळण । न लागतां क्षण तो करील ॥ ३३ ॥ तरी तुझे सद्बुद्धीचें हरण । कोणें क्रूरें केलें संपूर्ण । जे श्रीरामाचें दाराहरण[7] । केंवी आपणा करवेल ॥ ३४ ॥ शेषमाथींचा निजमणी । आणूं शकेल सांग कोणी । तेंवी सीता श्रीरामापासोनी । केंवी आमुचेनि आणवे ॥ ३५ ॥ श्रीसूर्याची प्रभावळी । हरूं न शके महाबळी । तेंवी श्रीरामावेगळी जनकबाळी । न करवेचि पैं आम्हां ॥ ३६ ॥ जैसी सर्वांगीं जडली व्योमा[8] । वेगळी न करवे नीळिमा[9] । तेंवी सीता वेगळी श्रीरामा । सर्वथा आम्हां न करवे ॥ ३७ ॥ ऐसेनि करितां सीताहरण । आम्हां तुम्हां आलें मरण । सकळ कुळाचें निर्दळण । होईल जाण लंकेशा ॥ ३८ ॥ नकटी होवोनियां आधीं । ससैन्येंसीं खरू वधिला युद्धीं । तरी शूर्पणखेची मूढ बुद्धी । ऐकतां त्रिशुद्धी निमेंशील[10] ॥ ३९ ॥ सहस्रबाहु गर्वेंकरीं[11] । ऋषीची धेनु बळें हरी । त्यातें ब्रह्मचारी मारी । क्षणामाझारी ससैन्य ॥ ४० ॥ करितां परदारहरण । अवश्य आम्हां आलें मरण । म्हणोनि मारीच रावणचरण । धरी तंव रावण क्षोभला ॥ ४१ ॥ दोघें माणसें वनवासी । नाहीं सैन्यसामुग्री त्यांसी । त्यांचें भय मज दाविसी । तरी तूं जालासी नपुंसक ॥ ४२ ॥ तूं तंव बळिष्ठ संपूर्ण । ते काय जाली आंगेंवण[12] । होतां श्रीरामनामस्मरण । कंपायमान कां होसी ॥ ४३ ॥ मी तंव रावण दुर्धर । बंदीं घातले ग्रह सुरवर । श्रीराम बापुडें किंमात्र[13] । त्याचें भय थोर सांगसी ॥ ४४ ॥ म्यां जितिल्या थोर थोर धुरीं[14] । तेथें कोण पाड श्रीरामचंद्रा । धाकुटा हाही निशाचरा । धरीं धीर

१ उत्सुक. २ बोलणें. ३ भयाची उत्पत्ति. ४ मरणावस्था. ५ उत्पन्न झाल्यास. ६ धैर्याचा. ७ स्त्रीचें हरण, स्त्री पळविणें. ८ आकाशाला. ९ निळेपणा. १० मरशील. ११ गर्वानें. १२ सामर्थ्य. १३ कःपदार्थ. १४ पुढारी.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

पुरा मारीचा तूं ॥ ४५॥ ऐकोनि रावणाचें वचन। मारीच जाला हास्यवदन । रावणा न धरीं गर्वाभिमान । पूर्ण कथन अवधारीं ॥ ४६ ॥

पुरा वीर्यादहं राजन् पर्यटन् पृथिवीमिमाम् ।
बलं नागसहस्रस्य धारयन् पर्वतोपमः ॥ १० ॥
अवजानन्न संमोहाद्बालोऽयमिति राघवम् ।
विश्वामित्रस्य तां वेदिमभ्यधावं कृतत्वरः ॥ ११ ॥

तुझ्याचऐसा लंकानाथा । मज पूर्वीं बळदर्प होता । जे बाळ मानोनि रघुनाथा । त्याच्या विघाता करूं गेलों ॥ ४७ ॥ अंगीं नागायुतबळ[1] । श्रीराम सगळें गिळीन बाळ । विश्वामित्रादि ऋषी सकळ । मारोनि तत्काळ भक्षीन ॥ ४८ ॥ ऐसी धरोनियां हांव । आश्रमीं घेतली धांव । तंव निःशंक धनुर्वीडा[2] राघव । बाणलाघव अनिवार ॥ ४९ ॥ मारीच सुबाहु महावीर । सवें निघडे निशाचर । मारूं जातां श्रीरघुवीर । बाण दुर्धर सूटले ॥ ५० ॥ राक्षस देखोनियां क्रूर । डळमळीना श्रीरामचंद्र । सुटला बाणांचा महापूर । वीरें वीर खोंचले ॥ ५१ ॥ माझा मुद्गल केला कूट । सुबाहूचें ओढण[3] केलें पीठ । वीर पाडिले उद्भट । ऐसा रणसुभट श्रीराम ॥ ५२ ॥ श्रीरामें बाण सोडिला तिधारा । तो म्यां तोडिला खर्गधारा । भल्लानें सुबाहु केला पुरा । मज पिसारा लागला ॥ ५३ ॥ पिसारा लागला ब्रह्मांडीं । तेणें डोळां आली झांपडी । अंगीं भोंवडी अशुद्ध नाकीं तोंडीं । वळे मुरकुंडी हातां पायां ॥ ५४ ॥ बाणपिसाऱ्याचा दुर्धर वारा । घायें उडविलें अंबरा । शतयोजनें समुद्रतीरा । मूर्च्छापन्न पुरा पाडिलों ॥ ५५ ॥ वटारिले नेत्रवाट[4] । घरघरीत वाजे कंठ । धाकें धुकधुकीतसे पोट । प्राणसंकट मज आलें ॥ ५६ ॥ अर्धोन्मीलित जाले नयन । प्राण जाला अति सुलीन । शरीर जालें अचेतन । बाणार्धखंडें मरण मज आलें ॥ ५७ ॥ उरला होता आयुष्यकण । तेणें मी जालों सावधान । घायें गेली आंगघण । धैर्य संपूर्ण पळालें ॥ ५८ ॥ श्रीरामबाणाचा भेदरा[5] । थोर लागला दशशिरा[6] । सर्वत्र देखोनि श्रीरामचंद्रा । चराचरामाझारीं ॥ ५९ ॥

वृक्षे वृक्षे हि पश्यामि चीरकृष्णाजिनांबरम् ।
गृहीतधनुषं रामं पाशहस्तमिवान्तकम् ॥ १२ ॥
अपि रामसहस्राणि भीतः पश्यामि रावण ।
रामभूतमिदं सर्वमरण्यं प्रतिभाति मे ॥ १३ ॥
राममेव हि पश्यामि रहिते राक्षसेश्वर ।
दृष्ट्वा स्वप्नगतं राममुद्भ्रमामीव चेतनः ॥ १४ ॥

चीरकृष्णाजिनांबर । जटामुकुटधनुर्धर । देखें वृक्षोवृक्षीं श्रीरामचंद्र । प्रळयरुद्र मारक ॥ ६० ॥ भयभीत चकितदृष्टी । श्रीराम देखें कोट्यनुकोटी । श्रीराममय ही सृष्टी । धाक पोटीं बाणाचा ॥६१॥ पक्षी सावज वनीं फडके । श्रीराम म्हणोनि मी वचकें । लहान थोर जें जें देखें । तें तें श्रीराम देखें धगधगीत ॥ ६२ ॥ देखतां वृक्षांची दाटी । श्रीरामचि देखें दृष्टीं । धाकें गजबजिलों पोटीं । ऐसी श्रीरामें पाठी पुरविली ॥६३॥ स्वप्नाचिये परिपाटीं । श्रीराम देखें दृष्टी। श्रीरामाचा धाक पोटीं। श्रीरामें पाठी पुरविली ॥ ६४ ॥ श्रीरामबाणाचा पिसारा । तेणें ऐसा लाविला भेदरा । तरी विरोधितां श्रीरामचंद्रा । उरी निशाचरां उरेना ॥६५॥ श्रीरामधाक मज मानसीं । त्या मज धाडितां रामापासीं । जीव जाईल देखतां त्यासी । निश्चयेंसीं रावणा ॥ ६६॥ रकारादि वर्णजल्प । ऐकतां मजला थोर कंप । श्रीरामनामाचा आलाप । तेणें सकंप सर्वदा ॥ ६७ ॥ श्रीरामाच्या पूर्वार्धबाणें । जीव वांचला दैवगुणें । आतां त्यापासीं जाणें । तैं तो मज प्राणें सोडी ना ॥ ६८ ॥ जैं मज मागें विंधिला बाण । तैं रामा होतें बाळपण । आतां तारुण्य संपूर्ण । घायें प्राण घेईल ॥ ६९ ॥ देखतांचि श्रीरघुनाथ । माझे जीवित्वाचा अंत । मी सर्वथा नवंचें[7] तेथ । त्रिसत्य सत्य मद्वाणी ॥ ७० ॥ ऐसें सांगोनि रावणासी । मारीच रडे उकसाबुकसीं । मग रावणें धरोनि पोटासीं । काय त्यासी बोलत ॥ ७१ ॥ मनुष्य खाजुकें[8] आम्हांसी । त्या रामातें तूं कां भीसी । सीता साधल्या मजसी । अर्धराज्यासी देईन ॥ ७२ ॥ जैसा माझा ज्येष्ठ कुमरू । त्याहूनि करीन राजधरू । तुज मी देईन छत्रचामरू । सैन्यसंभारू गज वाजी ॥ ७३ ॥

१ दहा हजार हत्तींचें बळ. २ धनुर्धर. ३ ढाल. ४ डोळे. ५ भय. ६ रावणा. ७ मीति. ८ जात नाहीं, येत नाहीं. ९ भक्ष्य वस्तु.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सांडीं रामभयाची धुकधुक । अर्धराज्य देईन देख । निधडा होईं निःशंक । माझी भाक तूं घेईं ॥ ७४ ॥ तरी मेल्यामागें पिंडदान । ते भक्षिती कागश्वान । श्रीरामें घेतलिया माझा प्राण । राज्य कोण भोगील ॥ ७५ ॥ तुझी बुद्धि ऐकतां जाण । ना मारीच ना रावण । ऐसें करील श्रीरामबाण । कुळनिर्दळण राक्षसां ॥ ७६ ॥ नकटीची केवळ दुर्बुद्धी । तिणें भेदिली तुझी बुद्धी । परदारहरण-विधी । करी तो त्रिशुद्धी महामूर्खे ॥ ७७ ॥ देखतां नकटीचा मुखवट । तत्काळ बुद्धीस होय पालट । जालासी परदारलंपट । शठ नष्ट महापापी ॥ ७८ ॥ होतां नकटीचें दर्शन । निमाला त्रिशिरा खर दूषण । आतां निर्दाळावया रावण । नकटें वदन आणिलें ॥ ७९ ॥ स्वयंवरीं वरावया सीतेतें । धनुष्य वाहतां अति स्वार्थे । धनुष्य न उचलतां तूतें । तें श्रीरामें भंगिलें ॥ ८० ॥ तैं काय झाली आंगवण । कां न केलें सीताहरण । सभेसी जालें काळें वदन । घेवोनि प्राण पळालासी ॥ ८१ ॥ तूं पळसी विराधाभेणें । तो श्रीरामें मारिला न लागतां क्षण । तेथें तूं बापुडें रावण । मशक कोण संग्रामीं ॥ ८२ ॥ शूर्पणखेची दुष्ट बुद्धी । श्रीरामदारहरणविधी । बाणीं दाही मस्तकें छेदी । तेणें त्रिशुद्धी निमशील ॥ ८३ ॥ स्वामीची वासना पुरवित । संवादीं मिळती बहुत । परी यथार्थ धर्म परमार्थ । सांगतां आप्त दुर्लभ ॥ ८४ ॥ ऐक बापा लंकानाथा । म्यां सांगितलें यथार्थता । तें जैं न माने तुझिया चित्ता । तैं माझी कथा अवधारीं ॥ ८५ ॥ होतां श्रीरामदर्शन । तत्काळ जाईल माझा प्राण । तेथें मी न वचें वाहिली आण । तेणें रावण क्षोभला ॥ ८६ ॥ श्रीराम तुझा घेईल प्राण । तरी मी मारितां राखेल कोण । वर्मी खोंचला रावण । तुझें निर्दळण माझेनि ॥ ८७ ॥ आज्ञाभंगो नरेंद्राणां । राजाज्ञेचें उल्लंघन । करी त्या रायें करावें हनन । संदेह जाण न करावा ॥ ८८ ॥ सेवक मोडी स्वामीचें वचन । यदर्थ शास्त्रविधिविधान । सेवकासी करावें हनन । हें तुझें मुख्य मरण माझेनि ॥ ८९ ॥ श्रीराम मानव रंक तापसी । त्याचें भय मज दाविसी । तो मी गिळीन एका घांसीं । लक्ष्मणासीं समवेत ॥ ९० ॥ मी तंव क्षोभल्या रावण । धाकें निमती राम लक्ष्मण । मग सीतेचें पाणिग्रहण । मी करीन प्रतापें ॥ ९१ ॥ मारीचाचा करावया घात । कोपें खवळला लंकानाथ । तंव मारीच पडला विचारांत । उभयथां मृत्यु मज आला ॥ ९२ ॥

रामादपि च मर्तव्यं मर्तव्यं रावणादपि ।
उभाभ्यामपि मर्तव्यं वरं रामो न रावणः ॥ १५ ॥

जातां पंचवटीआंत । अवश्य वधील श्रीरघुनाथ । आणि तेथें न वचतां अनर्थ । लंकानाथ वधील ॥ ९३ ॥ रावणाचे हातें मरण । तें मज जालें अधःपतन । आणि लागतां श्रीरामबाण । कृतकल्याण मज तेणें ॥ ९४ ॥ अति दुर्धर श्रीरामबाण । घायें वारील जन्ममरण । ज्यासी लागे तो सुखसंपन्न । कृतकल्याण रामबाणें ॥ ९५ ॥ ऐसें विचारोनि चित्ता । मारीच म्हणे लंकानाथा । बोलिलों श्रीरामभयाची वार्ता । तुझ्या पुरुषार्था पहावया ॥ ९६ ॥ करावया श्रीरामासीं रण । तुझी कैसी आंगवण । तूं तंव अति पुरुषार्थी रावण । तरी साह्य पूर्ण मी तुज ॥ ९७ ॥ हरावया श्रीरामकांता । सर्वस्वें वेंचीन जीविता । निमेषें प्रलोभोनि सीता । मृगवेषतावैभवें ॥ ९८ ॥ ऐसें ऐकोनि मारीचवचन । सुखावला दशानन । मग धांवोनि दिधलें आलिंगन । आणि कंठाभरण अर्पिलें ॥ ९९ ॥ ऐशा दोघीं करोनि सुखगोष्टी । मग बैसोनि रथपृष्ठीं । ठाकोनि आले पंचवटी । श्रीराम जगजेठी जे ठायीं ॥ १०० ॥ मागें ठेवोनि सारथी रथ । दोघे आले वनाआंत । मग मारीचासी म्हणे लंकानाथ । कृतकार्यार्थ साधावा ॥ १ ॥ कामीकमनीय मृगरूपता । धरोनि सवेग प्रलोभोनि सीता । दूरी न्यावें श्रीरघुनाथा । सौमित्रभ्रात्यासमवेत ॥ २ ॥ येतां देखोनि रामबाणासी । अदृश्य व्हावें लाघवेंसीं । तंव मी हरीन जानकीसी । मग लंकेसी जाऊं दोघे ॥ ३ ॥ ऐसी आसत्वें सांगोनि गोष्टी । हरिखें त्याची पाठी थापटी । परम प्रीती धरोनि पोटीं । पंचवटीं प्रवेशले ॥ ४ ॥ करितां जानकीचें हरण । धाकेंती

१ दृढनिश्चयाचा. २ कावळे व कुत्रे. ३ दुसऱ्याची बायको पळविणें. ४ सामर्थ्य, बळ. ५ मरशील. ६ राजाची आज्ञा उलंघन करणें. ७ दोन्ही प्रकारीं. ८ बळ, सामर्थ्य. ९ विलासी जनांस रमणीय वाटणारी. १० भिऊं लागले.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

मारीच आणि रावण । एका जनार्दना शरण । कथाविंदान अवधारा ॥ ५ ॥ पुढील श्रीरामचरित्र । अति गुह्य आणि विचित्र । श्रवणें पातकी होती पवित्र । चिदचिन्मात्र श्रीराम ॥ ६ ॥

स्वस्ति श्रीभावार्थरामायणे अरण्यकांडे एकाकारटीकायां मारीचरावणपंचवट्यागमनं नाम त्रयोदशोऽध्यायः ॥ १३ ॥ ओंव्या ॥ १०६ ॥ श्लोक ॥ १५ ॥

अध्याय चवदावा

श्रीरामचंद्राय नमः ॥ श्रीरामाश्रम पंचवटीं । रावण देखोनि आपुल्या दृष्टीं । मारिल्या राक्षसांच्या कोटी । तेणें पोटीं दचकला ॥ १ ॥ राक्षसांचीं दीर्घ मढीं । पडलीं देखोनि करंवंडीं । मारीच अत्यंत हडबडी । खाजवी शेंडी भयभीत ॥ २ ॥ आधींच श्रीरामभयें भीत । त्यावरी देखोनि राक्षसघात । मारीच चळचळां कांपत । जे राक्षसां अंतक श्रीराम ॥ ३ ॥ देखोनि राक्षसांचें कंदन । मारीचास स्वयें रावण । अत्यंत देऊनि सन्मान । त्याचे चरण दृढ धरिले ॥ ४ ॥ सीताहरण अति निर्वाण । खुंटलें स्वामिसेवकपण । कृपा करोनि आपण । जानकीहरण साधावें ॥ ५ ॥ ज्यालागीं आमुचें आगमन । तें कार्य तों साधावें आपण । दावोनियां मायामृगमोहन । सीताहरण मज साधीं ॥ ६ ॥

स रावणवचः श्रुत्वा मारीचो राक्षसाधिपः ।
मृगो भूत्वाश्रमपदे रामस्य विचचार ह ॥ १ ॥
रुक्मबिंदुशतैश्चित्रः प्रवालमणिभूषितः ।
मुक्ताजालपरिच्छन्नः स बभूव मनोहरः ॥ २ ॥

ऐकोनि रावणाचें वचन । मारीच म्हणे आलें मरण । श्रीरामबाणें देतां प्राण । तैं आपण अति धन्य ॥ ७ ॥ अंतीं करी जो रामस्मरण । तो स्वयें होय ब्रह्म पूर्ण । त्याचा लागलिया निजबाण । कृतकल्याण होईन मी ॥ ८ ॥ श्रीरामाच्या बाणघातीं । दासी होती चारी मुक्ती । अनायासें ब्रह्मप्राप्ती । श्रीराममूर्ति देखिलिया ॥ ९ ॥ ऐसें विचारोनि चित्तीं । रावणा सुख द्यावया अंतीं । जाला विचित्र मृगाकृती । लंकापति विस्मित ॥ १० ॥ नाहीं सांडीमांडी गेली । नाहीं फेडीवेडी देखिली । घवंकरी मृगशोभा शोभली । पडली भुली लंकानाथा ॥ ११ ॥ तनु मनोहर सोनसळी । रत्नबिंदु रोममूळीं । पृष्ठीं शोभे मुक्ताफळी । नभोमंडळीं जेंवी तारा ॥ १२ ॥ खुर आरक्त प्रवाळवर्णी । कळांवया मरकतमणी । पाचुबिंदु उमटले श्रवणीं । कर्णाभरणीं अति शोभा ॥ १३ ॥ इंद्रनीळशृंगें रत्नमुरडी । आरक्त नेत्र जिव्हा तांबडी । ठाणठकारपरवडी । मृगशोभा गाढी शोभत ॥ १४ ॥ शृंगाग्रीं मणी लखलखती । पुच्छ तळपे सिंदूराकृती । शुभ्र उदर हंसस्थिती । विचित्राकृति मृगशोभा ॥ १५ ॥ अंगींच्या तेजाची प्रगल्भा । लोपती रविचंद्रांचिया प्रभा । सोलींव लावण्याचा गाभा । मृगशोभा शोभत ॥ १६ ॥ ऐसा चवकँत विचकत । चकितदृष्टीं चपळ पाहत । कांहीं चरत कांहीं फडकत । आश्रमांत स्वयें आला ॥ १७ ॥ रिघोनियां पंचवटीं । सन्मुख सीतेचिया दृष्टीं । श्रीराम देखे जगजेठी । ऐसा निकटीं विचरत ॥ १८ ॥ श्रीरामापासोनि फडके दुरी । निकट विचरे सीतासुंदरी । सर्वांगें दावोनि साजिरीं । क्षणामाझारीं मोहिली ॥ १९ ॥ मृगासीं होतां दृष्टिभेटी । हर्ष जानकीचे पोटीं । त्याचें लावण्य देखतां दृष्टीं । आल्हाद पोटीं सीतेसी ॥ २० ॥ देखोनि मृगाचे अवयव । सीतेसी सुख अभिनव । परम सुखें सुखावे जीव । जडला भाव मृगस्वरूपीं ॥ २१ ॥ त्याचें पहावया स्वरूप । सीतेसी अतिशयें सांक्षेप । तंव तो आला अति समीप । आपुलें स्वरूप दावावया ॥ २२ ॥ सीता अंग प्रत्यंग न्याहाळी । जवळ येवोनि कुरवाळी । तंव मृदुरोमा तनु कोंवळी । दोहीं करतळीं निवाली ॥ २३ ॥ देखोनि मृगशोभा अत्यंत । स्वर्गीं सुरवर जाले भ्रांत । कोण कोणाचा कैंचा येथ । महाअद्भुत हा मृग ॥ २४ ॥ देखोनियां मृगाकृती । ऋषीश्वर पडले भ्रांतीं । तटस्थ ठेली चित्तवृत्ती । अवघे पाहती टकमकां ॥ २५ ॥ होतां मृगाचें दर्शन । मृग आकर्षी सीतानयन । मृगसौंदर्या वेधलें मन । लागलें ध्यान मृगाचें ॥ २६ ॥ हर्षें

---

१ चैतन्य व जड एतद्रूपी. २ तुकडे होऊन. ३ कपटी मृगरूपानें भुलवून. ४ आश्चर्यकारक मृगरूप धारण केलें. ५ मोहकारक. ६ हस्तभूषणें. ७ घाबरलेला. ८ लोभ. ९ आग्रह.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सांगे श्रीरामासी । उल्हासें बोले लक्ष्मणासी । मृगसौंदर्या शोभा कैसी । हेमांगेंसीं[1] रत्नावळी ॥ २७ ॥ वनें हिंडतां कोटयनुकोटी । ऐसिया मृगेंसीं नव्हे भेटी । मज पाहतां निजदृष्टीं । ऐसा मृग सृष्टीं नसेल ॥ २८ ॥ हा नाहीं स्रष्ट्यानें[2] स्रजिला । नाहीं कर्मजन्य जन्मला । निखिळ[3] लावण्याचा ओतिला । दैवें धाडिला मजलागीं ॥ २९ ॥ ऐसें सीता बोले आपण । श्रीरामा घाली लोटांगण । जें मज अपूर्व मागणें दान । तें आपण मज द्यावें ॥ ३० ॥ तूं तंव उदार चक्रवर्ती । मी मागतें अति प्रीतीं । कृपा करावी श्रीरघुपती । कृपामूर्ति कृपाळुवा ॥ ३१ ॥ म्हणोनि चरण धरिले ललाटीं । अश्रु भरले नेत्रवाटीं । सलज्ज पाहे गोरटी । श्रीरामदृष्टी लक्षोनि ॥३२॥ मृगत्वचा अति कोंवळी । हेमरत्नें शोभे मुक्तावळी । अयोध्यांप्रवेशनकाळीं[4] । त्याची कांचोळी करीन मी ॥ ३३ ॥ येथोनि अयोध्या प्रवेशावयास । उरली अवधी षण्मास । तरी ते कंचुकीची बहुत आस । तुम्ही उदास न व्हावें ॥ ३४ ॥ दिव्यालंकारभूषण । त्यांहूनि त्वचा शोभायमान । तियेपुढें नवरत्न । खद्योत जाण श्रीरामा ॥ ३५ ॥

इति सीतावचः श्रुत्वा दृष्ट्वा च मृगमद्भुतम् ।
उवाच राघवो हृष्टो भ्रातरं लक्ष्मणं वचः ॥ ३ ॥
पश्य लक्ष्मण वैदेह्याः स्पृहामुल्लसितामिमाम् ।
रूपश्रेष्ठतया ह्येष मृगोऽद्य न भविष्यति ॥ ४ ॥
न वने नंदनोद्देशे न चैत्ररथसंश्रये ।
कुतः पृथिव्यां सौमित्रे योऽस्य कश्चित्समो मृगः ॥ ५ ॥

मृगाचे हृदयींचें हृद्गत । जाणोनि सीतेचें मनोगत । संतुष्टला श्रीरघुनाथ । कर्तव्यार्थ लक्षोनी ॥ ३६ ॥ श्रीराम म्हणे गा सौमित्र । पाहें पां कैसा मृग सुंदर । ठाणमाणें[5] अति गंभीर । हेमशरीर रत्नांक ॥ ३७ ॥ ऐसा मृग नंदनवनीं । पूर्वी नाहीं देखिला नयनीं । नाहींच चित्ररथवनीं । ऐसा त्रिभुवनीं असेना ॥ ३८ ॥ वनें हिंडतां दिक्पुटीं[6] । ऐशा मृगासी नाहीं भेटी । लावण्यमृगाची कसवटी । नाहीं दृष्टीं देखिली ॥ ३९ ॥ या मृगत्वचेची कांचोळी । सप्रेम मागे जनकबाळी । अयोध्याप्रवेशाचिये काळीं । स्वयें वेल्हाळी लेऊं पाहे ॥ ४० ॥ जें अपूर्व मजकारणें । प्रथम सीतेचें मागणें । नेदीं म्हणतां लाजिरवाणें । मृग मारणें त्वचार्थ ॥ ४१ ॥ सीतेच्या मागण्यासाठीं । मृगवधार्थ श्रीराम उठी । हेमाभरणी धनुष्य मुष्टीं । वाण पृष्ठीं सज्जुनी ॥ ४२ ॥ श्रीरामें मांडोनियां ठाण । धनुर्ष्यीं वाहिलासे गुण[7] । सिंतीं लाविलासे बाण । मृग लक्षोन निघाला ॥ ४३ ॥

यावत्पृषतमेकेन सायकेन निहन्म्यहम् ।
हत्वैतच्चर्म चादाय शीघ्रमेष्यामि लक्ष्मण ॥ ६ ॥

लक्ष्मणा ऐकें सावधान । बाणें एकें मृग मारीन । मृगचर्म शोभायमान । सीतेसी देईन सुखार्थ ॥ ४४ ॥ मृगचर्म आलिया हाता । परम सुखें सुखावे सीता । ऐकें तिच्या मनोगता । उभयभागता विभागूं ॥ ४५ ॥ अर्धचर्माची कंचुकी पूर्ण । अर्धचर्माचें मज आसन । करितां अयोध्याप्रवेशन । शोभायमान आम्हां दोघां ॥ ४६ ॥ मृगचर्माचें भूषण । एक कंचुकी एक आसन । ऐसें सीतेचें भावी मन । पतिवंचन करूं नये ॥४७॥ उत्तम अन्न आणि पक्कान्न । वस्त्रें अलंकार आणि भूषण । पतीविण भोगी आपण । ते स्त्री जाण समवेश्या ॥ ४८ ॥

अहमेतद्धनिष्यामि मृगरत्नं न संशयः ।
इह त्वं भव सन्नद्धः शस्त्रवान्रक्ष मैथिलीम् ॥ ७ ॥
यावद्गच्छामि सौमित्र मृगमानयितुं वनम् ।
न गंतव्यमितोऽन्यत्र यावन्नाहमिहागतः ॥ ८ ॥
राक्षसादृष्टभावत्वाद्वितर्काः संभवंति हि ।
तथा तु तं समादिश्य भ्रातरं तु पुनः पुनः ॥ ९ ॥

असो हे ऐसी सीतेची कथा । लक्ष्मणा सावध ऐक आतां । मृग मारोनि मज न येतां । तिळभर परता होऊं नको ॥ ४९ ॥ मृग मारीन मी निश्चित । जरी मिळाले त्रैलोक्यींचे दैत्य । तरी मी मागें न सरें श्रीरघुनाथ । संशय येथ न मानावा ॥ ५० ॥ राक्षसांसीं पडिलें हाडद्वंद्व । तुवां नसावें असावध । शस्त्रास्त्रीं असावें सन्नद्ध । सीता सावध रक्षावी ॥ ५१ ॥ गुज सांगे सौमित्रकानीं । राक्षस

१ सुवर्णमय अंगानें. २ ब्रह्मदेवानें. ३ सर्व. ४ अयोध्येंत जाण्याचे वेळीं. ५ आंगाच्या बांध्यानें, ठेवणीनें. ६ आठही दिशांमध्यें. ७ धनुष्याच्या दोरीला. ८ इच्छी, वांछी.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

मायावी ये वनीं। सीता नेतील छळोनी। सावधानीं रक्षावी॥ ५२ ॥ मृग मारोनि मी यें जंववरी। तुवां न व्हावें येथोनि तिळभरी दूरी। संकट आलियाही जीवावरी। धीरें निर्धारीं सहावें ॥ ५३ ॥ मजविषयीं कांहीं चिंता। तुवां न करावी गा सर्वथा। सावधानें राखावी सीता। मागुतमागुता सांगत ॥ ५४ ॥ अति संकट देखसी दृष्टीं। तरी न सांडावी पर्णकुटी। तुझे कानीं सांगेन गुह्य गोष्टी। सीता गोरटी रक्षावी ॥ ५५ ॥ सन्मुख आलिया राक्षसकोडी। अंगाचिया निजप्रौढीं। युद्धा न निघावें तांतडीं। सीता रोकडी ते नेतील ॥ ५६ ॥ तुज गोंवोनि संग्रामासीं। राक्षस नेतील सीतेसी। झणीं सीतेसी विसंबसी। निश्चयेंसीं तुज सांगें ॥ ५७ ॥ तूं चढतां संग्रामपृष्टीं। मुख्य जानकी नाठवे पोटीं। मग एकली देखोनि पर्णकुटीं। राक्षस कपटी हरतील ॥ ५८ ॥ म्यां सांगितल्या ज्या ज्या युक्ती। त्या सुदृढ धराव्या चित्तीं। नाना परीच्या उपपत्तीं[1]। सीता सती रक्षावी ॥ ५९ ॥ ऐसें सौमित्रा सांगोन। वेगें निघे मृग लक्षून। सवेंचि परतोनि येऊन। सांगे पुन्हां सीता रक्षावी ॥ ६० ॥ वारंवार करोनि नेम। मृगवधार्थीं निघे राम। धनुष्यबाणाचा आक्रम[2]। अति संभ्रम[3] तद्वधीं ॥ ६१ ॥ श्रीराम देखोनि धनुष्यमुष्टी। मृग फडके चकितदृष्टी। सांडोनियां पंचवटी। उठाउठीं[4] पळतसे ॥ ६२ ॥ शूर्पणखेचें नासिकाच्छेदन। तेथें मृगाचें आगमन। येतां देखोनि श्रीरघुनंदन। सवेग गमन तेणें केलें ॥ ६३ ॥ राम देखोनियां दुरी। मृग चाटी पाठीवरी। तया स्थळा नांव चाटोरी। गंगातीरीं अद्यापि ॥ ६४ ॥ श्रीरामुखचंद्र न्याहारी। तया स्थळा नांव चांदोरी। श्रीराम न्यावा बहुत दुरी। निघे झडकरी मृग वेगें ॥ ६५ ॥ काहाडोनि न्यावें रघुवीरा। मृग फडकला मध्यमेश्वरा। दावँळ[6] दावोनि श्रीरामचंद्रा। मृग पुढारां चालिला ॥ ६६ ॥ दुरी अंतरावया पंचवटी। मृग पळाला गंगातटीं। श्रीराम धांवे पाठोपाठीं। धनुष्य मुष्टीं सज्जोनि ॥ ६७ ॥ कोठें देतो दृष्टी भेटी। कोठें पाहतां न दिसे सृष्टीं। श्रीराम मृगाची न सांडी पाठी। दृढ बाँणाटी[7] सज्जोनि ॥ ६८ ॥ कोठें दिसे कोठें न दिसे। कोठें उडे मृगविन्यासें[8]। श्रीराम धांवे अति आवेशें। बाण सपिच्छ विंधावया ॥ ६९ ॥ देखोनि श्रीरामाचा बाण। मृग वेगें सोडी ठिकाण। त्या ठाया नांव ठाण। सावधान अवधारा ॥ ७० ॥ प्रथम कुंकुमठाण। मातुळठाण नागठाण। बादामठाण पांचवें तें भौमठाण। मृग ठिकाण सोडीत ॥ ७१ ॥ मृगपाप छेदी श्रीरामरावो। तो छिन्नपाप देहगांवो। नेऊँर[9] विंधोनि पाडिला पहाहो। तो नेउरगांवो तेथें कीं ॥७२॥ भाळ भेदिलें जिव्हारीं। तो भाळगांव गंगातीरीं। लक्ष्मणा धांव झडकरी। गिरागजरीं मृग पडिला ॥ ७३ ॥

संप्राप्तकालमाज्ञाय चकार सुमहास्वनम्।
सदृशं राघवस्येव हा सीते लक्ष्मणेति च ॥ १० ॥
हा लक्ष्मणेति चुक्रोश त्राहीति महता वने।
स्वरमेनं तु संश्रुत्य लक्ष्मणस्तां प्रहासति।
लक्ष्मणेन विहीनां तां मैथिलीं रावणो हरेत्॥ ११ ॥

लागतां श्रीरामाचा बाण। करोनि सप्तताळ उड्डाण। मारीच सांडी निजप्राण। पाव लक्ष्मणा म्हणोनि ॥ ७४ ॥ मारीच महामावकर। श्रीरामस्वरासारिखा स्वर। करोनि आक्रंदे दुस्तर। दीन उत्तर तें ऐका ॥ ७५ ॥ लक्ष्मणा वेगीं धांव पाव। मिळोनि राक्षससमुदाव। रणीं निरोधें निरोधिलें पहा हो। महाबाहो धांव वेगीं ॥ ७६ ॥ तूं तंव माझा निजसखा। रणभूमीचा पाठीराखा। राक्षसीं मारिलें मारिलें देखा। रणमोचका पाव वेगीं ॥ ७७ ॥ ऐसिया युक्तीं आक्रंदोन। मृगरूपाचा त्याग करोन। मारीच राक्षस होतां जाण। घेतला प्राण श्रीरामबाणें ॥ ७८ ॥ मृगदेह राक्षसदेहो। स्थूळलिंगकारणदेहो। श्रीरामें छेदोनि निःसंदेहो। मारिला पहा हो मारीच ॥ ७९ ॥ मरणें मारिलें जन्मासहित। देही विदेही केला घात। माया मारोनियां समस्त। बाणें अत्यंत सुखी केला ॥ ८० ॥ श्रीरामाचा निजबाण। ज्यासी लागे तो सभाग्य[10] पूर्ण। बाण नव्हे हा आनंदघन। सुखसंपन्न श्रीरामें ॥ ८१ ॥ स्थूळ देहातें छेदीत। ते योद्धे देखिले बहुत। परी जीवीं जीवपणा करी घात। श्रीरघुनाथ निजयोद्धा ॥ ८२ ॥ छेदोनियां

१ युक्तींनीं. २ स्वीकार. ३ आवेश, आदर. ४ लगबगीनें, त्वरेनें. ५ पाही. ६ डावा भाग. ७ बाण. ८ हरिणाच्या गतीनें. ९ पायाचा घोटा. १० भाग्यवान्.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

भयाभय शोक। छेदोनियां द्वंद्वदुःख । श्रीरामें दिधलें महासुख। सुखाचें सुख श्रीराम ॥ ८३ ॥ मारीचानें नेम केला देख। श्रीरामबाणें पावेन सुख। तें रामें दिधलें आवश्यक। शत्रु सेवक समपदीं ॥ ८४ ॥ जें सुख भोगिती सनकादिक। तेंचि सुख मारीचास दे आवश्यक। बाप कृपाळू रघुकुळटिळक। सुखदायक संग्रामीं ॥ ८५ ॥ यापरी श्रीरामें आपण। मारीच मारिला विंधोनि बाण। धांव पाव गा लक्ष्मण। रघुनंदन साशंके ॥ ८६ ॥ मारीच आक्रंदाची हाक। दुमदुमिले तिन्ही लोक। हें सौमित्रें ऐकोनि देख। येईल आवश्यक धांवोन ॥ ८७ ॥ धांवण्या आलिया लक्ष्मण। अनर्थ होईल दारुण। मागें येवोनि रावण। सीता हरण करील ॥ ८८ ॥ जरी लक्ष्मण न येईल तत्त्वतां। तरी त्यासी राहूं न देईल सीता। बोल बोलेल उत्पांतता। अति त्रासता धाडील ॥ ८९ ॥ हा तंव मायावी मृग पूर्ण। अलक्ष योजिलें विंदांन। धांवण्या आणोनि लक्ष्मण। सीताहरण साधावें ॥ ९० ॥ ऐसें राक्षसीमायामत। आपण जाणोनि समस्त। विलंब करों नये येथ। त्वरित रघुनाथ रिघों पाहे ॥ ९१ ॥ जंव आला नाहीं लक्ष्मण। तंव तेथें जावें आपण। विलंब करितांचि जाण। सीता रावण हरील ॥ ९२ ॥ लक्ष्मण धांवण्या न ये उठाउठी। तंव ठाकावी पंचवटी। ऐसें विचारोनि पोटीं। मग जगजेठी निघों पाहे ॥ ९३ ॥ एका जनार्दना शरण। श्रीरामें मारीच मारिला पूर्ण। धांवण्या धांवेल लक्ष्मण। कथाविंदान अवधारा ॥ ९४ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे अरण्यकांडे एकाकारटीकायां मारीचकपटमृगवधो नाम चतुर्दशोऽध्यायः ॥ १४ ॥ ओंव्या ॥ ९४ ॥ श्लोक ॥ ११ ॥

अध्याय पंधरावा

श्रीरामचंद्राय नमः। श्रीरामस्वरासमान। मारीचानें केलें आक्रंदन। ऐकोनि सीता करी रुदन। श्रीराम आपण सांपडला ॥ १ ॥ राम रणरंगधीर संपूर्ण। विकट योद्धा अतिदारुण। तरी तो आक्रंदे दीनवदन। पाव लक्ष्मणा म्हणोनि ॥ २ ॥ श्रीरामाचें आक्रंदन। ऐकोनियां दीनवदन। उगाचि राहिला लक्ष्मण। याचें कां मन द्रवेना ॥ ३ ॥

आर्तस्वरं तु तं भर्तुर्विज्ञाय सदृशं वने।
उवाच लक्ष्मणं सीता गच्छ जानीहि राघवम् ॥ १ ॥
सखायं भ्रातरं ज्येष्ठं रामं पंथानमागतम्।
आक्रंदमानं तु वने भ्रातरं त्रातुमर्हसि ॥ २ ॥
तं क्षिप्रमभिधाव त्वं भ्रातरं शरणैषिणम्।
रक्षसां वशमापन्नं सिंहानामिव गोवृषम् ॥ ३ ॥

सीता म्हणे लक्ष्मणासी। आजि कां निष्ठुर झालासी। राक्षसीं रोधिलें रामासी। तूं कां न धांवसी धांवण्या ॥ ४ ॥ तूं जिवलग बंधु सखा। रणांगणींचा पाठीराखा। ऐकोनि श्रीरामाच्या हांका। धांवण्या तूं कां न धांवसी ॥ ५ ॥ जैसा व्याधिग्रस्त केसरी। वनीं वेढिजे वानरीं। श्रीराम तैसा वनांतरीं। निशाचरीं वेढिला ॥ ६ ॥ श्रीराम रणरंगधीर पूर्ण। तोही आक्रंदें आला शरण। शरणागताचें रक्षण। केंवी आपण न करिसी ॥ ७ ॥ ऐसें बोलोनियां सीता। लक्ष्मणचरणीं ठेवी माथा। श्रीराम पावला अति आकांता। धांवणें तत्त्वतां करीं वेगीं ॥ ८ ॥ ऐकोनि सीतेचें वचन। सौमित्र घाली लोटांगण। ऐक माते सावधान। रघुनंदन निजमहिमा ॥ ९ ॥

देवि देवमनुष्येषु गंधर्वेषु पतत्रिषु।
राक्षसेषु पिशाचेषु किन्नरेषु मृगेषु च।
अशक्यस्तव वैदेहि भर्ता जेतुं न संशयः ॥ ४ ॥

सुरासुर नर किन्नर। दानव मानव निशाचर। यक्ष राक्षस विद्याधर। पळती सत्वर श्रीरामबाणें ॥ १० ॥ पिशाच गुह्यक गंधर्ववीर। त्रैलोक्यींचे निधँडे शूर। पक्षी पन्नग विखार। पळती सत्वर श्रीरामबाणें ॥ ११ ॥ विरिंच्यादि सुरेश्वर। कांपती देखोनि श्रीरामशर। पिनाकपाणि श्रीशंकर। तोही श्रीरामासमोर होऊं न शके ॥ १२ ॥ देखोनि श्रीरामाचा बाण। शंकर घाली लोटांगण। त्या श्रीरामासी मारील कोण। व्यर्थ रुदन कां करिसी ॥ १३ ॥ तुजदेखतां त्रिशिरा खर। मारिले चवदा सहस्र निशाचर। त्या श्रीरामासी मृग किंकर। केंवी साचार मारवे ॥ १४ ॥

---

१ समानतेनें. २ भयंकर. ३ युक्ती. ४ गांठावी. ५ दया येत नाहीं. ६ सिंह. ७ दृढनिश्चयाचे. ८ सर्प. ९ ब्रह्मदेवादि. १० पिनाकनामक धनुष्य धरणारा शंकर. ११ कःपदार्थ.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

श्रीरामबाणाच्या निजनेटें। मेरुमांदारपर्वत[1] फुटे। कळिकाळाचें पोट फाटे। घायें उतटे[2] ब्रह्मांड ॥ १५ ॥ ऐसया श्रीरामासी देख। मृग बापुडें एकलें एक। कैंवी मारूं शकेल रंक। वृथा दुःख तूं कां करिसी ॥ १६ ॥ श्रीराम वध्य नव्हे कोणासी। श्रीराम वधील सर्वांसी। तूं कां रडसी आक्रंदेंसीं। मृत्यु श्रीरामासी असेना ॥ १७ ॥ वसिष्ठें सांगितलें निजवर्म। अजरामर श्रीराम परब्रह्म। हें नाठविसी तूं मूर्ख परम। रुदनधर्म तो मिथ्या ॥ १८ ॥ लक्ष्मणा धांव धांव सत्वर। हा तंव नव्हे श्रीरामस्वर। राक्षस वदती मावकर[3]। ते तूं साचार मानिसी ॥ १९ ॥ ऐक आतां माझें उत्तर। मृग मारोनियां सत्वर। आतांचि येईल तुझा भर्तार। धरीं धीर जानकिये ॥ २० ॥ राक्षसांचिये छळणवचनीं[4]। तुज एकलें सांडोनि वनीं। न वचें श्रीरामाच्या धांवणीं। सत्य वाणी हे माझी ॥ २१ ॥ श्रीराम सांगे वारंवार। जीवावरी आलिया दुर्धर। तरी न सांडावी सीता सुंदर। तुजसमोर नेमिलें ॥ २२ ॥ माझेविशींची कांहीं चिंता। लक्ष्मणा तुम्हीं न करावी सर्वथा। श्रीराम बोलिला तुजदेखतां। अति सावध सीता रक्षावी ॥ २३ ॥ पुनः पुनः सांगे कानीं। राक्षस मायावी ये वनीं। सीता नेतील छळोनी। सावधानीं राखावी ॥ २४ ॥ छळावया वनांतरीं। जाली शूर्पणखा अति सुंदरी। राक्षस येतील तैसियेपरी। सीता तिळभरी न विसंबें ॥ २५ ॥ श्रीरामाची शिकवण ऐसी। आणिक मी कैंवी करूं तुझ्या बोलासी। तुज सांडोनि वनवासीं। रामापासीं न वचें मी ॥ २६ ॥ उल्लंघोनि श्रीरामवचन। तुझेनि बोलें जातां आपण। राक्षसीं केलिया तुझें हरण। रोकडें मरण मज आलें ॥ २७ ॥

आत्मबुद्धिर्हितार्थाय गुरुबुद्धिर्विशेषतः।
परबुद्धिर्विनाशाय स्त्रीबुद्धिः प्रलयं गतः ॥ ५ ॥

निजात्मबुद्धि ते हितासी। सद्गुरुबुद्धि सुखैकराशी। परबुद्धि ते विनाशासी। मूळ प्रळयासी स्त्रीबुद्धी ॥ २८ ॥ ऐकतां स्त्रीवचन जमदग्नी। तो निमाला तत्क्षणीं। रेणुका घायेंवटे[5] पडे धरणीं। क्षत्रियां रणीं निर्दाळिलें ॥ २९ ॥ तीन सप्तकें[6] वधिले क्षेत्री[7]। रुधिरपूर वाहे धरित्रीं। स्त्रीवाक्याची हे थोरी। जे चराचरीं आकांत ॥ ३० ॥ ऐसी स्त्रीवाक्याची परी। हितोपदेशीं अनर्थ करी। तुज सांडोनि गुंफेमाझारी। तिळभरी दुरी मी न वचें ॥ ३१ ॥ अति कठिण माझा भावो। मज नाहीं श्रीरामस्नेहो। तुज एकलें सांडोनि पहा हो। शोधूं श्रीरामरावो न वचें मी ॥ ३२ ॥ मज काढावया गुंफेबाहेरी। धांव धांव म्हणिजे निशाचरीं[8]। ऐसी मायिक हांक मारी। तुजह्नि दूरी मी न वचें ॥ ३३ ॥ ऐसें बोलतां लक्ष्मणा। सीतेसी कोप आला चौगुणा[9]। सांडोनि मर्यादेची गणना[10]। कठिण वचना अनुवादे[11] ॥ ३४ ॥

नैव चित्रं सपत्नेषु पापं लक्ष्मण यद्भवेत्।
त्वद्विधेषु नृशंसेषु नित्यं प्रच्छन्नचारिषु ॥ ६ ॥

प्रत्यक्ष श्रीरामाची हांक। ते म्हणसी तूं नायिक। माझे ठायीं तुझा अभिलाष। पापी निष्टंकें[12] तूं एक ॥ ३५ ॥ माझा अभिलाष धरोनि मनीं। वनासी आलासी सेवक होउनी। श्रीराम राक्षसीं वधिल्या वनीं। मज निजपत्नी करूं पाहसी ॥ ३६ ॥ सापत्नांची हेचि बुद्धी। बंधूसी बंधु छळोनि वधी। त्याची भोगावी भोगसमृद्धी। हे दुष्टबुद्धि तुजपासीं ॥ ३७ ॥ सर्वचोराचें[13] साजणें[14]। तैसी सेवा केली लक्ष्मणें। नाना युक्तीं श्रीराम मारवणें। मज आपण भोगावया ॥ ३८ ॥ श्रीरामसेवा केली प्रबळ। त्या सेवेचें हेंचि फळ। पत्नी करावी जनकबाळ। सेवा सफळ येणें तुझी ॥ ३९ ॥ परदारकामिक[15] दुष्ट। सेवा करोनि अति शठ[16]। आजि कळला भाव स्पष्ट। महानष्ट तूं पापी ॥ ४० ॥ श्रीराम सन्निध देखोनी। म्हणसी जानकी माझी जननी। श्रीराम राक्षसीं वधिलिया वनीं। सीता पत्नी करूं पाहसी ॥ ४१ ॥ मी तंव श्रीरामाचें रंक। परपुरुषाचें न शिवें अंकें[17]। जळो तुझें काळें मुख। माझा अभिलाष करूं पाहसी ॥ ४२ ॥ तूं

१ मेरु व मांदार यांसारखे पर्वत. २ फाटे. ३ मायावी, कपटी. ४ मायावी शब्दानें. ५ घायानें. ६ एकवीस वेळां. ७ क्षत्रिय. ८ राक्षसांनीं. ९ चौपट. १० स्त्रियांच्या अंगीं नैसर्गिक असणारे लज्जा, विनय इत्यादि गुण टाकून देऊन. ११ बोलूं लागली. १२ खरोखर. १३ विश्वासघातक्याचें. १४ सोबत. १५ परस्त्रीची इच्छा करणारा. १६ वंचक. १७ मांडी.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

तंव माझा अभिलाषी । मजपासोनि दुरी न वचसी । मीच जाईन श्रीरामापासीं । काय त्यासी वर्तलें ॥ ४३ ॥

अश्रुपूर्णमुखी सीता तथोक्त्वा पुनरब्रवीत् ।
गोदावरीं प्रवेक्ष्यामि हीना रामेण लक्ष्मण ॥ ७ ॥
पिबामि वा विषं तीक्ष्णं प्रवेक्ष्यामि हुताशनम् ।
न त्वहं राघवादन्यं कदापि पुरुषं स्पृशे ॥ ८ ॥

लक्ष्मणा ऐकें सावधान । श्रीरामावेगळी मी आपण । होईन गंगेमाजी मग्न । कीं हुताशन[2] प्रवेशें ॥४४॥ किंवा करीन विषभक्षण । अथवा पर्वतपतन[3] । अथवा वृक्षाग्रीं वेंघोनें[4] । देईन प्राण अधःपतनें ॥ ४५ ॥ परी तुजसी अंगसंग । नाहीं करणें विषयभोग । बोलणें हेंचि माझें निर्व्यंग । तूं निःसंग विषयार्थी ॥ ४६ ॥ श्रीरामावेगळें आणिकातें । नाहीं स्पर्शणें जीतें । ऐसें जाणोनि निश्चितें । भजें भावार्थें श्रीरामा ॥ ४७ ॥ ऐकोनि सीतेची दुष्ट वाणी । सौमित्र बोटें घाली कानीं । श्रीरामनाम स्वयें स्मरोनी । अति उद्विग्न संतप्त ॥ ४८ ॥ जानकीचे वर्मीं वाग्बाण । साहों न शकेचि लक्ष्मण । दृढ खोंचलें अंतःकरण । वचनें प्राण सोडूं पाहे ॥ ४९ ॥ ऐसें बोलोनि अति कठिण । सीता आक्रोशें करी रुदन । तें देखोनि लक्ष्मण । बोले दारुण क्षोभोनी ॥ ५० ॥

स्वभावोऽयं हि नारीणां त्रिषु लोकेषु कथ्यते ।
विमुक्तधर्माश्चपलास्तीक्ष्णा भेदकराः स्त्रियः ॥ ९ ॥
उपशृण्वंतु मे सर्वे साक्षिभूता वनेचराः ।
न्यायवादी यथावाक्यमुक्तोऽहं परुषं त्वया ॥ १० ॥
स्त्रीस्वभावेन दुष्टेन दुरुक्तेन न्यवस्थितम् ।
यास्यामि यत्र काकुत्स्थः स्वस्ति तेऽस्तु वरानने ॥ ११ ॥

स्त्रीस्वभाव दुष्ट अद्भुत । जे नवमास वाहे उदरांत । जे सोसी सदा नरक मूत । त्या मातेसी सुत पारखा करी ॥ ५१ ॥ बंधुबंधूंसीं वैराकार । वाढवावया मुख्य साचार । स्त्रीसंगाचा बडिवार । वेगळाचार सुहृदांसीं ॥ ५२ ॥ मी बोलें नित्य नित्य निष्पाप । तो त्वां छळोनि श्रीरामप्रताप । मजवरी घालिसी अभिशाप । हें महापाप जानकिये ॥ ५३ ॥ सांडोनि मर्यादा धर्मार्गळा । स्त्रिया होती उच्छृंखळा । तें म्यां आजि देखिलें डोळां । जनकबाळाअभिशापें ॥ ५४ ॥ मज तुज साक्ष येथें । ऐकताती समस्त भूतें । उल्लंघावया श्रीरामाज्ञेतें । अभिशापोक्तें मज छळिलें ॥ ५५ ॥ तुज सांडोनि वनांतरीं । तिळभरी म्यां न व्हावें दूरी । हे श्रीराज्ञा वंदितां शिरीं । नानापरी त्वां छळिलें मातें ॥ ५६ ॥ त्वां मज घातला अभिशाप । तुझें तुज फळेल पाप । श्रीराम न भेटे सद्रूप । भोगिसी संताप षण्मास ॥ ५७ ॥ तूं जननी मी अपत्य । हा तंव माझा दृढ भावार्थ । तुझा तुज फळेल वचनार्थ । अति अनर्थ पावसी ॥ ५८ ॥ मी अपत्य तूं जननी । हा सद्भाव माझे मनीं । तरी राम भेटे मृग वधोनी । द्वंद्वबंधनीं[9] निर्मुक्त ॥ ५९ ॥ श्रीरामाज्ञेचें रक्षण । तुजपासीं होतों जाण । म्यां केलिया वनाभिगमन । राक्षस हरण तुज करिती ॥६०॥ पुढें श्रीरामाची दृष्टादृष्टी । सहसा तुजसी न होईल भेटी । सोशिल्या विघ्नांचिया कोटी । श्रीराम दृष्टीं देखसी तूं ॥ ६१ ॥ तुज सांडोनि निर्बंधन[10] । माझेनि न करवेचि गमन । माझें निजसत्त्व[11] संपूर्ण । संरक्षण तुज असो ॥ ६२ ॥ तूं न मानसी माझा भावो । मज पुसेल श्रीरामरावो । त्यालागीं रक्षणनिर्वाहो । करोनि पाहो मी जातों ॥ ६३ ॥ श्रीरामाचा निजसखा[12] । निर्विकल्प शुद्ध नेटका । तरी हे माझी मर्यादा देखा । ब्रह्मादिकां अनुल्लंघ्य ॥ ६४ ॥ माझे मर्यादेची रेखा । कळिकाळासी अटक देखा । तेथें राक्षसां पैं रंकां । केंवी आंवांका[13] करवेल ॥ ६५ ॥ राक्षसां न करवे हरण । ऐसें ठेविलें निजरक्षण । तुवां पाळावें येवढें वचन । रेखाउल्लंघन न करावें ॥ ६६ ॥ योगी संन्यासी तापसवेषी । भिक्षेसी येतील आश्रमासी । तूं विश्वासूं नको तयांसीं । मर्यादेसी नुल्लंघीं ॥ ६७ ॥ उल्लंघोनियां रेखेसी । जरी तूं भिक्षा देऊं जासी । तरी तूं राक्षसीं हरिजेसी । दुःखी होसी जानकिये ॥ ६८ ॥ ऐसें सांगोनि लक्ष्मण । करावया श्रीरामगवेषण[14] । सवेग निघाला आपण । धनुष्यबाण सज्जोनी ॥ ६९ ॥

१ जात नाहींस. २ अग्नींत. ३ पर्वतावरून कडेलोट. ४ चढून. ५ ज्यांत कांहीं उणें नाहीं असें, परिपूर्ण. ६ द्वेष. ७ निंदा, तळतळाट. ८ धर्मरूप मर्यादा.

९ शीतोष्ण सुखदुःखादि विकाररहित. १० रक्षणरहित, मोकळी. ११ शुद्धभाव. १२ मोठा आवडता, अत्यंत प्रिय. १३ धीर, धैर्य. १४ श्रीरामाचा शोध.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

त्यक्त्वा सुदुस्त्यजसुरेप्सितराजलक्ष्मीं
धर्मिष्ठ आर्यवचसा यदगादरण्यम् ।
मायामृगं दयितयेप्सितमन्वधाव-
द्वंदे महापुरुष ते चरणारविंदम् ॥ १२ ॥

देव वांछिती राज्यवैभव । पितृवाक्यें त्यजोनि सर्व । चरणचालीं श्रीराघव । आला स्वयमेव वनवासा ॥ ७० ॥ सीताप्रियेचें प्रियवचन । ऐकोनियां श्रीरघुनंदन । मायामृगीं करी धांवन । ते श्रीरामचरण वंदी सौमित्र ॥ ७१ ॥ ध्वजवज्रांकुशरेखा । श्रीरामपदें पाहत देखा । चालिला लक्ष्मण निजसखा । स्वानंदें देखा डुल्लत ॥ ७२ ॥ श्रीरामपदीं प्रेम पूर्ण । पद दों पदीं लोटांगण । श्रीरामचरण लागल्या जाण । धन्य प्राण पैं माझा ॥ ७३ ॥ श्रीराम चरण लागल्या जाण । तृण पर्ण मृत्तिका पाषाण । मस्तकीं वंदी तो रजःकण । धन्य चरण रामाचे ॥ ७४ ॥ श्रीरामपदें देखतां दृष्टीं । सौमित्रासी आनंदकोटी । गातां नाचत चालतां दृष्टीं । तंव श्रीराम जगजेठी देखिला ॥ ७५ ॥ मृग मारोनि गंगातटीं । अश्वत्थतरूच्या तळवटीं । स्वस्थ बैसला श्रीराम जगजेठी । तंव देखिला दृष्टीं सौमित्रें ॥ ७६ ॥ कुमित्रा गेल्या कल्पकोटी । श्रीरामासीं नव्हेचि भेटी । तो सौमित्रें देखिला दृष्टीं । स्वानंदपुष्टी सदोदित ॥ ७७ ॥ नाहीं श्रीरामीं युद्धकंदन । नाहीं राक्षस ना बंधन । नित्यमुक्त श्रीरघुनंदन । सुखसंपन्न देखिला ॥ ७८ ॥ लक्ष्मणा धांव धांव सत्वर । हें तंव मायिक उत्तर । सौमित्रें जाणोनि सत्वर । श्रीरघुवीर वंदिला ॥ ७९ ॥ दोघां जाली दृष्टादृष्टी । आनंदें ओसंडली सृष्टी । चरण वंदोनियां ललाटीं । पडली मिठी आलिंगनीं ॥ ८० ॥ दोनी दीपक एक होती । दोहींची मिळोनि एक दीप्ती । श्रीरामसौमित्र तैसिया रीतीं । क्षेम देती एकत्वें ॥ ८१ ॥ समुद्रीं रिघतांचि लवण । स्वयें समुद्र होय आपण । तेंवी श्रीरामलक्ष्मण । जाले परिपूर्ण पूर्णत्वें ॥ ८२ ॥ श्रीरामा नाठवे रामपण । येरा नाठवे भक्तपण । खुंटले बोल तुटलें मौन । आनंदीं निमग्न सदोदित ॥ ८३ ॥ सीतें छळिलें अभिशापवृष्टीं । ते नाठवे लक्ष्मणा गोष्टी । आणि ठाकोनि जावें पंचवटी । हेंही श्रीरामापोटीं नाठवे ॥ ८४ ॥ ऐसे स्वानंदाचे पोटीं । दोघां पडली एक मिठी । पुढें संरक्षावया सृष्टी । सुटली मिठी प्रेमाची ॥ ८५ ॥ श्रीराम म्हणे लक्ष्मणासी । एकले सांडोनि सीतेसी । तूं कां येथें धांवलासी । तें मजपाशीं सांग वेगें ॥ ८६ ॥

ततो लक्ष्मणमायातं ददर्श विगतप्रभम् ।
विषण्णः सविषण्णेन दुःखितो दुःखभागिना ॥ १३ ॥

पुसतां सीतेचें रक्षण । निवांत जाला लक्ष्मण । दुःखें दुःखी अति दारुण । अश्रुपूर्ण मुख दिसे ॥ ८७ ॥ पुसों जातां सीतेची गोष्टी । लक्ष्मणासी दुःखकोटी । देखोनियां मुखसन्निष्ठी । श्रीराम पोटीं धाकिन्नला ॥ ८८ ॥ स्वयें सीतेनें सौमित्रासी । दुष्ट दुरुक्तीं अति संत्रासीं । धांवण्या धाडिला मजपासीं । अति दुःखेंसीं दुःखित ॥ ८९ ॥ सौमित्र जुल्लंघी माझे वचना । परी वर्मस्पर्शाची संज्ञा । सीतेनें करविली आज्ञा । श्रीरामा सर्वज्ञा कळों सरलें ॥ ९० ॥ स्त्रीवाक्याचे दारुण वाण । हृदयीं खोंचले संपूर्ण । तेणें अति दुःखी लक्ष्मण । आला धांवोन मजपासीं ॥ ९१ ॥ सीता सांडोनि कां आलासी । ऐसें पुसतां श्रीरामासी । लक्ष्मण लागला पायांसीं । उकसाबुकसीं स्फुंदत ॥ ९२ ॥ आलिया विघ्नांच्या कोटी । परी मी न सांडितों पंचवटी । परि सीताभिशापगोष्टी । ऐकून उठाउठी मी पळालों ॥ ९३ ॥ ऐसें बोलली दारुण । जेणें तत्काळ ये मरण । करितां तुझें नामस्मरण । माझे प्राण वांचले ॥ ९४ ॥ जरी न करितों तुझें नामस्मरण । तरी तत्काळ मज येतें मरण । देखोनियां तुझे चरण । समाधान पावलों ॥ ९५ ॥ जानकीअनुवादकथन । ऐकें स्वामी सावधान । जे जे विंधिले वाग्बाण । तें तें प्रकरण अवधारीं ॥ ९६ ॥ लक्ष्मणा धांव धांव ऐसें गर्जन । मायामारीचाक्रंदन । ऐकोनि सीता करी रुदन । युद्धबंधन श्रीरामा ॥ ९७ ॥ जानकी म्हणे धांव सत्वर । राक्षसीं वेढिला रघुवीर । त्याचा करीं रणोद्धार । तूं सहोदर पाठिराखा ॥ ९८ ॥ म्यां दिधलें प्रतिवचन । राक्षस बापुडें मशक कोण । त्यासी नाटोपे रघुनंदन । ऐकें महिमान रामाचें ॥ ९९ ॥ मिळाल्या दैत्यदानवांच्या थाटी । आलिया राक्षस कोट्यनुकोटी । श्रीराम नाटोपे जगजेठी । नळी निवटी बाणें एकें ॥ १०० ॥ सीता न मानी तुझा

१ गवत, पानें, माती आणि दगड. २ रामाशीं विरोध करणाऱ्याला. ३ भरली, ४ सीतेनें, ५ उद्विग्न मुखाकडे, ६ सीतेनें केलेला आरोप. ७ जानकीचें बोलणें ऐक. ८ उत्तर, ९ मान, गळा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

प्रताप । अति आक्रंदें करी संताप । धांवण्या धांव सद्रूप । राम सद्रूप पाहत दृष्टीं ॥ १ ॥ श्रीरामाज्ञा माझे शिरीं । तुजपासोनि तिळभरी । परता नव्हें धांवण्या बाहेरी । निजनिर्धारीं बोलिलों ॥ २ ॥ तुज सांडोनि एकली नारी । मज जातां धांवण्या-वारी । तुज हरिल्या निशाचरीं । तिघांचे शिरीं दुर्नाम ॥ ३ ॥ श्रीराम सांगे आळवूनी । सीता राखावी सावधानीं । तो मी धांवण्या न धांवें वनीं । तुजपासोनि दुरी न वचें ॥ ४ ॥ ऐसी ऐकोनि माझी वाणी । सीता क्षोभली शतगुणीं । पूर्वमर्यादा सांडोनी । वर्मीं खोंचोनि अनुवादे[2] ॥ ५ ॥ श्रीरामधांवण्या न धांवोनी । दुरी नव्हेसी मजपासोनी । राम राक्षसीं वधिल्या वनीं । मज निजपत्नी करूं पाहसी ॥ ६ ॥ माझा अभिलाष धरोनि मनीं । सेवा करिसी संवचोरपणीं[3] । श्रीराम राक्षसीं वधिल्या वनीं । मज निजपत्नी करूं पाहसी ॥ ७ ॥ परदारिया अति लंपटा । सेवक-वर्गामाजी महानष्टा । मुख न दावीं मज पापिष्टा । दुष्टा भ्रष्टा चांडाळा ॥ ८ ॥ होवोनि श्रीरामाचा सवंता[4] । वना आलासी मजभोंवता । येणें वाक्यें सांडोनि सीता । आलों रघुनाथा तुजपासीं ॥ ९ ॥ महामारक जें कां विख । तें मज घेतां निजपीयूखं[5] । परी सीतावाक्याचें असुख । परम दुःख श्रीरामा ॥ ११० ॥ पित्यानें गांजिल्या शांतवी माता । मातेनें गांजिल्या शांतवी पिता । येणेंचि भावें श्रीरघुनाथा । आलों तत्त्वतां मी तुजपासीं ॥ ११ ॥ ऐकोनि सौमित्राचें वचन । श्रीरामें दिधलें आलिं-गन । तेणें जालें समाधान । सुखसंपन्न तेणें दोघे ॥ १२ ॥ साकर विरोनि होय जीवन । जीवना आलें गोडपण । तेंवी दोघे रामलक्ष्मण । सुखसं-पन्न येरयेर ॥ १३ ॥ लोह परिसासीं पडतां गांठी । तत्काळ काळिमेसी होय तुटी । तेंवी सौमित्रैसीं श्रीराम भेटी । दुःखकोटी निमाल्या ॥ १४ ॥ ऐकोनि सीतेचें वचन । विस्मित श्रीरामाचें मन । मायामृगाचें विंदान[6] । जाणे संपूर्ण श्रीराम ॥ १५ ॥ मायामृगें आक्रंदोन । धांवण्या आणिला लक्ष्मण । मागें येवोनि रावण । सीताहरण करील ॥ १६ ॥ ऐसा जाला कृतकार्यार्थ । जाणोनियां श्रीरघुनाथ । सुख मानिलें पोटांत । राक्षसअंत करावया ॥ १७ ॥ जाणोनि मायामृगाची गोष्टी । बाइलेचिया बोलासाठीं । राम कां धांवला मृगा-पाठीं । श्रोतीं पोटीं न मानावें ॥ १८ ॥ स्त्री-कामाच्या अति प्रीतीं । मायामृगीं श्रीरघुपती । नाहीं धांवला कामासक्तीं । गूढ ग्रंथोक्ती अवधारा ॥ १९ ॥ सीता केवळ नव्हे पत्नी । परमभक्त-शिरोमणी । चरणचालीं आली वनीं । सेवेलागोनि श्रीरामा ॥ १२० ॥ राज्यीं असतां श्रीरामासीं । सेवा वांटली सेवकांसी । स्वयें करावया सेवेसी । उल्हासेंसीं वना आली ॥ २१ ॥ सीता निर्विकार भक्त । श्रीराम जाणे मनोगत । तिचा पुरवावया भावार्थ । स्वयें धांवत मृगामागें ॥ २२ ॥ भक्ता-चिया वचनासाठीं । प्रकटला कोरडे काष्ठीं[7] । तो श्रीराम धांवे मृगापाठीं । सुखसंतुष्टी सीतेच्या ॥ २३ ॥ भक्ताचें भावें वचन । कदा नुल्लंघी श्री-रघुनंदन । सीतासद्भावें आपण । करी धांवणें मृगापाठीं ॥ २४ ॥ जैसा भाव तैसा देव । यदर्थीं नाहीं संदेह । देखोनि सीतेचा निजसद्भाव । धांवे श्रीरामराव मृगापाठीं ॥ २५ ॥ मायामृगीं करी धांवन । समूळ सांगितलें आपण । सीता निर्भर्त्सी[8] लक्ष्मण । तेंही निरूपण अवधारा ॥ २६ ॥ त्रैलोक्यपावन श्रीरामख्याती । वाढवावया अगाध कीर्ती । लक्ष्मणा दवडी सीता सती । नानावक्रोक्ती छळोनी ॥ २७ ॥ मुख्य सीतेचें मनोगत । श्रीरामें वधावा लंकानाथ । तोचि साधावया कार्यार्थ । केला छळणार्थ सौमित्रा ॥ २८ ॥ श्रीराम सीता सौमित्र । तिन्ही मूर्ती अति पवित्र । प्रकटावया श्रीरामचरित्र । कथाविचित्रअनुवादु ॥ २९ ॥ अवताराचें नटनाट्य[9] । प्रगट करावया स्पष्ट । कथानुवाद दिसे विकट । तोचि निर्दिष्ट परमार्थ ॥ १३० ॥ सीता सती स्वयें सद्रूप । ते लक्ष्मणा लावी अभिशाप । हे मूर्खांचे मूर्ख जल्प । कथानुरूप[10] अति गूढ ॥ ३१ ॥ येरयेरांचें मनोगत । जाणो-नियां स्वयें वर्तत । अगाधकीर्ति श्रीरघुनाथ । जग पुनीत श्रीरामनामें ॥ ३२ ॥ श्रीरामकथेचें अक्षर । क्षराक्षरातीत पर । श्रोते वक्ते अति पवित्र । कथाचरित्रअनुवादू ॥ ३३ ॥ केवळ जपतां

१ बजावून. २ बोलूं लागली. ३ विश्वासघातक्या-प्रमाणें. ४ शत्रू. ५ अमृतासमान. ६ कपट, कौतुक.

७ नृसिंहअवतार घेऊन. ८ दुष्ट शब्द बोलून. ९ अवतार-कृत्य. १० कथेंतील मर्माला अनुसरून.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

श्रीरामनाम। नामें वक्ता होय परब्रह्म। त्याचा चरित्रसंभ्रम। आनंद परम परमार्थी ॥ ३४ ॥ एका जनार्दना शरण। भेटले श्रीराम लक्ष्मण। येरीकडे सीताहरण। स्वयें रावण करूं पाहे ॥३५॥ सीता साधावया पंचवटी। रावण येवोनियां कपटी। त्या दोघांच्या धर्मगोष्टी। कथाकसवटी अनुपम्य ॥ १३६ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे अरण्यकांडे एकाकारटीकायां श्रीरामलक्ष्मणानुवादो नाम पंचदशोऽध्यायः ॥ १५ ॥ ओंव्या ॥ १३६ ॥ श्लोक ॥ १२ ॥

अध्याय सोळावा

श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ॥ लक्ष्मण गेला रामापासीं। सीता एकली गुंफेसी। रावण आला तेचि संधीसी। सीतेपासीं भिक्षुवेषें ॥ १ ॥

एतदंतरमासाद्य दशग्रीवः प्रतापवान्।
परिव्राजकरूपेण वैदेहीमन्ववर्तत ॥ १ ॥

गुंफे नसतां श्रीरामलक्ष्मण। शून्य मंदिरीं रिघे श्वान। तेंवी आला दशानन। सीताहरणकार्यार्थी ॥ २ ॥ गर्भजन्में जन्मली नाहीं। सीता देहींच विदेही। तिचें हरण करावया पाहीं। आला लवलाहीं लंकानाथ ॥ ३ ॥ सीताहरण करूं म्हणतां। मुळींच भीक लागली लंकानाथा। चौपालवी[3] आली हाता। अंगीं अशुभता बाणली ॥ ४ ॥ चौदा चौकड्यांचें राज्यलक्षण। तें गेलें न लागतां क्षण। भिकारी जाला आपण। सीताहरण करूं म्हणतां ॥ ५ ॥ सीतेचा आश्रम देखतां। भेणें पळाली राजवैभवता। भिक्षेनें वरिलें लंकानाथा। ऐसें सामर्थ्य सीतेचें दुर्धर ॥ ६ ॥ अभिलाषितां लाविली भीक। लंकेस सीता नेलिया हे देख। राक्षस मारवील एकाएक। लंका निःशेख जाळील ॥ ७ ॥ वळचणीमाजी दीपकळी। ठेवितां ते तत्काळ जाळी। तेंवी राक्षसकुळीं। करील होळी क्षणामध्यें ॥ ८ ॥ अभिलाषितां कामधेनु। निर्दाळिला सहस्रार्जुनु। तेंवी सीताहरणें रावणु। कुळनिर्दळणु राक्षसां ॥ ९ ॥ सीता पाहूं जातां जाण। पळाली त्याची आंगवण। भिक्षुरूप अति हीन। दीनवदन भिक्षार्थी ॥ १० ॥ स्वयंवरीं सीता देखतां जाण। रावणा जाला अति अपमान। येथेंही सीता पाहतां पूर्ण। निजापमान भिक्षुकत्वें ॥ ११ ॥ बाप सीतेचें विंदान। दृष्टीनें गांजिला रावण। आपणियां आपण दे अपमान। दीनवदन भिक्षार्थी ॥ १२ ॥ रावणा सन्निपात सीतेचा संपूर्ण। न कळे शुभाशुभ चिन्ह। भिक्षुवेषें अत्यंत हीन। दीनवदन भिक्षार्थी ॥ १३ ॥ षण्मासिक सन्निपात। रावणासी जाला येथ। सीताभिलाषीं निश्चित। निजात्मघात सकुळेंसीं ॥ १४ ॥ ऐसिया युक्तीं रावण। भरोनि भिक्षुत्व संपूर्ण। करोनि नारायणस्मरण। आला आपण आश्रमा ॥ १५ ॥ सीता देखतां गोरटी। रावणाची खुंटली दृष्टी। पूर्ण अभिलाष जाला पोटीं। अति गोमटी रामकांता ॥ १६ ॥ स्वरूपरूपें अति सगुण। रूपरेखा गुणलावण्य। सर्व अवयव सुखैकघन। सुखनिधान जानकी ॥ १७ ॥ केवळ लावण्याची पुतळी। निखळ सौंदर्याची ओतिली। बरवेपणासी चढली। सीता शोभली सुखरूप ॥ १८ ॥ सीतासौंदर्यें निवाले नयन। विसरला भूकतहान। देखोनि सुखावलें निजमन। नवनिधान जानकी ॥१९॥ सीतेसी होतां दृष्टिभेटी। भेटीसवें आनंदकोटी। इचेनि योगें सुखसंतुष्टी। आनंद सृष्टीं असेना ॥ २० ॥ ऐसिया सौंदर्याची बोली। कदाकाळीं नाहीं ऐकिली। सीता घवघवीत देखिली। भुली पडली इंद्रियां ॥ २१ ॥

नैव देवी न गंधर्वी नासुरी न च किन्नरी।
एवंरूपा मया नारी दृष्टरूपा महीतले ॥ २ ॥

देवी गंधर्वी सुरेश्वरी। त्याही न पावती इची सरी। रंभा उर्वशी किन्नरी। इच्या नखाग्रीं न सरती ॥ २२ ॥ दैत्यदारा आणि दानवी। सरी न पावती मानवी। सावित्री न पवे इची पदवी। सर्वावयवीं सुखरूप ॥ २३ ॥ पद्मिनी नारी अति विख्याता। सरी न पवती वनदेवता। उमा रमा हरिहरकांता। इची स्वरूपता त्यां नाहीं ॥ २४ ॥ मंदोदरी येथें कायसी। जेंवी खद्योत सूर्यापासीं। सीता लावण्याची राशी। सीमा रूपासीं न करवे

---

१ पळविण्याकरितां. २ संन्याशाच्या रूपानें. ३ झोळी. ४ श्रीमंतीची शोभा. ५ संन्याशाचें रूप. ६ करणी, कौतुक. ७ केवळ. ८ तृप्त झाले. ९ बरोबरी.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ २५ ॥ अमृतप्राय इची बोली । ऐकतां पीयूषा[1] पडली भुली । परमहंस न ये चाली । वेडावली मनोबुद्धि ॥२६॥ अंगीं खुपती चंद्रकिरण[2] । सुखैकघन सुकुमार । अकार उकार निर्विकार । मनोहर जानकी ॥ २७ ॥ आणिक स्त्रिया मनोहर । कवि वर्णिती स्तुतिमात्र । परी सीता मनोहर साचार । मज किंकरें[3] इनें केलें ॥ २८ ॥ मज हिंडतां सकळ सृष्टीं । ऐसी देखिली नाहीं दृष्टीं । इसी झालिया भोगभेटी । सुखसंतुष्टी स्वानंदें ॥२९ ॥ सीतासुख-भोगसंतुष्टी । यासी कांटाळें[4] ना सृष्टीं । भाग्य असलिया ललाटीं । सीता गोरटी तैं लाभे ॥ ३० ॥ जरी स्वयंवरीं धनुष्य उचलतें । तरी तैंच सीता वरिती मातें । धनुष्य भोंवलें मजभोंवतें । सामर्थ्य तेथें न चलेचि ॥ ३१ ॥ आतां ही आहे अति सांकडीं[5] । सीता एकली वनीं निर्वेडी[6] । श्रीरामाची पडल्या उडी । माझी नरडी मुरडील ॥ ३२ ॥ सांडोनि न वचें सीतेसी । श्रीरामाचा धाक मानसीं । छळोनि हरावया सीतेसी । भिक्षु-भावेंसीं बोलत ॥ ३३ ॥

कासि कस्य कुतश्च त्वं किंनिमित्तं च दंडकम् ।
एका चरसि कल्याणि घोरराक्षससेवितम् ॥ ३ ॥
इह वासश्च कान्तारे किमर्थं ते वरानने ॥ ४ ॥

रावण केवळ कपटवेषी । स्वयें होवोनि संन्यासी । येवोनियां सीतेपासीं । सद्भावेंसीं पूसत ॥ ३४ ॥ तूं तंव लावण्याची राशी । वनीं एकली कां वससी । कोणी न देखों संगतीसीं । निजवृत्तांतासी मज सांगें ॥ ३५ ॥ तूं कोण कोणाची पैं कैंची । एकाकी वस्ती काननाची । हे वृत्ति नव्हे साधुत्वाची । वस्ती वनींची अति कठिण ॥ ३६॥ दुस्तर वस्ती दंडकारण्यीं । राक्षस मायावी ये वनीं । स्त्रिया हरिती सिंतरोनी[7] । ब्राह्मण मारोनी भक्षिती ॥ ३७ ॥ ऐसिया कठिण वनस्थळीं । तूं तंव दिससी राजबाळी । वनीं वससी कां वेल्हाळी । हें समूळीं मज सांगें ॥ ३८ ॥ ऐकोनि अतीताचें वचन । सीता सांगे निजकथन । मी तंव दशरथाची सून । कन्यारत्न जनकाचें ॥ ३९ ॥ स्वयंवरीं रावणा अपमानून । श्रीरामें हरचाप भंगून । परशुरामातें जिंकोन । पर्णन[8] केलें पैं माझें ॥ ४० ॥ श्रीराम आणि लक्ष्मण । भरत आणि शत्रुघ्न । हे चवघे बंधु जाण । जीवप्राण येरयेरां ॥ ४१ ॥ राया दशर-थानें जाण । कैकेयीभाष्यनिर्बंधनें[9] । वना धाडिले श्रीरामलक्ष्मण । दंडकारण्यवनवासीं ॥ ४२ ॥ नेम मर्यादा चवदा वर्षीं । श्रीरामें वसावें वनवासीं । मजही धाडिलें वनवासासी । निजसेवेसी श्रीरामा ॥ ४३ ॥ श्रीरामसेवेसी सावधान । माझें करावया संरक्षण । सवें दिधला लक्ष्मण । वीर दारुण प्रतापी ॥ ४४ ॥ श्रीरामें मारिलें ताटकेसी । सुबाहु मारिला रणकर्कशी । मारीच उडविला आकाशीं । बाणाधेंसीं झडपोनी ॥ ४५ ॥ विराधें मज धरितां जाण । श्रीरामें विंधोनियां[10] बाण । एकेंचि घायें घेतला प्राण । दुष्टनिर्दळण श्रीराम ॥४६॥ विराधा-ऐसा महाबळी । घायें मेळविला धुळी । तेणें राक्षस कांपती चळचळीं । आतुर्बळी श्रीराम ॥ ४७ ॥ मग येवोनि गंगातटीं । आश्रम करोनि पंचवटीं । वनवासातें तो कंठी । सुखसंतुष्टी स्वानंदें ॥ ४८ ॥ सार्धवर्षत्रयोदश[11] । रामें क्रमिला वनवास । आतां उरले षण्मास । मग प्रवेश अयोध्ये ॥ ४९ ॥ सुवर्णमृग वधावयासी । श्रीराम धांवला वनासी । लक्ष्मण गेला तयापासीं । तेणें मज देखसी एकली ॥ ५० ॥ मी एकली नव्हें जाण । मज रक्षावया दोघे जण । दुर्धर वीर श्रीरामलक्ष्मण । न लागतां क्षण येतील ॥ ५१ ॥ मृग मारोनियां जाण । आतां येतील रामलक्ष्मण । तंववरी रहावें आपण । भिक्षा पूर्ण देईल राम ॥ ५२ ॥ श्रीराम अतीतांचा[12] सेवक । तुम्हांसी देखिल्या होईल सुख । भिक्षा देईल आवश्यक । तुम्हीं नावेंक[13] रहावें ॥ ५३ ॥ ऐकतां सीतेची गोष्टी । रावण थरथरां कांपे पोटीं । मागें पाहे चकितदृष्टीं । उठाउठीं पळूं पाहे ॥ ५४ ॥ करा-वया सीतेचें हरण । अत्यंत साक्षेपी रावण । गोड बोलाचा करी प्रश्न । विश्वास पूर्ण उपजा-वया ॥ ५५ ॥

इह व्यालमृगाः सिंहा वृकव्याघ्राश्च राक्षसाः ।
कथमस्मिन् महारण्ये न बिभेषि वरानने ॥ ५ ॥

१ अमृताला. २ चंद्राचीं किरणें. ३ सेवक. दास. ४ तुलना, माप, मोज. ५ संकटांत. ६ खरोखर. ७ ठकवून, फसवून. ८ पाणिग्रहण. ९ कैकेयीला दिलेल्या वचनामुळें. १० मारून. ११ साडेतेरा वर्षें. १२ याचकांचा. १३ क्षणभर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

ये वनीं श्वापदें दुस्तर। व्याघ्र सर्प सिंह शूकर। वृकें[1] जंबुक तरस तगर। निशाचरें[2] नरभक्षी ॥ ५६ ॥ स्त्रिया भयभीत त्रिभुवनीं। तुज भय नुपजे दुर्धर वनीं। हेंचि सांगें मजलागोनी। तूं कैसेनि निःशंक ॥ ५७ ॥ अतीता तूं ऐकें सावधान। वनीं वसतां श्रीरघुनंदन। प्रतापतेजें अति दारुण। संरक्षण निजभक्तां ॥ ५८ ॥ हृदयीं हाणोनियां नखें। मज अभिलाषिलें काकें। रामें सोडिलें दर्भईषिके[3]। वचनें एकें माझेनि ॥ ५९ ॥ श्रीरामाची दर्भईषिका। निवारेना ब्रह्मादिकां। काक हिंडतां तिहीं लोकां। शिवादिकां दुर्धर ॥६०॥ श्रीरामईषिका देखोन। चळीं कांपत इंद्रवरुण। कळिकाळ घाली लोटांगण। यम आपण शिरीं वंदी ॥ ६१ ॥ ईषिके नाहीं निवारण। काक श्रीरामा आला शरण। मग ईषिकेनें वाम नयन फोडून। कृपेनें प्राण वांचविले ॥ ६२ ॥ तैंपासोनि श्वापद गाढें। कोणी न पाहे मजकडे। तेथें राक्षस कायसें बापुडें। मजपुढें यावया ॥ ६३ ॥ श्रीरामाची प्रतिज्ञा पूर्ण। जो जो करील सीताहरण। त्याचा घेईन मी प्राण। दुर्धर बाण सोडोनि ॥ ६४ ॥ पक्षियावरी अति पुरुषार्थ। करोनि प्रतापी श्रीरघुनाथ। ऐसा न मानावा अर्थ। रणकंदनार्थ अवधारीं ॥ ६५ ॥ श्रीरामा नावडे कपटदृष्टी। शूर्पणखा अति खोटी। छळों आली पंचवटीं। केली नकटी सौमित्रें ॥ ६६ ॥ शूर्पणखाकैवारी जाण। मारिले त्रिशिरा खर दूषण। चवदा सहस्र राक्षसगण। रामें संपूर्ण निर्दाळिले ॥ ६७ ॥ लक्ष्मणें युद्धाआंत। अद्यापि लाविला नाहीं हात। त्याचा अनुच्छिष्ट पुरुषार्थ। इंद्रजितवधार्थ ठेविलासे ॥ ६८ ॥ मारिले त्रिशिरा खर दूषण। तैं श्रीरामेंच केला पण। मारोनि कुंभकर्ण रावण। अयोध्यागमन मग करणें ॥ ६९ ॥ ऐसा प्रतापी श्रीरघुकुळटिळक। पशुपक्षियां त्याचा धाक। त्याचेनि बळें यथासुख। वनीं निःशंक मी विचरें ॥ ७० ॥ ऐसें सीता स्वयें बोलोन। अतिथीस घाली आसन। तंव तिसीं करावया सन्निधान[4]। चाले आपण हरणार्थी ॥ ७१ ॥ तंव लक्ष्मणाची मर्यादारेखा। उलंघवेना दशमुखा। करितां बळाचा आवांका। मर्यादारेखा नुलंघवे ॥ ७२ ॥ रेखा रावण जंव पाहे तळीं। तंव ते खोल सप्तपाताळीं। वरती पाहतां निराळीं[5]। नभोमंडळीं जडलीसे ॥ ७३ ॥ तळींहूनि जावया नाहीं गती। उलंघावया न चले शक्ती। रेखेनें रोधिला लंकापती। सीतेप्रती न वचवे ॥ ७४ ॥ सीतेपासीं न वचवे जाण। मग कैसेनि करवेल हरण। सत्य सत्त्वांथिला[6] लक्ष्मण। रेखा रक्षण जानकिये ॥ ७५ ॥ सीता सांडोनि गेला लक्ष्मण। रेखा ठेविली दृढ रक्षण। अत्यंत कष्टतां रावण। सीताहरण न करवे ॥ ७६ ॥ मारीच निमालासे देखा। आणि माझेनि नुलंघवे रेखा। वेगीं आलिया रघुकुळटिळका। दाही मस्तकां छेदील ॥ ७७ ॥ ऐसिया विचाराच्या गोष्टी। उठल्या रावणाच्या पोटीं। सीता देखोनि गोरटी। उपरमदृष्टि उपजेना ॥ ७८ ॥ मग मांडिलें पूर्ण कपट। संन्यासी आलिया स्त्रियांनिकट। तो जाणावा महापापिष्ट। अति निर्दुष्ट यतिधर्मी ॥ ७९ ॥ संन्यासधर्माचें लक्षण। निंद्य स्त्रियांचें दर्शन। निंद्य स्त्रियांसीं संभाषण। सन्निधान अति निंद्य ॥ ८० ॥ श्रीराम परमार्थी नेटका। तरी कां धर्माआड ठेविली रेखा। येचविशींची आशंका। पळों न देखा जावया ॥ ८१ ॥ या वनींचे राक्षस वासी। भीत भीत आलों मी या वनासी। तुम्हां देखोनि मनुष्यवेषीं। येथें भिक्षेसी मी आलों ॥ ८२ ॥ तूं राक्षससुंदरी मनुष्यवेषी। भीतरी नेसी मारायासी। अत्यादरें बोलाविसी। सन्मान देसी भक्षावया ॥ ८३ ॥ ऐसें ऐकोनि अतिथिउत्तर। सीता म्हणे श्रीहरहर। आम्ही नव्हों गा निशाचर। नित्य किंकर अतिथींचे ॥ ८४ ॥ मग सीता आणावया रेखेबाहेरी। रावणें बुद्धि योजिली पुरी। क्षुधेनें पीडलों हो भारी। डोळां अंधारी येतसे ॥ ८५ ॥ जरी कृपा आहे अतीतासीं। बाहेरी आणोनि भिक्षा देसी। तरी गंगातीरीं सावकाशीं। निजआहारासी करीन ॥ ८६ ॥ गोड बोलसी जैसें पीयूख[9]। परी न घालिसी ये वेळे भीक। माझेनि न साहवेचि भूक। तरी आतां

१ लांडगे. २ मनुष्यें खाणारे राक्षस. ३ दर्भाची काडी. ४ सान्निध्य. ५ अंतराळीं, आकाशांत. ६ पूर्ण सत्त्वगुणसंपन्न. ७ विवेकदृष्टि. ८ रहाणारे. ९ अमृत.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

विमुख मी जातों ॥ ८७ ॥ मग सीता म्हणे स्वामिनाथा । विमुख न वचावें[1] सर्वथा । रेखा उल्लंघोनि तत्त्वतां । भिक्षा निजस्वार्थी देईन ॥ ८८ ॥ विमुख जालिया अतीत । श्रीरामसौमित्र युद्धाआंत । जयो कदा न पावत । अति विघात होईल ॥ ८९ ॥ सुखी केलिया अतीत । सुखी होईल श्रीभगवंत । श्रीरामलक्ष्मण युद्धाआंत । यशवंत होतील ॥ ९० ॥ राखितां[2] लक्ष्मणमर्यादारेख । अतीत होऊं पाहे विमुख । येणें पापें पावेल पति दुःख । भिक्षा आवश्यक मी घालीन ॥ ९१ ॥ ऐसा विचार मानसीं । सीतेनें करोनि निश्चयेंसीं । भिक्षा आणावया अतीतासी । स्वयें गुंफेसीं रिघाली ॥ ९२ ॥ तंव हडबड जाली देवांसी । स्वर्गीं होती कासाविसी । सकळ देव आणि ऋषी । ब्रह्मयापाशीं स्वयें आले ॥ ९३ ॥ जे सुटावी देवांची बांधवडी । आजिची आहे लग्नघडी । बुद्धि विचारावी गाढी । सुरसांकडी[3] फेडावया ॥ ९४ ॥ भिक्षा देतां रावणाप्रती । रावण सीता धरील हातीं । क्षणार्धें भस्म करील सीता सती । आदि शक्ती जगदंबा ॥ ९५ ॥ जेंवी पतंग दीपाप्रती । आलिंगितां मरोनि जाती । तेंवी सीता धरितां हातीं । भस्मगति रावणा ॥ ९६ ॥ रावण जालिया भस्मीभूत । मग लंकेसी न ये रघुनाथ । देवबांधवडी[4] समस्त । इंद्रजित सोडीना ॥ ९७ ॥ ऐसें विचारोनि जाण । गुंफेसी येऊनि सुरगण । धरिले सीतेचे निजचरण । भिक्षा आपण न घालावी ॥ ९८ ॥ अतीत जातां विमुख । श्रीरामलक्ष्मण पावती दुःख । तुम्ही सर्वज्ञ देवलोक । हा विवेक मज सांगा ॥ ९९ ॥ मग देव सांगती आपण । अतिथिरूपें हा रावण । तुझें करूं आला हरण । भिक्षा आपण न घालावी ॥ १०० ॥ मग बोलिली सीता सती । रावणें मज धरितां हातीं । त्यासी लावीन कल्पांतख्याती । भय किती मज त्याचें ॥ १ ॥ रावण कायसें बापुडें । दहा तोंडांचें तें किडें । त्याचें भय मजपुढें । वांडेंकोडें[5] काय सांगा ॥ २ ॥ तंव देव म्हणती ऐक माते । रावणबंदीं आम्ही समस्तें । तुवां निर्दळिलिया रावणातें । इंद्रजित आमुतें सोडीना ॥ ३ ॥ करावया आमुचें बंधमोचन । तुम्हां दोघांचें अवतरण[6] । तूंचि पाहें विचारून । पूर्वविधान निजयोग ॥ ४ ॥ ऐकोनि देवांचें वचन । सीता जाली हास्यवदन । पावोनि मूळींची निजखूण । काय आपण बोलली ॥ ५ ॥ जरी मी राहिलें गुप्तस्थिती । तरी रावण आलासे भिक्षार्थीं । त्यासी काय कराल युक्ती । ते मजप्रती सांगावी ॥ ६ ॥ देव बोलती निजयोग्यता । रावणाच्या भिक्षार्था । आम्ही करूं मायिक सीता । तेणें जनकदुहिता स्वयें हांसे ॥ ७ ॥ साकार आणि सचेतनता । मायिक रूपें श्रीरामकांता । करूं न शके तो विधाता । तुम्ही तत्त्वतां महामूर्ख ॥ ८ ॥ पर्जन्याची जळगार । करूं न शकती अति चतुर । तेंवी ब्रह्मादिक सुरवर । कृत्रिम अवतार करूं न शकती ॥ ९ ॥ जैसी माझी सगुण काया । तैसी मद्रूप माझी छाया । मी धाडितें भिक्षा द्यावया । सुरकार्या साधावया ॥ ११० ॥ ऐकोनि सीतेचें वचन । समस्तीं घातलें लोटांगण । सीतेचे वंदोनि श्रीचरण । राहिले लपोन विमानीं ॥ ११ ॥ भिक्षा घालावया लंकानाथा । सवेग छाया बाहेर येतां । हेचि मुख्यत्वें सती सीता । सत्य समस्तां मानलें ॥ १२ ॥ ठाणमाण गुणलक्षण । रूपरेखा[8] समसमान । सुर[9] सिद्ध साध्य चारण । अवघ्यांही ज्ञान सत्य सीता ॥ १३ ॥ यक्ष राक्षस दैत्य दानव । सत्य सीता मानिती मानव । बापें[10] जानकीचें लाघव । छाया सजीव पैं केली ॥ १४ ॥ सद्भावें समर्थ जानकी । स्वयें राहोनि अग्निमुखीं । छाया धाडिली भिक्षेसी निकी[11] । येतां सकळिकीं देखिली ॥ १५ ॥ भिक्षा घेवोनि वेगेंसीं । उल्लंघोनियां मर्यादरेखेसी । सीता आली रावणापासीं । तंव येरु अभिलाषी[12] हरणार्थ[13] ॥ १६ ॥ जेंवी छाया न राहे रूपापासीं । तेंवी उल्लंघोनियां मर्यादरेखेसी । भिक्षा देतां रावणासी । तो आकर्षी[14] सीतेतें ॥ १७ ॥

हस्ते हस्तं विनिक्षिप्य चकार सुमहद्वपुः ।

तच्च सौम्यं परित्यज्य भिक्षुरूपं स राक्षसः ॥ ६ ॥

१ न जावें. २ लक्ष्मणानें सांगितल्याप्रमाणें रेखा सोडून बाहेर न गेल्यानें. ३ देवांचें संकट. ४ देवांचें बंधन. ५ कौतुकेंकरून. ६ अवतार. ७ शरीराची ठेवण. ८ रूपलावण्य. ९ सुर, सिद्ध, साध्य आणि चारण ह्या देवजाती आहेत. १० मोठें. ११ खरोखर. १२ इच्छी. १३ नेण्याकरितां. १४ ओढी.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

भिक्षा देतां अतीताप्रती । अतीतें सीता धरिली हातीं । तंव येरी आंसडोनि[1] हस्तगतीं । पाडिला क्षितीं रावण ॥ १८ ॥ जंव रिघे मर्यादरेखेआंत । तंव तो आकर्षी लंकानाथ । सांडूनि भिक्षुवेष[2] समस्त । जाला अद्भुत राक्षस ॥ १९ ॥ दहा शिरें वीस भुजा । मी तंव लंकेचा हो राजा । तुज मी करीन निजभाजा । भोगीं माझा सुखभोग ॥ १२० ॥ राम तापसी दीनवदनी । कष्टलीसी वसतां वनीं । तुज करीन पट्टराणी । मुख्य विलासिनी मंदोदरी ॥ २१ ॥ तुज बैसतां माझे अंकीं । मंदोदरी मुख्य सेवेंकी[3] । ऐशीं सहस्र राण्या आणखी । तुझ्या वटकी[4] मी करीन ॥ २२ ॥ मी ब्रह्मयाचा नातु प्रसिध्दु । कुबेराचा धाकटा बंधु । माझा वंश अति शुद्धु । सांडीं छंदु श्रीरामाचा ॥ २३ ॥ वसंत वळंगे[5] शेजारें । सेज रचिजे कुसुमाकरें[6] । चंद्र निववी शीतळ करें । करीन किंकरें सुर सिद्ध ॥ २४ ॥ सुरश्रेष्ठ इंद्रादिक । तुझे वोळंगेचे[7] पायिकें[8] । मुख्य मी आज्ञेचा सेवक । अलोलिक भोग भोगीं ॥ २५ ॥ माझें देखिलिया अशोकवन । तुझें निवेल तन मन । धन्य म्हणसील दशानन । लंकाभुवन देखिलिया ॥ २६ ॥ सीता आक्रंदे राम राम । रावण अत्यंत सकाम । तिचे प्राप्तीचा संभ्रम[9] । आवडीं खेंवं[10] देऊं पाहे ॥ २७ ॥ सीता म्हणे रावणासी । वोळंबा[11] चाखों पाहे अग्नीसी । तेंवी तूं मज भोगूं पाहसी । जळोन मरसी मत्कामें ॥ २८ ॥ पतंग आलिंगी दीपकळी । तो तत्काळ होय होळी । तैसी भोगूं जातां जनकबाळी । तूं सकुळीं मरशील ॥ २९ ॥ अहल्याभिलाष सुरेंद्रा । सर्वांगीं भगें जाहलीं इंद्रा । तैसी अभिलाषितां रामदारा । बाणधारा निर्भंसील[12] ॥ १३० ॥ श्रीराम सूर्य रावण खद्योत । रावण कांजी श्रीराम अमृत । तुझे ठायीं जे भोगासक्त । ते निश्चित दंश मशक ॥ ३१ ॥ श्रीराम केवळ क्षीरसमुद्र । रावण मुताचें थिल्लर । त्याचे ठायीं भोगतत्पर । ते शूकर नरदेही ॥ ३२ ॥ श्रीराम जगाचें जीवन । रावण डोंबाड[13] परिच्छिन्न[14] । तेथें रमती ढोंकें[15] हीन । साधु निमग्न श्रीरामीं ॥ ३३ ॥ अतिथिवेषें अति कपटी । संन्यासीरूपें स्त्रीलंपटी । विषयगोडीचिया गोष्टी । आमिषासाठीं मरे मासा ॥ ३४ ॥

मम भर्ता तदा ब्रह्मन् वयसा सप्तविंशकः ।
अष्टादश तु वर्षाणि ममायुरवगम्यते ॥ ७ ॥

वना निघतां श्रीरामचंद्रा । सत्तावीस वर्षें त्या अवसरा । माझें वय वर्षें अठरा । वसिष्ठद्वारा ऐकिलें ॥ ३५ ॥ तूं तंव बहुकाळाचा म्हातारा । विषय भोगितां आली जरा । तूं माझिया अभिलाषद्वारा । निशाचरा कां मरसी ॥ ३६ ॥ मज न्यावया कैंची शक्ती । वृथा वल्गतोसी धरूनि भ्रांती । धांवण्या येवोनि श्रीरघुपती । करील शांती बाणें एकें ॥ ३७ ॥ सुटल्या श्रीरामाचें कुऱ्हाडें[16] । केउतें पळसी बापुडें । बाण सोडोनियां गाढे । धड दुखंडें[17] पाडील ॥ ३८ ॥ श्रीराम येईल त्रिशुद्धी । रावणें जाणोनियां दुर्बुद्धी । सीता घेवोनियां खांदीं । चपळपदीं निघाला ॥ ३९ ॥ तंव पिशाचवदन खरसंयुक्ता । सारथियें सन्मुख आणिलें रथा । मग रावणें रथीं वाहोनि त्वरिता । होय निघता लंकेसी ॥ १४० ॥ एका जनार्दना शरण । रावणें केलें जानकीहरण । आतां ऐकोनि सीताआक्रंदनें[18] । जटायु दारुण युद्ध करील ॥ ४१ ॥ जटायु रावणातें दंडून । सीता सोडवील आपण । रावण करील जटायुच्छळण । तेंही निरूपण अवधारा ॥ ४२ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे जानकीरावणहरणं नाम षोडशोऽध्यायः ॥ १६ ॥ ओंव्या ॥ १४२ ॥ श्लोक ॥ ७ ॥

अध्याय सतरावा

श्रीरामचंद्राय नमः ॥ रावण करोनि सीताहरण । सवेग निघाला आपण । ते काळींचें गमनलक्षण । सावधान अवधारा ॥ १ ॥

वामेन सीतां पद्माक्षीं मूर्धजेषु करेण सः ।
ऊर्वोस्तु दक्षिणेनैव परिजग्राह पाणिना ॥ १ ॥

---

१ हिसकावून. २ संन्याशाचें रूप. ३ दासी. ४ राबतो. ५ शेजघरांत. ६ वसंतऋतूनें. ७ आज्ञेचे. ८ सेवक. ९ घाई. १० आलिंगन. ११ वाळवी. १२ मरशील.

१३ डबकें. १४ क्षुद्र. १५ बगळे. १६ बाण. १७ दुखंड. १८ सीतेचा शोक-रडणें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

ततस्तां परुषैर्वाक्यैरभितर्ज्य महास्वनः ।
अंकेनादाय वैदेहीं रथमारोहयत्तदा ॥ २ ॥

सीता बैसवितां रथासीं । आंग टाकिलें भूमीसीं । रावणें धरोनियां केशीं । वाहोनि अंकासीं बैसे रथीं ॥ २ ॥ अंकीं बैसवितां पद्माक्षी । तेणें रावण जाला सुखी । सीता जाली परम दुःखी । धांवा पोखी आक्रंदें ॥ ३ ॥ धांव पाव गा श्रीरघुवीरा । सवेग धांवें गा सौमित्रा । रावणें हरूनि भिक्षाद्वारा । लंकापुरा मज नेतो ॥ ४ ॥ केउता राम केउता रावण । कैसें केलें माझें हरण । म्यां अभिशापिला लक्ष्मण । तें पाप पूर्ण मज फळलें ॥ ५ ॥ सौमित्र निष्पाप हरिदास । तो म्यां छळिला अति संत्रासें । आतां कायसी रामआस । माझी निरास म्यां केली ॥ ६ ॥ सौमित्रा रामीं अनन्यभक्ती । तो म्यां छळिला अति वक्रोक्तीं । त्या पापाची सद्यःप्रचीती । रावणाहातीं आतुडलें ॥ ७ ॥ श्रीरामाज्ञासंरक्षण । सौमित्र दवडिला म्यां छळून । तेणें पावें मज रावण । झोंटीं धरोन नेतसे ॥ ८ ॥ लक्ष्मण मज मानी जननी । मी त्यासी म्हणें करिसी पत्नी । तेणें पावें फुटे अवनी । महापापिणी मी एक ॥ ९ ॥ लक्ष्मणीं मिथ्या अभिशाप । तें मज माझें फळलें पाप । मज म्यां दिधला संताप । दुःख अमूप मज माझें ॥ १० ॥ जें पुढिलांसी करी छळण । तेणें छळें छळे आपण । तें मज फळलें संपूर्ण । जें केशाकर्षण रावणें ॥ ११ ॥ छळणाची शीघ्र गती । सौमित्र पावला श्रीरघुपती । मी तंव पडलें रावणाचे हातीं । बंधप्राप्ती पावलें ॥ १२ ॥ छळछद्मवक्रदृष्टी । महापापिणी मी ये सृष्टीं । आतां कैंची श्रीरामभेटी । दुःखकोटी मज माझी ॥ १३ ॥ आतां नव्हे श्रीरामभेटी । श्रीराम न देखें दृष्टीं । सौमित्रछळणासाठीं । दुःखकोटी मज माझ्या ॥ १४ ॥ छळवाद्याचें निजमुख । श्रीराम न पाहे निःशेख । मज म्यां दिधलें अति दुःख । ऐसी अधोमुख विलपत ॥ १५ ॥ महापाप्या परम गती । श्रीरामनाम जपतां अंतीं । त्याची करिसी तूं निर्मुक्ती । तैशिया गतीं मज पावें ॥ १६ ॥ लक्ष्मणाच्या छळवादीं । होणारासारिखी घडली बुद्धी । तेणें लागलीसे आधी । कृपानिधे कृपा करीं ॥ १७ ॥ मी तंव श्रीरामाची दासी । मजही गांजिलें राक्षसीं । आपलीं ब्रीदें सत्य करावयासी । धांव धांवण्या श्रीरामा ॥ १८ ॥ लक्ष्मणा तुझे चरणीं माथा । जरी तूं मज मानिसील माता । तरी माझ्या छळणोक्ती समस्ता । क्षमा सर्वथा कराव्या ॥ १९ ॥ श्रीरामभक्त तूं निष्पाप । तुजमाजी नाहीं गा कोप । माझ्या छळणाचा संताप । कृपानुरूप सांडावा ॥ २० ॥

हा लक्ष्मण महाबाहो गुरुचित्तप्रसादक ।
ह्रियमाणां न जानासि रक्षसा पापकर्मणा ॥ ३ ॥
जीवितं सुखमर्थं च धर्महेतोः परित्यजन् ।
ह्रियमाणामधर्मेण मां राघव न पश्यसि ॥ ४ ॥

लक्ष्मणा वेगीं धांव पाव । सवें घेवोनि श्रीराघव । रावणाचा हरूनि गर्व । छेदीं सर्व प्रतापें ॥ २१ ॥ तूं कां मजवरी रुसलासी । तुझे चरण झाडीन केशीं । थोर गांजिलें राक्षसीं । कवणापासीं मी सांगों ॥ २२ ॥ नेणें परपुरुषाची मात । त्या मज रावणें लाविला हात । दुःखें करीं आकांत । कां रघुनाथ विसरला ॥ २३ ॥ छळोनि दवडिलासी दुरी । तो कोप सांडोनि जिव्हारीं । ऐसिये आकांतअवसरीं । पावें झडकरी सौमित्रा ॥ २४ ॥ तूं जनक तूंचि जननी । सखा सांगाती जिवलग वनीं । वेगीं पावें कळवळोनी । मजलागोनि सोडवावया ॥ २५ ॥ विराध वधिला जिये बाणीं । तोचि बाण लावोनि गुणीं । प्रतापतेजें यावें गर्जोनी । मजलागोनी सोडवावया ॥ २६ ॥ पाप आहे माझे माथां । म्हणोनि नुपेक्षीं श्रीरघुनाथा । तुझें श्रीरामनाम स्मरतां । पाप सर्वथा मज नाहीं ॥ २७ ॥ महापापाच्या पर्वतकोडी । श्रीरामनाम क्षणें विभांडी । येवोनि कृपेनें तांतडीं । माझी बांदवडी सोडवीं ॥ २८ ॥ सोडावया देवांची बांदवडी । वना आलासी निजप्रौढीं । माझीं फेडावया सांकडीं । घालीं उडी श्रीरामा ॥ २९ ॥ म्यां पाठविलें मृगापाठीं । हेचि माझी बुद्धि खोटी । श्रीरामेंसीं पडली तुटी । दुःखकोटी मज माझ्या ॥ ३० ॥ मागतां मृगाची कांचोळी । सर्वे सुखाची जाली होळी । श्रीराम

१ धांवा करूं लागली. २ भिक्षेच्या मिषानें येऊन. ३ दुष्ट शब्दानें दुखविला. ४ सांपडलें. ५ वेणी धरून, केंस धरून. ६ दोषारोप. ७ इतरांस. ८ दोरीला. ९ हयगय करूं नकोस. १० नाहींसें करी. ११ संकट.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

अंतरला महाबळी । धांवण्यार्थ छळीं सौमित्रा ॥ ३१ ॥ भ्रतारापासीं जें मागणें । तें स्त्रियेचें निंद्य जिणें । मागण्यानिमित्त मज रावणें । आकर्षणें निजबंदीं ॥ ३२ ॥ भ्रतार जें दे संतोषोन । तें स्त्रियेसी अति पावन । स्वमुखें मागतां आपण । दुःख दारुण पावलें ॥ ३३ ॥ माझ्या मागण्याची कथा । माझी मजचि आली घाता । बंदीं पडलें लंकानाथा । श्रीरघुनाथा अंतरलें ॥ ३४ ॥ ऐसी अनुतापें संतप्ता । आपली आपणा अपराधता । स्वयें अनुवादे सीता । दुःखार्ता अति दुःखी ॥ ३५ ॥ दूरी अंतरला रघुनंदन । त्यापासीं गेला लक्ष्मण । माझें अत्यंत आक्रंदन । दोघेजण नायकती ॥ ३६ ॥ माझें उत्तर पडतें कानीं । दोघे येते अति गर्जोनी । रावणा बाणीं निर्दळोनी । अर्धक्षणीं सोडविते ॥ ३७ ॥ निरोप धाडावया श्रीरामासी । सीता पाहे द्विजशिष्यांसी । ब्राह्मण पळाले धाकेंसीं । निजपत्न्यांसी घेवोनी ॥ ३८ ॥ ते वेळीं सीता पाहे आपण । वृक्षवल्लींस रिघे शरण । श्रीरामा सांगावें आपण । मज रावण नेतसे ॥ ३९ ॥

आमंत्रये जनस्थानं कर्णिकारांश्च पुष्पितान् ।
नमस्करोम्यहं तेभ्यो भर्तुः शंसत मां हृताम् ॥ ५ ॥
यानि कानिचिदप्यत्र सत्त्वानि विविधानि च ।
सर्वाणि शरणं यामि मृगपक्षिगणानपि ॥ ६ ॥
दैवतानि च यान्यस्मिन् वने विविधपादपे ।
क्षिप्रं रामाय शंसध्वं सीतां हरति रावणः ॥ ७ ॥
विदित्वा तु महाबाहुरमुत्रापि महाबलः ।
आनेष्यति पराक्रम्य वैवस्वतहृतामपि ॥ ८ ॥

जनस्थानींचे जन वन । त्यांसी घालितें मी लोटांगण । श्रीरामा सांगावें आपण । केलें सीता-हरण रावणें ॥ ४० ॥ कर्णिकारादि बिल्व आम्र । समस्त वृक्षां नमस्कार । श्रीरामा सांगावें शीघ्र । सीता दशवक्त्र नेतसे ॥ ४१ ॥ गुल्म लता तृण पाषाण । दैवतें श्वापदें पक्षिगण । त्यांसी माझें लोटांगण । सांगावें आपण श्रीरामा ॥ ४२ ॥ सिंह-व्याघ्रादि श्वापदें क्रूर । त्यांसी माझा नमस्कार । धांवण्या धाडावा श्रीरघुवीर । दशशिर वधावया ॥४३॥ काग बक कारंडक । हंस मयूर चातक शुक । श्रीरामा सांगावें आवश्यक । सीता दशमुख नेतसे ॥ ४४ ॥ जळदेवता वनदेवता । आकाशींच्या गुप्त देवता । तुम्हीं सांगावें श्रीरघुनाथा । रावण सीता नेतसे ॥ ४५ ॥ श्रीरामा सांगावया जाण । वाचा पावोत तृण पाषाण । तिहीं सांगावें संपूर्ण । सीता रावण नेतसे ॥ ४६ ॥ विनवीतसें पंचभूतां । तुम्हीं सांगावें श्रीरघुनाथा । धांवण्या धाडावा शीघ्रता । लंकानाथा वधावया ॥ ४७ ॥ न भेटतां जनक-बाळी । स्वर्ग मृत्यु आणि पाताळीं । श्रीराम घेवोनि घरँधांडोळी । मज तत्काळीं आणील ॥ ४८ ॥ माझें ऐकतां हरण । सवेग येवोनि लक्ष्मण । रागें निर्दाळील रावण । अर्ध क्षण न लागतां ॥ ४९ ॥ रामें ऐकतां माझें हरण । जेथींचा तेथें सोडोनि बाण । घायीं रावणाचा घेईल प्राण । सोडवण तेणें माझी करील ॥ ५० ॥ लोकालोककुळाचळीं । लपविल्याही जनकबाळी । राम राक्षसां करील होळी । मज तत्काळीं सोडवील ॥ ५१ ॥ रावणें माझा केलिया घात । ऐसा प्रतापी श्रीरघुनाथ । पाडोनियां यमाचे दांत । मज निश्चित आणील ॥५२॥ माझिया प्रेमाचे आवडीं । श्रीराम काळाची मुरडील नरडी । तेथें राक्षसें कोण बापुडीं । बाणीं रोकडीं निर्दळील ॥ ५३ ॥ ऐसिया प्रतापी श्रीरघुनाथा । माझिया दुस्तर आकांता । कां पां न पवसीच तत्त्वतां । म्हणोनि सीता विलपत ॥ ५४ ॥ सीता स्वयें येचि अर्थी । ज्या त्या येतसे काकु-ळती । शुद्धि सांगावी श्रीरघुपती । रावणवधार्थी शीघ्र यावें ॥ ५५ ॥ धांव पाव श्रीरामचंद्रा । वेगीं यावें श्रीसौमित्रा । मज गांजिलें राक्षसेंद्रा । कृपा-समुद्रा कां न पावसी ॥ ५६ ॥ मर मर पापिया अदृष्टा । दुःखें फळलेंसी दुष्टा । वंचोनि श्रीराम-वरिष्ठा । वश्य दुष्टा मज केलें ॥५७॥ मी जनक-बाळा जानकी । श्रीरामाची निजसेवकी । रावणें दुष्टें केलें दुःखी । दशमुखी निर्बंध ॥ ५८ ॥ श्रीरामा तुझी अगाध थोरी । तुझें देहँगार फोडिलें चोरीं । चोरोनि नेली तुझी अंतुँरी । हे चराचरीं तुज लाज ॥ ५९ ॥ आपले लाजेकारणें । माझें करावें धांवणें । ऐसें सीतेचें आक्रंदणें । दीर्घस्वरें विलपत ॥ ६० ॥ ऐकतां सीताविलपन । व्याघ्रसिंहादि करिती

१ बोले. २ रडणें, ओरडणें. ३ दहा तोंडांचा (रावण). ४ पृथ्वी, आप, तेज, वायु व आकाश. ५ झडती. ६ या नावांचे पर्वतांमध्यें. ७ शोध. ८ प्रारब्धा. ९ रावणाचा प्रतिबंध. १० देहरूप घर. ११ स्त्री.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

रुदन । वृक्ष स्रवती संपूर्ण । गळती लोचन पक्ष्यांचे ॥ ६१ ॥ दुःखें फुटों पाहे अवनी । दुःखें द्रव आला पाषाणीं । दुःख न समाये गगनीं । ऋषिजनीं आकांत ॥ ६२ ॥ ऐकोनि सीतेचें रुदन । रावण झाला कंपायमान । वेगें आलिया रघुनंदन । माझा प्राण घेईल ॥ ६३ ॥ जेणें मारिले खर दूषण । मारीच मारिला विंधोनि बाण । विराध मारिला संपूर्ण । अर्धक्षण लागेना ॥ ६४ ॥ ताटका सुबाहु मारिला जाण । विराध मारिला संपूर्ण । तो श्रीराम माझा घेईल प्राण । ऐसी रावणा धुकधुकी ॥ ६५ ॥ सीता करील दीर्घ रुदन । तिसी देवोनि आलिंगन । रथीं बैसोनि रावण । लंघी गगन अति धाकें ॥ ६६ ॥ रावणाची शक्ति कैसी । सीता धरोनि पोटासीं । रथ चालवी आकाशीं । येरी आक्रोशीं आक्रंदे ॥ ६७ ॥ ऐकोनि आक्रंदतां सीता । तंव जटायु आला सकोपता । माझिया स्वामीची हे कांता । तिये गांजिता तूं कोण ॥ ६८ ॥

ततः पर्वतकूटाभस्तीक्ष्णतुंडः खगोत्तमः ।
वनस्पतिगतः श्रीमान्व्याजहार शुभां गिरम् ॥ ९ ॥
दशग्रीवः स्थितो धर्मे पुराणे सत्यसंश्रवः ।
भ्रातस्त्वं निंदितं कर्म कर्तुं नार्हसि सांप्रतम् ॥ १० ॥
राजा सर्वस्य लोकस्य रामो दशरथात्मजः ।
तस्यैषा लोकनाथस्य धर्मपत्नी यशस्विनी ॥ ११ ॥
सीता नाम वरारोहा यां त्वं हर्तुमिहेच्छसि ।
कथं राजा स्थितो धर्मे परदारान् परामृशेत् ॥ १२ ॥

रावणें सीता हरितां । तंव जटायु वनक्रीडे गेला होता । ऐकोनि जानकी आक्रंदतां । सवेगता तो आला ॥ ६९ ॥ त्रैलोक्यराजा श्रीरघुनाथ । मी जटायु श्रीरामभक्त । तूं रावणा अति उन्मत्त । सीतेसी हात लाविला ॥ ७० ॥ पर्वतप्राय महाबळी । मी असतां ये वनस्थळीं । कैंवी नेसील जनकबाळी । रणरांगोळी मी करीन ॥ ७१ ॥ पंचवटीं आश्रमानिकट । बैसलें असतां माझें मेटं । तुज कैसेनि फुटेल वाट । महानष्ट तूं परद्वारी ॥ ७२ ॥ श्रीरामरायाची अंतुरी । नेऊं पाहसी करोनि चोरी । चोरासी मी जीवें मारीं । तुझी उरी उरों नेदीं ॥ ७३ ॥ चोरापासीं वस्तुजात । सोडवोनि करीं घात । तेंवी सीता सोडवोनि येथ । तुझा निःपात करीन मी ॥ ७४ ॥ चौदा चौकड्यांचें राज्य शिरीं । शेखीं करों धांवसी चोरी । जळो रावणा तुझी थोरी । पापी परद्वारी महानष्ट ॥ ७५ ॥

यस्य त्वं लोकनाथस्य हृत्वा भार्यां गमिष्यसि ।
वृंतादिव फलं त्वां तु पातयेयं रथोत्तमात् ॥ १३ ॥

त्रैलोक्यस्वामी श्रीरघुनाथ । त्याची चोरोनि नेतां कांता । तुझ्या करीन निःपाता । जेंवी सदेंठ वृंताकें ॥ ७६ ॥ जैसीं कां परिपक्व फळें । सदेंठ झडती वायुबळें । तैसीं तुझीं कंठनाळें । दाही शिरकमळें छेदीन ॥ ७७ ॥ जटायुपक्षवात दुर्धर । न चले रावणाचा रहंवर । मागें ओसरले रथाचे खर । तंव दशशिर क्षोभला ॥ ७८ ॥ धनुष्या वाहोनियां गुण । जटायु लक्षोनियां पूर्ण । नाळीकनाराचांचे वर्षे बाण । युद्ध दारुण मांडिलें ॥ ७९ ॥ तुझ्या शस्त्रांचा कडकडाट । नखीं पाखीं करीन पीठ । माझी चंचु अति तिखट । दाही कंठ छेदीन ॥ ८० ॥ अरे मी जटायु न भेटतां । रावणा तुझी प्रतापता । हिरोनि नेतां श्रीरामकांता । तुज मी आतां मारीन ॥ ८१ ॥ रावण कायसें बापुडें । दाहा तोंडांचें जड किडें । हाणोनियां चंचुवाडें । सर्वत्र हाडें फोडीन ॥ ८२ ॥ चोरितां श्रीरामाची कांता । कीर्ति पळाली अपकीर्तिता । पापें शक्ति गेली लंकानाथा । तुज मारितां क्षण न लागे ॥ ८३ ॥ पापें जालासी निर्वीर्य । तुज युद्धीं कैंचें धैर्य । मारोनियां राक्षस सर्व । श्रीरामकार्य साधीन ॥ ८४ ॥ रावण वर्षे दुर्धर बाण । जटायु पांखीं उडवी पूर्ण । बाणप्रताप जाला क्षीण । रागें रावण क्षोभला ॥ ८५ ॥ जटायुपांखांच्या झडाडीं । विसां हातां वळे वेंगडी । दाही शिरें कांपती गाढीं । धनुष्य ओढी न ओढवे ॥ ८६ ॥ जटायुपक्षांच्या आवर्ता । आवर्ती पाडिलें लंकानाथा । पुढें ढळों नेदी रथा । अति विघाता पेटला ॥ ८७ ॥ रावण पावला आकांता । जटायु ढळों नेदी रथा । मागोनि आलिया श्रीरघुनाथा । माझ्या घाता तो करील ॥ ८८ ॥ मारीच बोलला सत्य वचन । करूं जातां सीताहरण । आम्ही दोघे पावों मरण । तें

१ क्रोधयुक्त होऊन. २ पहाऱ्याचें नाकें. ३ स्त्री. ४ वस्तुमात्र. ५ वांगें. ६ रथ. ७ चढवून. ८ नाळीक व नाराच नांवांचे बाण. ९ तोंडांसकट.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

प्रमाण दिसताहे ॥ ८९ ॥ नाहीं इंद्रजित कुंभकर्ण। नाहीं साह्य सैन्य प्रधान । मज मारितां राखेल कोण । अति उद्विग्न लंकानाथ ॥ ९० ॥ अति प्रयासें सीता आली हाता। हे पावल्या लंके-आंतौता। तेथें येवों न शके रघुनाथा। दुर्घट पंथा क्रमेना ॥ ९१ ॥ लंकादुर्ग अति गूढ । भोंवता समुद्राचा अगड। श्रीराम मानवी अति जड। मार्ग अवघड कंठेना ॥ ९२ ॥ परी प्रस्तुत जटायु दारुण। दृढ ओढवेलें विघ्न । हें शंकरें करावें निवारण। लंकाभुवन तो पाववो ॥ ९३ ॥ पुढें जटायु मार्गरोधन । मागोनि आलिया श्रीरघुनंदन। माझा घेईल तो प्राण। धाकें रावण धुकधुकी ॥ ९४ ॥ एकेचि वेळें शतबाण । जटायूतें विंधी रावण। येरें चुकविले तळपोन । आला कोपोन झडपीत ॥ ९५ ॥

ततोऽस्य सशरं चापं मुक्तामणिविभूषितम् ।
पक्षाभ्यां स महातेजा बभंज पतगेश्वरः ॥ १४ ॥
सारथिं सरथोपस्थं स जघान नखांकुरैः ।
कांचनोरश्छदान्दिव्यान्पिशाचवदनान्खरान् ॥ १५ ॥
पूर्णचंद्रप्रतीकाशं छत्रं च व्यजनैः सह ।
पातयामास वेगेन ग्राहिभी राक्षसैः सह ॥ १६ ॥

रावणाच्या धनुष्यावरी । मुक्ताफळांच्या झालरी। सुवर्णबद्ध मणिमंजरी। घेवोनि करीं विंधित ॥ ९६ ॥ जटायूनें सवेग पांखीं । रावण झडपिला दाही मुखीं । चाप छेदोनि सांडिलें नखीं। मुकुट मस्तकींचा पाडिला ॥ ९७ ॥ सवेंचि ध्वज छेदिला चांग। शशांकछत्राचा केला भंग। रावणाचें अंगप्रत्यंग। नखीं सवेग विदारी ॥ ९८ ॥ जटायुपक्षवातावर्त । रावण चळचळां कांपत । चंचूनें धरोनियां रथ । गगनाआंत उचलिला ॥ ९९ ॥ मग सीता धरोनि पोटासीं। रावण उडी टाकी वेगेंसीं । पिशाचवदन खर रथासीं । नखाग्रेंसीं मारिले ॥ १०० ॥ तेथोनि टाकितां रहंवर । सारथी वारुवेंसीं शतचूर । दणकां दुमदुमलें अंबर । दशशिर चळीं कांपे ॥ १ ॥ मुहूर्तीं केला छत्रपात। भंगिलें चाप भंगिला रथ। रावण केला हताहत। धन्य पुरुषार्थ जटायूचा ॥ २ ॥ देखोनि जटायु साटोप । स्वर्गीं देव वानिती प्रताप। धन्य धन्य जटायूचें तप। केला प्रताप रामकाजीं ॥ ३ ॥ रावण विचारी निजचित्ता। जटायु आलिया न जिरे सीता। इसी सांडोनियां जातां। आली लघुता तिहीं लोकीं ॥ ४ ॥ सहित पार्वतीमहेश । म्यां आंदोळिला गिरि कैलास। आणि जिंकोनि कुबेरास । विमानास हरितलें ॥ ५ ॥ देवांचिया अमित कोडी। अद्यापि माझे बांदवडीं। त्याही माझी गर्वझाडी। केली रोकडी येणें पक्ष्यें ॥ ६ ॥ जटायुचंचु अति तिखट। शस्त्रसमुदाय केला सपाट। यापासोनि न फुटे वाट। परम कष्ट रावणा ॥ ७ ॥

स भग्नधन्वा विरथो हताश्वो हतसारथिः ।
अंकेनादाय वैदेहीं पपात भुवि रावणः ॥ १७ ॥

भंगिलें धनुष्य भंगिला रथ। सारथी वारुवां केला घात। विरथी पदाती लंकानाथ। मग कपटार्थ मांडिला ॥ ८ ॥ राक्षसाची गुप्तस्थिती । कडिये घेवोनि सीता सती। रावण निघे खेचरगती। गगनपंथीं अति गुप्त ॥ ९ ॥ परी जटायूसी अरुणभेटी। त्यास सहज दिव्यदृष्टी। तेणें सीता नेतां देखोनि दृष्टीं। रावणापाठीं लागला ॥ ११० ॥

स विदार्य नखैस्तीक्ष्णैस्तस्य पृष्ठं समंततः ।
केशांश्चोत्पाटयामास नखपक्षमुखायुधः ॥ १८ ॥
स तदा गृध्रराजेन क्लिश्यमानो मुहुर्मुहुः ।
ततः क्रोधाद्दशग्रीवः सीतामुत्सृज्य वीर्यवान् ॥ १९ ॥

जटायु धांवला सरोखीं । सबळ बळें निजपांखीं। रावण झडपिला दाही मुखीं । विदारी नखीं सर्वांग ॥ ११ ॥ तिखट नखें दशशिरा। सर्वांगीं लागल्या रुधिरधारा । देहान्त मांडिला दशशिरा। साह्य दुसरा नाहीं कोणी ॥ १२ ॥ नखें पांखें चंचु तीक्ष्ण। घायीं घायवटला रावण। आतां माझे न वांचती प्राण। योद्धा दारुण जटायु ॥ १३ ॥ जटायु तळपोनि आकाशीं। केंस उत्पाटी दाढी मिशी। भेणें रावण कासाविसी। जीविताशेसी सांडिलें ॥ १४ ॥ मारीचवाक्य सत्यभाषण। करितां जानकीचें हरण। अवश्य पावशील मरण। तें प्रमाण दिसताहे ॥ १५ ॥ रावण म्हणे जानकी

१ या नांवाचा रावणाचा मुलगा. २ लंकेंत. ३ गुप्त. ४ खंदक. ५ आलें. ६ पताका. ७ चंद्राच्या आकाराचे छत्राचा.

८ घाबरा, पराजित. ९ आवेशयुक्त. १० पादचारी. ११ रक्ताच्या धारा. १२ घायाळ झाला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

नेतां । जटायु करील माझ्या घाता । भेणें सांडोनियां सीता । होय पळता लंकानाथ ॥ १६ ॥ जटायूनें गांजिलें वनीं । वेगीं धांवा पावा कोणी । ऐसा रावण आक्रंदोनी । सीता सांडोनि पळाला ॥ १७ ॥ तंव जटायु म्हणे लंकानाथा । जरी तुवां सांडिली सीता । तरी तुज न मारीं सर्वथा । जीवदान तुज दिधलें ॥ १८ ॥ रावणापासोनि जानकी । सुटोनि जाली अति सुखी । जटायु दाढुंगा तिहीं लोकीं । केवळ पक्षी म्हणों नये ॥ १९ ॥ सीताहरण महापाप्यासी । उपडोनि दाढ्या मिशांसी । प्रायश्चित्त दिधलें रावणासी । जटायु ऋषि धर्मात्मा ॥ १२० ॥ जटायु सोडवितां सीतेसी । तंव स्वर्गीं हडबड देवांसी । बंधनिर्मुक्ति नव्हे आम्हांसी । सीता लंकेसी न वचतां ॥ २१ ॥ ऐसें देवांचें मनोगत । तंव रावण झाला सावचित्त । मग होवोनियां निजयुद्धार्थ । पाचारीत जटायूसी ॥ २२ ॥ सीता होती मजपासीं । तेणें त्वां केलें कासाविसी । आतां युद्ध सावकासीं । पुरुषार्थैसीं करूं दोघे ॥ २३ ॥ गुंफेसी नसतां श्रीरामलक्ष्मण । शून्य मंदिरीं रिघे श्वान । तेंवी तुवां सीता चोरून । पलाथमान भयभीत ॥ २४ ॥ तुज कैंचें दाढुलेपण । वेगीं पळसी रामभेण । मजसीं करूं पाहसी रण । तरी आंगवण पाहों तुझी ॥ २५ ॥

तयोर्महति संग्रामे बभूवातुलविक्रमः ।
राक्षसानां च मुख्यस्य पक्षिणां प्रवरस्य च ॥ २० ॥

दहा शिरें वीस भुजा । राक्षसांचा मुख्य राजा । पक्षी पावला युद्धा पैजा । बळसमाजां वरिष्ठ ॥ २६ ॥ रावणाचें शस्त्र शर । पूर्वीं जटायूनें केलें चूर । आतां निजांगें दशशिर । मुष्टिप्रहार हाणों धांवे ॥ २७ ॥ ऐसा अति क्रोधें दशशिर । बळें हाणितां करप्रहार । तंव नखें विदारिले कर । वेगें दुर्धर जटायु ॥ २८ ॥ रागें हाणितां दृढ लात । तंव चंचुघातें करोनि घात । रावण केला अस्ताव्यस्त । मग लंकानाथ गजबजिला ॥ २९ ॥ तळपोनियां गगनीं भरे । झडपा हाणोनि दाही शिरें । मस्तक भेदी चंचुचक्रें । मुखें नखाग्रें विदारी ॥ १३० ॥ नखीं पांखीं चंचुधारें । रावणा लागलें घायवारें । धाकें धाकें जिकडे सरे । तिकडें नखाग्रें मारिजे ॥ ३१ ॥ जटायुपक्षांचा आघातें । रावण उडविला नभाआंत । गगनीं भोवंडोनि आवर्त । पाडिला मूर्च्छित अधोमुख ॥ ३२ ॥ येथोनि पुरे पुरे रण । रावण दांतीं धरी तृण । अकालीं ओढवलें मरण । जटायु प्राणघातक ॥ ३३ ॥ मी म्हणें हें पांखरूं । परी हा धीर वीर महाशूरू । विसां भुजांचा केला चूरू । अति दुर्धरू जटायु ॥ ३४ ॥ जटायूनें लाविली सीकं । दाही मुखेंसीं विमुख । रावण पाडिला अधोमुख । जीवा संकट मांडलें ॥ ३५ ॥ न चले बळाची आंगवण । परम दुःखी जाला रावण । मग करावया जटायुछळण । कपट पूर्ण मांडिलें ॥ ३६ ॥ मग रावण म्हणे लवलाहीं । दोघे झुंजों उसिणाघायीं । तंव जटायु म्हणे तुज शक्तीच नाहीं । उसिणें कैं फेडशील ॥ ३७ ॥ घाय आणितां सवर्म । न पळे न ढळे तो योद्धा परम । तूं नेणसी युद्धधर्म । व्यर्थ आक्रम बळाचा ॥ ३८ ॥ घालोनि श्रीरामाची आण । जटायूसी पुसे रावण । तुझें कोणे ठायीं मरण । सत्य संपूर्ण मज सांगें ॥ ३९ ॥ पडलिया अति आकांतीं । ओढवल्याही अंतगती । हरिभक्त असत्य न बोलती । जाण निश्चितीं पक्षिनाथा ॥ १४० ॥ भावार्थ दावोनि उदंड । मधुर शब्दीं असत्य लंडं । त्याचें मुख नरकुंड । काळें तोंड तयाचें ॥ ४१ ॥ जटायु म्हणे रावणासी । जरी तूं निजमृत्यु सांगसी । तरी मी सांगेन तुजपासीं । येरयेरांसी नेम जाला ॥ ४२ ॥ घातली श्रीरामाची आण । तरी असत्य न बोलें गेलिया प्राण । दोहीं पांखीं माझें मरण । सत्य संपूर्ण वदे पक्षी ॥ ४३ ॥ रावण छळवादी पातकी । मृत्यु सांगे वामांगुष्ठनखीं । जटायु सांगे दोहीं पाखीं । शुद्धसात्विकी सत्यवादी ॥ ४४ ॥ जटायु तळपोनियां देख । छेदिले वामांगुष्ठनख । तंव हातातळीं आले पांख । येरें निःशंक उपडिले ॥ ४५ ॥ रावणाचा छेदिला आंगोठा । तेथें जाला अवंढापट्टा । त्रिंबकीच्या निकट घाटा । अवंढापट्टा प्रसिद्ध ॥ ४६ ॥ जटायूसी येतां मरण । पडल्या करीत श्रीरामस्मरण । नष्ट रावणें केलें छळण । कुळनिर्दळण देखसी ॥ ४७ ॥ छळवादी अति दुष्ट ।

१ बलवान्. २ न जातां. ३ मोठेपणा. ४ श्रीरामाला भिऊन. ५ प्रहार. ६ शिक्षा. ७ दे घे अशा मोबदल्यानें. ८ नष्ट.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

परम पापी क्रियानष्ट । परदारी अति पापिष्ट । भोगिसी कष्ट छळणाचे ॥ ४८ ॥ छळणाच्या कपटनिष्टीं । जटायु मूर्च्छित पडला सृष्टीं । श्रीरामाच्या निजभेटीं । आत्मा कंठीं धरिलासे ॥ ४९ ॥ मुखीं श्रीरामनामस्मरण । चित्तीं श्रीरामचिंतन । नयनीं श्रीरामावलोकन । हृदयीं ध्यान श्रीरामाचें ॥ १५० ॥ श्रीरामरूप देखे पाषाण । श्रीरामरूप देखे तृण । वृक्ष वल्ली वन उपवन । देखे संपूर्ण श्रीराम ॥ ५१ ॥ श्रीरामकार्जीं वेंचितां प्राण । श्रीराम कृपाळु आपण । सर्वेरूपें स्वयें संपूर्ण । आला वोरसोन भेटीसी ॥ ५२ ॥ जटायूचे निजपोटीं । अंतीं श्रीराम देखावा दृष्टीं । देह पडतां स्वयें सृष्टीं । आला भेटी निजभक्ता ॥ ५३ ॥ रावण नव्हे माझा वैरी । तो तंव परमार्था साह्यकारी । श्रीराम भेटविला चराचरीं । सुखसागरीं सुखी केलें ॥ ५४ ॥ निजभक्तांचें मनोगत । पुरवूं जाणे श्रीरघुनाथ । जटायु जन्ममरणातीत । आनंदभरित सुखी केला ॥ ५५ ॥ एका जनार्दना शरण । जटायु छळणें वधी रावण । पुनरपि तो सीताहरण । करील आपण तें ऐका ॥ १५६ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे अरण्यकांडे एकाकारटीकायां जटायुच्छलनवधो नाम सप्तदशोऽध्यायः ॥ १७॥ ॥ ओंव्या ॥ १५६ ॥ श्लोक ॥ २० ॥

अध्याय अठरावा

श्रीरामचंद्राय नमः ॥ जटायूस स्वयें रावण । वधिता जाला करोनि छळँण[3] । तें देखोनि सीता जाण । झाली आपण अति दुःखी ॥ १ ॥

तं स्वल्पजीवितं भूमौ क्षतजार्द्रं जटायुषम् ।
निरीक्ष्य पतितं सीता विललाप सुदुःखिता ॥ १ ॥

जटायूचे उपडितां पांख । भूमीं मूर्च्छित जीव निःशेख । त्याचें देखोनियां असुँख[4] । परम दुःख सीतेसी ॥ २ ॥ न पवतीच श्रीरामलक्ष्मण । जटायु करितां सोडवण । तों त्यासीच आलें मरण । कपटी रावण दुष्टात्मा ॥ ३ ॥ जटायूसी म्हणे आपण । तुझें मज न येचि कां मरण । तूं बळियां बळी संपूर्ण । मजलागीं प्राण वेंचिला ॥ ४ ॥ युद्धीं गांजोनि रावण । माझी केली सोडवण । तुझें करोनियां छळण । मारी रावण महापापी ॥ ५ ॥ ऐसें बोलोनि सुंदरी । ललाट पिटी निजकरीं । जो होय माझा साह्यकारी । तो निशाचरीं मारिजे ॥ ६ ॥ वेगीं पावता श्रीरघुनंदन । तरी तुझा वांचविता प्राण । माझी करिता सोडवण । रणीं रावण मर्दोनी ॥ ७ ॥ जटायु सबळ धांवणें करी । जटायु माझा साह्यकारी । जटायु माझा निजकैवारी । तोही निशाचरीं मारिला ॥ ८ ॥ रावण विचारी मानसीं । चराचर साह्य श्रीरामासी । भलता सोडवील सीतेसी । शीघ्र लंकेसी हे न्यावी ॥ ९ ॥ शंकरें टाळिलें जटायुविघ्न । आणि उठलिया आन । मज न ठाके लंकाभुवन । शीघ्र गमन करावें ॥ १० ॥

तां क्लिष्टमाल्याभरणां विलपन्तीमनाथवत् ।
अभ्यधावत वैदेहीं रावणो राक्षसाधिपः ॥ २ ॥
क्रोशंतीं राम रामेति रामेण रहितां वने ।
जीवितांताय केशेषु जग्राहान्तकसंनिभः ॥ ३ ॥

केलिया जटायूच्या घाता । दुःखभरें आक्रंदे सीता । तिसी धरावया मागुता । होय धांवता लंकानाथ ॥ ११ ॥ रावणासी म्हणे सीता । तूं मज लंकेसी नेतां । करविसी राक्षसांचे अंता । तूं निजघाता पावसी ॥ १२ ॥ जटायूसीं करितां रण । तुवां धरिलें दांतीं तृण । तेथें आलिया श्रीरामबाण । कुळनिर्दळण तुजसहित ॥ १३ ॥ कायसा समुद्र अचाट । कायसें लंकेचें त्रिकूट । बाणें एकें करील पीठ । तुजसगट राक्षसां ॥ १४ ॥ ऐसें बोलतां सीतेसीं । कोप आला रावणासी । मग धांवोनि धरिली केशीं । जेंवी जीवांसी अंतक ॥ १५ ॥ रावणें धरितांचि सीता । रागें लोटी लंकानाथा । तंव चांचँरोनि[7] पडे पालथा । धांवे मागुता धरावया ॥ १६ ॥ जेंवी भेकापासीं[8] आलिया सर्प । तेंवी सर्वांगीं होय कंप । देखोनि सीतेचा प्रताप । अति कंप रावणा ॥ १७ ॥ युद्धा प्रवर्तलिया सीता । मज नाटोपे सर्वथा । ऐसें कळलें लंकानाथा । श्रीरामकांता दुर्धर ॥ १८ ॥ ऐसें रावणें विचारोनि मनीं । विसां भुजीं आकळोनी । सीता धरिली आंवळोनी । जेंवी कां स्वप्नीं निधान[9] ॥ १९ ॥ मज

---

१ प्रेमयुक्त होऊन. २ जन्म व मरण ज्यास नाहींत असा. ३ कपट. ४ दुःख. ५ पाठिराखा. ६ पोंचवणार नाहीं. ७ धडपडून. ८ बेडकाजवळ ९ धनाचा ठेवा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सीता जाली प्राप्त । रावणाचा मनोरथ । स्वप्नप्राय अवघा व्यर्थ । तोही कथार्थ अवधारा ॥ २० ॥ जरी निर्बळ असती सीता । तरी रावण बलात्कारें भोगिता । तिची जाणोनि सबळता । होय प्रार्थिता शरणार्थी ॥ २१ ॥ रावणापासोनि सीता । क्षण न लगे स्वयें सुटतां । परि निर्दळावया दुष्टां समस्तां । निजहरणार्था आक्रंदे ॥ २२ ॥ पुढील रामायणी कथा । दुसरेनि रावण हरी सीता । उल्लास राक्षसाचे चित्ता । लंकेस नेता तो होय ॥ २३ ॥

खमुत्पतंतं तं दृष्ट्वा मैथिली जनकात्मजा ।
दुःखिता परमोद्विग्ना भये महति वर्तिनी ॥ ४ ॥

रथ भंगिला तो जटायूनें । नाहीं आणविलें विमान । गगनगति[1] दशानन[2] । सीता घेवोन निघाला ॥ २४ ॥ सीता सोडविली जटायूनें । तेणें सुखी जाले ऋषिजन । सवेंच तिचें करितां हरण । तपोधन तळमळती ॥ २५ ॥ जळचर भूचर खेचर । जंगम आणि स्थावर । तळमळती जीवमात्र । सीता दशवक्त्र नेतांचि ॥२६॥ सीता निजखांदीं घेऊन । खेचरगतीं[3] निघे रावण । ठाकावया लंकाभुवन । सवेग आपण निघाला ॥ २७ ॥ तो मार्ग कळावया श्रीरामासी । सीता सांडी निजचिन्हांसी । मार्गोमार्गी निजमाळेसीं । सांडी सुमनांसी मार्गार्थ ॥ २८ ॥ श्रीराम येईल धांवणियासी । ही आशा सीतेचे मानसीं । यालागीं मार्गामार्गासी । प्रदेशोप्रदेशीं[4] चिन्हें सांडी ॥ २९ ॥ उल्लंघोनि महापर्वत । पंथ क्रमिला महादुरस्त[5] । शुद्धी पावावया श्रीरघुनाथ । वस्त्रें शुद्ध्यर्थ सीता सांडी ॥ ३० ॥

ह्रियमाणा तु वैदेही कंचिन्नाथमपश्यती ।
ददर्श गिरिशृंगस्थान् पंचवानरपुंगवान् ॥ ५॥
तेषां मध्ये विशालाक्षी कौशेयं कनकप्रभम् ।
उत्तरीयं वरारोहा शुभान्याभरणानि च ।
मुमोच यदि रामाय शंसेयुरिति भामिनी ॥ ६ ॥

लंघोनि पर्वतां थोरथोरां । कृष्णा वेण्या तुंगभद्रा । नदिया लंघोनि दुस्तरा । लंकापुरा मज नेतो ॥ ३१ ॥ धांवण्या न येववे श्रीरघुनाथा । कोणी न देखें सोडविता । ऐसें जाणोनियां सीता । परम चिंता पावली ॥ ३२ ॥ शुद्धि सांगावया श्रीरामचंद्रा । भोंवतें पाहे श्रीरामभद्रा । पर्वतमाथां पंच वानरां । देखे सुंदरा दुरोनि ॥ ३३ ॥ श्रीरामाचे जीवप्राण । वानर होती पांचही जण । सीता जाणोनि संपूर्ण । वस्त्राभरण तेथें त्यागी ॥ ३४ ॥ वस्त्राभरणें वरिचेवरी । सीता सांडी हे नव्हे चातुरी । जाणोनि अवताराची थोरी । त्यागी सुंदरी शुद्ध्यर्थ ॥ ३५ ॥ पीतांबर कनकशोभा । दिव्यालंकारांची प्रभा । शुद्धि सांगावया निजवल्लभा । पद्मगर्भा स्वयें सांडी ॥ ३६ ॥ नीळ पीत आरक्त देखा । पहातसे मज सन्मुखा । वानरांमाजी तो माझा सखा । तो रघुकुळटिळका शुद्धि सांगो ॥ ३७ ॥ श्रीरामनामांकित खेंवणें[6] । करमुद्रिका करकंकणें । पीतांबरीं बांधोनि तिनें । शुद्धीकारणें सांडिलीं ॥ ३८ ॥ सीतेनें वरूनि सांडितां । तीं आलीं हनुमंताच्या हाता । तेणें वंदोनियां माथां । होय सांगता सुग्रीवा ॥ ३९ ॥ तंव सुग्रीव म्हणे हनुमंतासी । हें तूं ठेवीं आपणापासीं । कैंचें आलें पां आकाशीं । विस्मयो त्यासी वाटत ॥ ४० ॥ सभाग्यें भाग्य ज्याचे माथां । श्रीराममुद्रा ये त्याचे हाता । उल्हास हनुमंताच्या चित्ता । श्रीरामकार्यार्था उद्यत[10] ॥ ४१ ॥ श्रीरामा वेगीं धांव पाव । ऐसा ऐकतां सीतारव[11] । मग अवघे वानर मानिती अपूर्व । जे नभीं कोण रव[12] अनुवादे[13] ॥ ४२ ॥ श्रीरामनामामृतगोष्टी । उठती नभाचिये पोटीं । अवघे पाहती ऊर्ध्वदृष्टीं । परी वदतां दृष्टीं लक्षेना ॥ ४३ ॥ व्यक्ताक्षरें[13] ऐकों येती कानीं । परी वदता न देखों नयनीं । जरी मानूं आकाशवाणी । तरी आक्रंदोनि अनुवादत ॥ ४४ ॥ ऐकोनि सीताआक्रंदन । आलें हनुमंता स्फुरण । मग तिची करावया सोडवण । नभीं[14] उड्डाण करूं पाहे ॥ ४५ ॥ दोन्ही वळोनि वज्रमुष्टी । पाहे वटारिलियां[15] दृष्टीं । रागें थरकत पुसाटी[16] । भूमी आपटी सक्रोध ॥ ४६ ॥ निर्दळा-

१ आकाशमार्गानें जाणारा. २ रावण. ३ पक्ष्यांच्या गतीनें. ४ जागोजागीं. ५ अति कठीण. ६ हनुमंताला. ७ जडिताचा अलंकार. ८ आंगठ्या. ९ रामाला आपला शोध लागावा म्हणून. १० तयार. ११ सीतेचा शब्द. १२ शब्दांचे आवाज काढतो. १३ स्पष्ट शब्द. १४ आकाशांत. १५ क्रोधयुक्त. १६ शेंपूट.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वया दशवदन । काळाग्निरुद्र देदीप्यमान । सगळें गिळों पाहे गगन । भ्यासुर वदन भासत ॥ ४७ ॥ निवटावया[1] दशशिरा । दांत खातसे करकरां । रोम बाहु थरकती थरथरां । कोप वानरा अनिवार ॥ ४८ ॥ करितां वानरें उड्डाण । गेलें ध्रुवलोकासमान । तंव तळीं पळाला रावण । सीता घेवोन लंकेसी ॥ ४९ ॥ ऐसें हनुमंतें देखतां दृष्टीं । रावण भय घेवोनि पोटीं । समुद्राचे परतटीं । उठाउठीं पळाला ॥ ५० ॥ जटायूपरीस अति दारुण । येथेंही उठों पाहे विघ्न । तेणें धाकें पलायमान । लंकाभुवन ठाकिलें ॥ ५१ ॥ लंकेसी गेला लंकानाथ । हनुमंतें क्रोध केला शांत । लंका जाळीन निमेषांत । हें पोटांत दृढ धरिलें ॥ ५२ ॥ राक्षसधुरांचिया[2] कोडी । मारीन न लागतां अर्ध घडी । ऐसिया कोपाची चौघडी । शांतिबुडीं सांठविली ॥ ५३ ॥ तंव येरीकडे लंकानाथ । सीता मज जाली प्राप्त । येणें उल्लासें नाचत । येथें रघुनाथ कैंवी पावे ॥ ५४ ॥ अति दुर्घट लंकागड । भोंवता समुद्राचा अगड[3] । न चले रामाची चरफड । मार्ग अवघड येथें यावया ॥ ५५ ॥ रावण सांगे सीतेप्रती । तुज म्यां आणिलें नभोगती[4] । श्रीरामलक्ष्मण पदाभिगती । कैसेनि येती या ठाया ॥५६॥ क्रूर श्वापदें वनीं वसती । मार्गा दुर्घट पर्वतीं । दुस्तर सरितांचे[5] स्रोतीं[6] । कैंवी रघुपती येऊं पावे ॥ ५७ ॥ ऐसेनि आलिया कष्टकोडी । दोघें मानवें बापुडीं । मज मारितां न लगे घडी । त्यांची गोडी तूं सांडीं ॥ ५८ ॥ त्या दोघांसी चारी भुजा । मज एकलिया वीस भुजा । मी मारीन श्रीरामराजा । निजपैजा जानकिये ॥ ५९ ॥ यापरी वो विचारितां । येथें न येववे श्रीरघुनाथा । तूं मज वरूनि आतां । राज्यभोगता सुखें भोगीं ॥ ६० ॥ अनर्घ्यरत्नांचे अलंकार । वस्त्रें दिव्यें मनोहर । पदकमेखळा गंभीर । विचित्र हार मणिमय ॥ ६१ ॥ चंदन आणि कृष्णागरु । कस्तुरी कुंकुम केशरु । विलेपनें सुख अपारु । सुखसेजारु सुमनांचा ॥ ६२ ॥ दोघें बैसोनि विमानीं । क्रीडा करूं नंदनवनीं । अथवा लंकेचे भुवनीं । अशोकवनीं सुख भोगूं ॥ ६३ ॥

इंद्रादिक सुरवर । करीन तुझे आज्ञेचे किंकर । मंदोदर्यादि अंतःपुर । त्या निरंतर तुझ्या दासी ॥ ६४ ॥ कायसी मृगाची कांचोळी । कंचुक्या लेईं मुक्ताफळी । अर्धचंद्र लेईं तो भाळीं । मस्तकीं जाळी गजमुक्त ॥ ६५ ॥ श्रीरामप्रिया भोगी दशशिर । हा तुज ब्रीदाचा तोडर । रावणें हरिली सीता सुंदर । हा चरणीं गजर अंदुवांचा ॥ ६६ ॥ सीता रावणाची पट्टराणी । ऐसिया वांकी गर्जती चरणीं । ऐकोनि रावणाची वाणी । सीता संतापोनी बोलत ॥ ६७ ॥ मर मर निर्लज्जा दशशिरा । काय बोलतोसी चिर्कुरा । तुजसारिखा निलाजिरा । जगीं दुसरा असेना ॥ ६८ ॥ स्वयंवरीं दावितां बळबंड । धनुष्यें दंडिलें वितंड । सभेंत जालें काळें तोंड । श्रीरामें कोदंड भंगितां ॥ ६९ ॥ तैं न करिसीच माझें हरण । काळें वदन पलायमान । तूं तंव शूर्पणखेसमान । नाकेंवीण जल्पसी ॥ ७० ॥ सदाचें तुझें काळें मुख । न राहवेचि रामासन्मुख । माझा धरोनि अभिलाख । मागों भीक आलासी ॥७१॥ भीक मागतां म्हणसी जननी । आणि आतां म्हणसी करीन पत्नी । तुजसारिखा मातृगमनी । आन त्रिभुवनीं असेना ॥७२॥ संन्यासी आणि चोरी करी । यतिधर्मी आणि परद्वारी । हे तुजचि साजे गा थोरी । तूं नानापरी मातृगमनी ॥ ७३ ॥ करितां जटायूसीं रण । तुवां दांतीं धरिलें तृण । मज सांडोनि पलायमान । तेव्हां आंगवण काय जाली ॥ ७४ ॥ घालितां श्रीरामाची आण । जटायु बोलिला सत्य वचन । तुवां कपटें करोनि छळण । घेतला प्राण जटायूचा ॥ ७५ ॥ माझा भोग भोगूं पाहे रावण । तेंही अधर्म्या अति दूषण । वायसां विष्ठेचें भक्षण । आणि अमृतपान चकोरां ॥ ७६ ॥ तैसी सीता श्रीरामासी । रावणा उपभोग राक्षसी । अभिलाषितां जानकीसी । अनायासीं मरसील ॥ ७७ ॥ गजाचें जें आभरण । तें रासभा घालितां ये मरण । तैसी सीता अभिलाषितां रावण । कुळनिर्दळण पावेल ॥ ७८ ॥ सकळ रस सेवितां मासी । परी दीप चाखितां मरण तीसी । तेंवी राज्य भोगितां रावणासी । सीताभिलाषीं प्राणान्त ॥ ७९ ॥ स्तनपानींच्या अपत्या । उत्तम

१ मारण्यासाठीं. २ मोठमोठ्या पराक्रमी राक्षसांच्या. ३ खंदक. ४ आकाशमार्गानें. ५ नद्यांच्या. ६ प्रवाहांत.

७ जनानखान्यांतील स्त्रिया. ८ दुष्टा. ९ धनुष्य. १० पराक्रम. ११ कावळ्यांना.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

पक्वान्नें सेवितां । तें त्यासी न जिरे सर्वथा । तेंवी लंकानाथा जानकी ॥ ८० ॥ जरी जालें अनर्घ्य[1] रत्न । तरी तें नव्हे शाळिग्रामासमान । तैसी सीता श्रीरामभोगायतन । ते दशानन केंवी पावे ॥ ८१ ॥ ऐरावतीं बैसे इंद्र । तेथें बैसों जातां मरे खर । सीताभिलाषीं दशवक्त्र । सकुळगोत्र निमेल ॥ ८२ ॥ सुंदरा आरसा सुखरूप । तोचि सिंमुरा[2] दावितां अति संताप । रावणाआंगीं सिमुरें पाप । सीता सुखरूप त्या नव्हे ॥ ८३ ॥ ऐसिया नाना सवर्म[3] युक्ती । रावणा निर्भर्त्सी सीता सती । तेणें कोपला लंकापती । मग दूतांप्रती बोलत ॥ ८४ ॥

संदिश्य राक्षसान्घोरान्रावणोऽष्टौ महाबलान् ।
आत्मानं बुद्धिवैक्लव्यात्कृतकृत्यममन्यत ॥ ७ ॥
अप्रमादाच्च गन्तव्यं सर्वैरेव निशाचरैः ।
कर्तव्यश्च सदा यत्नो राघवस्य वधं प्रति ॥ ८ ॥

राक्षसांमाजी बळी संपूर्ण । कपटकर्मीं अति प्रवीण । ऐसे बोलावोनि आठ जण । स्वयें रावण सांगत ॥ ८५ ॥ तुम्ही दुर्धर निशाचर । होवोनि जनस्थानीं एकत्र । रामवधार्थीं निरंतर । अति सादर राहावें ॥ ८६ ॥ मारिले त्रिशिरा दूषण खर । त्या रामा आणि आम्हां वर्द्धवैर[4] । तदर्थीं तुम्हीं आठही वीर । साधावें छिंद्र[5] अति यत्नें ॥ ८७ ॥ सन्मुख युद्ध करितां त्यासीं । जीवें मारील समस्तांसी । यालागीं अति गुप्तत्वेंसीं । त्याचे वधासी साधावें ॥ ८८ ॥ मारूं जातां श्रीरघुनंदन । तुम्हांसी निर्दळील लक्ष्मण । एकेच वेळे दोघे जण । साधोन आपण वधावे ॥८९॥ निजेले असतां वनीं । निदसुरे मारावे दोन्ही । कां आसनीं भोजनीं शयनीं । उदकपानीं साधावे ॥ ९० ॥ पडल्या श्रीरामाचे दृष्टीं । मग जिण्याची कायसी गोष्टी । आठांचींही शिरें निवटी । शरवृष्टिप्रतापें ॥ ९१ ॥ यालागीं आपणां लपवोनी । जनीं विजनीं गमनागमनीं । सीताशुद्धी पाहतां वनीं । सिंतरोनी[6] मारावे ॥ ९२ ॥ छळें बळें कपटमेळें[7] । दोघे मारावे एके वेळे । तदर्थीं तुम्हीं प्रबळें । स्वकार्य समूळ साधावें ॥ ९३ ॥ मारिल्या रामलक्ष्मण । तुम्हांसी दिधलें जनस्थान । तेथें नांदावें आपण । ढोल निशाण लावोनी ॥ ९४ ॥ ऐसें सांगोनियां त्यांसी । रावण आला सीतेपासीं । तीस न्यावया निजभवनासी । गृहें चौपासीं शृंगारिलीं ॥ ९५ ॥ गुढिया तोरणें विचित्र । मखरें शोभती मनोहर । सीता देखोनि मंदिर । मज अनुसरे तैसें करा ॥ ९६ ॥ रावणें हातीं धरोनि सीता । मंदिरें दाखवी अपूर्वता । दावोनि आपली समर्थता । अति एकांता आणिली ॥ ९७ ॥ पाहतां कोणी न देखे दृष्टीं । आणि दुजयाची न पडे दृष्टी । ऐसिया एकांता गोरटी । उठाउठीं आणिली ॥ ९८ ॥ रावणासवें अति एकांता । निःशंक आलीसे सीता । हा मज झालिया झोंबता । लंकानाथा उपटीन ॥ ९९ ॥ शुंभ निशुंभ चंडमुंड । जेंवी जगदंबा करी दुखंड । तेंवी रावणाचें बळबंड । खंडविखंड करीन मी ॥ १०० ॥ श्रीरामसेवेचें धडफुडें । माझे अंगीं बळ गाढें । रावण दहा मुखांचें किडें । मजपुढें केंवी झोंबे ॥ १ ॥ विसां भुजांतें वामकरें । दडपोनियां निजभारें । सकुंडल दाही शिरें । चमत्कारें खुडीन ॥ २ ॥ याचीं छेदावया कंठनाळें । कां लागलीं शस्त्रबळें । नखें खुडोनि शिरकमळें । रावण केवळ तृण जैसें ॥ ३ ॥ आलिया इंद्रजित कुंभकर्ण । मारीन चंडकणानें[8] हाणोन । कुमार सेना आणि प्रधान । निर्दाळीन क्षणमात्रें ॥ ४ ॥ माझें लंकेसी आगमन । रावण निर्दळावया ससैन्य । तें एकांतीं फावलिया पूर्ण । भीड कोण राखील ॥ ५ ॥ श्रीरामसेवाफळ संपूर्ण । निर्दळावें द्वंद्व दारुण । तें ज्याचेनि नव्हे जाण । भक्तपण त्या नाहीं[11] ॥ ६ ॥ सीता श्रीरामनिजशक्ती । ते केंवी आकळे रावणाहातीं । येणें बळें सीता सती । आली एकांतीं निःशंक ॥ ७ ॥ सीता नाकळे निजबळें । हें रावणासी समूळ कळे । मग विषयाचे प्रीतिमेळें[12] । चरणकमळें वंदिलीं ॥ ८ ॥

एतौ पादौ मया स्निग्धौ शिरोभिः परिपीडितौ ।
प्रसादं कुरु मे क्षिप्रं वश्यो दासोऽहमस्मि ते ॥ ९ ॥
इमाः शून्या मया वाचः शुष्यमाणेन भाषिताः ।
न चापि रावणः कांचिन्मूर्ध्ना स्त्रीं प्रणमेत ह ॥ १० ॥

१ उत्तम, मूल्यवान्. २ नकट्याला. ३ व्यंग. ४ हाडवैर. ५ गुप्तकार्य. ६ फसवून. ७ कपट करून. ८ संहार करीन. ९ गळे. १० थप्पड देऊन. ११ मिळेल. १२ विषयासक्तीनें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सीता आणोनि एकांता । रावणें चरणीं ठेविला माथा । मज विषयशरणागता[1] । कृपा तत्त्वतां करीं सीते ॥ ९ ॥ त्यजोनियां श्रीरघुनाथा । मज वरावें तुवां तत्त्वतां । माझी वाचा न करीं वृथा । शरणागता नुपेक्षीं ॥ ११० ॥ तुझीं वंदितां चरणकमळें । मस्तकीं लागलीं वो कोमळें । करस्पर्शनीं अति मवाळें[2] । मन कळवळे भोगार्थी ॥ ११ ॥ जिचे चरण सुखरूप । तिचें भोगितां स्वरूप । मज येईल सुख अमूप । कृपानुरूप वरीं मातें ॥ १२ ॥ मी तंव अतिगर्वी रावण । ब्रह्मादि देवां नव्हें शरण । दानवमानवां पाड कोण । तो मी तुझे चरण वंदितों ॥ १३ ॥ चरण वंदोनियां देख । होईन वशवर्ती[3] सेवक । अनुदिनीं तुझा आज्ञाधारक । कृपायाचक भोगार्थी ॥१४॥ सीतेचे चरण धरोनि हातीं । रावण येतसे काकुळती । मज अंगीकारीं भोगार्थी । तंव सीता सती हांसली ॥ १५ ॥ सुरवरां वंद्य श्रीरामचंद्र । त्यापुढें तुच्छ राक्षसेंद्र । सांडोनियां गजेंद्र । आरोहणा[4] खर तैसा तूं ॥ १६ ॥ सांडोनियां अमृतपान । करावें कागविष्ठाभोजन । तैंवी त्यजोनि श्रीरघुनंदन । तुच्छ रावण भोगावा ॥ १७ ॥ सांडोनियां सत्संगती । बैसावें सूकराचे पंक्ती । तैंवी त्यजोनियां श्रीरघुपती । रावण दुर्मती भोगावा ॥ १८ ॥ कागाघरीं[5] श्राद्धविधान । तेथें विष्ठेनें पितृतर्पण । तें न स्वीकारिती ऋषिजन । तें सेवन कागांचें ॥ १९ ॥ ऐकोनि सीतेचें वचन । रावण कोपला दारुण । तुज श्रीरामाचें दर्शन । कल्पांतीं जाण हों नेदीं ॥ १२० ॥ तुज श्रीरामा नव्हेचि भेटी । तुज त्यासीं करों नेदीं गोष्टी । तुज श्रीरामा देखों नेदीं दृष्टीं । मी महाहट्टी रावण ॥ २१ ॥ सीते ऐकें सावधान । तुज मी वधीन आपण । कां तुज मी कुजवीन । जंव तूं शरण मज येसी ॥ २२ ॥ तुज नेदीं अन्नपान । नेदीं अभ्यंगादि मर्दन । तुज नेदीं शय्या सुखासन । जंव तूं शरण मज येसी ॥ २३ ॥ मस्तकीं जीव पडती भारी । वस्त्रें लागती वज्रापरी । तुज मी पीडीन तंववरी । जंव तूं अंतुरी होसी माझी ॥ २४ ॥ पैल पाहें इंद्रजित कुंभकर्ण । कोट्यनुकोटी राक्षसगण । कुमार प्रधान अति दारुण । मशक कोण श्रीराम ॥ २५ ॥ श्रीराम आणि लक्ष्मण । ते तंव राक्षसांचें भक्षण । तुझी कोण करील सोडवण । आग्रही पूर्ण तूं मूर्ख ॥ २६ ॥ माझे राक्षसांहीं घालोनि घाला । राम लक्ष्मण गेला मेला[6] । सीते अंगीकारीं मजला । सांडीं आपला दुराग्रहो ॥ २७ ॥ पापभोगाचिये राशीं । वनीं कष्टलीसी रामासरिसी । परम पुण्यें लंकेशासीं । भोगीं सुखासीं जानकीये ॥ २८ ॥ पाप असेल तुझिये माथां । तरी सांडिसील लंकानाथा । भोगूं म्हणसी श्रीरघुनाथा । तरी तो सर्वथा निर्माला[8] ॥ २९ ॥ ऐकोनि रावणाचें बोलणें । सीता हांसिली सैत्राणें[7] । तूं मज भोगावयाकारणें । मरणा धरणें बैसलासी ॥ १३० ॥ पतंगें आकळितां दीपासी । जळोनि मरे स्नेहसंगतीसीं । ते तुज दशा रावणासी । मद्धोगेंसीं मरणार्थ ॥ ३१ ॥

गतासुस्त्वं गतश्रीको गतसत्त्वो गतेंद्रियः ।
लंका वैधव्यसंयुक्ता त्वत्कृते न भविष्यति ॥ ११ ॥
स हि देवरसंयुक्तो मम भर्ता महाद्युतिः ।
निर्भयो वीर्यमाश्रित्य शून्ये वसति दंडके ॥ १२ ॥
स ते वीर्यं बलं दर्पमुत्सेकं च यथाविधम् ।
व्यपनेष्यति गात्रेभ्यः शरवर्षेण संयुगे ॥ १३ ॥

करितां परदारेंची चोरी । गेलें आयुष्य यश कीर्ती श्री । लंकावैधव्याची परी । बैसेल खरी तुझेनि ॥ ३२ ॥ मारिलें म्हणसी श्रीरघुनाथा । हे तंव तुझी मिथ्या वार्ता । श्रीराम काळाचा नियंता । ऐकें आतां सांगेन ॥ ३३ ॥ नेणसी श्रीरामाची थोरी । मृत्यु श्रीरामाची आज्ञा[9] वरी । सकुळ मरण दशशिरीं । मग बोहरी[10] राक्षसां ॥ ३४ ॥ श्रीरामबाण अति तिखट । धाकें समुद्र देईल वाट । भेदील गिरि त्रिकूट । दाही कंठ छेदील ॥ ३५ ॥ इंद्रजित सबळ बळप्रवीण । क्षणार्धें मारील लक्ष्मण । कुमर वीर प्रधान सैन्य । घायें प्राण जातील ॥ ३६ ॥ निदसुरा कुंभकर्ण । रणीं हरवील नाक कान । लागतां श्रीरामाचा बाण । उभ्याच प्राण सांडील ॥ ३७ ॥ ऐसें बोलोनियां सीता । क्षोभें[11] पाहे लंकानाथा । त्यासी

१ विषयप्राप्तीस्तव शरण आलेल्याला. २ मृदु. ३ आज्ञाधारक. ४ बसण्याला. ५ कावळ्याचे घरीं. ६ मेला. ७ मोठ्यानें. ८ दुसऱ्याच्या स्त्रीची. ९ आज्ञा पाळतो. १० नाश. ११ क्रोधानें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

चळकांप सुटला चित्ता। दुर्धर दूतां पाचारी ॥ ३८ ॥ म्हणे इसीं भला नव्हे एकान्त। क्षोभें करील माझा घात। विचारीं पडला लंकानाथ। कृतकार्यार्थ साधेना ॥ ३९ ॥ भोगिली न वचे बळात्कारीं। पायां पडल्या नांगीकारी। सीता पतिव्रता खरी। राज्यभोगावरी भुलेना ॥ १४० ॥ सीता सती पतिव्रता। सत्य मानलें लंकानाथा। आपलिया निजस्वार्था। होय राखता जानकी ॥ ४१ ॥ त्रिजटा रावणाची भगिनी। गुज सांगे तिचे कानीं। सीता नेवोनि अशोकवनीं। सावधानीं राखावी ॥ ४२ ॥ अशोकवन ऐकतां गोष्टी। बांधी सीता शकुनगांठी। शोक पळाला उठाउठीं, होईल भेटी श्रीरामा ॥ ४३ ॥ अशोकवन ऐकोनि कानीं। अशोकवन देखे नयनीं। अशोक श्रीराम-हृदयभुवनीं। सीता तत्स्थानीं राखिली ॥ ४४ ॥ सीता राखिली अशोकांत। अशोकामाजी श्रीरघुनाथ। तीपासीं असे तो सतत। सावधानार्थ सुखरूप ॥ ४५ ॥ एका जनार्दना शरण। सीता प्रवेशली अशोकवन। अशोकीं नाहीं शोकबंधन। सीता तें स्थान पावली ॥ १४६ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे अरण्यकांडे एकाकारटीकायां सीताशोकवनप्रवेशो नाम अष्टादशोऽध्यायः ॥१८॥ ओंव्या ॥ १४६ ॥ श्लोक ॥ १३ ॥

अध्याय एकोणिसावा

श्रीसच्चिदानंदाय नमः ॥ अशोकवनीं सीतेपासीं। दुष्ट दुर्धर राक्षसी। रावण ठेवी भेडसावयासी। भयें आपणासी वश होईल ॥ १ ॥

अशोकवनिकामध्ये मैथिली नीयतामिति।
तत्रेयं रक्ष्यतां गूढं युष्माभिः परिवारिता ॥ १ ॥

सीतासंरक्षणीं नित्यवासी। विकटा विकृता सभयेंसीं। विरूपा विक्राळा राक्षसी। अशोकवनासी त्या आल्या ॥ २ ॥ नानारूपा नानाकारा। विक्राळा कराळा अति उग्रा। भिंगुलवाण्या[1] भयासुरा[2]। आल्या समग्रा सीतेपासीं ॥ ३ ॥ एकीचें विक्राळ वदन। सर्वांगासी एकचि कान। तीसी कानचि आच्छादन। येरवीं नग्न कराळी ॥ ४ ॥ लागतां कानाचा फडकारा। नक्षत्रें पडती जैशा गारा। जयांचें भय सुरासुरां। सीतेसी भेदरा देऊं आल्या ॥ ५ ॥ एकींचे उटकंटक[3] कपाळा। थडक हाणिती लोकपाळां। कपाळावरी विकट डोळा। जनकबाळा छळूं आल्या ॥ ६ ॥ एकींस एक कान आंथरूण। दुसरा कान तो प्रावरण[4]। कानें कांपती त्रिभुवन। सीतेसी छळण करूं आल्या ॥ ७ ॥ एकी स्तनायुधा दुर्धरा[5]। एकैक थान गांवें बारा। स्तनघातें मारी असुरां। सीतेसी भेदरा देऊं आली ॥ ८ ॥ भ्यासुर मुख दीर्घ दांताळी[6]। दांतीं दिग्गजां करी रांगोळी। वीर निर्दाळी दांतांतळीं। सीतेजवळी भय दावी ॥ ९ ॥ एकीचे केश सलंब पूर्ण। तेंचि नेसणें तेंचि पांघरूण। केश तिखट जैसे बाण। केशाभेणें जग पळे ॥ १० ॥ अजामुखी गजमुखी। सिंहश्वान-शूकरमुखी। व्याघ्रवानरतरसमुखी। घोडमुखी विक्राळा ॥ ११ ॥ खरोष्ट्रवक्त्रा सलंब ओष्ठ। होटें प्राण्याचा भरिती घोट। अवघ्या आलिया सीतें-निकट। भय उद्भट दावावया ॥ १२ ॥ विक्राळ मुख दीर्घ चांभाडी। कंटकी जिव्हा तांबडी। ते देखतां प्राणी प्राण सांडी। भक्षी मडीं राक्षसांचीं ॥ १३ ॥ राक्षस भक्षिती मनुष्यांसी। विक्राळा भक्षिती राक्षसांसी। तिसी रावण धाडी सीतेपासीं। भयें आपणासी वरावया ॥ १४ ॥ वांकडें मुख दीर्घ नाक। तेंही लांबवावें विशेख। जिचे श्वासावर्ती जग देख। शतानुशतक तळमळत ॥ १५ ॥ नाकींचिया केंसांआंत। म्हैसे गुंतले ओरडत। सिंह गुंतले तडफडित। गजावर्तें विकटास्या ॥ १६ ॥ नखायुधा क्रूरमुख। सलंब नखें अति तिखं। तींही लांब क्रोश एक। इंद्रादिक कांपती ॥ १७ ॥ नखाघांत अति उद्भट। घायें शस्त्र करी पीठ। नखें पर्वत करी सपाट। दुर्धर दुष्ट नखायुधा[11] ॥ १८ ॥ एकपादा आणि त्रिपादा। पंचपादादि हस्तपादा। शस्त्रास्त्रीं सन्नद्धबद्धा। आलिया उन्मादा राक्षसी ॥ १९ ॥ वाल्मीकरामायणाप्रती। राक्षसी बोलिल्या आहेति बहुती। तो विस्तारु न धरवे हातीं। कथा ग्रंथीं

१ भयानक. २ भ्यासुर, घिप्पाड. ३ उभारलेले केंस. ४ पांघरूण. ५ धरण्यास कठीण. ६ दंतपंक्ति. ७ हत्तीप्रमाणें मंडळाकार. ८ भयंकर तोंडांत. ९ तीक्ष्ण. १० नखांचा प्रहार. ११ नखेंच ज्यांचीं शस्त्रें आहेत अशा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वाढेल ॥ २० ॥ पुढील कथेची संगती । कृपा करावी साधुसंतीं । स्वयें रावण राक्षसींप्रती । काय उपपत्ति बोलिला ॥ २१ ॥

तथा च तर्जनैर्घोरैः पुनः सांत्वैश्च मैथिलीम् ।
आनयध्वं मम वशे वन्यां गजवधूमिव ॥ २ ॥

रावण सांगे राक्षसींसी । दुर्धर भेडसावा सीतेसी । गर्जन तर्जन अति आवेशीं । अट्टहासेंसीं गर्जोनी ॥ २२ ॥ ऐसें करावें गर्जन । तिचें चळकांपे मन । अत्यंत होवोनि उद्विग्न । मूर्च्छापन्न भयभीत ॥ २३ ॥ सुखें वरीन मी रावण । ऐसें बोले जंव आपण । तंववरी भय दाविजे संपूर्ण । जंव शरण मज होय ॥ २४ ॥ मज आलिया अनन्यशरण । तिसी करावें सुखशांतवन । सीते तुझें भाग्य धन्य । जे दशानन तुज कांत ॥ २५ ॥ ऐसें सांगोनि तयांसी । धाडिल्या अशोकवनासी । वश जालिया सीतेसी । आणावी गजरेंसीं मजपासीं ॥ २६ ॥ मग राक्षसी मिळोनि समस्ती । कोइत्या मुद्गल त्रिशूळ हातीं । आल्या अशोकवनाप्रती । हांक देती दुर्धर ॥ २७ ॥ हांकीं गर्जलें अंबर । स्वर्गीं कांपती सुरवर । भूतळीं गर्जती नर किन्नर । ऋषीश्वर भयभीत ॥ २८ ॥ राक्षसी करिती दीर्घ रवो । सीता मारोनि मांस खावों । तुझे कंठींचें रुधिर पिवों । आणि हार लेवों हाडांचे ॥ २९ ॥ तुझे सर्वांगाचिया शिरीं । करूं शेवयांची खिरी । काळीज काढोनि बाहेरी । कोशिंबिरी करूं आम्ही ॥ ३० ॥ ऐसिया गर्जती राक्षसी । अवघ्या आल्या सीतेपासीं । तंव तें भय भासेना सीतेसी । श्रीरामस्मरणें निःशंक ॥ ३१ ॥ देखतां सीतेचें दर्शन । राक्षसी झाल्या कंपायमान । सीतेनें पाहिल्या क्षोभोन । आमुचा प्राण घेईल ॥ ३२ ॥ सीता देखतांचि दृष्टीं । भयें पळाल्या उठाउठीं । राक्षसी भयभीत पोटीं । गोष्टी उफराटी येथें चाली ॥ ३३ ॥ भेडसावूं जातां सीतेसी । भयभीत झाल्या राक्षसी । श्रीरामस्मरणाची महिमा ऐशी । द्वंद्व भक्तांसी बाधीना ॥ ३४ ॥ मग रावणा सांगती निशाचरी । सीता आमुचें भय न धरी । आम्हां सीतेचें भय भारी । सर्वोपरी निःशंक ॥ ३५ ॥ तंव रावण म्हणे सती सीता । निःशंक निधडी पतिव्रता । हे मज भोगवेना सर्वथा । कष्ट वृथा गेले माझे ॥ ३६ ॥ तंव येरीकडे श्रीराम सौमित्र । दोघे होवोनि एकत्र । आश्रमीं एकली सीता सुंदर । दोघे सत्वर निघाले ॥ ३७ ॥

व्रजतस्तत्र तस्याथ वामलोचनमस्फुरत् ।
प्रास्फुरच्चास्खलद्रामो वेपथुश्चास्य जायते ॥ ३ ॥
उपालभ्य निमित्तानि सोऽशुभानि मुहुर्मुहुः ।
अपि सीता श्रमे सा स्याद्व्याजहार पुनः पुनः ॥ ४ ॥

सीतेचे भेटीस जातां जाण । अशुभ लवे वाम नयन । पदोपदीं श्रीरघुनंदन । अडखळे आपण क्षणक्षणां ॥ ३८ ॥ सौमित्रा ऐकें सावधान । अशुभ होताती अपशकुन । आजि सीतेचें दर्शन । केंवी देखों हें न कळे ॥ ३९ ॥ लक्ष्मणा एकली सीता । आश्रमीं असेल काय आतां । वारंवार होय पुसता । प्रबळ चिंता सीतेची ॥ ४० ॥ आश्रमीं एकली सीता सांडोनी । कां येथें आलासी धांवोनी । हरोनि नेतां राक्षसीं पत्नी । कोण तिजलागोनि सोडवील ॥ ४१ ॥ स्त्रियेच्या क्षुद्र बोलासाठीं । त्वां कां रागें सोडिली पंचवटी । सीता हरील रावण हट्टी । बुद्धि खोटी तुवां केली ॥ ४२ ॥ अशुभ होताती अपशकुन । तेणें मी अत्यंत उद्विग्न । सीता मागुती देखेन । हें सहसा मन मानीना ॥ ४३ ॥

ददर्श पर्णशालां च सीतया रहितां तदा ।
श्रिया विरहितां ध्वस्तां हेमंते पद्मिनीमिव ॥ ५ ॥
रुदंतमिव वृक्षैश्च ग्लानपुष्पमृगद्विजम् ।
श्रिया विहीनं विध्वस्तं संत्यक्तं वनदेवतैः ॥ ६ ॥

ऐशा मार्गीं करितां गोष्टी । दोघे आले पंचवटीं । सुंदर कपालेशानिकटीं । सीता गोरटी दिसेना ॥ ४४ ॥ शोधोनि पाहिली पंचवटी । शोधिली उभय गंगातटीं । वनीं धुंडितां परम कष्टीं । जाले जगजेठी अति श्रांत ॥ ४५ ॥ दोघे आले पंचवटी । तंव रिती दिसे पर्णकुटी । जनीं वनीं हिंडतां दृष्टी । सीता गोरटी दिसेना ॥ ४६ ॥ जरी शुद्धी पुसावी ऋषिजनीं । तरी ते पळाले जीव घेवोनी । मनुष्यमात्र न दिसे वनीं । तंव लक्ष्मण मनीं धाकतु

१ युक्ति. २ शिव्या देणें. ३ आकाश. ४ रक्त. ५ गळ्यांत घालूं. ६ सुखदुःखादि विकार. ७ धैर्यवान्. ८ इकडे. ९ पुरुषांचा डावा डोळा लवणें हें अशुभ चिन्ह समजत असतात. १० दुःखी, खिन्न. ११ भ्याला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ ४७ ॥ श्रीराम धाकत होता पोटीं । तेचि येथें घडली गोष्टी । अपेशपात्र जालों सृष्टीं । लक्ष्मणापोटीं अति चिंता ॥४८॥ लक्ष्मणें हारविली सीता । हें अपेश बैसलें माथां । काय मी सांगों रघुनाथा । शोधितां सीता दिसेना ॥ ४९ ॥ शुद्धी पुसों जातां वनीं । तंव वृक्ष खांकरले[1] फळपुष्पांनीं । जेंवी अंतरल्या जननी । दीनवदनी अपत्यें ॥ ५० ॥ वृक्ष स्रवती संपूर्ण । पशु पक्षी करिती रुदन । वनश्री गेली पळोन । अवदशा पूर्ण वना आली ॥ ५१ ॥ पक्षिणी पडल्या पारधियाहातीं । पिलीं चरफडती फडफडिती । तेंवी नेलिया सीता सती । जाली उपहती[2] आश्रमीं ॥ ५२ ॥ सीतेचेनि दुःखें जाण । सर्वांगीं द्रवती पाषाण । थेंबटे गाळों लागलें तृण । दुःख दारुण सर्वांसी ॥ ५३ ॥ ऐसी देखोनि उपहती । श्रीराम सुखावला चित्तीं । करावया अवतारख्याती । निजपुरुषार्थी उद्युक्त[3] ॥५४॥ सज्ञान माझी सीता सती । जे ससैन्य रावणवधार्थी । स्वयें गेली लंकेप्रती । राक्षसां ख्याती लावावया ॥ ५५ ॥ समुद्रीं तारून पाषाण । मारीन रावण कुंभकर्ण । श्रीरामा आलें स्फुरण । कुळनिर्दळण राक्षसांचें ॥ ५६ ॥ मारोनि राक्षसांच्या कोडी । सोडवीन देवांची बांधवडी । रामराज्याची निजगुढी । जगीं रोकडी उभवीन ॥ ५७ ॥ ऐसा श्रीराम सर्वज्ञ । जाणोनि भविष्याचें ज्ञान । सीताशुद्ध्यर्थ आपण । भ्रमलेपण स्वयें दावी ॥५८॥ जैसी अवताराची गती । तैसी अवताराची स्थिती । श्रीराम निघाला तैसिया रीतीं । सीताशुद्ध्यर्थी विलपत ॥ ५९ ॥ श्रीराम अवतार सुनिश्चित । त्यासीही लोकसंग्रहार्थ[4] । वसिष्ठें नेमिला परमार्थ । तेंचि रघुनाथ संपादी ॥ ६० ॥

अंतरेको बहिर्नाना अंतर्बोधो बहिर्जडः ।
अंतस्त्यागी बहिःसंगी लोके विहर राघव ॥ ७ ॥
बहिः कृत्रिमसंरंभो हृदि संरंभवर्जितः ।
अकर्ता च बहिःकर्ता लोके विहर राघव ॥ ८ ॥
अंतर्नैराश्यमादाय बहिराशोन्मुखो हि वा ।
बहिस्तप्तोऽन्तराशीतो लोके विहर राघव ॥ ९ ॥

अंतरीं जाणोनि परब्रह्म । बाह्य सीतार्थी विरहभ्रम[5] । अंतरीं स्वतःसिद्ध निष्काम । बाह्य दुःखधर्म सीताशुद्धी ॥ ६१ ॥ अंतरीं अद्वैतप्रतीती । बाह्य सीता पुसे जीवांप्रती । वृक्षवल्लींस ये काकुळती । सीता निश्चितीं मज सांगा ॥ ६२ ॥ अंतरीं निजबोध अति गोड । बाह्य सीतादुःखें अति जड । अंतरीं निर्विषय सुखवाड[6] । बाह्य धुमाड[7] विषयांचा ॥ ६३ ॥ अंतरीं अद्वैतत्वें सर्वत्यागू । बाह्य सीतेसीं विषयसंगू । अंतरीं सुनिश्चित चांगू । बाह्य लगबगू धांवण्या धांवे ॥ ६४ ॥ अंतरीं अणुमात्र नाहीं चाड । बाह्य सीतार्थी अति चरफड । अंतरीं निजसुखसुरवाड । बाह्य दुर्वाडे अति दुःखी ॥ ६५ ॥ अंतरीं नित्य नैराश्य । बाह्य सीतेचा आशापाश । तिचेनि दुःखें अति संत्रास । पिशाचभास जगीं दावी ॥ ६६ ॥ अंतरीं संतापनिवृत्त[9] । बाह्य संतापें अति संतप्त । अंतरीं सर्वार्थनिर्मुक्त । बाह्य विषयासक्त सीतार्थी ॥ ६७ ॥ अंतरीं भूतकृपा चोखडी । बाह्य युद्धार्थ पुरुषार्थपरवडी । मारोनि राक्षसांच्या कोडी । गजकरवडी पाडितु ॥ ६८ ॥ अंतरीं बोध अकर्त्रात्मता । बाह्य दिसे युद्धकर्ता । मारोनि राक्षसां समस्तां । लंकानाथा निर्दळील ॥ ६९ ॥ सद्गुरु वसिष्ठाचे युक्ती । श्रीराम वर्ते निजात्मस्थितीं । हें न कळे लोकांप्रती । श्रीराममूर्ति परब्रह्म ॥ ७० ॥ वाल्मीकमुनीचें भाषित । सत्य करावया श्रीरघुनाथ । विलंपत[10] सीताशुद्ध्यर्थ । स्वयें बोलत तें ऐका ॥ ७१ ॥ श्रीराम म्हणे लक्ष्मणासी । वेगीं बोलावीं सीतेसी । माझी आज्ञा कां न मानिसी । तुज काय तिसीं अबोला ॥ ७२ ॥ तूं तंव सीतेसीं क्षोभलासी । रागें तिसीं न बोलसी । तरी मीच पाचारितों तिसी । अतिसंभ्रमेंसीं[11] अनुवादे ॥ ७३ ॥

किं धावसि प्रिये दूरं दृष्टासि कमलेक्षणे ।
वृक्षेणावृत्य चात्मानं कस्मान्न प्रतिभाषसे ॥ १० ॥
तिष्ठ तिष्ठ वरारोहे न तेऽस्ति करुणा मयि ।
नात्यर्थं हास्यशीलासि किमर्थं मामुपेक्षसे ॥ ११ ॥

मी तुज देखतों वो सुंदरी । तूं कां पळतेसी दुरिचे दुरी । रिघोनि वृक्षगुल्मांमाझारीं । नेत्रांतरीं कां लपसी ॥ ७४ ॥ उभी वो राहें येथें । तूं जाशील

१ फळांच्या व पानांच्या योगें करून शब्द केला. २ औदासीन्य. ३ प्रवृत्त. ४ लोकांच्या कल्याणाकरितां. ५ भ्रांति. ६ आनंद. ७ विपुलता. ८ अनिवार. ९ संतापापासून मुक्त. १० शोक करीत. ११ मोठ्या आवेशानें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

जेथें जेथें । मी येईन तुजसांगातें । सांडोनि मातें जाऊं नको ॥ ७५ ॥ मृगकंचुकीसाठीं । मजसीं रुसलीसी गोरटी । मज न देसी दृष्टिभेटी । माझी गोष्टी कां नाइकसी ॥ ७६ ॥ माझे सेवेची तुज आवडी । मज न विसंबसी अर्धघडी । ते तूं आजि कडोविकडीं । वृक्षाबुडीं कां लपसी ॥ ७७ ॥ मृग मारोनि मज येतां । विलंब लागला तत्त्वतां । तेणें क्षोभ जाला चित्ता । क्षमा सर्वथा मज करीं ॥ ७८ ॥ लक्ष्मण न करी तुझें वचन । तेणें जालीस क्षोभायमान । तदर्थीं माझें लोटांगण । क्षमा पूर्ण मज करीं ॥ ७९ ॥ कृपेनें मज द्यावी भेटी । सांगें जीवींची गुजगोष्टी । तूं एकाकी गोरटी । वनदिक्पुटीं कां जासी ॥ ८० ॥ तुजलागीं मी आर्तभूत । तुझें कां वो निष्ठुर चित्त । कृपेनें येवोनियां येथ । माझें आर्त पुरवावें ॥ ८१ ॥ ऐसेनि न भेटे निजकांता । वृक्षवल्लींतें होय पुसता । पशुपक्ष्यादि समस्तां । पुसे सीता श्रीराम ॥ ८२ ॥ तुम्ही न बोला सकोपता । तुमचे चरणीं माझा माथा । केउती आहे माझी सीता । मज तत्त्वतां सांगावी ॥ ८३ ॥ देखोनि पर्वत पाषाण । श्रीराम घाली लोटांगण । तुम्हीं तरी कृपा करून । सांगावी आपण सीताशुद्धी ॥ ८४ ॥ ऐसी न देखतां सीता । श्रीरामासी परम चिंता । लक्ष्मणासी होय सांगता । गता मृता जानकी ॥ ८५ ॥

अब्रवील्लक्ष्मणं दीनो मुखेन परिशुष्यता ।
हता मृता गता सीता भक्षिता वा तपस्विनी ॥ १२ ॥

श्रीराम म्हणे सीता एकली । राक्षसभयें पळोन गेली । किंवा आपभयें निमाली । अथवा मारिली राक्षसीं ॥ ८६ ॥ राक्षसीं सीता मारून । स्वेच्छा केलें भक्षण । ऐसें बोलोनि रघुनंदन । मूर्च्छापन्न अति दुःखी ॥ ८७ ॥ सीता सीता म्हणतां वेळोवेळां । वाळले ओंठ सुकला गळा । अश्रु पूर्ण आले डोळां । जनकबाळा केउती आहे ॥ ८८ ॥ मूर्च्छापन्न मूर्च्छेआंत । हाय हाय सीता म्हणत । सीताविरहें श्रीरघुनाथ । दुःखाभिभूतें अति दुःखी ॥ ८९ ॥ पडे अडखळे उठे बैसे । सीता सीता म्हणे आवेशें । सीताविरहें लागलें पिसें । क्षणक्षणां पुसे जानकी ॥ ९० ॥

क्व गता मां परित्यक्त्वा हा सीतेति पुनः पुनः ।
इत्येवं विलपन्रामः पर्यधावद्वनाद्वनम् ॥ १३ ॥

क्वचिदुद्भ्रमते योगात्क्वचिद्विभ्रमते बलात् ।
क्वचिन्मत्त इवाभाति कान्तान्वेषणतत्परः ॥ १४ ॥

क्वचित्स्खलन्क्वचिद्वीक्षन्क्वचिद्धावन्क्वचित्पतन् ।
उच्चैर्नीचैश्च विक्रोशन्सीता सीतेति वा वदन् ॥ १५ ॥

आतां काय सीतेची आशा । म्हणोनि धांवे दाही दिशा । सीतेलागीं झाला पिसा । अति आक्रोशें विलपत ॥ ९१ ॥ हा हा सीते हा हा सीते । म्हणोनि पाहे सभोंवतें । न देखोनियां सीतेतें । वनीं वनातें परिभ्रमे ॥ ९२ ॥ कोठें अडखळे कोठें उडे । कोठें रडे कोठें पडे । सीताविरहें जालें वेडें । पाहे चहूंकडे जानकी ॥ ९३ ॥ सीता सीता म्हणोनि देखा । अति आक्रोशें मारी हांका । लक्ष्मणा तूं माझा सखा । उगाचि तूं कां पाहतोसी ॥ ९४ ॥ सीते वेगीं तूं धांव पाव । अति संभ्रमेंसीं देईं खेंवं । मी गर्जोनि घेतों नांव । माझी करुणा कां हो नुपजेचि ॥ ९५ ॥ कां रुसलीस सांगातिणी । म्हणोनि आंग टाकी धरणीं । सवेंचि धांवे उन्मत्तपणीं । वनीं काननीं गिंवसित ॥ ९६ ॥

तस्य शैलस्य सानूनि गुहाश्च शिखराणि च ।
प्रयत्नेन विचिन्वन्तौ नैव तामधिजग्मतुः ॥ १६ ॥

विचिंत्य सर्वतः शैलं रामो लक्ष्मणमब्रवीत् ।
न तां पश्यामि सौमित्रे वैदेहीं पर्वते शुभाम् ॥ १७ ॥

दऱ्या दरकुटें पर्वतशिखरें । गिरिगव्हरें गुहाकंदरें । शोधितां श्रीरामसौमित्रें । सीता सर्वत्र दिसेना ॥ ९७ ॥ श्रीराम म्हणे सौमित्रासी । शोधितां पर्वत देशोदेशीं । सीता न भेटे आम्हांसी । शुद्धी कोणासी पुसावी ॥ ९८ ॥ शुद्धी पुसावया जाण । हें केवळ वन विजन । शोधितां न भेटे जन । काय आपण करावें ॥ ९९ ॥ ऐसें बोलतां श्रीरघुनाथा । सीताविरहें संभ्रांतता । पुसों धांवे तो पर्वता । पर्वतमाथां वृक्षांसी ॥ १०० ॥

रे वृक्षाः पर्वतस्था गिरिगहनलता वायुना वीज्यमाना
रामोऽहं व्याकुलात्मा दशरथतनयः शोकवृत्तश्च दग्धः ।
बिंबोष्ठी चारुनेत्रा सुविपुलजघना बद्धरत्नाढ्यकांची
हा सीता केन नीता मम हृदयगता को भवान्केन दृष्टा ॥ १८ ॥

१ मोठ्या कडाक्यानें. २ इच्छित. ३ रागावून. ४ कोठें. ५ दुःखानें व्यापलेला. ६ शोक करीत. ७ फिरूं लागला. ८ आदरानें. ९ आलिंगन. १० शोधीत. ११ निर्जन.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

पर्वताग्रीं वृक्ष हो। तुम्ही दुरी देखतां पहा हो। तरी माझ्या हृदयींचा संदेहो। निःसंदेहो तुम्ही करा ॥ १ ॥ म्हणाल तूं कोण कोणाचा। तरी मी राम दशरथाचा। सीतावियोगविरहाचा। अति दुःखाचा पर्वत ॥ २ ॥ सीता म्हणाल आहे कैसी। तिचिया निजस्वरूपासी। मी सांगेन तुम्हांपासीं। यथार्थैसीं सुचिन्हें ॥ ३ ॥ आरक्त नेत्र आरक्त अधर। सुंदर सुनासिका सुकुमार। कटीं रत्नाढ्य कटिसूत्र। पीतांबरधर जानकी ॥ ४ ॥ ऐसिया लावण्याची खाणी। तुम्हांमाजी देखिली कोणीं। ते सांगावी मजलागोनी। तिची धांवणी मी करीन ॥ ५ ॥ वायूनें वृक्षपल्लव डोलती। श्रीराम म्हणे मज वृक्ष बोलाविती। ऐसें म्हणोनियां तयांप्रती। धांवोनि वेगवृत्तीं स्वयें जाय ॥ ६ ॥ तेथें न भेटतां सीता। परम दुःख श्रीरघुनाथा। मूर्च्छित पडे मागुता। हा हा सीता विलपत ॥ ७ ॥ सीता न सांगती पर्वत। तेणें क्षोभला श्रीरघुनाथ। भस्म करावया गिरि समस्त। धनुष्या हात घातला ॥ ८ ॥ धनुष्या लावोनियां गुण। गुणीं लाविला वज्रबाण। तंव लक्ष्मणें धरिले चरण। विरुद्ध आपण न करावें ॥ ९ ॥ निरपराध हे पर्वत। यांचा करूं नये घात। शांत करोनि श्रीरघुनाथ। पुढें वनांत चालिले ॥ ११० ॥

इमे लक्ष्मण वैदेह्यास्तपनीये विभूषणे।
जपापुष्पनिकाशैश्च चित्रक्षतजबिन्दुभिः ॥ १९ ॥
मन्ये लक्ष्मण वैदेही राक्षसैः कामरूपिभिः।
नीत्वा छित्त्वा विभक्ता वा भक्षिता वा तपस्विनी ॥ २० ॥

मार्गीं जातां रघुनंदन। देखे सीतेचें सुवर्णभूषण। लक्ष्मणा धांव म्हणोन। सीता येणें मार्गें नेलीसे ॥ ११ ॥ आतां माग लागला खरा। धांवणें करूं सौमित्रवीरा। तंव रक्तांकित देखोनि धरा। श्रीरामचंद्रा अति चिंता ॥ १२ ॥ कपटरूपें राक्षसीं। येथवरी आणोनि सीतेसी। छेदोनी मारोनी तिसी। विभागेंसीं भक्षिली ॥ १३ ॥ गेलें सीतेऐसें रत्न। अति दुःखित श्रीरघुनंदन। तंव पुढें देखतसे आपण। महारण वीरांचें ॥ १४ ॥

रणोपकरणं सर्वं विध्वस्तं धरणीतले।
मुक्तामणिनिभं दिव्यं तपनीयविभूषितम् ॥ २१ ॥
पतितं भुवि पश्य त्वं भ्रातः सौम्य महाद्भुतम्।
विशालं पतितं भूमौ कवचं यस्य कांचनम् ॥ २२ ॥

ते रणभूमी अवलोकितां नयनीं। धनुष्य भंगिलें हेमाभरणी। कवच पाडिलें दिसे धरणीं। मुक्ताभरणीं लखलखित ॥ १५ ॥ रथ भंगिला सचक्र। मारिले पिशाचवदन खर। दंडभंगें पाडिलें छत्र। युद्ध विचित्र वीरांचें ॥ १६ ॥ संतूणीर विखुरले बाण। मुकुट पाडिला देदीप्यमान। थोर जालें रणकंदन। सीता संपूर्ण मारिली ॥ १७ ॥ सीता अतिशयें सुंदर। तिजनिमित्त निशाचर। भिडिन्नले परस्पर वीर। युद्ध दुर्धर तयांचें ॥ १८ ॥ ऐसिया युद्धसंकटीं। सीता मारिली गोरटी। राक्षस तंव महाकपटी। मांसासाठीं मारिली ॥ १९ ॥ सीता मारिली राक्षसीं। काय मुख दावूं अयोध्येसी। काय सांगों जनकापासीं। क्षत्रियधर्मासी हे लाज ॥ १२० ॥

किं नु लक्ष्मण वक्ष्यामि समेत्य जनकं वचः।
मातरं चैव वैदेह्या विनतामहमप्रियम् ॥ २३ ॥

काय सांगों सीतेचे मातेसी। काय सांगों निजजनन्यांसी। सीता हरविली वनवासीं। काय सुहृदांसी मी सांगों ॥ २१ ॥ लाज लागली यशःकीर्तीसी। लाज लागली क्षात्रवृत्तीसी। लाज लागली मज मानसीं। सीता वनवासीं हरविली ॥ २२ ॥ लाजविला निजपुरुषार्थ। स्वर्गीं लाजेल श्रीदशरथ। लाज जाली तिहीं लोकांत। तेणें श्रीरघुनाथ क्षोभला ॥ २३ ॥ सुमित्रा पाहें आंगवण। म्हणोनि घेतलें धनुष्यबाण। सीतेनिमित्त पैं जाण। बाणें निर्दाळीन तिन्ही लोक ॥ २४ ॥

तमुवाच ततो रामश्चित्रं विस्फार्य कार्मुकम्।
अराक्षसीमिमां लंकां जगत्पश्याध लक्ष्मण ॥ २४ ॥

राक्षसीं नेलिया सीता सुंदरा। सकुल सपुत्र सपरिवारा। अराक्षसी करीन धरा। शरधारा निर्वटोनी ॥ २५ ॥ सीता पाताळीं नेतां जाण। पन्नगांतें निर्दाळीन। दानवमानवांतें विंधीन।

१ बरोबर. २ ओंठ. ३ मोठ्या त्वरेनें. ४ पृथ्वी. ५ सुवर्णालंकारयुक्त. ६ भाल्यासकट. ७ पसरले. ८ मारून.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

घोळसीन त्रिदशांतें ॥ २६ ॥ राक्षसीं मारिली सीता । तिसी जरी यम होय नेता । त्याचे करीन मी घाता । यमदूतांसमवेत ॥ २७ ॥ यम दंडितो जगासी । बाणीं मी दंडीन त्यासी । आणूनि नेदी जरी सीतेसी । तरी मी त्यासी दंडीन ॥ २८ ॥ यमाची मी नळी निमेटीं । कळिकाळाची फोडीन कवटी । दमूनियां सकळ सृष्टी । सीता गोरटी आणीन ॥ २९ ॥ मी तंव काळाचा आकळिता । अंतकातें निर्दळिता । मर्दोनि लोकां समस्तां । आणीन सीता निमेषार्धें ॥ १३० ॥ नयनाग्नीचे कल्लोळ । नेत्रींहूनि निघती ज्वाळ । धनुष्य ओढिलें विक्राळ । स्वर्गीं खळबळ देवांसी ॥ ३१ ॥ देव दानव ऋषीश्वर । भेणें कांपती थरथर । आंदोळलें चराचर । श्रीराम दुर्धर क्षोभला ॥ ३२ ॥ सीतेचिया शुद्धीसाठीं । क्रोधें जाळूं पाहे सृष्टी । भयें उमा झोंबे कंठीं । धाके पोटीं सदाशिव ॥ ३३ ॥

अदृष्टपूर्वं संक्रुद्धं दृष्ट्वा रामं सलक्ष्मणः ।
अब्रवीत्प्रांजलिर्वाक्यं मुखेन परिशुष्यता ॥ २५ ॥
पुरा भूत्वा मृदुर्दान्तः सर्वभूतहिते रतः ।
न क्रोधवशमापन्नः प्रकृतिं हातुमर्हसि ॥ २६ ॥
चंद्रे लक्ष्मीः प्रभा सूर्ये गतिर्वायौ भुवि क्षमा ।
एतच्च नियतं नित्यं त्वयि चानुत्तमं यशः ॥ २७ ॥

श्रीराम काळाग्निरूप क्रोधायमान । तें देखोनि धाके लक्ष्मण । तोंडींचें पाणी गेलें पळोन । कंपायमान भयभीत ॥ ३४ ॥ मारिली ताटका सुबाहू । तैं हा दुर्धर क्षोभ नव्हता बहू । विराध सीताग्रहणराहू । क्रोधोद्भवु तैं नव्हता ॥ ३५ ॥ हिरोनि राज्यवस्त्राभरणा । पार्यीं कैकेयीनें धाडिलें वना । तैं हा क्षोभ नव्हता जाणा । श्रीरघुनंदनालागोनि ॥ ३६ ॥ एक रामें आपण । वधिले त्रिशिरा खर दूषण । तैं ऐसा क्रोध दारुण । नाहीं आपण देखिला ॥ ३७ ॥ सीतेचिये शुद्धीसाठीं । श्रीराम क्षोभला प्रबल सृष्टीं । स्वर्गीं देवां हडबड मोठी । धाके पोटीं कळिकाळ ॥ ३८ ॥ दानव मानव ऋषीश्वरां । धाकें चळकांप थरथरां । क्षोभला देखोनि श्रीरामचंद्रा । वसुंधरा चळीं कांपे ॥ ३९ ॥ श्रीराम क्षोभला निर्वाण । देखोनि सौमित्र आपण । धांवोनि धरिले दोन्ही चरण । क्षमा संपूर्ण करीं रामा ॥ १४० ॥ सावध ऐकें कृपामूर्ती । भूतां कृपाळु तूं रघुपती । तुवां निर्मिली भूतसृष्टीची स्थिती । ते वेदोक्ती अवधारीं ॥ ४१ ॥ प्राण राखोनियां भूतीं । तुझेनि वायूची गती । चंद्रीं तुझेनि श्रीरघुपती । शोभा शोभती सर्वदा ॥ ४२ ॥ तुझियेनि निजतेजस्थितीं । सूर्यासी तेज अति दीप्ती । तुझिया क्षमेनें क्षिती । ते भूतें वाहिती सर्वदा ॥ ४३ ॥ समुद्र वेळा राखे सर्वदा । काळ तुजअधीन सदा । अकाळ प्रळयो न करी कदा । निजमर्यादा हे तुझी ॥ ४४ ॥ तो तूं आजि स्थिति काळासी । अकाळप्रळयो करूं पाहसी । विचारूनि निजमानसीं । क्षमा क्षोभासी करीं रामा ॥ ४५ ॥ तूं सृष्टीचा आदिकर्ता । तुझेनि बाळक विधाता । आपली परिपूर्ण पूर्णता । श्रीरघुनाथा आठवीं ॥ ४६ ॥ ऐसें ऐकोनि सौमित्रवचन । निजक्षोभातें स्वयें प्राशून । संतोषोनि श्रीरघुनंदन । दिधलें आलिंगन सौमित्रा ॥ ४७ ॥ ऐकोनि बंधूची विनंती । संतोषला श्रीरघुपती । प्राशूनियां क्रोधवृत्ती । सुखशांतीं तुष्टला ॥ ४८ ॥ संतोषोनि श्रीरघुपती । दोघे बैसले सुखस्थितीं । जाली पूर्णिमा पूर्णराती । उदयप्राप्ती चंद्राची ॥ ४९ ॥ एका जनार्दना शरण । आठवितां पूर्णपण । श्रीराम सुखें सुखावोन । केलें शयन तृणशय्ये ॥ १५० ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे अरण्यकांडे एकाकारटीकायां श्रीरामसीताशोकविलापनं नाम एकोनविंशतितमोऽध्यायः ॥ १९ ॥ ओंव्या ॥ १५० ॥ श्लोक ॥ २७ ॥

अध्याय विसावा

श्रीरामचंद्राय नमः ॥ पूर्णिमेची रात्री शोभायमान । तृणशेजे रघुनंदन । करिता जाला सुखें शयन । करी पांदसंवाहन सौमित्र ॥ १ ॥ चंद्रोदय मनोहर । चंद्रकिरण अति सुकुमार । अंगीं लागतां श्रीरामचंद्र । उठी सत्वर गजबजोनी ॥ २ ॥

१ मानगोटी, मान. २ मोडीन. ३ आज्ञेंत वागविणारा. ४ भीतीनें. ५ सुगावा लागावा म्हणून. ६ पृथ्वी. ७ ब्रह्मदेव. ८ गवताच्या अंथरुणावर. ९ पाय दाबणें-चेपणें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सौमित्रे ननु सेव्यतां तरुतलं चंडांशुरुज्जृंभते
चण्डांशोर्निशि का कथा रघुपते चंद्रोऽयमुन्मीलति ।
वत्सैतद्भवता कथं नु विदितं धत्ते कुरंगं यतः
क्वासि प्रेयसि हा कुरंगनयने चंद्रानने जानकि ॥ १ ॥

श्रीराम म्हणे लक्ष्मण । खडतर सूर्याचे किरण । मज बाधिती दारुण । बैसूं दोघे जण तरुतळीं ॥ ३ ॥ तंव सौमित्र म्हणे श्रीरघुनाथा । रात्रीं कायसी सूर्याची कथा । हा अमृतांशु[1] चंद्र तत्त्वतां । निववी समस्तां निजकिरणीं ॥ ४ ॥ जरी हें चंद्रबिंब सांगसी पूर्ण । सौमित्रा तुज हें कैसें ज्ञान । बिंबीं देखोनियां मृगचिन्ह । चंद्र लक्षण मी जाणें ॥ ५ ॥ जरी हें चंद्रबिंब निजचिन्हीं । एकत्र देखतसों नयनीं । तरी मृगनयना चंद्रवदनी । जनकनंदिनी ते कोठें ॥ ६ ॥ जरी मृगचिन्ह चंद्र देखसी । तरी मृगनयना चंद्रवदनेंसीं । सीता दाखवीं मजपासीं । म्हणोनि उकसाबुकसीं स्फुंदत ॥ ७ ॥ हा हा सीता प्रियकांता । सुखरूपा जनकदुहिता । लक्ष्मणा कोठें आहे सीता । दुःखावस्था अनुवादे ॥ ८ ॥ पाठीसीं उभी माझी सीता । पुढें पळे जनकदुहिता । लक्ष्मणा धांव धांव तत्त्वतां । रुसली कांता बुझावीं[2] ॥ ९ ॥ सर्वेंचि बोले आन आन । चंद्रें द्वंद्व मांडिलें जाण । खडतर तावितात[3] किरण । तापलों पूर्ण सौमित्रा ॥ १० ॥

चंद्रश्चंडकरायते मृदुगतिर्वातोऽपि वज्रायते
माल्यं सूचिकुलायते मलयजो लेपः स्फुलिंगायते ।
रात्रिः कल्पशतायते विधिवशात्प्राणोऽपि भारायते
हा हंत प्रमदावियोगसमयः संहारकालायते ॥ २ ॥

लक्ष्मणा सावध ऐकें तूं आतां । चंद्रमा दवडीं गा परता । न वचे तरी करीन घाता । संतापता मज तावी ॥ ११ ॥ लक्ष्मण घाली शीतल वारा । म्हणे तूं द्वंद्वा पेटलासी सौमित्रा । मज हाणिसी वज्रधारा । दशशिरा मिनलासी[4] ॥ १२ ॥ येथोनि ऊठ जाय परता । करूं आलासी माझे घाता । ऐसा विरहज्वर श्रीरघुनाथा । संतापता अति तावी ॥ १३ ॥ शीतोत्पली[5] सुमनसेजार । तेथें निजविला श्रीरामचंद्र । तंव सुयांनीं खिळिलें सर्व शरीर । आप्त सौमित्र मज द्वंद्वी[6] ॥ १४ ॥ जो तूं होतासी सुमित्र । तो तूं जालासी कुमित्र । सुयांनीं खिळिलें सर्व गात्र[7] । वृथा वैर कां करिसी ॥ १५ ॥ सवेग निघावया धगी[8] । बावन्न चंदन लाविले अंगीं । क्रोधें श्रीराम बोले वेगीं । आगी सर्वांगीं लाविली ॥ १६ ॥ सीताविरहें अति विव्हळ । त्यावरी लाविले त्वां विंगळ[9] । न भेटतां जनकबाळ । प्रळयकाळ मज आला ॥ १७ ॥ सीतेचे वियोगविरहें । सूर्य निमाला रे नेणों काये । रात्रि जाली कल्पप्राय । करूं मी काय सौमित्रा ॥ १८ ॥ मजसीं वैर चालवी चंद्र । वैरा पेटला सौमित्र । वायु चालवी वैराकार । वज्रधार मज लागे ॥ १९ ॥ सीतावियोगविरहें जाण । माझा निघों पाहे प्राण । सौमित्रा वेगीं रचीं सरण[10] । अलोट मरण मज आलें ॥ २० ॥ ऐसें बोलत बोलतां । सवेंचि धांवे म्हणे सीता । वृक्षांसी म्हणे माझी कांता । गुल्मलता आलिंगी ॥ २१ ॥ सीता म्हणोनियां जाण । श्रीराम चुंबी पाषाण । धांवोनि हृदयीं धरी तृण । सीता संपूर्ण हे माझी ॥ २२ ॥ लक्ष्मणासी म्हणे तूं सीता । तूंचि माझी निजकांता । ऐसी सीतेची अवस्था । श्रीरघुनाथा अति भ्रांती ॥ २३ ॥ मी येथें सौमित्रा सांग कोण । तूं श्रेष्ठ सखा स्वामी संपूर्ण । स्वामित्व मज कैंचें जाण । अयोध्यापति संपूर्ण श्रीराम ॥ २४ ॥ तूं मजपासीं कैंचा कोण । हर हर मी काय सांगूं आपण । नित्यानुवर्ती[11] लक्ष्मण । मज सेवक संपूर्ण आज्ञाधारी ॥ २५ ॥ तरी वनीं कां हिंडसी एकाकी । प्रियप्राप्तीच्या अनुलक्षीं । प्रिया कोण कैंची कीं । तुझी भार्या जानकी जनकात्मजा ॥ २६ ॥ ऐसी आठवण देतां । जानकी आठविली चित्ता । हा हा केउती गेली सीता । भेटवीं आतां सौमित्रा ॥ २७ ॥ ऐसें देखोनि श्रीरामासी । उमा विनवी महेशासी । कांहींएक पुसेन तुम्हांसी । तें निश्चयेंसीं मज सांगा ॥ २८ ॥ तुम्हींच सांगितलें आपण । श्रीराम परब्रह्म पूर्ण । त्याचें स्वरूप तें कोण । कृपा करून मज सांगा ॥ २९ ॥ म्हणोनि घातलें लोटांगण । मस्तकीं धरिले दोनी चरण । मग

१ अमृतरूपी आहेत किरण ज्याचे असा चंद्र. २ समजूत कर. ३ तापवितात. ४ मिळालास. ५ थंड कमलांची.

६ शत्रु. ७ शरीर. ८ निखारे. ९ द्वेष. १० चिता. ११ रोज बरोबर फिरणारा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

तीस उठवोनि जाण। शिव आपण स्वयें सांगे ॥ ३० ॥ वनामाजि जो विचरत। सीतेलागीं आर्तभूत। पूर्णब्रह्म श्रीरघुनाथ। जाण निश्चित पार्वतिये ॥ ३१ ॥ पार्वती म्हणे विषयासक्त। स्त्रीकामार्थी अति लोलुप्त। शिव म्हणे तेंचि सदोदित। ब्रह्म रघुनाथ पार्वतिये ॥ ३२ ॥ उमा म्हणे रडत पडत। अहर्निशीं तडफडत। सीतेलागीं चरफडत। तरी ब्रह्म रघुनाथ शिव म्हणे ॥ ३३ ॥ तुम्हांसी काय हेंचि ध्यान। तुम्हांसी काय हेंचि चिंतन। शिव म्हणे ज्ञानविज्ञान। आम्हां ब्रह्म पूर्ण श्रीराम ॥३४॥ विषयकामी कामासक्त। धन्य धन्य हे दोघे देवभक्त। ऐसी उमा उपहासें हांसत। ब्रह्म रघुनाथ शिव म्हणे ॥ ३५ ॥ रडत पडत तरफडत। विषयकामी कामासक्त। तरी परब्रह्म श्रीरघुनाथ। जाण निश्चित पार्वतिये ॥ ३६ ॥ उमा म्हणे महेशासी। जरी म्यां ठकविलें श्रीरामासी। तरी शिव म्हणे पार्वतीसी। ब्रह्मत्व त्यासी पैं नाहीं ॥ ३७ ॥ तुमचें जालिया आज्ञापन। क्षणार्धें छेळीन रघुनंदन। शिव म्हणे तो सावधान। सुखें छळण तूं करीं त्यासी ॥ ३८ ॥ ऐसें शिवासीं बोलतां। उमा स्वयें जाली सीता। मग छळावया श्रीरघुनाथा। अतिलाघवता छळणार्थी ॥ ३९ ॥ हा हा सीता स्वयें म्हणत। वनीं विचरे श्रीरघुनाथ। तंव त्यासन्मुख येवोनि ओ म्हणत। उमा वनांत पैं आली ॥ ४० ॥ ओ म्हणोनि रामापुढें। राम सीता म्हणे आणखीकडे। ते तंव येई तिकडे। तंव श्रीराम म्हणे आणखीकडे सीता ॥ ४१ ॥ जंव जंव ते ये रामासन्मुख। तंव तंव श्रीराम होय तिसी विमुख। हा हा सीते फोडोनि हांक। अधोमुख विलपत ॥ ४२ ॥ तंव लक्ष्मण विचारी निजचित्ता। वृक्षपाषाणां म्हणे सीता। ते जानकी सन्मुख असतां। दुःखावस्था कां श्रीरामा ॥ ४३ ॥ तंव लक्ष्मण म्हणे श्रीरघुनाथा। दुःख कां करितां भेटली सीता। तंव त्यासी हाणूं धांवे लाता। बोल बोलतां मारूं पाहे ॥ ४४ ॥ मग सौमित्र म्हणे कोपसी वृथा। पैल सन्मुख उभी सीता। ऐसें बोलणें ऐकतां। शस्त्रें घाता करूं धांवे ॥ ४५ ॥ सौमित्रा आम्ही तुम्ही सहोदर। तो तूं मजसीं करिसी वैर। येथें कैंची सीता सुंदर। दुःख दुर्धर मज आलें ॥ ४६ ॥ अति भ्रांति श्रीरघुनाथा। मारूं धांवे सीता सांगतां। लक्ष्मण म्हणे न बोलें आतां। बोलों जातां मारील ॥ ४७ ॥ सन्मुख भेटलीसे सीता। तेचि प्रबोधील श्रीरघुनाथा। आतां मी न बोलें सर्वथा। म्हणोनि मौनावस्था लक्ष्मणीं ॥ ४८ ॥ तंव स्वर्गीं सुरवरां समस्तां। ओढवली परमावस्था। बंदीं सुटोनि लंकानाथा। वना सीता केंवी आली ॥ ४९ ॥ विस्मय करिती ऋषीश्वर। विस्मय करिती सुरवर। जे ठकवूनियां दशशिर। सीता सुंदर वना आली ॥ ५० ॥ ऐसें ब्रह्मा मानी अपूर्वता। भस्म करोनि लंकानाथा। वना आली सती सीता। तेणें विधाता विस्मित ॥ ५१ ॥ पार्वती स्वयें जाली सीता। हें न कळे ब्रह्मादिकां समस्तां। तें कळलें श्रीरघुनाथा। सर्वांगें ज्ञाता श्रीराम ॥ ५२ ॥ श्रीराम अलिप्त ज्ञानें ज्ञाता। त्यासी मानिती अति भ्रांतता। पुढें काय वर्तली कथा। सावधानता अवधारा ॥ ५३ ॥ लक्ष्मण राहिला धरोनि मौन। मग सीता सीता जल्पे रघुनंदन। तंव कृत्रिम सीता धरी धांवोन। सावधान व्हावें तुम्हीं ॥ ५४ ॥ मी जवळीच उभी असतां। व्यर्थ कां धांवा म्हणा सीता। स्त्रीविरहें रडतां पडतां। लाज सर्वथा न ये तुम्हां ॥ ५५ ॥ पूर्वी बोलोनि निजमहिमान। मी श्रीराम नित्य सावधान। तें स्त्रीविरहें बुडालें ज्ञान। अति अज्ञान जालेती ॥ ५६ ॥ अज्ञानाची अगाध मातें। बुडविला प्रपंच आणि स्वार्थ। सखा बंधु भक्त विनवीत। त्याचाच घात करूं धांवा ॥ ५७ ॥ सखा बंधु आणि भक्त अनन्य। त्याचें करूं धांवा हनन। बुडालें प्रवृत्तीचें ज्ञान। ब्रह्मज्ञान तुम्हां मग कैंचें ॥ ५८ ॥ मज क्षण एक न भेटतां। जड मूढ जालेती भ्रांत अवस्था। प्रवृत्तिज्ञान नाठवे चित्ता। मग परमार्थता तेथें कैंची ॥ ५९ ॥ वनीं मी राहोनि अति गुप्त। तुमचें पाहिलें आचरित। तंव तुम्ही जालेती अति भ्रांत। मग धांवत मी आलें ॥ ६० ॥

१ रात्रंदिवस. २ फसवीन. ३ मोठ्या चातुर्यानें. ४ फिरे. ५ सखे बंधु. ६ समजावील. ७ बंधनांतून. ८ ऐका. ९ गोष्ट. १० प्रपंचाचें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

स पण्डितो नरश्रेष्ठः प्राज्ञः कर्मविदां वरः ।
अप्राज्ञ इव किं राम भार्याहेतोर्विमुह्यसे ॥ ३ ॥

पूर्वी मी म्हणसी आत्मा तत्त्वतां । परी स्त्रीविरहें तोचि आतां । कर्म करोनि अकर्त्रात्मता । जडमूढता अति भ्रांत ॥ ६१ ॥ जरी वियोगें भ्रांति मोठी । तरी तुम्हां आम्हां जाली भेटी । आतां भ्रांति सांडोनियां पोटीं । पंचवटीं जाऊं दोघें ॥ ६२ ॥ मर्यादा वर्षें चतुर्दश । आम्हीं करावा वनवास । आतां उरले असती षण्मास । अयोध्येस मग जाऊं ॥ ६३ ॥ श्रीराम म्हणे तूं काई । तेंचि नाम लोकांच्या ठायीं । अद्यापि राहिलेंसे पाहीं । म्हणती तुकाई जगदंबा ॥ ६४ ॥ तुकाई नामें नामाभिधान । तें जगदंबेचें निजस्थान । अद्यापि पूजिती जन । अति पावन दंडकारण्यीं ॥ ६५ ॥ श्रीरामवरदायिनी माता । तुकाई म्हणती रामवाक्यार्था । पुढें काय वर्तली कथा । सावधान श्रोतां परिसावी ॥ ६६ ॥ हांसोनि बोले श्रीरघुनंदन । माते तुज आलों लोटांगण । तुवां माझें न करावें छळण । मी अनन्य दीन शिवाचें ॥ ६७ ॥ श्रीराम म्हणे सीतेसी माता । तो विस्मय लक्ष्मणाच्या चित्ता । आश्चर्य सुरवरां समस्तां । नोळखे कांता ऋषी म्हणती ॥ ६८ ॥ श्रीराम म्हणे पुढती तिसी । एकलें सांडोनि शिवासी । सीतारूपें छळावयासी । तूं कां आलीस जननीये ॥ ६९ ॥ ऐकोनि श्रीरामाचें वचन । सीतेची स्वरूपता सांडोन । उमा घाली लोटांगण । श्रीराम सर्वज्ञ छळवेना ॥ ७० ॥ शिव बोलिला सत्यवचन । श्रीराम नित्य सावधान । त्यासीं तुझें न चले छळण । तें प्रमाण मज आलें॥ ७१ ॥ मी शिवाची शिवशक्ती । सीता जालें अतर्क्ययुक्ती । ब्रह्मादि देव मज नेणती । तुवां श्रीरघुपति ओळखिलें ॥ ७२ ॥ श्रीरामाचें अगाध ज्ञान । न चले छळण छद्मकामन । ऐसी बाणली उमेसी निजखूण । मग धरोनि चरण पुसतसे ॥७३॥ तूं सर्वार्थसर्वज्ञ संपूर्ण । अवलंबोनियां संभ्रांतपण । आलिंगावया तृण पाषाण । हें काय कारण मज सांगें ॥ ७४ ॥ सीताविरहें कामकामन । तुज नाहीं अणुप्रमाण । ते बाणली खूण संपूर्ण । जे ब्रह्म परिपूर्ण श्रीराम ॥ ७५ ॥ दुर्धर धरोनि पिशाचता । विरहेंवीण सीता सीता । म्हणोनि वनोवनीं धांवता । रडता पडता कां होसी ॥ ७६ ॥ ऐसें बोलोनि आपण । मग उमा धरी श्रीरामचरण । तुझी स्थिति हे संपूर्ण । कृपा करोन मज सांगें ॥ ७७ ॥ तंव श्रीराम म्हणे माझी स्थिति गती । सदाशिव जाणे निश्चितीं । तो सांगेल तुजप्रती । स्वमुखें कीर्ति नये सांगूं ॥ ७८ ॥ जरी सांगावें कृपाविधीं । तरी पाहावी पात्रशुद्धी । न व्हावा छळवादी । वादी विवादी नसावा ॥७९ ॥ न व्हावा धूर्त ज्ञानवंचक । नास्तिक दुजा शब्दवंचक । नीतिशास्त्रीं करी कुतर्क । आळसी वंचक न व्हावा ॥ ८० ॥ द्रव्यदारात्यागोन्मुख । शोधित सत्त्वाचा सात्त्विक । पूर्ण परमार्थी सविवेक । त्यासी परिपाक सांगावा ॥८१॥ तुझे अंगीं ज्ञानाभिमान । न मानोनि शिवाचें वचन । माझें करूं आलीस छळण । तुज आपण कैंवी सांगों ॥ ८२॥ नाहीं पतिवचनीं कर्तव्यार्थ । नाहीं गुरुवचनीं भावार्थ । तुज सांगों नये गुह्यार्थ । ऐसें श्रीरघुनाथ बोलिला ॥८३॥ ऐसें ऐकोनि श्रीरामवचन । उमा खोंचली मनीं संपूर्ण । पतिवचन गुरुवचन । उल्लंघन म्यां केलें ॥ ८४ ॥ न मानोनि शिवाचें वचन । छळूं आलें रघुनंदन । जळो माझा ज्ञानाभिमान । करी रुदन अनुतापें ॥ ८५ ॥ ज्ञानाभिमानाचें लक्षण । भेटल्या साधु सज्जन । जो शोधून पाहे दोषगुण । त्याचें छळण करावया ॥ ८६ ॥ छळणें छळवेना श्रीरघुनाथा । शेखीं मज कोपसी ना सर्वथा । तेणें मज पालट जाला चित्ता । ऐक आतां सांगेन ॥ ८७ ॥ तुझें होतांचि दर्शन । ज्ञानाभिमाना जालें दहन । छळछद्म गेलें जळोन । तुझी आण श्रीरामा ॥ ८८ ॥ ऐकोनि तिचें सत्य वचन । कृपें द्रवला श्रीरघुनंदन । आपुलें अतर्क्य गुह्य ज्ञान । सांगे आपण सद्भावें ॥ ८९ ॥ उमे ऐकें सावधान । पूर्वी हे वो ऋषिजन । माझे प्राप्तीलागोन जाण । केलें अनुष्ठान निष्कामें ॥ ९० ॥ माझे पावावया चरण । त्यांचा सद्भाव संपूर्ण । सांडोनि सर्वही अभिमान । तृण पाषाण होवोनि

१ अकर्तृत्व. २ घेऊन. ३ कामवासना. ४ कपटी. ५ धन, स्त्री, इत्यादिकांचा त्याग करण्याविषयीं अत्यंत उत्सुक. ६ तत्त्व, सार. ७ छळ करण्याचें कपट.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

ठेले ॥ ९१ ॥ एक ते वृक्ष होवोनी तिष्ठत । एक ते झाले पर्वत । एक ते तृणपाषाण होत । मी तेथें तेथें स्वयें धांवें ॥ ९२ ॥ त्यांचा भावार्थ देखोन । परम प्रीतीनें दें आलिंगन । त्यांसी तूं म्हणसी तृणपाषाण । पिसें पूर्ण मज म्हणसी ॥९३॥ ते तंव निरभिमानी भक्त । भक्तभावार्थी मी रघुनाथ । प्रीतीनें भक्त गिंवसित[1] । स्वयें धांवत वनोवन ॥९४॥ भक्त उद्धरावयाकारणें । रडणें पडणें अडखळणें । पर्वतोपर्वतीं धांवणें । आणि आलिंगनें वृक्षांसी ॥ ९५ ॥ उमे जाण तूं निश्चित । माझें पाऊल न पडे व्यर्थ । जाणे सदाशिव समर्थ । तुझा भावार्थ तो नाहीं ॥ ९६ ॥ गाळींव भावाचा भावार्थ । सर्व भूतीं श्रीभगवंत । हाचि मुख्यत्वें परमार्थ । निजस्वार्थ परमार्थ ॥ ९७ ॥ गुळाचें कारलें केलें । तें सकंटक कडू नाहीं जालें । तेंवी ब्रह्मवृत्तीं[2] कर्म केलें । ते मुकले बंधुत्वा ॥ ९८ ॥ साकरेचें वृंदावन[3] फळ केलें । कडू म्हणतां ते स्वयें ठकले । तेंवी साधूंचें कर्म निंदोनि बोलें । ते ते गेले अधःपाता ॥ ९९ ॥ साधूंची सच्चिद् गरिमा । अतर्क्य त्यांचें कर्म प्रेमा । ते नाकळती[4] मोहभ्रमा । अगाध महिमा साधूंचा ॥ १०० ॥ ते तूं म्हणसी तृणपाषाण । तरी त्या साधूंसी ब्रह्म पूर्ण । ऐसें ऐकोनि श्रीरामवचन । मूर्च्छापन्न पार्वती ॥ १ ॥ मी एक शक्ती तो एक शिव । हें नाठवे पूर्वापूर्व । श्रीरामासी रूप ना नांव । भावाभाव[5] विसरली ॥ २ ॥ अहं कोहं सोहंपण । येणें नासिलें मीतूंपण । कोंदाटलें ब्रह्म परिपूर्ण । समाधान शिवप्रिये ॥ ३ ॥ करितां श्रीरामच्छळणोक्ती । समाधि पावली पार्वती । ऐसी संतांची संगती । उपकारार्थी अपकारियां ॥ ४ ॥ पावोनि पूर्ण समाधान । उमा झाली सावधान । त्रैलोक्य देखे चैतन्यघन । श्रीराम पूर्ण तुष्टला ॥ ५ ॥ श्रीराम म्हणे अहो माते । कांहींएक सांगेन तूतें । तंव उमा म्हणे सर्वस्वार्थे । तुझे आज्ञेतें नुलंघीं ॥ ६ ॥ उमा धांवोनि उल्लासतां । श्रीरामचरणीं ठेविला माथा । तुझेनि जालें सुखरूपता । काय मी आतां अनुवादूं[6] ॥ ७ ॥ मिथ्या न म्हणावें शिववचन । कोणाचें न करावें छळण । हेंचि मागतों मी आपण । कृपा पूर्ण करीं माते ॥ ८ ॥ श्रीरामा तुझे देखतां चरण । छळणादि वृत्तींसी जालें दहन । न करीं शिवाज्ञाहेळण । ब्रह्मपरिपूर्ण परिपाक ॥ ९ ॥ तुझें ऐकतांचि वचन । जालें अविद्येचें दहन । निमालें छळण आणि हेळण । तुझी आण श्रीरामा ॥ ११० ॥ तुझेनि वचनें श्रीरघुनाथा । पावलें सुखसायुज्यता । मग चरणीं ठेवोनि माथा । गेली उल्लासता कैलासा ॥ ११ ॥ उमेनें केलिया नमन । सौमित्रें स्वयें धांवोन । मस्तकीं धरिले श्रीरामचरण । काय आपण बोलत ॥ १२ ॥ मी म्हणें हेचि आमची सीता । तंव ते शिवाची शिवकांता । भली ओळखिली श्रीरघुनाथा । सर्वज्ञ सत्य तूं श्रीरामा ॥ १३ ॥ देखोनि उमेची स्थिती गती । ब्रह्मादिक विस्मित चित्तीं । आम्ही म्हणों हे सीता सती । श्रीरामें पार्वती ओळखिली ॥ १४ ॥ आम्ही म्हणों सीताविरहें भ्रांत । परी अचुक ज्ञाता भ्रमांत । याचा न कळे निजवृत्तांत । ब्रह्म सदोदित श्रीराम ॥१५॥ रडणें पडणें स्वैर धांवणें । देखोनि जग पिसें म्हणे । श्रीराम विचरे ब्रह्मपणें । जग उद्धरणें श्रीरामा ॥ १६ ॥ देखोनि श्रीरामाची स्थिती । ब्रह्मादि देव विस्मित चित्तीं । मग तिंहीं वंदोनि श्रीराममूर्ती । गेले निश्चितीं निजधामा ॥ १७ ॥ फिटली देवांची निजभ्रांती । आणि लक्ष्मण पावला विश्रांती । अगाध श्रीरामाची स्थिती । नामें उद्धरती जडजीव ॥ १८ ॥ एका जनार्दना शरण । पुढें सीतागँवेषण[7] । करूं निघाले श्रीराम लक्ष्मण । हेंही निरूपण अवधारा ॥ १९ ॥ श्रीरामउमासंभाषण । यासी मूळ शिवरामायण । ते ग्रंथींचें निरूपण । श्रोते सज्ञान जाणती ॥ १२० ॥ संख्या शतकोटी समस्त । श्रीरामायण मूळ ग्रंथ । सुर नर पन्नग[8] यथार्थ । कलह करीत पैं आले ॥ २१ ॥ श्रीराम राजा सुरवरांचा । त्याची कथा वांटा देवांचा । पन्नग म्हणती शेषशायनींचा । राम आमचा तुम्ही कैंचे ॥ २२ ॥ मनुष्यें म्हणती मनुष्यकृतीं । रामें केली अगाध ख्याती । आमचा वांटा श्रीरामकीर्ती । तुम्ही तदर्थीं[9] कां भांडा ॥ २३ ॥ श्रीराम तुमचा वैकुंठपती । तरी वैकुंठीं नाहीं केली

---

१ शोधीत. २ दृश्यमात्र सर्वच ब्रह्म अशी वृत्ति ठेवून. ३ कवंडळ. ४ सांपडत नाहींत. ५ असणें व नसणें. ६ बोलूं. ७ सीताशुद्धि. ८ सर्प. ९ त्यासाठीं, त्याकरितां.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

ख्याती । श्रीराम शेषशयनी जरी निश्चितीं । तरी निजेल्या कीर्ति नाहीं केली ॥ २४ ॥ येवोनि मनुष्यलोकाप्रती । रामें केली विचित्र ख्याती । मृत्युलोकींची हे कीर्ती । तुम्ही तदर्थीं कां भांडा ॥ २५ ॥ एक खालते एक वरते । वांटा मागूं आलेती येथें । निर्लज्ज लाजाना पैं चित्तें । संबंध तुम्हांतें असेचिना ॥ २६ ॥ दोघे केले निरुत्तर । तरी कथेची आवडी फार । न सोडिती येरयेर । कथामृतसार सेवावया ॥ २७ ॥ तंव ब्रह्मयानें बुद्धि केली जाण । वांटेकरी तिघे जण । त्यांची करावया बुझावण । धाडी आपण शिवापासीं ॥ २८ ॥ मग शिवें बुद्धि केली कैसी । तिघे येतां आपणापासीं । स्वयें राखोनि निजसारासी । विभागेंसीं बुझावी ॥ २९ ॥ शिव म्हणे तयां तिघांसी । विमुखें मी न धाडीं कोणासी । वांटा देईन समभागेंसीं । वचन तिघांसी मानलें ॥ १३० ॥ शतकोटी संख्या येथ । रामायण मूळग्रंथ । शिव वांटी त्रैलोक्यांत । विभागार्थ तो ऐका ॥ ३१ ॥ तेहतीस कोटी प्रथमांक । तेहतीस लक्ष आणिक । तेहतीस सहस्र तीनशें श्लोक । तेहतीस आणिक एक उरला ॥ ३२ ॥ श्लोक एक उरला निर्धारें । त्याचीं बत्तीस अक्षरें । तींही वांटिलीं शंकरें । परिसा आदरें वांटणी ॥ ३३ ॥ दहा दहा अक्षरें वांट्या आलीं । दोन अक्षरें तेथें उरलीं । तदर्थीं शिवें बुद्धि केली । युक्त बोली बोलून ॥ ३४ ॥ अक्षरें दोन लोक तिन्ही । वांटा करितां न ये वांटणी । तरी हीं द्यावीं मज मापाऱ्यालागोनी । खळें दानी दानार्थ ॥३५॥ मग तिघे जणीं अति उल्हासीं । दोनी अक्षरें दिधलीं शिवासी । तेणें धरिलीं हृदयेंसीं । अहर्निशीं श्रीराम ॥ ३६ ॥ रामायणींचें सार पूर्ण । शिवाचें वसवी हृदयभुवन । श्रीराम हीं अक्षरें जाण । ब्रह्मपूर्ण परियेसा ॥३७॥ लोकविभाग मुख्य ऐका । तेहतीस कोटी तेहतीस लक्ष । तेहतीस सहस्र तीनशें श्लोक । दहा अक्षरें अधिक मृत्युलोकीं ॥ ३८ ॥ याही भागाचें विवरण । बहुविध कवित्व रामायण । तेही अर्थींचें निरूपण । सावधान अवधारा ॥ ३९ ॥ शिवरामायण शैवरामायण । आगम पंचरात्र रामायण । गुह्य गुह्यक रामायण । हनुमंत रामायण नाटक ॥ १४० ॥ मत्स्य कूर्म वराह रामायण । काळिकाखंडींचें निरूपण । महाकालीरामायण । स्कंदरामायण प्रसिद्ध ॥४१॥ अगस्ति पौलस्ति रामायण । पद्मपुराणींचें रामायण । रवि अग्नि वरुण रामायण । ऐकोनि आपण जटायु वक्ता ॥ ४२ ॥ नंदिग्रामीं भरत आपण । वदे तें भरतरामायण । महाभारतींचें रामायण । वक्ता आपण श्रीव्यास ॥ ४३ ॥ क्रौंचद्वीपीं अद्यापि जाण । क्रौंचऋषि सांगे पुराण । कथा पवित्र रामायण । अति पावन अनुपम्य ॥ ४४ ॥ बिभीषणापासीं जाण । नित्य कथानिरूपण । धर्मऋषि सांगे आपण । धर्मरामायण धार्मिक ॥ ४५ ॥ श्वेतद्वीपींचें निरूपण । श्वेतकेतु-रामायण । कथाविचित्रविंदान । अति पावन तिहीं लोकीं ॥ ४६ ॥ शंकर वक्ता स्वयें आपण । श्रोता भवानी सावधान । तें शिवभवानीरामायण । कथाविंदान विचित्र ॥ ४७ ॥ सदाशिव स्वयें वक्ता । स्वयें श्रीराम निजश्रोता । ते शिवरामायणी कथा । श्रवणीं ऐकतां स्वानंद ॥ ४८ ॥ स्वयें श्रीराम स्वानंदें पूर्ण । आपणाप्रति वदे आपण । ते कथा आत्मरामायण । गोड निरूपण सर्वार्थीं ॥ ४९ ॥ जैमिनिकृत रामायण । अपूर्व कथेचें विंदान । अलोलिक निरूपण । आश्चर्ययुक्त जाण चरित्र ॥ १५० ॥ जें कां अध्यात्मरामायण । रामायणींचे वेंचे काढोन । केलें आधुनिक निरूपण । ऋषिकृत जाण तें नव्हे ॥ ५१ ॥ मृत्युलोकामाजी भाविकीं । रामायणें असंख्यात कीं । कैसेनि आकळती तितुकीं । अल्पमात्र बोलिलों ॥ ५२ ॥ उमाश्रीरामदर्शन । समूळ मूळींचें निरूपण । एका जनार्दना शरण । श्रोतीं संपूर्ण क्षमा कीजे ॥५३॥ परम विश्रांति जीवशिवां । परम विश्रांति देहविदेहभावा । तो हा प्रसंग विसावा । उमाराघवां संवाद ॥ ५४ ॥ विश्रांति त्रिविधतापोद्भवा । अति विश्रांति देहभावा । तो हा प्रसंग विसावा । उमाराघवां संवाद ॥ ५५ ॥ विश्रांति निवृत्ति अहंभावा । विश्रांति निवृत्ति सोहंभावा । तो हा प्रसंग विसावा । उमाराघवां

१ समजूत. २ दुर्मुखलेला. ३ कथेंतील विचित्र कौतुक, गोष्टी. ४ पार्वती. ५ अपूर्व. ६ इल्लींचें. ७ आध्यात्मिक, आधिदैविक आणि अधिभौतिक हे तीन प्रकारचे ताप.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

संवाद ॥ ५६ ॥ विश्रांति अहमात्मवैभवा । विश्रांति हे ब्रह्मभावा । तो हा प्रसंग विसावा । उमाराघवां संवाद ॥ ५७ ॥ श्रमामाजी विश्रम-ठेवा । श्रमें चाळवी भवभावा । तो हा प्रसंग विसावा । उमाराघवां संवाद ॥ ५८ ॥ एका जनार्दना शरण । अगाध रामाचें रामायण । विचित्रकथानिरूपण । ग्रंथभूषण श्रीराम ॥ ५९ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे अरण्यकांडे एकाकार-टीकायामुमारामसंवादो नाम विंशतितमोऽध्यायः ॥ २० ॥ ओंव्या ॥ १५९ ॥ श्लोक ॥ ३ ॥

अध्याय एकविसावा

श्रीरामचंद्राय नमः ॥ उमा गेली महेशापाशीं । श्रीराम लक्ष्मण वनवासी । निघाले सीतागवेषणासी । मार्गचिन्हांसी पहातचि ॥ १ ॥

दद‍र्श भूमौ निष्क्रान्तं राक्षसस्य पदं महत् ।
स समीक्ष्य परिक्रान्तं सीताया राक्षसस्य च ॥ १ ॥
संभ्रान्तहृदयो रामः शशंस भ्रातरं प्रियम् ।
इह लक्ष्मण पश्य त्वं राक्षसस्य महत्पदम् ॥ २ ॥
मिथ्या मे तर्जितः शैलो न सीता गिरिगह्वरे ।
तद् दृष्ट्वा लक्ष्मणो भीतः पदं विकृतमद्भुतम् ॥ ३ ॥

मार्गीं माग[१] पहात जात । तंव राक्षसपद अत्यद्भुत । देखिलें लांब बारा हात । चतुर्हस्त रुंदाळ ॥ २ ॥ याचिपासीं सीतेचें पद । कुंकुमांकित पद्मबंध । देखोनि श्रीरामा आनंद । मार्गीं माग शुद्ध लागला ॥ ३ ॥ लक्ष्मणा धांव धांव आतां । राक्षस घेवोनि जातो सीता । मार्ग ओळख तूं तत्त्वतां । झणीं[३] दुश्चित्त होशील ॥ ४ ॥ राक्षसपद अति विक्रांतें[४] । देखोनि लक्ष्मण विस्मित । सवेंचि जाहला भयभीत । सीता भक्ष्यार्थ न वधावी ॥ ५ ॥ मार्गीं देखिला जो माग । त्याचा दोघीं धरोनियां लाग । धांवणें धांवतां सवेग । जटायु भग्नांग देखिला ॥ ६ ॥

अथ पर्वतसंकाशं छिन्नपक्षं द्विजोत्तमम् ।
दद‍र्श पतितं भूमौ क्षतजार्द्रं जटायुषम् ॥ ४ ॥
तं दृष्ट्वा गिरिशृंगाभं रामो लक्ष्मणमब्रवीत् ।
अनेन सीता वैदेही भक्षिता नात्र संशयः ॥ ५ ॥

जैसा कां महापर्वत । शेंदुरें न्हाणिला घगधगित । तैसा जटायु भासत । रक्तें आरक्त सर्वांगें ॥ ७ ॥ त्यासी देखोनि श्रीरघुनाथ । सौमित्रासी स्वयें सांगत । सीता भक्षोनि प्राशिलें रक्त । दिसे आरक्त राक्षस ॥ ८ ॥ त्याचा करीन मी घात । बाण सज्जोनि रघुनाथ । कोपें चालिला कृतांत । सीतासाह्यार्थ प्रतापी ॥ ९ ॥ माझी भक्षोनियां कांता । तूं कोण रे वनीं वसता[५] । तुझ्या मी करीन निजघाता । होय गर्जता श्रीराम ॥ १० ॥ ऐकोनि श्रीरामाची वाणी । जटायु घायवट[६] धरणीं । काय बोले दीनवचनीं । सावधानीं अवधारा ॥ ११ ॥

स दीनो दीनया वाचा सफेनं रुधिरं वमन् ।
अभ्यभाषत पक्षीशो राम रामेति राघव ॥ ६ ॥
यामोषधिमिवायुष्मन्नन्वेषसि महावने ।
सा देवी मम च प्राणा रावणेनोभयं हृतम् ॥ ७ ॥

ऐकोनि श्रीरामाचें वचन । जटायु म्हणे मी धन्य धन्य । करावया माझें दीनोद्धरण । स्वयें आपण श्रीराम आला ॥ १२ ॥ श्रीरामाचें आगमन । सीताशुद्ध्यर्थ नव्हे जाण । करावया दीनोद्धरण । वनाभिगमन[७] श्रीरामा ॥ १३ ॥ सफेन[८] रुधिर वमून । जटायु सांडीत होता प्राण । ऐकोनियां श्रीरामवचन । जाला सावधान भावार्थें ॥ १४ ॥ श्रीराम जय राम जयजय राम । जटायु स्मरे रामनाम । माझा छेदावया देहभ्रम । अंतीं श्रीराम पावला ॥ १५ ॥ धन्य धन्य वृक्षवल्ली औषधी । श्रीराम विचरे ज्यांसन्निधीं । ते पावन गा त्रिशुद्धी । कृपानिधि श्रीराम ॥ १६ ॥ ऐकें श्रीरामा रघुपती । वनीं विचरसी जीचे अर्थीं । ते म्यां देखिली सीता सती । नेली निश्चितीं रावणें ॥ १७ ॥ सीता मज पूज्य गुरुपत्नी । गुरुत्वें प्रिय प्राणांहूनी । तुम्ही आश्रमीं नव्हतां कोणी । नेली चोरोनी रावणें ॥ १८ ॥

त्वया विरहिता देवी लक्ष्मणेन च राघव ।
ह्रियमाणा मया दृष्टा रावणेन बलीयसा ॥ ८ ॥

तुज गेलिया मृगापाठीं । लक्ष्मणें सांडिली पर्णकुटी । वेगें येवोनि रावण कपटी । सीता गोरटी नेली तेणें ॥ १९ ॥ सीता बळें हरिली

१ भ्रांति. २ शोध. ३ कदाचित. ४ मोठें, भयंकर. ५ ठिकाणा. ६ घायाळ. ७ वनांत जाणें. ८ फेसासकट.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

रावणें। तुमचें नव्हेचि धांवणें। आक्रंदत नेली तेणें। ते म्यां देखणें देखिली ॥ २० ॥ ऐसें ऐकोनि श्रीरघुनाथा। मज मानिसी नपुंसकता। तरी सीतेनिमित्त लंकानाथा। केलें तें आतां ऐका स्वामी ॥ २१ ॥

सीतामभ्यवपन्नोऽहं रावणश्च रणे प्रभो।
विध्वंसितरथच्छत्रः पातितो धरणीतले ॥ ९ ॥
एतदस्य धनुर्भग्नमेते चास्य शरास्तथा।
अयमस्य रणे राम भग्नः सांग्रामिको रथः ॥ १० ॥
अत्र युद्धं मया दत्तं रावणस्य पुनः पुनः।
पक्षपातैर्नखैर्घैरैर्गात्राण्यारुह्य वैरिणः ॥ ११ ॥

रावणें हरितां सीतेसी। मी गेलों होतों वनक्रीडेसी। तंव सीता आक्रंदत आक्रोशीं। मी वेगेशीं पावलों ॥ २२ ॥ घोर युद्ध केलें रणीं। पैल पाहें रक्तांकित धरणी। रावणातें म्यां जींचूनी। छत्र भंगोनी पाडिलें ॥ २३ ॥ त्याचे जे कां धनुष्यबाण। नखें म्यां केले चूर्ण। रथींचे खर पिशाचवदन। तेही सप्राण निर्दाळिले ॥ २४ ॥ युद्ध जालें कडकडाट। ध्वज भंगिला अति उद्भट। रथ सारथी करोनि पीठ। शिरींचा मुकुट पाडिला ॥ २५ ॥ युद्धीं भंगिला रावण। मजसीं न चाले आंगवण[३]। मग मज ठकवोनि जाण। सीता घेवोन निघाला ॥ २६ ॥ राक्षसमावा[४] गुप्तत्वेंसीं। सीता घेवोनि काखेसीं। कळों न देतां पशुपक्ष्यांसी। निघे आकाशीं अति गुप्त ॥ २७ ॥ मजही हडबड जाली मोठी। हातींची नेली सीता गोरटी। काय श्रीरामा सांगूं गोष्टी। लाज पोटीं सलज्ज ॥ २८ ॥ मग पाहतां खुंटल्या दृष्टी। रावणें सीता नभाचे पोटीं। देखोनि धांविन्नलों उठाउठीं। झेंडपेसाठीं सांडविली ॥ २९ ॥ वेगीं धांवोनि सत्वर। घायीं घायवट केलें शरीर। नखें विदारितां दशशिर। वाहे पूर रुधिराचा ॥ ३० ॥ मुखीं नखीं पाखीं झडपित। रावण केला अस्ताव्यस्त। सीता सांडोनि त्वरित। पळे लंकानाथ अति धाकें ॥ ३१ ॥ पक्ष्यें सांडविली सीता। हे मज लाज लंकानाथा। मग युद्धा प्रवर्तला मागुता। सलज्जता अभिमानें ॥ ३२ ॥ तो मज रागें हाणी लाता। म्यां चुकविल्या तळपतां। तेणें मज हाणितां मुष्टिघाता। अति झडपितां झडपिला ॥ ३३ ॥ ऐसा पक्षवातावर्त। त्यामाजी नखमुखांचे आघात। रावणा करोनि अस्ताव्यस्त। रणीं मूर्च्छित पाडिला ॥ ३४ ॥ उभय पांखांच्या अति वाता। गगनीं उडविलें लंकानाथा। तेथोनि तळीं पडतपडतां। उडोनि मागुता झडपिला ॥ ३५ ॥ देखोनि माझी आंगवण। रावणें दांतीं धरिलें तृण। येथोनि पुरे पुरे रण। दीनवदन अति दुःखी ॥ ३६ ॥ पक्षी नावरे रणांगणीं। रावणा जाली मानहानी। मुख दाखवितां लाज जनीं। आला परतोनि रणासी ॥ ३७ ॥ मज छळावया पाहीं। रावण आला लवलाहीं। दोघे झुंजूं उसण्या घायीं। तें म्यां पाहीं मानिलें ॥ ३८ ॥ मज तुझी घालोनि आण। रावण पुसे माझें मरण। असत्य न वदें गेलिया प्राण। तुझी आण नुल्लंघीं ॥ ३९ ॥ रावणाचें निजमरण। म्यांही पुसिलें आपण। मिथ्यावादी पापी पूर्ण। प्रतारोन[७] बोलिला[८] ॥ ४० ॥ तुझेनि भजनें सत्यसात्त्विकी। मृत्यु सांगितला दोहीं पाखीं। रावण सांगे वामांगुष्ठनखीं। महापातकी अनृतवादी ॥ ४१ ॥ खग खेचर अति आवेशीं। दोघे मीनलों संग्रामासीं। लक्ष ठेवोनियां वर्मासी। युद्ध आकाशीं निराधारीं ॥ ४२ ॥ पांखीं झडपोनि दशानन। वामांगुष्ठा केलें छेदन। तेणें न मरेचि रावण। कपटी पूर्ण अनृतवादी ॥ ४३ ॥ रावण बोलिला भावार्थ। ऐसा माझे मनीं मनोरथ। यालागीं करोनि पुरुषार्थ। अंगुष्ठ त्वरित छेदिला ॥ ४४ ॥ छेदितां वामांगुष्ठनख। हातातळीं आले पांख। रावणें उपडिले देख। परम दुःख मज जालें ॥ ४५ ॥ उपडिले तेणें निजपांख। त्याचें मज नाहीं असुख। सीता नेली मजं प्रत्यक्ष। परम दुःख[९] श्रीरामा ॥ ४६ ॥ ऐसी रावणा लाविली ख्याती। तूं न पावसीच रघुपती। यश न ये माझ्या हातीं। सीता सती नेली तेणें ॥ ४७ ॥ पांख छेदिल्याचें दुःख कोण। वेगीं न येसीच तूं आपण। सीता घेवोनि गेला रावण। दुःख दारुण मज

१ दृष्टीनें. २ त्रास देऊन. ३ पराक्रम, सामर्थ्य. ४ राक्षसांचीं कपटें. ५ झडपेबरोबर. ६ समोरासमोर. ७ खोटें सांगितलें. ८ खोटें बोलणारा. ९ दुःख. १० माझ्या देखत.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

जाहलें ॥ ४८ ॥ मजचि देखतदेखतां । रडत रावणें नेली सीता । थोर दुःख हें रघुनाथा । किती आतां मी सांगूं ॥ ४९ ॥

रामस्तस्य तु विज्ञाय सीतासक्तां प्रियां कथाम्।
गृध्रराजं परिष्वज्य रुरोद सहलक्ष्मणः ॥ १२ ॥

ऐसें ऐकोनि जटायुवचन । अत्यंत कृपें रघुनंदन । त्यासी देतां आलिंगन । आलें रुदन श्रीरामा ॥ ५० ॥ सखा बंधु पुत्र आप्त । घायीं पडलिया रणांत । तैसियापरी श्रीरघुनाथ । असे स्फुंदत कृपाळू ॥ ५१ ॥ युद्धीं गांजोनि रावण । सीता सोडविली जाण । तो जटायु मारिला छळून । दुःखें लक्ष्मण विलपत ॥ ५२ ॥ जरी हा युद्धसमयीं येता । तरी कैसेनि रावण सीता नेता । माझा जटायु वांचता । अतिदुःखिता सौमित्रा ॥५३॥ कोणी न सांगेचि धर्डफुडें। यालागीं हिंडों मागें पुढें । मार्ग लागतां निवाडें । तरी कैवाडें धांवतों ॥ ५४ ॥ देखोनि जटायूच्या घाता । लक्ष्मणासी परम व्यथा । सखा निमाला सर्वथा । दुःखावस्था विलपत ॥ ५५ ॥

जटायो यदि शक्नोषि वाक्यं व्याहरितुं पुनः ।
सीतामाख्याहि भद्रं ते वधमाख्याहि चात्मनः ॥ १३ ॥

श्रीराम पुसे जटायूसी । जरी शक्ति असेल बोलावयासी । तरी सीताशुद्धि ये वेळेसीं । पुसेन तैसी मज सांगें ॥ ५६ ॥ सीता हरूनी रावण । कोणे दिशे केलें गमन । कोण त्याचें स्थान भुवन । हें संपूर्ण मज सांग ॥ ५७ ॥ ऐसी श्रीराम पुसतां गोष्टी । जटायूसी आनंद पोटीं । धन्य धन्य आजी मी सृष्टीं । श्रीराम दृष्टीं देखिला ॥ ५८ ॥ रावणें नेली सीता गोरटी । हे समूळ सांगावया गोष्टी । आत्मा म्यां धरिला कंठीं । तुझे चरणीं दृष्टीं देखावया ॥ ५९ ॥ मी पडलों मूर्च्छापन्न । केउतें रावणें केलें गमन । नेणें त्याचें स्थान आणि भुवन । सांगतां नयन लाविले ॥ ६० ॥ सत्य जाण श्रीरघुनाथा । येथोनि न बोलवे आतां । तुझे चरणीं ठेवोनि माथा । मी निजजीविता त्यागितों ॥ ६१ ॥ सीताहरणाचें असुख । तैसें मज नाहीं आत्यंतिक । जटायुमरणाचें दुःख । परम शोक सौमित्रा ॥ ६२ ॥ मदर्थें येणें वेंचिला प्राण । याचें व्हावया उत्तीर्ण । जटायूस आश्वासून । श्रीरघुनंदन अनुवादे ॥ ६३ ॥ कृपा उपजली श्रीरघुनाथा । ना भीं म्हणोनि जाला बोलता । तुज मी वांचवीन गा आतां । झणीं जीविता सांडिसी ॥ ६४ ॥ तुझें निवारीन दुःख । तुज मी देईन पांख । वांचवीन वर्षें असंख्य । मरणोन्मुख कां होसी ॥ ६५ ॥ आम्ही तुम्ही तिघे जण । शोधून मारूं वैरी रावण । तूं युद्धा साह्य कारी संपूर्ण । झणीं प्राण सोडिसी ॥ ६६ ॥ स्वर्गीं नमुचीच्या युद्धार्था । साह्य झालासी दशरथा । तैसा साह्य होईं आतां । लंकानाथा वधावया ॥ ६७ ॥ ऐकोनि श्रीरामाचें वचन । जटायु जाला हास्यवदन । वांचविसी हें नवल कोण । तूं स्त्रष्टा संपूर्ण सृष्टीचा ॥ ६८ ॥ तुझिया संकल्पसत्तेआंत । जगा उत्पत्ति स्थिति अंत । ब्रह्मा विष्णु शिव आज्ञा वंदीत । ऐसा तूं समर्थ श्रीरामा ॥ ६९ ॥ तुज मारितां रावण । निमेषार्ध न लागे जाण । तेथें मशक मी साह्य कोण । विज्ञापन अवधारीं ॥ ७० ॥ मज आयुष्य आकल्प पूर्ण । परी हेंचि नित्य चिंतन । जे ठाकोनियां श्रीरामचरण । माझें जन्ममरण छेदावें ॥ ७१ ॥ श्रीराम भेटावा अंतर्गतीं । योगी संन्यासी चिंतिती । तो तूं भेटलासी कृपामूर्ती । देहलोभ चित्तीं मज नाहीं ॥ ७२ ॥ ऐकें श्रीरामा सावधान । आतांच्या ऐसें मज मरण । पुढें सर्वथा न लाभे जाण । हेंही लक्षण अवधारीं ॥ ७३ ॥ वाचे श्रीरामनामस्मरण । दृष्टीं श्रीरामदर्शन । हृदयीं श्रीरामाचें ध्यान । ऐसें मरण मग कैंचें ॥ ७४ ॥ अंतीं तूंतें श्रीरामा स्मरतां । चारी मुक्ती देसी भक्तां । तें तूं पूर्ण ब्रह्म भेटलें असतां । देहलोभता मज नाहीं ॥ ७५ ॥ माझ्या पूर्वभाग्याच्या कोटी । तेणें श्रीराम परब्रह्म देखिला दृष्टीं । माझा देहलोभ निर्वटीं । कृपादृष्टीं मज पाहें ॥ ७६ ॥ रावणें केलें पक्षच्छेदन । छेदिला उभयपक्षाभिमान । तेणें तुष्टला श्रीरघुनंदन । वांचलेपण पुरे श्रीरामा ॥ ७७ ॥ माझ्या भाग्याची निजगती । श्रीराम पावला कृपामूर्ती । आतां नको देहसंगती । कृपामूर्ति श्रीरामा ॥ ७८ ॥ म्हणोनि धरिले दोनी चरण । माझें निवारीं जन्ममरण । ऐकोनि जटायूचें वचन । श्रीरघुनंदन तुष्टला ॥ ७९ ॥

१ सत्य. २ कोठें. ३ आपले प्राण. ४ दुःख. ५ प्राण सोडूं नको. ६ नाहींसा कर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

या च भूमिप्रदातॄणामाहिताग्नेश्च या गतिः ।
गोहिरण्यप्रदातॄणां या गतिः शरणार्थिनाम् ॥ १४ ॥

श्रीरामकाज लक्षून । सीतार्थी वेंचिला प्राण । त्यासी श्रीराम संतोषोन । गति संपूर्ण स्वयें देत ॥ ८० ॥ सोमयाग श्येनयाग । अश्वमेधादि नाना याग । अग्निहोत्राची गति सांग । जटायूस योग्य न मानीच राम ॥ ८१ ॥ गोदान भूमिदान तिळदान । हिरण्यादि नाना दान । जटायूअर्थी ते गति गौण । रघुनंदन स्वयें मानी ॥ ८२ ॥ शरणार्थ्याची शरणागती । धर्मशीलाची धर्मगती । अपुनरावृत्ती याची गती । तेही रघुपती गौण मानी ॥ ८३ ॥ संन्याश्या ब्रह्मसदनप्राप्ती । आणि योग्यांची योगमुक्ती । जटायूप्राप्त्यर्थ निश्चितीं । श्रीरघुपती स्वयें गौण मानी ॥८४॥ या अवघियां गतींवरती । उत्तमोत्तम उत्तम स्थिती । परात्पर परम गती । ममाज्ञाशक्तीं जाय वेगीं ॥ ८५॥ तुझे आज्ञेची निजशक्ती । तुझी आहे तुजप्रती । त्यां तेथें जावें कैशा रीतीं । विकल्प चित्तीं धरूं नको ॥ ८६ ॥ योगयागधर्मस्थितीं । धार्मिक जे गती पावती । ते भोगक्षयें क्षया जाती । पुनरावृत्ति सर्वांसी ॥ ८७ ॥ माझिया दर्शनाचें पुण्य । कल्प गेलिया नव्हे क्षीण । तें तूं पावसी शाश्वत स्थान । सत्य वचन हें माझें ॥ ८८ ॥ जटायु ऐकें सावधान । जैसें बोलती साधारण । तैसें नव्हे माझें वचन । त्वरित गमन तूं करीं ॥ ८९ ॥ ऐसें बोलतां श्रीरामचंद्र । वैकुंठवासी चतुर्भुजनर । पितांबरधारी शंखचक्रधर । आले सत्वर विमानस्थ ॥ ९० ॥ विमानस्थ चतुर्भुजनर । शंखचक्रगदाधर । साष्टांगीं वंदिला श्रीरामचंद्र । जोडोनि कर उभे ठेले ॥ ९१ ॥ श्रीराम म्हणे त्या पुरुषांसी । जटायु माझा पुण्यराशी । त्यासी न्यावें वैकुंठासी । अक्षयवासीं स्थापावा ॥ ९२ ॥ विमान देखतांचि पाहीं । जटायु जाला दिव्यदेही । लागला श्रीरामाच्या पायीं । म्हणे मी कायी वदूं आतां ॥ ९३ ॥ तुझें करितांचि स्तवन । वेदशास्त्रां पडलें मौन । तेथें मी पक्षी अति दीन । गुणवर्णन काय वदूं ॥ ९४ ॥ कांहीं न वदणें हेंचि स्तवन । कांहीं न करणें हेंचि भजन । कांहीं न होणें हे प्राप्ति पूर्ण । परिपूर्णें परिपूर्ण श्रीराम ॥ ९५ ॥ त्रिवार करोनि प्रदक्षिणा । लागोनि श्रीरामाच्या चरणां । जटायु आरूढोनि विमाना । वैकुंठभुवना निघाला ॥ ९६ ॥ वैकुंठवासिये पुरुषासी । स्वामित्व आहे रामापासीं । जटायु विस्मित मानसीं । निघे उल्लासीं वैकुंठा ॥ ९७ ॥ पुढतपुढतीं प्रदक्षिणा । पुढतपुढतीं लागे चरणां । मग आरूढोनि विमाना । वैकुंठभुवना निघाला ॥ ९८ ॥

तात त्वं निजतेजसैव गमितः स्वर्गं व्रज स्वस्ति ते
ब्रूमस्त्वेकमिमां वधूहृतकथां तातांतिके मा कृथाः ।
रामोऽहं यदि तद्दिनैः कतिपयैर्बीजानि सत्कंधरा
सार्धं बंधुजनेन सेंद्रविजयी वक्ता स्वयं राघवः ॥ १५ ॥

निजतेजें विराजमान । तेजस्वी देदीप्यमान । क्षणें पावसी वैकुंठभुवन । कृतकल्याण जटायु ॥ ९९ ॥ श्रीरामें जटायु पुनीत । वैकुंठा धाडी श्रीरघुनाथ । अगाध कथा वैकुंठांत । होईल ख्यात तिहीं लोकीं ॥ १०० ॥ तुज भेटेल माझा पिता । माझी पुसेल वनवार्ता । तरी रावणें हरोनि नेली सीता । हें सर्वथा नको सांगूं ॥ १ ॥ श्रीरामें उद्धरिलें जटायूसी । परम आल्हाद दशरथासी । परी सीता हरविली वनवासीं । ऐकतां त्यासी अति दुःख ॥ २ ॥ जन्मोनियां सूर्यवंशीं । सीता हरविली वनवासीं । लाज लाविली सूर्यवंशासी । अति आवेशीं क्षोभेल ॥ ३ ॥ मग वधावया लंकानाथ । येथें येईल दशरथ । एवढा होईल अनर्थ । सीताहरणार्थ नको सांगूं ॥ ४ ॥ तंव जटायु म्हणे श्रीरघुनाथा । भली हे सांगितली व्यवस्था । येऱ्हवीं मी सांगतों दशरथा । या गुह्यार्था न कळोनि ॥ ५ ॥ एवढें चरित्रकथन । कैसेनि पितयास होईल ज्ञान । तरी मागोनि येवोनि रावण । स्वमुखें आपण सांगेल ॥ ६ ॥ ज्याचें मी करीन उद्धरण । तोचि येवोनि आपण । सांगेल सीतेचें हरण । कुळनिर्दळण प्रसंगें ॥ ७ ॥ सपुत्रबंधुप्रधान । ससैन्येंसीं दशानन । रामें वधिला विंधोनि बाण । सीताहरण करितांचि ॥ ८ ॥ ऐसी ऐकतांचि वार्ता । सुख होईल श्रीदशरथा । आनंद पूर्वजां समस्तां । माझ्या पुरुषार्था देखोनि ॥ ९ ॥ श्रीराम ज्ञानविज्ञानघन । ब्रह्मलिखित तुझें

१ सीतेकरितां. २ सोनें आदिकरून. ३ जटायूकरितां. ४ शंका. ५ जन्ममरण पावणें. ६ बसून, चढून. ७ शोभायमान. ८ सीताहरणासंबंधीं हकीकत.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वचन । जटायु घालोनि लोटांगण । केलें गमन वैकुंठा ॥ ११० ॥ श्रीराम स्वयें ब्रह्म पूर्ण । जटायु भक्त संपूर्ण । करोनि पितर सनातन । जटायु सुखसंपन्न पैं केला ॥ ११ ॥ एका जनार्दना शरण । जालें जटायु उद्धरण । पुढें निर्दाळावया रावण । रघुनंदन चालिला ॥ १२ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे अरण्यकांडे एकाकारटीकायां जटायूद्धरणं नामैकविंशतितमोऽध्यायः ॥ २१ ॥ ओंव्या ॥ ११२ ॥ श्लोक ॥ १५ ॥

अध्याय बाविसावा

श्रीरामचंद्राय नमः ॥ करोनि जटायूद्धरण । श्रीराम आणि लक्ष्मण । करावया सीतांगवेषण[2] । वनोपवन शोधिती ॥ १ ॥ वन शोधितां लक्ष्मण । तंव देखता होय अपशकुन । तेणें भयें कंपायमान । सांगता होय श्रीरामा ॥ २ ॥

लक्ष्मणस्तं महातेजाः सत्यवांश्छीलवांश्छुचिः ।
अब्रवीत्प्रांजलिर्वाक्यं भ्रातरं दीनचेतसम् ॥ १ ॥
स्पंदते मे दृढं बाहुरुद्विग्नमिव मे मनः ।
प्रायशश्चाप्यनिष्टानि निमित्तान्युपलक्षये ॥ २ ॥
तस्मात्सज्जो भवार्य त्वं कुरुष्व वचनं मम ।
ममैव हि निमित्तानि सद्यः शंसन्ति संभ्रमम् ॥ ३ ॥

सौमित्र तेजस्वी महावीर । परनारीसहोदर[3] । सत्यवादी अति पवित्र । नित्य एकाग्र श्रीरामभजनीं ॥३॥ त्यागोनियां धनमान । रामा[4] त्यजोनि श्रीरामभजन । ऐसा सौमित्र अति पावन । अशुभ चिन्ह अनुवादे[5] ॥ ४ ॥ बाहु स्फुरती दुःखायमान । अशुभ लवती लोचन । तरी श्रीरामा होईं सावधान । अति विघ्न दिसताहे ॥ ५ ॥ सव्य[6] जाती पैं चाष । कुशब्द बोलती वायस । दिग्दाहें कोंदलें आकाश । दिसे त्रास पशुपक्ष्यां ॥६॥ ऐसें देखोनियां चिन्ह । दोघे जाले सावधान । पुढें करावया गमन । तंव दुर्धर विघ्न ओढवलें ॥ ७ ॥

वनस्य तस्य शब्दोऽभूद्वनमापूरयन्निव ।
तं शब्दं कांक्षमाणस्तु रामः खड्गी सहानुजः ॥ ४ ॥

श्रीरामलक्ष्मणांसन्मुख । वनीं जाली महाहांक । तेणें दुमदुमिले तिन्ही लोक । वनीं वनौक गजबजिले ॥ ८ ॥ श्वापदें आक्रोशें आरडती । एक दीर्घ स्वरें गर्जती । एक मूर्च्छागत पडती । वृक्ष उन्मूळती समूळीं ॥ ९ ॥ ऐसें देखोनि दोघे जण । धनुष्यीं सज्जोनियां बाण । वनींचें निर्दाळावया विघ्न । सावधान चालिले ॥ १० ॥ शुद्ध करावें दंडकारण्य । हे माझी प्रतिज्ञा संपूर्ण । तरी आधीं निरसोनि येथींचें विघ्न । मग गमन पुढें करूं ॥ ११ ॥ ऐसें बोलोनि श्रीरघुनाथ । विघ्न निरसावया चालिला तेथ । तंव राक्षस अत्यद्भुत । त्या वनांत देखिला ॥ १२ ॥

ददर्श सुमहाकायं राक्षसं घोरदर्शनम् ।
विवृद्धमशिरोग्रीवं कबंधमुदरे मुखम् ॥ ५ ॥
घोरौ भुजौ विकुर्वाणमुभौ योजनमायतौ ।
आकर्षन्तं विकर्षन्तमनेकान्मृगयूथपान् ।
भक्षयन्तं महाघोरानृक्षसिंहमृगद्विजान् ॥ ६ ॥

सकंठ मस्तकीं नाहीं शिर । आकाशप्राय दीर्घ शरीर । उदरोदरीं मुख क्रूर । दाढा अत्युग्र कैंराळा[10] ॥ १३ ॥ धगधगित दोन्ही नयन । अति क्रोधीं निमग्न । आणि तळवटीं भग्नचरण । बैसलें स्थान सोडीना ॥ १४ ॥ अति सलंब दोन्ही हात । एकैक बाहु योजनांत । हात दश दिशा भोंवत । कवळोनि खात पशुपक्षी ॥ १५ ॥ मैंत्त[11]मातंगांचे कळप । मुखामाजी होती गडप । सिंह व्याघ्र आस्वलें अमूप । मुखीं निक्षेप[12] दों हातीं ॥ १६ ॥ पक्षी उडतां योजनांत । धरोनि घाली मुखाआंत । पशु वनांतरीं चरत । कवळोनि समस्त मुखीं घाली ॥ १७ ॥ गांवें[13]गांव उंच हात । अखंड गगनांत भोंवत । प्राणी त्यातें न देखत । धरोनि मुखांत स्वयें घाली ॥ १८ ॥ कैंबंध[14] दिसे जैसा पर्वत । गुप्त कर भोंवत गगनांत । प्राण्यांचें लक्ष नाहीं तेथ । धरोनि समस्त मुखीं घाली ॥ १९ ॥ मारावया राम लक्ष्मण । रावणें धाडिले आठ जण । ते राक्षस महाबळिये दारुण । दोघांसी धरोन मारावया ॥२०॥ पुढिले अति गूढ विपिनीं । वाट

---

१ अनादिसिद्ध. २ सीतेचा शोध. ३ परकी स्त्रियांना बहिणीं-प्रमाणें मानणारा. ४ स्त्री. ५ सांगूं लागला. ६ डाव्या बाजूनें. ७ वनचर. ८ कोसळून पडूं लागले. ९ नाहींसें करण्याकरितां.

१० भयंकर. ११ माजलेल्या हत्तींचे. १२ घालणें, टाकणें. १३ चार चार कोस. १४ राक्षसविशेष, हा डोक्यावांचून होता, कबंध=धड.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

धरोनि मारावया दोनी । आठही निघाले कबंध-वनीं । तंव तेणें धरोनि भक्षिले ॥ २१ ॥ कबंधें धरोनि आठही जण । स्वेच्छा केलें त्यांचें भक्षण । मग पुढें धरावया राम लक्ष्मण । लक्ष लावोन राहिलासे ॥ २२ ॥ शिरश्चरणरहित मध्य । यालागीं नामें तो कबंध । देखोनि राम लक्ष्मण सन्निध । धरावया सिद्ध तो जाला ॥ २३ ॥

कबंधेनातिकायेन समूढौ दीर्घबाहुना ।
भ्रातरौ वैरिणा प्राप्तौ कृशप्राणौ महाबलौ ॥ ७ ॥
वदतं कार्यमिह वां किमर्थं चागतौ युवाम् ।
इमं देशमनुप्राप्तौ क्षुधार्तस्येह तिष्ठतः ॥ ८ ॥

त्या दोघांतें लक्षोनी । कबंधें दोनी बाहु पसरोनी । दोहीं हातीं धरिले दोनी । आवरोनी निजबळें ॥ २४ ॥ त्यांचें करावया भक्षण । कबंध ओढी रघुनंदन लक्ष्मण । तंव श्रीराम ओढेना[1] अणुप्रमाण । देखोनि आपण साशंक ॥ २५ ॥ मज कबंधाची निजशक्ती । आतां दोन्ही माणसें न ओढवती । तरी यांचे ठायीं दुर्धर शक्ती । यांची कुळवृत्ति पुसों पां ॥ २६ ॥ तुम्ही कोणाचे पैं कोण । आणि येथें यावया काय कारण । या ठाया जे आलेति जाण । मुख्य भक्षण तें माझें ॥ २७ ॥ तंव रामासी म्हणे लक्ष्मण । राक्षसें लाविलें दृढ बंधन । बळें सुटका नव्हे जाण । काय आपण करावें ॥ २८ ॥ राम म्हणे लागल्या दृढबंधन । तरी आपणा सोडवावें आपण । दुज्याची करी जो आस जाण । हीन दीन तो नपुंसक ॥ २९ ॥ सौमित्रा ऐकें सावचित्त । याचा पुसूं दे वृत्तांत । मग याचा करीन घात । न लागतां येथ क्षणमात्र ॥ ३० ॥ कबंध म्हणे जरी न सांगतां वृत्तांत । तरी मी तुमचा करीन घात । मग हांसोनियां श्रीरघुनाथ । निजवृत्तांत सांगत ॥ ३१ ॥ अरे मी दाशरथि रघुनंदन । रावणें केलें सीताहरण । तिचें करावया गवेषण[2] । दोघे जण येथें आलों ॥ ३२ ॥ तंव दीर्घबाहु निमग्नवदन[3] । विक्राळरूपी कैंचा कोण । मार्ग रोधावया[4] काय कारण । निजलक्षण मज सांगें ॥ ३३ ॥ हेंचि माझें निजवृत्त । तूं म्हणसील भक्षावें स्यां येथ । बाहुबळें आकर्षीत । दोघे मुखांत घालावया ॥ ३४ ॥ कबंध अति क्रोधानळीं । दोघांतें ओढी सबळ बळी । बाहु उखळूं पाहती समूळीं । परी बंधूंची जाळी ओढेना ॥ ३५ ॥ तंव लक्ष्मण म्हणे श्रीरघुनाथा । हा तंव पेटला निजघाता । तरी यासी वधावें शीघ्रता । विलंब आतां करूं नये ॥ ३६ ॥ श्रीराम सांगे आपण । यासी तंव नाहींत चरण । बाहुबळें हा सबळ पूर्ण । त्या आपण छेदाव्या ॥ ३७ ॥ आम्हां दोघांतें धरोनि येथ । याचे यानें गोंविले हात । तरी याच्या भुजा छेदोनि येथ । सावचित्त निजखगें[7] ॥ ३८ ॥

दक्षिणो दक्षिणं बाहुमासक्तमसिना ततः ।
चिच्छेद रामो वेगेन सव्यं वीरस्तु लक्ष्मणः ॥ ९ ॥
स पपात महाबाहुश्छिन्नबाहुर्महास्वनः ।
खं च गां च दिशश्चैव नादयञ्जलदो यथा ॥ १० ॥
स निकृत्तौ भुजौ दृष्ट्वा शोणितौघपरिप्लुतः ।
दीनः पप्रच्छ तौ वीरौ कौ युवामिति दानवः ॥ ११ ॥

खर्गे काढोनि सावचित्त । श्रीरामें छेदिला दक्षिण हस्त । आणि लक्ष्मणें त्याचि क्षणांत । वाम हस्त छेदिला ॥ ३९ ॥ भुजा छेदिल्या महा थोर । तंव वाहती रुधिराचे[5] पूर । राक्षस अति आक्रंदे थोर । तेणें चराचर डुमडुमलें ॥ ४० ॥ नाद कोंदला अंतराळीं । नाद कोंदला सप्त पाताळीं । नादें पक्षी श्वापदें आंदोळीं[6] । बैसली टाळी दिग्गजां ॥ ४१ ॥ घायें राक्षस कंपायमान । तुम्ही दोघे काय राम लक्ष्मण । केलें माझ्या भुजांचें छेदन । आणिकांसी जाण न तुटती ॥४२॥ अतर्क्य माझ्या भुजा जाण । लक्षूं जाणे श्रीराम लक्ष्मण । आणिकां न करवे छेदन । मूर्च्छापन्न देखोनि ॥४३॥ आणिकां न कळे माझी गोष्टी । आणिक मज देखतां दृष्टीं । मूर्च्छापन्न पडती सृष्टी । ते उठौंउठीं मी भक्षीं ॥ ४४ ॥ माझ्या भुजांचें बळ संपूर्ण । ओढितां न ओढती दोघे जण । आणि बळें बाहूंचें केलें छेदन । तरी राम लक्ष्मण तुम्ही दोघे ॥ ४५ ॥ तुमचा घाव लागतां देख । दुःख नासूनि वाटे सुख । श्रीराम सौमित्र तुम्ही आवश्यक । अलोलिक निजशक्ति ॥ ४६ ॥ ऐसें ऐकोनि राक्षस-वचन । सौमित्र सांगे आपण । आम्ही दोघे श्रीराम लक्ष्मण । सीतागवेर्षण[8] करूं आलों ॥४७॥

१ ओढतां येईना. २ शोध. ३ छातींत डोकें आहे असा. ४ अडविण्यास. ५ रक्ताचे. ६ हालवूं लागला.

७ तत्काल. ८ सीतेचा शोध.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

त्वं तु को वा किमर्थं वा कबंधसदृशो वने ।
आस्येनोरसि दीप्तेन भग्नजघो विचेष्टसे ॥ १२ ॥

तंव लक्ष्मण पुसे राक्षसासी । तरी तूं कोण येथें वनवासी । शिरश्चरणेंवीण कबंधेंसीं । येथें रहावयासी काय कारण ॥ ४८ ॥ कोथळ प्रचंड चरणेंवीण । येथें कैसें आगमन । आणि उदरीं दिसे क्रूर वदन । दीर्घ दर्शन विकराळ ॥ ४९ ॥ येथें तुझ्या मुखांहातीं । पशुपक्ष्यां जाली शांती । कवळोनि श्वापदें दोहीं हातीं । ऐसा अति क्षुधार्थी तूं कोण ॥ ५० ॥

एवमुक्तः कबंधस्तु लक्ष्मणेनोत्तरं वचः ।
उवाच वचनं प्रीतस्तदिदं वचनं स्मरन् ॥ १३ ॥
श्रिया विराजितं पुत्रं दनोस्त्वं विद्धि लक्ष्मण ।
रूपमासीन्ममाचिन्त्यं त्रिषु लोकेषु विश्रुतम् ।
सोऽहं रूपमिदं कृत्वा लोकवित्रासनं महत् ॥ १४ ॥

ऐकोनि लक्ष्मणाचें वचन । राक्षस स्वयें संतोषोन । मग आपुलें पूर्वविधान । स्वयें सावधान सांगत ॥ ५१ ॥ कश्यपाची प्रियपत्नी । दिती अदिती आणि दनी । जे कां रूपें श्रीसमानी । ते माझी जननी श्रीरामा ॥ ५२ ॥ तरी त्या दनूचा पुत्र मी प्रिय पूर्ण । यालागीं मातें म्हणती दनु । रूपें मदनमोहनु । सबळें पूर्णू बळवंत ॥ ५३ ॥ रूपयौवनसंपत्ती । अंगींच्या बळाची उद्धती । नानावदनविकटवृत्ती । ऋषी वनांतीं भेडसावीं ॥ ५४ ॥

ततः स्थूलशिरा नाम महर्षिः कोपितो मया ।
स चिन्वन्विविधं वन्यं रूपेणानेन धर्षितः ॥ १५ ॥
तेनाहमुक्तः प्रेक्ष्यैवं घोरशापाभिधायिना ।
एतदेवं नृशंसं ते रूपमस्तु विगर्हितम् ॥ १६ ॥
स मया याचितः क्रुद्धः शापस्यांतो भवेदिति ।
यदा छित्त्वा भुजौ रामस्त्वां दहेद्विजने वने ।
तदा त्वं प्राप्यसे रूपं स्वमेव विपुलं शुभम् ॥ १७ ॥

स्थूळशिरा महाऋषीसी । वनीं वेंचितां वनफळांसी । मी अधोमुखें भेडसावीं त्यासी । तंव तेणें क्रोधावेशीं शापिलें ॥ ५५ ॥ विक्राळ मुख योजन कर । चरणरहित स्थूळ शरीर । उदरामाजी निमग्न शिर । होसी अघोर राक्षस ॥ ५६ ॥ मग त्याचे धरोन चरण । उश्शाप मागितला आपण । करितां सीतागवेषण । राम लक्ष्मण वना येती ॥ ५७ ॥ त्यांसी तूं धरितां भक्षणार्थी । ते दोघे दोन्ही बाहु छेदिती । तेव्हां तू पावसी उद्धारगती । ऐसी वरदोक्ति ऋषि वदला ॥ ५८ ॥ आणिक एक माझी उद्धती । ते मी सांगेन तुम्हांप्रती । मज तुष्टला प्रजापती । तपोवृत्ती संतोषोनी ॥ ५९ ॥

अहं हि तपसोग्रेण पितामहमतोषयम् ।
दीर्घमायुः स मे प्रादात्ततो मां विभ्रमोऽस्पृशत् ॥ १८ ॥
दीर्घमायुर्मया प्राप्तं किं मां शक्रः करिष्यति ।
इत्येवं बुद्धिमास्थाय रणे शक्रमधर्षयम् ॥ १९ ॥
तस्य बाहुप्रमुक्तेन वज्रेण शतपर्वणा ।
सक्थिनी च शिरश्चैव शरीरे संप्रवेशितम् ॥ २० ॥

तपें प्रसन्न केला विधाता । ब्रह्मशाप निवारीं म्हणतां । द्विजशापीं न चले सामर्थ्यता । म्हणे नान्यथा ऋषिभाषित ॥ ६० ॥ न निवारवे ऋषिशापासी । मग मागितलें दीर्घायुष्यासी । ब्रह्मयानें देवोनि त्या वरासी । अदृश्येंसीं तो गेला ॥ ६१ ॥ व्हावया ब्रह्मशापप्राप्ती । गर्व वाटला माझे चित्तीं । मी तंव चिरंजीव त्रिजगतीं । इंद्रादि किती मजपुढें ॥ ६२ ॥ ऐसिया गर्वाची उद्धती । घ्यावया त्याची स्वर्गसंपत्ती । जाली इंद्रपदाची प्राप्ती । मज शचीपति कोपला ॥ ६३ ॥ मज आयुष्य आहे संपूर्ण । इंद्र मारावया मशक कोण । येणेंचि अति गर्वें जाण । युद्ध दारुण म्यां केलें ॥ ६४ ॥ तीक्ष्ण वज्र शतधारा । घायें हाणीतल्या पुरा । शरीरनिमग्न केलें शिरा । चरण धारा खंडिले ॥ ६५ ॥ घायें दुःखी जालों अत्यंत । इंद्रासी म्हणें मी न करीं घात । तंव तो म्हणे तूं चिरंजीवित । जीविता अंत घडेना ॥ ६६ ॥ ऐसें बोलतां सुरपती । मज आली ब्रह्मशापप्राप्ती । क्षणामाजी पडली भ्रांती । अति उन्मत्त राक्षस ॥ ६७ ॥ उदरोदरीं दिधलें मुख । अति विक्राळ आणि विकट । दोनी हात योजन एक । अति अगाध अनिवार ॥ ६८ ॥ जें जें सांपडे हातांत । पशु पक्षी प्राणी नित्य भक्षीत । तरी क्षुधेसी नाहीं अंत । समसमित अति दुःखी ॥ ६९ ॥ नवल कैसें

१ मुखाकडून. २ लक्ष्मीसारखी. ३ अत्यंत सौंदर्य आणि तारुण्य यांनीं शोभणारा असा. ४ चार कोस लांब. ५ दांडगाई. ६ ब्रह्मदेव. ७ तपश्चर्येमुळें. ८ ऋषीचें भाषण. ९ इंद्र.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

श्रीरघुनाथा। काय खाऊं हे चिंता। आणिक नाठवेचि सर्वथा। उदरावस्था अति दुःखी॥ ७०॥ पोटाचिये चिंतेहातीं। जगासी पडली अति भ्रांती। हृदयीं नाठवे श्रीरघुपती। ऐसा दुःखावर्त उदरार्थ॥ ७१॥ वेदशास्त्रीं अति संपन्न। स्वयें म्हणवीं मी सज्ञान। तरी शिस्नोदरपरायण। इतर जन ते मशक॥ ७२॥ असो इतरांची काय कथा। माझी जे कां दुःखावस्था। सावध ऐकें श्रीरघुनाथा। मोक्षदाता तूं माझा॥ ७३॥

ममाप्यनेन रूपेण निर्वेदः सुमहान्प्रभो।
मृत्पिण्डभूत एकस्थो जीवलोकविगर्हितः॥ २१॥
दीर्घौ चेमौ निकृत्तौ मे युवाभ्यामायतौ भुजौ।
राघवौ यन्मया दृष्टौ नास्ति धन्यतरो मया॥ २२॥
सत्यसंधौ तथा वीरौ धार्मिकौ सत्यविक्रमौ।
सहितौ भ्रातरौ दृष्ट्वा मुक्तोहं पापजीवितात्॥ २३॥

या देहाचे संगतीं। अति दुःखी मी श्रीरघुपती। मृत्पिंडप्राय नाहीं गती। निंद्य सर्वार्थीं सर्वस्वें॥ ७४॥ यासी नाहीं गमनगती। नाहीं अंतरीं शुद्धमती। बाह्यक्रिया जीवघाती। निंद्य सर्वार्थीं सर्वस्वें॥ ७५॥ मारोनि खावे जीवमात्र। न म्हणें ब्राह्मण क्षत्रिय शूद्र। ऐसा राक्षस मी अपवित्र। दुःखें दुर्धर अति दुःखी॥ ७६॥ तरी शापभाग्यास्तव[३] जाण। तुम्ही आलेति दोघे जण। तरी हें नव्हे सीतागवेषण। माझें उद्धरण करूं आलां॥ ७७॥ करितां माझे बाहुच्छेदन। छेदिला माझा देहाभिमान। घायें केलें सावधान। सुखसंपन्न श्रीरामा॥ ७८॥ तुम्ही दोघे पूर्ण पुरुष। सत्त्वनिष्ठ सद्विवेक। तुमचे चरण सुखदायक। सदा सात्त्विक तुमचेनि॥ ७९॥ ऐसे तुम्ही धीर वीर। सत्स्वरूप महाशूर। तुम्ही निजधर्माचें माहेर। चिदचिन्मात्र तुम्ही दोघे॥ ८०॥ तुम्हांसी देखतांचि दृष्टीं। निमाल्या अविद्या पापें कोटी। सुखस्वरूपीं झाली भेटी। कृपाळू सृष्टीं श्रीराम॥ ८१॥ तुम्ही दोघे अलौकिक। तुमच्या चरणां ओलंगतां देख। दुःख छेदोनि दिधलें सुख। परम पुरुष तुम्ही दोघे॥ ८२॥ पापकारी अति निंदित। राक्षसयोनीं अधःपात। त्या मज केलें निर्मुक्त। ब्रह्मभूत तुम्ही दोघे॥ ८३॥ ऐसें बोलोनि आपण। कबंध घाली लोटांगण। माझें केलिया देहदहन। सांगेन संपूर्ण सीताशुद्धी॥ ८४॥ सीताशुद्धी मी सांगेन। हें ऐकोनि श्रीरामवचन। त्यासी पुसे स्वयें आपण। अति सावधान शुद्धयर्थी॥ ८५॥

स त्वं सीता समाचक्ष्व येन वा यत्र वा हृता।
कुरु कल्याणमत्यर्थं यदि जानासि तत्त्वतः॥ २४॥

श्रीराम पुसे कवंधासी। सीताशुद्धी सांगेन म्हणसी। कोणीं नेली कोणे स्थळासी। कोणे देशीं ते सांगें॥ ८६॥ बुद्धि करोनि सावधान। स्वस्थ करोनि निजमन। सीतेचें केउतें गमन। स्थान मान मज सांगें॥ ८७॥

एवमुक्तस्तु रामेण वाक्यं दनुरनुत्तमम्।
इदं जगाद वचनं लक्ष्मणस्य च पश्यतः॥ २५॥
रावणेन हृता सीता रामपत्नी यशस्विनी।
नाममात्रं तु जानामि न रूपं तस्य रक्षसः॥ २६॥
निवासं वा प्रभावं वा वयं तस्य न विद्महे।
दिव्यमस्ति न मे ज्ञानं नाभिजानामि मैथिलीम्॥ २७॥

ऐसें ऐकोनि श्रीरामवचन। कवंध सांगे आपण। ऐसें मज आहे ज्ञान। तें सावधान अवधारीं॥ ८८॥ मग लक्ष्मणासी उभें करोनी। कवंध सांगे गर्जोनी। श्रीरामाची धर्मपत्नी। गेला घेवोनी रावण॥ ८९॥ त्याचें नांव म्यां ऐकिलें कानीं। परी तो देखिला नाहीं नयनीं। तो केउता गेला गगनीं। कोणे स्थानीं मी नेणें॥ ९०॥ त्याचा आवास ना निर्वास। कोणे ठायीं रहिवास। जनवास कीं वनवास। तें मी निःशेष जाणें ना॥ ९१॥

विज्ञानं तु परिभ्रष्टं शापदोषेण राघव।
स्वकृतेन मया प्राप्तं रूपं लोकविगर्हितम्॥ २८॥
किं तु यावन्न यात्यस्तं सविता श्रान्तवाहनः।
तावन्मामवटे कृत्वा दह राम यथाविधि॥ २९॥

श्रीरामा माझें शुद्ध ज्ञान। ब्रह्मशापें जालें विच्छिन्न। न करितां राक्षसदेहाचें दहन। माझें मज ज्ञान प्रकटेना॥ ९२॥ आच्छादावया निजज्ञान। श्रीरामा मुख्य देहबंधन। देहाभिमान

१ दुःखरूप भोंवरा. २ मातीच्या गोळ्याप्रमाणें. ३ शापरूपी भाग्याचे योगेंकरून. ४ सर्व चराचरस्वरूपी. ५ नाहींशा झाल्या, गेल्या. ६ सेवा केली असतां. ७ नरकवास. ८ रहाण्याचें ठिकाण.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

केलिया दहन । ज्ञानविज्ञान प्रांजळ ॥ ९३ ॥ यालागीं राक्षसीदेहदहन । दीर्घ गर्तेंत खाणून । त्यामाजी शुष्क काष्टें घालून । करावें दहन सौमित्रें ॥ ९४ ॥ अंतकाळ करी जो मित्र । तयाचें नाम गा सुमित्र । मी तंव तुमचें कृपापात्र । श्रीरामचंद्र कृपाळु ॥९५॥ लक्ष्मणा ऐकें सावधान । या देहा नाहीं प्रेतपण । श्रीरामहस्तें अति पावन । कृपेनें दहन करीं स्वामी ॥ ९६ ॥ केलिया राक्षसदेहदहन । सीताप्राप्तीचें विधान । मी यथार्थ सांगेन । सत्यवचन श्रीरामा ॥ ९७ ॥ ऐकोनि कवंधाचें वचन । संतोषला रघुनंदन । पाचारोनी लक्ष्मण । देहदहन करविलें ॥ ९८ ॥

चितामादीपयामास सा प्रजज्वाल सर्वतः ।
तच्छरीरं कबंधस्य घृतपिण्डोपमं महत् ॥ ३० ॥
स विधूय चितामाशु विधूमोऽग्निरिवोत्थितः ।
अरजे वाससी बिभ्रन्माल्यं दिव्यं महाबलः ॥ ३१ ॥
उत्पपाताशु संहृष्टः सर्वप्रत्यंगभूषणः ।
विमाने भास्वरे तिष्ठन्हंसयुक्ते यशस्करे ॥ ३२ ॥

कवंधाचें देहदहन । चितेमाजी करितां जाण । तो निंद्य देह त्यागून । जाला आपण दिव्यदेही ॥ ९९ ॥ दिव्यांबरपरिधान[1] । अनर्घ्य भूषणें दिव्य चंदन । मांदार पारिजात सनातन । माळा परिधान मघमघित ॥ १०० ॥ त्यजितां राक्षसदेहासी । दनु दानव उल्हासेंसीं । श्रीरामा तुझी कृपा ऐसी । निमेषार्धेंसीं सुखी केलें ॥ १ ॥ तुझें करितां नामस्मरण । सुरासुर येती शरण । तुझे देखिलिया श्रीचरण । चरणां शरण सायुज्य ॥२॥ त्यांत तुझें सांग संदर्शन । मज घडलें संपूर्ण । म्हणोनि घालितां लोटांगण । आलें विमान हंसयुक्त ॥ ३ ॥ धन्य द्विजाचा निजशाप । शापें केला निष्पाप । श्रीराम भेटला चित्स्वरूप । सुखरूप मी जालों ॥ ४ ॥ सुखरूप चराचर । सुखें भरले सागर । कवंधासी उत्साह थोर । श्रीरामचंद्र संतुष्टला ॥ ५ ॥ कवंध अति उल्लासोनी । बैसला हंसयुक्त विमानीं । सीताप्रातीचे विधानीं । स्वयें गर्जोनि सांगत ॥ ६ ॥

सोऽन्तरिक्षगतो वाक्यं कबन्धो राममब्रवीत् ।
शृणु राघव तत्त्वेन यथा सीतामवाप्स्यसि ॥ ३३ ॥
श्रूयतां राम वक्ष्यामि सुग्रीवो नाम वानरः ।
भ्रात्रा निरस्तः क्रुद्धेन वालिना शक्रसूनुना ॥ ३४ ॥

कवंध बैसोनि विमानीं । श्रीरामा सांगे कळवळोनी । सीताशुद्धीचे[3] विधानीं । सावधानीं अवधारीं ॥ ७ ॥ ऐकें श्रीरामा सत्योत्तर । सीता भेटावया अति सत्वर । सुग्रीवासी करीं मित्र । वानर वीर महाबळी ॥ ८ ॥ पालेखाइरे[4] वानर । केवळ नव्हती वनचर । किष्किंधेचा राज्यधर । सैन्य अपार जयाचें ॥ ९ ॥ सुग्रीवाचे चवघे प्रधान । राजनीतीं अति संपन्न । चहूं पुरुषार्थीं अति सज्ञान । बळवाहन बळिष्ठ ॥ ११० ॥ समानशीळ योग्य मैत्री[5] । येरयेरां नित्य साहाकारी । तुम्हां दोघां समान सरी । तेंही अवधारीं श्रीरामा ॥ ११ ॥ तुझी भार्या रावणें हरण । सुग्रीवभार्या वाळिग्रहण । दोघांची अवस्था समसमान । दोघे दीन स्त्रीविरहें ॥ १२ ॥ तुज राज्यत्यागें प्राप्त वन । त्यासी राज्यत्यागें ऋष्यमूक स्थान । दोघांचें दुःख समसमान । अति दीन स्थिति गति ॥ १३ ॥ तुम्ही नरपति धीर वीर । आणि वानरपति सुग्रीव वीर । त्यासीं करावा अगत्य मित्राचार । सीतासुंदरीप्राप्त्यर्थीं ॥ १४ ॥ हें तंव मानलें श्रीरामा वचन । केउतें सुग्रीवाचें स्थान । कोणें मार्गें करावें गमन । श्रीरघुनंदन पुसतसे ॥१५॥

स वानरवरः पंपामटतीव सुशंकितः ।
अभिषिक्तो बली कर्तुं कार्यं ते हरिपुंगवः ॥ ३५ ॥
वानरेंद्रो महावीर्यस्तेजोवानमितप्रभः ।
दिशो विचेतुं तां सीतां त्वद्वियोगेन शोचतीम् ॥ ३६ ॥
भास्करस्यौरसः पुत्रो वालिना कृतकिल्बिषः ।
सन्निधायायुधं क्षिप्रमृष्यमूकालयं कपिम् ॥ ३७ ॥

कवंध सांगे श्रीरामाप्रती । येणेंचि मार्गें श्रीरघुपती । पंपासरोवराची ख्याती । अति विश्रांति तापसां[6] ॥ १६ ॥ देखिलिया पंपेचें दर्शन । दुःखी होती सुखसंपन्न । तें त्या वानराचें स्थान । स्वानंदें पूर्ण क्रीडती ॥ १७ ॥ तुज सुग्रीवा जालिया भेटी । दोहींच्या दुःखा होईल तुटी । मेळवोनि वानरकोटी । सीता गोरटी शोधील ॥ १८ ॥ वानर धाडोनी महाबळी । त्रैलोक्यीं घेतील घर-

१ खचित. २ उत्तम वस्त्रें धारण केलेला. ३ सीताशोधासंबंधीं. ४ झाडांचीं पानें खाणारे. ५ मैत्री.

६ तपस्वी लोकांना.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

धांडोळी । ठायीं घालोनि जनकबाळी । वानर तत्काळीं येतील ॥ १९ ॥ सीताविरहें तूं आपण । गिंवसिसी गिरिकंदरें वन । तिची शुद्धी वानरगण । न लागतां क्षण आणिती ॥ १२० ॥ स्त्रीविषयींचें सुबद्ध । वाळिसुग्रीवां महाद्वंद्व । सहा सहा मासां करिती युद्ध । वीरां उन्माद वाटेंवि ॥ २१ ॥ तुझेनि हातें वाळिमरण । हें मज आहे ज्ञान पूर्ण । शीघ्र जावोनि आपण । वाळिनिर्दळण करावें ॥ २२ ॥ त्या दोघांच्या युद्धसंधीसी । ठाकोनि जावें त्वरेंसीं । रणीं निर्दाळावया वाळीसी । सुख सुग्रीवासी स्वानंदें ॥ २३ ॥ जें वाळीचें निर्दळण । तेंचि सुग्रीवा मित्रत्व पूर्ण । तेणें तूं पावशील कल्याण । सत्य वचन श्रीरामा ॥ २४ ॥ वंधुबंधूंमाजी वैर । पडावया मुख्य स्त्री साचार । स्त्रीसंग मुख्य दुर्धर । दुःखी नर स्त्रीसंगें ॥ २५ ॥ सुग्रीव मित्राचें महिमान । पावसील सीतारत्न । कीर्ति प्रकटेल अति पावन । सत्यवचन श्रीरामा ॥ २६ ॥ ऐसें कवंधें सांगोनी । स्वयें श्रीरामासी वंदोनी । आल्हादें विमानीं बैसोनी । ऊर्ध्वगमनीं तो गेला ॥ २७ ॥ एका जनार्दना शरण । जालें कवंधोद्धरण । पुढें श्रीरामलक्ष्मण । पंपाप्रयाण स्वयें करिती ॥ २८ ॥

स्वस्ति श्रीभावार्थरामायणे अरण्यकांडे एकाकारटीकायां कवंधोद्धरणं नाम द्वाविंशतितमोऽध्यायः ॥ २२ ॥ ओंव्या ॥ १२८ ॥ श्लोक ॥ ३७ ॥

अध्याय तेविसावा

श्रीरामचंद्राय नमः ॥ कवंधरूपें दानव दनु । पावला होता राक्षसतनु । तो श्रीरामें उद्धरोनु । केला पावनु तिहीं लोकीं ॥ १ ॥ दनूनें केलें ऊर्ध्वगमन । पुढें श्रीराम लक्ष्मण । पंपेसी निघाले आपण । धनुष्यबाण सज्जोनी ॥ २ ॥

पंपायाः पश्चिमे तीरे उपविष्टौ च राघवौ ।
ददर्शतुस्ततस्तत्र शबर्या रम्यमाश्रमम् ॥ १ ॥
तौ तमाश्रममासाद्य द्रुमैर्बहुभिरावृतम् ।
सुरम्यमभिवीक्षन्तौ शबरीमभ्युपेयतुः ॥ २ ॥
तौ दृष्ट्वा तु तदा सिद्धा समुत्थाय कृताञ्जलिः ।
पादौ जग्राह रामस्य लक्ष्मणस्य च धीमतः ॥ ३ ॥

श्रीराम लक्ष्मण अति सत्वर । पावोनि पंपापश्चिमतीर । सेवोनियां पंपापवित्रनीर । विश्रांतीस वीर वैसले ॥ ३ ॥ तेथें शवरीचा आश्रम । देखोनि अति मनोरम । स्वयें आले सौमित्र राम । आल्हाद परम शवरीसी ॥ ४ ॥ श्रीरामचरणीं लोटांगण । भावें वंदिला लक्ष्मण । शवरीसी आल्हाद पूर्ण । श्रीरामदर्शन देखोनि ॥ ५ ॥ मातंगऋषीच्या सेवावृत्तीं । शवरीची शुद्धमती । भगवद्भाव सर्वां भूतीं । श्रीरामीं भक्ति अनन्य ॥ ६ ॥ मातंगऋषीचे शिष्य निर्मळ । पडला असतां अति दुष्काळ । गुरूसी आणिती फळ मूळ । स्रवले केवळ श्रमबिंदु ॥ ७ ॥ श्रमबिंदु पडतां जाण । जालीं सरोवरें पावन । आटों नेणे तेथींचें जीवन । नित्य परिपूर्ण शुद्धजळें ॥ ८ ॥ श्रद्धेनें सेवितां तेथींचें आप । तत्काळ शमे त्रिविध ताप । सांसारिक शमे संताप । सुखरूप स्वानंदें ॥ ९ ॥ एकाचे बिंदु पडतां क्षितीं । सुमनें झालीं नानाजाती । सुकों नेणती कल्पांतीं । नित्य टवटविती मघमघित ॥ १० ॥ त्या सुमनांचा घेतां वास । मनाचा निरसे त्रिगुणत्रास । मग भोगी प्रकट परेश । अति उल्हास जीवशिवां ॥ ११ ॥ तिहीं पुष्पीं सुपुष्पित । वनश्री शोभासौभाग्ययुक्त । तें देखोनि श्रीराम संतोषत । अति भावार्थ शवरीचा ॥ १२ ॥ देखोनि शवरीचा भावार्थ । संतोषला श्रीरघुनाथ । मग तिचा वृत्तांत पुसत । समाधानार्थ द्यावया ॥ १३ ॥

कच्चित्ते निर्जिता विघ्नाः कच्चित्ते वर्धते तपः ।
कच्चित्ते नियतः कोप आहारश्च तपोधने ॥ ४ ॥
कच्चित्ते नियमाः प्राप्ताः कच्चित्ते मनसः सुखम् ।
कच्चित्ते गुरुशुश्रूषा सफला चारुभाषिणि ॥ ५ ॥

श्रीराम पुसे आपण । शवरी तूं ऐकें सावधान । मी एक ज्ञाता जग अज्ञान । हें महाविघ्न जिंकिलें कीं ॥ १४ ॥ ज्ञानाचा ज्ञानाभिमान । हेंचि तापसां महाविघ्न । जेणें जिंतिला ज्ञानाभिमान । तप

---

१ शोध लावून. २ शोधितोस. ३ मोठें भांडण. ४ पुरुषार्थ, बळ. ५ दुःसह. ६ पंपा सरोवराचें शुद्ध पाणी. ७ सतत सेवा केल्यानें. ८ प्राणिमात्राचे ठिकाणीं भगवत्प्रेम ठेवणारी. ९ एकनिष्ठ. १० आधिभौतिक, आध्यात्मिक आणि आधिदैविक हे तीन ताप. ११ सत्त्व, रज आणि तम ह्या तीन गुणांचा त्रास.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वर्धमान तयाचें ॥ १५ ॥ तयाच्या तपाची थोरी। स्वयें भगवंत आज्ञाधारी। तोचि तपस्वी या संसारीं। सुरासुरीं वंदिजे ॥ १६ ॥ अद्वैत देखिलें स्वस्वरूप। तैंचि जिंतिला जाय कोप। असतां द्वैतखटाटोप। सर्वथा कोप जिणवेना ॥ १७ ॥ जो पुढिलाचे ढक्यानें पडे। त्यावरी तो कोपें वावडे। स्वयें निसरोनि गडबडे। झाडितु मागें पुढें उगाचि निघे ॥ १८ ॥ स्वजिव्हा रगडितां दांतां-बुडीं। तया कोपाची कडाडी। दांत पाडी कीं जिव्हा तोडी। तैसी अद्वैतीं सवडी कोपासी नाहीं ॥ १९ ॥ जंव द्वैताची सुदृढता। तंव जिंकवेना मोहममता। अद्वैतभावना भावितां। मोहममता निमाली ॥ २० ॥ वृत्ति पावल्या चित्स्वरूप। तैं मन होतें सुखरूप। मनीं असतां दुःखसंताप। केल्याही तप अति मिथ्या ॥ २१ ॥ जरी सद्गुरु-सेवा सफळ। संसार होय मृगजळ। ऐसें न पावती ते बरळ। गुरु केवळ अनोळख ॥ २२ ॥ जे गुरूसी मनुष्य मानिती। त्यांची मिथ्या गुरु-भक्ती। त्यांसी कल्पांतीं नव्हे विश्रांती। उपदेशें भ्रांति मुख्यत्वें ॥ २३ ॥ मंत्र तंत्र जे सांगती। ते तोंडींचे तोंडीं उपदेशिती। नाहीं अंतरीं निजप्र-तीती। उपदेशभ्रांति मुख्यत्वें ॥ २४ ॥ सुवर्णाचा म्हणती नाग। नाग नव्हे तें सोनें चांग। तेंवी दृश्य द्रष्टा दिसे सांग। उपदेश अव्यंग या नांव ॥ २५ ॥ ऐसिये निजात्मप्रतीती। आहे सकळ गुरुभक्ती। सांडोनि ज्ञानगर्वउद्धती। विनीत सर्वांभूतीं अहेतुकें ॥ २६ ॥ इंद्रियकर्मांची प्रवृत्ती। तुज आहे कीं अकर्त्रात्मप्रतीती। तैं सकळ वासनां होय शांती। सुखस्थितिस्वानंद ॥ २७ ॥ ऐसी निजानंदप्रतीती। या नांव सार्थक तपःस्थिती। निजदेह मिथ्यात्वें देखती। मुख्य परमार्थी ते एक ॥ २८ ॥ ऐसें श्रीरामें पुसतां। शबरीस झाली पूर्णावस्था। श्रीरामचरणीं ठेवोनि माथा। समस्त तत्त्वतां वृत्तांता सांगत ॥ २९ ॥

अद्य प्राप्ता तपःसिद्धिस्तव संदर्शनान्मया।
अद्य मे सफलं जन्म गुरवश्च सुपूजिताः ॥ ६ ॥
चित्रकूटं त्वयि प्राप्ते विमानैरतुलप्रभैः।
मुनयो दिवमारूढा ये मयाभ्यर्चिताः पुरा ॥ ७ ॥
तैश्चाहमुक्ता धर्मज्ञैर्महाभागैर्महात्मभिः।
आगमिष्यति काकुत्स्थः सुपुण्यमिदमाश्रमम् ॥ ८ ॥
मया तु संचितं वन्यं विविधं पुरुषर्षभ।
तवार्थे पुरुषव्याघ्र पंपायास्तीरसंभवात्।
तत्ते परिगृहीतव्यं राम सौमित्रिणा सह ॥ ९ ॥

तुझें होतांचि दर्शन। सफळ तप सफळ ज्ञान। सकळ ध्येय ध्याता ध्यान। सफळ अनुष्ठान आजि माझें ॥ ३० ॥ आजि माझी सफळ वृत्ती। आजि माझी सफळ स्थिती। आजि माझी सफळ भक्ती। जे कृपें रघुपति आलासी ॥ ३१ ॥ तुझें करितां नामस्मरण। सहित पूर्वजां उद्धरण। त्या तुझें जालिया दर्शन। सफळ जनन आजि माझें ॥ ३२ ॥ तुझे देखि-लिया चरण। जन्ममरणांची बोळवण। बोळविलें मीतूंपण। सुखसंपन्न श्रीरामें ॥ ३३ ॥ तुज येतां चित्रकूटींहूनी। मार्गीं उद्धरिले मुनी। शरभंगु जातां विमानीं। म्यां प्ार्थोनि पूसिलें ॥ ३४ ॥ तेणें सांगितलें मजप्रती। तुझ्या आश्रमा येईल श्रीरघुपती। तैंपासोनि अहोरात्रीं। चरण चित्तीं दृढ धरिले ॥ ३५ ॥ माझा जाणोनि भावार्थ। कृपेनें आलासी कृपावंत। तरी आजि राहोनियां येथ। पूजा यथोक्त अंगीकारीं ॥ ३६ ॥ सूक्ष्म सामग्री अति पुनीत। म्यां किंचित केली असे येथ। ते अंगीकारावी श्रीरघुनाथ। सखा सम-वेत सौमित्र ॥ ३७ ॥ ऐसें ऐकोनि शबरीवचन। संतोषला श्रीरघुनंदन। विधियुक्त पूजा अंगीका-रोन। वनभोजन स्वयें केलें ॥ ३८ ॥

वचनात्तस्य सा रामं शबरी वाक्यमब्रवीत्।
कृत्स्नं वनमिदं दृष्टं श्रोतव्यं च श्रुतं त्वया ॥ १० ॥
तदिच्छाम्यभ्यनुज्ञाता त्यक्ष्याम्येतत्कलेवरम्।
तेषामिच्छाम्यहं गन्तुं समीपं भावितात्मनाम् ॥ ११ ॥

संतोषोनी बोलिला श्रीरघुनाथ। जें दनुजमुखें तुझें सामर्थ्य। ऐकोनि आम्ही आलों येथ। तुझें

१ वाढणारें. २ अभेदरूप. ३ जिंकवत नाहीं. ४ बडबडतो, ओरडतो. ५ चावतां. ६ आत्मानुभव. ७ परिपूर्ण. ८ ज्ञानाभिमानाचा ताठा. ९ अत्यंत नम्र. १० निरिच्छतेनें. ११ मी कर्ता नाहीं असा अनुभव. १२ शेवट, अंत. १३ एकनिष्ठ भक्ति.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

आचरित पहावया ॥ ३९ ॥ दनुदानवें जें सांगितलें । त्याहूनि अधिक म्यां देखिलें । ऐसें श्रीरामें बोलिलें । मन आनंदलें शबरीचें ॥ ४० ॥ सद्गुरुमंत्रसामर्थ्य पूर्ण । कदा कोमेजेना हें वन । सुमनां न ये सुकलेपण । न आटे जीवन बहुकाळें ॥ ४१ ॥ सद्गुरूचें सामर्थ्य भलें । जैसें ऐकिलें तैसें देखिलें । त्याचें वचन म्यां पाळिलें । तेणें देखिलें हे पाय ॥ ४२ ॥ ऐसें बोलोनि उल्लासतां । श्रीरामचरणीं ठेविला माथा । कांहींएक मी मागेन आतां । दयावंता तें देईं ॥ ४३ ॥ तुझें घ्यावया दर्शन । धरिलें देहाचें धारण । तरी तुझे देखिलिया चरण । कार्य कोण देहाचें ॥ ४४ ॥ तरी तुज देखतां श्रीरघुनाथा । गेली देहाची मोहममता । तो मी त्यागीन जीव आतां । कृपावंता आज्ञापीं ॥ ४५ ॥ देहसंगतीं अमित दोष । देहसंगति तो श्वानओक । देह तोचि महा नरक । परम दुःख देहसंगें ॥ ४६ ॥ देहाचिये संगतीं । ऐसीं दुःखें नेणों किती । त्या देहसंगाची करीन निवृत्ती । कृपें रघुपति आज्ञापीं ॥ ४७ ॥ ऐसें शबरियें स्वयें प्रार्थून । घातलें चरणीं लोटांगण । देखोनि तुष्टला रघुनंदन । आज्ञा संपूर्ण स्वयें देत ॥ ४८ ॥

धर्मिष्ठं तु वचः श्रुत्वा राघवः सहलक्ष्मणः ।
अनुजानामि गच्छेति प्रहृष्टवदनोऽब्रवीत् ॥ १२ ॥
अनुज्ञाता तु रामेण हुत्वात्मानं हुताशने ।
ज्वलत्पावकसंकाशा स्वर्गमेव जगाम ह ॥ १३ ॥
यत्र ते सुकृतात्मानो विहरन्ति महर्षयः ।
तत्पुण्यं शबरी स्थानं जगामात्मसमाधिना ॥ १४ ॥

ऐकोनि शबरीच्या वचनासी । श्रीराम बोले अति उल्लासीं । सांडोनियां देहलोभासी । परलोकासी सुखें जाय ॥ ४९ ॥ ऐकोनियां श्रीरामवचन । शबरी घालोनियां आसन । निजतेजासी चेतवोन । केलें दहन देहाचें ॥ ५० ॥ श्रीरामपुण्याची निजशक्ती । जाळोनियां देहस्थिती । शबरीसी कोण लोकप्राप्ती । तेही गती अवधारा ॥ ५१ ॥ जैसें पुण्याचें सामर्थ्य । ऋषि तैसे लोक पावत । शबरी पापपुण्यातीत । अति समर्थ श्रीरामें ॥ ५२ ॥ श्रीरामदर्शनाचें पुण्य । दिव्य भोगें नव्हे क्षीण । शबरी पावली अक्षय स्थान । गमनागमन जेथ नाहीं ॥ ५३ ॥ ऋषीश्वरांच्या पुण्यसंपत्ती । भोगक्षयें क्षया जाती । ते पावती पुनरावृत्ती । शबरीस प्राप्ती ते नाहीं ॥ ५४ ॥ जेथें नित्य वस्ती श्रीशुका । जेथें वस्ती सनकादिकां । शबरी पावली तया लोका । शिवादिकां निजपूज्य ॥ ५५ ॥ श्रीरामदृष्टि पुण्य परिपूर्ण । देहदहनें देदीप्यमान । तिसी न लागेचि विमान । केलें गमन निजगतीं ॥ ५६ ॥ जे जाती विमानगतीं । ते पावती पुनरावृत्ती । ते नाहीं शबरीप्रती । अगम्यगती ते गेली ॥ ५७ ॥ श्रीरामदर्शन पुण्यसंपत्ती । अक्षय सुखाची सुखवस्ती । क्षया न वचे कल्पांतीं । निजप्राप्ती शबरीसी ॥ ५८ ॥ श्रीराम देखतांचि दृष्टीं । पापपुण्यां पडली तुटी । खुंटली जन्ममरणांची गोष्टी । अक्षय संतुष्टी शबरीसी ॥ ५९ ॥ स्वयें श्रीराम कृपामूर्ती । शबरी तरली सुखानुभूतीं । स्वर्गीं जयजयकार करिती । सुमनें वर्षती सुरसिद्ध ॥ ६० ॥ यापरी शबरीउद्धरण । श्रीरामें केलें आपण । एका जनार्दना शरण । जगदुद्धरण श्रीराम ॥ ६१ ॥ शबरीआश्रम अति विश्रांत । राम लक्ष्मण बैसोनि तेथ । वनशोभा स्वयें पहात । तंव अपूर्व तेथ वर्तलें ॥ ६२ ॥ देखोनि मृगशावाक्षिवदनां । सीता आठवली मृगनयना । मदन क्षोभला श्रीरघुनंदना । मनमोहना श्रीरामा ॥ ६३ ॥ श्रीराम नित्य निष्काम । त्यासी क्षोभला अति काम । काम निष्कामआक्रम । कामसंभ्रम अवधारा ॥ ६४ ॥

मां हि शोकसमाक्रान्तं संतापयति मन्मथः ।
हृष्टः प्रवदमानश्च मामाह्वयति कोकिलः ॥ १५ ॥

वसंतें वन शोभायमान । कोकिलांचें पंचम आलापन । ऐकोनियां श्रीरघुनंदन । सकाम संपूर्ण सीतार्थी ॥ ६५ ॥

एष दात्यूहको हृष्टो रम्ये काननिर्झरे ।
प्रणदन्मन्मथाविष्टं शोचयिष्यति लक्ष्मण ॥ १६ ॥

नव्हे हें कोकिळाकूजन । हे मदनाचे दुर्धर बाण । हृदयीं विंधिती दारुण । द्वंद्वें संपूर्ण हा

१ वर्तन. २ कबंध राक्षसानें. ३ फुलांना. ४ उदक. ५ मोठ्या आनंदानें. ६ नाश. ७ त्या शबरीनें. ८ ऐका.

९ जाणें येणें, जन्ममरण. १० हरिणबालकांचे डोळे व मुख. ११ कोकिळेचें ओरडणें. १२ वैर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

करितो ॥ ६६ ॥ लक्ष्मणा करीं गा निवारण । कोकिळा न सांडिती कूजन । माझें नायके हा वचन । रघुनंदन कोपला ॥ ६७ ॥ याचें खुंटो वदतें वचन । यासी पडो दृढ मौन । रागें क्षोभे रघुनंदन । शाप दारुण स्वयें वदला ॥ ६८ ॥ कोकिळा विनवी अति दीन । सर्वेंचि तुष्टला रघुनंदन । वसंतीं तुज मधुर वचन । येऱ्हवीं मौन सर्वदा ॥ ६९ ॥

मां दृष्ट्वैव मृगो याति तं मृगी परिधावति ।
वक्ष्यती वनभीः कामैः कामैरर्धी मृगीरयम् ॥ १७ ॥

लक्ष्मणा माझे सन्मुख दृष्टीं । मृग रमतो मृगीपाठीं । मज काम क्षोभोनि हठी । द्वंद्वदृष्टी हा माझा ॥ ७० ॥ माझ्या मूर्खत्वाच्या गोष्टी । सांगतो मृगीच्या कर्णपुटीं । सीता हारविली गोरटी । मूर्ख सृष्टीं श्रीराम ॥ ७१ ॥ पशु पक्षी काग कपोता । स्त्रीपासोनि नव्हे परता । वनीं सांडोनि गेला सीता । मुख्य मूर्खता श्रीरामीं ॥ ७२ ॥ हातींची हारवोनि सीता । वनीं रडत भोंवतो आतां । श्रीरामाऐसी मूर्खता । मज सर्वथा असेना ॥ ७३ ॥ मी सांडोनि निजकांता । श्रीरामाऐसा न वचें परता । ऐसिया माझ्या निंद्य कथा । मृग सांगतो मृगीपासीं ॥ ७४ ॥ देखोनि मृगाचें मैथुन । श्रीरामें शापिला अति क्षोभून । तुज करितां दारगमन । घायें प्राण जातील ॥ ७५ ॥ ऐकोनि दुर्धर शापोक्ती । मृग श्रीरामा ये काकुळती । सर्वेंचि तुष्टला कृपामूर्ती । शापनिवृत्ति स्वयें वदे ॥ ७६ ॥ घंटापारधीचे रातीं । घायें तुमचे प्राण जाती । येरवीं विचरतां स्त्रियेप्रती । सुखसंभूति स्वानंदें ॥ ७७ ॥ उन्मत्त कामें कामगज । गजीसीं क्रीडे देखोनि मज । मज सीतेची लावोनि लाज । नाचे भोजें स्त्रीसंगें ॥ ७८ ॥ जेंवी मी प्रेमें आश्वासीं सीता । तेंवी तो सोंड ठेवितो गजीचे माथां । मज उपहासितो रघुनाथा । स्त्रीकामता उन्मत्त ॥ ७९ ॥ सीता पुसतां गजासी । कांहीं न बोले श्रीरामासी । गज क्रीडतो निजगजीसीं । तेणें श्रीरामासी कोप आला ॥ ८० ॥ श्रीरामें क्षोभोनि आपण । शाप दिधला दारुण । गजीसीं करितां कामरमण । स्त्रीसंगें प्राण जाईल ॥ ८१ ॥ गजी गज दीन वदन । दोघें प्रार्थिती रघुनंदन । त्यांचेनि वचनें संतोषोन । शापमोचन स्वयें वदला ॥ ८२ ॥ गजीसीं करितां मैथुन । तूं पडसी अचेतन । गजीनें माथां घालितां जीवन । तुझा प्राण वांचेल ॥ ८३ ॥ गजी तुज पुरवील तृण । त्याचें केलिया भक्षण । सातां दिवसां सावधान । वनविहरण तूं करिसी ॥ ८४ ॥ तया नांव गजोपशेज । ऐसें मिरविसील भोजें । ऐकतां सुखी जाला गज । तेणें सहजें सुख जालें ॥ ८५ ॥ अद्यापि गजगजीमैथुन । तेथें हें चालतें विंदान । बाप विनोद श्रीरघुनंदन । विचित्र विंदान करीतसे ॥ ८६ ॥

शिखिनीभिः परिवृतास्त एते मदमूर्च्छिताः ।
मन्मथाभिपरीतस्य मम मन्मथवर्धनाः ॥ १८ ॥
पश्य लक्ष्मण नृत्यंतं मयूरमुपनृत्यति ।
शिखिनी मन्मथार्तैषा भर्तारं गिरिसानुषु ॥ १९ ॥

पाहें पां लक्ष्मणा येथ । मयूरी मयूरसंयुक्त । नृत्य करी मन्मथोन्मत्त । मजही कामार्त करोनी ॥ ८७ ॥ मयूराची निजपत्नी । नाहीं राक्षसीं नेली हिरोनी । म्हणोनि नाचे गिरिकाननीं । वांकुल्या दुरोनि मज दावी ॥ ८८ ॥ म्यां सीता हारविली वनीं । मज दुःखितातें देखोनी । हा नाचतो घेवोनि पत्नी । रामें कोपोनि शापिला ॥ ८९ ॥ मज दुःखितातें देखतां । दोघें नाचती उन्मत्तता । तुज येईल नपुंसकता । अंगसंगता तुम्हां न घडे ॥ ९० ॥ ऐकोनियां शापवचन । मयूर विनवी अति दीन । मयूरीनें धरिले चरण । शापमोचन श्रीराम वदे ॥ ९१ ॥ सीतेचे वियोगें जाण । दुःखी होसी तूं रघुनंदन । आम्हां पक्षियांचा पाड कोण । दुःख दारुण पहावयासी ॥ ९२ ॥ ऐसें ऐकोनि मयूरवचन । श्रीराम जाला सुप्रसन्न । दोघें नृत्यमानें सुखसंपन्न । चक्षुर्वीर्यें पूर्ण सुख तुम्हां ॥ ९३ ॥ पाहें पां लक्ष्मणा विपरीत । काळा कावळा पत्नीसमवेत । मज दुःखिता वांकुल्या दावित । स्वयें क्रीडत पत्नीसीं ॥ ९४ ॥ श्रीराम सीता पुसे काकासी । दोघें न बोलती श्रीरामासीं । श्रीरामें क्षोभोनि आवेशीं । त्या दोघांसी शापिलें ॥ ९५ ॥ जन्मामध्यें एकदां

१ गायनादिकेंकरून मृगांस भुलवून पाशांत घालणारा तो घंटापारधी. षष्ठीचा संबंध घायें या पदाकडे. २ सुखेंकरून. ३ उदक. ४ आनंद. ५ कामविकारानें उन्मत्त होऊन. ६ कावळ्याला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

जाण। तुम्हां दोघां होय मैथुन। पुढतीं न घडे स्त्रीगमन। होती संपूर्ण कागवंध्या ॥ ९६ ॥ अद्यापि कागाच्या कागदेहीं। दुसरा गर्भसंभवं नाहीं। कागवंध्या म्हणती पाहीं। लोकीं तिहीं कागासी ॥ ९७ ॥ श्रीराम चक्रवाकें देखतां नयनीं। एकत्र विचरती पैं दोनी। परतीं नव्हेती अर्धक्षणीं। गमनागमनीं एकत्र ॥ ९८ ॥

एक एव सुखी लोके चक्रवाको विहंगमः।
पश्य दृष्टचा मनोरम्या छाययानुगता प्रिया ॥ २० ॥

या लोकीं सुखें सुखिया। पाहतां दिसे चक्रवाकिया। रूपासवें जैसी छाया। तैसी भार्या अनुगत ॥ ९९ ॥ चक्रवाकीसी सांगे कथा। श्रीरामें हारविली सीता। मी पत्नीसीं नव्हें परता। श्रीराममूर्खता मज नाहीं ॥ १०० ॥ वनीं एकली सांडी कांता। मुख्य मूर्खत्व याचे माथां। हें ज्ञान नाहीं श्रीरघुनाथा। निजमूर्खता विलंपत ॥ १ ॥ श्रीराम मूर्खशिरोमणी। कां गेला निजपत्नी सांडोनी। तिजलागीं अति दुःखी होवोनी। वनोवनीं हिंडत ॥ २ ॥ निजपत्नीसीं क्रीडतां। देखोनियां पुढिलाचिया एकांता। क्षोभ उपजे श्रीरघुनाथा। उपशांतता धरीना ॥ ३ ॥ श्रीराम सीता पुसे त्यांसी। ते न बोलती श्रीरामासीं। वियोग पावाल अहर्निशीं। चक्रवाकांसी शापिलें ॥ ४ ॥ चक्रवाकें तळमळती। दीनें येती काकुळती। आमची अवधारीं विनंती। कृपामूर्ति श्रीरामा ॥ ५ ॥ सीतेची वियोगगती। तुज न साहवे श्रीरघुपती। तो वियोग आम्हांप्रती। कैसिया रीतीं कंठवे ॥ ६ ॥ याहूनि श्रीरघुनाथा। अवश्य करीं आमच्या घाता। तुझेनि हातें मरतां। सुखरूपता आम्हांसी ॥ ७ ॥ सुखें सोसेल अंगभंग। परी न साहवे स्त्रीवियोग। विंनति ऐकतांचि चांग। श्रीराम अव्यंग तुष्टला ॥ ८ ॥ दिवसा दोघां अंगसंगती। वियोग पावाल पैं रातीं। परी वियोगीं योग शब्दसंगतीं। शापनिर्मुक्ति श्रीरामें ॥ ९ ॥ श्रीराम पंपातीरीं। सीताविरहाचे अंतरीं। वदला विचित्र कुसरी। लीलावधारी श्रीराम ॥ ११० ॥ मिथ्या सीतावियोगप्राप्ती। मिथ्याचि ती विरहशक्ती। सत्यत्वें दावी श्रीरघुपती। शापोपहती अनुवादे ॥ ११ ॥ सर्वां भूतीं श्रीराम सद्रूप। मिथ्या वियोग मिथ्या शाप। मिथ्या विरहाचा प्रताप। चित्स्वरूप श्रीराम ॥ १२ ॥ श्रीराम ज्ञानविज्ञानअभिव्यक्ती। श्रीराम निर्विकल्प ब्रह्ममूर्ती। श्रीराम चिन्मात्र दाशरथी। सीतापति परब्रह्म ॥ १३ ॥ सीता ध्येय श्रीराम ध्यान। सीता ज्ञेय श्रीराम ज्ञान। सीता चेतना श्रीराम चैतन्य। दोनी अभिन्न एकत्वें ॥ १४ ॥ श्रीराम चित्स्वरूपस्थिती। वर्णितां शास्त्रें मौनावती। श्रुति परतल्या नेति नेती। माझी वचनोक्ति ते काय ॥ १५ ॥ पुढील कथानुसंधान। येथोनि ऋष्यमूकातें गमन। करावया सुग्रीवासीं सौजन्य। श्रीरघुनंदन उद्यत ॥ १६ ॥

ऋष्यमूको गिरिर्यत्र नातिदूरे प्रकाशते।
यस्मिन् वसति धर्मात्मा सुग्रीवोंऽशुमतः सुतः ॥ २१ ॥

लक्ष्मणा पाहें सावचित्त। हा ऋष्यमूक महापर्वत। येथोनि समीप दिसत। सुशोभित फळीं पुष्पीं ॥ १७ ॥ ऋषींनीं यज्ञयाग केले येथ। यालागीं ऋष्यमूक यातें म्हणत। सुग्रीव वसताहे तेथ। प्रधानयुक्त भयभीत ॥ १८ ॥ वाळिभयें भयभीत। सुग्रीव वसे ऋष्यमूकांत। वाळीस ऋषि शाप देत। नव्हे सामर्थ्य तेथ यावया ॥ १९ ॥ सुग्रीवाची घ्यावया भेटी। तेथोनि निघाला उठाउठीं। वाळिभयाची निवटोनि गोष्टी। देऊं सुखसंतुष्टी सुग्रीवा ॥ १२० ॥ भार्या हरोनि सुंदरी। वाळीनें सुग्रीव गांजिला भारी। श्रीराम गांजिल्यांचा कैवारी। धनुर्धारी कृपाळु ॥ २१ ॥ संपलें आरण्यकांडकोड। किष्किंधाकांड अति गोड। त्या कथेचें सुख सुरवाड। श्रोते वारंवार परिसिती ॥ २२ ॥ पुरवोनि भरताचें कोड। पादुका देवोनि सुरवाड। त्याचें प्रेम वाढवोनि गोड। आरण्यकांड संपविलें ॥ २३ ॥ विराध राक्षस प्रचंड। ज्याचें रावणा भय उदंड। श्रीरामें त्यासी करोनि दुखंड। आरण्यकांड संपविलें ॥ २४ ॥ शरभंगु महामुनि वाडें। भेटी देवोनि केला निवाड। देवोनियां निजसुरवाड। आरण्यकांड संपविलें ॥ २५ ॥ संधा करोनि दुखंड। शूर्पणखेचें नासिकाखंड। सकर्ण विटंबोनि तोंड। आरण्यकांड संपविलें

१दुसरी गर्भोत्पत्ति. २आपल्या स्वतःच्या मूर्खपणानें शोक करतो. ३ परिपूर्ण. ४ चमत्कार, चातुर्य. ५ चैतन्यरूप. ६ ज्ञानमूर्ति. ७ तयार. ८ आनंदपरिपूर्ण. ९ इच्छा. १० मोठा, श्रेष्ठ.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ २६ ॥ पंचवटीं रण वितंड । खरदूषणां छेदोनि मुंडं[1] । त्रिशिराचें ठेंचोनि तोंड । आरण्यकांड संपविलें ॥ २७ ॥ मायामृगें छळितां दृढ । कपटी मारीच मारिला सुदृढ । जाणोनि भविष्याचें वाडें[2] । आरण्यकांड संपविलें ॥२८॥ रावणें जटायु खंडवितंड । दुःखें पसरोनि पाडिला तोंड । श्रीरामें सुखी करोनि अखंड । आरण्यकांड संपविलें ॥ २९ ॥ सीताशुद्धीचें कैवाडें[3] । विलापरूप श्रीराम गोड । पुरवोनि पार्वतीचें कोड । आरण्यकांड संपविलें ॥ १३० ॥ एका जनार्दना शरण । श्रीरामें शबरीउद्धरण । केलें आरण्यकांड संपूर्ण । परिपूर्ण श्रीरामें ॥ ३१ ॥ कबंधाचे छेदोनि बंध । तोही मुक्त केला शुद्ध । एका जनार्दनीं परमानंद । स्वानंदें[4]कंद श्रीराम ॥ ३२ ॥ संपलें आरण्यकांड गोड । पुढें किष्किंधाकांड अति प्रचंड । श्रोते परिसोत निवाड । सुखसुरवाड[5] रामायणीं ॥ ३३ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे आरण्यकांडे एकाकारटीकायां शबरीउद्धरणं नाम त्रयोविंशतितमोऽध्यायः ॥ २३ ॥ ओंव्या ॥ १३३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ २१ ॥ श्रीसीतारामचंद्रार्पणमस्तु ॥

१ शिर. २ स्वरूप. ३ मिष, कैवार. ४ निजानंदाचा केवळ गड्डाच. ५ सुखाचा सुकाळ.

अरण्यकांडं समाप्तम्

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations



श्रीएकनाथ महाराजकृत

श्रीभावार्थरामायण

किष्किंधाकांड

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations



वालिसुग्रीवांचें युद्ध व सुग्रीवाचा किष्किंधाराज्यप्रवेश

ताराविलाप व तिचें रामानें केलेलें सांत्वन.

सुग्रीवाला राज्यतिलक.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

श्रीसद्गुरवे रामचंद्राय नमः ।

श्रीएकनाथ महाराजकृत

श्रीभावार्थरामायण

—*—

किष्किंधाकांड

अध्याय पहिला

श्रीगणाधिपतये नमः ॥

श्रीगुरुभ्यो नमः ॥ श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ॥

आदित्यान्वयसागरे दशरथः स्वातीजलं निर्मलं
कौसल्याजठराख्यशुक्तिपुटके श्रीराममुक्ताफलम् ।
तन्नीलं हृदये हरेण पदकं सम्यग्धृतं सूज्ज्वलं
सच्छत्रं स्मरणेन शंकरसमं प्राप्नोति भाग्यं जनः ॥१॥
सच्चिदानंदरूपाय जनार्दनस्वरूपिणे ।
स्वप्रकाशाय शुद्धाय आचार्याय नमो नमः ॥ २ ॥
मायातीताय नित्याय मायागुणप्रकाशिने ।
व्यक्ताव्यक्तस्वरूपाय आचार्याय नमो नमः ॥ ३ ॥

अरण्यकांड झालें निरूपण । श्रीरामें केलें संपूर्ण । आतां किष्किंधाकांडकथन । श्रीरघुनंदन स्वयें वदवी ॥ १ ॥ माझ्या अंगीं मूर्खपण । त्या मजकरवीं रामायण । श्रीराम वदवी आपण । निग्रहूनि निजबळें ॥ २ ॥ सांडोनि रामकथालेखन । मज करितां गमनागमन । मार्गीं श्रीराम रामायण । स्वयें संपूर्ण प्रकाशी ॥ ३ ॥ करूं बैसतां भोजन । ग्रासोग्रासीं स्मरे रघुनंदन । मागें घालूनि जेवण । राम रामायण स्वयें वदवी ॥४॥ पाहों जातां निजस्वभावीं । श्रीराम रामायण स्वयें वदवी । ओंवीचढीत दाउनी ओंवी । कथा वदवी श्रीराम ॥ ५ ॥ बोलों जातां फुकट काहणी । तेचि रामकथा होय वाणी । वाचा खिळिली[3] रामायणीं । वचनावचनीं श्रीराम ॥ ६ ॥ निजेलों असतां स्वप्नीं पूर्ण । श्रीराम दाखवी रामायण । आपुलें गुह्यनिरूपण । सांगे आपण बोलोनी ॥ ७ ॥ केलें असतां सुषुप्तिशयन[4] । श्रीराम थापटी पाठी आपण । म्हणे लिहीं वेगीं रामायण । वृथा निजोन लाभ कायी ॥ ८ ॥ रामायण लिहावयासाठीं । श्रीरामें पुरविली पाठी । श्रीराम संचरोनि पोटीं । दाटोदाटीं लिहवीत ॥ ९ ॥ मी तंव निजनिद्रा डुल्लत । ग्रंथ लिहविता श्रीरघुनाथ । माझ्या कवित्वाचा इत्यर्थ । कर्ता समर्थ श्रीराम ॥ १० ॥ काय नेणों श्रीरघुनाथा । माझी आवडे मऱ्हाटी कथा । बळात्कारें होय वदविता । न करितां राहों नेदी ॥ ११ ॥ तें पूर्वकथानुसंधान । करूनि शबरीउद्धरण । किष्किंधेसी राम लक्ष्मण । दोघे जण चालिले ॥ १२ ॥

तौ तु दृष्ट्वा महात्मानौ भ्रातरौ रामलक्ष्मणौ ।
वरायुधधरौ वीरौ सुग्रीवः शंकितोऽभवत् ॥ ४ ॥
उद्विग्नहृदयः सर्वा दिशः समवलोयन् ।
न व्यतिष्ठत कस्मिंश्चिद्देशे वानरपुंगवः ॥ ५ ॥
नैव चक्रे मनः स्थातुं वीक्ष्यमाणौ महाबलौ ।
कपेः परमभीतस्य चित्तं व्यवससाद ह ॥ ६ ॥

१ विवरण, कथन. २ भाग पडून. ३ व्याप्त झाली. ४ गाढ निजेंत असतां. ५ त्वरेनें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

क्रमोनियां दुर्धर वन। वीर धीर ते दोघे जण। घेवोनियां धनुष्यबाण। श्रीराम लक्ष्मण पातले ॥ १३ ॥ इंद्रादि देवां हें दुर्गम वन। येथें पायीं आले दोघे जण। सुग्रीव म्हणे आपण। योद्धे दारुण हे दोघे ॥ १४ ॥ आम्हां कैपींतें देखती। मनुष्यें चळचळां कांपती। हे निःशंक आम्हांस-न्मुख येती। दुर्धर शक्ति या दोघां ॥ १५ ॥ मज मारावया जाण। वाळीनें आणिले दोघे जाण। तापसवेषें दोघे जण। मारेकरी पूर्ण हे माझे ॥ १६ ॥ ऐसें बोलोनि प्रधानांप्रती। सुग्रीव भय-भीत चित्तीं। येथील सांडावी शीघ्र वस्ती। शीघ्रगतीं पळावें ॥ १७ ॥

ततः सुग्रीवसचिवा दृष्ट्वा परमधन्विनौ।
जग्मुर्गिरितटात्तस्मादन्यच्छिखरमुत्तमम्॥ ७ ॥
ते क्षिप्रमभिगम्याथ यूथपा यूथपर्षभम्।
हरयो वानरश्रेष्ठं परिवार्योपतस्थिरे ॥ ८ ॥
एवमेकायनगताः प्लवमाना गिरेर्गिरिम्।
प्रकम्पयन्तो वेगेन गिरीणां शिखराणि च ॥ ९ ॥

ऐसें सुग्रीव बोलोन। दृष्टीं देखतां राम लक्ष्मण। वेगीं करोनि उड्डाण। पळे आपण गिरिगव्हँरीं ॥ १८ ॥ सुग्रीवासवें चौघे प्रधान। आणिक वानर लहानसान। अवघे सवेग पला-यमान। वनें उपवनें लंघिती ॥ १९ ॥ एक रिघाले गिरिकंदरीं। एक पळाले पर्वतशिखरीं। श्रीराम देखोनि धनुर्धारी। आँनाना परी वानरां ॥ २० ॥ सबळ वानरांच्या उड्डाणीं। वृक्ष पडती उन्म-ळोनी। पर्वतकडे पडती धरणीं। महापळणी वानरां ॥ २१ ॥ सुग्रीव राजा पैं आपण। गुहेसीं रामभयें बैसोन। तेथें आले चौघे प्रधान। कोण कोण ते ऐका ॥ २२ ॥ नळ नीळ जांबवंत। चौथा प्रधान हनुमंत। जो कां सबळ बळें विख्यात। तो स्वयें पुसत सुग्रीवा ॥ २३ ॥ तूं राजा सबळ सृष्टीं। दोघे मनुष्य देखोनि दृष्टीं। कां पळालासी उठा-उठीं। त्या भयाची गोष्टी मज सांगें ॥ २४ ॥ सुग्रीव म्हणे हें वन दुर्धर। रिघों न शकती सुरा-सुर। येथें पायीं आले दोघे वीर। धनुर्धर महा-बळी ॥ २५ ॥ वेढिलें चीरकृष्णाजिनांबर। तापस-वेषी अति सुंदर। त्यांपासीं कैसे चाप शर। मारेकर वाळीचे ॥ २६ ॥ मज मारावयासाठीं। वाळीनें आणिले हे कपटी। तें भय घेवोनियां पोटीं। उठाउठीं पळालों ॥ २७ ॥ त्यांची होतां आठवण। माझे जावों पाहती प्राण। तेणें भयें पलायमान। हें सत्य जाण हनुमंता ॥ २८ ॥ आणिक एक हनुमंता जाण। वाळीस असे शाप-वचन। ऋष्यमूकपर्वतीं करितां गमन। पावसी मरण निश्चयेंसीं ॥ २९ ॥ म्हणोनि हे साह्यकारी। दोघे आणिले धनुर्धारी। निर्भय येताती देखोनि उदरीं। भय निर्धारीं वाटत ॥ ३० ॥ दोघे वीर देखतां दृष्टीं। धैर्य न धरवे माझ्या पोटीं। बळें सांडवली सृष्टी। उठाउठीं पळालों ॥ ३१ ॥ त्यांची होतां आठवण। जाऊं पाहे माझा प्राण। तेणें भयें पलायमान। सत्यवचन हनुमंता ॥ ३२ ॥ ऐकोनि सुग्रीवाचें वचन। हनुमंत हांसिन्नला आपण। मी मंत्री असतां बळवान। भय कोण तुज राया ॥ ३३ ॥ जरी तूं मज आज्ञा देसी। तरी मी जाईन त्या दोघांपासीं। समूळ आणीन वृत्तांतासी। कोणे कार्यासी येथें आले ॥ ३४ ॥ ऐसें बोलतां हनुमंत। संतोषला वानरनाथ। त्या दोघांचा निजवृत्तांत। मज साद्यंत सांगावा ॥ ३५ ॥ दोघे धनुर्वाडे संपूर्ण। तुज मारितील विंधोन बाण। आपला वांचवोनियां प्राण। वृत्तांत संपूर्ण आणावा ॥ ३६ ॥ ते तूं म्हणसी साधारण। महायोद्धे अति निपुण। त्यांची ऐकिली म्यां आंगवण। साव-धान अवधारीं ॥ ३७ ॥ ताटका सुबाहु मारिले पूर्ण। मारीच मारिला विंधोनि बाण। त्रिशिरा आणि खर दूषण। घेतला प्राण विराधाचा ॥ ३८ ॥ तिंहीं मिळोनि दोघीं जणीं। कबंध मारिला अर्धक्षणीं। मी पळालों त्यांसी देखोनी। दुर्धर दोनी महावीर ॥ ३९ ॥ यालागीं त्यांपासीं जातां। सावधान असावें हनुमंता। वांचवोनियां निजजीविता। त्यांच्या वृत्तांता आणावें ॥ ४० ॥ आज्ञा देतां सुग्रीव वीर। हनुमंत निघाला सत्वर। पुढें देखतां श्रीरामचंद्र। झालें विचित्र तें ऐका ॥ ४१ ॥ जन्मतां अंजनीच्या पोटीं। हनुमंताची सबळ पुष्टी। नव्हतां श्रीरामासीं भेटी। करील

१ चालून जाऊन. २ वानरांना. ३ पर्वताच्या गुहेंत. ४ वेगवेगळ्या तऱ्हा, रीति. ५ उपळून. ६ ताबडतोब. ७ साह्यकारी, मदतनीस. ८ सुग्रीव.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सृष्टीं अनन्य ॥ ४२ ॥ हनुमंताची सबळता । देखोनि ब्रह्मया अति चिंता । तेणें युक्ति केली स्वतां । तेही व्यवस्था अवधारा ॥ ४३ ॥ वानरभ्रमाचिये भ्रांतीं । ब्रह्मा लोपी हनुमंतशक्ती । भेटतां श्रीरामाची मूर्ती । निजबळप्राप्ती पावेल हा ॥ ४४ ॥ ऐसें ब्रह्मयाचें वचन । मिथ्या नव्हे अणुप्रमाण । देखतांचि श्रीरघुनंदन । बळवाहन हनुमंत ॥ ४५ ॥ देखतांचि श्रीराममूर्ती । हनुमान पावला सबळ शक्ती । एकला नाटोपे त्रिजगतीं । हे प्रतीति पावला ॥ ४६ ॥ करितां सुग्रीवाचा कार्यार्थ । दृष्टीं देखतां श्रीरघुनाथ । हनुमान पावला पुरुषार्थ । समर्थता निजशक्ति ॥ ४७ ॥ स्वामी मानूं सुग्रीव वीर । तंव तो भ्याड पालेखाइर । माझा स्वामी कोण साचार । पुसे निर्धार अंजनीसी ॥ ४८ ॥ तुझे गर्भीची निजलंगोटी । नैष्ठिक ब्रह्मचर्याची कांसोटी । जो देखेल निजदृष्टीं । तो तुज सृष्टीं निजस्वामी ॥ ४९ ॥

मातुर्वाक्यं तु विज्ञाय हनूमान् मारुतात्मजः ।
पर्वतान्मलयात्तूर्णं पुप्लुवे यत्र राघवौ ॥ १० ॥

ऐकोनि मातेचें वचन । हनुमंतें करोनि उड्डाण । शीघ्र आला आपण । राम लक्ष्मण जे ठायीं ॥ ५० ॥ दोघे बंधु धनुर्धारी । शीतळ छाया तरुवरीं । श्रीराम लक्ष्मणाचे मांडीवरी । निद्रा करी स्वभावें ॥ ५१ ॥ त्याचि वृक्षावरी हनुमंत । येवोनि बैसलासे गुप्त । दोघांचें पहावया चरित्र । दिसे अतर्क्य तिष्ठत ॥ ५२ ॥ श्रीराम आश्चर्यें सांगे गोष्टी । लक्ष्मणा पाहें ऊर्ध्वदृष्टीं । वानरा ब्रह्मचर्यकांसोटी । सगर्भ पोटीं आभासे ॥ ५३ ॥ ऐकोनि श्रीरामवचन । हनुमान जाला हास्यवदन । दोघे मानव दुःखी दीन । स्वामी संपूर्ण केंवी मानूं ॥ ५४ ॥ सेवक सबळ स्वामी निर्बळ । तें स्वामित्व समूळ विकळ । तरी त्यांचे आंगीं किती बळ । पाहों परीक्षा अनुमानें ॥ ५५ ॥ माझ्या स्वामित्वाच्या अर्था । पाहों याचिया पुरुषार्था । शालवृक्ष घेवोनि हाता । आला रघुनाथासन्मुख ॥ ५६ ॥ देखतां श्रीरामाचे चरण । अजरामर मी आपण । आठवलें पूर्वस्मरण । जन्ममरण मज नाहीं ॥ ५७ ॥ श्रीराम देखतांचि दृष्टीं । हनुमंतासी आनंदकोटी । पुसावया वृत्तांतगोष्टी । हर्षे पोटीं न समाये ॥ ५८ ॥ तुम्ही दोघे कैंचे कोण । येथें यावया काय कारण । समूळ न सांगतां जाण । घायें प्राण घेईन ॥ ५९ ॥ हनुमंतप्रश्नाचा आक्रम । वरीवरी कोप अंतरीं प्रेम । हें जाणोनि रघूत्तम । निजानुक्रम सांगत ॥ ६० ॥ मी दाशरथी रघुनंदन । धाकुटा बंधु हा लक्ष्मण । सीता माझी भार्या जाण । वनाभिगमन पितृवाक्यें ॥ ६१ ॥ शून्याश्रमीं पंचवटीं । रावणें हरिली सीता गोरटी । त्या सीतेच्या शुद्धीसाठीं । उठाउठीं येथ आलों ॥ ६२ ॥ ऐसें बोलतां श्रीरघुनाथ । सर्वांगीं उल्लासे हनुमंत । दोहींचा कळला वृत्तांत । यांचा पुरुषार्थ पाहों पां ॥ ६३ ॥ वीर्य धैर्य शौर्य बळ । कोण वांटीव कैसें शीळ । हेंही शोधावया सकळ । कलहो प्रबळ मांडिला ॥ ६४ ॥ लक्षोनियां रघुकुळटिळक । वानरें देवोनियां विकट हांक । शालवृक्ष सोडिला देख । अति सन्मुख सक्रोध ॥ ६५ ॥ तंव लक्ष्मण सवेग उठी । धनुष्यबाण सज्जोनि मुष्टी । वानर देखतां सबळ सृष्टीं । कडकडाटीं लोटला ॥ ६६ ॥ शयनींचा नुठेचि रघुनंदन । उठों नेदितांचि लक्ष्मण । निजेलिया विंधोनि बाण । केला शतचूर्ण शालवृक्ष ॥ ६७ ॥ मग हनुमंत कोपेंकरीं । हाणी शतानुशत तरुवरीं । निजल्या विंधोनि शरधारीं । क्षणामाझारी छेदिले ॥ ६८ ॥ मग क्रोधें चालला पंचपर्वती । एक पुच्छीं दोनी दो हातीं । दोनी दोहीं स्कंधांप्रती । बळें मारुति हाणीत ॥ ६९ ॥ बाप धनुर्वाडा रघुनंदन । निद्रा न सांडी विंधितां बाण । पांचही पर्वत केले चूर्ण । बळिया संपूर्ण श्रीराम ॥ ७० ॥ श्रीराम मारील बाणेंसीं । हा धाक नाहीं हनुमंतासी । हनुमंत मारील आम्हांसी । हेंही श्रीरामासी भय नाहीं ॥ ७१ ॥ छेदोनि पांचही गिरिवरां । बाणपिसाऱ्याचा सुटला वारा । हनुमंत उडविला अंबरा । गरगरां परिभ्रमे ॥ ७२ ॥ वाहाटुळीमाजी भ्रमे तृण । तैसा परिभ्रमे

१ अनुभव. २ कार्यभाग. ३ पाला खाणारा. ४ कडकडीत ब्रह्मचर्य हीच कांसोटी. ५ दिसते. ६ बळवान्. ७ व्यर्थ. ८ आपली हकीकत. ९ शोधार्थ. १० धैर्य. ११ स्वभाव. १२ भयंकर. १३ मोठ्या पर्वतांना. १४ भोंवूं लागला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

हनुमान जाण । कांहीं न चले आंगवण । जाल्या क्षीण सर्व शक्ती ॥ ७३ ॥ वेंगडे वळले पाय हांत । पुच्छ घातलें पायांआंत । वानरें विचकिले दांत । तंव पिता वायु तेथ पावला ॥ ७४ ॥ म्हणे सावधान पाहें हनुमंता । तुझिया संग्रामआघाता । निद्रा न मोडोनी श्रीरघुनाथा । वृक्षपर्वतां छेदिलें ॥ ७५ ॥ त्रैलोक्यराजा श्रीरघुनाथ । याचा नको पाहों पुरुषार्थ । त्रैलोक्याचा करूं शके घात । निमेषार्धांत क्षोभोनी ॥७६॥ त्यासी तुवां सर्वस्वें आपण । अनन्यभावें रिघावें शरण । श्रीरामसेवेसी विकावा प्राण । स्वामी संपूर्ण श्रीराम ॥ ७७ ॥ ऐकोनि पित्या वायूचें वचन । हनुमंत घाली लोटांगण । श्रीरामासी अनन्य शरण । दास संपूर्ण मी तुझा ॥ ७८ ॥ अंतर्यामीं रघुनाथा । जाणसी माझे मनोगता । तुझें स्वामित्व पहावया तत्त्वतां । केला अनुचित संग्राम ॥ ७९ ॥ ऐसी माझी अपराधता । क्षमा करावी श्रीरघुनाथा । म्हणोनि चरणीं ठेविला माथा । शरणागता नुपेक्षीं ॥ ८० ॥ सौमित्र म्हणे रघुनाथा । वीर धीर झुंजार पुरता । सर्वेचि चरणीं ठेवितो माथा । नये सर्वथा विश्वासों ॥ ८१ ॥ रावणें दावोनि विश्वासासी । जैसें छेदिलें जटायूसी । तैसेंचि हा करील आम्हांसी । नये वानरासीं विश्वासों ॥ ८२ ॥ निधडा प्रतापी तूं रघुवीरा । छेदिले पंच पर्वत तरुवरां । एऱ्हवीं हा आमुचा करिता चुरा । नये वानरा विश्वासों ॥ ८३ ॥ श्रीराम म्हणे सौमित्रासी । तूं तंव यासी नोळखिसी । एकपिंडत्व यासी आम्हांसीं । हा अति विश्वासी निजसखा ॥ ८४ ॥ एकपिंडत्व हनुमंता । तेचिविषयीं पूर्वकथा । तुज सांगेन मी आतां । सावधानता अवधारीं ॥ ८५ ॥ मज चित्रकूटीं असतां । तुज भरतासीं युद्ध करितां । म्यां सांगितली होती कथा । ऐक मागुती सांगेन ॥ ८६ ॥ पुत्रेष्टियागीं यज्ञपुरुषीं । प्रसादताट दिधलें रायासी । त्रिविध भाग करितां त्यासी । तिघी राणियांसी दीधले ॥ ८७ ॥ पूर्वशापाचे उद्धारीं । कैकेयीचा भाग नेला घारीं । तेणें ते तळमळी भारी । उरले उरी दोन भाग ॥ ८८ ॥ कौसल्या येवोनि कैकेयीपासीं । सुमित्राही निजकृपेसीं । अर्ध विभाग दिधला तिसी । तेणें तियेसी सुख झालें ॥ ८९ ॥ ते हे आम्ही चौघे जण । एकपिंडी पैं संपूर्ण । श्रीराम भरत लक्ष्मण । आणि शत्रुघ्न समवेत ॥ ९० ॥ कैकेयीभाग घारी प्राशित । तीस अंजनीजन्म प्राप्त । यज्ञविभाग तिच्या उदरांत । राहिला निश्चित यज्ञपुरुष ॥ ९१ ॥ यज्ञपुरुषाचा निजप्राण । तिसीं विचरला संपूर्ण । तेंचि तिसी गर्भधारण । वायुनंदन हनुमंत ॥ ९२ ॥ विचारितां पैं अंतरीं । अंजनीभ्रतार केसरी । यज्ञपुरुषप्राणेंकरीं । जन्म धरी हनुमंत ॥ ९३ ॥ राम लक्ष्मण शत्रुघ्न भरत । अर्धार्धपिंड आम्हां समस्त । सगळया पिंडाचा हनुमंत । बळें समर्थ आतुर्बळी ॥ ९४ ॥ आम्हांसी आणि हनुमंता । समूळ मूळीं एकात्मता । नाहीं भिन्नत्वाची कथा । जाण तत्त्वतां सौमित्रा ॥ ९५ ॥ ऐकतांचि श्रीरामवचन । हनुमंतासी आल्हाद पूर्ण । स्वेदँ रोमांच आलें रुदन । श्रीरामचरण वंदिले ॥ ९६ ॥ तुटली भिन्नत्वाची गोष्टी । सुटलें मौन पडली मिठी । ऐक्याची पडली गांठी । घडली दाटी क्षेमाची ॥ ९७ ॥ गंगा यमुना सरस्वती । तिन्ही मिळोनि एक भागीरथी । श्रीराम लक्ष्मण आणि मारुती । ऐक्यानुवृत्ति चिन्मात्रें ॥ ९८ ॥ नाना सरितांचे संभार । मिळणीं मिळतां होती समुद्र । तेंवी मारुति आणि सौमित्र । जाले चिन्मात्र श्रीरामें ॥ ९९ ॥ एका विनवी जनार्दन । तिघां जालें समाधान । स्वामी समर्थ श्रीरघुनंदन । दोघे जण सेवक ॥ १०० ॥ गूळ गोडी नांवाची भिन्नता । पाहतां स्वरूप एक एकात्मता । तेंवी लक्ष्मणा हनुमंता । सेवकता श्रीरामीं ॥ १ ॥ पिंडभागव्यवस्था । हे शिवरामायणींची कथा । वृथानुवाद न म्हणिजे श्रोतां । पहावें त्या ग्रंथा विचारुनी ॥ २ ॥ ऐकोनि खुणाविलें श्रोतां । वदनीं श्रीराम वदवी कथा । झाडा चुकूं नको आतां । पुढील कथानुवादें ॥ ३ ॥ आधींच रम्य रामायणकथा । त्याहीवरी तूं रसाळ वक्ता । भाग्य आलें श्रवणाच्या पंथा । कथा ऐकतां स्वानंद ॥ ४ ॥ शतकोटि रामायण । त्या ग्रंथाचें जालें खंडन ।

१ बळ. २ हातपाय वळूं लागले. ३ एकनिष्ठतेनें. ४ मारिलें. ५ शिल्लक. ६ वायुपुत्र (मारुति). ७ घाम. ८ शहारे. ९ नद्यांचे. १० समुदाय. ११ व्यर्थ बडबड.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

त्याची जालीं दहा रामायणें । युगभेद जाण ग्रंथाचे ॥ ५ ॥ एका जनार्दना शरण । जालें हनुमंतदर्शन । विरोधबोधें समाधान । सुख संपूर्ण तिघांसी ॥ ६ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे किष्किंधाकांडे एकाकारटीकायां हनुमद्दर्शनं नाम प्रथमोऽध्यायः ॥ १ ॥ ओंव्या ॥ १०६ ॥ श्लोक ॥ १० ॥

अध्याय दुसरा

श्रीरामचंद्राय नमः ॥ श्रीरामहनुमंतांसी भेटी । दोघां आनंद कोट्यनुकोटी । पुढें हनुमंतें केल्या गोष्टी । ते कथाकसवटी अवधारा ॥ १ ॥

दूतोऽहं प्रेषितस्तेन सुग्रीवेण महात्मना ।
राजा वानरमुख्यानां हनूमान्नाम वानरः ॥ १ ॥
युवाभ्यां स हि धर्मात्मा सुग्रीवः सख्यमिच्छति ।
तस्य मां सचिवं विद्धि वानरं पवनात्मजम् ॥ २ ॥

हनुमंत सांगे श्रीरामासी । मज सुग्रीवें तुम्हांपासीं । धाडिलें पहावया वृत्तांतासी । सख्य तुम्हांसीं करावया ॥ २ ॥ देवदैत्यदानवांसी । रिघु नव्हे या वनासी । तेथें येतां तुम्हां मानवांसी । वानरांसी विस्मयो ॥ ३ ॥ धीर वीर गंभीरता । तुम्हां दोघां देखोनि येतां । भयें आश्चर्य सुग्रीवाच्या चित्ता । निःशंकता देखोनी ॥ ४ ॥ हृतदार हृतस्वार्थ । सुग्रीव वाळिभयें भीत । तुमचा इच्छितो साह्यार्थ । मज तदर्थ धाडिलें ॥ ५ ॥ तुम्ही निःशंक निधडे वीर । वाळिभयार्थी साहाकार । तुम्हांसीं करावया मित्राचार । पुसों साचार मी आलों ॥ ६ ॥ सुग्रीव तूं कोण म्हणसी । वानरस्वामित्व सुग्रीवासी । माझा विश्वास तयासी । माझें त्यापासीं प्राधान्य ॥ ७ ॥ अत्यादरें अतिशयेंसीं । माझा विश्वास सुग्रीवासी । मैत्री वांछितो तुम्हांसीं । अभय त्यासी देईं स्वामी ॥ ८ ॥ मी तंव केवळ तुझें निजबाळक । वानरसैन्येंसीं देख । सुग्रीव होऊं पाहे सेवक । कृपा आवश्यक करीं रामा ॥ ९ ॥

श्रुत्वा हनूमतो वाक्यं रामो लक्ष्मणमब्रवीत् ।
प्रहृष्टवदनः श्रीमान्भ्रातरं पार्श्वतः स्थितम् ॥ ३ ॥
सचिवोऽयं कपींद्रस्य सुग्रीवस्य महात्मनः ।
तमेव कांक्षमाणस्य ममांतिकमिहागतः ॥ ४ ॥

ऐकोनि हनुमंताचें वचन । संतोषला श्रीरघुनंदन । कार्यसिद्धीचें लक्षण । सांगे आपण सौमित्रा ॥ १० ॥ आम्ही ऐक्य वांछूं सुग्रीवासीं । तंव तेणेंचि धाडिलें प्रधानासी । तोही अति आप्त आम्हांसी । अतिशयेंसीं जिवलग ॥ ११ ॥ येथें आलिया हनुमंता । आम्हांसी शिणणें न लगे आतां । सुलभत्वें प्राप्त होईल सीता । जाण तत्त्वतां सौमित्रा ॥ १२ ॥ श्रीराम म्हणे हनुमंतासी । जें जें तूं कांहीं सांगसी । तें तें करीन निश्चयेंसीं । तुझिया वचनासी नुलंघीं ॥ १३ ॥ तुवां सांगितलें मजपासीं । तरी एके बाणें वधीन वाळीसी । सदार राज्य सुग्रीवासी । निमेषार्धेंसीं मी देईन ॥ १४ ॥ वाळी सुग्रीव हे दोघे जण । कैंचे कोणाचे हे कोण । यांचें समूळ कथन । मज संपूर्ण सांगावें ॥ १५ ॥

श्रीराम उवाच—

यच्छ्रुतं वै ऋक्षराजो वालिसुग्रीवयोः पिता ।
जननी का तयोरेव न त्वया परिकीर्तिता ॥ ५ ॥

श्रीराम म्हणे हनुमंता । वालिसुग्रीवांचा पिता । ऋक्षराज ऐसी ऐकिली कथा । त्यांची माता ते कोण ॥ १६ ॥ वानरांचें सकळ सैन्य । कोणें केलें यांचे अधीन । या दोघांचें समूळ कथन । विवंचून मज सांगें ॥ १७ ॥ यांचें कोण पूर्वभवन । यांसी कैसेनि प्राप्त हें स्थान । किष्किंधेचें राज्याभिषेचन । देता कोण पैं यांसी ॥ १८ ॥

हनूमानुवाच—

शृणु राम कथामेतां मया पृष्टः सकौतुकम् ।
कथयामास धर्मात्मा महर्षिः श्रूयतामिति ॥ ६ ॥
सुखमास्ते यदा देवः पद्मयोनिश्चतुर्मुखः ।
योगमभ्यसतस्तस्य नेत्रेभ्यो यद्रसोऽस्रवत् ॥ ७ ॥
तद्गृहीतं भगवता पाणिना चाविंतुं ततः ।
निक्षिप्तमात्रं तद्भूमौ ब्रह्मणा लोककर्तृणा ॥ ८ ॥
तस्मिन्प्रस्रवणे राम वानरः संबभूव ह ।
समाश्वास्य प्रियैर्वाक्यैरुक्तः किल महात्मना ॥ ९ ॥

---

१ स्त्री हिरावून नेली आहे असा. २ द्रव्य हिरावून नेलें आहे असा. ३ त्याकरितां, ४ पराक्रमी, ५ प्रधानपणा, ६ स्त्रीसह. ७ स्वाधीन. ८ विस्तारानें. ९ पूर्वीचें ठिकाण.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

हनुमंत म्हणे श्रीरघुनाथा। वालिसुग्रीवजन्मवार्ता। अगस्तिमुखें ऐकिली कथा। ते तुज आतां सांगेन ॥ १९ ॥ ब्रह्मयाच्या नेत्रांमधून जाण। वानराचें जन्मस्थान। तेंही समूळीं कथन। सावधान अवधारीं ॥ २० ॥ ब्रह्मा निजात्मयोगासनीं। बैसला असतां आत्मचिंतनीं। आनंदाश्रु स्रवतां नेत्रींहूनी। करीं धरोनी टाकिलें ॥ २१ ॥ नेत्रजळ सांडितां धरणीं[1]। वानर जन्मला तत्क्षणीं। ब्रह्मा माता पिता दोन्ही। यालागुनी प्रतिपाळी ॥ २२ ॥ तो ब्रह्मयाचा पढियंता[2]। लडिवाळ आवडता। निजशेजारीं निजविता। प्रतिपाळिता फळें मूळें ॥ २३ ॥ ब्रह्मयाच्या आसनापासीं। नृत्य करी विनोदेंसीं। नृत्यांगना गोवोनि पुसीं[3]। थाकांसरिसीं[4] त्यां पाडी ॥ २४ ॥ उडोनि बैसे ऋषिशिरांसी। वांकुल्या दावी सुरवरांसी। तंव तंव आनंद ब्रह्मयासी। वानरेंसीं अति प्रीती ॥ २५ ॥ जैसें पोटींचें लेंडिवाळ[5]। तैसें तयाचें पुरवी कोड। त्याचा विनोद वाटे गोड। कवतुकें चाड तयाची ॥ २६ ॥ ऋक्षराज ठेवोनि नांव। ब्रह्मा प्रतिपाळी वैभव। कांहींएक वर्तलें लाघव। अति अपूर्व ऐका स्वामी ॥ २७ ॥ वनीं विंचरोनि[6] अहर्निशीं। वानर नित्य ये ब्रह्मयापासीं। यूंका काढी दाढीमिशांसीं। चहूं मुखांसी चुंबोनी ॥ २८ ॥ तो वानरू एके दिवशीं। दूरी गेला वनवासासी। सांडोनियां सत्यलोकासी। गिरिकैलासीं परिभ्रमे ॥ २९ ॥ कैलासगिरिबाह्यप्रदेशीं। उमाशाप बद्ध सरोवरासी। स्नान घडलें तयासी। स्त्रीत्व त्यासी पैं आलें ॥ ३० ॥ निर्मळ जळीं उमावनीं। शिव आणि स्वयें भवानी। नग्न क्रीडा करिती दोनी। उल्लासोनी स्वानंदें ॥ ३१ ॥ तंव तीर्थनिमित्त स्नानासी। तेथें आले सप्तऋषी। देखोनि उमा लाजली त्यांसी। दोघें जळवासीं गुप्त जालीं ॥ ३२ ॥ उमा क्षोभोनि बोलिली वचन। सदाशिव करोनि भिन्न। जो नर येथें करील स्नान। स्त्रीत्व पूर्ण तो पावेल ॥ ३३ ॥ शाप ऐकतां दारुण। न करितां पैं आचमन। ऋषीश्वर पलायमान। शापबंधन सरोवरा ॥ ३४ ॥

कस्यचित्त्वथ कालस्य समतीतस्य वानरः।
चलत्केसरमात्मानं कृत्वा तस्य तटे स्थितः ॥ १० ॥
ददर्श तस्मिन्सरसि वक्त्रच्छायामथात्मनः।
कोऽयमस्मिन्मम रिपुर्वर्ततेऽन्तर्जले महान् ॥ ११ ॥
तदस्य दुष्टभावस्य करिष्यामि विनिग्रहम्।
आत्मानं पातयामास तस्मिन्वानरसत्तमः ॥ १२ ॥
उत्प्लुत्य तस्मात्सरस उत्थितः प्लवगः पुनः।
तस्मिन्नेव क्षणे राम स्त्रीत्वं प्राप स वानरः ॥ १३ ॥

तेणें वानरें आपणासी। शृंगारोनि नाना सुमनांसीं। येतां सरोवराच्या पासीं। प्रतिरूपासी देखिलें ॥ ३५ ॥ वांकुल्या दावितां तयासी। मारूं धांवतां आवेशीं। तेंही येतां मारावयासी। धांवे आवेशीं पैं स्वयें ॥ ३६ ॥ म्हणे हा मुख्य माझा वैरी। राहिलासे जळाभीतरीं। हांक फोडितो मजवरी। याची बोहंरी मी करीन ॥ ३७ ॥ निजबळाचिया महाथोरीं। साटोपू धरूनियां शरीरीं। उडोनियां गगनोदरीं। उडी सरोवरीं घातली ॥ ३८ ॥ क्रोधाचिया क्रोधदर्पीं। आंवळोनियां वज्रमुष्टी। पुच्छा वळोनियां वेंटी। उठाउठीं उडी घाली ॥ ३९ ॥ सरोवरीं उडी घालितां। वैरी नाडळेचि[9] पैं हाता। सवेग रागें बाहेर येतां। निजपुंरुषार्था[10] मुकला ॥ ४० ॥ लोपला निजपुरुषत्वाचा भावो। कुचादि योनि स्त्रीअवयवो। स्त्रीकटाक्ष हावभावो। जाला अपूर्व स्त्रीदेही ॥ ४१ ॥ अति सुंदर कमनीय[11] कांता। तिसीं कामें भुलला सविता। कामें इंद्र भुलला तिसी देखतां। स्त्रीकामता संभोग ॥ ४२ ॥

युगपत्सा तदा दृष्टा देवाभ्यां सुरसुंदरी।
कंदर्पवशगौ तौ तु दृष्ट्वा तां संबभूवतुः ॥ १४ ॥
अमोघरेतः शक्रस्य सुरेशस्य महात्मनः।
वालेषु पतितं तेन वाली नाम्ना बभूव सः ॥ १५ ॥
भास्करेणापि तस्यां वै कंदर्पवशवर्तिना।
बीजं निषिक्तं ग्रीवायां विधानमनुवर्तिना ॥ १६ ॥
ग्रीवायां पतिते बीजे सुग्रीवः समजायत।
एवमुत्पाद्य तौ वीरौ वानरेंद्रौ महाबलौ ॥ १७ ॥

१ पृथ्वीवर. २ आवडता. ३ शेंपटामध्यें. ४ तालाबरोबर. ५ लाडकें लेंकरूं. ६ फिरून, ७ उवा, ८ पार्वतीचा शाप. ९ नाश. १० पुरुषत्वाला. ११ सुंदर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वानर ऋक्षराजासी जाण। अंगीं स्त्रीत्व बाणलें संपूर्ण। तरी स्त्रीत्वाची आठवण। सर्वथा आपण स्मरेना॥ ४३॥ त्यासी देखोनि अति सुंदर। शक्र सूर्य दोन्ही देवेंद्र। धांविन्नले कामातुर। पळे भयें-करीं ऋक्षराज ॥ ४४॥ भयें सांगावया ब्रह्मया-जवळी। वानरी सवेग पळे भूतळीं। शक्र सूर्य कामसमेळीं। अंतराळीं धांविन्नले॥ ४५॥ नव्हतां तिच्या संभोगासीं। स्त्रीकामाच्या अति आवेशीं। वीर्यस्खलन जालें दोघांसी। समकाळेंसीं समवेत॥ ४६॥ संस्कृतभाषेमाजी विख्यात। केशां नांव वाल म्हणत। इंद्रवीर्य पडलें तेथ। वालाग्रांत अमोघें॥ ४७॥ वानरमस्तकीं महाबळी। जन्म पावलासे वालसमेळीं। यालागीं नांव ठेविलें वाळी। आतुर्बळी वानर॥ ४८॥ काय पडिलें मस्तकावरी। वरतें पाहे जंव वानरी। सूर्यवीर्य कंठावरी। ग्रीवांतरीं पडों सरलें॥ ४९॥ ग्रीवेमा-जी जन्मसंभव। यालागीं नांवें तो सुग्रीव। दोहीं बंधूंचें जन्मलाघव। अति अपूर्व परिसिलें॥ ५०॥ ऋक्षराज स्त्रीवेषेंसीं। सपुत्र आला ब्रह्मयापासीं। देखोनि त्याचिया रूपासी। ब्रह्मा मानसीं विस्मित॥ ५१॥ ब्रह्मा म्हणे अति सुंदर। दुष्ट-कर्मी देव अति दुर्धर। न म्हणती पात्रापात्र। करिती व्यभिचार वेश्येसीं॥ ५२॥ इसी देखोनि अति सुंदर। अमोघवीर्याचा व्यभिचार। जो तो रमेल सुरवर। होईल जोजार पोरांचा॥ ५३॥ मजपासोनि जन्म यासी। स्त्रीत्व पावला मूर्ख-त्वेंसीं। शापमुक्त करावयासी। कैलासासी निघाला॥ ५४॥ ब्रह्मा विनवी पार्वतीसी। शापमुक्त करीं ऋक्षराजासी। येरी पुसोनि सदाशिवासी। केलें वानरासी निर्मुक्त॥ ५५॥ सांडोनि भ्रमभुजंगभार। जेंवी सर्प रूपें होय दोर। तेंवी सांडोनि स्त्रीआकार। जाला वानर ऋक्षराज॥ ५६॥ स्वप्नीं ब्राह्मण होता अंत्यज। जागा होतां म्हणे मी द्विज। तेंवी सांडोनि स्त्रीत्वपुंज। जाला ऋक्षराज वानर॥ ५७॥ अगाध संतांची संगती। सवेग वानरा शापमुक्ती। सुखी झाला प्रजापती। सुखात्मस्थिति ऋक्षराजा॥ ५८॥ आतुर्बळी वानरमूर्ती। देखोनियां पुत्रसंतती। शक्र सूर्य सुखावती। संतुष्टती निजपुत्रां॥ ५९॥

दत्वा तु कांचनीं मालां वानरेंद्रस्य वालिनः।
अक्षयां गुणसंपूर्णां शक्रस्तु त्रिदिवं गतः॥ १८॥
सूर्योऽपि स्वसुतस्यास्य निरूप्य पवनात्मजम्।
कृतेषु व्यवसायेषु जगाम सवितांबरम्॥ १९॥

देखोनि वाळीच्या निजबळा। इंद्रासी पुत्रसुखाचा सोहळा। कंठीं निजकनकाची माळा। घातली गळां वाळीचिया॥ ६०॥ हे माळा कंठीं असतां। कृतांतासीं युद्ध करितां। श्रम नव्हे त्या वर्षें शत झुंजतां। निराहारता निरुदकीं॥ ६१॥ दुंदुभीपाठीं लागतां बळी। निराहारी निरुदकी युद्धकाळीं। कांहीं श्रमी नव्हेचि वाळी। तैं हे जवळी माळा होती॥ ६२॥ हे माळ असतां कंठेंसीं। युद्ध करितां महाबळियासीं। कदा अपजयो नव्हे त्यासी। वरदमाळेसीं सदा विजयी॥ ६३॥ वाळी सुग्रीव समानबळी। माळाबळें अधिक वाळी। युद्ध करितां रणकल्लोळीं। सुग्रीवासी तळीं सदा आणी॥ ६४॥ स्वयें युद्ध करितां देख। माळा शत्रूसी अति अतर्क्य। जो जो युद्धा ये सन्मुख। तो तो विमुख होय वरदमाळे॥ ६५॥ कैंची माळा इंद्रासीं। वधूं जातां वृत्रासुरासी। कश्यपें दिधली सामर्थ्यैंसीं। निजविजयार्थासी सुरेंद्रा॥ ६६॥ कश्यपसामर्थ्याची माळा। इंद्रें घातली वाळीच्या गळां। तेणें त्यासी प्रताप आगळा। कळिकाळा नावरे॥ ६७॥ इंद्रें देवोनि माळेसी। सामर्थ्य दिधलें वाळीसी। तैसेंचि सूर्यें सुग्रीवासी। हनुमंतासी निरविलें॥ ६८॥ हनुमंताच्या सामर्थ्यासी। प्रतीति आहे स्वयें सूर्यासी। बाळपणीं आला गिळावयासी। स्वयें राहूसी पळवूनी॥ ६९॥ ऐसें जाणूनि हनुमंतासी। सूर्यें निरविलें सुग्रीवासी। तुझेनि कीर्ति होईल यासी। श्रीरामासीं सख्यत्वें॥ ७०॥ हनुमंत होईल श्रीरामभक्त। सुग्रीव त्याचेनि सनाथ। ऐसा जाणोनि भविष्यार्थ। सुग्रीवा निरवीत हनुमंता॥ ७१॥ निजमाळा देवोनि वाळीसी। इंद्र गेला निजधामासी। सुग्रीवा निरवोनि हनुमंतासी। सूर्य गगनासी पैं गेला॥ ७२॥ शक्रसूर्य गेले दोन्ही। ऋक्षराजा

१ कामातुर होऊन. २ व्यर्थ न जाणारें. ३ मानेमध्यें. ४ योग्यायोग्य. ५ महार. ६ स्त्रीस्वरूप. ७ पराक्रमी. ८ आनंद.

९ आहारावांचून असतांही. १० मोठा जय प्राप्त व्हावा म्हणून. ११ स्वाधीन केलें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

पुत्र दोन्ही । स्वयें ब्रह्मयानें आश्वासोनी । राजधानी त्यां देत ॥ ७३ ॥

दृष्ट्वार्क्षरराजं स्वं पुत्रं ब्रह्मा लोकपितामहः ।
सांत्वयित्वा ततः पश्चाद्देवदूतं समादिशत् ॥ २० ॥
गच्छ मद्वचनाद्दूत किष्किधां नाम वै शुभाम् ।
विश्वकर्मकृतां दिव्याममतियोग्यां च शोभनाम् ॥ २१ ॥
अभिषिंचय राजानमारोप्य महदासने ।
दृष्टमात्राश्च ते सर्वे वानराणां चमूपतिः ॥ २२ ॥
ऋक्षराजस्य साह्यार्थं भविष्यति वशानुगः ॥ २३ ॥

ऋक्षराजासी पिता माता । स्वयें स्वयमेव विधाता । गेलें पुरुषत्व आणिलें हाता । आश्वासिता होये ब्रह्मा ॥ ७४ ॥ विश्वकर्मा पाचारूनी । किष्किंधा करवी राजधानी । नाना वृक्ष फळें शोभनी । नाना रत्नीं धनाढ्य ॥ ७५ ॥ दुर्ग दुर्गम रचिले वेगीं । दैत्य दानवां न लभे मागी । अतर्क्य तेथींचि रिंगीनिगी । पुत्रयोगीं करविलें ॥ ७६ ॥ मरीच्यादि ब्रह्मदूत । सर्वे देऊनि समस्त । ऋक्षराजाच्या अभिषेकार्थ । किष्किंधेआंत ते आले ॥ ७७ ॥ ब्रह्याची आज्ञा अति समर्थ । देशोदेशींचे वानर समस्त । सेनापति आले तेथ । अभिषेकार्थ ऋक्षराजा ॥ ७८ ॥ मुकुटकुंडलें रत्नमेखळा । बाहुअंगदें रत्नमाळा । वानरा बाणली राजकळा । सपुत्र सोहळा राज्याचा ॥ ७९ ॥ किष्किंधा मुख्य राजधानी । तेथें श्रेष्ठ वरासनीं । ऋक्षराज अभिषेकुनी । वानरसैन्यीं निजराजा ॥ ८० ॥ अभिषेकिती ऋषीश्वर । वानर करिती जयजयकार । सुमनें वर्षती सुरवर । ब्रह्मा साचार तुष्टला ॥ ८१ ॥ ऋक्षराज महाबळी । यौवराज्यीं अभिषेचिला वाळी । सेनापती महाबळी । केला ते काळीं सुग्रीव ॥ ८२ ॥ ऐसा तो ऋक्षराज समर्थ । दोहीं पुत्रांसमवेत । किष्किंधा राज्य जालें प्राप्त । भाग्य समर्थ स्रष्ट्यानें ॥ ८३ ॥ जे कां अकिंचन वानर । तेही केले राज्यधर । त्यांसी वंदिती सुरवर । पितृभाग्यें थोर सभाग्य ॥ ८४ ॥ त्रैलोकींचे वानर । वालिसुग्रीवांचे आज्ञाधर । पिता ऋक्षराज सधर । सेनासंभार असंख्य ॥ ८५ ॥ तो ऋक्षराज राजा जाण । काळगती पावला मरण । दोघीं पुत्रीं करूनि दहन । उत्तरविधान तिहीं केलें ॥ ८६ ॥ मिळोनि समस्त प्रधान । वाळीसी केलें अभिषेचन । कनिष्ठ सुग्रीवासी जाण । दिधलें संपूर्ण यौवराज्य ॥ ८७ ॥ वाळीनें पाहोनि बळ आणि नीती । धर्मयोद्धा आणि व्रती । तो नीळ केला सेनापती । गंभीरस्थिती दळभारीं ॥ ८८ ॥ वालिसुग्रीवांचा पिता । ऋक्षराज नव्हे रघुनाथा । ह्या दोहींची एकमाता । दोहींचा पिता तो भिन्न भिन्न ॥ ८९ ॥ एक शक्रसुत एक सूर्यसुत । जगीं विख्यात हे मात । ह्या दोहींचा निजवृत्तांत । समूळ साद्यंत सांगीतला ॥ ९० ॥ ऐसें सांगोनियां कथन । हनुमंत घाली लोटांगण । सुग्रीवेंसीं सख्य संपूर्ण । करावें कृपेनें श्रीरामा ॥ ९१ ॥ केवळ वनींचे वनचर । हे तंव नव्हती पालेखाईर । ब्रह्मकुळींचे कुळेश्वर । वीर दुर्धर नरयोद्धे ॥ ९२ ॥ समूळ यांची जुनाट कथा । ऐकोनि सुख जालें रघुनाथा । आलिंगिलें हनुमंता । उल्हासता स्वानंदें ॥ ९३ ॥ एका जनार्दना शरण । वालिसुग्रीवजन्मकथन । समूळ जालें निरूपण । रामायण अति गोड ॥ ९४ ॥ इति श्रीभावार्थरामायणे किष्किंधाकांडे एकाकारटीकायां वालिसुग्रीवजन्मकथनं नाम द्वितीयोऽध्यायः ॥ २ ॥ ओंव्या ॥ ९४ ॥श्लोक ॥२३॥ श्रीसीतारामचंद्रार्पणमस्तु ॥

अध्याय तिसरा

ॐ श्रीसच्चिदानंदाय नमः॥ वालिसुग्रीवजन्मकथा । ऐकोनि सुख श्रीरघुनाथा । संतोषोनियां हनुमंता । होये बोलता श्रीराम ॥ १ ॥ सख्य करावें सुग्रीवासीं । हें मुख्य कर्तव्य आम्हांसी । तूंही सख्यार्थ आलासी । अतिशयेंसीं सुख जालें ॥ २ ॥ कबंधें सांगीतलें मजपासीं । हृतदारदुःख सुग्रीवासी । सुखी करावया तयासी । ऋष्यमूकासी मी आलों ॥ ३ ॥ जो मज होय अनन्य शरण । त्याचें दुःख निर्दाळून । सुखी करावें संपूर्ण । ब्रीद जाण हें माझें ॥ ४ ॥ दुःख निरसूनि सुख द्यावयासी । मी आलों वनवासासी । वेगीं बोलावीं सुग्रीवासी । सुखी त्यासी मी करीन ॥ ५ ॥ ऐकोनि श्रीरामाचें वचन । हनुमंत जाला

१ आंत व बाहेर येणें. २ फुलें. ३ ब्रह्मदेवामुळें. ४ दरिद्री. ५ बळवान्. ६ स्त्रीहरण केल्याचें दुःख. ७ बाणा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सुखसंपन्न । वंदोनि श्रीरामाचें चरण । केलें उड्डाण उल्हासें ॥ ६ ॥

ऋष्यमूकात्स हनुमान् गत्वा मलयपर्वतम् ।
आचचक्षे तदा वीरः सुग्रीवाय महात्मने ॥ १ ॥
अयं रामो महाप्राज्ञः संप्राप्तो दृढविक्रमः ।
लक्ष्मणेन सह भ्रात्रा सख्यार्थं त्वामुपागतः ॥ २ ॥

हनुमंतें करोनि उड्डाण । सुग्रीवापासीं आला आपण । म्हणे तूं भाग्यें सभाग्य पूर्ण । श्रीरघुनंदन तुष्टला ॥ ७ ॥ राम लक्ष्मण महावीर । निःशंक निधडे धनुर्धर । तुजसीं करावया मित्राचार । आले साचार ऋष्यमूका ॥ ८ ॥ कोठील कोणाचे हे कोण । येथें यावया काय कारण । समूळ शोधिलें म्यां जाण । सावधान अवधारीं ॥ ९ ॥ श्रीराम दाशरथी महावीर । बंधु लक्ष्मण धनुर्धर । श्रीरामकांता सीता सुंदर । वनीं विहार पित्राज्ञा ॥ १० ॥ पित्याचे मानोनि आज्ञेसी । दंडकारण्यवनवासीं । तेंही रहावें चौदा वर्षीं । फळमूळांसी सेवोनि ॥ ११ ॥ शून्याश्रमीं[१] पंचवटीं । रावणें हरिली सीता गोरटी । तिची शुद्धी करावयासाठीं । आले जगजेठी ऋष्यमूका ॥ १२ ॥ श्रीरामें उद्धरिलें कबंधासी । शापविमुक्त केलें त्यासी । तेणें सांगितलें श्रीरामापासीं । सुग्रीवासी सुखी करीं ॥ १३ ॥ सीताहरण दुःख श्रीरामासी । दारहरण दुःख सुग्रीवासी । समान दुःख तुम्हां दोघांसी । येरयेरांसी[३] सुखी करा ॥ १४ ॥ निःशेष वधूनि वाळीसी । सदार[४] राज्य सुग्रीवासी । देवोनि सुखी करावयासी । किष्किंधेसी श्रीराम आला ॥ १५ ॥ सांडोनि सीताशुद्धयर्थ । साधावया तुझा कार्यार्थ । कृपेनें आला श्रीरघुनाथ । भाग्यवंता सुग्रीवा ॥ १६ ॥ श्रीराम प्रेमवत्सळू । श्रीराम निरपेक्ष स्नेहाळू । श्रीराम भक्तकाजकृपाळू । दीनदयाळू श्रीराम ॥ १७ ॥

श्रुत्वा हनूमतो वाक्यं सुग्रीवो हृष्टमानसः ।
दर्शनीयतमो भूत्वा प्रीत्योवाच च राघवम् ॥ ३ ॥

ऐकोनि हनुमंताची गोष्टी । सुग्रीवासी आनंद कोटी । हनुमंताची पाठी थापटी । प्रेमें संतुष्टीं आलिंगी ॥ १८ ॥ मेघगर्जनें मयूर नाचे । तैसा सुग्रीव हर्षें सांचे । संपूर्ण भाग्य हनुमंताचें । कोणे वाचे मी वानूं ॥ १९ ॥ माझा साधितां निजस्वार्थ । जाला श्रीरामाचा आप्त । श्रीरामभाग्यें हा समर्थ । कृतकृत्यार्थ मी झालों ॥ २० ॥ सुमनमाळा[५] सुकलियावरी । स्वयें सांडिजे जेंवी दुरी । तेंवी श्रीरामभय होतें भारी । तें माळेच्या परी त्यागिलें ॥ २१ ॥ घ्यावया श्रीरामाची भेटी । सुग्रीव निर्भय जाला पोटीं । श्रीराम लक्षोनियां दृष्टीं । उठाउठीं आले दोघे ॥ २२ ॥ धरोनि हनुमंताचा हात । जेथें होता श्रीरघुनाथ । सुग्रीव तेथें आला त्वरित । शरणागत मी तुझा ॥ २३ ॥ तूं सत्यप्रतिज्ञ रघुवीर । माझा करावा अंगीकार । मी तुझा निजकिंकर । शरण साचार श्रीरामा ॥ २४ ॥

एवं तद्वचनं श्रुत्वा सुग्रीवस्य सुभाषितम् ।
संप्रहृष्टमना हस्तं पीडयामास पाणिना ॥ ४ ॥
ततो रामस्य सुग्रीवः पाणिं जग्राह पाणिना ।
हृष्टः सौहृदमालंब्य पर्यष्वजत पीडितम् ॥ ५ ॥

ऐसें सुग्रीवसंभाषित[६] । ऐकोनियां श्रीरघुनाथ । होवोनियां आनंदभरित । जाला उदित खेंवेंसी[७] ॥२५॥ सुग्रीव घाली लोटांगण । श्रीरामें उचलिला हातीं धरून । वानरें करोनि हस्तग्रहण । दिधलें आलिंगन हृदयेंसीं ॥ २६ ॥ हृदया हृदय लागलें । तंव हृदयस्थ एक जाले । सहज सुहृदत्व घडलें । आलिंगिलें एकमेकां ॥२७॥ श्रीरामहृदयस्थ चिद्धन । त्यासी देतां आलिंगन । सुग्रीवहृदया समाधान । वाळिभयभान निमालें ॥ २८ ॥ नरा वानरा पडली मिठी । आधिव्याधि शमली पोटीं । सांगणें पुसणें सरल्या गोष्टी । आनंद कोटी सुग्रीवा[८] ॥ २९ ॥ दोघां सख्य जालें अलौकिक । अग्निसूर्यप्रमाण साक्ष[९] । कांहीं करणें न लगे देख । दोहींचें एक हृदय जालें ॥ ३० ॥ दोहींचें हृदय जालें एक । तेंचि निजसख्याचें सख्य । आण प्रमाण देतां भाक । तो लौकिक अति अल्प ॥ ३१ ॥ श्रीरामसख्यापुढें जाण । बहिर्भूत आणप्रमाण । भाक तेथें केवळ तृण । सखा संपूर्ण श्रीराम ॥ ३२ ॥ श्रीरामसख्याची थोरी । अति अगाध चराचरीं । तें सख्य पावोनि वानरीं । जयजयकारीं गर्जती ॥ ३३ ॥

सुग्रीवो राघवश्चैव वयस्यत्वमुपागतौ ।
प्रहृष्टमनसौ प्रीतौ तावुभौ हरिराघवौ ॥ ६ ॥

१ सख्य, मैत्री. २ आश्रमांत कोणी नसतांना. ३ परस्परांस. ४ स्त्रीसहित. ५ फुलांचा हार. ६ सुग्रीवाचें भाषण. ७ आलिंगन देण्याला. ८ आत्मे. ९ अग्नि आणि सूर्य यांच्या साक्षीनें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

अन्योन्यमभिवीक्षंतौ न तृप्तिमुपजग्मतुः ।
त्वं वयस्योऽसि हृद्यो मे एकं दुःखं सुखं च नौ ॥ ७ ॥

श्रीराम स्वयें नरपती । सुग्रीव स्वयें वानरपती । दोघां सख्यत्वाची स्थिती । अनन्य प्रीतीं आल्हाद ॥ ३४ ॥ जैसी प्रीति सुवाससुमनां । जैसी प्रीति जीवा मना । तैसी प्रीति सुग्रीवरघुनंदनां । अन्योन्य जाणा अति प्रीति ॥ ३५ ॥ जैसी प्रीति गूळ-गोडीसीं । जैसी दीपकप्रकाशीं । नाना रसा आणि उदकासीं । रामा सुग्रीवासीं अति प्रीति ॥ ३६ ॥ सुग्रीवें पाहतां श्रीरामचंद्रा । श्रीरामें पाहतां वानरेंद्रा । प्रीतीं पाहतां येरयेरां । दोहींच्या नेत्रां नव्हे तृप्ती ॥ ३७ ॥ जैसी प्रीति चकोरचंद्रां । तैसी प्रीति सुग्रीवरामचंद्रां । जैसी प्रीती जळा जळचरां । तैसी वानरां श्रीरामीं ॥ ३८ ॥ ऐसी श्रीरामा वानरां प्रीती । श्रीरामीं वानरां अनन्य भक्ती । ऐशिया ऐशिया प्रेमप्रीतीं । पाहतां तृप्ति नव्हे नेत्रीं ॥ ३९ ॥ श्रीराम सुग्रीव मारुती । तिघां झाली अनन्य प्रीती । मग बैसोनि सुखसंमतीं । अनुवादती[1] निजगुज ॥ ४० ॥ सुग्रीव म्हणे श्रीरघुपती । तुम्ही आलेति जीचे अर्थी । ते म्यां देखिली सीता सती । गगनगतीं[2] पैं नेतां ॥ ४१ ॥

ह्रियमाणा मया दृष्टा रक्षसा क्रूरकर्मणा ।
क्रोशंती राम रामेति लक्ष्मणेति च विस्वरम् ॥ ८ ॥
आत्मना पंचमं मां हि दृष्ट्वा शैलतले स्थितम् ।
उत्तरीयं तदा त्यक्तं शुभान्याभरणानि च ॥ ९ ॥

रावणाचे खांदेवरी । वेगें नेतां गगनांतरीं । आम्हीं देखिली वानरीं । श्रीराम गजरीं आक्रंदे ॥ ४२ ॥ श्रीरामराया धांव धांव । राघवा तूं सवेग पाव । घेवोनि लक्ष्मणाचें नांव । दीर्घ स्वरें आक्रंदे ॥ ४३ ॥ रामनाम सीतारव । वानरीं ऐकिला पैं सर्व । आणिक जालें जी लाघव । तें अति अपूर्व ऐकें स्वामी ॥ ४४ ॥ येचि पर्वतशिखरीं । आम्ही असतां पंचवानरीं । उत्तरीयवास[3] सीतासुंदरीं । सालंकारीं[4] त्यागिलें ॥ ४५ ॥ लक्षोनियां हनुमंता । वस्त्र अळंकार सांडी सीता । तें आलें हनुमंताच्या हाता । सभाग्यता म्हणोनियां ॥ ४६ ॥ श्रीराम-नामाचें उत्तरीयवस्त्र । रामनामांकित अलंकार । आम्हां दाखविले समग्र । राखे निरंतर मारुति ॥ ४७ ॥ रामनामीं ज्यां विश्वास । असे भाग्य सभाग्य ज्यांस । तेचि पावती श्रीरामवास । भाग्यें बहुवस हनुमंत ॥ ४८ ॥ रामनामें दीर्घस्वर । सीता आक्रंदे सुंदर । आम्हीं ऐकतां समग्र । हनुमान वीर खवळला ॥ ४९ ॥ मारोनि राक्षस दुर्धर । करोनि दीनांचा उद्धार । सोडवावया सीता सुंदर । हनुमान् सत्वर उसळला ॥ ५० ॥ रागें आपटोनि पुसाटी[5] । वटारोनि आरक्त दृष्टी । वळोनियां वज्रमुष्टी । उठाउठी उडाला ॥ ५१ ॥ हनुमंताचें निजउड्डाण । गेलें ग्रहचक्र टाकोन । तळीं तेणें धाके रावण । गेला लंघोन सागरु ॥ ५२ ॥ गेला देखोनि लंकानाथ । हनुमंत क्रोध करी शांत । ऐसा ऐकोनि वृत्तांत । अति विस्मित श्रीराम ॥ ५३ ॥ ऐकोनि वानरांच्या गोष्टी । विस्मयो सौमित्राच्या पोटीं । सीतालंकार पहावया दृष्टीं । उठाउठीं आणविले ॥ ५४ ॥

उत्तरीयं गृहीत्वा तु स तान्याभरणानि च ।
इदं पश्येति रामाय दर्शयामास वानरः ॥ १० ॥
ततो गृहीत्वा वासस्तु शुभान्याभरणानि च ।
हा प्रियेति रुदन्धैर्यमुत्सृज्य न्यपतद्भुवि ॥ ११ ॥

सीतालंकारवस्त्रांसी । हनुमंतें दाखविलें श्रीरामासी । तेणें धरोनि हृदयासीं । उकसाबुकसीं स्फुंदत ॥ ५५ ॥ सीते मजसीं कां रुसलीसी । पूर्वप्रीति कां विसरलीसी । रागें मजसीं कां न बोलसी । कोठें गेलीसी प्रिय कांते ॥ ५६ ॥ सीतेचे देखोनि अलंकार । श्रीराम करी विलाप थोर । मूर्च्छित पडे सत्वर । विसंज्ञ[6] अति विव्हळ ॥ ५७ ॥ श्रीरा-माची देखोनि व्यथा । सुग्रीवासी परमावस्था । सावध करोनि श्रीरघुनाथा । होय बोलता पुरुषार्था ॥ ५८ ॥ स्वामी तुज मज सख्य जालें असतां । तुझी निवारवेना व्यथा । तरी लागली लाज मित्रार्था । आणीन सीता शोधोनी ॥ ५९ ॥ कळि-काळाची मर्दितों मान । ऐसे माझे चौघे प्रधान । अमित मेळवीन वानरांचें सैन्य । सीता शोधोन आणीन ॥ ६० ॥ स्वर्ग मृत्यु पाताळीं । नेली असतां जनकबाळी । घेवोनियां जँगधांडोळी[7] । सीता वेल्हाळी आणीन ॥ ६१ ॥ श्रीरामा वाहतों तुझी आण । सीता आणीन मी शुद्धी करोन ।

१ सांगूं लागले. २ आकाशमार्गानें. ३ अंगावरील वस्त्र. ४ अलंकारांसह. ५ शेंपूट. ६ निचेष्ट. ७ जगभर शोध.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

पुढती शिवतों तुझे चरण । परम प्रमाण हें माझें ॥ ६२ ॥ रुदन करूं नको श्रीरामा । ऐक माझी प्रमाणसीमा । अधःपतन जाण मज प्लवंगमा[१] । श्रीरामा सीता जरी नाणीं ॥ ६३ ॥ सीताशुद्धि सांडोनि श्रीरामा । जरी मी गुंतेन आणिके कामा । तरी मी वानर अधमजन्मा । श्रीरामा सीता जरी नाणीं ॥६४॥ सांडोनि सीताशुद्धीच्या क्रमा । जरी मी लागेन आणिके कामा । तरी धिक्कार माझिया जन्मा । श्रीरामा सीता जरी नाणीं ॥ ६५ ॥ सीता-वियोगविभ्रमा । दुःख न करीं श्रीरघूत्तमा । निमेषें आणीन श्रीरामरमा[२] । प्रतापगरिमा[३] पाहें माझी ॥ ६६ ॥ लाजविला पितामह ब्रह्मा । लाज-विला पूर्वजमहिमा । लाजविलें क्षात्रधर्मा । श्रीरामा सीता जरी नाणीं ॥ ६७ ॥ ऐकोनि सुग्री-वाचें वचन । हास्य करी श्रीरघुनंदन । तुज राज्य दारा दिधल्यावीण । सीतास्मरण मज नाहीं ॥ ६८ ॥ मित्रकार्यापुढें जाण । सीताशुद्धी मज तृणासमान । वाहतों दशरथाची आण । सत्य जाण सुग्रीवा ॥ ६९ ॥ जें तूं बोलिलासी निर्वाण । तें मज मानलें प्रमाण । तुझें कार्य न होतां पूर्ण । सीताआगमन मज निंद्य ॥ ७० ॥ वैश्वदेव बळि-विधान । न करितां भोजन निंद्य जाण । तेंवी तुझें कार्य करितां पूर्ण । सीताआगमन मज निंद्य ॥ ७१ ॥ न करितां औपासनें[५] । स्वदारगमन वेश्येसमान । तेंवी तुझें कार्य न होतां पूर्ण । सीताआगमन मज निंद्य ॥ ७२ ॥ अतिथि दवडोनियां निराशन । जेंवी निंद्य होय निजभोजन । तेंवी तुझें कार्य न होतां पूर्ण । सीताआगमन मज निंद्य ॥ ७३ ॥ न करितां संध्यास्नान । यज्ञादि कर्मे निंद्य जाण । तेंवी तुझें कार्य न होतां पूर्ण । सीताआगमन मज निंद्य ॥ ७४ ॥ जरी तुवां येथें आणिली सीता । तुझें कृतकार्य न होतां । तिसी मी न पाहें सर्वथा । मज आण दशरथाची ॥ ७५ ॥ सीतेचें आधीं कोठें गमन । शुद्धी केल्या मग आगमन । वाळि-वधालागीं जाण । हें व्यवधान तंव नाहीं ॥ ७६ ॥ आधीं साधीन मित्रकार्यार्था । मग शोधोनि आणीन सीता । धनुष्यबाण घेवोनि हाता । वाळिवधार्था निघाला ॥ ७७ ॥

अद्यैव तं हनिष्यामि तव भार्यापहारिणम् ।
इमे हि मे महाभाग पत्रिणस्तिग्मतेजसः ॥ १२ ॥

वालिसंज्ञममित्रं ते भ्रातरं कृतकिल्बिषम् ।
शरैर्विनिहतं पश्य विकीर्णमिव पर्वतम् ॥ १३ ॥

सुग्रीवा ऐक सावधान । जेणें केलें तुझें दार-हरण । त्या वाळीचा घेईन प्राण । तीक्ष्ण बाण सोडोनी ॥ ७८ ॥ माझे बाण अति तिखट[६] । मंत्रोनि मारीन सदट । तेणें वाळीचा छेदोनि कंठ । करीन सपाट बाणें एकें ॥ ७९ ॥ वज्रें हाणीतला पर्वत । जैसा विखुरे[७] पृथ्वीआंत । तैसा वाळी वधीन येथ । रुधिरोक्षित[८] देखसी ॥ ८० ॥ क्षोभला देखोनि श्रीरघुनाथा । सुग्रीवें चरणीं ठेविला माथा । वाळीचिया अति पुरुषार्था । सावधानता अव-धारीं ॥ ८१ ॥ अरुणोदयापूर्वीं जाण । अविश्रमें[९] श्रमेंवीण । सप्तसमुद्रीं करी स्नान । अर्ध क्षण न लागतां ॥ ८२ ॥ वाळी सव्यहस्तें पर्वत । सवेग टाकी गगनाआंत । वामहस्तें स्वयें झेलीत । शता-नुशत गिरिवर ॥ ८३ ॥ महिषासुराचा ज्येष्ठ सुत । दुंदुभी नाम महिष अति विख्यात । युद्धालागीं परम उदित । विचरत तिहीं लोकीं ॥ ८४ ॥ दुंदुभी जावोनि पाताळासी । युद्ध मागे वरुणापासीं । तेणें धाडिलें हेमाद्रीपासीं[१०] । जाय त्यासीं युद्ध करीं ॥ ८५ ॥ दुंदुभी येवोनि युद्धार्थ । हेमाद्रीतें पाचा-रीत । तो म्हणे मी यदर्थीं[११] अशक्त । जाय युद्धार्थ तूं यमापासीं ॥ ८६ ॥ दुंदुभी पाचारी यमासी । यम विचारी मानसीं । वाळिहस्तें मृत्यु यासी । तेणें त्यापासीं धाडिलें ॥ ८७ ॥

दुंदुमे युद्धदानाय नाहं प्रतिबलस्तव ।
युद्धं समबलेनैव कर्तव्यं च जयैषिणा ॥ १४ ॥

किष्किंधां गच्छ रे तत्र वालिनामा हरीश्वरः ।
स युद्धतृष्णामापूर्य मदं ते नाशयिष्यति ॥ १५ ॥

यम म्हणे दुंदुभीसी । मज युद्ध न करवे तुजसीं । तूं युद्ध करीं वाळीसीं । तो समबळेंसीं बलिष्ठ ॥ ८८ ॥ वानर वाळी महाबळी । सबळ योद्धा आतुर्बळी । पाहतां ये भूमंडळीं । रणरंदळी[१२] करील ॥ ८९ ॥ वाळी युद्धतृष्णातृषित । तूंही

१ वानराला. २ श्रीरामाची स्त्री (सीता). ३ प्रतापाचा मोठेपणा. ४ आजा. ५ स्मार्तोग्निपूजन. ६ बळकट. ७ तुकडे तुकडे होतात. ८ रक्तानें भरलेला. ९ विश्रांति घेतल्या-शिवाय. १० मेरुपर्वताजवळ. ११ याविषयीं. १२ युद्धांत नाश.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

युद्धासी अति उद्यत। वाळीपासीं जावोनि त्वरित। युद्धपुरुषार्थ करीं त्यासीं ॥ ९० ॥ तूं म्हणसी वाळी कोण। किष्किंधेचा राजा जाण। त्यासीं करावें युद्ध दारुण। आंगवण पाहों तुझी ॥ ९१ ॥ ऐसें ऐकतां वचन। दुंदुभी सवेग आला जाण। ठाकोनि पावला किष्किंधाभुवन। करी गर्जन युद्धार्थ ॥ ९२ ॥ येथें कोण सबळ वाळी। तेणें बाहेर निघावें याचि काळीं। युद्धा यावें मजजवळी। रणरांगोळी मी करीन ॥९३॥ ऐकोनि दुंदुभियुद्धवादन। वाळी करोनि उड्डाण। सन्मुख आला पैं आपण। रागें गर्जोन भुभुःकारें ॥ ९४ ॥ ऐकतां भुभुःकारआरोळी। दुंदुभीची बैसली कानटाळी। म्हणे वानर हा महाबळी। कैंवी आकळीं संग्रामीं ॥ ९५ ॥ वाळीसी हाणितां मुष्टिघात। दुंदुभीचा उखळला हात। तेणें धाकें पळे वनांत। अति गुप्त निजमावा ॥ ९६ ॥ प्रवेशतां निजविळीं। थापें हाणितला तया वेळीं। असृग्ध वमूनी भूतळीं। प्राण तत्काळीं सांडिला ॥ ९७ ॥

कायं कैलाससंकाशमेतदस्ति प्रकाशते।
उद्धर्तुमेको वाली वा शक्तोऽहं रघुसत्तम ॥ १६ ॥
सर्वप्राणभूतां लोके तृतीयं नोपलक्षये।
ईदृशो विक्रमो यस्य जवे चानुत्तमा गतिः ॥ १७ ॥

त्या दुंदुभीचें कलेवर। कैलासप्राय महाथोर। श्रीरामा पाहें पां साचार। अति दुर्धर सुरनरां ॥९८॥ तें उचलावया कलेवर। स्वयें शक्त वाळी वीर। दुसरा सुग्रीव वानर। तिसरा शूर असेना ॥ ९९ ॥ दुंदुभिदेहउद्धारार्थी। धांडोळितां त्रिजगती। तिसरियाची न चले शक्ती। हे उचलिती दोघे बंधू ॥ १०० ॥ तिजा जो उचली अंगभारें। त्याचेनि हस्तें वाळी मरे। भाकिलें मातंगऋषीश्वरें। निजनिर्धारें श्रीरामा ॥ १ ॥ ऐसा वाळी बळी विख्यात। आणिक त्याचा पुरुषार्थ। तुज मी सांगेन इत्थंभूत। ऐक निश्चित श्रीरामा ॥ २ ॥ वाळी करितां अनुष्ठान। त्यासी धरूं आला रावण। वीस भुजा पसरोन। बळेंकरून कवळूं गेला ॥३॥ तंव येरें पसरोनियां वामहस्त। विसां भुजांसमवेत। आकळोनि लंकानाथ। काखेआंत चेपिला ॥४॥ विक्षेपें जाला अनुष्ठाना। वाळी सवेग उठिला स्नाना। काखे असोनि दशानना। तैसाचि तत्क्षणा निघाला ॥ ५ ॥ रावण असोनि काखेतळीं। सप्तसागरीं करी आंघोळी। नाकीं तोंडीं भरे जळीं। तेणें तळमळी रावण ॥ ६ ॥ काखेहूनि निसटावयासी। सामर्थ्य नव्हे रावणासी। कळ लागली दाही शिसीं। कासाविस लंकानाथ ॥ ७ ॥ काखे सूदला रावण। हें वाळी गेला विसरोन। घरा आला स्नान करून। अति विंदान तेथें जालें ॥ ८ ॥ आवडीं अंगद उचलिला वाळीं। तंव रावण पडिला भूतळीं। देखतां वानरीं सकळीं। भूतावळी मिळाली ॥ ९ ॥ दहा मुखें मुकुट शिरीं। त्यासी धरोनि वानरीं। अंगदाच्या पाळण्यावरी। खेळण्यावरी बांधिलें ॥ ११० ॥ अंगदाचें धारोष्ण मूत। रिचवे रावणाच्या मुखाआंत। मुखावरी हाणी लात। मुलें चिमटीत सर्वांगें ॥ ११ ॥ निर्गम नाहीं रावणासी। पौलस्ति येवोनि वाळीपासीं। भिक्षा मागोनि घेतलें लंकेशासी। वानरीं त्यासीं विनोद केला ॥ १२ ॥ एक मर्सी लाविती मुखासी। एकीं हिरतिलें मुकुटासी। काळें तोंड मोकळे केंसीं। रावण लंकेसी धाडिला ॥ १३ ॥ ऐसा वाळीचिया पुरुषार्था। विचारोनियां श्रीरघुनाथा। विक्रमें करवेल घाता। तरी त्या कार्यार्था अंगीकारीं ॥ १४ ॥ वाळी सुग्रीव आम्ही समबळीं। कश्यपमाळा वाळीजवळी। तेणें त्यासी ख्याती आगळी। युद्धकाळीं मज जिंके ॥ १५ ॥ कश्यपमाळा वरद देख। युद्धीं जो जो येईल सन्मुख। तो अवश्य होईल विमुख। आपण विजयी निजवरदें ॥ १६ ॥ श्रीराम स्वयें विचारी देख। वाळीस होऊं नये सन्मुख। आपण राहोनि विमुख। वाळी अवश्य वधावा ॥ १७ ॥ कश्यपाचिया वरदार्था। अवतारा न करवे अन्यथा। वाळीस वधावें विमुखता। मित्रकार्यार्था साधावें ॥ १८ ॥ सुग्रीव बोलिला जें आपण। सप्तताड विषम जाण। एके बाणें करी छेदन। वालिनिर्दळण त्याचेनि ॥ १९ ॥ वाळी सुग्रीव महावीरां। यांहोनि वेगळा जो आपण तिसरा। उचलील दुंदुभीच्या कलेवरा। वाळिवानरा तो वधील ॥ १२० ॥ ऐसें बोलतां सुग्रीवासी। श्रीरामें

१ तयार. २ पराक्रम, बल. ३ रक्त. ४ अडथळा. ५ सुटका. ६ काजळ. ७ समानशक्तीचे. ८ वाळीचा नाश.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

आश्वासिलें त्यासी। दाखवीं दुंदुभिकलेवरासी। आणि सप्ततालांसी छेदावया ॥ २१ ॥ दुंदुभिकलेवर मज तृण। वामांगुष्ठें उचलीन जाण। सप्ततालांचें छेदन। करीन संपूर्ण बाणें एकें ॥ २२ ॥ ऐसें बोलतांचि जाण। श्रीरामें धनुष्या वाहोनि गुण। म्हणे मज दावीं तालवन। सीतीं बाण लावोनी ॥२३॥ करावया वाळीचा घात। श्रीरामें धनुष्या घातला हात। सुग्रीव आनंदें नाचत। कृपा श्रीरघुनाथ तुष्टला ॥ २४ ॥ एका जनार्दना शरण। सुग्रीवाशीं सख्य जालें पूर्ण। पुढें वाळीचें निर्दळण। स्वयें श्रीरघुनंदन करील ॥ १२५ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे किष्किंधाकांडे एकाकारटीकायां सुग्रीवसख्यनिरूपणं नाम तृतीयोऽध्यायः ॥ ३ ॥ ओंव्या ॥ १२५ ॥ श्लोक ॥ १७ ॥

अध्याय चवथा

श्रीसीतारामचंद्राय नमः॥निर्दाळोनियां वाळीसी। सदार राज्य सुग्रीवासी।द्यावया श्रीराम उल्लासी। मित्रकार्यासी अंवंचक ॥ १ ॥ स्वकार्य सांडोनिया मागें। मित्रकार्यार्थ लागवेगें। श्रीरघुनाथ धांवे अंगें। साह्य सर्वस्त्रें शरणागता ॥ २ ॥ श्रीराम विचार करी शुध्दु। हे तंव दोघे सखे बंधु। कां पडला द्वेषसंबंधु। तो द्वेषसंबंधु पुसत ॥ ३ ॥

किंनिमित्तं महद्वैरं श्रोतुमिच्छामि तत्त्वतः।
अनंतरं वधिष्यामि संप्रधार्य बलाबलम् ॥ १ ॥

तुम्ही दोघे बंधु सहोदरें। तुम्हां दोघांत कां पडिलें वैर। तेंही अतिशयेंसीं दुर्धर। येरयेरां घातक ॥ ४ ॥ या वैराचें मूळ कारण। समूळ सांगावें संपूर्ण। ऐकोनियां श्रीरामभाषण। सांगे आपण सुग्रीव ॥ ५ ॥ पितापुत्रां सख्य सहोदरां। वैरासी मूळ द्रव्य दारा। सुहृद पेटती वैराकारा। द्रव्यदारदेहलोभें ॥ ६ ॥ द्रव्य दारा या लोभापासीं। अहंकार सदा मुसमुसी। तो वैर पाडी सुहृदांसी। आम्हां दोघांसी वैरलोभें ॥ ७ ॥ कैसें वैर लोभ कवण। त्याही वैराचें निजकारण। समूळ सांगेन लक्षण। सावधान अवधारीं ॥ ८ ॥

श्रूयतां राम तेनाहं राज्यात्स्वादवरोपितः।
परुषाणि च संश्राव्य निर्धूतोऽस्मि बलीयसा ॥ २ ॥

आमच्या वैराची थोरी। श्रीरामा सावध अवधारीं। स्त्रीराज्यलोभाचारीं। वाळीनें बाहेरी घातलें मज ॥ ९ ॥ पिता राज्यीं असतां जाण। वाळीस यौवराज्य संपूर्ण। मज दिधलें सैन्याधिपतिपण। समसमान एकात्मता ॥ १० ॥ पिता निमालियावरी जाण। समस्त मिळोनि प्रधान। ज्येष्ठा वाळीस राज्यासन। यौवराज्य पूर्ण मज दिधलें ॥ ११ ॥ शांत दान्त सुबुद्धि प्रबळ। सेना राखों जाणे अविकळ। तो सेनानी केला नीळ। सबळ दळ त्याचेनि ॥ १२ ॥ दोघे बंधू एकात्मता। येरयेरां अवंचकर्ता। उदक पिणें नाहीं तत्त्वतां। भोगभिन्नता मग कैंची ॥ १३ ॥ एकत्र आसन शयन। दोघां एकत्र भोजन। येरयेरांलागीं वेंचिती प्राण। दोघां संपूर्ण एकात्मता ॥ १४ ॥ ऐसे दोघे एकात्मता। अविकल्प राज्य करितां। पुढें आली विक्षेपता। तेही श्रीरघुनाथा अवधारीं ॥ १५ ॥

मायावी नाम तेजस्वी पूर्वजो दुंदुभेः सुतः।
तेन तस्य महद्वैरं वालिनः स्त्रीकृतं पुरा ॥ ३ ॥
स तु सुप्ते जने रात्रौ किष्किन्धाद्वारमागतः।
नर्दति स्म सुसंरब्धो वालिनं चाह्वयद्रणे ॥ ४ ॥

दुंदुभीचा ज्येष्ठ कुमर। मयनामा महासुर। पितृवैरें वैराकार। वाळी वानर वधूं इच्छी ॥ १६ ॥ विभांडूनियां किष्किंधा गड। वाळी मारीन हे मानसीं होड। घेईन दुंदुभीचा सूड। गर्वारूढ होवोनि आला ॥ १७ ॥ किष्किंधेच्या महाद्वारीं। मय आला मध्यरात्रीं। गर्जत घर्घरस्वरीं। गिरिदरी दुमदुमिल्या ॥ १८ ॥ ऐकोनि त्याचा गिरागजर। भयभीत झाले सबळ वानर। अवघे कांपती थरथर। रहावया धीर न धरवे ॥ १९ ॥ वानरांचा राजा वाळी। येथें कोण आहे महाबळी। मजसीं युद्ध करावया रणफळीं। वीरश्रीनें येथें यावें ॥ २० ॥ असुरासीं युद्धा निघतां वाळी। बंधुस्नेहाच्या कळवळीं। मीही आलों ते काळीं। बंधूजवळी साह्यार्थ ॥ २१ ॥

---

१ चढवून. २ दोरी. ३ न फसविणारा. ४ सरखे. ५ वारल्यावर. ६ बिनचूक. ७ सेनापति. ८ न फसविणें. ९ अडथळा, विघ्न. १० प्रतिज्ञा. ११ शब्दाचा ध्वनि.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

दुंदुभि मारिला माझा पिता। त्याचा सूड मीं घेईन आतां। ऐसें वाळीनें ऐकतां। सकोपता चालिला ॥ २२ ॥ वाळीनें देतांचि आरोळी। दुंदुभिपुत्राची बैसली टाळी। आम्हां दोघां देखतां बळी। धाकें तत्काळीं पळाला ॥ २३ ॥ मी एकला हे दोघे जण। घायें माझा घेतील प्राण। येणें भयें तो आपण। पलायमान भयभीत ॥ २४ ॥ वाळी म्हणे यासी न मारितां। नगरा न[1] वचें मी रिता। त्याच्या करावया जीवघाता। पाठी लागतां सोडीना ॥ २५ ॥ किष्किंधा सांडोनि दुरी। मय पळे गिरिकंदरीं। येवोनियां निजविवरीं। बिलद्वारीं प्रवेशला ॥ २६ ॥

स तृणैरावृतं दुर्गं धरण्यां विवरं महत्।
प्रविवेशासुरो वेगादावामासाद्य विष्ठितौ ॥ ५ ॥
मामुवाच तदा वाली वचनं क्षुभितेंद्रियः।
इह त्वं तिष्ठ सुग्रीव बिलद्वारि समाहितः ॥ ६ ॥
यावदत्र प्रविश्याहं निहन्मि समरे रिपुम्।
स्थापयित्वा तु मां तत्र प्रविवेश बिलं ततः ॥ ७ ॥

अतर्क्य बिळ तें सर्वांसी। असुर त्या बिळीं बिळवासी। आम्ही अंधारीं लक्षोनि त्यासी। बिळापासीं दोघे आलों ॥ २७ ॥ अंधाराचे निजनेटीं। दैत्य रिघे बिळ संकटीं। आम्ही त्याची न सोडूं पाठी। बिळानिकटीं आलों दोघे ॥ २८ ॥ वाळी मजला आज्ञा करी। सावध राहें बिलद्वारीं। मी रिघेन बिळाभीतरीं। जंव यें वैरी मारोनी ॥ २९ ॥ मी म्हणें सवें येईन साह्यासी। वाळी म्हणे त्या मशकासी। मारावया काय साह्य येसी। बैस द्वारासीं सावधान ॥ ३० ॥ बिळीं प्रवेशतां वाळी। दुंदुभिसुतें नेला पाताळीं। तेथें दानव कोट्यनुकोटी बळी। युद्धरवंदळी[2] मांडिली ॥ ३१ ॥ युद्ध देखोनि दारुण। वाळी जाला सावधान। वरद विजयमाळा पूर्ण। पाहे आपण ते काळीं ॥ ३२ ॥

अथ वाली सुसंक्रुद्धो मालां गृह्य च कांचनीम्।
पूर्वदत्तां महेंद्रेण या युद्धाय प्रतिश्रुता ॥ ८ ॥

कश्यपविजयवरदमाळा। इंद्रें दिधली कृपाळुमेळां[3]। वाळी सांभाळोनि गळां। मग परदळीं मिसळला ॥ ३३ ॥ कंठीं माळा आल्या देख। अवश्य वैरी होती विमुख। युद्धा आलिया सन्मुख। रणीं निःशेष[4] निमावे ॥ ३४ ॥ निराहारीं निरुदकीं। युद्ध करितां वर्षें अनेकीं। बाधों न शके तहान भुकीं। श्रमबाधा नव्हे वरदें ॥ ३५ ॥ वरदमाळा असतां जवळी। वाळी वानर आतुर्बळी। मर्दोनि दानवांची फळी। रणकल्लोळीं गर्जत ॥ ३६ ॥ सप्रधान ससैन्य सकुमर। दानव मारिले अपार। मुख्य धुर्रां[6] थोर थोर। वाहती पूर रुधिराचे ॥ ३७ ॥ दानव मारिले अमित। उरले ते पळाले समस्त। दुंदुभिपुत्र येवोनि तेथ। युद्ध करी वाळीसीं ॥ ३८ ॥ निरुदक निराहारेंसीं। अविश्रम[7] रण एकवीस मासीं। त्याचेनि हातें मृत्यु पावसी। मयासुरासी शिववरद ॥ ३९ ॥ वाळी मारावया निभ्रांत। वरदबळें युद्ध करीत। वाळी निजमाळें समर्थ। श्रमरहित रणयोद्धा ॥ ४० ॥ पंधरा मास रण दुर्धर। मयासुरासीं सुटलें रुधिर। अशुद्धें पूर्ण जालें विवर। बाहेरी पूरप्रवाह ॥ ४१ ॥

तस्य प्रविष्टस्य बिलं साग्रः संवत्सरो गतः।
स्थितस्य मे बिलद्वारि स कालो व्यत्यवर्तत ॥ ९ ॥
नर्दतामसुराणां च ध्वनिर्मे श्रोत्रमागतः।
निरतस्य च संग्रामे क्रोशतोऽपि स्वनो महान् ॥ १० ॥
अथ दीर्घस्य कालस्य बिलद्वाराद्विनिःसृतम्।
सफेनं रुधिरं दृष्ट्वा ततोऽहं भृशदुःखितः ॥ ११ ॥

मी बैसलों बिलद्वारीं। काय वर्तलें भीतरीं। तें मी नेणेंचि बाहेरी। सवा वर्षवरी तिष्ठलों ॥ ४२ ॥ तंव वीरांचा रणक्रोध। भीमावेशें गर्जत शब्द। नोकूंनपणाचें सुबद्ध। अति विरुद्ध ऐकिलें ॥ ४३ ॥ राहें साहें वीर शूर। पळों नको धरीं धीर। घाय वाजती निष्ठुर। घायें वीर हुंबती ॥ ४४ ॥ एक रडत एक पडत। एक कण्हत एक कुंथत। ऐसे वीर विकळित। म्यां हें समस्त ऐकिलें ॥ ४५ ॥ ऐसे शब्द जंव ऐकत। तंव बिळाआंतून रक्त। निघालें अति प्रवाहित। सफेन उतत बिलद्वारीं ॥ ४६ ॥ बिलद्वारीं देखोनि रक्त। वाटे वाळी मारिला युद्धांत। तेणें मी जालों दुःखाभिभूत ॥

१ जाणार नाही. २ भयंकर लढाई. ३ कृपायुक्त होऊन. ४ शत्रूंच्या सैन्यामध्यें. ५ सर्व. ६ पुढारी. ७ विश्रांतिरहित. ८ पराभव झाल्याचें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

भूत । पडिलों मूर्च्छित आक्रंदें ॥ ४७ ॥ वाळीऐसें बंधुनिधान । रणीं पडिलें आक्रंदोन । त्याचा सूड घ्यावया जाण । बिळीं आपण रिघों पाहें ॥ ४८ ॥ पाहोनि निजभुजांची वास[१] । दृढ घालोनियां कांस । बिळीं करितांचि प्रवेश । ऋषि लोमश मज वारी ॥ ४९ ॥ किष्किंधा राहिली बहु दुरी । दुंदुभिपुत्र बिलप्रदेशांतरीं । आम्ही दोघे गुंतलों विवरीं । राजा नगरीं कोणी नाहीं ॥ ५० ॥ ऐसें जाणोनि किष्किंधापुर । राज्य घ्यावया सत्वर । वेगीं आले विद्याधर । तिहीं नगर वेढिलें ॥ ५१ ॥ हाहाभूत देखोनि नगरी । मजपासीं प्रधान चारी । आले अति त्वरेंकरीं । रिघतां विवरीं तिहीं वारिलें ॥ ५२ ॥ विवरीं वाळीचा जाला अंत । तुझाही येथें करील घात । हातींचें राज्य जाईल व्यर्थ । ऐसा अनर्थ नको करूं ॥ ५३ ॥ वाळी मारिला निश्चित । सफेन रुधिर वाहे येथ । तुवां रिघों नये तेथ । ऋषी समस्त वारिती ॥ ५४ ॥ वैरी निर्दाळोनि समस्त । नगर राखोनि पैं स्वस्थ । मग वाळी बंधूच्या शुद्ध्यर्थ[२] । रिघों विवरांत समस्तही ॥ ५५ ॥

अहं त्ववगतो बुद्ध्या चिह्नैस्तैर्भ्रातरं हतम् ।
दुःखार्तश्चोदकं दत्वा किष्किन्धामागतस्ततः ॥ १२ ॥
गूहमानस्य मे तत्त्वं यत्नतो मंत्रिभिः श्रुतम् ।
समेतैर्मुनिभिः सर्वैस्ततोऽहमभिषेचितः ॥ १३ ॥

बिलद्वारीं वाहतां रक्त । असुरीं वाळी मारिला तेथ । म्यांही मानोनि निश्चित । अति दुःखांवतैं[३] ऊठिलों ॥ ५६ ॥ स्नान करोनियां जळीं । बंधु उद्धरावया वाळी । म्यां दिधली तिळांजळी । मंत्रमेळीं ऋषिउक्त ॥ ५७ ॥ ऐकोनि निजपुराचा बाध । स्त्रीबाळकां अति निर्बंध । तेणें मज आला क्रोध । नगररोध छेदावया ॥ ५८ ॥ नगर वेढिलें विद्याधरीं । असुर आलिया विवरद्वारीं । युद्ध करितां दोहींपरी । संकट भारी मांडेल ॥ ५९ ॥ ऐसें सांगतां ऋषीश्वरीं । म्यां उचलोनि प्रचंड गिरी । दृढ ठेविला विवरद्वारीं । वैरी बाहेरी न निघावया ॥ ६० ॥ मग करोनि उड्डाण । किष्किंधेसी येवोनि जाण । केलें विद्याधरांचें कंदन । चौघे प्रधान न येतांचि ॥ ६१ ॥ माझ्या उड्डानाचेनि वेगें । प्रधान राहिले पैं मागें । म्यां येवोनि लागवेगें । वैरी निजांगें निर्दाळिले ॥ ६२ ॥ माझें ऐकतां गर्जन । वीरीं उभ्यां सांडिले प्राण । अवघे झाले कंपायमान । जीव घेवोन पळाले ॥ ६३ ॥ स्त्रिया बाळें केलीं निर्मुक्त । नगर सुखी करोनि समस्त । माझा देखोनि पुरुषार्थ । संतोषत ऋषिवर्य ॥ ६४ ॥ येवोनि जंव पाहती प्रधान । तंव म्यां केलें अरिमर्दन । तेणें हर्षें चौघे जण । संतोषोन सुखी जाले ॥ ६५ ॥

राज्यं प्रशासतस्तस्य न्यायतो मम राघव ।
आजगाम रिपुं हत्वा वाली तमसुरोत्तमम् ॥ १४ ॥

माझा पुरुषार्थ देखोन । चौघे प्रधान ऋषी सज्ञान । किष्किंधेचें राज्य संपूर्ण । अभिषेचन मज केलें ॥ ६६ ॥ पूर्ण षण्मासपर्यंत । प्रजा सुखी केली समस्त । राज्य करोनि धर्मयुक्त । तंव शक्रसुत वाळी आला ॥ ६७ ॥ मर्दोनियां मयासुर । त्याचें घेवोनियां शिर । उघडोनियां विवरद्वार । केला भुभुःकार वाळीनें ॥ ६८ ॥ ऐकोनि वाळीचें गर्जन । मज उल्लास झाला पूर्ण । जेंवी प्रेताचा परते प्राण । तेंवी आगमन वाळीचें ॥ ६९ ॥ मृता होय अमृतपान । अंधा उघडती लोचन । अवर्षणीं वर्षे घन । तेंवी आगमन वाळीचें ॥ ७० ॥ पतिव्रते प्रियदर्शन । साधक पावे ब्रह्मज्ञान । तेंवी वाळीचें आगमन । सुखसंपन्न मज सुग्रीवा ॥ ७१ ॥ ऐकोनि वाळीचें आगमन । सुखी जाले ऋषी प्रधान । सुखी नगर नागरिक जन । सुखसंपन्न स्त्रिया बाळें ॥ ७२ ॥ उभवोनियां गुडिया मखरें । ढोल निशाण वाद्यगजरें । अवघे आले पैं सामोरे । जयजयकारें गर्जती ॥ ७३ ॥ म्यां सुग्रीवें येवोनि आपण । दीर्घ घालोनि लोटांगण । मस्तकीं वंदोनियां चरण । आलिंगन देऊं गेलों ॥ ७४ ॥ मज देखोनि सन्मुख । वाळी रागें जाला विमुख । माझें न पाहेचि मुख । परम दुःख मानसीं ॥ ७५

अभिषिक्तं तु मां दृष्ट्वा क्रोधसंरक्तलोचनः ।
मदीयान्मंत्रिणो बद्ध्वा परुषं वाक्यमुक्तवान् ॥ १५ ॥

मज केलें राज्याभिषिंचन[६] । तेणें वाळी क्रोधायमान । अभिषेक करवित जे प्रधान । त्यांतेंही आपण निग्रहूं[७] पाहे ॥ ७६ ॥ मग हात जोडोनि म्यां पुढती । वाळीप्रती केली विनंती । माझा

१ उत्साह, शक्ति. २ शोधार्थ. ३ दुःखित होऊन. ४ मारले. ५ शत्रूचा नाश. ६ राज्याभिषेक. ७ कैद करूं.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

अपराध कोणे अर्थीं । त्वां कां चित्तीं कोप धरिला ॥ ७७ ॥ आम्ही तुजवीण अनाथ । तूं तंव आमचा ज्येष्ठ भ्रात । तुझेनि आम्ही सदा सनाथ । आम्ही कृतार्थ तुझेनि ॥ ७८ ॥ भाग्यें जिंतोनि शत्रूसी । सभाग्य भाग्यें येथें आलासी । परम भाग्यें भेटलासी । ऐसें वाळीसी विनविलें ॥ ७९ ॥ ऐकोनियां माझें वचन । वाळी क्रोधें आरक्तनयन । कठिण बोलिला दारुण । सुहृदपण सांडोन ॥ ८० ॥ तूं बंधु नव्हेस माझा वैरी । वैर केलें बहुतां परी । तुझ्या वैराची पैं थोरी । परोपरी छळवादी ॥ ८१ ॥ मी रिघालों विवरांत । त्वां द्वारीं रहावें सावचित्त । तेथें तुवां केलें विपरीत । द्वारीं पर्वत स्थापिला ॥ ८२ ॥ सुग्रीवा तुझें मनोगत । असुरीं माझा करावा घात । स्वयें भोगावें राज्य समस्त । बिळ तदर्थ बूजिलें ॥ ८३ ॥ बिळीं रिघावें मजशुद्ध्यर्थ । तें त्वां सांडोनियां समस्त । तुम्हीं धरिला राज्यभोगस्वार्थ । कैंचें सुहृदत्व तुजलागीं ॥ ८४ ॥ स्वयें राज्य भोगावें समस्त । म्यां मरावें हें तुझ्या पोटांत । बिळ बुजिलें तदर्थ । कपटें व्यर्थ विनविसी ॥ ८५ ॥ म्यां रिघोनि बिळांत । दानव मारिले समस्त । सपुत्र सैन्या करितां घात । रक्त विवरीं प्रवाहे ॥ ८६ ॥ वीरीं करितां महामारी । अशुद्ध उलथलें विवरीं । तो प्रवाहो बिलद्वारीं । दानवां बोहरी पैं करितां ॥ ८७ ॥ वरद मायावी असुरांसी । निराहारी निरुदकासीं । युद्ध करितां एकवीस मासीं । मयवीरासी तैं अंत ॥ ८८ ॥

सूदयित्वा तु तं शत्रुं मायाविनमहं तदा ।
निष्कामन्नैव पश्यामि बिलस्य पिहितं मुखम् ॥ १६ ॥
मम विक्रोशतश्चैव सुग्रीवेति पुनः पुनः ।
यदा प्रतिवचो नास्ति तदाहं भृशदुःखितः ॥ १७ ॥

मारोनियां मयासुरासी । आणि मज बाहेरी यावयासी । मार्ग न दिसे कासाविसी । तुवां बिळेंसीं बूजिलें ॥ ८९ ॥ भोंवता भोंवें विवरांत । मार्ग मज नोहे प्राप्त । गुप्त दानव करिती घात । अंधारांत अति धाकें ॥ ९० ॥ मग विचार केला मानसीं । सुग्रीव आहे दारापासीं । आपण बोलावितां त्यासी । येवोनि वेगेंसीं काढील ॥ ९१ ॥ सुग्रीव सुग्रीव स्वयें बोलतां । पुनःपुनः हांका देतां । प्रतिवचन नायकतां । दुःखावस्था मज जाली ॥ ९२ ॥ एकला द्वारीं बैसला होता । दानवीं ठकोनि केलें घाता । तो कळिकाळातें नाटोपता । छळतां छळतां मारिला ॥ ९३ ॥ सुग्रीव मारिला तत्त्वतां । बंधुस्नेहें परम व्यथा । रडत पडत चडफडितां । दुःखावस्था मज जाली ॥ ९४ ॥ आम्हां दोघां सख्यसंबंधु । अणुमात्र नाहीं विरोधु । सुग्रीव अंतरला बंधु । दुःखसिंधु मज जाला ॥ ९५ ॥ केउंता गेलासी रे सुग्रीवा । तूं तंव माझा निजविसांवा । दैत्य मारोनि आलों दे खेंवा । बंधुगौरवा विसरलासी ॥ ९६ ॥ उल्लंघोनि मम आज्ञेसी । सुग्रीव नेंवचे लघुशंकेसी । दानवीं निर्दाळिलें त्यासी । उकसाबुकसीं स्फुंदत ॥ ९७ ॥ सुग्रीव वानर युवराजा । जीव प्राण आत्मा माझा । दैत्यीं मारिला युद्धीं समजा । कोणे काजा मी उरलों ॥ ९८ ॥ जरी मजसवें आला असता । तरी सुग्रीव माझा वांचता । विवरद्वारीं म्यां ठेवितां । स्वयें बंधुघाता म्यां केलें ॥ ९९ ॥ तुझा बाहेर केला घात । मज कोंडिलें विवरांत । माझा करावया उद्धरणार्थ । येईं धांवत बंधुराया ॥ १०० ॥ आम्ही तुम्ही वेगळे नव्हों कधीं । मज कां आठवली कुबुद्धी । तुज ठेवोनि द्वारांबंधीं । मी कां युद्धीं रिघालों ॥ १ ॥ मज लागला बहुत काळ । मजवीण न घेसी जळ फळ । तेणें तुज भरोनि तरळें । प्राण तत्काळ सांडिला ॥ २ ॥ ऐसा सुग्रीवालागीं विलपत । अंधारीं भोंवें विवरांत । दाटिला विवरद्वारीं पर्वत । देखिलें तेथ रविच्छिद्र ॥ ३ ॥

उपलेनास्मि संरुद्धो राज्यं मृगयतात्मनः ।
सुग्रीवेण नृशंसेन विस्मृत्य भ्रातृसौहृदम् ॥ १८ ॥
एवमुक्त्वा तु मां तत्र वाससैकेन वानरः ।
तदा निर्वासयामास वाली विगतसाध्वसः ॥ १९ ॥

सुग्रीवाचें निजहृद्गत । मज कोंडोनि मारावें विवरांत । बिलद्वारीं घातला पर्वत । राज्य समस्त भोगावया ॥ ४ ॥ पर्वत असतां बिलद्वारीं । रवि देखिला छिद्रांतरीं । घायें पर्वत करूनि दुरी । बिळाबाहेरी मी आलों ॥ ५ ॥

१ कृतकृत्य. २ जिंकून. ३ मनांतील अभिप्राय. ४ माझ्या शोधाकरतां. ५ निघालें. ६ नाश. ७ राक्षस. ८ कोठें. ९ आलिंगन. १० जात नाहीं. ११ द्वाराच्या तोंडीं. १२ कासाविशी.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सुग्रीव बैसविलासे एथ । त्याचा काय झाला
वृत्तांत । ऐसें जंव मी विचारित । तंव विपरीत
देखिलें ॥ ६ ॥ सुग्रीव किष्किंधेचा राजा । होवोनि
भोगी माझ्या [1]भाजा । शत्रुत्व जोडिलें ओजा ।
वैरी माझा हा एक ॥ ७ ॥ सुग्रीवालागीं मी तळ-
मळित । सुग्रीव माझाचि करी घात । ऐसें केलें
पैं विपरीत । राज्यभोगार्थ सुग्रीवें ॥ ८ ॥ विवरीं
माझी सांडोनि शुद्धी । सांडोनियां सुहृदबुद्धी ।
सुग्रीव बैसला राज्यपदीं । दुष्ट दुर्बुद्धि दुरात्मा
॥ ९ ॥ तारा सांगे वाळीपासीं । बुडतां किष्किं-
धेच्या राज्यासी । सुग्रीवें राखिलें प्रतापेंसीं ।
सत्य तुम्हांपासीं सांगतें ॥ ११० ॥ बिळीं गुंत-
लेती दोघे वीर । मागें शून्य राज्य नगर । तें
राज्य घ्यावया सत्वर । वेढिलें पुर विद्याधरीं
॥ ११ ॥ [2]विरोधोनि नगरनागरां । [3]निरोधिलें
स्त्रियां कुमरां । आकांत देखोनि समग्रां । ऋषी-
श्वरां परम चिंता ॥ १२ ॥ सेनापति वानरसैन्य ।
त्यांसी सर्वथा नाहीं ज्ञान । पूर्वीचे चौघे प्रधान ।
आले धांवोन तुम्हांपासीं ॥ १३ ॥ तुम्हां दोघां
जणां [4]आणावयार्थ । विवरा आले ऋषी समस्त ।
तंव विवरीं रुधिर देखिलें वाहत । सुग्रीव रडत
देखिला ॥ १४ ॥ रुधिर देखोनि सफेन । सुग्रीव
स्वयें कांस घालून । अवघ्यांस द्वारीं बैसवून ।
शुद्धीलागोन निघाला ॥ १५ ॥ सुग्रीव ऋषींपासीं
सांगत । वाळी मारिला प्रवाहे रक्त । मीही जातों
त्याचे शुद्ध्यर्थ । मंत्री हो समस्त पुरी राखा ॥१६॥
ऐसेंपरी सांगोनि ऋषि समस्तां । सुग्रीव बिळीं
प्रवेशतां । ऋषीश्वरीं धरिला त्वरिता । पूर्ण-
वृत्तांता अवधारीं ॥ १७ ॥ तुम्हांसि शोधावया-
लागोनी । प्रधान गेले वनोपवनीं । शून्य देखोनि
राजधानी । आले धांवोनि गंधर्व ॥ १८ ॥ तिंहीं
निरोधिलें नगर । आक्रंदती स्त्रिया कुमर । राज्य
गेलें गेलें समग्र । ऋषी सत्वर सांगों आले
॥ १९ ॥ वाळी निमाला रुधिरप्रवाहें । मेलिया-
मागें मरों नये । ब्रह्मदत्त स्वराज्य आहे । तें
आधीं संरक्षीं ॥ १२० ॥ स्वराज्य राखोनियां
स्वस्थ । मग निघावें वालिशुद्ध्यर्थ । तोंवरी बिल-
द्वारीं घालीं पर्वत । ऋषि सांगत पूर्वसूचने ॥ २१ ॥

युद्ध करितां विद्याधरीं । विवरद्वारें येतील वैरी ।
संकट पडेल [6]दोहींपरीं । घाली बिलद्वारीं पर्वत
॥ २२ ॥ ऋषींची आज्ञा अति समर्थ । सुग्रीवें
मानोनि निश्चित । घालोनि बिलद्वारीं पर्वत ।
आला युद्धार्थ महावीर ॥ २३ ॥ सुग्रीव वीर धीर
झुंझार । विभांडोनियां विद्याधर । विजयी जाला
एकांगवीर । जयजयकार ऋषी करिती ॥ २४ ॥
शून्य असों नये राजधानी । विचारोनि ऋषि-
प्रधानीं । सुग्रीवातें राहवूनी । अभिषिंचोनी बैस-
विलें ॥ २५ ॥ स्वयें सुग्रीव राज्य न घेता ।
बलात्कारें बैसविलें माथां । यासीं कोपों नको
आतां । क्षमा सर्वथा करा स्वामी ॥ २६ ॥ ऐको-
नियां तारेचें वचन । वाळी बोले कोपायमान ।
याचें तुज न कळे [7]विंदान । वैरी संपूर्ण हा माझा
॥ २७ ॥ विभांडूनि वैरियासी । राज्यीं बैसविलें
आपणासी । माझा आठवू कां नव्हे यासी । पूर्ण
द्वेषी हा माझा ॥ २८ ॥ माझा सांडोनि [8]परामर्ष ।
सुखें राज्य करी षण्मास । माझें मरणीं यासी
हर्ष । म्हणोनि विवरास बुजविलें ॥ २९ ॥ राज्य
राखोनि स्वस्थता । बिळींचा पर्वत जरी
काढिता । तरी मानितों अति सख्यता । वैरी
सर्वथा हा माझा ॥ १३० ॥ ऐसें बोलोनि सक्रो-
धता । करितां सुग्रीवाच्या घाता । तारेनें धांवोनि
धरिलें हाता । स्वबंधुघाता करूं नये ॥ ३१ ॥
सुषेणाची निजदुहिता । तारा वाळीची पतिव्रता ।
रुमा सुग्रीवाची कांता । हिरोनि घेता होय वाळी
॥ ३२ ॥ तारेचेनि बोलें जाण । राखिला सुग्री-
वाचा प्राण । हिरोन दारा वस्त्र भूषण । नगरनि-
र्याण [9]निवस्त्र केलें ॥ ३३ ॥ लावोनियां पैं लंगोटी ।
सुग्रीव दवडिला गिरिकपाटीं । सक्रोध प्रधानां
पाहतां दृष्टीं । तेही उठाउठीं पळाले ॥ ३४ ॥
प्रधानीं त्यासी केलें अभिषिंचन । कोपें दंडूं पाहे
जाण । तेणें भयें पलायमान । आले पळोन
मजपासीं ॥ ३५ ॥ सख्या बंधूंत दोघां आम्हां ।
विरोध पडावयाची सीमा । सांगीतली श्रीरामा ।
उभय धर्मा यथार्थ ॥ ३६ ॥ हृतयौवराज्य हृतयु-
वदारा । तेणें अति दुःखी मी श्रीरघुवीरा । अहो-
रात्र न लागे निद्रा । श्रीरामचंद्रा तुझी आण

१ स्त्रिया. २ अटकाव करून. ३ कोंडलें. ४ आणण्याकरितां. ५ नाकेबंदी केली. ६ दोहींकडून. ७ करणी.

८ शोध, चौकशी. ९ वस्त्ररहित. १० त्वरित,

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ ३७ ॥ ऐसें सुग्रीवें सांगतां । कृपा आली श्रीरघुनाथा । वाळी वधीन मी आतां । ठेविला माथां पद्महस्त ॥ ३८ ॥ वालिसुग्रीवां विरोध । त्याचा जाला अनुवाद । एका जनार्दनीं परम बोध । वालिवध निजमोक्ष ॥ १३९ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे किष्किंधाकांडे एकाकारटीकायां वालिसुग्रीवविरोधकथनं नाम चतुर्थोऽध्यायः ॥ ४ ॥ ॥ ओंव्या ॥ १३९ ॥ श्लोक ॥ १९ ॥

अध्याय पांचवा

श्रीसीतारामचंद्राय नमः ॥ पुढती वाळीच्या संत्रासीं । सुग्रीव सांगे श्रीरामापासीं । हृतराज्य गुप्त वनवासी । तेथेंही आम्हांसी मारूं धांवे ॥१॥

तेनाहमपविद्धश्च हृतदारश्च राघव ।
तद्भयाच्च महीं कृत्स्नां विचरामि समंततः ॥ १ ॥
ऋष्यमूकं गिरिवरं भार्याहरणदुःखितः ।
प्रविष्टोऽस्मि दुराधर्ष वालिनः कारणान्तरे ॥ २ ॥

आम्हीं जावें जेथ जेथ । वाळी मागें धांवे तेथ तेथ । आमचा करावया जीवघात । वैर पोटांत दृढ धरिलें ॥ २ ॥ वालिभयें भयभीत । अहोरात्र असों गुप्त । पाळती येवोनियां तेथ । शुद्धी सांगत वाळीसी ॥ ३ ॥ भयें भोंवतां दशदिशीं । नारदें सांगीतलें आम्हांसी । जावोनि रहावें ऋष्यमूक पर्वतासीं । तेथें वाळीसी ऋषिशाप ॥ ४ ॥ ऐक शापाचें कारण । दुंदुभि बळें उन्मत्त पूर्ण । वाळीपासीं येवोनि आपण । युद्ध दारुण मांडिलें ॥ ५ ॥

संगृहीत्वा विषाणाभ्यां दुंदुभिं गिरिसन्निभम् ।
पातयामास तं वाली क्षितौ पंचत्वमागतः ॥ ३ ॥
चिक्षेप बलवान्वाली पादेनैकेन योजनम् ।
तस्य वेगप्रविद्धस्य वक्त्रात्क्षतजबिंदवः ॥ ४ ॥
प्रपेतुर्मारुतोत्क्षिप्ता मतंगस्याश्रमं प्रति ।
तान्दृष्ट्वा पतितांस्तत्र मुनिः शोणितविप्रुषः ॥ ५ ॥
उत्ससर्ज महाशापं क्षेप्तारं वालिनं प्रति ।
इह तेनाप्रवेष्टव्यं प्रविष्टस्य वधो भवेत् ॥ ६ ॥

वेगीं धरोनि दुंदुभीसी । वाळीनें आपटितां भूमीसीं । घायें सांडवोनि प्राणांसी । पंचत्वासी पावविला ॥ ६ ॥ वाळीनें वेगें वामपदेंसीं । दुंदुभि उडविला आकाशीं । मतंग ऋषीच्या आश्रमासी । रुधिर त्यापासीं पैं स्रवलें ॥ ७ ॥ स्रवतां देखोनि रुधिरासी । कोप आला मतंगऋषीसी । तेणें शापिलें वाळीसी । अति आक्रोशीं सक्रोध ॥ ८ ॥ ज्याचिया आघातनिजशक्तीं । अशुद्ध स्रवे आश्रमाप्रती । त्यासी रिघतां या पर्वतीं । मरण निश्चितीं पावेल ॥ ९ ॥ पाय लावितां ऋष्यमूकासी । शापें मरण आहे वाळीसी । नारद सांगोनि आम्हांसी । धाडी वस्तीसी ऋष्यमूका ॥ १० ॥ ऋष्यमूकीं करितां वसती । होईल वालिभयाची निवृत्ती । थोर पावाल यश कीर्ती । श्रीरघुपतिप्रसादें ॥ ११ ॥ नारदवचनें ऋष्यमूकीं । निर्भय राहिलों निजसुखी । वालिभयाची धुकधुकी । येथें निःशेखी असेना ॥ १२ ॥ शापभय घेवोनि पोटीं । वाळी ऋष्यमूक न पाहे दृष्टीं । येथें यावयाची न करी गोष्टी । सुखसंतुष्टी असों आम्ही ॥ १३ ॥ नारदवचनाची वचनोक्ती । आजि मज आली प्रतीती । तूं भेटलासी कृपामूर्ती । आम्ही त्रिजगतीं निजविजयी ॥ १४ ॥

एतत्ते सर्वमाख्यातं विरोधे कारणं महत् ।
अनागसा मया प्राप्तं स्थानं निर्भयमात्मनः ॥ ७ ॥

सर्व वैराचें कारण । मुख्य माझें दारहरण । तें म्यां सांगितलें संपूर्ण । निर्भयस्थान ऋष्यमूकीं ॥ १५ ॥ माझी भार्या जे कां रुमा । ते मज पढियंती जैसा आत्मा । ते सोडविल्या श्रीरामा । सुखसंभ्रमा पावेन ॥ १६ ॥ तारा निजपत्नी वाळीसी । तेणें सुख भोगावें तियेसीं । रुमा माझी मज द्यावी गौरवेंसीं । वैर दोघांसीं असेना ॥ १७ ॥ आम्हां दोघां व्यर्थ विरोध । स्त्रीहरणें वैरसंबंध । सासांमासीं करितां युद्ध । पडियेलें द्वंद्व स्त्रीलोभें ॥ १८ ॥ बहुत युद्ध त्यासीं आम्हांसीं । नेमस्त करितां सांसामासीं । सुटका नव्हे निजपत्नीसी । उकसाबुकसीं स्फुंदत ॥ १९ ॥ देखोनि सुग्रीवाचें रुदन । श्रीराम काढी निर्वाणबाण । घायें वाळीचा घेईन प्राण । सत्य जाण सुग्रीवा ॥ २० ॥ वाळी सबळ बळवाहन । आतुर्बळी श्रीरघुनंदन । दोघे जण समसमान । न्यून पूर्ण असेना ॥ २१ ॥ पैल

---

१ कथन. २ भयानें. ३ ज्याचें राज्य हरण केलें आहे असा. ४ फिरतां फिरतां. ५ मृत्यूला. ६ रक्त. ७ नाश. ८ स्त्री पळविणें. ९ आवडती. १० सहा सहा महिन्यांनीं.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

दुंदुभिकलेवर जाण। अंगें उचली जो आपण। त्याचेनि हस्तें वालिमरण। ऋषि भाषे मातंगी ॥ २२ ॥ सप्तताड विषम वन। एकें बाणें करी जो छेदन। त्याचेनि हस्तें वालिमरण। ऋषि भाषे मातंगी ॥ २३ ॥

एवमुक्तवतस्तस्य सुग्रीवस्य महात्मनः।
राघवो दुन्दुभेः कायं वामांगुष्ठेन चालयन् ॥ ८ ॥
लीलयैव महावीर्यश्चिक्षेप दशयोजनम् ॥ ९ ॥

ऐकोनि सुग्रीववचन। स्वयें श्रीराम हास्यवदन। दुदुंभिकलेवर गिरिसमान[1]। देखिलें आपण श्रीरामें ॥ २४ ॥ तें वामांगुष्ठें उचलोन। केलें त्रिवार तोलन। स्वलीला सांडितां हेळसोन। दश योजन उडविलें ॥ २५ ॥ दुंदुभिकाय अति समर्थ। श्रीरामें उडविलें अंगुष्ठवत। तरी सुग्रीव साशंकित। बोले भयभीत तें ऐका ॥ २६ ॥

आर्द्रं समांसं प्रत्यग्रं क्षिप्तं कायं च वालिना।
सांप्रतं लघु निर्मांसं क्षिप्तं कायं त्वयाद्य वै ॥ १० ॥
नात्र शक्यं बलं ज्ञातुं तव वा तस्य वाधिकम्।
तालानेतान् सुनिर्भिद्य भवेद्व्यक्तिर्बलाबले ॥ ११ ॥

वाळीनें मारोनि दुदुंभीसी। मांसरक्तसार्द्रासी[2]। पायें उडविलें आकाशीं। आम्हां सर्वांसीं देखतां ॥ २७ ॥ आतां तुवां श्रीरघुनाथा। दुंदुभिकाय अति शुष्कता। वाळून जाला अति लघुता। तो पदघातें उडविला ॥ २८ ॥ ऐसेंही आम्हां देखतां। लक्षेना बळाबळता। विशाल ताड एकें बाणें छेदितां। तैं वालिहंता तूं होसी ॥ २९ ॥ संदिग्ध वानरवचन। ऐकोनि श्रीरामें चढवोनि गुण। गुणीं लाविला फणीबाण। तालच्छेदन करावया ॥ ३० ॥ विषम तालांची ताडस्थिती। शेषपृष्ठीवरी[3] उत्पत्ती। त्यांसी छेदावया श्रीरघुपती। केली युक्ति ते ऐका ॥ ३१ ॥ धनुष्य ओढोनी आपण। चेपिला लक्ष्मणाचा चरण। तेणें चुकवितां अंग संपूर्ण। विषम ते सम ताड झाले ॥ ३२ ॥ शेषावतार लक्ष्मण तेणें। अंग चुकवितां संपूर्ण। विषम ताड झाले समान। श्रीरघुनंदनें छेदितां ॥ ३३ ॥

स गृहीत्वा धनुर्घोरं शरमेकं च राघवः।
तालान्भित्वा गिरींश्चैव प्रविवेश रसातलम् ॥ १२ ॥

धनुष्य वाहूनि[4] दुर्धर। गुणीं लाविला अमोघ शर। बाण सोडितां श्रीरामचंद्र। जालें विचित्र तें ऐका ॥ ३४ ॥ सप्ततालांतें छेदूनी। गिरिवरांतें विदारूनी। सप्तपाताळ भेदूनी। गेला निघोनि शेषांगा ॥ ३५ ॥ शेषाचे आंगीं तालमूलता। त्यांतें झाला समूळ छेदिता। परतोनि येवोनि श्रीरामहाता। रिघोनि भातां स्वस्थ राहे ॥ ३६ ॥ श्रीरामें छेदिले विषम ताळ। तेणें सुग्रीवा सुखकल्लोळ। जयजयकारें गर्जती सकळ। आम्ही सबळ श्रीरामें ॥ ३७ ॥ भवभय ताडविषमता। श्रीरामदृष्टीं होय समता। विषम ताळ श्रीराम छेदितां। सुख समस्ता कपिकुळा ॥ ३८ ॥ श्रीराम आम्हां सुखसंपत्ती। श्रीराम आम्हां निजविश्रांती। श्रीराम आम्हां साह्यार्थी। निजसांगाती श्रीराम ॥ ३९ ॥ श्रीराम आम्हां जिवलग सोयरा। श्रीराम निजात्मा वानरां। श्रीराम स्वामी चराचरां। वंद्य सुरवरां श्रीराम ॥ ४० ॥ ऐसें बोलोनि आपण। सुग्रीवें घातलें लोटांगण। श्रीरामें दिधलें आलिंगन। समाधान जीवशिवां ॥ ४१ ॥ श्रीराम म्हणे सुग्रीवासी। पुढें जावोनि किष्किंधेसी। वाळीतें पाचारीं युद्धासी। तुझे पाठीसीं मी असें ॥ ४२ ॥ वाळी आलिया संग्रामासी। बाणें निवटीन क्षणार्धेसीं। तूं तंव भिवों नको त्यासी। निःशंकतेसीं युद्ध करीं ॥ ४३ ॥ सुग्रीवा वाळीसीं युद्ध करितां। विसरूं नको मज रघुनाथा। जयो पावसी सर्वथा। सत्वर वचन माथां वंदिलें ॥ ४४ ॥ ऐसें सांगतां श्रीरघुवीर। सुग्रीवें केला भुभुःकार। कौतुक पाहे श्रीरामचंद्र। वाळी वानर मी मारीन ॥ ४५ ॥ वाळी बळिया अति बळी। मीही श्रीराम आतुर्बळी। आजि वाळीची करीन होळी। रणरंवदळी[5] पाहें माझी ॥ ४६ ॥

एवमुक्त्वा तु सुग्रीवं शूरौ तौ नरवानरौ।
जग्मतुः सहितौ शीघ्रं किष्किंधां वालिपालिताम् ॥ १३ ॥
ते सर्वे सहसा गत्वा रामसुग्रीवलक्ष्मणाः।
वृक्षैरात्मानमावृत्य ह्यतिष्ठन् गहने वने ॥ १४ ॥

ऐसें बोलतां सुग्रीवासीं। सवेग उठिला सौमित्रेसीं। येवोनि किष्किंधाप्रदेशीं। वालिवधासी

---

१ पर्वतासारखें. २ मांस व रक्त यांहीं ओला अशा. ३ शेषाच्या पाठीवर. ४ उचलून. ५ ठार मारीन. ६ लढाईचा मार.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

उद्यत ॥ ४७ ॥ एक सखा जिवलग सौमित्र । दुजा सुग्रीव सन्मित्र । दोघे घेवोनि वेगवंत्तर । श्रीरामचंद्र निघाला ॥ ४८ ॥ एक जाले नरवानर । वानरवीरांचा संभार । अवघे करिती जयजयकार । किष्किंधाद्वार ठाकिलें ॥ ४९ ॥ श्रीराम सुग्रीव आणि सौमित्र । तिघे चालती एकत्र । आनंदें गर्जती वानर । किष्किंधाद्वार पांवले ॥ ५० ॥ जेंवी आत्मा देहाआंत । असोनि न देखती समस्त । तेंवी श्रीराम त्या वानरांत । ठेविला अति गुप्त जनदृष्टीं ॥ ५१ ॥ वालिसुग्रीवयुद्ध अति दुर्धर । पहावया श्रीरामचंद्र । वनीं वसोनि अगोचर । नरवानर न देखती ॥ ५२ ॥ निकट न देखती नरवीर । देखों न शकती ऋषीश्वर । त्यांसी केंवी देखे वाळी वानर । अगोचर श्रीराम ॥ ५३ ॥ गोचरा न दिसे अगोचर । हें तंव मूळीं-चेंचि ब्रह्मसूत्र । जवळी असतां श्रीरामचंद्र । नरवानर न देखती ॥ ५४ ॥ असो हे कथा अति विस्तार । श्रीराम कोणा नव्हे गोचर । साधु जाणती हा विचार । श्रीरामचंद्रगुह्य गुप्त ॥ ५५ ॥ सुग्रीवें घालोनियां कांस । पाहोनि श्रीरामाची वास । भुभुःकारें अति उल्लास । नादें आकाश दुमदुमिलें ॥ ५६ ॥ सुग्रीवाच्या गिरागजरें । दिवसा पडती नक्षत्रें । डळमळलीं मेरुशिखरें । गिरिकंदरें दुमदुमलीं ॥ ५७ ॥ दिग्गजांचीं बैसलीं टाळीं । नादें गजबजिला वाळी । ऐसा कोण आला बळी । प्रळयआरोळी देवोनी ॥ ५८ ॥ दूत सांगती वाळीसी । सुग्रीव आलासे युद्धासी । हें सामर्थ्य नाहीं त्यासी । शक्ति अनारिसी दिसतसे ॥ ५९ ॥ त्यासी कोणी भेटला बळी । त्याचेनि देतो महा आरोळी । ऐसें विचारोनि वाळी । कांस तत्काळीं घातली ॥ ६० ॥ आजिचें युद्ध अति संकटीं । विजयमाळा घातली कंठीं । तरी धाकतसे पोटीं । आरोळी मोठी ऐकोनी ॥ ६१ ॥ आजि मरणें कीं मारणें । दोहींचें वैर आजि छेदणें । ऐसा निश्चय करोनि तेणें । युद्धा येणें सक्रोधें ॥ ६२ ॥

श्रुत्वा तु निनदं भ्रातुः क्रुद्धो वाली महाबलः ।
निष्पपात सुसंरब्धो भास्करोऽस्ततटादिव ॥ १५ ॥

ततः सुतुमुलं युद्धं वालिसुग्रीवयोरभूत् ।
तलैरशनिकल्पैश्च वज्रकल्पैश्च मुष्टिभिः ।
जघ्नतुः समरेऽन्योन्यं भ्रातरौ क्रोधमूर्च्छितौ ॥ १६ ॥

ऐकोनि सुग्रीवाची आरोळी । युद्धा क्रोधें आला वाळी । दोघे भिडती क्रोधानळीं । महाबळी वानर ॥ ६३ ॥ वालिसुग्रीवयुद्धव्युत्पत्ती । ब्रह्मादि देव पाहूं येती । नभ दाटलें विमानपंक्तीं । दोहींची शक्ती लक्षावया ॥६४॥ समानबळ दोहीं वीरीं । युद्धव्युत्पत्ति दोघां पुरी । कवणा जय कवणा हारी । पाहूं सुरवरीं येइजे ॥ ६५ ॥ दोघां होतां दृष्टादृष्टी । कोपोद्भव उठिला पोटीं । समबंधुत्वा पडिली तुटी । स्त्रीलोभासाठीं अपघात ॥ ६६ ॥ जेंवी ग्रहणपर्वणीसी । ग्रासूं धांवे राहू सूर्यासी । तेंवी वाळी सुग्रीवासी । निर्दळावयासी धांवत ॥ ६७ ॥ वाळी पर्वत हाणी दारुण । सुग्रीव मुष्टिघातें करी चूर्ण । शाल ताल मानी कोण । रणमदें पूर्ण उन्मत्त ॥ ६८ ॥ दोहींची अदट आंगवण । अंग घटलें करितां रण । घाय हाणिती दारुण । भ्याडांचे प्राण निघों पाहती ॥ ६९ ॥ वज्रप्राय करांभिघाता । निष्ठुर मुष्टि हाणिती माथां । परस्परें तडवे देतां । अति निघाता पेटले ॥ ७० ॥ दंडीं मुंडपीं उरीं शिरीं । घाय हाणिती शिरोदरीं । जानु हाणिती उरावरी । ताडिती कोंपरीं येरयेरां ॥ ७१ ॥ दोघां जेत्यांचा आवांका । लाविती पुच्छांचा तडाका । परस्परें हाणिती थडका । उठला धडका अंतराळीं ॥ ७२ ॥ एक एका तळीं वरी । दोघे तळपती चक्रापरी । दोघे उसळती गगनोदरीं । निराधारीं भिडती ॥ ७३ ॥ घाय हाणिती महाबळी । न्याहीं उठिला पाताळीं । कृतांताची बैसली दांतखिळी । देतां आरोळी गर्जोनी ॥ ७४ ॥ क्षण एक युद्ध पृथ्वीवरी । क्षण एक युद्ध गगनोदरीं । युद्धलाघवता वानरीं । सुरासुरीं विस्मयो ॥ ७५ ॥ बाप बळिये दोघे वानर । वीर धीर महा शूर । दोघे योद्धे अति दुर्धर । येरयेरां नाटोपती ॥ ७६ ॥

धनुरादाय काकुत्स्थस्तावुभौ समुदैक्षत ।
अन्योन्यसदृशौ वीरावुभौ देवाविवाश्विनौ ॥ १७ ॥

१ मोठ्या त्वरेनें. २ समुदाय. ३ येऊन पोंचले. ४ वाट. ५ वेगळी. ६ वाली आणि सुग्रीव या दोघांमधील युद्धकौशल्य.

७ अपजय. ८ अमावास्येस. ९ अमर्याद. १० हातांचे माराला. ११ तडाखे. १२ जयेच्छु वीरांचा. १३ प्रतिध्वनि.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

यन्नावगच्छत्सुग्रीवं वालिनं वापि राघवः ।
ततो न कृतवान् बुद्धिं मोक्तुमंतकरं शरम् ॥ १८ ॥

दोघे वीर रणप्रवीण । देखोनि वानरांचें रण । संतोषला श्रीरघुनंदन । बळ समान दोहींचें ॥ ७७ ॥ दोघे वानर अनन्य । सबळ बळें समसमान । देखोनि श्रीरामें योजिला बाण । वाळी विंधोन मारावया ॥ ७८ ॥ तंव वाळी सुग्रीव दोघे जण । ठाणमाण वर्णलक्षण । रूपरेखा समसमान । कोणास बाण विंधावा ॥ ७९ ॥ जैसे कां दोघे अश्विनौ देवें । समरूप समानभाव । तैसेचि वालिसुग्रीव । समावयव सारिखे ॥ ८० ॥ श्रीराम सज्जूनियां बाण । स्वयें जाला विस्मयापन्न । दोघांमाजी वाळी कोण । कोणासी आपण वधावें ॥ ८१ ॥ न कळोनियां विंधूं जातां । अवचट जालिया सुग्रीवघाता । तेव्हां मी जालों विश्वासहंता । भाकही वृथा होय माझी ॥ ८२ ॥ बाण लागलिया अवचितां । श्रीरामें मारिलें शरणागता । ऐसें निंद्यत्व बैसेल माथां । क्षोभ समस्तां पूर्वजांसी ॥ ८३ ॥ मुख्य क्षोभेल हरिश्चंद्र । शिबी भगीरथ पृथु नरेंद्र । काकुत्स्थ दिलीपादि नृपवर । वंशींचे समग्र क्षोभती ॥ ८४ ॥ रुक्मांगद धर्मांगद । सूर्यवंशींचे वीर अगाध । अवघे क्षोभती प्रबुद्ध । केलें विरुद्ध श्रीरामें ॥ ८५ ॥ शरणागता वज्रपंजर । मिथ्या मिरवी श्रीरामचंद्र । ऐसें निंदितील सर्वत्र । लागल्या शर सुग्रीवा ॥ ८६ ॥ ऐसें विचारोनि जाण । श्रीराम न विंधीच बाण । तंव वाळीनें केलें आनें । जयो आपण पावावया ॥ ८७ ॥ वीर्य धैर्य आंगवण । सबळ बळें दोघे समान । वाळीनें जाणोनि आपण । केलें विंदानें निजविजया ॥ ८८ ॥ सुग्रीव नाटोपे निजबळें । वाळीस कळलें युद्धसमेळें । मग दाखविलें वरदमाळे । जयकाळें विजयार्थी ॥ ८९ ॥ युद्ध करितां वर्षानुवर्षीं । श्रम खेद नव्हे दोघांसी । वाळी जाणोनि मानसीं । मग माळेसी प्रयोजी ॥ ९० ॥

एतस्मिन्नंतरे भग्नः सुग्रीवस्तेन वालिना ।
अपश्यद्राघवं नाथमृष्यमूकं ययौ जवात् ॥ १९ ॥

होतां वरदमालादर्शन । सुग्रीवशक्ति झाली क्षीण । भोवंडी येवोनि पडे आपण । मूर्च्छित पूर्ण ऋष्यमूकीं ॥ ९१ ॥ रणीं मूर्च्छित पडतां पहा हो । सुग्रीवें सांभाळिला आवो । उडोनि ऋष्यमूकीं पहा हो । पडे महावाहो मूर्च्छित ॥ ९२ ॥ करावया सुग्रीवाचा अंत । वाळी रिघों न शके ऋष्यमूकांत । वाळी निजविजयें गर्जत । व्यर्थ रघुनाथ साह्य केला ॥ ९३ ॥ धरोनि श्रीरामाचें बळ । मजसीं करूं आलासी सळ । युद्धीं केलासी विकळ । व्यर्थ तळमळ कां करिसी ॥ ९४ ॥ मजसीं करावया संग्राम । सन्मुख राहों न शके राम । सांडीं स्त्रीराज्यांचा भ्रम । व्यर्थ श्रम करूं नको ॥ ९५ ॥ सुग्रीवा दिधलें रे जीवदान । न मारीं ऋक्षराजाची आण । ऐसें वाळी गर्जोन । गेला निघोन किष्किंधे ॥ ९६ ॥ विजयाच्या जयजयकारीं । वाळी प्रवेशला नगरीं । सुग्रीव ऋष्यमूकामाझारीं । दुःखें करीं विलपत ॥ ९७ ॥

अपश्यद्राघवं नाथमृष्यमूकं प्रदुद्रुवे ।
क्लांतो रुधिरसिक्तांगः प्रहारैर्जर्जरीकृतः ॥ २० ॥
राघवोऽपि सह भ्रात्रा सह चैव हनूमता ।
तदेव वनमागच्छत्सुग्रीवो यत्र वानरः ॥ २१ ॥

सुग्रीव पडतांचि मूर्च्छित । वानर झाले हाहाभूत । वालिभयें भयभीत । वानरें पळत ऋष्यमूकीं ॥ ९८ ॥ वाळीच्या घायीं जर्जरीभूत । रक्तें न्हाणिला धगधगीत । सुग्रीव अति दुःखें विलपत । साह्य रघुनाथ नव्हेचि ॥ ९९ ॥ वालिवधाचा आक्रम । श्रीरामें दावोनि पराक्रम । करविला युद्धधर्म । अति दुर्गम वाळीसीं ॥ १०० ॥ वाळी वधावया तत्काळ । धरोनि श्रीरामाचें बळ । निःशंक युद्ध केलें तुंबळ । अति सबळ वाळीसीं ॥ १ ॥ श्रीरामबळाचा निंजनेट । युद्ध केलें कडकडाट । श्रीरामें पाहिला माझा शेवट । घायवंट जंव पडें ॥ २ ॥ वाळीनें केला जर्जरीभूत । तरी साह्य नव्हे श्रीरघुनाथ । दैवें आलों ऋष्यमूकांत । येऱ्हवीं प्राणान्त पावतों ॥ ३ ॥ पडतों ऋष्यमूकाबाहेरी । तरी वाळी मारिता क्षणामाझारीं । श्रीराम होवोनि साहाकारी । रणद्वारीं गांजिलों ॥ ४ ॥ श्रीरामाचें

१ शरीराची ठेवण. २ अश्विनीकुमार. ३ क्रोध करितील. ४ ज्ञाते. ५ दुसरेंच. ६ युक्ती. ७ योजना केली. ८ तंटा, युद्ध. ९ स्त्रीचा व राज्याचा. १० मोठी भिस्त. ११ जखमी होऊन.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

साह्यबळ । रणरंगीं जालें विफळ । सुकली कृपेची पैं ओल । घायीं सखोल गांजिलों ॥ ५ ॥ श्रीरामें हारविली निजकांता । तो काय मज साह्य होईल आतां । वृथा बोलणें श्रीरघुनाथा । मज तत्त्वतां मानलें ॥ ६ ॥ श्रीराम सत्य सर्वज्ञ । राज्य त्यजोनि आला वना । तोही माझिया संरक्षणा । मिथ्याप्रतिज्ञ होवोनि ठेला ॥ ७ ॥ ऐसा सुग्रीव विलपत । तंव लक्ष्मणहनुमंतांसमवेत । तेथें आला श्रीरघुनाथ । कृपावंत कृपाळु ॥ ८ ॥

आह्वयस्वेति मामुक्त्वा दर्शयित्वा च विक्रमम् ।
वैरिणा घातयित्वा मां किंविदानीं करिष्यसि ॥२२॥

स्वमुखें सांगे श्रीरघुनाथ । वाळीसी पाचारीं युद्धार्थ । दृष्टीं पडतांचि करीन घात । तुझा कार्यार्थ साधीन ॥ ९ ॥ ऐसें बोलोनि आपण । वाळीसीं मज लाविलें रण । घायीं माझा निघतां प्राण । साह्य संपूर्ण नव्हेचि ॥ ११० ॥ आतां येवोनियां येथ । काय साधिसी कार्यार्थ । वाळी गेला नगरांत । निजविजयार्थ साधोनी ॥ ११ ॥ वाळीनें करितां अति निर्वाणें । नाहीं ढळलों अणुप्रमाण । वरदमाळा दावितां जाण । मूर्च्छापन्न[२] मी पडिलों ॥ १२ ॥ दैवें पाडिलें ऋष्यमूकांत । येऱ्हवीं वाळी करिता माझा घात । साह्य नव्हसीच मूर्च्छित । दुःखाभिभूत[३] मज केलें ॥ १३ ॥ मी मूर्च्छित होतां विमुख । पाठीसी घालोनि निःशंक । वाळीसी नव्हसीच सन्मुख । परम दुःख मज दिधलें ॥ १४ ॥ साह्य होवोनियां करावें सुखी । श्रीराम सत्यवादी तिहीं लोकीं । तुवां मज केलें परम दुःखी । तेही लटकी कीर्ति केली ॥१५॥ सुग्रीव देखोनि दुःखभिभूत । कळवळला श्रीरघुनाथ । त्याचें ऐकोनि रुदित । स्वयें बोलत कृपाळु ॥ १६ ॥

सुग्रीव श्रूयतां तात क्रोधश्च व्यपनीयताम् ।
कारणं येन बाणोऽयं न मया विनियोजितः ॥ २३ ॥
अलंकारेण वेषेण प्रमाणेन गतेन च ।
त्वं च सुग्रीव वाली च सदृशौ स्थः परस्परम् ॥ २४ ॥

क्रोध सांडोनि सावधान । सुग्रीवा ऐकें माझें वचन । साह्य न व्हावयाचें कारण । झालें विंदान परियेसीं ॥ १७ ॥ गुणीं लावोनियां बाण । वाळीचा म्यां घ्यावा प्राण । तंव तुम्ही बंधु दोघे जण । समसमान भासलेती ॥ १८ ॥ वस्त्रें अलंकार आभरण । रूपरेखा समसमान । न कळे वाळीचें निजचिन्ह । यालागीं बाण न विंधींच ॥ १९ ॥ न कळोनि बाण विंधितां । जरी तुज लागता अवचितां । तरी श्रीरामें मारिलें शरणागता । निजजघन्यता तिहीं लोकीं ॥ १२० ॥ अवचटें तुज लागल्या बाण । मग म्यां त्यजावा कीं आपुला प्राण । ऐसें जाणोनियां आपण । शरसंधान न करींच ॥ २१ ॥ तुझेनि कैवारें एकाएक । वाळीसीं युद्ध करितां देख । तेथेंही थोर आहे अटक । जरी सन्मुख वरदमाळा ॥ २२ ॥ जो जो युद्ध करी संमुख । वरदमाळा करी विमुख । मज नाहीं होणें पराङ्मुख । ते मज अटक युद्धार्थीं ॥ २३ ॥ युद्ध न करावया हेंचि कारण । साह्य व्हावें तंव दोघे समान । यालागीं मी न विंधींच बाण । सत्य जाण सुग्रीवा ॥ २४ ॥ व्यर्थ कां होसी खेदयुक्त । हा तुझा प्रारब्धभोग निश्चित । आणि वाळीचें कांहीं आयुष्य प्राप्त । तेणें पदार्थ ऐसा घडला ॥ २५ ॥ घायें घ्यावया वाळीचा प्राण । आतां मी घेतों धनुष्यबाण । मज मारितां न लगे क्षण । युद्धाक्रमण[६] करीं वाळीसीं ॥ २६ ॥ सुग्रीव म्हणे नाहीं शक्ती । केंवी मी पाचारूं युद्धार्थीं । कृपेनें आलिंगी श्रीरघुपती । अमृतहस्तीं स्पर्शिला ॥ २७ ॥ आलिंगनमिषें जाण । दिधली निजशक्ति संपूर्ण । पहिल्यापेक्षां शतगुण । आंगँवण[७] सुग्रीवा ॥ २८ ॥ सुग्रीव पाहे सावधान । अंगीं न देखे घाय ना वण । पुरती बाणली आंगवण । वाळीसीं रण करावया ॥ २९ ॥ सुग्रीव उठे ते काळीं । प्रतापें बोले श्रीरामाजवळी । आजि मी लोळवीन वाळी । रणकल्लोळीं विचरूनी ॥ १३० ॥ ऐसें बोलोनि श्रीरामाजवळी । वेगीं उठिला तत्काळीं । युद्ध करावया बळी । उडे अंबरीं सुग्रीव ॥ ३१ ॥ श्रीरामें पाचारोनि त्यासी । समरूपता तुम्हां दोघांसी । युद्धीं ओळखावया सुग्रीवासी । घालवी त्यासी गजमाळा ॥ ३२ ॥

गजपुष्पीमिमां फुल्लामुत्पाट्य शुभलक्षणाम् ।
कंठे कुरु त्वं सौमित्रे सुग्रीवस्य महात्मनः ॥२५॥

१ निकराची लढाई. २ मूर्च्छा येऊन. ३ दुःखानें व्यापलेला. ४ चमत्कार, कौतुक. ५ आपला कमीपणा. ६ युद्धाला आरंभ. ७ बळ, सामर्थ्य. ८ गजकमळांची माळ.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

गजकमळमाळा सुलक्षण । श्रीरामें निर्मोनियां आपण । सुग्रीवकंठीं घातली संपूर्ण । ओळखण रणरंगीं ॥ ३३ ॥ गजांतलक्ष्मी यावयासी । गजकमळमाळा घातली त्यासी । तेचि ओळखण रणभूमीसी । वालिवधासी मुख्य मूळ ॥ ३४ ॥ श्रीरामाज्ञा अति समर्थ । माळा न तुटे युद्धाआंत । लागतां वीराचे आघात । भंगातीत[1] राममाळा ॥ ३५ ॥ लक्ष्मण विंदानी महाबळी । कमळांच्या अष्टदळीं । सबाह्य लिहिल्या नामावळी । आतुर्बळी तेणें जाला ॥ ३६ ॥ गुणेंवीण[2] निजकमळा । निर्गुणगुंती गुंफिली माळा । घालितां सुग्रीवाच्या गळां । कळिकाळा नावरे ॥ ३७ ॥ सुग्रीवकंठीं घालितां माळ । हरिखला वानरांचा पाळ[3] । नळ नीळ तार तरळ । सैन्य सकळ समुदाव ॥ ३८ ॥ श्रीराम सौमित्र हनुमंत । सुग्रीव वानरांसमवेत । आले किष्किंधेपर्यंत । हर्षयुक्त उल्लासें ॥ ३९ ॥ अति आक्रोशें महाथोर । सुग्रीव करी भुभुःकार । ऐकोनि कोपला वाळी वानर । युद्ध दुर्धर[4] करूं पाहे ॥ १४० ॥ दोघे बंधु क्रोधयुक्त । युद्ध करिती अत्यद्भुत । वाळी वधील श्रीरघुनाथ । तोही गुह्यार्थ अवधारा ॥ ४१ ॥ एका जनार्दना शरण । पुढें गोड निरूपण । श्रीरामें वालिउद्धरण । संसारतरण श्रीरामें ॥ ४२ ॥ श्रीरामनामें द्वयअक्षर । क्षराक्षरातीत[5] पर । रामनाम स्मरे निरंतर । पावन नर तिहीं लोकीं ॥ ४३ ॥ रामनाम स्मरतां एकाएक । तोही तिहीं लोकीं अलोकिक । एका जनार्दनीं होत एक । नित्य निर्द्वंद्व श्रीराम ॥ ४४ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे किष्किंधाकांडे एकाकारटीकायां सुग्रीवभंगो नाम पंचमोऽध्यायः ॥ ५ ॥ ओंव्या ॥ १४४ ॥ श्लोक ॥ २५ ॥

अध्याय सहावा

॥ श्रीसीतारामचंद्राय नमः ॥ श्रीराम हनुमंत सौमित्र । सुग्रीवसमवेत वानर । पावोनि किष्किंधेचें द्वार । केला भुभुःकार सुग्रीवें ॥ १ ॥

अथ तस्य निनादं तं सुग्रीवस्य महात्मनः ।
शुश्रावांतःपुरगतो वाली भ्रातुरमर्षणः ॥ १ ॥

सुग्रीवाचेनि गिरागजरें । नादें दुमदुमिलें अंबर । कोसळों पाहे गिरिकंदर । वाळीचें मंदिर दणाणलें ॥ २ ॥ ऐकोनि सुग्रीवाची आरोळी । कोपें खवळलासे वीर वाळी । आरक्त जाला क्रोधानळीं । जेंवी कुलाचळीं[6] बालसूर्य ॥ ३ ॥ वाळी विचारी हृदयांत । आतांच युद्धीं जर्जरीभूत । म्यां पाडिला होता मूर्च्छित । सवेंचि गर्जत कैंवी आला ॥ ४ ॥ माझ्या घायें मासानुमास । कुंथत पडे वर्षानुवर्ष । सवेंचि आला युद्धास । अति उल्लासें गर्जत ॥ ५ ॥ आतां असो हा विचार । बंधु वैरी सत्य साचार । रणीं पाचारितां महाशूर । निघावें सत्वर युद्धासी ॥ ६ ॥ युद्धा निघतां वाळीसी । तारा लागली पायांसी । स्वहित सांगेन मी तुम्हांसी । विवेकेंसीं अवधारिजे ॥ ७ ॥ तुझे लागल्या घाये । सुग्रीव कुंथत पडिला राहे । तो सवेंचि येवोनियां वाहे । गर्जत आहे युद्धार्थी ॥ ८ ॥ हे तंव नव्हे सुग्रीवशक्ती । तेणें साह्य केला श्रीरघुपती । त्याचेनि बळें युद्धाप्रती । आला मागुती गर्जत ॥ ९ ॥ तुझा करावया घात । सुग्रीवा साह्य श्रीरघुनाथ । हा तुज न कळे अर्थ । बळोन्मत्त धांवसी ॥ १० ॥ तुवां जिंतिलें सुरनरांसी । मर्दिलें दैत्यदानवांसी । काखे सूदिलें रावणासी । श्रीरामापासीं तें न चाले ॥ ११ ॥ श्रीराम प्रतापें तेजोराशी । पूर्णावतार सूर्यवंशीं । ऐक त्याचिया प्रतापासी । मी तुजपासीं सांगेन ॥ १२ ॥ जे कां अटक तिहीं लोकां । श्रीरामें वधिली ते ताटका । छेदोनि सुबाहूच्या मस्तका । मारीच देखा उडविला ॥ १३ ॥ चवदा सहस्र निशाचर[8] । सहित त्रिशिरा दूषण खर । श्रीरामें मारिले समग्र । बाणीं दुर्धर विंधोनी ॥ १४ ॥ विंधोनियां एक बाण । विराधाचा घेतला प्राण । काळ कबंध मारिला जाण । प्रतापी पूर्ण श्रीराम ॥ १५ ॥ ज्या धनुष्यें गांजिला रावण । तें चाप श्रीरामें भंगोन । केलें जानकीवरण । जामदग्न्य[9] जिंकिला ॥ १६ ॥ श्रीरामाच्या बाणाभेण । भिकारी झाला पैं रावण । चोरोनि केलें जानकीहरण । देवोनि बलिदान मारीचाचें ॥ १७ ॥ धांवण्या आलिया श्रीरघुनंदन । एकेंचि घायें

---

१ भंगरहित, अभंग. २ दोरावांचून. ३ समुदाय. ४ महाभयंकर. ५ चेतनाचेतनांहून वेगळा. ६ हिमालयादि आठ मुख्य पर्वतांस कुलाचल म्हणतात. ७ प्रतिबंध. ८ राक्षस. ९ परशुराम.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

घेईल प्राण। येणें भयें तो रावण। गेला पळोन लंकेसी ॥ १८ ॥ ऐसा श्रीराम दुर्धर। तयापुढें तूं वानर। बळोन्मत्त पालेखाइर[1]। युद्धा सत्वर धांवसी ॥ १९ ॥ विंधोनियां एक बाण। श्रीराम तुझा घेईल प्राण। हें तंव माझें सत्य भाषण। युद्धा आपण नव जावें ॥ २० ॥ श्रीरामीं न करावा विरोध। त्यासीं करावया सख्यसंबंध। माझा ऐकोनि अनुवाद। युद्धक्रोध सोडावा ॥ २१ ॥ ऐकोनि तारेचें उत्तर। वाळी म्हणे सत्य साचार। मज श्रीरामासीं नाहीं वैर। अणुमात्र मानसीं ॥ २२ ॥ जे जे रामीं करिती विरोध। त्यांचा श्रीराम करील वध। हा मज कळला शुद्ध-बोध। कथानुवाद अवधारीं ॥ २३ ॥ ताटका सकळ लोकांतें बाधी। यालागीं श्रीराम तीतें वधी। सुबाहु यज्ञातें अवरोधी। रामें त्रिशुद्धी मारिला ॥ २४ ॥ विराधें केलें सीताहरण। श्रीरामें वधिला विंधोनि बाण। कबंधें धरिले दोघे जण। बाहु छेदोन मारिला ॥ २५ ॥ करोनि शूर्पणखेचा कैवार। हिरूं आले सीता सुंदर। श्रीरामें वधिले त्रिशिरा खर। तैसें वैर मजसीं नाहीं ॥ २६ ॥ मारीच मारिला कपटी पूर्ण। सीता-हरणें वैरी रावण। तैसें विरोधलक्षण[2]। मजसीं जाण असेना ॥ २७ ॥ मी तंव केवळ निरपराध। कैसेनि श्रीराम करील वध। करितां सुग्रीवासीं रणविरोध। वैरसंबंध कां श्रीरामीं ॥ २८ ॥ तारा स्वयें सांगे संपूर्ण। सुग्रीव श्रीरामा झाला शरण। श्रीराम शरणागता शरण्य[3]। संरक्षण सर्वार्थी ॥ २९ ॥ शरणागता जो विरोधी। तो श्रीरामाचा मुख्य द्वंद्वी[4]। त्यासी श्रीराम स्वयें वधी। जाण त्रिशुद्धी कपिराया ॥ ३० ॥ शरणा-गताचिये घाता। श्रीराम करूं नेदी सर्वथा। हेचि श्रीरामेंसीं वैरता। आत्मघाता निजमूळ[5] ॥ ३१ ॥ तुटे सुग्रीवेंसीं विरोध। श्रीरामासीं होय तैं सुहृदसंबंध[6]। तैसा साधीं निजबोध। जैं माझा शब्द खरा करिसी ॥ ३२ ॥

श्रूयतां क्रियतां चैव तव वक्ष्यामि यद्धितम्।
यौवराज्येन सुग्रीवं तूर्णं साध्वभिषेचय ॥ २ ॥
विग्रहं मा कृथा वीर भ्रात्रा राजन्यवीयसा।
अहं हि ते क्षमं मन्ये तेन रामेण सौहृदम् ॥ ३ ॥

वाळी ऐकें सावधान। तुझें निजस्वहित सांगेन। सखा केलिया रघुनंदन। होसी पावन तिहीं लोकीं ॥ ३३ ॥ श्रीरामीं सख्य घडे कशानें। ऐसा विकल्प[7] मानिसी मनें। तेंही निमेषार्धें साधीन। माझें वचन जरी करिसी ॥ ३४ ॥ जेणें आप्त होय श्रीरघुनाथ। तारे सांगे मनोगत। येरी सांगत उल्हासत। पूर्ण हितार्थ देखोनी ॥ ३५ ॥ विरोध तुटे बंधुबंधूंसीं[8]। पूर्ण सख्य होय श्रीरामासीं। यौवराज्य द्यावें सुग्रीवासी। निज-हितासी लक्षोनी ॥ ३६ ॥ सुग्रीवा यौवराज्य देतां। परम सुख श्रीरघुनाथा। तिघां होईल ऐक्यता। एकात्मता अति प्रीती ॥ ३७ ॥ जैसा तुज प्रिय अंगदु। तैसा सुग्रीव कनिष्ठ बंधु। त्यासीं सांडितां विरोधु। सख्यसंबंधु श्रीरामीं ॥ ३८ ॥ ऐसें बोलोनियां पाहें। तारेनें धरिले दोनी पाये। श्रीरामीं सख्यें सुख आहे। करीं लवलाहें कपिराजा ॥ ३९ ॥ रत्नाभरणीं[9] धन-वस्त्रांसीं। अंगद धाडीं श्रीरामापासीं। शरण रिघोनियां त्यासी। आपणासी वांचवीं ॥ ४० ॥ श्रीरामा रिघतां शरण। तुझें चुकेल जन्ममरण। दोघे बंधु पावोन बुझांवण[10]। कृतकल्याण पावसी ॥ ४१ ॥ जरी धरोनि गर्वबळ। श्रीरामेंसीं करिसी छळ[11]। तरी किष्किंधा सांडोनियां पळ। श्रीराम सबळ युद्धार्थी ॥ ४२ ॥ व्हावया श्रीरामासमोर। धीर न धरिती सुरासुर। तेथें तूं केवळ वानर। पालेखाइर केंवी राहसी ॥ ४३ ॥ श्रीरामीं सख्य करीं निर्मळ। अथवा उठोनियां पळ। त्यासीं करितां युद्ध प्रबळ। तूं तत्काळ मरसील ॥ ४४ ॥ लागतां श्रीरामाचा बाण। मेरुमांदारां होय विदारण। तेथें तुझा केवा कोण। बळें प्राण देऊं नको ॥ ४५ ॥ माझें नायकतां भाषण। तूं बैससी मरणा धरण[12]। श्रीराम विरोधिल्या जाण। जीवें प्राणें तो नुरे ॥ ४६ ॥ ऐकोनि तारेचें वचन। वाळी जाला कोपायमान। भ्यांडप्रकृति[13] तुम्ही स्त्रिया जाण। कंपायमान परदर्पें[14] ॥ ४७ ॥ सुग्रीवासी

१ पाला खाणारा. २ वैराचें लक्षण. ३ रक्षणकर्ता. ४ शत्रु. ५ मुख्य कारण. ६ स्नेहसंबंध. ७ संशय, शंका. ८ बंधुबंधूंमध्यें. ९ रत्नांच्या अलंकारांनीं. १० समजूत. ११ कष्ट. १२ पाड. १३ भित्र्या स्वभावाच्या. १४ दुसऱ्याच्या पराक्रमानें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

यौवराज्य देतां । मी न देवों दें सर्वथा । साह्य जालिया श्रीरघुनाथा । राज्य सर्वथा न देणें ॥४८॥ देखोनि श्रीरामाचें बळ । म्हणसी वानर हा निर्बळ । किष्किंधा सांडोनियां पळ । भयें प्रबळ जलपसी ॥ ४९ ॥ तारे ऐक माझी शक्ती । अल्प सांगेन तुजप्रती । युद्धा आलिया श्रीरघुपती । शंका चित्तीं मज नाहीं ॥ ५० ॥

उत्पाटयतु रामो वा बाहुभ्यां विंध्यपर्वतम् ।
इमां सर्वां समुद्रांतां संचालयतु वा महीम् ॥ ४ ॥
सचंद्रतारानक्षत्रं पतेदत्र ससागरम् ।
न विव्यथेऽहं समरे सुग्रीवं प्रति संहृतः ॥ ५ ॥

बाहुबळें श्रीरघुनाथ । उत्पाटू विंध्यपर्वत । पृथ्वी समुद्रवलयांकित । करो भस्मांत बाणें एकें ॥ ५१ ॥ सचंद्र तारा गगन गंभीर । सहित सप्तही सागर । बाणें शोषो श्रीरामचंद्र । तरी मी वानर न शंकें ॥ ५२ ॥ ऐसा पुरुषार्थ श्रीरघुनाथा । प्रत्यक्ष डोळ्यांदेखतां । मज बाधीना भयव्यथा । उल्लासता संग्रामीं ॥५३॥ रणीं मरणें भयभीत । त्यासी यश ना पुरुषार्थ । तैसा मी वाळी नव्हें एथ । रणीं रघुनाथ सुखी करीन ॥ ५४ ॥ सुग्रीव बापुडें किंकर । श्रीराम योद्धा रणवीर । त्यासीं मी भिडेन वानर । युद्ध दुर्धर पाहें माझें ॥ ५५ ॥ माझी पुरे आंगवण । ऐसा योद्धा आहे कोण । करावया श्रीरामासीं रण । आलें स्फुरण बाहूंसी ॥ ५६ ॥ श्रीराम आलिया संमुख । प्रतिज्ञेची देवोनि हांक । युद्ध करीन अपराङ्मुख[1] । वाळी युद्धासी पैं आला ॥ ५७ ॥

स वाली बलदृप्तात्मा मुष्टिमुद्यम्य वीर्यवान् ।
सुग्रीवमेवाभिमुखो ययौ योध्दुं कृतक्षणः ॥ ६ ॥
सुग्रीवोऽपि समुद्दिश्य वालिनं हेममालिनम् ।
श्लिष्टं मुष्टिं समुद्यम्य संरब्धतरमागतः ॥ ७ ॥
सुग्रीवेण तु निःशंकं सालमुत्पाट्य तेजसा ।
गात्रेष्वभिहतो वाली व्यपतत्स महीतले ॥ ८ ॥

वालिसुग्रीवां दृष्टिभेटी । होतां वळोनि निज-वज्रमुष्टी । युद्धक्रोधा महाहठी । उठाउठीं मिसळले ॥ ५८ ॥ उरीं शिरीं गुडघेमुष्टी । धांवोनि हाणिती पुसोटी[2] । तडवा[3] हाणोनि पाडिती सृष्टीं । दोघे हट्टी महावीर ॥ ५९ ॥ हेममुकुट हेममाळा । शोभती वाळीचिया गळां । सुग्रीवा शोभे कमळमाळा । रणसोहळा वीरांचा ॥ ६० ॥ मुष्टिघात चपेट-घात । निष्ठुर हाणिती आघात । दोघांही रुधिर प्रवाहत । जेंवी पर्वत गैरिकां[4] ॥ ६१ ॥ किंशुकें फुलले वसंतांत । तैसे दोघे वीर अति आरक्त । रणामाजी विचरत । बलोन्मत्त युद्धक्रोधें ॥ ६२ ॥ सुग्रीव लक्षोनियां दृष्टीं । वाली हाणी वज्रमुष्टी । मूर्च्छापन्न पडतां सृष्टीं । धैर्यें जगजेठी ऊठिला ॥ ६३ ॥ सुग्रीव क्षोभोनि ते वेळीं । शालवृक्षें[5] ठोकिला वाळी । घायें मूर्च्छित महीतळीं । महाबळी लोळविला ॥ ६४ ॥ वाळी पाडिला महावीर । वानर करिती हाहाकार । ऐकोनि वीरांचा गजर । वाळी सत्वर उसळला ॥ ६५ ॥ बाहु आफळोनि[6] वाळी । रणीं गर्जत क्रोधानळीं । कोपें सुग्रीव चालिला वळी । रणीं रवंदळी करावया ॥ ६६ ॥ सम तळपणें सम किराणा । गति विगति सम उड्डाणा । क्षणें भूमीं क्षणें गगना । युद्धविंदान दोहींचें ॥ ६७ ॥ दोघे बळें अति समर्थ । येरयेरां नाटोपत । दोघां लाभेना विजयार्थ । अति सामर्थ्यें करोनियां ॥ ६८ ॥ वाळी बळी वरदमाळा । श्रीराममाळा सुग्रीवगळां । पाहतां त्यांचा रण-सोहळा । समबळ समान ॥ ६९ ॥ युद्धकंदनें खेदक्षीण । श्रमस्वेदें दोघे क्षीण । ऐसें देखोनि श्रीरघुनंदन । धनुष्यीं बाण सज्जिला ॥ ७० ॥ सुग्रीव तळवटीं आणिला । ऐसें श्रीरामें देखिलें डोळां । आतां न मारितां वाळीला । गोष्टी होईल पहिल्याऐसी ॥ ७१ ॥

ततः संधाय रामेण शरमाशीविषोपमम् ।
वेगेनाभिहतो वाली निपपात महीतले ॥ ९ ॥

आक्रमें मारावया सुग्रीवासी । वाळी उडतां आकाशीं । श्रीरामें विंधितां वेगेंसीं । शरू सपिच्छी खडतरला ॥ ७२ ॥ जेंवी सर्प रिघे वारुळीं । तैसा बाण हृदयकमळीं । प्रवेशोनि अंतकाळीं[7] । पाडिला वाळी मूर्च्छित ॥ ७३ ॥ जैसा ईश्वर राहोनि गुप्त । निमेषमात्रें करी निःपात । तैसा अतर्क्य श्रीरघु-नाथ । करी वाळीचा घात बाणाग्रें ॥ ७४ ॥ अतर्क्य सद्गुरुवचन । श्रवणेंचि शिष्या समाधान । तैसा श्रीरामाचा बाण । सुखसंपन्न वाळीसी ॥ ७५ ॥ जैसा धडधडीत वन्ही[8] । सुखरूप सती-

१ तोंड न फिरवितां. २ शेंपटी. ३ हस्तप्रहार. ४ गेरूनें. ५ पळस. ६ ठोकून. ७ उड्या. ८ अग्नि.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

लागोनी । तैसें श्रीरामाचे बाणीं । वाळीलागोनी सुखरूप ॥७६॥ जेंवी कां सुख शुद्ध सात्त्विकी । अग्रीं कठिण गोड परिपाकीं । श्रीरामबाण तद्वतुलक्षीं । उभयपक्षीं सुखरूप ॥ ७७ ॥ सुग्रीवासी सुख लौकिक । वाळीस सुख त्याहूनि अधिक । बाण विंधोनियां एक । दिधलें सुख दोहींसी ॥७८॥ श्रीरामबाणाचा प्रताप । सुग्रीव भ्रमतां भयकंप । परी एक सुखरूप । श्रीराम चिद्रूप कृपाळू ॥७९॥ श्रीरामबाणाग्रीं भासे दुःख । तेंचि परिपाकीं परम सुख । वदेल वाळीचें निजमुख । श्रोतीं सकळिक परिसावें ॥ ८० ॥ श्रीरामाच्या निजबाणीं । वाळी मूर्च्छित पडिला धरणीं । बोले श्रीरामा अनुलक्षोनी । अधर्मकरणी तुवां केली ॥ ८१ ॥

पराङ्मुखवधं कृत्वा को नु प्राप्तस्त्वया गुणः ।
यदहं युद्धसंरब्धस्त्वत्कृते निधनं गतः ॥ १० ॥
शोचामि नात्मानमहं न तारां नापि बांधवान् ।
त्वत्कृतेन ह्यधर्मेण यथा शोचामि राघव ॥ ११ ॥

मी आणिकासीं युद्धासक्त । श्रीरामा तूं अति गुप्त । पराङ्मुखीं[1] केला घात । कोण पुरुषार्थ श्रीरामा ॥ ८२ ॥ न पाचारितां एकाएक । अतर्क्यरूपें निजघातक । तुझा हा अधर्म देखोनि देख । परम दुःख माझे मनीं ॥ ८३ ॥ नाहीं राज्यहरणाची व्यथा । ताराावियोग न बाधी चित्ता । तुझी देखोनि अधर्मता । दुःख रघुनाथा मज भारी ॥ ८४ ॥ नव्हे सुहृददुःख बाधक । बाधेना अंगदाचा शोक । तुझा अधर्म देखतां देख । परम दुःख मज रामा ॥ ८५ ॥ वध करीं नये निद्रिस्था । वधूं नये स्त्रियेसीं रमतां । वधूं नये न पाचारितां । पुरुष दुश्चिता नये वधूं ॥ ८६ ॥ तूं सर्वज्ञ श्रीरघुनाथा । ऐसिया जाणोनि शास्त्रार्था । अधर्मे करोनि माझे घाता । अपेश माथां घेतलें ॥ ८७ ॥ तूं चंद्राहूनि अति चोख । श्रीरामकीर्ति नित्य निर्दोख । अधर्मघाताचा[4] कळंक । त्यावरी देख बैसविला ॥ ८८ ॥ सुग्रीव बापुडें तें किती । काय साह्य होईल सीताशुद्धयर्थी[5] । तें मज सांगतासी श्रीरघुपती । करितों ख्याती ते ऐक ॥ ८९ ॥

सुग्रीवप्रियकामेन यदहं घातितस्त्वया ।
गले बध्वा प्रदद्यां ते निहतं रावणं रणे ॥ १२ ॥

न्यस्तां सागरतोये वा पाताले वापि मैथिलीम् ।
आनयेऽहं तवादेशाद्रुडेनामृतं यथा ॥ १३ ॥

रावण माझा काखवळ । गळां बांधोनि तत्काळ । आणितों न लगतां पळ । तूं माझें बळ नेणसी ॥ ९० ॥ समुद्रजळीं सप्तपाताळीं । शोधोनि लोकालोकाचळीं[6] । आणितों मी जनकबाळी । तुजजवळी निमेषार्धे ॥ ९१ ॥ चतुःसमुद्रीं प्रातःस्नान । करितां मजला न लगे क्षण । बळें मजपुढें तुच्छ रावण । सीता आणोन मी देतों ॥ ९२ ॥ मज हा सांगतासी विचार । सीता सती रावण सहपरिवार । लंका उपडोनि समग्र । येथें सत्वर आणितों ॥ ९३ ॥ सुग्रीवाच्या पक्षपाता । अधर्मे करितां माझ्या घाता । अपेश आलें श्रीरघुनाथा । कीर्तीचे माथां अपकीर्ती ॥ ९४ ॥ पुढें साचार श्रीरघुपती । जरी करिसी कोटिकीर्ती । तरी अधर्मघाताची अपकीर्ती । तिळभरी परती ढळेना ॥ ९५ ॥ नाहीं रडत राज्यहरणासी । नाहीं मी रडत निजमरणासी । अधर्म जडला श्रीरामचरणांसी । तेणें मानसीं अति दुःखी ॥ ९६ ॥ सेवकें कीर्ती करावी ऐसी । जगत्त्रय वंदी स्वामिसेवकांसी । सुग्रीवें गौरविलें श्रीरामासी । कीर्तिवंतासी अपकीर्ति ॥ ९७ ॥ सुग्रीवें काय केला उपकार । म्यां तुज काय केला अपकार । ऐसा न करितां विचार । मज सत्वर कां वधिलें ॥ ९८ ॥ संग्रामीं वधितासी सन्मुख । त्या मरणाचा मज हरिख । कीर्ति वर्णिते तिन्ही लोक । तें आवश्यक चुकलासी ॥ ९९ ॥ अधर्मे वधितां वाळीसी । श्रीरामहस्तें उद्धार त्यासी । मज यश तूं अपेशी । कीर्ति अतिविशेषीं त्वां केली ॥ १०० श्रीरामहस्तें मज मरण । तेणें मी त्रैलोक्यीं पावन । तुज तुवां लाविलें दूषण । अधर्मे बाण विंधोनी ॥ १ ॥ ऐकोनि वालिनिंदावचन । दुःख न मानीच रघुनंदन । काय बोलिला धर्मवचन । गुह्यज्ञान हितकारी ॥ २ ॥ पुढिल्या स्वधर्म शिकविती । स्वयें अधर्म आचरती । तयां मूर्खांची वाचावदंती । सत्य मानी तोचि महामूर्ख ॥ ३ ॥

अद्य धर्ममधर्मं च जानासि त्वं कपीश्वर ।
कृतं कर्म न जानासि भ्रातृभार्याविमर्शनम् ॥ १४ ॥

१ शेवटीं. २ पृथ्वीवर. ३ सन्मुख न आलेल्याचे माझ्या ठायीं. ४ अधर्मानें मारलेल्याचा. ५ सीताशोधार्थ. ६ या नांवांचे पर्वत आहेत. ७ पुढें, समोर. ८ आनंद. ९ दुसऱ्याला. १० बडबड.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

माझा बाण भेदल्यापाठीं । सांगतोसी या स्वधर्मगोष्टी । आपल्या अधर्माची रहाटी । निजात्मदृष्टीं न्याहाळिसी ना ॥ ४ ॥ कन्या भगिनी भ्रातृपत्नी । कन्येसमान या तिन्ही । ते बंधुभार्या त्वां हिरोनी । अनुदिनीं भोगिसी ॥ ५ ॥ तारेसारखी पतिव्रता । तुज असतां सुंदर कांता। बंधुभार्या अधर्मता। तूं कां भोगिता जालासी ॥ ६ ॥ आपुली नाठवे अधर्मता । अधर्म ठेविसी माझे माथां । अधर्माची संसर्गता । भासे अशुद्धता शुद्धत्वीं ॥ ७ ॥ जेंवी कां स्फटिक नित्य निर्मळ । त्यासी भेटतांचि काजळ । शुद्धता लोपोनि तत्काळ । भासे सकळ काळिमा ॥ ८ ॥ स्फटिक काजळें दिसतो काळा । परी तो काळि[2]मेवेगळा । तेंवी पापपुण्या निराळा । राम चित्कळा[3] चिन्मूर्ति[4] ॥ ९ ॥ नभीं नीळिमा नाहीं अळुमाळ[5] । निळें डोळ्याचें निजबुबुळ । तेणें नभ देखती सुनीळ । डोळ्यांचे मळ नभीं दिसती ॥ १० ॥ तेंवी मी राम नित्य शुद्धात्मा । तूं मज म्हणसी अधर्मकर्मा । तुझे छेदावया पापभ्रमा । अगाध महिमा बाणाचा ॥ ११ ॥ तुझे अंगीं पाप सदोष । तुजला मी केंवी भेटेन सन्मुख । छेदावया तुझे महादोष । बाण अतर्क्य विंधिला ॥ १२ ॥ मी विश्वात्मा विश्वतोमुख । साधुसंतां नित्य सन्मुख । तूं पापात्मा नित्य विमुख । बाणें निर्दोष केलें तुज ॥ १३ ॥ बाण विंधोनि अतर्क्यता । तुझी छेदोनि पापात्मता । कृपेनें भेटलों मी आतां । तुज तत्त्वतां तारावया ॥ १४ ॥ तुज तारावया हेंचि कारण। माझ्या सुग्रीवाचा बंधु पूर्ण। तुझा चुकवावया नरक दारुण। पापनिर्दळण बाणें केलें ॥ १५ ॥ शरणागताचा निजबंधु । त्यासी जालिया नरकवाधु । हा मज न साहे शब्दु । बाणें अति शुद्धु केलासे ॥ १६ ॥ सांडोनियां विकल्पवृत्ती । जो जो लागेल मद्भक्तसंगतीं । तो तो उद्धरीं मी श्रीरघुपती । वाळी निश्चितीं तूं जाण ॥ १७ ॥ तुझे अंगीं पाप दारुण । तेणें यम दंडिता तुज पूर्ण । तें चुकवावया विंधिला बाण । पुरश्चरण[6] महापापा ॥ १८ ॥

श्रीरामकृपेचा प्रताप । वाळीचें सरे निजपाप । तेणें पावोनि अनुताप । निर्विकल्प विनवीत ॥ १९ ॥

एवमुक्तस्तु रामेण वाली प्रव्यथितो भृशम् ।
प्रत्युवाच ततो रामं प्रांजलिर्वानरेश्वरः ॥ १५ ॥

राज्यमदें अति घूर्ण । पाप आचरलों संपूर्ण । तुवां कृपेनें सोडोनि बाण । केलें निर्दळण अकल्पित ॥ १२० ॥ तुवां कृपेनें विंधोनि बाण । छेदिला त्रिविध अभिमान । कुळाभिमान कर्माभिमान । गर्वाभिमान शौर्याचा ॥ २१ ॥ श्रीरामबाणाचा प्रताप । छेदी संकल्प विकल्प । छेदोनियां पुण्य पाप । नित्य निष्पाप केलें मज ॥ २२ ॥ वाढिवेचा गर्व परम । सन्मुख न करींच संग्राम । दुश्चिता मारणें अकर्म । मानीं अधर्म श्रीरामीं ॥ २३ ॥ पूर्ण पापी मी परम । श्रीरामीं मानीं अधर्म । श्रीराम परमात्मा परब्रह्म । हें मी वर्म नेणेंचि ॥ २४ ॥ प्रवृत्तिज्ञानें मी उन्मत्त । रामा मानीं अधर्मरत । श्रीराम स्वधर्मकर्मरहित । हा मुख्यार्थ श्रीरामीं ॥ २५ ॥ तुझेनि बाणें हृदयांत । केलें हृदय शुद्ध समस्त । आतां अनुभवासीही येत । श्रीरघुनाथ परब्रह्म ॥ २६ ॥ लटकें सीतेचें धांवणें । लटका तुवां शोक करणें । दीन उद्धरावयाकारणें । विचरत वनीं वनवासी ॥ २७ ॥ वना येवोनि श्रीरघुनंदन । उद्धरिले तृणपाषाण । पावन केले दीन जन । जगदुद्धरण श्रीराम ॥ २८ ॥

राम राम महाभाग जाने त्वां परमेश्वरम् ।
अजानता मया किंचिदुक्तं तत्क्षंतुमर्हसि ॥ १६ ॥
अनुजानीहि मां राम यांतं त्वत्पदमुत्तमम् ।
मम तुल्यबले बाले अंगदे त्वं दयां कुरु ॥ १७ ॥

मायानियंता[7] ईश्वर । त्याहूनि तूं परात्पर[8] । तुझ्या स्वरूपाचा पार । अगोचर श्रुतिशास्त्रां ॥ २९ ॥ ऐसिया तुज श्रीरघुनाथा । कर्मज्ञानाची योग्यता । निषेधिलासी अधर्मता । तें मज आतां क्षमा करीं ॥ १३० ॥ जळापासाव लवण होय । तें जळींचें जळीं विरोनि जाय । मोतीं जालें तें तंव कठिण पाहें । जळीं न जाय विरोनि ॥ ३१ ॥ मुक्तपणें मोला चढलें । तें वनितांधरीं[11] फांसां

---

१ स्त्री. २ काळेपणाहून निराळा. ३ ज्ञानाची कळा. ४ ज्ञानमूर्ति. ५ थोडी देखील. ६ मंत्राच्या सिद्धीसाठीं विवक्षित-संख्याक जप. ७ मदांध. ८ पराक्रमाचा. ९ मायेला स्वाधीन ठेवणारा. १० श्रेष्ठ. ११ स्त्रियांच्या ओंठावर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

पडिलें । मुक्तचि परी नासा आलें । कठिण केलें अभिमानें ॥ ३२ ॥ जळो हा कर्मधर्माभिमान । जळो हा सज्ञाना ज्ञानाभिमान । तेणें अभिमानें बंधन जाण । म्यां तुज पूर्ण निंदिलें ॥ ३३ ॥ कर्मज्ञानाच्या व्युत्पत्तीं । निर्भर्त्सिलासी दुष्ट दुरुक्तीं । ते मज क्षमा करीं श्रीरघुपती । कृपामूर्ति कृपाळुवा ॥ ३४ ॥ ऐसें बोलोनि आपण । वाळी घाली लोटांगण । मस्तकीं धरोनि श्रीरामचरण । म्हणे आपण क्षमा कीजे ॥ ३५ ॥ आणिक एक माझे चित्तीं । जें जें वर्तत आहे श्रीरघुपती । तें मी सांगेन तुजप्रती । अंगदार्थी अवधारीं ॥ ३६ ॥ मजसमान बळिया दृढ । अंगद माझें ललिवाड । त्यासीं करावा रण[2]सुरवाड । पुरवीं कोड[3] युद्धाचें ॥ ३७ ॥ अंगद माझा [4]कनकांगदी । सबळ साह्य होईल युद्धीं । म्हणोनि लाविला श्रीरामपदीं । कृपानिधि कृपा करीं ॥ ३८ ॥ अंगदा निरखोनियां जाण । वाळी जाला सावधान । पाहोनी श्रीरामाचें वदन । उल्हासोन बोलत ॥ ३९ ॥ तुझें निजपद सनातन । जें कां सच्चिदानंदघन । तें पावावया त्यजितों प्राण । लाविले नयन वाळीनें ॥ ४० ॥ देखोनि वाळीचें प्रेम पूर्ण । कृपें कळवळला श्रीरघुनंदन । स्वयें बोले मेघश्याम । सावधान अवधारा ॥ ४१ ॥ वाळी नको रे त्यजूं प्राण । तुझा उपडोनियां बाण । सामर्थ्यें वांचवीन जाण । सुख संपूर्ण भोगावया ॥ ४२ ॥ सीताशुद्धीं साह्य देख । तूं मज होसी आवश्यक । भोगीं ताराअंगदराज्यसुख । मरणोन्मुख होऊं नको ॥ ४३ ॥ गळां बांधोनि रावण । सीता आणीन मी आपण । तें तूं सत्य करीं वचन । साह्य संपूर्ण मज होईं ॥ ४४ ॥ ऐकोनि श्रीरामाचें वचन । वाळी जाला हास्यवदन । पूर्वील माझा बळाभिमान । गेला पळोन तुजपुढें ॥ ४५ ॥ सूर्यापुढें जेंवी [6]खद्योत । तेंवी देखोनियां श्रीरघुनाथ । सबळ बळ विरालें समस्त । तेज अद्भुत श्रीरामीं ॥ ४६ ॥ तुझिया निजप्रतापापुढें । रावण दहा तोंडांचें किडें । मी मशक साह्य कोणीकडे । सामर्थ्य गाढें श्रीरामीं ॥ ४७ ॥ तुझा सुटलिया बाण । बापुडें रावण तें कोण । होय त्रैलोक्यनिर्दळण । बळ संपूर्ण श्रीरामीं ॥ ४८ ॥ भोगावया स्त्रीपुत्रसुख । आजि वांचावें आवश्यक । स्त्रीभोग परम दुःख । निजनिष्टंक म्यां मानिलें ॥ ४९ ॥ तुझी विक्षेपभ्रुकुटी । रणीं आटील सकळ सृष्टी । तेथें कायसी वानरसाह्यगोष्टी । रावण कपटी केंवी उरे ॥ १५० ॥ स्त्रीसुखभोगाचा अनुवाद । सख्या बंधूसीं पाडी विरोध । स्वार्थघातक दुर्धर क्रोध । नित्य निरोध तो विषय ॥ ५१ ॥ श्रीरामा तूं तंव निजविवेकी । विषय भोगितां उभय लोकीं । कोणी नसे जाला सुखी । निजदुःखी तो विषयी ॥ ५२ ॥

त्यजाम्यसून् महायोगिन् दुर्लभं तव दर्शनम् ।
यन्नामविवशो गृह्णन् म्रियमाणः परं पदम् ॥ १८ ॥

न करितां योगयागसाधन । तुझे दृष्टीपुढें देह त्यागून । मी होईन कृतकल्याण । ब्रह्म परिपूर्ण पूर्णत्वें ॥ ५३ ॥ अंतकाळीं अवचटें जाण । केल्या रामनामस्मरण । परमपदप्राप्ति पूर्ण । जन्ममरण मग कैंचें ॥ ५४ ॥ आजिचे ऐसें रघुनाथा । पुढें मरण न ये हाता । तेंही ऐक सावधता । माझ्या निजहिता लक्षोनी ॥ ५५ ॥

विशल्यं कुरु मे राम हृदयं पाणिना स्पृशन् ।
हृदयाद्बाणमुद्धृत्य रामः पस्पर्श पाणिना ॥ १९ ॥
त्यक्त्वा तद्वानरं देहं स यातः परमां गतिम् ॥ २० ॥

रामनामाच्या कडकडाटीं । दोष जळती आकल्प सृष्टी । परम पद पावे शेवटीं । नित्य नेहटी श्रीरामनामें ॥ ५६ ॥ एवढी ज्याची नामख्याती । तो तूं स्वयें रघुपती । कृपेनें भेटलासी अंतीं । जिणें पुढती मज नको ॥ ५७ ॥ आतां नको विषयाचरण । आतां नको जन्ममरण । भावें धरोनि श्रीरामचरण । वाळी आपण विनवीत ॥ ५८ ॥ तुझे हातींचा लागतां बाण । मी जालों अति पावन । तुझा लागतां पद्महस्त पूर्ण । वांछित मरण सुखार्थी ॥ ५९ ॥ तुझा लागतां पद्महस्त । मी झालों नित्यमुक्त । सच्चिदानंदपद पूर्ण प्राप्त । मज निश्चित तुझेनि ॥ १६० ॥ ऐकोनि वाळीचें वचन । हृदयीं भेदला जो बाण । तो श्रीरामें उपडोनि आपण । केलें स्पर्शन अमृतहस्तें ॥ ६१ ॥ लागतां श्रीरामाचा हस्त । वाळी देहीं देहातीत ।

१ नाकांत. २ लढाईची हौस. ३ आवड. ४ सुवर्णमय बाहुभूषणें धारण करणारा. ५ शाश्वत. ६ काजवा.

७ क्रोधानें भ्रुकुटी (भुंवई) वक्र झाली असतां. ८ जगणें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वंधा मोक्षा अंतीत। केला निश्चित श्रीरामें ॥ ६२॥ श्रीरामहस्त मस्तकसीटीं। वाळीस सुखरूप जाहली सृष्टी। परमानंदीं पडली मिठी। कृपादृष्टी श्रीरामें ॥ ६३॥ ज्यां सुग्रीवासीं केला विरोधु। परी सुग्रीव सत्य परम सखा बंधु। त्याचेनि पावलों परमानंदु। सुखाववोधु श्रीराम ॥ ६४॥ यापरी वाळीनें आपण। वानरदेह त्यागोनि जाण। श्रीरामकृपेस्तव संपूर्ण। निजपदीं पूर्ण विनटला[३] ॥ ६५॥ विरोधरूपें श्रीरामें आपण। केलें वाळीचें उद्धरण। एका जनार्दना शरण। कृपा पूर्ण श्रीरामाची ॥ ६६॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे किष्किंधाकांडे एकाकारटीकायां वालिवधो नाम षष्ठोऽध्यायः ॥ ६॥ ओंव्या ॥ १६६॥ श्लोक ॥ २०॥

अध्याय सातवा

श्रीसीतारामचंद्राय नमः ॥ श्रीरामाय दृढबाणीं। घायें वाळी पडिला रणीं। लोळतां देखोनि धरणीं। वानरां पळणी मांडली ॥ १॥

निहते वालिनि रणे रामेण परमात्मना।
जग्मुस्ते वानराः सर्वे किष्किंधां भयविह्वलाः ॥ १॥
तारामूचुर्महाभागे हतो वाली रणाजिरे।
अंगदं परिगृह्याथ मंत्रिणं परिनोदय ॥ २॥
चतुर्द्वारकपाटादीन् बद्ध्वा रक्षामहे पुरीम्।
वानराणां तु राजानमंगदं कुरु भामिनि ॥ ३॥

श्रीरामाच्या बाणनेटीं। वाळी पडिला देखोनि दृष्टीं। वानरसेना भयसंकटीं। उठाउठीं पळाली ॥ २॥ वाळी मारिला विंधोनि पूर्ण। सैन्यावरी सोडील बाण। अवघियांचा घेईल प्राण। पलायमान तेणें धाकें ॥ ३॥ श्रीरामबाण अति दुर्धर। घायें निवटिले त्रिशिरा खर। चवदा सहस्र निशाचर। बाणीं सत्वर निर्दळिले ॥ ४॥ श्रीराम जीवें उरों नेदी। जो देखे तो समूळ वधी। तेणें भयें वानरमांदी[५]। किष्किंधेमधीं पळाली ॥ ५॥ वानर चळचळां कांपत। अवघे आले किष्किंधेआंत। सांगती श्रीरामें केला वालिघात। तेणें आकांत नगरीं होय ॥६॥ तारेसी सांगती सुभट। दुर्धर दुर्ग करीं बळकट। चहूं द्वारीं देवोनि कपाट। देईं राज्यपट अंगदासी ॥ ७॥ ऐकोनि वाळीचें मरण। अंगदातें हातीं धरोन। तारा निघाली आपण। आक्रंदन करीतचि ॥ ८॥ वाळी निमालियापाठीं। कायसी अंगदाची गोष्टी। कैंचे राज्य कैंची सृष्टी। देह उठाउठीं त्यागीन ॥ ९॥ कैंचें घर कैंचें दार। कैंचें दुर्ग कैंचें नगर। कैंचें प्रधान कैंचा परिवार। मरणतत्पर आजि मी ॥ १०॥ हृदयीं भेदिला श्रीरामबाण। वाळी निमाला निजप्राण। त्यातें तारा देखोन। मूर्च्छापन्न ते पडिली ॥ ११॥ सवेंचि आक्रंदोनि उठी। दुःखें मस्तक भूमीं आपटी। गडबडत लोळे सृष्टीं। हृदय पिटी आक्रोशें ॥ १२॥ केश सुटले मोकळे। अश्रुधारा स्रवती डोळे। दुःखें पुनःपुन्हां लोळे। आरंबळे अति दुःखें ॥ १३॥ गेलें माझें वैभव पूर्ण। गेलें माझें भोगभुवन। सुखसौभाग्या पडिलें खांन। निजनिधान अंतरलें ॥ १४॥ अंतरलिया निजपती। प्रिया पावे उपहती। उपयोगा न ये ते धर्मार्थी। शुभकार्यार्थी अशुभ ॥ १५॥ त्यजिलीं अलंकार आभरणें। त्यजिलीं सर्वांगभूषणें। गळसरी राखिली तिणें। पतीसीं करणें सहगमन ॥ १६॥ सांगती वृद्ध वनिता। अंगदासारिखा पुत्र असतां। सकळ राज्य येतां हाता। देह कां व्यर्थ त्यागिसी ॥ १७॥ भ्रताराच्या सुखासमान। पिता भ्राता सुत स्वजन। सर्वथा नव्हेति वो जाण। तेंही लक्षण अवधारीं ॥ १८॥

मितं ददाति हि पिता मितं भ्राता मितं सुतः।
अमितस्य हि दातारं भर्तारं का न पूजयेत् ॥ ४॥
शोणे उरसि लग्नेन जीवितप्राणहारिणा।
परिष्वक्तुं न शक्नोमि भुजाभ्यां त्वां हरीश्वर ॥ ५॥

पिता जालिया समर्थ। कन्येसी देणें परिमित। बंधूसी जालिया राज्य प्राप्त। नियत अर्थ भगिनीसी ॥ १९॥ पुत्र जालिया राज्यधर। मातेसी दे परिमित उपचार। सर्वसत्ता दे भ्रतार। त्यासीं मी शरीर कैंवी वंचूं ॥ २०॥ गजान्तलक्ष्मी पतीलागूनी। त्याची स्त्री म्हणवी स्वामिनी। हें नव्हे पित्यापुत्रापासूनी। भ्रतारावांचूनी निंद्य जिणें ॥ २१॥ पतीसवें सहगमन। न करितां मागें येईल

१ पलीकडील, निराळा. २ मस्तकाचे ठिकाणीं. ३ रंगला, मिळाला. ४ वानरांचा समुदाय. ५ मोठमोठे योद्धे. ६ वाहूं लागले. ७ खणती, दरवडा. ८ स्त्री. ९ नाश.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

मरण। तें मरणचि निंद्य जाण। अधःपतन रांडवा ॥ २२ ॥ धर्मकर्मार्थविहीन। विधवा नारी प्रेतासमान। हें तंव श्रुतिशास्त्रवचन। सुख कोण वैधव्याचें॥ २३ ॥ पतीसवें होतां सती। इहलोकीं पुण्य पर॑त्रीं मुक्ती। एवढी सांडोनियां प्राप्ती। पुत्रराज्यार्थी सुख काय ॥ २४ ॥ पतीसी देतां आलिंगन। हृदयीं श्रीरामाचा बाण। भेदला देखोनि संपूर्ण। तारा उद्विग्न अति दुःखी ॥२५॥ सेंजेचा निर्दाळिला पती। खेंव न देववे प्रेताप्रती। ऐसें वैर केलें श्रीरघुपती। तारा शापोक्ती क्षोभली ॥ २६ ॥

न सीता मम शापेन त्वां रंतुं प्रतिवत्स्यति।

याच्यमाना त्वया सीता पुनर्यास्यति मेदिनीम्॥ ६ ॥

पतिदुःखाच्या दुःखावर्ती। तारा क्षोभोनियां चित्तीं। शाप देत श्रीरघुपतीप्रती। तेही अति युक्ती अवधारा ॥ २७॥ विभांडूनियां लंकापती। तूं तंव पावसी सीता सती। परी ते नांदेना तुजप्रती। जाईल मागुती वनवासा ॥ २८ ॥ दोघां नांदतां अयोध्येसी। श्रीरामा तूं बलात्कारेंसीं। वना धाडिसील सीतेसी। मजऐसा होसी अति दुःखित ॥ २९ ॥ सीता वनवासी वनाआंत। लहु कुश जन्मती सुत। बारा वर्षें अयोध्येंत। अति दुःखित श्रीरामा ॥ ३० ॥ लंकेसी दिव्य घेईल पाहीं। सीता सती लोकीं तिहीं। येथें दवडावया कारण कायी। जग अन्यायी तुज म्हणेल ॥ ३१ ॥ वाळी मारिला त्वां वृथा। हें अपेश बैसलें तुझिया माथां। दुजें अपेश श्रीरघुनाथा। वना सीता दवडोनी ॥ ३२ ॥ पुत्रांचिया युद्धख्याती। अयोध्ये आणिसील सीता सती। तरी नांदेना तुजप्रती। जाईल मागुती धरणीमाजी ॥ ३३ ॥ श्रीरामासी शापवचन। ऐकोनि तारेचें भाषण। वाळी होवोनि सावधान। काय आपण बोलत ॥ ३४ ॥ तारेसी म्हणे मूढमती। पतिव्रते तूं महासती। शाप देऊं नको श्रीरघुपती। तो परब्रह्ममूर्ति परमात्मा ॥ ३५ ॥ अंगीं जंव होती विषयासक्ती। तंव राम नोळखवे ब्रह्ममूर्ती। बाणें छेदिली विषयासक्ती। मग स्फूर्ति मज आली ॥ ३६ ॥ हृदयीं भेटतां श्रीरामबाण। जगाचा न देखें दोषगुण। श्रीराम देखें ब्रह्म पूर्ण। जग संपूर्ण श्रीराम ॥ ३७ ॥ बाण नव्हे तो निजात्मबोध। समूळ माझा छेदिला भेद। तेणें पावलों परमानंद। आनंदकंद श्रीराम ॥ ३८ ॥ तुज जैं लागता श्रीरामबाण। तैं तूं पावतीस कल्याण। न देखसी दोषगुण। श्रीराम पूर्ण परात्मा ॥ ३९ ॥ मजसवें नको होऊं सती। जीवित्व अर्पावें रघुपती। तेंचि सतीत्व सत्य त्रिजगतीं। प्रेताप्रति नको मरूं ॥ ४० ॥ प्रेतप्रीतीं रिघावें अग्नीप्रती। त्या सतिया प्रेतभूत होती। डांकाभोगीं अवतरती। भोग मागती विषयांचे ॥ ४१ ॥ तैसें न करावें आपण। जीवित्व करावें रामार्पण। श्रीरामाचें निजवचन। अणुप्रमाण नुल्लंघीं ॥ ४२ ॥ अंगदा धरोनि आपण। तोही करावा रामार्पण। श्रीरामकृपेस्तव जाण। सुख संपूर्ण पावाल ॥ ४३ ॥ ऐसी तारेसी सांगोनि युक्ती। स्वानंदें बोले सुग्रीवाप्रती। तूं तंव जिवलग सांगाती। रामप्राप्ती तुझेनि ॥ ४४ ॥

भ्राता सहोदरो मे त्वं सखा चेष्टकरस्तथा।

इदं हि प्रतिपद्यस्व राज्यमेतद्वनौकसाम्॥ ७ ॥

सुषेणदुहिता चेयमर्थसूक्ष्मविनिश्चये।

यदेषा साध्विति ब्रूयात्कार्यं तन्मुक्तसंशयम्॥ ८ ॥

एष तारात्मजः श्रीमांस्त्वया तुल्यपराक्रमः।

यौवराज्येऽभिषेक्तव्यस्तेजस्वी तरुणोऽङ्गदः॥ ९ ॥

सुग्रीवा म्यां केलें दृढ वैर। परी तूं सखा सहोदर॑। भेटवोनि श्रीरामचंद्र। यमप्रहार चुकविला ॥ ४५ ॥ चुकविला माझा भयशोक। चुकविलें जन्ममरणदुःख। श्रीरामप्राप्तिपरमसुख। अलोलिक मज दिधलें ॥ ४६ ॥ तुझा मी काय होऊं उत्तीर्ण। अगाध सुख तुझेनि पूर्ण। कांहींएक देईन अणुप्रमाण। कृपा करोन अंगीकारीं ॥ ४७ ॥ मज व्हावया उत्तीर्ण। किष्किंधेचें राज्य पूर्ण। अंगीकारावें आपण। सखा परिपूर्ण तूं माझा ॥ ४८ ॥ सुषेणाची कन्या तारा। सारासारविवेकचतुरा। इच्या मानोनि विचारा। राज्यभारा चालवावें ॥ ४९ ॥ अंगदा यौवराज्य देवोनी। प्रतिपाळावें लळा पाळूनी। तूंचि पिता तूंचि जननी। श्रीरामभजनीं लावीं यांसी ॥ ५० ॥

१ परलोकीं. २ पराभव करून. ३ परमपुरुष. ४ पातिव्रत्य. ५ जन्माला येतात. ६ मोडूं नकोस. ७ बधुं. ८ उतराई. ९ थोडें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

प्रथम निर्दाळावया उद्भट। अंगद तुजपुढें सुभटें। रणीं राक्षसां करील पीठ। घेईल त्रिकूट लंकेचें ॥ ५१ ॥ आम्हांसी श्रीरामाचें बळ। आम्ही श्रीरामबळें सबळ। श्रीराम भजा तुम्ही सकळ। राम केवळ परब्रह्म ॥ ५२ ॥ श्रीराम सद्गुरु निश्चित। श्रीराम आम्हां गणगोत। आमचें सर्वस्व श्रीरघुनाथ। कुळदैवत श्रीराम ॥ ५३ ॥ तारा अंगद आणि सुग्रीव। भावें भजा श्रीरघुराव। हेंचि तिहीं लोकीं गौरव। अति अपूर्व आम्हांसी ॥ ५४ ॥ ऐकोनि वालीचें वचन। सुग्रीवें घातलें लोटांगण। मस्तकीं धरिले वालिचरण। काय आपण बोलत ॥ ५५ ॥ तुझिया वैराचे विभक्तीं। स्वामी जोडला श्रीरघुपती। जाली वैराची निर्जे-शांती। वानूं मी किती उपकार ॥ ५६ ॥ मीतूं-पणेंसीं तुटलें वैर। सुखेंचि उतरलों भवसागर। जाला वंशाचा उद्धार। हाही उपकार वाळी तुझा ॥ ५७ ॥ नुल्लंघितां तारेच्या वचनासी। यौवराज्य देईन अंगदासी। सर्वस्वें भजेन श्रीरामासी। भाक तुजपासीं हे माझी ॥ ५८ ॥ आम्ही वनचरें वानर। विषयोन्मत्त पालेखाइर। त्या आम्हां जोडला श्रीरामचंद्र। हाही उपकार वाळी तुझा ॥ ५९ ॥ ऐकोनि सुग्रीवाचें वचन। वाळी जाला सुख-संपन्न। विजयमाळा द्यावया आपण। उल्लास पूर्ण वाळीसी ॥ ६० ॥

इमां मालां गृहाण त्वं दत्तां सुग्रीव कांचनीम्।
उदारा श्रीः स्थिता यस्यां त्वामेष्यति मृते मयि ॥१०॥
इत्युक्त्वा स च सुग्रीवं रामं प्रांजलिरब्रवीत्।
प्रणम्य शिरसा पादौ त्यक्त्वासुं परमां गतिम् ॥११॥

कश्यपदत्त वरदमाळा। वृत्रवधाचिये काळा। घातली इंद्राचिये गळां। जे देखलिया डोळां वैरी विमुख ॥ ६१ ॥ माळा देखिलिया संमुख। धाकें वैरी होतील विमुख। विजयश्रीचें निजसुख। तिन्ही लोक वानिती ॥ ६२ ॥ इंद्रें दिधली मज-लागोनी। विजयमाळा हे कांचनी। सुग्रीवासी आलिंगोनी। वाळी आल्हादोनी देता जाला ॥ ६३ ॥ सुग्रीवा ही विजयमाळा। म्यां घातलीसे तुझ्या गळां। तूं नावरसी कळिकाळा। भोगीं सोहळा कपिराज्याचा ॥ ६४ ॥ विजयमाळेच्चिया प्राप्तीं। श्रीरामाची सेवावृत्ती। तुझी त्रैलोक्यीं विस्तरेल कीर्ती। नित्यानुवर्ती श्रीरामाचा ॥ ६५ ॥ ऐसें सांगोनि सुग्रीवासी। नमस्कारोनि श्रीरामासी। रामस्मरणें त्यजोनि देहासी। परम गतीसी पावला ॥ ६६ ॥ वाळीनें सांडिलिया प्राण। तारा अति दुःखीं निमग्न। श्रीरामापासीं येवोनि जाण। काय आपण स्वयें बोले ॥ ६७ ॥ वैधव्याचें दुःख शोक। न साहवे क्षणार्ध देख। मी मागेन कांहीं-एक। तें आवश्यक मज द्यावें ॥ ६८ ॥ माझें निर्वाण मागणें। ना न म्हणावें कृपणपणें। मजलागूनी उदार होणें। कृपा करणें श्रीरामा ॥ ६९ ॥

राम मां जहि बाणेन येन वाली हतस्त्वया।
गच्छामि पतिसालोक्यं पतिर्मामभिकांक्षति ॥ १२ ॥
पत्नीवियोगजं दुःखमनुभूतं त्वयानघ।
वालिने मां प्रयच्छ त्वं पत्नीदानफलं लभेः ॥ १३ ॥

वाळी विंधिला जेणें बाणें। मज वधावें बाणें तेणें। सवें जाऊं दोघें जणें। वियोग झणें होऊं देसी ॥ ७० ॥ पत्नीवियोगाचें दुःख। तुवां भोगिलें असे देख। मज बाणें विंधोनियां देख। धाडीं आवश्यक पतीपासीं ॥ ७१ ॥ माझी वाट तो पाहत। वाळी राहिलासे तिष्ठत। मजही पाठवावें जी तेथ। पुण्य अद्भुत होय रामा ॥ ७२ ॥ मज धाडिल्या वाळीपासीं। पत्नीदानफल लाहसी। जोडती पुण्याचिया राशी। पत्नी पतीसीं भेटविल्या ॥ ७३ ॥ ऐकोनि तारेचे बोल। प्रवृत्तिशास्त्र अति सखोल। तें अवघें करावया फोल। राम निश्चळ पूसत ॥ ७४ ॥

किं भीरु शोचसे व्यर्थं शोकस्याविषयः पतिः।
पतिस्तवास्ति देहो वा जीवो वा वद तत्त्वतः ॥१४॥

तारे ऐक सावधानेंसीं। तूं काय देहासी पति मानसी। अथवा जीवा पति म्हणसी। तें मज-पासीं शुद्ध सांगें ॥ ७५ ॥ देहासी सत्य पति मानिसी। तरी तो आहे तुजचिपासीं। सिद्ध असतां शोक कां करिसी। अति उल्लासीं भोगावा ॥ ७६ ॥ पति मानिसी जरी जीवासी। तरी त्वां देखिलें नाहीं त्यासी। गेला गेला कैंवी म्हणसी। व्यर्थ रांडवलीसी मूर्खत्वें ॥ ७७ ॥ जीवासी नाहीं मरणें जिणें। जीवासी नाहीं खाणें भोगणें।

१ मोठे शत्रु. २ महावीर. ३ फुटाफुटीनें. ४ पूर्ण लोप. ५ शपथ. ६ वृत्रासुराचे वधसमयीं. ७ समोर राहात नाहींत. ८ सुवर्णमय. ९ नित्याचा सेवक. १० निकराचें. ११ प्रापंचिक व्यवहारशास्त्र.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

जीवासी नाहीं येणें जाणें । गेला म्हणणें अति मिथ्या ॥ ७८ ॥ जीव चिदानंद चैतन्यघन । सर्वी सर्वत्र परिपूर्ण । त्यासी नाहीं गमनागमन । वृथा रुदन कां करिसी ॥ ७९ ॥ घटासी घडीमोडी बहुवस । घडमोड नेणे घटाकाश । तेंवी देहासी होतां नाश । जीव अविनाश नित्यत्वें ॥ ८० ॥ घटीं भरिल्या घृतमद्यांसी । तो लेपू न लगे घटाकाशीं । तेंवी देहींच्या पापपुण्यासी । आत्मप्रकाशीं रिघू नाहीं ॥ ८१ ॥ आत्मा परिपूर्ण सदोदित । कर्म धर्मीविरहित । सुखदुःखांसीं अलिप्त । तूं कां व्यर्थ विलपसी ॥ ८२ ॥

देहो हि काष्ठवद्राम जीवो नित्यश्चिदात्मकः ।
सुखदुःखादिसंबंधः कस्य स्याद्राम मे वद ॥ १५ ॥

देह तंव जड काष्ठप्राय । त्यासी सुखदुःख संबंध न होय । आत्मा चैतन्यघन सबाह्य । तेथें न समाय सुखदुःख ॥ ८३ ॥ सुखदुःखांचा हा मारा । कोणासी बाधी श्रीरामचंद्रा । याचा उकलू सांगावा खरा । दुःखपरपारा पावावया ॥ ८४ ॥ ऐकोनि तारेचा प्रश्न । स्वयें सांगे श्रीरघुनंदन । जंव देहीं देहाभिमान । दुःखबंधन अविवेकिया ॥ ८५ ॥ देहीं सबाह्य चैतन्य घन । तेथें मिथ्या भासे देहाभिमान । जेंवी दोराअंगीं सर्पपण । तेंवी संपूर्ण देह मिथ्या ॥ ८६ ॥ जन्ममरण देहसंभ्रम । क्षुधा तृषा प्राणधर्म । विषयांचे भोग परम । तें इंद्रियकर्म इंद्रियांचें ॥ ८७ ॥ सुख दुःख भय शोक । मनोधर्म हे आवश्यक । हरि हर ब्रह्मा त्रिगुणात्मक । काल्पनिक संसार ॥ ८८ ॥ आत्मा गुणी गुणातीत । देहीं देहबाधा अलिप्त । तेही विषयींचा दृष्टांत । सुनिश्चित अवधारीं ॥ ८९ ॥ स्फटिक कृष्णवर्णें दिसे काळा । पीतवर्णें दिसे पिंवळा । आरक्तें दिसे आरक्तकिळा । तरी तो वेगळा तिहीं रंगीं ॥ ९० ॥ तेंवी आत्मा संसारांत । त्रिगुणगुणीं गुणातीत । ऐसा जोडला ज्या परमार्थ । त्या नव्हे प्राप्त सुखदुःख ॥ ९१ ॥ ऐसी व्हावया निजप्राप्ती । अवश्य पाहिजे सत्संगती । त्याचेनि संगें विषयविरक्ती । तैं परमार्थी अधिकार ॥ ९२ ॥ शब्दें छेदी विकल्प समस्त । परमानंदें नित्य तृप्त । तैसिया गुरूपासीं परमार्थ । सुनिश्चितार्थ साधावा ॥ ९३ ॥ वेदांनुवादें सप्रमाण । ऐकोनि सद्गुरुवचन । देहीं मिथ्या देहपण । नित्य चैतन्य अनुलक्षीं ॥ ९४ ॥ अनुलक्षितां चैतन्य घन । परमानंदीं मूर्च्छापन्न । श्रीरामकृपा पावली पूर्ण । देहाभिमान विसरली ॥ ९५ ॥

श्रीरामेणोदितं सर्वं श्रुत्वा तारातिविस्मिता ।
देहाभिमानजं शोकं त्यक्त्वा नत्वा रघूत्तमम् ॥ १६ ॥
सुग्रीवोऽपि महाबाहुः श्रुत्वा रामस्य भाषितम् ।
विज्ञाय ज्ञानमखिलं स्वस्थचित्तोऽभवत्तदा ॥ १७ ॥

ऐकोनि श्रीरामाचें वचन । तारा विसरली देहाभिमान । हर्षें घालोनि लोटांगण । श्रीरामचरण वंदिले ॥ ९६ ॥ वाळीनें सांगितलें आपण । ब्रह्मीं ब्रह्मभूत श्रीरामवचन । ते मज पावली निजखूण । ब्रह्म परिपूर्ण श्रीराम ॥ ९७ ॥ ताराप्रबोधें श्रीरामवचन । सुग्रीवें ऐकतां आपण । विसरला देहाभिमान । सुखसंपन्न श्रीरामें ॥ ९८ ॥ ऐकोनि श्रीरामवचनोक्ती । तारासुग्रीवां सुखसंविती । दोघां जाली अति प्रीती । विकल्प चित्तीं त्यां नाहीं ॥ ९९ ॥ दोघां जालें परम समाधान । तंव बोलिला श्रीरघुनंदन । वाळीचें करोनि देहदहन । करावें पिंडदान तिलोदकें ॥ १०० ॥ अंगद सुग्रीव आणि प्रधान । वाळीस पुष्पकीं घालोन । पंपातीरीं केलें दहन । बिल्वचंदनकाष्ठादिकीं ॥ १ ॥ वाळीचें उत्तरविधान । तिलोदकें पिंडदान । करोनि सुग्रीवादि प्रधान । अंगदा घेवोन येते झाले ॥ २ ॥ येवोनियां अवघे जण । वंदोनि श्रीरामचरण । सुग्रीव हात जोडोनि आपण । अंगदा घेवोन उभा ठेला ॥ ३ ॥ श्रीराम म्हणे हनुमंता । सुग्रीवासी अति शीघ्रता । करावी राज्याभिषेकता । यौवराजता अंगदासी ॥ ४ ॥ ऐकोनि श्रीरामाची वचनोक्ती । हनुमंतें केली विनंती । स्वामींनीं येवोनि किष्किंधेप्रती । सुग्रीव राज्यार्थी अभिषेकावा ॥ ५ ॥ आपुलेनि हातें श्रीराघवा । सुग्रीव राज्यीं स्थापावा । हें आवडे आमुच्या जीवा । कृपाळुवा श्रीरामा ॥ ६ ॥ ऐकोनि हनुमंताचें वचन । संतोषला श्रीरघुनंदन । आपुलें नेमाचें लक्षण । स्वयें आपण सांगत ॥ ७ ॥

१ ज्ञानरूपी व आनंदस्वरूपी. २ स्वप्रकाशपरिपूर्ण. ३ घटांतील आकाश. ४ उलगडा. ५ कल्पनेनें झालेला. ६ तांबड्या प्रभेचा. ७ संशय. ८ वेदांत सांगितल्याप्रमाणें. ९ सुखज्ञान.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

चतुर्दशसमाः सौम्य ग्रामं वा यदि वा पुरम् ।
न प्रवेक्ष्याम्यहं वीर पितुर्निर्देशकारणात् ॥ १८ ॥

श्रीदशरथाज्ञा शिरीं । चवदा वर्षें निजनिर्धारीं । ग्रामीं अथवा नगरीं पुरीं । प्रवेश न करीं नेमस्थ ॥ ८ ॥ ऐकोनि नेमाचें वचन । हनुमंतें धरिले श्रीरामचरण । सवें धाडावा लक्ष्मण । राज्याभिषिंचन सुग्रीवा ॥९॥ राज्याभिषेचन सुग्रीवासी । रामाज्ञा लक्ष्मणासी । येरें वंदोनियां शिरसीं । सहपरिवारेंसीं चालिला ॥ ११० ॥ राज्यीं स्थापावा सुग्रीव वीर । किष्किंधे चालिला सौमित्र । प्रधानवानरपरिवार- । -जयजयकार प्रवर्तला ॥ ११ ॥ श्रीरामें तारा पाचारोनी । किष्किंधाराज्यीं तूं राजपत्नी । सुग्रीवातें अंगीकारूनी । माझे आज्ञेनें राज्य करीं ॥ १२ ॥ सर्वांभूतीं भगवद्भावो । त्यामाजी मानीं सुग्रीव नाहो[1] । माझे आज्ञेचा भोगीं अनुभवो । देहसंदेहो तेथें नाहीं ॥ १३ ॥ देवरांच सुतोत्पत्ती[2] । बोलिलें आहे धर्मशास्त्रार्थी । माझिया आज्ञेच्या अनुभूतीं[3] । सुग्रीवाप्रती भजावें ॥ १४ ॥ स्त्रीपुरुष उभय देहीं । आत्म्यावांचून आत्मी नाहीं । दृष्टि ठेवितां तिये ठायीं । देही विदेही सहजत्वें ॥ १५ ॥ हे चुकलिया निजात्मदृष्टी । स्वपत्नी भोगितां नरककोटी । निजात्मदृष्टीच्या संतुष्टीं । द्वंद्व सहज लोटीं ममाज्ञा ॥ १६ ॥ श्रीरामाचें अनुवादन । ऐकतां साच विस्मयापन्न । तारासुग्रीवां समाधान । श्रीरामवचन अनुलंघ्य ॥ १७ ॥ सुग्रीव किष्किंधेचा राजा । तारा त्याची निजभाजा[4] । यौवराज्य तारात्मजा । श्रीरघुराजाची हेचि आज्ञा ॥ १८ ॥ ऐसें बोलतां श्रीरामचंद्र । अवघीं केला जयजयकार । संतोषले वानरभार । आणि सुरवर समस्त ॥ १९ ॥ हा महोत्सव किष्किंधेंत । वानर मिळवोनियां समस्त । ऋषी आणिले असंख्यात । अभिषेकार्थ सुग्रीवा ॥ १२० ॥ सनेख[5] व्याघ्रचर्म समग्र । वराहदंष्ट्रा कूर्मचक्र । सप्तसमुद्रींचें नीर । आणिलें क्षीर सुरभीचें[6] ॥ २१ ॥ सप्तमृत्तिका तीर्थोदकें । स्थळँजें[7] जळँजें[8] कमळें अनेकें । सुमनें चंदनें अति चोखें । क्षीरोदकें मणिरत्नें ॥ २२ ॥ चूतपल्लव[9] पद्मपल्लव । अशोकपल्लवांची लवलव । नगर शृंगारिलें सर्व । अति अपूर्व हनुमंतें ॥ २३ ॥ मुकुट कुंडलें अलंकार । श्वेत छत्र युग्मचामर । सदाफळी औदुंबर । पीठँ[10] पवित्र अभिषेका ॥ २४ ॥ शातकुंभ[11] रजतकुंभ[12] । सालंकारी श्वेतवृषभ । रत्नीं पूर्ण रत्नकुंभ । हरिवल्लभ[13] अभिषेक ॥ २५ ॥ होम करोनि प्रधान । सवेंचि केलें द्विजपूजन । तिलाज्यधेनुविविधदान । अभिषिंचन सुग्रीवा ॥ २६ ॥ जैसी उमा आणि रमा । तैसी शोभे तारा रुमा । अंगदाची कांता क्षमा । महा महिमा अभिषेकीं ॥ २७ ॥ सुवासिक शीतळ गंधोदक । सुमनोदक कुशोदक । श्रीरामाचें चरणोदक । ऋषिअभिषेक वेदघोषीं ॥ २८ ॥ वस्त्रें अलंकार धनधान्य । द्विजां दिधलें भोजन । अंगदा यौवराज्य देऊन । सुखसंपन्न सुग्रीव ॥ २९ ॥ विधियुक्त वेदमंत्र । अभिषेकिती ऋषीश्वर । अभिषेकावया आले वानर । थोर थोर ते ऐका ॥ १३० ॥

गजो गवाक्षो गवयः शरभो गंधमादनः ।
मैंदद्विविदनीलाश्च सुषेणो जांबवान्नलः ।
अभ्यषिंचंत सुग्रीवमंगदं चापि पूजयन् ॥ १९ ॥

गज गवाक्ष गवय । शरभ गंधमादन उभय । मैंद द्विविद नीळ पाहें । आले लवलाहें अभिषेका ॥ ३१ ॥ नळ सुषेण जांबवंत सबळ । आणिक वानर बहुत प्रबळ । सुग्रीव अभिषेकावया सकळ । आले तत्काळ वानर ॥ ३२ ॥ अभिषेकिती सुग्रीवासी । यौवराज्य अंगदासी । पूजा करोनि दोघांसी । अति उल्लासीं स्थापिलें ॥ ३३ ॥ अंगदा यौवराज्य दिधलें । वानरींही सुग्रीवा संमानिलें । अवघे म्हणती भलें केलें । संस्थापिलें सुग्रीवा श्रीरामें ॥ ३४ ॥

एतस्मिन्नंतरे च्छत्रं गृहीत्वा पनसो मुदा ।
यूथपौ नलतारौ च वालव्यजनधारिणौ ॥ २० ॥

पहिलें बैसवोनि सौमित्र । मग रथीं बैसे सुग्रीव वीर । पुढें घेवोनि अंगद कुमर । निघे सत्वर रामनमना ॥ ३५ ॥ ते समयीं पनस वीर । सुग्रीवावरी धरी छत्र । कँनकदंडी[14] युग्मचामर । नळ तार वीर वीजिती[15] ॥ ३६ ॥ यापरी सुग्रीव राज्यधर ।

---

१ पति. २ दिरापासून पुत्रप्राप्ति. ३ प्रमाण मानून. ४ स्त्री. ५ नखासहित. ६ कामधेनूचें. ७ भूमीवरील. ८ जळांतील. ९ आंब्याचे टाळे. १० आसन. ११ सोन्याच्या घागरी. १२ रुप्याच्या घागरी. १३ वानरांना प्रिय. १४ सोन्याची काठी असलेले. १५ वारतात.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

घेवोनि वानरांचा संभार । करीत आले जयजयकार । तेणें रघुवीर सुखी जाला ॥ ३७ ॥ हैकार थैकार जयजयकार । करीत आले वानरवीर । तें देखोनि श्रीरामचंद्र । सुखनिर्भर स्वानंदें ॥ ३८ ॥ रथ सांडोनि सत्वर । अंगद सुग्रीव सौमित्र । लोटांगणीं श्रीरामचंद्र । नमस्कारें वंदिला ॥ ३९ ॥

निवेद्य रामाय महात्मने तदा
महाभिषेकं कपिवाहिनीपतिः ।
रुमां स्वभार्यामुपलभ्य वीर्यवान्
अवाप राज्यं त्रिदशाधिपो यथा ॥ २१ ॥

हनुमंत सांगे श्रीरामापासीं । राज्याभिषेक सुग्रीवासी । यौवराज्य देवोनि अंगदासी । पायांपासीं आणिलें ॥ १४० ॥ येथोनियां श्रीरघुनाथा । पुढील कार्यकर्तव्यता । विचारोनि सांगें आतां । आम्हां समस्तां दासांसी ॥ ४१ ॥ पर्जन्यकाळ चातुर्मासीं । करितां न ये सीताशुद्धीसी[३] । सुग्रीवा धाडिजे किष्किंधेसी । हनुमंतासी राम सांगे ॥ ४२ ॥ प्रस्रवणगिरिगुहेसीं । मी राहीन सौमित्रेसीं । लोटलिया पर्जन्यकाळासी । सीताशुद्धीसी शीघ्र यावें ॥ ४३ ॥ सुग्रीव म्हणे श्रीरामासी । लोटलिया चातुर्मास्यासी । आणोनि वानरसैन्यासी । सीताशुद्धीसी मी करीन ॥ ४४ ॥ ऐसें बोलोनि आपण । वंदोनियां श्रीरामचरण । उल्लासोनि अवघे जण । किष्किंधापुर पावले ॥ ४५ ॥ श्रीरामें उद्धरिला वाळी । राज्यीं स्थापिला सुग्रीव बळी । कीर्ति जाली भूमंडळीं । पिटिली टाळी तिहीं लोकीं ॥ ४६ ॥ आतां पुढें कथेसी । क्रमोनियां चातुर्मास्यासी । सुग्रीव घेवोनि येईल वानरांसी । सीताशुद्धीसी करावया ॥ ४७ ॥ एका जनार्दना शरण । जालें वाळीचें उद्धरण । वानरां सखा श्रीरघुनंदन । पशुपावन श्रीराम ॥ १४८ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे किष्किंधाकांडे एकाकारटीकायां सुग्रीवराज्याभिषेको नाम सप्तमोऽध्यायः ॥ ७ ॥ ओंव्या ॥ १४८ ॥ श्लोक ॥ २१ ॥

अध्याय आठवा

श्रीसीतारामचंद्राय नमः ॥ श्रीरामें उद्धरिलें वाळीसी । राज्याभिषिंचन सुग्रीवासी । सुखी केलें स्वयें तारेसी । देवोनि अंगदासी यौवराज्य ॥ १ ॥ सुग्रीव राजा निजभ्रतार । युवराज निजकुमर । तारा तेणें सुखनिर्भर । श्रीरामचंद्रप्रसादें ॥ २ ॥

अभिषिक्ते तु सुग्रीवे प्रविष्टे वानरे गुहाम् ।
आजगाम सह भ्रात्रा रामः प्रस्रवणं गिरिम् ॥ १ ॥

प्रधान-अंगदसमवेत । सुग्रीव गेला किष्किंधेंत । श्रीरामें वसविला माल्यवंत । गुहा प्रशस्त देखोनि ॥ ३ ॥ माल्यवंतगिरिवरीं । प्रस्रवणगुहेभीतरीं । श्रीराम राहिला मास चारी । सवें साहाकारी सौमित्र ॥ ४ ॥ चारी मास पर्जन्यकाळ । श्रीराम राहिला सुनिश्चळ । श्रीरामकार्या उतावेळ । शरत्काळ स्वयें आला ॥ ५ ॥ ग्रासोनियां वर्षाकाळ । शीघ्र पावला शरत्काळ । श्रीराम काळाचाही काळ । सुनिश्चळ स्वस्थानीं ॥ ६ ॥ जेंवी साधूंचें मानस । नित्य निर्मळ निर्दोष । मेघीं सांडिलें आकाश । स्वप्रकाश तेंवी भासे ॥ ७ ॥ शारदी निर्मळता आकाशीं । प्रसन्नप्रभा शशिसूर्यांसी । तो सुखकाळ साधकांसी । पुरुषार्थांसी साधावया ॥ ८ ॥ तीर्था निघाले तीर्थवासी । अभ्यासी बैसले अभ्यासासी । राजे करिती प्रस्थानासी । अरिवर्गासी जिंकावया ॥ ९ ॥ काळ काळातें आकळित । काळा नाकळे श्रीरघुनाथ । तो बैसला असे गिरिगुहेंत । सीताशुद्ध्यर्थ नटनाट्यें ॥ १० ॥ देखोनियां शरत्काळातें । श्रीराम म्हणे लक्ष्मणातें । सुग्रीव न येचि कां येथें । निजनियमातें विसरला ॥ ११ ॥ जे रंगले विषयस्वार्थीं । ते न व्हेति गा परमार्थी । त्यांसी दंडोनियां संतीं । हितकार्यार्थीं लावावें ॥ १२ ॥ जो अतिशयेंसीं विषयासक्त । तो कदा न देखेचि परमार्थ । तो शुद्ध उपकारार्थ । येईल निश्चित हें न घडे ॥ १३ ॥

चातुर्मास्ये गतेऽभ्येत्य सीतायाः परिमार्गणे ।
कृतार्थः समयं कृत्वा दुर्मतिर्नाभिमन्यते ॥ २ ॥

क्रमिलिया चातुर्मास्यासी । शीघ्र यावें सीताशुद्धीसी । तेंही नाठवे सुग्रीवासी । जो मजपासीं नेम केला ॥ १४ ॥ किष्किंधे जावोनि आपण । सुग्रीवा द्यावी आठवण । जरी तो न मानी माझें

१ सुखपूर्ण. २ पावसाळ्याचे चार महिनेपर्यंत. ३ सीतेचा शोध. ४ प्रस्रवणनामक पर्वताच्या गुहेमध्यें. ५ घालवून. ६ पशूंना पावन (पापमुक्त) करणारा. ७ पावसाळा. ८ धर्म, अर्थ, काम व मोक्ष ह्या चार पुरुषार्थांना. ९ शत्रूंना. १० सोंग घेऊन.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वचन । विंधोनि बाण वधावा ॥ १५ ॥ तारा रुमा दोघी पत्नी । जो उन्मत्त मद्यपानीं । माझें वचन न गणी । तो तत्क्षणीं मारावा ॥ १६ ॥ ज्यासी नाहीं माझी आठवण । नाहीं मत्कर्माचें स्मरण । त्यासी मारावें आपण । विंधोनि बाण सौमित्रा ॥१७॥ जेणें केलें वालिनिर्दळण । तोचि सोडोनियां बाण । घ्यावा सुग्रीवाचा प्राण । अर्ध क्षण न लागतां ॥ १८ ॥ शठ नष्ट कृतघ्न वानर । नेणती उपकार प्रत्युपकार । मिथ्यावादी पालेखाइर । हा कुमित्र मित्रत्वा ॥ १९ ॥ तूं तंव माझा सखा सौमित्र । सुग्रीव केवळ कुमित्र । त्याचें विचारोनि अभ्यंतर । मग संहार करावा ॥ २० ॥ ऐकोनि श्रीरामाचें वचन । करोनियां साष्टांग नमन । लक्ष्मण निघाला आपण । कोपायमान रामाज्ञे ॥ २१ ॥

शक्रचापनिभं घोरं धनुः कालांतकोपमम् ।
प्रगृह्य गिरिशृंगाभं प्रययौ लक्ष्मणस्तदा ॥ ३ ॥
शालतालांश्च कर्णांश्च तरसा पातयन् द्रुमान् ।
शिलाश्च शकलीकुर्वन् पद्भ्यां गज इवाशुगः ॥ ४ ॥

लक्ष्मणाचा अति साटोप । इंद्रधनुष्यासमान चाप । हातीं घेवोनि सकोप । पदाक्षेप[1] अवधारा ॥ २२ ॥ सक्रोध पाद सबळ शक्ती । सायसांदडे[2] नेणों किती । शाळ ताळ उन्मूळती । वृक्ष उपडती कर्णिकार ॥ २३ ॥ अति सक्रोध क्रोधानळीं । वज्रनिर्घातपादें[3] बळी । शिळा पाषाण पायांतळीं । होत रांगोळी पदोपदीं ॥ २४ ॥ पूर्वसूचना स्वयें हनुमंत । सुग्रीवासी असे सांगत । विसरलासी रामकार्यार्थ । अति उन्मत्त विषयांध ॥ २५ ॥ स्त्रीविषय मद्यपान । त्याहीवरी धन मान । त्याहीवरी शब्दज्ञान । हेचि नागवण स्वहिताविषयीं ॥ २६ ॥ द्रव्य दारा मद्यपान । तुझें बुडालें स्वहितज्ञान । विसरलासी श्रीरामभजन । परम विघ्न तुज आलें ॥ २७ ॥ गेला काळ तूं नेणसी । आयुष्य वेंचलें विषयासीं । लोटलिया चातुर्मास्यासी । सीताशुद्धीसी न निघसी ॥ २८ ॥ सीताशुद्धीसी न करितां । कोप येईल श्रीरघुनाथा । तो करील तुझिया घाता । सत्य सर्वथा सुग्रीवा ॥ २९ ॥ ऐकोनि हनुमंताचें वचन । सुग्रीव नव्हेचि सावधान । वाक्य बोलिला उदासीन । अति गौण कार्यार्थ ॥ ३० ॥ सुग्रीव सांगे हनुमंतासी । शीघ्र मूळ धाडावें सैन्यासी । ऐसें सांगोनियां त्यासी । राव राणिवसासी[4] निघाला ॥ ३१ ॥ हनुमंतें येवोनि अति शीघ्र । दहा सहस्र वानरवीर । आणावया सेना सैन्यधर[5] । स्वयें सत्वर धाडिले ॥ ३२ ॥ येरीकडे सौमित्र । कोपें चालिला काळाग्नि रुद्र । त्यातें देखोनि वानरवीर । थोर थोर गजबजिले ॥ ३३ ॥ किष्किंधेची धरोनि वाट । पायें पाषाण करीत पीठ । लक्ष्मण येताहे उद्भट[6] । वानर समस्त हडबडिले ॥ ३४ ॥

दशनागबलाः केचित् केचिद्दशगुणोत्तराः ।
केचिन्नागसहस्रस्य बभूवुस्तुल्यवर्चसः ॥ ५ ॥
शतकोटिबलाः केचित्केचिद्वायुबलोपमाः ।
अप्रमेयबलाश्चान्ये तत्रासन् हरिपुंगवाः ॥ ६ ॥
ततो भयपरीतांगाः क्रुद्धं दृष्ट्वा तु लक्ष्मणम् ।
कालमृत्युयुगान्ताभं शतशो दुद्रुवुस्तदा ॥ ७ ॥

एका दहा हस्तींचें बळ वानरा । एका त्याहूनि दशोत्तरां[7] । एका नागबळसहस्रा । त्यासम अपार असंख्य ॥ ३५ ॥ एकाचे अंगीं विद्युल्लताबळ । एकाचे अंगीं असंख्य बळ । एकएकाहूनि सबळ । तुळा अतुळ अप्रमेय ॥ ३६ ॥ ऐसे वानरांचे संभार । किष्किंधेमाजी अपार । नगर राखिती महावीर । अति दुर्धर बलिष्ठ ॥ ३७ ॥ लक्ष्मण शरचापधर । काळ कृतांत प्रळयरुद्र । त्यातें देखोनियां वानर । लहान थोर भयभीत ॥ ३८ ॥ देखोनि लक्ष्मणाचा यावा[8] । चळकांप वानरांच्या जीवा । कोणें कोणा धीर द्यावा । भय सर्वां समान ॥ ३९ ॥ लक्ष्मणें टणत्कारिलें सींतें[9] । वानर उडाले समस्त । एक एकापुढें पळत । अति आकांत नगरामाजी ॥ ४० ॥ एका मनुष्याची आली धाडी । तेणें पळती वानरकोडी । राजगृहीं हडबड गाढी । वानरें बापुडीं किलकिलती ॥ ४१ ॥ वानर बोलती विकंडीं[10] । वालिप्रताप-

१ पावलें टाकणें. २ सायसादडे नांवाचे वृक्ष. ३ वज्राघातासमान पाय पडून. ४ अंतःपुरांत. ५ सेनानायक. ६ बलाढ्य. ७ दसपटीनें. ८ आगमन. ९ धनुष्याची दोरी. १० भयभीत होऊन.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

ख्याती गाढी । तो मरतांचि आली धाडी । काढाकाढी कोण करी ॥ ४२ ॥ तारा सुग्रीवासी सांगत । नगरीं होतो अति आकांत । अझूनि काय कामासक्त । होईं सावचित्त उन्मत्ता ॥ ४३ ॥ प्रधान सांगती रायासी । सीताशुद्धि-मर्यादेसीं । तूं जावया चुकलासी । श्रीराम आवेशीं क्षोभला ॥ ४४ ॥ तुझा करावया घात । श्रीरामें लक्ष्मण धाडिला येथ । वानर पळाले समस्त । अति आकांत नगरामाजी ॥ ४५ ॥ समयो चुकलों आपण । सत्य कोपला श्रीरघु-नंदन । लक्ष्मणासी अनन्य शरण । रिघों आपण सकळही ॥ ४६ ॥

तं दृष्ट्वा क्रोधरक्ताक्षं सुगृहीतशरासनम् ।
सुग्रीवः सहसोत्तस्थौ कृतांजलिपुटस्तदा ॥ ८ ॥
तस्य तारा रुमा चैव द्वे भार्ये पुरतः स्थिते ।
कृतांजलिपुटे भूत्वा लक्ष्मणाभिमुखे तदा ॥ ९ ॥

धनुष्याचा वाहोनि गुण । सीतीं सज्जोनियां बाण । लक्ष्मण सक्रोधलोचन । सुग्रीव देखोन भयभीत ॥ ४७ ॥ तारा रुमा दोघी पत्नी । पुढें बद्धांजलि[1] करोनी । सुग्रीव आला लोटांगणीं । कर जोडोनि राहिला ॥ ४८ ॥ सुग्रीव म्हणे मी अपराधी । रामबाणें होय वधी[2] । लक्ष्मणा तूं कृपानिधी । मज त्रिशुद्धी[3] वांचवावें ॥ ४९ ॥ सुग्रीव येतां काकुळती । वांचवावया निजपती । तारा करीतसे विनंती । सत्त्वयुक्तीं दीनवचनें ॥ ५० ॥ लटिका तरी शरणागत । याचा करूं नये घात । मारिल्या अपकीर्ति जगांत । श्रीरघुनाथ पावेल ॥ ५१ ॥ सुग्रीव शरणागत जाला । श्रीरामें राज्यीं स्थापिला । तोचि श्रीरामें मारिला । स्वकीर्ती केला शिरच्छेद ॥ ५२ ॥ शरणागतवज्रपंजर । सूर्यवंशींचा हा बडिवार[4] । तेथें मारिलिया वानर । वंशीं श्रीरघुवीरअपकीर्ति ॥ ५३ ॥ वाळी वधिला अवचितां । हे अपकीर्ति श्रीरघुनाथा । सुग्रीव मारिल्या आतां । दुसरी माथां अपकीर्ति ॥ ५४ ॥ बाळक अंकावरी मुतलें । बापें धुतलें कीं मारिलें । तैसें शरणागत आपुलें । वांचवीं वहिलें सौमित्रा ॥ ५५ ॥ तुझें नाम सौमित्र । वधितां शरणागत वानर । सौमित्रा होसी तूं कुमित्र । नाम अपवित्र होऊं नेदीं ॥ ५६ ॥ वांचवीं सुग्रीवाचा प्राण । वांचवीं आमचें अहेवपण[5] । तारा रुमा दोघी धांवोन । धरिले चरण मस्तकीं ॥ ५७ ॥ ऐकोनि तारेच्या सद्युक्ती । लक्ष्मण सुखावला चित्तीं । सुग्रीव महापापमूर्ती । ऐक तुजप्रती सांगेन ॥ ५८ ॥ असत्यवादें[6] अधोगती । तेंही असत्य श्रीरामाप्रती । अनुवादलासी[7] पापमूर्ती । ऐक शास्त्रार्थी निर्णयो ॥ ५९ ॥

पंच स्वार्थानृतं हंति दश हंति गवानृतम् ।
शतमश्वानृते हंति सहस्रं पुरुषानृते ॥ १० ॥
हंति जातानजातांश्च हिरण्यार्थेऽनृतं वदन् ।
सर्वं भूम्यनृतं हन्ति मा स्म भूम्यनृतं वदः ॥ ११ ॥
आत्मानं स्वजनं हंति पुरुषः पुरुषानृते ।
पूर्वं कृतार्थो मित्राणां न तत्प्रतिकरोति यः ।
कृतघ्नः सर्वभूतानां स वध्यः पुरुषाधमः ॥ १२ ॥

आपस्वार्थी[8] असत्य वदती । पंच पूर्वज नरकीं जाती । असत्य वदलिया गोस्वार्थी । नरका जाती दश पूर्वज ॥ ६० ॥ अश्वार्थी असत्य वदती । शत पूर्वज नरका जाती । सहस्र पूर्वजां अधोगती । जे मिथ्या बोलती पुरुषार्थ ॥ ६१ ॥ जे द्रव्यार्थी असत्य वदती । त्यांचेनि जितां मेल्यां अधोगती । सकळ कुळ नरका नेती । जे असत्य वदती भूम्यर्थ ॥ ६२ ॥ येवोनि सत्पुरुषाप्रती । निश्चय कर्तव्यार्थ बोलती । तोचि नेमू न करिती । त्यांची दुर्गती अवधारीं ॥ ६३ ॥ सकलकुलस्वजनयुक्त । ते पावती निजात्मघात । मेल्यामागें नरक प्राप्त । त्यांसी निश्चितार्थ शास्त्र हें ॥ ६४ ॥ मित्रापासूनि स्वकार्य करूनि घेती । मित्रकार्य स्वयें न करिती । तंव ते वधावे सर्वभूतीं । नेमू शास्त्रार्थी ब्रह्मवाक्य ॥ ६५ ॥ परोपकारी सर्वकार्यार्थी । ते वंदावे सर्व भूतीं । जे वंचक मित्रकार्यार्थी । ते सर्वभूतीं निरसावे ॥ ६६ ॥ असतां घराश्रममढी । लटिका दोष लावोनि दुसरियांतें पीडी । त्याच्या नर-काची परवडी । संख्या कोण करील ॥ ६७ ॥ त्यासी सर्प स्वयें डंखिती । व्याघ्र ऋक्ष वृकें स्वयें भक्षिती । धर्मनियामक त्यासी विंधिती । वध्य होती सर्वांसी ॥ ६८ ॥ ऐकोनि लक्ष्मणाची

---

१ हात जोडून. २ वध करण्यास योग्य. ३ खरोखर. ४ मोठेपणा, ५ सौभाग्य. ६ खोटें बोलण्यानें. ७ बोललासी, ८ आपमतलबी. ९ आस्वलें. १० लांडगे.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

युक्ती। तारा विनवीतसे पुढती। सुग्रीव पापी होय निश्चितीं। पापनिर्मुक्की तुझेनि ॥ ६९ ॥ करितां श्रीरामनामस्मरण। सकळ पापां होय दहन। तो देखिल्या रघुनंदन। पापनिर्दळण सत्संगें ॥ ७० ॥ आवडीं करितां रामगोष्टी। पापें जळती कल्पकोटी। श्रीराम देखिल्या निज-दृष्टीं। निष्पाप सृष्टीं श्रीरामें ॥ ७१ ॥ रामनाम-प्रतापशक्ती। पायां लागती चारी मुक्ती। नाम ब्रह्मादिक वंदिती। पापनिर्मुक्ती श्रीरामनामें ॥ ७२ ॥ तारावाक्य नाममहिमान। तेणें सौमित्रा प्रेम पूर्ण। तारेनें धरिले दोनी चरण। पतिदान मज द्यावें ॥ ७३ ॥ तारासौमित्रसंभाषण। ऐकोनि सुग्रीवा आलें रुदन। श्रीरामसेवा चुकलों जाण। वध्य संपूर्ण मी होय ॥ ७४ ॥ लागल्या श्रीरामाचा बाण। तत्काळ जाईल माझा प्राण। सौमित्रा तुज मी अनन्य शरण। जीवदान मज द्यावें ॥ ७५ ॥

भ्रातृव्यसनसंतप्तं दृष्ट्वा दशरथात्मजम्।
सौवर्णमासनं हित्वा नत्वा तच्चरणांबुजम् ॥ १३ ॥

सांडोनि हेमसिंहासन। सांडोनि राज्यसन्मान। सांडोनियां राज्याभिमान। वंदिले चरण लक्ष्मणाचे ॥ ७६ ॥ सीताशुद्धिकार्याकारण। श्रीरामाज्ञेस्तव जाण। कोपोनियां लक्ष्मण। काय आपण बोलत ॥ ७७ ॥ कामचारिया[1] स्त्रीलंपटा। स्वकार्यवादिया महाशठा। श्रीरामकार्या परि-भ्रष्टा। अति पापिष्ठा तूं ऐक ॥ ७८ ॥

ब्रह्मघ्ने च सुरापे च चौरे भग्नव्रते तथा।
निष्कृतिर्विहिता लोके कृतघ्ने नास्ति निष्कृतिः ॥ १४ ॥

सुरापानी[2] ब्रह्मघाती[3]। असे यासी प्रायश्चित्त शास्त्रार्थी। चोर शठक भग्नव्रती। त्यांसीही निष्कृति[4] शास्त्रीं असे ॥ ७९ ॥ मित्रोपकारा जो कृतघ्न। त्यासी निष्कृति नाहीं जाण। तुवां चाळ-विला रघुनंदन। पापी संपूर्ण तूं एक ॥ ८० ॥ कठिण बोलतां लक्ष्मण। तारा सुग्रीव अति उद्विग्न। ऐसें संकट अवलोकोन। वायुनंदन[5] तेथें आला ॥ ८१ ॥ सीताशुद्धीचा कार्यार्थ। सांडोनि ठकिला[6] श्रीरघुनाथ। यालागीं रामें करविला घात। महा-पापी तूं कृतघ्न ॥ ८२ ॥ साधावया उभयकार्यार्थ। उचित बोले हनुमंत। न करोनि सुग्रीवाचा घात। रामकार्यार्थ साधावा ॥ ८३ ॥ सेवा चुकल्या श्रीरघुनाथा। कोटि अपराध याचे माथां। क्षमा करोनि शरणागता। रामकार्यार्था साधणें ॥ ८४ ॥ आणावया वानरसैन्यासी। दूत धाडिले देशो-देशीं। क्षमा करोनि सुग्रीवासी। रामकार्यासी साधावें ॥ ८५ ॥ ऐकोनि हनुमंताचें वचन। सौमित्र झाला सुखसंपन्न। तेव्हां सुग्रीव संतो-षोन। केलें नमन आल्हादें ॥ ८६ ॥

प्रणम्य लक्ष्मणं राजा सुग्रीवस्त्विदमब्रवीत्।
सर्व एव यतिष्यामो यद्रामस्य चिकीर्षितम् ॥ १५ ॥

सीताशुद्धि रामकार्यार्था। अति आल्हाद वान-रनाथा। सौमित्रचरणीं ठेवोनि माथा। होय बोलता सुग्रीव ॥ ८७ ॥ सेना यूथपँ सैन्य प्रधान। अंगदासहित आपण। श्रीरामसेवेसी विकिला प्राण। सत्य जाण सौमित्रा ॥ ८८ ॥ श्रीरामाचें मनोगत। सिद्धी पाववीन समस्त। सैन्य आणा-वया येथ। दूत त्वरित धाडिले ॥ ८९ ॥ माझे सेनाँनी सैन्यसंभार। रणकर्कश अति झुंजार। आतुर्वळी येती वानर। दूत सत्वर धाडिले ॥ ९० ॥ अर्घ्यपाद्यादि चंदन। धूपदीप माळा सुमन। करोनि लक्ष्मणाचें पूजन। केलें नमन सुग्रीवें ॥ ९१ ॥ सौमित्र म्हणे सुग्रीवासी। शीघ्र निघावें रामापासीं। एकाकी सांडोनि त्यासी। येथें आम्हांसी राहों न ये ॥ ९२ ॥ ऐकोनि सौमि-त्राचें वचन। उभे अवघे करोनि प्रधान। सुग्रीवें वाहियला पण। अति निर्वाण तो ऐका ॥ ९३ ॥ जो परतेल किष्किंधाभुवनीं। तो दंडीन रासभारोहणीं। तारा रुमा पाहे परतोनी। तो मातृगमनी महापापी ॥ ९४ ॥ सीताशुद्धि साध्य न होतां। श्रीराम सुखी न करितां। जो परतेल मागुता। तो दंडिजे पालथा तप्ततैलीं ॥ ९५ ॥ ऐसें सुग्रीवें नेमून। निशाणें त्राहाटिलीं गर्जोन। रथशिबिका संजोगून। तत्क्षणीं निघाले ॥ ९६ ॥ अंगद सौमित्र सुग्रीव वीर। रथीं चढले महाशूर। वालव्यंजन[11] श्वेतातपत्र[12]। धरिलें छत्र रायासी ॥ ९७ ॥ जाला वाद्यांचा एक गजर। भाट गर्जती गंभीर। वानरवीरांचा संभार। अति सत्वर चालिला ॥ ९८ ॥ माल्यवंतपर्वतामाझारीं। प्रस्र-

१ मनास वाटेल तसें वागणाऱ्या. २ दारू पिणारा. ३ ब्राह्मणास मारणारा. ४ प्रायश्चित्त, ५ मारुति, ६ फसविला. ७ सेनापति. ८ गाढवावर बसवून. ९ वाद्यें. १० वाजविलीं. ११ चवऱ्या. १२ शुभ्रच्छत्र,

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वणगिरिशिखरीं। राम मणिमय शिळेवरी। गुहाद्वारीं उपविष्ट ॥ ९९ ॥ श्रीरामा देखोनि वानर। अवघीं केला जयजयकार। अंगद सौमित्र सुग्रीव वीर। केला नमस्कार साष्टांगीं ॥ १०० ॥ आजानुबाहु पसरोन। श्रीरामें दिधलें आलिंगन। सुग्रीव पावोनि समाधान। काय गर्जोन बोलत ॥१॥ दूत धाडिले सत्वर। यूथ यूथप महावीर। वानरसेना सैन्यसंभार। अति सत्वर येताती ॥२॥

एतस्मिन्नंतरे घोरं वानराणां महाबलम्।
उत्पपात महावीरं चालयन् वसुधातलम् ॥१६॥
ततो नागेंद्रसंकाशैस्तीक्ष्णदंष्ट्रमहाबलैः।
बभूवुर्वानरैर्घोरैर्दिशः सर्वाः समावृताः ॥ १७ ॥

ऐसें बोलतां महावीर। वानरसेनासंभार। येवों सरले अपार। धरा समग्र व्यापोनि ॥ ३ ॥ वानरसेना अति प्रबळ। रितें न दिसे क्षितितळ। व्यापोनियां कुलाचळ। गोळांगूळ पैं आले ॥४॥ एक वानर पर्वताकार। एक वानरांमाजी गजेंद्र। तीक्ष्णनखें दंष्ट्रा क्रूर। अति दुर्धर युद्धार्थी ॥ ५ ॥ मारितां पुच्छांचा पैं साटें। शत सहस्त्रां होय आट। नखें पर्वतां करिती पीठ। दांतीं तिखट वीर मारिती ॥ ६ ॥ पूर्वे वानरांचे थाट। पश्चिमे दाटले घनदाट। उत्तरदक्षिणे वानरश्रेष्ठ। वीर उद्भट कोंदले ॥ ७ ॥ आग्नेय वायव्य नैर्ऋत्य। वानर कोंदले अमित। ईशान्य दिशेचा प्रांत। किळकिळीत वानरीं ॥ ८ ॥ वानरीं व्याप्त नभःस्थळ। वानरीं व्याप्त भूमंडळ। वानरीं व्यापिले सकळ। कुलाचळ पर्वत ॥ ९ ॥ एक ते अंजनाभ काळे। एक ते पीतवर्ण पिंवळे। एक ते गौरवर्ण सोनसळे। एक ते निळे सुनीळ ॥ ११० ॥ सिंदूरारक्त वानरगण। एक ते विद्युत्प्राय पूर्ण। एक ते शुद्ध शुभ्रवर्ण। धूम्रवर्ण पैं एक ॥ ११ ॥ एक ते भुरकट वानर। एक ते दाळिंबीसुमनाकार। एक ते पेरीजांचे डोंगर। अभ्रशरीर पैं एक ॥ १२ ॥ एक चंद्रप्राय चोखडे। एक कुंकुमांकित तांबडे। सलोमलोमीं रीस गाढे। सैन्यापुढें गुणगुणती ॥ १३ ॥ होतां श्रीरामदर्शन। रिसां रामनामगुणगुण। वानर करिती रामस्मरण। नामें त्रिभुवन कोंदलें ॥१४॥ देखतां श्रीरामाची मूर्ती। पालटल्या चित्तवृत्ती। वानरां आवडे श्रीरामभक्ती। नाम स्मरती अहर्निशीं ॥ १५ ॥ बाप सत्संगाचा महिमा। पशु विनटले रामनामा। श्रीरामभक्ति प्लवंगमां। तिंहीं हनुमान गुरु केला ॥ १६ ॥ श्रीरामनामाचा गजर। वानरीं केला भुभुःकार। श्रीरामचंद्र सुखसागर। आणि सौमित्र आल्हादे ॥ १७ ॥ स्वयें श्रीरामें अति उल्लासीं। सुग्रीवा धरिलें पोटासीं। सत्य सखा माझा होसी। दृढविश्वासी कार्यकरिता ॥ १८ ॥ सौमित्र पुसे सुग्रीवासी। मर्यादा न दिसे वानरांसी। त्यांची संख्या आहे कैसी। तेचि श्रीरामापासीं सांगावी ॥ १९ ॥

स्वैः स्वैः परिवृताः सैन्यैः सर्वे तिष्ठंति राघव।
शतैः शतसहस्त्रैश्च वर्तंते कोटिभिस्तथा ॥ १८ ॥
अयुतैरागमिष्यंति शंकुभिश्च परंतप।
अर्बुदैरर्बुदशतैर्मध्यैरंत्यैश्च वानराः ॥ १९ ॥

श्रीरामा तुझी प्रतापप्रौढी। सैन्यें आलीं तंव हीं थोडीं। पुढें येतील कल्पकोडी। संख्यापरवडी असंख्य ॥ १२० ॥ अर्बुदें निर्बुद हें अल्पक। शंख महाशंखाहूनि अधिक। सैन्य मिळालें असंख्य। करितां शंख नव्हे संख्या ॥ २१ ॥ समुद्राचे थोडे खडे। इतुकें सैन्य मिळेल पुढें। रावण कायसें बापुडें। आणीन रोकडें बांधोनी ॥ २२ ॥ ऐसें बोलोनियां पाहें। सुग्रीवें आंफळिली बाहे। शिवोनी श्रीरामाचे पाये। करील काय तें ऐका ॥ २३ ॥ रणीं राक्षसां खंदळी। करीन लंकेची पैं होळी। त्रिकूट उपटोनि समूळीं। जनकबाळी आणीन ॥२४॥ वधोनियां लंकानाथा। स्वयें आणोनियां सीता। सुखी करीन श्रीरघुनाथा। होय गर्जता आल्हादें ॥ २५ ॥ ऐकोनि सुग्रीवाची मात। संतोषोनि श्रीरघुनाथ। सुग्रीवास कडिये घेत। स्वयें नाचत स्वानंदें ॥ २६ ॥ जैसी आणोनि दिधली सीता। तैसें सुख झालें श्रीरघुनाथा। उचलोनियां निजभक्ता। होय नाचता श्रीराम ॥ २७ ॥ वानरीं केला भुभुःकार। ऋषी करिती जयजयकार। सुमनें वर्षती सुर-

१ सैन्य व सेनापति. २ श्रेष्ठ. ३ सपाटा. ४ काजळासारखे. ५ पेरीजनामक रत्नविशेष, त्यासमान रंगाचे. ६ वानरांना. ७ दशकोटी. ८ शतकोटी. ९ शंकुसंख्याक. १० मुंडा ठोकला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वर । सुखनिर्भर श्रीराम ॥ २८ ॥ सुग्रीव रामें उचलितां । सुखें विसरला देव-भक्तता । मीतूंपण नाठवे रघुनाथा । भक्तप्रेमता निजऐक्य ॥ २९ ॥ एका जनार्दना शरण । देवभक्तां ऐक्य पूर्ण । खुंटला बोल तुटलें मौन । सुखैकघन श्रीराम ॥ १३० ॥ सुख द्यावया सर्वांसी । श्रीराम आला वनवासासी । तेणें सुखी केलें सुग्रीवासी । निज-समरसीं निजांगें ॥ ३१ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे किष्किंधाकांडे एकाकारटीकायां सुग्रीवागमनं नाम अष्टमोऽध्यायः ॥ ८ ॥ ओंव्या ॥ १३१ ॥ श्लोक ॥ १९ ॥

अध्याय नववा

श्रीसीतारामचंद्राय नमः । सुग्रीवें विनविला रघुवीर । सैन्य सेनानी सेनाधर । सैन्ययूथपाळ महावीर । नमस्कार करूं पाहती ॥ १ ॥ स्वामि समवेतसौमित्र । पहावा वानरांचा संभार । ऐकोनि सुग्रीवाचें उत्तर । जाला सादर श्रीराम ॥ २ ॥

यूथपा दशसाहस्रं वृता वानरकोटिभिः ।
वानेयैः पार्वतीयैश्च सामुद्रैश्च महाबलैः ॥ १ ॥

माझे कटकीं दहा सहस्र । सेनानायक सेनाधर । एकएकातळीं कोटि कोटि वीर । अति दुर्धर रणयोद्धे ॥ ३ ॥ उदयास्तगिरिपर्यंत । वानर आले जी समस्त । नंदनवनींचे वीर विख्यात । आले त्वरित रामकार्या ॥ ४ ॥ सप्तारण्य सप्तसमुद्र । नदीस्रोत वनें उखरें[1] । तेथोनियां वानरवीर । आले सत्वर रामकार्या ॥ ५ ॥ मेरु मांदार आणि विंध्याद्री । वेंकटाद्रि आणि सह्याद्री । तेथोनि यावा[2] केला वानरीं । निजगजरीं रामकार्या ॥ ६ ॥ हिमाचळ अर्बुदाचळ । गंधमादन आणि श्रीशैल । पर्वतीं वानर सकळ । आले तत्काळ रामकार्या ॥ ७ ॥ घेवोनि आपुलाला भार । पृथक् करूं येती नमस्कार । स्वामीनें पहावे सादर । वानरवीर रणयोद्धे ॥ ८ ॥ शतबळीनामा वानर । सेना दशकोटिसहस्र । घेवोनियां वानरभार । केला नमस्कार श्रीरामा ॥ ९ ॥ हनुमंताचा पिता सावत्र । केसरीनामा महावीर । सेना कोट्यनुकोटि वानर । केला नमस्कार श्रीरामा ॥ १० ॥ वानराचे जातीआंतौतां[3] । केसरी अंजनीचा निजभर्ता । तो हनुमंताचा क्षेत्रजपिता[4] । येणें ग्रंथार्थी सत्यत्व ॥ ११ ॥ हनुमंत वायूचा वीर्यज सुतु । केसरी क्षेत्रत्वें पितु । दोहीं बापांचा हनुमंतु । सत्य ग्रंथु वाल्मीकी ॥ १२ ॥ नळ वीरु दहनदीप्त । बालसूर्यासम आरक्त । वानरसेना अयुतायुत[5] । वेगें श्रीरघुनाथ वंदिला ॥ १३ ॥ गोळांगूळें[6] असंख्यात । कोट्यनुकोटि लक्षानुलक्ष । घेवोनि आला गवाक्ष । श्रीराम संमुख वंदिला ॥ १४ ॥ अभ्रवर्ण[7] अति दुर्धर । धूम्रनामा महावीर । घेवोनि सेना शतसहस्र । केला नमस्कार श्रीरामा ॥ १५ ॥ पनस वानर दुर्धर । पर्वतोपम महावीर । दशकोटि सहपरिवार । केला नमस्कार श्रीरामा ॥ १६ ॥ मैंद द्विविद दोनी वीर । एका सप्तकोटि परिवार । एका अष्टकोटि वानर । केला नमस्कार श्रीरामा ॥ १७ ॥ वीर वानर गंधमादन । साठी कोटि वानरसैन्य । घेवोनि आला आपण । केलें नमन श्रीरामा ॥ १८ ॥ तारें तेजाचा घडिला । कीं चंद्रबिंबाचा ओतिला । तैसा तार वानर शोभला । श्रीरामें देखिला तेजस्वी ॥ १९ ॥ ऐसा तार महावीर । सवें शतकोटि वानरभार । घेवोनि आला सत्वर । केला नमस्कार श्रीरामा ॥ २० ॥ गाळोनि व्योमींची[8] नीळिमा । ओतिली नळाची प्रतिमा । सुनीळशोभा प्लवंगमां[9] । जो कां श्रीरामा पढियंतां[10] ॥ २१ ॥ सेतुबंधाची अनुवृत्ती[11] । याचेनि हातें शिळा तरती । हें जाणोनि श्रीरघुपती । करी अति प्रीती नळासीं ॥ २२ ॥ नामें नीळ वर्णें नीळ । कांस घातली सुनीळ । शतसहस्रकोटि दळ । घेवोनि तत्काळ तो आला ॥ २३ ॥ सुग्रीवदळाचा दळपती । नीळ दुर्धरप्रतापशक्ती । तेणें येवोनि विनीतवृत्तीं । श्रीरघुपती वंदिला ॥ २४ ॥ दधिमुख दुराधर्ष दोनी । अकरा कोटि सेना घेवोनी । श्रीरामातें अभिवंदोनी । कर जोडूनी राहिले ॥ २५ ॥ तरु तरळ कुमुद कुमुदाक्ष । गज शरभ गवय गवाक्ष । महाहनु इत्यादि प्रमुख । यूथप असंख्य पाहें श्रीरामा ॥ २६ ॥ तारेचा पिता वाळीचा श्वशुर । सुषेण वैद्यराज वानर । दहा

---

१ माळवट जमीन. २ आगमन. ३ जातीमध्यें. ४ वास्तविक पिता. ५ अयुत=दशसहस्र. ६ वानर. ७ शुभ्र.

८ आकाशसंबंधीं. ९ वानराला. १० आवडता. ११ रचना.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

अयुतें वानरभार। केला नमस्कार श्रीरामा॥ २७॥ जांबवंताचा ज्येष्ठ बंधु। नामें धूम्र पैं अगाधु। रीससैन्यासीं[१] सन्नद्धु[२]। आला साधूं रामकार्या॥ २८॥ जांबवंत वीर प्रबळ। बाहत्तर कोटि रीस सबळ। घेवोनियां निजदळ। आला तत्काळ निजगजरें॥ २९॥ जांबवंत आपण। नित्य करितां रामस्मरण। तेचि अस्वलांसी गुणगुण। अनुदिन अहर्निशीं॥ ३०॥ रामनामाची गुणगुण। तेणें कोंदलें त्रिभुवन। महीजीवन पावन। नामें गगन कोंदलें॥ ३१॥ देखोनियां जांबवंत वीर। श्रीरामसौमित्रां आल्हाद थोर। त्यासी स्वयें श्रीरामचंद्र। पुसे विचार निजविजया॥ ३२॥ नामापासीं नित्य कीर्ति। नामापासीं नित्य शांति। नामापासीं विजयवृत्ति। भवनिर्मुक्ति रामनामें॥ ३३॥ ऐसें जाणोनि श्रीरघुनाथ। आप्त मानी जांबवंत। त्यासीं करोनि नित्य एकान्त। निजविजयार्थ साधावया॥ ३४॥ ऐसे वानरांचे भार। श्रीरामें देखिले अपार। तंव जाला अति गजर। तुरें अपार लागलीं॥ ३५॥

ततः पद्मसहस्रेण वृतः शंखशतेन च।
युवराजोऽङ्गदः प्राप्तः पितृतुल्यपराक्रमः॥ २॥

निशाणें त्राहाटिलीं लवलाहीं। ढोल टिमक्या बुरंगें पाहीं। गिडिबिडिती ठायींच्या ठायीं। विराणीं पाहीं वाजती॥ ३६॥ काहळा आणि रणकाहळा। शंख त्राहाटिला भूगोळा। महागजर भेरींचा जाला। अंगद आला युवराजा॥ ३७॥ तडक फुटले एकसरें। वोडणें[३] भिंडिमाळांचे[४] पोंगोरे[५]। खाखाइलीं रणतुरें। भुभुःकारें गिरि गर्जे॥ ३८॥ पद्म महापद्म जाणा। शंखशब्दें असंख्यगणना। अंगदाची वानरसेना। आंगवण दाटुगी॥ ३९॥ वृक्ष उन्मूळिले सहसुमनां। श्वेत पीत केतक वानरसेना। शालतालवृक्ष-कर्दळीपाना। ध्वजा संपूर्णा शोभती॥ ४०॥ किंशुक[६] फुलले आरक्त। अगस्तिवृक्षीं सुमनें श्वेत। कांचन फुलले श्वेतपीत। तेणें सैन्यांत अति शोभा॥ ४१॥ ऐसा निजसेनासंभार। त्यामाजी अंगद राजकुमर। युवराज मनोहर। श्वेतच्छत्र रत्नांक॥ ४२॥ कनकदंडयुग्मचामरी। आरूढला रथावरी। ध्वजीं मुक्ताफळें झालरी। जयजयकारीं चालिला॥ ४३॥ हैकार थैकार जैकार। तळपत चमकत चमत्कार। वृक्ष झेलिती अपार। देती वानर किराणें[७]॥ ४४॥ वानरवीर अति सावध। शालतालशिळायुद्ध। महावीर पैं उन्नद्ध। सन्नद्ध बद्ध दळभार॥ ४५॥ रथ लोटिले घडघडाट। वानरसेनेचा पैं थाट। वीर चालिले उद्भट। कडकडाट सैन्याचा॥ ४६॥ वाजंत्रांचा नाद गंभीर। वानरीं केला भुभुःकार। दुर्धरसेनानिजसंभार। अंगद वीर पैं आला॥ ४७॥ वालिवळें सबळवळ। अंगद आला समदळ। वीर पुरुषार्थी प्रबळ। दुर्धर मेळ युद्धाचा॥ ४८॥ देखोनि अंगदाचा यावा[८]। सुख जालें श्रीराघवा। सुख सुग्रीवाच्या जीवा। सुख सर्वा सुरनरां॥ ४९॥ अंगदें सांडोनियां रथा। श्रीरामचरणीं ठेविला माथा। श्रीरघुनाथही उल्लासता[९]। होय आलिंगिता अंगदासी॥ ५०॥ चुंबोनि अंगदाचें वदन। श्रीरामें दिधलें आलिंगन। तेणें त्यासी समाधान। सुखसंपन्न श्रीरामें॥ ५१॥ केलें सुग्रीवासी नमन। सुग्रीवें दिधलें आलिंगन। अंगदें सुग्रीवा समाधान। सुखसंपन्न श्रीरामें॥ ५२॥ सुग्रीवें करविलें वालिघाता। हा द्वेष नाठवे अंगदाचे चित्ता। श्रीरामें उद्धरिला माझा पिता। त्यासी मुख्य कर्ता सुग्रीव॥ ५३॥ वालिजन्मशतांच्या कोडी। सुग्रीवें तोडविली ते बेडी। श्रीरामसुखाची निजगुढी[१०]। उभविली रोकडी वाळीनें॥ ५४॥ आम्ही पावलों श्रीरघुनाथा। हाही सुग्रीवधर्म तत्त्वतां। पित्याहूनि अधिक चुलता। आम्हां समस्तां उद्धरिलें॥ ५५॥ ज्याचेनि पाविजे परमार्था। तोचि माझा सखा पिता। सुग्रीवाहूनि परता। सखा सर्वथा मज नाहीं॥ ५६॥ सुग्रीवें वंश उद्धरिला। सुग्रीव वानरसुखा अवतरला। पुढती सुग्रीवाच्या चरणा लागला। अंगद जाला वंदिता॥ ५७॥ ऐकोनि अंगदाचें वचन। सुग्रीवासी आलें रुदन। अंगद वंशासी सुखनिधान। मी सुखसंपन्न अंगदें॥ ५८॥ ऐसें सुग्रीव बोलोन। अंगदासी दिधलें आलिंगन। सभेद द्वेष गेला विरोन। सुखसंपन्न श्रीरामें॥ ५९॥ देखोनि अंगदाचा दळभारू[११]। नळनीळादि प्रधान वानरू। अवघीं केला जयजय-

१ अस्वलसैन्यासह. २ तयार. ३ ढाला. ४ गोफिणीचे. ५ दोऱ्या. ६ पळस. ७ उड्या. ८ आगमन. ९ उल्हासानें.

१० मोठी पताका. ११ सैन्यसमुदाय.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

कारू । श्रीरामचंद्र वंदिला ॥ ६० ॥ एक फळ ठेविती श्रीरामापुढें । एक वानर घेवोनि तें उडे । संमुख बैसोनि रामापुढें । खाती निवाडें विंटाविती ॥ ६१ ॥ वांकुल्या दाविती रामापुढें । डोळे मिचकाविती लक्ष्मणापुढें । सुग्रीवा घुलकाविती रोकडें । नाचें उडती किळकिळित ॥ ६२ ॥ श्रीरामें हारवोनि सीता । ऐसा ऐसा रडत होता । उकसाबुकसीं होय स्फुंदता । पडे मूर्छित सीते सीते ॥ ६३ ॥ वानरचेष्टा श्रीरघुनाथ । देखोनि खदखदां हांसत । हांसतां सौमित्र मूर्छित । चेष्टायुक्त वानर ॥ ६४ ॥ देखोनि वानरांचे भार । सुखी जाला श्रीरामचंद्र । तंव येवोनि पवनपुत्र । केला नमस्कार श्रीरामा ॥ ६५ ॥ सुग्रीव सांगे निजनिवाडे । सकळ सैन्य एकीकडे । न तुके हनुमंताचेनि पांडें । अति बळ गाढें हनुमंताचें ॥६६॥ हनुमंताच्या बळापुढें । सकळ सैन्य तें बापुडें । फोडिलें राहूचें जाभाडें । रवि यापुढें चळीं कांपे ॥ ६७ ॥ ऐकोनि सुग्रीवाची मात । श्रीराम जाला विस्मित । आंतुर्बळी हा हनुमंत । श्रीरघुनाथ स्वयें जाणे ॥ ६८ ॥ असतां निजसखा हनुमंत । तुझा साधावया कार्यार्थ । वाळीचा केला नाहीं घात । तो वृत्तांत मज सांगें ॥ ६९ ॥ ऐसें पुसतां सुग्रीवासी । तंव तेथें आला अगस्ति ऋषी । देखोनि सकळ वानरांसी । भेटे विशेषीं श्रीरामा ॥ ७० ॥ पर्वविशेषीं स्नानासी । पंपे आला अगस्ति ऋषी । देखोनियां श्रीरामासी । आला उल्लासीं भेटावया ॥ ७१ ॥ ऋषीस देवोनि सन्मान । श्रीरामें केलें अभिवंदन । मग बैसवोनि सावधान । केला प्रश्न श्रीरामें ॥ ७२ ॥ सुग्रीवसखा हनुमंत । असतां आतुर्बळी वीर्यवंत । वाळीचा केला नाहीं घात । तो वृत्तांत मज सांगें ॥ ७३ ॥ हनुमंताचें जन्मकथन । नारदें सांगितलें संपूर्ण । तें मी सांगेन आपण । सावधान अवधारीं ॥ ७४ ॥ हनुमंताचें जन्मकर्म । बाळपणीं अति पराक्रम । कथा रम्य मनोरम । श्रोता संपूर्ण श्रीराम ॥ ७५ ॥ हनुमंताचें बाळकिराणें । ग्रासूं गेला रविबिंब पूर्ण । ते कथा परम पावन । एका जनार्दन विनवीत ॥ ७६ ॥ रामायणींचा एक एक श्लोक । वेदशास्त्रांहूनि अधिक । एकलें रामनाम एक । होय छेदक जन्ममरणा ॥ ७७ ॥ ऐसी रामायणींची कथा । अगस्ति वक्ता श्रीराम श्रोता । जन्मप्रयोग हनुमंता । होय सांगता ऋषिवर्य ॥ ७८ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे किष्किंधाकांडे एकाकारटीकायां सर्वसुग्रीवसेनाश्रीरामदर्शनं नाम नवमोऽध्यायः ॥ ९ ॥ ॥ ओंव्या ॥ ७८ ॥ ॥ श्लोक ॥ २ ॥

अध्याय दहावा

श्रीजानकीवल्लभाय नमः ॥ अगस्तिमहामुनीप्रती । प्रश्न केला श्रीरघुपतीं । सुग्रीवा निजसखा मारुती । अद्भुतशक्ती असतां ॥ १ ॥ तेणें साधावया मित्रकार्यार्थी । कां न करीच वाळीच्या घाता । या हनुमंताच्या भावार्था । मजला सांद्यंत सांगावें ॥ २ ॥

राघवस्य वचः श्रुत्वा हेतुयुक्तमृषिस्तदा ।
हनूमतः समक्षं तमिदं वचनमब्रवीत् ॥ १ ॥

ऐसें पुसतां श्रीरघुनाथ । अगस्ति मुनि आनंदयुक्त । हनुमंताचें निजसामर्थ्य । असे सांगत स्वानंदें ॥ ३ ॥ आतां सांगेन श्रीरघुनाथा । हनुमंताची जन्मकथा । सकळमूळारंभवार्ता । होय सांगता अगस्ति ॥ ४ ॥ पुत्रेष्टियाग दशरथासी । ताटप्रसाद यज्ञपुरुषीं । वसिष्ठें करोनि विभागांसी । तिघी राणियांसी दीधले ॥ ५ ॥ कैकेयीभाग हरिला घारीं । ते शापद्वारें जाली नारी । तेथें वर्तली नवलपरी । तेही अवधारीं श्रीरामा ॥ ६ ॥ यज्ञभाग तिच्या उदरीं । व्हावया श्रीरामसहाकारी । ब्रह्मा तीतें करी वानरीनारी । अंजनी केसरीची ॥ ७ ॥ उदरीं यज्ञभाग संपूर्ण । त्याचें व्हावया प्ररोहण । यज्ञपुरुषाचा निजप्राण । तिसीं आपण विचरला ॥ ८ ॥ यज्ञभाग अति बळवंत । जन्म पावला हनुमंत । यालागीं म्हणती वायुसुत । अंजनीपुत वानरत्वें ॥ ९ ॥ दो भागांचे तुम्ही चवघे जण । सगळ्या भागाचा हनुमंत पूर्ण । यालागीं बळप्रतापी जाण । अति संपन्न बळत्वें ॥ १० ॥ राम लक्ष्मण शत्रुघ्न भरता । यज्ञभागी हनुमंता । तुम्ही पांच एकात्मता । भिन्न दिसतां अभिन्न ॥ ११ ॥

१ वेडावीत राहिले. २ हनुमंत, मारुति. ३ बरोबरीनें. ४ मोठा पराक्रमी. ५ बालपणींचें उड्डाण. ६ मूळापासून शेवटपर्यंत. ७ वृद्धि. ८ अंजनीचा पुत्र.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

ऐकोनि अगस्तीची मात। संतोषला श्रीरघुनाथ। हर्षयुक्त स्वयें हनुमंत। आनंदभरित सौमित्र ॥१२॥ अगस्ति म्हणे श्रीरघुपती। बाळपणीं याची ख्याती। ते मी सांगेन तुजप्रती। अत्यद्भुत शक्ती हनुमंता ॥ १३ ॥ ब्रह्मचर्या अति गोमटी। हनुमंतासी गर्भकांसोटी। अंजनी माता देखे दृष्टीं। कीं राम जगजेठी देखेल ॥ १४ ॥ हनुमंताचें लिंगदर्शन। मुख्य माता न देखे आपण। मग इतर देखों शके कोण। ब्रह्मचारी पूर्ण कपिराज ॥ १५ ॥ हनुमंत पुसे बाळभावें। माते म्यां क्षुधेसी काय भक्षावें। आरक्त फळ जें देखावें। तेंचि खावें म्हणे माता ॥ १६ ॥

पावकार्कनिभं पुत्रं प्रसूय जननी गृहात्।
फलान्याहर्तुकामा सा निष्क्रांता च वनं तदा ॥ २ ॥
यशः कर्तुं स्ववीर्येण क्षुधया भृशमर्दितः।
अर्धोदितं विवस्वंतं जपापुष्पसमप्रभम् ॥ ३ ॥
ददर्श फललाभाय चोत्पपात रविं प्रति ॥ ४ ॥

जन्मतांचि हनुमंत। अग्नितेजें दीप्तिमंत। बालार्कप्रभासम भासत। दीप्तिमंत मारुति ॥ १७ ॥ सूर्योदय नव्हतां तेथ। सेजे निजवोनि हनुमंत। अंजनी गेली स्वयें वनांत। फळें त्वरित आणावया ॥ १८ ॥ मातृविहीन हनुमंत। रुदन करी अति क्षुधित। देखोनि बालार्क आरक्त। फळभक्षार्थ उडाला ॥ १९ ॥ क्षुधेनें पीडिला प्रबळ। बालार्कफळ अति वर्तुळ। भक्षावया स्वयें तत्काळ। उडे चपळस्वभावें ॥ २० ॥ हनुमंताची उड्डानशक्ती। ते गति न ये गरुडाप्रती। वायुसुताची शीघ्रगती। मनोवृत्ति ठणकली ॥ २१ ॥ भक्षावया बालार्कासी। ऊर्ध्वगति हनुमंतासी। देखोनि विस्मयो सुरवरांसी। देवऋषी विस्मित ॥ २२ ॥ धैर्य शौर्य महावीर्य। शीघ्रगतिगमनें गांभीर्य। हनुमंताचें परम औदार्य। सुरवर शौर्य वानिती ॥ २३ ॥ हनुमंताच्या समानशक्ती। कोणी नाहीं त्रिजगतीं। बाळभावें शीघ्रगतीं। सूर्यभक्षार्थीं धांवला ॥ २४ ॥

सूर्यदाहभयं द्रक्ष्यन् वायुस्तुहिनशीतलः।
यमेव दिवसं चासौ ग्रहीतुं भास्करं गतः ॥ ५ ॥
तमेव दिवसं राहुर्जिघृक्षति दिवाकरम् ॥ ६ ॥

मनोगति सांडोनि मागें। हनुमंत चालिला ऊर्ध्वमार्गें। सूर्यकिरणाचे निदाघयोगें। होईल सर्वांग भस्मित ॥ २५ ॥ जाणोनि वायु पिता। निजपुत्रातें संरक्षिता। हिमांबुकणें निवविता। होय चालता शिशुमार्गें ॥ २६ ॥ वायु धरूं पाहे हनुमंतासी। तंव तो नाटोपे तयासी। वेगीं आला सूर्यापासीं। फळभावेंसीं भक्षावया ॥ २७ ॥ हनुमंत आला बिंबापासीं। रविराहुग्रहण तेचि दिवशीं। राहु ग्रासितां सूर्यासी। हनुमान मानसीं कोपला ॥ २८ ॥ माझ्या गोड ग्रासाआड। येथें कोण आला मूढ। राहूचें फोडिलें जाभाड। पुच्छ सुदृढ हाणोनी ॥ २९ ॥ पुच्छीं हाणितां वानरा। घायें राहु होय घाबरा। नाकीं मुखीं रुधिरधारा। थरथरां कांपत ॥ ३० ॥ धाकें थरथरां कांपत। गगनीं गरगरां भोंवत। राहु पडतां अति मूर्च्छित। धांवोनि केत धरी त्यासी ॥ ३१ ॥ राहू केतू अति आर्तता। दोघां देहीं एकात्मता। केतु येवोनि राहुसाह्यार्था। कोपें हनुमंताकडे पाहे ॥ ३२ ॥ सकेतु राहु देखोनि दृष्टीं। रागें हनुमंत हाणी मुष्टी। दोघां पळतां पायपोटीं। हांक उठी ग्रहचक्रीं ॥ ३३ ॥ ग्रह सांगती सिंहिकासुता। पुच्छकेतु आला तुम्हांभोंवता। इंद्र अधिकारी नियंता। त्यासी तत्त्वतां तुम्ही सांगा ॥ ३४ ॥

स चेंद्रभवनं गत्वा सरोषः सिंहिकासुतः।
क्षुधापानोदनं कृत्वा चंद्रार्कौ मम वासव ॥ ७ ॥
किमिदानीं त्वया दत्तो वरोऽन्यस्मै सुरेश्वर।
अद्याहं पर्वकाले तु जिघृक्षुः सूर्यमागतः ॥ ८ ॥
आगत्यान्यः कोऽपि राहुर्जग्राह सहसा रविम् ॥ ९ ॥

राहु जो कां सिंहिकासुत। वानरघायें रुधिरोक्षित। इंद्रापासीं आला त्वरित। शंख करीत सांगावया ॥ ३५ ॥ माझी जीविका जीवनवृत्ती। चंद्रसूर्यग्रहणस्थिती। आजिचे ग्रहणकाळप्राप्ती। रविग्रहणार्थीं मी गेलों ॥ ३६ ॥ तंव मजहूनि बळवंत। पुच्छराहु येवोनि तेथ। घायें करूनि रुधिरांकित। धाडिलें येथें वोंवेंसीं ॥ ३७ ॥ तूं नियंता देवाधिदेवो। माझा न देखतां अन्यावो। तूं कां धाडिला पुच्छराहो। तेणें मज पाहो गांजिलें

१ सकाळच्या सूर्यासमान. २ थंड उदकाच्या बिंदूंनीं. ३ फळ अशा कल्पनेनें. ४ स्नेह. ५ राहूला. ६ रक्तबंबाळ होऊन. ७ सर्वांवर अधिकार चालविणारा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ ३८ ॥ शेखीं मज न पुसतां । तुवां करविलें गुतघाता । त्यां काय करावें गा आतां । मज तत्त्वतां तूं सांगें ॥ ३९ ॥ पुच्छराहु येवोनि तेथ । सूर्य आकळिला समस्त । माझा करूं धांवे घात । आलों रडत सांगावया ॥ ४० ॥

स राहोर्वचनं श्रुत्वा वासवः संभ्रमान्वितः ।
इंद्रः करींद्रमारुह्य राहुं कृत्वा पुरःसरम् ॥ १० ॥
ततः सूर्यं समुत्सृज्य राहुं स्थूलमवेक्ष्य सः ।
उत्पपात पुनर्व्योम्नि ग्रहीतुं सिंहिकासुतम् ॥ ११ ॥

ऐकोनि राहूचा वचनार्थ । इंद्रादि देव अति विस्मित । ग्रहचक्रातें विपरीत । कर्ता येथ तो कोण ॥ ४१ ॥ कोणें केला नवा राहो । त्यासी निर्दळावया पहाहो । घेवोनि सुरसेनासमुदावो । इंद्र स्वयमेवो तेथ आला ॥ ४२ ॥ ऐरावत सालंकार । गजेंद्रीं बैसोनियां इंद्र । करीं घेवोनियां वज्र । सहपरिवार तेथें आला ॥ ४३ ॥ इंद्र राहू पुढें बैसवोनी । नवा राहु दाखवीं म्हणोनी । जेणें तुज गांजिलें बळेंकरूनी । त्याचें निर्दळण मी करीन ॥ ४४ ॥ दाखवितां हनुमंतासी । थरथरां कंप सुटला राहूसी । दडोनी ऐरावतीचे पाठीसीं । दावी इंद्रासी दुरोनी ॥ ४५ ॥ येरीकडे हनुमंत । धांविन्नला रवि ग्रासावया क्षुधित । तेणें सूर्य चळीं कांपत । अति अनर्थ ओढवला ॥ ४६ ॥ दिनमान सांडोनि सविता । पळों न लाहे सर्वथा । निवारूं शकेना हनुमंता । अति आकांता पावला ॥ ४७ ॥ तेचि संधीं इंद्रापासीं । वानरें देखोनि राहूसी । रागें निघाला निर्दाळावयासी । अति वेगेंसीं धांवला ॥ ४८ ॥ मज क्षुधिताच्या आहारासीं । राहु ओढवला विवसी । धरोनी इंद्राच्या बळासी । माझ्या ग्रासासी घेवों आला ॥ ४९ ॥ ऐसें बोलोनि हनुमंत । सूर्यग्रासाची सांडोनि मात । राहूचा करूं धांवे घात । येरु बोंभात इंद्रातें ॥ ५० ॥ राहू पळे इंद्राकडे । तेथें तंव हनुमंताची उडी पडे । येरु अति आक्रोशें रडे । इंद्रापुढें सांगत ॥ ५१ ॥

इंद्र इंद्रेति मां त्राहि मुहुर्मुहुरभाषत ।
श्रुत्वेंद्रः प्राह मा भैषीरहमेनं निषूदये ॥ १२ ॥
बलान्नाहन्मि राजानमभिदुद्राव मारुतिः ।
मुहूर्तमभवद्घोरं कालाग्निरिव मूर्च्छितः ॥ १३ ॥

हनुमंत राहूतें मर्दूं पाहत । इंद्र इंद्र नामें राहु आक्रंदत । वानरें पुरविला अंत । आरंबळत आक्रोशें ॥ ५२ ॥ ऐकोनि राहूचा आकांत । इंद्र नाभीकार देत । भिवों नको धरीं पुरुषार्थ । याचा घात मी करीन ॥ ५३ ॥ ऐसें बोलोनि अमरपती । वेगीं प्रेरिला ऐरावती । त्यावरी धांविन्नला मारुती । हस्तें हस्ती उपटावया ॥ ५४ ॥ वानरु ऐरावती आकळी । तेणें पुच्छें ठोकिला गंडस्थळीं । गज आक्रंदोनि देत किंकाळी । भयें चळीं कांपत ॥ ५५ ॥ पुच्छ नव्हे तो वज्रघात । घायें विमुख ऐरावत । इंद्र बळें आकळीत । तरी युद्धांत परतेना ॥ ५६ ॥ पुच्छ हाणितां वानरें । गजें घेतलें घायवारें । शक्रा शक्ति तों नावरे । केलें घावरें इंद्रासी ॥ ५७ ॥ इंद्र देवांमाजी बळी । तो करितां हनुमंतासीं कळी । वानरें मुकुट पाडिला तळीं । झोंटी मोकळी इंद्राची ॥ ५८ ॥ मुकुट घ्यावया आपणापासीं । बाळभावें न कळे त्यासी । इंद्र केला कासाविसी । मरुद्गणांसी मर्दोनी ॥ ५९ ॥ इंद्र [illegible]जिला कपींद्रें । यम धांविन्नला कैवारें । दंड हाणोनि सत्वरें । केलें वानरें विपरीत ॥ ६० ॥ यम हाणी जंव दंडेंसीं । हनुमान आदळला अंगासीं । थापा हाणोनियां त्यासी । तोंडघसीं पाडिलें ॥ ६१ ॥ घाय हाणोनि प्रचंड । सांडोनियां बळवंड । यमाचेंच ठेंचिलें तोंड । बळ वितंड वानरा ॥ ६२ ॥ यमें गांजिलें जगासी । वानरें गांजिलें यमासी । घायें मिळविला धुळीसी । बळराशि वानर ॥ ६३ ॥ यम गांजिला दारुण । भेणें पळाला वरुण । कुबेर घाली लोटांगण । चरणा शरण कपिराजा ॥ ६४ ॥ हनुमंतें अर्धक्षणीं । सुरसेना नेली भंगोनी । अवघ्यां केली दाणादाणी । महाप्ळणी देवांसी ॥ ६५ ॥ हनुमंताच्या वेगापुढें । आम्हीं पळावें कोणीकडे । एक एकामागें दडे । जीवेंसांकडें देवांसी ॥ ६६ ॥ संगज उपटावया इंद्रासी । धरोनि ऐरावतीपुच्छासी । वानरें भोंवंडितां आकाशीं । सदेव ऋषी गजबजिले ॥ ६७ ॥ हनुमंतबळ देखोनि दृष्टीं । इंद्र उपटिला

१ शेवटीं. २ सरसावला. ३ गोष्ट. ४ ओरडूं लागला. ५ भिऊं नको म्हणून अभयवचन. ६ पराङ्मुख. ७ केश. ८ धांवाधांव, पळ. ९ प्राणसंकट. १० हत्तीसह.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सृष्टीं। जगीं एकचि बोंब उठी। महाहठी वानरु ॥ ६८॥ लघुलाघवें सुरपती। वज्रें हाणितला मारुती। घावो लागतां हनुमंताप्रती। पडिला क्षितीं मूर्च्छित ॥ ६९॥ मेरुशिखरपाठारांत। हनुमान पडिला मूर्च्छित। वायु पिता येवोनि त्वरित। निजसुत उचलिला ॥ ७०॥ क्षुधिता माझिया तान्हियासी। इंद्रें हाणोनि वज्रेंसीं। मूर्च्छित पाडिलें भूमीसी। वायु मानसीं क्षोभला ॥ ७१॥ वायु क्षोभोनि संपूर्ण। आकर्षिले जगाचे प्राण। ब्रह्मादिकां संकट पूर्ण। ऋषिभूतगण तळमळती ॥ ७२॥

रुरोध सर्वभूतानि वायुः सर्वमिवांतरम्।
वायुप्रकोपाद्भूतानि निरुच्छ्वासानि सर्वशः॥ १४॥
ततोऽमराः सगंधर्वाः सयक्षासुरमानुषाः।
प्रजापतिं समाधावन् दुःखिताश्च सुखेच्छया॥ १५॥

वायु क्षोभोनि सक्रोध। अंतरीं केला प्राणरोध। प्राणापान ठेले स्तब्ध। अति विरुद्ध भूतांसी ॥ ७३॥ प्राणनिरोधाची स्थिती। ठेली भूतांची नित्यगती। कोणा नाहीं सुखप्राप्ती। तळमळती अति दुःखें ॥ ७४॥ यक्ष राक्षस देव गंधर्व। सिद्धचारणादि मानव। सत्यलोका येवोनि सर्व। पितामह[१] वंदिला ॥ ७५॥ प्राणनिरोधाचे कष्ट। ऋषी सांगती श्रेष्ठ श्रेष्ठ। तंव ब्रह्मयाचें फुगलें पोट। अति संकट सर्वांसी ॥ ७६॥ ब्रह्मा भयभीत सांगे समस्तां। इंद्रें हाणोनि वज्रघाता। मूर्च्छित पाडिलें हनुमंता। वायु पुत्रार्थ क्षोभला ॥ ७७॥ वायु निज-पुत्रदुःखार्थीं[२]। भूतांचिया अंतर्गती। निरोधिल्या प्राणवृत्ती। पुत्रकार्यार्थीं क्षोभला ॥ ७८॥ राहुकैवारें अमरनाथ। वज्रें हाणितला हनुमंत। पुत्र पडतांचि मूर्च्छित। वायु प्राणान्त क्षोभला ॥ ७९॥ हनुमंत घेवोनि पुढें। वायु स्फुंदस्फुंदोनि रडे। तान्हें बाळ हें बापुडें। इंद्रें महामूढें मारिलें ॥ ८०॥ माझा निमाल्या हनुमंत। इंद्रादि देवांचा मी घात। करीन एका निमेषांत। वायु प्राणान्त क्षोभला ॥ ८१॥ प्राणवृत्ती चळतां वायु। तो तंव जगाचा जगदायु। पुत्रक्षोभें क्षोभोनि[३] बहु। भूतां प्रळयु मांडिला ॥ ८२॥ प्राणें प्राण्यां नित्य सुख। प्राणें प्राण्यां नित्य हरिख। प्राण जातांच निःशेख। परम दुःख प्राणियांसी ॥ ८३॥ प्राण गेलिया निघोनी। काष्ठप्राय प्राणी जनीं। दृष्टीं पाहतां सचैलस्नानीं[४]। विटाळ मानी जग त्याचा ॥ ८४॥ यालागीं प्राणें पवित्रता। प्राणें प्रीति प्रीतिवंता। प्राण गेलिया तत्त्वतां[५]। प्रिया प्रियकांता स्पर्शेना ॥ ८५॥ पत्नी प्रिया परम आप्त। नित्य एकांतीं भोगी जीवित। प्राण गेलिया प्राणिप्रेत। पतीसी भूत मानी पत्नी ॥ ८६॥ ऐसा प्राण प्रिय समस्तां। तो क्षोभोनि जाईल आतां। यालागीं वांचवावें हनुमंता। वैकुंठनाथा[६] सांगोनी ॥ ८७॥ प्राणें पीडिला शूळपाणी[७]। वायूची करावया बुझावणी। तोही आला तत्क्षणीं। वांचवा म्हणोनी हनुमंता ॥ ८८॥ शिव शक्र चतुरानन। जिहीं प्रार्थिला जनार्दन। हनुमंता द्यावया जीवदान। अवघे जण निघाले ॥ ८९॥

तद्यामस्तत्र यत्रास्ते मारुतो रुक्प्रदो हि नः।
मा विनाशं गमिष्याम अप्रसाद्यादितेः सुतम्॥ १६॥
ब्रह्महरिहरान् दृष्ट्वा वायुः पुत्रवधार्दितः।
शिशुकं तं समादाय उत्तस्थौ धातुरग्रतः॥ १७॥

ब्रह्मा हरि हर तिघे जण। स्वयें इंद्रादि देवगण। ऋषी श्रेष्ठ श्रेष्ठ प्रजा पूर्ण। अवघे जण तेथ आले ॥ ९०॥ जेथें घेवोनी हनुमंत। वायु बैसलासे रडत। प्राणरोधें क्रोधयुक्त। आले समस्त ते ठाया ॥ ९१॥ देखोनि ब्रह्मा हरि हर। वायु उठोनि सत्वर। कडिये घेवोनियां कुमर। केला नमस्कार सद्भावें ॥ ९२॥ एके पुत्रघाताकारणें। अवघें जगचि निर्दळणें। ऐसें न करावें आपणें। क्षमा करणें प्राणनाथा ॥ ९३॥ वायु बोले क्षोभें[८] कता। माझा हनुमंत न उठतां। करीन इंद्रादिकांच्या घाता। जाण तत्त्वतां प्रजापति ॥ ९४॥ ऐकोनि वायूचें वचन। हांसिन्नला श्रीजनार्दन। हनुमंताचें भाग्य पूर्ण। जन्ममरण त्या नाहीं ॥ ९५॥ श्रीरामभाग्याच्या द्विगुणित। जन्म पावला हनुमंत। त्यासी स्वप्नीं नाहीं मृत्य। असे हनुमंत चिरंजीव ॥ ९६॥ वरद वदला श्रीजनार्दन। तें ऐकोनि त्रिनयन[९]। वरद वदे संतोषोन[१०]। सावधान अवधारा ॥ ९७॥

१ ब्रह्मदेव. २ पुत्राकरितां. ३ रागावून. ४ वस्त्रांसुद्धां स्नान करून. ५ खरोखर. ६ विष्णूला. ७ महादेव. ८ समजूत. ९ इंद्र. १० रागावून.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

माझिया तृतीय नयनींचा वन्ही । जाळूं न शके यालागूनी । त्रिशूळ न शके अंगभेदनीं । वरदवाणी शिवाची ॥ ९८ ॥ विष्णु वरद वदे तत्पर । गदादि बाण चक्र दुर्धर । तेणें न भेदे याचें शरीर । अजरामर हनुमंत ॥ ९९ ॥ ब्रह्मा वदे निजवरदेंसीं । ब्रह्मदंड ब्रह्मशापेंसीं । बाधूं न शके हनुमंतासी । सकळ द्वंद्वासी निर्मुक्त ॥१००॥ इंद्र वदे निजवरदासी । माझें वज्र लागल्या हनूसी । तेणें हनुमंत नाम यासी । होईल सर्वांसी विख्यात ॥ १ ॥ माझें वज्र न बाधी पाहीं । हा होईल वज्र-देही । सुरासुरां नागवे पाहीं । याची ख्याती तिहीं लोकीं ॥ २ ॥ ऋषिकौशिकी कमळमाळा । सुकों नेणे कदा काळा । इंद्रें उल्लासें त्या वेळा । घातली गळां हनुमंताचे ॥ ३ ॥ निजवरद वदे सविता । मजहूनि शताधिकता । जों जों वृद्धि होईल हनुमंता । राक्षसघाता करावया ॥ ४ ॥ हा वांछील सज्ञानता । तैं सकळ वेदशास्त्रार्था । मी देईन अति योग्यता । होईल विख्यात परमार्थी ॥ ५ ॥ वरुण वदे वरदान । वर्षें शत जळीं निमग्न । होतां हनुमंता न ये मरण । पाशबंधन कदा न बाधी ॥ ६ ॥ यम वरद वदे वितंड । सुख पावसी तूं प्रचंड । तुज बाधीना यमकाळदंड । आरोग्य अखंड अजरत्वें[1] ॥ ७ ॥ धनेश[2] वदे निजवरदासी । युद्ध करितां वर्षानुवर्षी । कदाकाळीं श्रम न पावसी । अस्त्रबाधेसी वाधवेना ॥ ८ ॥ विश्वकर्मा वदे वरदान । ग्यां जीं शस्त्रें केलीं निर्माण । तीं हनुमंतासी युद्धीं जाण । कदाही संपूर्ण न बाधती ॥ ९ ॥ माझें शिल्पशास्त्रींचें ज्ञान । तें तूं पावसी संपूर्ण । ऐसें बोलोनि आपण । दे आलिं-गन हनुमंता ॥ ११० ॥

चतुर्मुखस्तुष्टमना वायुमाह जगद्गुरुः ।
अमित्राणां भयंकारी मित्राणामभयंकरः ॥ १८ ॥
अजेयो भविता पुत्रस्तव मारुत मारुतिः ।
रोमहर्षकराण्येव कर्ता कर्माणि संयुगे ॥ १९ ॥
एवमुक्त्वा तमामंत्र्य मारुतं त्वमरैः सह ।
यथागतं ययुः सर्वे पितामहपुरोगमाः ॥ २० ॥

ब्रह्मा जगद्गुरु सर्वांसी । संतोषोनि सांगे वायू-सी । हनुमंत भाग्याची राशी । सकळ देव त्यासी तुष्टले ॥ ११ ॥ धीर वीर महाशूर । अदट दाटुगा वज्रशरीर । बाधूं न शके शस्त्रसंभार । तुझा पुत्र सभाग्य ॥ १२ ॥ लाभलें भाग्य हनुमंता । गांजो-नियां लंकानाथा । शुद्धी आणोनियां सीता । सुखी रघुनाथा हा करील ॥ १३ ॥ तुझा पुत्र आतुर्बळी । घेईल इंद्रजितासवें[3] फळी । करोनि राक्षसां रवंदळी । लंकाहोळी हा करील ॥ १४ ॥ परम भाग्य हनुमंता । भेटोनि सुखी करील सीता । तिची शुद्धी आणील तत्त्वतां । श्रीरघु-नाथा सुखार्थ ॥ १५ ॥ श्रीरामाच्या कटकांत । अदट दाटुगा वीर हनुमंत । सेवाबळें परम आप्त । श्रीरघुनाथ मानील ॥ १६ ॥ भविष्य हनु-मंताची ख्याती । स्वयें सांगत प्रजापती । उल्लास वायच्या चित्तीं । पुत्रकीर्ती ऐकोनी ॥ १७ ॥ वरद लाहोनि हनुमंता । वायु अति उल्लासतां[4] । मुक्त केली प्राणरोधता । तेणें समस्तां सुख जालें ॥ १८ ॥ सुखी जाले सुरनर । सुखी जाले ऋषी-श्वर । सुखी जाले चराचर । जयजयकार तिहीं लोकीं ॥ १९ ॥ वर देवोनि हनुमंतासी । सुरवर गेले निजधामासी[5] । वायूनें आणोनि हनुमंतासी । अंजनीपासीं दीधलें ॥ १२० ॥ हनुमंताची बाळ-कीर्ती । विस्तारिली त्रिजगतीं । फळार्थ आकळितां गर्भस्ती[6] । लाविली ख्याती सुरवरां ॥ २१ ॥ हनुमं-ताचें सामर्थ्य सिद्ध । तेंचि देवीं दिधलें वरद । हनुमंतकीर्ती अति अगाध । तेणें सुख श्रीरामा ॥ २२ ॥ जें सामर्थ्य श्रीरामासी । तेचि शक्ति हनुमंतासी । एकात्मता अहर्निशीं । लोकक्रियेसीं देवभक्त ॥ २३ ॥ लोकक्रियासंग्रहार्थ । श्रीराम देव हनुमान भक्त । तोचि रामायणीं ग्रंथ । भक्त-सामर्थ्य वायुपुत्रीं ॥ २४ ॥ डोंगरीं दावाग्नीची ख्याती । घरींच्या दीपा तेचि निजदीप्ती । दोहींची एक दाहकशक्ती । तेंवी देवभक्तीं सामर्थ्य ॥ २५ ॥ हनुमान असतां मातेप्रती । अंगीं होतां अद्भुत-शक्ती । करितां बाळभावें उद्धती । ऋषीं हितोक्ती शापिला ॥ २६ ॥ गंगातीरीं ऋषींची वस्ती । अवघे आश्रम उचलोनि हातीं । हनुमंत ठेवी दूर पर्वतीं । जळ न पवती स्नानपाना ॥ २७ ॥ ऋषी आपुल्या तपःसामर्थ्यीं । पुढती गंगातीरा येती । हनुमान उचलोनी मागुती । घाली पर्वतीं अति दूर ॥ २८ ॥

---

१ जरा = वार्धक्य नसल्यामुळें. २ कुबेर. ३ सोबती. ४ उल्हासानें. ५ आपापल्या स्थानीं. ६ सूर्य. ७ दाखणाई.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

पुष्पपर्वतीं ऋषी वसती । सकळ पर्वत उचलोनि हातीं । हनुमान घाली उंखराप्रती । ऋषी तळमळती जळफळां ॥ २९ ॥ बाळभावाच्या परवडीं । ऋषींचीं यज्ञपात्रें फोडी । कुशासनें अजिनें फाडी । जानवीं तोडी भटांचीं ॥ १३० ॥ बटु ब्रह्मचारी कवळोनि पुच्छीं । हनुमान स्वयें उडे आकाशीं । लेंकरें होती कासाविसी । ऋषिपत्न्यांसी तळमळ ॥ ३१ ॥ मारोनि गज करवडें । ऋषिआश्रमीं टाकी मढें । काढितां शिष्यसमुदाव रडे । उपाव पुढें चालेना ॥ ३२ ॥ ब्रह्मवराचे वरदोक्तीं । शाप न चले हनुमंताप्रती । अवघे आले ब्रह्मयासी एकांतीं । बुद्धि पुसती प्रबुद्ध ॥ ३३ ॥ ब्रह्मा सांगे ऋषींप्रती । शाप द्यावा अति हितोक्तीं । मारुति जंव भेटे रघुपती । तंववरी तुझी शक्ती लीन राहो ॥ ३४ ॥ जेंवी यौवनसौभाग्यथोरी । अति गुप्तता राहे कुमारीं । तैंवी तुझी सामर्थ्यथोरी । तुजमाझारीं लीन राहो ॥ ३५ ॥ जेंवी आलिया तारुण्यता । यौवनें मुसमुसी होय वनिता । तेंवी भेटल्या श्रीरघुनाथा । निजसामर्थ्या पावसी ॥ ३६ ॥ ऐसें ऋषीश्वर शापिती । जाली हनुमंताची लीन शक्ती । मग राहिला साधुवृत्तीं । ऋषींप्रति अति नम्र ॥ ३७ ॥ द्रव्यमद तारुण्यमद । अंगीं बळाचा शक्तिमद । तेणें पुरुष होय स्तब्ध । करी विरोध अभिमानें ॥ ३८ ॥ व्यापार जालिया व्यापारी । नाना अनन्य कर्म करी । तोचि जालिया निराधारी । मग विचारी पापपुण्य ॥ ३९ ॥ कैंची संध्या कैंचें स्नान । केंवी पाविजे निजज्ञान । अधिकारू जालिया क्षीण । विवेक पूर्ण प्राण्यासी ॥ १४० ॥ तैसें जालें हनुमंता । निजबळ लीन होतां । स्यां पावावें परमार्था । साधुसंतां भजावें ॥ ४१ ॥ पूर्वी सूर्याचें वरदान । जेव्हां हनुमान इच्छील ज्ञान । तेव्हांचि होवोनि सुप्रसन्न । ज्ञानसंपन्न मी कर्ता ॥ ४२ ॥ तें ज्ञान मारुति वांच्छितां । अंतरीं उगवोनि चित्सविता । ज्ञान विज्ञान[3] लीनता । देहीं विदेहता श्रीरामीं ॥ ४३ ॥ ज्ञानविज्ञानसंतृप्ती । देहीं असोनि विदेहस्थिती[4]। श्रीरामाची अनन्य भक्ती । जाला मारुति जगद्वंद्य ॥ ४४ ॥ वालिसुग्रीवकलहांत । शापें हनुमंतीं शक्ति गुप्त । यालागीं वालीचा न करी घात । जाण निश्चित श्रीरामा ॥ ४५ ॥ सुग्रीव हनुमंताचा आत । परी शापें शक्ति होती गुप्त । यालागीं वालीचा न करी पैं घात । जाण निश्चित श्रीरामा ॥ ४६ ॥ ऐसी हनुमंताची ख्याती । ऐकोनि सुखावला श्रीरघुपती । श्रीरामासी पुसोनि अगस्ती । आश्रमाप्रति स्वयें गेला ॥ ४७ ॥ एका जनार्दना शरण । हनुमंतजन्मनिरूपण । ऐकोनि श्रीरघुनंदन । सुखसंपन्न स्वयें जाला ॥ ४८ ॥ सुखावोनि श्रीरघुपती । प्रीतीनें आलिंगिला मारुती । हा मज साह्य सीताशुद्ध्यर्थीं । रणकंदन करावया ॥ १४९ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे किष्किंधाकांडे एकाकारटीकायां हनुमज्जन्मकथनं नाम दशमोऽध्यायः ॥ १० ॥ ॥ ओंव्या ॥ १४९ ॥ श्लोक ॥ २० ॥

अध्याय अकरावा

श्रीरामचंद्राय नमः ॥ दाविला कपिसेनासंभार । अति दाटुगा हनुमंत वीर । तेणें सुखावला श्रीरामचंद्र । केला नमस्कार सुग्रीवें ॥ १ ॥ वानरसेना कडकडाटीं । वेगीं रिघों लागे वैकुंठीं । अथवा कैलासगिरितटीं । मेरुपृष्ठीं घालूं घाला ॥ २ ॥ रिघोनि पाताळाच्या पोटीं । मारूं दानवांच्या कोटी । अथवा दैत्यांचिया थाटी । उठाउठीं निर्दाळूं ॥ ३ ॥ गण गंधर्व सुरवर । यक्ष राक्षस नर किन्नर । माझे निर्दाळिती वानर । चराचर उलथिती ॥ ४ ॥ लोकालोकांहीपरती । कैंव घालोनि अवचितीं । वानर कृतकार्य साधिती । आज्ञा रघुपति शीघ्र द्यावी ॥ ५ ॥

इति ब्रुवंतं सुग्रीवं रामो दशरथात्मजः ।
बाहुभ्यां संपरिष्वज्य प्रीतो वचनमब्रवीत् ॥ १ ॥
ज्ञायतां सौम्य वैदेही निलये रावणस्य च ॥ २ ॥

ऐकोनि सुग्रीववचन । श्रीराम जाला सुप्रसन्न । आजानुबाहु पसरोन । दिधलें आलिंगन सुग्रीवा ॥ ६ ॥ श्रीराम म्हणे कपिनाथा । सीताशुद्धी करावी आतां । कोणे स्थानीं रावण वसता । तेंही तत्त्वतां शोधावें ॥ ७ ॥ ऐसें बोलतां श्रीरघुनाथा । सुग्रीवें चरणीं ठेविला माथा । हर्षें वानरां होय सांगता । शोधावी सीता सत्वर ॥ ८ ॥ विनतनामा महावीर । सवें सेना शतसहस्र । पूर्वे धाडिला सत्वर ।

---

१ मांळजमिनीवर. २ ज्ञानसूर्य. ३ अनुभवज्ञान; साक्षात्कार. ४ देहांतील स्थिति. ५ वेंढा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सीता सुंदर शोधावया ॥ ९ ॥ रावणाचें वसंति-स्थान । सीता शोधावी सावधान । नगर वन उपवन । गिरि गहन शोधावें ॥ १० ॥ तारेचा पिता सुषेण । त्याचे सुग्रीवें वंदूनि चरण । सीता-शुद्धीसी जावें आपण । शोधावी संपूर्ण पश्चिम-दिशा ॥ ११ ॥ पिता तैसा श्वशुर जाण । माझी कळवळ तुज पूर्ण । सीता पहावी सावधान । जन विजन शोधूनी ॥ १२ ॥ सर्वें शोधावें राष्ट्रोराष्ट्र । पुरें पाटणें नगरें समग्र । ग्राम गुहा गिरिकंदर । शिखरें शिखर शोधावें ॥ १३ ॥ वानरांमाजी अति प्रवर । शतबळीनामा महावीर । सेना शतकोटि-संभार । शोधूं उत्तरे धाडिला ॥ १४ ॥ कोठें वसताहे रावण । हें मुख्य शोधावें आपण । करावें सीतांगवेषण[3] । रघुनंदनसुखार्थ ॥ १५ ॥ खेटें पुरें खर्वटें नगरें । पर्वतसानु स्रोतें शिखरें । गिरि गुहा विवरें कंदरें । मेरुपाठारें शोधावीं ॥ १६ ॥ आग्नेय वायव्य ईशान्य । नैर्ऋत्यदिशेचा नैर्ऋत्य कोण । शोधूं धाडिले कोण कोण । सावधान अवधारा ॥ १७ ॥ पद्म आणि पद्माक्ष । कुमुद आणि कुमुदाक्ष । हे चार वीर अति दक्ष । सुग्रीव प्रत्यक्ष सन्मानी ॥ १८ ॥ कोटि कोटि सेना देवोनी । चौघे धाडिले चौंकोणीं । रावणा मारावया शोधोनी । श्रीरामपत्नी आणावया ॥ १९ ॥ रावण नागवेल तत्त्वतां । शुद्धी आणावी शीघ्रता । मग मी करीन रावणाचिये घाता । श्रीरामकांता आणीन ॥ २० ॥ चवघे बोलती आंगवणें । रावण मशक बापुडें कोण । दृष्टीं पडलिया जाण । घायें निर्दळण करीन ॥ २१ ॥ खांदीं घेवोनियां सीता । नाचत येऊं तत्त्वतां । सत्य जाण गा कपिनाथा । सुखी श्रीरघुनाथा करूं आम्ही ॥ २२ ॥ तार आणि दुसरा तरळ । वानरांमाजी वीर प्रबळ । शोधूं धाडिला पाताळ । कोटिदळ देऊनियां ॥ २३ ॥ अतळ वितळ सुतळ । रसातळ महातळ । तळातळ आणि पाताळ । सप्त पाताळें शोधावीं ॥ २४ ॥ पाताळ शोधावयाची गती । मी सांगेन जैशा रीतीं । तुम्हीं शोधावें त्याच स्थितीं । सावधानवृत्तीं अवधारा ॥ २५ ॥ पाताळलोकामाजी जाण । कोठें नांदताहे कोण । सुग्रीव सांगताहे आपण । सीता सावधान शोधावी ॥ २६ ॥ अतळीं वसे मयपुत्र बळ । नामें बळ प्रतापें बळ । त्याचा मंत्री हलकल्लोळ । दुर्धर दैत्य मळ त्याचा ॥ २७ ॥ तेथें शोधावया रावण । आडवे आलिया दैत्यगण । रावणासहित त्यांतें मर्दीन । सीता आपण आणावी ॥ २८ ॥ वितळीं वसे हाटकेश्वर । उमाकांत कर्पूरगौर । जेथील हाटकनदीचा पूर । सुवर्णसंभार प्रवाहे ॥ २९ ॥ रावण शिवाचा शिवगण । तेथें सांपडलिया जाण । त्याचा घेवोनियां प्राण । सीता आपण आणावी ॥ ३० ॥ सुतळीं महावैष्णव बळी । ज्याचा द्वारपाळ वनमाळी । प्रल्हाद वसे त्याचे जवळी । वैष्णवकुळीं नांदत ॥ ३१ ॥ तेथें सीता आणि रावण । स्वयें शोधावीं सावधान । सांपडतां घेवोनि प्राण । सीता आपण आणावी ॥ ३२ ॥ त्रिपुर भेदोनि शंकर । रसातळीं मयासुर । शिवें स्थापिला महावीर । सहपरिवार वसताहे ॥ ३३ ॥ तो सोयरा रावणासीं । तेथें तो असेल सीतेसीं । जीवें मारोनियां त्यासी । जानकीसी आणावें ॥ ३४ ॥ महातळीं कद्रुसुत । जे विषधर[11] क्रोधयुक्त । सर्प वसताती समस्त । रावण तेथ शोधावा ॥ ३५ ॥ जरी आतुंडला[12] दृष्टीं । तरी मारूनि त्या उठाउठीं । सीता आणावी गोरटी । सुखसंतुष्टी श्रीरामा ॥ ३६ ॥ तळातळीं तंव दानव । फणी मुख्य रायाचें नांव । निवातकवच वीर सर्वे । वैरी स्वयमेव इंद्राचे ॥ ३७ ॥ दनुजन्मे दानवमांदी । टवटाळक नामविधीं । संख्या नव्हे शंखशब्दीं । ते मुख्य द्वंद्वी[13] इंद्राचे ॥ ३८ ॥ तेथें आतुडलिया रावण । तो निर्दळावा आपण । आडवे दानव आलिया जाण । त्यांचेंही कंदन[14] करावें ॥ ३९ ॥ दानवांची असंख्य सृष्टी । तुम्ही वानर कोटयनुकोटी । रामकार्य लक्षोनि दृष्टीं । उठाउठीं मारावे ॥ ४० ॥ दानवांचें अति मर्दन । रणीं करोनि रणकंदन । जीवें मारोनि रावण । सीता आपण आणावी ॥ ४१ ॥ सातवे पाताळीं महानाग । शतसहस्रफणाभोग[15] । वासुकिप्रमुख अनेग । पद्मिनीभोग भोगिती ॥ ४२ ॥ स्वर्गीं

१ रहाण्याची जागा. २ श्रेष्ठ. ३ सीतेचा शोध. ४ खेडीं. ५ लहान गांव. ६ पर्वतशिखरें. ७ प्रवाह. ८ न सांपडेल. ९ आपलें सामर्थ्य. १० वामन. ११ विष धारण करणारे (सर्प.) १२ सांपडला. १३ शत्रु. १४ नाश. १५ शंभर हजार फणांचे मोठे सर्प.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

उर्वशी रंभा सुंदरी। कां पाताळीं पद्मिनी नारी। त्यांचिया सौंदर्याची थोरी। चराचरीं वाखाणे ॥ ४३ ॥ तेथें अति सावधानता। स्वयें शोध करोनि लंकानाथा। सांपडलिया करोनि घाता। सवेग सीता आणावी ॥ ४४ ॥ त्या तळीं त्रिशत-योजनांवरी। शेष वसे सहस्रशिरी। ज्याच्या शरीरभोगावरी। निद्रा करी श्रीरंग ॥ ४५ ॥ तेथें जानकी दशशिर। सावध शोधावीं सत्वर। सांपडलिया करोनि मार। सीता सुंदर आणावी ॥ ४६ ॥ शुद्धी करावी तेथवरी। तेथोनि परतावें वानरीं। वाट काढितां पुढारीं। तुम्ही अघोरीं पडाल ॥ ४७ ॥ त्याहूनि तळीं आत्यंतिक। अंधतामिस्त्र महानरक। त्याहूनि तळीं कूर्म देख। आवरणोदक त्या तळीं ॥ ४८ ॥ नरका जाती पापी नर। तुम्ही सांडोनि ते मोहर। रामनामाचा करोनि गजर। भजा सत्वर श्रीरामा ॥ ४९ ॥ स्वर्गभोग नावडे ज्यांसी। पुण्य करिती भोगेच्छेसीं। ते जीव होती पाताळवासी। निजपुण्यासी भोगावया ॥ ५० ॥ पुण्य नाहीं तिळभरी। जे केवळ पापाचारी। ते नर पँचती नरकांतरीं। पापेंकरीं महापापी ॥ ५१ ॥ वीरां सुग्रीव सांगे गर्जोन। तुम्हांसी नागवे जैं रावण। शीघ्र शुद्धी आणावी आपण। त्याचें निर्दळण मी करीन ॥ ५२ ॥ वानर बोलती कैवांडें। रावण दहा तोंडांचें किडें। सहसीता बांधोनि रोकडें। रामापुढें आणूं जी ॥ ५३ ॥ पाताळ शोधावयाची गती। सुग्रीवें केली अति निगुतीं। तार वानर स्वर्गाप्रती। धाडी ते स्थिती अवधारा ॥ ५४ ॥ तार वानर तेजोराशी। सेना शतकोटि तयासरसी। सुग्रीवें धाडिला स्वर्गासी। जानकीसी शोधावया ॥ ५५ ॥ सुग्रीव बोले ताराप्रती। मी सांगेन स्वर्गगती। सीता शोधावी ऐशा रीतीं। सावधानवृत्तीं निजबळें ॥ ५६ ॥ पृथ्वीहूनियां वरती। सूर्यमंडळाखालती। यक्ष रक्ष गंधर्व वसती। तेथें सीता सती शोधावी ॥ ५७ ॥ स्वर्गलोक आहेती बहुत। मी सांगेन संकळितें। सीता शोधावी तेथ तेथ। सावचित्त निजवृत्तीं ॥५८॥ सूर्यलोक लक्षांतरीं। लक्षयोजनें सौम त्यावरी। तारालोक त्याहीवरी। लक्षांतरीं वसताहे ॥५९॥ तारालोकाहूनि वरी। बुधलोक लक्षांतरीं। बुधलोकाच्याही वरी। दों लक्षांतरीं भृगुलोग ॥ ६० ॥ दैत्यगुरु भृगुपती। रावणा शुक्रा अति प्रीती। तेथें पहावा निश्चितीं। सीतासतीसमवेत ॥ ६१ ॥ तेथें देखिल्या सीता सुंदरी। बळें आणितां निजगजरीं। शुक्र बुद्धीं आडवा आला जरी। अवधारीं तेहीविषयीं ॥ ६२ ॥ मारूं नये गा ब्राह्मणा। श्रीवामनें केलासे तो काणा। फोडोनियां दुसरिया नयना। रामांगना आणावी ॥ ६३ ॥ तेथें नसलिया सीता सती। तरी निघावें शीघ्रगतीं। शुक्रलोकाहीवरती। दोन लक्ष भौमलोक ॥ ६४ ॥ भौमलोकाच्याही वरी। दोनी लक्ष योजनांतरीं। देवगुरु वस्ती करी। जो सुरवरीं निजपूज्य ॥ ६५ ॥ त्याहूनि दोनी लक्ष योजनीं। सूर्यसुत वसे शनी। लक्षयोजन त्याहूनी। वसती मुनी सप्तऋषी ॥६६॥ तेथें आहे अरुंधती। तीसी पुसावी सीता सती। ते सांगेल यथानिगुतीं। श्रीरामाप्रती सत्यत्वें ॥ ६७ ॥ तेथोनि दशलक्षयोजनगतीं। वसताहे अमरावती। इंद्र नांदे तो सुरपती। स्वर्गसंपत्तीसमवेत ॥ ६८ ॥ तेथें गिंवसावें सीतारत्न। चैत्ररथ-नंदनवन। कल्पतरूंचें उद्यान। स्वयें शोधून पहावें ॥ ६९ ॥ तेथोनि त्रैलोक्य सकळ। सरलें स्वर्ग मृत्यु पाताळ। त्याहीवरी आहे स्थळ। जनकंबाळा शोधावया ॥ ७० ॥ कैलासगिरीचे पाठारीं। कुबेराची अलका नगरी। सुवर्णकमळें सुगंधकारी। सजीव सरोवरीं विकासती ॥ ७१ ॥ ज्या कमळांचा सुगंधू। घेतां ब्रह्मा होय स्तब्धू। तेथें शोधावी श्रीरामवधू। कुबेर ज्येष्ठ बंधू रावणाचा ॥ ७२ ॥ तिहीं लोकांहुनि वरती। रावणा जावया कैंची शक्ती। जवळी आहे सीता सती। तिचेनि गति राक्षसा ॥ ७३ ॥ सीतेचे हरणसंगतीं। राक्षस पावतील ऊर्ध्वगती। हें बोलिलें बहुतां ग्रंथीं। सत्य जाणती सात्त्विक ॥७४॥ तिहीं लोकांहूनि बाहेरी। भक्तकृपाळू श्रीहरी। अलक्षलक्ष लक्षांतरीं। कृपेनें करी ध्रुवलोक ॥ ७५ ॥ त्रिलोकीं होतां प्रळयकाळ। ध्रुवासी कदा नव्हे चळ। तो

१ रावण. २ मार्ग. ३ शिजतात. ४ पापामुळें. ५ आवेशानें. ६ थोडक्यांत. ७ चंद्र. ८ मुद्दाम होऊन.

९ बाग. १० सीता. ११ वर जावयाचें सामर्थ्य.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सर्वदा अचळ । यालागीं अढळ ध्रुवपद ॥ ७६ ॥ ध्रुव वीर शूर भगवद्भक्त । देखोनि सीता आक्रंदत । पाडोनि रावणाचे दांत । सीता निश्चित सोडवील ॥ ७७ ॥ ध्रुव अढळपदीं सीता । प्रतिपाळील जैसी माता । त्यासी पुसावें तत्त्वतां । श्रीरघुनाथसुखार्थ ॥ ७८ ॥ तेथें न लभे जनकबाळ । आणिक स्थळ अति प्रबळ । तें मी सांगेन सकळ । सुनिश्चळ अवधारीं ॥ ७९ ॥ तेथें जावया एकचि गती । विकल्प सांडोनियां चित्तीं । तैं त्या स्थानाची प्राप्ती । जाण निश्चितीं महावीरा ॥ ८० ॥ पृथ्वीपासोनि कोटियोजनें । महर्लोक वसे जाण । तेथें वसती कल्पायु जन । तें वसतिस्थान तयांचें ॥ ८१ ॥ तेथें शोधावी गा सीता । त्याहूनि कोटियोजनांवरता । जनलोक आहे वसता । तेथील अवस्था अवधारीं ॥ ८२ ॥ तेथें ऊर्ध्वरेते योगी देख । तेथें वसती सनकादिक । सीता पुसावी आवश्यक । ते निष्टंक[1] सांगतील ॥ ८३ ॥ तेथोनि दोन कोटि योजनें अधिक । वसताहे तपोलोक । वैराजदेवां निवासक । तपस्वी देख अति शांत ॥ ८४ ॥ तपें तापस कर्कश होत । क्रोधयुक्त नित्य संतप्त । अल्पासाठीं शाप देत । तेणें भस्म होत तपश्चर्या ॥ ८५ ॥ ऐसे तापस ते नव्हेत । वैराजदेव अति शांत । तप करिती उपकारार्थ । दीन समस्त तारावया ॥ ८६ ॥ भावें करितां भगवद्भक्ती । ज्या कर्मी जे जे राहती । तें तें संपूर्ण ते करिती । उद्धरार्थी दीनांच्या ॥ ८७ ॥ त्यांसी करोनियां नमन । सीता पुसावी आपण । पुढें आहे ब्रह्मभुवन । सीताशोधन करावें ॥ ८८ ॥ तपोलोकाहूनि देख । चारी कोटि उंच अधिक । वसताहे सत्यलोक । सृष्टि [2]स्रजी स्वयें चतुर्मुख निजस्वामी ॥ ८९ ॥ ब्रह्मा । त्याचे लोकाचा निजमहिमा । सावधान ऐकें प्लवंगमा[3] । नाहीं उपमा त्या स्थाना ॥ ९० ॥ तेथें मूर्तिमंत वेद । मूर्तिमंत धर्म प्रसिद्ध । मूर्तिमंत ब्रह्मचर्य शुद्ध । तप विशद मूर्तिमंत ॥ ९१ ॥ मूर्तिमंत गायत्री वेदबीज अति गुप्त । मूर्तिमंत असे तेथ । वाचा मूर्तिमंत वर्तत । दया मूर्तिमंत उल्हासे ॥ ९२ ॥ तिन्ही याग[4] मूर्तिमंत । तिन्ही एकत्वें नांदत । सत्य सत्यलोकीं मूर्तिमंत । असत्य तेथ असेना ॥ ९३ ॥ ते लोकीं वसती कोण लोक । जे गायत्रीमंत्रजापक । जे ब्राह्मण तीर्थोपासक । यागोपासक निष्कामें ॥ ९४ ॥ ब्राह्मणकार्यीं जे निमाले[5] । गोरक्षणार्थ[6] जीव गेले । परोपकारार्थ प्राण वेंचले । ते पावले सत्यलोक ॥ ९५ ॥ जिहीं निष्काम द्विज पूजिले । जिहीं निष्काम द्विज भोजिले[7] । जिहीं निरपेक्ष यजन केलें । ते पावले सत्यलोक ॥ ९६ ॥ जे कृपाळु दीनार्थ देख । जे दयाळु बंधमोचक । जे सत्यवादी नित्य सात्त्विक । ते सत्यलोकनिवासी ॥ ९७ ॥ जे परापवादीं[8] मूक । जे परांगनीं[9] नपुंसक । जे परद्रव्या पराङ्मुख । ते सत्यलोकनिवासी ॥ ९८ ॥ ऐसी सत्यलोकींची स्थिती । तेथील ब्रह्मा अधिपती । ब्रह्मसृष्टि याहीवरती । नाहीं निश्चितीं महावीरा ॥ ९९ ॥ रावण पौलस्तीचा सुतु । तो होय ब्रह्मयाचा नातु । असेल सत्यलोकाआंतु । सीतासमवेतु राहिला ॥ १०० ॥ पहावा इंदिरावरसरोवरीं । कां सामसोमवनवृक्षांतरीं । ऐक त्या ठायाची थोरी । चराचरीं अनुपम्य ॥ १ ॥ इंदिरावरसरोवरीं करितां स्नान । सर्व रसांची गोडी जाण । सर्वांगीं पाविजे आपण । अमृतपान तें फिकें ॥ २ ॥ तेथें घडलिया सभाग्य स्नान । अगाध गोडी पावे पूर्ण । सीतासमवेत रावण । तेथें आपण गिंवसावा ॥ ३ ॥ सामसोमवृक्षच्छायेसीं । वैसल्या विश्रांति होय कैसी । सुषुप्तिसुख तेथींची दासी । स्वर्गसुख त्यासी कुंरवंडी[10] ॥ ४ ॥ ते छायेच्या सुखासाठीं । पुण्य वेंचिती कोट्यनुकोटी । तरी त्या छायेची नव्हेचि भेटी । अगम्य गोष्टी पावावया ॥ ५ ॥ पुण्य करोनि कडोविकडीं । सत्यलोका येती बापुडीं । त्यांसी न लाभे ही गोडी । ते पुण्यजोडी दुर्लभ ॥ ६ ॥ जांवयासवें आलें घोडें । दाणा देती करबाडें[11] । परी त्या पक्वान्न न जोडे । तेणें पाडें साधका ॥ ७ ॥ शोधित सत्त्वाची परवडी । गाळींव पुण्याच्या कोडी । तैं पाविजे तेथींची थडी । अगाध गोडी त्या ठायीं ॥ ८ ॥ त्या ठायाचें समाधान । समाधिसुखासमान । न करितां भग-

१ बरोबर रीतीनें. २ निर्माण करतो. ३ वानरा. ४ यज्ञ. ५ मेले. ६ गाईंच्या संरक्षणासाठीं. ७ जेऊं घातले. ८ लोकांची निंदा करण्याविषयीं. ९ परस्त्रीच्या ठिकाणीं. १० ओंवाळणी करी. ११ कडबा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वद्धजन । पुनरागमन तेथें नाहीं ॥ ९ ॥ यालागीं करितां भगवद्भक्ती । चारी मुक्ती दासी होती । श्रीरामनामाहीपरती । साधनशक्ती असेना ॥ ११० ॥ पहा पां कैसे अभागी जन । सांडोनियां श्रीरामस्मरण । करितां आन आन साधन । जन्ममरण सोडीना ॥ ११ ॥ नामापासीं साधनशक्ती । नामस्मरणा मुख्य भक्ती । भक्तीपासीं चारी मुक्ती । वेदशास्त्रार्थी निश्चित ॥ १२ ॥ श्रीरामस्मरणें मुख्य भक्ती । साधु संत स्वयें जाणती । तेंचि अनुवादावें किती । कथासंगती अवधारा ॥ १३ ॥ सामसोमवृक्षमेळीं । समवेत जनकबाळी । रावण गिंवसावा महाबळी । छायेतळीं उपविष्ट[२] ॥ १४ ॥ तेथेंही नसल्या रावणासी । तरी पहावें कैलासीं । शिवभक्ती आहे त्यासी । शिवलोकासीं शोधावा ॥ १५ ॥ जावया शिवलोकाप्रती । म्हणाल आम्हां नाहीं शक्ती । रामनामाच्या आवर्तीं[३] । सुलभ प्राप्ती शिवलोका ॥ १६ ॥ शिव श्रीरामभक्त संपूर्ण । ऐकोनि श्रीरामस्मरण । स्वयें सामोरा येईल आपण । अति सन्मान नामास ॥ १७ ॥ शिव सन्मानी रामासी । नाम स्मरावें अहर्निशीं । सुलभ प्राप्ति नामापासीं । शिवलोकासी जावया ॥ १८ ॥ वैकुंठकैलासवृत्तांत । वेदशास्त्रां अगम्य मात । ते मी सांगेन साद्यंत । सीताशुद्ध्यर्थ साधावया ॥ १९ ॥ सप्तावरणांहूनि बाहेरी । मायावरणाभीतरीं । वैकुंठकैलासाची थोरी । स्वलीला करी श्रीभगवंत ॥ १२० ॥ प्रळय होती ब्रह्मसृष्टीसी । वैकुंठकैलासशेषशायीसी । प्रळयो नाहीं या तिहींसी । बोलिला ऋषि याज्ञवल्क्य ॥ २१ ॥ तरी ते तिन्ही प्रळयातीत । म्हणों नये गा निश्चित । अत्यंत प्रळयीं प्रळय होत । प्रळय प्राप्त तैं त्यांसी ॥ २२ ॥ ऐसे प्रळय आहेत किती । पुसावें ऐसें वाटे चित्तीं । तरी ते सांगेन संकळितीं । सावधवृत्तीं अवधारा ॥ २३ ॥ पहिला जाण नित्यप्रळय । दुसरा तो मरणप्रळय । तिसरा दैनंदिनप्रळय । ब्रह्मप्रळय तो चवथा ॥ २४ ॥ पांचवा प्रळय आत्यंतिक । त्यासी नेणती कोणी लोक । त्याही पांचांचा विवेक । ऐका निष्टंक सांगेन ॥ २५ ॥ नित्यप्रळय तो सुषुप्ती[४] । मरणप्रळय होतां मरती । ब्रह्मयाच्या दिनांतीं । महाप्रळयो दैनंदिन ॥ २६ ॥ विरोनियां सप्तावरण । ब्रह्मांड विरे गा संपूर्ण । सृष्टिकर्ता[५] मरे आपण । ब्रह्मप्रळय जाण हा चवथा ॥ २७ ॥ आत्यंतिक प्रळयाची गोष्टी । लोक न देखती दृष्टीं । तो तंव ब्रह्मज्ञानाच्या पोटीं । गुरुवाक्यें उठी लखलखित ॥ २८ ॥ बाप गुरुवाक्याची दृष्टी । सान थोर समूळ निवटी[६] । कैंचा देव कैंची सृष्टी । नळी निमटी जीवशिवां ॥ २९ ॥ ज्ञेय ज्ञान ध्येय ध्यान । दृश्य द्रष्टा आणि दर्शन । त्रिगुणत्रिपुटीनिर्दळण । ब्रह्म परिपूर्ण पूर्णत्वें ॥ १३० ॥ जेथें जीवशिवत्व नाहीं । कैंचें वैकुंठ कैलास शेषशायी । मीतूंपण मुळींच नाहीं । ब्रह्म पाहीं परिपूर्ण ॥ ३१ ॥ विरे वैकुंठेंसीं नारायण । विरे शेषेंसी शेषशयन[७] । कैलासेंसीं त्रिनयन[८] । जाय विरोन परब्रह्मीं ॥ ३२ ॥ गुरुवाक्याचेनि बोलें । अत्यंतप्रळयाचें रूप केलें । ब्रह्मचि एक एकलें । असे कोंदलें परिपूर्ण ॥ ३३ ॥ ऐकतां सुग्रीवाची गोष्टी । श्रीराम सुखावला पोटीं । हर्षें दोघां पडली मिठी । सुखसंतुष्टी स्वानंदें ॥ ३४ ॥ सुग्रीवा नाठवे वानरपण । श्रीरामा नाठवे रामपण । ऐक्य देखतां संपूर्ण । सुखीं लक्ष्मण विराला ॥ ३५ ॥ एक पडतांचि मिठी । तिघांची विराली त्रिपुटी[९] । हर्षें कोंदलीसे सृष्टी । सुखसंतुष्टी श्रीराम ॥ ३६ ॥ अत्यंतप्रळयींचें परिपूर्ण । स्वयें श्रीरामचि जाण । संमुख देखतांही सगुण । ब्रह्म परिपूर्ण श्रीराम ॥ ३७ ॥ सीताशुद्धीची व्युत्पत्ती[१०] । शुद्धब्रह्म श्रीरघुपती । वानरां जाली पूर्ण ब्रह्मप्राप्ती । सुख सर्वार्थी श्रीराम ॥ ३८ ॥ श्रीरामाच्या निजसंगतीं । वानरां पूर्ण ब्रह्मप्राप्ती । बाप[११] सत्संगाची ख्याती । निंद्य ते होती अति वंद्य ॥ ३९ ॥ एका जनार्दना शरण । श्रीराम कारणा कारण । रामें रम्य रामायण । नामस्मरण तारक ॥ १४० ॥ नामें अहल्याउद्धरण । नामें गणिका[१२] अति पावन । नामें भुक्ति मुक्ति पूर्ण । श्रीरामस्मरण परब्रह्म ॥ ४१ ॥ श्रीराम सगुण दिसे पाहीं । परी तो देहींच विदेही । दीनोद्धारालागीं पाहीं । वना निजपायीं स्वयें आला ॥ ४२ ॥ जो देवां दुर्लभ नमस्कारा । जो न कळे वेदशास्त्रां ।

१ सांगावें. २ बसलेला. ३ सतत क्रमानें. ४ गाढ निद्रा. ५ हिरण्यगर्भ, ब्रह्मदेव. ६ नाश करी. ७ श्रीविष्णु. ८ शंकर. ९ ज्ञेय, ज्ञाता, ज्ञान हीं तीन. १० ज्ञान. ११ मोठी. १२ पिंगला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

तो सखा जाला वानरां। रामें वनचरां उद्धरिलें ॥४३॥ एका जनार्दना शरण। श्रीराम दीनोद्धारण। नामें तरती दीन जन। नामें छेदन भवबंधा ॥४४॥ श्रीरामनामापरतें। आन साधन नाहीं सरतें। एका शरण श्रोतियांतें। श्रीरामकथेतें अवधारा ॥१४५॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे किष्किंधाकांडे एकाकारटीकायां सीताशुद्ध्यर्थवानरप्रेरणं नाम एकादशोऽध्यायः ॥ ११ ॥ ॥ ओंव्या ॥ १४५ ॥ श्लोक ॥ २ ॥

अध्याय बारावा

श्रीसीतारामचंद्राय नमः॥ नाना स्थानें स्वर्गवासीं। तेथें शोधावया सीतेसीं। सुग्रीवें सांगोनि तारापासीं। वेगीं तो स्वर्गासी धाडिला ॥ १॥ पूर्व पश्चिम उत्तर। स्वर्ग पाताळा धाडिले वीर। दक्षिणदिशेचा विचार। सांगों कपीश्वर विसरला ॥ २ ॥ ऐसें न म्हणावें श्रोतीं। दक्षिणदिशेची गती। आहे सीतेची निजप्राप्ती। गोड ग्रासार्थी राखिली ॥ ३ ॥ गोड ग्रास तो रामायणांत। तो हा सीताशुद्धीचा ग्रंथ। ख्याति करील हनुमंत। लंकेआंत तें ऐका ॥ ४ ॥ दक्षिणदिशेचा विचार। सीताप्राप्तीचें मुख्य घर। तेथें धाडिले महाशूर। वीर दिनकरप्रतापी[1] ॥ ५ ॥

पितामहसुतं चैव जांबवंतं महाबलम्।
नीलमग्निसुतं चैव हनूमंतं च वानरम् ॥ १ ॥
गजं गवाक्षं गवयं सुषेणं वृषभं तथा।
मंदं च द्विविदं चैव सुषेणं गंधमादनम् ॥ २॥
अंगदप्रमुखान् वीरान् वीरः कपिगणेश्वरः।
विधाय हरिवीराणामादिशद्दक्षिणां दिशम् ॥ ३ ॥

ब्रह्मयाचा निजसुत। जो रिसांचा[2] निजनाथ। महाबळी जांबवंत। दक्षिणशुद्ध्यर्थ नेमिला ॥ ६ ॥ नीळ सेनानी[3] अग्निपुत्र। नळ विश्वकर्म्याचा कुमर। गज गवाक्ष शरभ वीर। वानरभार दक्षिणे ॥ ७ ॥ मैंद आणि द्विविद। दोघे वीर अति प्रसिद्ध। त्यांमाजी युवराज अंगद। सैन्य सन्नद्ध[4] त्या अधीन ॥ ८ ॥ अंगद राजा महावीर। सर्वे सेनानी श्रेष्ठ वानर। दक्षिण शोधावया सत्वर। केला भुभुःकार वानरीं ॥ ९ ॥ पूर्व पश्चिम उत्तर। निघती जे जे वानरवीर। तिंहीं केला भुभुःकार। नादें अंबर दुमदुमिलें ॥ १० ॥ नाद कोंदला उद्भट। ध्यानीं गजबजिला नीलकंठ। होऊं पाहे ब्रह्मांडस्फोट[5]। भय दुर्घट कळिकाळा ॥ ११ ॥ जातां देखोनि वानर। हनुमंतासी चिंता थोर। मज नाठवीच सुग्रीव वीर। श्रीरामचंद्र विसरला ॥ १२ ॥ सीताशुद्धीचा कार्यार्थ। जैं मज आजी नव्हेचि प्राप्त। तैं माझें व्यर्थ जीवित। धिक् पुरुषार्थ पैं माझा ॥ १३ ॥ जातां वानरांचे पाळे[6]। हनूमान पिटी निजकपाळें। अदृष्टें घेतलें ये वेळे। दुःखें लोळे गडबडां ॥ १४ ॥ वानर जातां पैं देखोन। हनुमंतासी आलें रुदन। तें जाणोनि श्रीरघुनंदन। होय हांसोन बोलता ॥ १५ ॥ हनुमंताची तीव्र व्यथा। कळों सरली श्रीरघुनाथा। तो श्रीराम अंतर्यामीं जाणता। होय सांगता सुग्रीवा ॥ १६ ॥ सीताशुद्धीचा कार्यार्थ। मुख्य साधक हनुमंत। त्याचे अंगीं अति पुरुषार्थ। त्यासी हा अर्थ सांगावा ॥ १७ ॥ ऐसें बोलतां श्रीरघुनाथा। सुग्रीवें चरणीं ठेविला माथा। मी विसरलों हनुमंता। धन्य जाणता श्रीराम ॥ १८ ॥ ऐसें सांगतां श्रीरघुनाथा। उल्लास सुग्रीवाच्या चित्ता। पाचारोनियां हनुमंता। होय सांगता उल्लासें ॥ १९ ॥

विशेषेण तु सुग्रीवो हनूमन्तमुवाच ह।
स हि तस्मिन्हरिश्रेष्ठे संभावयति विक्रमम् ॥ ४ ॥
न भूमौ नान्तरिक्षे वा नाम्बरे नामरालये।
नाप्सु वा गतिसंगं ते पश्यामि हरिपुंगव ॥ ५ ॥

सुग्रीव म्हणे हनुमंता। सीताशुद्धीच्या कार्यार्थी। तुवां निघावें शीघ्रता। श्रीरघुनाथा सुखार्थ ॥ २० ॥ तुवां जावोनि तत्त्वतां। सीताशुद्धि आणावी आतां। तुझिया ज्ञानबळा समता। नाहीं सर्वथा तिहीं लोकीं ॥ २१ ॥ देव दानव मानव दैत्यां। तुझिया बळा नाहीं समता। जळस्थळखेचरभूतां[7]। तुजसीं समता[8] असेना ॥ २२ ॥ यालागीं सवेग आपण। शीघ्र करावें गमन। करितां हनुमंतें उड्डाण। धरी धांवोनि

---

१ सूर्यासारखे पराक्रमी. २ आस्वलांचा. ३ सेनापति. ४ तयार. ५ ब्रह्मांडाचें विदारण. ६ समूह. ७ जलवासी, स्थलवासी व आकाशवासी प्राण्यांना. ८ बरोबरी.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सुग्रीव ॥ २३ ॥ तूं एकला शीघ्र जासी । सीताशुद्धि घेवोनि येसी । हें मानलें आम्हांसी । निश्चयेंसीं हनुमंता ॥ २४ ॥ अंगीकारोनि युवरायासी । यश द्यावें अंगदासी । त्यासी न्यावें सीताशुद्धीसी । हें मी तुजपासीं मागतों ॥ २५ ॥ ऐकोनि सुग्रीवाचें वचन । हनुमंतें केलें नमन । तूं राजा मी तुझ्या अधीन । आज्ञा प्रमाण मज पूज्य ॥ २६ ॥ सुग्रीवें आणोनि अंगदासी । स्वयें दिधला हनुमंतापासीं । वंदोनियां युवराजासी । निघे शुद्धीसी हनुमंत ॥ २७ ॥ वानर धाडिले शुद्धीसी । निघाले नेमिल्या दिशेसी । चहूं दिशांच्या गतिमानांसी । सुग्रीव त्यांपासीं सांगत ॥ २८ ॥

पूर्वां तु दिशमास्थाय विनतः प्लवगर्षभः ।
प्रतस्थे हरिशार्दूलो वानरैर्बहुभिर्वृतः ॥ ६ ॥

वीरशार्दूळ वानरपती । पूर्वें शोधावयाच्या अर्थीं । साक्षेपें सांगे विनीतांप्रती । गमनस्थिती ते ऐका ॥ २९ ॥ पूर्वें जातां महावीरीं । शुद्धि घ्यावी नानापरी । पहावी देशदेशांतरीं । गिरिशिखरीं ते ऐका ॥ ३० ॥ मंदराचळ अरुणाचळ । मुख्य शोधावा कुलाचळ । पूर्वें पर्वत सकळ । शिखरें शैल शोधावे ॥ ३१ ॥ अंग वंग कारुष कलिंग । गौड विदेह पौंड्र भृंग । कामरूप कामाक्ष देश अनेग । समूळ सांग शोधावे ॥ ३२ ॥ मंदगिरीच्या एके भागीं । लोक वसती पापमार्गी । ऐका त्यांचिही महामांगी । विकटांगी विक्राळ ॥ ३३ ॥ कर्ण प्रावरण विकर्ण एक । बर्बर खरमुख घोडमुख । हबसी किरात नर्दनाळिक । काळमुख महायवन ॥ ३४ ॥ कोळी माळी निषाद हूण । केशकंबळी केशावरण । लोमधारी लोमप्रावरण । विकराळवदन विकटाक्ष ॥ ३५ ॥ ऐशां पापियांमाजि जाण । असेल महापापी रावण । तेथें शोधावें आपण । सौभाग्यरत्न सीतेसी ॥ ३६ ॥ जळवासी जळमाणसें । आरक्तवर्ण अति कर्कशें । रूमशाम फिरंगवेशें । सागरप्रदेश शोधावा ॥ ३७ ॥ मधु मर्दिला मुरारीं । रक्त भरिलें सागरीं । त्या लोहसमुद्राच्या तीरीं । रत्नगिरि पर्वत ॥ ३८ ॥ तेथें गरुडाची नित्य वस्ती । तेणें गांजोनि लंकापती । सोडवोनि सीता सती । रामार्पणार्थी प्रतिपाळी ॥ ३९ ॥ तेथें जावोनि आपण । घ्यावें गरुडाचें दर्शन । सीता पुसावी करोनि नमन । नाहीं तरी गमन पुढें करावें ॥ ४० ॥ त्याचि सागरामाझारीं । गोमंतनामें पर्वत थोरी । उंच लक्ष योजनांतरीं । वस्ती त्यावरी मंदेहां ॥ ४१ ॥ मंदेहराक्षसांची थोरी । असंख्य उपजती सागरीं । सूर्योदयीं सूर्यावरी । शतसहस्रीं धांवती ॥ ४२ ॥ ते द्विजसंध्योदकेंकरीं । पडोनि निमती सागरीं । सर्वेंचि उपजती रात्रीं । लक्षांतरीं असंख्य ॥ ४३ ॥ धन्य द्विजांचें अर्घ्यदान । संध्योदकें दुष्टदलन । सूर्यासी करवी गमन । मार्गदान द्विजसंध्या ॥ ४४ ॥ यालागीं सूर्याची नित्यगती । आहे ब्राह्मणांच्या हातीं । ब्राह्मणमहिमा वानूं किती । भुक्ति मुक्ती चरणतीर्थीं ॥ ४५ ॥ ब्राह्मणांच्या सेवावृत्तीं । तेथें तुम्हां होईल गती । सीता शोधावी सावधवृत्तीं । श्रीरामभक्तिप्रतापें ॥ ४६ ॥ वालखिल्य तेचि पर्वतीं । अंगुष्ठमात्र देहाकृती । वैखानस त्यांसी म्हणती । सामर्थ्यशक्ती अनिवार ॥ ४७ ॥ त्यांच्या अनुवृत्तीं आपण । साष्टांग करोनि नमन । त्यांसी सांगावें निजगमन । सीताशोधन करावें ॥ ४८ ॥ पूर्वें जगन्नाथ स्थळ । उदार ब्रह्ममूर्ति मंगळ । तेथींचा महिमा अति प्रबळ । ऐका सकळ सद्भावें ॥ ४९ ॥ ब्रह्मभावो आणि चिच्छक्ती । मूर्तिमंत तिन्ही मूर्ती । कृष्ण बळभद्र सुभद्रापती । लोक वंदिती पर्यायें ॥ ५० ॥ प्रथम शक्तीचें दर्शन । तो नर होय सभाग्य पूर्ण । प्रथम बळभद्राचें दर्शन । धर्मपरायण तो पुरुष ॥ ५१ ॥ प्रथम देखिल्या भगवन्मूर्ती । त्यासी सद्य भगवत्प्राप्ती । पायां लागती चारी मुक्ती । भुक्ति मुक्ति त्या आंदण्या ॥ ५२ ॥ तेथें जावोनि आपण । करावें देवदर्शन । सीता शोधावी सावधान । नाहींतरी गमन करावें ॥ ५३ ॥ कोणे एके अवसरीं । स्वभावें कोप आला हरी । तो निक्षेपिला सागरीं । अग्नि समुद्रीं लागला ॥ ५४ ॥ जळचरां परम दुःख । कढों लागलें समुद्रोदक । कृपा उपजोनि देख । कोपानुकंप रचियेला ॥ ५५ ॥ दार्हक दीप्ति

१ नम्र अशा वानरांस. २ गाढवाच्या तोंडाचे. ३ ब्राह्मणांच्या संध्येच्या पाण्यानें. ४ अनुक्रमानें. ५ तत्काळ.

६ जाळणारें तेज.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

काढोनि बाहेरी । त्याचा रचिला कनकगिरी । उरला जो कां सागरोदरीं । त्याची थोरी वडवाग्नि ॥ ५६ ॥ वडवानळासी भक्ष्य देख । बारा गांवें समुद्रोदक । सभोंवतें देखोनि चोख । ठेविला निष्टंक सागरीं ॥ ५७ ॥ सागरू आपल्या जळसत्ता । विझवूं न शके त्यासी सर्वथा । सागरा शोषोनि समस्ता । होय भक्षिता प्रलयकाळीं ॥ ५८ ॥ तेथोनि उडतां महावीरीं । जळती वडवाग्निमाझारीं । वाट न चले पुढारीं । शीघ्र वानरीं परतावें ॥ ५९ ॥

पश्चिमां तु दिशं घोरां सुषेणः प्लवगैः सह ।
प्रतस्थे कपिशार्दूलो दिशं वरुणपालिताम् ॥ ७ ॥

सुग्रीव वीरपंचानन । पाचारोनियां सुषेण । पश्चिम दिशेचें शोधन । सांगे आपण तें ऐका ॥ ६० ॥ सौराष्ट्र सिद्ध सौवीर । उखामंडळ द्वारकापुर । त्रिगर्त गांधार काश्मीर । देश समग्र शोधावे ॥ ६१ ॥ मही मेधावती साबरमती । रेवा मधुमती वेदवती । पंचनद प्राची सरस्वती । पृथोदकाप्रती पहावी सीता ॥ ६२ ॥ कुरुक्षेत्र गीतावट । ज्वालामुखी नगरकोट । नेपाळ जयपाळ नीळकंठ । काश्मीरघाट शोधावे ॥ ६३ ॥ केतकीखंड शंखनाळवन । केशरउत्पत्ति सुगंधस्थान । जांगळादेवी पीतवन । सीता शोधून पहावी ॥ ६४ ॥ प्राग्ज्योतिषनाम नगर । हेममय मनोहर । महादुष्ट वसे नरकासुर । त्यासी नित्य मित्रत्व रावणासीं ॥ ६५ ॥ त्याचेनि बळें रावण तेथ । असेल सीतासमवेत । तो शोधोनि धरावा जीत । बांधोनि येथ आणावा ॥ ६६ ॥ सागरीं मधुकैटभस्थान । त्या नांव दशावर्त जाण । तेथें मधुमर्दी मधुसूदन । तें विजयस्थान हरीचें ॥ ६७ ॥ तेथेंचि पंचजन[1] वधून । शंख काढिला पांचजन्य[2] । ज्याचेनि नादें त्रिभुवन । कंपायमान सुरासुर ॥ ६८ ॥ तेचि समुद्रीं चक्रगिरी । वज्रनामी वज्रशरीरी । नित्य वसे तयावरी । सुरासुरीं दुर्धर्ष[3] ॥ ६९ ॥ त्यातें वधोनि चक्रधर । त्याच्या शरीराचें करी चक्र । आणि इंद्रालागोनि वज्र । निर्मी मयासुर लघुलाघव ॥ ७० ॥ ऐसें अति दुर्गम स्थान । रामनामें रिघोनि जाण । शुद्धि करोनियां सावधान । जीत[4] रावण धरावा ॥ ७१ ॥ याहीपुढें अस्तगिरी । सूर्य मावळे सचक्री । पुढें मार्ग न चले अंधारीं । शीघ्र वानरीं परतावें ॥ ७२ ॥

उत्तरां तु दिशं दिव्यां गिरिजालसमावृताम् ।
वीरः शतबलिर्नाम प्रययौ स पदानुगः ॥ ८ ॥

उत्तरदिशे गिरि जांगळी । शोधूं निघाला शतवळी । सुग्रीव सांगे त्याजवळी । देश देश शोधावा ॥ ७३ ॥ मद्रक मथुरा शूरसेन । कुरु कैकेय माळव मान । मत्स्य पुलिंदादि यवन । चीन महाचीन शोधावे ॥ ७४ ॥ उत्तरकुरुदेशाच्या ठायीं । शीतोष्णबाधा न बाधी पाहीं । जरा रोग शीक नाहीं । नाहीं ते ठायीं तस्कर ॥ ७५ ॥ त्या त्या देशांमाजी जाण । सीतासमवेत रावण । अवश्य शोधावा आपण । सावधान समस्तीं ॥ ७६ ॥ मेरु मांदार सोम हेमाद्री । भृंग तुंग भ्रमरगिरी । क्रौंच कालिंजर यांवरी । सीता सुंदरी शोधावी ॥ ७७ ॥ सुगंध सुरभि पीत पलाक्ष । देवदारु तरु तरक्ष । भूर्जपत्र वल्कलवृक्ष । सीता समक्ष शोधावी ॥ ७८ ॥ गंगा यमुना सरस्वती । तमसा कौशिकी गोमती । प्रयागतीर्थमहाराजख्याती । तेथ सीता सती शोधावी ॥ ७९ ॥ मानसरोवराचे ठायीं । जे जन्मली निजप्रवाहीं । शरयू तिचें नाम पाहीं । सीता ते ठायीं शोधावी ॥ ८० ॥ नारायणाचें निजमंदिर । बदरिकाश्रम अति पवित्र । पंचप्रयागादि केदार । सीता सुंदर शोधावी ॥ ८१ ॥ कनकगिरिशिखरीं देख । कृत्तिकागर्भीं स्वामी कार्तिक[5] । शरविल्वीचें वीर्योदक । जन्म षण्मुख पावला ॥ ८२ ॥ ते पर्वतीं अति एकान्त । रावण सीतासमवेत । शोधूनि पहावा निश्चित । तुम्हीं समस्त मिळोनी ॥ ८३ ॥ मानस सरोवराचा प्रांत । मेरुपाठारीं अति शोभित । सीता शोधावी तेथ तेथ । तुम्ही बळवंत वानर ॥ ८४ ॥ तेथोनि पुढें हिमाचळ । वाट न चले हिमकल्लोळ[6] । तेथोनि परतावें तत्काळ । हिमें प्रबळ पीडाल ॥ ८५ ॥

१ या नांवाचा दैत्य. २ विष्णूच्या हातांतील शंखाचें नांव, ३ देवांना व असुरांनाही अजिंक्य. ४ जीवंत.

५ कार्तिकस्वामी, ६ अत्यंत थंडी.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

तारांगदाभ्यां सहितः प्लवंगः पवनात्मजः ।
अगस्तिसेवितामाशां प्रतस्थे हनुमान् कपिः ॥ ९ ॥

अंगद युवराज कुमर । नळ नीळ जांबवंत दुर्धर । दक्षिण शोधावया सत्वर । हनुमान वीर चालिला ॥ ८६ ॥ दक्षिण शोधावयाचे अर्थी । सुग्रीव सांगे तयांप्रती । किती पर्वत देश किती । शोधित स्थिती अवधारा ॥ ८७ ॥ विंध्याद्रि सिंहाद्रि मलयाद्री । मतंग श्रीशैल अंतरगिरी । आणि वेंकटाद्री चंद्रगिरी । सीता महेंद्रीं शोधावी ॥ ८८ ॥ नर्मदा तपती गोदावरी । कृष्णा वेण्या मलप्रहारी । पातालगंगेच्या प्रसरीं । सीता सुंदरी शोधावी ॥ ८९ ॥ अहोबळ महोबळ धूतशंकरीं । पांडुरंगमहाक्षेत्रीं । वेणुनाद भीमातीरीं । सीता सुंदरी शोधावी ॥ ९० ॥ प्रतीची मैना ताम्रपर्णी । कृतमाला पयस्विनी । उभयकावेरी श्रीरंगस्थानीं । श्रीरामपत्नी शोधावी ॥ ९१ ॥ अगस्त्याश्रम कन्याकुमारी । मत्स्यतीर्थ चिदंबरी । कर्दळीवन मंगळागौरी । सीता सुंदरी शोधावी ॥ ९२ ॥ कर्णाटक तेलंगत्रिगुळांतरीं । ओढ्यामल्याळ पंचभर्तारीं । चोरमंडळामाझारी । सीता सुंदरी शोधावी ॥ ९३ ॥ पांचाळ देश मथुरामान । अति रमणीय कुमुदवन । चंद्रहास्य गुप्तार्जुन । सीता शोधून पहावी ॥ ९४ ॥ अहोबळाद्रि नृसिंहस्थान । चौक मथुरा दारुकवन । अनंतशयन कुंभकोण । श्रीरंगपट्टण शोधावें ॥ ९५ ॥ तेथोनि पुढें लंकापुर । राक्षस वसती महशूर । आडवा दुस्तर सागर । जावों वानर न शकती ॥ ९६ ॥ दक्षिणे सीताप्राप्तिस्थान । म्यां सांगीतलें स्थूळमान । तुम्हीं अवघे बळवाहन । सीता शोधून आणावी ॥ ९७ ॥ नळ नीळ प्राज्ञ जांबुवंत । आतुर्बळी वीर हनुमंत । अंगद राजसुत तुम्हांआंत । सीताशुद्ध्यर्थ साधावया ॥ ९८ ॥ सीताशुद्धी आणिल्या देख । माझे श्रीरामीं सरैतें सुख । तेणें श्रीरामा अति संतोषसुख । हें आवश्यक साधावें ॥ ९९ ॥ पालवै पसरोनि तुम्हांसी । मी मागतों अवघियांसी । आणोनि सीतेच्या शुद्धीसी । श्रीरामासी सुख द्यावें ॥ १०० ॥ सुखी केलिया श्रीरघुनाथा । परम सुख आम्हां समस्तां । सीताशुद्धीसी शीघ्रता । वदे वरदार्थी सुग्रीव ॥ १ ॥

यो मां निवृत्तो मासांते दृष्टा सीतेति वक्ष्यति ।
मम तुल्यफलं राज्यं संप्राप्तश्च भविष्यति ॥ १० ॥
एवमेतद्विचेतव्यं भवद्भिर्वानरोत्तमैः ।
तदुग्रशासनं भर्तुर्विज्ञाय हरिपुंगवाः ॥ ११ ॥

तुम्हांमधून भलता । यथार्थशुद्धि सांगे सीता । मजसमान राज्यसत्ता । नृपपूज्यता मी देईन ॥ २ ॥ मुगुट कुंडलें कटिसूत्र । कंठीं पदक विचित्र हार । श्वेतच्छत्र युग्मचामर । राज्यधर करीन मी ॥ ३ ॥ सीताशुद्धि जो सांगता । परम आप्त श्रीरघुनाथा । भुक्तिमुक्तींचा तो दाता । एकात्मता आलिंगी ॥ ४ ॥ अंतरीं आलिंगी एकात्मता । बाह्य स्थापी देवभक्तता । राज्यवैभव नित्यमुक्तता । शुद्धि सांगतां हे प्राप्ती ॥ ५ ॥ सीताशुद्धीच्या यथार्थी । प्राण्या आहे परम प्राप्ती । माझेनि भुक्ती श्रीरामें मुक्ती । जाणा निश्चितीं समग्र ॥ ६ ॥ सीताशुद्धीचे यथार्थी । भुक्ति मुक्ति परम गती । संतोषोनि दे श्रीरघुपती । येवढी प्राप्ती शुद्ध्यर्थी ॥ ७ ॥ ऐसें बोलतां सुग्रीवासीं । उल्लास आला वानरांसी । शुद्धिमर्यादा कैसी कैसी । आम्हांपासीं सांगावी ॥ ८ ॥ सुग्रीव सांगे आपण । म्यां सांगितलें जें जें स्थान । तें तें शोधूनि सावधान । यावें आपण मासें एकें ॥ ९ ॥ जो राहील मासावरता । त्यासी मी दंडीन तत्त्वतां । त्याच्या करीन जीवघाता । दंडनवार्ता ते ऐका ॥ ११० ॥ श्रीरामभजनीं विलंबन । विषयीं लोलुप्त संपूर्ण । त्याचे मस्तका मूत्रें वपन । काळें वदन पैं त्याचें ॥ ११ ॥ उपानहमाळा पूर्ण । त्यासी करीन रासभारोहण । गोमयसुमनीं वर्षती जन । देहदंडन विलंबिया ॥ १२ ॥ श्रीरामभजनीं करितां आळस । ऐसा पावाल सायास । यालागीं धरोनि आयास । रामकार्यास निघावें ॥ १३ ॥ ऐकोनि सुग्रीवाचें वचन । वानरीं केलें शीघ्र गमन । स्वस्वदिशेप्रती वानरगण । गिरा गर्जोन निघाले ॥ १४ ॥

स्वां स्वां दिशमभिप्रेत्य त्वरिताः संप्रतस्थिरे ।
नदंतश्चोन्नदंतश्च गर्जंतश्च प्लवंगमाः ॥ १२ ॥

---

१ समीपप्रदेशीं. २ प्रसिद्ध. ३ मान्य. ४ पदर. ५ जोड्यांच्या रांगा. ६ गाढवावर बसवणें. ७ शेणाच्या फुलांनीं. ८ प्रयत्न.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

प्रतिज्ञांचक्रिरे वीराः प्लवंगास्ते महौजसः ।
आनयिष्यामहे सीतां हनिष्यामश्च रावणम् ॥ १३ ॥
अहमेको हनिष्यामि प्राप्तं रावणमाहवे ।
ततश्चोन्मथ्य सहसा हरिष्ये जनकात्मजाम् ॥ १४ ॥

ऐकोनि सुग्रीववचन । वानरीं केलें नंदन । स्वास्वा दिशांप्रति गमन । गिरा गर्जोन निघाले ॥ १५ ॥ वानरीं केला भुभुःकार । दुमदुमिलें चराचर । प्रतिज्ञा बोलती वीर । दशशिरग्रहणार्थ ॥१६॥ कळिकाळाचें तोंड फोडून । आम्ही जानकी आणूं हिरोन । रावण बापुडें तें कोण । देखिल्या प्राण घेवोनि ॥ १७ ॥ एक प्रतिज्ञा बोले पूर्ण । युद्धीं मिळाल्या रावण । जेंवी गज विभांडी पंचानन । तेंवी दशानन आणीन ॥ १८ ॥ एक प्रतिज्ञा बोले वानर । युद्धीं मिनल्या दशशिर । जेंवी मूषक धरी मार्जार । तेंवी दशवक्त्र आणीन ॥ १९ ॥ एकाची प्रतिज्ञा दारुण । जेंवी पारधी बांधी हरिण । तेंवी बांधोनि रावण । येथें आणीन श्रीरामा ॥ १२० ॥ जेंवी चिडीमार आपण । चिंचांत चिडी धरी जाण । तेंवी चिंचात रावण । येथें आणीन सीतेसीं ॥ २१ ॥ जेंवी गळीं गिळिजे मासा । तेंवी पुच्छीं बांधोनि लंकेशा । येथें आणीन राघवेशा । माझा भरंवसा तुम्ही माना ॥ २२ ॥ जेंवी पारध्याचें श्वान । आणीच गळां बांधोन । तेंवी आणीन दशानन । सत्य वचन श्रीरामा ॥ २३ ॥ जेंवी हुरड्याचें लोंबट । बळें रगडी कुणबट । तेंवी रावणाचे दाही कंठ । निमटोनि यथेष्ट आणीन ॥ २४ ॥ ऐसी नानापरी प्रतिज्ञा करिती । रावण धरूनि मारूं म्हणती । हें ऐकोनि श्रीरघुपती । परम चित्तीं आनंद ॥ २५ ॥ ऐकोनि वानरांचें वचन । श्रीराम हांसे खदखदून । लक्ष्मण हांसे हे गिरा गर्जून । बळवाहन वानर ॥ २६ ॥ वंदोनि श्रीरामाचे चरण । सीताशुद्धीलागीं जाण । वानरीं केलें उड्डाण । चालिले गगन व्यापूनी ॥ २७ ॥ जेंवी शलभ आकाशीं । तेंवी वानर चौपासीं । धांविन्नले दशदिशांसी । सीताशुद्धीसी साधावया ॥ २८ ॥ दक्षिण शोधावया सत्वर । अंगद चालिला महावीर । सवें वानर अति दुर्धर । सहपरिवार निघाला ॥ २९ ॥ हनुमंत विनवी अंगदासी । पुसों चुकलों श्रीरामासी । वेगीं वंदोनियां त्यासी । मी तुजपासीं येईन ॥ १३० ॥ सीताशुद्धी वानरगमन । तें देखोनि रघुनंदन । सुग्रीवा दिधलें आलिंगन । सुखसंपन्न सौमित्र ॥ ३१ ॥ देखोनि वानरांचें गमन । सुखी श्रीराम लक्ष्मण । एका जनार्दना शरण । हनुमंतकथन अवधारा ॥ ३२ ॥ एकान्त हनुमंत येऊन । पुसेल सीतेचें निजलक्षण । सीतावस्तीचें महिमान । रघुनंदन सांगेल ॥ ३३ ॥ एका जनार्दनीं विनती । किष्किंधाकांडाच्या अनुवृत्तीं । हनुमंताची उद्भट ख्याती । सावधान श्रोतीं परिसावी ॥ ३४ ॥ हनुमंतचरित्र आहे बहुत । परी मी अल्पमतीनें सांगत । कथा सांगविता श्रीरघुनाथ । परिपूर्ण करिता जनार्दन ॥ ३५ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे किष्किंधाकांडे एकाकारटीकायां सीताशुद्धिवानरप्रेषणं नाम द्वादशोऽध्यायः ॥ १२ ॥ ओंव्या ॥ १३५ ॥ श्लोक ॥ १४ ॥

१ गर्जना. २ आपापल्या. ३ सिंह. ४ चिमणी मारणारा. ५ च्रीं च्रीं शब्द करीत. ६ कुत्रें. ७ टोळ.

अध्याय तेरावा

श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ॥ सीताशुद्धीस गेले वानर । दक्षिणेसी अंगद वीर । निघाले जी सहपरिवार । वानरवीरसमवेत ॥ १ ॥

सह ताराङ्गदाभ्यां तु प्रस्थितो हनुमान् कपिः ।
सुग्रीवेण यथोद्दिष्टं तं तु देशं दुरासदम् ॥ १ ॥

सुग्रीवें बोलावोनि हनुमंत । हातीं दिधला वालिसुत । सीताशुद्धीं रामकार्यार्थ । तुझेनि निजविजयी ॥ २ ॥ अंगद वीर अति विख्यात । सवें नळ नीळ जांबुवंत । वानरवीर असंख्यात । दुर्धर पंथ दक्षिणे ॥ ३ ॥ सिद्धि न्यावया रामकार्यार्थी । शुद्धि साधावया सीता । मुखरण करोनि हनुमंता । होय धाडिता सुग्रीव ॥ ४ ॥ सीताशुद्धि माझे माथां । सुग्रीवें ठेविली तत्त्वतां । तेणें उल्लास हनुमंता । श्रीरामकांता शोधावया ॥ ५ ॥ कैसी आहे पां ते सीता । गुणलक्ष्मणस्वरूपता । समूळीं पुसोन श्रीरघुनाथा । वनीं गिंवसितां ओळखाया ॥ ६ ॥ सद्गुरुमुखें सद्भावें । स्वरूपनिश्चय न करवे । तरी ते वस्तुप्राप्ति न होय । व्यर्थ भोंवे वनवासीं ॥ ७ ॥ स्वरूपनिश्चयो न

८ संदर्भानें. ९ वालिपुत्र अंगद. १० सीतेचा शोध लागावा म्हणून. ११ पुढारी, मुख्य.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

करितां । वानर पाहूं गेले सीता । त्यांसी न लभे ते सर्वथा । येतील आतां परतोनी ॥ ८ ॥ स्वरूपनिश्चय झाल्याविण । वस्तुप्राप्ति नव्हे जाण । हीन दीन खालती मान । येती परतोन अवघेही ॥ ९ ॥ वस्तुप्राप्तीविण देख । परते त्याचें काळें मुख । देव पितर त्या विमुख । एक एक त्या हांसती ॥ १० ॥ तैसें न करावें आपण । निश्चय करोनि संपूर्ण । सर्वभूतीं सावधान । सीताचिद्रत्न शोधावें ॥ ११ ॥ ऐसें धरोनि मानसीं । हनुमंत पुसे अंगदासी । नमस्कारोनि श्रीरामासी । शीघ्र तुजपासीं येईन ॥ १२ ॥ सुग्रीवें तुज सवें धाडितां । हर्षे ओसंडला चित्ता । पुसों विसरलों श्रीरघुनाथा । वंदोन आतां येईन ॥ १३ ॥ ऐकोनि हनुमंताचें वचन । अंगदें घातलें लोटांगण । नमस्कारोनि श्रीरामचरण । शीघ्र आपण येथें यावें ॥ १४ ॥ तुझेनि पिता वाळी निर्मुक्त । तुझेनि सुग्रीव सनाथ । तुझेनि आम्हां श्रीरघुनाथ । स्वामी संतत लाधला ॥ १५ ॥ तुझेनि श्रीरामदर्शन । तुझेनि वानरां भवतरण । तुझेनि सुग्रीवराज्यासन । तुझें महिमान अगाध ॥ १६ ॥ तूं स्वामी आम्हां दास्य । तूं माउली आम्ही पोष्यें । तूं सद्गुरु आम्ही शिष्य । सत्य भाष हे माझी ॥ १७ ॥ ऐसें असोनि तत्त्वतां । सेवक म्हणविसी हनुमंता । ऐसी तुझी अगाधता । वेदशास्त्रार्थी अगम्य ॥ १८ ॥ ऐकोनि अंगदाचें वचन । नळ नीळ जांबुवंत तारानंदन । अवघे घालिती लोटांगण । नमूनि चरण हनुमंताचे ॥ १९ ॥ धन्य धन्य अंगदा तुझी वाणी । धन्य अंगदा तुझी जननी । धन्य धन्य तुझी करणी । वानरसैन्यीं तूं धन्य ॥ २० ॥ ऐसे वानर समस्त । अंगदाचे गुण वर्णित । हनुमंतासी शरणागत । अभिवंदित दोघांसी ॥ २१ ॥ कुमार आणि विवेकता । राजा आणि विनीतता । यथार्थवादें रसाळ वक्ता । तेणें हनुमंता आल्हाद ॥ २२ ॥ चुंबोनि अंगदाचें वदन । हर्षें दिधलें आलिंगन । दोघां सुखसमाधान । आनंदघन श्रीराम ॥ २३ ॥ गहन गंभीर हनुमंत । आपला निजनिश्चितार्थ । कळों नेदीच लोकांत । पुसे गुह्यार्थ श्रीरामा ॥ २४ ॥ मग पुसोनि अंगदासी । हनुमंत आला श्रीरामापासीं । बैसोनियां एकांतासीं । सीता त्यापासीं पुसतसे ॥ २५ ॥ गवेषितां दक्षिणेसीं । सीता भेटल्या आम्हांसी । आम्हीं ओळखावी कैसी । तिच्या स्वरूपासी मज सांगें ॥ २६ ॥ रूपरेखा ठाणमाण । गुणगरिमा लक्षलावण्य । वस्ति स्थिति गति महिमान । कृपा करोनि मज सांगा ॥ २७ ॥ ऐकोनि हनुमंताचें वचन । संतोषला श्रीरघुनंदन । निजशक्तीचें महिमान । निजलक्षण सांगत ॥ २८ ॥ ऐक बापा हनुमंता । पुसों आलासी एकांता । मज तुज नाहीं भिन्नता । यथार्थ सीता सांगेन ॥ २९ ॥ माझें स्वरूप चैतन्यघन । सीता चिच्छक्ति संपूर्ण । सीतेसीं मज वेगळेपण । अणुप्रमाण असेना ॥ ३० ॥ श्रीराम गोडी सीता साकर । श्रीराम रस सीता नीर । श्रीराम घृत सीता क्षीर । चिदचिन्मात्र श्रीरामसीता ॥ ३१ ॥ मेळवितां द्रव्यांतर । अग्नि भासे द्रव्याकार । तेंवी सीता चिन्मात्र । दिसे साकार विश्वरूप ॥ ३२ ॥ नाबदेचे नारळ पूर्ण । कवटें काढी तो करंटा जाण । तेंवी सीता सच्चिद्घन । मनुष्यपण तीस नाहीं ॥ ३३ ॥ नारळ सर्वांगीं साकर । सीता चैतन्य साकार । तिचा इंद्रियव्यापार । चिदचिन्मात्रस्वभावें ॥ ३४ ॥ अर्धनारीनटेश्वर । दों स्वरूपीं एक शरीर । तेंवी सीता श्रीरामचंद्र । अभिन्नाकार भिन्नत्वें ॥ ३५ ॥ पुरुषभाग स्वयें लपवी । स्वइच्छा प्रकृतीतें नाचवी । प्रकृतिभाग जैं लपवी । प्रकटी पदवी पुरुषाची ॥ ३६ ॥ भ्रांतिपडदा सोडितां जाण । मिथ्या प्रकृतिपुरुषभान । तेंवी सीताश्रीरघुनंदन । चैतन्यघनस्वरूप ॥ ३७ ॥ असतां भ्रांतिपडदा साचार । तेथींचा हा निजनिर्धार । शोधूनियां न पाहती नर । तोचि विचार अवधारा ॥ ३८ ॥ दोहीं भागांचा व्यापार । जेंवी चालवी नटेश्वर । तेंवी सीताश्रीरामचंद्र । धरिती अवतार देवकार्या ॥ ३९ ॥ स्वपदीं स्थापावया सुरवर । भक्तां द्यावया सुख साचार । सीता आणि श्रीरामचंद्र । धरिती अवतार स्वलीला ॥ ४० ॥ अवताराच्या स्वलीळा । साकारें शोभे जनकबाळा । तिच्या स्वरूपाचा सोहळा । ऐकें कुशळा हनुमंता ॥ ४१ ॥ सीतेसी नित्य न गमनागमन । हे मुख्य ओळखावी खूण । सीतेचें अचरण चळण ।

१ प्राप्त झाला. २ पोसणीं, लेंकरें. ३ नमस्कार करीत. ४ शोधितां. ५ अंगाची ठेवण. ६ साखरेचे.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

चरणेंवीण गति तीसी ॥ ४२ ॥ द्वंद्वेंवीण पदद्वंद्व । तेंचि सीतेचें निजपद । जीवशिवपणाचा उच्छेद । तो पदबंध सीतेचा ॥ ४३ ॥ फडा पुच्छा वांकुडा नाग । तो नाग म्हणती सोनेंचि सांग । तेंवी गुल्फा जानू विभाग । सीतेची चांग चिन्मात्र ॥ ४४ ॥ सीतागुह्येंद्रियविचार । तिचें निजगुह्य श्रीरामचंद्र । तेथील रतिसुखाचें सार । असार-सार श्रीराम ॥ ४५ ॥ श्रीसीतेचें जें कां निजउदर । मळेंवीण निर्मळ साचार । चैतन्याग्नि वसवी जठर । तें माहेर जीवशिवां ॥ ४६ ॥ सीतेचें जें हृदयभुवन । नित्य वसवी श्रीरघुनंदन । हे मुख्य हनुमंता ओळखण । सुखसंपन्न श्रीरामें ॥ ४७ ॥ आंगींच्या अंगीं वाढोनी दोनी । जीवशिव कुच दोन्ही स्थानीं । जग जीववी स्तनपानीं । कुचकामिनी स्तनभारें ॥ ४८ ॥ जीवशिवकुचाच्छादनीं । विद्या अविद्या पांखे दोनी । बांधिले त्रिगुणांचे कंसूनी । श्रीरामावांचोनी कोण सोडी ॥ ४९ ॥ जीवशिवकुचांचें मर्दन । करिता एक श्रीरघुनंदन । येर बापुडें मशक कोण । मरेल रावण अभिलाषी ॥ ५० ॥ श्रीरामनामाचे निजमणी । गांठ्याळ फिकेचे सांडोनी । अनुस्यूत तंतु घेवोनी । अनुसंधानीं ओंविले ॥ ५१ ॥ सौभाग्यकल्याणश्रेणी । जे अतर्क्य जननयनीं । कंठीं श्रीराम आहेवमणी[३] । जो शिरोमणी अलंकार ॥ ५२ ॥ कंठावरील चिबुकां । रामश्यामें गोंदली देखा । रावण पाहतां तिचिया मुखा । श्यामशंका तो मानी ॥ ५३ ॥ जनमुखींचे अधर अधर । सीतामुखींचे ते अधर सधर । आवडी चुंबी श्रीरामचंद्र । तें सुखसार सीतेसी ॥ ५४ ॥ मुक्तपणाच्या विलासा । वनिताअधरीं सुवर्णफांसा । पडोनि मुक्त आलें नासा । रामपरेशा न भजोनी ॥ ५५ ॥ जानकीनाकींचें निजमोतीं । सहज देखे श्रीरघुपती । अधोमुखें ओळकंबती । मुक्तामुक्ती श्रीरामें ॥ ५६ ॥ जगमुखींचें नासिक । श्लेष्मागमनें पावे दुःख । जानकीमुखीं नाका विंक । चढलें देख श्रीरामें ॥ ५७ ॥ जानकीचे निजनयन । देखणेपणें सुनयन । तेणें देखणेपण जाण । श्रीराम परिपूर्ण तें देखे ॥ ५८ ॥ जानकीचे देखणे नेत्र । सांडोनियां क्षराक्षर । भूतमात्रीं देखे अक्षर । चिदचिन्मात्र श्रीराम ॥ ५९ ॥ सीतेचे जे निजश्रवण । सावधान नित्य जाण । वचनाक्षरें रघुनंदन । समाधान श्रवणार्थी ॥ ६० ॥ धन्य सीतेचें कपाळ । श्रीरामनमनें नित्य सफळ । प्रेमकुंकुम सोज्ज्वळ । सुखकल्लोळ श्रीरामें ॥ ६१ ॥ सीताहस्तक्रिया समस्त । कर्ता देखे श्रीरघुनाथ । श्रीराम हातांचाही हात । कर्मनिर्मुक्त श्रीरामें ॥ ६२ ॥ सीतासतीचे निजशिरीं । राम शिरोमणी शिरावरी । चिद्रत्नांच्या अलंकारीं । फरॅं त्यावरी शोभत ॥ ६३ ॥ गाळोनियां परम पीयूष । सोलींव सुखाचेंही निजसुख । तेणें ओतींव श्रीमुख । अलौकिक रामप्रिया ॥ ६४ ॥ जानकीचें मन सुमन । श्रीरामध्यानीं तें परिपूर्ण । मनीं मनचि निर्मन । सावधान श्रीरामें ॥ ६५ ॥ सीतेच्या चित्तीं रामचिंतन । तेणें चित्त चिंताविहीन । चित्तीं चित्त चैतन्यघन । समाधान श्रीरामें ॥ ६६ ॥ जानकीदेहींचा देहाभिमान । अहंसोहंकोहंविहीन । करितां श्रीरामनामस्मरण । अहं पूर्णपरब्रह्म ॥ ६७ ॥ समुद्रीं विरोनि लवण । स्वयें समुद्र होय आपण । तेंवी सीतेचा अभिमान । होय परिपूर्ण श्रीरामें ॥ ६८ ॥ सीतादेहींची निजबुद्धी । नाहीं प्रपंच परत्र आधी । नाहीं जन्ममरणव्याधी । नित्यसमाधि श्रीरामें ॥ ६९ ॥ जानकीच्या निजदेहीं । देहा देहत्वचि नाहीं । देहीं वर्ततां विदेही । हे खूण पाहीं नित्यत्वें ॥ ७० ॥ ऐसें सीतेचें लक्षण । ऐक आतां तिचे गुण । गुणागुणीं नित्य अगुण । स्वयें सगुण दिसताहे ॥ ७१ ॥ जानकीचें पाहतां ठाण । सर्वांसी दिसे साधारण । परी तीस ठेंगणें गगन । स्वरूपें सामान्य दिसतांही ॥ ७२ ॥ सीतेचें निजमहिमान । वेदशास्त्रां अगम्य जाण । सांगों जातां ठाणमाण । पडे मौन चहूं वाचां ॥ ७३ ॥ सीतारूपरेखागुणलक्षण । सांगितलें ठाणमाण । आतां स्थितीचें महिमान । सावधान अवधारीं ॥ ७४ ॥ सीतेची जेथ वसती घडे । तेथें राम राम स्मरती झाडें । पशुपक्षियां स्मरण घडे । पाषाण खडे राम स्मरती ॥ ७५ ॥ जानकीस्पर्शाचें जीवन । नित्य स्मरे श्रीरघुनंदन । जानकीजीवननिमग्न । त्यासी

१ घट्ट. २ अखंड. ३ मंगळसूत्रमणी. ४ हनुवटी. ५ शेंबूड येऊन. ६ तेज. ७ अलंकारविशेष. ८ मानसिक व्यथा. ९ शरीराचा बांधा. १० उदक.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

समाधान श्रीरामें ॥ ७६ ॥ सीतासतीची निजधरा । नित्य स्मरे श्रीरामचंद्रा । सीतांगस्पर्शाचा वारा । श्रीराघवेंद्रस्मरणेंसीं ॥ ७७ ॥ सीतास्वरूपवृत्तांत । आदरें सांगे श्रीरघुनाथ । तें ऐकतां हनुमंत । पडे मूर्च्छित स्वानंदें ॥ ७८ ॥ सप्रेम प्रेमयुक्त । मूर्च्छित पडिला हनुमंत । कृपें कवळी श्रीरघुनाथ । हृदयाआंत आलिंगी ॥ ७९ ॥ देतां हनुमंता आलिंगन । श्रीरामा नाठवे रामपण । मारुतीसी नाठवे वानरपण । ब्रह्म परिपूर्ण स्वयें जाला ॥ ८० ॥ विरोनि गेलें मीतूंपण । खुंटले बोल तुटलें मौन । दोघे जाले चैतन्यघन । वस्तु परिपूर्ण परिपूर्णत्वें ॥ ८१ ॥ सीतेचें स्वरूप सांगतां । धणी न पुरे श्रीरघुनाथा । धन्य धन्य श्रीरामकांता । तेणें हनुमंता उल्लास ॥ ८२ ॥ तुम्हीं सीताशुद्धि करितां । या खुणा पहाव्या हनुमंता । ऐसें श्रीरामें सांगतां । मारुतिचित्ता आल्हाद ॥ ८३ ॥ हनुमंत म्हणे श्रीरघुनाथा । इहीं लक्षणीं लक्षितां । मी जाणेन जनकदुहिता । सीता सर्वथा मज नेणे ॥ ८४ ॥ पूर्वीं मज नाहीं देखिलें । पूर्वीं मज नाहीं ऐकिलें । अकस्मात रामें धाडिलें । सत्यत्वें बोल मानीना ॥ ८५ ॥ ऐसाचि रावण कपटी । संन्यासवेषें घेऊनि भेटी । मज सिंतरिलें भिक्षेसाठीं । त्याचि परिपाटीं वानरू ॥ ८६ ॥ श्रीरामाच्या गोड गोष्टी । शुद्धि सांगतो गोमटी । परी हा वानर कपटी । विश्वास पोटीं मानीना ॥ ८७ ॥ जेथें विश्वास नाहीं पोटीं । तेथें जालिया व्यर्थ भेटी । भावार्थाच्या गुह्य गोष्टी । सीता गोरटी सांगेना ॥ ८८ ॥ नाहीं भेटी नाहीं गोष्टी । दुरोनि सीता देखिली दृष्टीं । ऐसिये शुद्धीचे परिपाटीं । तृणासाटीं सरेना ॥ ८९ ॥ सीतामनोगत सकळ । सीता वसती तें कोण स्थळ । रावणाचें किती बळ । तें मी सकळ शोधीन ॥ ९० ॥ ऐसें मनोगत श्रीरघुनाथा । जेणें मज आप्त मानील सीता । ऐसिया देखावें कार्यार्था । चरणीं माथा ठेविला ॥ ९१ ॥ ऐसें बोलतां हनुमंता । परम सुख श्रीरघुनाथा । निजात्ममुद्रा होय देता । ठेवोनि माथां वरदहस्त ॥ ९२ ॥

ददौ तस्मै ततः प्रीतः स्वनामांकोपशोभितम् ।
अंगुलीयमभिज्ञानं राजपुत्र्या परंतपः ॥ २ ॥

एतद्दृष्ट्वा हरिश्रेष्ठो दर्शने जनकात्मजा ।
मंस्यते मन्नियुक्तं त्वां लाघवं न करिष्यति ॥ ३ ॥

मुद्रिका देखिलिया दृष्टीं । सीता तुज न मानी कपटी । म्यां धाडिलासी शुद्धीसाठीं । सत्य गोरटी मानील ॥ ९३ ॥ श्रीरामनामांकित मुद्रा । देखतांचि सीता सुंदरा । आप्त मानील कपींद्रा । श्रीरामचंद्राचेनि धर्में ॥ ९४ ॥ मुद्रा देखोनि नामांकित । जीवाहूनियां परम आप्त । सीता मानील हनुमंत । रामकार्यार्थ साधील ॥ ९५ ॥ आधींच वानर बळवंत । त्यावरी मस्तकीं श्रीरामहस्त । श्रीराममुद्रा जाली प्राप्त । उल्लासत हनुमंत ॥ ९६ ॥ घेईन त्रिभुवनीं घरधांडोळी । शोधोनियां जनकबाळी । करीन राक्षसां खंदळी । हर्षें टाळी पिटिली ॥ ९७ ॥ श्रीराममुद्रा आली हाता । लंका जाळीन मी आतां । किती बळ लंकानाथा । तेंही सर्वथा तुकीन ॥ ९८ ॥ इंद्रजित बळी निशाचरी । त्यासीं मी करीन संग्राम थोरी । रावणा करीन थोर मारी । करीन बोहरी राक्षसां ॥ ९९ ॥ येणें हर्षें हनुमंत । नमस्कारूनि श्रीरघुनाथ । वेगीं उडाला गगनांत । रामकार्यार्थ साधावया ॥ १०० ॥ श्रीराममुद्रा घालितां हातीं । उडतां गळोनि पडेल क्षितीं । वस्त्र नाहीं मारुतीप्रती । पालवाप्रती बांधावया ॥ १ ॥ गांठींत घालितां गांठ्याळ । विकल्प मानी तो सख्याळ । आळ करी तो खट्याळ । जाण चांडाळ नाठवी तो ॥ २ ॥ नाम नावडे जयासी । तो जाणावा पापराशी । सकळ दोष तयापासीं । क्षयो त्यासी आकल्प ॥ ३ ॥ रामनाम न माने जयासी । अर्थवाद म्हणे नामासी । जितांचि प्रेतत्व त्यासी । स्पर्शों नये तयाला ॥ ४ ॥ धन्य युक्ति त्या कपींद्रा । हाता येतां श्रीराममुद्रा । मुखीं घालोनि वानरेंद्रा । केला थारा निजहृदयीं ॥ ५ ॥ वानराचें ठेवणें । गालफडां भरावे चणे । हनुमंतेंही तैसेंचि करणें । मुखीं घालणें श्रीराममुद्रा ॥ ६ ॥ जिव्हेपासूनि हृदयभुवन । नाममुद्रे सांठवण । हनुमंतें करोनि उड्डाण । शीघ्र गमन रामकार्या ॥ ७ ॥ नळ नीळ जांबवंत । जेथें अंगद वाट पाहत । तेथें आला हनुमंत । सीताशुद्ध्यर्थ शोधावया ॥ ८ ॥ आला देखोनि हनुमंत । अंगद जाला हर्षयुक्त । वानरां आल्हाद बहुत । दक्षिण-

१ तृप्ति. २ फसविलें. ३ घरांचा शोध, झडती. ४ नाश. ५ तोलून पाहीन. ६ पृथ्वीवर. ७ सीतेचा शोध लावण्याकरितां.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

पंथ शोधावया ॥ ९ ॥ एका जनार्दना शरण । शोधावया दिशा दक्षिण । वानरवीरां उल्लास पूर्ण । तेंही निरूपण अवधारा ॥ ११० ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे किष्किंधाकांडे एकाकारटीकायां श्रीरामहनुमत्संवादो नाम त्रयोदशोऽध्यायः ॥ १३ ॥ ओंव्या ॥ ११० ॥ श्लोक ॥ ३ ॥ श्रीरामचंद्रार्पणमस्तु ॥

अध्याय चौदावा

श्रीरामचंद्राय नमः ॥ पूर्व पश्चिम वायव्य ईशान्य । उत्तर नैर्ऋत्य आग्नेयकोण । पाताळदिशा स्वर्गभुवन । आले शोधून वानर ॥ १ ॥

तदहः प्रथमं कृत्वा मासे प्रस्रवणं गताः ।
कपिराजेन संगम्य निराशाः कपिकुंजराः ॥ १ ॥
समेत्य मासे संपूर्णे सुग्रीवमुपचक्रमुः ।
तं प्रस्रवणपृष्ठस्थमभिगम्याभिवाद्य च ।
सुग्रीवं प्लवगाः सर्वे सुषेणप्रमुखा ब्रुवन् ॥ २ ॥

राया सुग्रीवाचें आज्ञापन । मासें एकें संपूर्ण । अवघीं यावें सीता शोधून । न येतां दारुण राजदंड ॥ २ ॥ प्रस्रवण गिरिवरें[१] । तेथें वसे श्रीरामचंद्र । तयापासीं सुग्रीव वीर । नित्य तत्पर सेवेसी ॥ ३ ॥ श्रीराम पुसे सुग्रीवासी । वानर गेले दशदिशीं । कोणी नाहीं आला शुद्धीसीं । विलंब त्यांसी कां जाला ॥ ४ ॥ ऐसे करीत जंव विचार । सुग्रीवराजाज्ञा अति दुर्धर[२] । तेणें भयें वानरवीर । आले समग्र एकमासांतीं ॥ ५ ॥ शुद्धी न लभेचि साचार । अति सलज्ज वानरवीर । न येती श्रीरामासमोर । करिती नमस्कार सुग्रीवा ॥ ६ ॥ प्रतिज्ञा करोनि केलें नमन । शेखीं[३] आलों शुद्धीविण । लॅाजा[४] न बोलवे वचन । अधोवदन[५] तटस्थ ॥ ७ ॥ तटस्थ देखोनि वानरवीर । वालिसुग्रीवांचा श्वशुर । पुढें होवोनि सुषेण वीर । सांगे विचार शुद्धीचा ॥ ८ ॥

विचिताः पर्वताः सर्वे वनानि गहनानि च ।
गुहाश्च विचिताः सर्वा यास्त्वया परिकीर्तिताः ॥ ३ ॥
निम्नगाः सागरांताश्च सर्वे जनपदास्तथा ।
सत्वान्यतिप्रमाणानि विचितानि हतानि च ॥ ४ ॥
गहनेषु च देशेषु दुर्गेषु विषमेषु च ।
ये चैव गहना देशा विचितास्ते पुनः पुनः ॥ ५ ॥
विचिताश्च महागुल्मलताविततसंतताः ।
राक्षसा मानवाश्चैव तत्र तत्र प्लवंगमाः ॥ ६ ॥
ये चैव गहना देशा विचितास्ते पुनःपुनः ।
प्रवृत्तिं चैव वैदेह्या नानुविंदामहे प्रभो ॥ ७ ॥

क्षीरसमुद्र क्षारसमुद्र । दधिमधुघृतसमुद्र । सहावा तो इक्षुसमुद्र । सुरासमुद्र सातवा ॥ ९ ॥ शाल्मलिद्वीप शाकद्वीप । क्रौंचद्वीप कुशद्वीप । पुष्करद्वीप प्लक्षद्वीप । जंबुद्वीप सातवें ॥ १० ॥ अयोध्या मथुरा माया जे कां । काशी कांची अवंतिका । बळीचेनि द्वारें आलों देखा । ते द्वारका सातवी ॥ ११ ॥ दंडकारण्य खंडारण्य । चंपकारण्य वेदारण्य । नैमिषारण्य ब्रह्मारण्य । धर्मारण्य सातवें ॥ १२ ॥ सरें[८] सरितां[७] गुहा गव्हरें[८] । खेटें[९] खर्वटें[१०] ग्राम नगरें । जन विजन गिरिकंदरें । विवरें विवरें शोधिलीं ॥ १३ ॥ निंद्य अनिंद्य स्थानें । दुर्धर राक्षसांचीं भुवनें । तेथें तेथें प्रवेशणें । केलें शोधन सीतेचें ॥ १४ ॥ आळस सांडोनि वानर । आतुर्बळी महावीर । भूगोळ शोधितां समग्र । सीता सुंदर न लभेचि ॥ १५ ॥ सप्तद्वीप सप्तसागर । सप्तपुरी सप्तशिखर । सप्तारण्यें सप्तकंधर । सीता सुंदर शोधिली ॥ १६ ॥ जळ स्थळ आणि निराळ[११] । शोधूनि पाहतां जनकबाळ । शुद्धि न लभे अळुमाळ[१२] । आलों सकळ एकमासा ॥ १७ ॥ राजाज्ञा अति दुर्धर । समर्थीं न येतां विटंबु थोर । तेणें भयें आम्ही समग्र । आलों सत्वर एक मासा ॥ १८ ॥ सलज्जलज्जा वीरपंक्ती । श्रीरामासंमुख न येती । काय मुख दाखवूं तयाप्रती । सीता सती नुगमेचि ॥ १९ ॥ श्रीराम आम्हांस पुसेल सीता । आम्हीं काय सांगावी वार्ता । आम्हां वानरां समस्तां । बैसली माथां महालाज ॥ २० ॥ वानरवीरांचें मनोगत । श्रीराम जाणोनि समस्त । त्यांसी स्वयें आश्वासित । युक्तायुक्तविभागें ॥ २१ ॥ तुम्हांसी दिशा नेमिल्या आम्हीं । सीता नाहीं त्या भूमीं । कैंची शोधूनि आणावी तुम्हीं । अति आक्रमीं शोधोनि

---

१ प्रसिद्ध पर्वत. २ कडक. ३ शेवटीं. ४ लज्जेनें. ५ खालीं तोंड घालून. ६ सरोवरें. ७ नद्या. ८ मोठ्या गुहा. ९ खेडीं. १० लहान खेडीं. ११ आकाश. १२ किंचितही.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ २२ ॥ सीता नाहीं पैं तेथ । हें वचन सत्य सत्य । सत्यासी मानिजेल अनृत । रासभमत तयापासीं ॥ २३ ॥ ऐकोनि श्रीरामाचें वचन । वानरीं मस्तकीं धरिले चरण । श्रीरामें दिधलें आलिंगन । समाधान वानरां ॥ २४ ॥ साधावया श्रीरामकाज । वानरीं सोडोनियां लाज । करावया रावणासीं झुंज । नाचती भोंजें स्वानंदें ॥ २५ ॥ समयो लोटला साचार । न येती दक्षिणेचे वीर । ते शुद्धि आणितील साचार । श्रीरामचंद्र अनुवादे ॥ २६ ॥

सह तारांगदाभ्यां सः प्रस्थितो हनुमान् कपिः ।
स तु दूरमुपागम्य सर्वैस्तैर्हरिभिः सह ॥ ८ ॥

श्रीरामसुद्रा झालिया प्राप्त । वेगें निघाला हनुमंत । नळनीळादि जांबुवंत । वाट पाहत तिष्ठती ॥ २७ ॥ येरीकडे दक्षिणेसी । वानर वीर पराक्रमेंसीं । सीताशुद्धि करिती कैसी । श्रोतीं सावकाशीं अवधारिजे ॥ २८ ॥ हनुमंत येवोनियां तेथ । दक्षिणदिशेच्या शोधनार्थ । अंगद अति उल्लासयुक्त । कपींसमवेत निघाला ॥ २९ ॥ गुहा गहन गव्हरें । शैल कक्षा कुहरें । विवरें उखरें शिखरें । गिरिकंदरें शोधीत ॥ ३० ॥ खाती नानाविध फळें । सेविती नदीनिर्मळजळें । नीतीनें शोधिती स्थळें । निजबळें वानर ॥ ३१ ॥ वानरवीर अति उद्भट । अटवी शोधिती विकट । पुढें ओढवलें दुर्घट । अति संकट तें ऐका ॥ ३२ ॥

यत्र वै निष्फला वृक्षा विपुष्पाः पर्णवर्जिताः ।
निस्तोयाः सरितो यत्र मूलं यत्र सुदुर्लभम् ॥ ९ ॥
दंडो नाम महाभागः सत्यवादी तपोधनः ।
तस्य तस्मिन्वने पुत्रो बालको दशवार्षिकः ॥ १० ॥
प्रनष्टो जीवितान्ताय लब्धस्तत्र महामुनिः ।
तेनैव मुनिना शप्तं कृत्स्नं तच्च महद्वनम् ॥ ११ ॥

पुढें वन अति विकळ । वृक्ष कांखरले सकळ । नाहीं पत्र पुष्प फळमूळ । शुष्क जळ सरितांचें ॥ ३३ ॥ वनीं नाहीं मुंगी माशी । नाहीं पशुपक्षी कीटकेंसीं । सूर्य तपे निजेंदाघेंसीं । तेणें कासाविसी वानरां ॥ ३४ ॥ नाहीं फळमूळ भक्षावयासी । पाला न मिळे वानरांसी । जळ न मिळे प्राशनासी । कासाविसी वानरां ॥ ३५ ॥ त्यजावया दुष्ट त्या स्थाना । वानर करितां उड्डाणा । उडी पडे तेथींचे वना । मार्ग निर्गमनां दिसेना ॥ ३६ ॥ निर्गम न पुरे बाहेरी । क्षुधे तळमळिजे वानरीं । जळेंविण येती लहरी । उष्णेंकरीं तळमळती ॥ ३७ ॥ ऐसे वानरां परम कष्ट । ओढवलें दुःख दुर्घट । बाहेर जावया न फुटे वाट । प्राणसंकट मांडलें ॥ ३८ ॥ आतां कायसी सीताशुद्धी । आम्हांसी आली प्राणांतविधी । येथें निर्गत न दिसे बुद्धी । आम्ही त्रिशुद्धी निमालों ॥ ३९ ॥ ये वनीं रिघतां यावें मरण । ऐसा ऋषिशाप दारुण । वानरां नित्य रामस्मरण । तेणें सप्राण वांचले ॥ ४० ॥ श्रीराम भक्तांचा सहकारी । नामें दैन्य दुःख निवारी । शापोपदग्धवनांतरीं । नामोच्चारीं वांचले ॥ ४१ ॥ त्या वनाचा समूळ वृत्तान्त । वानरां सांगे हनुमंत । दंडऋषीचें वन शापयुक्त । निर्गम येथ असेना ॥ ४२ ॥ ऐसा शाप अति दारुण । द्यावयासी काय कारण । त्या शापाचें समूळ लक्षण । सांगे आपण हनुमंत ॥ ४३ ॥ दंडऋषीचा निजसुत । दशवर्षी प्रज्ञावंत । वनदैवतीं करोनि घात । मांस समस्त भक्षिलें ॥ ४४ ॥ त्याचें अस्थिचर्म जाण । पशुपक्षीं केलें भक्षण । ऋषीनें जाणोनियां ज्ञान । शाप दारुण दीधला ॥ ४५ ॥ दुर्धर शापें जाणा येथ । हें वन जालेंसे उपहत । जो प्राणी ये या वनांत । त्यासी प्राणान्त ऋषिशापें ॥ ४६ ॥ विद्यासंपन्न ऋषिसुत । वेदशास्त्रार्थी अति उन्मत्त । वादीं ब्राह्मणां निर्भर्त्सित । यालागीं घात भूतीं केला ॥ ४७ ॥ जो वादी ब्राह्मणां देत त्रास । तो जातीचा ब्रह्मराक्षस । त्याचा देह तो भूतग्रास । यालागीं नाश भूतीं केला ॥ ४८ ॥ ऐकतां हनुमंताची मात । वानरां झाला अति आकांत । सवेंचि दुसरा अनर्थ । त्या वनांत ओढवला ॥ ४९ ॥ त्या ऋषीचा निजसुत । ब्रह्मराक्षसत्व त्यासी प्राप्त । तो राहोनियां त्या वनांत । स्वयें भक्षीत प्राणिमात्रां ॥ ५० ॥

१ खोटें. २ सुखानें. ३ बोलला. ४ ऐकावें. ५ संचारस्थानें. ६ बिळें. ७ माळजमिनी. ८ पराक्रमी. ९ अरण्य. १० वाकून गेले. ११ आपल्या उष्णतेनें. १२ सुटका. १३ मरणकाळ. १४ खरोखर. १५ शापानें जळलेल्या रानांत. १६ दहा वर्षांचा. १७ ओसाड. १८ भूतांचें भक्ष्य.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

ददृशुस्ते महाकायमसुरं भीमकर्मणा ।
सहितान् वानरान् सर्वांस्तिष्ठ तिष्ठेति चाब्रवीत् ॥१२॥
तमापतंतं सहसा वालिपुत्रोऽगदस्तदा ।
रावणोऽयमिति ज्ञात्वा तलेनाभिजघान ह ॥ १३ ॥
स वालिपुत्राभिहतो मुखाच्छोणितमुद्वमन् ।
असुरो न्यपतद्भूमौ पर्यस्त इव पर्वतः ॥ १४ ॥

विकळ देखोनियां वानर । स्वयें भक्षावया समग्र । वेगीं धांविन्नला निशाचर । गिरागजर गर्जोनी ॥ ५१ ॥ अग्निकुंड जैंवी सोज्ज्वळें । तैसे आरक्त दोनी डोळे । वानर गिळावया सगळे । धांवे आंवाळें चाटीत ॥५२॥ येतां देखोनि राक्षसासी । वानर चालिले युद्धासी । अंगदें उडोनि आवेशीं । तळहातेंसीं ठोकिला ॥५३॥ अंगद म्हणे पैं आपण । हा राक्षस होय रावण । बळें हाणोनि चडकण । घायें प्राण घेतला ॥ ५४ ॥ घाय हाणितां निष्ठुर । नाकीं तोंडीं वमूनि रुधिर । अचेतन पर्वताकार । निशाचर पडियेला ॥ ५५ ॥ श्रीरामभक्तांच्या हातीं । ब्रह्मराक्षसा जाली मुक्ती । ऋषि सुखावोनि चित्तीं । शापनिर्मुक्ति वना केली ॥ ५६ ॥ वानरांचें वनप्रवेशन । तैं शापनिर्मुक्ति पावे वन । जेथें जेथें जाती भक्तजन । तें तें स्थान अति मुक्त ॥ ५७ ॥ रणीं पाडिला निशाचर । अंगद विजयी राजकुमर । वनीं न मिळे आहार नीर । तेणें वानर तळमळती ॥ ५८ ॥ सुग्रीवें सांगितलें ज्या रीतीं । निबरें उंखरें विपिनें क्षितीं । सीता शोधावी शतावर्तीं । नाना पर्वतीं सायासें ॥ ५९ ॥ सीताशुद्धीची निजकथा । लाग माग न लगे वार्ता । काय करावें आम्हीं आतां । चिंता समस्तां वानरां ॥ ६० ॥

गजो गवाक्षः शरभो गवयो गंधमादनः ।
मैंदश्च द्विविदश्चैव हनुमान् जांबवान्नलः ॥ १५ ॥
अंगदो युवराजश्च नीलश्च वनगोचरः ।
क्षुत्पिपासापरीतास्तु श्रांताश्च सलिलार्थिनः ॥ १६ ॥

गज गवाक्ष गवययुक्त । शरभ गंधमादन विख्यात । मैंद द्विविद जांबवंत । बीर हनुमंत नळ नीळ ॥६१॥ अंगद युवराज आपण । क्षुधेनें जावों पाहे प्राण । तृषा फुटलें अंतःकरण । आलें मरण वानरां ॥ ६२ ॥ वानरवीर अति विख्यात । पाला न मिळे आहारार्थ । क्षुधा तृषा परमोदित । मग प्रार्थित हनुमंता ॥ ६३ ॥ अवघे म्हणती हनुमंता । आम्ही शरण आलों आतां । शरणागतां आम्हां समस्तां । प्राणदाता तूं होईं ॥ ६४ ॥ आमचे वांचवावया प्राण । तुझे अंगीं सामर्थ्य पूर्ण । तुज देवांचें वरदान । जीवदान दे आम्हां ॥ ६५ ॥ वानरवीर ऐशिया रीतीं । पीडिले येती काकुळती । त्यांसी वांचवावयाचे अर्थीं । वनीं मारुति निरीक्षी ॥ ६६ ॥

ततः पर्वतसंकाशो हनुमान् वानरर्षभः ।
अवलोक्य वनं सर्वं संपश्यत्स्थिरचक्षुषा ॥ १७ ॥
निरीक्षमाणो ददृशे वृक्षाः स्निग्धाः समंततः ।
अब्रवीद्वानरान् सर्वान् कांतारवनकोविदाः ॥ १८ ॥
नूनं सलिलवानत्र भविष्यति महाह्रदः ।
बिलादस्मात्सुनिष्क्रांता हंसाःसारसवञ्जुलाः ॥१९॥
जलार्द्राश्चक्रवाकाश्च निष्क्रांताश्च सहस्रशः ॥ २० ॥

वन निरीक्षी हनुमंत । विवर देखे तंव त्या वनांत । वृक्षजाळीमाजी गुप्त । जळपक्षी तेथ रिघतां देखे ॥ ६७ ॥ क्षुधे तृषे अत्यंत क्षीण । त्या वानरां सांगे आपण । येथें आहे जलस्थान । सावधान तुम्ही पहा ॥ ६८ ॥ चंचूं[12] धरोनियां फळें । आंतून निघती पक्षिकुळें । हंस सारस बक वंजुळें[13] । निघती समेळें चक्रवाकें ॥ ६९ ॥ मत्स्य धरोनि मुखासीं । ढोंकें[13] निघती विवरप्रदेशीं । फळ जळ आहे विवरीं निश्चयेंसीं । तृप्ती तुम्हांसी मी देईन ॥ ७० ॥ आम्ही श्रीरामाचे भक्त । भक्तां संरक्षी श्रीरघुनाथ । क्षुधा केंवी करील घात । राम समर्थ तुम्हांला ॥ ७१ ॥ ऐकोनि हनुमंताची मात । वानरां आठवला श्रीरघुनाथ । श्रम गेला निमेषार्धांत । विवरार्थ पाहूं आले ॥ ७२ ॥ चंचूं धरोनियां फळें । असंख्य निघताती पक्षिकुळें । देखोनि वानरांचे पाळे[15] । सुखसमेळें हरिखले ॥७३॥ वानर बोलती विस्मित । धन्य धन्य देखणा हनुमंत । गुप्त विवर जाळीआंत । जळयुक्त लक्षिलें ॥ ७४ ॥ ऐसें विनविलें हनुमंता । अवघीं चरणीं ठेविला माथा । आम्हांसी जीवदाता । प्राणरक्षिता तूं आम्हां ॥ ७५ ॥ तूं तंव सर्वार्थीं अंदट[16] । तुझा

१ राक्षस. २ जिभल्या, ओष्ठप्रांत. ३ थप्पड. ४ रक्त. ५ निर्जीव. ६ उदक. ७ शुष्क. ८ पृथ्वीवर. ९ शतावर्त=स्थानविशेष. १० भूक. ११ तहान. १२ चोंचींमध्यें. १३ पक्षिविशेष. १४ बगळे. १५ समुदाय. १६ पराक्रमी.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सत्संग आम्हां श्रेष्ठ। आम्हां बाधेना संकट। तूं वरिष्ठ रक्षिता ॥ ७६ ॥ हनुमंत म्हणे वानरांजवळी। अवघे प्रवेशा ये बिळीं। तृप्ति पावोनि फळीं जळीं। जनकबाळी स्वयें शोधूं ॥ ७७ ॥

प्रविश्यात्र विचेष्यामो रावणं राक्षसाधमम्।
तां च सीतां महाभागां सर्व एव महद्बले ॥ २१ ॥
इत्युक्त्वा तद्बिले सर्वे प्रविष्टास्तिमिरावृतम्।
अचंद्रसूर्यं हरयो ददृशू रोमहर्षणम् ॥ २२ ॥
ततस्तस्मिन्बिले दुर्गे नानापादपसंवृते।
अन्योन्यं संपरिष्वज्य जग्मुर्योजनमंतरम् ॥ २३ ॥
ते नष्टसंज्ञाः संभ्रांतास्तृषिताः सलिलार्थिनः।
परिपेतुर्बिले तस्मिन् मासमेकं बुभुक्षिताः ॥ २४ ॥

तें देखोनियां विवर। गजबजिले वानरवीर। भीतरीं घडघुंग अंधार। रवि चंद्र भासेना ॥ ७८ ॥ प्रवेशतां विवराआंत। वानरां थोर भयसंकेत। पुढें चालिला हनुमंत। विवरप्रांत शोधावया ॥ ७९ ॥ येरयेरांचा धरोनि हात। वानर हनुमंता कवळीत। प्रवेशले विवराआंत। भयभीत अवधारीं ॥ ८० ॥ विवरमार्ग अति कठिण। आपणा न देखती आपण। ऐसे आंधारीं दारुण। उभ्यां प्राण निघों पाहे ॥ ८१ ॥ वानरवीरां एक मास। निखळ पडले उपवास। अन्नोदकेंवीण कासावीस। विवरीं त्रास पावले ॥ ८२ ॥ शक्ति नाहीं पुढें जावयासी। मागें परतोनि यावयासी। मार्ग लक्षेना तयांसी। वानरांसी अति दुःख ॥ ८३ ॥ विवरमार्गे अति दारुण। तमामाजी एक योजन। अति संकटीं केलें गमन। मूर्च्छापन्न मग झाले ॥ ८४ ॥ तमें गिळिली प्रज्ञासंज्ञा। निराहारें गिळिलें चैतन्या। तृषेनें शोषिलें वदना। शब्दसंज्ञा निमाली ॥ ८५ ॥ जेंवी प्रळयकाळीं जीव। महातमीं होती आपूर्व। तेंवी वानरवीर सर्व। पूर्वापूर्व विसरले ॥ ८६ ॥ वानर पडिले अचेतन। हनुमंत बळिया संपूर्ण। एकैक पुच्छीं बांधोन। करी गमन तेणेंसीं ॥ ८७ ॥ देखोनि वानरांची अवस्था। मागें सरणें नाहीं हनुमंता। विवर शोधावयाचे अर्था। घेवोनि समस्तां निघाला ॥ ८८ ॥ हनुमंताचे देखणे नेत्र। आवरूं न शके अंधार। पुच्छीं वानरांचा भार। घेवोनि सत्वर चालिला ॥ ८९ ॥ वांचवावया वानरांचा प्राण। हनुमंतें केलें विंदान। पिता पाचारोनि पवन। सांगे आपण तें ऐका ॥ ९० ॥ श्रीरामकार्यालागीं जाण। वानरां परमानंदें मरण। तुवां रक्षावा यांचा प्राण। सेवा संपूर्ण श्रीरामीं ॥ ९१ ॥ श्रीरामसेवाहितवचन। तेणें संतोषोनि पिता पवन। वानरांचा निजप्राण। स्वयें आपण संरक्षी ॥ ९२ ॥ श्रीरामाचे निजभक्त। जरी अदृष्टें जाले मूर्च्छित। तरी काळाचा न चले घात। श्रीरघुनाथ रक्षिता ॥ ९३ ॥ भक्त सावधान असावधान। त्यासी न विसंबे श्रीरघुनंदन। बाधूं न शके जन्ममरण। काळें वदन काळाचें ॥ ९४ ॥ नामें गर्जती अखंड। त्यांचेनि पवित्र ब्रह्मांड। भक्तां करूं जातां दंड। काळें तोंड काळाचें ॥ ९५ ॥ भक्त श्रीरामीं लळेवाड। श्रीराम त्यांचें पुरवी कोड। नामें गर्जोनि वितंड। ठेंचिलें तोंड काळाचें ॥ ९६ ॥ हनुमंत देखोनि श्रीरामदूत। कळिकाळ चळीं कांपत। हरिभक्ता करावया घात। नव्हे समर्थ कळिकाळ ॥ ९७ ॥ हनुमंतें तेचि आवेशीं। वानर तारिले बांधोनि पुच्छीं। सद्गुरुशिष्य निजकाजेंसीं। अनाथांसी तारक ॥ ९८ ॥ वानरां मूर्च्छा जरी प्राणान्त। जवळी सद्गुरु हनुमंत। येणें सुसंगें चुकला घात। अति समर्थ तारक ॥ ९९ ॥ श्रीरामभक्तांची निजकथा। ग्रंथ नाकळे आकळितां। एका शरण साधुसंतां। विवरवार्ता अवधारा ॥ १०० ॥ पुच्छीं बांधोनि वानरकोटी। हनुमंत चालिला जगजेठी। पुढें प्रकाश देखिला दृष्टीं। सुखसंतुष्टी सर्वांसी ॥ १ ॥ आतां ही हनुमंताची गोष्टी। नाम आठविल्या संकटीं। विघ्नें पळती बारा वाटीं। नामें जगजेठी तारक ॥ २ ॥ होतां प्रकाशाचें भान। अमृतमय प्रभा पूर्ण। वानर झाले सावधान। देखोनि स्थान विस्मित ॥ ३ ॥ आम्ही मूर्च्छित पडिलों क्षितीं। अद्भुत हनुमंताची शक्ती। सकळ श्रमा करोनि शांती। स्वस्थगतीं आणिलें ॥ ४ ॥ आम्हांसी मूर्च्छित सांडून। एकला न येचि आपण। कोटयनुकोटी वीर उचलोन। आला घेवोन कृपाळु ॥ ५ ॥ नळनीलादि जांबवंत। स्वयें

१ निबिड. २ परस्परांचा. ३ सारखे. ४ त्या अंधारांत. ५ बुद्धि आणि शुद्धि. ६ बुडून जातात. ७ युक्ति, कौतुक. ८ लाडके. ९ इच्छा, लाड. १० पराक्रमी.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

अंगद गुण वर्णीत । अवघीं वंदोनि हनुमंत । स्वस्थचित्त राहिले ॥ ६ ॥ एका जनार्दना शरण । निधडी हनुमंता आंगवण । अचेतन वानरसैन्य । आला घेवोन विवरांत ॥ ७ ॥ त्या विवरामाजी उद्बोधें । तापसीहनुमंतसंवाद । तो एका जनार्दनीं विनोद । परमानंद रामायणीं ॥ ८ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे किष्किंधाकांडे वानरबिलप्रवेशो नाम चतुर्दशोऽध्यायः ॥ १४ ॥ ओंव्या ॥१०८॥ श्लोक ॥२४॥ श्रीसीतारामचंद्रार्पणमस्तु ॥

अध्याय पंधरावा

॥ श्रीरामचंद्राय नमः ॥ वानर होवोनि सावधान । पाहती तंव हेमभुवन । हेमशय्या हेमासन । उपरी आस्तरण हेमाचें ॥ १ ॥ हेममय तेथींची क्षिती । हेममय अवघ्या भिंती । हेमदीपिका हेमदीप्ती । पात्रपंक्ती हेममय ॥ २ ॥ हेमविमानें हेमांबरें । हेमबद्ध सरोवरें । हेममत्स्य हेमनगरें । जळचरें हेममय ॥ ३ ॥ मुक्ताफळें हेमरत्नें । हेमपदकें हेमभूषणें । हेममय उपकरणें । हेमाभरणें पशुपक्षी ॥ ४ ॥ विवरीं धनधान्यसमृद्धी । विवरीं परमामृतनदी । विवरामाजि ऋद्धिसिद्धी । सुख त्रिशुद्धी वानरां ॥ ५ ॥ नसोनि रविचंद्रभास[३] । विवरामाजी नित्य प्रकाश । तेणें वानरां अति उल्लास । पाहती वास[४] वायुपुत्राची ॥ ६ ॥ ऐसिये रमणीय स्थानीं । हनुमंत पाहोनियां नयनीं । मनुष्यमात्र न दिसे नयनीं । सकळ भुवनीं शोधितां ॥ ७ ॥ अपूर्व देखिलें मंदिरामाझारीं । चीरकृष्णाजिनधारी । तापसी बैसली एक कुमारी । तेजें[५]करीं देदीप्यमान ॥ ८ ॥ तपःप्रताप आगळा । अंगीं तेजाचा उमाळा । तिसी देखतांचि डोळां । वानर[६]पाळा शंकला ॥ ९ ॥ तिचा शोधावया मुख्यार्थ । पुसता झाला हनुमंत । तूं कोण या भुवनाआंत । बिलवृत्तांत मज सांगें ॥ १० ॥

आत्मनस्त्वनुभावाद्वा कस्य चेदं महद्बिलम् ।
अजानतां नः सर्वेषां सर्वमाख्यातुमर्हसि ॥ १ ॥

तूं एकाकी स्त्री अबळा । तपःप्रभावें तेजःप्रबळा । कोणें निर्मिलें या बिळा । तुज या स्थळा कैंवी प्राप्ति ॥ ११ ॥ विवरीं समृद्धि संपूर्ण । सुखरूप शोभे भुवन । येथील राजा सांग कोण । तेणें हें कां स्थान त्यजियेलें ॥ १२ ॥ आश्रमासी आलों येथ । आम्ही तुझे अभ्यागत । पुसिला सांगोनि वृत्तांत । करीं स्वागत अतिथींचें ॥ १३ ॥

एवमुक्त्वा हनुमता तापसी धर्मचारिणी ।
प्रत्युवाच हनूमंतं सर्वभूतहिते रतम् ॥ २ ॥
मयो नाम महातेजा मायावी दानवर्षभः ।
पुरा दानवमुख्यानां विश्वकर्मा बभूव सः ॥३॥
तेनेदं कांचनं सर्वं निर्मितं मायया वनम् ।
कथं चेदं बिलं दुर्गं युष्माभिरुपलक्षितम् ॥ ४ ॥

ऐसें पुसतां हनुमंत । तापसी जाली अति विस्मित । हें विवर अति गुप्त । वानर येथ कैंवी आले ॥ १४ ॥ यक्षराक्षसां दुर्गम नित्य । देवदानवां विवर गुप्त । तुम्ही असाल श्रीरामभक्त । तरीच येथें आलेती ॥ १५ ॥ रामनामाचा विश्वास ज्यांसी । नामीं आवडी अहर्निशीं । दुर्गमीं रिघ त्या भक्तांसी । निश्चयेंसीं मी जाणें ॥ १६ ॥ नाम आवडे मानसीं । स्मरण न करीच अति आळसी । वांझ गाय कँपिला जैसी । जाण तैसी ते भक्ती ॥ १७ ॥ श्रीरामनाम आवडे पोटीं । नामेंवीण टवाळ गोष्टी । तेही आवडी समूळ खोटी । न ये शेवटीं उपयोगा ॥ १८ ॥ मुलाम्याचीं नाणीं जैसीं । घातकी होती ज्याचीं त्यासी । दांभिक भक्ति जाण तैसी । साधकांसी अपघाती ॥ १९ ॥ निजात्मप्रतीति कैंची त्यासी । भजन नुरे ज्याचें त्यासी । विकल्प डोळ पडिलें भक्तीसी । लोभें त्यासी नागविलें ॥२०॥ तुम्ही नेटाचे श्रीरामभक्त । विवरीं प्रवेशतां येथ । देहलोभें नित्यनिर्मुक्त । तुम्ही समस्त मज पूज्य ॥ २१ ॥ जन्ममरणाची भय[८]शारी । तुम्हीं घालोनि तोडरीं । प्रवेशलेती या विवरीं । राम निर्धारीं भक्तांचा ॥२२॥ रामस्मरण अहर्निशीं । विघ्नें निर्विघ्न होती त्यासी । तो प्रताप तुम्हां वानरांसी । तुमची दासी मी आतां ॥२३॥ तुम्हां वानरां समस्तां । मुख्य भक्त तूं श्रीहनुमंता । श्रीरामभजनीं एकाग्रता । तुम्हां समस्तां तारक ॥२४॥ म्यां जें केलें अनुष्ठान । तेणें

१ मोठी. २ ज्ञान. ३ सूर्यचंद्रांचा प्रकाश. ४ वाट. ५ तेजानें. ६ वानरांचा समूह. ७ काळ्या रंगाची.

८ निःसीम. ९ भयाची धडकी.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

मज जालें ज्ञान । हनुमंताचे भक्तिसमान । नाहीं आन तिहीं लोकीं ॥ २५ ॥ ऐसें बोलतां तापसी । प्रेम लोटलें तियेसी । लोटांगणीं हनुमंतासी । उकसाबुकसीं स्फुंदत ॥२६। अग्निकापुरा होतां भेटी । विरोनि येरयेरांचे पोटीं । निरालंब उरे शेवटीं । तैसीच गोष्टी तेथें जाली ॥ २७ ॥ निर्धारितां हनुमंतरूप । तापसी झाली अरूप । पाहतां तापसीचें रूप । सुखस्वरूप हनुमंत ॥ २८ ॥ भक्तभेटीचें लक्षण । लक्षलक्षातीत गहन । मनीं मनें चैतन्य । समाधान येरयेरां ॥ २९ ॥ म्यां तप केलें निष्काममतीं । त्या तपाची जाली फलप्राप्ती । भाग्यें भेटलासी मारुती । भवनिर्मुक्ति तारक ॥३०॥ श्रीरामभक्त ज्यांस भेटती । दर्शन स्पर्शन संवाद-स्थिती । भावें भवभावनिर्मुक्ती । हेही प्रतीती मज आली ॥ ३१॥ ऐसें बोलोनि तत्त्वतां । हनुमंतचरणीं ठेविला माथा । जें तुवां पुसिलें हनुमंता । समूळ कथा सांगेन ॥ ३२ ॥ मयदानव तेजोराशी । मायाविंदान तयापासीं । दानवीं देखोनि लाघवासी । केलें त्यासी विश्वकर्मा ॥ ३३॥ दानवांचीं पुरें मंदिरें । कवचें यंत्रें शस्त्रास्त्रें । हेमविमानें छत्रचामरें । अति विचित्रें निर्मिलीं ॥३४॥ मुक्ताफळें हिरे रत्नें । हेमभूषणें हेमोपकरणें । मायालाघवविंदानें । जें करणें तें मायिक ॥ ३५ ॥ मायालाघवी चपळ । निजवस्तीलागीं प्रबळ । तेणें निर्मिलें हेमबिळ । अतर्क्य स्थळ अति गुप्त ॥ ३६ ॥ येथें नसतां रविचंद्रांसी । नित्य प्रकाश विवरासी । हें लाघव तयापासीं । अतर्क्य कोणासी तर्केना ॥ ३७ ॥ हेमतरुवर स्वादफळीं । हेमसरोवर अमृतजळीं । हेमजळचर क्रीडती तळीं । हेमकमळीं सुगंध ॥ ३८ ॥ हेममंदिरें हेमभिंती । हेमभूमिका हेमक्षिती । मय मायिक मायावी स्थिती । जाण निश्चितीं कपिराजा ॥ ३९ ॥

स तु वर्षसहस्राणि तपस्तप्त्वा महावने ।
पितामहाद्वरं लेभे सर्वमौशनसं धनम् ॥ ५ ॥
विधाय सर्व बलवान् सर्वकामेश्वरस्तदा ।
उवास सुखितः कालं किंचिदस्मिन् महाबिले ॥ ६ ॥

तेणें मयासुरें येथ । बैसोनियां महावनांत । ब्रह्मा प्रसन्न केला तपोयुक्त । तपनेमार्थ साधोनि ॥ ४० ॥ मय वरद मागे आपण । म्यां शत्रु मारावे संपूर्ण । मज न यावें मरण । ऐसें वरदान मज द्यावें ॥ ४१ ॥ ऐकोनि मयाचें वचन । ब्रह्मा झाला हास्यवदन । जन्मासवें नित्य मरण । वरदान कैंवी लाभे ॥४२॥ निर्मरणवरू मागतां । हिरण्यकशिपु निजयोग्यता । सजीव निर्जीव नको म्हणतां । नखाग्रता निमाला ॥ ४३ ॥ मयासुरा तेचि कथा । मरण नको वर मागतां । यासी आली मरणावस्था । निर्मरणता कैंवी लाभे ॥ ४४ ॥ देहाभिमानाचिये माथां । नित्य वसे मरणावस्था । अहंममता न सांडितां । निर्मरणता कैंवी लाभे ॥ ४५ ॥ ऐक माझें वरदान । विवरीं असतां न ये मरण । बाहेर निघतांचि जाण । वैरी प्राण घेतील ॥ ४६ ॥ वैरी आलिया विवरांत । तुझेनि हातें पावती घात । बाहेर निघतां निःशंकत । तेथींचा तेथ निमसील ॥४७॥ मयासुरा ऐक निश्चित । जो जाला विषयासक्त । त्यावरी करी काळ घात । सत्य वाक्यार्थ ब्रह्मवाणी ॥ ४८ ॥ ब्रह्मा वदे वरदार्थ । सर्वेचि पडला विचारांत । सुरवर लोभें निघतां येथ । विवरीं समस्त निमतील ॥ ४९ ॥ यालागीं सुरवरां अतर्कित । बिलद्वार केलें गुप्त । मयासुर होता नांदत । तोही मरणार्थ पावला ॥५०॥ तापसीस पुसे हनुमंत । मरण न ये विवरांत । ऐसा ब्रह्मयाचा वरदार्थ । मयासुर मृत्यु कां पावला ॥५१॥ मयासुर बैसोनि विवराप्रती । जारण मारण इंद्रवधार्थीं । दैत्यदानवांसी सांगे युक्ती । मंत्रयंत्रोक्ति मोहका ॥ ५२ ॥ यालागीं मयासुरवधार्थ । इंद्र साक्षेपें टपत । रिघों न पावे विवरांत । द्वारीं तिष्ठत सर्वदा ॥ ५३ ॥ बाहेर येणें नाहीं मयासी । इंद्र मारूं न शके त्यासी । तो स्वयें पुसे ब्रह्मयासी । मय मरावयासी निजयुक्ति ॥ ५४ ॥ ब्रह्मा सांगे इंद्राप्रती । मयासी कामिनीकामप्रीती । बाहेर आणोनि प्रमदायुक्तीं । त्यासी तूं घातीं अमरेंद्रा ॥ ५५ ॥

तमप्सरसि हेमायां सक्तं दानवपुंगवम् ।
शनैर्निष्क्रांतमालोक्य निजघान पुरंदरः ॥ ७ ॥

हेमा अप्सरी सुंदरी । माझी सखी निजनिर्धारीं । ब्रह्मयानें घातली विवरीं । मयासुरा मरणार्थ ॥ ५६ ॥ कामिनीकामाचा आल्हाद । शुंभनिशुंभ

१ ब्रह्म. २ संभाषण. ३ संसारापासून सुटका. ४ अनुभव.

५ अत्यंत सावध राहून.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सुंदोपसुंद । पुरुष निमाले विविध । मरण प्रसिद्ध स्त्रीकामें ॥५७॥ कामिनीकामाची आसक्ती । मागें निमाले नेणों किती । पुढें स्त्रीकामेंही मरती । अधोगती स्त्रीकामें ॥५८॥ हेमाप्सरी सुंदरी । येतां देखोनि विवरीं । मयासुर पडिला फेरीं । भाग्यें-करीं आलीसी ॥ ५९ ॥ हेमाकामिनीं काम गहन । दोघीं केलें मद्यपान । करीत गायन नर्तन । बाहेरी आगमन दोघांचें ॥६०॥ कामिनीकामें नृत्य-गीतस्वरीं । तीसवें आला विवराबाहेरी । इंद्रें साधूनियां वैरी । वज्रेंकरीं मारिला ॥ ६१ ॥ मय मायिक हेममंडन । ब्रह्मा होवोनि प्रसन्न । हेममय करोनि भुवन । दिधलें स्थान हेमेसी ॥ ६२ ॥

इदं च ब्रह्मणा दत्तं हेमायै वनमुत्तमम् ।
शाश्वतः कामभोगश्च गृहं चेदं हिरण्मयम् ॥ ८ ॥
दुहिता मेरुसावर्णेरहं तस्याः स्वयंप्रभा ।
मम प्रियसखी हेमा नृत्यगीतविशारदा ॥ ९ ॥
तया दत्तवरं चेदं रक्षामि भवनं महत् ॥ १० ॥

ब्रह्मा होवोनि सुप्रसन्न । हेमेसी हेममय भुवन । स्वयें दिधलें संतोषोन । आणि स्थान अति दुर्गम[१] ॥ ६३ ॥ सुवर्णमनूची मी दुहिता । स्वयंप्रभा ना-मांकिता । हेमा सखी माझी आतता । एकात्मता दोहींसी ॥ ६४ ॥ तेचि काळीं म्यां आपण । ब्रह्म-यासी मागितलें वरदान । द्यावें निष्काम अनुष्ठान । मुक्तत्व पूर्ण मज द्यावें ॥ ६५ ॥ ऐकोनि माझी विनंती । संतोषला प्रजापती । आवडीं मानोनि वचनोक्ती । अति प्रीतीं स्वयें वदला ॥ ६६ ॥ धन्य निष्कामाचें वदन । धन्य निष्कामाचें वचन । धन्य निष्कामआगमन । जग पावन निष्कामें ॥ ६७ ॥ निष्कामाचें मज कौतुक । निष्कामाचें मज सुख । देखोनि निष्कामाचें मुख । परम हरिख हरि-हरां ॥ ६८ ॥ ये विवरीं हरिहरस्थान । पावसी निष्काम अनुष्ठान । स्वयंप्रभे सत्य जाण । हें वर-दान तुज माझें ॥६९॥ आणिका रीघ नव्हे येथ । विवरा येती श्रीरामभक्त । त्यांचें केलिया आति-थ्य । नित्यमुक्त त्यांचेनि ॥७०॥ हरिदासदर्शन-स्पर्शन । अभिवंदन संभाषण । आतिथ्य करितां संपूर्ण । मुक्तपण निजवंद्य ॥ ७१ ॥ हरिदासांची संगती । भाग्येंवीण नव्हे प्राप्ती । हरिदासांची सद्भ-क्ती । नित्यमुक्ती स्वभावें ॥७२॥ ऐसें मज देवोनि वरदान । अदृश्य जाला चतुरानन । हेमा माझी सखी जाण । तिचें हें भुवन ब्रह्मदत्त ॥ ७३ ॥ हेमा सकाम कामासक्ती । येथें नाहीं पुरुषप्राप्ती । मज ठेवोनि रक्षणार्थी । स्वर्गाप्रती ते गेली ॥ ७४ ॥ ब्रह्मवाणी सत्यभूत । ते हे तुम्ही श्रीरामभक्त । माझेनि भाग्यें आलेति येथ । मज निर्मुक्त करावया ॥ ७५ ॥ ऐसें बोलोनियां जाण । तापसी घा-ली लोटांगण । वंदोनि हनुमंताचे चरण । काय आपण विनवीत ॥७६॥ क्षुधें पीडिले वानर । वनीं रिघोनि समग्र । फळें भक्षावीं मधुर । प्राशावें नीर स्वादिष्ट ॥ ७७ ॥

अर्थी चास्मि प्रयच्छार्थं रणधर्ममनुत्तमम् ।
प्रीयमाणा निराहारान् संजीवय तपोधने ॥ ११ ॥

ऐकोनि तापसीचें वचन । हनुमंत बोले आपण । भुकें वानरांचे जाती प्राण । वृक्षारोहण न करवे ॥ ७८ ॥ वानर असते सावधान । मद्यांचि विध्वंसिते वन । तुज पुसावया राहतें कोण । क्षुधेनें क्षीणबळशक्ती ॥ ७९ ॥ वानरांची शक्ती क्षीण । वृक्षीं न करवे उड्डाण । आणोनि द्यावें आपण । वांचवीं प्राण क्षुधितांचे ॥ ८० ॥

अभिगम्योत्तमं दानं दानमाहूय मध्यमम् ।
याच्यमानं तु अधमं सेवादानं ततोऽधमम् ॥ १२ ॥

आणूनि देणें जें आपण । हें दानामाजी उत्तम दान । जें द्यावें घरा पाचारून । मध्यम दान त्या नांव ॥ ८१ ॥ वेळोवेळां काकुळती । येवोनि याचक मागती । ऐसें देणें तयांप्रती । दानस्थिति ते निंद्य ॥८२॥ वसवसूनि देती अन्न । एक देती निर्भर्त्सून । तें तें अधमाधम दान । पात्रा निंदोन जे देती ॥ ८३ ॥ सेवा घेवोनि आपण । द्विजांसी देती जें दान । दान नव्हे ते मजुरी जाण । दातृत्व पूर्ण अधमाधम ॥ ८४ ॥ यालागीं स्वधर्मरक्षण । करावया स्वयंप्रभे जाण । अतीतांसी फळें अर्पून । वांचवीं प्राण वानरांचे ॥ ८५ ॥

साधोस्तस्य वचः श्रुत्वा तापसी ब्रह्मचारिणी ।
आदाय फलमूलानि विधिनोपाहरत्तदा ॥ १३ ॥

१ स्त्रीच्या इच्छेनें. २ वजानें. ३ अति अवघड. ४ कन्या. ५ हर्ष, आनंद. ६ नमस्कार करणें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

भक्षयित्वा च ते सर्वे पीत्वा च विमलं जलम् ।
प्रसन्नवदनाः सर्वे सर्वे संतुष्टमानसाः ॥ १४ ॥

सर्वेऽपि बलवीर्याढ्यास्तत्रासन् हरियूथपाः ।
अपश्यन् सर्व एवैते दिशो वानरपुंगवाः ॥ १५ ॥

ऐकोनि हनुमंताचें वचन । तापसी फळें आणूनि पूर्ण । करोनि विधियुक्त पूजन । दिधलें भोजन तें ऐका ॥ ८६ ॥ पृथु चक्रवर्ती आपण । जैसें करी भगवत्पूजन । तेंवी हनुमंतादि वानरगण । पूजी संपूर्ण उल्लासें ॥ ८७ ॥ जया जैसें आवडे फळ । जया जैसें आवडे मूळ । तया तैसें अर्पूनि निर्मळ जळ । सुपरिमळ शिखरणी ॥ ८८ ॥ वानरां हेमाचीं ताटें । फळें ओगरिलीं चोखटें । नाना रसीं भरिले वाटे । अपूर्ण कोठें पडों नेदी ॥ ८९ ॥ आम्ररसें मधुरसें । अमृतरसें सुरस रसें । वानरां पीडिलें मासोपवासें । अति उल्लासें भक्षिती ॥ ९० ॥ एकें विडुळलीं[१] सकाम वातें । एकें हिरवीं करकरितें । एकें बहुबीजें[३] बुचबुचितें । एकें कचकचित अर्धैकाचीं ॥ ९१ ॥ एकें जडजाडयें जारठेलीं । एकें सकाम लोभें सारटलीं[२] । विकल्पमुरडें मुरकुटलीं । झडोनि पडलीं अमार्गीच ॥ ९२ ॥ एकें अभाववातें झडलीं । वनिताकुचकर्दमीं पडलीं । सर्वेचि तेथोनि गडबडलीं । तीं बुडालीं अंधतमीं ॥ ९३ ॥ एकें विवादकर्मठें । विधिनिषेधअतिअंबटें । एकें तपस्तेजें तिखटें । एकें तुरटें मतमुद्रा ॥ ९४ ॥ एकें वरिवरी वरवंटें । आंत द्विजद्वेषाचे कांटे । एकें दिसताती चोखटें । अति कडवटें परनिंदा ॥ ९५ ॥ एकें भेदवादें खणुवालीं । सभेदाच्या बुचबुचित आळी । त्यांसी न सेविती काउळी । पडिल्या धुळीतें मिळती ॥ ९६ ॥ गारठेलीं फळें अशांत । पडोनि फुटलीं जेथींचीं तेथ । वानर त्यांसी न लाविती हात । दुर्गंधि ते अति दुष्ट ॥ ९७ ॥ एक समेळ फळांचे घड गाढे । आदळले पाखांडियापुढें । फुटोनि होती पैं तुकडे । पडती किडे सुळसुळती ॥ ९८ ॥ एकें संज्ञानतेचिया शिखरीं । पडोनि जालीं काचरीं । त्यांसी न सेविजे वानरीं । झडपिती घारी गर्वाच्या ॥ ९९ ॥ वनिताहातींहूनि निसटलीं । अहंममतादेंठींहूनि सुटलीं । संकल्पविकल्पें तुटलीं । फळें आलीं परिपाका ॥ १०० ॥ नित्य निर्विकारें पाडा आलीं । शांतिसेजे स्वयें मुरालीं । जीं नैराश्यें मघमघिलीं । फळें सेविलीं वानरीं ॥ १ ॥ शांत दांत अरुवंरिलीं । आंत बीज ना बाहेरी साली । सुखस्वरूपें साकारलीं । फळें सेविलीं वानरीं ॥ २ ॥ निजात्मबोधें मघमघित । नित्य नैराश्यें रस गळत । जेथें हंस शुक झेंपावत । तीं फळें भक्षीत वानर ॥ ३ ॥ अहंकोहंसोहंविहीन । ब्रह्मीं ब्रह्मत्वही लीन । सांडोनियां मीतूंपण । फळें परिपूर्ण सेविती ॥ ४ ॥ बहुकाळाचे बुभुक्षित । केले परिपूर्ण नित्य तृप्त । बाप कृपाळु श्रीरघुनाथ । संकटीं भक्त वांचविले ॥ ५ ॥ संकट बाधूं जातां भक्त । संकटीं निकट श्रीरघुनाथ । द्वंद्व तेथें निर्द्वंद्व होत । भक्त निर्मुक्त श्रीरामें ॥ ६ ॥ ऐसिया पूर्णत्वाचे सिद्धी । वानरां जाली पारणीविधी । श्रीराम कृपाळु द्वंद्वबाधी । भक्त त्रिशुद्धी वांचविले ॥ ७ ॥ ग्रंथीं बोलतों त्रिशुद्धी । त्रिशुद्धीची कवण विधी । सद्गुरूवीण नव्हे सिद्धी । सावध बुद्धीं अवधारा ॥ ८ ॥ शब्द निःशब्द शब्दशुद्धी । आशा निराशा मनःशुद्धी । देहीं विदेहत्व देहशुद्धी । जाणा त्रिशुद्धी पावन ॥ ९ ॥ ऐसिया त्रिशुद्धीं वानर । पावोनि तृप्ति अभयंकर । देती स्वानंदें उद्गारें[१२] । तेणें अंबर गर्जत ॥ ११० ॥ फळें खाती गटगटां । मिटक्या देती मटमटां । लाळ येतसे नीळकंठा । भक्तवांटा सेवावया ॥ ११ ॥ वांकुल्या दाविती सुरवरां । वांकुल्या दाविती ऋषीश्वरां । फळें सेवितां वानरां । दुःखा दुस्तरा मूकले ॥ १२ ॥ वानर भोजनसमाजें । मिटक्या देतां अंबरें[१३] गाजे । तापसी धाडिली श्रीरघुराजें । कपिसमाज वांचववावया ॥ १३ ॥ संरक्षावया निजभक्तांसी । श्रीरामें निर्मिली विवरांसी[१४] । श्रीरामें धाडिली तापसी । वानरांसी वांचवावया ॥ १४ ॥ बुभुक्षितांसी तृप्तिभोजन । तेणें

१ वाढलीं. २ पचपचित झालीं. ३ पुष्कळ बियांचीं. ४ अपक्व. ५ निबर झालीं, जून झालीं. ६ अर्धवट कठिण झालेलीं. ७ आकुंचित झालीं. ८ चांगली. ९ छिद्रयुक्त. १० रसाळ. ११ उपोषणानंतरचें भोजन. १२ ढेंकर. १३ आकाश. १४ विवरांत.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सुखी श्रीभगवान । तापसीचें भाग्य गहन । श्रीरामजन सुखी केले ॥ १५ ॥ दुष्काळींचें द्विजभोजन । राजसूययागाहूनि गहन । अश्वमेधादिक यज्ञ । मशक होय त्यापुढें ॥ १६ ॥ बुभुक्षितां दिधलें अन्न । सुखी केले दीनजन । तेणें सुखावे श्रीभगवान । यज्ञादि पुण्य तें मशक ॥ १७ ॥ तापसीचें भाग्य गहन । फळें आणोनि संपूर्ण । वानरां देतांचि भोजन । सावधान ते जाले ॥ १८ ॥ विधिनोपाहरत्तदा । याचि धरोनि श्लोकाच्या पदा । वानरभोजनसंपदा । ग्रंथानुवादा मी वदलों ॥ १९ ॥ व्यर्थ वाढविलें ग्रंथा । ऐसें न म्हणावें श्रोतां । मुनीच्या धरोनि पदार्था । ग्रंथीं ग्रंथता राम वदवी ॥ १२० ॥ नेणें वेदशास्त्रश्रवण । माझे अंगीं मूर्खपण । माझें हिरोनि मीपण । राम रामायण स्वयें वदवी ॥ २१ ॥ श्रोते म्हणती नवलावो । वानरभोजनअभिप्रावो । शुद्ध साधूनी भक्तिसद्भावो । ब्रह्मान्वयो स्थापिला ॥ २२ ॥ आधींचि रम्य रामायण । वरी हें रसाळ निरूपण । कथा नव्हे ब्रह्म पूर्ण । सुखी संपूर्ण आम्हां केलें ॥ २३ ॥ ऐकोनि श्रोतियांचें वचन । एका जनार्दनीं लोटांगण । जें देखाल माझें न्यून । तें तें संपूर्ण तुम्हीं कीजे ॥ २४ ॥ श्रोते म्हणती नवल आतां । स्वयें श्रीराम वदनीं वक्ता । रामें रम्य रामकथा । न्यूनपूर्णता असेना ॥ २५ ॥ एका जनार्दना प्रबोधी । वानरां जाली पारणाविधी । पुढें लासेल सीताशुद्धी । शोधनविधी अवधारा ॥ २६ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे किष्किंधाकांडे एकाकारटीकायां तापसीहनुमंतसंवादो नाम पंचदशोऽध्यायः ॥ १५ ॥ ओंव्या ॥ १२६ ॥ श्लोक ॥ १५ ॥

अध्याय सोळावा

श्रीरामचंद्राय नमः ॥ वानरां मास उपोषण । तापसीं फळें आणूनि पूर्ण । दिधलें यावत्तृप्ति भोजन । वानरगण उल्लासी ॥ १ ॥

संतृप्तास्ते फलैर्मूलैः संजाताः शीतवारिणा ।
बलवीर्याश्च ते सर्वे तत्रासन् हरिपुंगवाः ॥ १ ॥
अपतन् सर्व एवैते दिशो वानरयूथपाः ॥ २ ॥

भक्षितां पैं फळमूळ । सेवितां निर्मळ जळ । वानर सुखी जाले सकळ । हर्ष प्रबळ तृप्तीचा ॥ २ ॥ वानरांचें सकळ दळ । पूर्विल्यापरीस अति प्रबळ । शतगुणें वाढलें बळ । जनकबाळ शोधावया ॥ ३ ॥ वानर म्हणती हनुमंतासी । येथें काय फळें खावया आलासी । किंवा सीता शोधावयासी । त्या रामकार्यासी साधावें ॥ ४ ॥ शोधितां या विवराआंत । सीता न लभेचि निश्चित । पुढील सांग कर्तव्यार्थ । दक्षिणपंथ शोधावया ॥ ५ ॥ रविशशिविरहित । नित्य प्रकाश विवरांत । वानर दशदिशा पाहत । दक्षिणपंथ दिसेना ॥ ६ ॥ पूर्व कोण पश्चिम कोण । न कळे उत्तर दक्षिण । न कळे दशदिशांचें ज्ञान । केउतें गमन करावें ॥ ७ ॥

अथ तानब्रवीत्सर्वान् विश्रांतान् हरिपुंगवान् ।
किं कार्यं कस्य वा हेतोः कान्ताराणि प्रपद्य च ॥ ३ ॥
इदं वचनमेकाग्रा तापसी धर्मचारिणी ।
यदि चैतन्मया श्राव्यं श्रोतुमिच्छामि तां कथाम् ॥ ४ ॥

अत्यंत भार ज्याचे माथां । कां जो त्वरेनें धांवता । अतिशयेंसीं उन्मत्तता । कथा वार्ता न ये पुसों ॥ ८ ॥ जो कां ज्ञानगर्वें पीडित । जो विषयमदें उद्धत । जो जो अतिशय क्षुधित । त्यासी वृत्तान्त पुसों नये ॥ ९ ॥ तापसी म्हणे वानरनाथा । वार्ता पुसों नये क्षुधिता । फळभोजन सावधानता । सांगें वृत्तांता मनींच्या ॥ १० ॥ विवर गूढ अति कांतार । मिळोनि आले वानरभार । येथें कां आलेती सकळ वीर । तोही विचार मज सांगा ॥ ११ ॥ तुम्ही श्रीरामाचे भक्त । माझेनि भाग्यें आलेती येथ । विवरीं प्रवेशावया गुप्त । कोण कार्यार्थ मज सांगा ॥ १२ ॥ मी तंव तुमची केवळ दासी । कार्य सांगों ये मजपासीं । ऐसें मानलिया तुम्हांसी । तरी कार्यासी मज सांगा ॥ १३ ॥

तस्यास्तद्वचनं श्रुत्वा हनूमान् मारुतात्मजः ।
आर्जवेन यथातत्त्वमाख्यातुमुपचक्रमे ॥ ५ ॥

ऐक तापसी पूर्ववृत्तांत । पूर्ण ब्रह्म श्रीरघुनाथ । अवतरला सूर्यवंशाआंत । कौसल्यासुत दाशरथी

---

१ मोठें. २ क्षुल्लक. ३ तृप्तता होईपर्यंत. ४ कोणीकडे. ५ अरण्य. ६ योग्य वाटल्यास.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ १४ ॥ पित्राज्ञेच्या निजनेटीं । बंधु सौमित्र सीता गोरटी । श्रीराम वनवासीं पंचवटीं । गंगातटीं रहिवास ॥ १५ ॥ रामलक्ष्मण गेले मृगापाठीं । मागें शून्य पंचवटी । भिक्षुरूपें[१] रावण कपटी । सीता गोरटी चोरिली ॥ १६ ॥ तिचें करावया शोधन । किष्किंधे आला रघुनंदन । वाळी भ्रातृभार्याहरण । विंधोनि बाण मारिला ॥ १७ ॥ राज्य दिधलें सुग्रीवासी । यौवराज्य अंगदासी । सुग्रीवें धाडिलें आम्हांसी । सीताशुद्धीसी दक्षिणे ॥ १८ ॥ दक्षिण शोधिली शतावर्ती । शुद्धि न लभेचि सीता सती । सीताशोधनशुद्ध्यर्थी । विवराप्रती आम्ही आलों ॥ १९ ॥ सुग्रीवाज्ञा अति दारुण । मासा यावें शुद्धी करून । न ये तया रासभारोहण[२] । विटंबन अपमानें ॥ २० ॥ विवरीं करितां प्रवेशन । मास एक लोटला संपूर्ण । विवर दुर्गम गहन । निर्गमन[३] दिसेना ॥ २१ ॥ बिळीं करितां प्रवेशन । आम्ही जालों मूर्च्छापन्न । कैसेनि येथें आगमन । हेंही ज्ञान आम्हां नाहीं ॥ २२ ॥ विवरींचें अभिनव चिन्ह । न कळे उत्तर दक्षिण । न कळे पूर्वपश्चिमभान । केउतें गमन करावें ॥ २३ ॥ आमुची आगती[४] निर्गती[५] । आम्हांसी न कळे निश्चितीं । तुजअधीन आमुची गती । कृपामूर्ति कृपा करीं ॥ २४ ॥ आमुची विवराबाहेर गती । आम्हांसी भेटे सीता सती । ऐसी कृपा करीं शीघ्रगतीं । वानरपंक्ती उद्धरीं ॥ २५ ॥ ऐसें ऐकतां वचन । तापसी जाली सुप्रसन्न । विवरींचें गमनागमन । नेणती सज्ञान द्विजदेव ॥ २६ ॥ ब्रह्मयाची वरदोक्ती । विवरीं आलियांची नव्हे निर्गती । बाहेर या विवराप्रती । यावया युक्ती लक्षेना ॥ २७ ॥ मज ब्रह्मा सुप्रसन्न । विवरींचें गमनागमन । करावया मी सज्ञान[६] । हें वरदान ब्रह्मयाचें ॥ २८ ॥ ज्यासी श्रीरामाची भक्ती । दुर्गमीं त्यासी निर्गती । रामनामप्रतापशक्ती । भवनिर्मुक्ति हरिभक्तां ॥ २९ ॥ श्रीरामनामाचेनि कैवांडें[७] । कळिकाळ पळती पुढें । विवर कायसें बापुडें । तुम्हां सांकडें[८] बाधावया ॥ ३० ॥ श्रीरामसेवा नित्यकर्म । हृदयीं श्रीरामाचें प्रेम । नित्य मुखीं श्रीरामनाम । सर्वत्र सुगम[९] गति त्यांसी ॥ ३१ ॥ पैल हनुमंतादि वीर । भक्तिप्रतापें प्रताप थोर । श्रीरामनामाचे गुणगंभीर । येणें उद्धार वानरांसी ॥ ३२ ॥ आजि माझें सफळ अनुष्ठान । होतां हनुमंतदर्शन । मी जालें सुखसंपन्न । महिमा गहन सत्संगें ॥ ३३ ॥ जप तप ध्यानस्थिती । अवघी सार्थक सत्संगती । त्या सत्संगाची अगाध कीर्ती । भवनिर्मुक्ति[१०] सत्संगें ॥ ३४ ॥ श्रीरामभक्तांच्या पंक्ती । आलेती माझिया भाग्यगती[११] । सेवा करीन यथाशक्ती । बिळनिर्मुक्ती[१२] वानरां ॥ ३५ ॥

सर्वानेव बिलादस्मात्तारयिष्यामि वानरान् ।
निमीलयत चक्षूंषि सर्वे वानरपुंगवाः ॥ ६ ॥

बिळाबाहेर निर्गती । व्हावया वानरां समस्तीं । डोळे झांकावे निजहस्तीं । माझ्या वचनोक्ती विश्वासा ॥ ३६ ॥ डोळे उघडे असतां । देव दानव ऋषिमहंतां । विवराबाहेर निर्गमता । कदा कल्पांता घडेना ॥ ३७ ॥ ऐकोनि तापसीचें वचन । वानरीं आपलाले आपण । निजकरीं झांकोनि नयन । सावधान निर्गमार्थी ॥ ३८ ॥ वानरीं झांकोनियां डोळे । मुहूर्त एक उभे ठेले । उघडा ऐसें कोणी न बोले । मग पाहूं लागले उघडोनि ॥ ३९ ॥

निमेषोत्तरमात्रेण बिलादुत्तारितास्तया ।
ततस्ते ददृशुर्घोरं समुद्रं वरुणालयम् ॥ ७ ॥
अपारमभिगर्जंतं घोरैरूर्मिभिराकुलम् ।
मयस्य मायाविहितं गिरिदुर्गं विचिन्वताम् ॥ ८ ॥
तेषां मासो व्यतिक्रांतो यो राज्ञा समयः कृतः ॥ ९ ॥

वानरीं उघडोनियां नेत्र । पाहती तंव पुढें समुद्र । अतिशयेंसीं दुर्धर । गर्जे घोर गडगडां ॥ ४० ॥ पुढें देखोनि समुद्र । विस्मयो करिती वानर । येथें कैसेनि आलों समग्र । केलें विचित्र तापसियें ॥ ४१ ॥ नाहीं चालविलें धरोनि करीं । नाहीं घेतलें कडेवरी । आम्हांसी विवराबाहेरी । कैसेपरी[१३] आणिलें ॥ ४२ ॥ पुच्छीं बांधोनि समस्त । हनुमंतें नेलें विवरांत । तैसेंही नाहीं केलें येथ । न हालत आणिलें ॥ ४३ ॥ येव्हढें लाघव जीपासीं ।

१ संन्याशाचें रूप घेऊन. २ गाढवावरून धिंड. ३ बाहेर जाण्याला मार्ग. ४ येणें. ५ जाणें. ६ जाणती. ७ साहाय्यानें. ८ संकट. ९ सोपी. १० संसारापासून मुक्तता. ११ प्रारब्धयोगानें. १२ गुहेंतून बाहेर पडण्यासाठीं. १३ कशा रीतीनें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

केउती आहे ती तापसी । पाहतां न दिसे चौपासीं । वानरांसी अति विस्मय ॥ ४४ ॥ अति आवेशें वानरवीर । वन शोधितां समग्र । ना तापसी ना तें विवर । विस्मय थोर वानरां ॥ ४५ ॥ निरसावया वानरभ्रांती । तापसी नव्हे ती श्रीरामशक्ती । कृपेनें आली विवराप्रती । वानरपंक्ती तारावया ॥ ४६ ॥ मयमायेच्या मायिकशक्तीं । विवरीं वानरां अति भ्रांती । रामनामाच्या आवर्तीं । विवरनिर्मुक्ति वानरां ॥ ४७ ॥ करितां श्रीरामाची भक्ती । भक्तां बाधूं न शके भ्रांती । रामनामाचिये ख्यातीं । विवरोन्मुक्ति वानरां ॥ ४८ ॥ श्रीरामाच्या नामसेणें । माया पळे घेवोनि प्राण । विवर बापुडें तें कोण । भक्तजन भुलवावया ॥ ४९ ॥ क्षुधार्थें हनुमंताची भक्ती । तापसी पावली नित्यमुक्ती । यालागीं हरिभक्तसंगती । भवनिर्मुक्ती भाविकां ॥ ५० ॥ तापसी तरली वानूं किती । रामनामाच्या आवर्तीं । वानरीं विवरीं केली ख्याती । सावधानवृत्तीं अवधारा ॥ ५१ ॥ नामें गर्जती वानर । नामें कोंदलेंसे विवर । तेणें जाला विवरोद्धार । जगदुद्धार रामनामें ॥ ५२ ॥ भक्त ज्या ठायासी जाती । तो ठाव नित्यमुक्ती । रामनामाच्या आवर्तीं । उद्धरती जड जीव ॥ ५३ ॥ वनीं वानर पाहती । नामें विवरा नित्यमुक्ती । वानरां विवराची अप्राप्ती । जड उद्धरती रामनामें ॥ ५४ ॥ यापरी ते वानर । करोनि विवराचा उद्धार । स्वयें पावले समुद्रतीर । सीता सुंदर शोधावया ॥ ५५ ॥ मागें शोधिलें गिरिगव्हर । तेथें न लभेचि सीता सुंदर । पुढें ओढवला समुद्र । अति दुस्तर वानरां ॥ ५६ ॥ सुग्रीवें केली मासावधी । ते लोटली विवरामधीं । तेथेंही न लभे सीताशुद्धी । कार्यविधि नव्हेचि ॥ ५७ ॥ सीताशुद्धि न होतां पूर्ण । आम्हांसी जातां परतोन । सुग्रीव करील अपमान । आज्ञोल्लंघन रायाचें ॥ ५८ ॥

नरेंद्रेणाभिषिक्तोस्मि रामेणाक्लिष्टकर्मणा ।
स पूर्वं बद्धवैरो मां राजा दृष्ट्वा व्यतिक्रमम् ॥ १० ॥
घातयिष्यति दंडेन तीक्ष्णेन कृतनिश्चयः ।
इहैव प्रायमाशिष्ये रम्ये सागररोधसि ॥ ११ ॥

सीताशुद्धीलागीं जाण । शतधा शोधली दक्षिण । पुढें समुद्र अति दारुण । गतिगमन खुंटलें ॥ ५९ ॥ पुढें गति खुंटली उदधीं । आतां न लभे सीताशुद्धी । मागें जावों नये त्रिशुद्धी । प्राणावधि वानरां ॥ ६० ॥ ऐसें बोलोनि अंगद । दुःखें दुर्धर करी खेद । अवश्य मज करील विरोध । तोही संबंध अवधारा ॥ ६१ ॥ युवराजा तूं त्रिशुद्धी । तुजअधीन वानरमांदी । न करितांचि सीताशुद्धी । मजचि आधीं दंडील ॥ ६२ ॥ थोर करील अवकळा । रासभारोहण मुख्य तो सोहळा । उपानहमाळा गळां । गोमयगोळा अभिषेक ॥ ६३ ॥ सोसितां अवकळा दारुण । लोकलज्जा येईल मरण । यापरीस येथें आपण । द्यावा प्राण तें श्रेष्ठ ॥ ६४ ॥ सीताशुद्धी न होतां दृढ । मुख्यत्वें माझी न राखे भीड । इतरांचा कोण पाड । दुःख दुर्वाड वानरां ॥ ६५ ॥ धन्य जटायु तो जाण । रावणासीं करोनि रण । सीता सांडवोनि आपण । दिधले प्राण रणरंगीं ॥ ६६ ॥ ऐकोनि अंगदाची गोष्टी । वानरीं भय घेतलें पोटीं । प्राण त्यजावा सिंधुतटीं । अवकळा मोठी कोण सोसी ॥ ६७ ॥ देहलोभें वांचों जातां । अवकळा बैसेल माथां । रामस्मरणें प्राण जातां । परमार्था मेळवूं ॥ ६८ ॥ यालागीं आम्ही अवघे जणें । अवश्यमेव प्राण देणें । घालोनियां कुशास्तरणें । मरणा धरणें बैसले ॥ ६९ ॥

उपविष्टास्तु ते सर्वे यस्मिन् प्रायं गिरिस्थले ।
हरयो गृध्रराजस्य तं देशमुपचक्रमुः ॥ १२ ॥

तृण घालोनि मुष्टिमुष्टी । प्रायोपवेशें समुद्रतटीं । वानर पडतां कोट्यनुकोटी । देखिले दृष्टीं संपातीनें ॥ ७० ॥ जे जे आले समुद्रतीरा । तो तो संपातीचा चारा । वेगीं भक्षावया वानरां । संपाती त्वरा तेथें आला ॥ ७१ ॥ तो बहुतां दिवसांचा उपवासी । देवें कृपा केली कैसी । मज भक्षावया वानरांसी । या ठायासी आणिलें ॥ ७२ ॥ संपाती पुसे स्वयें आपण । या ठाया जे आले जाण । माझें भक्ष्य त्यांसी मरण । तुम्ही येथें कोण कोणाचे ॥ ७३ ॥ तृणास्तरणीं समुद्रतटीं । वानरांच्या कोट्यनुकोटी । पडोनि करिती श्रीरामाच्या

१ कोठें. २ चारी बाजूंना. ३ नाहींशी करण्याकरितां. ४ सतत क्रमानें. ५ एक महिन्याची मुदत. ६ वानरसमूह.

७ दुर्दशा. ८ पादत्राणांची माळ. ९ शेणमार करून. १० सर्वस्वत्यागपूर्वक मरणार्थ बसून.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

गोष्टी । नाहीं पोटीं मरणभय ॥ ७४ ॥ माझेनि अति उग्र दर्शनें । प्राणियांतें प्राणान्त पळणें । तुम्ही गज-बजाना मनें । मरणा धरणें कां बैसलेती ॥ ७५ ॥ तुम्ही काय मरों टेंकलेती । जे या ठाया आणिलेती । ते माझे भोजनप्रयुक्तीं । वानरपंक्ती मराल ॥ ७६ ॥ करितां रामनामचावटी । सांगा श्रीराम कोण तो सृष्टीं । तुम्हांसी कोठें जाली भेटी । समूळ गोष्टी मज सांगा ॥ ७७ ॥ एकोनि संपातीचें वचन । अंगद म्हणे आम्ही धन्य । अनायासें आलें मरण । गृध्रभक्षण वानर ॥ ७८ ॥ अन्नोदकें त्यजूनि प्राण । चरफडोनि द्यावा जाण । श्रीरामें कृपा केली पूर्ण । आलें मरण अनायासें ॥ ७९ ॥ अंगद म्हणे संपातीसी । श्रीरामकथा कां पुससी । तूं आजि अतिथ आम्हांसी । वानरांसी सुखें भक्षीं ॥ ८० ॥ क्षुधितांसी द्यावें अन्नदान । हें तंव शास्त्र सनातन । आम्हीं तुज दिधलें देहदान । करीं भक्षण वानरां ॥ ८१ ॥ संपाती बोले आपण । तुम्ही करितां रामस्मरण । माझेनि न करवे भक्षण । नाम रक्षण भक्तांसी ॥ ८२ ॥ जेथें रामनामस्मरण । तेथें रिघों न शके मरण । माझेनि न करवे भक्षण । नाम रक्षण निजभक्तां ॥ ८३ ॥ रामनामाचिया स्मरणीं । जन्ममरणां महापळणी । श्रीरामभक्त तुम्ही निर्वाणीं । भाग्यें माझ्या आलेती ॥ ८४ ॥ मुखीं रामनामावृत्ती । हृदयीं श्रीरामाची प्रीती । देह विकिलें श्रीरामभक्ती । भाग्य किती मी वानूं ॥ ८५ ॥ अतिथीचे निजभोजनीं । तुम्ही समस्त देहदानी । श्रीरामभाग्यें सभाग्य जनीं । धन्य त्रिभुवनीं तुम्ही एक ॥ ८६ ॥ कोण कार्याचिये विधीं । तुम्ही आलेती सभाग्यनिधी । तें मज सांगावें त्रिशुद्धीं । कार्यसिद्धी मी करीन ॥ ८७ ॥ अत्यंत आवडी माझे पोटीं । ते मी पुसेन गुह्यगोष्टी । तुम्हीं श्रीराम देखिला दृष्टीं । कैसेनि भेटी श्रीरामीं ॥ ८८ ॥ श्रीराम राजा ईश्वरेश्वर । तुम्ही वनचरें वानर । कैसेनि रामभजनीं तत्पर । सविस्तर मज सांगा ॥ ८९ ॥ ऐकोनि संपातीचें वचन । वानर जाले विस्मयापन्न । करितां रामनामस्मरण । गीध भक्षण करूं न शके ॥ ९० ॥ जे आले या समुद्रतीरा । तो तो संपातीचा चारा । त्यासी भक्षवेना वानरां । श्रीरामचंद्राचेनि नामें ॥ ९१ ॥ करितां रामनामस्मरण । स्मरत्या मारूं न शके मरण । आम्ही अभागी संपूर्ण । रामस्मरण न करवे ॥ ९२ ॥ करितां नित्य नामस्मरण । मृत्यु त्याचे वंदी चरण । आम्हांसी प्रत्यक्ष प्रमाण । गिधा भक्षण न करवे ॥ ९३ ॥ मरण न ये रामनामोक्तीं । समुद्र बापुडें तें किती । नामस्मरणाची निजशक्ती । अपांपती आम्ही लंघूं ॥ ९४ ॥ धरोनि नामाचा निर्धार । आम्ही तरूं भवसागर । तेथें कायसा समुद्र । भाग्यें हा गृध्र भेटला ॥ ९५ ॥ ऐकतां नामाची निजख्याती । उल्लास हनुमंताचे चित्तीं । लंघावया अपांपती । पुसे संपातीस नाममहिमा ॥ ९६ ॥ तूं अंडज पक्षी पूर्ण । रामनामीं नाहीं मरण । हें तुज कैसेनि गुह्य ज्ञान । मूळकथन मज सांगें ॥ ९७ ॥ श्रीरामभक्तांचे संगतीं । संपातीची गेली भ्रांती । पूर्वस्मरणाच्या अनुवर्ती । मारुतीप्रति सांगत ॥ ९८ ॥ कश्यपाच्या निजकुळीं । अरुणवीर्याच्या समेळीं । जटायु संपाती बंधु जावळी । आतुर्बळी जन्मलों ॥ ९९ ॥ दैत्य दानव मानव प्रौढीं । सहित देव तेहतीस कोडी । आमचे दृष्टीस घुंगरडीं । बळाची गाढी अति मस्ती ॥ १०० ॥

आदित्यमनुधावंतौ ज्वलंतं रश्मिमालिनम् ।
आवामाकाशमार्गेण जवेनोपगतौ भृशम् ॥ १३ ॥
मध्यं प्राप्ते तु सूर्ये वै जटायुरवसीदति ॥ १४ ॥

अंगीं बळाची आंगवण । त्यावरी आलें तरुणपण । पैज घालोनि दोघे जण । सूर्यचरणवंदनार्थ ॥ १ ॥ पक्षबळाचेनि झडाडें । एक धांवे एकापुढें । एक एकावरी चढे । सूंभानु पुढें लक्षोनि ॥ २ ॥ वेगें येतां सूर्यापासीं । तंव तो असे मध्यान्हासी । जटायु जाला कासाविसी । रविकिरणेंसीं पोळोनि ॥ ३ ॥ तो रिघाला मजतळीं । मी श्लाघलों तये वेळीं । तंव पंखांची जाली होळी । गर्वमेळीं श्लाघ्यता ॥ ४ ॥ जटायूचे वांचले पंख । माझ्या पंखांची जाली राख । बाप गर्वाचें कौतुक । परम दुःख पावलों ॥ ५ ॥ माझ्या पंखांची होतां

१ भुकेलेल्यांना. २ अनादिसिद्ध असें. ३ अखेरीस. ४ कोणते कामासाठीं. ५ समुद्र. ६ पूर्वस्मरण होऊन. ७ जुळे. ८ सूर्य. ९ प्रौढी मिरविली.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

होळी । थोर दिधली म्यां आरोळी । अरुणें देखतां तये वेळीं । थोर कळवळी पुत्रस्नेहें ॥ ६ ॥ सूर्याप्रती सांगे अरुण । माझे पुत्र दोघे जण । स्वामीचे वंदूं येतां चरण । पक्षदहन केलें तेजें ॥ ७ ॥ भूतळीं जन करिती नमन । ते मी देखेन स्वयें सुभान । मज दावितां अंगवण । गर्वें दहन दोहीं पक्षां ॥ ८ ॥ माझे तेजाचे निजदीप्तीं । गर्वी तितुके भस्म होती । अरुणा तुझी हे संतती । म्हणोनि संपाती वांचला ॥ ९ ॥ अरुणा तुझें राखावया मन । पुत्ररक्षार्थ[1] देतों वरदान । तें तूं एकें सावधान । पुत्रसंतानउद्धारा ॥ ११० ॥ तूं तंव माझा निजसारथी । मज तुज नित्य एक गती । तुझी उद्धरावया संतती । शुद्ध वरदोक्ती अवधारीं ॥ ११ ॥ श्रीरामभक्तांचे संगतीं । ऐकतां रामनामवचनोक्ती । निरभिमानें पक्षप्राप्ती । स्वयें संपाती पावेल ॥ १२ ॥ होतां रामनामश्रवण । उभयपक्षीं निरभिमान । पक्ष पावोनि पूर्ण । अगम्य गमन करील ॥ १३ ॥ निरभिमान पक्षप्राप्ती । आगमनिगमअगम्यगती । येथें पावेल संपाती । सुखानुभूति[2] श्रीरामें ॥ १४ ॥ रामनामें दुःखनिवृत्ती । रामनामें सुखसंपत्ती । रामनामें अगम्यगती । जाण निश्चितीं सारथिया ॥ १५ ॥ जेथें श्रीरामआगमन । जटायु पावेल जनस्थान । करितां सीतासंरक्षण । रामें उद्धरण जटायु ॥ १६ ॥ दशरथकौसल्येच्या कुशीं । श्रीराम अवतरेल सूर्यवंशीं । यालागीं मैत्री दशरथासीं । करी विश्वासीं जटायु ॥ १७ ॥ जनस्थानामाझारीं । जटायु गेला पक्षेंकरीं । दक्षिणसमुद्राचे तीरीं । मी विंध्याद्रि तेथें पडलों ॥ १८ ॥ दग्धपक्ष देहव्यथा । काय खावें हे नित्य चिंता । राम नाठवेचि सर्वथा । वरदवार्ता बिसरलों ॥ १९ ॥ नेणें मी जटायु गेला केउता[3] । तोही नेणे माझी वार्ता । जटायु धन्य तुम्ही बोलतां । आजि म्यां आतां आयकिलें ॥ १२० ॥ कृपा करावी हनुमंता । म्हणोनि चरणीं ठेविला माथा । जटायूची समूळ कथा । मज तत्त्वतां सांगावी ॥ २१ ॥ ऐकोनि जटायूचें नाम । संपातीसी आलें प्रेम । धन्य धन्य जटायूचा धर्म । तेणें श्रीराम सेविला ॥ २२ ॥ मी करंटा पक्षहीन । राम नाठवे पापी पूर्ण । धन्य धन्य वानरांचें दर्शन । श्रीरामश्रवण मज जालें ॥ २३ ॥ श्रीरामाची कवण स्थिती । जटायूची कवण गती । तुम्ही अवघे प्राणत्यागार्थीं[4] । येथें कां आलेती तें सांगा ॥ २४ ॥

नामधेयमिदं भ्रातुः श्रीरामोऽपि मया श्रुतः ।
तत्त्वमिच्छाम्यहं श्रोतुं विनाशं बांधवस्य च ॥ १५ ॥

सात शतां वर्षांपाठीं । तुम्हां वानरांच्या वाक्पुटीं[5] । ऐकिली जटायूची गोष्टी । ज्याची मज पोटीं मोठी चिंता ॥ २५ ॥ जटायु पडला कवणे स्थितीं । जटायूची कवण गती । ऐसी चिंता वाहतां चित्तीं । शुद्धि निश्चितीं आज जाली ॥ २६ ॥ रावणें करितां सीताहरण । जटायुरावणांसीं रण । कैसेनि जटायु पावला मरण । श्रीरामें उद्धरण कैसें केलें ॥ २७ ॥ जटायूसी बळ संपूर्ण । मारूं न शके त्यासी रावण । कैसेनि जटायु पावला मरण । समूळ कथन मज सांगा ॥ २८ ॥ ऐकतां संपातीची वार्ता । कृपा उपजली हनुमंता । जटायूची समूळ कथा । होय सांगता स्वानंदें ॥ २९ ॥ दाशरथि श्रीरघुनंदन । पितृवाक्यें वनाभिगमन । सीतासमवेत लक्ष्मण । आला ठाकून जनस्थाना ॥ १३० ॥ जाली जटायूसी भेटी । स्वामिसेवकां पडिली मिठी । आश्रम केला गंगातटीं । पंचवटीं अति रम्य ॥ ३१ ॥ रामाश्रमीं अहोरात्र । जटायु जाला घरटीकार[6] । जानकी जननी अति सुंदर । अष्टौ प्रहर संरक्षी ॥ ३२ ॥ जटायु गेला वनभ्रमणा । मृगें छळिलें रामलक्ष्मणां । भिक्षामिषें आगमन रावणा । सीताहरणा तेणें केलें ॥ ३३ ॥

ददर्श सीतां वैदेहीं ह्रियमाणां विहायसा ।
रावणं विरथं कृत्वा मोचयित्वा च जानकीम् ॥ १६ ॥
छलेन युद्धधर्मेण रावणेन हतो रणे ॥ १७ ॥

सीता आक्रंदतां जाण । जटायु आला पैं धांवोन । रावणेंसीं केलें रण । अति निर्वाण तें ऐका ॥ ३४ ॥ भंगिलें चाप छेदिले शर । मारिले पिशाचवदन खर । झडपा हाणोनि रहंवर[7] । अति सत्वर भंगिला ॥ ३५ ॥ शिरींचा पाडोनियां मुकुट । दहाही झांबाडिले कंठ । रावणा गुलवोनि वाट ।

१ पुत्राचे रक्षणाकरितां. २ सुखाचा अनुभव. ३ कोठें. ४ प्राण देण्याच्या उद्देशानें. ५ तोंडानें. ६ संरक्षक. ७ रथ.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

प्राणसंकट मांडिलें ॥ ३६ ॥ नखक्षतीं वाहे रुधिर । वीस भुजा केल्या चूर । सोडवोनि सीता सुंदर । दशशिर गांजिला ॥३७॥ जटायु पुरे पुरे रण । माझा निघों पाहे प्राण । रावण दांतीं धरोनि तृण । जीवदान मागतसे ॥३८॥ रावण स्वयें आला शरण । जटायु त्याचा न घे प्राण । रक्षिला शरणागत म्हणोन । सीता घेऊन सोडिला ॥ ३९ ॥ पक्षे गांजिलें निश्चितीं । धुळीं मिळाली यशःकीर्ती । रावण परतला पुढती । छळणार्थीं पणयुद्धें ॥ १४० ॥ घालोनि श्रीरामाची आण । जटायूसी मृत्यु पुसे रावण । वामचरणांगुष्ठीं माझें मरण । सांगे आपण छळणोक्तीं ॥ ४१ ॥ ऐकतां निजबंधूची ख्याती । उल्लास संपातीचे चित्तीं । तंव तंव निजपक्ष वाढती । जैंवी वसंतीं वृक्षांगें ॥ ४२ ॥ श्रीरामाची निर्वाण आण । जटायु मानोनि प्रमाण । उभयपक्षीं सांगे मरण । युद्धा रावण पेटला ॥ ४३ ॥ जटायूनें एकाएक । अंगुष्ठ छेदिला सनख । रावणें उपडिले दोनी पंख । पावला दुःख जटायु ॥ ४४ ॥ पक्षोत्पाटीं यावें मरण । घ्यावया श्रीरामाचें दर्शन । करितां श्रीरामनामस्मरण । कंठीं प्राण राखिला ॥ ४५ ॥ श्रीराम कृपाळु पैं पूर्ण । राखता जटायूचा प्राण । तेणें धरोनियां चरण । युक्तवचनीं विनविलें ॥ ४६ ॥ तुजपुढें त्यजितां प्राण । मी होईन ब्रह्म पूर्ण । पुढां वांचल्यावरी भाग्य कोण । ऐसें मरण मग कैंचें ॥ ४७ ॥ ऐकतां जटायूचें वचन । श्रीराम जाल सुप्रसन्न । देहीं विदेही ब्रह्मपूर्ण । जाला आपण जटायु ॥ ४८ ॥ ऐशापरी श्रीरघुनाथें । उद्धरोनि जटायूतें । पुढें सीतेच्या शुद्धीतें । आले निश्चितें किष्किंधे ॥ ४९ ॥ तेथें वधोनि वाळीसी । राज्य दिधलें सुग्रीवासी । यौवराज्य अंगदासी । वालिसुतासी दीधलें ॥ १५० ॥ तो अंगद दक्षिणेप्रती । सवें देवोनि जुत्पती । रामें धाडिले सीताशुद्ध्यर्थीं । यावें मासांतीं मर्यादा ॥ ५१ ॥ दक्षिण शोधितां समस्त । सीताशुद्धी न लभे येथ । मर्यादा लोटली विवरांत । तेणें धाकत अवघेही ॥ ५२ ॥ अवकळा करोनि थोर । सुग्रीव दंडील महाक्रूर । तेणें भयें हे वानर । आले समग्र प्राणत्यागासी ॥ ५३ ॥ शुद्धी न लभेचि सीता । काय सांगावें श्रीरघुनाथा । थोर बैसली लज्जा माथां । प्राणत्यागार्था येथें आलों ॥ ५४ ॥ ऐकोनि हनुमंताचें वचन । संपाती घाली लोटांगण । तुम्ही त्यजूं नका प्राण । सीता सांगेन मी तुम्हां ॥ ५५ ॥ तुम्ही श्रीरामसेवक । माझे भवपाशमोचक[४] । मी तंव चरणरजरंक । शुद्धी निर्दोष अवधारा ॥ ५६ ॥ शतयोजनें समुद्रपारीं । लंकागडदुर्गामाझारीं । अशोकवनाभीतरीं । सीता सुंदरी दिसताहे ॥ ५७ ॥ रामनाम नित्य वाक्पुटीं[५] । रामस्मरणाच्या निजदृष्टीं । पैल पाहें सीता गोरटी । मज निजदृष्टीं दिसताहे ॥ ५८ ॥ मज जैं पंख असते येथ । मर्दोनियां लंकानाथ । सीता आणितों मी त्वरित । श्रीरघुनाथसुखार्थ ॥ ५९ ॥ ऐसें बोलतां वचन । संपातीसी निरभिमान । पक्ष निघाले संपूर्ण । वरदान सूर्याचें ॥ १६० ॥ स्वयें देखतां वानरगण । पक्ष निघाले निरभिमान । निरभिमानाचें निजचिन्ह । सावधान अवधारा ॥ ६१ ॥ मर्दोनियां लंकापती । म्यां आणावी सीता सती । जगीं होईल अति ख्याती । हेही अहंकृती[६] त्या नाहीं ॥ ६२ ॥ सोडवोनि सती सीता । सुख द्यावें श्रीरघुनाथा । मी एक सेवक पँढियंता । हेही अहंता त्या नाहीं ॥ ६३ ॥ निरभिमानाची निजकळा । मीतूंपण न दिसे डोळां । श्रीराम मजहूनि वेगळा । कदाकाळ स्मरेना ॥ ६४ ॥ श्रीरामभक्तांचे संगतीं । संपातीसी येवढी प्राप्ती । ऐकतां ती श्रीरामकीर्ती । निजविश्रांती पावला ॥ ६५ ॥ निरभिमानाचें गमन । लंघोनियां त्रिभुवन । भूगोल भेदोनियां जाण । जाला परिपूर्ण परब्रह्म ॥ ६६ ॥ ऐकोनि श्रीरामाची कीर्ती । पशु पक्षी उद्धरती । वनाभिगमन श्रीरघुपती । त्रिजगतीं उद्धार ॥ ६७ ॥ एका जनार्दना शरण । श्रीरामनामें ब्रह्म पूर्ण । कथा ऐकतां रामायण । उद्धरण जड जीवां ॥ ६८ ॥

स्वस्ति श्रीभावार्थरामायणे किष्किंधाकांडे एकाकारटीकायां संपातिउद्धरणं नाम षोडशोऽध्यायः ॥ १६ ॥ ओंव्या ॥ १६८ ॥ श्लोक ॥ १७ ॥

---

१ नखांच्या ओरखड्यांनीं. २ रक्त. ३ योद्धे. ४ संसारबंधनांतून मुक्त करणारे. ५ मुखासध्यें. ६ गर्व. ७ आवडता.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

अध्याय सतरावा

॥ श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ॥

आख्याता गृध्रराजेन समुत्पत्य प्लवंगमाः ।

संगताः प्रीतिसंयुक्ता विनेदुः सिंहविक्रमाः ॥ १ ॥

संपातीनें सीताशुद्धी । यथार्थ सांगितली बुद्धी । तेणें वानरांची मांदी । जयजयशब्दीं गर्जत ॥ १ ॥ मिळोनि वानरांचा भार । सिंहनादाहूनि थोर । करिते जाले भुभुःकार । सीता सुंदर सांपडली ॥ २ ॥ येरयेरां आलिंगन । येरयेरां अभिवंदन । सीता सांपडली चिद्रत्न । हर्षें उड्डाण करिताती ॥ ३ ॥ आमुच्या कष्टांची जाली सिद्धी । आजि पावली सीताशुद्धी । म्हणोनि वानरांची मांदी । हर्षानुवादीं डुल्लत ॥ ४ ॥ येरयेरां दाविती वांकुल्या । येरयेरां करिती गुदगुल्या । सत्य सीताशुद्धी जालिया । आमुची फिटली आशंका ॥ ५ ॥ अंगदें बैसोनि सपरिवार । शतयोजन हा सागर । उल्लंघों शके कोण वीर । तो विचार मांडिला ॥ ६ ॥ पाचारोनियां जुत्पंती । समुद्रलंघनाचे अर्थीं । कोणासी किती आहे शक्ती । तें समस्तीं सांगावें ॥ ७ ॥

अथांगदवचः श्रुत्वा सर्वे वानरपुंगवाः ।

स्वां स्वां गतिं समुत्साहमूचुस्तत्र समाहिताः ॥ २ ॥

गजो गवाक्षो गवयः शरभो गंधमादनः ।

मैंदश्च द्विविदश्चैव सुषेणो जांबवान्नलः ॥ ३ ॥

एकोनि अंगदवचनोक्ती । अकरा जण सेनापती । समुद्रलंघनाचे अर्थीं । आपुलाली शक्ती सांगती ॥ ८ ॥ गज सांगे निजनिर्वाण । दश योजनें मज उड्डाण । गवाक्ष बोले प्रमाण । त्याहूनि द्विगुण शक्ति माझी ॥ ९ ॥ शरभ सांगे अति निगुतीं । तीस योजनें माझी शक्ती । चाळीस योजनांची गती । बोले पुरुषार्थी वृषभ तो ॥ १० ॥ शक्ति बोले गंधमादन । पन्नास योजनें मज उड्डाण । मैंद बोलिला आपण । साठी योजनें शक्ति माझी ॥ ११ ॥ द्विविद बोले आपुली थोरी । उड्डाण योजनें सत्तरी । सुषेण महावीर वानरीं । सरी नांवावरी नेवों नये ॥ १२ ॥ तारेचा पिता जो सुषेण । पश्चिमशोधा धाडिला जाण । त्याचेनि नांवें वीर आन । त्याचें उड्डाण चार विसा ॥ १३ ॥ सांगावया निजपुरुषार्थ । लज्जायमान जांबवंत । सुखी न करवेचि श्रीरघुनाथ । वळाचा घात वार्धक्यें ॥ १४ ॥ मज तारुण्यावस्था असती । तैं आणूनि सीता सती । सुखी करितों श्रीरघुपती । गेली शक्ती वार्धक्यें ॥ १५ ॥

किंतु वक्ष्याम्यहं वीर्यमात्मनो यौवनोदये ।

सुषेणेन मया चैव बलियज्ञे सनातनः ॥ ४ ॥

प्रदक्षिणीकृतः पूर्वं क्रममाणस्त्रिविक्रमः ।

विक्रमेण मया तात सशैलवनकानना ॥ ५ ॥

त्रिःसप्तकृत्वः पृथिवी परिक्रांता प्रदक्षिणम् ॥ ६ ॥

माझे तारुण्यपुरुषार्थी । माझा मी सांगेन आतां । करूं नका उपहासता । समूळ कथा अवधारा ॥ १६ ॥ बलियज्ञीं नारायण । वामनरूपी जावोनि आपण । करावया बळीचें छळण । जाला आपण त्रिविक्रम ॥ १७ ॥ तेणें काळीं मी आणि सुषेण । दोघां पूर्ण तारुण्यपण । करावया त्रिविक्रमप्रदक्षिण । दोघे जण निघालों ॥ १८ ॥ त्रिवार करितां प्रदक्षिण । सुषेणाची शक्ति क्षीण । चालतां मेटें वळलीं जाण । मूर्च्छापन्न तो पडिला ॥ १९ ॥ ते काळीं माझी आंगवण । लक्षोनि त्रिविक्रमचरण । पृथ्वी सशैलवनकानन । केलें प्रदक्षिण त्रिःसप्त ॥ २० ॥ एकवीस वेळां एके उच्छ्वासीं । करोनि पृथ्वीप्रदक्षिणेसी । सवेंचि गेलों कैलासासी । महेशासी वंदावया ॥ २१ ॥

गत्वा वेगेन कैलासमागतो विबुधालये ।

दैत्यः पर्वतहस्तः सन् देवेंद्रमभिपद्यत ॥ ७ ॥

बलदैत्यो मम पिता देवेंद्रेण हतः पुरा ।

इत्युक्त्वा पर्वतं तस्मै चिक्षेपासुरनंदनः ॥ ८ ॥

ततः पतनखेदात्तु पर्वतो जानुना धृतः ।

तेन भग्नश्च जानुर्मे जातोऽहं न्यूनविक्रमः ॥ ९ ॥

स कदाचिद्गतो हंतुं विबुधानृषिसत्तमान् ।

बलपुत्रमहं हत्वा क्रोधान्मृत्युमिवापरम् ॥ १० ॥

वेगीं जावोनि कैलासासी । वंदोनियां महेशासी । तों बळपुत्र आला स्वर्गासी । इंद्रादिकांसी वधावया ॥ २२ ॥ बळ दैत्य माझा पिता । इंद्रें वधिला

१ समुदाय. २ मोठमोठे योद्धे. ३ दृढनिश्चयानें. ४ पराक्रमी. ५ बरोबरी. ६ वृद्धपणानें. ७ धिक्कार, निंदा.

८ अवसान खचलें. ९ एकवीस वेळां.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

अवचितां। त्याचा सूड घेईन आतां। करीन घाता इंद्राच्या ॥ २३ ॥ येणें रागें दैत्यसुतें। मारावया इंद्रातें। पर्वत उचलोनियां हातें। कोपें अद्भुत चालिला ॥ २४ ॥ इंद्रें हाणितलें वज्रघातें। वज्र झेलोनि डावे हातें। मग मारावया इंद्रातें। कोपें अद्भुत चालिला ॥ २५ ॥ बळपुत्र महाबळी। पर्वत झेलोनि करतळीं। करावया इंद्राची रांगोळी। क्रोधानळीं चालिला ॥ २६ ॥ येतां देखोनि गिरिवर। स्वर्गीं कांपती सुरवर। तों म्यां झेलिला सत्वर। उडी अति शीघ्र घातली ॥ २७ ॥ पर्वत झेलिला त्वरेंकरीं। तो निसटला दोहीं करीं। मग म्यां धरिला जानूवरी। अमरपुरी वांचविली ॥ २८ ॥ क्रोधें येतां बळपुत्रासी। म्यां दृढ युद्ध केलें त्यासीं। माझे बळें होतां कासाविसी। लघु लाघवेंसीं पळूं पाहे ॥ २९ ॥ पर्वतघातें भग्नचरण। तेणेंसीं शीघ्र करोनि उड्डाण। बळपुत्राचा घेतला प्राण। तेणें सुरगण सुखावले ॥ ३० ॥ तैंपासूनि भग्नचरण। माझी वार्धक्यें शक्ति क्षीण। तरी समुद्रीं उड्डाण। नव्वद योजनें करीन ॥ ३१ ॥ नळ बोलिला आपण। समुद्रामाजी उड्डाण। सत्याण्णव योजनें करीन जाण। त्यावरी त्राण मज नाहीं ॥ ३२ ॥ नीळ बोलिला वचन। एकें उड्डाणें शत योजन। करीन समुद्रोल्लंघन। हे आंगवण पैं माझी ॥ ३३ ॥ वालिसुत राजकुमार। अंगद जो कां महावीर। समुद्रोलंघनप्रकार। निजनिर्धारें सांगत ॥ ३४ ॥ शतयोजनें अब्धिलंघन। एक उड्डाणें करीन जाण। पुढती यावयालागीं जाण। संदेहापन्न मति माझी ॥ ३५ ॥ एके उड्डाणें उठाउठीं। जाईन समुद्रपरतटीं। तेथें आलिया राक्षसथाटीं। युद्ध निजनेटीं होय नव्हे ॥ ३६ ॥ माझे अंगीं बाळपण। नाहीं निवडली आंगवण। तरी स्मरोनि श्रीरामचरण। सीता साधीन क्षणमात्रें ॥ ३७ ॥ करितां रामनामस्मरण। राक्षसें बापुडीं तीं कोण। कायसा बळियाढ रावण। सीता आणीन निमेषार्धें ॥ ३८ ॥ ऐकोनि अंगदाचें उत्तर। वानरीं केला जयजयकार। जुत्पती करिती जोहार। तूं राजकुमर आतुर्बळी ॥ ३९ ॥ आम्ही असतां सेवक सकळ। राजकुमर आणि तूं बाळ। समुद्रलंघनाचें स्थूळ। तुजवरी सळ नये घालूं ॥ ४० ॥ अंगद म्हणे हें करितां। प्राण देणें लागेल समस्तां। सीताशुद्धीवीण जातां। अपमानता अनिवार ॥ ४१ ॥ तंव बोलिला जांबवंत। हनुमंत वीर अति विख्यात। हा कां उगाचि असे पहात। अत्यद्भुत प्रतापी ॥ ४२ ॥ बाळपणीं आकळितां भानु। राहूचा निर्दळिला अभिमानु। याचा पिता प्रभंजनु। बळवाहनु हनुमंत ॥ ४३ ॥ त्यासी गर्भीं ब्रह्मचर्यकौपीन। त्याचा देखणार रघुनंदन। माता अंजनी न देखे नग्न। ब्रह्मचारी पूर्ण कपिराज ॥ ४४ ॥ ऐसें बोलतां जांबवंत। स्तवनें हरिखला हनुमंत। लांगूल त्राहाटिलें रोमांकित। आल्हादयुक्त ऊठिला ॥ ४५ ॥ शतयोजनें अब्धिलंघन। तें माझें पादक्रमण। तुम्हांसी संदेह तो कोण। सीता आणीन निमेषार्धें ॥ ४६ ॥ करोनि रावणा उपहती। राक्षसां लावोनियां ख्याती। प्रतापें आणीन सीता सती। श्रीरघुपतिसुखार्थ ॥ ४७ ॥ आणिक एक विचार। तुम्हांसी सांगेन साचार। जेणें सुखी होय रघुवीर। तोही प्रकार मी करीन ॥ ४८ ॥ अवज्ञेनें आणितां सीता। कोप येईल रघुनाथा। तरी गांजोनि लंकानाथा। शुद्धी मी आतां आणीन ॥ ४९ ॥

महासंहननोपेतौ महान्तौ पुरुषर्षभौ।
ऋष्यमूकात्पुनःशैलादुभौ तौ रामलक्ष्मणौ ॥ ११ ॥
आनयिष्यामि वैदेह्याः सकाशं वानरर्षभ।
आनयिष्यामि तां देवीं रामस्य महिषीं प्रियाम् ॥ १२ ॥

राक्षसारी राम लक्ष्मण। वीर शूर दोघे जण। सीतेपासीं मी नेईन जाण। सकुळी रावण निर्दळावया ॥ ५० ॥ ऋष्यमूकपर्वताहूनि जाण। घेवोनियां राम लक्ष्मण। घालीन लंकेवरी उड्डाण। सकुळी रावण मारावया ॥ ५१ ॥ अथवा मी आतुर्बळी। करीन राक्षसां रवंदळी। सीता आणीन रामाजवळी। हरिखें टाळी पिटीत ॥ ५२ ॥ सीता

१ एकाएकीं. २ वज्राचा आघात करून. ३ क्रोधाग्नीनें. ४ मुख्य मुख्य देव. ५ घाईनें. ६ लंगडा. ७ संशययुक्त. ८ समुद्राच्या दुसऱ्या तीरावर. ९ राक्षसांचा समुदाय. १० मोठें. ११ संकट. १२ वायु. १३ आपटिलें. १४ समुद्र उल्लंघून जाणें. १५ चुराडा, नाश. १६ आनंदानें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

आणीन रामापासीं । कां राम देईन सीतेपासीं । अथवा शुद्धी आणीन तुम्हांपाशीं । या कार्यासी मी कर्ता ॥ ५३ ॥ लंकाद्वारीं रणकल्लोळीं । खेळेन शिरांची चेंडूफळी । लंकेची करीन होळी । तरी मी बळी हनुमंत ॥ ५४ ॥ सीताशुद्धी ते तंव किती । यालागीं कायसी कुंथाकुंथी[1] । सुखी रहावें समस्तीं । लंकेप्रती मी जातों ॥ ५५ ॥ ऐसें बोलोनि आपण । समस्तांसी घालोनि लोटांगण । अंगदें दिधलें आलिंगन । गर्जे गगन आल्हादें ॥५६॥ कपी हरिखले समस्त । त्यांसी हनुमंत बोलत । माझा उड्डाण-अंगवात । सहावया शक्त तुम्ही नव्हां ॥ ५७ ॥

न मे कोऽपि महावेगं प्लवने धारयिष्यति ।
एतानीह नगस्यास्य शिलासंकटशालिनः ॥ १३ ॥
शिखराणि महेंद्रस्य स्थिराणि च महांति च ।
एतानि मम वेगं हि पादयोः प्लवगोत्तमाः ॥ १४ ॥

माझे उड्डाणाचे निजनेटें । महेंद्र पृथ्वीमाजी दाटे । पर्वतशिखरें होती पीठें । कडे कपाटें बुजतील ॥ ५८ ॥ उड्डाणाचा अंगवात । पर्वत तुटोनि तळीं पडत । शिखरें तृणप्राय उडत । वृक्ष उपडत समूळीं ॥ ५९ ॥ वृक्ष उपडोनि समूळीं । परिभ्र[2]मती अंतराळीं[3] । शुष्क पर्णें वाहुटळीं । तैशा वेळुजाळी उडतील ॥ ६० ॥ उचंबळेल समुद्रजळ । तेणें तिमिरें[4] ध्रुवमंडळ । दिग्गज कांपती चळचळ । अति तळमळ जळचरां ॥ ६१ ॥ अंगवाताचेनि घर्घरें[5] । बैसती मेघांचीं दांतोरें[6] । समुद्र[7]गडगर्जनविसरें । येतील शाहारे कळिकाळा ॥ ६२ ॥ त्या नादाचा धाक मोठा । उमा झोंबेल नीलकंठा । रमा थापटी वैकुंठा[8] । भयसंकटा निवारीं ॥ ६३ ॥ उड्डाणकाळ अति दुर्धर । सुर नर धाकती निशाचर । तेथें तुम्ही गा वानर । कैसेनि धीर धराल ॥ ६४ ॥ यालागीं तुम्ही वानरगण । हात धरोनि अवघे जण । पर्वत कवळा सत्राण । तरीच प्राण उरतील ॥ ६५ ॥ दक्षिणेचे पर्वतकडे । तुटोनि पडती झडाडें । तुम्हीं रहावें उत्तरेकडे । होवोनि गाढे सुलीन ॥ ६६ ॥ जैसा श्रीरामाचा बाण । तैसें करीन उड्डाण । लंकेमाजी प्रथम कंदन । बोहणी जाण मी करीन ॥ ६७ ॥ करीन इंद्रजितासीं सळ । तुंकीन रावणाचें बळ । राक्षसांचें अमित दळ । तें मी सकळ गांजीन ॥ ६८ ॥ पाडोनि राक्षसदांतांसी । त्यांच्या मी करीन राशी । मग मोजूनि कुडवेंसीं । घालीन सळेंसीं रावण ॥ ६९ ॥ घेतां लंकेची घरधांडोळी[10] । जरी न लभे जनकबाळी । लंका उपडोनि समूळीं । रामाजवळी आणीन ॥७०॥

इति तस्य ब्रुवाणस्य सर्वे वानरपुंगवाः
चक्रुः प्रशंसां मुदिताः शक्रस्येव मरुद्गणाः ॥ १५ ॥
तस्य पुष्पवतीं चक्रुर्वनमालां महात्मनः ।
चक्रुस्ते वानरश्रेष्ठा बाहुभ्यां मंगलानि च ॥ १६ ॥
स तैः परिवृतः श्रीमान् वानरैर्वानरर्षभः ।
आरुरोह नगश्रेष्ठं महेंद्रमरिमर्दनः ॥ १७ ॥

ऐसें हनुमंताचें वचन । ऐकोनियां वानरगण । हर्षें वंदिले त्याचे चरण । जेंवी मरुद्गण इंद्रासी ॥ ७१ ॥ श्रीरामस्मरणलीला । त्याचि सुमनांच्या माळा । वानरीं विचित्र घातल्या गळां । वनीं वनमाळा शोभत ॥ ७२ ॥ परिवारलें[11] वानरभारीं । इंद्रासमान ज्याची थोरी । त्या चढला महेंद्रगिरीं । लंकापुरी लक्षोनी ॥ ७३ ॥ करोनियां श्रीरामस्मरण । देवोनि वानरां आलिंगन । करावयासी उड्डाण । आल्हाद पूर्ण हनुमंता ॥ ७४ ॥ मुखीं श्रीरामनाममुद्रा । हृदयीं धरोनि श्रीरामचंद्रा । उल्लंघावया समुद्रा । कपिकुंजरें[12] आल्हाद ॥ ७५ ॥ पाहतां निजबाहूंचें त्राण । अंगा आलें निजस्फुरण । लांगूल त्राहाटितां जाण । रोमांच पूर्ण थरकती ॥७६॥ पुच्छ आदळितां बळी । शिळाशिखरां झाली रांगोळी । वृक्ष वृक्ष मिळाले पैं धुळी । पुष्पीं फळीं समवेत ॥ ७७ ॥ पक्षी कळकळती आकाशीं । महाप्रळय दिग्गजांसी । तरस तगर बिळवासी । सिंहसूकरांसी अति त्रास ॥ ७८ ॥ उड्डाण करितां महाबळी । पर्वत दाटला[13] पायतळीं । तेणें तो रुपला भूतळीं । सर्प पाताळीं दडपले ॥ ७९ ॥ अर्धसर्प दडपतां एक । बाहेर काढोनियां मुख । सक्रोध वमितां[14] पैं विख । शिळा निःशेख भस्म होती ॥८०॥ जैसीं उभारिलीं छत्रें । सर्पफणा तदाकारें । अर्ध दडपिलीं शरीरें । फुफूत्कारें गर्जती ॥ ८१ ॥ सर्पीं वमितां पैं गरळ । उठती अग्नीचे कल्लोळ । विख सरलिया सकळ । अति विकळ तळमळती ॥ ८२ ॥

१ खेद. २ भोंवतात. ३ आकाशांत. ४ भिजेल. ५ घरघर शब्दानें. ६ दांताळीं. ७ समुद्रगर्जनांच्या समूहानें. ८ विष्णूला.

९ अजमावून पाहीन. १० घरांची झडती. ११ वेष्टिला. १२ वानरश्रेष्ठाला. १३ चेंपला, दडपला. १४ ओंकल्यानें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

पर्वतीं दिव्यौषधी अनेक। दाटल्या स्त्रवती पीयूख चोख। तो रस लागतांचि देख। निःशेष विख निमालें ॥ ८३ ॥ भारें दडपला पर्वतू। श्वेत पीत आरक्त धातू। धारावर्ती[1] पैं स्त्रवतू। तेणें शोभतू गिरिराज ॥ ८४ ॥ वामन जाला त्रिविक्रम। तैसा वाढला तो वानरोत्तम। दृढ धरिला आक्रम। पराक्रम स्वामिकार्या ॥ ८५ ॥ पर्वणीं वाढे जेंवी समुद्र। तैसा वाढला कपींद्र। तेणें दचकला काळाग्निरुद्र। ऐसा भ्यासुर भासत ॥८६॥ समुद्र-लंघनकौतुक। पाहूं आले ब्रह्मादिक। सुरवर दाटले अनेक। सिद्ध गुह्यक गंधर्व ॥ ८७ ॥ नाना-परींच्या विमानपंक्ती। नभीं दाटल्या नेणों किती। कैसा कैसा उडेल मारुती। पहावया समस्तां आल्हाद ॥८८॥ उमा रमा आणि सावित्री। पाहूं आल्या नवही नारी। समुद्रामाजीं वानरीं। कैसे-परी उडिजेल ॥ ८९ ॥ समुष्टि बाहु धरोनि पुढां। वळूनि पुच्छाचा आंकडा। बळें उडतां पैं माकडा। पडिला तडा[2] गिरितटीं ॥ ९० ॥ कडे खचले सागरीं। शिखरें उडालीं अंबरीं। समूळ वृक्ष वारेनिकरीं[3]। गगनांतरीं पैरिभ्रमत ॥ ९१ ॥ जैसा बोळवोनि अति आप्त। सुहृद माघारे परतत। तेंवी पाषाण वृक्ष समस्त। मागें पडत सागरीं ॥ ९२ ॥ विकट वानरें दिधली हांक। दुमदुमिले तिन्ही लोक। कळिकाळें घेतला धाक। सुर साशंक विमानीं ॥ ९३ ॥ जिणोनि पवनाची शक्ती। उल्लंघोनि मनोगती। लंका लक्षोनि मारुती। शीघ्रगतीं निघाला ॥ ९४ ॥ वेगें उडतां वानर। क्षोभें खवळला सागर। तेणें भुलले जळ-चर। येरां येर झोंबती ॥ ९५ ॥ अंगवातें मारुती। खुंटली रविचंद्रांची गती। ग्रहनक्षत्रें डळमळती। निजात्मगती खुंटली ॥ ९६ ॥ हनुमंताच्या अंग-दीप्तीं। नभीं शशि सूर्य लोपती। नक्षत्रांच्या लाह्या होती। तेजें मारुती देदीप्यमान ॥ ९७ ॥ बाळ-सूर्याचा ओतिला। कीं शेंदुराचा रचिला। नां तो कुंकुमाचा घडिला। तैसा देखिला हनुमंत ॥ ९८ ॥ हनुमंताच्या अंगप्रभा। नभत्व लोपताहे नभा। दिव्य तेजाचा निजगाभा। तैसी शोभा शोभत ॥ ९९ ॥ जैसा रामबाण नभाआंत। तैसा हनुमंत असे जात। साधावया स्वमिकार्यार्थ। त्वरान्वित मारुति ॥ १०० ॥ जैसें तप्तचामीकर[6]। तैसा जातसे वानर। विश्रांति द्यावया सत्वर। सांगे सागर मैनाद्री ॥ १ ॥ मी सगराचा स्थापित। सूर्यवंशाचा नित्यांकित। त्वरेनें जातसे हनुमंत। रामकार्यार्थ साधावया ॥ २ ॥

अस्य साह्यं मया देयमिक्ष्वाकुकुलवर्तिना।
इक्ष्वाकुकुलजो रामो मम पूज्यतमः परम् ॥ १८ ॥
कुरु साचिव्यमस्माकं विना कल्पात्ययो भवेत्।
सलिलादूर्ध्वमातिष्ठ विश्रमेच्च यथा कपिः ॥ १९ ॥

मज पूज्यता सूर्यवंशीं। साह्य व्हावें हनु-मंतासी। विसांवा द्यावया वानरासी। अति त्वरेंसीं भागला ॥ ३ ॥ यालागीं तुवां मैनाद्री। वेगीं निघावें जळाबाहेरी। संमुख निघोनि झड-करी। कपींद्रा करीं विश्रांती ॥४॥ हनुमान जातो त्वरेंकरीं। विलंब होतां जाईल दुरी। इतकें माझें प्राधान्य करीं। देईं वानरा विश्रांती ॥ ५ ॥ विश्रांति दिधलिया वानरीं। सेवा उपतिष्ठे श्रीरा-मचंद्रीं। पुढील मार्ग लंकापुरी। क्षणामाझारीं पावेल ॥ ६ ॥ ऐकें मैनाद्रि गिरिनाथा। विश्रांति दिधलिया हनुमंता। सुखसंतोष श्रीरघुनाथा। हें कार्य सर्वथा तुवां कीजे ॥ ७ ॥ ऐसें सांगतां सागर। उल्लासें वाढला गिरिवर। सुस्वादुफळें अरुवारें[9]। निर्मळ नीर कपिपूजा ॥ ८ ॥ विश्रांति-स्थळ अति प्रबळ। मंद सुगंध मलयानिळ। पंचम कूजती कोकिळ। झणत्कारें अलिकुळें ॥ ९ ॥ मागील जावोनि सकळ श्रम। पुढें विश्रांति पावे परम। ऐसा साधिला आराम। वानरोत्त-मविश्रांती ॥ ११० ॥ ऐसिया आरामकैवाडें[10]। हनु-मंताच्या मार्गापुढें। गिरि वाढला वांडेंकोडें[11]। विश्रांतिचाडें कपींद्रा ॥ ११ ॥ वाढला देखोनि पर्वत। उंच चढला हनुमंत। गिरि वाढला मार्ग रोधीत। त्याहूनि हनुमंत उंचावला ॥ १२ ॥ जंव जंव पर्वत वरती वाढे। तंव तंव मारुति गगनीं चढे। श्रम न बाधी तयाकडे। विश्रांतिचाडे उदास ॥ १३ ॥ नभीं चढला योजनशत। द्विगुण वाढला पर्वत। हनु-

१ अमावास्येला व पौर्णिमेला. २ भेग, फट. ३ वाऱ्यानें. ४ भोंवूं लागले. ५ किंवा. ६ तापविलेलें सोनें. ७ घाईनें.

८ केल्यासारखी होईल, राहील. ९ मधुर. १० विश्रांतीच्या मिषानें. ११ उल्हासानें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

मंत चढला पांच शत । गिरि सप्त शत वाढला ॥ १४ ॥ हनुमान चढला सहस्रवरी । इतकाचि वाढला गिरी । कपि चढला तयाहीवरी । समुद्रपरपारीं जावया ॥ १५ ॥ गिरि वाढला लक्षकोटी । कपि चढला नभःपृष्ठीं । पर्वत स्वयें कपाळ पिटी । चरणभेटी मज नव्हे ॥ १६ ॥ लंघोनि जातां हनुमंत । ग्लानीं मैनाक विनवीत । तूं कृपाळु श्रीरामदूत । उपेक्षून कां जासी ॥ १७ ॥ तुझा लागलिया चरण । मी होईन अति पावन । यालागीं मी वाढलों गा जाण । नाहीं अभिमान तुजसीं मज ॥ १८ ॥ सागरें सांगितलें मजप्रती । हनुमंता पूजावें अतिथी । यालागीं आलों मी तुजप्रती । द्यावया विश्रांति रामभक्ता ॥ १९ ॥ सगरें स्थापिला साचार । यालागीं नांवें तो सागर । तूंही सूर्यवंशींचा किंकर । आम्ही समग्र दास तुझे ॥ १२० ॥ तुझ्या पित्याचा स्थापित । मी वसत आहें समुद्रांत । तोही अवधारीं वृत्तान्त । उपेक्षित जाऊं नको ॥ २१ ॥ पूर्वी पर्वत पक्षधर । उड्डाणें घेती अति दुर्धर । पुरें पट्टणें करिती चूर । नगरेंनगर भंगिती ॥ २२ ॥ इंद्रें[1] घेवोनियां वज्र । गिरिपक्ष छेदिले समग्र । माझेही छेदावया दुर्धर । वज्रधर चालिला ॥ २३ ॥ मज होतां पलायमान । साह्य जाला तुझा पिता पवन । समुद्रीं आला गा घेवोन । तेणें हा प्राण वांचला ॥ २४ ॥ तुझ्या पित्याचा स्थापित । समुद्रामाजी होतों गुप्त । येतां देखोनि हनुमंत । विश्रांतिहेतू[2] वाढलों ॥ २५ ॥ ऐकोनि मैनाद्रीच्या वृत्तांता । कृपेनें सांगे निजकार्यार्था । शोधावया श्रीरामकांता । अति शीघ्रता मी जातों ॥ २६ ॥ आधीं असावी विश्रामता । मग द्यावी विश्रांतता । नामस्मरणें श्रीरघुनाथा । श्रमावस्था मज नाहीं ॥ २७ ॥ ज्यासी नाहीं नामीं विश्वास । त्यासी बाधी श्रम शोक त्रास । श्रीरामाचा निजदास । श्रमाचा लेश मज नाहीं ॥ २८ ॥ ऐकोनि हनुमंताचें वचन । मैनाद्रीस आलें रुदन । भाग्यें अभागी मी परिपूर्ण । हनुमंतचरण अप्राप्य[3] ॥ २९ ॥ पर्वताचा खेद देखोन । हनुमंत बोलिला वचन । तुझें न घें फळ मूळ जीवन । अंगुलिस्पर्शेन[4] तुज न करीं ॥ १३० ॥ पर्वत म्हणे हनुमंता । कृपेनें हात ठेवीं माथां । इतकेन मी सनाथता । आणिक सर्वथा मागेंना ॥ ३१ ॥ तंव इंद्र म्हणे मैनाद्री । जालासी हनुमंता साहाकारी । तुज मी सर्वथा न मारीं । समुद्राबाहेरीं सुखें विचरें ॥ ३२ ॥ मग हनुमंतें तये वेळीं । पर्वतीं ठेविली आंगोळी । भारें बैसला समुद्रतळीं । जाला पाताळीं हाहाकार ॥ ३३ ॥ पन्नग म्हणती पर्वतावरी । अतिशय भार पडिला भारी । करील सप्तपाताळचुरी । नवनागांतरीं हाहाकार ॥ ३४ ॥ आंगोळी ठेवितांचि शिरीं । पर्वत बुडाला सागरीं । कपि बैसता जरी वरी । तैं होता चकचुरी निर्नाम ॥ ३५ ॥ इतुकी करोनि ख्याती । पुढें चालिला मारुती । ब्रह्मादिकां विस्मय चित्तीं । जयजय करिती सुर सिद्ध ॥ ३६ ॥ उल्लंघावया अपांपती[5] । मारुती निघाला शीघ्रगती । तेणें देवदानवांप्रती । गजबज चित्तीं जाहली ॥ ३७ ॥ देव दानव अवघे जण । हनुमंताचा मार्ग रोधून । करावया चालिले विघ्न । तेंही कथन अवधारा ॥ ३८ ॥

ततो देवाः सगंधर्वाः सिद्धाश्च ऋषयस्तदा ।
समब्रुवन् दानवानां मातरं सुरसां दनुम् ॥ २० ॥
अयं वातात्मजः श्रीमान् प्लवते सागरोपरि ।
हनूमान्नाम तस्य त्वं मुहूर्तं विघ्नमाचर ॥ २१ ॥
बलमिच्छामहे ज्ञातुं वयं चास्य पराक्रमम् ।
किं करिष्यत्युपायं वा विषादं वा करिष्यति ॥ २२ ॥

सागरावरी शीघ्र गमन । करिताहे वायुनंदन । राक्षसरूपें करावें विघ्न । गमनागमन खंडावें ॥ ३९ ॥ किती बळ आहे हनुमंता । पहावया आवडी देवां समस्तां । दानवांची दनु जे माता । ते विघ्नार्थी धाडिली ॥ १४० ॥ जावों शके निजात्मशक्ती । किंवा येईल काकुळती । काय करील मारुती । तें निश्चितीं आम्ही पाहूं ॥ ४१ ॥ दनु सुरसा दानवांची माता । कपटतेजें सतेजता । ऐकोनि देवांची हे कथा । विघ्न हनुमंता करूं आली ॥ ४२ ॥ आश्रयूनि समुद्रजळ । राक्षसी जाहली विकराळ । मुख पसरोनि कराळ[6] । कपि तत्काळ गिळों आली ॥ ४३ ॥ येणें मार्गें जे जे येती । ते ते माझें भक्ष्य निश्चितीं । तुज मी गिळीन पुसें युक्ती । रीघ मुखाप्रति वानरा ॥ ४४ ॥ सीता-

१ इंद्र. २ विश्रांति देण्याच्या हेतूनें. ३ दुर्लभ. ४ बोटानें स्पर्श करणें. ५ समुद्र. ६ भयंकर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

शुद्धीसी जातों लवलाहें। श्रीरामकार्यासी साह्य होयें। विघ्न न करीं वो माये। तुझे पाये वंदितों ॥ ४५॥ भोजनीं निवारी क्षुधिता। तो सज्ञान अति मूर्खता। कैंचा राम कैंची सीता। तुज मी आतां भक्षीन ॥ ४६॥ आपुलें चुकावया मरण। मज सांगसी ब्रह्मज्ञान। क्षुधेनें निमालियां प्राण। सुकृत कोण भोगील ॥ ४७॥ राक्षसीनें पसरिलें वदन। हनुमान जाला एक योजन। येरीं मुख पसरिलें द्विगुण। दशयोजन कपि जाला ॥ ४८॥ मुख पसरी योजनें वीस। हनुमंत जाला योजनें तीस। येरीं पसरिलें चाळीस। कपि पन्नास होऊं सरला ॥ ४९॥ शत योजनें पसरी वक्त्रें। तंव हनुमंत जाला अंगुष्ठमात्र। मुखीं रिघाला सत्वर। नभीं सुरवर देखती ॥ १५०॥ देव म्हणती हनुमंता। सुरसेनें गिळिलें तत्त्वतां। शुद्धी करणें राहिली सीता। अति मूर्खता आम्हीं केली ॥५१॥ हनुमंतें शीघ्र करितां गमन। आम्हीं कां करविलें विघ्न। आम्हां कोपेल श्रीरघुनंदन। स्वर्गीं सुरगण धाकती ॥ ५२॥ हनुमंत रिघे राक्षसीवदनीं। अंतरीं पाहतां कश्यपपत्नी। दानवांची सखी जननी। माता सापत्नी देवांची ॥ ५३॥ पवन जो कां माझा पिता। त्याची हे सावत्र माता। इच्या करों नये घाता। हृदयीं हनुमंता मानलें ॥ ५४॥ रामकार्याचे त्वरेंकरीं। येथोनि निघावें बाहेरीं। वानराची युक्ती भारी। देखे कर्णरंध्रीं निर्गम ॥ ५५॥ सुरसा चाटी अवाळें। वानर दांतीं तोंडीं नाकळे। मुखींचें मुखीं हरपलें। किंवा गुंतलें दर्शनांतरीं ॥ ५६॥ राक्षसी घेतां वदनधांडोळी। तंव हनुमान निघे कर्णबिळीं। भुभुःकार देतां आतुर्बळी। पिटिली टाळी सुरवरीं ॥ ५७॥ हनुमंत विवेकी अति ख्यात। न करोनि सुरसेचा घात। निर्गम देखिला श्रवणांत। विघ्नातीत रामनामें ॥ ५८॥ विघ्नातीत श्रीरामभक्त। त्यामाजी मुखरण हनुमंत। श्रीरामनाम जे स्मरत। ते यशवंत तिहीं लोकीं ॥ ५९॥ सुमनें वर्षती देव। जयजयकार करीत सर्व। हनुमंताचें लघुलाघव। अति अपूर्व तिहीं लोकीं ॥ १६०॥ श्रीरामनाम मुखीं मुद्रा। हृदयीं स्मरण श्रीरामचंद्रा। कैंचें विघ्न त्या कपींद्रा। क्षणें समुद्रा लंघील ॥ ६१॥ न करोनि माझा जीवघात। हनुमंत निजबळें निर्मुक्त। देखोनि सुरसा संतोषत। आशीर्वाद देत हनुमंता ॥ ६२॥

अब्रवीत् सुरसा देवी स्वेन रूपेण वानरम्।
अर्थसिद्ध्यै हरिश्रेष्ठ गच्छ सौम्य यथासुखम् ॥ २३॥
संयोजयस्व वैदेहीं राघवेण महात्मना ॥ २४॥

सांडोनि राक्षसी क्रूरता। सुरसा जाली शांतरूपता। अर्थसिद्धि पावसी हनुमंता। श्रीरामसीतासंयोगें ॥ ६३॥ श्रीरामनामीं तुझी मिठी। यालागीं तूं दाटुगा सृष्टीं। तुझेनि रामसीतेसीं भेटी। रामराज्य सृष्टीं तुझेनि ॥ ६४॥ सीताशुद्धीची समयसिद्धी। तुझेनि होईल गा त्रिशुद्धी। निमेषें लंघिसील उदधी। तूं सद्बुद्धि कपींद्रा ॥ ६५॥ ऐसें बोलोनि उत्तर। सुरसेनें वंदिला वानर। येरु निघाला सत्वर। समुद्रापार लंघावया ॥ ६६॥ सुरसा देवी देवविघ्न। कपीनें जिंकिली न मारून। पुढें सागरीं बळवाहन। केलें कंदन तें ऐका ॥ ६७॥ सकळ ग्रंथांचें माहेर। तें हें श्रीरामचरित्र। पवित्र वक्त्याचें वक्त्र। पवित्र श्रोत्रें श्रोतियांचें ॥ ६८॥ स्वामिसेवेसी विकिला प्राण। ब्रह्मज्ञानाचें भूषण। नवविधभक्तीचें जीवन। कपिकथन शिववंद्य ॥ ६९॥ करितां हनुमंताचें स्मरण। विघ्न तेंचि होय निर्विघ्न। स्मरणें सुलभ ब्रह्मज्ञान। कथा पावन हनुमंतें ॥ १७०॥ एका जनार्दना शरण। कपिप्रतापकथा गहन। पुढें काय केलें कथन। सावधान अवधारा ॥१७१॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे किंष्किधाकांडे एकाकारटीकायां हनुमंतसमुद्रमध्यगमनं नाम सप्तदशोऽध्यायः ॥ १७॥ ओंव्या ॥ १७१॥ श्लोक ॥ २४॥ श्रीसीतारामचंद्रार्पणमस्तु ॥

अध्याय अठरावा

श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः। सुरसा देवविघ्नातें। स्वयें जिणोनि हनुमंतें। पुढें लंघोनि समुद्रातें। सिंहिका तेथें ग्रासूं आली ॥ १॥

---

१ नाहींसा झाला असतां. २ पुण्य. ३ तोंड. ४ दांतांमध्यें. ५ मुख्य. ६ पुष्पें. ७ बळवान्. ८ देवांनीं केलेलें विघ्न. ९ कान.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

प्लवमानं तु तं दृष्ट्वा सिंहिका नाम राक्षसी ।
मनसा चिंतयामास प्रवृद्धा कामरूपिणी ॥ १ ॥
इदं हि सुमहत्सत्त्वं चिरस्य वशमागतम् ।
इति संचित्य मनसा छायामस्य समाक्षिपत् ॥ २ ॥

गगनीं उडतां हनुमंत । छाया पडली समुद्रांत । सिंहिकेचा मनोरथ । ग्रासावया हनुमंत वाढली ॥२॥ शिववरद[1] सिंहिकेसी । छाया धरितां प्राणी ग्रासी । छायाग्रह नांव तिसी । ते हनुमंतासी गिळों आली ॥ ३ ॥ कपिच्छाया पडतां जळीं । सिंहिका ते छाया गिळी । हनुमंताची गति खुंटली । देहाची वळली मुरकुंडी ॥ ४ ॥

छायायां संगृहीतायां चिंतयामास वानरः ।
किमाक्षिप्तोऽस्मि सहसा निरुद्ध इव पर्वतः ॥ ३ ॥
तिर्यगूर्ध्वमधश्चापि वीक्षमाणस्तदा कपिः ।
छायाग्राहि महावीर्यं तदिदं नात्र संशयः ॥ ४ ॥

छाया ग्रासितां सिंहिकेसीं । गति खुंटली हनुमंतासी । तेणें तो जाला कासाविसी । पाहे चौपासीं गजबजिला ॥५॥ स्मरोनियां रघुनाथ । अधं[2] ऊर्ध्व हनुमान पाहत । तंव देखिली जळाआंत । अति अद्भुत राक्षसी ॥ ६ ॥ छायाग्रहो निजनामता । ते हे राक्षसी तत्त्वतां । वैरी राहूचिये माता । इच्या घाता मी करीन ॥ ७ ॥ समुद्रामाजी हें महाविघ्न । तें मी करीन निर्विघ्न । म्हणोनियां हनुमंतें आपण । साटोप[3] पूर्ण मांडिला ॥ ८ ॥ सिंहिका पसरोनि मुख । आली हनुमंतासन्मुख । कपि वाढे अधिकाधिक । तिणेंही आत्यंतिक मुख पसरिलें ॥ ९ ॥ एक जाभाड पाताळीं । दुजें लाविलें नभोमंडळीं । हनुमान गिळावया महाबळी । गर्जोनि किंकाळी टाकिली ॥१०॥ तिच्या मुखामाजी उडी । हनुमंत घाली लवडसवडीं । दांतांतळीं जंव ते रगडी । तंव घाटीबुडीं रिघाला ॥ ११ ॥

तस्याः संविवृते वक्त्रे निपपात महाकपिः ।
अंत्राण्यादाय सर्वाणि वेगेनापस्तृतो मुखात् ॥ ५ ॥
हृतजीवा हनुमता न्यपतल्लवणांभसि ॥ ६ ॥

रिघोनि तिच्या उदरांतरीं । नखाग्रीं तिचें काळीज चिरी । अंत्रमाळा[4] घेवोनि करीं । निघे बाहेरी वानर ॥ १२ ॥ नाहीं दांतांतळीं अडकलें । नाहीं चावितां चाखिलें । नाहीं मेद मांस भक्षिलें । जीवें घेतलें वानरें ॥ १३ ॥ मी म्हणें हें अल्पपशु । तंव हा वानरू अति कर्कशु । भरूं न शकतांचि घासु । जीवनाशु येणें केला ॥ १४ ॥ याची धरूं जातां छाया । छाया माया नाशिली काया । उद्धरलें मी कपिराया । तुझे पायाचेनि रजें ॥ १५ ॥ श्रीरामभक्तांचे रजःकण । निःशेष नाशिती जन्ममरण । घातक्या देती ब्रह्म पूर्ण । साधु सज्जन कृपाळु ॥ १६ ॥ करावी श्रीरामाची भक्ती । पढावी श्रीरामाची कीर्ती । श्रीरामनामाच्या आवर्ती[5] । जड मूढ उद्धरती तिहीं लोकीं ॥ १७ ॥ ऐसी देवोनि आरोळी । सिंहिका पडे समुद्रजळीं । स्वर्गीं देवीं पिटिली टाळी । आतुर्बळी हनुमंत ॥ १८ ॥ राहूपासोनि सुटे चंद्र । तैसा शोभला तो कपींद्र । त्यासी देखोनि स्तवीत इंद्र । ब्रह्मा शंकर देखोनी ॥ १९ ॥

भीममद्य कृतं कर्म महत्सत्त्वं त्वया हतम् ।
साधयार्थमभिप्रेतमरिष्टं प्लवतां वर ॥ ७ ॥
यस्य त्वेतानि चत्वारि वानरेंद्र यथा तव ।
धृतिर्मतिर्बलं दाक्ष्यं स कर्मसु न सीदति ॥ ८ ॥

छायाग्रही जीवें मारी । दुष्ट नष्ट कामाचारी । भयानक क्रूर भारी । ते वानरें नखाग्रीं मारिली ॥ २० ॥ करितां समुद्रीं उड्डाण । चारी पराक्रम अति गहन । तुवां दाखविली आंगवण[6] । श्रीरामभजननिजनेटीं ॥ २१ ॥ रामनामीं दृढ भक्ती । रामस्मरणीं दृढमती । अति दक्षता रामभक्तीं । श्रीरामशक्ती बलिष्ठ ॥ २२ ॥ तेणें बळें अपांपती । उल्लंघितां केली ख्याती । त्या त्या प्रतापाची कीर्ती । स्वर्गीं वर्णिती सुरवर ॥२३॥ प्रथमोड्डाणीं महाबळी । महेंद्र दाटला भूतळीं । सर्प दडपले पर्वतातळीं । नाग पाताळीं हडबडिती ॥ २४ ॥ हे प्रथमोड्डाणाची ख्याती । दुसरी हनुमंताची कीर्ती । मैनाद्रि देतां विश्रांती । न घेचि कपिपति महाबाहु ॥ २५ ॥ विश्रांति न घेवोनि महाबळी । पर्वतीं ठेवतां आंगोळी । भारें बुडाला समुद्रजळीं । बैसला तळीं भारभूत ॥२६॥ तेणें अतळ वितळ सुतळ । रसातळ आणि तळातळ । हडबडिलें सप्त पाताळ । भारें प्रबळ गिरि दाटी ॥ २७ ॥ आंगोळी लावितां हनुमंत । भारें कोंदला पर्वत । हा दुजा पवाडा[7] समु-

१ खालीं. २ वर. ३ उद्योग, उपक्रम. ४ आंतड्यांच्या माळा. ५ आवृत्तींनीं. ६ सामर्थ्य. ७ प्रताप.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

द्रांत। केला विख्यात वानरें ॥ २८ ॥ उल्लंघितां अपांपती। तिसरी केली महाख्याती। सुरसा केवळ कपटमूर्ती। निजात्मशक्तीं जिंकिली ॥ २९ ॥ सुरसा दनुदानवमाता। छळणें छळीतसे समस्तां। तें छळण न चलेचि हनुमंता। होय निघता पुरुषार्थे ॥ ३० ॥ ऋषि आणि दानवमानवां। सुरसा छळी छळणें देवां। तीमाजी करोनि रिघावा। केला निघावा हनुमंतें ॥ ३१ ॥ सुरसेनें हनुमंत गिळिला। परंतु जीवें नाहीं गेला। तिचा घात नाहीं केला। झाडा घेतला कपटाचा ॥ ३२ ॥ तिचिया कपटाची करितां झाडी। सुरसा जाली ते बापुडी। पायां लागोनि तांतडीं। वंदी आवडीं हनुमंता ॥ ३३ ॥ आजिपासोनि आतां। निमाली कपटवार्ता। विजयी होसील हनुमंता। श्रीरघुनाथा कृतकार्या ॥ ३४ ॥ करोनि कपटाची झाडी। रामकार्याचिये तांतडीं। हनुमान निघाला आवडीं। घालावया उडी लंकेसीं ॥ ३५ ॥ तिसरी हनुमंताची ख्याती। अति पावन त्रिजगतीं। देव ब्राह्मण वंदिती। अगाध कीर्ती हनुमंता ॥ ३६ ॥ आणिक चौथा पवाडा। हनुमंतें केला गाढा। सिंहिका निर्दाळोनि होडां। निघाला पुढां लंकेसी ॥ ३७ ॥ सिंहिका राक्षसी दुर्धर। हनुमंत गिळिला अति सत्वर। नखें निवटोनि निजजिव्हार। निघे वानर बाहेरी ॥ ३८ ॥ छायाग्रहण दुष्ट भारी। जळींचीं जलचरें संहारी। स्थळचरांतें जीवें मारी। घोंट भरी खेचराचा ॥ ३९ ॥ तिचें उघडोनि पोट। समुद्रीं वाहती केली वाट। चौथी कीर्ती हे उद्भट। केली वरिष्ठ वानरें ॥ ४० ॥ त्रिविध भूतांचें भक्षक। प्राणिमात्राचें जें दुःख। ऐसी सिंहिका मारोनि देख। तिन्ही लोक सुखी केले ॥ ४१ ॥ ऐसी चतुर्विध कीर्ती। करोनि निघाला मारुती। पुढें जे जे केली ख्याती। ते ते ग्रंथीं अवधारा ॥ ४२ ॥ सिंहिकेच्या उदराप्रती। विदारण केलें मारुतीं। तेचि त्यासी अति विश्रांती। पुढील ख्याती अवधारा ॥ ४३ ॥ सिंहिकाविदारणस्थिती। विश्रांति पावला मारुती। ते चौगुणीं वाढली शक्ती। लंकेप्रती जावया ॥ ४४ ॥ करोनि सिंहिकाविदारण। हनुमंतें केलें उड्डाण। लंका सांडोनियां जाण। गेला आपण पडलंके ॥ ४५ ॥ पडलंकाराज्यस्थानीं। क्रौंचा रावणाची भगिनी। घर्घर राक्षसाची पत्नी। राज्यस्थानीं ती मुख्य ॥ ४६ ॥ रावणइंद्रासीं युद्ध घोर। घर्घर क्रौंचेचा भ्रतार। युद्धीं पडिला महाशूर। राक्षसभार गांजोनी ॥ ४७ ॥ इंद्रें युद्ध केलें दारुण। राक्षसीं दांतीं धरिलें तृण। युद्धीं आक्रंदे रावण। रणकंदन देखोनी ॥ ४८ ॥ रावण धरितां रणांगणीं। पाठिराखा न देखे कोणी। सेनाप्रधान गेले पळोनी। निद्रास्थानीं कुंभकर्ण ॥ ४९ ॥ युद्धीं साह्य जाला घर्घर। युद्ध केलें अति दुर्धर। इंद्रें मारिला हाणोनि वज्र। केला चकचूर हाडांचा ॥ ५० ॥ शिववरदाचिये शक्तीं। इंद्रजित पावला गुप्तगती। अतर्क्य अभिचारांची युक्ती। अमरपति धरिला तेणें ॥ ५१ ॥ इंद्रासी लावोनि गळबंधन। लंके आणिला आपण। इंद्रजित अभिधान। तैंपासून पावला ॥ ५२ ॥ रावणाच्या निजसाह्यासी। घर्घर पडिला रणभूमीसी। तेणें आदरें क्रौंचेसी। दिधली राज्यासी पडलंका ॥ ५३ ॥ चवदा सहस्र निशाचरी। ठेविल्या क्रौंचेच्या सेवेवरी। अतिशयेंसीं दुर्धरी। निजझुंजारी खेचरा ॥ ५४ ॥ ते पडलंकापडिपाडीं। उत्तरस्रोताचिये थडीं। हनुमंताची पडली उडी। अति कडाडीं दुर्धर ॥ ५५ ॥ दुमदुमिलें पडलंकापीठ। दुमदुमिलें लंकात्रिकूट। निकुंबळेंसीं कडकडाट। अति उद्भट ऊठिला ॥ ५६ ॥ भूकंपें लंकेमाझारी। तेणें कांपती नरनारी। सीता आणिली करोनि चोरी। तैंहूनि नगरीं बहु विघ्नें ॥ ५७ ॥ तेणें नादें पडलंकेसी। बाहेर धांविन्नल्या राक्षसी। तंव देखिलें हनुमंतासी। तिंहीं चौपासीं वेढिलें ॥ ५८ ॥ हनुमंत बालब्रह्मचारी। पुरुषार्थ न करीच स्त्रियांवरी। तेणें तो बांधोनि खेचरीं। नेला भीतरीं पडलंके ॥ ५९ ॥ हनुमंत रूप धरी सामान्य। क्रौंचा देखे दीनवदन। लाविलें देखोनि गळबंधन। वानर कोण कोणाचें ॥ ६० ॥ तिसी सांगती खेचरी। दणका उठिला उड्डाणेंकरीं। तो हा आणिला भक्ष्य झडकरी। फळाहारी तुम्हांसी ॥ ६१ ॥ करावया कपीचा घात। क्रौंचा शस्त्रासी घाली हात। तें

१ प्रवेश. २ निघणें. ३ पैजेनें. ४ सिंहिकेला चिरून टाकल्यानें. ५ जारणमारणादि विद्येची. ६ गळफांस. ७ नांव. ८ पडलंकेच्या जवळ. ९ धरणीकंप. १० आकाशमार्गी गति असणाऱ्या राक्षसिणींनीं.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

देखोनि हनुमंत हांसत । माझा भक्षार्थ तुम्ही नेणां ॥ ६२ ॥ जडत्वें मांस नाहीं भीतरीं । म्हणोनि उडों झाडावरी । निष्काळजी निजशरीरीं । गिरिकंदरीं तेणें वसों ॥६३॥ रुधिरपूर्ण देहस्थिती । भेद करितां जिरेल क्षितीं[1] । मग काय खाशील वो माती । ऐसी युक्ती न करावी ॥ ६४ ॥ मांस नाहीं मजभीतरीं । मरणभय नाहीं शरीरीं । देह लावावा परोपकारीं । सगळयाचें करीं भक्षण ॥ ६५ ॥ मज सगळें गिळिल्यावरी । चवी चाखिसी तोंडावरी । माझे निजपुष्टीची थोरी । क्षणामाझारी पावसी ॥ ६६ ॥ ऐकोनि हनुमंताची युक्ती । क्रौंचा सत्य मानी चित्तीं । सवेंचि गिळावया मारुती । वदनावृत्ती पसरली ॥ ६७ ॥ तिणें पसरितांचि जाभाडी । हनुमंत सवेग घाली उडी । आकळितां जिव्हा लडबडी । तंव घाटीबुडीं रिघाला ॥ ६८ ॥ न कळेचि जिव्हामूळीं । नाडळेचि दांतांतळीं । वदनवाफु जाली होळी । चाटी आवोळी[2] राक्षसी ॥ ६९ ॥ आंबट तिखट ना खारट । गोड अथवा तें तुरट । चवी न कळे पैं स्पष्ट । करी कटकट राक्षसी ॥ ७० ॥ ऐसी सांगतां निजगोष्टी । कपि काळीज धरी मुष्टीं । तंव तियेसी शूळ उठे पोटीं । लोळे सृष्टीं गडबडां ॥ ७१ ॥ काळिज धरोनि मुष्टीसीं । वानर पाहे विस्मयेंसीं । बांधावया कोटिकुंजरांसी । देखे दोहीं कुशीं बहुवाडी ॥ ७२ ॥ जठराग्नीमाजि जाणा । पडिले पर्वत होती चुना । असो हे तिची विचारणा । कपिकथना अवधारा ॥ ७३ ॥ काळिज धरितांचि रोकडें । क्रौंचा लोळे गडबडें । सगळें गिळोनि केलें कुडें । अति वावडें वानर ॥ ७४ ॥ वानर नाढळेचि दांतीं । परी जावोनि तें बैसलें पित्तीं । ओखद खावयाची उपपत्ती[3] । केली आइती ते ऐका ॥ ७५ ॥ निंबाचीं शतानुशत झाडें । खसखसां रगडीतसे दाढें । चुळोदकीं हनुमंत बुडे । तेणें तो उडे उदरांत ॥ ७६ ॥ उदरीं वानर उडतां । क्रौंचा पावे परम व्यथा । तिच्या करावया निजघाता । बुद्धि हनुमंता आठवली ॥ ७७ ॥ पुच्छ वाढवोनि वानरें । कंठीं सूंदलीं[4] पुच्छाग्रें । तेणें ते खोकोनि गजरें । मग ओकारी सूटली ॥ ७८ ॥ पुढें देतां ओकारें । मागें अधोवात सरे । गांजूं आदरिलें वानरें । हागी ओकारें लागलें ॥ ७९ ॥ अधोवाताचे गजरीं । उडविल्या निशाचरी । त्या परिभ्रमोनि[5] अंबरीं[6] । पडोनि सागरीं बुडाल्या ॥ ८० ॥ आइजीचे अतिश्रद्धेनें[7] । दुर्गंधें निर्बुर्जलीं[8] घ्राणें । राक्षसी धाकती[9] निजप्राणें । मागें राहणें घड नव्हे ॥ ८१ ॥ दीर्घ देतां पैं ओकारी । पुच्छ आलें मुखाभीतरी । क्रौंचा धरोनियां करीं । ओढी बाहेरी अति कष्टें ॥ ८२ ॥ ओढा ओढा गे झडकरी । ओढिती दहा वीस नारी । तंव तें ओढेना तिळभरी । शतसहस्रीं ओढितां ॥ ८३ ॥ चवदा सहस्र राक्षसी श्रेष्ठ । ओढिताती अति उद्भट । तरी पुच्छाचा नव्हे शेवट । फुगलें पोट क्रौंचेचें ॥ ८४ ॥ पहिलें सामान्य दिसे वानर । उदरीं वाढलें अति थोर । न लभे पुच्छाचा परपार । येर शरीर कोण जाणे ॥ ८५ ॥ आइजीचें भाग्य थोर । वमनें उन्मळलें वानर । येरवीं करितें हें संहार । ओढा समग्र समयोगें ॥ ८६ ॥ चवदा सहस्र निशाचरी । पुच्छ ओढिती बळें भारी । काळीज घेवोनियां करीं । निघे बाहेरी हनुमंत ॥ ८७ ॥ काळीज उपडितां समूळीं । क्रौंचेनें दिधली आरोळी । आदळलिया भूतळीं । प्राण तत्काळीं सांडिला ॥ ८८ ॥ क्रौंचेचे गजरें भारी । निंधां[10] उठिला गिरिकंदरीं । तेणें निकुंबळ थरारी । लंकेमाझारी भूकंप ॥ ८९ ॥ चवदा सहस्र निशाचरी । आकळोनि पुच्छेंकरीं । झुगारिल्या पैं सागरीं । नेल्या जळचरीं भक्षार्थ ॥ ९० ॥ हनुमंताचें पडलंके उड्डाण । हें काळिकाखंडींचें निरूपण । श्रोतीं पाहोनि सावधान । वृथा भाषण न म्हणावें ॥ ९१ ॥ हे तंव रामायणी कथा । जरी मी बोलिलों वृथा । तरी तारक तत्त्वतां । याहीवरी श्रोतां क्षमा कीजे ॥ ९२ ॥ पडलंकेच्या माझारीं । एक उरली वृद्धा नारी । येर मारिल्या समग्री । केली बोहरी[11] हनुमंतें ॥ ९३ ॥ वृद्धेकडे हनुमंत । कृपादृष्टीं अवलोकित । पुसेन तो सांगें वृत्तांत । नाहीं तरी घात मी करीन ॥ ९४ ॥ येथोनियां पुढारी । लंका आहे किती दुरी । येरी म्हणे राहिली माघारी । पाहें पां हारी कळसांच्या ॥ ९५ ॥ परतोनि पाहे

१ पृथ्वीमध्यें. २ ओंठ. ३ युक्ति. ४ घातलीं. ५ भोंवून. ६ आकाशांत, ७ मलद्वारशब्दानें. ८ कंटाळलीं. ९ भ्याल्या.

१० प्रतिशब्द. ११ नाश.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

लंकापुरी । रावणमंदिराची थोरी । कनककळसांचिया हारी । माडिया गोपुरी रत्नांक ॥ ९६ ॥ कैसे शोभती रत्नकळस । तेजें लोपविती तरणीस[1] । लंका देखोनि सावकाश । अति उल्लास हनुमंता ॥ ९७ ॥ शोधावया श्रीरामकांता । घरधांडोळी घेईन आतां । जाजावोनि[2] लंकानाथा । करीन घाता राक्षसांचे ॥ ९८ ॥ मर्दोनि इंद्रजिताचा प्राण । त्यासीं करीन रणकंदन । रणीं मारीन राक्षसगण । सीतारत्न शोधावया ॥ ९९ ॥ ऐकोनि राक्षसीचें वचन । मागें देखोनि लंकाभुवन । करोनि उफराटें किराण[3] । आला आपण लंकेसी ॥ १०० ॥ रावणाचा विजयकेत । त्याचा पुच्छें केला घात । संमुख पाडिला लंकेआंत । तेणें आकांत राक्षसां ॥ १ ॥ सहित शिखरें विजयकेत । पडिला देखे लंकेआंत । तेणें दचकला लंकानाथ । आला अनर्थ लंकेसी ॥ २ ॥ नाहीं वायूचा झडाडा । नाहीं मेघांचा गडाडा । शिखरें खचलीं कडाडां । भंगिला दृढ विजयकेतु ॥ ३ ॥ रावणें हरिली श्रीरामरमा । तेथूनि विजयो नाहीं आम्हां । राजा रातला[4] अधर्मा । मरणधर्मा पावेल ॥ ४ ॥ ऐकोनि जनांचिया गोष्टी । उल्लास हनुमंताच्या पोटीं । पुच्छीं बांधोनि शकुनगांठी । राक्षसकोटी मारावया ॥ ५ ॥ शोधावया सीतारत्न । स्वरूप धरी आनें आनें[5] । कैसें कैसें करील चिन्ह । सावधान अवधारा ॥ ६ ॥

ससागरं दानवपन्नगायुतं
बलेन विक्रम्य महोर्मिमालिनम् ।
निपत्य तीरे च महोदधेस्तदा
ददर्श लंकाममरावतीमिव ॥ ९ ॥

अति दुर्धर हनुमंत वीर । वाढलासे पर्वताकार । शोधावया सीता सुंदर । करी विचार निजमानसीं ॥ ७ ॥ साधावया रामकार्यार्था । स्थूळ रूपें न लभे सीता । शुद्धी न लभेचि तत्त्वतां । तरी कां वृथा कष्टावें ॥ ८ ॥ ऐसा करोनि विचार । जाला सामान्य वानर । कोठें गोचर कोठें अगोचर । सीतार्थ नगर शोधावया ॥ ९ ॥ माझा आत्मा श्रीरामचंद्र । हा हनुमंतीं निजनिर्धार । तेणें जाणोनि विघ्नसंभार[6] । हेळा[7] समुद्र लंघिला ॥ ११० ॥ भंगोनि रावणविजयकेत । आला केतकीवनाआंत । सीता शोधावया हनुमंत । करी आकांत लंकेसीं ॥ ११ ॥ करोनि पडलंकेची झाडी । आतां लंकेसी आली धाडी । मारोनि राक्षसांच्या कोडी[8] । सीता धडफुडी शोधीन ॥ १२ ॥ सीतेचिया शुद्धीसाठीं । पुरवीन इंद्रजिताची पाठी । मारोनि राक्षसांच्या थांटी[9] । सीता गोरटी शोधीन ॥ १३ ॥ करितां सीतेच्या शुद्धीसी । रावणा गांजीन सभेसी । क्षोभवोनि निजपुच्छासी । लंका चौपासीं जाळीन ॥ १४ ॥ ऐसा हनुमंताचा आवांका[10] । समूळ शोधावया लंका । जें जें विंदांन करील देखा । तें तें ऐका चरित्र ॥ १५ ॥ रावणाच्या उपऱ्यांवरी[11] । नारिकेळींचिया हारी । हनुमंत सामान्य रूप धरी । चढला त्यांवरी अति गुप्त ॥ १६ ॥ तेथोनि पाहे लंकापुरी । जैसी अलकावती नगरी । नों[12] ते अमरावती दुसरी । त्यांहूनि थोरी लंकेची ॥ १७ ॥ त्रैलोक्यींचें वैभव । लंकेसी आणिलें असे सर्व । अमरपुरीहूनि अपूर्व । दिसे गौरव लंकेचें ॥ १८ ॥ ख्याति करोनि समुद्रांत । लंके आला हनुमंत । किष्किंधाकांडाचा अर्थ । जाला समाप्त श्रीरामें ॥ १९ ॥ व्यर्थ वानिलें हनुमंता । जिव्हा झडे ऐसें म्हणतां । श्रीरामबळें तो सपुरता[13] । आणि पढियंता श्रीरामाचा ॥ १२० ॥ सीताशुद्धीचें कैवाड[14] । सुंदरकांड अति गोड । हनुमंत ख्याति करील अति दृढ । सुखसुरवाड[15] श्रोतियांसी ॥२१॥ हनुमंताच्या बळबंडा । बाणपिसारा लावील भवंडा । तेणें श्रीरामभजनीं होवोनि गाढा । किष्किंधाकांडा संपविलें ॥ २२ ॥ सुग्रीवाच्या दुःखदुर्वाडा[16] । छेदोनियां सप्त ताडां । ठेंचोनि वाळीचिया तोंडा । किष्किंधाकांडा संपविलें ॥ २३ ॥ सुग्रीवें सीताशुद्धीच्या कैवाडा । वानर धाडिले चहूंकडा । हनुमंतें अर्थ साधोनि गाढा । किष्किंधाकांडा संपविलें ॥ २४ ॥ सीताशुद्धीचेनि कैवाडां । वानरां मरण आलें रोकडां । संपाती सीता दावूनि पुढां । किष्किंधाकांडा संपविलें ॥२५॥ सीताशुद्धीचिया चाडा । घेवोनि

१ सूर्याला. २ छळून. ३ उड्डाण. ४ रमला. ५ निरनिराळें. ६ दस्य. ७ विघ्नसमूह. ८ लीलेनें. ९ समुदाय. १० युक्ति.

११ उपरमाड्यांवर. १२ किंवा. १३ पूर्ण. १४ कैवार. १५ सुखाधिक्य. १६ दुःखातिशयामुळें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

हेमा तापसीचा झाडा । समुद्र लंघोनि रोकडां । किष्किंधाकांडा संपविलें ॥ २६ ॥ समुद्र लंघावया पुढां । वानर पडिले अति सांकडां । हनुमान कैवारी धडफुडा । किष्किंधाकांडा संपविलें ॥ २७ ॥ संपविलें किष्किंधाकांड । पुढें सुंदरकांड अति गोड । पुरे श्रोतयांचें कोड । सरे चाड वक्त्याची ॥ २८ ॥ एका जनार्दना शरण । कथा-कौतुक रामायण । श्रोतीं दिधलें अवधान । ब्रह्मसमाधान श्रवणार्थें ॥ २९ ॥ कथा ऐकतां सादर । निरसोनियां क्षरा[१]क्षर । श्रीराम पाविजे चिन्मात्र । कथा पवित्र रामायणी ॥ १३० ॥ रामकथेचें अक्षर । क्षराक्षरातीत पर । अवघी कथा सन्मात्र । चिदचिन्[२]मात्र रामायण ॥ ३१ ॥ एका जनार्दना शरण । किष्किंधाकांड जालें संपूर्ण । पुढें गोड निरूपण । सावधान अवधारा ॥ ३२ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे किष्किंधाकांडे एकाकारटीकायां हनुमंतलंकाप्रवेशो नाम अष्टादशोऽध्यायः ॥ १८ ॥ ओंव्या ॥ १३२ ॥ श्लोक ॥ ९ ॥ श्रीसीतारामचंद्रार्पणमस्तु ॥

॥ श्रीराम जय राम जय जय राम ॥

१ क्षर म्हणजे विनाशी, आणि अक्षर म्हणजे अविनाशी.

२ चेतनाचेतनात्मक.

किष्किन्धाकाण्डं समाप्तम्

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations



श्रीएकनाथ महाराजकृत

श्रीभावार्थरामायण

सुंदरकांड

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations



अशोकवाटिका.



इंद्रजितानें मारुतीला नागपाशानें बांधून रावणाच्या सभेंत नेलें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

श्रीसद्गुरवे रामचंद्राय नमः ।

श्रीएकनाथ महाराजकृत

श्रीभावार्थरामायण

—*—

सुंदरकांड

अध्याय पहिला.

श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः॥
श्रीगुरुदत्तात्रेयाय नमः ॥ श्रीराम समर्थ ॥

रामं लक्ष्मणपूर्वजं रघुवरं सीतापतिं सुंदरं
काकुत्स्थं करुणार्णवं गुणनिधिं विप्रप्रियं धार्मिकम् ।
राजेंद्रं सत्यसंधं दशरथतनयं श्यामलं शांतमूर्तिं
वंदे लोकाभिरामं रघुकुलतिलकं राघवं रावणारिम् ॥१॥

श्रीरामें पावन[1] कथा । श्रीरामें पावन वक्ता । श्रीरामें पावन श्रोता[2] । श्रीराम स्वतां ग्रंथार्थ ॥ १ ॥ श्रीरामें धन्य धरणी[3] । श्रीरामें धन्य करणी । श्रीरामें धन्य वाणी । जे रामायणीं विनटली[4] ॥ २ ॥ श्रीरामें पावन संसार । श्रीरामें पावन चराचर । श्रीरामें पावन नर । जे तत्पर नित्य स्मरती ॥ ३ ॥ रामनाम शुद्ध साधन । रामनाम शुद्ध ज्ञान । रामनामें सुटे बंधन । नाम पावन सर्वार्थीं ॥ ४ ॥ रामनामें सरतें[5] तोंड । रामनामें सरलें किष्किंधाकांड । आतां उगवलें सुंदरकांड । अति प्रचंड प्रतापी ॥ ५ ॥ पहा रामनामाची थोरी । श्रीराम आहे सर्वांतरीं । रामनाम सत्वर उच्चारी । तेणें भवसागरीं तरतील ॥ ६ ॥ सुंदरकांडींची कथावृत्ती[6] । आदि मध्य आणि प्रांतीं[7] । हनुमंताची परम ख्याती । सीताशुद्ध्यर्थीं प्रताप ॥ ७ ॥ त्याच्या प्रतापाची थोरी । राहोनि लंकेच्या शिखरीं । शोधावया सीता सुंदरी । विचार करी तो ऐका ॥ ८ ॥ त्रिकूटाच्या शिखरावरी । हनुमान वेंघोनियां[8] पाहे चौफेरीं । तंव देखे कनककळसांचिया हारी । गगनोदरीं लखलखती ॥ ९ ॥ जैसीं नक्षत्रें नभाच्या पोटीं । सुप्रभा शोभती गोमटी । कनककळस लखलखित त्रिकूटीं । कोट्यनुकोटी लंकेमध्यें ॥ १० ॥ द्यावी अमरावतीची उपमा । त्याहूनि अधिक इची महिमा । लंका निर्माण करी ब्रह्मा । विश्वकर्मा प्रेरूनी[9] ॥ ११ ॥ कुबेराची अलकावती । रावणें हिरोनि घेतां वस्ती । त्यासी शंकूनि उंमापती[10] । अलकावती सोडविली ॥ १२ ॥ तेकाळीं विश्वकर्म्याचे हातीं । लंका करवी प्रजापती । दुर्गें[11] दुर्गम अति निगुतीं । अगम्य गति सुरासुरां ॥ १३ ॥ अमरावती अलकावती । अवलोकूनियां भोगावती । देखोनि अधिक लंकेची स्थिती । संतोषें वस्ती रावणें केली ॥ १४ ॥ पाहतां कैलासासमान । शोभे लंकेचें महिमान । दुर्धरें[12] राक्षसांसहित जाण । दशानन संरक्षी ॥ १५ ॥ उत्तम मध्यम नरीं । शुद्ध अशुद्ध नरनारीं । नांदिजे कनकाच्या मंदिरीं । लंकेची थोरी अनुपम्य ॥ १६ ॥

१ पवित्र. २ ऐकणारा. ३ पृथ्वी. ४ रंगली. ५ मान्य, श्रेष्ठ. ६ कथेचा क्रम. ७ शेवटीं. ८ चढून. ९ पाठवून.
१० शंकर. ११ किल्ले. १२ भयंकर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

अगाध लंकेचें महिमान । स्वयें संरक्षी रावण । कोटयनुकोटी राक्षसगण । परिभ्रमण सदा करिती ॥ १७ ॥ तेथें रिघावया जाण । संधि न लभे अणुप्रमाण । लंकादुर्ग अति दारुण । कैंवी आपण रिघावें ॥ १८ ॥ लंकादुर्गी रिघोनि वारा । स्वयें जाऊं न शके सैरा । त्यासही रावणाचा दरारा । केला कामारा केरकाढ्या ॥ १९ ॥ जेथें पुंजेंनीं गदळली वाट । तेथें वायूसी वाजती साटे । त्या लंकेमाजी मी मर्कट । कैसेनि परिस्पष्ट वागावें ॥ २० ॥ वानररूपें लंकेआंत । हिंडतां होईल अनर्थ । कौतुकें जो तो धरील येथ । रामकार्यार्थ नासेल ॥ २१ ॥ राक्षसरूप धरितां क्रूर । तेथेंही अनर्थ आहे थोर । ब्राह्मणमांसाचा आहार । निशाचर करविती ॥ २२ ॥ राक्षसजातीचा परीक्षी । द्विजमांस स्वेच्छा भक्षी । तो राक्षस शुद्धपक्षी । येरु विपक्षी मारिती ॥ २३ ॥ द्विजमांस मज भक्षितां । समुद्रलंघन होईल वृथा । कैंचा राम कैंची सीता । अधःपाता मी जाईन ॥ २४ ॥ राक्षसरूपाचा विटाळ । मज न व्हावा अळुमाळ । कांटाळोनि गोळांगुळें । विचार स्थूळ मांडिला ॥ २५ ॥ मग स्मरोनि रामनाम । हनुमंत पावला विश्राम । लंकाप्रवेश अति दुर्गम । नीतिधर्म उपपादी ॥ २६ ॥ करूं जातां स्वयें शिष्टाई । गर्वे रावण न मानील पाहीं । सीता सुटेसें दान नाहीं । दानें वैदेही सुटेना ॥ २७ ॥ राक्षसांसी करितां भेद । न घडे आप्तत्वाचा बोध । मांसभक्षणीं संबंध । आप्तवाद तेथें कैंचा ॥ २८ ॥ भेदूं जातां राक्षसांसी । भेद जाईल दशग्रीवापासीं । भेद न चले तयासीं । युद्धही त्यापासीं दुस्तर ॥ २९ ॥ लंकादुर्ग अति दुर्धर । इंद्रजित कुंभकर्ण झुंझार । भोंवता आहे हा सागर । नरवानर कैंवी येती ॥ ३० ॥ श्रीराम निधडा झुंझार । रावण छेदील सपरिवार । आडवा सागर दुस्तर । तो लंकापुर कैंवी पावे ॥ ३१ ॥ नीतिशास्त्राचा अवबोध । साम दाम भेद युद्ध । रावणीं न चले संबंध । नीतिविरुद्ध राक्षस ॥ ३२ ॥ बैसोनि लंकेच्या शिखरीं । नानापरी विचार करी । लंकादुर्ग अटक भारी । कोणेपरी शोधावें ॥ ३३ ॥ असो हा लंकेचा वृत्तांत । मज साह्य श्रीरघुनाथ । लंका शोधीन समस्त । सीताशुद्ध्यर्थ निजांगें ॥ ३४ ॥

वंचनीया मया सर्वे जानकीपरिमार्गतः ।

लक्ष्यालक्ष्यात्मरूपेण द्रक्ष्यामि जनकात्मजाम् ॥ २ ॥

इति संचिंत्य हनुमान् वैदेह्या दर्शनं तदा ।

पृषदंशमात्रः स कपिर्बभूवाद्भुतदर्शनः ॥ ३ ॥

लक्षालक्ष स्वरूपविधी । ठकोनि राक्षसांच्या बुद्धी । मी करीन सीताशुद्धी । कार्यसिद्धी श्रीरामें ॥ ३५ ॥ सुरां असुरां निशाचरां । अलक्षगती मज वानरा । घरधांडोळी घेऊनि नगरा । सीता सुंदरा पाहीन ॥ ३६ ॥ ऐसा करोनियां विचार । हनुमंत जाला मशकमात्र । ऐसें धरूनि शरीर । अति लघुतर कपि जाला ॥ ३७ ॥ मुंगीचिया नयनाआंत । खुपों नेणेचि हनुमंत । येणें रूपें लंकेआंत । प्रवेशोनि पहात रामकांता ॥ ३८ ॥ कोणा न कळतां मात । जगाचें न दुखवितां चित्त । हनुमंत निघे लंकेआंत । असे पहात रामप्रिया ॥ ३९ ॥ खंदकपाळीं अति आटाळीं । उपरियाउपरीं माळयामाळीं । दुर्गाचिया पौळींपौळीं । जनकबाळी पहातसे ॥ ४० ॥ वनें उपवनें काननें । देवालयें शिवस्थानें । मठ मठिका ध्यानभुवनें । सीतेकारणें शोधीत ॥ ४१ ॥ कडे कपाटें स्रोत कांतारें । पर्वत गुहा गिरिकंदरें । सूक्ष्म स्थानें अनेक विवरें । साक्षेपें वानरें शोधिलीं ॥ ४२ ॥ आराम विराम उपरम । समविषम विषमीं सम । आश्रमाचें आश्रमधाम । प्लवंगम स्वयें शोधी ॥ ४३ ॥ नाना वाटिकाँ उदंड । शैलकक्षें पैं वितंड । सरोवरस्थानें प्रचंड । शोधी सुदृढ हनुमंत ॥ ४४ ॥ चूतखंडें अच्युतखंडें । कुशकर्दमपाणिपाखंडें । डांवलोनि बंडें उदंडें । मध्यमादंडें सीता पाहे ॥ ४५ ॥ ऐसा शोधूनि बाह्यप्रांत । मग निघाला नगराआंत । सीता शोधावया हनुमंत । अति उदित साक्षेपें ॥ ४६ ॥ तत्त्वें निरसूनि समस्त । साधक आत्मा साधी निश्चित । तेंवी घरोघर धांडोळीत । असे पाहत वैदेही ॥ ४७ ॥ पाहतां लंकेमाझारीं । ब्रह्मराक्षस वसती नगरीं ।

---

१ भीति. २ चाकर. ३ कचऱ्याच्या ढिगांनीं. ४ मलिन झाली. ५ चाबुक. ६ उघड उघड. ७ अन्यपक्षीय, शत्रु. ८ किंचितही. ९ वानर. १० कठिण. ११ उपदेश. १२ राक्षसांना. १३ खंदकांच्या जागेंत. १४ गच्च्यांवर. १५ तटांवर. १६ वानर. १७ बागा. १८ पर्वतांचे कडे. १९ टाकून. २० मध्यम स्थितीनें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

त्यांच्या निवासाची थोरी । निजनिर्धारीं अवधारा ॥ ४८ ॥ एक राक्षस लंकेमाझारी । रुद्राक्षमाळा गळां शिरीं । शैवदीक्षाधारी । त्रिपुंड्रधारी मंत्रोक्त ॥ ४९ ॥ दान अन्न देऊनि भूतांसी । काषायवस्त्रें एक संन्यासी । दृष्टीं देखिल्या मनुष्यासी । साक्षेपेंसीं गिळिती ॥ ५० ॥ सवेंचि करिती आचमन । स्वाहा करिती होमहवन । कर्मैं दाविती विचक्षण । धरिती ध्यान आहारार्थ ॥ ५१ ॥ एक नागवे जटाधारी । भस्मधारी शरीरीं । रिघोनियां वनांतरीं । गायी मारिती भक्षणार्थ ॥५२॥ तेंचि गोचर्म धरूनि करीं । आम्ही गोजिनांबरधारी । ऐसें सिरविती लोकाचारीं । वेषधारी राक्षस ॥ ५३ ॥ मांस भक्षावयाचा स्वार्थ । ऐसी संपादिती मात । ऐसे राक्षस लंकेआंत । देखे हनुमंत विचरतां ॥ ५४॥ मांस भक्षितां स्वइच्छेसीं । वांटा न देती कोणासी । संन्याशाचें घेतां तुम्हांसी । नरकवासी पैं व्हाल ॥ ५५ ॥ अग्निहोत्री राक्षस तेथ । कुंड मंडप वेदिकायुक्त । दोन्ही कर कुशमंडित । सायंप्रातः होम देती ॥ ५६ ॥ मुष्टि मुष्टि कुश करीं । देखिल्या मनुष्या तेणेंचि मारी । मांस भक्षावया होम करी । पापाचारी राक्षस ॥ ५७ ॥ होत्या पोत्याचा पुरोडाश । त्याचाही स्वयें करिती ग्रास । वांटा न देती कोणास । अति कर्कश मांसार्थी ॥ ५८ ॥ जेथें जेथें अति गौल्यता । तेथें कैंचा राम कैंची सीता । तेथोनि निघतां हनुमंता । होय देखता आश्चर्य ॥ ५९ ॥ वेदपाठक लंकेआंत । विजनीं आरण्यकें पढत । मनुष्य देखिल्या तेथ । स्वयें भक्षित फळाहारा ॥ ६० ॥

अग्निहोत्राश्च वेदाश्च राक्षसानां गृहे गृहे ।
यदा सत्यं च शौचं च राक्षसानां न विद्यते ॥ ४ ॥

अग्निहोत्र वेदाध्ययन । राक्षसांघरीं संपूर्ण । दया सत्य शुचित्वपण । राक्षसां जाण असेना ॥ ६१ ॥ ऐसी शोधितां ब्रह्मपुरी । ब्राह्मण गोंविले दोरीं । कर्माभिमान त्यावरी शिरीं । सीता सुंदरी तेथें नाहीं ॥ ६२ ॥ सर्वां भूतीं असे भगवंत । ऐसी दया नाहीं तेथ । कैंचा राम कैंची सीता तेथ । मुद्रा मंत्र ते दीक्षा ॥ ६३ ॥ पाहतां क्षत्रियांच्या थाटा । वाढिवेचा गर्व ताठा । लागतां हनुमंताचा चपेटा । स्वयें पटपटां पडतील ॥ ६४ ॥ नाहीं वीरवृत्ती पुरी । मरणभयाची न फिटे शिरी । ऐसें भेड क्षत्रियां घरीं । सीता सुंदरी न भेटे ॥ ६५ ॥ मरणभय पोटाआंत । ते तंव क्षत्रिय अति अशक्त । तयांसी नपुंसक म्हणत । सीता निश्चित तेथें नाहीं ॥ ६६ ॥ ऐसें शोधितां क्षत्रियपुरीं । तेथें न लभे सीता सुंदरी । मग निघाला वैश्यांचे घरीं । श्रीरामनारी शोधावया ॥ ६७ ॥ वैश्यांचें उदिमीं चित्त । अति लोलुप वांच्छिती वित्त । शीघ्र प्रवेशोनि पहात । सीताशुद्ध्यर्थ न लभेचि ॥ ६८ ॥ वैश्यांचें कृपण मन । कवडी कवडी सांचविती धन । त्यांचे घरीं सीता निधान । न लभे जाण हनुमंता ॥ ६९ ॥ आतां शोधूं शूद्रजाती । तीमाजी अठरा पगड जाती । तीं घरें धुंडाळीत मारुती । सीतासतीशुद्ध्यर्थ ॥ ७० ॥ पाहतां साळियांच्या मार्गीं । अवघीं गारींत घातलीं गुडघीं । हनुमान निजपुच्छाच्या संयोगीं । जाळील आगीं सस्नेह ॥ ७१ ॥ चाटे असत्यवादी ऐका । अंगलु मंगलु बोलती देखा । हनुमंत जाणे आगळिका । लावील सीकां पुरदहनीं ॥ ७२ ॥ ऐसी शोधितां चाटेवोळीं । तेथें न लभे जनकबाळी । पहावया सोनार्‍यांची आळी । निघाला आतुर्बळी हनुमंत ॥ ७३ ॥ सोनार्‍यांचें कर्म खोटें । खार लाविती नेटेंपाटें । बाहेर मुदियांचे साटे । शिस कांटे भांडवल ॥ ७४ ॥ रूपलग लाविजे एकीं । शीसलग लाविजे आणिकीं । पाहतां अवघेही हीन तुकीं । तेथें जानकी दिसेना ॥ ७५ ॥ सोनारांचा परिपाक । अवघे करिती ठकठक । देहाचा चोर एक एक । नाडिती लोक विश्वासें ॥ ७६ ॥ कडींलग मोतींलग । दाविती झळकेंचि झगमग । परी ते अवघे करिती डांकलग । नगें नग हीणकस ॥ ७७ ॥ सोनारकामाचा विवेकू । समूळीं विश्वासघातकू । लटिकीं तुकें देती तुकतुकूं । घेती जोखजोखूं दों हातीं ॥ ७८ ॥ सांगोनि विश्वासाच्या गोष्टी । खार लाविती पाठीं पोटीं । घालोनि सलोभाच्या पुटीं । पाडिती तुटी मुदलेंसीं ॥ ७९ ॥ सांडेपधरा घेऊनि हातीं । देतां नागवले किती । सोनारका-

१ भगवीं वस्त्रें स्वीकारून. २ वेदिका=होमकुंडाच्या ओट्यावरील जागा. ३ यज्ञद्रव्याचा शेष. ४ दांभिकपणा. ५ शौर्याचा. ६ कापडवाले. ७ शिक्षा. ८ सोनारांची. ९ वजनें. १० सोनें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

माची हे ख्याती । सीता सती तेथें नाहीं ॥ ८० ॥ कांसारकामाचें कौतुक । एक एक तें नांळिक[1] । अवघें काळेंचि देख । तुळा तुक तुटलें ॥ ८१ ॥ कांसारकामाचे परिपाटीं । अवघीं जनीं केली बुटी । तेथें कैंची सीता गोरटी । निघे उठाउठीं हनुमंत ॥ ८२ ॥ व्यवहारियांची ऐसी दशा । कैळांतराची[2] बहु आशा । मुदला घालूनि फांसा । लाविती आशा अति लोभें ॥ ८३ ॥ लक्ष्मी देऊनि पुढिला हातीं । काळा कागद लिहूनि घेती । तेणेंचि काळमुखे होती । खंती करिती जीवासीं ॥ ८४ ॥ देहींच्या खता देहींच व्यथा । त्याहूनि थोर कागदाच्या खता । त्याची व्यथा जीवाचे माथां । तिन्ही अवस्था अति दुःखी ॥ ८५ ॥ खत फाडिलें खताखती । जो भेटे त्यासी साक्षी करिती । स्वप्नीं व्यवहार सांगती । ओसंणती[3] निजेलिया ॥ ८६ ॥ देखोनि स्वतांची संपत्ती । व्यवहारी स्वयें उल्लासती । मागों गेलिया न लगे हातीं । मग कुंथती अति दुःखें ॥ ८७ ॥ व्यवहारियांची ऐसी गती । धरण्या करितां न लभे भुक्ती । धनलोभ्या कैंची मुक्ती । सीता सती तेथें नाहीं ॥ ८८ ॥ पाहतां तेलियाचें घर । नित्य करिती करकर । अवघे म्हणती पहारोपहारं[4] । भेटा रामचंद्र उठलिया ॥ ८९ ॥ जैंहूनि[5] आणिली जनकबाळा । तैंहूनि गेली लंकेची कळा । हनुमंतें धिक्कारिलें सकळां । होईल तळमळा पुरदाहें ॥ ९० ॥ तेलियाची निजजाती । नित्य नवे फेरे खाती । तेथें कैंची सीता सती । निघे मारुति पुढारां ॥ ९१ ॥ मुळींचा तंतु तुटतां सांग । साळी[6] विसरले मागेंमाग । पांजणीपरवणीचा उद्वेग । अति लगबग खळीलागीं ॥ ९२ ॥ खांचे रिघाले जीवें जीत । घडिया घडी न सांधे तेथ । स्वरूप नुतरेचि सवँसुत । मग तणतणीत ताणोनि ॥ ९३ ॥ अहर्निशीं घोटें हाणितां । स्वरूप नुतरेचि सर्वथा । साऊट बारूट गेले वृथा । तेथें सीता न लभेचि ॥ ९४ ॥ तांबोळीसन्मान पानभरें । देंठझडी झाले एकसरें । म्हणती फेरारे फेरारे । अभ्यंतरें मुरकुटले ॥ ९५ ॥ रुसण्या फुगण्याचें कारण । पानापाशीं अति सन्मान । तेणें अंतरीं सडलीं जाण । पडिलें खान निजलोभा ॥ ९६ ॥ पानसन्मानें अति दाटुकी । झडली अभिमानाची आटुकी । तोंडें तांबडीं अति अळुकीं । तेथें जानकी असेना ॥ ९७ ॥ शिंपियाची अति कुंसरी[8] । घेवोनि लोभाची कातरी । अखंड खंडी नानापरी । गुप्तत्वें चोरी त्यामाजी ॥ ९८ ॥ पहिलें अखंड खंडिलें । शिविल्या म्हणती त्या दंडिलें । शिंपियें ऐसें कर्म केलें । बाधक झालें त्याचें त्यासी ॥ ९९ ॥ अखंड खंडोनि करिती चोरी । तेणें शृंगारी कुंवारी नारी । बिरडें लावी गळ्यावरी । घरोघरीं टांचूनी ॥ १०० ॥ ऐसें कर्म केलियापाठीं । शिंपी सलोभ बोटें चाटी । पोट न भरे शिवण्यासाठीं । सीता गोरटी तेथें कैंची ॥ १ ॥ रंगशाळा अलोलिक । काळें करिती शुद्धसात्त्विक । काळे हात काळें मुख । अति रंगित रंगारे ॥ २ ॥ नामरूपाच्या ठशावरी । काळेंबेरें पालव धरी । ऐसिया रंगारियाच्या घरीं । सीता सुंदरी लाभेना ॥ ३ ॥ वेदपाठका नवलपरी । अनाध्याय स्वाध्याय घरीं । उदात्त[9] अनुदात्त[10] स्वरीं । वर्णोच्चारीं अभिमान ॥ ४ ॥ सानुनासिक अनुनासिक । उच्चार नेणतां निर्नासिक । त्याशीं हांसती वेदपाठक । एकासी एक उपहासिती ॥ ५ ॥ ऐसें करितां वेदपठण । कोरडी शब्दांची खणखण । न वचती मानाभिमान । सीता चिद्रत्न तेथें कैचें ॥ ६ ॥ पाहतां विद्वांसांचें व्याख्यान । शास्त्रव्युत्पत्ति[11] अति सज्ञान । ज्ञातेपणें गर्वाभिमान । जडला तो जाण सोडीना ॥ ७ ॥ जंव जंव शास्त्राची व्युत्पत्ती । तंव तंव अभिमानाची वस्ती । तेणेंचि गर्वाची होय स्फूर्ती । सीता सती तेथें नाहीं ॥ ८ ॥ पाहतां ज्योतिष्यांची स्थिती । ते गोंविले अवघ्या ग्रहगतीं । ग्रहगती लाविती । सीता सती तेथें नाहीं ॥ ९ ॥ हाट[12] चोहटे[13] पण विपण । शोधशोधूं पाहे आपण । पदोपदीं सावधान । सीता चिद्रत्न स्वयें पाहे ॥ १० ॥ देखतां कणांचिया राशी । निजबीजत्वें पाहे सीतेसी । फुलें गुंफितां फुलारियासीं । पाहे सुवासीं सीतेतें ॥ ११ ॥ वाणी पसारी[14] पाहतां । सीता पाहे आंतले पोतां । अंतर सांठवणें आतौता । होय पाहता सीतेतें ॥ १२ ॥ जे

१ जुनें, फुटकें. २ व्याजाची. ३ बडबडती. ४ प्रत्येक प्रहरास. ५ जेव्हांपासून. ६ कोष्टी, विणकर. ७ बरोबर.

८ कौशल्य. ९ ऱ्हस्व, लघु. १० दीर्घ, गुरु. ११ शास्त्राचें ज्ञान. १२ बाजार. १३ चवाठे. १४ व्यापारी.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

जे मार्गी जन भेटती। त्यांमाजी पाहे सीता सती। अश्वगजांहिआंतौतीं । सीता सती पहातसे ॥ १३ ॥ उत्तम देखोनि पक्कान्न। सबाह्य सीता पाहे सावधान । हनुमंता नाठवे अन्न। लागलें ध्यान सीतेचें ॥ १४ ॥ घरें चत्वरें परुसद्वारें। उपऱ्या आटाळ्या ओवरें। सीतेलागोनि वानरें। सर्वांतरें शोधिलीं ॥ १५ ॥ अंतरीं देखोनि विषमस्थिती। सीता न लभे म्हणे मारुती। लंका शोधित असे ऐशिया रीतीं। सीता सती भेटावया ॥ १६ ॥ दृष्टी पडे जिकडे जिकडे। सीता पाहे तिकडे तिकडे। सवेग तेथूनियां उडे। सीता पुढें पुढें पहातसे ॥ १७ ॥ पाहतां जंबुमाळीमळे। तंव ते लवलवती फळें। हनुमंत उपडी समूळ मूळें। जनकबाळी शोधावया ॥ १८ ॥ सांदींकोंदीं नदोनदीं। सीता पाहे विंदोविदीं। शोधितां लंकेचीं पैं मांदी। कोणी शुद्धी सांगेना ॥ १९ ॥ शोक नाहीं जिये स्थानीं। सीता वसे अशोकवनीं। ते तंव वार्ता न वदे कोणी। शुद्धि कैसेनि होईल ॥ १२० ॥ घरें शोधिलीं विचित्र। तेथें न लभेचि सीता सुंदर। उद्धट घरें थोर थोर। तींही वानरें शोधिलीं ॥ २१ ॥ इंद्रजितकुंभकर्णस्थान। श्रेष्ठ सेनानी प्रधान। रावणाचें निजभुवन। निद्रास्थान शोधिलें ॥ २२ ॥ हनुमंत बळिया महाबळी। घेईल रावणाची घरधांडोळी। नगरामाजी लावील कळी। करील रांडोळी सभेमाजी ॥ २३ ॥ ऐसें आश्चर्यचरित्र। हनुमंत करील अद्भुत। श्रोतीं व्हावें दत्तचित्त। कथा विख्यात श्रीरामें ॥ २४ ॥ एका जनार्दना शरण। गोड घांस रामायण। तें हें सुंदरकांड जाण। समाधान जीवशिवां ॥ २५ ॥ इति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां लंकाशोधनं नाम प्रथमोऽध्यायः ॥ १ ॥ ॥ ओंव्या ॥ १२५ ॥ श्लोक ॥ ४ ॥

अध्याय दुसरा

श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ॥ श्रीराम समर्थ ॥ हनुमंत महावीरें। लंका शोधिली घरोघरें। हाट चोहाटें चौवारें। गुप्त ओवरें स्त्रियांचीं ॥ १ ॥ ऐसें शोधितां नगरांत। न लभेचि सीताशुद्ध्यर्थ। राजवर्गाच्या गृहांत। सीता हनुमंत पाहों रिघे ॥ २ ॥

विचक्रमे गृहान्वेगात् प्रहस्तस्य निवेशनम्।
ततो न देवीति गृहं महापार्श्वस्य वीर्यवान् ॥ १ ॥
महोदरस्य च तथा महाकायस्य चैव हि।
विद्युजिव्हस्य भुवनं जंबुमालेस्तथैव च ॥ २ ॥
वज्रदंष्ट्रस्य च तथा शुकसारणयोरपि।
विद्युन्मालेः सुमालेश्च विकटस्याप्यतुर्बलेः ॥ ३ ॥
बहुशत्रोः सूर्यशत्रोः कुमित्रामित्रयोस्तथा।
चित्रकस्य विचित्रस्यातिगर्विशठमित्रयोः ॥ ४ ॥
ताम्राक्षस्य च धूम्रस्य मकराक्षमृगाक्षयोः।
लंबजिह्वविरूपाक्षाक्षादीनां च महाबलः ॥ ५ ॥

करोनि उड्डाणाची थोरी। हनुमंत रिघे प्रहस्तमंदिरीं। शोधिलीं घरें ओवरीओवरीं। स्त्रियांमाझारीं जानकी नाहीं ॥ ३ ॥ तेथें न लभेचि जाण। मग करोनियां उड्डाण। प्रहस्त महाबळिया प्रधान। त्याचेंही भुवन शोधिलें ॥ ४ ॥ तेथोनि उडोनि झडकरी। शोधावया सीता सुंदरी। रिघोनि महापार्श्वाचे घरीं। अंतःपुरीं शोधित ॥ ५ ॥ तेथें न लभेचि सीताशुद्ध्यर्थ। तेथूनि उडाला हनुमंत। महोदराच्या घराआंत। असे पाहत जानकी ॥ ६ ॥ अतिकाय महाकाय। यांचीं घरें शोधित जाय। अखया कुमराचें ठाय। शोधोनि पाहे वैदेही ॥ ७ ॥ वज्रदंष्ट्र आणि जंबुमाळी। तेथें शोधिली जनकबाळी। विद्युज्जिव्ह महाबळी। तेथें घरधांडोळी घेतली ॥ ८ ॥ रावणाचा आप्त पूर्ण। शुक आणि तो सारण। त्या दोघांचीं घरें जाण। पाहे आपण हनुमंत ॥ ९ ॥ विद्युन्माळी आणि सुमाळी। विकटशत्र आतुर्बळी। यांचे घरीं जनकबाळी। घेतां धांडोळी न लभेचि ॥ १० ॥ बहुशत्र आणि सूर्यशत्र। अमित्र कुमित्र शठमित्र। अति गर्वी चित्रविचित्र। पवनपुत्र घरें शोधी ॥ ११ ॥ धूम्राक्ष आणि ताम्राक्ष। विरूपाक्ष आणि मकराक्ष। शोधावया मृगशावाक्ष। परम अति दक्ष कपि शोधी ॥ १२ ॥ घस प्रघस महाघस। चौथा जो कां वीर विघस। हनुमंत शोधी सावकाश। द्यावया घंस रावणासी ॥ १३ ॥ शठ निशठ महाशठ। भट

---

१ चवाठे. २ माड्या. ३ धर्मशाळा. ४ प्रत्येक गल्लींत. ५ सर्व लंका. ६ सेनापति. ७ सावधान. ८ बाजार.

९ जनककन्या (सीता). १० नुकसान.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

उद्भट महाभट। हींही घरें शोधूनि स्पष्ट। निघे मर्कट पुढारां ॥ १४ ॥ युद्धोन्मत्त महोन्मत्त। वीर वाटीव अति उन्मत्त। घरें शोधोनि समस्त। निघे हनुमंत पुढारां ॥ १५ ॥ भीम महाभीम सभीम। तिघांचीं रूपें अति दुर्गम। देखतां काळास पडे भ्रम। सुखें प्लवंगम तेथही शोधी ॥ १६ ॥ वीरजिव्ह वीर उद्भट। जिव्हा वज्रप्राय तिखट। जिव्हाघायें पर्वत पीठ। करी शतकूट गिरिवरां ॥ १७ ॥ जिव्हा लांब योजन एक। सुरवरपन्नगांसी धाक। तींही घरें एक एक। शोधी निःशंक मारुति ॥ १८ ॥ विद्युज्जिव्ह नाम देख। जिव्हा विद्युत्तेजें देख। विजू कडकडी तैसी हाक। लोकानुलोक कांपती ॥ १९ ॥ ऐसे हे वीर विख्यात। त्यांचे त्यांचे घराआंत। हनुमान घरधांडोळी घेत। सीताशुद्ध्यर्थ साधावया ॥ २० ॥ विकर्ण नामें वीर निधडा। कर्णस्थानीं विकट दाढा। वृक्षपर्वतां करी रगडा। मुखापुढां कोण राहे ॥ २१ ॥ याचे दाढेचे भैयासेण। वारा वाजों न शके पूर्ण। हनुमान तेथें रिघोनि आपण। सीता शोधोन स्वयें पाहे ॥२२॥ जैशीं शुकाचीं चुचुवाडें। तैसें तिखट नाक गाढें। शुकनासिक नांव पडे। नाकें रगडी गिरिकूट ॥ २३ ॥ लागतां नाकाचा आघात। दैत्य दानव चळीं कांपत। हनुमंत रिघोनियां तेथ। असे पाहत जानकी ॥२४॥ अश्वमुख गजमुख। तरसतगरव्याघ्रमुख। त्यांचे घरीं हनुमान देख। शोधी सम्यक जानकी ॥ २५ ॥ कराळाक्ष विकराळाक्ष। शोणिताक्ष भीमाक्ष। हनुमान शोधोनि अति दक्ष। एकैक सुखें घरें शोधिलीं ॥ २६ ॥ सूर्यरथाचें जेवढें चाक। तेवढें एकैकाचें मुख। यालागीं त्यांतें चक्रमुख। नाम निर्दोख तयांसी ॥ २७ ॥ मुख पसरिल्या रणाआंत। तिहीं लोकीं अति आकांत। गिळों शकेल मेरु पर्वत। वीर विख्यात चक्रमुख ॥ २८ ॥ वाफ निघतां वदनींहूनी। सूर्यबिंब आच्छादूनी। धुई दाटती ह्या गगनीं। तैंपासोनि अद्यापि ॥ २९ ॥ ऐसीं घरें समस्त। हनुमान सौंक्षेपें शोधित। स्त्रीपुरुषांचा एकांत। सुरतरत स्वयें देखे ॥ ३० ॥ स्त्रीपुरुषांची एकांतीं। नानापरींची देखोनि रती। हनुमान उद्वेगला चित्तीं। ते श्लोकोक्ती स्वयें बोले ॥ ३१ ॥ हनुमंत म्हणे निजचित्तीं। श्रमतां सीतेचे शुद्ध्यर्थी। हे मुख्यत्वें ग्रहगती। आली उपहती ब्रह्मचर्या ॥ ३२ ॥ नाहीं परदारदर्शन। नाहीं परदारसंभाषण। त्या मज स्त्रीपुरुषमैथुन। योनिदर्शन ये काळीं ॥३३॥ घरोघरीं सीता सती। पाहतां स्त्रीपुरुष एकांतीं। देखिल्या नानापरींच्या रती। आली उपहती ब्रह्मचर्या ॥ ३४ ॥ देखे जो स्त्रीपुरुषमैथुन। हें ब्रह्मचर्या मुख्य विघ्न। त्या स्त्रियांचें अति मैथुन। अन्योन्यें देखिलें ॥ ३५ ॥ श्रीरामसेवा अति प्रीतीं। लंघोनि आलों अपांपती। येथें शोधितां सीता सती। अधोगति मज आली ॥ ३६ ॥ नग्न स्त्रियांचें दर्शन। तेंचि ब्रह्मचर्या नागवण। तेथें देखोनि मैथुन। अधःपतन मज आलें ॥ ३७ ॥ सीता शोधितां संकटीं। ब्रह्मचर्या होईल तुटी। न शोधितां उठाउठीं। श्रीराम जगजेठी क्षोभेल ॥ ३८ ॥ क्षोभलिया रघूत्तम। वृथा जन्म वृथा कर्म। वृथा गेला भजनधर्म। अति दुर्गम मज आलें ॥ ३९ ॥ शुद्धीकरितां न फिरतां। अपेश येईल माझे माथां। काय करूं श्रीरघुनाथा। बुद्धिदाता मज होईं ॥ ४० ॥ बुद्धिर्बुद्धिमतामस्मि। हे प्रतिज्ञा तुझी आगमनिगमीं। माझे संकटसंभ्रमीं। कृपानुधर्मी पावावें ॥ ४१ ॥ न मे भक्तः प्रणश्यति। ब्रीदें तुझीं गा श्रीरघुपती। सीताशुद्धीचे आकांतीं। कृपामूर्ति पावावें ॥ ४२ ॥ हनुमंताची अति चिंता। कळों सरली श्रीरघुनाथा। प्रकटला हृदयाआंतौता। भक्तसाह्यार्थी श्रीराम ॥ ४३ ॥ मुखीं श्रीरामनाममुद्रा। हृदयीं स्मरतां श्रीरामचंद्रा। उल्लास जाला त्या कपींद्रा। श्रीरामभार्या शोधावया ॥४४॥ करितां श्रीरामाचें स्मरण। हृदयीं आली आठवण। देखतां परदारमैथुन। बाधकपण मज नाहीं ॥४५॥ देखतां परदारा नग्न। देखोनि परदारमैथुन। मज नाहीं कामकामन। श्रीरामचरणप्रसादें ॥ ४६ ॥ देखतां परदाररती। अल्पही कामाची स्फूर्ती। बाधीना ज्ञानियांचे चित्तीं। श्रीरघुपतिप्रसादें ॥ ४७ ॥ चित्तामाजी कामाची वस्ती। तेणेंचि ते करितां श्रीरामभक्ती। चित्त पावलिया चैतन्यस्थिती। कामा निवृत्ति सहजेंचि ॥ ४८ ॥ जैंवी अंधारिया रातीं। खद्योत नक्षत्रें लखलखिती। तेथें उगवल्या गभस्ती। अस्त पावती अवघींही

१ शौर्याचे. २ भयानें. ३ अगत्यपूर्वक. ४ नाश. ५ परस्पर. ६ समुद्र. ७ काजवे.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ ४९ ॥ तेंवी काम क्रोध लोभ चित्तीं । तेणें चित्तें करितां भक्ती । राम प्रगटलिया सर्वा भूतीं । अस्त पावती काम क्रोध ॥ ५० ॥ इंद्रियां प्रवर्तक मन । मनाचे पोटीं स्त्रीपुरुषभान । सकळ कामासी कारण । मनचि जाण बाधक ॥ ५१ ॥ जेंवी समुद्रजळीं लवणकण । विरोनि समुद्र होय आपण । तेंवी करितां श्रीरामस्मरण । मनचि परिपूर्ण परब्रह्म ॥ ५२ ॥ मनाची मावळली मनोवृत्ती । स्त्रीपुरुषांचे एकांतीं । शोधितां सीता सती । बाध चित्तीं मज नाहीं ॥ ५३ ॥ मन मावळतांचि पाहीं । मी देहींच जालों विदेही । आतां नग्न स्त्रियांच्या ठायीं । शोधीन वैदेही विदेहत्वें ॥ ५४ ॥ नग्न देखतां सूकर श्वान । पुरुषास नव्हे कामकामन । तेंवी देखतां स्त्रीपुरुषमैथुन । बाधकपण मज नाहीं ॥ ५५ ॥ शस्त्र घालितां दळाआंत । पुरुष नव्हे कामासक्त । तेंवी रिघतां योनीआंत । कामकामार्थ मज नाहीं ॥ ५६ ॥ माशीवरी बैसल्या माशी । काम नुपजे कोणासी । तेंवी देखतां मैथुनासी । शंका मानसीं मज नाहीं ॥ ५७ ॥ पाविजे सद्गुरूचा वचनार्थ । तैंच कामाचा समूळ घात । तो मज तुष्टला श्रीरघुनाथ । कामकार्यार्थ मज नाहीं ॥ ५८ ॥ स्त्री चुकली सीता सती । ते शोधावी स्त्रियांप्रती । त्या स्त्रियांची देखतां रती । कामस्फूर्ति मज नाहीं ॥ ५९ ॥ स्त्री चुकली सीता सुंदरी । ते शोधावी स्त्रियांमाझारी । वांचून शोधितां श्वानशूकरीं । श्रीरामनारी तेथें कैंची ॥६०॥ सीता चुकलियासाठीं । वना धांवोनि उठाउठीं । शोधूं जातां मृगांची थाटी । मूर्खदृष्टी शोधक ॥ ६१ ॥ तें मज नाहीं मूर्खपण । सीताशुद्ध्यर्थ मी सज्ञान । शोधीन मी समस्त भुवन । गुह्यस्थानें स्त्रियांचीं ॥ ६२ ॥ जें का अत्यंत विषम स्थान । तेथें रिघतां संकट गहन । तेथें तेथें मी प्रवेशोन । सीता शोधीन सौक्षेपें[३] ॥ ६३ ॥ मागें शोधिलें भुवनोभुवन । आतां शोधीन दुर्गम स्थान । ऐसी धरोनि आंगवण । उडे आपण हनुमंत ॥ ६४ ॥ हनुमान उडों पाहे आपण । तंव देखिलें इंद्रजितभुवन । अनर्घ्य[४] रत्नीं विराजमान । तेजें गगन लखलखित ॥ ६५ ॥ घरावरी घरकुसरी । उपरीवरी उपरी । आटालिका थोर थोरी । त्यांहीवरी चौबारें ॥ ६६ ॥ रावणाचे घराहूनी । शोभा इंद्रजिताचे भुवनीं । कनककळस जडितरत्नीं । लागले गगनीं लखलखित ॥ ६७ ॥ श्वेत पीत आरक्त भारीं । पताका झळकती अंबरीं । जागेलें[५] घालिजे महा असुरीं । हारोहारीं दीपिका ॥ ६८ ॥ हाकोनियां उपराउपरी । घरटी घालिजे महावीरीं । वायूसी रीघ नाहीं भीतरीं । पाहे चौफेरीं हनुमंत ॥ ६९ ॥ तीन खण चारी खण पांच खणें । सप्तखणें आणि नवखणें । त्यांमाजी आहे महादुखणें । नित्य कुंथणें वाटिवा ॥ ७० ॥ आंत दुखण्याचें छेदन । करील लक्ष्मणाचा बाण । युद्धचर्या सांडील पूर्ण । पाडील खण गर्वाचें ॥ ७१ ॥ देखोनि इंद्रजितभवन । हनुमान खवळला आपण । भीतरीं रिघावया जाण । अणुप्रमाण स्वयें जाला ॥ ७२ ॥ रिघोनियां गवाक्षद्वारीं । वेगें पाहिलीं घरें चारी । शोधोनियां ओवरीं ओवरीं । उपऱ्याउपरीं धांडोळी ॥ ७३ ॥ अट्टालिकांहिमाझारी । हनुमान पाहे सीता सुंदरी । तंव देखिली नवलपरी । सहित[६] अंतुरी इंद्रजित ॥ ७४ ॥ मरकतमंचकँ सुंदर । त्यावरी त्रौहाटिले[७] मयूर । शेज रचिली सुकुमार । सुमनें अरुवार[९] सुगंधें ॥ ७५ ॥ मुक्तघोंसीं युक्त वितान[१०] । धवधवीत शोभायमान । कर्पूरवाती तेज गहन । पीकदानें रत्नाचीं ॥ ७६ ॥ अति सुगंधा सुवर्णभिंती । पाचुनिबद्ध अवघी क्षिती[११] । सुलोचना महा सती । विडिया देत इंद्रजिता ॥ ७७ ॥ सुलोचना पतिव्रता । कदा नुलंघी पतिवचनार्था । तीसी देखोनि हनुमंत । म्हणे हे सीता निश्चित होय ॥ ७८ ॥ नागकन्या सुलोचना । ते तंव पद्मिनी पद्मनयना । देखोनि हनुमान म्हणे जाणा । रामांगना हे होये ॥ ७९ ॥ पद्मिनी स्त्रियेचा विचार । पाउलीं पाउलीं भ्रमती भ्रमर । अंगसुवास मनोहर । सीता सुंदर हे होय ॥ ८० ॥ माझ्या स्वामीची हे कांता । अनुसरली रावणसुता । दोहींच्या करीन मी घाता । कोप हनुमंता पैं आला ॥ ८१ ॥ डोळे आरक्त क्रोधें कडाडी । वळिलीं पुच्छाचीं पैं वेटोळीं । दोघांची मुरडा-

१ मिठाचा खडा. २ तें सोडून. ३ मोठ्या प्रयत्नानें. ४ मूल्यवान्. ५ गस्त. ६ स्त्रीसहवर्तमान. ७ हिरेजडित पलंग. ८ काढले. ९ नाजूक. १० छत. ११ जमीन.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

-वया नरडी । शेंडी तडतडी हनुमंताची ॥ ८२ ॥ अधर्मी रतलीसे सीता । उभयवर्गां मारीन आतां । कोप आलिया श्रीरघुनाथा । दोघांचे प्रेतां दावीन ॥ ८३ ॥ अथवा निजपुच्छीं बांधोनी । जीतें[1] धरोनि नेईन दोनी । रागें घुलकावितो गगनीं । उडी घालोनी मारावया ॥ ८४ ॥ तंव सुलोचना ते पतिव्रता । पतीचे चरणीं ठेविला माथा । कांहींएक पुसेन मी आतां । प्राणनाथा क्षमा कीजे ॥ ८५ ॥ यावज्जन्म तुम्हांप्रती । नाहीं केली म्यां विनंती । हा घात देखोनि लंकापती । काकुलती पुसतसें ॥ ८६ ॥ राखों जातां अशोकवन । तुम्ही पावाल अति अपमान । अखया कुमरा आलें मरण । कुळनिर्दळण राक्षसां ॥ ८७ ॥ तंव इंद्रजित पुसे प्रियेप्रती । ऐसें होय कैशा रीतीं । रावणें आणिली सीता सती । कुळसमाप्ती राक्षसां ॥ ८८ ॥ वनीं छळोनि जनकबाळी । आणि छळला श्रीराम बळी । तेणें तो करील लंकेची होळी । राक्षसकुळीं आकांत ॥ ८९ ॥ तुम्हांवरी ओखटें चिन्ह । देखोनि धाके माझें मन । प्रार्थुनी दशानन । बुद्धि आपण सांगावी ॥ ९० ॥ तूं तंव त्याचा ज्येष्ठ कुमर । तुझा विश्वास त्यास थोर । सीता देवोनि सुंदर । श्रीरामचंद्र करीं सखा ॥ ९१ ॥ सखा केलिया श्रीरघुनाथ । राक्षसकुळ होईल स्वस्थ । तुम्ही अक्षयी समस्त । यशवंत तिहीं लोकीं ॥ ९२ ॥ इंद्रजित सांगे अति एकांत । रावणासीं सीतासन्निपात । जो जो सांगेल हितस्वार्थ । त्याचा घात करूं धांवे ॥ ९३ ॥ सख्य करोनि श्रीरघुनाथा । सीता सोडीं मज म्हणता । माझ्याच करूं धांवेल घाता । बैसेल माथां पितृद्रोह ॥ ९४ ॥ ऐकें प्रिये सावधान । चुकविलिया न चुके मरण । होणार तें होईल जाण । बुद्धी आपण न सांगावी ॥ ९५ ॥ ऐसी दोघांची एकांतकथा । ऐकोनि हनुमंता । सुलोचना नव्हे सीता । ऐसें तत्त्वतां मानलें ॥ ९६ ॥ इंद्रजित सुलोचना एकांतीं । कोणे ठायीं सीता सती । राखिली आहे लंकापती । तें मारुति नायकेचि ॥ ९७ ॥ लंकेमाजी आहे सीता । शुद्धी लागली हनुमंता । तिसी[2] शोधावया तत्त्वतां । होय निघता तेथोनि ॥ ९८ ॥ मेघाहूनि उंच शिखर । मेघवर्ण दीर्घ शिखर । तेथें शोधावया सीता सुंदर । उडे सत्वर मारुती ॥ ९९ ॥ सादरें शोधितां घर । हनुमान दचकला थोर । कुंभकर्ण महाथोर । निशाचर पहुडला ॥ १०० ॥ दीर्घ करितां महाघोर । नादें कोंदलें अंबर । शंख केलियाहि समोर । कानीं उत्तर पडेना ॥ १ ॥ श्वासोच्छ्वासाच्या आवर्ती[3] । शतानुशत पडले हस्ती । निर्गमू[4] नाहीं तळमळती । म्हैसे[5] आरडती त्यामाजीं ॥ २ ॥ दोन्ही नासापुटरंध्रीं[6] । सगळे कळप रिघती करी । त्यांचा निर्गमू नाहीं बाहेरी । प्राणी मारिती प्राण्यांतें ॥ ३ ॥ गाई म्हैशी बैल घोडीं । श्वासोच्छ्वासीं घुंगरडीं । निदसुरिया नाक रगडी । मरती किडी प्राण्यांच्या ॥ ४ ॥ हनुमान म्हणे आपुल्या चित्तीं । जें रचिली याची मूर्ती । तैं आळस नाहीं प्रजापती । अमूप माती रचियेली ॥ ५ ॥ बाबरझोंट्या अति विशाळ । जैसे भाले अणियाळ[7] । अंगींचीं रोमें जैसीं शूळ । दांत विक्राळ खंतेले[8] ॥ ६ ॥ शेवांळले[9] दिसती दशन[10] । कदा न करी दांतवण । देखोनियां त्याचें वदन । आलें वमन हनुमंता ॥ ७ ॥ येथें आलिया श्रीरघुनंदन । याची पहावी आंगवण । प्रथम यासी माझें रण । केला पण हनुमंतें ॥ ८ ॥ देखोनि त्याची देहस्थिती । कंटाळला स्वयें मारुती । येथें कैंची सीता सती । म्हणोनि चित्तीं त्रासला ॥ ९ ॥ अति त्रासें उद्वेगेला[11] । अत्यंत खेदें खिन्न झाला । ब्राह्मणजन्म हा पावला । व्यर्थ गेला निद्रेनें ॥ ११० ॥ अर्धें आयुष्य हातोहातीं । बळेंचि हिरोनि नेलें रातीं । जागा जालिया स्त्रियेसीं रती । कामासक्ति कामाची ॥ ११ ॥ कुटुंबचिंता बैसली चित्तीं । ते तंव न सोडी कल्पांतीं । आयुष्य गेलें याचि रीतीं । द्रव्यासक्ती अति तृष्णा ॥ १२ ॥ भोजनशयनद्रव्यासक्ती । जन नागवले याच रीतीं । कुंभकर्ण नागविलासे सुषुप्तीं । सीता सती येथ कैंची ॥ १३ ॥ तेथोनि करोनि उड्डाण । देखिलें बिभीषणाचें भुवन । टके पताका वृंदावन । हरिकीर्तन रामाचें ॥ १४ ॥ टाळघोषमृदंगमेळीं । नैराश्यें निघडा वैष्णव बळी । नामासरसीं

१ जीवंत. २ वाईट. ३ भोवऱ्यांत. ४ सुटका, मुक्ती. ५ टोणगे. ६ नाकपुड्यांत. ७ अणीदार. ८ क्षतें पडलेले.

९ बुरसटलेले. १० दांत. ११ कंटाळला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वाजवी टाळी । सुखसमेळीं डुल्लत ॥ १५ ॥ कीर्तनसुखें सुखावले । आपआपणिया विसरले । परमानंदें तृप्त जाले । गाऊं लागले रामगुण ॥ १६ ॥ निरपेक्षी विचक्षण । श्रुती उपरमे साव-धान । श्रीराम सगुणी निर्गुण । करिती कीर्तन तें ऐका ॥ १७ ॥ श्रीरामें धरणी अति पावन । राम जीवन राम दहन । राम तपन राम गगन । राम परिपूर्ण परब्रह्म ॥ १८ ॥ राम मनाचें उन्मन । राम चित्ताचें चैतन्य घन । राम बुद्धीचें सज्ञान । राम परिपूर्ण परब्रह्म ॥ १९ ॥ राम जंगमीं स्थावरीं । राम सबाह्य अभ्यंतरीं । राम पर-मात्मा श्रीहरी । जगदुद्धारी श्रीराम ॥ १२० ॥ देखोनि कीर्तनाची गोडी । हनुमंता अत्यंत आवडी । रंगीं घालोनियां वेगें उडी । गुप्त गड-बडीं नाचत ॥ २१ ॥ रंगीं नाचतां हनुमंत । रंगीं ओसंडला परमार्थ । तेणें बिभीषण मूर्च्छित । परम भक्त परमार्थी ॥ २२ ॥ हनुमंता स्वयें दर्शन । नाठवे देह विदेहभान । बिभीषण मूर्च्छापन्न । आपणा आपण विसरला ॥ २३ ॥ दोघांसीं ओळखी नसतां । दोघां भेटी गोष्टी न होतां । दोघां झाली एकात्मता । श्रीरामकथाकीर्तनें ॥ २४ ॥ हरिकीर्तन तें स्वकर्म । हरिकीर्तन तो स्वधर्म । हरिकीर्तन प्रेम परम । जें परब्रह्मप्रापक ॥ २५ ॥ बिभीषणाचे भुजेप्रती । दिग्विजयी श्रीराममूर्ती । तें देखोनियां मारुती । परम प्रीतीं सुखावे ॥ २६ ॥ बिभीषण श्रीरामभक्त । हनुमान आनंदें नाचत । भावें भजतां श्रीरघुनाथ । नित्य मुक्त बिभीषण ॥ २७ ॥ राक्षसा श्रीरामाची भक्ती । हरिखें उपरमे मारुती । रामें रावणाची केलिया शांती । राज्यप्राप्ति बिभीषणा ॥ २८ ॥ माझ्या श्रीरामाची भक्ती । राज्य करितां नित्य-मुक्ती । असतां स्त्रीपुत्रसंतती । भुक्ति मुक्ति भंगेना ॥ २९ ॥ हनुमंतें केला पण । रामें मर्दि-लिया रावण । लंकापति बिभीषण । हें शुभ चिन्ह सत्य माझें ॥ १३० ॥ जेथें श्रीरामाची भक्ती । तेथें आहे श्रीरामशक्ती । रामराज्य लंके-प्रती । सीता सती येतांचि देख ॥ ३१ ॥ जेथें रिघाली रामशक्ती । तेथेंचि भुक्ति तेथेंचि मुक्ती । रामराज्याची ऐशी स्थिती । केला मारुतीं निश्चयो ॥ ३२ ॥ सीताआगमन लंकेप्रती । राव-णासी मरणमुक्ती । बिभीषणा राज्यप्राप्ती । केला मारुतीं निश्चयो ॥ ३३ ॥ मागील श्रम खेद उप-हती । येथें आलिया झाली शांती । धन्य वैष्णवाची संगती । महिमा किती मी वानूं ॥ ३४ ॥ संतसंगें निरसे भ्रांती । संतसंगें जड उद्धरती । संतसंगें ब्रह्मप्राप्ती । नित्य मुक्ति सत्संगें ॥ ३५ ॥ संतचरणींचें रजःकण । हनुमान् वंदी पैं आपण । चरणरजीं घाली लोटांगण । परम पावन पदरज ॥ ३६ ॥ चरणरजस्नानापुढें । तीर्थमात्र तें बापुडें । चरणरजें मुक्ति जोडे । ब्रह्म आतुडे पदरजें ॥ ३७ ॥ बिभीषणाच्या भवना-प्रती । हनुमान पावला सुखविश्रांती । भगवद्भक्त जेथें भेटती । भ्रमनिवृत्ति आकल्प ॥ ३८ ॥ अर्थी स्वार्थी परमार्थी । गेलिया भक्तभवनाप्रती । त्याचेनि संगें सुखप्राप्ती । भ्रमनिवृत्ति आकल्प ॥ ३९ ॥ एका जनार्दना शरण । दुरोनि देखिल्या भक्तभवन । हनुमान झाला सुखसंपन्न । समाधान जीवशिवां ॥ १४० ॥ प्रत्यक्ष झालिया भक्तभेटी । त्यासी पुसतां गुह्य गोष्टी । परमानंदीं पडली मिठी । धन्य सृष्टीं हरिभक्त ॥ ४१ ॥ एका जना-र्दना विनंती । शोधूं जातां सीता सती । बिभीष-णाच्या भवनाप्रती । सुखसंपत्ती मारुतीसी ॥ १४२ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां सीताशोधनं नाम द्वितीयोऽ-ध्यायः ॥ २ ॥ ओंव्या ॥ १४२ ॥ श्लोक ॥ ५ ॥

अध्याय तिसरा

श्रीरामचंद्राय नमः ॥ शोधितां बिभीषणमंदिर । सुखी झाला तो कपींद्र । शुद्धि न लभेचि सीता सुंदर । तेणें वानर उद्वेगी ॥ १ ॥ शोधिलें समस्त नगर । शोधिलीं हटकें घरोघर । शुद्धि न लभेचि अणुमात्र । तेणें वानर उद्वेगी ॥ २ ॥ शोधिलें समस्त नगर जाण । जन आणि अवघें वन । स्वयें शोधिलें सावधान । तेणें उद्विग्न वानर ॥ ३ ॥ सीताशुद्ध्यर्थीं उद्विग्न । अति चिंता कंपा-यमान । आतां करूं बुद्धि आपण । सीता चिद्रत्न तेणें लाभे ॥ ४ ॥ येथें शोधावया सीताशुद्ध्यर्थ ।

१ दुःख. २ प्राप्त होतें. ३ पृथ्वीक्षयापर्यंत. ४ भक्तगृहाला. ५ बाजार.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

कळी[1] माजवूं नगराआंत । लागतां निष्ठुर आघात । सीताशुद्ध्यर्थ वदतील ॥ ५ ॥ रावणआज्ञा अति दारुण । त्याभेणें न सांगती जन । बुद्धि निर्धारी आपण । कलहो पूर्ण उत्पादी ॥ ६ ॥ आपण राहोनियां गुप्त । कळी लाविजे जेथिले तेथ । वर्मे कर्मे आक्रंदत । सीताशुद्ध्यर्थ वदतील ॥ ७ ॥ ऐसें विचारोनि जाण । प्रवेशला लंकाभुवन । राजद्वारीं संपूर्ण । करी विंदान[2] कलहाचें ॥ ८ ॥ गुप्त राहोनि जनाआंत । वानरचेष्टा करी चेष्टित । कलहा माजवी जेथींचा तेथ । कथा अद्भुत अवधारा ॥ ९ ॥ हनुमान विनोदें पैं जाण । निजपुच्छासी करी नमन । सीताशुद्ध्यर्थी आपण । साह्य संपूर्ण मज व्हावें ॥ १० ॥ पुच्छें गोवोनि फोडी घागरी । तीवरी पाडी दुसरी । सवेंचि ढकली तिसरी । चौथी तीवरी घटस्फोट[3] ॥ ११ ॥ पांचवी जाण पैं चौंचरी[4] । सहावीचा आधार धरी । शतानुशतें असंख्य नारी । फोडी घागरी निजपुच्छें ॥ १२ ॥ कोण मेला गेला आम्हांआंत । रिघोनि घागरी फोडित । हनुमान पुच्छ भोवंडी नाकांत । नारी नाचत चमकोनी ॥ १३ ॥ पुढिल्या चमकोनि नाचती । मागील दचकोनि झाडिती । नाकीं पुच्छ भोवंडी मारुती । नारी शिंकती खसखसां ॥ १४ ॥ नारी शिंकती थटथटां । घागरी फुटती फटफटां । नगरीं उदकाचा तोटा । लावी वेढा निजपुच्छें ॥ १५ ॥ भरली घागरी नगराआंत । रिघों नेदीच हनुमंत । द्वंद्व मांडिलें परी गुप्त । तोटा नगरांत उदकाचा ॥ १६ ॥ राजा निमाला[5] ये नगरीं । घटस्फोट राजद्वारीं । शंख करिती नरनारी । सीता सुंदरी क्षोभली ॥ १७ ॥ श्रीरामाची निजकांता । चोरोनि आणिलीसे सीता । तिणें उठविलें आकांता । लंकानाथा वधावया ॥ १८ ॥ सीता क्षोभली दारुण । शोषिलें राक्षसांचें जीवन । आतां कैसेनि वांचती प्राण । जीवनेंवीण जिणें कैंचें ॥ १९ ॥ आंगोळ्या मोडिती नरनारी । क्षोभें क्षोभली सीता सुंदरी । आतां राक्षसां नुरे उरी । करील बोहरी[6] लंकेची ॥ २० ॥ राजद्वारीं घटस्फोट । खापरें पडलीं घनदाट । बुजाली राजद्वाराची वाट । विघ्न दुर्धट लंकेसीं ॥ २१ ॥ ऐसा हा घटस्फोटवृत्तांत । वेगळा बैसोनि हनुमंत । कलहो माजवी नगराआंत । सीताशुद्ध्यर्थ शोधावया ॥ २२ ॥ राजसन्मानी महावीरीं । अश्वीं चढोनि राजद्वारीं । होहो मामा जीजीकारीं । नानापरी नाचविती ॥ २३ ॥ पुच्छ गोवोनि अश्वपायांत । वीरा तोंडघसीं पाडित । दांत घालोनि घशांत । करी आरक्त मुख त्याचें ॥ २४ ॥ पुच्छ अश्वाचे पाय उखळित । वीरांमुखीं अशुद्ध वाहत । ऐसे योद्धे असंख्यात । पडले कुंथत अति दुःखी ॥ २५ ॥ ऐशिया वीरांच्या कोडी । उचउचकूं त्यांचीं घोडीं । राजद्वारीं घाली उपडीं । दांत पाडी वीरांचे ॥ २६ ॥ तोंडें ठेंचलीं अश्वपती । तैसीच गजारूढांची गती । पुच्छें दंडिलें मारुती । तीही ख्याती अवधारा ॥ २७ ॥ गजयोद्धे महाशूर । चरणीं ब्रिदांचा तोडर । माथां धरूनि आतपत्र[9] । राजद्वारीं ठाकले ॥ २८ ॥ राजद्वारीं प्रवेशती । पुच्छें खुंटोनि गजगती । मागील ओढोनियां हस्ती । हाणी दांतीं पुढिल्यातें ॥ २९ ॥ माझ्या हस्तीवरी हस्ती । कां रे आणिला उद्धतीं । वीर वीरांतें हाणिती । गज भिडती गजांसीं ॥ ३० ॥ गजदंतांची खणखण । शस्त्रें सुटती सणसण । राजद्वारीं महारण । अति दारुण मांडिलें ॥ ३१ ॥ पुढील पडलिया माहुता । पार्श्वदूतीं पुढें बैसतां । गज गजासीं झुंझतां । अत्यद्भुत गजयुद्धें ॥ ३२ ॥ वीर विजयो पावूं पहात । गुप्त पुच्छाचा वाजे घात । गज गडबडी जैसें प्रेत । वीर कुंथत रगडोनि ॥ ३३ ॥ ऐसे नेणों किती हस्ती । गुप्त पुच्छाचे आघातीं । लोळविले ते कुंथती । गजपंक्ती गांजोनी ॥ ३४ ॥ रथीं बैसोनि राजकुमर । कनकदंड ढळती चवर । पुढें वाजंत्र्यांचे भार । राजद्वारा ठाकिले ॥ ३५ ॥ गुप्तगतीं थोकिलीं[10] घोडीं । पुच्छें सारथियांतें ओढी । लागवेगें ध्वज आसुडी । कुमर पाडी क्षितीसीं[11] ॥ ३६ ॥ महावीर पडतां क्षितीं । त्याचा रथ त्यावरी उलथी । चारी घोडीं होतां पालथीं । कुमर कुंथती दडपोन ॥ ३७ ॥ वारु सारथी महारथी । एक वेळीं ते पडती । वाजंत्री शंख

१ तंटा. २ युक्ति. ३ घागरी फोडणें. ४ वांकडी. ५ मृत्यु पावला. ६ नाश. ७ रक्त. ८ बिरुदावलीचा, ९ छत्र. १० थांबविली, ११ पृथ्वीवर, जमिनीवर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

करिती । क्षितीं लोळती चवरधर ॥ ३८ ॥ ऐशिया रथांच्या कोडी । हनुमान गुप्तघातें मोडी । पुच्छ नाचविल्या बुडीं । रथाचीं घोडीं फडफडती ॥ ३९ ॥ ऐसे वीर नेणों किती । पडिले राजद्वारीं हुंबती । खाट दांडिया उचलोनि नेती । तेही भीती गुप्तघाता ॥ ४० ॥ मागिला मागें ये पांपरी । पुढिला पुढें रणभरी । एवढा वळसा कोण करी । निजनिर्धारीं लक्षेना ॥ ४१ ॥ क्षोभली श्रीरामाची कांता । तिणें सोडिलें अति उत्पाता[1] । करील राक्षसांचे घाता । लंकानाथासमवेत ॥ ४२ ॥ प्रधानवर्ग राजसन्मानी । बैसोनि येतां सुखासनीं । पुच्छ भोवंडितां भोयांचे कानीं । दोघे चमकोनि पाहती ॥ ४३ ॥ भोई नाचती तडतडां । कान झाडिती फडफडां । पुच्छें लावितांचि वेढा । पालखी पुढां आदळली ॥ ४४ ॥ धरणीं आदळतां पालखी । दांडी मोडोनि वाजे मस्तकीं । प्रधानवर्ग झाले दुःखी । अधोमुखीं आदळत ॥ ४५ ॥ बोभाट केला सेवकीं । एक शिंपिती उदकीं । सावधान होतां एकाकीं । हांसिजे लोकीं लंकेच्या ॥ ४६ ॥ रावणापासीं अति सन्मान । त्यासी राजद्वारीं अपमान । हांसतां देखोनियां जन । क्षोभायमान त्यावरी ॥ ४७ ॥ सघृत त्यातें नित्य चौशेरी । यावेगळें भोजन घरीं । उचित वेतन देतां करीं । राजद्वारीं पडियेले ॥ ४८ ॥ भोयांसी देतां बुक्या लाता । ते म्हणती कां मारितां वृथा । भूत चेतवी श्रीरामकांता । अपमानता तेणें तुम्हां ॥ ४९ ॥ ऐशिया पालखियांच्या हारीं[2] । हनुमान उलथी पुच्छेंकरीं । अवकळा करोनि भारी । धुळीमाझारीं मेळविलें ॥५०॥ पालखी मोडली नये कामासी । खाटदांडी प्रधानांसी । कुंथत धाडिलें घरासीं । अपमानासीं राजवर्गी ॥ ५१ ॥ लंकेमाजी आहे सीता । ऐकोनि आल्हाद हनुमंता । तिचे साधावया इत्यर्था । कळी कलहार्थी उपपादी[3] ॥ ५२ ॥ पुढें व्रिदाचे माल[4] जात । मागेंही माल येती उन्मत्त । हनुमान उचलोनि त्यांची लात । वेगीं हाणित पुढलियां ॥ ५३ ॥ कां रे हाणितो लाता । तो म्हणे चांचरलों अवचिता । तूं तरी मातलासी सर्वथा । तुझिया घाता मी करीन ॥ ५४ ॥ दांत खावोनि सवोष्ठीं । भिंवया चढवोनि नाकाटीं । येरयेरां हाणिती मुष्टी । क्रोधदृष्टीं खवळोनि ॥ ५५ ॥ उरीं शिरीं मुंडपीं[5] देखा । बाहु आंसडोनि लाविती धडका । परस्परें हाणिती झडका । गुडघा ढका हाणोनि ॥ ५६ ॥ तळवे हाणिती रागेंकरीं । उफराटिया निजकरीं । वर्मी हाणितां कोंपरीं । शिरीं उरीं चंडघातें ॥ ५७ ॥ वेगें आणावया तळासीं । दोघे उडती आकाशीं । शिर हाणोनि शिरासीं । निजबाहूसीं आफळी ॥ ५८ ॥ एक रिघे एकातळीं । तंव तो त्यासी चेंपी भूतळीं । वरील उलथोनि तत्काळीं । धरी नळी निमटावया ॥ ५९ ॥ नळी चेंपितां प्रबळ । पायांमाजी लावी कळ । तेणें होवोनि विव्हळ । नळी तत्काळ सोडिली ॥ ६० ॥ सवेंचि धरोनि दोहों पायीं । उपटावया दोन्हीं बाहीं । बळें आदळितां भुयीं । तळपोनि हृदयीं हाणी लाता ॥ ६१ ॥ ऐसी मल्लविद्या गाढी । दोघांची समान घडमोडी । झोंबी घेतां कडोविकडीं । समर्पैरवडी[6] दों वीरां ॥ ६२ ॥ घेतां मल्लविद्येचा झाडा । मृदंग्या लाविला वादु गाढा । त्यापुढें राउतांचा झगडा । काढोनि जमदाढा हांकिती ॥ ६३ ॥ त्यापुढें ब्राह्मण वेदांती । घटपट बोलती युक्ती । कोठें आहे सीता सती । तेही नेणती निश्चयें ॥ ६४ ॥ वेदपाठकांचा वेवाद । अक्षरें चुकलीं स्वर अबद्ध । सीताशुद्धीचा अनुवाद । तेही विशद न बोलती ॥ ६५ ॥ ऐसी लावितां नगरीं कळी । ठायीं न पडे जनकबाळी । आतां रावणाचे जवळी । सभा समूळीं शोधूं पां ॥६६॥ तंव झाली निशी[7] तेथ । रावणाचे सभेआंत । रिघता झाला पैं हनुमंत । तोही प्रताप अवधारा ॥ ६७ ॥ सिंहासनीं दशानन । सभेसीं राक्षस प्रधान । निजयुद्धीं सावधान । पार्श्वदगण असंख्य ॥ ६८ ॥ सभेसीं[8] येवोनि घरटीकार[9] । करूनि रावणासी जोहार । सांगती नगरींचा विचार । विघ्न दुर्धर दिसताहे ॥ ६९ ॥ जितुकी दृष्टि संचारी । तितुकी आजिच्या प्रथम प्रहरीं । अवघी उठली राजद्वारीं । क्षयकारी नृपनाथा ॥ ७० ॥ अमरवरदें खटाटोप । ऐसीं अरिष्टें मानिती अल्प । स्वयें निमाला हिरण्यकशिप । सप्रताप अहर्निशीं ॥ ७१ ॥ ज्याचें आमंत्रण घेऊन । त्याचे घरीं अन्न खावोन । अधर्मैं

१ उपद्रव, २ रांगा. ३ उत्पन्न करी. ४ मल्ल. ५ गळा, कंठ. ६ सारखेपणा. ७ रात्र. ८ सभासद. ९ हेर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

हरी द्विजधन । सहस्रार्जुन निमाला ॥७२॥ त्याचे दुश्चिन्हांचे संधीं । सहस्रभुजांचे खांदीं । पुत्रांसहित सैन्यमांदी । त्यातें वधी द्विजपुत्र ॥ ७३ ॥ मग सांगती ज्योतिषी । जावोनि सांगा रायापासीं । अधर्में आणिलें सीतेसी । तें विघ्न नगरापासी पैं आलें ॥ ७४ ॥ अश्वपति गजपती । अतिरथी महारथी । राजद्वारीं स्वयें उलथती । घायें हुंबती दडपोनी ॥ ७५ ॥ कोणी न दिसतां आघाती । वीर मरणांत कुंथती । अश्व गज तळमळती । मूर्च्छा येती प्राणांत ॥ ७६ ॥ आणिक अरिष्टांची थोरी । घटस्फोट राजद्वारीं । असंख्यात शतसहस्रीं । करिती नारी महाशब्द ॥ ७७ ॥ पालखीपदस्थ आतुर्बळी । शिबिकाभंगें मेळविले धुळी । म्हणती क्षोभली जनकबाळी । करील होळी नगराची ॥ ७८ ॥ रावणें ऐकोनि ही कथा । दुष्ट वदला हे वार्ता । म्हणे करा रे याचे घाता । द्वंद्व सर्वथा हा होय ॥ ७९ ॥ आणा संमुख बांधा हात । जिव्हा छेदा रे सदंत । कान कापोनि येथ । न्या नगरांत खरारोहें ॥ ८० ॥ ऐकोनि रावणाचें वचन । हनुमान क्षोभला दारुण । असत्य मानितो विघ्नचिन्ह । सत्य यासी करूनि दाखवूं ॥ ८१ ॥ विघ्न समस्त सत्य मानिती । रावण चळीं कांपे चित्तीं । ऐसी सभेसी लावी ख्याती । कोपें मारुति खवळला ॥ ८२ ॥ माझीं सर्व दुश्चिन्हें सांगतां जरी । दंड पाविजे घरटीकारीं । तरी भूमिभार संसारीं । आतांचि बाहेर भोवंडीन ॥ ८३ ॥ आयुष्य व्हावें माझिया पुच्छासी । रावणसभा हे कायसी । ख्याती लावीन सकळांसी । रावणासी गांजोनी ॥ ८४ ॥ सभासमवेत प्रधानीं । रावण बैसला सिंहासनीं । हनुमान ते काळीं कोपोनी । केली करणी ते ऐका ॥ ८५ ॥ सुंगधतैलदीपिका अनेक । कर्पूरदीप अठरा लाख । दोहीं बाहीं लखलख । सभा सम्यक शोभत ॥ ८६ ॥ तंव हनुमंता आला तंवकें । पुच्छ हाणोनियां देख । विझविल्या दीपिका सकळिक । चमकले लोक सभेचे ॥ ८७ ॥ सभेसीं पडतां अंधारी । हनुमंतें मांडिली चोरी । मुकुट कुंडलें छत्रें हारीं । शस्त्रास्त्रीं नागविले ॥८८॥ एक म्हणती माझीं नेलीं वस्त्रें । दुजा म्हणे माझीं नेलीं शस्त्रें । भट म्हणे माझी नेली धोत्रें । सभा वानरें नागविली ॥ ८९ ॥ कुंडलें घेतां कान तोडी । वस्त्रें घेतां डोळे फोडी । बाहुवटें घेतां बाहु मोडी । केली धांदडी राक्षसां ॥ ९० ॥ मुकुट घेतां मस्तक फोडी । कटिसूत्रासी मार्जँ मोडी । मुद्रिका घेतां आंगोळया उपडी । केली धांदडी राक्षसां ॥ ९१ ॥ कंठमाळा घेतां कंठ मुरडी । पदका काढितां हृदय फोडी । नेसणें घेतां लिंग तोडी । केलीं बापुडीं राक्षसें ॥ ९२ ॥ नेसणीं सांडा रे लौकरीं । नातरी लिंगा करील बोहरी । नपुंसकता ये संसारीं । कैशापरी सोसेल ॥ ९३ ॥ पायीं ब्रिदें वीरांसी पूर्ण । तयांसाठीं मोडी चरण । बोंबलूं जातां छेदी घ्राणँ । फें फें वचन राक्षसां ॥ ९४ ॥ येरयेरां सांगती बुद्धी । बोंबलूं नका रे त्रिशुद्धी । बोंबलूं जातां नाक छेदी । निःशब्दवादी उगे राहा ॥ ९५ ॥ रावणाचे उरीं शिरीं । हनुमान सुबद्ध टोले मारी । तेणें त्यासी आली अंधारी । भयेंकरीं न बोलवे ॥ ९६ ॥ अंधारीनें न दिसे व्यक्त । आंगीं वाजती आघात । तेणें भयें लंकानाथ । चळीं कांपत थरथरां ॥ ९७ ॥ वस्त्रें अलंकार जोडती पुढें । तैसें नाक तंव न जोडे । ख्याति लाविली माकडें । येरु दडे येरामागें ॥ ९८ ॥ जो बोंबलिला घरटीकारें । तें विघ्न आलें दुस्तर । सीता क्षोभली साचार । दशशिरवधार्थी ॥ ९९ ॥ जानकी कोपोनि अद्भुत । तिणें सोडिला पुच्छकेत । रावण मेला कीं जीत । कोणी मात न सांगे ॥ १०० ॥ रावण निमाला अंधारीं । विघ्न आलें त्यावरी । बोंब पडली सभेमाझारी । ये पांपरी राक्षसां ॥ १ ॥ मारिला इंद्रजित कुंभकर्ण । तयांमागें येथें रावण । आतां धांवण्या धांवे कोण । राक्षसगण कांपती ॥ २ ॥ पिता क्षोभला पवन । दीपिका गेल्या विझोन । राक्षसां ओढवलें कंदन । दशवदन निमाला ॥ ३ ॥ भंगलें राजाज्ञेचें सूत्र । सभेमाजि रिघाले चोर । नागविले थोर थोर । निशाचर पळों पहाती ॥ ४ ॥ जो कोणी निघे सभेबाहेरी । त्यासी पुच्छ

१ पालखींत बसणारे. २ गाढवावर बसवून. ३ सुगंधी तेलाचे दिवे. ४ आवेश. ५ करगोट्यासाठीं. ६ कमर. ७ नाक. ८ भोंवळ. ९ गस्त घालणारा. १० नाश. ११ राक्षस.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सुबद्ध मारी । अवघे दडाले अंधारीं । ये पांपरी राक्षसां ॥ ५ ॥ सीता क्षोभली अति उद्भट । आम्हांसी आलें अति संकट । बाहेर जातां न फुटे वाट । विघ्न दुर्घट ओढवलें ॥ ६ ॥ पुढें रावणाचा मुकुट । अति बळें ओढी मर्कट । तेणें धाकें दशकंठ । म्हणे शेवट मज आला ॥ ७ ॥ सत्य बोलती घरटीकार । विघ्न आलें मज साचार । गुतघात अति दुर्धर । लागती निष्ठुर प्राणांत ॥ ८ ॥ हनुमान सांगे कानीं बीजाक्षर । तुवां चोरिली सीता सुंदर । तुझें छेदावया शिर । आलों साचार रामदूत ॥ ९ ॥ रावणाचीं दाही शिरें । हनुमान छेदिता नखाग्रें । निवारिलें हो श्रीरामचंद्रें । म्हणोनि वानरें राखिला ॥ ११० ॥ तूं जरी मारशील लंकानाथ । तरी माझा पुरुषार्थ जाईल व्यर्थ । ऐसें बोलिला श्रीरघुनाथ । तेणें हनुमंत न मारी ॥ ११ ॥ वानरें लावितांचि हात । रावण झाला अति भ्रांत । कानीं जो पडला गुप्तार्थ । लंकानाथ तो नेणे ॥ १२ ॥ दीपिका आणितांचि तेथ । अवघे नागवे हळहळित । येरयेरां जैं पहात । मग लाजत अधोमुखें ॥ १३ ॥ एकाची वळली बोबडी । एक धाकधाकें उबडीं । एक केवळ जाहलीं वेडीं । आला धाडी पुच्छकेत ॥ १४ ॥ एका झाली दांतपाडी । एक केवळ झालीं मढीं । एक धाकती बापुडीं । आला धाडी पुच्छकेत ॥ १५ ॥ एका झाला अधोवात । एका सुटला कंपवात । सभेचा निमाला पुरुषार्थ । पुच्छकेत लागला ॥ १६ ॥ रावणाचे सभेआंत । करोनि राक्षसां आकांत । नागवोनि गेला हनुमंत । लंकानाथ काळमुख ॥ १७ ॥ राक्षस गांजिले उदंड । सभेचें निमालें बळवंड । रावणाचें काळें तोंड । तोही वितंड गांजिला ॥ १८ ॥ संमुख देखिला दशानन । सभेमाजी पडिलें खान । अवघे हळहळती नग्न । दंतभग्न राक्षस ॥ १९ ॥ सभेसीं वैसोनि हनुमंत । रावणराक्षसां अति आकांत । हनुमान महात्मा याचा अर्थ । व्यर्थ ग्रंथ न म्हणावा ॥ १२० ॥ एक श्लोकाचा श्लोकार्थ । इतुका आहे गुप्तार्थ । श्रोतीं पहावें सावचित्त । मी अपत्य संतांचें ॥ २१ ॥

जगाम चिन्तापरां सीतांप्रति महाकपिः ॥

१ राक्षस, २ खरोखर, ३ घाबरलेली, ४ अतिशय, ५ पुष्कळ, ६ रावण, ७ खणका, दांडगाई.

अपत्यभाग्य कैंचें मज । मी तंव त्यांचें चरणरज । ग्रंथार्थी निर्जओज । श्रीरघुराज स्वयें वदवी ॥ २२ ॥ माझें भावार्थरामायण । त्याचें मूळ म्यां दावावें कवण । श्रीराम मूळीं मूळकारण । कथार्थ गहन श्रीराम ॥ २३ ॥ श्रीराम माझें वदतें वचन । अक्षरींअक्षरीं श्रीराम पूर्ण । माझे बुद्धीचें गुह्य ज्ञान । चैतन्यघन श्रीराम ॥ २४ ॥ हृदयीं श्रीराम रिघोनि जाण । बळेंचि करवी रामायण । ग्रंथाचे मूळीं श्रीरघुनंदन । ग्रंथार्थ गहन श्रीराम ॥ २५ ॥ नेणें वेद नेणें शास्त्रार्था । माझे अंगीं अति मूर्खता । ग्रंथ आवडला श्रीरघुनाथा । वदनीं वदविता श्रीराम ॥ २६ ॥ एका जनार्दना शरण । रामें रम्य रामायण । रामें रम्य कथा गहन । कथा पावन श्रीरामें ॥ २७ ॥ इति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां रावणसभालुंठनं नाम तृतीयोऽध्यायः ॥ ३ ॥ ओंव्या ॥ १२७ ॥

॥ श्रीराम जयराम जयजयराम ॥

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

अध्याय चौथा

श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः॥ रावणाचे सभेआंत । न लभे सीताशुद्धीची मात । तेणें दुःखें हनुमंत । चिंताग्रस्त दृढ झाला ॥ १ ॥

दृष्टमन्तःपुरं सर्वं दृष्टा रावणयोषितः ।
न ददर्श ततः सीतां निरीक्षति मुहुर्मुहुः ॥ १ ॥
चतुरंगुलमात्रोऽपि नावकाशः स विद्यते ।
दृष्टा हनुमता तत्र न तु सा जनकात्मजा ॥ २ ॥
चिंतामुपजगामाशु शोकोपहतचेतनः ।
नात्र सीतेति हनुमांश्चक्रे बुद्धिं महाकपिः ॥ ३ ॥

दृढ प्रयत्न केला भारी । समस्त शोधिली लंकापुरी । धांडोळिलें घरोघरीं । सीता सुंदरी तेथें नाहीं ॥ २ ॥ विनोदें वाटिका आरामशिरीं । नद नदी वांपी पोखैरीं । राजकुमरांच्या घरोघरीं । सीता सुंदरी तेथें नाहीं ॥ ३ ॥ प्रत्यावर्ती लंकापुरीं । शतावृत्ती घरोघरीं । शुद्धि घेतां नानापरी । सीता सुंदरी तेथें नाहीं ॥ ४ ॥ स्त्रीपुरुषांचे शेजारीं । त्या स्थानांचे उपराउपरीं ।

८ आपलें सामर्थ्य, बळ. ९ पायऱ्यांच्या विहिरी. १० पुष्करिणीमध्यें, ११ पुनरागमनानें. १२ शेंकडो वेळां.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

शोधितां कोट्यनुकोटी नारी । सीता सुंदरी तेथें नाहीं ॥ ५ ॥ रावणाचे सभेमाझारीं । धुरीं[1]चि गांजिल्या नानापरी । शुद्धि न लभेचि निर्धारीं । लंकेमाझारी नाहीं सीता ॥ ६ ॥ म्यां तंव आपुले निजबुद्धीं । जानकी शोधिली नानाविधीं । विधाता पावों नेदी सिद्धी । लंकेमधीं नाहीं सीता ॥ ७ ॥ मज शोधितां गुप्तगतीं । लंकेमाझारीं लक्षितां ती । चारी अंगुळें नुरेचि रिती । सीता सती एथें नाहीं ॥ ८ ॥ शुद्धि न लभेचि सीता । हनुमंतासी परम चिंता । उसकाबुकर्सी होय स्फुंदता । केंवी रघुनाथा मुख दावूं ॥ ९ ॥ आणिक एक उपपत्ती । पाहतां रावणाचे हातीं । देह त्यागिला योगगतीं । सीता सती तेथें नाहीं ॥ १० ॥ रामबाणाच्या धाकें । रावण पळतां अति तवकें । सीता निष्टोनियां तंवकें । पडोनि कुटके होवोनि गेली ॥ ११ ॥ रावण नेटें पळतां । दृढ आवळितां रामकांता । कळ लागोनी निमाली सीता । कैंची आतां शुद्धि लाभे ॥ १२ ॥ रावणापासोनि एकसरीं । निष्टोनि पडली सागरीं । सीता भक्षिली मत्स्यमगरीं । कैसेपरी शुद्धि लाभे ॥ १३ ॥ म्यां चाळिल्या नाना युक्तीं । माझ्या मिथ्या मजचिप्रती । संपातीनें लंकेप्रती । सीता सती सांगितली ॥ १४ ॥ मिथ्या नव्हे संपातिवचन । सीता लंकेस आहे जाण । दुष्ट नष्ट हा रावण । सीताभक्षण तेणें केलें ॥ १५ ॥ हर्षें नेलिया एकांता । वश्य नव्हेचि जनकदुहिता । रावणें रागें भक्षिली सीता । कैंची आतां शुद्धि लाभे ॥ १६ ॥ रावणपत्न्या नेणों किती । सुंदर देखोनि सीता सती । अवघियांवरी श्रेष्ठ सवती । म्हणोनि समस्तीं खादली ॥ १७ ॥ राक्षसीं स्वयें खादली सीता । ऐसें मानलें कपीचे चित्ता । कैंची शुद्धि लाभे आतां । म्यां कां वृथा कष्टावें ॥ १८ ॥ अश्रूपूर्ण झाले डोळे । दुःखें गडबडोनियां लोळे । न भेटतां जनकबाळे । कष्ट केले ते वृथा ॥ १९ ॥ वृथा समुद्रलंघन । वृथा लंकेचें शोधन । वृथा माझें दादुलपण[2] । सीता चिद्रत्न न साधेचि ॥ २० ॥ घेवोनि आलों श्रीरामुद्रा । ते न साधेचि रामभद्रा । कैसेनि भेटों श्रीरामचंद्रा । आणि कपींद्रा सुग्रीवा ॥ २१ ॥ सीता मारिली कीं मेली । किंवा रामविरहें निमाली । किंवा तरळ भरोनि मेली । कीं उं[3]तटली अति दुःखें ॥ २२ ॥ सीता निःशेष नासली । श्रीरामापाशीं वार्ता नेली । ऐसी ऐकतांचि बोली । मज आली अपकीर्ति ॥ २३ ॥ सीता[3]प्रियो कांतेकारणें । राम बैसलासे धरणें । तिचें ऐकतांचि मरणें । निजप्राणें तो जुरे ॥ २४॥ वेगीं लंघोनि उदधी । जेणें श्रीराममरण त्रिशुद्धी । ऐसी आणिली शुद्धी । म्हणती हा दुर्बुद्धि वानर ॥२५॥ सेवक नव्हे हा अधःपाती । आप्त नव्हे हा अतिघाती । कुशल नव्हे हा मंदमती[4] । श्रीरामघाती हनुमंत ॥ २६ ॥ म्हणती हनुमान बुद्धिवंत । तरी कां केला अति अनर्थ । याचेनि निमाला रघुनाथ । येणें कार्यार्थ नाशिला ॥ २७ ॥ सांगतां सीतेची हे कथा । अपेश येईल माझे माथां । राहों नये न सांगतां । तेणेंही माथां अति दोष ॥ २८ स्वामीपाशीं अति गोष्टी । न सांगे तो सेवक कपटी । नरका जाइजे उठाउठीं । होईन सृष्टीं अति दोषी ॥ २९ ॥ जैसें तैसें मनोगत । गुरूसी सांगावें इत्थंभूत[5] । ऐसा विश्वास नाहीं जेथ । नरकपात त्या नरा ॥ ३० ॥ गुरूसी सांगतां मनोगत । संकल्पविकल्प मनीं मुक्त। ऐसा विश्वास नाहीं जेथ। नरकपात त्या नरा॥३१॥सांगों जातां अति अनर्थ । न सांगतां नरकपात । कांहीं न चले उपाय येथ । चिंताग्रस्त मारुति ॥ ३२ ॥ उल्लंघोनियां सागरा । मज आणिलें लंकापुरा । सीता न भेटेचि सुंदरा । पुढील विचारा विवंची ॥ ३३ ॥ मज कल्याण येथें राहतां । किंवा किष्किंधेसी जातां । ऐसें चिंतितां हनुमंता । अति उत्पाता पावला ॥ ३४ ॥ तेथें जातां पैं आपण । सांगतां सीतेचें मरण । श्रीराम सांडील प्राण । आणि लक्ष्मण तत्काळ॥ ३५ ॥ राम आणि लक्ष्मण । दोघे निमाले ऐकोन । दुःखें भरत देईल प्राण । आणि शत्रुघ्न त्यासवें ॥ ३६ ॥ ऐकोनि पुत्रांचें निधन । तिघी माता पावती मरण । प्रधानही सांडिती प्राण । अयोध्येचे जन निमतील ॥ ३७॥ निमाला देखोनि रघुनंदन । दुःखें सुग्रीवा येईल मरण । त्यासवें अंगद देईल प्राण । वानरगण निमाले ॥ ३८ ॥ नि[6]धन सुग्रीवश्रीरामां । देह

१ मुख्य मुख्य मंडळी. २ मोठेपण. ३ सीतेचा पति, रामचंद्र. ४ मूढ. ५ जसें घडलें असेल तसें, यथास्थित. ६ शेवट.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

त्याजिती तारा रुमा । अति दुःख प्लवंगमां । मरणधर्मा रिघतील ॥ ३९ ॥ नळ नीळ जांबवंत । आणि जुत्पती[1] समस्त । श्रीरामआप्त त्यां प्राणांत । निमेषार्धांत निमतील ॥ ४० ॥ श्रीरामदुःख अति अचाट । दुसरें सुग्रीवाचें दुःख श्रेष्ठ । वानर होतील सपाट । कडेलोट करूनी ॥ ४१ ॥ मज तेथें करितां गमन । सूर्यवंशा निःसंतान । वानरवंश पडिला शून्य । तो मज कोण पुरुषार्थ ॥ ४२ ॥ मज येथेंचि राहतां । श्रीराम माझी परमावस्था । गुरुवंचकता[2] बैसेल माथां । केंवी रघुनाथा उपेक्षूं ॥ ४३ ॥ उपेक्षोनि श्रीरघुनाथा । मज तेथें न वचतां[3] । पृथ्वीचे दोष माझे माथां । अधःपाता जाईन मी ॥ ४४ ॥ अति अनर्थ तेथें जातां । परम दोष येथें राहतां । अति विचार हनुमंता । कर्त्तव्यता लक्षेना ॥ ४५ ॥ मज राहतां निजनिवाडें । सीताशुद्धि मागिलीकडे । माझीच शुद्धि पडेल पुढें । अति सांकडें श्रीरामा ॥ ४६ ॥ माझे शुद्धीचे[4] कैवाडें । अगाध उदधि कवण उडे । श्रीरामा सुग्रीवा सांकडें । रहाणें कुडें येथें माझें ॥ ४७ ॥ अति संकटीं त्यजूं प्राण । तंव मज न येचि मरण । जाळूं न शके हुताशन । न शके पवन मज मारूं ॥ ४८ ॥ जरी करूं पर्वतपतन । तरी तें माझें नित्य उड्डाण । बुडवों न शके मज जीवन । मरतां मरण मज न ये ॥ ४९ ॥ वज्रदेही जो मी लाठा । सीताशुद्धीचिया वाटा । तो मी झालों अति करंटा । मरण कटकटा[5] मज न ये ॥ ५० ॥ म्हणोनि क्षितितळीं पडे । धायँ मोकलोनि दीर्घ रडे[6] । माझें दुस्तर सांकडें । कोणापुढें मी सांगों ॥ ५१ ॥ ऐशा माझिया आकांता । धांवें पावें गा श्रीरघुनाथा । मज नुपेक्षीं सर्वथा । कृपावंता श्रीरामा ॥ ५२ ॥ भावें स्मरतां श्रीरघुनाथा । चित्तचैतन्या निमाली चिंता । परमानंद हनुमंता । श्रीरामकांता शोधावया ॥ ५३ ॥ सीताशुद्धीतें शोधितां । इंद्रजित-कुंभकर्णासमवेता । करीन रावणाचे घाता । आणि समस्तां राक्षसां ॥ ५४ ॥ नाहीं तरी जीवें जितां । पुच्छीं बांधोनि लंकानाथा । श्रीरामापाशीं नेईन आतां । त्यासी तो सीता पुसेल ॥ ५५ ॥ रांडवे स्त्रियेचेपरी । मी कां रडतों लंकापुरीं । स्वामी श्रीराम माझे शिरीं । भक्तसहाकारी श्रीराम ॥ ५६ ॥ मज साह्य श्रीपती । म्हणोनि उल्लासे मारुती । सीता शोधीन मागुती । प्रत्यावृत्तीं[7] साक्षेपें ॥ ५७ ॥ आळस सांडोनि संभ्रम । त्यजोनि विषयविषकाम । प्रयत्न करितां पैं परम । परब्रह्म आतुडे ॥ ५८ ॥ प्रयत्न करोनि विचक्षण । वैकुंठवासी होय पूर्ण । शेषशयनी नारायण । होती आपण अति प्रयत्नें[8] ॥ ५९ ॥ अति प्रयत्न तो मानसिक । तेणें पावती परम सुख । मी तंव रामाचा सेवक । सीता सम्यक शोधीन ॥ ६० ॥ उल्लास हनुमंताचे चित्ता । आलस्य सांडोनि विकल्पवार्ता । अति साक्षेपें शोधीन सीता । श्रीरघुनाथाचेनि बळें ॥ ६१ ॥ पूर्वी केलें स्वयें शोधन । समस्तही लंकाभुवन । शोधितां राहिलें जें जें स्थान । सावधान अवधारा ॥ ६२ ॥ रावणाचें शयनभवन । आणिक कामग[9] विमान । तेथें रिघोनि सावधान । सीता चिद्रत्न शोधीन मी ॥ ६३ ॥ ऐसा करोनि इत्यर्थ[10] । रावणाचे गृहाआंत । रिघावया पाहे हनुमंत । स्मरे रघुनाथ सद्भावें ॥ ६४ ॥ श्रीरामा तुज मी अनन्य शरण । लक्ष्मणा तुजलागीं माझें नमन । जनकात्मजेसी लोटांगण । निजदर्शन मज द्यावें ॥ ६५ ॥ मी तंव तुझें अत्यंत तान्हें । मज धाडिलें रघुनंदनें । वत्साप्रति धेनुधावणें । तैसी देणें मज भेटी ॥ ६६ ॥ तूं तंव श्रीरामाची शक्ती । तुझेनि मजला नित्यगती । म्हणोनि लोटांगण क्षितीं[11] । करी मारुती जानकीये ॥ ६७ ॥ स्वयें सीतेच्या शुद्ध्यर्था । नमूनियां श्रीरघुनाथा । जानकी शोधावया मागुता । होय निघता हनुमंत ॥ ६८ ॥ शोधावया रावणाचें भवन । सूक्ष्मरूप धरोनि जाण । कपी करिता जाला गमन । सीता चिद्रत्न शोधावया ॥ ६९ ॥ रावणगृहीं उपराउपरी । एकवीस माडियांवरी घरीं । गोपुरादि हारोहारीं । घरटीकारीं गडगजरू ॥ ७० ॥ सिंदूरारक्त श्वेत पीत । गज गर्जती चतुर्दंत । सैन्य थोवे थोवे समस्त । वीर जागत गडगजरें ॥ ७१ ॥ अश्व गज पदपदाती । सेनाधर सेनापती । राजगृहीं नित्य जागती । शस्त्रसंपत्ती अति गजरें ॥ ७२ ॥ ढोल दमामे शंख किंकाटी । विराणीं वाजती थापटीं ।

१ योद्धे, पराक्रमी. २ गुरूपाशीं प्रतारणा. ३ जातां. ४ निमित्तानें. ५ हाय हाय. ६ मोठ्यानें रडूं लागला. ७ पुनः फिरून. ८ प्रयत्नानें. ९ इच्छिल्या स्थानीं जाणारें. १० निश्चय. ११ जमिनीवर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

घरटीकार देताती घरंटी[1] । सावधवृत्तीं क्षोभक ॥ ७३ ॥ आईनीपाइनी[2] येकमेकां । उपराउपरी जागती देखा । हलकल्लोळें देवोनि हाका । एकमेकां गर्जती ॥ ७४ ॥ दडदडां निशाणें भेरी । त्राहाटिलिया राजद्वारीं । काहळा चिनकाहळा थोरी । बुरगे गजरीं गर्जती ॥ ७५ ॥ सप्तकक्षांतर[3] वाट । ऐसें सैन्य घनदाट । वाऱ्या तेथें न फुटे वाट । दृढ कपाट राजद्वारीं ॥ ७६ ॥ हनुमान सप्तद्वारांतरीं । रिघोनि सैन्याचे भीतरीं । शोधित असे सीता सुंदरी । गुप्ताचारीं अति युक्तीं ॥ ७७ ॥ राजपत्न्या शिबिकेआंत । बैसोनि जाती अति गुप्त । हनुमान रिघोनि घुंगुटाआंत । सीता शोधित अति युक्तीं ॥ ७८ ॥ अश्वशाळा गजशाळा शस्त्रशाळा । अस्त्रशाळा चित्रशाळा । आणि नाना विचित्र शाळा । जनकबाळा शोधित ॥ ७९ ॥ स्नानशाळा पानशाळा । गायनशाळा शयनशाळा । पाठशाळा अति विशाळा । यज्ञशाळा शोधित ॥ ८० ॥ शाकशाळा पाकशाळा । लतामृगसुमनशाळा । रत्नशाळा प्रयत्नशाळा । टांकशाळा शोधित ॥ ८१ ॥ कर्मशाळा धर्मशाळा । मठमठिका पर्णशाळा । ब्राह्मणांच्या ब्रह्मशाळा । अति विशाळा शोधित ॥ ८२ ॥ बावन्न चंदनइंधनशाळा । कंडणी[4]पेषणी अन्नशाळा । यंत्रतंत्रनाटकशाळा । रंगशाळा शोधित ॥ ८३ ॥ नानापरींचीं वातायनें । नानापरींचीं वितानें[5] । गोपुरें उपरी नानास्थानें । गौप्यस्थानें शोधित ॥ ८४ ॥ ऐसें शोधिलें बाह्यभवन । आतां रावणाचें शयनस्थान । आणिक कामग विमान । कपि सावधान शोधित ॥ ८५ ॥ ऐशिया भवनांमाझारीं । रावणशयनाची ओवरी । दहा योजनें विस्तीर्ण वरी । रुंदीची परी तदर्ध ॥ ८६ ॥ रत्नजडितसुवर्णभिंती । घोटींव पाचबद्ध अवघी क्षिती । सूर्यप्रभासम ज्योती । रत्नदीप्ती दीपक ॥ ८७ ॥ ओंवोनियां मुक्ताफळां । वातायनीं हेममाळा । हेममंचकीं माणिक्य[6]किळा । हेममाळा मोतीलग ॥ ८८ ॥ हेममुक्तमणीं विराजमान । हेमसूत्रीं शोभे वितान । सुवासें कोंदलें गगन । वसंतपवन कामारे[7] ॥ ८९ ॥ वितानातळीं वातायन । सुगंध सुवासें झळके पवन । त्यामाजी कामग

१ गस्त. २ आळीपाळीनें. ३ सातखणींमधून. ४ उखळ आणि जातें. ५ छतें. ६ माणिकांचें तेज. ७ कामकरी.

विमान । देदीप्यमान तेजस्वी ॥ ९० ॥ ब्रह्मयाकारणें देदीप्यमान । विश्वकर्मा करी विमान । तेथें बैसोनि चतुरानन । सुखसंपन्न विचरत ॥ ९१ ॥ त्याचि विमानाकारणें । कुबेर तप करी प्रयत्नें । एकांगुष्ठ धरोनि चरणें । एकाग्र राहणें निराहार ॥ ९२ ॥ करितां तप शतानुशतें । ब्रह्मा प्रसन्न होवोनि त्यातें । कुबेरासी विमान देत । हर्षयुक्त तो जाला ॥ ९३ ॥ घेवोनि कामग विमान । चाले पहावया चैत्रवन । तपोवन नंदनवन । सुखसंपन्न क्रीडत ॥ ९४ ॥ ऐसें देखोनियां रावण । सांडोनि बंधुसुहृदपण । कुबेरासीं करोनि रण । घेतलें विमान हिरोनी ॥ ९५ ॥ तें हें विमान पैं तेथ । रावणाचे घराआंत । तेथें बैसोनि लंकानाथ । सुखें क्रीडत स्त्रियांसीं ॥ ९६ ॥ विमानशोभा पुष्कळ । खांबोखांबीं इंद्रनीळ । त्यावरी शोभती महानीळ । अति सुनीळ भूमिका ॥ ९७ ॥ विमाना मुक्ताफ[8]ळांची झालरी । रत्नें जडलीं उपराउपरी । पाच प्रदीप्त हारोहारीं । चढे त्यावरी हनुमंत ॥ ९८ ॥ अति सूक्ष्म तो हनुमंत । लघुलाघवें विमानांत । रिघोनि पाहतसे वृत्तांत । सीताशुद्ध्यर्थ शोधावया ॥ ९९ ॥ रावणाचें निजभुवन । अति शोभा देदीप्यमान । त्यामाजि शोभत विमान । विराजमान निजस्त्रिया ॥ १०० ॥ जे लक्ष्मी स्वयें इंद्रापाशीं । जें वैभव यमवरुणांसीं । त्याहूनिही अति विशेषीं । रावणगृहासीं अति शोभा ॥ १ ॥ जें वैभव कुबेरासीं । जें वैभव स्वर्गवासीं । त्याहूनही अति विशेषीं । रावणगृहासीं श्रीशोभा ॥ २ ॥ नित्य नूतन अनपायि[9]नी । श्री विराजे दशाननीं । त्याचिया शयनस्थानीं । दिव्ययोगिनी योषितां[10] ॥ ३ ॥ शुद्ध पद्मिनीची जाती । नागकन्या नेणों किती । देवकन्या दिव्यदीप्ती । असंख्यात राजकन्या ॥ ४ ॥ सुरवरनरकन्यका । गंधर्वांच्या निजनायिका । दैत्यदानवांच्या अनेकां । रावणें देखा आणिल्या ॥ ५ ॥ जीं जीं अपूर्व स्त्रीरत्नें । तीं तीं करोनि भोगायतनें[11] । स्वयें आणिलीं दशाननें । विराजमानें तेजस्वी ॥ ६ ॥ ऐशा भोगिल्या अमित[12] कांता । तैसीच आणूं गेला सीता । ते तंव न जिरे लंकानाथा । अपमानितां हनुमंतें ॥ ७ ॥

८ मोत्यांची. ९ अपाय न करणारी. १० स्त्रिया, ११ सुखोपभोगाचीं स्थानें. १२ असंख्यात.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

रावणाचे शयनाशेजारीं । ऐशिया स्त्रियांच्या हारी । सुकुमारा अति सुंदरी । अलंकारीं शोभती ॥ ८ ॥ ऐशा योषिता नेणों किती । नाना यंत्रें[1] घेवोनि हातीं । रावणाचे शेजेप्रती । ओळंग[3] करिती गीतनृत्यें ॥ ९ ॥ वृद्धा नाचती व्युत्पत्तीं । वोपत्रीप तळप देती । संगीताच्या गतिविगती । अंग मोडिती थैथाकें ॥ ११० ॥ तरुण कामिनी कामासक्तीं । न लभती पुरुषासीं संगती । उन्मादकामकामार्तीं । दुःखी होती अति कामें ॥ ११ ॥ न पवे कामाचा संभव । नाडले भोगभोगवैभव । जळो हें रावणाचें दैव । तरी गौरव आम्हां नाहीं ॥ १२ ॥ गाढ देती आलिंगन । तरी रति नव्हे समाधान । मग करिती आनेंआन । सावधान अवधारा ॥ १३ ॥ भक्षिती उन्मादअन्न । करिती उन्मादप्राशन । तेणें स्त्रिया आनेंआन । करिती रमण तें ऐका ॥ १४ ॥ ऐशिया रावणाचे घरीं । मदविव्हळा असित नारी । फुलें गुंफवीजे फुलारीं । तैसी हारी स्त्रियांची ॥ १५ ॥ हनुमंत रिघोनि त्यांमाझारीं । शोधितां श्रीरामअंतुरी[3] । त्या तंव अवघ्या कामाचारी । सीता सुंदरी तेथें नाहीं ॥ १६ ॥ शोधितां असंख्यात नारी । येथें नाहीं सीता सुंदरी । तेचि शोधावया पुढारी । सौटोप धरी हनुमंत ॥ १७ ॥ पुढें जातां एक एक । देखिला रावणाचा मंचक । रत्नखचित अलौलिक । सेज सम्यक सुमनांची ॥ १८ ॥ पहुडावया दशशिर । पवनें त्राहाटिला स्वर । शेज रचिली सुमनाकार । सुगंधसेजार वसंत ॥ १९ ॥ तया मंचकाशेजारीं । एकली निजली मंदोदरी । हनुमान म्हणे हे सीता खरी । शोभा साजिरी देखोनि ॥ १२० ॥ श्रीरामाची निजकांता । मज सांपडलीसे सीता । उल्हास हनुमंताचे चित्ता । होय नाचता स्वानंदें ॥ २१ ॥ रावणाची क्रिया भली । सुमनसेजे सीता एकली । असे निष्पाप राखिली । नाहीं अभिलाषिली तेणें पैं ॥ २२ ॥ सीता सती निरुपम । अभिलाषितां करील भस्म । रावणाचा परम धर्म । सीता निजधर्में रक्षिली ॥ २३ ॥ जागी जाहलिया सीता गोरटी । रावण कपटी कीं हे कपटी । पुसावया गुह्य गोष्टी । मंचका नेहटी

अति गुप्त ॥ २४ ॥ सभेसीं देखोनि अति विघ्न । त्याचें करावया शांतिविधान । रावण करूं गेला । हवन[4] । अति उद्विग्न भयभीत ॥ २५ ॥ सभेचा आठवतां आघात । रावणा होऊं पाहे प्राणांत । तेणें भयें होम करित । विघ्नशांत्यर्थ अनुतापें ॥ २६ ॥ यालागीं एकली मंदोदरी । निजली देखिली सेजेवरी । हनुमान मानी सीता सुंदरी । निजजिव्हारीं निश्चित ॥ २७ ॥ मंदोदरीरावणां भेटी । त्या दोघांच्या गुह्य गोष्टी । हनुमान ऐकोनि कर्णपुटीं । होईल भेटी सीतेची ॥ २८ ॥ एका जनार्दना शरण । सीताशुद्धीचें महिमान । कथाकौतुक गहन । अति पावन पवित्र ॥ २९ ॥ सीताशुद्धीचा विधी । श्रवणें जाती आधिव्याधी । छेदोनि दुष्ट दुर्बुद्धी । चित्तशुद्धी श्रीरामें ॥ १३० ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां हनुमद्रावणशयनभवनशोधो नाम चतुर्थोऽध्यायः ॥ ४ ॥ ओंव्या ॥ १३० ॥ श्लोक ३ ॥ श्रीराम जयराम जय जय राम ॥ श्रीसीतारामचंद्रार्पणमस्तु ॥

अध्याय पांचवा

॥ श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ॥ विघ्न देखिलें सभेआंत । रावण होम करी शांत्यर्थ । मंदोदरी सेजे गुप्त । देखे हनुमंत एकाकी ॥ १ ॥ ही निश्चयें होय सीता । ऐसें मानलें हनुमंता । तेचि अवधारा पैं कथा । श्लोकीं श्लोकार्था अवधारिजे ॥ २ ॥ विमानीं उपराउपरीं । शोधितां एकांत ओंवरी । रावणाचे सेजेवरी । मंदोदरी देखिली ॥ ३ ॥ ठाण माण गुणलक्षण । रूपरेखास्थान यौवन । सीतेसारिखी समसमान । दोघी अनुपम्य स्वरूपें ॥ ४ ॥ हेचि श्रीरामाची कांता । हेचि माझी स्वामिनी सीता । ऐसें मानिलें हनुमंता । उल्हासतें नाचत ॥ ५ ॥ हर्षें निजबाहु आफळी । पुच्छा चुंबी सुखमेळीं । परमानंदें पिटी टाळी । जनकबाळी भेटली ॥ ६ ॥ मज जोडली सीताशुद्धी । जाहली श्रीरामकार्यसिद्धी । ही जानकी होय त्रिशुद्धी । हर्षानंदीं नाचत ॥ ७ ॥ आतां फिटेल सांकडें । कैसें रावण बापुडें । वांकुल्या दावी देवाकडे । येणें उडे स्वानंदें ॥ ८ ॥ हनुमान आनंदें डुलत । माझा

1 मनोरंजनाचीं वाद्यें. 2 सेवा. 3 श्रीरामपत्नी (जानकी). 4 होम. 5 फुलांची. 6 होम. 7 विघ्न. 8 प्रकार. 9 श्लोकीं. 10 आनंदानें. 11 संकट.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

जाहला निजस्वार्थ । मज तुष्टला श्रीरघुनाथ । चुकला अनर्थ वानरा ॥ ९ ॥ ऐकतां सीताशुद्धीची गोष्टी । श्रीरामासी आनंदकोटी । हर्षें माझी पाठी थापटी । सुखसंतुष्टी वानरा ॥ १० ॥ हर्षें जातां हनुमंत । करोनि रावणें होम समाप्त । सेजे आला लंकानाथ । चिंतायुक्त उद्वेगी ॥ ११ ॥ देखोनि विघ्नांची पैं थोरी । रावणासी भय भारी । न उठवितां मंदोदरी । सेजेवरी पहुडला ॥ १२ ॥ रावणाचे सांचलेवरी । जागी जाहली मंदोदरी । वेगें उठोनि चरण धरी । नमस्कारी सद्भावें ॥ १३ ॥ घेवोनि जांबुनदतस्त । पतिचरण प्रक्षाळितं । तें देखोनि हनुमंत । अत्यद्भुत कोपला ॥ १४ ॥ माझिया स्वामीची हे कांता । अनुसरली लंकानाथा । मी काय उगाचि पाहूं आतां । करीन घाता दोघांच्या ॥ १५ ॥ दाही शिरें लंकानाथा । अकरावा सीतेचा माथा । नखें खुडूनियां आतां । नेईन रघुनाथा भेटीसीं ॥ १६ ॥ सीता रतली लंकानाथा । त्या दोघींच्या केलिया घाता । कोपलिया श्रीरघुनाथा । चरणीं माथा ठेवीन ॥ १७ ॥ किंवा जीत पुच्छीं बांधोनी । श्रीरामापासीं नेईन दोन्ही । मग तो दंडील निजवाणीं । ऐसेंही मनीं विचारी ॥ १८ ॥ अथवा करूं आणीक एक । पुच्छीं बांधोनि मंचक । दोघें किष्किंधे नेलिया देख । दोष निर्दोख राम जाणे ॥ १९ ॥ ऐसें करितां जाण । श्रीरामें सांगितली खूण । आधीं पाहों पां आपण । नाममहिमान सीतेचें ॥ २० ॥ सीतेचे स्तंभभिंती लाविता कर्ण । तेथें नुठी रामस्मरण । कानीं लावितां पाषाण । नामोच्चारण तेथें नाहीं ॥ २१ ॥ पतिव्रता त्यागितां पती । तेथोनि पळे नामशक्ती । सीता सती ते असती । नामकीर्ति मावळली ॥ २२ ॥ सीता रतली अनाचारीं । नाम नुठी चराचरीं । इसीं मी आतां जीवें मारीं । आला वानरीं अति कोप ॥ २३ ॥ रागें कांपत थरथरां । दांत खातसे करकरां । डोळे भोवंडी गरगरां । रोम थरथरां थरकती ॥ २४ ॥ दोघां मारावया कडाडीं । वळिली पुच्छाची पैं विडी । रागें पिंजारिली दाढी । शेंडी तडतडी हनुमंताची ॥ २५ ॥ कोपामाजी हनुमंत । अतिशयेंसीं बुद्धिवंत । ऐकतां सुलोचनावृत्तांत । इंद्रजित वांचला ॥ २६ ॥ आतांही कोप करूं शांत । या दोहींची ऐकों मात । विचारोनि शब्दार्थ । निजकार्यार्थ साधावा ॥ २७ ॥ कोप आलिया दुर्धर । जयाचा लोपेना विचार । तोचि मोक्षगामी नर । परम धीर तो एक ॥ २८ ॥ कोपामाजी सावधान । अवतारपुरुषाचें हें चिन्ह । तें तें चालतें ब्रह्मज्ञान । जग पावन त्याचेनि ॥ २९ ॥ लोभ क्रोधाचें कारण । तो हनुमंता नाहीं जाण । यालागीं क्रोधीं सावधान । रघुनंदनगुरुकृपा ॥ ३० ॥ कपीनें कोप शांत करूनी । दोहींच्या कथा ऐकाव्या कानीं । राहिलासे गुप्त होउनी । सावधानीं सादर ॥ ३१ ॥ मंदोदरी म्हणे लंकानाथा । दुष्ट स्वप्न म्यां देखिलें आतां । तेणें पावलें अति आकांता । तें सादरता अवधारीं ॥ ३२ ॥ ऐसें स्वप्न देखिलें नयनीं । पडलंके कैंचा निर्दाळोनी । तो पुरुष निघोनि अशोकवनीं । श्रीरामपत्नी शोधित ॥ ३३ ॥ तो रिघतां अशोकवनीं । त्रिविध शोक लंकाभुवनीं । पुत्रशोक पतिअपमानीं । पुरदहनीं आकांत ॥ ३४ ॥ अशोकवनीं अति आत । केला सीतेसीं एकांत । करोनि वनकरांचा घात । समुद्रांत निक्षेपी ॥ ३५ ॥ अशोकवनाची रवंदळी । तो मारिला जंबुमाळी । राक्षसकुमरां करोनि होळी । उपटिली पौळी अखयातें ॥ ३६ ॥ सैन्यासी करोनि निःपात । इंद्रजित गेला युद्धाआंत । करितां राक्षसांचा घात । भयें पडत मेघनाद ॥ ३७ ॥ तो ब्रह्मयानें आणिला बांधोनी । रागें पुच्छातें पेटवोनी । तुमच्या दाढ्या मिशा जाळोनी । प्रथम कंदन हें केलें ॥ ३८ ॥ लंका जाळीत भडभडां । पुच्छें नगरा लाविला वेढा । रिघों नेदी मागांपुढां । चहूंकडा आकांत ॥ ३९ ॥ ऐसें दुष्ट स्वप्न देखोनी । वेगें उठलें गजबजोनी । थोर धाक लागला मनीं । निद्रा नयनीं लागेना ॥ ४० ॥ मग चरणक्षाळण करोनी । शुद्धाचमनातें सेवूनी । सदाशिवाला स्मरोनी । डावे कानीं निजेलें ॥ ४१ ॥ तंव स्वप्न देखिलें दुर्धर । शिळीं बांधोनि सागर । लंके आले नरवानर । निशाचरनिर्दळणीं ॥ ४२ ॥ इंद्रजित कुंभकर्ण दोनी । दोघे मारिले दोघे जणीं । तुमचीं शिरें रामवाणीं । गिधाचे चरणीं लोळती ॥ ४३ ॥ रणीं निमाला दशानन । माझ्या चुडियां

१ चाहुलीनें. २ सुवर्णाचें तस्त. ३ धूत. ४ स्वर्ग पावणारा. ५ फेंकून देई. ६ नाश.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

पडलें खांन । ऐसी करितसे रुदन । आक्रंदोन उठियेली ॥ ४४ ॥ ऐसें सांगतां एकाएक । मंदोदरी भुलली देख । बैसोनि रावणाचे संमुख । करी शंख अति दुःखें ॥ ४५ ॥ बोंब पडली लंकेआंत । रणीं निमाला लंकानाथ । म्हणोनि महाशब्द करित । तेणें हडबडित रावण ॥ ४६ ॥ मग धांवोनि लंकानाथ । तिचे धरिले दोन्ही हात । मी तंव आहें जीवें जीत । तूं कां वृथा तळमळसी ॥ ४७ ॥ सावध म्हणे लंकानाथा । माझें स्वप्न नव्हे मिथ्या । अशोकवनीं राहिली सीता । तुमचे घाता ते करील ॥ ४८ ॥ सख्य करोनि श्रीरघुनाथा । त्यासी संतोषें देइजे सीता । तेणें तुज कल्याण लंकानाथा । आणि समस्तां राक्षसां ॥ ४९ ॥ मी तंव होतें तुमची दासी । म्हणोनि लागलें पायांसी । भुक्ति मुक्ति होय आम्हांसी । सीता रामासी अर्पिलिया ॥ ५० ॥ सीता ऐकतां अशोकवनीं । हनुमान उल्लासला मनीं । हर्ष न माय त्रिभुवनीं । श्रीरामपत्नी चोजवली[३] ॥ ५१ ॥ सीता आहे अशोकवनीं । अशोकवनिका कोण स्थानीं । तें समूळ ऐकावया कानीं । सावधानी हनुमंत ॥ ५२ ॥ रावणमंदोदरीएकांत । समूळ परिसा वृत्तांत । गुप्त राहोनि हनुमंत । चित्तीं सावचित वचनार्थी ॥ ५३ ॥ जानकी आठवितां चित्ता । काम खवळला लंकानाथा । अशोकवना जाऊनियां आतां । बळेंचि सीता भोगीन ॥ ५४ ॥ नाठवे सभेचें अति विघ्न । नाठवे मंदोदरीचें स्वप्न । सीतासंभोगीं दशानन । अति उद्विग्न कामार्थी ॥ ५५ ॥ सहा महिने अशोकवनीं । म्यां कां ठेविली जनकनंदिनी । आतां निजबळेंकरूनी । रामपत्नी भोगीन ॥ ५६ ॥ सीताकामें सकामता । सन्निपात लंकानाथा । विसरला हितहितार्था । नाठवे चित्ता निजस्वार्थ ॥ ५७ ॥ सीताचिंता नित्य चिंतनीं । सीता नाम नित्य वदनीं । सीता स्मरे अनुदिनीं । ध्यानीं मनीं जानकी ॥ ५८ ॥ सकाम स्मरतां पैं सीता । पापधुणी लंकानाथा । हें सामर्थ्य श्रीरामभक्तां । भेटी रघुनाथा तिचेनि ॥ ५९ ॥ रावणासी सकामता । कळली मंदोदरीची चिंता । सीता अर्पावी श्रीरघुनाथा । लंकानाथा नमनेंसीं ॥ ६० ॥ सीता करावी रामार्पण । कदा न मानी दशानन ॥ मंदोदरीसी कळलें चिन्ह । स्वहितवचन अनुवादे[४] ॥ ६१ ॥ मीच जावोनि आपण । इंद्रजित आणि कुंभकर्ण । प्रधानांसी पाचारून । रामार्पण करीन सीता ॥ ६२ ॥ सीताकामें रावण वेडें । सांगों नये तयापुढें । अर्पितां सीता मज राम जोडे । फिटे सांकडें भवांचें[५] ॥ ६३ ॥ सखा जोडोनि रघुनंदन । विघ्न तें होय निर्विघ्न । चित्त होय चैतन्यघन । दुःख संपूर्ण सुख होय ॥ ६४ ॥ श्रेष्ठ सुख तेंचि मरण । मरतां स्मरल्या श्रीरामचरण । मरण होय ब्रह्म पूर्ण । सुखैकघन श्रीराम ॥ ६५ ॥ ऐसेंचि मी करीन आतां । शरण रिघेन श्रीरघुनाथा । स्वयें अर्पितांचि सीता । लंकानाथा कल्याण ॥ ६६ ॥ ऐकतां मंदोदरीचें वचन । रावण जाहला अति उद्विग्न । प्रिया नव्हे महाविघ्न । सीता हरोन नेऊं पाहे ॥ ६७ ॥ मंदोदरीचें वचन । इंद्रजित आणि कुंभकर्ण । नुलंघिती अणुप्रमाण । प्रधानजनही अवघे ॥ ६८ ॥ मंदोदरीचे वचनार्था । करिती मजही न पुसतां । इणें हिरोनि नेली सीता । दुःखावस्था रावणा ॥ ६९ ॥ अत्यंत खळबळला रावण । करावया[६] मंदोदरीछळण । युक्ति करी दशानन । सावधान अवधारा ॥ ७० ॥ विघ्न निरसावया समस्त । अनुसरावया श्रीरघुनाथ । आधीं पूजूं उमाकांत । कुळदैवत तो आम्हां ॥ ७१ ॥ सदाशिवाचे आज्ञेवरी । श्रीरामा अर्पूं सीता सुंदरी । यापरी छळोनि निजनारी । कार्यांतरीं[७] गोंविली ॥ ७२ ॥ रावणें पूजिला श्रीशंकर । मंदोदरीसी हर्ष थोर । येरीकडे दशशिर । करी विचार तो ऐका ॥ ७३ ॥ दूतिका पाचारोनि विश्वासी । वेगें जाय अशोकवनासी । शरमा आणि त्रिजटेसी । गुप्त त्यांपासीं सांगावें ॥ ७४ ॥ अति सन्मान इंद्रजिता । जरी तो माझा पढियंता । तेणेंही सोडा म्हणतां सीता । तुम्हीं सर्वथा न सोडावी ॥ ७५ ॥ कुंभकर्ण माझा भ्राता । तोही सोडा म्हणतां सीता । तुम्हीं न सोडावी सर्वथा । सोडिल्या घाता करीन मी ॥ ७६ ॥ मंदोदरी माझी कांता । आवडती आणि पतिव्रता । तिणेंही सोडा म्हणतां सीता । तुम्हीं सर्वथा न

१ खंडण. २ मृत्यु पावला. ३ जाणवली, समजली. ४ बोलूं लागली. ५ संसाराचें संकट. ६ मंदोदरीला फसविण्यासाठीं. ७ अन्य कार्यांत.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सोडावी ॥ ७७ ॥ अति महिमेचा सन्मान । सोडा म्हणतां श्रेष्ठ प्रधान । तरी न सोडावी आपण । सोडिल्या प्राण घेईन मी ॥ ७८ ॥ भट जोशी विद्वांस जन । मज पूज्यत्वें अति सन्मान्य । त्यांचेनिही सोडिल्या जाण । तुमचा प्राण घेईन मी ॥ ७९ ॥ आलिया स्वर्गींचे देवगण । स्वयें आलिया चतुरानन । सीता न सोडावी आपण । आज्ञा प्रमाण हे माझी ॥ ८० ॥ ऐसें रावणाचें वचन । ऐकोनियां गुह्य ज्ञान । अशोकवना शीघ्र गमन । करी सावधान दूतिका ॥ ८१ ॥ दूतिका चालतां लगबगें । हनुमान लागला मागें मागें । कृपा केली श्रीरामरंगें । अनुद्वेगें सीताशुद्धि ॥ ८२ ॥ दूतिका सवेग चालतां । अति उल्लास हनुमंता । कृपा केली श्रीरघुनाथा । भेटली सीता अनायासें ॥ ८३ ॥ दूतिका चालतां पुढें पुढें । हनुमान मागें नाचे उडे । हर्षें लोळत गडबडे । कृपा चंद्रचूडें मज केली ॥ ८४ ॥ आपआपल्या दावी वांकुली । आपआपणा करी गुदगुली । सीता माझी निजमाउली । ती भेटली अनायासें ॥ ८५ ॥ मंदोदरी रावणें छळिली । तैं रघुनाथें मज कृपा केली । सीता माझी निजमाउली । मज भेटविली अनायासें ॥ ८६ ॥ रावणाचा उपकार । आजी मज घडला थोर । न शोधितां अति दुस्तर । सीता सुंदर भेटली ॥ ८७ ॥ ऐशा हर्षाचेनि पूरें । हनुमान चालिला अति गजरें । पुढें अशोकवन अति साजिरें । स्वयें वानरें देखिलें ॥ ८८ ॥ श्रीरामाची निजपत्नी । सोता नाहीं शोकस्थानीं । नित्य वसे अशोकवनीं । हें सत्य मानी हनुमंत ॥ ८९ ॥ सोडोनि अशोकवनाची गती । सीता शोधितां शोकाप्रती । अशोकवनीं सीतेची वस्ती । नित्य मारुति स्वयें मानी ॥ ९० ॥ अशोक सीतेचे चरणीं । अशोक सीतेचे दर्शनीं । अशोक सीतेचे नयनीं । सत्य मानी मारुती ॥ ९१ ॥ अशोक सीतेचे वचनीं । अशोक सीतेचे स्मरणीं । सीता वसे अशोकवनीं । सत्य मानी मारुती ॥ ९२ ॥ अशोक सीतेच्या अंगुष्ठीं । अशोक सीतेच्या पोटीं । अशोकीं वसे सीता गोरटी । मानी जगजेठी हनुमंत ॥ ९३ ॥ अशोकवस्ती सीतेच्या पोटीं । अशोकीं वसे सीता गोरटी । अशोक सीतेचे निजपृष्ठीं । अशोक सृष्टीं सीतेनें ॥ ९४ ॥ रावणें आणिलें हिरोनी । शोक न देखे तिचेनी । तेणें ठेविली अशोकवनीं । श्रीरामपत्नी अशोक ॥ ९५ ॥ होतां अशोकाची वस्ती । सकळ शोका जाहली शांती । अशोकवन त्यालागीं म्हणती । मानी मारुती निश्चयें ॥ ९६ ॥ परम आल्हाद हनुमंता । आला अशोकवनाआंतौता । सीता देखोनि हर्षयुक्ता । उल्लासत स्वानंदें ॥ ९७ ॥ सीता देखतांचि जाण । हनुमान घाली लोटांगण । रामनाम स्मरती पाषाण । अणु रेणु तृण राम जपती ॥ ९८ ॥ वृक्षांचीं पानें वातगती । रामनामें दुमदुमती । धरा रामस्मरणीं गर्जती । सीता सती ही होय ॥ ९९ ॥ तेथें करितांचि आचमन । श्रीरामें स्वादिष्ठ जीवनें । मंद सुगंध लागतां पवन । होतें संपूर्ण रामनामें ॥ १०० ॥ सावध पाहतां साचारें । रामनामें गर्जे अंबरें । सीता सती ही सुंदर । सत्य वानर स्वयें मानी ॥ १ ॥ जेथें हरिभक्तांची वस्ती । नाम कोंदे पंचभूतीं । नामें ओसंडतां क्षिती । सीता सती ही होय ॥ २ ॥ रामें सांगितली खूण । ती तेथें बाणली संपूर्ण । नामें गर्जताहे तृण । वृक्ष पाषाण नामेंसीं ॥ ३ ॥ एका जनार्दना शरण । नामें जीवन नामें दहन । नाम पावन नाम गहन । नामें त्रिभुवन कोंदलें ॥ ४ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां हनूमदशोकवनप्रवेशजानकीदर्शनं नाम पंचमोऽध्यायः ॥ ५ ॥ ओंव्या ॥ १०४ ॥

१ घाईनें. २ निर्भय, कष्टांवांचून. ३ शंकरानें. ४ अशोकवनामध्यें. ५ पृथ्वी. ६ उदक. ७ खरोखर. ८ आकाश.

अध्याय सहावा

श्रीजानकीजीवनाय नमः । श्रीरामाची निजभक्ती । भजनें दाटुगी सीता सती । तृण पाषाण नामें गर्जती । नामें त्रिजगती कोंदली ॥ १ ॥ श्रीरामाची परम भक्ती । स्वयें जाणे सीता सती । तिचे भजनाची देहस्थिती । भजती युक्ती अवधारा ॥ २ ॥ हृदयीं आत्मा श्रीरघुपती । पाहतां वेदशास्त्रव्युत्पत्ती । ऐसी जे कां ऐसी निजप्रतीती । भजनभक्ति ते नांव ॥ ३ ॥ तेचि भक्ति धरितां चित्तीं । श्रीराम दिसे सर्वां भूतीं । हे दृष्टीची

९ भरुन वाहतां. १० आत्मानुभव.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

भजनस्थिती । केला वेदांतीं निश्चय ॥ ४ ॥ याचि स्थितीं वचनोच्चार । हेंचि वाचिक भजन निर्धार । श्रीराम अक्षरीं अक्षर । नामोच्चार श्रीराम ॥ ५ ॥ श्रीराम जय राम अक्षरें । क्षराक्षरातीत परें । भवानीसी[1] शंकरें । अत्यादरें सांगितलीं ॥ ६ ॥ याचि स्थितीं करितां श्रवण । अक्षरार्थ श्रीराम पूर्ण । सांगता झाला श्रीरघुनंदन । हें निजभजन श्रवणाचें ॥ ७ ॥ रसांसी श्रीराम स्वादता[2] । रसनें[3] राम रसज्ञता । ऐसेनि रसभोग भोगितां । श्रीरघुनाथा निजभजन ॥ ८ ॥ याचिपरी गंधघ्राण । सुगंधासी श्रीराम जीवन । तोचि अवघ्राणीं सर्वज्ञ । हें निजभजन घ्राणाचें ॥ ९ ॥ त्वचेचें करितां स्पर्शन । त्वचेची त्वचा रघुनंदन । स्पर्शा सबाह्य श्रीराम पूर्ण । हें निजभजन त्वचेचें ॥ १० ॥ श्रीराम मनाचें निजमन । श्रीराम चित्ताचें चैतन्यघन । श्रीराम बुद्धीचें समाधान । विवेकें सज्ञान श्रीराम ॥ ११ ॥ अहंसोहंकोहंपरता । श्रीराम वसे स्वभावतां । ऐसेऐशिया अनन्यता । भजे श्रीरघुनाथा जानकी ॥ १२ ॥ श्रीरामगतीची ही गती । श्रीराम सीतेची निजशक्ती । श्रीराम सबाह्य सर्वां भूतीं । तयाची स्थिति जानकी ॥ १३ ॥ ऐशिया श्रीरामभजनापुढें । रावणभय तें बापुडें । येवों न शके सीतेपुढें । सीताही रडे लटिकेंचि ॥ १४ ॥ रामसीतेची अनन्यता[4] । श्रीरामावेगळी नव्हे सीता । सीतेवेगळें श्रीरघुनाथा । नाहीं सर्वथा दूरी जाणें ॥ १५ ॥ ऐशापरी भजे सीता । समूळ कळलें हनुमंता । भक्तरक्षणें श्रीरघुनाथा । तेंही मज आतां कळों आलें ॥ १६ ॥ मंदोदरी मानोनि सीता । हे कां रंतली[5] लंकानाथा । कोपें करितां दोहींच्या घाता । रामें अनर्था चुकविलें ॥ १७ ॥ मी तंव वानर उन्मत्त । समूळ विचार न करित । दोघांचा करीत होतों घात । रामें अनर्थ चुकविला ॥ १८ ॥ मंदोदरी हेचि सीता । कैसें मानलें हनुमंता । मंदोदरी विष्णुसंभूता । समूळ कथा अवधारा ॥ १९ ॥ रावणाची माता कैकसी । पंचधान्यांचे पिष्टासीं[6] । पंचवक्त्र[7] भाऊनि त्यासी । करी पूजेसी शिवलिंगा ॥ २० ॥ पंचधान्य तें पंचवदन । ऐसी भावना भावून । पूजा करी अनुदिन । सावधान कैकसी ॥ २१ ॥ पंचधान्यांचा पंचवक्त्र । पूजितां अक्षय दशवक्त्र[8] । अक्षय होती माझे पुत्र । हें निजसूत्र पूजेचें ॥ २२ ॥ शिवरात्रीचे दिवशीं । येवोनि समुद्रतीरासी । निर्मोनियां शिवलिंगासी । करी कैकसी महापूजा ॥ २३ ॥ षोडशोपचारीं पूजा जाहली । त्यावरी बेलाची लाखोली । तिपानी शिवनामीं वाहिली । पूजा केली अनुपम्य ॥ २४ ॥ तिपानी बेलाचें पत्र । एक एक शिवनामें स्वतंत्र । भावें पूजिला श्रीशंकर । मनोहर ती पूजा ॥ २५ ॥ ऐसें करोनियां पूजन । लावोनियां दोनी नयन । कैकसी बैसतां धरोनि ध्यान । आनेंआंन तेथें जाहलें ॥ २६ ॥ राक्षसद्वेषी इंद्र येऊन । लिंग समुद्रीं करोनियां मग्न[10] । सागर न करीच भग्न । स्थापी सर्वज्ञ हाटकेश्वरीं ॥ २७ ॥ त्या लिंगाची हाटकेश्वरीं । पूजा होतसे अद्यापवरी । बिल्वप्रवाह गोमतीसागरीं । देखती शिवरात्रीं सर्व लोक ॥ २८ ॥ कैकसी जंव उघडी नयन । तंव पूजालिंगा पडलें खाण[11] । पुत्र पौत्र निमे संतान । तें अति विघ्न लिंगहानी ॥ २९ ॥ कैकसी दीर्घ रुदन करी । माझी देवपूजा नेली चोरीं । जळो रावणाची राज्यथोरी । काय संसारीं नांदत ॥ ३० ॥ ऐकतां मातेचें रुदन । रावण आला स्वयें धांवोन । येरी म्हणे लिंगा पडलें खाण । काय वदन दाविसी ॥ ३१ ॥ न करितां विसर्जन । जें लिंगासी होय विघ्न । तें संताना निःसंतान । शिववचन शैवागमीं ॥ ३२ ॥ येरू म्हणे माते अवधारीं । उतरले साही सूत्रीं । रत्नलिंग आहे घरीं । पूजा करीं तूं तयाची ॥ ३३ ॥ अनेकपरी लिंगाची थोरी । बोलिली आहे आगमशास्त्रीं । कैकसी त्या लिंगातें हातीं न धरी । अनाचारीं कैंवी रिघों ॥ ३४ ॥ माझें लिंग न येतां हाता । आणिक मी न घें सर्वथा । शैवदीक्षेची हे अवस्था । लिंग न येतां प्राणत्याग ॥ ३५ ॥ अद्यापवरी शैवमार्गीं । दुजिया लिंगाची सांडोनि मार्गी[12] । पूजन करिती लिंगालागीं । प्राणत्यागीं निजनेटें ॥ ३६ ॥ रावण विनवी मातेसी । तूं कां व्यर्थ प्राण देसी । मी जाईन शिवापासीं । तुझ्या

१ पार्वतीला. २ गोडी. ३ जिव्हेला. ४ ऐक्य. ५ रममाण झाली. ६ पिठाचें करून. ७ महादेव. ८ रावण. ९ चमत्कारिक.

१० बुडवून. ११ विघ्न, संकट. १२ विचार, मार्ग.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

लिंगासी आणीन ॥ ३७ ॥ शिव स्वामी माझें माथां । तूं तंव जाणसी तत्त्वतां । प्रसन्न करोनि विश्वनाथा । लिंग मी आतां आणीन ॥ ३८ ॥ कैकसी सांगे रावणासी । नारदें सांगितलें मजपासीं । आत्मलिंग शिवापासीं । तें आणिसी तैं धन्य ॥ ३९ ॥ ऐकोनि मातेचें वचन । सवेग निघाला दशानन । शिवापासीं स्वयें येऊन । करी नमन साष्टांगीं ॥ ४० ॥ जवळी आलिया रावणासी । शंकर न पुसे तूं कां आलासी । आजि कां झालासी उदासी । रावणासी पुसेना ॥ ४१ ॥ बाण आणि रावण । हेचि शिवाचे पढियंते पूर्ण । त्यांचें वचन अणुप्रमाण । शिव आपण नुल्लंघी ॥ ४२ ॥ त्याचि रावणासी आतां । शिव न पुसे सर्वथा । परम चिंता लंकानाथा । यासी मी आतां काय करूं ॥ ४३ ॥ जया भक्तासी निष्कामभावो । तया संमुख सदाशिवो । तोचि सकाम होतां पहा हो । शिव स्वयें पुसेना ॥ ४४ ॥ रावणें देखिली शिवाची कांता । जे कां पार्वती जगन्माता । हे मी शिवासी मागेन आतां । सकामता दुसरी ॥ ४५ ॥ रावण उभा दोन प्रहर । सदाशिव नव्हेचि सादर । कोठें गुंतला श्रीशंकर । पाहे अंतरीं रावण ॥ ४६ ॥ शृंगीच्या झणत्कारीं । शिव गुंतला नादांतरीं । ऐसें जाणोनि निर्धारीं । रावण करी तें ऐका ॥ ४७ ॥ उतरोनियां निजमाथा । शिर लावोनियां युक्ता । रावणें केला वीणा हाता । होय वाजविता अति युक्तीं ॥ ४८ ॥ रावणहस्ताचा पैं स्वर । मधुर मंजुळ आणि अरुवार । तेणें सुखावला श्रीशंकर । गौरीहर तुष्टला ॥ ४९ ॥ रावणासी माग म्हणतां । मागतां नये मोडिला माथा । कृपा उपजली विश्वनाथा । वर देता स्वयें झाला ॥५०॥ तुवां मोडोनियां निजशिर । मज सुखी केलें अपार । तूं होशील दशशिर । वीर शूर तिहीं लोकीं ॥ ५१ ॥ शिरा काढोनि हातींच्या सत्वर । तंतु लाविले साचार । एकएकाचे दहा-दहा कर । भुजाभार विंशति पैं ॥ ५२ ॥ वर देतां वृषभध्वज[3] । रावणा दहा शिरें वीस भुजा । अमृतकुपी देवोनि ओजा । बळसमाजी आतुर्बळी ॥ ५३ ॥ शिव म्हणे लंकानाथा । जें जें आवडे तुझे चित्ता । तें तें देईन मी आतां । प्रसन्नता गर्जत ॥ ५४ ॥ सदाशिव स्वयें भोळा । तो नेणे राक्षसाची कळा । दुष्ट बुद्धि त्याचे डोळां । मागती कळा ते ऐका ॥ ५५ ॥ पार्वती लावण्याची राशी । ते मज द्यावी निजभोगासीं । आत्मलिंग निजपूजेसीं । कैकसीसी तें द्यावें ॥ ५६ ॥ रावणमागणें ऐकतां । गेली उदारवरदउल्लासता । सुत मातेसीं रति मागतां । परम क्षोभता शिवासी ॥ ५७ ॥ परम क्षोभ शिवाचे चित्ता । यासी वरदान न देतां । असत्यता माझिया माथां । नेदी म्हणतां म्हणवेना ॥ ५८ ॥ माता सुत जवळीं उल्लासतां । सुतें मातेसी रति मागतां । प्राणांतक्षोभें क्षोभे माता । शिवाचे चित्ता तैसें जाहालें ॥ ५९ ॥ गुरुपत्नी ते शिष्यमाता । तिचा अभिलाष करितां । आली रावणा गुरुतल्पगता[5] । कैसेनि आतां वांचेल ॥ ६० ॥ पार्वती देतां रावणाहातीं । हिचेनि तुम्हां सर्वशांती । न कळोनि ते वचनोक्ती । लंकापति उल्लासे ॥ ६१ ॥ शिव म्हणे रावणासी । आत्मलिंग देतां तुजपासीं । शुचित्व पाहिजे अहर्निशीं । ठेविल्या भूमीसीं नये हाता ॥ ६२ ॥ आकर्षोनि चैतन्यज्योती । तेज मुसावोनि[6] आत्मशक्ती । तें आत्मलिंग उमापती । नित्य पूजिती नेमेंसीं ॥ ६३ ॥ तें लिंग देतां रावणाहातीं । लिंग जाईल हातोहातीं । तृतीयनेत्रीं क्षोभेल शक्ती । लावील ख्याति रावणा ॥ ६४ ॥ रावणें घेवोनि पार्वती । आत्मलिंग घेवोनि हातीं । उल्लासें सुचित्तवृत्ती[7] । लंकेप्रती निघाला ॥ ६५ ॥ रावणासी देखतां जाण । उमा[8] जाली हीन दीन । चिंतातुर अति गहन । दीनवदन ते जाली ॥ ६६ ॥ शिवें दिधलें रावणापासीं । माझी सुटका होय कैसी । उमा चिंती श्रीविष्णूसी । पावें वेगेंसीं कृपाळुवा ॥ ६७ ॥ ग्रहें गिळितां गजेंद्रासी । त्या उद्धरिलें अति वेगेंसीं । रावणग्रस्ता[9] मज दीनासी । शीघ्र पावावें ॥ ६८ ॥ राम उच्चारिल्यासाठीं । कुंटिणी वाहिली वैकुंठीं । तैसिया गा कृपादृष्टीं । पावें जगजेठी कृपाळुवा ॥ ६९ ॥ महापातकांची राशी । नामें उद्धार अजामिळासी । मी तंव तुझी निजदासी । पावें वेगेंसीं कृपाळुवा ॥ ७० ॥

१ इच्छा धरून आलेला. २ नाजूक. ३ बैलाचें चिन्ह ज्याच्या ध्वजावर आहे असा शंकर. ४ क्रोध.

५ गुरुस्त्रीगमनाचें पातक. ६ एकत्र करून. ७ आनंदित होत्साता. ८ पार्वती. ९ रावणानें पीडित.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

शिवासी छळितां भस्मासुरें । तुवां तारिलें कृपा-
करें । ऐकोनि उमेचीं उत्तरें । हरी सत्वरें धांवि-
न्नला ॥ ७१ ॥ शिवाची जे निजकांता । ते तंव
माझी सखी माता । तिचा अभिलाष करितां ।
लंकानाथा गांजीन ॥ ७२ ॥ पार्वती सोडवितां
एकाएक । गणेशस्वामी कार्तिका अटक । शिवव-
रदान होतां लटिक । शिव सम्यक कोपेल ॥ ७३ ॥
रावणाच्या पाडोनि दांतां । निमेषें सोडवीन
माता । शिववरदान मिथ्या होतां । आमचे घाता
शिव करील ॥ ७४ ॥ सोडवावया पार्वतीसी ।
धांवण्या येतां श्रीविष्णूसी । दोघे भेटले तयासी ।
वृत्तांत त्यांसी सांगोनि ॥ ७५ ॥ पूर्ण छळावया
रावण । विष्णूनें मांडिलें विंदान । द्विजगौंचें[1]
रक्षण । सांगे आपण गणेशा ॥ ७६ ॥ आपण
जाला धर्मऋषी । शिष्य केलें गुहकासीं[2] । उल्लासें
येतां रावणापासीं । संमुख त्यासी भेटला ॥ ७७ ॥
ऐसा उल्लास लंकापती । शिवें दिधली पार्वती ।
आत्मलिंग कृपामूर्ती । तेंही मजप्रती ओपिलें
॥ ७८ ॥ शिष्य रावणासी सांगती । आत्मलिंग-
सत्यप्राप्ती । परी हे नव्हे गा पार्वती । शिवें तुज-
प्रती ठकविलें ॥ ७९ ॥ शिव देईल निजकांता । हे
तंव न घडे गा सर्वथा । ठकिलें ठकिलें लंका-
नाथा । पाहें तूं आतां पार्वती ॥ ८० ॥ जंव पाहे
तो दशानन । तंव उमा न दिसे शोभायमान ।
निंद्य कुत्सित हीन दीन । देखे उद्विग्न मुख तिचें
॥ ८१ ॥ डोळे पिचके वाहे पाणी । वदनीं माशांची
गोंगाणी । श्लेष्मा[3] बिडिबिडित घ्राणीं[4] । मुखीं
पोहाणी[5] घाणत ॥ ८२ ॥ ती देखतांचि वक्रा[6] ।
रावणा आला अति ओकारा । विष्णु लाघवी
खरा । दशशिरा छळियलें[7] ॥ ८३ ॥ रावण म्हणे
ऋषींप्रती । माझेनि भाग्यें भेटलेती । आतां
जावोनि शिवाप्रती । मुख्य पार्वती मागेन ॥ ८४ ॥
शिव राखोनि निजदशा । तुज दिधली अवदसा ।
त्रिसत्य सत्य मानीं गा लंकेशा । भोळा महेश
मानूं नको ॥ ८५ ॥ उमा लपवी उमापती । ते खूण
सांगेन तुजप्रती । आसनाखालें लखलखिती ।
ते पार्वती तूं मागें ॥ ८६ ॥ ऐकोनि रावण अति
आवेशी । धांविन्नला शिवापासीं । विष्णू तेथें
लघुलाघवेंसीं । मंदोदरीसीं निर्मिलें ॥ ८७ ॥ केश-
राची अति गोमटी । रमेनें दिधली उटी । उदरीं
आढळतां मळवटी । केली गोरटी मंदोदरी ।
॥ ८८ ॥ निर्मावया सुंदर पुतळी । कांहीं नातुडे
हातातळीं । उदरीं गौर चंदनाची मळी । त्याची
निर्मिली मंदोदरी ॥ ८९ ॥ श्रीविष्णूचे उदरोदरीं ।
सुगंधचंदनकरीं । विष्णुमध्यांगीं जन्मली नारी ।
मंदोदरी त्या हेतू ॥ ९० ॥ माज[8] समावे मुष्टिमा-
झारीं । यालागीं म्हणती मंदोदरी । विषयतृष्णा
नाहीं उदरीं । मंदोदरी तेणें नांवें ॥ ९१ ॥ जे
जन्मली विष्णूचे करीं । संकल्प विकल्प नाहीं
उदरीं । यालागीं म्हणती मंदोदरी । शोभा सुंदरी
शोभत ॥ ९२ ॥ नयन वदन श्रवण[9] घ्राणं[10] । रूप-
रेखा ठाण माण । गुणगांभीर्य वदनभान । श्रीस-
मान करी विष्णु ॥ ९३ ॥ विष्णु लाघवी तत्काळीं ।
ऐसी निर्मोनी पुतळी । घातली शिवासनाचे
तळीं । तेजें वेल्हाळी शोभत ॥ ९४ ॥ रावण म्हणे
शिवाप्रती । तुवां लपवोनि पार्वती । ते अवदसा
दिधली माझे हातीं । धन्य वरदोक्ति हे तुझी
॥ ९५ ॥ शिव विचारी निजचित्तीं । येणें अभि-
लाषिली पार्वती । ते अवदसेची प्राप्ती । छळिला
निश्चितीं जगदंबा ॥ ९६ ॥ तीस विष्णु जाहला
साह्य । तेणें रावणा आला अपाय । तेथें न
चलती उपाय । यासी म्यां काय करावें ॥ ९७ ॥
रावण पाठींचा माझा गण । उमाभिलाषी[11] पूर्ण ।
गुरुतल्पगदोष[12] दारुण । अचुक मरण या आलें
॥ ९८ ॥ जेचि उमा तेचि सीता । जिचेनि अभि-
लाषें तत्त्वतां । मरण आलें लंकानाथा । पेटला
घाता श्रीविष्णु ॥ ९९ ॥ रावण पेटला अति
आवेशा । म्हातारपणीं लोभ कैसा । तुज वाढला
गा महेशा । मज अवदसा दिधली ॥ १०० ॥
तथास्तु म्हणोनि सदाशिवु । बहु अवदसा
भोगील जीवु । रावण विषयांध बहु । त्यावरी
गर्व वरदानाचा ॥ १ ॥ रावण म्हणे शिवाजवळी ।
उमा लपविली आसनातळीं । मज दिसताहे
सोज्ज्वळी । किती चंद्रमौळी[13] चाळविसी ॥ २ ॥
आसनीं देखोनि सुंदर कांता । अति विसयो
लंकानाथा । उमा सांडोनि जगन्माता । दिधली

१ ब्राह्मणांच्या गाईचें. २ कार्तिकस्वामीला. ३ शेंबूड. ४ नाकांत. ५ दुर्गंधी. ६ वांकडी. ७ फसविलें. ८ कमर. ९ कान. १० नाक. ११ पार्वतीची इच्छा करणारा. १२ गुरुपत्नीशीं गमनाचा दोष. १३ शंकरा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

लंकानाथा मंदोदरी ॥ ३ ॥ रावण बोलिला कोपें-
करीं । म्हातारपणीं स्त्रीलोभ भारी । माझी प्रिया
जगदात्मा तारी । अभिलाषें उरी उरों नेदी ॥ ४ ॥
असो याउपरी लंकापती । रावणें सांडोनि पार्वती ।
मंदोदरी अति प्रीतीं । घेवोनि चित्तीं निघाला
॥ ५ ॥ स्कंधीं घेवोनि मंदोदरी । आत्मलिंग घेवोनि
करीं । रावण निघतां झडकरीं । नानापरी छळी
विष्णु ॥ ६ ॥ रावण पावूनि हरिखा । अनुलक्षो-
नियां लंका । जातां लागली लघुशंका । पाऊल
देखा नुलंघवे ॥ ७ ॥ लिंग देऊं कोणाचे हातीं ।
कैसेनि करूं शंकानिवृत्ती । रावण थोर पडला
गुंतीं । पुढती गति खुंटली ॥ ८ ॥ अभिलाषितां
शिवाची नारी । रावण अशुचि चराचरीं । मृत्ति-
काजळें शौच करी । शुचित्व तरी उमजेना
॥ ९ ॥ मृत्तिकाजळें शुद्ध करिती गुद । तैसें
हृदय न करिती शुद्ध । शौचाचार तो अबद्ध ।
कर्ममंद कर्मठ ॥ ११० ॥ लिंग द्यावें कोणापासी ।
रावण पाहे चौपासीं । तंव देखिलें गणेशासी ।
द्विजगोंसी संरक्षी ॥ ११ ॥ दर्भ पवित्रें यज्ञोपवीत ।
टिळे द्वादश नामांकित । गणेशा देखे लंकानाथ ।
लिंग द्यावया प्रार्थित ॥ १२ ॥ जंव मी करीं शंका-
निवृत्ती । तंववरी लिंग धरावें हातीं । गणेश
म्हणे गाई जाती । वासरें पिती धेनूंसी ॥ १३ ॥
गाई पाजलियावरी । द्विज कोपतील भारी । तुझें
लिंग मी नांगीकारीं[1] । पाय धरी रावण ॥ १४ ॥
गणेश त्यासीं नेम करी । तुज न येतां झडकरी ।
लिंग ठेवीन भूमीवरी । निजनिर्धारीं नेम माझा
॥ १५ ॥ त्रिवार गर्जेनेंसीं । प्रतिज्ञा नेमूं जाण
ऐसी । तुज न येतां त्वरेंसीं । लिंग भूमीसीं ठेवीन
॥ १६ ॥ ऐसी निंगुती[2] करोनि देखा । करूं गेला
लघुशंका । मुतीं गुंतविलें दशमुखा । कांहीं
आवांका चालेना ॥ १७ ॥ कष्टीं मूत मोकळें होत ।
तंव तें झालें अत्यद्भुत । धारावर्ती प्रवाहत । मूतीं
लंकानाथ गुंतला ॥ १८ ॥ गणेश करी गर्जनेसी ।
रावण गुंतला मुतापासीं । लिंग ठेवोनि भूमीसीं ।
घेवोनि गाईसी तो गेला ॥ १९ ॥ रावण करुनि
शौचाचारी । वेगें येतां झडकरी । लिंग देखोनि
भूमीवरी । श्रद्धेंकरीं घेऊं गेला ॥ १२० ॥ एक हातें
दोहीं हातें । उचलितां रावण कुंथे । नुचलेचि
विंशति[3] हातें । म्हणे लिंगातें महाबळ ॥ २१ ॥
अहाच दिसे भूमीवरी । परी तें सबळ आहे भारी ।
उचलितां विंशति करीं । तिळभरी उचलेना
॥ २२ ॥ सर्व शक्ति अति प्रबळ । रावणें वेंचितां
सर्व बळ । लिंग उचलेना अळुमाळ[4] । महाबळ
तें लिंग ॥ २३ ॥ रावणें आपुल्या निजकरीं ।
आंदोळिला[5] कैलासगिरी । महाबळ लिंग हें भारी ।
तिळभरी नुचलेचि ॥ २४ ॥ लिंग भूमीवरी ठेवोनि
गेला । रावणें गणेशा दिधला टोला । अद्यापि
असे उभा केला । रावण क्षोभला निभ्रंशें ॥ २५ ॥
आत्मलिंग नये हातासी । उपाय न चले कांहीं
त्यासी । रावण स्फुंदे उकसाबुकसीं । कैकसीसी
काय सांगूं ॥ २६ ॥ लिंग गेलें अति मुततां ।
कांहीं केलिया नये हाता । नगरा जातां क्षोभेल
माता । भयें उभयतां अपावो[6] ॥ २७ ॥ नाहीं देव
ना पितर । उभयतां अपवित्र । विष्णूनें छळिलें
अपार । दशकंधर तळमळी ॥ २८ ॥ लिंगबंधनीं
उभय मुद्रा । शिवें लाविला शिवदोरा । रावणें
सांडितां अऱ्हापऱ्हा[7] । पंच मुद्रां पंचलिंग ॥ २९ ॥
मुरडोनियां सारितां वस्त्र । तेथें जाला मुरडे-
श्वर । मुद्रिका टाकितां पवित्र । गुप्तेश्वर तेथें
जाला ॥ १३० ॥ रागें टाकितां शिवदोर । तेथें
जाला गणकेश्वर । कानडे म्हणती धनेश्वर । लोक-
व्यवहार पैं ऐसा ॥ ३१ ॥ शिवसेज टाकितां
साचार । तेथें जाला शेजेश्वर । ऐशियावरी पंच-
वक्त्र । श्रीशंकर नांदत ॥ ३२ ॥ गोकर्ण हें तंव
अनादि क्षेत्र । तेथें महाबळ ईश्वर । यालागीं
गोकर्णमहाबळेश्वर । लोकव्यवहार प्रसिद्ध ॥ ३३ ॥
गौतमपर्वत समुद्रतीर । तेथें गोकर्णमहाबळेश्वर ।
वांईचा महाबळविचार । भिन्न परिचार ब्रह्म-
यागीं ॥ ३४ ॥ ब्रह्मयानें याग करितां प्रबळ ।
प्रगटला ते ठायीं महाबळ । दोहींचें भिन्न भिन्न
स्थळ । लोक सकळ जाणती ॥ ३५ ॥ असो
तीर्थीची हे वार्ता । संख्या करितां असंख्याता ।
कैसेनि हे कथा । मूळसंमतां अवधारा ॥ ३६ ॥
मंदोदरीसमान हे सीता । केंवी मानली हनुमंता ।
ब्रह्मोत्तरखंडींची हे कथा । विष्णुसंभूता मंदोदरी
॥ ३७ ॥ मंदोदरी सुंदर कांता । स्वयें विष्णु तिसी
निर्मिता । तिसीं सीतेची साम्यता । स्वभावतां

१ घेत नाहीं. २ नियम. ३ वीस. ४ किंचितही. ५ हालविला. ६ वाईट. ७ इकडे तिकडे. ८ शंकर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

पैं आली ॥ ३८ ॥ विष्णु करी अवलोकन । ते तंव होय श्रीसमान । मंदोदरी विष्णुनिर्माण । सीतेसमान मानी कपि ॥ ३९ ॥ दोघी अयोनिजा तत्त्वतां । दोघी जणी पतिव्रता । मंदोदरीसमान सीता । हनुमंता मानली ॥ १४० ॥ रावणाचे अति एकांता । मंदोदरीची ऐकोनि कथा । अशोकवनीं हनुमंता । भेटेल सीता तें ऐका ॥ ४१ ॥ अशोकवनामाजी मारुती । नमस्कारोनि सीता सती । श्रीरामाच्या कथानुवर्ती । सुखानुभूति दोहींसी ॥ ४२ ॥ एका जनार्दना शरण । हनुमान लाघवी आपण । करील वनविदारण । राक्षसकंदन तें ऐका ॥ ४३ ॥ इति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां मंदोदरीजन्मकथनं नाम षष्ठोऽध्यायः ॥ ६ ॥ ओंव्या ॥ १४३ ॥ श्रीराम जय राम जय जय राम ॥ श्रीसीतारामचंद्रार्पमणस्तु ॥

अध्याय सातवा

॥ श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः॥ पूर्वप्रसंगाप्रती । दूति[1]कांमागें मारुती । आला अशोकवनाप्रती । सीता सती वंदावया ॥ १ ॥ देखोनियां अशोकवन । हनुमान घाली लोटांगण । करोनियां श्रीरामस्मरण । सीतादर्शन करूं निघे ॥२॥ साधावया सीता चिद्रत्न । हनुमान क्षण एक धरी ध्यान । देखोनियां अशोकवन । आलें स्फुरण हनुमंता ॥ ३ ॥ जैसा श्रीरामाचा बाण । तैसें करोनि उड्डाण । अशोकवनामाजी जाण । आला आपण हनुमंत ॥ ४ ॥ वृक्ष सफळ आणि सरळ । वन देखोनि विशाळ । करी हर्षाचा गोंधळ । घोंटी लाल मिटक्या देत ॥ ५ ॥ दाट देखोनियां झाडां । उल्हास आला माकडा । वृक्षोवृक्षीं उडे तडतडां । नाचवी पुढां निजपुच्छ ॥ ६ ॥ सांपडली श्रीरामाची कांता । फिटली आधिव्याधिचिंता । विचकोनियां निजदांतां । देवां देवतां वांकुल्या दावी ॥ ७ ॥ नारळी घडघडती घडें । हनुमान पाहे तिकडे । पक्क खर्जूरी देखोनि पुढें । वेगें उडे गटकावया ॥ ८ ॥ पिकले आंबे देखोनि तेथ । हनुमान डोळे मिचकावित । द्राक्षांचे घड लोंबत । हालवी तेथ निजपुच्छ ॥ ९ ॥ मांतु[2]लिंगी आणि नारिंगी । देखोनि हनुमान नाचे रंगीं[3] । माझे दांत सभाग्यभागी । फळांलागीं करंडावया[4] ॥ १० ॥ फणसें परिपक्क घनदाटें । हनुमंतें नखें खुडिले कांटे । पिकलीं केळें चेपोनि बोटें । निंबें आंवटें मी नेघें ॥ ११ ॥ जांबुळें देखोनि कुळकुळितें । हनुमान विचकी दांतांतें । आंवळे न सेवीच हातें । कार्तिकव्रतें स्वीकारी ॥ १२ ॥ देखोनि उंबरें टेंबरें । बिब्बे विधामणें चारें बोरें । पिकलीं करवंदें नागरें । मिटक्या वानरें देइजेति ॥ १३ ॥ तोरणें अळुवें मव्हकें घोंटीं । वाळकें कांकड्या भरल्या पाटीं । मोहळें मधु देखोनि दाटी । लाल घोटी वानर ॥ १४ ॥ भरले खर्बुजांचे भारे । देखोनि पिकलीं भोंकरें । उल्लास कीजे पैं वानरें । पुच्छ पुढारें नाचवित ॥ १५ ॥ देखोनि साकरेची राशी । हनुमान खाजवी दोन्ही कुशी । कोण खाईल या गुळासी । नाँ[6]वदेसी गटकावूं ॥ १६ ॥ देखोनियां ऊंसपेरणी । वानर नाचे पैं रंगणीं । रसें देखोनि भरली मांदँणी[7] । पुच्छ घाली त्यामाजी ॥ १७ ॥ त्या प्रक्षाळून निर्मळ जळीं । गुज सांगे पुच्छाजवळी । भेटलिया जनकबाळी । वनखंदळी मग करूं ॥ १८ ॥ हनुमान पुच्छासीं करी एकांत । सीतेसी पुसोनि वृत्तांत । मग या फळांसी लावूं हात । तंववरी शांत त्वां असावें ॥ १९ ॥ ऐसी सांगोनि निजखूण । वेगें करोनि उड्डाण । प्राकारावरी जाण । हनुमान आपण वळंघला[8] ॥ २० ॥ अशोकवनामाझारीं । रावणाची शृंगारओवरी । उपराउपरी गोपुरी । हनुमान त्यावरी वळंघला ॥ २१ ॥ त्यावरी बैसोनि आपण । अवलोकी अशोकवन । नित्य वसंतें शोभायमान । सदा संपन्न फळपुष्पीं ॥ २२ ॥ अशोकवनाचिया आंत । नित्य नांदे वसंत । सदा सफळित सर्व वृक्ष । देखे हनुमंत स्वानंदें ॥ २३ ॥ शाल तमाल तरु तमाळ । सरळ शोभा अति विशाळ । कर्णिकारी पुष्प प्रबळ । अशोकीं विशाळ विश्रांती ॥ २४ ॥ कपित्थं[10] बिल्व चूत चंपक । पिचुमंद[11] नीप[12] शिंसिपकं[13] । आंवळी सालफळी मधुक । वृक्ष अनेक शोभती ॥ २५ ॥ नागचंपक उधाळक ।

---

१ दासींच्या मागून. २ महाळुंगें. ३ आनंदानें. ४ चावण्यास. ५ चांगलीं. ६ खडीसाखर. ७ रस ठेवण्याचें मृत्तिकापात्र. ८ तटावर. ९ चढला. १० कवंठीचा वृक्ष. ११ कडीनिंब. १२ कळंब. १३ अशोक.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

मांदार कल्पतरू पारिजातक । फणस पाटल नंदानक । टवटवित शोभती ॥ २६ ॥ रजतवृक्ष कैलासगिरीं । रावणें प्रार्थोनि त्रिपुरारी । सार्द्रसुमनसुगंध भारी । अशोकामाझारी रजतवृक्ष ॥२७॥ विभांडोनि कुबेरनगरी । सुमनवृक्ष नानापरी । सुगंध न माये अंबरीं । अशोकामाझारीं रावण आणी ॥ २८ ॥ यज्ञ राखितां सुगंधिनी । सार्द्रा सुवर्णकमलिनी । रावणें आणिलिया हिरोनी । अशोकवनीं घमघमिती ॥ २९ ॥ सुवर्णरजतवृक्षमेळीं । पुष्पें सुगंध पांढरीं पिवळीं । फळें स्वादिष्ट चवी आगळी । बीजरत्नावळी त्यामाजी ॥ ३० ॥ तया बीजापासोनि पुढतीं । नव्हे वृक्षाची उत्पत्ती । एक वेळ फळें येती । मग शोभती नुसतींचि ॥ ३१ ॥ ऐशिया वृक्षांचिया जाती । अशोकवनीं नेणों किती । शोभा स्वयें शोभती । उडे मारुति त्यामांजी ॥ ३२ ॥ वृक्षशोभा देखिल्यावरी । मन मूर्च्छित त्यामाझारीं । दृष्टि जावोनि विसरे बाहेरी । सुगंध हरी घ्राणातें ॥ ३३ ॥ ऐशिया वृक्षोवृक्षीं जाण । गदापाणि वीर दारुण । राक्षस ठेविले रक्षण । पाहे कोण तयांकडे ॥ ३४ ॥ दुर्धर वृक्षांमाझारी । हनुमान स्वइच्छा क्रीडा करी । राक्षसबळाची थोरी । तृणावारी गणीना ॥ ३५ ॥ अशोकवनीं देऊळ । रावण करी अति विशाळ । सहस्र स्तंभांचें प्रबळ । रत्नप्रवाळें मेखळा ॥ ३६ ॥ पाच पाचुका माणिकें वरी । हिरे मुक्ताफळें हारोहारीं । कळस लखलखिती अंबरीं । तयांवरी पताका ॥ ३७ ॥ सुवर्णवेदिका[१] दोहीं बाहीं । रत्नें जडलीं त्यांमाजी पाहीं । ओठंगणें ठायीं ठायीं । दिसे भुयीं प्रतिबिंब ॥ ३८ ॥ नंदनवन चैत्रवन । त्यांहूनि दिसे शोभायमान । आनंवनेंसीं समान । कैलासभुवन तेंवी शोभे ॥ ३९ ॥ वनद्वारीं प्रासादद्वारीं । राक्षस सावधान शस्त्रास्त्रीं । वारा यावया वाट नव्हे भीतरी । सुरासुरीं दुर्धर ॥ ४० ॥ बोट दाखवितां हात तोडी । डोळा दाखविल्या डोळा फोडी । दुर्धर राक्षसपरवडी[२] । कडोविकडीं[३] घर राखत ॥ ४१ ॥ लंकेप्रति आड सागर । पुढें दुर्ग अति दुर्धर । त्यामाजी रावणमंदिर । अति दुस्तर प्रवेशा ॥ ४२ ॥ त्याहीमाजी स्त्रियांचें भुवन । अतिशयेंसीं दुर्गम गमन । त्याचिमाजी अशोकभुवन । दुर्गम गमन सुरासुरां ॥ ४३ ॥ दुर्गमीं रिघावया हनुमंत । अति दक्ष आणि समर्थ । हेमरजतवृक्षांआंत । निःशंक क्रीडत तें ऐका ॥ ४४ ॥ असो हा वनविचार । सीतादर्शनीं अति सादर । संमुख चालिला वानर । धरोनि सूत्र लक्षाचें ॥ ४५ ॥ वरीवरी सीता दिसे समळ । अंतरीं रामध्यानें निर्मळ । बाह्य अति चिंतें व्याकुळ[४] । अंतरीं निश्चळ चिन्मय राम ॥ ४६ ॥ बाह्य उपवासें अक्षितें । अंतरीं परमानंदें तृप्त । बाह्य दिसे बंदी प्राप्त । आंत निर्मुक्त चहू देहीं ॥ ४७ ॥ बाह्य रोडेली दिसे काष्ठ । अंतरीं रामरामें धष्टपुष्ट । बाह्य राक्षसां मानी दुष्ट । अंतरीं निर्दुष्ट आत्मा मानी ॥ ४८ ॥ बाह्य रामें दिसे वियुक्त । अंतरीं श्रीरामें नित्ययुक्त । बाह्य दिसे दुःखाभिभूत[५] । अंतरीं सदोदित स्वानंदें ॥ ४९ ॥ बाह्य दिसे हीन दीन । अंतरीं दिसे सुप्रसन्न । बाह्य दिसे अति खिन्न । अंतरीं चैतन्यचिन्मात्रज्योति ॥ ५० ॥ बाह्य दिसे लंके नेली । परी ते रामापासोनि नाहीं ढळली । बाह्य दिसे कोमाइली । अंतरीं टवटविली श्रीरामें ॥ ५१ ॥ बाह्य दिसे मलिनांबर । अंतरीं शोभे चिदंबर । बाह्य दिसे अनलंकार । अंतरीं शृंगार श्रीरामें ॥ ५२ ॥ दिसे श्रीरामावेगळी । परी ते सबाह्य रामें रचिली । ऐसी देखोनि जनकबाळी । पिटिली टाळी हनुमंतें ॥ ५३ ॥ सीता अनुभवी रामचंद्रा । कैसेनि कळलें वानरा । श्रीरामें दिधली निजमुद्रा । तेणें कपींद्रा लक्षलें ॥ ५४ ॥ सांगतां सीतेचें रक्षण श्रीरामें सांगितली जी जी खूण । त्याची स्थिती पाहतां जाण । देखे पूर्ण वानर ॥ ५५ ॥ ऐसें सीतेचें पूर्णपण । हनुमान लक्षी स्वयें आपण । बाह्य लौकिक लक्षण । दिसे तें चिन्ह अवधारा ॥ ५६ ॥ निधानाभोंवतीं[६] विवंसी[७] । तैशा राक्षसी सीतेपासीं । खाऊं गिळूं घेऊं रक्तासी । देखे चौंपासीं हनुमंत ॥ ५७ ॥ गजपतीचे चुकोनी । पांगडीमाजी[८] पडे हस्तिनी । तैसी सीता अशोकवनीं । दीनवदनी दिसत ॥ ५८ ॥ नाहीं अभ्यंग ना स्नान । तेणें सर्वांग मलिन संपूर्ण । वस्त्र

१ सोन्याचे ओटे. २ राक्षसांचा समुदाय. ३ अत्यंत सावधानतेनें. ४ व्यापलेली. ५ दुःखानें पीडलेली. ६ ठेव्यासभोंवतीं. ७ अवदसा. ८ सपाट्यांत.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

पीतांबर अति जीर्ण । नाहीं प्रावरण दुसरें ॥ ५९ ॥ कुचांसी उदर आच्छादोनी । दोनी गुडघे हृदयीं धरूनी । बैसली असे श्रीरामपत्नी । चित्तीं अनुदिनी श्रीराम ॥ ६० ॥ ध्यावया श्रीरामाची भेटी । आत्मा धरिलासे कंठी । ऐसियापरी सीता गोरटी । देखे दृष्टीं हनुमंत ॥ ६१ ॥ कराळ विकराळ दुष्ट नष्टी । भोंवत्या[1] राक्षसींच्या कोटी । सीतेसी त्यांचें भय तुटी । निर्भय पोटी श्रीराम ॥ ६२ ॥ जंव नाठवे श्रीरघुनाथ । तंवचि भयाचा आवर्त । श्रीराम आठवल्या हृदयाआंत । भवभयार्थ मग कैंचा ॥ ६३ ॥ देखतां राक्षसी क्रूरदर्शन । सीता श्रीराम देखे संपूर्ण । वृक्ष वल्ली तृण पाषाण । देखे परिपूर्ण श्रीराम ॥ ६४ ॥ भय पावलें भयाप्रती । सुख पावलें सुखावर्ती । ऐशिया निष्ठे सीता सती । देखे मारुति आनंदें ॥ ६५ ॥ हृदयीं श्रीरामप्रतीती । श्रीराम देखे सर्वां भूतीं । भयामाजी निर्भयप्राप्ती । सीता सती स्वयें भोगी ॥ ६६ ॥ श्रीराम देखतां सर्वां भूतीं । सकळ भयांसी समाप्ती । भय तें होय ब्रह्ममूर्ती । सुखसंवित्ती[2] श्रीरामें ॥ ६७ ॥ ऐसिया अनुभवेंसीं जाण । श्रीरामनाम मुख्य साधन । नामें निरसे जन्ममरण । नाम परिपूर्ण परब्रह्म ॥ ६८ ॥ नामापासीं विरक्ति शांती । नामस्मरणें परम भक्ती । नामापासीं चारी मुक्ती । नामें निश्चितीं परब्रह्म ॥ ६९ ॥ नामासीं नाही स्नानबंधन । नाहीं नामापासीं विधिविधान । अबद्ध नाम अति पावन । नाम परिपूर्ण परब्रह्म ॥ ७० ॥ नामें दूषण होय भूषण नामें पापी अति पावन । नाम स्मरतां यम शरण । नाम परिपूर्ण परब्रह्म ॥ ७१ ॥ नामासी नाहीं कर्मबंधन । वेगळ्या कर्मा नामस्मरण । अच्युतनामें कर्म पावन । हें स्मृतिवचन श्रुत्यर्थ ॥ ७२ ॥ नामीं नाहीं अनध्यावो[3] । नामापासीं नित्य स्वाध्यावो[4] । नाम परब्रह्म स्वयमेवो । नामनिर्वाहो सभाग्य ॥ ७३ ॥ नाम चैतन्याचा मुढा । नाम परब्रह्माचा हुडा[5] । ब्रह्म नामाचिया पुढां । नाचे धडधडां स्वानंदें ॥ ७४ ॥ स्त्रियांसी रामनामस्मरण । तें भूषणाचें निजभूषण । अहेवपणा अहेवपण । नामें पावन स्त्रीशूद्र ॥ ७५ ॥ स्त्रियांसी गळसरी कृष्णमणी । पुरुषां गळसरी नामस्मरणी । ते तुटलिया रांडपणीं । काळकमणी करावी ॥ ७६ ॥ सीतेसी श्रीराम स्वधर्म । सीतेसी श्रीराम नित्यकर्म । सीतेसी भ्रतार श्रीराम । राम परब्रह्म सीतेसी ॥ ७७ ॥ श्रीरामनाम स्मरतां सीता । देहीं वर्ते विदेहता । भय न मानी लंकानाथा । हेंही हनुमंता कळों[6] सरलें ॥ ७८ ॥ श्रीरामनामांकित सीतापत्नी । भूषणा भूषणशिरोमणी । नामें निःशंक अशोकवनीं । अनुदिनीं निर्द्वंद्व ॥ ७९ ॥ ऐसी देखोनि जनकबाळी । हनुमान भेटीसी तळमळी । कराळा राक्षसींच्या किंकाळी । देखोनि जवळी शंकला ॥ ८० ॥ जैसी नारायणाची रमा । तैसी सीता श्रीरामा । तिची भेटी घेतां आम्हां । राक्षसी अधमा प्रतिबंध ॥ ८१ ॥ यां-देखतां भेटी घेतां । या मज झोंबती सर्वथा । यांच्या मी करितां घाता । रावण सीता वधील ॥ ८२ ॥ वधिलिया रामकांता । माझे कष्ट जाती वृथा । म्यां मारिलिया लंकानाथा । सुख रघुनाथा उपजेना ॥ ८३ ॥ यालागीं आपण तत्वतां । जंव राक्षसी होती निद्रिस्ता । तंव वृक्षीं राहूं गुप्तता । एकांतीं सीता जंव भेटे ॥ ८४ ॥ ऐसें स्वयें विचारून । हनुमान वृक्षीं होयँ[7] लीन । जेंवी कां चपळ पवन । होय सुलीन आकाशीं ॥ ८५ ॥ जेंवी अभ्रामाजी भास्वत[8] । स्वयें असे अति गुप्त । तेंवी वृक्षांमाजी हनुमंत । सावचित गुप्तत्वें ॥ ८६ ॥ जेंवी आत्मा हृदयआंत । असोनि न देखती समस्त । तेंवी वृक्षीं हनुमंत । अति गुप्त राहिला ॥ ८७ ॥ जेंवी का वेदींचा वेदार्थ । असोनि कोणा नव्हे व्यक्त । तेंवी वृक्षीं हनुमंत । अति गुप्त राहिला ॥ ८८ ॥ वृक्षीं राहतां मारुती । जाहली अरुणोदयप्राप्ती । गौळी दोहावा करिती । गोपी आरंभिती गोरसमंथन ॥ ८९ ॥ वेदपाठक वेदाध्ययनी । राजद्वारीं मंगळध्वनी । ललितगंधर्वगायनीं । जयजयध्वनी देवद्वारीं ॥ ९० ॥ अग्निहोत्रिहोमाज्यगंध । उन्मत्त गजांचा मदगंध । शुद्ध सुमनांचा सुगंध । सुधूपगंध देवालयीं ॥ ९१ ॥ नेसली प्रिया कालिमाबुंथी[9] । सोडोनि पीतांबर दे

१ भोंवरा. २ सुखाचा अनुभव. ३ अनध्ययनाचा दिवस. ४ अभ्यासाचा दिवस. ५ किल्ला. ६ समजलें, कळून चुकलें. ७ लपून बसला. ८ सूर्य. ९ अंधकाररूप आच्छादन.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

पती। तेंवी अंधार त्यजोनि राती। दे गभस्ती पीतप्रभा ॥ ९२॥ झाली सूर्योदयप्राती। व्यवहारपर त्रिजगती। निजचरें लीन होती। सुखसंभूती दिवाचरां ॥ ९३ ॥ हनुमंताचे निजचित्तीं। एकांतीं भेटावी सीता सती। अति शीघ्र व्हावी राती। वृक्षांतरवर्ती तिष्ठत ॥ ९४ ॥ ऐसें हनुमंतें धरितां चित्तीं। श्रीरामकार्याचे निजस्वार्थीं। कपीस भेटावया सीता सती। गेला गभस्ती अस्तमाना ॥ ९५॥ जैसी श्यामसुंदर बाळी। लेइली मोतियांचीं जाळी। तैशा नक्षत्रांच्या ओळी। नभोमंडळीं शोभती ॥ ९६ ॥ रात्री नव्हे ते सखी हनुमंता। भेटावया श्रीरामकांता। दोघां संवाद गुप्तकथा। साधूं एकांता आली असे ॥ ९७ ॥ भेटावया सीता स्वामिनी। रात्री नव्हे ती सखी जननी। जानकीसंवादपान्हा पाजूनी। समाधानीं बैसवील ॥ ९८॥ संवादपान्ह्याचे तुष्टपुष्टीं। अखयाक्षयासी करी भेटी। इंद्रजिताची पुरवोन पाठी। राक्षसकोटी गांजील ॥ ९९ ॥ रात्री नव्हेते महाकाळी। येवोन हनुमंताजवळी। भेटवोनि जनकबाळी। करील होळी लंकेची ॥ १०० ॥ रात्री नव्हे ते सप्तशती। शुंभनिशुंभां केली समाप्ती। आतां येवोनि हनुमंताप्रती। करील शांती राक्षसां ॥ १ ॥ रात्री नव्हे ते चामुंडा। धरोनि काळिमेचे बळबंडा। छेदावया रावणाच्या मुंडा। कपी प्रचंडा भेटें आली ॥ २ ॥ रात्री नव्हे ते काळरात्री। प्रवेशोनि कपींद्रीं। रिघोनियां लंकेमाझारी। करील बोहरी राक्षसां ॥ ३ ॥ ऐसी देखोनियां राती। रावणा आठवे सीता सती। जाली विरहज्वरप्राप्ती। सीताकामार्थीं सकाम ॥ ४ ॥ ऐसी देखोनियां राती। आनंदें उल्लासे मारुती। पुढील कथेची अनुवृत्ती। सावध श्रोतीं परिसावी ॥ ५ ॥ वस्त्राभरणीं भूषित। दिव्यचंदनअगरुलिप्त। सीताकामें लंकानाथ। पुष्पसेजेआंत तळमळी ॥ ६ ॥ जैसे का खदिरांगार। तैसा लागे सुमनसेजार। सुमनमाळा पोळी जिव्हार। चंदनें शरीर तप्त होय ॥ ७ ॥ नावडती भोगोपचार। नावडे वीणातंती मधुर। नावडे स्त्रियांसीं सेजार। नावडे मधुर रसपान ॥ ८ ॥ जैसी देखिली स्वयंवरीं। तैसी आठवली सीता सुंदरी। शेंदूरचर्चित भांग शिरीं। चांफेगोरटी सुकुमार ॥ ९ ॥ कमलनयन कमलवदन। ठाणमाण गुणलक्षण। आठवितां घनस्तन। मूर्च्छापन्न रावण ॥ ११० ॥ नावडे दुजाचा संचार। नावडे गायन सुस्वर। सीतेनें झेंडपिला दशशिर। भूतसंचार जानकी ॥ ११ ॥ सीता लागली महद्भूत। जीवें घेईल लंकानाथ। झाडणी भरणी न चले तेथ। सांडणीची मात मानीना ॥ १२ ॥ आंवरूं न शके निजचित्ता। सीता लागली तिहीं अवस्था। धीर न धरवे लंकानाथा। सकामता विव्हळ ॥ १३ ॥ सीताकामें कामातुर। त्यजिली शय्या स्त्रीशेजार। अल्पही होतां संचार। कोपे दुर्धर सेवकीं ॥ १४ ॥ ब्रह्मा वेद पढे घडघडाट। पढती नित्य शांतिपाठ। त्यासी वारिती राजभाट। मौनिनिष्ठ राहा स्वामी ॥ १५ ॥

ब्रह्मन्नध्ययनस्य नैष समयस्तूष्णीं बहिः स्थीयतां
स्वल्पं जल्प बृहस्पते जडमते नैषा सभावज्रिणः।
वीणां संहर नारद स्तुतिकथालापैरलं तुंबर
सीतारल्लकभल्लभग्नहृदयः स्वस्थो न लंकेश्वरः ॥ १ ॥

दूत म्हणती बृहस्पती। वृथा वडवड करिसी किती। जल्पसी इंद्रसभेप्रती। तैसी वदंती न करावी ॥ १६ ॥ नारदा वीणा आंवरीं। तुंबरा आलाप पुरे करीं। रावणा स्वस्थता नाहीं शरीरीं। नाचणी दूरीं दवडाव्या ॥ १७ ॥ भाटीं गर्जावें ना बाहेरीं। ब्रीदें पढावीं ना कैवारीं। उगें रहावें समग्रीं। रावणशरीरीं अति व्यथा ॥ १८ ॥ दूत ब्रह्मयातें नमस्कारिती। समयो नव्हे अध्ययनाप्रती। कोण व्यथा लंकापती। पुसे प्रजापति दूतांसी ॥ १९ ॥ दूत म्हणती हे गुप्त मात। प्रगट करो नये लोकांआंत। तुमचा समर्थ वचनार्थ। ऐका वृत्तांत व्यथेचा ॥ १२० ॥ सीतेचा भांग शेंदूरार्चित। तोचि भाला धगधगित। रुतला रावणाचे हृदयाआंत। तेणें अस्वस्थ लंकेश ॥ २१ ॥ जानकीकामें रावण भ्रांत। सर्वथा नेणे निजस्वार्थ। हित सांगे त्याचा करी घात। सीतासन्निपात लंकेशा ॥ २२ ॥ ब्रह्मवंशज लंकानाथ। न सांगावा जानकीमुख्यार्थ। करूं धांवेल अति अनर्थ। सीतासन्निपात रावणा ॥ २३ ॥ ऐशा सांगतां एकांतगोष्टी।

१ मनुष्यप्राण्यांना. २ अखया नांवाच्या रावणपुत्राचा वध. ३ अनुसंधान. ४ फुलांची शेज. ५ झपाटला. ६ बडबड. ७ कळावंतिणी. ८ बिरुदें, कीर्ती.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

अशोकवन लक्षोनि दृष्टीं । रावण कामक्षोभें उठी । सीता गोरटी देखावया ॥ २४ ॥ चारी महिने स्यां सीता । अशोकवनीं ठेविली वृथा । बळेंचि भोगीन मी आतां । म्हणोनि सकामता ऊठिला ॥ २५ ॥ कामोन्मत्त चाले लंकापती । सवें योषिता शतानुशतीं । सुवर्णदीपिका घेवोनि हातीं । तैल सिंचिती सुगंध ॥ २६ ॥ कनकदंडें युक्त माणिकीं । शशांकछत्रें धरिलीं एकीं । व्यजनें वारिती अनेकी । विडिया कितेकी देताती ॥ २७ ॥ कांसे पाटोळा नीलांबर । त्यावरी कटिसूत्र कटार । किंकिणीज्वाळमाळा विचित्र । ब्रह्मसूत्र सांगतां ॥ २८ ॥ मुकुट कुंडलें अलंकार । मणि मुक्तामाळा नीळहार । वांकी अंदुवांचा गजर । चरणीं तोडर ब्रीदांचा ॥ २९ ॥ सुगंध चंदनाची उटी । पदकें शोभती दशकंठीं । खड्ग वसवोनि मुष्टीं । सीताभेटी चालिला ॥१३०॥ चालिला अशोकवनाप्रती । सवें स्त्रिया नेणों किती । एक दीपिका दाविती । बळी ये म्हणती पैं एकी ॥ ३१ ॥ दडपती द्राक्षांचीं आळीं । खचती नागवेलीपाळी । लखलखिती सोनकेळी । वरिल्या पौळी चालिला ॥ ३२ ॥ देखोनि बनकरांचा थाट । स्त्रिया चालती घडघडाट । लवोन वृक्ष होती सपाट । स्पर्श दुष्ट स्त्रियांचा ॥ ३३ ॥ स्त्रियांच्या स्पर्शाखालीं । वाटिका वाळती समूळी । वृक्ष झडती पुष्पीं फळीं । वरिल्या पौळीं चालिला ॥ ३४ ॥ दीपिकातेजाचे कडाडीं । वृक्षां होईल फलपानझडी । अमृतवल्ली तडातडी । रोपें रोकडी जळतील ॥ ३५ ॥ स्त्रिया आघातें मोडती चांफे । मोडती हेमकमळिणीवाफे । वरिले पौळीचे साटोपें । सीतेसमीप तो आला ॥ ३६ ॥ रावण येतां सीतेप्रती । कोप हनुमंताचे चित्तीं । वृक्षीं सरसावला मारुती । लंकापतीतें धुमसावया ॥ ३७ ॥ रावणा झोंबतां सीतेसीं । बोंब नेतां रामापासीं । सांगों जातां । सुग्रीवासी । लाजेल मजसीं पुरुषार्थ ॥ ३८ ॥ हेंचि वानरें सांगों जातां । हनुमान म्हणे नपुसंकता । घायें मारीन लंकानाथा । न पुसतां श्रीरामासी ॥ ३९ ॥ मजदेखतां श्रीरामभाजा । गांजों जातां राक्षसराजा । दाही शिरें वीस भुजा । घायें पूजा करीन मी ॥१४०॥ आधींच न करावा घात । सीतेपासीं लंकानाथ । कैसी बोली बोलत । तो वृत्तांत ऐकों पां ॥ ४१ ॥ सीता अनुसरली रावणासी । हे तों न घडे कदा काळेंसीं । जरी हा भोगील बळेंसीं । तरी मी यासी धुमसीन ॥ ४२ ॥ मानोन्मत्त पानोन्मत्त । राज्योन्मत्त बळोन्मत्त । ज्ञानगर्वें ज्ञानोन्मत्त । पंचोन्मत्त रावण ॥ ४३ ॥ पंचोन्मत्त अति उन्मत्त । यालागीं त्यातें क्षीवें म्हणत । सीताकामें अति भ्रांत । भ्रमोन्मत्त रावण ॥ ४४ ॥ यापरी अशोकवनाआंत । लंकानाथ आणि हनुमंत । साधूं पाहती निजस्वार्थ । तो कथार्थ अवधारा ॥ ४५ ॥ आधींच गोड रामायण । श्रीरामाचें चरित्र गहन । त्याहीमाजी हनुमंतकथन । गोड निरूपण अवधारा ॥ ४६ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां रावणाशोकवनाभिगमनं नाम सप्तमोऽध्यायः ॥ ७ ॥ ओंव्या ॥ १४६ ॥ श्लोक ॥ १ ॥

अध्याय आठवा

श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ॥ पूर्वप्रसंग संपता तेथ । रावण होऊनि पंचोन्मत्त । येवोनि अशोकवनाआंत । सीता पाहत भोगेच्छा ॥ १ ॥ रावणें ऐसी देखिली सीता । कंपायमान अति भयार्ता । जेंवी कर्दली वायुघाता । श्रीरामकांता तेंवी कांपे ॥ २ ॥ देखोनियां दशानन । ऊरुउदरबाहुभूषण । पीतांबर अति जीर्ण । तेणेंचि आपणा आच्छादी ॥ ३ ॥ पीतांबर तो अति जीर्ण । तेणें अवयव आच्छादून । जानकी अति लज्जायमान । अधोवदन राहिली ॥ ४ ॥ नाहीं अभ्यंग ना स्नान । सर्वांग मलिन मळकण । नाहीं आच्छादन आस्तरण । नाहीं आसन बैसावया ॥ ५ ॥ सीता धरणिजा आपण । धरासनीं सुखसंपन्न । बैसली असे सावधान । लज्जायमान दशवक्त्र ॥ ६ ॥ धनलोही खतेली असे । तीमाजी निजनिधान वसे । सीता बाह्य मलिन भासे । अंतरीं वसे श्रीराम ॥ ७ ॥ सीता बाह्य भासे भयभान । अंतरीं निःशंक सावधान । हें नेणोनि दशानन । करी प्रार्थना भोगार्थ ॥ ८ ॥ स्वमुखें रावण म्हणे सीते । मज भिऊं नको प्रियकांते । मज देखोनि

१ स्त्रिया, २ पंखे, ३ घेऊन, ४ रगडीन, मारीन, ५ उन्मत्त, ६ केळ, ७ भूमिकन्या, ८ द्रव्य ठेवण्याची लोखंडी पेटी, ९ गंजलेली,

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

निजांगातें । वृथा आपणियातें गुप्त करिसी ॥ ९ ॥ मी प्रार्थितों दशानन । मजला व्हावें सुप्रसन्न । सकळ लज्जेसी सांडोन । सुखसंपन्न रम मजसीं ॥ १० ॥ सांडीं श्रीरामाची आस । हे घे माझी सत्य भाष । मज तुज जालिया आश्लेषें[1] । भोगीं अशेष निजराज्य ॥ ११ ॥ ऐशीं सहस्र माझ्या नारी । तयांत मुख्य जे कां मंदोदरी । तुझी करीन ते किंकरी । अवघ्यां वरी तूं श्रेष्ठ ॥ १२ ॥ इंद्रादिक देव समग्र । तुझे करीन वो किंकर । मीही होईन आज्ञाधर । साक्ष शंकर प्रमाण ॥ १३ ॥ स्वर्ग-मृत्युपाताळींची । संपत्ति आणिली त्रिभुवनींची । तेही अर्पीन मी तुजची । घे आमुची निजभाक ॥ १४ ॥ सवेग मलिनांबरें फेडीं । माझीं दिव्यांबरें वेढीं[2] । सांडोनि श्रीरामाची ओढी । भोगीं आवडीं तूं मज ॥ १५ ॥ मस्तक दिसताहे मलिन । करीं जवादीचें[3] मंगळस्नान । तुज मी चर्चीन चंदन । घनस्तन निववावया ॥ १६ ॥ रत्नजडित अलंकार । रत्नकुंडलें पदक हार । कंकणें बाहुवटे मनोहर । अर्धचंद्र रत्नांचे ॥ १७ ॥ सहित किंकिणीज्वाळमाळा । कटीं विराजे मेखळा । वांकी अंदुवांचा खळाळा । कळिकाळा भिऊं नको ॥ १८ ॥ तुझें देखोनि रूप यौवन । ब्रह्मा पडे मूर्च्छापन्न । माझें उतावेळ मन । दे आलिंगन जानकी ॥ १९ ॥ त्रिदशां[4] न खालवीं मान । तो मी येतों लोटांगण । तुझे धरितों चरण । पाणिग्रहण करीं सीते ॥ २० ॥ कुंभकर्ण दांरवंटे कर । इंद्रजित करीन फुलधर । अखयादि समग्र कुमर । करीन किंकर[5] आज्ञांकित ॥ २१ ॥ मंदोदरी स्वयें आपण । नित्य करील चरणक्षालण । मी करीन संवाहन । अंगस्पर्शनसुखार्थ ॥ २२ ॥ तुझा अंगस्पर्श सहज । घडावया भाग्य कैंचें मज । माझी सांडोनियां लाज । भोगीं निर्लज्ज भोग माझे ॥ २३ ॥ सिद्ध कामगविमानीं[6] । दोघें एकत्र बैसोनी । चैत्रवनीं नंदनवनीं । अशोकवनीं क्रीडूं पैं ॥ २४ ॥ सांडोनियां श्रीरामचंद्र । माझा करीं अंगीकार । राम बापुडें कोण किंकर । मजसमोर यावया ॥ २५ ॥ राम बापुडें तें किती । तूं कां त्याची करिसी खंती । ऐक त्या रामाची स्थिती । ते मी तुजप्रती सांगेन ॥ २६ ॥ वनवासी चीरवासी । अन्नावीण तो उपवासी । काय तूं त्यातें भोगिसी । भोगीं मजसीं त्रिविध भोग ॥ २७ ॥ गतविजयो श्रीरामचंद्र । गतश्रीक वनगोचर । त्यासी तूं काय भोगिसी सुंदर । भोगीं निरंतर भोग माझे ॥ २८ ॥ रामासी नाहीं शौर्यसाटोप । स्त्री हरविली अल्पतप । नाहीं परमकर्मप्रताप । धैर्यही स्वल्प श्रीरामा ॥ २९ ॥ धैर्ये राम निर्धडा असता । तरी कां स्त्रीलागीं रडत पडता । झाडोझाडीं कां खेंवं देता । सीता सीता म्हणोनि ॥ ३० ॥ नाहीं धैर्य मजसमान । नाहीं राज्य मजसमान । नाहीं मजसीं समान धन । हीन दीन श्रीराम ॥ ३१ ॥ नाहीं यश मजसमान । नाहीं समान सेनाधन । न चले मजसीं आंगवण । हीन दीन श्रीराम ॥ ३२ ॥ नाहीं ज्ञान मजसमान । स्त्री हारविली अपेश गहन । वनोवनीं करी रुदन । हीन दीन श्रीराम ॥ ३३ ॥ श्रीरामाची कथावार्ता । तुज मी ऐकों नेदीं सर्वथा । मजपासुनि सुटलिया आतां । कैंवी रघुनाथा पावसी ॥ ३४ ॥ व्यर्थ जातें तुझें यौवन । तें तंव नये वो परतोन । सेजे भोगीं दशानन । सुखसंपन्न तूं होसी ॥ ३५ ॥ परदारा स्वयें भोगितां । पाप लागेल लंकानाथा । राक्षसांची स्वधर्मता । ऐक आतां जानकीये ॥ ३६ ॥ आम्हीं हरोनि परनारी । बळेंचि भोगाव्या निजघरीं । परराज्याची थोरी । बळेंचि करीं हरावी ॥ ३७ ॥ देव दैत्य दानव मानव । बळेंचि विभांडोनि सर्व । स्त्रियादि अपूर्व वैभव । आम्हीं स्वयमेव भोगावें ॥ ३८ ॥ आग्रह सांडोनि आपुला । सीते ऐक माझ्या बोला । राम अति दुःखें[7] निमाला । प्राण दिधला लक्ष्मणें ॥ ३९ ॥ राम लक्ष्मण आहे कीं नाहीं । हा संदेह फिटला पाहीं । सुखें अनुसरें माझे ठायीं । म्हणोनि पायीं लागला ॥ ४० ॥ तुझी भीड म्यां धरिली भारी । राखिलीसे षण्मासांवरी । आतां भोगीन बलात्कारीं । अंगीकारीं मज सीते ॥ ४१ ॥ आणा पालखी धरा छत्र । सीतेनें वरिला दशवक्त्र । निशाणें त्राहाटा रे सर्वत्र । करा गजर वाद्यांचा ॥ ४२ ॥ ऐसें रावणाचें वचन । सीतेनें टाकिलें

१ आलिंगन. २ परिधान कर, नेस. ३ कस्तुरीचें. ४ देवांना. ५ सेवक. ६ इच्छित जागीं जाणाऱ्या विमानांत. ७ दुःख. ८ पराक्रमी. ९ आलिंगन. १० पराभव करून. ११ मरण पावला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

उपेक्षून । गजापासीं भुंके श्वानें । दशानन तेंवी भुंके ॥ ४३ ॥ देखोनि उत्तम पक्वान्न । स्वयें वसवसिजे श्वान । रावण दहा तोंडांचें शुन । सीतेकारणें वसवसी ॥ ४४ ॥ देखोनि दहींभाताचा गोळा । झडपूं धांवे जेंवी कावळा । तेंवी देखोनि जनकबाळा । रावण काळा डोंबकाग ॥ ४५ ॥ रावणा देखोनियां सीता । अल्पही बाधा न बाधे चित्ता । बैसली असे निःशंकता । श्रीरघुनाथाचेनि नेटें ॥ ४६ ॥ सीता पतिव्रता आपण । सबाह्य श्रीराम परिपूर्ण । हें स्मरणेंवीण नित्यस्मरण । मानी रावण तृणप्राय ॥ ४७ ॥ ऐकोनि रावणाचें वचन । प्रलोभयुक्त समाधान । साधूपुढें भुंके श्वान । तत्समान मानी सीता ॥ ४८ ॥ जेंवी दहा तोंडांचें घुबड । तैसी रावणाची बडबड । ते सीतेसी न लागे गोड । तद्विधि चाड अपवित्र ॥ ४९ ॥ आमिषालागीं तळपे मासा । परदाराभोगीं रावण तैसा । श्रीरामबाणांचा पडेल फांसा । हें लंकेशा लक्षेना ॥ ५० ॥ कामसर्प लागला रावणासीं । कडू परदारा गोड होय त्यासी । लहरी येतां रामबाणेंसीं । क्षणार्धेसीं निमेल ॥ ५१ ॥ असो हें सावधान सीता । लोकलज्जेच्या लौकिकार्था । आडकाडी करोनि हाता । लंकानाथा शिकवितसे ॥ ५२ ॥ जन्मोनि ब्रह्मयाचे वंशीं । रावणा भाग्यें वेदें विभागिसी । तो तूं परदारा अभिलाषिसी । वृथा मरसी अधमें ॥ ५३ ॥ जेंवी अशुची विकल्पवंता । ऋद्धि सिद्धि नये हाता । तेंवी मी सती श्रीरामकांता । तुज लंकानाथा अपवित्रा ॥ ५४ ॥ साळी भोज्य त्या शुकासी । सांडोनि जातां नारळीसी । तें फळ भक्षूं म्हणतां त्यासी । चंचुभंगेंसीं तळमळी ॥ ५५ ॥ तेंवी तूं त्यजूनि स्वदारा । भोगूं जातां परदारा । दुःखी होशील गा दशशिरा । बाणधारा श्रीरामाच्या ॥ ५६ ॥ तुझ्याचि स्त्रिया लंकानाथा । स्वइच्छें परपुरुषासीं रमतां । त्यांची तुज न माने पवित्रता । दोहींच्या घाता तूं करिसी ॥ ५७ ॥ तेंवी मी श्रीरामाची कांता । तुजसीं बोलणें अपवित्रता । कैंची अंगसंगाची कथा । मरसी वृथा अभिलाषें ॥ ५८ ॥ आत्मौपम्येन सर्वत्र । जो पाहे तो ज्ञाता नर । जैसी रक्षावी स्वदार । तैसी परदारा संरक्षीं ॥ ५९ ॥ म्हणसी श्रीराम जरी दूरी । परी तो तुज मजमाझारीं । नांदताहे निरंतरीं । त्याचि चोरी चालेना ॥ ६० ॥ भोईभेणें जो पळोनि जाये । जिकडे पाहे तिकडे भोये । तैसाचि श्रीराम माझा पाहें । सबाह्य आहे परिपूर्ण ॥ ६१ ॥ त्यासीं न चले चोरी मारी । तयाची भोगितां पैं नारी । घसा निवटील सेजेवरी । संसारा उरी उरों नेदी ॥ ६२ ॥ मजपासोनि न सुटे सीता । ऐसें बोलसी तें वृथा । रामें गिळिलासी लंकानाथा । सबाह्यता निवटोनि ॥ ६३ ॥ जोचि भोग स्वदारेंसीं । तोचि भोग परदारेंसीं । एकें पाविजे स्वधर्मासी । एकें नरकासी जाइजे ॥ ६४ ॥ जो भोग सूकरासूकरीसीं । तो भोग इंद्रा उर्वसीसीं । भोगसमता सर्वांसी । परदारेपासीं अधःपात ॥ ६५ ॥ हित सांगे ते दशशिरा । सुखें भोगावी स्वदारा । मज अर्पावें श्रीरामचंद्रा । कुळगोत्ररक्षणार्थ ॥ ६६ ॥ परदारा ते तंव माता । सकळ संमत वेदशास्त्रार्था । मातृगामी परदारभोक्ता । अधःपाता जाशील ॥ ६७ ॥ ऐसें बोलोनि सीता सुंदरी । रावण महापापी भारी । त्याचें अवलोकन न करी । जाली पाठमोरी जानकी ॥ ६८ ॥ सीता होतांचि विमुख । जालें रावणा परम दुःख । क्रोधलोभशांतवनपूर्वक । दशमुख अनुवादे ॥ ६९ ॥ ऐकोनि सीतेचें दुष्ट चिन्ह । क्रोधाविष्ट दशानन । सर्वांगेंसीं कंपायमान । काय आपण बोलत ॥ ७० ॥ मी तंव स्वयें राक्षसराजा । देव दानव माझ्या प्रजा । दुष्ट वचनें अपमान माझा । श्रीरामभाजा तूं करिसी ॥ ७१ ॥ मज रावणा देखतां दृष्टीं । देव दानव कांपती पोटीं । तूं तंव धीट आहेस मोठी । वदसी गोष्टी अपमानें ॥ ७२ ॥ माझ्या स्त्रीपुत्रांदेखतां । मज निर्भर्त्सिलें लंकानाथा । तुझ्या करावें म्यां घाता । परी स्त्री वधितां निषिद्ध ॥ ७३ ॥ तुझे अंगसंगाची आर्ती । कामक्रोधांची करीन शांती । तुझी मज अति प्रीती । वध तदर्थी न करवे ॥ ७४ ॥ शेखीं तूं न देशी अंगसंग । तुझा करीन अंगभंग । वेगवेगळाले विभाग । तुझें सर्वांग छेदीन ॥ ७५ ॥

१ कुत्रें. २ गळाला लावलेल्या मांसासाठीं. ३ वेदांचीं खंडें केलींस. ४ आपल्याप्रमाणें. ५ छेदील. ६ बोलूं लागला. ७ हे रामपत्नि सीते. ८ इच्छा, आवड. ९ त्यामुळें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वानिसी श्रीरामाची शक्ती। तें तंव मनुष्य बापुडें किती। कैंवी येईल लंकेप्रती। विचार चित्तीं न करिसी॥ ७६॥ सीता नेली लंकेसी। हें कोण सांगेल रामापासीं। दुर्घट मार्ग न कंठे त्यासीं। समुद्रासी काय करी॥ ७७॥ श्रीराम बापुडें चरणचाली। सीताविरहें भुललें भुली। अगाध समुद्राची खोली। उतरवली कैंवी जाय॥ ७८॥ श्रीराम राक्षसां भातुकें। तें मी भक्षीन महाकौतुकें। लक्ष्मण गिळीन चुळोदकें। यथानुसुखें मज भजे॥ ७९॥ तुज सीतेसी रामसंगती। कदा न घडे कल्पांतीं। मज अनुसरें अनन्यप्रीतीं। सांडीं आसक्ती रामाची॥ ८०॥ पित्यानें दिधला दवडून। राज्यहीन स्वधर्महीन। नाहीं अन्न नाहीं धन। अति दीन श्रीराम॥ ८१॥ नित्य तृणाचें शयन। मुखीं घालावया न मिळे पान। वनवासीं न मिळे अन्न। अति दीन श्रीराम॥ ८२॥ नाहीं वस्त्र नाहीं भूषण। नाहीं अभ्यंग तैलमर्दन। जटा वळिल्या वल्कल परिधान। अति दीन श्रीराम॥ ८३॥ श्रीरामासी बळ असतें। तरी कां वनीं रडत राहतें। तयासी येववेना पैं येथें। राम निश्चितें अति दीन॥ ८४॥ मजसमान नाहीं बळ। मजसमान नाहीं दळ। मजसीं न करवे सळ। राम केवळ अति दीन॥ ८५॥ बैसोनियां वनवासीं। झुंझावया राक्षसांसीं। रामें मेळविलें वानरांसी। तेही आम्हांसी निजभुक्ति॥ ८६॥ श्रीराम होवोनि वनचर। वनीं मेळविले वानर। त्यांतें गिळती निशाचर। भक्ष्य साचार ते आम्हां॥ ८७॥ रावण सांगे सांक्षेपूनी। ऋषिभाष्य डमरुपुराणीं। जें भाष्य ऐकिलें कानीं। तें सीते सावधानीं अवधारीं॥ ८८॥

भवित्री रंभोरु त्रिदशवदन ग्लानिरधुना
स ते रामः स्थाता न युधि पुरतो लक्ष्मणसखा।
इयं यास्यत्युच्चैर्विपदमधुना वानरचमू-
र्लघिष्ठेदं षष्ठाक्षरविपरिलोपात्पठ पुनः॥ १॥

रंभास्तंभगर्भ अति सुकुमारु। त्याहूनि अरुवार तुझा ऊरु। यालागीं बोलिजे रंभोरु। श्लोकार्थ सादर अवलोकीं॥ ८९॥ त्रिदशवदन जे का देव। थोर आपत्ती पावती सर्व। माझे रणीं भंगेल राघव। विमुख स्वयमेव लक्ष्मणेंसीं॥ ९०॥ माझिया कंदनाआंत। रणीं भंगलिया रघुनाथ। वानरें होतां वाताहत। राक्षस समस्त भक्षितील॥ ९१॥ सीता सज्ञान बोले सुंदर। रावणा श्लोक हा साचार। लोपोनियां तिन्हीं सप्ताक्षर। करीं उच्चार श्लोकाचा॥ ९२॥ रावणा तूं अति लघिष्ठ। मूर्खत्वें वाहसी दाही कंठ। सातवें अक्षर लोपोनि स्पष्ट। वाचीं घडघडाट श्लोकार्थ॥ ९३॥ ऐकोनि भाष्य लंकानाथा। असत्य वचन न वदे सीता। श्लोकाचिया भविष्यार्था। सावधानता अवधारीं॥ ९४॥ भविष्यार्थ आहे अति गहन। ग्लानि पावेल दशवदन। रणीं विजयी रघुनंदन। सखा लक्ष्मणसमवेत॥ ९५॥ वानरसेना आघवी। उंचावेल विजयगौरवीं। रावण निर्दळोनि राघवीं। रामराज्यपदवी तिहीं लोकीं॥ ९६॥ सीतेनें कथितां श्लोकार्थ। कोपें तिचा करावया घात। रावणें उचलिला हात। वृक्षीं हनुमंत कोपला॥ ९७॥ रावणें उचलितां हात। सीता निर्भत्सी लंकानाथ। कामोन्मत्त गर्वोन्मत्त। मरणोन्मत्त जाहलासी॥ ९८॥ कोपला देखोनि लंकानाथ। सीता मशकप्राय मानित। श्रीरामस्मरण अति समर्थ। निःशंक नित्य जानकी॥ ९९॥ दुःखदायक रावणवचन। अखंडधारा वर्षे घन। तेणें डळमळेना सीतेचें मन। जेंवी कां गगन तिंबेना॥ १००॥ रावणाचीं वचनें लाघवें। मानी मृगजळहेलावे। त्याचीं झाडावया गर्वपर्वें। निजानुभवें बोलत॥ १॥ सीतेचें वचन अति गुह्यार्थ। स्वहित आणि परहित। दोहीं अर्थीं असतां समर्थ। शुद्ध शब्दार्थ अनुवादे॥ २॥ जेंवी कां शुद्ध पुण्यकीर्ती। तीस नातळे अपकीर्ती। तैसी रावणाची दुष्ट दुरुक्ती। सीता सती स्पर्शेना॥ ३॥ देव दानव सेवा करिती। लंकाराज्य यशःकीर्ती। यावरी जोडिली अपकीर्ती। सीता सती चोरोनि॥ ४॥ शिवाचा सेवक प्रसिद्ध। चोरितां श्रीरामाची वधू। ऐसा रावण बुद्धिमंदू। पापबद्ध जालासी॥ ५॥ चोरी करोनि लंकानाथा। पळूं पाहसी तूं केउता। श्रीरामबाणाचे आघाता।

१ खाद्य. २ नेसावयास वस्त्र. ३ भक्षण, अन्न. ४ प्रयत्नानें. ५ केळीच्या गाभ्याप्रमाणें. ६ नाजुक. ७ योग्यतेनें हलका, हलकट. ८ ओलें होत नाहीं. ९ कोणीकडे, कोठें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

तुज कोण आतां राखील ॥ ६ ॥ धाता पिता सोम सविता । अनळ यम विधाता । कोपलिया श्रीरघुनाथा । हे सर्वथा न राखिती ॥ ७ ॥ लपों जातां शिवपुरीं । शिव मारील त्रिशूळेंकरीं । माझिया स्वामीची चोरिली नारी । प्रत्यक्ष वैरी तूं माझा ॥ ८ ॥ श्रीरामकांता जगत्रयजननी । विशेषें माझी गुरुपत्नी । कां चोरिली हे अभिलाषोनी । तृतीयनयनीं जाळील ॥ ९ ॥ यापरी गा लंकानाथा । चोरिलिया श्रीरामकांता । कोणी नाहीं गा रक्षिता । तुज तत्त्वतां ॥ ११० ॥ म्हणसी मज आहे दळवळ । श्रीराम एकाकी निर्वळ । श्रीरामाचें बळ प्रवळ । ऐक प्रांजळ सांगेन ॥ ११ ॥ ताटका मारिली आणि सुबाहु । मारीच मारिला त्याचा भाऊ । विराध करितां गर्व बहु । रणगौरवु बाणें एकें ॥ १२ ॥ एकलेनि बाणें रामें जाण । चवदा सहस्र राक्षसगण । त्रिशिरा मारिला खर दूषण । रणकंदन जनस्थानीं ॥ १३ ॥ लाज नाहीं तुजलागूनी । शूर्पणखा सखी भगिनी । तिचें नाक कान कापूनी । विंटवोनी धाडिली ॥ १४ ॥ तुज येतां तिच्या कैवारीं । प्रथम जाहलासी भिकारी । चोरोनि श्रीरामाची अंतुरीं । भयेंकरीं पळालासी ॥ १५ ॥ मुख न दावितां रामासी । बाणभयें पळालासी । धाकें लंकेमाजि लपसी । आणि जलधीसी वांढिव ॥ १६ ॥ जटायूसीं करितां रण । मजदेखतां आपण । दांतीं तुवां धरिलें तृण । काय आंगवण वानिसी ॥ १७ ॥ सीता निर्भर्त्सी लंकानाथ । हनुमान हांसे वृक्षावरुतें । देखोनि जानकीचा पुरुषार्थ । अति विस्मित वानर ॥ १८ ॥ श्रीरामें मारुनि खर दूषण । दोघे बंधु स्वयें बैसोन । वांटा केला आपणा आपण । सावधान अवधारीं ॥ १९ ॥ ज्येष्ठ वांटा श्रीराम द्विगुण । रावण आणि कुंभकर्ण । कनिष्ठ वांटा लक्ष्मण । इंद्रजित जाण एकाकी ॥ १२० ॥ उद्भट वीर वाढिवेंसीं । वांटा दिधला हनुमंतासी । शिष्टाई दिधली अंगदासी । नळनीळांसी सेतुबंध ॥ २१ ॥ येर समस्त सैन्यासी । श्रीरामें दिधलें सुग्रीवासी । वीरवृत्तिविभागांसीं । वानरांसी समजावी ॥ २२ ॥ श्रीराम स्वयें सच्चिदानंदघन । त्यासी तूं म्हणसी अति दीन । श्रीरामाचें महिमान । सावधान अवधारीं ॥ २३ ॥ श्रीरामनाम नित्यस्मरणीं । शिव वंदित पायवणी । ब्रह्मा घाली लोटांगणीं । देवां शिरोमणि श्रीराम ॥ २४ ॥ एकांतीं बैसोनि चंद्रचूडे । नित्य श्रीरामनाम पढे । त्यातें निंदिजे तुवां मूढें । मरण रोकडें तुज आलें ॥ २५ ॥ जो जो श्रीरामाची निंदा करी । शिव साक्षेपें त्यातें मारी । आपुला स्वामी तुवां केला वैरी । मूर्ख संसारीं तूं एक ॥ २६ ॥ श्रीरामा निंदितां जाणा । जिव्हा झडेल गा रावणा । होसिल नरकाचा पाहुणा । आंदणा महादुःखा ॥ २७ ॥ निंदितां देखोनि रघुनंदन । सीता जाली कोपायमान । रावणा तुझें भस्म करीन । अर्धक्षण न लागतां ॥ २८ ॥ बळेंचि भोगीन म्हणसी सीता । आणि निंदितां श्रीरघुनाथा । तुझें भस्म करीन आतां । क्षण न लागतां रावणा ॥ २९ ॥ परी आज्ञा समर्थ रघुनाथा । लागलिया अति आघाता । कोप न यावा सर्वथा । केंवी लंकानाथा भस्म करूं ॥ १३० ॥ आंगा येतां क्रोधसंग । अपवित्र होय सर्वांग । ब्रह्मचर्या होय भंग । तपा संहार होय क्रोधें ॥ ३१ ॥ यज्ञदानव्रतदक्षिणा । कोप येतांचि पैं जाणा । सर्व क्रियाकर्म व्यर्थ जाणा । करी उगाणा तपाचा ॥ ३२ ॥ छिद्र पडतां घट गळे । क्रोधानळें तप जळे । योगी संन्यासी पडती मैळे । क्रोधें निजबळें गांजिले पैं ॥ ३३ ॥ बाह्य मांगाचा विटाळ । जलमार्जनें फिटे मळ । क्रोध अतिशयें चांडाळ । नव्हे निर्मळ प्रयागीं ॥ ३४ ॥ करितां काशीवासस्नान । तंव क्रोध खवळे गहन । क्रोधाऐसा पापी पूर्ण । नाहीं आन संसारीं ॥ ३५ ॥ काम क्रोध लोभ जाणें । हे नरकाचे पाहुणे । तिन्ही त्यजावे आपणें । आज्ञा संपूर्ण रामाची ॥ ३६ ॥ श्रीरामाज्ञा प्रतिपाळितां । क्रोध आतळों नेदी चित्ता । तेणें वांचलासी लंकानाथा । अपघाता चुकलासी ॥ ३७ ॥ आतां मी वांचलों तत्त्वतां । ऐसें न मानीं लंकानाथा । करील श्रीराम तुझ्या घाता । हेही कथा अवधारीं ॥ ३८ ॥ श्रीरामधनुष्याचा ध्वनी । पडतांचि लंकाभुवनीं । राक्षस पडती मूर्च्छापन्नीं । त्रिकूट खचोनी पडे धाकें ॥ ३९ ॥ पायीं उतरोनी अंपांपती । शरवृष्टिसंपातीं । वीरें वीर पडती क्षितीं । अश्वगजरथी-

१ बडबडसी. २ कीर्ति, मोठेपणा. ३ पायांचें पाणी, गंगा. ४ दास. ५ नाश, भंग. ६ समुद्र.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

समवेत ॥ १४० ॥ इंद्रजित लक्ष्मणाचा भाग जाण । तो निकुंबळे घालील खाण । मेघनादाचा घेईल प्राण । शस्त्रें दारुण वर्षोनी ॥ ४१ ॥ श्रीराम विंधोनियां जाण । बाणीं फोडील कुंभकर्ण । रावणा तुझा घेईल प्राण । अर्ध क्षण न लागतां ॥ ४२ ॥ जेंवी थिल्लरीं अल्प जळ । रवि शोषितां न लगे वेळ । तेंवी श्रीरामाचे बाण प्रबळ । प्राण तत्काळ घेतील ॥ ४३ ॥ राजया उन्माद कामासक्तीं । तोही काम अधर्मरतीं । त्याचीं राष्ट्रें पुरें नासती । राज्यसंपत्तीसमवेत ॥ ४४ ॥ लंका रत्नाढ्य कनकगिरी । रावणा तुझी परदारचोरी । भस्म होईल क्षणामाझारी । सहपरिवारीं सहपुत्र ॥ ४५ ॥ निवारेल वज्रधार । निवारेल काळचक्र । परी श्रीरामाचा बाण अनिवार । दशशिरवधार्थ ॥ ४६ ॥ पाठीं लागलिया काका । ज्याचे हातींची दर्भशिखा । नावरेचि तिहीं लोकां । शिवादिकांसमवेत ॥ ४७ ॥ त्या रामाचे सकोप बाण । येथें निवारूं शकेल कोण । घेतील राक्षसांचा प्राण । मुख्य रावणा लक्षूनी ॥ ४८ ॥ म्हणसी सबळ दशानन । राम नव्हे मजसमान । श्रीराम सिंह तूं श्वान । पलायमान होसी चोरा ॥ ४९ ॥ मुखीं धरोनि पक्वान्न । हडहड करितां पळे श्वान । सीता चोरूनि चिद्रत्न । पलायमान तूं तैसा ॥ १५० ॥ श्रीराम चिन्मात्र गजेंद्रु । रावण विषयाचा काळेंद्रु । घरींचियांवरी करी कुरुकुरु । श्रीरामासमोरु न राहवे ॥ ५१ ॥ तूं तंव शूर्पणखेसमान । चोरी करोनि शूर पूर्ण । त्यावरीही बुचाटें आंगवण । काळें वदन रावणा ॥ ५२ ॥ ऐकोनि सीतेचा अनुवाद । रावणा आला सुबद्ध क्रोध । तिचा करावया वध । जाहला सिद्ध साटोपें ॥ ५३ ॥ सीतावचनाचे बाणाग्रीं । रावण खोंचला जिव्हारीं । दांत खावोनियां करकरीं । नेत्र वटारी अति क्रोधें ॥ ५४ ॥ संतापक्रोधें उचंबळे । फोडा इचे दोन्ही डोळे । वेगें मोडा रे सिसाळें । अंत्रमाळा काढा इच्या ॥ ५५ ॥ जिव्हा छेदा रे सवेग । वेगीं करा अंगभंग । विदारोनियां अष्टांग । भिन्न भाग करा इचे ॥ ५६ ॥ तिचा करावया घात । रावण शस्त्रेंसीं धांवत । तें देखोनियां हनुमंत । रागें कांपत थरथरां ॥ ५७ ॥ हात दोनी कुसकरी । पुच्छ भोंवडी चक्राकारीं । शेंडी माथेवरी थरारी । वृक्षावरी पिलंगत ॥ ५८ ॥ डोळे भोंवंडीत गरगरां । दांत खातसे करकरां । रोमें थरकती थरथरां । आला वानरा अति कोप ॥ ५९ ॥ सीतेसी लावितां हात । करीन रावणाचा घात । येणें साटोपें हनुमंत । घुलकावित वृक्षेंसीं ॥ १६० ॥ कोपला देखोनि वानरा । हाहाकार सुरवरां । कोपला देखोनि दशशिरा । स्त्रिया समग्रा कांपती ॥ ६१ ॥ सीता गांजितां रोकडी । हनुमंत जंव न घाली उडी । मंदोदरीची प्रज्ञा गाढी । आली तांतडी ते संधी ॥ ६२ ॥ खड्ग घेवोनि लंकानाथ । करितां सीतेचा पैं घात । मंदोदरी धांवोनि तेथ । धरिला हात खड्गाचा ॥ ६३ ॥ मंदोदरी धरितां हात । दचकलासे लंकानाथ । हनुमान वृक्षीं राहे गुप्त । पुढील कथार्थ अवधारा ॥ ६४ ॥ ऋषिरामायणाआंत । सीतारावणशब्दोन्मथित । कथा आहे अत्यद्भुत । तितका ग्रंथ न धरेचि ॥ ६५ ॥ कथा सांगतां संकळित । इतका वाढला पैं ग्रंथ । वदनीं वदविता श्रीरघुनाथ । गुह्य गुह्यार्थ तो जाणे ॥ ६६ ॥ श्रीराम आणि जनार्दन । दोहींमाजी ब्रह्म परिपूर्ण । एका जनार्दना शरण । कथा पावन श्रीरामें ॥ १६७ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां सीतारावणसंभाषणं नाम अष्टमोऽध्यायः ॥ ८ ॥ श्रीसीतारामचंद्रार्पणमस्तु । ओंव्या ॥ १६७ ॥ श्लोक ॥ १ ॥

अध्याय नववा

श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ॥ रावण सीतेसी लावितां हात । हनुमान त्याचा करिता घात । तों मंदोदरी येऊनि तेथ । अति अनर्थ चुकविला ॥ १ ॥ अतिकायाची जननी । रावणप्रिया वनमालिनी । तया रावणा आलिंगूनी । युक्तवचनीं बोलत ॥ २ ॥ स्वदारकाम मजसीं रम । मजसीं रमणें हा स्वधर्म । सीता अकाम चित्ता काम । परम अधर्म अधःपात ॥ ३ ॥ सांडीं अकाम सीतेसीं । स्वेच्छा रमावें मजसीं । माझेनि कामें सुखी होसी । सीतेपासीं अति दुःख ॥ ४ ॥ श्रीराम-

१ नाश. २ इंद्रजिताचा. ३ डबक्यांत. ४ कुत्रा. ५ व्यर्थ. ६ पराक्रम. ७ मर्मस्थानीं. ८ मस्तक. ९ आंतडीं. १० लोंबू लागला. ११ श्रेष्ठ. १२ सीता आणि रावण यांचे संवादापासून निघालेली. १३ थोडक्यांत. १४ स्वपत्नीची इच्छा धरून.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

कांता सीता सती। तिचे कामाचे आसक्तीं। राक्षसांची जावया व्यक्ती। होईल समाप्ती वंशाची ॥ ५ ॥ कुमार प्रधान सेनापती। अश्व गज रथ पदाती। इंद्रजित कुंभकर्ण लंकापती। भस्म होती सीताक्षोभें ॥ ६ ॥ सर्व रस चाखी माशी। दीप चाखितां दाहो तिसीं। तेंवी सांडोनि स्वदारेसी। सीतेपासीं भस्मार्थ ॥ ७ ॥ निजपुत्राचा द्वेष करी। खांब हाणितां शस्त्रधारीं। हिरण्यकशिपु नखाग्रीं। सहपरिवारीं निमाला[1] ॥ ८ ॥ खांबीं उठिला नरहरी[2]। येथें वनीं उठेल वनकेसरी। सीता सती क्षोभल्यावरी। होईल बोहरी[3] राक्षसां ॥ ९ ॥ जानकीचे निजगुह्यांत। काय भरलें आहे अमृत। आमुचें गुह्य विषप्रयुक्त। कडू लागत रावणा ॥ १० ॥ स्वस्त्रीपरस्त्रीकामकामुक। समान सुखाचे परिपाक। स्वदारकामें परम सुख। परम दुःख परदारा ॥ ११ ॥ परदारेची आसक्ती। पूर्वजां होय अधोगती। आपण पावे नरकाप्रती। वंशसमाप्ती परदारें ॥ १२ ॥ वनमालिनी नानायुक्तीं। शिकवितां त्या लंकापती। मंदोदरीनें धरोनि हातीं। नेला एकांतीं रावण ॥ १३ ॥ बैसवोनि प्रिया एकांतीं। नारदभाष्यकल्पोक्ती। सांगतसे रावणाप्रती। मुनि वदंती[4] जे वदला ॥ १४ ॥ आंगींचिये बळाचे मस्ती। तुवां पुसिलें नारदाप्रती। मज वधी कोण त्रिजगतीं। देवीं दैत्यीं कीं दानवीं ॥ १५ ॥ देवां अटक तूं दशकंठ। दैत्य तुज पुढें फोलकट[5]। दानवेंशीं धीट तिखट। परी नर तुज दुर्धर संग्रामीं ॥ १६ ॥ भविष्य पुसों नको रावणा। संकल्पभावी भावना। भविष्य चुकवावया जाणा। नाना विंदान करिती प्राणी ॥ १७ ॥ रावणें धरिले दोनी चरण। मज सांगावें माझें मरण। नारद जाणे रामायण। सत्य भाषण तो वदला ॥ १८ ॥ रावणा तुझ्या वधार्थीं। कौसल्यासुत राम दाशरथी। तो येवोनि लंकेप्रती। करील समाप्ती राक्षसां ॥ १९ ॥ ऐसें सांगोनि रावणाप्रती। नारद निघे ऊर्ध्वपंथीं[6]। त्याचे गमनाची गती। त्रिजगतीं अनुपम्य ॥ २० ॥ रामनामें वीणा वाजत। श्रीरामनाम मुखीं गात। नामामृतें नित्य तृप्त। स्वयें डुल्लत स्वानंदें ॥ २१ ॥ कीर्तनाच्या संतुष्टीं। श्रीरामरूप देखे दृष्टीं। पदोपदीं आनंदकोटी। सुखसंतुष्टीं उल्लासे ॥ २२ ॥ ऐसें नारदें केलिया गमन। मागें रावण उद्विग्न। पाचारोनि चतुरानन। पुसे आपण तें ऐका ॥ २३ ॥ कौसल्या ते कोण कैसी। दशरथ तो कोण कोणाचे वंशीं। त्याची वस्ती कोणे देशीं। हें मजपासीं सांगावें ॥ २४ ॥ नाहीं कौसल्येचा विवाह झाला। नाहीं दशरथ उपजला। नाहीं राम जन्मा आला। तें वोलिला नारद ॥ २५ ॥ ऐकोनि रावणाचें वचन। चहूं मुखें हांसे चतुरानन। नारदाचें जें भाषण। अन्यथा कोण करूं शके ॥ २६ ॥ ब्रह्मा सांगे रावणापासीं। कौसल्या कन्या कोसलरायासीं। दशरथ तो सूर्यवंशीं। अयोध्येसी निजराजा ॥ २७ ॥ त्या दोहींचें पाणिग्रहण। होतां रावणें केलें विघ्न। अन्यथा नव्हे नारदवचन। लागलें लग्न समुद्रीं ॥ २८ ॥ कौसल्या आणि दशरथ। कैंवी पां गेले समुद्राआंत। कैसेनि लग्न लागलें तेथ। श्रोते वृत्तांत पूसती ॥ २९ ॥ हे तंव जुनाट परिपाटी। काळिकाखंडीं गुह्य गोष्टी। नारदें देखोनि ज्ञानदृष्टीं। वदे जगजेठी निःशंक ॥ ३० ॥ सेतुबंधमाहात्म्यांत। दुसरे एके लघुमाहात्म्यांत। थोरलिया माहात्म्यांआंत। ग्रंथ समस्त लिहिला असे ॥ ३१ ॥ अहिरावण महिरावण। त्यांचें जनन आणि मरण। कौसल्यादशरथपाणिग्रहण[8]। तेथें संपूर्ण लिहिलें असे ॥ ३२ ॥ असो या ग्रंथाची ग्रंथोक्ती। झाडा सुचावा पैं किती। वदनीं वदविता श्रीरघुपती। कविता करिता श्रीराम ॥ ३३ ॥ माझे अंगीं मूर्खपण। लटिकें लिहिलें रामायण। तेंही वाचितां पैं जाण। होय क्षालन महापापा ॥ ३४ ॥ ग्रंथ असंख्य आनेंआन[9]। तेथेंही आनआन निरूपण। माझें भावार्थरामायण। सावधान अवधारा ॥ ३५ ॥ कौसल्यादशरथपाणिग्रहण। रावणें करितां अति विघ्न। समुद्रामाजी लागलें लग्न। तें अतिविंदान[10] अवधारा ॥ ३६ ॥ ब्रह्मा सांगे रावणापासीं। कौसल्यादशरथलग्नासी। वऱ्हाड जातें कोसलदेशीं। पांचवे दिवशीं लग्नसिद्धि ॥ ३७ ॥ ऐसी

१ मृत्यु पावला. २ वनसिंह. ३ संहार,नाश. ४ भाषण, वाणी. ५ क्षुल्लक. ६ आकाशमार्गानें. ७ युक्ति.

८ कौसल्यादशरथांचें लग्न. ९ निरनिराळे. १० महच्चमत्कार.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

रावणें ऐकतां गोष्टी । कौसल्येवरी क्षोभक दृष्टी । धाडी घालोनि उठाउठीं । हरिली गोरटी कौसल्या ॥ ३८ ॥ रावण पोटीं भयभीत । कौसल्या न ठेवी लंकेआंत । देव चिंतिती माझा घात । ते विपरीतार्थ करितील ॥ ३९ ॥ देव कामारे[1] मजपाशीं । माझा मृत्यु आवडे त्यांसी । ते कौसल्या दशरथापासीं । लघुलाघवेंसीं[2] नेतील ॥४०॥ ऐसा धाक रावणासीं । कौसल्या न ठेवीच लंकेसीं । तीतें घालूनि पेटीसीं । समुद्रापासीं ठेवणें धाडी ॥ ४१ ॥ द्रीपद्राक्षें अमृतफळें । लाडू पक्कान्नें रायकेळें । पात्रें भरूनि शीतळ जळें । सांठविलें पेटींत ॥ ४२ ॥ त्या पेटीमाजी कौसल्येसी । घालोनि धाडी समुद्रापासीं । समुद्रें ठेविली मीनापासीं । मीनें दाढेसीं[3] घातली ॥ ४३ ॥ मीन क्रीडतां समुद्रीं । त्यासीं तिमि[4] धांवे युद्धावारीं[5] । मीन म्हणे युद्धाचे संचारीं[6] । पेटी चकचुरी होईल ॥ ४४ ॥ म्हणोनियां उठाउठीं । पेटी ठेवोनि समुद्रबेटीं । मीन परतला युद्धासाठीं । सक्रोधदृष्टीं संग्रामा ॥ ४५ ॥ दशरथ लग्नत्वरा करी । पायवाट मार्ग दुरी । तारुवीं बैसोनि समुद्रीं । जाऊं त्रिरात्रीं कोसलदेशा ॥ ४६ ॥ चेउलींहूनि जेंवी द्वारका । पायवाट दूरी देखा । तारुवीं बैसोनि जातां लोकां । दिवसा दोंकां जाऊं पावती ॥ ४७ ॥ राया दशरथें यापरी । वऱ्हाड घालोनि नावेवरी । स्वयें निघाला समुद्रीं । त्वरेंकरीं जावया ॥ ४८ ॥ टकेपताका नावेवरी । निशाणें त्राहाटिल्या भेरी । वऱ्हाड चालिलें समुद्रीं । अति गजरीं उल्लासें ॥ ४९ ॥ रावणें पाळती करोनि पुरी । विमानबळें येवोनि अंधारीं । दशरथ बैसला जे नावेवरी । ते निशाचरीं फोडिली ॥ ५० ॥ बाप होणार कैसें बळी । तें न चुके कदाकाळीं । दशरथ बुडतां पैं जळीं । जालें ते काळीं अपूर्व ॥ ५१ ॥ दशरथ बुडतां पैं तळवटीं । रामनाम स्मरे वाक्पुटीं[7] । तंव सांपडली फुटकी पाटी । राम संकटीं तारक ॥ ५२ ॥ श्रीराम दशरथाचे कुशीं । म्हणोनि नाम आठवे त्यासी । बुडतां नव्हे कासाविसी । नामें रायासी तारिलें ॥ ५३ ॥ नाम आठविल्या आकांतीं । आकांतामाजी अति विश्रांती । नामें तारक त्रिजगती । सुखसंवित्ती[8] श्रीरामें ॥ ५४ ॥ सांपडतां फुटकी पाटी । समुद्रलाटांच्या पैं लोटीं । जेथें कौसल्येची पेटी । राजा त्या बेटीं लागला ॥ ५५ ॥ दशरथ पैं उठाउठीं । सवेग चालिला त्या बेटीं । संमुख देखोनियां पेटी । आश्चर्य पोटीं मानिलें ॥ ५६ ॥ भोंवतीं समुद्राची घरटी । येथें कोणें ठेविली पेटी । पाहतां दुसरें न दिसे दृष्टी । विस्मय पोटीं अनिवार ॥ ५७ ॥ तेणें ती पेटी हातीं धरिली । होणारें किल्ली उघडली । भीतरीं कौसल्या देखिली । असे बैसली सचिंत ॥ ५८ ॥ दशरथ पुसे तूं कोण । येरी विस्मयो पावली पूर्ण । तुम्ही कोणाचे कोण । येथें आगमन कैसेनि ॥ ५९ ॥ राजा म्हणे तूं गोरटी । तुज कैसेनि प्राप्त पेटी । तुज कोणें ठेविलें ये बेटीं । समूळ गोष्टी सांगावी ॥ ६० ॥ पयोनिधि[9] अगाध गहन । मत्स्य मगर अति दारुण । ऐसें दुस्तर दुर्गम स्थान । येथें आगमन कैसेनि ॥ ६१ ॥ कोसलरायाची मी राजबाळा[10] । रायें दशरथू वरू नेमला । तंव रावणें घालोनि घाला । घेऊनि आला मज लंके ॥ ६२ ॥ भविष्यें रावण दचकला पोटीं । भयेंचि मजला घालोनि पेटीं । ठेवणें धाडिलें समुद्राचे पोटीं । तेणें ये बेटीं ठेविलें ॥ ६३ ॥ ऐसिया सांगतां गोष्टी । कौसल्या बाष्पें दाटली कंठीं[11] । भाग्यें अभाग्य मीच सृष्टीं । नव्हेचि भेटी दशरथा ॥ ६४ ॥ न व्हावें दशरथाचें लग्न । यालागीं रावणें केलें विघ्न । दशरथा करावया भग्न । सवेग सैन्य मोकलिलें[12] ॥ ६५ ॥ जळो जळो तो दशानन । स्वप्नींही न व्हावें संभाषण । धरोनि दशरथाचें ध्यान । प्राण त्यागीन स्वानंदें ॥ ६६ ॥ ऐकोनि कौसल्येचें वचन । राजा जाला विस्मयापन्न । सप्तसागरीं होतां मग्न । होणार पूर्ण चुकेना ॥ ६७ ॥ राजा सांगे निजवृत्तांत । रावणें माझा करितां घात । रक्षिता झाला श्रीरघुनाथ । समुद्राआंत बुडवितां ॥ ६८ ॥ तो समुद्र भरिल्याआंत । येथें आलों मी दशरथ । येरी पुसे तूं अजाचा सुत । रघूचा नातू सूर्यवंशी ॥ ६९ ॥ ऐकोनि निश्चयवचन । कौसल्या जाली सुखसंपन्न । मज तुष्टला जनार्दन । केलें सुलग्न एकांतीं ॥ ७० ॥ नाहीं

१ चाकर. २ मोठ्या चातुर्यानें. ३ दाढेमध्यें. ४ एक प्रकारचा मोठा मासा. ५ युद्धार्थ. ६ युद्ध सुरू असतां. ७ तोंडानें. ८ सुखानुभव. ९ समुद्र. १० राजकन्या. ११ अश्रूंनीं कंठ भरून आला. १२ पाठविलें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

कर्माची खटपट । नाहीं लौकिक अंतःपट । नसतां लोकीं कटकट । लग्न लागलें निर्दोष ॥ ७१ ॥ दोहींचा जो निजहरिखं । तोचि तयांचा मधुपर्क । बोल बोलिलीं जे अनेक । मंगलाष्टकें तीं तेथें ॥ ७२ ॥ विकल्पाचीं झाडिलीं पळें । संकल्पासीं मूद ओंवाळे । स्वधर्माचा दीप उजळे । सुखकल्लोळ लग्नार्थ ॥ ७३ ॥ अनोळखता मागें सांडे । तेचि पायीं पायमांडे । परमानंद वाडेकोडें । सुखसुरवाडें लग्नार्थ ॥ ७४ ॥ उदरा येईल रघुनाथ । लग्नीं पावला अभिजित । लग्नघटिका पाहे भास्वैत । काल सांगत सावधान ॥ ७५ ॥ दोहींसी ओळखी होतां स्पष्ट । सुटोनि गेला अंतःपट । ॐपुण्याहंवचनें श्रेष्ठ । मौननिष्ठ होवोनि ठेले ॥ ७६ ॥ लग्नधरा समुद्रबेटीं । बोहोलें तेंचि मुख्य पेटी । लग्न लागलें उठाउठीं । दृष्टादृष्टी होतांचि ॥ ७७ ॥ यापरी कौसल्येनें निजकांत । लग्नीं वरिला दशरथ । पुढील कथेचा अर्थार्थ । आश्चर्यार्थ अवधारा ॥ ७८ ॥ कौसल्या आणि दशरथ । दोघें बैसलीं पेटीआंत । फळें पक्वान्नें भक्षित । जळ प्राशित स्वानंदें ॥ ७९ ॥ कौसल्या पुसे दशरथासी । पुढें निर्गती आमुची कैसी । राजा सांगे कौसल्येसी । रामनामेंसीं आम्हां मुक्ति ॥ ८० ॥ वसिष्ठसद्गुरुवचन । करितां रामनामस्मरण । भवभयाचें निर्दाळण । बंधमोचन तें किती ॥ ८१ ॥ आम्ही तुम्ही मिळोनि आतां । सावधान एकाग्रता । भावें स्मरतां श्रीरघुनाथा । भव सर्वथा आम्हां नाहीं ॥ ८२ ॥ पृथ्वी बुडावया हडबडे । आकाश तुटोनियां पडे । तरी नामस्मरत्याकडे । भय बापुडें कैंवी निघे ॥ ८३ ॥ ऐकतां रामनामगोष्टी । विघ्नें पळती बारा वाटीं । भिवों नको वो गोरटी । सुखसंतुष्टी श्रीरामें ॥ ८४ ॥ उदरा यावया श्रीरघुनाथ । निजसामर्थ्यप्रतापवंत । प्रवेशला दशरथाआंत । नामीं भावार्थ तेणें त्यासी ॥ ८५ ॥ ऐशीं दोघें करितां गोष्टी । मीनें मीना जिंणोनि हाँटीं । दोघांसहित घेवोनि पेटी । उठाउठीं निघाला ॥ ८६ ॥ ब्रह्मयासी पुसे रावण । कौसल्यालग्नसमय कोण । आजिचें होतें संधान । लागलें लग्न दशरथासीं ॥ ८७ ॥ ऐकोनि ब्रह्मयाची मात । रावण खदखदां हांसत । पहा हो सत्यलोकनाथ । असत्य वदत मजपासीं ॥ ८८ ॥ सत्यलोकीं मज असतां । असत्य मानिसी लंकानाथा । तरी ब्रह्मलिखितार्थ । तुज तत्त्वतां कळलें नसे ॥ ८९ ॥ म्यां केला दशरथाचा घात । कौसल्या घातली समुद्रांत । आतां लग्नीं कैंचा दशरथ । वचन असत्य न मानें ॥ ९० ॥ जिणें मरणें भगवत्सत्ता । ते तुज आली लंकानाथा । म्हणसी म्यां मारिलें दशरथा । हें तत्त्वतां असत्य होय ॥ ९१ ॥ ऐसी वक्रोक्ति ब्रह्मवचन । ऐकोनि कां दशानन । पेटी आणोनि पाहे आपण । तंव दोघां जणां देखिलें ॥ ९२ ॥ प्रथम निघतां दशरथ । दचकला तो लंकानाथ । त्याचा करावया घात । शस्त्रा हात घातला ॥ ९३ ॥ पुढां देखोनि रावण । दशरथा आलें स्फुरण । दहा कंठ विंशति नयन । भुई पाडीन करघातें ॥ ९४ ॥ ते काळीं श्रीरघुनाथ । पूर्णप्रतापें दशरथाआंत । यालागीं रावणा नाहीं भीत । निःशंकित पुरुषार्थे ॥ ९५ ॥ निःशंक देखोनि दशरथ । रावण तद्वंधीं उद्यत । मंदोदरी आली तेथ । निवारीत रावणा ॥ ९६ ॥ त्यासी नेवोनि एकांता । बुद्धि सांगे लंकानाथा । मारूं जातां दशरथा । तूं अपघाता पावसी ॥ ९७ ॥ पेटी आणोनि अकस्मात । आतांचि निघाला दशरथ । तैसाचि निघालिया रघुनाथ । मरण प्राप्त रावणा ॥ ९८ ॥ ऐसी ऐकतां गोष्टी । रावण भय घे पाठीं पोटीं । डोळां देखतांचि पेटी । रामभयें पोटीं चळीं कांपे ॥ ९९ ॥ दशरथलग्ना करितां विघ्न । रावण जाला अति उद्विग्न । दाही मुखें हीन दीन । कंपायमान भयभीत ॥ १०० ॥ बुद्धि सांगितली रावणासी । कांहीं न चले होणारासी । कौसल्येसहित दशरथासी । अयोध्येसी धाडीं वेगीं ॥ १ ॥ कौसल्या आणि दशरथासी । मारितां न मारवे आम्हांसी । ठेवों नये गा लंकेसीं । अयोध्येसी धाडवीं वेगीं ॥ २ ॥ अन्यथा करूं जातां आपण । यांसी सर्वथा न ये मरण । रावणा मानलें वचन । वेगीं विमान आणविलें ॥ ३ ॥ आणोनियां विमानासी । कौसल्यायुक्त दशरथासी । विमानीं बैसवोनि दोघांसी । अयोध्येसी स्वयें धाडी ॥ ४ ॥ राजा बुडाला समु-

१ अत्यानंद. २ कौतुकानें. ३ सूर्य. ४ सुटका. ५ हे सुंदरी. ६ जिंकून. ७ आवेशानें ८ ब्रह्मदेव. ९ वीस.

१० त्याचा वध करण्याला. ११ विपरीत.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

द्रांत । अयोध्यानगरीं अति आकांत । तंव तेथें आला दशरथ । कौसल्येसहित सुलग्न ॥ ५ ॥ राजा आला देखोनि नगरीं । निशाणें त्राहाटिल्या भेरी । गुढिया मखरें घरोघरीं । नरनारीआल्हाद ॥ ६ ॥ ऐसा पूर्वील वृत्तांत । मंदोदरी सांगे साद्यंत । रावणा तूं कां होसी भ्रांत । होणारार्थ चुकेना ॥ ७ ॥ ऐसें शिकवोनि रावणासी । सांडवूनि सीताप्रलोभासी । हातीं धरोनियां त्यासी । निजभुवनासी चालविला ॥ ८ ॥ एका जनार्दना शरण । कौसल्यादशरथांचें लग्न । परम गोड रामायण । निरूपण स्वयें वदवी ॥ ९ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां दशरथकौसल्याविवाहकथनं नाम नवमोऽध्यायः ॥ ९ ॥ ओंव्या ॥ १०९ ॥ श्रीसीतारामचंद्रार्पणमस्तु ॥

अध्याय दहावा

श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ॥ रावणें भेडसावितां सीता । त्याच्या पत्न्या ज्या समस्ता । आश्वासिती श्रीरामकांता । नेत्रवक्त्रा खुणावूनि ॥ १ ॥

देवगंधर्वकन्याश्च विषेदू राक्षसीस्तदा ।
ओष्ठप्रकारैरपरा नेत्राकारैस्तथा पराः ॥ १ ॥
सीतामाश्वासयामासुस्तर्जितां तेन रक्षसा ॥ २ ॥

सीतेसी म्हणे स्वयें रावण । माझी भार्या न होतां पूर्ण । तुझा घेईन मी प्राण । नाक कान कापूनी ॥ २ ॥ फोडा इचे दोनी डोळे । वेगें मोडा रे सिसाळें । स्तन कापा मांसगोळे । अंत्रमाळे काढा वेगीं ॥ ३ ॥ तुझिया पातिव्रत्याची थोरी । भीड धरिली सहा मासवरी । आतां भोगीन बलात्कारीं । राम भिकारी वनवासी ॥ ४ ॥ ऐसी गांजितां नानापरी । क्षोभोनि रावणाच्या नारी । आश्वासिती नानापरी । भय न धरीं तूं याचें ॥ ५ ॥ देवी गंधर्वी अति सुंदरी । नागकन्या निशाचरी । आश्वासिती सीता सुंदरी । खुणा करिती तें ऐका ॥ ६ ॥ एकी खुणाविती नेत्रांतरीं । एकींची संज्ञा ओष्ठांतरीं । एकी त्या निवारिती करीं । अंगुष्ठावरी अनेका ॥ ७ ॥ ब्रह्म शाप रावणशिरीं । झोंबों न शके परनारी । याचें कांहीं भय न धरीं । धीर धरीं श्रीरामकांते ॥ ८ ॥ सत्यलोकीं वनप्रदेशीं । रावण झोंबतां उर्वशीसीं । आजी नेम दिधला नलकूबरासी । तूं कां झोंबसी परदारे ॥ ९ ॥ बळें झोंबतां दशानन । उर्वशी करी आक्रंदन । तेथें आला चतुरानन । कोपायमान रावणा ॥ १० ॥ दुष्टा नष्टा लंकानाथा । येथोनि परदारेसीं झोंबतां । पावसील मस्तकपाता । ब्रह्मशापता दुर्लंघ्य ॥ ११ ॥ ज्याचा निजभाव निर्मळ । त्यावरी कृपा करी सकळ । रावणशापाचें निजमूळ । स्त्रियांनीं समूळ सांगितलें ॥ १२ ॥ असो हा मागील वृत्तांत । स्वयें देखे हनुमंत । मंदोदरीयें लंकानाथ । नेला घरांत तें ऐका ॥ १३ ॥

इत्युक्तो भार्यया राजा रावणः शत्रुकर्शनः ।
समादिश्य ततः सर्वा राक्षसीर्निर्जगाम ह ॥ ३ ॥
राक्षस्यो भीमरूपास्ताः सीतां सन्मतिमब्रुवन् ।
पौलस्त्यानां वरिष्ठस्य रावणस्य महात्मनः ॥ ४ ॥
दशग्रीवस्य भार्यात्वं सीते न बहु मन्यसे ।
ततः शूर्पणखा नाम राक्षसी वाक्यमब्रवीत् ॥ ५ ॥
सुरामानीयतां क्षिप्रं सर्वशोकविनाशिनीम् ।
मनुष्यमांसेन समं विभुज्य रसमंततः ॥ ६ ॥
तेन सोन्मादसानंदं नृत्यामश्च निकुंभिले ॥ ७ ॥

मंदोदरीयें नाना युक्ती । कौसल्यादशरथउत्पत्ती । शिकवोनियां लंकापती । निजधामाप्रती नेती जाली ॥ १४ ॥ विटा विक्राळा अति क्रूरी । राक्षसी पाचारिल्या समग्री । रावण त्यांसीं एकांत करी । सीता सती वश्य करा ॥ १५ ॥ भय दाखवावें गाढें । जें भय देखतांच पुढें । वश्य होय मजकडे । तैसीं चांभाडें पसरावीं ॥ १६ ॥ सामदामभेदकरीं । भय दाखवोनियां भारी । वश्य केलिया सीता सुंदरी । कृतोपकारी मी तुमचा ॥ १७ ॥ ऐसा करोनियां एकांत । रावण मंदोदरीसमवेत । निघता जाला निजधामांत । राक्षसी येत परतोनि ॥ १८ ॥ रावणें प्रेरिलिया सत्वरा । विकटा विक्राळा वक्रनेत्रा । मुखें पसरोनियां क्रूरा । सीतेसामोऱ्या धांविन्नल्या ॥ १९ ॥ एकी

---

१ परिपूर्ण, मूळापासून. २ सीतेचा अभिलाष. ३ डोळे व तोंड यांनीं खुणा करून.

४ मस्तक, डोकें. ५ आंतडीं. ६ भयंकर. ७ मोठें. ८ साम, दाम, भेद इत्यादि उपायांनीं.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

जटाकृतधारी । हरितजटा ते दूसरी । विस्तीर्ण कर्ण उदरावरी । स्थूळोदरी विक्राळा ॥ २० ॥ अहिमुखी हयमुखी महामारी । विकटा तिखटा चंडोदरी । आणिक राक्षसी घर्घरी । सीतेवरी धाविन्नल्या ॥ २१ ॥ शूळ पट्टिश मुद्गल लहुडी । शस्त्रें लखलखीत गाढीं । इची करा गे ताडातोडी । भीड येवढी ते काय ॥ २२ ॥ तडतडां तोडोनि मांस नेऊं । इचें काळीज भाजोनि खाऊं । इचे हाडांचे मणी नेऊं । शिरा घेऊं ओरपोनि ॥ २३ ॥ रावणा वरी ना जनकबाळा । हिच्या काढा अंत्रमाळा । वेगें निमटोनि[१] हिचा गळा । खाऊं सगळा वांटूनि ॥ २४ ॥ काढा मारा आणी धरा । हिचीं शतखंडें करा । हाका मारिती दुर्धरा । दशशिरा वरीना ॥ २५ ॥ अवघियांचे शेवटीं । आली शूर्पणखा नकटी । सीता लक्षोनियां दृष्टीं । सांगे गोष्टी फेंफांत ॥ २६ ॥ आईक सीते रावणोत्पत्ती । मुख्य ब्रह्मयाचा पौलस्ती । त्याचा विश्रवा प्रजापती । रावण निश्चितीं तयाचा ॥ २७ ॥ रावण ब्रह्मयाची चौथी पिढी । वेदविभागीं[३] प्रज्ञा[४] गाढी । राज्य प्राप्त चौदा चौकडी । त्यासी तूं वेडी वरिसी ना ॥ २८ ॥ रावण ब्रह्मवंशी ब्राह्मण । श्रीराम सूर्यवंशी क्षत्रिय हीन । त्याची तुज आवड कोण । श्रेष्ठ वर्ण रावणाचा ॥ २९ ॥ रावणसत्ता सुरीं असुरीं । श्रीराम केवळ भिकारी । ऋद्धि सिद्धि रावणा-घरीं । राम फळाहारी वनवासी ॥ ३० ॥ माझा बोल आईक आतां । होईं रावणाची प्रियकांता । दिव्य भोग भोगीं तत्त्वतां । सभाग्य सीता जग मानी ॥ ३१ ॥ सांडोनियां खरवाहन[५] । गजस्कंधीं बैसतां जाण । जग वानी[६] सभाग्यपण । तैसें पर्णन[७] रावणाचें ॥ ३२ ॥ शूर्पणखेचें ऐकोनि वचन । सीता सांडी हेळसून । जैसा हंस न पाहे शेण । तैसें वचन उपेक्षी ॥ ३३ ॥ सीता नेदी प्रतिवचन । शूर्पणखा कोपायमान । हिची जिव्हा कान कापून । रक्त पिईन नळीचें ॥ ३४ ॥ आणा मद्यमैरेयांसी[८] । इचे मांसें करूं उपहारासी । अंगें विभागूं सकळांसी । खाऊं सीतेसी अवघ्याही ॥ ३५ ॥ सीता-मेदमांसमेळें । मद्यासीं येथ चांगलें । खाता आनंदकल्लोळें । नाचूं निकुंबळें[९] गोंधळीं ॥ ३६ ॥

राक्षसी त्या ऐशापरी । भेडसाविती अति दुर्धरी । सीता त्यांचें भय न धरी । श्रीरामचंद्रीं निजबोध ॥ ३७ ॥ न करी रुदन नव्हे दीन । श्रीरामसुखें सुखसंपन्न । राक्षसींचें भयमान । तृणासमान सीतेसी ॥ ३८ ॥ नित्य श्रीरामनाम स्मरतां । सीतादेहीं विदेहता । शंका न मनी देह छेदितां । तोंचि श्लोकार्थी अनुवादे ॥ ३९ ॥

छिन्ना भिन्ना विभक्ता वा दीप्ते वाग्नौ प्रवेशिता ।
रावणायोपतिष्ठेति किं प्रलापेन वा चिरम् ॥ ८ ॥

नांव वैदेही सीता सती । देहभयाची नाहीं भ्रांती । श्रीरामध्यानें भयनिवृत्ती । न मानी क्षितीं देहाची ॥ ४० ॥ छेदा भेदा खा समस्तीं । श्रीराम भोक्ता सर्वां भूतीं । परि नांवें न पाहें लंकापती । स्वप्नस्थितीं स्पर्शेना ॥ ४१ ॥ देह करावा रामार्पण । तुम्हांत सबाह्य श्रीराम पूर्ण । तुम्ही करितांचि भक्षण । ब्रह्मार्पण देह माझा ॥ ४२ ॥ देह ठेवितां कृमि[११] होती । तो लावावा उपकारार्थी । मज भक्षावें तुम्हीं समस्तीं । भोक्ता सर्वां भूतीं श्रीराम ॥ ४३ ॥ देह छिन्नभिन्न करा समस्तीं । अथवा घाला अग्नीप्रती । परी नातळो[१२] लंकापती । जाणा निश्चितीं नेम माझा ॥ ४४ ॥ कराळविकराळवदनाकृती । घर्घर हाका माराल किती । नाहीं वरणें लंकापती । स्वप्नसुषुप्तीं जागृतीं ॥ ४५ ॥ निधडी[१३] देखोनि सीता सती । राक्षसी चळचळां कांपती । हे क्षोभलिया आम्हांप्रती । करील शांती अवघ्यांचि ॥ ४६ ॥ आमुचा द्वेष न करी सीता । सर्वां भूतीं देखे रघुनाथा । रावणआज्ञेसी छळितां । आम्हां समस्तां अवश्य निर्मणें[१४] ॥ ४७ ॥ इचेनि अभिलाषें रावण । सन्निपातें पावेल मरण । ऐशा राक्षसी आपआपण । स्वयें गुणगुण त्या करिती ॥ ४८ ॥

राक्षसी त्रिजटा वृद्धा इतरान्स्वयमब्रवीत् ।
आत्मानं खादतानार्या न सीताभक्षणं हितम् ॥ ९ ॥
स्वप्नोप्ययं मया दृष्टो ह्यशुभो रोमहर्षणः ।
राक्षसानामभावाय भर्तुरस्या भवाय च ॥ १० ॥
श्रुत्वा पप्रच्छ सा भीता त्रिजटां तामिदं वचः ।
अशेषं श्रोतुमिच्छामि तव दुःस्वप्नदर्शनम् ॥ ११ ॥

१ मोव्या पोटाची. २ मोडून. ३ वेदाची खंडें करण्यात. ४ बुद्धि. ५ गाढवावर बसणें. ६ वाखाणी. ७ पाणिग्रहण. ८ दारू, आसव वगैरे. ९ निकुंबलेमध्यें. १० पर्वा. ११ किडे. १२ न शिवो. १३ धैर्यवान्, पराक्रमी. १४ मरणें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

राघवश्च मया दृष्टः संनद्धस्तं महागजम् ।
आरूढः शैलसंकाशं सीतया सहलक्ष्मणः ॥ १२ ॥

देवोनि महाभयगर्जन । करितां सीतेसी तर्जन[1] । वृद्ध त्रिजटा क्षोभोन । कोपायमान बोलत ॥ ४९ ॥ त्रिजटा बिभीषणाची भगिनी । राक्षसी सत्त्वशिरोमणी । क्रूरा राक्षसींतें निवारूनी । सत्यवचनीं अनुवादे ॥ ५० ॥ म्यां केलें असतां शयन । सभाग्य देखिलें म्यां स्वप्न । सीतेसी घालोनि लोटांगण । विरुद्ध वचन न वदावें ॥ ५१ ॥ सीतेसी खाऊं पाहतां राक्षसी । तुम्हीं खावें आपआपणांसी । सीता सती सत्त्वराशी । विरुद्ध इयेसी न वदावें ॥ ५२ ॥ सीता सर्वा भूतीं समान । तुम्हीं कां वदावें विरुद्ध वचन । जानकी जगदंबा परिपूर्ण । वंदा चरण तुम्ही हिचे ॥ ५३ ॥ ऐकोनि त्रिजटेचें वचन । राक्षसी झाल्या कंपायमान । कैसें कैसें देखिलें स्वप्न । कृपा करोन सांगावें ॥ ५४ ॥ स्वप्नीं देखिलें श्रीरघुनाथ । श्वेत गज चौदंत । सीतासमवेत सालंकृत । लक्ष्मणयुक्त गजस्कंधीं ॥ ५५ ॥ चवरें ढाळिती सुरासुर । भाटींव[2] करिती नरवानर । ऋषी करिती जयजयकार । वाद्यें अपार वाजती ॥ ५६ ॥ श्रीरामसीता अभेदस्थितीं । म्यां देखिलीं स्वप्नाप्रती । ते ऐका हो उपपत्ती । यथानिगुतीं सांगेन ॥ ५७ ॥ सूर्यासवें प्रभा संगतीं । चंद्रीं चंद्रिका[3] निवविती । वायूसवें जैसी गती । सीता सती तेंवी रामीं ॥ ५८ ॥ गुळासवें सुस्वादता[4] । कर्पूरासवें सुगंधता । जळासह शीतळता । तैसी सीता श्रीरामीं ॥ ५९ ॥ ऐसा श्रीराम सीता सती । स्वप्नीं देखें मी सभाग्यस्थिती । देखिली रावणाची दुर्गती । तेही उपपत्ती अवधारा ॥ ६० ॥

वराहेण दशग्रीवः शिशुमारेण सत्कृतः ।
उष्ट्रेण च मया दृष्टो रक्तमाल्यानुलेपनः ॥ १३ ॥
प्रयातो दक्षिणामाशां प्रविष्टो गोमये ह्रदे
कुंभकर्ण इंद्रजिच्च सर्वे राक्षसपुंगवाः ॥ १४ ॥
पीत्वा तैलं प्रतप्ताश्च क्रीडतो गोमये ह्रदे ॥ १५ ॥

स्वप्नीं रावण देखिला दृष्टीं । सर्वांगीं शेंदुराची उटी । शेंदूर ओतिला ललाटीं । माळा कंठीं आरक्तपुष्पांच्या ॥ ६१ ॥ दाहीं बोडकीं शिरीं । मसीचा टिळक लाविला नाकावरी । सुसरी रावणातें धरी । अधोद्वारीं न्यावया ॥ ६२ ॥ सवेंचि बैसोनि उष्ट्रांवरी[5] । दक्षिणदिशे गमन करी । सवेंचि देखें सूकरांवरी[6] । वैश्वानरीं[7] क्रीडत ॥ ६३ ॥ गोमयाचे[8] डोहाआंत । स्वेच्छा क्रीडे लंकानाथ । आणिक स्वप्नींचा वृत्तांत । अतिअद्भुत तो ऐका ॥ ६४ ॥ इंद्रजित ससैन्य कुंभकर्ण । करोनियां तैलपान । गोमय[9]ऱ्हदीं क्रीडती नग्न । उन्मज्जनीं निमज्जनीं ॥ ६५ ॥ रावणनिद्रागृहावरी । वीज पडलीं एकसरीं । ऐसें देखिलें स्वप्नांतरीं । रावणावरी दुश्चिन्ह ॥ ६६ ॥ यालागीं सभाग्य सीता सती । तुम्हीं वंदावें सत्त्ववृत्तीं । ऐकोनि त्रिंजटा[10]वदंती । गेल्या समस्ती ओसरोनी[11] ॥ ६७ ॥ हनुमान म्हणे त्रिजटा भली । राक्षसी हे सात्त्विक देखिली । अतियुक्त बोलिली बोली । साह्य झाली सीतेसी ॥ ६८ ॥ सीता सभाग्य अशोक । अशोकवनीं बैसली देख । लौकिक रीतीं करी दुःख । तें कौतुक अवधारा ॥ ६९ ॥

राक्षसीवशगा याहं भर्त्स्यमाना सुदारुणम् ।
नाहं शक्ष्ये परित्यक्तमात्मच्छंदेन जीवितम् ॥ १६ ॥
मोघं चरित्वा च तपो व्रतं च
त्यक्ष्यामि चेज्जीवितमत्यनल्पम् ।
विषस्य दाता तु न मेऽस्ति किंचि-
च्छस्त्रस्य वा वेश्मनि रावणस्य ॥ १७ ॥
इहस्थां मां न जानीते शंके लक्ष्मणपूर्वजः ।
हतेति का मां गत्वा च राघवाय निवेदयेत् ॥ १८ ॥

रावणाचे बंदींत मी येथ । राक्षसींअधीन वनांत । स्वयें देवों न शके जीवित । रक्षण समस्त राक्षसी ॥ ७० ॥ राक्षसी असतां राखणी । जीव तों न देववे माझेनी । मज येथें विष देतें कोणी । रावणजाचणी चुकती माझी ॥ ७१ ॥ शस्त्र घालावें म्यां पोटीं । तंव शस्त्रदाता न दिसे दृष्टीं । श्रीरामें सांडिली माझी गोष्टी । थोर संकटीं मी पडिलें ॥ ७२ ॥ रावणें हिरोनि वेगेंसीं । मज आणिलें लंकेसी । हें ना कळलें श्रीरामासी । म्हणोनि लागेसी[12] न पवेचि ॥ ७३ ॥ मज राखिलें लंकेसीं । ऐसें कोण सांगे श्रीरामासी । अमित पुण्य

१ उपहास. २ वर्णन. ३ चांदणें. ४ गोडी. ५ उटावर. ६ डुकरावर. ७ अग्नींत. ८ शेणाच्या.

९ शेणाच्या डोहांत. १० त्रिजटेचें बोलणें. ११ परतून. १२ शोधाला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

आहे त्यासी । संख्या पुण्यासी असेना ॥ ७४ ॥ अन्नदान उदकदान । सामवेदाचें अध्ययन । द्विजबंधमोचन[१] । शुद्धी समान न येती ॥ ७५ ॥ कोटि अर्बुदें राजसूययज्ञ । ग्रहणीं कोटिगोदान । सुवर्णपूर्ण धरादान । शुद्धी समान नव्हेती ॥ ७६ ॥ सीताशुद्धीचें उत्तर एक । श्रीरामासी परम सुख । ब्रह्मज्ञान त्यापुढें रंकें[२] । होय अल्पक निजमोक्ष ॥ ७७ ॥ श्रीराम पावे परम सुख । भ्रांतिगत मोक्ष न ये तुकें[३] । ब्रह्मज्ञान तैसेंचि देख । यज्ञदानादिक कोण पुसे ॥ ७८ ॥ माझें व्रत तप दान शीळ । मी पतिव्रता निर्मळ । माझीं मजचि नव्हेती सफळ । झालीं निष्फळ रामेंवीण ॥ ७९ ॥ घाटां[४] पडलिया हिरवा चणा । घाटा दिसे परी नाहीं दाणा । तैसें निष्फळ व्रत तप दान । रघुनंदनावाचोनी ॥ ८० ॥ श्रीराम पुरुष प्रकृति सीता । जो करी नित्य याची ऐक्यता । तो पुण्यपुरुष याहीपरता । नाहीं सर्वथा तिहीं लोकीं ॥ ८१ ॥ त्याचेनि सुखी इहलोक । त्याचेनि सुखी परलोक । त्याचेनि पितरां मोक्षसुख । शिवादिक तेणें सुखी ॥ ८२ ॥ सीतेसी श्रीरामाची गोष्टी । त्या मज होतील पुण्याच्या कोटी । हनुमान नाचे वृक्षसंपुटीं[५] । लाळ घोंटी भेटावया ॥ ८३ ॥ धन्य धन्य सीता गोरटी । अनुवादली गोड गोष्टी । शब्दामृतें कर्ण घोंटी[६] । अर्थ चाटी अक्षरांचा ॥ ८४ ॥ श्रवणीं पडतांचि शब्द । अर्थ न घेतां परम मंद । हनुमंत तदर्थीं अति प्रबुद्ध । अर्थावबोध घुटकोनी ॥ ८५ ॥ बुद्धि स्फुरली हनुमंता । आतां इची भेटी घेतां । विकल्प मानील पैं सीता । आला मागुता रावण ॥ ८६ ॥ तैं होऊनि आला संन्यासी । आतां आला वानरवेषीं । विकल्प रिघालिया सीतेसीं । मग भेटीसीं ठाव कैंचा ॥ ८७ ॥ भेटी न घेवोनि स्वयें जातां । काय सांगू श्रीरघुनाथा । दुरूनि देखिली म्यां सीता । हेंही सांगतां मूर्खत्व ॥ ८८ ॥ जो तो पुसेल हनुमंता । कैसी काय बोलिली सीता । काय सांगावें समस्तां । वानरनाथा सुग्रीवा ॥ ८९ ॥ एकांतीं श्रीराम आपण । मज पुसेल जे जे खूण । तेव्हां माझें काळें वदन । प्रतिवचन न देववे ॥ ९० ॥ समुद्र लंघोनि हनुमंत । आला गेला अवघें वृथा । वानर टोले देतील माथां । फटमारता करतील ॥ ९१ ॥ सीतेची न घेतां एकांतभेटी । हिच्या न पुसतां गुह्य गोष्टी । मज गेलिया परतटीं । राम जगजेठी क्षोभेल ॥ ९२ ॥

सीतासंदेशरहितं मामितस्त्वरया गतम् ।
निर्दहेदपि काकुत्स्थः क्रोधनिर्दग्धचक्षुषा ॥ १९ ॥
यद्यनाश्वास्य गच्छामि शोकेनाभिनिपीडितम् ।
सर्वथा नास्ति संदेहो देहं त्यक्ष्यति जानकी ॥ २० ॥
प्राप्तदोषो भविष्यामि देशस्याकथने महान् ।
यदि चेद्योजयिष्यामि भर्तारं रामकारणात् ॥ २१ ॥
व्यर्थमागमनं तस्य ससैन्यस्य भविष्यति ॥ २२ ॥

एकांतीं न भेटतां सीता । तीतें गुह्यगोष्टी न पुसतां । जरी मी भेटलों श्रीरघुनाथा । काळकृतांत तो क्षोभेल ॥ ९३ ॥ श्रीरामनेत्रींचा क्रोधाग्नी । मज जाळील तत्क्षणीं । भेटी न घेतां सीता जननी । जातां येथूनि प्रमाद ॥ ९४ ॥ राक्षसीं गांजिली हे सीता । रामविरहें अति दुःखिता । तिसी आश्वासन न देतां । प्राण तत्त्वतां सांडील ॥ ९५ ॥ सीतेनें सांडितां प्राण । अवघें खुंटलें रामायण । हेंही अपेश मजचि जाण । श्रीराम पूर्ण क्षोभेल ॥ ९६ ॥ सीतेनें सांडितां प्राणांसी । हेंही अपेश माझे शिरसीं । हें न सांगतां श्रीरामापासीं । महादोषी मी होईन ॥ ९७ ॥ शुभाशुभ यथार्थ[११] वार्ता । सद्गुरूसी न सांगतां । परम दोष शिष्याचे माथां । वंचकेंतां[१२] गुरुद्रोही ॥ ९८ ॥ दुःख नव्हे रघुनाथा । सुख पाहे सती सीता । सुख उपजे श्रीरघुनाथा । युक्ति हनुमंता आठवली ॥ ९९ ॥ न कळतां राक्षसासी । स्कंधीं वाहोनि सीतेसी । स्वयें नेतां श्रीरामापासीं । सुख श्रीरामासी उपजेना ॥ १०० ॥ घेवोनि वानरांचें सैन्य । करीं सज्जोनि धनुष्यबाण । रामें वधावे रावण कुंभकर्ण । सपुत्र प्रधानसैन्येसीं ॥ १ ॥ सोडावी देवांची बांदवडी[१३] । तोडावी नवग्रहांची बेडी । उभवावी रामराज्याची गुढी । कीर्ति चोखडी श्रीरामाची ॥ २ ॥ तेथें मज नेतां सीता सती । एवढी श्रीरामाची कीर्ती । माझेनि होऊं पाहे अपकीर्ती । हे तंव युक्ती न ये करूं ॥ ३ ॥ एवं

१ ब्राह्मणस्त्रीची सुटका. २ अत्यंत क्षुद्र. ३ वजनास ४ शेंगेंत. ५ वृक्षांच्या घनदाट खांद्यांवरून. ६ तृप्त करी. ७ कानांत. ८ संशय. ९ उत्तर, जबाब. १० मोठी चूक. ११ असेल तसी. १२ शठपणानें. १३ बंधन.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

अवश्य भेटावी सीता । तेही भेटी अति गुप्तता । रावणराक्षसीं न देखतां । अति एकांता भेटावें ॥ ४ ॥ मज भेटतां सीतेपासीं । विकल्प धरील मानसीं । पूर्वी छळिलें संन्यासवेषीं । वानरवेषेंसी छळों आला ॥ ५ ॥ विश्वासावया श्रीरामभद्रा । आधीं टाकूं श्रीराममुद्रा । भावार्थ देखोनि सीता सुंदरा । भेटी वानरा ते संधी ॥ ६ ॥ सीताश्रीरामचंद्रां भेटी । सीतामुद्रिकासंवादगोष्टी । अनुपम्य कथाकसवटी । गोड गोष्टी सीतेच्या ॥ ७ ॥ सीतामुद्रिकासंवादकथा । अति गोड त्या हनुमंता । यापुढें फिकेंपण अमृता । सावधानता अवधारा ॥ ८ ॥ याचें नाम सुंदरकांड । अमृतापरीस गोड । पुरवी ब्रह्मज्ञानाचें कोड । करी निवाड श्रोतयां ॥ ९ ॥ एका जनार्दना शरण । गोडिया गोड निरूपण । कथा नव्हे हें ब्रह्म परिपूर्ण । समाधान जीवाशिवा ॥ १० ॥ करितां कथानिरूपण । जीवाचें उडे जीवपण । शिवाचें झडे शिवपण । ब्रह्म परिपूर्ण कोंदाटे ॥ १११ ॥ इति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां सीतानुतापो नाम दशमोऽध्यायः ॥ १० ॥ ओंव्या ॥ १११ ॥ श्लोक ॥ २२ ॥

अध्याय अकरावा

श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ॥ सवेग भेटी श्रीरामकांता । परम आल्हाद हनुमंता । तिच्या निरपेक्ष एकांता । वृक्षाआंतौता बैसला ॥ १ ॥ स्वस्थानीं राक्षसी समस्ता । स्वभावें जाहलिया निद्रिस्ता । अशोवृकक्षातळीं सीता । सावधानता बैसली ॥ २ ॥ म्हणे मज नाहीं पापकर्मपरता[१] । आणि कां भोगितें दुःखावस्था । वृथा लक्ष्मणाभिशापता[२] । तेणें पापें लंकेशा आतुडलें ॥ ३ ॥ लक्ष्मणाची मर्यादारेखा । म्यां उल्लंघितां देखा । अंतरोनि श्रीरामसखा । त्या दशमुखा आतुडलें ॥ ४ ॥ छळूं जातां श्रीरामभक्ता । मुकलें मी श्रीरघुनाथा । हें पाप माझे माथां । दुःखावस्था मी केली ॥ ५ ॥ अवज्ञा केली म्यां पापिणी । रावण म्हणे होय पत्नी । म्यांच केली खोटी करणी । श्रीरामस्वप्नीं मी न देखें ॥ ६ ॥ छळणपाप सबळ जनीं । त्या पापाची पाहे पां करणी । श्रीरामशब्द नायकें कानीं । श्रीराम स्वप्नीं न देखे ॥ ७ ॥ यालागीं कोणाचेंही छळण । प्राणांतींही न करावें आपण । छळणाचें पाप पूर्ण । आपलें आपण मी भोगीं ॥ ८ ॥ छळणपापाचे पातकीं । कैसी अनुतापली जानकी । बैसोनियां एकाकी । पुढील श्लोकीं अनुवादे ॥ ९ ॥

नूनं सकालो मृगरूपधारी
ममाल्पपुण्येन समागतोऽभूत् ।
मोहान्मया तत्र तदा नियुक्तो
रामानुजो लक्ष्मणपूर्वजश्च ॥ १ ॥
जितात्मनो महाज्ञाना येषां नास्ति प्रियाप्रियम् ।
प्रियाप्रियविमुक्तानां प्रपश्याम्यहमात्मना ॥ २ ॥

निश्चयें मानलें निजनिष्ठा । मृग नव्हे तो कळिकाळकांटा । तिघां केल्या तीन वाटा । हेंही कटकटां म्यां केलें ॥ १० ॥ मृगरूपी केवळ काळ । माझा लोभ तो काळवेळ । खवळोनियां तत्काळ । मज म्यांचि केवळ नाडिलें ॥ ११ ॥ माझिया लोभाची कुबुद्धि मोठी । मृगलोभाच्या सलोभ दृष्टीं । म्यां राम धाडिला मृगापाठीं । तेव्हांचि करंटी मी झालें ॥ १२ ॥ करंटी बुद्धि वाणली कैसी । लक्ष्मण रक्षण सत्त्वराशी । रामें ठेविला मजपाशीं । म्यां छळूनि त्यासी दवडिलें ॥ १३ ॥ लक्ष्मण न मानी अल्प छळणासी । माझी पापबुद्धि कैसी । एकला राहतोसी मजपासीं । रामपत्नीसी भोगावया ॥ १४ ॥ धांवण्या न जासी रामापाशीं । स्वयें भोगावया सीतेसी । तूं काय येथें राहतोसी । ऐशा वँक्रोक्तीसीं छळियेलें ॥ १५ ॥ ऐकोनि माझी पापगोष्टी । बोटें घातलीं कर्णपुटीं । लक्ष्मण पळे उठाउठीं । ऐसी मी खोटी पापिणी ॥ १६ ॥ श्रीरामआज्ञे लक्ष्मण । असतां मजपाशीं संरक्षण । तो रामआज्ञा उल्लंघून । छळोन परता म्यां दवडिला ॥ १७ ॥ श्रीरामआज्ञा उल्लंघितां । भेटणें ठेलें रघुनाथा । आतडोनियां लंकानाथा । दुःखावस्था तेणें पापें ॥ १८ ॥ लक्ष्मण सर्वत्र सुमित्र । तो म्यां छळोनि केला कुमित्र । तेणें पापें दशवक्त्र । मज अपवित्र झोंबला ॥ १९ ॥

१ वानररूपानें. २ लक्षपूर्वक. ३ पापाविषयीं आसक्ति. ४ लक्ष्मणाला वर्मी बोलणें. ५ सांपडलें. ६ फसवून घेतलें.

७ वाईट शब्दांनीं. ८ राहिलें, बंद पडलें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

धन्य लक्ष्मणाची मर्यादारेखा । नुलंघवेचि दशमुखा । ते म्यां उल्लंघितां देखा । दुःखशोका पावलें ॥ २० ॥ श्रीराम पाठविला मृगाचे पाठीं । हेचि माझी बुद्धि खोटी । तेणें रामीं पडली तुटी । दुःखकोटी मज प्राप्त ॥ २१ ॥ व्रतारापासीं स्वयें मागणें । हेंचि स्त्रियांचें निंद्य जिणें । तेणेंचि निंद्यत्वें मज रावणें । धरोनि आणिलें लंकेसी ॥ २२ ॥ लोभें मागतां मृगकांचोळी । माझ्या व्रतासी जाहाली होळी । श्रीराम अंतरला महाबळी । दुःखसमेळीं निजलोभें ॥ २३ ॥ श्रीराम केवळ आत्माराम । लक्ष्मण सबाह्य निष्काम । लाभ अलाभ दोन्ही सम । देहीं आराम निर्द्वंद्व ॥ २४ ॥ लाभालाभीं समान । ते निंधडे रामलक्ष्मण । त्यांसी माझें लोटांगण । अनन्य शरण मी त्यांसी ॥ २५ ॥ देखोनि अनुतापिनी सीता । कृपा उपजली हनुमंता । श्रीराममुद्रिका होय टाकिता । दुःखावस्था शमावया ॥ २६ ॥ श्रीराममुद्रेचा बडिवार । दुःख निर्दाळी समग्र । सुख द्यावया अपरंपार । सच्चिन्मात्र श्रीराममुद्रा ॥ २७ ॥ दीपिका जेंवी अंधार । श्रीराममुद्रा क्लेश ग्रासी समग्र । खँद्योत करी रवि चंद्र । प्रकाशवंत राममुद्रा ॥ २८ ॥ श्रीराममुद्रा प्रकाशवंत । सीता देखोनि अकस्मात । स्वयें जाहली विस्मित । कैसेनि एथ ही आली ॥ २९ ॥

रामनामांकितं दिव्यं श्रीरामस्यांगुलीयकम् ।
सुवर्णस्य सुवर्णस्य सुवर्णस्य च भामिनी ॥ ३ ॥
गृहीत्वा प्रेक्षमाणा सा निभर्तुर्विभूषणम् ।
नेत्रे प्रहर्षजं वारि समुद्भूतमधोमुखी ॥ ४ ॥
भर्तारमिव संप्राप्तं जानकी मुदिताभवत् ।
कुशली यदि काकुत्स्थो लक्ष्मणेन यवीयसा ॥ ५ ॥
किन्न लंकां समासाद्य मोचयेन्मामिह स्थिताम् ॥ ६ ॥

सुवर्णमुद्रा वरी सुवर्णवर्ण । श्रीरामसंगें शुद्ध सुवर्ण । जानकी स्वयें सुवर्णवर्ण । देखे सुवर्ण मुद्रिका ॥ ३० ॥ मुद्रिकापीठीं पत्रावळी । सहस्रनामप्रभावळी । अक्षरीं अक्षर लिहिल्या ओळी । अक्षरें न्याहाळी जानकी ॥ ३१ ॥ अक्षरीं निबद्ध मुद्रिका । दशावतारांची टीका । जडिंतपाचीमाणिका । सुखदायका सीतेसी ॥ ३२ ॥ मुद्रिकागर्भ अति पवित्र । त्याहीमाजी सार परात्पर । श्रीरामनामें निरक्षर । चिदचिन्मात्र मुद्रिका ॥ ३३ ॥ ऐसी देखोनि मुद्रिका तेथ । सीता जाहली सद्गदित । नेत्रीं आनंदजळ स्रवत । हर्षयुक्त जानकी ॥ ३४ ॥ मुद्रिका शोभे नामेंकरीं । श्रीरामनाम मुद्रिकेवरी । श्रीराम मुद्रिके सबाह्य अंतरीं । सीता सुंदरी स्वयें देखे ॥ ३५ ॥ देखेंतांचि चमत्कार जाहला । स्वयें श्रीरामचि आला । सीतेसी ऐसा भाव गमला । सरसावला अंचॅळू ॥ ३६ ॥ श्रीराम आला एकाएकीं । लाजें जाहली अधोमुखी । सर्वांगें हर्षली जानकी । सुखोन्मुखी डुल्लत ॥ ३७ ॥ केउता आहे लक्ष्मण । दुष्ट दुरुक्तें केलें छळण । त्याचे केशीं झाडीन चरण । त्यासी लोटांगण घालीन पैं ॥ ३८ ॥ सावध होतांचि देखा । पुढें देखिली अंगोळिका । ओळखोनि श्रीराममुद्रिका । प्रेमोन्मुखा जानकी ॥ ३९ ॥ पहिली वंदिली निढँळीं । मग आलिंगिली हृदयकमळीं । स्वानंदें चुंबी जनकबाळी । सुखें वेल्हाळी आलीसी ॥ ४० ॥ म्हणोनि घातलें लोटांगण । बैस करूं दे चरणक्षाळण । तुझें तीर्थ मी सेवीन । करीन संवाहन चरणांचें ॥ ४१ ॥ तूं माझी सखी श्रीराममुद्रा । घालूं सेजे करिसी निद्रा । श्रमलीस उतरतां समुद्रा । आणि गिरिवरां उल्लंघितां ॥ ४२ ॥ न म्हणे अचेतन सचेतन । भक्तिप्रेम संपूर्ण । तेणें हनुमंतासी आलें रुदन । करी स्फुंदन वृक्षाआड ॥ ४३ ॥ आम्ही म्हणतों भक्त । परी प्रेम नाहीं पोटाआंत । जानकीप्रेमें सदोदित । हिरीं रघुनाथ तुष्टला ॥ ४४ ॥ अचेतनीं प्रेमपान्हा हो । हा कोणासीं नाहीं सद्भावो । हिरीं तुष्टला श्रीरामरावो । वंद्य स्वयमेवो सर्वांसी ॥ ४५ ॥ सगुण निर्गुण सद्गुरु भक्त । जो वंदितो तो होय मुक्त । जो निंदितो त्या नरक प्राप्त । देवशास्त्रार्थ गर्जती ॥ ४६ ॥ मुद्रिका देखतांचि दृष्टीं । अत्यानंद मानी गोरटी । सीता सप्रेम पुसे गोष्टी । अवस्था पोटीं जे वर्ते ॥ ४७ ॥ कुशल असतां रामलक्ष्मण । माझी कां न करिती सोडवण । करावया नाहीं आंगवण । दुर्धर बाण असोनी ॥ ४८ ॥ सुटलिया श्रीरामाचे बाण ।

१ धैर्यवान्. २ सत्यज्ञानस्वरूपमय. ३ काजवा. ४ पाच आणि माणकें जडलेली, ५ जडचैतन्यस्वरूपी. ६ पदर. ७ मस्तकावर. ८ सखीप्रमाणें. ९ निर्जीव. १० सजीव.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

शोषोनि टाकितील समुद्र संपूर्ण । सकुळ निवटोनि रावण । माझी सोडवण कां न करी ॥ ४९ ॥ त्या दोघां वीरीं टाकिली सृष्टी । हे न सांगवे दुःखकोटी । यालागीं सुचली मौनदृष्टी । सज्ञान मोठी तूं होसी ॥ ५० ॥ श्रीराम गेला परलोकता । तूं मज मूळ आलीस आतां । तो जरी स्वस्थ असता । मज सोडविता निमेषार्धें ॥ ५१ ॥

जानासि त्वं प्रिये रामं किंवा शत्रुघ्नपूर्वजम् ।
जीवतौ तौ न कुर्यातां कथं हि मम मार्गणम् ॥ ७ ॥
नूनं मृतौ मे शोकेन तौ वीरौ रामलक्ष्मणौ ।
न्यस्तं शस्त्रमुभाभ्यां हि गतौ सुपरमां गतिम् ॥ ८ ॥
अथवा राक्षसेंद्रेण रावणेन दुरात्मना ।
व्यापादितौ स्नानपानाशनकर्माणि कुर्वतौ ॥ ९ ॥
अथवा न्यस्तशस्त्रौ तौ वने मूलफलाशिनौ ।
भ्रातरौ हि नरश्रेष्ठौ चरंतौ वनगोचरौ ॥ १० ॥

मुद्रिके तूं सांगें गोष्टी । रावणें मातें हरिल्यापाठीं । दोघे येवोनि पंचवटीं । अति संकटीं काय केलें ॥ ५२ ॥ मज न देखतां पर्णकुटीं । दोघे जाहले कडेलोटी । अथवा शस्त्रें घातलीं पोटीं । केले संकटीं गळां फास ॥ ५३ ॥ किंवा लोकलज्जे लाजले । दोघे विष घेवोनि निमाले । किंवा माझ्या शोकें मूर्च्छा पावले । कीं विकळ होतां गेले प्राण त्यांचे ॥ ५४ ॥ सीता सीता आक्रंदोनी । प्राण सांडिले दोघे जणीं । नातरी मागतां पाणी । ताहना फुटोनि निमाले ॥ ५५ ॥ माझेनि दुःखें दुःखी प्रबळ । आहार त्यजिला फळमूळ । दोघां भरोनियां तेरळ । प्राण तत्काळ सांडिले ॥ ५६ ॥ पर्वतपाठारीं प्रचंड धोंडीं । दोघीं घातलिया मुरकुंडी । तेथें वाळोनि जाहली करवंडी । दुःखनिर्वंडीं निमाले ॥ ५७ ॥ विजनीं मूर्च्छित पडिले । कीं वृकव्याघ्रीं ते फाडिले । किंवा सिंहें विभांडिले । कीं रगडिले वनगजीं ॥ ५८ ॥ किंवा गिळिले मत्स्यसुसरीं । कीं बुडाले असती सागरीं । अथवा रिघतां राहिले विवरीं । तरसीं तगरीं भक्षिले ॥ ५९ ॥ ते तों महावीर निधडे । सिंह व्याघ्र काय बापुडे । शार्दूळ पळती तयांपुढें । केलें कुंडें रावणें ॥ ६० ॥ रावणें छळोनि केलें घाता । स्नानतर्पण संपादितां । अथवा फळमूळ भक्षितां । दोघां निद्रिस्तां मारिलें ॥ ६१ ॥ देखतां श्रीरामाचा बाण । रावण भयें पलायमान । श्रीराम नित्य सावधान । त्यासी छळण चालेना ॥ ६२ ॥ विश्वामित्रयागाप्रती । श्रीराम सावध अहोरात्रीं । सुबाहूच्या छळणोक्ती । त्यासी रघुपतीं मारिलें ॥ ६३ ॥ छळावया सुंदरपणें । शूर्पणखा आली आपण । तिचें केलें विटंबण । न चले छळण रामासीं ॥ ६४ ॥ माझेनि दुःखशोकें जाणा । स्वयें रामें सोडिलें प्राणा । येरवीं निवटोनि रावणा । माझे सोडवणा येता कीं ॥ ६५ ॥ श्रीरामभातां दुर्धर शर । निवटून दुष्ट निशाचर । शोषोनियां महासागर । नरवानर येते कीं ॥ ६६ ॥ वर्षोनियां बाणजाळीं । लंकेची करोनियां होळी । रावण निर्दाळोनि समूळीं । जनकबाळी सोडविता ॥ ६७ ॥ विराधें लावितांचि हात । एकेंचि बाणें केला घात । श्रीराम असतां जीवें जीत । लंकानाथ निर्दाळिता ॥ ६८ ॥ चवदा सहस्र राक्षसगण । त्रिशिरा मारिला खर दूषण । त्यासी मारितां रावण । अर्धक्षण न लगे पैं ॥ ६९ ॥ श्रीराम सहजें उदासी । रावणें हरितां स्त्रियेसी । न्यस्तशस्त्र जाहला संन्यासी । वनवासीं विचरत ॥ ७० ॥ संन्यासियासी स्वभावतां । धरूं नये देहाची ममता । करूं नये स्त्रियेची चिंता । तुटली कथा धांवण्याची ॥ ७१ ॥ संन्यासधर्मे स्वभावतां । अभयदान दिधलें भूतां । आतां वधूं नये लंकानाथा । खुंटली कथा लंकेची ॥ ७२ ॥ अथवा आणिक आहे गुज । श्रीराम आत्माराम सहज । रावणें हरितांचि भाजं । समाधिसेजे प्रवेशला ॥ ७३ ॥ समाधिसुखें स्वभावतां । कैंचा राम कैंची सीता । रावणें हरिली माझी कांता । हेंही रघुनाथा नाठवे ॥ ७४ ॥ समाधिसुखें सुखसंपन्न । मिथ्या हें प्रपंचाचें भान । मिथ्या श्रीराम रावण । धांवण्या कोण येथें धांवे ॥ ७५ ॥ मुद्रिके सत्य सांग मजपासीं । श्रीराम तरी जाहला संन्यासी । अथवा समाधिसेजेसीं । किंवा देहासी त्यागिलें ॥ ७६ ॥ मुद्रिके मौनाचें लक्षण । निमाले श्रीरामलक्ष्मण । हेंचि तुझें मौनवचन । अति सावधान

---

१ ओरडून. २ भ्रम. ३ दुःखातिशयानें. ४ निर्जनप्रदेशीं. ५ लांडगे व वाघ यांनीं. ६ वाघ. ७ खोटें कृत्य. ८ जीवंत. ९ शस्त्रें टाकिलीं आहेत असा. १० स्त्री. ११ मृत्यू पावले.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

निजमौनें ॥ ७७ ॥ अबोलणें ज्याचे ठायीं । त्याचिया ज्ञाना मर्यादा नाहीं । तें तंव वर्ततें तुझे ठायीं । वानूं कायी गुण तुझे ॥ ७८ ॥ माझी वस्ती वामभागीं । तूं वर्तसी दक्षिणांगीं । श्रीरामाचे अंगसंगीं । तूं सर्वांगीं सर्वज्ञ ॥ ७९ ॥ सद्गुरुअंगींचें अचेतन । मिथ्या न मानी सीता सज्ञान । तिचें न करीच हेळण । उपेक्षण न करीचि ॥ ८० ॥ श्रीराममुद्रा अचेतन । तीस देवोनि अति सन्मान । मृदु मंजुळ विनवून । काय आपण पुसतसे ॥ ८१ ॥ कैसेनि चालवलें वाटा । कैसेनि उल्लंघवलें घांटा । समुद्र तरोनि दुस्तर मोठा । कैसेनि परतटा आलिसी ॥ ८२ ॥ मज संबोखावया[1] येथें । तुज काय धाडिलें श्रीरघुनाथें । ऐसें बोलत बोलत तेथें । पडे मूर्च्छित जानकी ॥ ८३ ॥ सीता पडतांचि मूर्च्छित । हनुमान् जाहला साशंकित । श्रीरामविरहें अति संतप्त । प्राण निश्चित त्यागील ही ॥ ८४ ॥ देखतां श्रीराममुद्रेसी । श्रीराम निमाला वनवासीं । धरोनि हा निश्चय मनासीं । निजदेहासी त्यागील ॥ ८५ ॥ देह त्यागितांचि सीता । श्रीराम म्हणेल हनुमंता । समुद्रलंघन तत्त्वतां । कवण्या अर्था साधिलें ॥ ८६ ॥ मज आलिया लंकेआंत । ना सीता ना रघुनाथ । ओढवला अति अनर्थ । तेणें हनुमंत महादुःखी ॥ ८७ ॥

इति संचिंत्य हनुमांश्चकार मतिमान् मतिम् ।
रामभक्तिष्टकर्माणं सबंधुमनुकीर्तयन् ॥ ११ ॥

सीता पडतांचि मूर्च्छापन्न[2] । हनुमंत मनीं अति उद्विग्न । हृदयीं स्मरतां रघुनंदन । बुद्धि निर्विघ्न आठवली ॥ ८८ ॥ सीता व्हावया सावधान । आतां करूं श्री रामसंकीर्तन[3] । म्हणोनि रामकथागायन । करी आपण मारुती ॥ ८९ ॥ कौसल्यागर्भीं गर्भातीत । दाशरथि श्रीरघुनाथ । परब्रह्म मूर्तिमंत सूर्यवंशीं अवतरला ॥ ९० ॥ श्रीराम परब्रह्म सीता प्रकृती । श्रीराम चैतन्या सीता चिच्छक्ती[4] । श्रीराम धैर्य सीता धृती[5] । श्रीराम अनन्यगती अवतारू ॥ ९१ ॥ श्रीरामाचें आचरित । गुरुपितृआज्ञाविक्रीत । ब्राह्मणाचा निजभक्त । सुरसाह्यार्थ श्रीराम ॥ ९२ ॥ कैकेयीवरदें दशरथें । श्रीराम धाडिला दंडकारण्यातें । सीतालक्ष्मणसमवेतें । निघे रघुनाथ वनवासा ॥ ९३ ॥ वनवास गंगातटीं । वसतिस्थान पंचवटीं । श्रीराम राहिला जगजेठी । सीता गोरटी समवेत ॥ ९४ ॥ शूर्पणखा करी छळण । तें जाणोनि श्रीराम सज्ञान । तिचे घेवोनि नाक कान । विटंबोन सोडिली ॥ ९५ ॥ तिचे कैवारी दारुण । त्रिशिरा मारिला खर दूषण । श्रीरामें घेवोनि जनस्थान । दिधलें दान ब्राह्मणां ॥ ९६ ॥ मृगकंचुकीस[6] लोभतां । मृगापाठीं धाडिलें श्रीरघुनाथा । छळोनि दवडिलें सौमित्रा । हरिली सीता रावणें ॥ ९७ ॥ श्रीराम अणि लक्ष्मण । करितां सीतागवेषण[7] । जटायुरावणेंसीं रण । दोघे जण तेथें आले ॥ ९८ ॥ रथपात छत्रपात । पक्षियें गांजिला लंकानाथ । जटायु रावणें पाडिला तेथ । श्रीरघुनाथ तेथ आला ॥ ९९ ॥ श्रीराम कृपाळु परिपूर्ण । करोनि जटायुउद्धरण । कबंध मारोनियां जाण । आले आपण किष्किंधे ॥ १०० ॥ श्रीरामें निर्दळोनि वाळीसी । राज्य दिधलें सुग्रीवासी । यौवराज अंगदासी । वानरांसी निजसख्य ॥ १ ॥ तुझे शुद्धीसी निरुतें । श्रीरामें पाठविलें मातें । तुझे भेटीलागीं व्रतें । श्रीरघुनाथें धरियेलीं ॥ २ ॥ शिळीं बांधोनि सागर । सपुत्र प्रधान निशाचर । येणेंसी वधोनि दशशिर । सीता सुंदर उद्धरणें ॥ ३ ॥ विश्वासू न मानील वानरा । म्हणोनि खूण आणिली मुद्रा । सांडोनियां दुःखनिद्रा । भेटें कपींद्रा रामदूता ॥ ४ ॥ ऐकोनि श्रीरामचरित । सीता जाहली सावचित्त । कथानुवाद वृक्षांआंत । अति विस्मित जानकी ॥ ५ ॥ कृपेनें कोंवळा श्रीरघुनाथ । मज आश्वासावया येथ । वृक्ष कथा अनुवादत । आला निश्चित श्रीराम ॥ ६ ॥ वृक्षासी पुसे करोनि नमन । कोण करितो श्रीरामकीर्तन । त्याचें पाहीन मी वदन । लोटांगण त्यासी माझें ॥ ७ ॥ ज्यासी श्रीरामकथेची शैली । त्याच्या चरणींची धुळी । मी वंदीन सुखसंमेळीं[8] । मुख मजजवळी दावावें ॥ ८ ॥ ज्याचे मुखीं श्रीरामकीर्तन । त्याचें मज देखतां

१ शांतवन करण्याकरितां. २ मूर्च्छित. ३ रामाचें गुणवर्णन, ४ ज्ञानशक्ति, ५ धैर्य.

६ सुवर्णमृगचर्माच्या चोळीचा लोभ करून, ७ सीतेचा शोध, ८ मोठ्या सुखानें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वदन । परम सुखसमाधान । कृपा करोन भेटावें ॥ ९ ॥ सीता सप्रेम निजचित्तें । परमोत्कंठ अति भावार्थें । जेणें खूणमुद्रा आणिली येथें । कृपावंतें भेटावें ॥ ११० ॥

तामब्रवीत् महातेजा हनूमान् मारुतात्मजः ।
शिरस्यंजलिमाधाय सीतां मधुरया गिरा ॥ १२ ॥

ऐकोनि सीतेचें वचन । हनुमान् स्वयें उतरून । सीतेसी घाली लोटांगण । मस्तकीं चरण वंदिले ॥ ११ ॥ सीता देखोनियां दृष्टीं । सीतेसी हनुमान निकट भेटी । हनुमंतासी हर्ष पोटीं । आनंद सृष्टीं न समाये ॥ १२ ॥ महानिधीचा लाभ जाहला । क्षीराब्धि चुळोदकें प्राशिला । कीं कळिकाळ जिंकोनियां ठेला । तो पांड जाहला हनुमंतासी ॥ १३ ॥ तेणें हर्षाचेनि मेळें । गडबडां पायांवरी लोळे । आनंदाश्रू स्रवती डोळे । सुखकल्लोळें नाचत ॥ १४ ॥ धांवधांवोनि पायां पडे । सद्गद कंठें सप्रेम रडे । पुच्छा नाचवोनियां पुढें । हर्षें उडे वानर ॥ १५ ॥ येथें सांपडली सीता । कार्यसिद्धी श्रीरघुनाथा । यश आलें हनुमंता । उल्हासतां उन्मत्त ॥ १६ ॥ सीता विचारी हृदयांत । हा म्हणवितो श्रीरामदूत । श्रीरामासी कैंचा हनुमंत । पूर्ववृत्तांत मी जाणें ॥ १७ ॥ श्रीरामलक्ष्मण दोघे वीर । त्यांसवें नाहीं नरवानर । कैंचें नेणों हें वानर । नाना विकार करिताहे ॥ १८ ॥ हा तरी रावण निश्चयेंसीं । पहिलें होवोनि आला संन्यासी । आतां आला वानरवेषीं । न ये यासीं विश्वासों ॥ १९ ॥ परी हा वदतो श्रीरामकथा । कपटी म्हणों नये हनुमंता । मी देखतें स्वप्नावस्था । तेचि सीता अनुवादे ॥ १२० ॥

स्वप्नो मयायं किमु दृश्यते वा
शाखामृगोऽयं मम भागधेयम् ।
स्वप्नोऽपि नायं नहि मेऽस्ति निद्रा
भयेन शोकेन च पीडितायाः ॥ १३ ॥

मज श्रीरामाचें नित्य ध्यान । तेणें मी हें देखें स्वप्न । रामदूताचें आगमन । सर्वथा जाण घडेना ॥ २१ ॥ दुर्गम दुर्ग लंकापुर । आड दुर्धर सागर । अशोकवन अति दुस्तर । केंवी वानर प्रवेशे ॥ २२ ॥ रावण राणिवसांआतां । अशोकवन अति गुप्त । तेथें प्रवेशेला रामदूत । हा सत्यार्थ[४] घडेना ॥ २३ ॥ जरी मी हें मानूं स्वप्न । तरी मी आहें सावधान । नाहीं निद्रा स्वप्न भान । सत्यगमनवानरू ॥ २४ ॥ श्रीरामकथा अनुवादत । धन्य धन्य हा श्रीरामभक्त । माझेनि भाग्यें हनुमंत । आला शुद्ध्यर्थ कैवारी ॥ २५ ॥ मिथ्या म्हणों न ये हनुमंता । जे बोलेल ते सत्य वार्ता । याचिया पूर्ववृत्तांता । पुसों आतां यापासीं ॥ २६ ॥ सीता पुसेल वृत्तांत । सत्य सांगेल हनुमंत । तया कथेचा कथार्थ । मुख्य मोक्षार्थ मुमुक्षां ॥ २७ ॥ श्रोतीं दिधलिया अवधान । कथा होय चैतन्यघन । श्रोतीं कथेसीं निजजीवनें । एका जनार्दन कृपाळू ॥ २८ ॥ एका जनार्दना शरण । सीतामारुतिसंभाषण । हें गोड रामायणीं रामायण । श्रोतीं अवधान मज द्यावें ॥ १२९ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे । सुंदरकांडे एकाकारटीकायां सीताहनुमद्दर्शनं नाम एकादशोऽध्यायः ॥ ११ ॥ ओंव्या ॥ १२९ ॥ श्लोक ॥ १३ ॥

अध्याय बारावा

॥श्रीरामचंद्राय नमः॥ एकाएकीं अशोक वनाआंत । आला देखोनि हनुमंत । त्यासी समूळ वृत्तांत । पुसे साद्यंत जानकी ॥ १ ॥

ततो रामकथां श्रुत्वा वैदेही वानरर्षभम् ।
उवाच वचनं सीता प्रियं मधुरया गिरा ॥ १ ॥
कथं रामेण संसर्गः कथं जानासि लक्ष्मणम् ।
वानराणां नराणां च कथमासीत्समागमः ॥ २ ॥
रामस्य यानि लिंगानि लक्ष्मणस्य च वानर ।
तानि भूयस्त्वामाचक्ष्व न मां शोकः समाविशेत् ॥ ३ ॥

मज वनवासीं असतां । तैं तूं नव्हतासी हनुमंत । कैंचा आलासी तूं आतां । निजवृत्तांता सांगावें ॥ २ ॥ कैसेनि राम देखिला दृष्टीं । तुज रामासीं कैसेनि भेटी । कैशा कैशा केलिया गोष्टी । जेणें पोटीं अति प्रीति ॥ ३ ॥ कैसा बाणला तो वचनार्थ । साधावया श्रीरामकार्यार्थ । हनुमान प्राणेंसीं साह्यभूत । तो गुह्यार्थ मज सांगें ॥ ४ ॥ श्रीराम भेटलिया कैसें सुख । श्रीरामवचनीं कैसें पीयूख । श्रीरामसंगें कैसा हरिख । योगपरिपाक

१ प्रकार, २ बोले, ३ जनानखान्यांत, ४ खरेपणा.

५ शोधार्थ, ६ प्राणधारण, ७ अमृत, ८ आनंद,

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

मज सांगें ॥ ५ ॥ श्रीरामाचें ठाणमाण[1] । रूपरेखा-गुणलक्षण । कैसा आहे लक्ष्मण । जीवींची खूण मज सांगें ॥ ६ ॥ ऐकतां श्रीरामाची कथा । दुःख शोक नाठवे चित्ता । निमे संसारभयव्यथा । कथा ऐकतां आनंद ॥ ७ ॥ याचलागीं तुजप्रती । कथा पुसें मी पुढतपुढती । कथेमाजी निज-विश्रांती । जाण मारुति निश्चित ॥ ८ ॥ केलिया कथेचें श्रवण । नाहीं मनन निदिध्यासन । ते कथा जाय वाळोन । जीवनेंवीण जेंवी धान्य ॥ ९ ॥ श्रद्धें श्रीरामकथाश्रवण । ऐकती त्यांचें निजमहिमान । मननें मन होय उन्मन । अहं विरोन होय सोहम्[2] ॥ १० ॥ चित्त तें होय चैतन्य । बुद्धी समसाम्य समाधान । कर्मचि होय ब्रह्म पूर्ण । इंद्रियाचरण चिन्मात्र ॥ ११ ॥ ऐसी श्रीरामस्वरूपावस्था । सादरें पुसतां पैं सीता । ठकें[3] पडियेलें हनुमंता । कथावार्ता विसरला ॥ १२ ॥ धन्य धन्य हनुमंताचें ज्ञान । करितां श्रीरामाचें कीर्तन । आठवविसरातें गिळोन । सावधान स्वयें जाहला ॥ १३ ॥

एवमुक्तस्तु वैदेह्या हनुमान् मारुतात्मजः ।
ततो रामकथातत्त्वमाख्यातुं च प्रचक्रमे ॥ ४ ॥
देवि रामस्य लिंगानि लक्ष्मणस्य च यानि मे ।
लक्षितानि विशालक्षि तानि वै शृणु तत्त्वतः ॥ ५ ॥

सीता पुसे श्रीरामकथा । तेचि श्रीरामस्वरूप-संस्था । हनुमंत होय सांगता । यथार्थता स्वरूप ॥ १४ ॥ लक्ष्मणाचें निजलक्षण । ठाणमाण गुण-लावण्य । समूळ सांगे आपण । सावधान अवधारा ॥ १५ ॥ सांगावया श्रीरामकथा । उल्लास हनुमंताच्या चित्ता । देखोनि सीतेची सादरता । होय सांगता स्वानंदें ॥ १६ ॥ श्रीराम रूपें अति सुरूप । रूपें जिंकिला कंदर्प । परी तो रूपेंचि अरूप । चित्स्वरूप[4] श्रीराम ॥ १७ ॥ श्रीराम राजीव-लोचन[5] । जगाचे नयनाचें नयन । परी तो देखणा डोळेवीण । देखणेपण हें जानकी ॥ १८ ॥ दृश्य देखणें हें तंव गौण । श्रवणान्तें[6] देखणें नयन । देखण्यास देखणेपण । श्रीराम पूर्ण देखतसे ॥ १९ ॥ कुंडलें वर्णिती साकार । एक म्हणती मकराकार । श्रवणें मावळती विकार । निर्विकार निजलेणें ॥ २० ॥ श्रीरामाचे श्रवण । श्रवणा होती निजभूषणें । श्रवण श्रवणाचें लेणें । श्रवणें देखणें परब्रह्म ॥ २१ ॥ परमार्थाचें निजबीक । निरपेक्ष तें नासिक । तेणेंवीण तें निर्नासिक । कैंचें सुख साक्षेपें ॥ २२ ॥ श्रीरामाची नासिकास्थिती । प्राणिप्राणां नित्यविश्रांती । श्रीरामप्राणें प्राण्यां गती । त्यांसी विश्रांति श्रीराम ॥ २३ ॥ श्रीरामाचा मुखशशांक[8] । नित्यानंद निष्कलंक । ब्रह्मादि देवां सुखदायक । जीवशिवां सुख श्रीराम ॥ २४ ॥ जीवशिव दोन्ही अधरें[9] । श्रीरामअधरीं जाहले सधरें[10] । मिळणीं मिळती एकाकार । शिवसुखेंसार[11] श्रीराम ॥ २५ ॥ श्रीराममुखींची दंतपंक्ती । जेंवी ओंकारामाजी श्रुतीची ही विश्रांती । श्रीराममूर्ती-मुखचंद्र ॥ २६ ॥ श्रीरामाचे निजनिढळीं[12] । सच्चिदानंद हेचि त्रिवळी । त्याचे ललाटभाग्य-मेळीं । लोकीं सकळीं नांदिजे ॥ २७ ॥ प्रेमकेशरस मेळा । टिळक रेखिला पिंवळा । निर्धार अक्षता निढळा । राम प्रेमळा पढियंता ॥ २८ ॥ अहंमृग विंधिला निर्लोभेंसीं । सोहं काढोनि मृगनाभासीं[13] । तेही अर्पिली श्रीरामासी । निजांगासी चर्चोनी ॥ २९ ॥ जन विजन विवंचून । काढिला निजधैर्य-चंदन । त्याचेंही सुगंध काढून । उद्वर्तनें[14] श्रीरामा ॥ ३० ॥ त्यजूनि स्वधर्मकर्मफळा । तेचि मुक्ताफळमाळा । शोभे श्रीरामाच्या गळां । राम प्रेमळां पढियंता ॥ ३१ ॥ ओंकार तोचि [15] कंबुकंठ । तेथोनि वेदांसी वाहती वाट । गर्जती विधिवादें उद्भट । होती प्रकट त्रिकाडीं ॥ ३२ ॥ त्वंपदतत्प-दातीत । हृदयीं पदक सदोदित । साधु चिद्रत्न-जडित । लखलखीत निजतेजें ॥ ३३ ॥ म्हणती कांसे कशिला पीतांबर । श्रीरामकांसे चिंदंबर । झांकी शून्यत्वाचें छिद्र । कांसे अच्छिद्र श्रीराम ॥ ३४ ॥ श्रीरामकांसेसी दृढ भारी । एकपत्नीव्रत-धारी । कांसे लागलियातें तारी । भवसागरीं तारक ॥ ३५ ॥ श्रीराम आकळे सगळा । भक्ति-भावार्थ कटीं मेखळा । क्षुद्रघंटिकाज्वाळमाळा । जाहल्या सकळा ऋद्धिसिद्धि ॥ ३६ ॥ सूक्ष्मम-ध्याची रचना । अभिमान होता पंचानना ।

१ आंगाची ठेवण. २ तो मी. ३ तटस्थपणा. ४ ज्ञान-स्वरूप. ५ कमलनेत्र. ६ कानापर्यंत. ७ सौंदर्य, तेज. ८ मुखचंद्र. ९ कमी. १० आधारयुक्त. ११ शंकराचें सर्व सुख. १२ मस्तकीं. १३ कस्तूरीसह. १४ उटी. १५ शंखाकृति कंठ.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

श्रीराममध्य देखोनि नयना । लाजोनि राना तो गेला ॥ ३७ ॥ पाहतां श्रीराममध्यासी । सिंहाडे जडले मेखळेसी । सर्वस्वें लोभले श्रीरामासीं । जावों रानासी विसरले ॥ ३८ ॥ श्रीरामचरणींची स्थिती । श्रीराम गतीची निजगती । श्रीराम गतीसी विश्रांती । जाण निश्चितीं जानकिये ॥ ३९ ॥ श्रीरामचरणाचें निजभूषण । वांकीनें वेदां आणिलें उणें । ते तंव धरोनि ठेले मौन । रामकीर्तन हें गर्जे ॥ ४० ॥ चहूं वाचा परात्पर । चरणीं गर्जे तोडर । श्रीरामपद चिन्मात्र । श्रीरामचंद्र परब्रह्म ॥ ४१ ॥ लक्षितां श्रीरामाचें ठाणें । त्यासी ठेंगणें गगन । पाहतां श्रीरामाचें मन । पडिलें मौन श्रुतिशास्त्रां ॥ ४२ ॥ पाहतां श्रीरामाचे गुण । सगुण दिसताहे अगुण । श्रीरामें हरिले त्रिगुण । निजनिर्गुण श्रीराम ॥ ४३ ॥ लक्षितां श्रीरामलक्षण । जो लक्षी तो विचक्षण । लक्ष्यॉलक्ष्यविलक्षण । लक्षणालक्षण त्या नाहीं ॥ ४४ ॥ श्रीराममुखींचीं अक्षरें । अमृतापरीस अति मधुरें । सभाग्य सेविती श्रवणद्वारें । आनंदरस भरे सर्वांगीं ॥ ४५ ॥ देखतां श्रीरामाचें मुख । फिकें होय समाधिसुख । स्वप्नींही न देखे दुःख । हरिखें हरिख कोंदाटे ॥ ४६ ॥ कोंदाटलें परब्रह्म । ब्रह्मरूप क्रियाकर्म । हरपले धर्माधर्म । जाहला उपरम वेदवादा ॥ ४७ ॥ ऐसा श्रीराम नेटका । तैसाचि सौमित्र निजसखा । दोघां अभिन्नत्व देखा । भिन्न आवांका दिसताहे ॥ ४८ ॥ घालोनियां लोटांगण । तुज कुशल कल्याण । स्वयें पुसे लक्ष्मण । पुसे कल्याण श्रीराम ॥ ४९ ॥ ऐसें हनुमंतें सांगतां । तटस्थ ठेली श्रीरामकांता । आपआपणा विसरे सीता । हनुमंताचेनि बोलें ॥ ५० ॥ हनुमंतें बोलाआंत । अवघाचि आणिला श्रीरघुनाथ । तेणें सीतेचा मनोरथ । सदोदित स्वानंदें ॥ ५१ ॥ हर्ष न माये पोटीं । संतोषाचिया कोटी । तेणें सुखें सीता गोष्टी । घातली मिठी हनुमंता ॥ ५२ ॥ वानर वदे मनुष्यवाणी । श्रीरामकथा त्याचे वदनीं । जिये कथेच्या श्रवणीं । भवबंधनीं निर्मुक्त ॥ ५३ ॥ ऐकतां वानराच्या गोष्टी । सत्य श्रीरामासी जाहली भेटी । निरसो-नियां दुःखकोटी । ओतिली सृष्टी सुखरूपें ॥ ५४ ॥ हर्षाचिया लवलाह्यां । स्वानंदें पसरोनि बाह्या । आलिंगिलें कपिराया । जेंवी कां माया प्रियपुत्रा ॥ ५५ ॥ सीतेसी सुख जाहलें गाढें । पुत्रसुख तें तृण त्यापुढें । हनुमंत वाडेंकोडें । प्रेमपडिपाडें पढियंत ॥ ५६ ॥

कपे त्वामभिनंदामि चिरंजीवी सुखी भव ।
सानुजः कुशली रामो येन मेऽद्य निवेदितः ॥ ६ ॥
बलेन यशसा चैव वर्धस्व प्रज्ञयापि च ।
शतयोजनविस्तीर्णं सागरं मकरालयम् ॥ ७ ॥
विक्रमेण समुल्लंघ्य मदर्थं प्राप्तवानसि ।
न हि त्वां प्राकृतं मन्ये वानरं वानरर्षभ ॥ ८ ॥
येनायं राक्षसावासस्त्वयैकेन प्रधर्षितः ॥ ९ ॥

श्रीराम भर्ता लक्ष्मण दीर । दोघे सुखसंपन्न वीर । हें ऐकतांचि उत्तर । सुख अपार मज जाहलें ॥ ५७ ॥ श्रीरामस्वरूपाची कथा । जे वद-लासि गा हनुमंता । तेणें सुखें ब्रह्मसायुज्यता । न ये तुकितां तुकासी ॥ ५८ ॥ श्रीरामकथा अनुवादोन । तुवां मज केलें सुखसंपन्न । तुज मी वदेन वरदान । सावधान अवधारीं ॥ ५९ ॥ हनुमंता होईं चिरंजीवी । तेंही जीवित्व ज्ञानानुभवी । नित्य नवें सुखसंभवीं । श्रीरामपदवी वैभवें ॥ ६० ॥ तुज कळिकाळ कांपे चळीं । ऐसा होसी आतुर्बळी । यश पावसी भूमंडळीं नामसमेळीं श्रीरामें ॥ ६१ ॥ निरसो-नियां विज्ञानां । श्रीरामभजनें प्रबुद्ध प्रज्ञा । ज्ञेय मुकलें ज्ञेयपणा । श्रीरामस्मरणाचेनि बळें ॥ ६२ ॥ श्रीरामाचिया स्मरणीं । अपयश निमे तत्क्षणीं । यश न माये त्रिभुवनीं । नामस्मरणीं प्रताप ॥ ६३ ॥ चिरंजीव सुखानुभवी । बळ प्रज्ञा आणि यशस्वी । याहून तुझी अधिक पदवी । देवीं दानवीं देखिजे ॥ ६४ ॥ शतयोजन सिंधु अगाध । तुवां लंघिला जैसें गोष्पद । त्यापुढें कायसें माझें वरद । प्रज्ञाप्रबुद्ध हनुमंत ॥ ६५ ॥ तुज म्हणों नये वानर । सुरासुरां दुर्धर । धांडा-ळोनि लंकापुर । निशाचरें गांजिलीं ॥ ६६ ॥ एकला एक हनुमंत । रावणाचे सभेआंत । राक्षसां

१ सिंह. २ परा, पश्यन्ती, मध्यमा आणि वैखरी. ३ ज्ञान स्वरूप. ४ शरीररचना. ५ लक्ष्य आणि अलक्ष्य यांहून वेगळा.
६ कुंठित झाला. ७ प्रेमभरानें. ८ तुलना करितां येत नाहीं. ९ पराक्रमी. १० नाहींसें करून. ११ प्रापंचिक ज्ञानाला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

करोनि आक्रांत । लंकानाथ गांजिला ॥ ६७ ॥ लंकेमाजी कडोविकडीं । गांजिल्या राक्षसांच्या कोडी । रावणाची सभा उघडी । केली रोकडी तुवां एकें ॥ ६८ ॥ देखतांही दशानन । सभेमाजी घालोनि खांण । तुवां नागविले राक्षसजन । शेखीं रावण गांजिला ॥ ६९ ॥ एवढा करितां आक्रांत । येथें आला हनुमंत । नाहीं कळलें लंकेआंत । ऐसा समर्थ तूं एक ॥ ७० ॥ ऐसा प्रतापिशिरोमणी । पावलासी अशोकवनीं । तूंचि जनक तूंचि जननी । राम घेवोनि शीघ्र यावें ॥ ७१ ॥ तुझी होवोनियां दासी । तुझे चरण झाडीन केशीं । शीघ्र आणावें श्रीरामासी । म्हणोनि पायांसी लागली ॥ ७२ ॥ आलें हनुमंतासी स्फुरण । व्यर्थ कशाला करिसी रुदन । वेगें देईं आपुली खूण । श्रीरघुनंदन आणावया ॥ ७३ ॥ तुज मीं आणिली खूण मुद्रा । तेणें तूं ओळखसी वानरा । खूण देईं श्रीरामचंद्रा । सत्य कपींद्रा मानावया ॥ ७४ ॥ काय करिसी देवोनि खूण । न लगे भाक न लगे आण । मज आठवली युक्ति आन । सावधान अवधारीं ॥ ७५ ॥

पृष्ठमारोह मे देवि मा भूत्कालस्य पर्ययः ।
त्वय्यहं पृष्ठलीनायां संतरिष्यामि सागरम् ॥ १० ॥
शक्तिरस्ति हि मे वोढुं लंकामपि सकाननाम् ।
द्रक्ष्यस्यचैव वैदेहि राघवं सहलक्ष्मणम् ॥ ११ ॥
न हि मे संप्रयातस्य त्वां गृहीत्वा वरानने ।
अनुगंतुं गतिः शक्तिः सर्वलंकानिवासिनाम् ॥ १२ ॥

पृष्ठीं बैसल्या सीता । तेचि क्षणीं श्रीरघुनाथा । तुज भेटवीन आतां । विलंब वृथा करूं नको ॥ ७६ ॥ शुद्धि सांगावया श्रीरघुनाथा । तुज येथें सांडोनि जातां । राक्षसीं केलिया तुझ्या घाता । शुद्धि वृथा होईल ॥ ७७ ॥ येथें मजचि देखतां । रावण वधूं आला होता । दैवें चुकविलें अनर्था । सांडोनि जातां मज नये ॥ ७८ ॥ शूर्पणखा केली नकटी । तुझा राग तिचे पोटीं । तुज मारील उठाउठीं । महा खोटी राक्षसी ॥ ७९ ॥ सांडोनि जाणें न घडे गोष्टी । वेगीं बैसें माझे पृष्ठीं । करीन श्रीरामासीं भेटी । विकल्प पोटीं धरूं नको ॥ ८० ॥ लंका त्रिकूट कनकगिरी । उपडोनि आपुलें बळेंकरीं । एकें उड्डाणें समुद्रीं । नेईन पैलतीरीं जानकीये ॥ ८१ ॥ करोनि एकचि उड्डाण । भेटवीन रामलक्ष्मण । वाहतों श्रीरामाची आण । करीं आरोहण पृष्ठभागीं ॥ ८२ ॥ तुज म्यां नेतां अति त्वरेंसीं । राक्षसमहावीरशूरांसी । वेगें न येववेल मजपासीं । त्या मशकांसी काय ठावें ॥ ८३ ॥ आलिया इंद्रजित कुंभकर्ण । त्यांसी रणीं विभांडून । रावणातेंही गांजोन । भेटवीन श्रीरामा ॥ ८४ ॥

कथमाकाशपंथानं क्रमस्युपरि सागरम् ।
पतिष्यामि हि ते पृष्ठाद्भयाद्वेगेन गच्छतः ॥ १३ ॥
ततो मां पतितां दृष्ट्वा सागरे मकरालये ।
भक्षयंत्यप्रतिभया ग्रहाः सागरवासिनः ॥ १४ ॥
ह्रियमाणां तु मां दृष्ट्वा राक्षसा भीमविक्रमाः ।
अनुगच्छेयुरादिष्टा रावणेन दुरात्मना ॥ १५ ॥
कथं शक्ष्यसि संयातुं मां चापि परिरक्षितुम् ।
युध्यमानस्य रक्षोभिस्ततस्तैः क्रूरकर्मभिः ॥ १६ ॥
प्रपतेयं च तान्दृष्ट्वा भयार्ता कपिसत्तम ।
अथवा युध्यमानस्य पतेयं विमुखस्य ते ॥ १७ ॥
पतितां मां हनिष्यंति राक्षसा भीमविक्रमाः ॥ १८ ॥

सीता म्हणे गा अवधारीं । बैसतां तुझे पाठीवरी । तुझिया वेगें उड्डानकरीं । पडेन सागरीं हिसळोनी ॥ ८५ ॥ पडतां समुद्राप्रती । मत्स्य मगर मज भक्षिती । तेव्हां तूं पडसी आवर्तीं । केंवी मारुती म्यां यावें ॥८६॥ कां धांवणें आलिया मागें वेगीं । तूं परतसील युद्धालागीं । समरांगणीं युद्धभागीं । मी रणरंगीं पडेन ॥ ८७ ॥ मज पडतांचि क्षितीं । क्षोभोनि राक्षस मज मारिती । हेंही न घडे गा युक्ती । केंवी मारुति म्यां यावें ॥ ८८ ॥ मज मारिलियापाठीं । जरी त्वां मारिल्या राक्षसकोटी । सुख नव्हे श्रीरामाचे पोटीं । बुद्धि खोटी हे हनुमंता ॥ ८९ ॥ सीते ऐक सावध गोष्टी । मज न लगे आटाआटी । माझें पुच्छ कोपलियापाठीं । मारील कोटी राक्षस ॥ ९० ॥ तुज मी राखीन राहीं स्वस्थ । माझें पुच्छ प्रतापवंत । करील राक्षसांचा घात । अर्बुदांतें जरी आले ॥ ९१ ॥ सीता

१ शून्याकार. २ शेवटीं. ३ पराक्रमी पुरुषांमध्यें श्रेष्ठ. ४ वचन. ५ संशय. ६ बळाचे योगानें. ७ उडीनें. ८ पराभवून. ९ भोंवऱ्यांत, संकटांत. १० रागावून. ११ दशकोटीपर्यंत.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

म्हणे तूं अल्प मारुती । पुच्छ तंव तुझें किती । कैंवी राक्षसां लावील ख्याती । सत्यत्व चित्तीं मानेना ॥ ९२ ॥

न मे जानाति सत्त्वं सा प्रभावं वाऽसितेक्षणा ।
तस्मात्पश्यतु वैदेही यद्रूपं परमं मम ॥ १९ ॥
विंध्यमंदरसंकाशो बभौ दीप्तानलप्रभः ।
अग्रतो व्यवतस्थे स सीताया वानरर्षभः ॥ २० ॥

सीते म्हणसी वानर किती । काय पुच्छाची शक्ती । पाहें माझी स्वरूपस्थिती । म्हणोनि मारुति वाढला ॥ ९३ ॥ विंध्याद्रि मेरु मांदार । त्याहूनि वाढला वानर । जैसा प्रळयकाळीं रुद्र । तैसा दुर्धर जाहला ॥ ९४ ॥ सीते नेणसी माझें सत्त्व । पाहें माझें स्वरूप प्रभाव । देव दानव आणि मानव । राक्षस सर्व गांजीन मी ॥ ९५ ॥ माझें पुच्छ पाहें प्रतापवंत । राक्षस मारोनियां समस्त । सगळी लंका तुजसमवेत । निमेषार्धात नेईन ॥ ९६ ॥ विकल्प सांडोनियां पोटीं । सीते बैसें माझे पृष्ठीं । करीन श्रीरामासीं भेटी । सुखसंतुष्टीं स्वानंदें ॥ ९७ ॥ तुज न्यावया श्रीरामाप्रती । पाहें माझी दुर्धर शक्ती । विकल्प सोडोनियां चित्तीं । बैस मारुतिपृष्ठभागीं ॥ ९८ ॥ दुर्धर देखोनि मारुती । देव दानव चळीं कांपती । निधडी निःशंक सीता सती । अनुवादती स्वधर्म ॥ ९९ ॥

तं दृष्ट्वाऽचलसंकाशमुवाच जनकात्मजा ।
भर्तृभक्तिं पुरस्कृत्य रामादन्यस्य वानर ॥ २१ ॥
न युक्तो गात्रसंस्पर्शः पुरुषस्य मयानघ ॥ २२ ॥

मज भेटावया श्रीरघुपती । निधडी[१] शक्ती तुज मारुती । तुझी देखोनि अचलस्थिती । मज निश्चितीं मानलें ॥ १०० ॥ एका रामावांचोनि जाण । परपुरुषीं आरोहण । तेंचि पतिव्रतेसी[२] दूषण । वेदपुराणसंमत ॥ १ ॥ सांडोनि राम उत्तम पुरुष । नरवानरीं गात्रस्पर्श । तो पातिव्रत्या महादोष । हा इतिहास हरिहरां ॥ २ ॥ अंगोअंगीं प्रवेशून । करितां गुरुपत्नीरक्षण । तेंचि विधूंसी[३] दूषण । जाहला संपूर्ण प्रायश्चित्ती ॥ ३ ॥ तैसेंचि मज खांदीं वाहतां । दोषी होसील हनुमंता । मी तंव नयें गा सर्वथा । दोहींचे माथां महादोष ॥ ४ ॥ परपुरुषीं अनुसरोन । एकाकी सहगमन । करितां दोघांही दूषण । सत्य जाण हनुमंता ॥ ५ ॥ ऐसें जानकी बोलतां । हांसों आलें हनुमंता । मज श्रीरामाची अति आप्तता । समूळ कथा अवधारीं ॥ ६ ॥ म्यां अंजनीस पुसिली गोष्टी । माझा स्वामी कोणता सृष्टीं । ते म्हणे सगर्भ कांसोटी । देखे जो दृष्टीं तो स्वामी ॥ ७ ॥ श्रीराम निजला तरुतळवटीं । मज बैसतां वृक्षसंपुटीं । सगर्भ ब्रह्मचर्यकांसोटी । देखे दृष्टी श्रीराम ॥ ८ ॥ राम सांगे सौमित्रासी । गर्भी ब्रह्मचर्य वानरासी । सगर्भकौपीन पाहें यासीं आश्चर्यासीं सांगत ॥ ९ ॥ ऐकोनि श्रीरामाचें वचन । माझे ठायीं हें लक्षण । दोघे मनुष्य हीन दीन । स्वामी तयांतें कैंवी मानूं ॥ ११० ॥ सेवक सबळ स्वामी निर्बळ । तो स्वामीच सकळ विकळ । पहावया श्रीरामाचें बळ । रणकल्लोळ म्यां केला ॥ ११ ॥ वृक्ष सांडिले शतानुशत निर्वाणीं सोडिले पंच पर्वत । निद्रा न सांडोनि श्रीरघुनाथ । वृक्ष पर्वत छेदिले ॥ १२ ॥ श्रीराम कृपाळु पैं पुरा । बाणीं न मारोनि वानरा । बाणपिसारीं[४] सोडिला वारा । मज अंबरा उडविलें ॥ १३ ॥ बाणपिच्छाचे[५] झडाडें । हात पाय जाहले देव्हँडे[६] । दांत विचकिले म्यां माकडें । उगवीं वेंढे निजपुच्छा ॥ १४ ॥ ऐसी पडतां मुरकुंडी । पिता पवन लवडसवडीं । येवोनियां अति तांतडीं । बुद्धि गाढी सांगितली ॥ १५ ॥ श्रीराम परमात्मा परिपूर्ण । त्याची पाहतां आंगवण । तुझा तत्काळ जाईल प्राण । श्रीरामार्पण देह करीं ॥ १६ ॥ रामाज्ञे विकावें जीवित्व । श्रीरामसेवेसीं देह विक्रीत । श्रीरामासवें नित्य तृप्त । द्वंद्वनिर्मुक्त तूं होसी ॥ १७ ॥ ऐकोनि पितयाचें वचन । काया वाचा मनें अनन्य शरण । मस्तकीं वंदोनि श्रीरामचरण । श्रीरामार्पण देह केला ॥ १८ ॥ राम ध्यानीं राम मनीं । श्रीराम नित्य निदिध्यासनीं । राम कानीं राम नयनीं । वस्ती वदनीं श्रीरामनामा ॥ १९ ॥ श्रीराम आसनीं शयनीं । श्रीराम नित्य गमनागमनीं । श्रीराम सुस्वादुभोजनीं । जागृतिस्वप्नीं श्रीराम ॥ १२० ॥ ऐसा मी अनन्य श्रीरामभक्ती । तुझा विकल्प परपुरुषार्थीं । सावध ऐक तेही अर्थी । अतिगुह्योक्ती

१ धैर्यवान्. २ पतिभक्तीच्या व्रताला. ३ चंद्राला. ४ अखेरीला. ५ आकाशांत. ६ बाणपिसाऱ्याच्या. ७ वांकडे.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सांगेन ॥ २१ ॥ गर्भीं ब्रह्मचर्यकौपीन । अंजनी माता न देखे नग्न । माझ्या लिंगाचें दर्शन । स्त्रष्टा आपण पावेना ॥२२॥ ऐसी देखोनि माझी स्थिती । मुद्रिका देवोनि माझे हातीं । मज धाडिलें वो तुजप्रती । तुझ्या चित्तीं विकल्प ॥ २३ ॥ श्रीरामें सांगितली खूण । करविलीं वल्कलें परिधान । तुज नेसतां न ये जाण । श्रीरामें आपण नेसविलीं ॥ २४ ॥ खूण सांगतां हनुमंता । चित्तीं चमत्कारली सीता । विकल्प सांडोनि तत्त्वतां । गुज एकांता अनुवादे ॥ २५ ॥ श्रीरामाज्ञा वंद्य आम्हांसी । श्रीरामें काय सांगितलें तुजपासीं । तुवां आणावें सीताशुद्धीसी । किंवा सीतेसी आणावें ॥ २६ ॥ जरी आणविलें सीतेसी । तरी मी येईन तुजसरसीं । आणविलें असेल शुद्धीसी । तरी वेगेंसीं त्वां जावें ॥२७॥ ऐसें तिणें पुसतां । गाहिंवर आला हनुमंता । धन्य धन्य सती सीता । निर्लोभता सज्ञान ॥ २८ ॥ सावध अवधारीं वो माते । असत्य न बोलें मी येथें । रामें आणविलें शुद्धीतें । हेचि निश्चितें श्रीरामाज्ञा ॥२९॥ सीता म्हणे हे हनुमंता । विलंबू न करावा सर्वथा । शीघ्र जावोनियां आतां । शुद्धि रघुनाथा सांगावी ॥ १३० ॥ माझी कृपा आहे हनुमंता । तरी जाऊन शीघ्रता । शुद्धि सांगावी श्रीरघुनाथा । चरणीं माथा ठेवोनी ॥ ३१ ॥ सीतानेत्रीं अश्रू मुखीं दीन । करितां हनुमंता गमन । वानरें अंगुष्ठ दांतीं धरून । घातलें लोटांगण सीतेसी ॥ ३२ ॥ ऐकोनि सीता-करुणावचन । तेणें हनुमंता आलें स्फुरण । शीघ्र देईं आपली खूण । आतांचि गमन मी करितों ॥ ३३ ॥ मुद्रिका देवोनि जाण । निरोपें सांगितली खूण । तेंवीच त्वां देखोनि भूषण । मुखें वचन मज सांगें ॥ ३४ ॥ तुवां निजवस्त्रां भूषणांसी । सांडिलें किष्किंधे वानरांपासीं । तेंचि दावितां श्रीरामासी । उकसांबुकशीं स्फुंदत ॥ ३५ ॥ ऐसी तुझी वो अवस्था । अतिशयेंसीं श्रीरघुनाथा । नित्य स्मरणीं सीता सीता । प्रियकांता पढियंती ॥ ३६ ॥ सत्य मानी लंकागमन । तैसें देईं निजभूषण । तैसेंचि सांगें मुखें वचन । श्रीराम पूर्ण सुखावे ॥ ३७ ॥

अभिज्ञानं तु रामस्य ददावात्मविभूषणम् ।
क्षिप्त्वेषीकामिंद्रकाकः काकुत्स्थेन पलायितः ॥ २३ ॥
मनः शिलायस्तिलको गंडपार्श्वे निषेवितः ॥ २४ ॥

ऐसें हनुमंतें सांगतां । सुखें सुखावोनि सीता । वेणियें मणी माथां होता । धाडी रघुनाथा खुणेसीं ॥ ३८ ॥ श्रीराममुखें सुखसमेळा । मन-शिळेचा युक्त टिळा । निजहस्तें लावी कपाळा । हेही गोळांगूळा खूण सांगें ॥ ३९ ॥ माझें ऐकतांचि उत्तर । काकावरी सोडी ब्रह्मास्त्र । ही गुह्य गोष्टी सांगतां गंभीर । श्रीराम साचार मानील ॥ १४० ॥ काग हिंडतां तिहीं लोकां । कोणाही नव्हे आवांका । शरण आला रघुकुळटिळका । मग दर्भशिखा निवारिली ॥ ४१ ॥ वामनेत्र घेवोनि जाण । कागाचा वांचविला प्राण । हे सांगतां निजखूण । श्रीरघुनंदन सुखावे ॥ ४२ ॥ ऐसीं शस्त्रास्त्रें तुजपासीं । तरी कां धांवण्या न धांवसी । मृगापाठीं धाडिलासी । तेणें रुसलासी श्रीरामा ॥ ४३ ॥ तो अपराध करोनि क्षमा । धांवण्या येवोनि श्रीरामा । बंधमोचन करीं आम्हां । पुरुषोत्तमा कृपाळुवा ॥ ४४ ॥ लक्ष्मणासी लोटां-गण । तुझे म्यां व्यर्थ केलें छळण । त्या पापाचें फळ हें जाण । मज रावण गांजितो ॥ ४५ ॥ छळण-पाप अति अद्भुत । सीता आणि श्रीरामाआंत । आडवे आले सिंधु पर्वत । दूरी दूरस्थ निर्बंध ॥ ४६ ॥ छळणपापाची हे ख्याती । पापिष्ठ रावणाचिये हातीं । बंदीं पडली सीता सती । श्रीरघुपति क्षोभला ॥ ४७ ॥ छळणपाप अति दारुण । ना श्रीराम ना लक्ष्मण । राक्षसांचें नित्य छळण । मज म्यां पूर्ण छळियेलें ॥ ४८ ॥ लक्ष्मणासी लोटांगण आतां । अनन्यें शरण श्रीरघुनाथा । शुद्धि सांगतां हनुमंता । अति शीघ्रता पावावें ॥ ४९ ॥ एका जनार्दना शरण । पुढें गोड निरूपण । वानर वनविध्वंसन । करील निर्दळण राक्षसां ॥ १५० ॥ स्वस्ति श्रीभावार्थ-रामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां सीताहनु-मत्संवादो नाम द्वादशोऽध्यायः ॥ १२ ॥ ओंव्या ॥१५०॥ श्लोक ॥ २४॥ श्रीसीतारामचंद्रार्पणमस्तु॥

१ ब्रह्मदेव. २ तुझ्याबरोबर. ३ शोध. ४ आवडती. ५ वानरा. ६ कावळ्यावर. ७ धैर्य. ८ मोठी खूण. ९ अडथळा, प्रतिबंध. १० एकनिष्ठतेनें. ११ मारुतीनें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

अध्याय तेरावा

॥ श्रीरामचंद्रायनमः ॥

मणिं दत्वा ततः सीता वानरं वाक्यमब्रवीत् ।
मणिं दृष्ट्वा रघुपतिस्त्रयाणां संस्मरिष्यति ॥ १ ॥
वीरो जनन्या मम च राज्ञो दशरथस्य च ।
त्वमस्मिन्कार्यनिर्योगे प्रमाणं हरियूथप ॥ २ ॥
स तथेति प्रतिज्ञाय मारुतिर्भीमविक्रमः ।
शिरसा वंद्य वैदेहीं गमनायोपचक्रमे ॥ ३ ॥

मणि देवोनि वानराहातीं । स्वयें बोले सीता सती । मणि देखोनि रघुपती । स्मरेल चित्तीं तिघांतें ॥ १ ॥ कौसल्या माता आणि सीता । आठवेल दशरथ पिता । तिघे आठवती श्रीरघुनाथा । कोण्या अर्थी तें ऐका ॥ २ ॥ पूर्वी समुद्रमंथनीं । तेथें निघाला कौस्तुभमणी । तो घेतां श्रीविष्णूंनीं । इंद्र ते क्षणीं तळमळी ॥ ३ ॥ ब्रह्मशापाच्या शापोक्तीं । सिंधुंनिमग्न सर्व संपत्ती । त्यांतील कौस्तुभ श्रीपती । माझा मजप्रती देइजे ॥ ४ ॥ इंद्र मणि मागे करोनि ग्लानी । विष्णु त्यास दे फणिमणि बदलोनी । इंद्रें देखतांचि नयनीं । केला कंठमणि आल्हादें ॥ ५ ॥ इंद्रें नमुचीचिंया युद्धासीं । साह्य नेलें दशरथासी । रायें निर्दाळोनियां दैत्यासी । युद्धीं इंद्रासी जयो दिधला ॥ ६ ॥ युद्धीं इंद्र संतोषोनी । दिधला दशरथासी कंठमणी । रायें निजनगरासी आणोनी । दिधला प्रियपत्नी कौसल्ये ॥ ७ ॥ कौसल्येनें अति प्रीतीसीं । तो मणि दिधला जानकीसी । तिणें घालोनि वेणीसीं । वनवासासी आणियेला ॥ ८ ॥ तोचि मणि हनुमंताहातीं । खूण पाठवितां श्रीरघुपती । राजा माता सीता सती । तिघें आठवती श्रीरामा ॥ ९ ॥ ही खूण देवोनि तत्त्वतां । आणावें गा श्रीरघुनाथा । हेंचि कार्य प्रमाणतां । तुझे माथां कपिराया ॥ १० ॥ हनुमान म्हणे न करीं चिंता । शीघ्र आणीन श्रीरघुनाथा । साष्टांगें सीता नमिली माथां । येरी हनुमंता कुरवाळी ॥ ११ ॥

हनुमानुवाच—इदं वनमशोकं च नंदनोपममुत्तमम् ।
बलाद्विध्वंसयिष्यामि शुष्केंघनमिवानलः ॥४॥
ततो महत्साश्वमहारथाधिकं
बलं समानेष्यति राक्षसाधिपः ।
निहत्य तद्रावणचोदितं बलं
सुखी गमिष्यामि कपीश्वरालयम् ॥ ५ ॥

खूण पुसोनि सीतेपासीं । हनुमान विचारी मानसीं । युद्ध न करितां राक्षसांसीं । श्रीरामापासीं नवजावें ॥ १२ ॥ येथें कलहासी कारण । रावणाचें अशोकवन । नंदनवनासीं समान । तें विध्वंसीन निजबळें ॥ १३ ॥ ऐकोनि वनविध्वंसनकथा । कोप येईल लंकानाथा । धाडील असंख्य गजरथां । दृढ युद्धार्थी महावीर ॥ १४ ॥ युद्ध करावया सैन्यासीं । निर्दाळोनि त्या राक्षसांसी । इंद्रजिता करोनि कासाविसी । श्रीरामापासीं मग जावें ॥ १५ ॥ मारोनि राक्षसांच्या कोडी । लंका करोनि कडाफोडी । मग श्रीरामापासीं जातां गोडी । ऐसी आवडी हनुमंता ॥ १६ ॥ इतकें करोनि जातां । सुख कपिकुळा समस्ता । सुख होईल श्रीरघुनाथा । सुख हनुमंता युद्धाचें ॥ १७ ॥ सीतेचें न घेतां आज्ञापन । मज विध्वंसितां नये वन । सीतेसी पुसावया जाण । करी विंदानँ हनुमंत ॥ १८ ॥ पुढती सीतेस लोटांगण । येरी म्हणे बा शीघ्र करीं गमन । हनुमंत खालती घाली मान । लज्जायमान बोलेना ॥ १९ ॥ सीताशुद्धि सांगावया जाण । उल्लास न देखे संपूर्ण । दिसतोसी अति उद्विग्न । काय कारण मज सांगें ॥ २० ॥ बोले तुझें करितां शोधन । नाहीं अन्न ना जीवर्न । क्षुधेनें जावूं पाहे प्राण । सिंधूल्लंघन न करवे ॥ २१ ॥ ऐकोनि हनुमंताचें वचन । सीतेसी आलें पैं रुदन । यासी न देतां समाधान । केंवी गमन मी करवीं ॥ २२ ॥ याचें न पुसतां स्वागत । नाहीं केलें अभ्यागत । महा पापिणी मी येथ । धाडितें श्रीरामभक्त भुकेला ॥ २३ ॥ ऐकें सखया हनुमंता । शिणलासी मज शोधितां । जीवें ओवाळीन तत्त्वतां । सांगेन आतां तें करीं ॥ २४ ॥ हें घेवोनि करकंकण । लंकेमाजी जावोनि आपण । घेवोनि चतुर्विध अन्न । करीं भोजन यथेष्ट ॥ २५ ॥ हनुमान पुसे सीतेपासीं । अन्नाची चवी आहे

१ कारणानें. २ समुद्रांत बुडलेली. ३ नमुचिनामक दैत्याच्या. ४ मारून. ५ न जावें. ६ नासून टाकीन.

७ युक्ति. ८ पाणी. ९ भक्ष्य, भोज्य, लेह्य आणि चोष्य इत्यादि चार प्रकारचें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

कैसी । सीता विस्मित मानसीं । तरी तुम्हांसी काय भक्ष्य ॥ २६ ॥ जे खाताती लवण[1] । त्यांसी शीघ्र ये म्हातारपण । चुना लावोनि तांबूलभक्षण । दंत भग्न तेणें त्यांसी ॥ २७ ॥ आम्ही श्रीरामदूत वानर । वनवासी निरंतर । नित्य वनफळांचा आहार । सत्य साचार जानकी ॥ २८ ॥ माझें मोडोनि कांकण । लंकेमाजी फळें पूर्ण । आवडतील तीं घेवोनि जाण । फळभोजन करीं बापा ॥ २९ ॥ सीते ऐकें माझें शीळ । मी तंव स्वयंपांकी[2] केवळ । ज्यासी मनुष्याचा विटाळ । तें फळ अपवित्र वानरा ॥ ३० ॥ स्वहस्तें तोडोनि फळसंभार । स्वयें भक्षूं आम्ही वानर । आतळल्या सुरनर । तें फळ वानरें भक्षूं नये ॥ ३१ ॥ सीता म्हणे या वनाआंत । मधुर सुंदर फळें अद्भुत । तुवां लावितांचि हात । करील घात रावण ॥ ३२ ॥ तूं निमालिया हनुमंत । तोचि मजला प्राणांत । दुःखें निमेल श्रीरघुनाथ । समवेत सौमित्रा ॥ ३३ ॥ श्रीराम निमाल्यापाठीं । निमती सुग्रीव कपींच्या कोटी । भरत शत्रुघ्न जगजेठी । उठाउठीं निमतील ॥ ३४ ॥ या फळांसी लावितां हात । येवढा होईल अनर्थ । हनुमान म्हणे असो वृत्तांत । जातों येथोनि भुकेला ॥ ३५ ॥ वन दिसताहे सफळ । माझेंचि कपाळ निष्फळ । निरोप नेदी जनकबाळ । काळवेळ मज आली ॥ ३६ ॥ मार्गीं क्षुधेनें जातील प्राण । श्रीरामापासीं सांगेल कोण । तुझी न होईल सोडवण । विघ्न दारुण ओढवलें ॥ ३७ ॥ क्षुधा नव्हे हा कल्पांत । माझा होईल प्राणांत । ऐसें बोलतां हनुमंत । सीता हृदयांत कळवळली ॥ ३८ ॥ जंव होय क्षुधाहरण । पडलीं फळें खाईं संपूर्ण । घालितें श्रीरामाची आण[3] । फळें तोडोन न खावीं ॥ ३९ ॥ ऐकोनि सीतेच्या आणेसी । हनुमान खाजवी दोन्ही कुशी । हें मानलें मज मानसीं । आला वृक्षांसी पैं अंत ॥ ४० ॥ सांडोनि सीतावनपैसार । दूरी जावोनि बैसला वानर । करावया फळाहार । करी विचार मारुती ॥ ४१ ॥ मेळवी प्रळयकाळाग्नी । अभिमंत्री जठराग्नी । मग बैसला फळभोजनीं । सावधान हनुमंत ॥ ४२ ॥ भोजनसमयींचे अतीत[4] । मुख्य द्विज[5] मुखाआंत । आधीं यांसी करोनि तृप्त । धर्मयुक्त भोजन ॥ ४३ ॥ द्विजीं न घेतां अवदान[6] । स्वयें घेवों नये अन्न । प्रथम द्विजांचें भोजन । करी सर्वज्ञ मारुती ॥ ४४ ॥ द्विज दोन्ही पंक्तीं सादर । पुच्छा आज्ञा देवोनि वानर । वेगीं अर्पी फळसंभार । रुचिकर स्वादिष्ठ ॥ ४५ ॥ देखोनि साकरेचे टेंकँ[7] । निंबरसेंसीं आवश्यक । आधीं सेवूं पित्तशामक । मग अनेक फळें भक्षूं ॥ ४६ ॥ उपडोनियां निंबोणी नारंगी । साकरनिंबोणी मातुलिंगी[8] । मेळवोनि साकरेच्या भागीं । मग आरोगी[9] गटगटां ॥ ४७ ॥ श्रीरामाची आण पाळित । वृक्ष उपडोनियां सांडित । पडलीं फळें खाय हनुमंत । आज्ञा नेमस्त सीतेची ॥ ४८ ॥ आंबे जांबळें फणस जंबेरी । कर्दळीफळांचा गटका करी । पिंपळ्या मिरें घोस माझारी । लोणच्यावारी भक्षित ॥ ४९ ॥ द्विजांसी सांगे हनुमंत । भोक्ता म्हणा श्रीरघुनाथ । द्विज कांहीं न बोलत । अति लोलुपं[10] रसस्वादा ॥ ५० ॥ द्वीपद्राक्षांचे घड । खर्जुरीफळें अति गोड । पुच्छें पुरविलें कोड । करोनि उपाड झाडांचा ॥ ५१ ॥ हनुमान आपोशन न मोडी । बैसली बैसका न सोडी । पुच्छ करी वाढावाढी । फळें झोडित आहेचि ॥ ५२ ॥ चोरें बोरें मोहें भोकरें । आवळे उंबरें टेंबरें । भोक्ता श्रीराम येणें उत्तरें । फळें वानरें भक्षिलीं ॥ ५३ ॥ धामणें येरमणें तोरणें । झेपे जेथ पाण्यावळें गोंदणें । पिकल्या करवंदांचें खाणें । श्रीरामार्पणें गटकावी ॥ ५४ ॥ पिकलीं खाय गटगटां । हिरवीं खाय तोंडपालटा । जारसें[11] खाय मटमटां । सुरां श्रेष्ठां विटावित[12] ॥ ५५ ॥ ऊसरसें भरली मांदणी[13] । जेंवी तान्हेला प्राशी पाणी । तेंवी तें नेलें प्राशूनी । ढेकर देवोनी पाहत ॥ ५६ ॥ डोळे मिचकावी देवांकडे । आंगठा दावी दैत्यांकडे । वांकुल्या दावी दानवांकडे । मानवांकडे घुलकावी ॥ ५७ ॥ हनुमंताचे अंगवातें । सुगंधसुमनें पारिजातें । चंदनागरु तरु समस्तें । उन्मूळती समूळीं ॥ ५८ ॥ भोंवता पुच्छाचा आवर्तें[14] । पक्षी किलकिलती गगनाआंत । वृक्ष कडकडां मोडित । होत आवर्त

१ मीठ. २ स्वतः पाक करून खाणारा. ३ शपथ. ४ अतिथी. ५ दांत, ब्राह्मण. ६ आहुती. ७ ढीग. ८ महाळुंगें.

९ खाई. १० लोभी, लुब्ध. ११ पक्व. १२ वेडावीत. १३ भांडें (मातीचें). १४ वेढा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वृक्षांसी ॥ ५९ ॥ उपडोनियां पोफळी । मुखशुद्धीच्या पैं मेळीं । पोफळी घाली दाढेतळीं । वनरांगोळी मांडिली ॥ ६० ॥ शाल ताल तमाल नारिकेळी । उपडोनियां केली वरवाळी । घेतां राक्षसांसवें फळी । हातातळीं हाणाया ॥ ६१ ॥ ऐसी युद्धाची सामग्री । रचोनियां देवद्वारीं । हनुमंत बैसलासे शिखरीं । त्याहून दूरी वृक्ष टाकी ॥ ६२ ॥

तद्वनं मथितं वृक्षैर्भग्नाश्च सलिलाशयाः ।
लतागृहं चित्रगृहं नाशितश्च गृहांतरः ॥ ६ ॥
तत्कृत्वा सुमहत्कृत्यं हनूमान्दर्शयद्बलम् ।
चकार सुमहद्रूपं राक्षसीनां भयावहम् ॥ ७ ॥
ततो गतायां निद्रायां राक्षस्यो विकृताननाः ।
तद्वनं ददृशुर्भग्नं तं च वीरं महाकपिम् ॥ ८ ॥

ऐकोनि वनभंग आघात । वनकर भयें चकित । राक्षसिणी उठल्या समस्त । ज्या कां विरूप विक्राळा ॥ ६३ ॥ स्वयंभू वृक्षांचे उत्पाट । मोडल्या सारणी रहाट पाट । विचित्र गृहें केलीं पीठ । केलीं सपाट लतागृहें ॥ ६४ ॥ न लावी देवालयां हात । माडिया गोपुरें समस्त । अंतरगृहें विध्वंसित । तेणें विस्मित वनकर ॥ ६५ ॥ राक्षस वृक्षांतळीं निद्रित । जे कां सबळ रखणाईत । ते वृक्ष उपडोनि समस्त । केले दूरस्थ हनुमंतें ॥ ६६ ॥ तंव वनकर जागृत होत । तों वृक्षमात्र न दिसती तेथ । तेणें ते जाहले अति विस्मित । केलें विपरीत महेशें ॥ ६७ ॥ मागोनि आणिले महेशापासीं । ते वृक्ष नेले कैलासासीं । किंवा उडाले आकाशीं । वनकरांसी लक्षेना ॥ ६८ ॥ दुर्धर रावणाचें शासन । मिथ्या वनविध्वंसन । आम्ही देखतों हें स्वप्न । म्हणोनि नयन लाविले ॥ ६९ ॥ तंव त्या राक्षसी कळवळित । वानर नव्हे हा काळ कृतांत । संचरोनि वनाआंत । राक्षसां घात करूं आला ॥ ७० ॥ ऐकोनि वनकर धांवती । कोठें कोठें तो मारुती । धरा धरा तो बहुतां हातीं । रावणाप्रति नेऊं आम्ही ॥ ७१ ॥ वनकर अति दुर्धर । एकवटले चवदा सहस्र । स्वयें धरावया वानर । अति सत्वर धांवले ॥ ७२ ॥ एक विंधिती बहुतकांडें । एक हाणिती गोफणगुंडे । एक सवेग हाणिती धोंडे । हनुमान पुढें लक्षोनी ॥ ७३ ॥ वनकर आले अति गर्जत । हनुमान बैसला सावचित्त । करावया वनकरांचा घात । पुच्छ प्रेरित साटोपें ॥ ७४ ॥ पुच्छघात अति उद्भट । धरितां ओढोनि करी पीठ । शस्त्रें करोनियां सपाट । वीर उद्भट गांजिले ॥ ७५ ॥ वाजतां पुच्छाचा पैं साट । वनकरां भोंवलासे आट । पुच्छें कवळिले सगट । हृदयस्फोट राक्षसां ॥ ७६ ॥ जो जो पळोनि जाय जिकडे । पुच्छ आडवें तिकडे तिकडे । राक्षसां ओढवलें सांकडें । मागें पुढें रिघवेना ॥ ७७ ॥ ऐसें गोवोनि वनकरांसी । हनुमंतें बांधोनि पुच्छासीं । निक्षेपिले[10] समुद्रासीं । मत्स्य मगरांसी आहारार्थ ॥ ७८ ॥ भूतें जाहलीं दीनवदन । वनकर चवदा सहस्र जण । दिधलें सागरीं मीनीं[11] भोजन । आम्हांसी लंघन चुकेना ॥ ७९ ॥ तंव बोलली महाकाळी । हनुमान मारील राक्षस बळी । मेदमांसरुधिरांजुळीं । भूतां सकळ अति तृप्ति ॥ ८० ॥ दिधलें मीनां मीनभोजन । देईल भूतांसी भूतभोजन । वृक[12] जंबूक[13] घारी गीध जाण । तृप्तिभोजन काळासी ॥ ८१ ॥ भूतें पुसती जगदंबेसी । ऐसें होईल कवणें दिवसीं । येच क्षणीं येच दिवसीं । तृप्ति सर्वांसी हनुमंतें ॥ ८२ ॥

राक्षस्यो वानरं दृष्ट्वा पप्रच्छुर्जनकात्मजाम् ।
कोऽयं कस्य कुतो वायं किन्निमित्तमिहागतः ॥ ९ ॥
कोऽयं वा त्वयि संवादं वानरः कृतवानसौ ।
अथाब्रवीत्तदा साध्वी सीता सर्वांगविज्वरा ॥ १० ॥
रक्षसां कामरूपाणां विज्ञाने मम का मतिः ।
वैदेह्या वचनं श्रुत्वा राक्षस्यो भयविह्वलाः ॥ ११ ॥
स्थिताः काश्चिद्गताः काश्चिद्रावणाय निवेदितुम् ॥ १२ ॥

चवदा सहस्र वनकरांसी । हनुमान निर्दाळी पुच्छेंसीं । तेणें भयभीत राक्षसी । सीतेपासीं पुसताती ॥ ८३ ॥ कोण कोणाचा कैंचा थोर । येथें आला हा वानर । तुज करोनि नमस्कार । कोण विचार दृढ केला ॥ ८४ ॥ तुझ्या घेवोनि आज्ञेसी । येणें मारिलें वनकरांसी । तुझेनि बोलें वन

१ नाश. २ युद्ध. ३ पुरद्वारें. ४ राखणे. ५ शंकरानें. ६ भयंकर. ७ तडाका. ८ अटकाव. ९ संकट. १० टाकिले. ११ माशांना. १२ लांडगे. १३ कोल्हे.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

विध्वंसी । तुवां द्वंद्वासी पेटविलें ॥ ८५ ॥ सीते- भोंवत्या राक्षसी । कलकल करिती चौपासीं । धरा मारा बांधा केशीं । इणें वानरासी चेतविलें ॥ ८६ ॥ सीता निःशंक मानसीं । भय न मानी राक्षसींसीं । यथोचित बोले त्यांसी । राक्षसांपासीं बहु मावा ॥ ८७ ॥ मारीच होवोनि मृगवेषी । प्रतारितां श्रीरामासी । स्वयें मुकला निजदेहासी । राक्षसांपासीं बहु मावा ॥ ८८ ॥ शूर्पणखा सुंदर- तेसीं । छळीं आली लक्ष्मणासी । कपटें नाडिलें नासिकासी । राक्षसांपासीं बहु मावा ॥ ८९ ॥ छळोनि हरावया सीतेसी । रावण जाहला संन्यासी । मूळींच भीक लागली त्यासी । राक्ष- सांपासीं बहु मावा ॥ ९० ॥ अमित मावा राक्षसां- पासीं । कोण कोणाचा वानरवेषी । हें काय पुसतां मजपासीं । निजमावा तुम्ही जाणा ॥ ९१ ॥ राक्षसी देखोनि सीतेपासीं । हनुमान गुरकावी तयांसी । वेगीं पळती विव्हळतेसीं । अति भयासीं भयभीत ॥ ९२ ॥ एकी चळचळां कांपती । एकी फळफळां मूतती । एकी भयें भुली भूलती । एकी पडती मूर्च्छित ॥ ९३ ॥ बोंब न करवे गाढी । जिव्हेसी वळली बोबडी । एकी अंधारीं देती दडी । आंत तों तोडी पैं एकी ॥ ९४ ॥ एक भयचकित भीती । नेसणीं गळालीं नेणती । नागवीं रावणापासीं जाती । मग सांगती वनबोंब ॥ ९५ ॥ एकी त्या भयाचे निर्भरें । राक्षसां म्हणती पळा रे त्वरें । पुच्छें मारिलीं वनकरें । घायवारें घेतलें ॥ ९६ ॥ एकी दडती सीतेपाशीं । एकी पळती चौंपासीं । आपपर नसे राक्षसींसी । हनुमंतासी देखोनी ॥ ९७ ॥ करितां हनुमंतें गर्जन । सीता जाहली निर्बंधन । श्रीरामभक्तांचें वचन । बंधमोचन तत्काळ ॥ ९८ ॥ राक्षसी सांगती रावणापासीं । वानरवीर प्रतापराशी । विध्वंसोनियां वनासी । वनकरांसी मारिलें ॥ ९९ ॥ नेणों कैंचा वीर वानर । बळें जैसा काळाग्निरुद्र । सीतेसी करोनि नमस्कार । केला मार बनकरांसी ॥ १०० ॥ जे प्रदेशीं जनकबाळी । तें वन राखिलें पुष्पीं फळीं । येरां वनांची केली रेंवदळी । वृक्षां समूळीं उप- डोनी ॥ १ ॥ सीतेसीं करोनि एकांत । मग मांडिला वनविघात । ऐसा एकोनि वृत्तांत । लंकानाथ क्षोभला ॥२॥ पाचारोनि घरटीकारं । त्यांसी सांगे दशशिर । धरोनि आणावा तो वानर । वन विचित्र विध्वंसी ॥ ३ ॥ रावणासी राक्षसी सांगती । घर- टीकार बापुडे किती । त्याच्या पुच्छाची दुर्धर शक्ती । लाविली ख्याती बनकरां ॥ ४ ॥ चवदा सहस्र बनकरांसी । भारा बांधोनियां पुच्छेंसीं । निक्षेपिलें समुद्रासीं । जळचरांसी आहारार्थ ॥५॥ रणीं मर्दोनि राक्षसांसी । मेदमांसें तृप्ती भूतांसी । द्यावया आँवंतिलें महाकाळीसी । आजिचे दिवसीं हनुमंतें ॥ ६ ॥ धरोनि आणावया वानर । तेथें कायसे घरटीकार । मूळ करोनि विचार । दुर्धर भार प्रेरावा ॥ ७ ॥ ऐसें राक्षसी सांगती । सर्वेचि चळचळां कांपती । बहुतां नाटोपे तो मारुती । दुर्धर शक्ती पुच्छाची ॥ ८ ॥ सीतेपासील वन सकळ । नाहीं मोडिलें देऊळ । वानर दिसे स्वध- र्मशीळ । त्यावरी प्रबळ प्रतापी ॥ ९ ॥ ऐकोनि राक्षसींचें वचन । दचकला तो दशानन । सभा जाहली कंपायमान । बळसंपन्न वानर ॥ ११० ॥

राक्षसीनां वचः श्रुत्वा रावणो राक्षसाधिपः ।
आत्मनः सदृशान्वीरान्किंकरान्नाम राक्षसान् ॥ १३ ॥
व्यादिदेश महातेजा निग्रहार्थं हनूमतः ॥ १४ ॥

एकोनि वनविध्वंसन । रावण जाहला कंपाय- मान । आपुलिया बळासमान । योद्धे दारुण अनि- वर्त्ती ॥ ११ ॥ युद्ध देखिलिया दृष्टीं । नाहीं परता- याची गोष्टी । रणंपाडे कोट्यनुकोटी । महाहठी रणगाढे ॥ १२ ॥ किंकर नांवें अति दुर्धर । नांवा- जिले महावीर । पाचारोनि ऐशीं सहस्र । धरा- वया वानर धाडिले ॥ १३ ॥ रावण जाणे आमुची ख्याती । शेखीं धाडी वानराप्रती । वानर बापुडें तें किती । इतुक्यांहातीं केंवी उरे ॥ १४ ॥ ऐसें करोनि गर्जन । शस्त्रास्त्रीं सन्नद्ध पूर्ण । धांवोनि आले अवघे जण । अशोकवना ठाकिले ॥ १५ ॥ अशोकवनाच्या प्रासादांत । पुढिल्या दुर्धर तोर- णांत । नेटका बैसला हनुमंत । काळकृतांत प्रळ- याग्नि ॥ १६ ॥ वानरा देखतांचि दृष्टीं । शस्त्रें कवळोनियां मुष्टीं । किंकर धांविन्नले उठाउठीं ।

१ अगदीं योग्य. २ कपट. ३ फसवितां. ४ आंतडें. ५ नाश. ६ रक्षक. ७ आमंत्रण केलें. ८ मागें न फिरणारे. ९ रणशूर. १० सिद्ध.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

शस्त्रवृष्टी समकाळें ॥ १७ ॥ शूल मुद्गल गदा फरश । त्रिशूल तोमर पट्टिश । चेंडुचक्रें लहुडी फरश । केली बहुवस शस्त्रवृष्टी ॥ १८ ॥ खंगला भंगला तुटला । शस्त्रास्त्रीं निवटला । घायीं तिळप्राय जाला । म्हणती निमाले वानर ॥ १९ ॥ किंकरीं पिटिली टाळी । म्हणती वानर आतुर्बळी । आम्हांसीं न करितां रणफळी। रणरांगोळी होऊनि गेला ॥ १२० ॥ ऐशीं सहस्र महावीर । बळें हाणिती निशाचर। जैसी पर्वतीं पर्जन्यधार । तैसा वानरीं शस्त्रपात ॥ २१ ॥ किंकरीं पिटतां टाळी । आम्ही यशस्वी रणकल्लोळीं । तें देखोनि हनुमान बळी । क्रोधानळीं खवळला ॥ २२ ॥

समाविध्यच्च लांगूलं ननाद च महावने ।
संभूत्वा च महाकायो हनुमान्मारुतात्मजः ॥ १५ ॥
पुच्छमास्फोटयामास लंकां शब्देन पूरयन् ।
जयत्यतिबलो रामो लक्ष्मणश्च महाबलः ॥ १६ ॥
राजा जयति सुग्रीवो राघवेणानुपालितः ।
दूतोऽहं कोशलेंद्रस्य हनुमान्शत्रुसूदनः ॥ १७ ॥
राक्षसानां सहस्रं तु जघान कपिकुंजरः ॥ १८ ॥

स्वयें पुच्छाची पाठी थापटी । पुच्छासी सांगे गुह्य गोष्टी । मारावया राक्षसांच्या कोटी । निजबुद्धिप्रतापें ॥ २३ ॥ ऐसी सांगितली गुह्य गोष्टी । लांगूलें त्राहाटिलें उठाउठीं । निधा उठिला गिरिकूटीं । लंकात्रिकूटीं आकांत ॥ २४ ॥ राक्षसांचा प्राणहर । दुर्धर केला भुभुःकार । तेणें किंकरांचा संभार । जाहला भूमिभार दचकोनी ॥ २५ ॥ धाकें टवकारिल्या दृष्टी । शस्त्रें गळालीं निजमुष्टीं । राक्षसीं धाक घेतला पोटीं । पुच्छें पाठी पुरविली ॥२६॥ धाकें राक्षस पळोनि जाती । पुच्छें बांधोनि मारी मारुती । एक मारिले शिळाघातीं । पर्वतपातीं समस्त ॥ २७ ॥ मारोनि राक्षस समस्त । वानर स्वानंदें गर्जत । श्रीरामाचा निजदूत । नामें हनुमंत मारुति ॥ २८ ॥ येथें मारोनि दशकंधर । विजयी स्वामी रामचंद्र । विजयी लक्ष्मण महावीर । विजयी वानरेंद्र सुग्रीव ॥ २९ ॥ मी आलों असें सीताशुद्धीसी । म्यां विध्वंसिलें या वनासी । जावोनि सांगा रावणापासीं । म्यां राक्षसांसी मारिलें ॥ १३० ॥ एका जनार्दना शरण । आलें हनुमंतासी स्फुरण । करील थोरथोरां निर्दळण । रणकंदन अवधारा ॥ ३१ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां हनुमद्वनविध्वंसो नाम त्रयोदशोऽध्यायः ॥ १३ ॥ ॥ श्रीसीतारामचंद्रार्पणमस्तु ॥ ओंव्या ॥ १३१ ॥ श्लोक ॥१८ ॥

अध्याय चौदावा

किंकरान्सुबहून्हत्वा हनूमान्मारुतात्मजः ।
द्रुमान्बभंज परमान्वृक्षपालान्जघान च ॥ १ ॥
निहतान्राक्षसान्श्रुत्वा रावणो लोकरावणः ।
प्रहस्तस्य सुतं वीरं जंबुमालिनमादिशत् ॥ २ ॥
अहत्वा वानरं वीरं न निवर्तितुमर्हसि ॥ ३ ॥

किंकर मारिले ऐशीं सहस्र । चवदा सहस्र बनकर । वन विध्वंसिलें मनोहर । तेणें दशशिर कोपला ॥ १ ॥ वानर जाणोनि महाबळी । प्रहस्तसुत जंबुमाळी । रावणें पाचारोनि जवळी । गुज त्याजवळी सांगत ॥ २ ॥ मारिले किंकर बनकर । वन विध्वंसिलें मनोहर । तो तुवां मारावा वानर । युद्धीं दुर्धर गांजोनी ॥ ३ ॥ वानर न मरतां देख । तुज परतल्या एकाएक । तरी तुवां हारविलें नासिक । नपुंसक राक्षसांत ॥४॥ वानरा न करवे मर्दन । तेव्हांचि तुझें काळें वदन । रासभारोहण अपमान । मूतें वपन मस्तका ॥ ५ ॥ ऐसी ऐकवोन वचनावळी । युद्धा धाडिला जंबुमाळी । तोही वीर आतुर्बळी । क्रोधानळीं चालला ॥ ६ ॥ महाखरीं जुंपिला रथ । शस्त्रसामुग्री घालोनि समस्त । धनुष्य घेवोनि अत्यद्भुत । आला युद्धार्थ जंबुमाळी ॥ ६ ॥ टणत्कारोनियां मेंढा । क्रोधें गर्जे वानरापुढां । किंकरां बनकरांच्या सुडा । घ्यावया रोकडा मी आलों ॥ ८ ॥ हनुमान सांगे गोड गोष्टी । तुम्हीं चोरिली सीता गोरटी । मारीन राक्षसांच्या कोटी । अवघ्यांशेवटीं रावण ॥ ९ ॥ जंबु तुझी आवड मोठी । किंकरां बनकरांसीं भेटी । तुज मी करीन उठाउठीं । रथसंपुटीसमवेत ॥ १० ॥ अर्धचंद्रबाणसमेळीं । हनुमान् विंधिला

१ मृत्यू पावला. २ पराक्रमी. ३ शेंपूट. ४ फडकाविलें. ५ प्रतिध्वनि. ६ दहा शिरांचा (रावण). ७ गाढवावर बसवून धिंड काढणें. ८ डोकें भादरणें. ९ धनुष्य.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

कपाळीं । बाण हिसळोनि[1] ते काळीं । लागला निढळीं[2] जंबूच्या ॥ ११ ॥ लागतां बाणाचा आघात । जंबुमाळी पडला मूर्च्छित । हनुमान गदगदां हांसत । विपरीतार्थ येथें जाहला ॥ १२ ॥ सावध होवोनि जंबुमाळी । वर्षलासे बाणजाळीं । बाण कोंदले नभःस्थळीं । भूमंडळीं शरजाळ ॥ १३ ॥ रामस्मरणें अति समर्थ । बाणांमाजी हनुमंत । रणधेंडा[3] स्वयें नाचत । अंगीं आघात लागेना ॥ १४ ॥ पंचक्रोश शिळा सोज्ज्वळी । कपीनें हाणिली जंबुमाळी । येरें विंधोनि बाणजाळीं । केली रांगोळी शिळेची ॥ १५ ॥ कोपोनियां हनुमंतें । विशाळ वृक्ष घेवोनि हातें । वेगें हाणितां जंबूतें । बाणें वृक्षातें छेदिलें ॥ १६ ॥ लागवेगांचेनि[4] लवलाहें । चौं बाणीं विंधोनि पाहें । वृक्ष केला तिळप्राये । जाहलें आश्चर्य हनुमंता ॥ १७ ॥ जीवें घ्यावा हनुमंत । निर्वाणें[5] परिघ घंटायुक्त । रागें काढिला धगधगित । करावया अंत वानरा ॥१८॥ परिघ घेवोनि करतळीं । गर्जिन्नला जंबुमाळी । वानरा तुझी करीन होळी । घावो सांभाळीं हनुमंता ॥ १९ ॥ माझ्या परिघाचा आघात । निश्चयें निमाला हनुमंत । कैसेनि राखेल रघुनाथ । रणवृत्तांत पाहों याचा ॥ २० ॥ रावणें नेमिलें आहे मातें । जीवें मारावें वानरातें । कोण निवारील माझ्या परिघातें । हनुमंतातें वांचवावया ॥ २१ ॥ परिघ येतां अति वेगेंसीं । हनुमान जाणे लघुलाघवासी । अंग चुकविलें घायासीं । वेगें आकाशीं उडाला ॥ २२ ॥ शस्त्रदेवता पैं ल्हाठी[6] । परिघ गेला हनुमत्पाठीं । पुच्छें परिघा घातली मिठी । चेपिली घाटी देवतेची ॥ २३ ॥ देवता म्हणे गा हनुमंता । तुज मी शरण आलियें आतां । शस्त्रशक्ती ज्या समस्ता । शरणागता तुज होती ॥ २४ ॥ शस्त्रशक्ती भूतशक्ती । आणिक मंत्रांच्या मंत्रशक्ती । अवघ्या तुज शरण येती । मज मारुति वांचविलिया ॥ २५ ॥ सोडोनि पुच्छाचें बंधन । शस्त्रदेवता वांचवोन । शक्तिमंडळा लोटांगण । घाली आपण हनुमंत ॥ २६ ॥ मारूं नये शरणागता । म्हणोनि वांचविली शस्त्रदेवता । भूतीं भजावें श्रीरघुनाथा । या बुद्धी समस्ता शक्ती वंदी ॥ २७ ॥ तंव त्या शक्ती पैं समस्ता । ओंवाळिती हनुमंता । करितां राक्षसांच्या घाता । आम्ही युद्धार्थी तुज साह्य ॥ २८ ॥ सीता आमुची आद्यशक्ती । तीस गांजितो लंकापती । राक्षसां विमुख याचि अर्थी । साह्य सर्वार्थी रामभक्तां ॥ २९ ॥ हनुमान म्हणे पुच्छा जगजेठी । युद्धीं माझी राखिजे पाठी । साह्य शक्ती कोट्यनुकोटी । पुच्छासाठीं मज जाहल्या ॥ ३० ॥ ऐसें पुच्छाचें स्तवन । करोनि पुच्छाचें लालन । देवोनि पुच्छासी चुंबन । जाहला सावधान युद्धार्थी ॥ ३१ ॥ परिघ घेवोनियां हाता । येतां देखोनि हनुमंता । जंबु पावला परम चिंता । माझें शस्त्र मज घाता प्रवर्तलें ॥ ३२ ॥ रावणा परदारा[7] अधर्म । पापें शक्ती क्षोभल्या परम । नासला आक्रम पराक्रम । मरणानुक्रम राक्षसां ॥ ३३ ॥

गृहीत्वा परिघं घोरं भ्रामयामास वानरः ।
सोऽतिवेगोऽतिवेगेन भ्रामयित्वा महाबलः ॥ ४ ॥
परिघं पातयामास जंबुमालेर्महोरसि ।
तस्य चैव शिरो नास्ति न बाहू जानुनी न च ॥ ५ ॥
न धनुर्न रथो नाश्वास्तत्रादृश्यंत नेषवः ॥ ६ ॥

करावया वानराचे घाता । राक्षसें परिघ सोडिला होता । तो आला हनुमंताचे हाता । जंबूचा माथा छेदावया ॥ ३४ ॥ कोप आला हनुमंता । परिघ भोवंडिला साटोपतां[8] । लक्षोनि जंबूचिया माथा । होय हाणिता तें ऐका ॥ ३५ ॥ वेगीं उडोनियां अंबरा । दांत खादले करकरां । परिघ भोवंडिला गरगरां । रहंवरा[9] ठोकिलें ॥ ३६ ॥ निधंडी[10] हनुमंताची शक्ती । ना त्या शरीर ना त्यास अस्थी । हातपाय न दिसती । न दिसे व्यक्ती राक्षसा ॥ ३७ ॥ ना तो रथ ना तो वारू । ना तें धनुष्य ना शस्त्रसंभारू । वानरें केला अव्यक्त मारू । न दिसे गोचरू राक्षस ॥ ३८ ॥ दुर्धर हनुमंताचा घात । जीव मारोनियां तेथ । घायवट न दिसे प्रेत । केला भस्मांत राक्षसां ॥ ३९ ॥ आधीं हनुमंत महाबळी । ऐशियापरी जंबुमाळी । परी घायें मेळविला धुळी । रणरांगोळी करोनी

१ परतून. २ मस्तकावर. ३ रणवीर. ४ अतित्वरेनें. ५ अखेरचा, निर्वाणींचा. ६ मोठी. ७ परस्त्री. ८ आवेशानें. ९ रथाला. १० मोठी.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ ४० ॥ जंबु मारिला तयीं मारुती । प्रहस्त बोंबले दोहीं हस्तीं । द्यावया मंत्राग्नी पुरती । शोधितां अस्थी न लभेचि ॥ ४१ ॥ पावोनियां पुत्रशोक । येवोनि रावणासंमुख । प्रहस्त करी महाशंख । दुर्धर दुःख घोटेना ॥ ४२ ॥ झोंटी[1] सुटली मोकळी । प्रहस्त लोळे क्षितितळीं[2] । ज्येष्ठ पुत्र जंबुमाळी । वानरें धुळीं मेळविला ॥ ४३ ॥ युद्धीं पडला प्रहस्तकुमर । इतर प्रधानांचे पुत्र । वेगीं मोकली[3] दशशिर । रणीं वानर मारावया ॥ ४४ ॥

ततस्ते राक्षसेंद्रेण नोदिता मंत्रिणां सुताः ।
हेमजालपरिक्षिप्तैर्ध्वजवद्भिः पताकिभिः ।
तोयदस्वननिर्घोषैर्वाजियुक्तमहारथैः ॥ ७ ॥
कृतास्त्रास्त्रविदां श्रेष्ठाः परस्परजयैषिणः ।
विस्फारयंतः संहृष्टाः सर्वे युद्धजिगीषवः ॥ ८ ॥
जनन्यस्तास्ततस्तेषां विदित्वा किंकरान्हतान् ।
बभूवुः शोकसंतप्ताः सबांधवसुहृज्जनाः ॥ ९ ॥
सृजंतो बाणवृष्टिं ते लघुस्वनमहास्वनाः ।
अभिषक्तु हनूमंतं तोरणस्थं व्यवस्थितम् ॥ १० ॥

रावणाचे सभेआंत । प्रधानपुत्र अति गर्वित । महा वीरांतें दृष्टी न गणित । बळोन्मत्त प्रतापें ॥ ४५ ॥ ऐसे बळदर्प अतिदर्प्त[4] । शस्त्रास्त्रीं निपुण नित्य । येरयेरां नापेक्षित । अति समर्थ युद्धार्थी ॥ ४६ ॥ युद्धाग्रणी प्रधानसुत । निवडोनियां समस्त । हनुमंतासीं युद्धार्थ । धाडी लंकानाथ साक्षेपें ॥ ४७ ॥ तुमचे अंगीं युद्धक्रम । नित्य वानितां[5] पराक्रम । वन विध्वंसी प्लवंगमें[6] । त्यासीं संग्राम करावा ॥ ४८ ॥ तुम्ही अवघे युद्धीं समर्थ । बांधोनि आणावा हनुमंत । नातरी करावा त्याचा घात । पाहों पुरुषार्थ तूमचा ॥ ४९ ॥ थोर वाढिवेंची[7] मात । नित्य सांगा सभेआंत । तोच दावावा पुरुषार्थ । युद्धीं हनुमंत जिंकोनी ॥ ५० ॥ ऐसें सांगतां लंकानाथ । प्रधानपुत्र समस्त । वेगीं संजोगोनी[8] रथ । शीघ्र युद्धार्थ निघाले ॥ ५१ ॥ हेमरत्नमाळाविराजित[9] । शृंगारिले अश्वरथ । ध्वज पताका डोलत । रथ शोभत अति शोभा ॥ ५२ ॥ मारिल्यावांचोनि हनुमंत । परते तो मातृगामी येथ । ऐशी करोनियां शपथ । आले समस्त युद्धार्थी ॥ ५३ ॥ रथारूढ धनुष्य हातीं । पुढें वाजंत्रें वाजती । मागें माता शंख करिती । पुत्रसंतती निमाली ॥ ५४ ॥ प्रहस्तदुःखासमान । दुःखी करावया प्रधान । हट्टीं पेटला दशानन । युद्धीं संतान मोकलिलें ॥ ५५ ॥ प्रहस्तपुत्र महाबळी । रणीं मारिला जंबुमाळी । किंकरांची केली होळी । केली रांगोळी बनकरां ॥ ५६ ॥ तेथें किती प्रधानसंतान । आजिच जाहलें निःसंतान । वानर नव्हे महाविघ्न । आलें निदान राक्षसां ॥ ५७ ॥ स्त्रिया सुहृद तळमळिती । माता पिता शंख करिती । वधूं धाडितां मारुती । पुत्रसमाप्ती वानरें ॥ ५८ ॥ येरीकडे कडकडाट । प्रधानपुत्र घनदाट । रथचक्रांचा घडघडाट । आले निकट हनुमंता ॥ ५९ ॥ देवालयाचे महाद्वारीं । बैसला होता तोरणावरी । देखोनि प्रधानपुत्रहारी । उल्लास भारी हनुमंता ॥ ६० ॥ जैसे पतंग दीपावरी । तैशा प्रधानपुत्रांच्या हारी । लोटल्या हनुमंताचे वरी । शरधारीं वर्षती ॥ ६१ ॥ बाण सुटती सणसणां । शस्त्रें वाजती खणखणां । बाण विंधिती झणझणां । कालकंडना[11] मांडिली ॥ ६२ ॥ समकाळ शरसंपात[12] । हनुमान बैसला सावचित्त । बाण चुकवी पिलंगत[13] । अमात्यसुत मारावया ॥ ६३ ॥ बाण वर्षले अत्यद्भुत । जैसे मेघ पर्वतांत । अचुकहस्ती आम्ही समस्त । मारा हनुमंत विंधोनी ॥ ६४ ॥ एक म्हणती विंधा शिरीं । एक म्हणती विंधा उरीं । एक म्हणती करा कांडोरी[14] । चरणां करां चुरा पैं ॥ ६५ ॥ एक म्हणे विंधा पोटीं । एक म्हणे विंधा पाठीं । एक म्हणे विंधा कंठीं । फोडूं घांटी[15] याची पैं ॥ ६६ ॥ एक म्हणती माझें संधान । याचें नासिक मी छेदीन । एक म्हणे छेदीन दोनी कान । पुच्छ छेदीन म्हणे एक ॥ ६७ ॥ ऐशा ऐकोनियां गोष्टी । हनुमान हांसिन्नला पोटीं । मग उठोनियां जगजेठी । लांगूल[16] त्राहटी सत्राणें[17] ॥ ६८ ॥ देतां भुभुःकार उद्भट । अवघ्यां झाला हृदयस्फोट । पुच्छ कवळोनि एकवट । केले पिष्ट निजघातें ॥ ६९ ॥ उडी टाकितां हनुमंत । अवघ्यां एकचि प्राणांत ।

१ केश. २ पृथ्वीवर. ३ पाठवी. ४ अत्यंत गर्विष्ठ. ५ वर्णन करितां. ६ वानर. ७ प्रतापाची. ८ जुंपून. ९ सुवर्णयुक्त रत्नांच्या माळांनीं सुशोभित. १० शेवट.

११ उच्छेद. १२ बाणांचा वर्षाव. १३ पुढें धांवून. १४ नायनाट. १५ गळा. १६ शेंपूट. १७ जोरानें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

धडधडां पडती पृथ्वीआंत। समवेत रथघोडीं ॥ ७० ॥ प्रेतें नुरती भूतळा। अतळ वितळ ना सुतळा। हनुमान निजबळें आगळा। रसातळा ते नेले ॥ ७१ ॥ लागतां हनुमंताचा घावो। प्रेतपणा नुरेचि देहो। रसातळीं न मिळे ठावो। धाडी महाबाहो वैकुंठा ॥ ७२ ॥ ऐसियापरी हनुमंत। निर्दळिले प्रधानसुत। बोंब सांगावया नुरे तेथ। केले निर्मुक्त अवघेही ॥ ७३ ॥ दुरोनि पाहती सुहृदलोक। अवघे करिती महाशंख। प्रधानपुत्र एकाएक। रणीं निःशंक मारिले ॥ ७४ ॥ हाकाबोंबांचा कल्लोळें। लंकेमाजी हलकल्लोळ। रावणा आली काळवेळ। करील निर्मूळ राक्षसां ॥ ७५ ॥ प्रहस्तादिक मुख्य प्रधान। रावणापासीं येवोनि जाण। अवघे करिती शंखस्फुरण। निःसंतान त्वां केलें ॥ ७६ ॥ तो वानर नव्हे केवळ। सीताकोपाग्निकल्लोळ। वनीं वाढलासे प्रबळ। राक्षसकुळ निर्दळावया ॥ ७७ ॥

हतान्मंत्रिसुतान्बुद्ध्वा वानरेण महात्मना।
रावणः संवृताकारश्चकार मतिमुत्तमाम् ॥ ११ ॥
संदिदेश दशग्रीवो वीरान्नव विशारदान्।
हनूमद्ग्रहणव्यग्रान्हनूमन्निग्रहं प्रति ॥ १२ ॥
सविरूपाक्षयूपाक्षौ दुर्धरं च महाबलम्।
प्रघसं भासकर्णं च पंच सेनाग्रनायकान् ॥ १३ ॥
महागुणपरिख्यातात्रणकर्मविशारदान् ॥ १४ ॥

प्रधानपुत्रसंतती। रणीं मारिली मारुती। तें ऐकोनि लंकापती। चिंता चित्तीं अनिवार ॥ ७८ ॥ जो जो धाडी युद्धाप्रती। त्याची कपि करी समाप्ती। मग रावणें पांचही सेनापती। संग्रामार्थीं पाठविले ॥ ७९ ॥ यूपाक्ष विरूपाक्ष दोघे जण। दुर्धर प्रघस भासकर्ण। हे सेनानी वीर दारुण। पांच जण दृढ योद्धे ॥ ८० ॥ रावण त्यांसी सांगे युक्ती। तुम्ही दुर्धर वीर पुरुषार्थी। वानर धरावा युद्धशक्तीं। तुम्हीं समस्तीं मिळोनि ॥ ८१ ॥ संमुख येतां प्रधानसुत। त्यांचा वानरें केला घात। तुम्हीं बुद्धिबळें प्रतापवंत। युद्ध प्रशस्त करावें ॥ ८२ ॥ चौघे राहूनि चौं दिशांप्रती। एकें रहावें नभस्थितीं। दावोनियां निजशक्ती। युद्धीं मारुति धरावा ॥ ८३ ॥ युद्धीं धरितां नये हाता। तरी करावें त्याच्या घाता। ऐसें सांगोनि समस्तां। होय धाडिता लंकेश ॥ ८४ ॥ रथपताका डोलायमान। पांच जण युद्धीं प्रवीण। पांचां ठायीं विखरोनि। युद्ध दारुण मांडिलें ॥ ८५ ॥

तं समीक्ष्य कपिं सर्वे दिक्षु सर्वास्ववस्थिताः।
तैस्तैः प्रहरणैर्भीमैरभिषेक्तुं ततस्ततः ॥ १५ ॥

पांचां ठायीं पांच जण। हनुमंतातें वेढोन। युद्धा झगटले दारुण। शस्त्रास्त्रीं संपूर्ण हाणित ॥ ८६ ॥ दुर्धर पंचमुख पंचबाण। मस्तकीं विंधिले संमुख येऊन। पाठीशीं तो भासकर्ण। हाणी दारुण गदाघात ॥ ८७ ॥ दक्षिणबाहू यूपाक्ष। वामांगीं विरूपाक्ष। शूळ हाणीती प्रत्यक्ष। कुक्षोपकुंक्ष लक्षोनी ॥ ८८ ॥ घ्यावया हनुमंतासीं घस। गगना चढला तो प्रघस। बाण वर्षे असमसाहसें। जेंवी आकाशीं मेघधारा ॥ ८९ ॥ पांचांची उडी अवचितीं। आली हनुमंताभोंवतीं। तेव्हां पुच्छें केली ख्याती। साह्य युद्धार्थीं सर्वदा ॥ ९० ॥ भोंवतां पुच्छाचा आवर्त। त्यांच्या शस्त्रां करोनि घात। पांचही आकळिले पुच्छाआंत। वीर विख्यात सेनानी ॥ ९१ जेंवी योगिया आपण। स्वयें निरोधी पंच प्राण। तेंवी पुच्छें पांचही जण। आकळोन राखिले ॥ ९२ ॥ जेंवी काळ प्रळयांत। पंचभूतां करी आवर्त। तेंवी पांचही पुच्छाआंत। बांधी हनुमंत वधार्थी ॥ ९३ ॥ जेंवी विवेकी साधुजन। पंचही विषयां करिती दमन। तेंवी वीर पांचही जण। पुच्छें गोंवोन राखिले ॥ ९४ ॥

अभवद्वानरः क्रुद्धो बालसूर्यसमप्रभः।
समुत्पाट्य गिरेः शृंगं जघान द्वौ निशाचरौ ॥ १६ ॥

कोपें वानर अति आरक्त। बाळसूर्यासम भासत। रागें उपडोनि पर्वत। करील कल्पांत पांचांही ॥ ९५ ॥ उपडोनियां महागिरी। घालितांचि पांचांवरी। घायें जाहली चकचुरी। केली बोहरी पांचांची ॥ ९६ ॥ पांचही विषय जैं निर्दळिती। तैं सुख पावे परमार्थी। वधोनी पांचही सेनापती। सुखें मारुति उल्लासे ॥ ९७ ॥ श्रीरामभक्ताचे आघातीं। अस्थिमांस ना गुणव्यक्ती। अवघे नेले गुणातीतीं। धन्य मारुति सुखमरण ॥ ९८ ॥

१ मोठा. २ ओरड. ३ विनाशकाल. ४ शंखध्वनि, ओरड. ५ सीतेच्या कोपाग्नीचा भडकाच. ६ मारुतीनें. ७ युद्धार्थ. ८ पसरून. ९ कुशी व कुशीजवळचा प्रदेश. १० अतुल प्रताप. ११ सुखदायक मरण देणारा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

श्रीरामभक्ताचें कौतुक । मारून द्यावें परम सुख । कोटि जन्मांचें हरोनि दुःख । सुखदायक संग्रामीं ॥ ९९ ॥ निर्दळोनि पांचही जण । भुभुःकारें देवोनि किंराण । देवालयाचें तोरण । धरोनि स्थान बैसला ॥ १०० ॥ पंचभूतांची निवृत्ती । साधका परमानंदप्राती । वधोनि पांचही सेनापती । सुखें मारुति उल्लासे ॥ १ ॥ मारिले पांचही सेनापती । बोंब गेली लंकेप्रती । दचकलासे लंकापती । वानरें ख्याति लाविली ॥ २ ॥ पारखें केलें अशोकवन । सहजें सीता नेईल हिरोन । क्रोधें कांपे दशानन । पाहे आपण कोण धाडूं ॥ ३ ॥ तंव देखिला समोर । जो कां लाडका अखया कुमर । त्यासी सांगे दशशिर । मारीं वानर प्रतापें ॥ ४ ॥

कुमारमक्षं प्रसमीक्ष्यमाणः
प्रचोदयामास तमेव संयुगे ।
पताकिनं रत्नविभूषितध्वजं
मनोजवाष्टाश्ववरैः सुयोजितम् ॥ १७ ॥
रथं समास्थाय ययौ स वीर्यवान्
सतूणमष्टासिनिबद्धबंधुरम् ।
संपूरयन्खं च महीं च साचलां
तुरंगमातंगमहारथस्वनैः ॥ १८ ॥
बलैः समेतः सहतोरणस्थितं
समर्थमासीनमुपागमत्कपिम् ।
स तं समासाद्य हरिं हरीक्षणो
युगांतकालाग्निमिव प्रजाक्षये ॥ १९ ॥

आज्ञा देतां दशशिर । वेगें निघाला अखया कुमार । छत्र पताका ध्वज मनोहर । रेंहंवर रत्नाढ्य ॥५॥ आठ वारू शिरोमणी । हेमबाण सचाप तूंणी । पाठीसीं राजकुमारश्रेणी । निपुण रणीं रणयोद्धे ॥ ६ ॥ अंगीं बळाचा गर्व थोर । रथीं बैसोनि अखया कुमार । जेथें आहे हनुमान् वीर । तेथें सत्वर पैं आला ॥ ७ ॥ प्रधान आप्त थोर थोर । रावणासीं करिती मरमर । मरों धाडिला अखया कुमार । बळें दुर्धर वानर ॥ ८ ॥ चवदा सहस्र वनकरां । पुच्छें बांधोनियां भारा । मत्स्यमगरां दिधला चारा । आणि किंकरां मारिलें ॥९॥ प्रधानपुत्र गर्वभरित । अति बळें सदा कुंथत । त्या अवघ्यांचा केला घात । केला निःपात जंबूचा ॥ ११० ॥ घालोनि पुच्छाच्या आवर्ती । पांच मारिले सेनापती । अखया बापुडें तें किती । क्षणें मारुति मारील त्या ॥ ११ ॥ तुझा हा लाडका कुमार । जाणोनि हनुमंत करील मार । रावणा तूं चुकलासी थोर । तेथें कां कुमार धाडिला ॥ १२ ॥ दृष्टी पडिलिया हनुमंता । अखया परतेना मागुता । त्याचे रक्षणीं लंकानाथा । वीरां समर्थां धाडावें ॥ १३ ॥ रावणें निवडोनियां चोखट । रणरंग धाडिले वीर उद्भट । महायुद्धाचा कडकडाट । आले निकट हनुमंता ॥ १४ ॥ रावणें चतुरंग एकवट । निधडे धाडिले महाभट । अश्व गज रथी घडघडाट । आले निकट हनुमंता ॥ १५ ॥ न येतां मागिले वीरांसी । अखया भिडला हनुमंतासीं । लघुलाघवें शरधारांसीं । हनुमंतासी आच्छादी ॥ १६ ॥ अमित बाणीं विंधिला शिरीं । दों बाणीं विंधिला भुजांवरी । बाण विंधले स्तनावरी । सर्वांग शरीं व्यापिलें ॥ १७ ॥ तेचि समयीं मागील वीर । वर्षती शस्त्रसंभार । तेणें आच्छादिला वानर । दिवाकर जेंवी अभ्रीं ॥ १८ ॥ गर्जगर्जोनि पर्जन्यधारा । कदा न रुपती गिरिवरा । तैंवी राक्षसशरसंभार । अंगीं वानरा न बाधती ॥ १९ ॥ निधडी हनुमंताची शक्ती । बाण लागतां पिष्ट होती । शस्त्रें भंगोनि पडती क्षितीं । रणीं मारुति नाटोपे ॥ १२० ॥ व्यर्थ करोनि शत्रुशस्त्रांसी । हनुमान उडाला आकाशीं । अखयाची शक्ती कैसी । रथ आकाशीं चालविला ॥ २१ ॥ कुमार आणि हनुमान वीर । दोघे भिडती निराधार । बळ वानिती सुरवर । चक्राकार संग्रामीं ॥२२॥ रथाचिया गतिविगती । तैसाची पिलंगत मारुती । क्षणैक नभीं क्षणैक क्षितीं । दुर्धर शक्ती दोघांची ॥२३॥ अखया मारूं पाहे हनुमंत । त्यासीं तो घाय नाढळत । कपि कुमाराचा करितां घात । त्यासी तो रथ नाटोपे ॥ २४ ॥ क्षणैक रथ दिसे भूतळीं । क्षणैक दिसे नभःस्थळीं । क्षणैक दिसे समुद्रजळीं । त्रिकूटाचळीं एक क्षण ॥ २५ ॥ अखया कुमार अति

१ उड्डाण. २ रथ. ३ घोडे. ४ भाता. ५ उत्तम. ६ छातीचे, धैर्याचे. ७ मोठे शूर, योद्धे.

८ सूर्य. ९ ढगांनीं. १० राक्षसांचे शरसमूह. ११ पुढें धांवत.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

समर्थ । वेडाविला हनुमंत । तेणें वानर अति विस्मित । कैसेनि घात करूं याचा ॥ २६ ॥ तंव बोलती सैन्यसंभार । निधडा योद्धा अखया कुमार । जाणोनि धाडी दशशिर । घायें वानर मारील हा ॥ २७ ॥ ठाकोनियां अखया कुमार । पळों जातां हा वानर । आम्ही धांवोनि संग्राम थोर । तीरमार करूं यासीं ॥ २८ ॥

वधे कुमारस्य महाबलस्य वै
चकार बुद्धिं हनुमान्महाबलः ।
रथे नियुक्तान्निजघान वाजिन-
स्तलप्रहारैः पवनात्मजः कपिः ॥ २० ॥
स भग्ननीडः परिवृत्तकूबरः
पपात भूमौ हतवाजिरंबरात् ।
स तं परित्यज्य महारथो रथं
सकार्मुकः खड्गधरः खमुत्पतन् ॥ २१ ॥

रणीं नाटोपे अखया कुमार । त्यासी मारावयाचा विचार । हनुमान विचारी साचार । गुप्त प्रकार तो ऐका ॥ २९ ॥ कैसेनि मारूं अखयासी । ऐसें विचारितां मानसीं । कोप आला पुच्छासी । राजपुत्रासी वधावया ॥ १३० ॥ कामंग रथ अखयासी । रणीं नाटोपे तो आम्हांसी । पुच्छ लागोनि पाठीसीं । रथ चौपासीं बांधिला ॥ ३१ ॥ स्वर्ग मृत्यु कैलासपृष्ठीं । रथ पळवितां संकटीं । पुच्छें पुरवोनियां पाठी । कडकडाटीं बांधिला ॥ ३२ ॥ लाता हाणोनि छत्रपात । करतळें ध्वजासी घात । तालवृक्षाचा आघात । भंगिला रथ ते काळीं ॥ ३३ ॥ आंख चक्र रथकुबरूं । पोंवळवेलीच्या धुरा थोरू । आठही वारू सारथि वीरू । केला चकचूरू एकें घायें ॥ ३४ ॥ पुच्छ नाचविलें धांदर्डीं । रथ उपडिला कडाडीं । अखया कुमारें लवडसवडी । घातली उडी अति वेगें ॥ ३५ ॥ वोडण खांडें घेवोनि करीं । मारावया खड्गधारी । धांविन्नला हनुमानावरी । गिरागजरीं गर्जोनी ॥ ३६ ॥ राहें साहें हनुमंता । तुझ्या करीन मी घाता । रणीं भंगिलें माझ्या रथा । झणीं श्लाघ्यता मानिसी ॥ ३७ ॥ धाकें थरकत चमकत । वोडणें धडकोनि धांवत । खड्ग लघुविद्या तळपत । आला त्वरित अति बळें ॥ ३८ ॥

समेत्य तं मारुतवेगविक्रमः
क्रमेण जग्राह च पादयोर्दृढम् ।
स भग्नबाहुः प्रविकीर्णभूषणो
हतः क्षितौ वायुसुतेन राक्षसः ॥ २२ ॥

कुमार आणि वानरासीं । क्षण भूमीं क्षण आकाशीं । युद्ध होतां अति आक्रोशीं । येरयेरांसी वधावया ॥ ३९ ॥ वानर मारावँयाठायीं । अखया उपरमे लवलाहीं । हनुमंतें वायुवेगें पाहीं । धरिला पायीं लघुवेगें ॥ १४० ॥ हनुमान अति आवेशीं । भोवंडितां अति आक्रोशीं । भोवंडी दाटली तयासीं । देहभावासी विसरला ॥ ४१ ॥ वोडण पडिलें त्रिकूटावरी । खड्ग पडिलें सागरीं । मुकुट पडिला सभेमाझारी । अपांपतीं भूषणें ॥ ४२ ॥ आवांकूनी महाबळी । आपटितां शिळातळीं । लंकादुर्ग कांपे चळीं । निधा पाताळीं ऊठिला ॥ ४३ ॥ दिग्गजां टाळीं बैसलीं कानीं । पन्नगां पाताळीं पळणी । मेरू पडला तुटोनी । कांपे अंवनी येणें मानें ॥ ४४ ॥ हनुमान श्रीरामभक्त चिद्रत्न । युद्धामाजी कृपाळू पूर्ण । अखया न देखे जन्ममरण । ऐसा संपूर्ण मारिला ॥ ४५ ॥ अखया राखावयासाठीं । रावणें धाडिले कोटयनुकोटी । अश्व गज रथ पळतां थाटीं । पुच्छें पाठी पुरविली ॥ ४६ ॥ ऐसा केला कोंडमार । वानरें करोनि शिळामार । रणीं पाडिले वीर वीर । धरणीं रुधिर प्रवाहे ॥ ४७ ॥ हनुमंतें ऐशिया रीतीं । केली अवघ्यांची समाप्ती । सुरनर ऋषीश्वर वर्णिती । अगाध कीर्ती हनुमंताची ॥ ४८ ॥ सुर वर्षती सुमनीं । जयजयकार ऋषिजनीं । कीर्ति पावन त्रिभुवनीं । धन्य अंजनीनिजसुत ॥ ४९ ॥ एका जनार्दना शरण । जाहलें अखयानिर्दळण । पुढें इंद्रजितहनुमंतां रण । सावधान अवधारा ॥ १५० ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां हनूमदक्षवधो नाम चतुर्दशोऽध्यायः ॥ १४ ॥ श्रीसीतारामचंद्रार्पणमस्तु । ओंव्या ॥ १५० ॥ ॥ श्लोक ॥ २२ ॥

१ स्वेच्छ जाणारा. २ रथाचा दांडा. ३ वेगानें. ४ ढाल. ५ तरवार. ६ डौल मारूं नकोस. ७ मारण्यासाठी. ८ समुद्रांत. ९ सर्पांना. १० पृथ्वी. ११ ज्ञानरत्न. १२ पुष्पांनीं.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

अध्याय पंधरावा

श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः॥ अखया कुमार पाडिला रणीं। रावणें ऐकतांचि कानीं। शंख करित दाही वदनीं। लोळे धरणीं गडबडां[1] ॥ १ ॥ मुकुट पडिला सभास्थानीं। हें प्रत्यक्ष देखोनि नयनीं। रावण रडे आक्रंदोनी। विरुद्ध करणी म्यां केली ॥ २ ॥ बुद्धिभ्रंश झाला मजसी। कुमार धाडिला युद्धासी। रणीं वानरें मारिलें त्यासी। बोल कवणासीं ठेवावा ॥ ३ ॥ माझें जें कां अशोकवन। तें मज जालें शोकस्थान। कपीनें लंके घालोनि खान। पुत्रनिधान तेणें नेलें ॥ ४ ॥ आम्हां अवघ्यांदेखतां जाण। देहामाजि घालोनि खान। अखया नेला निजनिधान। नागवण मज आली ॥ ५ ॥ नव्हे त्याची चोरी मारी। हनुमान नव्हे पैं खानोरी[2]। लाज लावोनि आमुचे शिरीं। अखया मारी पुरुषार्थें ॥ ६ ॥ अवघे बोलती प्रधान। आमुचे पुत्र पाडिले जाण। स्वयें संपादी रावण। श्रेष्ठ मरण संग्रामीं ॥ ७ ॥ अखया पुत्र पडिला रणीं। शंख करी दाही वदनीं। बोलासारिखी नाहीं करणी। निंद्याभिमानी रावण ॥ ८ ॥ सैन्य धाडिलें कोटयनुकोटी। तें मारिलें पुच्छासाठीं। वानरें पुरविली पाठी। रावणापोटीं धुकधुकी ॥९॥ अभिलाषितां शिवाची कांता। उमा[3] मागितली भोगार्था। तें पाप बैसलें माझे माथां। रुद्र[4] तत्त्वतां क्षोभला ॥ १० ॥ उमा ते तंव जगंत्रयजननी[5]। विशेषें माझी सद्गुरुपत्नी। ते म्यां अभिलाषितां नयनीं। रुद्र क्षोभोनी स्वयें आला ॥ ११ ॥ अखयासी क्षयो जाहला। सत्य स्वयें रुद्र क्षोभला। राक्षसांसी क्षयो आला। तो म्यां केला महादोष ॥ १२ ॥ हा तंव नव्हे गा वानर। क्षोभोनि आला काळाग्निरुद्र। कायसा राक्षसांचा भार। सर्व संहार येथें आला ॥ १३ ॥ जो जो धाडिला अशोकवनीं। तो तो पडिला काळाचे वदनीं। आतां धाडिला नवचे कोणी। रावण मनीं विचारी ॥ १४ ॥ अखयाचे कैवारासीं। धाडितां नये आणिकासी। मीच जाईन संग्रामासी। कांस[6] सरिसी तेणें केली ॥ १५ ॥ म्यां वानर मारिल्यापाठीं। लंका निर्मुक्त संकटीं। वानरें मज मारिल्यापाठीं। सीता गोरटी निर्मुक्त ॥ १६ ॥ लाज लागली रावणासी। न सांगतांचि कोणासी। आंगीं बांधिलें कवचासी। संग्रामासी निघाला ॥ १७ ॥ ऐसें ऐकतांचि कानीं। इंद्रजित आला गजवजोनी। रावणातें नमस्कारुनी। सिंहासनीं बैसविला ॥ १८ ॥ एकलें एक पैं वानर। वनवासी तें पालेखाइर। त्यावरी जाणें दशशिर। शुद्ध विचार हा नोहे ॥ १९ ॥ वीरीं घेतला वानरधाक। धाडितां न वचे कोणी एक। मी तरी घरगुती सेवक। आवश्यक मज धाडीं ॥ २० ॥ वीरीं वाँढिवेचे[7] बोल। रणांगणीं होती फोल। माझें बोलणें सत्य सखोल। जाणती सकळ सुरसिद्ध ॥ २१ ॥ माझ्या प्रतापाची ख्याती। तूंही जाणसी लंकापती। मज धाडावें शीघ्रगती। क्षणें मारुती आणीन ॥ २२ ॥ एकलें वानर तें किती। तुवां जाऊं नये लंकापती। मज धाडावें संग्रामार्थी। क्षणें मारुती आणीन ॥ २३ ॥ धरोनि रावणाचे चरण। इंद्रजित घाली लोटांगण। मागतां युद्धा आज्ञापन। आलें रुदन रावणा ॥ २४ ॥

तथा वानरसंग्रामे दृष्ट्वा श्रुत्वा परंतपः।
सुतमिंद्रजितं शूरं कथयामास रावणः ॥ १ ॥
निहताः किंकराः सर्वे जंबुमाली च राक्षसः।
अमात्यपुत्रा वीराश्च पंच सेनाग्रगास्तथा ॥ २ ॥
महोदरश्च शयितः कुमारोक्षश्च सूदितः।
न तु तेष्वपि मे सारो यस्त्वय्यरिनिषूदन ॥ ३ ॥
न खल्वियं मतिः श्रेष्ठा यत्त्वां संप्रेषयाम्यहम्।
इयं च राजधर्माणां क्षत्रस्य च मतिर्मता ॥ ४ ॥

चौदा सहस्र बनकर। ऐशीं सहस्र किंकर। जंबुमाळी प्रधानपुत्र। मारिले शूर सेनानी ॥ २५ ॥ देवां दानवांसी दुर्धर। बळियां बळी वीर शूर। तुझा बंधु अखया कुमार। वानरें मार दृढ[6] केला ॥ २६ ॥ पाचारोनि रणांगणीं। वीर मारिले आइणींपाइणीं[7]। ऐसा वानर दुर्धर रणीं। संमुख कोणी उरेना ॥ २७ ॥ वानरेंसीं समान बळी। कोणी न दिसे भूमंडळीं। त्यासी तुज घेतां फैंळी[8]। करील होळी रणमारें ॥ २८ ॥ जे गति जाहली अखयासी। ते गति होईल इंद्रजितासी। पुत्र धरोनि पोटासीं। उकसाबुकसीं[9] स्फुंदत ॥ २९ ॥ इंद्रजित म्हणे लंकानाथा। कायसी वानराची कथा। तूं कां

१ नाश. २ लुटारू. ३ पार्वती. ४ शंकर. ५ त्रैलोक्याची माता.

६ दृढ. ७ धैर्याचे. ८ माळी. ९ एकापाठीं एक. १० युद्ध.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

करिसी व्यर्थ चिंता । बांधोनि आतां आणीन ॥ ३० ॥ युद्धसंधीं गळा बांधोन । इंद्र आणिला जिंतोन । इंद्रजित हें अभिधान । तेंपासून मज जालें ॥ ३१ ॥ त्या मज वानरासीं रण । करितां तुज संदेह कोण । वानराचा गळा बांधोन । येथें आणीन भक्ति माझी ॥ ३२ ॥ ऐकोनि इंद्रजिताचें वचन । सुखावला दशानन । दुर्धर धाडी निजसैन्य । देऊनी सन्मान पाठवी ॥ ३३ ॥

ततस्तु रक्षोधिपतिर्महात्मा
हनूमताक्षे निहते कुमारे ।
मनः समाधाय स देवकल्पं
समादिदेशेंद्रजितं सरोषः ॥ ५ ॥
त्वमस्त्रभृच्छस्त्रविदां वरिष्ठः
सुरासुराणामपि शोकदाता ।
सुरेषु सेंद्रेषु च दृष्टकर्मा
पितामहाराधनसंचितास्त्रः ॥ ६ ॥
न तु ते समरे कश्चित्तुल्योऽस्ति रिपुसूदन ।
तस्माद्गच्छाद्य वै पुत्र युद्धाय विजयाय च ॥ ७ ॥

ऐकोनि इंद्रजिताचें वचन । रावण विचारी आपण । निराहारी ब्रह्मचारी पूर्ण । त्याचेनि मरण मेघनादा ॥ ३४ ॥ वानरा येथें फळभक्षण । याचेनि इंद्रजित न पवे मरण । तरी युद्धासीं संदेह कोण । धाडी रावण आल्हादें ॥ ३५ ॥ अखया मारिला जगजेठी । तेणें रावण क्रोधदृष्टी । इंद्रजितासी सांगे गोष्टी । वानर कपटी मारावा ॥ ३६ ॥ ब्रह्मयापासोनि विद्या सकळ । शिकलासी अस्त्रबळ । तुजपासीं शस्त्रें सकळ । सृष्टीं सबळ तूं एक ॥ ३७ ॥ इंद्रादि देवां रणधांदेंडीं । जिंतोनि अमर तेहतीस कोडी । घातले लंकेचे बांधवडीं । गाढी प्रौढी तुज पुत्रा ॥ ३८ ॥ करोनि मेघांचें तर्जनें । हिरोनी त्यांचें गडगर्जन । मेघनाद हें अभिधान । शोभे संपूर्ण तुज पुत्रा ॥ ३९ ॥ अस्त्रबळ शस्त्रबळ । बुद्धिबळ निजांगबळ । बळ मेळवोनियां सकळ । धरीं तत्काळ वानर ॥ ४० ॥ जरी नाटोपे करितां बळ । तरी त्वां त्याचा करावा छळ । तुजपासीं विद्या प्रबळ । गोळांगुळ धरावया ॥ ४१ ॥ प्रबळ बळें हनुमंत । तुजसीं तुकों नये एथ । तुजपासीं शस्त्रास्त्रें समस्त । समयीं लागत तीं घेईं ॥ ४२ ॥ वेळ पाहोनि सावचित्त । युद्धा निघावें त्वरित । जयो पावसी निश्चित । लंकानाथ अनुवादे ॥ ४३ ॥

ततः पितुस्तद्वचनं निशम्य
प्रदक्षिणं दक्षसुतप्रभावः ।
चकार भर्तारमतित्वरेण
रणाय वीरः प्रतिपन्नबुद्धिः ॥ ८ ॥
ततस्तैः स्वगणैरिष्टैरिंद्रजित्प्रतिपूजितः ।
युद्धोद्धतकृतोत्साहः संग्रामं संप्रपद्यत ॥ ९ ॥

पितृवाक्य आशीर्वचन । इंद्रजित ऐकोनि आपण । परमभक्तीं प्रदक्षिण । मस्तकीं चरण वंदिले ॥ ४४ ॥ इंद्रजित निघतां उल्लासेंसीं । नग्न कुमारी शिंके पाठीसीं । दचक पडिला रावणासीं । इंद्रजितासीं आशंका ॥ ४५ ॥ शिंका झाली पाठीसीं । भविष्य पुसे ब्रह्मयासी । ब्रह्मा सांगे रावणासी । अति गुह्यासी गुप्तत्वें ॥ ४६ ॥ अपेश यशीं यश अपेशीं । मरण नाहीं इंद्रजितासी । वानर आणी लंकेसीं । तुजपाशीं रावणा ॥ ४७ ॥ रणीं धरिजेल वानर । ऐकोनि ब्रह्मयाचें उत्तर । अवघे करिती जयजयकार । सैन्यसंभार सज्जोनी ॥ ४८ ॥ गुह्य सांगे स्वयें रावण । वानर नव्हे साधारण । रणकर्कश अति दारुण । जाण संपूर्ण कृतांत ॥ ४९ ॥ जे जे गेले अशोकवनीं । ते ते पडले काळाचे वदनीं । सैन्य अश्व गज रथ गांजोनी । वीर मर्दोनि निर्दळिले ॥ ५० ॥ जे जे देखिले हनुमंतें । ते ते निमाले निश्चितें । बोंब सांगावया पुरतें । नेदी वीरांतें उरी उरों ॥ ५१ ॥ कवच न चले तयापुढें । वोडणखांडें तें बापुडें । कोण राहे तयापुढें । घायें रोकडें विभांडी ॥ ५२ ॥ शस्त्रें न रुपती बाण । न चले अस्त्रांचें प्रेरण । आपुले वांचवोनी प्राण । रणांगण साधावें ॥ ५३ ॥ गुह्य सांगत तुजपासीं । परम शक्ति पुच्छासीं । पुच्छें निर्दळिलें सैन्यासी । महावीरांसी मारक ॥ ५४ ॥ इंद्रजित म्हणे असोत युक्ती । सत्य ब्रह्मयाची वचनोक्ती । गळा बांधोनियां मारुती । लंकेप्रति आणीन ॥ ५५ ॥ ऐकोनि इंद्रजिताचें उत्तर । वीरीं केला जयजयकार । झाला वाद्यांचा गजर । सैन्यसंभार चालिला ॥ ५६ ॥

१ युद्धामध्यें. २ नांव. ३ युद्धांत धुमाकूळ. उडवून. ४ कैदेंत. ५ धिक्कार. ६ थोर गर्जना. ७ इंद्रजिताचें नांव. ८ कपट. ९ वानर. १० यम. ११ ढाल, तरवार.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

रथैर्मत्तैश्च मातंगैर्वाजिभिश्च खरोष्ट्रकैः ।
शस्त्रैश्च विविधैस्तीक्ष्णैर्ध्रुवं चोपचिता बलैः ॥ १० ॥
छत्रध्वजपताकैश्चालंकृता महती चमूः ।
रथेनादित्यवर्णेन तं वानरमुपागमत् ॥ ११ ॥
मृदंगशंखाः पटहाः स्वनंति
विशालभेर्यश्च स्वनंति दुंदुभीः ।
तूर्याण्यनेकानि च डिंडिमाश्च
युद्धे जयायैव रथस्वनश्च ॥ १२ ॥

मत्तमातंग महाथोर । शायशीं प्रयुतें कुंजर । शतानुशतकोटि [1]रहंवर । असिवारें[2] असंख्य ॥ ५७ ॥ एक वळंघले उष्ट्रीं[3] । एक बळंघले महाखरीं । एक चढले अश्वांवरी । गिरागजरीं गर्जत ॥ ५८ ॥ वारु उडविती जेंवी केसरी । नाचविती तींच पायांवरी । हो हो मा मा जी जी करी । यावा[4] स्वरीं दाविजे ॥ ५९ ॥ वीर वांटीव आतुर्बळी । हस्तबाहुकरतळीं । कंगल टोप राघावळी । मुक्तामणिमेळीं पाखरा[5] ॥ ६० ॥ अंगत्राणें[6] पै वीरांसी । लखलखीत तेजोराशी । हिरे माणिकें जडलीं त्यांसी । रविप्रभेसीं सम प्रभा ॥ ६१ ॥ शेळी साबळी शक्ति तोमर । अढाउ चव्हाण कोइतेकार । शूळत्रिशूळफरशधर । धनुर्धर पायांचे ॥ ६२ ॥ भिंडिमाळा चेंडू चक्रें । गदा मुद्गल परिघपत्रें । सिद्ध केलीं अग्निशस्त्रें । नाना यंत्रें रणमारा ॥ ६३ ॥ अलंगाईत बाणाईत । तुळणें वोढणें धडकित । कोइतेकार पैं तळपत । जेठी पिलंगत मुष्टिघाता ॥ ६४ ॥ खड्गहस्त खेटकहस्त । पटाईत पट्टिशहस्त । जमदाढा कटारहस्त । अश्मपातें[9] पैं एका ॥ ६५ ॥ ऐसे पायँचे[10] मो[11]गेंर । वीर चालिले अपार । भाट गर्जती कैवार । गजगंभीर गडगर्ज ॥ ६६ ॥ पुढें पायांचे निधडे वीर । तयांमागें असिवार । त्यांचे पाठीसीं रहंवर । राजकुमार त्यांमागें ॥ ६७ ॥ दांतीं लोहसेंब्या तिखट । वारिया न चले वाट । दोहीं बाहीं गजांचा थाट । मदोत्कट चालती ॥ ६८ ॥ श्वेत पीत अति आरक्त । बहुपताकीं सैन्य शोभत । पताकीं वाढवावया पुरुषार्थ । ब्रिदाईत वागविती ॥ ६९ ॥ सूर्यप्रभासमयुक्त । रथ निजतेजें लखलखीत । ध्वज पताका शोभत । ओळकंबत बहुमाळा ॥ ७० ॥ तडक फुटले एकसरें । भिंडिमा[11]ळांचे [12]पांगोरे । खाखांइलीं[13] रणतुरें । वीर गजरें गर्जती ॥ ७१ ॥ धडधडां विघातें पाहीं । निशाणें[14] लागलीं एकचि घाई । विराणीं वाजती लवलाहीं । दुंदुभि पाहीं त्राहाटिल्या ॥ ७२ ॥ शंख मृदंग टाळघोळा । वाजती काहाळा[15] किनकाहाळा । घर्घरित घोगरगळा । ध्वनि आगळा बुरंगांचा ॥ ७३ ॥ पांवे वाजती थापटेकरी । पट त्राहाटिल्या भेरी । चंड वाजिन्नल्या चंडमोहरी । निशाणें गजरीं गर्जती ॥ ७४ ॥ रणीं वाजती गिडबिडीं । भेडां[16] मळमूत्र लिडबिडी । ऐकोनि हनुमंताची प्रौढी । भय धाकही घेतला ॥ ७५ ॥ हनुमान एकला एक वानर । त्यावरी अमित दळभार । तरी धाकती समग्र । झणीं वानर मारील आम्हां ॥ ७६ ॥ ऐकोनि वाजंत्र्यांचा नाद । सैन्य देखोनि सन्निध । हनुमान करितो आल्हाद । राम गोविंद तुष्टला ॥ ७७ ॥ करावया राक्षसांसीं झगडा । मुहूर्तें केला बनउपाडा । इंद्रजिताचा पादाडा । रणीं रोकडा झाडीन ॥ ७८ ॥ माझे पुरवावया मनोरथ । आजि तुष्टला श्रीरघुनाथ । रणीं निर्दळोनी समस्त । इंद्रजित गांजीन ॥ ७९ ॥ अखया मारोनि रणीं । प्रथम केली म्यां बोहणी । येथोनि वीरांचिया [17]श्रेणी । रणीं मर्दूनी मारीन ॥ ८० ॥ पुच्छ नाचतें पैं धरणीं । सैन्य मारोनियां रणीं । पूजूं चामुंडा भवानी । मांसाची धणी[18] भूतांसी ॥ ८१ ॥ पुच्छ अतिशयें सज्ञान । भूतां दिधलें आमंत्रण । मांसभोजन रुधिरपान । कृपा करोनि सेवावें ॥ ८२ ॥ ज्याचे पोटीं जे आवडी । ते मज सांगावी रोकडी । ते ते पुरवीन परवडी । राक्षसकोडी मारोनी ॥ ८३ ॥ आजि हेचि भाजी भाकरी । तुम्हीं करावी न्याहारी । श्रीराम पुढें रणकेसरी । पंचधारी निववील ॥ ८४ ॥ पुच्छासी गुज सांगे हनुमंत । जो जो आला सैन्यांत । परतों न द्यावा नगरांत । करावा घात अवघ्यांचा ॥ ८५ ॥ जो जो होईल शरणागत । त्यासी राखावें निश्चित । येर मारावे समस्त । आज्ञा समर्थ मानीं पुच्छा ॥ ८६ ॥

१ रथ. २ स्वार. ३ उंटांवर. ४ आवेश. ५ झुली. ६ चिलखतें. ७ ढाली. ८ हातांत तलवार घेतलेले. ९ धोंडमार. १० पायदळ. ११ गोफणगुंड्यांची. १२ वृष्टि. १३ वाजलीं. १४ रणभेरी. १५ झांजां. १६ भित्र्यांना. १७ पंक्ती. १८ संतोष.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ ८६ ॥ मानोनि स्वामीचें वचन । लंकाद्वारीं पुच्छ रक्षण । जो परतेल रक्षोगण[1] । त्याचा प्राण घ्यावया ॥ ८७ ॥ असो हे बहुसाल व्युत्पत्ती । पुढील कथेची संगती । इंद्रजित आरूढला रथीं । रथप्रयुक्ती अवधारा ॥ ८८ ॥

स पक्षिराजोपमतुल्यवेगै-
र्व्यालैश्चतुर्भिः स तु तीक्ष्णदंष्ट्रैः ।
रथं समायुक्तमसह्यवेगः
समारुरोहेंद्रजिदिंद्रकल्पः ॥ १३ ॥

रथचक्र तें प्रवाळ[2] । आंख मरकताचा[3] सुनीळ । धुरा आणि जूं तीतें इंद्रनीळ । उपराड सकळ रत्नांचे ॥ ८९ ॥ रथीं जुंपिले प्रबळ । नखी दंष्ट्री सिंह शार्दूल[4] । मुखें भयानकें अति विक्राळ । जिव्हा जाज्वल अग्निप्राय ॥ ९० ॥ रथीं सारथी कपटराशी । अश्ववागोरे[5] तयापासीं । इंद्रजित बैसला रथेशीं । निजचापासी सज्जोनी ॥ ९१ ॥ रथध्वज सुनीळनीळा । ध्वजपताका विचित्रलीळा । रत्नमुक्ताफळमाळा । रथीं बैसला इंद्रजित ॥ ९२ ॥ जैसा इंद्र सुरवरेंसीं । तैसा इंद्रजित राक्षसेंसीं । मुक्ताफळांच्या झालरेसीं । अति शोभेसीं सुप्रभा ॥ ९३ ॥ कनकदंडयुग्मचामरीं । उपभोग जाणविती नानापरी । ऐसिया सेनेसीं संभारीं । जयजयकारीं निघाला ॥ ९४ ॥ जैसी गरुडागमनीं शक्ती । तैसीच रथाची सवेग गती । रणीं जिणावया मारुती । शीघ्रगती निघाला ॥ ९५ ॥ इंद्रजित येतां समदळीं[6] । पुढें धाविन्नली असाळी[7] । जेणें मारिला अखया बळी । त्याची होळी मी करीन ॥ ९६ ॥ एकलें एक तें पालेखाईर । त्यावरी कोपे सैन्यभार । पिसाळले निशाचर । तो मी वानर मारीन ॥ ९७ ॥ ठाकोनि आली अशोकवन । संमुख हनुमंत देखोन । निकट वटारिले नयन । विक्राळ वदन पसरिलें ॥ ९८ ॥ एक जाभाडें भूतळीं । दुजें लाविलें नभःस्थळीं । कराळ विक्राळ दांताळी । जिव्हा काळी मसमसीत ॥ ९९ ॥ करितां स्वानंदें युद्धासीं । आडवी आली हे राक्षसी । जेंवी साधितां निधानासी । पहिलें विवसी पैं उठे ॥ १०० ॥ युद्धनिधानाजवळी । प्रथम विवसी हे असाळी । पहिलें हेचि देवोनि बळी । काळिके काळी चामुंडे ॥ १ ॥ भोजन करावया संतृप्ती । पहिलें लहान प्राणाहुती । ते संग्रामसमयीं तृप्ती । प्राणाहुती असाळी ॥ २ ॥ प्रथम समिधा होमून । मग होमिती प्रधान । तैसीच असाळी हे जाण । समिधार्वदान[8] संग्रामीं ॥ ३ ॥ असाळीनें पसरिलें जाभाडें । न पाहतां मागें पुढें । हनुमंताची उडी पडे । मशकाएवढें धरी रूप ॥ ४ ॥ नातळतांचि तिचे दांतां । जिव्हेसींही नांतळतां । उदरीं प्रवेशतां हनुमंता । न कळे तत्त्वतां राक्षसी ॥ ५ ॥ वानर मुखीं प्रवेशलें । मुखींच्या मुखीं हारपलें । किंवा दांतांतळीं दडालें । नाडलें पहिलें जिव्हाग्रीं ॥ ६ ॥ लीन झालें मुखापासीं । कीं पळालें श्वासोच्छ्वासीं । कोण गती वानरासी । असाळीसी लक्षेना ॥ ७ ॥ आंबट तिखट खारट । गोड कडू कीं तुरट । चवी न कळेचि स्पष्ट । करी कटकट राक्षसी ॥ ८ ॥ जिव्हादांतीं नाढळे[9] होटीं । शेखीं[10] तृत नव्हेचि पोटीं । वानरें ठकविलें उठाउठीं । अतर्क्य दृष्टीं कळेना ॥ ९ ॥ असाळीनें गिळिला हनुमंत । चुकला इंद्रजिताचा अनर्थ । लोकीं विस्तारिली मात । रणकंदनार्थ सैन्याचा ॥ ११० ॥ पहिलेंचि गिळिती वानर । तरी कां मरता अखया कुमार । किंकर आणि बनकर । प्रधानपुत्र वांचते ॥ ११ ॥ ऐसे लोक सांगती गोष्टी । तंव असाळीस शूळ पोटीं । हनुमंतें काळीज धरिलें मुष्टीं । लोळे सृष्टीं गडबडां ॥ १२ ॥ करावया इंद्रजितासीं रण । हनुमंताची आवडी पूर्ण । तिचे उदरीं न राहे क्षण । केलें विंदाण[11] तें ऐका ॥ १३ ॥ उपडोनि काळिजाचा देंठ । बेंबीपासीं फाडोनि पोट । हनुमंत निघोनियां प्रकट । केला उद्भट भुभुःकार ॥ १४ ॥ ऐकतां तयाचा भुभुःकार । कांपिनले निशाचर । मुख्य दचकला धुरे[12] । सैन्यसंभार खळबळला ॥ १५ ॥ रावणापासीं सांगती मात । असाळीनें गिळिला हनुमंत । सवेंचि दुसरी बोंब सांगत । केला निःपात असाळीचा ॥ १६ ॥ राक्षस मावकर[13] भारी । त्यांहूनि वानरीं विद्या थोरी । रिघोनि तियेचे उदरीं । महामारीं मारित ॥ १७ ॥ जैसी

१ राक्षससमुदाय. २ पोंवळें. ३ पाचेचा. ४ वाघ. ५ लगाम. ६ ससैन्य. ७ पहलंकेची स्वामिनी, रावणाची बहीण. ८ समिधांची आहुती. ९ न शिवतां. १० शेवटीं. ११ कौतुक, युक्ती. १२ मुख्य (इंद्रजित). १३ कपटी.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

बहीण शूर्पणखा । तैसीच हे असळिका । हनुमंतें मारितांचि देखा । दशमुखा बहु दुःख ॥१८॥ वानर पेटलें द्वंद्वासीं । करूं कोणकोणाच्या दुःखासी । काय होईल इंद्रजितासी । निजमानसीं धाकत ॥ १९ ॥ केला असाळीचा घात । ऐकोनि इंद्रजितें मात । कोपें चालिला कृतांत । हनुमंत दंडावया ॥ १२० ॥ देखोनियां हनुमंता । धिंवसा नव्हे सैन्या समस्ता । ऐसें कळलें इंद्रजिता । होय प्रेरिता निजरथ ॥ २१ ॥

आयांतं सरथं दृष्ट्वा तूर्णमिन्द्रजितं कपिः ।
ननाद च महानादं व्यवर्धत च वेगवान् ॥ १४ ॥
इंद्रजित्स रथं दिव्यमास्थितश्चित्रकार्मुकः ।
धनुर्विस्फारयामास तडिदूर्जितनिस्वनम् ॥ १५ ॥
ततः समेतावतितीक्ष्णवेगौ
महाबलौ तौ रणनिर्विशंकौ ।
कपिश्च रक्षोधिपतेश्च पुत्रः
सुरासुरेंद्राविव बद्धवैरौ ॥ १६ ॥
शरणामंतरेणाशु व्यावर्तत महाकपिः ।
हरिस्तस्याभिलक्ष्यस्य मोक्षयन्लक्ष्यसंग्रहम् ॥ १७ ॥

विजू गडगर्जे अंबर । तैसा धनुष्याचा टणत्कार । इंद्रजित निधडा महाशूर । रहंवर प्रेरिला ॥ २२ ॥ ऐकोनि धनुष्याचा टणत्कार । वानरें केल भुभुःकार । नादें कोंदलें अंबर । गिरिकंदर दुमदुमिलें[३] ॥ २३ ॥ निंधा उठिला पाताळीं । भूतें कळकळिती अंतराळीं । पक्षी भ्रमती नभोमंडळीं । बैसली टाळी दिग्गजांचीं ॥ २४ ॥ इंद्रजिता युद्धाची आवडी । रथ प्रेरिला कडाडीं । वानरें उभविली पुच्छाची गुढी । नाचे आवडीं रणरंगीं ॥ २५ ॥ एक रावणी राजकुमर । दुजा रामदूत वानर । एक राक्षसी राक्षसेंद्र । दुजा कपींद्र कपींमाजी ॥ २६ ॥ दोघे वीर अति प्रबळ । समान बळ समान शीळ । दोघे संग्रामीं अति कुशळ । दोघे चपळ रणमारा ॥ २७ ॥ दोघे भिडती महावीर । पाहूं आले सुरवर । सिद्ध गंधर्व ऋषीश्वर । नर किन्नर विमानीं ॥ २८ ॥ शचीसहित शचीपती । सावित्रीसहित प्रजापती । उमेसहित उमापती[६] । पाहूं येती संग्रामा ॥ २९ ॥ खवळले दोघे वीर । काळकृतांत अति दुर्धर । दोघे जैसे काळाग्निरुद्र । युद्धीं सत्वर मिसळले ॥ १३० ॥ एक गज एक केसरी । एक हिरण्यकशिपु एक नरहरी । सहस्रबाहु परशुधारी । ऐशियापरी मिसळले ॥ ३१ ॥ एक सर्प एक सर्पारी । एक त्रिपुर एक त्रिपुरारी । एक मुरँ एक मुरारी । ऐशियापरी मिसळले ॥ ३२ ॥ इंद्रजित हाणी दुर्धर घाय । हनुमान फळें खाय विटाय । कुशी खाजवी डोळे मिचकाय । दाविता होय आंगठा ॥ ३३ ॥ इंद्रजित खवळोनि रणीं । वर्षलासे दुर्धर बाणीं । वानर वर्षला पाषाणीं । रणांगणीं गर्जोनी ॥ ३४ ॥ विंधी सुवर्णपुंख भाळीं । वानर हाणी सबळ शिळीं । एक हाणी गदामुद्गलीं । शाळताळीं पैं दुजा ॥ ३५ ॥ इंद्रजित वर्षे विचित्र कांडें । वानर वर्षे चापट धोंडे । रागें उडोनि हाणितां खांडें । वृक्षखंडें ठोकिला ॥ ३६ ॥ साटोपें हाणितां शिवशक्ती । वानर वर्षे अति पर्वतीं । इंद्रजित वेडावला चित्तीं । रणीं मारुति नाटोपे ॥ ३७ ॥ एक चेंडुचक्र पैं सोडी । दुजा हाणी प्रचंड धोंडी । सवेग हाणितां लहुडी । समूळ धोंडी पैं दुजा ॥ ३८ ॥ पट्टिश हाणितां तंवकें । वानरें हाणितां खडकें । फुटलें इंद्रजिताचें धैर्यमडकें । पडला अटके पुच्छाचे ॥ ३९ ॥ इंद्रजिताची रणव्युत्पत्ती[११] । फावल्या रणीं लावी ख्याती । नाटोपतां पळे मागुती । पुच्छाप्रती बळ न चले ॥ १४० ॥ सैन्यासभोंवता चहूंकडां । पडला पुच्छाचा पैं वेढा । सरतां नये मागां पुढां । वानरें वेढा लाविलें ॥ ४१ ॥ पाषाणीं बाण करितां कूट । बाणीं पाषाण करी पीठ । युद्ध मांडलें अचाट । अति संकट इंद्रजिता ॥ ४२ ॥ वानर नाटोपे निजशक्ती । कपटें मारावा मारुती । कपट न चले पुच्छाप्रती । कपटघाती कपिपुच्छ ॥ ४३ ॥ इंद्रजित वर्षे शरधारीं । वानर वर्षे शिळाशिखरीं । सैन्या होतेसे चकचुरी । आंपांपरी[१२] राक्षसां ॥ ४४ ॥ बोंब सुटली सैन्याआंत । इंद्रजित मेला कीं जीत । वानरें केला पर्वतघात । रणीं हुंबत राक्षस ॥ ४५ ॥ न चले शस्त्रअस्त्रयुक्ती । मागें सरतां नये पुच्छाहातीं । पुढें नाटोपे मारुती । चिंतावर्ती[१३] इंद्रजित ॥ ४६ ॥ चिंतातुर देखोनि

१ युद्धाला. २ धैर्य. ३ प्रतिध्वनि. ४ इंद्राणीसहित. ५ ब्रह्मदेव. ६ शंकर. ७ मुरदैत्य. ८ सोन्याच्या पिसाऱ्याचे बाण. ९ बाण. १० आवेशानें. ११ युद्धकौशल्य. १२ दुर्दशा. १३ चिंतेच्या फेऱ्यांत.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

त्यातें । हनुमंत म्हणे इंद्रजितातें । शिळावृक्षीं न हाणीं तूतें । न हाणीं पर्वतें भाक माझी ॥ ४७ ॥ इंद्रजितनामाची ख्याती । जिहीं बाणीं जिंतिला अमरपती । तया बाणीं विंधोनि मजप्रती । विजयवृत्ति साधीं पां ॥ ४८ ॥ ज्या बाणांच्या कडाडीं । देव घातले बांधवडीं । ते मज विंधोनियां प्रौढीं । विजयाची गुढी उभारीं पां ॥ ४९ ॥ ऐसें बोलतां हनुमंता । राग आला इंद्रजिता । मंत्रयुक्ता अस्त्रां समस्तां । होय विंधिता अति कोपें ॥ १५० ॥

शराणामग्रतस्तस्य पुनः समभिवर्तत ।
प्रसार्य हस्तौ हनुमानुत्पपातानिलात्मजः॥ १८ ॥
परस्परं दुर्विषहौ बभूवतुः
समेत्य तौ मारुततुल्यविक्रमौ ।
ततस्तु लक्ष्ये प्रविहन्यमाने
शरेष्वमोघेषु च संपतत्सु ॥ १९ ॥

मंत्रयुक्तास्त्रप्रयुक्तीं । इंद्रजित वर्षे शरसंपत्ती । परता न सरेचि मारुती । शंका चित्तीं मानीना ॥ ५१ ॥ माझे अंगीं बाण रुपती । ही शंका नाहीं हनुमंतीं । सुर नर आश्चर्य मानिती । तैसी ख्याती तेणें केली ॥ ५२ ॥ रामनामाचिया शक्तीं । नित्य निर्द्वंद्वस्थिति मारुती । तेणें इंद्रजितासीं ख्याती । हेही उपपत्ती अवधारा ॥ ५३ ॥ पसरोनियां दोन्ही हात । बाण कवळोनियां समस्त । उसळोनियां गगनाआंत । बाण हाणित राक्षसां ॥ ५४ ॥ पडतां बाणांचा संपातें । स्वयें सैन्या होय निःपात । घायीं राक्षस कुंथत । जालें विपरीत संग्रामीं ॥ ५५ ॥ हनुमंतासीं करितां रण । इंद्रजित भुलला संपूर्ण । आपुलें सैन्य मारी आपण । निर्वाणबाण वर्षोनी ॥ ५६ ॥ धनुष्यबाण हनुमंतासीं । हा संग्राम नाहीं त्यासीं । आवेशें भुली इंद्रजितासीं । निजसैन्यासी मारित ॥ ५७ ॥ माझे निर्वाणींचे बाण । वानरें कवळोनि संपूर्ण । आमचीं शस्त्रें आम्हांसी जाण । रणकंदन मांडिलें ॥ ५८ ॥ इंद्रजिताचे बाणांआंत । स्वानंदें हनुमंत विचरत । बाण मंत्रशक्तियुक्त । केले व्यर्थ हनुमंतें ॥ ५९ ॥ न चले शस्त्रांची खटपट । न चले अस्त्रांचे पैं नेट । न चले वानरासीं कपट । रणीं उद्भट गांजिलें ॥ १६० ॥ दिव्यास्त्रें एक एक । वानरें केलीं निरर्थक । इंद्रजितें घेतला धाक । जीवीं धुकधुक लागली ॥ ६१ ॥ इंद्रजितबाणांची शरसुटी । वानरें करोनियां उटी । धांवोनि झोंबला पैं कंठीं । धनुष्य मुष्टीं मोडिलें ॥ ६२ ॥ सरली बाणांची निजओढी । तरी वानरा प्रौढी गाढी । मल्लविद्येची परवडी । कडोविकडी भीडती ॥ ६३ ॥ उरीं शिरीं आणि कोपरीं । तडवे हाणिती परस्परीं । कळा लावोनि भुजांवरी हाणिती उदरीं चपेटघात ॥ ६४ ॥ सांभाळितां वानरलातें । तंव मस्तकीं हाणितला हातें । सांभाळितां दक्षिणहस्तें । तंव गांजीत डाव्यानें ॥ ६५ ॥ करितां मल्लविद्याव्युत्पत्ती । मागें पुच्छाच्या आघातीं । सव्याघ्र रथ आणि रथसारथी । नेले समाप्ती वानरें ॥ ६६ ॥ मारोनि सारथी भेगिला रथ । इंद्रजित केला दैवहत । न टळे पुच्छाचा आँवर्त । रणीं हनुमंत नाटोपे ॥ ६७ ॥ ध्वज भंगिला आघातें । छत्रें भंगिलीं हाणोनि लातें । मुकुट पाडोनियां तेथें । इंद्रजितातें गांजिलें ॥ ६८ ॥ भूतळीं समस्त ऋषीश्वर । गगनीं पाहती सुरवर । अवघे करिती जयजयकार । विजयी वानर श्रीरामें ॥ ६९ ॥ एका जनार्दना शरण । इंद्रजिताजाला अपमान । पुढें सैन्यनिर्दळण । कपिबंधन अवधारा ॥ १७० ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुन्दरकांडे एकाकारटीकायां इंद्रजितअपमानहनुमद्धस्तेन नाम पंचदशोऽध्यायः ॥ १५ ॥ श्रीसीतारामचन्द्रार्पणमस्तु ॥ ओंव्या ॥ १७० ॥ श्लोक ॥ १९ ॥

अध्याय सोळावा

॥ श्रीसीतारामचंद्राय नमः ॥ इंद्रजित पावोनि अपमान । अतिशयें जाला उद्विग्न । हनुमंताचें बळलक्षण । सर्वथा संपूर्ण लक्षेना ॥ १ ॥ हनुमंताची धैर्यवृत्ती । हनुमंताची संग्रामशक्ती । हनुमंताची सवेग गती । अतर्क्यस्थिति लक्षेना ॥ २ ॥

हनूमतो वेद न राक्षसांऽतरं
न मारुतिस्तस्य महात्मनोंऽतरम् ।
जगाम चिंतां महतीं महात्मा
समाधिसंयोगसमाहितात्मा ॥ १ ॥

१ इंद्र. २ जयस्थिति. ३ ध्वजा. ४ समूह. ५ अत्यंत. ६ उजव्या हातानें. ७ वेढा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

अंतर्क्य हनुमंताची गती । ते लक्षेना नाना युक्तीं । इंद्रजिताची खुंटली मती । रणीं मारुति नाटोपे ॥ ३ ॥ रणीं नाटोपे मारुती । आपुलें पूर्वशौर्य कीर्ती । वानरें नेली निंदेप्रती । सलज्ज चित्तीं इंद्रजित ॥ ४ ॥ इंद्रातें रणीं जिंकोन । पावलों इंद्रजित अभिधान[1] । वानरासीं करितां रण । तृणासमान मज केलें ॥ ५ ॥ मी एक गाढा[2] वीर सृष्टीं । ऐसा फुगारा होता पोटीं । रणीं वानरें पुरवोनि पाठी । तृणासाठीं मज केलें ॥ ६ ॥ जळो माझी धैर्यशक्ती । माझी जळो वीरवृत्ती । रणीं नाटोपे मारुती । कीर्ति अपकीर्ति मज माझी ॥ ७ ॥ भंगिला रथ आणि सारथी । भस्म केली शस्त्रसंपत्ती । रणीं न जिंकवे मारुती । क्षीणशक्ति इंद्रजित ॥ ८ ॥ न चले शस्त्रास्त्रयुक्ती । न चले मल्लविद्याव्युत्पत्ती[3] । कपट न चले वानराप्रती । चिंतावर्ती इंद्रजित ॥ ९ ॥ कोणी एकादी युक्ती । न चले ह्या वानराप्रती । जळो माझी यशःकीर्ती । चिंतावर्ती इंद्रजित ॥ १० ॥ माझ्या वरदाची वरोक्ती । मारूं न शके मज मारुती । धरोनि नेलिया रामाप्रती । विटंबिती वानरें ॥ ११ ॥ रावणें आणिलें सीतेसी । बांधून नेईल मज रामापासीं । तेथें करितां अपमानासी । वानरासी कोण वारी ॥ १२ ॥ रावणें होऊनि भिकारी । चोरोनि आणिली सीता सुंदरी । वानरें करोनि झुंझारी । मज निर्धारीं नेईल ॥ १३ ॥ अंगदाच्या पाळण्यासीं । खेळणें बांधिलें दशमुखासी । पौलस्तीनें मागतां त्यासी । अपमानेंसीं सोडिला ॥ १४ ॥ मुंडोनि दाढ्या मिशांसी । मसी लावोनियां मुखांसी । पांच पाट काढोनि शिरांसीं । ऐसा लंकेसीं धाडिला ॥ १५ ॥ मज धरोनि नेलिया मारुती । माझी होईल तैसीच गती । कांहीं नचले उपपत्ती । चिंतावर्ती इंद्रजित ॥ १६ ॥ पुच्छीं बांधोनि हनुमंता । येथोनि मज धरोनि नेतां । धांवण्या कोणी नये सर्वथा । परम चिंता इंद्रजिता ॥ १७ ॥ सुबद्ध[6] धाक घेतला पोटीं । रणीं वानरा देवोनि पाठी । इंद्रजित पळे उठाउठीं । पुच्छासाठीं धाकोनि ॥ १८ ॥ पळतां न पळवे पुढें । पडिलें पुच्छाचें बिरडें । तेथल्या विवरामाजी दडे । बहु माकडें गांजिलें ॥ १९ ॥ दुस्तर धाक घेतला मनीं । गुप्त विवर अशोकवनीं । इंद्रजित गेला पळोनी । सुलीन होवोनि दडाला ॥ २० ॥ हनुमंत वीर जगजेठी । न लागेचि पळत्यापाठीं । समूळ विचारोनि पोटीं । विवेकदृष्टीं राहिला ॥ २१ ॥ इंद्रजिताचें निजमरण । सर्वथा नाहीं मजअधीन । तरी कां वृथा करूं निर्वाण । आंगवण कां नासूं ॥ २२ ॥ इंद्रजितासी मज मारितां । क्षण न लगे पैं आतां । ब्रह्मवरदाची वार्ता । मिथ्या सर्वथा मी न करीं ॥ २३ ॥ ऐसऐसिया विवेकदृष्टीं । हनुमान न लागे इंद्रजितापाठीं । सैन्य अवलोकिलें दृष्टीं । धांवे कडकडाटीं वधावया ॥ २४ ॥ पुच्छ म्हणे स्वामिनाथा । कवळोनि राखिलें समस्तां । तूं भागलासि युद्ध करितां । मज वधार्था दे आज्ञा ॥ २५ ॥ हनुमंत म्हणे तुझेनि बळें । म्यां महावीरां मांडिलें छळें । आतां विभांडोनियां दळें । रणकल्लोळें विचरोनि ॥ २६ ॥ मी जातें तूं घालीं वैरण । ऐसेनि भरडूं राक्षसधान्य । डोळ उरती जे सघन । रणकंदन करूं त्यांसी ॥ २७ ॥ मारावया सैन्यसंभार । करोनि पुच्छासीं विचार । मग दिधला भुभुःकार । निशाचर[11] खळवळले ॥ २८ ॥

अश्वैरश्वान्गजैर्नागान्योधैर्योधान् रथै रथान् ।
लांगूलेनाप्यनेकांश्च सैनिकान् समपोथयत् ॥ २ ॥
तलेनाभ्यवधीत्कांश्चित्पद्भ्यां कांश्चित्परंतपः ।
मुष्टिभ्यामवधीत्कांश्चिन्नखैः कांश्चिद्व्यदारयत् ॥ ३ ॥
ममार चोरसा कांश्चिदूरुभ्यामपरान् कपिः ।
केचित्तस्यैव नादेन तत्रैव पतिता भुवि ॥ ४ ॥
कृत्वा वै विस्वरान्नादान्निपेतुर्भुवि वाजिनः ।
भग्ननीडध्वजच्छत्रैर्भुवि कीर्णोऽभवद्रथः ॥ ५ ॥
स कपिर्नाशयामास राक्षसान्बलदर्पितान् ॥ ६ ॥

हनुमान देखोनि महाबळी । असुरीं मांडिली तंव फळी[12] । शस्त्रें सुटलीं समकाळीं । नभीं भूतळीं न समाती[13] ॥ २९ ॥ अतिरथी महारथी । अश्वपती गजपती । शस्त्रें हाणिती पदाती । रणीं मारुती लक्षोनि ॥ ३० ॥ शस्त्रघाताच्या समेळीं । हनुमान नाचत गोंधळीं । पुच्छें शस्त्रांची करोनि होळी ।

१ नांव, संज्ञा. २ बलिष्ठ. ३ मल्लविद्येचें ज्ञान. ४ युद्ध. ५ युक्ति. ६ अत्यंत. ७ भीति. ८ अति गुप्त. ९ सामर्थ्य, बळ. १० ब्रह्मदेवाच्या वराची. ११ राक्षस. १२ युद्ध. १३ मावेनात.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

रणसमेळीं विचरत ॥ ३१ ॥ हनुमान रणीं निंघट-घट । वीर हाणिती सुभट । हाणितां शस्त्रें होती पीठ । हाहा कटकटा राक्षसां ॥ ३२ ॥ करावया सैन्यसमाप्ती । रणीं खवळला मारुती । सवें मारका निजशक्ती । रणीं व्युत्पत्ति अवधारा ॥ ३३ ॥ अश्वीं अश्वातें मारित । गजीं गजातें संहारित । रथीं रथ उपडित । मारुनी मत्त सारथी ॥ ३४ ॥ पायींचे पायीं रगडित । वीरें वीर पैं झोडित । ध्वज छत्रेंसीं मोडित । रणीं मारित अति मारें ॥ ३५ ॥ पुच्छीं कवळोनि गजकोटी । हनुमान उसळोनि आपटी । गजीं गज ते उपटी । पडिलीं सृष्टीं गज-दळें ॥ ३६ ॥ विदारितां कुंभस्थळें । निघती गजांचीं मुक्ताफळें । रणीं पाडिलीं गजढिसाळें । पुच्छबळें उपडोनी ॥ ३७ ॥ शायसीं प्रयुतें[३] मत्त हस्ती । पुच्छें केली रणसमाप्ती । हस्तींच्या पिष्ट करोनि अस्थी । लाविली ख्याती कपिपुच्छें ॥ ३८ ॥ पुच्छ रिघोनि सैन्यतळीं । महावीरां बांधोनि मोळी । आपटितां त्यांसी भूतळीं । जाहली रांगोळी सैन्याची ॥ ३९ ॥ खर उष्ट्र अश्वतर । पुच्छीं बांधोनि अपार । तळीं उभे अश्वसंभार । घायें चकचूर करी त्यांचा ॥ ४० ॥ पुच्छें करितां महामार । रणीं उठला हाहाकार । येरीकडे हनु-मान वीर । करी वीरमार तो ऐका ॥ ४१ ॥ एक मारी करतळीं । असंख्य रगडिले पायांतळीं । अमित मारिले मुष्टिसमेळीं । नखें चिरफळी एकैकां ॥ ४२ ॥ एक मारिले जानुचक्रीं[४] । वीरीं केली बहुमारी । एक मारिले अर्धचंद्रीं । गिरिवरीं मारिले ॥ ४३ ॥ आंवळोनियां उरावरी । वीर मारिले शतसहस्त्रीं । तळवे हाणोनि उपराउपरीं । लक्षांतरीं मारित ॥ ४४ ॥ भुभुःकार देतां अति तवकें[६] । एकें निमालीं उपधाकें । एकें पडिलीं अधोमुखें । मेलीं अनेकें अंगवातें ॥ ४५ ॥ देतां भुभुःकार प्रबळ । रणीं उठला हलकल्लोळ । मेणें करोनि मूत्रमळ । प्राण तत्काळ सांडिले ॥ ४६ ॥ हनुमंताचे गिरागजरीं । वाजंत्री निमाले नादें-करीं । जो तो रणीं शंख करी । आपांपरी राक्षसां ॥ ४७ ॥ सभोंवता पुच्छाचा आवर्त । मध्यें मारित हनुमंत । जाला सैन्यासी अंत । आला प्राणांत राक्षसां ॥ ४८ ॥ पुच्छें पुरविली पाठी । होऊं नेदी कुटुंबभेटी । लंका पाहूं नेदी दृष्टी । जीवासाठीं राक्षसां ॥ ४९ ॥ रणीं मारितां हनुमंत । पुच्छ पळों नेदी नगरांत । जो तो येवोनि युद्धाआंत । पडे मूर्च्छित अति धाकें ॥ ५० ॥ एक घायें झालीं वेडीं । एकें पडलीं उपडीं । एकें नागवीं उघडीं । मेलीं मढीं होवोनि ठेलीं ॥ ५१ ॥ झाडिला इंद्र-जिताचा पार्दांडा । केला सैन्याचा नितोंडा । रामनामें हनुमान गाढा । केला झगडा निजनेटें ॥ ५२ ॥ रथ भंगिले कोट्यनुकोटी । मारिल्या अश्वगजांच्या थाटी[१०] । छत्रें भंगोनि लोळती सृष्टीं । ध्वजा कोट्यनुकोटी विखरलिया ॥ ५३ ॥ अशुद्ध वाहतें गडाडी । तेचि रणनदी गाढी । जाहल्या प्रेतांच्या दरडी । गजकरवडी[११] तेचि ग्राहें[१२] ॥ ५४ ॥ तीर तरती सपिच्छ । तेचि रणनदीचे मत्स्य । वोडणें[१३] वाहती ते कच्छ[१४] । सर्प सपुच्छ रणभाले ॥ ५५ ॥ मेद मांस अति दुर्गम । तोचि दोहीं तीरींचा कर्दम[१५] । वीर मिसळले विक्रम[१६] । सुसरी परम दों भागीं ॥ ५६ ॥ मोक्षसुखाची सुरवाडी । रणनदी वाहे पुराडी[१७] । सर्वस्वत्यागें घालिती उडी । त्या त्या जोडीतें तो जाय ॥ ५७ ॥ ध्वजेंसीं वाहे रहंवरू । तेंचि शिडेंसहित तारू । तेथें तारक श्रीरामचंद्रु । पापपारू पावती ॥ ५८ ॥ रिघोनियां रणसमुद्रीं । जो बैसे या तारवावरी । त्यासी श्रीराम सूत्रधारी । परपारीं पाववी ॥ ५९ ॥ या तारुवातें दृढ जो धरी । त्यासी श्रीराम स्वयें तारी । या तारवाची कीर्ति जो करी । राम पर-पारीं पाववी ॥ ६० ॥ उदो म्हणुनि भद्रकाळी । घेवोनि आली भूतावळी । खाती मांसाच्या वडवाळी[१८] । रुधिरांजुळी प्राशित ॥ ६१ ॥ या रणा-चिया युद्धख्याती । जे आवडीं नित्य गाती । श्रीराम सुखावोनि चित्तीं । त्यांसी तारी स्वानंदें ॥ ६२ ॥ आनंदें नाचे क्षेत्रपाळ । शिरें चौंडकें[१९] वाहे वेताळ । भूतें मिळोनियां सकळ । रणगोंधळ नाचती ॥ ६३ ॥ बहुतां दिवसांचें धरणें । दिधलें हनुमंतें पारणें । अवघे घालिती लोटांगणें ।

१ घटावलेला, निर्ढावलेला. २ मोठमोठे हत्ती. ३ प्रयुत= दश लक्ष. ४ गुडघ्यांनीं. ५ गचांडी देऊन. ६ वेगानें. ७ दुर्दशा. ८ गर्व. ९ नाश. १० समुदाय. ११ हत्तींचीं प्रेतें. १२ सुसरी. १३ ढाली. १४ कासवें. १५ चिखल. १६ पराक्रमी. १७ पुरानें. १८ ग्रास. १९ एक प्रकारचें वाद्य.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

विजयी होणें रणरंगीं ॥ ६४ ॥ काळिजें घेवोनि हातीं । रणीं यक्षिणी वाणें देती । शंखिणी डंखिणी वाणें घेती । मग भक्षिती स्वानंदें ॥ ६५ ॥ पिकें पिकली रणनगरी । राक्षसदांतांच्या राशी थोरी । भूतें मोजती कुडवेवरी । पाहे क्रीडेसीं हनुमंत ॥ ६६ ॥ देव ब्राह्मण भैरवांसी । बलुतें दिधलें वेताळासी । खळें दान तें भूतांसी । महाकाळीसी राजभाग ॥ ६७ ॥ खळें मातेरें मारकोसी । मेसको तिचे घरची दासी । वेसपेंडी सटवीसी । पाळीच्या भान्यासी काळिका ॥ ६८ ॥ अग्रपिकाची व्युत्पत्ती । विभागिली स्वयें मारुतीं । पश्चिम धान्याची महाख्याती । रघुपति विभागील ॥ ६९ ॥ करोनि सैन्याचा नितोडा । काढोनि पुच्छाचा पैं वेढा । देवळाचा पहिला हुडा । हनुमान गाढा बैसला ॥ ७० ॥ गेला देखोनि हनुमंत । सबळ वीर समस्त । आणिक घायाळ कुंथत । स्वनगरांत निघाले ॥ ७१ ॥ एक कण्हत एक कुंथत । एक हुंबत एक हुंबरत । एक पाणी पैं मागत । एक खुण हात दावोनी ॥ ७२ ॥ एक रडत एक पडत । एक अतिशयें चडफडित । एक अति दुःखें तडफडित । एक खुरंडत कटिभंगें ॥ ७३ ॥ एकाचें फुटलें कपाळ । एक ते अशुद्धबंबाळ । एकाची ओढे अंतरमाळ । एका तळमळ अति घातें ॥ ७४ ॥ एकाच्या मस्तका झाला भंग । एकाचें पर्वतीं चेंदलें अंग । एकाचे चरण पडिले व्यंग । एका क्षयरोग शाळताळीं ॥ ७५ ॥ पाडोनि राक्षसांचे दांत । मुष्टिघातें घातले घशांत । नखें नाकें छेदिलीं बहुत । वीर कुंथत अति लाजें ॥ ७६ ॥ रण शोधावया देख । अशोकवनीं न येती लोक । पुच्छें लाविलासे धाक । एकाएकीं धांवती ॥ ७७ ॥ समस्त सैन्या केली बोहरी । कळकळिती नरनारी । बोंब सुटली घरोघरीं । लंकानगरीं आकांत ॥ ७८ ॥ काळतोंडी रावणाची थोरी । चोरोनि आणिली सीता सुंदरी । केली राक्षसांची बोहरी । महामारी वानरें ॥ ७९ ॥ दशमुख तो काळमुखा । सीता चोरोनि आणिली देखा । मारविलें सकळ कटका । दुःखें लंका लवंडिली ॥ ८० ॥ मुळींच राजा जाला भिकारी । त्यावरी निंद्य कर्म चोरी । तेही हरण परनारी । आली महामारी राक्षसां ॥ ८१ ॥ रणीं रावण मरता । तैं लंकालोक स्वस्थ होता । करविलें इंद्रजिताचे घाता । रणीं हनुमंतावरी धाडूनी ॥ ८२ ॥ करितां अखयाचा कैवार । रणीं मारविला ज्येष्ठकुमर । शंख करिती निशाचर । दशवक्त्र हडबडिला ॥ ८३ ॥ इंद्रजित मेला किंवा जीतं । हे कोणी न सांगती मात । तेणें हडबडिला लंकानाथ । केला घात वानरें ॥ ८४ ॥ शोधूं जावें जंव रणासीं । भूतीं भक्षिलें प्रेतांसी । तेथें ओळखी कायसी । रावणासी अति दुःख ॥ ८५ ॥ रणीं निमाला ज्येष्ठ सुत । रावण मुखीं धुळी घालित । दाही मुखीं शंख करित । आक्रंदत अति दुःखें ॥ ८६ ॥ दुःखें गडबडां लोळे । केश सुटले मोकळे । अश्रुधारा स्रवती डोळे । पिटी कपाळें अति दुःखें ॥ ८७ ॥ इंद्रजिताच्या केलें घाता । काय करावें म्यां आतां । रणीं न धरवे हनुमंता । परम चिंता रावणा ॥ ८८ ॥ ब्रह्मयानें सांगितलें मजपासीं । गळा बांधोनि वानरासी । इंद्रजित आणील तुजपासीं । असत्य त्यासी कां जालें ॥ ८९ ॥ ब्रह्मयाचे ब्रह्मवाणीसीं । नाहीं विटाळ असत्यासी । भय नाहीं इंद्रजितासी । निश्चयेंसीं मी जाणें ॥ ९० ॥ पाचारोनि चतुराननन । त्यासी पुसे दशानन । इंद्रजित आणील कपि बांधोन । तें सत्य वचन करावें ॥ ९१ ॥ इंद्रजिताची स्थिति गती । राक्षस आणूं न शकती । वनीं बैसला मारुती । राक्षसघाती महावीर ॥ ९२ ॥ मीच जावोनि अशोकवना । इंद्रजिताची विवंचना । समूळ आणोनियां मना । दशानना सांगेन ॥ ९३ ॥ ऐसें सांगोनि लंकापती । वना आला प्रजापती । हनुमंतें ब्रह्मयाप्रती । घातलें क्षितीं लोटांगण ॥ ९४ ॥ ब्रह्मा हनुमंता सांगत । आला राक्षसांसी अंत । अवश्य तुवां करावा घात । लंकानाथ न मारूनी ॥ ९५ ॥ कुंभकर्ण आणि लंकानाथ । यांसी वधील श्रीरघुनाथ । लक्ष्मण वधील इंद्रजित । येरांचा अंत वानरीं ॥ ९६ ॥ हनुमान सांगे ब्रह्मयासी । माझी आवडी आहे ऐसी । भेटी घेवोनि

१ गांवचे वतनदार उपाध्या, जोशी वगैरे यांस चाकरीबद्दल दिलें जाणारें धान्यादि. २ नाश. ३ रक्तानें भरलेले, माखलेले. ४ सैन्य. ५ राक्षस. ६ रावण. ७ जीवंत. ८ चार मुखांचा, ब्रह्मदेव. ९ जमिनीवर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

रावणेंसीं । करूं लंकेसीं वाताहात ॥ ९७ ॥ ब्रह्मा सांगे हनुमंतासी । इंद्रजित तुझेनि भयेंसीं । लपाला विवरप्रदेशीं । मी त्याजपासीं जातसें ॥ ९८ ॥ तुज न लागे पाशबंधन । हें मज आहे निजज्ञान । माझें ऐकावें वचन । ब्रह्मबंधन मानावें ॥ ९९ ॥ इंद्रजित घालील ब्रह्मपाशासीं । तुवां बद्ध मानोनि आपणासी । स्वयें जावें गा लंकेसीं । रावणासी भेटावया ॥ १०० ॥ रावणाची घ्यावी भेटी । आवडी आहे तुझे पोटीं । ब्रह्मपाश मानोनि कंठीं । यावें त्रिकूटीं लंकेसीं ॥ १ ॥ इंद्रजिताचेनि हस्तपातें । हनुमान मानी पाशबंधातें । ब्रह्मदेवा तुझेनि हातें । ब्रह्मबंधातें मानीन ॥ २ ॥ ब्रह्मा म्हणे ऐसेंचि घडे । माझेनि हातें वाडेंकोडें । हनुमंता पाशबंधनीं पडें । रावणापुढें न्यावया ॥ ३ ॥ इंद्रजितें वानरा देखोनि पाठी । विवरीं पळतां अति संकटीं । अनुतापला कपाळ पिटी । उडाली पुष्टी वाढिवेची ॥ ४ ॥ इंद्रजित अति लज्जायमान । विवरामाजी बैसोन । वानरा ब्रह्मपाशीं बंधन । करी तें विंदान अवधारा ॥५॥ एका जनार्दना शरण । वानरा ब्रह्मपाशबंधन । बंधनीं मारुती निर्बंधन । कथाविंदान अवधारा ॥ ६ ॥

स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां हनुमत्कृतरावणसैन्यवधो नाम षोडशोऽध्यायः ॥ १६ ॥ ओंव्या ॥ १०६ ॥ श्लोक ॥ ६ ॥

॥ श्रीसीतारामचंद्रार्पणमस्तु ॥

अध्याय सतरावा

श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ॥ रणीं पाठी देखोनि वानरा । लपाला असतां विवरा । परम लज्जा राजकुमरा । काय महावीरां मुख दावूं ॥ १ ॥ माझी वीरवृत्ति अति लाठी । इंद्रजितनामाची ख्याति मोठी । वानरें नेली पुच्छासाठीं । रणसंकटीं गांजोनी ॥ २ ॥ कपिपुच्छाचा दुर्धर मार । रणीं गांजिला राजकुमर । सैन्या जाला समूळ मार । काय करूं मी आतां ॥ ३ ॥ कैसेनि भेटों महावीरां । कैंवी मुख दावूं राक्षसेंद्रा । आतां न वचें लंकापुरा । लाजेचें वीरा अति दुःख ॥ ४ ॥ वाहिली सदाशिवाची आण । शिवलों रावणाचे चरण । प्रमाणें जालीं अप्रमाण । वानरें पूर्ण गांजिलें ॥ ५ ॥ मज रणीं येतें मरण । तरी पावतों कृतकल्याण । अवकळा वांचले प्राण । वरदान जळो माझें ॥ ६ ॥ अवकळेचें जें जिणें । त्याहूनि श्रेष्ठ रणीं मरणें । जळोत माझीं वरदवचनें । वरदानें नागविलें ॥ ७ ॥ पोटीं घालावयापुरतें । शस्त्र नुरेचि माझे हातें । लाजें जीव द्यावा येथें । वरदान मातें मरों नेदी ॥ ८ ॥ रणीं गांजिलें माकडें । कांहीं उपाय न चले पुढें । इंद्रजित खळखळां रडे । अति सांकडें ओढवलें ॥ ९ ॥ मुख दावूं नये लाजेहातीं । मरण न ये वरदोक्तीं । इंद्रजित पडला अति आकांतीं । तंव ब्रह्मोक्ती आठवली ॥ १० ॥ गळा बांधोनि मारुती । इंद्रजित आणील लंकेप्रती । ऐसें बोलिला प्रजापती । त्यासी निश्चितीं पाचारूं ॥ ११ ॥ मिथ्या नव्हे ब्रह्मवाणी । तरी कां मी भंगलों रणीं । हनुमान न बांधवे बंधनीं । सत्यवचनी कैंवी ब्रह्मा ॥ १२ ॥ पाँचारावया चतुराननन । धाडावया नाहीं सेवकजन । बाहेर निघतां आपण । रोकडें मरण कपिपुच्छें ॥ १३ ॥ मज बाहेरी निघतां । पुच्छ करील माझे घाता । हनुमंत लागला मजभोंवता । नेदी विधाता मज भेटों ॥ १४ ॥ माझ्या पित्र्याचे पित्याचा पिता । कैसेनि भेटे मज विधाता । ऐसी इंद्रजित करितां चिंता । आला अवचिता परँमेष्ठी ॥ १५ ॥ ब्रह्मा देखोनि अवचिता । हर्ष इंद्रजिताच्या चित्ता । चरण वंदोनियां माथां । होय सांगता उल्लासें ॥ १६ ॥ स्वामी बोलिलेति वचनोक्ती । गळा बांधोनि मारुती । तूं आणिसील लंकेप्रती । मज उपहंति कां जाली ॥ १७ ॥

ततो मतिं राक्षसराजसूनु-
श्चकार तस्मिन्हरिवीरमुख्ये ।
अवध्यतां तस्य कपेः समीक्ष्य
कथं निगच्छेदिति निग्रहार्थम् ॥ १ ॥
ततः पैतामहं वीरः सोऽस्त्रमस्त्रविदांवरः ।
संदधे सुमहातेजास्तं हरिप्रवरं प्रति ॥ २ ॥
अवध्योऽयमिति ज्ञात्वा तमस्त्रेणास्त्रतत्त्ववित् ।
बबंध तं महाबाहुं मारुतात्मजमिंद्रजित् ॥ ३ ॥

---

१ नासाडी. २ आवडीनें. ३ पराक्रमाची. ४ मोठी. ५ लाजेमुळें. ६ बोलवण्यास. ७ ब्रह्मदेव. ८ पिता रावण, त्याचा पिता पुलस्त्य, त्याचा पिता ब्रह्मदेव. ९ प्रतिबंध, त्रास.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

तो राक्षसराजसुत । स्रष्ट्याप्रति असे पुसत । कैसेनि बांधवे हनुमंत । त्यासी निग्रहार्थ मज सांगें ॥ १८ ॥ हनुमान हरिहरां अवध्य । तया माझेनि न करवे बंध । कपीसीं न चले माझा क्रोध । वाक्य अवद्ध बंधनीं ॥ १९ ॥ इंद्रजिताचे निजहस्तीं । बंधन पावोनि मारुती । आणिजेल लंकेप्रती । ते वचनोक्ती सत्य करा ॥ २० ॥ असत्य न व्हावें ब्रह्मवचन । कपीस ब्रह्मपाशबंधन । नारदें सांगितलें आपण । ते आठवण मज जाली ॥ २१ ॥ स्वामीनें कृपा करून । द्यावें ब्रह्मपाशबंधन । तेणें मी हनुमंता बांधोन । मग श्लाघ्यता वाढिवीं ॥ २२ ॥ यासी ब्रह्मपाश नेदितां । मिथ्या मानी ब्रह्मवाक्यता । दिधल्या न बांधवे हनुमंता । प्रत्ययार्था दिधलें ॥ २३ ॥ इंद्रजित ब्रह्मपाश घेऊनी । मोकली मारुति लक्षोनी । कपि न लिंपे पाशबंधनीं । निर्वंधनी ब्रह्मपाशा ॥ २४ ॥ इंद्र यम वायु वरुण । यांचें हनुमंता वरदान । शशी सूर्य वन्हि ईशान[1] । यांचें वरदान हनुमंता ॥ २५ ॥ हरिहरांचें वरदान । ब्रह्मयाचें ब्रह्मवरदान । कपीस ब्रह्मपाशबंधन । न बांधी जाण वरदानें ॥ २६ ॥ कर्मपाश धर्मपाश । ब्रह्मयाचे ब्रह्मपाश । बांधूं न शके जन्मपाश । नित्य निर्दोष हनुमंत ॥ २७ ॥ हनुमान सबाह्य निराश । निरपेक्षाचे हरिहर दास । त्यासी कैसेनि बांधिती पाश । नित्यनिराश हनुमंत ॥ २८ ॥ पाश न लागती हनुमंता । इंद्रजितासी परम चिंता । ब्रह्मपाश गेले वृथा । तेचि श्लोकार्था अनुवादे ॥ २९ ॥

अहो महत्कर्म कृतं निरर्थं न राक्षसैर्मंत्रगतिर्विमृष्टा ।
पुनश्च नास्त्रे विहतेऽस्त्रमन्यत्प्रवर्तते संशयिताः स्म सर्वे ॥ ४ ॥
अस्त्रं तद्वितथं दृष्ट्वा चिंतयामास राक्षसः ।
अथागत्य ततो ब्रह्मा मारुतात्मजमब्रवीत् ॥ ५ ॥

इंद्रजित ब्रह्मपाश घालितां । ते न लगती हनुमंता । वानरें महाकर्म केलें वृथा । जघन्यता[2] मज आली ॥ ३० ॥ जेथें न चले माझी मंत्रशक्ती । न चले ब्रह्मपाश ब्रह्मशक्ती । तेथें राक्षसमंत्रयुक्ती । कैसेनि रीतीं सरेल ॥ ३१ ॥ माझी अस्त्रशस्त्रशक्ती । ब्रह्मपाश ब्रह्मशक्ती । अवघी वृथा केली मारुतीं । राक्षसयुक्ती अति मिथ्या ॥ ३२ ॥ ज्यासी बांधीना ब्रह्मपाशशस्त्र । त्यावरी न चले आणिकाचें अस्त्र । वानर सर्वार्थीं दुर्धर । यासी कपींद्र नाटोपे ॥ ३३ ॥ ब्रह्मयानें दिधली खोटी शक्ती । म्हणोनि न बांधवे मारुती । इंद्रजित कोपला प्रजापती । दुष्टमति आम्हांवरी ॥ ३४ ॥ तूं आमचा मूळपुरुष । तुवांचि मांडिला आमुचा द्वेष । रणीं मारावे राक्षस । देशी उपदेश वानरा ॥ ३५ ॥ ब्रह्मा म्हणे तूं विकल्पमूर्ती[3] । ब्रह्मद्वेष तुझ्या चित्तीं । तुज नातळे ब्रह्मशक्ती । रणीं मारुती कैंवी बांधवे ॥ ३६ ॥ निष्कपट निर्मळवृत्ती । शम दम नित्य शांती । त्याचेनि हातें ब्रह्मशक्ती । विजयप्राप्ती स्वानंदें ॥ ३७ ॥ माझी शक्ती दे मजप्रती । बांधोन देईन मी मारुती । तुमच्या न चलती युक्ती । तुम्हां मारुती न बांधवे ॥ ३८ ॥ मापेंवीण कणांच्या राशी । न मोजवती आणिकांसी । राक्षसीं पीडावें भूतांसी । हनुमंतासी न बांधवे ॥ ३९ ॥ डोळा देखे सर्वरूपासी । देखों न शके आपणासी । जीवपीडा[4] राक्षसांपासीं । हनुमंतासी न बांधवे ॥ ४० ॥ पाशशक्ति घेवोनि हातीं । सन्मुख येवोनि प्रजापती । स्वयें बोले हनुमंताप्रती । तेही उपपत्ती अवधारा ॥ ४१ ॥

नानृतं मद्वचो बंधग्रहणं कुरु वानर ।
एवमुक्तस्तथेत्युक्त्वावदत्कपिवरात्मजः ॥ ६ ॥
अभिवंद्य विचेष्टः स पपात धरणीतले ।
अस्त्रेण चापि बद्धस्य भयं मम न जायते ॥ ७ ॥

ब्रह्मा म्हणे हनुमंतासी । तुज न बांधवे ब्रह्मपाशीं । माझें वचन सत्यत्वासीं[5] । मानीं आपणांसी पाशबंध ॥ ४२ ॥ असत्यवाद माझे माथां । येवों नेदीं हनुमंता । ब्रह्मवाक्यें बंधनता । पाशबंधनता मानावी ॥ ४३ ॥ ब्राह्मणाचें ब्रह्मवचन । तुळंघिसी अणुप्रमाण । माझें पाळोनियां वचन । पाशबंधन मानावें ॥ ४४ ॥ ऐकोनि ब्रह्मयाचें वचन । हनुमंत घाली लोटांगण । तुझेनि बोलें देह त्यागीन । पाशबंधन तें किती ॥ ४५ ॥ ऐसें बोलोनि हनुमंत । ब्रह्मपाशीं पडे मूर्च्छित । धरणीवरी[6] निचेष्टित । धकधकित जैंवी भ्याड ॥ ४६ ॥ ब्रह्मपाशीं हनुमंत । पडला दिसे निचेष्टित । परी

१ शंकर. २ हीनत्व, कमीपणा. ३ संशयाची केवळ मूर्तीच. संशयी. ४ प्राणिमात्राला छळणें. ५ खरें करून. ६ पृथ्वीवर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

तो वंधमोक्षातीत । नित्यनिर्मुक्त रामभक्त ॥ ४७ ॥ ब्रह्मपाशीं हनुमंत । निश्चयेंसीं नित्य निर्मुक्त । ब्रह्माज्ञे बद्धत्व दावित । प्राकृत मानित बांधला ॥ ४८ ॥ जेंवी रवि थिलरांत । लोक मानिती थिल्लरस्थ । तेंवी कपि ब्रह्मपाशांत । बांधला दिसत परी मुक्त ॥ ४९ ॥ विजयी वीर इंद्रजित । ब्रह्मपाशीं बांधला हनुमंत । ऐशा गोष्टी लंकेआंत । सांगती मात घरोघरीं ॥ ५० ॥ ब्रह्मपाशें बांधला हनुमंत । परी तो ब्रह्मबंधातीत । देखोनि इंद्रजित विस्मित । तेंचि बोलेन श्लोकार्थी ॥ ५१ ॥

ततस्ते राक्षसा दृष्ट्वा निर्विचेष्टमरिंदमम् ।
बबंधू रज्जुपाशैश्च द्रुमचीरैश्च संहतैः ॥ ८ ॥
स बद्धस्तेन बंधेन विमुक्तस्तेन वीर्यवान् ।
अस्त्रबंधः स चान्यं हि न बंधमनुवर्तते ॥ ९ ॥
कृष्यमाणश्च रक्षोभिस्तैश्च बंधैर्न पीडितः ।
हन्यमानस्ततः क्रूरै राक्षसैः काष्ठमुष्टिभिः ॥ १० ॥
अथेंद्रजित्तं प्रसमीक्ष्य मुक्तमस्त्रेण बद्धं द्रुमचीरसूत्रैः ।
व्यदर्शयत्तत्र महाबलं तं हरिप्रवीरं सगणाय राज्ञे ॥ ११ ॥

क्षितितळीं निश्चेष्टितें । पडिला देखोनि हनुमंत । राक्षस धांवोनि समस्त । त्यासी बांधित वेलवाखीं ॥ ५२ ॥ एक तृणवेंठी वळिती । एक वृक्षसाली काढिती । एक द्रुम चिरफळिती । रणीं मारुती बांधावया ॥ ५३ ॥ एक आणिती चर्‍हाटें । एक वळिती सलंब फांटे । देखोनि हांसिजे मर्कटें । बंधन खोटें मज न लागे ॥ ५४ ॥ राक्षसें बापुडीं वेडीं । व्यर्थ करिती ओढाओढी । फोडीन लंकेच्या उतरंडी । पाडीन दरडी दुर्गाच्या ॥ ५५ ॥ रावणा देखोनियां दृष्टीं । यांचा घावो साहोनि पृष्टीं । तो घावो नेवोनि तृणासाटीं । लंका उठाउठीं जाळूं आजी ॥ ५६ ॥ ऐसा आवांका धरोनि पोटीं । द्रुमचीरबंधन मानूनि कंठीं । घ्यावया रावणाची भेटी । जातो जगजेठी हनुमंत ॥ ५७ ॥ जातां हनुमंताप्रती । भेणें पळाली ब्रह्मशक्ती । ब्रह्मपाशीं मुक्त मारुती । चिंतावर्ती इंद्रजित ॥ ५८ ॥ जो बांधवेना ब्रह्मपाशीं । तो केंवी बांधवे द्रुमपाशीं । वंधनमिसें जातो लंकेसी । रावणासी गांजावया ॥ ५९ ॥ बंधन नाहीं हनुमंता । मिथ्या मानोनि बंधनता । स्वयें लंकेसी जातो आतां । लंकानाथा गांजावया ॥ ६० ॥ आम्हासी गांजिलें अशोकवनीं । रावणा गांजील लंकाभुवनीं । परम चिंता इंद्रजिताचे मनीं । अपेश जनीं मज आलें ॥ ६१ ॥ इंद्रजितें हनुमंत । बांधोनि आणिला लंकेआंत । हेची लोकीं विरूढली मात । करील अनर्थ तें नकळे ॥ ६२ ॥ ब्रह्मयानें सांगितलें कानीं । तें हनुमंतें धरोनि मनीं । प्रवेशला लंकाभुवनीं । इंद्रजिताचे मनीं चळकांप ॥ ६३ ॥ इंद्रजित म्हणे राक्षसांसी । हनुमाना बांधा ब्रह्मपाशीं । ब्रह्मपाशें बंधन नाहीं त्यासी । तो तुम्हांसीं न धरवे ॥ ६४ ॥ राक्षस म्हणती वानर किती । सांपडलें आमुच्या हातीं । आम्ही याची करूं शांती । तूं कां चित्तीं भितोसी ॥ ६५ ॥

तं मत्तमिव मातंगं बद्धं कपिवरोतत्तमम् ।
रक्षोभिर्विकृताकारैः कृष्यमाणं ततस्ततः ॥ १२ ॥
स ददर्श महातेजा रावणः कपिसत्तमम् ।
राक्षसा राक्षसेंद्राय रावणाय न्यवेदयन् ॥ १३ ॥
हन्यतां दह्यतां चापि भक्ष्यतामिति चापरे ।
राक्षसास्तत्र संक्रुद्धाः परस्परमथाब्रुवन् ॥ १४ ॥
स हन्यमानो बहुभिश्च तत्र
समेत्य रक्षोधिपतेश्च दूतैः ।
न प्राणचिंता न शरीरभंग-
स्ते राजदूता व्यथिता बभूवुः १५ ॥

मत्तमातंगं महाबळी । वृथा बांधिजे कमळंमृणाळीं । तेंवी हनुमंत महाबळी । बांधिजे सकळीं वृक्षशाखा ॥ ६६ ॥ एक बांधिती रज्जुबंधनीं । एक बांधिती वाक वळूनी । एक बांधिती मुंज चिरूनी । कपि धरोनी आणिला ॥ ६७ ॥ एक ओढिती पूर्वेसी । एक ओढिती पश्चिमेसी । एक ओढिती उत्तरेसी । दक्षिणेसी एक पैं ॥ ६८ ॥ एक रागें हाणिती बुक्की । जो हाणी तो होय दुःखी । मणगटें मोडोनि तवकीं । महाशंख वामहस्तें ॥ ६९ ॥ एक आक्रोशें हाणिती मुसळ । मुसळ पिष्ट होय तत्काळ । हाणी त्याचा हात उखळे । पडे तत्काळ मूर्च्छित ॥ ७० ॥ एक धांवोनि टोला हाणित । घायें रुधिर स्रवे हात । हनुमान गदगदां हांसत ।

१ बंध व मोक्ष नाहींत असा. २ सूर्य. ३ डबक्यांत. ४ मूर्च्छित. ५ साली काढूं लागले. ६ निश्चय. ७ मोठ्या काळजीमध्यें. ८ नाश. ९ मदोन्मत्त हत्ती. १० कमळाच्या तंतूंनीं. ११ आवेशानें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

व्यर्थ पुरुषार्थ राक्षसांचा ॥ ७१ ॥ ओढाओढी हनुमंतासीं । राक्षस करिती कासाविसी । कपि कुंथत लौकिकेंसीं । निजमानसीं उल्लास ॥ ७२ ॥ धरोनि नेला रावणाप्रती । मी गांजीन लंकापती । राक्षस माझा घात करिती । वानरचित्तीं नाहीं शंका ॥ ७३ ॥ राक्षस अट्टहासें गर्जती । अखयाचा हा जीवघाती । सांपडला आमुच्या हातीं । प्राणाहुती करूं याची ॥ ७४ ॥ हनुमान पुढें नेइजेत । धरोनि इंद्रजिताचा हात । ब्रह्मा त्यामागें पैं जात । मंत्र जपत तो ऐका ॥ ७५ ॥ गृहा वैं प्रतिष्ठासूक्त । ब्रह्मा स्वानंदें जपत । रामराज्य लंकेआंत । हनुमंतप्रवेशें ॥ ७६ ॥ वेगें आणिला रावणापासीं । कोप आला दशमुखासी । रागें सांगे राक्षसांसी । भक्षा यासी सगळाचि ॥ ७७ ॥ रावण दांत खाय करकरां । मज देखतां शस्त्र[1]धारा । वानरा तिळप्राय करा । निशाचरां प्रेरिलें ॥ ७८ ॥ कोट्यनुकोटि पार्षदें[2] । धांविन्नले गदायोध । घाव हाणिती सुबद्ध । करावया छेद कपीचा ॥ ७९ ॥ बाण सुटती सणसण । शस्त्रें वाजती खणखण । घाय हाणिती दणदण । कपीचा प्राण घ्यावया ॥ ८० ॥ एक खोंचिती सबळ शूळें । एक हाणिती सबळ मुसळें । एक हाणिती काती त्रिशूळें । गदामुद्गलें पैं एक ॥ ८१ ॥ आलगाईत कोइतेकार । अढाउ चव्हाण चेंडूचक्र । फरश पट्टिश तोमर । हाणिती वानरा जमदाढा ॥ ८२ ॥ वानरासीं सर्वं[3]तोडी । हाणिती भाले ओढण खांडीं । एक ते हाणिती लहुडी । प्रचंड धोंडी पैं एक ॥ ८३ ॥ जीवें मरावया वानर । मिळोनी अवघे निशाचर । वर्षती शस्त्रांचे संभार । अति निष्ठुर निर्घातें ॥ ८४ ॥ ऐसिया शस्त्रघातीं हाणित । रामनामें तो सदोदित । हनुमान सदा सावचित्त । शस्त्रसंपात तृणप्राय ॥ ८५ ॥ वीर वांटिवे हाणित । शस्त्रें मोडलीं समस्त । एकाचे उखळले हात । वीरीं दांत विचकले ॥ ८६ ॥ घाय हाणितां पैं वाट । धापा फुगलें त्यांचें पोट । अशुद्ध वमती समसगट । हृदयस्फोट अवघ्यांही ॥ ८७ ॥ एकएकें समस्त । वीर पडियेले मूर्च्छित । हनुमंतासी न लागे घात । लंकानाथ क्षोभला ॥ ८८ ॥ हनुमंताचे अभ्यंतरीं । श्रीराम नांदे सबाह्यान्तरीं । शस्त्रें न रुपती तिळभरी । वीर महामारीं मूर्च्छित ॥ ८९ ॥ नव्हेचि हनुमंताचा घात । सारथी वीर समस्त । पडिले देखोनि मूर्च्छित । कोपें कृतांत रावण ॥ ९० ॥ क्षोभोनियां लंकानाथ । चंद्रसेन खड्गा घाली हात । कोपें हाणितां हनुमंत । कपि हांसत गदगदां ॥ ९१ ॥ घावो हाणितां प्रचंड । त्यानें दणाणिलें ब्रह्मांड । सरलें रावणाचें बळबंड । खालतें तोंड तेणें केलें ॥ ९२ ॥ रावण म्हणे गा हनुमंता । तूं हांसलासि कवणे अर्था । कपि म्हणे लंकानाथा । ऐक आतां सांगेन ॥ ९३ ॥ राक्षसस्वामी तूं लंकानाथा । तुझिया बळाचा मज भ्रम होता । घावो हाणोनि त्वां आतां । केला वृथा पुरुषार्थ ॥ ९४ ॥ राक्षसघायाचा समेळ । जैसी पिसाची बुळबुळ । तुझा घावो अति निर्बळ । जैसी पेळ कापसाची ॥ ९५ ॥ रावण निर्बळी हीन दीन । कैंवी रामासीं करिसील रण । जगीं निर्लज्ज तूं एक जाण । हास्य संपूर्ण तेणें मज ॥ ९६ ॥ सैंवरीं पाहतां हरकोदंड । तुझें झालें काळें तोंड । श्रीरामें तें केलें दुखंड । युद्ध वितंड कैंवी त्यासीं ॥ ९७ ॥ संमुख न येववे श्रीरघुनाथा । चोरोनि पळालासी घेवोनि सीता । त्यासीं युद्ध करीन म्हणतां । निर्लज्ज तूं रावणा ॥ ९८ ॥ तुझें शुभचिन्ह कळलें आतां । भीक लागली चोरितां सीता । त्यासी तुझी राज्यसत्ता । नुरे सर्वथा रावणा ॥ ९९ ॥ तुझा हात गा हळुंवट । घावो अतिशयें पोंचट । माझी लोमें न तुटे स्पष्ट । अहा कटकट राक्षसां ॥ १०० ॥ संमुख बैसोनि लंकानाथा । निःशंक बोलतां हनुमंता । चिंता रावणाच्या चित्ता । अवध्यता वानरीं ॥ १ ॥ अवध्य जाणतां वानरासी । प्रहस्ताहातीं[12] पुसवी त्यासी । तूं कोण कोणाचा कैंचा आलासी । वन भंगिलें किमर्थ ॥ २ ॥ रावण राजा प्रतापराशी । भेटी न घडे वानरासीं । म्हणोनि भंगिलें वनासी । दशमुखासी भेटावया ॥ ३ ॥ राक्षस आले मारावयासी । म्हणोनि युद्ध केलें त्यांसीं । वांचवावया निजदेहासी । राक्षसांसी मारिलें ॥ ४ ॥ ऐसें सांगोनि प्रहस्तासी । हनुमान बोले निजवृत्तांतासी । दृष्टीं नाणी प्रहस्तासी । राक्षसांसी गणीना ॥ ५ ॥ दशमुखाचे संमुख । पुच्छासनीं बैसला देख ।

१ शस्त्रधारेनें. २ सेवक. ३ मोठ्या जोरानें. ४ पराक्रमाचे. ५ रक्त. ६ ओकूं लागले. ७ वात. ८ शिवाचें धनुष्य. ९ मोठें. १० हलका. ११. केंस, लव. १२ प्रहस्ताकडून.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

हनुमंत अतिशयेंसीं निःशंक । नव्हे साशंक रावणा ॥ ६ ॥ रावणासंमुख हनुमंत । [१]वसला वांकुल्या दावित । सर्वेंचि डोळे मिचकावित । अंगोठा दावित नोकूंनी ॥ ७ ॥ हनुमंत न भी राक्षसांसी । दृष्टीं नाणी प्रधानासी । रावण जाणोनि मानसीं । स्वमुखें त्यासी पुसतसे ॥ ८ ॥

रे रे वानर को भवानिह गतस्त्वत्सूनुहंताहवे
दूतोऽहं खरखंडनस्य नृपतेः कोदंडदीक्षागुरोः ।
मद्दोर्दंडकठोरपाटनपटुः को वा त्रिकूटाचले
को मेरौ क्व च रावणादिगणना कोटिस्तु कीटायते ॥ १६ ॥
धिक्ते रावण पौरुषं तव बलं धिग्धिग्यशस्तेजसी
धिक्खड्गं सुरदर्पनोदनकरं धिग्धिग्वृथा जीवनम् ।
यस्माद्राघवबाणभीतमनसा सीतापरोक्षे हृता
तद्वैरादहमागतोऽस्मि हनुमान् बद्धो वधार्थे तव ॥ १७ ॥

रावण हेळसोनि बोले उत्तर । अरे तूं कोणाचा वानर । ऐक रे रावणा प्रत्युत्तर । सत्य साचार सांगेन ॥ ९ ॥ मारिले बनकर किंकर । जंबुमाळी निशाचर । रणीं मारिले प्रधानकुमर । तो मी वानर महावीर ॥ ११० ॥ पंच सेनानी मारिले शूर । निर्दळिला सैन्यसंभार । रणीं मारिला अखया कुमर । तो मी वानर महावीर ॥ ११ ॥ मारिलासे अखया सुत । ज्येष्ठ गांजिला इंद्रजित । त्याच्या सेने केला निःपात । तो मी हनुमंत महावीर ॥ १२ ॥ वनविध्वंस कवण्या चाडां । जैसें उपडिलें म्यां झाडां । तैसें राक्षसकुळउपाडा । करूं रोकडा मी आलों ॥ १३ ॥ तूं कोणाचा कैंचा कोण । येथें यावया काय कारण । ऐसा पुसिला जो प्रश्न । तयाचें उत्तर अवधारीं ॥ १४ ॥ सुबाहुताटकानिर्दळण । त्रिशिरा मारिला खर दूषण । त्या श्रीरामाचा दूत मी जाण । तुझा प्राण घेवों आलों ॥ १५ ॥ चौदा सहस्र रक्षोगण । वधूनि घेतलें जनस्थान । त्या श्रीरामाचा दूत मी जाण । तुझा प्राण घेवों आलों ॥ १६ ॥ विराध मारिला विंधोनि बाणें । मारीच कपटी मारिला जेणें । त्या श्रीरामाचा भक्त मी जाणें । तुझा प्राण घेवों आलों ॥ १७ ॥ कोदंडधारियां दीक्षागुरु । सूर्यवंशी श्रीरामचंद्रु । त्याचा दूत मी वानरु । तुझा संहारु करूं आलों ॥ १८ ॥ दंडधारियां परम गुरू । कामक्रोध वधी रघुवीरू । त्याचा दूत मी वानरू । तुझा संहारू करूं आलों ॥ १९ ॥ म्हणसी वधावया रावण । तुज कैंची रे आंगवण । माझें बळ असाधारण । नाहीं प्रमाण रणमारा ॥ १२० ॥ लागतां बाहुबळचपेट । मेरुमांदार होती पीठ । रावण दशमुख कीट । लंकात्रिकूट तें किती ॥ २१ ॥ दशमुखांचिया हारी । शिरें छेदीन नखाग्रीं । जेंवी पतंग अग्नीवरी । तैसी परी राक्षसां ॥ २२ ॥ रावणाऐसे दशकंठी । मिनलिया कोट्यनुकोटी । त्यांतें निर्दळीन वामांगुष्ठीं । लंकात्रिकूटीसमवेत ॥ २३ ॥ जळो ती रावणा तुझी पुरुषार्थथोरी । जळो तो राजा जो होय भिकारी । जळो तें कर्म करणें चोरी । परनारी पतिव्रता ॥ २४ ॥ जळो तें रावणा तुझें कुळ । जळो तें रावणा तुझें शीळ । जळो तें रावणा तुझें बळ । पापी तूं केवळ परद्वारी ॥ २५ ॥ धिक् धिक् रावणा राक्षसजाती । धिक्धिक् रावणा तुझी ख्याती । धिक् धिक् रावणा तुझी कीर्ती । झाली अपकीर्ती तिहीं लोकीं ॥ २६ ॥ धिक् धिक् रावणा तुझी श्रीमंती । धिक् धिक् रावणा तुझी शक्ती । धिक् धिक् तो खड्ग तुझ्या मुष्टीं । लव मारुतीची न तुटे ॥ २७ ॥ धिक् धिक् रावणा तुझें जन्म । धिक् धिक् रावणा तुझा धर्म । धिक् धिक् रावणा तुझें कर्म । निंद्य परम तिहीं लोकीं ॥ २८ ॥ धिक् धिक् जीवित्व तुझी ख्याती । धिक् धिक् रावणा तुझी शौर्यवृत्ती । परोक्ष हरिली सीता सती । बाणभयें भीसी श्रीरामा ॥ २९ ॥ माझ्या स्वामीची चोरिली नारी । तूं तंव माझा प्रत्यक्ष वैरी । मी तंव सीतेचा धांवणेकरी । तुजला मारीन मी आतां ॥ १३० ॥ तुजसीं प्रत्यक्ष व्हावया भेटी । वनीं वृक्षां केली अटाटी । राक्षस मारिले कोट्यनुकोटी । तुज दृष्टीं देखावया ॥ ३१ ॥ तुज म्यां देखावया दृष्टीं । बंधना लावूं दिधलें कंठीं । लत्ताटोले साहोनि मुष्टी । तुझिये भेटी मी आलों ॥ ३२ ॥ तुझे भेटीचें हेंचि फळ । तुज म्यां मारावें तत्काळ । सिद्धि नेवोनि श्रीरामसळ । जनकबाळ सोडवावी ॥ ३३ ॥ त्या तुज मज जाली भेटी । तुवां पुसिली जी गुह्यगोष्टी । ते म्यां सांगितली परिपाटी । मरण

१ धिक्काहन. २ इच्छेनें. ३ राक्षससमुदाय. ४ धनुर्धरांला. ५ सामर्थ्य. ६ परस्त्री इच्छिणारा. ७ प्रसिद्धि. ८ नकळत. ९ नाश. १० क्रमानें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

शेवटीं उरलेंसे ॥ ३४॥ तुझ्या आंगीं सबळ बळ। सैन्य सेनानी प्रधान प्रबळ। मज मारोनी तात्कळ। जनकबाळ भोगावी ॥ ३५ ॥ राक्षसां देखतां स्पष्टा। तुझें मर्दीन मी ओष्ठा। तुझ्या छेदावया दशकंठा। आलों मी वांटा रामाचा ॥ ३६ ॥ ऐसें बोलतां महाबळी। फिंदारल्या रोमावळी। लांगूल त्राहाटिलें भूतळीं। वटारिलें निराळीं कपिपुच्छा ॥ ३७ ॥ माथां शेंडी थरथराट। वटारिले नेत्रवाट। तंव कांपिनला दशकंठ। समसगट राक्षसां ॥ ३८॥ करावया सर्व संहार। जैसा वाढे प्रळयरुद्र। तैसा वाढला वानर। निशाचर कांपती ॥ ३९ ॥

एकोऽहं पवनात्मजो दशमुखस्त्वं चापि कोटीश्वर-
स्त्वां जित्वा समरे प्रभुप्रणयवान् सीतां च नेतुं क्षमः।
किं तस्याघटितं बलं बलवता रामेण सुश्रीमता
हत्वा दक्षिणपाणिना वसुमतीं त्वां हंतुमुक्तं वचः॥ १८ ॥

मी तंव एकलें एक वानर। श्रीरामाचा निजकिंकर। तुझे कोट्यनुकोटि झुंझार। मजसमोर करीं उभे ॥ १४० ॥ मशकें कोट्यनुकोटी झुंझार। मज मारितां दशशिर। कोण राखेल निशाचर। सुरासुर पाहों पां ॥ ४१ ॥ क्षोभला देखोनि हनुमंत। इंद्रजित चळचळां कांपत। आजि निमाला लंकानाथ। करील घात वानर ॥ ४२ ॥ निश्चयें रावणा आला अंत। ऐसें इंद्रजित चिंतित। तंव बोलिला हनुमंत। तोही वृत्तांत अवधारा ॥ ४३ ॥ रणीं मारोनि रावण। करोनि सीतासोडवण। श्रीरामापासीं नेतां जाण। मज कोण निवारी ॥ ४४ ॥ इतुकें करितां न लगे क्षण। परी श्रीरामें वाहिली आण। दक्षिणहस्तें विंधोनि बाण। रणीं रावण मारणें ॥ ४५ ॥ मारोनियां दशशिरा। स्वस्थ करीन वसुंधरा। सुखी करावें चराचरा। श्रीरामचंद्रा निजनेम ॥ ४६ ॥ सोडावी देवांची बांधवडी। तोडावी नवग्रहांची बेडी। उभारावी रामराज्याची गुढी। मर्यादा गाढी श्रीरामें ॥ ४७ ॥ श्रीराम बळवंतांचें बळ। श्रीरामबळें वीर सबळ। श्रीरामाचें सत्य शीळ। प्रतिज्ञा अढळ रामाची ॥ ४८ ॥ रामें मारावें लंकानाथा। सत्य प्रतिज्ञा श्रीरघुनाथा। माझ्यानें न करवे अन्यथा। कैंवी मी आतां तुज मारूं ॥ ४९ ॥ संमुख देखिल्या दशानन। वानरें उडोनि घ्यावा प्राण। रामें वांचविला रावण। स्वहस्तें आपण न मारावें ॥ १५० ॥ श्रीरामप्रतिज्ञेची पाखर। तेणें वांचविला दशशिर। रावणा न मारीच वानर। मर्यादामेरु नुलंघी ॥ ५१ ॥ रावणा तुज मी मारीन आतां। ऐसें बोलतां हनुमंता। इंद्रजितासी परम चिंता। आला लंकानाथा अपघात ॥ ५२ ॥ इंद्रजित बिभीषणा सांगत। आजि निमाला लंकानाथ। क्रोधें खवळला हनुमंत। उपाय येथें चालेना ॥ ५३ ॥ न चले शस्त्र अस्त्र सकळ। न चले वानरासीं बळ। न चले कपटविद्याछळ। बळें प्रबळ वानर ॥ ५४ ॥ मंत्रशक्ती तंत्रशक्ती। नातळे आक्रमविद्याशक्ती। न चले मायामोहनशक्ती। रणीं मारुति नाटोपे ॥ ५५ ॥ वानर नाटोपे सैन्यासीं। शेखी नाटोपे ब्रह्मपाशीं। तो केंवी आटोपे रावणासी। बिभीषणासी सांगत ॥ ५६ ॥ जें जें बांधावें बंधन। वानर ना म्हणे आपण। तृणासमान त्यासी मरण। निर्बंधन पाशबंधीं ॥ ५७ ॥ ऐसें इंद्रजितें सांगतां। बिभीषण म्हणे लंकानाथा। वानर अवध्य तत्त्वतां। तुज वधितां वधवेना ॥ ५८ ॥ वानर न वधवे सर्वथा। ऐसें कळलें लंकानाथा। श्रीरामा अर्पोनि सीता। शरण रघुनाथा निघावें ॥ ५९ ॥ श्रीरामा निघालिया शरण। आम्हांसी नाहीं जन्ममरण। त्रिसत्य सत्य रावणा जाण। विचार आन न करावा ॥ १६० ॥ अन्यथा विचार करूं जातां। रोकडें हनुमंत करील घाता। उपाय न चले सर्वथा। लंकानाथा भुलूं नको ॥ ६१ ॥ श्रीरामाचें एक वानर। आम्हां नाटोपे साचार। कोपोनि आलिया श्रीरघुवीर। रण दुर्धर कोण साहे ॥ ६२ ॥ अर्पोनियां जानकीतें। काया वाचा चित्तें वित्तें। शरण निघालिया रघूत्तमातें। कल्याणातें पावाल ॥ ६३ ॥ एका जनार्दना शरण। सत्त्वबुद्धि बिभीषण। ते बुद्धि न मानी रावण। गर्वाभिमान तो ऐका ॥ ६४ ॥ वानरा वनचराचे भेणें। रिघतां श्रीरामासी शरण। तें मज आलें उणेपण। जगीं जघन्य वाढिवे ॥ ६५ ॥ मरण पुसोनि कपिनाथा। त्याचेनि बोलें त्याचे घाता। बुद्धि विचारूनि हनुमंता। कुबुद्धिता रावणीं ॥ ६६ ॥ जटायूनें केला कासाविसी। सिंतरोनि

१ रावण. २ पृथ्वी. ३ झूल, पांघरूण. ४ कःपदार्थ. ५ भीतीनें, ६ नीचपणा, ७ पराक्रमाला. ८ ठकवून,

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

म्यां मारिलें त्यासी। तैसेंचि करिन हनुमंतासी। रावणापासीं कुबुद्धि ॥ ६७ ॥ एका जनार्दना शरण। पुसतां हनुमंतासी मरण। दहाही मुखें होरपळून। करील दहन लंकेचें ॥ ६८ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां रावणसभाहनूमदागमनं नाम सप्तदशोऽध्यायः ॥ १७ ॥ ओंव्या ॥ १६८ ॥ ॥ श्लोक ॥ १८ ॥ श्रीसीतारामचंद्रार्पणमस्तु ॥

अध्याय अठरावा

श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ॥ हनुमंतासी न चले घात। स्वयें सांगे इंद्रजित। अवध्य वीर हा हनुमंत। साक्षेपें सांगत बिभीषण ॥ १ ॥

निश्चितार्थस्ततः साम्ना पूज्यं शत्रुजिदग्रजम्।
उवाच हितमत्यर्थं वाक्यं वाक्यविशारदः॥ १ ॥

इंद्रजित जो कां ज्येष्ठ सुत। नानायुक्ती स्वयें सांगत। शस्त्रास्त्रीं ब्रह्मपाशांत। न चले पात हनुमंता ॥ २ ॥ शस्त्रशक्ती अस्त्रशक्ती। मंत्रशक्ती तंत्रशक्ती। कपटमायामोहनशक्ती। रणीं मारुति न धरवे ॥ ३ ॥ कर्मपाश धर्मपाश। ब्रह्मयाचा ब्रह्मपाश। बांधों न शके वानरास। जन्मपाश मुख्यत्वें¹ ॥ ४ ॥ बिभीषण प्रिय भ्राता। सांगतसे परम हिता। शरण रिघावें श्रीरघुनाथा। काय म्यां आतां करावें ॥ ५ ॥ सर्वथा अवध्य हा मारुती। इंद्रजिताची उपपत्ती। बिभीषणाची भिन्न युक्ती। लंकापति सचिंत ॥ ६ ॥

राक्षसाधिपतिः क्रुद्धस्तदकार्यमुपस्थितम्।
विदित्वा चिंतयामास कार्याकार्यविदां वरः॥ २ ॥

राग आला रावणासी। तरी मारवेना हनुमंतासी। अवध्यता देखोनि त्यासी। दशमुखासी अति चिंता ॥ ७ ॥ हनुमंतासी न वधितां। सकळ कुळाच्या करील घाता। हा न मरे मारूं जातां। परम चिंता लंकेशा ॥ ८ ॥ आण घालोनि श्रीरघुनाथा। मरण पुसे कपिनाथा। मरणानुक्रम आणूनि हाता। मग हनुमंता मारावें ॥ ९ ॥ ऐसें विचारोनि चित्तीं। पुसावया मरणयुक्ती। स्तवूं आदारिला मारुती। लंकापतीनें निजमुखें ॥ १० ॥ ऐकें वीरा हनुमंता। श्रीरामाच्या परम भक्ता। तुज मी पुसतसें आतां। सत्य तत्त्वतां सांगावें ॥ ११ ॥ असत्य वदों नये हरिभक्ता। शपथ घालितों रघुनाथा। मरण कैसेनि हनुमंता। यथार्थता सांगावें ॥ १२ ॥ ऐकोनि श्रीरामाची आण। हनुमान घाली लोटांगण। मज सर्वथा नाहीं मरण। सत्य जाण लंकेशा ॥ १३ ॥ ऐकोनि हनुमंताचें वचन। गदगदां हांसे रावण। जन्मामागें अखंड मरण। मिथ्या भाषण अमरत्व ॥ १४ ॥ म्हणती अमर निर्जरां देवां। तेही पावती मरणार्णवा। तेथें तुझा कायसा केवा। मिथ्या हेवा अमरत्वें² ॥ १५ ॥ चौदा कल्पायुषी गरिमा³। मार्कंडेयाचा मुख्य महिमा। तो जैं जाय मरणग्रामा। तैं झडे रोमा रोमहर्षणासी ॥ १६ ॥ युगानुयुगीं लोम झडे ज्यासी। ऐसा तो लोमहर्षण ऋषी। तोही मरे बकदाल्भ्याचे श्वासीं। मरण बकदाल्भ्यासी हंसपक्षें ॥ १७ ॥ हंसाचा पंख जेव्हां झडे। तंव बकदाल्भ्याचें आयुष्य उडे। त्या हंसासी मरण रोकडें। जैं कां नख खंडे भृंशुंडीचें⁵ ॥ १८ ॥ कूर्म हालवी निमख। तंव भृशुंडीस देख। मरण पावे आवश्यक। मरण अचूक सर्वांसी ॥ १९ ॥ एवं मरणपरंपरा। कदा न सोडी थोरथोरां। तेथें तूं पालेखाइरा⁶। केंवी वानरा अमरत्व ॥ २० ॥ तपस्तेजें महाऋषी। ते काळाची आंदणी दासी। श्रीरामनामीं प्रेम ज्यासी। काळ त्यापासीं कामारा⁷ ॥ २१ ॥ जागृतिसुषुप्तिसहित स्वप्न। ज्यासीं अखंड नामस्मरण। काळ त्याचे वंदी चरण। तेणें रावणा हे महिमा ॥ २२ ॥ भक्तिभावार्थें भजन। स्वयें जाणे श्रीभगवान। रावण विषयी अति दीन। त्यासीं हें ज्ञान केंवी लाभे ॥ २३ ॥ असो हे रावणाची स्थिती। मज श्रीरामाची भक्ती। माझ्या अमरत्वाची ख्याती⁸। दावूं प्रतीत रावणा ॥ २४ ॥ हनुमंतीं श्रीरामभक्ति लाठी। तरी कां बोले मिथ्या गोष्टी। मिथ्या वदलासी चावटी। कशासाठीं मज सांगें ॥ २५ ॥ आदरें पुसतां रावणासीं। बुद्धि स्फुरली वानरासीं। अपमानावया लंकेशासी। गुह्य त्यापासीं अनुवादे⁹ ॥ २६ ॥ रावण अतिशयेंसीं

---

१ मुख्यार्थ. २ म्हातारपणारहित. ३ पाड. ४ मोठेपणा. ५ या नांवाचा कावळा. ६ पाला खाणारा. ७ दास.

८ कीर्ति. ९ बोलूं लागला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

कपटी । सत्य वदलों मी ज्या गोष्टी । सत्य वार्ता मानी खोटी । विकल्प पोटीं रावणा ॥ २७ ॥ सर्वांह्य असत्य सदोदित । त्यास न माने सत्यत्व । सत्यासीं सत्य भावार्थ । रावणांत तो नाहीं ॥ २८ ॥ रावणाचा विकल्प झडे । माझें सत्यत्व दिसे रोकडें । तें साधावया धडफुडें । रावणापुढें गुह्य सांगे ॥ २९ ॥ मरण पुससी विश्वासेंसीं । तुवां मारिलें जटायूसी । तैसेंच मजही तूं करिसी । तेणें धाकेंसीं वदें मिथ्या ॥ ३० ॥ रावण म्हणे हनुमंतासी । मरणभय जयापासीं । श्रीरामभक्ति कैंची त्यासीं । देहलोभ्यासी राम कैंचा ॥ ३१ ॥ हनुमान म्हणे लंकानाथा । परोपदेशीं अति योग्यता । तुझी मी देखतों तत्त्वतां । शेखीं कपटता तुजपाशीं ॥ ३२ ॥ कपटें होवोनि संन्यासी । चोरोनि आणिलें सीतेसी । सदाशिवें सोडविलासी । कपटें पावसी कुळक्षय ॥ ३३ ॥ ऐसें हनुमंतें सांगतां । वर्म खोचलें लंकानाथा । ऐक माझी मरणावस्था । तुज तत्त्वतां सांगेन ॥ ३४ ॥ ऐकावया मारुतीचें वचन । सरसावला दशानन । कपि सांगे विंदाणें । सावधान अवधारा ॥ ३५ ॥ असत्य नाहीं तुजसीं । मरण नाहीं माझ्या देहासी । मरण आहे पुच्छासी । तें मारिसी तैं मी मरें ॥ ३६ ॥ ऐकोनि कपीचें वचन । ज्येष्ठ इंद्रजित श्रेष्ठ प्रधान । अवघे म्हणती सत्य भाषण । सेनानी सैन्यसमवेत ॥ ३७ ॥ वायूपरीस पुच्छ चपळ । याचे पुच्छासीं प्रबळ बळ । पुच्छें निर्दळिलें सकळ । बळें गोळांगूळ न मारवे ॥ ३८ ॥ पुच्छें मारिला रथसारथी । पुच्छें इंद्रजिता वाताहाती । पुच्छें रणीं लाविली ख्याती । वीरां घाती कपिपुच्छ ॥ ३९ ॥ इंद्रजित बोले देखोनि रण । पुच्छ अतिशयेंसीं दारुण । पुच्छा मारूं जातां आपण । रणकंदन करील ॥ ४० ॥ पुच्छ खवळल्या अद्भुत । वीर मारील समस्त । लंका करील वाताहत । लंकानाथ केंवी वांचे ॥ ४१ ॥ इंद्रजित सेनानी प्रधान । अवघे कांपती पुच्छाभेण । तें देखोनि दशानन । स्वयें आपण विचारी ॥ ४२ ॥ हनुमंतासी पुसे रावण । पुच्छ अतिशयें दारुण । कैसेनि पावेल मरण । सत्य संपूर्ण सांगावें ॥ ४३ ॥ हनुमंत म्हणे दशशिरा । पुच्छाचें मरण अति

१ संशय. २ आंतबाहेर. ३ युक्ती. ४ वायूपेक्षां. ५ वानर. ६ आकाशांत. ७ नाश. ८ शक्ति. ९ त्वरा

दुस्तरा । तेलें तुपें भिजवोनि वस्त्रा । पुच्छा समग्रा गुंडावें ॥ ४४ ॥ हनुमान मारावया निर्धारीं । अग्नि लावावा पुच्छाग्रीं । ज्वाला धडाडिलिया अंबरीं । मरण वानरीं तत्काळ ॥ ४५ ॥ उघडें राहिल्या तिळभरी । मरण नये पुच्छावरी । येईल राक्षसां महामारी । करील बोहरी लंकेची ॥ ४६ ॥ हनुमान न म्हणावा कपटी । मी सांगतों सत्य गोष्टी । ऐसी आंगवण असेल लाठी । तरी तूं वेष्टीं कपिपुच्छा ॥ ४७ ॥ ऐसी तुज असेल शक्ती । हें घे पुच्छ देतों हातीं । शीघ्रतें स्नेहेंवस्त्रप्रयुक्तीं । अति निगुतीं गुंडाळावें ॥ ४८ ॥ पुच्छ गुंडाळावया ओढाओढी । स्त्रीपुरुषें नागवीं उघडीं । लंका नागविली रोकडी । कडोविकडी पुच्छाची ॥ ४९ ॥ सभा नागविली स्यां निशीं । लंका नागविली दिवसीं । पुच्छें करोनि कासाविसी । राक्षसांसी उगोणु ॥ १५० ॥ पुच्छ गुंडाळावयाचे मिसीं । राजद्वारीं चोहट्यापासीं । लंका नागवी करीन दिवसीं । राक्षसांसीं गर्जोनी ॥ ५१ ॥ पुच्छ गुंडाळावयाचे चोंडा । सांठवणें कापड तडतडा । तेलासाठीं लावूं झगडा । तेलिया राजदंडा करूं ठावो ॥ ५२ ॥ आवडी हनुमंताचे पोटीं । नगर नागवूं पुच्छासाठीं । अग्नि लावूं लंकात्रिकूटीं । राक्षसकोटी आजि भाजूं ॥ ५३ ॥ ऐसें विचारोनि चित्तीं । पुच्छ दिधलें रावणाहातीं । पुढें पुच्छाची व्युत्पुत्ती । लाविली ख्याती ते ऐका ॥ ५४ ॥

आज्ञापिता रावणेन पार्षदाः पुच्छवेष्टने ।
तस्य तद्वचनं श्रुत्वा राक्षसाः क्रोधकर्कशाः ॥ ३ ॥
वेष्टयंति स्म लांगूलं जीर्णकार्पासिकैः पटैः ।
संवेष्टयमाने लांगूले व्यवर्धत महाकपिः ॥ ४ ॥

रावण सांगे निजदासांसी । आगी लावा कपिपुच्छासी । भिजवोनि तैलघृतासीं । जीर्ण वस्त्रासी गुंडाळावें ॥ ५५ ॥ ऐकोनि रावणाचें वचन । वीर शूर क्रोधी पूर्ण । क्रूर कर्कश अति दारुण । पुच्छा वेष्टन करूं आले ॥ ५६ ॥ वस्त्रें सरलीं पैं जीर्ण । नवीं गुंडाळावीं म्हणे रावण । नवींही सरलीं जाण । पुच्छ संपूर्ण गुंडेना ॥ ५७ ॥ घोंगडीं बारीक सकटें । सस्नेहें गुंडिलीं धुवटें । सखरें गुंडिली

करून. १० तेलानें भिजलेल्या वस्त्रांनीं. ११ नाश. १२ इच्छेनें. १३ तैलयुक्त करून.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

चोखटें । तरी न वेष्टे कपिपुच्छ ॥ ५८ ॥ घोंगडीं पांगडीं गुंडगीं खांडें । सखरें निखरें गुंडिलीं उंदंडें । आणिलीं सगळीं दिंडें। तरी न गुंडे कपिपुच्छ ॥ ५९ ॥ चाटेवेळी पडली ओस । तरी न पुरती पुच्छास । राजगृहींचीं असमसाहस । कपिपुच्छास न पुरती ॥ ६० ॥ समस्त चाटियांचे वस्त्रभार । राजगृहींचीं वस्त्रें मात्र । पुच्छ न चौतकर । अति दुर्धर वाढलें ॥ ६१ ॥ पुच्छ वाढलें दुर्धर । धाकिंनला दशशिर । इंद्रजितादिक निशाचार । सहपरिवार धाकती ॥ ६२ ॥ कपीचें मरण पुच्छापासीं । निश्चयें मानलें आम्हांसी । पुच्छ गुंडाळावें साक्षेपेंसीं । येरयेरांपासीं सांगत ॥ ६३ ॥ पडदे गुंडिती फाडफाडूं । बैठका गुंडिती उधडउधडूं । चांदवे गुंडिती सोडसोडूं । पुच्छ माकडु नाटोपे ॥ ६४ ॥ पुच्छ गुंडिलें बहुतेक । उरलें असे भाग एक । तें गुंडाळावें आवश्यक । सकळ लोक सांगती ॥ ६५ ॥ पुच्छ गुंडाळावया लवडसवडीं । सभेचीं घेतलीं लुगडीं । वानरें सभा केली उघडी । कडोविकडीं नागविलीं ॥ ६६ ॥ सभा नागविली वीरें । आणिलीं रावणाचीं वस्त्रें । तरी पुच्छासीं न पुरे । ओढा वानरें लाविला ॥ ६७ ॥ सेवकां सांगे दशवक्त्र । नगरामाजी राहिलीं वस्त्रें । हिरोन आणा रे सत्वरें । पुच्छीं वानर बांधावा ॥ ६८ ॥ जांवई आणिला दिवाळसणा । कोणाचा पाहुणा कोणाचा मेहुणा । दूत करिती वस्त्रहरणा । शंखस्फुरणा ते करिती ॥ ६९ ॥ नगरीं नरनारी वागती । दूत त्यांचीं वस्त्रें हरिती । नागवीं पळती हळहळती । शंख करिती चहूंकडे ॥ ७० ॥ नोवरी कुमारी गरोदरी । सौभाग्याच्या निजगजरीं । वाणें देती घरोघरीं । साळंकारीं शोभती ॥ ७१ ॥ कपिपुच्छवेष्टनावारी । राजदूत वस्त्रें हरी । लाजा उघडिया पडती नारी । लंकापुरीं आकांत ॥ ७२ ॥ राजगृहीं ज्यांची चाली । नेसोनि धोत्रें वोलीं । भट्ट निघाले ते मंडळीं । वस्त्रें हरिलीं बुकलोनि ॥ ७३ ॥ भट्ट वस्त्रें न सोडिती । दूत निःशंक झोंबती । महाशंख नानायुक्ती । शंख करिती व्युत्पन्न ॥ ७४ ॥ ओष्ठ मणगट जिव्हायुक्त । स्वर वर्ण अक्षरोक्त । शंख करिती वेदोक्त । रावण जित कीं मेला ॥ ७५ ॥ अनुनासिक सानुनासिक । स्वरप्रयुक्त वेदपाठक । वेदव्युत्पत्ती करिती शंख । दशमुख निमाला ॥ ७६ ॥ दिवसा ढवळया नगराआंत । राजद्वारीं वाट पाडित । राजा असतां जीवें जित । पारिपत्य तो करीना ॥ ७७ ॥ बोंब करितां फुगलें पोट । हाका देतां सुकले कंठ । राजा निमाला पैं स्पष्ट । हा हा कटकट ब्राह्मणां ॥ ७८ ॥ हनुमान वीर जगजेठी । लंका नागविली पुच्छासाठीं । शिणतां राक्षस कोट्यनुकोटी । पुच्छा शेवटीं वेष्टवेना ॥ ७९ ॥ अद्यापि पुच्छाचा अगरडा । बुजाला नाहीं दिसे उघडा । पुच्छवेष्टनीं लावोनि वेढा । केला बापुडा रावण ॥ ८० ॥ पुच्छ वेष्टावयासाठीं । शिणतां राक्षसांच्या कोटी । पुच्छ वेष्टवेना वेष्टीं । अग्र शेवटीं उघडेंचि ॥ ८१ ॥ पुच्छ गुंडितां केवढें । अग्र अधिकाधिक वाढे । वेड लाविलें माकडें । मरण रोकडें राक्षसां ॥ ८२ ॥ चँाटे रडती राजद्वारीं । कळकळती नरनारी । बोंब सुटली घरोघरीं । लंकानगरीं आकांत ॥ ८३ ॥ दुर्गसंग्रहपरवडी । तेलातुपाचीं टांकीं गाढीं । अवघीं पडलीं कोरडीं । तिंवितां लुगडीं पुच्छार्थ ॥ ८४ ॥ तेलातुपाचा पैं तडां । नगरीं पडलासे रोकडा । पुच्छ गुंडितां माकडा । लाविलें वेडा लंकेशा ॥ ८५ ॥ तूप न मिळे खावयापुरतें । रावणा लागले रोकडे भाते । माखोनियां द्यावया लेंकरातें । तूप कोणातें मिळेना ॥ ८६ ॥ टांकोटांक स्नेहसमाप्ती । घरोघरीं मालवे वाती । गडँद पडलें लंकेप्रती । लाविली ख्याती कपिपुच्छें ॥ ८७ ॥ हनुमंताची कैसी युक्ती । ज्याचे नगर त्याचे हातीं । नागवितां नाना प्रयुक्ती । लाविली ख्याती कपिपुच्छें ॥ ८८ ॥ नाहीं झगडा ना भांडण । करितां कपिपुच्छाचें वेष्टन । तृणप्राय केला रावण । गाढी आंगवण हनुमंता ॥ ८९ ॥ अल्प उरलें आहे अग्र । ऐसें सांगे दशशिर । यासी वेष्टोनि पीतांबर । मारूं वानर पुच्छदाहें ॥ ९० ॥ पीतांबरें श्वेतांबरें । पट्टकुळें मनोहरें । गुंडितांही क्षौमांबरे । पुच्छ नावरे कपीचें ॥ ९१ ॥ इंद्रजित धाकें जीवाआंत ।

१ पुष्कळ. २ कापडाचीं ओझीं. ३ कापडबाजार. ४ चवथा हिस्सा. ५ छतें. ६ अग्र. ७ कापडाचे व्यापारी. ८ पुष्कळ किंले. ९ भिजवितां. १० नाश. ११ अंधार. १२ रेशमी वस्त्रें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

पुच्छें नाटोपे हनुमंत। अग्नि लाविलिया तेथ। करील अनर्थ लंकेसीं ॥ ९२ ॥ तंव बोलिला विद्युन्माळी। वानरा आकळावया अति वळी। उघडी करा जनकबाळी। पुच्छ तत्काळीं आकळेल ॥ ९३ ॥ रावणही धाके मानसीं। पुच्छ न गुंडवे आम्हांसी। कैंवी मारावें वानरासी। उपायो यासी दिसेना ॥ ९४ ॥ ऐसें ऐकतां हनुमंतें। आवरिलें निजपुच्छातें। दूत सांगती रावणातें। आम्हीं पुच्छातें आकळिलें ॥ ९५ ॥ आम्ही सेवक आतुर्बळी। पुच्छ आकळिलें समूळीं। म्हणोनि पिटिली एक टाळी। केला सकळीं गडगर्ज ॥९६॥ रावण सांगे सेवकांते। अग्नी लावा रे पुच्छातें। पाचारोनि लोहकारांतें। लाविले भाते अग्नीसी ॥ ९७ ॥ तिये काळीं हनुमंतें। विनविलें निजपितयातें। वायु सत्य सखा अग्नीतें। ज्वाळा तेथें होऊं नेदीं ॥ ९८ ॥ ज्वाळा होऊं न द्यावी येथें। ऐसें नमून वायूतें। गांजावया राक्षसांतें। हनुमान पुच्छार्थे खवळला ॥ ९९ ॥ भाते फुंकितां चौपासीं। अग्नि लागेना पुच्छासी। राक्षसें होती कासाविसी। अग्नि पुच्छासी स्पर्शेना ॥ १०० ॥ रावण म्हणे हनुमंतासी। अग्नि कां न लागे पुच्छासीं। हनुमंत म्हणे रावणासी। तूं तंव आहेसी बहुमूर्ख॥ १ ॥ वेदविभाग केला व्युत्पत्ती। तोही न सरे वेदव्यासोक्ती। संतासंत न कळे स्थिती। तूं तंव मूर्ति गर्वाची ॥ २ ॥ संतासंतविवेक अणुवी। समूळ नाहीं ज्याचे जीवीं। त्यासी न साजे राजपदवी। वृथा गर्वी तूं रावणा ॥ ३ ॥ भाते फुंकितां अचेतन। कैंवी जाळवेल सचेतन। हें तुज नाहीं विवेकज्ञान। परम अज्ञान रावणा ॥ ४ ॥ वचन मानलें रावणासी। पाचारोनि निजविश्वासी। फुंकोनि अग्नि लावा पुच्छासी। राक्षसांपासी सांगत ॥ ५ ॥ राक्षस फुंकितां चौपासीं। पुच्छें दडपिलें अग्नीसी। खंवट घाण रिघे घ्राणांसी। कासाविसी राक्षसां ॥ ६ ॥ खंवट घाणी अति प्रबळ। डोळां आसुवें मुखीं लाळ। एक श्वासीं खोकिती सबळ। हलकल्लोळ उठिला ॥ ७ ॥ रावण म्हणे गा हनुमंता। पुच्छ कां न जळे फुंकितां। हनुमान म्हणे लंकानाथा। ऐक तत्त्वतां सांगेन ॥ ८ ॥ गृहस्थें आमंत्रण नेदितां। भोजना न येववे अतीता। तेंवी तुवां न फुंकितां। अग्नि सर्वथा प्रज्वळेना ॥ ९ ॥ गृहस्थें न करितां ब्रह्मार्पण। आपोशन न घेती ब्राह्मण। अग्नि न फुंकितां रावण। हुताशन प्रज्वळेना ॥ ११० ॥ एक मुखें हें फुंकिती। दहा मुखें तुज आहेती। तुवां फुंकिलिया लंकापती। पुच्छप्रदीप्ती हुताशनें ॥ ११ ॥ हनुमंताच्या निजयुक्ती। सत्य मानी लंकापती। पुच्छाग्नि फुंकावयाप्रती। केली आयती ते ऐका ॥ १२ ॥ करोनियां शुद्धाचमन। प्रथम देवोनि घृतावदान। फुंकावया हुताशन। दशवदन बैसला ॥ १३ ॥ रावणाचे पोटीं कपट। कपि जाळावया पुच्छासगट। येणें आवेशें दशकंठ। फुंकूं हव्यवाट बैसला ॥ १४ ॥

तैलेन परिषिच्याथ तेऽग्निं तत्रोपपादयन्।

लांगूलेन प्रदीप्तेन राक्षसांस्तानताडयन्॥ ५ ॥

रावणाचे निजचित्तीं। माझेनि मुखें पुच्छप्रदीप्ती। सांग जळालिया मारुती। जगीं मत्कीर्ति स्फुरेल ॥ १५ ॥ रावण तोंड परतें करी। हनुमान पुच्छ उचली वरी। पडला अपमान राजशिरीं। केली बोहरी खांडमिशां ॥ १६ ॥ ऐसा धरोनि अभिमान। रावणें फुंकितां हुताशन। भडका एकसरें उठोन। जालें दहन दाढीमिशां ॥ १७ ॥ प्रथम प्रारंभीं अपमान। दाढ्यामिशांचें जालें दहन। सिंहासनीं काळें वदन। लज्जायमान रावण ॥ १८ ॥ कीर्तीची जाली अपकीर्ती। दुसरी लज्जा रावणाप्रती। पुढें काय करील मारुती। चिंतावर्ती रावण ॥ १९ ॥ एका जनार्दना शरण। हें प्रथम पुच्छप्रकरण। पुढें राक्षसां गांजणें। पुरदहन अवधारा ॥१२०॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां रावणस्य खांडमिशादहनं नाम अष्टादशोऽध्यायः ॥ १८ ॥ ओंव्या ॥ १२० ॥ श्लोक ॥ ५ ॥ श्रीसीतारामचंद्रार्पणमस्तु ॥

अध्याय एकोणिसावा

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ॥ पुच्छाग्नि फुंकितां रावण। भडक्यानें उठला हुताशन। हनुमंत पित्यासी सांगे आपण।

---

१ मोठे बलवान. २ तिलप्राय. ३ नाकांत. ४ जेवणाच्या आरंभींचें उदकाचमन. ५ अग्नि. ६ तयारी. ७ तुपाच्या आहुति. ८ अग्नि. ९ चिंतारूपी भोंवऱ्यांत.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

करी अपमान रावणा ॥ १ ॥ ऐकोनि पुत्राचें वचन । वायु वन्हि प्रज्वळून । रावणाचें मुख पोळून । केलें दहन खांडमिशां ॥ २ ॥ अपमानला दशानन । ओष्ठ पोळले दारुण । शंख करूं न शके रावण । टिरी पिटोन आक्रंदे ॥ ३ ॥ उफराटें शंखस्फुरण । गुद त्राहाटोनि करी रावण । प्रथम पावला अपमान । पुच्छदहन भलें नव्हे ॥४॥

लांगूलेन प्रदीप्तेन बालसूर्यसमप्रभः ।
ततश्छित्वात्मनः पाशं वेगवान्स महाकपिः ॥ १ ॥
दह्यमाने च लांगूले चिंतयामास वानरः ।
स पुरद्वारमाश्रित्य शैलशृंगमिवोन्नतः ॥ २ ॥
प्रदीप्तोऽग्निरयं कस्मान्न करोति च मे रुजम् ।
रामप्रसादादाश्चर्यं न मां दहति पावकः ॥ ३ ॥
शिशिरस्येव संपातो लांगूलाग्रे प्रतिष्ठितः ।
अथ शीतलसर्वांगः स्वस्थसर्वेंद्रियक्रियः ॥ ४ ॥

रावण विचारी विवेकमार्गीं । आम्हीं पुच्छासी लाविली आगी । तें हित नव्हे आम्हांलागीं । वानर सर्वांगीं निःशंक ॥ ५ ॥ छळोनि जाळितां कपीसी । छळण न चले रामभक्तांसी । छळितां जाळिलें माझ्या मुखासी । दाढ्यामिशांसी दहनानें ॥ ६ ॥ दीप्तपुच्छ हनुमंत । शोभे जैसा बाळादित्य । पुच्छतेज तें किरणावर्त । निशाचरांत कपिपुच्छ ॥ ७ ॥ उगवल्या कपिदिनकर । अस्त पावती निशाचर । रावणा निर्दळी अंधार । घेवोनि समग्र गर्वरात्री ॥८॥ उड्डाण देतां वानरास । छेदिले रज्जु पाश द्रुमपाश । निर्दळोनि ब्रह्मपाश । नामें भवपाश छेदिले ॥९॥ रामनामाच्या आवर्तीं । सप्तपाशांसी निवृत्ती । पावोनियां स्वयें मारुती । गर्जे त्रिजगतीं स्वानंदें ॥ १० ॥ काळपाश कर्मपाश । धर्मपाश ब्रह्मपाश । मायापाश मोहपाश । जन्मपाश सातवा ॥ ११ ॥ काळपाश तो आयुष्यघात । कर्मपाश तो अनैश्वर्यवंत । धर्मपाश तो आश्रमगत । वेदविहितार्थ ब्रह्मपाश ॥ १२ ॥ देहममता तो मोहपाश । मुख्य माया तो आशापाश । कनककांता हा जन्मपाश । सप्तपाशीं जीव बद्ध ॥ १३ ॥ सप्तपाशांची निवृत्ती । रामें करी मारुती । येरांच्या न चलती युक्ती । पडे गुंती देहपाशीं ॥ १४ ॥ आठवा पाश तो वितंड । त्याचे पोटीं पाश उदंड । त्याचें नाम पाषंड । काळें तोंड कर्त्याचें ॥ १५ ॥ सकळ पाशांचें छेदन । करावया रामनाम प्रवीण । नामें हनुमंत संपन्न । पाशछेदन केलें तेणें ॥ १६ ॥ पुच्छीं धडाडितां वन्ही । हनुमंत लोळे गडबडोनी । पाशधर गेले पळोनी । धकधकोनी अपधाकें ॥ १७ ॥ जंव जंव पुच्छ धडाडित । तंव तंव पळे हनुमंत । द्वंद्वनिरासीं साह्य रघुनाथ । नित्य निजभक्तसाहाकारी ॥ १८ ॥ द्वंद्वनिरासीं वाडेंकोडें । सूक्ष्मस्वरूप निजनिवाडें । श्रीरामभक्तां मागेंपुढें । चहूंकडे कोंदाटे ॥ १९ ॥ ऐसा साह्य श्रीरघुनाथ । द्वंद्वबाधा कैंची तेथ । द्वंद्व तें सुखरूप होत । द्वंद्वनिर्मुक्त हनुमत ॥ २० ॥ पुच्छीं धडाडी हुताश[1] । हनुमंतासी अति संतोष । पुच्छीं बांधिला अमृतांश[3] । ऐसा उल्लास वानरा ॥ २१ ॥ पुच्छीं पेटला वैश्वानर । खेंवा[4] आला शरच्चंद्र । ऐसा उल्लासे कपींद्र । रामचंद्र निजसाह्य ॥ २२ ॥ रामनामाची नवलगोष्टी । द्वंद्वाचिये पाठीं पोटीं । राम चिद्रूप दावी दृष्टी । निर्द्वंद्व सृष्टी रामनामें ॥ २३ ॥ रामनामापरतें । साधन नाहीं सरतें । अग्नि बाधूं न शके मातें । कृपा रघुनाथें मज केली ॥ २४ ॥ पुढील कथेचा कथितार्थ । जंव जंव पुच्छ धडाडित । तंव तंव हनुमान तळमळित । राक्षस शांत करावया ॥ २५ ॥ नेत्रीं लाविली अर्धचंद्री । खरसीं आणिली मुखांतरीं । पुच्छ पसरोनि धरेवरी । मरणानुकारी निचेष्ट ॥ २६ ॥ राक्षस येवोनि समस्त । त्यातें हालवोनि पहात । तंव तो न हालवी पाय हात । वानरें दांत विचकिले ॥ २७ ॥ एक उलथें पालथें करिती । एक उफराटें धरिती । तंव पुच्छाग्नीनें पोळती । मग पळती माघारे ॥ २८ ॥ एक ढुंगीं घालिती काड्या । एक हाणिती फडफडां । वानरू निःशंक गाढा । दांत दाढा हालवीना ॥ २९ ॥ मीस करोनि अति निगुतीं । हालों नेदी पातया पातीं । म्हणती निमाला मारुती । करोनि ख्याती रणमारें ॥ ३० ॥ वानर वीर जगजेठी । मारिल्या राक्षसांच्या कोटी । इंद्रजिता रावणा धुकधुक मोठी । अवध्यांचे पोटीं अति धाक ॥ ३१ ॥ जरी हा मरण न पावता । करिता अवध्यांचे घाता । गाढी बुद्धि लंकानाथा । छळें हनुमंता मारिलें ॥ ३२ ॥ आमुचे

१ अग्नीनें. २ कपिरूपी सूर्य. ३ चंद्र. ४ अलिंगनाला.

५ श्रेष्ठ. ६ फेंस. ७ कपटानें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

दळीं इंद्रजित बळी । त्याची केली रणरांगोळी । वीर मारिले आतुर्बळी । कोण त्यासत्रें फळी घेवों शके ॥ ३३ ॥ रावणासीं नाहीं बळ । परी करूं जाणे स्वयें छळ । पेटवोनियां लांगूळें । गोळांगूळें[3] मारिला ॥ ३४ ॥ सत्यवादी वानर पूर्ण । पाळोनि श्रीरामाची आण । सांगोनियां निजमरण । आपणा आपण मारविलें ॥ ३५ ॥ वैद्य पोंहती विचक्षण । म्हणती हृदयीं आहे प्राण । तोही अतिशयेंसीं क्षीण । क्षणार्धें पूर्ण निमेल ॥३६॥ हनुमंत निमाला ऐकोनि वाणी । घावो घातला निशाणीं । इंद्रजित हर्षेला मनीं । रावणें शेरणी वांटिली ॥ ३७ ॥ राक्षसी सांगती सीतेपासीं । तुवां संवाद केला ज्या कपीसीं । आगी लावोनि त्याचे पुच्छासीं । रावणें त्यासी मारिलें ॥ ३८ ॥

श्रुत्वा तद्वचनं क्रूरमात्मापहरणोपमम् ।
जानकी शोकसंतप्ता हुताशनमुपागमत् ॥ ५ ॥
यद्यस्ति पतिशुश्रूषा यद्यस्ति चरितं तपः ।
यदि वा त्वेकपत्नीत्वं शीतो भव हनूमतः ॥ ६ ॥

मारिलें ऐकोनि कपीसी । सीता जाहली कासाविसी । जठराग्नि आणोनि ध्यानासीं । स्वयें त्यासी प्रार्थित ॥३९॥ जरी मज श्रीरामाची गुरुभक्ती । श्रीरामसेवा तपःसंपत्ती । श्रीरामभक्ती जरी हनुमंतीं । तरी मारुती वांचवीं ॥ ४० ॥ ऐकोनि सीतेचें वचन । अग्नि घाली लोटांगण । वाहतों श्रीरामाची आण । नाहीं मरण हनुमंता ॥ ४१ ॥ ऐकें हनुमंताची प्रौढी । लंका जाळील रोकडी । मारील राक्षसांच्या कोडी । जाळिली दाढी रावणाची ॥ ४२ ॥ रावणाचा अपमान । हनुमान करी पुरदहन । ऐसें ऐकोनियां वचन । सुखसंपन्न जानकी ॥ ४३ ॥ हनुमंत निमाला निःशेख । पाहों आले अवघे लोक । त्याचें पहावया मुख । एक एक दाटले ॥ ४४ ॥ मिळवावया राक्षसमांदी । मीस घेतलें निजबुद्धी । अवघियां वधावया त्रिशुद्धी । पेटले द्वंद्वीं तें ऐका ॥ ४५ ॥ दाटलिया राक्षसांच्या हारी । जळत पुच्छ घाली त्यांवरी । तंव ते पोळती उरीं शिरीं । आली महामारी राक्षसां ॥ ४६ ॥ पळों जातां पैं बाहेरी । जळत पुच्छ लावी द्वारीं । अवघ्यां केली कोंडमारी । निशाचरीं आकांत ॥ ४७ ॥ घुसघुसऊ बावरझोंटी । लोंबलिया राक्षसपृष्ठीं । पुच्छ तयांमाजी दाटी । बोंब उठी देहदाहें ॥ ४८ ॥ एकाच्या वस्त्रा लाविली आगी । तेणेंचि जळती सर्वांगीं । पुच्छ घाली एकाचे ढुंगीं । नेसण्या आगी लावी एका ॥ ४९ ॥ एकाचीं मुंडासीं जळत । फेडूं जातां पोळले हात । एकाचे झगे जळत । एकाचे जळत कटिबंध ॥ ५० ॥ आगी लागली धोत्रासी । द्विज पोळले लिंगप्रदेशीं । नागवे नाचती रावणापासीं । दाविती त्यासी निजलिंग ॥ ५१ ॥ रावणा तेथें लावीं हात । कांही तरी व्यथा होईल शांत । वेदविभागी तूं पुण्यवंत । पद्महस्त पैं तुझा ॥ ५२ ॥ कन्यासंक्रांतीं दुष्कर्म । करूं नये श्मश्रुकर्म । शप्पें वाढलीं पैं परम । कोपानुक्रम न करावा ॥ ५३ ॥ हनुमान मारिला राजद्वारीं । निशाणें त्राहाटिल्या भेरी । जळो जळो रावणा तुझी थोरी । जोहारमारी त्वां केली ॥ ५४ ॥ लंका नागविली वस्त्रासाठीं । तेलातुपा पाडिली तुटी । दीप लावणें खुंटली गोष्टी । शेखीं जीवा आटी मांडिली ॥ ५५ ॥ रावण म्हणे गा हनुमंता । लोकां जाळिसी कवण्या अर्था । सावध ऐकें लंकानाथा । तुज तत्त्वतां सांगेन ॥ ५६ ॥ पुच्छासीं मरण आलें निश्चित । मरणभयें झड[7] देत । भेणें लोकांमाजि दडत । त्यासी म्यां येथ काय कीजे ॥ ५७ ॥ एकाचे चरण धरित । एकाचे पाठीं रिघत । एकाचे पालवा[8] झोंबत । मरणभयातें चुकवावया ॥ ५८ ॥ एकासी होतें शरणागत । एकाचे गळां पडत । विनवोनियां लंकानाथ । मरणमुक्त करा म्हणे ॥५९॥ उरीं शिरीं जाळी सर्वांसी । या नांव तूं शरण म्हणसी । भली बुद्धि तुज हनुमंतासीं । राक्षसांसी मारावया ॥ ६० ॥ पुच्छ खवळलिया येथ । रावणा चुकलासी निश्चित । तोही सांगेन गुह्यार्थ । सावचित्त अवधारीं ॥ ६१ ॥ पुच्छ उघडें पडल्या तिळभरी । मरण नये पुच्छावरी । करील लंकेची बोंहरी । महामारी राक्षसां ॥ ६२ ॥ पूर्वी म्यां सांगितलें होतें । तुवां उपेक्षोनियां त्यातें । न सांभाळितां पुच्छातें । अग्नि तेथें लाविला ॥ ६३ ॥ पुच्छ तीं ठायीं उघडें होतें । तेणें मरण न येचि त्यातें । परतलें अग्निक्षोभार्थें । त्रिविधवातें

१ युद्ध. २ शेंपूट. ३ वानर. ४ खिरापत. ५ पागोटीं. ६ अग्नीमध्यें मारणें. ७ धडपड. ८ पदराला. ९ नाश.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

घातावया ॥ ६४ ॥ राक्षस मारील महाबळी । करील लंकेची होळी । बुजोनि खंदकाची पाळी । पाडील पौळी दुर्गाची ॥ ६५ ॥ पुच्छ क्षोभलें अति क्षोभकता । माझेनि निवारेना आतां । सत्य जाण गा लंकानाथा । करील घाता लंकेशा ॥ ६६ ॥ जरी असेल आंगवण । तरी पुच्छासीं करावें रण । माझेनि निवारेना जाण । क्षोभलें पूर्ण कपिपुच्छ ॥ ६७ ॥ ऐसें बोलतां हनुमंता । जळत पुच्छ राक्षसमाथां । वाजलें पैं अति निघाता । वीरविघाता मांडिलें ॥ ६८ ॥ पुच्छाभिघात महाबळी । सर्वेचि अग्नि सर्वांगें जाळी । राक्षसां मांडली महाहोळी । करील रांगोळी महावीरां ॥ ६९ ॥ रावणापासीं हनुमंत । निःशंक बैसला सावचित्त । पुच्छें मांडिला आकांत । अग्निसंताप राक्षसां ॥ ७० ॥ राक्षससैन्यामाझारीं । बोंब सुटली एकसरीं । अग्नि पोळीत उरीं शिरीं । पुच्छ महामारीं मारित ॥ ७१ ॥ मिळोनि महावीर समस्त । मारावया हनुमंत । धांविन्नले शतसहस्र । जेंवी कां मत्त मातंग ॥ ७२ ॥ वीर करूं येतां घात । हनुमंत स्वानंदें नाचत । उड्डाण करोनि अद्भुत । मग गर्जत भुभुःकारें ॥ ७३ ॥ जैसें गिरिशिखराकार । तैसें राजगृहाचें पूर्वद्वार । तेथें बैसला वानर । निशाचर लक्षोनी ॥ ७४ ॥ पूर्वद्वारीं अर्गळा होती । तीच घेवोनियां हातीं । रणीं मिसळला मारुती । राक्षसां शांती करीतचि ॥ ७५ ॥ पुच्छ महावीरांतें जाळी । हनुमान मारी आतुर्बळी । राक्षसांची रणरांगोळी । केली तत्काळीं वानरें ॥ ७६ ॥ हनुमान निमाला म्हणोनी । निशांणघायीं वांटिली शेरणी । तोंचि उठिला राक्षसनिर्दळणीं । महापळणी मांडली ॥ ७७ ॥ पळावया पैं पुरती । सवडी नाहीं यथारिती । लंका पेटली दहनावर्तीं । द्वंद्वा मारुति पेटला ॥ ७८ ॥ पुच्छ म्हणिजे अग्निकल्लोळ । लंकापौळी जाळी सकळ । राक्षस करिती तळमळ । न चले बळ पुच्छासीं ॥ ७९ ॥ रावण अन्यायी परोपरी । वस्त्रें नागविलीं नगरीं । तेलातुपा करोनि बोहरी । पुच्छ वानरी पेटविलें ॥ ८० ॥ पुच्छ पेटविलें मारायासी । तेंचि हत्यार जाहलें त्यासी । जाळों लागलें लंकेसी । राक्षसांसी देहदाहो ॥ ८१ ॥

यो ह्ययं मम लांगूले दीप्यते हव्यवाहनः ।
तस्य संतर्पणं न्याय्यं कर्तुमेभिर्गृहोत्तमैः ॥ ७ ॥
ततोऽसौ दीप्तलांगूलः सविद्युदिव तोयदः ।
भवनाग्रेषु लंकाया विचचारानिलात्मजः ॥ ८ ॥
मुमोच हनुमानग्निं कालानलशिखोपमम् ।
साचिव्यं तस्य कुर्वाणः सुतस्य सुतवत्सलः ॥ ९ ॥
ततोऽनलानिलौ क्रुद्धौ हनुमांश्चैव वीर्यवान् ।
परिदीप्य तदा लंकामासमंताद्विदीप्यते ॥ १० ॥
भवनानीव सिद्धानामंबरात्पुण्यसंक्षये ।
तानि भग्नविमानानि निपेतुर्धरणीतले ॥ ११ ॥

हनुमान विचारी निजमानसीं । अग्नि लागला माझे कांसेसी । परमातिथ्य करूं यासीं । देऊं भक्षावयासी गृहें उत्तम ॥ ८२ ॥ विचारितां मूळानुवादु । वेदानुवादें सखे बंधु । दोहींचा वायु पिता प्रसिध्दु । परम सुहृदु आप्तत्वें ॥ ८३ ॥ सखा बंधु साचोकारें । तृप्ती देऊं परमादरें । रत्नखचित माडिया गोपुरें । हेममंदिरें मणियुक्त ॥ ८४ ॥ ज्येष्ठ बंधु अति वरिष्ठ । भोजनीं लंकाभुवन ताट । राजमंदिरें परम श्रेष्ठ । भक्ष्य चोखट तें ऐका ॥ ८५ ॥ श्वेत पीत क्षौमांबरें । प्रथम भोजनीं क्षीरसाकरें । मणिमुक्तहारसंभारें । घृतांभिघारें शोभती ॥ ८६ ॥ चंदनमंदिरें तें ओदन । उपस्कर तें वरान्न । पताका खडखडिती जाण । कथिका पूर्ण फुरफुरित ॥ ८७ ॥ तिळतंडुळकणांचे राशी । घृतशर्करा प्राणाहुतींसीं । नगरगृहें ग्रासोग्रासीं । पूर्ण तृप्तीसीं भक्षावया ॥ ८८ ॥ जे जे आवडेल गोडी । ते ते पुरवीन रोकडी । घरोघरींच्या उतरंडी । स्वेच्छा परवडी सेवावी ॥ ८९ ॥ जे जे गृहीं गृहसामुग्री । ते ते लोणची कोशिंबिरी । तिखट शस्त्रें रायतीं खरीं । कवाडें करी पापड ॥ ९० ॥ विचित्र पडदे आणि वितानें । नानाकुसरींचीं वरासनें । तींचि परवडी पक्वान्नें । चांदवे ते चाकुळिया ॥ ९१ ॥ बांधलें बोचकें लाडूभक्षण । स्त्रियांचीं पोतीं तिळवे जाण । पर्यंक आणि परिस्तरणें । फेणिया पूर्ण सपदरा ॥ ९२ ॥ गादिया पसारे पोतडीं ।

१ नाश. २ तट. ३ वीरांच्या घाताला. ४ हत्ती. ५ आडसर. ६ वाद्यें (भेरी) वाजवून. ७ खरेपणानें. ८ अग्नीचा वेढा पडून. ९ खरोखर. १० तुपाच्या शिंपडण्यानें. ११ सामान. १२ वरण. १३ छतें. १४ आच्छादनें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सांडया काचऱ्या कुरवडी। तेथेंचि पैं मुगवडी। तबक परवडी आंबवडे ॥ ९३ ॥ ध्वजस्तंभ वरी लवण। मंडपदाह दधिओदन। तृणघराचें जें दहन। उत्तरापोशन समाप्ती ॥ ९४ ॥ सखा बंधु हुताशन। आदरें द्यावया भोजन। हनुमंतासी उल्लास पूर्ण। पुरदहन अवधारा ॥ ९५ ॥ अनिळानळ हनुमंत। दीर्घ क्षोभले अत्यद्भुत। लंका करावया हुत। तिघे समवेत चालिले ॥ ९६ ॥ पुच्छाग्नि अति प्रदीप्त। हनुमान विचरे लंकेआंत। अग्नि लावी जेथींचा तेथ। अति आक्रांत लंकेसीं ॥ ९७ ॥ कपि बैसोनि लंकाशिखरीं। आगी लावी घरोघरीं। कळकळती नरनारी। आपांपरी राक्षसां ॥ ९८ ॥ जळती घरें धवलारें। हाट हटवटिया चौबारें। माड्या उपरिया गृहें गोपुरें। अग्नि वानरें लाविला ॥ ९९ ॥ घरें तळघरें वोवरें। पीतांबरसांठवण पेटारे। मठ मंडप चत्वरें। आगी वानरें लाविली ॥ १०० ॥ पाकशाळा पाठशाळा। आगी लावी विचित्रशाळा। यंत्र तंत्र मृदंगशाळा। निघती ज्वाळा धडधडित ॥ १ ॥ अश्वशाळा गजशाळा। कनककोठारें संग्रहशाळा। रंगशाळा भोगशाळा। गंधर्वशाळा जाळित ॥ २ ॥ लंकादुर्गी सभोंवतें। गडपाळ सैन्य पैं जाळित। तेंही छळें बळें समस्त। हनुमंतें जाळिलें ॥ ३ ॥ लंकादुर्गदारवंटे। जाळिल्या अर्गळा कपाटें। मोकळे सातही दारवंटे। आगड मर्कटें बुजविले ॥ ४ ॥ आगी लावोन प्रबळबळी। खचले हुडे दुर्गाच्या पौळी। आगड बुजिले तत्काळीं। मांडिली होळी दुर्गाची ॥ ५ ॥ आगी लावोनि भडभडां। दुर्गाचे हुडे चहूंकडां। खचोनि पडती धडधडां। होत रगडां राक्षसां ॥ ६ ॥ हुडे खचती धडधडां। तळीं राक्षसांचा होय चुराडा। तेणेंचि बुजित आगडा। पुढें झगडा जिंतावया ॥ ७ ॥ पाडित दुर्गाचिया पौळी। आगड बुजीत समूळीं। श्रीराम यावया सहदळीं। वाट मोकळी करितसे ॥ ८ ॥ हनुमान बैसला निवांत। पुच्छ धांवे जेथींचें तेथ। आगी लावोन समस्त। ज्वाळाकुळित केली लंका ॥ ९ ॥ कपि म्हणे पित्या पवनासी। भोजन देतां सख्या बंधूसी। ज्येष्ठ बंधू पूज्य आम्हांसी। साह्य त्यासी त्वां व्हावें ॥ ११० ॥ ऐसें विनवितां मारुती। वायु सुखावला चित्तीं। दोघे बंधू पढियंती। साह्य सर्वार्थी तो जाहला ॥ ११ ॥ अग्नि वायूचा ज्येष्ठसुत। भेटला कनिष्ठ हनुमंत। सुतें आलिंगिला सुत। उल्लासत स्वयें वायु ॥ १२ ॥ वायु साह्य जाहला अग्नीसी। लंका कवळोनि चौपासीं। ज्वाळा उठिल्या बहुवर्णेसीं। सावकासीं अवधारा ॥ १३ ॥

क्वचित्कांचनवर्णाभास्तपनीयनिभाः क्वचित्।
क्वचित्तप्तसुवर्णाभाः क्वचिच्च रजतोपमाः ॥ १२ ॥
फुल्लाशोकनिभाः क्वापि क्वचित्किंशुकसन्निभाः।
क्वचिद्धूमावृतः श्यामो विधूमो ज्वलनः क्वचित् ॥ १३ ॥
इंद्रनीलनिभो भूत्वा नानावर्णः क्वचित्क्वचित् ॥ १४ ॥

कोठें काचवर्णज्वाळा। कोठें केवळ पिंवळा। कोठें कर्कोटकाळा। भासती ज्वाळा अग्नीच्या ॥ १४ ॥ कोठें हिरण्यवर्ण निर्मळा। भासती अतिशुभ्र ज्वाळा। कोठें अशोककुसुमकळा। आरक्त ज्वाळा भासती ॥ १५ ॥ किंशुक फुलले वसंतीं। तैसी सिंदूरवर्ण दीप्ती। कोठें ज्वाळा धुमाकुळिती। कोठें लखलखिती सोज्ज्वळा ॥ १६ ॥ आरक्त श्याम एकत्र प्रभा। इंद्रधनुष्यासम शोभा। नीलोत्पलसन्निभा। पद्मगर्भा भासती ॥ १७ ॥ ज्येष्ठपुष्करीं कमळानेका। तैसी ज्वाळाकुळित लंका। विमानीं आभासत लोकां। आणि सकळिकां भूतळीं ॥ १८ ॥ ज्वाळा भरतांचि गगनीं। जावोनि झोंबलिया विमानीं। ज्वाळमाळाकिंकिणी। पडती धरणीं विमानें ॥ १९ ॥ वेंचल्या निजपुण्यसंपत्ती। जेंवी स्वर्गस्थां होय च्युती। तेंवी विमानें ज्वाळाकुळिती। सवेग पडती भूतळीं ॥ १२० ॥ जैसा प्रळयकाळींचा अग्नी। जाय सत्यलोका ठाकोनी। तेंवी लंकादहनवन्ही। झोंबे धांवोनि निराळीं ॥ २१ ॥ श्वापदें पळालीं जीव घेऊनी। पक्षी किलकिलती गगनीं। देव पळती विमानीं। पाताळीं पळती पन्नग ॥ २२ ॥ मारुतें मारुति आणि वन्ही। लंका जाळिती तिघीं जणीं। तापें तापली धरणी। सर्व फणी पोळले ॥ २३ ॥ सर्व पोळोनियां फणी। दडाले अर्णवजीवनीं।

१ वायु आणि अग्नि. २ दुर्दशा. ३ बाजार. ४ बुरुज. ५ किल्ल्यांच्या. ६ ससैन्य. ७ सुवर्णकांतीच्या. ८ पळस. ९ पतन. १० आकाशीं. ११ वायु. १२ समुद्राच्या पाण्यांत

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

शेष पोळेना फणिमणी । शेषशायनी श्रीराम ॥२४॥ लंका जाळितां मारुती । तापें तापली त्रिजगती । लंकाजन अति आवर्ती । आली शांती राक्षसां ॥ २५ ॥

ततस्ते राक्षसाः सर्वे सरावणमहाबलाः ।
बाला वृद्धाश्च शोचंतो निर्ययुर्नगराद्बहिः ॥ १५ ॥
परस्परमवष्टभ्य हस्तं हस्तेन वेश्मनि ।
धूमावच्छन्ननयनाः क्रोशंतश्चेतरेतरम् ॥ १६ ॥
स्त्रियश्च ज्वालाबाधार्ता भ्रमंत्यो वै ततस्ततः ।
आक्रोशतः स्खलंतश्च धरण्यां रजनीचराः ॥ १७ ॥
बभ्रमुस्तत्र तत्रैव ज्वालामालाकुलेक्षणाः ॥ १८ ॥

राक्षस सांगती रावणातें । तुवां पुच्छ पेटवोनियां येथें । कां खवळिलें वानरातें । मारिलीं समस्तें कपिपुच्छें ॥ २६ ॥ पहिलें कपिपुच्छ दुर्धर । त्यासी अग्नि जाहला साहाकार । लंका जाळिली गिरिकंदर । दुर्ग समग्र जाळिले ॥ २७ ॥ अग्निबळाच्या समेळीं । दुर्गाची रे करोनि होळी । पाडोनि दुर्गींचिया पौळी । खंदक समूळीं बूजिला ॥ २८ ॥ बळें दुर्धर माकड । अवलीळा[3] हाणोनि झड । दुर्ग पाडोनि आगड[4] । सभोंवता बूजिला ॥ २९ ॥ दुर्गासभोंवतीं चौफेरें । भरलीं होतीं अग्नियंत्रें । आगी लावितां वानरें । तीं एकसरें सुटलीं ॥ १३० ॥ एक वेळे समकाळ । सुटले यंत्रांचे यंत्रगोळ । नगरीं उठला हलकल्लोळ । वीर सबळ निमाले ॥ ३१ ॥ पडोनि दुर्गाची पैं भेटी[6] । नगर जाळिलें उठाउठीं । वृद्धें आतुरें अति संकटीं । स्त्रियां बाळांपाठीं लावी अग्नि ॥ ३२ ॥ जरी वीरांचें बळ गाढें । काय करिती अग्नीपुढें । रावणा तुवां केलें कुडें । मरण रोकडें तुज आलें ॥ ३३ ॥ अग्नि लावला चौफेरीं । बोंब उठली एकसरीं । अति आकांत घरोघरीं । आपांपैंरी स्त्रियां बाळां ॥ ३४ ॥ अगे तूं जळसी रोकडी । दुजी पाउलें आंसुडी । तंव ते नागवी उघडी । पडे उपडी लोकलाजे ॥ ३५ ॥ पुच्छ येतां देखोनि बिंदीं । जन पळती सांदोसांदीं । जेथें देखे बहुत मांदी । पुच्छ त्रिशुद्धी घाली तेथें ॥ ३६ ॥ आगी लाविली वस्त्रातें । मरणभयें तें फेडित । मागें पुढें देवोनि हात । स्त्रिया धांवत नगरीं पैं ॥ ३७ ॥ अग्नीनें पोळलीं बहुत । एक कण्हती कुंथत । एक अतिशयें थकित । तळमळती एक पैं ॥ ३८ ॥ अग्नि देखोनि चौफेर । बाळ वृद्ध दीन आतुर । स्त्रिया घेवोनि कुमार । अति सत्वर धांवती ॥ ३९ ॥ एकएकांचे धरोनि हात । हाकाहाक बोंब करित । पिता पुत्रातें पाचारित । पुत्र हाकीत पित्यातें ॥ १४० ॥ दाहो देखोनि स्वधामा । आपांपरी सकळ ग्रामा । राम्या पेम्या धांव रे धर्म्या । पाव रे परम्या आकांतीं ॥ ४१ ॥ धांव वेंकटेशा पाव वितंकमुखा । धांव रे सुपुत्रा दुर्मुखा । ऐशा आक्रंदें देती हाका । वानरें लंका जाळिली ॥ ४२ ॥ निघावया ग्रामाबाहेरी । मिळोनियां जनांच्या हारी[8] । वेगीं येतां नगरद्वारीं । तंव चौफेरीं कपिपुच्छ ॥ ४३ ॥ जे जे द्वारीं रिघों जात । पुच्छ धगधगीत दिसे तेथ । निर्गम न पुरे निश्चित । जन भ्रमत अति भ्रांतीं ॥ ४४ ॥ जळत्या घरामाझारीं । माता सांडोनि म्हातारी । खांदीं घेवोनि निजनारी । पळे बाहेरी स्त्रीलोभें ॥ ४५ ॥ पति सांडोनि जळत्या घरीं । हातीं कुमरू कडियेकारी[10] । स्त्री निघे घराबाहेरी । तुम्ही बरव्या परी घर राखा ॥ ४६ ॥ जळत चण्याचें पडिलें टेंक फुटाणे खावे लागल्या भूक । माथणी भरली शीतोदक । घर सम्यक राखावें ॥ ४७ ॥ घरधणी राखण घरीं । बाळें पडोत अग्निबाहेरी । लेंकरें घेवोनि कडियेवरी । पळती नारी सवेग ॥ ४८ ॥ एकी एकासी म्हणे आतां । तुझी मी होईन कांता । स्वपति न भेटे आकांता । म्यां तो सर्वथा सांडिला ॥ ४९ ॥ एक भुलली सुंदर । भेटे त्यासी म्हणे भर्तार । मी तंव तुझी स्वदार[11] । अंगीकार करीं माझा ॥ १५० ॥ ऐसीं भ्रमलीं नेणों किती । नगरामाजी परिभ्रमती[12][13] । धुमाकूळ ते नेत्र स्रवती । आक्रंदती अति दुःखें ॥ ५१ ॥

पतंत्यो रेजिरेऽभ्रेभ्यः सौदामिन्य इवांबरात् ।
वज्रविद्रुमवैदूर्यमुक्तारजतसंहतान् ॥ १९ ॥
विचित्रान्भवने धातून्स्पंदमानान्ददर्श सः ।
नाग्निस्तृप्यति काष्ठानां तृणानां च यथा तथा ॥ २० ॥

हिरे वैदूर्य प्रवाळें[14] । रत्न माणिकें मुक्ताफळें[15] । रत्नखचित राउळें । जाळिलीं सकळें वन्हिजाळीं

१ फणेवर मणि असल्यामुळें. २ पर्वतांतील गुहा. ३ सहज, लीलेनें. ४ खंदक. ५ तोफा. ६ रचना. ७ दुर्दशा.

८ मार्गांत. ९ रांगा. १० कुमारी. ११ स्त्री. १२ भटकतात. १३ या नांवाचें रत्न. १४ पोवळीं. १५ मोत्यें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ ५२ ॥ जंव जंव जाळी लंकाभवन । तृप्ति न पवेचि हुताशन । लंका न जाळावी आपण । मन न मानी मारुतीचें ॥ ५३ ॥ अग्नि आणि हनुमंत । पिता वायु साह्य तेथ । लंका जाळोनि समस्त । केले वाताहत राक्षस ॥५४॥ ऐसी जाळोनियां नगरी । आला रावणाचे गृहावरी । अग्नि लाविला राजमंदिरीं । आपांपरी राणिवसा ॥ ५५ ॥

रक्तोत्पलनिकाशाश्च दृश्यंते पावकार्चिषः ।
रावणांतःपुरं चैतद्दह्यते सर्वतोऽग्निना ॥ २१ ॥

रावणाचीं समस्त घरें । सातखणी नवखणी मंदिरें । माड्या उपऱ्या गोपुरें । घरें तळघरें जाळिलीं ॥ ५६ ॥ रावणाचें सेजागार । निद्रा करितें मंदिर । राणिवसांचें घरोनघर । वानरें समग्र जाळिलें ॥ ५७ ॥ लंकेच्या कड्याकपाटांत । मंदोदरीसमवेत । राणिया लपाल्या समस्त । अग्नि तेथ पावेना ॥ ५८ ॥ रावण बैसला होता जेथ । कपिपुच्छ पावलें तेथ । राक्षस मिळोनि समस्त । अति आकांत मांडिला ॥ ५९ ॥ रावण काढावा बाहेरी । नाहीं तरी पुच्छ पाडील जोहरीं । दुर्ग पाडून निशाचरीं । केला मार्ग बहुकष्टें ॥ १६० ॥ बाप कपिपुच्छाची थोरी । जळत पुच्छ ठाकिलें द्वारीं । निर्गमें पुरेना बाहेरी । हाहाकारीं गर्जती ॥ ६१ ॥ विघ्न आलें रावणावरी । बोंब उठली निशाचरीं । इंद्रजित धाके निजजिव्हारीं । होईल बोहरी रायाची ॥ ६२ ॥ तये काळीं निशाचर । निवडोनियां निघडे वीर । सन्नद्धबद्धशस्त्रास्त्र । वानरावरी लोटले ॥ ६३ ॥

प्रेतदत्तैश्च शूलाग्रैः पाशैः खङ्गपरश्वधैः ।
हनूमंतं महावेगं निजघ्नुर्वानरर्षभम् ॥ २२ ॥
ते राक्षसा भीमबला नानाप्रहरणान्विताः ।
अजघ्नन् वानरश्रेष्ठं बाणैरादित्यसन्निभैः ॥ २३ ॥

सतेज शूळ असमसाहस । वोडण खड्ग पाश फरश । आदित्यवर्ण बाण बहुवस । हाणिती राक्षस हनुमंता ॥ ६४ ॥ हाणिती नानापरींचीं शस्त्रें । सोडिती नानापरींचीं यंत्रें । फोडिती भिंडिमाळा पांगोरे । राक्षस समग्र क्षोभले ॥ ६५ ॥ रावणाचे दृष्टीपुढें । युद्ध मांडलें रोकडें । वीर वाँटिवे अति निघडे । रणीं वेगाडे उठावले ॥ ६६ ॥ निशाणें त्राहाटिल्या भेरी । चिणकाहळा रणमोहरी । सिंहनाद करोनि वीरीं । वानरावरी लोटले ॥६७॥ इकडे वाजतां वाजंत्रीं विविध । वीर करिती सिंहनाद । तिकडे हाका बोंबा प्रसिद्ध । महाशब्द जनांचे ॥ ६८ ॥ मध्यें हनुमंत अग्रगणी । आलिया देखोनि वीरश्रेणी । पुच्छ नाचवीत रणांगणीं । घेई धणी युद्धाची ॥ ६९ ॥ कपि म्हणे निजपुच्छासी । लंका जाळिली चौपासीं । तूं अतिशयें भागलासी । विसांव्यासी घे आतां ॥ १७० ॥ आलिया राक्षसवीरश्रेणी । त्यांतें मारीन अर्धक्षीणीं । पुच्छ धांवोनि लागे चरणीं । ऐसें स्वामींनीं न करावें ॥ ७१ ॥ अर्धसंग्राम सुग्रासितां । सुखींचा ग्रास हनुमंता । काढों नये गा सर्वथा । राजधर्मता विचारीं ॥ ७२ ॥ स्वामी मी सेवक तुझा । माझा संग्राम पाहें कपिराजा । आलिया राक्षसांच्या फौजा । रणसमाजा मर्दीन ॥ ७३ ॥ राक्षसें बापुडीं काइसीं । तूं कशासाठीं उठसी । तूं असतां माझ्या पाठीसीं । या मशकांसी कोण पाड ॥ ७४ ॥ ऐसें निजपुच्छें सांगतां । हासूं आलें हनुमंता । आलिंगूनियां प्रेमंता । होय चुंबिता निजपुच्छ ॥ ७५ ॥ कपिपुच्छ होय साह्यता । माझें मज स्फुरण नावरतां । आम्ही तुम्ही समसाम्यता । वीरां समस्तां निर्दाळूं ॥ ७६ ॥ पुच्छ म्हणे ऐसेंच भलें । स्वामीचें वचन पाहिजे केलें । ऐसें कपिपुच्छ समजलें । सरसावलें संग्रामीं ॥ ७७ ॥ कपि पुच्छासीं करी एकांत । मारूं नको लंकानाथ । त्याचा श्रीराम करील घात । इंद्रजिताचा लक्ष्मण ॥ ७८ ॥ उरले राक्षस समस्त । त्यांचा आम्ही करूं घात । ऐसा करोनि इत्यर्थ । मग युद्धार्थ चालिला ॥ ७९ ॥ तूं आकळीं मी निर्दळीं । ऐसी राक्षसमंडळी । करूं आजी रणरांगोळी । पिटिली टाळी कपिपुच्छें ॥ १८० ॥ करितां वाद्यांचा गजर । राक्षसभार अति दुर्धर । येवोन हनुमंतासमोर । शस्त्रसंभार सोडिती ॥ ८१ ॥ रावणाचे दृष्टीपुढां । होईल निर्वाण झगडा । हनुमंत करील रणरगडा । करील नितोडा राक्षसां ॥ ८२ ॥ राक्षसवीर अत्यंत क्रूर । करीत आले हाहाकार । हनुमंत स्वस्थानीं

१ अग्नि. २ जनानखान्यांत. ३ शयनमंदिर. ४ जनानखान्यांतील. ५ अग्नीमध्यें. ६ सुटका. ७ शूर. ८ त्वरेनें. ९ झांजा. १० तृप्ति. ११ प्रेमपूर्वक. १२ राक्षसांचा समुदाय. १३ निकाल, नाश.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

स्थिर। अणुमात्र ढळेना ॥ ८३ ॥ अंगीं राक्षसांचे घाये। लागती तंव उगाचि राहे। मग उठोनियां लवलाहें। केलें काय तें ऐका ॥ ८४ ॥ राक्षसांचे शस्त्रनिर्घाता। भय नाहीं हनुमंता। करावया राक्षसांचे घाता। भय केलें तत्त्वतां तें ऐका ॥ ८५ ॥ रत्नखचित हेमालंकार। सभामंडपीं खांब थोर। वानरें उपटिला सत्वर। निशाचर मारावया ॥ ८६ ॥

ततो वातात्मजः क्रुद्धो हेमरत्नसमन्वितम्।
प्रासादस्य समुत्पत्य स्तंभं हेमविभूषितम् ॥ २४ ॥
भ्रामयित्वा शतगुणं नाम विश्राव्य चात्मनः।
जघान राक्षसान्वीरान्वज्रेणेन्द्र इवासुरान् ॥ २५ ॥

शस्त्रें हाणितां दुर्धर। आला राक्षसांचा भार[1]। खांब उपटोनि अग्रधार। रणीं वानर मिसळला ॥ ८७ ॥ मी रामाचा रामदूत। आलों राक्षसां करावया घात। बाण सारोनियां तेथ। खांव भोवंडीत शतावर्ती ॥ ८८ ॥ वीर हाणिती शस्त्रास्त्रीं। पुच्छें निवारी वरच्यावरी। खांब हाणितां वीरां शिरीं। करीत चुरी[2] शतसहस्त्रीं ॥ ८९ ॥ पुच्छ स्वेच्छा वीरांतें जाळी। उरीं शिरीं सर्वांग पोळी। खांब हाणोनि हनुमान बळी। करी रांगोळी वीरांची ॥ १९० ॥ कपीस मारावया रोकडें। कवची खड्गी वीर वेंगाढे। थरकोनि सरकोनि चहूंकडे। घाय देवँडे[3] हाणिती ॥ ९१ ॥ चुकवोनि पुच्छाचा आघात। संमुख चुकवोनियां घात। वीर तळपोनि घाय हाणित। रणीं हनुमंत मारावया ॥ ९२ ॥ हनुमान विचारी पोटांत। वीर खवळले समस्त। यांचा पाहूं पुरुषार्थ। अंगीं आघात साहोनि ॥ ९३ ॥ यांच्या शस्त्रांचे समेळीं। माझी न तुटे रोमावळी[4]। शस्त्रें हाणिती महाबळी। रणकल्लोळीं भिडोनी ॥ ९४ ॥ दडाला त्यांचे शस्त्रांतळीं। वीरीं दिधली आरोळी। अवघे म्हणती बळी रे बळी। कपि भूतळीं पाडिला ॥ ९५ ॥ संमुख हाणिती तोमर[5]। मागोन हाणिती महावज्र। वाम सव्य विंधिती तीर। वर्षती शस्त्रें गगनींहूनी ॥ ९६ ॥ राहिलें उड्डाण किराण। निःशेष गेला त्याचा प्राण। आमची गाढी आंगवण। भेरी निशाणें त्राहाटिलीं ॥ ९७ ॥ एक म्हणे म्यां शस्त्रघातें। संमुख पाडिला हनुमंत। एक म्हणे उराआंत। शूळघात म्यां खोंचिला ॥ ९८ ॥ एक म्हणे म्यां खड्गधारीं। पुरा केला मस्तकावरी। एक म्हणे वाणशरधारीं। सर्वांग शिरीं खिळिलें ॥ ९९ ॥ ऐशा वाँटिवा गर्जती वीर। हर्षें वांटिती साखर। आतां विझवा लंकापुर। रणीं वानर मारिला ॥ २०० ॥ वानरें थोर केली ख्याती। तरी आम्ही भद्रजाती। हाँरीं आँणिला मारुती। शस्त्रप्रयुक्तीं रणमारें ॥ १ ॥ रण शोधा रे सत्वर। कोणे ठायीं मेला कपिकुंजर। तंव तेथें देवोनि भुभुःकार। वेगीं वानर उसळला ॥ २ ॥ ऐकोनि कपीचें गर्जन। कांपिन्नला दशानन। राक्षसांचा पळाला प्राण। रोकडें मरण देखोनि ॥ ३ ॥ पुच्छ कवळोनि समसगट। अवघे केले एकवट। खांब हाणोनि घनदाट। केलें पीठ अवघ्यांचें ॥ ४ ॥ हात पाय ना मनगट। ना त्या अस्थि शिर ना कंठ। पाठीचें पोटींचें करोनि पीठ। केली एकवट अवघ्यांसी ॥ ५ ॥ ना ते भूतळीं ना ते पाताळीं। शेखीं नेलेच रसातळीं। हनुमंतें ते महाबळी। नेले तत्काळीं निर्गुणत्वा ॥ ६ ॥ इंद्रियें अव्यक्त देहाभिव्यक्ती। नांव रूप त्रिगुणजाती। निर्दळोनियां मारुतीं। गुणातीतीं ते नेले ॥ ७ ॥ श्रीरामभक्ताच्या निजहस्तीं। जे जे निमती मारकयुक्तीं। ते ते पावती गुणातीतीं। भक्तीची ख्याती पैं ऐसी ॥ ८ ॥ श्रीरामभक्ताच्या दृष्टीपुढें। मरे त्याचें भाग्य चोखडें। जिणोनि त्रिगुणांचें सांकडें। पावे रोकडें परब्रह्म ॥ ९ ॥ श्रीरामाचे अखंड स्मरणीं। अथवा सार तें ऐकिल्या कानीं। कर्माकर्मा होय धुंणी[6]। निजनिर्गुणीं तो पावे ॥ २१० ॥ श्रीराम ज्याच्या वदनीं। श्रीरामनाम ज्याच्या ध्यानीं। नित्य सावधान श्रीरामभजनीं। धन्य त्रिभुवनीं तो एक ॥ ११ ॥ ऐसी श्रीरामाची भक्ती। नित्य नांदे हनुमंतीं। रणीं राक्षसां लावोनि ख्याती। दिधली मुक्ती कपिराजें ॥ १२ ॥ रावणासी म्हणे हनुमंत। तुझा सर्वथा न करीं घात। आजि सोडिला जीवें जीत। तुज रघुनाथ बघील ॥ १३ ॥ एका जनार्दना शरण। जाहलें लंकापुरदहन। हनुमंताचें पुनरागमन। सावधान अवधारा ॥ १४ ॥ कैसी येईल श्रीरामभेटी। कैशा सांगेल सीतेच्या

१ समुदाय. २ नाश. ३ एकसारखे. ४ केश. ५ शस्त्रविशेष. ६ प्रौढीनें. ७ पराभूत केल्या. ८ क्षालन, नाश.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

गोष्टी । कथा अति गोड गोमटी । कृपादृष्टीं अवधारा ॥ १५ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां हनुमंतलंकादहनं नाम एकोनविंशोऽध्यायः ॥ १९ ॥ ओंव्या ॥ २१५ ॥ श्लोक ॥ २५ ॥

अध्याय विसावा

श्रीलक्ष्मीनारायणाभ्यां नमः ॥

स राक्षसांस्तान्सुबहून्निहत्य
वनं च भंक्त्वा बहुपादपं तत् ।
विसृज्य रक्षोभवनेषु वन्हिं
जगाम रामं मनसा महात्मा ॥ १ ॥

कोट्यनुकोटि वीर मर्दून । लंकाभुवना करोनि दहन । रावणातें अपमानून । कपि परतोन निघाला ॥ १ ॥ वीर मर्दितां समस्त । सांपडला लंकानाथ । हनुमान न करी त्याचा घात । श्रीरघुनाथ क्षोभेल ॥ २ ॥ रामें वाहिली असे आण । विंधोनियां निजबाण । रणीं मारीन रावण । असत्य कोण करूं शके ॥ ३ ॥ हातीं सांपडला लंकानाथ । मारितां क्षोभेल रघुनाथ । यालागीं न मारीच हनुमंत । जीवें जीत सोडिला ॥ ४ ॥ असत्य ठेवोनि स्वामीचे माथां । स्यां मिरवावी वाढिवतां । जळो ते श्लाघ्यतां हनुमंता । म्हणोनी लंकानाथा न मारीच ॥ ५ ॥ अशोकवनीं वनउंपाडा । निधडियां वीरां करोनि रगडा । हनुमान लोटोनियां पुढां । इंद्रजित गाढा पळविला ॥ ६ ॥ रावणासी जीवें मारितां । क्षणही न लगे मज आतां । मर्यादा नुल्लंघवे मज रघुनाथा । तेणें लंकानाथा न मारीच ॥ ७ ॥ बळें मारोनि जंबुमाळी । अखया उपडोनियां पौळीं । राक्षसभवनां करोनि होळी । कपि महाबळी परतला ॥ ८ ॥ वनें उपवनें शोधितां । भाग्यें सांपडली सीता । शुद्धि सांगावया श्रीरघुनाथा । हनुमंता उल्लास ॥ ९ ॥ एकेच उड्डाणें श्रीरघुनाथा । चरणीं ठेवावया माथा । शुद्धि सांगावया सीता । हनुमंता उल्लास ॥ १० ॥ केव्हां देखेन रघुनाथा । केव्हां शुद्धि सांगेन सीता । ऐसी आवडी हनुमंता । उल्लासता परतला ॥ ११ ॥ जळत पुच्छ धरोनि वरी । विझवूं जातां पैं सागरीं । समुद्रें निवारिला लहरीं । ऐसें न करीं हनुमंता ॥ १२ ॥ पुच्छ बुचकळितां सागरा । कढू सुटेल समुद्रनीरा । उकाडा होईल जळचरां । ऐसें कपींद्रा न करावें ॥ १३ ॥ पित्या पवनातें प्रार्थूनी । पुच्छाग्रीं पेटविला वज्राग्नी । तेणें कढेल समुद्रपाणी । मरतील श्रेणी जळजंतूंच्या ॥ १४ ॥ पुच्छ पसरिल्या समुद्रतीरीं । सिंधु म्हणे मी घालीन लहरी । विझवोनियां क्षणामाझारीं । युक्ती कपींद्रें मानिली ॥ १५ ॥

स दीर्घं लीलयोत्पत्य लांगूलं भीमदर्शनम् ।
निर्वापयामास तदा समुद्रे हरिपुंगवः ॥ २ ॥

धरिलें होतें रूप दारुण । पुच्छ वाढविलें गगन व्यापून । तें उग्रपण सांडोन । धरी सामान्य कपिरूप ॥ १६ ॥ सामान्य रूप समुद्रतीरीं । पुच्छ पसरितां लीळेंकरीं । क्षणार्धें विझविलें लहरीं । जाहली वानरीं विश्रांति ॥ १७ ॥ स्वेदें निपटोनि शरीरीं । स्वयें सांडितां सागरीं । पडिला तो ग्रासिला मगरीं । तेणेंचि उदरीं गर्भ तिसीं ॥ १८ ॥ मगरोदरीं गर्भसमाज । हनुमंताचा पुत्र स्वेदंज । जन्म पावला मकरध्वज । बळसमाज कपीसम ॥ १९ ॥ हनुमंतें ऐशियापरी । पुच्छ विझवोनि सागरीं । कथा चालिली पुढारीं । निजनिर्धारीं अवधारा ॥ २० ॥

प्रदीप्यमाने लांगूले रावणेन हनूमतः ।
जानकीं शोकसंतप्तां सरमा वाक्यमब्रवीत् ॥ ३ ॥
प्रसीद मम वैदेही हनुमंतं पतिप्रिये ।
गतः संप्रति दूतस्ते छित्वा पाशमपि दृढम् ॥ ४ ॥
स राक्षससहस्राणि विद्राव्य हरिपुंगवः ।
लंकामादीपयामास वायुपुत्रो महाबलः ॥ ५ ॥
निहत्य राक्षसांस्तत्र दिवमेवोत्पपात ह ।
शरीरं स्वामिकार्यार्थे ददाति मकरालये ॥ ६ ॥

आगी लावोनि पुच्छासी । रावणें मारिलें हनुमंतासी । राक्षसी सांगती सीतेपासीं । तेणें तिसीं अति चिंता ॥ २१ ॥ करोनियां वनउपाडा ।

१ शौर्य. २ थोरपणा. ३ वनांतील झाडें उपटणें. ४ लंकेच्या आवारांत. ५ समुदाय. ६ घाम. ७ घामापासून झालेला. ८ बलवान्.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

राक्षसांसीं केला झगडा । मारोनि धुरा[1] बुजोनि आगंडा[2] । आपणही पुढां निमाला ॥ २२ ॥ धुरा मारोनि करोनि रण । आपणही रणीं दिधला प्राण । हें वानराचें उन्मत्तपण । स्वामिकार्य न साधेचि ॥ २३ ॥ वानर पालेखाइरा किती । मारूं गेला लंकापती । तेणें जाळिला पुच्छीं प्रदीप्तीं । शुद्धि सीतापति न पवेचि ॥ २४ ॥ आणिक एक मूर्खपण । कां सांगितलें आत्ममरण । आपणा मारविलें आपण । हें अभाग्यपण मज माझें ॥२५॥ रावणें मारिलें हनुमंता । शुद्धि न पवेचि श्रीरघुनाथा । यासीं म्यां काय करावें आतां । शोकें सीता संतप्त ॥ २६ ॥ दुस्तर सागर शतयोजन । कोणा न येववे उड्डाण करून । शुद्धि न पवेचि रघुनंदन । अभाग्य पूर्ण हें माझें ॥ २७ ॥ ऐकोनि हनुमंताचें मरण । अश्रुधारा स्रवती नयन । अति दुःखें आक्रंदोन । मूर्च्छापन्न जानकी ॥ २८ ॥ हनुमंताचे मरणापुढां । पुत्रशोक तो बापुडा । आघात[3] वाजला एवढा । आंत चरफडा तळमळी ॥ २९ ॥ माझे आकांताचा सांगाती । तोही निमाला मारुती । आतां कैसेनि भेटेल श्रीरघुपती । चिंतावर्ती जानकी ॥ ३० ॥ त्रिजटेची सखी परमा । हरिखें सांगों आली सरमा । मरण नाहीं वो प्लवंगमा[4] । पराक्रमा ऐक त्याचे ॥ ३१ ॥ तोडितां कमलमृणालांस[5] । सायास न पवेचि गजास । तेंवी कपीनें छेदोनि पाश । घेवोनि मीस राहिला ॥ ३२ ॥ पुच्छीं पेटवितां हुताशन । रावणाचीं दशवदनें । खांडमिशांतें जाळून । पाडिला अपमान लंकेशा ॥ ३३ ॥ तुझे वस्तीचें अशोकवन तें न जाळीच हुताशन । येर लंकेचें केलें दहन । भवनें भवनें शोधोनी ॥ ३४ ॥ पुच्छ पेटविल्यापाठीं । सुभट वीर जगजेठी । राक्षस मारिले कोट्यनुकोटी । पुच्छासाठीं वानरें ॥ ३५ ॥ लंकेमाजी भवन भवन । पुच्छें केलें पुरदहन । वानरां गाढी आंगवण । गेला गांजोन लंकेशा ॥ ३६ ॥ इतुकें करोनियां कंदन । समुद्रीं पुच्छ विझवोन । तुझी निजशुद्धी घेवोन । गेला ठाकोन श्रीरामा ॥ ३७ ॥ हनुमंत जावोनियां तेथें । घेवोनि येईल श्रीरामातें । शीघ्र पावेल वो येथें । जाण निश्चयें जानकीये ॥ ३८ ॥ ऐकोनि सरमेचें वचन । सीता जाहली सुखसंपन्न । तीस देवोनि आलिंगन । दिधलें भूषण निजमुद्रा ॥ ३९ ॥ सरमा म्हणे अहो माते । आम्ही तुझीं आज्ञांकितें । कायसा सन्मान आमुतें । राक्षसी मातें नको म्हणों ॥ ४० ॥ सीता म्हणे तूं आकांतसांगातिणी । आम्ही तुम्ही निर्वाणबहिणी[6] । विकल्प न धरीं वो साजणी । सरमा चरणीं लागली ॥ ४१ ॥ ऐकोनि सरमेचें वचन । सीता पावली समाधान । येरीकडे हनुमंत आपण । अति उद्विग्न स्वयें जाहला ॥ ४२ ॥

संदीप्यमानां विध्वस्तां त्रस्तरक्षोगणां पुरीम् ।
अवेक्ष्य हनुमान्लंकां चिंतयामास वानरः ॥ ७ ॥
यदि दग्धा मया लंका नूनमार्यापि जानकी ।
दग्धा तेन मया भर्तुर्हतं कार्यमजानता ॥ ८ ॥
तस्य क्रोधाभिभूतेन मया मूलक्षयः कृतः ।
विनष्टा जानकी व्यक्तं न ह्यदग्धः प्रदृश्यते ॥ ९ ॥
तस्यासीत्सुमहान्त्रासः कुत्सा चात्मन्यजायत ।
लंकां प्रदहता कामं किंस्वित्कृतमिदं मया ॥ १० ॥

पुच्छ समुद्रीं विझवून । घ्यावया श्रीरामदर्शन । आलें हनुमंतासी स्फुरण । करावया उड्डाण सज्ज जाहला ॥ ४३ ॥ मागील पाहतां आवांका । ज्वलनाकुळ[7] देखिली लंका । कपीसीं पडली आशंका । सीता निःशेखा भस्म जाहली ॥ ४४ ॥ अति चिंता हनुमंता । जाळोन स्वामींची कांता । काय शुद्धी सांगों रघुनाथा । केलें अनर्था मर्कटत्वें ॥ ४५ ॥ लंका साटोपें जाळितां । न पाहेंचि स्वामिकार्यार्थां । न पाहेंचि निजस्वार्था । केलें अनर्था मर्कटत्वें ॥ ४६ ॥ मारिले वीर कोट्यनुकोटी । लंका जाळितां उठाउठीं । जाळिली सीता गोरटी । ही बुद्धि खोटी पैं माझी ॥ ४७ ॥ जो जो म्यां केला पुरुषार्थ । तो तो जाहला मज निंद्यार्थ । जाळिली श्रीरामाची कांता । काय रघुनाथा मुख दावूं ॥ ४८ ॥ दहनीं[8] जाळिली सीता सती । जळो जळो माझी ख्याती । कीर्ति ते जाहली अपकीर्ती । केंवी रघुपतीस मुख दावूं ॥ ४९ ॥ तिची शुद्धि सांगों जातां । दहनीं

१ धुरंधर वीर. २ चर, खंदक. ३ धक्का. ४ वानराला. ५ कमलतंतूंना. ६ संकटकालींच्या बहिणी. ७ अग्नीनें सर्वत्र व्याप्त अशी. ८ अग्नींत.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

जाळिली ती सीता । अपयश आलें मज हनुमंता । केंवी रघुनाथा मुख दावूं ॥ ५० ॥ पुच्छाग्नीच्या आवर्तीं । लंका जाळिली सहितक्षिती । अदग्ध चार बोटें नुरती । सीता केउती वांचेल ॥ ५१ ॥ विचार न करितां मर्कटा । करोनियां मर्कटचेष्टा । बारा जणां श्रेष्ठश्रेष्ठां । केल्या बारा वाटा तें ऐका ॥ ५२ ॥ ऐकतां सीतेचें मरण । श्रीराम सांडील निजप्राण । प्राण सांडील लक्ष्मण । भरत शत्रुघ्न निमतील ॥ ५३ ॥ निमतील तिघी माता । मरण नळ नीळ जांबवंता । मरण सुग्रीवा कपिनाथा । अंगद तत्त्वतां निमेल ॥ ५४ ॥ ऐसिऐशिया श्रेष्ठश्रेष्ठां । माझेनि ऐशा बारा वाटा । त्याहून श्रेष्ठा आणि कनिष्ठा । मरण बळकट माझेनि ॥ ५५ ॥ अयोध्येचे नारी नर । मरतील समग्र वानर । एवढ्या अपेशासी पात्र । सीता सुंदर जाळोनी ॥ ५६ ॥ क्रोध केवळ पैं मांग । क्रोधें अपवित्र पैं सर्वांग । साधिल्या कार्या केला भंग । क्रोधें सांग नागविलें ॥ ५७ ॥ शुद्धि साधिलियापाठीं । क्रोध संचरला पोटीं । लंका जाळिली क्रोधदृष्टीं । सीता गोरटी जाळिली म्यां ॥ ५८ ॥ क्रोध मांगडा अति चांडाळ । जळें निरसे मांगविटाळ । क्रोध त्याहून प्रबळ । नव्हे निर्मळ स्नानदानें ॥ ५९ ॥ क्रोधाऐसा महावैरी । जडला असतां निजजिव्हारीं । जो ज्ञानाची मानी थोरी । तो संसारीं अति मूर्ख[१] ॥ ६० ॥

धन्याः खलु महात्मानो ये बुद्ध्या कोपमूर्जितम् ।
निरुंधंति महात्मानो दीप्तमग्निमिवांभसा ॥ ११ ॥

क्रोध येऊं न देती दृष्टी । धन्य धन्य ते नरश्रेष्ठी । क्रोध आलियाही पोटीं । ते विवेकदृष्टीं निर्दळिती ॥ ६१ ॥ ऐसिये दृष्टीचे नर । ते चैतन्याचें निजमंदिर । परब्रह्माचें भांडार । ब्रह्म साकार ते पुरुष ॥ ६२ ॥ भूतीं पाहतां भगवद्भाव । कामक्रोधांसी कैंचा ठाव । ऐसा ज्याचा निजसद्भाव । तोचि स्वयमेव परब्रह्म[२] ॥ ६३ ॥ ऐसा समूळ विचार[३] । न करींच मी पामर । क्रोधें नागविलें साचार[३] । सीता सुंदर जाळिली ॥ ६४ ॥ क्रोध आलिया तत्त्वतां[३] । अणुमात्र न करींच स्वार्था । करविलें कोटिकोटी अनर्था । जघन्यता[४] जगनिंद्य ॥ ६५ ॥ आली मज अति निंद्यता । ऐसेनि श्रीरामासी भेटतां । प्रळयो होईल समस्तां । निमाली सीता ऐकोनी ॥ ६६ ॥

इहैव प्राणसंन्यासो ममापि ह्यद्य रोचते ।
किमग्नौ निपताम्यद्य आहोस्विद्वडवामुखे ॥ १२ ॥

न वचोनियां श्रीरामापासीं । येथेंचि घ्यावें संन्यासग्रहणासी । तंव हाडवैर पडलें राक्षसांसीं । इहप्रदेशीं[५] राहों न ये ॥ ६७ ॥ आतां देवों आपुला प्राण । तरी मज सर्वथा न ये मरण । तेंही निजातमलक्षण । आपणा आपण अनुवादे ॥ ६८ ॥ जाळूं न शके वैश्वानर[६] । बुडवूं न शके मज सागर । भक्षूं न शकती मत्स्यमगर । वज्रशरीर पैं माझें ॥ ६९ ॥ जाणूनि वज्रदेह मारुती । सिंह व्याघ्र वडवाजाती । सर्वथा मजला न भक्षिती । मृत्यु हनुमंतीं असेना ॥ ७० ॥ भेटवेना श्रीरघुनाथा । मरण न ये मरों जातां । संन्यास न घेववे पैं घेतां । काय म्यां आतां करावें ॥ ७१ ॥ ऐसा हनुमंत आपण । सीता निमाली मानून । तेणें जाहला अति उद्विग्न । समाधान पावेना ॥ ७२ ॥ मग म्हणे श्रीरघुनाथा । पाव माझिया आकांता[७] । काय करावें म्यां आतां । बुद्धिदाता होय मज ॥ ७३ ॥ ऐसी करितां विनंती । श्रीराम नांदे सर्वां भूतीं । तेचि काळीं पैं मारुती । अगाध[८] युक्ती आठवली ॥ ७४ ॥

रामस्य च मनःकांता सा कथं विनशिष्यति ।
यद्वा दहनकर्मायं सर्वत्र प्रभुरव्ययः ॥ १३ ॥
न मे दहति लांगूलं कथमार्यां प्रधक्ष्यति ।
तपसा सत्यसंवादादनन्यत्वाच्च भर्तरि ॥ १४ ॥
असौ विनिर्दहेदग्निं न तामग्निः प्रधक्ष्यति ॥ १५ ॥

श्रीराम एकपत्नीधारी । श्रीरामसेवा तपसामग्री । सत्य श्रीरामनाम जिव्हारीं । वन्हि कैशापरी जाळील ॥ ७५ ॥ श्रीरामव्रतें सीता सती । श्रीरामाची अनन्य भक्ती । श्रीरामनामीं अनन्य प्रीती । अग्नि कैसा जाळील ॥ ७६ ॥ रावणें आगी लावितां पुच्छीं । पुच्छ न जाळवे अग्नीसी । तो कैंवी जाळील सीतेसी । विशेषेंसीं श्रीरामप्रिया ॥ ७७ ॥ श्रीरामाची प्रियकांता । अग्नीसीं न

१ पृथ्वीसह. २ परब्रह्मस्वरूपाचें, ज्ञानस्वरूपाचें. ३ खरोखर. ४ नीचपणानें. ५ ह्या ठिकाणीं, येथें. ६ अग्नि. ७ संकटकालीं. ८ मोठी, उत्तम.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

जाळवे सर्वथा । अग्नि जाळों न शके सीता । श्रीरामसत्ताप्रतापें ॥ ७८ ॥ श्रीरामाचे निजकिंकर । पालेखाइरें मी वानर । मम पुच्छ न जाळी वैश्वानर । सीता चिन्मात्र केंवी जाळी ॥ ७९ ॥ जरी जाळिली वन्हीनें सीता । तरी मी त्यासी दंडीन आतां । कोप आला हनुमंता । शेंडी माथां थरारिली ॥ ८० ॥ करकरलिया दांतदाढा । वळला पुच्छाचा आंकोडा । वन्हि दंडावया पुढां । हनुमान गाढा खवळला ॥ ८१ ॥ पिता पवन सांगे कानीं । ज्येष्ठ बंधु तुझा वन्ही । त्यासी करूं नये दंडनी । सीता जननी ते स्वस्थ असे ॥ ८२ ॥ अग्नीनें सीता अभिवंदूनी । स्वस्थ ठेविली अशोकवनीं । ऐसें ऐकतांचि कानीं । उल्लास मनीं वानरा ॥ ८३ ॥ अभिवंदोनि हुताशन । घालोनि पित्यासी लोटांगण । घ्यावया सीतेचें दर्शन । केलें उड्डाण वानरें ॥ ८४ ॥

ततः कपिः प्राप्तमनोरथार्थस्तामक्षतां राजसुतां विदित्वा ।
प्रत्यक्षतस्तां पुनरेव दृष्ट्वा प्रतिप्रयाणाय मतिं चकार ॥ १६ ॥
ततस्तु शिंशपामूले जानकीं पर्यवस्थिताम् ।
अभिवाद्याब्रवीद्दृष्ट्वा पश्यामि त्वामिहाक्षताम् ॥ १७ ॥
ततस्तं प्रस्थितं सीता वीक्ष्यमाणा पुनः पुनः ।
भर्तुः स्नेहाहिदं वाक्यं हनुमंतमथाब्रवीत् ॥ १८ ॥
यदि त्वं मन्यसे तात वसैकाहमिहानघ ।
क्वचित्सुसंवृते देशे विश्राम्य श्वो गमिष्यसि ॥ १९ ॥
मम चैवाल्पभाग्यायाः सांनिध्यात्तव वानर ।
शोकस्यास्याप्रमेयस्य मुहूर्तं स्यादपि क्षयः ॥ २० ॥
अदर्शनं च ते वीर भूयो मां दारयिष्यति ॥ २१ ॥

उड्डाण करोनि हनुमंता । स्वयें लंकेमाजी येतां । दग्धगजभग्नदंता । होय देखता पुरध्वंस ॥ ८५ ॥ विमानाकार पुरमंदिरें । जळोन पडलीं समग्रें । पक्ष्यदग्ध पैं मयूरें । वैश्वानरें पुरदाहो ॥ ८६ ॥ पुच्छाग्निदग्ध लंकाभुवन । त्यामाजी अदग्ध अशोकवन । सीता देखोनि सुखसंपन्न । केलें लोटांगण वानरें ॥ ८७ ॥ घालोनियां लोटांगण । आवडीं वंदिले चरण । सीताचरणक्षालण । केलें कपीनें नयनाश्रूंनीं ॥ ८८ ॥ वेगें येवोनि मारुती । मागें पुढें पाहे सीता सती । पाहे मागुती मागुती । पुनरावृत्तीं सौक्षेपें ॥ ८९ ॥ नाहीं जळली पोळली । नाहीं लोम हुरपळली । सीता सुखरूप देखिली । पिटिली टाळी हनुमंतें ॥ ९० ॥ सीता देखोनि अक्षतें । हनुमान आनंदें नाचत । माझा फळला पुरुषार्थ । रामकार्यार्थ साधला ॥ ९१ ॥ सीताशुद्धि लाभली येथ । जालें सीतामनोगत । साधिला श्रीरामकार्यार्थ । माझा पुरुषार्थ मज फळला ॥ ९२ ॥ सीतेचे चरणीं ठेवोनि माथा । कपि म्हणे मातें न करीं चिंता । घेवोन येईन वो रघुनाथा । ही घे तत्त्वतां भाक माझी ॥ ९३ ॥ वानर श्रीरामाचा आत । माझाही सखा हनुमंत । संकटीं भेटोनि वनाआंत । भवभयार्थ निरसिला ॥ ९४ ॥ राक्षस मारोनि समर्थ । लंका करोनि हताहत । गांजोनियां लंकानाथ । रामपुरुषार्थ प्रकटिला ॥ ९५ ॥ ऐकतां हनुमंताची गोष्टी । फलोत्कट जनकाची भेटी । ऐसी जाहली सुखसंतुष्टी । हनुमान दृष्टीं देखोनि ॥ ९६ ॥ जो आकांतीं रक्षिता । तो हनुमंत माता पिता । हनुमान प्रिय श्रीरघुनाथा । वेदशास्त्रार्थी मज पूज्य ॥ ९७ ॥ लंका जाळितां चौपासीं । युद्ध करितां भागलासी । तुज द्यावया विश्रांतीसी । नाहीं मजपासीं शेजबाज ॥ ९८ ॥ सेवा न घडे हनुमंता । ऐसी माझी अभाग्यता । निर्वातस्थळीं एकांता । विश्रांति त्वां आजि घ्यावी ॥ ९९ ॥ आजी घेवोनि विश्रांती । प्रातःकाळीं त्वां मारुती । भेटी जावें गा रघुपती । माझी विनंती अवधारीं ॥ १०० ॥ ऐकोन सीतेचें वचन । हनुमान जाहला हास्यवदन । ऐक माते सावधान । विश्रांतिस्थान पैं माझें ॥ १ ॥ जन्ममरणाची निवृत्ती । सकळ श्रमांची विश्रांती । त्या रामनामाच्या आवृत्ती । जाण निश्चितीं जानकिये ॥ २ ॥ युद्ध करितां रणावर्तीं । सबाह्य कवच श्रीराममूर्ती । एकाकी जातां दुर्गम पंथीं । नाम सांगातीं निर्भय ॥ ३ ॥ आसनीं भोजनीं शयनीं । नित्यावर्तीं गमनागमनीं । राम सांगाती जागृतीं स्वप्नीं । सत्य वाणी हे सीते ॥ ४ ॥ ऐकोनि हनुमंताची स्थिती । जीवें ओंवाळी सीता सती । सबाह्य विकलें श्रीरामभक्ती । धन्य मारुति जन्म तुझा ॥ ५ ॥ ऐकोनि हनुमंताची युक्ती । अकृत्रिम

१ एकनिष्ठ सेवक. २ न जळलेलें. ३ प्रयत्नानें. ४ सुरक्षित. ५ अत्यंत आनंद. ६ नाश. ७ सोबती.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

श्रीरामभक्ती । तेणें सुखावे सीता सती । धन्य मारुति जन्म तुझा ॥ ६ ॥ सुखावोनी सीता सती । सवेंचि दचकली पैं चित्तीं । आतां जाईल मारुती । कैंवी मागुती देखेन ॥ ७ ॥ तुझें प्रयाण ऐकतां । प्राण निघों पाहे आतां । काय करूं गा हनुमंता । आवरितां चित्त आवरेना ॥ ८ ॥ आणिक एक हनुमंता । संदेह वर्तताहे चित्ता । तोही सांगेन मी आतां । सावधानता अवधारीं ॥ ९ ॥

तानि हर्यृक्षसैन्यानि तौ वा नरवरात्मजौ
कथं नु खलु दुष्पारं संतरिष्यंति सागरम् ॥ २२ ॥
त्रयाणामेव भूतानां सागरस्यातिलंघने ।
शक्तिः स्याद्वैनतेयस्य तव वा मारुतस्य च ॥ २३ ॥
तदत्र कार्यनिर्बंधे समुत्पन्ने दुरासदे ।
किं पश्यसि समाधानं त्वं हि कार्यविशारदः ॥ २४॥
काममस्य त्वमेवैकः कार्यस्य परिसाधने ।
पर्याप्तः परवीरघ्न यशस्यस्ते बलोदयः ॥ २५ ॥

कोटि कोटि वानरभार । कैसेनि लंघिती सागर । कैंवी पावती पैल पार । दशशिर दंडावया ॥ ११० ॥ समुद्रलंघनाप्रती । तिघांजणां आहे शक्ती । वैनतेय[1] वायु मारुती । चौथियाची गति चालेना ॥ ११ ॥ मिळोनियां नरवानर । कैंवी लंघितील महासागर । हेचि मज चिंता थोर । सत्य साचार हनुमंता ॥ १२ ॥ समुद्र लंघणें कार्यार्थी । आलें हनुमंता तुझे माथां । राक्षसदमनीं तुज दक्षता । लंकानाथा तुझा धाक ॥ १३ ॥ नांव ऐकोनि हनुमंत । रावण उभ्यां चळकांपत । तुज इंद्रजित सदा धाकत । तुझा पुरुषार्थ अनुपम्य ॥ १४ ॥ ऐकोनि सीतेचें उत्तर । हनुमान म्हणे मी किंकर । श्रीरामप्रताप दुर्धर । ऐक साचार सांगेन ॥ १५ ॥ श्रीरामभातीं दुर्धर शर । बाणीं वाहोनि नरवानर । राम पाववील समुद्रपार । श्रीरामचंद्र प्रतापी ॥ १६ ॥

स वानरसहस्राणां कोटीभिरभिसंवृतः ।
क्षिप्रमेष्यति वैदेहि सुग्रीवः प्लवगाधिपः ॥ २६ ॥
तौ च वीरौ नरवरौ सहितौ रामलक्ष्मणौ ।
आगम्य नगरीं लंकां सायकैर्विधमिष्यतः ॥ २७ ॥
सगणं राक्षसं हत्वा नचिराद्रघुनंदनः ।
त्वामादाय वरारोहे स्वां पुरीमभियास्यति ॥ २८ ॥

एवमाश्वास्य वैदेहीं हनूमान्मारुतात्मजः ।
गमनाय मतिं कृत्वा वैदेहीमभ्यवादयत् ॥ २९ ॥

वानरसेनेचिया । हारीं श्रीराम बैसवोनि शराग्रीं । उतरोनियां समुद्रीं । लंकापरपारीं आणील ॥ १७ ॥ राम लक्ष्मण वीर वरिष्ठ । धनुर्विद्या अति श्रेष्ठ । बाण वर्षोनि अति उद्भट । दशकंठ छेदील ॥ १८ ॥ रणीं पाडितां दशकंठ । इंद्रजित कुंभकर्ण वरिष्ठ । प्रधान मारोनि समसगट । करील सपाट राक्षसां ॥ १९ ॥ इतुकें करावया येथ । शीघ्र आणितों रघुनाथ । विलंबू न लगे वो निश्चित । वचन त्रिसत्य हें माझें ॥ १२० ॥ वाहतों श्रीरामाची आण । शिवतों तुझे श्रीचरण । शीघ्र आणीन रघुनंदन । निजप्रमाण हें माझें ॥ २१ ॥ हनुमंतें ऐसिये परी । आश्वासोनि सीता सुंदरी । सिंधु उडावया परपारीं । नमस्कारी सीतेतें ॥ २२ ॥ कपीनें करितां नमस्कार । सीतेसी आला गाहिंवर । तिसी विनंती करी वानर । शुद्धि निर्धार लक्षोनी ॥ २३ ॥ श्रीराम ध्यानीं धरोनि आतां । सांडावी सकळ चित्तचिंता । तेणें सत्य प्राप्ति श्रीरघुनाथा । स्वानंदता उल्लासें ॥ २४ ॥ ध्यानीं धरोनि राघवा । चिंता सांडावी देहभावा । तेणें ब्रह्मत्व जीवीं जीवा । तोचि विसांवा जीवशिवांचा ॥ २५ ॥ चित्तचित्ता चिंतनवृत्ती । सांडोनि स्मरावा श्रीरघुपती । हाचि विसांवा विश्रांती । जीवशिव होती परब्रह्म ॥ २६ ॥ जीवत्व नाठवे जीवा । शिवत्व नाठवे शिवा । नित्य श्रीराम स्मरावा । ते जीवशिवा विश्रांति ॥ २७ ॥ परब्रह्माचें ब्रह्मपण । राम स्मरतां आठवण । ऐसें श्रीरामस्मरण । विसांवा जाण जानकिये ॥ २८ ॥ ऐकोनि हनुमंताचें वचन । सीता जाहली सुखसंपन्न । एका जनार्दना शरण । गोड निरूपण पुढें आहे ॥ २९ ॥ कपिकाकुत्स्थआनंदभेटी[5] । सीताशुद्धीची गोड गोष्टी । ऐकतां परमानंद सृष्टीं । कथाकसवटी अनुपम्य ॥ १३० ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां हनुमत्सीताश्वासनं नाम विंशतितमोऽध्यायः ॥ २० ॥ ओंव्या ॥ ॥ १३० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ २९ ॥

१ शंका, संशय. २ गरुड. ३ निरुपम. ४ रांगा.

५ मारुति आणि राम यांची आनंदानें भेट.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

अध्याय एकविसावा

॥ श्रीरामचंद्राय नमः ॥

श्रीरामभक्ताचें महिमान । अगाध गहन अति पावन । हनुमंतें केलें लंकादहन । ओतिली संपूर्ण सुवर्णाची ॥ १ ॥ रामभक्त करिती कंदन । तें कंदन होय सुखसंपन्न । ऐसें भक्तीचें महिमान । कृपा संपूर्ण रामाची ॥ २ ॥ हनुमंतें जाळिलें लंकेसी । नव्हे काळी कोळसा मसी । सुवर्ण ओतिलें चौपासीं । पीतप्रभेसीं शोभत ॥ ३ ॥ करितां लंकेचें दहन । लंका ओतिली सुवर्ण । याचें मूळ मुख्य कारण । गजोपाख्यान अवधारा ॥ ४ ॥ भगवंताचें कृपाळुपण । नामस्मरणाचें महिमान । गजेंद्राचें उद्धरण । प्रसंगें पूर्ण सुवर्णमय लंका ॥ ५ ॥ चालतां कथा रामायण । त्यामाजी गजेंद्रोद्धरण । लंका ओतिली सुवर्ण । तें कारण सांगेन ॥ ६ ॥

आसीद्गिरिवरो राजन् त्रिकूट इति विश्रुतः ।
क्षीरोदेनावृतः श्रीमान्योजनायुतमुच्छ्रितः ॥ १ ॥
तावता विस्तृतः पर्यक् त्रिभिः शृंगैः पयोनिधिः ।
दिशास्वारोचयन्नास्ते रौप्यायसहिरण्मयैः ॥ २ ॥
अन्याश्च ककुभः सर्वा रत्नधातुविचित्रितैः ।
नानाद्रुमलतागुल्मैर्निर्घोषैर्निर्झरांभसाम् ॥ ३ ॥

जो योगियांचा योगाग्रणी । जो ब्रह्मचर्यशिरोमणी । जो ज्ञानियांचा मुकुटमणी । तो श्रीशुक मुनि सांगत ॥ ७ ॥ जो कां वैराग्याचा निधी । ज्ञान[1]विज्ञानाचा[2] उदधी[3] । जो कां सद्बुद्धीची बुद्धी । तो शुक त्रिशुद्धी बोलत ॥ ८ ॥ जो पांडवकुळीं कुळदीपक । कौरवकुळीं कुळनायक । श्रोता परिक्षिति त्यक्तोदक[4] । श्रवणचातक कथार्थी ॥ ९ ॥ त्या परीक्षितीकारण । गजेंद्राचें उद्धरण । श्रीशुक सांगे आपण । वसतिस्थान गजाचें ॥ १० ॥ त्रिकूटनामा गिरिवर । योजनें अयुत दहा सहस्र । गंडकीपासोनि क्षीरसागर । एवढा थोर पर्वत ॥ ११ ॥ जितुका पृथ्वीवरी विस्तार । तितुका उंच दश सहस्र । त्रिकूटनामा त्रिशिखर । गिरिवर शोभत ॥ १२ ॥ नाना रत्नांचिया खाणी । नाना धातूंचिया[5] भरणी । निर्मळ जळांचिया श्रेणी । सरें[6] पुष्करणी तेणें भरती ॥ १३ ॥ पर्वताचें निजमहिमान । नाना वर्णीं विराजमान । श्वेतश्यामसुवर्णवर्ण । शोभा संपूर्ण गिरिवरा ॥ १४ ॥ वृक्ष वल्ली लता द्रुम[7] । सिंहव्याघ्रादि पशु प्लवंगम[8] । नाना जातींचे विहंगम[9] । ऋषिआश्रम सिद्धांचे ॥ १५ ॥ निर्मळ जळसरोवरें पूर्ण । नानापक्षिकुळभाषण । गोचंमरींचें[10] वसतिस्थान । शोभायमान पर्वत ॥ १६ ॥ सुवर्णताम्ररौप्यखाणी । लोहो[11] निपजे लोहपाषाणीं । नाना धातुप्रवाहश्रेणी । पर्वतांतूनी प्रसवती ॥ १७ ॥

तस्य दिव्यं भगवतो वरुणस्य महात्मनः ।
उद्यानं ऋतुमन्नाम आक्रीडं सुरयोषिताम् ॥ ४ ॥
सर्वतोलंकृतं दिव्यैर्नित्यं पुष्पफलद्रुमैः ।
मंदारैः पारिजातैश्च पाटलाशोकचंपकैः ॥ ५ ॥
चूतैः प्रियालैः पनसैराम्रैराम्रातकैरपि ।
क्रमुकैर्नारिकेलैश्च खर्जूरैर्बीजपूरकैः ॥ ६ ॥
मधुकैः श्यालतालैश्च तमालैरसनार्जुनैः ।
द्राक्षेक्षुरंभाजंबूभिर्बदर्यक्षाभयामलैः ॥ ७ ॥
अरिष्टोदुंबरप्लक्षैर्वटैः किंशुकचंदनैः ।
पिचुमंदैः कोविदारैः सरलैर्देवदारुभिः ॥ ८ ॥

जया पर्वताची दरी । जे लागली गंडकीगिरीं । वनें उपवनें अति साजिरीं । नाना वृक्षांतरीं गंभीर ॥ १८ ॥ जें देखतां उपवन । विश्रांतीतें पावे मन । छाया शीतळ सुगंध पवन । कोकिळाकूजन[12] सुखकारी ॥ १९ ॥ सर्वा ऋतूंचें एकायतन[13] । सर्वा ऋतूंचें फळ पुष्प जाण । त्या वनीं सदा सुखसंपन्न । क्रीडास्थान अप्सरां ॥ २० ॥ अमृतापरिस फळें सुस्वाद । कस्तूरीहूनि सुगंध । मलयानिळ सुस्वर संबद्ध । क्रीडती आनंदें अप्सरा ॥ २१ ॥ कृष्णसारूप्यें कृष्ण भ्रमर । सुमनीं[14] प्रवेशोनि सादर । आमोद सेविती सुखसार । केंवी केशर कुचुंबे ॥ २२ ॥ वृक्ष शोभती देवतरू । पाटली पारिजातक मांदारू । संतानादिक कल्पतरू । वृक्षविस्तारू चंदनादि ॥ २३ ॥ चंदन चंपक हरिचंदन । चूतवन[15] अशोकवन । खर्जुरीवन

१ मोठेपणा. २ शास्त्राध्ययन व गुरुपदेश यांहींकरून जो बोध होतो तें ज्ञान, आणि विज्ञान म्हणजे अनुभवज्ञान. ३ समुद्र. ४ पाणीही पिणें सोडलें आहे असा. ५ पंक्ती. ६ सरोवरें. ७ झाडें. ८ वानर. ९ पक्षी. १० वनगाईंचें. ११ लोखंड. १२ कोकिळेचें ओरडणें. १३ एक स्थान. १४ फुलांमध्यें. १५ आंब्यांची राई.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

तालवन । नंदनवनसम शोभे ॥ २४ ॥ रायकेळी सोनकेळी । मघमघिती कर्पूरकर्दळी । घडघडित नारीकेळी । शोभा वनफळीं समवेत ॥ २५ ॥ मधुवन विमलार्जुन । औदुंबर अति गहन । तमालवृक्ष शोभायमान । बिल्ववनें साजिरीं ॥ २६ ॥ द्राक्षामंडप शोभायमान । जांबुळीवृक्ष एकसमान । इक्षुदंड श्वेत कृष्ण । रस उलोन स्रवत पैं ॥ २७ ॥ कंटकहीन बदरी रसाळी । आंवळीवृक्ष रायआंवळी । फणस मघमघिती फळीं । मधूकवृक्षातळीं[1] फळशोभा ॥ २८ ॥ पिचुमंद[2] सुशीतल । सकळ व्याधि निरसी सबळ । गुग्गुळवृक्ष सोवन[3] सरळ । वट पिंपळ पलाश ॥ २९ ॥ निंबोणी नारिंगी पोफळी । रायनिंबोणीच्या हारी विशाळी । कपित्थवनाची[4] नवाळी । वर्तुळफळीं परिपक्क ॥ ३० ॥ कोरांटे जेंवी कां कोविदार[5] । वृक्षवटाहूनि थोर । श्वेतपीतपुष्पीं सुंदर । आणि बीजपूर मातुलुंगें[6] ॥ ३१ ॥ सुरभि[7]वृक्ष देवदार । भल्लातकी[8]वृक्षविस्तार । इंगुदीवृक्ष[9] अपार । फळसंभार बहुपुष्पी ॥ ३२ ॥ ऐसिया वृक्षांचिया जाती । असंख्यात नेणों किती । तेणें शोभा पर्वतीं । ऋषी वसती मुनि सिद्ध ॥ ३३ ॥

तस्मिन्सरः सुविपुलं लसत्कांचनपंकजम् ।
कुमुदोत्पलकल्हारशतपत्रश्रियार्जितम् ॥ ९ ॥
मत्तषट्पदनिर्घुष्टं शकुंतैश्च कलस्वनैः ।
हंसकारंडवाकीर्णं चक्राह्वैः सारसैरपि ॥ १० ॥
मत्स्यकच्छपसंचारचलत्पद्मरजःपयः ।
मल्लिकाशतपत्रैश्च माधवीजालकादिभिः ॥ ११ ॥
शोभितं तीरजैश्चान्यैः सर्वर्तुभिरलंकृतैः ॥ १२ ॥

त्या गिरिकंदराचे ठायीं । एक अगाध सरोवर पाहीं । तेथींच्या जळा मर्यादा नाहीं । पूर्णत्व ठायीं परिपूर्ण ॥ ३४ ॥ न्यूनपूर्णता जळीं । असेनाचि कोणे काळीं । रातोत्पळीं[10] सीतोत्पळीं[11] । हेमकमळीं शोभत ॥ ३५ ॥ कुमुदें कल्हारें नीलोत्पळें । मल्लिका शतपत्रें कुड्मळें[12] । जळचांचल्यें चलत्कमळें । जळ परिमळे स्वादिष्ठ ॥ ३६ ॥ समस्त ऋतु पकाकाळें । सुपुष्पित सदा फळें । सरोवरींचेनि जळें । क्रीडती सकळें जळचरें ॥ ३७ ॥ सरोवरीं जळचर । मत्स कच्छ पर्वताकार । त्यांसी ग्रासी ऐसा नक्र[13] । थोरां थोर गजग्रहो ॥ ३८ ॥ तेचि वनीं वसे गजेंद्र । तेचि सरोवरीं वसे नक्र । दोघांसही पूर्व वैर । अति दुर्धर ब्रह्मशापें ॥ ३९ ॥ एवढी ब्रह्मशापाची थोरी । यांसी घडली कैशा परी । तेही कथीन निजनिर्धारीं । पूर्वानुस्मरीं अवधारा ॥ ४० ॥ पूर्वी इंद्रद्युम्न राजेंद्र । ब्रह्मशापें जाहला गजेंद्र । हूहू गंधर्व अति दुर्धर । तो झाला नक्र[14] ब्रह्मशापें[15] ॥ ४१ ॥ पौंड्रदेशीं[16] राजा इंद्रद्युम्न । भगवद्भक्तिपरायण । तो या सरोवरा येऊन । एकांत देखोन राहिला ॥ ४२ ॥ एकांत आणि विश्रांती । राव सुखावला चित्तीं । तेथें राहोनि नेमस्तीं । व्रत चालवी तपश्चर्या ॥ ४३ ॥

स एकदाराधनकाल आत्मवान्
गृहीतमौनव्रत ईश्वरं हरिम् ।
जटाधरस्तापस आप्लुतोऽच्युतं
समर्चयामास कुलाचलाश्रमः ॥ १३ ॥
यदृच्छया तत्र महायशा मुनिः
समागमच्छिष्यगणैः परिश्रितः ।
तं वीक्ष्य तूष्णीमकृतार्पणादिकं
रहस्युदासीनमृषिश्चुकोप ह ॥ १४ ॥
तस्मा इमं शापमदादसाधु-
रयं दुरात्मा कृतबुद्धिरद्य ।
विप्रावमंता विशतां तमिस्रं
यथा गजः स्तब्धमतिः स एव ॥ १५ ॥
एवं शप्त्वा गतोऽगस्त्यो भगवान्नृप सानुगः ।
इंद्रद्युम्नः स राजर्षिर्दिष्टं तदुपधारयत् ॥ १६ ॥
कौंजरीं योनिमापन्न आत्मस्मृतिविनाशिनीम् ॥ १७ ॥

तोचि राजा इंद्रद्युम्न । त्रिकाळ करितां संध्यास्नान । केश वळिले जटाग्रंथन । तपस्वी पूर्ण तापसत्वें ॥ ४४ ॥ तो एके काळीं इंद्रद्युम्न । आराधनकाळ लक्षून । ते सरोवरोदकीं करोनि स्नान । घालोनि आसन बैसला ॥ ४५ ॥ तेचि काळीं अगस्तिमुनी । आला [17]शिष्येंसीं परिवारुनी । रायें

१ मोहाच्या झाडाखालीं. २ निंबाचे वृक्ष. ३ नीट. ४ कवठीच्या झाडांची. ५ कांचनवृक्ष. ६ महालुंगें. ७ सुगंधदायक. ८ बिबव्याचें झाड. ९ हिंगणबेटीचीं झाडें. १० तांबड्या कमलांनीं. ११ पांढऱ्या कमलांनीं. १२ कळया. १३ मगर. १४ सुसर. १५ ब्राह्मणशापानें. १६ पौंड्रनामक देशांत. १७ शिष्यांनीं वेष्टित, शिष्यमंडळी बरोबर घेऊन.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

अभ्युत्थान न करोनी । बैसला आसनीं ध्यानस्थ ॥ ४६ ॥ ऋषि येतां देखोनी । रायें सांडिला उपेक्षोनी । नाहीं नमन ना अभ्युत्थानीं । बैसला ध्यानीं ध्यानस्थ ॥ ४७ ॥ साधु सर्वांगीं चैतन्यघन[3] । त्यासी न भजतां धरी ध्यान । तें ध्यान नव्हे परम विघ्न । अधःपतन[4] ध्यानगर्वें ॥ ४८ ॥ ध्यानगर्व ज्याचे ठायीं । ज्ञानगर्वें जो उताणा[5] पाहीं । विद्यागर्वी मुसमुसी देहीं । तो नर पाहीं अधःपाती ॥ ४९ ॥ साधु सच्चिदानंदव्यक्ती । ध्यानीं काल्पनिक मूर्ती । साधुउपेक्षा ध्यानाप्रती । ते अधःपाती ध्यानगर्वें ॥ ५० ॥ उपेक्षोनि साधुसज्जन । जो साक्षेपें[6] आदरी ध्यान । ध्यान नव्हे ते नागवण[7] । आपणा आपण नाडिलें[8] ॥५१॥ ब्राह्मणीं नाहीं ब्रह्मभाव । भूतीं नाहीं भगवद्भाव । त्याचें ध्यानचित्त वाव[9] । आला अपाव[10] ध्यानगर्वें ॥ ५२ ॥ ब्राह्मणीं नाहीं ब्रह्मत्वभक्ती । ना भगवद्भाव सर्वां भूतीं । रायाची खोटी ध्यानस्थिती । तेणें अगस्ति कोपला ॥ ५३॥ राजा सावधान भगवध्यानीं । परी उपेक्षा साधुसज्जनीं । परम विघ्न ध्यानस्थानीं । देखोनि मुनि कोपला ॥५४॥ रायाचा झडे ध्यानाभिमान । भगवत्प्राप्ति पावे पूर्ण । ऐसी कृपा अनुलक्षून । शापवचन देतसे ॥ ५५ ॥ परम कृपाळू अगस्ती । शाप वदला कृपामूर्ती । साधुसज्जनीं गर्वोन्मत्ती । गजत्वप्राप्ती पावसी ॥ ५६ ॥ साधुसज्जनीं गर्वोन्मत्त । तो तूं होसी गज उन्मत्त । ऐसें अगस्ति जंव वदत । गजत्व प्राप्त रायासी ॥ ५७ ॥ ब्राह्मणाचिया अभक्ती । साधुसज्जनीं ध्यानोन्मत्ती । रायासी गजत्वाची प्राप्ती । मुनि अगस्तीचेनि शापें ॥ ५८ ॥ ब्राह्मणशाप अति दुर्धर । तेचि वनीं तो राजेंद्र । जाला उन्मत्त गजेंद्र । बळोद्दार महाबळी ॥ ५९ ॥ ऐसी इंद्रद्युम्नाची गती । हूहू गंधर्व याचि रीतीं । ब्रह्मशापाचेनि प्राप्ती । नक्रत्वस्थिती पावला ॥ ६० ॥ तेचि सरोवरीं माध्यान्हकाळीं । देवऋषि करितां आंघोळी । हूहू गंधर्व तेचि काळीं । करी जळकेळी स्त्रियांयुक्त ॥ ६१ ॥ देवऋषि जळांआंत । उभा सूर्यसूक्त जपत । हूहू गंधर्व जळीं गुप्त । येवोनि धरी ऋषिपाय ॥ ६२ ॥ ग्रह[11] जैसा उदकीं । येवोनि झोंबे एकाएकीं । तैसाचि गंधर्व अविवेकीं । झोंबला तंवकीं[12] ऋषिपायीं ॥ ६३ ॥ पायीं झोंबतां सत्वर । कोपोनि शापी ऋषीश्वर । गुप्तरूपें जळचर । होसी नक्र गजग्रहो ॥ ६४ ॥ ब्रह्मशाप ऐकोनि कानीं । गंधर्व इंद्रद्युम्न दोनी । उच्छाप मागावया लागूनी । कर जोडूनी विनविती ॥ ६५ ॥ आमुचे आम्ही गर्वोन्मत्त । ब्रह्मशाप जाला प्राप्त । तुम्ही दोघे कृपावंत । शापन्मुक्त करावें ॥ ६६ ॥ आम्ही दोघे अति अपराधी । तुम्ही दोघे कृपानिधी । तुम्ही अक्षोभ[13] अगाधबुद्धी । आम्हां त्रिशुद्धी[14] उद्धरावें ॥ ६७ ॥ तुम्ही मायबापांहूनि आप्त । आम्ही अपराधी अत्यंत । दोघे कृपाळू जी समर्थ । शापोन्मुक्त करावें ॥ ६८ ॥ ऐसें ऐकतां प्रार्थन । कृपेनें द्रवले दोघे जण । वदते जाले उच्छापवचन । सावधान अवधारा ॥ ६९ ॥ एक जळीं एक स्थळीं । वैरी व्हाल आतुर्बळी । युद्ध करितां जलकल्लोळीं । तुम्हां वनमाळी पावेल ॥ ७० ॥ युद्ध करितां अत्यंत । जेव्हां मांडेल प्राणांत । तेव्हां पावोनि भगवंत । नित्य निर्मुक्त करील ॥ ७१ ॥ शापोन्मुक्त जन्मोन्मुक्त । हरि करील भवनिर्मुक्त[15] । ऐसें वदले वरदोक्त । ऋषि समर्थ कृपाळु ॥ ७२ ॥ ब्राह्मण शापिती क्षोभोन । हें समूळ मिथ्या वचन । ऋषी कृपाळु दीनोद्धरण । वरद वदोन उद्धरिले ॥ ७३ ॥ उद्धरावयाची नवलपरी । काढिले जन्ममरणाबाहेरी । एवढी कृपेची थोरी । कोपामाझारी ऋषींच्या ॥ ७४ ॥ जैसा मातेचा निजकोप । वरी कठिण आंत सुखरूप । तैसाचि ब्राह्मणांचा शाप । शापें चिद्रूप पावती ॥ ७५ ॥ ब्राह्मणांचे कोपें निर्वृती[16] । पाप निर्दळोन ब्रह्मप्राप्ती । संतोषलिया काय देती । श्रुतिस्मृती अगम्य ॥ ७६ ॥ ऐसी वरदोक्ति वदोन । ऋषी गेले करोनि स्नान । गजेंद्र नक्र दोघे जण । जाले आपण ऋषिशापें ॥ ७७ ॥ राजा गजेंद्र वनस्थळीं । गंधर्व नक्र जाला जळीं । दोघे जण आतुर्बळी । जळीं स्थळीं विचरत ॥ ७८ ॥ जळीं नक्र महाबळी । तिमिंगिलांतें[17] सगळें गिळी । जळचरें

---

१ उठून आदरसत्कार. २ हयगय करून. ३ ज्ञानसंपन्न. ४ नरकवास. ५ गर्विष्ठ. ६ प्रयत्नपूर्वक. ७ हानि. ८ फसविलें. ९ व्यर्थ. १० हानि, खराबी. ११ सुसर.

१२ आवेशानें. १३ क्षोभ (क्रोध) न पावणारे. १४ खरेपणानें १५ संसारापासून सोडवणूक झालेले. १६ सुख. १७ एक प्रकारचा मोठा मासा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

कांपती जळीं । जलकल्लोळीं विचरतां ॥ ७९ ॥ लहानसान नाणी दृष्टी । पर्वतप्राय मत्स्य घोंटी । ऐसा नक्र जगजेठी । सुखसंतुष्टीं राहिला ॥ ८० ॥ शापें स्मृति गेली समस्त । तरी माझा वैरी उदकांत । ऐसें गजेंद्र नित्य स्मरत । न ये उदकार्थ सरोवरा ॥ ८१ ॥ गजेंद्र जो कां माझा वैरी । वसतो याचि वनांतरीं । हे आठवण नित्य नक्रीं । न ये बाहेरी आहारार्थ ॥८२॥ नक्र जळीं महाबळी । गजेंद्र वनीं बळिया बळी । दोघे जण शापसमेळीं । जळीं स्थळीं विचरत ॥ ८३ ॥

तत्रैकदा तद्गिरिकाननाश्रयः करेणुभिर्वारणयूथपश्चरन् ।
सकण्टकान्कीचकवेणुवेत्रविशालगुल्मान्प्ररुजन्वनस्पतीन्
॥ १८ ॥

यद्गंधमात्राद्धरयो गजेंद्रा व्याघ्रादयो बालमृगाश्च खड्गाः ।
महोरगाश्चापि भयाद्द्रवंति सगौरकृष्णाः शरभाश्चमर्यः
॥ १९ ॥

वृका वराहा महिषर्क्षशल्या गोपुच्छशाला वृकमर्कटाश्च ।
अन्ये च क्षुद्रा हरिणा शशादयश्चरंत्यभीता यदनुग्रहेण
॥ २० ॥

जो गजेंद्र ते गिरिकंदरीं । गजीगजशावसह परिवारीं । क्रीडा करी वनांतरीं । वनविहारीं उन्मत्त ॥ ८४ ॥ चैत्रमासींच्या वनशाखी । तयानें सेवितां एकाएकीं । मद चालिला पैं तवकीं । अति उद्रेकीं उन्मेद ॥ ८५ ॥ तेणें उन्मादें आपण । मांडिलें वनविहरण । वेळुजाळिया उपडून । वेत्रवन विध्वंसी ॥ ८६ ॥ गुल्मलता थोर थोर । गगनचुंबी तरुवर । कांटेसांवरी अपार ।उन्मूळी समग्र दंताग्रें ॥ ८७ ॥ हाणितां दांतांचीं पैं झडें । पाडी पर्वतांचे कडे । त्याचे मदगंधापुढें । पळती रोकडे वनसिंह ॥ ८८ ॥ गजेंद्रमदाचे अवघ्राणें । दिग्गज कांपती संपूर्ण । शरभ शार्दूळ पलायमान । सांडिती प्राण व्याघ्रसिंह ॥ ८९ ॥ आस्वल वराह महिष वृक । गौरवानर खड्ग जंबुकें । गोचमरी शाळ शशकें । मृगादिक भयें पळती ॥ ९० ॥ पळत्या पशूंसी नाभीकारें । देवोनि राखी त्यांसी गजेंद्र । घेती उदक साचार । दर्प दुर्धर साहवेना ॥ ९१ ॥

स घर्मतप्तः करिभिः करेणुभि-
र्वृतो मदच्युत्कलभैरनुद्रुतः ।
गिरिं गरिम्णा परितः प्रकंपयन्
निषेव्यमाणोऽलिकुलैर्मदाशनैः ॥ २१ ॥

पर्वतीं चालतां गजेंद्र बळी । पर्वत दडपीत पाताळीं । सर्प चेपती फणामंडळीं । पन्नगकुळीं आकांत ॥ ९२ ॥ गजेंद्र उन्मादमदमेळीं । करितां वनाची रवंदळी । चैत्रींचा रवि माध्यान्हकाळीं । कुंभस्थळीं पोळत ॥ ९३ ॥ गजी गजशाव समस्त । उष्णें जालीं अति संतप्त । अवघीं जालीं तृषार्त । उदकार्थ तळमळती ॥ ९४ ॥ करोनि पंचयोजनें गमन । नित्य करिती गंडकीउदकपान । परी सरोवराचें जीवन । नक्राभेण स्पर्शेना ॥ ९५ ॥ गंडकी न ठाके उष्णसमेळीं । किरणीं पोळला कुंभस्थळीं । आला सरोवराजवळीं । भयसमेळीं तृषार्त ॥ ९६ ॥ सोंड घालितां सरोवरीं । गजेंद्र धाकत जिव्हारीं । झणीं मज झोंबेल वैरी । भय भारी जळपानीं ॥ ९७ ॥ सोंड घालितांचि जळीं । गजमदगंध सेवावया अळी । रुंजी करिती गंडस्थळीं । भ्रमरावळी रुणझुणती ॥ ९८ ॥ गजी गजशावयांसंयुक्त । तृषें पीडिलीं जळार्थ । गजेंद्रेंसीं समवेत । आलीं धांवत सरोवरा ॥ ९९ ॥

सरोनिलं पंकजरेणुरूषितं
जिघ्रन्विदूरान्मदविह्वलेक्षणः ।
वृतः स्वयूथेन तृषार्दितेन त-
त्सरोवराभ्याशमथागमद्द्रुतम् ॥ २२ ॥

विगाह्य तस्मिन्नमृतांबु निर्मलं
हेमारविंदोत्पलरेणुवासितम् ।
पपौ निकामं निजपुष्करोद्धृतम्
आत्मानमद्भिः स्नपयन्गतक्लमः ॥ २३ ॥

स्वपुष्करेणोध्दृतशीकरोंऽबुभि-
र्निपाययन्संस्नपयन्यथा गृही ।

१ अतिरेकानें. २ मस्ती. ३ वेतांचें रान. ४ झपाटे. ५ वास घेणें. ६ सिंहाला मारणारा एक पशु. ७ वाघ. ८ डुक्कर. ९ लांडगे. १० कोल्हे. ११ ससे. १२ अभय.

१३ सर्पकुलांमध्यें. १४ नाश. १५ हत्तीचे छावे. १६ कदाचित. १७ भ्रमर, भुंगे.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

घृणी करेणूः कलभाश्च दुर्मदो

नाचष्ट कृच्छ्रं कृपणोऽजमायया ॥ २४ ॥

तें तडागॅ अति पुष्कळ । माजी निर्मळ जळ सुनीळ । कमळगंध सुपरिमळ । अति शीतळ शीकॅरांबु ॥ १०० ॥ गज राहोनि जळावाहेरी । सोंड घालोनि सरोवरीं । जळ प्राशिलें स्वइच्छेवरी । मस्तकावरी शिंपिलें ॥ १ ॥ जळप्राशनें गजपती । जाली सकळ श्रमां शांती । जळशिंपणें जाली विश्रांती । चढला पुढती गजमद ॥ २ ॥ रिघोनि सरोवरजळीं । उन्मादें मांडिली जळकेळी । कमळां करित रॅवंदळी । जळकल्लोळीं क्रीडत ॥ ३ ॥ गजी गॅजशाव उदकाप्रती । रिघावया अवघीं भीती । शुंडादंडें गजपती । जळ पाजीत सर्वांसी ॥ ४ ॥ पहिलें पाजिलें प्रियभार्येसी । भार्या पाजी प्रियपुत्रासी । मग पाजित इतरांसी । जेंवी कुटुंबासी गृहस्थ ॥ ५ ॥ विसरोनियां निजमरण । गृहस्था कुटुंबपोषण । तैसा गजेंद्र आपण । नक्रग्रहण विसरला ॥ ६ ॥ प्राणी विसरे निजमरणासी । काळ टपतसे तयासी । तेंवी नक्र गजेंद्रासी । जळसहवासीं टपतसे ॥ ७ ॥ जेंवी काळ पाहोनि अंत । मग प्राण्याचा करी घात । तेंवी गजेंद्र सरोवराआंत । नक्र धरित साटोपें ॥ ८ ॥ माये केला विपरीतार्थ । विसरोनियां अपघात । स्त्रीपुत्रां अति मोहित । केला भ्रांत मोहममते ॥ ९ ॥

तं तत्र कश्चिन्नृप दैवनोदितो

ग्राहो बलीयांश्चरणे रुषाग्रहीत् ।

यदृच्छयैवं व्यसनं गतो गजो

यथाबलं सोऽतिबलो विचक्रमे ॥ २५ ॥

तथातुरं यूथपतिं करेणवो

विकृष्यमाणं तरसा बलीयसा ।

विचुक्रुशुर्दीनधियोऽपरे गजाः

पार्ष्णिग्रहास्तारयितुं न चाशकन् ॥ २६ ॥

नियुद्ध्यतोरेवमिभेंद्रनक्रयो-

र्विकर्षतोरंतरतो बहिर्मिथः ।

समाः सहस्रं व्यगमन्महीपते

सप्राणयोश्चित्रममंसतामराः ॥ २७ ॥

अंगीं देहलोभाचा मद । दुसरा बळाचा उन्माद । तिसरा गजमदाचा मद । जाला मदांध गजेंद्र ॥ ११० ॥ जन्ममरणाचा महाबाध । ज्या नाठवे तो मोहांध । न देखे नॅरकपातबाध । तो मदांध महामूढ ॥ ११ ॥ त्रिविध मोहमदें मोहित । बुद्धिअंधत्वें गजेंद्र भ्रांत । विसरोनियां नक्रघात । जळीं क्रीडत स्त्रीलोभें ॥ १२ ॥ ऐसें क्रीडत जळस्थानीं । नक्रें धांवोनि धरिला चरणीं । गजें निजबळें ओढोनी । बाहेर आणूनी मारूं पाहे ॥ १३ ॥ तंव तो नक्र महाबळी । हॅवका हाणोनि नेला जळीं । गजें युद्ध केलें ते काळीं । सोंडें कवॅळी नक्रातें ॥ १४ ॥ सोंड हाणितां तॅवकें शिरीं । सोंड आदळे जळावरी । नक्र निश्चळ जळाभीतरीं । भय न धरी सोंडेचें ॥ १५ ॥ सोंड बुडवितां जळसंपुटीं । नक्रें खुडिली सोंड आॅनकुटीं । तेणें गज जाला कष्टी । मकरमिठी सुटेना ॥ १६ ॥ नक्र जाणे गजवर्मस्थ । सोंडेची अणी टपोनि खुडित । अमित प्रवाहे पैं रक्त । गज किरकिरित अति दुःखें ॥ १७ ॥ गजें ओढितां भूतळीं । नक्र निजबळें ओढी जळीं । सहस्र वर्षें रणखंदळी । जळकल्लोळीं भिडले ॥१८॥ सहस्र वर्षें करितां रण । दोघे सबळ सप्राण । तें देखोनि अमरगण । आश्चर्य पूर्ण करिताती ॥ १९ ॥ नक्रासी जळीं जळाहार । गजा पडिले निराहार । भूतळा नाणवेचि नक्र । शक्ति समग्र क्षीण जाली ॥ १२० ॥ खंडितां सोंडेच्या अणीसी । गजेंद्र जाला कासाविसी । मग बोभाय स्त्रीपुत्रांसी । ओढोनि पुच्छेंसीं मज काढा ॥ २१ ॥ पुच्छीं लागोनि समग्र । बळें ओढिती स्त्रीपुत्र । तिळभरी ढळेना तो नक्र । केलें विचित्र तें ऐका ॥ २२ ॥ समस्तीं ओढितां पुच्छासी । न सोडवे गजेंद्रासी । [10]शेखीं न ओढवेचि नक्रासी । अति बळेंसीं कष्टतां ॥ २३ ॥ नक्रें आॅसुडितां तेथ । गजीगजशावसमवेत । गजेंद्र नेला सरोवरांत । भयभीत जळमग्न ॥ २४ ॥ नक्रभयें भयभीत । जळमय निर्बुजतॅ । गजेंद्रा सांडोनियां समस्त । आले पळत तीरासीं ॥ २५ ॥ स्त्रिया म्हणती भाग्य थोर । संकटीं वांचले कुमर । नक्रें गिळिला गजेंद्र । अक्षतॅ पुत्र कडे आले

१ सरोवर. २ जलतुषार. ३ नाश. ४ हत्तीचे छावे. ५ नरकांत पडण्याचें भय. ६ तडाका. ७ धरी. ८ आवेशानें. ९ अग्रभागीं. १० शेवटीं. ११ ओढतां. १२ कंटाळत. १३ इजा जहाल्यावांचून.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ २६ ॥ माता पुत्रांसी कृपादृष्टी । बुद्धि सांगती गोमटी । सोडा गजेंद्राच्या गोष्टी । जळसंकटीं न रिघवे ॥ २७ ॥ आयुष्य व्हावें निजपुत्रांसी । उदक पाजोनि समस्तांसी । संकटीं सांडोनि भ्रतारासी । घेवोनि पुत्रांसी वना गेल्या ॥ २८ ॥

ततो गजेंद्रस्य मनोबलौजसां
कालेन दीर्घेण महानभूद्व्ययः ।
विकृष्यमाणस्य जलेऽवसीदतो
विपर्ययोऽभूत्सकलं जलौकसः ॥ २८ ॥
इत्थं गजेंद्रः स यदाप संकटं
प्राणस्य देही विवशो यदृच्छया ।
अपारयन्नात्मविमोक्षणे चिरं
दध्याविमां बुद्धिमथाभ्यपद्यत ॥ २९ ॥
न मामिमे ज्ञातय आतुरं गजाः
कुतः करिण्यः प्रभवंति मोक्षितुम् ।
ग्राहेण पाशेन विधातुरावृतो-
प्यहं च तं यामि परं परायणम् ॥ ३० ॥

सहस्र वर्षें पुरुषार्थी । युद्ध करितां नक्राप्रती । निराहारीं युद्धावर्ती । क्षीणशक्ती गजेंद्र ॥ २९ ॥ क्षीण शरीरबळशक्ती । मनःशक्ती प्राणशक्ती । क्षीण इंद्रियें इंद्रियशक्ती । ग्रहगति गजेंद्रा ॥ १३० ॥ ऐसा गजेंद्र क्षीणशक्ती । येतां स्त्रीपुत्रां काकुलती । सांडोनि गेलीं पतिप्राणांतीं । कोणी अंतीं न येती कामा ॥ ३१ ॥ गजेंद्र पाहे ममता धरोनी । अंतीं सांडिलें सुहृज्जनीं । ज्येष्ठ कनिष्ठ असंख्य पत्नी । अंतीं त्यागोनी मज गेल्या ॥ ३२ ॥ मजसमान बळ दुर्धर । शतानुशत माझे कुमर । अंतीं विमुख समग्र । पुत्र कलत्र न ये कामा ॥ ३३ ॥ सुहृदें आणि पुत्र प्रौढ । तिहीं सांडिली माझी चाड । हस्तिणीचा कोण पाड । अति अवघड प्राणांत ॥ ३४ ॥ सोडवावया नक्राप्रती । गजें वेंचिली निजशक्ती । पुत्र कलत्र सुहृद्ज्ञाती । अंतीं न येती उपयोगा ॥ ३५ ॥ सार्थक करावया अंतकाळ । एक भगवंत कृपाळ । नामें मोक्षाचा सुकाळ । कळिकाळ आंकणीं ॥ ३६ ॥ ज्याचें आदरें करितां स्मरण । निःशेष निमे जन्ममरण । त्याचे चरणां रिघोनि शरण । भवबंधन छेदावें ॥ ३७ ॥ जीवशिवांहूनि पर । चहूं वाचां परात्पर । गुणागुणीं अनिवार । त्यासी साचार शरणार्थी ॥ ३८ ॥ श्रीहरीसी जालिया शरणागत । देहीं असोनि देहातीत । कळिकाळाचे पाडोनी दांत । फाडीन खत विषयांचें ॥ ३९ ॥ गर्जतां रामनामपवाडे । कर्मबंधन समूळ उडे । यम अंतक पायां पडे । नक्र बापुडें तें काय ॥ १४० ॥ ऐसी मज जे आठवण । हे श्रीहरीची कृपा पूर्ण । हरीचे अनुग्रहाविण । नामस्मरण नाठवे ॥ ४१ ॥

एवं व्यवसितो बुध्या समाधाय मनो हृदि ।
जजाप परमं जाप्यं प्राग्जन्मन्यनुशिक्षितम् ॥ ३१ ॥

करावें श्रीहरीचें स्मरण । ऐसी युक्ति विवंचून । मनबुद्धीं हृदयीं समाधान । देवोनि आपण स्वस्थ जाला ॥ ४२ ॥ नक्रें केला जो कां व्यग्र। ते व्यग्रता निरसावया समग्र । धैर्यधारणा धरोनि अव्यग्र । जपे परात्पर तें ऐका ॥ ४३ ॥ धैर्य नाहीं जयांपासीं । ते जन्ममरणाचे आंदणी दासी । पूर्वभजनसंस्कारेंसीं । धैर्य गजासी हरिस्मरणीं ॥ ४४ ॥ पूर्वभजनपरिपाटीं । हरिस्मरणीं धृष्टि पुष्टी । मंत्र जपावया वाक्पुटीं । उल्लास पोटीं गजेंद्रा ॥ ४५ ॥ एका जनार्दना शरण । गजेंद्रमुखींचें श्रवण । अनुतापें पशु पावन । त्याचें ज्ञान अवधारा ॥ १४६ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां गजेंद्रोपाख्यानं नाम एकविंशतितमोऽध्यायः ॥ २१ ॥ ओंव्या ॥ ॥ १४६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ ३१ ॥

अध्याय बाविसावा

॥ श्रीरामचंद्राय नमः ॥

गजेंद्र उवाच—ॐ नमो भगवते तस्मै यत एतच्चिदात्मकम् ।
पुरुषायादिबीजाय परेशायाभिधीमहि ॥ १ ॥
यस्मिन्निदं यतश्चेदं येनेदं य इदं स्वयम् ।
योऽस्मात्परस्माच्च परस्तं प्रपद्ये स्वयंभुवम् ॥ २ ॥
तस्मै नमः परेशाय ब्रह्मणेऽनंतशक्तये ।
अरूपायोरुरूपाय नम आश्चर्यकर्मणे ॥ ३ ॥

१ पाठमोरे. २ स्त्री. ३ संबंधी, मित्र. ४ गरज, जरूर. ५ खर्ची घातली. ६ अंकित, स्वाधीन. ७ खरेपणानें. ८ योजून. ९ चिंतातुर. १० चिंतारहित होऊन. ११ सुलभ, स्वाधीन.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

हृदयीं अंतरात्मा सर्वज्ञ । त्याचेनि बुद्धीं-द्रियें सज्ञान । तेणें काया वाचा मनें नमन । अनन्य शरण गजेंद्र ॥ १ ॥ भगवंतासी अनन्य शरण । होतां पालटे देहचिन्ह । इंद्रियांचें विपरीतज्ञान । तेंहि लक्षण अवधारा ॥ २ ॥ अनन्यत्वीं मन उन्मन । चित्त होय चैतन्यघन । बुद्धि होय समाधान । अहंता संपूर्ण सोहंत्वीं विरे ॥ ३ ॥ तेव्हां भूतें होती चिदाकारें। विषय होती तन्मात्र । अनन्यशरणत्वाचें सूत्र । संसारचरित्र परब्रह्म ॥ ४ ॥ होवावया अनन्य शरण । पाहिजे भाग्य सत्त्वसंपन्न । तेणें भाग्यें गजेंद्र गहन । करितो नमन भगवंता ॥ ५ ॥ ओंकार ब्रह्मरूप पूर्ण । त्यासी प्रकाशी चैतन्यघन । त्या भगवंतासी नमन । काया वाचा मनें अनन्यत्वें ॥ ६ ॥ ओमित्येकाक्षरं ब्रह्म । हें भगवद्गीतेचें निजवर्म । स्वयें बोलिला पुरुषोत्तम । ॐकारब्रह्मवेदबीजत्वें ॥ ७ ॥ ॐकारबीज सनातन । स्वरवर्ण उच्चार ब्रह्मपूर्ण । भूतभौतिकें चैतन्यघन । त्या भगवंता नमन अनन्यत्वें ॥ ८ ॥ जो या सर्वां आदि-कारण । स्वयें अकारण आपण । त्या श्रीपुरुषोत्तमासी नमन । अनन्यशरण अनन्यत्वें ॥ ९ ॥ ब्रह्मा विष्णु आणि महेश । हेहि ज्याचे अंशांश । ऐसा परेशाचा जो ईश । नमन माझें त्यास अनन्यत्वें ॥ १० ॥ त्याचें करूं जातां ध्यान । ध्येय ध्याता होय शून्य । ध्यानेंचि होय चैतन्यघन । त्यासी माझें नमन अनन्यत्वें ॥ ११ ॥ हें सर्व भासे ज्याचे ठायीं । ज्याचेनि सर्व प्रकाशलें पाहीं । जो सर्वी कोंदला ठायींच्या ठायीं । जो कीं सर्वही आपण ॥ १२ ॥ जेंवी गुळाचें कारलें केलें । देंठ-कांठियेनसीं गोडिये आलें । तेंवी हें सर्वही संचलें । असे ओतलें चिद्रूपत्वें ॥ १३ ॥ नार्वदेचे नारळ गोमटे । कवटी काढिती ते करंटे । तेंवी चैतन्येंचि नेटेंपाटें । भासे समसकटें सर्वरूप ॥ १४ ॥ तेथें जो देखे दोषगुण । तोचि नरकासी जाय आपण । मुनीचेनि शापें जाण । निजात्म-खूण पावलों ॥ १५ ॥ जो कां मीतूंपणापरता । अनन्यशरण त्या भगवंता । ज्यासी नाहीं जन्म-कथा । मरणवार्ता तो नेणे ॥ १६ ॥

न विद्यते यस्य च जन्म कर्म वा
न नामरूपे गुणदोष एव वा ।
तथापि लोकाप्ययसंभवाय यः
स्वं मायया तान्यनुकालमृच्छति॥ ४ ॥

ज्यासी नाहीं जन्मकर्म । त्यासी कैंचें रूपनाम । देहाविणें गुणदोषकर्म । धर्माधर्म असेना । ॥ १७ ॥ ऐसा जो कां भगवंत । स्वलीला लोकसंग्रहार्थ । ब्रह्मा विष्णु शिव समस्त । अवतार धरीत गुणकर्में ॥ १८ ॥ उत्पत्तिकाळीं चतुरानन । तोचि स्थितिकाळीं विष्णु जाण । तोचि प्रळयीं त्रिनयन । नामाभिधान गुणधर्में ॥ १९ ॥ जोचि पेरी तोचि सोंकरी । तोचि संवग-णीही करी । तैसा एकचि श्रीहरी । गुणावतारी त्रिरूप ॥ २० ॥ नट नानावेष मांडी । संपादूनि सवेंच सांडी । नटासी नाहीं घडामोडी । तैसी परवडी भगवंता ॥ २१ ॥ नाना अवतार धरितां । श्रीहरीस नाहीं जन्मकथा । धरिले अवतार सांडितां । मरणवार्ता तो नेणे ॥ २२ ॥ श्लोकांश-तस्मै नमः परेशाय ॥ ऐसा परेशा परेश । अनंत शक्तींचा जो ईश । जो ब्रह्मण्य देव जगदीश । परम पुरुष परमात्मा ॥ २३ ॥ जो अरूपरूप परिपूर्ण । अनंत रूपें धरी आपण । त्या भग-वंतासी लोटांगण । अनन्य शरण अच्युता ॥ २४ ॥

मादृक्प्रपन्नपशुपाशविमोक्षणाय
मुक्ताय भूरिकरुणाय नमोऽलयाय ।
स्वांशेन सर्वतनुभृन्मनसि प्रतीत-
प्रत्यग्दृशे भगवते बृहते नमस्ते ॥ ५ ॥

मजसारिखे अति दीन । स्वार्थीं विमुख पशूसमान । तुज आलिया अनन्य शरण । पाशछेदन तूं करिसी ॥ २५ ॥ नक्रपशुपाशग्रहण । हें तुच्छ यासी मानी कोण । कर्मपाश अति दारुण । कृपा करून छेदिसी ॥ २६ ॥ शरणाग-तांचें पाशछेदन । स्वस्वरूपीं होती लीन । ऐसी कृपा पूर्ण करून । आपुलें मुक्तपण त्यां देसी ॥ २७ ॥ त्यांसी देसी निजात्ममुक्ती । तेहीविशीं एक युक्ती । त्यांची छेदिसी संमूळ भ्रांती । नित्य मुक्ति सहजेंचि ॥ २८ ॥ ऐशिया श्रीहरि कृपावंता ।

१ एकनिष्ठेंत. २ परब्रह्मरूप. ३ ब्रह्मरूपानें. ४ साखरेचे. ५ निश्चयेंकरून. ६ रक्षी. ७ शेताची कापणी. ८ प्रकार. ९ ब्राह्मणभक्त. १० पाठमोरे.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

माझें नमन अनन्यता । तुझेनि नमनें भगवंता । दिसे आसता सर्वां भूतीं ॥ २९ ॥ सर्व भूतीं हृदयस्थ । अंतरात्मा तो भगवंत । द्रष्टेपणें सदोदित । असे नांदत प्रतिशरीरीं ॥ ३० ॥ भगवंताची सर्वां भूतीं । मनोन्मनें नित्य प्राप्ती । भगवत्कृपेची ही ख्याती । भक्त पावती अनन्यत्वें ॥ ३१ ॥ प्रत्यग्दृशा[1] हे मात । भूतां सबाह्य सदोदित । देखणेपणें भगवंत । दृश्यद्रष्टातीत कोंदला ॥ ३२ ॥ बृहद्ब्रह्म सनातन । हें भगवंताचें अभिधान[2] । त्यासी माझें अनन्य नमन । पाशबंधन छेदावया ॥ ३३ ॥ भगवंताची कृपा नव्हतां । कदा न तुटे अहंममता । ते अहंममतेची कथा । ऐक आतां सांगेन ॥ ३४ ॥

आत्मात्मजाप्तगृहवित्तजनेषु सक्तै-
र्दुष्प्रापणाय गुणसंगविवर्जिताय ।
मुक्तात्मभिः स्वहृदये परिभाविताय
ज्ञानात्मने भगवते नम ईश्वराय ॥ ६ ॥

मी म्हणणें हा खोडा जाण । माझी स्त्री ती खीळ कठिण । गृहसामुग्री विविध धन । पाचरा संपूर्ण सुबद्ध[3] ॥ ३५ ॥ तेथें अपत्याची आनंदगुढी[4] । तो खोडा घातल्यावरी बेडी । कर्म लौकिक स्वजनआवडी । ये बेडीची कडी खळखळीत ॥ ३६ ॥ खोडा खिळी त्यावरी बेडी । कृपणतेची हातकडी । हे कुटुंबधाडीची बांधवडी । त्याहीवरी भरडी नित्य विषय ॥ ३७ ॥ खोड्याची खीळ ते स्त्री कठिण । त्या कठिणपणाचें विंदाण । निजमातेतें त्यागून । स्त्री आपणा आप्त होये ॥ ३८ ॥ मातृसेवा वेदविहिती । ते सोडूनियां निश्चितीं । स्त्रीकामाची आसक्ती । वश करिती पुरुषातें ॥ ३९ ॥ दरवेशियाचें वानर जैसें । पुरुषासी वश करी तैसें । नाचवी तैसें नाचे बैसे । अनारिसें न करवे ॥ ४० ॥ जैसें पाळिलें का श्वान । तैसा होय स्त्रीअधीन । लाविल्या लागे वसवसून । वारिल्या मौन धरोनि राहे ॥ ४१ ॥ मातृसेवा भुक्तिमुक्ती । जे म्हणती ते माता त्यागिती । स्त्रीकामाची आसक्ती । ज्ञाते होती अति भ्रांत ॥ ४२ ॥ मातृसेवा भुक्तिमुक्ती । स्त्रीआसक्ती नरकप्राप्ती । ऐसें व्याख्यान जे करती । तेही मानिती स्त्री आप्त ॥ ४३ ॥ भ्रांतीमाजी सप्त पाश । अहंदारपुत्रपाश । गृहधनस्वजनपाश । आशापाश सातवा ॥ ४४ ॥ सत्संगति नाहीं ज्यांसी । रामनाम नाठवे त्यांसी । ते गुंतले कर्मपाशीं । हृदयस्थेंसीं नव्हे भेटी ॥ ४५ ॥ सप्तपाशांचें छेदन । करावया एक सत्संग जाण । त्या सत्संगाचें महिमान । सावधान अवधारा ॥ ४६ ॥

अत्यद्भुतं सच्चरितं सुमंगलं गायंति आनंदसमुद्रमग्नाः ॥ ७ ॥

श्रवणमननीं निश्चळ वृत्ती । निदिध्याससाक्षात्कारीं परम प्रीती । नाना चरित्रें श्रीहरीचीं गाती । धन्य त्रिजगतीं ते साधु ॥ ४७ ॥ अजन्मजन्म[5] सोमवंशीं । अयोनिजा[6] जन्म सूर्यवंशीं । एकें शोषिलें पूतनेसी । ताटिकेसीं पैं एकें ॥ ४८ ॥ एकें गुरुपुत्र आणिला । एकें गुरुयाग सिद्धी नेला । एकें गोवर्धन उचलिला । एकें बांधिला शिळासेतु ॥ ४९ ॥ एकें सोडोनि मातेसी । स्वयें गेला गोकुळासी । एकें सांडोनि निजराज्यासी । वनवासी दंडकीं ॥५०॥ जागें न होतां कोणासीं । मथुरा नेली द्वारकेसीं । रामें अयोध्या निजगजरेंसीं । वैकुंठासी स्वयें नेली ॥ ५१ ॥ एक लोणियालागीं आपण । मातेपासीं करी रुदन । एक सीताशोकें जाण । करी रुदन वनवासीं ॥ ५२ ॥ ठकोनि मारिला काळयवन । वाळी मारिला शिंतरोन[7] । शिशुपाळादिदैत्यकंदन । खरदूषण श्रीरामें ॥५३॥ कंसचाणूरनिर्दळण । मारिले रावण कुंभकर्ण । उग्रसेना राज्यस्थापन । लंकाभुवन बिभीषणा ॥ ५४ ॥ श्रीरामव्रत एकपत्नी । कृष्ण ब्रह्मचारी स्त्रिया भोगूनी । कृष्णें तारिलें गोकुळ अवनीं । जगदुद्धरणी रामनाम ॥ ५५ ॥ ऐसें करितां हरिकीर्तन । व्यास जारजपुत्र पावन । चोरट्या वाल्मीकाचें जाण । रामायण शिववंद्य ॥५६॥ वर्णितां श्रीहरीची पदवी । दोघे जाले महाकवी । त्या दोघांचे ग्रंथगौरवीं । मुक्ति सर्वी पाविजे ॥ ५७ ॥ अमंगळां करी मंगळ । ऐसी हरिकीर्ति निर्मळ । नाम मंगळा मंगळ । सुमंगळ हरिकीर्ति

१ अंतर्मुख दृष्टीनें. २ नांव. ३ उत्तम प्रकारें. ४ आनंदसूचक पताका, ध्वज. ५ जन्म नसूनही जन्म (अवतार) धारण करणारा श्रीकृष्ण. ६ स्त्रीपासून जन्मणारा नसूनही. ७ फसवून.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ ५८ ॥ रामनामाचे परिपाटीं । दोष जळती आकल्पकोटी । भुक्ति मुक्ति लागे पाठीं । पावन सृष्टी रामनामें ॥ ५९ ॥ यमयातनेचे पितर । चिंतिताती निरंतर । एकादशी हरिजागर । वंशीं तत्पर होऊ कोणी ॥ ६० ॥ पुत्र अथवा भ्रातृपुत्र । दुहिता[1] अथवा दौहित्रे[2] । करितां एकादशी जागर । यमप्रहार पैं चुके ॥ ६१ ॥ नामें नरकीं उद्धरती । नामें स्वर्गस्थांसी मुक्ती । ब्रह्मादिक अमरपती । जन्म वांछिती कलियुगीं ॥ ६२ ॥ कलियुगाची थोर ख्याती । नामासाठीं लाभे मुक्ती । स्त्रियादि अंत्यज उद्धरती । नामकीर्ति दाटुगी ॥ ६३ ॥ नामासीं नाहीं स्नानबंधन । नामासीं नाहीं विधिविधान । आसनीं भोजनीं शयनीं जाण । नाम पावन हरीचें ॥ ६४ ॥ निदसुरा निजशेजेंसीं । नामस्मरण जयापासीं । ब्रह्मादिक वंदिती त्यासी । चहूं मुक्तींसी माहेर ॥ ६५ ॥ नामासरसी वाजे टाळी । आशापाश होती होळी । तये कीर्तनसमेळीं । रंगीं वनमाळी डुल्लत ॥ ६६ ॥ हरिकीर्तनीं भक्तांआंत । हरिखें नाचे भगवंत । चरणरजें धूळि[3]भूषित । असे डुल्लत स्वानंदें ॥६७॥

भगवद्वाक्य–

नाहं वसामि वैकुंठे योगिनां हृदये रवौ ।
मद्भक्ता यत्र गायंति तत्र तिष्ठामि नारद ॥ ८ ॥

संकीर्तनसुखाचेनि उद्भटें । मज वैकुंठीं न कंठे । रविबिंबाही आतुटें । सुख न वाटे मज तैसें ॥ ६८ ॥ मुरडोनि योगियांचे मानसीं । धांवोनि जाय कीर्तनासी । तेथेंचि तिष्ठें अहर्निशीं[4] । स्वानंदेंसीं डुल्लत ॥ ६९ ॥ माझिया भक्तांचे आवडीं । हरिकीर्तनीं घालीं उडी । कीर्तनसुखाची मज गोडी । कडोविकडीं नाचत ॥ ७० ॥ भगवंतें निजगुह्यासी । सांगितलें नारदापासीं । म्हणोनि तोही हरिकीर्तनासीं । अहर्निशीं डुल्लत ॥७१॥ नामें निर्मुक्त महादोषी । ओस वस्ती यमलोकासीं । तीर्थीं मरती उपवासीं । यमनियमेंसीं लंघनें ॥ ७२ ॥ नामगजरेंचि निर्मुक्त । वही पाहे चित्रगुप्त । कोरीं पानें अवघीं तेथ । कर्मनिर्मुक्त हरिनामें ॥ ७३ ॥ रामनामाची प्रभा गाढी । वहीचीं पानें खोडी ना मोडी । अवघी वहीच उघडी । केली रोकडी हरिनामें ॥ ७४ ॥ ऐसें करितां कीर्तन । श्रोते वक्ते दोघे जण । होती आनंदीं निमग्न । आनंदघन श्रीरामनामें ॥ ७५ ॥

यस्य ब्रह्मादयो देवा वेदा लोकाश्चराचराः ।
नामरूपविभेदेन फल्ग्व्या च कलया कृताः ॥ ९ ॥

रामनामाच्या आवर्ती । त्यांसी झाली स्वरूपप्राप्ती । ज्यांचिये दृष्टी त्रिजगती । मिथ्या प्रतीती फल्गुत्वें ॥ ७६ ॥ आदिब्रह्मा इंद्रादि देव । लोकपाळादि सर्व विश्व । वेदांतवाद रूपनांव । मिथ्या सर्व रामनामें ॥ ७७ ॥ एक रामनामासाठीं । ब्रह्मादि देवांची हीं गोष्टी । फल्गुप्राय उडाले सृष्टीं । रामनामपुष्टी अगाध ॥ ७८ ॥ रामनाम हे चित्कळा[6] । आवडीं आलिया हृदयकमळा । रामकळा कोंदल्या डोळां । संसार सगळा तृणप्राय ॥ ७९ ॥ रामनामापासीं विरक्ती । रामनामें परम प्राप्ती । रामनामें भुक्तिमुक्ती । यथानिगुतीं अवधारा ॥ ८० ॥

विष्णोर्नामैव पुंसः शमलमपहरेत्पुण्यमुत्पादयेच्च
ब्रह्मादिस्थानभोगान्प्रदिशति च गुरोः श्रीपदद्वंद्वभक्तिम् ।
तत्त्वज्ञानं च विष्णोरिह मतिजननभ्रांतिबीजं च दग्ध्वा
संपूर्णानंदबोधे महति च पुरुषं स्थापयित्वा निवृत्तम् ॥ १० ॥

रामनाम स्मरतां नित्य । पाप निर्दळी आकल्पांत । पुण्य उपजवी अद्भुत । जें नित्यानित्यछेदक ॥ ८१ ॥ करितां नित्य नामस्मरण । तेणें उपजे परम पुण्य । जें भोगक्षयें नव्हे क्षीण । ब्रह्म परिपूर्ण प्रापक[7] ॥ ८२ ॥ नाम स्मरतां वैराग्यपूर्ण । इंद्रलोकादि ब्रह्मसदन । मिथ्या देखे जैसें स्वप्न । वैराग्य गहन त्या नामीं ॥ ८३ ॥ ऐसी जालिया विरक्ती । सद्गुरु तोचि ब्रह्ममूर्ती । ऐसी उपजे अभेदभक्ती । सर्वांभूतीं भगवंत ॥ ८४ ॥ अभेद गुरुभक्तीचें ज्ञान । सर्व भूतीं भगवद्भजन । भूतभौतिकें चैतन्यघन । ब्रह्मज्ञान या नांव ॥ ८५ ॥ ऐसऐसिया ब्रह्मस्थिती । जन्ममरणा सहज शांती । सबीज निर्दळे पैं भ्रांती । तेही उपपत्ति[8] अवधारा ॥ ८६ ॥ प्रपंच येथें जाला होता । हे समूळीं मिथ्या वार्ता । पुढें होईल मागुता । कदा कल्पांतीं घडेना

१ कन्या. २ नातू–मुलीचा मुलगा. ३ धूळ लागून शोभायमान झालेला. ४ रात्रंदिवस. ५ व्यर्थतेमुळें.

६ उपाधिशून्य ज्ञान. ७ मिळवून देणारें. ८ लक्षण.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ ८७ ॥ ऐसी जे कां सहजस्थिती । या नांव सबीज निरसे भ्रांती । पुरुषा परमानंदप्राप्ती । हे निजख्याती अवधारा ॥ ८८ ॥ देवोनि परमानंदप्राप्ती । पुनः न परते मागुती । रामनामाच्या आवृत्ती । जडासी मुक्ती द्यावया ॥ ८९ ॥ रामनामस्मरणासाठीं । परमानंदीं पडे मिठी । ब्रह्मरूप प्रकटे सृष्टीं । आनंदकोटी हरिनामें ॥ ९० ॥ ज्याचे नामाचें ऐसें महिमान । तो स्वामी जनी जनार्दन । त्यासी काया वाचा मनेंकरून । अनन्य शरण सद्भावें ॥ ९१ ॥ सद्भावेंसीं अनन्य शरण । ऐकतांचि दीनवदन । स्वयें धांविन्नला जनार्दन । कृपाळु पूर्ण दीनांचा ॥ ९२ ॥

शुक उवाच–एवं गजेंद्रमुपवर्णितनिर्विशेषं
ब्रह्मादयो विविधलिंगभिदाभिमानाः ।
नैते यदोपससृपुर्निखिलात्मकत्वात्
तत्राखिलामरमयो हरिराविरासीत् ॥ ११॥
तं तत्तदार्तमुपलभ्य जगन्निवासः
स्तोत्रं निशम्य दिविजैः सह संस्तुवद्भिः ।
छंदोमयेन गरुडेन समुह्यमान–
श्चक्रायुधोऽभ्यगमदाशु यतो गजेंद्रः ॥ १२॥

दीनोद्धारीं त्वरान्वित । परम कृपाळु भगवंत । तेणें श्रीशुक हर्षयुक्त । असे सांगत परीक्षितीप्रति ॥ ९३ ॥ सगुण तेंचि निर्गुण । निर्गुण तेंचि सगुण । नामें ब्रह्मप्राप्ति पूर्ण । जगदुद्धार हरिनामें ॥ ९४ ॥ सविशेषनिर्विशेषस्थिती । ऐसी गजेंद्रें केली स्तुती । तेणें तुष्टला श्रीपती । कृपामूर्ति कृपाळु ॥ ९५ ॥ शक्र विरिंचि शंकर । इत्यादिक सुरवर । पदाभिमानी थोर थोर । त्यांसी गजेंद्र उद्धरवेना ॥ ९६ ॥ समस्तांही सुरवरांसी । शिणतां निजसामर्थ्यैंसीं । न सोडवे गजेंद्रासी । तया हृषीकेशीवांचोनी ॥ ९७ ॥ पृथक् इंद्रियांची सत्ता । नित्य अधीन भगवंता । तयावांचूनि सर्वथा । दीनोद्धारता न करवे ॥ ९८ ॥ समस्तांही सुरवरांसी । नुद्धरवेचि गजेंद्रासी । तया काळीं हृषीकेशी । अति त्वरेंसीं निघाला ॥ ९९ ॥ ऐकोन गजेंद्राचें स्तवन । सुदर्शन हातीं बैसवून । शीघ्र गरुडावरी वळंघोन । श्रीभगवान चालिला ॥ १०० ॥ सकळ जीवांचा जीव । सर्व देव ज्याचे अवयव । सर्वात्मा श्रीकेशव । स्वयमेव चालिला ॥ १ ॥ ऐकोनि गजेंद्राचें स्तवन । येतां देखोनि गरुडवाहन । देव करिती दिव्य स्तवन । कृपाळु पूर्ण दीनांचा ॥ २ ॥ जयजयाजी दीनसंरक्षणा । जयजयाजी दीनपाळणा । जय-जयाजी दीनोद्धारणा । कृपाळु पूर्णा पूर्णत्वें ॥ ३ ॥ जयजयाजी भवभावना । जय जय भवभावनिर्मूळ-निर्दळणा । जय जय भवगजपंचानना । जय जना-र्दना जगद्गुरो ॥ ४ ॥ येतां देखोनि श्रीपती । आपु-लाल्या निजयुक्तीं । करिती नानापरींची स्तुती । विमानपंक्तीं सुरवर ॥ ५ ॥ गरुडारूढ मेघश्याम । दोहीं पंखांचा आक्रम । रथंतरबृहत्साम । मनोरम सामग ॥ ६ ॥ वामरथंतरसाम । दक्षिण-पक्षबृहत्साम । नादें डुल्लत पुरुषोत्तम । गरुडा-गमन स्वानंदें ॥ ७ ॥ यालागीं छंदोमय नाम । स्वयें पावला गरुडोत्तम । त्याचे गतीचा संभ्रम । अनुपम्य अवधारीं ॥ ८ ॥ पृष्ठभागीं भगवंत । धरी चरण दोहीं हातांत । मुखीं श्रीहरिनाम स्मरत । सामगीत दो पक्षीं ॥ ९ ॥ दोहीं हातीं चरणानुक्रम । पृष्ठीं मेघश्याम हृदयीं राम । मुखीं नेमस्त श्रीहरिनाम । बृहत्साम दो पक्षीं ॥ ११० ॥ ऐशी गरुडाची हे स्थिती । सबाह्य व्यापिली हरिभक्ती । यालागीं छंदोमय गाती । वेदानुवृत्तिअनुवाद ॥ ११ ॥ सपर्वत धरा सागरेंसीं । तुकितां तृणप्राय हरीसीं । ऐशियासी अहर्निशीं । गरुड पृष्ठेंसीं वाहत ॥ १२ ॥ ऐसा गरुडारूढ भगवंत । येतो परमानंदें डुल्लत । तंव गजेंद्र ग्रहग्रस्त । आर्तभूत देखिला ॥ १३ ॥ चक्र सरसावूनि हातीं । हरि म्हणे गरुडाप्रती । तुवां चालावें शीघ्रगती । गजेंद्राप्रती उद्धराया ॥ १४ ॥ मनोवेगाचिया स्थिती । सहस्राधिक गरुडगती । तोही चालतां सर्वशक्ती । गति भगवंता मानेना ॥ १५ ॥ करावया गजेंद्रोद्धरण । श्रीहरीस आलें पैं स्फुरण । बाहु थरकती सकंकण । आपणा आपण विसरला ॥ १६ ॥ फिंजारल्या रोमावळी ।

१ नाहींशी होते. २ सतत क्रम. ३ त्वरेनें युक्त, त्वरा करणारा. ४ इंद्र. ५ ब्रह्मदेव. ६ घेऊन. ७ बसून.

८ संसार उत्पन्न करणाऱ्या. ९ सामवेदांतील साम. १० तुलना करितां.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वीरगुंठी सुटली मोकळी । पुष्पें स्रवती क्षितितळीं । आतुर्वेळी चालिला ॥ १७ ॥ सांडोनियां गरुडवहन । सवेग वेगें उडी घालून । जेथें गजेंद्रग्रहण । शीघ्र आपण तेथें आला ॥ १८ ॥ येरीकडे गजेंद्र जाण । ग्रहग्रस्त अति दीन । काय बोलिला करुणावचन । जेणें भगवंत पावला ॥ १९ ॥

सोऽतःसरस्युरुबलेन गृहीत आर्तो
दृष्ट्वा गरुत्मति हरिं ख उपात्तचक्रम् ।
उत्क्षिप्य सांबुजकरं गिरमाह कृच्छ्रा-
न्नारायणाखिलगुरो भगवन्नमस्ते ॥ १३ ॥

तया अगाध सरोवरीं । नक्रें गर्जून आक्रमिला करी । धरोनियां जलांतरीं । बलात्कारीं गांजिला ॥ १२० ॥ ग्रहग्रस्त मज देखोनी । मज सोडिलें माझिये पत्नीं । पुत्रें सांडिलें स्वजनीं । अंतीं कोणी न ये कामा ॥ २१ ॥ मजला ग्रहाचे मुखीं अर्पूनी । अवघे जणीं जळ प्राशूनी । आम्ही वांचलों महाविघ्नीं । उल्लासोनी गेलीं वना ॥ २२ ॥ ऐसें तिन्हीं मज सांडितां । स्यांही सोडिली त्यांची ममता । तेव्हां आठवलें चित्ता । हरि रक्षिता प्राणांतीं ॥ २३ ॥ कृपा उपजली भगवंता । तरी तुटली दुस्तर ममता । आतां आठवतें चित्ता । हरि रक्षिता कृपाळु ॥ २४ ॥ अंतकाळींचा सोयरा । एक श्रीहरिच निर्धारा । ऐसें मानलें गजेंद्रा । सपुत्रदारमोहत्यागें ॥ २५ ॥ निःशेष गेलिया मोहममता । स्मरणादर पढिये चित्ता । भजनीं आवडी भगवंता । उल्लासता स्वानंदें ॥ २६ ॥ कांहीं अर्पावें भगवंता । अति संचितार्थ नये हाता । त्यावरी स्त्रीपुत्रांची सत्ता । स्वयें मागतां नेदिती ॥ २७ ॥ अंतीं मागतां कांहीं नेदिती । शेखीं सन्निपात झाला म्हणती । संचितार्थी तोंडीं माती । नागविती स्त्रीपुत्र ॥ २८ ॥ म्हणती हा आतां मरेल । मरतां द्रव्यार्थ वेंचील । आम्हांस भिकेसी लावील । याचा बोल नायकावा ॥ २९ ॥ ऐसें सुहृदांचें संमत । अंतीं संचितार्थ नागवित । गृहस्थ मरे चरफडत । तैसेंच प्राप्त गजेंद्रा ॥ १३० ॥ अर्पावया हरीस जवळी । कांहीं नाहीं हातातळीं । शोधितां सरोवरजळीं । कमळ ते काळीं सांपडलें ॥ ३१ ॥ शुंडादंडीं कमळप्राप्ती । उल्लास गजेंद्राचे चित्तीं । आक्रोशें स्मरावया श्रीपती । विकळगती वाचेसीं ॥ ३२ ॥ प्राण होतां पैं विकळ । वाचा अतिशयें विव्हळ । तरी पशुजन्म प्रेमळ । स्मरणशील गजेंद्र ॥ ३३ ॥ कमळ उचलोनि ऊर्ध्वगती । गजेंद्र पाहे अति प्रीतीं । गरुडारूढ लक्ष्मीपती । शंख चक्र हातीं देखिला ॥ ३४ ॥ दोघां होतां दृष्टादृष्टी । प्रेम उलथलें पोटीं । सुखें कोंदली सृष्टी । आनंदकोटी उल्लास ॥ ३५ ॥ पूर्वी वाचा अति विव्हळ । हरि देखतां निजात्ममूळ । अक्षरीं अक्षर अविकळ । वाचा सफळ अनुवादे ॥ ३६ ॥ अच्युत अव्यय अव्यक्त । व्यक्ताव्यक्तत्वें अनंत । स्वप्रकाशें सदोदित । अजन्मा नित्य अविनाशी ॥ ३७ ॥ नरांचें नित्य आयतन । यालागीं नांवें नारायण । जगद्गुरु जनार्दन । अनन्य नमन पैं माझें ॥ ३८ ॥ भूतां संसार निगुती । भूतां जन्ममरणप्राप्ती । विद्या-अविद्यातीतगती । भगवन्मूर्ति नमस्ते ॥ ३९ ॥ वैराग्य आणि ऐश्वर्य । अद्वैतज्ञान औदार्य । श्री अनुवादे यशःकार्य । तया नमस्कार भगवंता ॥ १४० ॥

तं वीक्ष्य पीडितमजःसहसावतीर्य
सग्राहमाशु सरसः कृपयोज्जहार ।
ग्राहाद्विपाटितमुखादरिणा गजेंद्रं
संपश्यतां हरिरमूमुचदुच्छ्रियाणम् ॥ १४ ॥

ऐकतां गजेंद्राचें आर्तवचन । स्वयें गरुडासन सोडून । सरोवरीं उडी घालून । आला भगवान कृपाळु ॥ ४१ ॥ चक्रें हाणोनियां नक्र । चक्रधारें फोडिलें वक्त्र । मगरमिठी अति दुस्तर । नक्र गजेंद्रा सोडीना ॥ ४२ ॥ लागतां श्रीहरीचें चक्र । रुधिरें न्हाला तो नक्र । तरी न सोडी गजेंद्र । दृढ वैर द्विजशापें ॥ ४३ ॥ बाप कृपाळु भगवंत । दोहीं तळीं घालोनि हात । जळाबाहेर अकस्मात । काढिले त्वरित भगवंतें ॥ ४४ ॥ लागतां भगवंताचा हात । दोघे जण अति उद्धत । तेही जाले शापोन्मुक्त । भाग्यवंत समभाग्यें ॥ ४५ ॥ विमानीं देखती सुरवर । भूतळीं पाहती ऋषीश्वर । गगनीं देखती खेचर । गजेंद्रनक्रउद्धरण ॥ ४६ ॥ भगवंतें कृपा करून । दोघे बाहेर आणून । गजेंद्रा

१ शेंडी. २ जमिनीवर. ३ नराचें (नित्यवस्तूचें) आधारस्थान. ४ दीन शब्द. ५ तोंड. ६ रक्तानें. ७ दांडगे, उद्धट.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

विमानीं घालून। श्रीभगवान निघाला ॥ ४७॥ जातां देखोनि भगवंत। नक्र गदगदां हांसत। त्यासी श्रीहरि पुसत। हास्य किमर्थ तुज आलें ॥ ४८॥ सर्वांभूतीं हरि समान। गर्जती वेदशास्त्रपुराण। त्या तुजपासीं विषमपण। आजि संपूर्ण देखिलें ॥ ४९॥ उद्धरिलें गजेंद्रातें। मज कां उपेक्षिलें येथें। याचि देखोनि विषमतेतें। अत्यद्भुत हासिनलों ॥ १५०॥ हरि स्वमुखें सांगे आपण। गजेंद्रें केलें माझें स्मरण। पापपुण्या निर्दळण। उद्धरण पावला ॥ ५१॥ तुझें जालिया दर्शन। माझें पाप नव्हे क्षीण। पापबळें म्यां आपण। श्रीभगवान जिंकिला ॥ ५२॥ तुझेनि नामें पाप निर्दळे। तुज देखिलया पाप न ढळे। माझे पापाभेणें हरि पळे। म्यां जिंकिलें गोविंदा ॥ ५३॥ सकळ पापांतें संहारी। यालागीं नांव म्हणिजे हरी। माझ्या पापांची त्याहूनि थोरी। तुज म्यां हरि जिंकिलें ॥ ५४॥ अति वक्रोक्ती नक्रवचन। ऐकोनि संतोषला भगवान। तुझें पहावया निजज्ञान। उपेक्षण म्यां केलें ॥ ५५॥ माझ्या दर्शनाची प्राप्ती। तुज जाली ज्ञानस्फूर्ती। ऐसें बोलोनि श्रीपती। नक्र गजपती भेटविला ॥ ५६॥ नक्रें धरिले गजाचे चरण। तुझें करितां चरणग्रहण। मज भेटला श्रीभगवान। तुझेनि जाण गजेंद्रा ॥ ५७॥ गजें घातलें लोटांगण। तुवां धरिले माझे चरण। मज आठवला श्रीभगवान। मज उद्धरण तुझेनि ॥ ५८॥ येरयेरांचा[१] उपकार। परस्परें मानिती थोर। श्रीहरि भेटला साचार। पूर्ववैर उपशमे ॥ ५९॥ आम्ही तुम्ही दोघे जण। पूर्वी सखे बंधु ब्राह्मण। धनलोभें शाप जाण। गजनक्रपण पावलों ॥ १६०॥ त्याही वैराची उपशांती[२]। आजि पावलों निश्चितीं। पूर्वापरवैरशांती। भगवन्मूर्ति भेटली ॥ ६१॥ श्रीहरिसमान समता। दोघे पावले स्वरूपता। त्याही स्वरूपाची व्यवस्था। यथार्थता अवधारीं ॥ ६२॥ श्यामराजीवलोचन। ठाणमाण गुणलक्षण। रूपरेखा समसमान। दोघे अनन्य हरिरूप ॥ ६३॥ शंख चक्र गदा पद्म। तिघे दिसती समान सम। मुख्य कोणता पुरुषोत्तम। देवां दुर्गम लक्षेना ॥ ६४॥ रमा[३] देखोनि तिन्ही मूर्ति। म्हणे भजावें कोणाप्रती। ब्रह्मादिक विस्मित चित्तीं। मूळमूर्ति लक्षेना ॥ ६५॥ संतोषोनि श्रीभगवान। स्वरूपता दे संपूर्ण। नेदी श्रीवत्सलांछन। मज अधीन नाहीं म्हणे ॥ ६६॥ ब्राह्मणाची दुर्वाक्यता। हृदयीं साहिल्या म्यां लाता। तें श्रीवत्स लाभे हाता। सत्यवाक्यता वेदार्थ ॥ ६७॥ ज्यासी श्रीवत्सलांछन। तोचि स्वामी श्रीभगवान। येर ते भक्त तत्समान। साधु सज्ञान लक्षिती ॥ ६८॥ भगवद्भक्त इंद्रद्युम्न। त्याचें करितां उद्धरण। धरितां भक्ताचे चरण। उद्धरण नक्रासी ॥ ६९॥ भक्तसंगती जे जे लागत। ते ते तारी श्रीभगवंत। ऐसें गर्जे भागवत। तें पद प्राप्त नक्रासी ॥ १७०॥ कृपाळु श्रीभगवंत। उद्धरिले निजभक्त। अवघे जयजयकार करित। सुर वर्षती दिव्य सुमनें[४] ॥ ७१॥ तंव गरुड धांपा देत। वेगें येतां त्वरान्वित। पुढें देखतां श्रीभगवंत। लज्जान्वित तो जाला ॥ ७२॥ मज न पुसतां श्रीपती। पुढें गेलासी कैसे रीतीं। गरुडा-तुझी देखोनि मंद गती। गजेंद्रार्थी धांविन्नलों ॥ ७३॥ ऐकोनि श्रीस्वामीचें वचन। गरुड जाला लज्जायमान। मग घालोनि लोटांगण। धरिले चरण हरीचे ॥ ७४॥ आमच्या गतीची तूं गती। आमच्या शक्तीची तूं शक्ती। आमचे मतीची तूं मती। कृपामूर्ती श्रीकृष्णा ॥ ७५॥ मज येतां त्वरायुक्त। क्षुधेनें पीडिलों बहुत। तूं तंव कृपाळु श्रीभगवंत। कांहीं आहारार्थ मज देईं ॥ ७६॥ श्रीहरि सांगे कृपा करून। गजनक्रदेह गहन। माझेनि हातें अति पावन। करीं भक्षण आहारार्थ ॥ ७७॥ गरुड जंव आला तेथ। तंव देखिलें विपरीत। भ्रूभंगपक्षी[५] आहारार्थ। सवेग धरित ते दोन्ही ॥ ७८॥

पक्षिणं तत्र गगने भ्रमंतं तं खगेश्वरः।
तावप्येकत्र संदृष्ट्वा भक्षार्थमग्रहीत्तदा ॥ १५॥
नखेन गजमेकेन नक्रमेकेन चाक्षिपत्।
चंच्वग्रे पक्षिणा गृह्य तदोत्पत्य गरुत्मता ॥ १६॥

भ्रूभंगपक्षी भ्रमे गगनीं। गजेंद्र नक्र एकत्र दोनी। तेणें देखतांचि नयनीं। झडप मारोनी धरियेले ॥ ७९॥ भ्रूभंगें धरितां ते दोन्ही। तार्क्ष्य[६] देखे दुरूनी। गरुड येतांचि तळपोनी। भ्रूभंग

१ परस्परांचा. २ शेवट, अंत. ३ लक्ष्मी. ४ पुष्पें. ५ एक प्रकारचा गिधाडांसारखा मांसाहारी पक्षी. ६ गरुड.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

धरोनी उडाला ॥ १८० ॥ तळीं गजेंद्र त्यावरी नक्र । भ्रूभंगपक्षी त्याहूनि थोर । गरुडें उचलितां सत्वर । माळा विचित्र परिलेंबे ॥ ८१ ॥ गरुड भिडतां भ्रूभंगासी । तेणें सोडिलें गजनक्रांसी । गरुडें धरिलें नखाग्रेंसीं । घेवोनि तिघांसी उडाला ॥ ८२ ॥

एषा मम महाशाखा शतयोजनमायता ।
स्थित्वाऽस्यां त्रीनिमान्भक्ष सुखेन त्वं खगेश्वर ॥ १७ ॥
ततो द्रुमं पतगसहस्रसेवितं
महीधरप्रतिमवपुः प्रकंपयन् ।
खगोत्तमो द्रुतमभिपत्य वेगवान्
बभंज तामविरलपत्रसंचयाम् ॥ १८ ॥
स्पृष्टमात्रा तु सा पद्भ्यां गरुडेन बलीयसा ।
अभज्यत तरोः शाखा भग्नान्तामप्यधारयत् ॥ १९ ॥
तां भग्नां स महाशाखां स्मयमानो विलोकयन् ।
अथात्र लजयाऽपश्यद्वालखिल्यानधोमुखान् ॥ २० ॥

मुखीं धरोनि भ्रूभंगासी । नखाग्रीं गजनक्रांसी । गरुड पाहे स्वस्थानासी । स्वयें आहारासी सेवावया ॥ ८३ ॥ येतां देखोनि गरुडासी । उल्हास कनकजांबूसी । स्वयें बोले आल्हादेंसीं । खगेश्वरासीं तें ऐका ॥ ८४ ॥ हरिहस्तें गज नक्र पुनीत । गरुड केवळ भगवद्भक्त । यांचा स्पर्श जालिया येथ । मी नित्य मुक्त होईन ॥ ८५ ॥ गजेंद्र भक्ताचे संगतीं । घातकी नक्र पावला मुक्ती । मीही याचिये संगतीं । नित्य मुक्ती पावेन ॥ ८६ ॥ जे जे लागले सत्संगतीं । ते ते नित्य पावले मुक्ती । कनकजांबू तदर्थी । गरुडाप्रती विनवित ॥ ८७ ॥

एषा मम महाशाखा शतयोजनमायता ॥ २१ ॥

शत योजन विस्तार । माझी शाखा अत्यंत थोर । तेथें बैसोनि खगेश्वर । करीं आहार तिहींचा ॥ ८८ ॥ गरुड क्षुधेनें पीडिला । तिहींसीं उडतां भागला । ऐकोनि कनकजांबूचे बोला । स्वयें बैसला शाखेसीं ॥ ८९ ॥ गरुड पाहे तो तरुवर । जैसा कां मेरु गिरिवर । भोंवत्या शाखा शतसहस्र । योजनविस्तार शतसंख्या ॥ १९० ॥ पक्षियांचीं नीडें तयावरी । शतसहस्र लक्षांतरीं । फळपुष्पित संभारीं । तरुवरी विश्रांति ॥ ९१ ॥ पहावया गरुडाची थोरी । वालखिल्य साठी सहस्री । गुप्त पावले शाखांतरीं । गरुड जीवरी बैसला ॥ ९२ ॥ गरुड बैसतांचि तेथ । शाखा मोडली कडकडीत । गरुड पाहे साशंकित । ऋषी लोंबत शाखेसीं ॥ ९३ ॥ ऋषी लोंबती अधोमुख । शाखा सांडों नये देख । ऋषी पावतांचि दुःख । थोर नरक पावेन ॥ ९४ ॥ शाखा धरोनि वामचरणीं । गज नक्र दक्षिणचरणीं । मुखीं भ्रूभंगा धरोनी । गेला उडोनी आकाशीं ॥ ९५ ॥ शाखा शतयोजनविस्तार । साठी सहस्र ऋषीश्वर । दक्षिणचरणीं गजनक्र । मुखीं महाथोर भ्रूभंग ॥ ९६ ॥ इतुकेनसीं समवेत । गरुड आकाशीं भ्रमत । बैसों नै लाहे यथास्वस्थ । ऋषी समवेत दुखवती ॥ ९७ ॥ मज बैसतांचि तळीं । भारें ऋषींची होय रांगोळी । येणें धाकें महाबळी । नभोमंडळीं भ्रमतसे ॥ ९८ ॥ घेवों न लाहे आहारातें । बैसों न लाहे स्वस्थचित्तें । परम संकट गरुडातें । तेणें श्रीहरीतें स्मरत ॥ ९९ ॥ थोर पावलों आकांता । वेगीं पाव गा भगवंता । काय म्यां करावें आतां । अनाथनाथा उद्धरीं ॥ २०० ॥ जोहरीं रक्षिलें पांडवांसी । नग्न करितां द्रौपदीसी । पितयानें गांजितां प्रह्लादासी । तेंवी मजपासीं पावावें ॥ १ ॥ आतां उद्धरिलें गजेंद्रासी । तो तूं मज विसरलासी । उडी घालावया वेग तुजपासीं । कां रुसलासी गोविंदा ॥ २ ॥ जना सबाह्य जनार्दन । तुझें नांव जगज्जीवन । मी तुझें अनाथदीन । माझें विघ्न निवारीं ॥ ३ ॥ गरुड श्रीहरीचा परम भक्त । तोही आनंदें नाम स्मरत । नामापासीं भगवंत । आहे डुल्लत स्वानंदें ॥ ४ ॥ करितां हरिनामस्मरण । स्वयें विघ्न होय निर्विघ्न । गरुड पावला समाधान । तेंही विंदाण अवधारा ॥ ५ ॥ गरुड भ्रमतां आकाशीं । भगवंताची कृपा कैसी । देखिलें पित्या कश्यपासी । तेजोराशी तपस्वी ॥ ६ ॥

स गत्वा पर्वतश्रेष्ठं गन्धमादनमंजसा ।
ददर्श कश्यपं तत्र पितरं तपसि स्थितम् ॥ २२ ॥
प्रजाहितार्थमारम्भो गरुडस्य तपोधनाः ।
चिकीर्षितं महत्कर्म तदनुज्ञातुमर्हथ ॥ २३ ॥
एवमुक्त्वा भगवता मुनयस्ते समाययुः ।
मुक्त्वा शाखां गिरिं पुण्यं हिमवंतं तपोधनाः ॥ २४ ॥

१ घरटीं. २ ज्यांचीं तोंडें खालीं आहेत असे. ३ न शके. ४ आकाशांत. ५ कौतुक.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

गन्धमादनपर्वतांत। कश्यप पिता तप आचरत। नभींहूनि देखिला अकस्मात। आला त्वरित त्यापासीं ॥ ७ ॥ येतां देखोनि गरुडासी। वृत्तांत कळला कश्यपासी। देखोनि वालखिल्य ऋषी। कश्यप त्यांसी प्रार्थित ॥ ८ ॥ घालोनियां लोटांगण। कश्यप विनवी कर जोडोन। गरुड माझें अपत्य दीन। कृपा करोन सोडावें ॥ ९ ॥ गरुडाचें मनोगत। आणूनियां परमामृत। माता करावी निर्मुक्त। तदर्थीं सामर्थ्य तुम्हीं द्यावें॥ २१० ॥ तुज करितां अनुष्ठान। नाहीं याचें सामर्थ्यज्ञान। येणें माता मुक्त करून। झाला वहन विष्णूचें ॥ ११ ॥ पहावया गरुडाचें सामर्थ्य। शाखेसीं बैसलों समस्त। तंव हा बळिया बळवंत। विजयी निश्चित तिहीं लोकीं ॥ १२ ॥ करोनि कश्यपासी नमन। देवोनि गरुडासी आशीर्वचन। वालखिल्यीं शाखा सोडोन। गेले तपोधन बदरीसी ॥ १३ ॥ गेले वालखिल्य देखोन। गरुड पावला समाधान। करोनि पितयासी नमन। पुसे आपण तें ऐका ॥ १४ ॥

भगवन्कुत्र मुंचामि तरुशाखामिमामहम्।
वर्जितं ब्राह्मणैर्देशमाख्याहि भगवन्मम ॥ २५ ॥
ततो निष्पुरुषं शैलं सागरोदरसंस्थितम्।
अगम्यं मनसाप्येतैस्तदाचख्यौ स कश्यपः ॥ २६ ॥

गरुड लोटांगण घाली। थोर जाजावलों[१] वालखिल्यीं। मुक्त जालों[२] तुझे बोलीं। शाखा आणिली ऋषिबाधें[३] ॥ १५ ॥ कनकजांबुशाखा सधर[४]। शतयोजनें सविस्तर। इशीं सांडावया कोण थार[५]। कोठें आहार म्यां घ्यावा ॥ १६ ॥ देखोनियां कनकजांबूसी। ब्राह्मण धांवती छळावयासी। धनलोभ बहु द्विजांसी। बळ ब्राह्मणांसीं चालेना ॥ १७ ॥ जेथ न पावती ब्राह्मण। सांगावें जी तें कोण स्थान। तेथें शाखा निक्षेपून[६]। करीं भोजन क्षुधार्थी ॥ १८ ॥ क्षुधित ऐकोनि गरुडासी। कृपा उपजली कश्यपासी। दुर्गम स्थान सांगे त्यासी। अगम्य सर्वांसी मनोवाचा ॥ १९ ॥ दक्षिणसमुद्रामाझारीं। सुनाभि पर्वत लंकागिरी। शाखा ठेवोनि त्यावरी। भोजन करीं सुपुत्रा ॥ २२० ॥ ऐकोनि कश्यपाचें वचन। स्वयें सुवर्णशाखा घेऊन। गज नक्र भूभंगेंसीं उडोन। आला आपण लंकेसीं ॥ २१ ॥

ततस्तस्य गिरेः शृंगमास्थाय स खगोत्तमः।
भक्षयामास गरुडस्तावुभौ क्षुधयार्दितः ॥ २७ ॥

लंकापाठार निर्जन। सुवर्णशाखा तेथ ठेवून। गरुडें केलें पैं भोजन। सावधान हरिस्मरणें ॥ २२ ॥ करितां भूभंगभक्षण। ग्रासोग्रासीं कृष्णार्पण। करी नक्राचें भोजन। ब्रह्मार्पण स्मरणेंसीं ॥ २३ ॥ भक्षितां त्या गजेंद्रासी। भोक्ता म्हणे हृषीकेशी। भक्त सेवी त्या त्या अर्थासी। हरिस्मरणेंसीं सावध ॥ २४ ॥ गरुड पीडला क्षुधेसीं। भोजन करितां ये विधीसीं। पावला परम तृप्तीसी। आल्हादेंसीं हरिस्मरणें ॥ २५ ॥ फळ मूळ आणि जीवन। जें भक्त सेविती आपण। तें तें करिती ब्रह्मार्पण। तृप्ती संपूर्ण तेणें त्यांसी ॥ २६ ॥ अन्न ब्रह्म अहं ब्रह्म। हृदयीं भोक्ता आत्माराम। त्याचें कर्मचि परब्रह्म। हें जाणती मर्म ते धन्य ॥ २७ ॥ भोजन करितां ऐसिये पंक्ती। आसहस्रांची[७] पंक्ती पुनाति[८]। ऐसें बोलती वेदश्रुति। सभाग्या पंक्ती हरिभक्त ॥ २८ ॥ ग्रासोग्रासीं हरिस्मरण। ऐसें जे करिती भोजन। तेथ भोक्ता श्रीभगवान। भोक्तेपण त्यां नाहीं ॥ २९ ॥ ऐसिये भोजनप्रयुक्तीं। गरुडासी जाली परम तृप्ती। तेणें घ्यावया विश्रांती। केली आइती[९] ते अवधारा ॥ २३० ॥ भारेंसीं भ्रमतां अंतराळीं। गरुड भागला महाबळी। तेणें पावोनि पाखांतळीं। केली ते वेळीं निजनिद्रा ॥ ३१ ॥ ऐसी घेऊनि विश्रांती। गरुड कैसा गेला शीघ्रगती। भगवद्भक्तपदप्रयुक्ती। भाग्यप्राप्ती लंकेसीं ॥ ३२ ॥ गरुडाचीं नखें स्पष्ट। लंकेसीं रुतलीं तिखट। पडतां पर्जन्याचे वाहावट। जालें त्रिकूट अति थोर ॥ ३३ ॥ कुबेराची अलकावती। रावणें हिरोनि घेतां वस्ती। त्यासी वारोनि प्रजापती। लंकापति तो केला ॥ ३४ ॥ विश्वकर्म्यातें घेऊन। स्वयें येवोनि चतुरानन। निर्माण केलें लंकाभुवन। दुर्ग दारुण दुर्गम ॥ ३५ ॥ विश्वकर्म्यानें झाडोनि कडे। त्रिकूट सज्ज केलें गाढें। लाग न लगे मागेंपुढें। चहूंकडे दुर्धर ॥ ३६ ॥ पडलंका मागिलीकडे। सुवेळा

१ डहाळीवर. २ त्रास पावलों. ३ ऋषींना पीडा होईल म्हणून. ४ बळकट. ५ ठिकाण. ६ टाकून.

७ सहस्रपर्यंत लोकांची. ८ पवित्र होते. ९ तयारी.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

शोभे लंकेपुढें । निकुंबळागड अवघडे । दक्षिणे-कडे दुर्गम ॥ ३७॥ तया लंकेच्या शिखरीं । कनकशाखा होती वरी । आगी लावितां पुच्छें-करीं । शाखा एकसरीं रस जाली ॥ ३८॥ हनुमंतें जाळिली लंका । सुवर्णाची ओतिली देखा । भगवद्भक्ताचा आवांका । दुःखदायका सुखरूप ॥ ३९ ॥ शाखा बहुकाळ पडली राहे । शेवाळली खडकप्राये । तेणें उपेक्षिली जाये । लक्षा न ये कोणासी ॥ २४० ॥ मरुत[1] मारुत[2] प्रळयवन्ही[3] । लंका जाळितां तिघीं जणीं । शाखा ओतिली रस होउनी । लंकाभुवनीं हेममय ॥ ४१ ॥ हनुमंतें जाळितां देखा । हेममय ओतली शाखा । तैंपासोनि सुवर्णलंका । समस्त लोकां अनुवाद ॥ ४२ ॥ कपीनें करितां लंकादहन । लंका जाली सुवर्णवर्ण । मग सीतेपासीं येऊन । केलें नमन साष्टांगीं ॥ ४३ ॥ नमस्कार करोनि सीतेसी । शीघ्र भेटावया श्रीरामासी । हनुमान आज्ञा पुसे तिसीं । अति त्वरेंसीं जावया ॥ ४४ ॥ भेटावया निजस्वामीसी । स्फुरण आलें हनुमंतासी । बाहु थरकती उल्लासीं । तळपे आकाशीं कपिपुच्छ ॥ ४५ ॥ मनें कवळिलें श्रीरामासी । श्रद्धा सीतेच्या पायापासीं । आज्ञा पुसावया तियेसी । एका-ग्रतेसीं तिष्ठत ॥ ४६ ॥ ऐसें देखोनि हनुमंता । उल्लास जानकीचे चित्ता । मारावया लंकानाथा । शीघ्र रघुनाथा आणावें ॥ ४७ ॥ ऐक हनुमंता सावधान । तुज मी देतें आशीर्वचन । मार्गीं बाधूं न शके विघ्न । राम चिद्धन पावसी ॥ ४८ ॥ ऐकोनि सीतेचें वचन । हनुमान घाली लोटांगण । वंदोनि सीतेचे चरण । केलें उड्डाण वानरें ॥ ४९ ॥ एका जनार्दना शरण । हनुमंतासी श्रीरामदर्शन । तेथील गोड निरूपण । सावधान अवधारा ॥ २५० ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां गजेंद्रोद्धरणं हनुमन्श्रीरामदर्शनागमनं नाम द्वाविंशतितमोऽध्यायः ॥ २२ ॥ ओंव्या ॥ २५० ॥ श्लोक ॥ २७ ॥

अध्याय तेविसावा

॥ श्रीरामचंद्राय नमः ॥ आश्वासोनि श्रीरामकांता । भेटावया श्रीरघुनाथा । हनुमंत होय निघता । तेचि कथा अवधारा ॥ १ ॥

पुनर्दृष्ट्वा च वैदेहीं मैथिलीमभिवाद्य च ।
प्रत्यागंतुं मनश्चक्रे पुनर्मध्येन सागरम् ॥ १ ॥

ततः स कपिशार्दूलः स्वामिसंदर्शनोत्सुकः ।
आरुरोह गिरिश्रेष्ठमरिष्टमरिसूदनः ॥ २ ॥

स च भूमिधरः श्रीमान्बलिना तेन पीडितः ।
दशयोजनविस्तारस्त्रिंशद्योजनमुच्छ्रितः ॥ ३ ॥

धरण्यां समतां प्राप्तो बभूव स धराधरः ॥ ४ ॥

लंकादहन करोनि संपूर्ण । हनुमंतासीं करितां गमन । घ्यावया सीतेचें दर्शन । आला परतोन तीपासीं ॥ २ ॥ सीता सर्वांगीं अक्षत । पाहोनियां सावचित्त । हनुमंत हर्षयुक्त । निघे त्वरित तें ऐका ॥ ३ ॥ घ्यावया श्रीरामाची भेटी । हनुमंतासीं त्वरा मोठी । वंदोनि सीता गोरटी । उठाउठीं निघाला ॥ ४ ॥ वेगीं उल्लंघावया सागर । चौफेर अवलोकी वानर । देखिला अरिष्ट गिरिवर । तेथें सत्वर वळंघला[4] ॥ ५ ॥ सकळ अरिष्टां आधार । यालागीं अरिष्ट गिरिवर । अनुवादती[5] ऋषीश्वर । त्याचा विस्तार अवधारा ॥ ६ ॥ दश इंद्रियीं विक्षेपकता । दशयोजन रुंदी पर्वता । वासनाविस्तार ऊर्ध्वता । शतयोजनता ते उंची ॥ ७ ॥ जागृति स्वप्न सुषुप्तिता । श्रीरामस्मरण हनुमंता । यालागीं चढला[6] अरिष्टमाथां । हाणी लाता नामनेटें[7] ॥ ८ ॥ पूर्ण कृपा श्रीरघुनाथा । पूर्ण प्राप्ती ते हनुमंता । चढोनि अरिष्टाचे माथां । हाणी लाता नामनेटें । ॥ ९ ॥ हनुमंताचे नामनेट । उड्डाणाचा कडकडाट । पृथ्वींत रुपला अरिष्ट । केला सपाट भूमिसम ॥ १० ॥ वृक्षशिखरें समसगट । भूमीं दाटला गिरिकूट । श्रीरामभजनीं निजनिष्ठ । केला सपाट हनुमंतें ॥ ११ ॥ हनुमान रामनामें आतुर्बळी । उड्डाणाच्या कल्लोळीं । अरिष्ट मेळविला धुळी । करोनि रांगोळी नामनेटें ॥ १२ ॥ स्वयें अरिष्टाचिये माथां । निर्दळणें हाणोनि लाता । हें ब्रीद साजे हनुमंता । श्रीरघुनाथाचेनि भजनें ॥ १३ ॥

येऽन्येऽरविंदाक्ष विमुक्तमानिन-
स्त्वय्यस्तभावादविशुद्धबुद्धयः ।
आरुह्य कृच्छ्रेण परं पदं ततः
पतंत्यधो नादृतयुष्मदंघ्रयः ॥ ५ ॥

१ वायु. २ मारुत (मारुती). ३ प्रल्याग्नी.

४ शांतवन करून. ५ त्वरित. ६ चढला. ७ बोलतात.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

तथा न ते माधव तावकाः क्वचिद्
भ्रश्यंति मार्गात्त्वयि बद्धसौहृदाः ।
त्वयाभिगुप्ता विचरंति निर्भया
विनायकानीकपमूर्द्धसु प्रभो ॥ ६ ॥

परम भाग्याची भाग्यस्थिती । मनुष्यजन्मातें नर येती । शोधितसत्त्वाची[1] सत्त्ववृत्ती । जन्म पावती ब्राह्मणाचा ॥ १४ ॥ तेथेंही वेदशास्त्रव्युत्पत्ती । जेणें परब्रह्म आतुडे[2] हातीं । ती सांडोनि मूढमती । बुद्धि यदर्थी अति योग्य ॥ १५ ॥ मुक्तत्वाचा निजाभिमान । वाग्वादीं अति निपुण । नाहीं भगवद्भावभजन । अलोट पतन तयांसी ॥ १६ ॥ येवोनि ब्रह्मप्राप्तीचे घरा । मुक्ताभिमान नागवी नरा । भार भगवद्भजनीं पाठिमोरा । ऐशिया नरा अधःपात[3] ॥ १७ ॥ भगवद्भजनीं जो पाठिमोरा । त्यासी जन्ममरणयेरझारा । कोट्यनुकोटि योनिद्वारा । अधःपात खरा त्या नांव ॥ १८ ॥ करोनि पत्रावलंबन । परीक्षा म्हणे माझें ज्ञान । हें ज्ञान कीं ज्ञानाभिमान । अधःपतन तयासी ॥ १९ ॥ अहं सोहं कोहं अभिमान । भक्त न धरती अति सज्ञान । त्यांसी बाधूं न शके विघ्न । विघ्नासी दमन श्रीरामनाम ॥ २० ॥ रामनामाच्या निजशक्ती । भक्त विघ्नमाथां चढती । शेखीं विघ्न निर्दाळिती । नित्य निर्वृत्ती[4] रामनामें ॥ २१ ॥ चारा घालोनि मुखाआंत । जेंवी पक्षिणी पिलीं पोशित । तेंवी आपुले निजभक्त । रक्षी भगवंत अहर्निशीं ॥ २२ ॥ विघ्न न येचि नामापासीं । तें केंवी ये भक्तांपासीं । भगवंत रक्षी अहर्निशीं । विघ्न भक्तांसीं निर्विघ्न ॥ २३ ॥ विघ्न करूं ये छळणार्थ । विघ्नाचा आत्मा तो भगवंत । विघ्न निर्विघ्न होय तेथ । भूतें भगवद्रूप भक्तांसी ॥ २४ ॥ सर्व भूतीं भगवद्भाव । तेथें विघ्नासी कैंचा ठाव । विघ्नीं विघ्नत्वा अभाव । विघ्न स्वयमेव देव जाला ॥ २५ ॥ भगवद्भावें चालतां भक्तां । विघ्नें ओढविती[5] माथा । ऐसी हरिभक्ति हनुमंता । श्रीरघुनाथाचेनि नामें ॥ २६ ॥ श्रीरामनामें हनुमान बळी । अरिष्ट पर्वत पायांतळीं । करोनियां पैं रांगोळी । मिळविला धुळी हरिनामें ॥ २७ ॥ अरिष्टाचें भाग्य श्रेष्ठ । लागतां हनुमंताचा अंगुष्ठ । विरोनियां गिरिकूट । जाला प्रविष्ट परब्रह्मीं ॥ २८ ॥ अरिष्टाची भाग्यावळी । हनुमंताचे पायांतळीं । नुरेचि भूतळीं पाताळीं । मिनला तत्काळीं परब्रह्मा ॥ २९ ॥ दशशतयोजन विस्तार । नामें अरिष्ट गिरिवर । हनुमंतें हाणोनि पादप्रहार । केला उद्धार अरिष्टाचा ॥ ३० ॥ कपीनें हाणोनि पांपरा[6] । जडत्व दवडोनि भूधरा[7] । ऐक्य केलें धराधरा[8] । गिरिवरा अरिष्टा ॥ ३१ ॥ करावया अरिष्टाचा उद्धार । श्रीरामभक्त हनुमंत वीर । जो करी जडाचा उद्धार । तोचि साचार हरिभक्त ॥ ३२ ॥ धरा धरी तो धराधर । त्यासीं अरिष्टाचा ऐक्याकार । श्रीरामभजनें करी वानर । जगदुद्धार हनुमंतें ॥ ३३ ॥ पुढील कथेची संगती । समुद्र लंघावया मारुती । चढला अरिष्ट पर्वतीं । तेही उपपत्ती अवधारा ॥ ३४ ॥

पीडितं तं नगवरं त्यक्त्वा गगनमास्थितः ।
आप्लुत्य च महावेगः पक्षवानिव पर्वतः ॥ ७ ॥
हनुमान्मेघजालानि विकर्षन्निव गच्छति ।
भुजयोरंतरासक्तं मेघजालं विकर्षयन् ॥ ८ ॥
दारयन्मेघवृंदानि निष्पतंश्च पुनः पुनः ।
ज्यामुक्त इव नाराचो महावेग उपागमत् ॥ ९ ॥
स किंचिदारात्संप्राप्तः समालोक्य महागिरिम् ।
ननाद सुमहानादं मेघनादसमस्वनः ॥ १० ॥

हनुमान उडतां महाबळी । पर्वत दडपला पायांतळीं । सर्प दडपती पाताळीं । वमिती ते काळीं विषगरळा ॥ ३५ ॥ भारें दडपला पर्वत । श्वेत पीत आरक्त धात । स्रवोनि निजशोभा शोभत । जेंवी वसंत निजसुमनीं ॥ ३६ ॥ जेंवी पर्वत पक्षमेळीं । तैसा कपि जातसे नभोमंडळीं । अभ्रें अडकलीं बाहुमूळीं । वक्षःस्थळीं कपीच्या ॥ ३७ ॥ उत्तरीयवास राजलीळा । वानरा आली राजकळा । सुनीळ भासतसे नीळा । घनसांवळा मारुती ॥ ३८ ॥ अभ्रें अडकलीं हनुमंता । आंगा आली घनश्यामता । पावला श्रीरामसारूप्यता । भासे समस्तां सुरसिद्धां ॥ ३९ ॥ देखोनियां महेंद्रगिरी । हर्ष कोंदला वानरीं । प्रळयांबुदगिरागजरीं[10] । भुभुःकारीं गर्जिनला ॥ ४० ॥ श्रीरामचापीं सुटला शर । तैसा लंघीत सागर । सवेग जातसे

१ शुद्ध सत्त्वगुणाची. २ सांपडे. ३ पतन. ४ सुख. ५ नमवितात. ६ लाथ. ७ पृथ्वी. ८ पर्वत. ९ अंगवस्त्र. १० प्रलयकालाच्या मेघाप्रमाणें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वानर । सुरासुर विस्मित ॥ ४१ ॥ नाद कोंदला अंबरीं । नाद कोंदला सागरीं । नाद कोंदला कपींद्रीं । जे महेंद्रीं राहविले ॥ ४२ ॥

निशम्य नदतो नादं वानरास्ते समंततः ।
बभूवुरुत्सुकाः सर्वे सुहृद्दर्शनकांक्षिणः ॥ ११ ॥
जांबवांश्च हरिश्रेष्ठः प्रीतिसंहृष्टमानसः ।
उपामंत्र्य हरीन्सर्वानिदं वचनमब्रवीत् ॥ १२ ॥
सर्वथा कृतकार्योऽसौ हनुमान्नात्र संशयः ।
न ह्यस्याकृतकार्यस्य नाद एवंविधो भवेत् ॥ १३ ॥
तस्य बाहूरुवेगं च निनादं च महात्मनः ।
संश्रुत्वा हरयो हृष्टाः समुत्पेतुः समंततः ॥ १४ ॥

ऐकोनि गिरागजर । महेंद्रीं राहिले होते वानर । तेही सावधान होती समग्र । तैसें गंभीर गर्जिन्नला ॥ ४३ ॥ गजर ऐकोनि अत्यद्भुत । वानरां सांगे जांबवंत । पैल आला रे हनुमंत । सीताशुद्ध्यर्थ लक्षोनी ॥ ४४ ॥ साधोनियां सीताशुद्ध्यर्थ । हर्षें गर्जे हनुमंत । अंगदादि वानरांआंत । सांगे जांबवंत दूतचिन्ह ॥ ४५ ॥ कार्य न साधितां जाण । मुख्य दुश्चित्त म्लानवदन । त्याचे वाचेसीं पडे मौन । गिरागर्जन त्या कैंचें ॥ ४६ ॥ सीताशुद्धीचा इत्यर्थ । साधूनि आला हनुमंत । तेणें आल्हादें गर्जत । केला निश्चितार्थ जांबवंतें ॥ ४७ ॥ ऊरुवेग बाहुवेग । हनुमंताचा अंगवेग । कार्य साधोनियां सांग । येतो सवेग मारुति ॥ ४८ ॥ ऐसा जांबवंतीं इत्यर्थ ॥ ऐकोनि वानर समस्त । अत्यंत आल्हादें नाचत । सीताशुद्ध्यर्थ साधला ॥ ४९ ॥

तमभ्रघनसंकाशमापतंतं महाकपिम् ।
दृष्ट्वा ते वानराः सर्वे तस्थुः प्रांजलयस्तदा ॥ १५ ॥
स तस्यैव गिरेः शृंगे निपत्य च महाजवः ।
निपपात महेंद्रस्य शिखरे पादपाकुले ॥ १६ ॥
ततस्ते प्रीतमनसः सर्वे वानरपुंगवाः ।
हनुमंतं महात्मानं परिवार्योपतस्थिरे ॥ १७ ॥
हनुमांस्तु गुरून्वृद्धान्जांबवत्प्रमुखांस्तदा ।
कुमारमंगदं चैव सोऽवंदत महाकपिः ॥ १८ ॥
स ताभ्यां पूजितः पूज्यःकपिभिश्च सभाजितः ।
दृष्टा देवीति विश्रांतः संक्षेपेण न्यवेदयत् ॥ १९ ॥

साधूनि सीताशुद्ध्यर्थ । पैल आला रे हनुमंत । इंद्रकील नीलपर्वत । तैसा शोभत मारुति ॥ ५० ॥ येतां देखोनि हनुमंत । वानरवीर हर्षयुक्त । उभे ठाकले समस्त । उभय हस्त जोडोनी ॥ ५१ ॥ फळीं पुष्पीं वृक्षयुक्त । महेंद्रगिरि सुशोभित । हनुमंत स्ववेगें आला तेथ । वानर जेथ उभे असती ॥ ५२ ॥ एकें उड्डाणें हनुमंत । समुद्र लंघोनि समस्त । वेगें आला महेंद्रांत । वानर जेथ उभे असती ॥ ५३ ॥ धांवतां हनुमंताचेनि वेगें । वायु ठाकोनि राहिला मागें । मनोवेगाहूनि वेगें । आला सवेग मारुति ॥ ५४ ॥ नाहीं लागली पैं धाप । नाहीं स्वेदें नाहीं कंप । श्रीराम स्मरतां चिद्रूप । आला सुखरूप हनुमंत ॥ ५५ ॥ जैसा श्रीरामाचा बाण । कार्य साधोनि संपूर्ण । परतोनि हाता ये आपण । तैसें आगमन कपीचें ॥ ५६ ॥ नळ नीळ जांबुवंत । अंगदादि वीर समस्त । त्यांतें देखोनि हनुमंत । नाम गर्जत आनंदें ॥ ५७ ॥ श्रीराम जयराम या गजरीं । हनुमान गर्जत अंबरीं । वानरीं गर्जविला गिरीं । नामोच्चारीं जय जय राम ॥५८॥ श्रीराम जय राम नाम । गर्जताती प्लवंगम । नादें गर्जवीत व्योम । आला सप्रेम हनुमंत ॥५९॥ नामें कोंदलें अंबर । नामें कोंदलें गिरिकंदर । करीत नामाचा गजर । आला वानर हनुमंत ॥ ६० ॥ देखोनियां वानरगण । करीत श्रीरामाचें स्मरण । हनुमान घाली लोटांगण । वंदीत चरण सर्वांचे ॥ ६१ ॥ साधोनि आलों सीताशुद्ध्यर्थ । गर्व नाहीं हनुमंतांत । ज्यातें त्यातें अभिवंदित । भूतीं भगवंत देखोनि ॥ ६२ ॥ वृद्धत्वें जांबुवंत गुरु । प्रथम त्यासी नमस्कारु । अंगद जो कां राजकुमरु । केला नमस्कारु तयासी ॥ ६३ ॥ एवं युक्तपरंपरा । हनुमान वंदित वानरां । तेणें आल्हाद समग्रां । पवनपुत्रा देखोनि ॥ ६४ ॥ सन्मानोनि हनुमंतातें । मध्यें बैसवोनि तयातें । वानर बैसले सभोंवते । सीताशुद्धीतें पुसावया ॥ ६५ ॥ जांबुवंतादि पूज्य समस्त । तिहीं पूजिला हनुमंत । तेणें आल्हादें सांगत । सीताशुद्ध्यर्थ संक्षेपें ॥ ६६ ॥ लंका नगरी वसे सागरीं । तेथें रावण राज्य करी । तेथील प्रवेश अटक[१२] भारी । सुरासुरीं

१ आकाशांत. २ तोंडांतून शब्द निघत नाहीं. ३ कार्यभाग. ४ संपूर्ण. ५ घाम. ६ ज्ञानस्वरूप. ७ आकाशांत. ८ पर्वत. ९ वानर. १० मारुतीला. ११ आग्रहानें. १२ प्रतिबंध.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

दुर्धर ॥ ६७ ॥ रामनामाचे निजनेटें। उड्डाण करोनियां नेटें। लंका शोधिली त्रिकूटें। समसंगटें पुरगृहें ॥ ६८ ॥ रावणाच्या निजभवनीं। सीता भेटली अशोकवनीं। तियें धाडिलें खूण देउनी। मस्तकमणि हा सीतेचा ॥ ६९ ॥ मणि देखोनि अलंकार। वानरीं केला जयजयकार। रामनामाचा गजर। नामें वानर गर्जती ॥ ७० ॥ सीता भेटली साचार। मणि मस्तकालंकार। तें देखोनियां वानर। केला भुभुःकार स्वानंदें ॥७१॥

ते नगाग्रान्नगाग्राणि शिखराच्छिखराणि च।
प्रहृष्टाः समपद्यंत हनुमंतं दिदृक्षवः ॥ २० ॥
ते प्रीताः पादपाग्राणि द्रुमशाखाश्च पुष्पिताः।
वासांसीव प्रकाशानि समवाप्यंत लांगुलैः ॥ २१ ॥
क्ष्वेडंत्यन्ये हसंत्यन्ये गर्जंत्यन्ये महाबलाः।
चक्रुः किलकिलामन्ये प्रतिगर्जंति चापरे ॥ २२ ॥
केचिदुच्छ्रितलांगूलाः प्रहृष्टाः कपिकुंजराः।
आयतांचितदीर्घाणि लांगूलानि प्रविव्यधुः ॥ २३ ॥
अपरे तु हनूमंतं श्रीमंतं वानरोत्तमम्।
आप्लुत्य गिरिशृंगेषु संस्पृशंति प्रहर्षिताः ॥ २४ ॥
स्तुवंति च नमस्यंति परिष्वंजंति चापरे ॥ २५ ॥

वृक्षींहोनि वृक्षांतरीं। पर्वताहोनि पर्वतावरी। हरिखें उडिजे वानरीं। सीता सुंदरी सांपडली ॥ ७२ ॥ श्वेत सुनीळ आरक्त। शाखा कपिपुच्छीं पुष्पित। जैशा वस्त्रगुढिया गगनाआंत। तैसी शोभा कपिपुच्छीं ॥ ७३ ॥ फळित पुष्पित शाखांबरीं। पुच्छगुढिया गगनांतरीं। उभवोनि नाचिजे वानरीं। सीता सुंदरी सांपडली ॥ ७४ ॥ सीतामस्तकींचें मणिरत्न। पहावया अवघे जण। हरिखें करोनि उड्डाण। वानरगण दाटले ॥ ७५ ॥ मस्तकमणि देखोनि डोळां। हरिख वानरां सकळां। पुच्छ उभविती अंतराळां। स्वानंदलीळा नाचती ॥ ७६ ॥ येरयेरां हाणिती धडका। येरयेरां लाविती चडका। येरयेरां देती धक्का। पाडिती देखा येरयेरां ॥ ७७ ॥ येरयेरां दाविती वांकुल्या। येरयेरां गटांगुळिया। येरयेरां गुदगुदलिया। कर्णांगुळिया येरयेरां ॥ ७८ ॥ येरयेरां कौतुकीं। जानुघातें हाणिती ढक्की। येरयेरां हाणिती बुक्की। वानर हर्षी उपरमोनी ॥ ७९ ॥ येरयेरां निखंदिती। येरयेरां उपहासती। येरयेरां निर्भर्त्सिती। वीर गर्जती आल्हादें ॥ ८० ॥ एक किळकिळती वानरजाती। एक रामनामें गर्जती। एक भुभुःकार देती। सीता सती सांपडली ॥ ८१ ॥ अर्धी मधीं हनुमंता। कोण वंदील पाहों आतां। उडिया टाकोनि असंख्यता। चरणीं माथा ठेविती ॥ ८२ ॥ जीव देणें हे गोड गोष्टी। हनुमान वीर जगजेठी। शुद्धि आणिली उठाउठीं। वानरकोटी नाचती ॥ ८३ ॥ विचित्र शाखा धरोनि पुच्छाग्रीं। पुच्छ उभवोनि अंबरीं। वानर नाचती सुखोद्गारीं। सीता सुंदरी सांपडली ॥ ८४ ॥ वानरीं मिळोनि एकमेळीं। रामनामाच्या कल्लोळीं। अवघीं पिटोनियां टाळी। हनुमानाजवळी मिनले ॥ ८५ ॥ वानरीं मिळोनि समस्त। हनुमंताची स्तुति करित। अनुक्रमें आलिंगित। अभिवंदित स्वानंदें ॥ ८६ ॥

तं मारुतिं महावीर्यं राक्षसैः क्षतविग्रहम्।
समीक्ष्य हरयः सर्वे परिवार्य समंततः ॥ २६ ॥
ततस्तमब्रवीद्वाक्यं जांबवानंगदस्तदा।
ब्रूहि वानरशार्दूल कृतं कर्म सुदुष्करम् ॥ २७ ॥
अपि दृष्टा त्वया सीता रामस्य महिषी प्रिया।
प्रशस्तवर्णो हि शुभस्तवांगुलिगतो मणिः ॥ २८ ॥

अंगदयुवराज प्रज्ञावंत। नळ नीळ पनस जांबवंत। गज गवय गवाक्ष युक्त। यूथपती समस्त बैसले ॥ ८७ ॥ मध्यें बैसविला हनुमान वीर। घायीं सर्वांग जर्जर। तें देखोनि वीर झुंजार। विस्मयो थोर पावले ॥ ८८ ॥ हनुमंत हा वज्रदेही। तोही ओरखडला घायीं। दारुण युद्ध जालें पाहीं। कपींतें कांहीं सांगेना ॥ ८९ ॥ आणिकही वानरभार। देखोनि हनुमान घायीं जर्जर। म्हणती युद्ध घोरांदर। अति दुस्तर येणें केलें ॥ ९० ॥ ऐकावया हनुमंताचें रण। वानरां येतसे स्फुरण। करोनि सीताशुद्धिप्रश्न। रणकंदन पुसावें ॥ ९१ ॥ हा तंव बलाढ्य स्वयें। हनुमंतें युद्ध केलें आहे। हनुमंताचे निजघाये।

१ एकंदर. २ आकाशांत. ३ निषेध करतात. ४ नमस्कार करतात. ५ ज्ञानवान्. ६ वानरवीर. ७ लढवय्ये.
८ अतिभयंकर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

कोण साहे रणरंगीं ॥ ९२ ॥ सिंह बोरांटी ओरबडे । तैसे शस्त्रांचे वरखडे । हनुमंताचे मागेंपुढें। चहूंकडे दिसताती ॥ ९३ ॥ आपुले युद्धाची निजख्याती । स्वमुखें न सांगे मारुती । सीताशुद्धीच्या प्रश्नोक्तीं । युद्धव्युत्पत्ती पुसावी ॥ ९४ ॥ अंगद जो कां युवराजा । वार्ता पुसे पवनात्मजा[1] । कैसेनि भेटली रामभाजा[2] । समूळ ओजौं[3] मज सांगें ॥ ९५ ॥ कोणे भुवनीं कोणे स्थानीं । तुज भेटली सीता जननी । कैसेनि दिधला मस्तकमणी । समूळ काहणी मज सांगें ॥ ९६ ॥ ऐकोनि अंगदाचा प्रश्न । हनुमंत परम विचक्षण । सीताशुद्धीचें लक्षण । स्वमुखें आपण सांगत ॥ ९७ ॥

एतच्छ्रुत्वा शुभं वाक्यमंगदस्य विपश्चितः ।
हनूमानब्रवीद्धृष्टः सर्वांस्तान्हरियूथपान् ॥ २९ ॥
अशोकवनिकामध्ये दृष्टा सा जनकात्मजा ।
रक्ष्यमाणा सुघोराभी राक्षसीभिरनिंदिता ॥ ३० ॥
एकवेणीधरा बाला रामदर्शनलालसा ।
उपवासपरिश्रांता जटिला मलिना कृशा ॥ ३१ ॥
यत्नेन महता दृष्टा सा मया जनकात्मजा ।
तया च सह संवादं कृत्वा पृष्ट्वा ह्यनामयम् ॥ ३२ ॥
अभिज्ञानं गृहीत्वा च सिद्धार्थोऽहमिहागतः ॥ ३३ ॥

अंगदाचें शुभ वचन । ऐकोनि हनुमंत हास्यवदन । सीताशुद्धीचें लक्षण । करोनि गौरव सांगत ॥ ९८ ॥ अंगद युवराजा समर्थ । नळ नीळ जांबुवंत । ऐका वानरवीर समस्त । सीताशुद्ध्यर्थ संक्षेपें[4] ॥ ९९ ॥ लंकादुर्ग अति दुर्धर । सभोंवता समुद्र दुस्तर । त्यामाजी रावणाचें नगर । लंकापुर ज्या नांव ॥ १०० ॥ तेथें रिघतां अति दुर्घट । मीहि पावलों परम कष्ट । नामें निरसोनि संकट । विघ्नें सपाट रामनामें ॥ १ ॥ त्याहीमाजी रावणभुवनें । त्यामाजी राणिवसा[6] गहन । त्याहीमाजी अशोकवन । सीता चिद्रत्न त्यामाजी ॥ २ ॥ सीतेपासीं संरक्षण । कराळ विक्राळ दारुण । भयानका राक्षसी रक्षण । तेथें कोण रिघों शके ॥ ३ ॥ दुष्ट दुर्मुख दारुण । ब्रह्मराक्षस रक्षोगण । सप्तावर्ती भ्यासुर पूर्ण । तेथें कोण रिघों शके ॥ ४ ॥ अशोकवन अति दुर्घट । वाऱ्या[7] तेथें न फुटे वाट । तेथेंही रिघालों करूनि कष्ट । अनेक संकटें सोसूनी ॥ ५ ॥ सीता स्वयमेव देखिली दृष्टी । तरी घेवों न शकें भेटी । भोंवती राक्षसांची घरटी[8] । वृक्षसंपुटीं[9] मी लपालों ॥ ६ ॥ सीतानिजदुःखदर्शन । नाहीं आस्तरणें[10] ना प्रावरणें[11] । एक वस्त्र परिधान । अति मळिण मळगंधी ॥ ७ ॥ नाहीं स्नान ना भोजन । उपवासें कृश दीन । वेणी वळिली जटाबंधन । मंगलस्नान असेना ॥ ८ ॥ तरी धन्य सीता सती । श्रीरामभजनीं अति प्रीती । जागृतीं स्वप्न आणि सुषुप्तीं । श्रीरामस्मृती विसरेना ॥ ९ ॥ सीता सती सावधान । करितां श्रीरामस्मरण । वृक्ष वल्ली तृण पाषाण । श्रीरामभजन जपताती ॥ ११० ॥ धन्य सीतेची रामभक्ती । सर्वेंद्रियीं श्रीरामस्फूर्ती । राम देखे सर्वां भूतीं । त्रिजगतीं रामनामें ॥ ११ ॥ ऐसी असतां सहजस्थिती । श्रीरामभेटीची अत्यासक्ती । मजलागीं ये काकुळती । श्रीरघुपति भेटवीं ॥ १२ ॥ स्यां सांगितली गुह्य गोष्टी । श्रीरामा तुझी आवडी मोठी । मज धाडिलें शुद्धीसाठीं । सीता गोरटी कोठें आहे ॥ १३ ॥ तुझी ठायीं पडलिया शुद्धी । घेवोनि वानरांची मांदी[12] । श्रीराम येईल त्रिशुद्धी । दिधली मुदी रामाची ॥ १४ ॥ मुद्रिका देखतांचि दृष्टीं । हरिखली सीता गोरटी । हरिखें माझी पाठी थापटी । जांई उठाउठीं शुद्धि सांगें ॥ १५ ॥ सखा जिवलग मज तूं आतां । तुझे चरणीं ठेवितें माथा । शीघ्र जावोनि हनुमंता । श्रीरघुनाथा आणावें ॥ १६ ॥ शीघ्र करावया गमन । स्यां मागितलें अभिज्ञान[13] । मस्तकमणि घेवोनि खूण । आलों धांवोनि तुम्हांपासीं ॥ १७ ॥ लंकेसीं आहे सीता सती । शुद्धि स्यां आणिली निश्चितीं । विकल्प न धरावा चित्तीं । चला रघुपतीला शुद्धि सांगों ॥ १८ ॥ ऐकोनि हनुमंताचें वचन । वानरां तळमळ पूर्ण । न सांगेचि युद्ध दारुण । बुद्धि कोण करावी ॥ १९ ॥ ऐकोनि हनुमंताचें वचन । अंगद सुखावला आपण । सीताशुद्धि तुवां आणून । रामाचा प्राण वांचविला ॥ १२० ॥ वानरांच्या कोट्यनुकोटी । पडल्या होत्या प्राणसंकटीं । तुवां

१ वायुपुत्राला (मारुतीला). २ रामपत्नी सीता. ३ वृत्तांत. ४ थोडक्यांत. ५ रावणाचा वाडा. ६ जनानखाना. ७ वाऱ्याला. ८ वेष्टण. ९ झाडांच्या डहाळ्यांत. १० अंथरूण. ११ पांघरूण. १२ समुदाय. १३ खूण.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वांचविल्या उठाउठीं। शुद्धिसाठीं सीतेच्या ॥ २१ ॥ धन्य जीवित्व हनुमंता। शुद्धि आणिली तत्त्वतां। हर्षे सांगावया रघुनाथा। उल्लासता अंगदा ॥ २२ ॥ तंव बोलिला जांबवंत। निधडा वीर हा हनुमंत। कैसेनि भेटला लंकानाथ। युद्धकंदनार्थ कां जाला ॥ २३ ॥

जांबवान्सर्ववृत्तांतमपृच्छन्मरुतात्मजम्।
कथं दृष्टा त्वया सीता कथं वा तत्र वर्तते ॥ ३४ ॥
संवादश्च कथं वृत्तः क्रूरकर्मा हि रावणः।
एतत्सर्वं समासेन प्रब्रूहि त्वं महाभुज ॥ ३५ ॥

जांबुवंत म्हणे हनुमंता। तूं व्रजदेही तत्त्वतां। तुझे अंगीं देखों शस्त्रघाता। त्या युद्धार्था सांगावें ॥ २४ ॥ रावण क्रूर आणि कपटी। कैसी त्यासीं जाली भेटी। सीता भेटली संकटीं। त्या गुह्य गोष्टी सांगाव्या ॥ २५ ॥ तुवां गांजिला इंद्रजित। पिता पवन होता सांगत। त्या नीळासीं एकांत। पुत्रपुरुषार्थ तो वदला ॥ २६ ॥ त्या युद्धाची समूळ कथा। कृपेनें सांगावी हनुमंता। समुद्रलंघनाची वार्ता। तेही तत्त्वतां सांगावी ॥ २७ ॥ येचिविशीं हनुमंतीं। पूर्वीं बुद्धि स्फुरली होती। वार्ता पुसलिया श्रीरघुपती। स्वमुखें कीर्ति नये सांगों ॥ २८ ॥ स्वामीनें पुशिलिया जाण। वार्ता वंचूं नये आपण। वंचितांचि लागे दूषण। बुद्धि कोण करावी ॥ २९ ॥ स्वमुखें सांगों नये कीर्ती। वंचूं नये स्वामीप्रती। ऐसिये संकटीं मारुतीं। प्रजापती विनविला ॥ १३० ॥ वंदोनि ब्रह्मयाचे चरण। हनुमंत विनवी पैं आपण। लंकेमाजी झालें वर्तन। पत्र लेहोन मज द्यावें ॥ ३१ ॥ स्वामीपासीं निजपुरुषार्थ। जो सांगे तो मूर्खोन्मत्त। वंचितां पावे अधःपात। हा शास्त्रार्थ स्वामीचा ॥ ३२ ॥ नाहीं दुसरा सांगाती। तो सांगता माझी कीर्ती। मज माझी पडली गुंती। पत्र तदर्थीं मज द्यावें ॥ ३३ ॥ माझा समस्तही पुरुषार्थ। ब्रह्महस्तींचें ब्रह्मलिखित। सत्य मानील श्रीरघुनाथ। निश्चितार्थ मज माझा ॥ ३४ ॥ ऐकोनि हनुमंताचें वचन। हांसिनला चतुरानन। परम प्रीतीं आलिंगून। पत्र लेहोन दिधलें ॥ ३५ ॥ वीर शूर गुणगंभीर। शास्त्रवेत्ता अति चतुर। समयोचित जाणोनि विचार। निधडा वीर हनुमंत ॥ ३६ ॥ उल्लासोनि प्रजापती। आदरें स्तवोनि मारुती। अत्यंत कपीची ख्याती। पत्र प्रीतीं दिधलें ॥ ३७ ॥ तेंचि ब्रह्मपत्र घेवोनि हातीं। उल्लासें उडोनि मारुती। वंदोनियां सीता सती। वानरांप्रती स्वयें आला ॥ ३८ ॥ जांबवंतें पुसतां ख्याती। ब्रह्मलिखित दिधलें हातीं। रिसासी नव्हे अर्थप्राप्ती। पडली गुंती गुणगुणित ॥ ३९ ॥ लक्ष्मणासीं वाचकशक्ती। तो तंव शेषावतारमूर्ती। कां अर्थ जाणे श्रीरघुपती। येरांची युक्ति सरेना ॥ १४० ॥ जांबवंताची बुद्धि कैसी। अर्थ न कळे आपणासी। कळों नेदीच वानरांसी। युक्ति विशेषीं चालविली ॥ ४१ ॥ ब्रह्मलिखित संपूर्ण। श्रीरामावांचोन आपण। वाचितां लागे दूषण। पत्र घेवोन तेथें जावें ॥ ४२ ॥ बैसवोनि श्रीराममूर्ती। बैसवोनि सुग्रीव कपिपती। पत्र देवोनि सौमित्राप्रती। अर्थयुक्तीं वाचावें ॥ ४३ ॥ युक्ति मानली समस्तां। शुद्धि सांगोनियां सीता। अवश्य भेटावें श्रीरघुनाथा। मग पत्रार्था वाचावें ॥ ४४ ॥ ऐसा करोनि संप्रधार। उठिला वानरांचा भार। अवघीं केला जयजयकार। श्रीरामचंद्र लक्षोनी ॥ ४५ ॥ एका जनार्दना शरण। हनुमंतासी रामदर्शन। आनंदें ओसंडलें गगन। सुखसंपन्न श्रीराम ॥ ४६ ॥ वाचितां ब्रह्मलिखितार्थ। उल्लासेल श्रीरघुनाथ। वानरां उल्लास अद्भुत। तो कथार्थ अवधारा ॥ ४७ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां सीताशुद्धिहनुमदागमनं नाम त्रयोविंशतितमोऽध्यायः ॥ २३ ॥ ओंव्या ॥ १४७ ॥ श्लोक ॥ ३५ ॥

अध्याय चोविसावा

॥ श्रीजगद्गुरवे नमः ॥

सर्वथा सीतया दग्धस्तपसा स निशाचरः।
निमित्तमात्रं रामस्तु वधे तस्य भविष्यति ॥ १ ॥
तस्य तद्वचनं श्रुत्वा वालिसूनुरभाषत।
जाम्बवत्प्रमुखान्सर्वान्हनुमंतं महाकपिम् ॥ २ ॥
अहं तं रावणं संख्ये ससैन्यं स पुरःसरम्।
सहपुत्रं वधिष्यामि ससुहृद्बांधवं युधि ॥ ३ ॥

१ पराक्रमी. २ लपवूं नये. ३ स्वपराक्रम. ४ सोबती. ५ अस्वलाला (जांबवानाला). ६ विचार. ७ समुदाय. ८ भरलें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

किं पुनः सहितो वीरैर्बलवद्भिः कृतात्मभिः ।
लंकां च त्वरया हंतुं रावणं च बलोत्कटम् ॥ ४ ॥

हनुमंत सांगे वीरांप्रती । सीता तपस्विनी श्रीरामसती । तिनें राक्षसांची वीर्यशक्ती । नेली भस्मांतीं कोपाग्नीं ॥ १ ॥ रावणाची शक्ति तेजोराशी । सीतेनें भस्म केलें त्यासी । राम निमित्त मारावयासी । रावणासी रणरंगीं ॥ २ ॥ सीताक्षोभें दशानन । जळोन भस्म जाहला जाण । पतीस यश दिधलें पूर्ण । रामें रावण मारिला ॥ ३ ॥ सीता जाळी श्रीराम मारी । ऐसेनि राक्षसांची बोहरी । क्षणें होईल लंकेमाझारी । सांगे वानरीं हनुमंत ॥ ४ ॥ ऐकोनि हनुमंताचें वचन । अंगदा आलें अति स्फुरण । सीतेनें जाळिला दशानन । मारितां आपण भय काय ॥ ५ ॥ एकला एक मी अंगदु । छेदोनि रावणाचा कंदु । स्वजन सुहृद सखे बंधू । करीन वधू ससैन्येंसीं ॥ ६ ॥ सखा सुहृद वीर जगजेठी । तुम्हीं राखिल्या माझी पाठी । ते मी लंकेच्या त्रिकूटीं । राक्षसकोटी मारीन ॥ ७ ॥ कुंभकर्णेसीं दशवक्त्र । इंद्रजितासहित राजपुत्र । प्रधान मारीन सर्वत्र । सैन्यसमुद्र मंथीन मी ॥ ८ ॥ हनुमंतें मारिले वीर समर्थ । इंद्रजित केला मेला ना जित । रावणा केलें हताहत । असे धुकधुकित वांचला ॥ ९ ॥ हनुमंतासमवेत । आम्हीं गेलिया पैं तेथ । धाकेंचि मरतील समस्त । लंकानाथ तो किती ॥ १० ॥ रणीं मारोनि रावण । सीता घेवोनि आपण । यावें विजयेंसीं गर्जोन । गुढी उभवून स्वानंदें ॥ ११ ॥ पुढें ठेवोनियां सीता । श्रेष्ठ भेटी श्रीरघुनाथा । तेणें उल्लास समस्तां । कपिनाथा सुग्रीवा ॥ १२ ॥ सीतेवीण रामापासीं । जावोनि काय सांगावें त्यासी । बहुत दिवस लागले शुद्धीसीं । लाज आम्हांसी भेटतां ॥ १३ ॥ भेटी घेतां रिते हातीं । पहिले रिते आले जुत्पती । तेचि आम्हां हुरो लाविती । कपिपति क्षोभेल ॥ १४ ॥ राम आणि लक्ष्मण म्हणती । करंटी वानरांची शक्ती । ऐसी पावों उपहती । माझी विनती नायकतां ॥ १५ ॥ जाहलें मर्यादोल्लंघन । त्यावरी रितें जाऊन । तेव्हां सुग्रीव क्षोभोन । जाण । करील अपमान तो ऐका ॥ १६ ॥ काळें वदन खरारोहण । उपानहमाळांचें भूषण । गोमयसुमनीं अभिषिंचन । स्तुतिस्तवन फाल्गुनाचें ॥ १७ ॥ तुम्हां वानरां समस्तां । माझें लोटांगण आतां । सीतेवांचोनि सर्वथा । भेटी रघुनाथा न जावें ॥ १८ ॥ तेथें सहावा अपमान । याहूनि लंकेसी जाऊन । ससैन्य रावण निर्दाळून । सीता घेऊन शीघ्र यावें ॥ १९ ॥ ऐसें बोलतां अंगदासीं । अति स्फुरण आलें त्यासी । रोमांच थरकती सर्वांगासीं । पुच्छ आकाशीं तळपत ॥ २० ॥ रणआवेश अंगदातें । देखतां आलिंगिलें हनुमंतें । वीर शूर पुरुषार्थें । जांबुवंतें वंदिला ॥ २१ ॥ वानर लागोनि पायांसी । शांत करिती युवरायासी । जांबुवंतें अति युक्तीसीं । अंगदासी समजाविलें ॥ २२ ॥

अंगदस्य वचः श्रुत्वा जांबवान्वाक्यमब्रवीत् ।
नैषा बुद्धिर्महाबाहो यां ब्रवीषि महाकपे ॥ ५ ॥
विचेतुं वयमाज्ञप्ता दक्षिणां दिशमुत्तमाम् ।
नानेतुं कपिराजेन नैव रामेण धीमता ॥ ६ ॥
सर्वेषां कपिमुख्यानां कथं मिथ्या करिष्यति ॥ ७ ॥

अंगदाचें प्रतापवचन । जांबुवंतें आयकोन । त्यासी द्यावया समाधान । पूर्वप्रस्थान अनुवादे ॥ २३ ॥ आम्हांसी धाडितां दक्षिणेसी । श्रीरामसुग्रीवाज्ञा ऐसी । तुम्हीं आणावें सीताशुद्धीसी । मर्यादेसीं मासांतीं ॥ २४ ॥ मारोनियां रावणासी । शीघ्र आणावें सीतेसी । श्रीरामाज्ञा नाहीं ऐसी । नाहीं नेमेंसीं राजाज्ञा ॥ २५ ॥ रावण मारितां आज्ञेवीण । श्रीराम क्षोभेल आपण । सुग्रीव कोपेल दारुण । तेंही कारण अवधारीं ॥ २६ ॥ श्रीरामें वाहिलीसे आण । स्वहस्तें विंधोनियां बाण । रणीं मारोनि रावण । सीता आपण सोडवूं ॥ २७ ॥ तो आम्हीं मारोनि रावण । सीता आणितां आपण । आम्हीं भंगितां रामपण । तिघे जण क्षोभती ॥ २८ ॥ मिथ्या करितां श्रीरामपण । सुग्रीव कोपेल दारुण । कोपा चढेल लक्ष्मण । श्रीराम पूर्ण क्षोभेल ॥ २९ ॥ रावण जरी मारूं येता । तरी कां हनुमंत सोडिता । निर्दळोनि

१ दहा तोंडांचा (रावण). २ नाश. ३ मूळ. ४ लाज. ५ विटंबना. ६ जोड्यांच्या माळांचें. ७ शेणमारानें. ८ पूर्वी ठरलेली गोष्ट. ९ सांगूं लागला. १० महिन्याचे अखेरीला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

लंकानाथा । सीता आणिता निमेषार्धें ॥ ३० ॥ धन्य हनुमंताचें ज्ञान । श्रीराममर्यादा पाळून । यालागीं न मारीच रावण । आला घेऊन शुद्धीसी ॥ ३१ ॥ ऐसा निश्चयो ऐकतां । अंगदें वंदिलें जांबुवंता । वीर शूर विवेकी ज्ञाता । तुजंपरता असेना ॥ ३२ ॥

तस्माद्गच्छामहे सर्वे यत्र रामः सलक्ष्मणः ।
सुग्रीवश्च महातेजाः कार्यस्यास्य निवेदने ॥ ८ ॥
बाढमित्येव चोक्त्वा वै प्रस्थानं समरोचयन् ।
प्रतस्थिरे ततः सर्वे वायुपुत्रपुरस्सराः ॥ ९ ॥
महेंद्राद्रिं परित्यज्य पुप्लुवुर्वानरोत्तमाः ॥ १० ॥

जांबुवंताचे वचनमेळीं । शुद्धि सांगावया जनकबाळी । शीघ्र जावया रामाजवळी । पिटिली टाळी वानरीं ॥ ३३ ॥ पुढें करोनि हनुमंत । अंगदादि वीर समस्त । रामनाम स्वयें गर्जत । भुभुःकारत उठावले ॥ ३४ ॥ आधीं वंदोनि श्रीरामासी । सवेंच वंदोनि लक्ष्मणासी । लोटांगण सुग्रीवासी । सीताशुद्धीसी सांगावया ॥ ३५ ॥ त्यजोनिया महेंद्रगिरी । उड्डाण केलें पैं वानरीं । एकाहूनि एकवरी । वीर अंबरीं दाटले ॥ ३६ ॥ हस्तचित्रांचें आभाळ । जेंवी आच्छादी रविमंडळ । तैसे वानर सकळ । उतावीळ चालिले ॥ ३७ ॥ उड्डाण करितां वानरीं । पर्वत खचती धरणीवरी । समूळ उपडोनि तरुवरीं[३] । गगनांतरीं परिभ्रमती ॥ ३८ ॥ करीत उल्लासें आल्हाद । कपिकुळें चाललीं विविध । पुढें मधुवनाचा गंध । आला सुगंध वानरां ॥ ३९ ॥ गंध येतां नासापुटीं । एक वानर लाळ घोटी । एक मटमटा देती मिठी । वानरकोटी तळमळिती ॥ ४० ॥ हें तंव सुग्रीवाचें वन । यासीं दधिमुख नित्य रक्षण । येथें रिघों शके कोण । काय आपण करावें ॥ ४१ ॥ सीताशुद्धीहोनि देख । आम्हां मधुवन अधिक । कृपा करीं रघुकुळटिळक । एकमेक तळमळिती ॥ ४२ ॥ राम सर्वात्मा सर्वज्ञ । ऐसीं वदती पुराणें । आम्हां दिधलिया मधुपान । आम्ही सर्वज्ञ सत्य मानूं ॥ ४३ ॥ जिभेनें घेतली लोळणी । थायां घेतला होठीं दोन्ही । मुख करताहे ग्लानी । मधुपानीं श्रीरामा ॥ ४४ ॥ सुग्रीवाचें मधुवन । सुरां असुरां अगम्य स्थान । ये वनींचें मधुपान[६] । कैंवी आपण पाविजे ॥ ४५ ॥ मनासीं मधुपानीं वणवण । चित्तासीं मधुपानीं चिंतन । केल्यावीण मधुपान । पुढें मन ढळेना ॥ ४६ ॥ ऐसे वानर समस्त । मधुपानीं अति आसक्त । कृपा करील रघुनाथ । तैंचि प्राप्त होय आम्हां ॥ ४७ ॥ राम सर्वांचे हृदयवासी । वानरां बुद्धी दिधली कैसी । प्रार्थोनियां हनुमंतासी । अंगदापासीं मागावें ॥ ४८ ॥ सुग्रीव कपिराजा प्रसिद्ध । तैसाचि युवराजा अंगद । हनुमंतें मागतां मद्य । देईल आल्हादेंकरोनी ॥ ४९ ॥

ततस्ते वानरा हृष्टा दृष्ट्वा मधुवनं महत् ।
हनुमतमयाचंत जांबवत्प्रमुखास्तथा ॥ ११ ॥
स चांगदमुपागम्य अयाचत तदा मधु ।
सिद्धार्थानां किलास्माकं प्रसादं कर्तुमर्हसि ॥ १२ ॥
श्रुत्वा हनूमतो वाक्यमंगदः प्रवरांगदः ।
प्रत्युवाच महातेजाः पिबंतु हरयो मधु ॥ १३ ॥
अवश्यं कृतकार्यस्य वाक्यं हनुमतो मया ।
अकार्यमपि कर्तव्यं किमंग पुनरीदृशम् ॥ १४ ॥
ततः कुमारस्तान्सर्वान्जांबवत्प्रमुखान्हरीन् ।
अनुज्ञामददात्तेषां निःशंकं मधुभक्षणे ॥ १५ ॥

जांबवंतादि वानरांसीं । अवघे आले हनुमंतापासीं । आम्हांसी मधु भक्षावयासी । अंगदापासीं वन मागें ॥ ५० ॥ हनुमंत म्हणे अंगदासी । काहीं एक मागणें तुजपासीं । तूं तंव युवराज आम्हांसी । अति कृपेसीं मज देईं ॥ ५१ ॥ अंगद म्हणे हनुमंता । तुझेनि बोलें देईन जीविता । इतर अर्थाची कोण कथा । सांग पां आतां काय देऊं ॥ ५२ ॥ वानर पीडले परदेशीं । श्रमले येतां अति वेगेंसीं । मागताती मधुपानासी । तुजपासीं महाराजा ॥ ५३ ॥ माझ्या पित्याचें हें वन । सत्ता आहे मजअधीन । वनीं रिघोनि वानरगण । करोत मधुपान यथेष्ट ॥ ५४ ॥ बाळवृद्धादि अकर्मवंत । त्यांसी न मागतां राय देत । दीनदयाळबिरुदें पढत । तुम्ही समस्त कृतकार्य ॥ ५५ ॥ तुम्हांसही न मागतां । म्यां अर्पावें निजजीविता । कायसी मधुवनाची कथा । हनुमंताचे निजबोलें ॥ ५६ ॥ ऐक हनुमंता सावधान । वाहतों श्रीरामाची आण ।

१ तुरुयाहून. २ बोलण्यावरून. ३ मोठमोठ्या वृक्षांवर. ४ नाकामध्यें. ५ छंद, हट्ट. ६ मद्यपान.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वानरीं आलोडोनि वन । मधुपान करावें ॥ ५७ ॥ जांबवंतादि वीर प्रसिद्ध । आलिंगी कनकांगदी अंगद । हनुमंताचें वंदोनि पद । करावें विविध मधुपान ॥ ५८ ॥ ऐकोनि अंगदाचें वचन । उल्लासले वानरगण । आक्रमोनियां तें वन । मधुपान मांडिलें ॥ ५९ ॥

पूजयित्वांगदं सर्वे यूथपालाश्च यूथपाः ।
ते प्रविष्टा मधुवनं पालानाक्रम्य शक्तितः ॥ १६ ॥
ते ताडयंतः शतशः सक्ता मधुवने तदा ।
त्रासयित्वा तु तान्सर्वान्वनपालान्बलोत्कटाः ॥ १७ ॥
मधूनि द्रोणमात्राणि भक्षयंति प्रहृष्टवत् ।
लोडयंति स्म शतशः सर्वं मधुवनं तदा ॥ १८ ॥
भक्षयंति सुगंधीनि मधूनि रसवंति च ।
जग्मुः प्रहर्षं ते सर्वे बभूवुश्च मदोत्कटाः ॥ १९ ॥

अंगद वीर धीर महाशूर । राजकुमर अति उदार । जुत्पती श्रेष्ठ सेनाधर । सहित वानर वानिती ॥ ६० ॥ धन्य अंगदाची मती । धन्य अंगदाची स्थिती । अंगदाची उदार कीर्ती । स्वयें वानिती वानर ॥ ६१ ॥ लाहोनि अंगदआज्ञापन । वनीं रिघोनि वानरगण । केलें वनकरांसी ताडण । जानुअपानमहामारू ॥ ६२ ॥ नाहीं घेतले तोंडावरी । नाहीं मारिले बुक्यावरी । गांडगुडघ्याचे महामारीं । वनकर बाहेरी घातले ॥ ६३ ॥ जानुअपानमारासाठीं । राखणे पळती बारा वाटीं । पळतां धाप लागली पोटीं । सांगती गोष्टी दधिमुखा ॥ ६४ ॥ पळवोनियां वनकर । वन आलोडिती वानर । मधु प्राशिती अति मधुर । देती वारंवार महामिटक्या ॥ ६५ ॥ प्रत्येक एक एक वानर । मधु प्राशिती द्रोणमात्र । मदें डुल्लती कपींद्र । वन समग्र व्यापोनी ॥ ६६ ॥ किराणें करिती तरुवरीं । एक उडती एकाचे शिरीं । एक लपती शाखांतरीं । एक वृक्षाग्रीं नाचती ॥ ६७ ॥ एक निजती वृक्षमूळीं । एक त्यांच्या पुच्छातळीं । घालिती मद्याची गुरळी । मदविव्हळीं उन्मत्त ॥ ६८ ॥ वानर तृप्त मद्यपानीं । उर्वरित मद्य घेउनी । खेळती मद्याचीं शिंपणीं । आक्रमूनी येरयेरां ॥ ६९ ॥ येरयेरां पुच्छ हाणिती । येरयेरां पाठीं लागती । एक पडती अडखळती । एक लोळती उन्मादें ॥ ७० ॥

खादंति केचिद्विहरंति केचित्
नदंति केचित्प्रवदंति केचित् ।
गायंति केचित्प्रणमंति केचित्
क्रुद्धचंति केचित्प्रलपंति केचित् ॥ २० ॥
पठंति केचित्प्रचरंति केचित्
प्लवंति केचित्प्रपतंति केचित् ।
पिबंति केचित्प्रवदंति केचित्
नृत्यंति केचित्प्लवंगाः प्रहृष्टाः ॥ २१ ॥

एक ते मधुपाना करिती । एक ते कोरिंबिरींसीं मद्य खाती । एक एकाचें मद्य हरिती । पात्र घेती हिसडोनी ॥ ७१ ॥ एक रडती एक पडती । एक ते ठायीं ठायीं अडखळती । एक ते मद्यानंदें नाचती । एक ते गाती रामकथा ॥ ७२ ॥ एक ते रागें रुसती । एक त्यांतें बुझाविती । एक मद्यसुखें सुखावती । एक डुलती मदोन्मादें ॥ ७३ ॥ एक उन्मादेंका वृत्ती । अति दीर्घ हांका देती । एक ते गोड गोष्टी सांगती । विध्वंसिती वन एक ॥ ७४ ॥ वृक्ष मोडिती वानरें । उलंडिती मद्यपात्रें । फोडिती मद्यसाधकयंत्रें । वनचरें उन्मादें ॥ ७५ ॥ वानरीं त्रासिले वनपाळ । दुःखें पळाले ते सकळ । दधिमुखापासीं केवळ । आले विव्हळ अति दुःखी ॥ ७६ ॥

अब्रुवन्परमोद्विग्ना गत्वा दधिमुखं तदा ।
तारांगदहनूमद्भिर्हतं मधुवनं कपे ॥ २२ ॥
वयं विकृष्टा जानुभ्यां देवमार्गं च दर्शिताः ।
यदत्रानंतरं कार्यं तच्च कर्तुमिहार्हसि ॥ २३ ॥

आमचे वानरवीर समस्त । मधुवनातें विध्वंसित । आम्हांसी निवारितां तेथ । दुःखाभिभूत आम्हां केलें ॥ ७७ ॥ लाता बुक्या सुबद्ध घाये । त्या घायांचें भय काये । शिळा शाळ ताळ येतां पाहें । झेलिलें जाय तळपोनी ॥ ७८ ॥ हाणितां नेटें जानु अपान । गुदें आलीं गा सुजोन । जळो तुझें मधुवन । गुदकंदन कोण सोसी ॥ ७९ ॥ गांडगुढघ्याचा आघात । पुच्छें रिघालीं दुंगांत ।

१ शोधून धुंडून. २ युद्धांतील मुख्य. ३ अंगदाची आज्ञा. ४ उज्या. ५ अडवून. ६ समजाविती. ७ मदोन्मत्त होऊन. ८ दुःखपीडित. ९ जोराचे.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

दधिमुखासी दुःख सांगत। सुजलीं दावित निजगुदें ॥ ८० ॥ तूं तंव आमचा गा नाथ। दुःख सांगितलें समस्त। यावरी जो कार्यार्थ। कर्तव्यार्थ विचारीं ॥ ८१ ॥

तदा दधिमुखः क्रुद्धो वृद्धो मधुवनाधिपः।
हतं मधुवनं श्रुत्वा हतांश्च वनपान्हरीन् ॥ २४ ॥
एत गच्छत गच्छामो वानरानतिदर्पितान्।
बलेन वारयिष्यामि प्रभुंजानान्मधूत्तमम् ॥ २५ ॥
श्रुत्वा दधिमुखस्येदं वचनं वानरर्षभाः।
पुनर्वीरा मधुवनं तेनैव सहिता ययुः ॥ २६ ॥

ऐकोनि वानरांचें वचन। दधिमुख क्रोधायमान। वानरसैन्य आश्वासून। आले परतोन मधुवना ॥ ८२ ॥ अंगद हो कां राजसुत। हनुमंत हो कां अति आप्त। राजाज्ञा जे उल्लंघित। तेही समस्त दंडीन ॥८३॥ वालिसुग्रीवांचा पिता। ऋक्षराजा-दार्[१]भ्यता। मी या वनाचा रक्षिता। कपी समस्तां कळलेंसे ॥ ८४ ॥ त्याही मज न पुसतां। राजाज्ञाही न घेतां। केली मधुवनासीं उद्धतता। त्यां समस्तां दंडीन ॥ ८५ ॥ ऐसें सांगोनि वनकरांसी। क्रोध आला दधिमुखासी। दंडिलें माझ्या सेवकांसी। मीही त्यांसी दंडीन ॥ ८६ ॥

ते स्वामिवचनं वीरा हृदये संनिधाय च।
हरयः संप्रधृष्यंतः शालतालशिलायुधाः ॥ २७ ॥
मध्ये चैषां दधिमुखः प्रगृह्य च महातरुम्।
समभ्यधावन्वेगेन ते च सर्वे प्लवंगमाः ॥ २८ ॥
वृक्षस्थाश्च स्थलस्थाश्च वानरा बलदर्पिताः।
अतिचक्रमिरे वीरान्पालान्शतसहस्रशः ॥ २९ ॥
सवृक्षं तं दधिमुखमापतंतं महाबलम्।
वेगवंतं विजग्राह बाहुभ्यां कुपितोऽगदः ॥ ३० ॥
मदांधो न कृपां चक्रे आर्य कोऽयं ममेति सः।
अथैनं निष्पिपेषाशु वेगेन वसुधातले ॥ ३१ ॥

ऐकोनि दधिमुखाचे बोल। वानरवीर वनपाळ। घेवोनि शिळा शाळ ताळ। सन्[३]द्ध सकळ चालिले ॥ ८७ ॥ गांडी सुजल्या गांडगुढघ्यांसीं। तो राग वनकरांचे मानसीं। घेवोनि आले दधिमुखासी। वानरांसी त्राहाटिलें ॥ ८८ ॥ जळस्थ स्थळस्थ वनस्थ। वानर सुग्रीवासीं भयभीत। अंगदापासीं आले धांवत। दुरोनि दावित दधिमुखा ॥ ८९ ॥ मध्यें दधिमुख वीर। हातीं प्रचंड शाळ तरुवर। भोंवता वानरांचा भार। अति दुर्धर लोटला ॥ ९० ॥ जांबवंतासीं समानबळी। दधिमुख जो आर्[४]तुर्बळी। वृक्ष घेवोनि करतळीं। करी खं[५]दळी वानरां ॥ ९१ ॥ सुग्रीवआज्ञा अति समर्थ। मधुवन केलें हताहत। दधिमुख धाडिला दंडार्थ। कपि सांगत अंगदा ॥ ९२ ॥ दधिमुख अविचार। अंगद हनुमंतादि बळी वीर। यांचा न घेतां विचार। कोपें तरुवर सोडिला ॥ ९३ ॥ तमालवृक्ष येतां वरी। अंगद उडोनि ते अवसरीं। वृक्ष झेलिला वरिचे वरी। सवेंच मारी दधिमुखा ॥ ९४ ॥ अंगद कोपला महावीरू। मदोन्मत्त अति दुर्धरू। पित्याचा मातुळ नये मारूं। हाही विचारू विसरला ॥ ९५ ॥ दधिमुख कपि वृद्[६]धता। परम पूज्य अति श्रेष्ठता। हेंही नाठवे अंगदाचे चित्ता। क्रोधोन्मत्तता मारिला ॥ ९६ ॥

स भग्नबाहूरुमुखो विह्वलः शोणितोक्षितः।
प्रमुमोह महावीर्यो मुहूर्तं कपिकुंजरः ॥ ३२ ॥
स कथंचिद्विमुक्तस्तैर्वानरैर्वानरर्षभः।
उवाचैकांतमागत्य स्वान्भृत्यान्समुपागतान्।
तत्र गच्छत गच्छामो भर्ता नो यत्र वानरः ॥ ३३ ॥

दधिमुखें हाणितां तरुवरीं। अंगदें झेलिला वाम[७]करीं। दधिमुख हाणोनि सव्यकरीं। धरणीवरी पाडिला ॥९७॥ हात पाय अव्यवस्थ विकळ। भग्न मस्तक नेत्र विक्राळ। अ[८]शुद्धें जाला बंबाळ। मुख विक्राळ विचकिलें ॥ ९८ ॥ दधिमुख उचलोनि वानरीं। टाकिला मधुवनाबाहेरी। उदक सिंपिजे वानरीं। वारा वनकरीं घालिजे ॥ ९९ ॥ दधिमुख सावध झाला। सांगे वनकरां सकळां। सुग्रीवापासीं सांगों चला। आम्हांसी केला अपमान ॥ १०० ॥ ऐसें सांगोनि वनकरांसी। दधिमुख उडाला आकाशीं। निमि[९]षें आला सुग्रीवापासीं। वनकरांसीं समवेत ॥ १ ॥ श्रीराम स्वामी आणि सौमित्र। उभे वानर जोडोनि कर। सुग्रीव बैसला कपिराजेंद्र। आज्ञा दुर्धर जयाची

१ ऋक्षराजापासून. २ वनरक्षक. ३ सज्ज होऊन. ४ पराक्रमी. ५ नाश. ६ वृद्ध असल्यामुळें. ७ डाव्या हातानें. ८ रक्तानें. ९ क्षणांत.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ २ ॥ आज्ञा उल्लंघिल्या अणुप्रमाण । दंड करी अति कठीण । नाक कान सरकडून । खरारोहण तत्काळ ॥ ३ ॥

ततो मूर्ध्ना निपतितं वानरं वानरर्षभः ।
दृष्ट्वैवोद्विग्नहृदयो वाक्यमेतदुवाच ह ॥ ३४ ॥
उत्तिष्ठोत्तिष्ठ कस्मात्त्वं पादयोः पतितो मम ।
अभयं ते प्रदास्यामि सत्यमेवाभिधीयताम् ॥ ३५ ॥

दधिमुख रडत उकसाबुकसीं । आडवा पडला सुग्रीवापासीं । वानरें दिधलें अपमानासी । पारपत्यासी करीं तया ॥ ४ ॥ सुग्रीव बोलिला वचन । तुज दिधलें अभयदान । कोणें वानरें कैसा अपमान । विशद करून मज सांगें ॥ ५ ॥ दधिमुख दुःख सांगत । अंगदादि हनुमंत । मधुवनातें विध्वंसित । मधु भक्षित राजपेयें ॥ ६ ॥ ऋक्षराज तुझा पिता । तैंपासोनि वन रक्षिता । वनावरी माझी सत्ता । तुजही मागतां मी न देईं ॥ ७ ॥ तुझी राजाज्ञा न घेतां । आणि मजही न पुसतां । केलें मधुवनविघाता । मद्यपानीं उन्मत्त ॥ ८ ॥ स्वादु सुगंध राजपान । वानरीं करीं करितां भक्षण । राजाज्ञा करावया दंडण । कोपें धांवोनि मी गेलों ॥ ९ ॥ अंगदें मज उपमर्दोन । वनीं सांडिलें मूर्च्छापन्न । वनकरां आघात जानुअपानें । गुदें सुजवोन सोडिलें ॥ ११० ॥ वनकर वीर असंख्यात । सघृत तेलें गुद शेकीत । निंदापमानें अति गांजित । शरणागत तुज आलों ॥ ११ ॥ तूं स्वामी असतां शिरीं । आम्ही गांजिलों ऐसियापरी । आमचा होवोनि कैवारी । स्वयें उद्धरीं राजाज्ञा ॥ १२ ॥ राजाज्ञेचें राहे बिक[३] । आमचें निरसे निजदुःख । ऐसी उद्धतां लावीं शीक[४] । दधिमुख विनवित ॥ १३ ॥ ऐकोनि दधिमुखाचें वचन । सुग्रीव आणि लक्ष्मण । दोघे वीर विचक्षण । कार्यकारणलक्षक[६] ॥ १४ ॥ क्षुधित तृषित परदेशीं । वानर पीडिले उपवासीं । साधिलें सीताशुद्धीसी । वन भक्षासी तरी दिधलें ॥ १५ ॥ अंगद वीर विचारी वीरश्रेष्ठ । राजपुत्र अति वरिष्ठ । जाणोनि सीताशुद्धीचे कष्ट । मधु यथेष्ट पाजिलें ॥ १६ ॥ साधिली सीताशुद्धि इत्यर्थ । तेणें वानरां अति सामर्थ्य । मधुवनासी विध्वंसित । ऐसा निश्चितार्थ मानिला ॥ १७ ॥ ज्याचें कार्य न साधे जाण । तो सदाचा हीनदीन । मुखींहूनि न निघे वचन । काळें वदन तयाचें ॥ १८ ॥ कार्य न साधे जयासी । मुख दाखवितां लाज तयासी । मुखीं उतरे तया मसी । सामर्थ्य त्यासी असेना ॥ १९ ॥ सीताशुद्धि लाधली खरी । म्हणोनि मधुवनामाझारी । वानरीं केली आपांपरी । मारामारी वनकरां ॥ १२० ॥

जांबवांस्तत्र नेता स्यादंगदश्च महाबलः ।
हनुमांश्च प्रतिष्ठाता न तत्र गतिरन्यथा ॥ ३६ ॥
दृष्टा देवी न संदेहो न चान्येन हनूमता ।
व्यवसायश्च वीर्यं च श्रुतं चापि व्यवस्थितम् ॥ ३७ ॥

जांबवंत मंत्री जेथें । अंगद वीर अत्यद्भुत । सीताशुद्धी केली हनुमंतें । मज निश्चितें मानलें ॥ २१ ॥ हनुमंतें सिद्धी नेलें सकळ । निश्चयें शोधिली जनकबाळ । तेणें विजयी वानर सकळ । बळें प्रबळ हनुमंत ॥ २२ ॥ हनुमंतावांचून । आणिका न साधे सीता चिद्रत्न । सीताशुद्धि साधोनि पूर्ण । मधुवन भक्षिलें ॥ २३ ॥ सीताशुद्धि जाली पूर्ण । सुग्रीव आणि लक्ष्मण । निश्चय करोनि आपण । कृतकल्याण पावले ॥ २४ ॥ सुग्रीव म्हणे दधिमुखासी । तूं तंव परम मूर्ख होसी । न पुसतां हनुमंतासी । त्वां कां त्यासीं युद्ध केलें ॥ २५ ॥ मद्यपानी नव्हे हनुमंत । आणि तो तुझा परम आप्त । त्यासी न पुसतां वृत्तांत । युद्धकंदनार्थ कां केला ॥ २६ ॥ सीताशुद्धि स्वयें साधून । वना आले वानरगण । तिहीं केलें मधुपान । सुखसंपन्न आम्ही तेणें ॥ २७ ॥ तुज जो दिधला अपमान । तो क्षमा करावा मजलागून । अंगदासी तूं भेटोन । समाधान साधावें ॥ २८ ॥ सीताशुद्धि स्वयें साधून । वना आले वानरगण । तेणें दधिमुख हरिखेजोन । केलें नमन सुग्रीवा ॥ २९ ॥ दधिमुख वानर येऊन । अंगदासी घाली लोटांगण । माझा अपराध संपूर्ण । क्षमा आपण करावा ॥ १३० ॥ अंगद म्हणे उन्मादतां । तेव्हां केली अपमानता । तें मज नाठवे गा आतां । क्षमा

१ स्पष्ट. २ राजानें प्यावयाचें असें. ३ तेज, सामर्थ्य. ४ नाहींसें होईल. ५ शिक्षा. ६ कार्यकारण जाणणारे. ७ दुर्दशा. ८ सीतेचा शोध. ९ आनंद पावून. १० प्रमादानें, मस्तीनें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

तत्त्वतां[1] करावी ॥ ३१ ॥ येरयेरां[2] अभिवंदन । येरयेरां आलिंगन । अंगदें दधिमुखासी जाण । समाधान स्वानंदें ॥ ३२ ॥ तुम्ही आलेति सीताशुद्धीसी । परम सुख सुग्रीवासी । शीघ्र बोलाविलें तुम्हांसी । श्रीरामासी भेटावया ॥ ३३ ॥ श्रीरामप्रेम वानरांत । जरी जाले मदोन्मत्त । तरी रामनाम स्मरत । विव्हळित मदभरें ॥ ३४ ॥ एक मद्याचे उन्मत्तीं । रामनामें हांका देती । एक ते रामनामें डुलती । एक म्हणती रामनाम ॥ ३५ ॥ एक मदमोहें अडखळती । एक रामनामें लडबडिती । एक अडखळोनि रामनाम स्मरती । एक उपरमती[3] हरिनामें ॥ ३६ ॥ एक मदमोहें नाचती । एक उन्मादें गीत गाती । गातां नाचतां राम स्मरती । विटाविती रामनामें ॥ ३७ ॥ वानर देखोनि मदोन्मत्त । हनुमान रामकार्यीं उद्यत[4] । वंदावया श्रीरघुनाथ । शीघ्रवत निघाला ॥ ३८ ॥ एका जनार्दना शरण । हनुमंतासी रामदर्शन । पुढें अति गोड निरूपण । सावधान अवधारा ॥ १३९ ॥

स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां वानरमधुवनविध्वंसो नाम चतुर्विंशतितमोऽध्यायः ॥ २४ ॥ ओंव्या ॥ १३९ ॥ श्लोक ॥ ३७ ॥

अध्याय पंचविसावा

॥ श्रीरामचंद्राय नमः ॥ वानर गेले दक्षिणेसी । मर्यादा लोटली तयांसी । कोणी नाणिती सीताशुद्धीसी । श्रीरामासी अति चिंता ॥ १ ॥ मजसीं करूनि एकांत । मुद्रा[5] घेवोनि गेला हनुमंत । तो कां न येचि पां त्वरित । अति सचिंत श्रीराम ॥ २ ॥ हनुमंत कार्यकर्ता । मजही भरंवसा होता । तोही न येचि वाट पाहातां । परम चिंता लागली ॥ ३ ॥ ऐसी श्रीरामाची चिंता । कळों[6] सरली त्या हनुमंता । शुद्धि सांगावया सीता । होय निघता अति शीघ्र ॥ ४ ॥ श्रीरामाची परम चिंता । सांगतां अंगदा जांबवंता । घांसा आड येऊं नये हनुमंता । घेवों दे आतां धणी[7] आम्हां ॥ ५ ॥ वानरें पीडलीं अति दीन । भाग्यें मिळालें मधुपान । त्यांसी तुवां न करावें विघ्न । तूं सज्ञान दीनदयाळ ॥ ६ ॥ विषयरसभोगापुढें । परमार्थ समूळ उडे । वानर मद्यपानें जाले वेडे । श्रीरामाकडे न चलती ॥ ७ ॥ वानर गुंतले मद्यपानांत । मद्यपानें बोधेना परमार्थ । ऐसें जाणोनियां हनुमंत । निघे त्वरित एकाकी ॥ ८ ॥ वानरीं सेविलें मधुपानासी । सीताशुद्धि साधली त्यांसी । निश्चयो मानला सुग्रीवासी । सौमित्रीसी[8] सांगत ॥ ९ ॥ सौमित्रि सुग्रीव अति हर्षेसीं । सीताशुद्धि सांगती रामासी । श्रीरामें देखिलें हनुमंतासी । येतां आकाशीं अति शीघ्र ॥ १० ॥ येतां देखोनि हनुमंता । अति उल्लास श्रीरघुनाथा । धांवोनि आकाशाहीपरता । सीताशुद्ध्यर्था पुसों पाहे ॥ ११ ॥ ऐसें जाणवलें हनुमंता । उठों नेदितां श्रीरघुनाथा । दुरोनि सीताशुद्धीची कथा । होय सांगता तें ऐका ॥ १२ ॥

> दृष्टा सा जनकात्मजा रघुपते युष्मत्प्रसादान्मया
> लंका नाम पुरी समुद्रजठरे तत्रास्ति वीर प्रभो ।
> राहुग्रस्तनिशापतेरिव कला लावण्यहीनप्रभा
> सीता जीवनहेतु किं वद सखे रामामृतं मानसे ॥ १ ॥

उठों नेदितां रघुनाथा । दुरोनि सांगणें हनुमंता । तुझिये कृपें म्यां तत्त्वतां । देखिली सीता जनकात्मजा ॥ १३ ॥ समुद्रामध्यें महागिरी । त्यावरी वसे लंकापुरी । रावणाच्या निजमंदिरीं । सीता सुंदरी रक्षिलीसे ॥ १४ ॥ केवळ नाहीं रावणाघरीं । अशोकवाटिकेंमाझारी[9] । रक्षण विक्राळ खेचरी[10] । त्यांमाझारी जानकी ॥ १५ ॥ एकवस्त्रा भूमिशायी[11] । मलिनांबरा मलिनदेही । मंगलस्नान करणें नाहीं । मस्तकीं पाहीं दृढ जटा ॥ १६ ॥ जैसा तूं श्रीराम जटाधारी । तें व्रत चालवी सीता सुंदरी । स्नेहें[12] दृष्टीचा हातीं न धरी । जटाधारी जानकी ॥ १७ ॥ नेघे अंजनादि चंदन । न करी भोजन रसपान । केवळ तिसी उपोषण । जळप्राशन तीस नाहीं ॥ १८ ॥ नित्यतृप्तीचें अवदान । ब्राह्मणां नेदितां ब्रह्मौदन । सीता न पाहे सर्वज्ञ । निंद्य म्हणोन नातळे[13] ॥ १९ ॥ परपुरुषाचें ध्यावें अन्न । ते परदारा जाली जाण । सीतेनें सांडिलें थुंकोन । जैसें वमन श्वानाचें ॥ २० ॥ रामवियोगाचें अन्न । तें श्वानविष्ठेसमान । रजस्वलेचें[14] रुधिरपान ।

१ खरोखर. २ परस्परांना. ३ समाधान पावतात. ४ तत्पर. ५ मुद्रिका, अंगठी. ६ समजली. ७ इच्छा, तृप्ति.

८ लक्ष्मणाला. ९ अशोकवनांत. १० राक्षसिणी. ११ जमिनीवर निजणारी. १२ तेल. १३ शिवत नाहीं. १४ विटाळशीचें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

तत्समान रसभोग ॥ २१ ॥ तुजवांचोनि श्रीरघुपती । जळ स्पर्शेना ते हातीं । किती सांगों उपपत्ती । सीता सती पतिव्रता ॥ २२ ॥ चंद्रग्रहणीं हीनकळा । तैसी हीन दीन जनकबाळा । स्वयें देखिली म्यां डोळां । वीरवेताळा[1] श्रीरामा ॥२३॥ नेघे अन्न ना जीवन । कैसेनि तिचे वांचले प्राण । श्रीराम पुसे कळवळोन । दीनजनकृपाळु ॥ २४ ॥ निजसखया हनुमंता । कैसेनि वांचली माझी कांता । हें मज सांगावें तत्त्वतां । होत पुसता श्रीराम ॥ २५ ॥ हनुमान अति विचक्षण । सीतासतीनिजजीवन । कैसें सांगेल आपण । सावधान अवधारा ॥ २६ ॥ हृदयीं श्रीराम चिन्मूर्ती । मुखीं रामनाम अहोरात्रीं । राम न्याहाळी सर्वा भूतीं । श्रीराम चित्तीं अहर्निशीं ॥ २७ ॥ राम धराधारक पूर्ण । श्रीराम जीवना जीवन । रविचंद्रां दीप्ति गहन । विराजमान श्रीराम ॥ २८ ॥ श्रीराम वायूचा निजप्राण । श्रीराम गगनाचें चिद्गगन । श्रीराम बुद्धीचें समाधिधन । प्राणपोषण श्रीराम ॥ २९ ॥ श्रीराम अहंसोहंनिमग्न । श्रीराम मनाचें उन्मन । श्रीराम चित्तचैतन्य । जीवा जीवन श्रीराम ॥ ३० ॥ ऐसऐसिया निजस्थिती । मीतूंपणाहोनि परती । सीताजीवन श्रीराममूर्ती । सत्य रघुपती बुद्धि माझी ॥ ३१ ॥ निर्विकल्प[2] भजनविधी । कायावाचामनोबुद्धी । म्यां आणिली सीताशुद्धी । सत्य त्रिशुद्धी[3] श्रीरामा ॥ ३२ ॥ श्रीरामनाम परमामृत । अमृतपानें अमर मरत । रामनाम ज्यासी प्राप्त । मरण मरत त्याचेनि ॥ ३३ ॥ रामनामीं श्रद्धा अढळ । त्यासी बाधेना हळाहळ[4] । पोळूं न शके प्रळयानळ । द्वंद्वें सकळ निर्द्वंद्व ॥ ३४ ॥ ऐसें श्रीरामनामामृत । तेंचि सीतेचें जीवन[5] नित्य । श्रीराम जाणे सत्य सत्य । श्रीरघुनाथ सर्वज्ञ ॥ ३५ ॥ ऐकोनि हनुमंताचें वचन । श्रीरामचंद्र संतोषोन । परमानंदें बाहु पसरोन । दिधलें आलिंगन निजऐक्यें ॥ ३६ ॥ स्वामित्व विसरे रघुनाथ । दासत्व विसरे हनुमंत । परमानंदें सदोदित । जगाआंत कोंदले ॥ ३७ ॥ अहंकोहंसोहंज्ञान । तें समरस गेलें विसरोन । हारपलें मीतूंपण । सुखसंपन्न स्वानंदें ॥ ३८ ॥ दोघे होतां सुखसंपन्न । विरोन गेलें ज्ञानाज्ञान । खुंटला बोल तुटलें मौन । चैतन्य घन कोंदलें ॥ ३९ ॥ दृश्य द्रष्टा आणि दर्शन । ज्ञेय ज्ञाता आणि ज्ञान । ध्येय ध्याता आणि ध्यान । गेलें विरोन स्वानंदीं ॥ ४० ॥ देव देवपणें दाटला । भक्त भावार्थें आटला । परमानंद प्रकटला । [6]तटका तुटला आशेचा ॥ ४१ ॥ भजनआवडीं भावार्थ । भक्तें गिळिला रघुनाथ । नामें गिळिले देवभक्त । मुख्य परमार्थ या नांव ॥ ४२ ॥ ऐसा पावोन परमार्थ । श्रीरामीं भजे हनुमंत । भजनें सदा यशवंत । द्वंद्वनिर्मुक्त हरिभजनें ॥ ४३ ॥ पावोनियां स्वरूपप्राप्ती । ज्यासी अखंड सद्गुरुभक्ती । देव वानिती त्याची कीर्ती । त्यासी वंदिती शिवादि श्रेष्ठ ॥ ४४ ॥ ऐसी दार्ढ्यगी भगवद्भक्ती । भक्तीच्या दासी चारी मुक्ती । भगवद्भजन सर्वां भूतीं । ब्रह्मप्राप्ती हरिनामें ॥ ४५ ॥ ऐसी हनुमंताची स्थिती । भक्ति कीर्ति विनयवृत्ती[9] । तिहीं लोकीं विजयख्याती । सूक्ष्मशांति श्रीरामें ॥ ४६ ॥ सूक्ष्मशांतीचें लक्षण । मारितां कोट्यनुकोटि रण । शांति न मोडे अणुप्रमाण । दुर्जेनविण संग्राम ॥ ४७ ॥ बुद्धिबळाचे खेळाकडे । तेथें मारितां हस्ती घोडे । मारित्यासी हिंसा न घडे । तेणें[10] पाडें संग्राम ॥ ४८ ॥ ऐसी हनुमंताची गती । साधुजन अनुलक्षिती । येरां भासे वानरवृत्ती । दुर्धरशक्ती श्रीरामें ॥ ४९ ॥ हनुमान आणि रघुनंदन । अनन्य भावें पडलें आलिंगन । पूर्ण पावोनि समाधान । जाले अभिन्न देवभक्त ॥ ५० ॥ सीतामस्तकींचा मणी । ठेवोनियां श्रीरामचरणीं । हनुमंत घालोनि लोटांगणीं । कर जोडोनि राहिला ॥ ५१ ॥ वानरसमूह मदोन्मत्त । पुढें गेला हनुमंत । अंगद नळ नीळ जांबवंत । हा वृत्तान्त नेणती ॥ ५२ ॥ हनुमंतें वंदोनि रघुनाथ । सांगोनि सीतेचा वृत्तान्त । सवेंचि मधुवनांत । पूर्वस्थित तैसाचि ॥ ५३ ॥ जावोनि आला हनुमंत । हें नेणे अंगद जांबवंत । इतरांची कायसी मातें[11] । कपिवृत्तान्त जाणावया ॥ ५४ ॥ सुग्रीव सौमित्रीस[12] सांगत । आम्हां देखतां आला हनुमंत । सांगतां सीतेचा वृत्तांत । श्रीरघुनाथ आलिंगी ॥ ५५ ॥

१ वीरश्रेष्ठा. २ विकल्परहित. ३ निश्चयेंकरून. ४ विष. ५ आधारस्थान. ६ संबंध. ७ वर्णन करितात. ८ मोठी.

९ नम्र स्वभाव. १० त्याचप्रमाणें, त्यासारखें. ११ गोष्ट. १२ सुमित्रासुत लक्ष्मणाला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

दोघे देतां आलिंगन । परस्परें जाले लीन[1] । नाहीं देखिलें होतां भिन्न । धन्य महिमान हनुमंता ॥ ५६ ॥ हनुमान नांदे श्रीरामांत । श्रीराम नांदे हनुमंतांत । ऐसी ऐकतांचि मात । पडे मूर्च्छित सौमित्री ॥ ५७ ॥ जैसी रामभक्ति हनुमंतासी । तैसें भजनलक्षण लक्ष्मणासी । एकात्मता त्या तिघांसी । येरयेरांसी[2] अभिन्न ॥ ५८ ॥ ऐसें देखोनि अनन्यभजन । सुग्रीव घाली लोटांगण । श्रीरामें दिधलें आलिंगन । समाधान सुग्रीवा ॥ ५९ ॥ अनन्यभक्तीचा वृत्तान्त । सुखकारी श्रीरघुनाथ । भजनभावें भाविक मुक्त । नामें निर्दोष महादोषी ॥ ६० ॥ एक एक श्रीरामनाम । नामें ब्रह्मप्राप्ति सुगम[3] । चहूं मुक्तींचा उडवोनि भ्रम । नामेंचि परम परमार्थ ॥ ६१ ॥ सुग्रीव सौमित्री तये वेळीं । निंवोनियां[4] सुखकल्लोळीं[5] । परमानंदें पिटोनि टाळी । श्रीरामाजवळी राहिले ॥ ६२ ॥ येरीकडे सीताशुद्ध्यर्थ । स्वयें साधोनि इत्यर्थ । मुख्य करोनि हनुमंत । अंगद समवेत युवराजा ॥ ६३ ॥ दधिमुख येवोनि जाण । घालोनियां लोटांगण । कथा सांगे सुखसंपन्न । सावधान अवधारा ॥ ६४ ॥ सीताशुद्धीपुढें जाण । मधुवन तृणासमान । सुग्रीव बोलिला आपण । जीवें निंबलोण[6] करूं पाहे ॥ ६५ ॥ शरीरचर्माचे मोचे[7] । केलिया उत्तीर्ण[8] नव्हे तुमचें । परम भाग्य अंगदाचें । कपिवंशाचें उद्धरण ॥ ६६ ॥ अंगद कपिवंशमंडण[9] । अंगद कपिवंशभूषण । अंगद कपिवंशतारण । वदला आपण सुग्रीव ॥ ६७ ॥ ऐकतां दधिमुखवचनार्थ । वानरीं स्मरिला श्रीरघुनाथ । श्रीरामनामें गर्जत । उल्हासयुक्त निघाले ॥ ६८ ॥

ततः किलकिलाशब्दं शुश्रावासन्नमंबरे ।
हनूमत्कर्मदृप्तानां नदतां काननौकसाम् ॥ २ ॥
किष्किंधामुपयातानां सिद्धिं कथयतामिव ।
ततः श्रुत्वा निनादं तं कपीनां कपिकुंजरः ॥ ३ ॥
आयतांचितलांगूलः सोऽभवत्तुष्टमानसः ।
आगतास्तेऽपि हरयो रामदर्शनकांक्षिणः ॥ ४॥
अंगदं पुरतः कृत्वा हनूमंतं महाबलम् ।
तेंऽगदप्रमुखा वीराः संहृष्टाश्च मदान्विताः ॥ ५ ॥

नमस्कारावया रघुवीर । गगनीं उसळले वानर । रामनामाचा गजर । केला भुभुःकार महावीरीं ॥ ६९ ॥ हनुमंताची विजयवृत्ती । उल्हासले उपरमले[10] जुत्पंती[11] । नामें गर्जती त्रिजगतीं । किष्किंधेप्रती पातले ॥ ७० ॥ वानरांचा गिरागजर । नादें कोंदलें अंबर[12] । दणाणिलें गिरिकंदर । शैलशिखरें[13] दुमदुमिलीं ॥ ७१ ॥ कपिकुळांची नादोक्ती । नादामाजी सीता सती । भेटों आलीसे आइती । ऐसा रघुपती सुखावे ॥ ७२ ॥ ऐकतां अंगदादिकांचा गजर । सुखावे सुग्रीव कपींद्र । पुच्छ थरकोनि समग्र । केला भुभुःकार वानरीं ॥ ७३ ॥ ऐकोनि सुग्रीवभुभुःकार । किष्किंधाभूतळीं वानर । उतरले पैं समग्र । हर्षनिर्भर उल्हासें ॥ ७४ ॥ श्वेत सुनीळ पीत आरक्त । सुवाससुमनीं सुफळित । अंगदसेनासंभारांत । टके[14] शोभत वृक्षांचे ॥ ७५ ॥ किंशुक[15] फुलले मनोहर । शाल ताल तमाल थोर । विचित्र पताकाअनुकार । तेंवी वानर झेलिती ॥ ७६ ॥ असो वनवृक्षप्रकार । वानरां पुच्छीं शाखा विचित्र । गुढिया उभविल्या समग्र । तेणें अंबर शोभत ॥ ७७ ॥ अंगद युवराज वीर विख्यात । नळ नीळ जांबुवंत । मुख्य मुखरणी हनुमंत । यशवंत त्याचेनि ॥ ७८ ॥ ऐसा अंगदसंभार । शोभा शोभे मनोहर । हर्षें नाचती वानर । करीत गजर नामाचा ॥ ७९ ॥ देखोनि अंगदाचा यावा[16] । सुखसंतोष सुग्रीवा । परम सुख श्रीराघवा । सुख सर्वां अंगदें ॥ ८० ॥ अंगद देखोनियां दृष्टीं । लक्ष्मणासी आनंदकोटी । अति उल्हासें टाळी पिटी । सीता गोरटी साधिली ॥ ८१ ॥ भेटावया श्रीरामचंद्रा । अंगदहनुमंतादि धुरां[17] । उल्हास समस्तां कपींद्रां । बहु वानरां आल्हाद ॥ ८२ ॥

ततः प्रस्रवणं शैलं ते गत्वा चित्रकाननम् ।
प्रणम्य शिरसा रामं लक्ष्मणं च महाबलम् ॥ ६ ॥
युवराजं पुरस्कृत्य सुग्रीवमभिवाद्य च ।
आख्यातुं तत्र सीतायाः प्रवृत्तिमुपचक्रमे ॥ ७ ॥

प्रस्रवणनामें महागिरी । तेथें वस्ती श्रीरामचंद्रीं । वनें काननें[18] साजिरीं । यावा वानरीं तेथें

१ एकरूप. २ एकमेकांना. ३ सोपी. ४ समाधान पावून. ५ आनंदभरांत. ६ ओंवाळणी. ७ जोडे. ८ उतराई. ९ वानरवंशाची शोभा. १० विश्रांति पावले. ११ युद्धांतील प्रमुख वीर. १२ आकाश. १३ पर्वताचीं शिखरें. १४ फांद्या. १५ पळस. १६ आगमन. १७ श्रेष्ठ. १८ रानें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

केला ॥ ८३ ॥ संमुख देखोनि रघुनंदन । स्रवती अश्रुधारा लोचन । अंगदें हनुमंतें संपूर्ण । लोटांगण घातलें ॥ ८४ ॥ मस्तकीं धरिले दृढ चरण । श्रीरामें दिधलें आलिंगन । कोटिजन्मांचें श्रमहरण । दोघे जण पावले ॥ ८५ ॥ सवेंच वंदिला लक्ष्मण । मस्तकीं धरिले त्याचे चरण । सौमित्रीनें दिधलें आलिंगन । कुमित्रपण निमालें[1] ॥ ८६ ॥ सुमित्र जालें निजमन । सुमित्र चित्त चैतन्यघन । सुमित्र जाला अभिमान । मति चिद्घन सुमित्र ॥ ८७ ॥ श्रीरामभजनीं तत्पर । इंद्रियें जालीं सुमित्र । जिव्हा रामनामीं एकाग्र । वाचा सुमित्र स्वयें जाली ॥ ८८ ॥ हरिदासाचें आलिंगन । ऐसें सबाह्य करी पावन । अभागी देखती दोषगुण । सभाग्य पूर्ण सद्भावें ॥ ८९ ॥

संदर्शनमनुष्वंगः संलापः परमं ततः ।
अंगांगसंगकैवल्यमहो सज्जनसंगतिः ॥ ८ ॥

साधूचें जें दर्शन । तेंचि परम अनुष्ठान । साधूचें जें भाषण । तपश्चर्या पूर्ण पूर्णत्वें ॥ ९० ॥ साधूचें चरणस्पर्शन । कैवल्य[2] त्यापुढें तृण । अगाध साधूचे चरण । जेणें पावन महादोषी ॥ ९१ ॥ सज्जनासी आलिंगन । तेणें सर्वांग पावन । देहचि होय चैतन्यघन । कृपा सज्जन जैं करिती ॥ ९२ ॥ साधुसज्जनसंगती । सभाग्य भाग्यातें पावती । सत्संगें भवनिर्मुक्ती[3] । वेदशास्त्रांसी संमत ॥ ९३ ॥ सज्जनांचे पादस्पर्शें । तेणें कर्माकर्म निरसे । जन्ममरण सकळ नासे । त्या रहिवास परब्रह्मीं ॥ ९४ ॥ सौमित्र साधु श्रीरामभक्त । त्यासी आलिंगन पैं देत । अंगद आणि हनुमंत । आनंदभरित स्वयें जाले ॥ ९५ ॥ हातीं धरोनि अंगदासी । हनुमान आला सुग्रीवापासीं । सप्रेम वंदितां तयासी । तोही उल्लासीं आलिंगी ॥ ९६ ॥ सुग्रीव म्हणे हनुमंता । तुझेनि अंगदासी श्लाघ्यता । तूं समस्तांसी जीवदाता । संरक्षिता आम्हांसी ॥ ९७ ॥ जांबुवंतादि वानरवीर । तिंहीं वंदोनि श्रीरामचंद्र । करोनि सुग्रीवासी जोहार[4] । सभा सादर बैसली ॥ ९८ ॥ सीताशुद्धीचा इत्यर्थ । स्वयें पुसे श्रीरघुनाथ । येथोनि कैसा क्रमिला पंथ । समूळ वृत्तान्त मज सांगें ॥ ९९ ॥

ऐसें पुसतां रघुनंदन । हनुमंतें धरिलें मौन । तेव्हां अंगद आपण । सांगे गौण सीताशुद्धि ॥ १०० ॥ घेवोनि स्वामीचें आज्ञापन । शतधा शोधिली दक्षिण । सीताशुद्धीचें लक्षण । अणुप्रमाण न लभेचि ॥ १ ॥ पुढती करावया शोधन । वानरीं केली आंगवण । ब्रह्मशापें उपहत[5] वन । तेथें उड्डाण पडियेलें ॥ २ ॥ नाहीं पाला नाहीं फळपान । शोधितां न मिळे जीवन । वृक्ष ठेले खरकडोन । पडिलें लंघनें[6] वानरां ॥ ३ ॥ दंडी नामा ऋषि समर्थ । वेदशास्त्रसंपन्न त्याचा सुत । विद्यागर्वें अति उन्मत्त । त्याचा केला घात वनदेवतीं ॥ ४ ॥ तो विद्यागर्वें अति उन्मत्त । वादीं ब्राह्मणांसी निर्भर्त्सित । तो ब्रह्मराक्षस जीवें जीत । यालागीं घात भूतीं केला ॥ ५ ॥ जाणोनि पुत्राचें निधन[7] । ऋषीनें शापिलें तें वन । तेथें ज्याचें आगमन । नव्हे निर्गमन[8] प्राणांतीं ॥ ६ ॥ आम्हांसी पडतांचि ते वनीं । प्राण जाते तत्क्षणीं । वांचलों रामनामस्मरणीं । संकटीं रक्षी श्रीराम ॥ ७ ॥ वनीं नाहीं मुंगी मासी । ठाव नाहीं श्वापदांसी । तृणशलाका[9] नाहीं भूमीसी । पडे वानरांसी लंघन ॥ ८ ॥ तें त्यजावया दुष्ट वन । सबळ बळें करोनि किराण[10] । करी तेथेंचि ये उड्डाण । नव्हे निर्गमन ब्रह्मशापें ॥ ९ ॥ त्या ऋषीचा ऋषिसुत । ब्रह्मराक्षस त्या वनाआंत । भक्षूं आला वानरांतें । त्याचा निःपात आम्हीं केला ॥ ११० ॥ हनुमंतादेखतां मरण । ब्रह्मराक्षसा उद्धरण । रामनामाचा प्रताप पूर्ण । जडतारण श्रीरामें ॥ ११ ॥ जालें पुत्राचें उद्धरण । तेव्हां दंडी ऋषी संतोषोन । शापोन्मुक्त केलें वन । हें महिमान हरिभक्तांचें ॥ १२ ॥ जेथें जाती श्रीरामभक्त । तें वन पुण्याश्रम म्हणत । ऐसें अंगद सांगत । सुखें डुल्लत श्रीराम ॥ १३ ॥ ऐकोनि कृपाळु रघुनाथ । सौमित्री स्वानंदें स्फुंदत । वानरसभा पैं तटस्थ । जाला विस्मित सुग्रीव ॥ १४ ॥ वन मुक्त केलें द्विजवरीं । वानरां लंघनें पडलीं भारी । निघवेना वनाबाहेरी । येती लहरी क्षुधातृषेच्या ॥ १५ ॥ हनुमंतें तिये काळीं । वनबिल्ववृक्षातळीं[11] । विवर[12] देखिलें सफळ जळीं ।

१ नाहीसें झालें. २ मोक्ष. ३ संसारापासून मुक्तता. ४ नमस्कार. ५ ओसाड. ६ उपोषण. ७ मरण. ८ परत जाणें. ९ गवताची काडी. १० उड्डाण. ११ वनांतील बेलांच्या झाडाखालीं. १२ भुयार.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

आम्ही ते बिळीं प्रवेशलों ॥ १६ ॥ पुढें करोनि हनुमंत । विवरीं रिघतां समस्त । तेथें मांडला प्राणावर्त । रक्षी हनुमंत श्रीरामतेजें ॥ १७ ॥ विवरीं गुडुप अंधार । स्वयें स्मरेना स्वशरीर । उबेनें निर्बुजले[1] वानर । पडले समग्र अचेतन[2] ॥ १८ ॥ मज अंगदासमवेत । नळ नीळ जांबुवंत । विवरीं अचेतन समस्त । सावधान हनुमंत श्रीरामें ॥ १९ ॥ क्षुधेनें आमचा क्षीण प्राण । तेणें विसरलों रामस्मरण । हनुमंत असे सावधान । सबाह्य पूर्ण श्रीराम ॥ १२० ॥ श्रीराम हनुमंताचा प्राण । सर्वेंद्रियें श्रीराम आपण । श्रीरामतेजें देखणे नयन । अंधारीं पूर्ण देखणा रामें ॥ २१ ॥ निधडा[3] वीर हनुमंत । पुच्छें बांधोनि कपी समस्त । शतयोजनें विवराआंत । नेले मूर्च्छित निजांगें ॥ २२ ॥ पाचारोनि पिता पवन । हनुमान गुज सांगे संपूर्ण । वांचवीं वानरांचे प्राण । रघुनंदनसुखार्थ ॥ २३ ॥ ऐसें सांगतांचि जाण । वानरांसी आला प्राण । अवघे जाले सावधान । वीर देखोन विस्मित ॥ २४ ॥ ते हेमहेमविवरभुवनीं । भेटली सुरसा तपस्विनी । तिनें हनुमंता देखोनी । जाली मनीं विस्मित ॥ २५ ॥ सुरसा पुसे तूं कोण येथ । हनुमान सांगे रामभक्त । विवरीं आलों सीताशुद्ध्यर्थ । समवेत वानरांसीं ॥ २६ ॥ सुरसा म्हणे तुम्ही श्रीरामभक्त । तरीच तुम्हां येववलें येथ । येरांसी हें स्थळ न प्राप्त । मी सनाथ तुमचेनि ॥ २७ ॥ ब्रह्मवरद मज येथ । तुज भेटतील श्रीरामभक्त । तेणें तूं होसील निर्मुक्त । तें भाग्य प्राप्त मज आजी ॥ २८ ॥ विकळ देखोनि वानरांसी । सुरसा ते सज्ञान कैसी । जेणें विश्रांति होय आम्हांसी । त्या उपायासी आदरिलें ॥ २९ ॥ दिधलें विश्रांतिरसपान । जीवन दिधलें स्वानंदघन । सुखस्वादिष्ट फळें संपूर्ण । रामस्मरणेंसीं सेविती ॥ १३० ॥ ग्रासोग्रासीं रामस्मरण । रसपान हरिचिंतन । वानरीं सेवितां जीवन । गडगर्जन नामाचें ॥ ३१ ॥ क्षुधा निमाली नित्यतृप्ती । निद्रा निमाली सुखसंवित्ती । सुखस्वानंदें हेलावती । परम विश्रांती वानरां ॥ ३२ ॥ राननामें तृप्त वानर । नामें कोंदलें विवर । नामें व्यापिलें चराचर । नामें कपींद्र गर्जती ॥ ३३ ॥ नामें कोंदलें वैकुंठपीठ । नामें डुल्लत श्रीनीलकंठ । सुरसेचें भाग्य वरिष्ठ । हनुमंत श्रेष्ठ सभाग्य ॥ ३४ ॥ हरिभक्तांचिया संगतीं । जढ मूढ उद्धरती । सुरसा सभाग्य वानूं[6] किती । हनुमंतीं विश्वास ॥ ३५ ॥ हनुमंतनिष्ठा रामस्मरण । कळिकाळाची बोळवण । नामें जन्ममरणा मरण । नाम परिपूर्ण परब्रह्म ॥ ३६ ॥ वानरां झाली नित्यतृप्ती । सुरसा पावली अति विश्रांती । हनुमंताचिये संगतीं । अवघे डुल्लती स्वानंदें ॥ ३७ ॥ ऐकतां अंगदाच्या गोष्टी । श्रीरामा सुखानुकोटी । हरिखें त्याची पाठी थापटी । स्वानंदपुष्टीं डुल्लत ॥ ३८ ॥ ऐकतां भक्तांची निजकथा । परम सुख श्रीरघुनाथा । त्यांमाजी हनुमंत पढियंता । त्याची कथा अति गोड ॥ ३९ ॥ अंगदासी म्हणे रघुवीर । पुढील सांगें समाचार । आवडे हनुमंताचा पुरुषार्थ थोर । रामा निरंतर ऐकावया ॥ १४० ॥ अंगद म्हणे श्रीरघुपती । वानरां जाली विश्रांती । शोधावया सीता सती । स्वयें पुसती हनुमंता ॥ ४१ ॥ नाहीं रविचंद्रविलासा । विवरीं स्वयंप्रकाशीं ठसा । तेथें लक्षेना दक्षिणदिशा । शुद्धीस धिंवसा काय करूं ॥ ४२ ॥ सुरसा सांगे हनुमंताप्रती । ब्रह्मवरदें गतिनिर्गती । मीच जाणें विवरस्थिती । तुमच्या शक्ती न निघवे ॥ ४३ ॥ सुरसा विनवी हनुमंताप्रती । शुद्धि पावेल सीता सती । यश पावाल परम कीर्ती । सत्य वचनोक्ती हे माझी ॥ ४४ ॥ हनुमान सांगे सुरसेसी । वेगीं काढीं वानरांसी । येरी लागली पायांसी । सांगेन तैसी स्थिति कीजे ॥ ४५ ॥ डोळे उघडे असतां । बाहेरी न काढवे सर्वथा । डोळे झांकिलिया समस्तां । निमेषार्धांत काढीन ॥ ४६ ॥ डोळे झांकितां वानर । पुढें गडगर्जे समुद्र । मागें न दिसे विवर । विस्मयो थोर वानरां ॥ ४७ ॥ डोळे झांकितां वानरीं । ना कडिये ना धरिलें करीं । अवघे विवराबाहेरी । समुद्रतीरीं स्वयें उभे ॥ ४८ ॥ रामनामाचे आवर्ती । सुरसेसहित विवरोन्मुक्ती । वानर विवरातें पाहती । तंव तेथें व्यक्ती[12] लक्षेना ॥ ४९ ॥ असो हे नव्हेचि सीता-

१ कासावीस झाले. २ निश्चेष्ट. ३ धैर्याचा, पराक्रमी. ४ आनंदानुभवानें. ५ उचंबळतात. ६ वर्णूं. ७ परिहार, पाठवणी. ८ आवडता. ९ धैर्य. १० जाणेंयेणें. ११ आवृत्तींनीं. १२ मागमूस.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

शुद्धी । पुढें अडविलें उदधी । मागें जावें तरी लोटला अवधी । वानरमांदी सचिंत ॥ १५० ॥ मागें जातां अपमान । सुग्रीव दंडील दारुण । पुढें समुद्र नव्हे गमन । द्यावया प्राण सिद्ध जालों ॥ ५१ ॥ लक्षोनियां समुद्रतीर । पडतां प्रायोपवेशीं वानर । संपाती पक्षी महाथोर । आला समग्र भक्षावया ॥ ५२ ॥ करोनि बहुकाळ लंघन । मग वानरीं त्यजावा प्राण । श्रीरामें कृपा केली संपूर्ण । सद्यः मरण पक्षिभक्षा ॥ ५३ ॥ व्यर्थ देहो द्यावा समुद्रतीरीं । अति उल्लास वानरीं । देह लागला परोपकारीं । स्मरती गजरीं श्रीरामा ॥ ५४ ॥ होतां श्रीरामनामस्मरण । फिटलें संपातीचें मूढपण । त्यासी उपजलें परम ज्ञान । सावधान अवधारा ॥ ५५ ॥ जेथें श्रीरामनामस्मरण । तेथें कल्पांतीं न रिघे मरण । संपाती घाली लोटांगण । तुम्ही धन्य कोण कोणाचे ॥ ५६ ॥ ज्याचे स्मरणीं श्रीरामनाम । सफळ जन्म सफळ कर्म । सफळ त्याचा देहधर्म । भाग्यें परम भेटलेती ॥ ५७ ॥ श्रीरामनाम स्मरतां येथ । अवघे आलेति किमर्थ । देह त्यागावया उदित । तुम्ही किमर्थ तें सांगा ॥ ५८ ॥ ऐकोनि संपातीचें वचन । अंगद म्हणे करीं भक्षण । संपाती म्हणे सत्य संपूर्ण । न रिघे मरण रामस्मरणें ॥ ५९ ॥ ऐकोनि संपातीचा वृत्तान्त । बोलता जाला हनुमंत । आम्ही श्रीरामाचे भक्त । सीताशुद्ध्यर्थ येथें आलों ॥ १६० ॥ शोधितां दक्षिण समुद्र समग्र । कोठें न भेटे सीता सुंदर । लोटली श्रीराममर्यादामेर । मरणीं तत्पर यालागीं ॥ ६१ ॥ ऐकोनि हनुमंताचें वचन । संपाती जाला हास्यवदन । मज आहे सीतेचें ज्ञान । सावधान अवधारा ॥ ६२ ॥ सिंधुमर्यादा शतयोजन । तेथें आहे लंकाभुवन । त्यामाजी आहे अशोकवन । सीता चिद्रत्न तेथें वसे ॥ ६३ ॥ मज असती पक्षगती । तरी आणितों सीता सती । ऐसें बोलतां संपातीसी । पक्षप्राप्ती पावला ॥ ६४ ॥ सूर्यवरद संपातीसी । भेटलिया श्रीरामभक्तांसी । निर्विकल्प पक्ष पावसी । सीताशुद्धीसी सांगतां ॥ ६५ ॥ निर्विकल्प पक्षप्राप्ती । सांडोनि त्रिगुण गुणवृत्ती । संपाती पावला गुणातीतीं । पुनरावृत्ती खंडली ॥ ६६ ॥ श्रीरामभक्तांसीं संगती । उद्धरले नेणों किती । आतांचि उद्धरला संपाती । धन्य संगती संतांची ॥ ६७ ॥ सिंधुमर्यादा शतयोजन । वानरां न करवे उल्लंघन । एकें उड्डाणें पैं जाण । गेला आपण हनुमंत ॥ ६८ ॥ स्वयें उडतां बळेंचिकरीं । गिरि कडे खचले सागरीं । शिखरें उडविलीं अंबरीं । आपांपरी पशुपक्षियां ॥ ६९ ॥ आम्ही वानर बळवंत । दक्षिणे राहतां होईल अनर्थ । उत्तरभागीं ठेवी हनुमंत । धरोनि पर्वत राहिलों ॥ १७० ॥ हनुमंत उडतां बळेंकरीं । कडे खचले सागरीं । जळ उसळलें अंबरीं । आपांपरी विमानां ॥ ७१ ॥ श्रीरामबाणाचिया गती । सवेग गेला पैं मारुती । जे जे लंकेसी केली ख्याती । तें तें रघुपति पुसावें ॥ ७२ ॥ ऐसें अंगद सांगत । सुखावला श्रीरघुनाथ । त्यासी धरोनि हृदयांत । स्वयें हनुमंत पाचारी ॥ ७३ ॥ एका जनार्दना शरण । हनुमंतप्रताप संपूर्ण । ब्रह्मलिखित अनुसंधान । गोड गहन श्रोत्यांसी ॥ १७४ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां अंगदश्रीरामसंवादो नाम पंचविंशतितमोऽध्यायः ॥ २५ ॥ ओंव्या ॥ १७४ ॥ श्लोक ॥ ८ ॥

अध्याय सव्विसावा

॥ श्रीगजाननाय नमः ॥ स्वमुखें निजकीर्ती । सर्वथा न सांगे मारुती । हें जाणोनि श्रीरघुपती । स्वयें प्रश्नोक्ती चालवित ॥ १ ॥ आदरें पुसे श्रीरामचंद्र । हनुमंता तूं वनचर । कैसेनि तरलासी सागर । सत्य साचार मज सांगें ॥ २ ॥ ऐकोनि श्रीरामाचें वचन । हनुमान घाली लोटांगण । श्रीरामप्रतापमहिमान । समुद्रतरण वानरा ॥ ३ ॥

हनुमदुक्तिः—राम राम तव नामजाप्यतः

पामरा अपि तरंति भवाब्धिम् ।

अंगसंगभवदंगुलिमुद्रा–

भृन्न चित्रमतरत्कपिरब्धिम् ॥ १ ॥

श्रीरामनामाच्या उच्चारें । जड मूढ तरती भवसागर । राममुद्रांकित वानर । तेणें परपार पावलों ॥ ४ ॥ रामनामाचा कडकडाट । भवसमुद्रीं पायवाट । पायरी करोनि वैकुंठ । होती प्रविष्ट परब्रह्मीं ॥ ५ ॥ जे रामनामांकित नर ।

१ ताबडतोब, २ तयार, ३ सूर्याचा वर, ४ मोठी दुर्दशा. ५ गतीप्रमाणें, ६ प्रताप, पराक्रम,

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

त्यांतें बुडवूं न शके सागर। श्रीरामसुद्रांकित वानर। परपार पावलों ॥ ६ ॥ श्रीरामें मुद्रा दिधली हातीं। तेव्हांचि मजला विजयवृत्ती। श्रीराममुद्रेची ख्याती। श्रुति बोलती पुराणें ॥ ७ ॥ श्रीराममुद्रा समुद्रतरण। श्रीराममुद्रा सीतादर्शन। श्रीराममुद्रा रणकंदन। लंकादहन श्रीराममुद्रा ॥ ८ ॥ श्रीराममुद्रा विजयप्राप्ती। लंकाभुवनीं केली ख्याती। आडनांव मी मारुती। अगाध करणी मुद्रेची ॥ ९ ॥ नित्य श्रीरामनामस्मरण। तेथें वीर्य धैर्य कीर्ति कल्याण। ब्रह्म पावती सनातन। तें महिमान स्मरणाचें ॥ १० ॥ जेथें नाहीं श्रीरामस्मरण। अकीर्ति अपयश अकल्याण। नित्य निंद्यत्व पापी पूर्ण। अधःपतन महानरकीं ॥ ११ ॥ यालागीं सांक्षेपें आपण। समूळ सांडावें विस्मरण। नित्य करितां श्रीरामस्मरण। कीर्ति कल्याण निजविजयी ॥ १२ ॥ श्रीराममुद्रानिजप्राप्ती। म्हणती हनुमंताची ख्याती। जें जें केलें लंकेप्रती। ते ते कीर्ति मुद्रेची ॥ १३ ॥ हनुमंताची निजस्थिती। स्वमुखें न सांगे निजकीर्ती। करोनि मुद्रिकेची स्तुती। सांगितली ख्याती श्रीरामा ॥ १४ ॥ हनुमंताचें मनोगत। अंतर्यामीं जाणे रघुनाथ। हृदयीं धरिला आनंदयुक्त। स्वामी सद्भक्त आल्हादी ॥ १५ ॥ हनुमंताची युद्धख्याती। ऐकावया वानरें तळमळती। हें जाणोनि श्रीरघुपती। पुसे पुढती हनुमंता ॥ १६ ॥ श्रीराम म्हणे गा मारुती। समुद्रलंघन लंकाख्याती। तुवां सांगितली कथा निगुती। संकेळितीं अति गौण ॥ १७ ॥

वैदेहीमक्षतां श्रुत्वा रामश्चोत्तरमब्रवीत्।
क्व सीता वर्तते देवी कथं च मयि वर्तते ॥ २ ॥
राक्षसानां त्वया सार्धं कथं युद्धं च दारुणम्।
एतन्मे सर्वमाख्याहि वैदेहीं प्रति वानर ॥ ३ ॥

सीता ऐकोनि अक्षता। संतोष जाला श्रीरघुनाथा। राक्षसांसीं युद्धकंदनार्थ। घडला किमर्थ तें सांगें ॥ १८ ॥ तेचि आतां विशदस्थिती। तुवां सांगावी लंकाख्याती। ऐसें बोलतां श्रीरघुपती। वंदी मारुती श्रीचरण ॥ १९ ॥ स्वमुखें सांगों नये स्वकीर्ती। वंचूं नये स्वामीप्रती। हनुमंतें येचि अर्थी। प्रजापति प्रार्थिला ॥ २० ॥ माझें समुद्रलंघन। लंकेमाजी सीताशोधन। स्वामीनें कृपा करोन। पत्र लिहून मज द्यावें ॥ २१ ॥ तुझे हातींचें ब्रह्मलिखित। देखोनि सीताशुद्धयर्थ। सत्य मानील श्रीरघुनाथ। शीघ्र कार्यार्थ साधेल ॥ २२ ॥ ऐकोनि कपीचें वचन। संतोषला चतुरानन। हनुमंताचें कीर्तिकथन। दिधलें लिहून साद्यंत ॥ २३ ॥ संतोषोनि प्रजापती। पत्र देवोनि हनुमंतहातीं। आलिंगिला अति प्रीतीं। विजयो सर्वार्थी पावसी ॥ २४ ॥ तें पत्र घेवोनि हनुमंत। स्वयें श्रीरामा विनवित। हें ब्रह्मयाचें लिखित। वाचूनि कार्यार्थ जाणावा ॥ २५ ॥ पत्र घेवोनि श्रीरघुपती। वंदोनियां अति प्रीतीं। दिधलें लक्ष्मणाचे हातीं। वाचावया श्रीरामें ॥ २६ ॥ पत्र लिहिता प्रजापती। श्रोता सादर श्रीरघुपती। वाचिता सौमित्र शेषमूर्ती। पत्रप्रयुक्ती अवधारा ॥ २७ ॥ ऐकावया हनुमंताची ख्याती। सुग्रीवादि यूथपती। सादरें बैसल्या वानरपंक्ती। हनुमत्कीर्तिचातक ॥ २८ ॥ ॐनमो जी श्रीरामचंद्रा। क्षराक्षरातीत परा। त्रिगुणातीत चिदचिन्मात्रा। परात्परा परब्रह्मा ॥ २९ ॥ जेथें नाहीं मीतूंपण। ब्रह्मीं नाठवे ब्रह्मस्फुरण। तो तूं श्रीराम सगुण। पूर्णत्व पूर्ण परब्रह्मा ॥ ३० ॥ ब्रह्मया तुझेनि ब्रह्मत्व। धर्मा तुझेनि धर्मत्व। कर्मा तुझेनि कर्मत्व। तूं स्वयमेव चिन्मात्र ॥ ३१ ॥ तुज निर्विकार श्रुति म्हणती। तो तूं भाससी विश्वमूर्ती। विश्व तूं मानितां निश्चितीं। तंव ते श्रीपति तुझी माया ॥ ३२ ॥ तूं साकार ना निराकार। तूं विश्वनाथ विश्वंभर। तुझ्या स्वरूपाचा निर्धार। न कळे साचार श्रुतिशास्त्रां ॥ ३३ ॥ श्रुति म्हणती नेति नेती। शास्त्रें थोटावलीं चित्तीं। चारी वाचा मौनावती। तो तूं रघुपती परमात्मा ॥ ३४ ॥ आतां जैसा आहेसी तैसिया। नमो तुज श्रीरामराया। तुझिया कृपें श्रीरघुवर्या। स्तुति वदावया सामर्थ्य ॥ ३५ ॥ तो तूं अपरंपार अनंत। अवतारां अवतारी तूं रघुनाथ। तुझा सेवक हनुमंत। त्याचा अद्भुत पवाडा ॥ ३६ ॥ लंघोनियां अंपांपती। येवोनियां लंकेप्रती। हनुमंतें केली जे जे ख्याती। ते तूं

१ वेद. २ प्रयत्नपूर्वक. ३ यथार्थ. ४ संक्षिप्तपणें. ५ सुरक्षित. ६ उघडपणें, स्पष्टपणें. ७ फसवूं नये. ८ ब्रह्मदेव. ९ शेषाचा अवतार. १० योद्धे. ११ वेद. १२ पराक्रम. १३ समुद्र.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

रघुपती अवधारीं ॥ ३७ ॥ तूं अवतार श्रीरामचंद्र । तुझें अगम्य चरित्र । तुझा रंक पालेखाईर । हनुमान वानर अगम्य ॥ ३८ ॥ अगम्य हनुमंताची गती । अगम्य हनुमंताची ख्याती । अगम्य हनुमंताची कीर्ती । ऐकें रघुपती पुरुषार्थ ॥ ३९ ॥ समुद्र लंघोनि हनुमान बळी । महेंद्रगिरि चेपिला तळीं । सर्प दडपले पाताळीं । तोंडें ते काळीं वासिलीं ॥ ४० ॥ अंगवाताचेनि झेंडाडें । समुद्रीं खचले पर्वतकडे । शिखरें उडालीं पैं पुढें । जेंवी घुंगुरडें आकाशीं ॥ ४१ ॥ उड्डानवाताचेनि घर्घरें । बैसलीं मेघांचीं दांतारें । दिग्गज कांपती थरारें । आले शहारे कळिकाळा ॥ ४२ ॥ उड्डानकाळींचा कल्लोळ । उचंबळलें समुद्रजळ । सत्यलोकीं पर्जन्यकाळ । ध्रुवमंडळ तिमिन्नलें ॥ ४३ ॥ उड्डाणकाळ दुर्धर मोठा । उमा झोंबली नीळकंठा । रमा थापटी वैकुंठा । भयें संकटीं संरक्षीं ॥ ४४ ॥ उड्डाणकाळीं कपि दुर्धर । सुर धाकती खेचर । सिद्ध गंधर्व विद्याधर । नर किन्नर कांपती ॥ ४५ ॥ जैसा श्रीरामाचा बाण । तैसें सवेग उड्डाण । कपीस आलें पैं स्फुरण । दुर्धर कोण आवरी ॥ ४६ ॥ पहावया हनुमंताची शक्ती । मिळोनियां देव समस्तीं । सुरसा धाडिली छळणोक्ती । मार्गरोधार्थी हनुमंता ॥ ४७ ॥ दनु जे कां दानवजननी । सुरसा नामें कश्यपपत्नी । विक्राळ मुख योजनमानीं । कपीलागोनी गिळावया ॥ ४८ ॥ हनुमान जाला वीस योजन । सुरसामुख तीस योजन । हनुमान वाढला शत योजन । तत्समान मुख पसरी ॥ ४९ ॥ हनुमान अणुमात्र होउनी । प्रवेशला तिचे वदनीं । न मारोनियां कश्यपपत्नी । गेला निघोनी कर्णद्वारें ॥ ५० ॥ सुरसा ओंवाळी चाटित । देव दानव शिव विस्मित । हनुमान गेला हातोहात । बळान्वित श्रीरामें ॥ ५१ ॥ सुरसा कश्यपाची पत्नी । पित्या वायूची सापत्नजननी । कपि न मारीच विवेकसज्ञानी । गेला निघोनी रामनामें ॥ ५२ ॥ हनुमान गेला न मारून । सुरसा तेणें संतोषोन । कपीस दिधलें आशीर्वचन । विजयी पूर्ण तिहीं लोकीं ॥ ५३ ॥ विसांवा घ्यावया मारुती । जळ स्थळ पाहे सभोंवतीं । तों मैनाक वाढला उर्ध्वगती । द्यावया विश्रांती हनुमंता ॥ ५४ ॥ कपि गिरिवरा नातळत । ऊर्ध्वगती निघे हनुमंत । मार्गरोधें वाढे पर्वत । योजनशत अति दीर्घ ॥ ५५ ॥ पर्वत देखोनि योजनें शत । हनुमान वाढला पंचशत । गिरि थोरावला सप्तशत । सहस्रशत कपि जाला ॥ ५६ ॥ हनुमान जातां उल्लंघून । पर्वतासी आलें रुदन । हरिभक्ताचें पादस्पर्शन । अभाग्य पूर्ण मी न पवेंचि ॥ ५७ ॥ पर्वताची सप्रेम बोली । तंव हनुमंतासी कृपा आली । मस्तकीं ठेवितां आंगोळी । गिरि पाताळीं बैसला ॥ ५८ ॥ आंगोळीसाठीं गेला पाताळीं । कपि बैसतां रांगोळी । सुरासुरीं पिटिली टाळी । आतुर्बळी हनुमंत ॥ ५९ ॥ सिंहिका राक्षसी दारुण । छायाग्रहणें ग्रासी पूर्ण । तिचें कैंरोनि विदारण । केलें उड्डाण हनुमंतें ॥ ६० ॥ जीवें मारोनि सिंहिका । उड्डाण करितां अति तवका । मागें सांडोनियां लंका । पडलंका पावला ॥ ६१ ॥ तेथें क्रौंचा निशाचरी । हनुमान तीस जीवें मारी । चौदा सहस्र निशाचरी । घातल्या सागरीं पुच्छाग्रें ॥ ६२ ॥ तेथोनि आला लंकेआंत । सीताशुद्धीच्या कार्यार्थ । घरें शोधिलीं समस्त । साक्षेपयुक्तें वानरें ॥ ६३ ॥ साधावया सीताशुद्ध्यर्थ । कलहो लाविला नगरांत । सभा नागविली समस्त । हळहळिती नागवे ॥ ६४ ॥ अनेक दीपिका लक्षांतरीं । वानरें विझविल्या पुच्छेंकरीं । रावणा टोले दिधले शिरीं । सभा अंधारीं नागविली ॥ ६५ ॥ प्रधानवर्ग थोरथोरी । घेतली घरोघर धांडोळी वानरीं । इंद्रजिताचे निजमंदिरीं । जाली परी ते ऐका ॥ ६६ ॥ देखोनि सुलोचना नारी । हेचि होय म्हणे सीता सुंदरी । अनुसरली रावणपुत्रीं । दोघांतें मारीन मी आतां ॥ ६७ ॥ तंव सुलोचना वदे कथा । रावणें चोरोनि आणिली सीता । तीस सोडवावें इंद्रजिता । येरी कुळघाता करील ॥ ६८ ॥ इंद्रजित म्हणे ऐक आतां । सोडीं म्हणों

१ पसरलीं. २ झपाट्यानें. ३ रोमांच. ४ भिजून गेलें. ५ पार्वती, ६ शंकराला, ७ रस्ता अडविण्यासाठीं. ८ ओंठ. ९ पराक्रमी. १० फाडून. ११ आवेशानें, १२ राक्षसी, १३ प्रयत्नानें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

जातां सीता । रावण करूं धांवे घाता । सुहृद्[1]ता सांडोनी ॥ ६९ ॥ रावणा सीतासन्निपात । बुद्धि सांगतां करील घात । आपण न वदावी हे मात । कुळक्षयार्थ ते सीता ॥ ७० ॥ ऐसें इंद्रजित सांगतां । सुलोचना हे नव्हे सीता । खूण पावली हनुमंता । होय निघता तेथूनी ॥७१॥ वेगीं उडोनि मारुती । गेला कुंभकर्णगृहाप्रती । घोर गर्जे त्रिजगती । श्वासावर्ती गज म्हैसे ॥ ७२ ॥ नासिकेच्या केशांतरीं । ओरडती गुंतलीं[2] कै-हीं । मातले हस्ती घेती झुंजारी । घशामाझारी जाती सिंह ॥ ७३ ॥ प्रबळ देखोनि कुंभकर्णार्थे । हनुमान म्हणे जीवाआंत । याचा पहावया पुरुषार्थ । प्रथम युद्धार्थ मी करीन ॥ ७४ ॥ नाहीं दांतवण पाणी । वेखंडल्यां[3] दंतश्रेणी । मुखीं उठिली पोहाणी[4] घाणी । कंटाळोनी कपि गेला ॥ ७५ ॥ बिभीषणाचे मंदिरीं । शोधूं जातां सीता सुंदरी । कीर्तनाचे निजगजरीं । सुख वानरीं उलथेलें[5] ॥ ७६ ॥ ताल छंद गीत नृत्य । ऐकतां श्रीरामचरित्र । हनुमान स्वानंदें डुल्लत । रंगीं नाचत गुप्तत्वें ॥ ७७ ॥ लंका घेतलिया रघुपती । बिभीषण लंकाधिपती । करणें निश्चयो हा हनुमंतीं । निश्चितार्थी निश्चयो ॥ ७८ ॥ परम पावोनि विश्रांती । रावणगृहीं सीताशुद्धयर्थी । शोधावयालागीं मारुती । शीघ्रगती निघाला ॥ ७९ ॥ रावणाचे भवनोभवनीं[6] । कपीनें पाहिलें शोधोनी । लंकेशाचे निद्रास्थानीं । सीताँशोधनी[7] करूं आला ॥ ८० ॥ रावणासहित सेजेवरी । हनुमान देखे मंदोदरी । हेचि मानोनि सीता सुंदरी । अभ्यंतरीं क्षोभला ॥ ८१ ॥ मी काय करूं नाट आतां । रडत सांगों श्रीरघुनाथा । रावणा अनुसरली सीता । दोघांच्या घाता मी करीन ॥ ८२ ॥ करकरां दांत खात दाढा । वळिला पुच्छाचा आंकोडा । दोहींचा करावया नितोडा । हनुमान गाढा क्षोभला ॥ ८३ ॥ दाही शिरें रावणातें । सीतेचें अकरावें तेथें । हें खुडूनियां वामहस्तें । नेईन भेटीतें श्रीरामा ॥ ८४ ॥ नातरी बांधोनि पुच्छासी । दोन्ही नेईन श्रीरामापासीं । श्रीराम दंडील दोघांसी । अधर्मासी देखोनी ॥ ८५ ॥ ऐसें चिंतितां हनुमंता । मंदोदरी लंकानाथा । स्वयें सांगे स्वप्नावस्था । दुःखवार्ता अति दुःखें ॥ ८६ ॥ आतांचि देखिलें म्यां स्वप्नीं । सीता ठेविली अशोकवनीं । तिचे कैवारालागोनी । आला क्षोभोनि महारुद्र ॥ ८७ ॥ क्रौंचा प्रियभगिनी तुम्हांसी । ते मारोनि पडलंकेसीं । सवेंचि आला तो लंकेसी । सीताशुद्धीसी साधावया ॥ ८८ ॥ माझें तुम्हांसी विज्ञापन । समूळ ऐका माझें स्वप्न । सीतारक्षणीं अशोकवन । दूत धांवोन तेथें गेला ॥ ८९ ॥ घेवोनि सीतेसीं तेणें भेटी । अशोकवनाची उत्पांटी[8] । स्वप्न देखिलें म्यां दृष्टी । राक्षस कोटी मारिले ॥ ९० ॥ चवदा सहस्र वनकर । ऐशीं सहस्र किंकर । जंबुमाळी प्रधानपुत्र । अखयाकुमर मारिला ॥ ९१ ॥ अखया आपटिला शिळीं । त्याचा कैवारी सवंदळीं[9][10] । इंद्रजित गांजोनि महाबळी । लंकाहोळी तेणें केली ॥ ९२ ॥ ऐसें देखोनि कंदन । जागी जालें गजबजोन । शिवसरणें शुद्धाचमन । केलें शयन वामभागीं ॥ ९३ ॥ तंव देखिलें दुर्धर स्वप्न । शिळीं सागर बुजोन । लंके आलें वानरसैन्य । राक्षसदळण करीतचि ॥ ९४ ॥ रामें मारिला कुंभकर्ण । लक्ष्मणें वधिला इंद्रजित आपण । तुम्हांवरी [12]ओखटें स्वप्न । म्यां संपूर्ण देखिलें ॥ ९५ ॥ दाही शिरें भूमीवरी । लोळती श्रीरामबाणधारीं । सांगतां भुलली मंदोदरी । शंख करी पतिशोकें ॥ ९६ ॥ रावणासंमुख बैसोन । म्हणे चुडियांसी पडिलें खान । पुढती करितां शंखस्फुरण । धरी रावण धांवोनी ॥ ९७ ॥ रावण म्हणे मज जितां । तूं कां खेद करिसी वृथा । शिर न देखें तुमचे माथां । मिथ्या वार्ता जिण्याची ॥ ९८ ॥ रावणें पोटासीं धरोन । प्रियेसी करी समाधान । येरी म्हणे मिथ्या नव्हे स्वप्न । आलें विघ्न अनिवार ॥ ९९ ॥ चरणीं ठेवोनियां माथा । मंदोदरी म्हणे लंकानाथा । अशोकवनीं ठेवितां सीता । कुळाचे घाता ते करील ॥ १०० ॥ स्वयें अर्पोनियां सीता । शरण रिघावें श्रीरघुनाथा ।

१ आप्तपण. २ उंटें. ३ बुरसल्या. ४ नरककुंडाची घाण. ५ मिळालें. ६ घरोघरीं. ७ सीतेचा शोध. ८ अपकीर्ति. ९ नाश. १० उपटणें. ११ समानसैन्ययुक्त. १२ अनिष्ट.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

निवारे जन्ममरणकथा । अक्षयता सुखरूप ॥ १ ॥ श्रीरामा जालिया अनन्यशरण । कदा बाधेना जन्ममरण । रावणा पावसी कृतकल्याण । सत्य भाषण हें माझें ॥ २ ॥ माझें न करसील वचन । तैं इंद्रजित कुंभकर्ण । पाचारोनि दोघे जण । रामार्पण करीन सीता ॥ ३ ॥ रावणा हितकुळार्था । रामार्पण करीं सीता । ऐसें रावणें ऐकतां । उद्वेगता पावला ॥ ४ ॥ मंदोदरीचें वचन । सर्वस्वें मानी कुंभकर्ण । इंद्रजित वचनाधीन । रामार्पण करितील सीता ॥ ५ ॥ रावण सांगे मंदोदरीसी । निवारावया स्वप्नविघ्नासी । आधीं पूजूं सदाशिवासी । उपचारांसी तूं आणीं ॥ ६ ॥ कार्यी गोवोनि निजांगना । विश्वासी राक्षसी दुर्मना । रावण धाडी अशोकवना । सीतेच्या यत्ना करावया ॥ ७ ॥ इंद्रजित अथवा कुंभकर्ण । मंदोदरी का बिभीषण । यांचेनि बोलें सीता आपण । सर्वथा जाण न सोडावी ॥ ८ ॥ अशोकवना निघे राक्षसी । हनुमान लागला तिचे मागेंसीं । श्रीरामें कृपा केली कैसी । सीता अनायासीं भेटेल ॥ ९ ॥ सीता देखिलिया दृष्टीं । हनुमान घेवों न शके भेटी । राक्षसी रक्षण कोट्यनुकोटी । वृक्षसंपुटीं राहे गुप्त ॥ ११० ॥ एकांतीं भेटावया सीतेसी । हनुमान गुप्त वृक्षवासी । तेथें सीतेची स्थिति कैसी । वृक्षवल्लींसीं रामस्मरण ॥ ११ ॥ अशोकवनींचे पाषाण । गुल्मलता पक्षी तृण । अवघीं करिती श्रीरामस्मरण । प्रभाव पूर्ण सीतेचा ॥ १२ ॥ जागृतीं स्वप्नीं तुर्यासुषुप्तीं । हनुमान शोधितां सीता सती । मीतूंपणाही परती । सहजस्थिती शोधित ॥ १३ ॥ परिसोनि सीतास्वरूपस्थिती । ऐकोनि हनुमंतशोधकशक्ती । सुखावोनि श्रीरघुपती । नयना स्रवती स्वानंदबिंदु ॥ १४ ॥ नव्हेती नयनां अश्रुजीवन । पूर्णानंदें अभिषिंचन । हनुमंतासी रघुनंदन । संतोषोन करीतसे ॥ १५ ॥ धन्य सीतेचें मनोगत । नित्य श्रीरामीं अनुरक्त । धन्य हनुमंताचें जीवित । सेवानुरक्त श्रीरामीं ॥ १६ ॥ धन्य ब्रह्मयाचें लिखित । अर्थी ऑसंडे परमार्थ । श्रवणमात्रें श्रीरघुनाथ । स्वयें डुल्लत स्वानंदें ॥ १७ ॥ परिसोनि सीतास्वरूपस्थिती । ऐकतां हनुमंताची ख्याती । संतोषोनि श्रीरघुपती । हर्षें मारुती आलिंगी ॥ १८ ॥ दोघां पडिलें आलिंगन । खुंटला बोल तुटलें मौन । एका जनार्दना शरण । रामायण रम्य रामें ॥ १९ ॥ श्रीरामा विश्रांति हनुमंतीं । हनुमंता श्रीरामीं विश्रांती । एकीं पडती अनन्य प्रीतीं । अगम्यस्थिती श्रुतिशास्त्रां ॥ १२० ॥ भक्तभावार्थाचें प्रेम । स्वयें जाणे पैं श्रीराम । भजनव्युत्पत्तीचें वर्म । प्लवंगम स्वयें जाणे ॥ २१ ॥ करितां बहुसाल व्युत्पत्ती । भक्तभावार्थ प्रेमप्रीती । सहसा न ये अभिव्यक्ती । कथासंगती अवधारा ॥ २२ ॥ एका जनार्दना शरण । हनुमान पावला अशोकवन । पुढील ब्रह्मपत्रलेखन । सावधान अवधारा ॥ २३ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां ब्रह्मपत्रहनुमत्प्रतापवर्णनं नाम षड्विंशतितमोऽध्यायः ॥ २६ ॥ ओंव्या ॥ १२३ ॥ श्लोक ॥ ३ ॥

अध्याय सत्ताविसावा

श्रीमार्तंडभैरवाय नमः ॥ धन्य धन्य तें ब्रह्मलिखित । धन्य धन्य आणिता हनुमंत । सौमित्र वाची सावचित्त । अर्थें रघुनाथ सुखावे ॥ १ ॥ सौमित्र वाची ब्रह्मलिखित । ऐकतां पत्रिकेचा अर्थ । श्रीराम स्वानंदें डुल्लत । हनुमंतचरित्र परिसोनी ॥ २ ॥ शुद्धि न लभे सीता सती । कळी लाविली लंकेप्रती । सभा नागविली रात्रीं । हनुमंतख्याती ते ऐका ॥ ३ ॥ हनुमंताचें आचरित । अचळ समूळ समस्त । ब्रह्मयानें लिहिलें ब्रह्मलिखित । सावचित्त अवधारा ॥ ४ ॥ गुप्त राहोनि नगरद्वारीं । वानरचेष्टा नानापरी । कलहो लाविला निशाचरीं । कपिकुसरी ते ऐका ॥ ५ ॥ पुच्छीं गोंवोनि नगरनारी । कलशस्फोट राजद्वारीं । भरलिया जाऊं दे ना घागरी । तोटा नगरीं उदकाचा ॥ ६ ॥ राजा निमाला दशकंठ । त्याचेनि नांवें घटस्फोट । राजद्वारीं होती स्पष्ट । नारी व्यथिष्ट कळकळती ॥ ७ ॥ गजारूढ गजपनी । त्या गजांची खुंटली गती । मागील महामस्त हस्ती । आणी त्यांप्रती

---

१ दुःख. २ आज्ञाधारक. ३ शंकराला. ४ पूजासामुग्री. ५ चवथ्या आनंदावस्थेंत. ६ ऐकून. ७ भरून वाहातो. ८ ऐकतांच. ९ वानर. १० उघडकीला. ११ भांडण. १२ मारुतीचें कौशल्य.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

संग्रामा ॥ ८ ॥ गज भिडतां गजांसीं । महावत महावतांसीं । कपि गुप्तत्वें बांधोनि पुच्छांसी । दोनी तोंडघशीं आदळती ॥ ९ ॥ गज आदळतां तडफडती । वीर रगडले चरफडती । राजद्वारीं ऐशा रीतीं । कलहप्राप्ती कपिपुच्छें ॥ १० ॥ अश्वस्वारांचिया हारी । हो हो मा मा जी जी करी । नाचती चंव पायांवरी । राजद्वारीं कपि पाडी ॥ ११ ॥ अश्व पाडोनि ऐसे रीतीं । हनुमान गांजी कलहप्राप्ती । तैसेचि अतिरथी महारथी । गांजी मारुती गुप्तत्वें ॥ १२ ॥ पुढील मल्लाची शेंडी ओढी । मागील मल्ल त्यावरी पाडी । मल्लविद्या कडोविकडी । केली बापुडी हनुमंतें ॥ १३ ॥ मल्ल अति बळें उन्मत्त । परस्परें कलहो होत । हनुमंतें करोनि घात । पाडिले कुंथत राजद्वारीं ॥ १४ ॥ विवादती वेदपाठक । सानुनासिक अनुनासिक । रामस्मरणीं नाहीं विवेक । निर्नासिक कपि मानी ॥ १५ ॥ अस्मात् कस्मात् उपपत्ती । विद्वांसीं विवेकयुक्ती । नामस्मरणीं नाहीं मती । मानी मारुती भूभार ॥ १६ ॥ प्रधान गवें अति सन्मानीं । बैसोनि येतां सुखासनीं । हनुमान अत्यंतविंदानीं । भोयांचे कानीं भोवंडी पुच्छ ॥ १७ ॥ भोई ओसरतां दचकोनी । धूर आदळतां धरणीं । धुळी निघालीसे वदनीं । दंतभग्नीं कुंथत ॥ १८ ॥ रायापासीं अति सन्मान । त्यांसी राजद्वारीं अपमान । हांसताती लंकेचे जन । तेणें प्रधान क्षोभले ॥ १९ ॥ सघृतभातें चौशेरी । उंच वरान्न भोजन घरीं । आम्हांसी पाडिलें राजद्वारीं । सुबद्ध मारी भोयांतें ॥ २० ॥ भोई म्हणती ऐका मात । व्यर्थ कां करा आमुचा घात । सीतेनें सोडिला पुच्छकेत । दंतभग्नार्थ तेणें तुम्हां ॥ २१ ॥ सीता आहे लंकेप्रती । नगरलोक अनुवादती । कोणे ठायीं नेमें निश्चिती । शुद्धि मारुती न लभेचि ॥ २२ ॥ ऐसें करितां जाली राती । शुद्धि साधावया सीता सती । निघाला रावणसभेप्रती । केली ख्याती ते ऐका ॥ २३ ॥ सिंहासनीं दशशिर । सभेसी निशाचर वीर । निकट प्रधान आणि कुमर । सभा सुंदर शोभत ॥ २४ ॥ सभेसी येवोनि घरटीकार । करोनि रावणासी जोहार । सांगती नगरींचा समाचार । विघ्न दुर्धर दिसताहे ॥ २५ ॥ मुख्य विघ्नाची पैं थोरी । अतर्क्य कलहो राजद्वारीं । गज रथ यांसी हारी । महावीरीं अपमान ॥ २६ ॥ राजगृहीं अति सन्मान । पालखीपदस्थ प्रधान । शिबिका राजद्वारीं भंगोन । दंतभग्न पावले ॥ २७ ॥ घटस्फोट राजद्वारीं । कळकळती नरनारी । उदकाचा तोटा नगरीं । घरोघरीं आकांत ॥ २८ ॥ लोक जल्पती समसकट । नगरीं निमाला दशकंठ । त्याचेनि नांवें घटस्फोट । नारी यथेष्ट कळकळती ॥ २९ ॥ रावणें ऐकतां उत्तर । कोपा चढला दुर्धर । धरा मारा घरटीकार । अपवित्र अनुवादती ॥ ३० ॥ माझा सांगतां विघ्नप्रकार । जरी मारिला घरटीकार । तरी मी हनुमान भूमिभार । केला चमत्कार तो ऐका ॥ ३१ ॥ सुगंधस्नेहदीपिका । कर्पूरदीपिका अनेका । अठरा लक्ष दोहीं बाहीं देखा । लखलखिता शोभत ॥ ३२ ॥ तंव वानरें पुच्छ हाणितां देख । विझविल्या दीपिका एकाएक । ऐसें पाहतां जनलोक । सभा सकळिक गजबजिली ॥ ३३ ॥ सभेसी पडतां अंधार । जिहीं बांधिला घरटीकार । ते धुमसोनि निशाचर । करी वानर मुक्त त्यांसी ॥ ३४ ॥ घरटीकार करोनि मुक्त । सभेसी क्षोभला हनुमंत । जें जें केलें अत्यद्भुत । सावचित्त अवधारा ॥ ३५ ॥ सभेसी पडतां अंधारी । हनुमंतें मांडिली चोरी । वस्त्रें अलंकारहारी । शस्त्रें वस्त्रें नागविलीं ॥ ३६ ॥ एक म्हणे नेलीं माझीं त्वां वस्त्रें । तो म्हणे नेलीं माझीं शस्त्रें । भट्ट म्हणती गेलीं धोत्रें । गुप्त वानरें नागविलें ॥ ३७ ॥ कुंडलें घेतां कान तोडी । वस्त्रें घेतां डोळे फोडी । बाहुवटें घेतां बाहु मोडी । गांजी कडोविकडी राक्षसां ॥ ३८ ॥ मुकुट घेतां मस्तक फोडी । कटिसूत्रांसाठीं मांज मोडी । मुद्रिकानिमित्त आंगोळ्या तोडी । केलीं वेडीं राक्षसें ॥ ३९ ॥ कंठमाळा घेतां कंठ मुरडी । पदकासाठीं हृदय फोडी । नेसणीं घेतां लिंगें तोडी । केलीं बापुडीं राक्षसें ॥ ४० ॥ नेसणीं सोडा रे लौकरी । नातरी लिंगा होय बोहरी । नपुंसकता संसारीं । कैशा परी सोसवेल ॥ ४१ ॥ पायीं बिरुदें वीरांचीं पूर्ण । तयांसाठीं मोडी चरण ।

१ वाद करतात. २ विद्वानांच्या ठिकाणीं. ३ मागें सरतां. ४ दांत पडणें. ५ बोलतात. ६ गस्त घालणारा. ७ पालखींत बसणारे. ८ पालखी. ९ मारून. १० करगोट्यासाठीं. ११ कमर. १२ शौर्यचिन्हें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

बोंबलूं जातां छेदी घ्राण । फें फें वचन राक्षसां ॥ ४२ ॥ येरयेरां सांगती बुद्धी । बोंबलूं नका रे त्रिशुद्धी । बोंबलूं जातां नाक छेदी । निःशब्दवादी राहा उगे ॥ ४३ ॥ वस्त्रें अलंकार जोडती पुढें । तैसें नाक तंव ना जोडे । ख्याति लाविली माकडें । येरू दडे येरामागें ॥ ४४ ॥ जें बोलिला घरटीकार । तें विघ्न आलें साचार । सीता क्षोभली दुर्धर । दशशिरवधार्थी ॥ ४५ ॥ जानकीक्षोभ अत्यद्भुत । तिणें सोडिला पुच्छकेत । रावण मेला किंवा जित । कोणी मात सांगेना ॥ ४६ ॥ रावण निमाला[1] अंधारीं । विघ्न आलें त्याचियेवरी । बोंब पडली सभेमाझारी । आंपांपरी[2] राक्षसां ॥ ४७ ॥ मारिला इंद्रजित कुंभकर्ण । तयामागें येथें रावण । आतां धांवण्या धांवेल कोण । राक्षसगण कांपती ॥ ४८ ॥ पिता क्षोभला पवन । दीपिकांतें जाय विझवोन । राक्षसां होताहे कंदनं[3] । दशानन निमाला ॥ ४९ ॥ भंगलें राजाज्ञेचें सूत्र । सभेमाजी निघाले चोर । नागविले थोर थोर । निशाचर पळों पाहती ॥ ५० ॥ जो कोणी निघे सभेबाहेरी । त्यासी पुच्छ सुबद्ध[4] मारी । अवघीं दडालीं अंधारीं । कोंडमारी राक्षसां ॥ ५१ ॥ सीता क्षोभली उद्भट । राक्षसां आलें अति संकट । बाहेरी जावया न फुटे वाट । मरण दुर्घट ओढवलें ॥ ५२ ॥ अंधारीं रावणाचा मुकुट । पुच्छाग्रीं ओढी मर्कट । तेणें धाकें[5] दशकंठ । म्हणे मज शेवट पैं आला ॥ ५३ ॥ रावणाच्या उरीं शिरीं । हनुमान सुबद्ध टोले मारी । तेणें त्यासी आली अंधारी । धाकें-करीं न बोलवे ॥ ५४ ॥ अंधारीं न दिसे पैं व्यक्त । अंगीं वाजती अति आघात[6] । तेणें भयें लंकानाथ । चळीं कांपत थरथरां ॥ ५५ ॥ सत्य बोलिला घरटीकार । विघ्न मज आलें साचार । गुप्त आघात दुर्धर । लागती निष्ठुर प्राणान्त ॥ ५६ ॥ हनुमान सांगे दशशिरं[7] । तुवां चोरली सीता सुंदर । तुझें छेदावया शिर । आलों साचार मी रामदूत ॥ ५७ ॥ रावणाचीं दश शिरें । हनुमान छेदिता नखाग्रें । परी वारिला होता श्रीरामचंद्रें । म्हणोनि वानरें सोडिला ॥ ५८ ॥ तुवां मारिल्या लंकानाथ । माझा पुरुषार्थ होईल व्यर्थ । ऐसें बोलिला रघुनाथ । तेणें हनुमंत न मारीच ॥ ५९ ॥ नागवोनि राक्षसपंक्ती । गांजोनियां लंकापती । सभेसी लावोनियां ख्याती । मग मारुती निघाला ॥ ६० ॥ वानरें लाविताचि हात । रावण झाला मूर्च्छाभ्रांत । कपि कानीं जल्पिला गुह्यार्थ । लंकानाथ तो नेणे ॥ ६१ ॥ नांव ऐकतां हनुमंत । एक फळफळां मुतत । एकां सुटला अधोवात । जाला भ्रांत रावण ॥ ६२ ॥ ऐसें वाचितां ब्रह्मलिखित । लक्ष्मण गदगदां हांसत । वानरां मुरकुंडी वळत । हास्य करी श्रीराम ॥ ६३ ॥ गांजोनियां लंकापती । सभा नागविली काळे रातीं । ऐकतां हनुमंताची कीर्ती । श्रीरघुपती सुखावे ॥ ६४ ॥ सुखावला लक्ष्मण । सुग्रीव सुखावे संपूर्ण । सुखावले वानरगण । गाढी आंगवण हनुमंता ॥ ६५ ॥ गांजोनि सभेचा पुरुषार्थ । रावणा करोनि हताहत । आला अशोकवनाआंत । हनुमंत महाबळी ॥ ६६ ॥ सीतेसीं करावया एकांत । हनुमान वृक्षीं अति गुप्त । सीताविरहें विषयासक्त । लंकानाथ तेथें आला ॥ ६७ ॥ सीतेसी सांगे स्वयें रावण । माझें करावें त्वां वरणं[8] । तुज मी मंहिषी[9] करीन । आण प्रमाण शिव साक्षी ॥ ६८ ॥ श्रीराम वनवासी हीन । राज्यभ्रष्ट अति दीन । त्याचें सांडोनियां ध्यान । राजा रावण वरीं सीते ॥ ६९ ॥ सीते तूं तंव समूळ वेडी । पाहें माझी प्रतापप्रौढी । देव जे कां तेहतीस कोडी । बांधवडी पैं माझे ॥ ७० ॥ इंद्र वारी[11] चंद्र कंन्हेरी[12] । वसंत सेजेचा फुलारी । रावणा वरिल्या सीता सुंदरी । सुरासुरीं वंदिजे ॥ ७१ ॥ मुख्य करोनि मंदोदरी । ऐशीं सहस्र माझ्या नारी । त्या करीन तुझ्या किंकरी । आज्ञाधारी सेवेसी ॥ ७२ ॥ माझें करावया वरण । तुज मी होतों अनन्य शरण । तुझे वंदितों मी चरण । पाणिग्रहण करीं माझें ॥ ७३ ॥ जो मी प्रतापी लंकानाथ । सुरनरां काळकृतांत । तुझा होतों शरणागत । त्यजीं रघुनाथ भजें मज ॥ ७४ ॥ ऐकोनि रावणाचें वचन । सीता बोले हास्यवदन । जळो तुझें हें महिमान । काळें वदन लंकेशा ॥ ७५ ॥ स्वयंवरीं वोहतां[13] हरंकोदंड[14] । तुझें जाहलें

१ मेला. २ दुःखावस्था. ३ नाश. ४ अत्यंत. ५ धाकामुळें. ६ घाव. ७ हे रावणा. ८ प्रताप. ९ स्वीकार. १० पट्टराणी.

११ छत्रधारी. १२ स्नानगृहाचा अधिकारी. १३ उचलितां. १४ महादेवाचें धनुष्य.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

काळें तोंड । श्रीरामें केलें दुखंड । वृथा बळबंड जल्पसी ॥ ७६ ॥ बाळपणीं विंधोनि बाण । घेतला ताटकेचा प्राण । सुबाहु मारोनियां जाण । केला संपूर्ण गुरुयाग ॥ ७७॥ शूर्पणखा विटंबून । चवदा सहस्र राक्षसगण । मारिले त्रिशिरा खर दूषण । दिधलें जनस्थान द्विजांसी ॥ ७८ ॥ नाहीं रघुनाथा सारथी । श्रीराम एकला पदाती । तेणें येव्हढी केली ख्याती । तुझी अपकीर्ति तूं ऐकें ॥ ७९ ॥ सहितभवानी त्रिपुरारी । आंदोळिला कैलासगिरी । तो तूं श्रीरामभयेंकरीं । झालासी भिकारी संन्यासी ॥८०॥ कपटी होवोनि संन्यासी । शेखीं परदारा चोरिसी । नाहीं पुरुषार्थ तुजपासीं । वृथा जल्पसी वाढीव ॥ ८१ ॥ श्रीराम परब्रह्मपुतळा । रावणा तूं काळा डोंबकावळा । सीता मानी त्याचे विटाळा । कल्पांतकाळीं स्पर्शेना ॥ ८२ ॥ चोरितां श्रीरामनायिका । निंद्य जालासी तिहीं लोका । रावणा तूं तंव शूकरमुखा । तुज मी देखा नातळें ॥ ८३ ॥ वायसाचा पाँथीकर । जेंवी नव्हेचि चंद्रचकोर । तेंवी सांडोनि श्रीरामचंद्र । दशवक्त्रें स्पर्शेना ॥ ८४ ॥ लक्ष्मणाचिया मर्यादारेखा । तूतें नुल्लंघवेचि दशमुखा । श्वान शूकर काळमुखा । तुज मी देखा स्पर्शेना ॥ ८५ ॥ साधु सज्जना सौम्य संत । कदा विष्ठेसी न लावी हात । तेंवी तूं अपवित्र लंकानाथ । तुज मी निश्चित स्पर्शेना ॥ ८६ ॥ ऐकोनि सीतेचें वचन । वर्मी खोंचला दशानन । जिव्हा सांडा रे छेदून । निंद्य वचन दिसताहे ॥ ८७ ॥ बळेंचि इसी मज भोगितां । कोण निवारील आतां । कैंवी राखवेल रघुनाथा । सती पतिव्रता पाहूं कैसी ॥ ८८ ॥ ऐसें बोलतां लंकानाथ । ऐकोनि क्षोभला हनुमंत । करावया रावणाचा घात । वृक्षाआंत खवळला ॥ ८९ ॥ टवकारिले नेत्रवाट । वळिला पुच्छाचा पैं सांट । छेदावया दशकंठकंठ । बळें उद्भट गुरगुरी ॥ ९० ॥ मजदेखतां गांजी सीता । मी काय वार्तिकार आतां । रडत जावोनि सांगूं रघुनाथा । नपुंसकता मज आली ॥ ९१ ॥ सीतेसी लावितांचि हात । जीवें मारीन लंकानाथ । येणें बळें हनुमंत । वृक्षाआंत गुरगुरी ॥ ९२ ॥ त्याची ऐकतां गुरगुर । कांपिनला दशशिर । सीतारक्षणीं श्रीरामचंद्र । अति सत्वर पातला ॥ ९३ ॥ रावण पडिला विचारीं । तंव पातली मंदोदरी । लंकापति धरोनि करीं । निजमंदिरीं तो नेला ॥ ९४ ॥ गुज सांगे तयासी । अखंड राम सीतेपासीं । हात लावितां तियेसी । वृथा तूं मरसी रावणा ॥ ९५ ॥ ऐसी सांगतांचि गोष्टी । रावणा धुकधुकी लागली पोटीं । येरीकडे सीता गोरटी । वृक्षसंपुटीं विलपत ॥ ९६ ॥ लक्ष्मण छळितां श्रीरामभक्त । तेणें अंतरला श्रीरघुनाथ । मज आकळी लंकानाथ । भक्तच्छळण महापाप ॥ ९७ ॥ श्रीरामाज्ञेचें रक्षण । मजपासीं लक्ष्मण । त्याचें करितां म्यां छळण । बंदीं रावण मज घाली ॥ ९८ ॥ छळवाद्याचें वदन । कदा न पाहे रघुनंदन । मज सांडिलें निंद्य म्हणोन । शोकनिमग्न छळणार्थी ॥ ९९ ॥ श्रीरामभक्ताचें छळण । पंचमहापापांहूनि दारुण । मज क्षोभला रघुनंदन । बंदीमोचन कोण करी ॥ १०० ॥ श्रीरामभातां दुर्धर शर । लंका विध्वंसी साचार । रावण निर्दळी सहपरिवार । मज रघुवीर क्षोभला ॥ १ ॥ सुटल्या श्रीरामाचा बाण । मशक बापुडें तें रावण । मज क्षोभला रघुनंदन । सखा लक्ष्मण छळितांचि ॥ २ ॥ न लागतां निमेषमात्र । श्रीराम वधिता दशवक्त्र । म्यां छळिला सखा सौमित्र । तेणें रघुवीर क्षोभला ॥ ३ ॥ दासासी दंडण शिरोमुंडण । स्त्रियेसी दंडण उपेक्षण । ऐसें बोलोनि आपण । दीर्घ रुदन करी सीता ॥ ४ ॥ श्रीरामें उपेक्षिलियापाठीं । जीवें जीत मी करंटी । प्राण द्यावया उठाउठीं । सीता गोरटी अनुतापी ॥ ५ ॥ करितां श्रीरामस्मरण । स्वेद रोमांच अश्रु पूर्ण । सीतेसी करितां स्फुंदन । आलें रुदन हनुमंता ॥ ६ ॥ कळवळ उपजली कपींद्रा । तेव्हां टाकिली श्रीराममुद्रा । मुद्रा देखोनि सीता सुंदरा । निद्रा तंद्रा विसरली ॥ ७ ॥ दोनी टवकारिले नयन । चिंता गेली हरपोन । मनीं पांगुळलें मन । विस्मयापन्न जानकी ॥ ८ ॥ श्रीराममुद्रेचा बडिवार । दुःख निर्दाळोनि

१ पार्वतीसह. २ शंकर. ३ सोबती. ४ रावण. ५ चाबूक. ६ हेर. ७ वृक्षवाटिकेमध्यें. ८ ब्रह्महत्त्या, सुवर्णाची चोरी, सुरापान, गुरुस्त्रीगमन, हीं चार पातकें व हीं करणाराचा समागम करणारा मिळून पंचमहापातकी. ९ ग्लानि, सुस्ती. १० तटस्थ झालें. ११ आश्चर्यचकित. १२ मोठेपणा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

समग्र। सुख द्यावें अपरंपार। चिदचिन्मात्र राममुद्रा ॥ ९॥ दीपिकातेज अंधारयुक्त। श्रीराममुद्रा ग्रासी समस्त। करोनि शशिसूर्य खद्योत[1]। प्रकाशवंत राममुद्रा ॥ ११०॥ मुद्रिका शोभे नामेंकरीं। श्रीरामनाम मुद्रिकेवरी। राममुद्रिका बाह्यांतरीं। सीता सुंदरी स्वयें देखे ॥ ११॥ मुद्रिकापीठपत्रावळी। सहस्रनामप्रभावळी। अक्षरीं अक्षरें लिहिल्या ओळी। अक्षरें न्याहाळी जानकी॥ १२॥ अक्षरीं अक्षरमुद्रिका। दशावतार त्यावरी टीका। जडित चरित्रमालिका। सुखदायका सीतेसी ॥ १३॥ मुद्रिकागर्भ अति पवित्र। त्याहीमाजीं परात्पर। श्रीरामनाम निजाक्षर। क्षराक्षरातीतें[2] ॥ १४॥ ऐसी मुद्रिका आनंदयुक्त। देखोनि सीता सद्गदित। नेत्रीं आनंदजळ स्रवत। रोमांचित जानकी ॥ १५॥ मुख्यमुद्रा तें सुवर्ण। त्यावरी श्रीराम सुवर्णवर्ण। देखोनि मुद्रेचें महिमान। सुखसंपन्न जानकी॥ १६॥ तेथें चमत्कार जाहला। मुद्रा नव्हे श्रीराम आला। ऐसा सीतेसी भाव गमला। सरसाविला अंचळ[3]॥ १७॥ श्रीराम आले एकाएकीं। लाजे जाली अधोमुखी। सर्वांगें हरिखेली[4] जानकी। सुखोन्मुखी डुलत ॥ १८॥ केउता आहे लक्ष्मण। दुष्ट दुरुक्तीं केलें छळण। त्याचे केशीं झाडीन चरण। लोटांगण त्या माझें ॥ १९॥ सर्वेचि श्रीरामेंसीं गोडी। घ्या जी फोडी देईन विडी। आलेति मजकारणें तांतडीं। चरण झाडीन निजकेशीं॥ १२०॥ ब्रह्मलिखित निरुपम। सीताचरित्र अनुपम। ऐकतां श्रीरामा आलें प्रेम। अति संभ्रम तो ऐका ॥ २१॥ सीते देईं आलिंगन। म्हणोनि उठला रघुनंदन। पैल दिसे सीता चिद्रत्न। आली धांवोन भेटावया॥ २२॥ दोनी बाह्या पसरोन। हर्षें धांवे रघुनंदन। सीता देखिली चिद्रत्न। आलिंगनालागून उभा असे ॥ २३॥ ऐसा धांवतां रघुनंदन। विस्मयो पावती कपिगण। सुग्रीव पडिला मूर्च्छापन्न। मूर्च्छित लक्ष्मण पत्रार्थी॥ २४॥ हर्षें ओसंडे रघुनाथ। पदोपदीं होय नाचता। धन्य सुदिन हनुमंता। माझी मज सीता भेटविली॥ २५॥ ऐकोनि म्हणे हनुमंत। थोरी चुकलों मी तेथ। सीता आणितों जरी येथ। श्रीरघुनाथ सुखावता ॥ २६॥ अति अनुताप हनुमंता। चुकलों चुकलों मी सर्वथा। मज काय आली नपुंसकता। निमेषें सीता आणीन ॥ २७॥ क्षण एक धीर धरीं रघुनाथा। सवेग आणीन मी सीता। चरणीं ठेवोनियां माथा। होय उडता हनुमंत ॥ २८॥ वेगें उडतां हनुमंता। उमज पडला श्रीरघुनाथा। स्वयें धांवोनि होय धरिता। ऐक आतां सांगेन॥ २९॥ ब्रह्मलिखित ऐकतां। प्रेम उसळलें चित्ता। दुश्चित तें वदलों सीता सीता। तुवां त्या अर्था नवजावें ॥ १३०॥ घेवोनि श्रीरघुनाथ। वेगें उडों पाहे हनुमंत। अंगदें देखोनि तो अर्थ। धांवोनि धरीत हनुमंता ॥ ३१॥ अंगदश्रीरामांसमवेत। उडों पाहे हनुमंत। तें देखोनि जांबुवंत। स्वयें धरीत तिघांसी॥ ३२॥ घेवोनियां तिघे जण। हनुमान करूं पाहे उड्डाण। सुग्रीव होवोनि सावधान। धरी धांवोन हनुमंता॥ ३३॥ सुग्रीवाही समस्त। उडों पाहे हनुमंत। तों लक्ष्मणें धांवोनियां तेथ। आवरीत निजबळें ॥ ३४॥ स्फुरणें खवळला हनुमंत। अंगद सुग्रीव जांबवंत। रामलक्ष्मणांसमवेत। लंकेआंत नेवों पाहे॥ ३५॥ पंच फळें वृक्षावरी। तेंवी पांच वीर ते अवसरीं। नेवों पाहे लंकेभीतरीं। तेही परी अवधारा॥ ३६॥ श्रीराम मारील रावण। इंद्रजित मारील लक्ष्मण। आम्ही मर्दूं राक्षसगण। सीता घेवोन येवों सुखें ॥ ३७॥ ऐसें कपीचें मनोगत। जाणोनियां श्रीरघुनाथ। हनुमंताचे चरण धरीत। क्षमा निश्चित पैं कीजे॥ ३८॥ श्रीरामें धरितां चरण। हनुमान घाली लोटांगण। तुझी आज्ञा अणुप्रमाण। प्राणांतीं आपण नुल्लंघीं ॥ ३९॥ तुज कळली सीतेची अवस्था। तिसी आणावया शीघ्रता। धीटपण केलें म्यां आतां। क्षमा सर्वथा मज कीजे ॥ १४०॥ ऐसें बोलोनि आपण। धरिले श्रीरामाचे चरण। रामें दिधलें आलिंगन। समाधान स्वामिभक्तां॥ ४१॥ एका जनार्दना शरण। हनुमंताचें बळ संपूर्ण। सुग्रीव आणि लक्ष्मण। वानरगण वानिती॥ ४२॥ बळ अद्भुत हनुमंता। पुढील सीतेची अवस्था। ब्रह्मलिखिताची कथा। सावधान अवधारा॥४३॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां ब्रह्मलिखितहनुमंतपराक्रमवर्णनं नाम सप्तविंशतितमोऽध्यायः ॥ २७॥ ओंव्या॥ १४३॥

१ काजवे. २ जें कांहीं विनाशी अविनाशी त्यापलीकडील. ३ पदर. ४ हर्ष पावली. ५ कोठें. ६ घाईनें. ७ भरला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

अध्याय अठ्ठाविसावा

॥ श्रीरामचंद्राय नमः ॥ मागील प्रसंग संपतां । अंगदसुग्रीवजांबवंतां । लक्ष्मणेंसीं श्रीरघुनाथा । घेवोनि उडतां हनुमंत ॥ १ ॥ हनुमंताची परम कीर्ती । गगनीं सुरवर वानिती । भूतळीं वाखाणिती जुत्पती । वानी कपिकीर्ती श्रीराम ॥ २ ॥ आवडीं म्हणे रघुनाथ । सौमित्रा वाचीं ब्रह्मलिखित । मुद्रिका देवोनि हनुमंत । करी एकान्त सीतेसीं ॥ ३ ॥ धन्य ब्रह्मयाचें ब्रह्मपत्र । धन्य श्रवणार्थी श्रीरामचंद्र । धन्य वाचक सौमित्र । धन्य कपींद्र कपिकुळीं ॥ ४ ॥ मुद्रिकातेजदेदीप्यता । श्रीराम आला मानी सीता । तेणें होवोनि सलज्जता । सप्रेमता घाबरी ॥ ५ ॥ सावधान पाहतां देखा । पुढें देखे आंगोळिका । जाणोनि श्रीराममुद्रिका । सुखोन्मुखा जानकी ॥ ६ ॥ पहिलें वंदिली निढळीं । मग आलिंगिली हृदयकमळीं । स्वानंदें चुंबी जनकबाळी । सुखें वेल्हाळी आलीसी ॥ ७ ॥ म्हणोनि घाली लोटांगण । भागलीस दूराभिगमन । तुझें करीन चरणक्षाळण । तीर्थसेवन हितार्थ ॥ ८ ॥ तुझें सेवितां तीर्थचरण । लक्ष्मणासी केलें स्यां छळण । त्या पापाचें निर्दाळण । प्राप्ती संपूर्ण श्रीरामीं ॥ ९ ॥ तूं तंव सखी श्रीरामसुद्रा । घालूं शेज करिसी निद्रा । श्रमलीस उतरतां समुद्रा । मार्गी गिरिवरां लंघितां ॥ १० ॥ मी वामांगीं तूं दक्षिणांगीं साजणी । आम्ही दोघी स्वानंदभगिनी । श्रीरामाची समूळ काहाणी । कृपा करोनी मज सांगें ॥ ११ ॥ नाठवे सचेतन अचेतन । सद्गुरुभक्तिप्रेम पूर्ण । तेणें हनुमंता आलें रुदन । धन्य भजन सीतेचें ॥ १२ ॥ आम्ही म्हणवितों श्रीरामभक्त । हें प्रेम नाहीं आम्हांआंत । जानकी सप्रेम सदोदित । हीस रघुनाथ तुष्टला ॥ १३ ॥ सगुण निर्गुण श्रीरामभक्त । जो वंदी तो नित्यमुक्त । जो निंदी त्यासी नरकपात । वदे हनुमंत वेदार्थ ॥ १४ ॥ मुद्रिका देखतांचि हर्षी । अत्यादरें मानी गोष्टी । तिसी पुसे सप्रेम गोष्टी । राम जगजेठी काय करितो ॥ १५ ॥ स्वस्थ श्रीरामलक्ष्मण । तरी कां माझी सोडवण । करावया न करिती आंगवण । दुर्धर बाण असतांही ॥ १६ ॥ श्रीरामभातां दुर्धर शर । समुद्र शोषोनि समग्र । निर्वंटोनियां दशशिर । सीता सत्वर सोडविता ॥ १७ ॥ त्यांहीं दोघीं त्यजिली सृष्टी । हे न सांगवे दुःखकोटी । म्हणोनि सुचली मौननिष्ठी । सज्ञान मोठी राममुद्रा ॥ १८ ॥ श्रीराम गेला परलोकता । मौनमुद्रा सांगे वार्ता । तो जरी येथें स्वस्थ असता । मज सोडविता निमेषार्धे ॥ १९ ॥ श्रीरामाचा एकैक बाण । करील त्रैलोक्याचें कंदन । त्यापुढें कायसें दशानन । गेला त्यजोन परलोका ॥ २० ॥ सखा छळिला स्यां लक्ष्मण । तेणें क्षोभला रघुनंदन । मज उदधींत सांडोन । गेले दोघे जण परलोका ॥ २१ ॥ मुद्रिके सांग सत्य गोष्टी । मज रावणें हरिल्यापाठीं । दोघे येवोनि पंचवटीं । अति संकटीं काय केलें ॥ २२ ॥ मुद्रिका नेदी प्रतिवचन । तुझ्या मौनाचें हेंचि कारण । माझेनि विरहें दोघे जण । रामलक्ष्मण निमाले ॥ २३ ॥ किंवा लोकलज्जे भ्याले । दोघे विष घेवोनि निमाले । माझेनि दुःखें दुखावले । मूर्च्छेसवें गेले प्राण त्यांचे ॥ २४ ॥ माझेनि दुःखें दुःख प्रबळ । त्यजिला आहार फळमूळ जळ । दोघां भरोनियां तरळ । प्राण तत्काळ सोडिले ॥ २५ ॥ सीता सीता आक्रंदोनी । प्राण सांडिला दोघीं जणीं । नातरी मागतां पाणी पाणी । ताहना फुटोनी निमाले ॥ २६ ॥ मज न देखतां पर्णकुटीं । दोघे जाले कडेलोटी । अथवा शस्त्रें घातलीं पोटीं । केला कंठीं गळफांस ॥ २७ ॥ पर्वतकड प्रचंड धोंडीं । दोघीं घातल्या मुरकुंडी । तेथें वाळोनि जाल्या कवडी । दुःखनिर्वेडी निमाले ॥ २८ ॥ कीं विजनीं मूर्च्छित पडिले । वृकव्याघ्रीं ते फाडिले । सिंहशार्दूळीं विभांडिले । किंवा रगडिले वनगर्जी ॥ २९ ॥ ते तंव वीर दोघे निधडे । सिंह शार्दूळ ते बापुडे । अथवा रावणें केलें कुडें । छळोनि रोकडे मारिले ॥ ३० ॥ विश्वामित्रयागाप्रती । श्रीराम सावध अहोरात्रीं । करितां सुबाहु छळणोक्ती । त्यासी रघुपतीनें मारिलें ॥ ३१ ॥ छळावया श्रीरामलक्ष्मण । शूर्पणखा सुंदर पूर्ण । तिचें केलें विटंबण । न चले छळण

१ मोठमोठे वीर, योद्धे. २ मुद्रिका, आंगठी. ३ मस्तकावर. ४ पराक्रम. ५ संहार करून. ६ मरण पावले. ७ भ्रम. ८ अति दुःखानें. ९ निर्जनस्थळीं. १० फाडले.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

श्रीरामीं ॥ ३२ ॥ श्रीराम सहजेंचि उदासी । रावणें हरितां सीतेसी । न्यस्तशस्त्र[1] जाला संन्यासी । वनवासी वनस्थ ॥ ३३ ॥ अथवा आणिक आहे गुज । श्रीराम आत्माराम सहज । रावणें हरितांचि मज । समाधिशेजे प्रवेशला ॥ ३४ ॥ जन्म मरण आधि व्याधी । जेथें शमती त्रिशुद्धी । श्रीराम सेवी ते समाधी । देहउपाधि जेथें नाहीं ॥ ३५ ॥ देहबुद्धीचिया माथां । मी राम सीता कांता[2] । हेंही नाठवे रघुनाथा । समाधिअवस्था समपदीं ॥ ३६ ॥ समाधिसुखीं स्वभावतां । कैंचा राम कैंची सीता । रावणें हरिली माझी कांता । हेंही रघुनाथा नाठवे ॥ ३७ ॥ समाधिशेजे सुखसंपन्न । मिथ्या देहादि प्रपंचभान । मिथ्या राम मिथ्या रावण । धांवण्या कोण धांवेल ॥ ३८ ॥ ऐसें ऐकतां ब्रह्मलिखित । श्रीराम जाला समाधिस्थ । सर्वेंद्रियें उपरमत । कर्तव्यार्थ नाठवे ॥ ३९ ॥ जें लिहिलें ब्रह्मलिखितीं । जें बोलिली सीता सती । तेंचि जाला रघुपती । स्वरूपस्थिति स्वभावें ॥ ४० ॥ श्रीराम परब्रह्ममूर्ती । ब्रह्मलिखित ऐकोनि स्थिती । स्वयें पावला उपरती । स्वरूपस्थिती स्वभावें ॥ ४१ ॥ नेत्र जाले अर्धोन्मीलित । प्राण पांगुळला जेथींचा तेथ । चित्त चैतन्यीं समरसित । जाला सदोदित परब्रह्म ॥ ४२ ॥ ब्रह्मस्थितीचें लक्षण । जेथें नाहीं मीतूंपण । कैंचा राम सीता रावण । आपणा आपण विसरला ॥ ४३ ॥ लक्ष्मणा खुंटली वाचाशक्ती । स्वरूपीं सुलीन रघुपती । सुग्रीव कळवळला कपिपती । तळमळती वानर ॥ ४४ ॥ लक्ष्मणा खुंटली वाचासिद्धी । श्रीराम पावला समाधी । सीता न सुटे लंकाबंदी । कार्य त्रिशुद्धी नासलें ॥ ४५ ॥ हनुमंतें धरिलें दृढ मौन । कथा ऐके कर जोडून । देखोनि समाधिविंदान । हनुमान संपूर्ण खवळला ॥ ४६ ॥ श्रीरामा समाधि ते उपाधी । मज कळलेंसे त्रिशुद्धी । हनुमंतें कैसी केली बुद्धी । विंदानविधी अवधारा ॥ ४७ ॥ म्यां आणिली सीताशुद्धी । मिथ्या होऊं पाहे त्रिशुद्धी । पुढील खुंटली कार्यसिद्धी । रामसमाधि भली नव्हे ॥ ४८ ॥ म्यां सीतेसी दिधली भाक[3] । कीं येथें आणीन रघुकुळटिळक । कायसें बापुडें समाधिसुख । माझी भाक नव्हे मिथ्या ॥ ४९ ॥ समाधिव्युत्थापनापरता[4] । श्रीराम स्वयें स्वभावता । त्यासी कायसी समाधिअवस्था । सावध आतां मी करीन ॥ ५० ॥ श्रीरामस्वरूपस्थिती । सकळ जाणे स्वयें मारुती । प्रबोधावया[5] रघुपती । केली युक्ती ते ऐका ॥ ५१ ॥ स्थूळ लिंग आणि कारण । तिहींविगळा होऊन । जेथें नाहीं मीतूंपण । तेथें आपण प्रवेशे ॥ ५२ ॥ महाकारणीं प्रवेशोन । प्रबोधावया रघुनंदन । वाचेवीण अनुवादोन । गुरुवचन प्रतिपादी ॥ ५३ ॥ श्लोक श्रीसद्गुरु वसिष्ठाचा । हनुमान वदे पांचव्या वाचा । तोडावया बंध समाधीचा । अर्थ तेथींचा अवधारा ॥ ५४ ॥ हातींचें हातीं घेतां वस्तु । शब्देंवीण अर्थ प्राप्तु । पांचवे वाचेचा हा अर्थु । श्रोता समर्थु हा राम ॥ ५५ ॥

अंतरेको बहिर्नाना अंतर्बोधो बहिर्जडः ।
अंतस्त्यागी बहिर्भोगी लोके विहर राघव ॥ १ ॥

अंतरीं अद्वैत एक । बाह्य स्वधर्में पाळी लोक । अंतरीं निजबोध चोख । वेदविवेक बाह्य पाळीं ॥ ५६ ॥ अंतरीं सर्वस्वाचा त्याग । बाह्यावतार भोगीं भोग । सांडोनि समाधिनिजयोग । उद्धरीं जग निजकीर्ती ॥ ५७ ॥ सांडोनि समाधिसांकडी[6] । तोडीं नवग्रहांची बेडी । सोडीं देवांची बांधवडी । उभारीं गुढी रामराजा ॥ ५८ ॥ सद्गुरु वसिष्ठाचें वचन । ऐकोनियां रघुनंदन । स्वयें होवोनि सावधान । दिधलें आलिंगन हनुमंता ॥ ५९ ॥ श्रीरामाचें जें हृद्गत । हनुमान जाणे भगवद्भक्त । हनुमंताचा भावार्थ । जाणे रघुनाथ हृदयस्थ ॥ ६० ॥ कपीसी दिधलें आलिंगन । श्रीराम जाला सावधान । देवा भक्ताचें अनन्यपण । अगम्य जाण श्रुतिशास्त्रां ॥ ६१ ॥ श्रीरामअनन्यभक्त सीता । अनन्य भक्ति हनुमंता । दोहींची ऐकावया कथा । श्रीरघुनाथा आल्हाद ॥ ६२ ॥ ब्रह्मलिखिताच्या अर्था । ऐकावया आवडी रघुनाथा । अशोकवनीं वदली सीता । ते कथा अति गोड ॥ ६३ ॥ श्रीराममुद्रा अचेतन । तिसी

१ शस्त्रें टाकलीं आहेत असा. २ स्त्री. ३ वचन. ४ समाधि उतरण्यापलीकडचा. ५ सावध करावयासाठीं.

६ समाधीचें संकट.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

देवोनि अति सन्मान। घालोनियां लोटांगण। सीता आपण पुसतसे ॥ ६४ ॥ कैसेनि चालवलें वाटा। कैसेनि उल्लंघिलें घांटा। समुद्र तरणीं दुस्तर मोठा। केंवी परतटा आलीस ॥ ६५ ॥ तुज आणिलें रघुपती। किंवा आणिकाचे संगतीं। तें तें सांगें मजप्रती। सीता सती पूसत ॥ ६६ ॥ रामनाम तुजवरी। अटकें नाहीं चराचरीं। सुखें तरसी भवसागरीं। धन्य संसारीं तूं राममुद्रे ॥ ६७ ॥ श्रीराममुद्रा ज्यासी लागे। तो संसारीं तरे सर्वांगें। हें तुज पुसणेंचि नलगे। कृपानुरागें आलीसी ॥ ६८ ॥ मी वामांगीं तूं दक्षिणांगिनी। आम्ही तुम्ही दोघी बहिणी। लगबगेंसीं मजलागोनी। कृपानुरागिणी आलीसी ॥ ६९ ॥ माझी कृपा तुझे पोटीं। तरी सांग पां गुह्य गोष्टी। मजमागें पंचवटीं। रामें संकटीं काय केलें ॥ ७० ॥ मुद्रिका नेदी प्रतिवेचन[2]। तुझे मौनाचें कारण। निमाले रामलक्ष्मण। न सांगोन सांगसी ॥ ७१ ॥ श्रीराम गेला निजधामासी। तुज धाडिलें सांगावयासी। मीही त्यजीन या देहासी। कैंस[3] सरसी तिणें केली ॥ ७२ ॥ साक्ष करूनि मुद्रिकेसी। मुद्रा धरोनि हृदयासीं। आठवितां श्रीरामासी। पडे भूमीसी मूर्च्छित ॥ ७३ ॥ सीता पडतांचि मूर्च्छित। गजबजिला हनुमंत। श्रीरामविरहें सीता संतप्त। प्राण निश्चित त्यागील ॥ ७४ ॥ देखतां श्रीराममुद्रेसी। राम निमाला वनवासीं। धरोनि निश्चयो मानसीं। निजदेहासी त्यागील ॥ ७५ ॥ येथें निमालिया सीता। काय मुख दाखवूं रघुनाथा। तुझी मरोनियां कांता। आलों मी आतां पुरुषार्थी[4] ॥ ७६ ॥ करोनि समुद्रोल्लंघन। मीचि सीतेसी जालों विघ्न। श्रीराममुद्रा स्वयें टाकोन। घेतला प्राण सीतेचा ॥ ७७ ॥ श्रीरामें मुद्रा दिधली खूण। ते म्यां आणोनि आपण। घेतला सीतेचा प्राण। अति उद्विग्न हनुमंत ॥ ७८ ॥ खूण दावोनि आणावी सीता। शेखीं खुणेनें मारिली तत्त्वतां। कैसेनि भेटों श्रीरघुनाथा। प्राणांतावस्था हनुमंतीं ॥ ७९ ॥ मुद्रिका टाकिली उठाउठीं। हेचि बुद्धि म्यां केली खोटी। श्रीराममुद्राविरहासाठीं। सीता गोरटी निमाली ॥ ८० ॥ मज येवोनि लंकेआंत। ना सीता ना रघुनाथ। ऐसा ओढवला अनर्थ। तेणें हनुमंत अति दुःखी ॥ ८१ ॥ माझेनि निमाली पैं सीता। अपेश बैसलें माझे माथां। काय करूं रे रघुनाथा। बुद्धिदाता मज होईं ॥ ८२ ॥ श्रीरामा मी तुझें अति दीन। माझे माथां बैसलें विघ्न। तूं कृपाळु रघुनंदन। नित्य निर्विघ्न मज करीं ॥ ८३ ॥

इति संचिंत्य हनुमांश्चकार मतिमान्मतिम्।
राममक्लिष्टकर्माणं सबंधुमनुकीर्तयन् ॥ २ ॥

आदरें स्मरतां रघुनंदन। बुद्धि आठवली अति निर्विघ्न। सीता व्हावया सावधान। श्रीरामकीर्तन करावें ॥ ८४ ॥ श्रीरामकीर्ती हनुमंत। आदरें गाय वृक्षाआंत। जेणें जोडे स्वार्थ परमार्थ। तैसा अर्थ अनुवादे[5] ॥ ८५ ॥ ऐकतां श्रीरामकीर्तन। सीता होय सावधान। तैसें हनुमंतें आपण। हरिकीर्तन मांडिलें ॥ ८६ ॥ कौसल्यागर्भीं गर्भातीत। दाशरथि श्रीरघुनाथ। परब्रह्म मूर्तिमंत। सूर्यवंशांत अवतरला ॥ ८७ ॥ श्रीरामपुरुष सीता प्रकृती[6]। श्रीराम चैतन्य सीता चिच्छक्ती। श्रीराम धैर्य सीता धृती[7]। धन्य जगतीं अवतार ॥ ८८ ॥ गोडी आणि साखर पाहतां। दों नामीं एकचि वस्तुता। तेंवी श्रीराम आणि सीता। एकात्मता अवतार ॥ ८९ ॥ श्रीरामाचें आचरित। गुरुपितृआज्ञे नित्य विक्रीत। ब्राह्मणांचा अनन्य भक्त। सुरसाह्यार्थ अवतार ॥ ९० ॥ कैकेयीवरदें श्रीदशरथें। श्रीरामा धाडिलें दंडकारण्यातें। सखा लक्ष्मण सांगातें। निघे रघुनाथ वनवासा ॥ ९१ ॥ वनवास गंगातटीं। वसतिस्थान पंचवटीं। राम राहिला जगजेठी। सीता गोरटी समवेत ॥ ९२ ॥ शूर्पणखा विटंबून। मारिले त्रिशिरा खर दूषण। श्रीरामें घेवोनि जनस्थान। दिधलें दान द्विजांसी ॥ ९३ ॥ मृगकंचुकीस लोभतां। मृगामागें पाठविलें रघुनाथा। छळोनि सौमित्रा दवडितां। हरिली सीता रावणें ॥ ९४ ॥ श्रीराम आणि लक्ष्मण। करितां सीतेचें गवेर्षण[8]। जटायुरावणांचें रण। दोघे जण तेथें आले ॥ ९५ ॥ श्रीराम कृपाळु पूर्ण। करोनि जटायुउद्धरण। कबंधातें मारोन। आले आपण किष्किंधे ॥ ९६ ॥ रामें निर्दाळोनि

१ प्रतिबंध. २ उत्तर. ३ तयार झाली. ४ मोठा पराक्रमी. ५ वर्णन करूं लागला. ६ माया. ७ धीरता (धैर्य.) ८ शोध.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वाळीसी । राज्य दिधलें सुग्रीवासी । यौवराज्य अंगदासी । वानरांसी निजसख्य ॥ ९७ ॥ तुझे शुद्धीलागोनि येथें । मज धाडिलें श्रीरघुनाथें । तुझे भेटीलागीं सीते । व्रत रघुनाथें धरियेलें ॥ ९८ ॥ विश्वासार्थें मनीं ह्या वानरा । म्हणोनि रामें दिधली मुद्रा । सांडोनियां निद्रा तंद्रा । भेटें कपींद्रा रामदूता ॥ ९९ ॥ ऐकोनि श्रीरामकथामृत । सीता उठली हर्षयुक्त । कथानुवाद वृक्षाआंत । तेणें विस्मित जानकी ॥ १०० ॥ कृपेनें कळवळला श्रीरघुनाथ । मज आश्वासावया येथ । वृक्ष कथा अनुवादत । आला निश्चित श्रीराम ॥ १ ॥ वृक्षांसी पुसे करोन नमन । कोण करितो रामकीर्तन । त्याचें पाहीन मी वदन । लोटांगण त्या माझें ॥ २ ॥ ज्यासी श्रीरामकथाशैली । त्याचे चरणींची रज[1]धुळी । मी वंदीन सुखसमेळीं । सुख मजजवळी दावावें ॥ ३ ॥ ज्याचे मुखीं रामकीर्तन । त्याचें मज देखतां वदन । परम सुख समाधान । कृपा करोन भेटावें ॥ ४ ॥ सीता सप्रेम निजचित्तें । अति उत्कंठित भावार्थें । जेणें खूण मुद्रा आणिली येथें । कृपावंतें मज भेटावें ॥ ५ ॥

तामब्रवीत्पुनर्धीमान् हनूमान्मारुतात्मजः ।
शिरस्यंजलिमाधाय वैदेहीं प्रत्यपूजयत् ॥ ३ ॥

ऐकोनि सीतेचें वचन । हनमंतें स्वयें उतरोन । सीतेसी घालोनि लोटांगण । मस्तकीं चरण वंदिले ॥ ६ ॥ महानिधीचा लाभ जाला । सुधाब्धि चूळोदकें प्राशिला । किंवा कळिकाळ जिंकोनि आला । तो पाडु जाला हनुमंता ॥ ७ ॥ तेणें हरि[2]खांचेनि मेळें । गडबडां पायांवरी लोळे । आनंदाश्रु स्रवती डोळे । सुखसमेळें डुल्लत ॥ ८ ॥ धांवधांवोनि पायां पडे । सस्वेद[3] सगद्गद सप्रेम रडे । पुच्छ नाचवोनि पुढें । हर्षें उडे वानर ॥ ९ ॥ येथें सांपडली सीता । जाली कार्यसिद्धि रघुनाथा । यश आलें मज हनुमंता । उल्हासता नाचत ॥ ११० ॥ सीता विचारी पोटाआंत । हा म्हणवितो श्रीरामदूत । रामासवें कैंचा हनुमंत । पंचवटिकेंत हा नव्हता ॥ ११ ॥ राम लक्ष्मण दोघे वीर । त्यांसवें नाहीं वानर । कैंचें नेणों हें वनचर । नानाविकार करिताहे ॥ १२ ॥ पूर्वीं जटायु देखिला होता । नाहीं देखिलें हनुमंता । येथें आलासे अवचिंतां । सीताछळणार्था रावण ॥ १३ ॥ पूर्वीं होवोनि आला संन्यासी । आतां जाला वानरवेषी । कैंवी विश्वासूं मी यासी । सीता मानसीं विचारी ॥ १४ ॥ श्रीरामकथा अनुवादत । धन्य धन्य हा श्रीरामभक्त । कपटी नव्हे हा हनुमंत । मज निश्चित मानलें ॥ १५ ॥ मिथ्या म्हणों न ये हनुमंता । सत्य सांगितली श्रीरामकथा । याच्या पूर्वापरवृत्तांता । यासी मी आतां पुसेन ॥ १६ ॥ सीता पुसेल वृत्तान्त । सत्य सांगेल हनुमंत । तेचि कथेचा कथार्थ । मुख्य मोक्षार्थ अवधारा ॥ १७ ॥ एकाएकीं[4] अशोकवनाआंत । आला देखुनी हनुमंत । त्याचा समूळ वृत्तान्त । पुसे सायंत जानकी ॥ १८ ॥

ततो रामकथां श्रुत्वा वैदेही वानरर्षभम् ।
उवाच वचनं सीता प्रियं मधुरया गिरा ॥ ४ ॥
क्व ते रामस्य संसर्गः कथं जानासि लक्ष्मणम् ।
वानराणां नराणां च कथमासीत्समागमः ॥ ५ ॥
रामस्य यानि लिंगानि लक्ष्मणस्य च वानर ।
तानि भूयस्त्वमाचक्ष्व न मां शोकः समाविशेत् ॥ ६ ॥

मी वनवासीं असतां । तूं नव्हतासी हनुमंता । कैंचा आलासी तूं आतां । निजवृत्तांता मज सांगें ॥ १९ ॥ कैसेनि श्रीराम देखिला दृष्टीं । तुम्हां श्रीरामा कैसेनि भेटी । कैशा कैशा केल्या गोष्टी । जेणें कां पोटीं अति प्रीती ॥ १२० ॥ कैसा बाणला वचनार्थ । साधावया श्रीरामकार्यार्थ । हनुमान सर्वांगीं उल्लासत । तो गुह्यार्थ मज सांगें ॥ २१ ॥ श्रीराम भेटल्या कैसें सुख । श्रीरामवचनीं कैसें पीयूख[5] । श्रीरामसंगें कैसा हरिख[6] । योगपरिपाकें मज सांगें ॥ २२ ॥ श्रीरामाचें ठाँणमाण[7] । रूप रेखा गुणलक्षण । कैसा आहे सखा लक्ष्मण । दोहींची खूण मज सांगें ॥ २३ ॥ ऐकतां श्रीरामाची कथा । दुःख शोक नाठवे चित्ता । निमे भवभयाची वार्ता । कथा ऐकतां आनंद ॥ २४ ॥ याचिलागीं पुढतपुढती । तुज मी पुसें अति प्रीती । कथेमाजी अति विश्रांती । जाण मारुती हरिभक्ता ॥ २५ ॥ केलिया कथेचें श्रवण । नाहीं

१ पायधूळ. २ आनंदाच्या. ३ घर्मयुक्त. ४ एकाएकीं. ५ अमृत. ६ हर्ष. ७ शरीराची ठेवण.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

मनन निदिध्यासन। तरी ते कथा होय शून्य। जेंवी मैथुन वंध्येचें॥ २६॥ श्रद्धा श्रीरामकथाश्रवण। ऐकती त्यांचें महिमान। अहं सोहं कोहं विरोन। ब्रह्म पूर्ण स्वयें होती॥ २७॥ चित्त तेंचि होय चैतन्य। बुद्धि समसाम्य समाधिधन। कर्म होय ब्रह्म परिपूर्ण। इंद्रियाचरण चिन्मात्र॥ २८॥ ऐसी श्रीरामस्वरूपसंस्था। सादरें पुसतां पैं सीता। टँक पडली हनुमंता। कथा वार्ता विसरला॥ २९॥ श्रीरामस्वरूप वदे सुंदरा। तेणें अवस्था अति वानरा। नेत्रीं अश्रूंचिया धारा। अंग थरथरां कांपत॥ १३०॥ अंग जालें रोमांचित। स्वेद आला डवडवित। मूर्च्छापन्न पडे हनुमंत। तेणें विस्मित जानकी॥ ३१॥ वानर वनचर पालेखाईर। त्यासी श्रीरामीं प्रेमपडिभार। लंघोनि आलें हें सागर। भक्त साचार हनुमंत॥ ३२॥ ऐसें जाणोनि तत्त्वतां। आवडीं आश्वासी[2] त्या सीता। सावधान करी हनुमंता। श्रीरामवार्ता पुसावया॥ ३३॥ एका जनार्दना शरण। सीताहनुमंतसंवादकथन। गोड गोड निरूपण। सावधान अवधारा॥ १३४॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां ब्रह्मलिखितजानकीहनुमंतसंवादकथनं नाम अष्टाविंशतितमोऽध्यायः॥ २८॥ ओंव्या॥ १३४॥ श्लोक॥ ६॥

अध्याय एकोणतिसावा

॥ श्रीविघ्नहारकाय नमः॥ सीता पुसे श्रीरामज्ञान। तें सांगावया हनुमान जाण। गिळोनियां ज्ञानाज्ञान। जाला सावधान श्रीरामें॥ १॥

एवमुक्तस्तु वैदेह्या हनुमान्मारुतात्मजः।
ततो रामकथातत्त्वमाख्यातुमुपचक्र मे॥ १॥
देवि रामस्य लिंगानि लक्ष्मणस्य च यानि मे।
लक्षितानि विशालाक्षि तानि वै शृणु तत्त्वतः॥ २॥

सीतेनें पुसिली श्रीरामकथा। तेचि सांगावया स्वरूपता। उल्हास हनुमंताचे चित्ता। यथार्थता सांगत॥ २॥ लक्ष्मणाचें निजलक्षण। ठाणमाण सगुणगुण। समूळ सांगेल आपण। सावधान अवधारा॥ ३॥ सादर श्रवणार्थी स्वयें सीता। तेणें आल्हाद हनुमंता। सावधान[3] मिळाल्या श्रोता। वदे वक्ता आल्हादें॥ ४॥ श्रीरामरूप अति स्वरूप। रूपें जिंतला कंदर्प। परी तो रूपेंचि अरूप। चित्स्वरूप श्रीराम॥ ५॥ राम राजीवलोचन[4]। जगाचे नयना सादृश्य तें नयन। परी देखणा डोळेवीण। देखणेपण हें त्याचें॥ ६॥ दृश्य देखे हें तत्त्व गौण। श्रवणान्तें[5] देखणे नयन। सर्वांगदेखणा रघुनंदन। डोळेविण देखत॥ ७॥ कुंडलें वर्णिती साकार। एक म्हणती मकराकार। श्रवणें मावळती विकार। निर्विकार निजलेणें॥ ८॥ श्रीरामाचेनि श्रवणें। श्रवणां होती निजभूषणें। श्रवणां श्रवणचि लेणें[6]। श्रवण देखणें परब्रह्म॥ ९॥ परमार्थाचें मुख्य वीक[7]। निर्पेक्षा[8] तेंचि नासिक। तेणेंवीण तें निर्नासिक। कैंचें सुख सापेक्षा॥ १०॥ श्रीरामाची नासिकस्थिती। प्राण्या प्राणें नित्य विश्रांती। श्रीराम जाणे प्राणगती। गतीसी विश्रांति श्रीराम॥ ११॥ श्रीरामाचा मुखमयंक[9]। नित्यानंदें निष्कळंक। ब्रह्मादि देवां सुखदायक। जीवशिवां सुख श्रीरामें॥ १२॥ जीव शिव ते दोन्ही अधर[10]। श्रीरामअधरीं जाले सधर। मिळणीं मिळाले एकाकार। शिवसुख साचार श्रीराम॥ १३॥ श्रीराममुखीं दंतपंक्ती। जेंवी ओंकारामाजी श्रुती। श्रुतिस्मृतींसी निजविश्रांती। श्रीराममूर्तिमुखचंद्र॥ १४॥ श्रीरामाचे निजनिढळीं। सच्चिदानंद हेचि त्रिवळी। त्याचे ललाटभाग्यसमेळीं। लोकीं सकळीं नांदिजे॥ १५॥ प्रेमकेशरसमेळा। टिळक रेखिला पिंवळा। निर्धार अक्षता निढळा। राम प्रेमळां पढियंता॥ १६॥ अहं मृग वधी निर्लोभेंसीं। काढिलें सोहं मृगनाभीसी[11]। तेंही अर्पिलें श्रीरामासी। निजांगासी चर्चोनी॥ १७॥ जन विजन विवंचून। साधिलें निजधैर्य चंदन। त्याचाही सुगंध काढून। उद्वर्तन श्रीरामा॥ १८॥ विद्याअविद्याशक्तिपडळा। त्यजोनि काढिलें मुक्ताफळा। तेच श्रीरामाचे गळां। मुक्तामाळा शोभत॥ १९॥ ॐकार तोचि कंबुकंठ[12]। तेथोनि वेदां वाहती वाट। गर्जती विधिवादें उद्भट। होती प्रकट त्रिकांडीं॥ २०॥ त्वंपदा[13]

१ एकाग्रता. २ धीर दिला. ३ लक्षपूर्वक ऐकणारा. ४ कमललोचन. ५ कानापर्यंत. ६ भूषण. ७ तेज.

८ निरिच्छता. ९ मुखचंद्र. १० ओंठ. ११ कस्तुरीला. १२ शंखाकृति गळा. १३ जीवात्म्याला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

तत्पदा[1] अतीतें[2]। हृदयीं पदक सदोदित। साधुचिद्रत्नीं रत्नखचित। लखलखीत निजतेजें ॥ २१ ॥ म्हणती कांसे कसिला पीतांबर। श्रीरामकांसे चिदंबर। झांकी शून्यत्वाचें छिद्र। कांसे अच्छिद्र श्रीराम ॥ २२ ॥ श्रीरामकांस दृढ भारी। एकपत्नीव्रतधारी। कांसे लागल्यातें तारी। भवसागरीं तारक ॥ २३ ॥ श्रीराम आकळे सगळा। भक्तभावार्थ कटिमेखळा। क्षुद्रघंटिकाज्वाळमाळा। जालिया सकळा ऋद्धिसिद्धी ॥ २४ ॥ सूक्ष्म मध्याची रचना। अभिमान होता पंचानना। देखोनि श्रीराममध्यरचना। लाजोनि वना तो गेला ॥ २५ ॥ पहावया श्रीराममध्यासी। शाहाडे[3] जडले मेखळेसीं। सर्वस्वें वेधले श्रीरामासीं। जावों वनासी विसरले ॥ २६ ॥ श्रीरामचरणांची ख्याती। जड पाषाण उद्धरती। श्रीराम सकळांची गती। गतींस सद्गति श्रीराम ॥ २७ ॥ श्रीरामचरणांचेनि भूषणें। वांकीनें वेदांसी आणिलें उणें। ते तंव धरोनि ठेले मौन। हरिकीर्तन हें गर्जे ॥ २८ ॥ चहूं वाचांसी अगोचर। चरणीं गर्जती तोडर। श्रीराम चिदचिन्मात्र। परात्पर परब्रह्म ॥ २९ ॥ लक्षितां श्रीरामाचें मन ठाण। त्यासी ठेंगणें दिसे गगन। पाहतां श्रीरामाचें मन। पडिलें मौन श्रुतिशास्त्रां ॥ ३० ॥ पाहतां श्रीरामाचे गुण। सगुणीं दिसे निर्गुण। रामनामें हरे त्रिगुण। निजनिर्गुण श्रीराम ॥ ३१ ॥ लक्षितां श्रीरामलक्ष्मण। जो लक्षी तोचि सुलक्षण। ऐसा श्रीराम विचक्षण। लक्ष्यलक्षण त्या नाहीं ॥ ३२ ॥ श्रीराममुखींचीं अक्षरें। क्षराक्षरातीत परें। सभाग्य सेविती श्रवणद्वारें। सर्वांगीं सुभरे स्वानंद ॥ ३३ ॥ देखतां श्रीरामाचें श्रीमुख। फिकें होय समाधिसुख। स्वप्नीं न देखिजे दुःख। हरिखें हरिख कोंदाटे ॥ ३४ ॥ कोंदाटल्या परब्रह्म। ब्रह्मरूप क्रियाकर्म। हरपले धर्माधर्म। जाला उपरम वेदवादा ॥ ३५ ॥ ऐसा श्रीराम नेटका। तैसाचि सौमित्र निजसखा। दोघां अभिन्नत्व देखा। भिन्न आवांका दिसताहे ॥ ३६ ॥ घालोनियां लोटांगण। तुज कुशळ कल्याण। स्वयें पुसे लक्ष्मण। पुसे कल्याण श्रीराम ॥ ३७ ॥

ऐसें हनुमंतें सांगतां। तटस्थ ठेली श्रीरामकांता। आपआपणा विसरे सीता। हनुमंताचेनि बोलें ॥ ३८ ॥ हनुमंताचे बोलाआंत। अवघा आणिला श्रीरघुनाथ। तेणें सीतेचा मनोरथ। सदोदित स्वानंदें ॥ ३९ ॥ हर्षे न माय पोटीं। होत हर्षाचिया कोटी। तेणें हर्षें सीता गोरटी। घाली मिठी हनुमंता ॥ ४० ॥ वानर वदे मनुष्यवाणी। श्रीरामकथा त्याचे वदनीं। ज्या कथेच्या निजश्रवणीं। भवबंधनीं निर्मुक्त ॥ ४१ ॥ ऐकोनि वानराच्या गोष्टी। सत्य श्रीरामीं जाली भेटी। निरसोनियां दुःखकोटी। ओतली सृष्टी सुखरूप ॥ ४२ ॥ हरिखाच्या लवलाह्या। स्वानंदें पसरोनि बाह्या। आलिंगिलें कपिराया। जेंवी कां माया[4] प्रियपुत्रा ॥ ४३ ॥ सीतेसी सुख जालें गाढें। पुत्रसुख तृण[5] त्यापुढें। हनुमंत वाडेंकोडें। प्रेमपडिपाडें पँढियंता ॥ ४४ ॥

कपे त्वामभिनंदामि चिरं जीव सुखी भव।
सानुजः कुशली भर्ता त्वया मेऽद्य निवेदितः ॥ ३ ॥
बलेन यशसा चैव वर्धस्व प्रज्ञयापि च।
शतयोजनविस्तीर्णं सागरं मकरालयम् ॥ ४ ॥
विक्रम्य श्लाघनीयेन क्रमता गोष्पदीकृतः।
न हि त्वां प्राकृतं मन्ये वानरं वानरर्षभ ॥ ५ ॥
येनायं राक्षसावासस्त्वयैकेन प्रधर्षितः ॥ ६ ॥

श्रीराम भर्ता लक्ष्मण देवर। दोघे सुखरूप महावीर। हें ऐकतांचि उत्तर। सुख अपार मज जालें ॥ ४५ ॥ मज येथें सामासांपाठीं। श्रीरामाची कथा गोष्टी। आजि ऐकिली तुझे वाक्पुटीं। धन्य सृष्टीं हनुमंता ॥ ४६ ॥ मरतया अमृतपान। सुकतया मीना मिळे जीवन। दुकळलिया मिळे मिष्टान्न। तेंवी तुझें वचन हनुमंता ॥ ४७ ॥ श्रीरामस्वरूपाची कथा। जेंवी वदलासी हनुमंता। ते मुखीं ब्रह्मसायुज्यता। न ये तुकितां तुकेसीं ॥ ४८ ॥ श्रीरामकथाअनुवादन। तेणें मी जालें सुखसंपन्न। तुज मी वदतें वरदान। सावधान अवधारीं ॥ ४९ ॥ हनुमंता होईं चिरंजीवी। तेंही जीवित्व ज्ञानानुभवी। नित्य नवा सुखसंभवी। श्रीरामपदवीवैभवें ॥ ५० ॥ तुज कळिकाळ

१ परमात्म्याला. २ अगम्य. ३ एक प्रकारचें हरिण. ४ आई. ५ तुच्छ. ६ प्रेमातिशयानें. ७ आवडता. ८ दीर. ९ तुलनेला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

कांपे चळीं। ऐसा होशील आतुर्वेळी। यश पावसी भूमंडळीं। नामसमेळीं श्रीरामें ॥ ५१ ॥ निरसोनियां ज्ञानाज्ञान। श्रीरामभजनें प्रबुद्ध प्राज्ञ। ज्ञेय मुके जाणपण। श्रीरामस्मरणाचेनि बळें ॥ ५२ ॥ शतयोजन सिंधु अगाध। तुवां लंघिला जैसा गोष्पद[१]। त्यापुढें कायसें माझें वरद। प्रज्ञाप्रबुद्ध[२] हनुमंत ॥ ५३ ॥ तुज म्हणों न ये वानर। सुरासुरां तूं दुर्धर। धांडोळिलें लंकानगर। निशाचरें गांजोनी ॥ ५४ ॥ एकला एक हनुमंत। रावणाचे सभेआंत। करोनि राक्षसां आकांत। लंकानाथ गांजिला ॥ ५५ ॥ लंकेमाजी कडोविकडीं। गांजिल्या राक्षसांच्या कोडी। रावणाची सभा उघडी। केली रोकडी तुवां एकें ॥ ५६ ॥ एवढा करितांही आकांत। येथें आलासी हनुमंत। नाहीं कळलें लंकेआंत। ऐसा समर्थ तूं एक ॥ ५७ ॥ रावण मंदोदरीएकान्त। तिचा ऐकोनि स्वप्नवृत्तान्त। आलासी अशोकवनाआंत। अति समर्थ तूं एक ॥ ५८ ॥ ऐसा प्रतापशिरोमणी। पावलासी अशोकवनीं। तूंचि जनक तूंचि जननी। राम घेवोनि शीघ्र यावें ॥ ५९ ॥ तुझी होईन मी दासी। चरण झाडीन निजकेशीं। शीघ्र आणावें श्रीरामासी। म्हणोनि पायांसी लागली ॥ ६० ॥ तुवां वंदिले माझे चरण। म्यां काय व्हावें उत्तीर्ण। आलें हनुमंतासी स्फुरण। भेटवीन श्रीरामा ॥ ६१ ॥ तुज येवढी अवस्था। विलंब कायसा वो आतां। शीघ्र भेटवीन श्रीरघुनाथा। बैसें आतां मम पृष्ठीं ॥ ६२ ॥

पृष्ठमारोह वैदेहि मा भूत्कालस्य पर्ययः।
त्वय्यहं पृष्ठलीनायां संतरिष्यामि सागरम् ॥ ७ ॥
शक्तिरस्ति हि मे वोढुं लंकामपि सकाननाम्।
द्रक्ष्यस्यद्यैव वैदेहि राघवं सहलक्ष्मणम् ॥ ८ ॥
न हि मे संप्रयातस्य त्वां गृहीत्वा वरानने।
अनुगंतुं गतिः शक्तिः सर्वलंकानिवासिनाम् ॥ ९ ॥

माझे पृष्ठीं बैसल्या सीता। येचि क्षणीं श्रीरघुनाथा। तुज भेटवीन मी आतां। विलंब वृथा करूं नको ॥ ६३ ॥ शुद्धि सांगावया रघुनाथा। तुज मज सांडोनि जातां। मागें राक्षसीं केलिया घाता। शुद्धि वृथा होय माझी ॥ ६४ ॥ येथें मजचि देखतां। रावण मारूं आला होता। दैवें चुकविलें अनर्था। सांडोनि जातां मज न ये ॥ ६५ ॥ सांडोनि जाणें न घडे गोष्टी। वेगीं बैसें माझे पाठीं। करीन श्रीरामेंसीं भेटी। विकल्प पोटीं धरूं नको ॥ ६६ ॥ शूर्पणखा केली नकटी। तुझा राग तिच्या पोटीं। तुज मारील उठाउठीं। महा खोटी राक्षसी ॥ ६७ ॥ लंकात्रिकूटमहागिरी। उपडोनियां बळेंकरीं। एके उड्डाणें[३] समुद्रीं। नेईन परतीरीं जानकिये ॥ ६८ ॥ करोनि एकचि उड्डाण। तुज भेटवीन रामलक्ष्मण। वाहतों श्रीरामाची आण। करीं आरोहण पृष्ठिभागीं ॥ ६९ ॥ तुज म्यां नेतां अति त्वरेंसीं। राक्षसवीरां महासुरांसी। वेगें न येववे मजपासीं। त्या मशकांसी कैंवी ढोंके[४] ॥ ७० ॥ आलिया इंद्रजित कुंभकर्ण। त्यांसी रणीं विभांडून। रावणातेंही गांजोन। भेटवीन श्रीरामा ॥ ७१ ॥ ब्रह्मलिखिताची व्युत्पत्ती। पूर्वसंवाद सीतामारुती। रामें परिसावया हनुमत्कीर्ती। नानायुक्तीं लिहिली असे ॥ ७२ ॥

कथमाकाशपंथानं क्रमस्युपरि सागरम्।
प्रपतेयं हि ते पृष्ठाद्भयाद्वेगेन गच्छतः ॥ १० ॥
ततो मां पतितां दृष्ट्वा सागरे मकरालये।
भक्षयंत्यप्रतिभया ग्राहाः सागरवासिनः ॥ ११ ॥
ह्रियमाणां तु मां दृष्ट्वा मकरैर्भीमविक्रमाः।
प्रहरिष्यंति ते व्योम्नि राक्षसास्त्वां निरायुधम् ॥ १२ ॥
कथं शक्ष्यसि संयातुं मां चापि परिरक्षितुम्।
युध्यमानस्य रक्षोभिस्ततस्तैः क्रूरकर्मभिः ॥ १३ ॥
प्रपतेयं च तान् दृष्ट्वा भयार्ता कपिसत्तम।
अथवा युद्ध्यमानस्य पतेयं विमुखस्य ते ॥ १४ ॥
पतितां मां हरिष्यंति राक्षसा भीमविक्रमाः ॥ १५ ॥

सीता म्हणे अवधारीं। बैसतां तुझे पृष्ठीवरी। तुझ्या उड्डानवेगेंकरीं[५]। पडेन सागरीं हिसळोन ॥ ७३ ॥ पडतांचि सागराप्रती। मत्स्य मगर मज गिळिती। तेव्हां तूं पडसी आवर्तीं[६]। कैंवी मारुति म्यां यावें ॥ ७४ ॥ कां धावणें आलिया लागवेगीं। तूं परतसी युद्धालागीं। झगडा देतां युद्धभागीं।

१ गाईच्या पावलांतील पाणी. २ महाबुद्धिवान्. ३ आवेशानें, ४ गांठवणार, ५ उड्डाणाच्या वेगानें, ६ घोंटाळ्यांत, संकटांत.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

मी रणरंगीं पडेन ॥ ७५ ॥ मज पडतांचि क्षितीं । क्रोधें राक्षस मज मारिती । हेही न घडे गा युक्ती । कैंवी मारुती म्यां यावें ॥ ७६ ॥ मज मारिलिया-पाठीं । जरी तुवां मारिल्या राक्षसकोटी । सुख नव्हे श्रीरामाच्या पोटीं । हे बुद्धि खोटी हनुमंता ॥ ७७ ॥ सीते ऐकें सावध गोष्टी । मज न लगे युद्धअटाटी । माझें पुच्छ कोपल्यापाठीं । मारील कोटी राक्षसां ॥ ७८ ॥ तुज मी सुखीं राखीन स्वस्थ । माझें पुच्छ प्रतापवंत । करील राक्षसांचा घात । अर्बुदांत जरी आले ॥ ७९ ॥ सीता म्हणे तूं अल्प मारुती । तुझें पुच्छ तंव तें किती । कैंवी राक्षसां लावील ख्याती । सत्यत्व चित्तीं मानेना ॥ ८० ॥

न मे जानासि सत्त्वं त्वं प्रभावमसितेक्षणे ।
तस्मात्पश्य तु वैदेहि यद्रूपं परमं मम ॥ १६ ॥
विंध्यमंदरसंकाशो बभौ दीप्तानलप्रभः ।
अग्रतो व्यवतस्थे स सीताया वानरर्षभः ॥ १७ ॥

सीते म्हणसी वानर किती । कायसी पुच्छाची शक्ती । पाहें माझी स्वरूपस्थिती । म्हणोनि मारुती वाढला ॥ ८१ ॥ विंध्य मेरु आणि मंदार । त्यांहून वाढला वानर । जैसा प्रलयकाळाग्निरुद्र । तैसा दुर्धर भासत ॥ ८२ ॥ सीते नेणसी माझें सत्त्व । पाहें माझें स्वरूप प्रभाव । देव दानव आणि मानव । राक्षस सर्व गांजीन ॥ ८३ ॥ माझें पुच्छ पाहें प्रतापवंत । राक्षसदळणीं अति समर्थ । सगळी लंका तुजसमवेत । निमेषार्धांत नेईन ॥ ८४ ॥ विकल्प सांडोनियां पोटीं । सीते बैस माझे पृष्ठीं । करीन श्रीरामासीं भेटी । सुखसंतुष्टी स्वानंदें ॥ ८५ ॥ परपुरुषीं आरोहण । हेंचि पतिव्रतेसी दूषण । ऐकोनि सीतेचें वचन । पूर्वकथन कपि सांगे ॥ ८६ ॥ राम सर्वार्थीं सर्वज्ञ । गर्भीं ब्रह्मचर्यकौपीन । माझी श्रीराम देखोन । धाडी आपण तुजपासीं ॥ ८७ ॥ माझी जाणोनि समूळ स्थिती । स्त्रियेसीं भेटी एकांतीं । ऐसें जाणोनि श्रीरघुपती । मज तुजप्रती धाडिलें ॥ ८८ ॥ तुझा विकल्प जावया जाण । निजमुद्रा देवोनि खूण । श्रीरामें धाडिलें आपण । अपत्य जाण मी तुझें ॥ ८९ ॥ आणिक सांगितली खूण । कैकेयी वल्कलें परिधान । तुज नेसतां न येती जाण । श्रीरामें आपण नेसविलीं ॥ ९० ॥ खूण सांगतां हनुमंता । चित्तीं चमत्कारली सीता । विकल्प सांडोनि तत्त्वतां । गुज एकांता पूसत ॥ ९१ ॥ श्रीरामें आणविलें शुद्धीसी । किंवा आणविलें सीतेसी । हें सत्य सांगें मजपासीं । त्या कार्यासी मी करीन ॥ ९२ ॥ श्रीरामें आणविली सीता । तरी आतांच येईन हनुमंता । ऐसें सीतेनें पूसतां । आला कपिनाथा गहिंवर ॥ ९३ ॥ आपुला दावोनि पुरुषार्थ । शीघ्र नेईन म्हणे हनुमंत । अगाध सीतेचें महिमासामर्थ्य । पुसे इत्यर्थ आज्ञेचा ॥ ९४ ॥ सावध अवधारीं वो माते । असत्य न बोलें मी येथें । श्रीरामें आणविलें शुद्धीतें । हेचि निश्चितें रामाज्ञा ॥ ९५ ॥ सीता म्हणे हनुमंता । विलंब न करावा सर्वथा । शीघ्र जावोनियां आतां । श्रीरघुनाथा सांगावें ॥ ९६ ॥ मजवरी कृपा आहे हनुमंता । तरी जावोनि शीघ्रता । शुद्धि सांगावया श्रीरघुनाथा । चरणीं माथा ठेविला ॥ ९७ ॥ सीतेनें करितां नमस्कार । पायांवरी लोळे वानर । अहो मी तुझें रंक किंकर । आज्ञाधार नेमस्त ॥ ९८ ॥ श्रीरामसेवक जो जो कोणी । तो मज वंद्य मुकुटमणी । त्याचे चरणीं लोटांगणीं । सत्य वाणी हनुमंता ॥ ९९ ॥ ऐकतां सीतासद्भाववचन । आलें हनुमंता स्फुरण । आतांचि देईं आपली खूण । शीघ्र गमन मी करितों ॥ १०० ॥ सत्य मानावया वानरा । खूण म्यां आणिली श्रीराममुद्रा । तूंही खूण दे श्रीरामचंद्रा । सत्य कपींद्रा मानावया ॥ १ ॥ ऐकतां कपीचें वचन । सीता खूण दे कळवळोन । कैसी दिधली खूण । सावधान अवधारा ॥ २ ॥

एष चूडामणिर्दिव्यो मया सुपरिरक्षितः ।
मनःशिलायास्तिलको गंडपार्श्वे निवेशितः ॥ १८ ॥
अखिलेन यथा दृष्टामिति मामाह जानकी ।
चित्रकूटे महाप्राज्ञ वायसं प्रति मानद ॥ १९ ॥
क्षिप्तामिषीकां काकस्य रोषादेकाक्षिशातनीम् ॥ २० ॥

उकलोनियां निजवेणी । खुणेसीं दिधला चूडामणी । खूण सांगीतली मुखवचनीं । श्रीरामाला-

१ लढाईचा खटाटोप. २ अब्जावारी. ३ राक्षस मारण्याच्या कामांत. ४ कुकल्पना. ५ शोधाकरितां. ६ चाकर. ७ खूण म्हणून.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

गोनी सांगावया ॥ ३ ॥ श्रीरामें स्वहस्तें स्वलीळा। उगाळोनि मनशिळा । माझे कपाळीं लाविला टिळा। गोळांगूळीं हे खूण सांगें ॥ ४ ॥ चित्रकूट पर्वतांत। काकें मज क्षतविक्षत। करितां कुचाग्रीं रक्तार्क्ते। तेणें रघुनाथ क्षोभला ॥ ५ ॥ कोपें इषीकास्त्र सोडितां। कागें तिहीं लोकीं पळतां। शिव शक्र यम विधाता। कोणी रक्षिता नव्हेचि ॥ ६ ॥ नारदवचनें तो मागुता। शरण आला श्रीरघुनाथा। डाव्या डोळया करोनि घाता। होय रक्षिता श्रीराम ॥ ७ ॥ ऐसीं दिव्यास्त्रें तुजपासीं। तरी कां मज उपेक्षिसी। मृगामागें धाडिलासी। तेणें रुसलासी श्रीरामा ॥ ८ ॥ महापापीण मी सीता। स्वामीवरी केली सत्ता। तेणें आतुडलें लंकानाथा। अधर्मता महादोषें ॥ ९ ॥ लक्ष्मण ठेविला त्वां रक्षण। त्याचेंही म्यां केलें छळण। ऐसी पापिणी मी जाणोन। सोडँवण न करिसी ॥ ११० ॥ सकळ दोष श्रीरघुनाथा। क्षमा करीं कृपावंता। ऐसें हनुमंतासी सीता। अति दीनता अनुवादे ॥ ११ ॥

एवमुक्तो हनुमता रामो दशरथात्मजः।
तन्मणिं हृदये कृत्वा रुरोद सह लक्ष्मणः ॥ २१ ॥
अयं हि जलसंभूतो मणिः परमभूषणः।
युद्धेन परितुष्टेन दत्तः शक्रेण मे पितुः ॥ २२ ॥
अस्याद्य दर्शनेनाहं तां प्राप्तामिव चिंतये।
किमिहासीत वैदेही ब्रूहि सौम्य पुनःपुनः ॥ २३ ॥

हनुमंतासीं संभाषण। करून सीता दीनवदन। चिंतामणि हृदयीं धरोन। रामलक्ष्मण अति दुःखी ॥ १२ ॥ श्रीरामासी आलें रुदन। अश्रुधारा स्रवती नयन। मस्तकमणि हृदयीं धरून। करी स्फुंदन कृपाळु ॥ १३ ॥ वारिज समुद्रमणी। युद्धीं इंद्रें संतोषोनी। दिधला दशरथालागोनी। नमुचि जैं रणीं पराभविला ॥ १४ तो हा दशरथें महामणी। दिधला कौसल्ये प्रियपत्नी। तिनें दिधला सीतेलागोनी। प्रथमदर्शनीं सूनमुखीं ॥ १५ ॥ मणि देतां हनुमंता। माता पिता प्रियकांता। तिघें भेटलीं तत्त्वतां। ऐसी मज चिंता होतसे ॥ १६ ॥ मणि मजपासीं देतां। प्रत्यक्ष भेटलीसे सीता। ऐसा आल्हाद श्रीरघुनाथा। हनुमंता आलिंगी ॥ १७ ॥ आलिंगूनि पुसे हनुमंता। पुढें काय वदली सीता। ते ते सांगें समूळ वार्ता। ऐके सादरता श्रीराम ॥ १८ ॥ ऐसें पुसतां श्रीरघुनंदन। हनुमान घाली लोटांगण। पुढील सीताअनुवादन। वाची लक्ष्मण ब्रह्मलिखित ॥ १९ ॥ समुद्रलंघनीं दिसे अंभावो। स्वयें सीतेसी हा संदेहो। तोचि हनुमंतासी पहा हो। स्वयमेव पूसत ॥ १२० ॥

सीतोक्तिः—
अयं च वीर संदेहस्तिष्ठतीव ममाग्रतः।
कथं नु खलु दुष्पारं तरिष्यंति महोदधिम् ॥ २४ ॥
तानि हर्यक्षसैन्यानि तौ वा नृपवरात्मजौ।
त्रयाणामेव भूतानां सागरस्य विलंघने ॥ २५ ॥
शक्तिः स्याद्वैनतेयस्य तव वा मारुतस्य च ॥ २६ ॥

ऐक बापा हनुमंता। माझे पोटीं परम चिंता। समुद्रलंघनीं तिघांची सत्ता। न देखें चौथा पुरुषार्थी ॥ २१ ॥ गरुड वायो कीं हनुमंता। दुर्धर समुद्र येरां समस्तां। नरवानरसह श्रीरघुनाथा। केंवी येथें आतां येववे ॥ २२ ॥ नुलंघवे गा हा सागर। न आणवे वानरांचा भार। येवों न शकती राम सौमित्र। केंवी दशवक्त्र मारवे ॥ २३ ॥ ऐकोनि सीतेचें वचन। हनुमान जाला हास्यवदन। श्रीरामाचें नेणसी महिमान। बाणप्रेरण अनिवार ॥ २४ ॥ श्रीरामभातां दुर्धर शर। बाणीं वाहोनि नरवानर। उतरोनियां परपार। निशाचर मारील ॥ २५ ॥ निर्दळोनि निशाचर। विध्वंसोनि लंकापुर। मारोनियां दशशिर। तुझा उद्धार करील ॥ २६ ॥ ऐसें उत्तर ऐकतां। सुखें उल्लासली सीता। वेगीं जाईं बा हनुमंता। शीघ्र रघुनाथा आणावया ॥ २७ ॥ न करितां युद्धकंदन। न करितां राक्षसांचें दमन। न करितां लंकादहन। उगा येथोन मी नें वेचें ॥ २८ ॥ मी काय आलों नाटिकारें। मी नेऊं तें प्रतिउत्तर। लंकेमाजी करीन क्षेत्र। दशवक्त्र गांजीन ॥ २९ ॥ राक्षसांचें बळ किती। किती सैन्य शस्त्रशक्ती। अवघी तुकीन मी मारुती। रणव्युत्पत्ती भिडेन ॥ १३० ॥ राक्षसांसीं करा-

१ धातुविशेष. २ वानरा. ३ घायाळ. ४ रक्तबंबाळ. ५ कावळा. ६ सांपडलें. ७ सुटका. ८ पाण्यांतून उत्पन्न झालेला. ९ या नांवाचा दैत्य. १० असंभव. ११ जाणार नाहीं. १२ निरोप्या; शिपाई. १३ जबाब. १४ रणक्षेत्र.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वया झगडा । मुख्य मूळ वनउपाडा । हनुमान बुद्धिवंत गाढा । केलें पुढां तें ऐका ॥ ३१ ॥ ऐसें विचारी जंव आपण । सीता म्हणे करीं वा गमन । हनुमान घाली खालती मान । लज्जायमान बोलेना ॥ ३२ ॥ भेटावया श्रीरघुनाथा । उल्लास न देखे हनुमंता । ऐसी प्रबळ कोण चिंता । ते मज तत्त्वतां सांगावी ॥ ३३ ॥ माझे सांगतां निजवृत्तांता । तुज लागेल अति चिंता । शोध तुझे हो न करितां । अन्नपानता मज नाहीं ॥ ३४ ॥ नाहीं अन्न नाहीं जीवन । क्षुधेनें जावों पाहे प्राण । न करवे समुद्रलंघन । अति उद्विग्न तेणेंसीं ॥ ३५ ॥ कपीचें वचन ऐकतां । गहिवरें रुदन करी सीता । महापापीण मी तत्त्वतां । धाडीं हनुमंता भुकेलें ॥ ३६ ॥ हें माझें करकंकण । लंकेमाजी जावोनि आपण । घेवोनि चतुर्विधा अन्न । करीं भोजन यथेष्ट ॥ ३७ ॥ हनुमान पुसे सीतेसी । अन्नाची चवी आहे कैसी । सीता म्हणे हनुमंतासी । काय तुम्हांसी भक्षणें ॥ ३८ ॥ आम्ही वानर वनचर । वनवासी निरंतर । नित्य वनफळांचा आहार । अन्नमात्र स्पर्शेना ॥ ३९ ॥ माझें मोडोनि कंकण । लंकेमाजी फळें संपूर्ण । आवडे तें घेवोनि आपण । फळभोजन करीं बापा ॥ १४० ॥ ऐक वो माते माझें शीळ । मी तंव स्वयंपाकी केवळ । ज्यासी मनुष्याचा विटाळ । तें मज फळ अपवित्र ॥ ४१ ॥ हाटवटींचें विक्रीत अन्न । जेंवी न घेती सुब्राह्मण । तैशींच फळें विक्रीत जाण । मजलागून अपवित्र ॥ ४२ ॥ ऐकोनि कपीचिया मता । साशंकित जाली सीता । हनुमंतासी आहारार्था । काय त्यां आतां अर्पावें ॥ ४३ ॥ याचि अशोकवनाआंत । फळें आहेत अत्यद्भुत । यांसी लावितांचि हात । करितील घात राक्षस[४] ॥ ४४ ॥ कपे तुझा करितील घात । तोच माझा प्राणान्त । साधिला प्रयत्न होय व्यर्थ । स्वामिकार्यार्थ नासेल[५] ॥ ४५ ॥ हनुमान म्हणे असो वृत्तान्त । जाईन भुकेला कुंथत । क्षुधा नव्हे हा कल्पान्त । आला प्राणान्त मजलागीं ॥ ४६ ॥ बोलतां बोलतां गेला चा[१]वरीं । मूर्च्छित पडला धरणीवरी[२] । दोहीं डोळां लाविली चंद्री । सीता सुंदरी गजबजली ॥ ४७ ॥ थापटोनियां हनुमंता । स्वयें सावध करी सीता । कोणासही कळों न देतां । गुप्त आहारार्था तूं सेवीं ॥ ४८ ॥ जोंवरी होय क्षुधा[३]हरण । पडलीं फळें खावीं आपण । घालितें श्रीरामाची आण । फळें तोडोनि न खावीं ॥ ४९ ॥ ऐकोनि सीतेचे वचनासी । हनुमान खाजवी दोन्ही कुसी । मग आला वनवृक्षांपासीं । निजमानसीं विचारी ॥ १५० ॥ सीतावचन अति प्रमाण । पाळोनि श्रीरामाची आण । वृक्ष उपटोनि झोडीन । फळें खाईन पडलीं तीं ॥ ५१ ॥ ऐकोन हनुमंताचें वृत्त । श्रीराम गदगदां हांसत । सुग्रीवादि कपि समस्त । स्वयें हांसत सौमित्र ॥ ५२ ॥ श्रीराम म्हणे गा सौमित्रा । कपीनें दमिलें निशा[४]चरां । लंकेमाजी केलें क्षेत्रा[५] । त्या ब्रह्मपत्रा वाचीं[६] वेगीं ॥ ५३ ॥ कैसें विध्वंसिलें वन । कैसें केलें राक्षसकंदन । इंद्रजित गांजिला दशानन । ब्रह्मलेखन तें वाचीं ॥ ५४ ॥ एका जनार्दना शरण । हनुमंताचें लंकादहन । श्रोता श्रीराम सावधान । वक्ता लक्ष्मण तें ऐका ॥ १५५ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां हनुमत्प्रतापब्रह्मलेखनपत्रवर्णनं नाम एकोनत्रिंशत्तमोऽध्यायः ॥ २९ ॥ ओंव्या ॥ १५५ ॥ श्लोक ॥ २६ ॥

अध्याय तिसावा

॥ श्रीविघ्नहारकाय नमः ॥ हनुमंताचें युद्धकंदन । मुख्यत्वें वनविध्वंसन । घेवोनि सीतेचें आज्ञापन । फळभोजन मांडिलें ॥ १ ॥ जोंवरी होय क्षुधाहरण । पडलीं फळें खाय वेंचोन । घातली श्रीरामाची आण । फळें तोडोन न खावीं ॥ २ ॥ जानकीआज्ञा वंदोनि शिरीं । वनाची करावया बोहेरी । हनुमान जाऊनियां दूरी । फळाहारीं बैसला ॥ ३ ॥ काळाग्नि आव्हानूनि जठरीं । मग बैसला फळाहारी । वना आली महामारी । वन संहारी कपिपुच्छ ॥ ४ ॥ सीतेची आज्ञा प्रमाण । घातली श्रीरामाची आण । पुच्छें वृक्ष उपडोन । तळीं झाडोन फळें खाय ॥ ५ ॥ पहिलें साकरेचें टेंक । स्वयें सेवी पित्तशामक ।

---

१ झेंप गेली, २ पृथ्वीवर. ३ भुकेची पूर्तता. ४ राक्षसांना. ५ नाश. ६ बोलावून.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वृक्षउपाडा केला अनेक । भक्षोनि वृक्ष झुगारी ॥ ६ ॥ हनुमान आपोशन न मोडी । बैसली बैसका न सोडी । पुच्छ पुरवी नाना परवंडी[1] । वनीं वृक्ष उपडी समूळ ॥ ७ ॥ कपिभोजन धर्मस्थिती । पहिलें द्विजां घाली तृप्ती । ते बैसविले दोहीं पंक्तीं । फळें अर्पी अति प्रीतीं ॥ ८ ॥ द्विजशेष सेवी हनुमंत । तेणें होवोनियां तृप्त । धालेपणाचे ढेंकर देत । वंनविघातें[2] कपिपुच्छ ॥ ९ ॥ अनु[3]संधानावांचून । हनुमान नेघे अवदान । वनफळांचें भाग्य गहन । ब्रह्मार्पण कपिमुखें ॥ १० ॥ पिकलीं फळें रामार्पण । जारसीं[4] करी कृष्णार्पण । हिरवीं करी ब्रह्मार्पण । सावधान प्रतिग्रासीं ॥ ११ ॥ फळें खात गटगटां । मिटक्या देतसे मटमटां । वांकुल्या दावी सुरश्रेष्ठां । दावी आंगोठा दैत्यांसी ॥ १२ ॥ पिकलीं खाय आवडीकरीं । हिरवीं तोंडपालटावरी । पिंपळी मिरें कोशिंबिरी । लोंणच्यावारीं[5] खातसे ॥ १३ ॥ अलवणता वाटे ज्यांसी । सामुद्रिक मेळवी त्यांसीं । पुच्छ विध्वंसी वनासी । वृक्ष चौपासीं उपडोनि ॥ १४ ॥ ताळ तमाळ वृक्ष सरळी । खर्जुरी पोफळी नारिकेळी । उपडोनि करी वडवाळी[6] । रणकल्लोळीं हाणावया ॥ १५ ॥ राक्षससैन्य आतुर्बळी । रणीं करितां रवंदळी । हाणावया हातातळीं । करी वडवाळी वृक्षांच्या ॥ १६ ॥ युद्ध होईल निश्चित । ऐसें जाणोनि हनुमंत । शिळा पाषाण वृक्ष पर्वत । आणिले तेथ युद्धार्थी ॥ १७ ॥ वृक्ष उपडितां कपींद्रें । जागीं जालीं वनकरें । म्हणती मारा रे मारा रे । वन वानरें भंगिलें ॥ १८ ॥ बोंब उठिली एकसरीं । वन भंगिलें चौफेरीं । शस्त्र घेवोनि वनकरीं । वानरावरी लोटले ॥ १९ ॥ एक तळपती वोडँणखांडें[7] । एक विंधिती लक्षोनि कांडें[8] । एक हाणिती गोफणगुंडे । एक ते धोंडे टाकिती ॥ २० ॥ वन उपडिलें माकडें । सांगतां रावो मानील कुडें । यासी धरावें रोकडें । रावणापुढें न्यावया ॥ २१ ॥ पुच्छ लांब आहे विशेष । टपोनि धरा म्हणती एक । एक म्हणती आवश्यक । घालूनि झडप धरूं यासी ॥ २२ ॥ ऐसी वनकरांची मात । ऐकोनियां हनुमंत । त्यांचा करावया घात । मग कृतांत क्षोभला ॥ २३ ॥ हाणितां पुच्छाचा पैं साट[9] । त्यांचीं शस्त्रें करोनि पीठ । अवघे कवळोनि एकवट । बांधिली मोट बनकरांची ॥ २४ ॥ चौदा सहस्र वनकरां । पुच्छें बांधोनियां भारा । निक्षेपिलें[10] पैं सागरा । मत्स्यमकरां आहारार्थ ॥ २५ ॥ राक्षसी आंटिती[11] सीतेसी । तुवां संवाद केला ज्यासीं । तेणें मारोनि वनकरांसी । केला वनासी विध्वंस ॥ २६ ॥ एकीं सुटला अधोवात । एकी फळफळां मूतत । एकी चळचळां कांपत । मूर्च्छागत पैं एकी ॥ २७ ॥ द्वंद्वा पिटला वानरू । तुज धरूं चिरूं मारूं । तुझ्या रक्ताचा घोट भरूं । गटका करूं सगळाचि ॥ २८ ॥ सीता गांजितां सुंदरी । हनुमान गुरगुरी तयांवरी । भेणें पळाल्या निशाचरी । आपांपरी[12] ते ऐका ॥ २९ ॥ भेणें पळाली देहस्मृती । नेसणीं गळालीं नाठवे चित्तीं । नागव्या जावोनि रावणाप्रती । मग सांगती वनबोंब ॥ ३० ॥ कैंचें नेणों आलें वानर । वन विध्वंसिलें परिकर[13] । चौदा सहस्र वनकर । पुच्छें समग्र मारिले ॥ ३१ ॥ भरंवशाचे निधडे[14] वीर । ऐशीं सहस्र किंकर । रावणें धाडिले सत्वर । आणा वानर बांधोनी ॥ ३२ ॥ रणीं रगडोनि मारावी धूर । ऐसे ऐशीं सहस्र किंकर । शस्त्रें वर्षती अपार । शेखीं वानर बूजिला ॥ ३३ ॥ हनुमान विचारी पोटांत । मज न रुतती शस्त्रघात । साहोनियां शस्त्रसंपात । काय समस्त करितील ॥ ३४ ॥ हनुमान निश्चळ शस्त्रांतळीं । तंव किंकरीं पिटिली टाळी । वानरें केली रणरांगोळी । महाबळी आम्ही रणमारे ॥ ३५ ॥ घायीं तुटला निवटला । बाणीं तृणप्राय केला । ऐकोनि किंकरांच्या बोला । कपि कोपला रणरागें ॥ ३६ ॥ कपि पुच्छासी सांगे गोष्टी । आजि निर्दाळूं राक्षसकोटी । हाणितां पुच्छाच्या[15] आघाटीं[15] । जीवा साटी[16] किंकरां[17] ॥ ३७ ॥ लागतां पुच्छाचा आघात । त्यांच्या

१ प्रकारांनीं. २ वनाचा विध्वंस करणारे. ३ भगवन्नाम. कीर्तनावांचून. ४ पाडाचीं. ५ लोणच्याप्रमाणें. ६ ग्रास. ७ ढालतलवारी. ८ बाण. ९ सपाटा. १० फेंकिलें. ११ गांजिती. १२ दुर्दशा. १३ समग्र, सुंदर. १४ शूर. १५ पुच्छभागानें. १६ भय. १७ सेवकांना.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

शस्त्रां करोनि भस्मान्त । किंकर मारिले समस्त । कपि गर्जत जयरामें ॥ ३८ ॥ मी तंव श्रीरामाचा दूत । सीताशुद्धीसी आलों हनुमंत । सीता सांपडली येथ । आला अंत राक्षसां ॥ ३९ ॥ राक्षसां करोनि रगडा । झाडीन इंद्रजिताचा पादांडा । रावण गांजोनियां गाढा । राम रोकडा आणीन ॥ ४० ॥ ऐकतां हनुमंताची मात । बोंब उठली लंकेआंत । ऐकोनि किंकरांचा घात । लंकानाथ दचकला ॥ ४१ ॥ प्रहस्तसुत आतुर्बळी । रागें धाडिला जंबुमाळी । कपि बांधोनि गळेसमेळीं । मजजवळी आणावा ॥ ४२ ॥ जरी येसी कपि न मारून । तरी तुझे मस्तका सूत्रवपन । शेखीं नासिक छेदीन । खरारोहण विटंब ॥ ४३ ॥ जंबुमाळी क्रोधायमान । वर्षला शरधारा दारुण । पृथ्वी आकाश व्यापून । शरीं संपूर्ण कोंदलें ॥ ४४ ॥ माझ्या आंगीं बाण न रुपती । शंका न मानीच मारुती । रामनामाच्या आवृत्तीं । निःशंकस्थिती विचरत ॥ ४५ ॥ पंचक्रोश शिळा प्रचंड । वानरें हाणितली वितंड । जंबु धनुर्वाडा अखंड । केली शतखंड बाणें एकें ॥ ४६ ॥ कपि हाणितां वृक्षघाय । तोही केला तिळप्राय । हनुमान म्हणे धन्य माय । योद्धा होय जगजेठी ॥ ४७ ॥ माझे शिळाघाय वृक्षसमेळीं । निवारोनि महाबळी । योद्धा होय राक्षसकुळीं । जंबुमाळी महावीर ॥ ४८ ॥ अर्धचंद्रबाणसमेळीं । कपींद्र विंधिला कपाळीं । बाण हिसळोनि ते वेळीं । लागला निढळीं जंबूच्या ॥ ४९ ॥ लागतां बाणाचा आघात । जंबुमाळी पडे मूर्च्छित । हनुमान गदगदां हांसत । विपरीतार्थ येथें जाला ॥ ५० ॥ मज न रुपती तुझे बाण । तुझाचि घेवों पाहती प्राण । आतां कायसें रे रण । जाय परतोन मी न मारीं ॥ ५१ ॥ ऐकोनि कपीचें वचन । जंबु विचारी आपण । परतलिया दंडील रावण । करूं निर्वाण युद्ध यासीं ॥ ५२ ॥ वनचामुंडावरददत्त । परिघ टाकिला घंटायुक्त । करावया हनुमंताचा घात । रागें सोडित राक्षस ॥ ५३ ॥ माझे परिघाचा घात । आजि निमाला हनुमंत । कैसेनि राखे रघुनाथ । रणपुरुषार्थ पाहों याचा ॥ ५४ ॥ परिघें येतां आंगापासीं । हनुमान उडाला आकाशीं । वरदसामर्थ्यशक्ति कैसी । लावी परिघासी कपिपाठीं ॥ ५५ ॥ सवेग जातां हनुमंतासी । परिघ न संडी पाठिलागासी । विस्मयो करी कपि मानसीं । शस्त्राची ऐसी निजशक्ती ॥ ५६ ॥ विचारीं पडतां वानर । स्वर्गी उठिला हाहाकार । परिघ सुटला दुर्धर । आजि कपींद्र वांचेना ॥ ५७ ॥ ऐशा ऐकतां गोष्टी । परिघ येतां देखोनि पाठीं । कपिपुच्छें घातली आंठी । चेपिली घांटी वनदेवतेची ॥ ५८ ॥ देवता म्हणे श्रीरामभक्ता । तुज मी शरण आलें आतां । शस्त्रदेवता समस्ता । शरणागता तुज होती ॥ ५९ ॥ शस्त्रशक्ति भूतशक्ती । मंत्रतंत्रयंत्रशक्ती । अवघ्या शरण तुज येती । मज मारुती वांचविल्या ॥ ६० ॥ सोडूनि पुच्छाचें बंधन । शस्त्रदेवता वांचवून । शक्तिमंडळा लोटांगण । घाली आपण हनुमंत ॥ ६१ ॥ मारूं नये शरणागता । म्हणोनि वांचविली शस्त्रदेवता । भूतीं देखोनि रघुनाथा । शक्ति समस्ता वंदिल्या ॥ ६२ ॥ उदो म्हणोनि समस्त शक्ती । हनुमंतातें ओंवाळिती । राक्षसां विमुख आम्ही समस्ती । साह्य युद्धार्थी श्रीरामा ॥ ६३ ॥ सीता आमुची आदिशक्ती । तिसी गांजितो लंकापती । रणीं राक्षसां लावोनि ख्याती । आम्ही युद्धार्थी तुज साह्य ॥ ६४ ॥ हनुमान म्हणे पुच्छा जगजेठी । युद्धीं माझी राखोनि पाठी । साह्य शक्ति कोट्यनुकोटी । पुच्छासाठीं मज जाल्या ॥ ६५ ॥ करोनि पुच्छाची पैं स्तुती । युद्धा परतला मारुती । परिघ देखोन त्याचे हातीं । जंबूचे चित्तीं चळकांप ॥ ६६ ॥ माझा परिघ हा तत्त्वतां । गेला हनुमंताचे हाता । रावणाच्या अर्धमेता । शस्त्रदेवता क्षोभलिया ॥ ६७ ॥ ऐसें जंबु जंव विचारी । तंव परिघ वाजिनला शिरीं । रथसारथींची चकचुरी । जंबूची उरी नुरेचि ॥ ६८ ॥ रथ वारू ना सारथी । ना त्याचें शिर ना त्या अस्थी । पाहतां त्याची न दिसे व्यक्ती । नेलें अव्यक्तीं वानरें ॥ ६९ ॥ हनुमंतें जंबुमाळी । घायें केली खंदळी । बोंब गेली रावणाजवळी । क्रोधानळीं भयभीत ॥ ७० ॥ मारावया पैं वानर । प्रधानपुत्र दश सहस्र । रागें धाडी

१ अभिमान. २ गळ्याशीं पाश घालून. ३ मूत लावून हजामत. ४ दगडांचे घाव. ५ आयुधविशेष. ६ मिठी. ७ गळा. ८ अधर्मवर्तनानें. ९ घोडा. १० भागसूस. ११ नाश. १२ क्रोधामीमुळें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

दशशिर । महावीर रणयोद्धे ॥ ७१ ॥ ध्वज पताका रणप्रयुक्तीं । पुढें वाजंत्रीं वाजती । मागें माता शंख करिती । पुत्रसंतती निमाली ॥ ७२ ॥ प्रधानपुत्र गजंभारीं । येतां देखोनि महागजरीं । हनुमान गर्जे भुभुःकारीं । पुच्छ अंबरीं तळपत ॥ ७३ ॥ पुच्छें कवळोनि समस्त । हनुमान करी पर्वतघात । घायें निमाले समस्त । जाला प्राणान्त समकाळें ॥ ७४ ॥ प्रधानपुत्रां केला घात । ऐकोनि धाके लंकानाथ । आतुर्बळी हनुमंत । काळकृतांत रणमारें ॥ ७५ ॥ रावण पडिला चिंतावर्ती । रणीं नाटोपे मारुती । वीर मारोनि भद्रजाती । लाविली ख्याती राक्षसां ॥ ७६ ॥ रणकर्कश रणरगडे । पांच सेनानीं निधडे । कपीसी मारावया रोकडे । धाडी वेगाढे युद्धासी ॥ ७७ ॥ चौघे राहोनि चहूं दिशांसी । एक राहोनि आकाशीं । मारावया हनुमंतासी । विकट विन्यासीं विंधिती ॥ ७८ ॥ कपिपुच्छ महाबळी । त्यांचे शस्त्रा करोनि होळी । पांच जणांतें आकळी । पुच्छेंसमेळीं कवळोन ॥ ७९ ॥ स्वयें योगिया आपण । जेंवी निरोधी पंच प्राण । तेंवी कपिपुच्छें पांच जण । आकळोन राखिले ॥ ८० ॥ विवेकवैराग्यसंपन्न । पंचविषयां करिती दमन । तेंवी कपिपुच्छें पांच जण । निर्बंधून राखिले ॥ ८१ ॥ पंचभूतांची निवृत्ती । केलिया सुख पावे परमार्थी । पांचही मारोनि पर्वतघातीं । सुखें मारुती सुखावे ॥ ८२ ॥ एकेचि घायें कपी आपण । घेतला पांचांचाही प्राण । ऐकोनि दचकला रावण । सेना प्रधान कांपती ॥ ८३ ॥ रावणा कोप आला दुर्धर । रणीं मारावया वानर । स्वयें धाडिला अखया कुमर । रणचतुर दिव्यमारें ॥ ८४ ॥ अखया जाणे रणकंदनार्थ । शस्त्रीं अस्त्रीं अतर्क्य घात । निरालंबीं चढवोनि रथ । मारील हनुमंत साटोपें ॥ ८५ ॥ आज्ञा देतां दशानना । तुरें वाजती निशाणां । अखया आला अशोकवना । रथछत्रसेनागजदळें ॥ ८६ ॥ अखयें शरसंपातीं । रणीं आच्छादिला मारुती । वीर सिंहनाद करिती । मारिला म्हणती वानर ॥ ८७ ॥ अखयाविजयाची नवायी । वाजंत्र्यांची लागली एकचि घायी । हनुमंतें तिये समयीं । केलें कायी तें ऐका ॥ ८८ ॥ भोंवता पुच्छाचा पैं सांट । त्याचीं शस्त्रें करोनि पिष्ट । सैन्य मारिलें समसगट । अखया उद्भट त्रासिला ॥ ८९ ॥ पुच्छें आकळितां अखयासी । रथ उडविला आकाशीं । धरितां न धरवे हनुमंतासी । लेंघुलाघवेंसीं तळपत ॥ ९० ॥ हनुमान अखया दोन्ही वीर । युद्ध करिती निराधार । विस्मयो करिती सुरवर । चक्राकार परिभ्रमती ॥ ९१ ॥ क्षणैक क्षितीं क्षणैक अंबरीं । क्षणैक रथ दिसे सागरीं । क्षणैक दिसे त्रिकूटावरी । अखया भारी लाघवी ॥ ९२ ॥ पुच्छ कोपोनि लागे पाठीं । रथ पळतां दिक्पुटीं । पुच्छें बांधोनि कडकडाटीं । रागें आपटी भूतळीं ॥ ९३ ॥ रथ आपटितांचि क्षिती । वोडणखांडें घेवोनि हातीं । अखया उसळोनि लघुगती । मारूं मारुती धांविन्नला ॥ ९४ ॥ मारावया हनुमंत । वोडणखड्गेंसीं तळपत । कपीचा करावया घात । गगनाआंत उसळला ॥ ९५ ॥ अखया उडतां आकाशीं । हनुमंतें धरिला पायांसीं । गरगरां भोंवंडितां त्यासी । देहभावासी विसरला ॥ ९६ ॥ खड्ग पडिलें मातेचे वाडां । मुकुट पडिला रावणापुढां । ओडण पडिलें लंकेच्या कडां । केला नितोर्डा बळाचा ॥ ९७ ॥ आपटितांचि शिळातळीं । निर्धों उठिला पाताळीं । दिग्गजांचीं बैसलीं टाळीं । झाली रांगोळी हाडांची ॥ ९८ ॥ करितां अखयाची समाप्ती । हनुमंताची अगाध कीर्ती । स्वर्गीं सुरवर वानिती । वानिती क्षितीं ऋषीश्वर ॥ ९९ ॥ मुकुट पडतांचि पुढें । वार्ता ऐकतां रावण रडे । म्हणे म्यांच केलें कुंडें । पुत्र कां पुढें धाडिला ॥ १०० ॥ वानरें अखया पाडिला धरणीं । बोंब आली वनींहूनी । रावण धुळी घाली वदनीं । पडिला धरणीं मूर्च्छित ॥ १ ॥ पुत्रशोकें कंपायमान । क्रोधें झाला सावधान । माझें जें अशोकवन । शोकस्थान तें झालें ॥ २ ॥ रणीं मर्दिलें वानरें । वीरीं घेतलें घायवारें । अखयाचेनि कैवारें । धाडावया दुसरें दिसेना ॥ ३ ॥ घ्यावया अखयाच्या सूडासी । मीच जाईन वनासी । वानरा मारीन निश्चयेंसीं । कासे सरसी घातली ॥ ४ ॥ म्यां मारिलिया तो

१ गजसमूहासह. २ उत्तम हत्ती. ३ सेनापती. ४ चपळ. ५ भव्य. ६ रचनेच्या योगानें. ७ शेंपटाच्या वेढ्यानें. ८ शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध हे पांच विषय.

९ अधांतरीं, आकाशांत. १० नवल, आश्चर्य. ११ गराडा. १२ परम कौशल्यानें. १३ ढालतरवार. १४ नाश. १५ प्रतिध्वनि, १६ खोटें कर्म. १७ सज्ज झाला,

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वानर । अखयाचा सूड पावला खरें । मज मारिलिया निर्धारें । सीता सुंदरी निर्मुक्त ॥ ५ ॥ ऐसा करोनि विचार । युद्धा निघाला दशशिर । तंव वेगें धांविला ज्येष्ठ कुमर । महावीर इंद्रजित ॥ ६ ॥ म्हणे एकलें वनचर । केवळ जें कां पालेखाइर । त्यावरी जाणें लंकेश्वर । श्रेष्ठ विचार हा नोहे ॥ ७ ॥ वीरीं घेतला रणधाक । म्हणोनि जाणें दशमुख । मी तंव घरगुती सेवक । अवश्यक मज धाडीं ॥ ८ ॥ वाहतों सदाशिवाची आण । शिवतों स्वामी तुझे चरण । वानरा रणीं न मारून । गळां बांधोन आणीन ॥ ९ ॥ निराहारी ब्रह्मचारी । तो इंद्रजितातें मारी । इंद्रजित न मारवे कपीच्या करीं । हा फळाहारी यथेष्ट ॥ ११० ॥ ऐसें विचारोनि रावण । इंद्रजितासी दिधलें आज्ञापन । रणीं वानरा गांजून । गळां बांधोन आणावें ॥ ११ ॥ इंद्रजित युद्धा निघतां वेळीं । निशाणें त्राहाटिलीं ते काळीं । कंगले[1] टोप राघांवळी[2] । केली आरोळी महावीरीं ॥१२॥ शायसीं प्रयुतें[3] मत्त हस्ती । कोट्यनुकोटी महारथी । अनिवार नेणों किती । वीर पदाती असंख्यात ॥ १३ ॥ वीरां कवचें रत्नखचित । शस्त्रें सैन्य लखलखित । पाँखरा[4] तेजीं झळकत । वीर गर्जत सिंहनादें ॥ १४ ॥ तडक फुटले एकसरें । भिंडिमाळांचे[5] पांगोरे[6] । खाखाइलीं रणतुरें । निजगजरें चालिले ॥ १५ ॥ इंद्रजित निघतां उल्हासेंसीं । नग्न कुमारी शिंके पाठीसीं । आशंका पडली इंद्रजितासी । रावणासी चळकांप ॥ १६ ॥ चिन्ह पुसतां ब्रह्मयासी । भविष्य कळलें तयासी । तोही तैसेंचि सांगे त्यासी । अति गुह्यासीं गुह्योक्ति ॥ १७ ॥ युद्ध करितां वानरासीं । अपेश यशीं यश अपेशीं । इंद्रजित बांधोनि कपीसी । तुजपासीं आणील ॥ १८ ॥ ऐकोनि ब्रह्मयाचें वचन । जयजयकारें स्वयें गर्जोन । इंद्रजितें केलें नमन । पुढील कथन अवधारा ॥ १९ ॥ येतां देखोनि इंद्रजित । आनंदें नाचे हनुमंत । पुरवावया युद्धमनोरथ । श्रीरघुनाथ तुष्टला ॥ १२० ॥ पुच्छ नाचवीत रणीं । चौफेरेंसीं सैन्य आकळोनी । रणीं मारोनि वीरश्रेणी । रुधिरें धरणी न्हाणीन ॥ २१ ॥ कपिपुच्छ विचक्षण । भूतां दिधलें आमंत्रण । मांसभक्षण रुधिरपान । रणभोजन करावें ॥ २२ ॥ वधोनि राक्षसांच्या कोडी । ज्याचे पोटीं जे आवडी । ते ते पुरवीन परवँडी । वाढावाढी रणमारें ॥ २३ ॥ आतांचि हे भाजीभाकरी । तुम्हीं करावी न्याहारी । पुढें श्रीराम नरकेसरी । पंचधारीं निववील ॥ २४ ॥ इंद्रजित येतां सहदळीं । पुढें धाविन्नली असाळी । जेणें मारिला अखया बळी । त्याची होळी मी करीन ॥ २५ ॥ ठाकोनि आली अशोकवन । पुढां हनुमंत लक्षोन । विकट वटारिले नयन । विक्राळ वदन पसरोनी ॥ २६ ॥ एक जाभाडें भूतळीं । दुजें लाविलें नभोमंडळीं । कराळ विक्राळ दांताळी । जिव्हा काळी लवथवित ॥ २७ ॥ अणुप्रमाण होवोनि तेथ । जिव्हा दांतां नातळत । वेगीं रिघाला घशांत । गेला उदरांत मारुती ॥ २८ ॥ मुखीं रिघाला मारुती । नातळेचि जिव्हादांतीं । असाळी विस्मयो मानी चित्तीं । ठकिलें निश्चितीं वानरें ॥ २९ ॥ गोड कडु कीं खारट । आंबट तिखट कीं तुरट । कांहीं चवी न कळे स्पष्ट । अहा कटकट राक्षसी ॥ १३० ॥ कपि न मरेचि माझे हातीं । वानर गेला अतर्क्यगती । पुढें काय करील ख्याती । जीवीं धाकली असाळी ॥ ३१ ॥ इंद्रजितासीं करावया रण । हनुमंतासी आवडी पूर्ण । तिच्या उदरीं न राहे एक क्षण । केलें विंदाण तें ऐका ॥ ३२ ॥ काळीज उपडोनि सदेंठ । बेंबीपासीं फाडोनि पोट । हनुमान रिघोनियां स्पष्ट । केला उद्भट भुभुःकार ॥ ३३ ॥ असाळियें गिळिला हनुमंत । कथा विस्तारिली लोकाआंत । चुकला इंद्रजिताचा अनर्थ । युद्धकंदनार्थ सैन्याचा ॥ ३४ ॥ पूर्वींच गिळिती वानर । तरी कां मरता अखया कुमर । वनकर किंकर प्रधानपुत्र । जंबुवीर वांचता ॥ ३५ ॥ रावणा हँरिखें सांगे दूत । असाळियें गिळिला हनुमंत । सवेंच दुसरी बोंब सांगत । केला निःपात असाळीचा ॥ ३६ ॥ क्रौंचा मारिली पडलंकां । विटंबिली शूर्पणखा । आतां मारिली असाळिका । कोण कोण दुःखा मी सोसूं ॥ ३७ ॥ जो रिघोनि उदराआंत । करी राक्षसिणींचा

१ अलंकारविशेष. २ रक्तवर्ण वस्त्रें (राजावळी.) ३ दशलक्ष. ४ झुली. ५ गोफिणींचे. ६ दोऱ्या. ७ प्रकारांनीं. ८ कौशल्य. ९ मोठा. १० आनंदानें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

निःपात । तो इंद्रजिताचा करील घात । चळीं कांपत रावण ॥ ३८ ॥ एका जनार्दना शरण । जालें असाळीनिर्दळण । पुढें इंद्रजितहनुमद्रण । साव-धान अवधारा ॥१३९॥ स्वस्ति श्रीभावार्थरामा-यणे सुंदरकांडे एकाकारटीकायां ब्रह्मलिखितहनु-मन्नसाळीवधो नाम त्रिंशत्तमोऽध्यायः ॥ ३० ॥ ओंव्या ॥ १३९ ॥

अध्याय एकतिसावा

॥ श्रीभवानीशंकराभ्यां नमः ॥ इंद्रजित युद्धा निघतां आवेशीं[१] । असाळी उठिली विवशी । श्रीरामें निरसिलें तियेसी । अति उल्हासीं हनुमंत ॥ १ ॥ गजदळेंसीं अति उन्नद्ध । सैन्य देखोनियां सन्नद्ध[२] । हनुमंतासी अति आल्हाद । श्रीराम गोविंद तुष्टला ॥ २ ॥ राक्षस मारावया अति अद्भुत । वनउंपाडा[३] पाहे सुमुहूर्त । इंद्रजित गांजोनियां तेथ । गर्वहत करीन मी ॥ ३ ॥ माझे पुरवावया मनोरथ । आजि तुष्टला श्रीरघुनाथ । इंद्रजित आला सैन्यासमवेत । हनुमान नाचत स्वानंदें ॥ ४ ॥ पुच्छ नाचतें पैं रणीं । मारोनियां वीरश्रेणी[४] । पूजूं चामुंडा चवंडायणी । भूतां देऊं धणी[५] मांसाची ॥ ५ ॥ अखया कुमराची बोहणी । प्रथम केली म्यां रणांगणीं । येथोनि वीरांचिया श्रेणी । मारीन रणांगणीं रणमारें ॥ ६ ॥ हनुमान पुच्छासीं करी एकांत । जो जो आला रणाआंत । परतोनि न जावा नगराआंत । करावा घात अवघ्यांचा[७] ॥ ७ ॥ जो जो येईल शरण । त्यासी येवों न द्यावें मरण । याचि नांवें दांडुलेपण[६] । येरां मर्दन रणमारें ॥ ८ ॥ पुच्छा आलिंगोनि पोटीं । हनुमंताची गोड गोष्टी । पुच्छें कवळोनि सैन्या-सकटी । राक्षसकोटी मारीन ॥ ९ ॥ स्वामिवचन मानोनि शिरीं । पुच्छ रक्षण लंकाद्वारीं । मागें परतल्या निशाचरीं । महामारीं मारावया ॥ १० ॥ कपिपुच्छसंवादमेळीं । करावया वीरां रणरांगोळी । युद्धानंदीं पिटोनि टाळी । आतुर्बळी खवळलें ॥ ११ ॥ ऐकोनि कपिपुच्छसंवाद । वानरां वाढिवेचा आल्हाद । ऐकावया हनुमंतयुद्ध । अति सावध स्वानंदें ॥ १२ ॥ सुग्रीवें उठोनि आपण । धरिले लक्ष्मणाचे चरण । इंद्रजितहनुमंताचें रण । सांग संपूर्ण वाचावें ॥ १३ ॥ उगे रहावया अवघे जण । घातली श्रीरामाची आण[८] । वानर वीर सावधान । हनुमद्रण परिसावया ॥ १४ ॥ परिसावया युद्ध उद्भट । टवकारोनि नेत्रवाट । वळोनि पुच्छाचा पैं साट[९] । वीर मर्कट सावध ॥ १५ ॥ कैसें पत्र वाचितो पुढें । लक्ष्मणाच्या तोंडाकडे । पहात ठेलीं पैं माकडें । युद्धंचाडें[१०] श्रवणार्थी ॥ १६ ॥ परिसावया कपीचा पुरुषार्थ । अति उल्हासला श्रीरघुनाथ । लक्ष्मण वाची ब्रह्मलिखितार्थ । युद्धकंदनार्थ कपीचा ॥ १७ ॥ ऐसें ऐकतां वानरीं सकळीं । हर्षानंदें पिटिली टाळी । जें आमुचे हृदयकमळीं । तेंचि सुखमेळीं रामाच्या ॥ १८ ॥ ऐसियापरी वानरगण । ऐकावया हनुमद्रण । अवघे बैसले सावधान । पत्र वाचणें सौमित्रा ॥ १९ ॥ ऐकोनि असाळीचा घात । कोपें खवळला इंद्रजित । कपीचा करावया घात । रथ त्वरित प्रेरिला ॥ २० ॥ तडक फुटला अति दुर्धर । निशाणें भेरी शृंगाकार । इंद्रजित आला गडगजर । रणतुरें वाजती ॥ २१ ॥ एकलें एक पैं वानर । त्यावरी येतां असंख्य वीर । चळीं कांपती महाशूर । दुर्धर मार कपीचा ॥ २२ ॥ जाणोनि सैन्याचा वृत्तान्त । इंद्रजितें रथ प्रेरिला त्वरित । पुढें लक्षोनि हनुमंत । शर वर्षत पैं आला ॥ २३ ॥ धनुष्याचा करितां टणत्कार । दुमदुमिले गिरिकंदर । नादें कोंदलें अंबर । वीर दुर्धर इंद्रजित ॥ २४ ॥ कपीनें करितां भुभुःकार[१२] । खळबळिले सप्त सागर । ध्यानीं दचकला पंचवक्त्र[११] । सुरासुर कांपती ॥ २५ ॥ नक्षत्रें तुटोनि पडती तळीं । तेचि रणरंगीं रणरांगोळी । भूतें कांपती कपिआरोळी । भद्रकाळी आश्वासी ॥ २६ ॥ याचिया रणमाराआंत । अति कृपाळु हनुमंत । मेदमांसें करील तृप्त । भय निश्चित तुम्हां नाहीं ॥ २७ ॥ ऐकतां कपिगिरागजर । मरणोन्मुख निशाचर । खळबळिले रथ कुंजर । निधडे वीर कांपती ॥ २८ ॥ इंद्रजितें युद्धाचे कडाडीं । रथ प्रेरिला लवडसवडीं । कपि पुच्छाची उभवोनि गुढी । नाचे आवडीं रणमारा ॥ २९ ॥ एक रावणराजकुमर । दुजा रामदूत वानर । येर राक्षसीं राक्षसेंद्र । दुजा कपींद्र

१ आवेशयुक्त. २ सिद्ध, तयार. ३ वनाचा विध्वंस करणें. ४ वीरसमुदाय. ५ तृप्ति. ६ मोठेपणा. ७ समग्र. ८ शपथ. ९ आंकडा. १० युद्धविषयक आवडीनें. ११ शंकर. १२ वानराच्या वाणीची गर्जना.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

कपिकुळीं ॥ ३० ॥ दोघे वीर अति प्रबळ । समान बळ समान शीळ । दोघे संग्रामकुशळ । दोघे चपळ रणमारा ॥ ३१ ॥ दोघे भिडतां महावीर । पाहूं आले सुरवर । सिद्ध गंधर्व विद्याधर । नाग किन्नर ऋषी पाहती ॥ ३२ ॥ सावित्रीसहित चतुर्मुख । उमेसहित पंचमुख । शक्तिसहित षण्मुख । आला देवमुख्य हव्यवाट[१] ॥ ३३ ॥ शचीसहित सुरेंद्र । विकटेसहित वीरभद्र । सिद्धिबुद्धींसीं गणेंद्र[२] । युद्धीं कपींद्र पाहूं आले ॥ ३४ ॥ दोघे खवळले महावीर । काळ कृतांत अति दुर्धर । दोघे जैसे काळाग्निरुद्र । युद्धा सत्वर मिसळले ॥ ३५ ॥ एक त्रिपुर एक शंकर । एक मदन एक शंबर । अनिरुद्ध बाणासुर । जेंवी सूकर[३] हिरण्याक्ष ॥ ३६ ॥ एक गज एक केसरी । एक सर्प एक सर्पारी[४] । वृत्र आणि वज्रधारी[५] । ऐसियांपरी मिसळले ॥ ३७ ॥ एक मुरु एक मुरारी । एक त्रिपुर एक त्रिपुरारी । सहस्रबाहु वज्रधारी । जेंवी नरहरी हिरण्यकशिपूसीं ॥ ३८ ॥ एकासी रथाची रथगती । दुजिया निजपुच्छ सारथी । दोघे भिडती वीर्यार्थी । रणव्युत्पत्ती महामारें ॥ ३९ ॥ क्षणैक भिडती भूतळीं । क्षणैक भिडती नभोमंडळीं । क्षणैक भिडती समुद्रजळीं । कुळाचळीं पैं दोघे ॥ ४० ॥ जैसी इंद्रजिताची पैं गती । त्याहूनि सवेग हनुमंतीं । न चले शक्ति ना छळणोक्ती । रणीं मारुती नाटोपे ॥ ४१ ॥ इंद्रजित म्हणे दुर्धर घात । हनुमान विटावी फळें खात । कांखा पिटोनि घुलकावित । मग दावित आंगोठा ॥ ४२ ॥ इंद्रजित खवळोनि रणीं । वर्षलासे दुर्धर बाणीं । हनुमान वर्षला पाषाणीं । रणांगणीं गर्जोनियां ॥ ४३ ॥ बाणीं पाषाण करी तो कूट । पाषाणीं बाण होती पीठ । दोघां जणां सम[६]सकट । कडकडाट युद्धाचा ॥ ४४ ॥ विंधी सुवर्णपुंखें[७] भाळीं । वानर हाणी सबळ शिळीं । भाळीं करोनि रांगोळी । मुकुट तळीं पाडिला ॥ ४५ ॥ इंद्रजित तेव्हां मुक्तकेशीं । शस्त्रें हाणी अति आवेशीं । जें तें तोडोनियां पुच्छीं । इंद्रजितासी गणीना ॥ ४६ ॥ रागें हाणी चेंडूचक्र । वानर हाणी शिळाशिखर । सवेग हाणितां तोमर । पर्वताग्रें टाकिलीं ॥ ४७ ॥ इंद्रजित वर्षे चक्रकांडें । वानर वर्षे पर्वतधोंडे । उडोनि हाणितां पैं खांडें । ठोकिला तोंडीं चडकणा ॥ ४८ ॥ इंद्रजित गांजिला पुरा । मुखीं सुटल्या रुधिरधारा । मारावया पैं वानरा । निर्वाणशस्त्रा घेतलें ॥ ४९ ॥ साटोपें हाणितां शूलशक्ती । जांजावला अति पर्वतीं । इंद्रजित थोंटावला चित्तीं । रणीं मारुती नाटोपे ॥ ५० ॥ यंत्रादि शस्त्रें हाणितां तवकें । वानरें ढिलाविला खडकें । फुटलें इंद्रजिताचें धैर्यमडकें । पडिलें अटकें पुच्छाचें ॥ ५१ ॥ इंद्रजिताची रणव्युत्पत्ती । फावल्या रणीं लावी ख्याती । नाटोपतां पळे मागुती । पुच्छाप्रती तें न चाले ॥ ५२ ॥ सैन्यासभोंवतीं चहूंकडां । पडिला पुच्छाचा पैं वेढा । सरों न ये मागां पुढां । वानरें वेढा लाविला ॥ ५३ ॥ मेघांकित इंद्रजितासी । पळोनि जावें मेघापाठीसीं । कपिपुच्छ तळपे आकाशीं । पळावयासी वाट नाहीं ॥ ५४ ॥ इंद्रजित हाणी निर्वाणघात । वानर वर्षे गिरिपर्वत । सैन्यासी चकचुरी होत । अति आकांत महावीरां ॥ ५५ ॥ बोंब सुटली सैन्याआंत । इंद्रजित मेला किंवा जीत । वानरें केला पर्वतघात । रणीं हुंवत राक्षस ॥ ५६ ॥ वानर न धरवे बळें । जरी धरावा कपटमेळें । कपट निर्दळी लांगूळें । गोळांगुळें लाजविलें ॥ ५७ ॥ कपि नाटोपे शस्त्रघातीं । अस्त्रें शस्त्रें धाकें गळती । रणीं नाकळे मारुती । चिंतावर्ती इंद्रजित ॥ ५८ ॥ न चले शस्त्रास्त्रांची शक्ती । मागें न पळवे पुच्छहातीं । पुढें नाटोपे मारुती । चिंतावर्ती इंद्रजित ॥ ५९ ॥ चिंताग्रस्त देखोनि त्यातें । हनुमान म्हणे इंद्रजितातें । शिळा शिखरें न हाणीं तूंतें । न हाणीं पर्वतें भाक माझी ॥ ६० ॥ इंद्रजित नांवाचा बडिवार । जिहीं बाणीं त्वां जिंतिला इंद्र । तिहीं बाणीं दंडोनि वानर । करीं गजर विजयाचा ॥ ६१ ॥ जया बाणांच्या कडाडीं । देव घातले बांधवडीं । ते बाणीं मज विंधोनि प्रौढी । उभारीं गुढी विजयाची ॥ ६२ ॥ ऐसें बोलतां वानर । इंद्रजित कोपला दुर्धर । निर्वाणशस्त्रांचा विविध मार । महाघोर मांडिला ॥ ६३ ॥

शराणामग्रतस्तस्य पुनः समभिवर्तत ।
प्रसार्य हस्तौ मतिमानुत्पपातानिलात्मजः ॥ १ ॥

---

१ अग्नि. २ गणपति. ३ आदिवराह. ४ गरुड. ५ इंद्र. ६ सारखेपणा. ७ सोन्याच्या पिसाऱ्याच्या बाणांनीं. ८ ग्रासला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

परस्परं दुर्विषहा बभूवतुः समेत्य तौ देवसमानविक्रमौ।
ततस्तु लक्ष्ये प्रविहन्यमाने शरेष्वमोघेषु च संपतत्सु ॥२॥

रणा पाडिल्या मारुती । मंत्रयुक्ती शरणशक्ती । इंद्रजित विंधी व्युत्पत्ती । कपिप्रयुक्ती ते ऐका ॥ ६४॥ इंद्रजित विंधी मारका शक्ती । हनुमानाचे रणव्युत्पत्ती । रामनामाच्या आवर्ती । निःशंकस्थिती वानर ॥ ६५॥ निर्वाणबाण वीर मोकली। हनुमान वरचेवरी झेली । पुच्छें करोनि गटांगुळी । दावी गोळांगुळें वांकुल्या ॥ ६६ ॥ कोपें भडका उठोनि पोटीं । इंद्रजित वर्षे बाणकोटी। हनुमान सावधान दृष्टीं । शरवृष्टी झेलिली ॥ ६७॥ कवळोनियां त्याचे बाण। हनुमान गगनीं उसळोन । त्याचेनि बाणें त्यासचि जाण । रणकंदन मांडिलें ॥ ६८ ॥ कपीनें करितां बाणसंपात । इंद्रजित कासावीस होत । सैन्य पडिलें बहुत । जालें विपरीत संग्रामीं ॥ ६९ ॥ हनुमंतेंसीं करितां रण । इंद्रजित भुलला संपूर्ण । आपुलें सैन्य मारी आपण । निर्वाणबाण वर्षोनी ॥ ७० ॥ धनुष्यबाण कपीपासीं । हे सामुग्री नाहीं त्यासीं । आलीसे भुली इंद्रजितासी । निजसैन्यासी मारीत ॥ ७१ ॥ माझे निर्वाणींचे बाण । वानरें कवळोनि संपूर्ण । आमच्या बाणीं आम्हांसीं जाण । रणकंदन मांडिलें॥ ७२ ॥ माझे सुटलिया शर । मेणें पळती सुरासुर । निःशंक निधडा हा वानर । बाण समग्र झेलिले॥ ७३ ॥ आमचीं शस्त्रें आम्हांवरी। परतलीसे महामारी । आतां राक्षसां कायसी उरी । कपिकेसरी नाटोपे ॥ ७४ ॥ कपिपुच्छाची व्युत्पत्ती । धनुष्य भंगी हातीं वे हातीं । रथ उपडितांचि क्षितीं । वारू सारथी निमाले ॥ ७५ ॥ इंद्रजित उडोनि सत्वर । तेणें सांडिला रहंवर । रणीं उठिला हाहाकार । राजकुमार मारिला ॥ ७६ ॥ रामनामाच्या निजशक्ती । निधडा निःशंक मारुती । इंद्रजितासी लाविली ख्याती । केला विरथी रणरंगीं ॥ ७७ ॥ बाण मंत्र शक्तियुक्त । रणीं वानरें केले व्यर्थ। मारिला सारथी भंगिला रथ । तेणें धाकत इंद्रजित ॥ ७८ ॥ दिव्य अस्त्रें एकैक । वानरें केलीं निरर्थक । इंद्रजितें घेतला धाक । जीवीं धुकधुक लागली ॥ ७९ ॥

न चले शस्त्रांची खटपट । न चले मंत्रास्त्रनेट । न चले कपिपुच्छासीं कपट । रणीं उद्भट गांजिलें ॥ ८० ॥ खुंटली शस्त्रास्त्रांची युक्ती । वानर विचारीत चित्तीं । मल्लविद्येची व्युत्पत्ती । शरीरशक्ती पाहूं याची ॥ ८१ ॥ इंद्रजित पडिला अति संकटीं । तंव वानर झोंबिनला कंठीं । दोघां झाली लटापटी । धिंगामस्ती मिसळले ॥ ८२ ॥ उरीं शिरीं आणि कोंपरीं । तडवे हाणिती परस्परीं । कळा लावोनि भुंजांतरीं । हाणिती उरीं चपेटघात ॥ ८३ ॥ सदा तूं सेविसी घृतक्षीर । आतुर्बळिया राजकुमार । मी वानर पालेखाईर । मजसमोर राहें पां ॥ ८४ ॥ ऐसें बोलोनि हनुमंत । मल्लव्युत्पत्ती हाणी लात । ते जंव चुकवी पिलंगतें । तंव ठोकित तळवेनी ॥ ८५॥ तो जंव चुकावी आघात । तंव तळपोनियां हनुमंत । उरीं शिरीं ललाटीं घात । स्वयें हाणित अनुबंधें ॥ ८६ ॥ करितां मल्लविद्यामार । रणीं गांजिला निशाचर । भवंडोनियां सांडी चक्राकार । जीवें वानर न मारीच ॥ ८७ ॥ इंद्रजित रुधिर वमून । रणीं पडिला मूर्च्छापन्न । त्यासी न मारीच आपण । श्रीलक्ष्मण यासी हंता ॥ ८८ ॥ भूतळीं समस्त ऋषीश्वर । गगनीं सुरनर किन्नर। अवघे करिती जयजयकार। विजयी वानर श्रीरामें ॥ ८९ ॥ रणीं इंद्रजित मूर्च्छापन्न।स्वयें होवोनि सावधान । अतिशयेंसीं लज्जायमान । अति उद्विग्न इंद्रजित ॥ ९० ॥ हनुमंताची धैर्यवृत्ती । हनुमंताची शौर्यशक्ती । हनुमंताची संग्रामगती । अतर्क्य स्थिती तर्केंवेना ॥ ९१ ॥ रणीं इंद्रातें जिंकोन । पावलों इंद्रजित अभिधान । वानरेंसीं करितां रण । तृणासमान मज केलें॥ ९२ ॥ मी एक गाढा वीर सृष्टीं। ऐसा फुगारा होता पोटीं । कपिपुच्छें पुरवोनि पाठी । तृणासाटीं मज केलें ॥ ९३ ॥ जळो माझी वीर्यवृत्ती । जळो माझी शौर्यशक्ती । रणीं नाटोपे मारुती । कीर्ति अपकीर्ति मज माझी ॥ ९४ ॥ कोणी एखादी युक्ती । न चले वानरासीं निग्रहार्थीं । जळो माझी यश कीर्ती । चिंतावर्ती इंद्रजित ॥ ९५ ॥ माझ्या वरदाची वरदोक्ती। मारूं न शके मज मारुती । धरोनि नेलिया रामाप्रती ।

१ वानर (मारुती.) २ बाणांची वृष्टी. ३ शूर. ४ वानरश्रेष्ठ. ५ रथ. ६ बाहूंत. ७ पुढें सरसावून. ८ आवेशानें.

९ नांव. १० बांधण्यासाठीं.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

विटंबिती वानर ॥ ९६ ॥ रावणें आणिलें सीतेसी । वदला मज नेईल रामापासीं । तेथें करितां अपमानासी । वानरांसी कोण वारी ॥ ९७ ॥ रावण होवोनि भिकारी । चोरोनि आणिली सीता सुंदरी । वानरें करोनि जुंझारी । मज निर्धारीं नेईल ॥ ९८ ॥ पूर्वीं अंगदपाळण्यासीं । खेळणें बांधिलें रावणासी । पौलस्तीनें मागतां त्यासी । अपमानेंसीं सोडिलें ॥ ९९ ॥ मुंडोनियां खांडमिशी । मसी लावोनि दशमुखांसी । पांच पाट काढोनि शिरांसी । ऐसा लंकेसी झुगारिला ॥ १०० ॥ पडतां लंकेचे चौबारां । हुरो लाविला दशशिरा । कोण आवरी लहानथोरां । लंकेश्वरा अति लाज ॥ १ ॥ मज धरोनि नेल्यापाठीं । माझीही होईल ऐशीच गोष्टी । वानर नाटोपे जगजेठी । पुच्छें पाठी पुरविली ॥ २ ॥ पुच्छीं बांधोनि तत्त्वतां । मज हनुमंतें धरोनि नेतां । धांवण्या कोणी न ये सर्वथा । परम चिंता इंद्रजिता ॥ ३ ॥ अखयाच्या कैवारासी । कोणा न येववे वानरापासी । मज बांधोनि नेतां पुच्छीं । धाकें धांवण्यासी कोणी न ये ॥ ४ ॥ ऐसा धाक घेवोनि पोटीं । रणीं वानरा देवोनि पाठी । इंद्रजित पळे उठाउठीं । पुच्छासाठीं धाकोनी ॥ ५ ॥ पळतां न पळवे पुढें । पडिलें पुच्छाचें विरडें । तेथिले विवरामाजी दडे । बहु माकडें गांजिलें ॥ ६ ॥ दुस्तर धाक घेवोनि मनीं । गुप्त विवर अशोकवनीं । इंद्रजित तेथें गेला पळोनी । अति दडोनी राहिला ॥ ७ ॥ लागों न ये पळत्यापाठीं । हे तंव स्वधर्मयुद्धगोष्टी । इंद्रजिता मारणें नाहीं पोटीं । यालागीं पाठी न लागेचि ॥ ८ ॥ पुच्छ म्हणे गा कपिनाथा । कोंडोनि राखिलें सैन्या समस्ता । तूं भागलासी इंद्रजित दमितां । मज युद्धार्था दे आज्ञा ॥ ९ ॥ हनुमान म्हणे तुझेनि बळें । म्यां महावीर मारिले खळ । आतां निर्दाळूं हें दळ । रणकल्लोळ विचारूनी ॥ ११० ॥ मी जातें तूं घालीं वैरण । ऐसें भरडूं राक्षससैन्य । डोळ जे उरती सघन । रणकंदन करूं त्यांसी ॥ ११ ॥ करावया सैन्यसंहार । कपि पुच्छासीं करोनि विचार । मग दिधला भुभुःकार । राक्षसभार खवळला ॥ १२ ॥

अश्वैरश्वान्गजैर्नागान्योधैर्योधात्रथै रथान् ।
लांगूलेनाहनत्कांश्चिद्गजवाजिखरोष्ट्रकान् ॥ ३ ॥

येतां देखोनि हनुमंत । राक्षसवीर समस्त । होवोनियां एकभूत । शस्त्रें वर्षत समकाळ ॥ १३ ॥ बाणीं खिळिलें पृथ्वीसी । शस्त्रें न समाती आकाशीं । शस्त्रीं बुजिलें हनुमंतासी । वीरीं राक्षसीं गर्जोनी ॥ १४ ॥ हनुमान युद्धीं निगरघट । राक्षस हाणिती भट सुभट । हाणितां शस्त्रें होती पीठ । अहा कटकटे राक्षसां ॥ १५ ॥ हनुमंत निधडा वीर । साहोनि त्यांचा शस्त्रसंभार । करावया सर्व संहार । रणीं वानर खवळला ॥ १६ ॥ अश्वीं अश्वांतें मारित । गजीं गजां संहारित । रथीं रथांतें उपटित । वारूनि मत्त सारथींसी ॥ १७ ॥ पायींचा पायीं रगडित । वीरें वीर पैं झोडित । ध्वज शस्त्रें छत्रें मोडित । रणीं पाडित महामारें ॥ १८ ॥ हनुमान युद्ध करी भिन्न । पुच्छें करी भिन्न कंदन । तेंही ऐका सावधान । रणमर्दन पुच्छाचें ॥ १९ ॥ शायशीं प्रयुतें मत्त हस्ती । पुच्छें उपटोनि मारुती । हस्तींच्या पिष्ट केल्या अस्थी । रणसमाप्ती गजदळा ॥ १२० ॥ विदारितां कुंभस्थळा । विखरा होय गजमुक्ताफळां । त्याचि रणरंगीं रंगमाळा । अति सोहळा युद्धाचा ॥ २१ ॥ पुच्छ रिघोनि सैन्यातळीं । महावीरां बांधोनि मोळी । उपडी त्यांसी भूतळीं । करी रांगोळी तळिल्यांची ॥ २२ ॥ अश्वतर खर उंष्ट्र । पुच्छीं बांधोनि अपार । तळीं उभे अश्वसंभार । घायीं चकचूर करी त्यांचा ॥ २३ ॥ कपिपुच्छाचा महामार । रणीं उठिला हाहाकार । येरीकडे हनुमान वीर । करी रणमार तो ऐका ॥ २४ ॥

तलेनाभ्यवधीत्कांश्चित्पद्भ्यां कांश्चित्परंतपः ।
मुष्टिभ्यामवधीत्कांश्चिन्नखैः कांश्चिद्व्यदारयत् ॥ ४ ॥
प्रममाथोरसा कांश्चिदूरुभ्यामितरान्कपिः ।
केचित्तस्यैव नादेन तत्रैव पतिता भुवि ॥ ५ ॥
विनेदुर्विस्वरान्नादान्निपेतुर्भुवि वाजिनः ।
भग्ननीडध्वजच्छत्रो भुवि कीर्णोऽभवद्रथः ॥ ६ ॥
स कपिर्नाशयामास राक्षसान्बलदर्पितान् ॥ ७ ॥

१ चवाठ्यामध्यें. २ हुर्यो, फजिती. ३ मोठमोठे. ४ घटावलेला. ५ हायहाय. ६ पसारा. ७ खालीं पडलेल्यांची. ८ खेचरें. ९ गाढव. १० उंटें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

रागें हाणितां थापडी । वीर मारीत लक्षकोडी । कोट्यनुकोटी पायीं रगडी । मुष्टिपडिपाडीं असंख्य ॥ २५ ॥ बहुत चिरफाळी नखाग्रीं । एकें मारिलीं जानुचक्रीं । जानुंवा[1] अपाना बहुतां मारी । अर्धचंद्रीं[2] पैं एकें ॥ २६ ॥ आंवळोनि उरावरी । वीर मारीत शतसहस्त्रीं । तडवे हाणोनि उपराउपरी । लक्षांतरीं मारीत ॥ २७ ॥ देतां भुभुःकार प्रबळ । रणीं उठिला हलकल्लोळ । भेणेंकरोनि मूत्रमळ । प्राण तत्काळ सांडिला ॥ २८ ॥ हनुमंताचे गिरागजरें । आक्रंदोनि वाजिकुंजरें । रणीं निमालीं अपारें । लक्षांतरें वीरश्रेणी ॥ २९ ॥ भोंवता पुच्छाचा आँवर्त[3] । मध्यें मारितो हनुमंत । जाला सैन्याचा अंत । आला प्राणान्त राक्षसां ॥१३०॥ पुच्छें पुरविलीसे पाठी । होवों नेदी कुटुंबभेटी । लंका पाहूं नेदी दृष्टीं । जीवासाटीं राक्षसां ॥ ३१ ॥ रणीं महामारी हनुमंत । पुच्छ पळों नेदी नगरांत । जो तो लपे प्रेतांआंत । मिथ्या मूर्च्छित वीरश्रेणी ॥ ३२ ॥ एक घायें घाबरलीं वेडीं । एक नागवीं उघडीं । एक पडिलीं उपडीं । मेलीं मढीं होवोनि ठेलीं ॥ ३३ ॥ झाडिला इंद्रजिताचा पादाडा[4] । केला सैन्याचा नितोडा[5] । रामनामें हनुमान गाढा । केला झगडा निजनेटें ॥ ३४ ॥ युद्ध झालें अति कर्कशीं । रणीं निर्दळिलें समस्तांसी । हाँव[6] न बाणे हनुमंतासी । राक्षसांसी मारीत ॥ ३५ ॥ रथ भंगिले कोट्यनुकोटी । मारिल्या अश्वगजांच्या थाटी । छत्रें भंगिलीं तीं सृष्टीं । ध्वजा कोटी विखरल्या ॥ ३६ ॥ अशुद्ध वाहत गडगडाडीं । तेचि रणनदी गाढी । जालिया प्रेतांच्या दरडी । गजकरवडी महाग्राह ॥ ३७ ॥ तीर वाहती सपिच्छीं । तेचि मासे रणनदीसी । वोडणें वाहती कासवें जैसीं । सर्प सपुच्छीं रणभाले ॥ ३८ ॥ मेद मांस अति दुर्गम । तेंचि दोहीं तीरींचा कर्दम । विक्राळ शिसाळें विक्रम । सुसरी परम दोहीं भागीं ॥ ३९ ॥ मोक्षसुखाची सुँरवाडी[7] । रणनदी वाहे पूराडीं[8] । सर्वस्वत्यागें जो घाली उडी । त्याचिये जोडी तो जोडे ॥ १४० ॥ ध्वजेंसीं वाहे रेंहवरू[9] । तेंचि शिडेंसहित तारूं । येथें तारक श्रीरामचंद्रू । परपारू पाववी ॥ ४१ ॥ उदो म्हणोनि भद्रकाळी । घेवोनि आली भूतावळी । खाती मांसाच्या वडवांळी[10] । रुधिरांजुळी प्राशिती ॥ ४२ ॥ यक्षिणी बहुकाळाच्या वृत्ती । लाखोली काळिजें घेवोनि हातीं । शंखिणी डाकिनी वाणें देती । मग भक्षिती स्वानंदें ॥४३॥ आनंदें नाचे क्षेत्रपाळ । शिरें चौंडकें वाहे वेताळ । भूतें मिळोनियां सकळ । रणगोंधळ नाचती ॥ ४४ ॥ बहुतां दिवसांचें धरणें । दिधलें हनुमंतें पारणें । अवघे घालिती लोटांगणें । विजयी होणें रणरंगीं ॥ ४५ ॥ पीक पिकलें रणचत्वरीं[11] । राक्षसदांतांच्या राशी थोरी । भूतें मोविती[12] कुडवेंकरीं । कौलकरी[13] हनुमंत ॥ ४६ ॥ देव ब्राह्मण भैरवासी । बळुतें[14] देती वेताळासी । खळेंदान तें भूतासी । महाकाळीसी राजभाग ॥ ४७ ॥ खळमातेरें मारकोसी । मेसको तिचे घरची दासी । वेसी पेंढी ते सटवाईसी । पाळभारियासी काळिका ॥ ४८ ॥ अग्रिमें[15] पिकाची व्युत्पत्ती । विभागिली स्वयें मारुती । पश्चिम धान्याची महाख्याती । श्रीरघुपती विभागील ॥ ४९ ॥ कुडवें दांत मेविजेती । ऐसी हनुमंतें केली ख्याती । हर्षानंदें कपी गर्जती । स्वयें उपरमती आल्हादें ॥ १५० ॥ आमुचा हनुमान आतुर्बळी । रणीं राक्षसां केली रांगोळी । वानरीं पिटोनियां टाळी । सुखसमेळीं नाचती ॥ ५१ ॥ सुग्रीव राजा तये वेळीं । आणोनियां द्रव्यांजुळी । हनुमंतावरी ओंवाळी । हृदयकमळीं आलिंगी ॥ ५२ ॥ तूं विसांवा कपिकुळासी । सुखी केलें श्रीरामासी । वांचविलें वानरांसी । यश आम्हांसी तुझेनि ॥ ५३ ॥ स्फुरण आलें अंगदासी । खांदीं घेवोनि हनुमंतासी । हरिखें नाचतां चौपासीं । कळिकाळासी विटावी ॥ ५४ ॥ धरिल्या हनुमंताचे चरण । कळिकाळ बापुडें तें कोण । करोनि हनुमंताचें स्मरण । मरणा मारीन मी आतां ॥ ५५ ॥ हनुमंताचें अगाध चरित्र । ऐकोनियां ब्रह्मलिखित । श्रीराम होवोनि विस्मित । आलिंगीत हनुमंता ॥ ५६ ॥ परमामृतें अभिषिंचन । नेत्रद्वारा रघुनंदन । हनुमंतासी करी आपण । स्वर्गीं सुरगण विस्मित ॥ ५७ ॥ कृपा करील रघुनंदन । हनुमंताचें भाग्य गहन । स्वमुखें वानी त्रिनयन ।

१ गुडघे. २ गचांडीनें. ३ वेढा. ४ गर्व. ५ नाश. ६ वीरश्री. ७ सुखानें. ८ प्रवाहानें. ९ रथ. १० ग्रास.

११ रणांगणांत. १२ मोजतात. १३ कौल देणारा. १४ देणगी. १५ पहिल्या पिकाची.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

भेरी निशाण लावोनी ॥ ५८ ॥ आलिंगितां हनुमंता । राम विसरे श्रीरामता । कपि विसरे वानरता । एकात्मता आल्हाद ॥ ५९ ॥ सांडोनियां मीतूंपण । देवां भक्तां आलिंगन । खुंटला बोल तुटलें मौन । सुखसंपन्न श्रीरामें ॥ १६० ॥ निविड आणि नित्य निंघोट । सुख कोंदलें घनदाट । नाहीं आदि मध्य शेवट । न चले वाट वेदवादा ॥ ६१ ॥ जेथें मौनावल्या श्रुती । तेथें पावला मारुती । सार्थक हनुमंताची भक्ती । पावन कीर्ति तिहीं लोकीं ॥ ६२ ॥ स्वयें सुखावे रघुनंदन । ऐसें हनुमंताचें भजन । पायां लागे ब्रह्मज्ञान । एका जनार्दना उपदेश ॥ ६३ ॥ नित्य श्रीरामस्मरण । नित्य श्रीरामनामभजन । एका जनार्दना शरण । ब्रह्मज्ञान हरिभजनीं ॥ १६४ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां ब्रह्मलिखितइंद्रजितअपमानहनुमंतपराक्रमवर्णनं नाम एकत्रिंशत्तमोऽध्यायः ॥ ३१ ॥ ॥ ओंव्या ॥ १६४ ॥ श्लोक ॥ ७ ॥

अध्याय बत्तिसावा

॥ श्रीहनूमते नमः ॥ श्रीराम होवोनि सावचित । लक्ष्मणासी स्वयें सांगत । पुढारां वाचीं ब्रह्मलिखित । अनुचरित[१] कपीचें ॥ १ ॥ राक्षसदांतांचिया रासी । पाडोनि केलिया रणभूमीसी । पुढें काय केलें लंकेसी । तें मजपासीं परिसवीं[२] ॥ २ ॥ ऐकोनि श्रीरामाची गोष्टी । सुग्रीवासी आल्हाद पोटीं । हर्षल्या वानरांच्या कोटी । कथाकसवटी ऐकावया ॥ ३ ॥ वानरांच्या निजकोडी । सभा बैसली परवडी । हनुमंताची प्रतापप्रौढी । अति आवडी ऐकावया ॥ ४ ॥ हनुमंताची प्रतापकीर्ती । वाचितां लक्ष्मणा परम प्रीती । अनुलक्षोनि श्रीराममूर्ती । पत्र प्रयुक्ती वाचित ॥ ५ ॥ झाडोनि इंद्रजिताचा पाडाडा । करोनि सैन्याचा निंतोडा । काढोनि कपिपुच्छाचा वेढा । हनुमान गाढा बैसला ॥ ६ ॥ पुढती करावया रण । कोण कोण धाडी रावण । त्यांचें करावया निर्दळण । सावधान बैसला ॥ ७ ॥ गेला देखोनि हनुमंत । मीस करूनि वीर समस्त । आणिक घायाळ कुंथत । नगराआंत निघाले ॥ ८ ॥ वीरीं घेतलें घायवारें[६] । रावणाचे सभेमाझारें । म्हणती पळा रे पळा रे । रणीं वानरें मारिजेल ॥ ९ ॥ रावण बापुडें तें किती । युद्धीं नाटोपे मारुती । सेनानी सैन्य नेलें भस्मांतीं । करील शांती लंकेची ॥ १० ॥ समस्त सैन्या केली बोहरी । बोंब सुटली घरोघरीं । कळकळती नगरनारी । लंकापुरी आकांत ॥ ११ ॥ समरीं रावणाची थोरी । चोरोनियां परनारी । केली राक्षसांची बोहरी । महामारी वानरें ॥ १२ ॥ रणीं रावण मरता । लंकालोक स्वस्थ होता । करविलें इंद्रजिताच्या घाता । रणीं हनुमंता खवळोनी ॥ १३ ॥ करितां अखयाचा कैवार । रणीं मारविला ज्येष्ठ कुमर । बोंब करितां निशाचर । दशवक्त्र हडबडिला ॥ १४ ॥ इंद्रजित मेला किंवा जीतें । कोणी न सांगती मात । तेणें गजबजिला लंकानाथ । केला रणघात वानरें ॥ १५ ॥ इंद्रजित मारिला रणीं । तरीच मारिल्या वीरश्रेणी । तो जरी असता सावधानी । कपि कैसेनि मारिता ॥ १६ ॥ शोधूं जावें जरी रणासी । राक्षस भीती कपिपुच्छासी । भूतीं भक्षिलें प्रेतांसी । तेथें कायसी ओळखी ॥ १७ ॥ रणीं निमाला ज्येष्ठ सुत । रावण मुखीं धूळ घालित । दाही मुखीं शंख करीत । आक्रंदत अति दुःखें ॥ १८ ॥ दुःखें गडबडां लोळे । केश सुटले मोकळे । अश्रु स्रवती विंशती डोळे । पिटी कपाळें अति दुःखें ॥ १९ ॥ इंद्रजिताचा केला घात । रणीं नाटोपे हनुमंत । वानरीं न चले पुरुषार्थ । लंकानाथ अति दुःखी ॥ २० ॥ ब्रह्मयानें सांगितलें मजपासीं । गळां बांधोनि वानरासी । इंद्रजित आणील तुजपासीं । असत्य त्यासी कैंवी आलें ॥ २१ ॥ पाचारोनि चतुरानन । त्यासी पुसे दशानन । इंद्रजित आणील कपि बांधोन । तें तूं वचन करीं सत्य ॥ २२ ॥ आम्ही तंव तुझी संतती । तुझेनि वरदें दाटुगे क्षितीं[११] । मज भेटवीं पुत्रसंतती । चरण तदर्थी[१२] वंदिले ॥ २३ ॥ इंद्रजिताच्या निजवृत्तांता । तुझेनि नाणवे गा दूता । करितो कपि राक्षसघाता । त्यासी सर्वथा न वंचवे ॥ २४ ॥ मीच जावोनि अशोकवना । इंद्रजिताची विवंचना[१३] । समूळ जाणोनियां मना । मग दशानना

---

१ दृढ. २ बर्तेन. ३ ऐकीव. ४ गर्व. ५ नाश. ६ शस्त्रप्रहाराचें भय. ७ सेनापती. ८ राक्षस. ९ जीवंत. १० वीस.

११ पृथ्वीवर. १२ त्यासाठीं. १३ शोध.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सांगेन ॥ २५ ॥ इंद्रजित मेला किंवा जित । ग्लानीं पुसे लंकानाथ । वानरें गांजिला अत्यद्भुत । आहे तो गुप्त म्हणे ब्रह्मा ॥ २६ ॥ ऐसें सांगोनि लंकापती । वना आला प्रजापती । ब्रह्मा देखोनि मारुतीं । घातलें क्षितीं लोटांगण ॥ २७ ॥ कपि पुसे ब्रह्मयाप्रती । ऐसी आवडी आहे चित्तीं । तुकोनि रावणाची शक्ती । करावी ख्याती लंकेसी ॥ २८ ॥ ब्रह्मा सांगे हनुमंतासी । इंद्रजित तुझेनि भयेंसीं । लपालासे विवरप्रदेशीं । मी त्यापासीं जातसें ॥ २९ ॥ इंद्रजिताचे करसंपुटीं । ब्रह्मपाश मानोनि कंठीं । यावें रावणाचे भेटी । लंकात्रिकूटीं कंदनार्थ ॥ ३० ॥ कपि म्हणे इंद्रजिताचे हातें । सर्वथा न मानीं पाशबंधातें । ब्रह्मदेवा तुझेनि हातें । ब्रह्मबंधातें मानीन ॥ ३१ ॥ ब्रह्मा म्हणे ऐसेंचि घडे । माझेनि हातें वाडेंकोडें । हनुमंत पाशबंधनीं पडे । रावणापुढें न्यावया ॥ ३२ ॥ रणीं वानरा देखोनि पाठी । पळतां विवरा संकटीं । इंद्रजितासी चिंता मोठी । लागली पोटीं धुकधुक ॥ ३३ ॥ रणीं गांजिलें माकडें । काय मुख दावूं रावणापुढें । इंद्रजित खळखळां रडे । अति सांकडें ओढवलें ॥ ३४ ॥ रणीं मज येतें मरण । तरी पावतों कृतकल्याण । वांचल्याचें फळ कोण । काळें वदन तिहीं लोकीं ॥ ३५ ॥ इंद्रजित नांवाची हे ख्याती । तिहीं लोकीं माझी कीर्ती । कीर्ति तेचि झाली अपकीर्ती । रणीं मारुती नाटोपे ॥ ३६ ॥ कपि केवळ पालेखाइर । आम्ही निधडे महावीर । रणीं न जिंकवे वानर । लज्जा थोर मज माझी ॥ ३७ ॥ काळें वदन लज्जानुवृत्तीं । मरण न ये मज वरदोक्ती । इंद्रजित पडतां चिंतावर्ती । तंव ब्रह्मोक्ती आठवली ॥ ३८ ॥ गळां बांधोनि मारुती । इंद्रजित आणील लंकेप्रती । स्वमुखें बोलिला प्रजापती । तो मज प्रत्यय यावा कीं ॥ ३९ ॥ पाचारावया चतुराननं । रणीं नुरेचि सेवकजन । माझा वांचलासे प्राण । विवरीं दडोन राहिलों ॥ ४० ॥ धाडावया नाहीं सेवकजन । बाहेर निघतां आपण । रोकडें कपिपुच्छें मरण । करी रुदन इंद्रजित ॥ ४१ ॥ माझे पित्याच्या पित्याचा पिता । कैसेनि भेटेल विधाता । ऐसी इंद्रजित करी चिंता । तंव आला अवचितां परमेष्ठी ॥ ४२ ॥ डोळां देखतांच परमेष्ठी । इंद्रजित धीर धरी पोटीं । समूळ सांगे युद्धगोष्टी । केलें कष्टी वानरें ॥ ४३ ॥

ततः पैतामहं वीरः पाशं शस्त्रविदां वरः ।
संदधे स महातेजास्तं हरिप्रवरं प्रति ॥ १ ॥
अवध्योयमिति ज्ञात्वा तमस्त्रेणास्त्रतत्त्ववित् ।
अवध्यं सर्वभूतानां तदस्त्रं न बबंध तम् ॥ २ ॥

रणीं गांजिलों मारुतीं । तो बांधवे माझे हातीं । ऐसी स्वामीची पूर्वोक्ती । कृपामूर्ति सत्य कीजे ॥ ४४ ॥ असत्य नव्हे ब्रह्मवचन । नारदें सांगितलें आपण । कपीसी ब्रह्मपाशबंधन । कृपा करोन मज द्यावें ॥ ४५ ॥ मज दिधल्या पाशबंधन । तेव्हां रणरंगीं गर्जोन । ब्रह्मपाशीं कपि बांधोन । मग श्लाघेन वाटिवा ॥ ४६ ॥ विरिंचि देतां पाशबंधन । इंद्रजित मोकली कपि लक्षोन । वानरासी ब्रह्मपाशबंधन । सर्वथा जाण बांधीना ॥ ४७ ॥ हरिवरदान हरवरदान । बांधूं न शके ब्रह्मबंधन । पाश गेले पैं तुटोन । निर्बंधन मारुती ॥ ४८ ॥ ब्रह्मपाशाचिया अनुवृत्तीं । रणीं खवळला मारुती । मरण मज असेल पुढती । इंद्रजिताचे चित्तीं चळकांप ॥ ४९ ॥

अहो महत्कर्म कृतं निरर्थकं न राक्षसैर्मंत्रगतिर्विमृष्टा ।
पुनश्च नास्त्रे विहतेऽस्त्रमन्यत्प्रवर्तते संशयिताः स्म सर्वे ॥ ३ ॥
अस्त्रं तद्वितथं दृष्ट्वा संजगर्हे पितामहम् ।
अथागतस्ततो ब्रह्मा मारुतात्मजमब्रवीत् ॥ ४ ॥

इंद्रजितें ब्रह्मपाश घालितां । ते न लगती हनुमंता । माझा रणधर्म गेला वृथा । जघन्यता मज आली ॥ ५० ॥ माझी अस्त्रशक्ती शस्त्रशक्ती । ब्रह्मपाश ब्रह्मशक्ती । अवघी वृथा केली मारुतीं । राक्षसपंक्ती केंवी चाले ॥ ५१ ॥ ब्रह्मपाश वृथा जाय । आणीक अस्त्रें करिती काय । वानरीं न चालती उपाय । आला अपाय राक्षसां ॥ ५२ ॥ ब्रह्मयानें दिधली खोटी शक्ती । यालागीं न धरवे मारुती । इंद्रजित कोपला ब्रह्मयाप्रती । तुझी दुष्टमति आम्हांवरी ॥ ५३ ॥ रावणें विभागिलें वेदांसी । त्याचा राग तुझे मानसीं । निर्दाळावया राक्षसांसी । बुद्धि सांगसी हनुमंता ॥ ५४ ॥ तूं आमुची मूळमूर्ती । आम्ही तुझी ब्रह्मसंतती । आम्हांसी देवोनि खोटी शक्ती । कपिहातीं मारविसी ॥ ५५ ॥ ब्रह्मा

१ संकट. २ आलें. ३ अनुभव. ४ ब्रह्मदेव. ५ पराक्रमानें. ६ योगानें. ७ नीचपणा. ८ नाश. ९ मूळपुरुष.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

म्हणे तूं विकल्पमूर्ती[1] । ब्रह्मद्वेषी ब्रह्मघाती । तुझी नातळे ब्रह्मशक्ती । कैंवी मारुती बांधवे ॥ ५६ ॥ ब्रह्मानुवादाचें उत्तर । गळां बांधोनि वानर । इंद्रजित आणील महावीर । तें साचार करीं वाक्य ॥ ५७ ॥ ब्रह्मा म्हणे इंद्रजिताप्रती । माझे पाश दे मज हातीं । गळां बांधोनि देईन मारुती । लंकेप्रती न्यावया ॥ ५८ ॥ इंद्रजित म्हणे ब्रह्मयासी । म्यां मोकलिलें ब्रह्मपाशासी । हनुमंतें बांधोनि राखिलें पुच्छीं । म्यां तुम्हांसी काय द्यावें ॥ ५९ ॥ ऐकोनि इंद्रजिताचें वचन । ब्रह्मा जाला हास्यवदन । कपीस ब्रह्मपाशबंधन । केलें विंदान तें ऐका ॥ ६० ॥

नानृतं मद्वचः कार्यं गृहाणास्त्रं हि वानर ।
एवमुक्तस्तथा चोक्त्वा बद्धः कपिवरात्मजः ॥ ५ ॥
अभिवाद्य विचेष्टः सन् पपात धरणीतले ॥ ६ ॥

ब्रह्मा सांगे गा हनुमंता । तुज न लागे पाशबंधता । माझ्या सत्यवचनार्थी[2] । ब्रह्मपाशता मानावी ॥ ६१ ॥ ऐकोनि ब्रह्मयाचें वचन । हनुमान घाली लोटांगण । तुझेनि बोलें देईन प्राण । पाशबंधन तें किती ॥ ६२ ॥ ऐसें बोलोनि हनुमंत । पाशबंधनीं पडे मूर्च्छागत । धरणीवरी निश्चेष्टित । धुकधुकीत भयभीत ॥ ६३ ॥ ब्रह्मपाशीं हनुमंत । पडिला देखोनि निचेष्टित । परी तो बंधमोक्षातीत[3] । नित्य निर्मुक्त श्रीरामें ॥ ६४ ॥ जेंवी रवि थिल्लरांतें[4] । मूर्ख मानिती थिल्लरस्थ । तेंवी कपि ब्रह्मपाशांत । बांधिला हनुमंत राक्षसीं ॥ ६५ ॥ हनुमान बांधिला ब्रह्मपाशांत । विजयी वीर इंद्रजित । निशाणें[5] त्राहाटिलीं[6] लंकेआंत । लंकानाथ आल्हादे ॥ ६६ ॥ ब्रह्मयानें बांधिला हनुमंत । परी ब्रह्मबंधासीं अतीत । देखोनि धाके इंद्रजित । करील अनर्थ लंकेसी ॥ ६७ ॥

अथ तं राक्षसो दृष्ट्वा निर्विचेष्टमरिंदमम् ।
बबंध रज्जुपाशैश्च द्रुमचीरैश्च मारुतिम् ॥ ७ ॥
कृष्यमाणश्च रक्षोभिस्तैः स्वबंधे प्रतिष्ठितः ।
हन्यमानस्तथा क्रूरै राक्षसैः काष्ठमुष्टिभिः ॥ ८ ॥

क्षितितळीं[7] निचेष्टित । पडिला देखोनि हनुमंत । राक्षस धांवोनि समस्त । त्यासी बांधीत वेलवाखीं[8] ॥ ६८ ॥ एक बांधिती चऱ्हाटें । साली बांधिती वृक्षफांटे । देखोनि हांसिजे मर्कटें । बंधन खोटें मजलागीं ॥ ६९ ॥ जो न बांधवे ब्रह्मपाशीं । तो कैंवी बांधवे चऱ्हाटेंसीं । बंधनमिसें जातो लंकेसी । रावणासी गांजावया ॥ ७० ॥ आम्हांसी गांजिलें अशोकवनीं । रावणा गांजील लंकाभुवनीं । परम चिंता इंद्रजिताचे मनीं । अपेश जनीं मज आलें ॥ ७१ ॥ इंद्रजितें हनुमंत । बांधोनि आणिला लंकेआंत । हे अवघीच मिथ्या मात । जातो अनर्थ करावया ॥ ७२ ॥ जें ब्रह्मयानें सांगितलें कानीं । तेंचि हनुमंतें धरोनि मनीं । प्रवेशला लंकाभुवनीं । इंद्रजित मनीं भयभीत ॥ ७३ ॥ वानर पालेखाइर । त्याचा इंद्रजितासी धाक थोर । आम्ही निधडे निशाचर । क्षणें कपींद्र मारूं या ॥ ७४ ॥ म्हणोनि बांधिती रज्जुबंधनीं । एक बांधिती वाख वळोनी । एक बांधिती मुंजी चिरोनी । कपि बांधोनि आणिती ॥ ७५ ॥ पूर्वपश्चिमउत्तरेसी । एक ओढिती दक्षिणेसी । हनुमाना करिती कासाविसी । कपि मानसीं हांसत ॥ ७६ ॥ राक्षसें केवळ वेडीं । व्यर्थ करिती ओढाओढी । लंका करीन कडाफोडी । पाडीन दरडी दुर्गाच्या ॥ ७७ ॥ मज नेलिया दुर्गाआंत । महावीरां करीन घात । मुख्य गांजीन लंकानाथ । दहनार्थ लंकेसी ॥ ७८ ॥ कपि बांधिला महाबळी । म्हणोनि राक्षसीं पिटिली टाळी । गुढी आणिली रायाजवळी । सभामंडळीं लंकेच्या ॥ ७९ ॥ वज्रदेही हनुमंत । बुकी हाणी तो पडे मूर्च्छित । मुसळघायें उखळे हात । वीर मूर्च्छित कपिघातें ॥ ८० ॥ इंद्रजितासीं समवेत । हनुमान नेतां लंकेआंत । ब्रह्मा स्वमुखें मंत्र जपत । विपरीतार्थ तो ऐका ॥ ८१ ॥ गृहा वै प्रतिष्ठा हें सूक्त । ब्रह्मा स्वमुखें गडगर्जत । रामराज्य लंकेआंत । हनुमंतप्रवेशें ॥ ८२ ॥ रावणें देखोनि वानरा । दांत खाय करकरां । जीवें मारिलें अखयाकुमरा । यासी करा तिळखंड ॥ ८३ ॥ सकळ सैन्य समसगट । शस्त्रें हाणिती कडकडाट । लागतां शस्त्रें होती पीठ । हृदयस्फोट राक्षसां ॥ ८४ ॥ एकाचे उखळले हात । वीरीं विचकिले पैं दांत । धापां दाटले समस्त । पडिले मूर्च्छित एकैक ॥ ८५ ॥ हनुमान रामनाम जपत । ससैन्य शस्त्रें हताहत । तें देखोनि

१ संशयखोर. २ माझें वचन सत्य व्हावें म्हणून. ३ बंधन व मुक्तता यांपासून वेगळा, ४ डबक्यांत, ५ रणवाद्यें. ६ वाजविलीं. ७ पृथ्वीवर. ८ वेलींनीं व वाकाच्या दोऱ्यांनीं.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

लंकानाथ। कोपें कृतांत पैं जाहला ॥ ८६ ॥ रावणें खड्ग घातला हात। बळें हाणितां हनुमंत। झणाणिला लंकानाथ। शस्त्रें हात लचकला ॥ ८७ ॥ घावो हाणितां प्रचंड। दणाणिलें त्याचें ब्रह्मांड। सरलें रावणाचें बळवंड। खालतें तोंड तेणें केलें ॥ ८८ ॥ घावो न मानीच हनुमंत। रावण चिंताग्रस्त। हनुमान गदगदां हांसत। व्यर्थ पुरुषार्थ रावणा ॥ ८९ ॥ राक्षसघायांचा समेळ। ढेंकणाऐसी त्याची बुळबुळ। तुझा घावो अति निर्बळ। जैसी पेळ कापसाची ॥ ९० ॥ सावध केलें लंकानाथा। तुझा मज थोर भ्रम होता। घावो हाणोनि आतां। केला वृथा पुरुषार्थ ॥ ९१ ॥ तुझ्या घायाच्या समेळीं। माझी न तुटे रोमावळी। श्रीरामासीं रणकल्लोळीं। घेसी फळी कैसेनि ॥ ९२ ॥ स्वयंवरीं वाहतां हरकोदंड। तेव्हां जालें काळें तोंड। तें श्रीरामें केलें दुखंड। युद्ध प्रचंड कैंवी त्यासीं ॥ ९३ ॥ तुझें शुभ चिन्ह कळलें आतां। स्वयें जालासी भीक मागता। भिक्षेमाजीही कपटता। श्रीरामकांता चोरिली ॥ ९४ ॥ गृहस्थाची जे पत्नी। ती भिक्षुकाची निजजननी। तूं तंव केवळ मातृगमनी। सीतावरणीं उद्यत ॥ ९५ ॥ भिक्षा दे वो म्हणसी माते। शेखीं अभिलाषिसी सीते। महापापी तूं सर्वार्थें। संनिपातें घेतलासी ॥ ९६ ॥ बाप होणाराची थोरी। राजत्व सांडोनियां दूरी। झोळी घेवोनियां करीं। स्वयें भिकारी जालासी ॥ ९७ ॥ स्वयें होतांचि भिकारी। राजत्वपदवी पळे दूरी। जळो तें वेदभाष्य तुझी थोरी। परनारी चोरिसी ॥ ९८ ॥ अवध्यता वानरासी। मारितां न मारवे आम्हांसी। विलोकोनि बोलतां सभेसी। रावणासी अति चिंता ॥ ९९ ॥ येथें आणितां हनुमंत। आम्हांसी न जोडे पुरुषार्थ। हनुमान माझा करील घात। चळीं कांपत रावण ॥ १०० ॥ रावणाचें सिंहासन। तयासमान पुच्छासन। हनुमान बैसला सावधान। दशानन लक्षोनी ॥ १ ॥ दशमुखेंसीं संमुख। वानर बैसला निःशंक। रावणा लागली धुकधुक। अधोमुख स्वयें जाला ॥ २ ॥ इंद्रजितें हनुमंत। धरोनि आणिला लंकेआंत। सत्य जाला ब्रह्मवाक्यार्थ। मज अपघात ओढवला ॥ ३ ॥ रावणाचे चित्तीं चिंता ऐसी। कळों सरली हनुमंतासी। वानरचेष्टा मांडिल्या त्यासी। लंकेशासी गांजावया ॥ ४ ॥ रावणसंमुख हनुमंत। बैसोनियां वांकुल्या दावित। कांखा कुशी खाजवीत। पुच्छ लावीत नाकासी ॥ ५ ॥ पुच्छ लावितांचि नाकीं। केश भरले नासिकीं। रावण शिंकेवरी शिंकी। दशमुखीं ओकित ॥ ६ ॥ दाहीं नाकीं शिंके थडथडां। होत शेंबुडाचा सडा। सिंहासनीं रोकडा। वानरें गाढा गांजिला ॥ ७ ॥ पुढें शिंकेचे पडतां नेट। बृहती वाजे परपराट। वानरचेष्टा अति वरिष्ठ। दशकंठ गांजिला ॥ ८ ॥ राजसन्मान राजाभिमान। वानरें उडविला संपूर्ण। सिंहासनीं दशानन। लज्जायमान बैसला ॥ ९ ॥ वानर न गणी राक्षसांसी। दृष्टी नाणी प्रधानासी। रावणें जाणोनि मानसीं। स्वमुखें कपीसी पूसत ॥ ११० ॥

रे रे वानर को भवानहमरे त्वत्सूनुहंताहवे
दूतोहं खरखंडनस्य जगतां कोदंडदीक्षागुरोः।
मद्दोर्दंडकठोरपाटनपटुः को वा त्रिकूटाचले
को मेरौ क च रावणोद्य गणना कोटिस्तु कीटायते ॥९॥

रावण हेळसोनि बोले उत्तर। अरे तूं कोण कोणाचें वानर। तैसाचि हेळसोनि बोले कपींद्र। ऐकें साचार रावणा ॥ ११ ॥ एकें म्हणतांचि अरे। सवेंचि दुसरा म्हणे कां रे। तैसेंचि मांडिलें वानरें। निशाचरें हेळसोनी ॥ १२ ॥ मारिले वनकर किंकर। जंबुमाळी प्रधानकुमर। पंच सेनानी मारिले शूर। तो मी वानर हनुमंत ॥ १३ ॥ करोनि वृक्षांचा उपाडा। झाडिला इंद्रजिताचा पादाडा। अखया कुमर मारिला गाढा। तो मी निधडा हनुमंत ॥ १४ ॥ कोणाचा म्हणसी कैंचा कोण। येथें यावया काय कारण। पुशिल्या प्रश्नांचें प्रतिवचन। सावधान अवधारीं ॥ १५ ॥ सुबाहु ताटकानिर्दळण। त्रिशिरा मारिला खर दूषण। त्या श्रीरामाचा दूत मी जाण। तुझा प्राण घेवों आलों ॥ १६ ॥ कोदंडधारिदीक्षागुरू। सूर्यवंशी श्रीरामचंद्रू। त्याचा दूत मी वानरू। तुझा संहारू करूं आलों ॥ १७ ॥ राक्षसराजा मी

१ राक्षसांचा सारखा मार. २ शिवधनुष्य. ३ दोन तुकडे. ४ येऊन ठेपला. ५ तिरस्कार, धिक्कार करून. ६ उत्तर.

७ धनुर्धरांस धनुर्विद्येचा उपदेश करणारा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

रावण । तुज वधावया कैंची आंगवण । तरी माझें बळ असाधारण । नाहीं प्रमाण मारावया ॥ १८ ॥ लागतां बाहूची चपेट । मेरुमांदार होती पीठ । तेथें रावण दशमुख कीट । लंकात्रिकूट तें किती ॥ १९ ॥ रावणाऐसे दशकंठी । रणीं मर्दीन कोट्यनुकोटी । तो मी लंकेची त्रिकूटी । वाममुष्टीं मर्दीन ॥ १२० ॥ म्हणसी तुजसवें वानर । असती पाठिराखे अपार । मी एकांगवीर[1] । पुरे दशशिर दंडावया ॥ २१ ॥

एकोहं पवनात्मजो दशमुखस्त्वं चापि कोटीश्वर–
स्त्वां जित्वा समरे प्रभुः प्रणयवान्सीतां च नेतुं क्षमः ।
किं तस्याघटितं बलं बलवता रामेण सुश्रीमता
हत्वा दक्षिणपाणिना वसुमतीं त्वां हंतुमुक्तं वचः ॥ १० ॥

मी तंव एकला एक वानर । श्रीरामर्कटकींचें[2] किंकर । तुझे कोटि कोटि झुंझार । मजसमोर करीं उभे ॥ २२ ॥ मशकें कोटी कोटी झुंझार । मज मारितां दशशिर । कोण राखेल निशाचर । सुरासुर पाहूं पां ॥ २३ ॥ सदाशिव तुज रक्षिता । तुवां चोरिली श्रीरामकांता । शिव पेटला तुझ्या घाता । चोरी करितां कोण राखे ॥ २४ ॥ ब्रह्मा तुज नित्य साहाकारी । त्याचे वंशीं तूं दुराचारी । चोरीमारी आणि परद्वारी । ब्रह्मा तुजवरी क्षोभला ॥ २५ ॥ ब्रह्मा शिव आणि शक्र । तुज क्षोभले सुर समग्र । मज मारितां दशशिर । कोण समोर राहील ॥ २६ ॥ मुख्य त्वां चोरिली सीता सती । जटायु मारिला विश्वासघातीं । पतिव्रतेसी मागतां रती । प्रजापती क्षोभला ॥ २७ ॥ मज मारितां दशवक्त्र । कुमर प्रधान सैन्य समग्र । रणीं मर्दोनि निशाचर । सीता सुंदर मग नेईन ॥ २८ ॥ ऐकोनि हनुमंताची मात । इंद्रजित चळीं कांपत । धाकें बिभीषणासी सांगत । आला अपघात रावणा ॥ २९ ॥ हनुमंताचा रणावर्त । भोगोनि इंद्रजित असे भीत । न साहवे पुच्छाचा घात । लंकानाथ केंवी वांचे ॥ १३० ॥ लंके आणोनि हनुमंत । कांहीं नव्हेचि पुरुषार्थ । आजि निमाला लंकानाथ । आला अंत राक्षसां ॥ ३१ ॥ इंद्रजित बिभीषण सचिंत । कैसेनि वांचेल लंकानाथ । तंव बोलिला हनुमंत । अति पुरुषार्थ रामाचा ॥ ३२ ॥ रणीं मारीन रावण । करोनि सीतासोडवण । सीता घेवोनि जातां जाण । आडवा कोण येऊं शके ॥ ३३ ॥ इतुकें करितां न लगे क्षण । परी श्रीरामें वाहिली आण[3] । स्वहस्तें मारीन रावण । मिथ्या कोण करूं शके ॥ ३४ ॥ मारोनियां दशशिरा । स्वस्थ[4] करावी वसुंधरा[5] । सुखी करावें चराचरा । श्रीरामचंद्रा निजनेम ॥ ३५ ॥ सोडावी देवांची बांधवडी[6] । तोडावी नवग्रहांची बेडी । उभारावी रामराज्याची गुढी । हे मर्यादा गाढी श्रीरामीं ॥ ३६ ॥ वानरें करोनि उड्डाण । जीवें मारावा दशानन । श्रीरामप्रतिज्ञापाळण । कपि रावण न मारीच ॥ ३७ ॥ रावणाचीं दाही शिरें । हनुमान खुडिता नखाग्रें । मर्यादा[7] केली श्रीरामचंद्रें । म्हणोनि वानरें राखिला ॥ ३८ ॥ श्रीराममर्यादेचें उत्तर । सर्वथा नुलंघीच वानर । यालागीं तो दशशिर । जीवें कपींद्र न मारीच ॥ ३९ ॥ जीवें न मारीच वानर । मरणापरीस हें दुर्धर । निर्भर्त्सिला दशशिर । तेंही सादर अवधारा ॥ ४० ॥

धिक्ते रावण पौरुषं तव कुलं धिग्धिग् यशस्तेजसी
धिक् खड्गासुरदर्पनोदनकरं धिग्धिग् वृथा जीवनम् ।
यस्माद्राघवबाणभीतमनसा सीता परोक्षे हृता
तद्वैरादहमागतोस्मि हनुमान्बद्धो वधार्थे तव ॥ ११ ॥

जळो ते रावणा तुझी थोरी । जळो तो राजा होय भिकारी । जळो तें कर्म करणें चोरी । परनारी पतिव्रता ॥ ४१ ॥ जळो तें तुझें रावणा कुळ । जळो तें रावणा तुझें शीळ । जळो तें रावणा तुझें बळ । पापी केवळ परद्वारी ॥ ४२ ॥ धिग्धिग् रावणा तुझा पुरुषार्थ । धिग्धिग् रावणा तुझा कर्तव्यार्थ । धिग्धिग् रावणा तुझें व्रत । स्वार्थ परमार्थ नाशिला ॥ ४३ ॥ धिग्धिग् रावणा तुझी राक्षसजाती । धिग्धिग् रावणा तुझी ख्याती । धिग्धिग् रावणा तुझी कीर्ती । जाली अपकीर्ति तिहीं लोकीं ॥ ४४ ॥ धिग्धिग् रावणा तुझें जन्म । धिग्धिग् रावणा तुझें कर्म । धिग्धिग् रावणा तुझा धर्म । निंद्य परम तिहीं लोकीं ॥ ४५ ॥ धिग्धिग् रावणा तुझी श्रीमंती । धिग्धिग् रावणा तुझी शक्ती । धिग्धिग् तो खड्ग[8] तुझे हातीं । लोमें[9] मारुतीचें न तुटेचि ॥ ४६ ॥ धिग्धिग् जीवित्व

१ पुष्कळ शूरांशीं एकटा लढणारा. २ रामाच्या सैन्यांतील. ३ शपथ. ४ सुखसंपन्न. ५ पृथ्वी. ६ बंदिवास. ७ अटक. ८ तरवार. ९ लंव, केंस.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

तुझें क्षितीं । धिग्धिग् रावणा तुझी शौर्यशक्ती । परोक्ष चोरिली सीता सती । बाणभयें भीसी श्रीरामा ॥ ४७ ॥ चोरिली माझ्या स्वामीची नारी । त्या तुझी म्यां धरिली चोरी । चोर तो तंव प्रत्यक्ष वैरी । सहपरिवारीं मारीन ॥ ४८ ॥ देखतां सैन्य भट सुभट । तुझे मर्दीन वीसही होंट । तुझे छेदावया दशकंठ । आलों मी वाटे रामाचा ॥४९॥ ऐसें बोलतां महाबळी । पिंजारिल्या रोमावळी । लांगूलें[३] त्राहाटिलें भूतळीं । वाढलें निराळीं कपिपुच्छ ॥१५०॥ सर्वेचि आठवलें हनुमंता । श्रीराम वधील लंकानाथा । व्यर्थ कां मी क्षोभूं आतां । केलें शांत निजकोपा ॥ ५१॥ एका जनार्दना शरण । केलें लंकेशगर्वहरण । जाळील लंकाभुवन । रणकंदन अवधारा ॥५२॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां हनुमद्रावणगर्वहरणं नाम ब्रह्मलिखिते द्वात्रिंशत्तमोऽध्यायः ॥ ३२ ॥ ओंव्या ॥ ॥ १५२ ॥ श्लोक ॥ ११ ॥

अध्याय तेहतिसावा

॥ श्रीसीतारामाभ्यां नमः ॥ रावणसिंहासनासमान । घालोनियां पुच्छासन । हनुमान बैसला सावधान । दशानन लक्षोनी ॥ १ ॥ जैसा सिंहापुढें गजाचा दर्प । कीं गरुडापुढें कांपती सर्प । तैसा देखोनि कपिप्रताप । महाकंप रावणा ॥ २ ॥ जंव रावण देखे भयभीत । तंव बिभीषण इंद्रजितसंयुक्त । लंकेशासी बुद्धि सांगत । कीं अवध्य हनुमंत सर्वथा ॥ ३ ॥ मारूं जातां हनुमंतासी । तेणें गांजिलें महावीरांसी । पुच्छें निर्दळिलें सैन्यासी । तो कपि कोणासी नाटोपे ॥ ४ ॥ तरी बुझवावया हनुमंता । श्रीरामा अर्पावी सीता । आणि शरण रिघालिया रघुनाथा । आम्हां समस्तां कल्याण ॥५॥ जें श्रीरामाचें एक वानर । केवळ तेंही पालेखाईर । तें नाटोपे आम्हां अति दुर्धर । मग आल्या रघुवीर कोणा साहे ॥ ६ ॥ ऐसें ऐकोनि बिभीषणउत्तरा । आणि देखोनि इंद्रजितासी रणेंभेदरा । परम चिंता दशशिरा । देखोनि वानरा चळकांप ॥ ७ ॥ तरी इंद्रजिताची बुद्धि भिन्न । आणि बिभीषण म्हणे रिघावें शरण । तरी म्यां काय करावें आपण । ऐसें रावण विचारी ॥ ८ ॥ तरी एकल्या वानराभेण । रिघावें श्रीरामासी शरण । तरी मज आलें उणेपण । करोनि छळण कपि मारूं ॥ ९ ॥ जैसा जटायु नाटोपतां जाण । मग म्यां मारिला करोनि छळण । तैसेंचि यासी घालोनि आण । पुसोनि मरण कपि मारूं ॥ १० ॥ जरी श्रीरामभक्त सत्यवादी । असत्य न बोलती त्रिशुद्धी । तरी याचे मरणा हेचि बुद्धी । छळणानुवादीं मारावा ॥ ११ ॥ ऐसी विचारोनि युक्ती । मग दाही मुखीं लंकापती । स्तवूं आदरिला मारुती । मरणयुक्ती पुसावया ॥ १२ ॥ तरी ऐकें कपींद्रा सावधान । तुज घालितों श्रीरामाची आण । कीं तुज कैसेनि ये मरण । हें सत्य वचन मज सांगें ॥१३॥ ऐकोनि श्रीरामाची आण । हनुमान घाली लोटांगण । मज सर्वथा नाहीं मरण । हें सत्यवचन लंकेशा ॥ १४ ॥ ऐसें परिसतां कपिवचन । गदगदां हांसे दशानन । जे जन्माआधीं गर्भी मरण । अमरपण तुज कैंचें ॥ १५ ॥ मग रावण वदे हनुमंता । मिथ्या वदों नको श्रीरामभक्ता । आणि तूं कां वदसी मिथ्या वार्ता । निजवृत्तांता मज सांगें ॥ १६ ॥ जैसें जटायूस पुसोनि मरण । त्यासि मारिलें करोनि छळण । तैसेंचि मजही करिसी जाण । तेणें भयें वदें मिथ्या ॥ १७ ॥ तरी मरणभय जयाचे चित्तीं । मग त्यासी कैंची श्रीरामभक्ती । देहलोभ्या श्रीरामप्राप्ती । कदा कल्पांतीं असेना ॥ १८ ॥ ऐसें परोपरी प्रबळ ज्ञान । योग्यता बोले दशानन । तरी परदाराचोरी आपण । हें जाणतेपण कोण रावणा ॥ १९ ॥ तरी मरणभयें कासाविसी । आणि सीता चोरोनि स्वयें पळसी । तो तूं आम्हां शिकविसी । मरणभयासी कां भीत ॥ २० ॥ वर्मी खोंचला लंकानाथ । मग त्यासी सांगे हनुमंत । ऐक माझा मरणार्थ । तुज यथार्थ सांगेन ॥ २१ ॥ मी असत्य वदलों नाहीं तुजसी । जें मरण नाहीं माझे देहासी । तरी मरण आहे पुच्छासी । तें मारिसी तैं मी मरें ॥ २२ ॥ कपिपुच्छासी केलिया दहन । अवश्य हनुमंतासी मरण । इंद्रजित सत्य मानी आपण । आणि सैन्य प्रधान सत्य मानिती ॥ २३ ॥ श्रीराम-

१ पाठीमागें. २ वीर. ३ शेंपूट. ४ समजूत घालण्यासाठीं, ५ लढाईचें भय, ६ वानराच्या भीतीनें, ७ शपथ, ८ खरोखर. ९ परस्त्रीचा अपहार, १० खराखरा, ११ जाळणें,

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

आणेनें भयभीत । सत्य वदला मरणार्थ । पुच्छदाहें मरेल हनुमंत । ऐसें लंकानाथ सत्य मानी ॥ २४ ॥ मग स्वयें पुसे दशानन । तरी कोणे युक्ती पुच्छदहन । जें जाळावया लंकाभुवन । करावया छळण कपि सांगे ॥ २५ ॥ वस्त्रें तेलतुपीं भिजवोन । पुच्छ गुंडाळावें संपूर्ण । मग जाळावें अग्नि लावोन । तेणें मरण वानरासी ॥ २६ ॥ मरणवर्म[1] आलें हाता । तेणें अतिउल्हास लंकानाथा । मग होय दूतांसी सांगता । वेष्टनार्थी कपिपुच्छा ॥ २७ ॥ पुच्छ गुंडाळितां तांतडी[2] । तंव सरलीं जुनीं पानीं लुगडीं । मग गुंडिती नवीं घोंगडीं । धुवट घडी उकलोनी ॥ २८ ॥ मग दिंडें आणिलीं उदंडें[3] । परी तें कपिपुच्छ न गुंडे । तेणें चाटे[4] भाटे फोडिती धोंडे । करिती तोंडें महाशब्द ॥ २९ ॥ शेले खाखी बेजवटे । काळीं बेरीं समसगटें । सखरें निखरें धुवटें । परी पुच्छ न वेष्टे कपीचें ॥ ३० ॥ राजगृहींचीं वस्त्रें । आणि नगरींचीं वस्त्रमात्रें । सभा नागविली समग्र । परी पुच्छ चतकोर गुंडेना ॥ ३१ ॥ पोताचीं वस्त्रें घेती काढकाढूं । आणि पडदे गुंडिती फाडफाडूं । का दुसे गुंडिती उघडउघडूं । द्वंद्वीं माकडू पेटला ॥ ३२ ॥ कोणाचा मेहुणा कोणाचा पाहुणा । जांवाई आणिला दिवाळसणा । त्यांचेही करितां वस्त्रहरणा । शंखस्फुरणा ते करिती ॥ ३३ ॥ जे जे देखती वस्त्रयुक्त । त्यांतें दूत नागवित । नगरीं भोंवे पुच्छावर्त । कळकळत नरनारी ॥ ३४ ॥ पुरुष नागवले हळहळित । मग कां तृणें लिंग झांकित । मागें पुढें देवोनि हात । स्त्रिया पळत अति नग्न ॥ ३५ ॥ मग राणिवसोंचीं[5] लुगडीं । करोनि आणिती उघडीं । लंका नागविली रोकडी । कडोविकडी कपिपुच्छें ॥ ३६ ॥ नगर नागविलें हळहळित । आणि सभा नागविली समस्त । नग्न स्त्रिया राणिवसांत । पुरविला अंत कपिपुच्छें ॥ ३७ ॥ दुर्गसांठवणं[6] निर्वेडी । तेलतुपांचीं टांकीं गाढीं । कपिपुच्छें केलीं कोरडीं । घोंगडीं पांगडीं भिजवोनि ॥ ३८ ॥ घृत स्नेहँ[7] नाहीं नगराआंत । वाती लाविल्या समस्त । गडद पडलें लंकेआंत । लंकानाथ धुकधुकी ॥ ३९ ॥ नगरीं तेलतुपाचा धर्डा[8] । आणि भोंवता वस्त्रांचा हरडा । तरी पुच्छ न गुंडे पुढां । लाविलें वेडा वानरें ॥ ४० ॥ सभा नागविली वीरानुवीरीं । वस्त्रमात्र न मिळे नगरीं । नागव्या हळहळित नरनारी । कपिपुच्छ तरी न गुंडे ॥ ४१ ॥ पुच्छ गुंडावयाची व्युत्पत्ती । ज्याचें नगर त्याचे हातीं । स्वयें नागवी मारुती । लाविली ख्याती कपिपुच्छें ॥ ४२ ॥ वानर महाजगजेठी । लंका नागविली पुच्छासाठीं । शिणतां राक्षसांच्या कोटी । पुच्छ शेवटीं न गुंडे ॥ ४३ ॥ पुच्छ गुंडितां पैं कैवाडें । अग्र अधिकाधिक वाढे । ऐसी ख्याती लाविली माकडें । मरण रोकडें राक्षसां ॥ ४४ ॥ नाहीं झगडा ना भांडण । करितां कपिपुच्छासी वेष्टण । तृणप्राय केला रावण । ऐसी गाढी आंगवण हनुमंता ॥ ४५ ॥ पुच्छ वेष्टिलें समग्र । अल्प उरलें दिसे अंग्र । ऐसें ऐकोनि दशशिर । पीतांबर म्हणे गुंडाळा ॥ ४६ ॥ इंद्रजित प्रधानसमवेत । रावण संतोषचित्त । पुच्छदाहें मरे हनुमंत । पुच्छ समस्त वेष्टावें ॥ ४७ ॥ मग पीतांबरें श्वेतांबरें । आणि पट्टकुळें[9] मनोहरें । गुंडिताती क्षौमांबरें[11] । पुच्छ न भरे कपीचें ॥ ४८ ॥ तंव इंद्रजित अतिशयें धाकत । जरी वांचला हनुमंत । तरी समस्तां करील घात । पुच्छदहनार्थें मारावा ॥ ४९ ॥ रावण धाके मानसीं । जें पुच्छ न गुंडे पैं आम्हांसी । तरी कैंवी मारवेल हनुमंतासी । म्हणोनि उकसाबुकसीं स्फुंदत ॥ ५० ॥ तंव बोलिला विद्युन्माळी[12] । जरी वानर आकळेना महाबळी । तरी उघडी करावी जनकबाळी । मग पुच्छ तत्काळीं आकळेल ॥ ५१ ॥ ऐसें ऐकतां हनुमंतें । मग सांवरिलें निजपुच्छातें । तंव दूत सांगती रावणातें । जें आम्हीं पुच्छातें आकळिलें ॥ ५२ ॥ आम्ही सेवक आतुर्बळी[13] । पुच्छ आकळिलें समूळीं । म्हणोनि पिटिली सर्वीं टाळी । केला समूळीं गडगर्ज ॥ ५३ ॥ तंव रावण सांगे अति क्रोधार्थें । अग्नि लावा रे पुच्छातें । मग आणोनि लोहकारातें । लाविले भाते अग्नीसी ॥ ५४ ॥ लंकानाथ सुखसमेळीं । पुच्छा करावया होळी । हनुमंत मारावा महाबळी । अग्नीजवळी स्वयें आला ॥ ५५ ॥ तंव अग्नीच्या पोटाआंत । कीं अपमानावा लंकानाथ । तंव तेंचि करूं पाहे हनुमंत ।

१ मरणाची खूण. २ घाईनें. ३ पुष्कळ. ४ कापडवाले. ५ अंतःपुरांतील. ६ किल्ल्यांतला सांठा, ७ तेल, ८ तोटा, ९ टोंक. १०. रेशमी महावस्त्रें. ११ रेशमी वस्त्रें. १२ या नांवाचा राक्षस, १३ महाबळवान्.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

तो गुह्यार्थ अवधारा ॥ ५६ ॥ तयाकाळीं हनुमंतें। विनविलेंसे पितयातें। जे वायु सखा अग्नीतें। तरी ज्वाळा तेथें होवों नेदीं ॥ ५७ ॥ ज्वाळा होवों नेदीं येथें। ऐसें नमोनियां वायूतें। अपमानावया रावणातें। कपि पुच्छाथें खवळला ॥ ५८ ॥ भाते फुंकितां चौपासीं। परी अग्नि स्पर्शेना पुच्छासी। राक्षस होती कासाविसी। परी अग्नि तयासी लागेना ॥ ५९ ॥ मग रावण पुसे हनुमंतासी। अग्नि कां न लागे पुच्छासी। हनुमान म्हणे रावणासी। तूं आहेसी अति मूर्ख ॥ ६० ॥ सदसद्विवेकज्ञान। ज्यासी नाहीं तो अतिअज्ञान। तूं तंव ज्ञानगर्वी पाषाण। जे धर्मलक्षण लक्षेना ॥ ६१ ॥ भाते फुंकितां अचेतन। केंवी ज्वाळा होती सचेतन। तरी हें तुज नाहीं ज्ञान। अति अज्ञान लंकेशा ॥ ६२ ॥ तें तंव वचन मानलें लंकेशासी। मग पाचारोनि निजवीरांसी। फुंकूं लाविलें पुच्छासी। साक्षेपेंसीं सांगोनी ॥ ६३ ॥ राक्षस फुंकितां चौपासीं। तंव पुच्छें दडपिलें अग्नीसी। घोर घाणी उठे घशासीं। तेणें कासाविसी राक्षसें ॥ ६४ ॥ घोर घाणी अति प्रबळ। डोळां आंसुवें मुखीं लाळ। आणि ऊर्ध्वश्वासें खोकती सकळ। हलकल्लोळ मांडिला ॥ ६५ ॥ ऐसा द्वंद्वा पेटला हनुमंत। सभा जाहली धूम्राकुळित। वानरें मांडिला हा अनर्थ। लंकानाथ गजबजिला ॥ ६६ ॥ मग रावण पुसे हनुमंता। पुच्छ कां न जळे फुंकितां। हनुमान म्हणे लंकानाथा। ऐक आतां सांगेन ॥ ६७ ॥ पोफळ नेदितां यजमानासी। होम न करवे तयासी। तरी न फुंकितां रावणासीं। अग्नि पुच्छासी स्पर्शेना ॥ ६८ ॥ जेंवी गृहस्थें न करितां ब्रह्मार्पण। द्विज न घेती आपोशन। तेंवी न फुंकितां रावण। हुताशन प्रबळेना ॥ ६९ ॥ एक मुखें किती फुंकिती। दहा मुखें तुज आहेती। तुवां फुंकिलिया लंकापती। पुच्छप्रदीप्ती हुताशना ॥ ७० ॥ मग करोनि शुद्धाचमन। आणि प्रथम देवोनि घृतावदान। मग फुंकावया हुताशन। दशानन बैसला ॥ ७१ ॥ हनुमंताची विवेकयुक्ती। सत्य मानलें लंकापती। पुच्छासी फुंकावया प्रदीप्ती। केली आईती ते ऐका ॥ ७२ ॥ रावणाचे पोटीं कपट। कपि मारावया समसगट। येणें आवेशें दशकंठ। हव्यवाट फुंकित ॥ ७३ ॥ जें रावणाचे निजचित्तीं। माझेनि मुखें पुच्छप्रदीप्ती। शांत जालिया मारुती। जगीं कीर्ति वाढेल ॥ ७४ ॥ तंव हनुमान म्हणे पित्या पवनासी। अग्नि फुंकितां रावणासीं। अति अपमान द्यावा त्यासी। सुख कोणासी न दावी ॥ ७५ ॥ तंव अति आवेशें दशानन। आक्रोशें फुंकी हुताशन। तंव भडका एकसरें होऊन। केलें दहन खांडमिशां ॥ ७६ ॥ होतां खांडमिशादहन। मुखीं पोळला दशानन। शंख करी गुद त्राहाटोन। काळें वदन लंकेशा ॥ ७७ ॥ जंव रावण तोंड परतें करी। तंव हनुमान पुच्छ वरतें धरी। पहिला अपमान राजशिरीं। केली बोहरी खांडमिशां ॥ ७८ ॥ अभिनव कपीची ख्याती। ऐकोनि हांसे श्रीरघुपती। आणि सुग्रीवासारखे जुत्पँती। स्वयें हांसती स्वानंदें ॥ ७९ ॥ वाचितां पत्र लक्ष्मण। तोही जाला हास्यवदन। हनुमंताचें अति विंदान। काळें वदन लंकेशा ॥ ८० ॥ आमुचा हनुमान आतुर्बळी। जे धुरेच्या मुखा केली होळी। म्हणोनि वानरीं पिटिली टाळी। सुखसमेळीं गर्जत ॥ ८१ ॥ विजयी हनुमंत महावीर। हरिखें नाचती वानर। अवघे करिती जयजयकार। श्रीरामचंद्र स्मरोनी ॥ ८२ ॥ मग अंगदें उठोनि जाण। भेरी त्राहाटिल्या निशाण। तंव सुमनें वर्षती सुरगण। तेणें सुखसंपन्न श्रीराम ॥ ८३ ॥ ऐकतां सेवकाची ख्याती। स्वयें सुखावे रघुपती। धन्य धन्य तो मारुती। जे पावन कीर्ति तिहीं लोकीं ॥ ८४ ॥ मग सौमित्रा श्रीराम सांगत। पुढें वाचीं ब्रह्मलिखित। पुच्छदहनें हनुमंत। पुढें पुरुषार्थ काय केला ॥ ८५ ॥ वंदोनि श्रीरामाचे चरण। पत्र वाची लक्ष्मण। आवडीं परिसत रघुनंदन। तें सावधान अवधारा ॥ ८६ ॥ श्रीरामातें अनुलंक्षोनी। हनुमान उभा कर जोडूनी। आपुल्या स्तुति ऐकोनी। नाें श्लाघे ना अभिमान ॥ ८७ ॥ मी पालेखाइरें वानर। माझी कीर्ति करिता श्रीरामचंद्र। रणीं रामनाम महाशूर। अति दुर्धर रामनाम ॥ ८८ ॥ श्रीराम हाताचा हात। श्रीराम शस्त्राचें सामर्थ्य। राम

१ मोठ्या यत्नानें. २ धुरानें व्याकुळ. ३ अग्नि. ४ शेंपूट जळणें. ५ तयारी. ६ मेलेला. ७ मल्लवीर. ८ वाजविल्या. ९ फुलें. १० पाहून. ११ बढाई केली नाहीं.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

करिता राक्षसघात । रणकंदनार्थ श्रीराम ॥ ८९ ॥ श्रीराम प्राणाचाही प्राण । श्रीराम बाणाचाही बाण । श्रीराम माझी आंगवण । श्रीरामीं समर्पण पैं माझें ॥ ९० ॥ ऐसे ऐकतां हनुमंताचे बोल । श्रीरामा येती सुखाचे डोल । जे भक्तिभावार्थाची ओल । अति सखोल श्रीरामीं ॥ ९१ ॥ पुढें ब्रह्मयाचें ब्रह्मलिखित । हरिखें सौमित्र वाचित । अपमानिला लंकानाथ । सभेआंत सलज्ज ॥ ९२ ॥ प्रथमप्रारंभीं पुच्छकंदन । दाढ्या मिशा जाळिल्या दहनें । सिंहासनीं काळें वदन । लज्जायमान रावण ॥ ९३ ॥ कीर्ति जाली अपकीर्ती । थोर चिंता रावणचित्तीं । पुढें काय करील मारुती । पुच्छदहनार्थी कळेना ॥ ९४ ॥ छळों जातां वानरासी । छळण न चले रामभक्तासी । छळणें जाळिलें माझ्या मुखांसी । खांडमिशांसी पुच्छदाहो ॥ ९५ ॥ वानर उडतां रामनामेंसीं । छेदिलें दुर्धर सप्त पाशांसी । तेथें द्रुमपाश रज्जुपाशासी । यमपाशासी कोण पाड ॥ ९६ ॥ काळपाश कर्मपाश । धर्मपाश ब्रह्मपाश । मायापाश मोहपाश । जन्मपाश सातवा ॥ ९७ ॥ काळपाश तो आयुष्यघात । कर्मपाश तो नैश्वर्यवंत । धर्मपाश तो आश्रमगत । वेदविहितार्थ ब्रह्मपाश ॥ ९८ ॥ देहममता मोहपाश । मुख्य माया तो आशापाश । कनककांता हा जन्मपाश । ऐसे सप्त पाशांहीं जीव बद्ध ॥ ९९ ॥ सप्त पाशांची निवृत्ती । रामनामें करी मारुती । तेथें येरांची न चले युक्ती । शास्त्रव्युत्पत्ती शीणतां ॥ १०० ॥ श्रीरामाचें जें नाम । तेंचि केवळ परब्रह्म । नामें निर्दळी कर्माकर्म । धर्माधर्मच्छेदक ॥ १ ॥ अबद्ध पढतां पैं वेद । अनिवार बाधिती निषेध । आणि नाम स्मरतांचि अबद्ध । होती सुबद्ध श्रवणार्थी ॥ २ ॥ अबद्ध मंत्राच्या प्रयुक्तीं । जापकें चळले नेणों किती । आणि अबद्ध नांवाच्या आवर्ती । जड मूढ तरती असंख्य ॥ ३ ॥ करितां क्रियाकर्मव्युत्पत्ती । जरी विधिविधानें व्यंग होती । व्यंग कर्मं नव्हे उद्धारगती । आणि हरिनामोक्ती अच्युत ॥ ४ ॥ नामासीं नाहीं कर्मबंधन । नामासी नाहीं विधिविधान । आसनीं भोजनीं शयनीं जाण । नाम पावन हरीचें ॥ ५ ॥ स्वप्नीं स्मरतां रामनाम । तिन्ही अवस्थां करी भस्म । ऐसें दांडुगें हरीचें नाम । नाम परब्रह्म प्रत्यक्ष ॥ ६ ॥ स्वप्नींचिया स्वप्नस्थिती । कौशिकीं रामरक्षेची प्राप्ती । जे कां दाडुगी त्रिजगतीं । उद्धरणार्थी जयाचे ॥ ७ ॥ तरी रामरक्षा ज्याचे हातीं । कळिकाळ त्यासी कांपती । यमधर्म पायां लागती । तीर्थें मागती चरणतीर्थ ॥ ८ ॥ असो रामरक्षाव्युत्पत्ती । दोनचि अक्षरें रामनामोक्ती । चहूं मुक्तींची फिटे भ्रांती । ब्रह्मप्राप्ति ठसावे ॥ ९ ॥ श्रीरामस्मरणाचेनि योगें । ब्रह्मस्थिति घर रिघे । कळिकाळासी करी उभें । ऐसें नाम दाडुगें श्रीहरीचें ॥ ११० ॥ ऐसी रामनामाची स्थिती । पूर्ण बाणली हनुमंतीं । तेणें त्याची पावन कीर्ती । त्रिजगतीं निजविजयी ॥ ११ ॥ ऐसी हनुमंताची स्थिती । ब्रह्मयानें लिहिली ब्रह्मलिखितीं । पुढें कपिपुच्छप्रदीप्ती । केली ख्याती ते ऐका ॥ १२ ॥ पुच्छीं धडाडी हुताशू । हनुमंतासी अति आवेशू । जैसा खेंवा आलिया अमृतांशू । ऐसा उल्लासू वानरीं ॥ १३ ॥ रामनामाहीपरतें । नाहीं साधन स्मरतें । अग्नि बाधूं न शके मातें । कृपा रघुनाथें मज केली ॥ १४ ॥ श्रीरामनामें हनुमंत । सप्तपाशबद्ध निर्मुक्त । परी तोही पुच्छें तळमळित । राक्षसां अंत करावया ॥ १५ ॥ नेत्रीं लाविली अर्धचंद्री । आणि खेंरसी आणिली मुखाभीतरी । पुच्छ पसरोनि धरणीवरी । मरणानुकारी कपि पडे ॥ १६ ॥ मग राक्षस येवोनि समस्त । जंव हालवोनि पहात । तंव कपि हालवीना पाय हात । वानरें दांत विचकिले ॥ १७ ॥ एक उलथें पालथें करिती । एक उफराटें धरिती । तंव ते पुच्छाग्नीनें पोळती । मग पळती माघारे ॥ १८ ॥ एक ढुंगीं घालती काठ्या । एक हाणिती फडफडाटा । ऐसा वानर मीसगांढा । दांत दाढा हालवीना ॥ १९ ॥ ऐसें मीस करोनि अति निगुतीं । हालों नेदी पातया पातीं । म्हणती निमाला मारुती । करोनि ख्याती रणमार ॥ १२० ॥ वानरवीर जगजेठी । मारिल्या राक्षसांच्या कोटी । इंद्रजित रावण धाके पोटीं । अवघ्यां पोटीं अति

१ अग्नीनें. २ दोऱ्यांचे बंधास. ३ जप करणारे. ४ शाश्वत. ५ दांडगें. ६ बुधकौशिक ऋषीला. ७ अग्नि. ८ आलिंगनाला. ९ चंद्र. १० श्रेष्ठ. ११ फेंस. १२ मरणोन्मुख होऊन. १३ ढोंग करण्यांत कुशल.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

धाक ॥ २१ ॥ जरी हा मरण न सांगता । तरी करिता अवघ्यांच्या घाता । परी तीक्ष्ण बुद्धि लंकानाथा । छळणें हनुमंता मारिलें ॥ २२ ॥ वानर सत्यवादी पूर्ण । पाळोनि श्रीरामाची आण । सांगोनियां निजमरण । आपणा आपण मारविलें ॥ २३ ॥ जंव वैद्य पाहती विचक्षण । म्हणती कपीचे हृदयीं आहे प्राण । परी तो अतिशयेंसीं क्षीण । क्षणार्धें पूर्ण निमेल ॥ २४ ॥ हनुमान निमाला ऐकोनी । घांव घातला निशाणीं[१] । इंद्रजित हरिखला मनीं । वांटी शेरेणी[२] लंकेसी ॥ २५ ॥ रावणें मारिला मारुती । लंकालोक पाहूं येती । राक्षसवीरांचिया पंक्ती । अमित क्षितीं दाटलिया ॥ २६ ॥ मिळाली राक्षसांची मांदी । मीस घेतलें निजबुद्धी । अवघ्यां वधावया त्रिशुद्धी । पेटला द्वंद्वीं तो ऐका ॥ २७ ॥ दाटल्या देखोनि राक्षसहारी । जळत पुच्छा घाली त्यांवरी । तंव ते पोळती उरीं शिरीं । ऐसी आपांपरी[३] राक्षसां ॥ २८ ॥ पळों जातां बाहेरी । तंव जळत पुच्छ लाविलें द्वारीं । अवघियां केली कोंडमारी । ऐसा निशाचरीं आकांत ॥ २९ ॥ जनांच्या वस्त्रां लाविली आगी । तेणें जळती सर्वांगीं । पुच्छ घाली एकाएकाचे ढुंगीं । नेसण्या आगी लाविली ॥ १३० ॥ आगी लागल्या धोत्रांसी । द्विज पोळले लिंगप्रदेशीं । नागवे नाचती रावणापासीं । दाविती त्यासी लिंगव्यथा ॥ ३१ ॥ हनुमान निघाला राजद्वारीं । निशाणें त्राहाटिल्या भेरी । जळो ते रावणा तुझी थोरी । जोहारंवोहारी त्वां केली ॥ ३२ ॥ लंका नागविली वस्त्रासाठीं । तेलातुपा पाडिली तुटी । दिवा लावणें खुंटली गोष्टी । शेवटीं जीवा सैाटी कपिपुच्छ ॥ ३३ ॥ आधींच वानर सबळ । आणि पुच्छ पेटविलें प्रबळ । आतां लंका जाळील तत्काळ । आणि मारील राक्षसां ॥ ३४ ॥ रावणा तुझे पोटीं कपट । त्या कपटें केलें तळपट । पुच्छें पेटला मर्कट । करील सपाट सर्वांचें ॥ ३५ ॥ रावण म्हणे रे हनुमंता । लंका जाळिसी कवण्या अर्था । सावध ऐकें लंकानाथा । तुज तत्त्वतां सांगेन ॥ ३६ ॥ पुच्छासी मरण आलें निश्चित । तें मरणभयें झाडा देत । भयें लोकांमाजी लपत । तरी त्यासी मी येथ काय कीजे ॥ ३७ ॥ एकाचे चरण धरित । आणि एकाचे पोटीं गवसत । एकाचे पाँलवीं झोंबत । जे मरणभयार्थ चुकवावया ॥ ३८ ॥ एकासीं होत शरणागत । एकाचे गळीं पडत । जे विनवूनि लंकानाथ । मरणोन्मुक्त करा म्हणे ॥ ३९ ॥ रावणा मीही करितों विनंती । जे जाजावोनि दहनार्थी । पुच्छ येतें काकुळती । तरी मरणोन्मुक्ती करीं त्यासी ॥ १४० ॥ उरीं शिरीं स्वयें जाळित । त्या नांव म्हणिजे शरणागत । पुच्छें मांडिला मरणावर्त । मरणोन्मुक्त करा म्हणे ॥ ४१ ॥ करावया राक्षसांचा घात । द्वंद्वा पेटला हनुमंत । देखोनि पुच्छदहनावर्त । लंकानाथ चळीं कांपे ॥ ४२ ॥ रावण कपिभयें कांपत । आणि निःशंक बैसला हनुमंत । पुच्छें मांडिला आकांत । दहनावर्त राक्षसां ॥ ४३ ॥ दशमुखेंसीं संमुख । हनुमान बैसला निःशंक । पुच्छें सेना आणि सैनिक । एकैक पोळविले ॥ ४४ ॥ राक्षससैन्यामाझारीं । बोंब सुटली एकसरीं । अग्नि पोळतां उरीं शिरीं । पुच्छ महामारीं पेटलें ॥ ४५ ॥ पुच्छ तंव तें अग्निकल्लोळ । लंका वेढिली सकळ । राक्षसें करिती तळमळ । न चले बळ कपिपुच्छीं ॥ ४६ ॥ तंव हनुमान विचारी मानसीं । अग्नि लागला माझे कांसेसी । तरी परम तृप्ती द्यावी यासी । ऐसें अति उल्लासे वानर ॥ ४७ ॥ विचारितां मूळ अनुवादु । वेदानुवादें सखे बंधु । दोहींचा पिता वायु प्रसिध्दु । परम सुहृदु आत्मत्वें ॥ ४८ ॥ अग्नि वायूचा ज्येष्ठ सुत । आणि कनिष्ठ भेटला हनुमंत । मग सुतें आलिंगिला सुत । तेणें उल्लासत स्वयें वायु ॥ ४९ ॥ ज्येष्ठ बंधु अति वरिष्ठ । भोजनीं लंकाभुवनताट । राजमंदिरीं परवंडी श्रेष्ठ । भक्ष्य चोखट तें ऐका ॥ १५० ॥ रावणाचा छत्रदींहो[११] । प्रथम प्राणाहुति पहा हो । माड्या गोपुरें[१२] गृहसमुदावो । निजनिर्वाहो भोजनीं ॥ ५१ ॥ चंदनमंदिरें तेंचि ओदन[१३] । गृहसामग्री तेंचि वरान्न । पताका कथिका[१५] ते पूर्ण । आणि घृत जाण मणिमाळा ॥ ५२ ॥ नानापरींचें

१ रणभेरी वाद्यें वाजविण्यांत आलीं. २ खिरापत. ३ दुर्दशा, ४ आगीनें राखरांगोळी, ५ भय. ६ सत्यत्वेंकरून.

७ पदराला. ८ कंटाळून. ९ जाळण्याचा सपाटा. १० प्रकार. ११ छत्र जाळणें. १२ मनोरे, १३ भात, १४ वरण, १५ कढी.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वृक्षदहन । त्या शाकां[1] स्वादिष्ठ संपूर्ण । गुप्तधन तें वरी लवण । दधिओदन[2] तृणघरें ॥ ५३ ॥ जालिया तृणघरांचें दहन । मग सर्वेचि उत्तरापोशन[3] । ऐसें ज्येष्ठ बंधूसी भोजन । लंकाभुवन अर्पित ॥ ५४ ॥ हनुमान बैसला पूर्वद्वारीं । आणि पुच्छ प्रेरिलें असे नगरीं । अग्नि लावितां घरोघरीं । नरनारीं आकांत ॥ ५५ ॥ नवल लाघवी वानर । पुच्छ करोनियां चौफेर । सबाह्य आकळिलें नगर । निशाचरें तळमळिती ॥ ५६ ॥ निर्गम न पुरे नगरीं । जळत पुच्छ नगरद्वारीं । तळमळिती नरनारी । आपांपरी राक्षसां ॥ ५७ ॥ नेसण्या आगी लावी आधीं । नरनारी धांवती नागव्या विदीं । हळहळित राक्षसमांदी । सांदोसांदीं कळकळिती ॥ ५८ ॥ लेंकीस माय म्हणे तूं कां बुची । तंव ते सांगे माझी पोळिली खोंची । तंव जांवई आला नागवाचि । तो देखे सासूची नग्नता ॥ ५९ ॥ मग म्हणे आजि सफळ नयन । जें देखिलें स्त्रियेचें जन्मस्थान । तंव लाजे सासू झांकी नयन । अवघे नग्न हळहळित ॥ १६० ॥ एक पोळती स्तनांतरीं । एक पोळती योनिद्वारीं[4] । एक पोळती उरीं[5] शिरीं । गुदद्वारीं पैं एक ॥ ६१ ॥ ऐसा राक्षसांसी आकांत । नगरीभोंवता पुच्छावर्त । काळें तोंड लंकानाथ । जे नगरदाहार्थ तेणें केला ॥ ६२ ॥ पुच्छाग्नीनें मारावा वानर । तंव तेणें अग्नि केला तीव्र । लंका जाळिली समग्र । निशाचरदेहदाहो ॥ ६३ ॥ निघाल्या नगराबाहेरी । येतां जनांचिया हारी । तंव जळत पुच्छ चौफेरीं । लंकापुरी कवळोनी ॥ ६४ ॥ जे जे द्वारीं रिघों जात । तंव पुच्छ धगधगीत तेथ । निर्गमें[6] न पुरे अति आकांत । जन भ्रमत अति भ्रांतीं ॥ ६५ ॥ आगी लावोनि प्रबळ बळी । पाडिले हुडे दुर्गांच्या पौळी । अगँड बुजिल्या पैं तळीं । मांडिली होळी दुर्गाची ॥ ६६ ॥ हुडे खचती दडदडां । तंव तळीं होत राक्षसां रगडा । सैन्य मारोनि बुजी अगडा । पुढें झगडा जिंतावया ॥ ६७ ॥ पाडोनि दुर्गांच्या पौळी । खंदक बुजिला समूळीं । श्रीराम यावया संवदळी[7] । वाट मोकळी कपि करी ॥ ६८ ॥ लंकानगरींचीं दुर्घटें । जाळिल्या अर्गळा[9] कपाटें । मोकळे सातही दारवंटे । ख्याती मर्कटें लाविली ॥ ६९ ॥ लंकानगरीसभोंवतें । गडपाळ सैन्य जागृत होतें । तीं तीं स्थळें बळें समस्तें । हतें कपिनाथें जाळिलीं ॥ १७० ॥ दुर्गाभोंवतीं चौफेरें । भरलीं होतीं अग्नियंत्रें[10] । अग्नि लावितां वानरें । तीं एकसरें सुटती ॥ ७१ ॥ एक वेळ समकाळ । सुटले यंत्रांचे यंत्रगोळ । नगरीं उठिला हलकल्लोळ । वीर प्रबळ निमाले ॥ ७२ ॥ हनुमान अग्नि वायु तिन्ही । लंका जाळितां तिघीं जणीं । तापें तापलीसे धरणी[11] । तेणें सर्पफणा पोळती ॥ ७३ ॥ सर्प पोळोनि फणोफणी । बुडी देती आवरणजीवनीं[12] । तंव शेष पोळेना सहस्रफणी । जे शेषशयनी श्रीराम ॥ ७४ ॥ जेंवी प्रळयकाळींचा अग्नी । राहे सत्यलोका जाळूनी । तैसा लंकादाहें दहनवन्ही । झोंबे धांवोनी निरांळीं[13] ॥ ७५ ॥ लंका जाळितां मारुती । तापें तापली त्रिजगती । लंकाजन अति आवर्तीं । आली शांती राक्षसां ॥ ७६ ॥ तंव रावणाच्या राणिवसांत[14] । अग्नि लावी स्वयें हनुमंत । मग रावण बैसला जेथ । आलें तेथ कपिपुच्छ ॥ ७७ ॥ रावणा मांडिला अति आकांत । तेणें राक्षस धाकती समस्त । इंद्रजित जाला शोकाकुळित । लंकानाथ केंवी वांचे ॥ ७८ ॥ युद्ध करितां मारुती । आमुचिया खुंटल्या सर्व शक्ती । मरण आलें लंकापती । कैसा रीतीं वांचेल ॥ ७९ ॥ रावण काढा रे बाहेरी । नातरी पडेल पुच्छजोहरीं । मग दुर्ग पाडोनि निशाचरीं । कष्टांतरीं मार्ग केला ॥ १८० ॥ नवल कपिपुच्छाची थोरी । जळत पुच्छ टाकिलें द्वारीं । तेणें निर्गम न पुरे बाहेरी । मग हाहाकारीं गर्जती ॥ ८१ ॥ मग ते काळीं निशाचर । निवडोनियां निधडे वीर । रागें लोटले कपीवर । शस्त्रास्त्रीं सन्नद्ध[8] ॥ ८२ ॥ वोडणखांडें शूळ त्रिशूळ । परशु पट्टिश गदा मुद्गल । बाणीं कोंदलें नभभूतळ । ऐसा रणकल्लोळ वीरांचा ॥ ८३ ॥ रावणाचे दृष्टीपुढां । होतो निर्वाणींचा झगडा । तंव हनुमान होवोनि गाढा । रणीं वेंगाढा ऊठिला ॥ ८४ ॥ कपीनें बहुतां लाविली ख्याती । तरी आज याची करूं शांती । गर्जोनियां रणविख्याती ।

१ भाज्या. २ दहींभात. ३ भोजनांतींचें आपोशन. ४ गुह्येंद्रिय. ५ हृदयीं. ६ बाहेर पडणें. ७ लवणामधून गेलेल्या वाटा. ८ ससैन्य. ९ अडसर. १० तोफा. ११ पृथ्वी. १२ आवरणोदकामध्यें. १३ आकाशांत. १४ जनानखान्यांत.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

शस्त्रसंपातीं मारणें ॥ ८५ ॥ कपीस मारावया रोकडे । कवची खड्गी वीर गाढे । सरकोनि थरकोनि चहूंकडे । घाय देव्हडे हाणिती ॥ ८६ ॥ एक कपिपुच्छें आकांत । लघुलाघवें चुकवित । संमुख वंचोनि आघात । रणकंदनार्थ मांडिला ॥ ८७ ॥ मग हनुमान विचारी पोटांत । वीर खवळले अत्यद्भुत । यांचा तरी पाहूं पुरुषार्थ । अंगीं घात साहोनि ॥ ८८ ॥ यांच्या शस्त्रांच्या समेळीं । माझी न तुटे रोमावळी । शस्त्रें हाणितां महाबळी । घायातळीं राहिला ॥ ८९ ॥ हनुमान आला घायातळीं । मग वीरीं दिधली आरोळी । म्हणती अवघे बळी रे बळी । जे कपि भूतळीं पाडिला ॥१९०॥ संमुख हाणिती तोमर । तंव एक मागोनि हाणिती वज्र । एके वेळे नाना शस्त्र । अति दुर्धर हाणिती ॥ ९१ ॥ वीर वर्षती शरजाळीं । तंव हनुमान पडला घायातळीं । मारुति मारिला आतुर्बळी । पिटिली टाळी सकळिकीं ॥ ९२ ॥ राहिलें उड्डाण किराण । निःशेष याचा गेला प्राण । आमची गाढी आंगवण । भेरी निशाणें त्राहाटिलीं ॥ ९३ ॥ वानरें थोर केली ख्याती । परी आम्ही वीर भद्रजाती । जे रणा आणिला मारुती । अति व्युत्पत्ती रणमारें ॥ ९४ ॥ ऐसें अति वाढिवा गर्जती वीर । आणि हरिखें वांटिती साखर । आतां विझवा रे लंकापुर । रणीं वानर पाडिला ॥ ९५ ॥ आतां रण शोधा रे सत्वर । जे कोणी घायीं निमाला कपींद्र । तंव तेथें करोनि भुभुःकार । वेगीं वानर उसळला ॥९६॥ ऐकतां कपीचें गर्जन । धाकिन्नला दशानन । राक्षसांचे पळाले प्राण । जें अचुक मरण ओढवलें ॥ ९७ ॥ लंका पडिली दहनावर्तीं । पळावया वाट नाहीं रिती । आणि पुढें खवळला मारुती । तेणें मरणप्राप्ती राक्षसां ॥९८॥ तंव सभामंडपींचा थोर । स्तंभ उपटोनि अष्टधार । आणिक कवळोनि निशाचर । घायें चकचूर करीतसे ॥ ९९ ॥ पुच्छें कवळोनि निशाचर सगट । अवघे करोनि एकवट । मग खांब हाणोनि उद्भट । केलें पीठ अवघ्यांचें ॥ २०० ॥ हात पाय ना मनगट । नाड्या अस्थि शिर कंठ । आणि पोटापाठीचें करोनि पीठ । केली एकवट अवघ्यांची ॥ १ ॥ ऊर्ध्वगती अधोगती । पुढती नव्हे मरणप्राप्ती । ऐसें राक्षसां मारोनि मारुती । गुणातीतीं ते नेले ॥ २ ॥ इंद्रियें अवघीं त्रिगुणवृत्ती । इंद्रियें देवता नानारूप ज्योती । जिवें मारोनियां मारुती । गुणातीतीं ते नेले ॥ ३ ॥ श्रीरामभक्ताचे निजहस्तीं । जे जे निमती मारकयुक्ती । ते ते पावती गुणातीतीं । भक्ताची ख्याती पैं ऐसी ॥ ४ ॥ हरिभक्ताचे दृष्टीपुढें । मरे त्याचें भाग्य गाढें । जिणोनि त्रिगुणांचें सांकडें । पावती रोकडें परब्रह्म ॥ ५ ॥ असो ऐसें रणव्युत्पत्ती । सैन्य मारिलें मारुती । तंव संमुख जाला लंकापती । मरणानुवृत्तीं धाकत ॥ ६ ॥ रावण धाकत निजचित्तें । जें सैन्य मारिलें हनुमंतें । आतां आल्या मजभोंवतें । कोण कपीतें निवारी ॥ ७ ॥ अखयाकुमार केला पुरा । इंद्रजितासीं रणभेदरा । आणि रणीं मारिलें निशाचरां । कोण वानरा निवारी ॥ ८ ॥ रावणा तुझे दाही माथे । कपि म्हणे म्यां तोडावे हातें । परी मज वारिलें श्रीरघुनाथें । जें तुज निजहस्तें मारावें ॥ ९ ॥ श्रीरामाची मर्यादारेखा । कपीस नुलंघवे देखा । तेणें वांचविलें दशमुखा । मरणोन्मुखा चुकवोनी ॥ २१० ॥ ऐसा गांजोनि दशानन । आणि जाळोनि लंकाभुवन । मग कपि परतला आपण । श्रीरामचरण वंदावया ॥ ११ ॥ सीतेसी घालोनि लोटांगण । आणि तिसी होवोनि अनन्यशरण । कपि परतला आपण । श्रीरामचरण वंदावया ॥ १२ ॥ मस्तकमणि घेवोनि खूण । आणि खूण पुसोनि मुखवचनें । कपि परतला आपण । श्रीरामचरण वंदावया ॥ १३ ॥ मुखीं श्रीरामनामावृत्ती । आणि हृदयीं श्रीरामाची मूर्ती । देह विकला श्रीरामकीर्ती । अनन्यभक्तीं हनुमंतें ॥ १४ ॥ श्रीराम देखे सत्सर्वार्थीं । श्रीराम देखे सर्वां भूतीं । देह विकला श्रीरामकार्यार्थीं । अनन्यभक्तीं हनुमंतें ॥ १५ ॥ श्रीराम देखे गतीची गती । श्रीराम देखे नयनस्वार्थीं । श्रीराम देखे सर्वां भूतीं । भक्त परमार्थीं हनुमंत ॥ १६ ॥ श्रीरामरूप इंद्रियस्थिती । श्रीरामरूप नाना निवृत्ती । श्रीरामरूप स्वप्नसुषुप्ती । भक्त परमार्थी हनुमंत ॥ १७ ॥ एका जनार्दना शरण ।

१ कवचें घातलेले. २ हातांत तरवार घेतलेले. ३ प्रौढीनें. ४ सत्त्व, रज, तम, ह्या तीन गुणांपलीकडे. ५ मृत्यु पावतात. ६ लढाईचा धाक. ७ प्राप्तमरण अशा तुला. ८ रामनामाचा जप.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

जालें ब्रह्मलिखित संपूर्ण । पुढारें श्रीरामागमन । सेतुबंधन अवधारा ॥ २१८ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां ब्रह्मलिखितहनुमत्प्रतापकथनं नाम त्रयस्त्रिंशतितमोऽध्यायः ॥ ३३ ॥ ओंव्या ॥ २१८ ॥

अध्याय चौतिसावा

॥ श्रीसीतारामाभ्यां नमः॥ ब्रह्मा म्हणे ब्रह्मलिखितीं । कपीची लिहिली अल्पकीर्ती । त्याहून अगाध हनुमंताची ख्याती । कीर्ति किती लिहावी ॥ १ ॥ श्रीरामा तुझें हें वानर । लंके आलें पालेखाइर । त्याची कीर्ति अति दुर्धर । मज साचार लिहवेना ॥ २ ॥ अठरा लक्ष दीपिका पूर्ण । कपीनें पुच्छें विझवोन । रावणसभा करोनि नग्न । दशानन गांजिला ॥ ३ ॥ रिघोन रावणशयनस्थाना । परिसोनि मंदोदरीचे स्वप्ना । सीता शुद्धि आणी मना । अशोकवना कपि आला ॥ ४ ॥ देवोनियां श्रीराममुद्रा । सुखी करोनि सीता सुंदरा । गांजावया राक्षसेंद्रा । केला तरुवरां नवभंग ॥ ५ ॥ मारिलें वनकरां किंकरां । पंच सेनानी प्रधानपुत्रां । जंबुमाळी करोनि पुरा । निशाचरां निर्दळिलें ॥ ६ ॥ मुख्य मारावया धुरा । प्रथम बोहणी अखया कुमरा । इंद्रजितासी लावोनि भेदरा । अदटें वीरां मारिलें ॥ ७ ॥ राक्षससैन्याचिया श्रेणी । अर्बुदांत पाडिल्या रणीं । रुधिरप्रवाहो धरणीं । भूतां पारणीं मेदमांसें ॥ ८ ॥ रणनदी रुधिरस्नान । मेदमांसें आतृप्ति भोजन । भूतें प्रेतें पिशाचगण । रणनर्तन ते करिती ॥ ९ ॥ दशमुखाची दाढी जाळिली । लंकापुराची करोनि होळी । हनुमान आला तुजजवळी । आतुर्बळी महावीर ॥ १० ॥ ब्रह्मा म्हणे माझे युक्तीं । धरविली ते लिहिली कीर्ती । मजही न कळे कपीची ख्याती । मी लिखितीं केंवी लिहूं ॥ ११ ॥ जैसा अवतार श्रीरामचंद्र । तैसाच हनुमंत साचार । वीर धीर महाशूर । गुणगंभीर गांभीर्यें ॥ १२ ॥ श्रीराम देव हनुमंत भक्त । दोहींच्या स्वरूपाचा इत्यर्थ । करूं नेणती श्रुतिशास्त्र । इत्थंभूत केंवी मी जाणें ॥ १३ ॥ श्रीराम जीव हनुमान प्राण । श्रीराम शिव हनुमान ज्ञान । श्रीराम ब्रह्म हनुमान पूर्ण । दोघे परिपूर्ण परब्रह्म ॥ १४ ॥ ब्रह्मयानें लिहिलें ब्रह्मलिखितीं । ऐकोनि हनुमंताची ख्याती । संतोषोनि रघुपती । अति प्रीतीं आलिंगी ॥ १५ ॥ हृदया हृदय लागतां देख । दोन्ही हृदयीं श्रीराम एक । एक तोचि पैं अनेक । अनेकीं एक श्रीराम ॥ १६ ॥ हनुमान अवघाचि रामाआंत । हनुमान सबाह्य श्रीरघुनाथ । लवण समुद्रीं एक होत । तैसा हनुमंत श्रीरामीं ॥ १७ ॥ देवाभक्ताची जाली भेटी । निर्विकल्पें पडली मिठी । परमानंदें कोंदली सृष्टी । आनंदकोटी सुग्रीवा ॥ १८ ॥ विजयी आमुचा हनुमान वीर । वानर करिती भुभुःकार । अवघीं केला जयजयकार । श्रीरामचंद्र स्मरोनी ॥ १९ ॥ अगाध हनुमंताची ख्याती । ऐकोनियां श्रीरघुपती । स्वमुखें आदरिली स्तुती । अति प्रीतीं हनुमंता ॥ २० ॥ वानितां हनुमंताची कीर्ती । करितां हनुमंताची स्तुती । धणी न पुरे श्रीरघुपती । तेचि श्लोकार्थीं अनुवादों ॥ २१ ॥

श्रुत्वा हनूमतः कीर्तिं यथावदभिभाषिताम् ।
रामः प्रीतिसमायुक्तं वाक्यमुत्तरमब्रवीत् ॥ १ ॥
नूनं हनूमतः कृत्यं सुमहद्भुवि दुष्करम् ।
मनसापि यदन्येन न शक्यं धरणीतले ॥ २ ॥
नहि तं प्रति पश्यामि यस्तरेत महार्णवम् ।
अन्यत्र गरुडाद्वायोरन्यत्र च हनूमतः ॥ ३ ॥
देवदानवयक्षाणां गन्धर्वोरगरक्षसाम् ।
अप्रवेश्या पुरी लंका रावणेनाभिपालिता ॥ ४ ॥
गुप्ता दुर्गगिरेर्मूर्ध्नि वीरेणैकेन धर्षिता ॥ ५ ॥

उल्लंघोनि अंपांपती । लंके जावोनियां मारुती । अतर्क्य श्रुतिशास्त्रप्रयुक्ती । ते ते ख्याती येणें केली ॥ २२ ॥ एकें उड्डाणें समुद्रलंघन । करी ऐसा आहे कोण । गरुड वायु कीं वायुनंदन । अन्यत्रा गमन न करवे ॥ २३ ॥ गरुडागमन पक्षगतीं । वायूसी सर्वत्र गमनशक्ती । एकें उड्डाणें हा मारुती । समुद्रीं ख्याती करोनि गेला ॥ २४ ॥ सुरसा सिंहिका मैनाकगिरी । कपीचा मार्ग रोधिला सागरीं । एका सोडी एका मारी । एकाचा गर्व हरी स्पर्शमात्रें ॥ २५ ॥ अगाध उड्डाणाची थोरी । लंका सांडोनि माघारी ।

---

१ धाक. २ बलाढ्य. ३ दशकोट्यवधि. ४ रक्ताची आंघोळ. ५ तृप्तता होईपर्यंत. ६ मीठ. ७ तृप्ती. ८ समुद्र.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

जावोनि पडलंकेभीतरीं । क्रौंचा सहपरिवारीं वधियेली ॥ २६ ॥ लंकादुर्गे सागरोदरीं । रावण रक्षी सहपरिवारीं । अति दुर्गम गिरिशिखरीं । दुर्धर थोरी गर्वाची ॥ २७ ॥ जया दुर्गाची निरवडी । देव बंदीं तेहतीस कोडी । नवग्रहांचे पायीं बेडी । येरां बापुडियां कोण पुसे ॥ २८ ॥ देव दैत्य गुह्यक दानव । यक्ष रक्ष सिद्ध गंधर्व । पन्नग ऋषीश्वर मानव । कांपती सर्व लंकेशा ॥ २९ ॥ ऐसिया दुर्धर लंकेप्रती । नाहीं साह्य ना सांगाती । एकला रिघोनियां मारुती । अभिनव[3] ख्याती येणें केली ॥ ३० ॥ इंद्रजितें दांतीं धरिलें तृण । ऐसें दुर्धर केलें रण । रावणाचें मुख जाळोन । केलें दहन लंकेचें ॥ ३१ ॥ सीतेची सावकाश घेवोनि भेटी । तिच्या पुसोनि गुह्य गोष्टी । मणि घेवोनि जगजेठी । उठाउठीं येथें आला ॥ ३२ ॥

न चात्मा लघुतां नीतः सुग्रीवश्चापि तोषितः ।
अहं च रघुवंशश्च लक्ष्मणश्च महाबलः ॥ ६ ॥
वैदेह्या दर्शनेनाद्य धर्मतः परिरक्षिताः ॥ ७ ॥

रणकंदन सीताशुद्ध्यर्थ । सुखी सुग्रीव कपिनाथ । ऐकोनि सीतानिजगुह्यार्थ । श्रीरघुनाथ सुखी जाला ॥ ३३ ॥ ऐकोनि सीताअनुतापवचनें । लक्ष्मण सुखावे जीवें प्राणें । वानरां होतसे सुखपारणें । कपीचें बोलणें ऐकोनी ॥ ३४ ॥ लघुत्व न येतां वानरजाती । कपीनें केली रणख्याती । तेणें सुग्रीव वानरपती । सुखसंवित्ती पावला ॥ ३५ ॥ करोनि राक्षसकंदनार्थ । कपीनें आणिला सीताशुद्ध्यर्थ । आम्हां अवघियां पुरुषार्थ । संरक्षित हनुमंत ॥ ३६ ॥ श्रीरामें करितां स्तुती । हनुमान अति विनतवृत्ती । लोटांगणें घालोनि क्षितीं । स्वयें रघुपतीतें विनवी ॥ ३७ ॥ श्रीरामा तुझी नामशक्ती । तेणें म्यां केली लंकेची ख्याती । त्या मज रंकाची स्तुती । केंवी रघुपती तूं करिसी ॥ ३८ ॥ ऐकोनि हनुमंताचें वचन । संतोषोनि श्रीरघुनंदन । पुढती पुसतसे आपण । दुर्गलक्षण लंकेचें ॥ ३९ ॥

पुनरेवाथ पप्रच्छ राघवः पवनात्मजम् ।
कति दुर्गाणि दुर्गाया लंकायास्तद्ब्रवीष्व मे ॥ ८ ॥
बलस्य परिमाणं च द्वारदुर्गक्रियामपि ।
गुप्तिकर्म च लंकायां रक्षसां सदनानि च ॥ ९ ॥
यच्च यावच्च यादृक्च लंकायामभिदृष्टवान् ।
तथा तत्सर्वमाचक्ष्व सर्वथा कुशलो ह्यसि ॥ १० ॥
स पृष्टो राजपुत्रेण रामेणाक्लिष्टकर्मणा ।
आचचक्षे हनुमता यथा दृष्टार्थमर्थवत् ॥ ११ ॥
परां समृद्धिं लंकायाः सागरस्य च भीमताम् ।
विभागं च बलौघस्य निर्देशं वाहनस्य च ॥ १२ ॥

लंकादुर्ग हें कैसें काये । कोणाची कैसी आहे । दुर्गीचें बळ दळसमुदाय । साभिप्राय मज सांगें ॥ ४० ॥ दुर्गद्वारीं क्रियास्थिती । दुर्गीचीं यंत्रें गुप्तगती । द्वाररक्षण सैन्यसंपत्ती । रिघूं निघूं युक्ती मज सांगें ॥ ४१ ॥ दुर्ग शोधिलें तुवां समूळीं । घेतली लंकेची घरधांडोळी । किती सैन्य रावणाजवळी । आतुर्बळी वीर किती ॥ ४२ ॥ आम्हांसीं मांडिलिया रण । संमुख येती कोण कोण । तूं तंव तेथींचा रणप्रवीण । रणलक्षण मज सांगें ॥ ४३ ॥ श्रीराम राजपुत्र सज्ञान । हनुमंत अनुलक्षोन । पुसिला लंकादुर्गप्रश्न । तेंवी आपण कपि सांगे ॥ ४४ ॥ लंका दुर्गीं समुद्र आगँड । तेणेंकरितां अति अवघड । न कळे सुरासुरांची घडमोड । परम गूढ समुद्रीं ॥ ४५ ॥ मत्त गजांचिया हारी । मद स्रवती लंकानगरीं । मदगंध न माये अंबरीं । मत्त भ्रमरीं झंकार ॥ ४६ ॥ अश्वरथांचिया थाटी । पदरज न माये अंबुटीं । सैन्य असंख्य कोट्यनुकोटी । वीर जगजेठी राक्षस ॥ ४७ ॥ लंकादुर्ग अतिशय दुर्धर । खंदकीं जळ अपरंपार । माजी मीन नक्र मगर । जळीं जळचरें असंख्य ॥ ४८ ॥ उभवोनि यंत्रावरी यंत्र । परसैन्याचे देखोनि भार । दुरोनि करिती चकचूर । यंत्रभार महागोळा ॥ ४९ ॥ नावानिगिया अति मर्दनी । ज्या शतघ्नी सहस्रघ्नी । दुर्ग चौफेरे चहूं कोनीं । यंत्रश्रेणी मारका ॥ ५० ॥ चोरद्वारांची व्युत्पत्ती । इंद्रजित कपटी गुप्तगती । घाला घालोनि रातोरातीं । धुरें मारिती अस्त्रबंधें ॥ ५१ ॥ दुर्गीं शतानुशत दारवंटे । मुख्य वागणें चहूं वाटे । आगळा सांखळा घडघडाटें । दृढ

१ कौशल्य. २ सोबती. ३ विलक्षण. ४ सुखानुभव. ५ राक्षसांस मारण्याचें कार्य. ६ घरांची झडती. ७ खंदक.

८ आकाशांत. ९ तोफा. १० प्रमुख प्रमुख वीर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

कपाटें लोहबंधें ॥ ५२ ॥ श्रीरामासीं करावया युद्ध । रावणासी अति आल्हाद । सैन्य सन्नद्ध बद्ध । द्वंद्वयुद्ध धुरेसीं ॥ ५३ ॥

शैलाग्रे रचिता दिव्या सा पूर्देवपुरोपमा ।
वाजिवारणसंपन्ना लंका परमदुर्जया ॥ १३ ॥
अयुतं रक्षसामत्र पूर्वद्वारं समाश्रितम् ।
शूलहस्ता दुराधर्षाः सर्वे खड्गाग्रयोधिनः ॥ १४ ॥
अर्बुदं रक्षसां तत्र पश्चिमद्वारसंस्थितम् ।
नियुतं रक्षसामत्र दक्षिणं द्वारमास्थितम् ॥ १५ ॥
शतशोऽथ सहस्राणि मध्यमं गुल्ममास्थिताः ।
उत्तरं द्वारमास्थाय रावणः पर्युपासते ॥ १६ ॥

समुद्रमध्यगिरीचे माथां । वसावया लंकानाथा । लंका करवी विधाता । दुर्गकर्ता विश्वकर्मा[१] ॥ ५४ ॥ विश्वकर्मा निजव्युत्पत्ती । लंका निर्मी दुर्गम गती । ते लंकेची दुर्गम ख्याती । म्यां तुजप्रती सांगितली ॥ ५५ ॥ चहूं द्वारीं संरक्षण । भट सुभट वीर दारुण । रावणें ठेविले आपण । रक्षोगण ते ऐका ॥ ५६ ॥ पूर्वद्वारीं दहा सहस्र । निधडे निःशंक निशाचर । शूळहस्ती खड्गधर । अति दुर्धर ते द्वारीं ॥ ५७ ॥ पश्चिमद्वारीं महाशूर । अर्बुदांत महावीर । शस्त्रास्त्रीं प्रवीण निशाचर । ते द्वारीं द्वार रक्षिती ॥ ५८ ॥ लक्षानुलक्ष निधडे वीर । रथ गज वाजी महाशूर । ते रक्षिती दक्षिणद्वार । अहोरात्र गर्जोनी ॥ ५९ ॥ उत्तरद्वाराचा पैं धाक । स्वयें वाहे दशमुख । येणें द्वारें रघुकुळटिळक । आवश्यक येईल ॥ ६० ॥ शतानुशतें शतानुसहस्रीं । गुल्मागुल्मीं हारोहारीं । स्वयें रावण सहपरिवारीं । उत्तरद्वारीं संरक्षी ॥ ६१ ॥ लंका समुद्राचे बेटीं । वसताहे गिरि त्रिकूटीं । भोंवतीं राक्षसांची घरटी । पारखें[२] दृष्टी केंवी देखे ॥ ६२ ॥ लंकादुर्ग अति गूढ[३] । ऐकतां वाटे अवघड । तोही केला म्यां निवाड[४] । कडेफोड दुर्गाची ॥ ६३ ॥

ते मया संक्रमा भग्नाः परिखाश्चापि पूरिताः ।
दग्धा च नगरी लंका साट्टप्राकारतोरणा ॥ १७ ॥
स्थिता पारे समुद्रस्य दूरपारस्य राघव ।
नौपथश्चापि नास्त्यत्र निरुद्देशश्च सर्वतः ॥ १८ ॥
येन केन तु मार्गेण तराम वरुणालयम् ।
हतेति नगरी लंका वानरैरुपधार्यताम् ॥ १९ ॥

लंकादुर्ग श्रीरघुपती । म्यां पाहिलें जाण निश्चितीं । म्हणसी चोरोनि रातीं बितीं । वीरां रणख्याती लावोनी ॥ ६४ ॥ रावणें पुच्छा लावितां आगी । लंका जाळितां उभयभागीं । वीर मारिले ते प्रसंगीं । रणरंगीं भिडोनी ॥ ६५ ॥ उपऱ्या धवलारें गोपुरें । सप्तखणी दामोदरें । लंका जाळिली घरोनघरें । राजमंदिरें मुख्यत्वें ॥ ६६ ॥ आगळा सांखळा दुर्गांचे ओटे । लोहेंनिबद्धें[५] कपाटें । जाळिले दुर्गांचे दारवंटे । श्रीराममर्कटें हनुम्यानें ॥ ६७ ॥ मत्स्यमगरकुळीं[६] । खंदक भरले होते जळीं । ते म्यां बुजिले समूळीं । दुर्गाच्या पौळी पाडोनी ॥ ६८ ॥ दुर्ग जाळितां नानापरी । मुख्य दुर्गवस्तीचा जो गिरी । तो म्यां जाळिला पुच्छेंकरीं । करोनि महामारी राक्षसां ॥ ६९ ॥ रावण करोनियां दीन । म्यां जाळिलें लंकाभुवन । राखिलें बिभीषणाचें सदन । तो भक्त पूर्ण परमार्थी ॥ ७० ॥ जो जो श्रीरामाचा भक्त । तो तो आमचा परम आप्त । रावणाच्या राण्या समस्त । त्याच्या घरांत वांचविल्या ॥ ७१ ॥ श्रीराम रिघावया समदळीं[७] । सदुर्ग लंका केली होळी । समुद्र तरलिया गोळांगूळीं । लंका तत्काळीं घेतील ॥ ७२ ॥

दृढा पारे समुद्रस्य दूरपारस्य राघव ।
नौपथश्चापि नास्त्यत्र निरुद्देशश्च सर्वतः ॥ २० ॥

श्रीरामोक्तिः—तपसा सेतुबंधेन सागरोच्छोषणेन वा ।
सर्वथा हि समर्थोहं सागरस्य विलंघने ॥ २१ ॥

समुद्रपारीं निश्चितीं । लंकादुर्गी रावणा वसती । नावांची तेथें न चले गती । मत्स्य गिळिती महामीन ॥ ७३ ॥ मत्स्य मीन आणि मगर । नावा गिळिती महानक्र । समुद्र अतिशयेंसीं दुर्धर । केंवी परपार पावाल ॥ ७४ ॥ समुद्र तरावया आतां । उपाव चिंतावा सर्वथा । दुस्तर सांगतां हनुमंता । आलें रघुनाथा स्फुरण ॥ ७५ ॥ सोडोनियां अग्निबाण । करीन समुद्राचें शोषण । जळजंतूंचे जातील प्राण । तरी मी आन न करीन

१ देवांचा कारागीर. २ परकी. ३ गुप्त. ४ निर्णय. ५ लोखंडानें खिळलेलीं. ६ मासे, सुसरी यांच्या समुदायांनीं. ७ वानरांनीं,

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ ७६ ॥ तीव्र तप सत्त्वनिष्ठ । समुद्रीं करोनि पायवाट । वानरवीर सुखें संतुष्ट । परतट पावती ॥ ७७ ॥ समुद्रलंघन तें किती । त्यास कां वेंचूं तपःसंपत्ती । सेतु बांधोनि सिंधूप्रती । नेईन जुत्पंती परतटा ॥ ७८ ॥ सुग्रीवास पाचारोन । गर्जोनि सांगे श्रीराम पूर्ण । आजचि करावें प्रयाण । रणीं रावण मारावया ॥ ७९ ॥

अस्मिन्मुहूर्ते सुग्रीव प्रयाणमभिरोचय ।
युक्तो मुहूर्तो विजये प्राप्तो मध्यं दिवाकरः ॥ २२ ॥
उत्तराफाल्गुनी ह्यद्य श्वस्तु हस्तेन योक्ष्यते ।
अभिप्रयाम सुग्रीव सर्वानीकसमावृताः ॥ २३ ॥
निमित्तानि च पश्यामि यानि प्रादुर्भवंति वै ।
निहत्य रावणं सीतामाहरिष्ये न संशयः ॥ २४ ॥

विजयादशमी सुमुहूर्तीं । जयो पावला रघुचक्रवर्ती । प्रपितामह तो आम्हांप्रती । त्याची ख्याती तूं ऐकें ॥ ८० ॥ शमीतळीं प्रथमवस्ती । धनेश्वर[२] तेचि रातीं । अपार वर्षला संपत्ती । विखुरलें[३] क्षितीं बहुधन ॥ ८१ ॥ तैंपासोनि अद्यापि जाण । आणावया बहुसाल धन । विजयादशमीस सीमोल्लंघन । शमीपूजन जन करिती ॥ ८२ ॥ पूर्वजांचे सुमुहूर्ते । आजि मज जाले प्राप्त । लंकेसी जावया त्वरित । सेना समस्त सिद्ध करीं ॥ ८३ ॥ रणीं दंडावया लंकापती । शुभ लोचन माझे लवती । आलिंगावया सीता सती । बाहु स्फुरती स्वानंदें ॥ ८४ ॥ मध्यान्हीं येतांचि आदित्य[४] । रणविजयीं अभिजित । प्रयाण करावें निश्चित । ऐसें रघुनाथ बोलिला ॥ ८५ ॥ ऐकोनि श्रीरामाचें वचन । सुग्रीवा आलें अति स्फुरण । भेरी त्राहाटिल्या निशाण । लंकाप्रयाण गडगर्जे ॥ ८६ ॥ अंगद हर्षला तत्काळीं । वानरसेनेंत पिटिली टाळी । रावण मारोनि महाबळी । जनकबाळी आणावया ॥ ८७ ॥ सुग्रीवराजाज्ञेची नीती । वानरांची निघती स्थिती । ज्यासी जैसी नेमिली गती । तिहीं त्या रीतीं चालावें ॥ ८८ ॥

अग्रे यातु बलस्यास्य नीलो मार्गं प्रवीक्षितुम् ।
वृतः शतसहस्रेण वानराणां तरस्विनाम् ॥ २५ ॥
फलमूलवता नील शीतकाननवारिणा ।
पथा मधुमता चाशु सेनां सेनापते नय ॥ २६ ॥
सागरौघनिभं भीमं वानराणां महद्बलम् ।
कपिसिंह प्रकर्षं तु शतशोथ सहस्रशः ॥ २७ ॥
गजश्च गिरिसंकाशो गवयश्च महाबलः ।
गवाक्षश्चाग्रतो यातु गवां पृष्ठ इवर्षभः ॥ २८ ॥
यातु वानरवाहिन्या वानरः प्लवतां पतिः ।
पालयन्दक्षिणं पार्श्वमृषभो वानरर्षभः ॥ २९ ॥
मत्तहस्तीव दुर्धर्षस्तरस्वी गंधमादनः ।
यातु वानरवाहिन्याः सव्यपार्श्वमधिष्ठितुम् ॥ ३० ॥

वानरसेना आज्ञावर्ती । नीळ महावीर सेनापती । तेणें चालावें ऐसिया रीतीं । मार्गगती शोधोनि ॥ ८९ ॥ धाडोनि तरस्वी[५] तराळ[६] । फळ मूळ जळ स्थळ । सेना चालवावी सुखसमेळ । यावें तत्काळ पाहोनी ॥ ९० ॥ जिकडे नाहीं फळ मूळ जळ । तिकडे चालवितां दळ । वानर कष्टतील सकळ । सेना विकळ होवों नेदीं ॥ ९१ ॥ यालागीं शोधोनि मार्गस्थिती । वानरां पदोपदीं विश्रांती । सेना चालवावी ऐसिया रीतीं । सेनापती सज्ञानें ॥ ९२ ॥ ऐकोनि श्रीरामाचा वचनार्थ । वानर हर्षले समस्त । बाप कृपाळु श्रीरघुनाथ । आम्ही सनाथ श्रीरामें ॥ ९३ ॥ जरी आम्ही वानरें उद्धत । तरी म्हणती रामदूत । हरिखें रामनामें गर्जत । आम्ही सनाथ श्रीरामें ॥ ९४ ॥ मार्गगतीचें लक्षण । श्रीराम वदला आपण । नीळें घालोनि लोटांगण । मस्तकीं चरण वंदिले ॥ ९५ ॥ नीळासवें निजपरिवार । शतसहस्र वानरवीर । अवघ्यांपुढें चाले भार । जयजयकार करोनी ॥ ९६ ॥ गज गवाक्ष शरभ वीर । नीळामागें सहपरिवार । चालिला तिघांचा संभार । जयजयकार करोनी ॥ ९७ ॥ गाईमागें जैसे गोऱ्हे । नीळामागें तेणें प्रकारें । वानर चालिले निजभारें । जयजयकारें गर्जती ॥ ९८ ॥ ऋषभ वीर वानरवोघीं । तेणें चालावें दक्षिणभागीं । गंधहस्ती गंधमादन दोघीं । वामभागीं चालावें ॥ ९९ ॥ कोट्यनुकोटी वानरभार । युवराज राजकुमर । अंगदें येवोनि सहपरिवार । केला नमस्कार श्रीरामा ॥ १०० ॥ निशाणें त्राहाटिल्या भेरी । तडक फुटला एकसरीं । काहाळा चिनकाहाळा थोरी । रणमोहरी गर्जती ॥ १ ॥ जाला तुरांचा गजर । सुग्रीव-

१ मोठे वीर, मल्ल. २ कुबेर. ३ पसरलें. ४ सूर्य.
५ जलद चालणारे. ६ गांवचा बलुतेदार महार.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

राजा सहपरिवार । वानरीं केला जयजयकार । संख्यासंभार अवधारा ॥ २ ॥

शतैः शतसहस्रैश्च कोटिभिश्चायुतैरपि ।
अर्बुदैरर्बुदशतैर्ययौ परिवृतस्तदा ॥ ३१ ॥

शतानुशत श्याममुख वानर । गोळांगूळें शतसहस्र । कोट्यनुकोटी केवळ शुभ्र । असंख्य वानर हेमवर्णी ॥३॥ एक ते डाळिंबीकुसुमाकार । शेंदुरवर्णी वीर अपार । सुनीळ निळे वानरभार । अंजनाकार असंख्य ॥ ४ ॥ एक बालार्कसम तांबडे । एक ते चंद्रबिंबसम चोखंडे । इंद्रचापासमान वेगाढे । एक रोकडे स्फटिकाचे ॥ ५ ॥ कोट्यनुकोटी अयुतें प्रयुतें । अर्बुदें अर्बुदांतशतानुशतें । वानरवीर असंख्यात । हरि गर्जत रामनामें ॥ ६ ॥ ऐसे वानरराजभार । शशांकच्छत्र युग्मचामर । सुग्रीव निघाला राज्यधर । जाला गजर वाद्यांचा ॥ ७ ॥ वृक्ष फळित पुष्पित । किंशुकफुलें झेलित । टकेपताका त्या सैन्यांत । वीर गर्जत रामनामें ॥ ८ ॥ वानरवीरां अत्यंत हरिख । मारोनियां दशमुख । सीता आणावी आवश्यक । देती हांक श्रीरामें ॥ ९ ॥ एक रामनामें उपरमत । एक ते आनंदें नाचत । वानरसैन्य उल्लासत । अभिषेकार्थ रामसीता ॥ ११० ॥ श्रीरामांकित आम्ही जुत्पती । रावण बापुडें तें किती । आणोनियां सीता सती । श्रीरघुपती अभिषेकूं ॥ ११ ॥ ऐसा देखोनि सुग्रीवभार । संतोषला श्रीरामचंद्र । निघावया अति सत्वर । केलें विचित्र तें ऐका ॥ १२ ॥

अधिरुह्य हनूमंतमिंद्रो गजमिव प्रभुः ।
अंगदं च समारुह्य लक्ष्मणस्त्वंतकोपमः ॥ ३२ ॥
सार्वभौमेन भूतेशो द्रविणाधिपतिर्यथा ।
जांबवांश्च सुषेणश्च वेगदर्शी च वानरः ॥ ३३ ॥
ऋक्षराजो महाबाहुः कुक्षिं रक्षतु ते त्रयः ।
जगाम रामो धर्मात्मा ससैन्यो दक्षिणां दिशम् ॥ ३४ ॥
मध्ये तु राजा सुग्रीवो रामो लक्ष्मण एव च ।
बलिभिर्हरिभिर्भीमैर्वृतः शत्रुनिबर्हणः ॥ ३५ ॥

इंद्र चढे ऐरावता । तैसा श्रीराम चढे हनुमंता । अंगद अति उल्लासता । होय उचलिता सौमित्रा ॥ १३ ॥ जैसा भूतारूढ भूतनाथ । तैसा अंगदीं ऊर्मिळाकांत । देखोनि उल्लासे श्रीरघुनाथ । अति उल्लासित सुग्रीव ॥ १४ ॥ श्रीरामलक्ष्मण वीर वरिष्ठ । सुग्रीवराजा तयांनिकट । दक्षिणपंथें घडघडाट । वीर उद्भट चालिले ॥ १५ ॥ सुषेण आणि जांबुवंत । जांबुवंताचा ज्येष्ठ भ्रात । जो कां ऋक्षराज विख्यात । नामसंकेत धूम्राक्ष ॥ १६ ॥ सुषेण वीर जगजेठी । जांबुवंत वीर निकटी । श्रीराम लक्षोनियां दृष्टी । सुखसंतुष्टी चालिले ॥ १७ ॥ श्रीरामाचे पाठीं जाण । जांबुवंत आणि सुषेण । हेही चालती सावधान । यांसी हें स्थान नेमस्त ॥ १८ ॥ वानरवीर श्रेष्ठ श्रेष्ठ । त्यांसी वांटोनि देती वाट । ऐका सांगेन तें स्पष्ट । वीर वरिष्ठ मार्गभागीं ॥ १९ ॥

हरिः शतबली भीमः कोटिभिर्दशभिर्वृतः ।
दक्षिणं पार्श्वमासाद्य ररक्ष हरिवाहिनीम् ॥ ३६ ॥
शतकोटिपरीवारः केशरी गवयो गजः ।
रभश्चातिबलः पार्श्वं सैन्यमध्यमपालयत् ॥ ३७ ॥
दधिमुखः प्रजंघश्च जंघश्च सरभः कपिः ।
सर्वे पार्श्वेभिधावंतो रक्षणार्थं नृपाज्ञया ॥ ३८ ॥
उल्कामुखः प्रभावश्च इंद्रजानुस्तथा कपिः ।
सर्वतस्ते ययुर्वीराश्चारयंतः प्लवंगमान् ॥ ३९ ॥

शतबळी नामें कपीश्वर । सेना दशकोटी परिवार । श्रीरामाचा दक्षिणपार । राखे वानर उल्लासें ॥ १२० ॥ केशरी हनुमंताचा पिता सावत्र । अंजनीचा पूर्व भ्रतार । सेना शतकोटिसंभार । वीर वानर आतुर्बळी ॥ २१ ॥ त्याहीसवें वीर प्रबळ । गज गवाक्ष वीर अतिबळ । गवय वानर अति विक्राळ । सकळ दळ संरक्षी ॥ २२ ॥ उल्कामुखनामें महावीर । प्रभवनामा अति दुर्धर । इंद्रजानु त्याहूनि थोर । आला सत्वर रामकाजा ॥ २३ ॥ दधिमुख प्रजंघ जंघ । शरभ क्षुरभ कपी अनेग । श्रीरामाचें सैन्य सांग । अष्टदिग्भाग रक्षिती ॥ २४ ॥ रामाज्ञा दुर्धर गाढी । नेमिल्या मार्गाच्या परवडी । चालती वानरांच्या कोडी । समुद्रथडी लक्षोनी ॥ २५ ॥

आप्लवंतः प्लवंतश्च नदंतश्च प्लवंगमाः ।
क्ष्वेडंतो विहरंतश्च जग्मुस्ते दक्षिणां दिशम् ॥ ४० ॥

१ उदयकाळच्या सूर्याप्रमाणें तांबडे. २ स्वच्छ, चांगले. ३ वानर. ४ ऊर्मिलापति (लक्ष्मण). ५ निरनिराळे भाग.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

पुरस्तात्पनसो वीरो नलः कुमुद एव च ।
पंथानं शोधयंतश्च वानरैर्बहुभिर्वृताः ॥ ४१ ॥

केचित्किलकिलां चक्रुर्वानरा वनगोचराः ।
प्रास्फोटयंश्च पुच्छानि सन्निजघ्नुः पदान्यपि ॥ ४२ ॥

समस्तही सीताप्राप्त्यर्थ । वानरां उल्लास अत्यद्भुत । येरयेरांपुढें उडत । उपरमत उल्लासें ॥ २६ ॥ येरयेरांवरी चढती । येरयेरांवरी उडती । येरयेरांतें पाडिती । आसुडती[1] येरयेरां ॥ २७ ॥ येरयेरां तिरस्कारिती । येरयेरां निखंदिती[2] । येरयेरां कुस्ती घेती । नोकोचिती[3] येरयेरां ॥२८॥ येरयेरां दाविती वांकुली । येरयेरां करिती गुदगुली । रामनामें गर्जती महाबळी । गगनीं आरोळी न समाये ॥ २९ ॥ वांकुल्या दाविती सुग्रीवाकडे । पिलंगती वाडेंकोडें[4] । अवघे नाचती रामापुढें । मातलीं माकडें रामनामें ॥ १३० ॥ सैरा[5] जातां वानरपंक्ती । निशाचर शितरती[6] । मार्ग शोधावयाचे अर्थी । पुढें जुत्पती पाठविले ॥ ३१ ॥ राक्षस मारोनि उद्भट । पुढील शोधावया वाट । नळ वीर अति उद्भट । वीरवरिष्ठ पैं पँनस ॥ ३२ ॥ राक्षसांची गती अगती । पनस जाणे अतर्क्यवृत्ती । कुमुद वीर महामती । राक्षसजातिघातक ॥ ३३ ॥ मार्ग शोधावया जाण । स्वयें श्रीरामें आपण । तिघे धाडिले वीर दारुण । वानरसैन्यसमवेत ॥ ३४ ॥ वानरसेनासमुद्रजळा । नीळ सेनानी तोचि वेळा । आवरोनि सकळ दळा । वीरागळा प्रतापी ॥ ३५ ॥ नीळाची निग्रहआज्ञावृत्ती । ऋक्ष वानर आणि जुत्पती । कोणी उल्लंघूं न शकती । प्रतापमूर्ति सेनानी ॥ ३६ ॥

समावृत्य महीं कृत्स्नां जगाम महती चमूः ।
ऋक्षवानरशार्दूलैर्नखदंष्ट्रायुधैरपि ॥ ४३ ॥

कराग्रैश्चरणाग्रैश्च वानरैरुद्धतं रजः ।
भीममंतर्दधे लोकं निवार्य सवितुः प्रभाम् ॥ ४४ ॥

सपर्वतवनाकाशं दक्षिणां हरिवाहिनी ।
छादयंती ययौ भीमा द्यामिवांबुदसंततिः ॥ ४५ ॥

उत्तरंत्याश्च सेनायाः सततं बहुयोजनम् ।
एवं ते हरिशार्दूला गच्छंतो बलदर्पिताः ॥ ४६ ॥

नेमूनि बोलिला श्रीरघुपती । मध्यें न करोनि वस्ती । आजिचे आजि लंकेप्रती । शीघ्रगती स्वयें जाणें ॥ ३७ ॥ ऐकोनि श्रीरामउत्तर । पृथ्वी कवळोनि सग्रह । चालिले वानरांचे भार । हातेरें[7] नखदंष्ट्रा ॥ ३८ ॥ श्रीरामनामाचा गुणगुणाचार । चालिले रीस अपार । नामें गर्जती वानर । असंख्य भार चालिले ॥ ३९ ॥ नदनदिया देशोदेशीं । गिरिकंदरीं विवरासीं । वानर आले रामकाजासीं । मही चौपासीं कवळोनी ॥ १४० ॥ चारी बोटें रिती क्षिती । नाहीं उरली वानरांहातीं । सोडवावया सीता सती । शीघ्रगती चालिले ॥ ४१ ॥ वानर वीर चालतां धरणी । रजःकण कोंदले गगनीं । सूर्य लोपला मध्यान्हीं । काळाच्या मनीं चळकांप ॥ ४२ ॥ सूर्य लोपतां माध्यान्हीं । गाई परतल्या गोठणीं । पक्षी कळकळती गगनीं । देव विमानीं कांपती ॥ ४३ ॥ वानरवीर अहोरात्रीं । वाटे न घेवोनि विश्रांती । सोडवावया सीता सती । शीघ्रगती निघाले ॥ ४४ ॥ श्रीरामकार्याचें निजसुख । वानरां नाठवे तहानभूक । निद्रा विसरोनि निःशेष । दक्षिणामुख चालिले ॥ ४५ ॥

ते सह्यं समतिक्रम्य मलयं च महागिरिम् ।
वनानि चाप्यतिक्रम्य नदीश्च विमलोदकाः ॥ ४७ ॥

आसेदुरानुपूर्व्येण समुद्रं भीमनिःस्वनम् ।
सा महार्णवमासाद्य तस्थौ वानरवाहिनी ॥ ४८ ॥

उल्लंघोनि विंध्याद्री । उल्लंघोनि मलयाद्री । नाना वनें वानरीं । क्षणामाझारीं लंघिलीं ॥ ४६ ॥ नदी नद थोरथोर । क्षणें उतरोनि वानर । तंव पुढें देखिला सागर । गर्जत घोर गडगर्जें ॥ ४७ ॥ ऐकोनि समुद्राचा गजर । श्रीरामनामें घेती वानर । अवघीं केला भुभुःकार । नादें अंबर कोंदलें ॥४८॥ नामें कोंदलें अंबर । नामें कोंदला सागर । नामें कोंदलें चराचर । नामें वानर गर्जती ॥ ४९ ॥ गिळोनि समुद्राचा ध्वनी । नाम कोंदलें जीवनीं[10] । नामें कोंदली अवनी । नाम त्रिभुवनीं कोंदलें ॥ १५० ॥ पुढें जलाब्धि महासागर । पाठीसी वानरसेनासमुद्र । मध्यें शोभे श्रीरामचंद्र । मर्यादामेरू धैर्याचा ॥५१॥ गंगायमुनासंगमांत । शोभे प्रयागवट मध्यस्थ । तैंवी सैन्यजलसिंधूआंत ।

१ ओढतात. २ निंदा करतात. ३ चुकवितात. ४ मोठ्या हर्षानें. ५ स्वेच्छेनें. ६ फसवितील. ७ या नांवाचा वानर. ८ वीररूपी अडसर. ९ जमीन. १० उदकामध्यें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

शोभे रघुनाथ प्रतापें ॥ ५२ ॥ पावोनियां समुद्रतीर । कटक उतरलें समग्र । उल्लंघावया सागर । वानरवीर उल्लासी ॥ ५३ ॥ समुद्रीं महामीन चवकतें। तैसेचि वानर तळपत । समुद्रीं मत्स्य उल्लाळे देत । कपि उपरमत आकाशीं ॥ ५४ ॥ अतिशयें निबरा पाठीं । कमठ देखोनियां दृष्टीं । शिळा बांधोनियां पाठीं । वानरकोटी नाचती ॥ ५५ ॥ तीक्ष्णदंत देखोनि मगर । दांत विचकोनि वानर । स्वयें धांवती त्यांसमोर । कपिपुच्छाग्र तोचि फडा ॥ ५६ ॥ समुद्रीं मत्स्यांची चळवळ । तैसी वानरां कळवळ । आणावया जनकबाळ । उतावीळ अवघेही ॥ ५७ ॥ समुद्रीं येती दुर्धर लाटा । तैसा वानरीं प्रताप लाठा । वेगीं जावोनि परतटा । दशकंठा मारावया ॥ ५८ ॥ जेंवी रेखा नुलंघवे सागरा । तेंवी श्रीरामआज्ञा वानरां । अवघे आले समुद्रतीरा । लंकापुरा जावया ॥ ५९ ॥ एका जनार्दना शरण । पुढें गोड निरूपण । श्रीरामा भेटेल बिभीषण । सेतुबंधन अवधारा ॥ १६० ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां श्रीरामसमुद्रतीरागमनं नाम चतुस्त्रिंशत्तमोऽध्यायः ॥ ३४ ॥ ओंव्या ॥ १६० ॥ श्लोक ॥ ४८ ॥

॥ श्रीसीतारामचंद्रार्पणमस्तु ॥

अध्याय पस्तिसावा

श्रीसीतारामाभ्यां नमः ॥ श्रीराम जगदानंदकंद । श्रीराम सच्चिदानंद । श्रीरघुपति नित्यशुद्ध । नाहीं भवबंध स्मरणें तुझ्या ॥ १ ॥ वानरसेनासंभार । पावोनियां समुद्रतीर । कटकं उतरलें समग्र । श्रीरामचंद्रासमवेत ॥ २ ॥ येरीकडे लंकेआंत । नगर जाळोनि गेला हनुमंत । तेणें कैकसीस आकांत । राक्षसां अंत दृढ आला ॥ ३ ॥

ततः परमदुःखार्ता जननी रक्षसां पतेः ।
सुतं वदंती वृत्तांतमित्युवाच विभीषणम् ॥ १ ॥
इष्टान्दारान्मृगयता प्रेषितो हनुमानिह ।
रामेण विनयज्ञेन न तदिष्टं विभीषण ॥ २ ॥
तदिदं गर्हितं कर्म कृतं भ्रात्रा तवानघ ।
न प्रीणयति मां भुक्तमपथ्यमिव भोजनम् ॥ ३ ॥

कैकसी रावणाची जननी । लंकागर्डदाहो देखोनी । परम दुःखित होय मनीं । स्रवती नयनीं अश्रुधारा ॥ ४ ॥ येवोनियां बिभीषणापासीं । निजदुःख सांगे त्यासी । मरण आलें रावणासी । राक्षसांसी कुळक्षयो ॥ ५ ॥ यासी मूळ तुझा ज्येष्ठ बंधू । चोरोनि आणिली श्रीरामवधू । श्रीराम रावणा करील वधू । सकुळ छेदू राक्षसां ॥ ६ ॥ सीता श्रीरामप्रियकर । शुद्धी धाडिला वानर । तेणें जाळोनियां नगर । निशाचर निर्दळिले ॥ ७ ॥ इंद्रजित आम्हांमाजी उद्भट । कपीनें त्याचें काढिलें चारटं । रणीं खवळोनियां मर्कट । दशकंठ गांजिला ॥ ८ ॥ सविष उत्तम पक्वान्न । सेविल्या अवश्य आणी मरण । तैसें सीताभिलाषण । कुळनिर्दळण राक्षसां ॥ ९ ॥ संताना होय निःसंतान । ऐसें अलोट आलें विघ्न । बिभीषणासी आलिंगून । करी रुदन कैकसी ॥ १० ॥ ऐकें श्रीरामाची गोष्टी । जो जो वीर पडला दृष्टी । तो तो निर्दळी शरवृष्टीं । वीर जगजेठी श्रीराम ॥ ११ ॥ ताटका मारिली उठाउठीं । सुबाहु मारिला यज्ञवाटीं । विराध मारिला रणदिग्पटीं । पडिल्या दृष्टी न सोडी ॥ १२ ॥ श्रीराम पदाति एकला जाण । मारिला त्रिशिरा खरदूषण । चौदा सहस्र रक्षोगण । रणकंदन केलें रामें ॥ १३ ॥ कबंध निर्दळिला बळी । बाणीं निर्दळिला वाळी । सुग्रीव मीनला त्याजवळी । वानरदळासमवेत ॥ १४ ॥ त्यामाजील हनुमंत एक । लंका जाळोनि निःशंक । गांजोनियां दशमुख । लाविला धाक राक्षसां ॥ १५ ॥ येथें आलिया रघुनाथ । कोण साहेल शरसंपात । होय राक्षसांसी कुळघात । लंकानाथ अविवेकी ॥ १६ ॥ अति गर्वी दशानन । माझी नायके शिकवण । तुझें मानितो वचन । हित संपूर्ण उपदेशीं ॥ १७ ॥ श्रीरामा अर्पोनि सीता । सख्य करावें श्रीरघुनाथा । तेणें कल्याण लंकानाथा । आणि समस्तां राक्षसां ॥ १८ ॥ ऐसी देतां शिकवण । रावण करील अपमान । तोही साहोनि आपण । हित संपूर्ण उपदेशीं ॥ १९ ॥ बिभीषणा

---

१ शोभतात. २ उसळ्या. ३ टणक, कठिण. ४ कांसव. ५ सीता. ६ वानरसेनेचा समुदाय. ७ सैन्य. ८ लंकादुर्गाचें दहन. ९ बलाढ्य. १० खोडकी जिरविली. ११ पायांनीं चालणारा. १२ राक्षससमूह.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

तुज परम शांती। सर्वथा क्रोध न ये चित्तीं। करोनि अपमाननिवृत्ती[1]। लंकापती उपदेशीं ॥२०॥ ऐसें बोलोनियां वचन। उकसाबुकसीं करी रुदन। माझें वांचवीं संतान। अनन्यशरण यालागीं॥२१॥ ऐकोनि मातेचें वचन। बिभीषणें वाहिले प्राण। प्राणान्त साहोनि अपमान। हित सांगेन लंकेशा ॥ २२ ॥ रावणा हित शिकवितां। सीतासन्निपात लंकानाथा। करूं धांवेल माझे घाता। शरण रघुनाथा मी होईन ॥ २३ ॥ तूं श्रीरामा निघालिया शरण। तुझेनि माझा कुसवा[2] धन्य। तुझेनि रावणा कृतकल्याण। वंशवर्धन तुझेनि ॥ २४ ॥

कुलं पवित्रं जननी कृतार्था
वसुंधरा पुण्यवती च तेन।
अपारसंवित्सुखसागरेऽस्मिन्
लीनं परब्रह्मणि यस्य चेतः ॥ ४ ॥
तथैव मुक्तश्चरणौ निपीड्य तौ
शुभौ जनन्या विषयेष्वलोलुपः।
कृताभ्यनुज्ञः स यथा कृतांजलि-
र्जगाम रक्षोधिपदर्शनोत्सुकः ॥ ५ ॥

श्रीरामासी निघाल्या शरण। त्याचेनि कुळ पवित्र पूर्ण। त्याचेनि धरा सुखसंपन्न। तीर्थ पावन त्याचेनि ॥ २५ ॥ शरण रिघाल्या श्रीरघुनाथा। कृतार्थ होय त्याची माता। त्याचेनि पूर्वजां होय सुखरूपता। उद्धरी समस्तां समागमें ॥ २६ ॥ त्याचेनि सुखरूप संसार। त्याचेनि सुखी सुरवर। त्याचेनि सुखी चराचर। जे श्रीरामचंद्र सेविती ॥ २७ ॥ श्रीरामासी रिघाल्या शरण। स्वप्नप्राय जन्ममरण। कळिकाळ घाली लोटांगण। श्रीरामचरण सेवित्या ॥ २८ ॥ श्रीराम रावणाचा वैरी। कैकसी त्याचा द्वेष न करी। ऐकोनि मातृवचनथोरी। आल्हाद भारी बिभीषणा ॥ २९ ॥ निर्मत्सर मातृवचन। तेणें बिभीषणा हरिखे[3] पूर्ण। मस्तकीं वंदोनि तिचे चरण। लोटांगण घातलें ॥ ३० ॥ मातृवचन महाबळी। वोडवोनि[4] कृतांजुळी। हरिखें निघाला रावणाजवळी। जनकबाळी सोडवावया ॥ ३१ ॥ जातां देखोनि बिभीषण। माता करी निंबलोण। तुझी कीर्ति होईल पावन। सुखसंपन्न तूं होसी ॥ ३२ ॥ माताआशीर्वचनगोष्टी। तेणें बांधिली शकुनगांठी। मग निघाला उठाउठीं। घ्यावया भेटी लंकेशा ॥ ३३ ॥ इंद्रजित अतिकाय पुत्र दोन्ही। सभा शोभत प्रधानीं। रावण बैसला सिंहासनीं। येतां देखोनि बिभीषण ॥ ३४ ॥ उठिले समस्तही राजकुमर। उठिले प्रधान चतुर। बिभीषण होवोनि एकाग्र। केला नमस्कार रावणा ॥ ३५ ॥ रावणें देवोनि सन्मान। अति प्रीतीं बिभीषण। देवोनियां हेमासन। आपणासमान बैसविला ॥ ३६ ॥ रावणा सांगे बिभीषण। समस्त मिळाले प्रधान। राक्षसां आलें दुर्धर विघ्न। केलें कंदन हनुमंतें ॥ ३७ ॥

प्रसाद्य भ्रातरं ज्येष्ठं सांत्वेनोपस्थितक्रमः।
देशकालार्थसंवादी दृष्टाचारपरावरः ॥ ६ ॥
यदाप्रभृति वैदेही संप्राप्तेह परंतप।
तदाप्रभृति दृश्यंते निमित्तान्यशुभानि वै ॥ ७ ॥
अग्नीष्टीष्टाग्निशालासु तथा ब्रह्मस्थलीषु च।
सरीसृपा विसर्पंति हव्येषु च पिपीलिकाः ॥ ८ ॥

ब्रह्मयाच्या ब्रह्मासनीं। दंश मशक वृश्चिकश्रेणी[5]। समस्त व्याकुळ लंकाभुवनीं। स्वस्थ कोणी असेना ॥ ३८ ॥ हनुमंतें ख्याती केली भारी। हाहाभूत लंकानगरी। सर्प उठिले अग्निहोत्रीं। हविर्द्रव्यामाझारीं पिपीलिका[6] ॥ ३९ ॥ जाणोनि भविष्याची गती। हित सांगे रावणाप्रती। जैंहूनि आणिली सीता सती। विघ्नांची ख्याती तैंहूनी ॥ ४० ॥ मी कनिष्ठ तूं तंव ज्येष्ठ। बुद्धि सांगों न ये स्पष्ट। विघ्न आलें अति अनिष्ट। विचार श्रेष्ठ विचारीं ॥ ४१ ॥ एकलें श्रीरामाचें वानर। मारिले असंख्य निशाचर। विध्वंसिलें लंकापुर। तुम्ही समग्र असतांही ॥ ४२ ॥ तुमचे माथां देवोनि पावो। मारिला अखया महाबाहो। इंद्रजिताच्या जीवा संदेहो। केला दाहो लंकेचा ॥ ४३ ॥ तुम्ही असतां समग्र। कोणा न धरवेचि वानर। कैसेनि जिंकवेल श्रीरामचंद्र। पुढें विचार तो कैसा ॥ ४४ ॥ वैर करितां श्रीरघुपती। राक्षसकुळा आली शांती। उपावो सांगेन तदर्थी[7]। स्वार्थपरमार्थी उपयोगी ॥ ४५ ॥

१ अपमानाचा त्याग करून (अपमान मनांत न आणून), २ कूस, ३ आनंद, ४ पुढें करून, ५ विंचवांचे समुदाय, ६ मुंग्या, ७ त्यासंबंधीं.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

तदेवं प्रस्तुते कार्ये प्रायश्चित्तमिदंक्षमम् ।
रोचये वीर वैदेही राघवाय प्रदीयताम् ॥ ९ ॥
प्रायेण चास्य मंत्रस्य निवृत्तास्तव मंत्रिणः ।
अवश्यं तु मया वाच्यं दृष्टं वा यदि वा श्रुतम् ॥ १० ॥
संप्रधार्य यथान्यायं तद्भवान्कर्तुमर्हति ॥ ११ ॥

तुवां चोरोनि आणिली सीता । तया अपराधा प्रायश्चित्ता । मी सांगेन लंकानाथा । तें तुवां तत्त्वतां करावें ॥ ४६ ॥ येणें तुज भुक्तिमुक्ती[1] । येणें तुज यश कीर्ती । येणें तुझिया कुळा विश्रांती । जाण निश्चितीं लंकानाथा ॥ ४७ ॥ सकळ पापांचें प्रायश्चित्त । नाम स्मरावें रघुनाथ । तो तुवां सेविल्या सीताकांत । सुखस्वार्थ पावसी ॥ ४८ ॥ आंगीं आदळल्याही विघ्न । उपाय न सांगती प्रधान । विचारीं प्रवेशेना त्यांचें मन । धरोन मौन राहिले ॥ ४९ ॥ देखोनि कपीचा युद्धप्रभाव[2] । पळाली त्यांच्या बळाची हांव । निमाला वाटिवेचा गर्व । परम संदेह प्रधानां ॥ ५० ॥ श्रुत[3] दृष्ट अनुमानचिन्ह । तुज म्यां सांगीतलें येवोन । न सांगतां न राहवे जाण । सखेपण आम्हां तुम्हां ॥ ५१ ॥ यावरी पुढील कार्यार्थ । रायें पाहोनि हिताहित । दृढ करावा इत्यर्थ । स्वार्थ परमार्थ जेणें साधे ॥ ५२ ॥ ऐकोनि बिभीषणाचें वचन । संतोषला दशानन । प्रधानांवरी कोपायमान । अति उद्विग्न स्वयें जाला ॥ ५३ ॥

लंकायां तु कृतं कर्म दृष्ट्वा घोरं भयावहम् ।
राक्षसेंद्रो हनुमता श्लाघनीयं सुदुष्करम् ॥ १२ ॥
अमात्यानब्रवीत्सर्वान्राक्षसान्राक्षसाधिपः ।
संरब्धो रक्तनयनः कोपात्किंचिदवाङ्मुखः ॥ १३ ॥
दृष्टा तेन च वैदेही प्रविश्यांतःपुरं मम ।
तेन वानरमात्रेण प्राकृतेन कुबुद्धिना ॥ १४ ॥

कंदन करोनि राक्षसांतें । लंका विध्वंसिली हनुमंतें । तें देखोनि लंकानाथें । हनुमंतातें मानवला ॥ ५४ ॥ एकला एक वानर । रणरंगीं वीर धीर । स्वामिकार्जीं महाशूर । दांडगा[4] वीर मारुती ॥ ५५ ॥ प्रधान सेनानी[5] रक्षोगण[6] । त्यांवरी रावण कोपायमान । आरक्त करोनियां नयन । कठिण वचन बोलत ॥ ५६ ॥ कळिकाळा माझी दुर्धर नगरी । ते शोधोनियां लंकापुरी । सीताशुद्धि घेवोनि खरी । करोनि बोहँरी[7] कपि गेला ॥ ५७ ॥ अखयादि सेना सैन्यगण । तुम्हांदेखतां केलें कंदन । जळो तुमचें काळें वदन । वाटींववल्गना[8] वृथा जल्प ॥ ५८ ॥ जळो तुमची वाटीवथोरी । जावोनि करा आडविहिरी । नातरी पोटीं घाला सुरी । वानरें नगरी नागविली ॥ ५९ ॥ एकलें एक वानर । तुम्हां न राहवे त्यासमोर । पुढें आलिया श्रीरामचंद्र । युद्धीं समग्र पळाल ॥ ६० ॥

इत्युक्त्वा राक्षसेंद्रेण राक्षसास्ते महाबलाः ।
ऊचुः प्रांजलयः सर्वे रावणं राक्षसाधिपम् ॥ १५ ॥

कोपला देखोनि रावण । अवघेही प्रधानगण । बोलों लागले आंगवण । सोळा जण साटोपें ॥ ६१ ॥ सप्तघ्न आणि यज्ञगोपास्य । यज्ञकेतु आणि दुर्धर्ष । रश्मिकेतु आणि प्रघस । विरूपाक्ष महाबाहु ॥ ६२ ॥ वज्रदंष्ट्र आणि धूम्राक्ष । वज्रनाभि आणि विद्युन्मुख । विद्युज्जिव्ह आणि त्रिशिख । मेघवर्ण महामारी ॥ ६३ ॥ कुंभ निकुंभ दोहींच्या बळा । नाहीं करावया कांटाळा[9] । ऐसे प्रधान सोळा । उठिला पाळी[10] सन्नद्ध[11] ॥ ६४ ॥ रथ वाजि पदाति कुंजर । शस्त्रास्त्रीं सन्नद्ध वीर । येवोनि रावणासमोर । स्वबडिवार बोलतीं ॥ ६५ ॥

ते ब्रुवन्रावणं सर्वे प्रदीप्ता इव तेजसा ।
वयं रामं हनिष्यामः सुग्रीवं सहलक्ष्मणम् ॥ १६ ॥
कृपणं च हनूमंतं लंका येन प्रधर्षिता ।
तान्गृहीतायुधान्सर्वान्वारयित्वा विभीषणः ॥ १७ ॥
अब्रवीत्प्रांजलिर्वाक्यं पुनः प्रत्युपवेश्य तान् ॥ १८ ॥

जैशा पतंगांच्या हारी । उडी घालिती वणव्यावरी । तेंवी राक्षस शस्त्रास्त्रीं । श्रीरामावरी निघाले ॥ ६६ ॥ रावणा ऐकें सावधान । न लागतांचि अर्धक्षण । आम्ही मारूं रघुनंदन । सुग्रीवलक्ष्मणसमवेत ॥ ६७ ॥ आणि जुत्पती थोर थोर । अंगदादि वानर वीर । रणीं मारोनि समग्र । धरणीं रुधिरप्रवाह ॥ ६८ ॥ जेणें येवोनि लंकेआंत । केला पुरदाहो राक्षसां अंत । तो मारूं आम्ही हनुमंत । निमेषार्धांत[12] उपडोनी ॥ ६९ ॥ पुढें भरला

१ सुखोपभोग व मोक्ष. २ पराक्रमाचा. ३ ऐकलेलें. ४ दांडगा. ५ सेनापति. ६ राक्षससमुदाय. ७ नाश. ८ शौर्याची बडबड. ९ तुलना. १० समुदाय. ११ तयार. १२ क्षणांत.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

आहे उदंधी । नसतां तरणोपायविधी । अवघे धांवत दुर्बुद्धी । मरणोन्मादीं उन्मत्त ॥ ७० ॥ यापरी ते वीर समस्त । युद्धा धांवती मरणोन्मत्त । त्यांसी बिभीषण निवारीत । युक्तायुक्तविचारें ॥ ७१ ॥ विभीषण म्हणे तुम्ही वीर । युद्धीं कुशळ अति दुर्धर । न करितां बळाबळविचार । युद्धा समग्र कैंवी जातां ॥ ७२ ॥ श्रीरामाचें एक वानर । मारिले कुमर निशाचर । जेव्हां जाळिलें लंकापुर । तेव्हां त्यासमोर कां नव्हां ॥ ७३ ॥ आला देखोनि हनुमंत । तुम्ही रांड महामिणी ऐसे लपत । आतां मिरवितां महापुरुषार्थ । लंकानाथप्रलोभा ॥ ७४ ॥ अशोकवनीं होतां रण । तुम्ही पळालां अवघे जण । अखया धाडितांचि जाण । घेतला प्राण हनुमंतें ॥ ७५ ॥ अखयाचिये कैवारा । धाडितां न देखतां निशाचरा । मग धाडिलें ज्येष्ठ कुमरा । महावीरा इंद्रजिता ॥ ७६ ॥ विश्वासतां तुमच्या बळा । अखया कुमर जीवें गेला । इंद्रजित रणीं गांजिला । लंकेचा केला पुरदाहो ॥ ७७ ॥ धिग्धिग् तुमचा पुरुषार्थ । धिग्धिग् तुमचें जीवित्व । वृथा चाळवा लंकानाथ । रावण निश्चित महाभोळा ॥ ७८ ॥ रावण भोळें बापुडें । तुम्हांसी विश्वासलें वेडें । तुमच्या पोटीं आहे कुंडें । हें धडफुंडें लक्षेना ॥ ७९ ॥ ऐकोनि विभीषणाचें वचन । समस्त जाले लज्जायमान । तंव उठिले पंच प्रधान । आपुली आंगवण वानित ॥ ८० ॥ प्रहस्त महोदर पार्श्वद देख । वज्रहनु आणि दुर्मुख । या पांचांचे पंच श्लोक । अलौलिक आंगवण ॥ ८१ ॥ रावणाचिये निजदळीं । प्रहस्त वीर महाबळी । तो आपली प्रतापनव्हाळी । रावणाजवळी सांगत ॥ ८२ ॥ युद्धामाजी ज्याचे हात । अरिनिर्दळणीं अति समर्थ । यालागीं नांवें प्रहस्त । अति आप्त लंकेशा ॥ ८३ ॥

सुव्यक्तं तृषिता भूमिः शोणितं पातुमिच्छति ।
हतानां संयुगेऽस्माभिर्वानराणां महेश्वर ॥ १९ ॥
लक्ष्मणः सह रामेण युद्धेषु शयनं गतः ।
गदाखड्गैश्च पाशैश्च राक्षसैर्बाहुशालिभिः ॥ २० ॥
रणं तालवनाकारं भवत्यद्भुतदर्शनम् ॥ २१ ॥

खड्ग चाप शूळ फरश । गदापाणी वीर राक्षस । मारावया वानरांस । आम्ही बहुत रणयोद्धे ॥ ८४ ॥ बहुकाळाची तृषित भूमी । वानररुधिरें तृप्त करूनि आम्ही । रणीं मारूं वानरस्वामी । विजयो आम्ही पावोनी ॥ ८५ ॥ लक्ष्मणासहित रामस्वामी । ठायीं पाडोनि रणभूमीं । आम्हांसी विचारिता संग्रामीं । पराक्रमी कोण आहे ॥ ८६ ॥ रामलक्ष्मणां करोनि घात । सुग्रीव अंगदा करोनि अंत । वानर मारीन मी समस्त । तरी प्रहस्त वीर तुझा ॥ ८७ ॥ ताळफळें गळती वनीं । तैशा पाडीन वानरश्रेणी । रामलक्ष्मणां पाडोनि रणीं । अर्ध क्षणीं येईन ॥ ८८ ॥ ऐसें बोलतां प्रहस्त । महोदर उठिला गर्जत । नरवानरां करीन घात । निजपुरुषार्थप्रतापें ॥ ८९ ॥

इदं मतिमतां मध्ये मतियुक्तो महोदरः ।
उवाच वाक्यं राजेंद्रं विशिष्टं विस्मयावहम् ॥ २२ ॥
ममापि वचनं राजन्वृत्तान्तं श्रोतुमर्हसि ।
राघवं च रणे राजन्हनिष्यामि सलक्ष्मणम् ॥ २३ ॥
निकृत्तानां रणे तावद्वानराणां महेश्वर ।
पिबंति रुधिरं सर्वे राक्षसास्तृषिता इव ॥ २४ ॥

बळवंत बुद्धिवंत । रावणाचा परम आप्त । महोदर निजपुरुषार्थ । असे सांगत साटोपें ॥ ९० ॥ जयाचें कां उदर । दुष्ट दुराश दुर्भर । यालागीं नाम महोदर । जेंवी विखार महा उरंग ॥ ९१ ॥ ऐक राया सावधान । मी शस्त्रास्त्रीं प्रवीण जाण । रणीं पाडीन रामलक्ष्मण । विगतप्राण रणरंगीं ॥ ९२ ॥ अंगद सुग्रीव जांबुवंत । या जुत्पतींचा करीन घात । वानरसेना समस्त । क्षितीं विख्यात पाडीन ॥ ९३ ॥ वानरांचें पैं रुधिर । तृषार्त प्राशिती निशाचर । ऐसें बोलोनि महोदर । उठे सत्वर युद्धार्थें ॥ ९४ ॥ महोदर निघतांचि देख । महापार्श्वें दिधली हांक । माझा पुरुषार्थ अलोलिक । स्वयें दशमुखा अवधारीं ॥ ९५ ॥ सकळ पार्षदमुख्यता यासी । म्हणोनि महापार्श्व म्हणती त्यासी । रावणा एकांतवासीं । विचारासीं अति आप्त ॥ ९६ ॥

बृहस्पतिसमो बुद्ध्या समरे च दुरासदः ।
महापार्श्वो रणापेक्षी वचनायोपचक्रमे ॥ २५ ॥

---

१ समुद्र. २ कपट. ३ खरें. ४ विलक्षण. ५ शौर्याची नवलाई. ६ शत्रुपराभवाचे कामीं. ७ हातांत गदा घेतलेले. ८ मोठ्या आवेशानें. ९ मोठ्या विषाचा. १० सर्प. ११ मेलेले.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

मच्छस्त्रपातात्प्रायेण हनिष्ये रामलक्ष्मणम् ।
राक्षसैर्निहता सेना वानराणां विभागशः ॥ २६ ॥
दृश्यंतु ते मृगेंद्रेण संहताः कलभा इव ।
बाहुभिः पीडिताः संतु गैरिकाणामिवाकराः ॥ २७ ॥
अस्माकमपि हस्तानां वागुरा इव बंधनम् ।
स्रवंतु रुधिराण्यंगाद्वानराणां कृतक्षतात् ॥ २८ ॥

तो महापार्श्व आपण । संमुख लक्षोनि रावण । बोले आपुली आंगवण । युद्ध दारुण संग्रामीं ॥ ९७ ॥ बृहस्पतिसमान बुद्धी । दारुण निर्वाणयुद्धीं । वीर धीर त्रिशुद्धी । दुष्टबुद्धी महापार्श्व ॥९८॥ माझ्या प्रथम शस्त्रघायीं । श्रीरामलक्ष्मणां पाडीन ठायीं । सुग्रीवादि वानर पाहीं । बहुत घायीं लोळवीन ॥ ९९ ॥ माझे बाहु तेचि वागुरा[1] । तेंचि दृढबंधन वानरां । बळें रगडितां कपींद्रां । रुधिरधारा सूटती ॥ १०० ॥ जैसा महामेरु पर्वत । वर्षाकाळीं असे द्रवत । तैसें वानरांचें रक्त । प्रवाहत देखाल ॥ १ ॥ जैशा पंचानना[3]च्या चपेटा । लागतां पडती गजघटा[4] । तेंवी वानरें घायवटा । पडले स्पष्ट देखाल ॥ २ ॥ माझिया शस्त्रघातेंकरीं । वानर पडिले पृथ्वीवरी । राक्षस रुधिरें स्नानेंकरीं । मांसआहारीं अति तृप्त ॥ ३ ॥ श्रीराम आणि लक्ष्मण । सुग्रीव आणि वानरगण । स्यां मारिलेगा संपूर्ण । ऐसें तूं जाण लंकेशा ॥ ४ ॥ निकटवर्ती[5] मी असतां । रावणा तुज कायसी चिंता । सुखें भोगावी हो सीता । विमानस्था महावनीं ॥ ५ ॥ ऐसें बोलतांचि देख । तंव रागें उठिला दुर्मुख । हनुम्यानें गांजिला दशमुख । तें महादुःख साहवेना ॥ ६ ॥

अब्रवीच्च सुसंक्रुद्धो दुर्मुखो नाम राक्षसः ।
इदं न क्षमणीयं हि सर्वेषां नः प्रधर्षणम् ॥ २९ ॥
अयं परिभवो भूयः पुरस्यांतःपुरस्य च ।
श्रीमतो राक्षसेंद्रस्य वानरेंद्रप्रधर्षणम् ॥ ३० ॥
अस्मिन्मुहूर्ते गत्वैव निवर्तिष्यामि वानरान् ।
प्रविष्टान् सागरं घोरमंबरं वा रसातलम् ॥ ३१ ॥
अद्य रामं ससुग्रीवं परिघेन सलक्ष्मणम् ।
आगमिष्यामि हत्वैको विक्षोभ्य हरिवाहिनीम् ॥ ३२ ॥

तो हनुमंत अति दुर्धर । मारीन तरी मी दुर्मुख वीर । गर्जोनि बोले निशाचर । संप्रधार[6] बळाचा ॥ ७ ॥ वानराची[7] चपळवृत्ती । मज येतांचि पळे मारुती । तरी मी त्याची करीन शांती । ऐकें निश्चितीं निर्धार ॥ ८ ॥ अतळ वितळ सुतळ । भेणें लंघिती सप्त पाताळ । तेथेंही धरीन गोळांगुळें । तो मी तत्काळ मारीन ॥ ९ ॥ मजभेणें पळतां सागरीं । उडी घालोनि पुच्छीं धरीं । मग काढीन बाहेरी । भूमीवरी आपटीन ॥ ११० ॥ आधीं मारीन हनुमंत । मग मारीन श्रीरघुनाथ । लक्ष्मणाचा करीन घात । करीन अंत सुग्रीवा ॥ ११ ॥ वानरांची मांदी आली । ते रगडीन घायातळीं । एकला एक आतुर्बळी । तुजजवळी येईन ॥ १२ ॥ दुजयाचा पाहे सांगात । जळो त्याचा पुरुषार्थ । रामलक्ष्मणवानरांत । रणकंदनार्थ माझेनि ॥ १३ ॥ दुर्मुखबडिवार ऐकोन । रागें उठिला वज्रहन । संमुख करोनि दशानन । स्वयें गर्जोन बोलत ॥ १४ ॥

ततो वज्रहनुर्नाम राक्षसः पर्वतोपमः ।
क्रुद्धः परिलिहन्सृक्कां जिह्वया वाक्यमब्रवीत् ॥ ३३ ॥
एकोऽहं भक्षयिष्यामि सर्वथा हरिवाहिनीम् ।
सर्वे भवंतस्तिष्ठंतु महाराजेन संगताः ॥ ३४ ॥
अहं रामं हनिष्यामि सुग्रीवं सह लक्ष्मणम् ।
अंगदं सहनूमंतं सर्वांश्चैवात्र वानरान् ॥ ३५ ॥
मोदिता राक्षसाः सर्वे प्रियाभिः सह संगताः ॥ ३६ ॥

पदाति रथ वाजी[10] कुंजर[11] । सुखें राहोत निशाचर । संहारावया नर वानर । माझें चक्र उदंड[12] ॥ १५ ॥ प्रहस्त महोदर हरिखें । महापार्श्वदादि दुर्मुखें । रावणापासीं राहावें सुखें । वानरकटकें मी जाणें ॥ १६ ॥ न लगे शस्त्रास्त्रभरण । आम्हांसी न लगे रणांगण । नरवानरांसी मरण । माझेनि जाण जिव्हाग्रें ॥ १७ ॥ लक्ष्मणासीं समवेत । प्रथम गिळीन मी रघुनाथ । अंगद सुग्रीव जांववंत । हनुमंत महावीर ॥ १८ ॥ नल नीळ तरस तरळ । सुषेण मैंदादि सकळ । माझेनि दर्शनें वानरदळ । प्रळयकाळ पावेल ॥ १९ ॥ पर्वताकृति निशाचर । जिव्हेनें चाटीतसे वक्त्र ।

१ शौर्य, पराक्रम. २ पाश, जाळें. ३ सिंहाच्या. ४ हत्तींचे समुदाय. ५ जवळ असणारा. ६ निश्चय. ७ वानर.
८ समुदाय. ९ दुर्मुखाचा प्रताप. १० घोडे. ११ हत्ती. १२ भयंकर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

दांत खातसे करकर । नरवानर भक्षावया ॥१२०॥ जिव्हा काळी सकंटक । दर्शन विक्राळ विटंकें । येवोनि रावणासंमुख । देवोनि हांक गर्जत ॥ २१ ॥ जा रे सांगा लंकानाथा । म्यां मारिलें रघुनाथा । वधिलें वानरां समस्तां । सुखें तुवां सीता भोगावी ॥ २२ ॥ आजिपासोनि लंकापुरा । भय नाहीं निशाचरां । स्वभोगीं भोगाव्या निजदारा । सुमनसेजेसीं संयुक्त ॥ २३ ॥ ऐसे राक्षस बहुवस । मिळोनि अति कर्कश । बोलाचें मिरवितातीं यश । आलें अपेश चुकेना ॥ २४ ॥ देखोनि राक्षसांची उद्धतोक्ती । बिभीषण तो महामतीं । तेणें निवारिलें पुढती । युक्तायुक्तिविभागें ॥ २५ ॥

धर्मे चार्थे च कुशलो वीर्येण च समन्वितः ।
अब्रवीन्मधुरं वाक्यमिदं भूयो विभीषणः ॥ ३७ ॥

हात जोडोनि समस्तांप्रती । मृदु मधुर मंजुळवृत्तीं । बिभीषण बोले पुढती । स्वधर्मनीती धर्मार्थ ॥ २६ ॥ तुम्ही प्रधान बुद्धिवंत । धर्माधर्मविचार येथ । रामरावणांचा वैरार्थ । अधर्म येथ मुख्यत्वें ॥ २७ ॥ श्रीरामाची दारा हरण । किमर्थ करी पैं रावण । हेंचि वैराचें कारण । प्राणहरण परदारा ॥ २८ ॥ सीता परम सती सृष्टीं । तिचिया अभिलाषदृष्टीं । रावणाची बुद्धि खोटी । महापापी सृष्टीं हा एक ॥ २९ ॥ त्यासी न सांगतां बुद्धी । तुम्ही साह्य होतां युद्धीं । यालागीं तुम्ही मंदबुद्धी । महामूढधी प्रधान हो ॥ १३० ॥ विष खातियाचे पंगतीं । जो बैसे तो मरणार्थी । धरितां पाप्याची संगती । अधोगती पावाल ॥ ३१ ॥ विचारोनि बळाबळ । मग करावें युद्ध प्रबळ । तदर्थी तुम्ही अवघे मूर्ख सकळ । अवघे निर्बळ युद्धार्थी ॥ ३२ ॥ सुबुद्धि सांगतां वाटे दुःख । साच बोलतां वाटे विख । आदिकरोनियां दशमुख । तुम्ही अवघे मूर्ख अविवेकी ॥ ३३ ॥ त्या अविवेकाचें लक्षण । तुम्हांस सांगेन संपूर्ण । पाहोनि पराची आंगवण । फावल्या आपण युद्ध कीजे ॥ ३४ ॥ रावण बापुडें भोळें येथ । प्रधान मिथ्यावादी समस्त । जैसे झांकवा तैसें झकत । हिताहित जाणेना ॥ ३५ ॥ कुष्ठियासी कुष्ठ सांगतां । कोप येतसे तत्त्वतां । कां रांडवेसी रांड म्हणतां । अति क्षोभतां संतापे ॥ ३६ ॥ तेंवी मज सत्य बोलतां । कोप येतसे तत्त्वतां । तरी रावणाच्या हितार्था । यथार्थता बोलेन ॥ ३७ ॥ प्रहस्त म्हणवितो बळी । पुत्र निमाला जंबुमाळी । हनुमान मारीच ते काळीं । रणकल्लोळीं उपटोनी ॥ ३८ ॥ पुत्रशोकें दुःखाभिभूत । रावणापासीं आला रडत । श्रीरामसौमित्र हनुमंत । मारीन म्हणत तें मिथ्या ॥ ३९ ॥ मिथ्या त्याचें बळवंड । बोल बोलतो वितंड । प्रहस्ताचें काळें तोंड । परम लंड प्रधान ॥ १४० ॥ मिथ्यावादी महोदर । जैं मारिला अखया कुमर । तेव्हां होवोनि कपीसमोर । रणीं वानर न मारीच ॥४१॥ अखया मारिला देखोन । महोदर पलायमान । आतां मिरवितो आंगवण । रामलक्ष्मण मारावया ॥ ४२ ॥ सूर्य जिणावयासाठीं । खद्योत निजतेजें हुटहुटी । तैसी महोदराची चावटी । मिथ्या गोष्टी महामूर्ख ॥ ४३ ॥ इंद्रजित गांजिला सुबद्ध । तेव्हां धांवोनि महापार्षद । हनुमंतासीं न करी युद्ध । पळाला प्रसिद्ध पडलंके ॥ ४४ ॥ तो हा मिरवितो आंगवण । मी मारीन रामलक्ष्मण । अंगद सुग्रीव वानरगण । हे चाळवण लंकेशा ॥ ४५ ॥ यापरी महापार्श्व । वृथा जल्पतां मिथ्यावाद । प्रधानांमाजी महामंद । अति निंद्य नपुंसक ॥४६॥ दुर्मुखाचें काळें मुख । जेव्हां गांजिला दशमुख । तेव्हां वानरासंमुख । युद्धोन्मुख न मारीच ॥ ४७ ॥ आतां बोलत बळनवाळी । जेणें केली लंकाहोळी । तो मी मारीन जळीं स्थळीं । सप्तपाताळीं शोधोनी ॥ ४८ ॥ लंका जाळिली तुम्हांदेखतां । तेव्हां न माराचि हनुमंता । आतां मारीन म्हणतां । लाज सर्वथा असेना ॥ ४९ ॥ असत्यवादी सदा देख । यालागीं नांव दुर्मुख । त्याचें बोलणें एक एक । अवघें लटिक लंकेशा ॥ १५० ॥ वज्रहनु बोलतो बोली । रामलक्ष्मणवानरांसी गिळीं । हनुम्यानें करितां लंकाहोळी । तेव्हां तत्काळीं गिळीचना ॥ ५१ ॥ कपीनें करितां लंकाहोळी । वज्रहनूची बैसे दांतखिळी । धाकें लपाला अर्धजळीं । रायाजवळी तैं नव्हता ॥५२॥ ऐसी प्रधानांची वार्ता । समूळ मिथ्या लंकानाथा ।

१ दांत. २ घनदाट. ३ स्त्री. ४ सामर्थ्य. ५ फसवाल. ६ खोटें बोलणारा. ७ जिंकण्यासाठीं. ८ काजवा. ९ मोह पाडणें. १० पुरुषार्थाची फुशारकी.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

श्रीरामासी अर्पावी सीता । कुल सर्वथा वांचवीं ॥ ५३ ॥ ऐकोनि बिभीषणवचन । प्रधान सेनानी रावण । अवघे जाले लज्जायमान । अधोवदन राहिले ॥ ५४ ॥ अपमानितां सर्वांसी । देखोनि क्षोभ[1] इंद्रजितासी । तोही आपण अति आवेशीं । बिभीषणासी बोलत ॥ ५५ ॥ पुढील प्रसंगीं अनुवाद । संवादामाजी विवाद । दोघां बंधूंसीं विरोध । परम क्रोध खवळेल ॥ ५६ ॥ एका जनार्दना शरण । श्रीरामासी अनन्य शरण । स्वयें होईल बिभीषण । तेंचि निरूपण अवधारा ॥ १५७ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां बिभीषणेन रावणप्रधाननिर्भर्त्सनं नाम पंचत्रिंशत्तमोऽध्यायः ॥ ३५ ॥ ओंव्या ॥ १५७ ॥ श्लोक ॥ ३७ ॥

अध्याय छत्तिसावा

श्रीरामचंद्राय नमः ॥ कपिपुरुषार्थ अति प्रचंड । राक्षसांचें बळबंड । प्रताप ऐकतां काळें तोंड । लज्जा वितंड लंकेशा ॥ १ ॥ हनुमंताचें अति प्रबळ । बिभीषणें वानिलें बळ । तेणें राक्षसें सकळ । तळमळ पैं करिती ॥ २ ॥ राक्षस सेनानी प्रधान । अवघे जाले हीन दीन । सभा समस्त लज्जायमान । म्लानवदन दशमुख ॥ ३ ॥ हें देखोनि इंद्रजित । कोपें जालासे कृतान्त । बिभीषणासी बोलत । निजपुरुषार्थ वर्णोनी ॥ ४ ॥

> बृहस्पतेस्तुल्यमतेर्वचस्तन्
> निशम्य यत्नेन बिभीषणस्य ।
> इदं बभाषे वचनं महामना-
> स्तत्रेंद्रजिन्नैर्ऋतराजपुत्रः ॥ १ ॥
> इदं हि ते तात कनिष्ठवाक्य-
> मनर्थकं वै बहुभीतवच्च ।
> अस्मिन्कुले योपि भवेन्न जातः
> सोपीदृशं नैव वदेन्न कुर्यात् ॥ २ ॥
> किं नाम तौ पार्थिवराजपुत्रा-
> वस्माकमेकेन निशाचरेण ।
> सुप्राकृतेनापि निहंतुमेतौ
> शक्यौ कुतो भीषयसे स्म भीरो ॥ ३ ॥
> त्रिलोकराजः स तु देवराजः
> शक्रो मया भूमितले निविष्टः ।
> भयार्दिताश्चापि दिशः प्रपन्नाः
> सर्वे ततो देवगणाः समग्राः ॥ ४ ॥
> सोहं सुराणामपि दर्पहंता
> दैत्योत्तमानामपि शोकहर्ता ।
> कथं नरेंद्रात्मजयोर्न शक्तो
> मनुष्ययोः प्राकृतयोः सुवीर्यः ॥ ५ ॥

इंद्रजित बोले कोपायमान । काकाजी तूं तंव धर्मसंपन्न । बुद्धियुक्तिप्रज्ञापन्न[2] । कनिष्ठ वचन कां वदसी ॥ ५ ॥ निंदोनि सेनानी रक्षोगण । निर्भर्त्सोनियां प्रधान । रामलक्ष्मणांची आंगवण । परम दारुण वानिसी ॥ ६ ॥ उद्देशून एक एक । तुवां निंदिलें आमुचें कटक । श्रीरामाची आगळिक । आत्यंतिक वानिसी ॥ ७ ॥ तूं तंव प्रबुद्ध प्रज्ञाप्राज्ञ[3] । युवराजाचें महिमान । रायाचें खोंचलें अंतःकरण । ऐसें कठिण कां वदसी ॥ ८ ॥ पाठी थापटिलिया येडका । अधिक हाणी चारी थडका । तैसें सेनानी सैनिकां । सन्मान देखा तुवां द्यावा ॥ ९ ॥ सन्मान देतां निजसैन्यासी । अति उल्लास संग्रामासी । शेखीं त्यांतें निर्भर्त्सिसी । श्रीरामासी वानोनी ॥ १० ॥ राजा तुझा ज्येष्ठ बंधु । तूं अति कनिष्ठ वदसी वादु । तेणें युवराजसंबंधु । अति विरुद्धु वाढला ॥ ११ ॥ जैसा पिता तैसा चुलता । यौवराज्य असे तुझे माथां । ज्येष्ठा निंदोनि लंकानाथा । श्रीरघुनाथा वानिसी ॥ १२ ॥ आमुचा एकैक रक्षोगण । करील दोघांचें भक्षण । यासीं काइसें रणांगण । रामलक्ष्मण ते किती ॥ १३ ॥ बापुडे रामलक्ष्मण । आमुचे दृष्टीस ते तृण । परीस माझी आंगवण । चरणां शरण नृप येती ॥ १४ ॥ वलयांकित[4] राजे किती । यज्ञ भोगिता अमरपती । तो म्यां आणिलासे क्षिती । लंकेप्रती कामारा[5] ॥ १५ ॥ आंसडोनियां ऐरावती । आरडत पाडिलासे क्षितीं[6] । दांत उपडोनि घेतला हातीं । त्रिजगती चळीं कांपे ॥ १६ ॥ माझी ऐकतांचि हांक । शूरगण एकाएक । अवघे पळती अधोमुख[7] । जेंवी कां रंक अति दीन ॥ १७ ॥ इंद्रासहित

१ क्रोध. २ बुद्धि, युक्ति आणि ज्ञान यांनीं युक्त. ३ प्रौढबुद्धीचा पंडित. ४ समुद्रवलयांकित पृथ्वीचे, अर्थात् सार्वभौम. ५ दास असा. ६ पृथ्वीवर. ७ खालीं तोंड घालून.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

अमरकोडी । ते म्यां घातले बांधवेडीं । तेथें काइसी रामाची प्रौढी । साह्य माकडीं वानिसी ॥ १८ ॥ अंगद सुग्रीव हनुमंत । नळ नीळ जांबुवंत । राक्षसां भक्ष्य हे समस्त । दांता दांत न लागतां ॥ १९ ॥ मनुष्य आमचे आहारीं । वानरें तंव कोशिंबिरी । त्यांसीं कायसी झुंजारी । क्षणामाझारी मारीन ॥ २० ॥ रणीं भिडोनि साटोपता । करीन श्रीरामाच्या घाता । रावणें सांडोनि सकळ चिंता । सुखें सीता भोगावी ॥ २१ ॥ राम आणि लक्ष्मण । रणीं पाडीन विंधोनि बाण । निर्दळीन वानरगण । आंगवण पाहें माझी ॥ २२ ॥ निंदोनियां श्रीरघुनंदन । ऐकतां इंद्रजिताचें वचन । बिभीषण कोपायमान । काय आपण बोलत ॥ २३ ॥

अथेंद्रकल्पस्य महारथस्य
महौजसस्तद्वचनं निशम्य ।
ततो बभाषे वचनं महारथं
विभीषणो धर्मभृतां वरिष्ठः ॥ ६ ॥
न तात मंत्रे तव निश्चयोस्ति
बालस्त्वमद्याप्यविपक्वबुद्धिः ।
तस्मात्त्वयाप्यात्मविनाशनाय
वचोथ हीनं बहु विप्रलब्धम् ॥ ७ ॥
पुत्रप्रवादेन तु रावणस्य
त्वमिंद्रजिन्मित्रमुखोसि शत्रुः ।
यस्येदृशं राघवतो विनाशं
निशम्य मोहादनुमन्यसे त्वम् ॥ ८ ॥
त्वमेव वध्यश्च सुदुर्मतिश्च
स चापि वध्यो य इहानयत्त्वाम् ।
बालं दृढं साहसिकं च योऽद्य
प्रावेशयन्मंत्रकृतां समीपम् ॥ ९ ॥

ऐक इंद्रजिता साचार । तूं तंव अपक्व बालत्व अहंकार । माथ्याचा वाळला नाहीं जार । स्वहितविचार तुज नाहीं ॥ २४ ॥ अवधारीं विचारें विचारकोटी । विवेक धरोनियां पोटीं । समूळ ऐकें माझी गोष्टी । स्वहितदृष्टी तुज नाहीं ॥ २५ ॥ स्वहितदृष्टी तुज नाहीं । जें बोलसी तें मिथ्या पाहीं । त्याही बोलाची नवलाई । मूळान्वयीं अवधारीं ॥ २६ ॥ म्हणसी आमचा एक रक्षोगण । भक्षील रामलक्ष्मण । ऐकोनि श्रीरामआंगवण । मिथ्या भाषण कां वदसी ॥ २७ ॥ बाळपणीं विंधोनि बाण । ताटकेचा घेतला प्राण । सुबाहु मारिला करितां रण । सैन्यगणसमवेत ॥ २८ ॥ बाणपिसारें सुटला वारा । तेणें मारीच उडविला अंबरा । श्रीराम अंतक निशाचरां । तूं निदसुरा उन्मादें ॥ २९ ॥ स्वयंवरीं वाहतां कोदंड । रावणाचें जालें काळें तोंड । तें श्रीरामें केलें दुखंड । बळें प्रचंड श्रीराम ॥ ३० ॥ येचि सीतेचे अभिलाखा । विराध मारिलासे देखा । तेचि गति दशमुखा । तुम्हां मूर्खांचेनि बोलें ॥ ३१ ॥ शूर्पणखेनें करितां छळणा । स्वयें मुकली नाककानां । गान्हाणें देतसे खरदूषणां । तेही जाणा मारिले ॥ ३२ ॥ त्रिशिरा आणि खरदूषण । चौदा सहस्र रक्षोगण । रामें मारिले करोनि रण । दुर्धर बाण वर्षोनी ॥ ३३ ॥ नाहीं सैन्य रथसंपत्ती । एकला श्रीराम पँदाती । त्याची ऐसी ऐकोनि ख्याती । तूं कां दुर्मती वदलासी ॥ ३४ ॥ नकट्या शूर्पणखेच्या बोलीं । रावणें पापबुद्धि केली । सीता चोरितां भीक लागली । तैसी आली अवदसा ॥ ३५ ॥ चोरावया परनारी । राजा आणि होय भिकारी । जळो ते वाँटिवेचि थोरी । निर्लज्ज भारी तूं एक ॥ ३६ ॥ दुजी वाटीव लंकानाथा । मरण देवोनि मारीचमाथां । छळोनि सुमित्रेच्या सुता । चोरोनि सीता पळाला ॥ ३७ ॥ लक्ष्मणाची मर्यादारेखा । नुलंघवेचि दशमुखा । मिथ्या बोलां बँळआवांका । काळमुखा पुरुषार्थ ॥ ३८ ॥ जटायूसीं करितां रण । रावणें दांतीं धरिलें तृण । त्यासी मारिलें करोनि छळण । पापी पूर्ण तुम्ही एक ॥ ३९ ॥ चोरी मारी पापी पँरद्वारी । इतुकें रावणाचे शिरीं । तेथें तुझें ज्येष्ठत्व भारी । बाँजीगिरी जैसी विद्या ॥ ४० ॥ म्हणसी जिंतिला ऐरावती । आणि जिंतिला अमरपती । सुरवरांसी लाविली ख्याती । श्रीरामाप्रती तें न चाले ॥ ४१ ॥ वरुणशक्रब्रह्मादि ईश । हे श्रीरामाचे अंशानुअंश । हें तूं नेणसी बाळभाष्य । जगीं जगदीश श्रीराम ॥ ४२ ॥ म्हणसी दमिला ऐरावती । चरणीं

१ देवांच्या कोटी. २ बंदींत. ३ काळ. ४ पादचारी. ५ पराक्रमाची. ६ आपल्या बळाची वाखाणणी. ७ परस्त्रीची इच्छा करणारा. ८ गारुडी विद्या.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

शिळा उद्धरती । श्रीरामाची परम शक्ती । बाळमंती तूं नेणसी ॥ ४३ ॥ बोलसी स्वयें निजपुरुषार्थी । मी मारीन श्रीरघुनाथा । रावणें सुखें भोगावी सीता । परदारता तूं महापापी ॥ ४४ ॥ रायासी सांगतां पापबुद्धी । तो वधावा सभेमधीं । राजपुत्र तूं दुर्बुद्धी । महामूढधी कुलघाती ॥ ४५ ॥ तूं एक मारिल्या जाण । सकळ कुळासी कल्याण । हे बुद्धि नायकतां रावण । कुळनिर्दळण पावेल ॥ ४६ ॥ इंद्रजित बोलतो निजबळ । तें तें मिथ्या पैं समूळ । सभा सर्वज्ञ ऐका सकळ । रायें प्रांजळ परिसावें ॥ ४७ ॥ प्रलोभावया[१] लंकानाथा । मारीन म्हणसी तूं रघुनाथा । हनुमंतेंसीं युद्ध करितां । तुझे पुरुषार्थी देखिलें ॥ ४८ ॥ हनुमंतासीं रणीं भिडतां । शस्त्रें अस्त्रें गेलीं वृथा । कपिपुच्छ वाजतां माथां । धीर सर्वथा न धरवे ॥ ४९ ॥ दुर्धर शस्त्रांचे संपात । वानरें झेलोनि समस्त । तुझ्या सैन्या केला घात । रणीं हुंबत पाडिलें ॥ ५० ॥ सांगावया लंकेआंत । कोणीही नुरेचि जीवंत । कपीनें अवधियांचा केला घात । तुजदेखत इंद्रजिता ॥ ५१ ॥ त्यांची करावया सोडवण । तुझी न चलेचि आंगवण । कपीनें गांजिलें संपूर्ण । घायें प्राण जावों पाहे ॥ ५२ ॥ लघुलाघवी हनुमंत । मारिला सारथी भंगिला रथ । रणीं इंद्रजित केला विरथ । छत्रपात कपिपुच्छें ॥ ५३ ॥ मल्लविद्येची कुसरी । चपेट हाणितां उरीं शिरीं । अशुद्ध वमितां जालासी चांचरी[३] । पळावया दुरी ठाव नाहीं ॥ ५४ ॥ तुझ्या युद्धाची गति ऐसी । फावल्या मारावया शत्रूसी । नातरी पळावें मेघापासीं । कपिपुच्छासीं तें न चले ॥ ५५ ॥ पडिलें पुच्छाचें बिरडें । सरों न ये मागेंपुढें । इंद्रजित खळखळां रडे । वानरें गाढें गांजिलें ॥ ५६ ॥ रडत पडत अशुद्ध[४] वमित । कपिपुच्छाभेणें धांवत । पळोनि गेलासी विवरांत । मुख्य पुरुषार्थ हा तुझा ॥ ५७ ॥ रायासंमुख निजनिर्धारीं । म्हणसी एकला मी श्रीराम मारीं । मिथ्या जल्पसी सभेमाझारीं । निर्लज्ज भारी तूं एक ॥ ५८ ॥ वानरा रणीं देवोनि पाठी । पळालासी उठाउठीं । ऐसी तुझी वाटीव मोठी । समूळ खोटी बुद्धि तुझी ॥ ५९ ॥ तुझी ऐकतांचि बुद्धी । रावण मरेल आधीं । मरेल राक्षसांची मांदी । कुळ त्रिशुद्धीं बुडेल ॥ ६० ॥ रायासंमुख आपण । सभेसी वदे मिथ्या वचन । त्याचें काळें करोनि वदन । जिव्हा कर्ण छेदावे ॥ ६१ ॥ राजनीति ऐसी येथ । कुळघातकी मारावा सुत । जेणें आणिला सभेआंत । तोही निश्चित मारावा ॥ ६२ ॥ जेणें प्रवेशिला द्वारीं । तोही मारावा निर्धारीं । कायसी इंद्रजिताची थोरी । निशाचरीं कुळपार्श ॥ ६३ ॥ रावणाचा ज्येष्ठ सुत । यालागीं राखिला म्यां हात । तुझा अवश्य करावा घात । कुळक्षयार्थ चुकवावया ॥ ६४ ॥ ऐकोनि बिभीषणाची मात । प्रधानसैनिकवीरांआंत । वाढला क्रोधाचा आवर्त । जाला कृतान्त लंकेश ॥ ६५ ॥

संक्रुद्धास्ते यतस्तत्र बहवः प्रियवादिनः ।
मुह्यमानाश्चोपहासं ते चक्रुः सहरावणाः ॥ १० ॥
रोषाचान्ये प्रजहसुर्भृशमन्येतिनिःश्वसन् ।
समीक्ष्यान्योन्यमाजल्पन्बभक्षुर्दशनानपि ॥ ११ ॥
तस्मिंस्तथोक्ते वचने महापार्श्वः प्रतापवान् ॥ १२ ॥

ऐकोनि बिभीषणाचें वचन । प्रधान जाले कोपायमान । सेनानीं वटारिले नयन । खाती दशन सेनाधर ॥ ६६ ॥ एक अधरोष्ठ चावती । एक करकरां दांत खाती । एक ते हात कुस्करिती । एक वळिती वज्रमुष्टि ॥ ६७ ॥ बिभीषणाचे उत्तरीं । एक निश्चित धुधुःकारी । एक हांसती क्रोधाकारीं । क्षोभोनि सारे डुलत ॥ ६८ ॥ एक परस्परें बोलत । बिभीषण जाला उन्मत्त । इंद्रजितातें मारीन म्हणत । संमुख वदत लंकेशा ॥ ६९ ॥ चोरी मारी पापी परद्वारी । ऐसें बिभीषणाचे उत्तरीं । रावण खोंचला जिव्हारीं । क्रोधें करी तळमळ ॥ ७० ॥ सन्मुख न राहवे वानरीं । पळोनि गेलासि तूं विवरीं । इंद्रजित लाजिला ये उत्तरीं । मौन धरोनि राहिला ॥ ७१ ॥ बिभीषणासीं संमुख । बोलों न शकेचि दशमुख । मग इतर कोण बोले रंक । टकमक अवघ्यांसी ॥ ७२ ॥ एक बोलती सर्वज्ञ । बिभीषणाचें धर्मवचन । न मानितांचि दशानन । कुळनिर्दळण सपुत्र

१ पोरकट बुद्धीनें. २ संतोषविण्याकरितां. ३ घाबरा, व्याकुळ. ४ रक्त. ५ समुदाय. ६ खरोखर. ७ मुलगा. ८ कुळास बट्टा लाविणारा. ९ भोंवरा. १० दांत. ११ मर्मस्थानीं.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ ७३ ॥ सभा देखोनि तटस्थ । महापार्श्व उठिला गर्जत । बिभीषण जालासे उन्मत्त । राजा राजसुत निंदिला ॥ ७४ ॥ संमुख निंदिला राजा रावण । वानितो श्रीरामाचे गुण । याची येथें भीड कोण । अवघे जण काय पाहती ॥ ७५ ॥ युवराज प्रतापसिंधु । रावणाचा कनिष्ठ बंधु । येणें सांडिला सुहृद्संबंधु । याचा वधु करावा ॥ ७६ ॥ मारा न म्हणेचि लंकानाथ । तरी आम्ही करूं याचा घात । गलका उठिला सभेआंत । अति उन्मत्त हा जाला ॥ ७७ ॥ बिभीषणाची शांति भारी । क्रोध न येचि तिळभरी । मारावा म्हणतां निशाचरीं । भय भीतरीं बाधेना ॥ ७८ ॥ जैसा सागर अगाध । तैसा बिभीषणाचा बोध । निंदोनि बोलिला महापार्श्वद । स्वयें विषाद न मानीच ॥ ७९ ॥ जेंवी सिंहापासीं घुंगुरडें । तेंवी महापार्श्व बिभीषणापुढें । विरुद्ध बोलतां कैवाडें[१] । कोपा न चढे बिभीषण ॥ ८० ॥ महापार्श्वेंसीं बिभीषण । स्वमुखें न बोलेचि आपण । तृणप्राय उपेक्षून । धरिलें मौन निजशांती ॥ ८१ ॥ बिभीषणाचा अनुचर[२] । परम आप्त प्रधान हेर । महापार्श्वेंसीं उत्तर । गिरा गंभीर बोलिला ॥ ८२ ॥ बंधुबंधूंचिया निजहिता । राजा युवराज बोलतां । तूं कां मध्यें कुंथसी वृथा । महामूर्खता तव आंगीं ॥ ८३ ॥ दोनी धुरा अति आप्तता । स्वहिताचा विचार न करितां । मध्यें बोलों नये सर्वथा । बोले तो तत्त्वतां महामूर्ख ॥ ८४ ॥ जैसा राजा रावण । तैसाच युवराज बिभीषण । त्यांसी बोलतां कठिण । तुझा प्राण वांचेना ॥ ८५ ॥

न ते महापार्श्व जिजीविषास्ति
त्वं रावणस्य प्रियकृन्निकामम् ।
विभीषणं वाक्परुषं ब्रवीषि
राजंस्त्वार्थं तरसा निहंसि ॥ १३ ॥
अयं सुनीतेः कुरुते सुवाक्यं
व्यर्थं कथं निंदसि मूढबुद्धे ।
प्रकोपितेनापि कृते सुमंत्रे
त्वया महापार्श्व न कुत्सनीयाः ॥ १४ ॥

रावणाच्या कनिष्ठ बंधूसीं । संवाद करितां धुरेसीं । तूं कां वृथा निंदा करिसी । निजप्राणासी मुकावया ॥ ८६ ॥ ऐसी आहे राजनीती । दोनी धुरा संवाद करिती । त्यांमाजी मध्यें निंदा करिती । त्यांतें मारिती नृपनाथ ॥ ८७ ॥ राजा युवराज निजहितीं । वाद करिती राजनीतीं । येरयेरांतें[३] निर्खंदिती[४] । तेथें तूं किती रे मशका ॥ ८८ ॥ बंधुबंधूंच्या हितानुवादीं । युक्ति निग्रहें[५] येती क्रोधीं । तेथ महापार्श्वा तूं दुर्बुद्धी । निंदानुवादीं जल्पसी ॥ ८९ ॥ आला देखोनि हनुमंत । रायादेखतां तुम्ही पळत । आतां वाटिवे[६] गर्जत । अति समर्थ निर्लज्जत्वें ॥ ९० ॥ तुम्ही राक्षसें रणीं दीन । नपुंसकाहूनि हीन । वाटिवे चाळवा दशानन । अति बोलोन पुरुषार्थ ॥ ९१ ॥ श्रीरामाचें एक वानर । मारिला अखया सैन्य समग्र । दमिला इंद्रजित ज्येष्ठ कुमर । लंकापुर जाळोनी ॥ ९२ ॥ वानर वनचर पालेखाइर । त्यापुढें पळाले समग्र । येथें आलिया श्रीरामचंद्र । दुर्धर शर कोण साहे ॥ ९३ ॥ सुटल्या श्रीरामाचा बाण । राक्षसकुळासी निर्दळण । तँदर्थीं हितवादी बिभीषण । तें रावण नायके ॥ ९४ ॥ सीता अर्पोनि श्रीरघुपती । स्वस्थ राहावें समस्तीं । ऐसी बिभीषणाची युक्ती । तूं कां कुत्सितोक्तीं[७] निंदिसी ॥ ९५ ॥ ऐकोनि हेराचें वचन । महापार्श्व लज्जायमान । खालती घालोनियां मान । दीनवदन राहिला ॥ ९६ ॥

ततः सदातिगंभीरः सत्यवादी जितेंद्रियः ।
अब्रवीद्रावणं धीमान्पुनरेव विभीषणः ॥ १५ ॥
यावद्धि केशग्रहणात्सुहृद्भिः
समेत्य सर्वैः परिपूर्णकामैः ।
निगृह्य राजन् परिरक्षितव्यो
भूतैर्यथा भीमबलैर्गृहीतः ॥ १६ ॥
परस्ववीर्यं स्वबलं च बुध्वा
स्थानं क्षयं चैव तथैव वृद्धिम् ।
तथा स्वपक्षेप्यनुमृश्य बुद्ध्या
वदेत्क्षमं स्वामिहितं स मंत्री ॥ १७ ॥

सत्त्ववंत धैर्यवंत । वीर्य माधुर्य बुद्धिवंत । ऐसा बिभीषण क्षमायुक्त । रावणहितार्थ बुद्धि सांगे ॥ ९७ ॥ बुद्धि सांगतां पुढतपुढती । न माने रावणाचे चित्तीं । तरी सांगे पुनरावृत्ती । सीता रघु-

१ कैवार घेऊन. २ सेवक. ३ परस्परांना. ४ धिक्कारतात. ५ मनाचें आकलन. ६ आवेश लावतां. ७ त्याकरितां.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

पती अर्पावया ॥ ९८ ॥ प्रहस्त महापार्श्व महोदर । इंद्रजित मुख्य कुमर । शुकसारणादि थोर थोर । ऐका समग्र बुद्धि माझी ॥ ९९ ॥ करोनि रावणा केशाकर्षण । सुबुद्धि सांगेन आपण । सीता करावी रामार्पण । कुळनिर्दळण चुकवावया ॥ १०० ॥ भूत लागलें हो ज्यासी । मंत्रवादी त्राहटी धरोनि केशीं । तेंवी सुबुद्धि सांगे रावणासी । सीता श्रीरामापासीं अर्पावया ॥ १ ॥ सीतासन्निपात रावणासी । तेणें कुळक्षयो राक्षसांसी । यालागीं धरोनियां केशीं । सुबुद्धि त्यासी शिकवीन ॥ २ ॥ याचि नांवें परम आप्त । याचि नांवें सुहृद समस्त । अपायीं पडतां लंकानाथ । त्यासी निश्चित वांचवावें ॥ ३ ॥ कुटुंब निजवोनि गृहाप्रती । जो गृहा दाहा करी प्राप्ती । त्यासी सज्ञान निवारिती । तैसी गती रावणा ॥ ४ ॥ करितां श्रीरामासीं वैर । समस्त मरती निशाचर । सपुत्र मरेल दशशिर । प्रतिज्ञोत्तर हें माझें ॥ ५ ॥ श्रीरामाचें एक वानर । त्यापुढें पळालेति समग्र । सुटल्या श्रीरामाचा शर । कोण दुर्धर साहेल ॥ ६ ॥

तीक्ष्णा न यावन्नवकंकपत्राः
सुदुर्धरा राघवविप्रमुक्ताः ।
भित्त्वा शरीरं प्रविशंति बाणाः
प्रहस्त तेनेह विकत्थसे त्वम् ॥ १८ ॥
न रावणो नापि महोदरो यं
न कुंभकर्णोऽपि न चातिकायः ।
न चेंद्रजिद्वाशरथिं प्रसोढुं
शक्तोस्ति तं शक्रसमप्रभावम् ॥ १९ ॥

तेलसाहाणे खरसाहाणे फुडा । लावी श्रीरामाचा बाण कुऱ्हाडा । कंकपत्राचा[3] झडाडा । कोण त्यापुढां साहों शके ॥ ७ ॥ सुटला श्रीरामाचा बाण । धाकें मरेल रावण । अतिकाय इंद्रजित कुंभकर्ण । सेनानी प्रधान निर्मतील[4] ॥ ८ ॥ प्रहस्त महोदर सोडिती प्राण । धाकें मरेल शुकसारण । सैन्य मरेल संपूर्ण । श्रीरामबाण येतांचि ॥ ९ ॥ दुर्धर श्रीरामाचे बाण । समुद्र शोषोनियां पूर्ण । लंका निर्दळिती रावण । सत्य वचन हें माझें ॥ ११० ॥ इंद्रादिकांचिया कोडी । न साहे श्रीरामबाणवोढी । धाकेंच पडती मुरकुंडी । राक्षसें वापुडीं तीं किती ॥ ११ ॥ यालागीं गा लंकानाथा । शीघ्र श्रीरामीं अर्पी सीता । तुझे चरणीं ठेवितों माथा । विकल्प आतां धरूं नको ॥ १२ ॥ जरी विकल्प धरिसी चित्ता । तरी न जिंकवे श्रीरघुनाथा । श्रीरामाची प्रतापकथा । ऐक आतां सांगेन ॥ १३ ॥

देवांतको वापि नरांतको वा
तथातिकायोऽतिरथो महात्मा ।
अकंपनश्चापि समानसारः
स्थातुं न शक्ता युधि राघवस्य ॥ २० ॥
अयं च राजा व्यसनाभिभूतो
मित्रैरमित्रप्रतिमैर्भवद्भिः ।
अन्वास्यते राक्षसनाशनार्थे
तीक्ष्णः प्रकृत्या ह्यसमीक्ष्यकारी ॥ २१ ॥

वेगें आलिया रघुनाथ । तुज साहावया नाहीं पुरुषार्थ । गर्वें प्राण वेंचिसी व्यर्थ । सत्य वचनार्थ हा माझा ॥ १४ ॥ निवारे श्रीरामबाणजाळ । तैसें तुज नाहीं शस्त्रबळ । करितां श्रीरामासीं सळ[5] । रणीं विकळ पडशील ॥ १५ ॥ रणीं जिंकावया रघुनाथा । तुझ्या आंगीं नाहीं सबळता । पडलासी धनुष्य वाहतां । सभेदेखतां स्वयंवरीं ॥ १६ ॥ तुजदेखतां पुरदहनीं । हनुमंतातें देखोनी । पळती प्रधान वीरश्रेणी[6] । केंवी राम रणीं जिंकवेल ॥ १७ ॥ तुझें करोनि काळें तोंड । रामें धनुष्य केलें दुखंड । वृथा वाहसी बळबंड । तूं तंव लंड निर्लज्ज ॥ १८ ॥ श्रीराम पाहावया संमुख दृष्टी । धैर्य नाहीं तुझे पोटीं । श्रीरामा लावोनि मृगापाठीं । सीता गोरटी चोरिली ॥ १९ ॥ व्हावया श्रीरामासंमुख । तुझें न सैरेचि[7] काळें मुख । वृथा बोलसी दशमुख । लाज निःशेख तुज नाहीं ॥ १२० ॥ हरावया सीता सुंदरी । सामर्थ्य नाहीं तुझे शरीरीं । मग तूं जालासी भिकारी । तरी गुंफेमाझारी रिघवेना ॥ २१ ॥ लक्ष्मणाची मर्यादारेखा । तुज नुलंघवे दशमुखा । रणीं पहावया रघुकुळटिळका । व्यर्थ आवांका जल्पसी ॥ २२ ॥ तुझ्या आंगीं नाहीं बळ । म्हणसी युद्ध करील दळ । तें तंव पुरदाहें केवळ । केलें विकळ हनुमंतें ॥ २३ ॥ इंद्रजिताचें बळ अद्भुत । कपीनें केलें हताहत । येथें

१ संकटांत. २ जाळील. ३ बाणाचा. ४ मरण पावतील. ५ छळ, कपट. ६ वीरसमुदाय ७ सरसावणार नाहीं. ८ पराक्रम.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

आलिया श्रीरघुनाथ । कोणा सामर्थ्य सहावयासी ॥ २४ ॥ यालागीं गा लंकानाथा । तुज सर्वथा न जिरे सीता । शरण रिघावें श्रीरघुनाथा । जनकदुहिता अर्पावी ॥ २५ ॥ श्रीरामा अर्पिल्या सीता । सकळ कल्याण समस्तां । हे सुबुद्धि ऐकें लंकानाथा । कुळाभिघाता चुकवावया ॥ २६ ॥ नानापरींच्या विवेकयुक्ती । म्यां सांगितल्या हितोक्ती । नाइकतां लंकापती । रणाभिवर्ती मराल ॥ २७ ॥ श्रीराम अवतारावतारी । पूर्ण ब्रह्म चराचरीं । त्याची कांता सीता सुंदरी । तुज तिळभरी जिरेना ॥ २८ ॥ म्हणसी श्रीराम बापुडें । तरी कां लपसी मागिलीकडे । चोरी करोनि पळसी पुढें । कर्म कुडें लंकेशा ॥ २९ ॥ मारिले त्रिशिरा खर दूषण । श्रीरामासीं करावया रण । संमुख न वचे तुझें सैन्य । आंगीं आंगवण असेना ॥ १३० ॥ श्रीराम शक्त अथवा अशक्त । तुझा करूं शके घात । सीता अर्पोनि निश्चित । श्रीरघुनाथ सुखी करीं ॥ ३१ ॥ हे माझी बुद्धि नाइकतां । वैर केलिया श्रीरघुनाथा । तो तुझ्या करील घाता । सैन्यसमवेता सपुत्रा ॥ ३२ ॥ साह्य झालियाही कळिकाळ । अनिवार श्रीरामबाणजाळ । काळा गांजोनि तत्काळ । तुझें कंठनाळ छेदील ॥ ३३ ॥ माझा नाइकतां वचनार्थ । पाडोनि कळिकाळाचे दांत । श्रीराम तुझा करील घात । जाण निश्चित लंकेशा ॥ ३४ ॥ साह्य केलिया ब्रह्मशक्र । निवारेना श्रीरामशर । शिव रामाचा किंकर । त्यासमोर तो न ये ॥ ३५ ॥ श्रीराम शिवाची ध्येयमूर्ती । त्याची चोरली सीता सती । तेणें क्षोभला उमापती । वांचती गति नाहीं ॥ ३६ ॥ चोरी मारी आणि परद्वारी । कपटवेषी संन्यासधारी । ब्रह्मा क्षोभला तुजवरी । वांचती परी तुज नाहीं ॥ ३७ ॥ राजा आणि अधर्मशीळ । त्यासी निर्दाळी कळिकाळ । काळें ग्रासिलें तुझें बळ । रणीं तत्काळ निमसील ॥ ३८ ॥ शक्तींमाजी आदिशक्ती । तुवां चोरिली सीता सती । क्षोभल्या शस्त्रदेवता समस्ती । तुझ्या घातीं उद्यत ॥ ३९ ॥ विचारितां विवेकविधी । तुज क्षयो आला त्रिशुद्धी । माझी नाइकतां बुद्धी । रणाभिमर्दी निमसील ॥ १४० ॥

१ खोटें. २ ब्रह्मदेव, इंद्र वगैरे. ३ शंकर. ४ खरोखर. ५ युद्धाच्या माऱ्यांत. ६ मरशील. ७ द्वैतबुद्धि.

रावणा ऐकें स्वहितवचन । श्रीरामासीं रिघोन शरण । सीता अर्पिल्या आपण । सकळ कल्याण पावसी ॥ ४१ ॥ श्रीरामासीं रिघाल्या शरण । तुज बाधेना जन्ममरण । बाधूं न शके द्वंद्वभाँन । कृतकल्याण पावसी ॥ ४२ ॥ गर्व न करीं लंकानाथा । श्रीरामचरणीं ठेवोनि माथा । सद्भावें अर्पिलिया सीता । स्वार्थां परमार्थां पावसी ॥ ४३ ॥ ऐकोनि बिभीषणाचें वचन । क्रोधें संतप्त रावण । त्याचे क्रोधाचें दारुणपण । श्लोकलक्षण अवधारा ॥ ४४ ॥

विभीषणवचः श्रुत्वा बलवान्राक्षसेश्वरः ।
अभवत्क्रोधसंरब्धः संध्यारक्त इवांशुमान् ॥ २२ ॥
अब्रवीद्रावणः क्रोधाद्विभीषणमिदं वचः ।
रावणाय त्वया भ्रात्रे धृता चानर्थबुद्धिता ॥ २३ ॥

ऐकोनि बिभीषणाचें वचन । रावण जाला क्रोधसंपन्न । आरक्त वटारिले नयन । जैसें जास्वंद नव फुललें ॥ ४५ ॥ क्रोधें म्हणे रे बिभीषणा । नष्टा चांडाळा दुर्जना । मज हीनत्व स्थापोनि जाणा । रघुनंदना वानिसी ॥ ४६ ॥ सपुत्र प्रधान अवघे जणीं । आम्हांसी म्हणसी मराल रणीं । रामा स्थापिसी विजयस्थानीं । धन्य वाणी हे तुझी ॥ ४७ ॥ राम मनुष्य बापुडें । तें काय वानिसी मजपुढें । एके घायीं चूर करीन हाडें । रडत त्याकडे तूं जाय ॥ ४८ ॥ जेंवी मार्जार बोका पाहें । आपलीं पिल्लीं आपण खाये । तैसाचि तूं राक्षसान्वयें । कुलक्षया एक हेतु ॥ ४९ ॥ आम्हांसि भेडसांविसी कैवांडें । म्हणसी तुम्हांसि मारितील माकडें । हीन दीन तूं बापुडें । श्रीरामाकडे सुखें जायें ॥ १५० ॥ एक माझें सत्य भाषण । आजिच निमाला बिभीषण । घटस्फोट सांडा त्यालागून । कुळदूषण कुळपांश ॥ ५१ ॥ ऐकोनि रावणाचें वचन । बिभीषण हास्यवदन । मुख्य धुरेंसींच मूर्खपण । तेथें शिकवण चालेना ॥ ५२ ॥

इह ते संति विगुणाः सहाया गुणवर्जिताः ।
एवं कृत्वा किमप्येतद्वर्तते मंत्रसंज्ञितम् ॥ २४ ॥
न युक्तं कैतवं कर्तुं हिताद्विप्रतिपादितम् ।
त्यक्त्वा कामपरं मंत्रमर्थधर्मविवर्जितम् ॥ २५ ॥

८ भिववितोस. ९ पक्षपातें, कैवारानें. १० कुळास कलंक लाविणारा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

राममेव गमिष्यामि धर्मार्थं परमं नृप ।
तव कोपादहं मुक्त्वा कृत्स्नं साभिजनं धनम् ॥ २६ ॥

धर्महेतोर्गमिष्यामि राममेव शुभव्रतम् ॥ २७ ॥

कनकबीजं खाय आवेशें । तो बडबडी व्याघ्र ससे मासे । रावणा तुज जालें तैसें । सीताभिलाषें संनिपात ॥ ५३ ॥ रावणा सीतासंनिपात । प्रधान गर्वें मदोन्मत्त । विचार विवेक स्वहितार्थ । कोणें येथ मानावें ॥ ५४ ॥ कपट काम कामासक्ती । परदारा अधर्मरती । रावणा तुज मरणप्राप्ती । ससैन्यसंपत्ती सपुत्र ॥ ५५ ॥ करितां दुर्गाअभिलाषण । शुंभ निशुंभ निमाले ससैन्य । चंडमुंड रक्तबीज जाण । घेतला प्राण जगदंबें ॥ ५६ ॥ तैसी श्रीरामाची सीता सती । अभिलाषितां लंकापती । व्यर्थ मरसी मरणावर्ती । सपुत्रसंपत्ती ससैन्य ॥ ५७ ॥ विष भक्षी त्याचे पंगतीं । जो बैसे त्या मरणप्राप्ती । त्यागोनि जाय तो सुमती । हे परम युक्ति लंकेशा ॥ ५८ ॥ शरण रिघोनि श्रीरघुपती । प्रेमें अर्पिल्या सीता सती । अर्थ स्वार्थ परमार्थप्राप्ती । हे परम युक्ती ऐकें पां ॥ ५९ ॥ माझी नायकतां युक्ती । तुज जिरेना सीता सती । गर्वें मरसी लंकापती । प्रतिज्ञा निश्चितीं हे माझी ॥ १६० ॥ तुम्हीं सांडिलें मी मेलों म्हणोन । आतां सुहृदत्वें उरलें कोण । खुंटली स्वहिताची शिकवण । श्रीरामा शरण मी जातों ॥ ६१ ॥ श्रीरामा गेलिया शरण । मी पावेन कृतकल्याण । तुम्हांसी अवश्य आलें मरण । श्रीरामबाणप्रतापें ॥ ६२ ॥ शरण गेलिया श्रीरघुपती । चारी मुक्ती दासी होती । आनंदें ओसंडेल त्रिजगती । एवढी प्राप्ती श्रीरामें ॥ ६३ ॥ श्रीराम मारील एकीं एक । क्रिया कर्ता नुरेल देख । मीच देईन तिलोदक । आवश्यक तुम्हांसी ॥ ६४ ॥ ऐकोनि बिभीषणाची गोष्टी । रावणा राग न माय पोटीं । खड्ग वसैवोनि मुष्टीं । दांत होटीं चाविले ॥ ६५ ॥

एतच्छ्रुत्वा तु संरब्धो रावणः क्रोधमूर्च्छितः ।
नेत्रे प्रकृतिताम्रेपि भूयस्ताम्रत्वमागते ॥ २८ ॥
घोरं ननाद वै शब्दं कल्पांत इव तोयदः ।
आसनाच्चूर्णमुत्पत्य पादेनाभिजघान तम् ॥ २९ ॥
रावणः क्रोधसंवेगादासनस्थो विभीषणः ।
अभवत्पतितो भूमौ मूर्च्छापन्नो महाबलः ॥ ३० ॥
वज्रपातहतः श्रीमान् विशीर्ण इव पर्वतः ।
प्रहस्तो वारयामास कुपितं राक्षसेश्वरम् ॥ ३१ ॥
शनैर्विचारयामास कोशस्थमकरोदसिम् ॥ ३२ ॥

ऐकोनि बिभीषणाची मात । हृदयीं पोळला लंकानाथ । रागें तयाकडे पाहत । जेंवी कां कृतान्त काळाग्नि ॥ ६६ ॥ स्वभावें आरक्त नयन । त्यावरी होतां क्रोधसंपन्न । झाले लाखरंगासमान । विंशति नयन वटारिले ॥ ६७ ॥ नयन आरक्त कल्लोळ । धाकें कांपती लोक सकळ । क्रोधें नेत्रीं निघती ज्वाळ । जाली खळबळ सभेसी ॥ ६८ ॥ बिभीषणावरी घालावया उडी । कोशाबाहेरी खड्ग काढी । विर्जूतेजसम परवडी । पडली झांपडी सभेसी ॥ ६९ ॥ प्रळयमेघ गर्जे कडाडीं । तेंवी रावण रागें गडाडी । घावो हाणावया निर्वेडी । शस्त्र झाडी साटोपें ॥ १७० ॥ ऐकतां रावणाची हांक । धाकें कांपती सकळ लोक । बिभीषण चित्तीं निःशंक । न मानी धाक रामनामें ॥ ७१ ॥ माझा स्वामी श्रीशंकर । त्यासी म्हणसी रामकिंकर । तरी छेदीन तुझें वक्त्र । शस्त्र सत्वर उचलिलें ॥ ७२ ॥ उडोनियां आकाशाआंत । घावो हाणितां लंकानाथ । रावणाचा लचकला हात । श्रीराम रक्षित निजभक्ता ॥ ७३ ॥ चमत्कारें सुटली मुष्टी । शस्त्र गळोनि पडलें भूपृष्ठीं । रावणें धाक घेतला पोटीं । गोष्टी उफराटी येथें झाली ॥ ७४ ॥ रावण चांचरे घावो हाणितां । पडला सिंहासनाखालता । राजपुरुषार्थ करोनि वृथा । राम रक्षिता भक्तासी ॥ ७५ ॥ पुढती रावणें खड्ग घेतां । प्रहस्तें धांवोनि धरिलें हाता । कोप न सांवरे लंकानाथा । हाणिल्या लाथा बिभीषणा ॥ ७६ ॥ रावणें हाणितांचि लाथा । बिभीषणें चरण वंदिले माथां । शरण जावया श्रीरघुनाथा । सुमुहूर्तता हे मांझी ॥ ७७ ॥ कोपा चढला लंकानाथ । त्यासी प्रहस्तें करोनि शांत । खड्ग घालोनि

१ धोतऱ्याचें बीं. २ भरेल. ३ घेऊन. ४ लाखेसारखे तांबडे लाल. ५ म्यानाबाहेर. ६ विजेच्या प्रभेप्रमाणें.
७ मला उत्तम मुहूर्त सांपडला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

देंळाआंत । बैसविला स्वस्थ सिंहासनीं ॥ ७८ ॥ रावणाची लागली लात । जेंवी पर्वतीं वज्रपात । बिभीषण पडतांचि मूर्च्छित । द्वंद्वनिर्मुक्त श्रीरामनामें ॥ ७९ ॥ अगाध बिभीषणाची शांती । अणुमात्र क्रोध न ये चित्तीं । कांहीं न बोलेचि दुरुक्ती । स्वस्थ चित्तीं बैसला ॥ १८० ॥ सुबुद्धि सांगावी सुहृदता । ते गोष्टी खुंटली आतां । स्वस्थ असावें लंकानाथा । शरण रघुनाथा मी जातों ॥ ८१ ॥ स्वयें हाणोनियां लात । मज तुष्टला लंकानाथ । स्वामी भेटेल श्रीरघुनाथ । हें भाग्य प्राप्त तुझेनि ॥ ८२ ॥ एका जनार्दना शरण । राम आश्वासील बिभीषण । तें अति गोड निरूपण । श्रोतीं अवधान मज द्यावें ॥ १८३ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां बिभीषणापमानो नाम षट्त्रिंशत्तमोऽध्यायः ॥ ३६ ॥ ओंव्या ॥१८३॥ ॥ श्लोक ॥ ३२ ॥

अध्याय सदतिसावा

॥ श्रीजानकीनाथाय नमः ॥ बिभीषणासी अपमान । जालिया नव्हे क्रोधायमान । स्वयें श्रीराम स्मरोन । सावधान बैसला ॥१॥ कांहीं न बोलोनि उपपत्ती । विचारोनि विवेकयुक्ती । शरण जावें श्रीरघुपती । निश्चयो चित्तीं दृढ केला ॥ २ ॥

अभिवंद्य ततो भूमौ रावणं क्रोधमूर्च्छितम् ।
चतुर्भिः सचिवैः सार्धं निश्चक्राम विभीषणः ॥ १ ॥
स शांतकोपं संपूर्णं मोहात्त्यक्तमिव श्रिया ।
रावणं मधुरं वाक्यं बभाषे च बिभीषणः ॥ २ ॥
सौहृदात्ते मया राजन् वाक्यमुक्तं दशानन ।
न प्रियद्गुत्वाणांस्तस्य राघवस्य ब्रवीमि ते ॥ ३ ॥
हितार्थं धर्म्यमेवैतन्मया वाक्यमुदाहृतम् ।
मंत्रं ज्ञात्वा मया प्रोक्तं वाक्यं राक्षससंसदि ॥ ४ ॥

चौघे घेवोनि प्रधान । स्वयें निघाला बिभीषण । रावणासी मधुर वचन । काय आपण बोलत ॥ ३ ॥ आम्ही तुम्ही सखे बंधु । अणुमात्र नाहीं विरोधु । सांगतां तुजला हितानुवादु । वृथा क्रोधु तुवां केला ॥ ४ ॥ निंदोनियां लंकानाथा । श्रीरामा वाणिलें स्वपक्षार्था । तरी मी जाईन अधःपाता । जाण तत्त्वतां लंकेशा ॥ ५ ॥ हनुमंतापुढें तुझें दळ । तुजदेखतां पळाले सकळ । तेंचि स्यां करोनि विकळ । तुज प्रांजळ सांगितलें ॥ ६ ॥ तेणें राग प्रधानचित्ता । तेणें राग सैन्या समस्ता । तूंही कोपलासी लंकानाथा । निजस्वार्था नेणोनी ॥ ७ ॥ चोरी मारी आणि परद्वारी । हा धर्म तुझे घरीं । अनुताप रिघावया तुजमाझारीं । निजगजरीं बोलिलों ॥ ८ ॥ राक्षसांची सभा खोटी । स्यां सांगितली स्वहितगोष्टी । तेच करोनि उफराटी । धरिला पोटीं महाक्रोध ॥ ९ ॥ जेंवी ज्वरिताचें मुख । दुग्धा मानी कडु विख । तैसें रावणा जालें देख । मानिसी असुख स्वहिताचें ॥ १० ॥ अति कोपें लंकानाथा । तुवां मजला हाणितल्या लाथा । तरी काय जिंकिलें रघुनाथा । किंवा स्वस्थता तुज जाली ॥ ११ ॥ कोप जगामाजी अपकारी । त्याची वस्ती तुजमाझारी । तेणें विवेकाची केली बोहरी । स्वहित दुरी दुराविलें ॥ १२ ॥

अपकारी भवेत्कोपः कोपे कोपः कथं न ते ।
धर्मार्थकाममोक्षाणां प्रसह्य परिपंथिनि ॥ ५ ॥

भलताही क्रोधानुकारी । कोपे अल्प अन्यायमात्रीं । कोप परम अपकारी । कोणी त्यावरी कोपेना ॥ १३ ॥ उन्मत्त गज जीवें मारी । त्यासी सिंह पाडी धरेवरी । परी कोपावरी कोप करी । ऐसा संसारीं वीर नाहीं ॥ १४ ॥ क्रोध एकला एक । चहूं पुरुषार्थां घातक । ऐक त्याचाही विवेक । दुष्ट परिपाक क्रोधाचा ॥ १५ ॥ क्रोध येतांच मानसीं । स्वधर्मकर्मा क्रोध त्रासी । क्रोध अर्थ स्वार्थ विध्वंसी । मोक्ष क्रोधापासीं कदा न घडे ॥१६॥ क्रोध आलिया एकांतीं । स्त्रीपुरुषां कलहउत्पत्ती । धक्काबुक्कीमध्यें रात्रीं । कामविघाती समूळ क्रोध ॥ १७ ॥ क्रोध आलिया धर्मसंधीं । मुख्य ब्राह्मणातें स्वयें निंदी । परापँवादाच्या अनुवादीं । क्रोधें धर्मसिद्धी कदा न घडे ॥ १८ ॥ क्रोध धर्मातें उच्छेदी । क्रोध कर्मातें निंदी । क्रोध पापी हा दुर्बुद्धी । निंदानु-

---

१ स्यानांत. २ सुखदुःखांहून निराळा. ३ उद्देश. ४ हिताच्या गोष्टी. ५ पृथ्वीवर. ६ परिणाम. ७ लोकांना दोष लावण्याच्या. ८ नाश करतो.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वादी जल्पोनी ॥ १९ ॥ क्रोध पित्यातें निर्भर्त्सी । क्रोध मातेतें म्हणे दासी । क्रोध स्वधर्मातें नासी । क्रोधापासीं अधर्म ॥ २० ॥ बंधु वंधु अति आप्त । अर्थस्वार्थें क्रोधाभिभूत । स्वबंधूसी हाणवी लाथ । अति अनर्थ तो क्रोध ॥ २१ ॥ उत्तम अर्थाचिये प्राप्ती । क्रोध मुख्य विश्वासघाती । अर्थापासीं क्रोध अनर्थी । जाण निश्चितीं लंकेशा ॥ २२ ॥ अंधारीं जरी सूर्य बुडे । तरी क्रोधापासीं मोक्ष जोडे । काम क्रोध लोभ जैं झडे । तैंच आंतुडे निजमोक्ष ॥ २३ ॥ धर्म अर्थ काम मोक्षता । चहूं पुरुषार्थां क्रोध नागविता । तो तुजमाजी वसे लंकानाथा । जेणें मज लाथा हाणविल्या ॥ २४ ॥ मज हाणितलिया लाथा । पावलासि कोणा निजस्वार्था । किंवा पावलासि परमार्था । जासी अधःपाता श्रीरामद्रोहें ॥ २५ ॥ परम कृपा रघुनाथा । तुवां हाणितल्या लाथा । अल्पही क्रोध न ये चित्ता । निजशांतता श्रीरामें ॥ २६ ॥ तुवां हाणितांचि लाथा । पावलों परम वैराग्यता । सांडोनि स्वराज्यसुहृदता । शरण रघुनाथा मी जातों ॥ २७ ॥ सापत्नभावें ध्रुवा हाणिल्या लाथा । तेणें तो पावला परम स्वार्था । तैशाच तुझ्या रावणा लाथा । श्रीरघुनाथप्राप्तिकर ॥ २८ ॥ श्रीराम कृपाळु दयाळ । श्रीराम भक्तवत्सल । तूं तें नेणसीच बरळ । क्रोधें विव्हळ केलासी ॥ २९ ॥ गर्व सांडोनि लंकानाथा । श्रीरामा अर्पिलिया सीता । तूं पावशील गा निजस्वार्था । येऱ्हवीं वृथा मरशील ॥ ३० ॥ सुटल्या श्रीरामाचे बाण । तुज येथें राखेल कोण । पळालेति हनुम्यांभेण । कैंची आंगवण राक्षसां ॥ ३१ ॥ ऐसें बोलोनि बिभीषण । वचनीं खोंचला रावण । क्रोधें अंतरला बंधु पूर्ण । कंपायमान स्वयें जाला ॥ ३२ ॥ माझी अपक्व बुद्धि पूर्ण । लाथा हाणितांचि जाण । सखा अंतरला बिभीषण । गेला शरण श्रीरामा ॥ ३३ ॥ आठवलें बिभीषणाच्या चित्ता । आधीं अभिवंदोनि माता । तीस सांगोनि निजवृत्तांता । शरण रघुनाथा जाईन ॥ ३४ ॥

स मातरं पुनर्दृष्ट्वा तस्यै सर्वं निवेद्य च ।
जगामाकाशमार्गेण यत्र रामो महाबलः ॥ ६ ॥

उत्पपात गदापाणिश्चतुर्भिः सचिवैः सह ।
अब्रवीच्च तदा वाक्यं जातक्रोधो विभीषणः ॥ ७ ॥

अंतरिक्षगतः श्रीमान्भ्रातरं धनदानुजः ।
स त्वं भ्रातासि मे राजन्ब्रूहि मां यद्यदिच्छसि ॥ ८ ॥

कुळक्षयो देखोनि जाणा । सुबुद्धि सांगावया रावणा । मातेनें धाडिलें बिभीषणा । हितोपसंज्ञा सांगावया ॥ ३५ ॥ रावणासी हित सांगतां । कोप आला लंकानाथा । बिभीषणा हाणितल्या लाथा । ऐकोनि माता अति दुःखी ॥ ३६ ॥ बिभीषणा भाग्यवंता । तूं पावलासि बा रघुनाथा । कंदन आलें लंकानाथा । कुळा समस्ता समवेत ॥ ३७ ॥ माता तुष्टली बिभीषणासी । तुझेनि धन्य माझी कुशी । श्रीरामीं तूं विनटलासी । सकळ कुळासी तूं भूषण ॥ ३८ ॥ तुझेनि सकळ कुळ पुनीत । तुझेनि वंश हा सनाथ । तुझेनि मी नित्यमुक्त । श्रीरघुनाथनिजसेवा ॥ ३९ ॥ ऐकोनि मातेचें वचन । बिभीषण घाली लोटांगण । पुढती वंदोनि तिचे चरण । निघाला शरण श्रीरामा ॥ ४० ॥ बिभीषण उडोनि आकाशीं । निराळीं राहोनि सावकाशीं । पुढती बोले रावणासी । सत्य तूं होसी सखा माझा ॥ ४१ ॥ मोहममतेचें सखेपण । हीन दीन अति गौण । कोपामाजी कृपाळु पूर्ण । सखा रावण सत्यत्वें ॥ ४२ ॥ हाणोनियां निजलाथा । शरण धाडिलें रघुनाथा । ऐसा सखा तुजपरता । नाहीं तत्त्वतां तिहीं लोकीं ॥ ४३ ॥ जन्ममरणांचिया कोडी । लाथा हाणोनि तोडिली बेडी । रावणकोपकृपापरवडी । जोडिला जोडी श्रीराम ॥ ४४ ॥ ऐसी रावणाची स्तुती । बिभीषण वदे निजशांती । तें ऐकोनि लंकापती । आश्चर्यें चित्तीं वचकला ॥ ४५ ॥ जाला अनुतापी रावण । माझी अपक्व बुद्धि पूर्ण । सखा अंतरला बिभीषण । गेला शरण रघुनाथा ॥ ४६ ॥ सैन्य सेनानी प्रधान । अवघे वानिती बिभीषण । अणुमात्र

१ क्रोधायमान. २ मिळतो, प्राप्त होतो. ३ धर्म, अर्थ, काम, मोक्ष या चार पुरुषार्थांना. ४ नमस्कार करून.

५ नाश. ६ पवित्र, पुण्यवान्. ७ अंतराळीं, आकाशांत. ८ पश्चात्तापयुक्त.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

कोप न येच जाण । व्यर्थ रावण क्षोभला ॥ ४७ ॥ धन्य बिभीषणाची शांती । धन्य बिभीषणाची कीर्ती । धन्य बिभीषणाची स्थिती । शरण रघुपती तो गेला ॥ ४८ ॥ राक्षसांच्या घातका युक्ती । हा सांगेल श्रीरामाप्रती । आली राक्षसां समाप्ती । केला समस्तीं निश्चयो ॥ ४९ ॥ बिभीषण म्हणे रावणासी । जे जे इच्छा तुझे मानसीं । ते ते सांग मजपासीं । सिद्धी सर्वांशीं श्रीराम ॥ ५० ॥ कृपेनें हाणोनियां लाथा । शरण धाडिलें श्रीरघुनाथा । ऐक माझी प्रत्युपकारिता । तुज मी आतां सांगेन ॥ ५१ ॥ सावध ऐकें दशशिरा । मी अंतकाळींचा[1] सोयरा । तुवां द्वेषितां श्रीरामचंद्रा । नरकद्वारा जावों नेदीं ॥ ५२ ॥ अंतीं होय परम मुक्ती । ऐसी श्रीरामनामकीर्ती । केलिया श्रीरामाची भक्ती । उद्धारगती वंशस्था ॥ ५३ ॥ ऐसें बोलोनि बिभीषण । करोनि रावणासी नमन । घेवोनियां चौघे प्रधान । निघाला शरण श्रीरामा ॥ ५४ ॥ जैसे चारी पुरुषार्थ । जीवास करिती नित्य मुक्त । तैसे चारी प्रधान तेथ । साह्य सतत बिभीषणा ॥ ५५ ॥ नांतरी[2] चारी वेद । उपनिषदीं करिती बोध । जीवासी पावे परमानंद । तैसे प्रबुद्ध प्रधान ॥ ५६ ॥ हो कां जैशा चारी मुक्ती । जीवासी देती ब्रह्मप्राप्ती । तैसे प्रधान परमार्थी । नित्यानुवर्ती[3] बिभीषणा ॥ ५७ ॥ नातरी जैशा वाचा चारी । नित्यानित्यविवेककरी । जीवासी नेती साक्षात्कारीं । तैसे चारी प्रधान ॥ ५८ ॥ ऐसे घेवोनि चारी प्रधान । मेरुमांदारांसमान । येतां देखोनि बिभीषण । वानरगण खवळले ॥५९॥

तं मेरुशिखराकारं ज्वलंतमिव पावकम् ।
गगनस्थं महीस्थास्ते ददृशुर्वानरर्षभाः ॥ ९ ॥
एषु सर्वायुधोपेतैश्चतुर्भिः सह राक्षसैः ।
राक्षसोऽभ्येति पश्यध्वमस्मान्हंतुं न संशयः ॥ १० ॥

बिभीषण राक्षसेश्वर । गगनीं मेरुशिखराकार । त्यातें भूमिस्थ वानर । देखोनि सत्वर ऊठिले ॥ ६० ॥ बिभीषण शांत दान्त[4] । विवेकवैराग्यें विरक्त । श्रीरामदर्शनीं अनुरक्त[5] । तेणें आरक्त[6] तो भासे ॥ ६१ ॥ रजतमधूम्र जाय निघोनी । लखलखित भासे चैतन्याग्नी । तैसा तेजस्वी बिभीषण गगनीं । वानरगणीं देखिला ॥ ६२ ॥ पुढील वीर धीर विराजमान । मागील ते चारी प्रधान । आमचें करावया हनन । आले धांवोनि सायुध ॥ ६३ ॥ बोडण खांड गदापाणी । धनुष्यबाण पाठीस तूंणी । आम्हांसी मारावयालागोनी । आले धांवोनि राक्षस ॥ ६४ ॥ आमचा करावया घात । पांच जण आले नेमस्त । पांचही निर्दळिलिया येथ । रामकार्यार्थ साधेल ॥ ६५ ॥ जो यांचा करील घात । तोच पुरुषार्थी समर्थ । तोच श्रीरामाचा परम आप्त[7] । युद्धकंदनार्थ मग कैंचा ॥ ६६ ॥ पुढिल्या पांचांची मोहर[8] । मारोनि केलिया चकचूर । मग मेल्या न येती निशाचर । वानरीं विचार दृढ केला ॥ ६७ ॥ देखोनि राक्षसांची जाती । वेगें उठिले जुत्पती । शाळ ताळ शिळा हातीं । हाणावया पर्वतीं पेटले ॥ ६८ ॥ मिळोनियां वानरवीर । अवघीं केला भुभुःकार । तेणें खळबळिला सेनासागर । नादें अंबर कोंदलें ॥ ६९ ॥ पाडीं पाडीं म्हणतां जाण । एकापुढें एक उड्डाण । करीत आले वानरगण । तेणें बिभीषण दचकला ॥ ७० ॥ शरण जातां श्रीरघुपती । मध्येंच वानर मज मारिती । तेव्हां हे गति ना ते गती । आली ग्रहगति मुख्यत्वें ॥ ७१ ॥ मुख्य विरोधाचा संबंधु । मी रावणाचा कनिष्ठ बंधु । वानरीं माझा करितां वधु । रामें विमर्दु[9] चुकवावा ॥ ७२ ॥ करितां श्रीरामनामस्मरण । दीनाचें चुके जन्ममरण । मी तंव श्रीरामीं अनन्य शरण । वानरविघ्न कां आलें ॥ ७३ ॥ येथें भेटता कीं हनुमंत । तो तंव माझा परम आप्त । मज भेटविता श्रीरघुनाथ । कपिकंदनार्थ चुकवोनी ॥ ७४ ॥ आतां असोत बहुत युक्ती । लोटांगण वानरांप्रती । मी अनन्य शरण रघुपती । तुम्ही कां युद्धार्थी धांवतां ॥ ७५ ॥ ऐसें बोलोनियां देख । बिभीषणें दिधली हांक । तोचि बिभीषणाचा श्लोक । अर्थविशेषें अवधारा ॥ ७६ ॥

उवाच स महाप्राज्ञः स्वरेण महता महान् ।
सुग्रीवं वानरान्प्रेक्ष्य खस्थ एव विभीषणः ॥ ११ ॥

१ अंतकाल. २ किंवा. ३ नित्य अनुकूल असणारे. ४ इंद्रियनिग्रही. ५ प्रीतियुक्त. ६ लाल, तेजस्वी. ७ भाता. ८ मार्ग. ९ मरण.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

भो भो शाखामृगाः सर्वे वचनं मे निबोधत ।
रामायाख्यातुमिच्छामि कोसलेंद्राय धीमते ॥ १२ ॥
रावणस्यानुजो भ्राता विभीषण इति श्रुतः ।
चतुर्भिः सचिवैः सार्धं शरणार्थी न संशयः ॥ १३ ॥
प्राप्तोहं राघवं द्रष्टुमिति मां वेत्थ वानराः ॥ १४ ॥

देखोनि वानरांचा तवकं[१] । गगनींहूनि बिभीषण देख । दीर्घ देतांचि पैं हांक । कपिकटक वेंचकलें[२] ॥ ७७ ॥ काय गर्जतो निशाचर । ऐकों ठेले वानरवीर । म्हणे मी शरणागत साचार । श्रीरामचंद्राचे चरणीं ॥ ७८ ॥ तो म्हणे सुग्रीवा कपिपती । वानरस्वामित्व तुझे हातीं । शरणगतासी मारूं येती । यांतें निश्चितीं निवारीं ॥ ७९ ॥ रावणाचा अनुज[३] बंधु । बिभीषण नामें मी प्रसिद्धु । म्हणोनि माझा कराल वधु । मी तंव शुद्ध शरणार्थी ॥ ८० ॥ येथें असता हनुमंत । तो सांगता माझा वृत्तान्त । मज भेटविता श्रीरघुनाथ । शरणागत म्हणोनि ॥ ८१ ॥ श्रीरामाचें सत्य व्रत । मारूं नये शरणागत । कपि मज मारावया उदित[४] । ते तूं समस्त निवारीं ॥ ८२ ॥ सुग्रीवा तुझे चरणीं माथा । वृतान्त सांगें श्रीरघुनाथा । रावणाचा कनिष्ठ भ्राता । शरण तत्त्वतां आला असे ॥ ८३ ॥ चौघां प्रधानांसमवेत । बिभीषण शरणागत । ऐकोनि सांगेल रघुनाथ । तोचि कार्यार्थ करावा ॥ ८४ ॥ कौसल्येचा निजसुत । कौसलेंद्र श्रीरघुनाथ । त्याचा अनन्य शरणागत । बिभीषण नाम पैं माझें ॥ ८५ ॥ बिभीषण अनन्य शरणागत । सुग्रीवा मानली हे मात । तोचि श्रीरामासी वृत्तान्त । वानरनाथ स्वयें सांगे ॥ ८६ ॥

एतत्तु वचनं श्रुत्वा सुग्रीवो वानरेश्वरः ।
लक्ष्मणस्याग्रजं राममिदं वचनमब्रवीत् ॥ १५ ॥
रावणस्यानुजो बंधुर्विभीषण इति श्रुतः ।
चतुर्भिः सचिवैः सार्धं शरणार्थमिहागतः ॥ १६ ॥

ऐकोनि बिभीषणाचें वचन । सुग्रीव येवोनि आपण । रामलक्ष्मणां करोनि नमन । सांगे आगमन बिभीषणाचें ॥ ८७ ॥ श्रीरामासी अर्पावी सीता । हें हित सांगतां लंकानाथा । तयासी हाणोनि लाथा । अनाथता दवडिला ॥ ८८ ॥ नगरीं धेंडे पिटोनि पूर्ण । नगरत्यागें बिभीषण । दवडितां बोलला रावण । जाय तूं शरण श्रीरामा ॥ ८९ ॥ श्रीराम जालिया पक्षपाती । कैसा येईल लंकेप्रती । कैंवी राक्षसां करील ख्याती । तेही प्रतीति अवधारा ॥ ९० ॥ जो बिभीषण सद्भावतां । शरण आला श्रीरघुनाथा । काय करावें त्यासी आतां । सांग समर्था श्रीरामा ॥ ९१ ॥ घेवोनियां चौघे प्रधान । बिभीषण अनन्य शरण । काया वाचा उदित मन । तुझे श्रीचरण देखोनि ॥ ९२ ॥

प्राप्तं विभीषणं श्रुत्वा रामः सुग्रीवमब्रवीत् ।
स्मरन्निव स्पृशन्हस्तं सहजामित्रतापनः ॥ १७ ॥
हरिश्रेष्ठ महाबाहो वचनं श्रूयतां मम ।
हनूमत्प्रमुखान्सर्वान्सचिवांश्च समाहृय ॥ १८ ॥
तैः समुच्चैव कर्तव्यं करिष्यामि परीक्षणम् ।
इति श्रुत्वा राघवस्य वचनं हरियूथपाः ॥ १९ ॥
बभूवुर्वानराः सर्वे प्रहृष्टाः साधुवादिनः ॥ २० ॥

बिभीषण आला भेटी । तेणें श्रीरामास आनंदकोटी । हरिखें सुग्रीवाची पाठ थापटी । आल्हाद पोटीं प्रेमाचा ॥ ९३ ॥ बिभीषणाचें मनोगत । अनन्य भावें शरणागत । जाणे अंतर्यामीं श्रीरघुनाथ । हृदयस्थ निवासी ॥ ९४ ॥ बिभीषण शरणागत परम । स्वयें जाणे आत्माराम । सुग्रीवाप्रती राजधर्म । अनुक्रमें[५] अनुवादे ॥ ९५ ॥ हनुमंतादि मुख्य प्रधान । पँचारिले[६] वानरगण । बिभीषण येतो शरण । त्याचें लक्षण लक्षावया ॥ ९६ ॥ बिभीषणाचें मनोगत । सत्य किंवा असत्य । निर्धारावया इत्थंभूत । कपी समस्त पाचारिले ॥ ९७ ॥ ऐकोनि श्रीरामाचें वचन । उल्लासले वानरगण । बिभीषणाचें लक्षण । अनुवादन ते करिती ॥ ९८ ॥ मुख्य सुग्रीवसंवादु । हा रावणाचा बंधु । अवश्य याचा करावा वधु । म्हणे कुमुदु मारावा ॥ ९९ ॥ नळ नीळ सांगती गोष्टी । तेचि तरळ[९] तरळाचे पोटीं । रावणानुज हा तंव कपटी । उठाउठीं मारावा ॥ १०० ॥ गज गवय सांगती जाण । शत्रुबंधु हा कपटी शरण । यासी न वरावें आपण । द्यावा दवडोन लंकेसी ॥ १ ॥ कपटी रावणाचा

१ आवेश. २ चपापलें. ३ धाकटा. ४ तयार. ५ अनुभव. ६ क्रमानें, ७ बोलाविले, ८ आनंद पावले.

९ संशय, भीति.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

बंधु । हा मारावा म्हणे मैंदु । तैसाचि अनुवादे द्विविदु । करावा वधु पैं याचा ॥ २ ॥ सुषेण पनस दधिमुख । तिघे होवोनि एकमुख । यासी राखितां परम दुःख । अवश्यमेव मारावा ॥ ३ ॥ मग बोलिला जांबुवंत । बिभीषणा पाचारा येथ । त्याचें लक्षितां चेष्टितें । मनोगत कळेल ॥ ४ ॥ स्थिति गति गमनागमन । नेत्र वैक्त्र संभाषण । येणें पराचें लक्षण । विचक्षण लक्षिती ॥ ५ ॥ अंगद बोले अति कौतुक । एकला एक बिभीषण रंक । त्यासाठीं हरलें कटक । कपि नेटक निजयुद्धें ॥ ६ ॥ धन्य धन्य या वानरां । शरण आलिया निशाचरा । जो तो म्हणे मारा मारा । हा काय खरा पुरुषार्थ ॥ ७ ॥ नेणोनि श्रीरामाची स्थिती । वृथा वानरें जल्पती । पैल बैसलासे मारुती । त्याची युक्ती अवधारा ॥ ८ ॥ सकळ लंकेचें शोधन । हनुमंतें केलें आपण । साधु कीं दुर्जन बिभीषण । त्याचें लक्षण तो जाणे ॥ ९ ॥ हनुमंतासी अविदितें । नाहीं उरला लंकेचा अर्थ । तो सांगेल इत्थंभूत । तें समस्त आयका ॥ ११० ॥ श्रीराम म्हणे गा हनुमंता । बिभीषणा शरणागता । काय करावें त्या आतां । तें तत्त्वतां मज सांगें ॥ ११ ॥ ऐकोनि स्वामीचें वचन । हनुमान घाली लोटांगण । वंदोनि श्रीरामाचे चरण । युक्त वचन अनुवादे ॥ १२ ॥

अथ संस्कारसंपन्नो हनुमान्बुद्धिसत्तमः ।
उवाच मधुरं श्लक्ष्णमर्थवच्च ततो वचः ॥ २१ ॥
न भवंतमतिश्रेष्ठं समर्थं वदतां वरम् ।
अतिशाययितुं शक्तो बृहस्पतिरपि ब्रुवन् ॥ २२ ॥
चारप्रणिहितं युक्तं यदुक्तं सचिवैस्तव ।
अर्थस्यासंभवात्तत्र कारणं नोपपद्यते ॥ २३ ॥
अदेशकाले संप्राप्ते इत्ययं यद्बिभीषणः ।
विवक्षा तत्र मेस्तीयं तां निबोध यथामति ॥ २४ ॥

हनुमंत सर्वांगें सज्ञान । सर्वेंद्रियीं एक विज्ञान । जें बोले तें युक्त वचन । श्रीरघुनंदनसुखकारी ॥ १३ ॥ हनुमान श्रीरामाचें लळिवाड । त्याचा बोल अमृतापरीस गोड । पुरतें वेदशास्त्रांचें कोडँ । श्रवणीं चाड श्रीरामा ॥ १४ ॥ हनुमान बोलतां आपण । टवकारले वानरगण । पाहात ठेले त्याचें वदन । अवघे जण टकमकां ॥ १५ ॥ बृहस्पति करितां निरूपण । अति एकाग्र अमरगण । तैसें ऐकती हनुमंताचें वचन । अवघे जण टकमकां ॥ १६ ॥ हनुमद्वाक्याची घडमोडी । वानरां टकमक लक्षकोडी । वचनीं सत्यत्वाची प्रौढी । तेणें अति गोडी श्रीरामा ॥ १७ ॥ खिरी तुपावरी साखर । तैसें वचन अति मधुर । सत्यवादी रामानुचर । श्रीरामचंद्रसुखकारी ॥ १८ ॥ सावधान ऐकें श्रीरघुनाथा । नेणोनि बिभीषणा हृदयस्था । कपि प्रधान बोलती वृथा । अंनुमानता मिथ्यात्व ॥ १९ ॥ न कळोनि बिभीषणाचा बोधु । शरण रिघोनि शत्रुबंधु । म्हणती आमचा करील वधु । वानरानुवादु अति मिथ्या ॥ १२० ॥ लंका शोधितां त्रिकूटीं । म्यां देखिलें आपुले दृष्टीं । बिभीषण हा नव्हे कपटी । सत्य गोष्टी हे माझी ॥ २१ ॥ बिभीषण नव्हे हा शठ । बिभीषण नव्हे हा नष्ट । बिभीषण नव्हे कपट । वाक्य निर्दुष्ट हें माझें ॥ २२ ॥ लंका शोधितां समस्त । राक्षसांचें हृद्गत । जाणोनि वदे हनुमंत । अति समर्थ सत्यत्वें ॥ २३ ॥ श्रीरामसेवातपोबळें । सर्वां हृदयीं हनुमान खेळे । तेणें सत्यासत्य आकळे । बोले प्रांजळें सत्य मधुर ॥ २४ ॥ कपी प्रधान जे बोलती । कपटी बिभीषणाची स्थिती । त्यांची मिथ्या हे वेंदंती । शुद्धभावार्थी बिभीषण ॥ २५ ॥ बिभीषणाची धर्मस्थिती । बिभीषणाची अगाध कीर्ती । बिभीषणाची भगवद्भक्ती । शुद्ध भावार्थी बिभीषण ॥ २६ ॥ बिभीषणा नाहीं अकर्म । बिभीषणा नाहीं विकर्म । बिभीषणीं नाहीं अधर्म । सत्यत्वें वचन हें माझें ॥ २७ ॥ बिभीषणीं नित्य निवृत्ती । बिभीषण धर्ममूर्ती । बिभीषणीं नित्य शांती । शुद्ध भावार्थी बिभीषण ॥ २८ ॥ सांडोनि यौवराज्य संपूर्ण । त्यजोनियां बंधु रावण । युद्धसमयीं आला शरण । त्यासी आपण नये मारूं ॥ २९ ॥ पहिलेंचि श्रीरामीं प्रेमता । त्यावरी रावणें हाणिल्या लाता । शरण आला श्रीरघुनाथा । भावार्थता स्वानंदें ॥ १३० ॥ भावार्थी अथवा कपटी पूर्ण । जो कां म्हणे मी आलों शरण । त्यासी मारितां

१ बोलला. २ वर्तन. ३ तोंड. ४ दुसऱ्याचें, शत्रूचें. ५ माहीत नाहीं असा. ६ आवडता. ७ इच्छा, आवड, ८ देवसमुदाय. ९ खरें बोलणारा. १० कल्पनेनें. ११ बोलणें, १२ कुकर्म,

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

आपण । लागेल दूषण सूर्यवंशा ॥ ३१ ॥ शिबि हरिश्चंद्र रुक्मांगद । वंशींचे क्षोभती धर्मविद । शरणागताचा पैं वध । अति विरुद्ध तिहीं लोकीं ॥ ३२ ॥ स्वर्गीं क्षोभेल दशरथ । अधर्मी जाला श्रीरघुनाथ । मारूं नये शरणागत । हा निश्चितार्थ श्रीरामा ॥ ३३ ॥ एकला एक बिभीषण । त्याचें आम्हांसी भय कोण । वधावा म्हणती वानरगण । त्यांची आंगवण अति तुच्छ ॥ ३४ ॥ तुटोन पडतां गगन । गजवजीना रघुनंदन । तेथें बापुडें बिभीषण । त्याचें भय कोण आम्हांसी ॥ ३५ ॥ ऐसें बोलतां मारुती । संतोषला श्रीरघुपती । सवेंच कपि बोले पुढती । ते उपपत्ती अवधारा ॥ ३६ ॥ बिभीषणाचिये संगती । राक्षसांच्या दुर्गम गती । वश्य होतील श्रीरघुपती । विजयप्राप्ति बिभीषणें ॥ ३७ ॥ आभिचारिक[1] विघ्नांनुवर्ती[2] । स्वयें रामा वश्य होती । बिभीषणाचे संगतीं । विजयप्राप्ती श्रीरामा ॥ ३८ ॥ रात्रीं अपरात्रीं निकटवर्ती[3] । घाला घालोनियां मारिती । तेथें हे बिभीषणसंगती । विजयप्राप्ती श्रीरामा ॥ ३९ ॥ अलक्ष अगम्य अतर्क्य गती । पृथ्वी कोरोनि धूर्ं[4] चोरिती । तेथें ही बिभीषणसंगती । विजयप्राप्ती श्रीरामा ॥ १४० ॥ संकट विकट अति दुर्घट । जेथें रिघतां परम कष्ट । बिभीषणसंगतीं होती सपाट । विजयपट श्रीरामा ॥ ४१ ॥ बिभीषणाची शुद्ध मती । बिभीषण केवळ परमार्थी । विकल्प न धरावा चित्तीं । शुद्ध शरणार्थी बिभीषण ॥ ४२ ॥ लंका शोधितां संकटीं । म्यां देखिलें आपुले दृष्टीं । त्रिसत्य सत्य माझी गोष्टी । नव्हे कपटी बिभीषण ॥ ४३ ॥ वाहतों श्रीरामा तुझी आण । भावें शिवतों तुझे चरण । कपटी नव्हे हा बिभीषण । सत्य भाषण हें माझें ॥ ४४ ॥ ऐकतां हनुमंताची गोष्टी । श्रीरामासी आनंद पोटीं । हरिखें खेंवा[5] पडली मिठी[6] । आल्हाद सृष्टीं न समाये ॥ ४५ ॥ जैसें श्रीरामाचें मनोगत । तैसेंचि बोलिला हनुमंत । तेणें उल्लासे श्रीरघुनाथ । असे गर्जत स्वानंदें ॥ ४६ ॥ मज मारावया जाण । कपटी रावण आलिया शरण । त्यासी माझें अभयदान । मग बिभीषण केंवी त्याज्य ॥ ४७ ॥ बिभीषण माझा आत्मा जाण । बिभीषण माझा जीवप्राण । माझेनि चिरंजीवी बिभीषण । जन्ममरण त्या नाहीं ॥ ४८ ॥ बिभीषणा शरणागता । वेगीं पाचारीं पैं आतां । लंका दिधली तत्त्वतां । निजराज्यतासंकल्पें ॥ ४९ ॥ जा रे म्यां मारिला रावण । लंकेसी स्थापिला बिभीषण । शरणागतीं प्रेम पूर्ण । आपणा आपण विसरला ॥ १५० ॥ ऐसिया श्रीरामउत्तरीं । हनुमान लोळे पायांवरी । जें म्यां नेमिलें जिव्हारीं[7] । तेंचि निर्धारीं[8] श्रीरामवाणीं ॥ ५१ ॥ भेटावया निजभक्ता । बाहु थरकती श्रीरघुनाथा । वेगीं बोलावीं गा हनुमंता । शरणागता बिभीषणा ॥ ५२ ॥ ऐकोनि बिभीषणाचें महिमान । सुग्रीवें खालती घातली मान । वानर जाले लज्जायमान । श्रीरघुनंदन उल्लासे ॥ ५३ ॥ बिभीषणाचें भाग्य पूर्ण । श्रीराम तुष्टला संपूर्ण । एका जनार्दना शरण । भेटीचें लक्षण अवधारा ॥ ५४ ॥ कैसी दोघांची दृष्टादृष्टी । कैसी दोघांची होईल भेटी । कैसे दोघे करितील गोष्टी । ते कथाकसवटी अनुपम्य ॥ ५५ ॥ देवाभक्ताचें दर्शन । ते कथा तंव अति पावन । एका जनार्दना शरण । रामायण अति रम्य ॥ १५६ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां बिभीषणागमनं नाम सप्तत्रिंशत्तमोऽध्यायः ॥ ३७ ॥ ओंव्या ॥ १५६ ॥ श्लोक ॥ २४ ॥

अध्याय अडतिसावा

॥ श्रीसीतारामाभ्यां नमः ॥ बिभीषणाचा वृत्तान्त । समूळ सांगे हनुमंत । तेणें तुष्टला श्रीरघुनाथ । उल्लासत स्वानंदें ॥ १ ॥

रामस्तेषां वचः श्रुत्वा शरणागतवत्सलः ।
पूरयन्निव घोषेण श्लक्ष्णं वचनमब्रवीत् ॥ १ ॥
एवं ब्रुवति सुग्रीवे तस्मिन्हरिगणेश्वरे ।
उवाच राघवः श्रीमान्धर्मार्थसहितं वचः ॥ २ ॥
सुदुष्टो वाप्यदुष्टो वा किमेष रजनीचरः ।
सूक्ष्ममप्यहितं कर्तुं मम शक्तः कथंचन ॥ ३ ॥

ऐकोनि हनुमंताचें वचन । संतोषला रघुनंदन । सुग्रीवादि वानरगण । त्यांप्रति आपण धर्म सांगे

---

१ जारणमारणादि करणारे. २ विघ्नें उत्पन्न करणारे. ३ जवळ असणारे. ४ मुख्य योद्धा. ५ मोठें. ६ आलिंगनाला. ७ मनांत, अंतःकरणांत. ८ निश्चयपूर्वक.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ २ ॥ सद्भावेंसीं संपूर्ण । अथवा कपटें आलिया शरण । त्यासी नाहीं सर्वथा मरण । सत्य भाषण हें माझें ॥ ३ ॥ माझा करावया घात । शरण आलिया लंकानाथ । त्यासीही माझा अभयहस्त । जाणा निश्चित कपि सर्व ॥ ४ ॥ शरणागतापासाव मरण । आम्हांसी सर्वथा नाहीं जाण । हेंही माझें सत्य भाषण । वानरगण तुम्ही जाणा ॥ ५ ॥ शरणागतासी क्रोधानळीं । जो कोणी उचलील आंगोळी । त्याची करीन मी होळी । शरजाळीं वर्षोनी ॥ ६ ॥ जो कोणी माझा शरणागत । त्यासी जेणें लाविला हात । त्याचा मी करीन घात । निश्चितार्थ हा माझा ॥ ७ ॥ श्रीराम कृपेचा कल्लोळ । श्रीराम शरणागतवत्सल । श्रीराम तो दीनदयाळ । प्रेमप्रांजळ श्रीराम ॥ ८ ॥ श्रीराम स्वानंदें गर्जत । बिभीषण जो शरणागत । त्यासी माझा अभयहस्त । आणा त्वरित भेटीसी ॥ ९ ॥

आनयध्वं हरिश्रेष्ठास्तमाश्वास्य ददाम्यहम् ।
बिभीषणो वा सुग्रीव यदि वा रावणो भयम् ॥ ४ ॥
राघवेणाभये दत्ते संनतो रावणानुजः ।
खात्पपातावनिं हृष्टः सर्वैरनुचरैः सह ॥ ५ ॥
स तु रामस्य धर्मात्मा निपपात बिभीषणः ।
पादयोर्निपपाताथ चतुर्भिः सह राक्षसैः ॥ ६ ॥

ऐसें बोलतां रघुनाथ । सुग्रीवासहित हनुमंत । उडाले पैं आकाशांत । जुत्पतियुक्तें स्वानंदें ॥ १० ॥ देखोनियां वानरंजात । पुढती बोले रघुनाथ । शरण आलिया लंकानाथ । अभयहस्त त्या माझा ॥ ११ ॥ शरण आलिया सर्वथा । बिभीषणाहून अधिकता । सुखी करीन लंकानाथा । जाण तत्त्वतां वानरेशा ॥ १२ ॥ रावण अथवा बिभीषण । दुष्ट नष्ट हो दुर्जन । मज आलिया शरण । अभय दान त्या माझें ॥ १३ ॥ जो भीतसे शरणागता । मरणभय ज्याचे चित्ता । जय न पावे तो सर्वथा । जाण तत्त्वतां कपिराजा ॥ १४ ॥ ज्याचे पोटीं सभयता । कैसें निर्भय शरणागता । तैसें नाहीं श्रीरघुनाथा । निःशंकता निर्भय ॥ १५ ॥ ऐकोनि श्रीरामाचें वचन । अवघे विस्मित वानरगण । गाढी श्रीरामाची आंगवण । निधडा पूर्ण निःशंक ॥ १६ ॥ श्रीरामचित्तीं नाहीं चिंता । मरणभय नाहीं रघुनाथा । हाचि शरण्य शरणागता । ऐसें समस्तां मानलें ॥ १७ ॥ ऐसा श्रीराम समर्थ । अवघे अति प्रीतीं बोलत । जेथें बिभीषण शरणागत । तेथें समस्त पातले ॥ १८ ॥ देखतांचि बिभीषण । सुग्रीवें दिधलें आलिंगन । बिभीषण भाग्याचा संपूर्ण । वानरगण वानिती ॥ १९ ॥ नळनीळादि समस्त । अंगद आणि जांबवंत । अवघे आलिंगन देत । भाग्यवंत बिभीषण ॥ २० ॥ देखतांचि हनुमंता । उल्लास बिभीषणाच्या चित्ता । त्याच्या चरणीं ठेवोनि माथा । सप्रेमता सद्गदित ॥ २१ ॥ माता पिता बंधु भगिनी । तूंचि सखा मजलागूनी । तुजवांचोनि त्रिभुवनीं । आन कोणी असेना ॥ २२ ॥ रावणाची संपूर्ण कथा । सांगितली त्या हनुमंता । स्वराज्य सुहृद त्यजोनि माता । शरण रघुनाथा मी आलों ॥ २३ ॥ ऐसें सांगताचि गोष्टी । हरिखें बाष्प दाटे कंठीं । सुखस्वानंदें जडोनि मिठी । पडिला सृष्टीं मूर्च्छित ॥ २४ ॥ त्यासी मूर्च्छित पडतां । उल्लास हनुमंताचे चित्ता । उचलोनियां स्वानंदता । उल्लासता आलिंगी ॥ २५ ॥ अंगा अंगस्पर्शन । हनुमंतासीं आलिंगन । तेणें पावला समाधान । सुखसंपन्न बिभीषण ॥ २६ ॥ कृपेनें बोले हनुमंत । बिभीषणा तूं भाग्यवंत । तुज तुष्टला श्रीरघुनाथ । कृपावंत कृपाळु ॥ २७ ॥ श्रीरामें बोलाविलें भेटी । वेगें चाल उठाउठीं । म्हणोनि धरिला बाहुवटीं । वानरां पोटीं आल्हाद ॥ २८ ॥

पादयोः स तु रामस्य निपपात बिभीषणः ।
राक्षसः शरणान्वेषी चतुर्भिः सचिवैः सह ॥ ७ ॥
तं तु रामः समुत्थाप्य परिष्वज्य बिभीषणम् ।
उवाच मधुरं वाक्यं सखा मम भवानिति ॥ ८ ॥
अब्रवीच्च तदा रामं प्रतिवाक्यं बिभीषणः ।
अनुजो रावणस्याहं तेन चास्म्यवमानितः ॥ ९ ॥
परित्यक्ता मया लंका मित्राणि च धनानि च ।
भवंतं सर्वभूतानां शरण्यं शरणं गतः ॥ १० ॥
राक्षसानां वधे साह्यं लंकायाश्चैव धर्षणे ।
करिष्यामि यथा प्राणं प्रवेक्ष्यामि च वाहिनीम् ॥ ११ ॥

१ क्रोधाग्नीनें अत्यंत संताप पावून. २ हात उगारील. ३ मुख्य वानरांसह. ४ वानरसमुदाय. ५ मोठी. ६ शरणागताचें रक्षण करण्याविषयीं समर्थ. ७ आप्तेष्टमंडळी. ८ आनंदानें. ९ सत्वर. १० मिठी मारून.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

भेटवावया श्रीरघुपती । बिभीषणासी धरोनि हातीं । वेगें उठिला मारुती । वानरपंक्तीसमवेत । ॥ २९ ॥ श्रीरामनामाचा गजर । करीत चालिले वानर । नामें उचंबळिला सागर । नामें अंबर दुमदुमलें ॥ ३० ॥ भेटावया शरणागता । बाहु स्फुरती श्रीरघुनाथा । आलिंगावया अति शीघ्रता । श्रीरामचित्ता आल्हाद ॥ ३१ ॥ शुभ चिन्हें डोळे लवती । हरिखें अष्टांगें थरकती । शरणागता श्रीरामप्राप्ती । आल्हाद चित्तीं भेटीचा ॥ ३२ ॥ अवलोकावया शरणागता । नेत्रपल्लव न हालतां । येणें उल्लासें श्रीरघुनाथा । उत्कंठता भेटावया ॥ ३३ ॥ येरीकडे[2] हनुमंत । धरोनि बिभीषणाचा हात । सुग्रीवादि कपि समस्त । आले गर्जत हरिनामें ॥ ३४ ॥ देखतां श्रीरामदर्शन । बिभीषण घाली लोटांगण । मस्तकीं धरितां त्याचे चरण । आपणा आपण विसरला ॥ ३५ ॥ विसरला यौवराज्य संपत्ती । विसरला स्त्रीपुत्रसंतती । विसरला राक्षसजाती । श्रीराममूर्ती देखतां ॥ ३६ ॥ विसरला जीवित्व जीव । विसरला देह अहंभाव । विसरला शिवत्व शिव । श्रीराघव देखतां ॥ ३७ ॥ राम देखतांचि दृष्टीं । विसरला द्वंद्वदुःख[3] त्रिपुटी[4] । विसरला स्वदेहेंसीं सृष्टी । आनंदकोटी श्रीरामा ॥ ३८ ॥ ऐसियापरी बिभीषण । श्रीरामासी अनन्य शरण । स्वयें घालितां लोटांगण । समाधान पावला ॥ ३९ ॥ मन बुद्धि चित्त अभिमान । साधु राखे सावधान । तैसेचि चौघेही प्रधान । आणिले शरण श्रीरामा ॥ ४० ॥ धर्मार्थ काम मोक्ष पूर्ण । साधक करी ब्रह्मार्पण । तैसे चवघेही प्रधान । आणिले शरण श्रीरामा ॥ ४१ ॥ साधनचतुष्टयसंपत्ती । साधून ब्रह्मार्पण करिती । तैशाच सजीव चारी मुक्ती । केले शरणार्थी श्रीरामा ॥ ४२ ॥ ऐसियापरी बिभीषण । अनन्यभावें लोटांगण । श्रीरामें उचलोनि आपण । आलिंगन दिधलें ॥ ४३ ॥ लवणजळा होय भेटी । तैसी दोघां पडली मिठी । विराले येरयेरांचे पोटीं । आनंद सृष्टीं न समाये ॥ ४४ ॥ दोनी दीप मेळविल्या ज्योती । दोनी मिळोनि एक होती । तैसें आलिंगितां रघुपती । अद्वैतस्थिति बिभीषणा ॥ ४५ ॥ जेंवी अलंकारें आपण । सुवर्णा दिधलें आलिंगन । ऐसिया स्थितीं रघुनंदन । भेटला आपण बिभीषणा ॥ ४६ ॥ ऐसें देवोनि आलिंगन । श्रीराम बोलिला गर्जोन । सखा माझा तूं पूर्ण । जीव प्राण तूं माझा ॥ ४७ ॥ जेंवी जळीं मिळाली साखर । स्वयें विरोनि होय नीर[6] । साखरें उदक केलें मधुर । तेंवी श्रीरामचंद्रबिभीषण ॥ ४८ ॥ श्रीरामाचें पूर्णपण । भक्तीं बिंबलें संपूर्ण । भक्तिभावाचें गोडपण । बिंबलें पूर्ण श्रीरामीं ॥ ४९ ॥ ऐसियापरी दोघे जण । पूर्ण पावोनि समाधान । हरिखेजोनि बिभीषण । काय आपण बोलत ॥ ५० ॥ राक्षस मारावयाची निजख्याती । मुख्य मुख्य धुरा रणीं पडती । तैसी सांगेन मी युक्ती । रणसमाप्ती राक्षसां ॥ ५१ ॥ दुर्गीं रिघावया झडझडां । युक्ति जाणें मी गाढा । परी तें न चले वानरांपुढां । उडोनि कडा चढतील ॥ ५२ ॥ सवेग करोनियां उड्डाण । दुर्गीं रिघतील वानरगण । तेथें माझी युक्ति कोण । मूर्खपण पैं माझें ॥ ५३ ॥ सुटल्या श्रीरामाचे बाण । समेरुसिंधूंसीं मरे रावण । तेथें माझी युक्ति कोण । मूर्ख पूर्ण मी एक ॥ ५४ ॥ ऐसें बिभीषणें सांगतां । कृपा उपजली रघुनाथा । अभयहस्त ठेवोनि माथां । होय बोलता तें ऐका ॥ ५५ ॥

इति ब्रुवाणं तं रामः परिष्वज्य विभीषणम् ।
उवाच लक्ष्मणं वीरं समुद्राज्जलमानय ॥ १२ ॥
तेन चेमं महाप्राज्ञमभिषिंच विभीषणम् ।
राजानं रक्षसां क्षिप्रं प्रसन्ने मयि लक्ष्मण ॥ १३ ॥

ऐसें बोलतां बिभीषण । संतोषला श्रीरघुनंदन । पुढती दिधलें आलिंगन । तुष्टमान[7] स्वयें जाला ॥ ५६ ॥ बिभीषणासी लंकापती । अभिषेकावया श्रीरघुपती । सिंधुजळ सिंचनार्थी । लक्ष्मणाप्रती स्वयें सांगे ॥ ५७ ॥ तीर्थोदक प्रयागोदक । चतुःसमुद्रींचें उदक । वानरीं आणिलें आवश्यक । श्रीरघुकुळटिलकनिजाज्ञा ॥ ५८ ॥ व्याघ्रचर्म पैं सनख । सप्तमृत्तिका कुशोदक । औदुंबरी पीठ अति सुटंक[8] । लंकाभिषेक बिभीषणा ॥ ५९ ॥ घडासहित सोनकेळीं । घडीं घडघडित नारळी ।

१ आकाश. २ दुसरीकडे. ३ सुखदुःखव्यथा. ४ ज्ञेय, ज्ञाता, ज्ञान, ५ नित्यानित्यवस्तुविवेक, वैराग्य, शमादिषट्क (शम, दम, उपरति, तितिक्षा, श्रद्धा आणि समाधानसंपत्ति) आणि मुमुक्षुत्व. ६ पाणी. ७ संतुष्ट. ८ सुचिन्हित.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वानर हाणिती सुखसमेळीं। पुष्पेंफळीं अभिषेकी ॥ ६० ॥ दशाननासी न वधितां । बिभीषणासी अभिषेकितां । अवघे वानर म्हणती मिथ्या। युक्ति रघुनाथा आठवली ॥ ६१ ॥ श्रीराम म्हणे हनुमंता। लंका देखिली तुवां तत्त्वतां। समुद्रतीरीं करीं आतां । यथार्थता मज दावीं ॥ ६२ ॥ ऐकोनि श्रीरामाचें वचन । हनुमान घाली लोटांगण। समुद्रतीरीं आपण । करी निर्माण लंकेचें ॥ ६३ ॥ भोंवता समुद्रपरिघ देखा । सव्य निकुंबळा मागें पडलंका । मध्यें निर्माण केली लंका। ध्वजपताका शोभती ॥ ६४ ॥ गडप्रवेश अति अवघड । चोरद्वारें मारे गूढ । विकट यंत्रें मारक दृढ । भरले अंगड बहुजळें ॥ ६५ ॥ महाद्वारासंमुख । गुप्तत्वें मारक घातक । हुडे अग्नियंत्रांचे भडक । पौरिखें कटक मारावया ॥ ६६ ॥ उलट लोट अतर्क्य घात। पारखे वीर ठायीं पडत। ऐसा मार दुर्गाआंत। दावी हनुमंत गड भागें ॥ ६७ ॥ फांजी पौळी निघोट कडे। दुर्धर मार दोहींकडे। ढळों न ये मागेंपुढें। दावी निवाडें हनुमंत ॥ ६८ ॥ रचिली लंकेची आकृती। तीपुढें तुच्छ अमरावती । राजमंदिरें शोभती । टके झळकती पताका ॥ ६९ ॥ माडिया गोपुरें सातखणी। उपऱ्यांउपरी नवखणी । घरोघरीं पैं दुखणी। लंकाभुवनीं अपार ॥ ७० ॥ राणिवसा शोभायमान । त्याहीमाजी अशोकवन । तेथें सीतेसी निर्बंधन। संरक्षण राक्षसी ॥ ७१ ॥ एकवस्त्रें अति दीन । मळिन केश कंपायमान । ऐसिये सीतेतें देखोन। रघुनंदन मूर्च्छित ॥ ७२ ॥ बिभीषण-चवके चित्तें। उपडोनियां हनुमंतें। तेचि लंका आणिली एथें। अति विस्मयें विस्मित ॥ ७३ ॥ लंका देखतांचि पुढें । तर्वकें उडालीं माकडें। दुर्धर दुर्गाचे पैं हुंडे। उड्डाण पडे माघारें ॥ ७४ ॥ अवघे करा आंगवण। शोधोनि काढा रे रावण। ऐसे भुलले वानरगण। केलें विंदाण हनुमंतें ॥ ७५ ॥ सावध पाहे रघुनंदन। तंव वाळूचें केलें लंकाभुवन। हनुमंतें शोभायमान। समसमान लंकेसीं ॥ ७६ ॥ ऐसे स्वयें दुर्ग देखोन। विस्मयो पावला लक्ष्मण। अंगद सुग्रीव आपण। विस्मयापन्न होऊन ठेले ॥ ७७ ॥ देखोनि हनुमंताची लंका । टक पडिलें ब्रह्मादिकां । ब्रह्मांड करितां ब्रह्मा देखा । पाहे टकमकां विस्मित ॥ ७८ ॥ हनुमंताचें मिथ्या रचन। ब्रह्मादिकां दिसे प्रमाण। ऐसें देखोनि विंदाण। सुखसंपन्न श्रीराम ॥ ७९ ॥ यापरी लंका देखोनि दृष्टीं । उल्लास श्रीरामाचे पोटीं। हनुमंताची पाठी थापटी। हरिख सृष्टीं न समाये ॥ ८० ॥ श्रीराम बोलिला आपण। मारोनि रावण कुंभकर्ण । मुख्य लंका देईन दान। सत्य जाण बिभीषणा ॥ ८१ ॥ मुख्य लंका देईन जंव दान। तंव हे हनुमत्कृत लंका जाण। तुजपासीं म्यां दिधली गहाण। सोडवण रावणांतीं ॥ ८२ ॥ बहुत दिन न ठेवीं गहाण। आम्हां तुम्हां वाइणी हेचि जाण। निर्दळोनियां रावण। सोडवण पैं इची ॥ ८३ ॥ लंकेहूनिही देखा। कोटि गुणें या मोल अधिका। माझ्या हनुमंताची लंका। ते तुजदेखतां डुलों नेदीं ॥ ८४ ॥ प्रीति प्रेम ज्ञान धन । तुज यथेच्छ देईन जाण । हनुमंतलंक सोडवीन। सत्य जाण बिभीषणा ॥ ८५ ॥ ऐकोनि श्रीरामाचें उत्तर । संतोषोनियां वानर। अवघे करिती जयजयकार। सुखनिर्भर सौमित्र ॥ ८६ ॥ हनुमंतलंका अद्यापवरी। आहे समुद्राचे तीरीं। काळ धाकें जतन करी । भय भारी हनुम्याचें ॥ ८७ ॥ राज्याभिषेकाची सामग्री । सिद्ध केली वानरीं। सौमित्रें घेवोनि करीं। अभिषेक करी बिभीषणा ॥ ८८ ॥

रामवाक्येन सौमित्रिरभिषिच्य विभीषणम् ।
मध्ये वानरमुख्यानां राजानं रामशासनात् ॥ १४ ॥
तं प्रसादं तु रामस्य दृष्ट्वा सद्यः प्लवंगमाः ।
प्रचक्रिरे महानादान्साधुसाध्विति चाब्रुवन् ॥ १५ ॥

श्रीरामाज्ञा लाहोन । बिभीषणा राज्याभिषिंचन। करिता झाला लक्ष्मण। वानरगणसमवेत ॥ ८९ ॥ राज्यपटअभिषिंचन । अंगदासुग्रीवासमान। बिभीषणासी सिंहासन । रामवरदानप्रयोगें ॥ ९० ॥ बिभीषणासी लंकादान। श्रीरामें दिधलें संतोषोन। तें देखोनि वानरगण। आल्हादें पूर्ण हरिखले ॥ ९१ ॥ जयजयकाराचा गजर।

१ उजव्या बाजूला. २ खंदक. ३ शत्रूचें सैन्य. ४ तट. ५ जनानखाना, ६ त्वेषानें. ७ बुरुज, ८ अट, ठराव, ९ रक्षण. १० राज्याभिषेक.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

करिते जाले वानरवीर। श्रीरामनामाचा उच्चार। तेणें अंबर गर्जेलें ॥ ९२ ॥ श्रीराम निजभक्तकृपाळु। श्रीराम शरणागतवत्सलु। श्रीराम प्रेमळ प्रांजळु। दीनदयाळु श्रीराम ॥ ९३ ॥ साधु स्वामी श्रीरघुनाथ। साधु बिभीषण शरणागत। साधु साधु तो हनुमंत। स्वामिकार्यार्थसाधक ॥ ९४ ॥ जैसा राजा श्रीरघुपती। तैसा सुग्रीव वानरपती। तैसाचि बिभीषण लंकापती। केला निश्चितीं श्रीरामें ॥ ९५ ॥ विकल्प न धरोनि चित्तीं। शत्रुबंधु तो शरणार्थी। आपणासमान पदप्राप्ती। दिधली निश्चितीं श्रीरामें ॥ ९६ ॥ शरणागता संरक्षणें। शेखीं[१] आपणासमान करणें। हें कर्तव्य श्रीराम जाणे। अनन्याकारणें कृपाळु ॥ ९७ ॥ न जिंकितां दशानन। बिभीषणासी लंकादान। श्रीरामकीर्ति अति पावन। दीनोद्धरण श्रीराम ॥ ९८ ॥ कीर्ति वानिजे सुरगणीं। कीर्ति वानिजे ऋषिजनीं। कीर्ति वानिजे वानरगणीं। कीर्ति पावन तिहीं लोकीं ॥ ९९ ॥ सत्य बंधु बिभीषण। कर्ता एक रघुनंदन। त्यासी जालिया अनन्य शरण। जन्ममरण त्या कैंचें ॥ १०० ॥ एका जनार्दना शरण। पुढें गोड अति निरूपण। सागरीं तरतील पाषाण। सेतुबंधन अवधारा ॥ १ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां बिभीषणलंकाराज्याभिषेको नाम अष्टत्रिंशत्तमोऽध्यायः ॥ ३८ ॥ ॥ ओंव्या ॥ १०१ ॥ श्लोक ॥ १५ ॥

अध्याय एकुणचाळिसावा

श्रीसीतारामाभ्यां नमः ॥ बिभीषणासी लंकादान। देवोनियां श्रीरघुनंदन। सभा बैसली सावधान। सुप्रसन्न स्वानंदें ॥ १ ॥ वानर करिती गदारोळ[३]। बिभीषणासी सुखकल्लोळ। सुग्रीवा उल्हास प्रबळ। सकळ दळ देखोनी ॥ २ ॥ वानरांचे महाभार। करूं येती नमस्कार। श्रीरामनामाचा गजर। देती भुभुःकार आल्हादें ॥ ३ ॥ तेथें येवोनि हनुमंत। सुग्रीवासीं करी एकान्त। सीता सोडवावयाचा मुख्यार्थ। लंकानाथ वधावया ॥ ४ ॥ समुद्राचिये तीरीं। बैसल्या वानरांच्या हारी। कैसेनि जाववेल पैलपारीं। तें विचारीं कपिनाथा ॥ ५ ॥

अब्रवीत्तं हनूमंतं स च राजा वनौकसाम्।
कथं सागरमक्षोभ्यं तरेम वरुणालयम् ॥ १ ॥

नद्या पर्जन्यें भरोनि येती। तेणें सिंधु प्रवाहे ना क्षितीं। उष्णकाळीं नद्या सुकती। तेणें अपांपती आटेना ॥ ६ ॥ ऐसा नित्य पूर्णत्वें गंभीर। अगाध अक्षोभ्य सागर। आमची सेना तंव वनचर। केंवी परपार पावती ॥ ७ ॥ समुद्रलंघना उपावो। आम्हांसी सर्वथा न दिसे पहाहो। तूं तंव वानरांचा महाबाहो[८]। काय उपावो करावा ॥ ८ ॥ बैसोनि वानरें समुद्रतटीं। करिती लांब लांब गोष्टी। ते तंव मिथ्या गा चावटी। जावया परतटीं शक्ति नाहीं ॥ ९ ॥ सुग्रीव म्हणे हनुमंता। काय बुद्धि करावी आतां। समुद्रलंघनीं तत्त्वतां। उपाव सर्वथा असेना ॥ १० ॥ कैसेनि वधावें लंकानाथा। कैसेनि आणावी ते सीता। सुखी न करवे रघुनाथा। ऐसी अवस्था दिसताहे ॥ ११ ॥ तुज पुसतों अति आप्तता। समुद्रलंघनीं उपाव वृथा। कार्य न साधे श्रीरघुनाथा। काय म्यां आतां करावें ॥ १२ ॥ कार्य न साधे श्रीरघुनाथा। ऐसें उत्तर ऐकतां। स्फुरण आलें हनुमंता। सोटोपता ऊठिला ॥ १३ ॥ निर्दळावया लंकापती। प्रळयरुद्राची[६] आकृती। वेगें वाढिन्नला मारुती। भेणें कांपती सुरवर ॥ १४ ॥ पिंजारिल्या रोमावळी। शेंडी थरथरी समूळीं। पुच्छ वाढिनलें निराळीं[७]। आर्तुबळी खवळला ॥ १५ ॥ तुम्ही अवघे वानरगण। करा माझें पुच्छग्रहण। श्रीरामलक्ष्मणां खांदीं वाहून। जाईन घेऊन लंकेसी ॥ १६ ॥ बिभीषण शरणागत। त्यासी धरोनि हृदयांत। एकेचि खेपे पैं समस्त। नेईन निश्चित लंकेसी ॥ १७ ॥ हनुमान आतुर्बळी उद्भट। वटारिले नेत्रवाट। बाहु स्फुरती थरथराट। वळिला सांटं पुच्छाचा ॥ १८ ॥ देखोनि हनुमंताची शक्ती। सुग्रीव दचकला चित्तीं। गजबजिले जुत्पती। शांत मारुति केंवी होय ॥ १९ ॥ देखोनि हनुमंताचें त्राण। वेगीं उठिला रघुनंदन। त्यास हृदयीं आलिंगून। मधुर वचन अनुवादे ॥ २० ॥ समुद्र बापुडें तें कोण।

---

१ शंका. २ शेवटीं. ३ गलबला. ४ समुद्र. ५ नेटानें. ६ प्रळयकाळींच्या रुद्राप्रमाणें भयंकर. ७ आकाशांत. ८ महाबळवान्. ९ अत्यंत. १० आंकडा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

अग्निबाणें कोरडा करीन । पायीं नेईन वानरगण । लंकाकंदन करावया ॥ २१ ॥ कायसा रावणाचा पुरुषार्थ । अर्धक्षणें करीन घात । ऐसा शांतवोनि हनुमंत । स्वस्थ रघुनाथें बैसविला ॥ २२ ॥ ऐकोनि श्रीरामाचें वचन । सुखावला बिभीषण । सुगमोपायें समुद्रतरण । मूळ कारण सांगत ॥ २३ ॥

एवमुक्तस्तु श्रीरामं प्रत्युवाच विभीषणः ।
समुद्रं शरणं राजन्गंतुमर्हसि राघव ॥ २ ॥
खानितः सगरेणायमप्रमेयो महोदधिः ।
कर्तुमर्हति रामस्य ज्ञातेः कार्यं महोदधिः ॥ ३ ॥
सागरश्च हि रामस्य श्रूयते प्रपितामहः ।
समुद्रो ज्ञातिसाहाय्यं करिष्यति न संशयः ॥ ४ ॥
एवं विभीषणेनोक्तं राक्षसेन विपश्चिता ।
प्रकृत्या धर्मशीलस्य राघवस्याप्यरोचत ॥ ५ ॥

श्रीरामवाक्य प्रतापपूर्ण । ऐकोनियां बिभीषण । स्वयें घालोनि लोटांगण । कर जोडून विनवित ॥ २४ ॥ सोडोनियां अग्निबाण । सिंधु शोषितां न लागे क्षण । परी तें नव्हे गा भूषण । अति दूषण सूर्यवंशा ॥ २५ ॥ सावधान परिसें श्रीरघुनाथा । सांगेन मी समूळ कथा । समुद्र पूर्वज तत्त्वतां । ते मूळानुवार्ता अवधारीं ॥ २६ ॥ तुझे पूर्वज सगर जाण । त्यांचेनि सागर हा निर्माण । यालागीं सागर हें अभिधान । वेदपुराण अनुवादे ॥ २७ ॥ पूर्वी समुद्र काये नव्हता । आवरणोदकीं[१] अति गुप्तता । सगरें खाणोनियां तत्त्वतां । प्रकटार्थी आणिला ॥ २८ ॥ सगरापासूनि सागरता । तो तुज पूर्वज तत्त्वतां । कैसेनि त्याच्या करावें घाता । निजवंशस्था समुद्रा ॥ २९ ॥ वेगळें करोनि दशरथा । सागर सातवा प्रपिता । ऐसी सूर्यवंशाची कथा । होय सांगता बिभीषण ॥ ३० ॥ समुद्र पूर्वज पूज्य जाण । त्यासी श्रीराम निघाल्या शरण । तो तुज भेटोनि आपण । सागरोत्तरण[२] सांगेल ॥ ३१ ॥ तुझा प्रताप श्रीरघुनाथा । समुद्र जाणतो तत्त्वतां । त्या तुज भेटीची परम आस्था । मज सर्वथा कळलीसे ॥ ३२ ॥ तूं तंव प्रतापी रघुराज । सगरवंशीं वंशध्वज । समुद्र तुझा निजपूर्वज । करील काज वंशाचें ॥ ३३ ॥ निजपूर्वज सिंधूसीं शरण । रिघतां तुज लाज कोण । सुखोपायें समुद्रतरण । स्वयें आपण सांगेल ॥ ३४ ॥ धर्मशील सज्ञानता । समूळ निजवंशाची कथा । बिभीषणें स्वयें सांगतां । श्रीरघुनाथा आल्हाद ॥ ३५ ॥ बिभीषणाची जे गोष्टी । ते रुचली श्रीरामाचे पोटीं । लक्ष्मणसुग्रीवें लक्षोनि दृष्टी । तेंच जगजेठी अनुवादे ॥ ३६ ॥

विभीषणस्य मंत्रोयं मम लक्ष्मण रोचते ।
ब्रूहि तावच्च सुग्रीव तवापि यदि रोचते ॥ ६ ॥
एवमुक्तौ तु रामेण तदा सुग्रीवलक्ष्मणौ ।
समुदाचारसंयुक्तमिदं वचनमूचतुः ॥ ७ ॥
किमर्थं नौ नरव्याघ्र न रोचिष्यति राघव ।
विभीषणोक्तं हृद्यं च युक्तं चैव विशेषतः ॥ ८ ॥

सागरासी रिघावें शरण । गोड बोलिला बिभीषण । सुग्रीव राजा सखा लक्ष्मण । तुम्हां हें वचन रुचे कीं ॥ ३७ ॥ सुग्रीव आणि लक्ष्मण । वदती वंदोनि श्रीरामचरण । बिभीषणवचन अति प्रमाण । तेंचि आपण करावें ॥ ३८ ॥ सत्यवादी बिभीषण । सिंधुपूर्वजासी रिगोनि शरण । अनायासें समुद्रतरण । तेंचि आपण करावें ॥ ३९ ॥ ऐकोनि दोघांचें वचन । रिघावया समुद्रा शरण । श्रीराम करी समुद्रपूजन । सुमनचंदनफळमूळें ॥ ४० ॥

सागरं द्रष्टुमिच्छामि रूपिणं सरितां पतिम् ।
कर्तुमर्हसि साहाय्यं भव त्वं शरणं मम ॥ ९ ॥
एवमुक्त्वा कुशास्तीर्णे रम्ये सागररोधसि ।
संविवेश तदा रामो वेद्यामिव हुताशनः ॥ १० ॥
तस्य रामस्य सुप्तस्य कुशास्तीर्णे महीतले ।
नियमादप्रमेयस्य निशास्तिस्रोऽतिजग्मतुः ॥ ११ ॥

रम्य समुद्राचे तटीं । पसरोनि कुशास्तरण[३] दाटी । दर्भशयनीं श्रीराम जगजेठी । घ्यावया भेटी सागराची ॥ ४१ ॥ तूं आमुचा पूर्वज । आम्ही तुझे वंशज । माझे सिद्धी पाववीं काज । शरण तुज अनन्यत्वें ॥ ४२ ॥ ऐसें बोलोनि रघुनंदन । दर्भासनीं करी शयन । जेंवी पुरिला हुताशन[४] । दैदीप्यमान अग्निहोत्रीं ॥ ४३ ॥ यापरी श्रीरघुनाथ । साधावया निजकार्यार्थ । त्रिरात्र सिंधुशरणागत । दिसे निद्रिस्थ सावधत्वें ॥४४॥

१ सर्व भूगोलास आच्छादून टाकणारे उदकांत. २ समुद्र ओलांडून जाण्याची युक्ती. ३ दर्भांचें शयन, ४ अग्नि.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

जागृती स्वप्न सुषुप्ती । तुरीयातीत श्रीराममूर्ती । तोही शरण सिंधू शरणार्थी । दिसे प्रतीति सुरनरां ॥ ४५ ॥ ऐसा प्रसुप्त श्रीरामचंद्र । देखोनि तळमळती वानर । केव्हां पावों समुद्रपार । दशशिरवधार्थ ॥ ४६ ॥ अनुलक्षोनि श्रीरघुनाथ । हनुमान निजगुह्या सांगत । निद्रा करितांचि येथ । व्यर्थ पुरुषार्थ दिसताहे ॥ ४७ ॥ स्वयें बोलती वानरगण । श्रीरामभातां दुर्धर बाण । तरी कां निघाला शरण । गाढेपण धरोनी ॥ ४८ ॥ हनुमान म्हणे मी निजसेवक । समुद्रतरणीं कायसी अटक । पुच्छाग्रीं समग्र कटक । एकीएक उतरीन ॥ ४९ ॥ अंतर्यामी श्रीरघुनाथ । जाणोनि हनुमंताचें हृद्गत । स्वयें उठिला सावचित्त । निजपुरुषार्थ दावावया ॥ ५० ॥

ततः क्रुद्धो महाबाहू रामो रक्तांतलोचनः ।
समक्षं लक्ष्मणं वीरं सरोषो वाक्यमब्रवीत् ॥ १२ ॥
चापमानय मे शीघ्रं शरांश्च विशिखोपमान् ।
अद्याक्षोभ्यमपि क्रुद्धः क्षोभयिष्यामि सागरम् ॥ १३ ॥
न साम्ना शक्यते कीर्तिर्न साम्ना लभते यशः ।
न साम्ना वीर्यशौर्ये च न साम्ना विजयो भवेत् ॥ १४ ॥
संपीड्य च धनुर्घोरं कंपयित्वा शनैर्जगत् ।
ततो बाणधनुष्पाणिः क्रोधविस्फारितेक्षणः ॥ १५ ॥
मत्कार्मुकविनिर्मुक्तैः शरैः शुष्को महोदधिः ।
अद्यैनं संतरिष्यंति पद्भ्यां सर्वे प्लवंगमाः ॥ १६ ॥

तीन दिवस लोटल्यापाठीं । स्वयें समुद्र न येचि भेटी । श्रीराम कोपला जगजेठी । रक्तांबरें[२]दृष्टी कृतान्त ॥ ५१ ॥ आमुचा पूर्वज हा पूर्ण । म्हणोनि सद्भावें रिघालों शरण । तंव याचें दुर्जनपण । न येचि आपण भेटीसी ॥ ५२ ॥ याचा वाढवोनि सन्मान । करोनि अर्घ्यपाद्यादि पूजन । अनन्य भावें रिघतां शरण । न येचि आपण भेटीसी ॥ ५३ ॥ याचे सर्वांगीं गर्व मोठा । अक्षोभ्यत्वें अगाध ताठा । यासी मी लक्ष्मणा सुभटा । लावीन वाटा निधनाचे[३] ॥ ५४ ॥ शरण रिघाली पुरुषार्थी । कीर्ति ते होय अपकीर्ती । शरण रिघावें अशक्तीं । तें केलिया शक्तिलाभ कैंचा ॥ ५५ ॥ शरण रिघतांचि पाठीं । वाढीव होय उफराटी । तेथें कायसी यशाची गोष्टी । अपेश वाक्पुटीं जग वदे ॥ ५६ ॥ शरण रिघतांचि वळवंतीं । समूळ पळे यश कीर्ती । त्यासी कैंची विजयप्राप्ती । अवघे म्हणती अशक्त ॥ ५७ ॥ समुद्र स्वयें अभक्त आपण । यासी मी भक्त रिघालों शरण । तंव तेणें गर्वें धरिला पूर्ण । केलें उपेक्षण पैं माझें ॥ ५८ ॥ मृदुपणें[४] नाहीं यश कीर्ती । मृदुपणें नाहीं लाभप्राप्ती । मृदुपणें नाहीं विजयवृत्ती । जाण निश्चितीं सौमित्रा ॥ ५९ ॥ मृदुत्वें संन्यासीं धराची शांती । तेणें त्यासी परमार्थप्राप्ती । मृदुत्व आम्हां रायांप्रती । जाण अपकीर्ती कारण ॥ ६० ॥ अदंड्यातें राजे दंडिती । अदम्यातें राजे दमिती । ते राजे जैं शांति धरिती । तेचि अपकीर्ति तयांसी ॥ ६१ ॥ समुद्राचा गर्व पूर्ण । तो नाशीन न लागतां क्षण । दे दे माझें धनुष्यबाण । अति दारुण सर्पप्राय ॥ ६२ ॥ सर्पे लागल्या उतरे विख । त्याहूनि माझे बाण तीख । सुरां असुरां प्राणांतक । जीवातेंही देख जीव घेती ॥ ६३ ॥ ऐसें बोलोनि आपण । कोपें वाहिलें धनुष्यबाण । अग्निअस्त्र सज्जोनि आपण । वोढी काढोन चालिला ॥ ६४ ॥ क्षोभला श्रीराम देखोन । स्वर्गीं देव कंपायमान । तळमळिती मगर मीन । आलें निधन सिंधूसी ॥ ६५ ॥ समुद्र शोषितां राघव । पाताळीं कांपती दानव । दैत्य नाग मानव । धाकती सर्व श्रीरामा ॥ ६६ ॥ बाण पडतां समुद्रजळीं । सप्तपाताळां करील होळी । पाताळवासी कांपती चळीं । श्रीराम महाबळी क्षोभला ॥ ६७ ॥ धनुष्य चढवितां श्रीरामा । धाकें रविचंद्रां काळिमा । नक्षत्रें पडती व्योमा[५] । ऋषी स्वधर्मा विसरले ॥ ६८ ॥ शोषितां समुद्राचें पाणी । बाणाग्नि मिळोनि अर्णवाग्नी[६] । दोनी भस्म करिती अवनी[७] । ब्रह्मा मनीं सचिंत ॥ ६९ ॥ ब्रह्मा देखोनि सचिंत । ब्रह्मभुवनीं अति आकान्त । सिंधुनिर्दळणीं श्रीरघुनाथ । करील अंत सृष्टीचा ॥ ७० ॥ ऐकें सौमित्रा साचार । शोषोनि समुद्राचें नीरें[८] । पायीं उतरीन वानर । निशाचरवधार्थ ॥ ७१ ॥ धनुष्य ओढितां सत्राणें[९] । दोनी वटारिले नयन । श्रीराम दिसे काळासमान । वानरगण

---

१ नित्यानंदस्वरूपस्थितीहून पलीकडे. २ रक्तवर्ण आकाशासारखे लाल नेत्र करून. ३ मरणाचे. ४ नम्रपणें.

५ आकाशांतून. ६ समुद्रांतील वडवानळाला. ७ पृथ्वी. ८ उदक. ९ नेटानें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

कांपती ॥ ७२ ॥ क्षोभला देखोनि श्रीरघुनाथ। स्त्रियांपुत्रांसमवेत । समुद्रासी अति आकांत। आला प्राणान्त श्रीरामें ॥७३॥ सुटल्या श्रीरामाचा बाण । त्यातें निवारूं शकेल कोण। त्यासी न होतांचि शरण। आलें मरण निश्चित ॥ ७४ ॥ परम कृपाळु श्रीरघुनाथ । स्त्रियांपुत्रांसमवेत। स्वयें होवोनि मूर्तिमंत। समुद्राआंत प्रकटला ॥७५॥

ततः समीपे रामस्य विधायोर्मीः सहस्रशः
स्वयं मध्यात्समुत्पत्य सागरः स च मूर्तिमान् ॥ १७ ॥
स राममुपसंगम्य पूर्वमामंत्र्य वीर्यवान् ।
अब्रवीत्प्रांजलिर्वाक्यं राघवं शरपाणिनम् ॥ १८ ॥
भो भो राम महाबाहो रघुवंशविवर्धन ।
शृणु मे वचनं सौम्य मा भूः क्रुद्धो रघूत्तम ॥ १९ ॥

रामानिकट सागरीं । सहस्रोर्मी महालहरी। सिंधु प्रकटला त्यांमाझारी । रूपधारी साकार ॥ ७६ ॥ द्वादशनामांकित टिळे। कंठीं यज्ञोपवीत रुळे। सपुत्रस्त्रिया कुटुंबमेळें। देखिलें त्या काळें श्रीरामें ॥ ७७ ॥ स्त्रियांपुत्रांसमवेत। समुद्र पायवाटे येत। तें देखोनि श्रीरघुनाथ। अति विस्मित स्वयें झाला ॥७८॥ पूर्वी ब्रह्मयानें केला निर्माण। यालागीं सिंधु शुद्ध ब्राह्मण । सगरीं पुढें केलें खनन। सागर अभिधान तेणें त्यासी ॥ ७९ ॥ ऐसा ब्राह्मण देखोनि तेथ। कृपाळु तो श्रीरघुनाथ। न करीच शरसंपातें । द्विजघात चुकवावया ॥ ८० ॥ बाहेर आलिया ब्राह्मण । मग समुद्रीं सोडीन बाण। श्रीरामें विचारोनि जाण। वोढी काढोन राहिला ॥ ८१ ॥ मग ब्राह्मण उदकाआंतौता। शरण शरण म्हणे श्रीरघुनाथा। माझ्या करूं नको घाता। शरण तत्त्वतां मी आलों॥ ८२॥ कोणें अपमानिलें द्विजवरा। धनवृत्ती कीं हरिली दारा। तें सांगें गा मज रघुवीरा। तुझ्या कैवारा मी करीन ॥ ८३ ॥ आधीं साधीन द्विजकार्यार्था। मग सोडवीन गा सीता। त्रिसत्य सत्य हें रघुनाथा। सांग मी आतां काय करूं ॥ ८४ ॥ मज श्रीरामा आलिया शरण। तुज कल्पांतीं नाहीं मरण। श्रीराम वंदुनी द्विजाचे चरण। पुसे आपण काय करूं ॥ ८५॥ द्विज म्हणे श्रीरघुनाथा। मी समुद्र शरण आलों आतां। सोडोनियां शरसंपाता। माझ्या घाता कां करिसी ॥ ८६ ॥ तूं माझा पूर्वज सनातन । तुज देवोनि सन्मान। तीन दिवस निरंजन। म्यां दर्भशयन सेविलें ॥ ८७ ॥ तुझे आंगीं गर्व पूर्ण। भेटी न देसीच जाणोन। आतां वांचवावया निजप्राण। आलों शरण म्हणतोसी ॥ ८८ ॥ तुझेनि थोर अपकीर्ती। झाली सूर्यवंशा अपख्याती। तेणें क्षोभें गा रघुपती। भेटी निश्चितीं न घेंचि ॥ ८९ ॥ आतां धरिलिया आंगवण। तरी मी घेवों आलों दर्शन। तुज गुह्य सांगों आलों आपण। सावधान अवधारीं ॥९०॥ देखतां वानरांचिया कोटी । रत्नांजळी घेवोनि मुष्टी । अर्पोनि श्रीरामअंगुष्ठीं । चरण ललाटीं वंदिले ॥ ९१ ॥ श्रीराम अवतार पूर्ण। मी जाणतों संपूर्ण । पुढती पुढती लोटांगण। पुढती चरण वंदिले ॥ ९२ ॥ श्रीरामा ऐकें सावधदृष्टीं। सांगणें आहे गुह्य गोष्टी । सूर्यवंशीं कीर्ति लाठी। ते उफराटी तुवां केली ॥ ९३ ॥ हरिश्चंद्राची कीर्ती। वाखाणिली त्रिजगतीं । शिबी मांस तुँकोनि कपोतीं। वैकुंठाप्रती पुरी नेली ॥ ९४ ॥ रुक्मांगद धर्मांगदेंसीं। व्रत पाळुनी एकादशी। नगरी नेली वैकुंठासी। जाले जगासी उपकारी ॥९५॥ माझी सूर्यवंशीं उत्पत्ती। जाली असे कैशा रीतीं। तेंही सांगेन श्रीरघुपती। सावधवृत्ती अवधारीं ॥९६॥

सागरः सगरात्कीर्तिर्गंगा कीर्तिर्भगीरथात् ।
रामस्याभिनवा कीर्तिरेका भार्या न रक्षिता ॥ २० ॥

सगरापासाव सागर। हा भागवतीं कथाविस्तार। कपिलमुनीश्वरचरित्र। अति विचित्र तिहीं लोकीं ॥ ९७ ॥ तया चरित्राचे पोटीं। कपिल लक्षूनि क्षोभक दृष्टीं। सगरवीर सहस्र साठी । वाग्वज्रदंष्ट्रीं शापिले ॥ ९८ ॥ बलोन्मत्त साठी सहस्र। नाहीं भूतदया अणुमात्र। जळत असाल अहोरात्र। हें वाग्वज्र सोडिलें ॥ ९९ ॥ वज्रघात एकातें मारी। वाग्वज्राची त्याहूनि थोरी। साठी सहस्रां कवळोनि वीरीं। आगी एकसरी लाविली ॥ १०० ॥ वज्रघात येतां दारुण। शूर छेदिती विंधोन बाण। वाग्वज्रासी

१ हजारों लाटा. २ नांव. ३ बाण सोडणें. ४ स्त्री. ५ पूर्वीपासूनचा. ६ निर्दोष, शुद्ध. ७ तोलून. ८ सगरापासून. ९ वाणीरूपी वज्रमय दाढांनीं. १० रात्रंदिवस.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

निवारण । सर्वथा जाण असेना ॥ १ ॥ ढळवेना ब्रह्मशापाहातीं । मागें पुढें न चले गती । धडधडाटें पैं जळती । अहोरातीं महावीर ॥२॥ जळत देखतां सगरांसी । कृपा उपजली मुनीश्वरांसी । प्रार्थोनियां कपिलासी । उश्शापासी मागितलें ॥ ३ ॥ भगापासूनि उत्पन्नभूत । वंशीं जन्मला भगीरथ । तो गंगा आणोनि एथ । सगर समस्त उद्धरील ॥ ४ ॥ तेचि वंशीं भगीरथ । गंगा आणोनि प्रयत्नयुक्त । पूर्वज तारिले गा समस्त । जग पुनीत तेणें केलें ॥ ५ ॥ ऐसी पूर्वजांची ख्याती । तेचि वंशीं तूं रघुपती । पुण्य पूज्यत्वें पवित्र कीर्ती । थोर अपकीर्ति तुज आली ॥ ६ ॥ कळिकाळ घालोनि तोडरीं । दोघे बंधु धनुर्धारी । शेखीं बाईल नेली चोरीं । लोकांतरीं अपकीर्ति ॥ ७ ॥ पाठीची हरविली कांता । लाज लाविली वंशपुरुषार्था । थोर अपकीर्ति तुझे माथां । श्रीरघुनाथा बैसली ॥ ८ ॥ श्रीराम सूर्यवंशस्थ । सीताविरहें रडत पडत । ऐसा ऐकोनि वृत्तांत । दुःखाभिभूत मी झालों ॥ ९ ॥ तुवां सेविल्या दर्भशयन । तेणें क्षोभें मी क्षोभायमान । तुझें न घेंचि दर्शन । सत्य जाण श्रीरामा ॥११०॥ शक्ति असोनि संपूर्ण । अशक्तसम आलासी शरण । येणेंही क्षोभें क्षोभायमान । तुझें दर्शन न घेंचि ॥ ११ ॥ सीता नेतां पैं रावण । तेथें न कराचि आंगवण । मज पूर्वजाचा घ्यावया प्राण । अग्निबाण सज्ज केला ॥१२॥ ऐकोनि समुद्राचें वचन । श्रीराम झाला लज्जायमान । गळों पाहती धनुष्यबाण । स्वेद संपूर्ण चालिला ॥ १३ ॥ ऐसें देखोनि श्रीरघुनाथा । समुद्रें चरणीं ठेविला माथा । जें मी बोललों उद्धतता । क्षमा तत्त्वतां मज कीजे ॥ १४ ॥ अति आवेशें सज्जोनि चाप । मजवरी धरूं नको कोप । सिंधु तरणें हें तंव अल्प । कार्य स्वल्प श्रीरामा ॥ १५ ॥ मी तव वंशस्थ कैवारी । दशरथाचा कृतोपकारी । तीही कथा निजनिर्धारीं । अवधारीं गा श्रीरामा ॥१६॥ तारकामययुद्धाआंत । मी आणि दशरथ । इंद्रासी साह्य गेलों तेथ । युद्धकंदनार्थ दृढ झाला ॥ १७॥ माझा दैत्यीं करितां घात । साह्य झाला दशरथ । दैत्य दमोनि समस्त । मज निर्मुक्त रायें केलें ॥ १८ ॥ कष्टी करोनि अरिमंडळें । दैत्य निर्दाळिले सकळ । इंद्र सुखावोनि तत्काळ । प्रीतीं भूपाळ पूजिला ॥ १९ ॥ इंद्रें अत्यंत सुखावोनी । राया दिधला मुकुटमणी । आम्हां दोघांतें पूजोनी । अति सन्मानीं गौरविलें ॥ १२० ॥ तोचि मणि दशरथें । अति आवडीं दिधला सीतेतें । जे खूण आणिली हनुमंतें । शुद्धि निश्चितें मानावया ॥ २१ ॥ ऐसा मी दशरथाचा उपकारी । कांहीं नव्हेंचि प्रत्युपकारी । तुज मी होईन साहाकारी । सैन्य सागरीं उतरावया ॥ २२ ॥

अयं कपिर्नलो नाम तनुजो विश्वकर्मणः ।
पित्रा दत्तवरः श्रीमान्युज्यते सेतुकर्मणि ॥ २१ ॥
तमहं धारयिष्यामि तवाप्यस्तु महान्सुहृत् ।
ग्राहा अनुचरिष्यंति प्रवहिष्यति मारुतः ॥ २२ ॥
सलिलं स्तंभयिष्यामि नलस्य वचनादहम् ।
एवमुक्तः समुद्रेण समुत्थाय नलस्तदा ॥ २३ ॥
अब्रवीद्वानरश्रेष्ठो वाक्यं राममिदं शुभम् ।
अहं सेतुं करिष्यामि विस्तीर्णे वरुणालये ॥ २४ ॥
पितृसामर्थ्यमाश्रित्य सत्यमाह महोदधिः ॥ २५ ॥

सागर श्रीरामा सांगत । पैल तो विश्वकर्म्याचा सुत । नळनामा कपि विख्यात । बांधील सेतें समुद्रीं ॥२३॥ त्यासी पित्याचें वरदान । सेतुकर्मीं हा विचक्षण । आज्ञा देवोनि आपण । सेतुबंधन करावें ॥२४॥ तूं तंव वंशस्थ रघुनाथा । मी कृतोपकारी दशरथा । ऐसियापरी परम सुहृदता । करीन साह्यता तें ऐकें ॥ २५ ॥ मीन महाग्राह न येती तेथ । लहरी शांत करीन समस्त । कुवायु वाजेना सेतुबंधांत । ऐसा साह्यार्थ करीन रामा ॥ २६ ॥ लाहोनि पित्याचें वरदान । नळ करील सेतुबंधन । आणिक आहे एक चिन्ह । सावधान अवधारीं ॥ २७ ॥ नळाअंगीं वानरधर्म । सागरीं सांडिले शाळिग्राम । कोपोनियां ऋषिसत्तम । शाप परम दिधला ॥ २८ ॥ माझ्या तीरीं ऋषी बैसोन । करिती स्नानसंध्या अनुष्ठान । पुढें मांडोनि शाळिग्राम । ध्यानस्थ होवोन बैसती ॥ २९ ॥ तेथें नळ कपि येवोन । ऋषींचे शाळिग्राम करीं घेवोन । समुद्रामाजी दे टाकोन । ऋषि कोपोन शाप देती ॥ १३० ॥ तुझेनि हातें सागरीं

१ शत्रुसमूह. २ पूल. ३. मासे. ४ प्रतिकूल वारा.

५ पावोन.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

शिळा। न बुडती कदा काळा। हाही सेतुबंधनीं नळा। असे आगळा पुरुषार्थ ॥ ३१ ॥ ऐकोनि समुद्राचें वचन। नळें वंदोनि श्रीरामचरण। स्वयें बोलिला गर्जोन। सेतुबंधन करीन मी ॥ ३२ ॥ सिंधु बोलिला सत्य गोष्टी। सेतुबंधनाची हातवटी। आहे सामर्थ्य माझे पोटीं। उठाउठीं निर्मीन ॥ ३३ ॥ सिंधु अगाध अत्यंत थोर। सेतु बांधीन मी सत्वर। पर्वत आणावया वानर स्वामीनें सत्वर धाडावे ॥ ३४ ॥

नलस्य वचनं श्रुत्वा रामः परमहर्षितः।
समुद्रमभिसंपूज्य वचनं चेदमब्रवीत् ॥ २६ ॥

सेतु बांधीन अर्धक्षणें। ऐकोनि नळाचें बोलणें। श्रीराम संतोषला सहस्रगुणें। अति सन्मानें प्रीतीं पूजी ॥ ३५ ॥ सर्वेचि सिंधूसी अनुवादन। वाक्पुष्पीं प्रीतिपूजन। मृदु मंजुळ मधुर वचन। श्रीरघुनंदन सांगत ॥ ३६ ॥ तुझ्या कोपाचिये कडाडीं। अग्निबाण लाविला कोदंडीं[१]। चाप ओढिलें परम प्रौढी। तो मी न काढीं माघारा ॥ ३७ ॥ सोडोनियां अग्निबाण। सांग कोणाचा घेऊं प्राण। माझा बाण अति निर्वाण। सत्य जाण समुद्रा ॥ ३८ ॥ समुद्र म्हणे पश्चिम तीरीं। मरु दैत्य दुराचारी। मज पीडितो नानापरी। तो संहारीं येणें बाणें ॥ ३९ ॥

तस्य तद्वचनं श्रुत्वा सागरस्य महात्मनः।
मुमोच तं शरं दीप्तं परं सागरशासनात् ॥ २७ ॥
तेन तन्मरुकांतारं पृथिव्यां किल विश्रुतम्।
निपातितः शरो यत्र वज्राशनिसमप्रभः ॥ २८ ॥
ननाद च तदा तत्र वसुधा शल्यपीडिता।
तस्माद्व्रनमुखात्तोयमुत्पपात रसातलात् ॥ २९ ॥
पशव्यश्चाल्परोगश्च बहुमूलफलोदकः।
बहुक्षीरो बहुस्नेहः सुगंधिविविधौषधिः ॥ ३० ॥

ऐकोनि समुद्राचें वचन। श्रीरामें सोडिला अग्निबाण। मरु मारिला न लागतां क्षण। झालें शोषण समुद्राचें ॥ १४० ॥ श्रीरामबाणाच्या कल्लोळीं। उदक आटे समूळीं। धरा[४] पोळोनि अग्निज्वाळीं। श्रीरामाजवळी आली शरण ॥ ४१ ॥ धरा देखोनियां दीन। वरद वदे श्रीरघुनंदन। केला मरुदेश पावन। तेंही चिन्ह अवधारा ॥ ४२ ॥ घरेसीं सुटलिया जळ। पृथ्वी पिकेल सर्व काळ। फळमूळांचा बहु सुकाळ। अति रसाळ सुस्वाद ॥ ४३ ॥ घरोघरीं मागतां नीर[६]। स्त्रिया संतोषें अर्पिती क्षीर[७]। गाईसी उदक पंच-रात्रांतर। तरी अपार क्षीर देती ॥ ४४ ॥ पशूंसी प्रत्यहीं नाहीं जीवन। पंच दिवसां उदक-पान। तरी घृत क्षीर परमान्न। नित्य भोजन घरोघरीं ॥ ४५ ॥ नानापरींच्या दिव्यौषधी। ज्यांच्या अंगीं सुगंध गंधी। श्रीरामाचे निजवरदीं। सुखानुवादी मरुदेशीं ॥ ४६ ॥ तिळाचे ठायीं स्नेह पूर्ण। ह्या अर्थाचें नवल कोण। अतिथीचें स्नेह पूर्ण। मरुदेशीं जाण घरोघरीं ॥ ४७ ॥ ज्यातें म्हणती मारवाड[५]। तेथें जिवाचे पुरती कोड। श्रीरामवरदाचें कैवाड। सुखसुरवाड[८] मरुदेशीं ॥ ४८ ॥ देखोनि श्रीरामाची ख्याती। समुद्र आश्चर्य मानी चित्तीं। हर्षें वंदोनि श्रीरघुपती। सप्रेम पुढती बोलत ॥ ४९ ॥ सोडोनियां निजशर। वधिला मरु दैत्य दुर्धर। पावन केलें मरुकांतार। श्रीरघुवीर कृपाळु ॥ १५० ॥ तुझिया प्रतापापुढें। समुद्र कायसें बापुडें। मज सुखी केलें रोकडें। फेडिलें सांकडें दुःखाचें ॥ ५१ ॥

रामः समुद्रं संपूज्य वचनं चेदमब्रवीत्।
भवान्पितृसमो मह्यं पितुश्च दयितः सुहृत् ॥ ३१ ॥

स्वयें राम संतोषोनी। अति प्रीती समुद्रपूजनीं। आल्हादें बोले हर्षवदनीं। अति सन्मानीं संबोधी ॥ ५२ ॥ जैसा पिता दशरथ। तैसा पूज्य पूर्वज तूं निश्चित। सेतुबंधाचा कार्यार्थ। सुगम समस्त तुवां केला ॥ ५३ ॥ तूं दशरथाचा आवडता। त्याहूनि मज पढियंता। तुझा उपकार मज तत्त्वतां। श्रीरघुनाथा थोर झाला ॥ ५४ ॥ ऐकोनि श्रीरामाचें वचन। समुद्र घाली लोटांगण। वंदोनि श्रीरामाचे चरण। गेला आपण निजधामा ॥ ५५ ॥ एका जनार्दना शरण। श्रीराम प्रतापी संपूर्ण। समुद्रीं तरतील पाषाण। सेतुबंधन अवधारा ॥ १५६ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां श्रीरामसमुद्रशरण-गमनं नाम एकोनचत्वारिंशत्तमोऽध्यायः ॥ ३९ ॥ ओंव्या ॥ १५६ ॥ श्लोक ॥ ३१ ॥

१ मोठा. २ धनुष्याला. ३ झपाट्यानें. ४ पृथ्वी. ५ मारवाडदेश. ६ पाणी. ७ दूध. ८ सुखाचा सुकाळ.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

अध्याय चाळिसावा

श्रीरामचंद्राय नमः ॥ नळहस्तें सेतुबंधन । समुद्रें श्रीरामासी सांगोन । वंदोनियां श्रीरामचरण । आज्ञा पुसोन स्वयें गेला ॥ १ ॥ ऐकोनि समुद्राचें वचन । संतोषला श्रीरघुनंदन । नळासी संमुख आपण । प्रीतिवचन बोलत ॥ २ ॥

प्रीत्या परमया रामस्तं नलं प्रशशंस च ।
क्रियतां मम कार्यार्थः सखे सौम्य महामते ॥ १ ॥
समुद्रे बध्यतां सेतुः सह सर्वैः प्लवंगमैः ।
ततः सुग्रीवसचिवान्हनुमत्प्रमुखान्हरीन् ॥ २ ॥
तदा दाशरथी रामो हर्षयुक्तोऽब्रवीद्वचः ।
श्रुतं भवद्भिर्वचनं समुद्रस्य महात्मनः ॥ ३ ॥
अत्र यत्संविधातव्यं तत्सर्वं संविधीयताम् ॥ ४ ॥

प्रीतिप्रेमाचें वचन । नळासी बोले रघुनंदन । सखा माझा तूं जीवप्राण । सेतु निर्माण करीं आतां ॥ ३ ॥ समुद्रें सांगितलें आपण । तुझेनि हातें सेतुबंधन । घेवोनियां वानरगण । सेतु निर्माण करीं आतां ॥ ४ ॥ स्वयेंचि श्रीरघुनाथ । स्वमुखें सुग्रीवासी सांगत । प्रधान जुंत्पती समस्त । मुख्य हनुमंत आदिकरोनि ॥ ५ ॥ नळहस्तें सेतुबंधन । समुद्रें सांगितलें आपण । राजा सुग्रीव ससैन्य । सेतुविधान करावें ॥ ६ ॥ सेतुबंधाची सामग्री । सवेग आणावी वानरीं । देवोनि नळाच्या करीं । सेतु सागरीं बांधावा ॥ ७ ॥ परम आल्हादें हर्षयुक्त । परमानंदें सांगे श्रीरघुनाथ । तेणें सुग्रीवा सुख अद्भुत । जुत्पतियुक्त उठियेला ॥ ८ ॥

रामस्य वचनं श्रुत्वा निर्दिष्टास्ते प्लवंगमाः ।
अभिपेतुर्महारण्यं हृष्टाः शतसहस्रशः ॥ ५ ॥
वचनात्तस्य सुग्रीवस्तमेवाभिप्रहर्षयन् ।
स्वयं च राजा सुग्रीवो नलो नीलश्च वानरः ॥ ६ ॥
गजो गवाक्षो गवयः शरभो गंधमादनः ।
युवराजोऽगदश्चैव तारश्चान्ये वनेचराः ॥ ७ ॥
अन्ये च वानरश्रेष्ठाः शतशोऽथ सहस्रशः ।
आस्फोटयंतः संहृष्टाश्चक्रुः किलकिलामपि ॥ ८ ॥

ऐकोनि श्रीरामाचें वचन । सुखावले वानरगण । आणावया पर्वत पूर्ण । केलें उड्डाण शतसहस्रीं ॥ ९ ॥ वानर सेतुबंधनार्थ । जातां देखोनि समस्त । स्वयें सुग्रीव विचारित । विलंब येथें नये करूं ॥ १० ॥ विलंबें सेतु बांधितां । जरी कळेल लंकानाथा । तरी तो करील सेतुघाता । अतर्क्यता साटोपें ॥ ११ ॥ ते खेचर आम्ही भूचर । मध्यें भरलासे सागर । युद्धीं प्राप्त वानर । सेतु सत्वर बांधावा ॥ १२ ॥ ऐसें बोलोनियां जाण । सुग्रीव राजा अंगें आपण । उठिला बाहु आफळोन । सेतुबंधनशीघ्रत्वा ॥ १३ ॥ अंगें न उठतां स्वयें धूरे । सेवासेवकीं वानर । सेतुबंधन नव्हे शीघ्र । उठिला सत्वर स्वयें राजा ॥ १४ ॥ धुरेवांचोनि वृथा कर्षण । धुरेवांचुनी वृथा रण । धुरेवांचुनी सेतुबंधन । अति शीघ्र जाण साधेना ॥ १५ ॥ हेंचि आवडे श्रीरघुनाथा । सेतु बांधोनि शीघ्रता । वधोनियां लंकानाथा । स्वानंदें सीता आणावी ॥ १६ ॥ ऐसी आवडी श्रीरामापोटीं । यालागीं स्वयें सुग्रीव उठी । सेतु बांधावया जगजेठी । वानरकोटींसमवेत ॥ १७ ॥ सुग्रीव उठतांचि जाण । सवेग उठिले वानरगण । मुख्य मुख्य धुरा दारुण । ते कोण कोण अवधारा ॥ १८ ॥ नळ नीळ जांबवंत । गज गवय गवाक्षयुक्त । शरभ गंधमादन समस्त । निघाले त्वरित सेतुबंधा ॥ १९ ॥ अंगद युवराजा आपण । अंगें उठतांचि जाण । उठावले वानरगण । संख्या कोण करी तेथें ॥ २० ॥ तर तरळ मैंद द्विविद । कोट्यनुकोटी अर्बुदें अर्बुद । वानर झेंपावती निर्बुद । सेतुबंध बांधावया ॥ २१ ॥ नळ बैसला सेतुबंधासी । वृद्ध देखोनि जांबवंतासी । सुग्रीवें ठेविलें नळापासी । समविषमासी सांगावया ॥ २२ ॥ सेतुबंधासी सत्वर । असंख्य निघाले वानर । वानरीं व्यापिलें अंबरें । दिगंतर कोंदलें ॥ २३ ॥ बाहु आफळोनि वानर । करोनि श्रीरामनामगजर । सवेग निघाले सत्वर । करिती भुभुःकार नामाचा ॥ २४ ॥ किलकिलशब्द वानरजाती । किलकिल म्हणिजे निर्धार स्थिती । श्रीरामनामें नित्य गर्जती । शब्दव्युत्पत्ति इत्यर्थ ॥ २५ ॥ यालागीं किलकिलशब्द । रामनामें अति

१ वीर, मल्ल. २ यत्नानें. ३ आकाशांत संचार करणारे. ४ थोपटून. ५ मुख्य. ६ दशकोटी. ७ आकाश.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

शुद्ध । वानरां परम आल्हाद । सेतुबंध बांधावया ॥ २६ ॥

दशकोटिपरीमाणा वानराश्च ततोऽधिकाः ।
पर्वतैस्तृणकाष्ठैश्च सागरं समपूरयन् ॥ ९ ॥

पांच कोटींचिया हारी[1] । दक्षिणबाहूसीं वानरीं । पर्वत देती नळाच्या करीं । त्वरेंकरीं अति शीघ्र ॥ २७ ॥ वामबाहूच्या सेतुप्रकारीं । पांच कोटी वानरहारी । पर्वत वृक्ष देती गजरीं । त्वरेंकरीं अति शीघ्र ॥ २८ ॥ नळें मांडिले शुद्धशीळ । साठी जण अति कुशळ । नळाजवळी सर्व काळ । सामग्री प्रबळ देती ते ॥ २९ ॥ नळाची परम ख्याती । सेतु बांधी दोहीं हातीं । तेथें जाली विपरीत गती । पर्वत बुडती समुद्रीं ॥ ३० ॥ नळें लाविलिया हात । पर्वत स्वयें समुद्रीं बुडत । तोही राहिला तटस्थ । सेतुबंधनार्थ चालेना ॥३१॥ समुद्रें सांगितलें येथ । नळाचे हातें पर्वत तरत । शेखीं[2] त्याचेचि हातें बुडत । दुःखाभिभूत सुग्रीव ॥ ३२ ॥ नळहस्तें पर्वत बुडत । हिंवसला[3] कपिनाथ । वृत्तान्त श्रीरामासी सांगत । सेतुबंधनार्थ चालेना ॥ ३३ ॥ ऐकोनि वानरांची मात । हांसिन्नला श्रीरघुनाथ । सेतुबंधनाचा गुह्यार्थ । सांगेल हनुमंत तें करा ॥ ३४ ॥ हनुमान सांगे नळवरदोक्ती । श्रीरामापुढें त्या न चालती । जेंवी खद्योत[4] हरपती । सूर्यदीप्तिप्रकाशें ॥ ३५॥ श्रीरामप्रतापापुढें । समुद्र कायसें बापुडें । नळ केवळ तें किडें । वरदोक्तिवेडें अभिमानग्रस्त ॥ ३६ ॥ माझेनि हातें तरती पाषाण । ऐसा नळासी वरदाभिमान । अभिमानें ते पर्वत निमग्न । सेतुबंधन चालेना ॥ ३७ ॥ अभिमान वसला ज्यांचे माथां । ते तंव बुडाले तत्त्वतां । युक्ति सांगेन मी आतां । सेतुबंधनार्थ अति शुद्ध ॥ ३८ ॥ पर्वत अथवा वृक्षपाषाण । ज्यासी लागे श्रीरामचरण । तयासी समुद्रीं घडे तरण । सत्य जाण सुग्रीवा । ॥ ३९ ॥ श्रीरामचरणींचे पर्वत । तेचि समुद्रीं तरत । तेचि सेतुसिद्ध्यर्थ । गुह्य हनुमंत बोलिला ॥ ४० ॥ ऐकोनि हनुमंताचें वचन । वानरां पावली जीवींची खूण । पुढती करावया सेतुबंधन । हनुम्याचे चरण वंदिले ॥ ४१ ॥ लागतांचि चरणकमळा । अहल्या उद्धरली दुःशीळा[5] । श्रीरामपदीं पर्वतशिळा । समुद्रजळा सुखें तरती ॥ ४२ ॥

ये मज्जंति निमज्जयंति च परान्ते प्रस्तरा दुस्तरे
वार्द्धौ वीर तरंति वानरभटाः संतारयंतेपि च ।
नैते ग्रावगुणा न वारिधिगुणा नो वानराणां गुणाः
श्रीमद्दाशरथेः प्रतापमहिमा सोऽयं समुज्जृंभते ॥ १० ॥

श्रीरामचरणाचें महिमान । अवघे ऐकोनि सावधान । उल्लासें सांगे वायुनंदन । प्रतापपूर्ण हरिचरणीं ॥ ४३ ॥ श्रीरामचरणींचे शिळापर्वत । समुद्रीं घालितां हनुमंत । त्यांतें वानरदळ बुडवीत । तरी ते तरत न बुडोनि ॥ ४४ ॥ एकएका पर्वतावरी । बैसले वानर लक्षांतरीं । तरी न बुडती समुद्रीं । तारिती सागरीं वानरां ॥ ४५ ॥ स्वयें बुडोनि आणिकां बुडविती । ऐसी पाषाणांची जाती । तेही सागरीं तरती । आणि तारिती वानरां ॥४६॥ नव्हे पाषाणांचा गुण । नव्हे समुद्राचें लक्षण । नव्हे ऋषीचें वरदान । श्रीरामचरणप्रताप ॥ ४७ ॥ श्रीरामचरणींचे पर्वत । पुष्पप्राय उचलित । येर जडत्वें जे डोलत । ते बुडत सागरीं ॥ ४८ ॥ श्रीरामचरणाचें महिमान । सिद्धी पावे सेतुबंधन । स्वयें हनुमंत सांगतां जाण । पावली खूण वानरां ॥ ४९ ॥ ऐकोनि हनुमंताचें वचन । सुग्रीवें दिधलें आलिंगन । अंगद घाली लोटांगण । वंदिले चरण वानरीं ॥ ५० ॥ हनुमंतें विघ्नाचें निर्विघ्न । हनुमंतें सेतुबंधन । हनुमंतें भवाब्धितरण । अवघे जण वानिती ॥ ५१ ॥ सुग्रीव बोले संतोषोन । अगाध श्रीराममहिमान । अति गुह्य गुप्त ज्ञान । जाणे संपूर्ण हनुमंत ॥ ५२ ॥ करोनि हनुमंताची स्तुती । सेतु बांधावया पुढती । वानर चालिले शीघ्रगती । भुभुःकार करिती श्रीरामनामें ॥ ५३ ॥ सुग्रीव सांगे स्वयें गर्जोन । पूर्व पश्चिम दिशा दक्षिण । तेथील बुडती पाषाण । ते आपण नाणावे ॥ ५४ ॥ उत्तरेचे जे पर्वत । तेचि आणावे सेतुबंधार्थ । ऐसा ऐकोनि इत्यर्थ । वानर समस्त चालिले ॥ ५५ ॥ उत्तरेचे जे पर्वत । वृक्ष पाषाण शिळा समस्त । श्रीरामपायीं अति पुनीत[6] । सेतुबंधातें शीघ्र आणा ॥५६॥ जैसे आकाशीं विखुरती[7] टोळ । तैसें चालिलें वानरदळ । सेतुबंधनार्थ सकळ । प्रतापी प्रबळ चालिले ॥ ५७ ॥ गगनीं नक्षत्रें पैं थोडीं । तैशा वानरांच्या कोडी । सेतुंबधनाची तांतडी । कपि कडाडीं चालिले ॥ ५८ ॥ सेतु

१ रांगा. २ शेवटीं. ३ खिन्न झाला. ४ काजवे. ५ पापी. ६ पवित्र. ७ पसरतात.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

बांधावया सत्वर। हांवे अहंपूर्वे अहंपूर्वे । वानरीं घेवोनियां धांव । आणिती सर्व गिरिवर ॥ ५९ ॥

खर्जूरैरर्जुनैस्तालैस्तिलकैस्तिमिशैरपि ।
अन्यैश्च विविधैर्वृक्षैर्गिरीणां शिखरैरपि ॥ ११ ॥
सागरे सलिले सेतुं चक्रुः शतसहस्रशः ।
दशयोजनविस्तारमायतं शतयोजनम् ॥ १२ ॥
नलश्चक्रे महासेतुं मध्ये नदनदीपतेः ।
तत्र शाखामृगाः सर्वे पुष्पितान्विहगैर्युतान् ॥ १३ ॥
महावृक्षान्समुत्पाट्य चिक्षिपुर्लवणांभसि ॥ १४ ॥

वानर अति बळें समर्थ । समूळ उपडोनियां पर्वत । घेवोनि येती सेतुबंधार्थ । कैसे शोभत तें ऐका ॥ ६० ॥ पर्वतमाथां खर्जूरीवृक्ष । अर्जुनवृक्ष ते असंख्य । शाल ताल तमाल तिलक । घटकवृक्ष विस्तीर्ण ॥६१॥ आणिक पर्वत असंख्यात ।आणिती शिखरांसमवेत । नाना जातींचे वृक्ष तेथ । फलपुष्पित आणिले ॥ ६२ ॥ माथां घेवोनि पर्वत । शतसहस्र असंख्यात । आणिती शिखरांसमवेत। गात नाचत स्वानंदें ॥ ६३ ॥ श्रीराम जय राम या गजरीं । आणिती पर्वतांच्या हारी । सर्वेचि घालिती सागरीं । आल्हाद भारी सेतुबंधा ॥ ६४ ॥ लांबी संख्या शतयोजन । रुंदी दशयोजन जाण । ऐसें सेतूचें निर्माण । करी नंदनें[३] विश्वकर्म्याचा ॥ ६५ ॥ पडती पर्वतांच्या कोडी । दोरी धरोनि अति निवाडीं । नळ पर्वतें पर्वत जोडी । रिती सवडी उरों नेदी ॥६६॥ पर्वत घ्यावया उठाउठीं । नळाजवळी दहा कोटी । वानर ठेविले जगजेठी । अधिक साठी अति कुशळ ॥ ६७ ॥

आप्लवंतः प्लवंतश्च गर्जतश्च प्लवंगमाः ।
तमचिंत्यमसह्यं ते ह्यद्भुतं लोमहर्षणम् ॥ १५ ॥
ददृशुः सर्वभूतानि सागरे सेतुबंधनम् ।
कृतानि प्रथमेनाह्ना योजनानि चतुर्दश ॥ १६ ॥

पर्वतांच्या कोट्यनुकोटी । वानर आणिती जगजेठी । सर्वेचि धांवती । उठाउठीं । गिरिकोटी आणावया ॥ ६८ ॥ पर्वत पडतां उपराउपरी । गाहाळू न करावा सागरीं । नांवें लिहिती पर्वतावरी । कपि नखाग्रीं कोरोनी ॥ ६९ ॥ नवल वानरांची कथा । संख्या सांगावया रघुनाथा । नांवें लिहिती पर्वतमाथां । सेतुबंधार्थी अभिनव ॥ ७० ॥ सेतुबंधन समुद्रजळीं । श्रीराम बांधी आर्तुर्वळी । स्वर्गमृत्युसप्तपाताळीं । पिटिली टाळी अति गजरें ॥ ७१ ॥ प्रथम दिवशीं समुद्रांतु । बुडाला पर्वतपर्वतु । तेणें खोळंबला सेतु । अल्प कार्यार्थु चालिला ॥ ७२ ॥ चवदा योजनें नेमस्तु । प्रथम दिवशीं बांधिला सेतु । सुग्रीव श्रीरामा सांगतु । हर्षयुक्तु स्वानंदें ॥ ७३ ॥ अति सज्ञान हनुमंतु । तेणें चालतां केला सेतु । आमचा पाहें पां पुरुषार्थु । बांधूं सेतु अति शीघ्र ॥ ७४ ॥ आजि माझें कौतुक पाहें। सेतु बांधीन लवलाहें। म्हणोनि आफळोनि बाहे । उडाला स्वयें शीघ्रत्वें ॥ ७५ ॥

प्रियकामश्च रामश्च सुग्रीवं संप्रहर्षयन् ।
स्वयं वानरराजानं पंचयोजनपर्वतम् ॥ १७ ॥
अर्धयोजनविस्तीर्णं विंध्यस्य शिखरं महत् ।
सुषेणः पाणिना गृह्य पातयामास सागरे ॥ १८ ॥
नीलेन मलयस्याथ शृंगं द्रुमशताकुलम् ।
दोर्भ्यामुत्पाट्य तरसा क्षिप्तं लवणसागरे ॥ १९ ॥
शृंगं सचंदनं गृह्य सर्वतः पुष्पितं महत् ।
आरुह्याजहतुः श्रीमान्मैंदश्च द्विविदश्च ह ॥ २० ॥
गजो गवाक्षो गवयः शरभो गंधमादनः ।
पंचैते शिखरं गृह्य महेंद्रादागता द्रुतम् ॥ २१ ॥
चिक्षिपुः सागरे सर्वे पर्वतान्पर्वतोपमे ॥ २२ ॥

श्रीरामासी सुखार्थ । पंचयोजन पर्वत । सुग्रीवें उपटोनि त्वरित । समुद्रांत निक्षेपी ॥ ७६ ॥ अर्धयोजन महाथोर । विंध्याद्रीचें दीर्घ शिखर । सुषेणें उपटोनी थोर । समुद्रीं गिरिवर निक्षेपी ॥ ७७ ॥ नीळें मलयाद्रिशिखर । बळें उपटिलें महाथोर । त्यावरी वृक्ष शतसहस्र । टाकिले सत्वर सागरीं ॥ ७८ ॥ चंदनवृक्षेंसीं गिरिवर । सुगंधपुष्प तरुवर । मैंद द्विविद दोघे वीर । समुद्रीं शीघ्र टाकिती ॥ ७९ ॥ गज गवाक्ष गवययुक्त । शरभ गंधमादन अद्भुत । पांच जण पांच पर्वत । समुद्रांत निक्षेपिती ॥ ८० ॥ आणीकही वानरवीर । पर्वत आणिती थोर थोर । सेतु बांधावया सत्वर । गिरी वानर वर्षती ॥ ८१ ॥

१ मोठ्या हौसेनें. २ मी पुढें, मी पुढें. ३ पुत्र (नळ). ४ पराक्रमी. ५ अति शीघ्र. ६ ठोकून, थोपटून. ७ टाकिता झाला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

दिवसेन द्वितीयेन षड्विंशद्योजनानि तु ।
बद्धः स वानरैस्तैस्तु समुद्रः सेतुकर्मणि ॥ २३ ॥

पश्चिमायां तु संध्यायां तपःस्थानानि भेजिरे ।
कर्माणि कथयंतस्ते स्वानि स्वानि प्लवंगमाः ॥ २४॥

श्रीरामं कथयंति स्म पश्य सेतुं महोदधौ ॥ २५ ॥

वानरें अति उल्लासीं । सेतुबंधन दुसरे दिवसीं । सव्वीस योजनें नेमेंसीं । श्रीरामापासीं सांगती ॥ ८२ ॥ तंव जाला अस्तमान । परतले ते वानरगण । रामापासीं येवोनि जाण । आंगवण सांगती ॥ ८३ ॥ सांटोपें बोलती वानर । आम्हीं आणिले पर्वत थोर। एक म्हणती थोर थोर। आम्हीं गिरिवर आणिले ॥ ८४ ॥ एक म्हणती न बोला वृथा। नामें लिहिलीं पर्वतमाथां । तें तें पाहोनि श्रीरघुनाथा। कपिपुरुषार्था वानावें ॥ ८५ ॥ एक साटोपें सांगती गोष्टी । आणिल्या पर्वतांच्या कोटी । स्वामींनीं येवोनि उठाउठीं। सेतु निजदृष्टीं पाहावा ॥ ८६ ॥ व्यर्थ कां बोला पुरुषार्थ । जाणतो सर्वज्ञ श्रीरघुनाथ । सुग्रीवें सांगोनि वृत्तान्त । कपिउक्त स्वयें परिसे ॥ ८७ ॥ सवेग आणितां पर्वत । वानर कष्टले समस्त। कोणासी जाणवेना तो अर्थ। निद्राभिभूत कपिकुळें ॥ ८८ ॥ कोणा नुघडवे दृष्टी । कायशा जागरणाच्या गोष्टी । वानर निजले कोट्यनुकोटी । शिळासंपुटीं सुषुप्तें ॥ ८९॥ चाळीस योजनें संख्यागोष्टी । वानरीं बांधिला सेतु संकटीं । पुढें उरला योजनें साठी । सहसा कांठीं पावेना ॥ ९० ॥ श्रीरामाचें मनोगत । जाणोनियां हनुमंत । दडोनि राहिलासे तेथ । व्हावया प्रभात पहातसे ॥ ९१॥ कायसी सेतुबंधसांकडी। बांधीन न लागतां अर्ध घडी । परी सूर्योदयाचे सांकडी । देचोनि दडी राहिलासे ॥ ९२॥

ततः प्रभातसमये कृत्वा पूर्वाण्हिकीं क्रियाम् ।
परस्परं समुत्सृज्य प्रस्थिताः सर्वतो दिशः ॥ २६॥

हनुमंतं गतं वीरा ददृशुः सेतुकर्मणि ।
सप्तयोजनविस्तीर्णान्पर्वतान्सप्त पाणिना ॥ २७ ॥

लवणांभसि चिक्षेप मध्ये कपिवृषस्तदा ।
गिरीणां क्षिप्यमाणानां सागरे सेतुकर्मणि ॥ २८॥

भुवि दिव्यंतरिक्षे च बभूव निनदो महान् ।
प्रक्षिप्यमाणैः शिखरैर्जलराशिः समुत्थितः ॥२९॥

आकाशाभिमुखो गत्वा विससर्प समंततः ।
दिवसेन तृतीयेन पंचाशद्योजनानि च ॥ ३० ॥

बद्धोतिकपिभिः सर्वैः शेषं तु दशयोजनम् ।
मुंचंतः पुष्पवर्षाणि सुराः संहृष्टमानसाः ॥ ३१ ॥
दिवि दुंदुभयो नेदुर्ननृतुश्चाप्सरोगणाः ॥ ३२ ॥

अरुणोदय होतां प्राप्त । सवेग उठोनि हनुमंत । पूर्वाण्हिकें क्रिया करोनि तेथ । सेतुबंधनार्थ उडाला ॥ ९३ ॥ न पुसतां श्रीरामासी । कळों न देतां वानरांसी । न पुसतां सुग्रीवासी । अति वेगेंसीं उडाला ॥ ९४ ॥ पुढें गेला रे हनुमंत । ऐकोनि वानर समस्त । पूर्वाण्हिकें करोनि तेथ । शीघ्र धांवत दशदिशा ॥ ९५ ॥ महावीर हनुमंत । उपटोनि पर्वत समस्त । एकैक योजन संख्या सप्त । घेऊनि येत उल्लासें ॥ ९६ ॥ दोन पर्वत दोहीं हातीं । दोन दोहीं कांखेप्रती । एक मस्तकीं स्वामिकार्यार्थी । पुच्छीं आवर्ती पैं एक ॥ ९७॥ एक पर्वत हनुवटीतळीं । आकळोनि महाबळी। गात नाचत नाममेळीं । सेतूजवळी स्वयें आला॥ ९८ ॥ घेवोनियां सप्त पर्वत। येतां देखोनि हनुमंत। श्रीराम जाला अति विस्मित। बळें अद्भुत मारुति ॥ ९९ ॥ प्रभातीं नळें आवेश धरोन । सेतु बांधिला एक योजन । सप्तपर्वतेंसीं संपूर्ण । आलें उड्डाण हनुमंताचें ॥ १०० ॥ पर्वत टाकितां उद्भट । ध्वनि उठला कडकडाट । सागर गर्जे घडघडाट । नादें वैकुंठ कोंदलें ॥ १ ॥ पर्वत सांडितां सागरीं । नादें कोंदला कैलासगिरी । ध्यान सांडोनि ते अवसरीं । पाहे बाहेरी नीलकंठ ॥ २ ॥ समुद्रीं पाषाण तारित । देखोनि श्रीरामचंद्राचा सेत । हरिखें सदाशिव डुल्लत । श्रीरघुनाथ परब्रह्म ॥ ३ ॥ सप्त पर्वतीं समस्त । हनुमंतें सिद्धि नेला सेत। आला रावणासी अंत। शिव सांगत शिवेसी ॥ ४ ॥ पर्वत सांडितां सिंधूसी । जळ उसळलें आकाशीं । भिजवोनियां ध्रुवमंडळासी । सत्यलोकासी आदळलें ॥ ५ ॥ बाप बळिया हनुमंत । स्वर्ग केला सचैल स्नात । देवां देतसे प्रायश्चित्त। आलें हास्य सुरवरां ॥ ६ ॥ रावणबंदीं देव निर्मुक्त । सोडविले

१ पराक्रम. २ आवेशानें. ३ निजलेले. ४ सकाळीं करण्याच्या. ५ शेपटीच्या गुंडाळ्यांत. ६ मोठा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

पैं समस्त । अवश्य पाहिजे प्रायश्चित्त । सचैल स्नान हनुमंत करवी ॥७॥ घालितां सत्त पर्वत पूर्ण । एकुणपन्नास योजन । हनुमंतें केलें सेतुबंधन । विस्मित मनें विरिंचि ॥८॥ विस्मय करीत सुरवर । विस्मय करिती ऋषीश्वर । विस्मय करिती नरवानर । श्रीराम सौमित्र विस्मित ॥९॥ आतुर्बळी हनुमंत । देवदुंदुभि स्वर्गी गाजत । सुर सुमनें वर्षत । नृत्यान्वित अप्सरा ॥ ११० ॥ तंतीवीणास्वरयुक्त । स्वर्गांगना नृत्य करीत । हर्षें वानर नाचत । सेतु समाप्त श्रीरामें ॥ ११ ॥ तृतीय दिवसाचा वृत्तांत । सुग्रीव श्रीरामा सांगत । तुझा निजभक्त हनुमंत । सेतु समाप्त त्याचेनि ॥ १२ ॥ आमचा वाढवावया सन्मान । राखिला दशयोजनें न्यून । एऱ्हवीं करिता संपूर्ण । अर्ध क्षण न लागतां ॥ १३ ॥ वानरीं आणोनियां पर्वत । दशयोजनें उर्वरितें । नळ स्वानंदें सेतु बांधित । हर्षयुक्त वानर ॥ १४ ॥

अन्ये च सूत्रं गृण्हंति दंडानन्ये धरंत्यपि ।
समश्च क्रियतां सर्वे नलमेवं बभाषिरे ॥ ३३ ॥
बद्धो बद्धो वदंति स्म सिद्धानामंबरे स्वनाः ।
वानराणां प्रहृष्टानां महान्नादो बभूव ह ॥ ३४ ॥
गिरिशृंगाणि चाप्यन्ये शिलाशैलान्यथापरे ।
अन्ये च वारयंति स्म बहूनां किं प्रयोजनम् ॥ ३५ ॥
दशयोजनविस्तारमायतं शतयोजनम् ।
नलश्चक्रे महासेतुं मध्ये नदनदीपतेः ॥ ३६ ॥
मलयाद्रिसमारब्धो लंकामूले प्रतिष्ठितः ।
नलेन बद्धं ददृशुः सेतुं मंदरसन्निभम् ॥ ३७ ॥

एकोणपन्नास योजनें सेतु । भरोनि गेला हनुमंतु । दश योजनें उर्वरीतु । नळ बांधितु पुढारां ॥ १५ ॥ तंव नळासी सांगिजे वानरीं । हनुम्यानें बांधिला जैशा परी । त्यासमान अवघा करीं । धरोनि दोरी कपि पाहती ॥ १६ ॥ हनुमंताचे क्रियेसम । तुझी क्रिया दिसे विषम । बराबर करीं समान सम । त्यासीं सम करविती ॥ १७ ॥ बांधिला बांधिला सेतु समग्र । सिंहानुवादें गर्जे अंबर । स्वर्गी गर्जती सुरवर । सेतु समग्र बांधिला ॥ १८ ॥ समुद्रीं सेतु अति दुर्धर । वानरीं बांधिला समग्र । स्वयें बोलती ऋषीश्वर । थोर थोर देव ऋषी ॥ १९ ॥ वानरवीर कोट्यनुकोटी । पर्वत आणिती उठाउठीं । त्यांतें वारिती कपि जेठी । सेतु परतटीं पावला ॥ १२० ॥ सेतु सिद्ध जाला संपूर्ण । कटकीं त्राहाटिलें निशाण । तें ऐकोनि वानरगण । टाकिती पाषाण पर्वत ॥ २१ ॥ पर्वतपाषाणांच्या हारी । वानरीं टाकिल्या धरेवरी । सेतुबंधन यात्रेकरी । अद्यापवरी देखिजेती ॥ २२ ॥ रुंदी संख्या दशयोजन । लांबी समग्र शतयोजन । नळें केलें सेतुबंधन । श्रीरघुनंदनप्रतापें ॥ २३ ॥ सेतुबंधना मूळ मलयाद्री । तेथोनि लंकामूळवरी । नळें बांधिला बरव्यापरी । मंदरगिरिसमप्रभ ॥ २४ ॥ सेतु पावला परतटीं । रामनामें वानरकोटी । गर्जगर्जोनि नाचती सृष्टीं । न समाती पोटीं नभाच्या ॥ २५ ॥ येरयेरांवरी किरांणें । हर्षें नाचती वानरगण । श्रीरामापुढें येवोनि जाण । लोटांगण घालिती ॥ २६ ॥ येरयेरांतें गुदगुली । येरयेरांतें वांकुली । श्रीराम आमची माउली । संतोषली सेतुबंधें ॥ २७ ॥ सेतु जाला समाप्त । वानरवीर हरिखें गर्जत । श्रीरामापासीं आले समस्त । हर्षोन्मत्त स्वानंदें ॥ २८ ॥ समुद्रीं सेतुबंधनस्थिती । देखोनि सुरवर बोलती । श्रीरामाची अगाध कीर्ती । त्रिजगतीं विस्तारली ॥ २९ ॥ सेतु पावतां समाप्ती । नळें येवोनि शीघ्रगती । नमस्कारिला श्रीरघुपती । श्रीरामें अति प्रीतीं आलिंगिला ॥ १३० ॥ आलिंगोनि सुखसमेळीं । पाठी थापटी वेळोवेळीं । तंव वानरीं पिटिली टाळी । दिधली आरोळी अंगदें ॥ ३१ ॥ सिद्धि पावलें सेतुबंधन । कायसें बापुडें रावण । इंद्रजित आणि कुंभकर्ण । निर्दळण राक्षसां ॥ ३२ ॥ नरांतक सुरांतक । अतिकायादि कुमर अनेक । रणीं मारीन एक एक । युद्धीं सन्मुख दशमुखा ॥ ३३ ॥ महोदर प्रहस्त जाण । महापार्श्व शुक सारण । रणीं देखतां दशानन । करीन कंदनँ प्रधानां ॥ ३४ ॥ निर्दाळोनि लंकानाथा । अर्धक्षणें श्रीरघुनाथा । तुझी आणीन मी सीता । उल्लासतां गर्जत ॥ ३५ ॥ मज म्हणों नको लेंकरूं । मी तंव वाळीचा कुमरू । करीन सीतेचा उद्धारू । दशकंधरू वधोनि ॥ ३६ ॥ आडवा होता जंव सागर । तंव विराले होते वानरवीर । आतां घ्यावया

१ ब्रह्मदेव. २ पुर्ष्वे. ३ शिल्लक, बाकी उरलेला. ४ उड्डाण. ५ एकमेकांना. ६ रावण. ७ नाश. ८ अडले.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

लंकापुर। अति सत्वर उपरमती ॥ ३७ ॥ अवघे मिळोनि मर्कट। छेदावया दशकंठ। तुझीच पाहती वाट। भट उद्भट वानर ॥ ३८ ॥ सेतु पावला लंकामूळीं। वानरीं पिटिली टाळी। नामें गर्जती आर्तुबळी। सुखसमेळीं नाचती ॥ ३९ ॥ रामनामाचा गजर। वानरीं केला भुभुःकार। देवीं करोनि जयजयकार। सुमनसंभार वर्षती ॥ १४० ॥ एका जनार्दना शरण। सिद्धि पावलें सेतुबंधन। पुढें गोड निरूपण। श्रीरामगमन लंकेसी ॥ ४१ ॥ नावदेचा पडिवाडें। जों जों चाखिजे तों तों गोड। तैसें रामायणी कथाकोड। सुखसुरवाड स्वानंदें ॥१४२॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां सेतुबंधनसमाप्तिर्नाम चत्वारिंशत्तमोऽध्यायः ॥ ४० ॥ ओव्या ॥ १४२ ॥ श्लोक ॥ ३७ ॥

अध्याय एकेचाळिसावा

श्रीरघुपतये नमः। नळें बांधिला सेतु समाप्त। यालागीं म्हणती नळसेत। परी तो श्रीरामपुरुषार्थ। जाला विख्यात तिहीं लोकीं ॥ १ ॥

बद्धं तु तं महासेतुं सुग्रीवो वाक्यमब्रवीत्।
कृतकृत्याः स्म राजेंद्र हता लंका न संशयः ॥ १ ॥
रावणश्च हतः शत्रुः समाप्तः सपरिच्छदः ॥ २ ॥

सेतु जालिया समाप्त। सुग्रीव संतोषें डुल्लत। वंदोनियां श्रीरघुनाथ। स्वयें बोलत स्वानंदें ॥२॥ समुद्रीं लाभली पायवाट। आमचे चुकले परम कष्ट। आतां लंका करीन सपाट। दशकंठ वधोनि ॥३॥ प्रधान सेनानी सपरिवार। राक्षसांचे भारसंभार। रणीं मारीन दुर्धर वीर। तरी किंकर मी तुझा ॥ ४ ॥ सेतु होतांचि समाप्त। लंका जाली हताहत। रणीं निमेल लंकानाथ। संदेह येथ असेना ॥५॥ ऐकोनि सुग्रीवाचें वचन। सेतु देखोनि संपूर्ण। उल्लासला श्रीरघुनंदन। शीघ्र गमन करावया ॥ ६ ॥ सोडवावया सीता सती। सवेग जावें लंकेप्रती। लक्ष्मणा धरोनि हातीं। शीघ्रगती निघे राम ॥७॥ ते काळीं जांबवंत गर्जोन। हांक देवोन बोले वचन। पायीं चालतां श्रीरघुनंदन। आनें-आन हों पाहे ॥ ८ ॥ श्रीराम चरणीं शिळा तारी। दोघे जातां सेतु उद्धरी। आम्ही राहोनि ऐलतीरीं। किलकिल करीतचि पैं ॥ ९ ॥ लागतां श्रीरामाचे चरण। सेतु पावेल उद्धरण। दोघे जातील निघोन। आम्ही राहों ऐलीकडे ॥ १० ॥ एकला जावोनि रघुनाथ। सकळ साधील कार्यार्थ। आमचा नव्हे रणसाह्यार्थ। ऐसा अनर्थ होऊं पाहे ॥११॥ ऐकोनि जांबवंताची मात। सकळां मानला सत्यार्थ। सुग्रीव निघाला धांवत। श्रीरघुनाथ थांबवावया ॥ १२ ॥ सुग्रीवें घालोनि लोटांगण। दृढ धरिले श्रीरामचरण। स्वयें बोलिला युक्तवचन। सावधान अवधारा ॥ १३ ॥ वानरें समस्त शरणागत। आम्हांसी सांडोनियां येथ। एकलें जाणें लंकेआंत। नव्हे उचित श्रीरामा ॥ १४ ॥ लागतां तुझे श्रीचरण। सेतु पावेल उद्धरण। आम्ही वानरें अडकोन। सर्वथा गमन न करवे ॥ १५ ॥ कष्टलों आणोनि पर्वत। हर्षें सेतु केला समाप्त। एकला जासी तूं रघुनाथ। धिक् जीवित्व पैं आम्हां ॥ १६ ॥ एकला साधिसी कार्यार्थ। आम्हांसी मानलें निश्चित। तेव्हां आमचें व्यर्थ जीवित। धिक् पुरुषार्थ वाटिवा ॥ १७ ॥ रावण मारोनि सगण। सीता सोडवील रघुनंदन। तेव्हां आमुचें काळें वदन। धिक्करण कपिकुळा ॥ १८ ॥ सवें घेवोनि कपी समस्तां। लंकेसी जावें श्रीरघुनाथा। म्हणोनि चरणीं ठेविला माथा। सप्रेमता सुग्रीवें ॥ १९ ॥ ऐकोनि सुग्रीवाचें वचन। श्रीराम जाला सुखसंपन्न। हनुमान येवोनि आपण। जाहला वहन श्रीरामा ॥ २० ॥

सुग्रीववचनं श्रुत्वा रामो दशरथात्मजः।
अधिरुह्य हनूमतः पृष्ठे नीलस्य लक्ष्मणः ॥ ३ ॥
अग्रतः सर्वसैन्यस्य श्रीमान्रामः सलक्ष्मणः।
अनुजग्मुः प्लवंतश्च गर्जंतश्च प्लवंगमाः ॥ ४ ॥
केचिज्जवेन धावंति सेतुना केचिदेव तु।
केचिदाकाशमार्गेण सेतुं नैव स्पृशंति च ॥ ५ ॥
अन्ये मध्ये च गच्छंति पार्श्वे चान्ये च वानराः।
सलिले प्रपतंत्यन्ये पंथानं ये न लेभिरे ॥ ६ ॥

जैंवी अपत्याचें बालभाषण। पिता न करी उपेक्षण। तैंवी सुग्रीवाचें वचन। श्रीरघुनंदन स्वयें मानी ॥ २१ ॥ ऐकोनि सुग्रीवाच्या वच-

१ पराक्रमी. २ पुष्पवृष्टी. ३ साखरेचा. ४ प्रकार. ५ सेवक. ६ गोष्ट. ७ सहपरिवार. ८ त्याग.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

नाथीं । श्रीराम चढला स्कंधीं हनुमंता । सौमित्रासी उल्लासता । पृष्ठीं बैसविता नीळ जाला ॥ २२ ॥ सज्जन चढती गुणातीतीं । तैसा श्रीराम हनुमंतीं । अवघे जयजयकार करिती । सुरवर वर्षती सुमनांतें ॥ २३ ॥ जेंवी निजबोधाचे माथां । साधु चढे निरपेक्षता । तेंवी नीळपृष्ठीं तत्त्वतां । होय बैसता सौमित्र ॥ २४ ॥ श्रीरामनामाचा गजर । हर्षें करिती वानरवीर । आनंदें नाचती थोर थोर । देती भुभुःकार हरिनामें ॥ २५ ॥ एक गर्जती नर्दत । एक आल्हादें नाचत । लंकेसी निघाला श्रीरघुनाथ । उल्लासती वानर ॥ २६ ॥ कोट्यनुकोटी पैं वानर । अर्बुदें निर्बुदेंहूनि अपार । सेतूसी दाटला वानरभार । करिती गजर श्रीरामनामें ॥ २७ ॥ एक श्रीरामनामें नर्तती । एक श्रीरामनामें गर्जती । एक श्रीरामनामामृतें डुल्लती । हांका देती श्रीरामनामें ॥ २८ ॥ सुग्रीव बिभीषण दोहींकडे । श्रीरामापासीं निजनिवाडें । नळ नीळ अंगद अवघ्यांपुढें । पाठीसीं गाढे तरस तरळ ॥ २९ ॥ श्रीरामापासीं जांबवंत । निकटवर्ती बुद्धिवंत । सुषेण वैद्यराज समर्थ । तो अति आप्त सुग्रीवा ॥ ३० ॥ श्वेत पीत रक्त पुष्पित । वृक्ष उभविले सैन्याआंत । कर्दळीपत्रें टके डोलत । तेणें सैन्य शोभत अति शोभा ॥ ३१ ॥ माड ताल झेलिती गंभीर । तेचि महाकेतु दुर्धर । नामें गर्जती वानर । गतिप्रकार तो ऐका ॥ ३२ ॥ एक समुद्रीं घालिती उडिया । एक आल्हादें देती बुडिया । एक धांवती थडोथडिया । उभवोनि गुढिया पुच्छांच्या ॥ ३३ ॥ एक ते श्रीरामा सांगती । जलतरणें दाविती गती । एक ते सेतुधारा चालती । एक नाचती जळस्थळीं ॥ ३४ ॥ नातळोनियां सेतूसी । एकांची गती आकाशीं । एक स्वयें श्रीरामापासीं । येणें प्रकारेंसीं चालती ॥ ३५ ॥ सेतूसी दाटले जुत्पती । एकां न लभे मार्गप्राप्ती । एक खचोनि समुद्रीं पडती । सर्वेचि घेती उड्डाण ॥ ३६ ॥ सेतूचिया कांठावरी । चालती वानरांच्या हारी । एक ते उडोनि अंबरीं । लंकापरपारीं पावले ॥ ३७ ॥

तानि कोटिसहस्राणि वानराणां महौजसाम् ।
तीर्त्वा तत्र महासेतुं जग्मुः पारं महोदधेः ॥ ७ ॥
वानराणां हि सा तीर्णा वाहिनी नलसेतुना ।
तीरे निवेशिता राज्ञा बहुमूलफलोदके ॥ ८ ॥
ततः पारे समुद्रस्य गदापाणिर्विभीषणः ।
परेषामभिघातार्थं चतुर्भिः सचिवैः सह ॥ ९ ॥
यूथपानां सहस्रौघैः प्रस्थितो लघुविक्रमः ॥ १० ॥

वानरवीर प्रतापवंत । कोट्यनुकोटी अर्बुदांत । समुद्र उतरले समस्त । श्रीरघुनाथ अनुलक्षी ॥ ३८ ॥ शतयोजन सेतूप्रती । मध्यें न करितांचि वस्ती । मुहूर्तें आले लंकेप्रती । शीघ्रगती हनुमंतें ॥ ३९ ॥ पृष्ठीं वाहोनि रघुनंदन । हनुमंताचें शीघ्र गमन । तयासवें वानरगण । चालतेपण विसरले ॥ ४० ॥ श्रीराम लक्षोनियां दृष्टीं । चालतां वानरांच्या कोटी । श्रम पळाला उठाउठीं । आले परतटीं स्वानंदें ॥ ४१ ॥ श्रीरामसवें करितां गमन । श्रम निवाला संपूर्ण । विरोनि गेलें भागलेपण । आले कपिगण स्वानंदें ॥ ४२ ॥ श्रीरामासवें श्रमनिवृत्ती । श्रीरामासवें सुगम गती । श्रीरामासवें परमपदप्राप्ती । आले जुत्पती स्वानंदें ॥ ४३ ॥ परतटा येतां वानरगण । पुढें देखिलें लंकाभुवन । रत्नकलशीं विराजमान । तेजें परिपूर्ण तेजस्वी ॥ ४४ ॥ अलकावती भोगावती । कायसी बापुडी अमरावती । कैलासासम दिसे दीप्ती । तेजें उघडती दशदिशा ॥ ४५ ॥ ऐसी लंका देखोनि दृष्टीं । वानरवीर जगजेठी । उडोनि रिघावया त्रिकूटीं । कोट्यनुकोटी खवळले ॥ ४६ ॥ तें देखोनि बिभीषण । निवारोनि वानरगण । अवघ्यांपुढें आपण । गदा घेवोन चालिला ॥ ४७ ॥ राक्षस कपटी गुप्तघाती । छळोनि वानरांतें मारिती । त्यांसी निर्दाळावया प्रयुक्ती । जाणे युक्ती बिभीषण ॥ ४८ ॥ राक्षसगती निर्वेधनें । करूं जाणती चवघे प्रधान । सवें घेवोनि वानरगण । पुढें बिभीषण निघाला ॥ ४९ ॥ गदापाणि बिभीषण । त्यापुढें राक्षस तंव तृण । संमुख येवों शके कोण । धाकेंच प्राण सांडिती ॥ ५० ॥ बिभीषण पुढें जातां । श्रीराम सांगे हनुमंता । त्यासी जावों नेदीं सर्वथा । ऐक तत्त्वतां विचार ॥ ५१ ॥ बिभीषण पुढें जात । छळोनि राक्षसीं केलिया घात । व्यर्थ जीवित्व पुरुषार्थ । याहूनि अनर्थ तूं

१ पुष्पें. २ दशकोटी. ३ जवळ असणारा. ४ न स्पर्शतां. ५ श्रमनिरास. ६ तेज. ७ निवारण.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

ऐकें ॥ ५२ ॥ शरणागत मारिल्या जाण । आम्हीच स्वयें सोडूं प्राण । कोण करील सीतासोडवण । अति दारुण अनर्थ ॥ ५३ ॥ यालागीं सांक्षेपेंसीं रघुपतीं । बिभीषणा धरोनि हातीं । बैसविला आपणाप्रती । कृपामूर्ति कृपाळुवें ॥ ५४ ॥ राक्षसगतिनिर्वंधन । करूं धाडिले चवघे प्रधान । तेही अतिशयें सावधान । विचक्षण रणयोद्धे ॥ ५५ ॥ समुद्राचे परतीरीं । फळमूळजळसंभारीं । बैसल्या वानरांच्या हारी । स्वानंदेंकरीं डुल्लती ॥ ५६ ॥

जयस्व शत्रुं नरदेव मेदिनीं
ससागरां पालय शाश्वतीः समाः ।
इति स्म रामं नरदेवसत्कृतं
शुभैर्वचोभिर्विबुधा अपूजयन् ॥ ११ ॥
ततो महान्तं कृतसेतुमीश्वरं
प्रतिस्वरूपे विजयाभिनंदनः ।
पुनः समुद्रोभिजगाम राघवं
स दिव्यरूपाभरणो महाद्युतिः ॥ १२ ॥

श्रीराम समुद्रपरतटीं । सुग्रीवसैन्य वानरकोटी । बैसला देखोनि जगजेठी । केली पुष्पवृष्टी सुरसिद्धीं ॥ ५७ ॥ शत्रु जिणोनि समर्थ । पृथ्वी समुद्रमेखलान्वित । प्रतिपाळावया तूं समर्थ । सुर गर्जत स्वानंदें ॥ ५८ ॥ दश सहस्र वर्षांआंत । निष्कंटक राज्य प्राप्त । देव करावया बंदिमुक्त । तुझा पुरुषार्थ श्रीरामा ॥ ५९ ॥ बंधमुक्तता सुरवरीं । आम्ही तुझे कृतोपकारी । स्मरोनि जन्मजन्मांतरीं । जयजयकारीं गर्जती ॥ ६० ॥ बांधिला देखोनि सेतुबंधु । ससैन्येंसीं राम उतरला सिंधु । उतरला वानरांचा वृंदु । ऐकोनि सिंधु अनुतापी ॥ ६१ ॥ पूर्वी भेटलों श्रीरघुवीरासी । युक्ति सांगितली सेतुबंधासी । नाहीं पूजिलें श्रीरामासी । मूढता ऐसी पैं माझी ॥ ६२ ॥ मी ज्येष्ठ श्रीराम कनिष्ठ । ऐसें मानितों पापिष्ठ । तेणें अभिमानें मी दुष्ट । श्रीराम वरिष्ठ न पूजीं ॥ ६३ ॥ कनिष्ठ मानितां श्रीराममूर्ती । महापापी मी त्रिजगतीं । त्या मज पापियाची पापयुक्ती । सेतुसमाप्ति नव्हेचि ॥ ६४ ॥ सेतु नव्हे माझे पापोक्ती । वृथा गेली नळवरदोक्ती । श्रीरामापायीं पर्वत तरती । सेतुसामग्री श्रीरामें ॥ ६५ ॥ समुद्रीं पर्वत तरती स्पष्ट । तो श्रीराम मी मानीं कनिष्ठ । मजहीपरता पापिष्ठ । अति दुष्ट आन नाहीं ॥ ६६ ॥ ऐशिया अनुतापवृत्ती । पूजावया श्रीराममूर्ती । घेवोनियां अलंकारसंपत्ती । श्रद्धान्वित सिंधु आला ॥ ६७ ॥ विजयलाभाच्या अनुवृत्तीं । सेतु पावला समाप्ती । परतीरीं देखिला श्रीरघुपती । सुग्रीव कपिपतीसमवेत ॥ ६८ ॥ संमुख लंका देखोनि दृष्टीं । बैसल्या वानरांच्या कोटी । रावण मारावया उठाउठीं । उल्लास पोटीं वानरां ॥ ६९ ॥ ऐसा देखोनि रघुनंदन । समुद्र घाली लोटांगण । श्रीराम वंदी सिंधुचरण । ज्येष्ठ संपूर्ण तूं आम्हां ॥ ७० ॥ ज्येष्ठ कनिष्ठ हा अभिमान । तेणें मजमाजी पाडलें खान । श्रीरामाचें महिमान । ज्येष्ठाभिमान कळों नेदी ॥ ७१ ॥ खांबीं उपजला सिंहवदन । तो काय धाकुटा प्रल्हादाहून । तेंवी ज्येष्ठ तूं रघुनंदन । धाकटेपण तुज नाहीं ॥ ७२ ॥ पायें तारिसी पाषाण । तो तूं परमात्मा परिपूर्ण । तुज कैंचें धाकुटेपण । ज्येष्ठज्येष्ठपण श्रीरामीं ॥ ७३ ॥ तूं परब्रह्म ब्रह्मस्थिती । तूं परमात्मा परंज्योती । तूं चिदात्मा चिन्मूर्ती । सगुणानुवर्ती निर्गुणत्वें ॥ ७४ ॥ तुज देखतांही सगुण । परी तूं सर्वांगें निर्गुण । हेही जाण उणी खूण । श्रीराम पूर्ण परब्रह्म ॥ ७५ ॥

समागतौ लक्ष्मणवानराधिपौ
विभीषणश्चर्क्षपतिश्च जाम्बवान् ।
मुदा प्रतीता हरयो वरप्रदं
नेमुश्च रामं सगरस्य चात्मजम् ॥ १३ ॥
स दिव्यरूपाभरणो महाद्युति-
र्दृष्ट्वा तु रामं मुनिवेषधारिणम् ।
शिरः समाघ्राय जयाय युंक्ष्व
समीक्ष्यमाणोऽपससार सागरम् ॥ १४ ॥
न वत्स युद्धे मुनिवेष इष्यते
विभज्य कर्माणि चरंति पार्थिवाः ।
त्वं राम राजाभरणैरलंकृतो
जयाय गच्छेति चकार सत्वरः ॥ १५ ॥
तथेति चोक्त्वा वचनं महोदधे-
र्विसृज्य चीराणि जटा नियम्य च ।

१ अगत्यानें, प्रयत्नानें. २ शहाणे. ३ रांगा. ४ शत्रुविरहित. ५ समुदाय. ६ नागवण. ७ ज्ञानस्वरूप.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

शुभानि राजाभरणानि चादधे
समुद्रहस्तात्कवचायुधानि ॥ १६ ॥

सिंधु उतरला श्रीरघुनाथ । समुद्र स्वयें आला तेथ । त्या दोघांसी समस्त । स्वयें वंदित तें ऐका ॥ ७६ ॥ लक्ष्मण सुग्रीव जांबवंत । बिभीषणादि वानर समस्त । श्रीरामा आणि सिंधूसी वंदित । दोघे समर्थ अति श्रेष्ठ ॥ ७७ ॥ समुद्रें करोनि स्तवन । स्वयें घालोनि लोटांगण । श्रीराम वंदी सिंधुचरण । ज्येष्ठ संपूर्ण तूं आम्हां ॥ ७८ ॥ ज्येष्ठकनिष्ठपणाची कथा । मागें वदलों मी यथार्थता । कांहीं एक विनवितों श्रीरघुनाथा । कृपावंता अवधारीं ॥ ७९ ॥ मुनिवेषें श्रीरघुनाथा । युद्ध न ये गा रणीं करितां । ऐक मुनिवेषाची कथा । तुज तत्त्वतां सांगेन ॥ ८० ॥ मुनिवेष पाहिजे निवृत्तीं । मुनिवेष पाहिजे शांती । मुनिवेष पाहिजे परमार्थी । युद्धकंदनार्थी न ये कामा ॥ ८१ ॥ मागील राजे नरवीर । युद्धार्थ करिती वीरशृंगार । युद्धीं आलिया मुनिवेषधर । वीर झुंझार न मानिती ॥ ८२ ॥ मुनिवेषाचें लक्षण । स्वभावें केलें निरूपण । मारिले त्रिशिरा खर दूषण । मुनिवेषपण असतांचि ॥ ८३ ॥ संन्यासी आणि झेंपंदे राऊत[३] । हा आहणा[४] होईल प्राप्त । मुनिवेषें युद्धकंदनार्थ । नव्हे शास्त्रार्थ श्रुतिमूळ ॥ ८४ ॥ निधडा वीर तूं समर्थ । कांहीं एक माझें मनोगत । श्रद्धें पूजावा श्रीरघुनाथ । अलंकारयुक्त उल्लासें ॥ ८५ ॥ सर्वालंकारभरणीं । उभा ठाकलिया रणांगणीं । आमच्या डोळ्यांची पुरेल धणी । म्हणोनि चरणीं लागला ॥ ८६ ॥ पुढती अलंकारयुक्त । कैं मी देखेन श्रीरघुनाथ । माझे पुरवावे मनोरथ । सिंधु विनवीत अति श्रद्धें ॥ ८७ ॥ सुग्रीवअंगदादि जुत्पती । सालंकृत श्रीरघुपती । पहावया उल्लास चित्तीं । आल्हादती स्वानंदें ॥ ८८ ॥ श्रीराम बाणल्या रत्नाभरणें । फिटेल डोळयांचें पारणें । उठे वल्कलांचें धरणें । बोळवणें मुनिवेषा ॥ ८९ ॥ लेइल्या अलंकार विचित्र । सुखी होतील आमचे नेत्र । तुझें देखतांचि वक्त्र । सुख चिन्मात्र कोंदाटे ॥ ९० ॥ श्रीराम देखिल्या कृपानिधी । मनाच्या सकळ आधिव्याधी । अहंकोहंसोहंसिद्धी । याही उपाधी हरपती ॥ ९१ ॥ चित्त होय चैतन्य । बुद्धि होय समाधान । प्रपंच होय ब्रह्मार्पण । श्रीरामदर्शन अति श्रेष्ठ ॥ ९२ ॥ सिंधु सुग्रीव आणि वानर । अवघे करोनि जयजयकार । भावें प्रार्थितां रामचंद्र । कृपें रघुवीर तुष्टला ॥ ९३ ॥

पूर्वश्लोकपदं---तथेत्युक्ते तु रामेण ।

सिंधुसुग्रीवप्रार्थन । ऐकोनियां रघुनंदन । स्वयें जाला सुप्रसन्न । मुनिवेषपणत्यागार्थ ॥ ९४ ॥ फेडोनियां वल्कलांबर । श्रीराम वेष्टी पीतांबर । जो कां अत्यंत मनोहर । स्वयें समुद्रें आणिला ॥ ९५ ॥ श्रीरामकांसेसी लागोन । वीज विसरली अस्तमान । तैसा पीतांबर जाण । दैदीप्यमान तेजस्वी ॥ ९६ ॥ स्वयें श्रीराम आपण । सुमनीं[६] जटा आच्छादोन । त्यावरी समुद्र आपण । मुकुट संपूर्ण बाणला ॥ ९७ ॥ अनर्घ्यरत्नीं रत्नघन । मस्तकीं मुकुट दैदीप्यमान । तेणें शोभला श्रीरघुनंदन । जननयनसुखकारी ॥ ९८ ॥ निजतेजें घवघवोनी । मुकुट माथां अनर्घ्यमणी । श्रीराम शिरोमणींचा शिरोमणी । तोही आभरणीं[८] शोभत ॥ ९९ ॥ कुंडलें शोभती मकराकार । हा लौकिक बाह्य विचार । तो मुख्य मूळीं निर्विकार । श्रवणें विकार निर्दाळी ॥ १०० ॥ उभय बाहुबाहुवटें । वरी कंकणें उद्भटें । मुक्ताफळें श्रेष्ठश्रेष्ठें । शोभती मनगटें सुंदर ॥ १ ॥ मनगटें बाणलीं सुंदरें । कंठी बाणली चौसरें । श्रीरामा आवडे एकसरें । गुह्य समुद्रें नेणिजे ॥ २ ॥ गुणातीत परिपाक । तेंचि श्रीरामा हृदयीं पदक । पाहतां जीवशिवां पडलें टक । अलोलिक निजसेवा ॥ ३ ॥ कटीं बाणली कटिमेखळा । क्षुद्रघंटिकाज्वाळमाळा । कंठीं अनर्घ्य रत्नमाळा । मुक्ताफळांसमयोगें ॥ ४ ॥ वांकीआंदुवांचा मेळा । ज्यांचा धाक कळिकाळा । वैरी कांपती चळचळां । तो चरणकमळा तोडरू ॥ ५ ॥ श्रीरामाचा मुखमृगांक[९] । परिपूर्णत्वें निष्कळंक । त्याचे उपमे न ये शशांक[१०] । तो सकळंक क्षयरोगी ॥ ६ ॥ मुकुट कुंडलें मेखळा । कांसे कसिला सोनसळा । घवघवीत घनसांवळा । देखोनि डोळां निवाले ॥ ७ ॥ टिळक रेखिला

१ मोक्षाचे कामीं. २ बलाढ्य. ३ स्वार. ४ म्हण. ५ तोंड. ६ पुष्पांनीं. ७ शोभून. ८ अलंकारांनीं.

९ मुखचंद्रमा. १० चंद्र.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

पिंवळा । आपाद कंठीं रत्नमाळा । घवघवीत घनसांवळा । देखोनि डोळां निवाले ॥ ८ ॥ कंठीं कौस्तुभ तेजाळा । कटिसूत्रीं किंकिणीजाळमाळा । ऐसा घवघवीत घनसांवळा । देखोनि डोळां निवाले ॥ ९ ॥ मुक्तीचा दुकाळ मुक्ताफळां । ते पडली श्रीरामाच्या गळां । मुक्ती देवोनि मुक्ताफळां । घनसांवळा शोभत ॥ ११० ॥ अम्लान[1] नैवपंकजांची[2] माळा । श्रीरामा तुळसीमाळ गळां । तोडर गर्जे रामपदकमळा । घनसांवळा घवघवीत ॥ ११ ॥ हृदयीं पदक अति गंभीर । बाहीं बाहुवटें मनोहर । ऐसा देखोनि श्रीरामचंद्र । नाचती नेत्र सुखोर्मी ॥ १२ ॥ चरणकमळीं संत भ्रमर । वांकीअंदुवांचा गजर । ऐसा देखोनि श्रीरामचंद्र । नाचती नेत्र सुखोर्मी ॥ १३ ॥ रूपरेखा अति लावण्य । ऐसा देखोनि रघुनंदन । ठाणमाण लावण्यधन । नाचती नयन सुखोर्मी ॥ १४ ॥ मांडोनि माहेश्वरी ठाण । करीं धरोनि धनुष्यबाण । ऐसा देखोनि रघुनंदन । नाचती नयन सुखोर्मी ॥ १५ ॥ वीरकंकणीं झणत्कार । करमुद्रिका दशावतार । ऐसा देखोनि रामचंद्र । नाचती नेत्र सुखोर्मी ॥ १६ ॥ नेत्र निवाले निर्विकारें । बुद्धि दोंदली सन्मात्रें । हृदय आनंदलें समग्र । चिदचिन्मात्र श्रीराम ॥ १७ ॥ अहंकोहंसोहंपण । सांडोनि अभिमान आपण । वंदितां श्रीरामाचे चरण । स्वानंदें पूर्ण निवाले ॥ १८ ॥ वीर शृंगार श्रीराममूर्ती । देखतांचि इंद्रियवृत्ती । परमानंदें नित्य तृप्ती । सरित्पति तटस्थ ॥ १९ ॥ टक पडिलें समुद्रा । टक पडिलें वानरां । टक पडिलें सुरनरां । श्रीरामचंद्रा देखोनी ॥ १२० ॥ वाहों विसरलें जीवन । जावों विसरला पवन । रवि विसरला दिनमान । श्रीरघुनंदन देखोनी ॥ २१ ॥ देखतां श्रीरामाची मूर्ती । समुद्र सुखावला चित्तीं । सुग्रीव सुखावला कपिपती । सुखी जुत्पती वानर ॥ २२ ॥ सुखावोनि वानर । अवघे करिती जयजयकार । देतां रामनामें भुभुःकार । नादें अंबर कोदलें ॥ २३ ॥ समुद्रें श्रीराम धरोनि हातीं । नेला वरुणालयाप्रती । वरुणासी नमस्कारी रघुपती । वृद्ध मूर्ति देखोनी ॥ २४ ॥ वरुण घाली लोटांगण । श्रीराम अवतारी ब्रह्म पूर्ण । शीघ्र करीं लंकागमन । विजयी पूर्ण तूं होसी ॥ २५ ॥ जैसा शृंगारिला श्रीरामचंद्र । तैसाचि सखा सौमित्र[3] । दोघे महावीर शूर । जेंवी रविचंद्र आकाशीं ॥ २६ ॥ समुद्रें आणोनियां जाण । रत्नांजळी भरोनि पूर्ण । श्रीरामासी ओंवाळून । सांडिली आपण स्वानंदें ॥ २७ ॥ सुग्रीव येवोनि उठाउठीं । ओंवाळोनि धनकोटी । वांटूं जातां समुद्रतटीं । मागता दृष्टी दिसेना ॥ २८ ॥ श्रीरामाचिये संगतीं । लोलुपता[4] निमाली निश्चितीं । मागण्याची समूळ शांती । स्वानंदें तृप्ती सर्वांसी ॥ २९ ॥ मागता न देखोनि दृष्टीं । वानरीं उडोनि उठाउठीं रावणाचे सभानिकटीं । केली वृष्टी धनरत्नीं ॥ १३० ॥ कायसी[5] धनरत्नांची वृष्टी । पाहूं धाडिल्या राक्षसकोटी । घेवोनि वानरसेनाकोटी । आला जगजेठी श्रीराम ॥ ३१ ॥ आला एकोनि श्रीरामासी । दशानना चिंता मानसीं । पाहों धाडिलें प्रधानांसी । आणि लंकेसी आकांत ॥ ३२ ॥ मागें पळावया नाहीं वाडी । पुढें आली वानरधाडी । रावणाची बुद्धि कुडी । बांधवडी स्त्रीपुत्रां ॥ ३३ ॥ एका जनार्दना शरण । हडबडिलें[6] लंकाभुवन । श्रीराम येवोनि आपण । करील कंदन राक्षसां ॥ १३४ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां श्रीरामसैन्यसिंधुपरपारप्रवेशो नाम एकचत्वारिंशत्तमोऽध्यायः ॥ ४१ ॥ ओंव्या ॥ १३४ ॥ श्लोक ॥ १६ ॥

अध्याय बेचाळिसावा

श्रीरामचंद्राय नमः ॥ आला ऐकोनि रघुनंदन । भयें भयभीत दशानन । प्रधान सेना अति उद्विग्न । लंकाजन सकंपित ॥ १ ॥ चाकाटला रावण । तंव भेरी लावोनि निशाण । स्वयें आला रघुनंदन । वानरसैन्यसंभारीं ॥ २ ॥

ततस्तु तूर्यघोषेण भेरीशब्देन नादिता ।
राघवस्यागमत्सेना नानाप्रहरणान्विता ॥ १ ॥
समागतां तु तां सेनां दृष्ट्वा राजा दशाननः ।
मुहूर्तं ध्यानमास्थाय सचिवान्वाक्यमब्रवीत् ॥ २ ॥
वाक्यं वाक्यविदां श्रेष्ठाः शृणुध्वं मम राक्षसाः ।
न ज्ञातं भवतामद्य लंकां प्राप्तः स राघवः ॥ ३ ॥

---

१ न कोमेजणाऱ्या. २ नवीन कमळांची. ३ लक्ष्मण. ४ लोभ. ५ कां ?, कशामुळें ?. ६ हडबडलें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सहितः सर्वसैन्येन वानराणां सलक्ष्मणः।
निवारणं नैव कृतं वानराणां रणाजिरे ॥ ४ ॥
गृहीत्वा वानरान्सर्वान्सेतुर्बद्धो महोदधौ।
भवंतो विषयासक्ताः प्रसंगे शयनं गताः ॥ ५ ॥

शंख भेरी टाळ घोळ । काहळा वाजती चिनकाहळ। ढोल पटह मांदळ। ध्वनि आगळा बुरुंगें ॥ ३॥ धडै धडै विख्यात वाही निशाणां लागली एक घाई। विराणीं वाजती दोहीं बाहीं। गिडबिड ठायीं गर्जती ॥ ४ ॥ ऐसा वाजंत्रांचा गजर। घेवोनि कपिकुळसंभार। लंके आला श्रीरघुवीर। केला भुभुःकार वानरीं ॥ ५॥ देखोनि श्रीरामाचा यावा। कल्पान्त रावणाच्या जीवा। कायसा प्रधानांचा केवा। दुःखकाल्लोवा राक्षसां ॥ ६॥ श्रीराम आला वानरभारीं। अति आकान्त लंकापुरीं। शंख करिती घरोघरीं। नर नारी कळकळिती ॥ ७ ॥ वानरदळ देखोनि गाढें। एक चाले एकापुढें। एक एकामागें दडे। कोणीकडे दडावें ॥ ८॥ पळावया वाट नाहीं पुढें। वानरीं बळकाविले हुडे। रावणाचें कर्म कुडें। मरण रोकडें सर्वांसी ॥ ९ ॥ रावणअपराधासाठीं। मरती राक्षसांच्या कोटी। घरोघरीं बोंब उठी। वानर दृष्टीं देखोनी ॥ १० ॥ पापबुद्धि लंकानाथा। चोरोनि श्रीरामाची कांता। करविलें लंकेच्या घाता। उपाव आतां चालेना॥ ११ ॥ पूर्वीं सुचवी बिभीषण। सीता देवोनि रिघावें शरण। पापी नायके आपण। आलें मरण राक्षसां ॥ १२ ॥ आला देखोनि रघुनंदन। अति क्षोभला दशानन। पाचारोनियां प्रधान। बोले आपण तयांसी ॥१३॥ घेवोनियां वानरसैन्य। लंके आला रघुनंदन। तरी तुम्हांसी नाहीं ज्ञान। मदें मैथुनविषयांध ॥ १४ ॥ समुद्रीं तारोनि पाषाण। सेतु बांधिला संपूर्ण। तरी तुम्हांस नाहीं ज्ञान। मदें मैथुनें विषयांध ॥ १५ ॥ श्रीराम येवोनि सहपरिवारीं। वानर ठाकिले उरावरी। तुम्ही सुषुप्तींत स्त्रियाजानूंवरी। विषयसंचारीं विषयांध ॥ १६ ॥ सहलक्ष्मण वानरभारीं। श्रीराम आला लंकेवरी। तुम्ही विषयांध निदसुरी। आदळे वैरी तुम्ही नेणां ॥ १७ ॥ मद्यमैथुनीं तत्पर। नाहीं जवळी हेर चार। वैरियें घेतलें घर तुम्ही पामर तें नेणां ॥१८ पंचविषय पंचभूत। तुम्हांस लागलें निश्चित। लंके आला श्रीरघुनाथ। तुम्ही सभ्रांत नेणांचि ॥ १९ ॥ पूर्वील तुमचा बडिवार। म्हणां बापुडे ते वानर। वनचर पालेखाइर। आम्हांसमोर कैंवी येती ॥ २० ॥ तेचि वानर महावीर। सेतु बांधोनि समग्र। लंके आले अति दुर्धर। देती भुभुःकार श्रीरामनामें ॥ २१॥ काळकृतान्त दशानन। त्यातें करोनि तृणासमान। सेतु बांधोनि वानरगण। युद्ध दारुण करूं आले ॥ २२ ॥ उपेक्षोनि वीर समस्त। मजचि लक्षोनि निश्चित। वानर युद्धासी उद्यत। अति समर्थ रणयोद्धे ॥ २३ ॥ रोकडें मांडलें असे रण। तुम्ही करितां कपिहेळण। अवश्य तुमचा घेतील प्राण। कपि विचक्षण रणयोद्धे ॥२४॥ तुमचिया असावधानता। लंके येणें श्रीरघुनाथा। वानरीं सेतुबंधनता। नेणों सर्वथा अति गर्वें ॥ २५ ॥

बध्यमानं तथा सेतुं वानरैश्च निशाचराः।
द्रष्टुं चारा न प्रहिता मंत्रिपक्षो मदोद्धतः ॥ ६ ॥
हितं मंत्रयते राज्ञः स मंत्रीति निगद्यते
मंत्रिभिः सह कार्यार्थः सिद्धिं गच्छत्यसंशयम् ॥ ७ ॥
एवं भवद्भिर्विश्रंभाद्वंचितोहं निशाचराः।
अंको ममायं सुमहान्यदि कार्यं विनंक्ष्यति ॥ ८ ॥

वानरवीर स्वयें समस्त। कडकडाटें सेतु बांधित। तें तुम्ही नेणां गर्वोन्मत्त। मद्याभिभूत स्त्रीकामी ॥ २६ ॥ धनोन्मत्त मदोन्मत्त। स्त्रीकामें कामोन्मत्त। गर्वोन्मत्त बळोन्मत्त। पंचोन्मत्त तुम्ही सर्व ॥ २७ ॥ पंचोन्मत्त उन्मत्त पूर्ण। चोर हेरें पाठविले कोण। माझ्या कार्याची आठवण। तुम्हांसी विस्मरण उन्मादें ॥ २८ ॥ सर्वदा रायाचें हित विचारी। यालागीं त्यासी म्हणिजे मंत्री। तें कार्य नाहीं तुम्हांमाझारी। विषयसंचारी विषयाचे ॥ २९ ॥ सकळ कार्य प्रधानांहातीं। ऐसी अनादि राजनीती। तुम्ही माझे विश्वासघाती। ठकिलें निश्चितीं निजस्वार्थी ॥ ३० ॥ तुम्हांस मज विश्वासतां। तुम्ही पेटलेति माझ्या घाता। लंके

१ वाद्यविशेष. २ आगमन. ३ पाड, गणना. ४ दुःखाचा कड. ५ बुरुज. ६ जासूद. ७ मोठेपणा. ८ वानरांची निंदा.

९ गैरसावधपणानें. १० दारू पिऊन गुंग झालेले. ११ दूत.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

आणिलें श्रीरघुनाथा। कुळक्षयार्थी समूळीं ॥ ३१ ॥ बिभीषण माझा धर्ममूर्ती। तो बोलिला सत्य युक्ती। प्रधान तुझे विश्वासघाती। हेही प्रतीति मज आली ॥ ३२ ॥ उन्मादें मदोन्मत्त प्रधान। अविश्वासी यांचें वदन। ऐसें बोलिला बिभीषण। प्रत्यक्ष प्रमाण मज आलें ॥ ३३ ॥ माझा बिभीषण येथें असता। तो सेतूचि बांधों न देता। येवों न देता रघुनाथा। माझ्या निजहिता कृतोपकारी ॥ ३४ ॥ तुमच्या वचना विश्वासोन। सखा दवडिला बिभीषण। आंगीं आदळला रघुनंदन। कपटी प्रधान मज माझे ॥ ३५ ॥

रावणेनैवमुक्तास्ते राक्षसा व्रीडिता भवन्।
व्रीडितानां ततस्तेषां मेघनादो ह्यभाषत ॥ ९ ॥
किमर्थं तप्यसे तात राघवो लक्ष्मणस्तथा।
किं करिष्यंति मनुजा वानरा वनचारिणः ॥ १० ॥
तौ वा मनुष्यमात्रौ तु भ्रातरौ रामलक्ष्मणौ।
व्यतीते संभ्रमे राजन्नहं हन्मि प्लवंगमान् ॥ ११ ॥

लंके आला रघुनंदन। सकोप रावणाचें वदन। ऐकोनि सेना प्रधान। लज्जायमान जाहले ॥३६॥ गजरें आला रघुनंदन। आंगीं आदळलें विघ्न। लज्जायुक्त प्रधान। कंपायमान भयभीत ॥ ३७ ॥ आला देखोनि रघुनाथ। रावण कोपें जाला कृतान्त। प्रधानराक्षसेंसीं आकान्त। प्राणावर्त सर्वांसी ॥ ३८ ॥ अधोवदनें अवघे स्तब्ध। कांहीं न बोलती शब्द। तया काळीं मेघनाद। करी अनुवाद जनकासीं ॥३९॥ आला देखोनि श्रीरघुनाथा। तूं कां व्यर्थ भीसी ताता। कायसी रामलक्ष्मणांची कथा। कपि समस्त कोण गणी ॥ ४० ॥ इंद्र आणिला बांधोन। बंदीं घातले सुरगण। रामलक्ष्मण ते कोण। वानरगण कोण गणी ॥४१॥ वानर स्वयें पालेखाइर। रामलक्ष्मण मनुष्यमात्र। ते तंव आमचा नित्य आहार। भय दुर्धर तुज कैंचें ॥४२॥ स्वामीनें राहावें सुखें स्वस्थ। तूंही जाणसी माझा पुरुषार्थ। जे जे आले आहेत येथ। ते मी समस्त मारीन ॥ ४३ ॥ विकट बाण वीरश्रेणी[१]। रामलक्ष्मण पाहीन रणीं। अंगद सुग्रीव राजे दोनी। रणीं शोधोनी मारीन ॥ ४४ ॥ ज्याचे पवाडे[२] अद्भुत। कंदन केलें लंकेआंत। तो मी मारीन हनुमंत। जावबंत दूसरा ॥ ४५ ॥ नळ नीळ गंधमादन। तरस तरळ पनस सुषेण। एकैक वानर ससैन्य। निर्दळीन बाणाग्रें ॥ ४६ ॥ माझ्या बाणांची झडाडी। रामलक्ष्मणां प्रेतपरवडी[४]। मारीन वानरांच्या कोडी। तीं बापुडीं मर्कटें ॥ ४७ ॥

मेघनादवचः श्रुत्वा प्रहस्तो वाक्यमब्रवीत्।
मुशलायोधिनो ह्यग्रे कः स्थास्यति रणाजिरे ॥ १२ ॥
मुशलं भ्रममाणं तु रावण त्वमवेक्ष्यथाः।
अहमेको वधिष्यामि तव शत्रुं दशानन ॥ १३ ॥
सुखी भव महाराज यथेष्टं कुरु चेष्टितम् ॥ १४ ॥

ऐकोनि इंद्रजिताचें वचन। प्रहस्त बोले अति गर्जोन। राया तुझे शत्रुदमन। मी करीन एकला ॥ ४८ ॥ माझ्या मुसळघायापुढें। रामलक्ष्मण बापुडे। कायसे वानर बळियाडे। रणीं रोकडे मारीन ॥ ४९ ॥ मुसळ साधन चक्राकार। अष्टांगीं विषम मार। प्रहस्त दावी महावीर। दशशिर अनुलक्षी ॥ ५० ॥ राया तुझा शत्रुसंभार। म्यां मारिला मानीं साचार। सेवोनि पद्मिनीकामसेजार। भोगीं विचित्र स्वयें भोग ॥ ५१ ॥

एवमुक्तः प्रहस्तेन धूम्राक्षो वाक्यमब्रवीत्।
लंकामूले स्थिताः सूक्ष्मीभूत्वा सद्यो निशाचराः ॥ १५ ॥
गच्छामस्त्वरिताः सर्वे तत्र तद्वानरान्बहून्।
सुखसुप्तान्हनिष्याम एतद्धि मम रोचते ॥ १६ ॥

ऐकोनि प्रहस्तनव्हाळी। धूम्राक्ष गर्जोनि वचन बोली। वानरसेना लंकामूळीं। आतुर्बळी आदळली ॥ ५२ ॥ सन्नद्ध आम्ही अवघे जण। रात्रीं जावोनि आपण। निजले असतांचि जाण। वानरगण निर्दळूं ॥ ५३ ॥ सौमित्र आणि रघुपती। सुग्रीवअंगदादि जुत्पती। जावोनि मारूं रातोरातीं। रणसमाप्ती शत्रूसी ॥ ५४ ॥ ऐसी करोनियां ख्याती। यश देऊं लंकापती। हेंचि आवडे माझे चित्तीं। वीरांप्रती सांगत ॥ ५५ ॥ ऐसीं धूम्राक्षाचीं उत्तरें। निर्भर्त्सिलीं महोदरें[५]। श्रीरामें नित्य रक्षिलीं वानरें। सहपरिवारें सुग्रीवें ॥ ५६ ॥

१ येऊन ठेपला. २ शूरांचा समुदाय. ३ स्तुति, कीर्ति. ४ मरणप्राप्ति. ५ शत्रूचा प्रतिबंध.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

महोदरोथ निर्भर्त्स्य धूम्राक्षं वाक्यमब्रवीत् ।
वानराणां बलं वीरैः समंतात्परिरक्षितम् ॥ १७ ॥
न तत्र गमनं युक्तं पुरा बुद्धिर्विधीयताम् ॥ १८ ॥

निजल्या वानरां करावा घात । हा कोण तुझा पुरुषार्थ । धूम्राक्षासी सभेआंत । निर्भर्त्सित महोदर ॥ ५७ ॥ श्रीराम नित्य सावधान । स्वयें रक्षी वानरगण । सुग्रीव राजा आपण । करी रक्षण अहोरात्र ॥ ५८ ॥ श्रीराम नित्य सावधान । छळितां मारीच पावला मरण । शूर्पणखा आपण । करितां छळण विटंबिली ॥ ५९ ॥ तेथें वानरांच्या निजघातीं । तुम्हांसी जातां रातोरातीं । श्रीरामबाणाच्या संपातीं । मराल निश्चितीं एकैक ॥ ६० ॥ श्रीराम नित्य देखणा जाण । परी त्याचिया भात्याचे बाण । आंधारीं देखणे पूर्ण । घेती प्राण गिवसंगिवसू[1] ॥ ६१ ॥ देखोनि श्रीरामदर्भशिखा । पाठी लागोन काका । हिंडवोनि तिहीं लोकां । शेखीं वामनेत्र देखा घेतला ॥ ६२ ॥ ऐसिया श्रीरामापुढें । घाला घालणें केंवी घडे । तुम्ही राक्षस उन्मत्त वेडे । मराल रोकडे श्रीरामबाणीं ॥ ६३ ॥ तुम्ही ऐका अवघे सावध । वानर आले अति उन्नद्ध । दुर्ग करा सन्नद्धबद्ध । दुर्गबळें युद्ध करूं त्यांसीं ॥ ६४ ॥ हुडे अटाळे पौळी पागरे । ठायीं ठायीं जडा यंत्रें । सन्नद्धबद्ध वीरानुवीरें । दुर्गद्वारें रक्षावीं ॥ ६५ ॥ दुर्धर या वानरांचे बळा । कपाटीं घाला रे अगेळा[2] । दृढ देखोनियां सांखळा । दळ समेळ संरक्षा ॥ ६६ ॥ ऐकोनि महोदराची मात । अतिकाय गदगदां हांसत । जो जो बोलिला पुरुषार्थ । तो तो व्यर्थ दिसताहे ॥ ६७ ॥ वानरांच्या उड्डाणापुढें । लंकादुर्ग तें बापुडें । अगेळा सांखळा कवाडें । कोणीकडे आवरती ॥ ६८ ॥ त्रिकूटाच्या शिखरांवरी । उडों शकिजेल वानरीं । तेथें तुमच्या दुर्गांची थोरी । तृणावारी गणीना ॥ ६९ ॥ स्वहित सांगतां बिभीषण । त्यासी केलें नगरनिर्यापण[3] । मजही बोलतां स्वधर्म पूर्ण । अवघे जण क्षोभाल ॥ ७० ॥ क्षमा कराल अवघे जण । तरी मी यथार्थ सांगेन । सत्यसंकल्प रघुनंदन । वृथा वल्गन प्रधानां ॥ ७१ ॥ इंद्रजित माझा ज्येष्ठ बंधू । पुरुषार्थें बोलतो असंबद्धू[4] । करितां कपीसीं युद्धसंबंधू । तेणें सुवद्धू[5] गांजिला ॥ ७२ ॥ तोचि इंद्रजित आतां । लाजेना वांटीव बोलतां । मिथ्या बोले राया-देखतां । अतिपुरुषार्थी वल्गोनी ॥ ७३ ॥ मारीन लक्ष्मण रघुनाथ । सुग्रीव अंगद जांबवंत । मारीन म्हणतां हनुमंत । सभेआंत लाजेना ॥ ७४ ॥ तैसाचि प्रहस्त प्रधान । जंबुमाळी मारिल्या जाण । पुत्रशोकें करी शंखस्फुरण । हनुमंतीं रण न करीचि ॥ ७५ ॥ हनुमंतेंसीं रण न करवे । तो प्रहस्त मुसळेंसीं धांवे । सुग्रीवादि कपि आघवे । मारीन लाघवें हे मृषा जल्प ॥ ७६ ॥ धूम्राक्ष महाबळवंत । निजल्या वानर समस्त । यांचा म्हणे मी करीन घात । थोर पुरुषार्थ हा त्याचा ॥ ७७ ॥ ऐसे मिथ्यावादी प्रधान । वृथा मिरविती आंगवण । त्यांसी विश्वासतां रावण । दुःख दारुण पावेल ॥ ७८ ॥

एतस्मिन्नंतरे वीरः प्रगृह्य विपुलं भुजम् ।
अतिकायो महावीर्यो रावणं वाक्यमब्रवीत् ॥ १९ ॥
रक्षितव्याः प्रजा राज्ञा रक्षितव्या द्विजातयः ।
दस्यवश्च निहंतव्याः परिपाल्याश्च साधवः ॥ २० ॥
रामो विनयसंपन्नस्तस्य भार्या त्वया हृता ।
तेनैव गर्विता यूयं विनाशाय कुलस्य च ॥ २१ ॥
तन्मह्यं रोचते बुद्ध्या सीता रामाय दीयताम् ।
एवमुक्त्वातिकायस्तु तूष्णींभूतो बभूव ह ॥ २२ ॥

तेचि समयीं वीराधिराज । उभवोनियां दक्षिण भुज । अतिकाय स्वधर्म गर्जे । अवधारिजे राजेंद्रा ॥ ७९ ॥ रायें रक्षावे गोब्राह्मण । निर्भय प्रजांसी संरक्षण । करावें दुष्टांचें निर्दळण । परिपाळण साधूंचें ॥ ८० ॥ ऐसिया स्वधर्मनीती । ज्या रायांच्या वर्तती स्थिती । ते राजे सदा सुखी असती । धरा भोगिती निर्भयें ॥ ८१ ॥ हित सांगतां बिभीषण । लत्ताघातें नगरनिर्यापण । मजही बोलतां स्वधर्म पूर्ण । दुष्ट दुर्जन न म्हणावें ॥ ८२ ॥ सुबुद्धि बिभीषण पवित्रु । दवडिला तुम्ही करोनि शत्रु । तूं पिता मी निजपुत्रु । धर्मविचारु अवधारीं ॥ ८३ ॥ जिकडे नित्य पापाचें आचरण । अकीर्ति अपेश अकल्याण । अति निंद्यत्वें पावे मरण । सत्य जाण लंकेशा ॥ ८४ ॥ जेथें नित्य

१ शोधशोधून. २ खिळी. ३ नगराबाहेर घालविणें. ४ बडबड. ५ मोठेपणा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

धर्माचरण । यश कीर्ति कृतकल्याण । त्रैलोक्यीं विजयी होय आपण । सत्य जाण लंकेशा ॥ ८५ ॥ श्रीराम धर्मात्मा अति शुध्दू । तुझा न करितां अपराधू । तुवां कां चोरिली त्याची वधू । पापी सुबध्दू जालासी ॥ ८६ ॥ सीता पतिव्रता संपूर्ण । करितां परदारहरण । खतेला पापी तूं पूर्ण । कुळनिर्दळण अति पापें ॥ ८७ ॥ सीता आणितां लंकेआंत । तैंहूनि उठिले अति उत्पात । अखयादि वीर समस्त । केला अति घात हनुमंतें ॥ ८८ ॥ परदारपापसंकटीं । वानरांसी देवोनि पाठी । इंद्रजित पळे उठाउठीं । सैन्यकोटी मारवूनी ॥ ८९ ॥ परदारादिहरण । तें पाप अति दारुण । वानरें गांजिला रावण । लंकाभुवन जाळोनी ॥ ९० ॥ ऐसी देखतां प्रतीती । वृथा माना बलोन्मत्ती । गर्वें निमसील[३] लंकापती । सैन्यसंपत्ती समूळ ॥ ९१ ॥ साष्टांग नमन रावणासी । दुसरें नमन इंद्रजितासी । तिसरें नमन प्रधानांसी । निजहितासी अवधारा ॥ ९२ ॥ माझे आवडीची कथा । श्रीरामासी अर्पोनि सीता । वांचवावें लंकानाथा । आणि समस्तां राक्षसां ॥ ९३ ॥ श्रीरामासी रिघोनि शरण । सीता अर्पितां आपण । अक्षय्य कुमर आणि रावण । सत्य वचन हें माझें ॥ ९४ ॥ सैन्य सेना प्रधान । अक्षय राक्षसलंकाभुवन । भुक्तिमुक्ति अक्षय पूर्ण । त्रिसत्य वचन हें माझें ॥ ९५ ॥ सीता अर्पोनि आपण । श्रीरामा रिघतां शरण । स्वप्नीं नाहीं जन्ममरण । परम कल्याण अति कीर्ति ॥ ९६ ॥ ऐसें स्वहिताचें उत्तर । स्वयें न मानी दशशिर । प्रधान न मानिती कुमर । मरणातुर उन्मादें ॥ ९७ ॥ मद्योन्मत्त धनोन्मत्त । बलोन्मत्त राज्योन्मत्त । अति गर्वें गर्वोन्मत्त । पंचोन्मत्त मरणार्थी ॥ ९८ ॥ पतंग दीपातें झडपिती । जळोनि स्नेहीं बुडती । तरी मागील झडप देती । मरणोन्मत्तीं उन्मत्त ॥ ९९ ॥ अभिलाषितां सीता सती । विरोधितां श्रीरघुपती । रावणा मरसी गर्वोन्मत्तीं । सैन्यसंपत्तीसमवेत ॥ १०० ॥ रावणा देखतां लंकेआंत । कपीनें केला अति आकांत । तेंही न माना तुम्ही समस्त । गर्वोन्मत्त मरणार्थी ॥ १ ॥ भीड सांडोनि बोलिलों कठिण । यालागीं माझें लोटांगण । क्षमा करावें संपूर्ण । बाळभाषण हें माझें ॥ २ ॥ स्वहित नायके दशानन । अतिकायासी आलें रुदन । अश्रुपूर्ण जाले नयन । धरोनि मौन राहिला ॥ ३ ॥ दुःख पावेल निजमाता । ऐशिया बोलाची कथा । येवों नेदीच वाक्पंथा । अति मौनता राहिला ॥ ४ ॥ ऐकोनि अतिकायाचें वचन । जीवीं खोंचला दशानन । इंद्रजित आणि खोंचले प्रधान । प्रतिवचन न देती ॥ ५ ॥ एका जनार्दना शरण । श्रोत्या वक्त्या पडलें मौन । सुंदरकांड जालें संपूर्ण । श्रीजनार्दननिजकृपा ॥ ६ ॥ घेवोनि वाळीचें बळबंड । सुग्रीवा राज्य दिधलें प्रचंड । कपिसैन्य आणोनि उदंड । सुंदरकांड संपविलें ॥ ७ ॥ सीताशुद्धीचिये चाडां । वानरें वनीं देवोनि झगडा । हेमविवरीं घेवोनि झाडा । सुंदरकांडा संपविलें ॥ ८ ॥ देवोनि समुद्रीं गडाडा । वानरीं प्राण देतां पुढां । संपाती भेटोनि रोकडा । सुंदरकांडा संपविलें ॥ ९ ॥ सीता शोधोनि धडफुडां । समुद्र उल्लंघोनि हनुमान गाढा । करोनि अशोकवना उपांडा । सुंदरकांडा संपविलें ॥ ११० ॥ मिष करोनि वनउपाडा । वनीं राक्षस करोनि रगडा । इंद्रजित गांजोनि गाढा । सुंदरकांडा संपविलें ॥ ११ ॥ किंकरवनकरांचा तोंडा । अखया उपटोनियां दुर्गापुढां । लंका जाळोनि भडभडां । सुंदरकांडा संपविलें ॥ १२ ॥ शुद्धि सांगोनि रामापुढां । गेला सिंधूसीं स्वयें रोकडा । झाडोनि समुद्राचा पादाडा[११] । सुंदरकांडा संपविलें ॥ १३ ॥ दशयोजनें रुंद येवढा । शतयोजनें सेतु गाढा । राम आणोनियां लंकापुढां । सुंदरकांडा संपविलें ॥ १४ ॥ संपवोनि सुंदरकांडा । पुढें युद्धकांडाचा झगडा । श्रीराम करील राक्षसरगडा । प्रतापपवाडा अवधारा ॥ १५ ॥ एका जनार्दना शरण । सुंदरकांड संपवून । पुढें युद्धकांडनिरूपण । गोड रामायण अवधारा ॥ ११६ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां रावणसेनासंवादे अतिकायरावणप्रबोधः श्रीरामलंकागमनं च नाम द्विचत्वारिंशत्तमोऽध्यायः ॥ ४२ ॥ ओंव्या ॥ ११६ ॥ श्लोक ॥ २२ ॥

१ निंद्य. २ अनुभव. ३ मरशील. ४ क्षयरहित, सुरक्षित. ५ वाणीनें. ६ स्तब्ध होऊन. ७ खजील झाला. ८ मोठें. ९ आवडीनें, इच्छेनें. १० नाश. ११ अभिमान, गर्व.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations



श्रीएकनाथ महाराजकृत

श्रीभावार्थरामायण

युद्धकांड

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

रामरावणांचें युद्ध.



लक्ष्मण युद्धांत पडला म्हणून मारुति द्रोणाचल आणीत आहे.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

श्रीसद्गुरवे रामचंद्राय नमः ।

श्रीएकनाथ महाराजकृत

श्रीभावार्थरामायण

युद्धकांड

अध्याय पहिला

श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः॥ उदार गंभीर सुंदरकांड । तें संपवूनि अतिशयें गोड । पुढां उठावलें युद्धकांड । अति प्रचंड प्रतापी ॥ १ ॥ वाखाणावया युद्धकांड । माझें केंवी सरतें तोंड । तरी जनार्दनकृपा अखंड । जे कांडें कांड अर्थवी॥ २ ॥ रामायणींचा सखोल अर्थ । वक्ता जनार्दन समर्थ । सबाह्य परिपूर्ण रघुनाथ । ग्रंथ परमार्थ श्रीराम ॥ ३ ॥ रामायणींचें निजसार । क्षरीं कोंदलें अक्षर । पदापदार्थ चिदचिन्मात्र । परम पवित्र रामकथा ॥ ४॥ कथेमाजील कथार्थ । सबाह्य कोंदला रघुनाथ । हाचि ग्रंथींचा परमार्थ । निजात्मस्वार्थ साधका ॥ ५ ॥ विषम जरी रामचरित्र । तरी ते कथा चिन्मात्र । जनार्दनकृपा अति उदार । कथासुखसार स्वानंदें ॥ ६ ॥ माझें जें वदतें वदन । स्वयें जाला रघुनंदन । वचनावचनीं निर्वचन । कथा पावन श्रीरामें ॥ ७ ॥ श्रीरामकथेचा गुह्यार्थ । यथार्थ वदवी रघुनाथ । माझे हातीं लेखणी दऊत । कथा लिहिवीत श्रीराम ॥ ८ ॥ माझे दृष्टीचें देखणेंपण । श्रीराम होवोनि आपण । दावी कथानिरूपण । जागृतिस्वप्नसुषुप्तीं ॥ ९ ॥ जागृतीं स्वयें कर्म करितां । तंव कर्मीं प्रकटे श्रीरामकथा । स्वप्नीं प्रकटे निजगुजवार्ता । होय सांगता श्रीराम ॥ १० ॥ सुषुप्तीं करितां सुखें शयन । तेथें नाहीं जन्ममरण । नाहीं कर्मधर्माचरण । सुषुप्ति पूर्ण श्रीराम ॥ ११ ॥ करूं बैसतां भोजन । ग्रासोग्रासीं रामायण । जेवणीं गोड श्रीरामभजन । दावी आपण श्रीराम॥ १२ ॥ चवी चाखतां रसाआंत । रसस्वाद श्रीरघुनाथ । करोनि भोजनाचा अंत । रामायणार्थ राम दावी ॥ १३ ॥ चाखूं जातां रसस्वादन । रस रसना रघुनंदन । श्रीरामें स्वानंदभोजन । रामायण अति गोड ॥ १४ ॥ चाखतां रामायणगोडी। रस रसना रसत्व सांडी । दृष्टि दृश्यातें ओसंडी । जोडितां जोडी रामकथा ॥ १५॥ करूं जातां सुखें शयन । विसरों नेदी रामायण । शेज बाज अंथरूण । होय आपण श्रीराम ॥१६॥ रामायण लिहावयाअर्थीं । जागृतीं स्वप्नीं आणि सुषुप्तीं । विसंबेना रघुपती । अहोरातीं रामकथा ॥ १७ ॥ रामायण लिहावयासाठीं । रामें पुरविली माझी पाठी। मीपण हरोनि हटाहटीं । कथा मराठी स्वयें दावी ॥ १८ ॥ श्रीरामाची रामकथा। ते चहूं मुक्तींतें हाणी लाता। निर्भर्त्सून चहूं पुरुषार्थां । कथार्थता परब्रह्म॥१९॥ एवढा साधकाचा स्वार्थ। साधावया श्रीरघुनाथ। रामायण स्वयें लिहिवीत । शुद्ध परमार्थ राम-

१ योग्य. २ फार खोल. ३ अवघड. ४ पहाणें. ५ जागृति, स्वप्न व सुषुप्ति या तीन अवस्थांमध्यें सुषुप्ति=गाढ झोंप. ६ टाकी.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

कथा ॥ २० ॥ असो हरिकथानिरूपण । नित्य करितां नामस्मरण । स्वयें ब्रह्म ये ओरसोन । जेंवी कां धेनु वत्सासीं ॥ २१ ॥ रामनामस्मरणासाठीं । परब्रह्मींच पडे मिठी । तें नाम सांडून करंटीं । करिती अटाटी कुशमृत्तिका ॥ २२ ॥ न कर्मणा न प्रजया श्रुती । कर्मे नव्हे पदप्राप्ती । कर्मे ते देहधर्मस्थिती । परब्रह्मप्राप्ती रामनामें ॥ २३ ॥ ऐसी रामनामाची ख्याती । तो श्रीराम लंकेप्रती । घेवोनि आला वानरपंक्ती । लंकापती दंडावया ॥ २४

ससैन्ये सागरे तीर्णे रामे दशरथात्मजे ।
अमात्यौ रावणः श्रीमानब्रवीच्छुकसारणौ ॥ १ ॥
वानरीं तनुमास्थाय परिसंख्यातुमर्हथः ।
बलं यात्राविधानं च योधानां च विनिर्णयः ॥ २ ॥
व्यवसायं च रामस्य वीर्यं प्रहरणानि च ।
लक्ष्मणस्य च सौमित्रस्तत्त्वतो ज्ञातुमर्हथः ॥ ३ ॥

समुद्रीं सेतु बांधोन । वानरसेना घेऊन । लंके आला रघुनंदन । भेरी निशाण लाऊनी ॥ २५ ॥ आला देखोनि रघुनंदन । रावण जाला अति उद्विग्न । पाचारोनि शुकसारण । दुःख दारुण आलोची ॥ २६ ॥ माझे प्रधान उन्मत्त पूर्ण । नाहीं स्वहिताची आठवण । करितां वारुणीमाध्वीमद्यपान । तेथें पाठवी कोण हेर चार ॥ २७ ॥ असो माझ्या प्रधानांची कथा । माझी मजचि पडली चिंता । लंके आल्या श्रीरघुनाथा । काय त्यां आतां करावें ॥ २८ ॥ तुम्हीं जावोनि हेरवृत्तीं । श्रीरामसैन्य आहे किती । झुंझार आणि वीरवृत्ती । संख्या मजप्रती सांगावी ॥ २९ ॥ श्रीरामाचा उत्साह पूर्ण । शस्त्रास्त्रें दुर्धर बाण । सखा सौमित्र लक्ष्मण । त्याची आंगवण मज सांगा ॥ ३० ॥ श्रीरामाचें बळ दळ । वानरांचें शौर्य शीळ । लक्ष्मणाचा रणकल्लोळ । करोनि विवळ मज सांगा ॥ ३१ ॥

इति प्रतिसमादिष्टौ राक्षसौ शुकसारणौ ।
कपिरूपधरौ वीरौ प्रविष्टौ वानरं बलम् ॥ ४ ॥
तौ गत्वा मायया च्छन्नौ राक्षसेंद्रस्य मंत्रिणौ ।
सारणश्च शुकश्चैव संख्यातुं नाधिजग्मतुः ॥ ५ ॥

जातां राक्षसवेषस्थिती । कपि तुमचा घात करिती । घेवोनि वानरवेषवुंथी । सैन्यसंपत्ती गणावी ॥ ३२ ॥ ऐकोनि रावणाचें वचन । शुक आणि सारण । वानरवेष धरोनि जाण । आले आपण कपिसैन्यीं ॥ ३३ ॥ सैन्य पहतां निर्वाडें । वानर दाटले चहूंकडे । रिती पृथ्वी दृष्टी न पडे । मागें पुढें कोंदले ॥ ३४ ॥ वानर दाटले भूतळीं । वानर दाटले नभःस्थळीं । वानर दाटले जळीं स्थळीं । लंकामूळीं कलकलती ॥ ३५ ॥ तेथें करितां शंखस्फुरण । वानरसंख्या न करवे जाण । थोटावले शुकसारण । वानरगण न गणवती ॥ ३६ ॥ एक आदळले लंकेसीं । असंख्य वानर आकाशीं । कपि कोंदले पृथ्वीसीं । सिंधूपासीं अगणित ॥ ३७ ॥ मागून वानरांच्या परवडी । सवेग धांवती तांतडी । नळ नीळ अंगद वीरकोडी । अति कडाडीं पैं आले ॥ ३८ ॥ श्रीरामापाठीसीं वानर । अर्बुदें निर्बुदें पद्मनिकर । त्यांमागें सुग्रीवाचा भार । अति अपार असंख्य ॥ ३९ ॥ त्याहीवेगळे पैं जुत्पती । वेगळे वेगळे भार नेणों किती । संख्या करितां शंखस्फूर्ती । सैन्यसंपत्ती न गणवे ॥ ४० ॥ शोधितां वानर पाळतीनें । तंव ओळखिले बिभीषणें । त्यांचीं लक्षून लक्षणें । धरिले तेणें साटोपें ॥ ४१ ॥

तौ ददर्श महामायौ प्रतिच्छन्नौ विभीषणः ।
ग्राहयित्वा महातेजा वानरैर्वानरोपमौ ॥ ६ ॥
आचचक्षे स रामाय तावुभौ शुकसारणौ ।
तौ दृष्ट्वा व्यथितौ रामं निराशौ जीवितं प्रति ॥ ७ ॥
सुप्रसन्नोऽब्रवीद्रामः सर्वभूतहिते रतः ।
बधार्हौ वां प्रमुंचामि दृष्ट्वा सैन्ये समंततः ॥ ८ ॥
वक्तव्यं राक्षसं गत्वा यथोक्तं वचनं मम ।
श्वोभूते नगरीं लंकां सप्राकारां सतोरणाम् ॥ ९ ॥
रक्षसां च बलं पश्य शरैर्विध्वंसितं मया ॥ १० ॥

दोहीं हेरांचें लक्षण । लक्षूं जाणे बिभीषण । त्याही लक्षणांचें लक्षण । अति विंदाण अवधारा ॥ ४२ ॥ उड्डाण विराण उलटें किराण । करूं नेणती शुक सारण । अवघे म्हणती कपटी पूर्ण । धरी धांवोन बिभीषण ॥ ४३ ॥ आणिकें त्यांसी धरूं

१ प्रेमयुक्त होऊन, पान्हा फुटून. २ यागयजनांत दर्भाचा व मातीचा उपयोग. ३ पाहे. ४ स्पष्ट.

५ वानररूप धारण करून. ६ लक्षपूवक. ७ सैन्यसमूह ८ पाळत ठेवून.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

जातां । दोघे पळती लघुलाघवता । बिभीषण जाणे राक्षसां समस्तां । होय धरिता धांवोनी ॥ ४४ ॥ वानरीं बांधोनि वानरवेषी । शीघ्र आणिले रामापासीं । राम कृपालु सर्व भूतांसी । काय त्यांसीं बोलत ॥ ४५ ॥ रावण चोर तुम्ही त्याचे हेर । वधायोग्य बोले शास्त्र । तरी मी न मारीं साचार । वानरभार पहा माझा ॥४६॥ आणिकापासून हे पळती । म्हणोनि दिधले हनुम्याहातीं । राक्षसमावांची व्युत्पत्ती । पुच्छाप्रती चालेना ॥ ४७ ॥ दोघे धरोनि पुच्छावर्ती । स्तोमें स्तोमें ऋक्षजुत्पती । दाखविली सैन्यसंपत्ती । रावणाप्रती सांगावया ॥ ४८ ॥ तुम्ही दोघे मारलिया जाण । कोण आमुचें दादुलेपण । रावणापासीं माझें वचन । स्वयें गर्जोन सांगावें ॥४९॥ प्रातःकाळीं कडकडाट । करीन राक्षसां सपाट । बाणीं भेदून त्रिकूट । दशकंठ छेदीन ॥ ५० ॥ माझे बाण सुटल्या देखा । झाडिती तोरणें पताका । बाणीं विध्वंसूनि लंका । दशमुखा छेदीन ॥ ५१ ॥ अपराधी निरपराधी । श्रीराम पाहे समानबुद्धी । दोघे सोडविले त्रिशुद्धी । कृपानिधि कृपाळुवें ॥ ५२ ॥ सांगोनि पराक्रम पुरुषार्थ । दोघां करविलें निर्मुक्त । स्वयें चळचळां कांपत । लंकेआंत ते आले ॥ ५३ ॥

इति प्रतिसमादिष्टौ राक्षसौ शुकसारणौ ।
आगम्य नगरीं लंकामब्रूतां राक्षसाधिपम् ॥ ११ ॥
विभीषणगृहीतौ तौ वधार्थ राक्षसेश्वरः ।
दृष्ट्वा धर्मात्मना मुक्तौ रामेणामिततेजसा ॥ १२ ॥
एकस्थानगता यत्र चत्वारः पुरुषर्षभाः ।
रामो दाशरथिः श्रीमान्लक्ष्मणश्च विभीषणः ॥ १३ ॥
सुग्रीवश्च महातेजा महेंद्रसमविक्रमः ।
एते शक्ताः पुरीं लंकां सप्राकारां सतोरणाम् ॥ १४ ॥
उत्पाट्य संक्रामयितुं सर्वे तिष्ठंतु वानराः ।
यादृशी श्रीर्हि रामस्य वीर्यं प्रहरणानि च ॥ १५ ॥
हनिष्यति पुरीं लंकामेकस्तिष्ठंतु ते त्रयः १६ ॥

चोर अपराधी वधयुक्त । ते श्रीरामें केले निर्मुक्त । धाकें चळचळां कांपत । आले धांवत लंकेसी ॥५४॥ रावण देखतांही दृष्टीं । धाकें धाप न समाये पोटीं । बोबडी वळलीसे होटीं । सांगतां गोष्टी चळकांप ॥ ५५ ॥ स्वस्थ होवोनि निवाडें । गोष्टी सांगती रावणापुढें । वानरसैन्य असंख्य गाढें । संख्या न घडे निश्चित ॥ ५६ ॥ आम्ही जातां दोघे जण । बिभीषणें धरिलें ओळखोन । नेतां रामापासीं बांधोन । अचुक मरण आम्ही मानूं ॥ ५७ ॥ मारावें म्हणे बिभीषण । मारा म्हणती वानरगण । राम धर्मात्मा आपण । दिधलें सोडून प्रतापदृष्टीं ॥ ५८ ॥ हे मारिल्या दोघे जण । आम्हीं काय जिंतिला रावण । त्यांसी दाखवा वानरसैन्य । पाळती गणा सर्वेही ॥ ५९ ॥ देवोनि हनुमंताचे हातीं । आम्हां दाखविली सैन्यसंपत्ती । असंख्य वानरांचिया जाती । संख्या सर्वार्थी न करवे ॥ ६० ॥ एक एक मर्कट । वधूं पाहे दशकंठ । लंका मानिती फोलकट । बळ उद्भट वानरां ॥ ६१ ॥ सप्राकार सतोरण । विध्वंसावया लंकाभुवन । चौघांपासीं प्रताप पूर्ण । कोण कोण तें ऐका ॥६२॥ श्रीराम आणि लक्ष्मण । घरचा भेदी बिभीषण । सुग्रीव राजा विजयी पूर्ण । म्हणती क्षणें रावण निर्दाळूं ॥ ६३ ॥ लंका उपडोनियां समूळीं । निक्षेपावया समुद्रजळीं । हेचि चौघे आतुर्बळी । करावया होळी राक्षसां ॥ ६४ ॥ असो या तिघांच्या ख्याती । एकला एक रघुपती । रावण वधून बाणावर्ती । लंका भस्मांतीं नेऊं पाहे ॥ ६५ ॥ आडवे आलिया प्रधान । इंद्रजित मकराक्ष कुंभकर्ण । अतिकायादिपुत्रदळण । लंकाभुवन भस्मान्त ॥ ६६ ॥ राक्षसांची जाती व्यक्ती । रणीं करील समाप्ती । एवढा प्रतापी श्रीरघुपती । एकला त्रिजगती दमूं शके ॥ ६७ ॥ प्रताप पुरुषार्थ गर्जोन । स्वयें बोलिला रघुनंदन । प्रभाते रणकंदन । करीन रावणवधार्थ ॥ ६८ ॥ ऐकोनि सारणाचें वचन । रावण जाला अति उद्विग्न । तें देखोनि त्याचें चिन्ह । सांगे सारण हितवाक्य ॥ ६९ ॥ युद्ध करितां दशशिर । रणीं नाटोपती वानर । निर्दाळोनि निशाचर । लंकापुर विभांडिती ॥ ७० ॥ वानरांपुढें नुरे दळ । वानरांसीं न चले बळ । वानरांसीं युद्धकल्लोळ । सर्वथा सकळ करूं नये ॥ ७१ ॥

प्रहृष्टयोधध्वजिनी वनौकसां
महात्मनां संप्रति युद्धमिच्छताम् ।

१ समूहांनीं. २ पुरुषार्थ, मोठेपणा. ३ मोठें. ४ तटांसह. ५ टाकण्यास. ६ पराक्रमी. ७ त्रैलोक्य. ८ सैन्य.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

अलं विरोधेन शमो विधीयतां
प्रदीयतां दाशरथेर्हि मैथिली ॥ १७ ॥

श्रीराम आणि लक्ष्मण। शस्त्रास्त्रीं अति प्रवीण। त्यांसीं सर्वथा न करवे रण। सुटल्या बाण प्राणान्त ॥ ७२ ॥ हेचि चौघे रणकंदनार्थ। करावया हर्षयुक्त[1]। शस्त्रास्त्रीं अति उदित। राक्षसांत श्रीराम ॥ ७३ ॥ तैसेच वानर समस्त। युद्धीं थांबवोनि श्रीरघुनाथ। निर्दाळावया लंकानाथ। आज्ञा पुसत आल्हादें ॥ ७४ ॥ विजयध्वजी वानरसेना। सुग्रीवें पाळिली जाणा। निर्दाळावया रावणा। आंगवण पावती ॥ ७५ ॥ सुग्रीव राजा उठाउठीं। उडी घालोनि त्रिकूटीं। मारील राक्षसांच्या कोटी। अवध्यांशेवटीं रावण ॥ ७६ ॥ असो ह्या महावीरांची मात। एकला एक हनुमंत। करूं पाहे तो लंकाघात। त्याचा पुरुषार्थ तुम्ही जाणा ॥ ७७ ॥ त्यासीं न करावें रण। त्रिसत्य सत्य रावणा जाण। सीता देऊनि रिघतां शरण। कृतकल्याण[2] पावसी ॥७८॥ सीता अर्पावी श्रीरघुनाथा। यालागीं चरणीं ठेवितों माथा। नको नको युद्धकथा। प्राणान्तव्यथा पावसी ॥ ७९ ॥ सीता देऊनि आवश्यक। सखा केलिया रघुकुळटिळक। सार्थक इहलोक परलोक। परम सुख पावसी ॥ ८० ॥ हित पथ्य सत्य पूर्ण। ऐकोनि सारणाचें वचन। रावण वदे दुरभिमान। दुष्ट दुर्जन दुरुक्ती ॥ ८१ ॥

तद्वचः पथ्यमक्लिष्टं सारणेनाभिभाषितम्।
निशम्य रावणो राजा प्रत्यभाषत सारणम् ॥ १८ ॥
यदि मामभियुंजीरन्देवगंधर्वदानवाः।
नैव सीतां प्रदास्यामि सर्वलोकभयादपि ॥ १९ ॥
त्वं तु सौम्य परित्रस्तस्तां दृष्ट्वा हरिवाहिनीम्।
प्रतिप्रदानं सीताया अतस्त्वं साधु मन्यसे ॥ २० ॥

देव दानव गंधर्वयुक्त। सुरेंद्र आलिया पायां पडत। तरी सीता न करीं मी निर्मुक्त। जाण निश्चित सारणा ॥ ८२ ॥ शिव आलिया त्रिशूळयुक्त। ब्रह्मा आलिया शाप देत। ऐसाही मांडल्या प्राणान्त। सीता निर्मुक्त मी न करीं ॥ ८३ ॥ तूं तंव भेडें[3] हीन दीन। देखोनि वानरांचें सैन्य। भय घेतलें दारुण। कंपायमान बोलसी ॥ ८४ ॥ भेणें भयें म्हणसी आतां। सीता अर्पावी रघुनाथा। हे तंव तुझी सभय कथा। मी सर्वथा नायकें ॥ ८५ ॥ आतां कळलें मज तत्त्वतां। श्रीराम न करी तुमच्या घाता। दोघे सोडिले जीवें जीतां। यालागीं सीता तूं दे म्हणसी ॥ ८६ ॥ अनुसरलासी श्रीरामाकडे। त्याचें भय मज सांगसी गाढें। जें जें बोलसी तें कुडें। दोनी भ्याडें नपुंसक ॥ ८७ ॥ जो ज्याचें राखी जीवित। तो त्याचा होय अति आप्त। यालागीं तूं म्हणसी येथ। सीता निर्मुक्त करावी ॥ ८८ ॥ आतां तुम्ही दोघे जण। श्रीरामाचे आप्त पूर्ण। मजसंमुख माझे अवगुण। अति कठिण अनुवादतां[4] ॥ ८९ ॥

राजदंडपरामृष्टास्तिष्ठंते नापराधिनः।
हन्यामहं त्विमौ पापौ शत्रुपक्षप्रशंसकौ ॥ २१ ॥
तेनैव मुक्तौ सुप्रीतावुभौ तौ शुकसारणौ।
रावणं जयशब्देन प्रतिपूज्याभिनिःसृतौ ॥ २२ ॥

राजदोष जे अनुवादती[5]। ते अपराधी शास्त्रनीतीं। दंड पावलां माझे हातीं। पापमूर्ती तुम्ही दोघे ॥ ९० ॥ वीर्य शौर्य बळ संपूर्ण। वैरियाचे अत्यंत वानां[6] गुण। माझे अनुवादां अवगुण। वध्य[7] संपूर्ण तुम्ही दोघे ॥ ९१ ॥ सत्यासत्यविवेक पूर्ण। न करितांचि रावण। वधावया शुक सारण। शस्त्र सज्जून ऊठिला ॥ ९२ ॥ रावणा वधिती वानरगण। ऐसें अनुवादां दोघे जण। तुमचा घेईन मी प्राण। पक्षपाती पूर्ण रामाचे ॥ ९३ ॥ हेर चार अवध्य पूर्ण। श्रीरामें दिधले सोडून। त्यांचें मी कैंवी करीं हनन। लज्जायमान रावण ॥ ९४ ॥ ऐसियापरी रावण। दवडोनि शुक सारण। कोपें म्हणे काळें वदन। मुख परतोन न दावावें ॥ ९५ ॥ जयशब्दें रावणस्तुती। करूनि शुक सारण पुढती। रावण पडला चिंतावर्तीं[8]। सबळ रघुपती देखोनी ॥ ९६ ॥ गेलिया शुक सारण। चिंतावर्ती पडे रावण। शार्दूलें[9] चार[10] विचक्षण। धाडी कपिसैन्य गणावया ॥ ९७ ॥ चारांमाजी प्रबळबळ। लघुलंघवी अति कुशळ। यालागीं नांवें शार्दूळ। वानरदळ गणूं आला ॥ ९८ ॥ शार्दूळ जंव स्वयें पाहत। तंव वानरसैन्य असं-

१ तयार, उद्युक्त. २ मोठें कल्याण. ३ भित्रा. ४ मोकळी, बोलतांत. ६ वर्णितां. ७ ठार मारण्यास योग्य. ८ काळजीच्या फेऱ्यांत. ९ शार्दूल नांवाचा हेर. १० मोठा कावेबाज, मतलबी.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

ख्यात । गणावया वाचा चित्त । जेथींचा तेथ पांगुळला ॥ ९९ ॥

बिभीषणेन तत्रस्था निगृहीता यदृच्छया ।
शार्दूलो ग्राहितस्त्वेकः पापोयमिति राक्षसः ॥ २३ ॥

वानरैरर्दितास्ते तु विक्रांतैर्लघुविक्रमैः ।
पुनर्लंकामनुप्राप्तो विमुक्तो रामशासनात् ॥ २४ ॥

शार्दूळ येतांच देखोन । बिभीषणें धरिला ओळखोन । नेला दृढपाशीं बांधोन । रघुनंदनसभेसी ॥ १०० ॥ वानर हाणिती दृढ मुष्टी । लाता देती कटीं पृष्ठीं । श्रीराम कृपाळु जगजेठी । कृपादृष्टीं सोडिला ॥ १ ॥ धरूनि आणिला अति संकटीं । चार हेर मारिल्यांसाठीं । काय ते वाढीव होय मोठी । बुद्धि करंटी अल्पक ॥ २ ॥ श्रीरामें शार्दूळ पाचारून । दाखवून वानरसैन्य । त्यासी देवोनि सन्मान । दिधला सोडून साक्षेपें ॥ ३ ॥ श्रीरामें सोडितांचि देख । घेवोनि वानरांचा धाक । शार्दूळ लंकेसंमुख । गेला दशमुख ठाकोनि ॥ ४ ॥ सर्वांगीं रुधिरोक्षित । शार्दूळ देखोनियां येत । दचकला लंकानाथ । बळोद्धत वानर ॥ ५ ॥ शार्दूळाचा अति पुरुषार्थ । त्यासी वानरीं घातली लात । रडत पडत अति कुंथत । आला थकत सभेसी ॥ ६ ॥ श्रीरामकटकीं चारपण । न चले बिभीषणाभेण । तो धरितां दृढ बांधोन । रघुनंदन सोडवित ॥ ७ ॥ एका जनार्दना शरण । रावणें पाहतां वानरसैन्य । श्रीराम करील छत्रभंजन । अनुसंधान बाणें एकें ॥ ८ ॥ ऐसें गोड निरूपण । श्रोतीं व्हावें सावधान । एका जनार्दना शरण । रामायण अति रम्य ॥ ९ ॥ रम्य रामायणी कथा । अति रमणीय वाल्मीक वक्ता । अनागत भाष्य वदला कथा । साधुसंतां सुखकारी ॥ ११० ॥ कथा सकामासी गोड । निष्कामाचें पुरवी कोड । सदाशिवासी सुखसुरवाड । गोडाही गोडरामकथा ॥ १११ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां चारप्रेरणं नाम प्रथमोऽध्यायः ॥ १ ॥ ओंव्या ॥ १११ ॥ श्लोक ॥ २४ ॥

१ स्तब्ध झाला, वेडावला. २ मारल्यामुळें. ३ रक्तानें माखलेला. ४ पुढील. ५ कल्पना. ६ बृहस्पतीची.

अध्याय दुसरा

श्रीरामचंद्राय नमः ॥ पूर्वप्रसंगवृत्तान्त । रडत पडत कुंथत । शार्दूळ आला रुधिरोक्षित । त्यासी पुसत लंकेश ॥ १ ॥

वीक्ष्यमाणो विषण्णं तु शार्दूलं शोककर्षितम् ।
उवाच प्रहसन्नेव रावणो भीमदर्शनः ॥ १ ॥

अयथावच्च ते वर्णो दीनश्चासि निशाचर ।
नासि कच्चिदमित्राणां क्रुद्धानां वशमागतः ॥ २ ॥

इति तेनानुपृष्टस्तु वाचं मंदमुदीरयत् ।
न ते चारयितुं शक्या राजन्वानरपुंगवाः ॥ ३ ॥
नापि संभावितुं शक्यं संप्रश्नोपि न लभ्यते ॥ ४ ॥

शार्दूळ देखोनि अति दुःखित । त्यासी पुसे लंकानाथ । वैरियासी जालासी हस्तगत । रुधिरोक्षित दिसतोसी ॥ २ ॥ सादरें पुसतां रावण । शार्दूळ बोले अति कुंथोन । असंख्यात वानरांचें सैन्य । संख्या कोण करूं शके ॥ ३ ॥ अमुके एक वानर असती । ऐसी भावना न करवे चित्तीं । संख्या पुसतां वानरांप्रती । तेही सांगती असंख्य ॥ ४ ॥ वाचस्पतीची वाचा मुरडे । वेदवाचा बोबडी पडे । रामसैन्याची संख्या न घडे । निजनिवाडें लंकेशा ॥ ५ ॥ श्रीरामसैन्याचें गणित । करावया ब्रह्मा नसे समर्थ । आम्ही काय मशकें तेथ । संख्या समर्थ करावया ॥ ६ ॥ श्रीरामकटकीं चारपण । सर्वथा न करवे जाण । मुख्य वैरी आम्हां बिभीषण । तो ओळखोन धरीतसे ॥ ७ ॥

विभीषणेन ज्ञातोऽहं वानरैश्च प्रधर्षितः ।
परिणीय च सर्वत्र नीतोऽहं रामसंसदि ॥ ५ ॥

हरिभिर्वध्यमानश्च याचमानः कृतांजलिः ।
राघवेण परित्रातो जीवन्नेव विमोचितः ॥ ६ ॥

आम्ही अति गुप्त मायावेषी । मावें न चले बिभीषणापासीं । तेणें धरोनि अति वेगेंसीं । वानरांपासीं दिधलें ॥ ८ ॥ वानरीं नेतां कटकाआंत । स्तोमें स्तोमें हिंडवीत । लाता बुक्या टोले देत । तेणें कल्पांत मज जाला ॥ ९ ॥ बळ सांगावया रावणापासीं । दळ दाखवितां मजसी । वानरीं

७ यःकश्चित्. ८ श्रीरामाच्या सैन्यांत. ९ हेरपणा. १० माया, कपट.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

करोनि कासाविसी । रामसमेसी मज नेलें ॥ १० ॥ हेर मारल्या कोण पुरुषार्थ । ऐसें बोलिला रघुनाथ । तेणें मज केलें निर्मुक्त । जीवें जीत मग आलों ॥ ११ ॥ श्रीरामाचें प्रतापबळ । असंख्य त्याचें दळ सबळ । त्यासीं न चले युद्धकल्लोळ । जनकबाळ अर्पावी ॥ १२ ॥ सीता अर्पिल्या श्रीरघुनाथा । मरणोन्मुक्ति लंकानाथा । स्वस्थता राक्षसां समस्तां । निर्भयता तिहीं लोकीं ॥ १३ ॥

पुरप्राकारमायांति क्षिप्रमेकतरं कुरु ।
सीतां वा संप्रयच्छाशु युद्धं वा सप्रदीयताम् ॥ ७ ॥
शार्दूलस्य महद्वाक्यं श्रुत्वोवाच स रावणः ।
यदि मां प्रतियोत्स्यंति देवगंधर्वदानवाः ॥ ८ ॥
नैव सीतां प्रदास्यामि सर्वलोकक्षयादपि ॥ ९ ॥

उडोनियां वानरवीर । लंका घेती सप्राकार । अझून कायसा विचार । शीघ्रतर करीं एक ॥ १४ ॥ युद्धा निघावें लंकानाथा । कीं श्रीरामा द्यावी सीता । येविषयीं विलंबू करितां । कुळक्षयार्था पावाल ॥ १५ ॥ ऐकोनि शार्दूलवचन । रावण झाला कंपायमान । मिथ्या धरोनि दुरभिमान । स्वयें गर्जोन बोलत ॥ १६ ॥ आदि करोनि श्रीराघव । युद्धा आलिया देवदानव । साह्य दैत्यादि गंधर्व । सीता स्वयंमेव मी न सोडीं ॥ १७ ॥ राक्षस मारिल्या समस्त । श्रीरामें केल्या कुळघात । मजही मांडल्या प्राणान्त । तरी मी सीता सोडींना ॥ १८ ॥ मज रावणा जीवें जितां । सर्वथा मी न सोडीं सीता । ऐसें बोलणें बोलतां । परम चिंता पावला ॥ १९ ॥ चारें मारणें नाहीं रघुनाथा । तेथूनि चार येथें येतां । श्रीरामा अर्पी शीघ्र सीता । मज तत्त्वतां सांगती ॥ २० ॥ ऐसा बोलिला बिभीषण । तैसेंचि बोलिला शुक सारण । शार्दूळ सांगतो आपण । भय दारुण रामाचें ॥ २१ ॥ श्रीरामापासीं वानरवीर । कोण धुरें थोर थोर । आतुर्बळी कोण झुंजारें । दशशिर पूसत ॥ २२ ॥

तदपारमसंख्येयं वानराणां महद्बलम् ।
निशम्य रावणो राजा शार्दूलं पर्यपृच्छत ॥ १० ॥
एवं के वानराः शूराः के मुख्याः के महाबलाः ।
के पूर्वमभिवर्तंतः के महोत्साहसंस्थिताः ॥ ११ ॥
क्षिप्रमाचक्ष्व शार्दूल सप्रधानाः प्लवंगमाः ।
श्रुत्वा तद्राक्षसेंद्रस्य वचनं परिपृच्छतः ॥ १२ ॥
संख्यातुमुपचक्राम प्राज्ञो मुख्यान्प्लवंगमान् ॥ १३ ॥

रावणें पुसिले जुत्पत्ती । वीर झुंझार आहेत किती । शार्दूळ आपुल्या व्युत्पत्तीं । संकळिंत सांगत ॥ २३ ॥ नळ नीळ रंभ पनस पन्नक । मैंद द्विविद सुमुख दुर्मुख । केशरी शतबळी दधिमुख । गवय गवाक्ष महावीर ॥ २४ ॥ विनीत प्रमाथी क्रोधन । ऋषभ शरभ गंधमादन । फरश नाग सुषेण । इंद्रजानु जाण महावीर ॥ २५ ॥ गज गोरभ तार तरळ । उन्नाह सन्नाह कुमुद कुशळ । क्रकच कराळ विकराळ । गोळांगूळ रणयोद्धे ॥ २६ ॥ जांबवंताचा ज्येष्ठ बंधु । धूम्राक्षनामा अति प्रसिद्धु । रीससमुदाय सन्नद्धु । अति उन्नद्धु रणमारा ॥ २७ ॥ श्रीरामाजवळी जांबवंत । आतुर्बळी बुद्धिवंत । मशकें राक्षसां मानीत । कुंभकर्णा तृणप्राय ॥ २८ ॥ वीर दुर्धर हनुमंत । लंकेंत केला अति आकांत । तो अग्रणी सैन्यांत । त्याचा पुरुषार्थ तुम्ही जाणां ॥ २९ ॥ ऋषिरामायणीं वीर । सांगितले अति अपार । तितुका न धरींच मी विस्तार । कथा अपार वाढेल ॥ ३० ॥ हनुमंताचेनि नांवें । रावण दचकला जीवें भावें । इतर महावीरांचे यावे । कोण साहे लंकेशा ॥ ३१ ॥ श्रीरामाचें प्रतापबळ । ऐकोनि वानरसेना सबळ । रावणा लागली तळमळ । जनकबाळ जिरेना ॥ ३२ ॥

एवमुक्त्वा महातेजा रावणः पुनरब्रवीत् ।
चारिता भवता सेना शूराः के तत्र वानराः ॥ १४ ॥
किंप्रजाः कीदृशाः सौम्य वानरा ये दूरासदाः ।
कस्य पुत्राश्च पौत्राश्च तत्त्वमाख्याहि राक्षस ॥ १५ ॥
अथैवमुक्तः शार्दूलो रावणं पुनरब्रवीत् ।
इदं वचनमारेभे वक्तुं रावणसंनिधौ ॥ १६ ॥

वानरवीर अति अपार । कोण कोणाचा पुत्र पौत्र । सत्कुळ किंवा वनचर । हेंही समग्र मज सांगा ॥ ३३ ॥ मुख्य ब्रह्मयाचा सुत । आतुर्बळी बुद्धिवंत । नांवें जांबवंत ऋक्षनाथ । अति विख्यात रणयोद्धा ॥ ३४ ॥ सूर्याचा निजसुत । सुग्रीवराजा

१ सैन्य. २ स्वतः. ३ हेर, दूत. ४ मुख्य. ५ जेठी, मल्ल. ६ थोडक्यांत, संक्षेपानें. ७ या नांवाचे वानर

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वीर विख्यात। करावया राक्षसांचा घात। लंकेआंत रिघों पाहे ॥ ३५ ॥ अंगद युवराज विख्यातु। जो कां स्वयें शक्राचा नातु। लंका उपडून न्यावया शक्तु। काळकृतांतु रणयोद्धा ॥ ३६ ॥ धर्मसुत[1] सुषेण देख। सोमसुत[2] दधिमुख। दोघे वीर अति नेटक। अंतका अंतक रणमारा ॥ ३७ ॥ सुमुख दुर्मुख मृत्युपत्र। केवळ मृत्यूचाच अवतार। रणीं मर्दिती निशाचरें[3]। यांसमोर कोण राहे ॥ ३८ ॥ अग्निपुत्र नामें नीळ। त्याअधीन वानरदळ। सेनापति स्वयें प्रबळ। राक्षसकुळ मारावया ॥ ३९ ॥ मैंद द्विविद महावीर। अश्विनौ देवांचे कुमर। यमाचे पंच पुत्र। अति दुर्धर ते ऐका ॥४०॥ गज गवाक्ष गवय जाण। शरभ आणि गंधमादन। वैवस्वतपुत्र पांचही जाण। वीर दारुण रणमारा ॥४१॥ विश्वकर्म्याचा नळ सुत जाण। जेणें बांधिलें सेतुबंधन। उतरोनि वानरसैन्य। लंकादहन करूं आला ॥ ४२ ॥ केशरीचा क्षेत्रज सुत। वायुपुत्र जो कां विख्यात। दोहों बापांचा हनुमंत। ज्याचा पुरुषार्थ तिहीं लोकीं ॥ ४३ ॥ हनुमान वीर अति बळी। लंका करूं पाहे रांगोळी[4]। शिरें खेळत चेंडूफळी। रणरवंदळी[5] राक्षसां ॥ ४४ ॥

दशवानरकोट्यश्च सुराणां युद्धकांक्षिणाम्।
श्रीमतां देवपुत्राणां शेषं नाख्यातुमुत्सहे ॥ १७ ॥

दशकोटी वानरवीर। श्रेष्ठ अग्रणी सेनाधर। यांहूनि असंख्य अपार। सांगावया वक्त्र[6] सरेना[7] ॥ ४५ ॥ गणवेल पृथ्वीच्या अंकुरां। सुखें गणवती पर्जन्यधारा। तरी न गणवे वानरभारां। दशशिरा हें सत्य ॥ ४६ ॥ वानरांचा सबळ सद्भावो। एकैकातळीं सैन्यसमुदावो। कोट्यनुकोटी अर्बुदें[8] खर्वें। सेना सर्व वागविती ॥ ४७ ॥ वीरानुवीरीं सैन्यवृत्तान्त। प्रत्येकें लिहितां वाढेल ग्रंथ। आतां सांगेन मुख्यार्थ। सैन्यसंख्यार्थ दोघांचा ॥ ४८ ॥ अंगद युवराजा कपिपती। सुग्रीव महाराजा भूपती। त्या दोघांची सैन्यसंपत्ती। संकळितार्थी सांगेन ॥ ४९ ॥

एवं वानरराजेन सुग्रीवेणाभिभाषितः।
वीरपद्मसहस्रेण वृत्तः शंकुशतेन च ॥ १८ ॥
युवराजोऽङ्गदो नाम त्वामाह्वयति संयुगे ॥ १९ ॥

श्रीरामाज्ञा यथोचित। अंगदा युवराज्य प्राप्त। सुग्रीव राजा अभिषिंचित। मंत्रयुक्त उल्लासें ॥ ५० ॥ अंगदाची सैन्यसंपत्ती। ऋषि वाल्मीक वदला ग्रंथीं। तेचि सांगेन उपपत्ती। यथानिगुतीं अवधारा ॥ ५१ ॥ शतसहस्रीं लक्ष म्हणती। शतलक्षीं कोटी गणिती। दशकोटी अर्बुद ख्याती। निर्बुद म्हणती तच्छतें ॥ ५२ ॥ शत निर्बुदीं खर्व गणिती। शतखर्वीं निखर्व म्हणती। शतनिखर्वीं पद्म वदती। जाण निश्चितीं महाराजा ॥ ५३ ॥ पद्मसहस्र वीर रणरंगीं। चालती अंगदाच्या वामभागीं। दक्षिणभागींच्या प्रयोगीं। वीर विभागीं अवधारा ॥ ५४ ॥ पद्मशताच्या गणती। शंकुशब्द त्यातें म्हणती। शंकुशतें वीर विख्याती। दक्षिणहस्तीं अंगदा ॥ ५५ ॥ अंगद बोलिला पुरुषार्थी। सैन्य प्रधान मशक किती। रणीं मारीन लंकापती। तुज युद्धार्थी पाचारी ॥ ५६ ॥ अंगदसेनासंख्यास्थिती। पद्मसहस्र वामभागार्थी। शंकुशतें दक्षिणहस्तीं। रणकंदनार्थी महाबळी ॥ ५७ ॥ ऐकतां अंगदसैन्यसंपत्ती। राक्षस महाशंख करिती। रावण दचकला चित्तीं। चिंतावर्ती[9] प्रधान ॥ ५८ ॥ शार्दूल म्हणे दशानना। राजचिन्हीं गडगर्जना। आली सुग्रीवराजसेना। तिची गणना तूं ऐकें ॥ ५९ ॥ सुग्रीव श्रीरामकिंकर। रामें केला राज्यधर। त्याच्या सैन्याचा संभार। सविस्तर अवधारीं ॥ ६० ॥

रामेण वालिनं हत्वा तस्य राज्येऽभिषेचितः।
सुग्रीवस्तस्य यत्सैन्यं तत्सर्वं कथयामि ते ॥ २० ॥
शतं शतसहस्राणां कोटिमाहुर्मनीषिणः।
शतं सहस्रकोटीनां शंकुरित्यभिधीयते ॥ २१ ॥
शतं शंकुसहस्राणां वृंदमाहुर्मनीषिणः।
शतं वृंदसहस्राणां महावृंदमिहोच्यते ॥ २२ ॥
महावृंदसहस्राणां शतं पद्ममिति स्मृतम्।
शतं पद्मसहस्राणां महापद्ममिति स्मृतम् ॥ २३ ॥
एवं कोटिसहस्रेण महापद्मशतेन च।
एवं वृंदसहस्रेण महावृंदशतेन च ॥ २४ ॥
एवं पद्मसहस्रेण महापद्मशतेन च।
सुग्रीवः सहितो राजा संप्रहारार्थमुद्यतः ॥ २५ ॥

१ यमाचा मुलगा. २ चंद्राचा पुत्र. ३ राक्षस. ४ भस्म. ५ समरांगणीं नाश. ६ मुख. ७ पुरत नाहीं. ८ दशकोटी.

९ काळजींत मग्न असे.

CC-0. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

श्रीरामें मारूनि वाळीसी। राज्य दिधलें सुग्रीवासी। ते राजसेना तयापासीं। समुदायेंसीं सन्नद्ध ॥ ६१॥ सहस्रांचें जें शत। त्यातें लक्ष ऐसें बोलत। लक्षाचें जें शत गणित। त्यातें म्हणत कोटि ऐसें ॥ ६२॥ वाल्मीक बोलिला येथ। तोच श्लोकींचा श्लोकार्थ। सहस्रकोटी शतसंख्यात। शंकु निश्चित त्या नांव ॥ ६३ ॥ शतशंकूंचें सहस्र गणित। वृंद ऐसें त्यातें म्हणत। वृंदशतें सहस्रसंख्यात। महावृंद निश्चित त्या नांव ॥ ६४॥ महावृंदशतसहस्रीं। पद्मसंख्या निजनिर्धारीं। पद्मशतें सहस्रवरी। ते संख्या खरी महापद्म ॥ ६५ ॥ सहस्रकोटी आणि शंकुशतक। सुग्रीवापुढें नित्य संमुख। वीर वाढिवे चालती देख। एक एक रणयोद्धे ॥ ६६ ॥ सहस्रवृंदें वीर नेटक। महावृंदें शतानुएक। दक्षिणबाहू सुग्रीवा देख। येती संमुख दशमुखा। ॥ ६७ ॥ गणितां सहस्रपद्में पद्म। सुग्रीवाचे बाहू वाम। वीर वाढिवे प्लवंगम। अति दुर्गम रणयोद्धे ॥ ६८ ॥ शतसंख्या महापद्म। सुग्रीवापाठीं कपिसत्तम। चालती वीर निरुपम। रणकर्दम करावया ॥ ६९ ॥ आणिक वानर अति उद्भट। सुग्रीवा मागेंपुढें थाट। वाम सव्य घनदाट। भट सुभट महाबळी ॥ ७० ॥ याही समुदायीं वीर वानर। सुग्रीवासवें अति दुर्धर। ठाकोनि आले लंकापुर। दशशिर मर्दावया ॥ ७१ ॥ करावया राक्षसांचें दळण। लंकाशिखरावरी उड्डाण। करिताती वानरगण। मुख्य रावण दंडावया ॥ ७२ ॥ ऐसेचि वेगळे वेगळे वीर। सांगों जातां सैन्यसंभार। कथा वाढू पाहे फार। तरी वानर न गणवती ॥ ७३ ॥

यदत्रानंतरं कार्यं तद्भवान्कर्तुमर्हति।
इत्युक्तो रावणः क्रुद्ध उत्थितः परमासनात् ॥ २६ ॥
आरुरोह ततः श्रीमान्प्रासादं हिमपांडुरम्।
बहुतालसमुत्सेधं रावणो यद्दिदृक्षया ॥ २७ ॥
ताभ्यां चराभ्यां सहितः स ददर्श महाबलम् ॥ २८ ॥

शार्दूल म्हणे दशानना। सांगितली वानरसेना। याउपरी जें येईल मना। त्या साधना शीघ्र साधीं ॥ ७४ ॥ ऐकोनि वानरांची सेना। कोप आला दशानना। सांडोनियां निजसिंहासना। पहावया नयनीं ऊठिला ॥ ७५ ॥ सातखणी प्रासाद थोर। त्याहीवरी दीर्घ गोपुर। तेथें चढला दशशिर। वानरभार पहावया ॥ ७६ ॥ उंची सप्तताळ अधिक। पांडुरवर्ण प्रासाद चोख। तेथ चढला दशमुख। कपिकटक पहावया ॥ ७७ ॥ हेर चार साही प्रधान। गोपुरीं चढला दशानन। पाहूं चढले लंकाजन। वानरसैन्यसमुदावो ॥ ७८ ॥ समुद्रतटीं लंकानिकटीं। दाटली वानरांची थाटी। सुवेळेपुढें वानरदाटी। रिती सृष्टी दिसेना ॥ ७९ ॥ लंकेसभोंवता वेढा। वानरीं घातला गाढा। सरों न ये मागां पुढां। हुँडोहुडां वानर ॥ ८० ॥ मुंग्या झोंबती गुळासी। तेंवी वानर लंकेच्या चौपासीं। झोंबताती अति आवेशीं। रावणासी लक्षूनी ॥ ८१ ॥ वानरीं कोंदलें जळ स्थळ। वानरीं कोंदले कुलाचळ। दशदिशा गोळांगूळ। नभीं कपिकुळ कोंदलें ॥ ८२ ॥ अति साक्षेपें पाहतां वानरसेना। दृष्टी टणकली दशानना। मूर्च्छा आली विसां नयनां। वानरसेना असंख्य ॥ ८३ ॥ पाहतां वानरसेना गाढी। दृष्टि भागली बापुडी। पडली डोळियां झांपडी। रिती सवडी दिसेना ॥ ८४ ॥ वानरसेना देखोनि दृष्टीं। लंकेमाजी बोंब उठी। अति विस्मय दशकंठीं। राक्षसकोटी किलकिलिती ॥ ८५ ॥ वानरसेना अपरिमित। पाहतां रावण तटस्थ। घरोघरीं अति आकान्त। चळीं कांपत राक्षस ॥ ८६ ॥ दहाही छत्रें रावणशिर्सीं। छाया पडली कपिकटकासी। श्रीराम पुसे बिभीषणासी। अभ्रें कायसीं अकाळीं ॥ ८७ ॥ बिभीषण म्हणे रघुनाथ। तुझा शत्रु सेना पाहत। त्याचे छत्रांची येथ। छाया पडत समस्तांवरी ॥ ८८ ॥ ऐकोनि बिभीषणाचें वचन। कोपा चढला रघुनंदन। सज्जोनियां धनुष्यबाण। काय आपण बोलत ॥ ८९ ॥ शत्रुच्छाया सैन्यावरी। हे तंव मज लज्जा भारी। रागें धनुष्य सज्जोनि करीं। बाण सांवरी साटोपें ॥ ९० ॥

रामः श्यामः कमलनयनस्तत्र धन्वी सरोषं।
लंकां पश्यन्भ्रमयति शरं पाणिना दक्षिणेन ॥ २९ ॥

१ हजारपट. २ पराक्रमी. ३ सातमजली. ४ राजवाडा. ५ मनोरा. ६ मोठा. ७ प्रत्येक बुरुजावर. ८ आवेशानें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

नवजलद[1]घनतन । कांसे पीतांबर विराजमान । श्रीराम राजीवलोचन । बाहु आजानु[2] सांगद ॥९१॥ मुकुट कुंडलें वनमाळा । कंठीं पदक कटीं मेखळा । तोडर गर्जे चरणकमळां । तेणें कळिकाळा अति धाक ॥ ९२ ॥ वीरकंकणें करीं मुद्रिका । दशावतारी सुरेख टीका । धनुष्य सज्जोनियां देखा । पाहे लंका सरोष ॥ ९३ ॥ दक्षिण करीं भ्रमे बाण । जीवें मारावया रावण । दुश्चिता मारूं नये आपण । छत्रच्छेदन करावें ॥ ९४ ॥ चमत्कारें सोडूनि बाण । दहाही छत्रें पैं छेदून । लंकेबाहेर पडोन । शर परतोन रिघे भातां ॥ ९५ ॥ देखोनियां छत्रसंपात । रिपुगुणा रिझला[3] लंकानाथ । परम धार्मिक श्रीरघुनाथ । शिरसंपात न करीचि ॥ ९६ ॥

संमतीचें वाक्य—शत्रोरपि गुणा ग्राह्याः ।

जेणें छेदिलीं दाही छत्रें । तो क्षणें छेदिता दहाही शिरें । अधर्म न करिजे रघुवीरें । दशशिरें गुण घेइजे ॥ ९७ ॥ गुणा रिझतां दशानन । प्रहस्त बोलिला प्रधान । दुसरा सुटलिया बाण । करील कंदन लंकेशा ॥ ९८ ॥ ऐकोनि प्रहस्ताचें वचन । श्रीरामाच्या बाणाभेण । रावण गेला पळोन । अचुक मरण चुकविलें ॥ ९९ ॥ अचुकसंधानी श्रीरघुनाथ । लक्ष्य भेदोनि जेथींचा तेथ । बाण परतोनि भातां येत । अत्यद्भुत धनुर्वाडा[4] ॥ १०० ॥ मूळींच झालें छत्रच्छेदन । हाचि मुख्य अपशकुन । रणीं मरेल रावण । लंकाजन जल्पती ॥ १ ॥ श्रीरामाच्या अनुसंधाना । देखोनि वानरांची सेना । कल्पान्त मांडला दशानना । छत्रभंजन अपशकुन ॥ २ ॥ एका जनार्दना शरण । पुढें गोड निरूपण । कपट करील रावण । त्याचें निर्दळण श्रीरामें ॥ ३ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां रावणच्छत्रभंगो नाम द्वितीयोऽध्यायः ॥२॥ ओंव्या ॥१०३॥ श्लोक ॥ २९ ॥

अध्याय तिसरा

श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ साधावया रणांगण । मुळींच रावणा अपशकुन । श्रीरामें केलें छत्रभंजन । अति उद्विग्न[5] लंकेश ॥ १ ॥

विसर्जयित्वा सचिवान्प्रविवेश स्वमालयम् ।
ततो राक्षसमादाय विद्युज्जिह्वं महाबलम् ॥ १ ॥
मायाविनं महाघोरमब्रवीद्राक्षसाधिपः ।
मोहयिष्यामहे सीतां मायया जनकात्मजाम् ॥ २ ॥
शिरो मायामयं गृह्य राघवस्य निशाचर ।
मां त्वं समुपतिष्ठस्व महच्च सशरं धनुः ॥ ३ ॥
एवमुक्तस्तथेत्याह विद्युज्जिह्वो निशाचरः ।
तस्य तुष्टोऽभवद्राजा प्रददौ चास्य भूषणम् ॥ ४ ॥

छत्रभंगाचा अपशकुन । तेणें उद्विग्न रावण । विसर्जूनि[6]यां प्रधान । आला आपण निजधामा ॥२॥ सबळ बळें श्रीरघुनाथा । वानरसैन्य असंख्यातता । काय म्यां करावें आतां । प्रबळ चिंता लंकेशा ॥ ३ ॥ बळेंचि जानकी भोगूं जातां । मजपरीस सबळ सीता । ते करूं शके माझ्या घाता । मज मारितां ते न ये ॥ ४ ॥ श्रीरामसेवाअनुवृत्ती[7] । जन्ममरणाहूनि परती । स्वयें सीतेची नित्य वस्ती । सीता निश्चितीं न मारवे ॥ ५ ॥ करितां श्रीरामनामस्मरण । तेणें ये मरणासीच मरण । तिसीं न चाले मारकपण । सीता संपूर्ण विदेही ॥ ६ ॥ करितां श्रीरामनामस्मरण । उठोनि पळे जन्ममरण तिसी न चाले मारकपण । सीता संपूर्ण विदेही ॥७॥ भोगितां न भोगवे सीता । न मारवे मारूं जातां । रणीं न जिंकवे रघुनाथा । काय मीं आतां करावें ॥ ८ ॥ रणीं मारिल्या रघुनाथा । वश्य होय जनकदुहिता । श्रीराम न मारवे सर्वथा । छळणें[8] सीता वश्य करूं ॥ ९ ॥ स्वयें कपटी रावण । विद्युज्जिव्ह कपटी पूर्ण । करावया सीताछळण । त्यासी आपण गुज सांगे ॥१०॥ करावया सीतेचें छळण । श्रीरामाचें शिर संपूर्ण । मायिक करावें आपण । धनुष्यबाणसमवेत ॥ ११ ॥ विद्युज्जिव्ह म्हणे आपण । शीघ्र शिर करीन निर्माण । त्यासी संतोषोनि रावण । कर[9]कंकण अर्पित ॥ १२ ॥ मायिक शिर रघुनाथा । करितां न करवे सर्वथा । विद्युज्जिव्हा परम चिंता । काय लंकानाथा मुख दाखवूं ॥ १३ ॥ मायिक करितां रामशिर । मोडलें मुंडलें[10] हातियेर । जवा[11] न बैसे कोरेकोर । मायिक शिर न करवे ॥ १४ ॥

१ नूतन मेघाप्रमाणें नीलवर्ण. २ गुडघ्यांपर्यंत. ३ मोहित झाला, ४ धनुर्विद्येंत निष्णात, ५ दुःखी, कष्टी, ६ रजा देऊन. ७ (सतत) रामसेवा केल्यामुळें. ८ कपटानें. ९ हातातील सुवर्णकंकण, १० बोथड झालें, ११ सांधा,

CC-0. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

श्रीराम नव्हे पैं रंगिक । रंगें वोरंगले सकळिक । विद्युज्जिव्हासी परम दुःख । दशमुख क्षोभेल ॥ १५ ॥ माया जाणोनि समस्ता । माव न चले श्रीरघुनाथा । विद्युज्जिव्हासी परम चिंता । काय म्यां आतां करावें ॥१६॥ माया नाहीं श्रीरामासीं । मायिक शिर न घडवे त्यासीं । विद्युज्जिव्ह कासाविसी । विश्वकर्म्यापासीं मग गेला ॥१७॥ चरण वंदोनियां त्याचे । मायिक शिर श्रीरामाचें । करोनि द्यावें निश्चयाचें । ऐसें वाचे अनुवादे ॥ १८ ॥ विश्वकर्मा वदे साचें । मायिक शिर श्रीरामाचें । म्हणतां कुष्ठ लागे वाचे । कुळनाशाचें निजमूळ ॥ १९ ॥ जेथें कपट तेथें तळपट । वेदानुवाद घडघडाट । भ्रमें भुलला दशकंठ । मरेल स्पष्ट कुळेंसीं ॥ २० ॥ श्रीराम सत्याचें निजसत्य । माया केवळ मिथ्याभूत । त्याचें मायिक शिर येथ । मज निश्चित न करवे ॥ २१॥ तुमचें निंदान आलें गाढें । यालागीं कपट मांडलें कुडें । कपट न चले सीतेपुढें । रणीं रोकडे मराल ॥ २२ ॥ ऐसें ऐकतां वचन । विद्युज्जिव्ह करी रुदन । श्रीरामशिर न नेतां जाण । दशानन मारील ॥ २३ ॥ रावणा सीतासन्निपात । न कळे स्वार्थ ना परमार्थ । अवश्य करील माझा घात । तो अनर्थ चुकवावा ॥ २४ ॥ दांतीं धरोनि अंगुठे जाण । मस्तकीं धरिले दृढ चरण । तुझा शिष्य मी पुरातन । माझे प्राण वांचवीं ॥ २५ ॥ मायिक विद्येची व्युत्पत्ती । तुजपासून मज प्राप्ती । तेचि न चले श्रीरामाप्रती । कृपामूर्ति वांचवीं ॥ २६ ॥ पुढती धरिले दृढ चरण । घालोनियां लोटांगण । विश्वकर्मा पैं आपण । कृपेनें पूर्ण कळवळला ॥ २७ ॥ संतचरणरज वंदून । ब्राह्मणचरणतीर्थ प्राशून । विश्वकर्मा स्वयें आपण । श्रीरामध्यान आरंभी ॥ २८ ॥ जैं ब्राह्मणपदरज वंदिती । तैं सकळ संपत्तीची अवाप्ती[३] । समस्त निर्दळती आपत्ती । श्रीराममूर्ति स्वयें भेटे ॥ २९ ॥ ब्राह्मणचरणरजोमहिमान[४] । जे जे वांछित अर्थ संपूर्ण । भुक्ति मुक्ति त्यांपाशीं आंदण । सुप्रसन्न श्रीराम ॥ ३० ॥ विश्वकर्म्याची ध्यानस्थिती । प्रकटली श्रीराममूर्ति । मायिक शिराची पैं प्राप्ती । वरदोक्ती स्वयें मागत ॥ ३१ ॥ विश्वकर्म्याची ध्यानमूर्ति । अनुवादे तयाप्रती । तुझी मागती वरदोक्ति । कठिण प्राप्ती ते आइक ॥ ३२ ॥ शिर न ये करणी करितां । शिर न घडे स्वयें घडितां । काल्पनिक शिरःसंस्था । निजवरदार्थी मी देईन ॥ ३३ ॥ आरसां[५] बिंबे प्रतिवदन । रूपरेखा समसमान । तैसें कल्पित शिर संपूर्ण । समयीं जाण पावशील ॥३४॥ जेव्हां मागेल रावण । विद्युज्जिव्ह तेव्हांचि जाण । काल्पनिक शिर संपूर्ण । स्वयें आपण पावेल ॥ ३५ ॥ आदर्शांत प्रतिमुख दिसे । परी तें तयामाजि नसे । मनःकल्पित शिर तैसें । अनायासें पावसी ॥३६॥ तेंही शिर अचेतन । आणिक कल्पित धनुष्यबाण । समयीं पावेल जाण । ऐसें वरदान पावला ॥ ३७ ॥ ऐसें लाहोनि वरदान । विद्युज्जिव्ह येतांचि जाण । अशोकवना निघे रावण । अति संपूर्ण साटोपें ॥ ३८ ॥

अशोकवनिकायां च सीतादर्शनलालसः ।
नैर्ऋतानामधिपतिः संविवेश महाबलः ॥ ५ ॥
ततो दीनामदीनां तां ददर्श धनदानुजः ।
अधोमुखीं शोकपरामुपविष्टां महीतले ॥ ६ ॥
भर्तारमनुध्यायंतीमशोकवनिकां गताम् ।
उपसृत्य ततः सीतां प्रहृष्टेनांतरात्मना ॥ ७ ॥
इदं च वचनं धृष्टमुवाच जनकात्मजाम् ।
सांत्वमाना मया भद्रे यमाश्रित्य विमन्यसे ॥ ८ ॥
खरहंता स ते भर्ता राघवः समरे हतः ।
छिन्नं ते सर्वथा मूलं दर्पश्च निहतो मया ॥ ९ ॥
व्यसनेनात्मनः सीते मम भार्या भविष्यसि ।
विसृजैतां मतिं मूढे किं मृतेन करिष्यसि ॥ १० ॥

करीत हरिखांचा[६] गजर । अशोकवना अति सत्वर । स्वयें आला दशशिर । सीता सुंदर प्रलोभावया ॥३९॥ बाह्य मळीं दिग्ध दिसे दीन । अंतरीं सुखैकश्रीरामध्यान । सीता देखोनि दशानन । काय आपण जल्पत ॥४०॥ श्रीरामबळाच्या अभिनिवेशीं[७] । माझें वचन उपेक्षिसी । रामवाढीव[८] अहर्निशीं । प्रजल्पसी[९] सर्वदा ॥ ४१ ॥ मारिला म्हणसी त्रिशिरा खर । ऐसा बळिया श्रीरामचंद्र ।

१ आच्छादित झाले. २ अंत, नाश. ३ प्राप्ती. ४ ब्राह्मणाच्या चरणधूळीचा महिमा. ५ आरशांत.
६ आनंदाचा. ७ दुराग्रहामुळें. ८ रामाचा मोठेपणा. ९ बोलतेस.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

मारून आला इंद्रजित कुमर। आणिलें शिर रामाचें ॥ ४२ ॥ माझा राम शूर श्रेष्ठ। माझा राम वीर सुभट¹। राम वानिसी रणश्रेष्ठ। मज फोलकट मानिसी ॥ ४३ ॥ ज्याचें धरोनियां बळ। मजसीं सदा चालविसी सळ। तो म्यां केलासे निर्मूळ। वरीं तत्काळ मजलागीं ॥ ४४ ॥ रणीं मारिलें रघुनाथा। आतां कोण सोडवील सीता। त्याची सांडोनि चिंता वार्ता। वरीं मज लंकानाथा उल्लासें ॥ ४५ ॥ गर्वें म्हणसी पतिव्रता। ते तूं आतुडसी² लंकानाथा। तुज मी न सोडीं सर्वथा। उल्लासतां³ वरीं मज ॥ ४६ ॥ आतां रावण न वरितां। तुज तंव गति नाहीं अन्यथा। सांडोनियां अति मूर्खता। होय तूं कांता लंकेची ॥ ४७ ॥ रणीं मारिले रामलक्ष्मण। निर्दळिले वानरगण। आतां तुझा आग्रह कोण। करीं रावण प्रियभर्ता ॥ ४८ ॥ श्रीराम पडलिया रणीं। सौमित्रेंसहित वानरश्रेणी⁴। भेरी त्राहाटिल्या निशाणीं। रावणा राणी सती सीता ॥ ४९ ॥ ऐकोनि श्रीराममरण। सीते न करिसी रुदन। मिथ्या म्हणसी माझें वचन। रणकंदन तें ऐकें ॥ ५० ॥ ऐसें रावण जल्पतां। कांहीं न बोले सती सीता। समूळ जाणे मिथ्या वार्ता। श्रीरघुनाथाचेनि धर्में ॥५१॥ घाला घालोनि इंद्रजित। रणीं मारिला रघुनाथ। सत्य न मानिसी माझी मात। रणवृत्तान्त तो ऐक ॥ ५२ ॥

शृणु भर्तृवधं सीते घोरं वृत्रवधं यथा।
बलेन महता रामो व्रजत्यस्तं दिवाकरे॥ ११॥
सन्निविष्टः समुद्रस्य तीरमासाद्य चोत्तरम्।
अथाध्वनि परिश्रांतमर्धरात्रे स्थितं बलम्॥ १२॥
सुखसुप्तं तमासाद्य चारितं प्रथमं चरैः।
तत्प्रहस्तप्रणीतेन बलेन महता मम ॥ १३ ॥
बलमस्य हतं रात्रौ यत्र रामः सलक्ष्मणः।
पट्टिशान्परिघांश्चक्राण्यृष्टीर्दंडान्महायुधान्॥ १४॥
उद्यम्योद्यम्य रक्षोभिर्वानरेषु निपातिताः।
अथ सुप्तस्य रामस्य प्रहस्तेन प्रमाथिना॥ १५॥
असक्तं कृतहस्तेन शिरश्छिन्नं महासिना॥ १६॥

जेंवी इंद्र वधी वृत्रासुरासी। तेंवी राक्षसीं वधिलें श्रीरामासी। भ्रतार वधिला कोणे प्रदेशीं। तेंही तुजपासीं सांगेन ॥ ५३ ॥ सेतु बांधोनि सागरीं। वानरभार निजगजरीं। ऐसा राम समुद्राच्या पारीं। दक्षिणतीरीं राहिला ॥ ५४ ॥ जंव जाला अस्तमान। मार्गीं भागिले वानरगण। अवघीं केलें सुखें शयन। रामलक्ष्मणसमवेत ॥ ५५ ॥ बिभीषणाचें भय दारुण। तोही जाला निद्रापन्न। ऐसी पाळती⁵ आणोन पूर्ण। निघे प्रधान प्रहस्त ॥ ५६ ॥ ससैन्य इंद्रजित प्रहस्त। घाला घातला रातोरात। निद्रिस्थ मारिला रघुनाथ। समवेत सौमित्र ॥ ५७ ॥ सुग्रीवादि वानरसैन्य। मध्यरात्रीं निद्रापन्न। प्रहस्तें घाला घालोन। रणकंदन तें केलें ॥ ५८ ॥ फरश पट्टिश तोमर। गदा मुद्गल बाण चक्र। पाचारोनियां वानर। रणीं समग्र मारिले ॥ ५९ ॥ निष्ठुर प्रहस्ताचे कर। छेदोनि श्रीरामाचें शिर। येथें आणिलें वो साचार। तुझा भ्रतार मारूनी ॥६०॥ श्रीरामाचे धनुष्यबाण। राम मारोनि आणिले जाण। ऐसें सांगतां दशानन। सीता रुदन करीना ॥ ६१ ॥ रणीं मारिला श्रीरामचंद्र। सत्य न मानी सीता सुंदर। तेणें क्षोभोनि दशशिर। वीरमहामार सांगत ॥६२॥ राम लक्ष्मण निद्रितां घात। सुग्रीवाचा ग्रीवापात⁶। आघातें मरे हनुमंत। जांबवंत कटिभंगें ॥ ६३ ॥ करोनियां जानुविहीनु। रणीं पाडिला इंद्रजानु। शूळें विदारिला सुषेणु। गंधमादनु पट्टिशें ॥ ६४ ॥ वर्षोनियां बाणजाळ। रणीं पाडिले नळ नीळ। मैंद द्विविद प्रबळ। छेदिलें कपाळ असिधारां⁷ ॥ ६५ ॥ तार तरळ गवय गवाक्ष। कुमुद महावीर देख। पांचही मारिले निःशेख। शस्त्रें अनेक वर्षोनी ॥ ६६ ॥ पिकोनियां फणस झडे। तेंवी पनसाचें शिर पडे। वानरवीर अति गाढे। रणीं रोकडे वारिले ॥ ६७॥ हरिमुख दधिमुख। सुमुख आणि दुर्मुख। रणीं वानरांचें कटक। एक एक मारिलें ॥ ६८ ॥ बाहु भेदोनि सहस्कंध। रणीं पाडिला अंगद। रात्रीं निशाचर प्रबुद्ध। रणविमर्दे⁸ वानरां ॥ ६९ ॥ अश्व रगडिले एक एक। गज मर्दिले

१ मोठा योद्धा. २ प्राप्त होशील. ३ आनंदानें. ४ वानरसमुदाय. ५ शोध, माहिती. ६ मान मोडणें.

७ तरवारीच्या धारेनें. ८ जागे. ९ रणकंदन.

CC-0. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

अनेक । एवं वानरांचें कटक । रणीं निःशेख मारिलें ॥ ७० ॥ दिवसा सबळ वानर । रात्रीं दुर्धर निशाचर । तिहीं करोनि रात्रीं मार । नर वानर रणीं मारिले ॥ ७१ ॥

एवं ते निहतो भर्ता ससैन्यो मम सेनया ।
क्षतजार्द्ररजोध्वस्तमिदं तस्याहृतं शिरः ॥ १७ ॥
विद्युजिह्वस्तदा गृह्य शिरस्तस्याग्रतः स्थितः ।
तमब्रवीत्ततो राजा रावणो राक्षसं स्थितम् ॥ १८ ॥
विद्युज्जिह्वं महाजिह्वं समीपपरिवर्तिनम् ।
अग्रतः कुरु सीतायाः शीघ्रं दाशरथेः शिरः ॥ १९ ॥
एवमुक्तं तु तद्रक्षस्तच्छिरः प्रियदर्शनम् ।
पुरो निक्षिप्य सीतायः क्षिप्रमंतरधीयत ॥ २० ॥
रावणश्चापि चिक्षेप भासुरं कार्मुकं तदा ।
त्रिषु लोकेषु विख्यातं रामस्य तदिति ब्रुवन् ॥ २१ ॥

माझें सैन्य सेनानी[१] निशाचर । जावोनि रातोरातीं सत्वर । निजल्या जागीं मारोनि रघुवीर । त्याचें शिर आणिलें ॥ ७२ ॥ माझ्या वचनाची वचनोक्ती । सत्य न वाटे सीतेप्रती । हें घे शिर देतों हातीं । भेट निजपतीसी स्वानंदें ॥ ७३ ॥ ऐकोनि रावणाची गोष्टी । सीता सज्ञान पैं मोठी । पालवीं[२] बांधिली शकुनगांठी । अचुक भेटी श्रीरामीं ॥ ७४ ॥ शत्रुमुखींचें वचन । वदविता राम चिद्घन । तुज भेटवितों रघुनंदन । राम परिपूर्ण भेटेल ॥ ७५ ॥ रावण बोले उपहासता[३] । शीघ्र भेटवीन रघुनाथा । तोही शकुन मानी सीता । छळणार्थता शिर दावी ॥ ७६ ॥ गर्जोनि बोले दशशिर । विद्युज्जिव्हा येईं शीघ्र । श्रीरामाचें शिर सुंदर । देईं सत्वर सीतेसी ॥ ७७ ॥ मायिक शिर सीतेसी देतां । विद्युज्जिव्हा चळीं कंपता । रावण दंडील न देतां । अति भीतता देतसे ॥ ७८ ॥ मिथ्या शिर सीतेसी देतां । क्षोभें शापील पतिव्रता । विद्युज्जिव्हा भयभीतता । अदृश्यता पळाला ॥ ७९ ॥ मिथ्या जाणोनि श्रीरामशिर । तेथेंही सीता भजनतत्पर । स्वयें देखतां दशशिर । करी नमस्कार साष्टांग ॥ ८० ॥ श्रीरामाचें धनुष्यबाण । देखोनियां सीता आपण । अनन्य घाली लोटांगण । स्वयें रावण देखतां ॥ ८१ ॥ श्रीरामशिर देखोनि छिन्न । सीता मिथ्या करी रुदन । रुदनामाजी महिमान । ऐके रावण तैसें गाय ॥ ८२ ॥ जन्ममरणापरता । नित्यवस्ती श्रीरघुनाथा । त्यासी राक्षसीं केल्या घाता । केंवी सत्यता घडे रामा ॥ ८३ ॥ निजबळें स्वयें खद्योत । सूर्याचा करी घात । तरी राक्षसीं रघुनाथ । रणाआंत न मारवे ॥ ८४ ॥ श्रीराम नित्य सावधान । जागृतिस्वप्नसुषुप्तिविहीन । त्यासी निद्रिता राक्षसीं हनन । केलें हें वचन केंवी घडे ॥ ८५ ॥ धूमें धुरकटेना[४] आकाशशशी । तेंवी निद्रा न लागे श्रीरामासी । सुखावस्था वधिलें त्यासी । निश्चयेंसीं केंवी मानूं ॥ ८६ ॥ उदकीं असोनियां गगन । अंगीं न लागे ओलेपण । तेंवी श्रीराम द्वंद्वविहीन । त्यासी मरण केंवी मानूं ॥ ८७ ॥ पर्जन्यधारा समुद्रासी । कदा न रुपती ज्याच्या त्यासी । तेंवी शस्त्रें श्रीरामासी । निजांगासी न लागती ॥ ८८ ॥ उंदीर कुरांडूं[५] शके चांदु । तरी श्रीरामा शिरश्छेदु । करूं न शके राक्षस मंदु । अबद्ध बोधु केंवी मानूं ॥ ८९ ॥ ऐसे श्रीरामपवाडे पढत । सीता उकसाबुकसीं स्फुंदत । तंव रावण चरफडत । सीता छळणार्था मानीना ॥ ९० ॥ स्वयंवरीं वाहतां त्र्यंबक[६] । केलें रावणाचें काळें मुख । त्या रामाचें प्रचंड धनुष्य । कोण मशक आणूं शके ॥ ९१ ॥ श्रीरामाचा निजबाण । रणीं करूनि रिपुमर्दन । स्वयें भातां रिघे परतोन । वेगळा कोण करूं शके ॥ ९२ ॥ ऐकतां सीतेचें रुदन । ललाट पिटी दशानन । सर्वथा सीतेसीं न चले छळण । तळमळी पूर्ण अभिलाषें ॥ ९३ ॥ तळमळितां दशानन । तंव झालें आनेंआन । श्रीरामशिराचें परिज्ञान । पाहे सुचिन्ह जानकी ॥ ९४ ॥

सा सीता तच्छिरो दृष्ट्वा तच्च कार्मुकमुत्तमम् ।
नयने मुखवर्णं च भर्तुस्तत्सदृशं भवेत् ॥ २२ ॥
अंतर्धानं च तच्छीर्षं तच्च कार्मुकमुत्तमम् ।
जगाम रावणस्यैव निर्याणसमनंतरम् ॥ २३ ॥

सादरें पाहे सीता सुंदर । श्रीरामासारिखें शिर । परी रामाचें नव्हे साचार । वदे गंभीर श्लोकपद ॥ ९५ ॥ श्लोकपद अति सुरस । श्रीरामशिरेंसीं सादृश्य । हाचि पदगर्भविलास । जाणे

१ सेनापति. २ पदरीं. ३ उपहासपूर्वक. ४ मळेना, ५ कुरतडूं शके. ६ शिवधनुष्य.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

अनायासें जानकी ॥ ९६ ॥ श्लोकपदगर्भ गंभीर। श्रीरामशिरासारिखें शिर । रघुनाथाचें नव्हे साचार। सीता सुंदर स्वयें जाणे ॥ ९७ ॥ नेत्र वक्त्र[1] श्रवण घ्राणें[2]। ओष्ठ वदन भंवया दशन[3]। श्रीराममुखासीं समान। केलें आनेंआन कृत्रिम ॥ ९८ ॥ मिथ्या देखोनि श्रीरामघाता। गजबजिली नाहीं सती सीता। राक्षसां न मारवे रघुनाथा। समूळ कथा अवधारा ॥ ९९ ॥ शस्त्रें सतेज सज्जून। सर्वथा न छेदवे गगन। तेंवी श्रीरामशिरश्छेदन। राक्षसां जाण न करवे ॥ १०० ॥ शस्त्र करांडितां दुधार। मुखच्छेदें मरे उंदीर। राक्षसां न छेदवे श्रीरामशिर। रामें निशाचर मरतील ॥ १ ॥ सर्वेही रस चाखे माशी। दीप चाखितां पोळे मुखासीं। राम न मारवे राक्षसांसी। श्रीराम त्यांसी प्राणान्त ॥ २ ॥ कृत्रिमशिर रघुनाथा। घडितां न घडवे सर्वथा। सादर पाहूं जातां सीता। अदृश्यता उडालें ॥ ३ ॥ शिर देवोनियां सीतेच्या करीं। विद्युज्जिव्ह पळे बाहेरी। सीता पाहतां शिर निर्धारीं। क्षणामाझारीं अदृश्य ॥ ४ ॥ थिल्लरीं[4] सूर्य बिंबला पाहीं। काढूं जातां तो तेथें नाहीं। कल्पित शिराची नवायी। ठायींच्या ठायीं अदृश्य ॥ ५ ॥ कल्पित शिरेंसीं धनुष्यबाण। सीतेनें पाहतां निर्धारून। अदृश्यगती गेलें उडोन। सत्य संपूर्ण तें नव्हे ॥ ६ ॥ सीतेचिये दृष्टीपुढें। सर्वथा राहों न शके कुडें। मिथ्यात्वें तें समूळ उडे। मागें पुढें श्रीराम ॥ ७ ॥ सीतासतीचा भजनानुक्रम। नयनीं राम वदनीं राम। शयनीं राम जीवनीं राम। तीपुढें भ्रम केंवी राहे ॥ ८ ॥ स्मरणीं राम करणीं राम। पंचभूतेंसीं धरणीं राम। क्षराक्षरेंसीं वाणीं राम। तीपुढें भ्रम केंवी राहे ॥ ९ ॥ कर्मी राम धर्मी राम। आश्रम विश्राम स्वयें राम। सदा स्वधर्मीं श्रीराम। तीपुढें भ्रम केंवी राहे ॥ ११० ॥ गति श्रीराम स्थिति श्रीराम। वृत्ति श्रीराम धृति श्रीराम। सर्वां भूतीं सदा श्रीराम। तीपुढें भ्रम केंवी राहे ॥ ११ ॥ ऐसियापरी सीता सती। विनटली[5] श्रीरामभक्ती। तिसीं न चले छळणोक्ती। लंकापति अति मूर्ख ॥ १२ ॥

एतस्मिन्नंतरे द्वाःस्थो रावणाय न्यवेदयत्।
कार्यमात्यंतिकं घोरं संज्ञया भ्रांतलोचनः ॥ २४ ॥

तेचि समयीं अति विव्हळ। उत्तरद्वारींचा द्वारपाळ। रावणेंसीं बोले बरळ। नेत्रीं विव्हळ भयभीत ॥ १३ ॥ सपरिवार वानरगण। लावोनियां भेरी निशाण। लंके आले रामलक्ष्मण। दुर्धर बाण सज्जूनी ॥ १४ ॥ विध्वंसूनि लंकाभुवन। राक्षसांसी करूनि कंदन। वधावया दशानन। दोघे जण स्वयें आले ॥ १५ ॥ अजूनि काय सीतेसी छळ। संग्रामासी नीघ तत्काळ। नातरी देवोनि जनकबाळ। शरण केवळ रिघें रामा ॥ १६ ॥ द्वारपाळें रावणापासीं। गोष्टी सांगतांचि ऐसी। छळण सांडोनि सीतेसी। निजसभेसी स्वयें आला ॥ १७ ॥

सीतां तु मोहितां ज्ञात्वा सरमा नाम राक्षसी।
तां समाश्वासयामास सखीस्नेहेन सुव्रताम् ॥ २५ ॥
न हतो राघवः सीते श्रीमान् शत्रुनिबर्हणः।
रावणेन नृशंसेन माया मायाविना कृता ॥ २६ ॥

रावणें ठेविली राखण। सरमा नामें राक्षसी जाण। तिसीं सीतेसीं आप्तपण। मैत्री पूर्ण सदाकाळीं ॥ १८ ॥ रावणें सीतेसी केलें छळण। ऐसें जाणोनि संपूर्ण। सरमा तिसी आपण। आश्वासून अनुवादे ॥ १९ ॥ तुज छळावया येथ। मिथ्यावादी लंकानाथ। नाहीं वधिला रघुनाथ। होईं तूं स्वस्थ जानकिये ॥ १२० ॥ सरमा वदे जाणोनि पूर्ण। स्वस्थ श्रीराम लक्ष्मण। स्वस्थ लाडका हनुमान। वानरगण स्वस्थ सुखी ॥ २१ ॥ तुझें करावया छळण। मायिक शिर धनुष्यबाण। रावणें दाखविलें जाण। कपटी पूर्ण महापापी ॥ २२ ॥ श्रीरामेंसहित कँपिकटक। अंगदसुग्रीवादि देख। वधावया दशमुख। लंकेसंमुख स्वयें आले ॥ २३ ॥ पैल पाहें वानरभार। करीत आले गडगजर। ऐकोनि सरमेचें उत्तर। सुखनिर्भर[8] जानकी ॥ २४ ॥ सीतेनें देवोनि आलिंगण। हर्षें दिधलें करकंकण। एका जनार्दना

---

१ तोंड. २ नाक. ३ दांत. ४ डबक्यांतील पाण्यांत. ५ मिळून गेली. ६ धीर देऊन. ७ वानरसैन्य.

८ हर्षयुक्त, सुखानें परिपूर्ण.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

शरण । समाधान श्रीरामें ॥ २५ ॥ श्रीरामें सुख-संपत्ती । श्रीरामें सुखैकप्राप्ती । श्रीरामें सीता सती । छळणार्थी छळेना ॥ १२६ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां जानकीच्छलनं कपटशिरोदर्शनं नाम तृतीयोऽध्यायः ॥ ३ ॥ ओंव्या ॥ १२६ ॥ श्लोक ॥ २६ ॥

अध्याय चवथा

श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः॥ प्रबळ बळें रघुनंदन । आला ऐकोनि रावण । अतिशयें चिंतानिमग्न[1] । म्लानवदन सभेसी ॥ १ ॥

तेन शंखविमिश्रेण भेरीशब्देन रावणः ।
मुहूर्तं ध्यानमास्थाय सचिवानभ्युदैक्षत ॥ १ ॥
ततस्तु सुमहाप्राज्ञो माल्यवान्नाम राक्षसः ।
उवाच रावणं मंत्री कृतबुद्धिर्बहुश्रुतः ॥ २ ॥
तन्मह्य रोचते संधिः सह रामेण रावण ।
यदेर्थमभियुक्तोसि सीता तस्मै प्रदीयताम् ॥ ३ ॥
तस्य देवर्षयः सर्वे गंधर्वाश्च जयैषिणः ।
विरोधं मा गमस्तेन रामेणामिततेजसा ॥ ४ ॥

सभे सचिंत दशानन । तंव शंख भेरी ढोल निशाण । श्रीरामकटकीं त्राहाटिले पूर्ण । तेणें रावण गजबजिला[2] ॥ २ ॥ ऐकोनि वाजंत्रांचा गजर । त्यामाजी वानरांचा भुभुःकार । तेणें दचकला दशशिर । मुहूर्तमात्र तटस्थ ॥ ३ ॥ कार्यकारणकर्तव्यता । कांहीं नाठवे लंकानाथा । तेव्हां माल्यवंत जाला बोलता । निजहितार्थी शिकवाया ॥४॥ रावणाचा परम आप्त । वृद्ध राक्षस माल्यवंत । बहुश्रुतत्वें[3] बुद्धिवंत । धर्मी धर्मवंत सुनीति ॥ ५ ॥ म्हणे ऐक लंकानाथ । दिवि[4] भुवि अंतरिक्षांत । त्रिविध उत्पातीं लंका व्याप्त । आला कुळघात राक्षसां ॥ ६ ॥ मध्यान्हीं उल्कापात[5] । राजद्वारीं भूस्फोट[6] होत । दिवाभीतें घराआंत । बळेंचि रिघत झडपोनी ॥ ७ ॥ रुधिरवृष्टी होत नगरीं । गोमायु गर्जती चौबारीं । भांणीं झडपोनि नेती घारी । आली महामारी राक्षसां ॥ ८ ॥ यालागीं ऐक लंकानाथा । सीता अर्पूनि रघुनाथा । रामरावणां अतिसख्यता । करीं सर्वथा क्षणार्धें ॥ ९ ॥ येथें कलहाचें कारण । मुख्यत्वें सीताचि जाण । ते केलिया रामार्पण । कृतकल्याण सर्वांसी ॥ १० ॥ श्रीरामाची निजकांता । रामार्पण करितां सीता । रावणा तुज कां व्यर्थ व्यथा । हेंचि कुळघाता निजमूळ ॥ ११ ॥ श्रीरामाचा प्रताप पूर्ण । समुद्रीं तारिले पाषाण । लंके आणिलें वानरसैन्य । त्यासंमुख कोण राहूं शके ॥ १२ ॥ गजापुढें[11] मशक जाण । सिंहापुढें भुंके [12]न । तेंवी श्रीरामीं रावण । करितां रण निमेल ॥ १३ ॥ सूर्यासीं करावया रण । उठावले घृतकण । तैसा श्रीरामीं रावण । मरेल पूर्ण रणरंगीं ॥ १४ ॥ पतंग अग्नीसीं झगडा । करूं पाहे पंखझडाडा । तेंवी रावण रामापुढां । मरेल रोकडा बाणें एकें ॥ १५ ॥ धरोनियां शहाणपणा । सुबुद्धि ऐकावी रावणा । सीता अर्पूनि रघुनंदना । कुळकल्याणा साधावें ॥ १६ ॥

तत्तु माल्यवतो वाक्यं हितमुक्तं दशाननः ।
न मर्षयति दुष्टात्मा कालस्य वशमागतः ॥ ५ ॥
अमर्षात्परिवृत्ताक्षो माल्यवंतमथाब्रवीत् ।
मानुषं कृपणं राममेकं शाखामृगाश्रयम् ॥ ६ ॥
समर्थं मन्यसे केन त्यक्तं पित्रा वनाश्रयम् ।
वीरद्वेषेण वा शंके पक्षपातेन वा रिपोः ॥ ७ ॥
एवं ब्रुवाणं संरब्धं क्रुद्धं विज्ञाय रावणम् ।
व्रीडितो माल्यवांस्तूर्णं तस्माद्देशादपाक्रमत् ॥ ८ ॥

क्षीर ज्वरिता कडू विख । तेंवी हितवाक्य दशमुख । माल्यवंताचें न मानूनी सुख । परम दुःख पावला ॥ १७ ॥ परम क्रोधें दशकंठ । वटारूनि नेत्रवाट । स्वामिनिंदक तूं अति दुष्ट । शठ नष्ट माल्यवंता ॥ १८ ॥ राम बापुडें मनुष्यमात्र । घेवोनि आलें वानरभार । त्यासी वानिसी थोर थोर । मी राज्यधर मज निंदिसी ॥ १९ ॥ शत्रुपक्षाचा अभिमान । वानिसी श्रीराममहिमान । निखंदिसी[13] दशानन । कुळनिर्दळण श्रीरामें ॥२०॥ श्रीरामासीं करितां रण । रणीं राक्षसां निर्दळण । मुख्य मरेल रावण । ऐसें कठिण वदतोसी ॥२१॥ तुवां भेडसाविल्या जाण । मज रामाचें भय

---

१ चिंतातुर. २ भ्याला. ३ ज्ञानानें. ४ स्वर्गीं. ५ विजा पडणें. ६ पृथ्वीला खळगे. ७ घुबडें. ८ रक्तवृष्टि. ९ कोल्हे.

१० अन्नपात्रें. ११ हत्तीपुढें. १२ कुत्रा. १३ निंदितोस.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

कोण । रणीं मारीन रामलक्ष्मण । वानरगणसमवेत ॥ २२ ॥ विरुद्ध अनुवादतां येथ । तुझा करावा म्यां घात । अति वृद्ध परम आप्त । म्हणोनि हात राखिला ॥ २३ ॥ कोपला देखोनि दशवदन । माल्यवंत स्वयें सरकोन । सत्वर गेला पैं निघोन । मुख परतोन पाहेना ॥ २४ ॥ सीता अर्पावी रघुनाथा । ऐसें माल्यवंत सांगतां । रावण करूं पाहे घाता । तो अदृश्यता फडकला ॥ २५ ॥ माल्यवंत गेलिया जाण । प्रधानां सांगे रावण । दुर्ग[1] सज्जून दारुण । वीरीं सावधान राहावें ॥ २६ ॥

लंकायास्तु तदा गुप्तिं कारयामास राक्षसः ।
प्रहस्त व्यादिदेशाथ पूर्वद्वारे निषूदनम् ॥ ९ ॥
दक्षिणे तु माहवीर्यौ महापार्श्वमहोदरौ ।
पश्चिमे तु तथा द्वारे पुत्रमिंद्रजितं तदा ॥ १० ॥
उत्तरे चापि स द्वारे व्यादिश्य शुकसारणौ ।
स्वयमत्र भविष्येहमिति तान्मंत्रिणोऽब्रवीत् ॥ ११ ॥
राक्षसं तु विरूपाक्षं महाबलपराक्रमम् ।
मध्ये संस्थापयामास बहुभिः सह राक्षसैः ॥ १२ ॥

रावण करी दुर्गसंस्था[2] । पूर्वद्वारीं ठेवी प्रहस्ता । दक्षिणद्वारीं होय ठेविता । महोदर तथा महापार्श्व ॥ २७ ॥ पश्चिमद्वारींचा निर्धार । इंद्रजित ठेविला ज्येष्ठ कुमर । कोट्यनुकोटी निशाचर । सहपरिवार सहसैन्य ॥ २८ ॥ उत्तरद्वारीं पैं जाण । तेथें ठेविले शुकसारण । सहपरिवारें रावण । ते द्वारीं आपण स्वयें राहे ॥ २९ ॥ उत्तरद्वारीं श्रीरघुनाथ । निश्चयें येईल येथ । यालागीं तेथें लंकानाथ । स्वयें राहत सावधान ॥ ३० ॥ अमित सैन्य देवोनि त्यासी । मध्य[3]गुल्मीं ठेविलें विरूपाक्षासी । उणें देखावें ज्या द्वारासी । साह्य त्यासी तेणें जावें ॥ ३१ ॥ देखोनियां लंकाभुवन । दुर्ग घ्यावया वानरगण । रामापासीं अवघे जण । कर जोडून राहिले ॥ ३२ ॥ मिळोनियां वानरवीर । नमस्कारोनि रामचंद्र । आम्हांसी घ्यावया लंकापुर । आज्ञा सत्वर दे स्वामी ॥ ३३ ॥ आज्ञा पुसतां जुत्पती । बिभीषण श्रीरामाप्रती । सांगे दुर्गाची पाळती । प्रधानाहस्तीं जे आणविली ॥ ३४ ॥

अथ तेषु ब्रुवाणेषु रावणावरजोऽब्रवीत् ।
अनलः पनसश्चैव संपातिः प्रमतिस्तथा ॥ १३ ॥
गत्वा लंकाममात्या मे पुरीं पुनरिहागताः ।
भूत्वा शकुनयः सर्वे प्रविष्टाश्च रिपोर्बलम् ॥ १४ ॥
संविधानं यदाहुस्ते रावणस्य दुरात्मनः ।
राम ते ब्रुवतः सर्व याथातथ्येन मे शृणु ॥ १५ ॥

लंका घ्यावया हातोहातीं । गर्जत उठतां वानरपंक्ती । बिभीषणें थांबवोनि जुत्पती । दुर्गपाळती स्वयें सांगे ॥ ३५ ॥ करूं जातां रणकंदन । रणीं पडे पारिखें[4] सैन्य । ऐसें दुर्गाचें विंदान । बिभीषण स्वयें सांगे ॥ ३६ ॥ यंत्रें शतघ्नी[5] गुप्तगोळ । दारूयंत्रें पाषाण प्रबळ । निर्दाळावया पारिखें दळ । दुर्ग प्रबळ सज्जिले ॥ ३७ ॥ माझे चौघेही प्रधान । धांडोळोनि लंकाभुवन । दुर्गाचें मारक विंदान । पाळती पूर्ण घेवोनि आले ॥ ३८ ॥ तुझ्या चौघां प्रधानांसी । ओळखी सर्वत्र सर्वांसीं । पाळती आणिली कैसी । बिभीषणासी पुसे राम ॥ ३९ ॥ माझे चौघे प्रधान । ऐक त्यांचें नामाभिधान । अनळ हर प्रघस संपाती जाण । अति विचक्षण कामरूपी[6] ॥ ४० ॥ पक्षिवेषाचे अनुवृत्ती । रिघोनियां लंकेप्रती । तिंहीं दुर्गाची पाळती । यथार्थगतीं आणिली ॥ ४१ ॥ पूर्वे प्रहस्त अति प्रसिद्ध । दक्षिणे महोदर महापार्श्वद । पश्चिमे इंद्रजित अगाध । सन्नद्ध बद्ध सैन्येंसीं ॥ ४२ ॥ उत्तरद्वारीं शुकसारण । ठेविले नाममात्र जाण । सकळ सैन्येंसीं आपण । राहे रावण ते द्वारीं ॥ ४३ ॥ सैन्यसमुदाय मध्यगुल्मासीं । अग्रगणी केलें विरूपाक्षासी । मोड जाल्या ज्या द्वारासीं । साह्य त्यासी तेणें जावें ॥ ४४ ॥ मारावया वानरपंक्ती । हुडोहुडीं[7] गुप्तगतीं । यंत्रें जोडिलीं नेणों किती । क्रोधानुवृत्ती रावणें ॥ ४५ ॥ दुर्गासी झोंबतां वानरें । मारावया गुप्तमारें । चर्याचर्या सज्जिलीं यंत्रें । दशशिरें रणमारा ॥ ४६ ॥ दुर्ग सज्जिले दारुण । दुर्गीं झोंबतां वानरगण । यंत्रमारें मरती पूर्ण । ऐसें आपण न करावें ॥ ४७ ॥ यंत्रोयंत्रीं दीर्घ ध्वजा । श्वेत पीत आरक्त विरजा । दुर्गवेष्टणीं समसमाजा । उभविल्या वोजा शोभती ॥ ४८ ॥

---

१ किल्ले. २ किल्ल्यांची व्यवस्था. ३ मध्यभागीं. ४ शत्रूचें. ५ तोफा वगैरे. ६ हुशार. ७ इच्छित रूप धारण करणारे. ८ बुरुजांवर. ९ साह्यभूत.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

हुलमुखे दीर्घ हुडे। विचित्र निर्वाळिले कडे। पताका सज्जिलया चहूंकडे। राक्षस गाढे राखिती ॥ ४९ ॥ ऐकोनि बिभीषणाची युक्ती। वानर गद‍्गदां हांसती। आमच्या उड्डाणव्युपत्ती। दुर्ग किती यंत्रेंसीं ॥ ५० ॥ लंकेचिया शिखरावरी। उड्डाण कीजे वानरीं। तेथें दुर्गाच्या यंत्रमारीं। कवणावरी पडावें ॥ ५१ ॥ ऐकोनि वानरांची मात। बिभीषण अति विस्मित। श्रीराम स्वानंदें हांसत। अति पुरुषार्थ वानरां ॥ ५२ ॥ दुर्गातळीं जे राहती। यंत्रमारें ते मरती। वानरां दुर्गावरी गती। यंत्रें जाती सुनाट ॥ ५३ ॥ ऐशी बिभीषणाची पाळती। ऐकोनि दुर्गाची संस्थिती। श्रीराम सांगे सुग्रीवाप्रती। द्वारानुवृत्ती निरोधा ॥ ५४ ॥ दुर्गामाजी तडा पडे। तैसीं धरावीं पाणियाडें। दुर्ग वेढावे चहूंकडे। मागेंपुढें ढळों नेदीं ॥ ५५ ॥ भीतरिल्या बाहेर नव्हे गती। बाहेरील भीतरी जावों न शकती। दुर्ग निरोधावे ऐशा रीतीं। स्वयें रघुपति सांगत ॥ ५६ ॥

कपीनामुग्रवीर्याणां सहस्रैर्बहुभिर्वृतः।
नीलः प्रहस्तं प्लवगो राक्षसं प्रति धावताम् ॥ १६ ॥
अंगदो वालिनः पुत्रो बलेन महता वृतः।
दक्षिणे धावतां द्वारे महापार्श्वमहोदरौ ॥ १७ ॥
हनूमान्पश्चिमं द्वारं निष्पीड्य पवनात्मजः।
प्रविशत्वप्रमेयात्मा कपिभिर्बहुभिर्वृतः ॥ १८ ॥
परिक्रामति यत्सर्वांल्लोकान्संतापयन्प्रजाः।
तस्याहं राक्षसेंद्रस्य रावणस्य वधे धृतः ॥ १९ ॥
उत्तरं नगरद्वारमहं सौमित्रिणा सह।
निपीड्याभिप्रवेक्ष्यामि सबलो यत्र रावणः ॥ २० ॥
वानरेंद्रश्च बलवान्ऋक्षराजश्च वीर्यवान्।
राक्षसेंद्रानुजश्चैव गुल्मे भवतु मध्यमे ॥ २१ ॥

प्रहस्त पूर्वद्वारानुवृत्ती। त्यासीं भिडावया नीळ दळपती। सवें वानर भद्रजाती। दुर्गगती निरोधा ॥ ५७ ॥ दक्षिणद्वारीं महावीर। महापार्श्वद महोदर। त्यांवरी अंगद वाळिकुमर। द्वारनिर्धार रणकंदना ॥ ५८ ॥ पश्चिमद्वारीं इंद्रजित। त्याचा करावया घात। बळिया ठेविला हनुमंत। रणकंदनार्थ राक्षसां ॥ ५९ ॥ मुख्यत्वें कपटी पूर्ण। उत्तरद्वारीं असे रावण। त्याचें करावया कुळनिर्दळण। रामलक्ष्मण आम्ही दोघे ॥ ६० ॥ राजा सुग्रीव जांबवंत। बिभीषण शरणागत। यांहीं राहावें मध्यगुल्मांत[1]। सैन्य समस्त लक्षूनी ॥ ६१ ॥ कोणे द्वारीं कैसें रण। वीरां वानरां युद्धकंदन। भंगलिया बळासी जाण। साह्य संपूर्ण इंहीं व्हावें ॥ ६२ ॥ ऐसा मध्यगुल्मवृत्तांत। दुर्ग रोधूं सांगे रघुनाथ। ते वानरीं ऐकोनि मात। लंकाग्रहणार्थ मांडिला ॥ ६३ ॥ ज्यांच्या वांट्या जें द्वार। ते ते द्वारीं वानरवीर। करिते झाले चरित्र। अति विचित्र अवधारा ॥ ६४ ॥ दुर्गतळीं राहतां वीर। होईल यंत्रांचा महामार। हें जाणोनियां वानर। करिती दुर्धर तें ऐका ॥ ६५ ॥ लंकेहूनि उंच पर्वत। आणोनियां योजनान्त। वानर निजद्वारीं स्थापित। राक्षसान्त करावया ॥ ६६ ॥ पर्वतीं वेंघले[2] वानर बळी। लंकादुर्ग राहिलें तळीं। राक्षसदुर्गाचिये पौळी। घायातळीं आतुडले ॥ ६७ ॥ त्यांसी हाणितां शिळाशिखर। घायीं अष्टांगें होती चूर। वानरीं करितां महामार। दुर्गधर पळाले ॥ ६८ ॥ वीर धीर सपुरतें। हुडोहुडां[3] नित्य जागते। वानर देखोनि आपणांवरते। तेही निश्चितीं गजबजिले ॥ ६९ ॥ आम्ही तळीं ते दुर्गावरी। येथें झाली विपरीत पैरी[4]। वानरीं आणोनि महागिरी। आम्हांहीवरी वळंघले ॥ ७० ॥ हुडोहुडां वीर अमित। वानर करिती पर्वतघात। शतसहस्र चूर्ण करीत। हुडे खचत आघातें ॥ ७१ ॥ पारख्या करितां महामारी। दुर्गीं जोडल्या यंत्रहारी। त्याही उचलोनि वानरीं। नेवोनि सागरीं घातल्या ॥ ७२ ॥ दुर्गासभोंवते याचिपरी। हुडोहुडां पैं वानरीं। राखणाइतां महामारी। अपांपरी[5] राक्षसां ॥ ७३। एकें निमालीं प्राणान्त। एकें धायवट[6] हुंबतँ[7]। उरलीं जीव घेवोनि पळत। दुर्गनिर्मुक्त कपिभयें ॥ ७४ ॥ दुर्गाचिया पौळोपौळीं[8]। राक्षसां करोनि रंवंदळी[9]। वानरवीरीं आतुर्बळी। नगरधांडोळी मांडिली ॥ ७५ ॥ एकांचे मुकुट आसुडती। एकांचीं शस्त्रें हिसकिती। वीर हाणितां आघातीं। उडोनि जाती आकाशीं ॥ ७६ ॥ न

१ सेनेच्या मध्यव्यूहांत. २ चढले. ३ प्रत्येक बुरुजावर. ४ तऱ्हा. ५ दुर्दशा. ६ घायाळ. ७ कुंथत.

८ भिंतींभिंतींवर. ९ नाश.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

घेतां रत्नें मुक्ताफळें । हाटवाटींचीं विकतीं फळें । आणोनियां निजबळें । सुखसमेळें भक्षिती ॥ ७७ ॥ आणोनि गुळाचिया भेंडा । वानर खाती मटमटां । दुकानींचा काढोनियां सांटा । मधु घटघटां सेविती ॥ ७८ ॥ आणोनियां फुटाण्यांची पाटी । वानर खाती लाळघोटी । चारें बोरें लुटिती हाटीं । नाचती चौहाटीं लंकेच्या ॥ ७९ ॥ देखोनि वानरांची धाडी । निशाचरीं दिधली दडी । घरोघरीं कडाफोडी । केलीं बापुडीं राक्षसें ॥ ८० ॥ श्रीराम म्हणे सुवेळागिरी । वळंघोनियां तयावरी । युद्ध होत लंकागिरीं । वीरीं वानरीं पाहों तें ॥ ८१ ॥

स तु कृत्वा सुवेलस्य मतिमारोहणं प्रति ।
लक्ष्मणानुमतो रामः सुग्रीवमिदमब्रवीत् ॥ २२ ॥
विभीषणं च धर्मज्ञमनुरक्तं निशाचरम् ।
लंकामालोकयिष्यामो निलयं तस्य रक्षसः ॥ २३ ॥
रामः सुवेलमारोहद्वासार्थं चित्रकाननम् ।
अध्यारोहंत शतशः सुवेलं यत्र राघवः ॥ २४ ॥
शासनादथ रामस्य सुग्रीवस्य विभीषणः ।
द्वारे द्वारे प्लवंगानां कोटिं कोटिं न्यवेशयत् ॥ २५ ॥

राम जावया सुवेळेप्रती । लक्ष्मणाच्या विचारवृत्तीं । आणि सांगोनियां सुग्रीव कपीप्रती । बिभीषणानुमतीं निघे राम ॥ ८२ ॥ आतां येथून अहर्निशीं । नित्यवस्ती सुवेळेसी । ऐसें सांगोनि सर्वांसी । निघे वेगेंसीं श्रीराम ॥८३॥ ऐसी ऐकतांचि गोष्टी । वानरवीर कोट्यनुकोटी । धांवोनियां सुवेळापृष्टीं । शिळा समपृष्ठी आंथुरिती ॥ ८४ ॥ लंकेआंतील वृत्तांत । सुवेळेहूनि असे दिसत । याचि अनुलक्षीं रघुनाथ । सुवेळाआंत राहिला ॥ ८५ ॥ लावोनियां निशाणभेरी । श्रीराम चढे सुवेळागिरी । परिवारिला वानरभारीं । निजगजरीं पैं आला ॥ ८६ ॥ लंका देखोनि रघुपती । स्वयें सांगे वानरांप्रती । दुर्ग घ्यावें हातोहातीं । लंकापती गांजोनी ॥८७॥ राक्षसीं भय घेतलें भारी । कोणी न ये लंकेबाहेरी । आपण रिघोनियां भीतरीं । सहपरिवारीं दुर्ग घ्यावें ॥ ८८ ॥ ऐकोनि श्रीरामाची मात । सुग्रीव वानरां सांगत । करोनि राक्षसांचा घात । दुर्गाआंत रिघावें ॥ ८९ ॥ बिभीषण सांगे रामाजवळी । जे जे आले लंकेच्या मूळीं । त्या त्या सैन्या होती रांगोळी । यंत्रानुमेळीं महामारें ॥९०॥ लंकेसी वारा वाजतां भीत । पक्षी भोंवों न शकती तेथ । रावणें राखिली अति गुप्त । जालें विपरीत ते ठायीं ॥९१॥ लंकेहूनि उंच योजनान्त । वानरीं आणिले पर्वत । वीर वळंघोनि तेथ । रणकंदनार्थ राक्षसां ॥ ९२ ॥ श्रीरामप्रतापनव्हाळी । लंकादुर्ग राहिलें तळीं । पर्वतावरूनि वानर बळी । करिती रांगोळी राक्षसां ॥९३॥ लाहोनि श्रीरामसामर्थ्य । वानरीं केला विपरीतार्थ । जोडोनियां पर्वता पर्वत । लंका समस्त रोधिली ॥ ९४ ॥ पाडोनि दुर्गाच्या पौळी । यंत्रें उचटून समूळीं । सागर भरिला यंत्रगोळीं । आतुर्बळी वानर ॥ ९५ ॥ वानरांच्या भयेंकरीं । हाटचौहाटां लंकापुरीं । कोणी वागेना बाहेरी । अपांपरी राक्षसां ॥ ९६ ॥ ऐसें बोलोन बिभीषण । वानरां सांगे आपण । आतां घ्यावें लंकाभुवन । रणकंदन करीतही ॥ ९७ ॥ श्रीराम असतां पाठिराखा । कायसा पाड दशमुखा । कांहीं न धरोनि शंका । अवश्य लंका तुम्हीं घ्यावी ॥ ९८ ॥ ऐसें ऐकतां उत्तर । वानरीं केला जयजयकार । देवोनि रामनामें भुभुःकार । लंकापुर ठाकिलें ॥ ९९ ॥ श्रीरामाज्ञेची थोरी । लंका वेढिली वानरीं । गुळीं जैशा मुंग्यांच्या हारी । तैशापरी झोंबती ॥ १०० ॥ न लगे अर्गळां काढणें । न लगे शृंखळा तोडणें । न लगे कपाटें उघडणें । वानर किरांणें गड घेती ॥ १ ॥ राक्षसीं हाणावें हातियेरीं । वानर उंच पर्वताग्रीं । मारावें जों यंत्रमारीं । वानरीं यंत्रें बुडविलीं ॥ २ ॥ लंकेभोंवतीं दुसरी । पर्वतलंका केली वानरीं । त्यावरी वळंघोनि महावीरीं । दुर्गाभीतरीं प्रवेश ॥३॥ वानरवीर जगजेठी । असंख्य निघाले लंकात्रिकूटीं । मारितां राक्षसांच्या कोटी । सुग्रीवें पाठी राखिली ॥ ४ ॥ करितां राक्षसां महामारी । वानर ढेंसले लंकेभीतरीं । बोंब सुटली घरोघरीं । अपांपरी राक्षसां ॥ ५ ॥

ततः सहस्रयूथाश्च कोटियूथाश्च यूथपाः ।
कोटियूथशताश्चान्ये लंकामारुरुहुस्तदा ॥ २६ ॥
जयत्युरुबलो रामो लक्ष्मणश्च महाबलः ।
राजा जयति सुग्रीवः श्रीरामेणानुपालितः ॥ २७ ॥

१ बाजारांतील. २ विक्रीस ठेवलेलीं. ३ ढेंपी. ४ चढून. ५ श्रीरामप्रतापाचा चमत्कार. ६ बाजार. ७ चवाठे. ८ दुर्दशा. ९ अडसर. १० उड्डाणानें. ११ शिरले.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

परिखां पूरयंतश्च गंभीरविमलोदकाम् ।
पांसुभिस्तृणकाष्ठैश्च पर्वताग्रैश्च वानराः ॥ २८ ॥
इति ते घोषयंतश्च गर्जंतश्च प्लवंगमाः ।
अभ्यधावंत लंकायाः प्राकारं कामरूपिणः ॥ २९ ॥

श्रीरामाज्ञासन्निधी । वानर लक्षानुलक्षकोटी । वृंदानुवृंद जगजेठी । लंकापीठीं प्रवेशले ॥६॥ यूथपावरी यूथप । वानर आले सप्रताप । विध्वंसावया मठ मंडप । अति साटोपें चालिले ॥ ७ ॥ फाडिती पताका तोडिती तोरणें । पाडिती मंदिरें सप्तखणें । राजमंदिरें शोभायमानें । करिती कंदनें वानरें ॥ ८ ॥ खंदक बुजिती आतुर्बळी । खंदकामाजी घालिती धुळी । पर्वतशिखरें काष्ठें शिळीं । परिघ समूळीं बूजिला ॥ ९ ॥ करिती राक्षसांची होळी । पाडिती दुर्गांचिया पौळी । वानर येवोनि आतुर्बळी । पिटिती टाळी जयाची ॥ ११० ॥ आम्ही श्रीरामाचे दूत । प्रवेशलों लंकेआंत । श्रीराम जाला यशवंत । हर्षें गर्जत वानर ॥ ११ ॥ श्रीराम नित्य विजयान्वित । लक्ष्मण सदा यशवंत । श्रीरामें सुग्रीवा राज्य प्राप्त । तोही निश्चित निजविजयी ॥ १२ ॥ जयजयकाराचा गजर । रामनामें गर्जती वानर । लंका घेतली सत्वर । श्रीरामचंद्र निजविजयी ॥ १३ ॥ लंकाराज्य समस्त । बिभीषणासी जालें प्राप्त । ऐसें वानर गर्जत । हर्षयुक्त स्वानंदें ॥ १४ ॥ यापरी स्वयें लंकेआंत । वानर गर्जत नर्तत । राक्षस त्रासले समस्त । सांगती आकांत लंकेशा ॥ १५ ॥

ततस्ते राक्षसास्तत्र गत्वा रावणमंदिरम् ।
न्यवेदयन्पुरीं रुद्धां रामेण सह वानरैः ॥ ३० ॥
रुद्धां तु नगरीं श्रुत्वा जातकोपो दशाननः ।
विधानं द्विगुणं कृत्वा प्रासादं चाप्यरूरुहत् ॥ ३१ ॥
स ददर्शावृतां लंकां सशैलवनकाननाम् ।
असंख्यातैर्हरिगणैः सर्वतो योद्धुमाहवे ॥ ३२ ॥
स दृष्ट्वा वानरैः सर्वैः काननं कपिलं कृतम् ।
कथं क्षपयितव्याः स्युरिति चिंतापरोऽभवत् ॥ ३३ ॥

वानरीं त्रासिले निशाचर । रावणा सांगती सत्वर । पर्वतशिळाशिखरांचा मार । करीत वानर पैं आले ॥ १६ ॥ दुर्गाह्नि योजनान्त । लंकेसभोंवते पर्वत । वानर वळंघोनि तेथ । केला निर्घात राक्षसां ॥ १७ ॥ वानर पर्वताग्रीं महाबळी । लंका दुर्ग राहिलें तळीं । वर्षोनि पर्वतशिखरशिळीं । केली रांगोळी राक्षसां ॥ १८ ॥ कपींसी न चाले हतियेर । उंच पर्वताग्रीं वानर । त्यांसी न चले यंत्रमार । निशाचर चडफडती ॥ १९ ॥ वानरां न लगे दुर्ग पाडणें । न लगती कपाटें उघडणें । त्रिकूट घेतलें जी निजकिराणें । अति सत्राणें उडोनी ॥ १२० ॥ उड्डाणबळें जगजेठी । वानरांच्या कोट्यनुकोटी । पैल पाहें लंकापीठीं । वीर त्रिकूटीं दाटले ॥ २१ ॥ वानरांचे मारासेण । राक्षस जाले पलायमान । राक्षस पळती जीव घेऊन । दुर्गरक्षण असेना ॥२२॥ यापरी गा लंका एथ । वानरीं करोनि निर्मुक्त । प्रवेशले रामदूत । कपि गर्जत रामनामें ॥ २३ ॥ वृथा वानिती प्रधान प्रौढी । आम्ही मारूं वानरकोडी । आल्या वानरांच्या धाडी । देवोनि दडी लपताती ॥ २४ ॥ सवेग येतां वानरधाडी । दुर्गांच्या फाँजी पौळी पाडी । खंदक बुजिले निर्वेडीं । कडाफोडी लंकेसीं ॥ २५ ॥ ऐकोनि राक्षसांची मात । गजबजिला लंकानाथ । वानर भरले लंकेआंत । पाहूं चढत अंटाळीं ॥२६॥ रावण चढोनि गोपुरीं । पाहे तंव वानरहारी । दाटले लंके आंतबाहेरी । वनोवनांतरीं कपिभार ॥ २७ ॥ वानरसैन्य असंख्यात । न समाये लंकेआंत । पौळीं वानर समस्त । वनीं वृक्षस्थ ढेंसले ॥ २८ ॥ वानरसभेच्या समेळीं । पिंवळ्या दिसती दुर्गपौळी । कपिप्रभा आणि प्रभावळी । दिसती पिंवळीं वृक्षवनें ॥ २९ ॥ लंका सबाह्य संपुटीं । देखोनियां वानरथाटी । रावणा चळकांप उठी । कैशी निकटीं कपिधाडी ॥ १३० ॥ रावण देखोनि गोपुरीं । जो तो वानर उपराउपरी । युद्धालागीं स्वयें पाचारी । निघें बाहेरी नपुंसका ॥३१॥ एकीं देवोनि किराण । ढिलावूं पाहती रावण । तें देखोनि दशानन । अति उद्विग्न स्वयें जाला॥३२॥ मज दशमुखासमोर । वनचरें पालेखाइर । युद्धा धांवती सत्वर । वानरवीर महाबळी ॥३३॥ वानर देखोनि दुर्धर । तळीं उतरला दशशिर । कपींसीं करावया रणमार । सैन्य सत्वर मोकली ॥ ३४ ॥

१ श्रीरामाचे आज्ञाधारक. २ यूथप=सैन्यनायक. ३ आवेशयुक्त. ४ नाचूं लागले. ५ चढून. ६ आपल्या उड्यांनीं. ७ भिंती. ८ तट. ९ नेटानें. १० गच्चीवर. ११ दाटले. १२ (लंकेच्या) आंतबाहेर. १३ पाठवी.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

ततः कोपपरीतात्मा रावणो राक्षसाधिपः ।
निर्याणं सर्वसैन्यानां द्रुतमाज्ञापयत्तदा ॥ ३४ ॥
निष्पतंति तदा सेना हृष्टा रावणचोदिताः ।
एतस्मिन्नंतरे रौद्रः संग्रामः समपद्यत ॥ ३५ ॥
राक्षसानां वानराणां घोराणां कामरूपिणाम् ।
ते गदाभिः प्रवृत्ताभिः शूलशक्तिपरश्वधैः ॥ ३६ ॥
निर्जघ्नुर्वानरान्घोरान्कंपयंतः स्वविक्रमान् ।
तदावृक्षैर्महाकायाः पर्वताग्रैश्च वानराः ॥ ३७ ॥
निर्जघ्नुरथ रक्षांसि नखैर्दंतैश्च वेगिताः ॥ ३८ ॥

कपि प्रवेशले लंकेआंत । तेणें कोपला लंकानाथ । निजसैन्या स्वयें मोकलित । रणकंदनार्थ वानरां ॥ ३५ ॥ सैन्य पाठविलें सत्वर । तेथें वानर निशाचर । युद्ध करिती घोरांदर । येरयेरां नोकूनि ॥३६॥ राक्षस आले करीत गजर । नामें वानरांचा भुभुःकार । घाय हाणिती निष्ठुर । येरयेरां उपमर्द ॥ ३७ ॥ राक्षसांचा शस्त्रसंपात । वानर तळपोनि चुकवित । कपींनीं करितां पर्वतघात । रणीं हुंवत राक्षस ॥ ३८ ॥ वानर धरोनियां पुच्छीं । उपटितां अति आवेशीं । वानरें ओरबडोनि नेत्रांसी । आणिलें राक्षसांसी अंधत्व ॥ ३९ ॥ वामहस्तें नेत्र फोडी । दक्षिणहस्तें देवोनि थापडी । राक्षसांतें तळीं पाडी । नाक कान करांडी अतिरागें ॥ १४० ॥ वानर धरोनि चरणकमळीं । उपटूं जातां आतुर्बळी । पुच्छें त्यांची निमटून नळी । पाडिती भूतळीं राक्षसां ॥ ४१ ॥ राक्षसीं वानरां उठाउठीं । रणीं झाली लटापटी । झोंटी धरोनि पाडिती सृष्टीं । हाणिती मुष्टी निष्ठुरा ॥४२॥ गदा मुद्गल शूळ शक्ती । राक्षस निजबळें हाणिती । शालतालशिळापर्वतीं । वानर मारिती राक्षसां ॥ ४३ ॥ दंडीं मुंडेपीं उरीं शिरीं । थडका हाणिती शिरोदरीं । पुच्छ आणोनी उरावरी । पाडिती हारी राक्षसांच्या ॥ ४४ ॥ शस्त्रास्त्रांसीं घडघडाट । आले राक्षसरथथाट । तें देखोनियां मर्कट । रथानिकट स्वयें आले ॥ ४५ ॥ शस्त्रें हाणितां राक्षसीं । वानर उसळल आकाशीं । वर्षोनियां पर्वतांसी । सहित रथेंसीं चकचूर ॥ ४६ ॥ वानर वेगीं निमेषार्धांत । मकरतोंडीं धरोनि रथ । वळें भूतळीं उपडित । केले भस्मांत असंख्य ॥ ४७ ॥ राक्षसरथ कोट्यनुकोटी । वानरीं उपडितां सृष्टीं । रणीं एक बोंब उठी । लंकात्रिकूटीं आक्रांत ॥ ४८ ॥ वानरश्रेणी पडतां रणीं । श्रीरामाच्या नामस्मरणीं । व्यथा जावोनि तत्क्षणीं । उठती रणीं संग्रामा ॥ ४९ ॥ नाम स्मरतां प्रल्हादासी । शस्त्रें न रुपती अंगासी । श्रीराम असतां पाठीसीं । वानरांसी भय काय ॥ १५० ॥ आम्ही श्रीरामाचे दूत । वानर निजनामें गर्जत । गजवाजिरथांचा निःपात । असंख्यात राक्षसां ॥ ५१ ॥

स संप्रहारस्तुमुलो मांसशोणितकर्दमः ।
राक्षसानां वानराणां बभूवाद्भुतदर्शनः ॥ ३९ ॥
वनौकसां तत्र तु सन्निनादो
लंकागतानां च निशाचराणाम् ।
प्रक्ष्वेडितास्फोटितनर्दितानां
द्वाभ्यां महद्भयामिव सागराभ्याम् ॥ ४० ॥

वानर राक्षस रणांगणीं । भिडिन्नले आयणींपायणीं । मांसशोणितकर्दम धरणीं । पर्वतपाषाणीं विमर्द ॥ ५२ ॥ वानर वर्षती पर्वत । निवारण न चलेचि तेथ । अनिवार पर्वतघात । तेणें प्राणान्त राक्षसां ॥ ५३ ॥ आड धरितां वोढणँ । वोढणेंसीं वीरां मरण । पर्वतघातें शतचूर्ण । अचुक मरण राक्षसां ॥ ५४ ॥ राक्षस दुर्गाचिया पौळीं । वानर पर्वताग्रीं आतुर्बळी । वर्षोनि वृक्षपर्वतशिळीं । केली रांगोळी राक्षसां ॥ ५५ ॥ पर्वतीं न चले शस्त्रसंपात । पर्वतीं न चले बाणावर्त । राक्षस पावोनि आक्रांत । लंकेआंत पळाले ॥ ५६ ॥ दोनी समान सैन्यसागर । समान बळ समान शूर । युद्ध केलें घोरांदर । अति दुर्धर रणमर्द ॥ ५७ ॥ परस्परें गर्जत । परस्परें नर्तत । परस्परें नोकिर्त । रणोन्मत्त भिडिनले ॥ ५८ ॥ वानरांचा पर्वतघात । राक्षस त्रासले अद्भुत । ते पळाले लंकेआंत । अति कुंथत घायाळ ॥ ५९ ॥ राक्षससैन्या वोहट तेथ । श्रीरामसैन्य विजयभरित । हें देखोनि श्रीरघुनाथ । सुग्रीवादि तोषले ॥ १६० ॥ एका जनार्दना शरण । लंकावेष्टन राक्षसकंदन । पुढें अंगदशिष्टाईकथन । सावधान अवधारा ॥ ६१ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां प्रथमयुद्धकथनं नाम चतुर्थोऽध्यायः ॥ ४ ॥ ओंव्या ॥ १६१ ॥ श्लोक ॥ ४० ॥

१ मान. २ केंस. ३ पागोट्यांवर. ४ वानरसमूह. ५ क्रमानें. ६ रक्तमांसाचा चिखल. ७ ढाल. ८ दुःख देत.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

अध्याय पांचवा

॥श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः॥ सुवेळे बैसल्या रघुकुळटिळका। मनोहर दिसताहे लंका। संमुख देखोनि दशमुखा। केला आवांका सुग्रीवें॥ १॥

ततो रामः सुवेलाग्रं योजनद्वयमंडलम्।
आरुरोह ससुग्रीवो हरियूथैः समन्वितः॥ १॥
ददर्श लंकां सुव्यक्तां रम्यकाननशोभिताम्।
तस्यां गोपुरशृंगस्थं राक्षसेंद्रं दुरासदम्॥ २॥
श्वेतचामरपर्यस्तं विजयच्छत्रशोभितम्।
पश्यतां वानरेंद्राणां राघवस्यापि पश्यतः॥ ३॥
दर्शनाद्राक्षसेंद्रस्य सुग्रीवः सहसोत्थितः।
अचलाग्रादथोत्थाय पुप्लुवे गोपुरस्थले॥ ४॥

श्रीराम चढला सुवेळेवरी। सहित सुग्रीव कपिसंभारीं। दोनी योजनें सुवेळाग्रीं। सभा वानरीं शोभत॥ २॥ तंव देखिलें लंकानगर। वनीं काननीं अति सुंदर। त्यामाजी रावणाचें गोपुर। दीर्घ मनोहर रमणीय॥ ३॥ श्रीरामसेना वानरसंभार। आले देखोनि अपार। ते पहावया दशशिर। सवेग गोपुर वळंघला॥ ४॥ रावण अंजनाभ काळा। सुवर्णभूषणीं सोज्वळा। कांसे आरक्त पाटोळा। आरक्त माळा रत्नाढ्य॥ ५॥ सवें निशाचरांचा भार। युग्मचामर श्वेतातपत्र। ऐसा देखोनि दशशिर। सुग्रीव वीर क्षोभला॥ ६॥ माझ्या स्वामीची चोरिली कांता। कायसें छत्र याचिया माथां। याच्या करीन मी घाता। साटोपता खवळला॥ ७॥ वळिला पुच्छाचा आंकोडा। रोमें थरकती चहूंकडां। वेग न धरवे गाढा। अति वेंगाढा उडाला॥ ८॥ श्रीरामासी न पुसतां। कोणासी न विचार सांगतां। गेला गोपुराआंतौता। लंकानाथा संमुख॥ ९॥

स्थित्वा मुहूर्तं संप्रेक्ष्य निर्भयेनांतरात्मना।
तृणीकृत्य च तद्रक्षः सोऽब्रवीत्परुषं वचः॥ ५॥
लोकनाथस्य रामस्य सखा दासोऽस्मि राक्षस।
न मया मोक्ष्यसेद्य त्वं पार्थिवेंद्रस्य तेजसा॥ ६॥
इत्युक्त्वा सहसोत्पत्य पुप्लुवे तस्य चोपरि।
आकृष्य मुकुटं चित्रं पातयामास तद्भुवि॥ ७॥

पडतां सुग्रीवाची उडी। निशाचरें झालीं वेडीं। रावणासी शंका गाढी। वळली बोबडी सर्वांची॥ १०॥ खुंटली राक्षसांची युक्ती। सुग्रीव गर्जे रावणाप्रती। श्रीरामाचा सखा सांगाती। जाण निश्चितीं सेवक॥ ११॥ सुग्रीव तो मी विख्यात। तुझा करूं आलों घात। माझेनि हातें लंकानाथ। आजि जिवंत वांचेना॥ १२॥ ऐसें बोलोनि निष्ठुर। निःशंक उभा सुग्रीव वीर। कोणा न बोलवे उत्तर। अधोमुख राक्षस॥ १३॥ सुग्रीव उभा मुहूर्त। कांहीं न बोले लंकानाथ। उडोनि उरावरी देत लात। मुकुटा हात घातला॥ १४॥ मुकुट आसुडितां तत्काळीं। दोघे जण आतुर्बळी। आदळले क्षितितळीं। रावण ते काळीं मूर्च्छित॥ १५॥ मुकुट घेवोनियां जाण। सुग्रीव निघतां त्वरा करून। सावध होवोनि रावण। काय आपण बोलत॥ १६॥

समीक्ष्य तूर्णमायांतं तं बभाषे निशाचरः।
सुग्रीव त्वं परोक्षे मे हीनग्रीवो भविष्यसि॥ ८॥
इत्युक्त्वोत्थाय तं क्षिप्रं बाहुभ्यामाक्षिपत्तले॥
कंदुवत्स समुत्थाय बाहुभ्यामाक्षिपद्धरिः॥ ९॥
परस्परं स्वेदविदिग्धगात्रौ परस्परं श्लिष्टनिरुद्धचेष्टौ।
परस्परं शोणितरक्तदेहौ परस्परं शाल्मलिकिंशुकौ यथा॥ १०॥
मुष्टिप्रहारैश्च तलप्रहारैरंघ्रिप्रपातैश्च कराग्रपातैः।
तौ चक्रतुर्युद्धमसह्यरूपौ महाबलौ वानरराक्षसेंद्रौ॥ ११॥

मुकुटेंसीं सुग्रीव जात। त्यासी पाचारी लंकानाथ। मी दुश्चित होतों मूर्च्छित। युद्ध न करितां तूं कैंवी जासी॥ १७॥ मजवरी घालोनियां उडी। आतां पळतोसी तांतडी। कराग्रें हाणोनियां थापडी। ग्रीवा रोकडी पाडीन॥ १८॥ जरी आहे आंगवण। परत करावयासी रण। पुढें जासी तैं काळें वदन। कोपें रावण अनुवादे॥ १९॥ वेगें उडोनियां लंकानाथ। सुग्रीवातें आसुडित। तेणें तो गदगदां हांसत। तुझा पुरुषार्थ इतकाचि॥ २०॥ सुग्रीवें आसुडितां रावण। तोंडघसीं पडला जाण। वीसही बाहु स्वयें टेंकून। दशानन ऊठिला॥ २१॥ तेणें रागें पैं रावण। सांडोनियां शस्त्रास्त्रीं रण। आंगीं आदळला आपण। विचार आन कल्पूनी॥ २२॥ वानराअंगीं दोनचि हात। विसां हातीं

१ मनोरा. २ काजळाप्रमाणें. ३ दोन चवऱ्या. ४ खालीं तोंड घालून. ५ घाईनें. ६ मान.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

मी समर्थ। कळा लावोनि सर्वांगांत । कपि निश्चित मारीन ॥ २३ ॥ पालेखाईर वानर किती । याचे अंगीं कायसी शक्ती । मी सबळ बळें लंकापती । हातोहातीं मारीन ॥ २४ ॥ तंव तो वानर आतुर्बळी ।विसां हातांची पैं मोळी। पुच्छीं बांधिली तत्काळीं। रावण ते वेळीं गजबजिला ॥ २५ ॥ ते काळीं दशानन । पुच्छासी डसला आपण । तेव्हां सुग्रीवें हांसोन । दिधला सोडून उपेक्षूनी ॥२६॥ मल्लविद्येच्या निर्वडीं। दोघे भिडतां पडिपाडीं। उलट लोट घाय घडमोडी । गुप्त थापडी करघात ॥ २७ ॥ झोंबी घेतां अत्यद्भुत। स्वेदें न्हाले डवडवित । कळा लावितां वर्मस्थ । निचेष्टित होती दोघे ॥ २८ ॥ नखक्षतांचे महामार। दोघांही अंगीं वाहे रुधिर । वसंतीं फुलले किंशुक तरुवर । तैसे महावीर भासती ॥ २९ ॥ तळपोनियां मुष्टिघात । परस्परां वंचोनियां देत । चुकवितां मुष्टिघात । पांपैर हाणित साटोपें ॥ ३० ॥ पांपर चुकवितां तेथ । उठतां हाणिती तळाघात । तळाघातें तळीं पाडित । मग हाणित हुमण्याँ ॥ ३१ ॥ पदाभिघाताची पैं थोरी । तडवे हाणिती परस्परीं । उलट लोट देती उरीं । हाणिती शिरीं कराघात ॥ ३२ ॥ दोघांचें युद्ध घोरांदर । सुरांसुरां अति दुर्धर। वानर आणि निशाचर । करिती विचित्र मंडळें ॥ ३३ ॥ गोपुरभूमिका समस्थळ । दोघीं युद्ध केलें चिरकाळ । युद्ध देखोनि कळिकाळ । धाकें चळचळ कांपती ॥ ३४ ॥

कृत्वा नियुद्धं भृशमुग्रवेगौ
कालं चिरं गोपुरवेदिमध्ये ।
उत्क्षिप्य चोत्क्षिप्य विनम्रदेहौ
पादक्रमाद्गोपुरवेदिलग्नौ ॥ १२ ॥
अन्योन्यमापीड्य विलग्नदेहौ
तौ पेततुः सालनिखातमध्ये ।
उत्पेततुर्भूतलमस्पृशंतौ
स्थित्वा मुहूर्तं त्वभिनिःश्वसंतौ ॥ १३ ॥

गोपुरभूमिकेमाझारां । युद्ध तँगटल्या दोंनी धुँरा । उपटूं धांवती येरयेरां । मल्लविद्याद्वारा तळपोनी ॥ ३५ ॥ येरयेरां निघोनि तळीं । उपटितां आतुर्बळी । तोही तळपोनि तत्काळीं। दुजा आकळी उपटावया ॥ ३६ ॥ येरयेरां झोंबी घेती । झोंबत्या युक्ती आकळिती । कँटीं कंठीं कळा लाविती । दोघे राहती निचेष्टित ॥ ३७ ॥ खवळोनि दोघे दुर्धर । वाम सव्य चमत्कार । उलट टोले देतां पांपरैं । येरयेरां मिसळले ॥ ३८ ॥ उरीं शिरीं खांदां कोपरीं । घाय देती उदरोदरीं । हुमणी हाणोनि मुखावरी । चक्राकारीं भोंवंडिती ॥ ३९ ॥ खचोनियां गोपुरींहूनि अवनीं । दोघे पडले सभास्थानीं । अंग न लागतां धरणीं । उडोनि गगनीं भीडती ॥ ४० ॥ आकाशगती स्वयें वानर । दुजा सहजचि खेचर । दोघे भिडती निराधार । सुरासुर विस्मित ॥ ४१ ॥

आलिंग्य चालिंग्य च बाहुयोक्त्रैः
संयोजयामासतुराहवे तौ ।
संरंभशिक्षाबलसंप्रयुक्तौ
सुचेरतुः संप्रति युद्धमार्गे ॥ १४ ॥
शार्दूलसिंहाविव जातदंष्ट्रौ
गजेंद्रपोताविव संप्रयुक्तौ ।
संहत्य संवेष्ट्य च तौ कराभ्यां
तौ पेततुर्वै युगपद्धरायाम् ॥ १५ ॥
उद्यम्य चान्योन्यमधिक्षिपंतौ
संचक्रमाते बहुयुद्धमार्गे ।
व्यायामशिक्षाबलसंप्रयुक्तौ
क्रमं न तौ जग्मतुराशु वीरौ ॥ १६ ॥
बाहूत्तमैर्वारणवारणाभै-
र्निवारयन्तौ परवारणाभौ ।
चिरेण कालेन भृशं प्रयुद्धौ
संचेरतुर्मंडलमार्गमाशु ॥ १७ ॥

मुहूर्तमात्र राहोनि स्थिर । धांपा जिरवोनि महावीर । युद्धा मिसळले दुर्धर । येरयेरां हांकोनि ॥ ४२ ॥ बाहुबळें लावूनि वेसंणी। आसडोनि आणितां धरणीं । येरयेरां नाकळे कोणी । समान दोन्ही संग्रामीं ॥ ४३ ॥ वीस भुजीं लावितां झडका । सुग्रीवें हाणिल्या थडका। दाही शिरीं उठिल्या तिडका । तेणें दशमुखा

१ नाना प्रकारांनीं. २ लाथ. ३ कोपरखळ्या. ४ लागलें असतां. ५ दोघांकडील प्रमुख बीर. ६ कमरेंत. ७ लाथा. ८ जमिनीवर. ९ आकाशांत संचार करणारा. १० बंधन.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

आकांत ॥ ४४ ॥ वानर नाटोपे पैं देखा । ऐसें कळलें लंकानायका । तरी युद्धाचा आवांका । स्वयें दशमुखा न सांडवे ॥ ४५ ॥ साटोपोनियां रावण । पुढती करूं आला रण । थरक सरक वेगविंदाण । रणप्रवीण ते दोघे ॥ ४६ ॥ घात पात चपेट आघात । उलट पांपरा प्राणान्त । ऐसे मल्लविद्यासंकेत । दोघे दावित रणमारें ॥४७॥ दोघे वीर अति दुर्धर । रगडोनि हाडें करावया चूर । खेंवँ देतां पैं सत्वर । अति विचित्र तेथें झालें ॥ ४८ ॥ विसां भुजांचें बंधन । द्विभुजीं सांडिलें आकळून । कळ लागली दारुण । दशानन कुसमुसी ॥४९॥ कळ लावितां दारुण । न वांचे रावणाचा प्राण । सुग्रीवें देतांचि सोडून । पुढती रण करूं आला ॥५०॥ उरीं उराड हाणिती देखा । शिरीं शिरासी हाणिती थडका । दंडी मुंडपी हाणिती ढका । लाविती सडका पदबंधें ॥५१॥ पदबंधाच्या कुसरीं । भिडतां गोपुरवेदिकेवरी । दोघे जण एकसरीं । धरेवरी आदळले ॥ ५२ ॥ सवेंचि उठोनियां जाण । बोटवडीचें दाविती रण । हिंका दाविती थरकोन । मुष्टिपात न उचाटे ॥ ५३ ॥ उलट लोट विकट रण । हेटकीचें युद्ध दारुण । विविध बंधांचें निर्वाण । रणविंदान दोघांचें ॥ ५४ ॥ दोघे राजे व्योमधारी । शिक्षा दीक्षा जाणोनि खरी । भवंडितां चक्राकारीं । न ये गिरिगिरी भवंडीचे ॥ ५५ ॥ रणविद्येचा उद्बोध । युद्ध करितां न बाधी खेद । युद्धसमर्यी परम आल्हाद । दोघां रणमद युद्धाचा ॥ ५६ ॥ गजदंतीं गज जाण । युद्ध करिती खणाण । तैंवी हे वीर दोघे जण । करिती रण बाहुबळें ॥ ५७ ॥ दोघां दुर्धर रणकल्लोळ । दोघीं युद्ध केलें चिरकाळ । दोघां श्रम नाहीं अळुमाळ । दोघे प्रबळ युद्धार्थी ॥ ५८ ॥ दाविती क्रौंचाकार मंडळ । चक्राकार फिरती प्रबळ । रंजकाकार उपटिती सबळ । रण तुंबळ कंदनप्राय ॥ ५९ ॥ युद्ध करितां मृगगती । सवेंचि दाविती छगगती । निराधारें श्येनगती । दोघे गजगतीं दाविती रण ॥ ६० ॥ कुक्कुटाचिये निजगतीं । युद्धीं माघारे न सरती । नातरी केसरीच्या स्थितीं । उडी घालिती साटोपें ॥ ६१ ॥ दोघां पूर्ण युद्धव्युत्पत्ती । नाना मंडळें नाना गती । दोघे जण रणमारार्थी । निजविजयार्थी उन्मत्त ॥ ६२ ॥

तौ परस्परमासाद्य यत्तावन्योन्यसूदने ।
मार्जाराविव भक्षार्थे वितस्थाते मुहुर्मुहुः ॥ १८ ॥

मंडलानि विचित्राणि स्थानानि विविधानि च ।
परिमोक्षं प्रहाराणां वर्जनं परिधावनम् ॥ १९ ॥

मल्लविद्येच्या विंदानीं । दोघे भिडती सर्वांगग्रहणीं । येरयेरांतें मारावें रणीं । घाय निर्वाणीं हाणिती ॥ ६३ ॥ तिरकस तिरकस थरकती । चक्राकृती झोले देती । पदाभिघाताच्या व्युत्पत्ती । घाय चुकविती तळपोनी ॥ ६४ ॥ बिडाळ बिडाळाच्या परी । गुरगुरती एकएकांवरी । तैसेचि हेही परस्परीं । येरयेरांवरी मिसळले ॥ ६५ ॥ छागाच्या परी मागें सरती । सवेंचि येऊनि दोघे भिडती । नाना परींच्या गति विगती । रणव्युत्पत्ती मारांगीं ॥ ६६ ॥ स्थान मान विविध गती । नाना मंडळें व्युत्पत्ती । गोमूत्रिकावक्रगती । दोघे दाविती थरकोनि ॥ ६७ ॥ युद्धामाजील गतागत । येरयेरांवरी उसळत । येरयेरांतळीं तळपत । पदाभिघात पदबंधें ॥ ६८ ॥ एक एकातें पाडोनि अँवनीं । दिसे जैसा मारिला रणीं । तंव तो पादघातें उलथोनी । घोळसी धरणीवँरी लातें ॥ ६९ ॥ भिडती पडती तडकती । तळीं तळपोनि उसळती । येरयेरांतें आकळिती । कळा लाविती वर्मस्थ ॥ ७० ॥ वर्मी लाविताती कळे । वीर उलथोनि आदळे । आदळला तो सवेंचि उसळे । वक्षःस्थळें ताडिती ॥ ७१ ॥ अष्टांगें मोकळीं सोडिती । सवेंचि तळाघातें पाडिती । येरयेरांतें आसुडिती । झिंझाडिती सर्वांगें ॥ ७२ ॥ धरणें मारणें सोडणें । सवेंचि पदबंधें पाडणें । अष्टांगेंसीं झाडणें । आसुडणें आक्रोशें ॥ ७३ ॥ झाला युद्धाचा शेवट । ऐसें वानिती सुर वरिष्ठ । तरी दोघे वीर उद्भट । कडकडाट युद्धाचा ॥ ७४ ॥

अभिद्रावणमाप्लावमवस्थानं सविग्रहम् ।
परावृत्तमपावृत्तमपद्रुतमवप्लुतम् ॥ २० ॥

---

१ अवसान. २ लाथा. ३ आलिंगन. ४ युक्तीनें. ५ अल्पही. ६ सुरुंगाप्रमाणें. ७ मेंढ्याची गति. ८ ससाण्याची गति. ९ मांजर. १० जमिनीवर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

उपन्यस्तमपन्यस्तं युद्धमार्गविशारदौ ।
तौ विचेरतुरन्योन्यं वानरेंद्रश्च रावणः ॥ २१ ॥
एतस्मिन्नंतरे रक्षो मायाबलमथात्मनः ।
आरब्धुमुपसंपेदे ज्ञात्वा तं वानराधिपः ॥ २२ ॥
उत्पपात तदाकाशं जितकाशी जितक्लमः ।
रावणः स्थित एवात्र हरिराजेन वंचितः ॥ २३ ॥

दोघे आवेशें धांवती । वोसरोनि आदळिती । प्रतिज्ञेच्या ठाया नेती । तेथें बैसविती साटोपें ॥ ७५ ॥ बैसलिया ठायाप्रती । उठतां नुठवे निज-शक्तीं । येणें बळें पैं दाटती । शौर्यशक्ति साटोपें ॥ ७६ ॥ पाठिमोरे तळपती । सवेंचि संमुख भिडती । येरयेरांतें कांपविती । मग पाडिती साटोपें ॥ ७७ ॥ पडतपडतांचि क्षितीं । दोघे गगना उसळती । थरकती चवकती सरकती । नाना व्युत्पत्ती[2] युद्धाची ॥७८॥ गुडघा कोंपर मुष्टिघात । मुंडपीं मुंडप मुरडित । ते ते घाय शून्य करित । अंग चुकवित लघुविद्या ॥ ७९ ॥ दोघे वीर विच-क्षण[3] । दोघे युद्धीं अति प्रवीण । दोघे करितां निर्वाणें[4] । सुग्रीवें रावण क्षीण केला ॥ ८० ॥ रावणें आणोनि मायाशक्ती । सुग्रीव धरावा कपटगतीं । हें जाणोनि कपिपतीं । केली युक्ती ते ऐका ॥ ८१ ॥ बाहु बाहूसीं कवळित । पदीं पदा आकळित । शिरीं शिरातें आदळत । पुच्छ नाकांत सूदलें ॥ ८२ ॥ रावण सटसटां शिंकी । सुग्रीव हाणी बुक्या बुकी । तेणें लंकेश अति दुःखी । अधोमुखीं पाडिला ॥ ८३ ॥ दहाही कंठीं तत्काळ । पुच्छें लावोनियां कळ । रावण सर्वांगें विकळ । पाडिला तत्काळ सुग्रीवें ॥ ८४ ॥ रावण पाडिला अचेतन । यासी मारितां न लगे क्षण । जीवें मारितांचि रावण । राम संपूर्ण क्षोभेल ॥ ८५ ॥ श्रीरामें वाहिली असे आण । स्वहस्तें मारावा रावण । त्यासी मारितां आपण । श्रीराम दारुण कोपेल ॥ ८६ ॥ श्रीरामाची हे प्रतिज्ञा । मिथ्या करणें हे अवज्ञा । हें कळलें सुग्रीवा सर्वज्ञा । दशानना न मारीच ॥ ८७ ॥ मारितांचि रावणासी । द्रोही व्हावें श्रीरामासीं । वृथा अंतरणें सेवेसी । यालागीं त्यासी न मारीच ॥ ८८ ॥ रणीं गांजोनि रावण । मुकुट घेवोनियां जाण । सुग्रीव जातों मी आपण । केलें गर्जन लंकेसी ॥ ८९ ॥ इंद्रजित आणि कुंभकर्ण । निधडे वीर प्रधान । ज्यांसीं असेल आंगवण । करावया रण तिंहीं यावें ॥९०॥ कुंभकर्ण निद्रापन्न । इंद्रजित धाकें कंपायमान । लपाले ससैन्य प्रधान । पडिलें मौन राक्षसां ॥ ९१ ॥ ऐसें गर्जोनि लंकेसी । घेवोनि रावणाचे मुकुटासी । सुग्रीव उडाला आकाशीं । श्रीरामापासीं यावया ॥ ९२ ॥ सुग्रीव निधडा वीर परम । नाहीं संग्रामीं स्वेदें[5] श्रम । अपार क्रमोनियां व्योम[6] । आला श्रीराम ठाकूनी ॥ ९३ ॥ मूर्च्छित पाडोनियां रावणासी । मुकुट घेतला न कळतां त्यासी । सुग्रीव आला श्रीरामापासीं । विजया-भिनिवेशीं डुल्लत ॥ ९४ ॥

अथ हरिवरनाथः प्राप्तसंग्रामकीर्ति-
र्निशिचरपतिमाजौ योजयित्वा श्रमेण ।
गगनमतिविशालं लंघयित्वार्कसूनु-
र्हरिगणबलमध्ये रामपार्श्वे जगाम ॥ २४ ॥
इति स सवितृसूनुस्तत्र तत्कर्म कृत्वा
पवनगतिरनीकं प्राविशत्संप्रहृष्टः ।
रघुवरनृपसूनोर्वर्धयन्युद्धहर्षं
मृगतरुगणमुख्यैः पूज्यमानो हरींद्रः ॥ २५ ॥

वानरांचा राज्यधर । जो कां सुग्रीव राजेंद्र । तेणें संग्रामीं दशशिर । स्वयें दुर्धर जिंकिला ॥ ९५ ॥ जो नाटोपे सुरां असुरां । जो नाटोपे यक्षकिन्नरां । जो नाटोपे नृपां नरवरां । जो विखारां नाटोपे ॥ ९६ ॥ नाटोपे दानवां घोरां-दरां । नाटोपे दैत्यां दुर्धरां । ज्याचा त्रैलोकीं दरारा[7] । त्या दशशिरा जिंकिलें ॥ ९७ ॥ सुग्रीव-संग्रामाची कीर्ती । असुर सुर नर वानिती । येवढी पावोनि विजयकीर्ती । आला कपिपति[8] रामाजवळी ॥ ९८ ॥ उडोनियां सावकाशीं । अपार क्रमोनि आकाशीं । सुग्रीव आला कपिसेनेशीं । श्रीरामासी वंदावया ॥ ९९ ॥ सुग्रीव जो कां सूर्यसुत । रावणविजयें अति विख्यात । वंदावया श्रीरघुनाथ । आंर्तभूत[9] स्वयें आला ॥ १०० ॥ रावणाच्या मुगुटासी । ठेवोनि श्रीरामपायांपासीं । सुग्रीव लागला पायांसी । अति उल्हासीं स्वानंदें ॥ १ ॥ देखोनि सुग्रीवाची ख्याती ।

१ पृथ्वीवर. २ माहिती. ३ हुशार. ४ निकराचें युद्ध. ५ घाम. ६ आकाश. ७ भीति. ८ सुग्रीव. ९ उत्सुक.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

एकांगें जिणोनि लंकापती । तेणें वानर उल्लासती । पायां लागती जयशब्दें ॥ २ ॥ विजयी जाला सुग्रीववीर । सुखावला श्रीरामचंद्र । वानरांचा जयजयकार । केला गजर हरिनामें ॥ ३ ॥ श्रीरामाच्या कृपादृष्टीं । सुग्रीवासी विजयपुष्टी । एकला न माये सृष्टीं । स्वानंदकोटिआल्हादें ॥ ४ ॥ रघुवंशींचा रघुनाथ । त्यासी द्यावया सुखार्थ । सुग्रीवें जिंकिला लंकानाथ । तेणें कपि पूजित कपिनाथा॥५॥

अथ तस्मिन्निमित्तानि दृष्ट्वा लक्ष्मणपूर्वजः ।
सुग्रीवं संपरिष्वज्य रामो वचनमब्रवीत् ॥ २६ ॥
असंमन्त्र्य मया सार्द्धं तदिदं साहसं कृतम् ।
एवं साहसमत्युग्रं न कुर्वंति जनेश्वराः ॥ २७ ॥
संशये स्थाप्य मां चेदं बलं चेमं विभीषणम् ।
कष्टं कृतमिदं वीर साहसं साहसप्रिय ॥ २८ ॥
इदानीं मा कृथा वीर एवंविधमरिंदम ।
त्वयि किंचित्समापन्ने किं कार्यं सीतया मम ॥२९॥
भरतेन महाबाहो लक्ष्मणेन बलीयसा ।
शत्रुघ्नेन च शत्रुघ्न स्वशरीरेण वा पुनः ॥ ३० ॥

युद्धाभिघात कपिपती । तें देखोनि रघुपती । आलिंगोनि अति प्रीतीं । काय त्याप्रती बोलत ॥ ६ ॥ सुग्रीव राजा तूं आपण । मजसीं न पुसतांचि जाण । एकल्या जावोनि केलें रण । धुरेचें लक्षण हें नव्हे ॥ ७ ॥ आजि माझें भाग्य समर्थ । जें तूं आलासी जीवें जीत । जैं तुज मारिता लंकानाथ । तैं मज प्राणान्त ओढवता ॥ ८ ॥ भिडतां सुग्रीव लंकानाथ । मज निःसंदेहो पैं प्राणान्त । बिभीषणासी अति कल्पान्त । वृथा पुरुषार्थ संग्रामीं ॥ ९ ॥ एकाकी संग्रामगोष्टी । हे तंव तुझी बुद्धि खोटी । असतां सैन्य कोट्यनुकोटी । वृथा अटाटी कां केली ॥ ११० ॥ सुग्रीवा मारिल्या शरणागता । भरत शत्रुघ्न तिघी माता । प्राप्त जालियाही सीता । प्राण सर्वथा राखींना ॥ ११ ॥ शरणागताचें जें मरण । तेंचि माझें प्राणोत्क्रमण । सखा असतांही लक्ष्मण । प्राण सर्वथा राखितोंना ॥ १२ ॥ मज सांडितांचि प्राण । निमती सीता लक्ष्मण । निमसे भरत शत्रुघ्न । सूर्यवंशी कंदन सर्वांतें ॥ १३ ॥ रावण सुग्रीवा करिता घात । तैं सूर्यवंशा होता अंत । दैवें चुकविला कुळकंदनार्थ । पुढें ऐसें कृत्य न करावें ॥ १४ ॥ सुग्रीव युद्धीं अति समर्थ । तुझा जाणें मी पुरुषार्थ । जेणें होय कुळकंदनार्थ । तैसा अनर्थ न करावा ॥ १५ ॥

तमेवंवादिनं रामं सुग्रीवः प्रत्यभाषत ।
तव भार्यापहर्तारं दृष्ट्वा राघव रावणम् ॥ ३१ ॥
मर्षयामि कथं वीर ज्ञात्वा पौरुषमात्मनः ।
इत्येवंवादिनं वीरमभिनंद्य स राघवः ॥ ३२ ॥
लक्ष्मणं लक्ष्मिसंपन्नमिदं वचनमब्रवीत् ॥ ३३ ॥

ऐकोनि श्रीरामाचें वचन । सुग्रीवें घातलें लोटांगण । मस्तकीं वंदोनियां चरण । काय आपण बोलत ॥ १६ ॥ तुझी भार्या चोरोनि नेतां । त्या देखोनि लंकानाथा । धीर न धरवेचि पुरुषार्था । करावया घाता खवळलों ॥ १७ ॥ पूर दाटला पुरुषार्था । तुज पुसावें नाठवे चित्ता । रणीं मारावें लंकानाथा । सवेग या अर्था उडालों ॥ १८ ॥ अंगीं असतां आंगवण । धीर न धरवे अर्ध क्षण । हेंचि पुरुषार्थाचें लक्षण । सत्य जाण श्रीरामा ॥ १९ ॥ ऐकोनि सुग्रीवभाषण । पुरुषार्थाचें निजलक्षण । तेणें संतोषोनि रघुनंदन । दे आलिंगन स्वानंदें ॥ १२० ॥ लक्ष्मणा लक्ष्मीवंता । सुग्रीवा निजविजयार्था । फळें पुष्पें अति उत्तमता । होय अभिषिंचिता श्रीराम ॥ २१ ॥ एका जनार्दना शरण । जालें सुग्रीवरावणरण । पुढें करील श्रीरघुनंदन । रणकंदन अवधारा ॥ १२२ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां सुग्रीवरावणयुद्धप्रसंगो नाम पंचमोऽध्यायः ओंव्या ॥ १२२ ॥ श्लोक ॥ ३३ ॥

अध्याय सहावा

श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ पूर्वप्रसंगीं रणांगणीं । वानरीं मारिल्या वीरश्रेणी । रुधिरप्रवाह देखोनि धरणीं । श्रीराम मनीं कळवळला ॥ १ ॥ कृपा उपजली रघुनाथा । एकाचिया अपकारता । करूं नये सकळांच्या घाता । राजधर्मता हे नव्हे ॥ २ ॥ सुग्रीवराजा आणि जांबवंत । अंगदादि वानर समस्त । नळनीळादि हनुमंत । शरणागत बिभीषण ॥ ३ ॥

१ त्रास, २ मरून जात्या, ३ नाश, ४ सामर्थ्य. ५ (राक्षसांचे) वीरसमुदाय, ६ अपकारामुळें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

राघवः सन्निवेश्यैवं स्वसैन्यं रक्षसां वधे ।
संमंत्र्य मंत्रिभिः सार्धं निश्चित्य च पुनःपुनः ॥ १ ॥

आनंतर्यमभिप्रेप्सुः क्रमयोगार्थतत्त्ववित् ।
विभीषणस्यानुमते राजधर्ममनुस्मरन् ॥ २ ॥

दुर्गपरिघी द्वारबंध । कराया राक्षसांचा वध । सैन्य ठेविलें सन्नद्ध । वीर विविध आतुर्बळी ॥ ४ ॥ याउपरी काय कर्तव्यता । श्रीराम पुसे समस्तां । अवघे म्हणती रघुनाथा । युद्ध तत्त्वतां करावें ॥ ५ ॥ तुम्ही वृद्ध वृद्ध धर्मयुक्त । सुबुद्धि बुद्धिवंत । यापुढील कर्तव्यार्थ । सुनिश्चित मज सांगा ॥ ६ ॥ वानरभाराच्या गजरीं । सेतु बांधोनि सागरीं । रावण मारावया सहपरिवारीं । लंकेवरी आम्ही आलों ॥ ७ ॥ ससैन्य मारावें लंकानाथा । विचार कायसा पैं आतां । ऐसें समस्तीं सांगतां । तें रघुनाथा न मानेचि ॥ ८ ॥ जे राजधर्म वेदविहित । तेणेंचि साधे परमार्थ । ऐसे धर्म श्रीरघुनाथ । उपपादित सच्छास्त्रें ॥ ९ ॥ अतिशयेंसीं अति समर्थ । शिष्ट धाडावा लंकेआंत । ऐसें बोलतां श्रीरघुनाथ । वानर समस्त क्षोभले ॥ १० ॥ आमची चोरोनि नेली सीता । आम्हींच शिष्ट पाठवावा आतां । हें तंव अयुक्त रघुनाथा । युद्ध करितां भय काय ॥ ११ ॥ नाहीं पां हटलों रणें । नाहीं युद्धीं आलें उणें । याहीवरी शिष्ट धाडणें । लाजिरवाणें आम्हांसी ॥ १२ ॥ ऐसें बोलतां समस्त । श्रीराम सांगे राजधर्मार्थ । भूतदया आणि परमार्थ । समचित्त उपपादी ॥ १३ ॥ युद्धधर्म चतुर्विध । साम दान दंड भेद । अनादिसिद्ध हे प्रसिद्ध । ऐका विशद विभाग ॥ १४ ॥ धुरेचे आंगीं गाढेपण । तेथें युद्ध करी कोण । गज वाजी रथ देवोनि धन । शत्रु बुझावून बोळवावे ॥ १५ ॥ नातरी देवोनि देशदुर्ग । वांचवावें धुरेचें अंग । या नांव गा दानप्रयोग । भेदविभाग तो ऐका ॥ १६ ॥ पडल्या धुरेसीं दारुण युद्ध । नाहीं सेनानी सैन्य सन्नद्ध । तेणें परसैन्या करोनि भेद । करावें युद्ध तदन्वयें ॥ १७ ॥ भेदाचिया अनुवृत्तीं । रणीं परचक्रा लाविती ख्याती । ऐसी भेदाची गती । सामस्थिती ते ऐका ॥ १८ ॥

युद्धसमयीं सामानुक्रम । हा मुख्यत्वें राजधर्म । सामीं भूतदयासंभ्रम । साम तो परम परमार्थ ॥ १९ ॥ साम न करितां जाण । युद्ध करितां दारुण । असंख्य मरती प्राणीगण । ते हत्या कोण सोशील ॥ २० ॥ स्वयें साम न करितां । साम न मानी जो सर्वथा । भूतहत्या त्याचे माथां । राजधर्मता सुनीती ॥ २१ ॥ श्रीराम स्वयें परब्रह्म । अनुवादला राजधर्म । तेचि भूतदया निःसीम । परमार्थ परम संग्रामीं ॥ २२ ॥ करितां युद्ध रणकंदनार्थ । तेथेंचि लाभे पैं परमार्थ । ऐसें बोलतां रघुनाथ । वेद विस्मित विरिंचि ॥ २३ ॥ स्वधर्म बोलतां रघुपती । चाकाटला बृहस्पती । चाकाटल्या वेदश्रुती । टकमकती शास्त्रार्थ ॥ २४ ॥

यस्य नाहंकृतो भावो बुद्धिर्यस्य न लिप्यते ।
हत्वापि स इमांल्लोकान्न हंति न निबध्यते ॥ ३ ॥

गीतेमाजी श्रीभगवंत । युद्धीं बोलिला परमार्थ । तोचि अनुवादे श्रीघुनाथ । तोचि श्लोकार्थ अवधारा ॥ २५ ॥ ज्यांसीं नाहीं रणाभिमान । कर्मी नाहीं कर्माभिमान । ज्यांसी देहीं नाहीं देहाभिमान । ते तूं जाण नित्यमुक्त ॥ २६ ॥ ते जें जें करिती कर्माचरण । तें तें कर्मचि होय ब्रह्म पूर्ण । त्यांसी नाहीं दोषदर्शन । चैतन्यधन निजदृष्टीं ॥ २७ ॥ ज्यांच्या बुद्धीच्या पैं ठायीं। देह देही दोनी नाहीं । कर्मबाध त्यां न बाधी कांहीं । देहीं विदेही ते पुरुष ॥ २८ ॥ ऐशा पुरुषीं करितां रण । मरते मारिते नाहीं जाण । ठसठसावोनि पूर्ण । करिती रण रणमारें ॥ २९ ॥ ब्रह्म पावोनि तटस्थ जाला । तो तंव सत्त्वगुणें प्रशिला । त्रिगुणां जिंणोनि दादुला । युद्धीं तगटला तो शूर ॥ ३० ॥ समूळ स्वधर्माची कथा । स्वयें सांगतां श्रीरघुनाथा । अति विस्मय हनुमंता । जांबवंता ताटस्थ्य ॥ ३१ ॥ ऐकोनि श्रीरामाचें वचन । हनुमान घाली लोटांगण । अंगदसुग्रीवादि बिभीषण । वानरगणसमयोगें ॥ ३२ ॥ येथोनियां श्रीरघुनाथा । आमच्या युक्ति खुंटल्या आतां । तुज्या मानेल अनुमानता । त्या कार्यार्था तूं करीं ॥३३॥ ऐकोनि वानरांचें वचन । स्वयें पुसे पैं सर्वज्ञ ।

१ किल्ल्याचा घेर. २ तयार. ३ वेदांना मान्य. ४ सांगूं लागला. ५ शत्रु प्रबळ असल्यास. ६ घोडे. ७ त्या उपायास अनुसरून. ८ अंगिकार करून. ९ सर्व प्राण्यांवर दया. १० जिकून. ११ टिकला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

शिष्ट पाठवावा कोण । तो निवडून मज सांगा ॥ ३४ ॥ शिष्टें न धरावी भीड । शिष्ट बोलका सुघंड[1] । निधडा प्रौढ निजबळें ॥ ३५ ॥ शिष्ट नसावा कानकुंडा[2] । शिष्ट नसावा प्रेमळ गाढा । शिष्ट नसावा ज्ञानमूढा । पाहिजे निधडा[3] अति योग्य ॥ ३६ ॥ शिष्ट पाहिजे अति चतुर । उत्तरीं देणें प्रत्युत्तर । राहोनियां धुरेसमोर । अति प्रखर बोलका ॥ ३७ ॥ धुरेसंमुख बोलतां । सभाक्षोभ नुपजे चित्ता । आपुल्या दावोनि पुरुषार्था । स्वामिकार्यार्थी साधक ॥ ३८ ॥ दूत पाहिजे अत्यंत लाठा । क्षोभल्या गांजी दशकंठा । रावणसभेचा उन्मादताठा । जो वांटीव पाटा रणमर्दे[4] ॥ ३९ ॥ श्रीरामीं सर्वज्ञत्व चोखडें । आम्ही तंव वानर माकडें । काय बोलावें तुजपुढें । जेंवी सूर्यापुढें खद्योतें ॥ ४० ॥ जे वदलासी दूतकथा । तो लक्षेना आमुच्या चित्ता । जो तुज मानेल रघुनाथा । त्यासी तत्त्वतां धाडावें ॥ ४१ ॥ शिष्ट धाडावा हनुमंता । येणें गांजिलें लंकनाथा । लंका जाळून आला आतां । त्यासी सर्वथा नये धाडूं ॥ ४२ ॥ नीळ दूत विचक्षण । बोलूं जाणे सुलक्षण । त्याच्या ठायीं अवलक्षण । अति अवगुण तो पेका ॥ ४३ ॥ शिष्टाई न घेतां रावण । नील न परते आपण । त्यासींच करील रणकंदन । बळाभिमान बळदर्प ॥ ४४ ॥ नळही त्याचसारिखा । न कळे स्वामिकार्याचा आवांका । जावोनि झोंबेल दशमुखा । बाहुबळें देखा मारावया ॥ ४५ ॥ दूत पाठवावें दधिमुखा । संधि न माने दशमुखा । तो पावोनियां अति दुःखा । मर्दील लंका अविवेकें ॥ ४६ ॥ दूत पाठवावा जांबवंत । अति वृद्ध पायीं अशक्त । तो अतिमंत्री बुद्धिवंत । असावा सतत मजपासीं ॥ ४७ ॥ दूतत्वें धाडूं पनस । परी तो अतिशयें कर्कश । नेणे सदुक्ति अनुप्रवेश । झोंबेल उदास दशकंठा ॥ ४८ ॥ दूत धाडितां कुमुद । करील रावणासीं विवाद । बोलत बोलतां चढेल क्रोध । करील उपमर्द लंकेशा ॥ ४९ ॥ दूत पाठवावा सुषेण । चतुर बोलका सुलक्षण । संधि न मानितां रावण । देईल प्राण सीतेसाठीं ॥ ५० ॥ श्रेष्ठत्वा दूत केसरी । त्यासीं रावणाचा राग भारी । सर्पमुंगुसांच्या परी । परस्परें भिडतील ॥ ५१ ॥ ऋषभ शरभ गवय गवाक्ष । मैंद द्विविद रंभ पद्माक्ष । नेणतां शिष्टाईचा पक्ष । अतिदक्ष संग्रामीं ॥ ५२ ॥ इतर जे जे वानरवीर । नेणती शिष्टाईचा प्रकार । मारावया दशशिर । अवघे सत्वर ऊठती ॥ ५३ ॥ सुग्रीव मुख्य वानरराज । धाडूं नये दूतकाज । दूत लक्षावया दशरथात्मज । वानरसमाज शोधित ॥ ५४ ॥ दूत पाठवितां बिभीषण । अवश्य मारील रावण । मग मज देणें प्राण । हेंही आपण नये करूं ॥ ५५ ॥ तंव बोलिला हनुमंत । विनंती परियेसीं श्रीरघुनाथ । युवराजा अति विख्यात । दूतकार्यार्थ साधील ॥ ५६ ॥

वेदेंदुपद्ममितवानरवाहिनीयं
प्रौढप्रतापनिधयः कपयोऽत्र सर्वे ।
तत्रापि च प्रखरबुद्धिवचःप्रतापं
जानेंऽगदं रघुपते तव दूतयोग्यम् ॥ ४ ॥

हनुमान म्हणे रघुनंदना । मुख्य मुख्य धुरांच्या गणना । वीस पद्म संख्या जाणा । आंगवणा आतुर्बळी ॥ ५७ ॥ यांहीमाजी बाळिसुत । अंगद अतिबळें विख्यात । रावणाच्या सभेआंत । अति समर्थ बोलावया ॥ ५८ ॥ बोलतां राक्षससभेमधीं । सभाक्षोभ यासी न बाधी । शत्रुवाक्यें वाक्यें निषेधी । अतिसुबुद्धि बोलका ॥ ५९ ॥ अंगद बोलका निघरघट[5] । अंगद वीर धीर सुभट । अंगद गांजूं शके दशकंठ । वीर वरिष्ठ अंगद ॥ ६० ॥ अंगदामाजी परम धीर । अंगद अतिशयेंसीं शूर । अंगदाचा निजनिर्धार । अतिगंभीर क्षीरोदें[6] ॥ ६१ ॥ छळावया रावणाच्या युक्ती । अंगदामाजी अति व्युत्पत्ती[7] । अंगद एकला पुरुषार्थी । रणकंदनार्थी राक्षसां ॥ ६२ ॥ अंगद निधडा स्वामिकार्यार्थी । अंगदापासीं अनेक युक्ती । अंगदाअंगीं अगाध शक्ती । रणकंदनार्थी राक्षसां ॥ ६३ ॥ अंगद वाळीचा लाडका सुत । दूतकार्यार्थी योग्य युक्त । ऐसें बोलतां हनुमंत । श्रीरघुनाथ तोषला ॥ ६४ ॥

१ स्पष्ट. २ लाजाळू. ३ बळकट. ४ अपमान. ५ घटावलेला. ६ क्षीरसमुद्र. ७ ज्ञान.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

अंगदं वालितनयं कौसलेंद्रोऽब्रवीद्वचः ।
गच्छ सौम्य दशग्रीवं ब्रूहि मद्वचनादिदम् ॥ ५॥
अराक्षसमिमं लोकं कर्तास्मि निशितैः शरैः ।
न चेच्छरणमभ्येषि तामादाय च मैथिलीम् ॥ ६॥
यद्याविशसि लोकांस्त्रीन्पक्षीभूत्वा मनोजवः
मम चक्षुःपथं प्राप्य न जीवन्प्रतियास्यसि ॥ ७॥

पाचारोनि अंगदासी । श्रीराम आलिंगी हृदयासीं । शिष्ट जावोनि रावणापासीं । सांगें हें त्यासी मद्वाक्य ॥ ६५॥ दंडासी कारण मुख्य चोरी । तुवां चोरिली माझी नारी । तुज दंडावया बाणधारीं । आलों मी निर्धारीं सीताकांत ॥ ६६॥ मुख्य परदाराहरण । तुझ्या मरणा हेंचि कारण । सुटल्या माझे दुर्धर बाण । तुज कोण राखील ॥ ६७॥ सावध ऐकें दशमुखा । सबंधु सपुत्र ससैन्यका । अराक्षसी करीन लंका । बाणसंपर्का निजनेटें ॥ ६८॥ लंकेसी आणोनि माझी कांता । म्हणसी श्रीरामा न सुटे सीता । तों मी वधावया आलों लंकानाथा । केउता आतां पळसील ॥ ६९॥ सीता अभिलाषितां काका । पाठी लाविली दर्भशिखा । त्यासी पळतां तिहीं लोकां । ठाव देखा न मिळेचि ॥ ७०॥ मग तो मज आला शरण । म्यां वामनेत्र घेऊन । त्याचा वांचविला प्राण । हें विंदाण इषिकेचें ॥ ७१॥ ऐसी दर्भशिखा दारुण । सुटल्या माझे दुर्धर बाण । पक्षी होवोनि पळतां जाण । जीवें रावण मारीन ॥ ७२॥ त्रैलोक्यीं पळतां दिक्पटीं । बाण न सोडी पाठी । आतुडल्या माझे दृष्टीं । दशकंठीं निःपात ॥ ७३॥ काक अपराधी संपूर्ण । मज अनन्य रिघतां शरण । शरणागता नाहीं मरण । मग त्याचा प्राण वांचविला ॥ ७४॥ रावणा तूंही तैसाचि जाण । सीता देवोनि रिघाल्या शरण । लंकाराज्यीं स्थापून । जन्ममरण येवों नेदीं ॥ ७५॥ बिभीषणा लंकादान । तदर्थीं ऐकें सावधान । नवी लंका करून निर्माण । तेथें बिभीषण स्थापीन ॥ ७६॥ सागरीं तारिले पाषाण । त्या मज श्रीरामासीं जाण । करितां नवी लंका निर्माण । अर्ध क्षण लागेना ॥ ७७॥ यालागीं श्रीरामा अर्पितां सीता । स्वस्थ जीवित लंकानाथा । लंका निजराज्य स्वस्थता । श्रीरघुनाथाचेनि धर्में ॥ ७८॥ ऐसें श्रीरामें आपण । स्वमुखें अंगदासी सांगोन । अमृतफळें देवोनि जाण । करवी गमन लंकेसी ॥ ७९॥ अमृतफळांचा शकुन । ज्यांसी करवी रघुनंदन । मर्दूनि परांचा मानाभिमान । विजयी पूर्ण तो होय ॥ ८०॥ अंगदा तुझी शौर्यशक्ती । धृति कीर्ति सहनशांती । परम पुरुषार्थाची ख्याती । हनुमंतें मजप्रती सांगितली ॥ ८१॥ अंगद म्हणे श्रीरघुनाथा । आज्ञा प्रणाम जी समर्था । स्वयें पुरुषार्थ बोलतां । अति मूर्खता येऊं पाहे ॥ ८२॥ असो आमुचिया पुरुषार्था । तुझी आज्ञा श्रीरघुनाथा । कार्यसिद्धीचिये माथां । आम्हां विजयता श्रीरामें ॥ ८३॥ वानर वनचर पालेखाईर । झाले श्रीरामाचे किंकर । तेणें आमुचा प्रताप थोर । सुरासुर वंदिती ॥ ८४॥ श्रीरामा तुझे आज्ञेपुढें । रावण कायसें बापुडें । आजि माझें भाग्य चोखडें । कार्य मजकडे सांगितलें ॥ ८५॥ आजि माझे सफलित मनोरथ । स्वयें स्वमुखें श्रीरघुनाथ । मज सांगितला कार्यार्थ । भाग्यवंत मी एक ॥ ८६॥ सद्गुरु हनुमंताचा धर्म । मज तुष्टला श्रीरघूत्तम । स्वमुखें सांगे कार्यानुक्रम । भाग्याचा परम मी एक ॥ ८७॥ श्रीरामाज्ञा आल्या हाता । साधावया स्वामिकार्यार्था । अति उल्लास अंगदचित्ता । होय निघता लंकेसी ॥ ८८॥ करोनि श्रीरामातें प्रदक्षिणा । लागोनि श्रीरामचरणां । चरणतीर्थ घेवोनि जाणा । लोटांगणा घातलें ॥ ८९॥ वंदोनि लक्ष्मणबिभीषणां । लागला सुग्रीवाच्या चरणां । तेणें देवोनि आशीर्वचना । उल्लासें जाणा अनुवादे ॥ ९०॥ श्रीरामाज्ञा वंदोनि शिरसीं । जीवित्व अर्पिलें श्रीरामासी । तुझेनि श्लाघ्यता कपिवंशासी । रामकार्यासी शीघ्र साधीं ॥ ९१॥ नळ नीळ जांबवंत सुषेण । इत्यादि वानरगण । लोटांगणें वंदूनि चरण । आज्ञापन पूसत ॥ ९२॥ अवघे म्हणती वाळिसुता । मृदु मंजुळ विनीतता । सुखी केलें आम्हां समस्तां । निजविजयार्था तूं लाहसी ॥ ९३॥ देखोनि सद्गुरु हनुमंता । अंगदासी

१ बाणांच्या योगेंकरून, २ कोठें, ३ दर्भशिखेचें. ४ त्यासंबंधीं, ५ सेवक, ६ चांगलें, ७ मस्तकीं, ८ मोठेपण,

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

उल्लासता । त्याचे चरणीं ठेवोनि माथा । सप्रेमता सद्गदित ॥ ९४ ॥ अंगदा हनुमंताची भक्ती । अंगदा हनुमंतासीं प्रीती । शीघ्र जावया लंकेप्रती । आज्ञा मारुति देतसे ॥ ९५ ॥ अंगदासी हनुमंतें । आश्वासोनि वरदहस्तें । लंकेसी पाठविलें त्यातें । दशमुखातें गांजावया ॥ ९६ ॥ श्रीरामा साष्टांग नमस्कार । अवलोकोनि लंकापुर । करोनि रामनामें गजर । अंगदवीर उसळला ॥ ९७ ॥

जगामाकाशमाविश्य मूर्तिमानिव हव्यवाट् ।
सोऽभिपत्य मुहूर्तेन श्रीमद्रावणमंदिरम् ॥ ८ ॥
ददर्शासीनमव्यग्रं रावणं सचिवैः सह ॥ ९ ॥

गगनीं जातां अंगदवीर । सुग्रीवादि पैं वानर । तिहीं केला जयजयकार । अति गजर नामाचा ॥ ९८ ॥ जैसा श्रीरामाचा बाण । तैसें अंगदाचें उड्डाण । सत्वर सत्वर करोनियां गमन । आला आपण लंकेसी ॥ ९९ ॥ आकाशाचिये पोकळी । अंगदें घालोनि पायांतळीं । चढोनि निरालंब निराळीं । लंकेजवळी स्वयें आला ॥ १०० ॥ बाळसूर्य रसें ओतिला । किंवा अग्नितेजें घडला । तैसा अंगद शोभला । लंके आला देदीप्यमान ॥ १ ॥ अंगदाचें निजउड्डाण । लंकेपासीं आलें जाण । एका जनार्दना शरण । पुढें निरूपण अति गोड ॥ २ ॥ अंगदरावणसंभाषण । युक्तीप्रयुक्तीचें छळण । तेंही गोड निरूपण । सावधान अवधारा ॥ ३ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां अंगदशिष्टाईगमनं नाम षष्ठोऽध्यायः ॥ ६ ॥ ओंव्या ॥ १०३ ॥ श्लोक ॥ ९ ॥

अध्याय सातवा

श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ अंगद आकाशमार्गेसीं । शीघ्र आला तो लंकेसी । प्रवेशला रावणसभेसी । अति विन्यासीं तें ऐका ॥ १ ॥

सोऽभिपत्य मुहूर्तेन श्रीमद्रावणमंदिरम् ।
ददर्शासीनमव्यग्रं रावणं सचिवैः सह ॥ १ ॥
ततस्तस्याविदूरेण निपत्य हरिपुंगवः ॥ २ ॥

रावणसभेपुढें जाण । आलें अंगदाचें उड्डाण । तेणें दचकला दशानन । कंपायमान भयभीत ॥ २ ॥ पडतां अंगदाची उडी । लंका अत्यंत हडबडी । दडाल्या वीरांचिया कोडी । जालीं बापुडीं राक्षसें ॥ ३ ॥ करावया अवघ्यांचा घात । पुढती आला रे हनुमंत । ऐसा वेंळसा लंकेआंत । अति आकान्त राक्षसां ॥ ४ ॥ कपिभयें भयभीत । रावणसभा पैं समस्त । जैसें चित्रींचें लिखित । तैसे तटस्थ अवघेही ॥ ५ ॥ अंगदेंसीं स्वयें संमुख । बोलों न शके दशमुख । आणीक कोण बोले मशक । टकमक पाहती राक्षस ॥ ६ ॥ होतां अंगदाचें आगमन । राक्षसां पडिलें महामौन । चाकाटला दशानन । तें देखोनि कपि बोले ॥ ७ ॥ मी तंव सभेचा अतित । कोणी पुसेना स्वागत । भयभ्रमें अति भ्रांत । निजनिश्चित महामूर्ख ॥ ८ ॥ तुम्हां अवघ्यांसी पडिलें मौन । त्याही मौनाचें कारण । तें म्यां लक्षिलें संपूर्ण । सावधान अवधारा ॥ ९ ॥ वानरांच्या निजदळीं । श्रीराम आला आतुर्बळी । तेणें तुम्हां दांतखिळी । वचनावळी खुंटली ॥ १० ॥ अचुकसंधानी श्रीरघुनाथ । देखोनियां छत्रपात । वेडावला लंकानाथ । युक्तायुक्त विसरला ॥ ११ ॥ येतां देखोनि रघुनंदन । राक्षससभा आणि प्रधान । अवघ्यां पडलें महामौन । वचनावचन खुंटलें ॥ १२ ॥ असो ही श्रीरामाची ख्याती । तुम्हांसी गांजिलें मारुतीं । खुंटली हनुमंतें वचनोक्ती । तेही उपपत्ती अवधारा ॥ १३ ॥ हनुमान अशोकवनीं बळी । केली राक्षसां रवंदळी । तेणें तुम्हां दांतखिळी । वचनावळी खुंटली ॥ १४ ॥ हनुमान पुच्छाच्या निजज्वाळीं । लंका करिता पैं होळी । तेणें बैसली दांतखिळी । वचनावळी खुंटली ॥ १५ ॥ अचुकसंधानी रघुनाथ बळी । कपिपुच्छाच्या निजज्वाळीं । केली राक्षसां रवंदळी । वचनावळी खुंटली ॥ १६ ॥ रावणें फुंकितां अग्निज्वाळीं । खांडमिशां जाहली होळी । तेणें बैसली दांतखिळी । वचनावळी खुंटली ॥ १७ ॥ हनुमंतें राक्षसांस । रणीं दिधला अति त्रास । तेणें वाचा पडली ओस । कोणी कोणास पुसेना ॥ १८ ॥ लंकेसी भोवंडोनि आवर्त । आतुर्बळी हनुमंत ।

---

१ अति चातुर्यानें. २ भीति, धाक. ३ दचकला, ४ पाहुणा. ५ नाश. ६ धुमाकूळ.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

कैसा असे रामकटकांत । कपिवृत्तान्त अवधारा ॥ १९ ॥

यो युष्माकमदीदहत्पुरमिदं योऽदीदलत्काननं
योऽक्षं वीरममीमरद्गिरिगुहां योऽबीभरद्राक्षसान् ।
सोऽस्माकं कटके कदाचिदपि नो वीरेषु संभाव्यते
दूतत्वेन इतस्ततः प्रतिदिनं संप्रेष्यते सांप्रतम् ॥ ३ ॥

जो कां अशोकवनाआंत । वनें उपाडी हनुमंत । करोनि अखयाचा घात । केला निःपात राक्षसां ॥ २० ॥ वनकर किंकर प्रधानपुत्र । हेही मारिले समग्र । गांजोनि इंद्रजित ज्येष्ठ कुमर । सैन्य-संभार निर्दोळिला ॥ २१ ॥ रावण अपमानोनियां भारी । जाळोनियां लंकापुरी । मारोनियां राक्षस-हारी । लंकागिरिदरी पूर्ण केली ॥ २२ ॥ राक्षस-दांतांच्या राशी थोरी । हनुमान मोजी कुडवें-वरी । तो श्रीरामकटकामाझारी । महावीरीं गणिजेना ॥ २३ ॥ सांपेंसांपें पैं देख । चिट्टीपत्रांचे पायिके[२] । लंकें धाडिले ते एक रंक । अति मशक हनुमंत ॥ २४ ॥ करावया अंगदाचें छळण । दुरु-क्तिबोलाचें विंदान । स्वयें अनुवादे रावण । साव-धान अवधारा ॥ २५ ॥ सांडूनि दुर्गद्वारभूमी । तूं आलासी अमार्गगामी[३] । यालागीं तुजसीं न बोलों आम्ही । मौनानुक्रमीं राहिलों ॥ २६ ॥ अमार्गगा-म्यासीं संभाषण । हें तव आम्हांसी अति दूषण । ऐकोनि रावणाचें वचन । हास्यवदन अंगद ॥२७॥

श्लोकार्ध—संपश्यति परं दोषमात्मदोषं न पश्यति ॥ ४ ॥

रावणा ऐक सावधान । देखती पुढिलांचे अव-गुण । आपुलें न देखती दूषण । रासभें पूर्ण ते एक ॥ २८ ॥ पुच्छ रासभाचे ठायीं । हे तंव लांडे गधडे पाहीं । स्वधर्मविवेक ज्यां नाहीं । ते नर भुईं भारभूत ॥ २९ ॥ वानरां आकाशगमन । हें तंव आमुचें स्वधर्माचरण । स्वधर्मा लाविजे जें दूषण । शूकर श्वान तो एक ॥ ३० ॥ मुख्य अधर्मे तस्करपण । तेंही परदारहरण । खतेला पापी तूं रावण । काळें वदन तिहीं लोकीं ॥ ३१ ॥ वेद-बाह्य तूं एक जाण । स्वधर्मकर्मी तुज दूषण । महा-पापी तूं रावण । काळें वदन तिहीं लोकीं ॥ ३२ ॥ निकट देखोनि रावण । त्याचें करावया निर्दळण । आलें अंगदासी स्फुरण । रोम संपूर्ण थरकती ॥ ३३ ॥ रावण मारीन मारिलिया ठायीं । अवघी खंडली शिष्टाई । म्हणोनि सरसावला पाहीं । आठव कांहीं नाठवे ॥ ३४ ॥ अंगद खवळला देखोन । चळीं कांपे दशानन । राक्षस कांपती प्रधान । दुसरें विघ्न हें आलें ॥ ३५ ॥ पहिला करोनि गेला होळी । दुसरा आला त्याहूनि बळी । राक्षस कांपती चळाचळीं । आतुर्बळी वानर ॥ ३६ ॥ लंका निरोधी श्रीरघुनाथ । निःशंक एकला रामदूत । आम्हांसी करूं आला अंत । चळीं कांपत राक्षस ॥ ३७ ॥ अंगदाचे दृष्टीकडे । पाहतां रावण जालें वेडें । राक्षससैन्य तें बापुडें । येर दडे येरामागें ॥ ३८ ॥ रावणहंता श्रीरघुनाथ । यालागीं न मारीच हनुमंत । मूर्खपणें मी उन्मत्त । लंकानाथ मारूं पाहें ॥ ३९ ॥ करितां श्रीरामनामस्मरण । समूळ पळे मूर्खपण । क्रोधा-नुवृत्ती गिळोनि जाण । सावधान पैं जाला ॥ ४० ॥ स्वमुखें बोलिला रघुपती । अंगदाअंगीं शौर्य शांती । गिळोनियां क्रोधानुवृत्ती । सभेप्रति बैसला ॥ ४१ ॥

तस्य वेदवसुयोजनमानं भद्रपीठमुदवेक्ष्य सुंदरम् ।
वायुसूनुरिव पुच्छविवृद्धिर्यातुधानसममाशु ववर्ध ॥ ५ ॥

चौऱ्यायसीं संख्या योजन । उंच रावणसिंहा-सन । अंगदही तत्समान । घाली आसन तें ऐका ॥ ४२ ॥ जैंवी लंकादहनहेत । पुच्छ वाढवी हनु-मंत । रावणासम आसनार्थें । पुच्छपुरुषार्थी अंगद ॥ ४३ ॥ पुच्छ वाढवोनियां जाण । त्याचें वळोनि पुच्छासन । अंगद बैसला आपण । समस-मान दशमुखा ॥ ४४ ॥ दशमुखेंसीं संमुख । अंगद बैसला निःशंक । रावणा लागली टकमक । अति साशंक राक्षस ॥ ४५ ॥ अंगदा येथोनि परता सर । ऐसें म्हणावया दशशिर । न संभवे पैं उत्तर । ऐसा अत्युग्र कपि भासे ॥ ४६ ॥ रावणा-संमुख सिंहासनीं । अंगद बैसोनि पुच्छासनीं । वांकुल्या दावी फळें खाऊनी । मिचकावूनी नय-नांतें ॥ ४७ ॥ अंगद श्रीरामाचा दूत । एकला आलासे सभेआंत । तेणें राक्षसां आकांत । भया-कुळित रावण ॥ ४८ ॥ अंगद बैसला देखोन । हळूच पुसे दशानन । हनुमान नव्हेसी तरी तूं

१ सांप्रत. २ सेवक. ३ आडमार्गानें. ४ इतरांचे.

५ गाढव. ६ खय्याल. ७ रागाचा वेग.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

कोण । आगमन किमर्थ ॥ ४९ ॥ ऐसें पुसतां लंकानाथ । अंगद आपुला वृत्तान्त । स्वयें असे पैं सांगत । श्रीरघुनाथ स्मरोनी ॥ ५० ॥

दूतोऽहं कोशलेंद्रस्य रामस्याक्लिष्टकर्मणः ।
वालिपुत्रोंऽगदो नाम यदि ते श्रोत्रमागतः ॥ ६ ॥

ज्याचा निर्दुष्ट पुरुषार्थ । जेणें खरदूषणां केला घात । त्या श्रीरामाचा मी दूत । वाळिसुत² अंगद ॥ ५१ ॥ मारीच मारिला वनाआंत । ज्या संमुख न ये लंकानाथ । त्या श्रीरामाचा मी दूत । वाळिसुत अंगद ॥ ५२ ॥ कौसल्योदरपंचानन³ । कौसल्यानंदवर्धन । त्या श्रीरामाचा दूत मी जाण । वाळिनंदन अंगद ॥ ५३ ॥ देवां वाळी दैत्यां वाळी । सुरां असुरां दानवां वाळी । त्या वाळीचा अंगद बळी । आलों तुजजवळी तें ऐक ॥ ५४ ॥ रावणा सूनि⁴ कांखेतळीं । सप्तसमुद्रीं केली आंघोळी । त्या वाळीचा पुत्र अंगद बळी । रामें तुजजवळी धाडिलें ॥ ५५ ॥ दुंदुभि मारिला किष्किंधेजवळी । तत्पुत्र मारिला विवरसमेळीं । त्या वाळीचा पुत्र मी अंगद बळी । रामें तुजजवळी धाडिलें ॥ ५६ ॥ सहा मास निराहारी निरुदक । विवरीं मारिले दैत्य अनेक । त्या वाळीचा मी अंगद देख । रामें आवश्यक मज धाडिलें ॥ ५७ ॥ सीता देवोनि शरणागत । जाहल्या वांचेल लंकानाथ । येरव्हीं त्याचा करीन घात । ऐसें रघुनाथ बोलिला ॥ ५८ ॥ छळावया अंगदोक्ती । क्षोभें बोले लंकापती । रावणाच्या छळणोक्ती । अति व्युत्पत्ती अवधारा ॥ ५९ ॥

रे रे अंगद सांप्रतं तव पिता रामेण हत्वा स्वयं
सत्यं ते मम नारदेन कथितं तारार्पिता सुग्रिवे ।
दूतत्वेन कथं न लज्जसि कपे रामस्य लोकस्य वा
भूभार शृणु जीवनं कपिकुले साधर्म्यनष्टाधम ॥ ७ ॥

धिग् धिग् अंगदा तुझा पुरुषार्थ । धिग् धिग् अंगदा तुझा बळार्थ । जेणें पित्याचा केला घात । त्याचा दूत म्हणविसी ॥ ६० ॥ संमुख संग्रामीं न करी घात । ठकून मारिला युद्धाआंत । ऐसा नष्ट श्रीरघुनाथ । त्याचा दूत म्हणविसी ॥ ६१ ॥ आणिक एक अभिनव काहाणी । नारदें सांगितलें मजलागूनी । रामें हिरोनि तुझी जननी । केली निजपत्नी सुग्रीवा ॥ ६२ ॥ ठकवोनि केला पित्याचा घात । मातेसी आणिक योजिला कांत । ऐसा नष्ट श्रीरघुनाथ । त्याचा दूत म्हणविसी ॥ ६३ ॥ अंगदा तूं निर्लज्ज मूर्तिमंत । आमचेही सभेआंत । न लाजसी म्हणवितां रामदूत । धिक् पुरुषार्थ अंगदा ॥ ६४ ॥ पोटीं पुत्र व्हावा रूढ । तेणें घ्यावा पित्याचा सूड । तूं तंव जन्मलासी दगड । वृथा माकड श्रृंघसी ॥ ६५ ॥ अंगदासारिखा निलाजिरा । पाहतां न दिसे दुसरा । काय मुख दाविसी वानरा । रिघोनि सागरां जीव देईं ॥ ६६ ॥ नातरी करीं आड विहिरी । कां पोटीं घालीं सुरी । जळो तुझी वाढीव थोरी । निंद्य संसारीं तूं एक ॥ ६७ ॥ छळणा बोले लंकानाथ । अंगदा तूं सभाग्यवंत । मज रावणासी जाहल्या शरणागत । अभयहस्त तुज माझा ॥ ६८ ॥ साधावया पितृकार्यार्थ । मिथ्या म्हणविसी रामदूत । हाही कळला तुझा वृत्तान्त । शरणागत तूं माझा ॥ ६९ ॥ सूड घ्यावया पिता वाळी । शरण आलासी मजजवळी । मी रावण आतुर्बळी । तुज तत्काळीं कुढावीन ॥ ७० ॥ मारोनि श्रीराम लक्ष्मण । करोनि सुग्रीवा रणकंदन । अंगदा देईन किष्किंधाभुवन । सत्य वरदान हें माझें ॥ ७१ ॥ ऐसें बोलतां दशानन । अंगद झाला हास्यवदन । कैसें देतो प्रतिवचन । सावधान अवधारा ॥ ७२ ॥ स्वयंवरीं धनुर्ष्यी⁹ वाहतां गुणं । सभे पडलासी उलथून । तुझ्या अंगीं नपुंसकपण । केंवी म्यां शरण रिघावें ॥ ७३ ॥ स्वयंवरीं श्रीरामें आपण । करितां त्र्यंबकंभंजन¹⁰ । रावणाचें काळें वदन । तुज म्यां शरण केंवी यावें ॥ ७४ ॥ संमुख न येववे रघुनाथा । मारीचा देवोनि मरणार्था । सीता चोरोनि होसी पळता । शरणागता कोण न राखे ॥ ७५ ॥ नपुंसक हीन दीन रावण । त्या तुज मी केंवी रिघावें शरण । उलटें हाणितां चडकण¹¹ । धाकेंचि प्राण सांडिसी ॥ ७६ ॥ म्हणोनि उचलितां हात । गजबजिला लंकानाथ । अंगदें कोप करोनि शांत । अनुवादत रामाज्ञा ॥ ७७ ॥ बहुत ऐकिले रावण । त्यांमाजील तूं कोण । विविध

१ दोषरहित. २ वालिपुत्र. ३ सिंह. ४ घालून ठेवून. ५ प्रख्यात. ६ स्तुति करतोस. ७ कपटानें. ८ रक्षीन. ९ दोरी. १० शिवधनुष्याचा भंग. ११ थप्पड.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

रावणांचें लक्षण । वदे विचक्षण अंगद ॥ ७८ ॥ एका रावणाची थोरी । सहस्रार्जुनासीं युद्ध करी । तेणें कवळोनि वामकरीं । क्षणामाझारीं धरियेला ॥ ७९ ॥ सहस्रार्जुन कृपावंत । रावण हीन दीन अशक्त । नगरोद्बंधें संरक्षित । कारागृहांत न घालीच ॥ ८० ॥ दुर्गद्वारपाळ पाचारून । स्वमुखें सांगे सहस्रार्जुन । दहा मुखांचा रावण । बाहेर आपण जाऊं नेदीं ॥ ८१ ॥ नगरदुर्गोद्बंधन । पायीं शृंखलाबंधन । यापरी राखोनि रावण । वाहवी जीवन [1]रेवेचें ॥ ८२ ॥ रावणाच्या दहा शिरीं । देवोनियां दहा घागरी । जळ वाहे निरंतरीं । घरोघरीं उदकार्थ ॥ ८३ ॥ राजगृहींचें जें भातें । खावया न पुरे रावणातें । दहाही मुखें समसं[2]मितें । केलें तेथें तें ऐका ॥ ८४ ॥ बैसोनियां जात्यावरी । गीत गाय दहाही स्वरीं । कणीकँच[3]रडा झाल्यावरी । दहाही शिरीं देती टोले ॥ ८५ ॥ कुटका भाकरी हाता येत । रावण धाँपसे[4] तेथें नाचत । इफिइफि पिंगा गात । मागे भात घरोघरीं ॥ ८६ ॥ दाही मुखें दोहरे गात । वीसही नाचवी हात । थै थै थैकार दावित । चणे मागत पसारा ॥ ८७ ॥ ताक मागावयालागूनी । श्वानवाणी रासभवाणी । रावण भुंके दहाही वदनीं । दावी रडणी श्वानाची ॥८८॥ सहस्रार्जुनें कानडदेवतेसी । राखण ठेविलें नगरासी । तिचें रक्षण चौपासीं । अहर्निशीं सावध ॥ ८९ ॥ रावण पळतां आकाशगतीं । कानडदेवता रक्षणस्थिती । वेताटी माथां वाजती । पडे क्षितीं मूर्च्छित ॥ ९० ॥ ऐसा सहा महिनेवरी । निर्गमें न पुरेचि ते नगरीं । नेसणें फाटल्या उघड्या टिरी । उवा लिखा शिरीं बुचबुचित ॥ ९१ ॥ तेथें पौलस्ति पुत्रस्नेहेंसीं । येवोनि सहस्रार्जुनापासीं । मुक्त करवी रावणासी । तंव तो त्यासी नाठवे ॥ ९२ ॥ पौलस्तीस पाठवी कारागृहांत । देखे दशमुख असंख्यात । तेणें पौलस्ति अति विस्मित । रावण तेथ असेना ॥ ९३ ॥ तंव रावणशिरीं घागरी । थै थै नाचे नानापरी । चण्यावारीं घरोघरीं । देखोनि दुरी पौलस्ति ॥ ९४ ॥ रावण धरोनियां हातीं । पौलस्ति नेतां लंकेप्रती । द्वारपाळीं केली विनंती । नव्हे निर्गति अचिन्हीं ॥ ९५ ॥ पौलस्ति पुसे चिन्हसंज्ञा । काळें करोनियां वदना । नाकीं लाविलिया चुना । उद्बंधनाँ[5] निर्मुक्ति ॥ ९६ ॥ राजमुद्रा घेवोनि करीं । शीघ्र आलिया नगरद्वारीं । सुखरूप निर्गमाची थोरी । जाण निर्धारीं ऋषिवर्या ॥ ९७ ॥ पौलस्ति आणूं गेला मुद्रेसी । रावणें मसी लावोनि मुखासी । चुना लावोनियां नाकासी । केला द्वारेंसीं निर्गम ॥ ९८ ॥ सावध ऐकें लंकापती । ऐसी एक्या रावणाची गती । ऐक दुजियाची स्थिती । ते मी तुजप्रती सांगेन ॥ ९९ ॥ दुजा रावण उन्मादबळी । सवेग रिघोनि सुतळीं[6] । रणीं जिणावया बळी । क्रोधानळीं चालिला ॥ १०० ॥ बळिद्वारीं द्वारपाळ वामन । तेणें जावों दिधला रावण । बळीपुढें दशकंठ तृण । लज्जायमान राहिला ॥ १ ॥ बळी आणि विंध्यावळी । सारीपाट खेळती सुखसमेळीं । रावण आलिया जवळी । मशकसमेळीं लक्षेना ॥ २ ॥ रावण दशमुखी किडें । किंवा आलेंसे घुंगरडें । हें न दिसे बळीपुढें । खेळाकडे विगुंतला ॥ ३ ॥ बळी तृणप्राय न गणी । कळलें रावणा मनीं । त्यासी मारावें सितरूनी । आवांका धरोनी उभा असे ॥ ४ ॥ सारीपाट खेळतां आवेशा । हातींचा गळोनि पडिला फांसा । दे दे म्हणतां लंकेशा । त्यासी तो सहसा उचलेना ॥ ५ ॥ एके हातीं दोहीं हातीं । चहूं हातीं दहाही हातीं । वामनें आकर्षिली शक्ती । विसां हातीं उचलेना ॥ ६ ॥ उचलूं जातां लज्जामेळीं । फांसा आदळला कपाळीं । देवोनि आक्रंदे आरोळी । पडिला तळीं मूर्च्छित ॥ ७ ॥ रावण पडतांचि भूतळीं । दहाही मुखीं भरली धुळी । देखोनि हांसे विंध्यावळी । पिटिली टाळी सेवकीं ॥ ८ ॥ रावण पडतां मूर्च्छित । कपाळीं अशुद्धँ[10] प्रवाहत । तेणें तो दिसताहे आरक्त । जैसें कां प्रेत अहेवेचें[11] ॥ ९ ॥ दहाही शिरें वीस हात । करंटें कोणें आणिलें येथ । याचें पडो नये रक्त । काढा म्हणे विंध्यावळी ॥ ११० ॥ येवोनि बळीचे सेवक । अलंकार एक एक । वस्त्रें शस्त्रें हिरोनि देख । नेला दशमुख अति दूरी ॥ ११ ॥ अति बळेंसीं कुंथत ।

---

१ नर्मदेचें. २ दुःखाचें. ३ कणीक दळणें. ४ धापा देत. ५ सुटका. ६ शरीरावर कांहीं खुणा न करितां.

७ बंधनापासून. ८ सप्त पातालांपैकीं सुतळनामक पाताळांत. ९ फसवून. १० रक्त. ११ सुवासिनीचें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

युद्धा आला लंकानाथ । त्याचा निवडला पुरु-
षार्थ । विटंबनार्थ तो ऐका ॥ १२ ॥ आगे लंड
पिछे गांड । सेवकीं केलें भंडोभंड । रावणाचें
काळें तोंड । लज्जावितंड तेणें त्यासी ॥ १३ ॥
रावण राजा अति समर्थ । न्हावी न मिळेचि
तेथ । केश लांब दहा हात । असे दावीत जगासी
॥ १४ ॥ आशीर्वाद दिधला ऋषीं । केशवृद्धि
जाली त्यासी । जो तो रावण उपहासी । उकसा-
बुकसीं स्फुंदत ॥ १५ ॥ रावणाच्या निजमूळीं ।
वामन लागला समूळीं । तेणें मेळविला धुळी ।
केली रांगोळी गर्वाची ॥ १६ ॥ लज्जान्वित दशा-
नन । जाऊं पाहे जीव निघोन । वामनें राखिलासे
कोंडोन । द्वार धरोनि बैसला ॥ १७ ॥ रावण म्हणे
वामनासी । तूं कां आतां द्वंद्वा चालिसी । स्फुंद-
स्फुंदोन रडे उकसाबुकसीं । सोडीं आम्हांसी
जाऊं दे ॥ १८ ॥ वामन म्हणे मी बळीचा सेवक ।
राजाज्ञेवांचून देख । जाऊं नेदीं राव रंक । व्रत
निष्टंक हें माझें ॥ १९ ॥ वामनातें चुकावून । खेच-
रगती दशानन । जातां गगनीं देखे वामन । पळे
परतोन भयभीत ॥ १२० ॥ पाताळगती करितां
गमन । धरधरुनी आणी वामन । भयभीत दशा-
नन । येत परतोन माघारा ॥ २१ ॥ राक्षसां अदृ-
श्यगतीं गमन । अदृश्यद्रष्टा वामन । त्यातें
देखोनि रावण । पळे आपण अति धाकें ॥ २२ ॥
पूर्वपश्चिमदक्षिणदिशीं । पळों जातां उत्तरेसी ।
वामन कोंदला आकाशीं । देखे दशदिशांसी
वामन ॥ २३ ॥ रावण चिंता करितां गहन ।
चिंतामूळीं देखे वामन । दहाही मुखीं शंखस्फु-
रण । करी रावण अति भयें ॥ २४ ॥ वामनें पुर-
विली पाठी । खुंटली निर्गमाची गोष्टी । जाजों-
वोनि दशकंठी । होवोनि हिंपुटी राहिला ॥ २५ ॥
ठकवोनियां रघुपती । पुढें चोरील सीता सती ।
तेणें रागें वामनमूर्ती । परम आपत्ती भोगवी
॥ २६ ॥ निर्गम न लभेचि दशानन । क्षुधेनें
पीडिला रावण । चणे मागावया जाण । गेला
आपण अश्वशाळे ॥ २७ ॥ अश्ववाहकांची कथा ।
जरी तूं लीद वाहसी माथां । मूठ मूठ चणे देऊं
आतां । मानी क्षुधार्त रावण ॥ २८ ॥ जंव लागली
नाहीं भूक । तंव राजा दशमुख । वामनें चेतविली
अधिक । मागवी भीक उदरार्थ ॥ २९ ॥ दशमु-
कुट लंकानाथा । लीद चढती तये माथां । पोट
न भरे चणे खातां । दुःखावस्था तळमळी
॥ १३० ॥ कांतिन कोष्टयासी सांगे लंकानाथ ।
मज आहेत वीस हात । दहाही राहाटीं कांतीन
सूत । अन्न निश्चित मज द्यावें ॥ ३१ ॥ वाटूं जातां
कापुसासी । रावण पडला तोंडघसीं । सरक्या
रिघतां नासिकासी । अति लज्जेसीं सलज्ज
॥ ३२ ॥ कांताया बैसला लंकानाथ । वांकले स्वध-
र्माचे चात । तुटलें सूक्ष्मत्वाचें सूत । फिसके कांत
तडतडां ॥ ३३ ॥ म्हणती दशमुख खोटा । मोडिलें
सत्कर्माचे राहाटा । पिंजिला रूं नाशिला सांटा ।
देती थापटा नरनारी ॥ ३४ ॥ नाशिला मुदलींचा
सांठा । अवघे मोडिलें राहाटा । दशमुख पोटींचा
खोटा । देती चापटा नरनारी ॥ ३५ ॥ उपाय येती
अपायासीं । तेणेंचि न मिळे खावयासी । वामनें
आपदा लाविली ऐसी । उकसाबुकसीं स्फुंदत
॥ ३६ ॥ लंकापती दशमुखा । मागें पुढें लाविला
सुडका । पोटेंवीण केला रोडका । वामनें देखा
गांजिला ॥ ३७ ॥ पहिलें येतां दशानन । वामन हीन
दीन । आतां त्याचा प्रताप गहन । तेणें त्रिभुवन
व्यापिलें ॥ ३८ ॥ रात्रीं पळतां रावण । अंधारीं
देखणा वामन । तेणें गांजिला दशानन । करी रुदन
अति दुःखें ॥३९॥ सोडवावया रावणासी । पौलस्ति
आला बळीपासीं । अति सन्मानें पूजोनि त्यासी ।
कार्यार्थासी बळी पुसे ॥ १४० ॥ पौलस्ति सांगे पैं
आपण । तुवां कां रोखिला रावण । ऐकतां ऋषि-
वचन । अति उद्विग्न बळि जाला ॥ ४१ ॥ बळीनें
वाहिली आण । माझ्या राज्यामाजी जाण । रोग-
राईचें नाहीं बंधन । बंदिखान येथें कैंचें ॥ ४२ ॥
कोणे ठायीं कोणे देशीं । कोणें राखिलें रावणासी ।
शोधोनि आणा मजपासीं । सन्मानेंसीं सोडीन
॥ ४३ ॥ पौलस्ति स्वयें पाहूं जातां । लिदीच्या
पाट्या दहाही माथां । पोट न भरे चणे खातां ।
भीक मागतां देखिला ॥ ४४ ॥ दहाही मुखीं भुंके
रावण । खंडेरायाचें होवोनि श्वान । हडहड
करितां जन । लज्जायमान पौलस्ति ॥ ४५ ॥

१ पूर्ण. २ शंखध्वनि, बोंब. ३ मुक्ततेची. ४ कष्ट पावून. ५ निराश, कष्टी. ६ सूत कांतणाऱ्या.

७ कापूस. ८ अडकविला. ९ कष्टी.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

भुंकिन्नला होवोनि श्वान । पौलस्ति देखतां आपण । तेणें रावण लज्ञायमान । अधोवदन राहिला ॥४६॥ पौलस्ति पुसे रावणासी । येवढ्या लावोनि आपदांसी । येथें कां बळीनें राखिलासी । अति लज्जेसीं सांगत ॥ ४७ ॥ वामनें घालोनि अटका । मागें पुढें लावोनि सुडका । क्षुधा तृषा केला रोडका । अति दुःखें देखा गांजिलें ॥४८॥ वामनापासीं विद्या सकळ । वामनापुढें न चले बळ । स्यांही विद्या करितां प्रबळ । न चले छळ वामनासीं ॥ ४९ ॥ कार्य नाहीं बळीपासीं । आज्ञा पुसिल्या वामनासीं । सुखेंचि आहे निर्गम आम्हांसी । पौलस्तीसी सांगितलें ॥ १५० ॥ मग घेवोनियां पुत्रासी । पौलस्ति आला वामनापासीं । आज्ञा द्यावी रावणासी । निजनगरासी न्यावया ॥ ५१ ॥ पौलस्ति येतांचि आपण । वामनें घातलें लोटांगण । मस्तकीं वंदोनियां चरण । धर्मवचन अनुवादे ॥ ५२ ॥ मी तंव बळीचा सेवक । द्वारपाळ प्रतिहारक । आज्ञेवेगळा एकाएक । राव रंक जाऊं नेदीं ॥ ५३ ॥ राजाज्ञा आणिलिया जाण । सुखेंचि करावें गमन । नाहीं तरी केलिया चिन्ह । निर्गमन राजाज्ञा ॥ ५४ ॥ पौलस्ति पुसे कैसें चिन्ह । वामन सांगे संतोषोन । दहाही मस्तकां वपन । आणि मुंडन खांडमिशां ॥ ५५ ॥ काळें करोनि दशवदन । दहाही नाकीं कवड्या बांधोन । वदनीं श्वेत पीत लेखन । निर्गमन येचि चिन्हीं ॥ ५६ ॥ पौलस्ति म्हणे रावणासी । जाऊं चाल बळीपासीं । आज्ञा देईल सन्मानेंसीं । निजनगरासी जावया ॥ ५७ ॥ रावण म्हणे हेंचि बरवें । मान्य केलें माझिया जीवें । परंतु बळीपासीं जावें । जीवें भावें मानेना ॥ ५८ ॥ मूर्च्छित पडिलों फांसा देतां । त्यापासीं स्यां मुख दावितां । लज्जा प्राण जाईल ताता । न यें सर्वथा त्यापासीं ॥ ५९ ॥ युद्धा गेलों अति सैत्राणें । त्या मज जालें लाजिरवाणें । येथेंचि आतां प्राण देणें । नाहीं येणें बळीपासीं ॥१६०॥ ऋषि म्हणे निषिद्ध राजवपन । येरु म्हणे कैंचें राजलक्षण । सुडका लागला अति दीन । केल्या मुंडन भय काय ॥ ६१ ॥ जे जे होती बंदिनिर्मुक्त । त्यांसी पाहिजे प्रायश्चित्त । मज आजीच आला सिद्धस्थ । निषिद्धार्थ न वदावा ॥ ६२ ॥ वामनापासून निर्मुक्ती । कदा नव्हे गा कल्पांतीं । माझेनि भाग्यें वपनोक्ती । बोलिला निर्गुतीं वामन ॥ ६३ ॥ ऐसें बोलोनि दशवदन । खांडमिशां मस्तकवपन । काळें करोनि वदनचिन्ह । आला आपण अति शीघ्र ॥६४॥ देखोनि रावणाचें चिन्ह । लाजविती सकळ जन । गोमयपिंडीं अभिषिंचन । दिधला सोडून वामनें ॥ ६५ ॥ एका जनार्दना शरण । अंगद वक्ता विचक्षण । रावणातें निर्भर्त्सून । वदे आपण निःशंक ॥ ६६ ॥ पुढील प्रसंगीं रावणकथा । विचित्रवाणी अंगद वक्ता । अपूर्व अप्रमेय अभिनव वार्ता । द्यावें श्रोतां अवधान ॥ ६७ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां अंगदरावणच्छलनं नाम सप्तमोऽध्यायः ॥ ७ ॥ ओंव्या ॥ १६७ ॥ श्लोक ॥ ७ ॥

अध्याय आठवा

श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ मागिले प्रसंगीं जाण । वामनें गांजिला रावण । तिज्या रावणाचें प्रकरण । सांगे आपण अंगद ॥ १ ॥ पूर्वप्रसंगीं स्वभावतां । जाली दों रावणांची कथा । तिज्या रावणाची प्रौढता । ऐक तत्त्वतां लंकेशा ॥ २ ॥ परिसतां अंगदवचन । रावणा हृदयीं खोंचती बाण । कांहीं न चले आंगवण । ऐके आपण कुसमुसित ॥ ३ ॥ एक रावण मूर्खाविशीं । स्वयें निघाला श्वेतद्वीपासी । तेथें गति न चले विमानासी । सेवकांसी अगम्य ॥ ४ ॥ मागें सांडोनि विमान । राहवोनियां सेवकजन । एकला निघे रावण । मूर्खाभिमान आक्रोशीं ॥ ५ ॥ श्वेतद्वीपींचें राज्य समस्त । करावया हस्तगत । येणें अभिलाषें लंकानाथ । असे जात श्वेतद्वीपा ॥ ६ ॥ श्वेतद्वीपासी स्वयें जाण । नारद जाऊं न शके आपण । तेथें बापुडें रावण । मशक कोण प्रवेशे ॥ ७ ॥ रावण चालतां षण्मास । श्वेतद्वीप न ठाके त्यास । मार्गीं शिणला बहुवस । परम क्लेश पावला ॥ ८ ॥ न कळे उदय अस्तमान । न मिळे अन्न ना जीवन । नसे बसावया वस्तीचें स्थान । दशानन अति दुःखी ॥ ९ ॥ पुढें लक्षेना पैं स्पष्ट । मागें यावया भुलला वाट । भ्रमणचक्रीं दशकंठ । परम कष्ट

---

१ वसद, २ गर्वानें, गेन्हानें, ३ अरेरपणानें, ४ शेणमारानें,
भा. रा. ४१

५ तिसऱ्या.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

पावला ॥ १० ॥ निरंजनीं विजनवासीं । रावण रडे उकसाबुकसीं । कोण संबोखील त्यासी । परदेशीं एकाकी ॥ ११ ॥ जळ न्यावया नगरा-आंत । गंगा प्रवाहे श्वेत । जळवाहका दासींची मात । ऐके निवांत रावण ॥ १२ ॥ जळ वाहतां देखोन दासी । रावण जाला अति उल्लासी । मी पावलों श्वेतद्वीपासी । हरिखें त्यांपासीं पुसों आला ॥ १३ ॥ देखोनियां दशमुखासी । स्वयें विनोदें धरिती त्यासी । खेळणें करावया दशशिर्सी । कौतु-केंसीं आणिला ॥ १४ ॥ दहा मुखें वीस हात । दहाही शिरें मुकुटांकित । अभिनव किडें आलें तेथ । दासी धरीत साक्षेपें ॥ १५ ॥ सोडवावया आपणाप्रती । न चले रावणाची शक्ती । जेंवी कां चिडिया पारध्याहातीं । तैसिया रीती धरियेला ॥ १६ ॥ पारध्याहातीं चिडी चीचांत । दासीपासीं लंकानाथ । अडकला कुंथत कुंथत । कांहीं सामर्थ्य चालेना ॥ १७ ॥ धरिला देखोन दशानन । भोंवते मिळाले पैं जन । विनोदें अवघे जण । करिती छळण तें ऐका ॥ १८ ॥ काड्या घालोनियां नासीं । विचकाविती दहाही मुखांसी । टोले हाणोनियां शिर्सीं । डोळे विसी मिचकावी ॥ १९ ॥ एकें हाणो-नियां लात । एक हरणुली नाचवित । एक गटां-गळ्या देत । अवघेही दांत विचकावया ॥ २० ॥ काकस्वरें श्वानस्वरें । खरस्वरें जंबुकस्वरें । भुंक-विती पैं लेंकुरें । घुघुस्वरें पैं एक ॥ २१ ॥ एक घालविती कोल्हाटे । एक घालविती हेलाटे । दुःख पावोनि दशकंठें । म्हणे येथें कोठें मी आलों ॥ २२ ॥ अवघ्या मिळोनियां दासी । चेंडू करोनि रावणासी । एक टाकिती एकीपासीं । एकी चौपासीं धांवती ॥ २३ ॥ एकी टाकिती एकीवरी । एकी झेलिती माझारीं । एकी उडविती वरच्या-वरी । दुःख दुर्धर रावणा ॥ २४ ॥ जळो ते माझी शौर्यशक्ती । जळो ते माझी प्रतापव्यक्ती । जळो ते माझी यश कीर्ती । दासी झेलिती तृणप्राय ॥ २५ ॥ चांकाटली माझी बुद्धी । विध्वंसली माझी शुद्धी । येथें कां आलों मी दुर्बुद्धी । पडिलों बंदीं दासींच्या ॥ २६ ॥ दासी परस्परें टाकिती । रावण डसला एकीचे हातीं । चाविरें म्हणोनि निश्चितीं । झुगारिती लंकेसी ॥ २७ ॥ आदळतां लंकापुरीं । सवोष्ठ दांतांची चकचुरी । नाक चेंदलें वाहे रुधिरीं । राजद्वारीं आकान्त ॥ २८ ॥ ऐसा कोण निधडा दादुला । अंतरिक्षीं संग्राम केला । तेथोनि रावण झुगारिला । तो आदळला लंकेसी ॥ २९ ॥ इंद्रजितासहित कुम-रजन । वृत्तान्त पुसती प्रधान । रावण झाला लज्जायमान । प्रतिवचन नेदीच ॥ ३० ॥ तिज्या रावणाची ख्याती । श्वेतद्वीपगमनानुवृत्ती । सांगितली सर्वेही तुजप्रती । यथानिगुतीं लंकेशा ॥ ३१ ॥ चौथ्या रावणाची स्थिती । अतिशयें अभिवन कीर्ती । ते मी सांगेन तुजप्रती । लंका-पते अवधारीं ॥ ३२ ॥ चवथा रावण आतुर्बळी । ध्यानस्थ देखोनियां वाळी । त्यासी धरितां कपट-मेळीं । तेणें कांखेतळीं दडपिला ॥ ३३ ॥ रावण घालोनि कांखेतळीं । सवेग उडोनियां वाळी । सप्तसमुद्रीं करोनि आंघोळी । ध्यानानुमेळीं बैसला ॥ ३४ ॥ रावणा दृढ लागली कळ । चर-फडी परी न चले बळ । नाकीं तोंडीं भरलें कक्षांजळ । जाला विकळ ते काळीं ॥ ३५ ॥ निज-भवना येतां वाळी । अंगद उचलितां सुखसमेळीं । कांखेचा रावण पडिला तळीं । वानरीं सकळीं देखिला ॥ ३६ ॥ वीस भुजा दश शिर । मुकुट कुंडलें मनोहर । कंठीं विविध विचित्र हार । अति सुंदर अंगदीप्ति ॥ ३७ ॥ पाचू पदक हृदयावरी । मुक्ताफळांच्या झालरी । कटिसूत्र कटीवरी । झळ-कत हारीं क्षुद्रघंटी ॥ ३८ ॥ ऐसा देखतां वानरीं । अंग-दाच्या पाळण्यावरी । रावण बांधिला खेळण्या-वारी । हेमसूत्री शृंखळा ॥ ३९ ॥ बाळलीलापद-संचारी । लाथा हाणी मुखावरी । अंगदमूत्राची धार थोरी । रिघे मुखांतरीं रावणाच्या ॥ ४० ॥ चिमटितां वानरवानरीं । दांत विचकी नानावि-कारीं । टोले देतां शिरावरी । डोळे त्यांवरी मिचकावी ॥ ४१ ॥ लाता हाणितां संमुखा । क्षतें पडलीं दहाही मुखां । अंगद पारखी निका । तेणें दशमुखा ओळखिलें ॥ ४२ ॥ अंगद म्हणे त्यांतील तूं कोण । हें पुसावें न लगे जाण । माझे लातांचे वण । तुझे मुखीं संपूर्ण दिसती ॥ ४३ ॥

१ पाणी नेणाऱ्या. २ विलक्षण. ३ चिमण्या. ४ चिंव-चिंव करते. ५ नाकांत. ६ गर्दभस्वर काढून. ७ मोह पावली. ८ ओंठासकट. ९ रक्त वाहूं लागलें. १० कांखेंतील घाम. ११ मोत्यांच्या. १२ रांगेनें. १३ बारीक घागऱ्या.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

माझ्या मुताची बाळधार । तुझे मुखीं पडतां निरंतर । तेही चिन्हें उभय अधर । घांसली कोर दिसतसे ॥ ४४ ॥ तो तूं अतिशयें हीन दीन । भद्रीं बैसलासि रावण । तुज कैंची आंगवण । करावया रण रामासीं ॥ ४५ ॥ अंगदाचे वाग्बाण । हृदयीं खोंचले संपूर्ण । तेणें तळमळी रावण । वचनें प्राण जाऊं पाहे ॥ ४६ ॥ अंगदवाक्य खडतर । शतधा खोंचलें जिव्हार । तेणें तळमळी दशशिर । सर्वथा वानर नाटोपे ॥ ४७ ॥ अंगद नाटोपे वचनानुमेळीं । अंगद नाटोपे करितां कैळी । अंगद बैसला आतुर्बळी । रावण चळीं कांपत ॥ ४८ ॥ अंगदासीं करावया रण । स्वयें साशंकित दशानन । कुमर कांपती प्रधान । कंपायमान राक्षस ॥ ४९ ॥ हनुमंतें लाविला धाक । त्याहूनि अंगद निःशंक । तेणें धाके एकएक । सैन्य सेवक सेनानी ॥ ५० ॥ ऐसें देखोनियां चिन्ह । बुद्धिवंत दशानन । अति कोपें हास्यवदन । काय आपण अनुवादे ॥ ५१ ॥ सभेसी बैसोनि वानरा । किती जल्पसी सैरावैरा । तोंडीं नाहीं वोढावारा । दशशिरा नोळखसी ॥ ५२ ॥ ऐक माझी आंगवण । बंदीं घातले सुरगण । श्रीराम बापुडें तें कोण । संमुख रण करावया ॥ ५३ ॥ माझी वाजतांचि हांक । सुरासुरीं अति धाक । श्रीराम बापुडें मशक । मजसंमुख कैंवी राहे ॥५४॥

इंद्रं माल्यकरं सहस्रकिरणं द्वारे प्रतीहारकं
चंद्रं छत्रधरं समीरवरुणौ संमार्जयंतौ गृहान् ।
पाच्यत्वे परिनिष्ठितं हुतवहं किं मद्गृहे नेक्षसे
रक्षोभक्ष्यमनुष्यमात्रवपुषं त्वं राघवं स्तौषि किम् ॥ १ ॥

रणीं करोनियां दुर्धर मार । बंदीं घातले सुरवर । कामार केले समग्र । तोही प्रकार अवधारीं ॥ ५५ ॥ पाचारोनि कुसुमाकर । विचित्र शेजा विचित्र हार । इंद्रें आणावे सत्वर । माल्यधर तो केला ॥ ५६ ॥ सूर्य जो कां सहस्रकर । द्वारपाळ निरंतर । मलयानिळ चवरधर । चंद्रें छत्र धरावें ॥ ५७ ॥ वायूचा अधिकार जाण । बिदी झाडाव्या संपूर्ण । वरुण येवोनि आपण । सडासंमार्जन करावें ॥ ५८ ॥ स्वयें न लावितां इंधन । फुंकिते रांधिते नसोन । अग्नि निपजवी अन्न पक्वान्न । सूपविधान शास्त्रार्थें ॥ ५९ ॥ जाहलिया पाकविधान । स्वयें अग्नीनें आपण । करावें वस्त्रक्षाळण । रंग राखोन सावध ॥ ६० ॥ सबळ डाग बैसले पोटीं । ते काढावे उठाउठीं । जावों न द्यावी कां नवटी । मळमळवटी फेडावी ॥ ६१ ॥ जळावांचून सकळ मळ । सबाह्य करावे निर्मळ । ऐसा क्षाळक कुशळ । अधिकारी प्रबळ नेमाचा ॥ ६२ ॥ विधि दळकांड करी । चंडी तरोंळी माझे नगरीं । माझ्या सामर्थ्याची थोरी । घरोघरीं पाहें पां ॥ ६३ ॥ बृहस्पति माझे कीर्तीचा भाट । ब्रह्मा नित्य जपे शांतिपाठ । माझ्या सामर्थ्याचा लोट । अति वरिष्ठ तिहीं लोकीं ॥ ६४ ॥ राम बापुडें मानवी नर । आमुचें खाजुकें ग्रासमात्र । वानर जे कां पालेखाईर । धाकेंचि समग्र निमतील ॥ ६५ ॥ मुख्य भक्ष्य राम लक्ष्मण । वानर तिखटें कोशिंबिरी जाण । एकेंचि घांसें कुंभकर्ण । भक्षील आपण निमेषार्धें ॥ ६६ ॥ शंभुसमवेत गौरी । म्यां आंदोळिला कैलासगिरी । त्या मज रावणाची थोरी । चराचरीं अतुळित ॥ ६७ ॥ तो मी ऐकतां दशानन । मानवी श्रीरामाचें स्तवन । अंगदा वल्गसी गर्जोन । आनेंआन सैराचि ॥ ६८ ॥ श्रीरामें कोठें केलें रण । कोण दमिले वीर दारुण । मारिले त्रिशिरा खर दूषण । हेचि उंचकण मज देशी ॥ ६९ ॥ ऐसें बोलतां दशानन । अंगद वक्ता अति सज्ञान । श्रीरामाचे गुण गर्जोन । वदे संपूर्ण पुरुषार्थ ॥ ७० ॥ धिग् धिग् रावणा तुझी कथा । संमुख न येववेचि रघुनाथा । चोरून पळालासी सीता । वृथा पुरुषार्था जल्पसी ॥ ७१ ॥ जेणें तुज बैसवूनि कांखेतळीं । केली सप्तसमुद्रीं आंघोळी । तो श्रीरामें मारोनि वाळी । तुज सहकुळीं वधूं आला ॥ ७२ ॥ जया विराधामेण । सर्वदा पळे रावण । तो श्रीरामें मारोनि जाण । राक्षसकंदन करूं आला ॥ ७३ ॥ स्वयंवरीं नुचलेचि कोदंड । तें श्रीरामें केलें दुखंड । तयाहीपुढें बळबंड । वृथा तूं लंड वल्गसी ॥ ७४ ॥ ज्यासी समुद्र आला शरण । जेणें समुद्रीं तारिले पाषाण ।

१ सिंहासनावर. २ भांडण, तंटा. ३ बडबडतोस. ४ प्रतिबंध, मर्यादा. ५ चाकर. ६ वसंत. ७ सहस्र हस्तांचा (किरणांचा). ८ मलयपर्वतावरील वारा. ९ नवीनता. १० चाकर. ११ स्मरण. १२ शिवधनुष्य.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

त्या श्रीरामा माणुसपण । मूर्ख रावण तूं म्हणसी ॥ ७५ ॥

रे रे रावण हीन दीन कुमते रामोऽपि किं मानुषः
किं गंगापि नदी गजः सुरगजो उच्चैःश्रवाः किं हयः।
किं रंभाप्यबला कृतं किमु युगं कामोपि धन्वी नु किं
त्रैलोक्यप्रभवप्रतापविभवः किं रे हनूमान्कपिः॥ २ ॥

ऐकें रावणा कुमती । दुष्टबुद्धि तूं दुर्मती । चैतन्यविग्रही[1] श्रीराममूर्ती । मनुष्य त्याप्रती तूं म्हणसी ॥ ७६ ॥ रामनामें मनुष्य तरती । मनुष्य मानिसी त्या रघुपती । रावणा तुज अति दुर्मती । द्वेषानुवृत्तीं मरसील॥ ७७॥ इतर ओहळांसमान । मानूं नये गंगाजीवन । जिचे जळीं करितां स्नान । परम पावन जड जीव॥ ७८ ॥ समुद्रमंथनींचा ऐरावती । मानूं नये रानवट हस्ती । उच्चैःश्रवा अश्वजाती । पशु अश्वस्थितीं मानूं नये ॥ ७९ ॥ कर्पूर कर्दळीजन्मस्थान । रंभा युवती स्वर्गभूषण । ते जड मूढ स्त्रियांसमान । नव्हे जाण सर्वथा ॥ ८० ॥ कृतयुगाचें महिमान । सत्यवादी सात्त्विक जन । इतर युगेंसीं समान । तें युग जाण नये मानूं ॥ ८१ ॥ अंगीं नुमटतां वण । स्त्रीपुरुषां भेदी पंचबाणें[2] । तो स्थूळ धनुर्धरांसमान । सर्वथा जाण नये मानूं॥ ८२ ॥ समुद्राचें उल्लंघन । राक्षसकंदन लंकादहन । ऐसा हनुमंताचा प्रताप पूर्ण[3] । त्रैलोक्यीं जाण स्वयें वंद्य ॥ ८३ ॥ ऐसा हनुमंत कपींद्र । ज्यासी आत्मत्वें मानी श्रीरामचंद्र । त्यासी तूं म्हणसी वानर । तूं दशशिर महामूर्ख ॥ ८४ ॥ गंगा नव्हे नदीपडिपाडें । ऐरावता हस्तित्व न घडे । उच्चैःश्रवा नव्हे घोडें । कृतयुगा न घडे इतर युगत्व ॥ ८५ ॥ रंभा नव्हे इतर नारी । हनुमान नव्हे तनुवानरी । राम परब्रह्म अवतारी । मनुष्यदेहधारी तो नव्हे ॥ ८६॥ राम नव्हे मानुषवेख । राम त्रैलोक्यीं तारक । राम परमात्मा चोख । राम निष्टंकें परब्रह्म ॥ ८७॥ मरमर रे लंकानाथा । मनुष्य मानिसी रघुनाथा । बळें कुंथतोसि आतां । तुझें बळ वृथा तें ऐक ॥ ८८ ॥ शंभूसहित स्वयें गौरी । आंदोळिला कैलासगिरी । म्हणसी त्या बळाची थोरी । तृणावारी सरेना ॥ ८९ ॥

रे रे रावण शंभुशैलमथने प्रख्यातवीर्यं कथं
रामेण प्रतियोद्धुमिच्छसि मुधा चेत्तत्र युक्तं तव ।
रामस्तिष्ठतु लक्ष्मणेन धनुषा रेखा कृताऽलंघिता
तच्चारेण च लंघितो जलनिधिर्दग्धा हतोऽक्षः पुरी ॥ ३ ॥

कैलासआंदोळणाचें बळ । सीता चोरितांचि तत्काळ । तुझें तुज जालें निर्फळ । तूं निर्बळ नपुंसक ॥ ९० ॥ म्हणसी श्रीरामीं करीन युद्ध । अयुक्त वचन बोल अबद्ध । श्रीरामाभेणें पळसी निर्बंध । त्यासीं युद्धा तूं कैंवी मिळसी ॥ ९१ ॥ तुज नाहीं आंगवण । श्रीरामासीं न करवे रण । लक्ष्मणरेखेपुढें जाण । काळें वदन तुझें जालें ॥ ९२ ॥ लक्ष्मणाची धनुष्यरेखा । नुल्लंघवेचि दशमुखा । तूं सदाचि काळमुखा । वृथा आवांका बळदर्प ॥ ९३ ॥ तुज नुलंघवे धनुष्यरेखा । श्रीरामसेवकाचा आवांका । समुद्र लंघोनियां देखा । येवोनि लंका विध्वंसी ॥ ९४ ॥ वनकर किंकर प्रधान पुत्र । जंबुमाळी अखया कुमर । मारोनियां निशाचर । लंकापुर जाळिलें ॥ ९५ ॥ तुम्हांमाजी इंद्रजित अदट । त्याचें हनुम्यानें काढिलें चरपट । पळावया पुढें न फुटे वाट । विवरीं स्पष्ट लपाला ॥ ९६ ॥ श्रीरामाचा निजसेवक । हनुमान एकला एक । तेणें मर्दूनि तुझें कटक । तुझें दशमुख जाळिलें ॥ ९७ ॥ हनुम्यानें जाळिलें तुझ्या तोंडा । सभेसी बैसलासी काळतोंडा । वृथा बोलसी बळवंडा । ऐक लंडा निजहित ॥ ९८ ॥ सीता अर्पूनि आपण । श्रीरामासीं रिघाल्या शरण । तैंच तुझे वांचती प्राण । येरवीं मरण कुळेंसीं ॥ ९९ ॥ श्रीरामा सीता न देतां जाण । रावणा तुज राखेल कोण । मीच तुझा घेईन प्राण । आंगवण पाहें माझी ॥ १०० ॥ रावणा तुझीं दहाही शिरें । मी छेदितों नखाग्रें[6] । परी तीं शिवनिर्माल्य अपवित्रें । म्हणोनि करें ना स्पर्शें ॥ १ ॥ शिरें वाहून विश्वनाथा । परतोनि वाहिलीं माथां । पूर्ण पापी तूं लंकानाथा । तुज मारितां दोष नाहीं ॥ २ ॥ स्मरोनियां श्रीरघुनाथा । पाप न बाधी तुज मारितां । दहाही शिरीं हाणोनि लाता । रणीं आतां पाडीन ॥ ३ ॥ दशमुखासंमुख । अंगद आला निःशंक । रावणा

१ ज्ञानरूपी विग्रह=देह धारण करणारा. २ मदन. ३ पूर्णपणें. ४ बलाढ्यता. ५ मोठा वीर. ६ हातानें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

तूं रंक मशक । मारितां देख कोण राखे ॥ ४ ॥ अतिशयेंसीं निगरघट । अंगीं आदळला मर्कट । तेणें गजबजिला दशकंठ । करील शेवट वानर ॥५॥

ततः सरोषमापन्नः शशास सचिवांस्तदा ।
गृह्यतामिति दुर्मेधा वध्यतामिति चासकृत् ॥ ४ ॥
रावणस्य वचः श्रुत्वा दीप्ताग्निमिव तेजसा ।
आललंबुस्ततो घोराश्चत्वारो रजनीचराः ॥ ५ ॥
ग्राहयामास तारेयः स्वयमात्मानमात्मवान् ।
बलं दर्शयितुं वीरो निशाचरगणे तदा ॥ ६ ॥
स तान्बाहुद्वयासक्तानादाय पतगानिव ॥ ७ ॥

अंगद आदळला अंगासीं । बोलिला निष्ठुर वाक्यासी । तेणें रावण कासाविसी । अति कोपेंसीं कोपला ॥ ६ ॥ रावणासीं विविध बाध । स्वयेंचि भय स्वयेंचि क्रोध । धरा म्हणावया अंगद । सहसा शब्द न बोलवे ॥ ७ ॥ वांचवावया आपणासी । आक्रोशें सांगे प्रधानांसी । धरा मारा रे वानरासी । मज सभेसी निर्भर्त्सीं ॥ ८ ॥ न धरितां भीडचाड । सभेमध्यें हा माकड । माझें म्हणे काळें तोंड । खंडविखंड करा यासी ॥ ९ ॥ माझे अपवाद असंख्यात । हा बोलिला सभेआंत । अवश्य याचा करावा घात । तुम्हीं समस्त मिळोनी ॥ ११० ॥ ऐकोनि रावणाचें वचन । अंगद धरावया जाण । सैन्य सेनानी प्रधान । अति गर्जोन धांवती ॥ ११ ॥ अंगद विचारी मानसीं । मारूं नये रावणासी । अलोट रावणाच्या बळासी । आणि सैन्यासी शक्ति किती ॥ १२ ॥ यालागीं अंगदें आपण । थोडेंचि केलें उड्डाण । त्यासी धरावया सकळ सैन्य । अति संत्राण धांविन्नलें ॥ १३ ॥ गदा मुद्गल परिघ पाषाण । शिळा शिखरें विंधिती बाण । अंगदासी धरावया पूर्ण । रक्षोगणें धांविन्नले ॥ १४ ॥ धरीं मारीं पाडीं पाडीं । करीत आले राक्षसकोडी । अंगदा न बाधी भयसांकडी । लव वांकडी नव्हेचि ॥ १५ ॥ लांब सोडिली पुसाटी । तेथें झोंबल्या राक्षसकोटी । एक झोंबले चरणसंनिष्ठीं । एकीं तो कंठीं कवळिला ॥१६॥ पक्षी उडोनि आकाशीं । झडपोनि धरिती वृक्षासी । तेंवी चौघे वीर पक्षाभिवेषीं । अंगदासी झोंबले ॥ १७ ॥ चौघांही वीरां बळ बहू । अंगद धरिला दोहीं बाहू । रामस्मरणें निःसंदेहू । नाहीं संदेहू अंगदा ॥ १८ ॥ जैंवी कां गुळावरी माशी । तेंवी अंगद राक्षसीं । वेढिला तो चौपासीं । तरी अंगदासी नाहीं शंका ॥ १९ ॥

प्रासादं शैलसंकाशमुत्पपातांगदस्तदा ।
तेंऽतरिक्षाद्विनिर्धूतास्तस्य वेगेन राक्षसाः ॥ ८ ॥
भूमौ निपातिताः सर्वे राक्षसेंद्रस्य पश्यतः ।
भंक्त्वा प्रासादशिखरं नाम विश्राव्य चात्मनः ॥ ९ ॥
आस्फोटयामास तदा विनद्यं चक्रमे पुनः ।
वायुवेगं समालंब्य रावणस्य तदांगदः ॥ १० ॥
जग्राह मुकुटं चीरं पादमास्थाय मस्तके ।
अंगदेन पदाक्रांतो रक्षः संसदि रावणः ॥ ११ ॥
रावणस्तु परं चक्रे क्रोधं प्रासादधर्षणात् ।
विनाशं चात्मनो पश्यन्निःश्वासपरमोऽभवत् ॥ १२ ॥

कटिपृष्ठीं बाहुमूळीं । अंगद धरिला राक्षसीं सकळीं । तेणेंसीं तो आतुर्बळी । स्वयें तत्काळीं उडाला ॥ १२० ॥ लंकेसी शिखरासमान । रावणाचें निजभवन । अंगदाचें निजउड्डाण । सवेग जाण तेथें आलें ॥ २१ ॥ तेथोनियां पाहतां तळीं । भूमिका दिसताहे जवळी । म्हणोनि अंगद बळिया बळी । वेगें निराळीं उडाला ॥ २२ ॥ अंग झाडितां आतुर्बळी । राक्षसीं धरिला होता बळीं । अंगवातें पडोनि तळीं । जाली रांगोळी अवघ्यांची ॥ २३ ॥ पाणी न मागतां देख । निमाले एक एक । महावीरीं घेतला धाक । त्यासंमुख न ये कोणी ॥ २४ ॥ तेथोनि अंगदाचें उड्डाण । सवेग येतांचि सैंत्राण । तळीं पाडोनि रावण । मस्तकीं चरण दिधला ॥ २५ ॥ अंगदें हाणितांचि लाथा । रावण पडिला पालथा । त्यासी होतां पैं उलथा । बळ सर्वथा राहेना ॥ २६ ॥ रावण घालोनि पायांतळीं । अंगद गर्जे महाबळी । धुर सोडवावया ये काळीं । राक्षसकुळीं कोण आहे ॥ २७ ॥ इंद्रजित अथवा कुंभकर्ण । सैन्य सेनानी प्रधान । सोडवावया स्वयें रावण । आंगवण नव्हे कोणा ॥ २८ ॥ कुंभकर्ण निद्राग्रस्त । वानरभयें इंद्रजित । स्वयें चळचळां कांपत । भयें आकांत प्रधानां ॥ २९ ॥ राक्षसांचे सभेआंत । लिर्डाविला लंकानाथ । अंगद अति-

१ बळवान, २ आवेशानें, ३ राक्षससमुदाय, ४ पुच्छ, ५ पायाला, ६ आकाशांत, ७ वेगानें, ८ घोळसाविला,

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

शयें गर्जत । नव्हे पुरुषार्थ राक्षसां ॥ १३० ॥ नामविख्यात वाळिसुत । अरे मी अंगद श्रीरामदूत । दमावया राक्षसपुरुषार्थ । लंकेआंत आलों असें ॥ ३१ ॥ कोणा अंगीं असेल बळ । कोणी करूं शकेल सळ । तेणें येवोनि तत्काळ । रणकल्लोळ करावा ॥ ३२ ॥ माझ्या पायांतळीं दशानन । अडकलासे संपूर्ण । ज्यासी असेल आंगवण । तेणें सोडवण करूं यावें ॥ ३३ ॥ सभामंडपीं अति आवेशीं । अंगद पाचारी युद्धासी । कोणी न ये सोडवणेसी । घेतला राक्षसीं अति त्रास ॥ ३४ ॥ विध्वंसावें लंकाभुवन । तें शरणागता दिधलें दान तेणें क्षोमेल रघुनंदन । ऐसें आपण नये करूं ॥ ३५ ॥ दान दिधलें शरणागता । ते म्यां लंका मोडितां । क्षोभ वाटेल रघुनाथा । यालागीं स्वस्थता राखिली ॥ ३६ ॥ स्वयें मारूं नये रावण । अंगदें जाणोनि आपण । पायीं दडपोन दशानन । मुकुट हिरोन घेतला ॥ ३७ ॥ मुकुट घेवोनि आपण । अंगद उडतां सत्राण । मस्तकें मंडप उचलिला पूर्ण । नाहीं ज्ञान अंगदा ॥ ३८ ॥ धन्य अंगदाचा साटोप । ऐशीं-सहस्रस्तंभी मंडप । उपडितां न कळेचि अल्प । परम प्रताप कपीचा ॥ ३९ ॥ ख्याति करोनि उद्भट । शिरीं मंडप हातीं मुकुट । अंगद आला वीरवरिष्ठ । देखिला स्पष्ट वानरीं ॥ १४० ॥ मागें लंकेमाजी जाण । कळकळिती राक्षसगण । नेलें सभेचें मंडण । भाग्यें रावण वांचला ॥ ४१ ॥ अंगद वीर उद्भट । रावणा घोळसोनि स्पष्ट । हिरोनि घेतला मुकुट । भाग्यें दशकंठ वांचला ॥ ४२ ॥ अंगदापासून रावणें । भाग्यें सुटल्या जीवें प्राणें । आजि करा याचें जितोणें । वर्धापन जीविताचें ॥ ४३ ॥ रावण सांगे स्वभावतां । अंगदें हाणितांचि लाथा । प्राण जावा पैं तत्त्वतां । सभाग्यता वांचलों ॥ ४४ ॥ म्हणे पुरुषार्थी हनुमंत । त्याहून अंगद विख्यात देखोनि वानराचा पुरुषार्थ । साशंकित रावण ॥ ४५ ॥ मंडप अंगदाचे शिरीं । रत्नकळसांचिया हारी । मुक्ताफळांच्या झलरी । पताका वरी विचित्र ॥ ४६ ॥ वानर सांगती उल्लासतां । सगळी लंका घेवोनि माथां । अंगद आला ऊर्ध्वपंथीं । पाहें पुरुषार्था श्रीरामा ॥ ४७ ॥ मंडप देखोनियां माथां । कोप आला श्रीरघुनाथा । अंगदें केली अधर्मता । तुझ्या घाता मी करीन ॥ ४८ ॥ लंका दिधली शरणागता । तेथींचा अर्थ येथें आणितां । मज लागेल अधर्मता । तुज या अर्था दंडीन ॥ ४९ ॥ अंगद म्हणे ऐकें रघुनाथा । निजबळें मज उडतां । केव्हां मंडप बैसला माथां । न कळतां मज येथें आला ॥ १५० ॥ मस्तकबळें उपडोन । मंडपाचें येथें आगमन । सर्वथा मज नाहीं ज्ञान । तुझी आण श्रीरामा ॥ ५१ ॥ ऐकोनि अंगदाची आण । श्रीराम झाला सुप्रसन्न । अंगदें करोनि रामस्मरण । केलें विंदाण तें ऐका ॥ ५२ ॥ पुढील येतें जें उड्डाण । तें करोनि उलटें किंराण । लक्षोनियां सभास्थान । मंडप संपूर्ण सांडिला ॥ ५३ ॥ बाप अंगद विंदानी । उथाळीं बैसलीं स्तंभस्थानीं । समूळ सूत्र चुकों नेदूनी । ठेविला स्वस्थानीं मंडप ॥ ५४ ॥ मंडप येतां कडकडाट । राक्षसां होय हृदयस्फोट । आक्रंदला दशकंठ । आलें अरिष्ट अनिवार ॥ ५५ ॥ अंगद मंडप गेला घेवोनी । श्रीरामें सोडविला परतोनी । रावणें ऐकतांचि कानीं । धाकें मनीं भयभीत ॥ ५६ ॥ अंगद म्हणे दशानना । रामें मंडप धाडिला जाणा । लंका दिधली बिभीषणा । रणीं रावणा मारूनी ॥ ५७ ॥ ऐसें सांगोनि लंकानाथा । अंगद परतला तत्त्वतां । भेटावया श्रीरघुनाथा । उल्हासता स्वानंदें ॥ ५८ ॥

अंगदः पुनरागत्य ववंदे चरणौ ततः ।
सुग्रीवस्य च रामस्य लक्ष्मणस्य तथैव च ॥ १३ ॥
अन्योन्यं ते महावीरा अभिवाद्य महाबलाः ।
रक्षोराजस्य मुकुटं राघवाय न्यवेदयत् ॥ १४ ॥
तं दृष्ट्वा मुकुटं रामो रत्नसारविभूषितम् ।
आबबंध महाबाहू रावणानुजमस्तके ॥ १५ ॥

लंकेसी मंडप सांडून । अंगदें करोनियां उड्डाण । सवेग येवोनि आपण । श्रीरामचरण वंदिले ॥ ५९ ॥ वंदोनि सौमित्रचरण । सुग्रीवासी अभिवंदून । वंदोनियां बिभीषण । लोटांगण हनुमंता ॥ १६० ॥ आणिकही वानरवीर । नळनीळजांबुवंतादि थोर । अवघे वंदोनि वानर । केला भुभुःकार रामनामें ॥ ६१ ॥ सर्वेचि अंगद महावीर । येवोनि श्रीरामासमोर । पुरुषार्थाचें निजसार । केलें चरित्र तें दावी

१ सामर्थ्य. २ पराक्रम. ३ मोठी. ४ जीवंत सुटल्याबद्दल उत्सव. ५ आकाशमार्गानें ६ अन्याय. ७ उड्डाण. ८ मोठा, ९. नमस्कार करून. १० लगेच,

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ ६२ ॥ अनर्घ्य[1] रत्न अति तेजिष्ठ । रावणाचा महामुकुट । श्रीरामापुढें ठेवोनि स्पष्ट । पायां मर्कट लागला ॥ ६३ ॥ तुझिया कृपा श्रीरघुनाथा । लंकेसी जावोनि तत्त्वतां । रावणापासीं मागतां सीता । अति अहंता[2] अनुवादे[3] ॥ ६४ ॥ तेथें म्यां केल्या तीव्र गोष्टी । जेणें रावण कपाळ पिटी । तरी तो राक्षस महाहट्टी । सीता गोरटी सोडीना ॥ ६५ ॥तुम्हांसीं मागतां कोरान्न । मी तंव सीता नेदीं चिद्रत्न । ऐसें बोलतां दशानन । कोप दारुण मज आला ॥ ६६ ॥ रावणाऐसा अति बळिष्ठ । घायें ढिलाविला सुभट[4] । पायें चेपून दशकंठ । शिरींचा मुकुट हरियेला ॥ ६७॥ राक्षसांच्या वीरश्रेणी । धांविन्नल्या माझ्या ग्रहणीं[5] । त्या म्यां आपटितां अवनीं[6] । रुधिरें धरणी प्रवाहे॥ ६८॥ रावण गांजिलियापाठीं । राक्षस निघाले दिक्पटीं। तिंहीं सांडिल्या युद्धगोष्टी । संमुख दृष्टी कोणी न ये ॥ ६९ ॥ तेथूनि मज सवेग येतां । मंडप आला न कळतां। तो म्यां सांडिला मागुता। सत्य रघुनाथा हे गोष्टी ॥ १७० ॥ ऐकोनि अंगदाच्या गोष्टी । मुकुट देखोनियां दृष्टीं। श्रीराम सुखावला पोटीं। स्वानंदपुष्टीं आलिंगी ॥ ७१ ॥ धन्य अंगदाचा पुरुषार्थ । रणीं गांजोनि लंकानाथ । मुकुट घेवोनि आला व्यक्त । अति विस्मित श्रीराम ॥ ७२ ॥ संतोषोनि रघुनंदन । हृदयीं आलिंगी सुप्रसन्न । करी अंगदमुखचुंबन । अंगद धन्य श्रीरामें ॥७३॥ श्रीरामें मुकुट घेवोन । पाचारोनि बिभीषण । त्याचे मस्तकीं आपण । संतोषोन स्वयें घाली ॥ ७४ ॥ बिभीषण जाला राज्यधर । वानरीं केला जयजयकार । रामनामें गर्जे अंबर । देती भुभुःकार स्वानंदें ॥ ७५ ॥ मुकुट बिभीषणाचे मौळीं[7] । देखोनि वानरीं सकळीं । हरिखें पिटोनियां टाळी । सुखकल्लोळीं नाचती ॥ ७६ ॥ नळ नीळ जांबुवंत । सुग्रीव सुषेण हनुमंत । अंगदाचा पुरुषार्थ । वानर वानीत[8] आल्हादें ॥ ७७ ॥ अंगद वीर अति उद्भट । अंगद वीर भट सुभट । तेणें गांजोनि दशकंठ । आणिला मुकुट प्रत्यक्ष ॥७८॥ ऐसी अंगदाची वाटिव[9]। वानर वानिताती सर्व । अंगदमानसीं श्रीराघव । भाग्यें अभिनव अंगद ॥७९॥ शिष्टाई न मानीच रावण । तेणें क्षोभला रघुनंदन । आतां करील रणकंदन । दुर्धर बाण सोडूनी ॥ १८० ॥ वानर निशाचर रणीं । भिडती झोंटधरणीं । अशुद्धें[10] पूर वाहेल धरणीं । आयणीपायणी[11] भिडतील ॥ ८१ ॥ एका जनार्दना शरण । अंगदशिष्टाई जाली पूर्ण । पुढें गोड निरूपण । रम्य रामायण श्रीरामें ॥ १८२ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां अंगदशिष्टाईनिरूपणं नाम अष्टमोऽध्यायः ॥ ८ ॥ ओंव्या ॥ ॥ १८२ ॥ श्लोक ॥ १५ ॥

अध्याय नववा

श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ सभेत गांजूनि रावणातें । अंगदें आणिल्या मुकुटातें । श्रीरामें आपुल्या निजहातें । बिभीषणातें वाहिला ॥ १ ॥ मुकुट बाणतां बिभीषणासी । देखोनि उल्लास वानरांसी । राजशोभा शोभली त्यासी । श्रीरामासी आल्हाद ॥ २ ॥

> ददृशुर्वानरा वीरा भीषणं च विभीषणम् ।
> मुकुटेन प्रभासंतं त्रिकूटमिव मंदरम् ॥ १ ॥
> रामस्तु बहुभिर्हृष्टैर्विनदद्भिः प्लवंगमैः ।
> वृतो रिपुवधाकांक्षी युद्धायैव प्रवर्तत ॥ २ ॥

मुकुट बाणतां बिभीषणासी । कैसी शोभा आली त्यासी । जेंवी मंदराद्रि[12] रत्नशिखरेंसीं । शोभा तैसी बिभीषणा ॥ ३ ॥ मस्तकीं बाणतांचि मुकुट । जैसा जाला राज्यपट । तैसा दिसताहे तेजिष्ठ । अति वरिष्ठ बिभीषण ॥ ४ ॥ बिभीषणआज्ञेचें भय भारी । जेंवी राजमुद्रा बाणली शिरीं । ऐसा देखोनि वानरीं । नवलपरी तिंहीं केली ॥ ५ ॥ मिळोनियां वानरवीरीं । रामाज्ञा वंदूनि शिरीं । छत्र धरोनि बिभीषणावरी । जयजयकारीं गर्जती ॥ ६ ॥ नवछत्र रावणावरी । झडपून आणिलें वानरीं । धरोनि बिभीषणावरी । जयजयकारीं गर्जती ॥ ७ ॥ बिभीषण देखोनि छत्रांकित[13] । अति उल्लासें उल्लासित। स्वयें जाला श्रीरघुनाथ । नामें गर्जत वानर ॥ ८ ॥ सत्यसंकल्प श्रीरघुनाथ । बिभीषण जाला राज्यप्राप्त ।

---

१ अमूल्य. २ मोठ्या गर्वानें. ३ बोललो. ४ अत्यंत. ५ पकडण्याकरितां. ६ पृथ्वीवर. ७ मस्तकावर. ८ वर्णन करूं लागले. ९ शौर्य. १० रक्तानें. ११ क्रमाक्रमानें. १२ मंदर पर्वत. १३ राजचिन्ह अशा छत्रानें मंडित.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वानर आल्हादें नाचत । स्वयें गर्जत हरिनामें ॥ ९ ॥ छत्र नसतां रघुनाथा । मज धरूं नये सर्वथा । स्वामिमर्यादा संरक्षिता । अति ज्ञाता बिभीषण ॥ १० ॥ छत्र ठेवोनियां दुरी । गदा घेवोनियां करीं । मिळोनि सुग्रीवामाझारीं । नमस्कारी । श्रीरामा ॥११॥ विभीषण निजव्युत्पत्ती । अंगदाची शौर्यशक्ती । अंगदाची अगाध ख्याती । अनुवादे कीर्ति आल्हादें ॥ १२ ॥ ज्याचे वंदीं सुरगण । तोही आक्रमून रावण । चरणीं दशकंठ मर्दून । मुकुट हिरोन आणिला ॥१३॥ ऐसी करावया ख्याती । त्रिलोकीं कोणा नाहीं शक्ती । अंगदाची अगाध कीर्ति । सुर वानिती स्वर्गस्थ ॥१४॥ अंगदाची वीरवाढिव । वानर करिताती भाटिंव । गुण अनुवादे श्रीराघव । भाग्यवैभव अंगदा ॥१५॥ शिष्टाई न मानीच रावण । तेणें क्षोभला रघुनंदन । करावया रिपुदलनें । रणगर्जनें चालिला ॥१६॥

उत्तरं द्वारमागत्य रामः सौमित्रिणा सह ।
आवृत्य बलवांस्तस्थौ सुग्रीवश्च महाबलः ॥ ३ ॥
गजो गवाक्षो गवयः शरभो गंधमादनः ।
भीमो दधिमुखश्चैव केसरी पनसस्तथा ॥ ४ ॥
एतस्मिन्नंतरे चक्रुः स्कंधावारनिवेशनम् ॥ ५ ॥

लंकाउत्तरद्वाराजवळी । राम आला महाबळी । सौमित्रिही आला तत्काळीं । शस्त्रसमेळीं सन्नद्ध ॥ १७ ॥ गेला देखोनि रघुनाथ । सुग्रीव जो कां वानरनाथ । कपिसमुदायासमवेत । आला तेथ अति शीघ्र ॥१८॥ सन्नद्ध बद्ध गदापाणी । बिभीषण आला तत्क्षणीं । भिडावया रणांगणीं । रामाज्ञेलागूनी तिष्ठत ॥१९॥ गेला देखोनि रघुनाथ । नळ नीळ जांबवंत । अंगदादि हनुमंत । वानर समस्त स्वयें आले ॥ २० ॥ आपुलाल्या निजकोटी । वानरवीर जगजेठी । राहिले पैं नेहटानेहटीं । युद्धसंघिष्टीं सन्नद्ध ॥ २१ ॥ गज गवाक्ष गवय जाण । शरभ ऋषभ गंधमादन । भीम दधिमुख सुषेण । केसरी दारुण रणयोद्धा ॥ २२ ॥ वीर वानर जो कां पनस । युद्धालागीं अति कर्कश । करावया राक्षसांचा नाश । अति उल्हास युद्धाचा ॥ २३ ॥ हे अकराही वीर जाण । युद्धार्थी अति दारुण । तिहीं केलें जें विंदान । करावया रण तें ऐका ॥२४॥ लंकादुर्गाहून उंच पर्वत । वानरीं आणोनियां त्वरित । अकरा वीर वेंघोनि तेथ । राक्षसान्त मांडिला ॥ २५ ॥ तें देखोनि वानर । अवघीं आणोनि गिरिवर । त्यांवरी वेंघोनि सत्वर । राक्षसमार मांडिला ॥२६॥ लंकाचौपासीं वानर । पर्वताग्रीं महावीर । करीत रामनामाचा गजर । आले दुर्धर युद्धार्थ ॥२७॥ लंकेआंत अति आकांत । देखोनियां लंकानाथ । करावया वानरांचा अंत । स्वयें धाडीत निजयोद्धे ॥ २८ ॥

रुद्धां तु नगरीं श्रुत्वा जातक्रोधो निशाचरः ।
विधानं द्विगुणं कृत्वा प्रासादं चाप्यरोहत ॥ ६ ॥
ते हयैः कांचनापीडैर्गजैश्चाद्भुतदर्शनैः ।
रथैश्चादित्यसंकाशैः कवचैश्च मनोरमैः ॥ ७ ॥
विनिर्जग्मुर्महावीरा नादयंतो महीतलम् ।
राक्षसा भीमकर्माणो रावणस्य जयैषिणः ॥ ८ ॥
वानराणामपि चमूर्महती जयमिच्छताम् ।
युध्यतां तु तदा तेषां वानराणां महात्मनाम् ॥ ९ ॥
रक्षसां च बभूवाथ बलकोपसुदारुणः ॥ १० ॥

वानरीं रोधिलें लंकाभुवन । ऐसें ऐकोनि दशानन । करावया वानरांसीं रण । युद्धार्थी आपण स्वसैन्य धाडी ॥ २९ ॥ देखोनियां वानर प्रबळ । त्यांहूनि द्विगुणित राक्षसदळ । नानापरी वीर सकळ । रणकल्लोळ करूं धाडी ॥ ३० ॥ अश्वसैन्य सहपरिवारीं । सुवर्णाभरणें त्यांमाझारी । हो हो मा मा जीजी-करीं । वीर संभारीं चालिले ॥ ३१ ॥ गजसैन्याचे पैं थाट । मदोन्मत्त अति उद्भट । दंतीं मणिबंध तिखट । ते गंजघंट असंख्य ॥ ३२ ॥ सन्नद्ध बद्ध शस्त्रास्त्रीं । चालिल्या रथांचिया हारी । ध्वज पताका त्यांवरी । झळकती झालरी मोत्यांच्या ॥ ३३ ॥ अंधाऊ चव्हाण कोयतकार । सेंळी सांबळी धनुर्धर । आले पायाचे मोगर । वीर दुर्धर गर्जती ॥ ३४ ॥ रत्नें मुक्ताफळें हिरा । कवचें बाणलीं महावीरां । अश्वीं झळकती पांखरा । शस्त्रसंभारें लखलखित ॥ ३५ ॥ राक्षसवीर आतुर्बळी । दिधली सिंहनादें आरोळी । निंधा उठला पाताळीं । नाद निराळीं कोंदला ॥ ३६ ॥ देखोनि राक्षसांचा भार । युद्धा खवळले

१ वीरवृत्ति, पराक्रम. २ स्तुतिपाठकपणा. ३ शत्रुनाश. ४ युद्धाच्या उत्कंठेनें. ५ नामांकित. ६ सोन्याचे अलंकार. ७ गजसमूह. ८ सैन्यांतील वीरविशेष. ९ पायदळ. १० झुली. ११ प्रतिशब्द. १२ आकाशांत.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वानर । रामनामाचा गजर । दिधला भुभुःकार महावीरीं ॥ ३७ ॥ लंकाद्वारीं राक्षसकोटी । दोहीं सैन्यां दृष्टादृष्टी । सुटली शस्त्रास्त्रांची वृष्टी । कांपत पोटीं यमकाळ ॥ ३८ ॥ राक्षसवीर स्वयें गर्जती । विजयी आमुचा लंकापती । वानर रामनामें गर्जती । रघुपति निजविजयी ॥ ३९ ॥ वीरां वानरां होत मेळ । रणीं उठिला हलकल्लोळ । खवळला रणवेताळ । रणगोंधळ नाचत ॥ ४० ॥ एक हाणिती शक्तिशूळें । दुजे हाणिती शालताळें । एक वर्षती शरजाळें । दुजे अंतराळें महाशिळा ॥ ४१ ॥ एक हाणिती चेंडूचक्रें । दुजे हाणिती शिळाशिखरें । एक हाणिती तोमरें । वृक्षाग्रें पैं एक ॥ ४२ ॥ वीर वर्षती विचित्र बाण । वानर वर्षती पाषाण । परिघ हाणितां दारुण । तत्काळ मरण राक्षसां ॥ ४३ ॥ करितां शस्त्रास्त्रीं घात । वानर वर्षती पर्वत । अश्वगजां चूर होत । रथ मोडत ध्वजेंसीं ॥ ४४ ॥ वानरवीर भद्रजाती[1] । पुच्छीं बांधोनियां हस्ती । बळें उपडितां क्षिती । असंख्य मरती पायांचे ॥ ४५ ॥ निधडे वीर पडिले ठायीं । पायींचे रगडिले पायी । वानरां शिवणें नाहीं भुयी । मारीत पाहीं गगनस्थ ॥४६॥ वानरवीरीं घालोनि उडी । रथ भंगिले कोट्यनुकोटी । रणीं मर्दिलीं रणघोडीं । गजकरवडी पाडिल्या ॥ ४७ ॥ राक्षसीं वानरांचा करितां घात । कपि उसळती गगनांत । तेथोनि करिती पर्वतपात । वीर मारीत असंख्य ॥४८॥ वानर घायवट होत । श्रीरामपदरजें[2] पायवणी सेवीत । सर्वेचि येवोनि युद्धाआंत । वीर मारीत रणमारें[3] ॥ ४९ ॥ वानरवीर पडतां रणीं । रामनामाच्या स्मरणीं । मरण पळे त्यांपासूनी । उठती रणीं रणमारा ॥ ५० ॥ श्रीराम असतां पाठीसीं । भय नाहीं वानरांसी । रणीं मर्दूनि राक्षसांसी । अति संत्रासीं त्रासिले ॥५१॥ करितां रामनामस्मरण । तेथें रिघों न शके मरण । तो श्रीराम असतां जाण । वानरां निधन असेना ॥५२॥ न चले आंगिकें[4] निजबळ । शस्त्रास्त्रें सुटलीं सकळ । वानरवीर अति प्रबळ । राक्षसदळ भंगलें ॥ ५३ ॥ मारितां राक्षसांच्या श्रेणी । असृग्रें[5] वाहों लागलें धरणीं । जाली मांसाची चिडाणी[6] । उरले जे रणीं ते पळताती ॥ ५४ ॥ मोडलें देखोनि निजसैन्यासी । कोप आला इंद्रजितासी । तोही निघाला युद्धासी । अति आवेशीं सन्नद्ध ॥ ५५ ॥

> एतस्मिन्नंतरे तेषामन्योन्यमभिधावताम् ।
> रक्षसां वानराणां च द्वंद्वयुद्धमवर्तत ॥ ११ ॥

चोवीस जण वानरवीर । चोवीस योद्धे निशाचर । द्वंद्वयुद्ध घोरांदर । सविस्तर अवधारा ॥ ५६ ॥ इंद्रजित आणि अंगद । दोघां जणां द्वंद्वयुद्ध । प्रजंघ अतिक्रुद्ध । करीत युद्ध संपातीसीं ॥ ५७ ॥ अतिकाय रावणपुत्र । विनीत आणि रंभुवानर । या दोघांसी युद्ध दुर्धर । करी सत्वर अति युक्तीं ॥ ५८ ॥ महोदर आणि सुषेण । मकराक्ष जांबुवंतेंसीं रण । विद्युज्जिव्हा शातवळी जाण । गजप्रतापनां द्वंद्वयुद्ध ॥ ५९ ॥ जांबवंताचा बंधु धूम्र । त्यासीं कुंभकर्णपुत्र । देवांतक रावणकुमर । गवाक्ष वीर तेणेंसीं ॥ ६० ॥ सारण आणि कपि ऋषभ । त्रिशिरा आणि शरभ । नरांतकपुत्र प्रगल्भ । पनस स्वयंभ तेणेंसीं ॥ ६१ ॥ अकंपन आणि कुमुदहारी । धूम्राक्ष आणि केसरी । महापार्श्व गंधमादनावरी । शुकरणाग्रीं[7] वेगदर्शी ॥ ६२ ॥ जंबुमाळीसीं हनुमान आपण । मित्रघ्नेंसीं बिभीषण । निकुंभ नीळेंसीं महारण । तपन तो जाण नळासीं ॥ ६३ ॥ प्रघसा सुग्रीवासीं रण । विरूपाक्ष आणि लक्ष्मण । अशनिप्रभा द्विविदकंदन । वज्रमुष्टि पूर्ण मैंदासीं ॥ ६४ ॥ ऐसे चोवीसही जोडे । युद्धा मिसळले गाढे । युद्ध केलें पडिंपाडें । निजनिवाडें अवधारा ॥६५॥ वाजंत्र्यांच्या निजगजरीं । ढोलनिशाण टमकी भेरी । सिंहनाद करोनि वीरीं । परस्परीं मिसळले ॥ ६६ ॥ इंद्रजित अतिविंदानी । अंगद लक्षोनियां रणीं । शस्त्रास्त्रें वर्षोनि बाणीं । येरें चुकवोनी सांडिलीं ॥६७॥ अंगदाच्या हृदयभेदा । करावया सोडिली दुर्धर गदा । गगना उसळला योद्धा । घावो नुसधा तळीं गेला ॥ ६८ ॥ तेथोनि घालोनियां उडी । सारथीसहित मारिलीं घोडीं । रथ भंगिला कडाडीं । छत्रें मोडिलीं पुच्छाग्रें ॥ ६९ ॥ इंद्रजित धाकें घालितां उडी । वानर मुकुटातें

१ उत्तम जातीचे, २ पादोदक, चरणतीर्थ, ३ मरण ४ शारीरिक, ५ रक्त, ६ खीच, ७ पराकाष्ठेचें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

ओंसुडी । सवेंचि देतां पैं थापडी । आली भवंडी प्राणांता ॥ ७० ॥ पूर्वील हनुमंतआघात । तेणें इंद्रजित नित्य धाकत । पुढती अंगदाचा घात । आला प्राणान्त रोकडा ॥७१॥ वानरें केला अस्ताव्यस्त । मोकळे केशीं आणि विरथ । पळों जातां लंकेआंत । लज्जान्वित इंद्रजित ॥ ७२ ॥ पळोनि जातां इंद्रजितासी । अंगदें धांवोनि धरिला केशीं । येरें कापूनि बुचड्यासी । अंतर्धानेंसीं पळाला ॥ ७३ ॥ रणीं वानरासीं संमुख । युद्धीं माझें न सरेचि मुख । इंद्रजितासी परम दुःख । पोटीं आणिक तेणें धरिलें ॥ ७४ ॥ करोनियां निःसीम युद्ध । रामलक्ष्मणादि कपि सन्नद्ध । अवघियां करीन शरबद्ध । ऐसें विरुद्ध मनीं धरिलें ॥ ७५ ॥ येरीकडे द्वंद्वयुद्ध । वीरां वानरां अति उन्नद्ध । आयणीपायणीचे बाध । तेंही युद्ध अवधारा ॥ ७६ ॥ प्रजंघ वीरें तीं बाणीं । संपाती कपि विंधिला रणीं । तेणें ते बाण चुकवूनी । अश्वकर्णी ठोकिला ॥ ७७ ॥ अश्वकर्णाऐसीं पत्रें पूर्ण । तो वृक्ष म्हणती अश्वकर्ण । तेणें तो वृक्ष ठोकून । मूर्च्छीपन्न प्रजंघ ॥ ७८ ॥ अतिकायसुत रावणी । रंभु विनीत वानर दोनी । पाचारूनि रणांगणीं । अमितां बाणीं विंधिले ॥ ७९ ॥ वंचूनि त्याचे बाण दुर्धर । कोपें खवळले वानर । वर्षले शिळा पर्वत घोर । केले चकचूर राक्षस ॥ ८० ॥ अतिकाय पर्वतपातीं । धनुष्य भंगून ठेंचला लातीं । रथ भंगून सारथी । पडिला क्षितीं मूर्च्छित ॥ ८१ ॥ महोदरें रणीं सुषेण- । हृदयीं विंधिले पांच बाण । तेणें त्याचा जावा प्राण । रामस्मरणें जाण वांचला ॥ ८२ ॥ करितां रामनामस्मरण । आलें चौगुणें स्फुरण । पंच योजनें शिळा दारुण । घाली सुषेण त्यावरी ॥ ८३ ॥ महोदरें लवडसवडी । लंकेमाजी घातली उडी । रथ सारथी मारिलीं घोडीं । सैन्य शिळेबुडीं असंख्य ॥ ८४ ॥ मकराक्ष खरात्मज । जांबवंत ऋक्षराज । दोहींसीं युद्धाचें व्याज । रण समाज रणमारें ॥ ८५ ॥ जांबवंतें घेवोनि वृक्ष । रणीं ठोकिला मकराक्ष । येरें छेदोनियां देख । बाण असंख्य वर्षला ॥ ८६ ॥ जांबवंतें करतळीं । हाणोनि पाडिला सभामंडळीं । रावणाच्या पायांजवळी । मूर्च्छासमेळीं मकराक्ष ॥ ८७ ॥ जांबवंतें करांगुळीं । मर्दून सैन्य केली रांगोळी । रथसूतअश्वसमेळीं । मेळविला धुळी मकराक्ष ॥ ८८ ॥ विद्युज्जिव्ह राक्षस बळी । बाणीं विंधिला शतबळी । अश्वपर्णवृक्ष पैं कपाळीं । हाणोनि तळीं पाडिला ॥ ८९॥ गज आणि प्रतपन । दोघीं केलें दुर्धर रण । वाम पार्श्वीं गजासी जाण । शूळें संपूर्ण खोंचिलें ॥९०॥ गज क्षोभला दुर्धरशक्ती । शालवृक्ष घेवोनि हातीं । हाणून लघुलाघवगतीं । पाडिला क्षितीं प्रतपन ॥ ९१ ॥ कुंभ जो कां कुंभकर्णकुमर । जांबवंतबंधु धूम्राक्ष वीर । दोघां द्वंद्वयुद्ध दुर्धर । येरां येर नाटोपती ॥ ९२ ॥ दोघे वीर आतुर्बळी । रणीं विचरत सैन्यमेळीं । गदापट्टिशतोमरत्रिशूळीं । शालताळीं वानर ॥ ९३ ॥ धूम्रें हाणितां पायावरी । कुंभ मूर्च्छित जाय चांचेरी । सेवकीं नेला लंकेमाझारीं । जाली महामारी राक्षसां ॥ ९४ ॥ देवांतक जो रावणी । गवाक्ष विंधिला पांच बाणीं । तेणें ठेंचून पाय पाषाणीं । तत्क्षणीं मोडिले ॥ ९५ ॥ गवाक्ष कोपोनि वानर । शालवृक्ष उपडोनि थोर । रागें हाणों जातां रावणपुत्र । तेणें तो सत्वर छेदिला ॥९६॥ आणिक विंधितां नव बाण । गवाक्षें वरिचेवरी झेलून । मग शिळा शिखरें वर्षोन । केलें कंदन देवांतका ॥९७॥ धनुर्बाण शस्त्रें सारथी । अश्वरथ उपडिला क्षितीं । देवांतक वीर पदाती । मुष्टिघातीं मिसळला ॥ ९८ ॥ उरीं शिरीं खांदां कोपरीं । दंडीं मुंडपीं थडका उरीं । तंडवे हाणोनि परस्परीं । चक्राकारीं भवंडिले ॥ ९९ ॥ दोघे पुरुषार्थी दादुले । उसणंयाघाईं भिडिन्नले । दोघे श्रमस्वेदें क्लिन्न जाले । दोघे पडिले मूर्च्छित ॥ १०० ॥ सारणें वीरें युद्धावरी । ऋषभ पाचारिला रणाग्रीं । एकापकीं उरावरी । शालवृक्ष ठोकिला ॥ १ ॥ वृक्ष आदळतांचि उरांडीं । दोहीं डोळां आली भोवंडी । जावोनि अडखळे गडबडीं । पडली मुरकुंडी सारणान्त्री ॥ २ ॥ मेघवर्ण कुंजरावरी । त्रिशिरा बैसोनियां गजरीं । वेगें येवोनि शरभावरी । तोमरें शिरीं ताडिला ॥ ३ ॥ तोमर लागावा जों शिरीं । घाव चुकविला लंघवेंकरीं । सप्तपर्ण तरुसंभारीं । गजकुंभावरी ताडिला ॥ ४ ॥ गज

१ हिसका दिला. २ पृथ्वीवर. ३ चौपट. ४ कार्य, निमित्त. ५ झेंपा देत. ६ चपराका. ७ समोरासमोर. ८ भिजलेले. ९ छातीवर. १० मोठ्या युक्तीनें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

हाणितां कुंभावरी । वृक्ष आदळला त्रिशिरावरी ।
दोघे जावोनि चांचरी । धरेवरी लवंडले ॥ ५ ॥
नरांतक रावणसुत । पनस वानर विख्यात । त्यासीं
युद्धकंदनार्थ । बाणीं विंधित ऊठिला ॥ ६ ॥ येतां
देखोनि त्या बाणासी । पनस उडाला आकाशीं ।
तेथोनि सोडितां पर्वतासी । कासाविसी नरांतक
॥ ७ ॥ वर्षतां शिळासंपातीं । शिरींचा मुकुट
क्षितीं । रथींचा मारिला सारथी । घोडे रथ नेती
सुनाट[1] ॥ ८ ॥ घोडीं रथ नेला लंकाभिमुख । नरां-
तक झाला विमुख । कटकीं वाजली एकचि हांक ।
तें परम दुःख नरांतका ॥ ९ ॥ अकंपनें कुमुदासी ।
परिघें हाणितांचि शिर्सी । मेटें वळलीं वानरासी ।
मग भूमीसी बैसला ॥ ११० ॥ सवेंचि उठोनि उठा-
उठीं । अकंपन देखोनि दृष्टीं । कुमुदें हाणितां
मुष्टी । पडिला सृष्टीं निर्जीव ॥ ११ ॥ धूम्राक्ष आणि
केशरी । युद्ध करितां चक्राकारीं । एक वर्षे शर-
धारीं । शिळाशिखरीं पैं दुजा ॥ १२ ॥ केसरी
उडोनि प्रत्यक्ष । पायीं धरोनि धूम्राक्ष । बळें भोंवं-
डोनि देख । अधोमुख[2] पाडिला ॥ १३ ॥ महापार्श्व
गंधमादन । दोघीं युद्ध केलें दारुण । शस्त्रास्त्रीं
बाण पाषाण । रणकंदन अत्युग्र ॥ १४ ॥ गंधमा-
दनें लवडसवंडी[3] । महापार्श्वावरी घालोनि उडी ।
बळें झोंबून कडाडीं । तडाफोडी तो केला ॥ १५ ॥
पुच्छें आकळोनि स्पष्ट । नखीं नांगरिलें पोट ।
दांतीं करांडिला कंठ । रणीं यथेष्ट गांजिला ॥ १६ ॥
वेगदर्शी वीर वानर । शुक लाघवी[4] निशाचर ।
दोघां युद्ध घोरांदर[5] । अति दुर्धर तिहीं केलें ॥ १७ ॥
वेगदर्शी स्वयें उडोन । रथ उपटितां जाण । अश्व
सारथि जाले चूर्ण । शुक पळोन स्वयें गेला ॥ १८ ॥
तपन आणि वानर नळ । दोघीं युद्ध केलें तुंबळ ।
नळें थाप देवोनि सबळ । डोळे तत्काळ फोडिले
॥ १९ ॥ तपन जालें आंधळें । युद्ध करीना मागें
पळे । पडिलें रणभूमीसीं लोळे । मग तें नळें उपे-
क्षिलें ॥ १२० ॥ पूर्वी जंबुमाळी जाण । हनुम्यानें
मारिला आपण । त्याचा सूड घ्यावया पूर्ण । जंबु
आन स्वयें आला ॥ २१ ॥ जंबु झाला पैं रथस्थ ।
रथच्युतपत्ती दावी समस्त । तेणें तीं बाणीं हनुमंत ।
हृदयाआंत विंधिला ॥ २२ ॥ हनुमंत वज्रदेही ।
बाण विंधिल्या नव्हे कांहीं । ते बाण उसळोनियां
पाहीं । जंबूच्या देहीं खडतरले ॥ २३ ॥ तयाच्या
लघुलाघवाआंत । रथीं येवोनि हनुमंत । तळ-
प्रहारें शिरःपात । जंबु रणांत पाडिला ॥ २४ ॥
मित्रघ्न चापविंदानी[6] । बिभीषण विंधिला बाणीं ।
विभीषणें गदा हाणोनी । पाडिला धरणीं मित्रघ्न
॥ २५ ॥ सैन्य त्रासित घसाघस । अति बळी वीर
प्रघस । स्वयें जिणावया सुग्रीवास । रणाभिवेष
युद्धार्थी ॥ २६ ॥ प्रघस जंव सोडी बाण । तंव
सुग्रीवें आपण । वृक्ष घेवोनि सप्त पूर्ण । घेतला
प्राण प्रघसाचा ॥ २७ ॥ सुग्रीवाच्या घायापुढें ।
प्रघस कायसें बापुडें । घायें चूर केलीं हाडें ।
अशुद्धें[7] उडे आकाशीं ॥ २८ ॥ विरूपाक्ष आणि
लक्ष्मण । दोघीं आरंभिलें लाघवी रण । लक्ष्मणें
विंधोनि विकट बाण । घेतला प्राण बाणें एकें
॥ २९ ॥ वज्रमुष्टीसीं कपि मैंद । दोघां जालें
दुर्धर युद्ध । घाय हाणोनि विविध । रणविमर्द
तिंहीं केला ॥ १३० ॥ वज्रमुष्टी सूनि[8] दृष्टी । मैंद
हाणितां निजमुष्टीं । घायें पाडियेला सृष्टीं । जेंवी
धूर्जटी[9] त्रिपुरातें ॥ ३१ ॥ द्विविदअशनीपडिपाडीं ।
युद्धीं द्विविदें मारिलीं घोडीं । रथ मोडितां
कडाडीं । पाडिली मुरकुंडी अशनिप्रभा ॥ ३२ ॥
निकुंभ आणि सेनानी नीळ । दोघां जाहलें युद्ध
तुंबळ । निकुंभें सोडूनि शरजाळ । नीळासी
तत्काळ उपहासी ॥ ३३ ॥ तूं तंव वानर बापुडें ।
कैंवी राहसी मजपुढें । रणीं मारीन रोकडें ।
निजकुऱ्हांडें[10] सोडिलें ॥ ३४ ॥ निकुंभाचे सतेज
शर । पुच्छें छेदोनि समग्र । घेवोनि त्याचें
रथचक्र । छेदोनि शिर पाडिला ॥ ३५ ॥ राव-
णाच्या सैन्याआंत । चौघे जण वीर विख्यात ।
दृष्टीं नाणितां लंकानाथ । बळोद्धुत अति बळी
॥ ३६ ॥ गाढी बळाची आंगवण । वानरवीर अति
दारुण । अवघे लेखिती तृण । श्रीरामीं रण करूं
आले ॥ ३७ ॥ यज्ञकेत आणि शतघ्न । रश्मिकेत
यज्ञकोपन । चौघे वीर अति दारुण । रामीं रण
करूं आले ॥ ३८ ॥ चौघे जण येतां देख । हनुमान
म्हणे हे रंक मशक । मी असतां सिद्ध सेवक ।
धुरेसंमुख कैंवी येती ॥ ३९ ॥ मारावया चौघे

१ पाहिजे तिकडे. २ खालीं तोंड असा. ३ तांतडीनें, घाईनें. ४ कुशल. ५ भयंकर. ६ बाणयुद्धांत अतिकुशल.

७ रक्त. ८ घालून. ९ महादेव. १० आपला बाण.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

जण । हनुमंतासी आंगवण । सवेग करितां उड्डाण । गेलें किराण सत्यलोका ॥ १४० ॥ लघुलाघवी चौघे जण । विकट विचित्र विंदान । श्रीरामासी विंधोन बाण । रणगर्जन तिंहीं केलें ॥ ४१ ॥ धन्य धनुर्वाडा श्रीरामचंद्र । त्यांचे निवारोनियां शर । चौघांतेंही छेदोनि शिर । रणीं महावीर मारिले ॥ ४२ ॥ वेगविंदानी श्रीरघुनाथ । परतोनि ये हनुमंत । तंव चौघांचाही करोनि घात । केलें विपरीत तें ऐका ॥ ४३ ॥ शिरें छेदितां आवेशीं । वेगें उडालीं आकाशीं । गगनीं भेटलीं हनुमंतासी । गुह्य त्यापासीं सांगत ॥ ४४ ॥ सवेग हस्तें श्रीरघुनाथ । शिरें छेदोनि केलीं मुक्त । तुझा अबळ पुरुषार्थ । आतां कां व्यर्थ धांवसी ॥ ४५ ॥ ऐकोनि शिरांचें वचन । निराळीं हनुमान लज्जायमान । वंदोनि श्रीरामचरण । जीवें निंबलोण स्वयें केलें ॥ ४६ ॥ हनुमान म्हणे मी शीघ्रगती । ऐसा गर्व होता चित्तीं । त्याहून श्रीराम शीघ्रहस्ती । वानूं किती पुरुषार्थ ॥ ४७ ॥

भल्लैः खड्गैर्गदाभिश्च शक्तितोमरसायकैः ।
अपविद्धैश्च भग्नैश्च रथैः सांग्रामिकैर्हयैः ॥ १२ ॥
निहतैः कुंजरैर्मत्तैस्तथा वानरराक्षसैः ।
चक्राक्षयुगदंडैश्च भग्नैर्भूतलमाश्रितैः ॥ १३ ॥
बभूवादौ घनं घोरं गोमायुगणसंकुलम् ।
कबंधानि समुत्पेतुस्तस्मिन्युद्धे सुदारुणे ॥ १४ ॥

खड्ग भाले शूळशक्तीं । गदातोमरबाणगुप्तीं । रथ भंगिले नेणों किती । निमाले हस्ती असंख्य ॥ ४८ ॥ रथ मोडितां कडाडीं । सारथ्यांचीं मारिलीं घोडीं । सांग्रामिक हय कोडी । रणीं पडिपाडीं पाडिले ॥ ४९ ॥ रुधिरांची नदी दुर्गम । मांसशोणिताचा कर्दम । वृकव्याघ्रादि गृध्र विहंगमें । मांसें सुगम भक्षिती ॥ १५० ॥ शस्त्रास्त्रेंसीं सन्नद्ध । रणीं उठले कबंध । करावया दुर्धर युद्ध । रणीं विविध धांवती ॥ ५१ ॥ कोटिसैन्य पडिल्याअंतीं । शस्त्रें घेवोनियां हातीं । शिरेंवीण धडें धांवती । कबंध म्हणती त्या नांव ॥ ५२ ॥ एका जनार्दना शरण । जालें द्वंद्वयुद्ध दारुण । पुढील कथा रणविंदान । युद्ध दारुण अवधारा ॥ ५३ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां द्वंद्वयुद्धनिरूपणं नाम नवमोऽध्यायः ॥ ९ ॥ ओंव्या ॥ १५३ ॥ श्लोक ॥ १४ ॥

अध्याय दहावा

श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ रणीं करितां द्वंद्वयुद्ध । इंद्रजित गांजिला सुबद्ध । त्याचे पोटीं अति विरुद्ध । रात्रीं शरबंध करावया ॥ १ ॥ प्रथम गांजिलें हनुमंतें । तें बहु दुःख इंद्रजितातें । अंगदें गांजितां येथें । अति लज्जेतें पावला ॥ २ ॥ अपमानाचें अति विरुद्ध । रामलक्ष्मणादि वीर विविध । रणीं करावया शरबंध । रात्रीं युद्ध मांडिलें ॥ ३ ॥

युद्ध्यतामेव तेषां तु तदा वानररक्षसाम् ।
रविरस्तंगतो रात्रिः प्रवृत्ता प्राणहारिणी ॥ १ ॥
अन्योन्यं बद्धवैराणां घोराणां जयमिच्छताम् ।
संप्रवृत्तं निशायुद्धं तदा वानररक्षसाम् ॥ २ ॥
राक्षसोऽसीति हरयो वानरोऽसीति राक्षसाः ।
अन्योन्यं समरे जघ्नुस्तस्मिंस्तमसि दारुणे ॥ ३ ॥
हत दारय चैहीति कथं विद्रवसीति च ।
एवं सुतुमुलः शब्दस्तस्मिंस्तमसि शुश्रुवे ॥ ४ ॥

रणीं भिडतां वानरवीर । राक्षस गांजिले थोर थोर । निबिड पडावया अंधकार । निशा निशाचर इच्छिती ॥ ४ ॥ रात्रीं प्रबळ निशाचर । तेथें निर्बळ वानर । ऐसा करितां विचार । दिवाँकरअस्त जाला ॥ ५ ॥ निजबळें सबळ रजनी । सुषुप्ति प्राण्यां प्राणहरणी । तें गुडुप पडतां रणीं । कोणा कोणी देखेना ॥ ६ ॥ अरे तूं काय होसी वानर । कपीसी पुसती निशाचर । पडखळोनि येरयेर । रणीं सत्वर मारिती ॥ ७ ॥ राक्षसां वानरां बद्धवैर । राक्षसां साह्य अंधकार । वानरां साह्य श्रीरामचंद्र । युद्ध दुर्धर मांडलें ॥ ८ ॥ छेदीं भेदीं रणीं पाडीं । पायीं धरोनियां ओढीं । वेगीं उपटा रे तांतडीं । वीर कडाडीं गर्जती ॥ ९ ॥ आमुचा अधिक पुरुषार्थ । इतर मशकें कायसीं येथ । ऐसें अंधारीं गर्जत । करीत घात येरयेरां ॥ १० ॥ पाडीं पाडीं म्हणती रणीं । मिसळल्या

१ करवंडी, २ रक्ताची. ३ चिखल, ४ पक्षी, ५ अनायासें, ६ तयार, ७ सूर्यास्त, ८ रात्र, ९ उठवून,

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वीरश्रेणी । युद्ध होतसे झोंट[1]धरणी । मागें कोणी न सरती ॥ ११ ॥

तस्मिंस्तमसि दुःपारे राक्षसाः क्रोधमूर्च्छिताः ।
परिपेतुः सुसंक्रुद्धा भक्षयंतो वनेचरान् ॥ ५ ॥
हयान्कांचनपीडांश्च ध्वजांश्चाभरणानि च ।
आप्लुत्य दशनैस्तीक्ष्णैर्नखैश्च विचकर्षिरे ॥ ६ ॥
कुंजरान्कुंजरारोहान्पताकाध्वजिनो रथान् ।
आप्लुत्य विचकर्षुस्ते दशनैः क्रोधमूर्च्छिताः ॥ ७ ॥
लक्ष्मणस्त्वथ रामश्च शरैराशीविषोपमैः ।
आदिश्यादिश्य रक्षांसि प्रवराणि निजघ्नतुः ॥ ८ ॥
तुरंगखुरविध्वस्तं रथनेमिसमुद्धतम् ।
रुरोध कर्णौ योधानां चक्षूंषि च महीरजः ॥ ९ ॥

आपणा न दिसे आपुलें शरीर । तेथें कोण देखे येरयेर । तमोबळें निशाचर । युद्धार्थ दुर्धर पेटले ॥ १२ ॥ निशाबळें निशाचरीं । लावून आले निशाणभेरी । नाद ऐकोनि वानरीं । राक्ष-सभारीं[2] मिसळले ॥ १३ ॥ वानर धरोनि अंधा-रांत । राक्षस मुखीं खावों घालित । दांतीं करां-डून[3] दांत । जिव्हा तोडित नखाग्रीं ॥ १४ ॥ कपि घालितां मुखांतरीं । निघोनियां कर्णद्वारीं । लात हाणोनियां शिरीं । धरेवरी पाडिती ॥ १५ ॥ वानर खावों सूती पोटीं । ऊर्ध्व उडोनि जगजेठी । फोडून ब्रह्मांडकवटी । राक्षसां [4]सृष्टीं पाडिती ॥ १६ ॥ सुवर्णाभरणीं शोभती गाढे । रणीं पाख-रिले पैं घोडे । त्यांवरी उडउडोनी माकडें । रणीं रोकडे पाडिती ॥ १७ ॥ नखीं चिरोनि उदर । मुखीं फाडोनि पाखर । रणीं पाडिती मुख्य धुर । असिँवारासमवेत ॥ १८ ॥ पताका फाडोनियां दांतीं । गजदंत उपटोनियां घेती । रणीं पाडोनि गजपती । मारिले हस्ती असंख्य ॥ १९ ॥ वानरीं घालोनियां उडी । रथसारथींसहित घोडीं । मोडिल्या रथांचिया कोडी । रणपरवडी राक्षसां ॥ २० ॥ राक्षसें हाणितां नाना शस्त्रीं । वानर उडाले अंबरीं । वृथा घाय जाती अंधारीं । राम साहाकारी वानरां ॥ २१ ॥ श्रीरामतेजें निरंतर । अंधारीं देखणे वानर । तिंहीं मारिले निशाचर । सैन्य समग्र रणमारें ॥ २२ ॥ रणीं पाडोनि निशा-चर । सैन्य मारोनि समग्र । रामनामाचा गजर । केला भुभुःकार वानरीं ॥ २३ ॥ येरीकडे राम सौमित्र । मुख्य धुरा थोर थोर । नावानिगे निशाचर । रणीं समग्र मारिले ॥ २४ ॥ सुवर्ण-पत्री कंकपत्री । बाण वर्षोनि बहुपत्री । मारिल्या राक्षसांच्या हारी । रणमहामारी श्रीराम ॥ २५ ॥ रथ छेदिले सचक्र । छेदिले अश्वांचे खुर । कंठ-नाळ छेदूनियां वीर । रणीं समग्र पाडिले ॥ २६ ॥ शुंडादंड दांतेंसहित । छेदोनि पाडिले गजघट । वीरांचे छेदोनि नेत्रवाट । रणीं सुभट पाडिले ॥ २७ ॥ श्रीराम देखणा अंधारीं । वायकांड नाहीं करीं । पाचँपाचारूनि धुरा थोरी । रणमहामारीं मारिल्या ॥ २८ ॥ श्रीराम वर्षोनि बाणजाळ । सैन्यासगट धुरा प्रबळ । क्षणें मारिल्या सकळ । हलकल्लोळ ऊठिला ॥ २९ ॥ रावण म्हणे प्रधा-नांसी । मारूं म्हणां श्रीरामासी । तो करितो रण-कंदनासी । तुम्ही युद्धासी कां नें वेंचां ॥ ३० ॥ सत्य बोलिला बिभीषण । त्याचें वचन अति प्रमाण । करावया श्रीरामासीं रण । आंगवण नाहीं तुम्हां ॥ ३१ ॥ ऐकोनि रावणाचें वचन । स्वयें विनविती प्रधान । न होतें आज्ञापन । म्हणोनि रण नाहीं केलें ॥ ३२ ॥ रावणवचनें लज्जायमान । युद्धा निघाले प्रधान । नावानिगे साही जण । रणप्रवीण ते ऐका ॥ ३३ ॥

यज्ञशत्रुश्च दुर्धर्षो महापार्श्वमहोदरौ ।
वज्रदंष्ट्रो महाकायस्तौ चोभौ शुकसारणौ ॥ १० ॥
तेषां रामः शरैः षड्भिः षड् जघान निशाचरान् ।
निमेषांतरमात्रेण घोरैरग्निशिखोपमैः ॥ ११ ॥
ते तु रामेण बाणौघैर्लघुहस्तेन ताडिताः ।
युद्धादपसृतास्तत्र सावशेषायुषोऽभवन् ॥ १२ ॥
सुवर्णपुंखैर्विशिखैः संपतद्भिः समंततः ।
दिशश्चकार विमलाः प्रदिशश्च महाबलः ॥ १३ ॥
ये त्वन्ये राक्षसा वीरा रामस्याभिमुखे स्थिताः ।
तेऽपि नष्टाः समासाद्य पतंगा इव पावकम् ॥ १४ ॥

---

१ केंस धरून. २ राक्षसांच्या सैन्यांत. ३ चावून. ४ पृथ्वीवर. ५ घालिती. ६ मस्तक. ७ स्वारांसहित. ८ आकाशांत. ९ नांवाजलेले. १० वायबाण. ११ बोलबोलावून. १२ जात नाहीं.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

श्रीरामासीं करावया रण । नावानिगे जे प्रधान । युद्धा आले सहाही जण । कोण कोण ते ऐका ॥ ३४॥ महापार्श्व महोदर । वज्रदंष्ट्र महाकाय वीर । शुक सारण चतुर । सहाही दुर्धर युद्धार्थी ॥ ३५ ॥ निजसैन्याचा कडकडाट । महारथांचा घडघडाट । श्रीरामासंमुख उद्भट । वीर वरिष्ठ पैं आले ॥ ३६ ॥ येतां देखोनि सहाही जण । त्यांचा निःशेष घ्यावया प्राण । रामें सज्जिले सहा बाण । वेगविंदान तें ऐका ॥ ३७ ॥ सहाही जणीं धनुष्यातें । निर्वाणबाण सज्जिले तेथें । विंधों जातां श्रीरामातें । तंव रघुनाथें विंधिले ॥ ३८ ॥ त्यांचे छेदोनि चाप बाण । रथ सारथि करोनि चूर्ण । धुळी मेळवोनि सहाही जण । मुकुट छेदून पाडिले ॥ ३९ ॥ जरी ते रणीं न देती पाठी । राम मारिता जगजेठी । आयुष्य होतें अदृष्टीं । देवोनि पाठी पळाले ॥ ४० ॥ श्रीराम न मारी पळत्यातें । हें तिहीं पूर्वीं ऐकिलें होतें । वांचवावया जीवितातें । रणीं रामातें विमुख झाले ॥ ४१ ॥ पळतां देखोनि प्रधान । स्वयें हांसती वानरगण । तरी ते पलायमान । रामबाणाभेण सलज्ज ॥ ४२ ॥ पळालिया ते प्रधान । त्यांचे सेनानी आणि सैन्य । रामें केलें रणकंदन । दुर्धर बाण वर्षोनी ॥४३॥ सुवर्णकवची वीरश्रेणी । खिळोनि सांडिले धरणीं । असंख्य वीर शिरें छेदूनी । पाडिले रणीं हुंबतें[१] ॥ ४४ ॥ जो रणीं मिरवी हात । बाणीं होत शिरःपात । जो रणीं हांक देत । जिव्हा सदंत छेदी बाणें ॥ ४५ ॥ यापरी रामें रणांगणीं । धडमुंडांकित[३] केली धरणी । उरले ते जीव घेवोनी । गेले पळोनी लंकेसी ॥ ४६ ॥

ततः क्रोधसमाविष्टः शरवर्षेण रावणिः ।
अंगदस्य चमूं घोरां नाशयामास सर्वतः ॥ १५ ॥
ततः क्रोधपरीतात्मा युवराजोऽगदो बली ।
शिलामुत्पाटयामास बाहुभ्यां प्रणदन्मुहुः ॥ १६ ॥
तां समुत्क्षिप्य तेजस्वि छादयानः शरोर्मिभिः ।
रथं बभंज वेगेन शिलया कपिकुंजरः ॥ १७ ॥
वर्तमाने चातिरौद्रे संग्रामेऽतिभयंकरे ।
अंगदो विरथं कर्तुं रावणिं समुपाद्रवत् ॥ १८ ॥

इंद्रजित्तं रथं त्यक्त्वा हताश्वो हतसारथिः ।
अंगदेन महामायस्तत्रैवांतरधीयत ॥ १९ ॥

प्रधान पळाले त्वरान्वित । सैन्य भंगलें समस्त । ते काळीं इंद्रजित । अंगदसैन्यांत मिसळला ॥ ४७ ॥ इंद्रजित धनुर्वाडा चपळ । रागें वर्षत बाणजाळ । अंगदसैन्या हलकल्लोळ । रणकल्लोळ मांडला ॥ ४८ ॥ निजसैन्यासी आवर्त[४] । तेणें अंगद क्रोधान्वित । रणीं मर्दावया इंद्रजित । केला पुरुषार्थ तो ऐका ॥ ४९ ॥ पंचयोजनें सबळ शिळा । अंगद उचली बाहुबळा । त्याच्या छेदोनि बाणजाळा । सवेग शिळा सोडिली ॥५०॥ इंद्रजित विंधी अमित शर । परी ते शिळा दुर्निवार । धाकें सांडूनि रहंवरें[५] । पळे सत्वर इंद्रजित ॥ ५१ ॥ त्या शिळेच्या निजघातीं । रहितरथाश्वसारथी । इंद्रजित रणांगणीं विरथी । लाविली ख्याती अंगदें ॥ ५२ ॥ होतां शिळेचा संपात । तेणें मरावा इंद्रजित । परी तो राक्षस बुद्धिवंत । त्वरान्वित पळाला ॥ ५३ ॥ हताश्व हतसारथी । इंद्रजित रणांगणीं विरथी । धनुष्यबाणशस्त्रसंपातीं । शिळासंपातीं शतचूर्ण ॥ ५४ ॥ विरथी पळतां इंद्रजितासी । अंगदें धांवोनि धरिला केशीं । येरें कापून बुचड्यासी । लागवेगेंसीं पळाला ॥ ५५ ॥ अंधारीं पळतां गुप्तगती । अंगदें उडोनि धरितां हातीं । तंव तो अंतर्धानस्थितीं । खेचरगती[६] तडकला ॥ ५६ ॥ इंद्रजित पावतां अंतर्धान । अंगदें केलें गडगर्जन । निर्दाळून त्याचें सैन्य । बळवाहन परतला ॥ ५७ ॥ द्वंद्वयुद्ध आणि आतांचें रण । दोहीं रणकाळीं आपण । अंगदापुढें पलायमान । अति उद्विग्न इंद्रजित ॥ ५८ ॥ प्रथम मज गांजी हनुमंत । अंगदें दोनी वेळां येथ । जळो जळो माझा पुरुषार्थ । केलों हताहत वानरीं ॥ ५९ ॥ रणीं न जिंकवती वानर । कैंवी जिंकवे रामचंद्र । इंद्रजित स्वयें चिंतातुर । करी अभिचारें[७] शरबंधा ॥ ६० ॥ इंद्रजितासी शिववरदान । शिवाचें जें सर्पभूषण । तेंचि होवोनियां बाण । शरबंधन वीरांसी ॥६१॥ सर्प जे कां शिवभूषण । तेचि स्वयें होवोनि बाण । भलतैसा वीर विचक्षण । शरबंधीं जाण बांधिती ॥ ६२ ॥ केल्या

१ पाठमोरे. २ कुंथत. ३ धडांनीं व मस्तकांनीं चिन्हित.

४ संकट. ५ रथ. ६ आकाशगतीनें. ७ जारण मारण प्रयोग.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

तदर्थ आभिचारिक। रणीं होय फलोन्मुख। येरवीं तें निरर्थक । ऐसें देख शिववरदान ॥ ६३ ॥ यालागीं इंद्रजित आपण । करावया आभिचारिक यज्ञ । करिता होय यज्ञसाधन । विधिविधान तें ऐका ॥ ६४ ॥

स यज्ञभूम्यां विधिवत्पावकं जुहुतेऽस्त्रवित् ।
जुह्वतस्तस्य तत्राग्निं रक्तपीतांबरस्रजः ॥ २० ॥
आजहुस्तत्र सामग्रीं राक्षसा यत्र रावणिः ।
शस्त्राणि शतपत्राणि समिधश्च विभीतकाः ॥ २१ ॥
लोहितानि च वासांसि स्रुवं कार्ष्णायसं तथा ।
सर्वतोऽग्निं समास्तीर्य शतपत्रैः सतोमरैः ॥ २२ ॥
छागस्य चापि कृष्णस्य कंठं जग्राह जीवतः ।
शोणितं तत्र विधिवत्स जुहाव रणोत्सुकः ॥ २३ ॥

आरक्त वस्त्र आरक्त माळा । आरक्त शेंदुराचा टिळा । गोरोचनमणींच्या पीत माळा । घातल्या गळां यज्ञसिद्ध्यर्थ ॥ ६५ ॥ अभिचारहोमविधानीं । शस्त्रें मंथोनि काढिला अग्नी । रक्तचंदनइंधनीं । पेटविला वन्ही लखलखित ॥६६॥ अग्नि पेटवितां धूम निघे । तैं कर्त्यासी अपजयो लागे । विधूम ज्वाळा निघतां वेगें । तैं लागवेगें रणविजय ॥ ६७ ॥ आणिक तेथील यागविधान । उलूककर्कें परिसमूहन । शस्त्रांचें परिस्तरणें । करी आपण इंद्रजित ॥ ६८ ॥ राक्षसीं आणिले शस्त्रसंभार । इंद्रजित प्रोक्षी जपोनि मंत्र । परिस्तरणाचा प्रकार । शास्त्रविचार तो ऐका ॥ ६९ ॥ शतपत्रा शतघ्नी । खड्ग त्रिशूळ तोमर बाणीं । गदा मुद्गल गुप्तघ्नी । परिस्तरणीं हीं शस्त्रें ॥७०॥ तिखें काढिलें लोह गाळोनी । त्याच्या स्रुवा होमविधानीं । इंद्रजित करीं धरोनी । होमा अवदानी छागरक्ता ॥ ७१ ॥ ज्या छागासी पांढरा तिलक । तेणें यजमाना लागे सीक । निखळ कृष्णवर्ण देख । आवश्यक आणिला ॥ ७२ ॥ छाग मारोनि निघतां रक्त । होमसिद्धी ते विपरीत । शस्त्रास्त्र निर्जीव होत । नव्हे सामर्थ्य रणमारा ॥ ७३ ॥ यालागीं छाग जीवें जीत । त्याचे कंठींचें घेवोनि रक्त । इंद्रजित स्वयें होम करीत । जालें विपरीत तें ऐका ॥ ७४ ॥ इंद्रजित जपतां मंत्रमेळीं । त्याची वैसली दांतखिळी । स्वयें क्षोभली कंकाळी । क्रोधानुमेळीं वाग्देवी ॥ ७५ ॥ रणीं मारावा श्रीरघुनाथ । उच्चारितां हा मंत्रार्थ । वाग्देवता चळीं कांपत । तेणें वचनार्थ खुंटला ॥ ७६ ॥ श्रीराम जगाचें जीवन । श्रीराम परमात्मा चिद्घन । त्यासी नाहीं जन्ममरण । मंत्रोच्चारण खुंटलें ॥ ७७ ॥ श्रीराम जन्ममरणातीत । श्रीराम सबाह्य सदोदित । त्यासीं सर्वथा न चले घात । मंत्रीं मंत्रार्थ खुंटला ॥७८॥ मंत्रशक्ति जे कंकाळी । शिववरदानशक्ति शूळीं । दोघीं क्षोभोनि क्रोधानळीं । मंत्रार्थशैली खुंटली ॥ ७९ ॥ मंत्र नाठवे हृदयकमळीं । शब्द नुच्चारी जिव्हामूळीं । होमसिद्धीच्या निजकाळीं । माझी वचनावळी खुंटली ॥ ८० ॥ नाठवे मंत्रार्थ ना मंत्र । मुखीं नुच्चारे अक्षर । तेव्हां रावणज्येष्ठकुमर । दुःख दुर्धर पावला ॥ ८१ ॥ शिववरदेंशीं समर्थ । शरीं बांधावया श्रीरघुनाथ । जो जो केला म्यां पुरुषार्थ । तो तो व्यर्थ मज माझा ॥ ८२ ॥ होमसिद्धिकाळ प्राप्त । माझा खुंटला वचनार्थ । जिंकणें ठेला रघुनाथ । दुःखाभिभूत इंद्रजित ॥ ८३ ॥ न जिंकवे रघुकुळटिळक । इंद्रजितासी परम दुःख । विलपतसे अधोमुख । करी महाशंख अति दुःखें ॥८४॥ तें जाणोनि श्रीरघुनाथ । म्हणे इंद्रजिताचा पुरुषार्थ । केंवी बांधील शरबंधांत । तोही युद्धार्थ पाहूं पां ॥ ८५ ॥ स्वयें विचारी श्रीरघुनाथ । मी तंव जन्ममरणातीत । सौमित्र मरणेंसीं अलिप्त । शरबंधार्थभय काय ॥ ८६ ॥ शिववरद इंद्रजितासी । मिथ्या न करीं मी शिवासी । अंगीं साहेन शरबंधासी । शिववरदासीं सत्यत्वा ॥ ८७ ॥ माझा गेलियाही प्राण । मिथ्या न करीं शिववरदान । शरबंधाचें भय कोण । साहतां कठिण मज नाहीं ॥ ८८ ॥ प्राकृतीं भ्यावें शरबंधासी । त्याचें भय काय आम्हांसी । सत्य करीन शिववरदासी । शरबंधासी साहोनी ॥ ८९ ॥ ऐसें विचारोनि तत्त्वतां । राम वाग्देवतेची देवता । इंद्रजिताच्या वचनार्था । निर्मुक्तता श्रीरामें ॥९०॥ वाचा होतांचि निर्मुक्त । इंद्रजित जाला हर्षयुक्त । मंत्र आणि मंत्रबीजार्थ । हृदयीं समस्त प्रकटले

१ जारणमारणप्रयोग. २ रक्तचंदनाच्या लाकडांनीं. ३ धूररहित. ४ घुबडाच्या रक्तानें. ५ यज्ञकुंडाभोंवतीं उदक शिंपणें. ६ यज्ञकुंडाभोंवतीं दर्भ पसरणें. ७ शिंपडी. ८ पोलाद. ९ एकळांकडी यज्ञपात्र. १० बोकडाचें रक्त. ११ अति उग्र. १२ सामान्य जनांनीं.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ ९१ ॥ कृष्णछागाचें[1] घेवोनि रक्त । उग्रमंत्रीं मंत्रबीजार्थ । होम करितां विध्युक्त । साश्व रथ प्रकटला ॥ ९२ ॥ रथ देखतां सामग्रीसीं । अति उल्लास इंद्रजितासी । युद्ध करावया श्रीरामासीं । अति आवेशीं चालला ॥ ९३ ॥

आरुरोह रथं श्रेष्ठमंतर्धानचरं शुभम् ।
अवध्यवाजिभिर्युक्तं शस्त्रैश्च विविधैर्युतम् ॥ २४ ॥
समारोपितनेपथ्यं शस्त्रशक्तिसमन्वितम् ।
भल्लैस्तथार्धचन्द्रैश्च तूणीरैः समुपस्थितम् ॥ २५ ॥
जाज्वल्यमानं वपुषा तपनीयविभूषितम् ।
जांबूनदमयो नागस्तरुणादित्यसन्निभः ॥ २६ ॥
बभूवेंद्रजितः केतौ वैडूर्यसमलंकृतः ॥ २७ ॥

रथ होमीं नाहीं प्रकटला । कैंचा कैसा कोठून आला । मेघनादें[2] नाहीं लक्षिला । अवचट आला अभंग ॥ ९४ ॥ अभंग रथ अवध्य वारू[3] । वरी दिव्यास्त्रसंभारू[4] । ऐसा देखोनि रहंवरू[5] । रावणकुमरू उल्लासे ॥ ९५ ॥ रथीं शस्त्रांचा संभार । शतघ्नी शक्ती सहस्र । भाले परिघ चंद्रार्ध शर । बाण तूणीर शूळशक्ती ॥ ९६ ॥ ऐशी शस्त्रास्त्रांची संपत्ती । जिये रथीं असे पुरती । त्यासी नेपथ्य म्हणती । शास्त्रप्रयुक्तीं अभिधान ॥ ९७ ॥ ऐसा देखोनियां रथ । इंद्रजित करी होम समाप्त । रथीं बैसला उल्हासित । हर्षान्वित तेजस्वी ॥ ९८ ॥ सुवर्णाभरणीं सुशोभित । रथीं झळकत गजेंद्रकेत । तोही वैडूर्यसालंकृत । रथीं शोभत अति शोभा ॥ ९९ ॥ अभिचाराचा पुरुषार्थ । साधूनि इंद्रजित उल्हासित । हाता आल्या अभंग रथ । मग गर्जत स्वानंदें ॥ १०० ॥ अंतर्धानरथगती । न ये दुजियासी अभिव्यक्ती । निरालंब मार्गाप्रती । अतर्क्य शक्ति रथवेगा ॥ १ ॥

हुत्वाग्नौ राक्षसैर्मंत्रैस्ततो वचनमब्रवीत् ।
अद्य हत्वा वधार्हौ तौ मिथ्या संजल्पतौ रणे ॥ २८ ॥
जयं पित्रे प्रदास्यामि रावणाय मनःप्रियम् ॥ २९ ॥
निर्वाणबाणैर्विहतं राघवं सहलक्ष्मणम् ।
करिष्यामि ससुग्रीवमित्युक्त्वांतरधीयत ॥ ३० ॥

राक्षसविजयाचे निजमंत्र । होम करोनि अभिचार । अभंग पावलों रहंवर । विजयी सर्वत्र मी एक ॥ २ ॥ मारीन कपिकुंजरकोटी । सुग्रीव पाडीन उठाउठीं । निर्वानर करीन सृष्टी । तरी मी हट्टी इंद्रजित ॥ ३ ॥ आतां माझ्या प्रतापापुढें । श्रीराम कायसें बापुडें । रणीं मारीन रोकडें । फोडीन हाडें सौमित्राचीं ॥ ४ ॥ जटाधारी वल्कलपरिधान । कपटी दोघे राम लक्ष्मण । विंधोनियां वरद बाण । घेईन प्राण दोहींचा ॥ ५ ॥ घरींचा वैरी बिभीषण । त्याचें छेदीन नाक कान । एवढा करोनि अपमान । लंकाभुवन मग देखेन ॥ ६ ॥ श्रीरामाच्या संग्रामासी । परम आधि[6] रावणासी । रणीं मारून त्या दोघांसी । सुखी पित्यासी[7] करीन ॥ ७ ॥ आभिचारिकवरदवाणी । तेणें मी विजयी त्रिभुवनीं । इंद्रजित गर्जतां आल्हादोनी । आकाशवाणी तंव जाली ॥ ८ ॥ शिववरदाच्या सर्पबाणीं । राम जिंतिला शरवंधनीं । परी तो तुम्हांस मारील रणीं । दुर्धर बाणीं वर्षोनी ॥ ९ ॥ श्रीरामा साह्य शंकर । रामनाम जपे निरंतर । निजसर्पाचा बाणभार । स्वयें शंकर उखळील ॥ ११० ॥ मोकळे होवोनि राम सौमित्र । वर्षोनियां दुर्धर शर । रणीं पाडिती दशशिर । निशाचर निवर्टिती[8] ॥ ११ ॥ विकट वर्षोनियां बाण । रणीं पाडील कुंभकर्ण । तुज मारील लक्ष्मण । कुळनिर्दळण श्रीरामें ॥ १२ ॥ कुमर सेनानी[9] प्रधान । इतर चतुरंगसैन्य । श्रीराम करील रणकंदन । कुळनिर्दळण श्रीरामें ॥ १३ ॥ लंकाराज्यीं बिभीषण । श्रीराम स्थापील आपण । सीता श्रीरामें सुखसंपन्न । सत्य वचन हें मानीं ॥ १४ ॥ ऐकोनि आकाशवाणीची मात । चळीं कांपे इंद्रजित । अंतर्धानामाजी लपत । झणीं रघुनाथ मज देखे ॥ १५ ॥ शिववरदें समर्थ । प्रत्यक्ष रथ झाला प्राप्त । आकाशवाणी मिथ्याभूत । भय कोण येथ तियेचें ॥ १६ ॥ अशरीरी आकाशवाणी । जिव्हा नाहीं तिजलागूनी । जे बोलती मिथ्या काहाणी । कोण मानी सत्यत्वें ॥ १७ ॥ शिववरदाचे सर्पबाण । वृथा न वचती जाण । बाणीं मारीन राम लक्ष्मण । वानर-

१ काळ्या बोकडाचें. २ इंद्रजितानें. ३ घोडे. ४ दिव्य अस्त्रसमुदाय. ५ रथ. ६ मानसिक व्यथा. ७ रावण.

८ निर्मूळ करितील. ९ सेनापति.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

गणसमवेत ॥ १८ ॥ क्षणां भ्याकड क्षणां धाकड । इंद्रजितासी अति सांकडे । पुढील युद्धाचा पडिपाड । कथा अति गोड श्रीरामें ॥ १९ ॥ रामायणींचें गोडपण । स्वयें श्रीराम आपण । त्याचें चरित्र अति विंदाण । परम पावन शिवप्रिय ॥ १२० ॥ एका जनार्दना शरण । श्रीराम पाळी शिववरदान । साहोनियां शरबंधन । करील कंदन राक्षसां ॥ १२१ ॥ स्वस्ति श्री० युद्धकांडे एकाकारटीकायां शरबंधहोमविधानं नाम दशमोऽध्यायः ॥ १० ॥ ओंव्या ॥ १२१ ॥ श्लोक ॥ ३० ॥

अध्याय अकरावा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ पूर्वप्रसंगीं इंद्रजित वीर । होम करूनि अभिचार । शस्त्रें पावला रहंवर[3] । तेणें तो दुर्धर खवळला ॥ १ ॥ अभंग रथ अश्व अमर । रथीं दिव्यास्त्रसंभार । ऐसा पावोनि रहंवर । रणीं जावया निघाला ॥ २ ॥ बैसोनि तया रथावरी । अदृश्य इंद्रजित गगनांतरीं । येतां रणभूमीवरी । देखे झुंझारी नरवानर ॥ ३ ॥

स ददर्श महावीर्यस्तावुभौ रामलक्ष्मणौ ।
क्षिपंतौ शरजालानि कपिमध्ये व्यवस्थितौ ॥ १ ॥
स तु वैहायसं प्राप्य रथं तौ रामलक्ष्मणौ ।
आचचक्ष रणे तस्मिन्विव्याध निशितैः शरैः ॥ २ ॥
तौ तस्य शरवेगेन पतितौ भ्रातरावुभौ ।
गृहीत्वा धनुषी व्योम्नि घोरान्मुमुचतुः शरान् ॥ ३ ॥

देखिले राम लक्ष्मण वीर । वानरभार सहपरिवार । करिती निशाचरां मार । रणीं वानर खवळोनी ॥ ४ ॥ इंद्रजित नभीं रथस्थिती । राहोनियां अदृश्यगती । राम लक्ष्मण उभयमूर्ती । शरसंपातीं विंधिले ॥ ५ ॥ बाणीं वेढिले राम सौमित्र । बाणीं व्यापिलें अंबर[4] । बाण वर्षोनि दुर्धर । धरा[5] समग्र खिळियेली ॥ ६ ॥ गगनाहून अति दुर्धर । येतां देखोनियां शर । क्षोभोनि राम सौमित्र । धनुष्य सत्वर वाहिलें ॥ ७ ॥ पुढें लक्षेना लक्ष्य जाण । कशावरी विंधावे बाण । ऐसें लक्षितां रघुनंदन । ऐके गुणगुण राक्षसांची ॥ ८ ॥ आकाशीं अदृश्यगती । इंद्रजिताची परम शक्ती । स्वयें आल्हादें अनुवादती[6] । धरूं रघुपती शरबंधें ॥ ९ ॥ राम शब्दवेधी निपुण । अचुक बाणीं अनुसंधान । शब्दानुगती विंधोनि बाण । छेदी वदन वक्त्याचें ॥ १० ॥ वीर सांगती वाढिव लाठी[7] । शब्दासवें शर उठी । बाण भेदोनियां कंठीं । पाडी सृष्टीं राक्षसां ॥ ११ ॥ राक्षस गर्जती चर्वकोन[8] । गजरासवें विंधोनि बाण । शब्दवेधी रघुनंदन । करी कंदन राक्षसां ॥ १२ ॥ बाणीं त्रासिले देतां हांक । हांकेसवें बाण असंख्य । विंधोनियां एक एक । निर्दाळी कटक[9] शत्रूचें ॥ १३ ॥ वीरीं वानितां आंगवण । शब्दासवें विंधोनि बाण । जिव्हा सदंत छेदून । करी कंदन राक्षसां ॥ १४ ॥ घायवट[10] वीर कुंथतां जाण । कुंथासवें येवोनि बाण । त्यांचें कंठनाळ छेदून । करी कंदन राक्षसां ॥ १५ ॥ उंच करूं जातां गोष्टी । बाण येवोनि भरती कंठीं । बोंबलूं जातां पैं शेवटीं । सपिच्छ ओंठीं बाण भरती ॥ १६ ॥ इंद्रजितधनुष्याचा झणाण । ऐकोनियां रघुनंदन । नादासवें विंधोनि बाण । चाप छेदून पाडिलें ॥ १७ ॥ श्रीराम आहे शब्दवेधी । इंद्रजित जाणों सरला बुद्धी । बोलणें सांडोनि त्रिशुद्धी[11] । निःशब्दवादी राहिला ॥ १८ ॥ कांहीं बोलतां आपण । अंगीं वाजती श्रीरामबाण । वीरीं सांडून अनुवादन । महामौन राक्षसां ॥ १९ ॥ अदृश्यगती गुप्त गमन । तेथें येवोनि श्रीरामबाण । राक्षसांसी केलें कंदन । रघुनंदन दृढ योद्धा ॥ २० ॥ शब्दवेधें श्रीरामशर । येवोनियां अति दुर्धर । मारिले राक्षसांचे भार । श्रीरामचंद्र दृढ योद्धा ॥ २१ ॥ श्रीराम आहे शब्दवेधी । इंद्रजितें जाणोनि त्रिशुद्धी । तेणें कैसी केली बुद्धी । तोही विधी अवधारा ॥ २२ ॥ सैन्य सेनानी प्रधान । त्यांसी इंद्रजित सांगे आपण । येथोन धरावें दृढ मौन । बोलतां मरण रामबाणीं ॥ २३ ॥

नैव ज्यातलनिर्घोषो नापि नेमिखुरस्वनः ।
शुश्रुवे चरतस्तस्य न च रूपं स्म दृश्यते ॥ ४ ॥

---

१ संकट. २ प्रकार. ३ रथ. ४ आकाश. ५ पृथ्वी. ६ बोलूं लागले. ७ मोठी. ८ घाबरून. ९ सैन्य. १० जखमी. ११ खरोखर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

संविधायांधकाराणि मायाबलसमन्वितः ।
दिशश्चांतर्दधे वीरो नीहारतिमिरावृतः ॥ ५ ॥

राघवौ सूर्यसंकाशौ घोरैर्दत्तवरैः शरैः ।
बिभेद समरे क्रुद्धः सर्वगात्रेषु रावणिः ॥ ६ ॥

अवचट वारु हिंसल्या जाण । सवेग येती श्रीरामबाण । धाकें अश्वरसना बांधोन । रथचक्रें पूर्ण वाजों नेदी ॥ २४ ॥ निःशब्दवादें निशाचर । वाजों न देती अश्वांचे खुर । अंधारीं देखणा श्रीरामचंद्र । झांकी स्वशरीर धुंईमाजी ॥ २५ ॥ करोनि अविद्याअभिचार । धुई उठली दुर्धर । गुडुप दाटलें कुंहर । इंद्रजित वीर त्यामाजी विचरे ॥ २६ ॥ जैसे अपर दिवांकर । तैसे राम सौमित्र वीर । त्यांवरी इंद्रजित वर्षे शर । रामसौमित्र लक्षोनी ॥ २७ ॥ अंधारीं दाटलें कुहर । त्यांत कपटी इंद्रजित वीर । गगनींहूनि वर्षे शर । अति दुर्धर कोपोनी ॥ २८ ॥

तौ हन्यमानौ नाराचैर्धारामिरिव पर्वतौ ।
हेमपुंखान्नरव्याघ्रौ घोरान्मुमुचतुः शरान् ॥ ७ ॥

अंतरिक्षत्वमासाद्य ते रिपुं कंकवाससः ।
निपेतुरुर्व्यां विशिखाः शराः शतसहस्रशः ॥ ८ ॥

लक्ष्मण आणि रघुनाथ । निशाचरें विंधिले अत्यद्भुत । धारांवर्षी जैसे पर्वत । तैसे बाणांत झांकोळले ॥ २९ ॥ देखोनि शत्रूची शरवृष्टी । लक्ष्मण वीर जगजेठी । धनुष्य सज्जोनि निजमुष्टीं । सावधदृष्टीं विंधीत ॥ ३० ॥ श्रीराम नित्यसावधान । येतां इंद्रजिताचे बाण । निजबाणीं ते छेदून । पाडिले पूर्ण दुखंडी ॥ ३१ ॥ एक दोन पांच सात । शत सहस्र असंख्यात । बाण छेदिले समस्त । सूक्ष्मलक्ष्यार्थें श्रीरामें ॥ ३२ ॥ धन्य धनुर्वाडा श्रीरामराणा ! सूक्ष्मदृष्टीचा देखणा । लक्षून इंद्रजिताच्या बाणां । छेदोनि जाणा पाडिलें ॥ ३३ ॥ अभिचाराचे वरद शर । रामें छेदिले समग्र । इंद्रजित म्हणे मर मर । रणीं रघुवीर नाटोपे ॥ ३४ ॥ रणीं जिंकावया रघुपती । इंद्रजित जावोनि शिवाप्रती । सर्पबाण शिववरदोक्ती । शीघ्रगती आणिले ॥ ३५ ॥

पन्नगैस्तु शरोद्भूतैं रावणिः प्रहसन्रणे ।
अतिमात्रशरौघेन पीडयामास राघवौ ॥ ९ ॥

तानिषून्पततो भल्लैरनेकैर्निचकर्ततुः ।
तेन विद्धाश्च हरयो निहताश्च गतासवः ॥ १० ॥

राघवार्थे परिक्रांता धरण्यामुपशेरते ।
लक्ष्मणस्तु सुसंक्रुद्धः क्रोधादद्भुतमब्रवीत् ॥ ११ ॥

ब्राह्ममस्त्रं प्रयोक्ष्यामि वधार्थे सर्वरक्षसाम् ॥ १२ ॥

सर्प जे कां शिवभूषण । तेचि स्वयें होवोनि बाण । करावया श्रीरामा शरबंधन । विंधी गर्जोन इंद्रजित ॥ ३६ ॥ शिवाचे शिववरद बाण । त्यांसी राम न करी निवारण । मिथ्या होऊं नेदी शिववचन । निजांगें बाण खडंतरतां ॥ ३७ ॥ जीव जाईल तरी जावो । परी शिववचन मिथ्या न होवो । ऐसा श्रीरामाचा भावो । बाणवर्षाव स्वयें साहे ॥ ३८ ॥ वानर वीर भिडतां रणीं । मूर्च्छित पडियेले धरणीं । तेही विंधोनियां बाणीं । रामकारणीं देहत्याग ॥ ३९ ॥ श्रीरामाच्या निजकार्यार्था । वानरीं वेंचितां जीविता । अधिकाधिक उल्लासता । पाय मागुता न काढिती ॥ ४० ॥ देह वेंचितां रामकार्यार्थी । ठाकठोक ब्रह्मप्राप्ती । पळोनि जातांचि मागुती । अधोगति नरकांत ॥ ४१ ॥ पळोनि जातां ऐसें घडे । श्रीरामसेवे अंतर पडे । भुक्तिमुक्तींसीं कीर्ति उडे । नरकीं पडे आकल्प ॥ ४२ ॥ निधडी वानरांची आंगवण । श्रीरामकाजीं वेंचिती प्राण । आम्हांसी नाहीं जन्ममरण । ब्रह्मप्राप्ती पूर्ण सुगमत्वें ॥ ४३ ॥ ऐसिया निर्धारसंनिष्ठी । वानरवीर कोट्यनुकोटी । सुखें साहती शरवृष्टी । राम दृष्टीं लक्षोनी ॥ ४४ ॥ पडिले देखोनि वानरगण । निजअंगीं खडतरतां बाण । अति क्रोधें लक्ष्मण । श्रीरामीं आपण बोलत ॥ ४५ ॥ पडिले आमुचे वानरगण । अंगीं भेदती दुर्धर बाण । तुजही रुपले शर दारुण । उगाचि आपण काय पाहसी ॥ ४६ ॥ मारावया राक्षसांसी । ब्रह्मास्त्र आहे मजपासीं । श्रीराम

१ खिंकाळल्यास. २ घोड्यांच्या लगामी. ३ धुक्यामध्यें. ४ पोकळी. ५ फिरे. ६ सूर्य. ७ पर्जन्यवृष्टीनें. ८ धनुर्धर.

९ तावडतोब. १० खोंचतां. ११ दृढनिश्चयानें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

म्हणे लक्ष्मणासी । होईल जगासी प्राणान्त ॥४७॥ इंद्रजितअपराधासाठीं । मारूं नये सकळ सृष्टी । दीन जन कोट्यनुकोटी । वृद्धें धाकुटीं मरतील ॥ ४८ ॥ अंडजजरायुजादि जीवांला । चराचरां भूतां सकळां । नाश होईल स्त्रियां बाळां । अस्त्रसमेळां प्रळयान्त ॥ ४९ ॥ ऐसें अस्त्राचें महिमान । प्राणांतें करूं नये प्रेरण । आणिक एक माझें वचन । सावधान अवधारीं ॥ ५० ॥ शिववरदाचे सर्पबाण । सर्वथा छेदूं नयेति आपण । मिथ्या करितां शिववचन । परम दूषण आम्हांसी ॥ ५१ ॥ आम्ही शिवाचे निजभक्त । मिथ्या करूं नये शिववरदार्थ । हाचि आमुचा परमार्थ । मुख्य पुरुषार्थ या नांव ॥ ५२ ॥ विचारितां मूळान्वयीं । मज तुज दोघां मरण नाहीं । शिववरदबाण साहतां देहीं । भय कायी आम्हांसी ॥ ५३ ॥ यालागीं शिववरदबाण । स्वयें साहावें शरबंधन । ऐसें सांगतां रघुनंदन । पावली खूण लक्ष्मणा ॥ ५४ ॥ प्रतिपाळावा शिववरदार्थ । दोघांचें एक हृद्गत । पुढील कथेचा कथार्थ । सावचित्त अवधारा ॥ ५५ ॥

ततस्तौ राघवौ वीरौ सर्वमर्मातिगैः शरैः ।
भृशमावेदयांचक्रे रावणिः समितिंजयः ॥ १३ ॥
सरामं लक्ष्मणं चैव घोरैर्दत्तवरैः शरैः ।
बिभेद समरे क्रुद्धः सर्वगात्रेषु रावणिः ॥ १४ ॥
तौ संप्रचलितौ वीरौ वेधितौ मर्मभेदिभिः ।
निपेततुर्महेष्वासौ जगत्यां जगतीपती ॥ १५ ॥

ते काळीं इंद्रजित आपण । श्रीराम आणि लक्ष्मण । वर्मी विंधितां संपूर्ण । निःश्वासें बाण उडोनि जाती ॥ ५६ ॥ इंद्रजित वर्षे जे जे बाण । श्रीरामश्वासमात्रें जाण । वाहुटळीमाजी उडे तृण । तैसे उडोन शर जाती ॥ ५७ ॥ इंद्रजिताचे जे जे बाण । न करितां निवारण । श्वासमात्रें गेले उडोन । नव्हे सामान्य श्रीराम ॥ ५८ ॥ ज्यां विंधिले जे शर सत्राण । ज्याचे श्वासें उडती बाण । त्याचें सुटल्या शरसंधान । करील कंदन राक्षसां ॥ ५९ ॥ इंद्रजित क्षोभोनि दारुण । शिववरदाचे वरद बाण । रागें घेवोनि आपण । अति सत्राण विंधिले ॥ ६० ॥ शिववरद वदे सम्यक । शरबंधनीं रघुकुळटिळक । राक्षस येतां संमुख । छेदील मस्तक निमेषार्धे ॥ ६१ ॥ शरबंधनीं सर्पबाण । करिती श्रीरामाचें स्तवन । राम शरबंधीं सावधान । सत्य जाणे इंद्रजित ॥ ६२ ॥ शिववरदाचे वरद शर । तिंहीं भेदिले राम सौमित्र । बाणें खिळिलें गात्रेंगात्र । प्रवाहे रुधिर धरणीसीं ॥ ६३ ॥ शिववरदाचे वरद बाण । अंगीं रुपतां राम लक्ष्मण । स्वयें न करिती निवारण । आंगवण असतांही ॥ ६४ ॥ किंशुकें फुलले वसंतीं । तैसे दोघे शेंदुराकृती । अशुद्धें बंबाळले शोभती । रघुपती सौमित्र ॥ ६५ ॥ वर्मी भेदले वरद बाण । तेणें दोघे कंपायमान । श्रीराम आणि लक्ष्मण । मूर्च्छापन्न ते पडिले ॥ ६६ ॥ सौमित्र आणि श्रीराममूर्ती । जगतीं पडिले जगतपती । ते काळीं स्वयें क्षिती । जाली मृद्धती पुष्पप्राय ॥ ६७ ॥ अंगीं खडतरले बाण । लागती जैसे चंद्रकिरण । श्रीराम आणि लक्ष्मण । सावधान शरबंधीं ॥ ६८ ॥

पतितः प्रथमं रामः शरतल्पे निपीडितः ।
पुनश्च लक्ष्मणो वीरो निश्चेष्टो धरणीं गतः ॥ १६ ॥
पश्चात्स राक्षसेंद्रो वै बबंध शरपंजरे ।
नालीकैरर्धनालीकैर्भल्लैर्मुक्तैः सहस्रशः ॥ १७ ॥
नाराचैर्वत्सदंतैश्च सिंहदंष्ट्रैः शितैः शरैः ।
तौ तु वीरौ शरैर्बद्धौ राक्षसाः कामरूपिणः ॥ १८ ॥
युद्धचमानं न क्षमते शक्रोपि त्रिदशेश्वरः ।
द्रष्टुमासादितुं वापि न शक्तः किं पुनर्युवा ॥ १९ ॥

शरबंध शरतल्पाच्या ठायीं । प्रथम राम पाडिला पाहीं । सवेंचि लक्ष्मण तोही । भूमिशायी पाडिला ॥ ६९ ॥ इंद्रजित कपटी निशाचर । वरदबाणांचा शरपंजर । बांधले दोघे राम सौमित्र । गात्रेंगात्र खिळोनी ॥ ७० ॥ नाळीकसंख्या अरत्निमात्र । अर्धनाळीक वितस्तिशर । निकट वेधाचा पैं मार । अति दुर्धर जयाचा ॥ ७१ ॥ विद्युत्प्राय तेजाकार । भाळी धगधगीत वैश्वानर । त्यांहीं विंधोनि अपार । राम सौमित्र

१ पक्षी इत्यादिकांना. २ रक्त. ३ पळस. ४ रक्तानें. ५ मूर्च्छित होऊन. ६ पृथ्वी. ७ एका प्रकारचे बाण. ८ कोंपराएवढे. ९ वीतप्रमाणाचे. १० विजेसमान. ११ अग्नि.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

बांधले ॥ ७२ ॥ चांफेकळीच्या जैशा अग्रा । सगज भेदिती पाखरा । नाराच म्हणती तयां शरां । विंधिले अपार शरबंधा ॥ ७३ ॥ वत्सदंतांचिया परी । ज्या भाळींसी दोनी हारी । केल्या सतेज कुसरी । ऐसिया शरीं शरबंध ॥ ७४ ॥ भाळी ज्या कां अर्धचंद्रा । सिंहदंष्ट्रा अत्यंत उग्रा । शरबंधनीं श्रीरामचंद्रा । अति विचित्रा विंधिल्या ॥ ७५ ॥ श्रीराम आणि लक्ष्मण । शरबंधनीं बांधोनि पूर्ण । इंद्रजित स्वयें जाण । करी गर्जन तें ऐका ॥ ७६ ॥ पायां लागती सुरगण । अमरेंद्र जो आपण । त्यासीही अलक्ष्य युद्धमहिमान । आणिला बांधोन शरबंधें ॥ ७७ ॥ माझ्या युद्धाची गुप्तगती । पावों न शके अमरपती । तुम्ही दोघे मनुष्य किती । व्यर्थ मरणार्थी आलेती ॥ ७८ ॥ ऐकोनि इंद्रजिताचें वचन । खवळला स्वयें लक्ष्मण । श्रीरामा पुसत आपण । शरबंधन छेदावया ॥ ७९ ॥ मी तंव शेषावतार पूर्ण । निवारीन सर्पाद्भुतबाण । नरवानरां निर्बंधन । करीन जाण निमेषार्धें ॥ ८० ॥ देवोनियां फूत्कार । मारीन इंद्रजित निशाचर । बोहरी करीन लंकापुर । दशशिर निवटोनी ॥ ८१ ॥ राक्षसांच्या शिरकमळीं । आजी खेळेन चेंडुफळी । माजवीन रणकंकाळी । रणरवंदळी राक्षसां ॥ ८२ ॥ वाहती असृग्दांचे पूर । भूतें भक्षिती मांस रुधिरें । तृप्त होती श्येन घार । ऐसें चरित्र करीन ॥ ८३ ॥ आज्ञा देईं श्रीरामचंद्रा । ऐसें पुसतां सौमित्रा । हांसू आलें रघुवीरा । निजनिर्धारा सांगत ॥ ८४ ॥ प्रकट करितां शेषावतार । आम्हीं उच्छेदिलें वेदशास्त्र । उच्छेदिलें पुराणमात्र । अनागत चरित्र उच्छेदिलें ॥ ८५ ॥ उच्छेदिली धर्मनीती । उच्छेदिली लोकस्थिती । उच्छेदिली भगवद्भक्ती । ऐसी अपख्याती होईल ॥ ८६ ॥ बहुरूप्याचीं राव राणी । मिथ्या स्त्रीपुरुष जाणोनी । तेचि करिती संपादणी । स्त्रीपुरुषपणीं सत्यत्वें ॥ ८७ ॥ तैसेंच अवतारचरित्र । प्रतिपाळावें वेदशास्त्र । स्वधर्मलौकिकाचें सूत्र । अति तत्पर रक्षावें ॥ ८८ ॥ समूळ मूळींचें लक्षण । आम्हां दोघां नाहीं मरण । साहतां शिववरदाचे बाण । कठिण कोण सौमित्रा ॥ ८९ ॥ सौमित्रा ऐक सावधान । शिववरदाचें शरबंधन । आम्हांसी न बाधी अणुप्रमाण । सुप्रसन्न शिव आम्हां ॥ ९० ॥ ऐकोनि श्रीरामाचें वचन । मस्तकीं वंदोन श्रीरामचरण । लक्ष्मण घाली लोटांगण । काय आपण अनुवादे ॥ ९१ ॥ श्रीरामा तुझी अगाध स्थिती । श्रीरामा तुझी अगाध कीर्ती । श्रीरामा तुझी अगाध शांती । तेथें मी किती जाणावया ॥ ९२ ॥ जेथें वेदां मौन पडे । शास्त्रानुवाद न चले पुढें । तुझें महिमान अगाध गाढें । कैंवी मी वेडें अनुवादूं ॥ ९३ ॥ राम अभिमानीं निरभिमान । सगुण वर्ततां निर्गुण । देहीं असोनि विदेहपण । राम परिपूर्ण परब्रह्म ॥ ९४ ॥ ऐसें श्रीरामस्तवन । आल्हादें अनुवादोनि पूर्ण । शरबंधीं लक्ष्मण । पडे आपण रामाज्ञा ॥ ९५ ॥ लक्ष्मणाचा क्रोध अद्भुत । श्रीरामें करोनि शांत । दोघे जण शरबंधांत । पडिले दिसत निचेष्टित ॥ ९६ ॥ हातीं धनुष्य पाठीसीं भाते । सुवर्णपत्री बाण तेथें । पडिले देखोनि दोघांतें । इंद्रजितातें आल्हाद ॥ ९७ ॥ शरबंधीं स्वयें आपण । श्रीराम-आणि लक्ष्मण । बांधले सत्यत्वें मानून । इंद्रजितें पूर्ण वल्गिजे ॥ ९८ ॥ श्रीरामीं लागला शरबंध । इंद्रजितासी आल्हाद । निजपुरुषार्था करी अनुवाद । परमानंद जयाचा ॥ ९९ ॥ शिववरदाचें वचन । मिथ्या न करी लक्ष्मण । स्वयें सत्य मानून शरबंधन । केलें विंदानें तें ऐका ॥ १०० ॥ एका जनार्दना शरण । श्रीरामा लागलें शरबंधन । शिववरदाचे सर्पबाण । रामें आपण मानूनी ॥ १०१ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां श्रीरामशरबंधनं नाम एकादशोऽध्यायः ॥ ११ ॥ ओंव्या ॥ १०१ ॥ श्लोक ॥ १९ ॥

अध्याय बारावा

श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ शरबंधनीं बांधोनि रघुनाथ । इंद्रजित अतिशयें श्लाघत । तेचि अर्थीचा श्लोकार्थ । स्वयें वदत तें ऐका ॥ १ ॥

---

१ नाश. २ रक्ताचे. ३ आपला निश्चय. ४ पुढील. ५ रामाज्ञेनें. ६ स्वपराक्रमाचा. ७ नवलाई. ८ प्रौढी मिरवूं लगला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

इन्द्रजित्त्वात्मनः कर्म तौ शयानौ निरीक्ष्य च ।
उवाच परमप्रीतो हर्षयन्सर्वनैर्ऋतान् ॥ १ ॥
दूषणस्य च हन्तारौ खरस्य च महाबलौ ।
सादितौ मामकैर्बाणैर्भ्रातरौ रामलक्ष्मणौ ॥ २ ॥
नैतौ मोक्षयितुं शक्यौ चैतस्मादिषुबन्धनात् ।
सर्वैरपि समागम्य सर्पसंघैः सुरासुरैः ॥ ३ ॥
यत्कृते चिन्तयानस्य शोकार्तस्य पितुर्मम ।
अयं मूलमनर्थस्य सर्वेषां निहतो मया ॥ ४ ॥

शरबंधीं राम लक्ष्मण । दीर्घशयन अचेतन । पडिले देखोनि दोघे जण । इंद्रजितें आपण वल्गिंजे ॥ २ ॥ जिहीं मारिले खर दूषण । त्रिशिऱ्याचा घेतला प्राण । चौदा सहस्र राक्षसगण । विंधोनि बाण निवटिले ॥ ३ ॥ एकला श्रीराम पदाती । तेणें एवढी केली ख्याती । हें ऐकोनि लंकापती । अहोरातीं चळीं कांपे ॥ ४ ॥ श्रीरामाच्या प्रतापाभेण । सदा वोसणांवे रावण । ते दोघे राम लक्ष्मण । शरबंधीं पूर्ण म्यां पाडिले ॥ ५ ॥ अठ्ठ्यायशीं सहस्र ऋषिगण । शिव शक्र चतुरानन । मिळाल्या सुरासुर पूर्ण । शरबंधन सोडवेना ॥ ६ ॥ माझ्या शरबंधापासून । सोडवूं शके येथें कोण । शरबंधीं राम लक्ष्मण । दोघे जण संपूर्ण मारिले ॥ ७ ॥ इंद्रजित वीर जगजेठी । शरबंधाचे परिपाटीं । वानरवीर कोट्यनुकोटी । रणपरिपाटीं पाडिले ॥ ८ ॥ ज्यासी धाके लंकानाथ । ज्याचेनि लंकेसी आकान्त । तो म्यां मारिला रघुनाथ । वानरेंसहित सौमित्र ॥ ९ ॥ राक्षसवैराचें दृढ मूळ । राम लक्ष्मण वीर प्रबळ । प्राणान्त भेदोनि शरजाळ । केलें निर्मूळ वैराचें ॥ १० ॥ राहिली रणाची आटाआटी । सरल्या युद्धाचिया गोष्टी । राम लक्ष्मण वीर जगजेठी । शरसंकटीं पाडिले ॥ ११ ॥ वानरसमुदायसमवेत । रणीं जिंकिला रघुनाथ । रणीं विजयी इंद्रजित । निघे नगरांत आल्हादें ॥ १२ ॥ निजविजयाच्या भेरी । निशाणें त्राहाटिल्या मोहरी । वीर गर्जती जयजयकारीं । प्रवेश नगरीं आल्हादें ॥ १३ ॥ निजविजयाच्या गजरीं । शृंगारिली लंकापुरी । गुढिया मखरें घरोघरीं । डोलती अंबरीं पताका ॥ १४ ॥ सडे चौक रंगमाळा । अति आल्हाद राक्षसकुळा । इंद्रजितें जेत्यांचा सोहळा । पहावया डोळां आल्हाद ॥ १५ ॥

स इन्द्रजिन्महामायः सर्वसैन्यसमन्वितः ।
प्रविवेश पुरीं लंकां जीमूतमिव भास्करः ॥ ५ ॥
तत्र रावणमासीनमभिवाद्य कृतांजलिः ।
आचचक्षे प्रियं पित्रे निहतौ रामलक्ष्मणौ ॥ ६ ॥
उत्पपात ततो हृष्टः पुत्रं च परिषस्वजे ।
रावणो रक्षसां मध्ये श्रुत्वा शत्रू निपातितौ ॥ ७ ॥
मूर्ध्नि चैनमुपाजिघ्रन्पप्रच्छ प्रीतमानसः ।
प्रहसंस्तु ततस्तस्मै पित्रे वृत्तं न्यवेदयत् ॥ ८ ॥
सहर्षवेगानुगतांतरात्मा
श्रुत्वा गिरस्तस्य महारथस्य ।
जहौ ज्वरं दाशरथेः समुत्थं
प्रहृष्टवाचाभिननंद पुत्रम् ॥ ९ ॥

महाकपटी इंद्रजित । सकळसैन्यासमवेत । स्वयें प्रवेशे लंकेआंत । जेंवी भास्वत महाअभ्रीं ॥ १६ ॥ विजयवाद्यांच्या गजरीं । छत्रें पल्लवछत्रें शिरीं । विजयमान युग्मचामरीं । लंकापुरीं प्रवेशे ॥ १७ ॥ सिंहासनीं दशानन । त्यासी करोनि अभिवंदन । सखे बंधु सुहृज्जन । प्रिय प्रधान आलिंगी ॥ १८ ॥ सभे समस्तांदेखतां । बैसवोनि लंकानाथा । विजयसंग्रामाची कथा । होय सांगता इंद्रजित ॥ १९ ॥ करोनि शरबंधविंदान । प्रथम पाडिला रघुनंदन । सवेंचि पाडिला लक्ष्मण । वानरगण एक एक ॥ २० ॥ अंगद सुग्रीव जांबवंत । रणीं पाडिला हनुमंत । वानरवीर अति समर्थ । मारिले समस्त शरबंधें ॥ २१ ॥ ऐकोनि इंद्रजिताचें वचन । गर्जे रावण आल्हादोन । हरिखें करोनि उत्प्लवनें । दे आलिंगन पुत्रातें ॥ २२ ॥ वीस भुजीं आलिंगितां । धणी न पुरे लंकानाथा । पुनःपुन्हां मुख चुंबितां । अवघ्राही माथां आल्हादें ॥ २३ ॥ अनर्घ्य रत्नांचा अभिषेक । निजपुत्रासी करी दशमुख । रणीं विजयाचा हरिख । परम सुख लंकेशा ॥ २४ ॥ श्रीरामयुद्धाच्या आधीं । रावणा होती क्षय-

---

१ वल्गना केली. २ स्वप्नामध्यें बडबडतो. ३ इंद्र. ४ ब्रह्मदेव. ५ प्रकारें. ६ विजयी इंद्रजिताचा. ७ सूर्य. ८ मोठ्या ढगांत. ९ आनंदानें. १० उडी मारुन. ११ तृप्ती. १२ हुंगी.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

व्याधी । इंद्रजितानें ती त्रिशुद्धी । आधिव्याधी छेदिली ॥ २५ ॥ रणीं मारिले राम लक्ष्मण । ऐकोनि इंद्रजिताचें वचन । निसूर जाला रावण । शत्रू संपूर्ण निमाले ॥ २६ ॥ राम लक्ष्मण सहवानरीं । रणीं मारलियावरी । वैरी मज नाहीं संसारीं । निश्चय करी रावण ॥ २७ ॥ शरबंधीं राम सौमित्र । पडिले देखोनि वानरवीर । रक्षावया श्रीरामचंद्र । कपिकुंजर पावले ॥ २८ ॥

तस्मिन्प्रविष्टे लंकायां कृतार्थे रावणात्मजे ।
ररक्षुः परिवार्याथ राघवौ प्लवगर्षभाः ॥ १० ॥

हनूमानंगदो नीलः सुषेणः कुमुदो नलः ।
गजो गवाक्षः पनसः सानुप्रस्थो महाहरिः ॥ ११ ॥

जांबवानृषभः सुंदो रंभः शतबलिः पृथुः ।
व्यूढानीकाश्च यत्ताश्च द्रुमानादाय सर्वतः ॥ १२ ॥

इंद्रजित विजयगजरा । प्रवेशला लंकापुरा । शरबंधीं श्रीरामचंद्रा । रक्षण वानरां अति यत्नें ॥ २९ ॥ शरबंधीं राम सौमित्र । संरक्षणीं वानरवीर । पावले पैं थोर थोर । परम शूर वाढिवा ॥ ३० ॥ हनुमंत अंगद आणि नीळ । सुषेण कुमुद आणि नळ । सानुप्रस्थ वीर प्रबळ । रणकल्लोळ शतबळी ॥ ३१ ॥ गज गवाक्ष पनस रंभ । जांबवंत ऋषभ शरभ । पृथु वानर स्वयें सुप्रभ । सैन्यसमारंभ सज्ज केला ॥ ३२ ॥ राम पाडिला शरपंजरीं । भोंवत्या वानरांच्या हारी । द्रुमपाणी महावीरीं । सैन्यसंभारीं रक्षण रामा ॥ ३३ ॥ राम सौमित्र शरपंजरीं । विकळ देखिले वानरीं । यालागीं मिळोनि महावीरीं । शिळाशिखरीं सन्नद्ध ॥ ३४ ॥ वानरवीर श्रेष्ठ श्रेष्ठ । रामरक्षणीं अति सचिष्ट । वारया वाहों न शके वाट । व्यूह दुर्घट तिहीं केला ॥ ३५ ॥

रामलक्ष्मणयोर्दृष्ट्वा शरीरे सायकैश्चिते ।
वानरेंद्रस्य संजातं सुग्रीवस्य महद्भयम् ॥ १३ ॥

तमुवाच परित्रस्तं वानरेंद्रं विभीषणः ।
सबाष्पवदनं दीनं क्रोधव्याकुललोचनम् ॥ १४ ॥

अलं त्रासेन सुग्रीव बाष्पवेगो निगृह्यताम् ।
एवंप्रायाणि युद्धानि विजयो नास्ति नैष्ठिकः ॥ १५ ॥

सभाग्यशेषतास्माकं यदि वीर भविष्यति ।
मोहादेतौ विमुच्येते भ्रातरौ रामलक्ष्मणौ ॥ १६ ॥

शरबंधीं राम सौमित्र । बाणें भेदिलीं गात्रेंगात्र । रिता ठाव नाहीं तिळमात्र । पडिले वीर निचेष्टित ॥ ३६ ॥ ऐसें देखोनि दोघांसी । भय त्रास सुग्रीवासी । अश्रु स्रवती लोचनांसी । उकसाबुकसीं स्फुंदत ॥ ३७ ॥ शरबंधाच्या बंधनीं । मुख्य धुरा निमाल्या दोनी । गुह्य बिभीषणा सांगोनी । तळमळोनी विलपत ॥ ३८ ॥ सिद्धि न पवेचि कार्यार्थ । व्यर्थ गेला माझा पुरुषार्थ । रणीं निमाला श्रीरघुनाथ । विलपत अति दुःखें ॥ ३९ ॥ भाक दिधली श्रीरामचरणीं । सीता आणीन वंदीपासोनी । राम निमाला शरबंधनीं । श्रीरामऋणीं मी उरलों ॥ ४० ॥ श्रीराम गेला परलोकासी । सवें नेलें लक्ष्मणासी । ऋण फेडावें कोणापासीं । अति दुःखेंसीं विलपत ॥ ४१ ॥ रणीं मारोनि लंकेशासी । सोडवून आणिल्या सीतेसी । ते पुसेल श्रीरामासी । मुख तीपासीं काय दावूं ॥ ४२ ॥ रडत पडत अति निर्दैव । म्हणाल नपुंसक सुग्रीव । राम अंतरला जीवींचा जीव । प्रताप दावूं कोणासी ॥ ४३ ॥ माझ्या अंगीं अति पुरुषार्थ । क्षणें निर्दाळीन लंकानाथ । रणीं उपटीन इंद्रजित । तरी रघुनाथ न भेटे ॥ ४४ ॥ रणीं निमाला श्रीरघुनाथ । ऐसा मानोनि इत्यर्थ । श्रीरामदुःखें दुःखाभिभूत । सुग्रीव प्राणान्त करूं पाहे ॥ ४५ ॥ श्रीरामामागें राहणें । तें तंव मज निंद्य जिणें । रामविरहें प्राण देणें । याकारणें उद्यतें ॥ ४६ ॥ त्यासी बिभीषण संबोखितें । नाहीं निमाला रघुनाथ । समूळ न घेतां वृत्तान्त । व्यर्थ प्राणान्त कां करिसी ॥ ४७ ॥ चाल पाहों शरबंधांत । श्रीराम निमाला कीं जित । समूळ घेवोनि इत्यर्थ । मग कार्यार्थ विचारूं ॥ ४८ ॥

एवमुक्त्वा ततस्तस्य जलक्लिन्नेन पाणिना ।
सुग्रीवस्य शुभे नेत्रे प्रममार्ज बिभीषणः ॥ १७ ॥

विमृज्य वदनं तस्य कपिराजस्य धीमतः ।
अब्रवीत्कालसंप्राप्तमसंभ्रांतमिदं वचः ॥ १८ ॥

१ निर्भय, २ हातांत वृक्ष घेतलेले असा. ३ गळूं लागले. ४ तयार. ५ समजूत करूं लागला,

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

तस्मादुत्सृज्य वैक्लव्यं सर्वकार्यविनाशनम् ।
हितं रामपुरोगाणां सैन्यानामनुचिंतय ॥ १९ ॥

अथवा रक्ष्यतां रामो यावत्संज्ञाविपर्ययः ।
लब्धसंज्ञौ हि काकुत्स्थौ भयं नौ व्यपनेष्यतः ॥ २० ॥

सुग्रीवासी संबोखून । जलहस्तें बिभीषण । त्याचे नेत्र परिमार्जून । हितवचन अनुवादे ॥ ४९ ॥ तूं तंव राजा वानरनाथ । तुज देखोनियां रडत पडत । इंद्रजित येवोनि त्वरित । करील घात सर्वांचा ॥ ५० ॥ श्रीरामाच्या हितकार्यार्थी । प्रवर्तावें गा तत्त्वतां । येवों न द्यावी विकळता । संरक्षितां श्रीरामा ॥ ५१ ॥ श्रीराम होईल सावधान । त्रिसत्य सत्य माझें वचन । विकल्प न धरावा आपण । ऋषिभाषण वाल्मीकी ॥५२॥ सेना सैनिक प्रधान । मेळवोनि वानरगण । श्रीराम रक्षावा आपण । सावधान जंव होय ॥ ५३ ॥ सावध जाल्या रघुनाथ । करील रावणाचा घात । इंद्रजितकुंभकर्णासमवेत । रणीं प्राणान्त राक्षसां ॥ ५४ ॥ राक्षसांची जाती व्यक्ती । उरों नेदी रघुपती । सकळ भयाची समाप्ती । जाण निश्चितीं श्रीरामें ॥ ५५ ॥ सुग्रीव आणि बिभीषण । ऐकोनि दोहींचें अनुवादन । अंगद झाला हास्यवदन । श्रीराममहिमान अलक्ष्य ॥ ५६ ॥ श्रीरामनामाच्या स्मरणीं । जन्ममरणा समूळ पळणी । तो राम पडला शरबंधनीं । सत्य मानी तो मूर्ख ॥ ५७ ॥ शस्त्रघात लागल्या स्वप्नीं । तेणें जागृतीं न मरे कोणी । तेंवी राक्षसशरबंधनीं । श्रीराम रणीं कैंवी पडे ॥ ५८ ॥ राम काळाचा कृतान्त । राम जन्ममरणातीत । राम परब्रह्म सदोदित । त्यासी रणघात कैंवी घडे ॥ ५९ ॥ श्रीराम जगाचें जीवन । राम सर्वांगें चैतन्यघन । राम शस्त्रांचें तिखटपण । त्यासी लागती बाण हें कदा न घडे ॥ ६० ॥ राम अवतारी ब्रह्म पूर्ण । त्यासी नाहीं जन्ममरण । त्याचे अंगीं लागोनि बाण । पावला निधन तें मिथ्या ॥ ६१ ॥ राम चैतन्यविग्रही । राम देहींच विदेही । श्रीरामासी द्वंद्वबाधा नाहीं । पडिला घायीं तें मिथ्या ॥ ६२ ॥ करितां रामनामस्मरण । मरणासी ये अलोट मरण । त्या श्रीरामा लागोनि बाण । निमाला पूर्ण तें मिथ्या ॥ ६३ ॥ शरबंधनीं रघुनंदन । चित्स्वरूपें सावधान । राम बंधनीं निर्बंधन । हें मुख्य लक्षण रामाचें ॥ ६४ ॥ राम शरबंधनीं बंधातीत । तरी कां पडोन राहिला तेथ । त्याही अर्थींचा वृत्तान्त । सावचित्त अवधारा ॥ ६५ ॥ शिववरदाचे वरद बाण । मिथ्या न करी रघुनंदन । स्वयें साहोनि शरबंधन । शिववरदान प्रतिपाळी ॥ ६६ ॥ ऐसी श्रीरामाची मूळकथा । अंगद सांगे आल्हादता । तेणें उल्हास हनुमंता । सप्रेमता आलिंगी ॥ ६७ ॥ परम प्रीतीं पाठी थापटी । श्रीरामस्वरूपकसवटी । अंगदाची गोड गोष्टी । सकळां पोटीं आल्हाद ॥ ६८ ॥ श्रीरामासी नाहीं मरणावस्था । श्रीरामीं नाहीं विकळता । कोण पाड इंद्रजिता । मज हनुमंता असतांही ॥ ६९ ॥ ऐकोनि हनुमंतउत्तर । उल्लासलें स्वयें वानर । अवघे करिती जयजयकार । हर्षें निर्भर सुग्रीव ॥ ७० ॥ येरीकडे स्वयें रावण । सीता वश करावया आपण । रणीं निमाले राम लक्ष्मण । संक्षेपें श्रवण स्वयें करवी ॥ ७१ ॥

राक्षसस्त्रिजटा चापि शासनात्तमुपस्थिताः ।
ता उवाच ततो हृष्टो राक्षसी राक्षसेश्वरः ॥ २१ ॥

हताविंद्रजिताख्यातौ वैदेह्या रामलक्ष्मणौ ।
पुष्पकं तां समारोप्य दर्शयध्वं रणे हतौ ॥ २२ ॥

यस्याश्रयादवष्टब्धा सीता मां नोपतिष्ठते ।
सोऽस्या भर्ता सह भ्रात्रा निहतो रणमूर्धनि ॥ २३ ॥

त्रिजटा वृद्ध राक्षसी । साक्षेपें पाचारोनि तिसी । रावण सांगे तियेसी । अति उल्लासीं गर्जोनी ॥ ७२ ॥ इंद्रजितानें करोनि रण । रणीं मारिले राम लक्ष्मण । ऐसें सीतेसी सांगोनि आपण । करवीं दर्शन दोहींचें ॥ ७३ ॥ सीता पुष्पकीं वाहोनि जाण । तिसी दाखवीं रणांगण । जेथें पडले राम लक्ष्मण । विंधोन बाण शरबंधीं ॥ ७४ ॥ श्रीरामबळें तत्त्वतां । मज दृष्टीं नाणी सीता । त्या मारिलें रघुनाथा । सहित भ्राता सौमित्र ॥ ७५ ॥ रणीं मारिलें रघुकुळटिळका । सीते सांडोनि समूळ शंका । उल्लासें वरीं लंकानाथा । सकळ सुखा पावसी ॥ ७६ ॥

---

१ पुसून. २ बोलूं लागला. ३ विनाशक. ४ युद्धांत नाश. ५ आधार. ६ मृत्यु. ७ ज्ञानस्वरूपी. ८ पर्वा. ९ प्रयत्नानें. १० पुष्पकनामक विमानांत.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

विमानं पुष्पकं सीतां शनैरारोपयन्शुभम् ।
रावणः कारयन्लंकां पताकाध्वजमालिनीम् ॥ २४ ॥
घोषयामास च तदा स्वपुर्यां राक्षसेश्वरः ।
हताविंद्रजिता संख्ये तावुभौ रामलक्ष्मणौ ॥ २५ ॥
विमानेन तु सा सीता तदा त्रिजटया सह ।
ददर्श वानराणां तु सर्वसैन्यं निपातितम् ॥ २६ ॥
ततः सीता ददर्शोभौ शयानौ शरतल्पगौ ।
लक्ष्मणं चैव रामं च विसंज्ञौ शरपीडितौ ॥ २७ ॥
तौ दृष्ट्वा भ्रातरौ तत्र शोकबाष्पसमाकुला ।
वेपंती दुःखिता सीता करुणं विललाप ह ॥ २८ ॥

सीता वाहोनि विमानीं । त्रिजटा निघाली घेवोनी । तंव रावण लंकाभुवनीं । गुढिया उभवोनी हरिखेंजे ॥ ७७ ॥ इंद्रजितानें विंधोनि बाण । रणीं पाडिले रामलक्ष्मण । भेरी त्राहाटिल्या निशाण । गडगर्जन लंकेसी ॥ ७८ ॥ राम मारिला निशाचरीं । अनुवादती नरनारी । वानरांच्या मारिल्या हारी । बहु बाणाग्रीं विंधोनी ॥ ७९ ॥ वानरांचें निवास[१]-स्थान । देखिलें चालतां विमान । रणीं पडिले राम लक्ष्मण । रणांगण देखिलें ॥ ८० ॥ श्रीराम आणि सौमित्र । पडिले क्षितितळीं[२] महावीर । बाणीं भेदलें गात्रेंगात्र । प्रवाहे रुधिर सर्वांगीं ॥ ८१ ॥ देखोनि श्रीरामदर्शन । सीता हरिखली संपूर्ण । धन्य धन्य रावणच्छळण । श्रीरामनिधान[३] देखिलें ॥ ८२ ॥ रावणाचा कृतोपकार । हा मज आजि घडला थोर । स्वयें भेटविला श्रीरामचंद्र । दशशिर कृपाळू ॥ ८३ ॥ विमानींहून आपण । हरिखें घाली लोटांगण । देखतां श्रीराम लक्ष्मण । सुख संपूर्ण सीतेसी ॥ ८४ ॥ देखोनि श्रीरामावस्था । अवघें मिथ्या मानी सीता । राक्षसमाव हे तत्त्वतां । मृत्यु रघुनाथा असेना ॥ ८५ ॥ ऐकतां रामनामगजर । मृत्यु पळे अति सत्वर । न येववे रामनामासमोर । श्रीरामचंद्र न मारवे ॥ ८६ ॥ राम काळाचा आकळिता । त्यासी नाहीं मरणावस्था । रणीं मारिलें रघुनाथा । मिथ्या वार्ता मायिक ॥ ८७ ॥ श्रीराम शस्त्राची निजशक्ती । श्रीराम गतीची निजगती । श्रीराम जगदात्मा त्रिजगतीं । शस्त्रसंपातासीं[४] अलिप्त ॥ ८८ ॥ शस्त्रें छेदितां आकाशासी । शस्त्रें वृथा जाती आपैसीं । तैसीच गति श्रीरामासी । शस्त्रघातासीं अलिप्त ॥ ८९ ॥ श्रीराम निजांगें आपण । सकळ शस्त्रांचें तिखटपण । त्याच्या अंगीं रुपले बाण । वृथा विंदान मायिक ॥ ९० ॥ श्रीरामाच्या स्वस्वरूपासीं । ठाव नाहीं जन्ममृत्यूंसी । त्या मारिलें श्रीरामासी । वृथा राक्षसी अनुवाद ॥ ९१ ॥ निजनिश्चयें तत्त्वतां । मरण नाहीं श्रीरघुनाथा । येणें निश्चयें असतां सीता । न बाधे व्यथा अणुमात्र ॥ ९२ ॥ श्रीराम शिव सीता शक्ती । येरयेरांच्या जाणती गती । तेही लोकरक्षणार्थी । असे विलपती तें ऐका ॥ ९३ ॥ माझ्या सर्वांगीं शुभलक्षण । मज न यावें वैधव्यपण । रणीं मारिल्या रघुनंदन । अवलक्षण लक्षणें ॥ ९४ ॥ हातीं पद्म पायीं पद्म । टाळुमस्तकीं सौभाग्यपद्म । रणीं मारिल्या श्रीराम । पद्में अपद्म मज माझीं ॥ ९५ ॥ निजलक्षणें सीता सती । स्वयें असे अनुवादती । अति दुःखें विलपती । श्रीरघुपतिवियोगें ॥ ९६[६] ॥ सौभाग्यवती तूं संपूर्ण । वसिष्ठाचें आशीर्वचन । मिथ्या जालें त्याचें ज्ञान । रघुनंदन निमाल्या ॥ ९७ ॥ मजसीं श्रीरामा अभिषिंचनें[५] । ऐसें अगस्तीचें वचन । त्याचेंही मिथ्या झालें ज्ञान । रघुनंदन निमाल्या ॥ ९८ ॥ अनसूया पतिव्रता पूर्ण । निजसौभाग्य अर्पी आपण । तिचेंही उडालें सतीपण । रघुनंदन निमाल्या ॥ ९९ ॥ अरुंधती श्रेष्ठ नारी । तिणें मज दिधली गळसरी । श्रीराम निमालियावरी । तिचीही थोरी अति मिथ्या ॥ १०० ॥ विश्वामित्र वरद परम । नित्य सीतासौभाग्यसंभ्रम । त्याचाही मिथ्या वचनधर्म । रणीं श्रीराम निमाल्या ॥ १ ॥ हा राम हा लक्ष्मण । दीर्घ स्वरें करी रुदन । दिव्यास्त्र असतां पूर्ण । सर्वांगीं बाण वेधले कैसे ॥ २ ॥ सर्वांगीं खँडतरोनि[७] बाण । क्षितीं[८] लोळती राम लक्ष्मण । सीता आक्रंदें करोनि रुदन । काय आपण अनुवादे ॥ ३ ॥ रणीं निमाल्या राम लक्ष्मण । निःशंक मज गांजील रावण । मीही आतांच सांडीन प्राण । कांस संपूर्ण घातली ॥ ४ ॥ घालोनियां वज्रासन । अर्धोन्मीलित करोनि नयन । सबाह्य श्रीराम चिंतून । उदित प्राण त्यजावया ॥ ५ ॥ तंव त्रिजटा म्हणे सीतेसी । तूं काय जालीस परम

१ राहाण्याची जागा. २ पृथ्वीवर. ३ रामरूपी मोठा ठेवा. ४ शस्त्राच्या आघाताला. ५ राज्याभिषेक. ६ सीतासौभाग्याबद्दल उद्योग. ७ खोंचून. ८ जमिनीवर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

पिसी । स्वस्थ असतां श्रीरामासी । तूं कां त्यजिसी निजप्राण ॥ ६ ॥

परिदेवयतीं सीतां राक्षसी त्रिजटाब्रवीत् ।
मा विषादं कृथा देवि भर्तायं तव जीवति ॥ २९ ॥
कारणानि तु वक्ष्यामि महांति सदृशानि च ।
नैतौ शक्यौ रणे जेतुमपि सर्वैः सुरासुरैः ॥ ३० ॥
इदं विमानं वैदेहि पुष्पकं नाम नामतः ।
दिव्यं न धारयेत्त्वां हि यदि रामो हतो भवेत् ॥ ३१ ॥
त्यज शोकं च दैन्यं च दुःखं च जनकात्मजे ।
रामलक्ष्मणयोरर्थे नैतौ शूरौ विजीवितौ ॥ ३२ ॥

ऐकोनि सीतेचें रुदन । देखोनि प्राणान्त निर्वाणें । त्रिजटा बोले आपण । सीते सावधान अवधारीं ॥ ७ ॥ नाहीं निमाले राम लक्ष्मण । हें माझें सत्य भाषण । शरबंधीं सावधान । दोघे जण निजबोधें ॥ ८ ॥ दिव्यास्त्रें असती त्यांपाशीं । केंवी सांपडती शरबंधासी । त्याही समूळ कारणांसी । ऐक तुजपासीं सांगेन ॥ ९ ॥ इंद्रजितें करोनि अभिचार । प्रसन्न करोनि श्रीशंकर । शिववरदाचे सर्पशर । अति अनिवार मागीतले ॥ ११० ॥ शिववरद सम्यक । जातां श्रीरामासंमुख । तो तुझें छेदील मस्तक । अंधारीं लागे अतर्क्य शरबंध ॥ ११ ॥ माझ्या वरदबाणांस्तव आपण । शरबंधीं पडती दोघे जण । तुज संमुख गेलिया जाण । घेतील प्राण निमेषार्धें ॥ १२ ॥ शरबंधीं राम सौमित्र । सावधानत्वें निधडे शर । संमुख आल्या निशाचर । छेदिती शिर निमेषार्धें ॥ १३ ॥ ऐसिया शिववरदाभेण । कदा संमुख न ये रावण । इंद्रजित स्वयें न ये आपण । राक्षसगण न येती ॥ १४ ॥ सप्त प्रहर जाल्यापाठीं । सुटती शरबंधाच्या गांठी । दोघे उठती कडकडाटीं । राम जगजेठी अनिवार्य ॥ १५ ॥ आणीक आहे गुह्य गोष्टी । गरुड येईल श्रीरामभेटी । शरसर्प पळती उठाउठीं । दोघे जगजेठी निर्मुक्त ॥ १६ ॥ असत्य न वदे माझें वदन । पूर्वीं विटाळलें नाहीं जाण । पुढें न बोलें असत्य वचन । सत्य भाषण हें माझें ॥ १७ ॥ सीतासतीचे संगतीं । त्रिजटेसी ज्ञानस्फूर्ती । दृष्टीं देखिल्या रघुपती । विज्ञानस्थिति ठसावे ॥ १८ ॥ आणीक प्रत्यक्ष दृष्टांत । विधवास्पर्शें विमान पतित । हें तंव घडलें नाहीं येथ । तूं सौभाग्यवती श्रीरामें ॥ १९ ॥ निमला असता रघुनाथ । तरी हें विमान होतें पतित । तूं सौभाग्यभाग्यवंत । स्वस्थ रघुनाथ शरबंधीं ॥ १२० ॥ ज्यासी स्वभावें विमान प्राप्त । तो त्रैलोक्यीं होय समर्थ । तें विमान देत लंकानाथ । तूं सौभाग्यवंत भाग्याची ॥ २१ ॥ दाटून प्राप्त होय विमान । या भाग्याचें निजमहिमान । येथें गणूं शके कोण । तूं भाग्यपूर्ण श्रीरामें ॥ २२ ॥ शरपंजरीं श्रीराम स्वस्थ । सत्य मानून वचनार्थ । शोक दैन्य दुःखार्थ । सांडीं समस्त जानकीये ॥ २३ ॥ संरक्षणाचे अनुवृत्ती । त्रिजटेसी सीतासंगती । तेणें पावली ज्ञानस्फूर्ती । धन्य संगती संतांची ॥ २४ ॥ त्रिजटा केवळ सत्त्वमूर्ती । नाहीं असत्याची अनुवृत्ती । तेणें फळली संतसंगती । ज्ञानस्थितीं अनुवादे ॥ २५ ॥

श्रुत्वा च वचनं तस्याः सीता सुरसुतोपमा ।
कृतांजलिरुवाचेमामेवमस्त्विति मैथिली ॥ ३३ ॥
विमानं पुष्पकं तच्च सन्निवर्त्य मनोजवम् ।
दीना त्रिजटया सीता लंकां भूयः प्रवेशिता ॥ ३४ ॥
ततस्त्रिजटया सार्द्धं पुष्पकादवतीर्य सा ।
अशोकवनिकामेव राक्षसीभिः प्रवेशिता ॥ ३५ ॥

स्वस्थ श्रीराम लक्ष्मण । ऐकोनि त्रिजटेचें वचन । सीता जाहली सुप्रसन्न । स्वानंदें पूर्ण अनुवादे ॥ २६ ॥ जें अनुवादलीसी साजणी । तथास्तु हो तुझी वाणी । ऐसें सीता अनुवादोनी । श्रीरामदर्शनीं सादर ॥ २७ ॥ परतवितां विमान । श्रीरामाचें दूर दर्शन । सीता पाहे सावधान । प्रत्यंगीं मन न्यासूनी ॥ २८ ॥ ठाणमाणगुणलक्षण । सबाह्य श्रीरामलक्ष्मण । सीता निरखी आपण । सावधान पतिरूपीं ॥ २९ ॥ सबाह्य श्रीराम मूर्च्छापन्न । अंतरीं स्वयें सावधान । बाह्य अर्धोन्मीलित नयन । देखणा पूर्ण सर्वांगें ॥ १३० ॥ बाह्य श्रीरामा शरबंधन । अंतरीं बंधमोक्षविहीन । बाह्य रुधिरोक्षित मलक्लिन्न ।

१ वेडी. २ निश्चय. ३ शाबरी विद्याप्रयोग. ४ तत्काल. ५ संबंधानें. ६ बोललीस. ७ खरी ठरो. ८ ठेऊन.

९ सुंदर. १० रक्तानें माखलेला. ११ मळानें भिजलेला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

अंतरीं निर्मळ निर्गुणत्वें ॥ ३१ ॥ बाह्य विकळतां रघुपती । अंतरीं सावध सर्वां भूतीं । बाह्य पडला दिसतो क्षितीं । गुणातीतीं विश्रांत ॥ ३२ ॥ लक्षितां श्रीरामठाणमाण । वेदशास्त्रां पडे मौन । माजी हरपे गगन गहन । त्याचेंही महिमान कोण वर्णी ॥ ३३ ॥ ऐसें देखोनि रघुनाथा । आपआपणा विसरे सीता । सबाह्य कोंदली स्वरूपता । पतिपरमार्था देखोनी ॥ ३४ ॥ छळूं जातां स्वयें रावण । छळणीं श्रीराम सुप्रसन्न । देवोनि निजात्मदर्शन । सुखसंपन्न मज केलें ॥ ३५ ॥ रावण म्हणों नये कपटी । जेणें श्रीरामेंसीं करोनि भेटी । निवविलें सुखसंतुष्टीं । उपकार कोटी मज त्याचा ॥ ३६ ॥ स्वप्नीं नायकें श्रीरामगोष्टी । तो प्रत्यक्ष दाविला दृष्टी । रावण म्हणों नये कपटी । सुखसंतुष्टीं निववीलें ॥ ३७ ॥ यापरी दावोनि रणांगण । भेटवोनि श्रीराम लक्ष्मण । त्रिजटा परतली आपण । घेवोनि विमान सीतेसीं ॥ ३८ ॥ शोक नाहीं सीतेच्या मनीं । यालागीं पावली अशोकस्थानीं । सुखसंपन्न निजबंधनीं । श्रीरामपत्नी सुखरूप ॥ ३९ ॥ उल्लंघोनि लंकाभुवन । ठाकोनि आली अशोकवन । तेथें खेंचोनि विमान । ठेवी आपण सीतेसी ॥ १४० ॥ छळण करितां रावण । छळणीं सीता सुप्रसन्न । एका जनार्दना शरण । रामायण अति रम्य ॥ ४१ ॥ श्रीरामा करितां शरबंधन । राम शरबंधीं सुप्रसन्न । एका जनार्दना शरण । रामायण अति रम्य ॥ ४२ ॥ रावणें करितां अति बंधन । श्रीराम सीता सुप्रसन्न । एका जनार्दना शरण । रामायण अति रम्य ॥ ४३ ॥ श्रीरामसीतादर्शन । देखतां दोघें सुप्रसन्न । एका जनार्दना शरण । रामायण अति रम्य ॥ १४४ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां जानकीश्रीरामदर्शनं नाम द्वादशोऽध्यायः ॥ १२ ॥ ओंव्या ॥ १४४ ॥ श्लोक ॥ ३५ ॥

अध्याय तेरावा

श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ सीता नेलिया अशोकवना । मागें शरबंधीं रघुनंदना । पावोनि लब्धचेतना । आपआपणा अवलोकी ॥ १ ॥

अथ दीर्घेण कालेन संज्ञां लेभे नरोत्तमः ।
प्रत्यवेक्षत चात्मानं शोणितेन परिप्लुतम् ॥ १ ॥
अदीनो दीनया वाचा रामः परमसत्त्ववान् ।
अभ्यभाषत दीनात्मा हरिभिः परिवारितः ॥ २ ॥
लक्ष्मणं पतितं दृष्ट्वा दुःखशोकसमन्वितः ।
विललाप ततो रामो मंदमश्रूण्यवर्जयन् ॥ ३ ॥
किं नु मे सीतया कार्यं लब्धया जीवितेन वा ।
शयानं योऽद्य पश्यामि लक्ष्मणं शुभलक्षणम् ॥ ४ ॥
यत्र क्वचिल्लभेद्भार्यां पुत्रान्मित्रांश्च बांधवान् ।
न लक्ष्मणसमो भ्राता सचिवः सांपरायिकः ॥ ५ ॥

शरबंधनीं रघुनंदन । स्वयें होवोनि सावधान । निजांगीं खंडतरले बाण । रुधिरें क्लिन्न भूमिशायी ॥२॥ सवेंचि पाहे लक्ष्मण । तंव त्यासी न देखे प्राण । सज्ञान होवोनि अज्ञान । मिथ्या रुदन स्वयें दावी ॥ ३ ॥ नाहीं लक्ष्मणा जीवघात । ऐसें जाणोनि श्रीरघुनाथ । पहावया वानरवृत्तान्त । आक्रंदत अति दुःखें ॥ ४ ॥ वाचा विकळ भ्रष्टस्वर । ऐकतां देखती वानर । रणीं पडला सखा सौमित्र । तेणें रघुवीर विलपत ॥ ५ ॥ रावण इंद्रजित कुंभकर्ण । मारिल्या मज सुख कोण । सखा न भेटे लक्ष्मण । सांडीन प्राण यालागीं ॥ ६ ॥ करूनि राक्षसकंदन । घेतलिया लंकाभुवन । सखा न भेटे लक्ष्मण । सांडीन प्राण त्यालागीं ॥ ७ ॥ स्त्रिया सीतेऐशा जाण । असंख्य मिळती संपूर्ण । तैसा न मिळे सखा लक्ष्मण । सांडीन प्राण त्यालागीं ॥ ८ ॥ स्त्रिया मेळविल्या मिळती । पुत्र पौत्रें होय संतती । सख्या लक्ष्मणाची प्राप्ती । त्रिजगतीं दुर्लभ ॥ ९ ॥ प्रवेशल्या अयोध्येसी । भरतशत्रुघ्नकौसल्येसी । केंवी मुख दाखवूं सुमित्रेसी । त्यजीन प्राणांसी यालागीं ॥ १० ॥ वना आलों दोघे जण । पुसती केउता तो लक्ष्मण । तेव्हां माझें काळें वदन । त्यजीन प्राण यालागीं ॥ ११ ॥ लक्ष्मणावांचून आपण । सर्वथा न करीं फळभक्षण । त्यावीण न घें मी जीवन । त्यजीन प्राण यालागीं ॥ १२ ॥ लक्ष्मणावांचून आपण । पदमात्र न करीं गमन । त्यालागीं त्यजीन

---

१ मूर्च्छा. २ जमिनीवर. ३ कपटानें फसविण्याला. ४ सौख्य देऊन आनंदविलें, ५ सावध होऊन, ६ खोंचले, ७ भिजलेला. ८ जमिनीवर पडलेला. ९ राक्षसांना मारणें. १० नातू. ११ कोठें, कोणीकडे. १२ पाणी,

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

मी प्राण । सत्य भाषण हें माझें ॥ १३ ॥ दुःख आठवलें दारुण । नयनीं आले अश्रु पूर्ण । आपुल्या कर्माचें दूषण । स्वयें आपण अनुवादे ॥ १४ ॥

अयं मिथ्या प्रलापो मे हत्वा युद्धे दशाननम् ।
यन्मया न कृतो राजा राक्षसानां बिभीषणः ॥ ६ ॥

रणीं मारोनि रावण । राक्षसराजा बिभीषण । माझेनि न करवेचि जाण । शेकलें ऋण मज त्याचें ॥ १५ ॥ परम माझें मज दूषण । लंका बिभीषणा दिधली दान । तें मी नव्हेंचि उत्तीर्ण । शेकलें ऋण मज त्याचें ॥ १६ ॥ भरतासी पत्र देतां जाण । तेणें रणीं विंधोनि रावण । राजा करील बिभीषण । ऋण उत्तीर्ण त्याचेनि ॥ १७ ॥ आमची ऐकून मरणावस्था । भरत शत्रुघ्न तिघी माता । प्राण देतील तत्त्वतां । उत्तीर्णता नव्हे तेणें ॥ १८ ॥ अंतकाळींचें जें ऋण । वंदून बिभीषणाचे चरण । त्यासी देवोनि धनुष्यबाण । ऋणउत्तीर्ण मी होईन ॥ १९ ॥ दिव्यास्त्रेंसीं धनुष्यबाण । माझे पावल्या बिभीषण । त्रैलोक्यीं पूज्य होईल पूर्ण । निजवरदान हें माझें ॥ २० ॥ ऐकोनि श्रीरामवचन । बिभीषण मूर्च्छापन्न । स्वयें दीर्घ करी रुदन । अभाग्य पूर्ण मज माझें ॥ २१ ॥ बुद्धि सांगे रघुनंदन । आम्हां दोघांचा गेल्या प्राण । गजरें येवोनि रावण । करील कंदनें वानरां ॥ २२ ॥ मजसंमुख करोनि रण । वानरां मारतील रक्षोगण । मागें तुम्हांसी न यावें मरण । शीघ्र गमन तुम्ही करा ॥ २३ ॥ जुत्पती वीर वानरगण । त्यांसी माझें लोटांगण । सवेग न येतां रावण । शीघ्र गमन तुम्ही करा ॥ २४ ॥ मजपुढें करोनि रण । वीर मारिले रक्षोगण । जालेती सर्वस्वें उत्तीर्ण । शीघ्र गमन करावें ॥ २५ ॥

अस्मिन्मुहूर्ते सुग्रीव प्रतियातुमिहार्हसि ।
सत्त्वहीनं हि मां राजा रावणोऽभिद्रविष्यति ॥ ७ ॥

अंगदं तु पुरस्कृत्य ससैन्यं ससुहृद्गणम् ।
सागरं तर सुग्रीव पुनस्तेनैव सेतुना ॥ ८ ॥

सुग्रीवा बुद्धि ऐक पां खरी । येचि समर्यींचे अवसरीं । जंव पडली आहे अंधारी । सहपरिवारीं निघावें ॥ २६ ॥ वानरवीर सुहृज्जन । सैन्य सेनानी कपिगण । एकवटोनि आपण । करावें गमन किष्किंधे ॥ २७ ॥ वानरवीरांसमवेत । सुग्रीवराजा जीवें जीत । ऐकोनि येईल लंकानाथां । करावया घात वानरां ॥ २८ ॥ वानरराजा तूं कपिपती । तुजवीण वानर न चालती । तुवां निघावें शीघ्रगतीं । किष्किंधेप्रति नेमस्त ॥ २९ ॥ अंगदें आणिलें मुकुटासी । तो राग पोटीं रावणासी । पुढें घालोनियां त्यासी । सकळ सैन्येंसीं निघावें ॥ ३० ॥ करोनि आलों सेतुबंधन । तेणें मार्गें गा आपण । शीघ्र करावें गमन । किष्किंधाभुवन ठाकोनी ॥ ३१ ॥ ऐकोनि श्रीरामवचन । सुग्रीव न ढळे अणुप्रमाण । पुढती बोले रघुनंदन । शीघ्र गमन करीं बापा ॥ ३२ ॥

यत्तु कार्यं वयस्येन सुहृदा वा परं मम ।
कृतं सुग्रीव तत्सर्वं भवता धर्मभीरुणा ॥ ९ ॥
मित्रकार्यं कृतमिदं भवद्भिर्वानरर्षभाः ।
अनुज्ञाता मया सर्वे यथेष्टं गंतुमर्हथ ॥ १० ॥
शुश्रुवुस्तस्य ये सर्वे वानराः परिदेवितम् ।
ते सर्वे चक्रुरश्रूणि नेत्रैः कृष्णेतरेक्षणाः ॥ ११ ॥

आमुचें तुमचें सख्यत्व परम । त्या सख्यत्वाचें कृतकर्म । तुवां संपादिलें सुगम । आत्माराम मी जाणें ॥ ३३ ॥ मित्रकार्यीं तूं विख्यात । संपादिला मित्रकार्यार्थ । सुखी केला हा रघुनाथ । परम आप्त तुम्ही मज ॥ ३४ ॥ असंख्य मेळवोनियां दळ । महावीर कपि प्रबळ । सेतु बांधोनि तत्काळ । आलेति सकळ मत्कार्या ॥ ३५ ॥ सखया सुग्रीवा परियेसीं । वानर कष्टले परदेशीं । यांसी नेवोनि स्वगृहांसी । स्त्रीपुत्रांसी भेटवीं ॥ ३६ ॥ तुवांही किष्किंधाभुवनीं । तारा रुमा दोन्ही पत्नी । सुख भोगावें अनुदिनीं । सिंहासनीं स्वानंदें ॥ ३७ ॥ अंगद युवराजा जाण । वीर शूर सुभट पूर्ण । त्याचेही लळे पाळून । सुखी संपूर्ण करावें ॥ ३८ ॥ माझिया कार्यालागीं जाण । वानरीं वेंचिले आपुले प्राण । समस्तां माझें लोटांगण । शीघ्र गमन करावें ॥ ३९ ॥ तुम्ही शीघ्र न करितां गमन । येथें येवोनि दशानन । करील वानरां रणकंदन । दुःख

१ सुटलेला, मुक्त. २ नाश. ३ राक्षससमुदाय. ४ मोठमोठे योद्धे. ५ काळोख. ६ सैन्यासह. ७ सुलभपण. ८ सैन्य.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

दारुण तें मज ॥ ४० ॥ मज न बाधी माझी दुःखावस्था । परी सुग्रीवाची परम चिंता । दुःख न होतां कपी समस्तां । शीघ्रगमनता निघावें ॥४१॥ लक्ष्मणाच्या दुःखावस्था । मी प्राण त्यागीन आतां । प्राण त्यागील स्वयें सीता । यालागीं शीघ्रता तुम्हीं जावें ॥ ४२ ॥ ऐसें श्रीरामाचें विलपन । ऐकोनियां वानरगण । अश्रुपूर्ण जाले नयन । रुदन स्फुंदोन ते करिती ॥ ४३ ॥ ऐकोनि श्रीरामवचन । सुग्रीव बोलिला गर्जोन । सांडोनियां रामचरण । मागें आपण सरूंना ॥ ४४ । निकट आल्या प्राणान्त । ओढवलिया कल्पान्त । नाहीं सांडणें रघुनाथ । निश्चितार्थ हा माझा ॥ ४५ ॥ कैंचें राज्य कैंचें छत्र । कैंचें कलैत्र कैंचे पुत्र । सखा सांडोनि श्रीरामचंद्र । अणुमात्र ढळूंना ॥ ४६ ॥ सांडोनियां रघुनंदन । आठवी स्त्रियादि भोग भवन । तेव्हांचि त्याचें काळें वदन । आकल्प पतन तयासी ॥ ४७ ॥

विभीषणस्तु रामस्य दृष्ट्वा गात्रं शरैश्चितम् ।
लक्ष्मणस्य च धर्मात्मा बभूव व्यथितस्तदा ॥ १२ ॥
जलक्लिन्नेन हस्तेन तयोर्नेत्रे विमृज्य च ।
शोकसंपीडितमना रुरोद विललाप ह ॥ १३ ॥

सर्वांगीं खोंचोनियां बाण । रणीं पडले रामलक्ष्मण । ते देखोनियां बिभीषण । करी रुदन अति दुःखें ॥ ४८ ॥ बैसोनियां सुग्रीवापासीं । बिभीषण रडे आक्रोशीं । कपटें छळोनि राक्षसीं । रणीं रामासी पाडिलें ॥ ४९ ॥ खोंचले देखोनियां बाण । जळहस्तें बिभीषण । श्रीराम आणि लक्ष्मण । करी स्पर्शन सर्वांगीं ॥ ५० ॥ बिभीषणहस्तींचें उदक । तेणें निवारेल देहदुःख । श्रीरामलक्ष्मण नैंवेक । पावले सुख शरबंधीं ॥५१॥ बिभीषणहस्तोदकगुण । दोघे झाले सावधान । परी सर्वांगीं विकळपण । अर्ध क्षण बैसवेना ॥ ५२ ॥ सुग्रीव आणि बिभीषण । दोघे देखोनि अति उद्विग्न । ते काळीं अंगद आपण । बोले गर्जोन तें ऐका ॥ ५३ ॥ श्रीराम आणि लक्ष्मण । सुग्रीवादि वानरगण । सुख पावती संपूर्ण । तें मी करीन अवधारा ॥५४॥

अथाब्रवीद्वानरेंद्रः सुग्रीवः पुत्रमंगदम् ।
सुषेणं श्वशुरं पार्श्वे समाहूयेदमब्रवीत् ॥ १४ ॥
सहशूरैर्हरिगणैर्लब्धसंज्ञावविक्लवौ ।
उभा प्रापयतः क्षिप्रं किष्किंधां रामलक्ष्मणौ ॥ १५ ॥

सुग्रीव सांगे अंगदासी । पाचारोनि सुषेण शूरासी । सकळसैन्यसमुदायेंसीं । न्यावे किष्किंधेसी राम सौमित्र ॥ ५५ ॥ ऐकोनि सुग्रीवाची युक्ती । अंगदें अति विनयवृत्तीं । सुग्रीवादि सकळ जुत्पती । केली विनती अभिवंद्य ॥ ५६ ॥ सुग्रीव राजा कपिपती । घेवोनि सौमित्र सीतापती । न वचतां किष्किंधेप्रती । वानर न ढळती ससैन्य ॥ ५७ ॥ स्वामी तुज सुग्रीवेंवीण । वेगळे न होती वानरगण । घेवोनि राम लक्ष्मण । जावें आपण किष्किंधेसी ॥ ५८ ॥

अहं तु रावणं हत्वा सपुत्रं सहबांधवम् ।
मैथिलीमानयिष्यामि शक्रो नष्टामिव श्रियम् ॥ १६ ॥
सर्वे गच्छंतु विश्वासाद्धत्रांगो मारुतात्मजः ।
अनेनाहं सहायेन हनिष्ये राक्षसाधिपम् ॥ १७ ॥

सुग्रीव सुषेण जुत्पती समस्त । नळनीळादि जांबवंत । अंगद लोटांगणें विनवीत । निजपुरुषार्थ लक्षोनी ॥ ५९ ॥ लब्धसंज्ञ राम लक्ष्मण । दोघे जाले सावधान । येथोनि यांसी नाहीं मरण । विकळ पूर्ण सर्वांगीं ॥ ६० ॥ जंव विकळ राम लक्ष्मण । तंव सुग्रीवादि वानरगण । समस्तांहीं होवोनि सावधान । न्यावे दोघे जण किष्किंधे ॥ ६१ ॥ मागें मी एकला आपण । मारीन इंद्रजित कुंभकर्ण । रणीं निर्दाळीन रावण । सपुत्रप्रधानसैन्यासीं ॥ ६२ ॥ माझेनि विश्वासें समस्त । सुखीं जावें सुनिश्चित । एक ठेवावा हनुमंत । रणसाह्यार्थ मजलागीं ॥ ६३ ॥ याचेनि रणसाह्यपणीं । करीन रावणाची धूळधाणी । मारीन राक्षसांच्या श्रेणी । सीता जननी सोडवीन ॥ ६४ ॥ करोनियां समुद्रमंथन । इंद्रें श्री काढिली शोधून । तेंवी राक्षस दमून । सीता चिद्रत्न आणीन ॥ ६५ ॥ लंका बिभीषणा दिधली दान । जें कां श्रीरामवाचाऋण । तें मी होईन उत्तीर्ण । बिभीषण येथें ठेवा ॥ ६६ ॥ रणीं मारोनि रावणासी । स्वयें सोडवीन सीतेसी । राज्य देईन बिभीषणासी । रामऋणासी उतराई ॥६७॥

१ शोक. २ स्त्री. ३ किंचित् देखील. ४ क्षणभर. ५ सावध झालेले. ६ न जातां. ७ संज्ञा पावलेले, ८ समुदाय.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

इतुकें करोनि लंकेसी। सीता घालोनि शिबिकेसी। गर्जत येईन किष्किंधेसी । सत्य वचनासी मानावें ॥६८॥ ऐकोनि अंगदअनुवादन। सुखावला सुग्रीव आपण । हरिखें चुंबोनियां वदन। संतोषोन स्वयें डोले ॥ ६९ ॥ धन्य अंगदा तुझी वचनावळी। धन्य अंगदा तुझी शैली । वीर शूर आतुर्बळी। वानरकुळीं अंगद ॥ ७० ॥ जैसा बोलिलासी तैसी शक्ती । तैसी करूं शकसी ख्याती । निधडा वीर तूं त्रिजगतीं । वानूं किती गुण तुझे ॥ ७१ ॥ तूं एकला करिसी रण। आम्ही घेवोनि राम लक्ष्मण। किष्किंधे जातां पैं पळोन । अतिजघन्य पैं आम्हां ॥ ७२ ॥ नगरीं हांसिजे वानरीं। स्वर्गी हांसिजे सुरवरीं। हांसिजेल ऋषीश्वरीं। चराचरीं अतिनिंद्य ॥ ७३ ॥ इंद्रजित आलिया कुंभकर्ण । ससैन्य आलिया रावण। मागें सरणें नाहीं जाण। केलें निर्वाणें सुग्रीवें ॥ ७४ ॥ ऐकोनि अंगदाची मात। हरिखला हनुमंत । आला स्वानंदें गर्जत । राक्षसान्तकृतकारी ॥ ७५ ॥ अंगद माझा निजसखा । मी अंगदाचा पाठीराखा । मारावया दशमुखा । विचार इतुका कायसा ॥ ७६ ॥ जांबवंत सुग्रीव बिभीषण । नळनीळादि वानरगण । श्रीरामाचें शरबंधन । निर्बंधन कैंवी होय ॥ ७७ ॥ ऐसा करितां विचार । तंव तपस्तेजाचा डोंगर। आला नारद मुनीश्वर। करीत गजर नामाचा ॥ ७८ ॥ नारदाची निजआवडी। श्रीराम मारील राक्षसकोडी। डोळेभरी पाहीन गोडी। कडोविकडीं नाचत ॥ ७९ ॥ शस्त्रास्त्रीं वीर वानरगणीं। श्रीराम भिडेल झोंटधरणीं। त्याही युद्धाची घेईन धणी। शेंडी थरकोनी थडथडित ॥ ८० ॥ पाताळीं युद्ध न पडे दृष्टी। नारद पायें पृथ्वी पिटी। नसतां मृत्युलोकीं रणगोष्टी। तैं त्या उठी पोटशूळ ॥ ८१ ॥ स्वर्गी नाहीं रणकल्लोळ। नारदा कपाळशूळ। लंकाभुवनीं रणगोंधळ। केला सुकाळ श्रीरामें ॥ ८२ ॥ संग्रामपीक आलें प्रबळ। पडिले शरबंधनाचे टोळ। नारद उडवील तत्काळ। रणसुकाळ पहावया ॥ ८३ ॥ पहावया श्रीरामरणगोडी। नारदासी परम आवडी। फेडावया शरबंधसांकडी। अति तांतडी तो आला ॥ ८४ ॥ श्रीरामाचा निजबाण। ज्या लागे तो ब्रह्म पूर्ण। ऐसें पहावया निर्वाणरण। आवडी गहन नारदासी ॥ ८५ ॥

एतस्मिन्नेव काले तु महायोगबलान्वितः ।
आजगाम महातेजा देवर्षिर्नारदस्तथा ॥ १८ ॥
राघवस्य समीपे तु निपपात सखीकृतः ।
कृत्वा प्रदक्षिणं रामं तेषां मध्ये वनौकसाम् ॥ १९ ॥
अभितुष्टाव काकुत्स्थं स्मारयन्पूर्वजन्म च ।
राम राम महाबाहो शृणुष्व वदतां वर ॥ २० ॥
दिव्यं लक्ष्मणसंयोगं किमात्मानं न बुध्यसे ।
भवान्नारायणः श्रीमान्सर्वलोकनमस्कृतः ॥ २१ ॥

श्रीराम देखोनि शरबंधनीं। नारद येवोनि तेच क्षणीं । प्रदक्षिणा लोटांगणीं । लागला चरणीं रामाच्या ॥ ८६ ॥ अगाध नारदाचें महिमान। तपस्तेजें देदीप्यमान। मानूनि श्रीरामभक्त पूर्ण। वानरगण स्वयें वंदिले ॥ ८७ ॥ मी एक श्रेष्ठ महामुनी । वानर वनचर हीन भजनीं। ऐसें नारद कदा न मानी। घाली लोटांगण सर्मसाम्य ॥८८॥ जोचि भाव श्रीरामचंद्रीं। तोचि भाव वानरांवरी । प्रदक्षिणा नमस्कार करी। भिन्नत्व न धरी अणुमात्र ॥ ८९ ॥ ऐसी साधूंची शुद्ध शैली। नारदीं नांदे सुखसमेळीं । तो येवोनि श्रीरामाजवळी। सांगे समूळीं मूळकथा ॥ ९० ॥ तुझें स्वरूप द्वंद्वविहीन । मिथ्या मानिसी शरबंधन। होवोनियां सावधान । करीं कंदन राक्षसां ॥ ९१ ॥ तुझें होताहे निर्वाणरण। पाहूं आलों मी आपण। घेवोनियां धनुष्यबाण। करीं कंदन राक्षसां ॥९२॥ ऐसें सांगतां नारदमुनी। श्रीराम तुठी शरबंधनीं। मुख्य स्वरूप प्रबोधोनी। अनुवादे वाणी ते ऐका ॥ ९३ ॥ तूं तंव सर्वभूतीं सबाह्य पूर्ण। पूर्णपणें निजनिर्गुण। निर्गुणत्वें तूंचि सगुण। निजलक्षण निर्धारीं ॥ ९४ ॥ मत्स्यरूपें अवतरोन। शंखासुरातें मर्दून। स्वयें केलें वेदोद्धरण। तूं आदिकारण श्रीरामा ॥ ९५ ॥ कूर्मरूपें तूं आपण। पृष्ठभागीं धरीं धरोन। करोनियां समुद्रमथन। काढिलीं पूर्ण चौदा रत्नें ॥ ९६ ॥ वराहरूपें तूंचि जाण।

१ पालखींत. २ फार नीचपणा. ३ चराचरात्मक सर्व सृष्टींत. ४ अखेरचा निश्चय. ५ शरबंधनाचें संकट.

६ त्वरेनें. ७ निकराची लढाई. ८ सारख्या भावानें. ९ रीत. १० पृथ्वी.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

निमग्न धरा उद्धरोन । हिरण्याक्ष निर्दाळून । जालासी आपण स्वयें वराह ॥ ९७ ॥ प्रल्हाद-कैवारालागीं जाण । अचेतन खांब फोडून । हिरण्यकशिपा विदारून । जालासी आपण नृसिंह रामा ॥ ९८ ॥ कां उपेंद्ररूपें आपण । दानप्रसंगें बळीचें छळण । शेखीं जालासी बळीचे अधीन । म्हणती वामन द्वारपाळ ॥ ९९ ॥ परशुराम तूं ब्रह्मक्षत्री । गोब्राह्मणांचा कैवारी । सहस्रार्जुनासी करिसी बोहरी । धरा निःक्षत्री त्रिसप्तकें ॥ १०० ॥ तो तूं सातवा अवतार । प्रत्यक्षाकारें श्रीरामचंद्र । मिथ्या शरबंध शरपंजर । उठीं सत्वर रिपुदळणीं ॥ १ ॥ ऐसें नारदें सांगतां आपण । शिववरदाचे वरदबाण । मिथ्या न करी श्रीरघुनंदन । ऋषि पूर्ण जाणों सरला ॥ २ ॥ तूं तंव साक्षात नारायण । शेषशायी श्रीजनार्दन । तूं तंव जगाचा जीवन। गरुडवाहन श्रीरामा ॥ ३ ॥ गरुड तुझा निजसेवक । हात जोडोनि उभा संमुख । शरबंध छेदावया देख । त्यासी आवश्यक स्मरावें ॥ ४ ॥ श्रीराम म्हणे नारदाप्रती । गरुडस्वामी मी रघुपती । शरबंधाचे निवृत्ती । सेवका काकुलती कैंवी करूं ॥ ५ ॥ माझा स्वामी श्रीशंकर । निवारील शरपंजर । ऐसें ऐकतां उत्तर । शिव सत्वर धांविन्नला ॥ ६ ॥ शिव सांगे गरुडासी । तूं तंव महा मूर्ख होसी । शरबंध लागला श्रीरामासी । शीघ्र त्यापासीं तूं जाय ॥ ७ ॥ माझ्या वरदाचे वरद बाण । स्वयें छेदीना रघुनंदन । तुवां जावोनि आपण । शरबंधन छेदावें ॥ ८ ॥ माझ्या वरदाचे सर्पशर । तिंहीं बांधिला श्रीरामचंद्र । तुवां जावोनि सत्वर । नागशर छेदावे ॥ ९ ॥ ऐकोनि शिवाचें उत्तर । गरुडासी उल्लास थोर । वंदावया श्रीरामचंद्र । अति सत्वर चालिला ॥ ११० ॥

एतस्मिन्नन्तरे वायुर्मेघाश्चासन्सविद्युतः ।
पर्यस्तं सागरे तोयं कंपंतश्च महीधराः ॥ २२ ॥

महता पक्षवातेन सर्वे तीररुहा द्रुमाः ।
बहवः पातिता भग्नाः समूला लवणांभसि ॥ २३ ॥

ततो मुहूर्ताद्गरुडं वैनतेयं महाबलम् ।
वानरा ददृशुः सर्वे ज्वलंतमिव पावकम् ॥ २४ ॥

तमागतमभिप्रेक्ष्य नागास्ते विप्रदुद्रुवुः ।
यैस्तु तौ पुरुषौ बद्धौ शरभूतैर्महाबलैः ॥ २५ ॥

ततः सुपर्णः काकुत्स्थौ दृष्ट्वा प्रत्यभिवाद्य च ।
विममर्श च पाणिभ्यां मुखे चंद्रसमप्रभे ॥ २६ ॥

गरुडें करितां उड्डाण । उभयपक्षांचा पवन । पर्वतवृक्ष उन्मळोन । पडती आपण समुद्रीं ॥ ११ ॥ खचोनि पडती गिरिकडे । पक्षी किलकिलती बापुडे । समुद्रजळ गगना उडे । अति झडाडें पक्षांच्या ॥ १२ ॥ पक्षवात तो मेघ निर्वाहे । उसळलें जळ वर्षताहे । सुवर्णपक्ष विद्युत्प्राये । झळकताहे आकाशीं ॥ १३ ॥ तेजोराशि दैदीप्यमान । कपि देखती गरुडागमन । न लागतां अर्धक्षण । आलें उड्डाण शरबंधा ॥ १४ ॥ येतां गरुडाचें उड्डाण । सर्पोद्भुत शरबंधन । पळोनि जाले शिवभूषण । गरुडाभेणें अतिधाकें ॥ १५ ॥ वेगळें राहतां आपण । गरुड करील पैं विदारण । सर्प जाले शिवभूषण । निजमरण चुकवावया ॥ १६ ॥ शिवाचिया अंगावरी । बाहुभूषणें उरीं शिरीं । लपती सर्पांचिया हारी । देखोनि सर्पारी अति धाकें ॥ १७ ॥ शरबंधनीं सर्पबंधन । ते सर्प जातांचि पळोन । श्रीराम आणि लक्ष्मण । सावधान स्वयें जाले ॥ १८ ॥ सावध होतां रघुनंदन । गरुड घाली लोटांगण । मी तंव अपराधी दारुण । क्षमा संपूर्ण मज कीजे ॥ १९ ॥ पुढती नमन लोटांगण । पुढती करी प्रदक्षिण । मी तंव अपराधी दारुण । क्षमा संपूर्ण मज कीजे ॥ १२० ॥ मज लागल्या शरबंधन । तुवां सांडिलें उपेक्षून । ऐसें श्रीरामा तूं न म्हण । शठ पूर्ण मज न मानीं ॥ २१ ॥ शरबंधाचिये संकटीं । म्यां नाहीं ऐकिलें जगजेठी । शिवें सांगतांचि गोष्टी । उठाउठीं मी आलों ॥ २२ ॥ मज येतांचि पैं जाण । फिटलें सर्पशरबंधन । माझेनि दोघां मुक्तपण । सेवा संपूर्ण हे माझी ॥ २३ ॥ मी तंव घरगुती आप्त । दोघांही केलें शरनिर्मुक्त । हेचि सेवा सुनिश्चित । श्रीरघुनाथसुखार्थी ॥ २४ ॥ सर्पशरबंध दारुण । आल्या सुरासुरगण । मिळालिया सिद्ध चारण । शरबं-

१ वामनरूपानें. २ शेवटीं. ३ एकवीस वेळां. ४ आधार. ५ मुक्ततेकरितां. ६ धारण करिता झाला. ७ गरुडाच्या भीतीनें. ८ गरुड. ९ हयगय करून.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

धन सुटेना ॥ २५ ॥ ब्रह्मा शक्र[1] कुबेर वरुण । आल्या कोटिकोटि सुरगण । सर्पोद्भुत शरबंधन । सर्वथा जाण सुटेना ॥ २६ ॥ अठ्यायशीं सहस्र ऋषिपंक्ती । आल्या तपस्वी तेजोमूर्ती । सर्पशरबंधनिवृत्ती । त्यांच्या निजशक्ती न करवे ॥ २७ ॥ सर्पशरबंध अति कठिण । ब्रह्मादिकां अगम्य जाण । त्याचें केलें म्यां निवारण । सेवा संपूर्ण श्रीरामीं ॥ २८ ॥ असतां दिव्यास्त्रें संपूर्ण । दोघां दुर्गम शरबंधन । तें म्यां निवारिलें जाण । सेवा संपूर्ण हे माझी ॥ २९ ॥ तुमच्या अंगीं रुतले बाण । त्यांचे बुजवावे वण । करितां गरुडें परिमार्जन । लज्जायमान स्वयें जाला ॥ १३० ॥ श्रीराम आणि लक्ष्मण । अंगीं रुपले नाहींत बाण । अंगासी पडला नाहीं वण । परिमार्जन तें काय ॥ ३१ ॥ शरबंधीं सर्प शिवभूषण । करिती श्रीरामस्तवन । शरबंधीं रघुनंदन । सुखसंपन्न स्वानंदें ॥ ३२ ॥ शरबंधीं सर्प सतत । शोधितसत्त्व समस्त । भाग्यें उठिला रघुनाथ । नित्यमुक्त श्रीराम ॥३३॥ शरबंधीं सुखसंपन्न । सर्प करिती मधुर स्तवन । लक्ष्मण तोचि शेष शयन । रघुनंदन सुखशायी ॥ ३४ ॥ गरुडें सोडविलें सर्पबंधन । हें तों माझें मिथ्या वचन । श्रीराम नित्यमुक्त चिद्घन । लज्जायमान वैनतेय[2] ॥ ३५ ॥ शरबंधीं राम सुखसंपन्न । शरसर्प करिती रामस्तवन । अगाध श्रीराममहिमान । मी केंवी दीन आकळीं ॥ ३६ ॥ श्रीरामप्रतापनिजनिवाडें । सेवा कीजे चंद्रचूडें[3] । तेथें मी काय बापुडें । श्रीरामापुढें सामर्थ्यें ॥३७॥ शरबंध करावया निर्मुक्त । अतिशयेंसीं मी समर्थ । ऐसा गर्वें होता फुंजत[4] । तोही गर्वहत श्रीरामें ॥३८॥ श्रीरामसामर्थ्य चोखडें । कळिकाळ न पाहे तयाकडे । येथें मी कायसें बापुडें । पायां पडे अनुतापें ॥ ३९ ॥

रावणं च रणे हत्वा सीतां त्वमुपलप्स्यसे ।
इत्येवमुक्त्वा वचनं संपूर्णः शीघ्रविक्रमः ॥ २७ ॥
रामं च नीरुजं कृत्वा मध्ये तेषां वनौकसाम् ।
प्रदक्षिणं तु तं कृत्वा परिष्वज्याभिवाद्य च ॥ २८ ॥
जगामाकाशमाविश्य गरुडः पवनो यथा ।
नीरुजौ राघवौ दृष्ट्वा ते तु वानरयूथपाः ॥ २९ ॥
प्रहृष्टाः ससृजुर्नादान्राक्षसानां भयावहान् ।
ततो भेरीः समाजघ्नुर्मृदंगांश्चाप्यवादयन् ॥ ३० ॥
दध्मुः शंखान्संप्रहृष्टाः क्ष्वेलंत्यपि यथापुरम् ॥ ३१ ॥

ते काळीं गरुडें आपण । प्रदक्षिणा लोटांगण । हरिखें[5] वंदोनि वानरगण । प्रेम संपूर्ण श्रीरामीं ॥ १४० ॥ वानर पूर्ण श्रीरामभक्त । गरुडें जाणोनि निश्चित । कपिकुळासमवेत । श्रीरघुनाथ अभिवंदी ॥ ४१ ॥ पुढती पुढती प्रदक्षिणा । पुढती पुढती लोटांगणा । हर्षें वंदी वानरगणा । करावया गमना पूसत ॥ ४२ ॥ देखोनि गरुडाचें प्रेम पूर्ण । श्रीराम झाला सुप्रसन्न । देवोनि आलिंगन समाधान । करवी गमन स्वानंदें ॥ ४३ ॥ गरुडें करितांचि गमन । श्रीरामासी आशीर्वचन । अनुवादला संतोषोन । गिरागर्जन तें ऐका ॥ ४४ ॥ रणीं मर्दूनि रावणासी । राज्य देवोनि बिभीषणासी । सीता आणोनि स्वानंदेंसीं । सुखी होसी श्रीरामा ॥ ४५ ॥ गरुडें नमूनि श्रीरामासी । वेगें उसळला नभासी । पवन प्रवेशे आकाशीं । तेणें वेगेंसीं निघाला ॥ ४६ ॥ रामरावणजुंझारी[6] । पहावया उल्लास गरुडा भारी । श्रीरामभात्याभीतरीं । गरुड गरुडास्त्रीं प्रवेशे ॥ ४७ ॥ अस्त्रदैवतें अत्यद्भुतें । यश पावावया श्रीरामहस्तें । भातां दाटलीं समस्तें । रणसाह्यार्थें श्रीरामा ॥ ४८ ॥ राम शस्त्रांची निजगती । राम अस्त्रदेवतां निजशक्ती । राम जगदात्मा त्रिजगतीं । राम निश्चितीं परब्रह्म ॥ ४९ ॥ गरुडें केलिया गमन । श्रीराम देखोनि सावधान । वानरां आलें स्फुरण । करिती गर्जन हरिनामें ॥१५०॥ हरिखाँच्या[7] निजगजरीं । निशाणें त्राहाटिल्या भेरी । ताल घोळ मृदंग मोहरी । शंख वानरीं आस्फुरिले[8] ॥ ५१ ॥ श्रीराम नित्य सावधान । वर्म जाणोनि वानरगण । रणीं मर्दावया रावण । गुढिया उभवोनि नाचती ॥ ५२ ॥ वाजंत्र्यांचा ध्वनि गंभीर । वानरीं केला भुभुःकार । त्यामाजी रामनामाचा गजर । नामीं अंबर कोंदलें ॥५३॥ नाद कोंदले गगनीं । आनंद झाला त्रिभुवनीं । दचकल्या राक्षसश्रेणी । ऐकतां ध्वनी सुटला कंप ॥५४॥ ऐकतांचि ते नादध्वनी । रावण दचकला सिंहासनीं । इंद्रजित दचकला

१ इंद्र. २ गरुड. ३ शंकरानें. ४ प्रौढी मिरवीत. ५ आनंदानें. ६ रामरावणांचें युद्ध. ७ आनंदाच्या. ८ वाजविले.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

मनीं । राम शरबंधनीं सूटला ॥ ५५ ॥ सुटोनियां शरबंधन । श्रीराम जाला सावधान । सुमनें वर्षती सुरगण । उल्लास संपूर्ण सर्वांसी ॥ ५६ ॥ एका जनार्दना शरण । श्रीराम नित्य सावधान । पुढील कथा अति पावन । मोक्षोपपादन श्रोतयां ॥५७॥ नर वानर निशाचर । युद्ध करिती घोरांदर । तें मोक्षाचें निजमाहेर । कथा पवित्र श्रीरामें ॥ ५८ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां रामशरबंधननिर्मुक्तिर्नाम त्रयोदशोऽध्यायः ॥१३॥ ओंव्या ॥१५८॥ श्लोक ॥३१॥

अध्याय चौदावा

श्रीसीतारामाभ्यां नमः ॥ सर्पशरबंधापासून । सुटले राम लक्ष्मण । दोघीं सज्जिलें धनुष्यबाण । ठाणमाणसाटोपें ॥ १ ॥ सावध होवोनि रघुनाथ । सुग्रीव अंगद जांबवंत । बिभीषण हनुमंत । कपि समस्त आलिंगी ॥ २ ॥ एक एक वानरवीर । स्वयें आलिंगी रामचंद्र । वानरीं केला भुभुःकार । जयजयकारें गर्जती ॥ ३ ॥ रामनामाचा गजर । वानरीं केला अति सधैर । नामें दुमदुमिलें अंबर । दशशिर दचकला ॥ ४ ॥

तेषां तु तुमुलं शब्दं वानराणां तरस्विनाम् ।
नर्दतां राक्षसैः सार्द्धं तदा शुश्राव रावणः ॥ १ ॥
उवाच रक्षसां श्रेष्ठः समीपपरिवर्तिनः ।
ज्ञायतां तूर्णमेतेषां सर्वेषां वनचारिणाम् ॥ २ ॥
तौ च बद्धौ शरैस्तीक्ष्णैर्भ्रातरौ रामलक्ष्मणौ ।
शोककाले समुत्पन्ने हर्षकारणमुत्तमम् ॥ ३ ॥
ते तथोक्तास्तु संभ्रांताः प्राकारमधिरुह्य च ।
विषण्णवदनाः सर्वे राक्षसेंद्रमुपस्थिताः ॥ ४ ॥

वानरांचा गिरागजर । ऐकोनियां दशशिर । भास पाचारोनि निशाचर । सांगे विचार भयचकित ॥ ५ ॥ शरबंधीं राम लक्ष्मण । बांधोन टाकिले अचेतन । वानरां शोककाल दारुण । हर्ष संपूर्ण कैसेनि ॥ ६ ॥ तरी तुम्हीं सौमित्रासमवेत । पहावा शरबंधीं रघुनाथ । वानरां हर्ष विमर्श । समूळ वृत्तान्त आणावा ॥ ७ ॥ देखोनि वानरांचें स्फुरण । बाहेर येतां राक्षसगण । धाकें जाऊं पाहे प्राण । कंपायमान भयभीत ॥ ८ ॥ पहावया वानरवृत्तान्त । गोपुरा[३] चढले रावणदूत । तेथोनि टकमकां पाहत । अत्यद्भुत देखिलें ॥ ९ ॥ तोडोनियां शरबंधन । श्रीराम आणि लक्ष्मण । वाहोनियां धनुष्यबाण । आले दारुण संग्रामा ॥ १० ॥ दोहीं बाहीं कपिकुंजर । नामें गर्जती वानर । शिळाशिखरद्रुमपाणि वीर । आले सत्वर युद्धार्थी ॥ ११ ॥ उठिला देखोनि रघुनंदन । दूतांचा जाऊं पाहे प्राण । अतिशयें म्लानवदन । आले परतोन सभेसी ॥ १२ ॥ धाकें दूतांचें पळालें पाणी । तोंड कोरडें विकळ वाणी । राम सुटोनि शरबंधनीं । आला कोपोनी रणमारा ॥ १३ ॥

तदप्रियं दीनमुखा रावणस्य निशाचराः ।
न्यवेदयन्यथावृत्तं सर्वे वाक्यविशारदाः ॥ ५ ॥

शरबंधीं सुटला रघुनाथ । ऐकोनि दूतांचा वृत्तान्त । रावण जिव्हारीं कांपत । इंद्रजित स्वयें धाके ॥ १४ ॥ इंद्रजित धाके जीवाआंत । जरी उठिला रघुनाथ । तरी राक्षसां आला अंत । कुळघात समूळीं ॥ १५ ॥ वानरभार अति दुर्धर । साह्य झाल्या श्रीरामचंद्र । रणीं मारिती निशाचर । लहान थोर निवटोनी ॥ १६ ॥

तच्छ्रुत्वा वचनं तेषां राक्षसेंद्रोऽथ रावणः ।
चिंतारोषपरीतांगो विवर्णवदनोऽभवत् ॥ ६ ॥
अब्रवीद्रक्षसां मध्ये धूम्राक्षं नाम राक्षसम् ।
बलेन महता युक्तो रक्षतां भीमविक्रमः ॥ ७ ॥
निष्क्रमस्व वधायाशु राघवस्य वनौकसाम् ।
एवमुक्तस्तु धूम्राक्षो राक्षसेंद्रेण धीमता ॥ ८ ॥
कृत्वा प्रणामं संहृष्टो निर्जगाम नृपाज्ञया ॥ ९ ॥

शरबंधीं मुक्त राम लक्ष्मण । ऐकोनि हेरांचें वचन । चिंतातुर दशानन । म्लानवदन होसं[६]रला ॥ १७ ॥ कोप आला रावणासी । पाचारोनि धूम्राक्षासी । रणीं मारावया वानरांसी । धाडी युद्धासी साक्षेपें ॥ १८ ॥ तुझा जो कां सैन्यभार । निघडे वीर निशाचर । ध्वज रथ अश्व कुंजर ।

१ भयंकर. २ मोठ्या जोराचा. ३ द्वारावरील मजल्यावर. ४ शिळा, शिखरें आणि वृक्ष हातांत घेणारे.

५ अंतःकरणांत. ६ झाला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

संग्रामा शीघ्र निघावें ॥ १९ ॥ ऐकोनि रावणाचें वचन । धूम्राक्षें करोनियां नमन । अति उल्लासें गर्जोन । निघे आपण संग्रामा ॥ २० ॥ युद्धा निघाले निशाचर । करोनियां वीरशृंगार । चालिले पायांचे मोगर । गर्जत वीर आल्हादें ॥ २१ ॥ फरश पट्टिश तोमर । शूळ परिघ गदा मुद्गर । लहुडी भिंडिमाळा खड्ग चक्र । धनुर्धर पायांचे ॥ २२ ॥ अश्वीं बाणली मोहाळी । आरसे झळकती पाखरांतळीं । वीर वळंघले आतुर्बळी । घोडीं रणमेळीं नाचविती ॥ २३ ॥ मद गाळिती कुंजर । पालाणिले अति अपार । घंटा घागरिया अलंकार । ध्वजा विचित्र शोभती ॥ २४ ॥ दांतीं लोहशेंब्या तिखट । वरी वळंघले वीरवाट । रथ चालिले घडघडाट । वीर उद्भट युद्धार्थी ॥ २५ ॥

वृकसिंहमुखैर्युक्तं खरैः कनकभूषणैः ।
आरुरोह रथं दिव्यं धूम्राक्षः खरनिस्वनः ॥ १० ॥
स निर्ययौ महातेजा धूम्राक्षो राक्षसैर्वृतः ।
पश्चिमेन तु द्वारेण हनूमान्यत्र तिष्ठति ॥ ११ ॥
रथशीर्षे महाभीमो गृध्रो विनिपपात ह ।
ध्वजाग्रे पक्षिणस्तस्य निपेतुर्मांसभोजनाः ॥ १२ ॥
रुधिरार्द्रं महच्चैव श्वेतं छत्रमस्य पपात ह ।
स उत्पातांश्च तान्दृष्ट्वा राक्षसानां भयावहान् ॥ १३ ॥
प्रादुर्भूतान्महाघोरान्धूम्राक्षो व्यथितोऽभवत् ॥ १४ ॥

सिंहमुख वृक जंबुक खर । तिंहीं जुंपिला रहंवरें । सुवर्णपाखरा सालंकार । रथावर शोभती ॥ २६ ॥ रथीं ध्वज अति विचित्र । झळके माथां श्वेत छत्र । रथीं बैसतां धूम्राक्ष । जालें विचित्र तें ऐका ॥ २७ ॥ गृध्र येवोनि त्वरेंकरीं । बैसला रथाच्या ध्वजावरी । मांस भक्षितां गलितरुधिरीं । श्वेत छत्रें करी आरक्त ॥ २८ ॥ ध्वजीं गृध्र उडवितां । धूम्राक्ष झडपिला माथां । करून त्याच्या छत्रपाता । होय उडता आकाशीं ॥ २९ ॥ अनेक उठिले उत्पात । भूस्फोट राजद्वारीं होत । सर्वेचि जाला अशनिपात । वाजला आघात आकाशीं ॥ ३० ॥ वायु प्रतिकूळ दुर्धर । रजें झांकोळले नेत्र । गगनींहूनि वर्षे रुधिर । दुश्चिन्हें थोर ऊठलीं ॥ ३१ ॥ दुश्चिन्हें अत्यद्भुत । देखोनियां अति उत्पात । धूम्राक्ष जाला भयभीत । चिंताग्रस्त पैं जाला ॥ ३२ ॥ ऐशा अपशकुनाभेण । मागें परततां आपण । विटंबें दंडील रावण । नाक कान छेदोनी ॥ ३३ ॥ मागें पळतां विटंबण । रणीं भिडतां मुक्तपण । येणें उल्लासें तो जाण । निघे आपण युद्धासी ॥ ३४ ॥ नरकपात मागें पळतां । रणीं पडल्या सायुज्यता । श्रीरामचरणीं प्राण देतां । ब्रह्मस्वरूपता सुलभ ॥ ३५ ॥ येणें विचारें संपूर्ण । धूम्राक्ष स्वयें आपण । न मानून अपशकुन । करावया रण स्वयें आला ॥ ३६ ॥ पश्चिमद्वारें जंव निघत । ते द्वारीं यूथप हनुमंत । वानरभारें संयुक्त । काळकृतांत बैसला ॥ ३७ ॥

निर्यातं प्रेक्ष्य धूम्राक्षं राक्षसं भीमदर्शनम् ।
विनेदुर्वानराः सर्वे प्रहृष्टा युद्धकांक्षिणः ॥ १५ ॥
तेषां सुतुमुलं युद्धं संजज्ञे हरिरक्षसाम् ।
अन्योन्यं पादपैर्घोरैर्जघ्नुस्ते शूलशक्तिभिः ॥ १६ ॥
वानरा राक्षसैर्घोरैर्व्यथिताश्च विदारिताः ।
वानरै राक्षसाश्चापि द्रुमैर्भूमिः समीकृता ॥ १७ ॥
विदार्यमाणा रक्षोभिर्वानरास्ते महाबलाः ।
जगृहुः पादपांश्चैव शिलाश्च हरियूथपाः ॥ १८ ॥
ते भीमवेगा हरयो नर्दमानाः सहस्रशः ।
ममंथू राक्षसान्घोरान्नामानि च बभाषिरे ॥ १९ ॥

धूम्राक्ष महानिशाचर । गज वाजी रथ सहपरिवार । येतां देखोनि वीरसंभार । हरिखें वानर नर्तती ॥ ३८ ॥ येतां देखोनि राक्षसभार । शिळा वृक्ष पर्वत शिखर । वानर उठिले करीत मार । तेणें निशाचर खवळले ॥ ३९ ॥ वानर आणि निशाचर । युद्धास मिसळले सत्वर । येरयेरां करिती मार । घाय निष्ठुर हाणोनी ॥ ४० ॥ शूळ शक्ति गदा मुद्गर । मुसळें मारितां वानर । करीत गोफणगुंडामार । निशाचर खवळले ॥ ४१ ॥ घाय चुकवोनि वानर । पुच्छें निवारून शस्त्रसंभार । नखीं विदारिले निशाचर । वाहे रुधिर महावीरां ॥ ४२ ॥ वानर हाणोनि मुष्टिघात ।

१ पायदळ. २ मोहरकी (घोड्याच्या तोंडाला बांधलेली दोरी). ३ शृंगारिले. ४ रथ. ५ सोन्याच्या झुली. ६ गिधाड. ७ अरिष्टें, संकटें. ८ वज्रपात. ९ रक्त. १० घोडे. ११ नाचूं लागले.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

राक्षसां पाडिती मूर्च्छित। राक्षस जंव मारू जात। तंव ते उडत आकाशीं ॥ ४३ ॥ गगना उसळतां वानर। राक्षसीं विंधोनियां तीर। बाणें खिळोनि केला मार। नाचती कपींद्र रणोन्मत्त ॥ ४४ ॥ करावया राक्षसांसी घात। वानर होवोनि एकीभूत। गगना उसळोनि समस्त। शिळा पर्वत वर्षती ॥ ४५ ॥ होतां शिळापर्वतपात। वोडण खड्ग बाण समस्त। शिळातळीं चूर्ण होत। वीर निमत असंख्य ॥ ४६ ॥ वानर हरिनामें गर्जत। राक्षस क्षितितळीं कुंथत। घायवट आक्रंदत। आला अंत राक्षसां ॥ ४७ ॥ मणिमुक्तसुवर्णकवचें। वीर लेइले ब्रीदाचे। हृदय पर्वतीं छेदोनि त्यांचे। मणिमुकुट पाडिले ॥ ४८ ॥ होतां पर्वतमहामार। अश्व सारथी रहंवर। करटभिन्न कुंजर। केले चकचूर रणरंगीं ॥ ४९ ॥ आम्ही श्रीरामाचे भद्रजाती। वानरवीर निजनांवाची ख्याती। रणीं गर्जगर्जोनि युद्ध करिती। आली समाप्ती राक्षसां ॥ ५० ॥ अश्व मारिले अपरिमित। रणीं मोडले रथेंरथ। वीर मारिले असंख्यात। नेली भस्मांत गजसेना ॥ ५१ ॥ छत्र भंगूनि पडिलें धरणीं। शस्त्रें लोळती रणांगणीं। रणीं मारिल्या वीरश्रेणी। रुधिर अवनीं प्रवाहे ॥ ५२ ॥ वानर गगनीं राक्षस अवनीं। मारिले पर्वतपाषाणीं। वीरीं रणकावा घेवोनी। रणांगणीं वोसरले[१] ॥ ५३ ॥ वानरीं करितां महामार। मारिला राक्षसांचा भार। रणीं पळती निशाचर। घायीं दुर्धर गांजिले ॥ ५४ ॥ रणीं मोडला राक्षसपक्ष। तेणें कोपला धूम्राक्ष। धनुर्ध्यीं साधोनियां लक्ष। मारावया विपक्षें[४] चालिला ॥ ५५ ॥

धूम्राक्षोऽथ धनुष्पाणिर्वानरात्रणमूर्धनि ।
हसन्विद्रावयामास विश्वस्तान्शरवृष्टिभिः ॥ २० ॥
नाराचैराहताः केचित्केचिच्च शकलीकृताः ।
केचिद्विमथिता भूमौ रुधिरार्द्रा वनौकसः ॥ २१ ॥
केचिद्विद्राविता नष्टाः संक्रुद्ध राक्षसैर्युधि ।
विभिन्नहृदयाः केचिदेके पार्श्वेन शायिताः ॥ २२ ॥

स्वयें धूम्राक्ष आपण। वाहोनियां धनुष्यबाण। वानरां करूं लागला कंदन। तीक्ष्णबाण विंधोनी ॥ ५६ ॥ जेंवी पर्वतीं पर्जन्यधारा। तेंवी बाणीं विंधिलें वानरां। एकां लागल्या रुधिरधारा। एक अंबरा उडाले ॥ ५७ ॥ एक सर्वांगां क्षतविक्षत। एक पडिले मूर्च्छित। सवेंचि उठोनि युद्ध करीत। एक विवळत शरघातें ॥ ५८ ॥ एक रुधिरें थबथबित। तैसेचि वानर युद्ध करीत। एकां बाण भेदले हृदयाआंत। श्रीरामा स्मरण महाबळी ॥ ५९ ॥ करितां रामनामस्मरण। स्वयें विरोनि जाती बाण। एकाचे वामपार्श्व विंधोन। वानरगण त्रासिले ॥ ६० ॥ होतां देखोनि वानर त्रस्त। तेणें कोपला हनुमंत। रणीं खवळला कृतान्त[५]। करावया घात धूम्राक्षा ॥ ६१ ॥

धूम्राक्षेणार्दितं सैन्यं व्यथितं प्रेक्ष्य मारुतिः ।
अभ्यवर्तत संक्रुद्धः प्रगृह्य महतीं शिलाम् ॥ २३ ॥
क्रोधाद्द्विगुणरक्ताक्षः पितुस्तुल्यपराक्रमः ।
शिलां तां पातयामास धूम्राक्षस्य रथंप्रति ॥ २४ ॥
आपतंतीं शिलां दृष्ट्वा गदामुद्यम्य संभ्रमात् ।
रथादाप्लुत्य वेगेन वसुधायां व्यतिष्ठत ॥ २५ ॥
सा प्रमथ्य रथं तस्य निपपात शिला भुवि ।
सचक्रं कूबरमुखं सध्वजं सशरासनम् ॥ २६ ॥
भित्वा तु सरथं तस्य हनूमान्पवनात्मजः ॥ २७ ॥

हनुमंत कोपेंकरीं। सतयोजन शिळा थोरी। घाली धूम्राक्षरथावरी। गिरागजरीं गर्जोनी ॥ ६२ ॥ जीवें मारावया धूम्राक्ष। क्रोधें जाला तो रक्ताक्ष। दृढ साधोनि अनुलक्ष। शत्रुपक्ष छेदावया ॥ ६३ ॥ हनुमंतें हाणीतली शिळा। न ढळे विंधितां बाणजाळा। न तुटे न फुटे शस्त्रसमेळां। अस्त्रां सकळां अनिवार्य ॥ ६४ ॥ ऐसें जाणोनि निर्धारीं। धूम्राक्ष ते अवसरीं। गदा घेवोनियां करीं। पळाला दुरी लघुवेगें ॥ ६५ ॥ अश्व सारथी रथ कुंजर। ध्वजा पताका रथचक्र। चाप शर छत्र चामर। केलें चकचूर शिळाघातें ॥ ६६ ॥ गदा घेवोनि करतळीं। धूम्राक्ष पळाला महाबळी। तेणें हनुमंत कोपा[६]नळीं। राक्षसदळीं मिसळला ॥ ६७ ॥ पित्या वायूचा आक्रम[७]। तैसाचि हनुमंतीं पराक्रम। करावया राक्षसांचें भस्म। स्वयें संग्राम मांडिला

१ मरूं लागले. २ घायाळ. ३ पळूं लागले. ४ शत्रु. ५ यमासारखा. ६ क्रोधाग्नीनें. ७ पराक्रम.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ ६८ ॥ पुच्छें कवळोनि सैन्य समेळीं। शिर छेदित करतळीं । कपीची न तुटे रोमावळी। शस्त्रानुमेळीं राक्षसां ॥ ६९ ॥ द्रुमपाणी आतुर्बळी । राक्षसां करीत रणरांगोळी । बोंब उठली नादावळी । राक्षसदळीं आकान्त ॥ ७० ॥ ऐकतां हनुमंताचें नांव । भेणें सांडूं पाहती जीव । तोचि संग्रामीं आला स्वयमेव । कल्पांतभय राक्षसां ॥ ७१ ॥ हनुमंतेंसीं रणरवंदळी । निशाचर कांपती चळचळीं । रागें देतां पैं आरोळी । दांतखिळी राक्षसां ॥ ७२ ॥ फोडोनी राक्षसांची फळी । आला धूम्राक्षाजवळी । तोही राक्षस आतुर्बळी । युद्धानुमेळीं खवळला ॥ ७३ ॥

विद्राव्य राक्षसानीकं हनूमान्पवनात्मजः ।
गिरिशृंगं तु संगृह्य धूम्राक्षं व्यद्रवद्बली ॥ २८ ॥
तमापतंतं धूम्राक्षो गदामुद्यम्य वीर्यवान् ।
विनर्दंतं हनूमंतं गदां तां बहुकंटकाम् ॥ २९ ॥
पातयामास धूम्राक्षः स्तनदेशे हनूमतः ।
स कपिर्मारुतबलस्तं प्रहारमचिंतयन् ॥ ३० ॥
धूम्राक्षस्य शिरोमध्ये गिरिशृंगमपातयत् ।
स विह्वलितसर्वांगो गिरिशृंगेण पोथितः ॥ ३१ ॥
पपात सहसा भूमौ विशीर्ण इव पर्वतः ।
निहतं राक्षसं दृष्ट्वा हतशेषा निशाचराः ॥ ३२ ॥
त्रस्ताः प्रविविशुर्लंकां वध्यमाना वनौकसैः ॥ ३३ ॥

करोनि सैन्यासी खंदळी । धूम्राक्ष मारावया महाबळी । शिखर घेवोनि करतळीं । आला तत्काळीं हनुमंत ॥ ७४ ॥ हनुमान आला देखोनि जवळी । धूम्राक्ष झाला क्रोधानळी । गदाघातें हृदयकमळीं । मरणानुमेळीं हाणितला ॥ ७५ ॥ घावो लागला हृदयकमळीं । गदा होवोनि गेली रांगोळी । धूम्राक्ष तये काळीं । स्वयें न्याहाळी विस्मित ॥ ७६ ॥ शक्तिवरदाचे उद्रेक । तेचि गदेसी कंटक । वरदगदा सकंटक । तिसी अंतक धाकत ॥ ७७ ॥ वरदगदा अति वरिष्ठ । घायें मारावया मर्कट । शेखीं गदाच केली पीठ । बळें उद्भट वानर ॥ ७८ ॥ ऐसें धूम्राक्ष जंव विचारी । तंव हनुमंतें शिळा शिखरी । दृढ टाकिली मस्तकावरी । जातां चाचेरीं लवंडला ॥ ७९ ॥ धूम्राक्ष पडतांचि धरणीं । पिवों न मागतां पाणी । प्राण गेला तत्क्षणीं । रणभंगाणी राक्षसां ॥ ८० ॥ रणीं पडलिया मुख्य धुर । सैन्यसंभार निशाचर । मारितां उरले जे वीर । अति सत्वर पळाले ॥ ८१ ॥ एक हुंबत हुंवत । एक कण्हत कुंथत । एक अतिशयेंसीं थिकत[३] । लंकेआंत पैं आले ॥ ८२ ॥ रणीं गौरविलें वीरां । ओढिती अंत्रमाळां[४] शिरा । एक वाहती रुधिरधारा । एकांचे उदरा नखघात ॥ ८३ ॥ वानरवीर जगजेठी । न लागती पळत्यापाठीं । घायाळ गेले लंकात्रिकुटीं । बोंब उठी राक्षसां ॥ ८४ ॥ वानरवीर रणप्रवीण । केलें राक्षसां रणकंदन । हनुमंतें पैं आपण । घेतला प्राण धूम्राक्षाचा ॥ ८५ ॥ धूम्राक्षगदावरदपात । तो हनुमंतें केला व्यर्थ । हनुमंतें केला शिखरघात । तेणें प्राणान्त राक्षसां ॥ ८६ ॥ ऐसें ऐकोनि दशानन । स्वयें जाला क्रोधायमान । पाचारोनि अकंपन । धाडिला आपण संग्रामा ॥ ८७ ॥ येरीकडे रामकटकांत । वानर रामनामें गर्जत । आम्ही श्रीरामाचे दूत । विजयान्वित सर्वदा ॥ ८८ ॥ रामनामाच्या स्मरणीं । वानरां विजय अनुदिनीं । धाकें अपेश गेलें निमोनी । जागृतीं स्वप्नीं दिसेना ॥ ८९ ॥ स्मरणापासीं विजयवृत्ती । स्मरणापासीं यश कीर्ती । स्मरणापासीं ब्रह्मप्राप्ती । हे विख्याती स्मरणाची ॥ ९० ॥ विस्मरणें अपेशप्राप्ती । विस्मरणीं नित्य अपकीर्ती । विस्मरण स्वयें पापमूर्ती । नरकप्राप्ती विस्मरणें ॥ ९१ ॥ एका जनार्दना शरण । कथा रम्य रामायण । हनुमंतें स्वयें आपण । केलें निर्वाण[६] धूम्राक्षा ॥ ९२ ॥ लागला हनुमंताचा घात । कोटि जन्मांचा मरणावर्त । चुकोनि जाला नित्यमुक्त । भाग्यवंत धूम्राक्ष ॥ ९३ ॥ एका जनार्दना शरण । श्रीरामदृष्टीपुढें मरण । बाण भेदितां ब्रह्म पूर्ण । समाधिचिद्घन संग्राम ॥ ९४ ॥ येथें मूर्च्छनेचा जो बोध । तो तंव केवळ आनंदकंद । एका जनार्दनें उद्बोध । परमानंद संग्रामीं ॥ ९५ ॥ जो अहंममतेसीं करी संग्राम । तो निधडा योद्धा परम । त्यासी साह्य सदा श्रीराम ।

१ हातांत वृक्ष घेतलेला. २ झेंप जाऊन. ३ चरफडत. ४ आंतडीं. ५ रामाच्या सैन्यांत. ६ मोक्ष. ७ मरणक्रम. ८ आनंदाचें मूळ, आश्रयस्थान. ९ ज्ञान. १० छातीचा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

स्वयमेव ब्रह्म तो होय ॥ ९६ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां धूम्राक्षवधो नाम चतुर्दशोऽध्यायः ॥ १४ ॥ ॥ ओंव्या ॥ ॥ ९६ ॥ श्लोक ॥ ३२ ॥

अध्याय पंधरावा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥

धूम्राक्षं निहतं श्रुत्वा रावणो राक्षसेश्वरः ।
क्रोधेन महताविष्टो निःश्वसन्नुरगो यथा ॥ १ ॥
दीर्घमुष्णं च निःश्वस्य क्रोधेन कलुषीकृतः ।
अब्रवीद्राक्षसं क्रूरं वज्रदंष्ट्रं महाबलम् ॥ २ ॥
गच्छ त्वं वीर निर्याहि राक्षसैः परिवारितः ।
जहि दाशरथिं रामं सुग्रीवं वानरैः सह ॥ ३ ॥
तथेत्युक्त्वा द्रुततरं मायावी राक्षसेश्वरः ।
निर्जगाम बलैः सार्धं बहुभिः परिवारितः ॥ ४ ॥

धूम्राक्ष राक्षस बळवंत । त्याचा हनुमंतें केला घात । तें ऐकोनि लंकानाथ । क्रोधान्वित अति दुःखें ॥ १ ॥ धूम्राक्षाचें युद्धमरण । ऐकोनि स्वयें रावण । सर्पप्रायें[१] फुंपावे पूर्ण । क्रोधें प्राण त्यजूं पाहे ॥ २ ॥ धीर वीर महाशूर । वज्रदंष्ट्र निशाचर । त्यासी सांगे दशशिर । युद्धा सत्वर निघावें ॥ ३ ॥ रणा जावोनि आपण । मारावे राम लक्ष्मण । अंगद सुग्रीव कपिगण । हनुमान सोधून धरावा ॥ ४ ॥ राक्षसांचा दुर्धर भार । सबळ सेनेसीं सपरिवार । सहराम मारावे वानर । लहान थोर शोधूनी ॥ ५ ॥ ऐकोनि रावणाचें वचन । वज्रदंष्ट्र उल्लासोन । वंदोनियां दशानन । निघे आपण संग्रामा ॥ ६ ॥ मुकुट कुंडलें बाहुभूषणें । केयूरान्वित करकंकणें । अंगत्राण शिरस्त्राणें[२] । करत्राणें गोधांगुळी[३] ॥ ७ ॥ वज्रदंष्ट्र वीर दारुण । लेवोनियां रणाभरण । सज्जोनियां धनुष्यबाण । निघे आपण संग्रामा ॥ ८ ॥ वाजी पदाती खर उष्ट्र । वाहनारूढ निशाचर । रथ ध्वजी मत्त कुंजर । सैन्यसंभार सज्जुनी ॥ ९ ॥ विचित्र पताका कडकडाट । रथ चालिले घटघडाट । विचित्रध्वज अति वरिष्ठ । वीर उद्भट चालिले ॥ १० ॥ हेमाभरणीं सालंकृत । ध्वजपताकीं रथ शोभत । वज्रदंष्ट्र बैसला तेथ । दक्षिणावर्त साधूनी ॥ ११ ॥ गदापरिघबाणयुत । खड्गतोमरशूळहस्त । एक वीर मुशलान्वित । एक झेलित मुद्गल ॥ १२ ॥ वोडणखगें महावीर । एक पायींचे धनुर्धर । पायदळाचे मोगर । वीर झुंजार गर्जती ॥ १३ ॥ वीरांअंगीं आंगवण । कांसा घातल्या नानावरण । अंगप्रत्यंगीं रणाभरण । उल्लास पूर्ण युद्धाचा ॥ १४ ॥ दोहीं बाहीं गजथाट[४] । गजयोद्धे वीर उद्भट । शूळ त्रिशूळ तोमर निकट । गजघटे चालविती ॥ १५ ॥ गजयुद्धाच्या व्युत्पत्ती । त्या दाविती गतिविगती । परसैन्या लाविती ख्याती । दाविती युद्धीं रणमारें ॥ १६ ॥ अश्वगजरथघडघडाट । वीरीं वीरांचा कडकडाट । दक्षिणद्वारें सैन्यसंघात । वज्रदंष्ट्र निघाला ॥१७॥

निःसृतो दक्षिणद्वारादंगदो यत्र यूथपः ।
तेषां निष्क्रममाणानामशुभं समजायत ॥ ५ ॥

अंगद यूथपें[५] दक्षिणद्वारीं । सैन्य निघतांचि बाहेरी । तेथें जाली नवलपरी । निशाचरीं अशुभार्थ ॥ १८ ॥ उलूक तळपोनि अंबरीं । बैसला वज्रदंष्ट्रावरी । भालू भुंकती उंच स्वरीं । निशाचरीं अशुभार्थ ॥ १९ ॥ वज्रदंष्ट्राची जेठी । अपशकुन नाणी दृष्टीं । युद्धा निघे उठाउठीं । कडकडाटीं ससैन्य ॥ २० ॥ अंगदाचे वानरवीर । युद्धा मिसळले सत्वर । राक्षस हाणिती हतियेर । बहुप्रकारें वानरीं ॥ २१ ॥ मृदंग शंख भेरी गहन । काहळा वीणा आणि विषाण । रणीं त्राहाटिलें[६] निशाण । आलें स्फुरण उभय दळीं ॥ २२ ॥ राक्षस हाणिती हतियेर । घाय चुकविती वानर । बाहुबळें निशाचर । रणीं सत्वर उपटिती ॥ २३ ॥ वानर आणि निशाचर । युद्धा मिसळले दुर्धर । घाय हाणिती निष्ठुर । येरयेरां नोंकोनी ॥ २४ ॥ शस्त्रें हाणितां निशाचर । गगनीं उसळती वानर । घाय टाळूनि कपींद्र । करिती विचित्र तें ऐका ॥ २५ ॥ धनुष्याचीं तोडिती शिंतें[७] । आसडोनि घेती शस्त्रांतें । निःशस्त्र करोनि

१ सर्पासारखा. २ पक्खरू. ३ धनुष्याच्या दोरीचा घासा पडूं नये म्हणून हातांत घालतात तें. ४ गजसमूह. ५ सेनापति. ६ धिक्कारून. ७ दोऱ्या.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

राक्षसांतें। मुष्टिघातें मारिती ॥ २६ ॥ बाहुबळें महावीर । झोंबी घेताती दुर्धर । मल्लयुद्धींचा प्रकार । चमत्कार दाविती ॥ २७ ॥ मुष्टिघात तळवेघात । चरणघात बाहुघात । वानर खवळले रणांत । करिती घात राक्षसां ॥ २८ ॥ गुडघ्यां खांदे कोंपरीं । तडवे हाणिती परस्परीं । धडका हाणोनियां उरीं । महामारी राक्षसां ॥ २९ ॥ रणीं वानर वृक्षहस्त । रथी सारथी साश्वरथ । अवघ्यां करोनि एकघात । वीर कुंथत पाडिले ॥ ३० ॥ वानर गगनीं उसळोन । शिळा पर्वत पाषाण । टाकोनियां करिती चूर्ण । रणकंदन राक्षसां ॥ ३१ ॥ भग्नजानु भग्नकटी । वीर पाडिले कोट्यनुकोटी । वज्रदंष्ट्रें देखोनि दृष्टी । रणसंकटीं क्षोभला ॥ ३२ ॥ वानरीं मारिले निशाचर । वाहती रुधिराचे पूर । देखोनि वज्रदंष्ट्रवीर । रथ सत्वर प्रेरिला ॥ ३३ ॥ स्वयें वज्रदंष्ट्र आपण । सज्जोनियां धनुष्यबाण । साटोपोनि रणांगण । वानरसैन्य विंधिलें ॥ ३४ ॥ रणोन्मत्त अति दुर्धर । बाण न गणिती वानर । तिंहीं वेढिला वज्रदंष्ट्र । शिळा-शिखरद्रुमपाणि ॥ ३५ ॥ रणीं नाटोपती वानर । चिंतानिमग्न वज्रदंष्ट्र । सर्वसंहारक जें अस्त्र । अति दुर्धर योजिलें ॥ ३६ ॥ तो बळवंत अस्त्रवेत्ता । करावया वानरांच्या घाता । होय अस्त्रातें सोडिता । साटोपता समंत्र ॥ ३७ ॥ अस्त्रविद्येचें बळ गाढें । मागील मागें पुढील पुढें । वानरां भेटलें कुऱ्हाडें । चहूंकडे रणमार ॥ ३८ ॥ अस्त्रविद्येचिया बाणीं । वानर पाडिले रणांगणीं । एक उफळतां गगनीं । पाडी विंधोनी साटोपें ॥ ३९ ॥ जेंवी पाहोनि प्रळयान्त । अंतकें करी जीवघात । तेंवी वानरां रणावर्त । असे करीत वज्रदंष्ट्र ॥ ४० ॥ देखोनि वानरांच्या भारा । क्रोधें कांपतसे थरथरां । सज्जोनियां बाणधारा । रणीं वानरां निवटीत ॥ ४१ ॥ अस्त्रविद्येचिये बाणीं । वानरसेना भंगली रणीं । अंगदें देखिली दुरोनी । आला गर्जोनी साटोपें ॥ ४२ ॥ भंगली देखोनी कपिसेना । अंगद कोपला चौगुणा । वृक्ष उपटोनियां जाणा । राक्षससेना निर्दाळी ॥४३॥ सिंह देखतांचि दृष्टीं । मृगें पळती बारा वाटीं । अंगद-वृक्षघायासाठीं । राक्षसकोटी निमताती ॥ ४४ ॥ बळें हाणितां वृक्षघातीं । राक्षसशिरें पडती क्षितीं । रुधिराचे पूर वाहती । अंगदें ख्याती लाविली ॥ ४५ ॥ जे जे युद्धा संमुख येती । वृक्ष हाणितां रणीं पडती । वृक्ष घेवोनियां हातीं । अति आघातीं मारीत ॥ ४६ ॥ जेंवी प्रळयकाळींचा वन्ही । वाढे उदक निर्दाळूनी । तेंवी राक्षस निर्दाळूनी । अंगद रणीं खवळला ॥ ४७ ॥ मूळ छेदल्या वृक्ष लवंडती । तेंवी राक्षस पाडोनि क्षितीं । गज रथ अश्व सारथी । वृक्षघातीं शतचूर्ण ॥ ४८ ॥ भंगिले रथ ध्वज विचित्र । युद्धें मारिले छत्रधार । छत्रभंगें अलंकार । हार केयूरें लोळती ॥ ४९ ॥ मुकुट कुंडलें सशिरें । बाहु लोळती सर्पाकारें । करकंकणें केयूरें । शस्त्रें वस्त्रें लोळती ॥ ५० ॥ लोळती वस्त्रें अलंकार । तेणें शोभे भूमि विचित्र । शरत्काळीं जेंवी नक्षत्र । निशीं सचंद्र शोभत ॥ ५१ ॥ रणीं मारितां निशाचर । वाहती रुधिराचे पूर । तेणें भूमि भयंकर । अति दुस्तर भासत ॥ ५२ ॥ तुटोनि दूर गेलीं शिरें । अरुंडें लोळती शरीरें । गजकलेवरें महाथोरें । अंगदवीरें पाडिलीं ॥ ५३ ॥ देखोनि अंगदाच्या मारा । पळ सुटला निशाचरां । अवघीं कांपती थरथरां । धीर वीरां न धरवे ॥ ५४ ॥ लागतां वायूचा आघात । मेघमंडळ हंताहत । तेंवी राक्षस समस्त । रणीं पळत अति धाकें ॥ ५५ ॥ राक्षसांचें सबळ दळ । अंगदें मर्दिलें सकळ । वज्रदंष्ट्र महाबळ । कोपें प्रबळ चालिला ॥ ५६ ॥ इंद्रचापसम दुर्धर । विस्फारोनि धनुष्य घोर । नादें कांपे चराचर । महावीर वज्रदंष्ट्र ॥ ५७ ॥ इंद्राचापीं नाद दुर्धर । तैसा धनुर्ष्यीं टणत्कार । लक्षोनि वानरांचा भार । शर दुस्तर सोडिले ॥ ५८ ॥ वज्रदंष्ट्रासवें शूर । निधडे भरंवशाचे वीर । रथीं बैसोनि अपार । युद्धा दुर्धर मिसळले ॥ ५९ ॥ युद्धा मिसळतां निशाचर । कपिसेना दुर्धर वीर । युद्धा खवळले वानर । साश्व रहंवर उपडिती ॥ ६० ॥ वानरसैन्याचिया कोटी । रणीं पावल्या उठाउठीं । राक्षसांच्या झोंटमिठी । रणीं सन्निधीं भिडती ॥ ६१ ॥ राक्षसांचे निधडे वीर । त्याहून बळवंत

१ चिंतेमध्यें निमग्न-बुडालेला. २ काळ, यम. ३ रणरूपी भोंवरा. ४ चौपट. ५ जमिनीवर. ६ कोसळतात.

७ बाहुभूषणें. ८ रक्ताचे. ९ वितुळतें. १० टणत्कार करून. ११ सैन्य.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वानर । युद्ध करिती घोरांदर । योद्धे दुर्धर पाडोनी ॥ ६२ ॥ राक्षस भिडती सर्वांगें । वानर न सरतीच मागें । पाय हाणितां पैं रागें । करिती अष्टांगें शतचूर्ण ॥ ६३ ॥ बाणशूळत्रिशूळघात । वृक्ष शिळा गिरी पर्वत । परस्परें घाय हाणित । रुधिरोक्षित[1] महावीर ॥ ६४ ॥ अदट दादुर्गी वानरें । राक्षसांचीं छेदिती शिरें । बाहुभंगें निशाचरें । अवनीं[2] रुधिरें[3] वाहती ॥ ६५ ॥ वानर रणीं पडतां जाण । लाविती श्रीरामचरणरेण । तेणें घाय कानपोन[4] । उठती गर्जोन संग्रामीं ॥ ६६ ॥ वानर वर्षती पर्वत । तेणें शस्त्रें चूर होत । राक्षस वीर पडिले बहुत । पर्वतपातमहामारें ॥ ६७ ॥ शिळाशिखरपर्वतपात । तेणें राक्षसां प्राणान्त । बोंब उठली सैन्यांत । रणकंदनार्थ राक्षसां ॥ ६८ ॥ रणीं पडले अति दुर्धर । काक बक श्येन घार । वृकें[5] जंबुकें[6] श्वान सूकर । मांस रुधिर भक्षिती ॥ ६९ ॥ शिरें गेलीं पैं तुटोनी । कबंधें धांवती रणीं । भूतें नाचती गर्जोनी । घेती धणी[7] मांसाची ॥ ७० ॥ राक्षसांचे भुजाभार । तुटोनि पडिले कर शिर । तेणें रणभूमि भयंकर । अति दुर्धर भासत ॥ ७१ ॥ युद्धीं खवळोनी वानर । रणीं पाडिले निशाचर । निशाचरीं करोनि मार । रणीं वानर पाडिले ॥ ७२ ॥ वानर पडतां निर्वाणें[8] झुंजें । सर्वेचि उठती रामपदरजें । राक्षस पडती युद्धव्याजें । रणसमाजें प्राणान्त ॥ ७३ ॥ श्रीरामबळें वनचर । रणीं उद्भट वानरवीर । धाकें पळती निशाचर । राक्षसभार भंगले ॥ ७४ ॥ वानरांच्या रणसंत्रासीं । भय घेवोनि राक्षसीं । वज्रदंष्ट्राचे पाठीसीं । चळकांपेंसीं निघाले ॥ ७५ ॥ वज्रदंष्ट्र सांगती सकळ । वानरांचें प्रबळ बळ । तुम्ही येथोनि शीघ्र काढा पळ । शिळा कपाळ भेदिती ॥ ७६ ॥ पर्वतांच्या घायें जाण । शस्त्रें तितकीं होती चूर्ण । आडवें न चले वोडण । वृथा प्राण कां देतां ॥ ७७ ॥

स्वबलस्य च घातेन अंगदस्य बलेन च ।
राक्षसः क्रोधमाविष्टो वज्रदंष्ट्रो महाबलः ॥ ६ ॥
विस्फार्य च धनुर्घोरं शक्राशनिसमप्रभम् ।
वानराणामनीकानि प्रकिरन्शरवृष्टिभिः ॥ ७ ॥

राक्षसांचें दीन वदन । सैन्य भंगलें देखोन । वज्रदंष्ट्र कोपायमान । धनुष्यबाण सज्जिले ॥ ७८ ॥ राक्षसांचें रणमर्दन । वानरीं केलें कंदन । तें वज्रदंष्ट्रें देखोन । ताम्रनयन क्षोभला ॥ ७९ ॥ धनुष्य घेवोनियां जाण । कंकपत्री सतेज बाण । करी वानरां विदारण । खोंचोनि बाण सर्वांगीं ॥ ८० ॥ वृक्ष शिळा शिखरें पर्वत । बाणीं तोडिले समस्त । वानर पाडिले बहुत । क्षत विक्षत शरघातें ॥ ८१ ॥ बाणलाघवी विद्या पूर्ण । सात पांच नव जण । घायें पाडी आठ जण । केलें कंदन वानरां ॥ ८२ ॥ घायीं अडकले असतां शर । संमुख भिडती वानर । रामनामें बळ थोर । वज्रदंष्ट्र विस्मित ॥ ८३ ॥ देखोनि बाणमहामार । रणीं भंगले वानर । अंगदापासीं सत्वर । आले समग्र ठाकोनि ॥ ८४ ॥ जेंवी झाल्या व्यसन[10] प्राप्त । पित्यापासीं ये अपत्य । तेंवी अंगदापासीं त्वरित । आले धांवत वानर ॥ ८५ ॥ मोडली वानरांची सेना । वाळिसुतें[11] देखोनि नयना । कोप आला चौगुणा । घ्यावया प्राणा तयाच्या ॥ ८६ ॥ अंगद क्रोधें ताम्राक्ष[12] । येवोनि वज्रदंष्ट्रा संमुख । पुनःपुन्हां पाहोनि मुख । मारूं निःशंक चालिला ॥ ८७ ॥ निशाचर मज मारिती । हें भय नाहीं अंगदा चित्तीं । करावया राक्षसांची शांती । भद्रजाती खवळला ॥ ८८ ॥ देखोनि अंगद महावीर । शिष्टाईचा हा वानर । येणें गांजिला दशशिर । निशाचर कांपती ॥ ८९ ॥ देखोनियां वाळिकुमर । खळबळिला राक्षसभार । तेव्हां अंगदासमोर । वज्रदंष्ट्र स्वयें आला ॥ ९० ॥ मदोन्मत्त गज केसरी । दोघे भिडती तैशियापरी । घाय हाणिती नाना कुसरीं । शिरीं उदरीं तळपोनी ॥ ९१ ॥ वज्रदंष्ट्रें धांवोनी । घाय हाणितां पडला अवनीं । अंगद उसळला गगनीं । उडी टाकोनि मारावया ॥ ९२ ॥ वज्रदंष्ट्र स्वयें आपण । वर्मस्थान लक्षोन । वर्षे शतसहस्र बाण । घ्यावया प्राण अंगदाचा ॥ ९३ ॥ अंगद बाणें रुधिरोक्षित[13] । रणभैरव रणोन्मत्त । तैसा रणरंगीं डुल्लत । करावया घात राक्षसां ॥ ९४ ॥ वज्रदंष्ट्राचे जे बाण । अंगदासी तृणासमान । त्याचा घ्यावयासी प्राण ।

१ रक्तानें माखलेले. २ पृथ्वीवर. ३ रक्तें. ४ नाहींसे होऊन. ५ लांडगे. ६ कोल्हे. ७ तृप्ती. ८ निकराच्या.

९ नाश. १० संकट. ११ अंगदानें. १२ क्रोधानें तांबडे डोळे झाले आहेत असा. १३ रक्तानें माखलेला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

आला गर्जोन साटोपें ॥ ९५ ॥ त्याचा करावया चूर । सहस्रशाखांचा तरुवर । रागें उपटोनि दुर्धर । रणीं सत्वर सोडिला ॥ ९६ ॥ आलें देखोनियां झाड । राक्षसां थोर हडबड । घायें करी हो निवाड । हाडेंहाड फोडूनी ॥ ९७ ॥ हडबडिलें राक्षससैन्य । वज्रदंष्ट्र सावधान । कैसें केलें रणकंदन । निवारण वृक्षाचें ॥ ९८ ॥ देखोनि वृक्षाचें पतन । वज्रदंष्ट्र सावधान । गदा साटोपें घेऊन । रथावरून उडाला ॥ ९९ ॥ वज्रदंष्ट्र महाबळी । गदाघातें वृक्ष निर्दळी । छेदोनि पाडिला भूतळीं । पिटिली टाळी राक्षसीं ॥ १०० ॥

समापतंतं तं दृष्ट्वा रथादाप्लुत्य वीर्यवान् ।
गदापाणिरसंभ्रांतः पृथिव्यां समतिष्ठत ॥ ८ ॥
अंगदेन शिला क्षिप्ता गत्वा तु रणमूर्धनि ।
वज्रदंष्ट्रस्य शिरसि पातयामास वानरः ॥ ९ ॥

अंगद वीर तेचि काळीं । उडोनियां अंतराळीं । दीर्घ घेवोनियां शिळी । घाली कपाळीं वज्रदंष्ट्रा ॥ १ ॥ श्लाघोनि जंव बैसला रथावरी । तंव शिळा बैसे येवोनि शिरीं । कासावीस होत चांचरी । कष्टेंकरीं पळाला ॥ २ ॥ शिळा पडतां रथावरी । रथ सारथी शस्त्रसामग्री । सचक्र साटा[1] अंके धुरी । केली चकचुरी ध्वजेंसीं ॥ ३ ॥ शिळेतळीं निजशरीर । चुकवोनि वांचला वज्रदंष्ट्र । तेणें कोपला वानर । पर्वत थोर उचलिला ॥ ४ ॥ नाना वृक्ष सुशोभित । उपटिला उचलोनि पर्वत । वज्रदंष्ट्रावरी घालीत । क्रोधान्वित अंगद ॥ ५ ॥ घायापाठीं घायासी । येतां राक्षस कासाविसी । निवारण नाठवे त्यासी । तंव पर्वत शिंसीं[3] वाजला ॥ ६ ॥ पर्वत पडतांचि सबळ । त्याचें फुटोनियां कपाळ । जाला अशुद्धें[4] बंबाळ । मूर्च्छा तत्काळ त्या आली ॥ ७ ॥ गदा टेंकोनि दोहीं हातीं । मूर्च्छापन्न पडला क्षितीं । मुहूर्त एक मूढमती । कांहीं स्फूर्ति स्फुरेना ॥ ८ ॥ वज्रदंष्ट्र पडतां अवनीं । बोंब उठली राक्षससेनीं । वानर नाचती रणांगणीं । पडिला रणीं वज्रदंष्ट्र ॥ ९ ॥ उत्साह आणि आकान्त । दोहीं दळांमाजी होत । मूर्च्छा भंगूनियां त्वरित । सावचित्त तो झाला ॥ ११० ॥ वज्रदंष्ट्र सावध होत । गदा घेवोनि क्रोधान्वित । लक्षोनियां वाळिसुत । त्याच्या वधार्थ धांविन्नला ॥ ११ ॥ गदा घेवोनि क्रोधेंकरीं । अंगद ताडिला उरावरी । तो न डंडळी तिळभरी । जैंवी कां गिरि पर्जन्यें पैं ॥ १२ ॥ डंडळेना वाळिसुत । वृथा गेला गदाघात । अंगदें उडोनि धरिला हात । आला प्राणान्त करावया ॥ १३ ॥ हाणों येतां मुष्टिघात । मल्लविद्या आकळित । वज्रदंष्ट्र क्रोधान्वित । अनुलक्षित मारावया ॥ १४ ॥ बळें निमटोनियां गळा । परस्परें लाविती कळा । लाता देतां हृदयकमळा । लागे डोळां अर्धचंद्री ॥ १५ ॥ सर्वेचि होवोनि सावचित्त । आघातघात उलटघात । चिकाटचा तळीं तळघात । घायें वर्मस्थ हाणिती ॥ १६ ॥ वानर आणि निशाचर । जाले घायीं अति जर्जर । सर्वांगीं वाहे रुधिर । येरां येर न ढळती ॥ १७ ॥ किंशुक फुलले वसंतांत । तैसे दोघे रणीं आरक्त । युद्धश्रमें श्रमभूत । तरी भिडत साटोपें ॥ १८ ॥ अंगदें उडोनि ते काळीं । सुशोभित पुष्पीं फळीं । वृक्ष उपडोनि समूळीं । रणकल्लोळीं पातला ॥ १९ ॥ अंगदाचें बळ वितंड । वृक्ष देखोनि प्रचंड । राक्षसाचें बळबंड । खंडविखंड हों सरलें ॥ १[illegible] ॥ वज्रदंष्ट्र सावचित्त । वोडणखड्ग घाली हात । वोपत्रिप तळप देत । करावया घात अंगदा ॥ २१ ॥ अर्धचंद्र दृढ वोडण । ज्वाळमाळारत्नभूषण । धडकधडकूं दे किराण । दावी आंगवण वज्रदंष्ट्र ॥ २२ ॥ एक वोडणखड्गहस्त । दुजा वीर वृक्षहस्त । निर्वाणींचे घाय देत । निजविजयार्थ साधावया ॥ २३ ॥ भैरव चर्ची सिंदूर । तैसे रक्तें आरक्त वीर । धांवती येरयेरांसमोर । घाय निष्ठुर हाणोनी ॥ २४ ॥ अंगदाचा वृक्षघात । राक्षसाचा खर्गघात । दोघे पडले मूर्च्छागत । सावचित्त संग्रामीं ॥ २५ ॥ संग्रामीं अति भ्रांत । दोघे घायीं जर्जरित । रणीं पडले मूर्च्छित । तोही वृत्तान्त अवधारा ॥ २६ ॥ दोघे वीर महाहठी । रणीं बैसले मेटीखुंटीं । घुंमीं बाष्प दाटलें कंठीं । नेत्रवाटी बहु विकळ ॥ २७ ॥ अंगदवीर मूर्च्छेआंत । रामनामें सावचित्त । वज्रदंष्ट्राचा केला घात । निमेषांत तो ऐका ॥ २८ ॥ वृक्षघाय गेला व्यर्थ । तेणें अंगद क्रोधान्वित । सर्प

१ रथाची साटी. २ रथाचा आंस. ३ मस्तकीं. ४ रक्तानें. ५ घाबरेना. ६ पळस. ७ सावध. ८ ढाल व तरवारीला. ९ उडी. १० निकराचे. ११ ढोंपरें टेंकून. १२ आवेशानें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

जैसा दंडाहत । तैसा धांवत साटोपें ॥२९॥ अंगद वीर निधडा जाण । वज्रदंष्ट्रासी सावधान । स्वयें करोनि आपण । केलें हनन गर्जोनी ॥ १३० ॥

निर्मलेन सुधौतेन खड्गेनास्य महच्छिरः ।

जघान वज्रदंष्ट्रस्य वालिसूनुर्महाबलः ॥ १० ॥

वज्रदंष्ट्राचें खग थोर । अति निर्मळ सतेज धार । अंगदें हिरोनि सत्वर । छेदिलें शिर तयाचें ॥ ३१ ॥ अंगद वीर अति विख्यात । त्याच्या शस्त्रें त्याचा घात । करोनियां मस्तकपात । रणीं गर्जत हरिनामें ॥ ३२ ॥ अंगद वीर अति निधडा । घायें शिर उडविलें पुढां । अशुद्ध वाहे भडभडां । केला निंतोडा राक्षसां ॥ ३३ ॥ वज्रदंष्ट्राचा केला घात । राक्षससैन्य भयभीत । अवघे पळती भयान्वित । वानरीं अंत पुरविला ॥ ३४ ॥ मुकुट कुंडलें शस्त्रास्त्रें । अनर्घ्य भूषणें विचित्रें । सांडोनि पळती निशाचरें । लंकाद्वारीं आकान्त ॥ ३५ ॥ एक रडत एक पडत । एक अत्यंत चरफडत । एक पाणी पैं मागत । खुणा हातें दावूनी ॥ ३६ ॥ एक हंबतें हुंबतें । एक कुंथतें कण्हतें । एकाचीं लोंबती अंतें । लंकेशातें निंदिती ॥ ३७ ॥ चोरोनियां सीता सुंदरी । आम्हांसी केली महामारी । धाड आणिली लंकेवरी । होत बोहरी राक्षसां ॥ ३८ ॥ राक्षससैन्य समस्त । पळोनि गेलें लंकेआंत । विजयी जाला वाळिसुत । श्रीरघुनाथकृपेनें ॥ ३९ ॥ मारोनियां वज्रदंष्ट्र । विजयी जाला वाळिकुमर । वानरांसी हर्ष थोर । सुखें निर्भर अंगद ॥ १४० ॥ मारोनियां वृत्रासुर । शोभे जैंवी सुरेश्वर । तैसा शोभे अंगद वीर । सपरिवार वानरीं ॥ ४१ ॥ अंगदाचें सबळ बळ । वानर वानिती सकळ । श्रीरामदर्शना प्रेमळ । आला निजदळेंसमवेत ॥४२॥ संमुख देखोनि रामचंद्र । अवघीं केला जयजयकार । श्रीरामनामाचा गजर । नमस्कार घातला ॥४३॥ वंदोनियां रामचरण । अभिवंदिला लक्ष्मण । सुग्रीवासी लोटांगण । बिभीषण वंदिला ॥४४॥ प्रेमें वंदिला हनुमंत । नळनीळादि जांबवंत । वानरसमुदाय समस्त । अभिवंदित अंगद ॥४५॥ राजकुमर बळवंत । सत्त्वगुणी अति समर्थ । अंगद वीर विख्यात । स्वयें वानीत श्रीराम ॥४६॥ अंगदें केलें रणविंदान । झालें वज्रदंष्ट्रहनन । पुढें येईल अकंपन । तेंही रण अवधारा ॥४७॥ अंगदवीरें समराआंत । वज्रदंष्ट्राचा केला घात । हें ऐकोनि लंकानाथ । क्रोधान्वित स्वयें जाला ॥४८॥

वज्रदंष्ट्रं हतं श्रुत्वा वालिपुत्रेण रावणः ।

बलाध्यक्षमुवाचेदं कृतांजलिमुपस्थितम् ॥ ११ ॥

शीघ्रं निर्यांतु दुर्धर्षा राक्षसा घोरदर्शनाः ।

अकंपनं पुरस्कृत्य सर्वशस्त्रास्त्रकोविदम् ॥ १२ ॥

ततो नानाप्रहरणा भीमाक्षा भीमदर्शनाः ।

निर्ययू राक्षसा मुख्या बलाध्यक्षप्रणोदिताः ॥ १३ ॥

अति क्रोधें दशानन । पाचारोनी अकंपन । तूं तंव वीरपंचाननं । रणप्रवीण रणयोद्धा ॥ ४९ ॥ सौमित्रेंसहित श्रीराम । रणीं मर्दून प्लवंगम । माझे निढळींचा पुरीं घाम । प्रिय परम मज करीं ॥ १५० ॥ ऐकोनि रावणाचें वचन । गर्जिन्नला अकंपन । वानरेंसीं राम लक्ष्मण । न लागतां क्षण निवटीन ॥ ५१ ॥ आलिया सुरासुरगण । मागें न सरें मी अकंपन । राम लक्ष्मण बापुडे कोण । वानर तृण मजपुढें ॥ ५२ ॥ ज्याचे देखतां दर्शन । भयानक अति दारुण । धाकेंचि वीर सांडी प्राण । अत्युग्र सैन्य सज्जिलें ॥५३॥ ज्याचें देखतां विकट वदन । सैन्य पडे मूर्च्छापन्न । ऐसें दुर्धर सज्जोनि सैन्य । अकंपन निघाला ॥ ५४ ॥ कात्या त्रिशूळ तोमर । गदा मुद्गल परिघ घोर । झेलीत शस्त्रसंभार । निशाचर निघाले ।५५॥ अकंपनाअंगीं आंगवण । सबळ बळाचा गर्व पूर्ण । रावणें देवोनि सन्मान । करावया रण धाडिला ॥ ५६ ॥

रथमास्थाय विपुलं तप्तकांचनभूषणम् ।

अकंपनस्तु तैर्घोरै राक्षसैः सह निर्ययौ ॥ १४ ॥

तस्य निर्धावमानस्य संरब्धस्य युयुत्सया ।

अकस्माद्दैन्यमागच्छद्धयानां रथवाहिनाम् ॥ १५ ॥

प्रस्फुरन्नयनं चास्य सव्यं युद्धाभिकांक्षिणः ।

तानुत्पातानधः कृत्वा निर्जगाम निशाचरः ॥ १६ ॥

शस्त्रास्त्रीं रथ सज्जून । रथीं बैसला अकंपन । कवच कुंडलें तप्तकांचन । विराजमान महावीर

१ रक्त. २ नाश. ३ आंतडीं. ४ नाश. ५ इंद्र ६ आपल्या सर्व सेनेसह. ७ वीरांमध्यें सिंहासारखा. ८ वानर. ९ दांत. १० भयंकर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ ५७ ॥ अकंपन महावीर । स्वभावें क्रूर आणि अत्युग्र । घेवोनि निशाचरांचा भार१ । युद्धा सत्वर निघाला ॥ ५८ ॥ रथ चालतां घडघडाट । शुद्ध भूमिका मार्ग सपाट । चहूं वारुवां२ वळली मेट । मारितांही साट न उठती ॥ ५९ ॥ वारुवें दांतीं धरली भोये । उठवितां न उठती पाहें । अकंपनें धरिलें भये । करावें काये नाठवे ॥ १६० ॥ सचिंत होतां मुख्य धुरें३ । अशुभें लवे वाम नेत्र । भयभीत निशाचर । दुश्चिन्हें थोर देखोनी ॥ ६१ ॥ साटोप धरोनियां पोटीं । वारु उठवी जगजेठी । त्यांची थापटोनियां पाठी । रथ संन्निष्ठीं४ सज्जिला ॥ ६२ ॥ वारु करोनि सुप्रसन्न । रथीं बैसला अकंपन । सवेग करितां रथाभिगमन । पुढें दुश्चिन्ह देखिलें ॥ ६३ ॥ वृक जंबुक सिंह व्याघ्र । ऊर्ध्वमुख विवर्णस्वर५ । शब्द वदती अत्युग्र । पक्षीही क्रूर शब्द करिती ॥ ६४ ॥ निधडा वीर अकंपन । शूर पुरुषार्थी पंचानन । उत्पात सांडिले हेळसून६ । करावया रण निघाला ॥ ६५ ॥ शंके देखोनि जो उत्पात । त्याचे अंगीं नाहीं पुरुषार्थ । जय न पवे तो युद्धांत । जो भयभीत अपशकुनें ॥ ६६ ॥ अकंपन वीरउद्भट । करोनि वाढिवेचा नेट । रथ प्रेरिला घडघडाट । अति कडकडाट युद्धाचा ॥ ६७ ॥

तस्य निर्यातमानस्य रक्षसः सह राक्षसैः ।
बभूव सुमहान्नादः क्षोभयन्निव सागरम् ॥ १७ ॥
तेन शब्देन वित्रस्ता वानराणां महाचमूः ।
द्रुमशैलप्रहाराणां योद्धुं समवतिष्ठताम् ॥ १८ ॥
तेषां युद्धं महाघोरं बभूव कपिरक्षसाम् ।
रामरावणयोरर्थे समरे त्यक्तजीविनाम् ॥ १९ ॥
अन्योन्यं रजसा तेन कौशेयारुणपांडुना ।
संवृत्तं धूम्रधूम्रेण ददृशुस्ते रणाजिरम् ॥ २० ॥
न ध्वजो न पताका वा चर्म वा तुरगोपि वा ।
आयुधं स्यंदनं वापि ददृशुस्तेन रेणुना ॥ २१ ॥

वीरीं करोनि रणशृंगार । मुकुटकुंडलें कवच वीर । अकंपनासवें दुर्धर भार । निशाचर चालिले ॥ ६८ ॥ सिंहनादें गिरागजर । गर्जत येतां राक्षसभार । तें देखोनि कपिकुंजरें७ । युद्धा सत्वर मिसळले ॥ ६९ ॥ शिळा शिखरें वृक्ष पर्वत । वानर भिडती युद्धाआंत । घायें राक्षसां करिती घात । सैन्यकंदनार्थ मांडिला ॥ १७० ॥ त्रिशूळ कात्या शक्ति तोमरें । राक्षसें घेवोनि हतियारें । रणीं खोंचलीं वानरें । वाहत रुधिर भडभडां ॥ ७१ ॥ रावणाच्या निजकार्यार्थे । राक्षसीं वेंचितां जीवित । वानरीं करोनि पर्वतघात । असंख्यात मारिले ॥ ७२ ॥ वानरीं करोनि युद्ध निर्वाण । श्रीरामकार्जी वेंचितां प्राण । त्यांसी न बाधी जन्म मरण । नामस्मरण करितांचि ॥ ७३ ॥ वानर घायीं होतां निर्बुज । लाविती श्रीरामचरणरज । घाय पानपोन होती नीरुंज । कपिसमाज गर्जत ॥ ७४ ॥ करितां रामनामस्मरण । नामें वानरां बळ संपूर्ण । नामबळें करोनि कंदन । बळवाहन गर्जती ॥ ७५ ॥ वीरां वानरां करितां रण । रणीं उठले रजःकण । रविबिंबेंसीं झांकती किरण । आपणा आपण न देखती ॥ ७६ ॥ ध्वजपताकांसीं न दिसे रथ । अश्व सारथि वीर विख्यात । मुख्य अकंपन तटस्थ । सैन्य समस्त केंवी देखे ॥ ७७ ॥ निशाचर देखती रातीं । ऐसी सर्वत्र वदंती११ । तेही करोनि सामान्य शक्ती । देखणी स्थिति वानरां ॥ ७८ ॥ श्रीराम दीप्तीची निजदीप्ती । श्रीराम स्वयें तेजोमूर्ती । त्याचेनि तेजें जुत्पती । देखणी शक्ती वानरां ॥ ७९ ॥ वानरांअंगीं सिद्ध उड्डाण । त्यावरी आलें देखणेपण । रणीं राक्षसां केलें कंदन । सावधान अवधारा ॥ १८० ॥

एतस्मिन्नंतरे वीरा वानराश्च महाबलाः ।
संरब्धाः परमं क्रुद्धाश्चक्रुर्युद्धमनुत्तमम् ॥ २२ ॥
ते मुष्टिभिर्महावेगा राक्षसानां चमूमुखे ।
कन्दनं सुमहच्चक्रुर्लीलया हरिपुंगवाः ॥ २३ ॥
शब्दश्च सुमहांस्तेषां नर्दतामभिधावताम् ।
श्रूयते तुमुलो युद्धे न रूपाणि चकाशिरे ॥ २४ ॥
तदा च रक्षोगणमुन्नदंतं
संभ्रांतनागाश्वरथं विकृष्टम् ।
महोदधेः पूरमिवानुरूपं
निशाचराणां बलमाबभासे ॥ २५ ॥

१ समुदाय. २ घोड्यांना. ३ मुख्य सेनानी. ४ उत्साहानें. ५ भिन्न शब्द करणारे. ६ कानाडोळा करून. ७ वानरश्रेष्ठ. कुंजर=हत्ती. ८ व्याकुळ. ९ भरून येऊन. १० व्यथारहित, निरोगी. ११ बोलणें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

रणीं रज दाटलें दुर्धर । तये संधीं वानरवीर । राक्षसां केला दुर्धर मार । शिळाशिखरद्रुमपाणी ॥ ८१ ॥ निशाचरीं सूनि दृष्टी । वानरवीर वळोनि मुष्टी । मारिती राक्षसांच्या थाटी । रणीं सन्निष्टीं गर्जोनी ॥ ८२ ॥ कोपोनियां अति दुर्धर । रणीं खवळले वानर । करितां शिळाशिखरमार । निशाचर भंगले ॥ ८३ ॥ वोडण खड्ग शूळ दुर्धर । पर्वतघातें करिती चूर । वानरीं भंगिलीं हतियेरें । निशाचर मर्दूनी ॥ ८४ ॥ रणीं राक्षसां होतां घात । त्यांसी प्रतिकूळ महावात । तोच वानरां अनुकूळ होत । श्रीरघुनाथाचेनि साह्यें ॥ ८५ ॥ असुर वानर करितां रण । उठले होते रजःकण अशुद्धें वाहतां रणांगण । रज दारुण उपशमलें ॥ ८६ ॥ बळें उन्नद्ध राक्षसभार । वानरीं करितां पर्वतमार । रथाश्व गज सारथी वीर । निशाचर कळकळती ॥ ८७ ॥ मंदरें मथितां सागर । क्षोभला गर्जे अति दुर्धर । कपि मथितां राक्षसभार । निशाचर कळकळती ॥ ८८ ॥ भंगले देखोनि रक्षोगणें । तीव्र कोपला अकंपन । धनुर्ध्यीं सज्जू नियां बाण । सांगे आपण सारथ्या ॥ ८९ ॥ मर्दूनि राक्षसांचे भार । गर्जत उभे वानरवीर । शीघ्र प्रेरीं रहंवर । कपिकुंजर वधावया ॥ १९० ॥

तत् दृष्ट्वा सुमहत्कर्म कृतं वानरसत्तमैः ।
क्रोधमाहारयामास युधि तीव्रमकंपनः ॥ २६ ॥
दृष्ट्वा तत्कर्म शत्रूणां सारथिं वाक्यमब्रवीत् ।
तत्रैव त्वरितं याहि सारथे यत्र वानराः ॥ २७ ॥
एते हि बलिनो घ्नन्ति सुबहून्राक्षसात्रणे ।
एतान्निहन्तुमिच्छामि समरश्लाघिनो ह्यहम् ॥ २८ ॥
ततः प्रजविताश्वेन रथेन रथिनां वरः ।
हरीनभ्यहनत्क्रोधाच्छिरन्बाणानकंपनः ॥ २९ ॥
न शेकुर्वानराः स्थातुं किं पुनर्योद्धमाहवे ।
अकंपनशरैर्भग्ना दुद्रुवुः सर्ववानराः ॥ ३० ॥

ऐकोनि अकंपनवचन । सारथियें रथ प्रेरून । जेथें वानर करिती रण । तेथें आपण आणिला ॥ ९१ ॥ अकंपन महावीर । बाणीं व्यापिलें अंबरें । उडोनि जातां पैं वानर । केला मार शरघातें ॥ ९२ ॥ शिळा शिखरें द्रुम पाषाण । शराग्रें करोनि शतचूर्ण । सपिच्छी विंधोनियां बाण । वानरसैन्य त्रासिलें ॥ ९३ ॥ वाम सव्य दशदिशीं । निघों जातां वानरांसी । बाण भेदिती सपिच्छी । रणभूमीसीं राहवेना ॥ ९४ ॥ जैसी पर्जन्याची वृष्टी । त्याहून सवेग शरसुटी । वानर बाणीं होवोनि हिंपुटी । उठाउठीं पळाले ॥ ९५ ॥ रावणाच्या कटकाआंत । अकंपन वीर विख्यात । कायसी वानरांची मात । रणीं रघुनाथ मारीन ॥ ९६ ॥ रणीं उभा अकंपन । गर्जतसे अति श्लाघोनें । पळतां देखोनि वानरगण । हनुमान आपण चालिला ॥ ९७ ॥ रामनामें स्वयें गर्जत । वानरां नाभीकारं देत । करावया अकंपनाचा घात । आला हनुमंत साटोपें ॥ ९८ ॥

समीक्ष्य हनुमान्ज्ञातीनुपतस्थे महाबलः ।
तं महाप्लवगं दृष्ट्वा सर्वे ते प्लवगर्षभाः ॥ ३१ ॥
समेत्य समरे वीराः सहिताः पर्यवारयन् ।
अकंपनस्तु शैलाभं हनूमन्तमवस्थितम् ॥ ३२ ॥
महेंद्र इव धाराभिः शरैरभिववर्ष ह ।
अचिंतयित्वा बाणौघान्शरीरे पतितान्कपिः ॥ ३३ ॥
अकंपनवधार्थाय मनो दध्रे महाबलः ।
शालमुत्पाट्यामास गिरिशृंगसिव स्थितम् ॥ ३४ ॥
समुद्यम्य महाशालं भ्रामयामास मारुतिः ।
भ्रामयन्त स चिच्छेद शरैः शालमकम्पनः ॥ ३५ ॥

येतां देखोनि हनुमंत । पळते वानर समस्त । स्वयें परतले युद्धार्थ । बळोन्मत्त हनुमंत ॥ ९९ ॥ मेरुशिखरासमान । हनुमान आला देखोन । अकंपन कंपायमान । दुर्धर विघ्न मज आलें ॥ २०० ॥ राक्षसांचा कंदकुदळ । मुख्य हनुमान अतिबळ । यासीं करोनि रणकल्लोळ । गोळांगूळ मारीन ॥ १ ॥ आजि मरणें कां मारणें । ऐसें निर्वाणयुद्धें करणें । रणीं गर्जोन सैंत्राणें । निर्वाणबाणें विंधीत ॥ २ ॥ जेंवी मेरूच्या शिखरा । मेघ वर्षती मुसळधारा । तैसे बाण पैं कपींद्रा । विंधी वानरां सर्वांगीं ॥ ३ ॥ अकंपनाची शरसुटी । हनुमंतासी पुष्पवृष्टी । बाणांतें न गणी

१ शिळा, शिखरें, वृक्ष हातांत घेऊन. २ घालून. ३ मंदरनामक पर्वतानें; ४ राक्षससमूह. ५ रथ. ६ आकाश.

७ बाणवर्षाव. ८ कष्टी. ९ प्रौढी मिरवून. १० भिऊं नका म्हणून सांगत. ११ वानर. १२ निकराचें युद्ध. १३ नेटानें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

जगजेठी । शंका पोटीं असेना ॥ ४ ॥ गिरिशिखरेंसीं समान । शालवृक्ष उपटून । मारावया अकंपन । हनुमान जाण चालिला ॥ ५ ॥ बळें हाणितां शालवृक्ष । अकंपन अति दक्ष । हातींच्या हातीं छेदिला देख । साधोनि लक्ष संग्रामीं ॥ ६ ॥ बळें हाणितां अत्यद्भुत । वृक्ष छेदिला हातांत । तेणें हनुमान अति विस्मित । वीर विख्यात अकंपन ॥ ७ ॥ हनुमंताचा आघात । निवारूं शके इंद्रजित । अकंपन वीर विख्यात । केला घात शालवृक्षा ॥ ८ ॥ बळें हाणितां मारुती । वृक्ष छेदिला हातींच्या हातीं । अकंपनाची रणव्युत्पत्ती । सुर वानिती स्वर्गस्थ ॥ ९ ॥

विध्वस्तं कर्म तद् दृष्टा हनूमान्प्रेक्ष्य विस्मितः ।
स गृहीत्वा गिरेः श्रृंगं जवेनाभिससार तम् ॥ ३६ ॥
दूरादेव महाबाणैरर्धचंद्रैर्व्यदारयत् ।
तं पर्वताग्रमाकाशे रक्षोबाणविदारितम् ॥ ३७ ॥
विकीर्णं पतितं दृष्ट्वा हनूमान्क्रोधमूर्च्छितः ।
सोऽश्वकर्णं समासाद्य रोषदर्पान्वितो हरिः ॥ ३८ ॥
तूर्णमुत्पाट्यामास महागिरिमिवोचितम् ।
तं गृहीत्वा महाकायं भ्रामयामास संयुगे ॥ ३९ ॥
प्रधावन्नुरुवेगेन बभंज तरसा द्रुमान् ॥ ४० ॥

अकंपनें छेदिला शालद्रुम । कपीचें वृथा गेलें कर्म । तेणें हनुम्यासी विस्मय परम । दृढ विक्रम अकंपना ॥ २१० ॥ घायें मारावया अकंपन । गिरिशिखर घेवोनि जाण । हनुमान धांवला आपण । शिखरें प्राण घ्यावया ॥ ११ ॥ शिखर हाणितां हनुमान वीर । लघुलाघवें विंधोनि शर । शतधा छेदिलें शिखर । बळें दुर्धर अकंपन ॥ १२ ॥ अकंपनें छेदितां शिखर । राक्षस करिती जयजयकार । बळ वानिती ऋषीश्वर । स्वर्गीं सुरवर वानिती ॥ १३ ॥ अर्धचंद्रबाणाच्या झडाडां । शिखर छेदूनि पाडितां पुढां । हनुमान विस्मित जाला गाढा । निर्वाणनिधडा अकंपन ॥ १४ ॥ देखोनि अकंपनाची ख्याती । बाणलाघवी शीघ्रगती । राक्षसांमाजी अति पुरुषार्थी । त्यासी मारुति मारूं पाहे ॥ १५ ॥ अकंपनाचा घ्यावया प्राण । वृक्ष उपटोनि अश्वकर्ण । हनुमान धांवोनि आपण । वृक्ष भवंडोनि हाणीत ॥ १६ ॥ अश्वकर्णाच्या आघातीं । लघुलाघवें हाणी मारुती । वृक्ष सोडिले नेणों किती । पडावया क्षितीं अकंपन ॥ १७ ॥ बाणलाघवी अकंपन । चमत्कारें शर विंधोन । वृक्ष छेदितां अश्वकर्ण । छेदी आन आँन द्रुमा ॥ १८ ॥ वृक्ष छेदोनि पाडितां तळीं । अकंपन दे आरोळी । आल्हाद राक्षसांच्या दँळीं । पिटिली टाळी सकळिकीं ॥ १९ ॥ सुरासुर नर वानर । अवघे आश्चर्य मानिती थोर । अकंपन निधडा वीर । स्वयें समग्र मानिती ॥ २२० ॥ हनुमंताचे तीन विक्रम । अकंपनें केले निर्धर्म । तेणें कपीसी सुखसंभ्रम । आल्हाद पूर्ण युद्धाचा ॥ २१ ॥ अकंपना तुझी युद्धख्याती । रणीं तुष्टलों मी मारुती । तुज मी न मारीं युद्धावर्ती । जाय लंकेप्रती विजयेंसीं ॥ २२ ॥ ऐकोनि हनुमंताचें वचन । हास्य करी अकंपन । जंव तुझा घेतला नाहीं प्राण । तंववरी जय मज नाहीं ॥ २३ ॥ आधीं मारीन हनुमंता । मग मारीन सौमित्रिरघुनाथां । अंगदसुग्रीवजांबवंतां । मारीन समस्तां वानरां ॥ २४ ॥ इतुकें केलिया रणकंदन । माझ्या अंगीं विजय पूर्ण । ऐसें ऐकतांचि वचन । हनुमान दारुण क्षोभला ॥ २५ ॥

हनूमान्परमक्रुद्धश्चरणैः कंपयन्महीम् ।
जघान समरे क्रुद्धान्पदातींश्चापरान्बहून् ॥ ४१ ॥
तमापतंतं संरब्धं राक्षसानां भयावहम् ।
ददर्शाकंपनो वीरश्चुक्रोध च ननाद च ॥ ४२ ॥
स चतुर्दशभिर्बाणैर्विशिखैर्मर्ममेदिभिः ।
निर्बिभेद महावीर्यं हनुमंतमकंपनः ॥ ४३ ॥
स तथा तेन विद्धोऽपि बहुभिर्मार्गणैः शितैः ।
हनूमान् ददृशे वीरो रुधिरेण समुक्षितः ॥ ४४ ॥
उत्पाट्य सहसा वृक्षं कृत्वा वेगमनुत्तमम् ।
शिरस्यभिजघानाशु राक्षसेंद्रमकंपनम् ॥ ४५ ॥

हनुमान रागें धांवतां पाहीं । राक्षससैन्य रगडी पायीं । पुच्छघायें वीर पाडीत ठायीं । अंकपन पाहीं कोपला ॥ २६ ॥ चौदा बाणीं त्वरित । हृदयीं विंधिला हनुमंत । तेही बाणीं कपि उन्मत्त ।

१ रणकौशल्य. २ मोठ्या कुशलतेनें. ३ बाण मारण्यांत कुशल. ४ पराक्रमी. ५ जमिनीवर. ६ दुसरे वृक्ष. ७ सैन्यांत. ८ व्यर्थ, फुकट.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

क्रोधान्वित चालिला ॥ २७ ॥ वृक्ष उपटोनि संत्राण । मस्तकीं टाकितां संपूर्ण । रथा सारथ्यासहित जाण । सांडिला प्राण अकंपनें ॥ २८ ॥ अकंपनें सांडितां प्राण । धाकें पळती रक्षोगण । त्यांसी वानरीं केलें कंदन । रणमर्दन राक्षसां ॥ २९ ॥ वोडणें खड्ग धनुष्यबाण । सांडोनि अलंकार आभरण । राक्षस घेवोनि पळती प्राण । रणीं अकंपन पाडिला ॥ २३० ॥ राक्षस अतिभयें पळत । लंकाद्वारीं विमर्द होत । वानर आले रे मारीत । बोंब सांगत नगरस्थां ॥ ३१ ॥ पुढें पळत मागें पाहत । अवघे आले लंकेआंत । रावणासी स्वयें सांगत । केला घात अकंपना ॥ ३२ ॥ घायाळ आले कुंथत । ते सांगती निजवृत्तान्त । एकला येवोनि हनुमंत । केला घात सर्वांचा ॥ ३३ ॥ हें ऐकोनि लंकानाथ । करावया राक्षसांचा घात । मूळीं लागला हनुमंत । चिंताग्रस्त रावण ॥ ३४ ॥

समेत्य हरयः सर्वे हनूमंतमपूजयन् ।
सोऽपि प्रहृष्टस्तान्सर्वान्वानरान्प्रत्यपूजयत् ॥ ४६ ॥

मर्दूनि राक्षससैन्य । करितां रामनामगर्जन । परतले वानरगण । उल्लास पूर्ण विजयाचा ॥ ३५ ॥ वानर मिळोनि समस्त । लोटांगण नमनयुक्त । अवघीं पूजिला हनुमंत । यशवंत रणरंगीं ॥ ३६ ॥ निगर्वी वीर हनुमंत । अंगद सुग्रीव जांबवंत । नळनीळादि महंत । वानर समस्त वंदिले ॥ ३७ ॥ घालोनियां लोटांगण । वंदिले श्रीराम लक्ष्मण । जयजयकारें गर्जे गगन । हर्षें त्रिभुवन कोंदलें ॥ ३८ ॥ एका जनार्दना शरण । स्वयें हनुमंत आपण । अकंपनातें निर्दळून । श्रीरामचरण वंदिले ॥ २३९ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां वज्रदंष्ट्रअकंपनवधो नाम पंचदशोऽध्यायः ॥ १५ ॥ ओंव्या ॥ २३९ ॥ श्लोक ॥ ४६ ॥

अध्याय सोळावा

श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ पूर्वील प्रसंगीं हनुमंतें । रणीं मारिलें अकंपनातें । ऐकोनियां लंकानाथें । क्रोधान्वित उद्वेगी ॥ १ ॥

ततस्तु रावणः क्रुद्धः श्रुत्वा हतमकंपनम् ।
पुरीं परिययौ लंकां सर्वगुल्मानवेक्षितुम् ॥ १ ॥
रुद्धां तु नगरीं दृष्ट्वा रावणो राक्षसेश्वरः ।
उवाचात्महितं काले प्रहस्तं युद्धकोविदम् ॥ २ ॥
पुरस्योपनिरुद्धस्य सहसा पीडितस्य च ।
नान्यं समर्थं पश्यामि युद्धे युद्धविशारद ॥ ३ ॥
अहं वा कुंभकर्णो वा त्वं वा सैन्यपतिर्मम ।
इंद्रजिद्वा निकुंभो वा वहेयुर्भारमीदृशम् ॥ ४ ॥
सर्वं बलमिदं शीघ्रं मायया परिगृह्य च ।
विजयायाशु निर्याहि यत्र सर्वे वनौकसः ॥ ५ ॥

एकें हनुमंतें रणांगणीं । अकंपन पाडोनियां रणीं । मारिल्या राक्षसांच्या श्रेणी । त्यापुढें कोणी उरेना ॥ २ ॥ अकंपनाचा भरंवसा होता । मारील सौमित्रा रघुनाथा । अंगदादि हनुमंता । मारील समस्तां वानरां ॥ ३ ॥ तंव जाला विपरीतार्थ । अकंपना मारी हनुमंत । दुःखें तळमळे लंकानाथ । आला आक्रान्त राक्षसां ॥ ४ ॥ अकंपनाऐसा देखा । आणीक न मिळे युद्धसखा । परम धाक दशमुखा । सन्नद्ध लंका तो करवी ॥ ५ ॥ लंकादुर्गसंरक्षण । गुल्मोगुल्मीं हिंडे रावण । दृढ कपाटें बंधन । करवी आपण साक्षेपें ॥ ६ ॥ दुर्गपरिधी सखोल आगंड । यंत्रमारें मारक दगड । रावणें दुर्ग केलें गूढ । अति अवघड पारखियीं ॥ ७ ॥ आगड गुल्में यंत्रसंभार । दुर्धट दुर्ग कायसे थोर । शिखरें उडोनि आले वानर । निशाचर निर्दळिती ॥ ८ ॥ वानरीं रोधिलें लंकाभुवन । धाकिन्नला दशानन । प्रहस्त पाचारोनि प्रधान । युद्धविधान आलोची ॥ ९ ॥ ध्वज पताका विध्वंसून । करीत राक्षसां कंदन । वानरीं व्यापिलें लंकाभुवन । अति दारुण युद्धार्थी ॥ १० ॥ रणीं पडिल्या अकंपन । वानरांसीं करावया रण । आम्ही मुख्यत्वें पांच जण । युद्धविधानरणवेत्ते ॥ ११ ॥ रावण आणि कुंभकर्ण । प्रहस्त सेनानी प्रधान । इंद्रजितासी आंगवण । पांचवा जाण निकुंभ ॥ १२ ॥ जैसाच मी राजा रावण । तैसाच तूं प्रहस्त प्रधान । दोहींची

---

१ आवेशानें. २ संहार. ३ ढाल. ४ तरवार. ५ अत्यंत कोपयुक्त. ६ दुःखी होत्साता. ७ समुदाय. ८ तयार.

९ प्रत्येक सैन्यभागामधून. १० किल्ल्याचा परिघ. ११ खंदक. १२ परक्यास. १३ पाहूं लागला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

समान आंगवण । विचक्षण रणवेत्ते ॥ १३ ॥ पदाती सेनानी महावीर । पालाणूनी अश्व कुंजर । संजोगोनि रहंवर । युद्धा सत्वर निघावें ॥ १४ ॥ राम लक्ष्मण पाडोनि रणीं । वानर उरों नेदीं कोणी । वैरी निर्दळूनी रणीं । मजलागोनी सुख द्यावें ॥ १५ ॥ तुवां जावोनि संग्रामांत । इतुका करावा पुरुषार्थ । कंठमाळा दे लंकानाथ । साधीं विजयार्थ प्रहस्ता ॥ १६ ॥ इंद्रजिताचें काळें वदन । वृथा गेलें शरबंधन । तैसें न करावें आपण । राम लक्ष्मण मारावे ॥१७॥ प्रहस्त म्हणे लंकापती । बिभीषणें केली विनती । श्रीरामा अर्पिल्या सीता सती । सुखप्राप्ती सर्वांसी ॥ १८ ॥ त्याचें नायकतां वचन । युद्ध मांडिलें निर्वाण । सत्य बोलिला बिभीषण । तें हें रण ओढवलें ॥ १९ ॥ समग्र माझे लळे पाळून । तुवां केलें प्रतिपाळण । तुझे कार्या वेंचितां प्राण । रणांगण पाहें माझें ॥ २० ॥

मद्बाणानां तु वेगेन हतानां तु रणाजिरे ।
अद्य तृप्यंतु मांसादाः पक्षिणः काननौकसः ॥ ६ ॥
न हि मे जीवितं रक्ष्यं पुत्रदारधनानि च ।
संपश्य मां जुह्वयंतं त्वदर्थं जीवितं रणे ॥ ७ ॥
हुताशनं तर्पयित्वा ब्राह्मणांश्च प्रणम्य च ।
स्रजश्च विविधाकारा जगृहुस्त्वाभिमंत्रिताः ॥ ८ ॥
रावणं प्रेक्ष्य राजानं प्रहस्तः पर्यवारयत् ।
अथामंत्र्य तु राजानं भेरीमाहत्य भैरवाम् ॥ ९ ॥
आरुरोह रथं दिव्यं प्रहस्तः सज्जकार्मुकः ।
ब्राह्मणाः स्वस्तिवचनाः संग्रामाय जयाशिषः ॥ १० ॥

संमुख ऐकतां रावण । प्रहस्त बोले आंगवण । प्रथम विंधितांचि बाण । राम लक्ष्मण मारीन ॥ २१ ॥ अंगद सुग्रीव हनुमंत । मारीन नळ नीळ जांबवंत । वानर मारीन समस्त । रणाआंत निसंनिसूं ॥ २२ ॥ वाहवीन अशुद्धाचे पूर । वृक जंबुक श्येन घार । मांस भक्षिती वनचर । ऐसा रणमार करीन ॥ २३ ॥ सांडोनि जीविताची आस । रणांगणीं घातली कांस । त्यजून स्त्रीपुत्रविलास । स्वामिकार्यास साधीन ॥ २४ ॥ सुमुहूर्तीं करितां प्रयाण । घृतप्लुतादि अर्धदान । प्रथम पूजिला हुताशन । पूजिले ब्राह्मण विधियुक्त ॥ २५ ॥ मुख्य ब्राह्मणांचें पूजन । अन्न धन आणि सन्मान । प्रहस्त घाली लोटांगण । आशीर्वचन रणविजयी ॥ २६ ॥ मुकुट कुंडलें रणकंकण । कवच शोभे रत्नभूषण । सज्जोनियां धनुष्यबाण । करी प्रयाण प्रहस्त ॥ २७ ॥ बाहुअंगदें पदक गळां । हिरे रत्न कंठीं मुक्तामाळा । अंगीं बाणोनि रणसोहळा । रावणाजवळी पूसत ॥ २८ ॥ जो जो गेला संग्रामासी । परतोनि न ये रायापासीं । हेचि भेटी तुम्हां आम्हांसी । लागे पायासीं प्रहस्त ॥ २९ ॥ ऐकोनि प्रहस्तवचन । रावणासी आलें रुदन । धांवोनि दिधलें आलिंगन । दोघे जण गहिंवरती ॥ ३० ॥ बोलती सभेचें सज्ञान । दोघांचेंही अशुभ चिन्ह । युद्धप्रयाणीं रुदन । अपशकुन मुख्यत्वें ॥ ३१ ॥ जैसाचि स्वयें रावण । तैसाचि प्रहस्त प्रधान । ध्वज पताका शोभायमान । सेना सज्जून आणिली ॥ ३२ ॥ ज्वाळमाळारत्नांकित । रथ अतिशयें शोभिवंत । वरी ध्वज लखलखीत । घोंस लोंबत मुक्तामाळा ॥ ३३ ॥ नमस्कारोनि रावण । प्रहस्तें करितां रथारोहण । सज्जोनियां धनुष्यबाण । भेरी निशाण त्राहाटिलें ॥ ३४ ॥

लंकायां निर्ययौ शीघ्रं बलेन महता वृतः ।
निनदंतः स्वरान्घोरान्राक्षसा जग्मुरग्रतः ॥ ११ ॥
तस्य निर्याणघोषेण राक्षसानां च गर्जताम् ।
ववर्षू रुधिरं देवाः प्रहस्तस्य रथोपरि ॥ १२ ॥
ध्वजमूर्धनि गृध्रश्च विलीनो दक्षिणामुखः ।
प्रयातस्य च संग्रामे हयश्च विकृतोऽभवत् ॥ १३ ॥
अश्रुपूर्णमुखश्चास्य दक्षिणः स्खलितो हयः ।
सारथेर्बहुधा चास्य पृतनामेव गाहतः ॥ १४ ॥
प्रतोदो न्यपतद्धस्ताद्धरण्यां हयशासिनः ।
निर्याणश्रीश्च तस्यासीद्भास्वरा च सुदुर्लभा ॥ १५ ॥
सा ननाश मुहूर्तेन समे च स्खलिता हयाः ॥ १६ ॥

१ सज करून. २ जोडून. ३ तोडतोडून. ४ रक्ताचे. ५ लांडगे. ६ होमद्रव्य. ७ अग्नि. ८ रणभेरी. ९ बाजविलें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वाजंत्र्यांचा निजगजर। निघडे वीर निशाचर। उघडोनि लंकाद्वार। राक्षसभार चालिले ॥ ३५ ॥ प्रहस्तरथासमोर। राक्षस गर्जती घरघर। सिंहनाद करिती घोर। भार दुर्धर चालिले ॥३६॥ तेचि समयीं निरभ्रीं। प्रहस्ताच्या रथावरी। रुधिरवृष्टि आरक्तधारीं। उल्का चौफेरीं स्वयें पडती ॥ ३७ ॥ अश्रुमुख रथींचे घोडे। दक्षिणवारू अडखळोनि पडे। सारथियें उठवितां निवाडें। चाबूक पडे रथचक्रीं ॥ ३८ ॥ जेणें करावें अश्वशासन। तो प्रतोद[3] झाला भग्न। सारथ्याचें सचिंत मन। अपशकुन धुरेसीं ॥ ३९ ॥ वारू सज्जोनि वाडेंकोडें। रथ सज्जोनि चालतां पुढें। एक वेळे चारी घोडे। अडखळतां पडे सारथी ॥ ४० ॥ एवं सैन्याच्या संभारीं। पडिले घोडे सांडोनि दुरी। रथ सज्जिला वारुवांतरीं। सारथि वरी बैसला ॥ ४१ ॥ त्याच काळीं ध्वजीं देख। गीध बैसे दक्षिणाभिमुख। भालू भुंकती अग्निमुख। परम दुःख प्रहस्ता ॥४२॥ प्रहस्त जंव पाहे पुढें। तंव अशिर छाया भूमीं पडे। मरण आलें मज रोकडें। जीवीं धडफुडें कळों सरलें ॥ ४३ ॥ मागें सरतांचि आपण। अपमानें दंडील रावण। श्रीरामापुढें देतां प्राण। ब्रह्म परिपूर्ण मी होईन ॥४४॥ ऐसिया करोनि निश्चयासी। अवश्य जावें युद्धासी। परम उल्लास प्रहस्तासी। निजसैन्यासी अवलोकी ॥ ४५ ॥ दारुण देखोनी अपशकुन। सैन्य सेनानी उद्विग्न। अवघे जाले मनोरथभग्न। तंव कळलें चिन्ह प्रहस्ता ॥ ४६ ॥ आपली दावोनि आंगवण। सैन्यासी उल्लास द्यावा पूर्ण। ऐसें साधोनि विंदाण। केलें गर्जन प्रहस्तें ॥ ४७ ॥

कालो भवेयं कालस्य दहेयमपि पावकम्।
मृत्युं मरणधर्मेण संयोजयितुमुत्सहे ॥ १७ ॥

तस्य तद्वचनं श्रुत्वा प्रहस्तस्य रणाजिरे।
सुसंरब्धाश्च ते नेदू राक्षसा युद्धकांक्षिणः ॥ १८ ॥

ततः प्रहस्तं निर्यातं भीमं भीमपराक्रमम्।
गर्जंतं सुमहाकायं राक्षसैरभिसंवृतम् ॥ १९ ॥

ददर्श महतीं सेनां वानराणां बलीयसाम्।
अतिसंजातहर्षाणां प्रहस्तमभिगर्जताम् ॥ २० ॥

म्यां साधिलें रणांगण। आजी काळातें निर्दळीन। अंतकाळातें आकळीन। अग्नीतें जाळीन प्रतापें ॥ ४८ ॥ राम लक्ष्मण मानवी दोन्ही। वानरांतें कोण गणी। मृत्यु मारोनियां रणीं। वाधावैंणी विजयाची ॥ ४९ ॥ ऐकोनि प्रहस्ताचें वचन। वीरीं केलें सिंहगर्जन। उल्लासलें त्याचें सैन्य। रणकंदन करावया ॥ ५० ॥ प्रहस्त देखोनि ससैन्य। वानरांसी उल्लास पूर्ण। राक्षसांचें करावया कंदन। वीर गर्जोन चालिले ॥ ५१ ॥ राक्षसांचे गिरागजर। सिंहनाद करिती थोर। वानर करिती भुभुःकार। रामनामें वीर गर्जती ॥ ५२ ॥

तेषामन्योन्यमासाद्य संग्रामः सुमहानभूत्।
बहूनामश्मवृष्टिं च शरवृष्टिं च वर्षताम् ॥ २१ ॥

बहवो राक्षसा युद्धे बहून्वानरयूथपान्।
वानराश्चापि रक्षांसि विजघ्नुर्बहवो बहून् ॥ २२ ॥

ते शूलैः प्रथिताः केचिद्वानराः परमायुधैः।
परिघैराहताः केचित्केचिच्छिन्नाः परश्वधैः ॥ २३ ॥

वानरै राक्षसाश्चैव पार्श्वतश्च विदारिताः।
पादपैर्गिरिशृंगैश्च संपिष्टा धरणीतले ॥ २४ ॥

वानर आणि निशाचर। युद्धा मिसळले दुर्धर। घाय हणिती निष्ठुर। येरयेरां नोकोनी ॥५३॥ धीर वीर राहें साहें। मागें न ठेविती पाये। माथां वाजती घाये। रुधिर वाहे भडभडां ॥ ५४ ॥ राक्षस खोंचिती शूळाग्रें। वानर टाकिती शिळाशिखरें। राक्षस हाणिती तोमरें। कपि वृक्षाग्रें ढिलाविती ॥ ५५ ॥ वीरीं विंधितां दृढ बाण। वानर वर्षती पाषाण। शक्ति हाणिती रक्षोगण। पर्वतीं प्राण वानर घेती ॥ ५६ ॥ घायीं वानर पडतां धरणीं। रामनामाच्या स्मरणीं। व्यथा जावोनि तत्क्षणीं। भिडती रणीं रणमारें ॥ ५७ ॥ वानरवीरां प्रताप श्रेष्ठ। शिळाशिखरें कडकडाट। रणीं राक्षसां करोनि पीठ। पाडिलें स्पष्ट क्षितितळीं ॥ ५८ ॥ कपि मर्दितां निशाचर। रणीं उठिला हाहाःकार।

१ ढग नसतांना. २ अग्निरूप तारा. ३ चाबूक. ४ वाद्यें वाजवणें. ५ धिक्कारून. ६ राक्षसमंडळी.

७ पृथ्वीवर. ८ नाश करितां.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

प्रहस्त प्रधान चौघे वीर । वानरां मार करूं आले ॥ ५९ ॥

करंधमः कुंभहनुर्महानादः समुन्नतः ।
एते प्रहस्तसचिवाः सर्वे जघ्नुर्वनौकसः ॥ २५ ॥

जांबवांस्तु सुसंरब्धः प्रगृह्य विपुलां शिलाम् ।
पातयामास तेजस्वी महानादस्य वक्षसि ॥ २६ ॥

द्विविदो गिरिशृंगेण जघानैकं करंधमम् ।
दुर्मुखः पुनरुत्थाय कपिः सविपुलं द्रुमम् ॥ २७ ॥

राक्षसं क्षिप्रहस्तं तु समुन्नतमपोथयत् ।
अथ कुंभहनुस्तत्र तारेणासाद्य वीर्यवान् ॥ २८ ॥

वृक्षेण महता प्राणान्कपिस्तस्य समाददे ।
अमृष्यमाणस्तत्कर्म प्रहस्तो रथमास्थितः ॥ २९ ॥

चकार कदनं घोरं धनुष्पाणिर्वनौकसाम् ॥ ३० ॥

प्रहस्त प्रधान चौघे वीर । रणप्रवीण महाझुंझार । मारावया वानरभार । अति दुर्धर चालिले ॥ ६० ॥ करंधम आणि महानाद । कुंभहनु आणि समुन्नद्ध । चौघे वीर रणउन्नद्ध । करावया युद्ध लोटले ॥ ६१ ॥ वर्षोनियां बाणजाळा । वृक्ष पर्वत छेदोनि शिळा । रणीं मर्दिती वानरदळा । वक्षःस्थळा विंधोनी ॥६२॥ चौघे जण चहूंकडोनी । वानर शरजाळें वेढोनी । मारूं आदरिलें रणीं । दुर्धर बाणीं भेदोनि ॥६३॥ वानर उडतां आकाशीं । बाण भेदोनि सपिच्छी । सवेंचि पाडिती भूमीसी । कासाविसी कपिसेना ॥ ६४ ॥ वानरीं करितां उड्डाण । उरीं शिरीं विंधिती बाण । हाणितां पर्वत पाषाण । कर छेदून पाडिती ॥ ६५ ॥ ऐसे प्रधान चौघे जण । करितां वानरां कंदन । कपि धांविन्नले चौघे जण । प्रधानप्राण घ्यावया ॥ ६६ ॥ द्विविद दुर्मुख क्रोधान्वित । तार आणि जांबवंत । करावया प्रधानांचा घात । युद्धाआंत मिसळले ॥ ६७ ॥ द्विविद येवोनि गर्जोन । करंधमातें पाचारोन । पुच्छें छेदोनि धनुष्यबाण । गिरिशृंगें पूर्ण ठोकिला ॥ ६८ ॥ गिरिशिखरें[1] हाणितां पूर्ण । रणीं अशुद्ध[2] वमून । करंधमें सांडिला प्राण । अर्धक्षण न लागतां ॥ ६९ ॥ दुर्मुखासी आला क्रोध । पाचारोनि समुन्नद्ध । दोघीं केलें मल्लयुद्ध । विविध बंध रणमारें ॥ ७० ॥ आणोनि प्रहस्तासंमुख । उपटोनियां तमाल रुख[3] । समुन्नद्धा हाणितां देख । न घेतां उदक निमाला ॥ ७१ ॥ रणीं खवळला जांबवंत । महानादातें पाचारीत । शीघ्र करोनि शिळाघात । युद्धाआंत पाडिला ॥ ७२ ॥ कुंभहनु निशाचर । त्यासी तगटला[4] तार वीर । करितां चपेटघातमार । पायी वानर धरियेला ॥ ७३ ॥ रागें उपटितां त्यासीं । पुच्छें निमटिलें घांटीसी[5] । कुंभहनु पाहे कासाविसी । बळ कपीसीं चालेना ॥ ७४ ॥ कुंभहनु मूर्च्छापन्न । तार गेला पैं निसटून । सवेंचि शालवृक्ष हाणोन । घेतला प्राण कुंभहनूचा ॥ ७५ ॥ चारी प्रधान योद्धे पूर्ण । रणमारे विचक्षण । त्यांचे वानरीं घेतले प्राण । शंखस्फुरण राक्षसां ॥७६॥ चहूं प्रधानां झाला घात । बोंब उठली राक्षसांत । येरयेरांपुढें पळत । अति आकांत राक्षसां ॥ ७७ ॥ चौघे मारून प्रधान । राक्षसांचें केलें कंदन । प्रहस्त चालिला आपण । दुर्धर बाण सज्जूनि ॥ ७८ ॥ निर्दळावया वानरभारा[6] । दांत खातसे करकरां । ज्वाळा निघती नेत्रद्वारा । रहंवरा पेलिलें[7] ॥ ७९ ॥ करितां वानरसेना पीठ । रथ लोटिला घडघडाट । बाण विंधोनि तिखट । वीर विकट खोंचिले ॥ ८० ॥ वानरांचे निजघात । पर्वतशिळाद्रुमआघात । बाणाग्रें छेदोनि समस्त । रणीं खोंचित वानरां ॥ ८१ ॥ मधुमाधवमासांआंत[8] । पळस फुलती आरक्त । तैसे वानर रुधिरोक्षित[9] । प्रवाहे रक्त रणरंगीं ॥ ८२ ॥ प्रहस्त धनुर्वाडा दुर्धर । रणयोद्धा अति चतुर । बाणीं विंधीत वानर । प्रवाहे पूर अशुद्धाचा[10] ॥ ८३ ॥

सा मही रुधिरौघेण प्रच्छन्ना संप्रकाशते ।
संच्छन्ना माधवे मासि पलाशैरिव पुष्पितैः ॥ ३१ ॥

शोणितौघां महातोयां नदीं सागरवाहिनीम् ।
गृध्रहंसवराकीर्णां कंकसारसनादिताम् ॥ ३२ ॥

मेदःफेनसमाकीर्णामावर्तस्वननिःस्वनाम् ॥ ३३ ॥

वानर आणि निशाचर । रणीं भिडले घोरांदर । वाहाती अशुद्धाचे पूर । नदी दुस्तर उलथली ॥८४॥ प्रहस्तें करितां रणख्याती । अशुद्धें पूर्ण जाली

१ पर्वतशिखरें टाकून. २ रक्त. ३ वृक्ष. ४ भिडला. ५ गळ्याला. ६ वानरसमुदायाला. ७ पुढें हाकिलें. ८ चैत्रवैशाखांत. ९ रक्तानें माखलेले. १० रक्ताचा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

क्षिती । चारी वोटें न दिसे रिती । पूर वाहती रुधिराचे ॥ ८५ ॥ गीध कंक बक घार । वृक जंबूक रानसूकर । मांस भक्षिती अपार । प्राशिती रुधिर यथेष्ट ॥ ८६ ॥ रणनदी सम सागर । प्रवाहें प्रात यमद्वार । रणीं असतां श्रीरामचंद्र । प्रवाहे पूर परब्रह्मीं ॥ ८७ ॥ धन्य राक्षसांची ख्याती । रणीं पडतां ब्रह्मप्राप्ती । बाप कृपाळु रघुपती । सायुज्य मुक्ती शत्रूसी ॥ ८८ ॥ ऐसा रणनदीविनोद । रणप्रवाहें सुखस्वाद । हंस सारस करिती शब्द । अति अगाध अक्षोभ्य ॥ ८९ ॥ ऐसी दुस्तर रणनदी । मेंडा नुतरवे त्रिशुद्धी । प्रहस्त मर्दितां वानरमांदी । नीळ सक्रोध क्षोभला ॥ ९० ॥

ततः सृजंतं बाणौघान्प्रहस्तं स्यंदने स्थितम् ।
ददर्श तरसा नीलो निघ्नंतं वै प्लवंगमान् ॥ ३४ ॥
स तं परमदुर्धर्षमायांतं तं महाकपिः ।
प्रहस्तं ताडयामास वृक्षमुत्पाट्य वीर्यवान् ॥ ३५ ॥
स तेनाभिहतः क्रुद्धो नर्दन्राक्षसपुंगवः ।
ववर्ष शरवर्षाणि प्लवंगानां चमूपतौ ॥ ३६ ॥
रोषितः शरवर्षेण शालेन महता महान् ।
निजघान हयान्नीलः प्रहस्तस्य महाजवान् ॥ ३७ ॥

रथारूढ प्रहस्त कुशल । व्युत्पत्ती वर्षतां बाणजाळ । तेणें त्रासितां वानरदळ । नीळ तत्काळ क्षोभला ॥ ९१ ॥ वृक्ष उपडोनि सबळ । प्रहस्तासी हाणितां नीळ । तेणें वर्षोनि बाणजाळ । वृक्ष समूळ छेदिला ॥ ९२ ॥ वृक्ष छेदोनियां जाण । नीळावरी अति तीक्ष्ण । प्रहस्त वर्षला बाण । हस्तविंदानलाघवी ॥ ९३ ॥ येतां प्रहस्तबाण कडाडीं । पडत डोळियां झांपडी । वानरें कायसीं बापुडीं । नीळा समपाडीं विंधिलें ॥ ९४ ॥ प्रहस्ताच्या बाणश्रेणी । नीळ निवारी पुच्छपाषाणीं । रागें शालवृक्ष उपटोनी । घावो निर्वाणीं ओपिला ॥ ९५ ॥ प्रहस्त गेला हातोहातीं । अश्व ध्वज रथ सारथी । घायें नेले पैं भस्मांतीं । विस्तीर्ण क्षितीं पाडिले ॥ ९६ ॥ येतां शालवृक्षआघात । धाकें गजबजिला प्रहस्त । रथ सांडोनि सवेग पळत । नीळ कृतांत क्षोभला ॥ ९७ ॥ नीळ सेनापति महाबळी । सरथ अश्व सारथ्या करोनि होळी । पुढें चालिला रणसमेळीं । रणकल्लोळीं गर्जत ॥ ९८ ॥

विधनुः स कृतस्तेन प्रहस्तो वाहिनीपतिः ।
प्रगृह्य मुसलं घोरं स्यंदनादवपुप्लुवे ॥ ३८ ॥
ततस्तौ वाहिनीमुख्यौ जातक्रोधौ तरस्विनौ ।
सिंहशार्दूलसदृशौ सिंहशार्दूलविक्रमौ ॥ ३९ ॥
आजघान तदा नीलं ललाटे मुसलेन सः ।
प्रहस्तः परमायत्तस्ततः सुस्राव शोणितम् ॥ ४० ॥
ततः शोणितसंसिक्तः संगृहीत्वा महातरुम् ।
प्रहस्तस्योरसि क्रुद्धो विससर्ज महाकपिः ॥ ४१ ॥
तमचिंत्यप्रहारं स प्रगृह्य मुसलं महत् ।
अभिदुद्राव बलिनं बलान्नीलं प्लवंगमम् ॥ ४२ ॥

देखोनि शालवृक्षआघात । मुसळ घेवोनि हातांत । रथावरूनि उडे प्रहस्त । सांडून तेथ चापशर ॥ ९९ ॥ नीळ कपिसेनाधिपती । प्रहस्त रावणसेनापती । सेनापतीसीं सेनापती । दोघे भिडती रणरंगीं ॥ १०० ॥ जैसे शरत्काळींचे पोळ । दोघे जैसे सिंहशार्दूळ । दोघांअंगीं प्रबळ वळ । दोघे चपळ रणमारा ॥ १ ॥ एक विंधी दृढ बाणीं । दुजा पिष्ट करी पाषाणीं । एक हाणी गदा विंदानीं । दुजा द्रुमपाणी रणमारें ॥ २ ॥ रथ भंगिला सहसारथी । प्रहस्त जाला पदाती । मुसळ घेवोनियां हातीं । लघु व्युत्पत्ती तळपत ॥ ३ ॥ मुसळयुद्धीं अति कुशळ । लघुलाघवें हाणोनि मुसळ । भेदिलें नीळाचें कपाळ । केला बंबाळ अशुद्धें ॥ ४ ॥ अशुद्धें डवरला वानर । शोभे जैसा नृसिंहवीर । करावया प्रहस्तासी मार । उडे सत्वर आकाशीं ॥ ५ ॥ उडी घालोनियां गजरीं । निर्घातें हाणी उरावरी । प्रहस्त चालिला चांचरी । स्वयें सांवरी मूर्च्छेतें ॥ ६ ॥ वीर प्रबळ प्रहस्त । कपीचा न मानूनि घात । मुसळ घेवोनि धांवत । करावया घात नीळाचा ॥ ७ ॥

तस्य युद्धाभिकामस्य मृधे मुसलयोधिनः ।
प्रहस्तस्य शिलां नीलो मूर्ध्नि तूर्णमपातयत् ॥ ४३ ॥

---

१ भित्र्याला. २ खरोखर. ३ हस्तकौशल्यांत प्रवीण. ४ निकराचे प्रसंगीं. ५ माजलेले बैल. ६ सिंह आणि वाघ. ७ कौशल्यानें. ८ हातांत वृक्ष असलेला. ९ रक्तानें. १० भरला, शोभला. ११ आघात करून.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

नीलेन कपिमुख्येन विमुक्ता महती शिला ।
बिभेद बहुधा घोरा प्रहस्तस्य शिरो महत् ॥ ४४ ॥
स गतासुर्गतश्रीको गतसत्त्वो गतेंद्रियः ।
पपात सहसा भूमौ छिन्नमूल इव द्रुमः ॥ ४५ ॥

लघुलाघवी मुसळहस्त । येतां देखोनि प्रहस्त । नीळ आनंदें नाचत । करावया घात पडिपाडें ॥ ८ ॥ प्रहस्त झेलितां मुसळ । सवेग मारूं आला नीळ । नीळें घेवोनि शीघ्र शिळ । त्याचे कपाळीं ओपिली ॥ ९ ॥ सबळ बळें हाणितां शिळा । शतधा भेदिलें कपाळा । अशुद्ध वाहत भळभळां । क्षितितळा उलंडला ॥ ११० ॥ आयुष्य गेलें हातोहातीं । प्राण सांडिला इंद्रियवृत्ती । देहींची पैं गेली मती । पाडिला क्षितीं भणभणित ॥ ११ ॥ गेलें यश गेली कीर्ती । गेली त्याची शौर्य शक्ती । गेली गेली सन्मानमहती । पाडिला क्षितीं भणभणित ॥ १२ ॥ पुष्पित सपल्लव सफळ । वृक्ष उलंडे छेदितां मूळ । तेंवी प्रहस्त वीर प्रबळ । पडे तत्काळ क्षितितळीं ॥ १३ ॥

हते प्रहस्ते नीलेन तदकंप्यं महाबलम् ।
न शेकुः समवस्थातुं निहते वाहिनीपतौ ॥ ४६ ॥
सेतुबंधं समासाद्य विशीर्णं सलिलं यथा ।
रक्षःपतिगृहं गत्वा ध्यानमूकत्वमागताः ॥ ४७ ॥
ततस्तु नीलो विजयी महाबलः
प्रशस्यमानः स्वकृतेन कर्मणा ।
समेत्य रामेण सलक्ष्मणेन
प्रहृष्टरूपोऽथ बभूव यूथपः ॥ ४८ ॥

नीळें मारिला प्रहस्त । बोंब उठली राक्षसांत । मुख्य धुरेचा जाला घात । अति आकांत लंकेसी ॥ १४ ॥ संमुख रहावया जाण । कोणी न धरती आंगवण । पळतां राक्षस कंपायमान । लंकाभुवन ठाकेना ॥ १५ ॥ पळतां पायीं वेंगडी वळत । धाकें धाकें मागें पाहत । रणीं पडल्या प्रहस्त । अति आकांत राक्षसां ॥ १६ ॥ देखोनि प्रहस्ताचें मरण । एकां पडिलें महामौन । भयें मूर्च्छित जालें मन । कार्यकारण विसरले ॥ १७ ॥ कुंभ भंगलिया जाण । सैरा पसरे जीवन । प्रहस्त निमाल्या प्रधान । पळे सैन्य सैरावैरां ॥ १८ ॥ नीळ सुग्रीवसेनापती । प्रहस्त मारोनि रणव्युत्पत्तीं । स्वयें पावला विजयवृत्ती । वानर स्तविती स्वानंदें ॥ १९ ॥ नीळाची विजयख्याती । स्वयें जुत्पती वानिती । स्वमुखें वानी रघुपती । वानी कीर्ती सौमित्र ॥ १२० ॥ नीळ येवोनि आपण । श्रीरामा घाली लोटांगण । रामें दिधलें आलिंगन । समाधान स्वानंदें ॥ २१ ॥ लक्ष्मणाचे वंदी चरण । तेणेंही दिधलें आलिंगन । नीळाचें भाग्य गहन । करिती स्तवन सुरवर्य ॥ २२ ॥ अंगद सुग्रीव जांबवंत । सांक्षेपें वंदिला हनुमंत । नळकुमुदादि जुत्पती समस्त । नीळ वंदित स्वानंदें ॥ २३ ॥ सुग्रीवें थापटिली पाठी । अंगद स्वानंदें लावी कंठीं । वानर सांगती विजयगोष्टी । नीळ जगजेठी रणयोद्धा ॥ २४ ॥ श्रीराम असतां पाठिराखा । रणीं वानरां नाहीं शंका । जिणावँया दशमुखा । करिती आंवांका अवघेही ॥ २५ ॥ एका जनार्दना शरण । श्रीरामदृष्टीपुढें रण । रण नव्हे तें ब्रह्म पूर्ण । घाय ते जाण महाबोध ॥१२६॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां प्रहस्तवधो नाम षोडशोऽध्यायः ॥ १६ ॥ ओंव्या ॥ १२६ ॥ श्लोक ॥ ४८ ॥

अध्याय सतरावा

श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ पूर्वं प्रसंगीं रणाआंत । नीळें मारिला प्रहस्त । ऐकोनियां लंकानाथ । अति आकान्त पावला ॥ १ ॥ रावणाचा अति आप्त । प्रधान सेनानी प्रहस्त । त्याचा नीळें केला घात । लंकेआंत आकान्त ॥ २ ॥

प्रहस्तस्य वधं श्रुत्वा रावणो भ्रांतमानसः ।
राक्षसानादिदेशाथ राक्षसेंद्रो महाबलः ॥ १ ॥
कार्या शत्रुषु नावज्ञा यैरिंद्रबलसूदनः ।
सूदितः सैन्यपालो मे सानुयात्रः सकुंजरः ॥ २ ॥
सोऽहं रिपुविनाशाय विजयाय विचारयन् ।
स्वयमेव गमिष्यामि रणशीर्षं तदद्भुतम् ॥ ३ ॥
अथ तद्वानरानीकं रामं च सहलक्ष्मणम् ।
निर्दहिष्यामि बाणौघैः शुष्कं वनमिवानलः ॥ ४ ॥

---

१ शेंकडों ठिकाणीं. २ पेटके आले, गोळे आले. ३ मडकें. ४ पाणी. ५ मरण पावतां. ६ आदरपूर्वक. ७ जिंकण्यासाठीं. ८ धैर्य.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

नीळें मारिला प्रहस्त । बोंब उठली लंकेआंत । तें ऐकोनि लंकानाथ । जाला भ्रांत सक्रोधी ॥ ३ ॥ इंद्रबळेंसीं समसमान । तो प्रहस्त मारिला प्रधान । शत्रु वाढले संपूर्ण । त्यांचें मर्दन मी करीन ॥ ४ ॥ लक्ष्मणासहित श्रीरघुनाथ । मी मारीन म्हणे लंकानाथ । करावया वानरांचा अंत । रावण निघत संग्रामा ॥ ५ ॥ युद्धा जातां लंकानाथ । धेंडें[1] पडिलीं नगरांत । वीरीं निघावें त्वरित । अश्वगजरथभारेंसी ॥ ६ ॥ स्वयें वानरीं आपण । विरूपाक्ष अकंपन । मारिला प्रहस्त प्रधान । शत्रु सामान्य म्हणों न ये ॥ ७ ॥ शत्रु म्हणों नये सामान्य । त्याचें करूं नये हेळण[2] । यालागीं स्वयें रावण । निघे आपण संग्रामा ॥ ८ ॥ शुष्क तृण जाळी अनळ[3] । तैसें मारीन वानरदळ । राम लक्ष्मण वीर प्रबळ । मारीन तत्काळ रणमारें ॥ ९ ॥ एक धनुष्य श्रीरामशक्ती । दहा धनुष्यें माझे हातीं । त्यासी पाडून बाणांवर्ती । पाडीन क्षितीं बंधु दोनी ॥ १० ॥

एवमुक्त्वा महातेजा रावणो राक्षसेश्वरः ।
अगच्छत्सहसा क्रूरो महासैन्येन संवृतः ॥ ५ ॥

स एवमुक्त्वा तु विमानरूपं
रथं तुरंगैर्बहुभिः सुयुक्तम् ।
प्रकाशमानं वपुषा ज्वलंतं
समारुरोहामरराजशत्रुः ॥ ६ ॥
सशंखभेरीपणवप्रणादै-
राक्ष्वेडितास्फोटितसिंहनादैः ।
पुण्यैः स्तवैश्चापि सुपूज्यमान-
स्तदाययौ राक्षसराजमुख्यः ॥ ७ ॥
सशैलजीमूतनिकाशरूपै-
र्महाबलैः पावकदीप्तनेत्रैः ।
बभौ वृतो राक्षसराजमुख्यो
भूतैर्वृतो रुद्र इवामरेशः ॥ ८ ॥
ततो नगर्याः सहसा महौजा
निष्क्रम्य तद्वानरसैन्यमुग्रम् ।
महार्णवाभ्रस्तनितं ददर्श
समुद्यतं पादपशैलहस्तम् ॥ ९ ॥

मारावया रामसौमित्र । निर्दाळावया वानरभार । युद्धा निघाला दशशिर । सैन्यसंभार सज्जूनी ॥ ११ ॥ अतिरथी महारथी । अश्वपती गजपती । युद्धा आले नरपती । सैन्यसंपत्ती सज्जूनी ॥ १२ ॥ कंगल टोप राघावळी । पाखरा लखलखित तेजाळी । झळकती अश्वाची मोहळी[6] । दाटली फळी असिवारांची[7] ॥ १३ ॥ हो हो मा मा जी जी करीं । नाचविती तीं पायांवरी । एक वारू उडविती अंबरीं । एक धरेवरी थरकती ॥ १४ ॥ चढोनियां असिवारीं । सिंहनादें गर्जती गजरीं । यावा दाविजला स्वारीं । शस्त्रसंभारीं लखलखित ॥ १५ ॥ वारू जुंपोनियां श्रेष्ठ । रथीं बैसले सुभट । ध्वजपताकालखलखाट । घडघडाट रथांचा ॥ १६ ॥ आढाऊ चव्हाण अलंगाइत । सेली सांबळी बाणाईत । शूळ कट्यार फरशुहस्त । अपरिमित पायांचे ॥ १७ ॥ तुळवे तळपती थैकारीं । जेठी पिलंगती हुंकारीं । भिंडिमाळा घेवोनि करीं । केला वीरीं गडगर्ज ॥ १८ ॥ एका हतियेर मुसळ । एका खट्वांग प्रबळ । एका यष्टिका[9] सबळ । मिनलें दळ पायांचें ॥ १९ ॥ असंख्य दोहीं बाहीं कुंजर[10] । मदोन्मत्त सालंकार । वरी वळंघले वीर । परम शूर गजयोद्धे ॥ २० ॥ जैसें चालतें विमान । तैसा रथ शोभायमान । ध्वजीं शोभे रथचिन्ह । पताका संपूर्ण झळकती ॥ २१ ॥ ज्वाळमाळाखचित रत्न । मणिमुक्तामाळापरिलंबन । रथीं बैसला दशानन । शोभायमान अति शोभा ॥ २२ ॥ रथीं बैसला रावण । वीर करूं येती वंदन । सेवक सांगती गर्जोन । पहावें नमन धुरेचें ॥ २३ ॥ पर्वतप्राय निशाचर । मेघसदृश[11] महावीर । एकाचे धगधगीत नेत्र । वैश्वानरसमप्रभ[12] ॥ २४ ॥ कराळ विकराळ दांताळी । ऐशा वीरांच्या समेळीं । रावण निघे आतुर्बळी । रणकल्लोळीं भिडावया ॥ २५ ॥ घेवोनि गण साठी सहस्र । जेंवी कां निघे महारुद्र । तेंवी निघाला दशशिर । सैन्यसंभारसमवेत ॥ २६ ॥ छत्रशशांक त्याचे शिरीं । सूक्ष्म शलाका मणिमंजरी । मुक्ताफळांच्या झालरी । शोभती हारी पाचूंच्या ॥ २७ ॥ घावो घातला

१ प्रमुख वीर. २ उपेक्षा. ३ अग्नि. ४ बाणांच्या भोंवऱ्यांत. ५ झुली. ६ मोहरकी (घोड्याच्या मुखांतील दोरी) ७ स्वारांची. ८ हे सैनिकांचे प्रकार आहेत. ९ काठी. १० हत्ती. ११ मेघासारखे. १२ अग्नीप्रमाणें शोभणारे.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

निशाणीं । शंखभेरीमृदंगध्वनी । ढोल टमकी किंकिणी । रणविराणीं गाजती ॥ २८ ॥ गिडबिडी थापडी गजरीं । शृंग वेणु गर्जती गंहिवरीं । खा[1]खाइलीं रणमोहेरीं[2] । भाट कैवारीं गर्जती ॥२९॥ काहळा[2] वाजती चिनकाहळा[2] । बुरुंगांचा[2] ध्वनि आगळा[3] । रणीं त्राहाटिला भोंगळा[4] । राक्षसदळा आल्हाद ॥ ३० ॥ ऐसें सैन्य सहपरिवारीं । वाजंत्र्यांच्या निजगजरीं । रावण निघाला बाहेरी । नरवानरीं युद्धार्थ ॥३१॥ सैन्यपताका असंख्यात । श्वेत आरक्त सुनीळ पीत । दाडिंबसुमनीं[5] शोभत । सिंदूरान्वित अनेका ॥३२॥ देखोनि राक्षससंभार[6] । वानरीं आल्हाद अपार । घेवोनि वृक्ष शिळा शिखर । युद्धा सत्वर निघाले ॥ ३३ ॥ जैसा अक्षोभ्य सागर । तैसा वानरांचा भार[6] । तें देखोनियां दशशिर । निशाचर सकंप ॥ ३४ ॥

तद्राक्षसानीकमतिप्रचंडमालोक्य रामो भुजगेंद्रबाहुः ।
बिभीषणं शस्त्रभृतां वरिष्ठमुवाच सेनानुगतः पृथुश्रीः॥ १०॥
नानापताकाध्वजछत्रजुष्टं प्रासासिशूलायुधशस्त्रजुष्टम् ।
कस्येदमक्षोभ्यमभीरुजुष्टं सैन्यं महेंद्रोपमनागजुष्टम्॥ ११॥
ततस्तु रामस्य वचो निशम्य विभीषणः शुक्रसमानबुद्धिः ।
शशंस रामस्य बलप्रवेकं महात्मनां राक्षसपुंगवानाम्॥ १२॥

सुवेळाग्रीं[7] श्रीरामचंद्र । देखोनि राक्षससेनाभार । सैन्य अतिशयें अपार । वीर दुर्धर रणयोद्धे ॥ ३५ ॥ बिभीषणा पुसे श्रीरामचंद्र । नाना पताका ध्वज विचित्र । कोणाचा हा सैन्यसमुद्र । अति दुस्तर अक्षोभ्य ॥ ३६ ॥ रावण सदा भयभीत । राक्षससेना भयचकित । निःशंक कैसेनि पैं येत । अति गर्जत उल्लासें ॥ ३७ ॥ शूळ शक्ति खड्गधार । गदा मुद्गल लहुडी चक्र । घेवोनियां शस्त्रसंभार । वीर दुर्धर भद्रजाती[8] ॥ ३८ ॥ ऐसें बोलत बोलतां । येतां देखोनि लंकानाथा । रणश्री चढली रघुनाथा । करावया घाता निजशत्रूच्या ॥३९॥ आजानुबाहु भुजगेंद्रसमता[9] । स्फुरण आलें श्रीरघुनाथा । धनुष्य सज्जोनियां हाता । होय पुसता बिभीषणा ॥ ४० ॥ सैन्यामाजी रणप्रवीण । निधडे निःशंक कोण कोण । त्यांचें सांग पां सुचिन्ह । रणीं शोधून मारावया ॥ ४१ ॥ ऐकोनि श्रीरामवचन । विभीषण शुक्रबुद्धिसमान । राक्षससैन्यीं वीर दारुण । त्यांचें सुचिन्ह सांगत ॥ ४२ ॥ सावध ऐकें श्रीरामचंद्रा । मुख्य करोनि दशशिरा । रणप्रवीण बारा धुरीं[10] । अति दुर्धरा तें ऐक ॥ ४३ ॥ बालार्कतेजेंसीं[11] समान । गजस्कंधीं आरोहण । गज डुलतां डुले आपण । अकंपन तो जाण ॥ ४४ ॥ मागें मारिला अकंपन । त्याच्या बळासीं समान । अतिशयेंसीं रणप्रवीण । निधडा पूर्ण रणयोद्धा ॥ ४५ ॥ ज्याच्या ध्वजीं सिंहकेत । बळें गजबळें उन्मत्त । इंद्र धरोनि आणिला तितें[12] । इंद्रजित तो जाला ॥ ४६ ॥ धनुष्यीं करोनि टणत्कार । रथीं रणयोद्धा विचित्र । अतिकाय महावीर । अति दुर्धर सुरवर्या ॥ ४७ ॥ घंटा सनाद सालंकार । खरारूढ महोदर । गर्जताहे खरस्वर । आरक्तनेत्र रणयोद्धा ॥ ४८ ॥ सुवर्णपाखरांचा[13] विचित्र वारू[14] । त्यावरी बैसला रावणकुमरू । नरांतक महावीरू । खड्गें दुर्धरू रणमारा ॥ ४९ ॥ किंकिणीज्वाळमाळाविभूषित । गजारूढ शूळहस्त । त्रिशिरा गजयोद्धा विख्यात । विबुधांतकें[15] रणमर्दी ॥ ५० ॥ ज्याच्या रथीं पन्नगकेत । रथानुगतीं अति विख्यात । धनुर्बाणीं रणाभिवृत्त । कुंभ उन्मत्त रिपुघाती ॥५१॥ सुवर्णखचित रत्नकंठ । अष्टौ घंटा परिघ उद्भट । रणाभिमर्दनीं कुंभ श्रेष्ठ । शत्रुसंकट रणविजयी ॥ ५२ ॥ ध्वजपताकाशोभित । धनुर्धारी अतिपुरुषार्थ । देवांतक रावणसुत । रणोन्मत्त रणमारा ॥५३॥ आरूढोनि शुभ्र गज । किरीटकुंडलीं कवचीं सज्ज । धनुर्धारी विकटभुज । खरात्मज मकराक्ष ॥५४॥ व्याघ्रमुख उष्ट्रमुख । तरसतगरसिंहमुख । ऐसें सैन्य ज्याचें विटंक । सैराट देख विकृतास्य[16] ॥५५॥ पैल राजा दशशिर । शशिप्रभ श्वेतच्छत्र । कनकदंडी युग्मचामर । धुरा थोर थोर दोहीं बाहीं ॥ ५६ ॥ ऐसा देखोनि सैन्यसमुद्र । स्वयें बोले श्रीरामचंद्र । रावण उग्र अत्युग्र । सुरासुर कांपती ॥ ५७ ॥ रावण आला दृष्टितळीं । त्यासी विंधोनि बाणजाळीं । त्याची करीन मी रांगोळी । गर्वानुमेळीं

१ गर्जलीं. २ रणवाद्यें. ३ गंभीर. ४ मुखवाद्य, तुतारी. ५ डाळिंबाच्या फुलांनीं. ६ समुदाय. ७ सुवेळ पर्वताच्या शिखरावर. ८ श्रेष्ठ. ९ सर्पराज वासुकीसमान. १० मुख्य वीर.

११ उगवत्या सूर्याच्या तेजासमान. १२ तेव्हांपासून. १३ सोन्याच्या झुलींनीं युक्त असा. १४ घोडा. १५ देवांचा नाश करणारा. १६ तोंडें उघडीं असें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

कुंथत ॥ ५८ ॥ रावणाचें उग्र स्वरूप । रावणाचा उग्र प्रताप । तोडावया रावणदर्प । दृढसाटोप श्रीरामा ॥ ५९ ॥

एवमुक्त्वा ततो रामो धनुरादाय वीर्यवान् ।
लक्ष्मणानुचरस्तस्थौ समुद्धृत्य शरोत्तमम् ॥ १३ ॥

ऐसें बोलोनि आपण । रणीं लक्षोनि रावण । श्रीराम आणि लक्ष्मण । धनुर्ष्यीं बाण सज्जिले ॥ ६० ॥ येरीकडे दशशिर । देखोनि वानरसैन्य-समुद्र । जैसा मथिजे क्षीरसागर । तेंवी वानरवीर विमर्दी ॥ ६१ ॥ जेंवी मकरें सागरीं खळाळ । तेंवी वानरांचें दळ । रावणें केला हलकल्लोळ । शरजाळ वर्षोनी ॥ ६२ ॥ रावणाचे उग्रशर । तेणें भेदले वानर । घायें तळमळित वीर । कपिसंभार खळबळिला ॥ ६३ ॥ येतां देखोनि रावण । सुग्रीवासी आलें स्फुरण । त्यासीं करावया रण । केलें उड्डाण अति वेगें ॥ ६४ ॥ रे रावणा म्हणे राहें साहें । माझा यावा आला पाहें । तुज राखेल कोण माये । एकें घायें मारीन ॥ ६५ ॥ चोरोनि श्रीरामाची अंतुरी । जावोनि लपसी लंकापुरीं । आजि आलासी बाहेरी । मारीन महामारीं रणमारें ॥ ६६ ॥ ज्यावरी शिखरें असंख्यात । प्रचंड उपटोनी पर्वत । रणीं ठोकिला लंकानाथ । क्रोधान्वित सुग्रीवें ॥ ६७ ॥ बाणीं विंधिलें अमित । परी तो भंगेना पर्वत । गजबजिला लंकानाथ । रणीं प्राणान्त ओढवला ॥ ६८ ॥ येतां देखोनि गिरिवर । राक्षसदळीं हाहाकार । पर्वत आला अनिवार । दशशिर वांचेना ॥ ६९ ॥ रावण होवोनि सावचित्त । बाण ब्रह्मवरदत्त[2] । तेणें विंधोनि पर्वत । शतधा छेदिला ॥ ७० ॥ वृथा जातांचि पर्वत । सुग्रीवें रथीं दिधली लात । रथसारथि अश्वयुक्त । परिभ्रमत रणभूमीं ॥७१॥ रथ भोंवतां चक्रान्वित । रावण जाला अति विस्मित । सुग्रीव बळिया बळिवंत । परम पुरुषार्थी कपिकुळीं ॥ ७२ ॥ सुग्रीव उसळोनि गगना । पर्वत हाणितां रावणा । कोप आला दशानना । वरदबाणें विंधिलें ॥७३॥

स सायकार्तो विपरीतचेताः
कूजन्पृथिव्यां निपपात वीरः ।
तं प्रेक्ष्य भूमौ पतितं विसंज्ञं
नेदुः प्रहृष्टा युधि यातुधानाः ॥ १४ ॥
ततो गवाक्षो गवयः सुषेणो
मैंदो गजो ज्योतिमुखो नलश्च ।
शिलाः समुद्यम्य विवृद्धकायाः
प्रदुद्रुवुस्तं प्रति राक्षसेंद्रम् ॥ १५ ॥
तेषां प्रहारान्स चकार मोघान्
रक्षोऽधिपो बाणशतैः शिताग्रैः ।
ते वानरेंद्रास्त्रिदशारिबाणै-
र्भिन्ना निपेतुर्भुवि भीमकायाः ॥ १६ ॥
ते वध्यमानाः पतिताश्च शूराः
संताड्यमाना भयशल्यविद्धाः ।
ते वानरा रावणसायकार्ता
जग्मुः शरण्यं शरणं स्म रामम् ॥ १७ ॥

वरदबाण आतुर्बळी । भेदतांच हृदयकमळीं । रामनामें देवोनियां आरोळी । पडिला भूतळीं सुग्रीव ॥७४॥ सुग्रीवराजा पडतां क्षितीं । राक्षस जयजयकारें गर्जती । आमचा विजयी लंकापती । गुढिया उभारिती स्वानंदें ॥ ७५ ॥ धूर पडतांचि रणीं । रावण नेईल काढोनी । यालागीं वानरवीरश्रेणी । चहूंकडोनी धांवत ॥ ७६ ॥ शिळा शिखर वृक्ष पर्वत । वानर निजबळें हाणित । जाजावला[3] लंकानाथ । वानरीं रथ वेढिला ॥ ७७ ॥ गुळासीं लागती माकोडे[4] । तैंसीं रावणासीं माकडें । झोंबिन्नलीं चहूंकडे । मागें पुढें कवळोनी ॥ ७८ ॥ चुकवी पुढिलांचे आघात । मागून वानर करिती घात । जंव मागिलां निवारित । तंव हाणित वामसव्य[5] ॥७९॥ रावणाच्या अंगावरी । चालती वानरांच्या हारी । जाजाविला वनचरीं । न चले थोरी बळाची ॥ ८० ॥ अंगप्रत्यंगीं चौपासीं । मुंग्या झोंबती सर्पासी । त्यांवरी बळ न चले त्यासी । तेंवी रावणासी कपिभारीं ॥ ८१ ॥ रावण जंव बाण सोडी । एक वानर शीर्तें[6] तोडी । एक बाणातें आसुडी । एक तो ओढी धनुष्यातें ॥ ८२ ॥ सुग्रीव पडतां अचेतन । यालागीं वानरगण । स्वयें वेंचूं पाहती प्राण । रणीं रावण वेढूनि ॥ ८३ ॥ सुग्रीव

१ स्त्री. २ ब्रह्मदेवानें वरप्रसंगीं दिलेला. ३ पीडित झाला. ४ मुंग्या, डोंगळे. ५ डाव्या उजव्या बाजूंनीं. ६ धनुष्याची दोरी.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

न्यावया लंकेप्रती । उचलोनि घालूं पाहे रथीं । वानरीं वेढिला लंकापती । विस्मित चित्तीं रावण ॥ ८४ ॥ पसरोनि विंशतिभुजांभारू । कवळोनि मारितां वानरू । गगनीं उसळोनि सत्वरू । लहान थोरू निष्टले ॥८५॥ मूर्च्छित पडतां मुख्य धूर । वेगीं पावले कपिकुंजर । करीत नामाचा भुभुःकार । वानरवीर तें ऐका ॥ ८६ ॥ गज गवाक्ष गवय तिन्ही । सवेग आले पैं ठाकोनी । मैंद द्विविद वीर दोन्ही । रणनिर्वाणीं खवळले ॥ ८७ ॥ सुदंष्ट्र वीर प्रबळ । नळ नीळ तार तरळ । वानर पावले सकळ । वृक्ष शिळा प्रवळ पर्वत हस्तीं ॥ ८८ ॥ मुख्य लक्षोनि रावण । वानरवीरीं मांडिलें रण । शिळा शिखरें द्रुमें पाषाण । रणकंदन लंकेशा ॥ ८९ ॥ रणीं कोपोनि दशानन । सज्जोनियां धनुष्यबाण । तोडोनि द्रुम शिळा पाषाण । कपिकंदन मांडिलें ॥ ९० ॥ वानर आले अति वेगेंसीं । तोडोनि त्यांच्या आयुधांसी । बाण भेदूनि सपिच्छी । रणभूमीसी पाडिले ॥ ९१ ॥ विंधोनियां निर्वाणबाणीं । मुख्य धुरा पाडिल्या धरणीं । वानरवीरांचिया श्रेणी । रणकंदनीं त्रासिल्या ॥ ९२ ॥ अनिवार्य रावणबाण । वानरवीर रणीं त्रासून । सांडोनियां रणांगण । आले शरण श्रीरामा ॥ ९३ ॥ सुवर्णपत्री भाळीं सुधारा । रणीं त्रासितां वानरां । शरण आले श्रीरामचंद्रा । जीवनें वानरां श्रीराम ॥ ९४ ॥

ततो महात्मा स धनुर्धनुष्मान्
आदाय रामः सहसा जगाम ।
तं लक्ष्मणः प्रांजलिरभ्युपेत्य
प्रोवाच वाक्यं परमार्थयुक्तम् ॥ १८ ॥
अहमार्य सुपर्याप्तो वधायास्य दुरात्मनः ।
वधिष्याम्यहमवैवमनुजानीहि मां विभो ॥ १९ ॥
तमब्रवीन्महातेजा रामः सत्यपराक्रमः ।
गच्छ त्वं वचनं चेदं निबोध मम लक्ष्मण ॥ २० ॥
तस्य च्छिद्राणि मार्गस्व स्वच्छिद्राण्यपि लक्षय ।
चक्षुषा धनुषा चैव रक्षात्मानं समाहितः ॥ २१ ॥
राघवस्य वचः श्रुत्वा संपरिष्वज्य पूज्य च ।
अभिवाद्य ततो रामं ययौ सौमित्रिराहवे ॥ २२ ॥

रावणाचे दुर्धर बाण । वानर त्रासिले देखून । श्रीरामें घेवोनि धनुष्यबाण । युद्धा आपण निघाला ॥ ९५ ॥ युद्धीं निघतां रघुनंदन । लक्ष्मणें धांवोनि धरिले चरण । आजिचें मज द्यावें रण । कृपा करून श्रीरामा ॥ ९६ ॥ रावण बापुडें तें किती । तुवां न रिघावें युद्धार्थी । त्यासीं मी रणीं लावीन ख्याती । रणव्युत्पत्ती पाहें माझी ॥ ९७ ॥ ऐकोनी लक्ष्मणाचें वचन । संतोषला रघुनंदन । रावणासीं करावया रण । बुद्धि संपूर्ण सांगत ॥ ९८ ॥ रावणाची बुद्धि खोटी । रावण अतिशयें कपटी । त्यापासीं मायाकोटी । रणसंकटीं सिंतरावैया ॥ ९९ ॥ त्यासीं करावया रण । स्वयें व्हावें सावधान । दृढ राखोन अनुसंधान । विंधावे बाण अलक्ष्यलक्ष्यीं ॥ १०० ॥ देहीं नैं फुटतां घावो । शत्रु जीवें मारावा पहा हो । हाचि धरोनियां आवो । रणनिर्वाहो करावा ॥ १ ॥ ब्रह्मरूप अनुसंधान । ब्रह्मरूपीं विंधितां बाण । ब्रह्मरूप आपणाआपण । हें रणांगण साधावें ॥ २ ॥ ऐसिया साधोनि रणरंगास । सांडोनि शरीराची आस । कळिकाळावरी घालोनि कांस । रणीं उदास विचरावें ॥ ३ ॥ मरणभय ज्याचे पोटीं । तो तंव शूर नव्हे सृष्टीं । त्याची आशंका लागे त्यापाठीं । मरे शेवटीं निजभयें ॥ ४ ॥ चैतन्यतेजें लखलखाट । देहीं विदेहत्वाचा नेट । ऐसेनि धैर्यें अति सुभट । ते वीर श्रेष्ठ संग्रामीं ॥ ५ ॥ तेथें न चले शठकपट । तेथें न चले मायेचें कचाट । निर्दळे शत्रुपक्षसंकट । करी सपाट पापपुण्या ॥ ६ ॥ ऐकोनि श्रीरामवचन । लक्ष्मणा आनंद गहन । एका जनार्दना शरण । युद्ध दारुण अवधारा ॥ १०७ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां सुग्रीवमूर्च्छापतनं नाम सप्तदशोऽध्यायः ॥ १७ ॥ ओंव्या ॥ १०७ ॥ श्लोक ॥ २२ ॥

अध्याय अठरावा

श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ श्रीरामें निरूपण सांगून । बंधूसी पावली मूळींची खूण । घालोनियां लोटांगण । श्रीरामचरण वंदिले ॥ १ ॥ वंदितां श्रीरामचरण । लक्ष्मणासी आलें स्फुरण ।

---

१ वीस हात. २ वृक्ष. ३ समुदाय. ४ आधार. ५ फसविण्याकरितां. ६ न लागतां. ७ फिरावें. ८ बंड.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

श्रीरामें देवोनि आलिंगन । धाडिला आपण संग्रामा ॥ २ ॥

स रावणं वारणहस्तबाहुं
ददर्श भीमोद्यतदीप्तचापम् ।
प्रच्छादयंतं शरवृष्टिजालै-
स्तान्वानरान्बाणविकीर्णदेहान् ॥ १ ॥
तमालोक्य महातेजा हनुमान्मरुतात्मजः ।
निवार्य शरजालानि विदुद्राव स रावणम् ॥ २ ॥
रथं तस्य समासाद्य तोदमाक्षिप्य सारथेः ।
त्रासयन्रावणं धीमान्हनुमान्वाक्यमब्रवीत् ॥ ३ ॥
एष मे दक्षिणो बाहुः पंचशाखः समुद्यतः ।
विधमिष्यति ते देहे भूतात्मानं चिरोषितम् ॥ ४ ॥

रावणाचें उग्र स्वरूप । अत्युग्र वाहोनियां चाप । अनिवार शरप्रताप । वानरदर्प भंगिला ॥ ३ ॥ रावणाच्या निजबाणीं । वानरां जाली भंगा[१]णी । पाठिराखा नाहीं कोणी । रणमर्दनीं त्रासिले ॥ ४ ॥ श्रीराम आणि सौमित्र । करितां धर्मयुद्धविचार । रावणें त्रासितां वानर । हनुमान सत्वर पावला ॥ ५ ॥ रणीं गर्जोनि मारुती । येतां देखोनि शीघ्रगती । रावणबाण जंव सज्जिती । तंव तो रथीं आदळला ॥ ६ ॥ बाण ओढावया पुरती । रावणा सवडी नुरेचि रिती । आमें[२]डआसडूनियां मारुती । रथींचा सारथी घोळें[३]शिला ॥ ७ ॥ हनुमान म्हणे रावणातें । पंचांगुळी दक्षिणहस्तें । तुझ्या मारीन भूतात्म्यातें । तळघातें हाणोनि ॥ ८ ॥ भूतात्मा तुझ्या देहाआंत । बहुकाळ वसिन्नला अधर्मयुक्त । त्याचा करीन मी घात । दक्षिणहस्ताचेनि घायें ॥ ९ ॥ रावण म्हणे हनुमंता । शीघ्र करीं माझ्या निःपाता । तुझ्या देखोनि पुरुषार्था । मग तुझ्या घाता मी करीन ॥ १० ॥ जेव्हां मारिला अखयासुत । तेव्हांचि तुझा प्राणान्त । आतां मेला ना जीतें[४] । मिथ्या पुरुषार्थ तूं वल्गसी ॥ ११ ॥ ऐकोनि कपीच्या वाक्यातें । कोपें प्रज्वळोनि लंकानाथें । उरावरी हनुमंतातें । निष्ठुर घातें ताडिलें ॥ १२ ॥ हृदयीं लागतां तळघात । उल्लास कपीच्या हृदयांत । करावया रावणाचा घात । स्वयें हाणीत तळघातें ॥ १३ ॥

आजघान च संक्रुद्धस्तलेनैवासुरद्विषम् ।
दशग्रीवः पपातोर्व्यां यथा भूमितलेऽचलः ॥ ५ ॥
संग्रामे तं तथा दृष्ट्वा रावणं तलताडितम् ।
ऋषयश्चारणाः सिद्धा नेदुर्देवाश्च वानराः ॥ ६ ॥
अथाश्वस्य महातेजा रावणो वाक्यमब्रवीत् ।
साधु वानर वीर्यं ते श्लाघनीयोऽसि मे रिपुः ॥ ७ ॥
रावणेनैवमुक्तस्तु मारुतिर्वाक्यमब्रवीत् ।
धिगस्तु मम वीर्यस्य यत्त्वं जीवसि रावण ॥ ८ ॥

हनुमंतें हाणितां करतळ । रावण होवोनियां विव्हळ । भूकंपें उलथे अचळ[५] । तैसा विव्हळ लवंडला ॥ १४ ॥ चंद्रीं लागली विसां[६] नेत्रीं । खेंरसी[७] दाही मुखांतरीं । रावण पडतांचि क्षितीवरी । निशाचरीं आक्रांत ॥ १५ ॥ जाणोनि हनुमंत अति उद्भट । त्यासीं कां भिडों गेला दशकंठ । तेणें तळघातें केला शेवट । राज्यलोट[८] लंकेचा ॥ १६ ॥ बोंब सुटली दळभारीं । बोंब सुटली निशाचरीं । बोंब सुटली लंकेमाझारीं । केली बोहरी[९] हनुमंतें ॥ १७ ॥ आतुर्बळी वायुनंदन । पूर्वी जाळिलें लंकाभुवन । आतां मारिला दशानन । केलें कंदन राक्षसां ॥ १८ ॥ देखोनि हनुमंताची ख्याती । सुरवर जयजयकार करिती । असुर आंगवण वानिती । ऋषि स्तविती जयशब्दें ॥ १९ ॥ सिद्ध गंधर्व चारण । वानिती कपीची आंगवण । रणीं ढिलावला रावण । बळ संपूर्ण हनुमंता ॥ २० ॥ अदृष्टगतीचें[१०] विंदाण । कपीचेनि हातें नाहीं मरण । रावणाचा परतला प्राण । सावधान स्वयें जाला ॥ २१ ॥ रावण सावधान होतां । धन्य म्हणे हनुमंता । अप्रमेयबळपुरुषार्था[११] । शौर्यश्लाघता तिहीं लोकीं ॥ २२ ॥ तुझ्याऐसें बळ सत्राण । इंद्रादि देवां नाहीं जाण । दानव मानव बापुडे कोण । तुझी आंगवण त्यां नाहीं ॥ २३ ॥ दैत्य म्हणविती अदट । ते तुझे वाटिवेचे भाट । तूं वीरा वीर वरिष्ठ । शौर्य श्रेष्ठ मी मानीं ॥ २४ ॥ ऐकोनि रावणाचें वचन । हनुमान बोले लज्जायमान । जळो माझी आंगवण । घायें रावण न मारवेचि ॥ २५ ॥ माझा लागतां आघात । निःशेष मरावा लंका-

---

१ नाश. २ ओढओढून. ३ जर्जर केला. ४ जीवंत. ५ पर्वत, ६ ताटकळी. ७ फेंस, ८ नाश, ९ निर्बल केला.

१० प्रारब्धाचें. ११ अतुल बळानें पुरुषार्थयुक्त अशा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

नाथ । तो तूं सावधान बोलत । धिक् पुरुषार्थ पैं माझा ॥ २६ ॥

तेन वानरवाक्येन कोपस्तस्य प्रजज्वले ।
स मुष्टिं पातयामास वज्रकल्पं महायशाः ॥ ९ ॥
स तेनाभिहतो गाढं विसंज्ञो विह्वलोऽभवत् ।
विव्हलं तं तदा दृष्ट्वा हनूमंतं महाबलम् ॥ १० ॥
रथेनातिरथः क्षिप्रं नीलं प्रतिसमाद्रवत् ॥ ११ ॥

ऐकोनि हनुमंताचें वचन । रावण जाला कोपायमान । रागें वज्रमुष्टि वळोन । हाणी धांवोनहनुमंता ॥ २७ ॥ हृदयीं लागतां मुष्टिघात । नावेकें हनुमान मूर्च्छित । रावणाचा झणाणिला हात । व्यथाभूत रथावरी ॥ २८ ॥ मुष्टि हाणितां तडकला हात । तों हनुमान जाला सावचित्त । निमेषार्धें करील घात । निघे लंकानाथ अति धाकें ॥ २९ ॥ रण सांडोनि मागें जातां । उपहास लंकानाथा । रणीं चुकवावया हनुमंता । प्रेरी निजरथा नीळावरी ॥ ३० ॥ हनुमंतयुद्धसंकट । चुकवोनि रथ घडघडाट । नीळावरी आला दशकंठ । बाण उद्भट वर्षत ॥ ३१ ॥ रावण रणीं वर्षे बाण । नीळें हाणोनि पाषाण । रावणाचे बाण करी चूर्ण । रणविंदान दोहींचें ॥ ३२ ॥

अंतकप्रतिमैर्बाणैः परमर्मविभेदिभिः ।
क्षिप्रमापीडयामास नीलं हरिचमूपतिम् ॥ १२ ॥
स शरौघं समायांतं नीलः परमदारुणः ।
गिरिशृंगं च शैलाभं रक्षोऽधिपतयेऽक्षिपत् ॥ १३ ॥
हनूमानपि तेजस्वी समाश्वस्तो महाबलः ।
समीक्ष्यमाणो युद्धेप्सुः सरोषमिदमब्रवीत् ॥ १४ ॥
नीलेन सहसा सक्तो रावणो राक्षसाधिपः ।
न न्याय्यं हि मया योद्धुं क्षत्रधर्मविजानता ॥ १५ ॥

रावण विंधी जे जे बाण । नीळें वर्षोनि पाषाण । अवघे करितां शतचूर्ण । रणीं रावण क्षोभला ॥ ३३ ॥ साधोनियां रणांगण । अंतकतुल्य घेवोनि बाण । तोडून नीळाचे पाषाण । शर संपूर्ण विंधिले ॥ ३४ ॥ वर्मी भेदातांचि शर । तेणें क्षोभला वानर । मलयाद्रिसम गिरिवर । रागें सत्वर उपटिला ॥ ३५ ॥ न धरत न सांवरत । रागें ठोकिला लंकानाथ । तेणें रावण अति विस्मित । पर्वतपात देखोनि ॥ ३६ ॥ श्रीरामाच्या निजदळीं । जो तो वानर आतुर्बळी । पर्वत उपडोनि समूळीं । रणकल्लोळीं भिडताती ॥ ३७ ॥ मारिलें माझ्या प्रहस्तासी । तो सूड घेईन मी तुजपासीं । नीळ म्हणे रावणासी । तुज प्रहस्तासी भेटवीन ॥ ३८ ॥ तुम्हां दोघां जाहल्या भेटी । प्रहस्त सांगेल गुह्य गोष्टी । तेणें रावण क्षोभोनि पोटीं । शरवृष्टी वर्षत ॥ ३९ ॥ येरीकडे हनुमंत । मूर्च्छा शांतवून सावचित्त । रणीं मर्दावया लंकानाथ । असे पाहात साटोपें ॥ ४० ॥ रावण नीळेंसीं युद्धासक्त । तें देखोनि हनुमंत । स्वयें सांडी युद्धकंदनार्थ । धर्मयुक्त विवेकी ॥ ४१ ॥ दोघे वीरीं एकजणासीं । युद्ध करणें पापराशी । यालागीं त्यजूनि रावणासी । श्रीरामापासीं कपि आला ॥ ४२ ॥ रावण आणि नीळ । दोघे जण रणप्रबळ । दोघे करिती रणकल्लोळ । दोघे कुशळ रणमारा ॥ ४३ ॥ नीळें टाकिला प्रचंड गिरी । रावणें नवबाणेंकरीं । छेदून पाडिला धरेवरी । शतधां करी विखंड ॥ ४४ ॥

तद्विशीर्णगिरेः शृंगं दृष्ट्वा हरिचमूपतिः ।
अन्यांश्च विविधान्वृक्षान्नीलश्चिक्षेप संयुगे ॥ १६ ॥
स तानापततः शीघ्रं वृक्षांश्चिच्छेद रावणः ।
नीलस्याप्याहनद्गात्रे दर्शयंश्च स्वलाघवम् ॥ १७ ॥
ह्रस्वं कृत्वा ततो रूपं ध्वजाग्रे निपपात ह ।
ध्वजाग्रे धनुषश्चाग्रे किरीटाग्रे च तं हरिम् ॥ १८ ॥
सौमित्रिः सुगलो रामो हनूमान्विस्मयं गतः ।
रावणोऽपि महासत्त्वः कपिलाघवविस्मितः ॥ १९ ॥
नीललाघवसंभ्रांतं दृष्ट्वा रावणमाहवे ॥ २० ॥

पर्वत छेदोनि प्रचंड । बाणीं केला खंडविखंड । नीळ कोपला वितंड । रावणबंड दंडावया ॥ ४५ ॥ नीळ होवोनि कोपायमान । वृक्ष घेतला बहुशाख जाण । दंडावया दशानन । दावी आपण हस्तवेग ॥ ४६ ॥ अश्वकर्ण शाल्मली शाल । चूत चंपक तमाल ताल । खर्जूरी पोपळी सरळ । पिंपळ लेंघुलाघवें ॥ ४७ ॥ जांबळी बेहकळी प्रचंड खैर । वृक्षीं त्रासला दशशिर । दुर्धर तरुवरांचा मार ।

१ क्षणभर. २ भयंकर. ३ युद्धकौशल्य. ४ यमासारखे. ५ पराक्रमी. ६ प्रयत्नपूर्वक. ७ लढाई करणें. ८ नऊ बाण टाकून. ९ पृथ्वीवर. १० शेंकडों ठायीं. ११ सांवरीचें झाड. १२ आंबा. १३ थोर कुशलतेनें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

रणीं धीर न धरवे ॥ ४८ ॥ एक वृक्ष जंव तोडीत ।
तंव वृक्ष येती शतानुशत । जाजावला लंका-
नाथ । रणीं उसंतें घेवों नेदी ॥ ४९ ॥ वृक्ष आद-
ळती शिरीं । वृक्ष आदळती उरावरी । वृक्ष आद-
ळती भुजांवरी । धनुष्य करीं धरूं नेदी ॥ ५० ॥
अश्व हाणितां मुखावरी । सारथि पडला रथावरी ।
रथ भ्रमे चक्राकारीं । भ्रमे चांचरी रावण ॥ ५१ ॥
सारथी मूर्च्छित रथावरी । अश्ववांगोरे कोण
आवरी । रथ भोंवे सैरावैरी । अर्पांपरी रावणा
॥ ५२ ॥ नीळें ऐसऐशापरी । रावण त्रासिला
तरुवरीं । रावणें लघुलाघवेंकरीं । नीळ शरधारीं
विंधिला ॥ ५३ ॥ रावण धनुर्वाडा अति दक्ष ।
विकट साधोनियां लक्ष । छेदोनि सांडिले वृक्षें-
वृक्ष । नीळ संमुख विंधिला ॥ ५४ ॥ रावणाचें
बाणलाघव । नीळें लक्षोनियां सर्व । स्वयें झाला
अति ऱ्हस्व । ऱ्हस्वांन्वयविंदानी ॥ ५५ ॥ ऱ्हस्व-
रूपें नीळ वानरी । बैसला रावणाच्या ध्वजावरी ।
ध्वजीं विंधोनि जातां शरीं । धनुष्याग्रीं बैसला
॥ ५६ ॥ धरूं जातां धनुष्याग्रीं । सर्वेचि बैसे
मुकुटावरी । धरूं जातां मुकुटाग्रीं । ध्वजाग्रीं
आभासे ॥ ५७ ॥ देखोनि नीळाचें चरित्र । गद-
गदां हांसे सौमित्र । हनुमान सुग्रीव रामचंद्र ।
वानरवीर हांसती ॥ ५८ ॥ ध्वजाग्रीं धनुष्याग्रीं ।
मुकुटाग्रीं बाणाग्रीं । सर्वेचि भासत रथाग्रीं ।
नीळ निर्धारीं लक्षेना ॥ ५९ ॥ विस्मय मानी
श्रीरघुनाथ । विस्मित हनुमंत सौमित्र । विस्मित
वानर समस्त । नीळें लंकानाथ गांजिला ॥ ६० ॥
वीस बाहु वीस डोळे । रावण एकाग्र केला
नीळें । युद्ध काय होतें तें न कळे । संभ्रांतमेळें
तटस्थ ॥ ६१ ॥ वानर मिशांसी घेती हिंदोळा ।
एक काढिती कंठमाळा । एक पदकें घालिती
गळां । रावण भुलला संग्रामीं ॥ ६२ ॥ एक
आसुडिती वीरकंकणें । एक घेती बाहुभूषणें ।
नीळें रावणें एकाग्र करणें । देह विसरणें संग्रामीं
॥ ६३ ॥ एवं रणीं गांजोनि दशशिर । नीळें
केला भुभुःकार । वानरांचा जयजयकार । केला
गजर हरिनामें ॥ ६४ ॥ ऐकोनि वानरांचा गजर ।
रणीं क्षोभला दशशिर । मारावया नीळ वानर ।

१ त्रासला. २ विसांवा. ३ घोड्यांच्या दोऱ्या. ४ दुर्दशा. ५ लहान रूप धारण करण्यांत कुशल. ६ निश्चयपूर्वक.

बाण दुर्धर वर्षला ॥ ६५ ॥ रावणबाणांच्या
आवर्तीं । लक्षा न येचि सेनापती । शर सुटले
सुनाट जाती । लंकापति क्षोभला ॥ ६६ ॥ नीळ
जो कां सेनापती । आटोपेना शस्त्रावर्तीं । मग
दिव्यास्त्रें लंकापती । तद्वधार्थीं प्रयोजी ॥ ६७ ॥

वानराणां प्रणादेन संक्रुद्धो रावणस्तदा ।
अस्त्रमाहारयामास दीप्तमाग्नेयमुत्तमम् ॥ २१ ॥
आग्नेयास्त्रेण संयुक्तं गृहीत्वा रावणः शरम् ।
ध्वजशीर्षस्थितं नीलमुदैक्षत निशाचरः ॥ २२ ॥
ततोऽब्रवीन्महातेजा रावणो राक्षसेश्वरः ।
कपे लाघवयुक्तोऽसि मायया परया युतः ॥ २३ ॥
त्वद्वधाय मया क्षिप्तः सायकश्चाभिमंत्रितः ।
जीवितं खलु रक्षस्व यदि शक्तोऽसि वानर ॥ २४ ॥
एवमुक्तो महाबाहू रावणो राक्षसेश्वरः ।
संधाय बाणमस्त्रेण चमूपतिमताडयत् ॥ २५ ॥

वानरांचा जयजयकार । ऐकोनि क्षोभला दश-
शिर । नीळ मारावया वानर । अग्निअस्त्र सजिलें
॥ ६८ ॥ धगधगीत सज्जून बाण । रागें विंधितां
रावण । नीळें होवोनि अणुप्रमाण । गेला उडोन
ध्वजाग्रीं ॥ ६९ ॥ नीळ नाढळे बाणासी । अलक्ष्य
लक्षेना लक्ष्यासी । अग्निअस्त्र न लागे त्यासी ।
मनीं कुसुमुसी रावण ॥ ७० ॥ नीळाची सूक्ष्म
लाघवी गती । निर्बंधावया लंकापती । दमनीं
अस्त्रप्रयुक्ती । नीळाप्रती प्रयोजी ॥ ७१ ॥ दमनीं
अस्त्रमंत्रप्रयुक्ती । नीळाची खुंटली सर्व शक्ती ।
अग्निअस्त्र घेवोनि हातीं । लंकापति गर्जत ॥ ७२ ॥
लघुलाघवें सूक्ष्मगतीं । दाविसी नाना माया-
व्युत्पत्ती । ते म्यां तुझी दंडिली शक्ती । रणा-
भिवर्ती मारावया ॥ ७३ ॥ तुझा ध्यावया
निजप्राण । म्यां सोडिला आहे बाण । पाहूं तुझी
आंगवण । आपणा आपण वांचवीं ॥ ७४ ॥ नीळ
लक्षोनि ध्वजाग्रीं । अग्निबाण घेवोनि करीं ।
रावण विंधी निजनिर्धारीं । रणगजरीं गर्जोनी
॥ ७५ ॥ येतां देखोनि अग्निबाण । नीळा करितां
न ये उड्डाण । मंत्रास्त्रें निजशक्ति क्षीण । हृदयीं
बाण खडतरला ॥ ७६ ॥ हृदयीं लागतांचि बाण ।

७ व्यर्थ. ८ त्याचा वध करण्यासाठीं. ९ कुरकुरे. १० पराक्रम,

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

नीळ करी श्रीरामस्मरण । येतां येतां पळालें मरण । वरकांती बाण खडतरले ॥ ७७ ॥ जेथें श्रीरामस्मरण । तेथें कल्पांतीं न रिघे मरण । नीळाचा वांचला प्राण । वरकांती बाण लागला ॥ ७८ ॥

शस्त्रयुक्तेन बाणेन नीलो वक्षसि ताडितः ।
निर्दह्यमानः सहसा निपपात महीतले ॥ २६ ॥
विसंज्ञं वानरं दृष्ट्वा दशग्रीवो रणोत्सुकः ।
रथेनांबुदघोषेण सौमित्रिमभिदुद्रुवे ॥ २७ ॥

लागतां अग्निअस्त्राघात । नीळ भूतळीं पडे मूर्च्छित । तेथेंही जालें विपरीत । अत्यद्भुत तें ऐका ॥ ७९ ॥ अग्निअस्त्रें करावें घाता । तंव अग्नि नीळाचा पिता । तो न करीच प्राणघाता । नीळ तत्त्वतां वांचला ॥ ८० ॥ लागतां अग्निअस्त्राचा बाण । नीळें केलें रामस्मरण । घालोनियां वीरासन । मूर्च्छापन्न तो पडिला ॥ ८१ ॥ अग्निअस्त्राचा ताप शमोन । श्रीरामस्मरणें वोलावोन । नीळ सुखें मूर्च्छापन्न । सुखसंपन्न श्रीरामें ॥ ८२ ॥ वानर रामाचे निजभक्त । त्यांसी पडतां रणाआंत । सबाह्य प्रकटोनि रघुनाथ । रक्षी भक्त स्वानंदें ॥ ८३ ॥ अंतकाळींचा सोयरा रघुनाथ । शस्त्राभिघातीं सुखोन्मत्त । यापरी रक्षी निजभक्त । युद्धाआंत श्रीराम ॥ ८४ ॥ श्रीरामें सुखरूप रण । श्रीरामें नाठवे जन्ममरण । श्रीरामें वानरां समाधान । सुखसंपन्न संग्रामीं ॥ ८५ ॥ श्रीरामाचे निजसंगतीं । रणीं वानरां सुखसंवित्ती[1] । बाप कृपाळु रघुपती । संग्रामस्थितीं स्वानंद[2] ॥ ८६ ॥ नीळ सेनानी वीर सुभट । रणीं पडिला अति श्रेष्ठ । रथीं घालोनि घडघडाट । जाऊं स्पष्ट लंकेमाजी ॥ ८७ ॥ रावणें रणीं लावोनि ख्याती । धरोनि आणिला सेनापती । इतुकी तरी विजयवृत्ती । लंकेप्रती हो माझी ॥ ८८ ॥ रावणें जावें नीळेंसकट । तंव सौमित्र आला निकट । तेणें तळमळे दशकंठ । खोटें अदृष्ट हें माझें ॥ ८९ ॥ यशेंसीं जावया आपण । वांडी[3] नुरेचि अणुप्रमाण । युद्धा आलासे लक्ष्मण । निर्वाण कंदन हा करील ॥ ९० ॥ लंकागमन राहिलें स्पष्ट । युद्ध करणें विचार श्रेष्ठ । रथ मुरडोनि घडघडाट । रागें दशकंठ परतला ॥ ९१ ॥ एक प्रद्युम्न एक शंबर । एक वृत्र एक देवेंद्र । तैसा रावणेंसीं सौमित्र । युद्धीं सत्वर मिसळला ॥ ९२ ॥ सौमित्ररावणांचें रण । शस्त्रास्त्रीं विचित्र दारुण । एका जनार्दना शरण । श्रोतीं अवधान मज द्यावें ॥ ९३ ॥ नेणें पदबंधव्युत्पत्ती । नेणें कथेची संगती । रामायण वदवी रघुपती । कथाप्रयुक्तीं प्राकृत ॥ ९४ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां नीलरावणयुद्धप्रसंगो नाम अष्टादशोऽध्यायः ॥ १८ ॥ ओंव्या ॥ ९४ ॥ श्लोक ॥ २७ ॥

अध्याय एकोणिसावा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ पूर्वप्रसंगाच्या अंतीं । नीळ मूर्च्छित पडिला क्षितीं । रावण मिरवी यश कीर्ती । गर्वोन्नति विजयाची ॥ १ ॥

विसंज्ञं वानरं दृष्ट्वा दशग्रीवो रणोत्सुकः ।
रथेनांबुदघोषेण सौमित्रिमभिदुद्रुवे ॥ १ ॥
तमाह सौमित्रिरदीनसत्त्वो
विस्फारयंतं धनुरप्रमेयम् ।
अवेहि मामद्य निशाचरेन्द्र
न वानरांस्त्वं प्रतियोद्धुमर्हसि ॥ २ ॥
स तस्य वाक्यं प्रतिपूर्णघोषं
ज्याशब्दमुग्रं च निशम्य राजा ।
आसाद्य सौमित्रिमुपस्थितं तं
रोषान्वितं वाक्यमुवाच रक्षः ॥ ३ ॥
दिष्ट्यासि मे राघव दृष्टिमार्गं
प्राप्तोऽन्तगामी विपरीतबुद्धिः ।
अस्मिन्क्षणे यास्यसि मृत्युलोकं
संछाद्यमानो मम बाणजालैः ॥ ४ ॥

श्रीरामस्मरणें सुखसंपन्न । नीळ निजसुखें मूर्च्छापन्न । त्यातें देखोनि विसंज्ञ[4] । दशानन विचारी ॥ २ ॥ वानरांचा सेनापती । रावणें आणिला रणख्याती । ऐसी मिरवावया कीर्ती । नीळ लंकेप्रती स्वयें न्यावा ॥ ३ ॥ तंव नीळाची सोडवण । करूं पावला लक्ष्मण । सज्जोनियां

१ खरोखर, २ आनंदाचा, सुखाचा अनुभव. ३ मार्ग, वाट. ४ मूर्च्छित.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

धनुष्यबाण । संमुख रावण लक्षूनी ॥ ४ ॥ रावण म्हणे निजचित्तीं । रामसैन्यीं वीर भद्रजाती । मज न लभे यश कीर्ती । ऊर्मिलापति[1] स्वयें आला ॥ ५ ॥ आजि लक्ष्मणासीं रण । युद्ध करणें निजनिर्वाणें[2] । ऐसा करोनियां पण । स्वयें रावण परतला ॥ ६ ॥ मेघ गर्जती कडकडाट । तैसा रथाचा घडघडाड । लक्ष्मणेंसीं निकटानिकट । युद्धा दशकंठ स्वयें आला ॥ ७ ॥ रावणासी म्हणे सौमित्र । लंकाधिपति तूं दशशिर । मस्तकीं ढळती छत्र चामर । त्या तुज वानर गांजिती ॥ ८ ॥ जरी अंगीं आहे आंगवण । तरी मजसीं करीं पां रण । लक्ष्मणें साधिलें रणांगण । धनुष्यबाण सज्जूनी ॥ ९ ॥ लक्ष्मणें करितां ज्याघोषें[3] । नादें त्रासला लंकेश । जीवीं बैसला परम त्रास । वीरवित्रास[4] सौमित्र ॥ १० ॥ ज्याघोष तळघोषेंसीं जाण । ऐकोनि सौमित्राचें वचन । कोपें कोंदला दशानन । रणीं गर्जोन अनुवादे ॥ ११ ॥ आजि माझे मनोरथ । शिवें संपूर्ण केले येथ । लक्ष्मण आला रणाआंत । करीन घात बाणें एकें ॥ १२ ॥ शूर्पणखीचे नाक कान । येणें छेदिले आपण । तिचें व्हावया उत्तीर्ण[5] । घेईन प्राण बाणें एकें ॥ १३ ॥ दृष्टी पडतां लक्ष्मणासी । बाणीं निर्दळून त्यासी । अवश्य धाडीन मृत्यूपासीं । गर्जे आवेशीं रावण ॥ १४ ॥ ऐकोनि रावणाचें गर्जन । सौमित्र जाला हास्यवदन । करून दावीं रणविंदाण । वृथा जल्पोन कार्य काय ॥ १५ ॥

जानामि वीर्यं तव राक्षसेंद्र
बलं प्रतापं च पराक्रमं च ।
अवस्थितोऽहं शरचापपाणि-
रागच्छ किं मोघविकत्थनेन ॥ ५ ॥

स एवमुक्तः कुपितः ससर्ज
रक्षोऽधिपः सप्तशरान्सुपुंखान् ।
तान् लक्ष्मणः कांचनचित्रपुंखै-
श्छिच्छेद बाणैर्निशितैः सुपत्रैः ॥ ६ ॥

क्षुरार्धचंद्रोत्तमकर्णभल्लैः
शरांश्च चिच्छेद न चुक्षुभे च ।

स तान्प्रचिच्छेद निशाचरेंद्रं
शितान्शरान्लक्ष्मणमाजघान ॥ ७ ॥

सौमित्र म्हणे दशानना । तुझें वीर्य शौर्य प्रताप पूर्ण । सर्वेही मज आहे ज्ञान । सावधान अवधारीं ॥ १६ ॥ स्वयंवरीं वाहतां हरकोदंड[6] । तुझें जालें काळें तोंड । तरी वाढिवसी बळबंड । अति तूं लंड निःसंग ॥ १७ ॥ वाळीनें घालोनि कांखेतळीं । केली सप्तसमुद्रीं आंघोळी । तो तूं म्हणवितोसी बळी । राक्षसकुळीं निःसंग ॥ १८ ॥ तूं निःसंगत्वाचा निखिल राशी । राजा आणि भीक मागसी । तोही कपटी कपटवेषी । परदारेसी हरावया ॥ १९ ॥ राजा निजांगें चोरी करी । हे तुझ्या प्रतापाची थोरी । वाखाणिली दिगंतरीं । निःसंग संसारीं तूं एक ॥ २० ॥ चोरी करूनियां परनारी । पळोनि लपसी लंकापुरीं । तरी वानिसी बळाची थोरी । निःसंग संसारीं तूं एक ॥ २१ ॥ तुज श्वेतद्वीपाप्रती । दासी लाता देवोनि नाचविती । हेही तुझी परम ख्याती । निर्लज्ज निश्चितीं तूं एक ॥ २२ ॥ कपटवेषें भीक मागतां । सीतेसी स्वयें म्हणविसी माता । तिसीच करूं पाहसी कांता । मातृगामिन महापापी ॥ २३ ॥ चोरीमारी परद्वारी । मातृगामी दुराचारी । इतुकीं ब्रीदें तुझ्या शिरीं । लाज संसारीं तुज नाहीं ॥ २४ ॥ असो हा तुझा निंद्य वृत्तान्त । माझा करीन म्हणसी घात । तो मी शरचापसमन्वित । युद्धाआंत उभा असें ॥ २५ ॥ रणीं करोनि दावी ख्याती । त्यातें वीर शूर प्रतापी म्हणती । जे कां वृथा बडबड करिती । त्यांतें निंदिती अधमत्वें ॥ २६ ॥ सज्जूनियां धनुष्यबाण । स्यां साधिलेंसे रणांगण । माझा घेणें आहे प्राण । यावें आपण संग्रामा ॥ २७ ॥ शूर्पणखीचे नाक कान । छेदिले हें कर्म सामान्य । नाककानेंसीं दशानन । आजि छेदीन संग्रामीं ॥ २८ ॥ रावणा ऐकें माझी गोष्टी । संग्रामीं देवों नको पाठी । मग मी न लगें तुझ्या पाठीं । कडकडाटीं झुंजावें ॥ २९ ॥ ऐकतां सौमित्राचें वचन । हृदयीं पोळला दशानन । सुवर्णपत्री निर्वाणबाण । विंधी दारुण शर सप्त ॥ ३० ॥ रावणाचे सातही बाण । हेळाँ[7] सौमित्र

---

१ लक्ष्मण. २ निकरानें. ३ धनुष्याचा टणत्कार. ४ शत्रुकडील वीरांना त्रासविणारा. ५ ऋणमुक्त. ६ शिवधनुष्य. ७ लीलेनें, सहज.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सांडी तोडून । तेणें क्षोभला रावण । असंख्य बाण वर्षला ॥ ३१ ॥ ज्या बाणांच्या कडोविकडीं । सुरासुर पाडिले निर्वडीं। ते ते बाण सौमित्र तोडी । जेंवी सर्पकोडी खगेंद्रं॥ ३२ ॥ गरुड छेदी भुजंगभार। तेंवी रावणाचे दुर्धर शर। रणीं पसरले अपार । तेणें दशशिर गजबजित ॥ ३३ ॥ तेचि समयीं सौमित्र । निर्दाळावया दशशिर । सुवर्णपत्री सुपुंखें शर । विंधिले विचित्र ते ऐका ॥ ३४ ॥ सुरूप भाळी सतेज शर । नाराच नाळीक अर्धचंद्र । सवेग विंधितां सौमित्र । बाणीं जर्जर लंकेश ॥ ३५ ॥ तरी बळियाढा रावण । निवारोनि लक्ष्मणाचे बाण। घ्यावया लक्ष्मणाचा प्राण । अस्त्र निर्वाण प्रयोजी ॥ ३६ ॥ काळी कराळी कंकाळास्त्र । देहदमनी दाहकास्त्र । अखंडास्त्र विखंडास्त्र । दंडें दंडास्त्र मारक ॥ ३७ ॥ चंडास्त्र प्रचंडास्त्र । दंडास्त्र वितंडास्त्र । घातनास्त्र पातनास्त्र । निमेषें सौमित्र निवारी ॥ ३८ ॥ निर्वाणास्त्र अति क्रूर । ज्याचेनि होय सर्व संहार । रागें मोकली दशशिर । तें सौमित्र निवारी ॥ ३९ ॥ निर्वाणास्त्रें माझीं समस्त । हेळा सौमित्रें केलीं व्यर्थ । रावण चुरी दोनी हस्त । दांत खात करकरां ॥ ४० ॥ हृदयीं आली आठवण । ब्रह्मदत्त वरदबाण । रणीं मारावा लक्ष्मण । रागें रावण विंधीत ॥ ४१ ॥

शरेण कालाग्निसमप्रभेण
स्वयंभुदत्तेन ललाटदेशे ।
स लक्ष्मणो रावणसायकार्त-
श्चचाल चापं शिथिलं प्रगृह्य ॥ ८ ॥

पुनः स संज्ञां प्रतिलभ्य कृच्छ्रा-
च्चिच्छेद चापं त्रिदशेंद्रशत्रोः ।
निकृत्तचापं त्रिभिराजघान
बाणैस्तदा दाशरथिः शिताग्रैः ॥ ९ ॥

स सायकार्तो विचचाल राजा
कृच्छ्राच्च संज्ञां पुनराससाद ।
स कृत्तचापः शरताडितश्च
मेदार्द्रगात्रो रुधिरावसिक्तः ॥ १० ॥

ब्रह्मदत्त वरदबाणांसी । रावण विंधी रणाभिवेषीं । लक्ष्मण निवारीच ना त्यासी । वंदिली शिसीं ब्रह्माज्ञा ॥ ४२ ॥ श्रीराम आणि लक्ष्मण । अन्यथा न करिती ब्रह्मवचन । ललाटीं वंदिला वरद बाण । दिसे संपूर्ण रुतलासा ॥ ४३ ॥ ब्रह्मवराचा वरदहस्त । बाण नव्हेती गंधाक्षत । सौमित्रासी रणाभिषिक्त । स्वानंदें करीत स्वयंभू ॥ ४४ ॥ पुढील कथेची महिमा भारी । बाण खर्डेतरतांचि शिरीं । लक्ष्मणधैर्याची थोरी । मूर्च्छा सांवरी येतयेतां ॥ ४५ ॥ धनुष्याग्र लावोनि शिरापुढां । मूर्च्छा सांवरी वीर गाढा । सवेग उठोनि वेगाढा । सज्जिला मेढा शरवृष्टी ॥ ४६ ॥ शिथिल चाप शिथिल दर्प । शिथिल युद्धखटाटोप । ते काळीं सौमित्रिप्रताप । धरी साटोप तें ऐका ॥ ४७ ॥ सौमित्राची शौर्यथोरी । रावण विंधितांचि शरीं । एक उरीं एक शिरीं । एक चापकरीं छेदिले ॥ ४८ ॥ भयें स्वेदसकंपशरीर । सर्वांगीं वाहे रुधिर । सौमित्रें दशशिर । केला जर्जर बाणजाळें ॥ ४९ ॥ छिन्नधन्वा लंकानाथ । लागतां बाणांचा आघात । चांचरी जात गडबडित । पडत पडत सांवरी ॥ ५० ॥ वृथा गेला वरदबाण । रणीं न मरेचि लक्ष्मण । तेणें क्षोभला रावण । शक्ति दारुण स्वयें सज्जी ॥ ५१ ॥

जग्राह शक्तिं सहसा सुचण्डां
स्वयम्भुदत्तां युधि देवशत्रुः ।
स तां सधूमानलसन्निकाशां
वित्रासनीं वानरराक्षसानाम् ॥ ११ ॥

चिक्षेप शक्तिं सहसा ज्वलंतीं
सौमित्रये राक्षसराजसिंहः ।
प्रदीप्यमानां रघुनन्दनस्तां
जघान बाणैरनलप्रकाशैः ॥ १२ ॥

तथापि सा तस्य विवेश शक्ति-
र्भुजांतरं दाशरथेर्विशालम् ॥ १३ ॥

शक्त्या तया स सौमित्रिस्ताडितोऽपि स्तनांतरे ।
विष्णोरमीमांस्यभागमात्मानं प्रति सोऽस्मरन् ॥१४॥

१ कौशल्यानें, २ गरुड. ३ सर्पसमूह. ४ उत्तम पिसाऱ्याचे. ५ बाणविशेष. ६ लागतांच, ७ धनुष्य मोडलें आहे असा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

ब्रह्मयानें दिधली निर्वाणार्थी । ब्रह्मयाची ब्रह्मशक्ती । अनिवार त्रिजगतीं । लक्ष्मणवधार्थी मोकली ॥५२॥ रावणें सोडितांचि शक्तीसी । कोटिसूर्यसमप्रकाशी । कडाडिली पैं आकाशीं । तेज चौपासीं न समाये ॥५३॥ तेजें राक्षसां पैडिपाडीं । वानरां पडली झांपडी । उभय सेना त्रासली बापुडी । शक्तिकडाडीं सभ्रांत ॥५४॥ शक्ति तेजें देदीप्यमान । नादें कडाडितां गगन । लक्ष्मण ते काळीं सावधान । शरचापबाण सज्जूनी ॥ ५५ ॥ शक्ति येतां अति प्रचंड । लक्ष्मणाचें बळ वितंड । बाणीं करोनि शतखंड । शक्तीचें तोंड ठेंचिलें ॥ ५६ ॥ मागें न सरे ब्रह्मशक्ती । पुढें न निघवे बाणाहातीं । जाजावली रणावर्ती । वांचती गति दिसेना ॥ ५७ ॥ लक्ष्मणाचा करावा घात । तो राहिला शक्तिपुरुषार्थ । शक्तीसी आला प्राणान्त । वीर विख्यात सौमित्र ॥ ५८ ॥ अचुक लक्ष्मणाचे बाण । चुकवितां न चुकती जाण । शक्ति सौमित्राला शरण । माझा प्राण वांचवीं ॥ ५९ ॥ शरणागता नाहीं मरण । हें तंव तुमचें ब्रीद संपूर्ण । वांचवावया निजप्राण । शक्ति लोटांगण स्वयें घाली ॥ ६० ॥ दृढ ब्रह्मचारी तूं लक्ष्मण । मी ब्रह्मयाची ब्रह्मशक्ति जाण । तुझे हातें कन्यारत्न । हृदयीं संपूर्ण सांठवीं ॥ ६१ ॥ तूंचि माता तूंचि पिता । मी जालें तुझी दुहिता । लक्ष्मणा कृपावंता । माझ्या घाता करूं नको ॥ ६२ ॥ शक्तीनें म्हणतांचि शरण । लक्ष्मणें विंधों सांडिले बाण । शक्तीसी दे हृदयस्थान । कृपाळु पूर्ण शरणागता ॥ ६३ ॥ शक्तीनें देतांचि आलिंगन । होईल परदारस्पर्शन । लक्ष्मणें सांडोनि देहाभिमान । जाला परिपूर्ण परब्रह्म ॥ ६४ जेथें नाहीं पुरुषप्रकृती । जेथें नाहीं शिवशक्ति । लक्ष्मण राहिला ते अद्वैतीं । सहजस्थितीं स्वानंदें ॥ ६५॥ लक्ष्मण पावला विश्रांती । निर्मुक्त केली ब्रह्मशक्ति । श्रीरामभजनाची हे ख्याती । सकळ विश्रांती श्रीरामें ॥ ६६ ॥ धर्मयुद्धाची निजनीती । पूर्वी शिकविली रघुपती । लक्ष्मण राहिला तेचि गतीं । सहजस्थितीं स्वानंदें ॥ ६७ ॥ घातूं आली ब्रह्मशक्ती । तिसी दिधली नित्यमुक्ती । धन्य संतांची संगती । सुखसंविती घातका ॥ ६८ ॥ बाह्यकथेची अनुवृत्ती । म्हणती योद्धा लंकापती । लक्ष्मण भेदूनि शक्ती । पडिला क्षितीं मूर्च्छित ॥ ६९ ॥

विसंज्ञं पतितं दृष्ट्वा सौमित्रिं राक्षसेश्वरः ।
अवतीर्य रथात्तूर्णमभिदुद्राव लक्ष्मणम् ॥ १५ ॥
ततो दानवदर्पघ्नं सौमित्रिं देवकंटकः ।
तं पीडयित्वा बाहुभ्यां न प्रभुर्लंघनेऽभवत् ॥ १६ ॥
हिमवान्मंदरः शैलः कैलासश्च महाचलः ।
शक्यो भुजाभ्यां संवोढुं न त्वयं राघवानुजः ॥१७॥
आश्वस्तश्च विशल्यश्च लक्ष्मणः शत्रुसूदनः ।
विष्णोर्भागममीमांस्यमात्मानं प्रत्यनुस्मरन् ॥ १८ ॥

विसंज्ञ देखोनि लक्ष्मण । रथाहूनि उडोनि रावण । सवेग येवोनियां आपण । मुष्टिघातें पूर्ण ताडिला ॥ ७० ॥ रावणें हाणितां मुष्टिघात । झणाणिले दोनी हस्त । धापा दाटला लंकानाथ । पडत पडत सांवरी ॥ ७१ ॥ लक्ष्मणा हाणितां मुष्टिघात । माझा होऊं पाहे प्राणान्त । त्यासी न्यावें लंकेआंत । परम पुरुषार्थ हा माझा ॥ ७२ ॥ मुख्य धूर लक्ष्मण । रथीं घालितां रावण । त्यासी नुचले तो अणुप्रमाण । सर्वशक्तीं पूर्ण शिणतांही ॥ ७३ ॥ एके दोनी चौं हातीं । लक्ष्मण नुचले लंकापती । सात पांच दहाही हातीं । विसां हातीं कुंथत ॥ ७४ ॥ लक्ष्मणायेवढी धूर प्राप्त । माझेनि न नेववे लंकेआंत । कपाळ पिटी लंकानाथ । अभागी निश्चित मी एक ॥ ७५ ॥ लक्ष्मण न मरे मुष्टिघाता । लंके न नेववे घालोनि रथा । यासी करितां शस्त्रघाता । शस्त्रें वृथा स्वयें जाती ॥७६॥ शस्त्रें हाणितां आकाशासी । जेंवी न रुपती तयासी । तेंवी शस्त्रपात लक्ष्मणासी । अंग घायेंसीं आढळेना ॥ ७७ ॥ आकाशमोट बांधूं जातां । जेंवी चौपाळवी ये हाता । तेंवी लक्ष्मणासी उचलितां । लंकानाथा अति लज्जा ॥ ७८ ॥ भाग्यें सांपडला येथ । न चले मुष्टिघात शस्त्रपात । न नेववे लंकेआंत । तळमळित रावण ॥ ७९ ॥ लक्ष्मणें सांडितां देहअहंता । देहीं कोंदली ब्रह्मरूपता । तेणें तो नुचले लंकानाथा । स्वयें कुंथतां सांटोपें ॥ ८० ॥ रावण विस्मित मानसीं । म्हणे

१ सोडली. २ बरोबरच. ३ प्रचंड, विशाळ. ४ सुखानुभव. ५ संबंध. ६ पृथ्वीवर. ७ मूर्च्छित, निचेष्ट, ८ झोळी, वस्त्र. ९ देहाभिमान. १० मोठ्या यत्नानें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

शिवासगट कैलासासी । म्यां आंदोळिलें निजबळेंसीं । परी लक्ष्मणासी नुचलवे ॥ ८१ ॥ मेरु मंदार गिरिवर । निमेषें उचलीन मी दशशिर । परी नुचलवे हा सौमित्र । रामानुचर बळिष्ठ ॥ ८२ ॥ अचेतन पडिला लक्ष्मण । त्यासीं न चले आंगवण । जळो माझें रावणपण । आपणा आपण निर्भर्त्सी ॥ ८३ ॥ लक्ष्मणासी धरितां लंकानाथ । कोपें खवळला हनुमंत । वज्रप्राय मुष्टिघात । स्वयें हाणीत लंकेशा ॥ ८४ ॥

ततः क्रुद्धो वायुसुतो रावणं समभिद्रवत् ।
आजघानोरसि व्यूढे वज्रकल्पेन मुष्टिना ॥ १९ ॥
तेन मुष्टिप्रहारेण रावणो भीमविक्रमः ।
जानुभ्यां न्यपतद्भूमौ चचाल निपपात च ॥ २० ॥
विसंज्ञं रावणं दृष्ट्वा समरे भीमविक्रमम् ।
ऋषयो वानराश्चैव नेदुर्देवाश्च सासुराः ॥ २१ ॥
हनुमानपि तेजस्वी लक्ष्मणं शुभलक्षणम् ।
आनयद्राघवाभ्याशं बाहुभ्यां परिगृह्य वै ॥ २२ ॥
वायुसूनोः सुहृत्त्वेन भक्त्या परमया च सः ।
अकंप्योऽपि हि शत्रूणां लघुत्वमगमत्कपेः ॥ २३ ॥

लक्ष्मण होतां मूर्च्छान्वित । लंके नेऊं पाहे लंकानाथ । तेणें कोप येवोनि हनुमंत । दे मुष्टिघात लंकेशा ॥ ८५ ॥ तेणें मुष्टिघातें रावणासी । गुडघे आदळोनि भूमीसीं । पालथा पडिला तोंडघसीं । मोकळ्या केशीं विसंज्ञ ॥ ८६ ॥ बळियां[१] बळी लंकानाथ । ज्यासी सुरासुर नित्य कांपत । त्यासी लागतां वानरघात । पडे मूर्च्छित लंकेश ॥ ८७ ॥ रावण पडतां मूर्च्छित । वानर रामनामें गर्जत । सुरासुर जयजयकार करीत । ऋषि वदत पुरुषार्थ ॥ ८८ ॥ देखोनि हनुमंताचें बळ । स्वर्ग मृत्यु पाताळ । जयजयकारीं गर्जती सकळ । राक्षसदळ खवळलें[३] ॥ ८९ ॥ राक्षसदळीं हाहाकार । पुढें जो जो जाईल वीर । त्यासी कपि करील संहार । द्वंद्वी वानर राक्षसां ॥ ९० ॥ विकळ पाडोनि रावणासी । हनुमंत गेला लक्ष्मणापासीं । उचलोनियां सावकाशीं । श्रीरामापासीं आणिला ॥ ९१ ॥ होतां श्रीरामदर्शन । ब्रह्मशक्तीतें उद्धरोन । सौमित्र जाला सावधान । अगाध महिमान भक्तीचें ॥ ९२ ॥ भक्तीपासीं यश कीर्ती । भक्तीपासीं शांति विरक्ती । भक्तीपासीं ब्रह्मस्थिती । स्वानंदें वर्तती सर्व कर्मीं ॥ ९३ ॥ भक्तीस विकला भगवंत । भक्ताचें उच्छिष्ट स्वयें काढीत । रणांगणीं घोडे धूत । शेखीं होत द्वारपाळ ॥ ९४ ॥ भक्तसांकडीं समस्त । सदा सोशी भगवंत । ते भक्ति हनुमंतांत । सप्रेम वर्तत स्वानंदें ॥ ९५ ॥ विसां हातीं स्वयें रावण । शिणतां नुचलेचि लक्ष्मण । तोचि हनुमंतें आपण । पुष्पप्राय जाण उचलिला ॥ ९६ ॥ अभक्ता जो दुर्धर नेमस्त । तो भक्ता जड नव्हे भगवंत । यालागीं पुष्पप्राय हनुमंत । स्वयें उचलीत सौमित्र ॥ ९७ ॥ होतां श्रीरामदर्शन । सौमित्र जाला सावधान । वानरां उल्लास पूर्ण । केलें गर्जन रामनामें ॥ ९८ ॥

रावणोऽपि महातेजाः प्राप्य संज्ञां महाहवे ।
आददे निशितान्बाणान्जग्राह विपुलं धनुः ॥ २४ ॥
अस्वस्थश्च विशल्यश्च लक्ष्मणः शत्रुसूदनः ।
एतस्मिन्नंतरे वीरो दृष्ट्वा रावणविभ्रमम् ॥ २५ ॥

लागतां हनुमंताचा हात । रावण पडला होता मूर्च्छित । तो होवोनि स्वयें स्वस्थ । शरचापयुक्त रथीं बैसे ॥ ९९ ॥ येरीकडे लक्ष्मण । स्वयें होवोनि सावधान । सज्जोनियां धनुष्यबाण । पाहे रावण युद्धार्थी[५] ॥ १०० ॥ मज हाणोनि ब्रह्मशक्ती । केउता गेला लंकापती । त्यासी रणीं लावोनि ख्याती । बाणावर्तीं मारीन ॥ १ ॥ माझे लागलिया बाण । रणीं वांचला रावण । हें मज उणेपण । घेईन प्राण बाणें एकें ॥ २ ॥ सोडूनियां बाणावर्त[७] । रणीं रावणासी करीन घात । लक्ष्मण चालिला गर्जत । शरचापयुक्त साटोपें ॥ ३ ॥ लक्ष्मण निघतां उल्लासेंसीं । श्रीरामें धरिला पोटासीं । अति प्रीतीं प्रेमेंसीं । गुह्य त्यापासीं सांगत ॥ ४ ॥ रणीं मारावा दशानन । माझी प्रतिज्ञा हे प्रमाण । प्रतिपाळावी आपण । रणीं रावण मज द्यावा ॥ ५ ॥ तुवां करितांचि रण । निमेषें मारशील रावण । माझी प्रतिज्ञा होऊं नेदीं शून्य । सखा संपूर्ण तूं माझा ॥ ६ ॥ किती रावणाचें बळ । रणमाराचें कैसें संळ । तुंकोन पाहूं दे एक वेळ । संग्रामशील तयाचें ॥ ७ ॥ ऐकोनि श्रीरामाचें वचन । सौमित्र

१ निचेष्टित. २ बलवंतांत बलवंत. ३ खळवळलें. ४ लढणारा. ५ युद्ध इच्छिणारा. ६ कोठें. ७ बाणांच्या मान्यानें. ८ वृथा. ९ आग्रह. १० परीक्षून, तोलून.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

घाली लोटांगण । श्रीरामा देवोनि रावण । वंदूनि चरण परतला ॥ ८ ॥

लक्ष्मणं च समाश्वस्तं सैन्यं च मुदितं पुनः ।
निपातितानां वीराणां वानराणां महाचमूः ॥ २६ ॥
दृष्ट्वा रामो रणं गत्वा प्रत्ययाद्रावणं युधि ।
आयांतमुपसंगम्य हनूमान्वाक्यमब्रवीत् ॥ २७ ॥
राम पृष्ठं समारुह्य जह्येनं पापराक्षसम् ।
श्रुत्वा हनूमतो वाक्यं रामो दाशरथिस्ततः ॥ २८ ॥
एवमुक्तस्तथेत्युक्त्वा समारुह्य प्लवंगमम् ॥ २९ ॥

स्वस्थ राखोनि सौमित्रासी । संग्रामा निघतां श्रीरामासी । युद्ध करावया रावणासीं । वानरांसी उल्लास ॥ ९ ॥ वानर घायीं अति निर्बुजे । लाविती श्रीरामचरणरज । अवघे होवोनि नीरुजे । नाचती भोजें संग्रामीं ॥ ११० ॥ करितां श्रीरामनामस्मरण । वानरां बाधेना जन्ममरण । येणें निःशंकपणें जाण । रावणीं रण करूं येती ॥ ११ ॥ मांडून माहेश्वरी ठाण । सज्जूनियां धनुष्यबाण । संमुख लक्षोनियां रावण । श्रीराम रण करूं आला ॥ १२ ॥ श्रीराम करितां रणगर्जन । कांपिन्नलें त्रिभुवन । हडबडिला दशानन । राक्षससैन्य खळबळिलें ॥ १३ ॥ रावण रथी श्रीराम विरथी । देखोनि क्षोभला मारुती । येवोनियां श्रीरामाप्रती । करी विनंती अति नम्र ॥ १४ ॥ रणीं मर्दावया रावण । स्वयें स्वामीनें कृपा करून । माझे पृष्ठीं करावें आरोहण । म्हणोनि चरण दृढ धरिले ॥ १५ ॥ ऐकोनि हनुमंताची विनंती । संतोषला श्रीरघुपती । हनुमंताचे पृष्ठाप्रती । शौर्यशक्ती बैसला ॥ १६ ॥ गरुडासन वृषभासन । इंद्र ऐरावतीं आरोहण । अवघे दिसती तृणसमान । श्रीरामासन कपिपृष्ठीं ॥ १७ ॥ आधींच हनुमंत परम शूर । तो जाला श्रीराम रहंवर । त्यावरी बैसला श्रीरामचंद्र । आला संहार राक्षसां ॥ १८ ॥ चालता बोलता रथ । स्वयें जालासे हनुमंत । आला राक्षसांसी अंत । रणप्राणान्त रावणा ॥ १९ ॥ पशु अश्व जुंपितां रथीं । त्यापासीं पाहिजे सारथी । तो नाहीं श्रीरामरथीं । एकला मारुति रथयंता ॥ १२० ॥

१ मूर्च्छित. २ व्याधिरहित. ३ आनंदानें. ४ रथ. ५ रणांत मरण. ६ रथ आणि सारथि. ७ अग्नि.

राघवः समराकांक्षी हंतुकामस्तु रावणम् ।
गंभीरोदग्रया वाचा राक्षसेंद्रमुवाच ह ॥ ३० ॥
तिष्ठ तिष्ठ मम त्वं हि कृत्वा विप्रियमीदृशम् ।
क्व नु राक्षसशार्दूल गत्वा मोक्षमवाप्स्यसि ॥ ३१ ॥
यदींद्रवैवस्वतभास्करान्वा
स्वयंभुवैश्वानरशंकरान्वा ।
गमिष्यसि त्वं दशधा दिशो वा
तथपि नैवाद्य गतो विमोक्ष्यसे ॥ ३२ ॥

रणीं मर्दावया दशानन । सकोप कोपे रघुनंदन । गिरा गंभीर गर्जोन । काय आपण बोलत ॥ २१ ॥ चोरोनियां सीता सुंदरी । येवोनि लपसी लंकापुरीं । माझ्या दृष्टी पडल्यावरी । कैशा परी वांचसी ॥ २२ ॥ माझे लागलिया घाय । तुज कोण राखेल माय । सुरासुर जाल्या साह्य । तरी पाहें सोडींना ॥ २३ ॥ इंद्र चंद्र वरुण कुबेर । यम वायु वैश्वानर । माझे देखोनि दुर्धर शर । सुरासुर कांपती ॥ २४ ॥ माझे सुटल्या बाण । दशदिशा पळतां जाण । कोणी राखों न शके प्राण । अलोट मरण तुज आलें ॥ २५ ॥ माझे सुटल्या बाण । धाकें सुरवर सांडिती प्राण । तेथोनि तुज राखेल कोण । अलोट मरण तुज आलें ॥ २६ ॥ जन्मोनियां ब्रह्मवंशीं । महापापी तूं जालासी । ब्रह्मा क्षोभलासे मानसीं । राक्षसांसी प्रळयांत ॥ २७ ॥ चोरीमारी परदारी । इतुकीं पापें रावणा तुझे शिरीं । तेणें ब्रह्मा क्षोभला भारी । निशाचरीं प्रळयान्त ॥ २८ ॥ माझे सुटलिया बाण । ब्रह्मा बापुडें ब्राह्मण । त्यासी नव्हे निवारण । अलोट मरण तुज आलें ॥ २९ ॥ रावणा तूं तंव पापमूर्ती । अति उन्मांद विषयासक्ती । भोग मागतां पार्वती । शिव तुजप्रती क्षोभला ॥ १३० ॥ स्वामीची जे निजकांता । ते तंव सेवकाची निजमाता । मातृगामी तूं लंकानाथा । उमा मागतां प्रळयान्त ॥ ३१ ॥ चोरितां श्रीरामाची दारा । परम क्षोभ श्रीशंकरा । निर्दाळावया निशाचरां । प्रळयरुद्रा प्रेरिलें ॥ ३२ ॥ ऐकोनि श्रीरामवचन । हृदयीं खोंचला दशानन । हनुमंतावरी दुर्धर बाण । रागें रावण विंधीत ॥ ३३ ॥

८ परस्त्रीहरण. ९ ताठा. १० पार्वती. ११ स्त्री.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

राघवस्य वचः श्रुत्वा राक्षसेंद्रो महाकपिम् ।
आजघान शरैस्तीक्ष्णैः कालवैश्वानरोपमैः ॥ ३३ ॥
ततो रामो महातेजा रावणेन कृतं व्रणम् ।
दृष्ट्वा प्लवगशार्दूलं क्रोधस्य वशमभ्यगात् ॥ ३४ ॥
तस्याभिसंगम्य रथं सचक्रं
साश्वध्वजच्छत्रमहापताकम् ।
ससारथिं साशनिशूलखड्गं
रामः प्रचिच्छेद शरैः सुतीक्ष्णैः ॥ ३५ ॥

तीव्र बोलतां रघुनाथ । हृदयीं पोळला लंकानाथ । करावया हनुमंताचा घात । बाण सज्जीत साटोपें ॥ ३४ ॥ खंडोनि माझी रथगती । सव्यासव्य चक्राकृती । रणीं विचरतो मारुती । दुर्धर शक्ती वानरा ॥ ३५ ॥ येणें मारिला अखयासुत । इंद्रजित केला हताहत[१] । मुख्य द्वंद्वी[२] हा हनुमंत । याचा घात मी करीन ॥ ३६ ॥ माझ्या रथासीं समान । येणें आणिला रघुनंदन । याचें करीन मी हनन । सवर्म बाण विंधोनी ॥ ३७ ॥ अडकलाहे श्रीरामातळीं । उडोन जाऊं न शके बळी । तंव मी याची करीन होळी । बाणजाळीं विंधोनि ॥३८॥ ऐसें बोलोनि दशशिर । बाण घेवोनि दुर्धर । रणीं लक्षोनियां वानर । शर सत्वर विंधिला ॥ ३९ ॥ बाण लागतांचि जीवीं । हनुमान निर्द्वंद्वं[३] सर्वभावीं । रावणातें वांकुल्या दावी । घायाची पदवी पोंचट ॥ १४० ॥ बाण नव्हेती सुमनमाळा[४] । तुवां घातली माझे गळां । घायें उल्लास गोळांगुळां[५] । राक्षसदळा दंडावया ॥ ४१ ॥ हें ऐकोनि दशशिर । बाण घेऊनि दुर्धर । रणीं लक्षोनि वानर । शर सत्वर विंधीत ॥४२॥ हनुमान जाला श्रीरामरथ । पुच्छें राक्षससैन्यघात । मुख्या धुरांतेंचि घोळसीत[६] । रणकंदनार्थ कपिपुच्छ ॥४३॥ कपिपुच्छाचा दुर्धर मार । राक्षसदळीं हाहाकार । तेणें दचकला दशशिर । रणीं वानर नाटोपे ॥ ४४ ॥ हनुमंतासी बाणघात । देखोनियां रुधिरोक्षित[७] । रणीं कोपला श्रीरघुनाथ । लंकानाथ दंडावया ॥ ४५ ॥ अति लाघवी रघुनंदन । कैसें कैसें केलें रणविंदान । भ्रमचक्रीं पडे रावण । तैसे बाण सोडिले ॥ ४६ ॥ बाणपिसारियाचा पवन । सरथ उडविला रावण । वाहटुळीमाजीं भ्रमे पान । तेंवी भ्रमण लंकेशा ॥ ४७ ॥ बाणपिसारियाचा वारा । रावण उडविला अंबरा । परिभ्रमे गरगरां । रथीं थरथरां कांपत ॥ ४८ ॥ श्रीरामयुद्धाची कडाडी । रावणा पाडिली रणझांपडी । अतिशयेंसीं हडबडी[८] । रणनिर्वेंडी विसरला ॥ ४९ ॥ बाप लाघवी रघुनाथ । अश्व सारथी ध्वजेंसीं रथ । बाणीं छेदिला आकाशांत । छत्रपात सचक्र ॥१५०॥ तयाचि लाघवामाझारीं । चाप छेदोनि वरच्यावरी । मुकुट छेदोनियां शिरीं । धरेवरी पाडिला ॥ ५१ ॥ छेदोनि पाडितांचि रथ । पालथा मुखीं लंकानाथ । धरेवरी आदळत । पर्वतपात जेंवी होय ॥ ५२ ॥

तं विज्वलंतं तु समीक्ष्य रामः
समाददे दीप्तमथार्धचंद्रम् ।
तेनार्कवर्णं सहसा किरीटं
चिच्छेद रक्षोधिपतेर्महात्मा ॥ ३६ ॥
तन्निर्विषाशीविषसन्निकाशं
शांतार्चिषं सूर्यमिव प्रकाशम् ।
गतश्रियं कृत्तकिरीटकुंडलं
प्रोवाच रामो युधि राक्षसेंद्रम् ॥ ३७ ॥
कृतं त्वया कर्म महत्सुतीव्रं
हतप्रवीरश्च कृतस्त्वयाहम् ।
तस्मात्परिश्रांत इति व्यवस्य
न त्वां शरैर्मृत्युवशं नयामि ॥ ३८ ॥

बाणार्धचंद्रकडकडाट । सकुंडल छेदिला मुकुट । रणीं गांजिला दशकंठ । वीर वरिष्ठ श्रीराम ॥ ५३ ॥ दांत पाडिलिया देख । जैसें सर्पाचें शमे विख । तेंवी संग्रामीं दशमुख । बळें निःशेष सांडवला ॥५४॥ जेंवी शांत होय हुताशन[१०] । सूर्यासी गिळी अभ्रघन[११] । तेंवी संग्रामीं दशानन । हीन दीन आभासे ॥ ५५ ॥ मुकुट कुंडलें छेदिलीं शिरीं । विरथ रावण मोकळे केशीं । संमुख देखोनि श्रीरामासी । कासाविसी होतसे ॥ ५६ ॥ बाणपिसारियाचा वारा । सरथ उडविला अंबरा । त्यासीं भिडावया श्रीरामचंद्रा । न धरवे धीर लंकेशा ॥ ५७ ॥ करितां श्रीरामासीं रण । माझी न पुरे आंगवण[९] । आतां त्याचे सुटल्या बाण । अवश्य प्राण घेतील ॥ ५८ ॥ रणीं सहाय यावा

१ जर्जर. २ शत्रु. ३ सुखदुःखरहित. ४ पुष्पमाला. ५ वानराला. ६ जर्जर करीत. ७ रक्तानें माखलेला. ८ घाबरला. ९ युद्धकार्यकौशल्य. १० अग्नि. ११ ढग.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

दुसरा। तंव कपिपुच्छें निशाचरां। थोर लाविला भेदरा। मुख्य धुरा घोळसूनी ॥ ५९ ॥ हनुमान होवोनि श्रीरामरथ। पुच्छें राक्षसां करी आघात। जो तो दडे जेथींचा तेथ। लंकानाथ कोण पाहे ॥ १६० ॥ कपिपुच्छें राक्षसश्रेणी। त्रासियेल्या रणांगणीं। रावणा साह्य न ये कोणी। तोही रणीं धाकत ॥ ६१ ॥ कपिपुच्छें राक्षसभार। रणीं गांजिले निशाचर। रामें गांजिला दशशिर। दुर्धर शर वर्षोनी ॥ ६२ ॥ छत्रपात शस्त्रपात। रथपातेंसीं कळापात। दीन देखोनि लंकानाथ। आश्वासीत श्रीराम ॥ ६३ ॥ सावध ऐकें दशानना। तुज म्यां दिधलें जीवदाना। आजि मी न घें तुझ्या प्राणा। जाय परतोन लंकेसी ॥ ६४ ॥ तुझे पुत्र आणि प्रधान। वानर म्हणती हीन दीन। तिहीं तुजसीं केलें रण। आंगवण जंव पुरे ॥६५॥ वानरांसीं करितां रण। भागलासी संपूर्ण। माझे साहतां दुर्धर बाण। अति क्षीण जालासी ॥ ६६ ॥ भंगल्याचा करितां घात। हा तंव नव्हे गा पुरुषार्थ। आजींचा चुकला आघात। लंकेआंत जाय वेगीं ॥ ६७ ॥ जावोनि भगिनी निजकलत्र। संबोखीं पुत्र पौत्र। सुखें सुहृद स्वगोत्र। पाहें समग्र लंकेशा ॥ ६८ ॥ माझ्या बाणाचा बाणावर्त। तो तुज रावणा प्राणान्त। एक वेळां जावोनि लंकेआंत। भार्गीं मुख्यार्थ प्रिय कांता ॥ ६९ ॥

स एवमुक्तो हतमानदर्पो
निकृत्तचापः स हताश्वसूतः।
अन्यं रथं सारथिना प्रणीतं
समारुरोहाथ विवृद्धलज्जः ॥ ३९ ॥
शोकार्दितः कृत्तमहाकिरीटो
विवेश लंकां सहसा गतश्रीः।
तस्मिन्प्रविष्टे रजनीचरेंद्रे
महाबले दानवदेवशत्रौ ॥ ४० ॥
हरीन्विशल्यान्सह लक्ष्मणेन
चकार रामः परमाहवाग्रे ॥ ४१ ॥

तुज दिधलें जीवदान। ऐकोनि श्रीरामाचें वचन। रावण जाला हीन दीन। लज्जायमान रणरंगीं ॥ १७० ॥ रावणाची गेली राजकळा। अंगीं बाणली अवकळा। शौर्यवीर्यधैर्यबळा। रामें नागविला रणरंगीं ॥ ७१ ॥ रावणाचें ब्रीद गहन। आपणा म्हणवी अरिदर्पघ्न। श्रीराम दर्पघ्ना दर्पघ्न। दशानन दंडूनी ॥ ७२ ॥ रावणाच्या शरीरभारा। मुसमुसित गर्वफुगारा। बाणपिसाऱ्याचा वारा। दशशिरा गर्वभंगा ॥ ७३ ॥ रणीं क्षोभोनि रघुनाथ। रावणा केलें हताहत। आणिक आणोनियां रथ। लंकेआंत प्रवेशे ॥७४॥ निर्वाणशस्त्रें अति प्रबळ। शर चाप त्रिशूळ शूळ। परिघ पट्टिश शक्ति सबळ। केलें निर्मूळ श्रीरामें ॥ ७५ ॥ मुकुट कुंडलें नाहींत शिरीं। रथीं बैसला मोकळे केशीं। परम लज्जा रावणासी। स्वयें लंकेसी प्रवेशला ॥ ७६ ॥ रावण जातां पैं लंकेसी। मुखीं उतरल्या मसी। मुख न दाखवी कोणासी। अधोमुखेंसीं निघाला ॥ ७७ ॥ युद्धीं अपजयो राक्षसेंद्रा। तेणें रुदन दशशिरा। नयनीं स्रवती अश्रुधारा। लंकापुरा प्रवेशे ॥ ७८ ॥ स्वयें येवोनि रघुपती। लक्ष्मणासी भेदली शक्ती। आलिंगून अति प्रीतीं। निःशल्य करिती सौमित्रा ॥ ७९ ॥ माझे सखे जुत्पती। घायवट रणीं पडती। त्यांसी द्याया सुखविश्रांती। स्वयें रघुपती रणा पाहे ॥ १८० ॥ घायवट पडतां कपिभुज। लाविती श्रीरामचरणरज। तेणें जावोनि दुःखसमाज। नाचती भोजें रणरंगीं ॥ ८१ ॥ वानरवीर रणांगणीं। रणीं पडला नाहीं कोणी। रामनामाच्या स्मरणीं। उल्लासोनी गर्जत ॥ ८२ ॥ रणीं भंगला दशशिर। विजयी जाला श्रीरामचंद्र। वानर करिती जयजयकार। नामें कपींद्र गर्जती ॥ ८३ ॥ लागली विजयवाद्यांची ध्वनी। घाव घातला निशाणीं। मंगळ तुरें मंगळ ध्वनीं। कपिये रणीं नाचती ॥ ८४ ॥ वानरां हर्ष अपार। अवघे करिती जयजयकार। नामें गर्जत अंबर। श्रीरामचंद्र निजविजयी ॥ ८५ ॥ एका जनार्दना शरण। रणीं भंगला रावण। नित्यविजयी रघुनंदन। बिभीषण आल्हादी ॥८६॥ बिभीषणाचे मनोरथ। पुरवावयालागीं रघुनाथ। रणीं दंडिला लंकानाथ। विजयान्वित श्रीराम ॥ १८७ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां रावणपराजयो नाम एकोनविंशतितमोऽध्यायः ॥ १९ ॥ ओंव्या ॥ १८७ ॥ श्लोक ॥ ४१ ॥

१ भय, धाक. २ शत्रूंचा गर्व हरण करणारा. ३ खालीं तोंड घालून. ४ जखमी.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

अध्याय विसावा

श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ श्रीरामासीं करितां रण । रणीं भंगला रावण । लज्जायमान अति उद्विग्न । आला आपण लंकेसी ॥ १ ॥

स प्रविश्य पुरीं लंकां रामबाणभयार्दितः ।
भग्नदर्पस्तदा राजा बभूव व्यथितेंद्रियः ॥ १ ॥
मातंग इव सिंहेन गरुडेनेव पन्नगः ।
अभिभूतोऽभवद्राजा राघवेण महात्मना ॥ २ ॥
ब्रह्मदंडप्रतीकानां विद्युत्सदृशवर्चसाम् ।
स्मरन्राघवबाणानां विव्यथे राक्षसेश्वरः ॥ ३ ॥

हीन दीन लज्जायमान । राजा प्रवेशे लंकाभुवन । आठवितां श्रीरामबाण । धाकेंचि प्राण निघों पाहे ॥ २ ॥ जैसा विजेचा लखलखाट । तैसा बाणांचा कडकडाट । श्रीरामबाणें दशकंठ । धाकें यथेष्ट धाकत ॥ ३ ॥ ब्रह्मदंडा न चले निवारण । तैसे अनिवार श्रीरामबाण । तिंहीं बाणीं त्रासिला रावण । आक्रंदे पूर्ण अति धाकें ॥ ४ ॥ सिंह मदगजा खंदळी[1] । गरुड सर्पा करी चिरफळी । तेंवी श्रीरामबाणजाळीं । त्रासें तळमळी लंकेश ॥ ५ ॥ वीर्य शौर्य रणसाटोप । रावणाअंगीं खटाटोप । देखोनि श्रीरामप्रताप । भग्नदर्प[2] लंकेश ॥ ६ ॥ रणीं भेदरला[3] रावण । रातीं वोसणाये[4] आपण । आले आले श्रीरामबाण । माझा प्राण घ्यावया ॥ ७ ॥ जागृति स्वप्न सुषुप्ति अवस्थां । श्रीरामभय लंकानाथा । आणीक कांहीं नाठवे चित्ता । भयार्तता संत्रस्त[5] ॥ ८ ॥ सुख नाहीं सुमनसेजेसीं[6] । सुख नाहीं स्त्रीभोगापासीं । श्रीरामभय रावणासी । अहर्निशीं[7] संतप्त ॥ ९ ॥

स कांचनमयं दिव्यमाश्रित्य परमासनम् ।
अवेक्षमाणः सचिवान्रावणो वाक्यमब्रवीत् ॥ ४ ॥
सर्वं तत्खलु मोघं मे यत्तप्तं परमं तपः ।
इंद्रेण यः समानोऽहं मानुषेण पराजितः ॥ ५ ॥
देवदानवगंधर्वैर्यक्षराक्षसपन्नगैः ।
अवध्यत्वं मया प्राप्तं परिभूतास्तु मानुषाः ॥ ६ ॥
सत्यं विभीषणेनोक्तं यत्तद्वाक्यं महात्मना ।
मया दर्पबलोत्सेकादन्यथा चिंतितं तदा ॥ ७ ॥
तदिदं मामनुप्राप्तं विभीषणवचः शुभम् ।
तस्य प्रत्युतवाक्यस्य नान्यथा जातु सांप्रतम् ॥ ८ ॥

रावण लज्जान्वित मनीं । बैसला हेमसिंहासनीं । ज्या सिंहासनाच्या महिमानीं । येती लोटांगणीं सुरवर ॥ १० ॥ ते आसनमहिमा समस्त । रामें केली हताहत । ते आसनीं लंकानाथ । अति सचिंत अनुतापी ॥ ११ ॥ इंद्रादिक सुरगण । नित्य माझे बंदीजन । श्रीरामें त्या मज करितां रण । तृणासमान मज केलें ॥ १२ ॥ माझी पाहतां आंगवण । चळीं कांपती सुरगण । त्या मज मनुष्यासीं करितां रण । तृणासमान मज केलें ॥ १३ ॥ इंद्रादिक सुरगण । निवातकवच दैत्यगण । दानव मानव करितां रण । अवध्य रावण मी सर्वथा ॥ १४ ॥ यक्ष गंधर्व विद्याधर । किंपुरुषादि पन्नग विखार[8] । त्यांसीं युद्ध करितां घोरांदर[9] । दशशिर अवध्य ॥ १५ ॥ ऐसा अवध्य मी रावण । श्रीरामेंसीं करितां रण । मज केलें फल्गुसमान[10] । घेईल प्राण बाणें एकें ॥ १६ ॥ मज देवोनि जीवदान । रामें सोडिलें आपण । तो मज जरी विंधिता बाण । जाता प्राण निमेषार्धें ॥ १७ ॥ सत्य बोलिला बिभीषण । राम बाणें घेईल प्राण । ते मज प्रतीति[11] आली पूर्ण । करितां रण रामासीं ॥ १८ ॥ बिभीषणहितवाक्यार्थ[12] । तें मी न मानींच गर्वोन्मत्त । तें मज आतां जालें प्राप्त । रण प्राणान्त श्रीरामें ॥ १९ ॥ माझा बिभीषण येथें असता । तरी तो चुकविता आघाता । काय म्यां करावें आतां । परम चिंता मज वाटे ॥ २० ॥ चिंतेनें होतां अति उद्विग्न । आठवला कुंभकर्ण । त्यासी उठवावया रावण । धाडी आपण प्रधानसैन्या ॥ २१ ॥

स चाप्रतिमगांभीर्यो देवदानवदर्पहा ।
ब्रह्मशापाभिभूतस्तु कुम्भकर्णो विबोध्यताम् ॥ ९ ॥
समरे जितमात्मानं प्रहस्तं च हतं रणे ।
ज्ञात्वा रक्षोबलं भीममादिदेश महाबलः ॥ १० ॥
निद्रावेशसमाविष्टः कुंभकर्णो विबोध्यताम् ।
स हि संख्ये महाबाहुः ककुदं सर्वरक्षसाम् ॥ ११ ॥
वानरान्राजपुत्रौ च क्षिप्रमेव हनिष्यति ।
नवसप्तदशाष्टौ च मासान्स्वपिति राक्षसः ॥ १२ ॥

---

१ नाश करी. २ गर्वरहित. ३ भ्याला. ४ झोंपेंत बडबडूं लागला. ५ त्रासलेला. ६ पुष्पशय्येवर. ७ रात्रंदिवस. ८ स्तुतिपाठक. ९ विषमय. १० कसपटासमान. ११ अनुभव. १२ बिभीषणाचें हितकारक भाषण.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

विबोधयित्वा तं क्षिप्रं कुंभकर्णं महाबलम् ।
भविष्यति न मे शोकः कुंभकर्णे विबोधिते ॥ १३ ॥

कुंभकर्ण आंतुर्बळी । शीघ्र उठवा रे ये काळीं । राक्षस मारिले महाबळी । रणकल्लोळीं वानरीं ॥ २२ ॥ वानरीं करून कंदन । विरूपाक्ष अकंपन । प्रहस्त मारिला प्रधान । जो जीवप्राण लंकेशा ॥२३॥ श्रीरामासीं रावण । संमुख साटोपें करितां रण । घायें केला तृणासमान । हीन दीन मशकत्वें ॥ २४ ॥ ऐसें सांगोनि निर्वाण । शीघ्र उठवा कुंभकर्ण । तो मारून राम लक्ष्मण । आमचे प्राण राखील ॥२५॥ कुंभकर्ण बळिया बळी । भिडतभिडतां रणकल्लोळीं । राम सौमित्र सगळे गिळी । करील होळी वानरां ॥ २६ ॥ कुंभकर्णाची रणव्युत्पत्ती । आम्हां आहे परम विश्रांती । तो उठवावा शीघ्रगती । लंकापति सांगत ॥ २७ ॥ निवारावया वानरविघ्न । प्रबोधावया कुंभकर्ण । सैन्य सेनानी प्रधान । शीघ्र रावण पाठवी ॥ २८ ॥ ब्रह्मशापाची संपूर्ण । कुंभकर्णा निद्रा दारुण । त्यासी प्रबोधावया रावण । धाडी आपण प्रधानसेना ॥ २९ ॥ प्रथमप्रबोध सात मास । कदाचित लागती आठ मास । केव्हां केव्हां नवमास । एक वेळ दश मास लोटले ॥ ३० ॥ उरीं आदळलें मरण । अद्यापि सुखनिद्रा कोण । शीघ्र उठवा कुंभकर्ण । स्वयें रावण गर्जत ॥ ३१ ॥ शक्रशिवतुल्य बळ त्यासी । उपयोगा न ये गा या समयासी । व्यर्थ पोषिलें मांसराशीं । रावण आवेशीं गर्जत ॥ ३२ ॥

तेऽपि तद्वचनं श्रुत्वा राक्षसेंद्रस्य राक्षसाः ।
जग्मुः परमसंभ्रांताः कुंभकर्णनिवेशनम् ॥ १४ ॥
तस्य निःश्वासवातेन कुंभकर्णस्य राक्षसाः ।
बलवंतोऽपि पुरतः स्थातुं नाशक्नुवंस्तदा ॥ १५ ॥
कुंभकर्णस्य निःश्वासैरवधूता महाबलाः ।
अतिप्रमाणाः कृच्छ्रेण यत्नात्प्रविविशुर्गृहान् ॥ १६ ॥
ऊर्ध्वरोमांचिततनुं श्वसंतमिव पन्नगम् ।
ददृशुर्नैर्ऋतव्याघ्राः शयानं भीमविक्रमम् ॥ १७ ॥
भीमप्राणबलं भीमं पातालविपुलाननम् ॥ १८ ॥

ऐकोनि रावणाचें उत्तर । प्रधान सेनानी निशाचर । प्रबोधावया कुंभकर्ण वीर । अवघे सत्वर निघाले ॥ ३३ ॥ अश्वसंभार गजघट । रथ चालिले घडघडाट । प्रबोधावया कुंभकर्ण स्पष्ट । वीर वरिष्ठ चालिले ॥ ३४ ॥ कुंभकर्णगृहाआंत । रिघतां राक्षस समस्त । अवघे चळचळां कांपत । जीवीं धुकधुक धाकती ॥ ३५ ॥ पाताळतळविवरदरा । तैसें वदन निशाचरा । काळें करूं शके अंधारा । तैसी शरीरा काळिमा ॥ ३६ ॥ काळें करूं शके काजळा । ऐसा सबाह्य निखळ काळा । ना तो कोळशियाचा घडला पुतळा । किंवा ओतिला मोढ्याचा ॥ ३७ ॥ राक्षस येतां द्वाराप्रती । शतानुशत श्वासानुवर्ती । आवर्तीं पडले हस्ती । येती जाती निःश्वासीं ॥ ३८ ॥ नासिकरंध्रामाझारीं । अडकलीं आरडती कोहीं । म्हैसे गुंतले त्यामाझारीं । निर्गम बाहेरी पुरेना ॥३९॥ निःश्वासाचा तीव्र वारा । अश्वपदातिरथकुंजरां । वेगें उडविलें अंबरा । भोंवती गरगरां आकाशीं ॥ ४० ॥ राहतां त्याच्या मुखासंमुख । जो तो पावे असुखं । अवघे जाले पराङ्मुख । प्रबोधीं दुःख राक्षसां ॥ ४१ ॥ राक्षसीं करोनि अति यत्न । चुकवोनि त्याचें श्वासावर्तन । प्रयासें प्रवेशले भवन । प्रबोधन करावया ॥४२॥ तिखट शस्त्रें तेजाळीं । तैशा ऊर्ध्व रोमावळी । हात लावितां सर्वांगफळीं । कोणी जवळी येऊं न शके ॥४३॥ भयानक प्राणपरिचार । भयानक शरीरभार । भयानक मुख अत्युग्र । भासे क्रूर सर्वांसी ॥ ४४ ॥ कुंभकर्णाची क्षुधा दारुण । सिद्ध भक्ष्य नसतां जाण । भक्षील अवघें लंकाभुवन । यालागीं भक्षण रावण धाडी ॥ ४५ ॥

तत्रोपजह्रुः क्षिप्रं ते कुंभकर्णाग्रतस्तदा ।
भूतानां मेरुसंकाशं राशिं परमतर्पणम् ॥ १९ ॥
मृगाणां महिषाणां च वराहाणां च संचयान् ।
चक्रुर्नैर्ऋतशार्दूला राशिमन्नस्य चाद्भुतम् ॥ २० ॥
ततः शोणितकुंभांश्च मांसानि विविधानि च ।
पुरस्तात्कुंभकर्णस्य चक्रुस्त्रिदशशत्रवः ॥ २१ ॥
गंधं माल्यं तथा पानं भक्ष्यं चादाय सत्वरम् ।
आसाद्य भवनं तस्य विविशुस्ते नृपाज्ञया ॥ २२ ॥

पक्वान्नांचे डोंगर । अन्नांचे गिरिवर । स्वयें रिचवी दशशिर । क्षुधा दुर्धर कुंभकर्णा ॥ ४६ ॥

१ पराक्रमी. २ निकराचा प्रसंग. ३ जागा करण्याकरितां. ४ सेनापति. ५ इंद्र, शंकर यांसमान. ६ हत्तींचा समुदाय. ७ अगदीं, निव्वळ. ८ उंटें. ९ सुटका. १० दुःख. ११ श्वासोच्छ्वास.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

अन्नें तृप्ति नव्हे कुंभकर्णासी । मृग वराह मेंढे महिषांसी । रावण धाडी भक्षावयासी । बहु फळपांसी असंख्य ॥ ४७ ॥ मद्याचे कोटिकोटि घट । तैसेचि असृ्ग्[1]चे लोट । शीघ्र धाडी दशकंठ । कुंभकर्णाचे तृप्तीलागीं ॥ ४८ ॥ कुंभकर्णासी समाधान । द्यावयालागीं दशानन । तांबूलादि सुमन[2]चंदन । धाडी आपण सुखार्थ ॥ ४९ ॥ भक्ष्य भोज्य अन्नपान । घेवोनियां प्रधान । प्रवेशले कुंभकर्णभवन । कंपायमान अति धाकें ॥ ५० ॥

कुंभकर्णं महानिद्रं बोधनाय प्रचक्रिरे ।
जलदा इव उन्नेदुर्यातुधानास्ततस्ततः ॥ २३ ॥
बिभिदुश्चास्य गात्राणि घ्नंतोऽतिव्यनदंस्तथा ।
कुंभकर्णविबोधार्थं चक्रुस्ते विपुलं स्वनम् ॥ २४ ॥
उष्ट्रान्खरान्हयान्नागान्जघ्नुर्दंडकशांकुशैः ।
भेरीशंखमृदंगांश्च सर्वप्राणैरवादयन् ॥ २५ ॥
निजघ्नुश्चास्य गात्राणि महाकाष्ठकटंकरैः ।
मुद्गरैर्मुशलैश्चैव सर्वप्राणसमुद्यतैः ॥ २६ ॥

कुंभकर्णनिद्रा घोरांदर । त्यासी बोधावया[3] निशाचर । मेघ गडगडे ऐसा गिरागजर । करिती समग्र महानादीं ॥ ५१ ॥ टाळ घोळ मृदंग भेरी । गिडबिडीं वाजती अति गजरीं । शंख वाहिले निशाचरीं । दिधल्या असुरीं आरोळया ॥ ५२ ॥ अंकुशें गज किरकिरती । दंडें उष्ट्र[4] आरडती । दीर्घ स्वरें खरें भुंकती । अश्व हिंसती समकाळें ॥ ५३ ॥ अश्व गज खर उष्ट्र । हांक देतां निशाचर । कुंभकर्णनिद्रा आसुर । प्रबोधपर[6] तो नव्हे ॥ ५४ ॥ असुर खळबळले अत्यंत । काष्ठ तरटें टोणपेघात । एक मुसळ वरी घालित । एक हाणित गदाप्रहारें ॥ ५५ ॥ एक हाणिती गुडघे कोंपर । एक लाताविंती त्याचें शरीर । एक ते हाणिती मुद्गर । एक ते दुर्धर देती बुक्या ॥ ५६ ॥ एक त्यावरी अति तांतडीं । सर्वशक्तीं घालिती उडी । एक काष्ठें घालोनियां बुडीं । आपल्या प्रौढीं उचलिती ॥ ५७ ॥

ततः सहस्रं भेरीणां युगपत्समहन्यत ।
तद्रक्षो बोधयिष्यंतश्चक्रुरन्ये पराक्रमान् ॥ २७ ॥
केशान्प्रलुलुपुश्चान्ये कर्णानन्ये दशंति च ।
अन्ये च बलिनस्तस्य कूटमुद्गरपाणयः ॥ २८ ॥
मूर्ध्नि वक्षसि गात्रेषु निर्दयं समपातयन् ।
दशराक्षससाहस्रं जघ्नुर्भीमपराक्रमाः ॥ २९ ॥
राक्षसानां सहस्रं तु शरीरेऽस्य प्रधावति ।
कुंभकर्णस्तदा सुप्तो नैव संप्रत्यबुध्यत ॥ ३० ॥
ततो गजसहस्रं तु शरीरे संप्रधावति ।
स हन्यमानोऽपि तदा न चाबुध्यत राक्षसः ॥ ३१ ॥

सहस्रभेरीनादकल्लोळ । त्राहाटिल्या समकाळ[8] । ब्रह्मशापें निद्रा प्रबळ । नव्हे अळुमाळ[10] प्रबोध ॥ ५८ ॥ प्रबोध न पवे कुंभकर्ण । तेणें क्षोभोनि राक्षसगण । दीर्घ मुद्गर घेवोनि जाण । घाय दारुण हाणिती ॥ ५९ ॥ उरीं शिरीं सर्व गात्रीं । घाय हाणिजेती निशाचरीं । कुंभकर्णा निद्रा भारी । प्रबोध न धरी आघातें ॥ ६० ॥ पिसा वळवळती अंथरुणीं । तैसीं राक्षसांचीं मारणीं । कुंभकर्ण तें कांहीं न मानी । सुखशयनीं सुषुप्ती ॥ ६१ ॥ एक झोंटी धरोनि आसुडिती । एक केशांतें ओढिती । एक रागें कानीं डसती । तरी सुषुप्ती भंगेना ॥ ६२ ॥ दहा सहस्र वीर विख्यात । विक्रमें शरीर लोटीत । तेणें कुंभकर्णा ऐसें होत । पोटकुल्या होत सुखनिद्रा ॥ ६३ ॥ रावणा सांगती निशाचर । प्रयत्न करितां घोरांदर । जागा न होय कुंभकर्ण वीर । तेणें दशशिर क्षोभला ॥ ६४ ॥ शरीर दडपितां संभार । जागा होईल कुंभकर्ण वीर । गज दिधले सहस्रें सहस्र । शरीर भारें दडपावया ॥ ६५ ॥ निद्राप्रबोधनीं अति चतुर । भरंवसियाचे सहस्र वीर । रावणें धाडिले प्रबोधकर । देहीं निरंतर धांवावया ॥ ६६ ॥ देहीं निरंतर धांवतां । प्रबोध न होय कुंभकेता । या काकुळती लंकानाथा । होय धाडिता गजांसी ॥ ६७ ॥ कुंजर आणि निशाचर । धांवतां कुंभकर्णशरीर । तेथें जालें चरित्र । अति विचित्र तें ऐका ॥ ६८ ॥ कुंभकर्णरोमावळीआंत[12] । गज हरपले महावतांसहित । उदय अस्त न कळे तेथ । परिभ्रमत घोर वनीं ॥ ६९ ॥ पुढिलां मागील न देखती । मागिलां पुढील न दिसती । रोमांमाजी अति भ्रांती । परिभ्रमती अवासवा ॥ ७० ॥ पुढें मार्ग न दिसे स्पष्ट । मार्गे परतावया न कळे वाट । महावतेंसीं गजघट । पावती कष्ट

१ रक्ताचे. २ फुलें आणि चंदन. ३ जागा करण्याकरितां. ४ उंटें. ५ गाढव. ६ जागा. ७ लाथा मारूं लागले. ८ वाजविल्या. ९ एकाच वेळीं. १० किंचितही. ११ जागृति. १२ कुंभकर्णाच्या केंसांत.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

चालतां ॥ ७१ ॥ गज निर्बुजले किरकिरती । महा-
वतें हांका देती । धांवण्या कोणी तेथें न पवती ।
परिभ्रमती अति दुःखीं ॥ ७२ ॥ न धरत न
सांवरत । बुडाले नाभीं महागर्ते । गज पडिले
असंख्यात । त्यांसी प्राणान्त तेथेंचि ॥ ७३ ॥ गज
चालतां अंगावरी । म्हणती मर्दन अति चतुरी ।
निदसुरिया हाणितां तोंडावरी । महामारी असंख्य
॥ ७४ ॥ गजसैन्य देतां हांक । परतावया न सरे
मुख । निर्बुजोनि एकाएक । गज निःशेख निमाले
॥ ७५ ॥ कुंभकर्णाच्या अंगावरी । असंख्य गजां
जाली बोहरी । तरी जागा नव्हे विवरीं ।
निशाचरीं आक्रान्त ॥ ७६ ॥ सहस्र वीर बळेंकरीं ।
वळंघले त्याच्या अंगावरी । अवघे येतां
उरावरी । लोमांमाझारी अडकले ॥ ७७ ॥ पूर्व
पश्चिम ते कोण । न कळे उत्तर दक्षिण । पुढारां
केउतें गमन । पुनरागमन लक्षेना ॥ ७८ ॥ सैरा
धांवती निशाचरी । पडिले दोहीं कांखेमाझारी ।
कांखवळा पैं भीतरीं । राक्षसहारी निमाल्या
॥ ७९ ॥ एक संमुख हृदयावरी । पडिले श्वासो-
च्छ्वासयंत्रीं । येत जात नासारंध्रीं । वायुचक्रीं
विगुंतले ॥ ८० ॥ ऐसे शिणतां राक्षसगण । जागा
नव्हे कुंभकर्ण । मग उपाव मांडिला कोण ।
सूक्ष्म सान तो ऐका ॥ ८१ ॥ कुंभकर्णप्रबोधार्थ ।
मांडिलें स्त्रियांचें अनुगीत । त्याही गीताचा
वृत्तान्त । सावचित्त अवधारा ॥ ८२ ॥

प्रमदाश्चागतास्तत्र संमृष्टमणिकुंडलाः ।
नागराक्षसकन्याश्च तथा गंधर्वकन्यकाः ॥ ३२ ॥
मनुजानां दुहितरः किन्नराणां तथैव च
प्रविष्टा भवनं रम्यं तप्तकांचनकुट्टिमम् ॥ ३३ ॥
ताः स्त्रियो गीतवादित्रैः कुंभकर्णाग्रतः स्थिताः ।
दिव्यादिव्यैरलंकारैर्दिव्यधूपेन धूपिताः ॥ ३४ ॥

कुंभकर्णप्रबोधना । करावया संगीतगायना ।
नागकन्या गंधर्वकन्या । राजकन्या आणविल्या
॥ ८३ ॥ गावों जाणती नाना कुसरीं । किन्नरी
आणि खेचरी । कुंभकर्णमंदिरामाझारी । त्वरेंकरीं
आणविल्या ॥ ८४ ॥ कन्या आणिल्या सालंकार ।
हेमभूमिका हेममंदिर । तेथें पहुडला निशाचर ।
घोरें अंबर गर्जत ॥ ८५ ॥ त्याच्या घोरापुढें
स्त्रीगायन । होवोनि गेलें तृणासमान । तें देखोनि
दशानन । उपाव आन आरंभी ॥ ८६ ॥ घृताची
रंभा मेनका । नारायणदत्त उर्वशी देखा । तिसी
मुख्यत्व देवोनि देखा । अष्टनायिका आणिल्या
॥ ८७ ॥ त्यांसी सांगे दशानन । तुम्हीं प्रबोधावा
कुंभकर्ण । नाहीं तरी नाक कान छेदीन । त्यावरी
दंडीन खरारोहीं ॥ ८८ ॥ ऐकोनि रावणाचें वचन ।
अप्सरा जाल्या कंपायमान । कुंभकर्णाचें भवन ।
गेल्या ठाकोन प्रबोधा ॥ ८९ ॥ सज्जोनि वीणा
श्रुतिसन्नद्ध । रागानुरागीं साधिला नाद । गातां
विविध बोधप्रबंध । नव्हे प्रबोध कुंभकर्णा ॥ ९० ॥
कुंभकर्ण घोरे दारुण । त्यापुढें कळा-
विचित्र गायन । अवघें गेलें हारपोन । जेंवी
भानूपुढें खद्योत ॥ ९१ ॥ सकळ कळा जाली
क्षीण । प्रबोध न पवे कुंभकर्ण । तेणें घृताची रंभा
मेनका जाण । अति उद्विग्न भयभीत ॥ ९२ ॥ उठ-
वितां कुंभकर्ण । स्त्रीदेहासी विटंबन । रावण
छेदील नाक कान । खरारोहण अपमान ॥ ९३ ॥
ऐसें देखोनियां विघ्न । उर्वशी जाली सावधान ।
निजात्ममूळ जो नारायण । त्याचें स्तवन आदरिलें
॥ ९४ ॥ उर्वशी नारायणनिजशक्ती । कृपेनें
धाडिली स्वर्गाप्रती । तीच नारायणाची स्तुती ।
अनुतापवृत्तीं अनुवादे ॥ ९५ ॥ भूतीं भूतात्मा
परात्पर । तुझिये सत्ता प्राणप्रचार । निमेषोन्मे-
षांचा व्यापार । तुझेनि साचार चालतो ॥ ९६ ॥
भूतीं भूतात्मा तो वेदोक्त । भूतां सबाह्य तूं भग-
वंत । तुझेनि भूतें विधियुक्त । सदा वर्तत निजकर्मीं
॥ ९७ ॥ तूं मनाचें उन्मन । तूं बुद्धीचें समाधिधन ।
तूं अभिमानीं निरभिमान । चित्तास चिंतन
तुझेनि ॥ ९८ ॥ तूं प्राणाचा निजप्राण । तूं जीवाचा
जीव आपण । प्रबोधावया कुंभकर्ण । कृपा संपूर्ण
करावी ॥ ९९ ॥ प्रबोधोनि कुंभकर्ण । निवारावें
माझें विघ्न । ऐसें ऐकतां विज्ञापन । श्रीनारायण
तुष्टला ॥ १०० ॥ अंतर्यामीं श्रीनारायण । ऐकतां
उर्वशीगायन । चेतवी असुराचा प्राण । चेतना
संपूर्ण चेतविली ॥ १ ॥ घोर गर्जत धांवे प्राण ।
तो अंतर्यामीं आवरून । हृदयीं आणोनि आपण ।

१ घाबरून. २ नाश. ३ कोठें. ४ नाकपुड्यांत. ५ आकाश. ६ गाढवावर बसवून. ७ काजवे. ८ जीवांची हालचाल. ९ डोळ्यांचें मिटणें व उघडणें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

दशधा संपूर्ण स्थापिला ॥ २ ॥ प्राणपरिचार-प्रयुक्ती । चेतना जे चिच्छक्ती । तिणें चेतविल्या इंद्रियवृत्ती । देहस्फूर्ती आठवली ॥ ३ ॥

गीतवादित्रशब्देन स्वरेण मधुरेण च ।
दिव्येन चैव गांधर्वस्वरेण विविधेन च ॥ ३५ ॥

विबुद्धः कुंभकर्णोऽसौ भीमो भीमपराक्रमः ।
तस्य जाजृंभमाणस्य वक्त्रं पातालसन्निभम् ॥३६॥

ददृशे मेरुशृंगाग्रे दिवाकर इवोदितः ।
राक्षसास्त्वरितं जग्मुर्दशग्रीवनिवेशनम् ॥ ३७ ॥

तेऽभिगम्य दशग्रीवमासीनं परमासने ।
ऊचुर्बद्धांजलिपुटाः सर्व एव निशाचराः ॥ ३८ ॥

प्रबुद्धः कुंभकर्णो वै भ्राता ते राक्षसेश्वरः ॥ ३९ ॥

देहस्फूर्तीचेनि कैवाडें । उघडी नेत्रांचीं कवाडें । श्रवणाचें टाळें उघडे । वाचा निवाडें वदे स्पष्ट ॥ ४ ॥ प्राण परिचारितां घ्राणीं । सावधानता सकळ करणीं । बुद्धी बोद्धव्य बोधुनी । संकल्प मनीं चेतविले ॥ ५ ॥ एक निःशंक सुंदरा । चंदन चर्चिती निशाचरा । एक घालिती विंझणवारा । एकी राक्षसेंद्रा थापटिती ॥ ६ ॥ गीतवाद्यस्वर सुस्वर । प्रमदागायन[1] अति मधुर । ऐकोनि उठिला निशाचर । अति दुर्धर भयानक ॥ ७ ॥ उग्र क्रूर भयानकदृष्टी । कळिकाळ चळीं कांपे पोटीं । प्रमदा पळाल्या उठाउठीं । सैन्य बारा वाटीं पळालें ॥ ८ ॥ जांभया देतां निशाचर । जैसें उघडलें पाताळविवर । तैसें मुख पसरिलें दुर्धर । अति उग्र भयानक ॥ ९ ॥ विजुतेजें अति कडाडीं । जिव्हा लखलखित तांबडी । कराळ विक्राळ दाढांची जोडी । प्रळयाग्निपाडीं[2] सतेज दृष्टी ॥ ११० ॥ भयानक रूप भयानक दृष्टी । भयानक सर्वांगाची पुष्टी । परम भयानक उठिला सृष्टीं । कांपती पोटीं सुर सिद्ध ॥ ११ ॥ प्रबोध झाला कुंभकर्णा । राक्षस सांगों येती रावणा । प्रवेशोनि लंकाभवना । सभास्थाना ते आले ॥ १२ ॥ सिंहासनीं दशानन । दूत घालिती लोटांगण । प्रबोध पावला कुंभकर्ण । कर जोडून सांगती ॥ १३ ॥ उर्वशीचा चमत्कार । वीणा सज्जोनि सुस्वर । प्रबोधिला निशाचर । महावीर कुंभकर्ण ॥ १४ ॥

रावण सांगे दूतांसी । परम क्षुधा कुंभकर्णासी । तृप्तिभोजन देवोनि त्यासी । मजपासीं मग आणावा ॥ १५ ॥ शीघ्र न पवे अन्नआहार । पुढें पाठविला फलाहार । मेष वराह जंबूक उष्ट्र । कळप अपार गीळित ॥ १६ ॥ मेंढरें घालितां मुखांत । कानावाटे निघती मेमेंत[3] । एक तीं गेलीं उशींत । तेणें शिंकत सटसटां ॥ १७ ॥ शेंबुडाच्या बेडक्यांत । राक्षस दडपती असंख्यात । रावणाचे सभेआंत । शेंबूडपर्वत वीरांवरी ॥ १८ ॥ कुंभकर्णाच्या शेंबुडांत । सभा जाहली सचैल स्नात । तरी तो नव्हे तृप्त । मृगें भक्षीत चितळेंसीं ॥ १९ ॥ कैन्हीं[4] घशांत आरडत जात । वराह गिळी ओरडत । रानम्हैसे घशांत झुंझत । थडके देत कळप गिळी ॥ १२० ॥ हस्ती सांपडल्या हातातळीं । ध्वजा पताका महावतेंसीं[6] गिळी । रावण शंकला ते काळीं । करील होळी लंकेची ॥ २१ ॥

द्रष्टुमिच्छति ते राजा सर्वराक्षसपुंगवः ।
कुंभकर्णः सुदुर्धर्षो भ्रातुराज्ञाय शासनम् ॥ ४० ॥

तथेत्युक्त्वा महावीर्यः शयनादुत्पपात सः ।
प्रक्षाल्य वदनं हृष्टः स्नातः परमभूषणः ॥ ४१ ॥

दुरोनि सांगती दूत । लंकेश भेटीसी वाट पहात । ज्येष्ठाज्ञा मानोनि समर्थ । उठिला त्वरित कुंभकर्ण ॥ २२ ॥ कुंभकर्ण सभे अत्युग्र । सर्वार्थी गमे क्रूर । भ्रातृआज्ञेचा किंकर । मानी उक्त सर्वस्वें ॥ २३ ॥ मुख प्रक्षाळितां तेथ । गुरळीसवें शतानुशत । राक्षस वाहों वाहून जात । चळीं कांपत सेवक ॥ २४ ॥ गुरळीच्या पुराआंत । तारूं घालोनि वीर काढीत । अमित बुडाले जेथींचे तेथ । आणिले असंख्यात लावोनि कांसे ॥ २५ ॥

पिपासुस्त्वरयामास पानं मद्यसमन्वितम् ।
ततस्तु त्वरितास्तस्य राक्षसा रावणाज्ञया ॥ ४२ ॥
मद्यं भक्ष्यांश्च विविधान्क्षिप्रमेवानयंस्तदा ॥ ४३ ॥

पशु भक्षितां असंख्यात । कुंभकर्ण जाला तृषित । मद्याचे घट अमित । मुखीं रिचवीत[7] अति त्वरा ॥ २६ ॥ मुखीं रिचवितां सहस्र घट । त्यांचा होय एक घोंट । कंठ वाजे घडघडाट । हृदय-

१ अप्सरांचें गायन. २ प्रलयाग्नीसमान. ३ मे मे शब्द करीत. ४ उंटें. ५ डुकर. ६ माहुतांसह. ७ ओतूं लागले.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

स्फोट राक्षसां ॥ २७ ॥ ते संधीं अति तांतडीं । असंख्य पक्वान्न[1]परवडी । लागवेगें रावण धाडी । राक्षसकोडी धांवत ॥ २८ ॥ ओदनांचे[2] गिरिवर । शिड्या लावोनि निशाचर । स्वयें रिचविती पर्वताकार । तैसेच डोंगर पक्वान्नांचे ॥ २९ ॥ बाप कुंभकर्णाची थोरी । एकचि घांसें गटका करी । तृप्ति दिसेना पुढारी । निशाचरीं आकांत ॥ १३० ॥ तृप्ति न पुरे कुंभकर्णा । धाक राक्षसां आणि रावणा । बुद्धि आठवली दशानना । मांसभोजना उपपादी ॥ ३१ ॥

प्रहर्षणार्थं मनसो दीप्तास्यो रक्तलोचनः ।
आददे क्षुधितो मांसं शोणितं तृषितोऽपिबत् ॥ ४४ ॥
मेदःकुंभांश्च मद्यं च पपौ शक्ररिपुस्तदा ।
ततस्तृप्त इति ज्ञात्वा समुत्पेतुर्निशाचराः ॥ ४५ ॥
शिरोभिश्च प्रणम्यैनं सर्वतः पर्यवारयन् ।
किमर्थमहमादृत्य भवद्भिः प्रतिबोधितः ॥ ४६ ॥
कच्चित्सुकुशलं राज्ञो भयं वा नेह किंचन ॥ ४७ ॥

क्षुधेनें मुख अति विस्तीर्ण । आरक्त जिव्हा आरक्त नयन । तृप्ति न पवे कुंभकर्ण । धाडी रावण मांसआहार ॥ ३२ ॥ मांसपाक अति चोखट । मैरेयकें[3] मद्य श्रेष्ठ । मद्याचे कोटिकोटि घट[4] । धाडी दशकंठ आहारार्थ ॥ ३३ ॥ सुखी व्हावा कुंभकर्ण । उत्तम पदार्थ रावण । स्वयें धाडी साक्षेपून[5] । हर्ष संपूर्ण व्हावया ॥ ३४ ॥ मांसमद्याचे पैं घट । कुंभकर्णें केले गट । तरी क्षुधेचा लवलवाट । चाटी घोट मटमटां ॥ ३५ ॥ त्यासी सांगे स्वयें रावण । रणीं ठेसले[6] वानरगण । भक्षूनि श्रीरामलक्ष्मण । तृप्ति संपूर्ण पावसी ॥ ३६ ॥ मैरेयकमद्यपान । साक्षेपें करवी रावण । तृप्ति पावोनियां पूर्ण । कुंभकर्ण डुल्लत ॥ ३७ ॥ मैरेयकमद्यपानपरिपाठीं । कुंभकर्णा तुष्टिपुष्टी । हर्षें उचंबळला पोटीं । आनंद सृष्टीं न समाये ॥ ३८ ॥ तृप्ति पावोनि संपूर्ण । स्वस्थ बैसला कुंभकर्ण । तेव्हां सेवक प्रधान । करिती नमन साष्टांगें ॥ ३९ ॥ पूर्वी येतां क्षुधितापासीं । जें देखे त्यातें ग्रासी । स्वस्थ बैसल्या सावकाशीं । आला त्यापासीं परिवार ॥ १४० ॥ सेवक देखोनि प्रधान । त्यांसी पुसे कुंभकर्ण । मज उठवावया काय कारण । स्वस्थ रावण आहे कीं ॥ ४१ ॥ स्वस्थ लंकाराज्यानुबंधु । स्वस्थ माझे ज्येष्ठ बंधु । तरी कां केला मज प्रबोधु[7] । कार्यानुवादु मज सांगा ॥ ४२ ॥

न ह्यल्पकारणे सुप्तं प्रबोधयति मादृशम् ।
तत्कथ्यतां यथार्थेन मम बोधनकारणम् ॥ ४८ ॥
अथवा ध्रुवमन्येभ्यो भयं परमुपस्थितम् ।
यदर्थमेव त्वरितैर्भवद्भिः प्रतिबोधितः ॥ ४९ ॥
अद्य राक्षसराजस्य भयमुत्सादयाम्यहम् ।
पोथयिष्ये महेंद्रं वा भक्षयिष्यामि वाऽनलम् ॥ ५० ॥

अल्पकार्याकारणें । मज [8]नुठविजे रावणें । मज साक्षेपें[9] उठवणें । तो सांगणें कार्यार्थ ॥ ४३ ॥ अतिशयेंसीं अति निर्वाणं[10] । तुम्हांसी आलें विघ्न दारुण । यालागीं माझें प्रबोधन । करवी रावण साक्षेपें ॥ ४४ ॥ रावणाचे अरि वीर । इंद्र चंद्र वरुण कुबेर । त्यांचा करीन मी संहार । दशशिरसुखार्थ ॥ ४५ ॥ रावणशत्रूची होळी । क्षणें करीन रणकल्लोळीं । तरीच मी आतुर्बळी । धुरेजवळी सुबंधु ॥ ४६ ॥ रावणहिताच्या समेळीं । प्रळयानळ सगळा गिळीं । मर्दीन शत्रूची समफळी । तरीच मी सुबंधु ॥ ४७ ॥

एवं ब्रुवाणं संरब्धं कुंभकर्णमरिंदमम् ।
यूपाक्षः सचिवो राज्ञः कृतांजलिरुवाच ह ॥ ५१ ॥
न नो देवकृतं किंचिद्भयमस्ति कदाचन ।
गंधर्वदानवेभ्यो वा भयमस्ति न नः क्वचित् ॥ ५२ ॥
यादृशं मानुषाद्राज्ञो भयं घोरसुपस्थितम् ।
वानरैः पर्वताकारैर्लंकेयं परिवारिता ॥ ५३ ॥
सीताहरणदुःखार्ताद्रामान्नः परमं भयम् ॥ ५४ ॥

कोपला देखोनि कुंभकर्ण । यूपाक्ष तयाचा प्रधान । त्यासी विनवी कर जोडून । विघ्नचिन्ह सांगावया ॥ ४८ ॥ देव दानव गंधर्व । गरुडादि पक्षी पन्नगें[11] सर्व । यक्षरक्षादि स्वयमेव । त्यांपासाव भय आम्हां नाहीं ॥ ४९ ॥ घेवोनि वानरांचे भार । मनुष्यावतारी श्रीरामचंद्र । तेणें क्षीण केला दशशिर । युद्धीं दुर्धरें[12] गांजोनी ॥ १५० ॥

१ पक्वान्नांचे प्रकार. २ भाताचे. ३ एक प्रकारची दारू. ४ हांडे. ५ प्रयत्नानें. ६ जमले, भरले. ७ जागें करणें. ८ उठविणार नाहीं. ९ प्रयत्नानें. १० संकटाचें. ११ सर्प. १२ अत्यंत.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

राघवें विंधितांचि बाण । लंकेशाचा जावा प्राण । रामें देवोनि जीवदान । रणीं रावण सोडिला ॥ ५१ ॥ रावणें केलें सीताहरण । तेणें रागें रघुनंदन । दुर्धर सज्जूनियां बाण । त्याचा प्राण घेऊं पाहे ॥ ५२ ॥ तरी कृपाळु रघुनाथ । रावण सोडिला जीवें जीत । रणीं सांपडल्या लंकानाथ । न करीच घात श्रीराम ॥ ५३ ॥ श्रीरामापरतें सर्वथा । भय नाहीं लंकानाथा । ऐसें कुंभकर्ण ऐकतां । सक्रोधता[1] गर्जिन्नला ॥ ५४ ॥

स यूपाक्षवचः श्रुत्वा भ्रातुश्च भयमागतम् ।
कुंभकर्णो विवृत्ताक्षो यूपाक्षमिदमब्रवीत् ॥ ५५ ॥
सर्वमद्यैव यूपाक्ष हरिसैन्यं सलक्ष्मणम् ।
राघवं च रणे हत्वा पश्चाद् द्रक्ष्यामि रावणम् ॥ ५६ ॥
तस्याथ वाक्यं वदतो निशम्य
सगर्वितं रोषविवृद्धघोरम् ।
महोदरो राक्षसयोधमुख्यः
कृतांजलिर्वाक्यमिदं बभाषे ॥ ५७ ॥
पश्चादपि महाबाहो शत्रून्युधि विजेष्यसि ।
त्वद्दर्शनपरं तावत् भ्रातरं द्रष्टुमर्हसि ॥ ५८ ॥
महोदरवचः श्रुत्वा राक्षसैः परिवारितः ।
कुंभकर्णो महातेजाः संप्रतस्थे महाबलः ॥ ५९ ॥

ऐकोनि यूपाक्षवचन । श्रीरामयुद्धीं दुःखी रावण । ऐसें ऐकतां कुंभकर्ण । करावया रण खवळला ॥ ५५ ॥ मारोनियां राम लक्ष्मण । निर्दाळूनियां वानरगण । मग मी येईन आपण । स्वयें रावण वंदावया ॥ ५६ ॥ वानरांचें मांस शोणित[2] । तेणें राक्षस करोन तृप्त । रामलक्ष्मणांचें मांस रक्त । तें मी समस्त भक्षीन ॥ ५७ ॥ रावणशत्रूसी मर्दून । रणीं करोनि दृढ बंधन । सुखी करोनि दशानन । मग मी येईन नमस्कारा ॥ ५८ ॥ ऐकोनि कुंभकर्णगर्जन । महोदर मुख्य प्रधान । स्वयें बोलिला सुलक्षण[3] । कर जोडून तें ऐका ॥ ५९ ॥ भेटीसी उदित[4] दशानन । त्यासी भेटोनि आपण । त्याचें घेवोनि आज्ञापन । रणकंदन करीं सुखें ॥ १६० ॥ महोदराचें युक्त वचन । ऐकतां सुखी कुंभकर्ण । भेटावया दशानन । निघे आपण आल्हादें ॥ ६१ ॥

उदाराणां समद्यानां तदा राक्षसपुंगवः ।
पीत्वा घटसहस्रे द्वे तथा भुक्त्वा च भोजनम् ॥ ६० ॥
सज्जकर्णान्सजठरान्महिषान्शूलपैष्टकान् ।
अष्टौ पशुशतान्येव पुरुषांश्चैकविंशतिः ॥ ६१ ॥
संभुज्य सुमहाकायो दावाग्निरिव कत्तृणम् ।
कुंभकर्णो महाबाहुर्गमनायोपचक्रमे ॥ ६२ ॥
सरोषश्चोत्कटोन्मत्तस्तेजोबलसमन्वितः ।
सोऽगच्छद्भवनं राज्ञो रक्षोगणसमन्वितः ॥ ६३ ॥

भेटी जालिया रावण । अवश्य करणें पडेल रण । ऐसें जाणोनि कुंभकर्ण । प्राशी आपण महामद्य ॥ ६२ ॥ सहस्रें सहस्र घटांच्या हारी । रिचंविती[5] त्याच्या मुखामाझारी । तैसींच लोणचीं कोशिंबिरी । भोजनोपचारीं महामद्य ॥ ६३ ॥ सांडिया कुरवंडिया पापड । लाडू तिळव्याचे जोड । कुंभकर्णा भोजन गोड । पुरत कोड मद्येंसीं ॥ ६४॥ आठ शत म्हैशियांच्या हारी । गिळिल्या कोशिंबिरीवारी[6] । एकवीस सहस्र पशु सोपचारीं । लोणच्यावारी भक्षिले ॥ ६५ ॥ दावाग्नीमाजी पडे तृण । तें जेंवी जळे न लागतां क्षण । तेंवी जें जें भक्षी कुंभकर्ण । तें तें संपूर्ण करी भस्म ॥ ६६ ॥ महाबाहु कुंभकर्ण । तृप्ति होवोनि संपूर्ण । भेटावया स्वयें रावण । निघे आपण अति गर्वें ॥ ६७ ॥ मदोन्मत्त बळोन्मत्त । गर्वोन्मत्त अति उन्मत्त । ऐसा राजगृहाआंत । प्रवेशत कुंभकर्ण ॥ ६८ ॥ एका जनार्दना शरण । संमुख देखोनि रावण । स्वयें कुंभकर्णें आपण । लोटांगण घातलें ॥ ६९ ॥ बंधुबंधूंची भेटी । दोघे सांगती गुह्य गोष्टी । ते ते कथेची कसवटी । सावध दृष्टीं अवधारा ॥ १७० ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां कुंभकर्णप्रबोधनं नाम विंशतितमोऽध्यायः ॥२०॥ ओंव्या ॥ १७० ॥ श्लोक ॥ ६३ ॥

अध्याय एकविसावा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ प्रबोधोनि कुंभकर्णा । भेटों जातां पैं रावणा । भय उपजलें वानरगणा । त्याच्या उग्रपणा देखोनी ॥ १ ॥

---

१ क्रोधानें. २ रक्त. ३ योग्य. ४ तयार. ५ ओतितात. ६ कोशिंबिरींप्रमाणें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

जगाम तत्रांजलिमालया वृतः
शतक्रतुर्गेहमिव स्वयंभुवः।
तं मेरुशृंगप्रतिमं किरीटिनं
स्पृशंतमादित्यमिवात्मतेजसा ॥ १ ॥

वनौकसः प्रेक्ष्य विवृद्धमद्भुतं
भयार्दिता दुद्रुविरे समंततः।
केचिच्छरण्यं शरणं स्म रामं
व्रजंति केचिद्व्यथिताः पतंति ॥ २ ॥

केचिद्दिशश्च त्वरिताः प्रयांति
केचिद्भयार्ता भुवि शेरते स्म ॥ ३ ॥

मेघांचिया मेघमाळा । शोभती कुंभकर्णाच्या गळां । मुकुट टेंकला नभोमंडळा । तेजें रविकळा लोपती ॥ २ ॥ कराळ विक्राळ भयानक वदन । प्रळयतेजें अत्युग्र नयन । देखोनि त्याचें भयासुर[1]पण । वानरगण त्रासले ॥ ३ ॥ उग्र देखोनि कुंभकर्ण । वानर श्रीरामा आले शरण । एक पडले मूर्च्छापन्न । एकांचे प्राण निर्बुजले[2] ॥ ४ ॥ एकांची वळली बोबडी । एकां भरली अरडी[3]-दरडी । एक पडलीं उंबडीं । तोंडें कोरडीं एकांचीं ॥ ५ ॥ एक वानर त्वरेंकरीं । गेले समुद्रपरतीरीं । एक झालीं रानभरीं । एक धरेवरी लवंडलीं ॥ ६ ॥ नावानिगे जे जुत्पती । वानरवीर भद्रजाती । कुंभकर्णाच्या युद्धार्थी । आज्ञा पुसती श्रीरामा ॥ ७ ॥

ततो रामो महातेजा धनुरादाय वीर्यवान् ।
किरीटिनं महाकायं ददर्शातिभयंकरम् ॥ ४ ॥

यं दृष्ट्वा विद्रुता दिग्भ्यो वानराणां महाचमूः ।
सुविस्मितमिदं रामो विभीषणमुवाच ह ॥ ५ ॥

कोऽयं पर्वतसंकाशः किरीटी हरिलोचनः।
आचक्ष्व मे महान्कोऽसौ राक्षसो यदि वा सुरः ॥ ६ ॥

न मयैवंविधं भूतं दृष्टपूर्वं कदाचन ।
संपृष्टो राजपुत्रेण रामेणाक्लिष्टकर्मणा ॥ ७ ॥

विभीषणो महाप्राज्ञः काकुत्स्थमिदमब्रवीत् ॥ ८ ॥

दीर्घ मुकुट अति दारुण । भयानक कुंभकर्ण । श्रीरामें देखोनि आपण । धनुर्ष्यीं बाण सज्जिला ॥ ८ ॥ नाहीं पूर्वीं ऐकिला । नाहीं पुराणीं परिसिला । अकस्मात दीर्घ दादुला । रामें देखिला एकाएकीं ॥ ९ ॥ तेणें अतिशयें विस्मित । बिभीषणा पुसे श्रीरघुनाथ । अति दीर्घ लंकेआंत । कोण दिसतो विक्राळ ॥ १० ॥ ज्याचें देखतां उग्रपण । पळाले माझे वानरगण । मुकुट कुंडलें पिंगट नयन । सांग हा कोण मजपासीं ॥ ११ ॥ ऐसें पुसतां रघुनाथ । बिभीषण बुद्धिमंत । कुंभकर्णाचा पूर्ववृत्तांत । असे सांगत श्रीरामा ॥ १२ ॥

सैष विश्रवसः पुत्रः कुंभकर्णो निशाचरः ।
एतेन जातमात्रेण क्षुधितेन महात्मना ॥ ९ ॥

भक्षितानि सहस्राणि सत्त्वानि सुमहान्त्यपि ।
प्रजाभिः सह शक्रस्तु ययौ स्थानं स्वयंभुवः ॥ १० ॥

कुंभकर्णस्य दौरात्म्यं शशंसुस्ते प्रजापतेः ।
प्रजानां भक्षणं चैव शशंसुस्ते दिवौकसः ॥ ११ ॥

एवं यदि प्रजा नित्यं भक्षयिष्यति राक्षसः ।
अचिरेणैव कालेन शून्यो लोको भविष्यति ॥ १२ ॥

तो हा विश्रव्याचा पुत्र जाण । नांवें विख्यात[5] कुंभकर्ण । येणें उपजतांचि जाण । केलें भक्षण प्रजेचें ॥ १३ ॥ शतसहस्र भूतावळी । प्रजा भक्षिल्या जन्मकाळीं । तरी तृप्ति नव्हे आतुर्बळी । जिव्हा लळलळी हळहळित ॥ १४ ॥ स्वर्गींचे भक्षी देवगण । मृत्युलोकींचे मानव जाण । सर्व पक्षी सिद्ध चारण । भक्षी संपूर्ण जीवजात ॥ १५ ॥ ऐसा देखोनि भूतांवर्त[6] । प्रजा शक्रसमवेत । ब्रह्मयासीं गान्हाणें देत । भूतें भक्षीत कुंभकर्ण ॥ १६ ॥ करावया भूतांचा घात । भला निर्मिला कुंभकर्ण नात । ब्रह्मसृष्टीचा क्षयार्थ । भोजनावर्त कुंभकर्ण ॥ १७ ॥ कुंभकर्णभोजनासाठीं । त्रिसप्तरात्रीं शून्य सृष्टी । हा करील उठाउठी । शक्रें परमेष्ठी प्रार्थिला ॥ १८ ॥ नित्य भक्षितां भूतानुकोटी । तृप्ति नव्हे याचे पोटीं । भूतशून्य करील सृष्टी । पोटासाठीं कुंभकर्ण ॥ १९ ॥

वासवस्य वचः श्रुत्वा सर्वलोकपितामहः ।
रक्षः समाह्वयामास कुंभकर्णं ददर्श च ॥ १३ ॥

कुंभकर्णं समीक्ष्यैव विस्मितोऽभूत्प्रजापतिः ।
कुंभकर्णं महावीर्यं स्वयंभूरिदमब्रवीत् ॥ १४ ॥

---

[1] भयंकरपणा. [2] घाबरले. [3] सांदीकोंदींत पडलीं.

[4] अव्यवस्थित, [5] प्रख्यात. [6] प्राणिमात्राचें संकट.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

शयितो ह्येष षण्मासमेकाहं जागरिष्यति ।
असौ तु वीर एकाह्ना क्षुधितो विचरन्भुवि ॥ १५ ॥
आत्मना व्यसनेनाद्य कुंभकर्णो विबोधितः ।
त्वत्पराक्रमभीतश्च राजा संप्रति रावणः ॥ १६ ॥

ऐशी ऐकोनि इंद्राची गोष्टी । सादर जाला परमेष्टी । कुंभकर्ण पहावया दृष्टीं । उठाउठीं आणविला ॥ २० ॥ कराळ विक्राळ दारुण । अति उग्र कुंभकर्ण । त्यातें देखोनि चतुरानन । विस्मयापन्न स्वयें जाला ॥ २१ ॥ पोटासाठीं भूतविघाती । निर्माण केला हा पौलस्ती । कुंभकर्णासी प्रजापती । शापोन्मुक्ती स्वयें वदला ॥ २२ ॥ मृतकल्प अति अंसोस । नित्य निद्रा तुज षण्मास । जागा होशी एक दिवस । त्यामाजी त्रास क्षुधेचा ॥ २३ ॥ ब्रह्मशापें निद्रा पूर्ण । तो हा जाण कुंभकर्ण । तुजसीं करावया रण । स्वयें रावण उठविता झाला ॥ २४ ॥ तुझेनि संग्रामें रावण । धाकेंचि सोडूं पाहे प्राण । म्हणोनि तुजसीं करावया रण । कुंभकर्ण उठविला ॥ २५ ॥ त्यासी देखतांचि जाण । वानर पळती घेवोनि प्राण । त्यासीं संमुख करावया रण । नाहीं आंगवण कपींसीं ॥ २६ ॥ इंद्र चंद्र कुबेर वरुण । विद्याधर सिद्ध चारण । कुंभकर्णें करोनि रण । रणीं सुरगण जिंकिले ॥ २७ ॥ दैत्य दुर्धर दानव । यक्ष राक्षस गणगंधर्व । पाताळपन्नग मानव । येणें सर्वा जिंतिलें ॥ २८ ॥ या कुंभकर्णाची पाठी । कोणीं देखिली नाहीं सृष्टीं । देव दैत्य दानवकोटी । येणें रणसंकटीं गांजिले ॥ २९ ॥ ऐसा दुर्धर कुंभकर्ण । क्षुधेनें पीडिला दारुण । भक्षावया वानरगण । येईल आपण आक्रोशें ॥ ३० ॥

स एष क्षुधितो वीरो निर्गतः शिबिरात्खलु ।
वानरान्भृशसंक्रुद्धो भक्षयिष्यति वीर्यवान् ॥ १७ ॥
विभीषणवचः श्रुत्वा हेतुमत्सुमुखोद्गतम् ।
उवाच राघवो वाक्यं नीलं सेनापतिं तदा ॥ १८ ॥
गच्छ सैन्यानि सर्वाणि व्यूह्य तिष्ठस्व पावके ।
द्वाराणि संक्रमांश्चैव लंकाया यूथपैः सह ॥ १९ ॥
राघवेण समादिष्टो नीलो हरिचमूपतिः ।
शशास वानरानीकं यथावत्कपिकुंजरः ॥ २० ॥

साक्षेपें सांगे बिभीषण । अति खादाड कुंभकर्ण । भक्षावया वानरगण । येईल आपण संग्रामा ॥ ३१ ॥ ऐकोनि बिभीषणवचन । हांसिन्नला रघुनंदन । मी असतां कुंभकर्ण । वानरगण केंवी भक्षी ॥ ३२ ॥ एक एक वानरगण । गांजूं शकती कुंभकर्ण । सर्व याची आंगवण । करितां रण कळेल ॥ ३३ ॥ देखोनियां मांसें मोठा । म्हणसी कुंभकर्ण लेंठा । लागतां वानरचपेटा । धाटामोटा घोळसिती ॥ ३४ ॥ आणोनि नीळ सेनापती । स्वमुखें सांगे रघुपती । वानरभार वीर जुत्पती । सन्नद्ध स्थितीं सज्जावे ॥ ३५ ॥ शिळा शिखरें द्रुम पाषाण । पर्वतपाणी वानरगण । सन्नद्ध बद्ध सावधान । लंकाभवन रोधावें ॥ ३६ ॥ आलिया रावण कुंभकर्ण । इंद्रजितासगट सैन्य । अवघ्यां करीन रणकंदन । रघुनंदन गर्जत ॥ ३७ ॥ पळत्या देवोनि नार्भिकार । दृढ सज्जिला वानरभार । अरे मी असतां श्रीरामचंद्र । कपींसी मारूं कोण शके ॥ ३८ ॥ नीळें ऐकतां श्रीरामवचन । पळत्या आलें अति स्फुरण । भ्याडा शतधा आंगवण । रणीं रावण गांजावया ॥ ३९ ॥ नीळ सेनापति आपण । स्वमुखें करितां गर्जन । ऐकोनि श्रीरामवचन । वानरगण हरिखेले ॥ ४० ॥ श्रीरामाचें आज्ञापन । दृढ रोधावें लंकाभवन । वानरीं करोनि उड्डाण । त्रिकुटीं जाण वळंघेले ॥ ४१ ॥ येरीकडे लंकेआंत । भेटावया लंकानाथ । हरिखें कुंभकर्ण जात । तोही कथार्थ अवधारा ॥ ४२ ॥

सोऽभिगम्य गृहं भ्रातुः कक्षामभिविगाह्य च ।
ददर्शासीनमाविष्टं विमाने पुष्पके गुरुम् ॥ २१ ॥
अथ दृष्ट्वा दशग्रीवः कुंभकर्णमुपस्थितम् ।
तूर्णमुत्थाय संहृष्टः सन्निकर्षमुपानयत् ॥ २२ ॥
अथासीनस्य पर्यंके कुंभकर्णो महाबलः ।
स जग्राह तदा भ्रातुः पादौ राक्षसपुंगवः ॥ २३ ॥
उत्पत्य चैव मुदितो रावणः परिषस्वजे ।
स भ्रात्रा संपरिष्वक्तो यथावच्चाभिनंदितः ॥ २४ ॥
कुंभकर्णस्ततो दिव्यं प्रतिपेदे वरासनम् ।
स तदासनमाश्रित्य कुंभकर्णो महाबलः ॥ २५ ॥
संरक्तनयनः क्रोधाद्रावणं वाक्यमब्रवीत् ॥ २६ ॥

१ आश्चर्यचकित. २ प्राणिघातक. ३ अत्यंत, फार. ४ सामर्थ्य. ५ पराक्रमी. ६ पर्वत हातांत घेऊन. ७ वेढावें. ८ अभय. ९ शंभरपट. १० आनंद पावले. ११ चढले.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

कुंभकर्ण महाबळ । भ्रातृभेटीस उतावेळ । जातां सप्त द्वारपाळ । पायां सकळ लागती ॥ ४३ ॥ विमानसदृश सिंहासन । तेथें बैसला दशानन । त्यासी देखोनि कुंभकर्ण । लोटांगण घातलें ॥ ४४ ॥ रावणें उठोनि आपण । हातीं धरोनि कुंभकर्ण । आपणाजवळी आणून । आलिंगन दीधलें ॥ ४५ ॥ पर्यंकारूढ रावण । त्याचे कुंभकर्णें आपण । मस्तकीं वंदिले चरण । प्रेम संपूर्ण बंधूचें ॥ ४६ ॥ अतित्वरेनें रावण । सिंहासनींचा उठोन । पुढती दिधलें आलिंगन । समाधान दोघांसी ॥ ४७ ॥ कुंभकर्ण दशानन । दोघीं देतां आलिंगन । दोघे जाले सुखसंपन्न । समाधान दोघांसी ॥ ४८ ॥ ते वेळीं रावण उल्लासोन । आपल्या समसमान । कुंभकर्णासी वरासन । संतोषोन दीधलें ॥ ४९ ॥ तया आसनीं कुंभकर्ण । बैसोनियां सावधान । संमुख करोनि दशानन । सादर प्रश्न पूसत ॥ ५० ॥

किमर्थमहमत्राद्य त्वया राजन्प्रबोधितः ।
शंस कस्माद्भयं तेऽद्य को वा प्रेतो भविष्यति ॥ २७ ॥
पर्वतांश्चूर्णयिष्यामि दारयिष्यामि मेदिनीम् ।
देवान्विद्धि वधिष्यामि त्रैलोक्ये पार्थिवानपि ॥ २८ ॥
अद्य पश्यंतु भूतानि भक्ष्यमाणानि सर्वशः ।
सोऽद्य तृप्तिं गमिष्यामि भक्षयित्वा सुरासुरान् ॥ २९ ॥
कुम्भकर्णवचः श्रुत्वा जहृषे रावणस्तदा ।
पुनर्जातमिवात्मानं मेने स रजनीचरः ॥ ३० ॥

रावणासी पुसे कुंभकर्ण । मज उठवावया काय कारण । कोण भय आलें दारुण । मजलागून तें सांगें ॥ ५१ ॥ तुजलागीं लंकानाथा । सुरासुरांच्या करीन घाता । चूर्ण करीन पर्वतां । पृथ्वी आतां विदारीन ॥ ५२ ॥ जरी एक अपराध केला । तो जाण पां प्रेतत्वा गेला[१] । माझेनि हातें रणीं निमाला[२] । संशय या बोला धरूं नको ॥ ५३ ॥ देव दानव मानव । यक्ष किन्नर गंधर्व सर्व । भूतें गिळोनि सावयव[३] । प्रतापगौरव[४] पाहें माझें ॥ ५४ ॥ सुरासुर भक्षून येथ । सहसा मी नव्हें तृप्त । पुढें माझा कार्यार्थ । सावचित्त अवधारीं ॥ ५५ ॥ तुझे वैरी जे समस्त । भक्षावया मी अति क्षुधित । जें जें भक्षूं सांगसी येथ । तें तें त्वरित गिळीन ॥ ५६ ॥ ऐकोनि कुंभकर्णाचें वचन । हरिखला दशानन । मरोनि वांचलों आपण । नवा जन्म जाण कुंभकर्णा ॥ ५७ ॥

अयं ते सुमहान्कालः शयानस्य निशाचर ।
स्वपितस्त्वं न जानीषे मम रामान्महद्भयम् ॥ ३१ ॥
एष दाशरथी रामः सुग्रीवसहितो बली ।
समुद्रं लंघयित्वा तु कुलं नः परिकृंतति ॥ ३२ ॥
न देवासुरनागेभ्यो गंधर्वेभ्यः कदाचन ।
भूतपूर्वं भयं तादृग्यादृशं मानुषादिदम् ॥ ३३ ॥

ऐकें कुंभकर्णा सावधान । तुवां निद्रा केलिया जाण । मज श्रीरामभय दारुण । जागृति स्वप्न सुषुप्तीं ॥ ५८ ॥ श्रीरामबाणीं रणार्दित । अहर्निशीं धुकधुकित । श्रीरामें माझा प्राणान्त । जाण निश्चित कुंभकर्णा ॥ ५९ ॥ अश्व ध्वज रथ सारथी । छेदोनि मुकुट पाडिला क्षितीं । विरथी केलें मज क्षीणशक्ती । रणीं रघुपति न मारीच ॥ ६० ॥ श्रीराम कृपा संपूर्ण । सांपडला न घेच प्राण । देवोनियां जीवदान । रणीं रावण सोडिला ॥ ६१ ॥ अति गर्वी मी लंकानाथ । मोकळा केशीं करोनि विरथ । आणि नागवा हळहळित । लंकेआंत धाडिला ॥ ६२ ॥ पूर्वी ऐसा अपमान । दानव मानव सुरगण । त्यांहीपासून अति दारुण । नाहीं अपमान देखिला ॥ ६३ ॥ न भूतपूर्व[६] अपमान । स्वप्नीं न देखे दशानन । तैसाही श्रीरामें गांजून । तृणासमान मज केलें ॥ ६४ ॥ आणिक एक नवल जाण । समुद्रीं तारून पाषाण । करोनियां सेतुबंधन । आला आपण लंकेसी ॥ ६५ ॥ त्याच्या सेतूच्या परिपाठीं[७] । लंके आल्या वानरकोटी । दुर्ग वेढिले मर्कटीं । आपले दृष्टीं पाहें पां ॥ ६६ ॥ वनीं उपवनीं वानरथाटी । दुर्गीं झोंबती कोट्यनुकोटी । पैल पाहें लंकात्रिकूटीं । वीर जगजेठी वळंघले ॥ ६७ ॥ करितां वानरांसीं रण । विरूपाक्ष अकंपन । प्रहस्त मारिला प्रधान । न लागतां क्षण वानरीं ॥ ६८ ॥ येवढाले महावीर । युद्धा आलिया दुर्धर । नुठी श्रीराम ना सौमित्र । केला रणमार[८] वानरीं ॥ ६९ ॥ सुग्रीवअंगदादि कपिपती । हेही नाहीं आले युद्धार्थी । वानरीं लावो-

१ मरण प्राप्त करून घेईल. २ मृत्यु पावला. ३ अवयवांसहित. ४ पराक्रमाचा मोठेपणा. ५ युद्धांत त्रास पावलेला. ६ पूर्वीं कधींही न झालेला असा. ७ मार्गानें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

नियां ख्याती। तिघे पुरुषार्थी मारिले ॥ ७० ॥ विरूपाक्ष अकंपन। एकें हनुमंतें मारिले जाण। नीळें प्रहस्त प्रधान। न लागतां क्षण निर्दाळिला ॥ ७१ ॥ नीळें मजसीं करितां रण। मज केलें तृणासमान। गाढी वानरांची आंगवैण। निधडे दारुण संग्रामीं ॥ ७२ ॥

ये राक्षसा मुख्यतमा हतास्ते युधि वानरैः।
वानराणां क्षयं युद्धे न पश्यामि कदाचन ॥ ३४ ॥

मुख्य धुरेसीं निशाचर। वानरीं मारिले अपार। एकही न मरेचि वानर। रण दुर्धर करितांही ॥ ७३ ॥ घार्यी जर्जर वानरभुज। लाविती श्रीरामचरणरज। सर्वेचि उठोनि कपिसमाज। नाचती भोजें रणरंगीं ॥ ७४ ॥ अपार मरती निशाचर। एकही न मरेचि वानर। हेंचि मज आश्चर्य थोर। दशशिर सांगत ॥ ७५ ॥ तुम्हां-श्रीरामांमाजी जाण। वैर पडावया काय कारण। ऐसें पुससी जरी आपण। तरी समूळ निरूपण ऐकावें ॥ ७६ ॥

पुरा त्वं नाभिजानीषे यदा सीता मया हृता।
सीताहरणसंतप्ताद्रामान्मे सुमहद्भयम् ॥ ३५ ॥
हंतावेक्षस्व लंकाया वनान्युपवनानि च।
सेतुना सुखमागम्य वानरैकार्णवं कृतम् ॥ ३६ ॥
नगरं शत्रुणा रुद्धं हता युद्धे सुहृज्जनाः।
कोशश्च क्षयितः सर्वः स त्वमद्य प्रपश्यताम् ॥ ३७ ॥
त्रायस्वेमां पुरीं लंकां बालवृद्धावशेषिताम्।
भ्रातुरर्थे महाबाहो कुरु साहाय्यमुत्तमम् ॥ ३८ ॥
मयैवं नोक्तपूर्वो हि भ्रातः कश्चित्परंतप।
त्वय्यस्ति तु मम स्नेहः परा संभावना च मे ॥ ३९ ॥

तुवां निद्रा केलिया जाण। पंचवटीं जावोनि आपण। मारीचमृगें करोनि छळण। सीताहरण म्यां केलें ॥ ७७ ॥ तेणें रागें रघुनंदन। मेळवोनि वानरसैन्य। करोनियां सेतुबंधन। बळवाहन लंके आला ॥ ७८ ॥ लंके यावया रघुनंदन। मुख्य द्वंद्वी वायुनंदन। विध्वंसोनि अशोकवन। राक्षसकंदन तेणें केलें ॥ ७९ ॥ मारिले वनकर किंकर। पंच सेनानी प्रधानपुत्र। मारिला जंबुमाळी महावीर। अखया कुमर मुख्यत्वें ॥ ८० ॥ अखया कुमरकैवारार्थ। युद्धा जातां इंद्रजित। रणीं करोनि हताहत। केला निःपात सैन्याचा ॥ ८१ ॥ ब्रह्मपाशाचिये गती। लंके आणिला मारुती। तेणें केली अति ख्याती। सांगों किती सुबंधो ॥ ८२ ॥ जाळोनियां लंकाभवन। मजही देवोनि अपमान। असंख्य राक्षस मारून। गेला निघोन किष्किंधे ॥ ८३ ॥ किष्किंधे जावोनि आपण। घेवोनि आला रघुनंदन। निरोधोनि लंकाभवन। माझें कंदन करूं आला ॥ ८४ ॥ पूर्वी ऐसा काकुळती। नाहीं आलों कोणाप्रती। तूं सखा बंधु रणसाह्यार्थी। यालागीं तुजप्रती सांगितलें ॥ ८५ ॥ सेतुद्वारा वानरवीर। येवोनि वेढिलें स्वनगर। विध्वंसिलें लंकापुर। द्वारें द्वार रोधूनी ॥ ८६ ॥ विध्वंसोनि लंकाभवन। रणीं मारिले सुहृज्जन। ठेविले ठायीं भांडार क्षीण। जालें जाण सुबंधो ॥ ८७ ॥ दुर्धर आम्हां आलें विघ्न। माझें करीं पां संरक्षण। लंका रक्षावी आपण। बाळें वृद्धजन कुळ रक्षीं ॥ ८८ ॥ तुझ्या भुजांची मज आस। तुझा अति विश्वास। शत्रुसमुदाय करोनि ग्रास। दुःखक्लेश निवारीं ॥ ८९ ॥ रणीं गांजिलों संपूर्ण। त्वां साह्य करावें आपण। ऐसें सांगतां रावण। आलें रुदन अनिवार्य ॥ ९० ॥ तूं तंव पराक्रमी परम। माझा निरसीं सकळ श्रम। साह्य करीं अति उत्तम। सुखसंभ्रम जेणें वाढे ॥ ९१ ॥ ऐसी हे समूळ कथा। सांगितली यथार्थता। वैरासी मुख्य कारण सीता। जाण तत्त्वतां सुबंधो ॥ ९२ ॥ प्रयासीं केलें सीताहरण। ते त्वां भोगिली आपण। नाहीं म्हणतां रावण। पुसे कुंभकर्ण छळणोक्ती ॥ ९३ ॥

किं कार्यं प्रतिबोधितो वद सखे रामांगनास्त्याहृता।
सा भुक्ता न हि किं यतो न रमते रामात्परं जानकी ॥
रामः किं भवितासि नो शृणु सखे तारामलं श्यामलम्।
रामांगं भजतो ममापि कपटो भावो हि संशाम्यति ॥ ४० ॥

कुंभकर्ण म्हणे लंकानाथा। मज उठविलें कोण्या अर्था। सीताहरण दुःखावस्था। तुज तत्त्वतां सांगावया ॥ ९४ ॥ हरूनि आणिली जे

१ मोठी. २ पराक्रम. ३ धैर्यवान्. ४ आनंदानें. ५ स्वपराक्रम हेंच वाहन ज्याचें असा, अति बलवान्. ६ सेनापति. ७ वेढा घालून.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सीता। ते त्वां भोगिली लंकानाथा। रामावांचून सर्वथा। आणिकेंसीं सीता रमेना ॥ ९५॥ रूपरेखा लक्षलक्षण। हावभाव कटाक्ष गुण। चाप सज्जोन ठाणमाण। गंभीर गहन विन्यासें ॥ ९६॥ श्यामसुंदर कमलनयन। श्रीराम होवोनि आपण। सीता न भोगावया काय कारण। कुंभकर्ण पूसत ॥ ९७॥ नानापरींच्या लंकानाथा। मावा जाणसी समस्ता। श्रीराम होवोनि भोगितां सीता। विलंबता कां केली ॥ ९८॥ कुंभकर्ण ऐक आतां। तुज मी सांगेन तत्त्वतां। माव न चले श्रीरघुनाथा। छळणें[३] सीता न भोगवे ॥ ९९॥ मज स्वयें श्रीराम होतां। कैंचा राम कैंची सीता। ठाव नाहीं लंकानाथा। भोग्य भोक्ता असेना ॥ १००॥ नाहीं तेथें ध्येयें ध्याता। नाहीं तेथें कर्म कर्ता। समूळ तेथें नाहीं सीता। नाहीं भोक्ता रावण ॥ १॥ नाहीं द्रष्टा दृश्य दर्शन। नाहीं धर्माधर्मलक्षण। नाहीं कर्म क्रिया आचरण। मीतूंपण असेना ॥ २॥ श्रीराम होतां ईत्थंभूत। जनीं विजनीं श्रीरघुनाथ। भूतमहाभूतें समस्त। सदोदित श्रीराम ॥ ३॥ श्रीराम जीवनँ पावन। श्रीरामही हुताशर्न। श्रीराम दशदिशा आपण। जग संपूर्ण श्रीराम ॥ ४॥ ऐसें मज श्रीराम होतां। समूळ तेथें नाहीं सीता। काय म्यां भोगावें गा आतां। रावण भोक्ता असेना ॥ ५॥ ऐकतां रावणाचें वचन। कुंभकर्णा आलें रुदन। श्रीराम परब्रह्म परिपूर्ण। कुळनिर्दळण विरोधें ॥ ६॥ माया बाधेना श्रीरघुनाथा। कपटें भोगवेना सीता। ऐसें कळोनि लंकानाथा। विरोध वृथा कां करिसी ॥ ७॥ कपटें श्रीराम स्वयें होतां। पावली पूर्ण अगाधता। त्यासीं सप्रेम भावें भजतां। स्वानंदता सुखवास ॥ ८॥ समुद्रीं तारिले पाषाण। त्यासी अवश्य रिघावें शरण। सखा करोनि रघुनंदन। सुखसंपन्न नांदावें ॥ ९॥ श्रीरामस्वरूपाची प्रतीती। तुज बाणली लंकापती। विरोध सांडोनियां चित्तीं। शरण रघुपती निघावें ॥ ११०॥ रामासी निघाल्या शरण। स्वप्नीं नाहीं जन्ममरण। विघ्नचि होय निर्विघ्न। सुखसंपन्न नांदावें ॥ ११॥ शरण रिघाल्या श्रीरघुनाथा। भयचि होय निर्भयता। सख्य केलिया काकुत्स्था। अति श्लाघ्यता[११] तिहीं लोकीं ॥ १२॥

स तु श्रुत्वा महाराजः कुम्भकर्णस्य भाषितम्।
भृकुटिं चैव संचक्रे क्रुद्धश्चैवमुवाच ह ॥ ४१ ॥
मान्यो गुरुरिवाचार्यः किं मां त्वमनुशाससि।
किं वा कृच्छ्रगतं कर्तुं कालयुक्तं विधीयताम् ॥ ४२ ॥
अस्मिन्काले तु यद्युक्तं तदिदानीं विचिन्त्यताम्।
ममापनयजं दुःखं विक्रमेण समीकुरु ॥ ४३ ॥
क्रुद्धोऽयमिति विज्ञाय शनैः श्लक्ष्णमुवाच ह।
कुम्भकर्णः शनैर्वाक्यं बभाषे परिसांत्वयन् ॥ ४४ ॥

शत्रु मर्दील कुंभकर्ण। उल्लासें प्रबोधी रावण। तो म्हणे रामा निघावें शरण। तेणें उद्विग्न लंकेश ॥ १३॥ श्रीरामा निघावें शरण। निश्चयें वदला बिभीषण। तैसेंचि वदला कुंभकर्ण। तेणें रावण अति दुःखी ॥ १४॥ ऐकतां कुंभकर्णउत्तर। रावण कोपला दुर्धर। नेत्र भोवंडी चक्राकार। भृकुटी विक्राळ सक्रोध ॥ १५॥ कुंभकर्णीं सूंनि[१२] दृष्टी। रावणें भंवयां दिधली गांठी। क्रोधें खवळला पोटीं। वदतां गोष्टी साशंक ॥ १६॥ क्रोधानुवादें कुंभकर्ण। बिभीषणाऐसा आपण। श्रीरामासी गेलिया शरण। मग रक्षण मज कैंचें ॥ १७॥ यालागीं स्वयें दशानन। निजक्रोधातें आवरून। कुंभकर्णासी मृदु वचन। कोपायमान अनुवादे ॥ १८॥ जेंवी कां शिष्यासी नेमून। सद्गुरु करी आज्ञापन। तैसाचि तूं मजलागून। निग्रहून[१३] वदतोसी ॥ १९॥ मी ज्येष्ठ तूं कनिष्ठ। ही सांडोनि नीट वाट। धरोनि जाणिवेचा[१४] लोट। गुरुत्वें स्पष्ट नेमिसी मज ॥ १२०॥ शत्रु निर्दाळिसी करोनि रण। तुझा भरंवसा होता पूर्ण। शेखीं[१५] श्रीरामा निघावें शरण। निग्रहून वदतोसी ॥ २१॥ बहु बोलाचें काय कारण। उचित काळ अनुलक्षून। माझिया साह्यालागीं जाण। करावें रण रामासीं ॥ २२॥ बहुतां दिवसांचा क्षुधित। उठलासि निद्रिस्थ। श्रीरामवा-

१ शरीररचनेनें. २ कपटविद्या. ३ कपटानें. ४ ज्याचें ध्यान करावयाचें तो. ५ ध्यान करणारा. ६ यथार्थपणें. ७ पाणी. ८ अग्नि. ९ अनुभव. १० ककुत्स्थवंशांतील रामाला. ११ स्तुत्यता. १२ घालून. १३ ताब्यांत ठेवून. १४ ज्ञानाचा. १५ शेवटीं.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

नरांचा घात । करीं निःपात निजभक्षें ॥ २३ ॥ कुंभकर्ण अति सज्ञान । कोपला देखोनि रावण । त्यासी द्यावया समाधान । काय आपण अनुवादे ॥ २४ ॥ श्रीरामेंसीं नरवानरां । देखोनियां दशशिरा । मीच कांपतों थरथरां । मृत्यु खरा हा आम्हां ॥ २५ ॥ नारदाचें त्रिसत्य सत्य वचन । सुटल्या श्रीरामाचे बाण । रावण इंद्रजित कुंभकर्ण । कुळनिर्दळण राक्षसां ॥ २६ ॥ त्रिसत्य सत्य नारदवचन । तुज त्यासीं कोठें दर्शन । कैसें केलें संभाषण । पुसे रावण साक्षेपें ॥ २७ ॥ एका जनार्दना शरण । नारदइतिहासलक्षण । हें समूळ मुळींचें रामायण । सावधान अवधारा ॥ १२८ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां रावणकुंभकर्णसंवादो नाम एकविंशतितमोऽध्यायः ॥ ओंव्या ॥ १२८ ॥ ॥ श्लोक ॥ ४४ ॥

अध्याय बाविसावा

॥ श्रीरामचंद्राय नमः ॥ नारदसंवादलक्षण । समूळ मूळींचें रामायण । रावणासी कुंभकर्ण । स्वयें आपण सांगत ॥ १ ॥

शृणुष्वेदं महाराज मम वाक्यमरिंदम ।
यदर्थं तु पुरा सौम्य नारदाच्छ्रुतवानहम् ॥ १ ॥
षण्मासादहमुत्थाय अशित्वा भक्ष्यमुत्तमम् ।
न च तृप्तोऽस्मि राजेंद्र ततोऽहं प्रस्थितो वने ॥ २ ॥
बहूनि भक्षयित्वाहं सत्वानि विविधानि वै ।
भुक्त्वा चाप्रीणनं कृत्वा शिलातलमुपाविशम् ॥ ३ ॥

शत्रुदमनीं अति समर्था । ऐकें बापा लंकानाथा । नारदमुखें मीं ऐकिली कथा । सावधानता अवधारीं ॥ २ ॥ सहा मासां मज जागेपण । खातां उत्तम अन्नपक्वान्न । तृप्ती न पवेचि संपूर्ण । मग मी आपण वना गेलों ॥ ३ ॥ जावोनियां वनाप्रती । भक्षितां जीव नानाजाती । तेणें मज जाली तृप्ती । अति विश्रांती पावलों ॥ ४ ॥ अति विस्तीर्ण शिळातळ । वरी छाया सुशीतळ । तेथें बैसलों मी निश्चळ । नभोमंडळ निरीक्षोनि ॥ ५ ॥ तंव ब्रह्मवीणाझणत्कार । करीत रामनामाचा गजर । येतां नारदमुनीश्वर । नभीं सत्वर म्यां देखिला ॥ ६ ॥ दिव्य चंदनाची उटी । त्रिपुंड्र रेखिला ललाटीं । दिव्य वनमाळ कंठीं । स्वानंदपुष्टीं डुल्लत ॥ ७ ॥

शिलातलस्थोऽपश्यं वै नारदं शशिसप्रभम् ।
आकाशेन द्रुतं यांतं मां च दृष्ट्वा स तु स्थितः ॥ ४ ॥
अवतीर्णश्च सहसा मया चैवाभिवादितः ।
उपविष्टः शिलायां तु ततोऽहं तु तमब्रुवम् ॥ ५ ॥
कुत आगम्यते ब्रह्मन्कुतो वा प्रतिगम्यते ।
एवमुक्तो महाराज नारदो मामुवाच ह ॥ ६ ॥
देवानामालयं मेरुं गतोऽहं देवसंसदि ।
युष्मत्तो भयभीतानां समाजस्तत्र सम्बभौ ॥ ७ ॥

तपस्तेजें देदीप्त । तेंजें शशिसूर्य लपत । नारद नभोमंडळीं येत । अकस्मात देखिला ॥ ८ ॥ मज नारदें देखोनि नयनीं । क्षणैक स्थिरावला गगनीं । सवेंचि उतरोनि अवनीं । आला मुनि मजपासीं ॥ ९ ॥ मग म्यां उठोनि आपण । मुनीस घातलें लोटांगण । मस्तकीं वंदोनियां चरण । शिळातळीं बैसविला ॥ १० ॥ शिळातळीं बैसविल्या जाण । मुनीसी म्यां पुसिला प्रश्न । कोठोनि तुमचें आगमन । पुढारें गमन तें कोठें ॥ ११ ॥ ऐसा पुसतां प्रश्न । नारद हांसे गदगदोन । मग साक्षेपें आपण । सकारण गुज सांगे ॥ १२ ॥ मेरुगिरीवरी देवसभेंत । तुमचेनि भयें भीत । समाज मिळाला समस्त । रावणान्तउपाया ॥ १३ ॥ देव दानव मानव । यक्षोरग ऋषि गंधर्व । ब्रह्मा विष्णु सदाशिव । सर्व समुदाय मिळाला ॥ १४ ॥

मंत्रं संमंत्रिरे तत्र वधे रक्षःकुलस्य च ।
देवराजो निबद्धश्च यमः संख्ये पराजितः ॥ ८ ॥
जितौ तु सबलौ संख्ये कुबेरवरुणावपि ।
यज्ञा विध्वंसिताः सर्वे धर्मिष्ठाश्च हता नृपाः ॥ ९ ॥
देवोद्यानानि भग्नानि स्त्रियो नीता यथेप्सितम् ।
चिंतयध्वं वधोपायं रावणस्य दुरात्मनः ॥ १० ॥
एवमुक्ते तु वचने ब्रह्मा देवानुवाच ह ।
अवध्यत्वं मया दत्तं देवदैत्यैश्च राक्षसैः ॥ ११ ॥
मानुषेभ्यो भयं तस्य वानरेभ्यश्च देवताः ॥ १२ ॥

---

१ त्रिवार सत्य, अगदीं सत्य. २ लक्षपूर्वक. ३ आकाशांत. ४ पृथ्वीवर. ५ यानंतर. ६ आग्रहानें. ७ रावणाच्या वधाकरितां. ८ यक्ष व सर्प.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

तेथें मिळोनि देवसमुदाव। रावणवधाचा उपाव। मुख्य रावणाचा अन्याव। साभिप्राव तो ऐका ॥ १५ ॥ मुख्य इंद्र घातला बांधवंडीं[१]। आणीक देव तेहतीस कोडी। कुबेर जिंतला रणधांदडीं[२]। केलीं बापुडीं यमवरुणें ॥१६॥ विध्वंसिले याज्ञिक यज्ञ। मारिले धार्मिक जन। मारिले अग्निहोत्री ब्राह्मण। अन्याय संपूर्ण लंकेशा ॥१७॥ चैत्रवन नंदनवन। विध्वंसूनि देवोद्यानें[३]। येणें वाढविलें अशोकवन। स्त्रियांसीं रमण रमावया ॥१८॥ देवस्त्रिया असुरस्त्रिया। नागकन्या पद्मिनी प्रिया। बळेंचि आणिल्या धरोनियां। मुख्य अन्याया हें मूळ ॥ १९ ॥ परदारांचें[४] जें हरण। हाचि अन्याय अति दारुण। यालागीं रावणाचें मरण। अवघे जाण चिंतिती ॥ २० ॥ तेथें बोलिला ब्रह्मदेव। माझ्या वचनाचा अभिप्राव। मिळाल्या सुरसमुदाव। तरी दशग्रीव अवध्य ॥ २१ ॥ दारहरणकैवारा। करूं आल्या नरवानरां। तत्काळ मरण दशशिरा। सत्य साचार ब्रह्मवाणी ॥ २२ ॥

सुरासुरसमूहेऽपि वधस्तस्य न विद्यते।
तस्मादेष हरिर्देवः पद्मनाभस्त्रिविक्रमः ॥ १३ ॥
पुत्रो दशरथस्यास्तु चतुर्व्यूहः सनातनः।
भवंतो वसुधां गत्वा विष्णोरस्य महात्मनः ॥ १४ ॥
वानराणां तनुं धृत्वा सहायत्वं करिष्यथ।
एवमुक्त्वा ततो ब्रह्मा तत्रैवांतरधीयत ॥ १५ ॥
एतदाख्यातवान्मह्यं नारदो भगवानृषिः।
यथातत्त्वमशेषेण ततो यातः सुरालये ॥ १६ ॥
सोऽयं विष्णुः सुरैः सार्द्धं वानरत्वमुपागतैः।
तन्मह्यं रोचते सीता रामाय प्रतिदीयताम् ॥१७॥
नमस्व रामं राजेंद्र रक्ष चात्मानमात्मना।
योग्यश्च राघवो मित्रं संधिश्चैवोत्तमो भवेत् ॥१८॥

सुरासुरीं अवध्यता। ब्रह्मवरदें[५] लंकानाथा। नरवानर याच्या घाता। होय सांगता स्वयंभू ॥२३॥ पद्मनाभ विष्णु विख्यात। तो होईल दशरथाचा सुत। रामलक्ष्मणशत्रुघ्न भरत। व्यूह चतुर्थ पुरुषार्थें ॥ २४ ॥ रणीं गांजावया दशशिर। सकळ जे कां सुरवर। होती दुर्धर वानरभार। निशाचर मारावया ॥ २५ ॥ वानर साह्य श्रीरामासीं। श्रीराम रक्षिता वानरांसी। ऐसें ब्रह्मयानें देवांपासीं। निश्चयेंसीं नेमिलें ॥ २६ ॥ मिळोनियां वानरभार। रणीं मारिती निशाचर। श्रीराम मारील दशशिर। सबंधुपुत्र ससैन्य ॥ २७ ॥ परम कपटी इंद्रजित। अभिंचारी[६] निकुंबळेआंत। त्याचा सौमित्री करील घात। निजपुरुषार्थप्रतापें ॥ २८ ॥ नरवानर मिळोन। करितील राक्षसां निःसंतान। ऐसें विरंचिवरदान। ब्रह्मवचन नव्हे मिथ्या ॥ २९ ॥ वर वदोनियां स्पष्ट। ब्रह्मा जाला अदृष्ट। ते हे नरवानर सुभट। आले यथेष्ट लंकेसी ॥ ३० ॥ आमच्या नाशासी कारण। समुद्रीं तरती पाषाण। रावणा निश्चयेंसीं जाण। आलें मरण आम्हांसी ॥ ३१ ॥ मिथ्या न होय नारदवचन। जालें प्रत्यक्ष प्रमाण। ते हे वानर जाण। आले गर्जोन लंकेवरी ॥ ३२ ॥ राक्षस मरती कपि न मरती। तुवांचि सांगितलें मजप्रती। काळ साह्य रघुनाथीं। जाण निश्चितीं लंकेशा ॥३३॥ श्रीराम परमात्मा ब्रह्ममूर्ती। विरोध न करावा त्याप्रती। त्यासी अर्पून सीता सती। सुखसंवित्ती[७] भोगावी ॥ ३४ ॥ राक्षस मरती कपि न मरती। हे आत्मत्वाची निजप्रतीती[८]। समुद्रीं पाषाण तरती। दुजी प्रतीती ईश्वरत्वाची ॥ ३५ ॥ जेणें भंगिलें शिवचाप। त्यासीं न चले गा प्रताप। देखतां विरोधें श्रीरामरूप। येतो चळकांप सर्वांगीं ॥३६॥ श्रीरामासीं करितां रण। प्राणान्तें जालासी क्षीण। रणीं रामें दिधलें जीवदान। त्यासी कां शरण न रिघावें ॥ ३७ ॥ आत्मसत्ता ईश्वरसत्ता। नित्य अधीन श्रीरघुनाथा। त्यासीं न ये विरोध करितां। अर्पून सीता करीं सख्य ॥ ३८ ॥ घालोनियां लोटांगण। सीता करोनि रामार्पण। श्रीरामासीं रिघाल्या शरण। सुखसंपन्न सर्वदा ॥ ३९ ॥ श्रीरामासीं रिघोनि शरण। मुख्यत्वें वांचवीं निजप्राण। तोचि सकळ कुळा संरक्षण। आमचेंही मरण चुकेल ॥ ४० ॥ श्रीरामासीं रिघाल्या शरण। स्वप्नीं नाहीं जन्ममरण। विघ्नाचें होय निर्विघ्न। सुखसंपन्न सर्वदा ॥ ४१ ॥ सती श्रीरामाची सीता। स्वयें श्रीरामासी अर्पितां। तुज संदेह कोण लंकानाथा। विरोध वृथा कां करिसी ॥ ४२ ॥

१ बंदींत, कैदेंत. २ युद्धाची गर्दी करून. ३ देवांचे बगीचे. ४ दार=स्त्री. ५ ब्रह्मदेव. ६ जारणमारण विधी करणारा. ७ सुखानुभव. ८ अनुभव.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

कुंभकर्णवचः श्रुत्वा रावणो राक्षसेश्वरः ।
तूष्णींभूतश्चिंतयित्वा ततो वाक्यमुवाच ह ॥ १९ ॥
कुंभकर्ण महाप्राज्ञ कुरुष्व वचनं मम ।
कोऽसौ विष्णुरिति ख्यातो यस्मात्त्वं तात बिभ्यसे॥२०॥
दैवत्वेन न मन्येऽहं तथान्ये देवदानवाः ।
मानुषत्वं गते तस्मिन्किं भयं त्वामुपस्थितम् ॥ २१ ॥
नित्यमाहारभूतास्तु मानुषाः स्म सदाबलाः ।
खादयित्वा तु यं पूर्वं कथं पश्चान्नमाम्यहम् ॥ २२ ॥
प्रणम्य मानुषं रामं सीतां दत्वा तु तस्य वै ।
हास्यास्पदत्वं लोकानामनुयास्यामि पृष्ठतः ॥ २३ ॥

ऐकोनि कुंभकर्णाचें वचन । रावणा पडियेलें मौन । महादुःखें आंदोलायमान[1] । अति उद्विग्न सचिंत ॥ ४३ ॥ ज्याचेनि बळें करावें रण । तोचि कुंभकर्ण आपण । सीता श्रीरामासी अर्पून । रिघावें शरण सांगत ॥ ४४ ॥ बिभीषण येच अर्थी[2] । नाना परींचिया उपपत्ती । चाळूनियां सर्व युक्ती । शरण रघुपती रिघा म्हणे ॥ ४५ ॥ संमुख लक्षोनि कुंभकर्ण । सरोष बोले रावण । झोंपें जालासि सज्ञान । बोलसी वचन चापल्यें ॥ ४६ ॥ विष्णु विष्णुपणें असतां । मज संमुख न येचि युद्धार्था । तो नीचत्वें आला मनुष्यता । त्याची सभयता ते किती ॥ ४७ ॥ मनुष्य विष्णु स्वयें सांगसी । सांगसांगों स्वयें भिसी । शेखीं मजसी भेडसाविसी । थोर जालासी पुरुषार्थी ॥ ४८ ॥ मनुष्य आमचें खाजुकें[3] । सगळीं भक्षूं यथासुखें । तूं भीतोसि त्याचेनि धाकें । थोर तंवकें[4] पुरुषार्थी ॥ ४९ ॥ अति धाकें धाकोनि थोर । अजासी वंदितां लाजे व्याघ्र । तेंवी म्यां वंदितां श्रीरामचंद्र । लज्जा थोर मज माझी ॥ ५० ॥ मनुष्य आमचा आहार । त्यासी म्यां करावा नमस्कार । तैं मज हांसती सुरासुर । निशाचर उपहासिती ॥ ५१ ॥ रणीं इंद्र आणितां बांधोन । बंदीं घालितां सुरगण । विष्णु लपला भेण । न करीच रण अति धाकें ॥ ५२ ॥ विष्णूसकट इंद्रादि देव । दैत्य दानव मानव । म्यां तृणप्राय केले सर्व । त्या मज भय मनुष्याचें ॥ ५३ ॥ श्रीराम मनुष्यमात्र जाण । सीता अर्पून रिघावें शरण । हे मज लज्जा अति दारुण । भय कोण रामाचें ॥ ५४ ॥ सर्पें वंदावें मूषकासी । गरुडें वंदावें सर्पासी । तेंवी भक्ष्यभूत श्रीरामासी । कैंवी म्यां त्यासी वंदावें ॥ ५५ ॥ पूर्वीं भक्षिलें मनुष्यांसी । तेंचि मनुष्यत्व श्रीरामासी । मज शरण रिघतां त्यासी । उपहासासी पावेन ॥ ५६ ॥ श्रीरामाचे शरणपणें । नित्यावृत्ती त्याचें होणें । पाठीसीं चालतां रावणें । लाजिरवाणें तिहीं लोकीं ॥ ५७ ॥

यदि वा राघवो विष्णुर्व्यक्तं ते श्रोत्रमागतः ।
देवतानां हितार्थाय प्रविष्टो मानुषीं तनुम् ॥ २४ ॥
अत्यंतं वैरिणं रामं यं नमस्कर्तुमिच्छसि ।
अस्मान्हंतुं किलायातः स संधेयः कथं मया ॥ २५ ॥
यदि रामः स्वयं विष्णुर्लक्ष्मणः शेषसंमितः ।
स वानराणां राजानं सुग्रीवं शरणं गतः ॥ २६ ॥
अहोस्य सदृशं सख्यं तिर्यग्योनिगतैः सह ।
वीर्यहीनस्तु किं विष्णुर्योगतो ऋक्षवानरान् ॥ २७ ॥

श्रीराम विष्णु तत्त्वतां । मुनिमुखें त्वां ऐकिली कथा । तो देवांचिया हितार्था । आमुच्या वधार्था मनुष्य जाला ॥ ५८ ॥ विचारितां निजनिर्धारीं । श्रीराम आमुचा अत्यंत वैरी । त्यासी अर्पूनि सीता सुंदरी । म्हणसी तूं करीं नमस्कार ॥ ५९ ॥ आमुच्या वधाकारणें । श्रीरामें मनुष्यत्व धरणें । त्यासीं म्यां सख्य करणें । जीवें प्राणें घडेना ॥ ६० ॥ सर्पा मुंगसासीं सौजन्य[6] । करवी ऐसा आहे कोण । तेंवी राम आणि रावण । सख्य संपूर्ण घडेना ॥ ६१ ॥ श्रीरामासीं सौजन्य । करूनि देतां आलिंगन । खेंवांसवेंचि मी गिळीन । मनुष्यभक्षण तें आम्हां ॥ ६२ ॥ केळें दिधल्या वानरा करीं । तें काय आठ प्रहर धीर धरी । तत्काळचि गटका करी । तेंवी खेंवामाझारीं श्रीराम ॥ ६३ ॥ श्रीराम विष्णु जरी आपण । सौमित्र शेषावतार संपूर्ण । तरी कां सुग्रीवा गेला शरण । शुद्ध्यर्थ जाण सीतेच्या ॥ ६४ ॥ श्रीरामासीं विष्णुत्व कदा न घडे । सीतेलागीं होवोनि वेडें । वनीं रडे पडे झडे । विष्णुत्व घडे कैसेनि ॥ ६५ ॥ तिर्यग्योनी[8] जे वानर । पालेखाइरे[5] वनचर । त्यांच्याशीं सख्य करी रामचंद्र । तो राघवेंद्र

१ घोंटाळयांत पडलेला. २ उद्देशानें. ३ खाद्य. ४ बलानें.
५ खरेपणानें. ६ मैत्री. ७ मिठी मारतांच. ८ पशुयोनि.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

अति नीच ॥ ६६ ॥ विष्णूसी नाहीं पुरुषार्थ । बळीसीं न करीच युद्धार्थ । छळणें झाला तो अतीत । यज्ञसमयीं याचक ॥ ६७ ॥ स्वयें वामनरूपें मागोन । त्रिविक्रमाक्रमें घेतां जाण । समुद्रमेखळा पृथ्वी दान । करोनि छळण घेतली ॥ ६८ ॥ पृथ्वी घेवोनियां दान । सर्वेचि कैसा कृतघ्न । दैत्यासी लाविलें बंधन । कपटी पूर्ण श्रीविष्णु ॥ ६९ ॥ पुढिलांसी करितां छळ । सदाचें अपेशी कपाळ । बळीनें केला द्वारपाळ । सर्व काळ तिष्ठत ॥ ७० ॥ कुडा कपटी हीन दीन । विष्णूसी नाहीं आंगवण । त्यांतही आलें मनुष्यपण । आम्हीं कां शरण रिघावें ॥ ७१ ॥ उपकारा अपकार करणें । याच परी विष्णूचें जिणें । त्यासीही म्यां शरण रिघणें । लाजिरवाणें तिहीं लोकीं ॥ ७२ ॥

यदा मे निर्जिता देवाः स्वर्गं गत्वा त्वया सह ।
तदा किं नास्ति विष्णुत्वं तस्य देवस्य राक्षस ॥ २८ ॥
सांप्रतं कुत आयातः स विष्णुर्येन बिभ्यसि ।
शरीररक्षणार्थाय ध्रुवं ते वाक्यमीदृशम् ॥ २९ ॥
नायं क्लीबयितुं कालः कालो युद्धे निशाचर ।
आयुः पितामहात्प्राप्तं त्रैलोक्यं च वशीकृतम् ॥ ३० ॥
राघवं प्रणमे कस्माद्धीनवीर्यपराक्रमम् ।
गच्छ स्वशयनीयाय शश्वत्त्वं विगतज्वरः ॥ ३१ ॥
शयानं न च हन्यात्त्वां राघवो लक्ष्मणस्तदा ॥ ३२ ॥

पूर्वीं तुजसमवेत म्यां जाण । स्वर्गीं जिंतिले देवगण । तैं कां विष्णु न करी रण । आतां आंगवण त्या कैंची ॥ ७३ ॥ विष्णूस असतें विष्णुपण । तैं मजसीं न करीच रण । आतां आलें मनुष्यपण । त्यासी कुंभकर्ण भयभीत ॥ ७४ ॥ श्रीरामासीं न करवे रण । आपुला वांचवावया प्राण । रघुनाथा रिघावें शरण । भय संपूर्ण आम्हां सुचविसी ॥ ७५ ॥ क्लीब आणि दिससी लाठा । वृथा वाढलासी कागें दिवटा । हीन दीन तूं मांसमोठा । अति करंटा नपुंसक ॥ ७६ ॥ आपलिया मरणामेण । श्रीरामा रिघा म्हणसी शरण । हें तुझें भ्याडपण । मज संपूर्ण कळों सरलें ॥ ७७ ॥ आजिचा युद्धकाळ दारुण । तुवां सांडिली आंगवण । आतां जावोनि करीं शयन । अनुद्विग्न सुचित्त ॥ ७८ ॥ तुज निजलिया जाण । निद्रितासी रामलक्ष्मण । सर्वथा न मारिती जाण । निजावें आपण सुचित्त ॥ ७९ ॥ तुझी थोर आस होती देख । तिसी म्यां दिधलें तिळोदक । दावूं नको काळें मुख । जाय आवश्यक करीं निद्रा ॥ ८० ॥ दीर्घायु दिधलें ब्रह्मयांनीं । ते म्यां वश केली अवनी । तुवां निजोनि दीर्घशयनीं । केली हानि आयुष्या ॥ ८१ ॥ कुंभकर्णा भागलासी । निदसुरा तूं डुकली जासी । जाऊन करावें पूर्ण निद्रेसी । रण रामासीं मी करीन ॥ ८२ ॥

अहं रामं वधिष्यामि ससुग्रीवं सलक्ष्मणम् ।
वानरांश्च वधिष्यामि ततो देवान्महारणे ॥ ३३ ॥
विष्णुं चैव वधिष्यामि ये च तस्यानुयायिनः ।
गच्छ गच्छ स्वकं धाम चिरंजीव सुखी भव ॥ ३४ ॥
जानामि सीतां धरणीप्रसूतां
जानामि रामं मधुसूदनं वा ।
अहं हि जाने स्वयमस्य वध्य-
स्तेनाहृता मे जनकात्मजैषा ॥ ३५ ॥
न कामाच्चैव न क्रोधात्
त्यजामि जनकात्मजाम् ॥ ३६ ॥

करोनियां रणकंदन । मुख्यत्वें श्रीराम वधीन । सुग्रीव वधीन सहलक्ष्मण । वानरगण रणमारें ॥ ८३ ॥ सुरवरांच्या साह्यासी । राम आला मृत्युलोकासी । श्रीराम विष्णु सुरवरांसी । मृत्यूपासीं धाडीन ॥ ८४ ॥ सुरवरांचिया थाटी । रणीं मारीन उठाउठीं । मग लागोनि विष्णूच्या पाठीं । रिघोन वैकुंठीं मारीन ॥ ८५ ॥ जे विष्णूचे उपासक । आणि विष्णूचे सेवक । रणीं शोधशोधोनि देख । एक एक मारीन ॥ ८६ ॥ असो हे वाढिवेची कथा । कोण श्रीराम कोण ते सीता । हें मज कळलें तत्त्वतां । सावधानता अवधारीं ॥ ८७ ॥ धरणीपासाव प्रसूता । अयोनिजा सती सीता । परब्रह्मत्व रघुनाथा । मजही तत्त्वतां कळलेंसे ॥ ८८ ॥ श्रीरामाचे स्वबोधबाण । त्यांसी म्यां अर्पिला जीवप्राण । तरी सीता देवोनि आपण । श्रीरामा शरण

१ पराक्रम. २ इतराला. ३ नपुंसक. ४ पराक्रमी. ५ कावळा. ६ मांस वाढून मोठा. ७ टाकिली, त्याग केला. ८ पृथ्वीपासून. ९ मातापितरांपासून न जन्मलेली.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

रिघेंना ।। ८९ ।। अभिलाषितां जनकदुहिता । श्रीराम करील माझ्या घाता । तरी श्रीरामा अर्पून सीता । शरण रघुनाथा रिघेंना ।। ९० ।। सीता अभिलाषितां मज मरण । जाणोन केलें सीताहरण । सीता न करीं रामार्पण । न रिघें शरण श्रीरामा ॥९१॥ राज्यलोभसकामता । न सांडीं मी जनकदुहिता । श्रीराम आला सक्रोधता । तरी मी सीता सोडींना ।। ९२ ॥ देहलोभसभयता । मृत्युभय वाजतां माथां । तरी मी न सोडीं गा सीता । निजपरमार्थाचेनि लोभें ॥ ९३ ॥ ऐकें कुंभकर्णा सावधान । तुझ्या अंगीं भेडसेपण[1] । वांचवावया निजप्राण । निघावें शरण श्रीरामा ॥ ९४॥ सेवितां श्रीरामाचे पाय जाण । तुज बाधेना जन्ममरण । नित्य निर्भय व्हावया जाण । रिघावें शरण श्रीरामा ॥ ९५ ॥ सेवितां श्रीरामाचे पाय । तुज बिभीषण होईल साह्य । यालागीं तूं शीघ्र जाय । शरण लवलाहें श्रीरामा ॥ ९६ ॥ आतां जावोनि करीं शयन । कां श्रीरामा रिघें शरण । ऐसें गर्जतां रावण । कुंभकर्ण क्षोभला ॥ ९७ ॥

कुंभकर्णः पुनर्वाक्यं साश्रुपूर्णमभाषत ।
अलं राक्षसशार्दूल संतापमुपगम्य हि ॥ ३७ ॥
रोषशोकौ परित्यज्य स्वस्थो भवितुमर्हसि ।
अवश्यं तु हितं वाच्यं सर्वावस्थं महीपतिम् ॥ ३८ ॥
बंधुवादादभिहितं भ्रातुः स्नेहाच्च पार्थिव ।
सदृशं यत्तु कार्येऽस्मिन्कर्तुं स्निग्धेन बंधुना ॥ ३९ ॥
अनभिज्ञा हि शास्त्राणां बहवः पशुबुद्धयः ।
मूर्खमंत्रिगणोपेतो भ्राता मे पापबुद्धिभिः ॥ ४० ॥
वस्त्रांतेनाहरन्नाग्निं पापैर्न प्रतिषेधितः ॥ ४१ ॥

रावणाचें कठिण वचन । ऐकोनियां कुंभकर्ण । कोपे नेत्रीं अश्रुपूर्ण । तरी शांत वचन अनुवादे ॥ ९८ ॥ ऐकें सुबंधो सावधान । परापवादानुवादन[2] । तेणें तुज सुख कोण । करिसी गर्जन दशमुखें ॥ ९९ ॥ इतरांची गोष्टी कायसी । मजचि सख्या निजबंधूसी । वर्मी वाग्बाण विंधिसी । अति क्षोभेंसीं क्षोभोनी ॥ १०० ॥ विनती ऐकें दशानना । कोप आवरून मना । स्वस्थ बैसोनि सावधाना । कार्यकारणा विवंचीं ॥ १ ॥ बंधूनें बंधूच्या हितोक्ती । न पुसतां सांगाव्या भूपती । ऐसी आहे स्नेहाची जाती । तूं कां तदर्थीं[3] कोपसी ॥ २ ॥ निजबंधूचें निजहित । स्वयें सांगती कालोचित । आप्तवादें निग्रहांत । नेमून सांगत बंधुत्वें ॥ ३ ॥ बिभीषणें हित सांगतां । वृथा क्षोभलासी लंकानाथा । त्यासी हाणोनियां लाता । शरण रघुनाथा धाडिलें ॥ ४ ॥ त्याचि बिभीषणाच्या वचना । प्रतीति[4] आली दशानना । आतां करितोसी रुदना । स्वहितज्ञाना नेणसी ॥ ५ ॥ माझा बिभीषण येथें असता । तरी तो चुकविता अनर्था । ऐसें बोलसी लंकानाथा । शेखीं स्वहिता नेणसी ॥ ६ ॥ राजा रावण तूं अगाध । सहावा बंधूचा अपराध । स्वहित मानूनि विरोध । सखा बंधु दवडिला ॥ ७ ॥ स्वयें राजा तूं अज्ञान । प्रधान पशुबुद्धिसमान । रामें करितां सेतुबंधन । तैं कां विघ्न न केलें ॥ ८ ॥ सेतु बांधितां रघुनाथा । गर्वें[5] न कळलें लंकानाथा । प्रधान अति उन्मादता । कोणें स्वहिता लक्षावें ॥ ९ ॥ लावोनियां भेरी निशाण । लंके आला रघुनंदन । देखोनि वानरांचें सैन्य । आतां उद्विग्न होतसां ॥ ११० ॥ अग्नि बांधोनि वस्त्रांसी । जेंवी नेसविजे शरीरासी । तैसी दशा रावणासी । केली पापराशी प्रधानीं ॥ ११ ॥ आणितां श्रीरामपरदारा । कोणी निषेधीना लंकेश्वरा । अनुमोदून दशशिरा । पापाचारा प्रवर्तविलें ॥ १२ ॥ सीताकोपतेजानुवृत्तीं[6] । राक्षसांची शौर्यशक्ती । निःशेष[7] गेली गा भस्मांतीं । उरले दिसती निर्वीर्य ॥ १३ ॥ अभिलाषितां सीता सती । रावणाची यशःकीर्ती । अवघी जाली गा अपकीर्ती । जग निंदिती नष्टत्वें ॥ १४ ॥ रावण भोगी सीतारत्न । आम्ही रामासीं करूं रण । ऐसें बोलिले प्रधान । काळें वदन तयांचें ॥ १५ ॥ तुमची यश कीर्ति शौर्यवृत्ती । जळाली सीताक्रोधानुवृत्तीं । अवघियांची क्षीण शक्ती । रणीं मारुति न जिंकवे ॥ १६ ॥ एकला एक हनुमंत । तेणें मारिला अखया सुत । इंद्रजित करोनि हताहत । केला निःपात सैन्याचा ॥ १७ ॥ ते काळीं कपीसीं रण । करावया नाहीं आंगवण । पळाले सैन्येंसीं प्रधान । जीव घेऊन लंकेशा ॥ १८ ॥ येथें आणिली सीता सती । तुमची भस्म जाली शक्ती । रणीं न ये यश कीर्ती । जाण निश्चितीं लंकेशा ॥ १९ ॥ रावण म्हणे

१ भित्रेपणा. २ दुसऱ्यांची निंदा करणें. ३ त्यासाठीं. ४ अनुभव. ५ गर्विष्ठपणानें. ६ सीतेच्या कोपाग्नीमध्यें. ७ सर्वस्वी.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

कुंभकर्ण बंधु । किती लाविसी गंतापराधु । पुढां ओढवला युद्धसंबंधु । आला सन्नद्ध कपिभार ॥ १२० ॥ ऐकोनि रावणाचें वचन । कुंभकर्णा आलें स्फुरण । करावया रणकंदन । काय गर्जोन बोलत ॥ २१ ॥

नैवमर्हसि वक्तुं त्वं मयि जीवति पार्थिव ।
तमहं शासयिष्यामि यत्कृते परितप्यते ॥ ४२ ॥
शत्रूणां कदनं पश्य क्रियमाणं मयानघ ।
अद्य पश्य महाबाहो मया समरमूर्द्धनि ॥ ४३ ॥
हतं रामं सह भ्रात्रा द्रवंतीं कपिवाहिनीम् ।
अद्य रामस्य दृष्ट्वा त्वं मया नीतं रणे शिरः ॥ ४४ ॥
सुखी भव महाराज सीता भवतु दुःखिता ।
अद्य रामस्य निधनं पश्यंतु सुमहत्प्रियम् ॥ ४५ ॥

त्रिसत्य सत्य नारदवचन । श्रीरामबाणीं आम्हां मरण । हेंचि बोलतां आपण । दुःखी रावण होतसे ॥ २२ ॥ आम्हां अवश्य आलें मरण । दुःखी न करावा रावण । जेणें पावे सुख संपूर्ण । तैसें आपण अनुवादे ॥ २३ ॥ कुंभकर्ण म्हणे रावणा । मज जीवें जितां जाणा । तुज मी जाऊं नेदीं रणा । रघुनंदनासीं युद्धार्थी ॥ २४ ॥ मी घरचा सेवक निजबंधु । असतां स्वामीसीं युद्धसंबंधु । पडों देतां सेवक मंदु । परम बाधु सेवकत्वा ॥ २५ ॥ स्वयें करावया जाईन रणा । ऐसें न बोलावें वचना। तुझ्या शत्रूचे मर्दना¹ । मी करीन लंकेशा ॥ २६ ॥ ज्याचा धाक अहोरातीं । नित्य वाहसी लंकापती । ते म्यां मारिले रणख्याती । मानीं निश्चितीं लंकेशा ॥ २७ ॥ राम लक्ष्मण निधडे दोनी । मी मारीन रणांगणीं । मारीन वानरांच्या श्रेणी³ । रणभंगाणी⁴ कपिकुळा ॥ २८ ॥ रणीं मारिले राम सौमित्र । हें बोलणें अनुमानकर । दोहींचें देईन आणूनि शिर । तरी मी साचारें सेवक ॥ २९ ॥ आणिल्या श्रीरामाचें शिर । सुखी होईल दशशिर । दुःखी होईल सीता सुंदर । ऐसा रणमार करीन ॥ १३० ॥ रणीं पाडिले राम सौमित्र । स्वर्गी देखती सुरवर । भूतळीं देखती नर किन्नर । ऐसा रणमार करीन ॥ ३१ ॥

अद्य रामं ससौमित्रिं ससुग्रीवं समारुतिम् ।
सर्वानिकायने हन्मि प्रतिज्ञा मे तवाग्रतः ॥ ४६ ॥

गर्जोनि बोले कुंभकर्ण । आजिचें माझें मुख्य रण । शत्रु मारोनि संपूर्ण । आंगवण दावीन मी ॥ ३२ ॥ श्रीराम आणि लक्ष्मण । अंगद सुग्रीव हनुमान गहन । अवघे मारीन वानरगण । एकला जाण मी एक ॥ ३३ ॥ रणप्रवीण दोघे येथ । सौमित्री आणि रघुनाथ । त्यांसीं भिडेन रणाआंत । जंव पुरुषार्थ पुरे त्यांचा ॥ ३४ ॥ दोघे मारून रणाआंत । वानर भक्षीन समस्त । सुग्रीव अंगद हनुमंत । लोणच्यार्थ खाईन ॥ ३५ एकला एक मी आपण । ऐसें करीन रणकंदन । रावणा वाहतों तुझी आण⁶ । परम प्रमाण हें माझें ॥ ३६ ॥ म्हणसी ऐसें कोणे काळीं । आजचि आतां ये वेळीं । मर्दूनि शत्रूंची समफळी । तुजजवळी येईन ॥ ३७ ॥ सायुध सज्ज सन्नद्ध जाण । युद्धा निघतां कुंभकर्ण । मंदोदरी आली आपण । रणकंदन वारावया ॥ ३८ ॥ युद्धा जातां कुंभकर्ण । क्षणार्धे राम घेईल प्राण । रणीं निमाल्या कुंभकर्ण । शिष्टाई पूर्ण चालेना ॥ ३९ ॥ श्रीरामासीं करितां रण । अवश्य मरेल कुंभकर्ण । रावणातें निवारावया जाण । आली आपण मंदोदरी ॥ १४० ॥ एका जनार्दना शरण । पुढें गोड निरूपण । मंदोदरी आणि रावण । अनुवादन निजगुह्य ॥ ४१ ॥ स्त्रीपुरुषांचा एकान्त । विवादामाजी परमार्थ । बाप लाघवी रघुनाथ । वैरियां देत सायुज्य ॥ १४२ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां रावणकुंभकर्णसंवादो नाम द्वाविंशतितमोऽध्यायः ॥ २२ ॥ ओंव्या ॥ १४२ ॥ ॥ श्लोक ॥ ४६ ॥

अध्याय तेविसावा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ सन्नद्ध⁷ बद्ध सायुध पूर्ण । युद्धा निघतां कुंभकर्ण । काय बोलिला गर्जोन । एकला मारीन अवघ्यांतें ॥ १ ॥ रामलक्ष्मणां करीन घात । वानर भक्षीन समस्त । अंगद सुग्रीव हनुमंत । फळशाकार्थ¹¹ गिळीन

१ होऊन गेलेल्या गोष्टींबद्दल दोष. २ नाशाला. ३ समुदाय. ४ युद्धांत पराजय. ५ खरोखर. ६ शपथ.

७ बोलणें, भाषण. ८ मोठा. ९ कुशल. १० तयार. ११ फळें किंवा भाजी म्हणून.

CC-0. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ २ ॥ ऐकोनि कुंभकर्णगर्जन । रावणा आलें अति स्फुरण । नगरीं त्राहाटिलें निशाण । युद्धा आपण निघावया ॥ ३ ॥

कुंभकर्णवचः श्रुत्वा रावणो लोकरावणः ।
गंतुमैच्छदतिक्रोधः सर्वसैन्येन संवृतः ॥ १ ॥
संग्राममभिकांक्षंतं रावणं श्रुत्य भामिनी ।
तत्रोत्थाय ततो देवी नाम्ना मंदोदरी तथा ॥ २ ॥
माल्यवंतं करे गृह्य यूपाक्षसहिता तथा ।
मंत्रिभिर्मंत्रतत्त्वज्ञैस्तथान्यैर्मंत्रिसत्तमैः ॥ ३ ॥
छत्रेणाध्रियमाणेन अतिकायपुरःसरा ।
चामरैर्वीज्यमानैश्च वीज्यमाना स्वलंकृता ॥ ४ ॥
सेवार्थं मार्गविपुलं ध्वजमाल्योपशोभितम् ।
उत्सारणं प्रकुर्वद्भिर्वेत्रझर्झरपाणिभिः ॥ ५ ॥

रणीं त्राहाटूनि निशाण । युद्धा निघतो दशानन । हें मंदोदरीनें ऐकोन । आली आपण अति शीघ्र ॥ ४ ॥ सालंकृत मनोहर । मस्तकीं शोभे शशांकच्छत्र । ढळताहे युग्मचामर । चाले सुंदर गडगजें ॥ ५ ॥ माल्यवंत आणि यूपाक्ष । आणीक मंत्री मंत्रदक्ष । विवेकवंत जाणिजे मुख्य । ते ते सकळिक सांगातें ॥ ६ ॥ सवें सखियांचा समाज । मार्गशोभा पुष्पध्वज । रामपत्नीची गमनवोज । दावीत सहज स्वयें चाले ॥ ७ ॥ मार्ग संकुळितां निवार । करावया वेत्रपाणी वीर । वेत्रनादांचा झणत्कार । तेणें समग्र दूर पळती ॥८॥ अतिकाय जो रावणपुत्र । तेणें येवोनि धरिलें छत्र । देवांतक नरांतक कुमर । युग्मचामर ढाळिती ॥ ९ ॥ जें सतीत्वाचें निजभूषण । जें रावणराजाचें मंडण । ते मंदोदरी आपण । सभास्थान पावली ॥ १० ॥

प्रविवेश सभां दिव्यां प्रभया द्योतमानया ।
प्राप्तां देवीं ततो राजा प्रियां मंदोदरीं तदा ॥ ६ ॥
दृष्ट्वा ससंभ्रमस्तूर्णं परिष्वज्य दशाननः ।
किमागमनकृत्यं ते देवि शीघ्रं तदुच्यताम् ॥ ७ ॥
तूर्णं मम समीपं तु किमर्थं त्वमिहागता ।
मन्त्रिभिः सहिता किं तु ब्रूहि साध्वि यथातथम् ॥८॥

मंदोदरी शोभायमान । प्रवेशली सभास्थान । तिसी देखोनि दशानन । दे आलिंगन अति प्रीतीं ॥ ११ ॥ रत्नपर्यंकीं आपणापासीं । बैसवोनि निजप्रियेसी । कोण कार्या तूं आलीसी । तें मजपासीं शीघ्र सांगें ॥ १२ ॥ प्रधानांसहित सपुत्र । येथें आलीस अति सत्वर । यथातथ्य जो विचार । तो सांग समग्र मजपासीं ॥ १३ ॥ कोण कार्योद्देशासाठीं । तूं आलीस माझिया भेटी । ते सांगावी गुह्य गोष्टी । प्रीती मोठी मज तुझी ॥१४॥

एवमुक्ता तु राजानं प्रिया वचनमब्रवीत् ।
विश्वस्य शृणु राजेंद्र याचे त्वाहं कृतांजलिः ॥ ९ ॥
श्रुता मे नगरी रुद्धा श्रुता मे राक्षसा हताः ।
धूम्राक्षसहिता वीराः प्रहस्तेन सहैव तु ॥ १० ॥
भवान्वै युद्धकामश्च निर्गंतु कृतनिश्चयः ।
इति संचिंत्य राजेंद्र ममागमनकारणम् ॥ ११ ॥

सत्य सांग वो सुंदरी । आलीस कोणँ कार्यावरी । रावणें पुसतां अत्यादरीं । स्वयें मंदोदरी अनुवादे ॥ १५ ॥ कर जोडून तुम्हांप्रती । बहुतां दिवसां करितें विनंती । अवधारोनियां भूपती । माझी वचनोक्ती करावी ॥ १६ ॥ स्त्रियेचें वचन केवळ ममता । तैसें नव्हे गा लंकानाथा । जें उपयोगी अर्थस्वार्था । जें परमार्था पावन ॥ १७ ॥ समुद्रीं तारोनि पाषाण । लंकेसी आले राम लक्ष्मण । वानरीं रोधिलें लंकाभवन । हें अपूर्व देखोन मी आलें ॥ १८ ॥ वानरीं व्याप्त लंकाभवन । रणीं मारिले राक्षस गहन । धूम्राक्ष आणि अकंपन । मुख्य प्रधान प्रहस्त ॥ १९ ॥ त्यांचे संगतीं थोर थोर । रणीं पडले निशाचर । एकही न मरेचि वानर । युद्ध दुर्धर करितांही ॥ २० ॥ प्रहस्तादि वीर दारुण । कडकडाटें करितां रण । नाहीं उठले राम लक्ष्मण । वानरीं भिडोन मारिले ॥ २१ ॥ प्रहस्त एवढा वीर गहन । नीळें मारिला न लागतां क्षण । येरां राक्षसांसी जाण । केलें कंदन वानरीं ॥ २२ ॥ राक्षसां करावया घात । मूळीं लागला हनुमंत । जो जो येतो युद्धाआंत । त्याचा निःपात करीतसे ॥ २३ ॥ ऐसें जाणोनि संपूर्ण । श्रीरामासीं करावया रण । केंवी निघतां आपण । मुख्यत्वें प्राण द्यावया ॥ २४ ॥ काल श्रीरामें रणांगणीं । सोडिलासी जीवदानीं । तें

१ वाजविलें. २ चंद्राप्रमाणें शुभ्रवर्णाचें छत्र. ३ बरोबर. ४ चालण्याची पद्धती. ५ गर्दी मोडण्यासाठीं. ६ भालदार. ७ काय काम योजून. ८ मोठे बलवंत. ९ इतर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

नाठवे तुझ्या मनीं । पुढें मरावया रणीं धांवसी ॥ २५ ॥

न त्वं युक्तं प्रमुखतः स्थातुं तस्य महात्मनः ।
राघवस्य ससौमित्रेर्यस्य नास्ति समो युधि ॥ १२ ॥
न च मानुषमात्रोऽस्ति रामो दशरथात्मजः ।
एकेन येन वै पूर्वं बहवो राक्षसा हताः ॥ १३ ॥

श्रीरामासीं संमुख । राहूं न शके दशमुख । रामप्रताप अलोलिक । राक्षसांतक श्रीराम ॥२६॥ ताटिका मारिली बाळपणीं । मारीच उडविला बाणपिसारेनीं । सुबाहु मारिला यज्ञस्थानीं । राक्षसश्रेणींसमवेत ॥ २७ ॥ रामें हरचाप भंगून। सभेमाजी दशानन । यथेष्ट पावला अपमान । श्रीरामेंसीं रण तुम्हां न टिके ॥ २८ ॥ येच सीतेच्या अभिलाषमेळीं । विराध मारिला आतुर्बळी । एकबाणें केली होळी । वनसमेळीं श्रीरामें ॥ २९ ॥ शूर्पणखा करितां छळण । तिचे घेतले नाक कान । तिच्या कैवारालागीं जाण । केलें कंदन राक्षसां ॥ ३० ॥ एकला पदाति श्रीरामचंद्र । मारिले त्रिशिरा दूषण खर । चवदा सहस्र निशाचर । रामें समग्र मारिले ॥ ३१ ॥ मारीच लागला मृगसमेळीं । कबंध छेदिला बाहुमेळीं । बाणें एकें छेदिला वाळी । जो आतुर्बळी तिहीं लोकीं ॥ ३२ ॥ तुम्ही उद्विग्न वाळिभेण । त्याचा श्रीरामें घेतला प्राण । त्या श्रीरामासीं करावया रण । आंगवण तुम्हां कैंची ॥३३॥ समुद्रीं तारोनि पाषाण । लंके आणिले वानरगण । श्रीराम मनुष्य नव्हे जाण । अवतार पूर्ण परब्रह्म ॥ ३४ ॥ सीता देवोनि त्रिशुद्धी । रामासीं करावा संधी । श्रीरामेंसीं रणसमृद्धी । विजयसिद्धी तुम्हां नाहीं ॥३५॥

प्रहस्तेन कृतं किंचिद्युध्यता राक्षसे बले ।
धूम्राक्षेण च राजेंद्र नित्यं समरगाहिना ॥ १४ ॥
महाकायेन च तथा महामायेन राक्षस ।
अकंपनेन वीरेण युध्यता राक्षसेश्वर ॥ १५ ॥
तथा तैर्युध्यमानैश्च किं कृतं वानरे बले ।
न हतो यूथपः कश्चिद्बलाद् द्वेषेण रावण ॥ १६ ॥
येषां नास्ति समो वीर्ये ते हता वानरैर्युधि ।
न चापि वानराः शक्या हंतुं पादपयोधिनः ॥१७॥

रावणबळेंसीं समान । नानानिगें वीरसैन्य । युद्धा जावोनि प्रहस्त प्रधान । काय आंगवण तेणें केली ॥ ३६ ॥ रणीं एकही वानरगण । प्रहस्तें न मारितांचि जाण । वानरीं त्याचा घेतला प्राण । सैन्य संपूर्ण मारूनी ॥ ३७ ॥ प्रहस्ताची ऐसी गती । धूम्राक्ष रणगर्वार्थी । नित्य कुंथे रणोन्मत्तीं । तोही कपिहस्तीं निमाला ॥ ३८ ॥ महाकाय महामाय । रणप्रवीण उभवोनि बाहे । लागतां वानरघाये । आक्रंदें पाहें निमाले ॥ ३९ ॥ ज्याचेनि बळें दशानन । कळिकाळा न गणी आपण । वीर दुर्धर अकंपन । रिपुभंजन रणमर्दी ॥ ४०॥ तोही वानरीं युद्ध करितां । मारिला पाणी न मागतां । विजय घेवोनि लंकानाथा । कोणी मागुता न येचि ॥४१॥ हे तंव वीर अति दारुण । युद्ध करितां अतिसत्राणें । नुठतां राम लक्ष्मण । वानरींच जाण मारिले ॥ ४२ ॥ वानरीं मारिले वीर सप्राण । अवघे राक्षस करितां रण । एकही न मरेचि वानरगण । राम रक्षण वानरां ॥ ४३ ॥ रणीं राक्षस निःशेष मरती । एकही न मरे कपिपती । श्रीराम पूर्ण अवतारमूर्ती । वानरार्थी रक्षिता ॥ ४४ ॥

रक्ष्यमाणास्तु रामेण सुग्रीवेण च पालिताः ।
तत्र ते रोचतां संधिः सह रामेण रावण ॥ १८ ॥
तस्य देवर्षयः सर्वे गन्धर्वाश्च जयैषिणः ।
विरोधं मा गमस्तेन संधिस्ते तेन रोचताम् ॥१९॥
रामभार्या सती ह्येषा रामाय प्रतिदीयताम् ।
विभीषणेन चैवोक्तं पूर्वमेव महात्मना ॥ २० ॥
गतस्तत्रैव रामश्च तद्वचोयं करिष्यति ॥ २१ ॥

वानरांसीं करावया सळ । राक्षसांमाजी नाहीं बळ । कपि मारिती राक्षसदळ । संग्रामीं प्रबळ भिडोनी ॥ ४५ ॥ रणीं निमतां निशाचर । एकही न मरेचि वानर । कपिरक्षिता रामचंद्र । पूर्ण अवतार परब्रह्म ॥४६॥ सुग्रीव पाळी वानरभार । सुग्रीवा पाळी श्रीरामचंद्र । श्रीरामबळें वानर । अजरामर निजविजयी ॥ ४७ ॥ ज्याचेनि विजयी वानर । त्यासी करावें नित्य मित्र । सखा करावा श्रीरामचंद्र । सीता सुंदर अर्पूनी ॥ ४८ ॥ तेथें आहे बिभीषण । तो संधि करील संपूर्ण । सीता

१ शंकराचें धनुष्य. २ इच्छेनें. ३ नाश. ४ पायीं चालणारा. ५ मैत्री. ६ नामांकित. ७ अति नेटानें. ८ वैर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

देवोनि आपण । रिघावें शरण श्रीरामा ॥ ४९ ॥ श्रीरामा रिघाल्या शरण । सकळ कुळासी कल्याण। तुमचें चुकलें मरण । कुंभकर्ण वांचेल ॥ ५० ॥

तस्यास्तु वचनं श्रुत्वा प्रियाया राक्षसेश्वरः ।
उष्णं दीर्घं च निःश्वस्य निरीक्ष्य च सभासदान् ॥२२॥
त्वया हि हितकांक्षिण्या वचो यद्बहुभाषितम् ।
न तन्मनसि मे देवि यत्प्रोक्तं वै प्रियं प्रिये ॥ २३ ॥
देवाञ्जित्वा रणे पूर्वं ससुरासुरमानवान् ।
प्रणमे मानुषं कस्माद्वानरान्यः समाश्रितः ॥ २४ ॥
हस्ते मन्दोदरीं गृह्य वाचमेतदुवाच ह ।
न तु संधिं करिष्यामि राघवेण सहैव तु ॥ २५ ॥
वैदेहीं नार्पयिष्यामि न करिष्यामि संनतिम् ॥ २६ ॥

ऐकोनि मंदोदरीचें वचन । रावणासी पडिलें मौन । उगाचि राहिला आपण । अति उद्विग्न अनुतापी ॥ ५१॥ जिंतले सुरासुर दानव । पादाक्रांत केलें विश्वं । राम जाणे रणलाघव । तरी राघव वंदींना ॥ ५२ ॥ निधडा नव्हे श्रीरघुनाथ। केवळ वानरांचा आश्राइत। त्यासी मी वंदीं लंकानाथ । तरी जगांत जघन्यं ॥ ५३ ॥ रणीं जातांही माझा प्राण । सीता देवोनि आपण । श्रीरामासी न रिघें शरण। सत्य भाषण हें माझें ॥५४॥ मंदोदरी धरोनि हातीं । रावणें नेली एकांतीं । जीवींची जे निजगुह्योक्ती। स्वयें तीप्रति सांगत ॥५५॥ शरण रिघा म्हणे बिभीषण । तैसेंचि सांगत कुंभकर्ण । आणीकही बहुसाल जन । रिघावें शरण तूं म्हणसी ॥ ५६ ॥ मी कां नायकें आपण । तेही अर्थीचें कारण। तें तूं ऐक सावधान । माझें ज्ञान हृदयस्थ ॥ ५७ ॥ म्यां अभिलाषिली सीता सती। अन्यत्र मरण नरकप्राप्ती । श्रीरामहस्तें अंतगती । सायुज्यमुक्ति सहजचि ॥ ५८ ॥ लागोनि श्रीरामाचा बाण । रणीं माझा गेलिया प्राण । तेव्हांच मी ब्रह्म पूर्ण । जन्ममरण मग कैंचें ॥ ५९ ॥ पंचवटीं रामासंमुख जातां । मीच पावतों सायुज्यता । सकळकुळउद्धारणार्था । आणिली सीता चोरोनी ॥ ६० ॥ अंतीं राम राम स्मरतां। रंक पावे सायुज्यता । श्रीरामहस्तें स्वयें मरतां। ब्रह्मपूर्णता पावेन ॥ ६१ ॥ लागोनि श्रीरामाचा बाण । जों माझा जाय प्राण । तों सीता न सोडीं आपण । सत्य भाषण हें माझें ॥ ६२ ॥ लागतां श्रीरामाचा बाण। माझ्या जन्ममरणासी ये मरण। मी होईन ब्रह्म परिपूर्ण । हें मज ज्ञान नारदोक्तें ॥ ६३ ॥ यालागीं श्रीरामा न रिघें शरण । न वंदीं श्रीरामाचे चरण । यालागीं संदेहं न मानीं जाण । नारदवचनविश्वासें ॥ ६४ ॥ जरी तूं पतिव्रता लांठी । तरी हे माझी गुह्य गोष्टी। कोठें न वदावी वाक्पुटीं। राखावी पोटीं अति गुह्य ॥ ६५ ॥ एका जनार्दना शरण । मंदोदरी सुखसंपन्न । वंदोनि रावणाचे चरण । निघे आपण निजधामा ॥ ६६ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां रावणमंदोदरीसंवादो नाम त्रयोविंशतितमोऽध्यायः ॥ २३ ॥ ओंव्या ॥ ६६ ॥ श्लोक ॥ २६ ॥

अध्याय चौविसावा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ श्रीरामँपदांबुजीं नित्य न्हातां । श्रीरामकीर्ती अखंड गातां । श्रीरामरूपीं मन वसतां । श्रीरामता उन्मनेंसीं ॥ १ ॥ मंदोदरीचिया भवनासी । स्वभावें आला धर्मऋषी । तिणें पूजोनियां त्यासी । अत्यादरेंसीं पूसिलें ॥ २ ॥ नारदमुनीच्या वचनासी । परम विश्वास रावणासी । हे पूर्व कथा जाली कैसी। विदित तुम्हांसी तरी सांगा ॥ ३ ॥ ऋषि म्हणे मी स्वधर्मता । जाणें भूतभविष्यार्था । तुझ्या प्रश्नाची निजकथा । सावधानता अवधारीं ॥ ४ ॥ पूर्वीं भेटी सनत्कुमारांसीं। त्यांच्या वचनार्था श्रद्धेसीं। तेंचि पुसतां नारदापासीं । जाला विश्वासी परमार्थी ॥ ५ ॥ परी विरोधें घ्यावी मुक्ती । हेचि आवडी रावणाचे चित्तीं । विरोध करावयाची स्थिती । ऐक तुजप्रती सांगेन ॥ ६ ॥

पुरा कृतयुगे नाम प्रजापतिसुतं प्रभुम् ।
सनत्कुमारमासीनं रावणो राक्षसाधिपः ॥ १ ॥
सदृशं सूर्यसंकाशं ज्वलंतमिव तेजसा ।
विनयावनतो भूत्वा ह्यभिवाद्य कृतांजलिः ॥ २ ॥
उक्तवान्रावणो राजा तमृषिं सत्यवादिनम् ।
को ह्यस्मिन्प्रवरे लोके देवानां बलवत्तरः ॥ ३ ॥

---

१ सर्व सृष्टि. २ युद्धकुशलता. ३ निंद्यता, कमीपणा. ४ चवथी मुक्ति. ५ संशय. ६ मोठी. ७ श्रीरामाच्या पदकमलीं.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

यं समाश्रित्य विबुधा जयंति समरे रिपून् ।
कं यजंति द्विजा नित्यं कं ध्यायंति च योगिनः ॥ ४ ॥
एतन्मे शंस भगवन्विस्तरेण तपोधन ॥ ५ ॥

रावण बैसोनि विमानीं । स्वभावें जातां गगनीं । सनत्कुमार देखिले नयनीं । देदीप्यमान तेजस्वी ॥ ७ ॥ जयांचिया अंगप्रभा । रविसोमांची हरिली आभा । रात्रिदिवसांची लोपली शोभा । सच्चिद्राभा तेजस्वी ॥ ८ ॥ ऐसे ते तेजस्वी सदोदित । ब्रह्मयाचे मानससुत । रावणें देखिले अकस्मात । जाला विस्मित मानसीं ॥ ९ ॥ कृतयुगाचे परम प्रीतीं । सनत्कुमार तेजोमूर्ती । ते भेटले लंकापती । ऐक उपपत्ती तयांची ॥ १० ॥ श्रद्धायुक्त स्वयें रावण । घालोनियां लोटांगण । मस्तकीं वंदोनियां चरण । विनीत[1] प्रश्न पूसत ॥ ११ ॥ ब्रह्मयाचा नातू आपण । माझें नांव पैं रावण । कृपा करोनि संपूर्ण । पुसतों प्रश्न सांगावा ॥ १२ ॥ द्विज कोणाचें करिती यजन । योगी कोणाचें धरिती ध्यान । भक्त कोणाचें करिती भजन । तुम्हांसी चिंतन कोणाचें ॥ १३ ॥ कोणाचे बळें देवगण । रणीं करिती रिपुदलन । ऐसा बलवत्तर कोण । कृपा करून सांगावें ॥ १४ ॥ तुमचे गांठीं तपोधन । भगवद्भाव सनातन । त्याचें श्रेष्ठ महिमान । चरणां शरण सुरश्रेष्ठ ॥ १५ ॥ शिव विष्णु शक्र ब्रह्मा । त्रिपदा गायत्री उमा रमा । चरणा शरण येती तुम्हां । तपाचा महिमा अगाध ॥ १६ ॥ तपोधना भीती सुरासुर । तपोधना भीती यक्ष किन्नर । तपोधना देखोनि समोर । स्वयें हरिहर वंदिती ॥ १७ ॥

विदित्वा हृद्गतं तस्य ध्यानदृष्टिर्महायशाः ।
उवाच रावणं प्रेक्ष्य श्रूयतामिति पुत्रक ॥ ६ ॥
यो वै भर्ता जगत्कृत्स्नं यस्योत्पत्तिं न विद्महे ।
सुरासुरैर्नतो नित्यं हरिर्नारायणः प्रभुः ॥ ७ ॥
येन सर्वमिदं सृष्टं विश्वं स्थावरजंगमम् ।
तं समाश्रित्य विबुधा विधिना हरिमध्वरे ॥ ८ ॥
पिबंति ह्यमृतं चैव मानवाश्च यजन्ति तम् ।
ध्यायंति योगिनो नित्यं क्रतुभिश्च यजन्ति तम् ॥ ९ ॥

दैत्यदानवरक्षांसि ये चान्ये वामरद्विषः ।
सर्वाञ्जयति संग्रामे सदा सर्वैः सुपूज्यते ॥ १० ॥

रावणाचें मनोगत । ध्यानदृष्टीं समस्त । जाणोनियां ते संत । मग सांगत प्रश्नातें ॥ १८ ॥ नाहीं आदि मध्य निधन । जो सदोदित सनातन । तो स्वामी श्रीनारायण । ज्यासी त्रिभुवन सदा वश्य ॥ १९ ॥ ज्यासी वंदिती सुरासुरगण । ज्याचें योगी करिती ध्यान । यज्ञीं यजिती ज्या ब्राह्मण । तो स्वामी नारायण सर्वांचा ॥ २० ॥ जो विश्व सृजी संपूर्ण । जो अंगें विश्व आपण । ज्याचेनि बळें सुरगण । अमृतपान करिताती ॥ २१ ॥ ज्याचिया गा निजस्थितीं । तिळभरी वाट नाहीं रिती । जो कोंदलासे त्रिजगतीं । जो सर्वां भूतीं संबाह्य ॥ २२ ॥ ऐसा जो कां जगत्स्वामी । जो कां वंद्य आगमनिगमीं[11] । ज्याचेनि बळें सुरोत्तमीं । रिपु संग्रामीं निर्दळिले ॥ २३ ॥ ज्याचेनि आश्रयें नर । यक्ष राक्षस किन्नर[12] । रणीं जिंकिती सुरासुर । तो स्वामी साचार स्वयें विष्णु ॥ २४ ॥ नामीं रत जे पुरुष । ते स्वप्नीं न देखती अपेश । त्रिभुवनीं न माये यश । हृषीकेश निजस्वामी ॥ २५ ॥ इंद्रियां प्रेरिता वारिता । ऐसी ज्याची निजसत्ता । हृषीकेश तो तत्त्वतां । साह्य निजभक्तां सर्वार्थीं[13] ॥ २६ ॥ जनीं जनार्दन निजीं निज । जनीं जनार्दन सहजीं सहज । जनीं जनार्दन भजनीं भज्य । सर्वार्थीं पूज्य जनार्दन ॥ २७ ॥ ऐकोनि ऋषीचें वचन । अति विनीत प्रीतीं प्रश्न । स्वयें पुसत रावण । वंदून चरण ऋषीचे ॥ २८ ॥

श्रुत्वा महर्षेस्तद्वाक्यं रावणो राक्षसाधिपः ।
उवाच प्रणतो भूत्वा पुनरेव महामुनिम् ॥ ११ ॥
दैत्यदानवरक्षांसि ये हताः समरे सुराः ।
कां गतिं प्रतिपद्यंते किंवा ते हरिणा हताः ॥ १२ ॥
रावणस्य वचः श्रुत्वा प्रत्युवाच महामुनिः ।
दैवतैर्निहता नित्यं प्राप्नुवंति नभस्तलम् ॥ १३ ॥
पुनस्तस्मात्परिभ्रष्टा जायंते वसुधातले ।
पूर्वार्जितैश्च सुकृतैर्जायंते च म्रियंते च ॥ १४ ॥

---

१ कांति. २ शेवटीं. ३ नम्र होऊन. ४ इंद्र. ५ पार्वती. [illegible] मृत्यु. ७ अनादिसिद्ध. ८ देवांचें आणि राक्षसांचे समुदाय. ९ निर्माण करितो. १० आंत आणि बाहेर. ११ वेदशास्त्रांमध्यें, १२ गंधर्व, १३ सर्व कार्यांत.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

ये ये हताश्चक्रधरेण राजन्
त्रैलोक्यनाथेन जनार्दनेन ।
ते ते गतास्तन्निलयं नरेंद्र
क्रोधोऽपि देवस्य वरेण तुल्यः ॥१५॥

परम श्रद्धा अति प्रीतीं । रावण पुसे मुनीप्रती । सुरासुरांतें मारिती । त्यांसी कोण गती मज सांगा ॥ २९ ॥ जे कां श्रीविष्णूच्या हातीं । निधडे वीर रणीं पडती । त्यांसी होय कोण गती । तेंही मजप्रती सांगावें ॥ ३० ॥ ऐकोनि रावणाचा प्रश्न । सनत्कुमार स्वयें आपण । सांगे ते गतीचें लक्षण । सावधान अवधारा ॥ ३१ ॥ सुरवरहस्तें जे मरती । त्यांसीं स्वर्गपंथ ऊर्ध्वगती । क्षीणपुण्यें तेथोनि रिचवती[1] । माघारे येती गर्भवासा ॥ ३२ ॥ गर्भवासाचें सांकडें । अतिशयेंसीं दुःख गाढें । रावणा तें मी सांगेन तुजपुढें । निजनिवाडें अवधारीं ॥ ३३ ॥ केवळ रजस्वलेचें रुधिर । माजी पित्याचें रेत मात्र । तें हें विटाळाचें शरीर । अपवित्र निंद्यत्वें ॥ ३४ ॥ मातेचिया उदरकुहरीं[2] । विष्ठामूत्रांचे दाथरावरी[3] । जठराग्नीमाझारीं । नवमासवरी उकाडा ॥ ३५ ॥ गर्भवासाचें दुःख गाढें । विष्ठालेप[4] चहूंकडे । नाकीं तोंडीं रिघती किडे । कोणापुढें सांगेल ॥ ३६ ॥ देखोनि गर्भीची आटकें[5] । जीव अनुतापें करी शंख । विषयसुखगर्भीचें दुःख । आक्रंदें हांक स्वयें मारी ॥ ३७ ॥ विषयांपासीं जन्ममरण । विषयें गर्भदुःख दारुण । विषयसुख ते नागवण[6] । विषय ते जाण महामैंद[7] ॥ ३८ ॥ विषय देहदरीचा वाघ । विषय विश्वासी मारक मांग । विषय तोचि सर्वांगदाघ[8] । विषय सांग महावैरी ॥ ३९ ॥ गर्भवासापुढें देख । अंधतामिस्र महानरक । ते तंव बापुडे मशक । परमदुःख गर्भवासीं ॥ ४० ॥ जे देवांचेनि हातें मरती । ते ते पडती दुःखावर्तीं । स्वर्गसंसारआवर्तीं । जन्म भोगिती अविश्रम ॥ ४१ ॥ विष्णूचे हातें जे जे मरती । तयां सद्यः ब्रह्मप्राप्ती । सायुज्यादि चारी मुक्ती । शरण येती तयांतें ॥ ४२ ॥ चक्रधर जो जनार्दन । त्याचेनि हातें सभाग्य मरण । अभाग्या नाठवे नामस्मरण । मग दर्शन तें कैंचें ॥ ४३ ॥ क्रोध आणि सुप्रसन्न । विष्णूच्या ठायीं दोनी समान । भक्ता आणि वैरिया जाण । समान दान ब्रह्मसायुज्य ॥ ४४ ॥ ऐकोनि ऐसें रावण । अतिशयें विस्मयापन्न । अति श्रद्धें उल्लासोन । पुढती प्रश्न पूसत ॥ ४५ ॥

श्रुत्वा ततस्तद्वचनं निशाचरः
सनत्कुमारस्य मुखाद्विनिर्गतम् ।
तथा प्रहृष्टः स बभूव विस्मितः
कथं नु यास्यामि हरिं महाहवे ॥ १६ ॥
एवं चिंतयतस्तस्य रावणस्य दुरात्मनः ।
पुनरेवापरं वाक्यं व्याजहार महामुनिः ॥ १७ ॥
मनश्चोत्कंठितं यत्ते भविष्यति तदाहवे
सुखी भव महाबाहो कंचित्कालमुदीक्षय ॥ १८ ॥

विष्णूचेनि हातें मरण । तें ब्रह्मसायुज्य कृतकल्याण । मुनिमुखें ऐकोनि रावण । सुखसंपन्न स्वयें जाला ॥ ४६ ॥ ऐसा सभाग्य काळ कोण । मज विष्णूसीं घडे रण । विष्णुहस्तें जाय माझा प्राण । स्वयें रावण हेंचि वांच्छी ॥ ४७ ॥ श्रीविष्णूसीं करितां रण । केव्हां जाईल माझा प्राण । हेंचि वांच्छी स्वयें रावण । आवडी गहन[9] युद्धाची ॥ ४८ ॥ श्रीविष्णूसीं महारण । स्वयें पावेल रावण । ऐसें बोलिले मुनिगण । तेथें विलंबन काळाचें ॥ ४९ ॥ यथाकाळें पावे रण । तंव प्रतीक्षा[10] करावी[11] आपण । पुढें युद्ध अति दारुण । अलोट जाण होईल ॥ ५० ॥ जैसें तुझें मनोगत । तैसें युद्ध करील रघुनाथ । हें ऐकोनि लंकानाथ । उल्लासित स्वयें जाला ॥ ५१ ॥ करोनियां प्रदक्षिणा । लागोनि मुनीच्या चरणा । रावण निघे ब्रह्मसदना । मुनि अनुष्ठाना स्वयें गेले ॥ ५२ ॥ श्रीविष्णूसीं महारण । कैं मी देखेन आपण । ऐसें अहोरात्र जाण । करी ध्यान युद्धार्थी ॥ ५३ ॥

ब्रह्मलोकान्निवर्ततं समासाद्य महामुनिम् ।
उवाच हृष्टमनसा नारदं रावणस्तदा ॥१९॥
आब्रह्मभुवनाल्लोकास्त्वया दृष्टा ह्यनेकशः ।
कस्मिँल्लोके महाभाग मानवा बलवत्तराः ॥ २० ॥

---

१ पडतात. २ उदररूपी गुहेंत. ३ उकाड्यांत. ४ नरकाची लिंपण. ५ अडथळा, प्रतिबंध. ६ फसवणूक. ७ अति दुष्ट. ८ सर्वांगास जाळणारा अग्नि. ९ ईश्वराशीं अभेद करून देणारी सायुज्यता मुक्ति. १० मोठी, ११ वाट [illegible]

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

तान्ममाख्याहि धर्मज्ञ पिता मे त्वं हि धर्मतः ।
चिंतयित्वा मुहूर्तं तु नारदः प्रत्युवाच तम् ॥ २१ ॥
श्रूयतां सर्वमाख्यास्ये तव राक्षसपुंगव ॥ २२ ॥

ब्रह्मभवनाहूनि रावण । परतोनि येतां आपण । झालें नारदाचें दर्शन । तेणें दशानन आल्हादी ॥५४॥ रावण म्हणे मी सफळितार्थ । नारदमुनि भेटला येथ । याचेनि माझे मनोरथ । कृतकृत्यार्थ मुनिवाक्यें ॥ ५५ ॥ ऐसें बोलोनि आपण । रावण घाली लोटांगण । वंदोनि नारदाचे चरण । आदरें प्रश्न पूसत ॥५६॥ आब्रह्मभुवन लोक । स्वामींनीं देखिले अशेख । मजसीं युद्ध करावया देख । बळी पुरुष आहे कोणी ॥ ५७ ॥ माझिया भुजांचें त्राण । पुरे ऐसें करावया रण । सृष्टीमाजी बळिया कोण । त्याचें लक्षण मज सांगा ॥ ५८ ॥ त्याची कैसी कैसी स्थिती । त्याची कैसी कैसी गती । त्याची अवयवआकृती । यथानिगुतीं मज सांगा ॥ ५९ ॥ ऐसा रावणें पुसतां प्रश्न । नारद अंतर्यामीं आपण । जाणोनि हृदयस्थ संपूर्ण । त्याचेंचि लक्षण अनुवादे ॥६०॥ रावणा आवडी तुझी पूर्ण । मुख्य देवासीं करावें रण । त्याचें द्विविध लक्षण । सगुणनिर्गुणविभागें ॥ ६१ ॥ सगुण निर्गुण विभागोन । तें मी सांगेन विवंचून । रावणा ऐक सावधान । कृतकल्याण पावावया ॥ ६२ ॥

स हि सर्वगतो देवः सूक्ष्मोऽव्यक्तः सनातनः ।
तेन सर्वमिदं व्याप्तं त्रैलोक्यं सचराचरम् ॥ २३ ॥
अहश्च रात्रिश्च उभे च संध्ये
दिवाकरश्चैव यमश्च सोमः ।
स एव कालो ह्यनिलोऽनलश्च
ब्रह्मेंद्ररुद्राश्च स एव सर्वः ॥ २४ ॥
ॐकारश्चैव सत्यं च सावित्री पृथिवी च सः ।
धराधरधरो देवो ह्यनंत इति विश्रुतः ॥ २५ ॥

जेथोनि नाना अवतार । सबळ बळें उठती साचार । तें मुख्य स्वरूप निराकार । निर्विकार तें ऐका ॥ ६३ ॥ भूतां सबाह्य भगवंत । कोंदला आहे सदोदित । अति सूक्ष्मत्वें नव्हे व्यक्त । जेंवी गुळांत निजगोडी ॥ ६४ ॥ गुळा सबाह्य निखळ गोडी । तेथें गूळ हे वार्ता कुडी । तेंवी मिथ्या भूतपरवडी । चित्सत्ता रोकडी सबाह्य नांदे ॥६५॥ जेंवी सूक्ष्म लक्षितां तंत । वस्त्रमात्र मिथ्या मात । तेंवी लक्षितां भगवंत । प्रपंच व्यर्थ मिथ्यात्वें ॥ ६६ ॥ दोराअंगीं सर्पत्व नसे । नसताचि सर्प भ्रांतासी भासे । तेंवी भगवंतीं प्रपंच नसे । मिथ्या आभासे मूर्खासी ॥ ६७ ॥ स्वरूप लक्षितां साचार । मिथ्या ब्रह्मा विष्णु शिव शक्र । तेथें कैंचें गा चराचर । वस्तु चिन्मात्र सदोदित ॥६८॥ नाहीं आकार विकार विलास । नाहीं आयुष्य मग कैंचा नाश । यालागीं अव्यय अविनाश । म्हणती परेश परमात्मा ॥ ६९ ॥ तेथें नाहीं अहोरात्र । नाहीं नक्षत्रें रवि चंद्र । नाहीं वरुणादि यम कुबेर । काळ दुर्धर तेथें मिथ्या ॥ ७० ॥ ऐसी वस्तु जे अविनाशी । तेचि कोंदलीसे जगासीं । तिचेनि गति इंद्रियांसी । तिचेनि प्राणांसी प्राणत्व ॥ ७१ ॥ तिचेनि प्रकाशें अहोरात्र । तिचेनि तपती रवि चंद्र । तिचेनि पंचभूतें साचार । चराचर तिणें अति व्याप्त ॥७२॥ तिचेनि ओंकार आपण । तिचेनि सत्या सत्यपण । तिचेनि गायत्री पावन । वंद्य ब्राह्मण तेणें तेजें ॥७३॥ ब्रह्मा विष्णु शंकर । हेही वस्तूचे गुणावतार । वस्तु निर्गुण निर्विकार । चराचर व्यापूनि ॥७४॥ उभें आडवें विणून सूत । त्या नांव पैं वस्त्र म्हणत । तेंवी व्यापक भगवंत । त्यासीच म्हणत प्रपंच ॥ ७५ ॥ तोचि धरा तोचि धराधर । तोचि विश्व तोचि विश्वाधार । तोचि भूत भूतात्मा साचार । त्यासी संसार मानिती मूर्ख ॥ ७६ ॥ ऐकोनि नारदाचें वचन । रावण झाला अति उद्विग्न । पुढती करोनियां नमन । काय आपण पूसत ॥ ७७ ॥ रूप सांगितलें निर्गुण । त्यासी करितां न ये रण । माझ्या भुजांचें पुरे त्राण । तैसा संपूर्ण बळी सांग ॥७८॥ नारद म्हणे दशानन । तुजसीं करावया रण । देव दानव मानव जाण । नाहीं आंगवण ये समयीं ॥ ७९ ॥ मज पाहतां लोक तीन्ही । युद्ध करावया तुझे ठायीं । बळिया न दिसे ये समयीं । सत्य पाहीं लंकेशा ॥ ८० ॥ रावण अनुवादे आपण । दिग्विजयो करितां जाण । नाहीं योद्धा मजसमान ।

१ ब्रह्मलोकाहून. २ कृतकृत्य. ३ सर्व. ४ दोन प्रकारचे. ... ६ परा-माया तिचा ईश म्हणजे स्वामी. ७ सर्वव्यापी आत्मा. ८ पृथ्वी. ९ पृथ्वी धारण करणारा शेष. १० सामर्थ्य.

Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

हेंही संपूर्ण मी जाणें ॥ ८१ ॥ मजसीं करावया रण । थोरल्या देवासी आंगवण । इतर योद्धे मजपुढें तृण । त्यांचें लक्षण मज सांग ॥ ८२ ॥ थोरल्या देवासी आंगवण । तो कां न ये करावया रण । तोही लपतो मज भेण । त्याचें भेडपण दिसताहे ॥ ८३ ॥ ऐसें बोलतां दशानन । नारद विस्मयें हास्यवदन । मुख्य देवासी करावया रण । काय कारण तें सांग ॥ ८४ ॥ देवांशीं करितां रण । निमाल्या न सोडी जन्ममरण । मुख्य देवें वधिल्या जाण । ब्रह्मत्व परिपूर्ण अवाप्त[1] ॥ ८५ ॥ हेही मजलागीं निजखूण । सनकादिकीं सांगितली जाण । यालागीं मुख्य देवासी रण । करावया मन उद्यत ॥ ८६ ॥ ऐकोनि रावणाची उक्ती[2] । नारद संतोषला चित्तीं । जेणें पावे ब्रह्मप्राप्ती । ते श्रीराममूर्ती स्वयें सांगे ॥ ८७ ॥

नीलोत्पलदलश्यामः किंजल्कारुणवाससः ।
प्रावृट्काले यथा व्योम्नि सतडित्तोयदस्तथा ॥ २६ ॥
श्रीमान्मेघवपुश्यामः शुभपंकजलोचनः ।
श्रीवत्सेनोरसा युक्तः शशांककृतलक्षणः ॥ २७ ॥

नीलोत्पलदलश्याम[3] । राजीवलोचन श्रीराम । ज्याचिया श्यामता लोपलें व्योम । घनश्याम श्रीराममूर्ति ॥ ८८ ॥ श्रीरामश्यामता संपूर्ण । मेघश्यामता त्यापुढें तृण । ज्याची श्यामता देखिल्या जाण । सुखसंपन्न सबाह्य ॥ ८९ ॥ नेत्रोपम कमळदळें । तीं तंव नश्वर तत्काळें । श्रीरामाचे देखणे डोळे । सर्वकाळ सद्रूप ॥ ९० ॥ विजू घालोनियां पुटीं । सबाह्य शोधिली गोमटी । तैसा पीतांबर माळगाठी । शोभे परवंटी[4] श्रीरामा ॥९१॥ श्रीरामकांसे लागोनि जाण । विजु विसरली अस्तमान । दिव्य तेजें विराजमान । सर्वदा जाण लखलखीत ॥ ९२ ॥ मुकुट कुंडलें मेखळा । कांसे कसिला सोनसळा[5] । कंठीं मनोहर माळा । तुळसीदळासमयुक्त ॥ ९३ ॥ बाहुअंगदें रत्नभूषणें । करमुद्रिका करकंकणें । श्रीराम लेणियांचें[6] लेणें । कैसा कवणें वानावा ॥ ९४ ॥ लक्ष्मी डांवलोनि[7] संपूर्ण । दक्षिणांगीं विप्रचरण । शोभे श्रीवत्सलांछन । शशाङ्कचिन्ह जेंवी नभीं ॥ ९५ ॥ श्रीरामपदसामुद्रिका । चतुर्मुखा पंचमुखा । न वर्णवे षण्मुखा । सहस्रमुखा निजमौन ॥ ९६ ॥ वांकीअंदुवांचा गजर । चरणीं गर्जती तोडर । बळियां बळी श्रीरामचंद्र । सुरासुर कांपती ॥ ९७ ॥ मांडून माहेश्वरी ठाण । सज्जूनियां धनुष्यबाण । श्रीरामासीं करावया रण । संमुख कोण राहील ॥ ९८ ॥ श्रीरामासीं करावया रण । वापुडें कायसें रावण । एके बाणें घेईल प्राण । सत्य जाण लंकेशा ॥ ९९ ॥ ऐकोनियां नारदाची मात । रावण आल्हादें नाचत । श्रीरामासीं युद्धकंदनार्थ । कोण्या काळीं होईल ॥ १०० ॥ युद्धीं तगटे श्रीरामचंद्र । तें युद्ध व्हावें अति शीघ्र । ऐसें पुसतां निशाचर । मुनीश्वर सांगत ॥ १ ॥ भूत भविष्य वर्तमान । नारदासी नित्यज्ञान । श्रीरामाचें समूळ कथन । स्वयें आपण सांगत ॥ २ ॥ श्रीरामाचें निजलक्षण । नारद सांगे संतोषोन । सावध ऐकें दशानन । युद्धकारण लक्षूनी ॥ ३ ॥

कृते युगे व्यतीते तु मुखे त्रेतायुगस्य च ।
हितार्थं देवमर्त्यानां भविता नृपविग्रहः ॥ २८ ॥
इक्ष्वाकूणां कुले राजा भाव्यो दशरथो भुवि ।
तस्य सूनुर्महातेजा रामो नाम भविष्यति ॥ २९ ॥
महातेजा महाबुद्धिर्महाबलपराक्रमः ।
महाबाहुर्महासत्त्वः क्षमया पृथिवीसमः ॥ ३० ॥
आदित्य इव दुष्प्रेक्ष्यः समरे शत्रुभिः सदा ।
भविता हि तदा रामो नरो नारायणः प्रभुः ॥ ३१ ॥

कृतयुगाचा होतां प्रांत[8] । त्रेतायुगाचे प्रारंभांत । होईल राजा दशरथ । त्याचा सुत श्रीराम ॥ ४ ॥ देव स्थापावया निजपदीं । भक्तां द्यावया मोक्षसिद्धी । मनुष्य लावावया सुबुद्धी । श्रीराम त्रिशुद्धी अवतार ॥ ५ ॥ सूर्यवंशीं वंशभूषण । ककुत्स्थकुळीं उत्पन्न । अवतार श्रीरघुनंदन । चैतन्यघन[9]विग्रही ॥ ६ ॥ जें आदिकारणा कारण । ज्यासी श्रुती म्हणती नारायण । तेंचि श्रीरामस्वरूप जाण । स्वामी संपूर्ण सर्वांचा ॥ ७ ॥ ज्याचेनि तेजःप्रतापें । चंद्रसूर्यांची प्रभा लोपे । आकाश शून्यत्वें हरपे । श्रीरामदीपें निजतेजें ॥ ८ ॥ धन्य श्रीरा-

१ प्राप्त. २ भाषण. ३ नील कमलदलाप्रमाणें काळसर. ४ नेसणें. ५ पीतांबर. ६ अलंकारांचे. ७ दूर सारून. ८ शेवट. ९ चैतन्यरूपी देह धारण करणारा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

माची निजबुद्धी । वैरिया दे सायुज्यसिद्धी । वोखटें करूं नेणे त्रिशुद्धी । बुद्धीची सुबुद्धी श्रीराम ॥ ९ ॥ श्रीराम बळाचिये सिद्धी । समूळ छेदी देहबुद्धी । मीतूंपणाचिये विधी । स्वयें त्रिशुद्धी निर्दळी ॥ ११० ॥ आजानुबाहु श्रीरघुनाथ । द्वैतदळणीं निजपुरुषार्थ । भवभीता अभयहस्त । रक्षी निजभक्त वरदहस्तें ॥ ११ ॥ अगाध श्रीरामाचें सत्त्व । जग जन्ममरणविकाररहित । सकळ विश्व प्रतिपाळीत । न करितां घात निर्दळी ॥ १२ ॥ श्रीरामशांतीची नवलपरी । अपकार साहोनि अंगावरी । अपकारिया होय उपकारी । अगाध थोरी शांतीची ॥ १३ ॥ ऐसिया श्रीरामशांतस्थितीं । साहोनि भूतांची उद्[3]धृती । पृथिवी आली परम शांती । सहजस्थितीं निजशांती ॥ १४ ॥ मध्यान्हकाळींच्या सूर्यापुढें । पाहतां दृष्टीं अंधार पडे । तैंवी संग्रामीं श्रीरामापुढें । कोण बापुडें राहील ॥ १५ ॥ देखतां श्रीरामाचे बाण । धाकेंचि वीरांचे जाती प्राण । त्यासीं संमुख करावया रण । राहे कोण संग्रामीं ॥ १६ ॥ श्रीरामस्वरूपदर्शन । सहसा पावों शके कोण । तेही विषयींचें निरूपण । सावधान अवधारीं ॥ १७ ॥

न शक्यते सुरैर्द्रष्टुं नासुरैर्न च पन्नगैः ।
यस्य प्रसादं कुरुते स वै तं द्रष्टुमर्हति ॥ ३२ ॥
न हि यज्ञफलैस्तात न तपोभिश्च संचितैः ।
शक्यते भगवान्द्रष्टुं न दानेन न चेज्यया ॥ ३३ ॥

ज्यासी श्रीराम सुप्रसन्न । त्यासीच भेटे रघुनंदन । इतराचें ज्ञान ध्यान । तृणासमान श्रेष्ठत्व ॥ १८ ॥ हृदयीं वैराग्य संपूर्ण । त्यांसी राम सुप्रसन्न । वैराग्यावीण ज्ञान ध्यान । तृणासमान श्रेष्ठत्व ॥ १९ ॥ देखावया श्रीराममूर्ती । सुरवरांची न चले शक्ती । असुरपन्नगादि सिद्धपंक्ती । त्यांसीही रघुपति दु[4]ष्प्रेक्ष्य ॥ १२० ॥ तपस्वी तपोयुक्तीं । सांचिती देहें तपःसंपत्ती । तपाची स्वर्गावरी गती । त्यांसी रघुपति भेटेना ॥ २१ ॥ करूनियां पशुहनन । यज्ञीं करिती यजन । तेथें हिंसेचें आयतन । रघुनंदन न भेटे ॥ २२ ॥ देतां नानाविध दान । दातेपणाचा अभिमान । दानफळही वांछित मन । तेथें रघुनंदन न भेटे ॥ २३ ॥ यज्ञदानतपःसंपत्ती । याची योगा सामर्थ्यशक्ती । श्रीरामाची नव्हे प्राप्ती । जाण निश्चितीं लंकेशा ॥ २४ ॥ पावावया श्रीरामप्राप्ती । दृढ वैर कां अनन्य भक्ती । येणें पाविजे रघुपती । जाण निश्चितीं लंकेशा ॥ २५ ॥ अनन्यभक्तीचें लक्षण । पहिलें सांगेन परिपूर्ण । पाठीं वैराचें कारण । केल्या निर्वाणं तें साधे ॥ २६ ॥

तद्भक्तैस्तद्गतप्राणैस्तच्चित्तैस्तत्परायणैः ।
शक्यते भगवान्द्रष्टुं ज्ञाननिर्दग्धकिल्बिषैः ॥ ३४ ॥
अथवा पृच्छ राजेंद्र यदि तं द्रष्टुमिच्छसि ।
कथयिष्यामि ते सर्वं श्रूयतां यदि रोचते ॥ ३५ ॥

सांडोनियां प्रपंचसाधन । देह केला रामार्पण । श्वासोच्छ्वासीं श्रीरामसेवन । तद्गतप्राण या नांव ॥ २७ ॥ सोहंहंसाच्या [7]अनुवृत्ती । ज्याच्या प्राणवृत्ती विचरती । तद्गतप्राण त्यातें म्हणती । हे योगस्थिति अति गुह्य ॥ २८ ॥ सांडोनि प्रपंचचिंता । नित्य चिंतितां निजात्मता । चित्त [8]रातलें भगवंता । मच्चित्तता या नांव ॥ २९ ॥ नाना चिंतेचे प्रबळ अर्थ । पुढें येवोनि झाल्या प्राप्त । चित्त विसरेना भगवंत । जाण मच्चित्त [9]अहर्निशीं ॥ १३० ॥ उत्तममध्यमाधमा भूतीं । [10]भगवद्भाव अहोरातीं । या नांवें मुख्य भगवद्भक्ती । स्वप्नसुषुप्तीं भगवंत ॥ ३१ ॥ जागृतिस्वप्नसुषुप्तीं । ज्यासी स्फुरेना देहस्फूर्ती । ऐशा चालीं वेदोक्तीं । जाण तो निश्चितीं मत्पर ॥ ३२ ॥ सद्गुरुवाक्य अति निपुण । जाणोनि देहाचें मिथ्यापण । मी आत्मा चिद्रूप परिपूर्ण । मत्परायण या नांव ॥ ३३ ॥ देहीं देहाचें नाहीं स्फुरण । वेदोक्त चालवी कर्माचरण । ज्यासी नुठे आत्माभिमान । मत्परायण तो भक्त ॥ ३४ ॥ नित्य करितां भगवद्भजन । संकल्प विकल्प गेले विरोन । त्यासीच भेटे रघुनंदन । अनन्यभजन या नांव ॥ ३५ ॥ वैर करावया आवडी पूर्ण । अंगीं असेल आंगवण । तरीच वैराचें पूर्ण कारण । साङ्ग संपूर्ण सांगेन ॥ ३६ ॥ मुख्य वैराचें कारण । करावें गा [11]दारहरण । तेचि विषयींचें निरूपण । नारद आपण सांगत ॥ ३७ ॥

१ [illegible]. २ संसाराला भ्यालेल्यास. ३ अविनय, [illegible]. ४ दिसण्यास कठीण, ५ स्थान. ६ मोक्ष, ७ सतत ध्यानानें. ८ रमलें, ९ रात्रंदिवस. १० ईश्वरभावना. ११ स्त्रीहरण,

CC-0. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

तस्य पत्नी महाभागा लक्ष्मी सीतेति विश्रुता ।
दुहिता जनकस्यैषा प्रोत्थिता वसुधातलात् ॥ ३६ ॥
रूपेणाप्रतिमा लोके सर्वलक्षणलक्षिता ।
छायेवानुगता रामं निशाकरमिव प्रभा ॥ ३७ ॥
शीलाचारगुणोपेता साध्वी धैर्यसमन्विता ॥ ३८ ॥

त्या श्रीरामाची निजकांता । परम सुंदर पतिव्रता सीता । तिच्या स्वरूपासीं समता । नाहीं सर्वथा तिहीं लोकीं ॥ ३८ ॥ रंभा उर्वशी तिलोत्तमा । तृणप्राय यांची उपमा । खद्योतप्राय[1] उमा रमा । सीतेसीं समा त्या नव्हती ॥ ३९ ॥ रूपावेगळी नव्हे छाया । तेंवी सीता श्रीरामराया । वेगळी नव्हे कांहीं केलिया । अनुगंत[2] तया अहर्निशीं ॥ १४० ॥ जेंवी चंद्राची द्योतकता[3] । वेगळी न करवे सर्वथा । तेंवी श्रीरामावेगळी सीता । नव्हे तत्त्वतां निश्चित ॥ ४१ ॥ ते जनकाची निजदुहिता । नित्यानुकूल श्रीरघुनाथा । शीलसाध्वी पतिव्रता । सती सीता निजसत्त्वें ॥ ४२ ॥

एवं ते सर्वमाख्यातं मया रावण विस्तरात् ।
महते देवदेवस्य शाश्वतस्याव्ययस्य च ॥ ३९ ॥
एवं श्रुत्वा महाबाहो राक्षसेन्द्र प्रतापवान् ।
त्वया सह विरोधेच्छुश्चिंतयामास राघवः ॥ ४० ॥

सावध करोनि रावण । नारद अनुवादे पैं आपण । श्रीरामाचें स्वरूपलक्षण । तुज म्यां संपूर्ण सांगितलें ॥४३॥ सगुण आणि निर्गुण । दोहीं स्वरूपीं राम पूर्ण । हें म्यां सांगितलें विवंचून[4] । स्वरूपलक्षण सीतेचें ॥ ४४ ॥ देवाधिदेव श्रीरघुनाथ । अजन्मा अव्यय अच्युत । त्याचा सांगितला वृत्तान्त । समूळ साद्यंत लंकेशा ॥ ४५ ॥ यावरी तुजला उचित । जो देखसी निजहितार्थ । तो तो करावा निश्चित । हें नारदोक्त ऐकोनि ॥ ४६ ॥ स्वयें बोलतो रावण । युद्धीं माझा जाय प्राण । ऐसें श्रीरामीं करणें रण । तें वैरकारण मज सांगें ॥ ४७ ॥ भूत भविष्य वर्तमान । स्वामींसी आहे निजज्ञान । श्रीरामासीं वैरकारण । कृपा करून मज सांगा ॥ ४८ ॥ श्रीरामासीं झोंटधरणीं[5] । दुर्धर युद्ध करणें रणीं । ऐसी आवडी माझे मनीं । ते स्वामींनीं पुरवावी ॥ ४९ ॥ श्रीरामहस्तें निमाल्या जाण । मी पावेन ब्रह्म पूर्ण । यालागीं करावया रण । उद्यत मन पैं माझें ॥ १५० ॥ ऐसें पुसत दशानन । नारद वदे हास्यवदन । मुख्य वैरासी कारण । वनप्रयाण श्रीराम ॥ ५१ ॥

पितुर्नियोगात्स विभुर्दंडके विविधे वने ।
विचरिष्यति धर्मात्मा सह भ्रात्रा सपत्निकः ॥ ४१ ॥

दशरथाज्ञा श्रीरघुनाथ । वनीं वनवासी दंडकारण्यांत । लक्ष्मणसीतासमवेत । येईल निश्चित जनस्थाना ॥ ५२ ॥ तेथें करोनियां छळण । करावें त्याचें दारहरण[6] । हें वैराचें कारण । रणीं रावण मारावया ॥ ५३ ॥ श्रीरामबाणांच्या आघातीं । निमोनि देह पडे क्षितीं[7] । तंव न सोडावी सीता सती । सायुज्यमुक्ती पावावया ॥ ५४ ॥

नारदस्य तु तद्वाक्यं चिंतयित्वा मुहुर्मुहुः ।
रावणो मुमुदे श्रीमान्युद्धार्थी विचचार ह ॥ ४२ ॥

ऐकोनि नारदाचें वचन । आल्हादें नाचे दशानन । श्रीरामासीं करावया रण । हर्ष पूर्ण युद्धाचा ॥ ५५ ॥ संक्षेपें सांगितलें बहुतीं[8] । रावण न सोडी सीता सती । श्रीरामहस्तें पावावया मुक्ती । मुनिवचनोक्तीं विश्वासें ॥ ५६ ॥ हा इतिहास पुरातन । धर्मऋषीनें आपण । मंदोदरीप्रति सांगोन । केलें गमन स्वाश्रमा ॥ ५७ ॥ एकाजनार्दना शरण । जाहलें पूर्व निरूपण । पुढील कथा अति गहन । श्रोतीं अवधान मज द्यावें ॥ १५८ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां नारदरावणसंवादो नाम चतुर्विंशतितमोऽध्यायः ॥ २४ ॥ ॥ ओंव्या ॥ १५८ ॥ श्लोक ॥ ४२ ॥

अध्याय पंचविसावा

॥श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः॥ पूर्वप्रसंगामाझारी । समेसी आली मंदोदरी । तिसी एकान्त गुह्योत्तरीं । धाडी अंतःपुरीं रावण ॥ १ ॥

अंतःपुराय गच्छ त्वं सुखिनी भव सस्नुषा ।
एवमुक्त्वा परित्यज्य भार्यां प्रीतमना इव ॥ १ ॥

१ काजव्यांसमान. २ बरोबर असणारी. ३ प्रकाश. ४ स्पष्ट करून. ५ एकमेकांचे केंस धरून भांडणें. ६ स्त्री–जानकी–तिचें हरण. ७ पृथ्वीवर. ८ अगत्यानें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

रावणस्तु ततो वाक्यं राक्षसानिदमब्रवीत् ।
कल्प्यतां मे रथः शीघ्रं क्षिप्रमानीयतां धनुः ॥ २ ॥
अथादाय शितं शूलं शत्रुशोणितरंजितम् ।
कुंभकर्णो महातेजा रावणं वाक्यमब्रवीत् ॥ ३ ॥
अहमेको गमिष्यामि रणं रणविशारद ॥ ४ ॥

रावणें मंदोदरीप्रती । सांगोनि एकान्त गुह्योक्ती । समाधानसुखानुवृत्तीं । अंतःपुराप्रती पाठवी ॥ २ ॥ सपुत्रस्नुषेंसीं[1] आपण । सांडोनि चिंता अनुद्विग्न । सुखी राहावें सुसमाधान । सुप्रसन्न सुखरूप ॥ ३ ॥ ऐकोन रावणाचें वचन । मंदोदरी सुखसंपन्न । करोनियां साष्टांग नमन । आली आपण निजधामा ॥ ४ ॥ येरीकडे दशानन । पाचारोनि सैन्य प्रधान । रथ आणवी गर्जोन । रणकंदन करूं आजी ॥ ५ ॥ ऐकोनि रावणाचें गर्जन । काळकृतांतासमान । स्वयें उठला कुंभकर्ण । शूळ घेवोन साटोपें[3] ॥ ६ ॥ शत्रुरुधिरें पैं रंजला । मेदोमांसें माखला । धगधगीत शूळ घेतला । मग गर्जेला कुंभकर्ण ॥ ७ ॥ मी जवळी असतां जाण । युद्धा कां निघे रावण । एकला एक मी आपण । करीन कंदन[4] शत्रूचें ॥ ८ ॥ शत्रु बापुडे ते किती । मज संमुख कैंवी राहती । एकला एक मी निश्चितीं । करीन समाप्ती शत्रूंची ॥ ९ ॥

कुंभकर्णस्य वचनं श्रुत्वोवाच महोदरः ।
कुंभकर्ण कुले जातो वृथा प्राकृतदर्शनः ॥ ५ ॥
येन पूर्वं जनस्थाने बहवो राक्षसा हताः ।
तं शूरं राघवं संख्ये कथमेको हनिष्यसि ॥ ६ ॥
एवमुक्तस्तु संक्रुद्धः कुंभकर्णो महोदरम् ।
उवाच रक्षसां मध्ये राक्षसं रावणोपमम् ॥ ७ ॥
स तथोक्तो विनिर्भर्त्स्य कुंभकर्णो महोदरम् ।
आददे निशितं शूलं शत्रुशोणितरंजितम् ॥ ८ ॥
खड्गं कालायसं दीप्तं तप्तकांचनभूषितम् ।
इंद्राशनिसमं घोरं वज्रप्रतिमभैरवम् ॥ ९ ॥

एकला एक रणव्युत्पत्ती । करीन शत्रूची समाप्ती । महोदरें ऐकोनि युक्ती । कुंभकर्णाप्रती वर्म बोले ॥ १० ॥ कुंभकर्णा तूं सुकुळीन । तुज सन्मानी दशानन । तुझ्या अंगीं बळ संपूर्ण । परी मूर्खपण विशेष ॥ ११ ॥ राम राक्षसां कंदकुदळ[5] । राम राक्षसां केवळ काळ । त्यासीं एकला रणकल्लोळ । करिसी केवळ मूर्खत्वें ॥ १२ ॥ एकला एक पदाती[6] रामचंद्र । चौदा सहस्र निशाचर । त्रिशिरा दूषण आणि खर । विंधोनि शर मारिले ॥ १३ ॥ एकेंचि बाणें वाळी । लोळविला आतुर्बळी । तुज मारितां रणकल्लोळीं । करील होळी बाणें एकें ॥ १४ ॥ अति स्थूळ तुझें शरीर । तेणें दिसतोसी दुर्धर । परी लागतां श्रीरामाचे शर । न मागतां नीरँ[7] मरशील ॥ १५ ॥ ऐकोनि महोदरवचन । कोपा चढला कुंभकर्ण । महोदरातें निर्भर्त्सून । काय आपण अनुवादे ॥ १६ ॥ तूं तंव केवळ हीन दीन । युद्धापासीं पलायमान । एकल्या न करवे रण । नपुंसकपण तुजपासीं ॥ १७ ॥ युद्धा जातां येईल मरण । हें तुजपासीं भेडपण । युद्धापासीं पलायमान । नपुंसकपण तुजपासीं ॥ १८ ॥ युद्धा जातां ज्यासी जाण । नाठवे देह गेह[8] मरण । तोचि शूर पैं संपूर्ण । विजय पूर्ण त्यापासीं ॥ १९ ॥ नपुंसक जो हीन दीन । तो तूं रावणाचा प्रधान । सभेसी पावसी सन्मान । काळें वदन पैं तुझें ॥ २० ॥ तुझे बुद्धीचें प्राधान्य । अधर्मी केला दशानन । जळो तुझें काळें वदन । निंद्य रावण तुझेनि ॥ २१ ॥ तुज जरी असती सुबुद्धी । तरी सीता देवोनि रामीं संधी[9] । कां न करिसी तूं कुबुद्धी । तुझेनि दुर्बुद्धि रावण ॥ २२ ॥ आम्हां सांगतोसी बुद्धी । सर्वथा न रिघावें युद्धीं । हगीर भ्याड तूं त्रिशुद्धी[10] । सभेमधीं नसावासी ॥ २३ ॥ ऊठ वेगें नीघ सभेबाहेरी । नाहीं तरी हाणीन तोंडावरी । महोदरातें नानापरी । कुंभकर्ण भारी निंदीतसे ॥ २४ ॥ ऐसें बोलोनि आपण । शूळ घेवोनियां जाण । स्वयें उठिला कुंभकर्ण । अति गर्जोन युद्धार्थी ॥ २५ ॥ केवळ तिख्यांचा[11] दारुण[12] । शतधार शूळ पूर्ण । सुवर्णबंदीं शोभायमान । विद्युत्समान निजतेज ॥२६॥ शत्रुरुधिरें न्हाणिला । मेदें मांसें दिसे माखला । कुंभकर्णें शूळ घेतला । स्वयें चालिला युद्धासी ॥ २७ ॥ कुंभकर्ण अति आवेशीं । स्वयें निघतां युद्धासी । अति उल्लास रावणासी । सर्वें त्यासी सन्मानी ॥ २८ ॥

---

१ पुत्र आणि सून यांसह. २ सुखी होत्साता. ३ आवे-[...]शें ४ नाश. ५ कंद खणणारी कुदळच. ६ पायीं चालणारा. ७ पाणी. ८ घर. ९ मैत्री. १० भित्रा. ११ खरोखर. १२ अत्यंत तीव्र.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

अथासनात्समुत्पत्य मणिं सूर्यसमप्रभम् ।
आबबंध महातेजा कुंभकर्णस्य मस्तके ॥ १० ॥
अंगदे ह्यंगुलीयानि कवचं च महाधनुः ।
हारं च शशिसंकाशं स बबंध महामनाः ॥ ११ ॥
दिव्यान्सुगंधमाल्यांश्च रत्नानि विविधानि च ।
गात्रेषु योजयामास कुंडले च महाभुजः ॥ १२ ॥
कांचनांगदकेयूरनिष्कप्रवरभूषणः ।
कुंभकर्णो महाबाहुर्हुतोऽनल इवाबभौ ॥ १३ ॥

उठोनियां अति आवेशीं । त्यागोनियां सिंहासनासी । स्वयें रावण कुंभकर्णासी । अति उल्लासीं पूजित ॥ २९ ॥ मुगुट कुंभकर्णालागूनी । त्याच्या मस्तकीं महामणी । दिव्यतेजें लोपतो तरणी । ऐसा आणोनि बाणिला ॥ ३० ॥ बाहीं बाहुवटें रत्नभूषणें । करमुद्रिका करकंकणें । अनर्घ्य कुंडलें रावणें । प्रीतीं पूजिला कुंभकर्ण ॥ ३१ ॥ कवचादि दिधलें अमोलिक । माळा दिधल्या अलोलिक । श्वेत रक्त अति सुटंकें । चंदन चोख चर्चिलें ॥ ३२ ॥ दिव्य चंदनाचा टिळा । तेणें शोभत वीरमगेळा । त्यावरी दिव्य सुमनमाळा । घातल्या गळां रावणें ॥ ३३ ॥ कंठीं पदक एकावळी । जडितरत्न प्रभावळी । दोहीं भागीं मुक्ताफळीं । इंद्रनीळीं महाशोभा ॥ ३४ ॥ रत्नखचित अलंकार । रावणें अर्पिले अपार । होमीं हविला वैश्वानर । तैसा दुर्धर आभासे ॥ ३५ ॥

श्रोणीसूत्रेण महता कांचनेन विराजितः ।
अमृतोत्पादने नद्धो भुजगेनैव मंदरः ॥ १४ ॥
सर्वाभरणजुष्टांगः शूलपाणिः स राक्षसः ।
स रावणं परिष्वज्य कृत्वा चापि प्रदक्षिणम् ॥ १५ ॥
प्रणम्य शिरसा चैनं संप्रतस्थे महाबलः ।
तस्य सूतो रथं दिव्यं पंचनल्वप्रमाणतः ॥ १६ ॥
युक्तं खरसहस्रेण युद्धध्वजविभूषितम् ॥ १७ ॥

कुंभकर्णासी कटिसूत्र । देता जाला दशशिर । कैसा बाणला अलंकार । तोही चमत्कार अवधारा ॥ ३६ ॥ समुद्रमंथनीं जेंवी मंदर । शेषें वेष्टिला सर्परिकर । तेंवी कुंभकर्णा कटिसूत्र । मनोहर आभासे ॥ ३७ ॥ सर्वाभरणीं शोभायमान । युद्धा निघतां कुंभकर्ण । आलिंगोनि दशानन । मस्तकीं चरण वंदिले ॥ ३८ ॥ करोनियां प्रदक्षिणा । पुढती लागला चरणा । येथोनि आतां रावणा । भेटी दोघां जणां खुंटली ॥ ३९ ॥ रणीं भिडोनि रघुनाथा । परतोनियां येईन मागुता । ही तंव सहसा न घडे कथा । लंकानाथा सत्यत्वें ॥ ४० ॥ तुझिया निजकार्यार्थी । युद्ध करोनियां दुर्धरता । तुजलागोनि वेंचीन जीविता । सत्य वार्ता हे माझी ॥ ४१ ॥ ऐकोनि कुंभकर्णवचन । दोघां बंधूंसीं आलें रुदन । तेव्हां कुंभकर्णें आपण । केलें गर्जन साटोपें ॥ ४२ ॥ सारथियें आणिला शीघ्र रथ । सहस्र खरीं संयोजित । युद्धध्वजें अति शोभित । प्रमाण तेथ पंच पंच ॥ ४३ ॥ कुंभकर्णाचे पंच पंच हस्त । तेचि प्रमाणें रथीं रथस्थ । तेथें बैसोनियां त्वरित । निघे युद्धार्थ कुंभकर्ण ॥ ४४ ॥

महाजलधिनिर्घोषं कैलासशिखरोपमम् ।
अष्टचक्रं महावेगमुपनीतं महारथम् ॥ १८ ॥
स तं समारुह्य ययौ मेघगंभीरनिस्वनः ।
सोऽतिकायो महातेजा राक्षसैः परिवारितः ॥ १९ ॥
तमाशीर्भिः प्रशस्ताभिः प्रेषयामास रावणः ।
शंखदुंदुभिनिर्घोषैः सैनिकैश्च वरायुधैः ॥ २० ॥
तं गजैश्च चतुर्दंतैः स्यंदनैश्चांबुदस्वनैः ।
अन्वगच्छन्महात्मानो रथिनं रथिनां वरम् ॥ २१ ॥
स पुरद्वारमासाद्य राक्षसो घोरदर्शनः ।
निपपात महातेजाः कुंभकर्णः प्रतापवान् ॥ २२ ॥

प्रळयमेघाचा कडकडाट । तैसा रथाचा घडघडाट । कैलासशिखरासम श्रेष्ठ । रथचक्रें घडघडती ॥ ४५ ॥ कुंभकर्ण बैसोनि येथ । रथ प्रेरिला गर्जत । रावणें संतोषोनि तेथ । सैन्य समस्त सवें धाडी ॥ ४६ ॥ पुरस्कारोनियां विशद । रावणें देवोनि आशीर्वाद । कुंभकर्ण वीर प्रसिद्ध । करावया युद्ध धाडिला ॥ ४७ ॥ चतुर्दंत गजसंभारीं । सवें चालती सालंकारी । अश्वगजरथांची हारी । केला घोरीं गडगर्ज ॥ ४८ ॥ शंख भेरी मृदंग गहन । त्राहाटिलें रणनिशाण । कुंभकर्णा आलें स्फुरण । स्वयें गर्जोन चालिला ॥ ४९ ॥ कुंभकर्णाचे पाठीसीं ।

१ स्वतः. २ सूर्य. ३ फार शोभायमान. ४ तिलक. ५ वीराकृति. ६ पेटविला, चेतविला. ७ अग्नि. ८ शोभला. ९ जवळच्या सरंजामासुद्धां. १० गाढवांनीं. ११ पाठविला. १२ उत्तेजन देऊन. १३ समुदाय.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सैन्य दाटलें चौपासीं । अनुलक्षोनियां त्यासी । संग्रामासी निघालें ॥ ५० ॥ कुंभकर्ण महावीर । रथ प्रेरिला सत्वर । ठाकोनि आला नगरद्वार । छत्रातपत्र शोभत ॥ ५१ ॥

सपुष्पपर्णैरवकीर्यमाणो
धृतातपत्रः शितशूलपाणिः ।
मदोत्कटः शोणितपानमत्तो
विनिर्ययौ राक्षसयोधमुख्यः ॥ २३ ॥
कुंभकर्णो महावक्त्रः प्रहसन्वाक्यमब्रवीत् ।
अद्य वानरमुख्यानां तानि यूथानि भागशः ॥ २४ ॥
निर्दहिष्यामि संक्रुद्धः शलभानिव पावकः ।
स वै रामसहायश्च ये चान्ये मम शत्रवः ॥ २५ ॥
नापराध्यंति मे कामं वानरा वनचारिणः ।
हते यस्मिन्हताः सर्वे तं हनिष्यामि संयुगे ॥ २६ ॥
एवं तस्य ब्रुवाणस्य कुंभकर्णस्य रक्षसः ।
बभूवुर्घोररूपाणि निमित्तानि समंततः ॥ २७ ॥

युद्धा निघतां कुंभकर्ण । पुष्पवृष्टि करी रावण । छत्रचामरीं शोभायमान । उल्हास पूर्ण युद्धाचा ॥ ५२ ॥ रुधिरपानें रुधिरोन्मत्त । मद्यपानें मदोन्मत्त । युद्ध करावया बळोन्मत्त । सैन्यासमवेत निघाला ॥ ५३ ॥ विक्राळवदन कुंभकर्ण । करावया रणकंदन । स्वयें बोलताहे गर्जोन । आंगवण युद्धाची ॥ ५४ ॥ वांनरयूथप[1] बहुत । रणकर्कश रणोन्मत्त । ते मी मारीन समस्त । जेंवी वणव्यांत पतंग ॥ ५५ ॥ अंगद सुग्रीव जांबवंत । नळनीळादि हनुमंत । यूथपें यूथपें समस्त । मारीन येथ शोधशोधूं ॥ ५६ ॥ वानर बापुडे वनचर । त्यांसीं मज नाहीं वैर । मुख्य वैरी श्रीरामचंद्र । त्यासी वानर रणीं साह्य ॥ ५७ ॥ लक्ष्मणासीं समवेत । रणीं मारिल्या रघुनाथ । वानर निमोले[2] समस्त । ऐसा युद्धार्थ साधीन ॥ ५८ ॥ श्रीराम आणि सुमित्र । दोघे बंधु मनुष्यमात्र । आधीं गिळीन ते स्वतंत्र । मग वानर भक्षीन ॥ ५९ ॥ कुंभकर्णाचा गिरागजर । तेणें कांपती गिरि सागर । त्यामाजी गर्जती निशाचर । युद्धा सत्वर निघाले ॥ ६० ॥ ऐसेनि अति उल्हासीं । युद्धा जातां कुंभकर्णासी । अपशकुन जाले त्यासी । चहूं भागांसीं दुश्चिन्ह ॥ ६१ ॥

१ वानरसैन्याचे मुख्य. २ मृत्यु पावले. ३ घुबड.

निपपात च गृध्रोऽस्य रथस्योपरि गच्छतः ।
प्रास्फुरन्नयनं चास्य सव्यो बाहुरकंपत ॥ २८ ॥
गगनान्निपपातोल्का ज्वलंती भीमनिःस्वना ।
आदित्यो निष्प्रभश्चासीन्न वाति च सुखोऽनिलः ॥ २९ ॥
अचिंतयन्महोत्पातानुत्थितांञ्जीवितांतकान् ।
निर्ययौ कुंभकर्णस्तु कृतांतबलनोदितः ॥ ३० ॥

कुंभकर्ण निघतां गजरीं । उलूक[3] बैसला ध्वजावरी । गीध बैसला त्याचे शिरीं । शिवा श्वान खरी भुंकती ॥ ६२ ॥ भूस्फोट नगरद्वारीं । भूकंप होत नगरीं । विजू पडली निरभ्रीं । प्राणसंहारी कडकडाट ॥ ६३ ॥ अशुभ पक्षी किलकिलित । अपसव्य परिभ्रमत । क्रूर उल्कापात[4] होत । जीवितान्त राक्षसां ॥ ६४ ॥ कुंभकर्णाचा स्वयें आपण । अशुभें लवे वामलोचन । वामबाहूचें अशुभ स्फुरण[5] । जय संपूर्ण लाभेना ॥ ६५ ॥ सूर्य जाला प्रभाहीन । प्रतिकूळ वायूचा सणाण । आजिच्या युद्धीं न वांचती प्राण । अचुक मरण राक्षसां ॥ ६६ ॥ कुंभकर्ण ते अवसरीं । अपशकुनांतें अव्हेरी । अंतका अंतक बळाची थोरी । आला संभारी रणरंगीं ॥ ६७ ॥

स निष्क्रम्य पुरीद्वारात्कुम्भकर्णो महाबलः ।
ननाद च महानादं समुद्र इव पर्वणि ॥ ३१ ॥
तं दृष्ट्वा राक्षसश्रेष्ठं वानराः पर्वतोपमम् ।
वायुक्षिप्ता यथा मेघा ययुः सर्वा दिशस्तदा ॥ ३२ ॥
तद्वानरानीकमतिप्रचंडं
दिशो द्रवद्भिन्नमिवाभ्रजालम् ।
स कुम्भकर्णः समवेक्ष्य हर्षा-
न्ननाद नादं घनवद्घनाभः ॥ ३३ ॥
ते तस्य घोरं निनदं निशम्य
यथा निनादं दिवि वारिदस्य ।
पेतुर्धरण्यां बहवः प्लवंगा
निकृत्तमूला इव शालवृक्षाः ॥ ३४ ॥

येवोनि नगराबाहेरी । सेना देखोनि वानरी । कुंभकर्ण गिरागजरीं । घर्घरस्वरीं गर्जिन्नला ॥ ६८ ॥ ज्याचा ऐकतांचि रव । मूर्छित पडती देवदानव । तेणें नादें वानर सर्व । घेवोनि जीव

४ तारे पडणें. ५ फुरफुरणें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

पळाले ॥ ६९ ॥ नाद ऐकतां कडकडाटीं । लहान सान वानरथाटी । धाकें पडती पटपटीं । मूर्च्छित सृष्टीं कपिकुळ ॥ ७० ॥ कुंभकर्ण क्रूरांभासा । वानरीं सांडिला युद्धधिंवसा । स्वयें पळती दशदिशा । एक आकाशा लंघिती ॥ ७१ ॥ पळतां देखोनि वानर । कुंभकर्णा हर्ष थोर । पुढती गर्जे दीर्घस्वर । तेणें वनचरें विव्हळती ॥ ७२ ॥ एक पळाले समुद्रतीरीं । एक रिघाले गिरिकंदरीं । एक लपाले वृक्षांवरी । एक ते विवरीं दडाले ॥ ७३ ॥ एक ते जाले पिसीं । एक ते पळती चौपासीं । अंगद अभय देत वानरांसी । दशा ऐसी देखोनि ॥ ७४ ॥ छेदिल्या वृक्षाचें पैं मूळ । उलंडती शाल ताल । तैसें वानरांचें दळ । अति विव्हळ देखोनि ॥ ७५ ॥

तांस्तु विद्रवतो दृष्ट्वा राजपुत्रोऽङ्गदोऽब्रवीत् ।
आत्मनस्तानि विस्मृत्य वीर्याण्यभिजनानि च ॥ ३५ ॥
साधु सौम्या निवर्तध्वं किं प्राणान्परिरक्षथ ।
नालं युद्धाय वै रक्षो महतीयं बिभीषिका ॥ ३६ ॥
विक्रमाद्विधमिष्यामो निवर्तध्वं प्लवंगमाः ।
कृच्छ्रेण महताश्वास्य संस्तभ्य च ततस्ततः ॥ ३७ ॥
शिलापादपहस्तास्ते तस्थुः संग्राममूर्धनि ।
निर्जग्मुः परमक्रुद्धाः समदा इव कुंजराः ॥ ३८ ॥

पळतां देखोनि वानर । अंगद जो कां राजकुमर । परतावया कपि समग्र । काय उत्तर बोलत ॥ ७६ ॥ रणीं मारूं दशानन । श्रीरामापासीं बोलां गर्जोन । ते तुम्ही न करितां रण । कैंवी पळोन जातसां ॥ ७७ ॥ पळोनि जातां गांवासी । स्त्रिया निर्भर्त्सिती[3] तुम्हांसी । पाठी दिधली संग्रामासी[2] । श्याममुखेंसीं[4] आलेती ॥ ७८ ॥ स्त्रिया म्हणती काळतोंडें । पळोनि आलीं माकडें । मरणाहूनियां गाढें । दुःख रोकडें पावाल ॥ ७९ ॥ जळो तुमचें काळें वदन । नपुंसकांहूनि हीन दीन । रणीं सांडोनि रघुनंदन । कैंवी पळोनि आलेती ॥ ८० ॥ पळोनि गेलिया वानर । तुम्ही काय व्हाल अजरामर[6] । पळणें हीन दीन विचार । सांडोनि शीघ्र परतावें ॥ ८१ ॥ आम्ही सुकुळींचे वानर । जन्मोनियां वीर शूर । करितां पळण्याचा विचार । ब्रीदें[7] समग्र हरविलीं ॥ ८२ ॥ पूर्वजांसी आणोनि उणें । पळोनि जातां नरका जाणें । यालागीं धरोनि आंगवणें । स्वयें परतणें संग्रामा ॥ ८३ ॥ धरोनि देहलोभाचा स्वार्थ । रणीं सांडितां रघुनाथ । पदोपदीं नरकपात । आकल्पान्त पावाल ॥ ८४ ॥ कुंभकर्णाची पैं गोष्टी । पोंचट तन[8] मांसमोठी[5] । तेणें भेणें तुम्ही करंटीं । उठाउठीं पळतसां ॥ ८५ ॥ करितां श्रीरामस्मरण । आम्हां बाधूं न शके मरण । विभांडीन मी कुंभकर्ण । आंगवण पहा माझी ॥ ८६ ॥ ऐकोनि अंगदाचें वचन । परस्परें आश्वासून । परतले वानरगण । आंगवणसाशंक ॥ ८७ ॥ अंगद सांगे जीवींची खूण । सांडून देहलोभ विस्मरण । करितां रामनामस्मरण । आंगवण पावाल ॥ ८८ ॥ करितां रामनामस्मरण । वानरां आलें अति स्फुरण । शतधा वाढली आंगवण । कुंभकर्णसंग्रामा ॥ ८९ ॥ करितां रामनामगजर । मदोन्मत्त जेंवी कुंजर । तैसे परतले वानर । निशाचररणमारा ॥ ९० ॥ शिळा शिखरें तरुवर । वानरीं सज्जून हातियेर । युद्धीं परतले दुर्धर । करीत गजर नामाचा ॥ ९१ ॥ अंगदाचे गोष्टीसाठीं । वानरवीरांचिया कोटी । धैर्य धरोनियां पोटीं । उठाउठीं परतले ॥ ९२ ॥

निजघ्नुः परमक्रुद्धाः कुंभकर्णं वनौकसः ।
पांसुभिर्वालतालैश्च शिलाभिश्च महाबलाः ॥ ३९ ॥
पादपैः पुष्पिताग्रैश्च वध्यमानो न चुक्षुभे ।
वानरास्तु सुसंक्रुद्धा गिरिशृंगैर्महाबलाः ॥ ४० ॥
राक्षसानामनीकानि विनिर्जघ्नुः सहस्रशः ।
तच्छैलवेगाभिहतं हत्वा स्वरथवारणम् ॥ ४१ ॥

वानरीं धरोनियां आंगवण । पाचारोनि कुंभकर्ण । शिळा पर्वत पाषाण । संमुख गर्जोन हाणिती ॥ ९३ ॥ शतसहस्र कोट्यनुकोटी । वानर भिडती जगजेठी । शिळापर्वतवृक्षवृष्टीं । कडकडाटीं हाणती ॥ ९४ ॥ वानरीं व्यापिलें भूतळ । वानरीं व्यापिलें नभोमंडळ । कुंभकर्णातें कपि सकळ । शाल ताल हाणिती ॥ ९५ ॥ जैशा माशा मोहळासी । तैसे वानर चौपासीं । वेढूनियां कुंभ-

१ दिसण्यांत अति क्रूर असा. २ युद्ध करण्याविषयींचें धैर्य. ३ छीथू करतील, फजिती करतील. ४ काळीं तोंडें घेऊन. ५ मोठें. ६ अमर. ७ कीर्ति. ८ शरीर. ९ शंभरपट. १० हत्ती.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

कर्णासी। अति आवेशीं हाणिती ॥ ९६ ॥ वानर हाणिती जे जे घाय । कुंभकर्णासी तृणप्राय । वानर बापुडे ते काय । अलक्ष पाहें लक्षेना ॥ ९७ ॥ कुंभकर्णासी पर्वत । लागूनि शतचूर्ण होत। शिळा होती शकलीभूत[1]। वृक्ष मोडत शाल ताल ॥ ९८ ॥ जैसे कां ढेंकुण सेजेसीं । तैसे वानर चौपासीं । झोंबती कुंभकर्णासीं । परी तो त्यांसी गणीना ॥ ९९ ॥ न डंडळी कुंभकर्ण । वानरीं जाणोनि आपण । त्याच्या सैन्यासी केलें कंदन । रणविंदान अवधारा ॥ १०० ॥ रणीं क्षोभोनि वानर। करोनि पर्वतांचा मार । सैन्य मारिलें शतसहस्र । गज खरोष्ट्रे[2] रथाचे ॥ १ ॥ अश्व सारथी रहंवरें[3]। गजपती निशाचर । रणीं मारिले अपार। अवनीं रुधिर प्रवाहे ॥ २ ॥ रणीं क्षोभोनि प्लवंगमें[4] । दुर्धर केला पैं संग्राम । मांसशोणित-कर्दम[5]। रण दुर्गम राक्षसां ॥ ३ ॥ मारोनियां निशाचर । रणीं गर्जती वानर । अवघीं केला जयजयकार । करीत गजर हरिनामें ॥ ४ ॥ मारिली देखोनि निजसेना। कोप आला कुंभकर्णा । मारावया वानरगणा । आंगवणा ऊठिला ॥ ५ ॥ थोर थोर वानरगण । कुंभकर्णासीं करितां रण । एका जनार्दना शरण । सावधान अवधारा ॥ ६ ॥ सावध ऐकतां रामायण । चारी मुक्ती येती शरण । करितां नित्य नामस्मरण । ब्रह्म परिपूर्ण स्वयें होती ॥ १०७ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां कुंभकर्णयुद्धप्रारंभो नाम पंचविंशतितमोऽध्यायः ॥ २५ ॥ ओंव्या ॥ १०७ ॥ श्लोक ॥ ४१ ॥

अध्याय सव्विसावा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ रणीं मारिले निशाचर। कुंभकर्णासी क्रोध फार । गिळावया पैं वानर । अति सत्वर धांवला ॥ १ ॥ संमुख येतां कुंभकर्ण । मागां न सरती वानरगण । अंगदें आश्वासिलें पूर्ण । करावया रण उद्यत[6] ॥ २ ॥

ते निवृत्ता महाकायाः श्रुत्वांगदवचस्तदा ।
नैष्ठिकीं बुद्धिमास्थाय सर्वे संग्रामकांक्षिणः॥ १ ॥
अथ वृक्षान्महाकायाः शृंगाणि सुमहांति च ।
वानरास्तूर्णमुत्पाट्य कुंभकर्णमभिद्रवन् ॥ २ ॥

देवोनि रामनामाचा धीर । अंगदें परतविले वानर । करोनि वाढिवेचा गजर । धांवले समोर कुंभकर्णा ॥ ३ ॥ सांडोनि शरीराची आस । मरणावरी घालोनि कांस । वानरवीरां विशेष। अति उल्लास संग्रामीं ॥ ४ ॥ रामनामाच्या गजरीं । मरण घालून तोंडरीं । कुंभकर्णासीं समरीं। युद्ध वानरीं मांडलें ॥ ५ ॥ कुंभकर्ण आवेशें येत । त्यासी वानरवीर समस्त । शिळा शिखरें पर्वत । स्वयें हाणीत सांटोपें ॥ ६ ॥ कुंभकर्ण रागेंकरीं । वानरां करावया बोहरी । धरोनियां दोहीं करीं। मुखाभीतरीं घालीत ॥ ७ ॥ वानर घालितां मुखांतरीं । सर्वेचि निघती कर्णद्वारीं । बैसोनियां नाकावरी । भुभुःकारीं गर्जत ॥ ८ ॥ निघोनियां कर्णद्वारीं । वानर चढले मुगुटावरी । एक बैसले ध्वजाग्रीं । एक छत्राग्रीं वळंघले[9] ॥ ९ ॥ वानर गेले हातोहात । मुख राहिलें हर्कहकित[11] । चवी न लभेचि निश्चित । समसमित[12] अवाळीं[13] ॥ १० ॥ जिव्हा राहिली वणवणीत । आसावले[14] ठेले दांत। कांहीं नाढळे मुखांत । चरफडित कुंभकर्ण ॥ ११ ॥ वानर नाढळती घांसासीं । राग आला कुंभकर्णासी। मारावया वानरांसी । अति आवेशीं चालिला ॥१२॥ छेदावया वानरांचा कंद। कुंभकर्णा आला क्रोध । तंव पावला अंगद । रणबंधसमवेत ।.१३॥

अंगदः कुमुदो नीलो गवाक्षो गवयो हरिः ।
मैंदोऽथ द्विविदश्चैव जांबवान्विनतस्तथा ॥ ३ ॥
युगपद्यहनन्सर्वे कुंभकर्णं महाबलम् ।
तस्य गात्रे विनिक्षिप्ताः शिलाः शैलनिभास्तदा ॥ ४॥
ध्वजं रथं खरांश्चैव शूलं चैव न्यपातयन् ॥ ५ ॥

कोपें येतां कुंभकर्ण । अंगदादि दाही जण । उठावले वानरगण । कोण कोण ते ऐका ॥ १४ ॥ अंगद कुमुद नील प्रख्यात। गवाक्ष गवय आणि विनत । मैंद द्विविद जांबवंत । हरि विख्यात महावीर ॥ १५ ॥ इंहीं दहा जणीं वीरीं । क्षोभें कुंभकर्णावरी । शिळा शिखरें पर्वत गिरी । बहु

---

१ तुकडेतुकडे. २ गाढव आणि उंटें. ३ रथ. ४ वानर. ५ मांसाचा आणि रक्ताचा चिखल. ६ तयार. ७ पर्वा न करून. ८ आवेशानें. ९ नाश. १० चढले. ११ अतृप्त. १२ कोरडे. १३ ओष्ठप्रांत. १४ आशावलेले -आशाभूत.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

तरुवरीं हाणिल्या ॥१६॥ कुंभकर्णाच्या अंगावरी। शिळा शिखरें होत चुरी। पिष्ट होइजे तरुवरीं। महावीरीं हाणितां ॥१७॥ अंगदाची प्रबळ शिळा। न भेदीच त्याच्या शूळा। रथ सांडोनि उडाला। गजबजिला कुंभकर्ण ॥ १८ ॥ रथ सारथी सहस्र खर। ध्वज पताका सहितछत्र। अवघा केला चकचूर अंगदवीरें गर्जोनी ॥ १९ ॥ अंगदें थोर केली ख्याती। कुंभकर्ण केला विरथी। तेणें गदा घेतली हातीं। कोपानुवृत्तीं धांविन्नला ॥ २० ॥

सोऽवप्लुत्य रथाद्वीरो गदामुद्यम्य सत्वरम्।
वेगेनाभ्युत्पपाताशु पक्षवानिव पर्वतः ॥ ६ ॥
स कुम्भकर्णः संक्रुद्धः शूलमुद्यम्य वीर्यवान्।
शतानि सप्त चाष्टौ च सहस्राणि च वानराः ॥ ७ ॥
प्रकीर्णाः शेरते भूमौ कुम्भकर्णनिपातिताः।
षोडशाष्टौ च दश च सहस्रं वापि वानरान् ॥ ८ ॥
संपरिष्वज्य बाहुभ्यां निष्पिपेष स राक्षसः ॥ ९ ॥

रथ सारथि होतां चूर। उडोनि गेला निशाचर। गदाशूळेंसीं सशस्त्र। मारूं वानर धांवला ॥ २१ ॥ अंगदवाक्यप्रवोधनीं। वानरवीर रणांगणीं। पाठी देणें नाहीं कोणी। भिडती रणीं सांटोपें ॥ २२ ॥ कुंभकर्ण शूळहस्तें। एके घायें वानरांतें। सात शतें आठ शतें। खोंचून अमितें पाडिलीं ॥ २३ ॥ पसरोनियां दोन्ही हात। सोळा शत अठरा शत। दहा सहस्र असंख्यात। कपि मारीत आवेशीं ॥ २४ ॥ वानरवीर असंख्यात। कुंभकर्णें खेव्याआंत। रगडूनियां अपरिमित। रणीं बहुत पाडिले ॥ २५ ॥ वानरवीरांचियां श्रेणी। कुंभकर्णें पाडिल्या रणीं। अशुद्ध प्रवाहे धरणीं। जाली चिंडाणी मेदमांसें ॥२६॥ वानरवीर पडतां रणीं। सुषेण वैद्यशिरोमणी। श्रीरामचरणरज घालोनी। वानरश्रेणी उठविल्या ॥ २७ ॥ मांस भक्षावया तेथ। कुंभकर्ण असे पहात। वानर उठले समस्त। अति विस्मित तेणें जाला ॥ २८ ॥ भक्तां साह्य श्रीरघुनाथ। मरों नेदी निजभक्त। रामनामें पैं गर्जत। कपि समस्त ऊठले ॥२९॥ रणीं वाढला कुंभकर्ण। त्यासीं करावया रण। कपि पावले पांच जण। शिळापाषाणद्रुमयोद्धे ॥ ३० ॥

ऋषभः शरभो नीलो गवाक्षो गंधमादनः।
पंचवानरशार्दूलाः कुम्भकर्णमुपाद्रवन् ॥ १० ॥
शैलैर्वृक्षैस्तलैः पादैर्मुष्टिभिश्च महाबलाः।
कुंम्भकर्णं महाकायं सर्वतो व्यहनन्दृढम् ॥ ११ ॥
स्पर्शानिव प्रहारांस्तान्मन्यमानो न विव्यथे।
ऋषभं तु महावेगं बाहुभ्यां परिषस्वजे ॥ १२ ॥
कुम्भकर्णभुजाभ्यां तु पीडितो वानरोत्तमः।
पपात ऋषभो भूम्यां मुखादागतशोणितः ॥ १३ ॥

पांचही वीर संग्रामशीळ। ऋषभ शरभ आणि नीळ। गवाक्ष गवय अति प्रबळ। वीरशार्दूळ संग्रामीं ॥ ३१ ॥ नीळ निजांगें आपण। घेऊन पर्वत पाषाण। संमुख ठोकिला कुंभकर्ण। रणीं गर्जोन साटोपें ॥ ३२ ॥ लागतां पर्वतांचा घात। कुंभकर्ण रुधिरोक्षित। तेणें रागें मुष्टिघात। नीळासी देत निजहस्तें ॥ ३३ ॥ लागतांचि मुष्टिघात। तेणें नीळ रुधिर वमितें। विकळ पडिला मूर्च्छित। जेंवी पर्वत वज्रघातें ॥ ३४ ॥ नीळ पडतांचि मूर्च्छित। श्रीरामस्मरणान्वित। सवेंचि होवोनि सावचित्त। आला गर्जत संग्रामा ॥ ३५ ॥ शिळा शिखरें प्रचंड शैलें। तळघातें शाल ताल। मुष्टीं हाणिती वर्मस्थळ। संग्रामकुशळ कपियोद्धे ॥ ३६ ॥ पांचही वीर एकीभूत। होवोनियां संग्रामांत। कुंभकर्णासीं भिडत। आले गर्जत साटोपें ॥ ३७ ॥ ऐसे लागतां प्रहार। कुंभकर्ण केला जर्जर। ते घाय न मानूनि निशाचर। रणीं दुर्धर खवळला ॥ ३८ ॥ ऋषभवीर आतुर्बळी। आकळोनियां करतळीं। खेंव देवोनि रांगोळी। केला तत्काळीं कुंभकर्णें ॥ ३९ ॥ अति बळें बळवंत। ऋषभवीर अति विख्यात। स्वयें रुधिरातें वमित। रणीं मूर्च्छित पाडिला ॥ ४० ॥

मुष्टिना शरभं चापि जानुना नीलमाहवे।
आजघान गवाक्षं च तलेनेंद्ररिपुस्तदा ॥ १४ ॥
शरैरामर्दितस्तत्र सुगंधो गंधमादनः।
दत्तप्रहार व्यथिता मुमुहुः शोणितोक्षिताः ॥ १५ ॥
निपेतुश्चापि मेदिन्यां निकृत्ता इव किंशुकाः।
तेषु वानरमुख्येषु पातितेषु महात्मसु ॥ १६ ॥

१ रथरहित. २ क्रोधाविष्ट होऊन. ३ अंगदानें केलेल्या उपदेशानें. ४ आवेशानें. ५ मिठीमध्यें. ६ पंक्ती. ७ रक्त. ८ पृथ्वीवर. ९ पर्वत, ढीग. १० रक्तानें माखलेला. ११ओकला. १२ पर्वत.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वानराणां सहस्राणि कुम्भकर्णं प्रदुद्रुवुः ।
ते वानराः खमुत्पत्य सन्नदन्तो महाबलाः ॥ १७ ॥
तं नखैर्दशनैश्चैव जानुभिर्मुष्टिभिस्तलैः ।
कुम्भकर्णं महाकायं ते निजघ्नुः प्लवंगमाः ॥ १८ ॥

ऋषभा पाडोनि मूर्च्छापन्न । उरले जे कां चवघे जण । त्यांवरी धांवला कुंभकर्ण । रणीं गर्जोन साटोपें ॥ ४१ ॥ शरभें हाणितला पर्वत । येरें दिधला मुष्टिघात । पर्वत पिष्ट करोनि तेथ । शरभ मूर्च्छित पाडिला ॥ ४२ ॥ नीळें हाणितां शिळाशिखर । रागें दिधला पांपर¹ । लातां शिखर करोनि चूर । नीळ महावीर पाडिला ॥ ४३ ॥ गवाक्ष वीर अति विख्यात । कुंभकर्णाचे पाडिले दांत । येरें हाणोनि तळघात । रणीं मूर्च्छित पाडिला ॥ ४४ ॥ गंधमादन वीर दारुण । शालतालवृक्षीं जाण । हाणोनियां कुंभकर्ण । रुधिरें पूर्ण न्हाणिला ॥ ४५ ॥ रागें त्रिशूळ हाणितां जाण । गगना गेला गंधमादन । कुंभकर्ण स्वयें उडोन । धरी धांवोन साटोपें ॥ ४६ ॥ सुगंध देखोनि गंधमादन । त्याचें केलें अंगमर्दन । ऐसे पाडिले पांचही जण । केलें गर्जन कुंभकर्णें ॥ ४७ ॥ पळवावया वानरभार । धांविन्नला निशाचर । तंव ते निधडे महावीर । युद्धा सत्वर मिसळले ॥ ४८ ॥ करोनियां रामनामस्मरण । गगना उडोनि वानरगण । शिळा पर्वत पाषाण । शाल ताल पूर्ण हाणिती ॥ ४९ ॥ कुंभकर्ण आतुर्बळी । हाणोनियां निजशूळीं । शिळावृक्षपर्वतजाळी³ । छेदून तत्काळीं सांडिले ॥ ५० ॥ मारावया वानरकोटी । धांविन्नला उठाउठीं । वानरवीर जगजेठी । कंठीं मुकुटीं झोंबले ॥ ५१ ॥ कुंभकर्णाचे आंगावरी । चालिल्या वानरांच्या हारी । एक चिरिती नखाग्रीं । एक दशनाग्रीं⁴ मारिती ॥ ५२ ॥ एक गुडघा हाणिती तळीं । मुष्टिघातें आतुर्बळी । एक हाणिती करतळीं । तनु रक्ताळी⁵ तिहीं केली ॥ ५३ ॥ वानर मिळोनि समस्त । निष्ठुर हाणोनियां घात । कुंभकर्ण रुधिराक्त । केला रणांत वानरीं ॥ ५४ ॥ ऐसें वानरीं करितां रण । कोपा चढला कुंभकर्ण । शूळ घेवोनि आपण । कपिकंदन मांडिलें ॥ ५५ ॥

बाहुभ्यां वानरान्सर्वानाकृष्य सुमहाबलः ।
भक्षयामास संक्रुद्धो गरुडः पन्नगानिव ॥ १९ ॥
मर्दयन्वानरान्सर्वान्संक्रुद्धो राक्षसोत्तमः ।
मांसशोणितसंक्लेदां कुर्वन्भूमिं स राक्षसः ॥ २० ॥
वज्रहस्तो यथा शक्रः पाशहस्तो यथांतकः ।
शूलहस्तो बभौ युद्धे कुंभकर्णो महाबलः ॥ २१ ॥
यथा शुष्काण्यरण्यानि ग्रीष्मे दहति पावकः ।
तथा वानरसैन्यानि कुंभकर्णो ददाह सः ॥ २२ ॥

हाणितां शूळाचा आघात । वानर उडती आकाशांत । कुंभकर्णें पसरोनि हात । कपि समस्त आकळिले ॥ ५६ ॥ एक रगडोन भक्षित । एक सगळेचि गिळित । एक शिळातळीं मर्दित । एक चघळित दांतांतळीं ॥ ५७ ॥ रणीं मारितां प्लवंगमं⁶ । जाला मांसशोणितकर्दम । रणभूमि अति दुर्गम । वानरां परम प्रळयान्त⁷ ॥ ५८ ॥ इंद्र वज्रें करी पर्वतछेदन । पाशहस्तें यम घे प्राण । तेंवी शूळाघातें कुंभकर्ण । वानरां कंदनँ करीतसे ॥ ५९ ॥ जेंवी कां शुष्कवनीं तृणें । ग्रीष्मीं जाळिजे हुताशनें⁸ । तेंवी वानरपाळीगणें⁹ । कुंभकर्णें त्रासिलीं ॥ ६० ॥

ततस्ते वध्यमानास्तु कुंभकर्णेन वानराः ।
राघवाभ्याशमाजग्मुर्व्यथिता नष्टचेतसः ॥ २३ ॥

कुंभकर्ण करितां घात । वानरां आश्रय श्रीरघुनाथ । त्यापासीं आले समस्त । दुःखाभिभूत कपिकुळें ॥ ६१ ॥ कुंभकर्णाच्या आटाटी¹⁰ । श्रीराम लक्षोनियां दृष्टीं । वानर आले कोटयनुकोटी । रणीं संकटीं त्रासूनी ॥ ६२ ॥ वानरसैन्याची महाआंटी । हनुमंतें देखोनियां दृष्टीं । रागें उठला कडकडाटीं । फोडावया घांटी¹¹ कुंभकर्णाची ॥ ६३ ॥ सीताशुद्धी करितां जाण । दीर्घ देखिला कुंभकर्ण । त्यासींच आपण करावें रण । हा संकल्प पूर्ण हनुमंतीं ॥ ६४ ॥ बळी वाखाणिला कुंभकर्ण । त्यासींच करोनियां रण । त्याची पहावया आंगवण । उल्लास पूर्ण हनु-

१ लात. २ आवेशानें. ३ शिळा, वृक्ष आणि पर्वत यांचे समूह. ४ दांतांच्या अग्रांनीं. ५ रक्तानें भरलेला.

६ वानर. ७ नाश. ८ अग्नीनें. ९ वानरांचे थवे. १० मोठा नाश, घात. ११ गळा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

मंता ॥ ६५ ॥ आजि माझें भाग्य समर्थ । प्रसन्न जाला श्रीरघुनाथ । रणीं सांपडला कुंभकेत । युद्धपुरुषार्थ तुकावया[1] ॥ ६६ ॥

हनुमाञ्शैलशृंगाणि शतशोऽथ सहस्रशः ।
ववर्ष कुंभकर्णस्य शरीरे वानरर्षभः ॥ २४ ॥
तानि पर्वतशृंगाणि शूलेन परमाहवे ।
बिभेद परमायत्तः कुंभकर्णो मदोत्कटः ॥ २५ ॥
ततो हरीणां तदनीकमुग्रं
दुद्राव शूलं निशितं प्रगृह्य ।
तस्थौ च तस्यापततः पुरस्तान्
महीधराग्रं हनुमान्प्रगृह्य ॥ २६ ॥

पहिलें पुच्छाचें करोनि रण । पाहूं कुंभकर्णाची आंगवण । नाटोपे तरी आपण । देवोनि उड्डाण निर्दळूं ॥ ६७ ॥ ऐसें विचारोनि हनुमंत । पुच्छाग्रें प्रेरितां पर्वत । वर्षे पर्वत शतानुशत । असंख्यात ते वेळां ॥ ६८ ॥ शतानुशत पर्वत । पुच्छ लागवेगें वर्षत । तेणें कुंभकर्ण साशंकित । गिरि तोडीत शूळहस्तें ॥ ६९ ॥ पर्वत सहस्रें सहस्र । तोडितां श्रमला निशाचर । झणाणिले त्याचे कर । कपि दुर्धर पुच्छाग्रें ॥ ७० ॥ ऐसें त्याचें पुच्छ बळी । करोनि राक्षसां खंदळी[2] । केली लंकेची पैं होळी । आतुर्बळी कपिपुच्छ ॥ ७१ ॥ पुच्छाग्रबळें जाण । केलें अखयाचें निर्दळण । इंद्रजितासी रणीं गांजोन । करावया रण कपिपुच्छ ॥ ७२ ॥ कपिपुच्छ प्रतापवंत । धाक लाविला लंकेआंत । निधडा[3] वीर हनुमंत । ऐसें निश्चित मानलें ॥ ७३ ॥ ऐसा कपिपुच्छाचा धाक । कुंभकर्णें घेतला देख । हनुमंत आला पैं संमुख । देवोनि हांक साटोपें ॥ ७४ ॥ जैसा अचळ गिरिवर । तैसा कुंभकर्णासमोर । उभा ठेला हनुमान वीर । शैलशिखर झेलीत ॥ ७५ ॥ कुंभकर्ण मदोन्मत्त । सैरा धांवे शूळहस्त । पुढें देखोन हनुमंत । साशंकित तो जाला ॥ ७६ ॥ हाणितां पुच्छाभिघात । कुंभकर्ण चांचरी[4] जात । झणाणिला शूळहस्त । शूळ गळत रणांगणीं ॥ ७७ ॥ शूळ रणीं गळोनि पडत । तेणें कुंभकर्ण क्रोधान्वित[5] । शूळ घेवोनि धांवत । रणीं हनुमंत मारावया ॥ ७८ ॥

सशूलमाविध्य तडित्प्रकाशं
गिरिर्यथा प्रज्वलिताग्रशृंगम् ।
स तेन वीरोभिहतस्तनांतरे
स विह्वलः शोणितमुद्वमन्मुखात् ॥ २७ ॥
रणे बभासे हनुमान्महायशा
यथातपांते सजलो बलाहकः ॥ २८ ॥

कुंभकर्णाची आंगवण । पहावया हनुमंत आपण । पुढें राहिला सावधान । मरण मारून प्रतापी ॥ ७९ ॥ याच्या अंगीं किती शक्ती । घावो हाणील कैशा रीतीं । तें पहावया मारुती । सावधवृत्तीं राहिला ॥ ८० ॥ मारावया हनुमंत । कुंभकर्ण शूळहस्त । रागें रणरंगीं गर्जत । स्वयें धांवत साटोपें ॥ ८१ ॥ जेंवी विजू धगधगित । तैसा शूळ सिंदूराचिंत । जैसा देदीप्यमान पर्वत । तैसा भासत महाशूळ ॥ ८२ ॥ घाव हाणितां कपींद्रा । शूळ न फुटेचि वानरा । भवंडी आली निशाचरा । पडे माघारा चांचरित ॥ ८३ ॥ पुढें अशुद्धातें[6] वमित । मूर्च्छापन्न हनुमंत । देखोनि कुंभकर्ण धांवत । कपीचा घात करावया ॥ ८४ ॥ हनुमंत अति विंदानी[7] । कुंभकर्ण धरोनि चरणीं । गर्जत उठिला तो रणीं । गरगरोनि भवंडित ॥ ८५ ॥ क्षणैक भवंडी भूतळीं । क्षणैक भवंडी नभःस्थळीं । हनुमान वीर महाबळी । चक्रानुमेळीं भवंडिला ॥ ८६ ॥ त्यासी टाकितां समुद्रजळीं । समुद्र लागेल नाभिमूळीं । आपटितां पैं भूतळीं । होईल रांगोळी पाताळा ॥ ८७ ॥ यासी टाकितां अंबरीं[8] । गिळील विमानांचिया हारी । त्यासी मारूं कैशापरी । विचार करी हनुमंत ॥ ८८ ॥ कुंभकर्णायेवढें धेंडें । उचलोनियां कैवाडें । हनुमान मातला रणसुरवाडें । वाडेंकोडें नाचत ॥ ८९ ॥ श्रीराम संतोषोनि पूर्ण । सुग्रीवासी सांगे आपण । हनुमंताची आंगवण । रणविंदान पाहें पां ॥ ९० ॥ ऐकतां श्रीरामवचन । सुग्रीवासी आलें स्फुरण । स्वयें करोनि उड्डाण । कुंभकर्ण हांकिला[9] ॥ ९१ ॥ एकावरी दोघे जण । हा पुरुषार्थ नव्हे जाण । हनुमंतें कुंभकर्ण । स्वयें आपण सोडिला ॥ ९२ ॥ जैसा होता स्वयें उचलिला । तैसाच तेथें उभा

१ तुलना करण्यास. २ नाश. ३ अति बलाढ्य. ४ घेरी येऊं लागली. ५ क्रोधयुक्त. ६ रक्त. ७ पराक्रमी.

८ आकाशांत. ९ हांक मारून बोलाविला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

केला। निधडा हनुमंत दादुला। उडोनि आला श्रीरामापासीं ॥ ९३ ॥ घालोनियां लोटांगण। मस्तकीं वंदोनियां चरण। हनुमंत कोपायमान। काय आपण बोलत ॥ ९४ ॥ हनुमान म्हणे श्रीरामातें। धूरलक्षण नाहीं तूतें। काय उणें देखोनि मातें। सुग्रीवातें धाडिलें ॥ ९५ ॥ नाहीं वीर्य धैर्य सांडिलें। नाहीं उणेपण मज आलें। सुग्रीवासी कोणें बोलें। त्वां धाडिलें श्रीरामा ॥ ९६ ॥ धाडोनियां युद्धसंग्रामासी। तुवां दिधलें आणिकासी। गाऱ्हाणें सांगू कोणापासीं। उकसाबुकसीं स्फुंदत ॥ ९७ ॥ देखोनि हनुमंताची व्यथा। कृपा आली श्रीरघुनाथा। आलिंगोनि एकात्मता। आश्वासिता होय त्यासी ॥ ९८ ॥ हनुमंताच्या उदरांत। डोई घालोनि रघुनाथ। माझे अपराध समस्त। क्षमा निश्चित करीं बापा ॥ ९९ ॥ पाहें हनुमंताचें रण। म्हणतां त्यासी आलें स्फुरण। मजही न पुसतां जाण। केलें उड्डाण सुग्रीवें ॥ १०० ॥ तुझी आण हनुमंता। सुग्रीव मज न पुसतां। रणीं आला सांटोपता। सत्य वार्ता हे माझी ॥ १ ॥ श्रीरामाच्या मृदु वचनीं। हनुमान लोळे गडबडोनी। त्रिसत्य सत्य तुझी वाणी। वेदपुराणीं अति वंद्य ॥ २ ॥ हनुमान चरणीं ठेवोनि माथा। म्हणे सुखी जालों श्रीरघुनाथा। परिहार सुचों नको आतां। पुढील कथा अवधारीं ॥ ३ ॥ एका जनार्दना शरण। हनुमंतकुंभकर्णरण। जाहलें दोहींचें संपूर्ण। पुढें निरूपण अवधारा ॥ १०४ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां हनुमंतकुंभकर्णयुद्धवर्णनं नाम षड्विंशतितमोऽध्यायः ॥२६॥ ओंव्या ॥१०४॥ श्लोक ॥२८॥

अध्याय सत्ताविसावा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ स्वयें बोले श्रीरघुनंदन। सुग्रीव आणि कुंभकर्ण। दोघांसीं मांडलेंसे रण। सावधान अवधारा ॥ १ ॥

उत्पपात तदा वीरः सुग्रीवो वानराधिपः।
सशालहस्तः सहसा समाविध्य महाबलः ॥ १ ॥
अति दुद्राव वेगेन कुंभकर्णं महाबलम्।
तमापतंतं संप्रेक्ष्य कुंभकर्णः प्लवंगमम् ॥ २ ॥
तस्थौ विवृत्तसर्वांगो वानरेंद्रस्य संमुखः।
कुंभकर्णं स्थितं दृष्ट्वा सुग्रीवो वाक्यमब्रवीत् ॥ ३ ॥
निहताश्च त्वया वीराः कृतं कर्म सुदुष्करम्।
सहस्वैकं निपातं मे शालवृक्षस्य राक्षस ॥ ४ ॥

सुग्रीव कपिराज आपण। लक्षोनियां कुंभकर्ण। सवेग करोनि उड्डाण। आला गर्जोन शालहस्ती ॥ २ ॥ कुंभकर्ण अति विस्मित। मज उचलोनि हनुमंत। होता गरगरां भोंवंडित। तो कां न मारितां स्वयें गेला ॥ ३ ॥ मज कुंभकर्णाची शक्ती। क्षणार्धें केली नॅ सरती। निधडा बळियाढा मारुती। धर्मस्थितीं रणयोद्धा ॥ ४ ॥ एकावरी दोघेजण। श्रेष्ठीं करूं नये रण। तें धर्मशास्त्र प्रतिपाळून। स्वस्थ ठेवून मज गेला ॥ ५ ॥ बळें भवंडितां आकाशीं। येतां देखोनि सुग्रीवासी। मज स्वस्थ ठेवोनि भूमीसी। श्रीरामापासीं स्वयें गेला ॥ ६ ॥ हा तंव नव्हे हनुमंत। सुग्रीवराजा अति विख्यात। याचा करीन मी घात। संग्रामांत निमेषार्धें ॥ ७ ॥ ऐसें बोलोनि आपण। सुग्रीवातें अनुलक्षून। संमुख आला कुंभकर्ण। शूळ घेऊन साटोपें ॥ ८ ॥ शूळहस्ती शालहस्ती। दोघे वीर भद्रजाती। येरयेरांतें निर्भर्त्सिती। स्वयें बोलती नोकोनी ॥ ९ ॥ संमुख देखोनि कुंभकर्ण। सुग्रीव स्वयें बोले आपण। नीचा कपीसीं करोनि कंदन। दादुलपण मिरविसी ॥ १० ॥ आतां मी आलों शालहस्ती। किती आहे तुझी शक्ती। ते दाखवीं कां मजप्रती। रणव्युत्पत्ती विचारोनि ॥ ११ ॥ मी एकला शालहस्ती। श्रीरामसेवक भद्रजाती। तुझी करीन समाप्ती। रणव्युत्पत्तीं महामारें ॥ १२ ॥ ऐकोनि सुग्रीववचन। हांसोन बोले कुंभकर्ण। वीर न बोलती आंगवण। करोनि रण दाविती ॥ १३ ॥ जे कां बहुविध जल्पती। त्यांसी नाहीं संग्रामभक्ती। जरी तूं होसील पुरुषार्थी। करोनि ख्याती दावीं मज ॥ १४ ॥ सुग्रीवासीं करावया रण। कुंभकर्णा उल्हास पूर्ण। सरसावले दोघे जण। अति निर्वाण संग्रामीं ॥ १५ ॥

स कुंभकर्णस्य वचो निशम्य
व्याविध्य शैलं सहसा मुमोच।

---

१ पराक्रमानें. २ अगदीं सत्य. ३ शालवृक्ष हातांत घेऊन.

४ तुच्छ, निरुपयोगी. ५ अत्यंत शूर. ६ निर्भर्त्सना करून.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

तेनाजघानोरसि कुंभकर्णं
शैलेन शक्राशनिसन्निभेन ॥ ५ ॥
तच्छैलशृंगं सहसा प्रभग्नं
भुजांतरे तस्य तदा विशाले ।
सशैलशृंगाभिहतश्चुकोप
ननाद रोषाच्च विवृत्य वक्त्रम् ॥ ६ ॥
विव्याध शूलं च तडित्प्रकाशं
चिक्षेप हर्यृक्षपतेर्वधाय ।
तत्कुंभकर्णस्य भुजप्रणुन्नं
शूलं शितं कांचनदामजुष्टम् ॥ ७ ॥
क्षिप्रं समुत्पत्य निगृह्य दोर्भ्यां
बभंज वीरस्तरसा बलेन ॥ ८ ॥
कृतं भारसहस्रस्य शूलं कालायसं दृढम् ।
बभंज जानुमारोप्य संप्रहृष्टः प्लवंगमः ॥ ९ ॥

ऐकोनि कुंभकर्णवाक्यासी । कोप आला सुग्रीवासी । शूळ हाणितां आवेशीं । शालवृक्षीं त्यासी ठोकिलें ॥ १६ ॥ शाल लागतां भुजांतरीं । शूळ पडिला धरेवरी । कुंभकर्णा आली घेरी । अर्धचंद्री लागली ॥ १७ ॥ विकळ जातां चांचरी । राक्षस मूर्च्छेतें सांवरी । शूळ घेवोनियां करीं । सुग्रीवावरी धांविन्नला ॥ १८ ॥ कुंभकर्ण अर्ध क्षणीं । वानरराजासी पाडील रणीं । राक्षससैन्याचिया श्रेणी । आल्हादोनी गर्जती ॥ १९ ॥ शूळ ताडितां कोपेंकरीं । सुग्रीवबळाची पैं थोरी । उडोनि शूळ दोहीं करीं । वरिच्यावरी झेलिला ॥ २० ॥ जैसें उंसाचें करबाड । गुडघीं घालोनि मोडिती गोड । तैसा शूळ अति प्रचंड । केला दुखंड सुग्रीवें ॥२१॥ शतत्रय पुरुषांसी । शूळ नुचले अति आवेशीं । सुग्रीवें झेलोनि आकाशीं । जानुप्रदेशीं मोडिला ॥ २२ ॥ निर्खळ तिख्याचा धगधगित । तुळितां भार शतानुशत । रत्नालंकारीं लखलखित । अत्यद्भुत महाशूळ ॥ २३ ॥ तोही वरच्यावरी झेलोनी । सुग्रीवें सांडिला मोडूनी । हरिखें श्रीरामनामवाणी । गर्जत रणीं महावीर ॥ २४ ॥ शूळ भंगितां सत्वर । स्वर्गीं नाचती सुरवर । सुग्रीवराजा महाथोर । कर्म दुर्धर स्वयें केलें ॥ २५ ॥

१ चिपाड. २ तीनशें. ३ गुडघ्यांवर धरून. ४ केवळ. ५ तोलून पाहतां. ६ आनंदानें. ७ शुद्धि. ८ भिडतां.

स तं तदा भग्नमवेक्ष्य शूलं
चुकोप रक्षोऽधिपतिर्महात्मा ।
उत्पाट्य शृंगं सहसा गिरेस्त-
ज्जघान सुग्रीवमभिप्रतर्दन् ॥ १० ॥
स शैलशृंगाभिहतो विसंज्ञः
पपात भूमौ युधि वानरेंद्रः ।
तं प्रेक्ष्य भूमौ पतितं विसंज्ञं
नेदुः प्रहृष्टा युधि यातुधानाः ॥ ११ ॥
ततस्तमासाद्य जगाम वीरं
संस्तूयमानो युधि राक्षसौघैः ।
शृण्वन्निनादं त्रिदिवालयानां
प्लवंगराजग्रहविस्मितानाम् ॥ १२ ॥
ततस्तमादाय तदा स मेने
हरींद्रमिंद्रोपममिंद्रवीर्यः ।
अस्मिन्हते सर्वमिदं प्रशांतं
सराघवं सैन्यमितींद्रशत्रुः ॥ १३ ॥

जेणें शूळें सुरासुर । यक्ष गंधर्व किन्नर । रणीं भंगिला अमरेंद्र । तो येणें सत्वर मोडिला ॥२६॥ माझा शूळ अत्यद्भुत । झेलून भंगिला आकाशांत । तेणें कुंभकर्ण विस्मित । धन्य पुरुषार्थ सुग्रीवा ॥ २७ ॥ शूळ भंगिला महाथोर । तेणें कोपला निशाचर । घेवोनियां गिरिशिखर । सुग्रीवावरी टाकिलें ॥२८॥ सुग्रीव उडतां आकाशीं । शिखर आदळलें उरासी । मूर्च्छित पडिला भूमीसी । संज्ञा त्यासी असेना ॥ २९ ॥ कुंभकर्णें तये क्षणीं । वानरराजा पाडिला धरणीं । राक्षसवीरांची श्रेणी । उठली गर्जोनी जयजयकारें ॥ ३० ॥ वानरराजा रणांत । मज जाला हस्तगत । यश आलें अत्यद्भुत । रणीं डुल्लत कुंभकर्ण ॥ ३१ ॥ सुग्रीव मारिला रणांत । वानरसेना हताहत । रामसौमित्र हनुमंत । तेही समस्त मारीन ॥ ३२ ॥ मज विचरतां रणाआंत । बापुडें मनुष्य रघुनाथ । मुख्य मारिल्या हनुमंत । रणकंदनार्थ संपला ॥ ३३ ॥ यश मिरवावया रावणाजवळी । सुग्रीव वीर आतुर्बळी । स्वयें सूनि कांखेतळीं । निघे तत्काळीं लंकेसी ॥ ३४ ॥ निशाणें त्राहाटिल्या

९ घालून. १० वाजविल्या.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

भेरी । भाट गर्जती कैवारीं । स्तुती करिती निशाचरी । लंकेमाझारी निघाला ॥ ३५ ॥

विद्रुतां वाहिनीं दृष्ट्वा वानराणां ततस्ततः ।
कुम्भकर्णेन सुग्रीवं गृहीतं चापि वानरम् ॥ १४ ॥
हनूमांश्चिंतयामास मतिमान्मारुतात्मजः ।
एवं गृहीते सुग्रीवे किं कार्यं वै मया भवेत् ॥ १५ ॥
यत्तु न्याय्यं मया कर्तुं तत्करिष्यामि सर्वथा ।
भूत्वा पर्वतसंकाशो नाशयिष्यामि राक्षसम् ॥ १६ ॥
मया विमोक्षितस्यास्य सुग्रीवस्य महात्मनः ।
अप्रीतिश्च भवेत्कष्टा कीर्तिनाशश्च शाश्वतः ॥ १७ ॥

कुंभकर्णें रणाभिनिवेशीं । धरोनि नेतां सुग्रीवासी । प्रळय मांडिला वानरांसी । पळती चौपासीं किरकिरत ॥ ३६ ॥ तें देखोनि हनुमंत । स्वयें उठिला बळान्वित । सोडवावया वानरनाथ । असे गर्जत साटोपें ॥ ३७ ॥ धरोनि नेतां मुख्य धुर । उगेच पाहती वानर । तैसा नव्हें मी किंकर । करीन उद्धार स्वामिकार्याचा ॥ ३८ ॥ हाणोनियां मुष्टिघात । सोडवीन कपिनाथ । कुंभकर्णाचा करीन घात । असे गर्जत साटोपें ॥ ३९ ॥ मारोनियां कुंभकर्णासी । म्यां न सोडवितां सुग्रीवासी । परम अपकीर्ति रायासी । प्राण लाजेसीं सांडील ॥ ४० ॥ रणीं मारितां कुंभकर्ण । मज न लागे अर्ध क्षण । लाजें सुग्रीव सांडील प्राण । यालागीं आपण स्थिर व्हावें ॥ ४१ ॥ संज्ञा सांगे रघुनंदन । सुग्रीव स्वांगें आपण । करील आपली सोडवण । तुम्हीं आंगवण न करावी ॥ ४२ ॥ तुम्हीं करितां पुरुषार्थ । राक्षस त्याचा करितील घात । तेव्हां होईल अनर्थ । उगे स्वस्थ रहा येथें ॥ ४३ ॥ ऐसें सांगतां रघुनाथ । वानरवीर निवांत । उगा राहिला हनुमंत । पुढील कार्यार्थ अवधारा ॥४४॥ लंके जातां कुंभकर्ण । त्यासी होती अपशकुन । आडवे जाती बिडालगण । करिती रुदन म्यांव शब्दें ॥ ४५ ॥

स कुम्भकर्णोऽथ विवेश लंकां
स्फुरंतमादाय महाहरिं तम् ।
विमानचर्यागृहगोपुरस्थैः
पुष्पाग्र्यवर्षैरभिपूज्यमानः ॥ १८ ॥
ततः स संज्ञां प्रतिलभ्य कृच्छ्राद्
बलीयसस्तस्य भुजांतरस्थः ।
अवेक्षमाणः पुरराजमार्गं
विचिंतयामास मुहुर्महात्मा ॥ १९ ॥
एवं गृहीतेन कथं नु नाम
शक्यं मया संप्रति कर्तुमद्य ।
तथा करिष्यामि यथा हरीणां
भविष्यतीष्टं मम चैव पथ्यम् ॥ २० ॥
ततः कराग्रैः सहसोर्ध्वमेत्य
राजा हरीणाममरेंद्रशत्रोः ।
चकर्त कर्णौ दशनैश्च नासां
ददार पार्श्वेषु च कुंभकर्णम् ॥ २१ ॥

सुग्रीव धरिला कपिनाथ । महायशें मदोन्मत्त । कुंभकर्ण लंकेआंत । असे जात उल्लासें ॥ ४६ ॥ लंकामंदिरें विमानाकारी । त्यांवरी राहूनि नरनारी । हर्षें कुंभकर्णावरी । सुमनधारीं वर्षती ॥४७॥ घरोघरींच्या नारी उल्लासीं । अक्षता टाकोनियां शिरीं । ओंवाळिती कुंभकर्णासी । विजयाभिनिवेशीं जातसे ॥ ४८ ॥ बिभीषणाची निजकांता । जे कां परम पतिव्रता । तिणें कुंभकर्ण ओंवाळितां । विपरीतता तेथें जाली ॥४९॥ कुंभकर्ण उंच भारी । अक्षता न वचती तेथवरी । त्या पडिल्या सुग्रीवाच्या शिरीं । म्हणे झडकरी विजयी होईं ॥५०॥ पतिव्रतेचें वचन । सुग्रीवासी फळलें पूर्ण । मूर्च्छा जावोनि संपूर्ण । सावधान स्वयें जाला ॥ ५१ ॥ कुंभकर्णाचे कांखेभीतरीं । धरोनि आणिला लंकापुरीं । सुटका होय कैशापरी । ऐसें विचारी सुग्रीव ॥ ५२ ॥ श्रीरामनामाच्या आवर्तीं । सकळ श्रमांची निवृत्ती । तत्काळ होय बंधनमुक्ती । तें स्मरे चित्तीं सुग्रीव ॥ ५३ ॥ करितां रामनामस्मरण । सुग्रीव सुटला संपूर्ण । विटंबावया कुंभकर्ण । स्वयें आपण विचारी ॥ ५४ ॥ निघोनियां कांखेबाहेरी । बैसोनि त्याच्या उरावरी । नाका कानां केली बोहरी । तेही परी अवधारा ॥ ५५ ॥ मदोन्मत्त बळोन्मत्त । राज्योन्मत्त गर्वोन्मत्त । विजयोन्मत्त महामत्त । पंचोन्मत्त कुंभकर्ण ॥ ५६ ॥ पंचोन्मत्ताची पैं भुली । सुग्रीव सुटला

१ लढाईंत चिकाटीनें, २ सेवक, ३ मांजरें, ४ पुष्पवृष्टीनें, ५ जाऊं शकत ना, ६ घोषानें, पठनानें, ७ परिहार, ८ नाश,

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

कांखेतळीं । कुंभकर्णा नाठवे ते काळीं । विजयोन्मेळीं उन्मत्त ॥ ५७ ॥ सुग्रीव बैसोनि उरेंसीं । नखीं छेदिलें नाकासी । दांतीं छेदिलें कानासी । गेला आकाशीं उडोनी ॥ ५८ ॥ पंचोन्मत्त आवेशी । देह नाठवे कुंभकर्णासी । विटंबिलें नाककानांसी । हें तयासी स्मरेना ॥ ५९ ॥

स कुंभकर्णो हृतकर्णनासो
भृशं नदन्वेदनयान्वितश्च ।
रोषाभिभूतः क्षतजार्द्रगात्रः
सुग्रीवमाविध्य पिपेष भूमौ ॥ २२ ॥
स भूतले भूरिबलेन पिष्टः
सुरारिभिस्तैरभिहन्यमानः ।
जगाम खं कंदुकवज्जवेन
पुनश्च रामं सहसा जगाम ॥ २३ ॥

नाक कापोनि दोहीं हातीं । कान छेदोनियां दांतीं । गगना उसळला कपिपती । हें नेणे निश्चितीं कुंभकर्ण ॥ ६० ॥ जेंवी मैद्यपी विसरे शरीर । तेंवी देह विसरे निशाचर । काय करोनि गेला वानर । न कळे विचार कुंभकर्णा ॥ ६१ ॥ यशोमदें डुल्लत । लंकेमाजी असे जात । नाककानां जाला घात । नेणे वृत्तान्त कुंभकर्ण ॥ ६२ ॥ कुंभप्रायँ वाटोळे कान । यालागीं नांव कुंभकर्ण । वानरें छेदिले ते श्रैवण । आतां विकर्ण शोभत ॥ ६३ ॥ स्वर्गीं सुरवरीं पिटिली टाळी । बाप सुग्रीव आतुर्बळी । निष्टोनियां कांखेतळीं । केली होळी नाककानां ॥ ६४ ॥ सुग्रीव उसळोनि गगना । तेथून सांडितां नाककानां । दडपोनि राक्षसांची सेना । मुकली प्राणा लक्षान्त ॥ ६५ ॥ कुंभकर्णनाकाची बोहरी । धाड आली लंकेवरी । बोंब सुटली घरोघरीं । राक्षसहारी निमाल्या ॥ ६६ ॥ छेदोनियां नाककान । सुग्रीवें करोनि उड्डाण । श्रीरामाचे ठाकिले चरण । यशस्वी पूर्ण कपिनाथ ॥ ६७ ॥ सुग्रीव येवोनि आपण । घालोनियां लोटांगण । वंदितां श्रीरामाचे चरण । केलें गर्जन वानरीं ॥ ६८ ॥ निशाणें त्राहाटिल्या भेरी । गुढिया उभविल्या वानरीं । रामनामाच्या गजरीं । जयजयकारीं गर्जती ॥६९॥ आमुचा राजा बळिवंत । कुंभकर्ण बळोन्मत्त । त्याच्या नाककानां करोनि घात । विजयान्वित स्वयें आला ॥ ७० ॥ स्वयें सुग्रीव सांगे आपण । श्रीरामा ऐकें सावधान । वृथा आमची आंगवण । तुजवीण रघुनाथा ॥ ७१ ॥ कुंभकर्णें धरितां जाण । निःशेष जाता माझा प्राण । आठवतांचि नामस्मरण । आलें स्फुरण मज तेव्हां ॥ ७२ ॥ रामनामाच्या बळापुढें । राक्षसबळ तें बापुडें । मशक मानूं घुंगुरडें । मज बळ गाँढें रामाचें ॥ ७३ ॥ रामनामबळें जाण । त्याचे छेदिले नाककान । नामें पावलों तुझे चरण । विजयी संपूर्ण रामनामें ॥ ७४ ॥ नामापासीं यश कीर्ती । नाम[illegible]पासीं विजयवृत्ती । नामापासीं भुक्ति मुक्ती । रा[illegible]म स्मरती ते धन्य ॥ ७५ ॥ धन्य श्रीरामाचे चर[illegible] । धन्य श्रीरामाचें दर्शन । धन्य श्रीरामाचें स्मरण । बंदिमोचन रामनामें ॥ ७६ ॥ धन्य श्रीरामाची कीर्ति । धन्य श्रीरामभजनभक्ती । धन्य श्रीरामनित्यानुवृत्ती । नाम स्मरती ते धन्य ॥७७॥ नामासी नाहीं विधिविधान । नामासी न लागे कर्मबंधन । नामचि दासासी अनुष्ठान । नाम परिपूर्ण परब्रह्म ॥ ७८ ॥ नामासी न लागे सूतक । नाम भस्म करी पातक । नाम सर्वथा नित्य निर्दोख । स्मरतें सुख रामनामें ॥ ७९ ॥ नामासी नाहीं अँनाध्यावो । नामस्मरणीं नित्य स्वैाध्यावो । नाम स्मरती ते सभाग्य पहा हो । नाम स्वयमेव परब्रह्म ॥ ८० ॥ ऐसें बोलतां सुग्रीवासी । प्रेम ओसंडलें श्रीरामासी । आलिंगोनियां हृदयासीं । आपणापासीं बैसविला ॥ ८१ ॥ जीवापरिस परम आप्त । सुग्रीवा मानी श्रीरघुनाथ । तोही उठोनियां त्वरित । चरण धरीत हनुमंताचे ॥ ८२ ॥ माझे अपराध समस्त । क्षमा करावे त्वां निश्चित । म्यां केलें गा जें उर्द्धत । तें सावचित्त अवधारीं ॥ ८३ ॥ तुझिया संग्रामाआड । मी आलों गा महामूढ । विचार न करितां दृढ । केला कैवाड संग्रामा ॥ ८४ ॥ तुझिया संग्रामा अभक्ती । मी पावलों बंधनप्राप्ती । सुटलों रामनामानुवृत्तीं । क्षमा मारुति मज कीजे ॥ ८५ ॥ मी सुग्रीव प्रतापराशी । केंवी सांपडें कुंभकर्णासी । तुझिया संग्रा-

१ उरावर. २ दारूबाज. ३ मडक्याप्रमाणें. ४ कान. ५ मोठें, ६ बंदी, सुटी, ७ अभ्यास करण्याचा दिवस. ८ अडाणीपणा. ९ रामनामस्मरणानें, १० मोठा पराक्रमी,

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

मविक्षेपासीं । मी त्यापासीं अडकलों ॥ ८६ ॥ तेव्हां आठवावया श्रीरघुनाथ । हनुमानसद्गुरुकृपा समर्थ । तेणें जालों नित्यमुक्त । जाण निश्चित कपिवर्या ॥ ८७ ॥ तुवां भेटविला श्रीरघुनाथ । तूं गुरु आम्ही शिष्य समस्त । जें जें केलें म्यां उद्धत । क्षमा समस्त मज कीजे ॥ ८८ ॥ ऐकोनि सुग्रीवाचें वचन । हनुमान घाली लोटांगण । येरें दिधलें आलिंगन । समाधान श्रीरामें ॥ ८९ ॥ दोघांचे गेले गुणागुण । दोघां नाठवे दोनपण । एका जनार्दना शरण । कृपा पूर्ण श्रीरामाची ॥ ९० ॥ करितां रामनामस्मरण । सुग्रीवें विटंबिला कुंभकर्ण । एका जनार्दना शरण । गोड निरूपण पुढें आहे ॥ ९१ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां सुग्रीवकुंभकर्णयुद्धे सुग्रीवविजयप्राप्तिर्नाम सप्तविंशातितमोऽध्यायः ॥ २७ ॥ ओंव्या ॥ ९१ ॥ श्लोक ॥ २३ ॥

अध्याय अठ्ठाविसावा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ कुंभकर्णा लावोनि ख्याती । सुग्रीव पावोनि विजयवृत्ती[१] । स्वयें आला श्रीरामाप्रती । वानर गर्जती उल्लासें ॥ १ ॥ येरीकडे कुंभकर्ण । विजयोल्लासें आपण । लंकेसी जातसे जाण । दशानन वंदावया ॥ २ ॥ हांसती लंकेचे जन । हारवोनियां नाक कान । विजय मिरवितो आपण । काळें वदन कुंभकर्णा ॥ ३ ॥ कुंभकर्ण अति उन्मत्त । नाककानां झाला घात । कोणी सांगों न शके मात । तेणें लंकानाथ अति दुःखी ॥ ४ ॥ शत्रु मर्दील कुंभकर्ण । ऐसा भरंवसा होता पूर्ण । शेखीं हरवोनि नाककान । आला आपण फेंपात ॥ ५ ॥ सुग्रीवें छेदिले नाककान । हें कुंभकर्णा व्हावया ज्ञान । दीर्घ काष्ठीं आरसा बांधवोन । दावी रावण कुंभकर्णा ॥ ६ ॥ आरसा देखतां संमुख । आरशासीं भांडे देख । नापितहस्तें तूं काळमुख । मज निर्नासिक दाविसी ॥ ७ ॥ हातें पाहों जातां स्पष्ट । नाक कान सरसपाट । सुग्रीवें केलें यथेष्ट । अहा कटकट कुंभकर्णा ॥ ८ ॥ सुग्रीव पाहतां कांखेतळीं । तेणें सुटोनि तेचि काळीं । नाककानां करोनि होळी । श्रीरामाजवळी तो गेला ॥ ९ ॥ जळो माझी रणव्युत्पत्ती[४] । सन्मुखपणें विजयवृत्ती । कीर्ति जाली अपकीर्ती । केंवी लंकापती मुख दावूं ॥ १० ॥ हारवोनि नाककान । केंवी वंदूं दशानन । कोपें परतला कुंभकर्ण । वानरसैन्य निर्दळावया ॥ ११ ॥

> कर्णनासाविहीनस्तु कुंभकर्णो महाबलः ।
> रराज शोणितोत्सेकैर्गिरिः प्रस्रवणैरिव ॥ १ ॥
> पुनः स पुर्याः सहसा महात्मा
> निष्क्रम्य तद्वानरसैन्यमुग्रम् ।
> बभक्ष रक्षो युधि कुम्भकर्णः
> प्रजा युगांताग्निरिव प्रदीप्तः ॥ २ ॥
> बुभुक्षितः शोणितमांसगृध्नुः
> प्रविश्य तद्वानरसैन्यमाशु ।
> चखाद रक्षांसि हरीन्पिशाचा-
> नृक्षांश्च मोहाद्युधि कुंभकर्णः ॥ ३ ॥
> एवं द्वौ त्रीन्बहूंश्चापि वानरान्राक्षसैः सह ।
> समादायैकहस्तेन मुखे प्रक्षिपति स्म सः ॥ ४ ॥

सुग्रीवें नेले नाककान । अपमानिला कुंभकर्ण । कोपें परतला आपण । वानरगण मारावया ॥ १२ ॥ नाकीं कानीं रुधिरधारा । रक्तें न्हाणिलें निशाचरा । गेरु शोभे जेंवी गिरिवरा । तेंवी साजिरा रणीं दिसे ॥ १३ ॥ सांडोनियां लंकाभवन । केलें कुंभकर्णें उड्डाण । मर्दूनियां वानरगण । स्वयें आपण भक्षीत ॥ १४ ॥ वटारोनियां दोनी नयन । पसरोनियां दीर्घ वदन । भक्षीतसे वानरगण । कुंभकर्ण आक्रोशें ॥ १५ ॥ एक दोन तीन चारी । वानरसैन्याचिया हारी[६] । राक्षससैन्या त्याचि परी । मुखाभीतरी घालीत ॥ १६ ॥ रणीं मातला अति दुर्धर । त्यासी नाठवे आपपर । वानर आणि निशाचर । भक्षी एकत्र समसगट ॥ १७ ॥ प्रळयकाळीं हुताशन[७] । सर्व भक्षिता होय आपण । तेंवी वानररक्षोगण[८] । कुंभकर्ण भक्षीत ॥ १८ ॥ मांस खावया येती भूतें । कुंभकर्ण भक्षी त्यांतें । पिशाचें कंकाळें समस्तें । अस्वलांतें भक्षीत ॥ १९ ॥

> ते वध्यमाना हरयो रामं जग्मुः सतां गतिम् ।
> राघवश्च समुत्पत्य धनुरुग्रं समाददे ॥ ५ ॥

१ लढाईंत आडकाठी आणल्यामुळें. २ विजयप्राप्ति. ३ शेवटीं, ४ रणकौशल्य. ५ काव. ६ समुदाय. ७ अग्नि.

८ वानर आणि राक्षस यांचे समुदाय.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

स वानरगणैस्तैस्तु वृतः परपुरंजयः ।
लक्ष्मणानुगतो रामः संप्रतस्थे महाबलः ॥ ६ ॥

वृक्षशिळापर्वतपाषाण । वानरीं युद्ध करितां निर्वाण । रणीं नागवे कुंभकर्ण । आले धांवोन श्रीरामापाशीं ॥ २० ॥ कुंभकर्ण नाकेंविण । रणीं वानरां करितां कंदन । देखोनि कोपला रघुनंदन । धनुष्यबाण सज्जूनी ॥ २१ ॥ सुवर्णवंदी अति सुंदर । मणिरत्नांकित मनोहर । पाचूवंद परिकर । चाप गंभीर शोभत ॥ २२ ॥ ऐसिया सज्जोनियां धनुष्यासी । वानर घालोनि पाठीसीं । राम खवळला रणाभिनिवेशीं । कुंभकर्णासी निवटावया ॥ २३ ॥ श्रीरामें सज्जोनियां मेढा । उभा कुंभकर्णापुढां । राम नेटका धनुर्वाडा । मागां पुढां हालों नेदी ॥ २४ ॥ दोहीं बाहीं वानरगण । निकटवर्ती लक्ष्मण । रणीं क्षोभतां रघुनंदन । बिभीषण धांविन्नला ॥ २५ ॥ घालोनियां लोटांगण । वंदोनि श्रीरामचरण । मृदु मंजुळ मधुर वचन । बिभीषण विनवीत ॥ २६ ॥ कुंभकर्णा आवडी मोठी । त्याची घेवोनियां भेटी । जंव मी सांगेन जीवींच्या गोष्टी । तंव शरवृष्टी न करावी ॥ २७ ॥ निवारूनि वानरगणा । युद्ध ठेवोनि अर्ध क्षणा । भेटावया कुंभकर्णा । आज्ञापना मज द्यावें ॥ २८ ॥ कृपेनें बोले रघुनाथ । कुंभकर्ण अति उन्मत्त । रागें करील तुझा घात । कुळक्षयार्थ वाढेल ॥ २९ ॥ ऐकतां श्रीरामवचन । बिभीषणा आलें रुदन । प्रेम देखोनि रघुनंदन । आज्ञापन दीधलें ॥ ३० ॥

विभीषणः पुरो दृष्ट्वा मालिनीयं लघुः सदा ।
करुणाक्रोधलज्जाभिर्व्याप्तो विह्वलतां गतः ॥ ७ ॥
विभीषणो महाबाहुः कुंभकर्णमुवाच ह ।
गदितं मे कुलस्यास्य रक्षणार्थमरिंदम ॥ ८ ॥
न कृतं सर्वरक्षोभिस्ततोऽहं राममागतः ।
क्षमितव्यं तु भवता सुकृतं दुष्कृतं तु वा ॥ ९ ॥
एवमुक्त्वाश्रुपूर्णाक्षो गदापाणिर्विभीषणः ।
एकांतमाश्रितो भूत्वा चिंतयामास तत्क्षयम् ॥ १० ॥

संमुख देखोनि बिभीषण । कुंभकर्णा आलें रुदन । बाळपणापासून । प्रतिपालन येणें केलें ॥ ३१ ॥ माता पिता धाय धांता । त्याहून त्याची अधिक प्रेमता । त्यासी रावणें हाणितल्या लाता । अति विव्हळता स्फुंदत ॥ ३२ ॥ देखोनि कुंभकर्णाचें रुदन । स्वयें बोले बिभीषण । कुळरक्षणार्थ आपण । स्वहित संपूर्ण सांगितलें ॥ ३३ ॥ हा सविवेक प्रपंचहिता । हाचि हितार्थ परमार्था । त्यासी रावणें हाणितल्या लाथा । दुःखावस्था स्फुंदत ॥ ३४ ॥ ते स्वहिताची माझी मात । नायके इंद्रजित लंकानाथ । प्रधान परिवार समस्त । शेखीं प्रहस्त नायके ॥ ३५ ॥ लाथा हाणिल्या सभेप्रती । मज क्षोभ चढला नाहीं चित्तीं । बलात्कारें धरोनि हातीं । श्रीरामाप्रती दवडिलें ॥ ३६ ॥ यालागीं गा आपण । श्रीरामासी आलों शरण । माझे अपराध जे दारुण । क्षमा संपूर्ण करावे ॥ ३७ ॥ ऐकतां बिभीषणवचन । कुंभकर्णा आलें रुदन । दोघां पडिलें आलिंगन । स्रवती नयन दोघांचे ॥ ३८ ॥ बिभीषण धरोनि हातीं । कुंभकर्णें नेला एकांतीं । वैर करितां रघुपती । कुळसमाप्ती कुळक्षयो ॥ ३९ ॥ देखोनियां अति एकान्त । कुंभकर्ण सांगे अति भावार्थ । बिभीषणा तुझें भाग्य समर्थ । श्रीरघुनाथ पावलासी ॥ ४० ॥ करितां जप तप ध्यान । योगायोग अनुष्ठान । स्वप्नीं न दिसे रघुनंदन । तो सुप्रसन्न तुज जाला ॥ ४१ ॥

आत्मकार्यं कृतं वत्स यस्त्वं राममुपागतः ।
त्वमेको रक्षसां लोके सत्यधर्माभिरक्षितः ॥ ११ ॥
नास्ति सत्याभिसक्तानां व्यसनं तु कदाचन ।
संतानार्थं त्वमेवैकः कुलस्यास्य भविष्यसि ॥ १२ ॥
राघवस्य प्रसादाच्च रक्षसां राज्यमाप्स्यसि ।
प्रकृत्याहं सुदुर्धर्षः शीघ्रं मार्गादपक्रम ॥ १३ ॥
न स्थातव्यं पुरस्तान्मे संभ्रमान्नष्टचेतसः ।
न वेद्मि संयुगे सक्तः स्वान्परान्वा निशाचर ॥ १४ ॥
रक्षणीयोसि मे वत्स सत्यमेतद्ब्रवीमि ते ॥ १५ ॥

दोघां बंधूंचा एकान्त । कुंभकर्ण सांगे भावार्थ । पूर्णावतार श्रीरघुनाथ । निश्चितार्थ मी जाणें ॥ ४२ ॥ नारदवाक्याच्या निर्धारीं । श्रीराम अवतारां अवतारी । त्यासी पाहतां वैराकारीं । करील

१ युद्ध, लढाई. २ सुंदर. ३ धनुष्य. ४ उत्तम. ५ जवळ असणारा. ६ दाई. ७ पोषण करणारा. ८ राग, क्रोध. ९ शत्रुत्वेंकरून.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

बोहरी कुळाची ॥ ४३ ॥ श्रीराम वैरी करितां जाण । सपुत्र ससैन्यप्रधान । क्षय पावेल रावण । हेंही संपूर्ण मी जाणें ॥ ४४ ॥ तुवां थोर केलें उचित । होवोनि श्रीरामा शरणागत । कुळ तारिलें निश्चितार्थ । आम्ही समस्त उद्धरिलों ॥ ४५ ॥ राक्षसांच्या कुळाप्रती । बिभीषणा तूं भावार्थी । तुझ्या ठायीं श्रीरामभक्ती । परम परमार्थी तूं एक ॥ ४६ ॥ राक्षसकुळीं धर्मभूषण । सत्यानुवर्ती बिभीषण । तुझ्या धर्माचें निशाण । वैकुंठीं जाण गाजत ॥ ४७ ॥ ज्याच्या ठायीं श्रीरामभक्ती । त्यास भय नाहीं कल्पांतीं । कळिकाळ शरण येती । पायां लागती महाविघ्नें ॥ ४८ ॥ रणीं खवळला श्रीरघुनाथ । करील राक्षसांचा घात । मजसगट लंकानाथ । कुळ समस्त निर्दाळील ॥ ४९ ॥ रिघोन श्रीरामासी शरण । राक्षसकुळा संरक्षण । तूं वांचलासी बिभीषण । तिळतर्पण पिंडदाना ॥ ५० ॥ तुझें भाग्य अति समर्थ । तुज तुष्टला श्रीरघुनाथ । लंकाराज्य होईल प्राप्त । जाण निश्चित बिभीषणा ॥ ५१ ॥ धन्य प्रतापी रघुनंदन । न जिंणतां दशानन । लंकाराज्य दिधलें दान । अन्यथा कोण करूं शके ॥ ५२ ॥ आम्हीं जोडिला लौकिकार्थ । दाद्गुगेपणाचा पुरुषार्थ । तुवां जोडिला श्रीरघुनाथ । निजमोक्षार्थ राक्षसां ॥ ५३ ॥ लागतां श्रीरामाचे बाण । मी पावेन ब्रह्म पूर्ण । परम उल्लासें आपण । कुंभकर्ण अनुवादे ॥५४॥ घालोनियां लोटांगण । वंदून बिभीषणाचे चरण । म्हणे श्रीरामासीं करावया रण । आज्ञापन मज देईं ॥ ५५ ॥ मज कोप आल्या घोरांदर । युद्धीं नाठवे आपपर । तूं येथोनि परता सर । आम्ही निशाचर अविवेकी ॥ ५६ ॥ आम्ही राक्षस अति उन्मत्त । संमुख तुजला असतां येथ । अवचट होईल अनर्थ । नीघ निश्चित सुबंधो ॥ ५७ ॥ तूं श्रीरामाचा शरणागत । तुज मारणें नाहीं येथ । जवळी असतां होईल अनर्थ । नीघ निश्चित सभाग्या ॥ ५८ ॥ ठाकूनि जाईं श्रीरघुनाथ । तेथें तुज न लागे आघात । ऐसें बोलोनि कुंभकेत । रणाआंत निघाला ॥ ५९ ॥

मर्दंतं वानरान्संख्ये कालांतकयमोपमम् ।
तं दृष्ट्वा राक्षसश्रेष्ठं प्रदीप्तानलवर्चसम् ॥ १६ ॥
विस्फारयामास तदा कार्मुकं पुरुषर्षभः ।
स तस्य चापनिर्घोषात्कुपितो नैर्ऋतर्षभः ॥ १७ ॥
अमृष्यमाणस्तं घोषमभिदुद्राव राघवम् ।
तस्मिन्काले सुमित्रायाः पुत्रः परबलार्दनः ॥ १८ ॥
चकार लक्ष्मणः क्रुद्धो युद्धं शस्त्रविदां वरः ।
स कुंभकर्णस्य शराञ्शरीरे सप्त वीर्यवान् ॥ १९ ॥
निचखानाददे चान्यान्विससर्ज स लक्ष्मणः ।
अतिक्रम्य स सौमित्रिं कुंभकर्णो महाबलः ॥ २० ॥
राममेवाभिदुद्राव कंपयन्निव मेदिनीम् ॥ २१ ॥

जैसा काळ भूतां आकळित । कां यम यमपाशीं बांधित । अंतक सगळाचि गिळित । तेंवी वानरांतें कुंभकर्ण ॥ ६० ॥ जेंवी वन्ही वनाआंत । वनस्थळी भस्म करीत । तेंवी कुंभकर्ण वानरांत । कंदंन करीत कपिकुळा ॥ ६१ ॥ करीत वानरां मर्दन । येतां देखोनि कुंभकर्ण । तेणें क्षोभला रघुनंदन । धनुष्यबाण सज्जूनी ॥ ६२ ॥ करीत धनुर्ष्यी टणत्कार । नादें दुमदुमलें अंबर । कुंभकर्णाचें जिव्हार । अति दुर्धर दचकलें ॥ ६३ ॥ ऐकोनि चापगर्जन । कोपें खवळला कुंभकर्ण । लक्षूनियां रघुनंदन । सवेग आपण धांविन्नला ॥ ६४ ॥ धांवोनि येतां कुंभकर्ण । आडवा आला लक्ष्मण । धनुष्य सज्जोनि संपूर्ण । सात बाण विंधिले ॥ ६५ ॥ लागतांही सात बाण । डंडळीना कुंभकर्ण । तें देखोनि लक्ष्मण । बाण दारुण विंधिले ॥ ६६ ॥ अव्हेरून त्याचे बाण । उपेक्षोनियां लक्ष्मण । लक्षूनियां रघुनंदन । कुंभकर्ण धांवला ॥ ६७ ॥

कुंभकर्णो महातेजा राघवं वाक्यमब्रवीत् ।
नाहं विराधो विज्ञेयो न कबन्धः खरो न च ॥ २२ ॥
न वाली न च मारीचः कुंभकर्णमवैहि माम् ।
पश्य मे मुद्गरं घोरं सर्वकालायसं दृढम् ॥ २३ ॥
अनेन निर्जिता देवा दानवाश्च मया रणे ।
शक्रश्च निर्जितो राम नष्टाहं च स्वयंभुवः ॥ २४ ॥

---

१ नाश. २ सत्यधर्मानें वागणारा. ३ जिंकल्यावांचून. ४ उलट, ५ शूरत्वाचा, ६ प्रौढी, ७ भयंकर, ८ दाबांत ठेवितो. ९ अग्नि, १० नाश, ११ अंतःकरण, १२ भ्याला नाहीं,

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

विकर्णनास इति मां नावज्ञातुमिहार्हसि ।
अल्पापि हि न मे पीडा कर्णनासाविकर्तनात् ॥ २५ ॥

श्रीरामाची आंगवण । नोकोनि[1] बोले कुंभकर्ण । रणीं मारिले रक्षोगण । ते उपेक्षून अनुवादे ॥ ६८॥ विराध न्हें मी वनगोचर । त्रिशिरा दूषण न्हें मी खर । मी तंव न्हें वाळी वानर । दुश्चित्ता[2] शर विंधावया ॥ ६९ ॥ कबंध न्हें मी पायेंवीण । मारीच न्हें मी कनकहरिण । माझें नांव कुंभकर्ण । रामलक्ष्मण मर्दावया ॥ ७० ॥ माझे हातींचा मुद्गर । तिखट तिख्याचा दुर्धर । येणें जिंतिले सुरासुर । यक्ष किन्नर पन्नग[3] ॥ ७१ ॥ दैत्य दानव मानव । येणें जिंतिले म्यां सर्व । रणीं मारावया राघव । घेवोनि धांव आलों असें ॥ ७२ ॥ इंद्र धरिला जीवें जीत । तो मी ब्रह्मयाचा नात । नाककानां जाला घात । उपेक्षित न मानावा ॥७३॥ नाककानांची हे व्यथा । अल्प बाधीना माझ्या चित्ता । उणीव न्हेचि पुरुषार्था । रणीं रघुनाथा मर्दीन ॥ ७४ ॥ ऐकोनि कुंभकर्णवचन । रामें विंधिले दुर्धर बाण । तेणें न ढळे कुंभकर्ण । मग निर्वाण मांडिलें ॥७५॥ रामें विंधितां रुद्रास्त्र । त्याचे हृदयीं भेदला शर । अति विव्हळ निशाचर । हातींचा मुद्गर[4] गळाला ॥ ७६ ॥ मुद्गर पडतांचि क्षितीं[5] । कोपें खवळला भद्रजाती । तोचि मागुता घेवोनि हातीं । श्रीरामाप्रती धांविन्नला ॥ ७७ ॥ रणीं मर्दीत वानर । आपुले भक्षी राक्षसभार । गिळीत अश्व खर[6] कुंजर । आपपर नोळखे ॥ ७८ ॥ रणीं मातला निशाचर । नोळखे आपपर । मारावया श्रीरामचंद्र । घेवोनि मुद्गर धांविन्नला ॥ ७९ ॥ मुद्गरेंसीं घेवोनि धांव । निकट ठाकिला राघव । तो जंव हाणी घाव । केलें लाघव श्रीरामें ॥ ८० ॥

दर्शयेक्ष्वाकुशार्दूल वीर्यं गात्रेषु मेऽनघ ।
ततस्त्वां भक्षयिष्यामि दृष्टपौरुषविक्रमम् ॥ २६ ॥

वायव्यमादाय ततो महास्त्रं
रामः प्रचिक्षेप निशाचराय ।
समुद्गरं तेन जहार बाहुं
निकृत्तबाहुस्तुमुलं ननाद ॥ २७ ॥

स कुंभकर्णोऽस्त्रनिकृत्तबाहु-
र्महासिकृत्ताग्र इवाचलेंद्रः ।
उत्पाटयामास करेण वृक्षं
ततोऽभिदुद्राव रणे नरेंद्रम् ॥ २८ ॥

तं तस्य बाहुं सहशालवृक्षं
समुद्यतं पन्नगभोगकल्पम् ।
इंद्रास्त्रयुक्तेन जहार रामो
बाणेन जांबूनदभूषितेन ॥ २९ ॥

निकट येतां कुंभकर्ण । वायव्यास्त्र सज्जून । श्रीरामें सोडिला बाण । निजनिर्वाणसाटोपें ॥८१॥ धन्य त्या बाणाची न्हाळी । मुद्गर असतांही करतळीं । बाहु छेदोन समूळीं । भूमंडळीं पाडिला ॥ ८२ ॥ बाहु छेदितां समूळीं । कुंभकर्ण आतुर्बळी । तेणें घायें न डंडळी । आला आरोळी देऊनी ॥८३॥ छेदिलिया वामहस्त । माझा न वचे पुरुषार्थ । दक्षिण हस्तें मी समर्थ । रणीं रघुनाथ मारावया ॥ ८४ ॥ श्रीराम लक्षून केवळ । दीर्घ उपडोनियां शाल । धांविन्नला उतावेळ । रणकल्लोळ संग्रामीं ॥ ८५ ॥ रणीं सरकत थरकत । शालहस्तें तळपत । मारावया श्रीरघुनाथ । असे धांवत साटोपें ॥८६॥ श्रीरामाचे येतां बाण । शालहस्तें मोडून । रणीं मारावया रघुनंदन । आला गर्जोन कुंभकर्ण ॥ ८७ ॥ आजानुबाहु अत्यंत थोर । शोभा शोभे भुजंगाकार । मारावया श्रीरामचंद्र । शाल वृक्ष उचलिला ॥ ८८ ॥ त्याचा जंव लागे घावो । तंव श्रीरामें करोनि लवलाहो । इंद्रास्त्र सज्जूनि पहाहो । सशाल बाहु छेदिला ॥ ८९ ॥ सुवर्णपत्री बाण शोभत । छेदोनि कुंभकर्णाचा हात । बाण परतोनि भातां रिघत । श्रीरघुनाथ प्रतापी ॥ ९० ॥ उभय भुजा रघुपती । छेदोनि पाडिलिया क्षितीं । धनुष्य ठेवोनियां हातीं । श्रीरघुपति राहिला ॥ ९१ ॥ उभय भुजा जाल्या क्षीण । रणीं निःशस्त्री कुंभकर्ण । त्या वीर न विंधी[9] बाण । धर्मप्रवीण श्रीराम ॥ ९२ ॥ कुंभकर्ण म्हणे श्रीरामासी । तूं कां रे युद्ध न करिसी । प्रळयशक्ति आहे मजपासीं । तुम्हां दोघांसी मारावया ॥ ९३ ॥ मज नें[10] मौनीं[11] निःशस्त्री[12] क्षीण । करोनियां रणउड्डाण । दोघां करीन शत-

१ धिक्कारून. २ असावधाला. ३ सर्प. ४ शस्त्रविशेष, मुसळ, ५ जमिनीवर, ६ गाढव, ७ हत्ती. ८ चमत्कार.
९ भ्याला नाहीं. १० त्वरा, घाई. ११ समजूं नकोस, १२ शस्त्ररहित.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

चूर्ण । वानरसैन्यसमवेत ॥ ९४ ॥ ऐसें बोलोनि कुंभकर्ण । दुर्धर धांव घेतली जाण । मारावया रामलक्ष्मण । आला आपण साटोपें ॥ ९५ ॥ अमित विंधितां पैं बाण । मागें न सरे कुंभकर्ण । दोघां करावया शतचूर्ण । दीर्घ उड्डाण तेणें केलें ॥ ९६ ॥

तं कृत्तबाहुं समवेक्ष्य रामः
समापतंतं सहसोन्नदन्तम् ।
ततोऽर्धचंद्रौ निशितौ गृहीत्वा
चिच्छेद पादौ युधि राक्षसस्य ॥ ३० ॥

स कृत्तबाहुर्विनिकृत्तपादो
विदार्य वक्त्रं वडवामुखाभम् ।
दुद्राव रामं सहसाभिगर्ज-
न्राहुर्यथा चंद्रमिवांतरिक्षे ॥ ३१ ॥

बाहु छेदिल्या निशाचर । मारावया रामचंद्र । धांविन्नला अति सत्वर । कोपें दुर्धर उडाला ॥ ९७ ॥ सवेग घालोनि उड्डाण । चूर्ण करावे रामलक्ष्मण । येणें लाघवें कुंभकर्ण । आला धांवोन आवेशें ॥ ९८ ॥ म्हणे रामा राहें साहें । माझा यावा आला पाहें । तुज कोण राखेल माये । गर्जोनि लवलाहें उडाला ॥ ९९ ॥ येतां देखोनि निशाचर । बाण काढिला अर्धचंद्र । ज्याची लागतांचि धार । छेदी जिव्हार वायूचें ॥ १०० ॥ श्रीराम धनुर्वाडा संपूर्ण । विंधोनि अर्धचंद्र बाण । उडतां विंधोनि दोनी चरण । कुंभकर्ण पाडिला ॥ १ ॥ नाहीं नाक नाहीं कान । छेदोनियां करचरण । रणीं पाडिला कुंभकर्ण । तरी आंगवण सांडीना ॥ २ ॥ पसरोनियां निजमुख । झेंपावे श्रीरामासंमुख । तें देखोनि शक्रादिक । अलोलिक मानिती ॥ ३ ॥ नाहीं नासिक नाहीं कर्ण । नाहीं त्यासी करचरण । अभिनव सोंग कुंभकर्ण । वानरगण हांसती ॥ ४ ॥ मुख नाडिलें सुग्रीवें । करचरण खंडिले राघवें । कुंभकर्ण हें सोंग नवें । उचित पावे श्रीरामें ॥ ५ ॥ श्रीराम उदार चक्रवर्ती । त्याची छेदोनि दरिद्रकुमती । त्यासी देईल ब्रह्मप्राप्ती । वेद गर्जती पवाडे ॥ ६ ॥ जेंवी कां राहु आकाशीं । ग्रासूं धांवे पूर्णचंद्रासी । तेंवी कुंभकर्ण श्रीरामासी । ग्रासावयासी धांवत ॥ ७ ॥

१ असंख्य. २ हल्ला. ३ धनुर्विद्येंत प्रवीण. ४ इंद्रादिक देव. ५ अगदीं नवीन. ६ निकराचे बाण. ७ धनुष्य. ८ पृथ्वी.

सुवर्णपत्री श्रीरामबाण । मुखें ग्रासी कुंभकर्ण । जे जे सोडी रघुनंदन । ते ते आपण स्वयें ग्रासी ॥ ८ ॥

अथाददे सूर्यमरीचिकल्पं
सब्रह्मदंडांतककालतुल्यम् ।
अरिष्टमैंद्रं निशितं सुपुंखं
रामं शरं मारुततुल्यवेगम् ॥ ३२ ॥

तं कार्मुके समाधाय विकृष्य च महाबलः ।
ससर्ज कुंभकर्णस्य वधाय शरमुत्तमम् ॥ ३३ ॥
दिव्यं मघवता दत्तं ज्वलंतमिव तेजसा ।
स विसृष्टो बलवता रामेण निशितः शरः ॥ ३४ ॥
कुंभकर्णस्य हृदयं भित्वा धरणिमाविशत् ॥ ३५ ॥

निजमुखें कुंभकर्ण । रणांगणीं ग्रासी बाण । तेणें क्षोभोनि रघुनंदन । शर दारुण सज्जिले ॥ ९ ॥ घ्यावया राक्षसाचा प्राण । जेंवी खडतर सूर्यकिरण । तैसे सज्जिले निर्वाणबाण । ज्यांसी निवारण असेना ॥ ११० ॥ श्रीरामें सज्जूनि कोदंड । काळदंड यमदंड । अनिवार ब्रह्मदंड । तैसाच प्रचंड शर विंधी ॥ ११ ॥ अरिघ्नास्त्र आणि रुद्रास्त्र । दोन्ही अस्त्रें अनिवार । बाणीं सज्जून समंत्र । रणीं रघुवीर विंधीत ॥ १२ ॥ ऐसे विंधितां निर्वाणबाण । हृदयीं भेदे कुंभकर्ण । घायीं पडला मूर्च्छापन्न । धरा भेदून शर गेला ॥ १३ ॥

अथाददे शरं चान्यं दिव्यं दिव्याभिमंत्रितम् ।
कुंभकर्णवधस्यार्थे राघवो हि महाबलः ॥ ३६ ॥
स तं महापर्वतकूटसन्निभं
सुवृत्तदंष्ट्रं चलचारुकुंडलम् ।
चकर्त रक्षोधिपतेः शिरस्तदा
यथैव वृत्रस्य पुरा पुरंदरः ॥ ३७ ॥
तद्रामबाणाभिहतं पपात
रक्षःशिरः पर्वतसन्निकाशम् ।
बभंज पुर्या गृहगोपुराणि
प्राकारमुच्चं तमपातयच्च ॥ ३८ ॥

हृदयीं भेदला बाण । तरी मरेना कुंभकर्ण । श्रीरामासीं करावया रण । उपरमे आपण साटोपें ॥ १४ ॥ ऐसें देखोनि जाण । दिव्यास्त्र परम निर्वाण । श्रीरामें सज्जिला बाण । कुंभकर्ण मारा-

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वया ॥ १५ ॥ सुवर्णपत्री सुतीक्ष्ण । श्रीरामें स्वयें अभिमंत्रून । मारावया कुंभकर्ण । निर्वाणबाण सोडिला ॥ १६ ॥ अचुकहस्ती श्रीरामचंद्र । पर्वतप्राय त्याचें शिर । छेदूनि पाडिलें भूमीवर । तरी निशाचर मरेना ॥ १७ ॥ शिर उडोनि आकाशीं । ग्रासूं धांवे श्रीरामासी । धड गडबडित वेगेंसीं । ये रघुरायासी रगडावया ॥ १८ ॥ श्रीरामें शरधारीं । शिर विंधिलें अंबरीं । धड विंधोनि बाणेंकरीं । लंकेमाझारीं पाडिलें ॥ १९ ॥ धड पाडितां लंकेआंत । तेथेंही मांडला आकान्त । गृहें गोपुरें पाडीत । रगडूं रघुनाथ धड धांवे ॥ १२० ॥ धड धांवे रगडावयासी । तें पिटून घाली बाणेंसीं । शिर येतां ग्रासावयासी । उडवी आकाशीं शराग्रें ॥ २१ ॥ धड धांवे धरेसीं । शिर धांवे आकाशीं । श्रीराम पिटी त्या दोहींसी । लघुलाघवेंसीं बाणाग्रें ॥ २२ ॥ कुंभकर्णवरदाची थोरी । दुधड केलिया शरीरीं । पाठिमोरा न होतां वैरी । तो धरेवरी पडेना ॥ २३ ॥ शिववरदाची निजथोरी । रणीं पाठिमोरा जाल्या वैरी । तैंच पडावें धरेवरी । प्रेतापरी अचेतन[3] ॥ २४ ॥ बिभीषण म्हणे श्रीरामासी । क्षणार्ध पाठी द्यावी यासी । तरीच मरण कुंभकर्णासी येरवीं । आकल्प मरेना ॥ २५ ॥ ऐकतां बिभीषणवचन । क्षोभा चढला रघुनंदन । आकल्पान्त करितां रण । पाठी आपण दावीना ॥ २६ ॥ तिळभरी मागें सरणें । तरी सूर्यवंशा आलें उणें । पूर्वजांसी लाजिरवाणें । निंद्य जिणें क्षत्रियांचें ॥ २७ ॥ मागें सरणें नाहीं सर्वथा । हें नित्य व्रत रघुनाथा । बिभीषणासीं परम चिंता । होय सांगता कपींप्रती ॥ २८ ॥ पाठी न देतां रघुनंदन । आकल्प करितां रण । तरी मरेना कुंभकर्ण । अटक संपूर्ण ओढवलें ॥ २९ ॥ अंगदसुग्रीवादि जुत्पती । अवघे गजबजिले ठाती । कोणें बुझवावा रघुपती । चिंतावर्ती समस्त ॥ १३० ॥ कार्य साधावया आकान्त । एक बळियाढा हनुमंत । अतर्क्य साधील कार्यार्थ । तोही वृत्तान्त अवधारा ॥ ३१ ॥ युद्ध करितां धडशिरेंसीं । हनुमान येवोनि पाठीसीं । पुच्छें डंवची श्रीरामासी । तो फिरोनि त्यासी पूसत ॥ ३२ ॥ राम फिरतां रणांगणीं । धडशिर पडलें धरणीं । जयजयकारें देववाणी । स्वर्गीं निशाणीं गाजत ॥ ३३ ॥ एक वेळ जयजयकार । अवघे गर्जती वानर । विजयी जाला श्रीरामचंद्र । निशा[8]चर पाडिला ॥ ३४ ॥ क्षोभों न देतां रघुनाथ । हनुमंतें साधिला कार्यार्थ । अवघे वानर आल्हादयुक्त । हरिखें गर्जत हरिनामें ॥ ३५ ॥ माझें राखोनि सत्यव्रत । कळों न देतां विमुख पुरुषार्थ । हनुमंतें साधिला कार्यार्थ । तेणें रघुनाथ तुष्टला ॥ ३६ ॥ बळवंत विवेकवंत । भक्तिवैराग्यज्ञानवंत । सर्वार्थी साधक हनुमंत । श्रीरघुनाथ तुष्टला ॥ ३७ ॥ ऐसे अनुवादोनि गुण । संतोषोन रघुनंदन । देवोनि हनुमंता आलिंगन । सुखसंपन्न स्वयें केला ॥ ३८ ॥ सुखसंपन्न सुरगण । सुखसंपन्न सिद्धचारण । सुखसंपन्न वानरगण । रणीं कुंभकर्ण पाडिला ॥ ३९ ॥

तं तु भूमौ निपतितं रक्षो विक्षिप्तभूषणम् ।
राक्षसानां सहस्रे द्वे कायेनातिव्यपोथयत् ॥ ३९ ॥
स चातिकायो हिमवत्प्रकाशो
रक्षोधिपस्तोयनिधेः समीपे ।
ग्राहान्परान्मीनवरान्भुजंगान्
विक्षोभ्य भूमिं च तथा पपात ॥ ४० ॥
सवेगं पतता लंका प्राकारास्तोरणानि च ।
तास्मिन्निपतिते भूमौ चुक्षुभे च महोदधिः ॥ ४१ ॥

मुकुट कुंडलें सालंकार । विक्राळ दंष्ट्रा दर्शन क्रूर । कुंभकर्णाचें दीर्घ शरीर । रामें सत्वर छेदिलें ॥ १४० ॥ श्रीरामें शिर छेदोनि बाणीं । सवेग पाडितांचि धरणीं । दोन सहस्र राक्षसश्रेणी । दडपोनि रणीं निमाले ॥ ४१ ॥ दडपोनि मारावया श्रीरामासी । धड गडबडितां आवेशीं । असंख्य दडपिलें राक्षसांसी । अति आवेशीं रणमर्दें ॥ ४२ ॥ शरीर रणवेगें गडबडित । जावोनि पडिलें समुद्रांत । तेथेंही जळचरां विघात । केला वृतान्त तो ऐका ॥ ४३ ॥ [9]तिमि तिमिंगिळें मत्स्य मगर । कच्छप नक्र[10] जळचर । या अवघियांचा करितां चूर । गेले सत्वर पाताळा ॥ ४४ ॥ कुंभकर्ण पडतां तळीं । भूकंप जाला ते काळीं । गडबडिल्या

१ आकाशांत. २ बाणानें. ३ निर्जीव. ४ जीवित. ५ बलाढय. ६ राक्षस (कुंभकर्ण). ७ दाढा. ८ दांत

९ मत्स्यविशेष. १० सुसरी.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

लंकापौळी । समुद्र ते काळीं उचंबळला ॥ ४५ ॥ बैसतांचि रसातळीं । महाभुजंगांच्या मेळी । पन्नग दडपले देहातळीं । नेटेंपाटें पाताळीं बैसला ॥ ४६ ॥ जैसा हिमाचल गिरिवर । तैसें शरीर महाथोर । करीत जळचरांचा चकचूर । गेले सत्वर रसातळा ॥ ४७ ॥ रणीं मारितां वानर । उरले जे कां निशाचर । दीर्घ करोनि बोंबस्वर । रणीं सत्वर पळाले ॥ ४८ ॥ युद्धाभिघातें अति श्रांत । रणमारें जर्जरीभूत । कण्हत कुंथत कांपत । लंकेआंत पळाले ॥ ४९ ॥ जेंवी इंद्रें मारिला वृत्रासुर । तेंवी रामें मारिला महावीर । सुमनें वर्षती सुरवर । जयजयकारें गर्जोनी ॥ १५० ॥ एका जनार्दना शरण । रणीं मारोनि कुंभकर्ण । विजयी जाला रघुनंदन । सुखसंपन्न कपिकुळें ॥ १५१ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे कुंभकर्णवधो नाम अष्टाविंशतितमोऽध्यायः ॥ २८ ॥ ओंव्या ॥ १५१ ॥ श्लोक ॥ ४१ ॥

अध्याय एकोणतिसावा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ श्रीरामें मारिला कुंभकर्ण । ऐकोनियां पैं रावण । स्वयें करी शंखस्फुरण । दुःखें प्राण निघों पाहे ॥ १ ॥

कुंभकर्णं हतं श्रुत्वा राघवेण महात्मना ।
राक्षसा राक्षसेंद्राय रावणाय न्यवेदयन् ॥ १ ॥
स श्रुत्वा निहतं संख्ये कुंभकर्णं महाबलम् ।
रावणः शोकसंतप्तो मुमोह च पपात च ॥ २ ॥
राज्येन नास्ति मे कृत्यं किं करिष्यामि सीतया ।
कुंभकर्णविहीनस्य जीविते नास्ति मे स्पृहा ॥ ३ ॥
तदिदं मामनुप्राप्तं विभीषणवचः शुभम् ।
यदज्ञानान्मया तस्य न गृहीतं महात्मनः ॥ ४ ॥

येवोनि घायाळ रक्षोगण । सांगती कुंभकर्णाचें मरण । सुग्रीवें छेदिले नाककान । रामें करचरण छेदिले ॥ २ ॥ ऐसा विटंबोनियां जाण । रणीं मारिला कुंभकर्ण । अदट श्रीरामआंगवण । न लागतां क्षण निर्दाळिला ॥ ३ ॥ कुंभकर्णाची जे वरदावस्था । श्रीरामें तेही केली वृथा । रणीं छेदून पाडिला माथा । क्षणार्धता बाणें अर्धचंद्रें ॥ ४ ॥ विटंबोनि मारिला कुंभकर्ण । ऐसें ऐकोनि रावण । बंधुस्नेहें तळमळोन । पडे आपण मूर्च्छित ॥ ५ ॥ सवेंचि होवोनि सावधान । दीर्घस्वरें करी रुदन । कुंभकर्ण निमाल्या जाण । मज कोण चाड राज्याची ॥ ६ ॥ मज चाड नाहीं राज्यासी । मज चाड नाहीं सीतेसी । चाड नाहीं जीवितासी । अति आक्रोशीं स्फुंदत ॥ ७ ॥ देवदैत्यदानवांसीं रण । करितां नाटोपे कुंभकर्ण । त्यासी मानवी श्रीरामबाण । लागतां प्राण सांडिला ॥ ८ ॥ बिभीषण बोलिला वचन । तें तें वाक्य अति प्रमाण । म्यां तैं केला गर्वाभिमान । तें हें निर्दानीं पावलों ॥ ९ ॥ रणीं निघोनि कुंभकर्ण । शत्रु निर्दळील संपूर्ण । तोचि रणीं पडला आपण । आतां मी प्राण राखेंना ॥ १० ॥ बंधुस्नेहें रावण । अति दुःखें दुःखीं निमग्न । अतिशयें आक्रंदोन । मूर्च्छापन्न तो पडिला ॥ ११ ॥ पिता पडतांचि मूर्च्छित । अतिकायादि पुत्र समस्त । महोदर महापार्श्वयुक्त । आक्रंदत स्वयें आले ॥ १२ ॥

पितृव्यं निहतं दृष्ट्वा देवांतकनरांतकौ ।
त्रिशिराश्चातिकायश्च रुरुदुः शोकपीडिताः ॥ ५ ॥
भ्रातरं निहतं श्रुत्वा रामेणाक्लिष्टकर्मणा ।
महोदरमहापार्श्वौ शोकाक्रांतौ बभूवतुः ॥ ६ ॥

रावण लोळतां भूमीसीं । पुत्र आले तयापासीं । रडत स्फुंदत आक्रोशीं । पितृदुःखेंसीं अति दुःखी ॥ १३ ॥ देवांतक नरांतक । त्रिशिरा अतिकाय देख । चौघे पुत्र अति नेटक । आले दशमुख ठाकोनी ॥ १४ ॥ दीर्घ स्वरें रडे रावण । ऐकोनियां तयाचें रुदन । महोदर आला आपण । सवेंचि जाण महापार्श्व ॥ १५ ॥ रणीं पडतां कुंभकर्ण । महोदर महापार्श्व जाण । तेही बंधु दोघे जण । आले धांवोन अतिदुःखी ॥ १६ ॥ ऐकोनि रावणविलपन । त्रिशिरा पुत्र आला आपण । सिंहासनीं राजरुदन । धुरेचें लक्षण हें नव्हे ॥ १७ ॥

रावणं शोकसंतप्तं त्रिशिरा वाक्यमब्रवीत् ।
न तु सत्पुरुषा एवं विलपंति यथा भवान् ॥ ७ ॥
ननु त्रिभुवनस्यापि पर्याप्तस्त्वं विनिग्रहे ।
स कथं प्राकृत इव शोचस्यात्मानमीदृशम् ॥ ८ ॥
स सर्वायुधसंपन्नो राघवं हन्तुमर्हसि ।
कामं तिष्ठ महाराज निर्गमिष्याम्यहं रणे ॥ ९ ॥

---

१ लंकेचें आवार. २ पुच्छें. ३ गरज. ४ शेवटीं.

५ मुख्याचें, नायकाचें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

उद्धरिष्यामि ते शत्रुं गरुडः पन्नगं यथा ।
तथाऽद्य शयिता रामो मया युद्धे निपातितः ॥ १० ॥

शोकें संतप्त रावण । हें देखोनियां संपूर्ण । त्रिशिरा बोले आपण । राजलक्षण धुरेचें ॥ १८ ॥ त्रैलोक्यराजा तूं रावण । बंदीं घातले सुरगण । तो तूं करिसी रांडरुदन । राजलक्षण हें नव्हे ॥ १९ ॥ दुधड तुटल्या महावीर । ग्लानि न करिती अणुमात्र । रडतां देखोनि दशशिर । लोक समग्र निंदिती ॥ २० ॥ रडतां तुरे शौर्यशक्ति । रडतां तुरे धैर्यवृत्ति । रडतां तुरे यशकीर्ति । अपयशप्राप्ति रडतांचि ॥ २१ ॥ रुदनें नेली आंगवण । रुदनें नेलें राजमहिमान । रुदनें वाढिवे नागवण । तें तूं रावण स्वयें करिसी ॥ २२ ॥ रणीं निमाल्या कुंभकर्ण । काय गेली आमची आंगवणं । मी एकला करोनि रण । रणीं रघुनंदन मारीन ॥ २३ ॥ मारीन राम लक्ष्मण । विध्वंसीन वानरगण । धरिले रावणाचे चरण । आज्ञापन मज देईं ॥ २४ ॥

श्रुत्वा त्रिशिरसो वाक्यं रावणो राक्षसाधिपः ।
पुनर्जातमिवात्मानं मेने तस्य सुभाषितम् ॥ ११ ॥
ततः श्रुत्वा तु तद्वाक्यं देवांतकनरांतकौ ।
अतिकायश्च तेजस्वी बभूवुर्युद्धकांक्षिणः ॥ १२ ॥
ततो हर्षसमाविष्टा जगर्जुर्नैर्ऋतर्षभाः ।
रावणस्य सुता वीराः शक्रतुल्यपराक्रमाः ॥ १३ ॥
ततस्तांस्तु परिष्वज्य पूजयित्वा विभूषणैः ।
आशीर्भिस्तु प्रशस्ताभिः प्रेषयामास संयुगे ॥ १४ ॥
महोदरमहापार्श्वौ भ्रातरौ चापि रावणः ।
रक्षणार्थं कुमाराणां प्रेषयामास संयुगे ॥ १५ ॥

एकला मी करोनि रण । रणीं मारीन राम लक्ष्मण । ऐकोनि त्रिशिराचें वचन । दशानन हरिखला ॥ २५ ॥ जेंवी अचेतन पडे प्रेत । त्यासी मागुती ये जीवित । त्रिशिरावचनें लंकानाथ । पावला मानीत पुनर्जन्म ॥ २६ ॥ त्रिशिराचे वचनें देख । संतोषला दशमुख । तेणें देवांतक नरांतक । युद्धासी हरिखे अतिकाय ॥ २७ ॥ रावणाचे चौघे सुत । शक्रसमान बळवंत । युद्धार्थी अति उद्यत । तेणें लंकानाथ हरिखला ॥ २८ ॥ मुकुट कुंडलें वीरकंकणें । चौघां देवोनि भूषणें । चौघे आलिंगोनि रावणें । पुत्र धाडिले संग्रामा ॥ २९ ॥ राखावया चौघां पुत्रांसी । महोदरमहापार्श्वांसी । रावणें धाडिलें त्यांपासीं । संग्रामासी साह्यार्थ ॥ ३० ॥ पदाति रथ वाजी कुंजर । अदट दाट्ठुर्गा सैन्यसंभार । युद्धा निघतां राजकुमर । केला दुर्धर गडगर्ज ॥ ३१ ॥ शस्त्रास्त्रीं सन्नद्ध बद्ध । चौघां पुत्रां युद्धंदुर्मद । महोदर महापार्श्व प्रसिद्ध । वीर बंधु निघाले ॥ ३२ ॥ ऐसे वीर सहाही जण । संग्रामीं अति प्रवीण । मारावया राम लक्ष्मण । धाडी रावण संग्रामीं ॥ ३३ ॥ युद्धा निघतां सहाही जण । रथाश्व गजवाहन । कोणा कोणासी कोण कोण । सावधान अवधारा ॥ ३४ ॥ ऐरावतकुळींचा गज गंभीर । त्यावरी बैसोनि महोदर । युद्धा निघाला सत्वर । जेंवी भास्कर मेघावरी ॥ ३५ ॥ त्रिशिरा तिन्ही मुकुट शिरीं । बैसोनियां रथावरी । इंद्रचापासमान चाप करीं । निघे बाहेरी संग्रामा ॥ ३६ ॥ अतिकाय महारथी वीर । रथ मरकंताचा आंख चक्र । त्यावरी रत्नाढ्य कूंबर । वारू विचित्र जुंपिले ॥ ३७ ॥ ते रथीं बैसोनि पाहें । संग्रामा आला अतिकाय उत्साहें । त्याचा यावा कोण साहे । दुर्धर होय सुरासुरां ॥ ३८ ॥ उच्चैःश्रव्यासम सुंदरू । बळें बळवंत श्वेत वारू । त्यावरी नरांतक वीरू । युद्धीं दुर्धरू शोभत ॥ ३९ ॥ विद्युत्प्राय खड्ग हातीं । दुर्धर त्याची संग्रामशक्ती । त्यासीं विचरतां युद्धक्षितीं । स्वर्गीं कांपती सुरसिद्ध ॥ ४० ॥ जो कां अंतका अंतक । महावीर देवांतक । रथीं बैसोनि एकाएक । आला निःशंक संग्रामा ॥ ४१ ॥ मंथावया क्षीरसागरीं । जैसा विष्णुहातीं मंदरगिरी । तैसा परिघ घेवोनि करीं । आला बाहेरी देवांतक ॥ ४२ ॥ महापार्श्व रथावरी । दुर्धर गदा घेवोनि करीं । करावया महामारी । आला झडकरी संग्रामा ॥ ४३ ॥ चौघे रथी एककुंजरी । एक तो शोभे अश्वावरीं । करावया वीरमहामारी । आले झडकरी संग्रामा ॥ ४४ ॥

प्रगृहीता बभौ तेषां छत्राणामावलिः शुभा ।
शरदभ्रप्रतीकाशा हंसानामावलिर्यथा ॥ १६ ॥

---

१ सामर्थ्य, शौर्य. २ पायदळ. ३ घोडे. ४ हत्ती. ५ अजिंक्य. ६ बलाढ्य. ७ युद्धाचा अभिमान. ८ सूर्य. ९ पाचेचा. १० इसाड. ११ घोडे. १२ हल्ला. १३ रणांगणीं.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

मरणं चापि निश्चित्य शत्रूणां च पराजयम् ।
इति कृत्वा मतिं वीरा निर्जग्मुः संयुगार्थिनः ॥ १७ ॥
जगर्जुश्चापि ते नेदुश्चिक्षिपुश्चापि सायकान् ।
क्ष्वेडितास्फोटितानां वै संचचालेव मेदिनी ॥ १८ ॥
ततो निष्क्रम्य मुदिता राक्षसेंद्रा महाबलाः ।
ददृशुर्वानरानीकं समुद्यतशिलानगम् ॥ १९ ॥

जेंवी कां हंसावळी अंबरीं । तेंवी श्वेतछत्रांचिया हारी । शोभती राजपुत्रांवरी । युग्मचामरीं संवीजेंय ॥ ४५ ॥ आजि मरणें कां मारणें । ऐसा श्रीरामीं संग्राम करणें । दृढ निश्चय करितां मनें । युद्धाकारणें ते आले ॥४६॥ अश्व रथ महाकुंजर । अदट पायांचे मोगर । चतुरंग सैन्यसंभार । आले सत्वर संग्रामा ॥ ४७ ॥ ध्वजा पताका अति विचित्र । किंकिणीज्वाळमाळा मनोहर । युद्धा निघतां राजकुमर । रथकुंजर शृंगारिले ॥ ४८ ॥ छत्रें शोभती शिरीं । मुक्ताफळांच्या झालरी । निशाणें त्राहाटिल्या मेरी । रणमोहरी गर्जत ॥ ४९ ॥ अवघे मिळोनियां वीर । सिंहनाद केला थोर । नादें उतटंत अंबर । धरा भूधर सकंप ॥ ५० ॥ देखोनि छत्रपतिभार । रणीं नाचती वानर । कौतुक पाहे श्रीरामचंद्र । निशाचर मारितां ॥ ५१ ॥ शिळाशिखरें गिरिवर । हरिखें झेलिती वानर । एक परजिती तरुवर । राजकुमर मारावया ॥ ५२ ॥ देखोनि वानरांचें बळ । खवळलें राक्षसदळ । घाय हाणिती प्रबळ । युद्ध तुंबळ मांडलें ॥ ५३ ॥ गदा मुद्गर पट्टिश । शक्ति शूळ परिघ फरश । घाय हाणित राक्षस । आला आवेश वानरां ॥ ५४ ॥ करावया रणकंदन । सरसावले अवघे जण । वानरीं केलें विंदान । सावधान अवधारा ॥ ५५ ॥

समुद्यतमहाशैलाः मुदा नेदुः पुनः पुनः ।
अमृष्यमाणा रक्षांसि प्रतिनर्दंत वानराः ॥ २० ॥
केचिदाकाशमाविश्य केचिदुर्व्यां प्लवंगमाः ।
ते पादपशिलाशैलैश्चक्रुर्वृष्टिमनुत्तमाम् ॥ २१ ॥
बाणौघैर्वार्यमाणाश्च हरियो भीमविक्रमाः ।
केचिद्रथगतान्वीरान्गजवाजिगतानपि ॥ २२ ॥

१ हंसपंक्ति. २ वारा घातले गेलेले. ३ हत्ती, घोडे, रथ व पायदळ. ४ रथाचे हत्ती. ५ फाटूं लागलें. ६ पर्वत.

निर्जघ्नुः सहसोत्प्लुत्य यातुधानान्प्लवंगमाः ।
शैलशृंगान्वितांगास्ते मुष्टिनिष्क्रान्तलोचनाः ॥ २३ ॥
चेलुः पेतुश्च नेदुश्च तत्र राक्षसपुंगवाः ॥ २४ ॥

वानर उदित युद्धासी । सपर्वत उडोनि आकाशीं । पुनः पुनः रामनामेंसीं । अति आवेशीं गर्जत ॥ ५६ ॥ वानरवीर नभःस्थळीं । राक्षसभार ते भूतळीं । वर्षती पर्वतशिळीं । होत रांगोळी वीरांची ॥ ५७ ॥ बाणीं निवारितां पर्वत । वानरवीर अत्यद्भुत । भूतळा येवोनि समस्त । करिती घात राक्षसां ॥ ५८ ॥ राक्षसांचे शस्त्रसंपात । वानर तळपोनि करिती व्यर्थ । शिळाद्रुमपर्वतहस्त । रणीं विचरत रणमारें ॥५९॥ एक वानर आकाशीं । वर्षती शिळापर्वतेंसीं । सर्वांग छेदोनि राक्षसांसी । कटिभंगेंसीं खुरडत ॥ ६० ॥ यावरी वानर आकाशीं । कंदन करिती राक्षसांसी । एक ते राहून पृथ्वीसी । निशाचरांसी निर्दळिती ॥ ६१ ॥ वानरीं साधोनियां रण । मुष्टिघातें पाडिती नयन । एकां राक्षसां दंत भग्न । एकां वमन रुधिराचें ॥ ६२ ॥ एक राक्षस पडिले रणीं । एक आरडती आक्रंदोनी । एक मागती पाणी पाणी । रणांगणीं पळताती ॥ ६३ ॥ एक मर्दिती रथस्थ । एक मर्दिती गजस्थ । एक मर्दिती अश्वगत । रणकंदनार्थ राक्षसां ॥ ६४ ॥

वानरं वानरेणैव जघ्नुर्घोरा हि राक्षसाः ।
राक्षसं राक्षसेनैव पिपिषुर्वानरा भुवि ॥ २५ ॥
आक्षिप्य बलिनो जग्मू राक्षसा वानरास्तथा ।
मुहूर्तेनावृता भूमिरभवच्छोणितप्लुता ॥ २६ ॥
भग्नचर्मतनुत्राणा राक्षसा वानरैर्हताः ।
सुस्राव रुधिरं तेभ्यः सरितः पर्वतादिव ॥ २७ ॥
रथेन रथिनं चापि राक्षसं राक्षसेन च ।
हयेन च हयान्केचिन्निष्पिपेषुर्वलीमुखाः ॥ २८ ॥

शस्त्रसामग्री जाली चूर्ण । पायीं पिष्ट पर्वतपाषाण । विचंबले हतियेराविण । ते काळींचें रण अवधारा ॥ ६५ ॥ वानरीं उचलोनि वानरांसी । रणीं मारिती राक्षसांसी । राक्षसीं उचलोनि राक्षसांसी । रणीं वानरांसी निर्दळिती ॥ ६६ ॥ रणीं रणमदें उन्मत्त वीर । तयां नाठवे आपपर ।

७ नवल, चमत्कार. ८ तयार. ९ शस्त्रांचे नेम, घाव. १० कष्ट पावले.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

रण मांडलें घोरांदर । येरां येर निर्दळिती ॥ ६७॥ पाचारोनि रणांगणीं । निधडे वीर झोंटधरणीं । भिडताती रणांगणीं । आयणीपायणी संग्राम ॥ ६८॥ रणीं मोडलीं वोडणें । घायीं झडलीं अंगत्राणें । राक्षस मारिले जीवें प्राणें । पर्वतपाषाणें वानरीं ॥ ६९ ॥ जेंवी पर्वतीं आरक्त पाझर । तैसे वाहती रुधिरपूर । रणीं खवळले वानर । निशाचर मारितां ॥ ७० ॥ रणभूमि अति दुर्गम । मांसशोणितकर्दम । रणीं खवळोनि प्लवंगम । राक्षसां परम गांजिलें ॥ ७१ ॥ दुर्धर वानरांचा मार । रणीं उठला हाहाकार। मोडला राक्षसांचा भार । घायीं जर्जर विव्हळती ॥ ७२॥ दुर्धर वानरांचा मार। कोपें खवळला नरांतक वीर। अश्वारूढ अति दुर्धर । वानरां मार करूं आला ॥ ७३ ॥ शिळा शिखरें वृक्ष पर्वत । वानरीं सांडिले अत्यद्भुत । खड्गें निवटोनि समस्त। वानरां घात करूं आला ॥ ७४ ॥

ततो हयं मारुततुल्यवेग-
मारुह्य शक्तिं निशितां प्रगृह्य ।
नरांतको वानरराजसैन्यं
विवेश मीनश्च यथार्णवौघम् ॥ २९ ॥
सवानरान्सप्तशतानि वीरः
प्रासेन दीप्तेन विनिर्बिभेद ।
एकः क्षणेनेंद्ररिपुर्दुरात्मा
जघान सैन्यं हरिपुंगवानाम् ॥ ३० ॥
न शेकुर्वानराः सोढुं ते विनेदुर्महास्वरान् ।
ते त्रस्ता वानरश्रेष्ठाः सुग्रीवमुपतस्थिरे ॥ ३१ ॥

ठाणमाण शुभ्र सुंदरू । वायुवेगाहून सवेग वारू । तो अश्वारूढ नरांतक वीरू । वानरां मारू करूं आला ॥ ७५ ॥ तुरंगासनी खड्गहस्त । सात दशक दहा शत । वानर मारी शताशत । होत आकान्त कपिकुळा ॥ ७६ ॥ शिळा शिखरें वृक्ष पर्वत । वानरां साटोपें हाणित । खड्गहस्तें तोडूनि समस्त । करी प्रळयान्त वानरां ॥ ७७ ॥ करावया रणमारा । वानरीं उपडितां गिरिवरा । उडतां वाजे खड्गधारा । वमित रुधिरा पाडिले ॥ ७८ ॥ वानर उसळले गगनासी। वारू उडवोनि आकाशीं। निरालंबीं निवटी त्यांसी । कपिप्रळयासी नरांतक ॥ ७९ ॥ पूर्वी नांव नरांतक । आतां जाला वानरांतक । अवघीं घेवोनि युद्धधाक । एक एक पळाले ॥ ८० ॥ जेंवी कां मातला मगर । तेणें खळबळीत सागर । तेंवी वानरसैन्य समग्र । त्रासिलें थोर नरांतकें ॥ ८१ ॥ नरांतकाच्या समोर । राहूं न शकती वानर । किंकाळ्या देवोनि समग्र । सुग्रीव धूर ठाकिले ॥ ८२ ॥ सुग्रीव आमुचा कपिनाथ । संग्रामीं राखील स्वस्थ । येणें विचारें समस्त । आले धांवत तयापासीं ॥ ८३ ॥ वानर पडिले निचेष्टित । सुषेण वैद्य अति समर्थ । देवोनि श्रीरामचरणतीर्थ । उठविले समस्त संग्रामीं ॥८४॥ लाविता श्रीरामपादकण । कर्णपले घायांचे वण । करितां श्रीरामनामस्मरण । वानरगण ऊठले ॥ ८५ ॥ घेतां श्रीरामचरणोदक । स्वस्थ झाले सकळिक । पुढें मारावया नरांतक । सुग्रीव सम्यक क्षोभला ॥ ८६ ॥

दृष्ट्वोवाच महातेजाः सुग्रीवो हरिपुंगवः ।
कुमारमंगदं वीर शक्रतुल्यपराक्रमम् ॥ ३२ ॥
गच्छैनं राक्षसं वीरं योसौ तुरगमास्थितः ।
भक्षयंतं च सैन्यानि क्षिप्रं प्राणैर्वियोजय ॥ ३३ ॥
सभर्तुर्वचनं श्रुत्वा निष्पपातांगदस्तदा ।
निरायुधो महातेजाः केवलं नखदंष्ट्रवान् ॥ ३४ ॥
नरांतकमुपागम्य वालिसूनुरुवाच ह ।
तिष्ठ किं प्राकृतैरेभिर्हरिभिस्त्वं करिष्यसि ॥ ३५ ॥
अस्मिन्वज्रसमस्पर्शे प्रासं क्षिप ममोरसि ॥ ३६ ॥

नरांतकें त्रासिले वानर । तें देखोनि सुग्रीव वीर । त्यासीं करावया रणमार । अंगदकुमर स्वयें धाडी ॥ ८७ ॥ अश्वारूढ घोर विक्रांत । करी वानरां प्राणान्त । तयाचा करीं जीवघात । सुग्रीव सांगत अंगदासी ॥ ८८ ॥ शक्रबळेंसीं समान । अंगदाची आंगवण । ऐकोनि सुग्रीवाचें वचन । आलें स्फुरण अंगदा ॥ ८९ ॥ श्रीरामासी लोटांगण । वंदूनि हनुमंताचे चरण । सुग्रीवा अभिवंदून । केलें उड्डाण अंगदें ॥ ९० ॥ करावया नरांतकासीं झगडा । अंगद वीर असे गाढा । येवोनि उभा ठेला पुढां । जैसा कां कडा मेरूचा

१ भयंकर. २ एकमेकांच्या शेंड्या धरून. ३ क्रमाक्रमानें. ४ ढाली. ५ वानर. ६ घोडा. ७ तरवार हातांत घेऊन. ८ बुजून गेले. ९ योग्य.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ ९१ ॥ येऊनि नरांतकासमोर । उदार धीर अति गंभीर । अंगद बोलिला उत्तर । निःशंक शूर प्रतापी ॥ ९२ ॥ पालेखाइर वनचर । किंकरें कां मारिसी वानर । मी आलों असें तुजसमोर । हाण हतियेर मजलागीं ॥ ९३ ॥ शस्त्रास्त्रांची सामग्री । जे जे असेल तुजपासीं खरी । ते ते घालीं मजवरी । अंगद गजरीं गर्जत ॥ ९४ ॥ अंगदाच्या कठिण उत्तरीं । नरांतक क्षोभें[१]करीं । निजखड्गाच्या खड्गधारीं । हृदयावरी हाणितला ॥ ९५ ॥

अंगदस्य वचः श्रुत्वा स च क्रुद्धो नरांतकः ।
संपीड्य दशनैरोष्ठौ निःश्वस्य च पुनः पुनः ॥ ३७ ॥
तं प्रासमादाय समुज्ज्वलंतं
ससर्ज वेगेन च वानराय ।
स वालिपुत्रोरसि वज्रकल्पे
बभूव भग्नः पतितश्च भूमौ ॥ ३८ ॥

दांत खावोनि करकरां । खड्ग भोंवडोनि गरगरां । हृदयावरी वानरा । खड्गधारा हाणितलें ॥ ९६ ॥ अंगदाचें बळ वितंड । घाव हाणितां प्रचंड । खड्ग जालें दुखंड । गेलें बळबंडें[२] राक्षसी ॥ ९७ ॥ अखंड रामनामस्मरण । अंगदहृदय अच्छेद्य जाण । खड्गभंगासी कारण । रामस्मरण सप्रेम ॥ ९८ ॥ आवर्डी स्मरतां श्रीरघुनाथ । द्वंद्वबाधा[३] नित्य निर्मुक्त । काय खड्गाचा आघात । निमेषार्धांत भंगेल ॥ ९९ ॥ खड्ग आदळतां हृदयआरामीं । दुखंड होवोनि पडिलें भूमीं । अंगद गर्जोनि संग्रामीं । युद्धानुक्रमीं खवळला ॥१००॥

अर्सि समालोक्य तदा च भग्नं
सुपर्णकृत्तोरगभोगकल्पम् ।
मुष्टिं समुद्यम्य स वालिपुत्र-
स्तुरंगमं तस्य जघान मूर्घनि ॥ ३९ ॥
स तस्य वाजिर्निपपात भूमौ
तलप्रहारेण विशीर्णशीर्षः ।
नरांतकः क्रोधवशं जगाम
हतं तुरंगं पतितं समीक्ष्य ॥ ४० ॥
स मुष्टिमुद्यम्य महानुभावो
जघान शीर्षे युधि वालिपुत्रम् ।
अथांगदो मुष्टिनिपातघीरः
सुस्राव तीव्रं रुधिरं च शीर्षात् ॥ ४१ ॥
मुहुः प्रजज्वाल मुमोह चापि ।
संज्ञां समासाद्य च विस्मितोऽभूत् ॥ ४२ ॥

गरुड छेदी जेंवी उरग । तैसें छेदोनि सांडिलें खड्ग । अंगदासी आला राग । राक्षस सांङ्ग वधावया ॥ १ ॥ विद्युत्प्राय वारू तळपत । अंगदें ताडितां मुष्टिघात । टाळू फोडोनि सदंत । वारू रणांत पाडिला ॥ २ ॥ धन्य त्या मुष्टिघाताची थोरी । नेत्र पडले धरेवरी । वारू न्हाणोनि रुधिरीं । रणामाझारी पाडिला ॥ ३ ॥ वारू मारितां निःशेख । दूर उडाला नरांतक । शस्त्रसामग्री नसतां देख । अति तँवक[४] युद्धाचा ॥ ४ ॥ मुष्टि वळोनि क्रोधेंकरीं । अंगद ठोकिला उरावरी । जात जात अति चांचरी । स्वयें सांवरी मूर्च्छेतें ॥ ५ ॥ ब्रह्मांडीं तडकला मुष्टिघात । नाकीं तोंडीं रुधिरोक्षितें[५] । अंगद पडिला मूर्च्छित । रणाआंत मुष्टिघातें ॥ ६ ॥ अंगद पडतांचि मूर्च्छित । स्वयें स्मरे श्रीरघुनाथ । श्रम जावोनि समस्त । उठिला गर्जत संग्रामा ॥ ७ ॥ करितां श्रीरामनामस्मरण । श्रम जावोनि संपूर्ण । आलें शतगुणें स्फुरण । राक्षसकंदन करावया ॥ ८ ॥ आघातीं[६] आठवे श्रीरघुनाथ । त्याचें भाग्य अति समर्थ । त्यासी बाधेना अनर्थ । विजयान्वित तिहीं लोकीं ॥ ९ ॥ रामनामस्मरणापुढें । विघ्न कायसें बापुडें । अंगदाचें बळ गाढें । युद्ध कैवांडें[७] मांडिलें ॥ ११० ॥

अथांगदो वज्रसमप्रवेगः
संबध्य मुष्टिं गिरिशृंगकल्पम् ।
निपातयामास तदा महात्मा
नरांतकस्योरसि वालिपुत्रः ॥ ४३ ॥
नरांतको भूमितले पपात
यथाचलो वज्रनिपातभग्नः ।
तदांतरिक्षे त्रिदशोत्तमानां
वनौकसां चापि महान्निनादः ॥ ४४ ॥
बभूव तस्मिन्निहतेऽतिवीर्ये
नरांतके वालिसुतेन संख्ये ॥ ४५ ॥

१ रागानें. २ शक्तीची प्रौढी. ३. सुखदुःखादि पीडा. ४ आवेश. ५ रक्तबंबाळ. ६ संकटसमयीं. ७ चातुर्यानें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

मूर्च्छा भांजोनि अंगद । स्वयें होवोनि सावध। करावया नरांतकाचा वध । अति उन्नद्ध ऊठिला ॥ ११ ॥ मुष्टि वळोनि क्रोधेंकरीं । वेगें हाणितां उरावरी । हाडें करोनि चकचुरी । धरेवरी पाडिला ॥ १२ ॥ नाकीं तोंडीं रुधिरधारा । लागल्या नरांतक वीरा । एके घायें करोनि पुरा । निशाचरा पाडिलें ॥ १३ ॥ नरांतक महाबळी । अंगदें पाडिला क्षितितळीं । कपी नाचती सुखसमेळीं । पिटिली टाळी सुरसिद्धीं ॥ १४ ॥ एक रावणराजकुमर । दुजा वाळिसुत राजपुत्र । युद्ध करोनि घोरांदर । कुमरें कुमर मारिला ॥ १५ ॥ करोनि रामनामगजर । हरिखें नाचती वानर । स्वर्गी नाचती सुरवर । अंगदवीर निजविजयी ॥ १६ ॥ एका शरण जनार्दनीं । नरांतक पडिला रणीं । उरल्या वीरीं पांच जणीं । केली करणी ते ऐका ॥ १७ ॥ अंगदें नमिला रघुनंदन । रामें दिधलें आलिंगन । वंदून लक्ष्मणाचे चरण । अभिवंदन हनुमंता ॥१८॥ सुग्रीवराजेंद्रा दंडवत । वानर वीर जे समस्त । अंगद पायांवरी लोळत । अवघे गर्जत स्तुतिवादें ॥ १९ ॥ वीर शूर प्रतापवंत । राजपुत्र आणि विनीत । अवघे हरिनामें गर्जत । स्तुति वदत अंगदाची ॥ १२० ॥ रम्य रामायणकथार्थ । नरांतका जाला अंत । एका जनार्दना शरणागत । रणीं परमार्थ श्रीरामें ॥ १२१ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां नरांतकवधो नाम एकोनत्रिंशत्तमोऽध्यायः ॥ २९ ॥ ओंव्या ॥ १२१ ॥ श्लोक ॥ ४५ ॥

अध्याय तिसावा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ अंगदें मारिला नरांतक । राक्षसदळीं परम धाक । पळोनियां वीरनायक । लंकेसंमुख निघाले ॥ १ ॥ पळतां देखोनि राक्षसभार । कोपा चढला राजकुमर । अवघे होऊनि एकत्र । निशाचर परतले ॥ २ ॥

नरांतकं हतं दृष्ट्वा चुक्रुशुर्नैर्ऋतर्षभाः ।
देवांतकस्त्रिमूर्धा च पौलस्त्यश्च महोदरः ॥ १ ॥
आरूढो मेरुसंकाशं वानरेंद्रं महोदरः ।
वालिपुत्रं महावीर्यमभिदुद्राव वीर्यवान् ॥ २ ॥
भ्रातृव्यसनसंतप्तस्तदा देवांतको बली ।
आदाय परिघं घोरमंगदं समभ्यद्रवत् ॥ ३ ॥
रथमादित्यसंकाशं युक्तं परमवाजिभिः ।
आस्थाय त्रिशिराश्चापि वालिपुत्रमुपाद्रवत् ॥ ४ ॥
स त्रिभिर्मेघसंकाशैर्नैर्ऋतैस्तैरभिद्रुतः ।
वृक्षमुत्पाटयामास महाविटपमंगदः ॥ ५ ॥

अंगद वीरशिरोमणी । नरांतक पाडिला रणीं । तें देखोनि पांचही जणीं । आले गर्जोनी संग्रामा ॥ ३ ॥ त्यांहीमाजी तिघे वीर । त्रिशिरा देवांतक महोदर । रणीं मारावया अंगद वीर । अति सत्वर धांवले ॥ ४ ॥ रणीं मर्दावया अंगद वीर । गजारूढ महोदर । धांविन्नला अति दुर्धर । घायें वानर मारावया ॥ ५ ॥ बंधुस्नेहें आत्यंतिक । खवळोनियां देवांतक । परिघ हाणावया संमुख । देवोनि हांक पैं आला ॥ ६ ॥ अनर्घ्य रथ अनर्घ्य वारू । त्यावरी बैसोनि त्रिशिरा वीरू । रणीं मारावया वानरू । अतिसत्वर धांविन्नला ॥ ७ ॥ रणीं मारावया जुंतपती । एक गजी दोघे रथी । धांवतां संग्रामव्युत्पत्तीं । अंगदें ख्याती लाविली ॥ ८ ॥ रावणकुमर रणप्रवीण । एकावरी तिघे जण । येतां देखोनियां जाण । आलें स्फुरण अंगदा ॥९॥ अतिरथी तिघे जण । करीत आले गडगर्जन । करावया तिघांसींही रण । आलें स्फुरण अंगदा ॥ १० ॥ जैसा शनैश्चर जाण । तीन राशी भोगी आपण । तैसाच अंगद रणप्रवीण । तिघे जण मर्दावया ॥ ११ ॥ मेघगर्जनें गर्जती वीर । रामनामें गर्जे वानर । युद्ध मांडिलें घोरांदर । शस्त्रसंभार सूटले ॥ १२ ॥

महोदरं समासाद्य शालमुत्पाट्य वीर्यवान् ।
देवांतकाय तं वीरश्चिक्षेप सहसांगदः ॥ ६ ॥
महावृक्षं महाशैलं शक्रो दीप्तमिवाशनिम् ।
त्रिशिरास्तं तु चिच्छेद शरैराशीविषोपमैः ॥ ७ ॥
वृक्षं निकृत्तमालोक्य समुत्पत्य ततोऽगदः ।
स ववर्ष ततो वृक्षाञ्शिलाश्च कपिकुंजरः ॥ ८ ॥
तांश्चिच्छेद सुसंक्रुद्धस्त्रिशिरा निशितैः शरैः ।
परिघाग्रेण तान्वृक्षाञ्शिलाश्च निजघान सः ॥९॥

१ सावरून. २ तयार होऊन. ३ आनंदानें. ४ धरावयास कठीण असा. ५ आयुधविशेष. ६ अमूल्य. ७ मुख्य योद्धे. ८ युद्धकौशल्यानें. ९ भयंकर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

दोघे रावणराजकुमर । महाबळ महोदर । क्षोभला अंगद वाळिकुमर । तिघे वीर मारावया ॥ १३ ॥ पर्वतभारेंसीं संभार । उपडोनि शालवृक्ष थोर । देवांतकावरी वानर । रागें सत्वर सोडित ॥ १४ ॥ वाजतां अंगदाची हांक । येतां देखोनि संमुख । आवो भुलला देवांतक । उपाव एक सुचेना ॥ १५ ॥ येणें मारिला नरांतक । तैसाच मारील देवांतक । त्रिशिरा धांवोनियां देख । शालवृक्ष छेदिला ॥ १६ ॥ वृक्ष छेदितां शतधारीं । अंगदें लोटोनि पुच्छेंकेंरीं । पाडितां राक्षसांचे भारीं । शतसहस्त्रीं प्राणान्त ॥ १७ ॥ राक्षसदळीं हाहाकार । अंगदें केला महामार । विस्मित त्रिशिरा महोदर । धन्य वानर प्रतापी ॥ १८ ॥ तिघांसीं युद्ध करी समोर । पुच्छें मारी राक्षसभार । अंगद प्रतापी वानर । सुरासुर वानिती ॥ १९ ॥ माझ्या वृक्षाचा आघात । तिघीं मिळोनि केला व्यर्थ । अंगद क्षोभला अत्यंत । रणकंदनार्थ करावया ॥ २० ॥ मारावया निशाचर । पाचारोनि निजवानर । म्हणे शिळा पर्वत शिखर । रणीं सत्वर पुरवावे ॥ २१ ॥ ऐसें सांगोनि वानरांसी । अंगद उसळला आकाशीं । मग मांडिलें संग्रामासी । अति आवेशीं क्षोभोनि ॥ २२ ॥ शिळा शिखरें अत्यद्भुत । वृक्ष पाषाण पर्वत । अंगद गर्जगर्जोनि वर्षत । रणीं प्राणान्त राक्षसां ॥ २३ ॥ शिळाशिखरीं अत्यद्भुतीं । रणीं लावोनियां ख्याती । करीन तिघांची समाप्ती । रणव्युत्पत्ती पहा माझी ॥ २४ ॥ उँपमर्दून तिन्ही गुण । सुख पावती योगिजन । तुम्हीं मारिल्या तिघे जण । रणकल्याण मज तेंव्हां ॥ २५ ॥ ऐसें गर्जोनि समर्थ । शिळाशिखरें द्रुम पर्वत । लँगवेगें पैं वर्षत । रणकंदनार्थ राक्षसां ॥ २६ ॥ द्रुमादि पर्वतशिखरें थोर । चेंपला राक्षसांचा भार । रणीं उठला हाहाकार । राजकुमर विस्मित ॥ २७ ॥ आम्हांसीं युद्ध करितां संमुख । मागें राक्षस गांजिले निःशेर्खं । अंगद वीर अति अचुक । पाडिलें टक तिघांसी ॥ २८ ॥ बाणीं पर्वत निवारीत । तंव येती असंख्यात । तेही साटोपें जंव तोडीत । येती आघात वृक्षांचे ॥ २९ ॥ वृक्ष निवारितां जाण । मस्तकीं वाजती पाषाण । घाबरें केले तिघे जण । रणप्रवीण अंगदें ॥ ३० ॥ बाण तोमर परिघाग्र । तिघीं निवारितां गिरिवरां । अंगद वर्षे सत्वर । शिळाशिखरें तरुवर ॥ ३१ ॥ जैशा पर्जन्याच्या धारा । तैसा वर्षे गिरितरुवरा । उँसंत नाहीं तिघां वीरां । राजकुमारां गांजिलें ॥ ३२ ॥ पुरुषार्थाची परम कीर्ती । तिघे वीर ते अतिरथी । अंगदें लावोनियां ख्याती । रणव्युत्पत्तीं गांजिले ॥ ३३ ॥ त्रिशिरा वीर रणप्रवीण । वज्रास्त्रें विंधोनि बाण । पर्वत तरुवर छेदून । केले शतचूर्ण रणरंगीं ॥ ३४ ॥ पर्वत पुरविल्या वानरांसी । त्रिशिरा विंधी अति आवेशीं । तिंहीं घेवोनि त्रासासी । सुग्रीवापासीं पळाले ॥ ३५ ॥ देवांतकाचा परिघ थोर । महोदराचा तोमर । त्रिशिरा विंधी तीव्र शर । अंगद वीर मूर्च्छित ॥ ३६ ॥ अंगद वानरीं युवराजा । सांपडला आमच्या समाजा । त्यासी बांधोनियां वोर्जा । नेऊं विजयध्वजा लंकेसी ॥ ३७ ॥ त्यासी बांधवेना संपूर्ण । त्याच्या अंगीं आंगवण । मंडप घेवोनि उडाला जाण । त्यासी कोण बांधील ॥ ३८ ॥ सांपडला आहे हाताआंत । तंव याचा करूं घात । ऐसें विचारितां समस्त । केलें विपरीत अंगदें ॥ ३९ ॥ अंगद पडतां मूर्च्छित आपण । स्मरे श्रीरामनामस्मरण । मूर्च्छा जावोनि संपूर्ण । आलें स्फुरण अंगदा ॥ ४० ॥ महोदरा देवोनि लात । गर्जी पाडिला मूर्च्छित । देवांतकासी चपेटघात । तोही रथस्थ पाडिला ॥ ४१ ॥ त्रिशिऱ्याचे धनुष्याचें शिंतें । पुच्छें छेदोनियां तेथ । त्याचे बाण करोनियां व्यर्थ । रणीं गर्जत अंगद ॥ ४२ ॥ तिघे महावीर दारुण । अंगदासीं करितां रण । धन्य अंगदाची आंगवण । तिघांही जणां नाटोपे ॥ ४३ ॥

त्रिशिराश्चांगदं वीरमभिदुद्राव सायकैः ।
गजेन समभिद्रुत्य वालिपुत्रं महोदरः ॥ १० ॥
स त्रिभिर्नैर्ऋतश्रेष्ठैर्युगपत्समभिद्रुतः ।
न विव्यथे महातेजा वालिपुत्रः प्रतापवान् ॥ ११ ॥

अंगद नाटोपे रणप्रवीण । त्रिशिरा क्षोभला अति दारुण । काढोनियां निर्वाणबाण । आला गर्जोन संग्रामा ॥ ४४ ॥ गजावरून अति तांतंडी ।

१ धैर्य. २ शेंपटानें. ३ प्रहार. ४ अपमानून. ५ अति त्वरेनें. ६ सर्व. ७ विसांवा. ८ आनंदें. ९ दोरी. १० त्वरेनें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

महोदरें घातली उडी । तोमरेंसीं लवडसवडी । अंगद कडाडीं ठोकिला ॥ ४५ ॥ देवांतक तेच अवसरीं । परिघ घेवोनियां करीं । अंगद ताडिला हृदयावरी । गडगजैं गर्जोनी ॥ ४६ ॥ परिघ तुळोनि साटोपता । बळें रणरंगीं तळपतां । घाव मागुता मागुता । होय हाणिता वारंवार ॥ ४७ ॥ तिघे वीर अति विख्यात । सबळ बळें घाव हाणीत । अंगद नव्हे व्यथाभूत । घाय मानीत तृणप्राय ॥ ४८ ॥ अंगदें उडोनि कडाडीं । गजासी देतां पैं थापडी । डोळे फाडोनियां बुडीं । रणपडिपाडीं मारिलें ॥ ४९ ॥

तलेन भृशमुत्पत्य जघान गजमंगदः ।
पेततुर्नयने तस्य विननाश स वारणः ॥ १२ ॥
विषाणं चास्य निष्कृष्य वालिपुत्रो महाबलः ।
देवांतकमभिद्रुत्य स जघान तदोरसि ॥ १३ ॥
स विह्वलितसर्वांगो वातोद्धूत इव द्रुमः ।
लाक्षारससवर्णं च सुस्राव रुधिरं मुखात् ॥ १४ ॥
अथाश्वस्य महातेजाः कृच्छ्राद्देवांतको बली ।
आविध्य परिघं वेगादाजघान तदांगदम् ॥ १५ ॥

महोदराचा महाहस्ती । थापा हाणोनि पाडिला क्षितीं । गजदंत उपडोनियां हातीं । देवांतकाप्रती धांविन्नला ॥ ५० ॥ अंगदें पूर्वरागेंकरीं । देवांतकाचे उरावरी । गजदंत हाणोनि निजगजरीं । धरेवरी पाडिला ॥ ५१ ॥ नाकीं तोंडीं सुटलें रक्त । लाक्षारंगासम आरक्त । मुखीं रुधिरातें वमित । रणीं मूर्च्छित पडियेला ॥ ५२ ॥ तोंडीं सुटलें रक्त तडफडी । हात पाय स्वयें वोढी । अति कष्टाच्या पडिपाडीं । मूर्च्छा गाढी भांजिली ॥ ५३ ॥ मूर्च्छा भांजोनि संपूर्ण । देवांतक स्वयें आपण । परिघ घेवोनि दारुण । अंगद जाण ठोकिला ॥ ५४ ॥ परिघ लागतांचि निजनेटीं । रणरंगीं मेटीकुटी । घालोनि बैसला जगजेठी । मूर्च्छा पोटीं सांवरूनी ॥ ५५ ॥ अंगदें करितां उड्डाण । त्रिशिरा विंधी दारुण बाण । महोदर स्वयें आपण । हाणी निर्वाण तोमरें ॥ ५६ ॥ सर्पप्राय त्रिशिराबाण । ललाटीं भेदला दारुण । धन्य अंगदाची आंगवण । अणुप्रमाण न ढळेचि ॥ ५७ ॥ दोहीं कटकीं वाजली हांक । अंगद बळिया चोख । तेणें हनुमंता हरिख । आला तवक नीळासी ॥ ५८ ॥

ततोऽगदं परिक्षिप्तं त्रिभिर्नैर्ऋतपुंगवैः ।
हनूमानथ विज्ञाय नीलश्चापि प्रतस्थतुः ॥ १६ ॥
ततश्चिक्षेप शैलाग्रं नीलस्त्रिशिरसे तदा ।
तद्रावणसुतः शूरो निर्बिभेद शितैः शरैः ॥ १७ ॥
ततश्चूर्णितमालोक्य हर्षाद्देवांतकस्तदा ।
परिघेणाभिदुद्राव मारुतात्मजमाहवे ॥ १८ ॥
तमापतंतमुत्पत्य हनूमान्कपिकुंजरः ।
आजघान तदा मूर्ध्नि वज्रकल्पेन मुष्टिना ॥ १९ ॥
स मुष्टिनिष्पिष्टविभिन्नमूर्धा विशीर्णदंताक्षिप्रलंबजिह्वः ।
देवान्तको राक्षसराजसूनुर्गतासुरुर्व्यां सहसा पपात ॥ २० ॥

तिघां जणांसीं भिडतां । अंगद श्रमला युद्ध करितां । हनुमंत त्यासी साह्य जातां । नीळही तत्त्वतां स्वयें आला ॥ ५९ ॥ त्रिशिरा अंगदा विंधी बाण । त्यासी नीळें पाचारून । दीर्घ पर्वत अति सघन । घाली गर्जोन मस्तकीं ॥ ६० ॥ त्रिशिरा धनुर्वाडा चोख । लक्ष साधून शरसंनिष्ठ । घायें पर्वत केला पिष्ट । पाडिला सकूट पृथ्वीसी ॥ ६१ ॥ पर्वत छेदिला त्रिशिरेनें । तेणें देवांतक हरिखेंजोनी । निजपरिघेंसीं गर्जोनी । हाणी धांवोनी हनुमंता ॥ ६२ ॥ हनुमान रणीं धीट नीट । त्याचा परिघ करोनि पीठ । टोला देतां चतुस्फोट । पाडिला स्पष्ट पृथ्वीसीं ॥ ६३ ॥ कैसा टोल्याचा आघात । भग्न मस्तक रुधिरांकित । पृथ्वीतळीं सनेत्र दांत । जिव्हा लोळत सलंब ॥ ६४ ॥ देवांतक रावणसुत । टोल्यासाठीं करोनि घात । रणीं पाडिला निश्चेष्टित । केला प्राणान्त हनुमंतें ॥ ६५ ॥

ततस्तु नीलः प्रतिलब्धसंज्ञः सशैलमुत्पाट्य सवृक्षखंडम् ।
सुदूरमुत्पत्य खमुग्रवेगो महोदरं तेन जघान मूर्ध्नि ॥ २१ ॥
स तेन शैलेन समाहतस्तु रक्षोधिपो भूमितले पपात ।
महोदरो जीवितमुत्ससर्ज यथा गजः सिंहबलाभिभूतः ॥ २२

येरीकडे नीळ महोदर । युद्धा पेटले दुर्धर । नीळ क्षोभोनि सेनाधर । केला संहार तो ऐका ॥ ६६ ॥ महोदराचा तोमर । नीळ उड्डाणें हरी

१ युद्धचातुर्यानें. २ लाखेच्या रंगासारखा. ३ उतरली, सांवरली, ४ गुडघे टेंकून, ५ अचुक शरसंधानानें.

६ शिखरासहित. ७ हर्ष पावून. ८ टोल्याचे योगानें, ९ दुसरीकडे, १० भयंकर,

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सत्वर। रागें उपडिला गिरिवर। त्यावरी थोर द्रुमशिखरें ॥ ६७॥ नीळें देवोनियां हांक। पर्वत टाकितां संमुख। महोदरासी टकमक। आली भुली देख रणमारें ॥ ६८॥ देखतां नीळाची आंगवण। महोदर धाके संपूर्ण। धाकेंचि त्याचा गेला प्राण। गिरिनिवारण कोण करी ॥ ६९ ॥ नीळें पर्वत घालितां पैं शिरीं। महोदर पडिला धरेवरी। जाहली हाडांची चकचुरी। प्राणान्त करी वानर ॥ ७० ॥ देवांतकातें हनुमान मारी। नीळ महोदरातें संहारी। रावणा जाली पोरमारी। अपांपरी राक्षसां ॥ ७१ ॥

पितृव्यं निहतं दृष्ट्वा त्रिशिरा क्रोधमूर्च्छितः।
हनुमंतं सुसंक्रुद्धो विव्याध निशितैः शरैः ॥ २३ ॥
ततो हनूमानुत्पत्य हयांस्त्रिशिरसस्तदा।
ददार करजैस्तीक्ष्णैर्गजेंद्रं मृगराडिव ॥ २४ ॥
अथ शक्तिं समादाय कालरात्रिमिवांतकः।
हनूमंतं प्रचिक्षेप त्रिशिरा रावणात्मजः ॥ २५ ॥
दिवि क्षिप्तां महोल्काभां शक्तिं तां तु महाप्रभाम्।
बभंज हनुमांस्तस्य हर्षाच्च विननाद ह ॥ २६ ॥

अंगदें नरांतकसंहार। देवांतका हनुमान वीर। नीळें मारिला महोदर। त्रिशिरा दुर्धर क्षोभला ॥ ७२ ॥ त्रिशिरा कोपोन दारुण। हनुमंतासी विंधिले बाण। पुच्छाग्रें करोनि चूर्ण। केलें उड्डाण हनुमंतें ॥ ७३ ॥ हनुमान तैळपोनि अंबरीं। त्रिशिरारथाचे वारू चारी। विदारिले नखाग्रीं। जेंवी केसरी गजातें ॥ ७४ ॥ विदारूनि वारू चारी। रथ करोनि चकाचुरी। हनुमान गर्जे गिरागजरीं। जो महामारी राक्षसां ॥ ७५ ॥ बांधावया हनुमान वीर। त्रिशिरा कोपला अत्युग्र। शक्ति काढिली दुर्धर। रणीं वानर मारावया ॥ ७६ ॥ उल्का जैसी कडाडित। कीं काळरात्री धडधडित। करावया हनुमंताचा घात। त्रिशिरा सोडीत महाशक्ती ॥ ७७ ॥ शक्ति अतिशयें दुर्धर भारी। तेज न समाये अंबरीं। कडकडोनि प्रळयगजरीं। हनुम्यावरी लोटली ॥७८॥ धन्य बळिया हनुमंत। पुच्छें शक्तीचा केला घात। मोडून सांडिली रणाआंत। कपि गर्जत स्वानंदें ॥ ७९ ॥ शरचाप रणीं केलें व्यर्थ। दुर्धर शक्तीचा केला घात। त्रिशिरा स्वयें कोपान्वित। खड्ग काढीत साटोपें ॥ ८० ॥

ततः खड्गं समुत्पाद्य त्रिशिरा राक्षसोत्तमः।
निचखान तदा शूरो वानरेंद्रस्य वक्षसि ॥ २७ ॥
खड्गप्रहाराभिहतो हनूमान्प्लवगोत्तमः।
आजघान त्रिशिरसं तलेनोरसि वीर्यवान् ॥ २८ ॥
स तलाभिहतस्तेन स्रस्तकेशांबरो भुवि।
निपपात महातेजा विसंज्ञस्त्रिशिरास्तदा ॥ २९ ॥
यत्नतस्तस्य खड्गं तु समाक्षिप्य महाकपिः।
ननाद गिरिसंकाशस्त्रासयन्सर्वराक्षसान् ॥ ३० ॥

रणीं खवळोनि त्रिशिरा भारी। खड्ग काढोनि कोशाबाहेरी। हनुमान हाणिला उरावरी। खड्गधारीं साटोपें ॥ ८१ ॥ रणप्रवीण हनुमंतें। त्रिशिरा हाणोनि तळाघातें। हिरोन घेऊन खड्गातें। पाडिला तेथें मूर्च्छित ॥८२॥ खड्गहस्ती हनुमान वीर। रणीं गर्जती वानर। चळीं कांपती निशाचर। अति दुर्धर हनुमंत ॥ ८३ ॥ चेतना लाहोनि त्रिशिरा। देखोनि खड्गहस्त वानरा। दांत खावोनि करकरां। हाणी कपींद्रा मुष्टिघात ॥ ८४ ॥ माझें खड्ग वानराहातीं। देखोनि प्रज्वळला चित्तीं। हनुमान हाणी मुष्टिघातीं। सर्वशक्तीं साटोपें ॥ ८५ ॥ हनुमंतासी मुष्टिघात। हाणितां झणाणिला हात। त्रिशिरा चांचरी जात। स्वयें सांवरीत विव्हळ ॥ ८६ ॥ लागतां त्याचा मुष्टिघात। डळमळीना हनुमंत। खड्गहस्तें क्षणाआंत। केला निःपात तिहीं शिरां ॥ ८७ ॥

स तेन खड्गेन महाशिरांसि
कपिः समस्तानि सकुंडलानि।
क्रुद्धः प्रचिच्छेद तदा हनूमां-
स्त्वष्टुः सुतस्यैव शिरांसि शक्रः ॥ ३१ ॥
तस्मिन्हते देवरिपौ त्रिशीर्षे
हनूमता शक्रपराक्रमेण।
नेदुः प्लवंगाः प्रचचाल भूमी
रक्षांसि सर्वाणि विदुद्रुवुश्च ॥ ३२ ॥
हतं त्रिशिरसं दृष्ट्वा तथैव च महोदरम्।
हतौ प्रेक्ष्य दुराधर्षौ देवांतकनरांतकौ ॥ ३३ ॥

१ दुर्दशा, २ झळकून, ३ सिंह, ४ तुटून पडणारा तारा, ५ म्यानांतून, ६ प्राप्त होऊन,

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

चुकोप परमामर्षी मत्तो राक्षसपुंगवः ।
जग्राहार्चिष्मतीं चापि गदां सर्वायसीं तदा ॥ ३४ ॥

खड्ग घेवोनि हनुमंतें । छेदिलें त्रिशिऱ्याचे तिहीं शिरांतें । समुकुट सकुंडलांतें । लखलखीत पाडिलीं ॥ ८८ ॥ विरूपाचीं महाशिरें । जैसीं कां छेदिलीं इंद्रें । तैसीं त्रिशिऱ्याचीं शिरें । रणीं कपींद्रें पाडिलीं ॥ ८९ ॥ गिरिशृंगें उद्भट[1] । शिरें शोभती लखलखाट । वटारिले नेत्रवाट । पाडिले स्पष्ट रणरंगीं ॥ ९० ॥ त्रिशिरा सुरवरांचा वैरी । हनुमंतें रणमारीं । शिरें छेदून शस्त्रधारीं । धरेवरी पाडिला ॥ ९१ ॥ सुरवर करिती जयजयकार । नामें गर्जती वानर । धाकें पळती निशाचर । रणीं महाशूर मारिले ॥ ९२ ॥ त्रिशिरा मारिला महाशूर । मारिला बंधु महोदर । देवांतक राजकुमर । मारिला वीर नरांतक ॥ ९३ ॥ देखोनि सुहृदांचा[2] मार । महापार्श्व महावीर । दुःखशोकें अति जर्जर । चढला पूर मोहाचा ॥ ९४ ॥ महापार्श्व मोहान्वित । स्वयें होवोनि सावचित्त । रणीं राहोनि ध्यानस्थ । कर्तव्यार्थ विचारी ॥ ९५ ॥ पळोनि जातां लंकेआंत । पुत्रशोकें लंकानाथ । अवश्य करील माझा घात । कीं अपमानांत गांजील ॥ ९६ ॥ मुखीं लावील मसीचा टिळा । रासभारोहणीं[3] गोमयगोळा । उपानहांच्या[4] माळा गळां । होईल सोहळा शिमग्याचा ॥ ९७ ॥ ऐसें अपमानें जिणें । त्याहून श्रेष्ठ रणीं मरणें । निमाल्या निजमोक्ष पावणें । जिंतल्या जिणें जगद्वंद्व ॥ ९८ ॥ ऐसें विचारोनि जाण । महापार्श्व विचक्षण[5] । वानरीं करावया रण । स्वयें आपण परतला ॥ ९९ ॥

चुकोप सुमहातेजा महापार्श्वो महाबलः ।
जग्राह महतीं घोरां गदां सर्वायसीं तदा ॥ ३५ ॥
हेमपट्टपरिक्षिप्तां मांसशोणितफेनिलाम् ।
विरोचमानां विपुलां शत्रुशोणिततर्पिताम् ॥ ३६ ॥
गदामादाय संक्रुद्धो महापार्श्वो महायशाः ।
हरीन्समभिदुद्राव युगांताग्निरिव ज्वलन् ॥ ३७ ॥

निमाले देखोनि स्वजन । वानरेंसीं करावया रण । महापार्श्व स्वयें आपण । गदा घेऊन धांविन्नला ॥ १०० ॥ अवघी तिख्याची लखलखित । अग्निप्राय धगधगित । सुवर्णबंदी रत्नांकित । गदा शोभत अति शोभा ॥ १ ॥ शत्रुशोणितें[6] न्हाणिली । अरिशिरःकमळें[7] पैं पूजिली । रिपुमांसें तृप्त केली । गदा घेतली साटोपें ॥ २ ॥ करावया भूतांची बोहरी । प्रळयाग्नि जैशापरी । तैसी गदा घेवोनि करीं । वानरांवरी धांविन्नला ॥ ३ ॥ येतां देखोनि वानरान्त । ऋषभ वीर वरुणसुत । उडोनियां संमुख येत । करावया घात महापार्श्वा ॥ ४ ॥

ऋषभस्तु समुत्पत्य वानरो वरुणात्मजः ।
महापार्श्वं समासाद्य तस्थौ तस्याग्रतो बली ॥ ३८ ॥
तं पुरस्तात्स्थितं दृष्ट्वा वानरं पर्वतोपमम् ।
आजघानोरसि क्रुद्धो गदया वज्रकल्पया ॥ ३९ ॥
स तथाभिहतस्तेन गदया वानरर्षभः ।
भिन्नवक्षाः समाधूतः सुस्राव रुधिरं बहु ॥ ४० ॥

येतां देखोन महापार्श्वासी । ऋषभवीर अति वेगेंसीं । उडोनि आला तयापासीं । संग्रामासी साटोपें ॥ ५ ॥ जैसा पर्वताचा कडा । तैसा वानर आला पुढां । महापार्श्व कोपला गाढा । उठावला गाढा गदेसीं ॥ ६ ॥ गदा घेवोनि कोपेंकरीं । ऋषभ हाणितला उरावरी । घायें पडिला धरेवरी । उभाचि रुधिरीं न्हाणिला ॥ ७ ॥ घायासरसा विसंज्ञ[8] । ऋषभ पडला अचेतन । चिरकाळें स्वयें आपण । संज्ञा संपूर्ण पावला ॥ ८ ॥

स संप्राप्य चिरात्संज्ञामृषभो वानरर्षभः ।
क्रुद्धो विस्फुरमाणौष्ठो महापार्श्वमवेक्षत ॥ ४१ ॥
गृहीत्वा तां गदां वीरो व्याविध्य च पुनः पुनः ।
मत्तानीकं महापार्श्वं जघान रणमूर्धनि ॥ ४२ ॥
स तया गदया भिन्नो विशीर्णदशनेक्षणः ।
निपपात महापार्श्वो वज्राहत इवाचलः ॥ ४३ ॥

तस्मिन्हते भ्रातरि रावणस्य
तन्नैर्ऋतानां बलमर्णवाभम् ।
मुक्तायुधं केवलजीवितार्थी
दुद्राव भिन्नार्णवसन्निकाशम् ॥ ४४ ॥

१ प्रबळ. २ आप्तांचा. ३ गाढवावर बसवून. ४ जोड्यांच्या, ५ शहाणा. ६ शत्रूच्या रक्तानें, ७ शत्रूच्या शिरोरूपी कमळांनीं. ८ मूर्च्छित.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

संज्ञां[१] लाहोनि वानर। करावया रणप्रत्युपकार। दृढ करोनियां विचार। केला चमत्कार तो ऐका ॥ ९ ॥ ऋषभ वीर रणमगळा[२]। पुच्छें कंठीं लावोनि कळा। गदा हिरोनियां तत्काळा। गेला निराळा[३] उडोनी ॥ ११० ॥ वानर गदा हिरोनि नेतां। विस्मयो महापार्श्वचित्ता। आणिक शस्त्र घ्यावें हाता। तंव गदाघातां ठोकिलें ॥ ११ ॥ कोपें कपि कांपे थरथरां। दांत खावोनि करकरां। गदा भोवंडोनि गरगरां। निशाचरा ठोकिलें ॥ १२ ॥ गदाघात वाजतां शिरीं। दांत खावोनि चकचूरी। नेत्र पडिले बाहेरी। धरेवरी पडियेला ॥ १३ ॥ महापार्श्वें रणव्युत्पत्तीं। गदा पडतांळिली हातीं। त्याची भोंवली त्याभोंवतीं। पडिला क्षितीं घायें एकें ॥ १४ ॥ शंबराचें शिर छेदून। जैसें कां करी प्रद्युम्न। तैसेंचि महापार्श्वा जाण। रणमर्दन केलें ऋषभें ॥ १५ ॥ रावणाचा बंधु जाण। महापार्श्व प्रिय प्रधान। त्याचा रणीं घेतला प्राण। पलायमान राक्षस ॥ १६ ॥ प्रळयीं खवळल्या सागर। त्याचें जेंवी नावरे नीरें। तेंवी निमाल्या पांचही वीर। राक्षसभार भंगला ॥ १७ ॥ देवांतक महोदर। नरांतक त्रिशिरा वीर। महापार्श्व मारिला शूर। राक्षस समग्र पळाले ॥ १८ ॥ चौघीं मारिले पांचही जण। अतिकाय करील निर्वाण। एका जनार्दना शरण। तेंही निरूपण अवधारा ॥ ११९ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां देवांतकत्रिशिरादिवधो नाम त्रिंशत्तमोऽध्यायः ॥ ३० ॥ ओंव्या ॥ ११९ ॥ श्लोक ॥ ४४ ॥

अध्याय एकतिसावा

॥ श्रीरामचंद्राय नमः ॥ चौघे मिळोनि वानर। तिघे रावणराजकुमर। महापार्श्व आणि महोदर। पांचही महाशूर मारिले ॥ १ ॥ आम्ही म्हणों हे वानर। पालेखाइरे वनचर। परी हे निधडे महाशूर। दुर्धर वीर मारिले ॥ २ ॥ सखे बंधु मारिले तिन्ही। पितृव्य निमाले दोन्ही। तें देखोनियां नयनीं। अतिकाय मनीं क्षोभला ॥ ३ ॥ मारिले देखोनि स्वजन। अतिकाय कोपायमान। रविप्रभेसीं समान। देदीप्यमान तेजस्वी ॥ ४ ॥ एवढिया तेजासी कारण। ब्रह्मदत्त वरद संपूर्ण। प्राकृतांचेनि हातें मरण। सर्वथा जाण न पावसी ॥ ५ ॥ ब्रह्मवरदें बळवंत। देवदानवदैत्यघात। स्वयें करी रणाआंत। निजपुरुषार्थ मिरवोनी ॥ ६ ॥ सारथ्यासी स्वयें सांगत। जेथें आहे रघुनाथ। वानरांसी न लावूं हात। रणीं रघुनाथ मारावया ॥ ७ ॥ पाठीसीं असतां श्रीरघुनाथ। रणीं वानर नाटोपत। तेथवरी प्रेरिला रथ। त्यासी रणांत मारावया ॥ ८ ॥ वानरांचें बळकारण। मुख्य श्रीरामलक्ष्मण। ते मारिल्या दोघे जण। वानरगण निमाले ॥ ९ ॥ अखया मारून जाळिलें नगर। देवांतक नरांतक त्रिशिर। महापार्श्व महोदर। सुहृद समग्र निर्दळिले ॥ १० ॥ ते व्हावया उत्तीर्ण[१०]। सुखी करावया रावण। रणीं मारीन रामलक्ष्मण। तरी मी जाण अतिकाय ॥ ११ ॥ रणीं मारिल्या श्रीरामचंद्र। मारणें न लागती वानर। तेही विषयींचा विचार। ऐक साचार सांगेन ॥ १२ ॥ श्रीराम वृक्ष लक्ष्मण दंड। हनुमान एक मध्यबिंड। सुग्रीवादि शतशाखा प्रचंड। विस्तार उदंड कपिसेना ॥ १३ ॥ सीता सुंदर सुमनफळ। रावण भुलला तत्काळ। हित सांगतांही सकळ। तो अळुमाळें[११] उमजेना ॥ १४ ॥ रणीं मारिल्या रघुवीर। निमाले हनुमान सौमित्र। निमाले सुग्रीवादि वानर। सीता सुंदर स्ववश ॥ १५ ॥ ऐसी करावया ख्याती। अतिकाय मी रणार्थी। घायें मारीन रघुपती। बाणावर्तीं वर्षोनी ॥ १६ ॥ रणीं मारावया रघुनाथ। मी अतिकाय आलों येथ। विस्फारोनि चापहस्त। रणीं गर्जत साटोपें ॥ १७ ॥ मुकुट कुंडलें वीरकंकणें। अतिकाय शोभला तेणें। बाहुअंगदें अंगत्राणें। जेंवी कां किरणें श्रीसूर्य ॥ १८ ॥ धनुष्यीं करितां टणत्कार। दुमदुमिले गिरिकंदर। भूकंपें उलथती सागर। भेणें वानर पळाले ॥ १९ ॥ अतिकाय देखोनि दुर्धर। भयें त्रासिले वानर। पळोन आले ते समग्र। श्रीरघुवीर ठाकोनी ॥ २० ॥ जो शरण्य[१२] शरणागता। ठाकून आले त्या रघुनाथा। अभय देतांचि समस्तां। कपि स्वस्थता पावले ॥ २१ ॥

१ सावध होऊन. २ रणकुशल. ३ आकाशांत. ४ घेतली. ५ उदक. ६ निकराचें युद्ध. ७ चुलते. ८ ब्रह्मदेवानें दिलेला वर. ९ सामान्य मनुष्यादिकांचे. १० त्यांचे उतराई होण्याकरितां. ११ यत्किंचितही. १२ शरणागतांचें रक्षण करणारा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

अतिकाय तो अति दुर्धर । रथीं बैसला दिसे अत्युग्र । त्यातें देखोनि रघुवीर । विस्मय थोर पावला ॥ २२ ॥ स्वयें श्रीरामें आपण । पाचारोनि बिभीषण । म्हणे पैल हा वीर येतो कोण । रण- प्रवीण निःशंक ॥ २३ ॥ हाकाऊन[1] बिभीषण । स्वयें पुसे रघुनंदन । पर्वतप्राय अति दारुण । येतो कोण तें सांग ॥ २४ ॥ धनुर्धारी पिंगाक्ष । रथीं बैसला अति दक्ष । येतो आमचें धरून लक्ष्य । रणाध्यक्ष प्रतापी ॥ २५ ॥ रथीं जुंपिले अश्व सहस्र । दोन शतें वीस तूणीर । असि चाप गदा मुद्गर । त्रिशूळ तोमर रथस्थ ॥ २६ ॥ छत्र पताका युग्मचामरीं । ध्वजीं मुक्तमाळाझल्लरी । राहूचें शिर ध्वजावरी । रणमहामारीं व्रीदाइत ॥ २७ ॥ बाहुअंगदें मुकुट शिरीं । कुंडलांचें तेज भारी । लखलखी मुखावरी । जेंवी भास्करीं निजकिरण ॥ २८ ॥ हेमसंनद्ध[2] चापबाण । रथीं बैसला निःशंक पूर्ण । मजसंमुख यावया जाण । आंगवण केंवी यासी ॥ २९ ॥ तेच विपर्यीचें निरूपण । स्वयें सांगतो बिभीषण । अतिकायाची आंगवण । बळ संपूर्ण वरदोक्तीं ॥ ३० ॥

भीमकर्मा महातेजा रावणो राक्षसाधिपः ।
तस्यैष वीर्यवान्पुत्रो रावणप्रतिमो बली ॥ १ ॥
वृद्धसेवी श्रुतिधरः सर्वास्त्रविदुषां वरः ।
अश्वपृष्ठे नागपृष्ठे खड्गे धनुषि कर्षणे ॥ २ ॥
भेदे सांत्वे च दाने च न्याये मंत्रे च संमतः ।
तनयं विद्धि मालिन्या अतिकायमिमं विदुः ॥ ३ ॥

रावण जाला लंकापती । महामालिनीगर्भ- संभूतीं । याची जाली पैं उत्पत्ती । नामें निश्चितीं अतिकाय ॥ ३१ ॥ अतिकाय वीर विख्यात । रावणासमान बळवंत । परी हा साधुसेवी अति विनीत । आणि श्रवणवंत सच्छास्त्रीं ॥ ३२ ॥ जाणे रथगती चक्रभ्रमण । गजवाजीआरोहण । खड्ग पदाति करावया रण । आंगवण अतिकाया ॥ ३३ ॥ शूळ त्रिशूळ मुद्गर । फरश पट्टिश तोमर । अचुकसंधानी धनुर्धर । प्रवीण शस्त्रीं अतिकाय ॥ ३४ ॥ भेदाचें परिमार्जन । लोभदंभाचें सांत्वन । दान देवोनि उदार पूर्ण । विनीतपण सर्वांसीं ॥ ३५ ॥ निर्दळोनि अनीती । दृष्टीपुढें ओळंगे नीती । विचाराविषयीं हा बृहस्पती । सांगे सुखोक्तिसंवाद ॥ ३६ ॥ ऐसा सर्वार्थी निपुण । संग्रामीं जिंतले सुरगण । मशकप्राय करोनि जाण । इंद्र संपूर्ण गांजिला ॥ ३७ ॥ संग्रामीं अति प्रखर । प्रतापतेजें जैसा रुद्र । सर्वार्थी अति दुर्धर । रावणकुमर अतिकाय ॥ ३८ ॥

अनेनाराधितो ब्रह्मा तपसा भावितात्मना ।
अस्त्राणि चास्य दत्तानि रिपूणां च पराजये ॥ ४ ॥
सुरासुरैरवध्यत्वं दत्तमस्य स्वयंभुवा ।
एतच्च कवचं दिव्यं रथश्च रविभासुरः ॥ ५ ॥
एतेन शतशो देवा दानवाश्च पराजिताः ।
एषोऽतिकायो बलवान्राक्षसानामथर्षभः ॥ ६ ॥
तदस्मिन्क्रियतां यत्नः क्षिप्रं पुरुषपुंगव ॥ ७ ॥

पूर्वी अतिकाय निरन्न । करूनि ब्रह्मयाचें आरा- धन । ब्रह्मा करोनि सुप्रसन्न । ब्रह्मवरदान पावला ॥ ३९ ॥ पराभवून शत्रुसमुदाव । नित्य संग्रामीं निजविजय । ऐसा शस्त्रअस्त्रसमुदाव । ब्रह्मदेव स्वयें अर्पी ॥ ४० ॥ सुरासुरांसीं करितां रण । सर्वथा युद्धीं न ये मरण । अवध्यत्वाचें वरदान । दिधलें आपण ब्रह्मदेवें ॥ ४१ ॥ अभेद्य कवच अभेद्य रथ । ब्रह्मा देत हर्षयुक्त । तेणें देवदानव समस्त । रणीं गांजित अतिकाय ॥ ४२ ॥ वरदबळें बळोन्मत्त । अतिकाय येतो गर्जत । शीघ्र याच्या वधार्थ । यत्न निश्चित करवावा ॥ ४३ ॥ अभेद्य कवच अनिवार्य बाण । येणें बळें अतिकाय जाण । येतो तुजसीं करावया रण । आंगवण वरदाची ॥ ४४ ॥ याचे न सुटतां बाण । प्रयत्न देखावा आपण । ऐसें बोलतां बिभीषण । रघुनंदन हांसि- ला ॥ ४५ ॥ ब्रह्मवरद तें बापुडें । अतिकाय मशक घुंगुरडें । त्याचें भय वाडेंकोडें[4] । काय मजपुढें सांगसी ॥ ४६ ॥ माझा सुटलिया बाण । कळि- काळाचा घेईल प्राण । अतिकाय तें बापुडें कोण । मरेल आपण निमेषार्धें ॥ ४७ ॥ अतिकाय प्रेरून रथ । आला वानरसैन्याआंत । धनुष्य टणत्का- रोनि तेथ । असे गर्जत रणरंगीं ॥ ४८ ॥ रणरंगीं वारंवार । सिंहनाद करितां थोर । तेणें क्षोभोनि वानरवीर । युद्धा सत्वर मिसळले ॥ ४९ ॥ अतिकाय अति भयंकर । देखोनि श्रेष्ठ श्रेष्ठ वानर ।

१ हांक मारून, बोलावून. २ सुवर्णबद्ध. ३ तरवारीनें युद्ध. ४ कौतुकानें,

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

युद्धा मिसळले दुर्धर । शिळाशिखरद्रुमपाणी ॥ ५० ॥ कपि हाणितां द्रुमपाषाण । अतिकाय त्यांसी न विंधी बाण । हीन दीन वानरें जाण । मारिल्या कोण पुरुषार्थ ॥ ५१ ॥ वानर वनचर ते किती । पालेखाईर यांची जाती । त्यांसी मारिल्या कोण कीर्ती । रणीं रघुपती मारीन ॥ ५२ ॥ वानरांसीं करणें रण । हेंचि मज उणेपण । मुख्य धूर मी मारीन । रघुनंदन संग्रामीं ॥ ५३ ॥ वानरांचे द्रुमपाषाण । अतिकाय मानून तृण । श्रीरामासीं करावया रण । आला आपण साटोपें ॥ ५४ ॥ वानर बापुडे ते किती । त्यांवरी धनुष्य न धरीं हातीं । रणीं मारावया रघुपती । संग्रामशक्ती मज आहे ॥ ५५ ॥ निवारून द्रुम पाषाण । उपेक्षून वानरगण । श्रीरामासीं करावया रण । आला गर्जोन अतिकाय ॥ ५६ ॥ घेवोनियां धनुष्यबाण । युद्धा आलों मी आपण । ज्यासी असेल आंगवण । तेणें मजसीं रण करावें ॥ ५७ ॥ तुम्हांमाजी कोणाप्रती । जरी असेल संग्रामशक्ती । तरी तेणें येवोनि मजप्रती । रणव्युत्पत्तीं भिडावें ॥ ५८ ॥

तत्तस्य वाक्यं ब्रुवतो निशम्य
चुकोप सौमित्रिरमित्रहंता ।
अमृष्यमाणश्च समुत्पपात
जग्राह बाणांश्च ततः प्रहस्य ॥ ८ ॥
पुरस्ताचातिकायस्य विचकर्ष महाधनुः ।
पूरयित्वा महीं शैलानाकाशं सागरं दिशः ॥ ९ ॥
ज्याशब्दो लक्ष्मणस्याग्रे त्रासयन्रजनीचरान् ।
विसिस्मिये महातेजा राक्षसेंद्रसुतो बली ॥ १० ॥
अथातिकायः कुपितो दृष्ट्वा लक्ष्मणमग्रतः ।
आदाय निशितं बाणमिदं वचनमब्रवीत् ॥ ११ ॥

ज्यासी असेल आंगवण । तेणें मजसीं करावें रण । ऐकोनि अतिकायाचें वचन । आलें स्फुरण लक्ष्मणा ॥ ५९ ॥ वंदून रामाचे चरण । सज्जोनियां धनुष्यबाण । करून स्वानंदें उड्डाण । आला गर्जोन सौमित्र ॥ ६० ॥ सबळ बळें अति गाढा । दृढ सज्जोनियां मेढा । आला अतिकायापुढां । रणीं निधडा सौमित्र ॥ ६१ ॥ करितां धनुर्ष्यीं टणत्कार । भूकंप सपर्वतसागर । नादें उठत अंबर । गिरिकंदर दुमदुमलें ॥ ६२ ॥ टाळीं बैसलीं दिग्गजांसी । नाद कोंदला दशदिशीं । भय सुटलें राक्षसांसी । कासाविसी ज्याघोषें ॥ ६३ ॥ ऐकतां ज्याघोष दारुण । अतिकायाचा जाऊं पाहे प्राण । उतटलें अंतःकरण । निधडा पूर्ण सौमित्र ॥ ६४ ॥ संमुख निधडा लक्ष्मण । देखतां अतिकाया कोप पूर्ण । धनुर्ष्यीं सज्जोनियां बाण । रागें गर्जोन बोलत ॥ ६५ ॥ मागां सांडून रघुकुळटिळक । पुढें आलासी तूं बाळक । माझी वाजतांचि हांक । मरसी निःशेख घायेंविण ॥ ६६ ॥ धरोनियां अभिमान । मजसीं करूं म्हणसी रण । माझे सहावया निर्वाणबाण । आंगवण तुज कैंची ॥ ६७ ॥ सुटतां मद्बाणशैली । तुज पळतां रणकल्लोळीं । लपतां भूतळीं कीं नभःस्थळीं । शोधून होळी करतील ॥ ६८ ॥ हेमपत्रीं सुतीक्ष्ण बाण । सुटल्या घेती तुझा प्राण । मजसीं करितां रणांगण । वृथा मरण पावसी ॥ ६९ ॥ सांडोनियां धनुष्यबाण । शीघ्र पळावें आपण । तुज म्यां दिधलें जीवदान । सर्वथा जाण मारींना ॥ ७० ॥ त्यजून संग्रामसंकट । सांडून युद्धकडकडाट । तुज म्यां दिधली धर्मवाट । घडघडाट पळावें ॥ ७१ ॥ अतिकायाच्या निंद्य उत्तरीं । कोप न येचि सौमित्रीं । अगाध शांतीची निजथोरी । शब्दचातुरी अवधारा ॥ ७२ ॥ स्वमुखें बोलतां निजकीर्ती । ते तंव शूरासी अपकीर्ती । शब्दचातुर्यव्युत्पत्तीं । काय पुरुषार्थी जालासी ॥ ७३ ॥ बोलतां शब्दाची आंगवण । त्वां काय जिंतिलें रणांगण । व्यर्थ बोलाचें दादुलेंपण । निर्लज्ज पूर्ण तूं एक ॥ ७४ ॥ जे बडबडती वितंड । त्यांतें म्हणती केवळ भांड । भंडपुराण तुझें तोंड । तूं रणनिर्लंड निर्लज्ज ॥ ७५ ॥ घेवोनियां धनुष्यबाण । संमुख उभा मी लक्ष्मण । बोलासारखी आंगवण । करून आपण दावावी ॥ ७६ ॥

बालोऽयमिति विज्ञाय न चावज्ञातुमर्हसि ।
बालो वा यदि वा वृद्धो मृत्युं जानाति संयुगे ॥ १२ ॥

बालत्व मानिलें कुमारासी । तेणें मर्दिलें लवणासुरासी । तेंवी या बालत्वें राक्षसीं । रणमर्दैसीं

१ शिळा, शिखरें आणि वृक्ष हातांत घेऊन. २ धनुष्याची दोरी, ३ धनुष्याच्या दोरीच्या शब्दानें, ४ सोनेरी पिसाऱ्याचे. ५ मोठेपणा. ६ नुसती बडबड करणारें, ७ रणाविषयीं नपुंसक,

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

मर्दीन ॥ ७७ ॥ नवग्रहांचें बळ घटासी । तरी युद्ध न करवे पाषाणासीं । तैंवी तूं शूर देवदैत्यांसी । संग्राम मजसीं न करवे ॥ ७८ ॥ मज मानूनि बाळपण । सर्वथा न करावें हेळण[1] । माझ्या बाळपणाचें लक्षण । सावधान अवधारीं ॥ ७९ ॥ धाकुटी दीपकळिका जैसी । स्वयें लावितां वळचणीसी । जाळीत उठे पुरनगरांसी । गिरिदुर्गासी भस्मान्त ॥ ८० ॥ तैसें माझें धाकुटपण । संग्रामीं राक्षसां कुळकंदन । मारीन इंद्रजित रावण । तेथें तूं कोण क्षुद्र मशक[2] ॥ ८१ ॥ माझे सुटल्या निर्वाणबाण । अतिकाया तुज राखेल कोण । क्षणार्धें घेईन तुझा प्राण । तुझी आंगवण दावीं पां ॥ ८२ ॥ ऐसें बोलतां लक्ष्मण । अतिकाय कोपला दारुण । काढोनि निर्वाणबाण । सौमित्र संपूर्ण विंधिला ॥ ८३ ॥

लक्ष्मणस्य वचः श्रुत्वा हेतुमत्परमार्थवत् ।
अतिकायः प्रचुक्रोध बाणं चास्य समाददे ॥ १३ ॥
तमापतंतं सौमित्रिस्त्रिधा चिच्छेद लाघवात् ।
रावणिः परमामर्षी शरैरेनमुपाद्रवत् ॥ १४ ॥
ततः शरसहस्रेण संस्थाप्य रघुनंदनम् ।
विभीषणं च सामात्यं शरवर्षैर्महाभुजः ॥ १५ ॥
अर्धचंद्रेण चिच्छेद लक्ष्मणः परवीरहा ।
ततो विद्याधराः सर्वे देवा देवर्षयस्तथा ॥ १६ ॥
गुह्यकाश्च महात्मानस्तद्युद्धं ददृशुस्तदा ॥ १७ ॥

आपली स्तुति करणें आपण । हें शूरासी निंद्य दूषण । ऐसें धर्मयुक्तवचन । स्वयें लक्ष्मण बोलिला ॥ ८४ ॥ हृदयीं भेदला वाग्बाण । तेणें कोपें अतिकाय आपण । घेवोनियां निर्वाणबाण । रणीं लक्ष्मण विंधिला ॥ ८५ ॥ लक्ष्मणें लघुलाघवेंकरीं[3] । बाण छेदोनि वरच्यावरी । त्रिधा[4] भेदून अंबरीं । धरेवरी पाडिला ॥ ८६ ॥ निर्वाणबाण रणाआंत । करावया लक्ष्मणाचा घात । तो बाण येणें केला व्यर्थ । धन्य पुरुषार्थ सौमित्रा ॥ ८७ ॥ श्रीराम आणि लक्ष्मण । दोघांही निधडी[5] आंगवण । दोघे योद्धे रणप्रवीण । संग्रामीं जाण नाटोपती ॥ ८८ ॥ ठाकून मारिल्या बिभीषण । न लगे झुंझ न लगे भांडण । दोघे स्वयें सांडिती प्राण । तैसें विंदान मांडिलें ॥ ८९ ॥ ब्रह्मदत्ताचे सहस्र बाण । अनिवार्य अति दारुण । विंधोनि गोंविला लक्ष्मण । त्रासिला बिभीषण शरवर्षे ॥ ९० ॥ शरणागता वज्रपंजर । सत्यशास्त्री लक्ष्मण वीर । सोडूनि बाण अर्धचंद्र । शरें शर छेदिले ॥ ९१ ॥ बाण येतांचि कडाडीं । अतिकाय अतिशयें हडबडी[6] । डोळां चालली झांपडी । पडली मुर्कुंडी घायेंवीण ॥ ९२ ॥ अतिकाया ब्रह्मवरदान । प्राकृताहातीं न ये मरण । अवतारपुरुषाहातीं जाण । दिनान्तीं प्राण जातील ॥ ९३ ॥ न होतां सूर्यास्तमान । अतिकायासी न मारीच बाण । पाळोनियां ब्रह्मवरदान । आला परतोन तूंणीरीं ॥ ९४ ॥ लक्ष्मणाचें रण विचित्र । पाहूं आले सुरासुर । सिद्ध चारण विद्याधर । यक्ष किन्नर गुह्यक ॥ ९५ ॥ देवऋषि नारदमुनी । युद्ध पाहूं आला धांवोनी । हरिखें नाचे उपरमोनी । धन्य करणी सौमित्रा ॥ ९६ ॥ अनिवार ब्रह्मवरदबाण । घाय निवारोनि संपूर्ण । शरणागता संरक्षण । धन्य लक्ष्मण पैं योद्धा ॥ ९७ ॥ बाण निवारोनि समस्त । स्वस्थ राखोन शरणागत । न लावितां त्यासी आघात । पाडी मूर्च्छित अतिकाया ॥ ९८ ॥ युद्ध पहावया पडिपाडें[9] । पाहूं लागला लंकेपुढें । नारद हरिखें नाचे उडे । वांडेंकोडें[10] गर्जत ॥ ९९ ॥ स्वर्गीं गर्जती सुरवर । ऋषी करिती जयजयकार । नामें गर्जती वानर । धन्य सौमित्र रणयोद्धा ॥ १०० ॥ अतिकाय उघडी नयन । तंव बाण गेला परतोन । दुर्धर होवोनि कोपायमान । निर्वाणरण मांडिलें ॥ १ ॥ लक्ष्मणाचे पंच प्राण । घ्यावया सोडिले पांच बाण । निश्चयाचें निजनिर्वाण[11] । परम दारुण संग्रामीं ॥ २ ॥ अतिकायाचे पांचही बाण । छेदून सांडी लक्ष्मण । जेंवी सर्पांतें गरुड जाण । छेदी आपण नखाग्रें ॥ ३ ॥ छेदून त्याचें शरसंधान । स्वयें लक्ष्मण आपण । तेजस्वी घेऊन बाण । ओढी[12] काढून विंधिला ॥ ४ ॥ कडकडाटें येवोनि बाण । ललाटीं लागला दारुण । तेथेंचि जाला निमग्न । जेंवी सर्पागमन वारुळीं ॥ ५ ॥ अतिकायें करितां निवारण । त्याचे छेदूनियां बाण । जाला ललाटीं निमग्न ।

१ उपहास. २ क्षुल्लक. ३ मोठ्या चातुर्यानें. ४ तीन ठिकाणीं, ५ मोठी, ६ घाबरला, ७ भात्यामध्यें. ८ थांबून. ९ तुलनेनें. १० कौतुकानें. ११ पराकाष्ठा. १२ धनुष्याची दोरी कानापर्यंत ओढून.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

कंपायमान राक्षस ॥ ६ ॥ रुधिराचिया धारा । रक्तें न्हाणिलें निशाचरा । घायें दंडिलें महावीरा । रणीं थरथरां कांपत ॥ ७ ॥ जेंवी त्रिपुराचें त्रिपुर । रुद्र बाणीं करी जर्जर । तैसाच येथें निशाचर । लक्ष्मणें दुर्धर गांजिला ॥ ८ ॥ बाणमात्रें महाबळी । लोळविला रथातळीं । घायें मेळविला धुळी । आतुर्बळी सौमित्र ॥ ९ ॥

चिंतयामास चाश्वास्य विश्रम्य च महाबलः ।
साधुमुक्तेन बाणेन श्लाघनीयोऽसि मे रिपुः ॥ १८ ॥
स्यंदनोपस्थमादाय चापमादाय चोत्तमम् ।
एकत्रीन्पंचसप्तेति सायकान्राक्षसर्षभः ॥ १९ ॥
ततस्तान्राक्षसोत्सृष्टाञ्शरौघान्राघवानुजः ।
असंभ्रांतः प्रचिच्छेद निशितैर्बहुभिः शरैः ॥ २० ॥

अतिकाय शरसमेळीं । लोळविला रथातळीं । मूर्च्छा भांजून ते काळीं । झाला महाबळी सावध ॥ ११० ॥ माझी निवारोनि शरसुटी । बाण भेदिला ललाटीं । धन्य धनुर्वाडा तूं श्रेष्ठी । वीर जगजेठी मी मानीं ॥ ११ ॥ देव दानव दैत्य पन्नग । सदा संग्रामीं मजसीं विमुख । त्याही मज त्वां लाविला धाक । योद्धा नेटक मी मानीं ॥ १२ ॥ ऐसा शत्रूचा घेतां गुण । अतिकाय कोपला दारुण । घेवोनियां निर्वाणबाण । विंधी आपण साटोपें ॥ १३ ॥ प्रथम विंधिला बाण एक । लक्ष्मणें तोडिला तो देख । सवेंचि विंधी पांच आणिक । तेही निःशेख तोडिले ॥ १४ ॥ सवेंचि विंधिले बाण तीन । तेही सांडिले छेदून । आणीक विंधितां सात बाण । तेहीं तोडून सांडिले ॥ १५ ॥ एक तीन पांच सात । बाण छेदिले समस्त । अतिकाय तेणें कोपान्वित । दांत खात संग्रामीं ॥ १६ ॥

तान्शरान्युधि संप्रेक्ष्य निकृत्तान्रावणात्मजः ।
चुकोप त्रिदशेंद्रारिर्जग्राह च शितं शरम् ॥ २१ ॥
तेन सौमित्रिमायातमाजघान स्तनांतरे ।
सोऽतिविद्धो बलवता लक्ष्मणो लक्ष्मिवर्द्धनः ॥ २२ ॥
सुस्राव रुधिरं भूरि मदमत्त इव द्विपः ।
स चकार तदात्मानं विशल्यं सहसा विभुः ॥२३ ॥

अतिकायाचे निर्वाणशर । लक्ष्मणें छेदिले समग्र । तेणें क्षोभोनि रावणकुमर । शर दुर्धर सज्जिला ॥ १७ ॥ तेणें बाणेंसीं गर्जोन । हृदयीं विंधिला लक्ष्मण । बाण भेदलियाही संपूर्ण । सौमित्र जाण न डंडळी ॥ १८ ॥ सुटलिया रुधिरधारा । शोभे जैसा रणनोवरा । रणीं गर्जतां सौमित्रा । निशाचरां आकान्त ॥ १९ ॥ जेंवी महागज मदच्युत । डुलत विचरे वनाआंत । तेंवी लक्ष्मण रुधिरोक्षित । स्वानंदें डुल्लत रणरंगीं ॥ १२० ॥ हृदयीं रुपला जो बाण । तो स्वयें उपडोनि आपण । हृदय निःशल्य केलें जाण । रणप्रवीण सौमित्र ॥ २१ ॥ जो हृदयींचें शल्य फेडी । त्याचे तोडरीं विघ्नकोडी । प्रपंचपरमार्थविजयगुढी । उभवी रोकडी तिहीं लोकीं ॥ २२ ॥ जो शल्य फेडी हृदयाआंत । त्यासी रणरंगीं परमार्थ । तोचि विजयी संग्रामांत । जो करी घात अहंममतेचा ॥ २३ ॥ यापरी तो वीर धीर लक्ष्मण । हृदयींचें सर्व शल्य काढून । अतिकायाचा घ्यावया प्राण । अस्त्रसंधान संयोजी ॥ २४ ॥ निधडा धनुर्वाडा वीर । रणव्युत्पत्तीं शूर सौमित्र । अस्त्र मंत्र बीजाक्षर । सतेज शर सज्जिला ॥ २५ ॥

जग्राह च शरं तीक्ष्णं तमस्त्रेणाभिसंदधे ।
आग्नेयेन महाबाहुः सर्वा विद्योतयन्दिशः ॥ २४ ॥
अतिकायाय चिक्षेप कालदंडमिवांतकः ।
दृष्ट्वा तु तं महाबाहुः शरं जग्राह कोपनः ॥ २५ ॥
उत्ससर्ज तदा बाणं दीप्तं सूर्यास्त्रसंयुतम् ।
तावुभावंबरे बाणावन्योन्यममिजघ्नतुः ॥ २६ ॥
तावन्योन्यं विनिर्भिद्य पेततुर्धरणीतले ॥ २७ ॥

सौमित्र युद्धीं सावधान । घ्यावया अतिकायाचा प्राण । अग्निअस्त्र सज्जून बाण । विंधी आपण साटोपें ॥ २६ ॥ बाण सुटतां तेजोराशी । प्रभा न माय आकाशीं । अतिकाय देखोनि त्यासी । सूर्यास्त्रासी विंधिलें ॥ २७ ॥ अग्नि सूर्य तेजोराशी । बाण भिडतां आकाशीं । तेज मिळालें तेजासीं । अस्त्रें अस्त्रासी निवारण ॥ २८ ॥ पहातां पहातां वाडेंकोडें । तेजीं तेज मिनलें गाढें । दोहींचीं निर्वीर्य कांडें । रणीं दुखंडें तीं पडलीं ॥ २९ ॥ दोनी अस्त्रें झालीं निराकार । दोघे विसांवले

१ सांवरून. २ बाणवर्षाव. ३ शूर, श्रेष्ठ. ४ सर्व. ५ घाबरला नाहीं. ६ ज्याच्या गंडस्थळांतून मदस्राव होत आहे असा. ७ व्यथा. ८ मिसळलें. ९ बाण.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वीर । रणीं क्षोभोनि निशाचर । ईषीकास्त्र सोडिलें ॥ १३० ॥ रणीं क्षोभोनि निशाचर । रागें सोडिलें इषीकास्त्र । लक्ष्मण निधडा धनुर्धर । छेदिलें सत्वर इंद्रास्त्रें ॥ ३१ ॥ छेदिलें देखोनि इषीकास्त्र । कोपोनियां रावणपुत्र । सोडिता जाला याम्यास्त्र । रणीं सौमित्र लक्षोनी ॥ ३२ ॥ येतां देखोनि याम्यास्त्र । अस्त्रविंदानी सौमित्र । वाय्वस्त्रें तेंही अस्त्र । रणीं सत्वर छेदिलें ॥ ३३ ॥ रणीं खवळोनि सौमित्र । पर्जन्यधारा वर्षे शर । पावोनि अतिकायशरीर । बाण समग्र भंगिले ॥ ३४ ॥ ब्रह्मदत्त कवच त्यासी । बाण न रुपती अतिकायासी । तेणें लक्ष्मणें अति आवेशीं । बाणायुतेंसीं विंधिला ॥ ३५ ॥ रणीं कोपोनि सौमित्र । अयुतायुत विंधितां शर । ब्रह्मकवचें अतिकाय वीर । व्यथा अणुमात्र पावेना ॥ ३६ ॥

स वृष्यमाणो बाणौघैरतिकायो महाबलः ।
ब्रह्मदत्तवरो वीरो राक्षसेंद्रो न विव्यथे ॥ २८ ॥
न शशाक रुजं कर्तुं यदा तस्य महाशरैः ।
अथैनमभ्युपागम्य वायुर्वाक्यमभाषत ॥ २९ ॥
ब्रह्मदत्तवरो ह्येष ह्यभेद्यकवचावृतः ।
ब्राह्मेणास्त्रेण भगवञ्जहि दैवतकंटकम् ॥ ३० ॥

लक्ष्मणाचे दुर्धर शर । भेदूं न शकती निशाचर । ब्रह्मदत्तकवचें वीर । व्यथा अणुमात्र पावेना ॥ ३७ ॥ ऐसें देखोनि लक्ष्मण । विचारीं पडला संपूर्ण । अतिकाया न भेदती बाण । काय आपण करावें ॥ ३८ ॥ तंव गुप्तत्वें येऊनी । वायु गुज सांगे कानीं । यासी न भेदवे बाणीं । ब्रह्मवरदानी कवचावृत ॥ ३९ ॥ यासी ब्रह्मयाचें वरदान । ब्रह्मास्त्रें विंधोनि बाण । सवेग याचा घ्यावा प्राण । दुष्ट दारुण देवद्रोही ॥ १४० ॥ देवद्रोही देवकंटक । भूतद्रोही जीवघातक । धर्मद्रोही दुःखदायक । यासी आवश्यक मारावें ॥ ४१ ॥ ऐकोनि वायूचें वचन । रणीं हर्षला लक्ष्मण । अतिकायाचा घ्यावया प्राण । ब्रह्मास्त्र पूर्ण सज्जिलें ॥ ४२ ॥ अचुकसंधानी सौमित्र । हेमपत्री सितँ पीत शर । बाणीं सज्जिलें ब्रह्मास्त्र । निशाचर मारावया ॥ ४३ ॥ अस्त्रतेजाचा लखलखाट । बाणबळाचा कडकडाट । शरपिसारियाचा सुसाट । भंवत आटँ सुरासुरां ॥ ४४ ॥ दैत्य दानव सुरगण । चंद्रसूर्यादि ग्रहगण । सुटतां लक्ष्मणाचा बाण । आंदोलायमान राक्षस ॥ ४५ ॥ क्षोभे उलथत सागर । कंपें कांपती धराधर । बाण सोडितां सौमित्र । चराचर हडबडिलें ॥ ४६ ॥ ऐसा येतां देखोनि बाण । स्वयें अतिकाय आपण । दृढ साधूनि रणांगण । धनुष्या गुंण वाहिला ॥ ४७ ॥ अतिकाय महावीर । लघुलाघवें विंधी शर । ते बाण छेदूनि समग्र । ब्रह्मास्त्र लोटलें ॥ ४८ ॥ येतां देखोनि ब्रह्मास्त्रासी । अतिकाय विंधी बहु बाणांसी । त्या छेदूनि सर्वांसी । आलें अंगासी ब्रह्मास्त्र ॥ ४९ ॥ जेंवी गरुड छेदी अजगर । तेंवी ब्रह्मास्त्रें छेदोनि शर । अतिकायाचें छेदावया शिर । आलें ब्रह्मास्त्र अंगासीं ॥ १५० ॥ सरलें हाणितां शस्त्रास्त्र । मग हाणी पर्वतशिखर । तरी न धरवे ब्रह्मास्त्र । हाहाकार ऊठिला ॥ ५१ ॥ निर्वाणींचे विंधितां बाण । तेही ब्रह्मास्त्रें करोनि चूर्ण । अतिकायाचा घ्यावया प्राण । आलें जाण अंगासीं ॥ ५२ ॥ शक्ति शूळ गदा तोमर । फरश पट्टिश खड्ग कुठार । हाणितांही परिघ मुद्गर । परी ब्रह्मास्त्र ढळेना ॥ ५३ ॥ समस्तही शस्त्रजाळ । ब्रह्मास्त्रें करोनि निष्फळ । अतिकायाचें कंठनाळ । रणीं तत्काळ छेदिलें ॥ ५४ ॥ मुकुट कुंडलें सुशोभित । निजतेजें लखलखित । शिर छेदोनि रणांत । देदीप्यमान पाडीत भूमीसीं ॥ ५५ ॥

तच्छिरः सशिरस्त्राणं लक्ष्मणेन प्रमर्दितम् ।
पपात सहसा भूमौ शृंगं हिमवतो यथा ॥ ३१ ॥
तं भूमौ पतितं दृष्ट्वा विक्षिप्तं वीरभूषणम् ।
बभूवुर्व्यथिताः सर्वे हतशेषा निशाचराः ॥ ३२ ॥

कुंभकर्णाची परम ख्याती । त्यातें महारथी म्हणती । अतिकाय तो अतिरथी । पाडिला क्षितीं सौमित्रें ॥ ५६ ॥ धन्य बळियाढा लक्ष्मण । मुकुटकुंडलें सशिरस्त्राण । शिर पाडिलें छेदून । विराजमान भूतळीं ॥ ५७ ॥ जैसें हिमाद्रीचें शिखर । तैसें छेदोनि पाडिलें शिर । तें देखोनि निशाचर । पळती सत्वर लंकेसी ॥ ५८ ॥ मारितां उरली

१ इषीका=दर्भ, तत्संबंधीं अस्त्र. २ याम्य=यमसंबंधी. ३ कवचानें आच्छादित. ४ देवांचा द्रोह करणारा. ५ देवांचा वैरी. ६ शुभ्र. ७ त्रास. ८ पर्वत. ९ गडबडले. १० दोरी.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

राक्षससेना । पळोनि जावोनि लंकाभुवना । वृत्तान्त सांगती दशानना। जे साही जणां मारिलें ॥ ५९ ॥ देवांतक नरांतक त्रिशिरा । महापार्श्व महोदरा । मारिलें अतिकाया दुर्धरा । सहाही महावीरां प्राणान्त ॥ १६० ॥ रणीं लक्ष्मणाच्या हातीं । अतिकाय पावला ब्रह्मप्राप्ती । श्रीरामदृष्टीं युद्धस्थिती । परम मुक्ति राक्षसां ॥ ६१ ॥ एका जनार्दना शरण । कुमार मारिले साही जण । पुढील कथेचें अनुसंधान । सावधान अवधारा ॥६२॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां अतिकायवधो नाम एकत्रिंशत्तमोऽध्यायः ॥ ३१ ॥ ओंव्या ॥ १६२ ॥ श्लोक ॥ ३२ ॥

अध्याय बत्तिसावा

॥श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः॥ अतिकाय तो अतिरथी । सौमित्र केवळ पदाती । तेणें त्यासी पाडिलें क्षितीं । वानर गर्जती हरिनामें ॥ १ ॥

प्रहर्षयुक्ता बहवश्च वानराः
प्रबुद्धपद्मप्रतिमाननास्तदा ।
अपूजयन्लक्ष्मणमिष्टभागिनं
हते रिपौ भीमबले दुरासदे ॥ १ ॥

जैसीं उत्फुल्लित[१] पद्मकमळें । तैसीं वानरांचीं मुखकमळें । स्वानंदें शोभती प्रांजळें[२] । अतिकाय बळें मारलिया ॥ २ ॥ अतिकाय तो अतिरथी । लक्ष्मणें मारिला पदाती[३] । तें देखोनि श्रीरघुपती । सौमित्रा पूजित स्वानंदें ॥ ३ ॥ स्वर्गीं गर्जती सुरवर । नामें गर्जती वानर । ऋषी करिती जयजयकार । विजयी सौमित्र संग्रामीं ॥ ४ ॥ रणीं मारितां राक्षसभार । शेष उरले निशाचर । भेणें[४] ठाकून लंकापुर । सांगती सत्वर लंकेशा ॥ ५ ॥ रडत पडत कुंथत । घायीं आले जर्जरित । येवोनियां सभेआंत । वृत्तान्त सांगत लंकेशा ॥ ६ ॥ मागिल्या वीरांच्या कथा । त्वां ऐकिल्या लंकानाथा । अतिकाय मारिला आतां । आम्हांदेखतां सौमित्रें ॥ ७ ॥ अतिकाय मारिला सौमित्रें । हें ऐकोनि लंकेश्वरें । अति दुःखी दुःखभारें । काय उत्तर बोलत ॥ ८ ॥ मागिलें दुःख आठवून । स्वयें अनुवादे रावण । समस्त वीर रणप्रवीण । मारिले स्वजन संग्रामीं ॥ ९ ॥ धूम्राक्ष वज्रदंष्ट्र । अकंपन प्रहस्त धुरे[५] । कुंभकर्ण सहोदर । महोदर महापार्श्व ॥ १० ॥ माझिया कुमरां महावीरां । ज्यांचा धाक सुरासुरां । जे नाटोपती इंद्रादि अमरां[६] । त्या महाशूरां मारिलें ॥ ११ ॥ देवांतक आणि त्रिशिरा । मारिलें नरांतक वीरा । आक्रंदत रुदनद्वारा । दशशिरा अति दुःख ॥ १२ ॥ भरंवशाचा कुंभकर्ण । कुमर मारिले प्रधान । आतां त्या रामासीं रण । करील कोण संग्रामीं ॥ १३ ॥ सुग्रीवें मेळविलें दळ । श्रीरामें आश्वासिलें सकळ । वानरीं करोनि रणकल्लोळ । धुराचि प्रबळ मारिल्या ॥ १४ ॥ आमच्या वर्मीचे आघात । सांगावया बिभीषण तेथ । तेणें मांडिला कुळक्षयार्थ । अतिकायघात तेणें केला ॥ १५ ॥ ब्रह्मास्त्रें अतिकाया मरण । हें वर्म सांगे बिभीषण । तेणें संग्रामीं लक्ष्मण । झाला संपूर्ण निजविजयी ॥ १६ ॥ श्रीराम अणि लक्ष्मण । अंगद सुग्रीव हनुमान जाण । यांसीं कोण करील रण । रडे रावण आक्रोशें ॥ १७ ॥ ऐकोनि रावणाचें रुदन । इंद्रजित आला धांवोन । आपला पुरुषार्थ आपण । बोले गर्जोन तें ऐका ॥ १८ ॥ इंद्रजित जीतँ[७] असतां । तुज दुःख कोण लंकानाथा । रामलक्ष्मणांच्या करीन घाता । आणि समस्तां वानरां ॥ १९ ॥ तूं राजा सर्वार्थीं प्रबळ । दुःखशोकाचा नव्हे काळ । आजि माझें पाहें बळ । रणकल्लोळ संग्रामीं ॥ २० ॥ सुटल्या माझे निर्वाणबाण । सर्वांग बाणीं खिळोन । मारीन रामलक्ष्मण । प्रतिज्ञा प्रमाण हे माझी ॥ २१ ॥ वानरें कायसीं बापुडीं । बाणीं विंधोनि निर्वेडीं[८] । पाडीन कपींचिया कोडी । रणधांदडीं[९] संग्रामीं ॥ २२ ॥ ऐसी बोलोनि आंगवण । घेवोनियां आज्ञापन । करून रावणासी नमन । रथारोहण तेणें केलें ॥ २३ ॥ रथीं जुंपोनि महाखर । वरी बैसला निशाचर । ध्वज पताका छत्र चामर । शस्त्रसंभारसंयोगें ॥ २४ ॥ वायुवेगें अत्यद्भुत । सबळ संजोगोनि रथ । इंद्रजित बैसोनियां तेथ । निघाला गर्जत संग्रामा ॥ २५ ॥ जे रथीं बैसला देख । समाधिसुखाहून अधिक ।

१ फुललेली. २ निर्मळ, सुंदर. ३ पायीं चालणारा अशा. ४ भयानें. ५ मुख्य सेनापति. ६ देवांना.

७ जीवंत. ८ संपूर्ण. ९ रणकल्लोळानें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

संग्रामीं जयाचें वाढे सुख । तेणें संमुख युद्धा आला ॥ २६ ॥ युद्धा निघतां इंद्रजित । सैन्य निघालें अत्यद्भुत । रथस्थ गजस्थ अश्वस्थ । निघाले समस्त गडगजें ॥ २७ ॥ फरश पट्टिश तोमर । शूळ त्रिशूळ मुद्गर । अचुकसंधान धनुर्धर । सैन्यसंभार चालला ॥ २८ ॥ जेंवी तमाबाहेर भास्कर । स्वयें निघे तेजाकार । तेंवी इंद्रजित महावीर । निघे सत्वर लंकेआंतोनी ॥ २९ ॥ शंख भेरी निशाण । वाजंत्रांचा नाद गहन । इंद्रजित निजतेजें विराजमान । अपरभानु रणरंगीं ॥ ३० ॥ सूर्यतेज फांके गगनीं । ह्याचें तेज संग्रामस्थानीं । इंद्र आणिला बांधोनी । रणांगणीं जिणोनियां ॥ ३१ ॥ सन्नद्ध सेनासंभार । युद्धा निघतां रावणकुमर । संतोषोनि दशशिर । काय उत्तर बोलत ॥ ३२ ॥ रणीं जिणोनि इंद्रासी । बांधोनि आणिलें मजपासीं । तैसेंचि रामलक्ष्मणांसी । आणीं मजपासीं बांधोनी ॥ ३३ ॥ रणीं न बांधवे रघुपती । दोघे मारावे रणव्युत्पत्तीं । तूं तंव योद्धा महारथी । करावी ख्याती संग्रामीं ॥ ३४ ॥ ऐकोनि पित्याचें वचन । करोनि प्रदक्षिणा नमन । इंद्रजित निघे आपण । घेवोनि सैन्यसंभारा ॥ ३५ ॥ दोघे निधडे रामसौमित्र । भेणें कांपे इंद्रजितवीर । त्यांसीं करावया अभिचार । गेला सत्वर निकुंबळे ॥ ३६ ॥ निकुंबळा अटकगिरी । तेथें अभिचारसामग्री । इंद्रजित दुष्ट दुराचारी । करवी ती परी अवधारा ॥ ३७ ॥ इंद्रजित नव्हे निधडा वीर । कपटें करोनि अभिचार । रणीं जिंतिले सुरासुर । तैसा रघुवीर न जिंकवे ॥ ३८ ॥

स्थापयामास रक्षांसि रथं प्रति समंततः ।
सर्वतोऽग्निं समास्तीर्य शस्त्रपात्रैः सतोमरैः ॥ २ ॥
जुहाव रक्तं कृष्णस्य कंठाच्छागस्य जीवतः ।
सकृदेव समिद्धस्य विधूम्रस्य महार्चिषः ॥ ३ ॥
ततस्तं हुतभोक्तारं हुतभुक्सदृशप्रभः ।
जुहुवे राक्षसश्रेष्ठो विधिवन्मंत्रसत्तमैः ॥ ४ ॥
सहविर्लाजसत्कारैर्माल्यगंधसुसंयुतैः ।
जुहुवे पावकं तत्र राक्षसेंद्रः प्रतापवान् ॥ ५ ॥

करावया अभिचारासी । इंद्रजित आला निकुंबळेसी । तरी धाकत मानसीं । कळल्या रामासी येईल धाडी ॥ ३९ ॥ यालागीं निकुंबळेपासीं । द्वारद्वार मार्गमार्गासी । राखण ठेविलें राक्षसांसी । ससैन्यासीं सावध ॥ ४० ॥ श्रीरामाच्या कर्णपुटीं । बिभीषण हे सांगतां गोष्टी । वानरधाड येईल लोंठी । हेंही पोटीं धाकत ॥ ४१ ॥ वारयासी न फुटे वाट । ऐसीं राखणें ठेवोनि स्पष्ट । आपण सेविलें यज्ञवाट । हव्यवाटप्रतिष्ठा ॥ ४२ ॥ नागबाण शिववरदोक्त । मागां बांधिले राजसुत । ते तेंच जाले भस्मान्त । श्रीरघुनाथप्रतापें ॥ ४३ ॥ श्रीरामीं मिनली शस्त्रदेवता । ते परतोन न येचि हाता । इंद्रजित होय कुसुमुसिता । गेले वृथा नागपाश ॥ ४४ ॥ वृथा गेलें नागबंधन । आतां उरलें ब्रह्मवरदान । त्या ब्रह्मपाशाचें बंधन । सावधान अवधारा ॥ ४५ ॥ ब्रह्मवरदान इंद्रजितासी । होम करितां अभिचारासीं । होमदेवता तत्काळेंसीं । होईल तुम्हांसी सुप्रसन्न ॥ ४६ ॥ मागां शरबंधपरिपाटीं । बंदीं घातल्या देवकोटी । ते न चले श्रीरामीं गोष्टी । सावधानदृष्टी शरबंधीं ॥ ४७ ॥ श्रीरामीं न चले आभिचारिक । येतां देखे शरबंधासंमुख । इंद्रजित हो दशमुख । छेदील मस्तक राक्षसाचें ॥ ४८ ॥ यालागीं शरबंधासमोर । येतांचि वीर निशाचर । श्रीराम त्याचें छेदील वक्त्र । अतर्क्य शर वर्षोनी ॥ ४९ ॥ शस्त्रदेवतेसी देवोनि मान । शरबंधीं पडिले आपण । त्यांसी न लागे शरबंधन । नित्यसावधान श्रीराम ॥ ५० ॥ हे ब्रह्मयाची ब्रह्मवरदोक्ती । पूर्वींच सांगितली होती । तेचि अभिचारस्थिती । आरंभी पुढती इंद्रजित ॥ ५१ ॥ रिघोनियां यज्ञवाटा । प्रतिष्ठोनि हव्यवाटा । होमसामग्रीची निष्ठा । निंद्य पापिष्ठा ते ऐका ॥ ५२ ॥ द्विजकपाळींचीं जाण । प्रणीतापात्रें संपूर्ण । असितोमरादि धनुष्यबाण । परिस्तरण शस्त्रांचें ॥ ५३ ॥ मद्याचें परिसमूहन । मातंगमज्जाआघारण । अशुद्धांचा होम जाण । तोही सावधान अवधारा ॥ ५४ ॥ निखळकृष्णछाग खरा । तोही जीवंत असतां पुरा । त्याचे कंठीं देवोनि सुरा । धरिलें रुधिरा

१ प्रतिसूर्य. २ जारणमारण. ३ मोठी. ४ यज्ञस्थान. ५ अग्निप्रतिष्ठा. ६ अग्नीला. ७ सभोंवार पसरणें. ८ सभोंवतीं मार्जन करणें. ९ आघारण=वर टाकणें. १० रक्ताचा. ११ अत्यंत काळा बोकड.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

नरशिरीं ॥ ५५ ॥ स्रुक्स्रुवापात्रविचार । घडविलेसे अश्मसार । तेणें स्रुवेनें निशाचर । होमी रुधिर हुताशीं ॥ ५६ ॥ अस्त्रदेवता आव्हानून । मंत्रतंत्रक्रियाविधान । सर्व साधून सावधान । करी हवन इंद्रजित ॥ ५७ ॥ मातंगीचे आणून दशनें । त्यांच्या लाह्या केल्या भाजून । गोरोचनाचें गंधविधान । सुमनें संपूर्ण कैंरवीर ॥ ५८ ॥ सर्षपभल्लातकमद्येंसीं । काळीचिडी दिवाभीतांसी । जीतचि खिळणीं करोनि त्यांसी । होमिजे राक्षसीं आभिचारिक ॥ ५९ ॥ होम करितां प्रधान । यज्ञभोक्ता जो हुताशन । संतोषोनि आपण । ब्रह्मवरदान देता जाला ॥ ६० ॥

सोऽस्त्रमाहारयामास ब्राह्ममस्त्रविदां वरः ।
धनुः शरान्रथं चैव सर्वं तत्राभ्यमंत्रयत् ॥ ६ ॥

तस्मिन्नाहूयमानेऽस्त्रे हूयमाने च पावके ।
सार्कं ग्रहेंदुनक्षत्रं वितत्रास नभःस्थलम् ॥ ७ ॥

स पावकं पावकदीप्ततेजा
हुत्वा महेंद्रप्रतिमप्रभावः ।
स चापबाणासिरथाश्वशूलः
खेऽन्तर्दधेऽत्मानमाचिंत्यरूपः ॥ ८ ॥

ब्रह्मवरदाचें वरदान । करितां ब्रह्मास्त्रआवाहन । स्वयें शस्त्रदेवता येऊन । सुप्रसन्न होंसरलीं ॥ ६१ ॥ त्याचेनि मंत्रोदकें जाण । रथखङ्गादि धनुष्यबाण । अवघीं अभिमंत्री आपण । इंद्रजित जाण मंत्रोक्त ॥ ६२ ॥ होम करितां प्रधान । मंत्रोदकें अभिषिंचन । रथाश्व सारथि चाप बाण । अंतर्धान पावलीं ॥ ६३ ॥ देवता अंतर्धानगती । इंद्रजित हरिखला चित्तीं । सांडून सैन्यभारसंपत्ती । बैसला रथीं साटोपें ॥ ६४ ॥ अंतर्धानाचें लक्षण । रथाश्व सारथि चापबाण । स्वयें इंद्रजित आपण । कोणासी जाण न दिसती ॥ ६५ ॥ ऐसिये अदृश्यगतीं । देखोनि इंद्र चंद्र बृहस्पती । सूर्य वरुण ग्रहपंक्ती । धरा कांपती सपर्वत ॥ ६६ ॥ इंद्रजिताची अदृश्य गती । कैसेनि वांचे रघुपती । स्वर्गीं सुरवर गजबजिती । ऋषी धाकती ससिद्ध ॥ ६७ ॥ ऐसिये अदृश्यगतीं । इंद्रजित बैसोनियां रथीं । धनुष्य वाहोनियां हातीं । वानरांप्रती शर वर्षे ॥ ६८ ॥

ततः सरक्षोऽधिपतिर्महात्मा
सर्वा दिशो बाणगणैः शिताग्रैः ।
प्रच्छादयामास रविप्रकाशै-
र्विद्रावयामास च वानरेंद्रान् ॥ ९ ॥

सशूलनिस्त्रिंशपरश्वधानि
दीप्तानलार्कद्युतिसन्निभानि ।
सविस्फुलिंगोज्ज्वलपावकानि
ववर्ष तस्मिन्प्लवगेंद्रसैन्ये ॥ १० ॥

अदृश्यगति निशाचर । बाण वर्षे शरधार । आच्छादोनि रवि चंद्र । दिशा समग्र बाणांकुळित ॥ ६९ ॥ बाण येतां न दिसती । अवचितें अंगीं आदळती । तेणें वानरां खडतरती । रणीं पडती आक्रंदें ॥ ७० ॥ वानरांची जाति व्यक्ती । रणीं खिळले शरसंपातीं । अदृश्य गतीची व्युत्पत्ती । वानरां ख्याती लाविली ॥ ७१ ॥ संमुख योद्धा न दिसे जाण । कोणासी हाणूं द्रुमपाषाण । कोणासीं करूं आंगवण । म्हणतांचि बाण खडतरती ॥ ७२ ॥ ऐसें वर्षोनि शरजाळ । वानरांचें प्रबळ दळें । रणीं खिळोनियां तें सकळ । पाडिलें विकळ रणभूमीं ॥ ७३ ॥ अदृश्यगति शस्त्रसंभार । परशु पट्टिश गदा मुद्गर । शूळ परिघ तोमर । रणीं वानर खोंचले ॥ ७४ ॥ अदृश्य विंधी वानरवीरां । लाविला मेघनादें दरारा । विंधिल्या मुख्य धुरा । त्याही अवधारा सांगेन ॥ ७५ ॥ अदृश्य विंधी इंद्रजित । खवळोनि अत्यद्भुत । मुख्य धुरांचा करीत घात । अकस्मात अतर्क्य ॥ ७६ ॥ अदृश्य रथाश्वसारथी । अदृश्य इंद्रजित महारथी । बाण येतां न दिसती । अंगीं वाजती अतर्क्य ॥ ७७ ॥ सुग्रीव राजा हनुमंत । अंगद नळ नीळ जांबवंत । रणीं पाडिले मूर्च्छित । अतर्क्य घात महावीरां ॥ ७८ ॥ येतां न दिसती बाण । जरी करावें निवारण । योद्धा संमुख न दिसे जाण । आंगवण करावया ॥ ७९ ॥ मैंद द्विविद गंधमादन । केसरी दधिमुख सुषेण । कुमुद कुमुदाक्ष जाण । मूर्च्छापन्न पाडिले ॥ ८० ॥ गज गवय गवाक्ष । हरिलोमा पावकाक्ष । विद्यु-

१ दगडी. २ अग्नीमध्यें. ३ दांत. ४ फुलें. ५ पांढऱ्या कण्हेरीचीं. ६ शक्तिहीन. ७ प्राप्त झाली. ८ आनंद पावला.

९ पृथ्वी. १० सिद्ध=एक देवजाति. ११ बाणांनीं व्याप्त. १२ सैन्य. १३ इंद्रजितानें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

ज्जिव्ह उल्कामुख । पाडिले असंख्य मूर्च्छित ॥ ८१ ॥ असंग वेगवंत पनस । धूम्र शतवली ज्योतिर्मुख । सूर्यानळ आणि सुमुख । बाणीं असंख्य पाडिले ॥ ८२ ॥ करावया इंद्रजितसंहार । तार तरळ हरि वानर । गगना उसळले सत्वर । रावणकुमर वधावया ॥ ८३ ॥ अतर्क्य बाणांचा आघात । शर भेदले हृदयांत । तेहीं घायीं विव्हळत । मूर्च्छान्वित पाडिले ॥ ८४ ॥ अतर्क्य शरांचा महामार । आणिकही वानरवीर । पाडून शरबंधीं समग्र । हर्षें निर्भर इंद्रजित ॥८५॥ शरबंधीं वानरमात्र । रणीं पाडिले समग्र । आतां वधावया रामसौमित्र । निशाचर खवळला ॥८६॥ संमुख देखतां रघुनाथ । निमिषार्धें[1] करील घात । अतर्क्य ब्रह्मवरदांतें[2] । भोगी पुरुषार्थ इंद्रजित ॥८७॥ ब्रह्मवरदाचें ब्रह्मास्त्र । होमीं साधून अभिचारें[3] । तेणें बळें इंद्रजित वीर । रणीं वानर पाडिले ॥८८॥ होमीं तोषवोनि हुताशन[4] । लावोनियां वरद बाण । घेवोनि ब्रह्मास्त्राचें वरदान । वानरसैन्य पाडिलें ॥ ८९ ॥ सौमित्रा सांगे रघुनंदन । पूर्विलाऐसें शरबंधन । कराया इंद्रजित आपण । वरदबाण वर्षत ॥ ९० ॥ वानर माझेनि वीर्यवंत । माझेनि धैर्यें धैर्यवंत । माझेनि प्रतापें प्रतापवंत । ब्रह्मवरदें समस्त पडले ॥ ९१ ॥ वरदबाण अति गुप्त । अंगीं लागती अकस्मात । तेणें घायें कपि समस्त । रणीं हुंबत पाडिले ॥ ९२ ॥ अतर्क्य ब्रह्मवरदविंदान । न दिसे योद्धा न दिसती बाण । अदृश्य शस्त्रीं वानरगण । शरबंधनीं जाण बांधिले ॥ ९३ ॥ मंत्र अस्त्र ब्रह्मास्त्रदेवो । मिळोनि तिहींचा समुदावो । कपि शरबंधीं बांधिले पहाहो । सांगे रघुरावो सौमित्रा ॥ ९४ ॥ ब्रह्मवरदबाणधारा । शरबंधीं बांधल्या वानरां । मुख्य उरल्या दोन धुरा । बांधावया शरां वर्षत ॥ ९५ ॥ आम्हां उभे असतां दोन्ही । इंद्रजित विंधील विकट बाणीं । ते निवारावया धरणीं । शरबंधनीं पहुडावें ॥ ९६ ॥ मागां साहिलें शिववरदान । तैसेंच सहावें ब्रह्मवरदान । मिथ्या करितां ब्रह्मवचन । दोष दारुण सौमित्रा ॥ ९७ ॥ मिथ्या करितां न ये ब्रह्मवचन । दोष ब्रह्महत्येसमान । यालागीं ब्रह्मवरदान । स्वयें आपण पाळावें ॥ ९८ ॥ अवमानितां ब्राह्मणासी । क्षोभ उपजेल भगवंतासी । मिथ्या करितां ब्रह्मवरदासी । परम दोषी होइजे ॥ ९९ ॥ समूळ मूळींचें लक्षण । आम्हां दोघांसी नाहीं मरण । साहतां ब्रह्मशरबंधन । संदेह[5] कोण सौमित्रा ॥ १०० ॥ ऐकतां श्रीरामाचें वचन । शरबंधीं पहुडे लक्ष्मण । त्याचि सवें रघुनंदन । शरबंधीं जाण पहुडला ॥ १ ॥ सव्यहस्तें[6] धनुष्यबाण । दोघे देखोनि विसंज्ञ[7] । इंद्रजित हरिखला संपूर्ण । भेरी निशाण त्राहाटिलें ॥ २ ॥ करोनियां वाजंत्रांचा गजर । पुढें नाचती निशाचर । रणीं जिंतिले रामसौमित्र । सांगे समग्र लंकेशा ॥ ३ ॥

संस्तूयमानः स तु यातुधानैः
पित्रे च सर्वं हृषितोऽभ्युवाच ।
तयोस्तदासादितयो रणाग्रे
मुमोह सैन्यं हरियूथपानाम् ॥ ११ ॥
सरामसौमित्रिमथाप्रमेयं
विव्याध सर्वं सहसा रणाग्रे ।
सर्वे विषण्णा विगतप्रभाश्च
न चापि किंचित्प्रतिपेदिरे स्म ॥ १२ ॥

शरबंधेंसीं बांधोनि वैरी । इंद्रजित प्रवेशतां नगरीं । भाट गर्जती कैवारीं । निशाचरीं स्तुतिवाद ॥ ४ ॥ शरबंधीं रामसौमित्र । बांधिले वानर समग्र । इंद्रजित हर्षें निर्भर । सांगे सत्वर लंकेशा ॥ ५ ॥ शरबंधीं बांधितां जाण । वीर्यधैर्यशौर्यक्षीण । मुख्य करोनि रामलक्ष्मण । आंगवण न करवे ॥ ६ ॥ शरबंधाचें लक्षण । लागतांचि सूर्यकिरण । अवघियांचे जातील प्राण । कोणासी कोण सोडवील ॥ ७ ॥ श्रीरामकटकीं शरपंजर । शरबंधीं बांधले वानर । इंद्रजित विजयी महावीर । हर्षें निर्भर लंकेश ॥ ८ ॥ एका जनार्दना शरण । मिथ्या शरबंधीं रामलक्ष्मण । स्वयें पडोनि आपण । ब्रह्मवरदान प्रतिपाळिती ॥ १०९ ॥

स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां रामलक्ष्मणशरबंधनं नाम द्वात्रिंशत्तमोऽध्यायः ॥ ३२ ॥ ओंव्या ॥ १०९ ॥ श्लोक ॥ १२ ॥

---

१ निमिष=डोळ्याची पापणी लवण्याचा काळ. २ ब्रह्मदेवाच्या वरानें. ३ जारणमारणक्रिया. ४ अग्नि. ५ संशय. ६ उजव्या हातानें. ७ मूर्च्छित, निश्चेष्ट.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

अध्याय तेहतिसावा

॥ श्रीरामचंद्राय नमः ॥ प्रतिपाळावया ब्रह्मवरदान । श्रीराम आणि लक्ष्मण । शरबंधीं पडोनि आपण । विसंज्ञपण दाविती ॥१॥ बहुरूपी प्रेताचें सोंग धरी । आपण सावध अंतरीं । रामसौमित्र तयापरी । शरपंजरीं सावध ॥ २ ॥ शरबंधीं बांधले दोघे जण । विकळ दिसती रामलक्ष्मण । परी ते सबाह्य सावधान । प्रतापें पूर्ण पुरुषार्थी ॥३॥ ब्रह्मयाचे वरदें देख । येतां शरबंधासंमुख । इंद्रजित अथवा दशमुख । छेदील मस्तक श्रीराम ॥ ४ ॥ यालागीं शरबंधासमोर । कोणी न येती निशाचर । करीत विजयाचा गजर । गेले समग्र लंकेसी ॥ ५ ॥ लागतां शरबंधाचे बाण । वानरांचा जावा प्राण । करितां रामनामस्मरण । अवघे जण वांचले ॥ ६ ॥ शरबंधीं रामलक्ष्मण । शरबंधीं वानरगण । तें देखोनि बिभीषण । आला आपण सांक्षेपें ॥ ७ ॥ शरबंधीं वानरसैन्य । बाणीं पाडिलें खिळोन । शरबंधीं रामलक्ष्मण । दोघे विसंज्ञ महावीर ॥ ८ ॥ ऐसें देखोनि शरबंधन । स्वयें आला बिभीषण । बाणीं खिळिले वानरगण । सावधान नाहीं कोण ॥ ९ ॥ कपटबुद्धि राक्षसाधमा । रणीं बांधिलें रघूत्तमा । बिभीषण धार्मिक धर्मात्मा । शुद्ध सत्त्वात्मा सात्त्विक ॥ १० ॥ वानरराजा सुग्रीव जाण । त्यापासीं येवोनि बिभीषण । त्यासी करी सावधान । युक्तवचन अनुवादे ॥ ११ ॥ ब्रह्मशापाचें वरदान । स्वयें पाळी रघुनंदन । त्यासी बांधी शरबंधन । सावधान शरबंधीं ॥ १२ ॥ नाहीं भयाचा संकेत । विषाद सांडावा समस्त । शरबंधीं श्रीरघुनाथ । सावचित्त स्वानंदें ॥ १३ ॥ ब्रह्मदत्तवरदान । तें हें ब्रह्मास्त्र दारुण । ब्रह्मवरदा मिथ्यापण । रघुनंदन येऊं नेदी ॥ १४ ॥ हृदयीं साहोनियां लात । श्रीवत्सलांछन मिरवित । तो हा स्वयें श्रीरघुनाथ । मिथ्या वरदार्थ होऊं नेदी ॥ १५ ॥ ऐसिया वरदानपरी । वानरवीरांचिया हारी । खिळोनि पाडिल्या शरपंजरीं । नाहीं त्यां तरी जीवभय ॥ १६ ॥ ब्रह्मास्त्रा देवोनि मान । शरबंधीं रामलक्ष्मण । तैसाच हनुमंत आपण । तो देत सन्मान ब्रह्मास्त्रा ॥ १७ ॥ हनुमंता न बाधी शरबंधन । तोही ब्रह्मास्त्रा देतसे मान । ऐकोनि बिभीषणवचन । मारुति आपण बोलत ॥ १८ ॥

विभीषणवचः श्रुत्वा हनुमानिदमब्रवीत् ।
अस्मिन्शस्त्रहते सैन्ये वानराणां मनस्विनाम् ॥ १ ॥
यो यो धारयति प्राणांस्तंतमाश्वासयावहे ।
तावुभौ युगपद्वीरौ वायुपुत्रविभीषणौ ॥ २ ॥
उल्काहस्तौ तदा रात्रौ रणशीर्षे विचेरतुः ॥ ३ ॥

ऐकोनि बिभीषणवाक्यासी । हांसूं आलें हनुमंतासी । ब्रह्मास्त्र न बाधी आम्हांसी । हें तूं जाणसी कैसेनि ॥ १९ ॥ अशोकवनीं ब्रह्मपाश । ब्रह्मयानें घालितां सावकाश । तंव तूं वश न होसी त्यास । मग ब्रह्मास्त्रास कैंवी होसी ॥ २० ॥ ऐकोनि बिभीषणाचें वचन । हनुमान जाला सुखसंपन्न । पडलें देखोनि वानरसैन्य । काय आपण बोलत ॥२१॥ वानरवीर पडिले क्षितीं । कोणाची कैसी गती । दोघे चुडी घेऊनि हातीं । शोधूं निश्चितीं रणभूमी ॥ २२ ॥ ऐसें बोलतांचि जाण । संतोषला बिभीषण । चुडी उजळोनि देदीप्यमान । दोघे जण निघाले ॥ २३ ॥ वानरवीरांचिया श्रेणी । खिळोनि पाडिल्या शरबंधनीं । अशुद्ध वाहत धरणीं । होत चिडाणी मेदमांसा ॥ २४ ॥ वानरवीरांच्या वडवाळीं । खिळोनि पाडिल्या भूतळीं । मुख्य धुरा आतुर्बळी । त्याही शरजाळीं पाडिल्या ॥ २५ ॥ सुग्रीव अंगदादि जुत्पती । जे पूर्वप्रसंगीं लिहिले आहाती । तेचि वीर वानर क्षितीं । पडिले मारुति स्वयें देखे ॥ २६ ॥ असंख्य वानर पडिले क्षितीं । संख्या न करवे निश्चितीं । संख्या करूं शकला मारुती । तेही संख्योक्ती अवधारा ॥२७॥ पावत पावतां दिनान्त । वानर पडिले रणाआंत । त्यांची संख्या हनुमंत । बिभीषण युक्त सांगत ॥ २८ ॥ अस्त पावतां दिनकर । सदुसष्ट कोटी वानर । रणीं पाडिले महाशूर । विंधोनि शर ब्रह्मास्त्रें ॥ २९ ॥ न मे भक्तः प्रणश्यति । हे रामाची अगाध कीर्ती । वानर सर्वथा न मरती । केली युक्ती हनुमंतें ॥ ३० ॥ वानर सदुसष्ट कोटी । पडिले देखोनि रणसंकटीं । हनुमंत कृपादृष्टीं । कानीं गोष्टी अनुवादे ॥३१॥ कानीं सांगतां श्रीरघुनाथ ।

१ जगल्यानें. २ मूर्छित. ३ दुःख, खेद. ४ समुदाय, पंक्ती. ५ रक्त. ६ चिखल. ७ समुदाय. ८ पृथ्वीवर. ९ सूर्य.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वानर व्यथेसीं निर्मुक्त । ब्रह्मवरदानें गोंविले तेथ । उठों न शकत निजबळें ॥ ३२ ॥ रामनामस्मरणेंकरी । वानर सावध शरपंजरीं । तिळभरी व्यथा नाहीं शरीरीं । न सुटवे तरी शरबंधीं ॥ ३३ ॥ धन्य ब्राह्मणाचें महिमान । उलंघीना रघुनंदन । स्वयें शरबंधीं पहुडोन । ब्राह्मणवचन प्रतिपाळी ॥ ३४ ॥ ऐसी वरदानाची ख्याती । तेथें वानर ते किती । कैसेनि शरबंधीं सुटती । ब्रह्मवरदोक्तीं बांधले ॥ ३५ ॥ बाप कृपाळू हनुमंत । कानीं जपोनि श्रीरघुनाथ । शरबंधीं सावचित । केले समस्त वानर ॥ ३६ ॥ वानर शरबंधीं समस्त । देखोनि बिभीषण हनुमंत । शोधावया जांबवंत । स्वयें निघत साक्षेपें ॥ ३७ ॥ अति वृद्ध जांबवंत । अतिशयेंसीं बुद्धिमंत । वानर व्हावया निर्मुक्त । उपायार्थ सांगेल ॥ ३८ ॥ अत्यंत जर्जरित जरा । बाणीं खिळिलें शरीरा । देखोनि जांबवंतवीरा । आला पुढारां बिभीषण ॥ ३९ ॥ तयासी पुसे बिभीषण । सर्वांगीं खडतरले बाण । तुझे वांचले कैसेनि प्राण । तें संपूर्ण मज सांग ॥ ४० ॥ जांबवंत सांगे आपण । अंगीं खडतरतां बाण । तेव्हांचि माझा जावा प्राण । वांचलों जाण रामस्मरणें ॥ ४१ ॥

विभीषणवचः श्रुत्वा जांबवानृक्षपुंगवः ।
कृच्छ्रेण धारयन्प्राणानिदं वचनमब्रवीत् ॥ ४ ॥
नैर्ऋतेंद्र महावीर्य स्वरेण त्वामिलक्षये ।
विद्धगात्रः शितैर्बाणैर्न त्वां पश्यामि चक्षुषा ॥ ५ ॥
अंजना सुप्रजा येन मातरिश्वा च निर्वृतः ।
क्वचिद्धारयति प्राणान्हनूमान्प्लवगर्षभः ॥ ६ ॥

ऐकोनि बिभीषणाची मात । बाणीं खिळिला विव्हळित । अति प्रयासें जांबवंत । असे बोलत तें ऐका ॥ ४२ ॥ ओळखूनियां शब्दज्ञान । तुज मी जाणें बिभीषण । बाणधारा विकळ पूर्ण । डोळे उघडोन पाहवेना ॥ ४३ ॥ असो हे विकळतेची मात । अंजनीपुत्र अति विख्यात । तो स्वस्थ आहे कीं हनुमंत । त्याचा वृत्तान्त मज सांग ॥ ४४ ॥ धन्य हनुमंताचें भजन । धन्य हनुमंताचें आचरण । धन्य हनुमंताची आंगवण । लंकाकंदन जेणें केलें ॥ ४५ ॥ चौदा सहस्र वनकर । ऐशीं सहस्र किंकर । जंबुमाळी प्रधानपुत्र । अखयाकुमर मारिला ॥ ४६ ॥ ससैन्य गांजिला इंद्रजित । लंके गांजिला लंकानाथ । परम पराक्रमी हनुमंत । त्याचा वृत्तान्त मज सांगा ॥ ४७ ॥ ऐसें बोलतां जांबवंत । बिभीषण अति विस्मित । सांडून श्रीरामाची मात । पुसे हनुमंत साक्षेपें ॥ ४८ ॥ तेंचि त्याचें मनोगत । समूळ शोधावया भावार्थ । बिभीषण असे पुसत । तोचि श्लोकार्थ अवधारा ॥ ४९ ॥ कोठें आहे हनुमंत । ऐसें पुसतां जांबवंत । त्याचा पहावया भावार्थ । वाक्य वदत बिभीषण ॥ ५० ॥ बांधोनि सेतुबंधासी । ज्यांलागीं आलों लंकेसी । सांडूनि त्या रामलक्ष्मणांसी । हनुमान पुससी किमर्थ ॥ ५१ ॥ सुग्रीव राजा वानरनाथ । अंगद युवराज विख्यात । सांडून जुत्पतीवृत्तान्त । कां पां हनुमंत पुससी ॥ ५२ ॥ सांडून ज्येष्ठ बंधु धूम्रासी । सांडून श्रेष्ठां वानरांसी । हनुमान साक्षेपें पुससी । कोण अर्थासीं सांग पां ॥ ५३ ॥ सांडून श्रीरामाची भक्ती । नाहीं सुग्रीवआसक्ती । हनुमंतीं अति प्रीती । कोण अर्थी तें सांग ॥ ५४ ॥

विभीषणवचः श्रुत्वा जांबवानिदमब्रवीत् ।
शृणु नैर्ऋतशार्दूल यन्मां पृच्छसि मारुतिम् ॥ ७ ॥
तस्मिन्जीवति वीरे हि हतमप्यहतं बलम् ।
हनूमति हते सर्वे जीवंतोऽपि हता वयम् ॥ ८ ॥
एतच्छ्रुत्वा शुभं वाक्यं प्रत्युवाच विभीषणः ।
ध्रियते मारुतिस्तात मारुतप्रतिमो जवे ॥ ९ ॥
वैश्वानरसमं तेजो धारयन्प्लवगर्षभः ।
त्वामेव मार्गणायातो मयैवाद्य सह प्रभो ॥ १० ॥

कां पुसिला हनुमंत । ऐसें बिभीषण पुसत । त्यापुढें जांबवंत । प्रताप सांगत हनुमंताचा ॥ ५५ ॥ जीत असतां हनुमंत । मेले वानर समस्त जीत । ऐसा मारुति प्रतापवंत । जीवन निश्चित कपिसैन्या ॥ ५६ ॥ जरी तो निमाला हनुमंत । तरी आम्ही मेलों जीव जीत । कोण करील सावचित्त । शरबंधीं समस्त वानर ॥ ५७ ॥ लागतां सूर्योदयींचे किरण । शरबंधीं वानरगण । आदि करोनि रामलक्ष्मण । अवघ्यांचे प्राण जातील ॥ ५८ ॥ जीत असलिया हनुमंत । आणोनि द्रोणाद्रि

१ ब्रह्मदेवाच्या वरदवाणीनें. २ म्हातारपणानें. ३ अगत्यानें. ४ जीवंत.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

पर्वत। वानर वांचवील समस्त। यालागीं हनुमंत पूसिला ॥ ५९ ॥ जांबवंताचें गोड वचन। ऐकोनियां बिभीषण। संतोषोनियां आपण। हनुमंतलक्षण सांगत ॥ ६० ॥ हनुमंत वज्रदेही आपण। याच्या अंगीं न रुपती बाण। त्यासी बांधीना शरबंधन। सावधान साटोपें ॥ ६१ ॥ तो महावीर हनुमंत। मजसवें तुज गिंवसित। स्वयें आला असे येथ। जाण निश्चित ऋक्षराजा ॥ ६२ ॥ प्रळयतेजें विराजमान। वायुबळेंसीं समान। हनुमान आलासे आपण। तुझें दर्शन घ्यावया ॥ ६३ ॥ ऐसें बोलतां बिभीषण। हनुमंतें घातलें लोटांगण। जांबवंत करितां नमन। येरें आलिंगन दीधलें ॥ ६४ ॥

ततोऽब्रवीन्महातेजा हनूमंतं स जांबवान्।
आगच्छ हरिशार्दूल वानरांस्त्रातुमर्हसि ॥ ११ ॥
भवान्विक्रमसंपन्नस्त्वमेषां परमा गतिः।
त्वत्पराक्रमकालोऽयं नान्यं पश्यामि कंचन ॥ १२ ॥
ऋक्षवानरवीराणामनीकानि प्रहर्षय।
विशल्यौ कुरु चाप्येतौ भ्रातरौ रामलक्ष्मणौ ॥ १३ ॥

आला जाणोनि हनुमंत। आम्ही वांचलों समस्त। पुनर्जन्म जाला प्राप्त। ऐसा हर्षित जांबवंत ॥ ६५ ॥ आलिंगोनि हनुमंतासी। जांबवंत बोले त्यासी। वांचवावया कपिसैन्यासी। दिसे तुजपासीं पराक्रम ॥ ६६ ॥ शरबंधीं रामलक्ष्मण। त्यांची करावया सोडवण। तुझ्या अंगीं आंगवण। न दिसे आन तिहीं लोकीं ॥ ६७ ॥ वानरसैन्याची मांदी। पडली आहे शरबंधीं। ते तूं वांचवीं त्रिशुद्धीं। दिव्यौषधी आणोनी ॥ ६८ ॥ शरबंधीं वानर सकळ। पडिले आहेत अति विकळ। आजि तुझा प्रतापकाळ। तूं प्रबळबळपुरुषार्थी ॥ ६९ ॥ तुझ्या बळाची अगाध थोरी। दिव्यौषधी आणोनि हारीं। उठवीं कपिसेना संभारीं। होईं उपकारी श्रीरामा ॥ ७० ॥ आमच्या भाग्यास्तव जाण। शरबंधीं तूं सावधान। वांचवावया वानरगण। आंगवण तुजपासीं ॥ ७१ ॥ कोठोनि आणूं औषधींसी। ऐसें कांहीं पुसों पाहसी। त्याही सांगेन स्थळासी। अति वेगेंसीं निघावें ॥ ७२ ॥ विलंब न साहे व्यवधान। लागतांचि सूर्यकिरण। निमती श्रीरामलक्ष्मण। वानरगणसमवेत ॥ ७३ ॥ यालागीं नुगवतां गभस्ती। शीघ्र जावोनि रातोरातीं। आणावें दिव्यौषधींप्रती। श्रीरघुपतिनिजसेवा ॥ ७४ ॥ ऐकोनि जांबवंतवचन। आलें हनुमंता स्फुरण। शीघ्र करावया उड्डान। औषधिस्थान पूसत ॥ ७५ ॥ आदरें पुसतां हनुमंत। दिव्यौषधींचा पर्वत। हर्षें सांगे जांबवंत। तोचि श्लोकार्थ अवधारा ॥ ७६ ॥ ऐका दिव्यौषधींचें स्थान। सागरावरौतें जाण। लंघून महागगन। विजनवन टाकावें ॥ ७७ ॥ तेथें हिमाचल पर्वत। ठाकून जावें निश्चित। त्याच्या हेमशिखराआंत। द्रोणाद्रि त्वरित पावसी ॥ ७८ ॥ ऐकें तो चतुष्कोण विस्तृत। दिव्यौषधीं लखलखित। तेजें दशदिशा दीप्तिमंत। तेज नभाआंत न समाये ॥ ७९ ॥ ऐसा निजतेजें विराजमान। त्या औषधी कोण कोण। उपयोगी गुणलक्षण। विशद व्याख्यान अवधारीं ॥ ८० ॥ मेले वांचवी वायुस्पर्शनीं। तीस नांव अमृतसंजीविनी। हृदयींचें शल्य जाय विरोनी। विशल्यकरणी ते दुजी ॥ ८१ ॥ घायीं तुटले दुधड वण। जिचेनि जाती पैं बुजोन। अंगीं घाव न दिसे वण। सुवर्णकरिणी ते जाण ॥ ८२ ॥ तुटलीं हडीं छिन्नभिन्न। पूर्विलींऐसीं जाती सांधून। सर्वथा न दिसे तुटलेपण। संधिनी जाण ते चवथी ॥ ८३ ॥ चौऔषधींसमवेत। शीघ्र यावें रातोरात। वानर वांचवीं समस्त। श्रीरघुनाथसंतोषा ॥ ८४ ॥ ऐकतां जांबवंतवचन। आलें हनुमंता स्फुरण। जैंवी चंद्रोदयीं जाण। भरे संपूर्ण क्षीराब्धी ॥ ८५ ॥ जांबवंतवाक्यें जाण। औषधी आणावया आपण। हनुमंतें मांडिलें उड्डाण। तेंही लक्षण अवधारा ॥ ८६ ॥ हनुमान अंगें आतुर्बळी। साटोपें देतां आरोळी। लंकेमाजी बैसली टाळी। दांतखिळी राक्षसां ॥ ८७ ॥ अंगें गर्जला हनुमंत। इंद्रजित धाके लंकानाथ। राक्षसांसी अति आकान्त। प्रळयावर्त लंकेसी ॥ ८८ ॥ रामकटकींचा वृत्तान्त। पाहूं येतां राक्षस भीत। अवघे दडाले लंकेआंत। साशंकित कपिभयें ॥ ८९ ॥ पायें दडपोनि लंकागिरी। वानर उडतां अंबरीं।

१ शोधीत. २ ऋक्ष—अस्वल, त्यांचा राजा (जांबवंत). ३ दुसऱ्यानें=बिभीषणानें. ४ जमाव, समुदाय. ५ सत्यपणानें. ६ सूर्य. ७ स्पष्ट. ८ जखम बरी करणारी. ९ हाडें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

माड्या गोपुरें लंकापुरीं । पडती सागरीं अंगवातें ॥ ९० ॥ मुख आरक्त अति विक्राळ । थरकत सर्पप्राय लांगूळ[1] । टंवकरोनि कर्णयुगळें[2] । कपि प्रबळ उडतसे ॥ ९१ ॥ खालावोनि[3] निजपृष्ठी । भ्रूभंगा देवोनि गांठी । पर्वत लक्षोनियां दृष्टीं । उठाउठीं उडाला ॥ ९२ ॥ पर्वत दडपतां तळीं । सर्प गजबजती पाताळीं । वृक्ष उपडती निराळीं । जेंवी वाहुटळीं तृणपर्णें ॥ ९३ ॥ उचंबळलें समुद्र-जळ । सरिता उचंबळल्या तत्काळ । तेणें तिंबलें ध्रुवमंडळ । कपीचें प्रबळ उड्डाण ॥ ९४ ॥ करोनि प्रदक्षिणा उड्डान । इंद्रचंद्रादिग्रहस्थान । सूर्यवरु-णादि यमसदन । उल्लंघून चालिला ॥ ९५ ॥ शो-धावया सूर्याची गती । पूर्वे उडाला मारुती । मग देखोनियां अपार राती । उत्तरपंथीं उडाला ॥ ९६ ॥ जनोलोक तपोलोक । ओलांडोनि सत्यलोक । टा-किलें मेरुमस्तक । एकाएक हनुमंतें ॥ ९७ ॥ सँन्निध कैलासाद्री । तेथें देखिला हेमाद्री । द्रोणाद्रि तो त्यामाझारी । जयावरी दिव्यौषधि ॥ ९८ ॥ दिव्यौषधि दीप्तिमंत । तेजें नंभ लखलखित । तें देखोनि हनुमंत । अति विस्मित स्वयें जाला ॥ ९९ ॥

कैलासमुग्रं हिमवच्छिलाश्च
तं वै वृषं कांचनशैलमग्र्यम् ।
प्रदीप्तसर्वौषधिसंप्रदीप्तं
ददर्श सर्वौषधिपर्वतेंद्रम् ॥ १४ ॥

कैलासानिकट हेमाद्री । द्रोणाद्रि तो त्यामा-झारी । दिव्यौषधि त्यावरी । निजतेजेंकरीं लखल-खित ॥ १०० ॥ वायु रुद्राचा निजदूत । मारुति त्याचा निजसुत । वेगें उडोनि हनुमंत । औषधी आणूं स्वयें आला ॥ १ ॥ दिव्यौषधी पर्वतीं । कपि नेऊं आला निश्चितीं । तेणें त्या ठेल्या अदृ-श्यगती । वेढा मारुतीं लाविला ॥ २ ॥ पुढां औ-षधी लखलखती । तेथें सवेग जाय मारुती । घेवों जातां हातोहातीं । त्याही होती अदृश्य ॥ ३ ॥ पुढां औषधी दिसती । हनुमान धांवे तयांप्रती । तंव त्या मागें आभासती । त्याही होती अदृश्य ॥ ४ ॥ औषधी न लागतीच हातीं । तेणें क्षोभला मारुती । गर्जोनि कोपानुवृत्तीं । पर्वताप्रती बोलिला ॥ ५ ॥ मी श्रीरामाचा निजदूत । शरबंधीं पडला श्रीरघुनाथ । विशल्य करावया निश्चित । औषधार्थ मी आलों ॥ ६ ॥ तुवां औषधि केलिया गुप्त । आतां पाहूं तुझा पुरुषार्थ । पुच्छें कवळोनि पर्वत । औषधींसहित उपडिला ॥ ७ ॥ कपिशक्ति अति वाड । पर्वत उपडितां कडाड । स्वर्गीं सुर-वरां हडबंड । कांपती प्रौढ दिग्गज ॥ ८ ॥ देखोनि कपीची आंगवण । सुरासुरांचा दचके प्राण । विद्याधर सिद्ध चारण । कंपायमान धरींधर[11] ॥ ९ ॥ दिव्यौषधींसमवेत । उपडोनि तो पर्वत । सवेग हनुमान असे येत । जेंवी भास्वंत[12] प्राचीसी[13] ॥ ११० ॥

संस्तूयमानः सुरसिद्धसंघै-
र्जगाम वेगादतिचंडवेगः ।
स तेन शैलेन भृशं रराज
शैलोपमो गंधवहस्य सूनुः ॥ १५ ॥

स तं गृहीत्वा निपपात तस्मिन्
शैलोत्तमं वानरसैन्यमध्ये ।
हर्युत्तमैस्तैरभिशस्यमानो
विभीषणेनापि च शस्यमानः ॥ १६ ॥

ततस्तु तौ मानुषराजपुत्रौ
तं गंधमाघ्राय महौषधीनाम् ।
बभूवतुस्तत्र तदा विशल्यौ
संरूढसर्वव्रणनष्टशोकौ ॥ १७ ॥

उपडोनि द्रोणाद्रि पर्वत । घेवोनि जातां हनुमंत । सुर सिद्ध स्तुतिवाद करीत । श्रीरामभक्त कपि-मुख्य ॥ ११ ॥ स्वामी करावया सावधान । सगळा पर्वत उपडोन । घेऊन आला वायुनंदन । आंग-वण अतुळित[14] ॥ १२ ॥ निवारावया स्वामिसंकट । पर्वत उपटिला उद्भट[15] । आंगवण अति श्रेष्ठ । वीर वरिष्ठ हनुमंत ॥ १३ ॥ विष्णुचक्र सवेग जात । त्याहून वेगें हनुमंत । औषधींसहित पर्वत । स्वा-मिकार्यार्थ आणिला ॥ १४ ॥ पर्वत घेवोनि हनु-मंत । कैसिया शोभा शोभत । जैसा विष्णु चक्र-युक्त । तैसा दिसत महावीर ॥ १५ ॥ पर्वत जया औषधी वरी । आणितांचि वानरभारीं । त्या वायु-

१ पुच्छ. २ दोन्ही कान. ३ खालीं करून. ४ आका-शांत. ५ नद्या. ६ भिजलें. ७ जवळ. ८ शल्य=जखम, तीपासून मुक्त. ९ फार विलक्षण. १० भय. ११ शेष. १२ सूर्य. १३ पूर्वेला. १४ अतुल्य. १५ मोठा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

स्पर्शें वानरहारी। शरपंजरीं सूटल्या ॥ १६ ॥ रामलक्ष्मण दोघे बंधु। येतां दिव्यौषधिगंधु। विरोनि गेला शरबंधु। निर्मुक्त बोधु पावले ॥१७॥ वानरांअंगीं घाय दारुण। बुजोनि गेले पैं संपूर्ण। अंगींचे कानपले वण। अस्थि संपूर्ण सांधिल्या ॥ १८ ॥ घाय बुजती हें नवल कोण। वानरांच्या अस्थि शतचूर्ण। त्याही अस्थिबंधें सांधून। सावधान उठवील ॥ १९ ॥ श्रीरामें सन्मानिला हनुमंत। सुग्रीव अंगद जांबवंत। बिभीषण सन्मानित। स्तुति वदत स्वानंदें ॥ १२० ॥ वानरसैन्या विश्रांती। देता जाला स्वयें मारुती। अवघे जण अभिवंदिती। सन्मानिती स्तुतिवादें ॥ २१ ॥ शरबंधीं सुटला रामचंद्र। वानर करिती जयजयकार। रामनामाचा गजर। नामें अंबर कोंदलें ॥ २२ ॥ बाप बळियाढा हनुमंत। उचलोनि औषधिपर्वत। जेथील तेथें ठेवोनि स्वस्थ। आला त्वरित स्वामीपासीं ॥ २३॥ एका जनार्दना शरण। झालें शरबंधमोचन। पुढील कथा गोड गहन। सावधान अवधारा ॥ १२४ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां शरबंधमोचनं नाम त्रयस्त्रिंशत्तमोऽध्यायः ॥ ३३ ॥ ओंव्या ॥ १२४ ॥ श्लोक ॥ १७ ॥

अध्याय चौतिसावा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ स्वयें बिभीषण बोलत। हनुमान वीर अति विख्यात। शरबंधीं श्रीरघुनाथ। सैन्यासमवेत ऊठिला ॥ १॥ अंगद सुग्रीव राज्यधर। जुत्पतींसमवेत वानर। येणें उठविले समग्र। वीर शूर स्वामिभक्त ॥२॥ मारुतीस मानी श्रीराघव। मारुतीस मानी सत्य सुग्रीव। मारुतीस मानिती वीर सर्व। कीर्ति अभिनव येणें केली ॥३॥ निमिषें आणोनि पर्वत। वानर उठवोनि समस्त। ठेवोनि आला जेथींचा तेथ। श्रीरामभक्त हनुमंत ॥ ४ ॥

ततोऽब्रवीन्महातेजाः सुग्रीवो वानराधिपः।
अर्थ्यं विज्ञापयन्नेवं हनूमन्तमिदं वचः ॥ १ ॥
यतो हतः कुम्भकर्णः कुमाराश्च निषूदिताः।
नेदानीमुपनिर्हारं रावणः कर्तुमर्हति ॥ २ ॥
लंकामभिपतंत्वाशु प्रगृह्योल्काः प्लवंगमाः।
ततोऽस्तंगत आदित्ये रौद्रे तस्मिन्निशामुखे ॥ ३ ॥
लंकामभिमुखा जग्मुः सोल्कास्ते हरियूथपाः ॥ ४ ॥

देखोनि हनुमंताची ख्याती। सुग्रीव सुखावोनि चित्तीं। काय बोले वीरांप्रती। धन्य मारुति प्रतापी ॥ ५ ॥ ऐकें बापा पवनपुत्रा। ज्याचा भरंवसा दशशिरा। त्या मारिलें रावणकुमरा। परिवारासंगत ॥ ६ ॥ देवांतक नरांतक वीरा। मारिला अतिकाय त्रिशिरा। यापरी त्या रावणकुमरां। रणीं समग्रां निर्दळिलें ॥ ७ ॥ येणें दुःखें दशकंठ। करील नानाविध कपट। तंवचि वानरीं उद्भट। लंकात्रिकूट जाळावें ॥ ८ ॥ ऐकतांचि सुग्रीववचन। रातोरातीं वानरगण। अग्निचूडी घेवोनि जाण। लंकादहन मांडिलें ॥ ९ ॥ हातीं घेवोनि अग्निचूडी। वानरवीरांचिया कोडी। लंकेमाजी घालोनि उडी। आगी धडाडी लाविती ॥ १० ॥

उल्काहस्तैर्हरिगणैः सर्वतः समभिद्रुताः।
आरक्षस्था विरूपाक्षा राक्षसाः संप्रदुद्रुवुः ॥ ५ ॥
गोपुराट्टप्रतोलीषु चर्यासु विविधासु च।
प्रासादेषु च संहृष्टाः ससृजुस्ते हुताशनम् ॥ ६ ॥
तेषां गृहसहस्राणि ददाह हुतभुक्तदा।
तेषां शतसहस्राणि रक्षसां पुरवासिनाम् ॥ ७ ॥
अदहत्पावकस्तत्र जज्वाल च पुनःपुनः ॥ ८ ॥

उल्काहस्ती वानरवीर। जाळूं आले लंकापुर। देखोनि राखते निशाचर। अति सत्वर पळाले ॥ ११ ॥ ठेवोनि राक्षससैन्यासी। नगर रक्षितां विरूपाक्षासी। येतां देखोनि वानरांसी। तोही धाकेंसीं पळाला ॥ १२ ॥ पळतां देखोनि निशाचर। पाठी लागती वानर। येतां मारिले घरटीकार। जाळिले अपार जागेकरी ॥ १३ ॥ जेथें जेथें जागेकरांचीं घरें। तेथें तेथें आग लाविती वानरें। बाहेर निघावया निर्गम न पुरे। जाळितां वानरें समग्रें ॥ १४ ॥ घरें मंदिरें धवळारें। रम्य वाडिया गोपुरें। प्रासाद पौळी शिखरें। जाळित वानरें अति क्षोभें ॥ १५ ॥ शरबंधीं बांधले राघवेंद्र। अति नष्ट हे निशाचर। इंद्रजित जाळूं दशशिर। लंकापुरा पुरदाहो ॥ १६ ॥ ऐसें बोलोनि वानर।

१ बरे झाले. २ हाडें. ३ आकाश. ४ बलवान्, पराक्रमी. ५ मुख्य मुख्य योद्ध्यांसह. ६ अपूर्व. ७ क्षणांत.

८ अग्निचूडी हातांत घेऊन. ९ गस्तवाले, रक्षक. १० वाडे. ११ कोट.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

जाळूं आदरिलें नगर । सहस्रसंख्या लक्षांतर । असंख्याकार गृहदाहो ॥ १७ ॥ माणिकनिबद्ध अवनी । रत्नजडित स्तंभश्रेणी । मुक्ताफळें मंडपाभरणीं । उत्तमां भवनीं महादाहो ॥ १८ ॥ लहानसहान घरें । आगी न लाविती वानरें । सुंदर भवनें सुप्रकारें । तींचि आदरें जाळिती ॥ १९ ॥ सुंदर मनोहर गृहांसी । शोधून जाळिती साक्षेपेंसीं । वानर पडले द्वंद्वासीं । आगी चौपासीं लाविली ॥ २० ॥ हनुमंतें जाळिलें नगर । तेव्हां दिवसा होता दिनकर । हा रात्रिदाहो निर्धार । स्त्रिया कुमर कळकळती ॥ २१ ॥ आगी लाविली चौफेरीं । पळती राक्षसांच्या हारी । आकान्त होत नरनारीं । अपांपरी नगरस्थां ॥ २२ ॥ दंपत्यें निजसेजेसीं । निद्रिस्थ असतां दोहींसीं । जळोनियां जैसीं तैसीं । गृहदाहेंसीं भस्मान्त ॥ २३ ॥ नाना सामग्री उपकरण । शस्त्रास्त्र अंगत्राण । धनुष्यबाणेंसीं वोडण । वस्त्राभरण जाळीत ॥ २४ ॥ पुरुष उठवितां स्त्रियेसी । ते म्हणे सुखें भोगा कामासी । आगी लागली गृहासी । नीघ वेगेंसीं निर्लज्जे ॥ २५ ॥ जेथींच्या तेथें घरोघरीं । राक्षस जळती निद्राभरीं । बहुतां रिघू न पुरे बाहेरी । अग्नीमाझारी कोंडलीं ॥ २६ ॥ हांका देती शंखस्फुरणें । आक्रंदती अति सँत्राणें । दुर्धर अग्नीचें जाळणें । कोणासी कोणें राखावें ॥ २७ ॥ आगीं कोंडोनि चौफेर । महायोद्धे दहा सहस्र । जळोनि मेले निशाचर । घोरांदर आकान्त ॥ २८ ॥ अग्नि खवळला अनिष्ट । चहूंकडे धडधडाट । लंकेमाजी न चले वाट । कलकलाट राक्षसां ॥ २९ ॥ शरबंधीं करोनि कपट । श्रीराम बांधिला वरिष्ठ । त्याचें फळ हें अनिष्ट । होत तळपट राक्षसां ॥ ३० ॥

शयनेषु महार्हेषु प्रसुप्तानां प्रियैः सह ।
त्रस्तानां गच्छतां चैव पुत्रानादाय सत्वरम् ॥ ९ ॥
धूमजालपरीतांगा बहवो परमार्दिताः ।
राक्षसा विनदंति स्म वन्हिज्वालाभयाकुलाः ॥ १० ॥

घरोघरींचीं समस्त । महामंचकीं सुनिश्चित । स्त्रीपुरुषें निद्रान्वित । अग्नि तेथ पोळीत पावे ॥ ३१ ॥ स्त्रिया पुत्र घेवोनि पळती । पुरुष गजबजिले आक्रंदती । घरोघरीं हांका देती । धूमाकुलित आरडत ॥ ३२ ॥ धूमाकुलित न दिसे वाट । अग्नि पोळीत चटचट । राक्षसांसी भवंत आट । अति कष्ट स्त्रीबाळां ॥ ३३ ॥ राक्षस पडले ज्वलनावर्तीं । ज्वालाकुलित झाली क्षिती । सहसा निर्गम न पावती । हांका देती आक्रोशें ॥ ३४ ॥ जे जे राक्षस बाहेर येती । ते ते उचलोनि जुत्पती । अग्नीमाजी निक्षेपिती । द्वंद्वानुवृत्तीं वानर ॥ ३५ ॥ शरबंधीं धरिला रामचंद्र । तेणें रागें पैं वानर । जाळूं आदरिले निशाचर । लहान थोर कवळोनी ॥ ३६ ॥ श्रीराम परब्रह्म स्पष्ट । त्यासीं राक्षसीं केलें कपट । त्यांचें करावें तळपट । द्वंद्वा मर्कट पेटले ॥ ३७ ॥ जे राक्षस बाहेर येत । त्यांस कपि घालिती अग्नींत । राहूं जातां लंकेआंत । ज्वलनावर्तें जाळीत ॥ ३८ ॥ ऐसा राक्षसां आकान्त । आरंभिला लंकेआंत । हांकबोंबेचा आवर्त । प्रळयान्त नगरस्थां ॥ ३९ ॥

उष्ट्रैर्मुक्तैर्गजैर्मुक्तैर्मुक्तैश्च तुरगैरपि ।
बभूव लोको लंकायां भ्रांतग्राह इवार्णवः ॥ ११ ॥
अपरे हेमकक्षाश्च संनद्धा वरवारणाः ।
त्रस्ता बंधात्समाक्षिप्य येन केन प्रदुद्रुवुः ॥ १२ ॥
पानीयं पातुमिच्छंतः परिभ्रमणतर्षिताः ।
प्रतिबिंबं जले दृष्ट्वा तमग्निमिति मेनिरे ॥ १३ ॥

देखोनियां दहनावर्त । हस्ती घोडे केव्हे मुक्त । अग्निभयें अति भ्रांत । परिभ्रमत अव्हांसव्हा ॥ ४० ॥ अवघीं जळतृषातृषित । उदकप्राशनार्थ येत । अग्निप्रतिबिंब जळांत । देखोनि पळत माघारीं ॥ ४१ ॥ जळ नव्हे तो मानूनि अग्नी । पळती उदक न घेऊनी । ऐसी परी लंकाभुवनीं । अग्निदहनीं आकान्त ॥ ४२ ॥ धनुष्य सज्जोनि लक्ष्मण । विंधोनियां अग्निबाण । करितां राक्षसां कंदन । लंकाभुवन कळकळित ॥ ४३ ॥ भेदितां सौमित्राच्या शरीं । आक्रंदती नरनारी । बोंब सुटली निशाचरीं । अपांपरी राक्षसां ॥ ४४ ॥ ऐसें देखोनियां कंदन । कृपेनें द्रवला रघुनंदन । निवारोनि लक्ष्मण । बोले आपण सुग्रीवासी ॥ ४५ ॥ विंधोनियां अग्निबाण । निद्रितांचें करितां

१ प्रारंभ केला. २ अनेक खांब. ३ दुर्दशा. ४ ढाल. ५ निर्लज्जे. ६ आवेशानें. ७ अग्नीच्या फेऱ्यांत. ८ पृथ्वी. ९ फेंकतात. १० अग्निचक्र, अग्नीचा फेरा. ११ उंटें. १२ अव्यवस्थित रीतीनें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

दहन। आम्हांसी पुरुषार्थ कोण। निंद्य लक्षण क्षात्रधर्मा ॥ ४६ ॥ दहनीं घालोनि लंकाभुवन। जाळितां निद्रितादि जन। तरी काय मारिला दशानन। निंद्य लक्षण क्षात्रधर्मा ॥ ४७ ॥ रात्रीमाजी द्वंद्वें जें करणें। चोरोनियां अग्नि लावणें। हीं तंव अधर्माचीं चिन्हें। लाजिरवाणें क्षात्रधर्मा ॥ ४८ ॥ बाहेर आल्या रणांगणीं। मारीन वीरांचिया श्रेणी। धडमुंडांकित धरणी। अर्धक्षणीं मी करीन ॥ ४९ ॥ मज असतां श्रीरामचंद्रा। कासया राक्षसांचा दरारा। विंधोनियां बाणधारा। दशशिरा निवटीन ॥ ५० ॥ निवारोनियां लक्ष्मण। वर्जोनियां वानरगण। न जाळावे निद्रित जन। लंकाभुवन न जाळावें ॥ ५१ ॥ निद्रित जाळितांचि देख। अंगीं लागे महापातक। तें वर्जोनि रघुकुळटिळक। युद्ध संमुख करूं इच्छी ॥ ५२ ॥ संमुखा संमुखीं अति निर्वाण। करावया रावणासीं रण। सैन्य सज्जावें संपूर्ण। रघुनंदन आज्ञापी ॥ ५३ ॥ ऐकोनि श्रीरामवचन। सुग्रीव घाली लोटांगण। हरिखें गर्जोनि आपण। वानरगण नेमीत ॥ ५४ ॥

आदिष्टा वानरेंद्रास्ते सुग्रीवेण महात्मना।
आसन्नं द्वारमाविश्य प्लवंगा युद्धकांक्षिणः ॥ १४ ॥
यश्च वो वितथं कुर्यात्तत्र शत्रावुपस्थिते।
स हन्तव्योऽभिसंहत्य बलवान्यः पलायते ॥ १५ ॥

रावणासीं करावया रण। श्रीरामें नेमिलें आपण। सुग्रीवआज्ञा अति दारुण। वानरगणनियमार्थी ॥ ५५ ॥ आजिचें करितां रणांगण। वेंचावा श्रीरामकाजीं प्राण। मागें पळाला तो जाण। अंगदें आपण मारावा ॥ ५६ ॥ मातुळ मावसा मेहुणा नातू। चुलता पुतण्या बंधु सुतू। स्त्रियेचा बंधु अत्यंत आप्तू। करावा घातू रणीं सरतां ॥ ५७ ॥ श्रीरामकाजीं वंचकपण। त्यासी मारावें आपण। त्याचा घेतल्याही प्राण। दोष दारुण बाधेना ॥ ५८ ॥ अंगद बोलिला हांसोन। पळत्या देवोनि अभयदान। मी मारीन दशानन। रणविंदान पहा माझें ॥ ५९ ॥ ऐकोनि अंगदाची मात। संतोषला श्रीरघुनाथ। टाळी पिटली वानरांत। रणीं लंकानाथ वधावया ॥ ६० ॥ दिवस उगवतांचि जाण। देखोनि लंकादहन। कोपा चढला दशानन। खात दर्शन अति रागें ॥ ६१ ॥ कुंभकर्णाचे कुमर। कुंभ निकुंभ महाशूर। युद्धा धाडिले सत्वर। नरवानर मारावया ॥ ६२ ॥ कुंभ निकुंभ दोघे जण। वांढिवे गर्जती आपण। वानर बापुडे ते कोण। रामलक्ष्मण निर्दळूं ॥ ६३ ॥

लंकाया निर्ययुद्धाराद्नदंतो भीमविक्रमाः।
कुंभकर्णात्मजौ वीरौ परिगृह्य समंततः ॥ १६ ॥
बहुसैन्यैः परिवृतौ शीघ्रं रावणनोदितौ।
भीमं च रथमातंगहयवाहनसंकुलम् ॥ १७ ॥
तद्दृष्ट्वा बलमायातं राक्षसानां महत्तदा।
संचचाल कपीनां तु बलमुच्चैर्ननाद च ॥ १८ ॥

कुंभ निकुंभ दोघां वीरीं। सैन्य सज्जोनि समग्रीं। निघाले लंकेबाहेरी। वीर गजरीं गर्जती ॥ ६४ ॥ रथाश्वेंसीं मत्त मातंग। सन्नद्ध बद्ध चतुरंग। कुंभकर्णपुत्र चांग। वीर निर्व्यंग युद्धार्थी ॥ ६५ ॥ रावणाचे आज्ञेवरी। नाना वाद्यांचे गजरीं। दोघे निघतांचि बाहेरी। येतां वानरीं देखिले ॥ ६६ ॥ देखोनि राक्षसांचें दळ। रणीं खवळले गोळांगूळ। युद्धा मिसळले तत्काळ। रणकल्लोळ माजविला ॥ ६७ ॥ रामनामाचा गजर। वानरीं केला भुभुःकार। सिंहनादें निशाचर। घोरांदर गर्जती ॥ ६८ ॥ काल्या तोमर त्रिशूळ भाले। राक्षस युद्धा मिसळले। वृक्षपर्वत शालतालें। वानर बळें भिडताती ॥ ६९ ॥ वानर आणि निशाचर। युद्धा पेटले दुर्धर। नोकोनियां येरां येर। घाय निष्ठुर हाणिताती ॥ ७० ॥ राक्षस आणि वानरगण। ज्याची जैसी आंगवण। युद्ध करिती भिन्न भिन्न। रणप्रवीण रणयोद्धे ॥ ७१ ॥ युद्ध करितां निशाचर। पाठिराखे येरां येर। तैसेचि योद्धे कपिकुंजर। येरां येर रक्षिती ॥ ७२ ॥

प्रवीरानभितो जघ्नू रक्षसामंतरे स्थितान्।
घ्नंतमन्यं जघानान्यः पतितोऽन्यमपातयत् ॥ १९ ॥
गर्हमाणं जगर्हान्यो दशंतमपरोऽदशत्।
देहीत्यन्यो ददात्यन्यो ददामीत्यपरः पुनः ॥ २० ॥

१ अग्नीमध्यें. २ युद्ध, लढाई. ३ समुदाय. ४ आनंदानें. ५ वानरांना हुकुमांत ठेवण्याविषयीं. ६ मुलगा. ७ कपट. ८ दांत. ९ शौर्याच्या आवेशानें. १० ठार करूं. ११ हत्ती. १२ सैन्य. १३ वानर. १४ शाल व तालवृक्ष. १५ निर्भर्त्सना करून.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

रक्षसां दशसप्तेति वानरा जघ्नुराहवे ।
वानरानपि सप्ताष्टौ दश राक्षसपुंगवाः ॥ २१ ॥

मथून राक्षसव्यूहसंबंध । वाढिवा लाठिवा वीर प्रबुद्ध । त्यांसीं वानरीं द्वंद्वयुद्ध । अति सुबद्ध आदरिलें ॥ ७३ ॥ महावीर रणप्रवीण । अंगीं प्रबळाची आंगवण । येरयेरांतें पाचारून । नामें घेऊन भिडताती ॥ ७४ ॥ आम्ही श्रीरामाचे दूत । रामनामें घाय हाणीत । तसेच राक्षस विख्यात । रणीं भिडत रणमारें ॥ ७५ ॥ एक एकातें घाय हाणीत । तोही घाया घाय देत । एक एकातें तळीं पाडीत । तोही पडत उलथोनी ॥ ७६ ॥ वानर अशक्त पालेखाइर । तुम्हांसी युद्धीं कैंचा धीर । तुम्ही महापापी निशाचर । चोरटी धूर परद्वारी ॥ ७७ ॥ चोरी मारी परद्वारी । इतुकीं पापें दशशिरीं । त्याचे तुम्ही सहाकारी । पापाचारी अशक्त ॥७८॥ पापें मारिलें तुम्हांसी । मारणें न लगे आम्हांसी । ऐसें निंदून राक्षसांसी । कपि आवेशीं भीडती ॥ ७९ ॥ श्रीराम स्वयें सोज्ज्वळ । नित्य निष्पाप निर्मळ । तुमची धूरें कश्मळ । पापी केवळ परदारी ॥ ८० ॥ त्या पाप्याचे होवोनि दूत । संग्रामासी आलेति येथ । जयो न पावां निश्चित । रणीं समस्त मराल ॥ ८१ ॥ राक्षसां डसती वानर । वानरां डसती निशाचर । पुच्छें ठोकोनि सत्वर । फोडिती वक्त्र राक्षसांचें ॥८२॥ घायें करोनि दंत भग्न । भूमीं पाडोनि दर्शन । राक्षसांसी करोनि कंदन । कपिगण गर्जती ॥८३॥ एक म्हणे राहें साहें । दुजा म्हणे पुढें पाहें । माथां हाणिती दुर्धर घाये । रुधिर वाहे भडभडां ॥ ८४ ॥ दे दे म्हणतां निशाचर । घाय देती वानर । अशुद्धांचा वाहे पूर । घोरांदर रणमार । ॥ ८५ ॥ राहें साहें धरीं धीर । घाय साहे तो महाशूर । नोकोनियां येर येर । करिती मार रणमारें ॥ ८६ ॥ एवं राक्षस गोळांगूळ । युद्धीं भिडती अति तुंबळ । रणीं खवळला रणवेताळ । हलकल्लोळ रणांगणीं ॥ ८७ ॥ वानरवीर रणाआंत । राक्षस दहा पांच सात । एक वेळे करिती घात । रणोन्मत्त महामारें ॥ ८८ ॥ याचि परी राक्षसवीर । सप्ताष्टदश वानर । घायें मारिती निशाचर । रणीं दुर्धर गर्जोनी ॥ ८९ ॥ ऐशापरी रणांगणीं । वीरां वानरां झोंटधरणी । होतां देखूनियां नयनीं । आला गर्जोनि अंगद ॥ ९० ॥

प्रवृत्ते संकुलेऽत्यर्थं तस्मिन्वीरवरक्षये ।
अंगदोऽकंपनं वीरमाससाद रणोत्कटः ॥ २२ ॥
आहूय सोंऽगदं कोपात्ताडयामास वेगतः ।
गदयाकंपनः श्रीमान्स पपाताचलोपमः ॥ २३ ॥

कुंभनिकुंभाचा प्रधान । मुख्य सेनानी अकंपन । त्यासी उत्कट करावया रण । अंगद आपण पाचारी ॥ ९१ ॥ अंगद येतांचि गर्जत । अकंपनें गदाघात । हाणोनि पाडिला मूर्च्छित । जेंवी पर्वत वज्रघातें ॥ ९२ ॥ मूर्च्छा सांवरोनि सत्वर । उठोनियां अंगद वीर । रागें हाणोनि शिळाशिखर । केला शतचूर अकंपन ॥ ९३ ॥ न मागतां प्यावया पाणी । अकंपन पाडिला रणीं । राक्षससैन्या जाली भंगाणी । गेले पळोनी कुंभाप्रती ॥ ९४ ॥ राक्षसांचे सैन्यसंभार । धाकें पळोनि सत्वर । कुंभ निकुंभ महावीर । आले समग्र त्यांपासीं ॥ ९५ ॥ अकंपनाचा केला घात । हांक वाजली सैन्याआंत । तेणें कुंभ क्रोधान्वित । शरचापयुक्त चालिला ॥ ९६ ॥

आपततीं च वेगेन कुंभस्तां सांत्वयन् चमूम् ।
तेन हाटकवर्णेन पत्रिणा चित्रवाससा ॥ २४ ॥
आकर्णकृष्टमुक्तेन विव्याध द्विविदं बली ।
स तयाभिहतस्तेन विप्रमुक्तपदः स्फुटम् ॥ २५ ॥
निपपाताद्रिकूटाभो विह्वलो गाढवेदनः ।
कुंभमभ्यपतत्क्षिप्रं प्रगृह्य महतीं शिलाम् ॥ २६ ॥
तां शिलां सलताजालां तस्मै चिक्षेप रक्षसे ॥ २७ ॥

मारिलिया अकंपन । पळत आलें राक्षससैन्य । त्यासी कुंभें आश्वासून । निघे आपण संग्रामा ॥ ९७ ॥ कुंभ योद्धा महाशूर । श्रेष्ठ श्रेष्ठ वानरवीर । शोधोनियां विंधी वीर । लहानथोर मारीना ॥ ९८ ॥ वानरसैन्यीं नाना व्यक्ती । त्यांतें कुंभ न धरी हातीं । श्रेष्ठ श्रेष्ठ जे जुत्पैती । बाण त्यांप्रती विंधीत ॥९९॥ धनुष्यबाण स्वयें सज्जूनी । आकर्णान्त वोढी काढूनी । द्विविद विंधोनियां

१ बलाढ्यपणानें. २ महाबुद्धिवान. ३ रावणाचे ठिकाणीं. ४ मदतनीस. ५ मुख्य. ६ पापयुक्त. ७ तोंड. ८ दांत. ९ भयंकर. १० रक्ताचा. ११ भयंकर. १२ वानर. १३ नाश. १४ वीर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

बाणीं। पाडिला रणीं मूर्च्छित ॥ १०० ॥ बाणीं विंधितां सुदृढ। द्विविद पाडिला गाढ मूढ। वीरशूरयुद्धकैवाड। रणसुरवाड संग्रामीं ॥ १ ॥ मूर्च्छित पडतांचि द्विविद। बंधु क्षोभला महामैंद। कुंभासीं करावया युद्ध। सन्नद्ध बद्ध चालिला ॥ २ ॥ वृक्ष वल्ली द्रुम सकळा। सपर्वत उपडोनि शिळा। घालितां कुंभाच्या कपाळा। तेणें तत्काळ छेदिली ॥ ३ ॥ विंधोनियां पांच बाण। शिळा छेदून केली शतचूर्ण। मैंदासी शर दारुण। विंधी आपण साटोपें ॥ ४ ॥

वक्षस्यपि च तेनासौ मैंदं विव्याध राक्षसः।
रुधिरानुगतो भूमौ निपपात हि मूर्च्छितः ॥ २८ ॥
ततोऽगदस्तौ पतितौ मातुलावभिजग्मिवान्।
अभिदुद्राव वेगेन कुंभमुद्यतकार्मुकम् ॥ २९ ॥
तमापतंतं विव्याध कुम्भः पंचभिरायसैः।
त्रिभिश्चान्यैस्त्रिभिर्बाणैर्मातंगमिव तोमरैः ॥ ३० ॥

मैंदें सोडिले शिळा पर्वत। कुंभें छेदोनि समस्त। सुवर्णपत्री बाण युक्त। हृदयाआंत विंधिला ॥५॥ हृदयीं भेदतां तो शर। वमून रुधिरांचे पूर। मूर्च्छित मैंद वानर। रणीं सत्वर पाडिला ॥ ६॥ मैंद द्विविद वीर प्रबळ। दोन्ही अंगदाचे मातुळ। रणीं पडतां अति विव्हळ। अंगद तत्काळ क्षोभला ॥ ७ ॥ करावया कुंभाचा घात। अंगदें उपडोनि पर्वत। धांविन्नला त्वरान्वित। रणीं गर्जत साटोपें ॥ ८ ॥ कुंभें विंधोनि पांच बाण। येतां पर्वत केला चूर्ण। अंगदासी तीन बाण। अति सत्राण विंधिले ॥ ९ ॥ अंगद वीर अति विख्यात। जरी बाणीं जाला जर्जरित। तरी कुंभाचा करावया घात। सवृक्षहस्त स्वयें आला ॥ ११० ॥ पर्वतामागें पर्वत। वृक्षामागें वृक्ष वर्षत। कुंभ करितां अस्ताव्यस्त। तोही सावचित्त रणमारीं ॥ ११ ॥ कुंभवीर रणाभिनिवेशीं। तोडोनि वृक्षपर्वतांसी। अंगद विंधिला भ्रूप्रदेशीं। रुधिर त्यासी सुटलें ॥ १२ ॥ गज आवरिजे अंकुशेंसीं। तेंवी अंगद बाणेंसीं। नावरेचि युद्धाभिनिवेशीं। शालहस्तेंसीं लोटिला ॥ १३॥

अंगदः पाणिना नेत्रे विमृज्य रुधिरोक्षितः।
शालमासन्नमेकांते परिजग्राह पाणिना ॥ ३१ ॥
तमिंद्रकेतुप्रतिमं शालं शालभुजो बली।
उत्ससर्जांगदो वेगात्त दूरादन्ववैक्षत ॥ ३२ ॥

अंगदकपाळीं विंधिला शर। प्रवाहे अश्रुर्धांचा पूर। नेत्रींचें पुसोनियां रुधिर। अंगद सत्वर धांविन्नला ॥ १४ ॥ जैसा इंद्राचा इंद्रकेत। तैसा शोभे शालहस्त। लाता हाणोनि सारथि रथ। केला निःपात रणभूमीं ॥ १५ ॥ आम्ही म्हणों हे वानर। हीन दीन पालेखाइर। तंव हे निधडे महाशूर। पूर्ण झुंझार रणरंगीं ॥ १६ ॥ शाल हाणितां सत्वर। कुंभ निधडा धनुर्धर। सतेज विंधोनियां शर। शाल समग्र छेदिला ॥ १७ ॥ हेमंपुंखी सरले शर। धगधगीत तेजाकार। अंगद विंधिला वानर। वज्रधार दृढ बाणीं ॥ १८ ॥ सबळ अंगदाचें उड्डाण। हृदयीं भेदतां वज्र बाण। क्षितीं पडला मूर्च्छापन्न। आपणा आपण विसरला ॥ १९ ॥ युवराजा पडतां क्षितीं। कोपें खवळले जुत्पती। युद्ध करावया कुंभाप्रती। कोप्यनुवृत्ती चालिले ॥ १२० ॥

अंगदं व्यथितं दृष्ट्वा सीदंतमिव कुंजरम्।
दुराधर्षं राजपुत्रं धूम्रो ह्यभ्यवपद्यत ॥ ३३ ॥
अथ धूम्रः शिलाहस्तः कोपसंरक्तलोचनः।
रिरक्षिषंतोऽभ्यपतन्नंगदं वानरर्षभाः ॥ ३४ ॥

अंगद युवराजा विख्यात। रणीं पडतांचि मूर्च्छित। कुंभ होवोनि हर्षयुक्त। त्यासी नगरांत नेऊं पाहे ॥ २१ ॥ भंगिला रथ सारथी। अंगद न्यावा कैशा रीतीं। कुंभ विचारी जंव चित्तीं। तंव धूम्राची अवचितीं उडी आली ॥ २२ ॥ धूम्र वीर तये काळीं। आरक्तनयन क्रोधानळीं। पर्वत झेलीत करतळीं। कुंभाजवळी पातला ॥ २३ ॥ बाणपिसारियाचा वारा। धूम्र उडविला अंबरा। तेणें हाहाकार वानरां। निशाचरां आल्हाद ॥ २४ ॥ धूम्र ज्येष्ठ बंधु जांबवंता। त्यासी रणीं कुंभें गांजितां। नाहीं अंगदासी रक्षिता। तेणें जांबवंता कोप आला ॥ २५ ॥ जांबवंत निघे आपण। सवें निघाला सुषेण। वेगदर्शी वानर जाण। करावया रण चालिला ॥ २६ ॥ येतां देखोनि वानरांसी। कुंभ वीर रणाभिनिवेशीं। बाणीं कुंठिलें कपिमार्गासी। अंगदापासीं येवों नेदी ॥ २७॥ वर्षोनियां

१ युद्धाविषयीं आनंद. २ वृक्ष. ३ युद्धाच्या आवेशानें. ४ रक्ताचा. ५ सुवर्णखचित पिसाऱ्याचे. ६ आकाशांत.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

शरौघ[१]। कपिप्रताप केला मोघ[२]। बाणीं खिळिलें सर्वांग। रणोद्योगें[३] चालेना ॥ २८ ॥ जेंवी कां वायु आकाशासी। तोडोनि ने मेघजालासी[४]। तेंवी कुंभें वानरांसी। बाणाभिनिवेशीं वारिलें ॥ २९ ॥ अंगद धरिला राजकुमर। रणीं उठला हाहाकार। तें देखोनि सुग्रीव वीर। कोपें दुर्धर चालिला ॥ १३० ॥ सांडोनि कुंभबाणमार्गासी। अलक्ष उडोनि आकाशीं। सुग्रीव आदळला अंगेंसीं। अंगद पाठीसीं घालोनी ॥ ३१ ॥

कुंभस्य धनुराच्छिद्य बभंजेंद्रायुधोपमम् ।
अवप्लुत्य ततः शीघ्रं कृत्वा कर्म च दुष्करम् ॥ ३५ ॥
अब्रवीत्कुपितः कुंभं भग्नशृंगमिवर्षभम् ।
कृतं कर्म परिश्रांतो विश्रांतः पश्य मे बलम् ॥ ३६ ॥
तेन सुग्रीववाक्येन सावमानेन मानितः ।
ततः कुंभः समुत्पत्य सुग्रीवमभिपत्य च ॥ ३७ ॥

सुग्रीवें घालोनि उडी। कुंभाचें धनुष्य आसुडी[५]। रागें मोडोनि कडाडीं। आदळला प्रौढी अंगेंसीं ॥ ३२ ॥ जैसें इंद्रचाप आकाशीं। तैसें धनुष्य कुंभापाशीं। सुग्रीवें मोडून आवेशीं। काय त्यासी बोलत ॥ ३३ ॥ तुवां घेऊन धनुष्यबाण। रणीं त्रासिले वानरगण। तें म्यां चाप भंगिल्या जाण। आतां आंगवण तुज कैंची ॥ ३४ ॥ भग्नशृंग वृषभासी[६]। जेंवी न करवे संग्रामासी। तेंवी भंगिल्या चापासी। प्रौढी युद्धासी तुज कैंची ॥ ३५ ॥ आजवरी म्यां रणीं। वीर मारिला नाहीं कोणी। प्रथम करीन तुझी बोहणी। पुढें वीरश्रेणी[७] मारावया ॥ ३६ ॥ ऐसे सुग्रीवाचे उत्तरीं। कुंभासी कोप आला भारी। कोपें मुष्टि उरावरी। वज्रप्रहारीं हाणितली ॥ ३७ ॥ फोडोनि देहींच्या चर्मासी। मुष्टि पावली अस्थीपासीं। भेदून अंगींच्या वर्मासी। अति आवेशीं हाणितां ॥ ३८ ॥ येवढी कुंभाची मुष्टी। सुग्रीवें नेली तृणासाटीं। अशुद्धें डवर्रला[८] जगजेठी। रणसंतुष्टीं डुल्लत ॥ ३९ ॥ जैसा गेरुकें मिरवे मेरू। कां वडवाग्नी सागरू। अशुद्धें डवरला वानरू। रणीं परम शोभत ॥ १४० ॥

स तथाभिहतस्तेन सुग्रीवो वानरेश्वरः ।
मुष्टिं संवर्तयामास वज्रवेगां महाबलः ॥ ३८ ॥
मुष्टिं संपातयामास कुंभस्योपरि वानरः ।
मुष्टिनाभिहतस्तेन निपपात स राक्षसः ॥ ३९ ॥

कुंभ महाबळी वीर। मुष्टी हाणितां निष्ठुर। डंडळेना सुग्रीव वीर। वानरेश्वर प्रतापी ॥ ४१ ॥ सुग्रीवें वळोनि वज्रमुष्टी। कुंभास हाणितां उठाउठीं। फोडोनि मस्तकाची कवटी। पाडिला सृष्टीं निष्प्राण ॥ ४२ ॥ कुंभ पडिला महावीर। विजयी झाला वानरेश्वर। वानर करिती जयजयकार। नामें अंबर[१०] गर्जत ॥ ४३ ॥ स्वयें उठोनि श्रीरघुनाथ। आलिंगिला वानरनाथ। सुग्रीव होवोनि लज्जान्वित। काय बोलत तें ऐका ॥ ४४ ॥ कुंभ कायसें बापुडें। रणीं मारिलें म्यां किडें। तें यश मिरवूं तुजपुढें। हें तंव कुडें मजलागीं ॥ ४५ ॥ रावणाच्या दहाही शिरांसी। मुरडोनि आणीन पायांपासीं। तेचि मी करीन सेवेसी। पुरुषार्थेंसीं सुग्रीव ॥ ४६ ॥ ऐसें सुग्रीवाचें वचन। उल्लासें मानी रघुनंदन। एका जनार्दना शरण। कुंभनिर्दळण रणीं झालें ॥ ४७ ॥ कुंभाचा रणीं केला घात। क्षोभला निकुंभ विख्यात। त्यासी मारील हनुमंत। कथावृत्तान्त अवधारा ॥ १४८ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां कुंभवधो नाम चतुस्त्रिंशत्तमोऽध्यायः ॥ ३४ ॥ ओंव्या ॥ १४८ ॥ श्लोक ॥ ३९ ॥

अध्याय पस्तिसावा

॥श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः॥ सुग्रीवें झोंटधरणीं। कुंभ पाडिलिया रणीं। तें देखोनियां नयनीं। निकुंभ क्षोभोनी चालिला ॥ १ ॥

निकुंभो भ्रातरं दृष्ट्वा सुग्रीवेण निपातितम् ।
प्रदहन्निव कोपेन सुग्रीवं प्रत्यवेक्षत ॥ १ ॥
कृतसंग्राममाल्यं च दत्तपंचांगुलं शुभम् ।
आददे परिघं घोरं नगेंद्रशिखरोपमम् ॥ २ ॥
निकुंभो भूषणैर्भाति परिघेणायतेन च ।
नगर्या विटपावत्या गन्धर्वनगरैरपि ॥ ३ ॥
सहस्रैवामरावत्या सर्वैश्च भुवनैः सह ।
निकुंभपरिघोद्धूतं भ्रमतीव नभस्थलम् ॥ ४ ॥

---

१ बाणसमूह. २ निष्फल, व्यर्थ. ३ युद्धांत पराक्रम. ४ मेघसमूहाला. ५ हिसकलें. ६ बैलाला. ७ वीरसमूह.

८ भरला, शोभला. ९ कावेनें. १० आकाश.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

कुंभ पडतांचि रणीं। निकुंभ चालिला कोपोनी। सुग्रीवा जाळिलें नयनीं। क्रोधोन्मार्दीं[1] अवलोकी ॥ २ ॥ मागें बहुतां रणांगणीं। जेणें केलिया संग्रामश्रेणी। जो दाटुगा अरिदळणीं। तो परिघ घेवोनि चालिला ॥ ३ ॥ परिघमाथां पंचपांकोळी[2] । दृढ धरिला पंचांगुळीं। निकुंभ वीर महाबळी। घेऊन करतळीं चालिला ॥ ४ ॥ मुकुटकुंडलें पदक कंठीं। बाहुभूषणें सुगंध उटी। अंगत्राण[3] लखलखाटी। परिघ मुष्टीं डुलत ॥ ५ ॥ परिघ साधन प्रत्यावृत्ती। अमरावती अलकावती। वसतां हातीं वीट पावती। भ्रमणावर्ती पाडिल्या ॥ ६ ॥ भ्रमे गंधर्वांचें नगर। सचंद्र तारा ग्रह समग्र। परिभ्रमतां परिघाग्र। काळचक्र परिभ्रमे ॥ ७ ॥ निकुंभाअंगीं प्रबळ बळ। परिघ साधोनि अति कुशळ। भ्रमत भासे नभोमंडळ। भासे भूतळ परिभ्रमतें ॥ ८ ॥ परिघाच्या भ्रमणद्वारा। छेदिलें वृक्षशिळाशिखरां। पुढें रिघवेना वानरां। परिघधारामहामारें ॥ ९ ॥ भंवता परिघाचा आवर्त। न चले वानरांचा पुरुषार्थ। कपिप्रताप गेला व्यर्थ। संग्रामार्थ चालेना ॥ १० ॥ वानर होतां लज्जान्वित। देखोनि आला हनुमंत। पहावया निकुंभाचा पुरुषार्थ। संग्रामीं येत संमुख ॥ ११ ॥ हनुमान म्हणे निकुंभवीरा। तुझ्या परिघाचा थोर दरारा। आधीं मज मारीं वानरा। मग पुढारां संग्राम ॥ १२ ॥ मारिले सुर नर समस्त। दैत्यदानवां केला घात। मज मारिल्या हनुमंत। तुझा पुरुषार्थ कळेल ॥ १३ ॥ मागील बडिवाराचे बोल। आज मी करीन तुझे फोल। पाहूं पां किती तुझें बळ। परिघें प्रबळ हाण मज ॥ १४ ॥ ऐकोनि हनुमंताच्या उत्तरा। दांत खावोनि करकरां। परिघ भोंवंडोनि गरगरां। मारूं वानरा धांवला ॥ १५ ॥ परिघ गाळींव लोहान्वित[4] । सुवर्णबंदी रत्नांकित। पाचपिरोजीं लखलखित। सिंदूरार्चित नरमांसें ॥ १६ ॥ निकुंभें परिघ घेवोनि करीं। भोंवंडोनि चक्राकारी। हाणितां हनुमंताचे उरावरी। शतसहस्रीं भंगला ॥ १७ ॥ वज्रदेही कपि बळकट। लागतां परिघ झाला पीठ। निकुंभ करी कटकट। म्हणे फटफट हनुमंत ॥ १८ ॥ तुझे अंगीं पोंचट बळ। घाव हाणिसी तो पोकळ। परिघ जैसा एरंड सरळ। गेला तत्काळ मोडूनी ॥ १९ ॥ पुढां तिखट मागें पोंचट। तैसे तुझे बोल फळकट। वृथा संग्रामीं करिसी कष्ट। आजि तूं स्पष्ट मरसील ॥ २० ॥ कंप न येचि धराधरा[5]। आकाश कांपेना थरथरां। तेंवी मज हनुमंता वीरा। नाहीं भेदरा परिघाचा ॥ २१ ॥ गज हाणितां फुलेंसीं। तैसा परिघ हनुमंतासी। नाहीं मूर्च्छा ना कासाविसी। रणाभिनिवेशीं गर्जत ॥ २२ ॥ जेंवी गगनीं उल्कापातें[6]। तेंवी परिघखंडें समस्त। उडोनि पडलीं धगधगीत। लखलखित धरेवरी[7] ॥ २३ ॥ तुझा घेतां परिघघात। तेणें मी झालों रिणाईत। उतराई व्हाया येत। मुष्टिघात साहें माझा ॥ २४ ॥ निकुंभाचा परिघघात। हनुमंतें केला व्यर्थ। त्यासी हाणावया मुष्टिघात। जाला उदित वानर ॥ २५ ॥ पंचांगुळीं अंगुष्ठनेटीं। दृढ वळोनि वज्रमुष्टी। निकुंभा हाणितां नेटपाटीं। पाडिला सृष्टीं धुकधुकित ॥ २६ ॥ धन्य कपीची आंगवण। फोडोनियां अंगत्राण। देहींचें चर्म भेदून जाण। मुष्टि दारुण लागली ॥ २७ ॥ मुष्टि हाणितां गोळांगुळा[8]। राक्षसहृदयीं निघती ज्वाळा। प्रतापतेजाचा उमाळा। जेंवी अंतराळां[9] महाविजु ॥ २८ ॥ ऐसा हनुमंतें आपण। निकुंभ पाडिला जाण। तरी त्यासी न ये मरण। आंगवण सांडीना ॥ २९ ॥ हनुमंतें हाणोनि मुष्टिघात। निकुंभ पाडिला मूर्च्छित। पडिला तो जांभया देत। नव्हे प्राणान्त तयाचा ॥ ३० ॥ पडल्या पडल्या रणाआंत। राक्षस स्वयें भ्रमरहित। होवोनि तो सावचित्त। धरी हनुमंत कवळोनि ॥ ३१ ॥ निमाला मानूनि निश्चित। हनुमंतें टाकिला उपेक्षित। राक्षस होवोनि सावचित्त। धरी हनुमंत कवळोनी ॥ ३२ ॥ धरिला मानूनि हनुमंत। उल्हास राक्षससैन्यांत। एक जावोनि लंकेआंत। हरिखें[10] सांगत लंकेशा ॥ ३३ ॥ बहुतां प्रकारांचा वैरी। हनुमान धरिला युद्धामाझारी। ऐसें सांगतां निशाचरीं। दशशिरीं अति धाक ॥ ३४ ॥ जरी धरिला हनुमंत। तरी त्याचा न करवे घात। जरी आणिला लंकेआंत। करील आकांत राक्षसां ॥ ३५ ॥ मागें धरिला ब्रह्मपाशीं।

१ क्रोधाच्या आवेशानें. २ पांच पाकळ्या. ३ कवच. ४ लोखंडाचा. ५ शेषाला, पर्वताला. ६ तारे पडणें. ७ पृथ्वीवर. ८ वानरानें. ९ आकाशांत. १० आनंदानें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

तैं न मारवेचि आम्हांसी । मारोनियां राक्षसांसी । जाळून लंकेसी प्रतापें गेला ॥ ३६ ॥ कपि न धरवे संग्रामांत । ऐसें मानी लंकानाथ । येरीकडे पैं हनुमंत । करी घात निकुंभाचा ॥ ३७ ॥ निकुंभें धरितां हनुमंतासी । तोही मुष्टि हाणी त्यासी । मिठी न सोडून मारुतीसी । पडे तेणेंसीं रणभूमीं ॥ ३८ ॥ न सुटे निकुंभाची मिठी । हनुमान पडल्या पडल्या लोटी । चेपितां राक्षसाची घांटी । अति संकटीं सोडिला ॥ ३९ ॥ स्वयें सोडोनि ऐसियापरी । हनुमान उडोनि ३अंबरीं । उडी घातली निकुंभावरी । संग्राम४गजरीं गर्जोन ॥ ४० ॥

हनूमानुत्पपाताशु निकुंभं मारुतात्मजः ।
समुत्पत्य च वेगेन निपपातास्य वक्षसि ॥ ५ ॥
परिगृह्य च बाहुभ्यां परिवृत्य शिरोधराम् ।
अपातयत्तस्य शिरो भैरवं नदतो महत् ॥ ६ ॥
अथ निनदति सादिते निकुंभे
पवनसुतेन रणे बभूव युद्धम् ।
दशरथसुतराक्षसेंद्रसूनो-
र्भृशतरमागतरोषयोः सुभीमम् ॥ ७ ॥

हनुमंतें गिरागजरीं । उडी घालोनि निकुंभावरी । दोन्ही बाहु मुरडोनि करीं । शिर नखाग्रीं खुडियेलें ॥ ४१ ॥ छेदोनि निकुंभाचें शिर । रामनामाचा गजर । हनुमंतें केला भुभुःकार । गर्जती वानर हरिनामें ॥ ४२ ॥ हनुमंतें बळा५नुबंधें । निकुंभ मारिला महायुद्धें । वानर नाचती आनंदें । जयजयशब्दें गर्जोनि ॥ ४३ ॥ निकुंभ मारिला पराक्रमें । हें देखोनियां श्रीरामें । कोपा चढला क्षात्रधर्मे । पुरुषानुक्रमें बोलत ॥ ४४ ॥ लहान सहान मारितां येथ । युद्ध नव्हे पैं समस्त । मारावया लंकानाथ । धनुष्या हात घातला ॥ ४५ ॥ निर्दाळावया रावण । आलें श्रीरामा स्फुरण । बाहु थरकती संपूर्ण । धनुष्यबाण सज्जूनी ॥ ४६ ॥ रावण मारावया कडाडीं । काढोनि धनुष्याची वोढी । श्रीरामें घालितां उडी । आले तांतडीं त्रिवर्गे ॥ ४७ ॥ सुग्रीव बिभीषण हनुमंत । तिघीं जणीं श्रीरघुनाथ । निववोनी कोप केला शांत । सभा स्वस्थ बैसली ॥ ४८ ॥

व्यपेते तु जीवे निकुंभस्य हृष्टा
विनेदुः प्लवंगा दिशः सस्वनुश्च ।
चचालेव चोर्वी पफालेव सा द्यौ-
र्बलं राक्षसानां भयं वा विवेश ॥ ८ ॥

निकुंभ देखोनि निर्जीव । करोनि रामनामाचा रव । हरिखें नाचती वानर सर्व । केलें अपूर्व हनुमंतें ॥ ४९ ॥ हनुमंताची आंगवण । देखोनि पृथ्वी कंपायमान । स्वर्गीं धाकती सुरगण । भय संपूर्ण राक्षसां ॥ ५० ॥ देखोनि हनुमंताची ख्याती । राक्षस चळवळ कांपती । चळीं कांपे लंकापती । रणीं मारुति नाटोपे ॥ ५१ ॥ विजयाच्या निजगजरीं । वानर गर्जती नामेंकरीं । नाम कोंदलें चराचरीं । दशदिशांमाझारीं हरिनाम ॥ ५२ ॥ निकुंभाच्या बळाची थोरी । ज्यासी कांपिजे सुरासुरीं । तोही मारिला निर्धारीं । क्षणामाझारी हनुमंतें ॥ ५३ ॥ हनुमंतें बळें अद्भुत । केला निकुंभाचा घात । पुढील कथावृत्तान्त । श्रोतां सावध परिसिजे ॥ ५४ ॥ निकुंभ पडतांचि रणीं । राक्षसां जाली महापळणी । पळोनि गेले लंकाभुवनीं । घायवं८ट रणीं कुंथत ॥ ५५ ॥ कुंभ निकुंभ दोघे जण । कपींनीं मारिले करोनि रण । तें ऐकोनि रावण । दुःख दारुण पावला ॥ ५६ ॥ आजानुबाहु विशालाक्ष । वीरपुत्र जो कां मकराक्ष । संग्रामीं परम दक्ष । विपक्ष१०पक्षच्छेदक ॥ ५७ ॥ त्यासी पाचारोनि रावण । गुह्य सांगे स्वयें आपण । रणीं मारावे रामलक्ष्मण । वानरगणसमवेत ॥ ५८ ॥ धरोनि पुरुषार्थाचें बळ । रामलक्ष्मण माझे शल्यें११ । तें त्वां करावें निःशल्य । वानरदळ दमूनी ॥ ५९ ॥ पितृघातक मुख्य वैरी । त्यासी तूं साधोनियां मारीं । तुझ्या पुरुषार्थाची थोरी । सुरासुरीं कांपिजे ॥ ६० ॥ ऐसें बोलोनि दशानन । स्वयें सांडून सिंहासन । मकराक्षासी आपण । गौरवी रावण युद्धार्थीं ॥ ६१ ॥ दिव्य गंध सुमन१२माळा । मुकुट कुंडलें कटिमेखळा ।

१ दुसरीकडे. २ गळा. ३ आकाशांत ४ रणगर्जना करून. ५ बळाच्या जोरानें. ६ त्वरेनें. ७ तिघे जण. ८ ध्वनि, गजर. ९ जखमी. १० शत्रुपक्षाचा नाशक. ११ दुःखदाते. १२ पुष्पमाळा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

अंगत्राण पदक गळां। मुक्ताफळांसमवेत ॥ ६२ ॥ ऐकोनि रावणाचें वचन । शूर अभिमानी खर-नंदन । म्हणे मारोनि रामलक्ष्मण। विशल्य करीन लंकेशा ॥ ६३ ॥ नमस्कारोनि रावणा । त्यासी करोनि प्रदक्षिणा । मकराक्षें केली गर्जना । शीघ्र रथ आणा सैन्येंसीं ॥ ६४ ॥ रामलक्ष्मण मनुष्य-मात्र । मनुष्य आमुचा नित्य आहार । वानर ते पालेखाईर । मारीन समग्र रणमारें ॥ ६५ ॥ मकराक्षआज्ञा समर्थ । सैन्येंसीं आणिला रथ । प्रदक्षिणा करोनि तेथ । रथीं बैसत साटोपें ॥ ६६ ॥ स्वयें सारथियासी सांगत । जेथें आहे रघुनाथ । तेथवरी जाऊं दे रथ । संग्रामार्थ तेणेंसीं ॥ ६७ ॥ लहानसहानासी हात । नाहीं घालणें रणाआंत । स्वयें निर्वटीन रघुनाथ। निश्चितार्थ हा माझा ॥ ६८ ॥ राक्षसांप्रती गर्जोन । मकराक्ष सांगे आपण । रणीं मारावे रामलक्ष्मण । स्वयें रावण मज सांगे ॥ ६९ ॥ आजी रणीं आपण । वधीन रामलक्ष्मण । सुग्री-वातें निर्दळीन । वानरसैन्यसमवेत ॥ ७० ॥ मकराक्षाचें सबळ सैन्य । विकट दाढा विक्राळ वदन । एका अंगीं रोम दारुण । जैसे बाण सतेज ॥ ७१ ॥ व्याघ्रमुख तरसमुख । वडवामुख तगरमुखें[१] । राक्षससैन्य अनेक । भयानक गडगर्जे ॥ ७२ ॥ मत्त वृषभाऐसे डरकत । मत्त गजाऐसे गडगर्जत । राक्षस मिळाले असंख्यात । मकराक्ष तेथ मुख्य धूर ॥ ७३ ॥ घाव घातला निशाणा । शंख भेरी विकट विराणां[३] । दुंदुभि गाजती दणदणां । विक्राळ गर्जना वीरांची ॥ ७४ ॥ ऐसा वीरांचा गडगजर । चालतां मकराक्षाचा संभार[४] । निष्ठेोनि सारथ्याचा कर । आसूड सत्वर तळीं पडला ॥ ७५ ॥ वीरवीरांची आरोळी । सैन्य चालतां गजदळी । निष्ठोनि सारथ्याकरतळीं । आसूड तळीं पडों सरला ॥ ७६ ॥ वेगें काढितां आसुडा । रथातळीं झाला रगडा । अश्व चालतां पुढां । चरणांचीं उबडा पडती मेटें ॥ ७७ ॥ वारुवांची क्षीण शक्ती । समभूमीं मेटें वळती । अवघे अडखळोनी पडती । खुंटली गती रथाची ॥ ७८ ॥ उठवोनि अश्वसमाज । रथ करूं जातां सज्ज । रथाचा मोडोनि पडिला ध्वज । जेंवी कां वीज लखलखित ॥ ७९ ॥ प्रतिकूळ वायु खवळला बळी । डोळा उघडितां रिघे धूळी । जो तो दोन्ही डोळे चोळी । अश्रूंतें गाळी गजाश्व ॥ ८० ॥ करीत वाजंत्रांचा गजर । येतां मकरा-क्षाचा भार । तो देखोनि वानरवीर । युद्धा सत्वर मिसळले ॥ ८१ ॥ ऐसे देखोनि अपशकुन । मकराक्ष सांडी उपेक्षून । जेथें उभे रामलक्ष्मण । तेथें आपण शीघ्र आला ॥ ८२ ॥ उडउडों पैं वानर । झांबडती[६] राक्षसंभार[७] । तैसेच क्षोभती निशाचर । रणीं वानर मर्दिती ॥ ८३ ॥ रणीं खवळला वेताळ । वानरां निशाचरां प्रबळ । रोमहर्षें[८] युद्ध तुंबळ । हलकल्लोळ राक्षसां ॥ ८४ ॥ शूळ पट्टिश विंधिती बाण । हाणिती शिळा द्रुम पाषाण । फोडोनियां अंगत्राणं[९] । धनुष्यबाण मोडिती ॥ ८५ ॥ जैसे दानवांसीं सुरवर । रणीं भिडती अति दुर्धर । तैसेचि वानर आणि निशाचर । घोरांदर मांडिलें ॥ ८६ ॥ मोडिलें देखोनि निशाचरसैन्य । मकराक्षें वाहोनियां[१०] गुणं । रणीं त्रासिले वानरगण । सपिच्छ बाण भेदूनी ॥ ८७ ॥ सपिच्छी खडतरतां बाण । रणीं त्रासिले वानरगण । श्रीरामापाशीं अवघे जण । आले पळोन अति भीत ॥ ८८ ॥ श्रीराम कृपाळू संपूर्ण । निवारोनी राक्षसबाण । आश्वासोनि वानरगण । अभयदान दीधलें ॥ ८९ ॥

> वारितान्राक्षसान्दृष्ट्वा मकराक्षो निशाचरः ।
> क्रोधानलसमाविष्टो वचनं चेदमब्रवीत् ॥ ९ ॥
> क्वासौ रामः सुदुर्बुद्धिर्येन मे निहतः पिता ।
> जनस्थानगतः शूरः सानुजः सपरिच्छदः ॥ १० ॥

आश्वासोनी वानरगण । संत्रासितां राक्षस-सैन्य । तें मकराक्षें देखोन । रागें आपण जल्पत ॥ ९० ॥ कोण तो राम कैसा येथें । जेणें जिणोनी जनस्थानातें । मारिलें माझिया पितयातें । बंधूसहित ससैन्य ॥ ९१ ॥ ते तुझी संग्राम-ख्याती । आजी मी आणीन समाप्ती । तुम्ही बापुडीं मनुष्यें किती । माझे शरघातीं उरावया ॥ ९२ ॥ जनस्थानीं मी नव्हतों तेथें । म्हणोनि

१ मारीन. २ तगरासारख्या तोंडाचें. ३ नगारे. ४ सेनासमूह. ५ घोड्यांची. ६ झोंबून झुंजूं लागले. ७ राक्षसांचें सैन्य. ८ अंगावर रोमांच येतील असें. ९ कवच. १० दोरी चढवून.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

पावलेती यशातें। आतां जाणवेल येथें। संग्रामार्थ पुरुषार्थी ॥ ९३ ॥ पुरुषार्थान्वियां प्रौढी। मारीन रामलक्ष्मणजोडी। वानरांची करीन झोडी। तीं तंव बापुडीं वनचरें ॥ ९४ ॥

अद्य गंतास्मि वैरस्य पारं ते रजनीचर।
सुहृदां चैव सर्वेषां निहतानां रणाजिरे ॥ ११ ॥
हत्वा रामं सुदुर्बुद्धिं लक्ष्मणं च नराधमम्।
तयोः शोणितनिस्यंदैः करिष्ये सलिलक्रियाम् ॥१२॥
एवमुक्त्वा महाबाहुर्युद्धेषु रजनीचरः।
रथेनांबुदघोषेण ययौ रामदिदृक्षया ॥ १३ ॥
आहूयमानो बहुभिर्वानरैर्बलशालिभिः।
युद्धाय स महातेजा रामादन्यं न चेच्छति ॥ १४ ॥

रणीं मारिले माझे पितर। त्या वैराचें परपार। आजि मी पावेन साचार। रामसौमित्र मारूनी ॥ ९५ ॥ मारोनि दोघे महाबळी। त्यांच्या अशुद्धाची[१] अंजुळी। पितरां देईन तिळांजळी। तेचि काळीं उत्तीर्ण ॥ ९६ ॥ या दोघांचें घेवोनि रक्त। रणीं मारिले सुहृद आप्त। ते ते तर्पीन समस्त। पितृकार्यार्थी उत्तीर्णत्वें[२] ॥ ९७ ॥ प्राशावें लक्ष्मणाचें रक्त। ऐसा शूर्पणखेचा मनोरथ। तिचाही पुरवीन अर्थ। दोघे रणांत मारूनी ॥ ९८ ॥ ऐसा बोलोनि बंडिवार[३]। युद्धालागीं खरपुत्र। मेघगडगर्जनें रँहंवर[४]। पेलोनि सत्वर संग्रामा आला ॥ ९९ ॥ वानरवीर अति आवेशीं। मकराक्षा पाचारिती युद्धासी। परी उपेक्षूनि त्यां समस्तांसी। श्रीरामा गिंवसी संग्रामा ॥ १०० ॥ श्रीरामावांचून आणिकांसी। नाहीं करणें संग्रामासी। ऐशा करोनि नेमासी। श्रीरामा गिंवसी[५] साटोपें ॥ १ ॥ वीर धीर श्रीरघुनाथ। ऐसा पवाडा अति विख्यात। तो कां लपतो वानरांत। संग्रामार्थ निघेना ॥ २ ॥ श्रीरामासीं रणकल्लोळ। करावया मकराक्षाचें बळ। डावलोनि[६] वानरदळ। आला तत्काळ संग्रामा ॥ ३ ॥

दृष्ट्वा रामं सुदूरस्थं लक्ष्मणं च महारथम्।
सेषुणा पाणिनाहत्य ततो वचनमब्रवीत् ॥ १५ ॥
तिष्ठ राम मया सार्धं द्वंद्वयुद्धं प्रयच्छ मे।
त्याजयिष्यामि ते प्राणान्धनुर्मुक्तैः शितैः शरैः ॥ १६ ॥
यत्तदा दंडकारण्ये पितरं हतवान्मम।
दह्यंते भृशमंगानि दुरात्मन्मम राघव ॥ १७ ॥
दिष्ट्यासि गोचरं राम मम त्वं प्राप्तवानसि।
कांक्षितोऽसि क्षुधार्तस्य सिंहस्येवेतरो मृगः ॥ १८ ॥

ऐसा विचरतां रणाआंत। दूरी देखिला रघुनाथ। तंव मकराक्ष बाणहस्त। असे पाचारीत कराग्रें ॥ ४ ॥ ऐकें श्रीरामा सावध। मजसी द्यावें द्वंद्वयुद्ध। आम्हां तुम्हां युद्धसंबंध। इतरीं विनोद पहावा ॥ ५ ॥ दोघांच्या संग्रामांत। जो तिसरा घालील हात। त्याचा तेथेंच करावा घात। हा निश्चितार्थ करावा ॥ ६ ॥ संगें नको वानरगण। कायसें बापुडें लक्ष्मण। तुजसी करावें रणांगण। संकल्प पूर्ण हा माझा ॥ ७ ॥ त्रिशिरा मारिला खर दूषण। त्या द्वंद्वाचा संताप पूर्ण। तुझा घ्यावया प्राण। रणांगण वांछितों[७] ॥ ८ ॥ हो कां माझे अदृष्टपूर्तें। भाग्यें भेटलासी तूं येथें। जैंवी क्षुधिता सिंहातें। भेटती अवचितें लांडगे मृग ॥ ९ ॥ क्षुद्र मृग सिंहासी ग्रास। तैसा मी तुझा करीन घांस। कायसा संग्रामविलास। श्रीरामपशु भेटला ॥ ११० ॥ जरी असेल आंगवण। तरी मजसीं करावें रण। त्याही युद्धाचें लक्षण। सावधान अवधारीं ॥ ११ ॥ तूं श्रीराम प्रतापें प्रबळ। मी मकराक्ष संग्रामशीळ। माझा तुझा रणकल्लोळ। लोक सकळ देखोत ॥ १२ ॥ शस्त्रास्त्रीं धनुष्यबाणीं। शूलमुद्गलगदापाणीं। अथवा मल्लविद्याविंदाणीं। बाहुप्रहरणीं भिडूं दोघे ॥ १३ ॥ जें जें अभ्यासिलें रघुपती। मजसीं भिडावें त्वां व्युत्पत्तीं। श्रीरामाची यशःकीर्ती। करीन समाप्ती संग्रामीं ॥ १४ ॥ श्रीराम नामें ब्रीदाइत। सकळकुळीं कुळ प्रस्तुत। मज द्यावा द्वंद्वयुद्धार्थ। कळेल पुरुषार्थ दोघांचा ॥ १५ ॥ तुझिया पुरुषार्थाची झडती। घेवों आलों मी निश्चितीं। वानरांमाजी लपसी किती। निंद्य युद्धार्थी श्रीरामा ॥ १६ ॥ ऐकोनि मकराक्षाचें वचन। श्रीराम बोले हास्यवदन। ज्याचे ठायीं बहुत जल्पन। आंगवण त्या नाहीं ॥ १७ ॥ महाशूराची नवलगती। युद्धीं करोनि दाविती ख्याती। वृथा जे कां बडबडती[८]। ते तंव निश्चितीं तोंडभांड ॥ १८ ॥ सैरा

१ रक्ताची. २ उतराई व्हावें म्हणून. ३ मोठेपणा. ४ रथ. ५ शोधूं लागला. ६ टाकून, सोडून. ७ कौशल्यानें. ८ नुसती बडबड करणारे.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

बडबड करिती भांड । त्यांचे बोल भंडउभंड । तैसेंचि जाण तुझें तोंड । अति वितंड जल्पसी ॥ १९ ॥ बोलाचिया बळावारी । कोणीं जिंतिला नाहीं वैरी । तूं तंव निर्लज्ज संसारीं । भांडाच्या परी जल्पसी ॥ १२० ॥ जरी असेल आंगवण । तरी करोनि दावीं रण । बडबडेचें फळ कोण । सीतारमण बोलिला ॥ २१ ॥ नाहीं बळ नाहीं पुरुषार्थ । तोंडभांड जल्पसी येथ । ऐसें बोलतां रघुनाथ । पोळला जीवांत मकराक्ष ॥ २२ ॥ बोलाचिया बळावारी । कोणीं जिंतिला नाहीं वैरी । येणेंही बोलें जिव्हारीं । पोळला भारी मकराक्ष ॥ २३ ॥ धनुष्या वाहोनियां गुण । शत सहस्र अमित बाण । श्रीरामावरी क्षोभोन । वर्षे आपण मकराक्ष ॥ २४ ॥ सुवर्णपुंखी मनोहर । रत्नांकित अति गंभीर । मकराक्षाचे तीव्र शर । रामें समग्र छेदिले ॥ २५ ॥ बद्धगोधांगुळित्राण[1] । ज्याघोष[2] तळघोष जाण । तेणें नादें कोंदलें गगन । त्रिभुवन दुमदुमलें ॥ २६ ॥ मकराक्ष आणि श्रीरामचंद्र । युद्धीं मिसळले महाशूर । कौतुक पहावया सुरवर । विमानीं समग्र दाटले ॥ २७ ॥ देव दानव ऋषीश्वर । महोरगें[3] नर किन्नर । सिद्ध गंधर्व विद्याधर । विमानीं अंबर कोंदलें ॥ २८ ॥ मकराक्ष वर्षे शर । बाण वर्षे श्रीरामचंद्र । तेणें लोपले रवि चंद्र । दिशा समग्र कोंदल्या ॥ २९ ॥ बाणीं खिळोनि सांडिली धरा । बाणीं खिळियेला वारा । बाणीं व्यापिलें अंबरा । दिशा समग्र कोंदल्या ॥ १३० ॥ निशाचर विंधी जे जे शर । ते ते तोडी रामचंद्र । श्रीरामाचे शर दुर्धर । निशाचर स्वयें छेदी ॥ ३१ ॥ छेदितां बाणीं बाण । कोपा चढला रघुनंदन । अनिवार शर दारुण । विंधी आपण साटोपें ॥ ३२ ॥

ततः क्रुद्धो महाबाहुर्धनुश्चिच्छेद संयुगे ।
अष्टाभिरथ नाराचैः सूतं विव्याध राघवः ॥ १९ ॥
छित्वा शरै रथं रामो हत्वा चाश्वानपोथयत् ।
विरथो वसुधां प्राप्य मकराक्षो निशाचरः ॥ २० ॥
अधिकं क्रोधसंरब्धः शूलं जग्राह पाणिना ।
त्रासयन्सर्वभूतानां युगांताग्निसमप्रभम् ॥ २१ ॥
विभ्राम्याथ च तच्छूलं प्रज्वलंतं निशाचरः ।
क्रोधाच्च प्राहिणोत्तस्मै राघवाय महात्मने ॥ २२ ॥

मकराक्षें आपण । निवारितां बाणें बाण । श्रीरामें धनुष्य छेदोनि आपण । पाडिलें जाण क्षितितळीं[4] ॥ ३३ ॥ सर्वेचि विंधोनियां बाण । सारथ्याचा घेतला प्राण । चारी वारु मारिले जाण । श्रीरामें क्षोभोन संग्रामीं ॥ ३४ ॥ हताश्व हतसारथी । मकराक्ष जाला विरथी । सक्रोध शूळ घेवोनि हातीं । श्रीरामाप्रती धांविन्नला ॥ ३५ ॥ मकराक्षाचे निर्वाणभल्ल[5] । शूळहस्तीं वरद शूळ । धगधगीत अति प्रबळ । अग्निकल्लोळतेजस्वी ॥ ३६ ॥ जैंवी कां भूतांसी घातक । दंडहस्तें धांवे अंतक । तैंवी शूळहस्तें मकराक्ष । रामासंमुख धांविन्नला ॥ ३७ ॥ ज्वाळा निघती नेत्रद्वारा । दांत खातसे करकरां । शूळ फिरजोनी[6] गरगरां । श्रीरामचंद्रा हाणितला ॥ ३८ ॥ शूळ येतांचि कडाडीं । सर्व भूतां पडे झांपडी । स्वर्गी सुरवरें झालीं वेडीं । रामें निर्वडीं विंधिला ॥३९॥

आपततं ज्वलंत तु खरपुत्रकराच्च्युतम् ।
बाणैश्चतुर्भिराकाशे शूलं चिच्छेद राघवः ॥२३ ॥
स च्छिन्नो बहुधा शूलो दिव्यहाटकचित्रितः ।
व्यशीर्यत महोल्केव रामबाणार्दितो भुवि ॥ २४ ॥
तं दृष्ट्वा विफलं शूलं मकराक्षो निशाचरः ।
मुष्टिमाधाय काकुत्स्थं तिष्ठ तिष्ठेति चाब्रवीत् ॥ २५ ॥
स तं दृष्ट्वा पतंतं तु प्रहस्य रघुनंदनः ।
पावकास्त्रं ततो रामः संदधे स्वशरासने ॥ २६ ॥
तेनास्त्रेण हतं रक्षः श्रीरामेण महात्मना ।
संभिन्नहृदयस्तत्र पपात च ममार च ॥ २७ ॥

शूळ येतां धगधगित । राम रणयोद्धा सावचित्त । तीं बाणीं आकाशांत । छेदूनि निश्चित पाडिला ॥ १४० ॥ शिववरद शूळशक्ती । श्रीराम शिवाची ध्येयमूर्ती । देखोनि पळाली ते परती । शूळ या युक्तीं छेदिला ॥ ४१ ॥ बाप धनुर्वाडा श्रीरघुनाथ । जैसा गगनीं उल्कापात[7] । तैसा शूळ धगधगित । रणाआंत पाडिला ॥ ४२ ॥ शूळ जातांचि निष्फळ । मकराक्ष करी तळमळ ।

१ हाताला घट्टा न पडावा· म्हणून बोटांवर आच्छादन घालून. २ धनुष्याच्या दोरीचा टणत्कार. ३ मोठे सर्प.

४ पृथ्वीवर. ५ भल्ल=भाले. ६ फिरवून, पेलून. ७ तारे पडणें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

श्रीरामासीं न चले बळ । सिद्धि[1] सेंळ न पैवेचि[2] ॥ ४३ ॥ म्हणे श्रीरामा राहें राहें । माझा मुष्टि-घाय साहें साहें । म्हणूनि उभवोनि[3] बाहे[4] । आला लवलाहें राक्षस ॥ ४४ ॥ मकराक्ष येतां दारुण । श्रीरामें सज्जिला अग्निबाण । हृदयीं विंधितांचि जाण । पडे निष्प्राण क्षितितळीं ॥ ४५ ॥ बोंब सुटली राक्षसदळीं । वानरीं पिटिली टाळी । मकराक्ष महाबळी । रामें तत्काळीं मारिला ॥४६॥

दृष्ट्वा ते राक्षसाः सर्वे मकराक्षस्य पातनम् ।
लंकामेव प्रधावंति रामबाणभयार्दिताः ॥ २८ ॥

श्रीरामें निमिषार्धांत । मकराक्षाचा केला घात । राक्षससेना भयभीत । लंकेआंत पळाली ॥ ४७ ॥ दुर्धर मारिला निशाचर । विजयी जाला श्रीरघुवीर । वानर करिती जयजयकार । श्रीरामचंद्र निजविजयी ॥ ४८ ॥ एका जनार्दना शरण । झालें मकराक्षाचें निर्दळण । पुढील गोड निरूपण । रामायण अति रम्य ॥ १४९ ॥ स्वस्ति श्रीभावार्थ-रामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां मकराक्षवधो नाम पंचत्रिंशत्तमोऽध्यायः ॥ ३५ ॥ ओंव्या ॥ १४९ ॥ श्लोक ॥ २८ ॥

अध्याय छत्तिसावा

॥श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः॥ करोनि मकराक्षाचा घात । विजयी बैसला श्रीरघुनाथ । येरीकडे इंद्रजित । क्रोधान्वित तळमळी ॥ १ ॥

निहतं मकराक्षं तं दृष्ट्वा रामेण संयुगे ।
शक्रजित्सुमहाक्रुद्धो विवेश रणसंकटम् ॥ १ ॥

मकराक्ष मारिला महाकपटी । तें देखोनियां दृष्टीं । इंद्रजित पडिला रणसंकटीं । त्याची गोष्टी अनुवादे ॥ २ ॥ मारिले भरंवशाचे वीर । जे कां निधडे महाशूर । त्यांसी मारिती वानर । पालेखाइर पशुदेही ॥ ३ ॥ मारिला कुंभकर्ण महावीर । देवांतक नरांतक त्रिशिर । वधिला अतिकाय दुर्धर । महोदर महापार्श्व ॥ ४ ॥ प्रहस्त पावला रणीं मरण । कुंभ निकुंभ दोघे जण । मकराक्षाचा घेतला प्राण । विंधोन बाण श्रीरामें ॥ ५ ॥ भरंवशाचे वीर दारुण । ते ते पावले रणीं मरण । आलें राक्षसांचें निधन । काय आपण करावें ॥ ६ ॥ राखावया मकराक्षाची पाठी । मज धाडी दशकंठी । ते गोष्टी जाली उफराटी । तोही शेवटीं मारिला ॥ ७ ॥ शिणोन मारावे वानर । श्रीरामतीर्थें ते वनचर । अवघे उठती पालेखाइर । अति दुर्धर रणयोद्धे ॥ ८ ॥ मारिल्या राक्षसांच्या कोडी । न दिसती वानरांच्या करवंडी[5] । हे श्रीरामाची कृपा गाँढी[7] । प्राणान्तपार्डी संरक्षी ॥ ९ ॥ रामलक्ष्मण महाशूर । तैसेच निधडे वानर । आतुर्बळी हनुमान वीर । अति दुर्धर सर्वार्थी ॥ १० ॥ त्यासीं न चले आंगवण । काय करावें आपण । बळें करूं जातां रण । माझाही प्राण घेतील ॥ ११ ॥ यांसीं न चले पैं वरदार्थ । रावणपापें वरद व्यर्थ । आला राक्षसांसी अंत । रणीं रघुनाथ क्षोभला ॥ १२ ॥ परतोनि जातां लंकेआंत । मज कोपेल लंकानाथ । इंद्रजित चिंताक्रांत । असे चिंतित उपावो ॥ १३ ॥ राम लक्ष्मण हनुमंत । अंगद सुग्रीव जांबवंत । अवघियांचा होईल घात । तो कार्यार्थ साधीन ॥ १४ ॥

मेघनादस्तदा दृष्ट्वा भ्रातरौ रामलक्ष्मणौ ।
रणायाभ्युद्यतौ वीरौ जुहुवे पावकं तदा ॥ २ ॥
ततो रथमवस्थाप्य रावणी राक्षसैर्वृतः ।
सीतां मायामयीं कृत्वा तस्या वधमरोचयत् ॥ ३ ॥
सर्वेषां मोहनार्थाय बुद्धिं कृत्वा सुदुर्मतिः ।
हंतुं सीतां व्यवसितो वानराभिमुखो ययौ ॥ ४ ॥

श्रीराम आणि लक्ष्मण । दोघे उद्यत करावया रण । देखोनि इंद्रजित आपण । अभिचारयज्ञ आरंभी ॥ १५ ॥ इंद्रजित सदा कपटानुवृत्ती । स्वप्नींही नाहीं सुमती । मांवेची करोनि सीता सती । रणानुवृत्तीं मारीन ॥ १६ ॥ देखतांचि सीतेचें मरण । तत्काळ अवघे त्यजिती प्राण । श्रीराम आणि लक्ष्मण । वानरगण समस्त ॥ १७ ॥ मायिक सीतेचें दर्शन । तेंचि अवघ्यां परम मरण । ऐसें मानोनि दुर्जन । सीतार्थीं हवन आरंभी ॥ १८ ॥ ऐसिया हर्षाचिया स्थितीं । अभिचारहोम मंत्रोक्तीं । करितां न करवे सीता सती । न ये अभिव्यक्ती आकार ॥ १९ ॥ सीता

१ मंत्रादि सिद्धि. २ उपयोगीं पडली नाहीं. ३ उभारून. ४ बाहू. ५ शेवट. ६ प्रेतें. ७ मोठी. ८ जारणमारणाचा होम. ९ खोटी.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

नाकळे होमद्वारा । सीता नाकळे मंत्रतंत्रा । सीता नाकळे अभिचारा । निशाचरा अति चिंता ॥ २० ॥ जारण मारण उच्चाटण । मोहन अथवा स्तंभन । यांसी सीता नाकळे जाण । निर्वधन श्रीरामें ॥ २१ ॥ करितां श्रीरामनामस्मरण । पळे जारण मारण उच्चाटन । सीता चिच्छक्ति[1] आपण । मायाबंधन बाधेना ॥ २२ ॥ सबळबळें अंधकार । नव्हे सूर्यासी गोचर । तैसा मायिक वेव्हार । सीतेसमोर होऊं न शके ॥ २३ ॥ मायिक न करवे सीता । इंद्रजितासी परम चिंता । मारावया रघुनाथा । काय म्यां आतां करावें ॥ २४ ॥ शिववरद मज त्रिशुद्धी[2] । आभिचारिका करितां सिद्धी । आजिचा सुनाट[3] गेला विधी । पुसों बुद्धी सदाशिवा ॥ २५ ॥ इंद्रजित शिवसमेसी । स्वयें रडे उकसाबुकसीं । मिथ्यात्व आलें तुझ्या वरदासी । कोणापाशीं मी सांगूं ॥ २६ ॥ मायिक सीता यावया हाता । तुझ्या वरदोक्तें होम करितां । प्राप्त नव्हेचि सती सीता । आली मिथ्यता वरदासी ॥ २७ ॥ मायातीत श्रीराम सीता । तिशीं न चले अभिचारता । मायिक सीता न ये हाता । शिव सत्यता स्वयें वदला ॥ २८ ॥ ऐकोनि शिवाचें वचन । इंद्रजित करी रुदन । सीता न पावतां जाण । समाधान मज नव्हे ॥ २९ ॥ दृढ धरितां शिवाचे चरण । शिव बोलिला आपण । मायिक सीतेलागीं जाण । पार्वतीलागोन प्रार्थावें ॥ ३० ॥ छळावया रघुनाथा । पार्वती झाली मायिक सीता । तिचेनि वरदानें तत्त्वतां । मायिक सीता पावसी ॥ ३१ ॥ इंद्रजितें पार्वती प्रार्थितां । ते म्हणे म्यां छळावया रघुनाथा । मायिक जालें होतें सीता । तिच्याही घाता शिव चिंती ॥ ३२ ॥ पुढिलांचें करितां छळण । जो छळी तो पावे मरण । इंद्रजित मरावया जाण । मागे आपण मायिक सीता ॥ ३३ ॥ पार्वती म्हणे इंद्रजिता । विनवोनियां विश्वनाथा । मायिक मागतोसी सीता । मरणावस्था तुज आली ॥ ३४ ॥ मायिक न करवे श्रीरामकांता । मायिक न करवे गा सीता । माया न चले श्रीरघुनाथा । मायामर्दिता[4] श्रीराम ॥ ३५ ॥ मायिक सीतेच्या स्वरूपता । मी छाया धाडीन तत्त्वतां । तिच्या करितांचि घाता । इंद्रजिता मरशील ॥ ३६ ॥ कां मागसी मायिक सीता । अशोकवनीं आहे सीता । जाऊनि करीं तिच्या घाता । मग पुरुषार्थ कळेल ॥ ३७ ॥ मारितां अशोकवनाआंत । सीता करील भस्मान्त । ऐकोनि उमा[5] हांसत । धिक् पुरुषार्थ कपटत्वें ॥ ३८ ॥ मायिक सीतेचें मागणें । तूं बैसलासी मरणा धरणें । उमा क्षोभेंकरून म्हणे । जीवें प्राणें मरशील ॥ ३९ ॥ इंद्रजित म्हणे आपण । मज सर्वथा न ये मरण । निजमरणाचें लक्षण । स्वयें आपण अनुवादे ॥ ४० ॥ बारा वर्षें निराहारी । जो कां बाळब्रह्मचारी । ऐसा पुरुष नाहीं संसारीं । मी कैसेपरी मरेन ॥ ४१ ॥ ऐसें मानूनि निश्चयेंसीं । इंद्रजित येवोनि सैन्येंसीं । मायिक सीतेच्या मूर्तीसी । गडगजैंसीं काढिली ॥ ४२ ॥ दडदडां निशाणघोषीं । शंख भेरी गडगजैंसीं । सीता आणितां युद्धापासीं । वानरीं तिसी देखिलें ॥ ४३ ॥ जे कां पार्वतीवरदत्त । मायिक सीता रथीं रथस्थ । राक्षससेनापरिवारयुक्त । आणिली वधार्थ संग्रामा ॥ ४४ ॥ शिव सांगे वायूपासीं । गुह्य सांगावें हनुमंतासी । मारितां मायिक सीतेसी । कैवारासी न करावें ॥ ४५ ॥ देखतां सीतेचिया घाता । हनुमान करील अति अनर्था । मारोनि राक्षसां समस्तां । स्वयें सीता सोडवील ॥ ४६ ॥ वाल्मीकभाष्य अनागत[6] । सिद्धी पावावें समस्त । पार्वतीचा वरदार्थ । तोही गुह्यार्थ पाळावा ॥ ४७ ॥ ऐकोनि वायूचा वचनार्थ । शिववाक्य वंदी हनुमंत । पार्वतीचा वरदार्थ । प्रतिपाळीत मारुती ॥ ४८ ॥ करावया सीतेच्या घाता । रथीं वाहूनि[7] मायिक सीता । इंद्रजित होय आणिता । कपी देखती संग्रामीं ॥ ४९ ॥

एकवेणीधरां सीतां रक्षोहरणकर्शिताम् ।
परिक्लिष्टैकवसनां मलिनां हतमंडनाम् ॥ ५ ॥
रथरेणुसमादिग्धां भीतरूपां वराननाम् ।
रजोमलाभ्यामालिप्तैः सर्वगात्रैरवेक्षिताम् ॥ ६ ॥
ददर्श हनुमांस्तत्र सपंकामिव पद्मिनीम् ।
स मुहूर्तमिव ध्यात्वा सीतेयमिति वानरः ॥ ७ ॥
बभूव चिरदृष्टा हि तेन सा जनकात्मजा ॥ ८ ॥

१ ज्ञानशक्ति. २ खरोखर. ३ व्यर्थ. ४ मायेचा नाश करणारा. ५ पार्वती. ६ न आलेलें, पुढें होणारें. ७ रथांत घालून.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

इंद्रजिताच्या रथावरी । मायिकसीतासौभाग्यथोरी । भासतसे कवण्यापरी । जेंवी कां खरी जानकी ॥ ५० ॥ माथांचिया केशश्रेणी । जटाबंधन वळली वेणी । एकवस्त्र शय्या धरणी । दीनवदन जानकी ॥ ५१ ॥ न घे आस्तरणं प्राव-रॅण । न घे अभ्यंगमर्दन । तेणें सर्वांग पैं जाण । दिसे संपूर्ण मलदिग्ध ॥ ५२ ॥ न घे मंडण भूषण । न घे सुमन चंदन । न घे तृषार्थ जीवन । श्रीरामध्याननिष्ठ ॥ ५३ ॥ राक्षसीं आणितां रणाआंत । स्त्रीस्वभावें भयभीत । रथरजरेणूंनीं सर्वांग व्याप्त । दिसे भयभीत जानकी ॥ ५४ ॥ सीता देखोनि हनुमंत । सांडोनियां निजपुरुषार्थ । शिववाक्यें पैं ध्यानस्थ । दिसे तटस्थ पैं राहिला ॥ ५५ ॥

तां दीनां मलदिग्धांगीं रथस्थां प्रेक्ष्य जानकीम् ।
बाष्पपर्याकुलमुखो हनुमान्व्यथितोऽभवत् ॥ ९ ॥
कृत्वा विकोशं निस्त्रिंशं प्रजहास महास्वनः ।
तां प्रगृह्य स केशेषु रावणिर्जनकात्मजाम् ॥ १० ॥
क्रोशंतीं राम रामेति कृत्वा मायामयीं तदा ।
खङ्गरत्नमसिं गृह्य केशपक्षे परामृशत् ॥ ११ ॥

इंद्रजितहस्तगत । रथीं जानकी आक्रंदत । तीतें देखोनि हनुमंत । अश्रु स्रवत अति दुःखें ॥ ५६ ॥ सीतासतीचें हनन । हनुमंत स्वयें देखोन । अश्रुधारा स्रवती नयन । करी रुदन अति दुःखें ॥ ५७ ॥ देखोनि सीतेचा पैं घात । हनुमान करील अति अनर्थ । होता इंद्रजित धाकत । तेणें तो रडत देखिला ॥ ५८ ॥ रडतां देखोनि हनुमंता । केशीं धरोनियां सीता । इंद्रजित साटोपें गर्जता । इसी मी आतां मारीन ॥५९॥ हें तंव मुख्य अवलक्षण । इचे अंगीं अशुभ चिन्ह । इचें करितां पाणिग्रॅहण । रघुनंदन अति दुःखी ॥ ६० ॥ इच्या लग्नाचे माझारीं । परशुरामेंसीं झुंझारी । पडली श्रीरामाचिये शिरीं । भाग्यकरीं वांचला ॥ ६१ ॥ हे तंव समूळ करंटी । बैसोनि श्रीरामाचे पाटीं । अयोध्ये येतां उठाउठीं । घातला दिक्पटीं श्रीराम ॥ ६२ ॥ वना काढितां श्रीरघुनाथा । जीवें मारिलें दशरथा । मुख्य मूळ हे अनर्था । दुःखावस्था इचेनि ॥ ६३ ॥ करितां सीतेचें वरण । गेलें राज्याचें मंडण । सेवेलागोनि आपण । वनोवन हिंडवी ॥ ६४ ॥ हिंडवितां वनोवन । नाहीं अन्न रसपान । तृणशय्येचें शयन । अवलक्षण जानकी ही ॥ ६५ ॥ सीता निखळ दुःखराशी । दुःखी करावया श्रीरामासी । स्वयें आली वनवासासी । दुःख बहुतांसी दीधलें ॥ ६६ ॥ विराधें धरिलें वाटे येतां । दुःखी केला निजभर्ता । विराधें मारावें रघुनाथा । तोचि अवचिता निमाला ॥ ६७ ॥ सीता स्वरूपें निखळ पाप । सखा लक्ष्मण नित्य निष्पाप । त्यावरी घातला अभिशापॅ । दुःखरूप जानकी ॥६८॥ ऐसी अति अनर्थी सीता । सुखें पंचवटीं असतां । मृगामागें धाडोनि भर्ता । दुःखावस्था तिघांसी ॥ ६९ ॥ इचें देखतांचि मुख । लंकेशासी लागली भीक । इचे अभिलाषें दशमुख । परम दुःख पावला ॥ ७० ॥ इसी आणितां लंकेआंत । लंका जळाली समस्त । कुमर वीर कुंभकर्णान्त । महोदर प्रहस्त निमाले ॥ ७१ ॥ हे दुःखदायक महाआगी । हे सुँहृदबंधुसंगभंगी । हे मी मारीन रणरंगीं । खङ्ग सवेगीं उचलिलें ॥ ७२ ॥ काढोनि कोशाबाहेरां । पुसोनियां खङ्गधारा । मारावया सीता सुंदरा । निशाचरा आवेश ॥ ७३ ॥ पुरुषाचे समुष्टी हस्त । तें षड्रत्नी खङ्ग खचित । तेणें खङ्गेंसीं इंद्रजित । सीतेचा घात करूं आला ॥ ७४ ॥ रामनामें आक्रंदती । केशकलाप धरोनि हातीं । मारावया सीता सती । क्रोधानुवृत्ती इंद्रजित ॥ ७५ ॥

गृहीतां तां तदा दृष्ट्वा हनूमान्दैन्यमागतः ।
दुःखजं वारि नेत्राभ्यामसृजत्पवनात्मजः ॥ १२ ॥

शिवाज्ञा सांगे वायुपिता । मिथ्या मायामय सीता । इंद्रजित करितां घाता । तूं सर्वथा भिऊं नको ॥ ७६ ॥ जन्ममरणातीतॅ सीता । तिच्या कोण करील घाता । सीता मायिक मारितां । तूं अनर्था करूं नको ॥ ७७ ॥ मानून शिवाचें वचन । देखोनि सीतेचें हनन । हनुमान मिथ्या करी रुदन । मायिक लक्षण जाणूनी ॥ ७८ ॥ देखतां सीतेचिया घाता । हनुमान करिता अति आकांता । मारिता इंद्रजिता लंकानाथा । आणि समस्तां राक्षसां ॥ ७९ ॥ जाणोनि मायिक सीताज्ञान । पाळून

१ आंथरूण. २ पांघरूण. ३ विवाह. ४ लढाई. ५ सुदैवानें. ६ अपवाद, दोषारोप. ७ सुहृत्, बंधु इत्यादिकांचा विरह उत्पन्न करणारी. ८ तरवार. ९ जन्ममरणांवेगळी.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

शिवाचें वचन। हनुमान मिथ्या करी रुदन। स्रवती नयन अश्रुधारा ॥ ८० ॥ मुख्य शिवाचें वचन। सांगोनि गेला पिता पवन। तें हनुमंतें पाळून। मिथ्या रुदन करीतसे ॥ ८१ ॥

परिवार्य हनूमंतं प्रत्युवाचेंद्रजित्तदा।
सुग्रीवस्त्वं च रामश्च यन्निमित्तमिहागताः ॥ १३ ॥
तां हनिष्यामि वैदेहीमद्यैव तव पश्यतः।
इमां हत्वा ततो रामं लक्ष्मणं त्वां च वानर ॥ १४ ॥
सुग्रीवं च हनिष्यामि तं चानार्यं विभीषणम्।
तमेवमुक्त्वा रुदतीं सीतां मायामयीं ततः ॥ १५ ॥
शितधारेण खड्गेन निजघानेंद्रजित्स्वयम्।
यज्ञोपवीतमार्गेण छिन्ना तेन तपस्विनी ॥ १६ ॥

मारितां देखोनि सीता। हनुमान करील अति-आकांता। ऐसा इंद्रजित धाकत होता। तों कपि रडतां देखिला ॥ ८२ ॥ रडतां देखोनि हनुमंत। इंद्रजित जाला उल्लसित। रणरंगीं स्वयें गर्जत। निजपुरुषार्थ अनुवादे ॥८३॥ सीता सोडवणें हेत। शिळीं बांधोनियां सेत। लंके आला श्रीरघुनाथ। सुग्रीवयुक्त ससैन्य ॥ ८४ ॥ ते हे जनकदुहिता। सीता ओळख तूं हनुमंता। इच्या करितों मी घाता। तुजदेखतां संग्रामीं ॥ ८५ ॥ इसी मारितां जाण। आधीं तुझा घेईन प्राण। वृथा करूं नको रुदन। आलें निधन हनुमंता ॥ ८६ ॥ आधीं तुझा घेवोनि प्राण। मग मारीन रामलक्ष्मण। अंगद सुग्रीव राजे जाण। वानरगण वधीन ॥ ८७ ॥ बिभीषण आमचा चुलता। परी पेटला आमुच्या घाता। कैंचें साधुत्व त्याचे माथां। तोही मी आतां मारीन ॥ ८८ ॥ हनुमंतासी निर्भर्त्सून। इंद्रजित करितां गर्जन। शिववाक्य प्रतिपाळून। धरिलें मौन हनुमंतें ॥ ८९ ॥ इंद्र-जित मारितां मायिक सीता। तुवां न करावें पुरु-षार्था। सांगोनि गेला पवन पिता। तेंही तत्त्वतां प्रतिपाळी ॥ ९० ॥ निवान्त देखोनि हनुमंत। तंव तंव इंद्रजित गर्जत। मायिक सीतेचा करावया घात। खड्गा हात घातला ॥ ९१ ॥ सीता रडत पडत। रामनामें आक्रंदत। तिचे झोंटीसि घालोनि हात। खड्ग तुळिलें इंद्रजित ॥ ९२ ॥ मायिक सीतावधद्वारा। अति उल्लास निशाचरा। अश्म-निशितखड्गधारा। सीतेच्या शिरा छेदिलें ॥ ९३ ॥ द्विज घालिती यज्ञोपवीत। तैसा करितां शस्त्रघात। मायिक सीतेचें पैं प्रेत। न दिसे व्यक्त रणरंगीं ॥ ९४ ॥ नाहीं रथावरी शिर। नाहीं धरे-वरी शरीर। अवघें झालें निराकार। आश्चर्य थोर सुरसिद्धां ॥ ९५ ॥ मारितां दोराच्या सर्पासी। मुळीं प्रेतत्व नाहीं त्यासी। तेंवी मायिक सीतेसी। नाहीं देहासी देहत्व ॥ ९६ ॥ मायिक सीता प्रेत-मूर्ती। नाहीं रथीं ना क्षितीं। देखोनि इंद्रजित निजचित्तीं। भयभ्रांती पावला ॥ ९७ ॥ तंव तेथें आकाशांत। शब्द उठिला भयभीत। रिघों न शकसी लंकेआंत। होईल प्राणान्त संग्रामीं ॥ ९८ ॥ जितकें तुवां केलें कपट। आतां त्याचा आला शेवट। सौमित्र छेदील तुझा कंठ। रणीं यथेष्ट भिडोनी ॥ ९९ ॥ मारितां मायिक सीता। कोप आला हनुमंता। करावया इंद्रजि-ताच्या घाता। होय उचलिता महाशिळा ॥१००॥

स तु शोकेन चाविष्टः कोपेन च महाकपिः।
हनूमान्राक्षसरथे पातयामास वै शिलाम् ॥ १७ ॥
भीमां पतंतीं दृष्ट्वा तु रथः सारथिना सह।
विवेश धरणीं भित्वा सा शिला व्यर्थतां गता ॥ १८॥
पतितायां शिलायां तु रक्षसां व्यथिता चमूः।
तामध्यगच्छन्शतशो नदंतः काननौकसः ॥ १९ ॥
वृक्षशैलशिलावर्षं विसृजंतः प्लवंगमाः।
शत्रूणां कदनं चक्रुर्नेदुश्च विविधैः स्वनैः ॥ २० ॥

घालावया इंद्रजिताच्या कपाळा। कोपें हनु-मंतें सोडिली शिळा। इंद्रजितानें देखोनि डोळां। बाणजाळा वर्षत ॥ १ ॥ विंधितां कोटि कोटि बाण। शिळा न फुटे अति दारुण। विंधितांही वज्रबाण। अणुप्रमाण भंगेना ॥ २ ॥ ऐसें देखोनियां डोळां। उघडोनियां तेथींचिया बिळा। इंद्रजित रथेंसीं सगळा। स्वयें पळाला त्यामाजी ॥ ३ ॥ चुकला इंद्रजिताचा घात। शिळा पडतां सैन्याआंत। अवघ्यां एकचि जाला घात। जाला प्राणान्त शिळा-तळीं ॥ ४ ॥ शिळातळीं राक्षससंभार। मारितां देखोनि वानर। आले गर्जत अपार। शिळाशिख-

१ बोले. २ मरण. ३ केशांस. ४ परजीत. ५ सीतेचा वध केल्यानें. ६ सहाणेवर घांसलेल्या तरवारीच्या धारेनें. ७ जमिनीवर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

रतरुहस्ती ॥ ५ ॥ एक मारिती शिळाशिखरीं । एक मारिती तरुवरीं । राक्षससैन्यासी वोहरीं । करूं वानरीं आदरिली ॥ ६ ॥ इंद्रजित अडकला बिळाआंत । राखण बैसला हनुमंत । बाहेर निघतां करील घात । तेणें धाकत इंद्रजित ॥ ७ ॥ येरीकडे वानरभारीं । बोंब सुटली एकसरीं । इंद्रजितानें खड्गधारीं । सीतासुंदरी मारिली ॥ ८ ॥ ऐसी ऐकतांचि मात । धाकिन्नला हनुमंत । सीताविरहें श्रीरघुनाथ । क्षणीं प्राणान्त करील ॥ ९ ॥ बिळीं सोडोनि इंद्रजितासी । हनुमान आला वानरसेनेसीं । निवारी त्यांच्या युद्धासी । श्रीरामापासीं यावया ॥ ११० ॥

यन्निमित्तं च युध्यामः सा हता जनकात्मजा ।
इममर्थं च विज्ञाप्य रामं सुग्रीवमेव च ॥ २१ ॥

तौ यत्प्रतिविधास्येते तत्करिष्यामहे वयम् ।
शनैः शनैरसंभ्रांतः सबलः संन्यवर्तत ॥ २२ ॥

ततः प्रेक्ष्य हनूमंतं व्रजंतं यत्र राघवौ ॥ २३ ॥

जीनिमित्त युद्ध करणें । ती सीता मारिली इंद्रजितानें । हा वृत्तान्त सांगावयाकारणें । शीघ्र जाणें श्रीरामापासीं ॥ ११ ॥ आम्हां मुख्य श्रीरामचंद्र । सुग्रीव आमचा राजेंद्र । सीतावधाचा विचार । सांगों समग्र त्यांपासीं ॥ १२ ॥ ते तंव विचारचक्रवर्ती । कैसा काय विचार करिती । विचार करोनि जें सांगती । तेंचि निश्चितीं करूं आम्ही ॥ १३ ॥ इंद्रजितानें मारिली सीता । सत्य न माने श्रीरघुनाथा । जन्ममरणाची कथा । सीतेसी सर्वथा असेना ॥ १४ ॥ युद्धापासूनि वानर । शनैः शनैः काढोनि समग्र । पुढें होवोनि हनुमान वीर । आले सत्वर रामापासीं ॥ १५ ॥ पाळोनियां शिववरदान । हनुमान आला करीत रुदन । तें देखोनि रघुनंदन । पावली खूण वरदाची ॥ १६ ॥ इंद्रजितानें मारिली सीता । ऐसें हनुमंतें सांगतां । मिथ्या कळोनि तत्त्वतां । आली रघुनाथा महामूर्च्छा ॥ १७ ॥

तस्य तद्वचनं श्रुत्वा रामो दुःखेन मूर्च्छितः ।
निपपात तदा भूमौ कृत्तमूल इव द्रुमः ॥ २४ ॥

लक्ष्मणस्तं तु बाहुभ्यां परिष्वज्य सुदुःखितः ।
उवाच राममस्वस्थं वाक्यं हेत्वर्थसंयुतम् ॥ २५ ॥

राममाश्वासयामास लक्ष्मणो भ्रातृवत्सलः ।
अवेक्ष्य गुल्मान्सकलांस्ततः प्राप्तो विभीषणः ॥ २६ ॥

मायिक सीता मायिक वार्ता । मिथ्या जाणोनि तिच्या घाता । मूर्च्छा आली श्रीरघुनाथा । शिववरदार्था पाळावया ॥ १८ ॥ गंगातीरींचा तरुवर । उन्मळोनि पडे थोर । तैसा पडिला रघुवीर । दुःख दुर्धर सीतेचें ॥ १९ ॥ श्रीराम मूर्च्छित पडतां । लक्ष्मणासी दुःखावस्था । आलिंगोनि बंधुवत्सलता । अंकीं भ्राता निजवीतसे ॥ १२० ॥ अंकीं वाहोनि श्रीरघुनाथा । स्वयें लक्ष्मण होय बोलता । इंद्रजितानें मारिली सीता । उपाय आतां दिसेना ॥ २१ ॥ महापाप मारणें सीता । तेणें सुखरूपता इंद्रजिता । आम्ही वर्ततों स्वधर्मता । दुःखावस्था आम्हांसी ॥ २२ ॥ धर्माधर्मविवंचना । न कळे सहसा अज्ञाना । येतां श्रीरामा मूर्च्छना । अति वेदना वानरां ॥ २३ ॥ वानर मिळोनियां सकळ । नीलोत्पलीं सुगंध जळ । शिंपितां श्रीराममुखकमळ । झाला अळुमाळ सावध ॥ २४ ॥ हनुमंताचिया समता । पाळावया शिववरदार्था । अत्यंत मूर्च्छा श्रीरघुनाथा । आली विकळता सर्वांगीं ॥ २५ ॥ ऐसें देखोनि श्रीरघुनाथा । लक्ष्मणासी दुःखावस्था । इंद्रजितानें मारिल्या सीता । राम सर्वथा वांचेना ॥ २६ ॥ श्रीरामें सोडितांचि प्राण । आम्हां अवघ्यांतेंचि मरण । दुःखें मरतील भरत शत्रुघ्न । सांडितील प्राण तिघी माता ॥ २७ ॥ निमालिया रघुनंदन । निमतील अयोध्येचे जन । किष्किंधे निमतील वानरगण । प्रळय पूर्ण पैं आला ॥ २८ ॥ जातांच शरीराचा प्राण । खुंटे इंद्रियांचें चळण । तेंवी निमाल्या रघुनंदन । आम्हीही जाण निमालों ॥ २९ ॥ देहींहून जातां आत्मा । प्रेतरूप राहे प्रतिमा । तैसेंच होय गा आम्हां । स्वयें श्रीराम मरतांचि ॥ १३० ॥ श्रीराम जीव आम्ही देहवंतें । श्रीराम आत्मा आम्ही भूतें । श्रीराम चैतन्य आम्ही चित्तें । अन्यथा येथें असेना ॥ ३१ ॥ करोनि सीतेचा निजघात ।

१ नाश. २ दुसऱ्या बाजूला. ३ वानरसैन्यासह. ४ बंधुप्रेमानें. ५ निळ्या कमळांनीं. ६ किंचित्. ७ शिथिलता. ८ चिच्छक्ति.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

साधिला इंद्रजितानें पुरुषार्थ। आम्हुचा विध्वं-सोनि स्वार्थ। अति आकान्त ओढवला ॥ ३२ ॥ इंद्रजितानें मारिली सीता। कांहीं उपाय न चले सर्वथा। कैंवी वांचवे रघुनाथा। परम चिंता अवघ्यांहीं ॥ ३३ ॥ श्रीरामाचें हृद्गत। स्वयें जाणे हनुमंत। हनुमंताचें मनोगत। श्रीरघुनाथ स्वयें जाणे ॥ ३४ ॥ लक्ष्मणासी करितां रुदन। वानर अवघे चिंतामग्न। मिथ्या सीतेचें हनन। आला शोधून बिभीषण ॥ ३५ ॥ दूत धाडोनि लंकेआंत। अशोकवनीं सीता स्वस्थ। इतुका घेवोनि वृत्तान्त। आला त्वरित बिभीषण ॥ ३६ ॥ तंव वानरकटकांत। वर्तताहे अति आकान्त। ऐकोनि सीतेचा मरणार्थ। श्रीरघुनाथ मूर्च्छित ॥ ३७ ॥

दर्दर्श मोहमापन्नं लक्ष्मणस्यांकमाश्रितम्।
व्रीडितं शोकसंतप्तं प्रेक्ष्य रामं विभीषणः ॥ २७ ॥
अंतर्दुःखेन दीनात्मा किमेतदिति सोऽब्रवीत्।
उवाच लक्ष्मणो वाक्यमिदमश्रुपरिप्लुतः ॥ २८ ॥
हतामिंद्रजिता सीतां सम्यक् श्रुत्वैव राघवः।
हनूमद्वचनाद्दीनस्ततो मोहमुपागतः ॥ २९ ॥
कथयंतं तु सौमित्रिं संनिवार्य विभीषणः।
पुष्कलार्थमिदं वाक्यं विसंज्ञं राममब्रवीत् ॥ ३० ॥

महामोहें अति मोहित। मूर्च्छापन्न श्रीरघुनाथ। तेणें दुःखें दुःखाभिभूत[२]। शोकान्वित बिभीषण ॥ ३८ ॥ लक्ष्मणाचे मांडीवरी। श्रीरामीं विकळता भारी। स्वामी मूर्च्छित कैशापरी। पुसे आदरीं बिभीषण ॥ ३९ ॥ कोण लागला आघात। कैसेनि श्रीराम मूर्च्छित। ऐसें बिभीषण पूसत। त्यासी सांगत सौमित्र ॥ १४० ॥ इंद्रजितानें मारिली सीता। ऐसें हनुमंतें सांगतां। मूर्च्छा आली श्रीरघुनाथा। उपाय आतां दिसेना ॥ ४१ ॥ हनुमंताचा वचनार्थ। मिथ्या न मानी श्रीरघुनाथ। तेणें सांगितला सीतेचा घात। मूर्च्छाभिभूत श्रीराम ॥ ४२ ॥ ऐकोनि सौमित्राचें वचन। बिभीषण हास्यवदन। सीतेसी नाहीं जन्ममरण। वृथा कां रुदन तुम्ही करा ॥ ४३ ॥ महाकपटी इंद्रजित। मायिक सीतेचा केला घात। तिचें तळीं तुरेचि प्रेत। कैसेनि सत्य हनुमंत मानी ॥ ४४ ॥ अशोकवनाआंत। सीता स्वस्थ आहे तेथ। जाऊन आले माझे दूत। तुम्ही कां रडत अति दुःखें ॥ ४५ ॥ सावध नव्हे श्रीरघुनाथ। बिभीषण दुःखाभिभूत। अंगद सुग्रीव जांबवंत। वानर समस्त अति दुःखी ॥ ४६ ॥ हें देखोनि हनुमंत। स्वयें आला पैं गर्जत। मारीन इंद्रजित लंकानाथ। मारीन समस्त राक्षस ॥ ४७ ॥ मिथ्या मायिक सीताघात। तळीं तिचें तुरेचि प्रेत। हें म्यां जाणोनि इत्थंभूत। सांगावया येथ मी आलों ॥ ४८ ॥ मिथ्या सीतेचें हनन। मिथ्या मूर्च्छित रघुनंदन। ऐकतां हनुमंतगर्जन। झाला सावधान श्रीराम ॥ ४९ ॥ श्रीराम आणि हनुमान बळी। खूण पावोनि वरदानमेळीं। पिटिली टाळिया टाळी। झाला तत्काळीं सावध ॥१५०॥ जवळी येतांचि हनुमंत। सावध जाला श्रीरघुनाथ। स्वामिसेवकांचा वृत्तान्त। न कळे गुह्यार्थ वेदांसी ॥ ५१ ॥ सावध होतां श्रीरामचंद्र। वानरीं केला जयजयकार। रामनामाचा गजर। देती भुभुःकार स्वानंदें ॥ ५२॥ अशोकवनाप्रती। स्वस्थ आहे सीता सती। हे बिभीषणाची वचनोक्ती। मानी रघुपति त्रिसत्य सत्य ॥ ५३ ॥ बिभीषणाचें वचन। मिथ्या न मानी रघुनंदन। हर्षें देवोनि आलिंगन। सावधान बैसले ॥ ५४ ॥ सांडून मोह शोक दुर्धर। सुखी बैसला सौमित्र। सुखी सुग्रीवादि वानर। गर्जती समग्र रामनामें ॥ ५५ ॥ एका जनार्दना शरण। मिथ्या मायिक सीतामरण। जाणोनियां रघुनंदन। सावधान बैसला ॥ ५६ ॥ श्रीराम नित्य सावधान। श्रीराम जगाचें जीवन। नाहीं मोहममताबंधन। स्वानंदघनें[३] श्रीराम ॥ ५७ ॥ रामनामाच्या आवर्ती। मोह ममता समूळ जाती। तो मोह ममता श्रीरामाप्रती। कदा कल्पांतीं घडेना ॥ १५८ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां मायिकसीतावधो नाम षट्त्रिंशत्तमोऽध्यायः ॥ ३६ ॥ ओंव्या ॥ १५८ ॥ श्लोक ॥ ३० ॥

अध्याय सदतिसावा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ हनुमंताचा पर्वतघात। चुकवावया इंद्रजित। स्वयें पळाला बिळाआंत। धुकधुकित अति धाकें ॥ १ ॥ मायिक-

१ वानरसैन्यांत. २ दुःखानें परिपूर्ण. ३ आनंदपूर्ण.
४ सतत क्रमानें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सीतेचा पैं घात। जाणोनियां हनुमंत। माझा करील प्राणान्त। भेणें[1] धाकत इंद्रजित ॥ २ ॥ सांगावया रणवृत्तान्त। श्रीरामापासीं गेला हनुमंत। तेव्हां इंद्रजित भयभीत। गेला पळत निकुंबळे ॥ ३ ॥

निकुंभिलामथासाद्य जुहुवेग्निमथेंद्रजित्।
यज्ञभूमौ तु विधिना पावकस्तेन रक्षसा ॥ १ ॥
हूयमानः प्रजज्वाल जपहोमपरिष्कृतः।
सार्चिः पिनद्धो ददृशे पूयशोणिततर्पितः ॥ २ ॥
सन्ध्यागत इवादित्यः परिवेषसमन्वितः।
जुहोति यत्र विधिवद्रक्तोष्णीषं वरस्त्रियः ॥ ३ ॥
शस्त्राण्यलाबुपत्राणि समिधश्च बिभीतकाः।
अस्थि कृष्णमृगस्याथ रक्तं जग्राह जीवतः ॥ ४ ॥
लोहितानि च वासांसि स्रुवं कार्ष्णायसं तथा।
सर्वतोग्निं समास्तीर्य शनैः पात्रैः सतोमरैः ॥ ५ ॥

जीवें मारील हनुमंत। येणें धाकें इंद्रजित। पळाला निकुंबळेआंत। अभिचारार्थ[2] साधावया ॥४॥ मारावया रामसौमित्र। वधावया हनुमान वीर। निर्वाणींचे अभिचार। करी साचार इंद्रजित ॥ ५ ॥ मारावया रामलक्ष्मण। सुग्रीवादि वानरगण। मारितां नलगे अर्ध क्षण। यालागीं निर्वाणहोम मांडी ॥ ६ ॥ यक्षिणीवटातळीं। होमकुंडें दीर्घ विळीं। तेथें रिघोनि महाबळी। होम तत्काळीं आरंभी ॥ ७ ॥ कुंड मंडप विधिविधान। विधियुक्त अग्निस्थापन। शस्त्रांचें परिस्तरण। परिसमूहन मद्याचें ॥ ८ ॥ नरकपाळें नरशिर। तेंचि प्रणीताघृतपात्र। कृष्णच्छागाचें[3] रुधिर। भरिलें सत्वर त्यामाजी ॥ ९ ॥ जीतें-कृष्णच्छाग धरूनि पुरा। सर्वांगीं घेवोनि शिरा। धरोनियां त्याच्या रुधिरा। त्या त्या पात्रामाजी भरी ॥ १० ॥ शरचाप खड्गादि तोमर। होमाभोंवते शस्त्रसंभार। अभिषिंचूनि समंत्र। मांडी तें तंत्र इंद्रजित जाणे ॥ ११ ॥ अभिचाराचिये अभिव्यक्ती। शस्त्रांसीं यावया पूर्ण शक्ती। इंद्रजित मंत्रव्युत्पत्तीं। मांडी विध्युक्त विभागें ॥ १२ ॥ शस्त्रशक्तीं अवधिया। मंत्रसामर्थ्य आकळोनियां। आरक्तओष्ठी क्रूर स्त्रिया। आणिलिया यज्ञवाटा ॥१३॥ लोहसाराच्या स्रुक्स्रुवा। तेणें पात्रें होम करावा। होमद्रव्यांचा यावा। विधिगौरवा तो ऐका ॥ १४ ॥ लवण सर्षप भिल्लातर्क। कालवोनि मातंगीचें रक्त। मद्य मेळवोनि त्याआंत। होम मंत्रोक्त विधिवादें ॥ १५॥ जेंवी मिरवे बाळादित्य। तेंवी अग्नि धगधगित। परिस्तरणीं सुशोभित। होम करीत इंद्रजित ॥ १६ ॥ काळीचिडी कांकणधारी। उलूक खिळोनि त्यामाझारी। कृष्णसर्प अर्धशिरीं। होमावरी बांधिला ॥ १७॥ त्या सर्पाचें स्रवे गरळ। तेचि वसोर्धारा प्रबळ। मानी इंद्रजित अमंगळ। पापी केवळ अभिचारी ॥१८॥ प्राणियांसी करोनि घात। पूर्ण रुधिर धरोनि बदबदित। मेळवोनि ब्राह्मणाचें रक्त। होम करीत इंद्रजित ॥ १९ ॥ बेहडा अपवित्र जगांत। त्याच्या समिधा होम करीत। कडू भोपळयाच्या पात्राआंत। मद्य भरीत होमार्थ ॥ २० ॥ आरक्त वस्त्र आरक्त विराजित। रक्ताचा टिळा मस्तकांत। आरक्त माळा कंठीं शोभत। अभिचारयुक्त इंद्रजित ॥ २१ ॥ जपहोम मंत्रयुक्त। विकळ उच्चार होंं[11] नेदित। इंद्रजित स्वयें होम करीत। अभिचारार्थ साटोपें ॥२२॥ सरड बेडूक मत्स्य मगर। पिंगळा बोलका गीध घार। होमीं जाळिती अपार। निशाचर महापापी ॥ २३ ॥ यापरी इंद्रजित। निकुंबळे होम करीत। जाणोनि त्याचा वृत्तान्त। बिभीषण सांगत श्रीरामा ॥ २४ ॥

निकुंभिलायां काकुत्स्थ जुहोति हि न संशयः।
सबलास्तत्र गच्छामो यावत्तन्न समाप्यते ॥ ६ ॥
लक्ष्मणं प्रेषयास्माभिः सह सैन्यानुकर्षिभिः।
एष तं नरशार्दूल रावणिं निशितैः शरैः ॥ ७ ॥
त्याजयिष्यति तत्कर्म प्राणनिष्ठां च संयुगे।
तपसा तेन वीरेण वरदानात्स्वयंभुवः ॥ ८ ॥
अस्त्रं ब्रह्मशिरः प्रासं कामगाश्च हयोत्तमाः।
स एवं विदधे चास्य धीमतः पुण्यकर्मणः ॥ ९ ॥
निकुंभिलामसंप्राप्तमकृताग्निं च यो रिपुः।
त्वामाह्वयिष्यते युद्धे इंद्रशत्रो स ते वधः ॥ १० ॥
इत्येवं तस्य विहितो वधोपायो दुरात्मनः ॥ ११ ॥

१ भीतीनें. २ जारणमारणविधि. ३ काळ्या बोकडाचें. ४ रक्त. ५ जीत=जीवंत. ६ समुदाय. ७ मोहरी. ८ बिब्बे. ९ मांगिणीचें. १० समिधांनीं. ११ होऊं दिला नाहीं.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

बिभीषण सांगे श्रीरामाप्रती । इंद्रजित अभिचारहोमस्थितीं । निकुंबळे गेलासे दुर्मती । कपटानुवृत्ति दुरात्मा ॥२५॥ ब्रह्मवरदी शिववरदी । अभिचारहोमविधीं । तत्काळ त्यासी व्हावी सिद्धी । वरद त्रिशुद्धीं तयासी ॥ २६ ॥ होम न होतां संपूर्ण । मध्येंचि विध्वंसिल्या जाण । तेंचि इंद्रजितासी मरण । शिववरदान सत्यत्वें ॥ २७॥ होम न होतां समाप्ती । मध्येंचि जाल्या विघ्नप्राप्ती । तेणें मरण रणावर्ती[1] । हे वचनोक्ती ब्रह्मयाची ॥ २८ ॥ वरदास्तव इंद्रजिता तेथ । ब्रह्मशिरोस्त्र जाल्या प्राप्त । कामग हय[3] कामग रथ । तेणें तो विख्यात तिहीं लोकीं ॥ २९ ॥ तेणें बळें रणकडार्डी । देव जे कां तेहतीस कोडी । इंद्रजित घाली बांधवडी । वरदप्रौढीप्रतापें ॥ ३० ॥ येणेंचि बळें युद्धाआंत । इंद्र धरिला जीवें जीत । नांव पावला इंद्रजित । शिववरदार्थप्रतापें ॥ ३१ ॥ ते घोडे आणि तोचि रथ । रणीं न जिंकवे रघुनाथ । दोहीं शरबंधां केला घात । प्रतापवंत श्रीराम ॥ ३२॥ दों शरबंधीं इंद्रजित । युद्धीं परम प्रतापवंत । त्याचा श्रीरामें केला घात । इंद्रजित तळमळी ॥ ३३ ॥ तेणें रागें इंद्रजित आपण । मारावया श्रीरामलक्ष्मण । अभिचार करितो निर्वाण । अति दारुण विधिभागें[5] ॥ ३४ ॥ पुढेंमागुता युद्धाआंत । न चले शरबंधपुरुषार्थ । श्रीरामें छेदिला वरदार्थ । तळमळित इंद्रजित ॥ ३५ ॥ त्याच्या कर्मा करावया विघ्न । बिभीषण निघाला आपण । मजसवें द्यावा लक्ष्मण । वीर दारुण प्रतापी ॥ ३६ ॥ लक्ष्मण वीर धीर । लक्ष्मण परम शूर । करील इंद्रजिताचा संहार । सखा सौमित्र प्रतापी ॥ ३७ ॥ होमस्थान अति गुप्त । आणिकासी नव्हे प्राप्त । तें मी दाखवीन साग्रंत । करावया घात इंद्रजिताचा ॥ ३८ ॥ होम झालिया समाप्त । इंद्रजित तिन्ही लोकां अजित । करील समस्तांचा घात । हा वरदार्थ शिवाचा ॥ ३९ ॥ यालागीं अति शीघ्रगतीसीं । श्रीरामा आज्ञा देईं आम्हांसी । सवें द्यावें सौमित्रासी । विघ्न होमासी करावया ॥ ४० ॥ सुटल्या सौमित्राचा बाण । विध्वंसील होमस्थान । इंद्रजित उठतांचि जाण । घेईल प्राण रणमारें ॥ ४१ ॥ त्याच्या होमासी होतांचि विघ्न । रणीं इंद्रजित मरेल जाण । ऐसें शिवाचें वरदान । यालागीं आपण धाडावें शीघ्र ॥ ४२ ॥

बिभीषणवचः श्रुत्वा रामो लक्ष्मणमब्रवीत् ।
जानामि तस्य रौद्रस्य मायामेतां दुरात्मनः ॥ १२ ॥
तस्यांतरिक्षे चरतः सरथस्य परंतप ।
न गतिर्वेदितुं शक्या सूर्यस्येवाभ्रसंप्लवे ॥ १३ ॥
तं मायागमसंप्राप्तं महावीर्यमरिंदमम् ।
जहि बाणैरिदं कर्म कुरु सत्यपराक्रमम् ॥ १४ ॥
यदृक्षराजस्य बलं तेन सर्वेण संवृतः ।
युवराजोऽगदः सार्द्धमनेन च हनूमता ॥ १५॥
गच्छ तं राक्षसेंद्रस्य तनूजं जहि लक्ष्मण ॥ १६ ॥

ऐकोनि बिभीषणवचन । संतोषला रघुनंदन । पाचारोनियां लक्ष्मण । काय आपण सांगत ॥ ४३ ॥ तूं निधडा वीरपंचानन । रणरंगीं रणप्रवीण । इंद्रजित महामायावी जाण । कपटी संपूर्ण वंचक ॥ ४४ ॥ उभा न राहे युद्धा क्षितीं । सवेग जाणें नभःस्थिती । रथ वारु सारथी । गुप्तगतीं खेचर ॥ ४५ ॥ जेंवी कां गगनीं गभस्ती[10] । अभ्रांमाजी न ये व्यक्ती[11] । तेंवी इंद्रजित गुप्तगती । रणानुवृत्ती[12] लक्षेना ॥ ४६ ॥ कवडा राहोनियां गगनीं । अलक्ष मीन लक्षी जीवनीं[13] । तेंवी इंद्रजित गुप्तगतीं रणीं । सूक्ष्मदर्शनीं लक्षावा ॥ ४७ ॥ नांव रूप गुण लक्षण । स्वयें सांडावें विवंचून । लक्षावें कारणाकारण । सूक्ष्मदृष्टि जाण या नांव ॥ ४८ ॥ लक्षिल्या कारणाकारण । न करितांही रणांगण । इंद्रजित मरेल हा पण । मात्रार्ध[14] बाण विंधितां ॥ ४९ ॥ यापरी रणरंगीं । शत्रु मारावा अंगोअंगीं[15] । पंगिस्त[16] न व्हावें दुजियालागीं । हें रणभागीं लक्षूनी ॥ ५० ॥ यापरी सौमित्रासी । संग्रामा धाडी इंद्रजितासीं । सवें धाडिलें वानरांसी । निधड्या वीरांसी तें ऐका ॥ ५१ ॥ बळवंत बुद्धिवंत । अंगद युवराज विख्यात । ससैन्य निघे

१ भर लढाईंत. २ इच्छिल्या ठिकाणीं जाणारे. ३ घोडे. ४ निकराचा. ५ विधिविधानाप्रमाणें. ६ वीरश्रेष्ठ. ७ मोठा कपटी. ८ फसविणारा. ९ जमिनीवर. १० सूर्य. ११ उघडकीस. १२ युद्धाच्या गर्दीत. १३ उदकांत. १४ अत्यल्पही. १५ पूर्णपणें. १६ पराधीन.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

जांबवंत । सैन्यासमवेत चालिला ॥ ५२ ॥ भरंवशाचा वीर विख्यात । सवें दिधला हनुमंत । ज्याचेनि बळें श्रीरघुनाथ । स्वयें निश्चित सर्वार्थी ॥ ५३ ॥ अतिशयें बळें प्रबळ । सवें दिधले नळनीळ । देखोनि वानरांचा मेळ । हर्ष प्रबळ सौमित्रा ॥ ५४ ॥ जावोनियां निकुंभिलेसी । युद्ध करावया इंद्रजितासीं । अति उल्लास लक्ष्मणासी । आलें बाहूंसीं स्फुरण ॥ ५५ ॥

अयं त्वां सचिवैः सार्द्धं महात्मा रावणानुजः ।
अभिज्ञस्तस्य देशस्य पृष्ठतोऽनुगमिष्यति ॥ १७ ॥
स रामस्य वचः श्रुत्वा लक्ष्मणः परवीरहा ।
जग्राह कार्मुकं श्रेष्ठं भीमं भीमपराक्रमः ॥ १८ ॥
सन्नद्धः सशरः खड्गी कवची वामचापभृत् ।
रामपादावुपस्पृश्य हृष्टः सौमित्रिरब्रवीत् ॥ १९ ॥
अद्य मत्कार्मुकोत्सृष्टाः शरा निर्भिद्य रावणिम् ।
लंकामभिपतिष्यंति हंसाः पुष्करणीमिव ॥ २० ॥

श्रीराम म्हणे सौमित्रासी । तुम्ही गेलिया निकुंभिलेसी । यज्ञवाट न कळे तुम्हांसी । अति गुप्तेंसीं महागूढ ॥ ५६ ॥ त्या यज्ञवाटाचें लक्षण । अति गूढ गुप्त गहन । रिगिनिगी स्थानमान । तें बिभीषण सांगेल ॥ ५७ ॥ यालागीं तुम्हांसांगातें । मी देतों बिभीषणातें । तुम्हीं संरक्षावें यातें । जेंवी जीवातें निजात्मा ॥ ५८ ॥ माझा जीव आत्मा प्राण । तो हा मूर्तिमंत बिभीषण । यासी रक्षावें आपण । अवघे जण मिळोनी ॥ ५९ ॥ महाकपटी इंद्रजित । सिंतरोनि[१] करील घात । मारिलिया शरणागत । तोचि कल्पान्त आम्हांसी ॥ ६० ॥ सांगतां त्याचें वर्म कर्म । इंद्रजितासी द्वेष परम । ठकून करील घातक धर्म । पापकर्मा पापात्मा ॥ ६१ ॥ राम सांगे हनुमंतासी । संरक्षावें बिभीषणासी । साह्य व्हावें सौमित्रासी । दोघे तुजपासीं दीधले ॥ ६२ ॥ ऐकतां श्रीरामवचन । हनुमंतासी उल्लास पूर्ण । तुझें नाम संरक्षण । सर्वार्थी जाण सर्वदा ॥ ६३ ॥ रामा तुझिया नामाचें । आम्हांसी वज्रकवच साचें । भय नाहीं कळिकाळाचें । इंद्रजिताचें तोंड कोण ॥ ६४ ॥ ऐसें ऐकतां वचन । लक्ष्मणासी आलें स्फुरण । सज्जोनियां धनुष्यबाण । जाला आपण सन्नद्धबद्ध ॥ ६५ ॥ कवची खड्गी हेममाळा । लक्ष्मणें घालोनि गळां । येवोनि श्रीरामाजवळां । चरणकमळा वंदीत ॥ ६६ ॥ वंदूनि श्रीरामचरण । करोनि त्रिवार प्रदक्षिण । लक्ष्मण बोले आंगवण । सावधान अवधारा ॥ ६७ ॥ आजि माझे सुटल्या बाण । घेतील इंद्रजिताचा प्राण । सव्य बाहु तोडूनि जाण । पाठवीन लंकेसी ॥ ६८ ॥ हंस बुडी देती पुष्करणीसी । तेंवी बाण भेदती राक्षसांसीं । ऐसें बोलोनि श्रीरामासी । संग्रामासी निघाला ॥ ६९ ॥

निकुंभिलामभियायौ हंतुं रावणिमाहवे ।
विभीषणेन सहितो राजपुत्रः प्रतापवान् ॥ २१ ॥
कृतस्वस्त्ययनो भ्राता लक्ष्मणो निर्ययौ तदा ।
वानराणां सहस्रैश्च हनूमान्बहुभिर्वृतः ॥ २२ ॥
विभीषणश्च सहसा रामभ्रातरमन्वगात् ।
महाकपिबलौघैस्तु संपतन्निव सर्वतः ॥ २३ ॥
ऋक्षराजबलं चैव महाभ्रमिव नादयन् ।
स गत्वा दूरमध्वानं सौमित्रिर्मित्रनंदनः ॥ २४ ॥

वधूं जातां वृत्रासुरासी । जें स्वस्त्ययन[२] केलें इंद्रासी । तें स्वस्त्ययन सौमित्रासी । करी आदरेंसीं श्रीराम ॥ ७० ॥ बाणें छेदावया त्रिपुरासी । जें स्वस्त्ययन शंकरासी । तें स्वस्त्ययन सौमित्रासी । करी साक्षेपेंसीं[३] श्रीराम ॥ ७१ ॥ मर्दूं जातां मुर दैत्यासी । जें स्वस्त्ययन केलें भर्गवंतासी । तें स्वस्त्ययन सौमित्रासी । करी साक्षेपेंसीं श्रीराम ॥ ७२ ॥ ऐसें करोनि स्वस्त्ययन । स्वयें हनुमंत बिभीषण । देवोनियां वानरसैन्य । धाडी लक्ष्मण निकुंभिलेसीं ॥ ७३ ॥ काळें अभ्र अति गहन । तैसें जांबवंताचें सैन्य । करितां रामनामगुणगुण । निकुंभिले जाण निघाले ॥ ७४ ॥ नळ नीळ अंगद जांबवंत । आतुर्बळी हनुमंत । बिभीषण विचारवंत । सवें चालत सौमित्र ॥ ७५ ॥ बिभीषणाचे प्रधान चारी । मार्गद्रष्टे चतुर भारी । चालती अवघियांच्या पुढारीं । अंतरावरी साटोपें ॥ ७६ ॥ किराणें[४] करिती वनरवीर । चढले निकुंभिलापाठार । पुढें देखिलें दुर्धर । घोरांदर महावन ॥ ७७ ॥ वनवृक्ष वनस्थळीं । कंटकनिबद्ध समूळीं । उडों[५] जातां

१ फसवून, २ कल्याणप्रद आशीर्वचन, ३ अगत्यानें.
४ श्रीकृष्णाला, ५ उड्डाणें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

गोळांगुळी। होती चिरफळी अंगाची ॥ ७८ ॥ कंटकीवन घोरांदर। रिघों न शकती वानर। तेथें कैंवी रिघती राजकुमर। अटक थोर ओढवली ॥ ७९ ॥ मार्ग पाहतां चौपासीं। जागले रोधिले दशदिशीं। वाट न फुटे वारियासी। पुढें कोणासी न चालवे ॥ ८० ॥ पुसतां बिभीषणा पुढां। मार्ग न कळे चहूंकडां। तोही लागतांचि वेडा। वाहिला मेढा सौमित्रें ॥ ८१ ॥ वर्षोनियां बाणजाळी। विपिन छेदितां समूळीं। वनदेवता सकळी। देती आरोळी अतिदुःखें ॥ ८२ ॥ वनदेवता समस्ता। त्या वांचवावया निजजीविता। शरण आल्या हनुमंता। सांगावया घाता इंद्रजिताच्या ॥ ८३ ॥ आम्हांस केलीसे खिळणी। बोलावया नुखळे वाणी। ऐसें हनुमंतें ऐकोनी। गर्जला वाणी रामनामें ॥ ८४ ॥ तुम्ही वनदेवता समस्ता। श्रीरामनाम स्मरा आतां। ऐसें हनुमंतें सांगतां। जाल्या निर्मुक्ता वनदेवता ॥ ८५ ॥ स्मरतां रामनामवाणी। पळाल्या खिळणीपिळणी। अभिचारा समूळ धुणी। नामस्मरणीं बडिवारें ॥ ८६ ॥ वनदेवी उल्लासतां। चरणीं लागती हनुमंता। तूं तंव आमुचा प्राणदाता। खिळणी समस्ता सोडविल्या ॥ ८७ ॥ खिळणीपिळणी समस्ता। तुवां उपडिल्या हनुमंता। करावया इंद्रजिताचिया घाता। सांगतों आतां तें शीघ्र करीं ॥ ८८ ॥ जो हें छेदील कंटकवन। त्याचेनि हातें इंद्रजित आपण। तत्काळ पावेल मरण। हें भाषण शिवाचें ॥ ८९ ॥ प्रथम बंध कंटकविपिन। दुजा बंध महापर्जन्य। तिजा झंजावात दारुण। चौथें आवरण महासर्प ॥९०॥ पांचवें पिशाच जाण क्रूर। सहावें गुप्त हतियेर। सातवा तो राक्षससंभार। निशाचर महायोद्धे ॥ ९१ ॥ यक्षिणीवटातळीं प्रबळ। अति गुप्तत्वें महाबिळ। त्यामाजी आहे होमशाळ। अलक्ष तें स्थळ लक्षेना ॥ ९२ ॥ येणें अभिचारें इंद्रजित। जाला तिहीं लोकीं अजित। इंद्र धरिला जीवें जीत। येथील अर्थ साधूनी ॥ ९३ ॥ ऐसें वनदेवी सांगतां। वृत्तान्त कळला हनुमंता। नमस्कारोनि वनदेवता। सन्मानता आश्वासी ॥ ९४ ॥ यापरी जिणोनि कंटकवन। पुढें उल्लासें करी गमन। लागला दुस्तर पर्जन्य। अति दारुण अनिवार्य ॥ ९५ ॥ उतटों पाहती गिरिकूट। ऐसा विजुवांचा कडकडाट। धारा येती अचाट। प्रळयो स्पष्ट ओढवला ॥ ९६ ॥ मेघ जिणोनि हरिला शब्द। नांव पावला मेघनाद। तेणें मार्गें करावया रोध। घन सुबद्ध वर्षवी ॥९७॥ लागतां पर्जन्याच्या धारा। अति हुडहुडी वानरां। कोप चढिला सौमित्रा। धनुष्यीं शरा सज्जिलें ॥ ९८ ॥ मेघ गर्जतां कडकडाटा। लक्ष्मणें विंधोनि खिळिल्या वाटा। पर्जन्य राहिला थेंबटा। कोरड्या वाटा चालिले ॥ ९९ ॥ देखोनि सौमित्राचें बळ। मेघीं सांडिलें निरोधस्थळ। अंगीं खडतरतां बाणजाळ। मेघ सकळ निवारिले ॥ १०० ॥ पुढें चालतां समस्त। वायु सुटला झंझावात। वानर उडविले गगनांत। जेंवी तृणातें वाहुटळी ॥ १ ॥ लक्ष्मण शेष तत्त्वतां। सहस्रमुखीं वायु भक्षितां। निवारोनि झंझामारुता। होय सज्जिता महाशस्त्र ॥ २ ॥ वायु जो कां निजपिता। त्यासी हनुमान होय पुसता। मार्ग रोधणें रामदूता। कवण्या अर्था त्वां केलें ॥ ३ ॥ हा इंद्रजितमंत्रवात। खिळोनि राखिला मार्ग रोधीत। तोही तुझा अंशभूत। म्हणे हनुमंत निवारीं ॥४॥ ऐकोनि हनुमंतवचन। मोकळें केलें मार्गरोधन। वायु वायूचें करी प्राशन। वानरगण उल्लासती ॥ ५ ॥ पुढें चालतां हर्षयुक्त। कालियनाग अपरिमित। सर्प उठिले अत्यद्भुत। स्वयें वमित महागरळा ॥६॥ हनुमान म्हणे सौमित्रा। गरुडास्त्रा नकुळास्त्रा। घालोनि पिपीलिकास्त्रा। सर्पां समग्रां निर्दळीं ॥ ७ ॥ लक्ष्मण शेष इत्थंभूत। सर्पसंहारा कळवळित। मज गमन करितां येथ। मार्गरोधार्थ कां केला ॥ ८ ॥ वंदून लक्ष्मणाचे चरण। सर्प सांगती आपण। आम्हांसी महामंत्रीं खिळून। मार्गरोधन करविलें ॥ ९ ॥ ऐकोनि सर्पांचा वचनार्थ। श्रीरामनामाच्या गजरांत। खिळणीं पळालीं चळीं कांपत। केले निर्मुक्त महासर्प ॥ ११० ॥ पुढें चालतां कपिपुंगवें। कंकाळ वेताळ नग्न भैरव। झोटिंग पिशाच प्रेत सर्व। घेवोनि धांव छळों येती ॥ ११ ॥ शुंकी मैळीं महाकंकाळी। प्रेतउच्छिष्टचांडाळी। देवोनियां आरोळी। त्याही सकळी धांवि

१ वानर. २ उघडत नाहीं. ३ कांट्यांचें रान. ४ अटकाव करण्याची जागा. ५ वानरश्रेष्ठ. ६ पिशाचगणविशेष. ७ जलदेवताविशेष.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

न्नल्या ॥ १२ ॥ खाखाते खिखाते । कातिया त्रिशूळ घेवोनि हातें । अवघीं घाघातें घुंघातें । आलीं समस्तें छळावया ॥ १३ ॥ येतां देखोनियां भूतें । उड्डाण केलें हनुमंतें । कवळोनि मारितां समस्तें । शरणागतें तीं आलीं ॥ १४ ॥ सांगती इंद्रजित कपटराशी । कोणी न यावया यज्ञवाटांसीं । मंत्रीं खिळोनि आम्हांसी । मार्गरोधासी राखिलें ॥ १५ ॥ ऐसी ऐकोनि त्यांची मात । त्यांसीं तुष्टला हनुमंत । गर्जोनि श्रीरामनामावर्त । केला निर्मुक्त भूतसमूह ॥ १६ ॥ भूतें म्हणती हनुमंता । आम्हांसी आज्ञा देईं आतां । मारोनी राक्षसां समस्तां । विजयी सर्वथा होशील ॥ १७ ॥ हनुमंत म्हणे भूतांसी । सुखें राहावें स्वेच्छेसीं । आम्ही मारूं राक्षसांसी । तुम्हीं प्रेतांसी भक्षावें ॥ १८ ॥ भूतें सांगती हनुमंतासी । गुप्त शस्त्रें भंवती आकाशीं । पुढारें जातां तुम्हांसी । तीं सर्वांसी वधितील ॥ १९ ॥ ऐसें हनुमंतें ऐकतां । ज्या कां शस्त्रास्त्रदेवता । ज्यांचेनि शस्त्रें करिती घाता । त्या समस्ता आकळिल्या ॥ १२० ॥ पुच्छें कवळोनि देवता । हनुमंतें करितां घाता । मारूं नको गा कपिनाथा । येती समस्ता काकुळती ॥ २१ ॥ इंद्रजित महाकपटमूर्ती । आम्हां खिळोनि मंत्रोक्तीं । आम्हांसी स्थापी मार्गरोधनार्थीं । दुःखाभिभूत महादुःखीं ॥ २२ ॥ ऐसें हनुमंतें ऐकतां । रामनामस्मरणावस्था । शस्त्रदेवता समस्ता । केल्या निर्मुक्ता रामनामें ॥ २३ ॥ शस्त्रदेवता समस्ता । नमस्कारोनि हनुमंता । म्हणती इंद्रजिताच्या घाता । यश सर्वथा पावाल ॥ २४ ॥ घेवोनियां वानरवीर । सवेग चालतां सौमित्र । पुढें निशाचरभार । अति दुर्धर देखिला ॥ २५ ॥

राक्षसेंद्रबलं दूरादपश्यन्व्यूह्य संस्थितम् ।
अथ तं समवस्थाप्य लक्ष्मणं रावणानुजः ॥ २५ ॥
परेषामहितं वाक्यं स्वार्थसाधनमब्रवीत् ।
अस्यानीकस्य महतो भेदने यत लक्ष्मण ॥ २६ ॥
राक्षसेंद्रसुतो ह्यत्र भिन्नदेहो भविष्यति ।
विभीषणवचः श्रुत्वा संप्रहृष्टः स लक्ष्मणः ॥ २७ ॥
राक्षसेषु महाभीमं शरवर्षमवर्षत ॥ २८ ॥

देखोनि राक्षसांचा भार । उल्लासला सौमित्र । बिभीषण येवोनि सत्वर । सांगे विचार संग्रामा ॥ २६ ॥ राक्षसभार दिसतो येथ । त्यामाजी इंद्रजित अति गुप्त । बिळामाजी होम करीत । कर्म समाप्त करावया ॥ २७ ॥ त्याच्या कर्मा करावयाघात । राक्षस निर्दळितां येथ । प्रकट होईल इंद्रजित । जाण निश्चित सौमित्रा ॥ २८ ॥ ऐकोनि बिभीषणउत्तर । उल्लासला वीर सौमित्र । सज्जोनियां चाप शर । राक्षसभार निर्दळीत ॥ २९ ॥ रणीं खिळोनि वानर । मारिती राक्षसांचे भार । घोळसोनियां वानर । निशाचर भिडताती ॥ १३० ॥

ऋक्षाः शाखामृगाश्चैव वृक्षशैलशिलायुधाः ।
अभ्यधावन्त संहृष्टास्तदनीकं बिभित्सवः ॥ २९ ॥
राक्षसाश्च शितैः शूलैरसिभिः पट्टिशैः शरैः ।
उद्यतैस्त्वरिताः सर्वे कपीनभिजिघांसवः ॥ ३० ॥
ऋक्षवानरमुख्यैश्च महाकायैर्महाबलैः ।
रक्षसां युध्यमानानां महद्भयमजायत ॥ ३१ ॥

रीसें आणि वानरभार । शैल शिला साल तरुवर । करोनि राक्षसांसी मार । देती भुभुःकार रामनामें ॥ ३१ ॥ शूळ त्रिशूळ चाप शर । असि पट्टिश परिघ तोमर । शस्त्रास्त्रीं निशाचर । करिती मार वानरां ॥ ३२ ॥ गगनीं उसळोनि मर्कट । शस्त्रघात केले सुनाट । वानरीं वर्षोनि गिरिकूट । केलें सपाट राक्षसां ॥ ३३ ॥ लागतां पर्वतआघात । राक्षस पळाले समस्त । यक्षिणीवट केला निर्मुक्त । आले समस्त त्या ठाया ॥ ३४ ॥ यक्षिणीवट अति दुर्धर । देखतांचि भयंकर । सेंदुरें धगधगीत क्रूर । नरवानर भयभीत ॥ ३५ ॥ सहस्रयोजन शाखा थोर । ऐसिया शाखा अति अपार । घुघुशब्दें गर्जे घोर । वटविस्तार भयानक ॥ ३६ ॥ वटवृक्ष भयंकर । त्यातळीं गुप्त होमविवर । त्याहीमाजी इंद्रजित वीर । करी अभिचारहोमातें ॥ ३७ ॥ तेथें हिंडतां गोळांगूळें । लक्षेना तें होमबिळ । अति गुप्त वटमूळ । वेडा सकळ लाविले ॥ ३८ ॥ येवोनियां बिभीषण । स्वयें पाहत आपण । लक्षेना तें होमस्थान । अवघे जण सचिंत ॥ ३९ ॥ होम न होतां समाप्त । आम्हीं प्रवेशावें तेथ । विवर-

१ यज्ञाच्या जागेमध्यें. २ मार्ग अडविण्याकरितां. ३ फिरत आहेत. ४ राक्षससमुदाय. ५ अस्वलें. ६ तरवार. ७ शून्य, व्यर्थ. ८ पर्वतशिखरें. ९ होम करण्याची गुहा. १० वानर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

द्वार नव्हे प्राप्त। वेडा समस्त लागले ॥ १४० ॥ तेव्हां खवळला हनुमंत। वट उपडोनियां तेथ। शोधीन विवरद्वार गुप्त। तरी मी दूत रामाचा ॥४१॥ वनदेवता शस्त्रदेवता। ज्या हनुमंतें केल्या मुक्ता। त्याही येऊनि समस्ता। गुह्य हनुमंता सांगती ॥४२॥ यक्षवटींची यक्षिणी। मुख्य आमुची स्वामिनी। इंद्रजितानें करोनि खिळणी। विवररक्षणीं राखिलीसे ॥ ४३ ॥ तिसी केलिया निर्मुक्त। विवरद्वार होईल प्राप्त। ऐसें ऐकतां हनुमंत। उल्लासित उसळला ॥ ४४ ॥ वटाग्रीं खिळिली यक्षिणी। हनुमान तेथें गेला उडोनी। रामनामाच्या स्मरणीं। अर्धक्षणीं केली मुक्त ॥ ४५ ॥ मुक्त होतांचि यक्षिणी। लागली हनुमंताच्या चरणीं। वटमूळासी आणोनी। बीळ उघडोनी दाविलें ॥ ४६ ॥ उघडितां बिळद्वार। रामनामाचा गजर। वानर करिती जयजयकार। हर्षें निर्भर अवघेही ॥ ४७ ॥ द्वार उघडितां यक्षिणीसी। कपाट नुघडे तियेसी। शिणतां नाना युक्तींसीं। अलक्ष्य तिसी लक्षेना ॥ ४८ ॥ इंद्रजितकपाटाच्या अर्गळा। वज्रार्गळा भुवार्गळा। देवोनि दुबंधा सांखळा। अढळ शिळा लाविल्या ॥४९॥ कोणी न ये होमाप्रती। ऐसी करोनि निश्चिती। इंद्रजित बैसला होमाप्रती। जाण मारुति कपिराजा ॥१५०॥ कपाट उघडावया येथ। तुम्ही विचारा समस्त। ऐसें यक्षिणी सांगत। तंव हनुमंत क्षोभला ॥ ५१ ॥ कपाट उघडावया जाण। चिंताग्रस्त बिभीषण। चिंतावर्ती वानरगण। तंव लक्ष्मण खवळला ॥ ५२ ॥ विंधोनियां वज्रबाण। कपाट करीन शतचूर्ण। याचा संदेह तो कोण। चाप संपूर्ण सज्जिलें ॥ ५३ ॥ बाण लावितांचि शितीं। हनुमंतें धरिला हातीं। कपाट बापुडें तें किती। तुवां ते अर्थीं न शिणावें ॥ ५४ ॥ मी तंव घरगुती सेवक। पाहें माझें कवतुक। म्हणोनि दिधली हांक। लोकालोक दुमदुमले ॥ ५५ ॥ दिग्गजांसी बैसली टाळी। नक्षत्रें पडती भूतळीं। इंद्रजित दचके होमसमेळीं। कपिआरोळी ऐकोनी ॥ ५६ ॥ कैसेनि आला रे मारुती। इंद्रजित पडला चिंतावर्ती। जपहोम न रुचे चित्तीं। पूर्णाहुती विसरला ॥ ५७ ॥ न होतां दुजियाचें आगमन। माझें दुश्चित झालें मन। होमसिद्धीसी पडिलें विघ्न। विधिविधान नाठवे ॥ ५८ ॥ बहुत आवरणें बाहेरी। हनुमान येईल कैशापरी। म्हणोनि बैसे होमावरी। ध्यान निर्धारीं धरोनी ॥ ५९ ॥ येरीकडे हनुमंत। कपाट भेदून समर्थ। काळ खवळला कृतान्त। करावया घात होमाचा ॥१६०॥ कपाटीं रोहोकोनियां दृष्टी। वळोनियां वज्रमुष्टी। कपाटा हाणितां जगजेठी। कडकडाटीं वट गर्जे ॥ ६१ ॥ घायें कपाटें केलीं पिष्ट। वज्रार्गळा शतकूट। शिळा सांखळया करोनि पीठ। यज्ञवाट देखिलें ॥ ६२ ॥ तया यज्ञवाटाआंत। होमधर्मी व्यवस्थित। बैसला देखोनि इंद्रजित। ध्यानान्वित अभिचारें ॥ ६३ ॥ मनुष्यरक्तें अति विराजित। वस्त्रें नेसला आरक्त। रक्तचंदन मस्तकांत। माळा आरक्त सुमनांच्या ॥ ६४ ॥ प्रेतावरी विकटासन। मनुष्यरक्ताचें हवन। धूपदीप हुताशन। यजमानविघ्नसूचक ॥ ६५ ॥ मोकळें पडतां यज्ञद्वार। आला वानरांचा भार। रामनामाचा गजर। जयजयकार करीतचि ॥ ६६ ॥ बिभीषण आणि सौमित्र। वानरवीरांचा भार। इंद्रजित देखिला महाक्रूर। होमतत्पर ध्यानस्थ ॥ ६७ ॥ सटवलीं तान्हीं बाळकें। होम करी तेणें सिसाळें। काढोनियां अंत्रमाळें। पूजी कंकाळें कराळीं ॥ ६८ ॥ तान्हीं बाळें आकळोनी। खिळूनि आणिल्या बाळंतिणी। रजस्वला मातंगिणी। न्हाणिली परटिणी सवंर्दणीजळें ॥ ६९ ॥ कृष्णमेषाच्या दावणी। आणीक जीवांचिया श्रेणी। आणिल्या असती खिळोनी। अभिचारहवनीं होमावया ॥ १७० ॥ गर्जतां रामनामवाणी। पळालिया खिळणीपिळणी। सोडिल्या जीवश्रेणी। कृपा करोनी हनुमंतें ॥ ७१ ॥ बैसोनियां अति ध्यानस्थ। इंद्रजित एकाग्र होम करीत। त्यासी उठवील हनुमंत। होम समाप्त न होतांचि ॥ ७२ ॥ उठवितां इंद्रजितवीर। त्यासीं भिडेल पैं सौमित्र। युद्ध होईल घोरांदर। अति दुर्धर संग्राम ॥ ७३ ॥ दोघे वीर विचक्षण। दोघे जण रणप्रवीण। एका जनार्दना शरण। रणविंदाण अवधारा

१ अडसर. २ दोरीला. ३ सूर्याच्या प्रकाशमर्यादेचे पर्वत. ४ लावून. ५ फुलांच्या. ६ भयंकर बैठक. ७ अग्नि. ८ चांभाराच्या कुंडांतील पाण्यानें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ ७४ ॥ वदनीं वदता श्रीरघुनाथ । श्रीराम चालवी कार्यार्थ । एका जनार्दनीं वचनार्थ । निजपरमार्थ श्रीरामें ॥ १७५ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां निकुंभिलाबिलप्रवेशनं नाम सप्तत्रिंशत्तमोऽध्यायः ॥ ३७ ॥ ओंव्या ॥ १७५ ॥ श्लोक ॥ ३१ ॥

अध्याय अडतिसावा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ वानर बिळीं प्रवेशोन । जालें इंद्रजितदर्शन । बैसला आहे धरून ध्यान । जपावदान होमनिष्ठा ॥ १ ॥ वानरीं आसुडितांचि जाण । तो न सांडी प्रेतासन । त्याचें भंगेना तें ध्यान । जपावदान होमनिष्ठा ॥ २ ॥ घाय हाणितां दारुण । इंद्रजिताचें भंगेना ध्यान । हातींचें न राहे अवदान । होमविधान जपनिष्ठा ॥ ३ ॥ वानरवीरांचिया श्रेणी । शंख करिती दोनी कानीं । इंद्रजित डंडळीना ध्यानीं । होमविधानीं सादर ॥ ४ ॥ कष्टतांही वानरगण । ध्यान भंगेना अणुप्रमाण । हातींचें न राहे अवदान । होमविधान खुंटेना ॥ ५ ॥ तये काळीं बिभीषण । त्याचें भंगावया ध्यान । मायामंदोदरी निर्माण । करीत रुदन आणिली ॥ ६ ॥ रडत पडत आक्रंदत । आणिली होमशाळेआंत । जेथें बैसला इंद्रजित । शंख करीत तेथें आली ॥ ७ ॥ रावणाच्या दहाही शिरीं । भरोनियां ओंटी भरी । नानापरींच्या दीर्घस्वरीं । रुदन करी तें ऐका ॥ ८ ॥ रणीं मारिला दशानन । अझून कायसें रे ध्यान । उघडोनि निजनयन । पाहें दर्शन पित्याचें ॥ ९ ॥ माझा करसील कैवाडें । घेशील रावणाचा सूड । आलें तंव तूं ध्यानारूढ । हा मूढ अभिचार ॥ १० ॥ निघालें रावणाचें मडें । कायसें ध्यानाचें सांकडें । दहाही शिरें पाहें पुढें । म्हणोनि रडे अति दीर्घ ॥ ११ ॥ रणीं छेदिला दशमुख । मी पावलें परम दुःख । अझून कायसें अभिचारिक । महामूर्ख झालासी ॥ १२ ॥ रावणाचें निजशरीर । विदारिती गीध घार । तूं उरलासी ज्येष्ठ कुमर । परी संस्कार न करिसी ॥ १३ ॥ सांडून अभिचारविधान । करीं पित्याचें पिंडदान । भंगेना त्याचें ध्यान । होमावदान राहीना ॥ १४ ॥ इतुक्या अवसरांत । होमकुंडीं अजित रथ । आला वारुवांसहित । तेणें तळमळीत बिभीषण ॥ १५ ॥ इंद्रजित न पडे हो दुश्चित । न करवेचि कर्मघात । होमीं प्रकटला साश्व रथ । करील प्राणान्त अवघ्यांचा ॥ १६ ॥ सप्तावरणें भेदून । राक्षसांसीं करोन रण । यक्षिणीवटमूळ उघडून । अवघे जण येथें आलों ॥ १७ ॥ अवघे जण आलों येथ । तो उद्योग गेला व्यर्थ । होमीं प्रकटला रथ । आक्रंदत बिभीषण ॥ १८ ॥ भाक देवोनि श्रीरामासी । म्यां आणिलें सौमित्रासी । होमीं प्रकटल्या रथासी । इंद्रजितासी न मारवे ॥ १९ ॥ रथीं बैसोनि इंद्रजित । करील लक्ष्मणाचा घात । अवघ्यां आला पैं प्राणान्त । आक्रंदत बिभीषण ॥ २० ॥ इतुका काळपर्यंत । उगाचि होता हनुमंत । आक्रंदतां शरणागत । काळकृतान्त खवळला ॥ २१ ॥ तो म्हणे बिभीषणा पैं तूतें । मज निरविलें श्रीरघुनाथें । तुज कोण मारिता येथें । वृथा कां चित्तें भीतोसी ॥ २२ ॥ मारिलिया शरणागत । धिक् जीवित धिक् पुरुषार्थ । ऐसें बोलोनियां हनुमंत । काळकृतान्त खवळला ॥ २३ ॥ थरकत माथांची पैं शेंडी । वळोनी निजपुच्छाची वेढी । होमकुंडामाजी तांतडीं । घातली उडी हनुमंतें ॥ २४ ॥ अश्वशस्त्रेंसीं समवेत । कुंडीं निघत होता रथ । हनुमंतें देवोनि लात । पाताळगत तो केला ॥ २५ ॥ सर्वेचि उसळोनि तांतडीं । रागें इंद्रजित आसुडी । वाचेसी पडली बोबडी । कर्म निर्वंडी भंगलें ॥ २६ ॥ स्रुवा आसडोनि कराग्रें । उलंडलीं असृक्पात्रें । ख्याति लाविली वायुपुत्रें । निशाचरें हडबडलीं ॥ २७ ॥ कर्म न होतां समाप्त । कैसेनि आला हनुमंत । जंव पाहे विवरांत । अत्यद्भुत देखिलें ॥ २८ ॥ निधडा योद्धा वीर धीर । अचुकसंधानी सौमित्र । सवें वानरांचा भार । वीरीं विवर दाटलें ॥ २९ ॥ अति दुर्गम पंथ दारुण । भेदोनियां सप्तावरण । कैसेनि आले अवघे जण । पाहे आपण इंद्रजित ॥ ३० ॥ तंव देखिला बिभीषण । आमचें गुह्य गुप्तस्थान । दाखविता हा एक जण । कुळनिर्दळण हा आम्हां ॥ ३१ ॥ तंव बोलिला हनुमंत । युद्धीं इंद्र धरिला

१ हालेना, चळेना. २ साह्य, कैवार. ३ स्वाधीन केलें. ४ घाईनें. ५ समूळ. ६ रक्तपात्रें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

जीत । ब्रीदें पढविसी इंद्रजित । तो पुरुषार्थ आजि दावीं ॥ ३२ ॥ ब्रीदें पढविसी इंद्रजित । शेखीं लपसी विवरांत । कळला तुझा पुरुषार्थ । कपटी निश्चित अभिचारत्वें ॥ ३३ ॥ तुजसी करावया रण । निधडा आलासे लक्ष्मण । दावीं आपुली आंगवण । धनुष्या बाण सज्जूनी ॥ ३४ ॥

उक्तस्त्वाविंद्रजिच्छीघ्रमवस्थाप्यैव कर्मकृत् ।
स तु कर्मण्यनिर्वृत्ते मनः शल्यमिवोद्वहन् ॥ १ ॥
रथेनादित्यवर्णेन बलवान्रावणात्मजः ।
इंद्रजित्कवची खड्गी सध्वजः प्रत्यदृश्यत ॥ २ ॥
लक्ष्मणस्तमुवाचाथ रावणिं रघुनंदनः ।
समाह्वये त्वां संग्रामे सौम्य युद्धं प्रयच्छ मे ॥ ३ ॥

कर्म न होतां समाप्त । उठतां इंद्रजित तळमळित । होमकुंडीं प्रकटतां रथ । केला हताहत हनुमंतें ॥ ३५ ॥ हनुमंताएवढा वैरी । आणिक नाहीं संसारीं । राक्षसांतें नानापरी । करीत बोहरी येथें आला ॥ ३६ ॥ याचेनि कर्मभंगें जाण । मज अलोट आलें मरण । आतां सौमित्रासीं रण । करीन निर्वाणसंग्राम ॥ ३७ ॥ संग्राम करावया मर्गळा । सांडोनियां होमबिळा । शीघ्र आला वटमूळा । संमुख पावला सौमित्र ॥ ३८ ॥ परतोनि होमबिळाआंत । रिघों नेदी हनुमंत । बीळ आवरोनि समस्त । राहिला कृतान्त बिळद्वारीं ॥ ३९ ॥ पूर्वील जो कामग रथ । आदित्यतेजें लखलखित । कामग अश्वसंयुक्त । सालंकृत ध्वजेंसीं ॥ ४० ॥ मुकुटकुंडलें मेखळा । वीरकंकणें कंठमाळा । कवच लेइला तो मर्गळा । खड्ग करतळीं तुकीतसे ॥४१॥ ध्वजच्छत्रपताकान्वित । सारथ्यानें आणिला रथ । तेथें बैसला इंद्रजित । रणीं गर्जत साटोपें ॥ ४२ ॥ संमुख देखोनि लक्ष्मण । इंद्रजित बोलिला आपण । आम्ही तुम्ही दोघे जण । करूं निर्वाणसंग्राम ॥४३॥ तुझे हातें मज प्राणान्त । कां माझेनि हातें तुझा घात । हाचि आजिचा युद्धार्थ । जाण सुनिश्चित सौमित्रा ॥ ४४ ॥ ऐसें बोलोनि विस्मित । इंद्रजित स्वयें असे पाहत । क्रमोनियां दुस्तर पंथ । कैसेनि येथ स्वयें आला ॥ ४५ ॥ भेदूनियां सप्तावरण । कैसेनि आले वीर दारुण । तंव देखिला बिभीषण । कुळनिर्दळण हा आम्हां ॥ ४६ ॥

किं कृतं शाठ्यमच्छिद्रं प्रहरस्यात्मजे मयि ।
शोच्यस्त्वमसि दुर्बुद्धे निंदनीयश्च साधुभिः ॥ ४ ॥
यस्त्वं स्वजनमुत्सृज्य परेषां भृत्यतां गतः ।
न जातित्वं न सौहार्दं न भ्रातृत्व न बंधुता ॥ ५ ॥
रक्षितं नैव शूरत्वं क्लीबत्वं प्रकटीकृतम् ॥ ६ ॥

देखोनियां बिभीषण । कोपें इंद्रजित जाला अग्न । कैसें बोले तो निर्भर्त्सून । अनुक्षून पितृव्या ॥ ४७ ॥ साधुसज्जनसुहृद्भावेंसीं । रावणें दिधलें यौवराज्यासी । ज्येष्ठसन्मान सभेसी । तुज राक्षसीं वंदिजे ॥ ४८ ॥ प्रधान आणि सेना कुमर । केले तुझे आज्ञाधर । तो तूं सांडोनि दशशिर । गेलासी सत्वर श्रीरामा शरण ॥ ४९ ॥ जैसा पिता तैसा चुलता । तो तूं मिळोनि रघुनाथा । करावया मज अपत्याच्या घाता । कपींसी गुह्यार्था दाविसी ॥ ५० ॥ सांडून आमचें सुहृदपण । श्रीरामासी रिघोनि शरण । करावया कुळनिर्दळण । वर्मे संपूर्ण सांगसी ॥ ५१ ॥ दांडा जन्मोनि वृक्षावरी । मिळोनि कुऱ्हाडीमाझारी । तो कुळाचाचि छेद करी । तैशापरी तूं येथें ॥ ५२ ॥ नाहीं राखिला जातिधर्म । नाहीं राखिला कुळानुक्रम । साधूंमाजी तूं पापी परम । निंद्य जन्म पैं तुझा ॥ ५३ ॥ सांडून यौवराज्यासी आगळिक । जालासी श्रीरामाचा सेवक । शठ नष्ट तूं नपुंसंक । परम दांभिक साधुत्वें ॥ ५४ ॥

क्रुद्धेनेंद्रजिता वाक्यं परुषं रावणानुजः ।
इत्युक्तो भ्रातृपुत्रेण प्रत्युवाच विभीषणः ॥ ७ ॥
अजानन्निव मच्छीलं किं त्वमेव ब्रवीषि माम् ।
राक्षसेंद्रसुतानार्य पारुष्यं त्यज गौरवात् ॥ ८ ॥
परोऽपि हितवान्बंधुर्बंधुरप्यहिते रतः ।
अहितो देहजो व्याधिर्हितमारण्यमौषधम् ॥ ९ ॥
परस्वानां च हरणं परदाराभिमर्षणम् ।
सुहृदामपि संकोपस्त्रयो दोषाः क्षयावहाः ॥ १० ॥

इंद्रजिताचें निंद्य वचन । ऐकोनियां बिभीषण । काय बोलिला आपण । धर्मवचन धर्मात्मा ॥ ५५ ॥ ऐक बापा इंद्रजिता । तुज कळलीसे माझी शीळता । जाणोनि निंदिसी कां वृथा । दुर्मदता साभिमानें ॥ ५६ ॥ तुज संग्रामीं नाहीं बळ । नष्ट

१ शेवटीं. २ नाश. ३ इच्छेंकरून जाणारा. ४ आपल्या चुलत्याला. ५ स्वभाव. ६ मदांध होऊन.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

कपटी तूं केवळ । अभिचार हें तुझें शीळ । पापी प्रबळ तूं एक ॥ ५७ ॥ करोनियां अभिचारता । मारूं पाहसी श्रीरघुनाथा । तुझा साक्षेपें घात करितां । पाप सर्वथा असेना ॥ ५८ ॥ परद्रव्याचें ज्यासी हरण । परदाराभिलाषण । सुहृदांचा द्वेष पूर्ण । तेथें मरण सहजचि ॥ ५९ ॥ सीताभिलाषें हताहत । पापें निमालेति समस्त । तुम्हांसी तुम्हीं केला घात । आत्मा रघुनाथ द्वेषितां ॥ ६० ॥ सखा बंधु करी अनहित । तोचि वैरी पैं निश्चित । निरपराध जो हितान्वित । तो परम आप्त निजसखा ॥ ६१ ॥ अहित देहींचा देहज व्याधी । जो कां आपला आपण बाधी । हित अरण्यस्थ ओषधी । जे आधिव्याधिच्छेदक ॥ ६२ ॥ तेंवी आप्त तुम्ही उन्मादता । मज हाणोनियां लाथा । केलें माझिया स्वहिता । शरण रघुनाथा धाडिलें ॥ ६३ ॥ परदारपरद्रव्यहरण । या पापें बुडाला रावण । तुम्ही अवघे पापी पूर्ण । पावाल मरण निजपापें ॥ ६४ ॥

विभीषणवचः श्रुत्वा रावणिः क्रोधमूर्च्छितः ।
अब्रवीत्परुषं वाक्यं क्रयन्हेत्वर्थसंयुतम् ॥ ११ ॥
प्रागेव विश्वविजयी न निषेधयिता मम ।
यदा जहार रत्नानि भुवनेभ्योऽखिलान्यपि ॥ १२ ॥
तदा त्वमपि रत्नानां भागभागभवः स्वयम् ।
निहतं वालिनं दृष्ट्वा सुग्रीवमभिषेचितम् ॥ १३ ॥
त्वया तद्राज्यलुब्धेन दुरात्मन्समनुष्ठितम् ॥ १४ ॥

बिभीषणाचें निजवचन । धर्मार्थरूप अति तीक्ष्ण । तेणें इंद्रजित क्षोभोन । काय आपण बोलत ॥ ६५ ॥ त्रिभुवनींच्या संपत्ती । हरूनि आणी लंकापती । वांटा घेसी हातोहातीं । उल्लास चित्तीं मानिसी ॥ ६६ ॥ वांटा घेतां आपण । परद्रव्यापहरण । न म्हणसीच पापाचरण । शठ संपूर्ण तूं एक ॥ ६७ ॥ छेदोनियां वाळीचा कंठ । सुग्रीवा केला राज्यपट । तेंवी राज्यलोभें तूं कपटी नष्ट । श्रीरामीं वरिष्ठ शरणागत ॥ ६८ ॥ बिभीषण भला साधुसंत । ऐसा पवाडा विख्यात । शेखीं राज्यलोभीं ठेवोनि चित्त । शरणागत श्रीरामीं ॥६९॥ इंद्रजितें स्वमुखें आपण । निंदितां बिभीषण । तें देखोन लक्ष्मण । आला आपण साटोपें ॥ ७० ॥ सज्जोनियां धनुष्यबाण । मांडून माहेश्वरी ठाण । घ्यावया इंद्रजिताचा प्राण । आला लक्ष्मण साटोपें ॥ ७१ ॥ संमुख देखोनि लक्ष्मण । इंद्रजित गर्जे आपण । मजसीं करावया रण । आंगवण तुम्हां कैंची ॥ ७२ ॥

इन्द्रजिद्धनुरादाय शरांश्चाशीविषोपमान् ।
उवाच चेदं संरब्धः सौमित्रिं स विभीषणम् ॥ १५ ॥
तांश्च वानरशार्दूलान्पश्यध्वं मत्पराक्रमम् ।
अद्य वो मामका बाणा महाकार्मुकनिःसृताः ॥ १६ ॥
गात्राणि विधमिष्यंति तूलराशिमिवानलः ।
अद्य वो गमयिष्यामि सर्वानेव यमक्षयम् ॥ १७ ॥

धनुष्यासी घालोनि हात । इंद्रजित रणरंगीं गर्जत । तुम्ही जे जे आलेति येथ । तुम्हां प्राणान्त माझेनि ॥ ७३ ॥ लक्ष्मण आणि बिभीषण । प्रथम यांचा घेईन प्राण । हनुमान वज्रदेही मारीन । निर्वाणबाण विंधोनी ॥७४॥ अंगद नळ नीळ जांबवंत । आणिक वानर समस्त । बाणीं करोनि क्षतविक्षत । मारीन येथ संग्रामीं ॥ ७५ ॥ माझे धनुष्याचा बाण । व्यर्थ न वचे पैं जाण । घेईन अवघियांचा प्राण । रणनिर्वाण हें माझें ॥ ७६ ॥ रामलक्ष्मण तुम्ही दोन्ही । दोन वेळां शरबंधनीं । घोळसिले रणांगणीं । तेंही विसरोनी आलेती ॥७७॥

तच्छ्रुत्वा रावणेर्वाक्यं गर्वितं लक्ष्मणस्तदा ।
अभ्यधावत्सुसंक्रुद्धो राक्षसं वाक्यमब्रवीत् ॥ १८ ॥
न वाचां दुर्गमं पारं कार्याणां राक्षसाधम ।
वाचा व्याहृत्य जानीषे कृतार्थोऽस्मीति दुर्मते ॥ १९ ॥
अंतर्ध्यानगतेनावां यत्त्वयाभिहतौ रणे ।
तस्कराचरितो मार्गो यः स शूरैर्न सेवितः ॥ २० ॥
तदाहवपथे प्राप्य स्थितोऽहं तव राक्षस ।
दर्शयस्वाद्य यत्तेजो वाचा किं बहु कत्थसे ॥ २१ ॥

इंद्रजिताचे ऐसे वाक्यार्थ । ऐकोनियां गर्वान्वित । लक्ष्मण बोले उपहासत । गर्वहत करावया ॥ ७८ ॥ वाचेचे बाणप्रहारीं । कोणीं मारिले नाहीं वैरी । तुझ्या शूरत्वाची थोरी । जे बोलवरी वाढिवें ॥ ७९ ॥ शूराचें मुख्य लक्षण । करोनियां दाविती रण । तूं तंव तोंडभांड जाण । भंडपुराण वाढीव ॥ ८० ॥ बडबडेची आंगवण । तुझे ठायीं

१ जारणमारण. २ पराक्रम. ३ आवेशानें. ४ पवित्रा. ५ पराक्रम. ६ नुसती बडबड करणारा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

दिसे संपूर्ण । संमुख न करवे रण । जासी पळोन कपटत्वें ॥ ८१ ॥ अंधारीं लपोनि आपण । आम्हांसीं केलें शरबंधन । तो तंव चोरीचा मार्ग जाण । नव्हे लक्षण शूराचें ॥ ८२ ॥ संमुख करावया संग्रामता । तुज नाहीं सामर्थ्यता । मारून मायेची सीता । विवराआंतौता लपसी तूं ॥ ८३ ॥ अतिकाय मकराक्ष जाण । संमुख करोनियां रण । क्षात्रधर्मे दिधला प्राण । कपटी संपूर्ण तूं एक ॥ ८४ ॥ ज्यासी लाविलें शरबंधन । तो मी आलों स्वयें लक्ष्मण । करोनि दावीं आंगवण । बडबडोन काम काय ॥ ८५ ॥

एवमुक्तो धनुर्भीमं परामृश्य महाबलः ।
विससर्ज शितान्बाणानिंद्रजित्समितिंजयः ॥ २२ ॥
तदोत्सृष्टा बलवता शरास्तीक्ष्णा विषोपमाः ।
संप्राप्य लक्ष्मणं पेतुः श्वसन्त इव पन्नगाः ॥ २३ ॥
सशरौघैश्च विद्धांगो रुधिरेण च भूषितः ।
शुशुभे लक्ष्मणः श्रीमान्विधूम इव पावकः ॥ २४ ॥
इन्द्रजित्त्वात्मनः कर्म प्रसमीक्ष्याथ राक्षसः ।
विनद्य च महानादमिदं वचनमब्रवीत् ॥ २५ ॥
अद्य मत्कार्मुकोत्सृष्टाः शरास्तीक्ष्णाः सुपत्रिणः ।
आदास्यंति शरीरात्ते जीवितं जीवितच्छिदः ॥ २६ ॥

ऐकोनि लक्ष्मणाचें वचन । इंद्रजित अति कोपायमान । उग्र शरचाप सज्जून । तीक्ष्ण बाण विंधिले ॥ ८६ ॥ जैसे धुंधुवात विखार[1] । तैसे सोडिले उग्र शर । ओरखडोनियां शरीर । वाहे रुधिर सौमित्रा ॥ ८७ ॥ अभेद्यकवची[3] श्रीलक्ष्मण । त्यास भेदूं न शकती बाण । रुधिरोक्षित शोभायमान । रणगर्जन राक्षसां ॥ ८८ ॥ सर्वांगीं वाहतां रुधिर । जैसा तेजस्वी वैश्वानर[4] । तैसा शोभतसे सौमित्र । निशाचररणमर्दी ॥ ८९ ॥ देखोनि लक्ष्मणाचें रुधिर । इंद्रजित म्हणे मी योद्धा थोर । बाणीं भेदला सौमित्र । गर्जे थोर सिंहनादें ॥ ९० ॥ जे जे तुम्ही आलेति येथ । ते बाणीं भेदोनि समस्त । सौमित्रेंसीं समवेत । जीवितान्त करीन ॥ ९१ ॥ माझे सुवर्णपत्राचे बाण । घेतील अवध्यांचा प्राण । ऐकोनि इंद्रजितगर्जन । काय लक्ष्मण बोलत ॥९२॥ नाहीं आंगवण गाढी । नुसती बोलाची प्रौढी । काय जिंतिलें रणनिर्वेडीं । उभवोनि गुढी गर्जसी ॥ ९३ ॥

इत्युक्त्वा पंचपर्वाणमाकर्णापूरितं शरम् ।
निचखान महावेगं लक्ष्मणो रावणात्मजम् ॥ २७ ॥
स शरेणाहतस्तेन सरोषो रावणात्मजः ।
सुप्रमुक्तैः शितैर्बाणैः प्रतिविव्याध लक्ष्मणम् ॥ २८ ॥
स बभूव महाभीमो नरराक्षससिंहयोः ।
विमर्दस्तुमुलो युद्धे परस्परवधैषिणोः ॥ २९ ॥

इंद्रजितगर्वितगर्जन । ऐकोनि स्वयें लक्ष्मण । घेवोनि पंचपर्वी बाण । विंधी आपण साटोपें ॥९४॥ लक्ष्मणें रणनिर्वेडीं । शर चाप जोडोनि जोडी । ओढी आकर्ण कानाडी । प्रतापप्रौढीं साटोपें ॥ ९५ ॥ अभेद्य कवच भेदूनि जाण । लागतां लक्ष्मणाचा बाण । घायें इंद्रजित तळमळून । अमित बाण वर्षला ॥ ९६ ॥ येतां इंद्रजिताचे शर । सौमित्र सोडी बाण अनिवार । दोघेजण महाशूर । अति दुर्धर संग्रामीं ॥ ९७ ॥ लघुलाघवी अति चपळ । दोघे वर्षती शरजाळ । नर राक्षस सिंह शार्दूळ[6] । दोघे कुशळ संग्रामीं ॥ ९८ ॥ वर्मी विंधोनियां बाण । येरयेरांचा[7] घ्यावा प्राण । टपताती दोघे जण । रणप्रवीण रणयोद्धे ॥ ९९ ॥

उभौ हि बलसंपन्नावुभौ विक्रमशालिनौ ।
उभावपि च विख्यातौ सर्वशस्त्रास्त्रकोविदौ ॥ ३० ॥
उभौ परमदुर्धर्षावुभौ परमतेजसौ ।
युयुधाते महात्मानौ व्याघ्रकेसरिणाविव ॥ ३१ ॥
भूतैर्बहुभिराकाशं विस्मितैरावृतं बभौ ।
ऋषयः पितरो देवा गंधर्वा गरुडोरगाः ॥ ३२ ॥
शतक्रतुं पुरस्कृत्य ररक्षुर्लक्ष्मणं रणे ॥ ३३ ॥

दोघे जण बळवंत । दोघे जण अति विख्यात । दोघे जण प्रतापवंत । दोघे समर्थ संग्रामीं ॥ १०० ॥ दोघे धनुर्विद्यानिपुण । दोघे शस्त्रास्त्रप्रवीण । लघुलाघवी दोघे जण । दुर्धर रण दोघांचें ॥ १ ॥ दोघे जण महावीर । दोघे जण महाशूर । दोघे जण परम धीर । दोघे दुर्धर संग्रामीं ॥२॥ दोघां वाढीव प्रसिद्ध । दोघां नाहीं श्रमस्वेद । दोघां चढला रणमद । दोघे सन्नद्ध संग्रामीं ॥ ३ ॥ एक

१ लटकी, खोटी. २ सर्प. ३ अभेद्य कवच घातलेला. ४ अग्नि. ५ धनुष्याची दोरी. ६ वाघ. ७ परस्परांचा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

केवळ सत्त्वस्थिती । एक केवळ कपटमूर्ती । एकामाजी अगाध शांती । एक छळणोक्तीं निपुण ॥ ४ ॥ दोघांचेंही युद्ध दुर्धर । पाहूं आले सुरवर । यक्ष गंधर्व¹ किन्नर । विद्याधर किंपुरुष ॥ ५ ॥ दैत्य दानव मानव पितर । देव ऋषी सनत्कुमार । युद्धा पाहूं आला इंद्र । वरुण कुबेर यम सोम ॥ ६ ॥ ब्रह्मा स्वयें अति सत्वर । पाहूं आला युद्ध दुर्धर । उमे²सहित श्रीशंकर । सहपरिवार भूतगणीं ॥ ७ ॥ रणीं रक्षावया सौमित्र । अवघे आले पैं सत्वर । विमानीं दाटलें अंबर । विजयमंत्र ऋषींचे ॥ ८ ॥ लक्ष्मण देखोनि दुर्धर । रणीं क्षोभला निशाचर । अनुलक्षोनि सौमित्र । काय उत्तर बोलत ॥ ९ ॥

अद्य ते दर्शयिष्यामि तिष्ठेदानीं स्थिरो भव ।
इत्युक्त्वा सप्तभिर्बाणैरभिविव्याध लक्ष्मणम् ॥ ३४ ॥
दशभिश्च हनूमंतं तीक्ष्णधारैः शरोत्तमैः ।
ततः शरशतेनैव सुप्रयुक्तेन वीर्यवान् ॥ ३५ ॥
क्रोधाद्द्विगुणसंरंभं निर्बिभेद विभीषणम् ।
स दृष्ट्वा राक्षसेंद्रस्य कर्म रामानुजस्तदा ॥ ३६ ॥
अचिंतयित्वा प्रहसन्नैतत्किंचिदपि ब्रुवन् ।
अब्रवीच्च शरान्घोरानुद्यम्य नरपुंगवः ॥ ३७ ॥
लघवश्चाल्पवीर्याश्च शरा हीमे सुखास्तव ॥ ३८ ॥

इंद्रजितें करूनि गर्जन । विंधिला सात बाणीं लक्ष्मण । हनुमंतासी दहा बाण । अति दारुण विंधिले ॥ ११० ॥ मारावया बिभीषण । पोटांतून क्रोध दारुण । विंधिले शतानुशत बाण । घ्यावया जाण प्राण त्याचा ॥ ११ ॥ इंद्रजिताचे सर्व बाण । येतां देखोनि लक्ष्मण । वरच्यावरी तोडी आपण । बिभीषण रक्षावया ॥ १२ ॥ छेदूनि इंद्रजिताचे बाण । त्याही कर्माचा अभिमान । स्वमुखें न वदे लक्ष्मण । गंभीर पूर्ण संग्रामीं ॥ १३ ॥ बिभीषण शरणागत । कोणी लावितांचि हात । त्याचा करावया घात । सावचित्त सौमित्र ॥१४॥ इंद्रजिताप्रति लक्ष्मण । स्वयें सांगताहे आपण । पुष्पप्राय³ लागती बाण । आंगवण तुज नाहीं ॥ १५ ॥ कपटें भस्म शौर्यवृत्ती । नाहीं सामर्थ्य ना शक्ती । रणीं वल्गसी⁴ किंती । निर्लज्ज निश्चितीं तूं एक ॥ १६ ॥ ऐसें बोलोनि लक्ष्मण । घ्यावया इंद्रजिताचा प्राण । दुर्धर विंधिले पैं बाण । रणविंदानें⁵ लघुहस्तें ॥ १७ ॥

तस्य बाणैरपध्वस्तं कवचं कांचनं महत् ।
व्यशीर्यत रथोपस्थे ताराजालमिवांबरात् ॥ ३९ ॥
निकृत्तवर्मा नाराचैर्बभूव स कृतव्रणः ।
इंद्रजित्समरे शूरः सर्वतो रुधिरोक्षितः ॥ ४० ॥
स शक्रासनसंस्पर्शैर्लक्ष्मणेन हतः शरैः ।
मुहूर्तमभवन्मूढः सर्वतः क्षुभितेंद्रियः ॥ ४१ ॥
उपलभ्य मुहूर्तेन संज्ञां प्रत्यागतेंद्रियः ।
ददर्शावस्थितं वीरमाजौ दशरथात्मजम् ॥ ४२ ॥

इंद्रजित रथगत आपण । त्यासी लक्ष्मणें विंधोनि बाण । हेमकवच शोभायमान । पाडिलें छेदून रणभूमीं ॥ १८ ॥ वर्षोनियां शरजाळीं । घायें कवचा केली रांगोळी । शोभे लखलखीत भूतळीं । नभोमंडळीं जेंवी तारा ॥ १९ ॥ कवच छेदोनि सत्वर । निधडा इंद्रजित झुंजार । घायवँट⁶ केला जर्जर । वाहे रुधिर सर्वांगीं ॥ १२० ॥ वज्रप्राय दुर्धर शर । वर्मीं विंधितां सौमित्र । मूर्च्छित पडला निशाचर । महावीर इंद्रजित ॥ २१ ॥ घायें लागली अर्धचंद्री । प्राण पांगुळला शरीरीं । इंद्रियें तटस्थ व्यापारीं । धरेवरी पडियेला ॥२२॥ चेतना लपाली अंतरीं । आठव नाठवे शरीरीं । मूढमति धरेवरी । घटका चारी मूर्च्छित ॥ २३ ॥ उपलब्धि⁹ येतां जाण । इंद्रजित होतां सावधान । भोंवतें पाहे आपण । देखे लक्ष्मण रणरंगीं ॥ २४ ॥ हातीं वाहोनियां मेढें¹⁰ । अंतका अंतक निधडा । महाकाळाचा संवगडा । देखिला पुढां सौमित्र ॥ २५ ॥ लक्ष्मणाचा खटाटोप । देखोनि युद्धाचा साटोप । इंद्रजितासी आला कंप । रणाभिदर्प मावळला ॥ २६ ॥ निधडा देखोनि लक्ष्मण । इंद्रजित जाला कंपायमान । पावोनियां अंतर्धान । करावया छळण विचारी ॥ २७ ॥ करावया लक्ष्मणासी छळण । इंद्रजित वर्षे अमित बाण । तैसेच वर्षे लक्ष्मण । बाणीं गगन व्यापिलें ॥ २८ ॥

तौ प्रयुक्तौ पुनर्वीरौ रणे लक्ष्मणराक्षसौ ।
शरवर्षं हि वर्षंतौ जघ्नतुस्तौ परस्परम् ॥ ४३ ॥

१ गंधर्वविशेष. २ पार्वतीसह. ३ फुलाप्रमाणें. ४ बडबडतोस. ५ रणकौशल्य. ६ लढवय्या. ७ जखमी. ८ पृथ्वीवर. ९ शुद्धि. १० धनुष्य.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

इन्द्रजिल्लक्ष्मणश्चैव परस्परजयैषिणौ ।

चक्रतुस्तुमुलं घोरं सन्निपातं मुहुर्मुहुः ॥ ४४ ॥

पुढती दोघे महावीर । नरशूर निशाचर । युद्धा मिसळले सत्वर । दुर्धर शर वर्षोनी ॥ २९ ॥ बाण वर्षतां दोघां वीरां । रणीं उठला रणधुळोरा । बाणीं खिळिली धरा¹ । बाणीं अंबरा व्यापिलें ॥ १३० ॥ बाण कोंदले दशदिशांत । बाणीं व्यापिले दिगंत । आच्छादिले चंद्रादित्य । दोघे उन्मत्त रणमारें ॥ ३१ ॥ साधकता बाधकता युद्धस्थितीं । रणमारका माराच्या युक्ती । दोघां धनुर्विद्यार्व्युत्पत्ती । दोघे भिडती निःशंक ॥ ३२ ॥ येरयेरांचा करावया घात । शस्त्रास्त्रीं मिरवत हस्त । शस्त्रीं शस्त्रांचा निःपात³ । वीरकंदनार्थ करिताती ॥ ३३ ॥ लक्ष्मण वीर रणोन्मत्त । निधडा त्याचा पुरुषार्थ । जाणोनियां इंद्रजित । निजकपटार्थ मांडिला ॥ ३४ ॥ बाणीं झांकिले रविकर⁴ । रणीं पडतां अंधार । गुप्त केला रहंवर⁵ । अश्वयंतयांसमवेत⁶ ॥३५॥ मेघ जिणोनि विविध । नांव पावला मेघनाद । त्यांचे पृष्ठावरी सन्नद्ध । बाण सुबद्ध विंधीत ॥ ३६ ॥ इंद्रजित जावोनि मेघपृष्ठीं । दुर्धर वर्षे बाणवृष्टी । लक्ष्मण मारीन उठाउठीं । वानरकोटीसमवेत ॥ ३७ ॥ जेणें मार्गें आलेति येथ । तो बाणें आच्छादिला लंकापथ । पावों न शकां रघुनाथ । तुम्हां प्राणान्त माझेनि ॥ ३८ ॥ खुंटली श्रीरामाची भेटी । खुंटली श्रीरामासीं गोष्टी । येथें माझिया बाणवृष्टीं । उठाउठीं मराल ॥ ३९ ॥ ऐकतां इंद्रजिताचें गर्जन । आक्रंदला बिभीषण । निशाचरें केलें छळण । गेला निघोन मेघपृष्ठीं ॥ १४० ॥ निधडा वीर लक्ष्मण । घायें त्याचा घेईल प्राण । युद्धसंधीं करोनि छळण । गेला निघोन मेघपृष्ठीं ॥ ४१ ॥ तेथें न चले अनुसंधान । त्याचे आम्हां लागती बाण । कैसेनि वांचेल लक्ष्मण । बिभीषण आक्रंदे ॥ ४२ ॥ सौमित्रासी रणाभिघात । वानर मारील समस्त । आम्हांसी आला प्राणान्त । आक्रंदत बिभीषण ॥ ४३ ॥ आक्रंदतां बिभीषण । आलें हनुमंता स्फुरण । शरणागता आलें मरण । धिक् आंगवण पैं माझी ॥ ४४ ॥ माझेनि भरंवसें जाण । स्वयें श्रीरामें आपण । शरणागत बिभीषण । आणि लक्ष्मण धाडिले ॥ ४५ ॥ जीवें जीता मी हनुमंत । कोण करूं शके घात । आश्वासोनि शरणागत । रणीं गर्जत साटोपें ॥ ४६ ॥ इंद्रजित केवळ कपटमूर्ती । त्याचें बळ तें छळणोक्ती । यालागीं आक्रंदसी किती । क्षणानुवृत्तीं⁸ मारीन ॥ ४७ ॥ करावया इंद्रजिताची शांती । लक्ष्मणा वाहोनियां हातीं । वेगें वाढला मारुती । दुर्धर वृत्तीं अत्युग्र ॥ ४८ ॥ तळहातीं वाहोनियां जाण । जेथून इंद्रजित विंधी बाण । तेथें आणोनि लक्ष्मण । केलें गर्जन हनुमंतें ॥ ४९ ॥ ऐकोनि हनुमंतगजर । प्रत्यक्ष देखोनि वानर । येथेंही आणिला सौमित्र । निशाचर दचकला ॥ १५० ॥ एका जनार्दना शरण । इंद्रजित लक्ष्मण । दोघे करिती निर्वाण । सावधान अवधारा ॥ १५१ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां इंद्रजिन्मेघपृष्ठगमनं नाम अष्टत्रिंशत्तमोऽध्यायः ॥ ३८ ॥ ओंव्या ॥ १५१ ॥ श्लोक ॥ ४४ ॥

अध्याय एकुणचाळिसावा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ इंद्रजित जातां मेघपृष्ठीं । हनुमान त्याची न सांडी पाठी । निर्दळावया⁹ महाकपटी । उठाउठीं पावला ॥ १ ॥ करावया इंद्रजिताचा घात । लक्ष्मण घेवोनियां हातांत । वेगें वाढला हनुमंत । मेघापर्यंत साटोपें ॥ २ ॥ वानरसैन्यासमवेत । तळीं असतां शरणागत । छळणें इंद्रजित करी घात । रक्षणार्थ कपि योजी ॥ ३ ॥ बिभीषण लक्ष्मण । आणि समस्त वानरगण । लोमें¹⁰ तुटों नेदीं जाण । आंगवण पहा माझी ॥ ४ ॥ पुच्छाचिया आंकोड्याआंत । वानर आणि शरणागत । बैसवोनियां समस्त । वज्रकवचांत राखिले ॥ ५ ॥ येरीकडे¹¹ हनुमंत । करावया इंद्रजिताचा घात । खवळला रणाआंत । तोही वृत्तान्त अवधारा ॥ ६ ॥ ठाणमाण धनुष्यबाण । कपिकराग्रीं लक्ष्मण । अंगीं आदळतां जाण । इंद्रजित पूर्ण हडबडिला¹² ॥ ७ ॥ कैसेनि आला पैं हा येथ । घेवोनि आला हनुमंत । तें देखोनि इंद्रजित । चळीं कांपत अति धाकें

---

१ पृथ्वी. २ धनुर्विद्येचें कौशल्य. ३ संहार. ४ सूर्याचे किरण. ५ रथ. ६ घोडे व सारथी यांसह. ७ जीवंत.

८ क्षणाच्या अवकाशांत. ९ मारण्याकरितां. १० केंस. ११ दुसरीकडे. १२ घाबरला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ ८ ॥ कायसें बापुडें लक्ष्मण । निधडी कपीची आंगवण । मजसीं करावया रण । आणिला आपण सौमित्र ॥ ९ ॥ सुरनरां अगम्य पूर्ण । तें हें माझें गुप्तस्थान । तेथेंही आणिला लक्ष्मण । वैरी पूर्ण हनुमंत ॥ १० ॥ इंद्रजितासी म्हणे लक्ष्मण । सांडून पळालासी रण । कपटें करावें छळण । हेचि आंगवण तुजपासीं ॥ ११ ॥ इंद्र जिंतिला म्हणविसी । शेखीं संग्रामीं पळसी । लाज नाहीं तुजसी । येवोनि लपसी दुर्गमीं[1] ॥ १२ ॥ हनुमंताचा निजधर्म । दुर्गम तें तें आम्हां सुगम[2] । ऊठ वरता करीं संग्राम । इंद्रजित परम निखंदिलां[3] ॥ १३ ॥ वर्मी खोंचला निशाचर । कांहीं न देववे उत्तर । सज्जोनियां चाप शर । युद्धा सत्वर मिसळला ॥ १४ ॥ त्यासीं करावया रण । संमुख चालिला लक्ष्मण । धनुष्या वाहोनियां गुण[4] । निर्वाणबाण सज्जिले ॥ १५ ॥ एक गज एक केसरी । एक नर एक नरहरी । एक मुरु एक मुरारी । ऐसियापरी मिसळले ॥ १६ ॥ एक सर्प एक सर्पारी । एक त्रिपुर एक त्रिपुरारी । एक शंबर एक शंबरारी । ऐसियापरी मिसळले ॥ १७ ॥ दोघांचेंही शरजाळ । सुटतां व्यापिलें अंतराळ[5] । बाणीं खिळलें भूतळ । दोघे चपळ लघुहस्तें ॥ १८ ॥ येरयेरांचा प्राणान्त । करावया खवळले अत्यद्भुत । वर्में कर्में घात पात । घाय हाणीत लघुवेगें ॥ १९ ॥ दोघे वीर संग्रामश्रेष्ठ । शस्त्रास्त्रवेत्ते अति वरिष्ठ । दोघे वीर भट सुभट । रणसंनिष्ठ साटोपें ॥ २० ॥ इंद्रजिताचे दुर्धर बाण । लक्ष्मणें केले तृणासमान । सौमित्राचे शर दारुण । सर्वांगीं पूर्ण खडतरले ॥ २१ ॥ जेंवी तृणांकुर गिरीवर । तेंवी बाणीं खिळिला निशाचर । सर्वांगीं वाहे रुधिर । इंद्रजित थोर हडबडिला ॥ २२ ॥ इंद्रजिताची शौर्यशक्ती । शस्त्रास्त्ररणव्युत्पत्ती । लक्ष्मणें नेली भस्मांतीं । संग्रामीं ख्याती लावोनी ॥ २३ ॥ सौमित्र योद्धा अति दारुण । संमुख भिडतां घेईल प्राण । त्यासीं करावया छळण । मांडिलें विंदाण कपटाचें ॥ २४ ॥ रथ सारथी नभोगत[6] । स्वयें संग्रामीं करोनि गुप्त । अदृश्यगतीं बाण विंधीत । अतर्क्यघात संग्रामीं ॥२५॥ मारावया बिभीषण । गुप्तगतीं विंधी बाण । हनुमान नित्य सावधान । सांडिले छेदून पुच्छाग्रीं ॥२६॥ लांगूल[7]वज्रकवचाआंत । हनुमंतें राखिले स्वस्थ । न चले बिभीषणासी घात । तळमळत इंद्रजित ॥ २७ ॥ मुख्य वैरी हनुमंत । त्याचा करावया निःपात । सारथी धांविन्नला गुप्त । गदाघात हाणावया ॥ २८ ॥ गदा हाणितां आतुर्बळी । घायें गदा जाली रांगोळी । सारथी आदळला भूतळीं । अति तळमळी आघातें ॥ २९ ॥ हनुमंतें हाणितां लाथ । सवेग सारथी जाला गुप्त । पळोनि गेला रथाआंत । भाग्यें प्राणान्त चुकलासे ॥ ३० ॥ मारावया हनुमंत । सारथी होवोनि गेला गुप्त । लक्ष्मण झोंबला संग्रामांत । करावया घात सारथ्याचा ॥ ३१ ॥ लक्ष्मण आणि हनुमंत । दोघे क्षोभले रणांत । इंद्रजितानें केला छळणार्थ । तोही वृत्तान्त अवधारा ॥ ३२ ॥ रथ घडघडी पश्चिमेसी । वारू हिंसती उत्तरेसी । बाण विंधीत दक्षिणेसी । करी पूर्वेसी सिंहनाद ॥ ३३ ॥ कपटी इंद्रजित संग्रामांत । कांहीं केल्या नव्हे अभिव्यक्त[8] । लक्ष्मण होतां चिंताग्रस्त । तेणें हनुमंत क्षोभला ॥ ३४ ॥ पुच्छ तळपतां आकाशीं । रथ आकळिला वारुवेंसीं[9] । छळणें पळणें सितरींवयासी[10] । कपिपुच्छेंसीं चालेना ॥ ३५ ॥ अति गुप्तत्वें गगनाआंत । विद्युत्प्राय जो तळपे रथ । तो पुच्छाग्रें बांधी हनुमंत । केला अभिव्यक्त संग्रामीं ॥ ३६ ॥ खुंटलें इंद्रजिताचें छळणें । खुंटलें रथाचें पळणें । खुंटलें आभिचारिक करणें । खुंटलें जाणें यज्ञवाटा ॥ ३७ ॥ खुंटलें दशमुख देखणें । खुंटलें लंकेमाजी जाणें । खुटलें जीवितेंसीं जिणें । ऐसें करणें कपिपुच्छें ॥ ३८ ॥ मुख्य वैरी हनुमंत । इंद्रजित वज्रघाय हाणीत । वज्र भंगोनि लचके हात । मग कुंथत संग्रामीं ॥ ३९ ॥ माझ्या निजवज्राचा घात । करिता मुख्य हनुमंत । त्यासीं न चले घातपात । इंद्रजित अति दुःखी ॥ ४० ॥ येथून खुंटली यज्ञवाट । खुंटली लंकेची निजवाट । देखणें ठेलें दशकंठ । पुच्छाग्रें स्पष्ट बांधलों ॥ ४१ ॥ मोकळा असता माझा रथ । तरी मी जातों हातोहात । हनुमंतें बांधिलों येथ । रणप्राणान्त कपिपुच्छें ॥ ४२ ॥ इंद्रजित होतां चिंतामग्न । येरीकडे[11] लक्ष्मण ।

१ अवघड जागीं. २ सोपें. ३ निर्भर्त्सना केली, उपहास केला. ४ दोरी. ५ आकाश. ६ आकाशस्थ. ७ लांगूल=पुच्छ. ८ दृष्टिगोचर. ९ घोड्यांसह. १० फसविण्यास. ११ दुसरीकडे.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सज्जोनियां धनुष्यबाण । आला आपण संग्रामा ॥ ४३ ॥ अनुलक्षोनि निशाचर । उपहासें बोले सौमित्र । संग्रामशीळ अति गंभीर । वाक्य खडतर अनुवादे ॥ ४४ ॥ वीर शूर मिरविसी ख्याती । शेखीं लपसी अव्यक्तीं । संग्रामशीळ तें छळणोक्तीं । कपटमूर्ति महापापी ॥ ४५ ॥ ऐसें बोलोनि आपण । रथ छेदावया जाण । बाण घेतला अति कठिण । अति दारुण अनिवार्य ॥ ४६ ॥

अथ राक्षससिंहस्य कालान्कनकभूषणान् ।
शरैश्चतुर्भिः सौमित्रिर्विव्याध चतुरो हयान् ॥ १ ॥
धनुर्मेघप्रसूतेन यंतुर्जीवितमाददे ।
सयंतरि महातेजा निहते रावणात्मजे ॥ २ ॥
प्रजहौ च समुद्धर्षं विवर्णश्च बभूव ह ।
विषण्णवदनं दृष्ट्वा रावणिं हरियूथपाः ॥ ३ ॥
प्रहर्षमतुलं गत्वा रथमस्य व्यपोथयन् ॥ ४ ॥

छेदावया इंद्रजिताचा रथ । बाण कनकपत्री सुशोभित । प्रतापतेजें झगझगित । स्वयें विंधीत सौमित्र ॥ ४७ ॥ त्याचें करावया निवारण । इंद्रजित विंधी अमित बाण । परी तो अनिवार लक्ष्मण । अणुप्रमाण ढळेना ॥ ४८ ॥ चहूं बाणांचा मार । देखोनियां अनिवार । इंद्रजित सांडितां रहंवर[1] । चाऱ्ही वारू मारिले ॥ ४९ ॥ वारू पडतांचि क्षितीं । सवेग मारावया सारथी । सौमित्रें बाण सज्जिला सीतीं[2] । साटोपवृत्ति सन्नद्ध ॥ ५० ॥ इंद्रचापासमान चाप । बाण सज्जिला काळकल्प । देखोनि सारथ्या महाकंप । कपटानुरूप छळच्छद्मी ॥ ५१ ॥ सारथी मायालघुलाघवें । सवेग जंव पळून जावें । तंव कपिपुच्छें बांधिला पाहें । ढळों न लाहे सर्वथा ॥ ५२ ॥ कपिपुच्छें हातपायीं । बांधलें हें दिसत नाहीं । ढळों नेदी ठायींच्या ठायीं । केलें कायी लक्षेना ॥ ५३ ॥ सारथी पाताळीं रिघतां । कपिपुच्छें ओढिजे वरता । सवेग आकाशीं गुप्त होतां । वाजती माथां पुच्छाग्र[3]टोले ॥ ५४ ॥ तंव लक्ष्मणाचा बाण । घेऊं सरला त्याचा प्राण । सारथी पडतांचि जाण । करी रुदन इंद्रजित ॥ ५५ ॥ होतां सारथ्याचा घात । माझा बुडाला पुरुषार्थ । ऐसा इंद्रजित तळमळत । दुःखाभिभूत अति दुःखी ॥ ५६ ॥ गेली वाढीव[4] गेलें वीर्य । गेली शक्ति गेलें शौर्य । गेलें संग्रामऔदार्य । रणीं धैर्य न धरवे ॥ ५७ ॥ दुःख दाटलें दारुण । अश्रुधारा स्रवती नयन । इंद्रजित होतां दीनवदन । वानरगण उल्लासती ॥ ५८ ॥ इंद्रजित होतां दुःखाभिभूत । वानरवीर जे समस्त । तिंहीं भंगिला त्याचा रथ । नामें गर्जत स्वानंदें ॥ ५९ ॥ गर्जतां देखोनि थोर वानर । क्षोभला इंद्रजित दुर्धर । रणीं मारावया सौमित्र । दुर्धर शर वर्षत ॥ ६० ॥ त्याचपरी सौमित्र क्रूर । बाण वर्षे घोरांदर । दोघे वीर अति दुर्धर । येरां येर नाटोपती ॥ ६१ ॥

अन्योन्यं निशितैर्बाणैर्जघ्नतुर्भीमविक्रमौ ।
परस्परवधे वीरौ निविष्टौ तौ महाबलौ ॥ ५ ॥
चक्रतुर्घोरमन्योन्यं शरजालाकुलं रणम् ।
ललाटे लक्ष्मणं बाणैः सुघोरैस्त्रिभिरिंद्रजित् ॥ ६ ॥
अभेद्यं कवचं मत्वा विव्याध लघुहस्तवित् ।
अर्दितस्त्वथ बाणौघैस्तेनामित्रेण लक्ष्मणः ॥ ७ ॥

येरयेरांचा घ्यावा प्राण । धगधगीत विंधिती बाण । बाणासवें धांव घेऊन । हाणिती जाण वज्रमुष्टी ॥ ६२ ॥ हाणितांचि वज्रमुष्टी । दुजा ओपी कोंपराटी । घायें मूर्च्छित पाडी सृष्टीं । वीर जगजेठी संग्रामीं ॥ ६३ ॥ दोघे उसळती महाबळी । दोघे भिडती अंतराळीं[5] । दोघे उतरोनि भूतळीं । शरजाळीं वर्षत ॥ ६४ ॥ दोघे जण विंधितां बाण । बाणीं संपूर्ण केलें रण । रणीं नाटोपे लक्ष्मण । इंद्रजित आपण विचारी ॥ ६५ ॥ वज्रकवची लक्ष्मण । त्यासी न भेदती बाण । ललाटदेश वर्मस्थान । विंधी आपण तीं बाणीं ॥ ६६ ॥ ब्रह्मांडीं भेदतांचि बाण । मूर्च्छित पाडिला लक्ष्मण । कांहीं नाठवे पैं स्फुरण । आपणा आपण विसरला ॥ ६७ ॥ विकळ देखोनि लक्ष्मण । त्याचा सवेग घ्यावा प्राण । इंद्रजित वर्षे अमित बाण । अति दारुण साटोपें ॥ ६८ ॥ सौमित्र वीर महाबळी । औट[6]कोटी रोमावळी[7] । ऐसा खिळितां बाणजाळीं । पडे धरातळीं मूर्च्छित ॥ ६९ ॥ सर्वांग भेदतांचि शरीं । हनुमंताच्या हातावरी । मूर्च्छा दाटली सौमित्रीं । निशाचरीं देखिजे ॥ ७० ॥ इंद्रजित गर्जत आपण । रणीं पाडिला लक्ष्मण । आतां मारितां बिभीषण । त्याचा प्राण कोण राखे

१ रथ. २ दोरीवर. ३ शेंपटीच्या शेवटाचे सपाटे. ४ मोठेपणा. ५ आकाशांत. ६ साडेतीन कोटी. ७ केशसमूह.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ ७१ ॥ बिभीषणाचा निजप्राण । इंद्रजित घेवों पाहे आपण । ऐसें ऐकतां वचन । आलें स्फुरण सौमित्रा ॥ ७२ ॥ देहीं देहाची विकळता । ते दवडोनि सत्त्वावस्था । राखावया शरणागता । होय उठता सौमित्र ॥ ७३ ॥ श्रीरामाचें नाम स्मरतां । पळाली देहाची विकळता । राखावया शरणागता । होय उठता सौमित्र ॥ ७४ ॥ सावध श्रीराम आठवितां । देहीं असोन विदेहता । तरी राखावया शरणागता । होय उठता सौमित्र ॥ ७५ ॥ शरणागता वज्रपंजर । तो हा सत्य सौमित्र । चापबाणेंसीं सत्वर । महावीर ऊठिला ॥ ७६ ॥ माझी देखोनि विकळवृत्ती । भय न धरावें चित्तीं । मागें न सरावें मारुती । हें मी तुजप्रती मागतों ॥ ७७ ॥ मागें सरतां युद्धस्थितीं । सूर्यवंशा अपकीर्ती । माझी बुडाली शौर्यवृत्ती । यश कीर्ति रामाची ॥ ७८ ॥ तिळभरी मागें सरणें । हेंचि आम्हांसी गा उणें । मागें सरोनि जीवें जिणें । त्याहून मरणें वरिष्ठ ॥ ७९ ॥ ऐकोनि सौमित्राचें बोलणें । हनुमंत जीवें प्राणें । त्यासी करीतसे निंबलोणें । शौर्यगुणें संतोष ॥ ८० ॥ घायीं झाल्याही जर्जर । धैर्य न सांडी सौमित्र । तेणें विस्मित वानर । विस्मित वीर हनुमंत ॥ ८१ ॥ पाठीसी घालोनि शरणागत । करावया इंद्रजिताचा घात । खवळला काळकृतान्त । रणप्राणान्त सौमित्र ॥ ८२ ॥ ललाटीं लागतां तीन बाण । सौमित्र पडिला मूर्च्छापन्न । सवेंचि होतां सावधान । कैसें चिन्ह शोभत ॥ ८३ ॥

शरैस्त्रिभिरदीनात्मा ललाटस्थैः शरोत्तमैः ।
लक्ष्मणः शुशुभे वीरस्त्रिशृंग इव पर्वतः ॥ ८ ॥
उद्ववर्ष शरान्घोरान्रावणात्मजवारणान् ।
तमाशु प्रतिविव्याध लक्ष्मणः पंचभिः शरैः ॥ ९ ॥
ततः शोणितदिग्धांगौ लक्ष्मणेंद्रजितावुभौ ।
रणे विरेजतुर्वीरौ पुष्पिताविव किंशुकौ ॥ १० ॥

मस्तकीं लागतां तिन्ही बाण । व्यथा न मानी लक्ष्मण । रणीं दिसे शोभायमान । त्रिशृंगी जाण पर्वत ॥ ८४ ॥ रावणसुत रणोन्मत्त । रणीं खवळला मदोन्मत्त । त्यासी मयूरपिच्छांकित । बाण विंधीत सौमित्र ॥ ८५ ॥ पुष्पित तरु पर्वतावरी । तैसे बाण सुवर्णपत्री । शोभती लक्ष्मणाच्या शिरीं । संग्रामगिरी डुलत ॥ ८६ ॥ मयूरपिच्छांकित शर । अंगीं रुतले अपार । पिच्छ पसरोनि नाचे मयूर । तेंवी निशाचर शोभत ॥ ८७ ॥ लागतां सौमित्राचे बाण । इंद्रजित क्षोभला दारुण । घेवोनि पांचही निर्वाणबाण । रणीं लक्ष्मण विंधिला ॥ ८८ ॥ घातपात वर्मस्थ । लघुलाघवें घाय देत । घायें घाय निवारीत । दोघे उन्मत्त रणरंगीं ॥ ८९ ॥ परस्परें घाय देत । दोघे जाले रुधिरोक्षित । जैसे किंशुक वसंतांत । तैसे शोभत रणरंगीं ॥ ९० ॥ येरयेरां मारणें आपण । निर्वाणयुद्ध अति दारुण । काढून वरदाचे बाण । घ्यावया प्राण विंधिती ॥ ९१ ॥

स लक्ष्मणाय संक्रुद्धः शक्रजिच्छरमाददे ।
उत्तमं रक्षसां मध्ये यमदत्तं महाबलः ॥ ११ ॥
तं समीक्ष्य महातेजा महेषुस्तेन सन्धितुम् ।
लक्ष्मणो व्याददे बाणमन्यं भीमपराक्रमः ॥ १२ ॥
कुबेरेण स्वयं दत्तं स्वप्ने बाणं महात्मना ।
दुर्जयं दुर्विषह्यं च सेंद्रैरपि सुरासुरैः ॥ १३ ॥
ताभ्यां तु धनुषि श्रेष्ठे संहितौ सायकोत्तमौ ।
विकृष्यमाणौ वीराभ्यां भृशं जज्वलतुः श्रियम् ॥ १४ ॥
तौ भासयन्तावन्योन्यं धनुर्भ्यां विशिखौ च्युतौ ॥ १५ ॥

घ्यावया लक्ष्मणाचा प्राण । यमदत्त वरदबाण । इंद्रजित सज्जी आपण । अति निर्वाण संग्राम ॥ ९२ ॥ इंद्रजितें देखोनि निजप्राणान्त । मग निर्वाणा घातला हात । वरदबाण यमदत्त । स्वयें सज्जित संग्रामीं ॥ ९३ ॥ यमदत्त वरदबाण । रणीं शत्रूचा घ्यावा प्राण । ऐसें त्याचें वरदान । निवारण असेना ॥ ९४ ॥ इंद्रजित सज्जितां दुर्धर बाण । स्वयें सावध लक्ष्मण । स्वप्नदत्त कुबेरबाण । सज्जी आपण साटोपें ॥ ९५ ॥ लक्ष्मणें नग्न देखतां सीता । विकल्प नुपजे चित्ता । कामकुबेर ये एकात्मता । स्वप्नावस्था वरदोक्ती ॥ ९६ ॥ कामें दिधला निष्काम बाण । छेदक स्थूळलिंगकारण । कुबेर वदला वरदान । जय संपूर्ण पावसी ॥ ९७ ॥ ज्यावरी योजिसी हा बाण । त्याचें करील निर्दळण । कुबेर वदे वरदान । जाला लक्ष्मण जागृती ॥ ९८ ॥ वर वदला स्वप्नस्थितीं । तो बाण उरलासे जागृतीं । इंद्रजितासीं

१ ग्लानि. २ तीन शिखरांचा. ३ रक्तानें भरलेले. ४ पळस. ५ परस्परांना.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

लावावया ख्याती । तोचि सीतीं योजिला ॥ ९९ ॥ दोघे वीर पडिपाडीं[1] । धनुष्य ओढितां कानांडी । लक्ष्मण न वांचे निर्वडी । हडबड गाढी सुरवरां ॥ १०० ॥ यमवरदाचा बाण । अवश्य याचा घेईल प्राण । कैसेनि वांचेल लक्ष्मण । चिंता गहन स्वर्गस्थां ॥ १ ॥ भूतळींचे ऋषीश्वर । सिद्ध चारण विद्याधर । अवघे करिती हाहाकार । रणीं सौमित्र कैंवी वांचे ॥ २ ॥ इंद्रजित बाण सोडी । तंव सौमित्र रणनिर्वडीं । समूळ त्याचा बाहु खुडी । पाडिला बुडीं सचाप ॥ ३ ॥ बाहु छेदितां सत्वर । आक्रंदला निशाचर । सुरवर करिती जयजयकार । धन्य सौमित्र धनुर्वाडा ॥ ४ ॥ त्याचा येतां शर दारुण । बाणामागें विंधी बाण । बाहु पाडिला छेदून । धन्य लक्ष्मण धनुर्वाडां[3] ॥ ५ ॥ यमदत्त वरदबाण । मूळ गुह्य वदे आपण । इंद्रजितहस्तें पापाचरण । पुरश्चरण सौमित्रें ॥ ६ ॥ श्रीरामाचा सहोदर । तो तंव आमुचाही सुमित्र । बाणें करोनि नमस्कार । रिघे सत्वर तूंणीरीं ॥ ७ ॥ जय द्यावया सुमित्रासुता । सेवा घडावया श्रीरघुनाथा । बाण निघाला लक्ष्मणभातां । करावया घाता इंद्रजिताच्या ॥ ८ ॥ बाहु छेदिला सचापशर । रणीं खवळला निशाचर । खड्गहस्तीं अति दुर्धर । मारूं सौमित्र धांविन्नला ॥ ९ ॥ रुधिर वाहत धरधरां । बाण तोडीत खड्गधारा । मारावया सौमित्रा । निशाचर साटोप ॥ ११० ॥ माझा झाल्या भुजपात । मी नाहीं झालों शंकित । झणीं श्लाघसी तूं येथ । करीन घात निमेषार्धें ॥ ११ ॥ बाहु तुटला तें नाठवत । खड्ग घेवोनि तळपत । उल्लाळ[6] देवोनि उसळत । करावया घात सौमित्रा ॥ १२ ॥ थरक सरक चवक । दावीत शौर्याची आगळिक । आला सौमित्रासंमुख । खड्गें मस्तक छेदावया ॥ १३ ॥ सौमित्र सोडी जे जे बाण । खड्गधारा तोडी आपण । रणीं मारावया लक्ष्मण । आला गर्जोन खड्गेंसीं ॥ १४ ॥ इंद्रजित देखोनि दुर्धर । रणीं खवळला सौमित्र । दंडावया निशाचर । शरीं रुद्रास्त्र संयोजी ॥ १५ ॥

सौमित्रिरथ संक्रुद्धः संदधेऽस्त्रं सुदारुणम् ।
रौद्रं स चेंद्रजित्क्रुद्धो व्यसृजत्तदनंतरम् ॥ १६ ॥

सबीजमंत्रें समंत्र । अभिमंत्रोनि रुद्रास्त्र । सवेग सोडी पैं सौमित्र । निशाचर दंडावया ॥ १६ ॥ येतां देखोनि शस्त्रपात । इंद्रजित खड्गधारा हाणीत । घायीं ठिणग्याँ उसळत । लखलखित आकाशीं ॥ १७ ॥ घाव चुकवावया नेहटीं । पळों जातां गुप्त परिपाठीं । रुद्रास्त्रें पुरविली पाठी । कपिपुच्छासाठीं पळवेना ॥ १८ ॥ पळों जातां पळवेना । लपों जातां लपवेना । घाव वारितां निवारेना । लागली नयनां टकमक ॥ १९ ॥ सौमित्राचा शस्त्रघात । खड्गेंसीं छेदून हात । पाडिला पैं लंकेआंत । सुर गर्जत स्वानंदें ॥ १२० ॥ छेदितां दोन्ही भुजाभार । निःशस्त्री जाला निशाचर । शस्त्रें न हाणितां सौमित्र । इंद्रजित थोर क्षोभला ॥ २१ ॥ आम्हीं गिळावें मनुष्यासी । मुख्य हातेर हें आम्हांसी । तुज मी गिळीन निमिषेंसीं । अति आवेशीं धांविन्नला ॥ २२ ॥ दोहीं बाहीं वाहतां रुधिर । रणीं खवळला निशाचर । गिळावया सौमित्र । पसरोनि वक्त्र चालिला ॥ २३ ॥ अमित विंधितांही बाण । मागें न सरे आपण । गिळावया लक्ष्मण । पसरोनि वदन धांविन्नला ॥ २४ ॥ ग्रहणीं राहु गिळी चंद्र । तैसा गिळावया सौमित्र । धांविन्नला निशाचर । विशाळ वक्त्र पसरोनि ॥ २५ ॥ साधारण बाणघात । तेणें न मरे इंद्रजित । त्याचा करावया शिरःपात । निर्वाणशर घेत सौमित्र ॥ २६ ॥

तमिंद्रदत्तं सौमित्रिः समरेष्वपराजितः ।
शरश्रेष्ठं धनुश्रेष्ठे नरश्रेष्ठोऽभिसंदधे ॥ १७ ॥
संधाय च धनुःश्रेष्ठं विकर्षन्निदमब्रवीत् ।
लक्ष्मीवांल्लक्ष्मणो वाक्यमर्थसाधनमात्मनः ॥ १८ ॥
धर्मातमा सत्यसंधश्च रामो दाशरथिर्यथा ।
पौरुषे चाप्रतिद्वंद्वस्तथेमं जहि राक्षसम् ॥ १९ ॥
इत्युक्त्वा बाणमाकर्णं विकृष्य तमजिह्मगम् ।
लक्ष्मणः समरे वीरः ससर्जेन्द्रजितं प्रति ॥ २० ॥

१ दोरीवर. २ कौशल्यानें. ३ धनुर्विद्येमध्यें प्रवीण. ४ भात्यांत. ५ अभिमान धरूं नकोस. ६ आरोळी. ७ किटाळें. ८ क्षणांत.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

तच्छिरः सशिरस्त्राणं श्रीमज्ज्वलितकुंडलम् ।
प्रमथ्येंद्रजितः कायात्पातयामास भूतले ॥ २१ ॥

ध्यावया इंद्रजिताचा प्राण । इंद्रदत्त वरदबाण । सौमित्रें सज्जिला आपण । ज्यासी निवारण असेना ॥ २७ ॥ बाणश्रेष्ठ वीरश्रेष्ठ । धनुष्य वाहिलें अतिश्रेष्ठ । कानाडी ओढिली यथेष्ट । शत्रुकंठ छेदावया ॥ २८ ॥ हाणितां बहुत शस्त्रघात । नव्हे इंद्रजितशिरःपात । यालागीं निर्वाणबाण अद्भुत । स्वयें सज्जित सौमित्र ॥ २९ ॥ युद्ध मांडिलें निर्वाण । सज्जोनि निर्वाणींचा बाण । घालोनि श्रीरामाची आण[१] । विंधी आपण सौमित्र ॥ १३० ॥ कैसी कैसी रामशपथ । लक्ष्मण घालिता झाला येथ । सावधान तो वृत्तान्त । श्रोते श्रीमंत परिसोत ॥ ३१ ॥ श्रीराम धर्माधर्मातीत । तोचि धर्मात्मा सुनिश्चित । येणें सत्यें शिरःपात । हो रणांत शत्रूचा ॥ ३२ ॥ श्रीराम सत्यासत्यातीत । श्रीराम सत्याचें निजसत्य । जरी हें श्रीरामसत्यव्रत । हो शिरःपात शत्रूचा ॥ ३३ ॥ श्रीराम स्त्रीपुरुषातीत । तोचि स्त्रीपुरुष समस्त । हेंचि श्रीरामाचें निजव्रत । तरी हो शिरःपात शत्रूचा ॥ ३४ ॥ श्रीराम दशरथाचा सुत[२] । तोचि ब्रह्म सदोदित । येणें सत्यें इंद्रजित । पडो रणांत या बाणें ॥ ३५ ॥ श्रीराम स्त्रीपुत्रीं युक्त । सकळ कुटुंबेंसीं नांदत । तो राम सत्य द्वैतातीत । हो शिरःपात बाणें येणें ॥ ३६ ॥ रामा नाहीं द्वंद्वभान[३] । तो सर्वांगीं चैतन्यघन । येणें शपथें शिरःपतन । पावो आपण इंद्रजित ॥ ३७ ॥ सकळ भूतें श्रीरघुनाथ । हें वेदशास्त्रां सत्य संमत[४] । तरी इंद्रजिताचा शिरःपात । हो रणांत बाणें येणें ॥ ३८ ॥ माझा आत्मा श्रीरघुनाथ । हेंचि श्रीरामाचें नित्यव्रत । येणें इंद्रजिताचा शिरःपात । हो रणांत बाणें येणें ॥ ३९ ॥ घालितां श्रीरामाची आण । इंद्रजिताचा गेला प्राण । लक्ष्मणें विंधोनियां बाण । शिर सत्राण छेदिलें ॥ १४० ॥ धन्य निधडा[५] सौमित्र । विंधोनियां बाण दुर्धर । गगना उडवोनियां शिर । निशाचर पाडिला ॥ ४१ ॥

ततः स निपपाताशु धरण्यां रावणात्मजः ।
कवची सशिरस्त्राणो विप्रविद्धशरासनः ॥ २२ ॥
चुक्रुशुस्ते ततः सर्वे वानराः सविभीषणाः ।
प्राहृष्यन्निहते तस्मिन्देवा वृत्रवधे यथा ॥ २३ ॥
अथांतरिक्षे भूतानामृषीणां च महात्मनाम् ।
बभूव जयसन्नादो गंधर्वाप्सरसामपि ॥ २४ ॥

मुकुट कुंडलें शिरस्त्राण शिरीं । कवची खड्गी धनुर्धारी । शिर छेदोनियां बाणाग्रीं । धरेवरी पाडिला ॥ ४२ ॥ इंद्रजित पडतां क्षितीं । वदे सौमित्राची स्तुती । तूं परमात्मा ब्रह्ममूर्ती । मी परम मुक्ती पावलों ॥ ४३ ॥ नमस्कार हनुमंता । नमन वानरां समस्तां । नमस्कार श्रीरघुनाथा । परम मुक्तता पावलों ॥ ४४ ॥ इंद्रजित पडतां धरेवरी[६] । वानरवीरां हर्ष भारी । श्रीरामनामाच्या गजरीं । जयजयकारीं गर्जती ॥ ४५ ॥ विजयी झाला लक्ष्मण । हरिखें[७] नाचे बिभीषण । स्वर्गीं उल्लासले सुरगण । भेरी निशाणें त्राहाटिलीं[८] ॥ ४६ ॥ गंधर्व गाणीं गाती । हर्षें अप्सरा नाचती । दिव्य सुमनें[९] नेणों किती । सुर वर्षती स्वानंदें ॥ ४७ ॥ इंद्र चंद्र वरुण कुबेर । हरिखें नाचती समग्र । वृत्रवधाहूनि फार । हर्ष निर्भर सुरसिद्धां ॥ ४८ ॥ आनंदाच्या सुखनिर्भरीं । स्वर्गीं गिरागजरीं । सिद्धचारणऋषीश्वरीं । जयजयकारीं गर्जिजे ॥ ४९ ॥ धन्य सौमित्र रामबंधु । केला इंद्रजिताचा वधु । एका जनार्दना स्वानंदु । परमानंदु रामायणीं ॥ १५० ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायामिंद्रजितवधो नाम एकोनचत्वारिंशत्तमोऽध्यायः ॥ ३९ ॥ ओंव्या ॥ १५० ॥ श्लोक ॥ २४ ॥

अध्याय चाळिसावा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ रणीं पाडूनि इंद्रजित शूर । विजयी झाला सौमित्र । हर्षें उपरमती वानर । जयजयकार करोनी ॥ १ ॥ इंद्रजित पडतांचि रणरपांडीं[१०] । तेचि काळीं तेचि घडी । बिभीषणा हर्षकोडी । जोडिला जोडी आल्हाद ॥ २ ॥

---

१ शपथ. २ पुत्र. ३ सुखदुखःदिकांचें स्मरण. ४ मान्य. ५ शूर. ६ पृथ्वीवर. ७ आनंदानें. ८ वाजविलीं. ९ फुलें. १० रणांगणांत.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

पतितं रावणिं ज्ञात्वा सा राक्षसमहाचमूः ।
वध्यमाना प्रदुद्राव हरिभिर्जितकाशिभिः ॥ १ ॥
केचिल्लंकामभिमुखं प्रविष्टा वानरार्दिताः ।
समुद्रे पतिताः केचित्केचिच्छैलान्समाश्रिताः ॥ २ ॥
हतमिन्द्रजितं दृष्ट्वा शयानं धरणीतले ।
जहर्ष शक्रो भगवान्सह सर्वैर्महर्षिभिः ॥ ३ ॥
जगाम निहते तस्मिन्राक्षसे पापकर्मणि ॥ ४ ॥

रणीं पडतां इंद्रजित वीर। राक्षसांचे महाभार। वानरीं त्रासितां अपार। निशाचर पैं पळती ॥ ३ ॥ धाकें धाकें राक्षसकोडी। धरिली समुद्राची थडी। एक पळाले लंकापहाडीं। पर्वतीं दडी देती एक ॥ ४ ॥ पडिल्या देखोनि इंद्रजितासी। अति उल्हास पैं इंद्रासी। उल्हास सुरनर सिद्धांसी। आल्हादें[१]सीं नाचती ॥ ५ ॥ मारितां इंद्रजिता महापाप्यासी। परम सुख सदाशिवासी। अति उल्हास ब्रह्मयासी। वंशज दुष्टासी मारितां ॥ ६ ॥ दश दिशा विधूम[१]वंता। सुप्रसन्न उगवे सविता[२]। निर्मळ जळें वाहती सरिता[३]। सुख समस्तां सौमित्रें ॥ ७ ॥ सौमित्राची आंगवण। स्वयें वानिती शिवगण। स्वर्गीं वानिती सुरगण। वानरगण भूतळीं ॥ ८ ॥ रणीं लाहोनि निजविजया। उभवोनि पुच्छाचिया गुढिया। वानर नाचती सुखोर्मिया[४]। उभवोनि बाह्या रामनामें ॥ ९ ॥ रामनामगीत गात। विजयसुखें नृत्यान्वित। वानर स्वानंदें डुल्लत। रणीं गर्जत हरिनामें ॥ १० ॥ रणीं विजयाचा उत्साहो। देखोनि वानरांचा लवलाहो। सौमित्र महाबाहो। काय स्वयमेवो बोलत ॥ ११ ॥

रुधिरक्लिन्नगात्रस्तु लक्ष्मणः शुभलक्षणः ।
बभूव हृष्टस्तं हत्वा शत्रुजेतारमाहवे ॥ ५ ॥
ततः स शरभं वीरं जांबवंतं च वीर्यवान् ।
संनिपत्य महातेजास्तांश्च सर्वान्वनौकसः ॥ ६ ॥

लक्ष्मणाचें शुभलक्षण। विकळ जाहलिया प्राण। न सांडून रणांगण। शत्रु संपूर्ण निर्दाळिला ॥ १२ ॥ अवघे ऐका सावचित्त। रामप्रतापें रणाआंत। म्यां मारिला इंद्रजित। स्वयें सांगत सौमित्र ॥ १३ ॥ इंद्रजित मारिला शौर्यवृत्तीं। ते तंव नव्हे माझी शक्ती। श्रीरामप्रतापयुक्ती। स्मरणा[६]नुवृत्तीं निर्दाळिला ॥ १४ ॥ श्रीराम माझे बळाचें बळ। श्रीरामबळें शौर्यशीळ। इंद्रजिताचें शिरकमळ। छेदिलें समूळ श्रीरामसत्त्वें ॥ १५ ॥ घालोनि श्रीरामाची शपथ। म्यां मारिला इंद्रजित। ऐसें लक्ष्मण सांगत। चांचरी[७] जात विकळत्वें ॥ १६ ॥ रणीं भिडतां निशाचरा। बाणीं खिळिलें सौमित्रा। सर्वांगीं रुधिरधारा। तेणें शरीरा विकळत्व ॥ १७ ॥ तिन्ही बाण रुतले कपाळीं। ते भेदले ब्रह्मांडमूळीं। बाणीं खिळिल्या रोमावळीं। तेणें महाबळी विकळांग ॥ १८ ॥ शरभ जांबवंत कपिगण। युद्धीं निवारोनि जाण। पाचारोनि बिभीषण। काय लक्ष्मण सांगत ॥ १९ ॥ मी घायर्[८]वट सर्व शरीरीं। सर्वांग निंथळे रुधिरीं। प्राणान्त मज देखिल्यावरी। राम पोटीं सुरी घालील ॥ २० ॥ यालागीं पूर्वसूचनेवरी। सुग्रीवसंज्ञानुकारीं। शस्त्रें काढवावीं दूरी। पुढें वानरीं जाऊनी ॥ २१ ॥ संतोषावया श्रीरामचंद्र। देवोनि इंद्रजिताचें शिर। पुढें धाडावे वानर। अति चतुर बोलके ॥ २२ ॥ वानावी माझी वाढीव। करावी माझी भाटीव। संतोषलिया राघव। शस्त्रें सुग्रीव काढील ॥ २३ ॥ हें अंतींचें माझें वचन। तुम्हीं करावें सावधान। ऐसें बोलतां लक्ष्मण। मूर्च्छापन्न स्वयें पडला ॥ २४ ॥ झांकले दोन्ही नयन। खुंटलें वदतें वदन। तें देखोनियां बिभीषण। वानरगण अति दुःखी ॥ २५ ॥ सखा अंतरला लक्ष्मण। वानर करिती शंखस्फुरण। दुःखीं फुटे बिभीषण। अवघे जण लोळती ॥ २६ ॥ कोण कोणा आश्वासील। कोण कोणा संबोखील[१०]। अवघ्यां समान कळवळ। अति तळमळ वानरां ॥ २७ ॥ तंव बोलिला जांबवंत। साधिला सौमित्रें कार्यार्थ। मध्यें ओढवला अनर्थ। गडबडित अति दुःखी ॥ २८ ॥ अवघ्यां सांगे हनुमंत। सौमित्रआज्ञा करा समस्त। यासी घेवोनि जावें तेथ। श्रीरघुनाथ वंदावया ॥ २९ ॥ मी तंव न यें रामापासीं। मज निरविलें सौमित्रासी। रणीं मारवोनि त्यासी। काय रामासी मुख दावूं ॥ ३० ॥ बळी देवोनि लक्ष्मणासी। रणीं मारिलें इंद्रजितासी। पूर्ण जहालों

१ धूम्ररहित. २ सूर्य. ३ नद्या. ४ आनंदाच्या उकळ्यांनीं. ५ हर्षोत्सव. ६ स्मरणाचे योगानें. ७ केशपंक्ती. ८ जखमी ९ वाहे. १० समजूत करील. ११ स्वाधीन केलें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

अपेशी । काय रामासी मुख दावूं ॥ ३१ ॥ बळी दिधलें सौमित्रासी । हें यश मिरवूं अति श्लाघ्यतेसीं । अपेशकाळिमा आली मुखासी । काय रामासी मुख दावूं ॥ ३२ ॥ मरों जातां न ये मरण । धिक् चिरंजीवपण । मज न जाळी हुताशनें । समुद्र मग्न मज न करी ॥ ३३ ॥ मरण न दे पर्वतपात । न चले शस्त्राचा आघात । विष घेतल्या न ये अंत । अपेशवंत मी एक ॥ ३४ ॥ अपेशें गांजिलों मी मोठा । पडल्या पडल्या येथें करंटा । वाळोनि होईन खराटा । परी त्या वाटा मी न यें ॥ ३५ ॥ तंव बोलिला बिभीषण । भाक देवोनि आपण । आणून मारविला लक्ष्मण । अपेशी पूर्ण मी जालों ॥ ३६ ॥ अपेश बैसलें माझे माथां । कांहीं चालेना पैं आतां । कैंवी मुख दावूं रघुनाथा । मरणावस्था मज आली ॥ ३७ ॥ अपेश बैसलें दारुण । वांचल्याचें फळ कोण । अवश्य सांडीन मी प्राण । बिभीषण अनुवादे ॥ ३८ ॥ ऐकोनि क्षोभला हनुमंत । येथें मरतां शरणागत । प्राण सांडील रघुनाथ । ऐसा अनर्थ न करावा ॥ ३९ ॥ जाहल्या सौमित्राचा घात । वांचों न शके रघुनाथ । मरतांचि शरणागत । सद्यःप्राणान्त श्रीरामा ॥ ४० ॥ लक्ष्मणाचें आज्ञापन । आम्ही करूं अवघे जण । मीही येतों गा आपण । रघुनंदन वंदावया ॥ ४१ ॥ देऊनि इंद्रजिताचें शिर । गुढिया उभवोनि सत्वर । पुढें धाडावे वानर । अति चतुर ते कोण ॥ ४२ ॥ तंव बोलिला बिभीषण । इंद्रजिताचें शिर घेऊन । पुढें जाईन मी आपण । रघुनंदनउल्हासा ॥ ४३ ॥ बिभीषण निशाचर । घेवोनि इंद्रजिताचें शिर । गुढिया उभवोनि वानर । अति सत्वर निघाले ॥ ४४ ॥ मागील जे कां वानरवीर । उचलोनियां सौमित्र । अंगींचा सलों[३] न देतां शर । अति अरुंवार[४] चालती ॥ ४५ ॥

अथाचचक्षे धर्मात्मा राघवाय विभीषणः ।
छिन्नमिंद्रजितः शीर्षं लक्ष्मणेन महात्मना ॥ ७ ॥
निवेदयित्वा रामाय तस्थौ हृष्टो विभीषणः ॥ ८ ॥

पुढें येवोनि बिभीषण । वंदूनि श्रीरामाचे चरण । लक्ष्मणाचें रणांगण । सांगे आपण तें ऐका ॥ ४६ ॥ सप्तावरणें दुर्धर वाट । करोनि सौमित्रें सपाट । उघडोनियां यज्ञवाट । झाला प्रविष्ट होमस्थानीं ॥ ४७ ॥ इंद्रजित होम करीत । कुंडीं निघाला साश्वें[६] रथ । उडी घालोनि हनुमंत । इंद्रजित आसुडिला ॥ ४८ ॥ कर्म न होतां समाप्त । उठविला इंद्रजित । बिभीषण घेवोनि आ[illegible] येथ । त्या माझा घात करूं धांवे ॥ ४९ ॥ पाठीसी घालोनि शरणागत । सौमित्र आला युद्धाआंत । त्यासी देखोनि इंद्रजित । साशंकित स्वयें झाला ॥ ५० ॥ विवर सांडोनियां कपटी । गेला मेघाचिये पृष्ठीं । मग हनुमंतें उठाउठीं । सौमित्र जगजेठी तेथें नेला ॥ ५१ ॥ सौमित्र निधडा वीर शूर । अचुक संधानी दुर्धर । वारु[६] सारथी रहंवरँ[७] । बाणीं सत्वर छेदिले ॥ ५२ ॥ बाणीं बाणनिवारण । शस्त्रीं शस्त्रनिराकरण । दोघे योद्धे विचक्षण । रणप्रवीण संग्रामीं ॥ ५३ ॥ अचुक सौमित्राचा हात । उभय भुजां करोनि घात । सवेंचि केला शिरःपात । तें शिर येथ आणिलेंसे ॥ ५४ ॥ बिभीषण अति चतुर । आणून इंद्रजिताचें शिर । ठेविलें श्रीरामासमोर । देखोनि वानर बुजाले[८] ॥ ५५ ॥ धन्य सौमित्र आतुर्बळी । बाण भेदले कपाळीं । हेमपिच्छाची मुंडावळी । शिरासी बांधिली रणरंगीं ॥ ५६ ॥ मिशा मुर्डिवा विशाळा । दाढा विकट विक्राळा । बाण भेदले कपाळा । कपाळीं टिळा गोरोचनाचा ॥ ५७ ॥ देखोनि हरिखला राघव । बिभीषणसंज्ञा सुग्रीव । शस्त्रसामग्री नेली सर्व । अतर्क्य लाघवविन्यासें ॥ ५८ ॥ लक्ष्मणाचें बळ दुर्धर । देखोनि इंद्रजिताचें शिर । ऐकोनि बिभीषण उत्तर । हर्षें रघुवीर अनुवादे ॥ ५९ ॥

विभीषणवचः श्रुत्वा हर्षव्याकुललोचनः ।
विभीषणं पुरस्कृत्य हनूमंतं च राघवः ॥ ९ ॥
जांबवंतं ससुग्रीवं सभाज्य च वनौकसः ।
शूरमिक्ष्वाकुशार्दूलं समाश्वासयतानुजम् ॥ १० ॥
रामचंद्रसमो भ्राता लक्ष्मणं शुभलक्षणम् ।
उपवेश्य तमुत्संगे परिष्वज्य सुपीडितम् ॥ ११ ॥
पीडितं सायकैर्दृष्ट्वा दुःखितो राघवस्तदा ।
दुःखहर्षयुतो रामः स मूर्च्छित इवाबभौ ॥ १२ ॥

देखोनि इंद्रजिताचें शिर । ऐकोनि बिभीषणउत्तर । सौमित्रप्रताप अति गंभीर । तेणें रघुवीर हरिखला ॥ ६० ॥ लक्ष्मण योद्धा अति गहन । तेणें हरिखला

१ प्रौढीनें. २ अग्नि. ३ खुपूं न देतां. ४ हलुहलू. ५ अश्वांसह. ६ घोडे. ७ रथ. ८ भयचकित झाले. ९ कौशल्यानें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

रघुनंदन । वर्षे स्वानंदजीवन । संतप्त जन निववावया ॥ ६१ ॥ बाप कृपाळु रघुनाथ । बिभीषण हनुमान जांबवंत । अनुक्रमें आलिंगीत । वानरां समस्त आल्हाद ॥ ६२ ॥ अवघीं केला नमस्कार । अद्यापि कां न ये सौमित्र । ऐसें पुसतां श्रीरामचंद्र । झालें चरित्र तें ऐका ॥ ६३ ॥ बाणीं जर्जर सर्व शरीरीं । सौमित्र उचलोनियां वानरीं । घालितां श्रीरामाचे मांडीवरी । नाहीं शरीरीं चेतना ॥ ६४ ॥ इंद्र वंदी ज्याचे बळासी । ऐसिया सबळ सौमित्रासी । बाणीं खिळिलें सर्वांगासी । पाहे चौपासीं श्रीराम ॥ ६५ ॥ तीन बाण हे कपाळीं । रुतले ब्रह्मांडींच्या मूळीं । बाणीं भेदल्या रोमावळी । बाणजाळीं खिळिलासे ॥ ६६ ॥ रणीं विंधितां शरधारीं । रितीं जागा अंगावरी । नाहीं उरली तिळभरी । शरीं शरीरीं खिळियेला ॥६७॥ इंद्रजितमरणें सुखोद्भूत । सौमित्रदुःखें दुःखित । रघुनाथ ऐसा हर्षशोकान्वित । पडे मूर्च्छित श्रीराम ॥ ६८ ॥ श्रीराम पडतां मूर्च्छापन्न । गजबजिला बिभीषण । हडबडिले वानरगण । करिती रुदन अति दुःखें ॥ ६९ ॥ दोघे पढियंते पूर्ण । येरयेरां जीव प्राण । सौमित्रदुःखें रघुनंदन । झणीं हा प्राण सांडील ॥ ७० ॥ मूर्च्छित पडतां रघुनंदन । सुग्रीव आणि बिभीषण । मिळोनियां वानरगण । करिती रुदन अति दुःखें ॥ ७१ ॥ एक निमाला रणरंगीं । दुजा निमतो तयालागीं । काय करावें या प्रसंगीं । वानरांअंतरीं अति चिंता ॥७२॥ सौमित्रातें आलिंगून । श्रीराम पडिला मूर्च्छापन्न । सवेंच चेतना लाहोन । सावधान स्वयें जाला ॥ ७३ ॥

उपलभ्य ततः संज्ञां लक्ष्मणं समुदैक्षत ।
मूर्ध्नि चैनमुपाघ्राय रामः शूरमुपागतम् ॥ १३ ॥
कृतं परमकल्याण कर्मेदं दुष्करं त्वया ।
अद्य मन्ये हते पुत्रे रावणं निहतं युधि ॥ १४ ॥
निरमित्रः कृतोस्म्यद्य निर्यास्यति हि रावणः ।
बलव्यूहेन महता श्रुत्वा पुत्रं निपातितम् ॥ १५ ॥
त्वया लक्ष्मण नाथेन सीता च पृथिवी च मे ।
न दुष्प्रापा हते तस्मिन्शक्रजेतरि चाहवे ॥ १६ ॥

संज्ञों पावोनि रघुनंदन । घायीं जर्जरित लक्ष्मण । देखोनियां विगतप्राण । करी रुदन अति दुःखें ॥ ७४ ॥ निकुंबळे जावोनि आपण । इंद्रजित मारोनि दिधला प्राण । तें कल्याण तेंचि अकल्याण । मज तुजवीण सौमित्रा ॥ ७५ ॥ ऐकोनि इंद्रजिताचें मरण । निर्वाणयुद्धा येईल रावण । त्यासीं कोणें करावें रण । तुजवीण सौमित्रा ॥ ७६ ॥ बारा वर्षें निराहारी । राहोनियां ब्रह्मचारी । मारून दिधला माझा वैरी । तरी मजवरी कां रुसलासी ॥ ७७ ॥ बारा वर्षें वनवासीं । म्यां नाहीं पुसिलें आहारासी । तेणें मजवरी रुसलासी । लागोनि पायांसी बुझावूं ॥ ७८ ॥ इंद्रजितासी उठाउठीं । रणीं केली त्वां संवसाटी । तुजवीण जगजेठी । मी ये सृष्टीं वांचेंना ॥ ७९ ॥ निकुंबळे धाडिला एकला । तेणें धरिला त्वां अबोला । बंधुस्नेहें आक्रोशिला । आक्रंदला श्रीराम ॥ ८० ॥ दुर्धर इंद्रजिताचें मरण । तें त्वां साधिलें करोनि रण । रणांगणीं दिधला प्राण । तें अकल्याण मज केलें ॥ ८१ ॥ करोनि इंद्रजिताच्या घाता । तुवां निर्मुक्त केली सीता । वसुधा वश्य केली माझ्या हाता । सत्य तत्त्वतां सुबंधो ॥ ८२ ॥ सीता सुंदर महासती । कोणें भोगावी वसुमती । तुजवीण ऊर्मिलापती । प्राण निश्चितीं त्यागीन ॥ ८३ ॥ अनंत अपराध मजपाशीं । तेणें मजवरी रुसलासी । चरण झाडीन मी केशीं । उकसाबुकसीं स्फुंदत ॥ ८४ ॥ धांव पाव गा सौमित्रा । साद दे कां सहोदरा । माझिया दुःखा दुर्धरा । महावीरा निवारीं ॥ ८५ ॥ केउतां गेलासी सुबंधु । अद्यापि कां न देसी सादु । करितां श्रीरामासी खेदु । दुःखबाधु समग्रां ॥ ८६ ॥ तुजवीण मी अनाथ । तुजवीण मी हताहत । तुजवीण निजजीवित । त्यागीन निश्चित सौमित्रा ॥ ८७ ॥ तुजवीण मी प्रभाहीन । तुजवीण मी हीन दीन । तुजलागीं त्यजीन प्राण । सत्य जाण सौमित्रा ॥ ८८ ॥ राया दशरथाची आणें । तुजवीण मी त्यागीन प्राण । ऐसें बोलोनि रघुनंदन । घातलें आसन प्राणान्ता ॥ ८९ ॥ देवोनि सौमित्रा आलिंगन ।

१ शुद्धि. २ रिकामी. ३ कदाचित्. ४ शुद्धीवर येऊन. ५ अवघ्राणून. ६ रणकंदन. ७ पृथ्वी. ८ हे लक्ष्मणा ! ९ हे बंधो ! १० कोठें. ११ शपथ.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

चुंबोनियां त्याचें वदन । श्रीरामें त्यागावया प्राण । घातलें आसन प्राणान्त ॥ ९० ॥ तें देखोनि हनुमंत । खवळला काळकृतान्त । स्वयें येवोनि गर्जत । काय सांगत श्रीरामा ॥ ९१ ॥ मी सेवक असतां जाण । कोण मारूं शकेल लक्ष्मण । तूं कां वृथा त्यजिसी प्राण । आंगवण पाहें माझी ॥ ९२ ॥ यमें नेलिया लक्ष्मणासी । धुळी मेळवीन यमासी । शीकें लावीन कळिकाळासी । सौमित्रासी नेतांचि ॥ ९३ ॥ इंद्र चंद्र वरुण कुबेर । मुख्य करोनि दिवाकर । त्यांचेनि न मारवे सौमित्र । मारिल्या समग्र निर्दळीन ॥ ९४ ॥ सौमित्र नेलिया कैलासासी । तेथून मी आणीन त्यासी । जरी नेला वैकुंठासी । ख्याती करीन ते ऐका ॥९५॥ उभें करोनियां भगवंतासी । झाडा घेईन वैकुंठासी । ओळखोनि सौमित्रासी । तुझा तुजपासीं आणीन ॥ ९६ ॥ नेलिया क्षीरसागरासी । झाडा घेईन शेषापासीं । उलथोनि नारायणासी । सौमित्रासी आणीन ॥ ९७ ॥ सौमित्र शेषावतार बळी । अडकल्या नारायणातळीं । तोही उलथोनि तत्काळीं । तुझा तुजजवळी आणीन ॥ ९८ ॥ पृथ्वी मीनली पृथ्वीसी । आप मीनलें आपासी । तेज मीनलें तेजासी । प्राण वायूसी मीनला ॥ ९९ ॥ आकाश मीनलें आकाशासी । चैतन्य मीनलें चैतन्यासी । कैंचा सौमित्र आणिसी । मूर्ख म्हणसी वानर ॥ १०० ॥ ऐसाही आणीन लक्ष्मण । तरी मी तुझा सेवक जाण । तुझें करितां नामस्मरण । अटक कोण मजलागीं ॥ १ ॥ तुझ्या नामाचेनि बळें । कळिकाळाची शक्ति गळे । संसार आपभेयें पळे । मोक्ष मावळे मिथ्यात्वें ॥ २ ॥ नामस्मरण परम धर्म । नाम निर्दळी कर्माकर्म । नाम केवळ परब्रह्म । पुरुषोत्तमहरिकीर्ती ॥ ३ ॥ दांडुगें तुझें नामस्मरण । नामबळें लक्ष्मण । तुझा तुजपासीं आणीन । तेंही लक्षण अवधारीं ॥ ४ ॥ पृथ्वी दमिली पृथूनीं । मीही दमीन मेदिनी । सौमित्राचें शरीर अवनी । जंव आणोनि मज अर्पी ॥ ५ ॥ आपीं आपत्व तंव शोधीन । सौमित्रा निजजीवन । आणोनियां गा आपण । मदर्पण जंव करो ॥ ६ ॥ निजतेजाच्या आवेशीं । तेज दमीन तेजासीं । सौमित्राच्या निजतेजासी । जंव मजपासीं तें अर्पी ॥ ७ ॥ माझा निजपिता पवन । त्याचेंही करीन शोषण । लक्ष्मणाचा निजप्राण । जंव आणून मज अर्पी ॥ ८ ॥ दंडणें न लगे आकाशासी । सहज प्रवेश आकाशीं । ध्यानीं धरोनि चैतन्यासी । चेतनेसी आणीन ॥ ९ ॥ ध्यानीं धरोनि चैतन्या । आणीन जीवकळा चेतना । जावया देहींचा जडपणा । तेज निजप्राणा चेतवी ॥ ११० ॥ धरोनि चेतनेचा हात । प्राण प्रवेशे देहाआंत । तंव तंव देहीं देहवंत । सावचित्त होय जीव ॥ ११ ॥ वांचवावया लक्ष्मण । सांडून स्थूळ लिंग कारण । हनुमान करूं पाहे उड्डाण । तंव सुषेण तेथें आला ॥ १२ ॥ हनुमंता तूं परोपकारी । आणिला होता द्रोणगिरी । दिव्यौषधी तयावरी । त्या म्यां गृहीं संग्रहिल्या ॥१३॥ पर्वतावेगळ्या ओषधी जाण । न राहती अर्ध क्षण । घालितां श्रीरामपदकण । ओषधी संपूर्ण थांबल्या ॥ १४ ॥ त्यांचा रस देतां जाण । सावध होईल लक्ष्मण । ऐसें बोलतां सुषेण । रघुनंदन सुखावे ॥ १५ ॥ ऐकतां हनुमंताची कथा । परम सुख रघुनाथा । आलिंगिला जीवापरता । उल्लासतां स्वानंदें ॥ १६ ॥

स तं भ्रातरमाश्वास्य परिष्वज्य च राघवः ।
रामः सुषेणं मुदितः समाभाष्येदमब्रवीत् ॥ १७ ॥
सशल्योऽयं महाप्राज्ञ सौमित्रिर्मित्रनंदनः ।
यथा भवति निःशल्यस्तथा त्वं कर्तुमर्हसि ॥ १८ ॥
विशल्यकरणी नाम वने हिमवतः शुभा ।
लक्ष्मणाय ददौ नस्यं सुषेणः परमौषधिम् ॥ १९ ॥
स तस्या गंधमाघ्राय विशल्यः समपद्यत ।
तथा निर्वेदनश्चैव संरूढव्रण एव च ॥ २० ॥

लक्ष्मण व्हावया सावधान । श्रीरामें जें केलें रुदन । ऐसें नव्हे तें अमृतपान । स्वानंदजीवन संतप्तां ॥ १७ ॥ अश्रु तेंचि अमृतपान । आलिंगन तेंचि विशल्यकरण । करसंस्पर्शें करी निर्व्रण । कृपाळु पूर्ण श्रीराम ॥ १८ ॥ निजभक्तांची जे जे व्यथा । नानापरींच्या नानावस्था । निवारण

१ शिक्षा. २ सूर्य. ३ श्रीविष्णूच्या खालीं. ४ उदक. ५ आपोआप. ६ मोठें. ७ पृथ्वी. ८ उदकामध्यें. ९ सांडविल्या. १० वनस्पती. ११ श्रीरामाचे पदरजःकण. १२ व्रणरहित.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

श्रीरघुनाथा । पुढील कथा अवधारा ॥ १९ ॥ सावध व्हावया लक्ष्मण । रामें पाचारोनि सुषेण । शल्या विशल्या ओषधी जाण । देववी आपण सांक्षेपें ॥१२०॥ शल्या शल्य फेडी संपूर्ण । विशल्या घाय बुजी आपण । अंगींचे हरपती व्रण । ते सुवर्णा जाण दिव्यौषधी ॥ २१ ॥ अंगींचे कानपोनि व्रण । सुवर्णा करी सुवर्णवर्ण । ऐशिया दिव्यौषधी जाण । दे सुषेण सौमित्रा ॥ २२ ॥ शल्या विशल्या देतां जाण । शल्यें विरालीं संपूर्ण । हर्षें निर्भर अंतःकरण । सावध होय सौमित्र ॥ २३ ॥ ओषधी देतां सुवर्ण । कानपोनि अंगींचे व्रण । शरीर जालें सुवर्णवर्ण । उठला लक्ष्मण स्वानंदें ॥ २४ ॥ पूर्विल्यापेक्षां जाण । शक्ति पावोनि शतगुण । साटोपें उठिला लक्ष्मण । रणीं रावण दंडावया ॥ २५ ॥

विभीषणसुखानां च सुहृदां राघवाज्ञया ।
तामोषधिं महाबाहुः सुषेणः प्रददौ तदा ॥ २१ ॥

लक्ष्मण जालिया सावधान । बिभीषण सुग्रीव रघुनंदन । पाचारोनि सुषेण । सांगे आपण तें ऐका ॥ २६ ॥ लक्ष्मणासवें वानर वीर । घायीं जाले अति जर्जर । ओषधी देवोनि सत्वर । करीं समग्र सावध ॥ २७ ॥ ऐसें सांगतां रघुवीर । असंख्यात कपि वानर । सुषेणें अपरिमित ॠक्षवीर । केले समग्र सावध ॥ २८ ॥ अपरिमित ऋक्षवीर । असंख्यात कपि वानर । बिभीषणाचे निशाचर । घायीं जर्जर अमित ॥ २९ ॥ धन्य सुषेण वैद्यरावो । वेंचून ओषधींचा संग्रहो । अंगीं व्रण न दिसे घावो । सकळ समुदावो सुखी केला ॥ १३० ॥ गेला क्लेशश्रमेंसीं स्वेदें । गेली शल्यबाधा गेला खेद । सकळ वीरांसी आल्हाद । परमानंद श्रीरामें ॥ ३१ ॥ पूर्विल्या बळापेक्षां जाण । प्रताप आला पैं चौगुण । उपमिंती आंगवण । गडगर्जन हरिनामें ॥ ३२ ॥ रामनामाचा गजर । वानरीं केला भुभुःकार । संतोषला श्रीरामचंद्र । विशल्य वीर देखोनी ॥ ३३ ॥ जैसें अमरां अमृतपान । तैशा वानरां ओषधी जाण । करितांचि अवघ्राण । सुखसंपन्न स्वानंदें ॥ ३४ ॥ सुखी झाला लक्ष्मण । सुखी झाला बिभीषण । सुखी झाले वानरगण । सुखसंपन्न सुग्रीव ॥ ३५ ॥ सुखी देखोनि सौमित्र । सुखावला श्रीरामचंद्र । तेणें संतोषें वानर । हर्षें निर्भर नाचती ॥ ३६ ॥ इंद्रजित मारोनि दुर्धर । विजयी जाला सौमित्र । वानरीं करोनि जयजयकार । हर्षें निर्भर नाचती ॥ ३७ ॥ किंशुकवृक्ष उचलोनियां । उभवोनि पुच्छाग्रीं गुढिया । वानर नाचती लवलाह्या । श्रीरामरायाचेनि धर्मे ॥ ३८ ॥ एका जनार्दना शरण । स्वानंदें उठला लक्ष्मण । तेणें संतोषला रघुनंदन । कथा पावन श्रीरामें ॥ ३९ ॥ इंद्रजिताची निजकांता । सुलोचना पतिव्रता । तिच्या सतीत्वाची कथा । सावधानता अवधारा ॥ १४० ॥ रामें सत्या सत्त्ववृत्ती । रामें भक्तां भुक्ती मुक्ती । राम वैरियां परम गती । नामें त्रिजगती पावन ॥ १४१ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां लक्ष्मणसावधानीकरणं नाम चत्वारिंशत्तमोऽध्यायः ॥ ४० ॥ ओंव्या ॥ १४१ ॥ श्लोक ॥ २१ ॥

अध्याय एकेचाळिसावा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ रणीं मारोनि इंद्रजित । सौमित्र झाला विजयान्वित । तेणें सुखावला रघुनाथ । सुग्रीवयुक्त स्वानंदें ॥ १ ॥ हटी नष्टी कोटिकपटी । येणें इंद्रजित दुर्धर सृष्टीं । तो मारितां शस्त्रवृष्टीं । सुखानुकोटी सर्वांसी ॥ २ ॥ सुखी झाले नरवानर । सुखी झाले ऋषीश्वर । दैत्य दानव सुरवर । सुखी समग्र सौमित्रें ॥ ३ ॥ येरीकडे लंकेमाझारी । इंद्रजिताची भुजा थोरी । पडली सुलोचनामंदिरीं । खड्गधारी सायुध ॥ ४ ॥ सुलोचना निजमंदिरीं । शिवस्वरूप आणोनि अंतरीं । शिवस्मरणीं निरंतरीं । ध्यान करीत शिवाचें ॥ ५ ॥ जवळी असतां सखिया बहुत । शिवपूजा करीत अद्भुत । तंव अंगणीं पडूनि अकस्मात । ध्वनि होय भुजदंडाचा ॥ ६ ॥ ऐकोनियां तो ध्वनी । सुलोचना गजबजली मनीं । सवें सखिया घेऊनी । पाहे अंगणीं निजदृष्टीं ॥ ७ ॥ सख्या म्हणती सुलोचने । स्वर्गी देवांदैत्यांशीं दारुण । युद्ध होत आहे जाण । भुजा तेथून पडि-

१ अगत्यानें. २ बुजून. ३ शंभरपट. ४ आस्वल. ५ घाम. ६ तुलना करून पाहतात. ७ जखमेशिवाय. ८ हुंगणें. ९ पळसाचे वृक्ष. १० सत्वर. ११ विजयी. १२ तरवारीसह. १३ हत्यारांसह. १४ अंतःकरणांत.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

येली ॥ ८ ॥ ऐसा संवाद करितां जाणा । घाबरे-पणें सुलोचना । जवळी येवोनियां नयनां । पतिहस्त जाणा ओळखिला ॥ ९ ॥ देखोनि इंद्र-जिताचा कर । सुलोचना भूमीं घाली शरीर । हृदयीं कवळोनियां सत्वर । विचार साचार पूसत ॥ १० ॥ म्हणे भुजे मायबहिणी । मूळ आलीस मज साजणी । पति इंद्रजित रणांगणीं । केंवी सोडूनि आलीस ॥ ११ ॥ अभ्यंग मार्जन उद्वर्तन । करोनियां नीराजन । स्वयें घालोनि लोटांगण । पुसे आपण भुजेसी ॥ १२ ॥ निकुंभिले गेलिया-पाठीं । काय वर्तलें रणसंकटीं । तूं आलीस कास-यासाठीं । ते गुह्य गोष्टी मज सांगें ॥ १३ ॥ मजपा-सून इंद्रजित । युद्धा गेलिया वृत्तान्त । काय झाला तो साद्यंत । मज यथार्थ सांगावा ॥ १४ ॥ आम्ही तुम्ही वो साजणी । दोघी जणी एकांग-बहिणी । काय वर्तलें रणांगणीं । समूळ काहणी मज सांगें ॥ १५ ॥ जरी मी असेन सत्यव्रत । पतिव्रता सुनिश्चित । तरी त्वां तेथींचा वृत्तान्त । मज साद्यंत सांगावा ॥ १६ ॥ तंव ते अचेतनें भुजा । चेतना नाहीं तेथें सहजा । येरीनें स्मरला कैलासराजा । शरण तुज मी स्वामिया ॥ १७ ॥ पतिभुजा अंगणीं आली । चेतनाविरहित पडली । आत्मशक्ति चेतवूनि बहिली । सजीव केली पाहिजे ॥ १८ ॥ म्हणोनियां शिवालागीं । स्तुति करितां तये प्रसंगीं । शिव दयाळु भक्तांलागीं । आज्ञा करी इंद्रातें ॥ १९ ॥ म्हणे भुजांतरीं प्रवे-शोन । इंद्रजिताचें समरवर्तमान । समूळ करावें कथन । येथें अनमान न करावा ॥ २० ॥ होतां शिवाचें आज्ञापन । भुजांतरीं इंद्र जाण । प्रविष्ट होवोनि आपण । करी सचेतन भुजेसी ॥ २१ ॥ ऐकतां सुलोचनेचें वचन । आलें भुजेसी स्फुरण । संज्ञा दावूनियां खूण । मागे साधन लेखनाचें ॥ २२ ॥ तंव तिणें भूमिकेवरी । दऊत लेखणी झडकरी । आणोनि ठेविली निर्धारीं । लिहून सत्वरीं मागितलें ॥ २३ ॥ पाचबद्ध भूमिकेवरी । दऊत लेखणी घेऊन करीं । ओळी लिहिल्या व्यक्ताक्षरीं । अर्थकुसरीविन्यासें ॥ २४ ॥ तंव ते भूमि पाचबद्ध । अक्षरें उमटलीं शुद्ध । तीं सुलोचना वाची सुबद्ध । अर्थ विविध जाणूनी ॥ २५ ॥ पतिव्रते सुलोचने । तुज विचारोनि गेलिया जाण । लाहोनि रावणाचें आज्ञापन । युद्ध दारुण मग केलें ॥ २६ ॥ जिंकोनियां वानरगण । निकुंभिलेसी जावोनि जाण । होमासी आरंभ करून । अग्नि सुप्रसन्न म्यां केला ॥ २७ ॥ प्रसन्न झालिया वन्ही । रथ प्रकटला प्रत्यक्ष दहनीं । चार अंगुळें चाकें राहोनी । सार्थी नयनीं देखिला ॥ २८ ॥ रथ होतांचि प्रकट । युद्ध करीन मी अचाट । ऐसा संकल्पाचा लोट । होतां अदृष्ट निष्फल ॥ २९ ॥ तंव घेऊन वानरभार । बिभी-षण आणि हनुमान वीर । सवें घेऊनि सौमित्र । घाला सत्वर घातला ॥ ३० ॥ घेवोनियां प्रचंड शिळा । हनुमान होऊनि उतावेळा । रथावरी घालितां गोळांगुळा । रथ झाला भूमिगत ॥ ३१ ॥ मज करीं धरोनियां जाण । अंगदें आसुडितां आपण । नेत्र उघडोनि पाहतां जाण । तंव वान-रगण देखिले ॥ ३२ ॥ मग सावध होवोनियां । सारथियें रथ आणोनियां । रथारोहण करोनियां । युद्ध त्यांसवां मांडिलें ॥ ३३ ॥ लक्ष्मण वीर जग-जेठी । प्रवेशोनि यज्ञवाटीं । युद्धा येतां कडक-डाटीं । देखिला दृष्टीं म्यां मेघनादें ॥ ३४ ॥ त्यासीं छळ करोनि कपटीं । गेलों मेघांचिये पृष्ठीं । हनुमंतानें उठाउठीं । आणिला नेहटीं सौमित्र ॥ ३५ ॥ लक्ष्मणें आणि आम्हीं । युद्ध मांडलें रणभूमीं । लक्ष्मणें बाणाक्रमीं । शरीर रणभूमीं पाडिलें ॥ ३६ ॥ लक्ष्मणें विंधोनि सत्वरीं । उभय भुजा छेदिल्या शरीं । एक पडली धरेवरी । लंकेमाझारीं दूसरी ॥ ३७ ॥ घालितां श्रीरामाची शपथ । तेणें बाणासी बळ अत्यंत । इंद्रजिताचा शिरःपात । केला निश्चित सौमित्रें ॥ ३८ ॥ एक भुजादंड उडाला । तो तुजकारणें मूळें धाडिला । शिर रामचंद्रनमनाला । गेलें तुजला कळावें ॥ ३९ ॥ धड पडिलें निकुंभिलेसी । शिर नेलें रामचंद्रापासीं । आतां आपल्या सतीत्वासी । प्रकट जनांसी दाखवीं ॥ ४० ॥ सतीत्व असेल संपूर्ण । तरी अवलोकावा लक्ष्मण । वंदूनि श्रीरा-माचे चरण । शिर आपण मागावें ॥ ४१ ॥ मी

१ आमंत्रण. २ स्नान. ३ उटणें लावणें. ४ आरती. ५ निर्जीव. ६ सत्वर. ७ अमींत. ८ सांगाडा. ९ वानरानें –हनुमंतानें. १० बोलावण्याला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

प्राण अर्पूनि लक्ष्मणा । भवसमुद्रपार झालों जाणा । तुझी मार्गप्रतीक्षा सुलोचना । करितों जाण वेगें येई ॥ ४२ ॥ ऐशा पाचबद्ध भूमीवरी । वाचिल्या अक्षरांच्या हारी । तेणें सुलोचना सुंदरी । अंग धरेवरी टाकीत ॥ ४३ ॥ इंद्रजिता तुजवीण । मज दाही दिशा झाल्या शून्य । कवणा देऊं आलिंगन । शुभ वचन कोणा बोलूं ॥ ४४ ॥ मजवांचून तुजला । क्षण वियोग न वचे साहिला। तो तूं आज टाकून मजला । सायुज्यपदाला जाऊं पाहसी ॥ ४५ ॥ तुजवीण मी अनाथ । शिरीं नाहीं मज नाथ । आतां काय हें जीवित । येईन त्वरित तुजपासीं ॥ ४६ ॥ पुच्छ तुटल्या सापसुरळी । कीं जळावेगळी मासोळी । तैंवी सुलोचना तळमळी । नाहीं ते वेळीं देहशुद्धी ॥ ४७ ॥ गडबडां भूमीवर लोळत । नानापरी आक्रंदत । बहुत ग्लानि करीत । आक्रोश बहुत मांडिला ॥ ४८ ॥ तंव शांतिमती सखी जाण । आणि विवेक सखा आपण । शांतिमती सुलोचनेलागून । विवेका विचारून म्हणे माते ॥ ४९ ॥ आतां पतिसमागम । सायुज्यपद अति सुगम । प्राप्त होय उत्तम धामें । तो उपाय परम योजावा ॥ ५० ॥ ऐसें ऐकतां वचन । सुलोचना विचारी आपण । विना वैराग्यप्राप्तीविण । रामचरण नातुडती ॥ ५१ ॥ सांडोनि प्रपंचविलास । सर्व भावीं झाली उदास । गृहधनादि सर्वस्वास । झाली उदास सुलोचना ॥ ५२ ॥ त्रैलोक्यींची संपत्ती । इंद्रजितीं मेळविली होती । तिची गणना करावी किती । बहु संपत्तिसागर ॥ ५३ ॥ वस्त्रें ललामें अमोलिक । तयांचे न करवती लेखं । सुलोचना मानी ओक । देहसार्थक मांडिलें ॥ ५४ ॥ आशा तृष्णा कामना । यांची बोळवण करूनि जाणा । निस्पृह झाली सुलोचना । दानधर्मा करूं सरली ॥ ५५ ॥ जडित मुद्रा अलंकार । मणिमंडित उत्तम हार । इंद्रजिताचें भांडार । वांटी समग्र द्विजांसी ॥ ५६ ॥ बोलावूनि ऋषी ब्राह्मण । आणि सुवासिनी जाण । वांटिती झाली धन । अपरिमित जाण ते काळीं ॥ ५७ ॥ करोनि लोभाची बोहरी । न देणें दवडोनि दूरी । कृपणता घालूनि बाहेरी । वांटी सुंदरी सर्वस्व ॥ ५८ ॥ लोभें धन पुरों जाती । मुळींच त्यांकडे माती । भूमीं निक्षेपली संपत्ती । तोंडीं माती पाषाण ॥ ५९ ॥ तैशी नोहे सुलोचना । सर्व संपत्ती दिधली दाना । देतां उल्लास चौगुंणा । वांटिलें धना निर्लोभत्वें ॥ ६० ॥ दास दासी सेवक । त्यांसी दिधलें यथेष्ट कनक । मागत्यासी नव्हे विमुख । सती चोख सुलोचना ॥ ६१ ॥ आप्त याचक तृप्त झाले । धन अपरिमित उरलें । नेतां नेववेना उबगले । धन राहिलें तळीं बहुत ॥ ६२ ॥ मग सुलोचना निजगृहासी । नमस्कारोनि साष्टांगेंसीं । सखिया घेवोनि समागमेंसीं । निघे सासूसी भेटावया ॥ ६३ ॥ सतीपणाचे अळंकारीं । पांढरा तोडर गळसरी । हरिद्राकुंकुमसिंदूरीं । दिसे सुंदरी घवघवीत ॥ ६४ ॥ शुभ्र कंचुकी शुभ्र वस्त्र । शुभ्र सुमनांचा शृंगार । तेणें शोभतसे सुंदर । मनोहर पतिव्रता ॥ ६५ ॥ वाहनारूढ व्हावें जरी । राम न लभे निर्धारीं । याकरितां पादचारी । निजनिर्धारीं चालली ॥ ६६ ॥ आदरें भुजेच्या पूजना । करोनि भावें प्रदक्षिणा । घालोनियां लोटांगणा । वाहिली जाणा सुखासनीं ॥ ६७ ॥ करोनियां रामनामस्मरण । सुलोचना निघे आपण । पदोपदीं पतीचें स्मरण । करीत गर्जन वेळोवेळां ॥ ६८ ॥ आली सभामंडपासी । रावण देखिला मंदोदरीसीं । साष्टांगें करोनि नमनासी । वृत्तांतासी निवेदी ॥ ६९ ॥ करितां सासूसी नमस्कार । तंव ते आक्रंदली थोर । माझा निमाला ज्येष्ठ कुमर । दुःख दुर्धर घोटेना ॥ ७० ॥ ये रे माझ्या ज्येष्ठ सुता । नांवानिगिया इंद्रजिता । लक्ष्मणें तुझिया केलें घाता । मुखही सर्वथा दिसेना ॥ ७१ ॥ तुझेनि मजला परम सुख । अंतीं तुझें न देखें मुख । तेणें मज झालें परम दुःख । दुःखदायक संसार ॥ ७२ ॥ बाणांचिये शेजेवरी । पहुडलासी अमित्रकरीं । मी तंव निजाची सोयरी । अति दूरी अंतरलें ॥ ७३ ॥ तुझा आश्रय लंकानाथा । निश्चयेंसीं केला होता । रणीं पावलासी घाता । हे दुःखावस्था अनिवार ॥ ७४ ॥ ऐशी

१ पंक्ती. २ सोसवत नसे. ३ मोक्षाला. ४ मोक्ष. ५ [illegible] स्थान. ६ प्राप्त होणार नाहींत. ७ दागिने. ८ मोजदाद. ९ नाश. १० चौपट. ११ त्रासले, कंटाळले. १२ शत्रूच्या हातांनीं.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

आक्रंदोनि भारी । गडबडां लोळे धरणीवरी । संबोखी सुलोचना नारी । निजविचारीं अति गुह्य ॥ ७५ ॥ तुम्हीं न करावें खेदासी । अति सत्यत्वें सतीत्वासीं । आजिचेनि सातवे दिवसीं । रावणासी प्राणान्त ॥ ७६ ॥ मंदोदरी बोले आपण । मजही आहे हें ज्ञान । शिकविलें नायके रावण । कुळनिर्दळण याचेनि ॥ ७७ ॥ आश्वासोनि मंदोदरी । येतां सुलोचना बाहेरी । रावण देखोनि शंख करी । दीर्घ स्वरीं आक्रंदे ॥ ७८ ॥ तिहीं लोकां दुर्धर देख । ज्याचा प्रताप अटंक[2] । तो मारिला एकाएक । मनुष्यमशकें लक्ष्मणें ॥ ७९ ॥ आठवितां पुत्रदुःख । दहाही मुखीं करी शंख । दुःखें तळमळित दशमुख । अधोमुख मूर्च्छित ॥ ८० ॥ दुःखें मूर्च्छित दशानना । थापटोनि सुलोचना । करोनियां समाधाना । गुह्य ज्ञाना अनुवादे ॥ ८१ ॥ संमुख घायीं देतां प्राण । वीर पावती कृतकल्याण । पति पावला ब्रह्मपद पूर्ण । दुःख आपण न करावें ॥ ८२ ॥ बाणीं श्रीरामशपथवृत्ती । सौमित्राचिये निजहस्तीं । इंद्रजितासी परम गती । दुःख तदर्थीं[3] न करावें ॥ ८३ ॥ धैर्य धरोनि संपूर्ण । सांडा शोक दुःख रुदन । माझें कांहीं विज्ञापन । सावधान अवधारा ॥ ८४ ॥ अहो स्वामी लंकानाथा । श्वशुर आणि माता पिता । तुम्हीच माझे सर्वथा । ऐका आतां वचन माझें ॥ ८५ ॥ इंद्रजिताचें शिरकमळ । घेवोनि गेले गोळांगूळ[4] । तें आणोनि द्याल ये वेळ । तरी मज सकळ पावलें ॥ ८६ ॥ ऐसें बोलतां सुलोचना । आवेश आलासे रावणा । सैन्य पालाणा रे पालाणा । सन्नद्ध सेना करा वेगीं ॥ ८७ ॥ म्हणे सुलोचने माये । स्वस्थ होवोनियां राहें । इंद्रजिताचें शिर लवलाहें । आतांचि पाहें आणतों ॥ ८८ ॥ जिंकोनि सौमित्र रघुनाथ । वधोनियां वानर समस्त । इंद्रजिताच्या शिरासमवेत । भेटी त्वरित पैं येतों ॥ ८९ ॥ तंवपर्यंत आपण । स्वस्थ करोनि अंतःकरण । येथें असावें जाण । युद्धाकारणें मी जातों ॥ ९० ॥ ऐसा आविर्भाव जाणून । मंदोदरीनें सुलोचनेलागून । एकांतीं नेऊनि जाण । ऐशापरी सांगितलें ॥ ९१ ॥ रावण बोलतो ज्या गोष्टी । त्या अवघ्या मिथ्या चावटी । तुवां स्वयें जाऊन उठाउठीं । श्रीरामभेटी पैं घ्यावी ॥ ९२ ॥ नमोनियां रामचरण । तया जावोनियां शरण । शिर आणोनि स्वहित जाण । आपणा आपण उद्धरीं ॥ ९३ ॥ झालियाविना शरणागत । कार्य न साधे त्वरित । आपलें आपण स्वहित । करावें निश्चित साजणी ॥ ९४ ॥ ऐसें जाणोनि साचार । स्वयें करावा विचार । दृढ धरोनियां निर्धार । श्रीरघुवीर सेवीं माये ॥ ९५ ॥ परस्वाधीन जो होय । त्याचें कार्य कधीं न होय । स्वयें आपण आपली सोय । स्वहित पाहें साधावें ॥ ९६ ॥ ऐकोनि मंदोदरीची मात । सुलोचना घाली प्रणिपात[6] । येवोनि नमिला लंकानाथ । आज्ञा त्वरित मागतसे ॥ ९७ ॥ मागावया पतीच्या शिरा । भेटूं जाईन श्रीरामचंद्रा । आज्ञा मज द्यावी दशशिरा । तूं सासुरा मजलागीं ॥ ९८ ॥ क्षोभें बोले दशशिर । सीताविरहें विरहातुर । तुज देखोनि अति सुंदर । रामचंद्र सोडीना ॥ ९९ ॥ ऐकोनि रावणाचें वचन । सुलोचना हास्यवदन । परम भ्रांत दशानन । नेणे महिमान श्रीरामाचें ॥ १०० ॥ श्रीराम परस्त्रीसहोदर । ज्याचें नाम परम पवित्र । नामें पावन चराचर । श्रीरघुवीर परब्रह्म ॥ १ ॥ विकल्प नांदे रावणापासीं । विकल्प नाहीं रामासीं । पाप नातळे[7] रघुवीरासी । नाम जगासी तारक ॥ २ ॥ ऐसें बोलतां सुलोचना । मंदोदरी येवोनि जाणा । भेटावया रघुनंदना । आज्ञापना देववी ॥ ३ ॥ जाणोनियां भविष्यचिन्ह । आज्ञा देता झाला रावण । मग सुलोचना निघे आपण । रामा नमन करावया ॥ ४ ॥ करितां योगयागकोटी । स्वप्नीं नव्हे श्रीरामभेटी । तो श्रीराम आज देखेन दृष्टीं । हर्षें गोरटी चालली ॥ ५ ॥ हृदयीं कवळोनि भुजादंड । पादचारी अति प्रचंड । रामनामें गर्जोन वितंड[8] । ध्यान अखंड रामाचें ॥ ६ ॥ वाजंत्रांच्या गडगर्जनीं । चालली सत्त्वशिरोमणी । पदोपदीं ओंवाळणी । अक्षय वाणी नारींचीं ॥ ७ ॥ सर्वे सखिया सांगातिणी । रामरूप आणोनि ध्यानीं । सुलोचना एकनिष्ठ मनीं । रामसरणीं चालली ॥ ८ ॥ देखतां श्रीरामाचें कटक । सुलोचनेसी अति हरिख[9] । आजि

१ समाधान करून. २ अतुल्य. ३ त्यासंबंधी. ४ वानर.
५ तयार करा. ६ नमस्कार. ७ शिवत नाहीं. ८ सैन्य. ९ आनंद.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

माझें भाग्य चोखें। रघुकुळटिळक देखेन ॥ ९ ॥ जयजयकारें गर्जन। करोनि घाली लोटांगण। वंदावया श्रीरामचरण। कर जोडून राहिली ॥ ११० ॥ वानरीं देखिली सुलोचना। रावणें सीता धाडिली जाणा। सर्वी करोनि गर्जना। रामराणा नमियेला ॥ ११ ॥ वानर म्हणती रामराया। सती जानकी आदिमाया। रावणें दिधली धाडोनियां। युद्धभया मानूनी ॥ १२ ॥ ऐकोनि वानरांचें वचन। काय बोले रघुनंदन। रावण जीवंत असतां जाण। सीता आपण देखोंना॥ १३ ॥ पुरता वृत्तान्त जाणोनी। कोण येतें विचारोनी। समस्त स्वस्थ होवोनी। अवलोकोनि पहा वेगीं ॥ १४ ॥ रामभक्तांसी पाहीं। पापवासना सर्वथा नाहीं। तंव सुलोचना येत पायीं। रामनाम गर्जत ॥ १५ ॥ वानरीं खालत्या केल्या माना। तंव आली सुलोचना। घालोनि रामासी प्रदक्षिणा। मस्तक भूमीं ठेविलें ॥ १६ ॥ हनुमंत म्हणे श्रीरघुनाथा। पैलें हे इंद्रजिताची कांता। सुलोचना पतिव्रता। वंदनार्था आली असे ॥ १७ ॥ तूं तंव कृपाळु रघुनाथ। पुसोनि पूर्ण मनोगत। हिचे पुरवावे मनोरथ। ऐसें हनुमंत बोलिला ॥ १८ ॥ श्रीराम म्हणे वो माये। उठीं उठीं वो सये। इच्छा असेल ती बोल स्वयें। पुरवीन जायें निजधामा ॥ १९ ॥ ऐसें त्रिवार बोलतां। सुलोचना उठली तत्त्वतां। हृदयीं भुजादंड असतां। श्रीरघुनाथा स्तवन करी ॥ १२० ॥ जय जय वो श्रीरामा। भक्तकामकल्पद्रुमा[३]। मी शरण आलें मेघश्यामा। चरणमहिमा कोण जाणे ॥ २१ ॥ मी तंव तुज आलें शरण। वानरीं इंद्रजिताचें शिर जाण। आणिलें तें देवोनि आपण। सनाथ मजला करावें ॥ २२ ॥ भेटवावें सौमित्रा। तो आम्हां स्वानंदसोयरा। द्यावें इंद्रजिताच्या शिरा। विहिताचारा[४] करीन ॥ २३ ॥ मी तंव तुझी कन्यका। जामातृशिर देवोनि देखा। बोळवण[५] करीं रघुनायका। आणीक मी न मागें कांहीं ॥ २४ ॥ ऐसें बोलतां सुलोचना। हृदयीं कळवळला रामराणा। अवलोकोनि वानरसेना। काय वचना बोलत ॥ २५ ॥ अहो सुग्रीवा जांबवंता। नळ नीळ अंगदादि तत्त्वतां। विचार मानला कीं समस्तां। इंद्रजितकांता काय बोले ॥ २६ ॥ हे तंव रावणाची सून। आम्हांलागीं आली शरण। इंद्रजिताचें शिर देऊन। बोळवण केली पाहिजे ॥ २७ ॥ ऐसें बोलतां रघुनाथ। सुग्रीव म्हणे वानरनाथ। सुलोचने तुज वृत्तान्त। कैसा त्वरित समजला ॥ २८ ॥ शिर आणिलें वानरीं। तुज श्रुत जालें कवणेपरी। भुजदंड धरिला हृदयावरी। तो झडकरीं दाविला ॥ २९ ॥ परिसें वानरनाथा सुग्रीवा। माझे अंगणभूमीवरी बरवा। भुजदंड आला जेव्हां। प्रार्थना तेव्हां त्यां केली ॥ १३० ॥ पाचबद्ध भूमीवरी। वर्तमान लिहिलें सविस्तरीं। तो हा भुजदंड हृदयावरी। म्हणोनि निर्धारीं दाविला ॥ ३१ ॥ तंव बोलिला सुग्रीव वीर। तोंडचे तोंडीं समाचार। कोण मानी साचार। ऐक निर्धार सांगतों ॥ ३२ ॥ शिर प्रत्यक्ष बोलेल। तुझे पातिव्रत्या साक्ष देईल। आम्हां साच मानेल। नाहीं तरी फोलकट[९] ॥ ३३ ॥ श्रीरामसंज्ञेकरोनी। शिर दिधलें आणोनी। सुलोचना देखोनि नयनीं। हर्षित मनीं पैं झाली ॥ ३४ ॥ शिर घेवोनियां सन्निध। अंचळें पुसोनि यथाविध। निढळा[८] मिळवोनि निढळ विनोद। बोले सुबद्ध सुलोचना ॥ ३५ ॥ आसन घातलें पद्मासन। भुजदंड आणि शिर जाण। पुढें मांडीवरी घेऊन। काय आपण बोलत ॥ ३६ ॥ अहो इंद्रजिता स्वामी। वानरीं तुमचें शिर रणभूमीं। घेऊन आणिलें झेलीत व्योमीं। तो राग स्वामी न धरावा ॥ ३७ ॥ मी तंव तुझी निजदासी। प्रतारणा[९] न करावी मजसी। साक्ष देवोनि वानरांसी। पतिव्रतापणासी साच करीं ॥ ३८ ॥ वानरीं मांडिली माझी छळणा। तुजवांचून सांगूं कवणा। ऐसें बोलोनि सुलोचना। करी नमना हस्तेंसीं ॥ ३९ ॥ नानापरी उपचारीं। शिरालागीं प्रार्थना करी। शिर न बोले निर्धारीं। मग अंतरीं विचारीत ॥ १४० ॥ एका शुद्ध भावावीण। वैरंपंगी[१०] उपचार जाण। करितां न बोले शिर आपण। आतां सतीपण दावूं यांसी ॥ ४१ ॥ जरी मी सत्य पतिव्रता। असेन साचार तत्त्वतां। तरी साक्ष देवो माझा भर्ता। श्रीरघुनाथासमक्ष

१ चांगलें. २ पलीकडे. ३ भक्तांची इच्छा पूर्ण करणाऱ्या कल्पवृक्षा. ४ सती जाणें. ५ पाठवणी. ६ व्यर्थ.

७ पदरानें. ८ मस्तकाला. ९ फसवणूक. १० वरवर केलेले.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ ४२ ॥ सबाह्य अभ्यंतरीं आपण । म्हणे मी प्रतिव्रता असेन । इंद्रजिता तुजवांचून । शेषासमान सर्वेही ॥ ४३ ॥ ऐसा असल्या निर्धार । साक्ष बोलावी प्रखर । बोलो अचेतन हें शिर । पतिव्रता साचार सुलोचना ॥ ४४ ॥ ऐकतां सतीचें उत्तर । थरथरलें अचेतन शिर । देखतां श्रीरामचंद्र । साक्ष साचार अनुवादे ॥ ४५ ॥ जैसा रामचंद्र सत्य सत्य । तैसें सुलोचनेचें पातिव्रत्य । जाणोनियां इत्थंभूत । कार्य निश्चित करीं स्वामी ॥ ४६ ॥ ऐशी साक्ष देतां शिर । वानरीं केला जयजयकार । सुखावला श्रीरामचंद्र । चिंतातुर लक्ष्मण ॥ ४७ ॥ केवळ अचेतन शिर । साक्ष वदलें पैं साचार । संतोषोनि श्रीरामचंद्र । काय उत्तर बोलत ॥ ४८ ॥ रघुनंदन म्हणे सुलोचने । काय इच्छा तें बोलणें । काय मागसी तें देईन सजणे । प्रसन्नवदनें बोलिला ॥ ४९ ॥ सुलोचना म्हणे गा श्रीरामा । भक्तकामकल्पद्रुमा । पतिशिर देवोनि आम्हां । पुनर्जन्मा देऊं नको ॥ १५० ॥ तुझ्या चरणीं अक्षय वास । तुझ्या नामीं दृढ विश्वास । हेंचि देवोनि आम्हांस । निजधामास बोळवीं ॥ ५१ ॥ ऐसें मागे सुलोचना । संतोषला रामराणा । पावाल अक्षयी निजभवना । आशीर्वचना जाण माझ्या ॥ ५२ ॥ आणीक होवोनि हर्षान्वित । काय बोलला रघुनाथ । आतां उठवीन इंद्रजित । म्हणोनि हस्त उचलिला ॥ ५३ ॥ तंव बोलिला हनुमंत वीर । स्वामींनीं हा परोपकार । पुरे करावा विचार समग्र । आतां उदार न व्हावें ॥ ५४ ॥ तंव बोलिला लक्ष्मण । हनुमानाचें वचन प्रमाण । स्वामींनीं करोनि आपण । आज्ञापन द्यावें सुलोचने ॥ ५५ ॥ सुग्रीव बोले सुलोचनेप्रती । शिर घेवोनि नीघ त्वरितीं । विलंब न करावा ये अर्थीं । जायीं निश्चितीं निजमाये ॥ ५६ ॥ ऐसें ऐकतां वचन । शिरा भुजादंड कवळोन । श्रीरामा नमस्कार प्रदक्षिण । करोनि विनवणी करीतसे ॥ ५७ ॥ ऐकें स्वामी रघुनाथा । आजिचा दिवस युद्धवार्ता । आपण न करावी सर्वथा । वानर आपले आवरावे ॥ ५८ ॥ अवश्य म्हणे रघुनंदन । करी सुग्रीवा आज्ञापन । आजिचा दिवस वानरगण । रणकंदना न जावे ॥ ५९ ॥ ऐसें होतां सुलोचना । भुजदंड आणि शिर जाणा । मस्तकीं वाहोनि रणांगणा । निकुंबळे जाणा जाती झाली ॥ १६० ॥ सर्व सखियांसमवेत । रामनामें गर्जत । चरणचाली निकुंबळेंत । आली जेथ धड होतें ॥ ६१ ॥ शिर जोडोनि धडासी । उभय भुजा ठेवोनि समीपेंसीं । अग्निप्रवेशाचे सामग्रीसीं । स्वयें साहित्यासी मांडिलें ॥ ६२ ॥ तंव रावणाचे हेरीं । वर्तमान निवेदिलें ते अवसरीं । रावण मंदोदरी सहपरिवारीं । स्वयें झडकरी तेथें आलीं ॥ ६३ ॥ रावणें येवोनि आपण । कुंड करोनि चतुष्कोण । आंत चंदनकाष्ठें घालून । त्यास कृशान लाविला ॥ ६४ ॥ सुलोचना कुंडासमीप । येती झाली आपैंआप । सतीपणाचें घेऊन रूप । अग्नीसमीप उभी ठेली ॥ ६५ ॥ इंद्रजिताचें सर्व शरीर । चितेमाजी संपरिकर । घालोनियां अति सत्वर । अग्नि साचार लाविला ॥६६॥ आपण राहोनि कुंडाजवळी । सतीपणाचीं वाणें ते काळीं । देती झाली वेल्हाळी । सत्या सकळी मिळाल्या ॥६७॥ स्वर्गीं करिती जयजयकार । विमानीं दाटले सुरवर । वन्हि चेतला समग्र । कुंड जाहलें वन्हिमय ॥ ६८ ॥ येरी पूजोनि रंगशिळा । कुंडाप्रति प्रदक्षिणा केल्या । उभी राहिली रंगशिळां । चहूंकडे अबला विलोकिती ॥ ६९ ॥ स्वर्गीं दाटलीं विमानें । सत्याही देखिल्या नयनें । सुलोचनें एकाग्र मनें । करोनि आपण काय करी ॥ १७० ॥ इंद्रजिताचें निजरूप । ध्यानीं आणिलें आपैंआप । तंव देहभावना निजस्वरूप । आपैंआप विरालीं ॥७१॥ विसरोनियां देहभान । इंद्रजिताच्या स्वरूपीं निमग्न । स्वयें होवोनि आपण । अग्निप्रवेशन करिती झाली ॥ ७२ ॥ तंव देदीप्यमान विमानीं । इंद्रजित देखिला नयनीं । उभयतां एके ठायीं होवोनी । सायुज्यसदनीं प्रवेशलीं ॥ ७३ ॥ क्षणामाजी दुजी सृष्टी । देखते झाले सर्वेही दृष्टीं । देव करिती पुष्पवृष्टी । जयजयकार बोभाटीं गर्जत ॥ ७४ ॥ देव गेले आपल्या स्थाना । लंकावासी जन जाणा । आठवीत सुलोचनेच्या गुणा । आपलाल्या भवना स्वयें गेले ॥ ७५ ॥ लंकानाथ आणि

१ निर्जीव. २ सुंदरी. ३ पाठव. ४ अग्नि. ५ सर्व साहित्यासह. ६ नाहींशीं झालीं.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

मंदोदरी। आक्रोशें रुदन करिती भारी। रावण म्हणे निर्धारीं। ऐकें सुंदरी मंदोदरी ॥ ७६ ॥ आजी वडील पुत्र वडील सून। जाली उभयतांची बोळवण। आतां आपणही जाण। सत्वर प्रयाण करावें ॥ ७७ ॥ शोक करणें कासयासी। आतां राहणें नाहीं आपणासी। ऐसें बोलोनि सहपरिवारेंसीं। निजभवनासी पैं आले ॥ ७८ ॥ ज्या रावणाची संपत्ती। गणितां न गणवे गणती। पुत्र पौत्रे बहुसंतती। ऐसा निश्चितीं दुजा नाहीं ॥ ७९ ॥ नगरी पाहतां सुवर्णाची। सर्व देव सेवा करिती ज्याची। विपरीत कळा कैसी आजची। एक रावणचि उरला असे ॥ १८० ॥ तोही मरेल रामबाणें। निदानीं उरेल बिभीषण। ऐसें काळाचें करणें। कोण जाणे कैसें होय ॥ ८१ ॥ एका जनार्दना शरण। सुलोचनाग्निप्रवेशन। झालें सकळ निरूपण। सज्जनीं सावधान परिसावें ॥ ८२ ॥ पुढें रामरावणांचें युद्ध। होईल आतां सुसंबद्ध। श्रोते परिसोत विविध। निजबोध रावणा ॥ ८३ ॥ एकाएकीं एकनाथ। शरणागत भावार्थे वर्णीत। जनार्दनाचें मी अपत्य। लळे समस्त पाळीत ॥ १८४ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां सुलोचनाग्निप्रवेशनं नाम एकचत्वारिंशोऽध्यायः ॥ ४१ ॥

अध्याय बेचाळिसावा

॥ श्रीरामचंद्राय नमः ॥ इंद्रजिताचा करोनि घात। सौमित्र विजयान्वित। तें ऐकोनि लंकानाथ। दुःखाभिभूत अति दुःखी ॥ १ ॥ निकुंभळे विवराआंत। लक्ष्मणें जावोनि तेथ। केला इंद्रजिताचा घात। प्रधान सांगत लंकेशा ॥ २ ॥ लक्ष्मणा साह्य हनुमंत। प्रतापें रिघोनि विवरांत। बाहेर काढितां इंद्रजित। मेघपृष्ठपर्यंत वाढला ॥ ३ ॥ इंद्रजित मेघपृष्ठीं गर्जत। लक्ष्मण नेवोनि स्वहस्तें तेथ। मेघनादाचा केला घात। साह्य हनुमंत सर्वार्थी ॥ ४ ॥ ऐकोनि इंद्रजिताचा घात। रावण महामोहान्वित। सिंहासनातळीं मूर्च्छित। पडे अकस्मात विसंज्ञ ॥ ५ ॥ संज्ञा पावोनियां रावण। दहाही मुखीं करी शंखस्फुरण। दीर्घस्वरें करी रुदन। पुत्रनिधान अंतरलें ॥ ६ ॥ दुःखें गडबडां लोळे। केश सुटले मोकळे। अश्रुधारा स्रवती डोळे। लाळ गळे दशमुखीं ॥ ७ ॥ पुत्रशोकें अति संतप्त। नेत्रद्वारा अश्रु स्रवत। क्रोधें गरगरां नेत्र भ्रमत। अवघे पळत अति धाकें ॥ ८ ॥ जिकडे जिकडे दृष्टि जाये। तिकडे आगी लागों पाहे। कोपें थरथरां कांपताहे। करावें काये स्मरेना ॥ ९ ॥ सर्वेचि म्हणे इंद्रजिता। तुज गेलिया रे आतां। मज नाहीं कोणी रक्षिता। दुःखावस्था विलपत ॥ १० ॥ शंखस्फुरणें फुटले ओंठ। रडतां सोकले दहाही कंठ। पुत्रशोकाचें यथेष्ट। दुःख अचाट रावणा ॥ ११ ॥ मग बोलिला गर्जोन। इंद्रजिताचा सूड घेईन। रणीं मारीन रामलक्ष्मण। आंगवण पहा माझी ॥ १२ ॥ माझे मारिले थोर थोर। निधडे योद्धे महावीर। सखे बंधु लाडके कुमर। तेंचि दशशिर अनुवादे ॥ १३ ॥

महापार्श्वे विनिहते राक्षसे च महोदरे।
निशाचरे महामात्ये विरूपाक्षे निपातिते ॥ १ ॥
विश्रुतेषु च योधेषु कांदिग्भूतेषु सर्वशः।
रावणः शोकसंतप्तः कार्यशेषमचिंतयत् ॥ २ ॥
चिंतयित्वा नातिचिरं स्वसैन्यानि निवर्त्य च।
सूतं संचोदयामास वाक्यं चेदमुवाच ह ॥ ३ ॥
निहतानाममात्यानां रुद्धस्य नगरस्य च।
दुःखमेवापनेष्यामि हत्वा तौ रामलक्ष्मणौ ॥ ४ ॥

दुःखें वदे दशकंठ। माझे मारिले भट सुभट। बंधु मारिले अति बळिष्ठ। ज्येष्ठ कनिष्ठ निजकुमर ॥ १४ ॥ किती सोसूं दुःख दारुण। म्हणाल मारिले कोण कोण। ते मी सांगेन अवघे जण। रणप्रवीण महायोद्धे ॥ १५ ॥ महापार्श्व महोदर जाण। निधडा मारिला कुंभकर्ण। प्रहस्त मारिला प्रधान। अकंपन महावीर ॥ १६ ॥ व्रजदंष्ट्र विरूपाक्ष। कुंभ निकुंभ धूम्राक्ष। अतिकाय त्रिशिरा मकराक्ष। वीर असंख्य मारिले ॥ १७ ॥ देवांतका नरांतका निःपात। ज्येष्ठ मारिला इंद्रजित। तेणें होऊं पाहे प्राणान्त। लंकानाथ तळमळी ॥ १८ ॥ पुच्छ तुटल्या सापसुरळी। जळावेगळी मासोळी। तैसा रावण तळमळी। राक्षसकुळी निर्दाळितां ॥ १९ ॥ रणीं मारिले

१ खरेपणानें. २ नातू. ३ शेवटीं. ४ दुःखानें व्याप्त. ५ बेशुद्ध होऊन. ६ रावण. ७ योद्धे. ८ नाश.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

नेणों किती । उरली जे सैन्यसंपत्ती । धाकें पळाली दश दिशांप्रती । लंकापति अति दुःखी ॥ २० ॥ मिळोनियां रामलक्ष्मण । माझ्या सुहृदां केलें कंदन[1] । त्या दोघांचा घेईन प्राण । गर्जे रावण आक्रोशें ॥ २१ ॥ सांडूनि सैन्याची आस[2] । घालोनि संग्रामाची कांस । पाचारोनि सारथ्यास । सांगे लंकेश तें ऐका ॥ २२ ॥ मिळोनियां वानर नर । सुहृद मारिले समग्र । माझें रोधिलें[3] असे नगर । निशाचर गांजोनी ॥ २३ ॥ त्या दोघांचा करावया अंत । स्वयें मी जातों संग्रामांत । शीघ्र सज्जोनि आणीं रथ । लंकानाथ अनुवादे ॥ २४ ॥

कर्मणोऽस्य हि तौ मूलं भ्रातरौ राघवावुभौ ।
ययोः प्रशाखाः सुग्रीवो हरयोऽन्ये च यूथपाः ॥५॥
फलपुष्पे जनकजा शिला धृष्टश्च मारुतिः ।
मूले हते हतं सर्वं तौ हनिष्यामि संयुगे ॥ ६ ॥

संग्रामवृक्षाचें मूळ जाण । मुख्य श्रीरामलक्ष्मण । सबळ दिंडें तो सुग्रीव जाण । खांद्या संपूर्ण कपिमुख्य ॥ २५ ॥ योद्धे वानर शाखा सरळ । जनकजा ते पुष्पफळ । संग्राम वाढवी तें शीळ । जाण केवळ हनुमंता ॥ २६ ॥ लाहोनि हनुमंताचें बळ । संग्रामाचें बळशीळ । माझें निर्दळावया कुळ । द्वंद्वी केवळ हनुमंत ॥ २७ ॥ रामलक्ष्मणादि समस्त । उणें पडत जेथ जेथ । हनुमान साह्य होय तेथ । अटकें कार्यार्थ साधूनि ॥ २८ ॥ आतां मी जावोनि आपण । रणीं मारीन रामलक्ष्मण । मूळ छेदिलिया जाण । अवघे जण निमतील ॥ २९ ॥ राम सौमित्र निमाल्यापाठीं । हनुमान मरेल उठाउठीं । निमतील वानरांच्या कोटी । निर्वैर सृष्टी करीन ॥ ३० ॥ ऐसें बोलोनि रावण । रथीं बैसला आपण । अति क्रोधें क्रोधायमान । गडगर्जन करीतचि ॥ ३१ ॥

स दिशो दश घोषेण रथेन सहसा भृशम् ।
नादयन्राक्षसश्रेष्ठो राघवावभ्यवर्तत ॥ ७ ॥
स विस्फार्य महाचापं किरीटामृष्टकुंडलः ।
नाम संश्रावयामास जगर्ज च ननाद च ॥ ८ ॥
ते राक्षसेंद्रं तं दृष्ट्वा वानरास्त्रस्तचेतसः ।
शरण्यं शरणं जग्मुर्मनसा पुरुषोत्तमम् ॥ ९ ॥

ततस्तं राघवो दृष्ट्वा रथस्थं पर्वतोपमम् ।
विद्युन्वानं धनुर्घोरं व्यायतास्यमिवांतकम् ॥ १० ॥

घडघडाट रथस्पंदें[7] । दश दिशा कोंदल्या नादें । मी रावण येणें शब्दें । गर्जत ब्रीदें स्वयें आला ॥ ३२ ॥ मुकुट कुंडलें मेखळा । अंगदें कंकणें कंठमाळा । चाप सज्जोनि प्रबळबळा । रथीं बैसला गडगजैं ॥ ३३ ॥ ध्वज पताका छत्र चामर । कवची खड्गी धनुर्धर । संमुख लक्षोनि रामचंद्र । दशशिर चालिला ॥ ३४ ॥ वानरसेनांचिया थाटी । बाणीं त्रासिल्या कोट्यनुकोटी । कपि पळोनि उठाउठीं । रिघाले पाठीं श्रीरामाच्या ॥ ३५ ॥ वानर धाकत धापत । भेणें चळचळां कांपत । अभय देवोनि रघुनाथ । पुढें लंकानाथ देखिला ॥ ३६ ॥ पाचारोमि बिभीषण । स्वयें पुसे रघुनंदन । माझे त्रासीत वानरगण । येतो कोण तो सांग ॥ ३७ ॥

आचचक्षे महातेजा राघवाय विभीषणः ।
दशग्रीवो महातेजा राजा वैश्रवणानुजः ॥ ११ ॥
भीमकर्मा महोत्साहो रावणो राक्षसाधिपः ॥ १२ ॥

माझे त्रासीत वानर । कवची खड्गी धनुर्धर । कोण येतो निशाचर । सांग सत्वर बिभीषणा ॥ ३८ ॥ ऐसें पुसतां रघुनंदन । स्वयें सांगे बिभीषण । अति दुर्धर हा दशानन । राजा जाण लंकेचा ॥ ३९ ॥ इंद्रजिताचा झाला घात । पुत्रशोकें अति संतप्त । युद्धा आला लंकानाथ । करीत प्राणान्त वानरां ॥ ४० ॥ करावया निर्वाणरण[8] । युद्धा आलासे रावण । त्याचें करावया निर्दळण । सज्जीं बाण श्रीरामा ॥ ४१ ॥ ऐकोनि बिभीषणवचन । संतोषला रघुनंदन । निर्दळावया दशानन । धनुष्यबाण सज्जिलें ॥ ४२ ॥ संमुख लक्षोनि रावण । धनुर्ष्यी सज्जोनियां बाण । काय बोलिला रघुनंदन । सावधान अवधारा ॥ ४३ ॥ विंधोनियां दृढ बाण । घायें मारीन रावण । अभिषिंचीन बिभीषण । रणा संपूर्ण समाप्ती ॥ ४४ ॥ माझी दृष्टि पडलिया जाण । लंकेशाचे न वांचती प्राण । रणीं मारीन रावण । प्रतिज्ञा पूर्ण हे माझी ॥ ४५ ॥ आजचि रणसमाप्ती । रामराज्य त्रिजगतीं । करावया रघुपतीं । बाण शिंतीं[9] सज्जिला ॥ ४६ ॥

१नाश. २आशा. ३वेढा घातला. ४खोड. ५सीता. ६ फार कठिण. ७रथाच्या आवाजानें. ८ अखेरचें युद्ध. ९दोरीवर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

बाण ओढोनि कानाडी। विंधीत अति कडाडीं। रावण येत येतां तोडी। रणनिर्वेडी साधूनी ॥४७॥ बाण विंधितां रघुवीर। तीं बाणीं छेदी दशशिर। तेणें क्षोभला सौमित्र। चाप सत्वर सज्जिलें ॥४८॥ सौमित्राचा चापशब्द। तेणें रावण झाला स्तब्ध। सैन्य सेनानी जाले मंद। भय सुबद्ध राक्षसां ॥४९॥ सौमित्रें विंधितां शर। दणाणिला दशशिर। हदादले निशाचर। राक्षसभार खवळला ॥५०॥ लागतां सौमित्राचे बाण। रणीं क्षोभला रावण। संमुख देखोनि लक्ष्मण। काय आपण जल्पत ॥५१॥ घेतला इंद्रजिताचा प्राण। तूं तंव माझा द्वंद्वी पूर्ण। विंधोनियां निर्वाणबाण। तुज धाडीन यमलोका ॥५२॥ मारावया सौमित्रा। रागें कांपत थरथरां। नेत्र भवंडी तो गरगरां। दांत करकरां खातसे ॥५३॥ त्यासी सौमित्र म्हणत। बडबडसी कां खासी दांत। करूनि दाखवीं पुरुषार्थ। तूं लंकानाथ प्रतापी ॥५४॥ बडबड करावया जाण। बहु तोंडीं तोंडाळ दशानन। कांहीं न दिसे आंगवण। रणीं रावण तूं नपुंसक ॥५५॥ माझे सुटलिया बाण। ससैन्य मारीन रावण। ऐसें बोलतां लक्ष्मण। दशानन खवळला ॥५६॥

संत्रस्यद्वानरानीकं शरवर्षैर्महाभुजः।
रामोऽपि राक्षसश्रेष्ठं शरैरद्र्यर्कसन्निभैः ॥ १३ ॥
ततः प्रवर्तते युद्धं रामरावणयोर्महत्।
जीवितांतकरं घोरं परस्परवधैषिणोः॥ १४ ॥

संमुख लक्षूनि लक्ष्मण। रावणें विंधिले दुर्धर बाण। एक एक त्रिधा भेदून। सांडी लक्ष्मण लघुहस्तें ॥५७॥ त्रिधा छेदिले बाण संपूर्ण। तेणें क्षोभला दशानन। लक्ष्मणावरी आपण। कोटि कोटि बाण वर्षला ॥५८॥ लक्ष्मण निवारी जंव बाण। तंव विंधिला बिभीषण। सुग्रीव विंधोनियां जाण। वानरगण त्रासिले ॥५९॥ अग्न्यर्कतेजस्वी बाण। क्रोधें घेवोनि रावण। दशग्रीवें गर्जोन। रघुनंदन विंधिला ॥६०॥ येतां रावणाचे बाण। रामें सांडिले छेदून। ते काळीं अति निर्वाण। दोघांहीं रण मांडिलें ॥६१॥ दोघे वीर विचक्षण। येरयेरांचे घ्यावया प्राण। लघुलाघवें विंधिती बाण। हस्तविदान दावूनी ॥६२॥

राघवो रावणं संख्ये रावणश्चापि राघवम्।
अन्योन्यं विशिखैस्तीक्ष्णैः शरैरभिववर्षतुः ॥ १५ ॥
चेरतुश्चरितं चित्रं मंडले सव्यदक्षिणे ॥ १६ ॥

राम उठावला रावणावरी। रावण उठावला रामावरी। युद्ध मांडलें जीवावरी। परस्परीं झगटले ॥ ६३ ॥ विचित्र मंडळें विचरत। लघुलाघवें बाण विंधीत। येरयेरांचा करावया घात। रणीं उन्मत्त मातले ॥ ६४ ॥ रावण रणीं रणोन्मत्त। श्रीराम रणीं सावचित्त। दशशिराचा करावया घात। संधि पाहात साटोपें ॥६५॥ श्रीरामाची निजगती। न पवे मनबुद्धि चित्तवृत्ती। रावण बापुडें तें किती। कैशा रीतीं पावेल ॥६६॥ पदाति राम रथी रावण। मंडळें करितां सव्यदक्षिण। रथैसीं श्रमला दशानन। रघुनंदन नाटोपे ॥६७॥ रामरावणांचे शर। आच्छादिती दिनकर। रणीं पाडिती अंधकार। येरां येर न देखती ॥६८॥ श्रीरामहस्तींची मुद्रिका। तिचेनि तेजें पैं देखा। श्रीरामा आणि दशमुखा। युद्धाचा आवांका संग्रामीं ॥६९॥ परस्परें घ्यावया प्राण। संधी पाहती दोघे जण। दोघे संग्रामीं विचक्षण। रणप्रवीण धनुर्वाडे ॥७०॥

उभौ च परमेष्वासावुभौ शस्त्रविशारदौ।
उभौ शस्त्रभृतां श्रेष्ठावुभौ युद्धे न चेलतुः ॥ १७ ॥
एकमेकेन बाणेन त्रिभिस्त्रीन्दशभिर्दश।
व्यसृजच्छरवर्षाणि राघवो राक्षसेश्वरः ॥ १८ ॥

दोघे धनुर्विद्यानिपुण। दोघे शस्त्रास्त्रप्रवीण। शस्त्रप्रेरणनिवारण। दोघे जण जाणती ॥७१॥ एकें छेदिती एक बाण। तीन बाणीं तीन बाण। दाहीं छेदिती दहा बाण। दोघे जण लघुवेधी ॥७२॥ अदट दाटुगे वीर धीरें। चपळहस्तें बाणमारें। रणीं न सरती माघारें। दोघे गजरें गर्जोनी ॥७३॥ ऐसियामध्यें राजा रावण। दुर्धर सज्जोनियां बाण। लक्षोनियां रघुनंदन। विंधी आपण साटोपें ॥७४॥ त्याचे निवारोनि बाण। रामें विंधिले शर दारुण। रथैसहित रावण। नेला उडवोन आकाशा ॥७५॥ बाणपिसारियाचा वारा। रथ भोंवे गरगरां। रावणें निवारोनियां

१ युद्धकौशल्य. २ कांपूं लागले. ३ शत्रु. ४ तीन ठिकाणीं. ५ अग्नि आणि सूर्य यांप्रमाणें तेजस्वी. ६ मोठ्या कुशलतेनें. ७ सूर्य. ८ धैर्य.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

शरां । रहंवरा[१] थांबविलें ॥ ७६ ॥ रामें विंधोनियां बाण । रणीं उडविला दशानन । तेणें खवळला रावण । अस्त्र निर्वाण सोडिलें ॥ ७७ ॥ रावण जपोनि समंत्र । अस्त्र प्रेरिलें आसुर । त्यापासून जीव क्रूर । अति दुर्धर चालिले ॥ ७८ ॥ वृकें[२] जंबुकें[३] सिंह व्याघ्र । काक कंक गीध घार । वडवा वराह महाखर । सर्प विखार धुंधुवात ॥ ७९ ॥ नीळ नकुळें[४] दंशें[५] कुक्कुट[६] । क्रूर श्वापदांचे थाट । श्रीरामावरी अचाट । सोडी दशकंठ अस्त्रयोगें ॥ ८० ॥ माराया रामराणा । रावण क्रोधें काळिया जाणा । सर्पप्राय विंधी बाणां । आंगवण साटोपें ॥ ८१ ॥ असुरास्त्र महाघोर । येतां देखोनि अति क्रूर । अचुकसंधानी रामचंद्र । तेणें अग्नि-अस्त्र सजिलें ॥ ८२ ॥

आसुरेण समाविष्टः सोऽस्त्रेण युधि रावणः ।
ससर्जास्त्रं महोत्साहः पावकं पावकोपमम् ॥ १९ ॥
ते रावणशरा घोरा राघवास्त्रेण मोहिताः ।
विलयं जग्मुराकाशे विनिकृत्ताः सहस्रधा ॥ २० ॥

असुरास्त्र अति क्रूर । चालिले सिंह वृक व्याघ्र । रामें सोडून अग्निअस्त्र । केले समग्र भस्मान्त ॥ ८३ ॥ अस्त्रें निवारोनि अस्त्र । निधडा योद्धा श्रीरामचंद्र । तें देखोनि दशशिर । क्रोधें दुर्धर खवळला ॥ ८४ ॥

ततः संत्रस्तवक्त्रस्तु रावणो लोकरावणः ।
नाराचमालां रामस्य ललाटे प्रत्यमुंचत ॥ २१ ॥
रौद्रचापप्रयुक्तां च नीलोत्पलमयीमिव ।
शिरसा धारयन्रामो न व्यथामध्यगच्छत ॥ २२ ॥

माझें अस्त्र निजनिर्वाण । रामें सांडिलें छेदून । तेणें रावण अति दीन । म्लानवदन पैं झाला ॥ ८५ ॥ असुरास्त्र केलें वृथा । रणीं मारीन रघुनाथा । पांच बाण विंधिले माथां । लघुलाघवता साटोपें ॥ ८६ ॥ येतां रावणाचे बाण । राम न करी निवारण । पाहूं पां याची आंगवण । दारुणपण बाणांचें ॥ ८७ ॥ कमळमाळा मनोहर । तैसे मस्तकीं शोभती शर । व्यथा न पवे श्रीरामचंद्र । निधडा वीर संग्रामा ॥ ८८ ॥ पुष्पप्राय लागले बाण । तेणें लाजला रावण । जळो माझी आंगवण । रघुनंदन ढळेना ॥ ८९ ॥ निर्वाणबाणाचा आघात । उघडा अंगीं श्रीराम साहत । माझा न चले पुरुषार्थ । चिंताक्रांत रावण ॥ ९० ॥ रावणाचे पांचही बाण । श्रीराममस्तकीं देखोन । सौमित्र क्षोभला दारुण । धनुष्यबाण वाहिलें ॥ ९१ ॥

एतस्मिन्नंतरे क्रुद्धो राघवस्यानुजो बली ।
लक्ष्मणः सायकान्सप्त जग्राह परवीरहा ॥ २३ ॥
तैः सायकैर्महायोगै रावणस्य महाद्युतेः ।
ध्वजं मनुष्यशीर्षं च तस्य चिच्छेद वीर्यवान् ॥ २४ ॥
सारथेश्चैव बाणेन शिरो ज्वलितकुंडलम् ।
जहार लक्ष्मणः श्रीमान्नैर्ऋतस्याशु पपात च ॥ २५ ॥
कृष्यमाणं तु चिच्छेद धनुर्गजकरोपमम् ।
लक्ष्मणो राक्षसेंद्रस्य पंचभिः पंचपर्वभिः ॥ २६ ॥
नीलमेघनिभांश्चास्य सदश्वान्पवनोपमान् ।
निजघान महावेगान्रावणस्य विभीषणः ॥ २७ ॥

धनुष्य वाहोनि लक्ष्मण । गुणीं लाविले सात बाण । क्रोधें लक्षोनि रावण । विंधी आपण साटोपें ॥ ९२ ॥ लक्ष्मणबाणांच्या कडाडीं । रावणा पडली झांपडी । काढों विसरला तो वोढी । चेतना वेडी होवोनि ठेली ॥ ९३ ॥ ध्वज नरशि-रसंमयुक्त[९] । ब्रीद मिरवी लंकानाथ । तो छेदो-नियां त्वरित । संग्रामांत पाडिला ॥ ९४ ॥ दुसरा येतांचि शर । मुकुट कुंडलें मनोहर । सारथ्याचें छेदोनि शिर । रणीं सत्वर पाडिलें ॥ ९५ ॥ छत्र पताका झल्लरी । मुक्ताफळांच्या माळा थोरी । छेदोनि पाडिल्या धरेवरी । बाणाग्रीं सौमित्रें ॥ ९६ ॥ लघुलाघवें लक्ष्मण । सव्यापसव्य विंधोनि बाण । रावणाचें धनुष्यबाण । रणीं छेदोन पाडिलें ॥ ९७ ॥ नीळमेघपडिपांडें[१०] । पवन-वेगी जोड्या जोडे । रावणरथाचे घोडे । मारिले रोकडे बिभीषणें ॥ ९८ ॥ बिभीषणें विंधोनि बाण । वारुवांचा[११] घेतला प्राण । तेणें बंधूवरी रावण । काळरूपें पूर्ण क्षोभला ॥ ९९ ॥ जवळी असतां लक्ष्मण । करूं न शके आंगवण । कुसमुसूनि रावण । उगाच आपण राहिला ॥ १०० ॥ निधडा शूर लक्ष्मण । रणीं गांजोनियां रावण । विरथी करोनियां जाण । पायीं संपूर्ण पळविला ॥ १ ॥ विजयी झाला सौमित्र । वानर करिती जयजय-

१ आपल्या रथाला. २ लांडगे. ३ कोल्हे. ४ मुंगुस. ५ मुर्कुटें. ६ कोंबडा. ७ अखेरीचें, निकराचें. ८ धनुष्याच्या दोरीवर. ९ मनुष्याच्या मस्तकांनीं युक्त. १० नीलवर्ण मेघां-सारखे. ११ घोड्यांचा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

कार। रामनामाचा गजर। नादें अंबर कोंदलें ॥ २ ॥ एका जनार्दना शरण। युद्ध झालें अति निर्वाण। रावणें मारितां बिभीषण। ते शक्ति लक्ष्मण साहेल ॥ ३ ॥ पुढील प्रसंगीं स्वभावता। शक्तिभेदाची येईल कथा। एका जनार्दनीं सरतां। अवधान श्रोतां मज द्यावें ॥ ४ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां रावणरथभंगापजयो नाम द्विचत्वारिंशोऽध्यायः ॥ ॥ ४२ ॥ ओंव्या ॥ १०४ ॥ श्लोक ॥ २७ ॥

अध्याय त्रेचाळिसावा

॥श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः॥ लक्ष्मणें रणाआंत। ध्वज सारथी छेदून रथ। रावण केला हताहत। संग्रामांत साटोपें ॥ १ ॥ रणीं लक्ष्मणें केला विरथ। तो राग न मानी लंकानाथ। बिभीषणें केला अश्वघात। त्यासी टपत मारावया ॥ २ ॥ लक्ष्मण झालिया परता। करीन बिभीषणाच्या घाता। तो सोडीना शरणागता। क्षणार्धतां न विसंबे ॥ ३ ॥ धीर न धरीच रावण। परता नव्हेचि लक्ष्मण। बिभीषणावरी आपण। अति निर्वाण मांडिलें ॥४॥ घोडे मारितां रावण। वेगीं रथ सांडूनि जाण। मारावया बिभीषण। करूनि उड्डाण धांविन्नला ॥ ५ ॥ बिभीषण देखोनियां दृष्टीं। दांत खाय सकट ओंठीं। त्याचे नेळीचें रक्त घोटीं। ऐसा दशकंठी क्षोभला ॥ ६ ॥ एके घायें होय शांती। ऐसी अभिमंत्रून शक्ती। सोडिली बिभीषणाप्रती। लंकापतीं साटोपें ॥ ७ ॥ रावणें सोडितां शक्ती। लक्ष्मणें बाणावर्ती। त्रिधा छेदून पाडिली क्षितीं। निजशरणार्थी रक्षिला ॥ ८ ॥ राखावया बिभीषण। पाठीराखा लक्ष्मण। पाहों न शके रावण। शक्ति छेदून सांडिली ॥ ९ ॥ शक्ति छेदिली लक्ष्मणें। ऐसें देखोनि रावणें। दुसरी शक्ति सज्जिली तेणें। बिभीषण प्राणें घ्यावया ॥ १० ॥ बिभीषणाचा घ्यावया प्राण। दुजी शक्ति सज्जी रावण। निवारूं जातां लक्ष्मण। दोघे जण मरतील ॥ ११ ॥ शक्ति अनिवार्य दारुण। स्वयें तोलोनि रावण। अनुलक्षोनि बिभीषण। सोडी आपण अति कोपें ॥ १२ ॥ करावया बंधूची समाप्ती। घाव हाणी विसां हातीं। प्रळयविजुतुल्य दीप्ती। गगनीं शक्ती कडाडी ॥१३॥ शक्ति अनिवार्य दारुण। जाणोनियां बिभीषण। म्हणे माझे न वांचती प्राण। अचुक मरण मज आलें ॥ १४ ॥ बिभीषण चिंताक्रांत। तंव सौमित्र पावला तेथ। पाठीसीं घालोनि शरणागत। अभयान्वित स्थापिला ॥ १५ ॥ बिभीषणा शरणागता। स्वयें स्मरें रघुनाथा। नामीं नाहीं मरणावस्था। निर्भयता श्रीरामें ॥ १६ ॥ रामनामाच्या अनुवृत्तीं। दोघे स्वानंदें नाचती। तें देखोनि लंकापती। विस्मित चित्तीं पैं झाला ॥ १७ ॥ मीं सोडिली दुर्धर शक्ती। तें मरणभय नाहीं चित्तीं। दोघे स्वानंदें नाचती। निर्भयस्थितीं सौमित्र ॥ १८ ॥ नर वानर नामांकित। मरणभया नाहीं भीत। तें देखोनि लंकानाथ। अति विस्मित पैं झाला ॥ १९ ॥ अगाध नामाचें महिमान। पुढील कथानुसंधान। श्रोतीं द्यावें अवधान। शक्तिनिवारण सौमित्रें ॥ २० ॥ बिभीषणाच्या निजघातीं। रावणें सोडिली जे शक्ती। सौमित्रें नेली भस्मांतीं। तेही युक्ती अवधारा ॥ २१ ॥ यक्षिणीवटींची मुख्य शक्ती। ते लक्ष्मणा वशवर्ती। शक्तीनें निवारिली शक्ती। पाडिली क्षितीं दुखंडें ॥ २२ ॥ राखावया शरणागत। सौमित्र सदा सावचित्त। तेणें क्षोभला लंकानाथ। येणें भ्रातृघात चुकविला ॥ २३ ॥ येणें शक्तिपातें जाण। निःशेषें मरावा बिभीषण। आडवा येवोनि लक्ष्मण। शक्तिच्छेदन तेणें केलें ॥ २४ ॥ आधीं मारीन लक्ष्मण। मग मारीन बिभीषण। ऐसें आक्रोशे रावण। शक्ति निर्वाण काढिली ॥ २५ ॥ जिचें नांव ब्रह्मशक्ती। जे निवारेना रघुपती। सौमित्राच्या निजघातीं। निर्वाणार्थी सोडीत ॥ २६ ॥ विमुख करोनि माझी ख्याती। भस्म केल्या दोन्ही शक्ती। तेणें क्षोभला लंकापती। ब्रह्मशक्ती सोडीत ॥ २७ ॥ नानापरींच्या दुर्धरा युक्तीं। मयें केली मायिक शक्ती। ते न चले श्रेष्ठ सुरवरांप्रती। लंकापति सचिंत ॥ २८ ॥ तेणें प्रार्थिला प्रजापती। मागितली ब्रह्मशक्ती। अनिवार्य त्रिजगतीं। ब्रह्मवरदोक्ती

१ आकाश. २ समर्थ. ३ जर्जर. ४ अर्धक्षण देखील. ५ नरडीचें. ६ बाणांच्या क्रमानें. ७ पृथ्वीवर. ८ तेज. ९ निर्भय. १० पूर्णपणें. १२ मयासुरानें, हा रावणाचा सासरा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

दुर्धर ॥ २९ ॥ ब्रह्मा म्हणे रावणा । शक्ति सर्वांच्या घेईल प्राणा । अवतारपुरुषीं जाणा । बाधकपणा चालेना ॥ ३० ॥ अवतारपुरुषाप्रती । माझी बाधेना ब्रह्मशक्ती । प्राण न घेववे तिचेनि निश्चितीं । त्याचेनि शक्ति संपेल ॥ ३१ ॥ ज्यावरी शक्ति प्रेरणें । तेणें जीवें नाहीं वांचणें । ऐसी ब्रह्मशक्ति रावणें । लक्ष्मणाकारणें सज्जिली ॥ ३२ ॥ शक्तीनें मारावा बिभीषण । तो सौमित्रें वांचविला आपण । संमुख लक्षोनि लक्ष्मण । काय रावण बोलत ॥ ३३ ॥ शक्ति निवारून जाण । त्वां वांचविला बिभीषण । आतां तुझा घेईन प्राण । शक्ति दारुण सोडूनी ॥ ३४ ॥ शक्ति सोडीन दारुण । तिसी न चले निवारण । हृदय भेदून संपूर्ण । घेवोनि प्राण येईल ॥ ३५ ॥ माझे शक्तीचा आघात । चुकविल्या कळैल पुरुषार्थ । ऐसें बोलोनि लंकानाथ । शक्ति सोडीत साटोपें ॥ ३६ ॥ शक्तितेजाच्या कडाडीं । उभय सैन्या पडे झांपडी । प्रळयविजूच्या पडिपाडीं । गगन गडाडी गडगजें ॥ ३७ ॥ सौमित्र आणि रघुनाथ । तिसरा वीर हनुमंत । यांचींच नेत्रें सावचित्त । येर मूर्च्छित शक्तितेजें ॥ ३८ ॥ शक्ति देखोनि दुर्धर । लक्ष्मणयोद्धा वीर धीर । डंडळीना अणुमात्र । सज्जोनि शर छेदीत ॥ ३९ ॥ शक्ति कडाडितां गगनीं[2] । लक्ष्मणें विंधोनि बाणीं । शतधा सांडिली छेदूनी । घातली पिटोनि निरां[2]-लंबीं ॥ ४० ॥ ब्रह्मशक्ति अति निर्वाणीं । गगनीं येतां कडाडूनी । लक्ष्मणाच्या संरक्षणीं । कृपा-वचनी वदे राम ॥ ४१ ॥ श्रीरामदृष्टीं अवलोकन । शक्तीची शक्ति केली क्षीण । ब्रह्मशक्तीसी देवोनि मान । राखिली आपण निर्वीर्यत्वें ॥ ४२ ॥ श्रीरामें शक्ति केली क्षीण । त्यावरी लक्ष्मणें विंधितां बाण । शक्ति पडत पडतां जाण । झेली रावण साटोपें ॥ ४३ ॥ तूं ब्रह्मयाची ब्रह्मशक्ती । निष्फळ कैंवी पडसी क्षितीं । रावणें घेवोनि हातीं । हाणी पुढती सौमित्रा ॥ ४४ ॥ जवळून शक्ति हाणितां जाण । लक्ष्मण विंधील तीव्र बाण । येणें भेणें रावण । हाणी आपण दुरोनी ॥ ४५ ॥ रावणें शक्ति घेवोनि हातीं । आपुलिया सर्वशक्तीं । सोडिली सौमित्राप्रती । सकोपवृत्तीं साटोपें ॥ ४६ ॥ अंगबळें जांघबळें । बाहुबळें प्रतापशीळें । शक्ति सोडितां रणकल्लोळें । गगना उसळे कडक-डित ॥ ४७ ॥ लक्ष्मण वीर अति निधडा । कदा न सरे मागांपुढां । शक्ति छेदिली तडतडां । निजकुऱ्हाडा विंधोनी ॥ ४८ ॥ मयासुरें निर्मिली होती । जे ते छेदिली बाणांवर्ती[3] । उरली केवळ ब्रह्मशक्ती । ब्रह्मवरदोक्ती अनिवार्य ॥ ४९ ॥ शक्ति येतांच संपूर्ण । लक्ष्मणें विंधोनि बाण । सत्यलोकावरती जाण । उडवी आपण साटोपें ॥ ५० ॥ शक्ति निजबळें येऊं पाहे । लक्ष्मण बाणीं पिटीत जाये । शक्ति उसणें घेवों न लाहे । दुर्धर घाये हाणीत ॥ ५१ ॥ शक्ति तळपोनि गुप्तगतीं । अंगीं आदळावया पैं टपती । लक्ष्मणें खड्ग[4] घेवोनि हातीं । उडविली मागुती सत्य-लोका ॥ ५२ ॥ खड्गघायाच्या खणाणीं । शक्ति छेदितां रणांगणीं । ठिणग्या उसळल्या गगनीं । जेंवी तारांगणीं नभशोभा ॥ ५३ ॥ लक्ष्मण असतां सावचित्त । होऊं न शके शक्तिपात । हें जाणोनि लंकानाथ । करी छळणार्थ तें ऐका ॥ ५४ ॥ लक्ष्म-णवीर अति गाढा । अचुकसंधानीं नित्य निधडा । शक्ति येऊं नेदी अंगाकडा । लाविलें वेडा लंकेशा ॥ ५५ ॥ लक्ष्मण पडावया दुश्चित । छळण करी लंकानाथ । रणीं मारिला रघुनाथ । राक्षस गर्जत अति गजरें ॥ ५६ ॥ रावणाच्या निजबाणीं । राम पडिला रणांगणीं । लक्ष्मणें ऐकतां हे वाणी । काया वाचा मनीं विकळ गेला ॥ ५७ ॥ मन झालें सचिंत । धनुर्ष्यीं विकळ गेला हात । रामविरहें अति दुश्चित । तंव शक्तिपात आद-ळला ॥ ५८ ॥ शक्ति भेदतां हृदयासी । रामस्मरण सौमित्रासी । शक्तिभेद झाला हृदयासी । वर-कांतीसीं लागली ॥ ५९ ॥ जेथें श्रीरामाचें स्मरण । तेथें सर्वदा न रिघे मरण । शक्ति बापुडी ते कोण । वरकांती जाण लागली ॥ ६० ॥ हृदयीं लागतांचि शक्ती । लक्ष्मण विकळ पडला क्षितीं । तें देखोनि रघुपती । कृपानुवर्ती[6] गहिंव-रला ॥ ६१ ॥ आसवें स्रवती लोचन । राम झाला विषण्णवदन । लक्ष्मणाचा गेला प्राण । काय आपण करावें ॥ ६२ ॥ लक्ष्मण रणीं पडल्या जाण । श्रीरामासी दुःख दारुण । अश्रुधारा

१ सारखेपणानें, २ आकाशांत, ३ बाणसमूहानें, ४ तर-वार, ५ वरवर, ६ अतिशय कृपेनें, ७ तोंड उतरलेला,

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

स्रवती नयन। सबाष्प वचन बोलत॥ ६३॥ तेचि काळीं रघुनाथ। क्षण राहोनियां ध्यानस्थ। लक्ष्मणा नाहीं जीवघात। जाणोनि युद्धार्थ आरंभी॥ ६४॥ रणीं मारावया रावण। काळकृतान्त प्रळयाग्नि पूर्ण। तैसा खवळला रघुनंदन। धनुर्ध्यीं बाण सज्जूनी॥ ६५॥ येतां श्रीरामाचे बाण। त्यांसी न चले निवारण। तेणें गजबजिला रावण। पळे आपण अति धाकें॥ ६६॥ लक्ष्मणाचे क्षोभें जाण। रामें मांडिलें निर्वाण। विंधितां बाण घेईल प्राण। धाकें रावण पळे दुरी॥ ६७॥ पळोनियां उठाउठीं। गुप्त राहतां सैन्यगोठीं। तरी रावण धाके पोटीं। रामशरवृष्टी साहवेना॥ ६८॥ जैसा कां चंडवात। मेघां करीत हताहत। तैसा रावण सैन्याआंत। स्वयें पळत अति धाकें॥ ६९॥ श्रीरामवीर जगजेठी। न लागे पळतयापाठीं। रावण निजसैन्याचे गोठीं। अति संकटीं राहिला॥७०॥ श्रीरामें नेम केला आपण। रणीं मारावा रावण। रावण सैन्यीं राहिला लपोन। आपणा आपण वांचविलें॥ ७१॥ रणीं असतां लंकानाथ। विषादकाळ नव्हे येथ। सौमित्र करावा सावचित्त। हाचि पुरुषार्थ पैं आम्हां॥ ७२॥

तं ददर्श तदा रामः शक्त्या निर्भिन्नमाहवे।
लक्ष्मणं रुधिरादिग्धं सपन्नगमिवाचलम्॥ १॥
सौमित्रिं चैव सा भित्वा विवेश धरणीतले।
तां कराभ्यां परामृश्य रामः शक्तिं भयावहाम्॥ २॥
बभंज समरे क्रुद्धो बलेनापचकर्ष च।
तस्य चाकर्षतः शक्तिं नाराचान्दीप्ततेजसः॥ ३॥
निचखान दशग्रीवः सर्वगात्रेषु वीर्यवान्।
अचिंतयित्वा तान्बाणान्समुत्थाय स लक्ष्मणम्॥ ४॥
अब्रवीच्च हनूमन्तं सुग्रीवं चैव वानरम्।
लक्ष्मणं संपरिष्वज्य नीत्वा चैव स्वमालयम्॥ ५॥
अस्मिन्मुहूर्ते न चिरात्सत्यं प्रतिशृणोमि वः।
अरावणमरामं वा जगद्द्रक्ष्यथ वानराः॥ ६॥

रावण लपाला रणमेळीं। राम येवोनि सौमित्राजवळी। शक्ति भेदूनी हृदयकमळीं। धरातळीं प्रवेशली॥ ७३॥ जैसा सर्प प्रवेशे वारुळीं। तैसी शक्ति भेदली हृदयकमळीं। तें देखोनि तये वेळीं। राम कळवळी बंधुस्नेहें॥ ७४॥ राम कृपाळु संपूर्ण। शक्ति उपडावया जाण। वांचवावया लक्ष्मण। करी स्पर्शन अमृतहस्तें॥ ७५॥ शक्ति भेदली हृदयांत। तिसी श्रीरामें लावोनि हात। स्वयें उपडूं पाहत। बहुत वर्जित नाना युक्ती॥ ७६॥ शक्ति उपडितांचि जाण। लक्ष्मणाचा जाईल प्राण। एक म्हणती ऐसें आपण। सर्वथा जाण न करावें॥ ७७॥ बाप कृपाळु रघुपती। त्यांच्या उपेक्षोनि नाना युक्ती। शक्ति उपडी निजहस्तीं। कृपामूर्ति कृपाळु॥ ७८॥ श्रीरामें लावितांचि हात। शक्ति झाली वीर्यहत। लक्ष्मण मारावयाचें सामर्थ्य। हताहत होवोनि गेलें॥ ७९॥ ब्रह्मवरदोक्ती पुरती। हृदयीं रुतली ब्रह्मशक्ती। ते श्रीरामें धरोनि हातीं। स्वलीला युक्तीं छेदिली॥ ८०॥ शक्ति उपडितां रघुनंदन। ते संधि साधोनि रावण। श्रीरामावरी वर्षे बाण। अति दारुण साटोपें॥ ८१॥ रावणाचे येतां बाण। राम मानी तृणासमान। स्वहस्तें उठवोनि लक्ष्मण। दे आलिंगन अति प्रीतीं॥८२॥ हनुमान सुग्रीवादि जाण। पाचारोनि वानरगण। श्रीराम सांगे आपण। न्यावा लक्ष्मण स्वस्थाना॥ ८३॥ ग्रीष्मांतीं चातकासी। मेघ निववी जीवनेंसीं। तेंवी निववावें लक्ष्मणासी। तंव रावणासी मी वधीन॥ ८४॥ आजी प्रतिज्ञेचें माझें रण। पृथ्वी देखाल अरावण। कीं अराममय जाण। जग संपूर्ण देखाल॥ ८५॥ रामनामीं न ये मरण। तो राम केंवी मरे आपण। रणीं निमाला रावण। अवघे जण देखाल॥ ८६॥ राम जगाचा आत्माराम। जेथें न रिघे जन्ममरण। रावणासी मरणधर्म। अलोट मरण पैं आलें॥ ८७॥ राम चैतन्यविग्रही। राम देहींच विदेही। राम द्वंद्वातीत पाहीं। राम ठायींच्या ठायीं परब्रह्म॥ ८८॥ रामेंवीण सर्वथा। तिळभरी ठाव नाहीं रिता। मिथ्या जन्ममरणवार्ता। पुढील कथा अवधारा॥ ८९॥ शिबिरीं धाडोनि लक्ष्मण। बाणें विंधितां रावण। त्यावरी श्रीराम आपण। क्षोभला दारुण शर-

१ गहिंवरून. २ पाण्यानें. ३ रावणरहित. ४ रामरहित. ५ मृत्यु पावला. ६ चैतन्यरूप देही. ७ आपलें सैन्य जेथें उतरलें होतें तेथें, छावणींत.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वृष्टीं ॥ ९० ॥ ज्यालागीं सुग्रीवा राज्यदान । ज्यालागीं आणिले वानरगण । तो मी मारीन आजि रावण । निर्वाणबाण विंधोनी ॥ ९१ ॥ ज्यालागीं आणोनि पाषाण । समुद्रीं केलें सेतुबंधन । तो मारीन रावण । निर्वाणबाण विंधोनी ॥ ९२ ॥ माझिया युद्धाचा चमत्कार । देखोत सुर नर किन्नर । सिद्ध चारण विद्याधर । देखोत समग्र सुर सिद्ध ॥ ९३ ॥ रामें करोनि दुर्धर रण । मारिला अति गर्वी रावण । पुढें पृथ्वीवरी जाण । हें पढती पुराण सुरसिद्ध ॥ ९४ ॥ ऐसें बोलोनि रघुपती । सुवर्णपुंखी भल्ल हातीं । सतेज घेवोनि धगधगिती । लंकापती विंधिला ॥ ९५ ॥ रावणें सज्जोनि बाण । रणीं विंधिला रघुनंदन । समूळ नाराचं[1] शर दारुण । विंधी आपण लघुवेगें ॥ ९६ ॥ सुटलें दोहींचें शरजाळ । भूतळ आणि अंतराळ । बाणीं कोंदलें दिग्मंडळ । कुळाचळ कोंदले ॥ ९७ ॥ दोघे वीर अति उद्भट । वाऱ्या वाहों न देती वाट । शस्त्रें हाणितां खणखणाट । हव्यवाट[2] ऊठिला ॥ ९८ ॥ शस्त्रें हाणितां बळोन्मेळीं । ठिणग्या उठती अग्निकल्लोळीं । बाण जळती अंतराळीं । आतुर्बळी रणयोद्धे ॥ ९९ ॥ श्रीरामाचे दुर्धर बाण । निवारूं न शके रावण । भेदोनियां अंगत्राण । अंगीं संपूर्ण आदळती ॥ १०० ॥ धनुष्य छेदिलें हातींचे हातीं । रथींचा मारिला सारथी । रथींचे वारु पाडिले क्षितीं । केला विरथी लंकेश ॥ १ ॥ छत्रपात मुकुटपात । ध्वजपात रथपात । पांचवा झाला कळापात । रणीं रघुनाथ खवळला ॥ २ ॥ छेदावया दशकंठी । रामें शर सज्जिले नेटीं । तंव रावणें देवोनि पाठी । उठाउठीं पळाला ॥ ३ ॥ रणीं मारावा लंकानाथ । निर्वाण नेमें आला रघुनाथ । रावण पळोनि बुद्धिवंत । जीवघात चुकविला ॥ ४ ॥

संकीर्यमाणः शरजालवृष्टिभि-
र्महात्मना दीप्तधनुष्मता रणे ।
भयात्प्रदुद्राव समेत्य रावणो
यथानिलेनाभिहतो बलाहकः ॥ ७ ॥

रामें मारावें रावणासी । रावणाची बुद्धि कैसी । पळोनियां रणभूमीसी । आपआपणासी वांचविलें ॥ ५ ॥ राम न मारी पळत्यासी । हें कळलें आहे रावणासी । पळोनियां लागवेगेंसीं । आपआपणासी वांचवी ॥ ६ ॥ रामबाणीं जर्जरीभूत । रावण झाला हताहत । कांहीं न चले पुरुषार्थ । मागें पळत अति धाकें ॥ ७ ॥ लंकेचा जो लंकानाथ । अपमानला रणाआंत । मोकळ्या केशीं पायीं पळत । घायीं कुंथत अति दुःखी ॥ ८ ॥ मेघ उडती चंडवातें । गज पळती सिंहाभिघातें[3] । गरुड पळवी सर्पांतें । तेंवी रावणातें श्रीराम ॥ ९ ॥ यापरी स्वयें रावण । सांडून गेला रणांगण । पुढील कथानुसंधान । सावधान अवधारा ॥ १० ॥ एका जनार्दना शरण । रणीं पळवोन रावण । उठवावया लक्ष्मण । कृपाळु पूर्ण परतला ॥ ११ ॥ राम स्वानंद कृपाळु । राम सप्रेम स्नेहाळु । राम स्वयें दीनदयाळु । प्रणतपाळु[4] श्रीराम ॥ ११२ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां लक्ष्मणशक्तिभेदो नाम त्रिचत्वारिंशोऽध्यायः ॥ ४३ ॥ ओंव्या ॥ ११२ ॥ श्लोक ॥ ७ ॥

अध्याय चव्वेचाळिसावा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ रणीं दंडोनि रावणासी । सावध करावें सौमित्रासी । राम आला अति स्नेहेंसीं । जीवीं जीवासी जीवन ॥ १ ॥ राम जगाचें जीवन । राम जीवाचें चिद्धन । सखा आत्माराम आपण । राम परिपूर्ण परब्रह्म ॥ २ ॥ तोचि राम स्वयें आपण । वांचवावया लक्ष्मण । कृपाळु संतुष्टला संपूर्ण । त्यासी कल्पान्तीं मरण असेना ॥ ३ ॥ राम निजज्ञानें अति समर्थ । तोही वानरांचे विचारांत । अनुसरला स्वयें वर्तत । अनुचरित लक्ष्मूनी ॥ ४ ॥

विश्रम्य स्वस्थमालोक्य सुषेणं राघवोऽब्रवीत् ।
एष रावणवेगेन लक्ष्मणः पतितो भुवि ॥ १ ॥
सर्पवच्चेष्टते वीरो मम शोकमुदीरयन् ॥ २ ॥

भूत भविष्य वर्तमान । सर्वही जाणे रघुनंदन । तरी मनुष्यनाट्यविडंबन । स्वयें आपण दावीत ॥ ५ ॥ विकळ देखोनि लक्ष्मण । जाणोनि भविष्याचें चिन्ह । वृथा करी विलपन । तेंही लक्षण

१ एका प्रकारचे बाण. २ अग्नि. ३ सिंह प्रहार करील या भीतीनें. ४ शरणागताचें रक्षण करणारा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

अवधारा ॥ ६ ॥ लक्ष्मण देखोनि रुधिरोक्षित । धरोनि सुषेणाचा हात । बंधुस्नेहें कळवळीत । काय बोलत श्रीराम ॥ ७ ॥ प्राणापरीस अधिक जाण । सखा बंधु लक्ष्मण । मज एकलें सांडून । स्वयें प्रयाण मांडिलें ॥ ८ ॥ सखे बंधु दोघे जण । येरयेरांचा आश्रय धरोन । वना निघालों आपण । पितृवचन पाळावया ॥ ९ ॥ वचन ऐकें सुषेणा । लक्ष्मणें वेंचलिया प्राणां । मज चाड नाहीं निजप्राणां । येरां जणां काय चाड ॥ १० ॥ बुडालें धैर्य वीर्य । बुडालें माझें परम शौर्य । बुडालें यश सर्व । बंधु स्वयमेव अंतरला ॥ ११ ॥ बुडाली माझी धृति कीर्ती । बुडाली माझी शौर्यशक्ती । बुडाली माझी परम ख्याती । बंधु निश्चितीं अंतरला ॥ १२ ॥ नेत्रां येतसे अंधारी । गात्रें कांपती थरथरीं । धनुष्य न धरवे करीं । धीर निर्धारीं न धरवे ॥ १३ ॥ प्राण जाती विकळ । मति न स्मरे अळुमाळ । वाचा जातसे बरळ । शरीर चळचळ कांपत ॥ १४ ॥ आतां मज युद्धाचें कार्य कोण । यश कोण घे आपण । कोण कार्य वधून रावण । बंधु लक्ष्मण अंतरला ॥ १५ ॥ चाड नाहीं विजयवृत्ती । चाड नाहीं धृतिगती । चाड नाहीं यशकीर्ती । बंधु निश्चितीं अंतरला ॥ १६ ॥ जीविताची चाड कोण । उभ्याच मी सांडीन प्राण । या जिण्याचें सुख कोण । बंधु लक्ष्मण अंतरला ॥१७॥ धांव पाव रे लक्ष्मणा । कां करितोसी प्रयाणा । मज सोडोनि दीनवदना । कोण्या स्थाना जातोसी ॥ १८ ॥ वनीं मी पीडलासी रे उपवासीं । म्हणोनियां रुसून जातोसी । कीं युद्ध करितां भागलासी । म्हणोनि जासी विसांवया ॥ १९ ॥ इंद्रजितासारिखा रणयोद्धा । रणीं श्रमलासी तूं करितां द्वंद्वा । कीं सीता बोलली अपवादा । त्या विषादा मानिलें ॥ २० ॥ लक्ष्मणा ये रे ये रे । परतोनि मज भेटी दे रे । मजवरी रुसलासी कां रे । दोघेही वनींचे सांगाती ॥ २१ ॥ तुजवीण न घें जीवन । सर्वथा न सेवीं अन्न । न करीं अयोध्यागमन । उभ्यां प्राण सांडीन ॥ २२ ॥ सीता न लगे मज सर्वथा । काय तोंड दाखवूं त्या भरता । काय उत्तर देऊं तिघी मातां । बंधु सर्वथा अंतरला ॥ २३ ॥ शत्रुघ्न मज पुसेल जेव्हां । काय मी मुख दावूं तेव्हां । गेला सर्व सुखाचा ओलावा । जीवीं जीवा आकान्त ॥ २४ ॥ म्हणवोनि घातली लोळणी । अंग टाकिलें धरणीं । लक्ष्मणें मोकलिलें रणीं । कोण शिरांणी जिण्याची ॥ २५ ॥ वक्षःस्थळ पिटी हातें । डोयी पिटी धरणीतें । विकळ जातां सर्व सामर्थ्यें । सुषेणें तेथें धरियेलें ॥ २६ ॥ महामेरु कडाडितां । कीं धैर्याचा स्तंभ पडतां । कीं तारूं समुद्रीं बुडतां । झाला राखता सुषेण ॥ २७ ॥ मरतया अमृतपान । कीं दुकाळिया मिष्टान्न । कीं अवर्षणीं वर्षे घन । तेंवी वचन सुषेणाचें ॥ २८ ॥

> राममेवं ब्रुवाणं तु शोकविह्वलितेंद्रियम् ।
> आश्वासयन्नुवाचेदं सुषेणः परमं वचः ॥ ३ ॥
> त्यजेमां नरशार्दूल बुद्धिवैक्लव्यकारिणीम् ।
> शोकसंजीविनी चिंता बाणैस्तुल्या चमूमुखे ॥ ४ ॥
> नैव पंचत्वमापन्नो लक्ष्मणो लक्ष्मिवर्धनः ।
> न ह्यस्य विकलं वक्त्रं नैव श्यामत्वमागतम् ॥ ५ ॥
> सुप्रभं च प्रसन्नं च मुखमस्य निरीक्ष्यताम् ।
> पद्मपत्रनिभौ हस्तौ सुप्रसन्ने च लोचने ॥ ६ ॥
> नेदृशं दृश्यते रूपं गतासूनां विशांपते ।
> विषादं मा कृथाः शूर सप्राणोऽयमरिंदम ॥ ७ ॥
> पश्य चास्य प्रसुप्तस्य स्वस्थगात्रस्य भूतले ।
> सोल्लासं हृदयं वीर कंपमानं मुहुर्मुहुः ॥ ८ ॥

ऐकें स्वामी रघुनंदन । तूं सर्वदा पैं सावधान । बंधुवैकल्यवासना जाण । क्षणीं मना धरितोसी ॥ २९ ॥ उभा राहोनि चमूमुखासी । चिंतेचे बाण हृदयीं घेसी । तेणें अत्यंत दुःखी होसी । ऐसें मानसीं न धरावें ॥ ३० ॥ नाहीं पंचत्व पावला । नाहीं याचा प्राण गेला । जीवनश्रियेनें असे भरला । नाहीं निमाला सर्वथा ॥ ३१ ॥ विशीर्ण न दिसे याचें वदन । नाहीं पालटलें देहचिन्ह । नाहीं कालिमा चढली जाण । जीवें लक्ष्मण जीत असे ॥ ३२ ॥ श्रीरामा पाहें सावधान । सुप्रसन्न याचें वदन । पद्मदळासारिखें जाण । मुखचिन्ह दिसताहे ॥ ३३ ॥ सुकुमार याचें करकमळ ।

१ रक्तानें भरलेला. २ आवड, इच्छा. ३ किंचितही. ४ युद्धाला. ५ रागाला. ६ सोबती. ७ पाणी, ८ उमेद. ९ पृथ्वीवर. १० कौतुक. ११ बंधुनाशाची कल्पना. १२ मरण. १३ चैतन्यानें. १४ निस्तेज.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

शीतळ न लागती चरणतळ । टवटवीत नेत्रयुगळ । लक्ष्मण विकळ नाहीं रामा ॥ ३४ ॥ प्राणहीन पैं शरीर । याचें न देखों साचार । सावधान याचीं गात्रें वक्त्र । शेषावतार हा होय ॥ ३५ ॥ सावध ऐकें रघुनंदना । अरिगजसैन्यपंचानना । राक्षसकुळनिभंजना । बंधुरत्ना भय नाहीं ॥ ३६ ॥ शक्तिभेदें लक्ष्मण । पडला असतांही जाण । सर्वथा नाहीं विसंज्ञ । तेंही चिन्ह अवधारीं ॥ ३७ ॥ जरी दिसताहे विकळ । तरी पाटव्य[1] असे प्रबळ । धुकधुकीत नेत्रकमळ । अळुमाळ दिसताहे ॥ ३८ ॥ सर्वथा यासी भय नाहीं । हें मी जाणतसें पाहीं । प्रतिज्ञा करितों तुझे पायीं । भय नाहीं लक्ष्मणा ॥ ३९ ॥ मी जाणतसें वैद्यक । प्रेतचिन्ह आवश्यक । सौमित्रा भय नाहीं देख । प्रतिज्ञा सुटंकें[2] वदतसें ॥ ४० ॥ शक्ति भेदली हृदयसंधीं । त्यासी उपाय ऐक कृपानिधी । एक वेळां आणोनि दिव्यौषधी । बंधु सुबुद्धि वांचवीं ॥ ४१ ॥ म्हणसी ओषधि येते कैसेन । त्या उपायासी सांगेन । एक वेळां प्रार्थून वायुनंदन । ओषधि जाण आणाव्या ॥ ४२ ॥ जंव नव्हे सूर्योदयो । तंव ओषधि आणाव्या पहाहो । उदया येतां कश्यपतनयो[3] । कार्यान्वियो साधेना ॥ ४३ ॥ उदया येतां गभस्ती । ओषधि प्राप्त नव्हती । आणि अनावर ब्रह्मशक्ती । ऊर्मिळापती[4] न वांचे ॥ ४४ ॥ साधावया या कार्यासी । सामर्थ्य एक हनुमंतासी । इतरांची गति कायसी । लक्ष्मणासी वांचवावया ॥ ४५ ॥ इतुकें सांगोनि श्रीरामासी । सवेंचि सांगे हनुमंतासी । आजि सौमित्र वांचवावयासी । तूंचि होसी प्राणदाता ॥ ४६ ॥

एवमुक्त्वा महाप्राज्ञः सुषेणो राघवं वचः ।
समीपस्थमुवाचेदं हनूमंतं प्लवंगमम् ॥ ९ ॥
सौम्य शीघ्रमितो गत्वा शैलं तं तु महोदयम् ।
पूर्वं वै कथितो योऽसौ वीरजाम्बवता तव ॥ १० ॥
दक्षिणे शिखरे जातामोषधिं तामिहानय ॥ ११ ॥

जवळी बोलावोनि वायुनंदन । गुज सांगे सुषेण । लक्ष्मण पडिला विसंज्ञ । त्यासी जीवदान त्वां द्यावें ॥ ४७ ॥ वांचविलिया लक्ष्मण । रामासी सुखसमाधान । सुख सुग्रीवा अंगदा जाण । सुखसंपन्न वानर ॥ ४८ ॥ तूं श्रीरामाचा निजभक्त । तुज सबाह्य श्रीरघुनाथ । श्रीरामप्रेमें सदा डुल्लत । राम स्मरत सर्वदा ॥ ४९ ॥ तुज सर्वां भूतीं समसमान । अखंडता रामानुसंधान । दृश्य द्रष्टा आणि दर्शन । राम चिद्घन देखसी ॥ ५० ॥ सुग्रीव अंगद जांबवंत । नळनीळादि वानर समस्त । तुझेनि आम्ही रामभक्त । श्रीराम सेवित सर्वदा ॥ ५१ ॥ तुझेनि आम्हां श्रीरामभेटी । तुझेनि आम्हां श्रीरामीं गोष्टी । तुझेनि राम देखिला दृष्टीं । धन्य सृष्टीं तुझेनि आम्ही ॥ ५२ ॥ तुझेनि वानर वनचर । झाले श्रीरामसेवेचे किंकर । तुझेनि भवसमुद्र दुस्तर । झाला समग्र कोरडा ॥ ५३ ॥ जन्ममरणाचे आवर्तीं । बुडत होतों मारुती । ते तुवां लावोनि श्रीरामभक्ती । वानरपंक्ती उद्धरिल्या ॥ ५४ ॥ हेंचि नवल सांगों किती । तुवां उद्धरिली त्रिजगती । तुझेनि पापी उद्धरती । पापनिर्मुक्ती तुझेनि ॥ ५५ ॥ वानरैंमांदीसमवेत[5] । पीडितां उपवासीं समस्त । तुवां नेवोनि विवरांत[6] । केले तृप्त फळें जळें ॥ ५६ ॥ विवरेंसहित हेमा । तुवां उद्धरिली वीरोत्तमा । समुद्रतीरीं प्लवंगमा[7] । मरणधर्मा चुकविलें ॥ ५७ ॥ पांखेंवीण मांसाचा गोळा । संपाती उद्धरिला कीं हेळा[8] । शुद्धि लावोनि त्या काळा । समुद्रजळा आक्रमिलें ॥ ५८ ॥ छायाग्रह राक्षसी । तिणें सगळाचि गिळिलासी । काळीज उपटोनि वेगेंसीं । दुष्ट राक्षसी मारिली ॥ ५९ ॥ सुरसा दानवांची माता । न मारोनि गेलासी परता । पाय देवोनि पर्वतमाथां । तोही तत्त्वतां उद्धरिला ॥ ६० ॥ अति दुस्तर समुद्रतीरा । तुझा पराक्रम कपींद्रा । जावोनियां परतीरा । केलें चरित्रा तें ऐकें ॥ ६१ ॥ झाडा घेवोनि मध्यरात्रीं । लंका शोधिली मारुती । करोनि रावणसभा पालथी । सीता निश्चितीं शोधिली ॥ ६२ ॥ चौदा सहस्र वनचर । तुवां मारिले एकसर । झाडें झोडोनि समग्र । वन चौफेर विध्वंसिलें ॥ ६३ ॥ जंबुमाळी प्रधानपुत्र । तुवां मारिला अखयाकुमर । इंद्रजितासीं करोनि क्षात्र[9] । रणीं सत्वर गांजिला ॥ ६४ ॥ देखोनि संमुख रावण । तुवां करोनि

१ अव्यंगता. २ निश्चयाची. ३ सूर्य. ४ लक्ष्मण. ५ बेशुद्ध. ६ भोंवऱ्यांत. ७ वानरसमूहासह. ८ सहज. ९ युद्ध.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

पुच्छासन । तिखट वाग्बाणीं करून । हृदयीं दशानन विंधिला ॥ ६५ ॥ आगी लावोनि पुच्छासी । जाळिलें दाही मुखांसी । भस्म करोनि लंकेसी । सीताशुद्धीसी आणिलें ॥ ६६ ॥ एकल्या एकें आपण । अर्धरात्रीं तुवां जाण । आणोनि महापाषाण । सेतुबंधन संपविलें ॥ ६७ ॥ अति संकटींही रिंगम[1] करून । खांदीं वाहून लक्ष्मण । वीर इंद्रजित दारुण । तुवां एकलेन मारविला ॥ ६८ ॥ मनीं न धरवती धरितां । तीं तीं कर्मे केलीं हनुमंता । भक्तोत्तमा कपिनाथा । श्रीरामसुखार्था बंधु उठवीं ॥ ६९ ॥ शीघ्र जावोनि आपण । उदया न येतां भास्वान[2] । वेगीं दिव्यौषधींतें आणून । बंधु लक्ष्मण वांचवीं ॥ ७० ॥ पूर्वी वीरें जांबवंतें । तुजलागीं सांगितलें होतें । त्याचि जावोनि द्रोणाद्रीतें । दिव्यौषधींतें आणावें ॥ ७१ ॥ त्या पर्वताच्या दक्षिणशिखरीं । दिव्यौषधि थोरथोरी । ऐक त्यांच्या नामांची कुसरी । सविस्तरीं सांगेन ॥ ७२ ॥ शल्यें विशल्य होती पूर्ण । विशल्यकरणी तीस अभिधान । अति युक्तीनें आपण । वेगें शोधून आणावी ॥ ७३ ॥

विशल्यकरणी नाम सुवर्णकरणी शुभा ।

संजीवनार्थं वीरस्य लक्ष्मणस्य महात्मनः॥ १२॥

स्वयें घाय जाती बुजोन[3] । क्षतें कानैपती[4] आपण । अंगीं राहों न शके वण । सुवर्णी जाण तीस नांव ॥ ७४ ॥ पानें शीतळ सुकुमार । खुपों न शकती चंद्रकर । फळें हिरवीं सुंदर । रक्तांबर फुलें तिचीं ॥ ७५ ॥ वांचवावया लक्ष्मण । करावें सवेग गमन । म्हणोनि धरिले दोन्ही चरण । वेगीं प्रयाण करावें ॥ ७६ ॥ तूं आमुचा जीवदाता । तुवां चुकविली भवव्यथा । बहु बोलणें न घडे सर्वथा । सद्गुरु तत्त्वतां तूं आम्हां । ॥ ७७ ॥ तुझेनि चुकलों भवभ्रमा । तुझेनि आम्हां श्रीरामीं प्रेमा । प्रिय व्हावया वानरां आम्हां । प्लवंगमा ऊठ वेगीं ॥ ७८ ॥ चित्तीं धरोनि रघुनंदन । करावें सवेग प्रयाण । तेणें सकळार्थ संपादून । विजयी होऊन येशील ॥ ७९ ॥ माझेनि स्वामी श्रीराम यांसी । माझेनि भक्तिसुख वानरांसी । ते मज सांगसी स्मरणासी । ऐसें मानसीं न मानावें ॥ ८० ॥ प्रेमाची जाति ऐसीच आहे । बोलतां मागें पुढें न पाहे । ऐसी कोणी एक स्थिती आहे । जाणता होयें तूं एक ॥ ८१ ॥ स्मरणीं नाहीं द्वंद्वबाधा । स्मरणें नाशे सकळापदा । छेदोनि द्वंद्वाचिया कंदा । परमानंदा पाविजे ॥ ८२ ॥ तें करोनि रामस्मरण । वेगीं करावें उड्डाण । मार्गीं जावें सावधान । मार्गचिन्ह जाणोनी ॥ ८३ ॥

समुद्रं समतिक्रम्य लवणोदं महोदधिम् ।

कुशद्वीपमतिक्रम्य क्षीरोदं च महार्णवम् ॥ १३ ॥

लवणादि सकळ समुद्र । सांडून कुशद्वीप सुंदर । ओलांडोनि क्षीरसागर । पर्वतेंद्र आणावा ॥ ८४ ॥ पर्वताच्या उत्तरभागीं । दिव्यौषधि अनेगी । सर्वथा न लक्षिती जगीं । त्याही वेगीं परिसें पां ॥ ८५ ॥ अम्लानपुष्पें[5] देदीप्यमान । प्रभा सूर्यतेजासमान । पर्णे सदा नित्य नूतन । समूळ जाण सुस्वादा ॥ ८६ ॥ समुद्रमथनीं अमृत । निघतां दैत्य भांडत । पर्वतीं सांडलें त्वरित । ओषधि तेथ झालिया ॥ ८७ ॥ तेथें गंधर्व राज्य करिती । दुर्धर तयांची स्थिती । ओषधि अति यत्नें राखिती । अहोरात्रीं सावध ॥ ८८ ॥ तुज आणितां ओषधींसी । गंधर्व मिसळती युद्धासी । चुकवोनियां अपायांसी । दिव्यौषधींसी आणावें ॥ ८९ ॥

बहुमायाश्च मार्गेषु राक्षसाः कामरूपिणः ।

अप्रमत्तेन गंतव्यं त्वया वीर महाबल ॥ १४ ॥

लक्षत्रयं योजनानां शतानां विंशतिर्दश ।

गंतव्यं धीयतां ध्याने द्विगुणं तु गतागतम् ॥ १५ ॥

यावन्न क्षीयते रात्रिर्यावन्नोत्तिष्ठते रविः ।

तावत्त्वया महाबाहो आगंतव्यं महाबल ॥ १६ ॥

लक्ष्मणोऽपि विनश्येत नियतं शर्वरीक्षये ॥ १७ ॥

राक्षस नष्ट मायावी । कपटें छळिती महालाघवी । मार्गीं घालिती महांगोंवी[6] । ते चुकवावी अति यत्नें ॥ ९० ॥ नानापरींच्या छळणोक्ती । राक्षस छळिती अतर्क्ययुक्ती । तें सांडून मारुती । शीघ्रगतीं परतावें ॥ ९१ ॥ दूरपंथ अति अध्वानें[7] । निमेषार्धेंसीं क्रमून । मनोवेगें तुज गमन । आम्ही संपूर्ण जाणतों ॥ ९२ ॥ तथापि मार्गीचिया

१ रिघाव, प्रवेश. २ सूर्य. ३ बरीं होतील. ४ सर्व विपत्ति. ५ न कोमेजणारीं फुलें. ६ मोठा अडथळा. ७ मार्ग.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

गणिता । तुज सांगेन कपिनाथा । गमन करावया आतां । संख्या तत्त्वतां अवधारीं ॥ ९३ ॥ तीन लक्ष दहा शतें । दहा योजनें अधिक तेथें । येतां जातां द्विगुणितें । पंथ निश्चितें क्रमावा ॥ ९४ ॥ जंव रात्र आहे मध्यान्ह । सूर्योदय न होतां जाण । ओषधि घेवोनि संपूर्ण । शीघ्र आगमन करावें ॥ ९५ ॥ रात्रि अवघी अतिक्रमितां । सूर्य उदयातें न पावतां । ओषधि येती हाता । कपिनाथा अवधारीं ॥ ९६ ॥ उदया येतां दिवाकर । ओषधि मंदतेजा[१] समग्र । होताती न लागतां क्षणमात्र । न होती गोचर सर्वार्थी ॥ ९७ ॥ आणीक बीज एक कपिनाथा । तुज मी सांगेन तत्त्वतां । दिवाकर उदया येतां । कार्य सर्वथा नासेल ॥ ९८ ॥ ब्रह्मशक्तीसी वरद पूर्ण । उदया येतां सहस्रकिरण । ज्यावरी घालिजे आपण । त्याचा प्राण वांचेना ॥ ९९ ॥ यालागीं कपिनाथा । सवेग गमन करीं आतां । सौमित्रा वांचवोनि सर्वथा । श्रीरघुनाथा सुख देईं ॥ १०० ॥

गच्छ वीर महाबाहो प्रार्थितं मंत्रयस्व नः ॥ १८ ॥

राजा सुग्रीव आपण । प्रार्थिता झाला वायुनंदन । शीघ्र करोनि प्रयाण । बंधु लक्ष्मण उठवावा ॥ १ ॥ बिभीषण लागे पायांसी । सत्वर करावें गमनासी । वेगें आणोनि ओषधींसी । सौमित्रासी उठवावें ॥ २ ॥ वडील सकळ वानरांस । तो जांबवंत बोले सुरस । आणोनियां द्रोणाद्रीस । सुबंधूस वांचवीं ॥ ३ ॥ अंगद युवराजा जो कां । बोलोनियां अति नेटका । तोही विनवीतसे देखा । कपिनायका आदरें ॥ ४ ॥ तुझेनि सकळ दुस्तर । तरलों आम्ही वानर । तो तुझा उपकार । केवीं सांगूं समग्र हनुमंता ॥ ५ ॥ अति संकटीं दुर्गमीं । तुवां वांचविलों आम्ही । आम्हां सकळां तूंचि स्वामी । बहु वाचा मी किती बोलूं ॥ ६ ॥ आतां सकळार्थाचें सार । ऐकें कपींद्रा साचार । प्राण त्यागितां सौमित्र । सर्व संहार होईल ॥ ७ ॥ न देखतां लक्ष्मण । राम तत्काळ सोडील प्राण । त्यासवेंचि सुग्रीव जाण । देईल प्राण तत्त्वतां ॥ ८ ॥ रामसुग्रीवांपाठीं । बिभीषण न राहे सृष्टीं । येरां वानरा काय गोष्टी । सकळ सृष्टीं आकान्त ॥ ९ ॥ ऐकतांचि सीता सुंदर । न लागतां निमेषमात्र । सवेग त्यागील शरीर । अनर्थ थोर होईल ॥ ११० ॥ भरत शत्रुघ्न ऐकतां । प्राण सांडितील सर्वथा । ऐकतांचि तिघी माता । प्राण तत्त्वतां न राखिती ॥ ११ ॥ आकान्त होईल अयोध्येसी । आकान्त सकळ लोकांसी । आकान्त देवदानवांसी । सकळ सृष्टीसी आकान्त ॥ १२ ॥ बांधँवडी[२] सोडील कोण । वधील कोण रावण । देवकार्य न साधे पूर्ण । येवढें विघ्न मांडेल ॥ १३ ॥ यालागीं गा कपिनंदना । वीर शूर सर्वज्ञा । ओषधि आणोनि लक्ष्मणा । जीवदाना होईं दाता ॥ १४ ॥ इतुकें बोलतां अंगद वीर । सकळ वानरांचा भार । ऐकोनियां श्रीरामचंद्र । काय उत्तर बोलत ॥ १५ ॥ कपिकुळपंचानना । ऐकें हनुमंता सर्वज्ञा । भ्रातृभिक्षेचिया दाना । यालागीं शरण जाण तुज आलों ॥ १६ ॥ लक्ष्मणाचें जीवदान । तुज भिक्षा मागों आलों जाण । सर्वथा पराङ्मुख न होणें । बंधुजीवदान मज देईं ॥ १७ ॥ वनीं एकला एक अनाथ । लक्ष्मणेंवीण जालों येथ । आम्हां जीवदाता कपिनाथ । तुवां सनाथ करावें ॥ १८ ॥ वांचलिया लक्ष्मण । आम्ही बंधु चौघे जण । पांचवा हनुमंत आपण । निश्चयें जाण भाक माझी ॥ १९ ॥ पांच मिळतां एके ठायीं । रणीं युद्धाचा पाड कायी । रावणाचें भय नाहीं । घायीं ठायीं निमेल ॥ १२० ॥ हेंचि नवल सांगूं काये । पांचही एक जाले हो पाहें । साधों शके महत्कार्य । सहजान्वयें[३] सांगेन ॥ २१ ॥ होतां पांचांचा एक मेळा । विरे पांचां भूतांचा गोळा । पांचां इंद्रियांचा पाळा । एकहेळां भस्म होय ॥ २२ ॥ हे पांचां विषयांची विषयस्थिती । एके निमेषार्धें भस्म होती । विषयीं शोभे चिच्छक्ती । जैं पांचही मिळती एकत्र ॥ २३ ॥ इतस्ततां[४] विचरती जाण । ते सार्म्या[५] येती पंचप्राण । चळण सांडोनि आपण । निश्चल जाण स्वयें होत ॥ २४ ॥ एकें आवरिल्या चौघांस । होय पांचांची एक मूस । अहंकार चित्त बुद्धि मानस । सहज समरस स्वयें होती ॥ २५ ॥ पांचांचिया एकात्मता । कळिकाळातें

१ श्रीसूर्य. २ हीनवीर्य. ३ बंधन. ४ सरळ रीतीनें. ५ इकडे तिकडे. ६ ऐक्यतेला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

हाणों लाता । कायसा काळ नियंता । ब्रह्मसा-
युज्यता हाता चढे ॥ २६ ॥ जिणोनि जीवशिव-
पदवी । स्वस्वरूप स्वयें अनुभवी । पूर्णब्रह्मत्व
ठसावे जीवीं । पंचऐक्यभावीं पद ऐसें ॥ २७ ॥
यालागीं गा कपिनंदना । शीघ्र करोनि प्रयाणा ।
वांचवीं बंधु लक्ष्मणा । बहु प्रतारणा काय बोलूं
॥ २८ ॥ ऐसें श्रीरामाचें उत्तर । तैसेच जुत्पंती[1]
समग्र । ऐकोनि आल्हादें कपींद्र । काय उत्तर
बोलत ॥ २९ ॥ समुद्र ओलांडोनि आसंका[2] ।
जेणें पालथी केली लंका । भेदरा लाविला दश-
मुखा । तो हनुमान देखा सरसावला ॥ १३० ॥
हनुमान साटोपतां जीवीं । सुरदुंदुभी त्राहाटिल्या[3]
देवीं । पुष्पवृष्टि केली अवघी । निजवैभवीं
कपींद्रा ॥ ३१ ॥ सत्वर जावोनि कपिपती । ओषधी
आणील निश्चितीं । सौमित्र उठवील मारुती ।
उदया गभस्ती न येतां ॥ ३२ ॥ लक्ष्मण उठलिया
जाण । श्रीराम स्वयें आपण । निमेषार्धें वधील
रावण । राज्यीं बिभीषण स्थापील ॥ ३३ ॥
फिटेल सकळांची सांकडी । सुटेल देवांची
बांधवडी । आणोनियां अमरकोडी । स्वर्गीं गुढी
उभारिती ॥ ३४ ॥ ऐसा सरसावला वानर ।
करोनि रामनामें भुभुःकार । काय बोलिला
उत्तर । श्रीरघुवीर परिसत ॥ ३५ ॥ लोटांगण
श्रीरामचरणां । करून अनुवादला जाणा ।
सावध ऐक रघुनंदना । विज्ञापना हे माझी
॥ ३६ ॥ स्वामीस येवढी कोण चिंता । दिव्यौषधी
समर्था । मजसारिखा दूत असतां । क्षणार्धंता
आणीन ॥ ३७ ॥ ऐकें नरवीरपंचानना । झणीं
विकळ करिसी मना । तुझेनि नामें दीनजनां ।
आंगवण जाणा धैर्याची ॥ ३८ ॥ तुझेनि नामें
यश कीर्ती । तुझेनि नामें धृति[4] विरक्ती । तुझेनि
नामें अगाध शांती । प्राणी पावती रघुराया
॥ ३९ ॥ नामीं नाहीं जन्ममरण । नामीं नाहीं
निजपतन । नामीं सदा स्वानंदघन पूर्ण । नाम
चिद्घन[5] रघुवीरा ॥ १४० ॥ अत्यंत जड मूढ
पाषाण । नामें उद्धरले संपूर्ण । तेथें बापुडें मरण
कोण । श्रीलक्ष्मण जितावया ॥ ४१ ॥ मुख्य
ओषधी सकळ जनीं । नाम अमृतसंजीवनी ।
नामें निर्मुक्त भवबंधनीं । चूडामणी नरवीरा ॥ ४२ ॥
कायसें ब्रह्मशस्त्राचें बळ । कायसें बापुडें काळ ।
मृत्यूचें मारक सबळ । नाम केवळ रघुनाथा
॥ ४३ ॥ ऐसें असोनियां स्वामी । मज आज्ञा
दिधली तुम्हीं । तरी दिव्यौषधी आणीन मी ।
ज्या दुर्गम तिहीं लोकीं ॥ ४४ ॥ चिंता न करीं
रघुनाथा । चित्ता दुःख नेदीं सर्वथा । चिंतेचे
बाण हृदयीं घेतां । दुःखावस्था अनिवार ॥ ४५ ॥
चिंता संचरल्या शरीरीं । सुख नेदी तिळभरी ।
लागतां चिंतेची लहरी । सुरासुरीं कांपिजे ॥ ४६ ॥
सुख नेदी राजभवन[6] । सुख नेदी भोगायतन ।
दारापुत्रादि जन । सुख जाण न देती ॥ ४७ ॥
सुख नेदी धनसंपत्ती । सुख नेदी सकळ संपत्ती ।
सुख नेदी यश कीर्ती । चिंता चित्तीं प्रवेशतां
॥ ४८ ॥ चिंतेनें नव्हे इहलोक । चिंतेनें प्राप्त नव्हे
स्वर्गीक । चिंतेनें न साधे योगसुख । चिंतादाह
देख भला नव्हे ॥ ४९ ॥ परमानंदाचें वन समग्र ।
चिंतेनें जाळिलें चौफेर । चिंतेनें परमार्थाचें घर ।
निरंतर उद्धसे[7] ॥ १५० ॥ परमात्मा श्रीरामचंद्र ।
चिंतेनें केलासी किंकर । इतरांचा कायसा
विचार । चिंता दुस्तर श्रीरामा ॥ ५१ ॥ ते
चिंतेचा समूळ दाहो । करितें तुझें नाम पहाहो ।
एवढा तुझा नामनिर्वाहो । महाबाहो श्रीरामा
॥ ५२ ॥ ते समूळ चिंता सांडूनि पाहीं । स्वस्व-
रूपीं सावध होयीं । सौमित्रासी भय नाहीं ।
प्रतिज्ञा पाहीं हे माझी ॥ ५३ ॥ आतांचि जावोनि
सत्वर । आणोनि ओषधिसंभार[8] । क्षणें उठवीन
सौमित्र । प्रतिज्ञा साचार हे माझी ॥ ५४ ॥ ऐसें
बोलोनि गोळांगूळें[9] । त्राहाटिलें[10] भूमीसी लांगूळ[11] ।
पुढील कथा अति रसाळ । श्रोते सकळ परिसोत
॥ ५५ ॥ एका जनार्दनाचें तान्हें । भुकाळु परी
मागों नेणें । यालागीं मजकारणें । मुखीं घांस
देणें जननिये ॥ ५६ ॥ जें गोड लागे माउलीसी ।
तोंडींचें काढी ते वेगेंसीं । ओपी बाळकाच्या
मुखासी । निजमानसीं स्नेहाळ ॥ ५७ ॥ एका
जनार्दना शरण । श्रोतीं द्यावें अवधान । हनुमान
जावानि आपण । ओषधींसीं आगमन करील
॥ १५८ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे

१ वीर. २ सर्व. ३ वाजविल्या. ४ धैर्य. ५ ज्ञानस्वरूप. ६ राजवाडा. ७ भयाण–ओसाड होतें. ८ ओषधींचा समुदाय. ९ वानर (मारुति). १० आपटिलें. ११ शेंपूट.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

एकाकारटीकायां ओषध्यर्थहनुमंतप्रार्थनं नाम चतुश्चत्वारिंशोऽध्यायः ॥ ४४ ॥ ओंव्या ॥ १५८ ॥ श्लोक ॥ १८ ॥

अध्याय पंचेचाळिसावा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ ऐसें बोलतां हनुमंत । संतोषला रघुनाथ । स्वानंदसुखें डुल्लत । पाठी थापटीत कपीची ॥ १ ॥

राघवः पुनरेवेदमुवाच पवनात्मजम् ।
त्वर वीर त्वयावश्यमानेतव्या महौषधि ॥ १ ॥
स्वस्ति तेऽस्तु महासत्त्व गच्छ यात्रां प्रसादतः ।
एवमुक्तस्तु रामेण सुग्रीवेणांगदेन च ॥ २ ॥
सुवेलमभिसंरुह्य संपीड्याप्लुत्य वानरः ।
जगाम सत्वरं श्रीमानुपर्युपरि सागरे ॥ ३ ॥

सर्वेंचि बोले रघुराजा । सवेग उठीं पवनात्मजा[1] । शीघ्र करोनि यावें काजा[2] । बंधुराजा उठवावें ॥ २ ॥ स्वस्थ असो तुझें चित्त । स्वस्थ असो तुझें जीवित । अंग प्रत्यंग समस्त । कपिनाथ निजविजयी ॥ ३ ॥ स्वस्ति असो तुजलागीं । कल्याण असो सर्वांगीं । सर्वदा विजयी जगीं । तनु सर्वांगीं सुदृढ ॥ ४ ॥ हनुमंता होईं चिरंजीवी । तेंही जीवित्व ज्ञानानुभवी । ज्ञानविज्ञानपदवी । तुझेनि व्हावी जगासी ॥ ५ ॥ आतां मी तुज देवों आशीर्वाद । तंव पूर्वींच तुझें बळ अगाध । प्रताप कीर्ति अति प्रसिद्ध । ऐक सावध सांगेन ॥ ६ ॥ बाळपणीं आकळिला भानु[3] । तंव वज्रें इंद्रें हाणितला हनु । हनुमंत हें नामाभिधानु[4] । तैंपासून तुज जालें ॥ ७ ॥ त्या रवीच्या धांवण्यासी । आले लोकपाळ वेगेंसीं । ख्याति लाविली तयांसी । ऐक सावकाशीं सांगेन ॥ ८ ॥ कुंठित जालें इंद्रवज्र । शिवाचा शूळ जाला चूर । वरुणाचे पाश समग्र । चकचूर पैं जाले ॥ ९ ॥ तुज न बाधी वरुणपाश । दुसरा आश्रमीं आश्रमपाश । तिसरा कर्माचा कर्मपाश । तुज वीरेशा बाधीना ॥ १० ॥ धर्मपाश ज्ञानपाश । अहंकाराचा अहंपाश । परब्रह्मींचा ब्रह्मपाश । तुज सहसा बाधीना ॥ ११ ॥ तेथें वरुणपाश ते किती । तुज बांधावया मारुती । यमाची तेथें कोण शक्ती । तुज निश्चितीं दंडावया ॥ १२ ॥ यम नियंतों सकळ जगा । पदाभिमानें लगबगा । दंड घेवोनियां वेगा । तुज सवेगा दंडूं आला ॥ १३ ॥ त्या यमाचा यमदंड पाहीं । मोडून गेला तुझे देहीं । इतर बापुडीं कोण कायी । हनुमान पाहीं दंडावया ॥ १४ ॥ अग्नि वायु कुबेर चंद्र । सर्वेही झाले तुझे किंकर[5] । एवढा अदट साचार । हनुमान वीर तिहीं लोकीं ॥ १५ ॥ आपुलिया हो प्रतापशक्तीं । लाँहोनि सकळांची वरदोक्ती । वज्रदेही ऐसी ख्याती । त्रिजगतीं मिरविजे ॥ १६ ॥ कायसें माझें वरदान । आतुर्बळी वायुनंदन । वेगें करोनि उड्डान । बंधुरत्न मज देईं ॥ १७ ॥ ऐसें बोलतां श्रीरामचंद्र । संतोषले वानरांचे भार । ऐकोनि पिंजारिला कपींद्र । अति भ्यासुर भासत ॥ १८ ॥ पिंजारिल्या रोमावळी । दिसे विक्राळ दांताळी । मस्तक गेला नभोमंडळीं । गोळांगुळीं[6] आवेश ॥ १९ ॥ दोन्ही दिसती नेत्रगोळ । जैसे धगधगीत इंगळ । त्राहाटितां भूमीसी लांगूळ । लोक सकळ भयभीत ॥ २० ॥ वळिला पुच्छाचा आंकोडा । लंघोनि सुवेळेचा कडा । राम स्मरोनि वेगाढा । केला गाढा भुभुःकार ॥ २१ । ऐकोनि त्याचा भुभुःकार । दचके कैलासीं शंकर । ब्रह्मांड हडबडिलें थोर । घोरांदर मांडिलें ॥ २२ ॥ अकाळीं प्रळयो कायसा सृष्टीं । प्रळयरुद्र निमती दृष्टी । इंद्रादिक पडिले संकटीं । प्राण कंठीं दाटले ॥ २३ ॥ कडे खचले सागरीं । वृक्ष भ्रमती गगनांतरीं । उड्डाण करितां कपिकेसरी । सुरासुरीं आकान्त ॥ २४ ॥ सप्त सागरां खळबळा । धरा जाऊं पाहे रसातळा । आकांत जीवमात्रा सकळा । गोळांगुळाचेनि धाकें ॥ २५ ॥ करोनियां रामनामस्मरण । सवेग केलें उड्डाण । न लागतां अर्ध क्षण । सागर संपूर्ण क्रमियेला ॥ २६ ॥ उपर्युपरी गगनांतरीं । सत्यलोकपर्यंत वरी । गेली उड्डाणाची थोरी । विक्रम भारी कपीचा ॥ २७ ॥ दिशा दुमदुमल्या संपूर्ण । प्राणांतिक सकळ राक्षसगण । तें ऐकोनियां रावण । अति चिंता मन उपजवी ॥ २८ ॥ म्हणे गेलिया कपींद्र ।

---

१ वायुपुत्रा (मारुते). २ काम. ३ सूर्य. ४ शासन करणारा. ५ सेवक. ६ पराक्रमी. ७ संपादून. ८ वानर हनुमंताचे ठायीं. ९ निखारे. १० शेंपूट.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

आणील ओषधी समग्र। उठविल्या सौमित्र। श्रीरामचंद्र नाटोपे ॥ २९ ॥ हे तंव एकमेकांपरीस। वीर रणयोद्धे कर्कश। अवघे मिळाल्या युद्धास। मग आम्हांस प्राणान्त ॥ ३० ॥ आतां काय करूं विचार। प्रधान मारिले समग्र। इंद्रजितादि अखया पुत्र। कुमरें कुमर मारिले ॥ ३१ ॥ ऐसें चिंतितां रावणा। करूं विसरला भोजना। विसरला उदकपाना। अति चिंता मना पीडित ॥३२॥ निद्रा न लागे शेजेसी। करीत असे उठीबैसी। तंव देखिलें काळनेमीसी। मग चरणासी लागला ॥ ३३ ॥ चारी मुखें सरती लाळा। दाढा विकट विकराळा। धगधगीत नेत्रगोळा। जैसे इंगळ खदिराचे ॥ ३४ ॥ जिव्हा मुखीं समसमित। अति दीर्घ चारी हात। केश नीळ कठिण तेथ। उभे दिसत शूळ जैसे ॥ ३५ ॥ अति तिखट दाढा चारी। मुख समान पर्वतदरी। खापराऐसा काळा शरीरीं। मुखें चारी समसमित ॥ ३६ ॥ वृक्ष रोंविले जैसे असती। तैसे हात पाय दिसती। भिंगुळवाणी शरीराकृती। देखतां भीती यम काळ ॥ ३७ ॥ अति भयानक शरीर। त्यासी प्रार्थी दशशिर। तुवां जावोनि सत्वर। पर्वतेंद्र ठाकावा ॥ ३८ ॥ लवणादि सकळ समुद्र। कुशद्वीप समग्र। लंघोनियां क्षीरसमुद्र। पर्वतेंद्र ठाकावा ॥ ३९ ॥ तुज नभोवेगें गमन। म्हणोनि आलों तुज शरण। तेथें गेला कपिनंदन। त्यासी विघ्न करावें ॥ ४० ॥ काळनेमी ऐक विनंती। लक्ष्मणा भेदलीसे शक्ती। उदया येतां गभस्ती। सौमित्र निश्चितीं मरेल ॥ ४१ ॥ यालागीं वायुनंदन। करोनि सवेग उड्डान। दिव्यौषधी आणोन। स्वयें लक्ष्मण उठवील ॥४२॥ उदया न येतां गभस्ती। आणोनि ओषधी समस्ती। वांचवावया निश्चितीं। प्रतिज्ञा मारुति करून गेला ॥ ४३ ॥ तत्काळ ओषधी आणोन। आतांचि उठेल लक्ष्मण। मग त्यासीं झुंझेल कोण। रामलक्ष्मण आतुर्बळी ॥ ४४ ॥ अति बळिया हा वायुनंदन। कळिकाळा नाटोपे जाण। बलिष्ठ सकळ वानरगण। त्यांसीं कोण झुंझेल ॥ ४५ ॥ कपटेंकरून ब्रह्मशक्ती। आकळिलाहे ऊर्मिलापती[३]। तंव कार्य साधावें हातोहातीं। उदया गभस्ती न येतां ॥ ४६ ॥ चंद्रामृतें सदा पूर्ण। चंद्राचल म्हणती म्हणोन। एरवीं तो द्रोणाद्रि जाण। नाभाभिधान विख्यात ॥ ४७ ॥ रूपा आलें चंद्रामृत। अमृतसंजीवनी त्यासी म्हणत। ओषधी ऐशा अनंत। पर्वतीं समस्त वर्तती ॥ ४८ ॥ तेथें गेला कपिनंदन। बहु माया करोनि आपण। त्यासी करावें विघ्न। सूर्योदयो जंव न होय ॥ ४९ ॥ तेंही मायेचें लक्षण। जटाधारी वल्कलाभरण। सर्वांगीं भस्मोध्दूळण। असाधारण ऋषिवेष ॥५०॥ तापसवेष धरोनि पूर्ण। करावा आश्रम निर्माण। गोंवावया कपिनंदन। माया आपण करावी ॥ ५१ ॥ सुपक्क फळें सुशीतळ जळ। सुंदर वृक्ष सुपरिमळ। आपण धरावें अति सुशीळ। गोळांगूळ विगुंतवावया ॥ ५२ ॥ निष्ठा दावावी ब्रह्मज्ञान। कथेसी वर्णावा रघुनंदन। तेणें त्यासी सुख गहन। कपिनंदन विगुंतेल ॥ ५३ ॥ आतिथ्य करावें हनुमंता। सुरस सांगावी रामकथा। जेणें गुंती पडे कपिनाथा। तें तें सर्वथा करावें ॥ ५४ ॥ तेथें महाशूर राक्षसी। प्राणिमात्रा सगळें ग्रासी। आपण युक्ती साधावी ऐसी। जे कपींद्रासी ते गिळी ॥ ५५ ॥ ओषधी समीप सविस्तर। जळें संपूर्ण सरोवर। सुंदर कमळीं मनोहर। तेथें कपींद्र गोंवावा ॥ ५६ ॥

तत्र त्वया प्रहंतव्यं उपायेन प्लवंगमः।
हनूमति विनष्टे तु लक्ष्मणो नभविष्यति ॥ ४ ॥
लक्ष्मणस्य विनाशेन रामो वै नभविष्यति।
रामस्य च विनाशेन सुग्रीवो नभविष्यति ॥ ५ ॥
सुग्रीवस्य विनाशेन ह्यंगदो नभविष्यति।
अंगदस्य विनाशेन क्षयं यास्यंति वानराः ॥ ६ ॥
ध्रुवमस्य जयो वीर गच्छ शीघ्रं महाबल।
अर्धराज्यं प्रदास्यामि कृते कर्मणि राक्षस ॥ ७ ॥

गमन करोनि शीघ्रगती। सर्व प्रकारें असे शक्ती। जेणें मरण पावे मारुती। ते ते युक्ती साधावी ॥ ५७ ॥ मी तुज सांगों कपटगती। तंव तूं केवळ कपटमूर्ती। तेथें माझी काय युक्ती। सर्वथा मारुती मारावा ॥ ५८ ॥ मरण पावल्या हनुमंत। सौमित्र मरेल त्वरित। मरण पावेल रघुनाथ। दोघां मृत्य त्याचेनि ॥ ५९ ॥ मरण

१ भयानक. २ सूर्य. ३ लक्ष्मण. ४ वानर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

पावल्या रघुनंदन। कैसेनि वांचेल बिभीषण। सुग्रीवही सांडील प्राण। अर्ध क्षण न लागतां ॥ ६० ॥ नळ नीळ जांबवंत। जुत्पती मरतील समस्त। एवढा साधेल कार्यार्थ। जरी हनुमंत मारिला ॥ ६१ ॥ म्हणोनि धरिले दोनी चरण। देईन अर्ध राज्य जाण। चिंतासागरीं बुडतां पूर्ण। तारूं आपण स्वयें व्हावें ॥ ६२ ॥ मग ग्लानि भाकी बहुता। पडे चरणांवरी मागुता। मज होतसे प्राणान्त अवस्था। जीवदाता तूं होईं ॥ ६३ ॥ ऐसें ऐकतांचि उत्तर। दचकला राक्षसवीर। हृदयीं खोंचिला दुर्धर। कपटप्रकार भला नव्हे ॥ ६४ ॥ कपट करितां हिरण्यकशिपु। खंडविखंड केली वपु[1]। तेथें आमचा कोण प्रतापु। रुद्ररूप जिंकावया ॥ ६५ ॥ कपट साधिलें अमरेंद्रें[2]। भगीं व्यापिलें शरीरें। कपट साधिलें चंद्रें। क्षयरोगें थोर व्यापिला ॥ ६६ ॥ खाऊन जेवून घर घेणें। ऐसें मांडिलें सहस्रार्जुनें। सांडून हस्तपाद छेदणें। शेखीं[3] प्राणें निमालीं[4] ॥ ६७ ॥ येणें रावणें जाण। सांडोनिया राजचिन्ह। भीक मागों गेला आपण। सीते कोरान्न[5] देईं माते ॥ ६८ ॥ माता म्हणे जियेसी। भोगूं पाहे तियेसी। कपटें मेळविलें धुळीसी। सपुत्रसैन्येंसीं मारविलें ॥ ६९ ॥ इतरांची गति कायसी। कपटें नाडिलें देवांसी। ईश्वरत्व सांडोनि मानसीं। स्वयें भिकेसी लागला ॥ ७० ॥ आपण होवोनियां रंक। बळीसी मागों लागला भीक। तेणें द्वारपाळ केला देख। पुराणें असंख्य बोलती ॥ ७१ ॥ यालागीं कपटाची वार्ता। भली नव्हे गा सर्वथा। कपट करितां कपिनाथा। स्वघातासी करावें ॥ ७२ ॥ श्रीरामाचे निजभक्त। त्यांसीं कोणी कपट करीत। ते स्वयेंचि मरण पावत। नरक भोगीत अनिवार ॥ ७३ ॥ हनुमान श्रीरामाचा किंकर। श्रीरामभजनीं अति तत्पर। त्यासीं कपट करी जो नर। त्याचें शरीर वांचेना ॥ ७४ ॥ ऐसें जाणतों मी आपण। स्वयें सांगतसे रावण। कपीसी जें विघ्नकरण। तें मजचि मरण ओढवलें ॥ ७५ ॥ पायां पडोनि रावणें। अर्ध राज्य देईन म्हणे। मज निमालिया प्राणें। राज्य कोणें भोगावें ॥ ७६ ॥ आतां न वचतां राहों येथें। तरी रावणचि करील घातातें। तयापरीस हनुमंतें। होय आम्हांतें हित कांहीं ॥ ७७ ॥ हनुमान सबाह्य श्रीरघुनाथ। श्रीरामप्रेमें सदा डुल्लत। होतां त्याचेनि हातें घात। कृतकृत्यार्थ मी जालों ॥ ७८ ॥ ऐसें विचारोनि मनीं। मान देत रावणवचनीं। तुझी आज्ञा उल्लंघोनी। सामर्थ्य जनीं असेना ॥ ७९ ॥ ऐसा कोण आहे थोर। जो उल्लंघूं शके तुझें उत्तर। वेगें करोनि नमस्कार। निशाचर उसळला ॥ ८० ॥ पर्वता पावे जंव मारुती। तंव आपण गेला शीघ्रगती। माया केली अति निगुतीं। तेही निश्चितीं परिसावी ॥ ८१ ॥

एवमुक्तं तु तद्रक्षः प्रणिपत्य दशाननम्।
मनोजवेन वेगेन संप्राप्तश्चंद्रपर्वतम् ॥ ८ ॥
तस्मिन्पर्वतपार्श्वे तु सोऽकार्षीन्माययाश्रमम्।
अग्निहोत्रेण दिव्येन सोपवासकृशोदरः ॥ ९ ॥
जटामुकुटभारेण चीरवल्कलसंवृतः।
दीर्घमश्रुधरो भूत्वा तस्थौ जपपरायणः ॥ १० ॥
गृह्याक्षमालां हस्तेन तस्यागमनकांक्षया ॥ ११ ॥

तेथें जावोनि रक्षोगण। केला आश्रम निर्माण। फळें जळें संपूर्ण। वृक्षारोपण अति रम्य ॥ ८२ ॥ आपण घेवोनि अग्निहोत्र। तापसवेषें निशाचर। दिसे उपवासी निरंतर। गेलें उदर खपाटीं ॥ ८३ ॥ माथां जटांचा संभार। परिधान त्यासी वल्कलांबर। वंक्त्रीं वाढले श्मश्रु फार। अति विचित्र भासती ॥ ८४ ॥ काखवळ हात हात। लिंग बुडालें केशांआंत। वानप्रस्थरूप तेथ। जप करीत एकाग्र ॥ ८५ ॥ हातीं घेवोनि जपमाळी। बुबुळें नेलीं भंवयातळीं। जैसी खेचरी मुद्रा लाविली। तैसी शैली दिसताहे ॥ ८६ ॥ घालोनियां वज्रासन। करोनियां एकाग्रमन। बकवत् धरोनि ध्यान। पाहे आगमन कपीचें ॥ ८७ ॥ उदकामाजी असे बक। जैसा कोणी सात्त्विक। जळवासी पुण्यश्लोक। ऐसा देख दिसतसे ॥ ८८ ॥ मत्स्य आलिया दृष्टीतळीं। गटकावोनि सगळा गिळी। तेंवी राक्षस कपटमेळीं। कपिआगमन शैलीं पाहतसे ॥ ८९ ॥ तंव दक्षिणदिशेच्या भागीं।

१ शरीर. २ इंद्रानें. ३ शेवटीं. ४ मरण पावला. ५ कोरडी भिक्षा. ६ फसविलें, ७ न जातां. ८ कालनेमी राक्षस. ९ मुखावर. १० पर्वतावर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

जैसी मूस ओतिली आगीं । कीं नक्षत्रांचा पुंज स्वर्गीं । दिसे वेगीं धांवत ॥ ९० ॥ कीं बाळसूर्य उदया आला । तैसा येतसे दादुला । नातरी शेषफणाहूनि निष्टला । मणि निघाला चरावया ॥ ९१ ॥ ऐसें उड्डाण कपिनाथा । आलें पर्वताचे माथां । देखतां आकान्त राक्षसचित्ता । धीर सर्वथा न धरवे ॥ ९२ ॥ डोळां पडली झांपडी । हातां वळली वेंगडी । पडली मनाची मुरकुंडी । नावेकें भैंवंडी[1] त्यासी आली ॥ ९३ ॥ मग सावध होवोनि पाही । विचारोनि आपुलेच देहीं । म्हणे मज जालें कायी । आठव नाहीं कार्याची ॥ ९४ ॥ सकळ जन्माचें निजसार । मज जोडों आलें साचार । आणि मी दुश्चित पामर । स्वहित-विचार नाठवे ॥ ९५ ॥ म्यां स्वामिकार्य साधावें येथें । कीं मुक्त व्हावें कपिहस्तें । तें विसरोनि निजकार्यातें । मूर्च्छितचित्तें पडिलों असें ॥ ९६ ॥ ऐसें विचारोनि मनीं । स्वस्थ बैसला आसनीं । कपीनें देखिला दुरोनी । मग धांवोनी तेथ आला ॥ ९७ ॥ दुरोनि देखिला तापस । हर्षित कपीचें मानस । भरला सर्वांगीं उल्हास । ऋषिनमनास तेथ आला ॥ ९८ ॥ हनुमान श्रीरामकिंकर । रामरूप चराचर । देखे सर्वदा साचार । प्रेमा थोर श्रीरामीं ॥ ९९ ॥ ज्याची जैसी अंतर्वृत्ती । ते जगातें तैसेचि देखती । तेही विषयींची उपपत्ती । श्लोकसंपत्ती परिसावी ॥ १०० ॥ सज्जनाचें मुख्य लक्षण । ब्रह्मस्वरूप स्वयें आपण । जग देखणें ब्रह्मपूर्ण । कपटचिन्ह तो नेणे ॥ १ ॥

नारायणमयं धीराः पश्यंति परमार्थिनः ।
जगद्धनमयं लुब्धाः कामुकाः कामिनीमयम् ॥ १२ ॥

जिणोनियां काम क्रोध । दमूनि इंद्रियांचें द्वंद्व । खणोनि विषयाचा कंद । परमानंद पावले ॥ २ ॥ त्यांसी दृश्य द्रष्टा दर्शन । ध्येय ध्याता आणि ध्यान । ज्ञेय ज्ञाता आणि ज्ञान । अवघें चिद्घन भासत ॥ ३ ॥ हें सज्जनाचें लक्षण । लुब्ध जे कां वित्तेषणें । सांगों त्यांचेंही चिन्ह । सावधान अवधारा ॥ ४ ॥ द्रव्यलाभ देखे ज्यापासीं । सदा ओळखे तयासी । अणुमात्र नुलंघी वचनासी । म्हणे सर्वस्वेंसीं मी दास तुझा ॥ ५ ॥ देखे धनवंत वेव्हारें । सौजन्य त्यासीं अत्यादरें । विरक्त देखोनि एकसरें । स्वयें दातारें बैसवी ॥ ६ ॥ म्हणे भगवंताची कोण सत्ता । सिद्ध ईश्वरदत्त-भोग असतां । सांडून धरली तापसता । अभाग्यता केवढी पां ॥ ७ ॥ वित्तैषणांचा जो नर । त्याचा ऐसा विचार । आतां कामातुर जो नर । संक्षेपाकार सांगेन ॥ ८ ॥ स्त्रीकाम ज्यांचे चित्तीं । मायबहिणींतें नोळखती । स्त्रीरूप झाली वृत्ती । जग देखती स्त्रीरूप ॥ ९ ॥ बापाभावांसीं सांगतां गोष्टी । मायबहिणींचा विकल्प पोटीं । इतरांची कायसी गोष्टी । सकळ सृष्टीमाझारी ॥ ११० ॥ हनुमान साधुरत्न अगाध । साधुरत्नें अद्वैतबोध । नेणे राक्षसाचें कपट भेद । साधुत्वें शुद्ध नमूं आला ॥ ११ ॥ दिव्याश्रम मनोरम । देखोनियां महोत्तम । नमन करितां प्लवंगम । अति सप्रेम हरिरंगें ॥ १२ ॥ येरू स्वकार्या अति कुशळ । आला देखोनि गोळांगुळ । घातलें लोटांगण प्रबळ । चरणकमळवंदना ॥ १३ ॥ बैसों घातलें वरासन । आणिलें चरणक्षाळणा जीवन । अर्घ्य-पाद्यादि संपादन । पूजाविधान मांडिलें ॥ १४ ॥ नम्र होवोनि अत्यंत । चरण चुरावया धांवत । आणिलीं फळमूळें समस्त । कपीसी आतिथ्य मांडिलें ॥ १५ ॥ स्वामी अंगीकारावें फळमूळ । प्राशन करावें शीतळ जळ । मार्गीं शिणलेती बहुळ । स्वेदकल्लोळ सर्वांगीं ॥ १६ ॥ दिसतोसी जैसा रामदूत । वानरतनुगृहीत । कोण कार्या त्वरित । तुम्हीं येथ येणें केलें ॥ १७ ॥ म्हणाल तूं काय जाणसी । मज भेटी झाली बहुत ऋषींसीं । त्यांहीं सांगितलें वार्तेसी । ऐक तुजपासीं सांगेन ॥ १८ ॥ रामलक्ष्मण बंधु दोघे । पितृवचनेंसीं निघती वेगें । क्रमोनियां मही स्वांगें । वना वेगें पैं आले ॥ १९ ॥ त्यांचा पुरुषार्थ अत्यद्भुत । परिसतां तो कपिनाथ । आवडी उठली बहुत । अनुचारित परिसावया ॥ १२० ॥ स्वयंवरीं भंगिलें हरकोदंड । रावणाचें काळें तोंड । झाडिलें भार्गवाचें बळबंड । यश प्रचंड घेतलें ॥ २१ ॥ सीतेसमवेत दोघे जण । वना निघाले आपण । मारोनि राक्षस दारुण । वाळीही जाण

१ भिरभिरी. २ क्षणभर. ३ भोंवळ. ४ खरोखर. ५ मारुतीनें. ६ मूळ कारण. ७ धनलोभ करणारे.

८ सुजनता, नम्रता. ९ पाणी. १० पुष्कळ. ११ वानर-देहधारी. १२ शिवधनुष्य. १३ परशुरामाचें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

मारिला ॥ २२ ॥ राज्य सुग्रीवा दीधलें। वानरसैन्य आपैसें केलें। तें वानरतनुज देखिलें। म्हणोनि पुसिलें उत्तर ॥ २३ ॥ स्वागत असो गा तुज। सनाथ करावें मज। जरी देखसी अधिकार ओज। जीवींचें गुज तुज सांगों ॥ २४ ॥

स्वागतेनार्थयित्वा च सोऽब्रवीत्त्वं क्व चागतः।
विश्रमस्व कपिश्रेष्ठ भुक्त्वा पीत्वा च गम्यताम् ॥१३॥
तस्य तद्वचनं श्रुत्वा हनूमान्वाक्यमब्रवीत्।
श्रुता चेद्यदि किष्किंधा वानराणां महापुरी ॥ १४ ॥
सुग्रीवो यत्र वसति वानरेंद्रो महाबलः।
तस्य मित्रं महाराजो रामो दशरथात्मजः ॥ १५ ॥
तस्य भार्या जनस्थाने हृता सीतेति विश्रुता।
मायाविना राक्षसेन रावणेन दुरात्मना ॥ १६ ॥
तन्निमित्तं च लंकायां युद्धमासीत्सुदारुणम्।
तस्य भ्राता राघवस्य लक्ष्मणो नाम वीर्यवान् ॥ १७ ॥
शक्त्यासौ ताडितो विप्र विसंज्ञो मेदिनीं गतः।
तस्यार्थमिह संप्राप्त ओषधिं प्रति तापस ॥ १८ ॥

श्रीरामाची निजकथा। तापसमुखें ऐकतां। उल्लास झाला कपिनाथा। देखोनि सादरता वानरीं ॥ २५ ॥ श्रीराम असतां जनस्थानीं। रावण कपटरूपें येवोनी। शून्याश्रम देखोनी। श्रीरामपत्नी चोरिली ॥ २६ ॥ ते सीतेच्या धांवण्यासी। श्रीराम निघे वेगेंसीं। मार्गी आडवे होतां राक्षसांसी। श्रीरामें त्यांसी मारिलें ॥ २७ ॥ वाळीनें पीडून सुग्रीवासी। हरिलें स्त्री आणि राज्यासी। रामें मारोनि त्यासी। सुग्रीवासी स्थापिलें ॥ २८ ॥ सुग्रीवराजा महावीर। सकळ वानरांचे भार। झाले श्रीरामाचे किंकर। बद्धोपकार होउनी ॥ २९ ॥ दोघां पडिलें अति सख्य। समुद्रीं शिळा बांधिल्या देख। न लागतां निमिष एक। लंकासंमुख येते झाले ॥ १३० ॥ युद्ध झालें घोरांदर। रावणप्रधानादि कुमर। मारिलें सैन्य जुंझार। मारिले समग्र एक एक ॥ ३१ ॥ दुःखें खवळला रावण। घेवोनि ब्रह्मशक्ति आपण। हृदय सौमित्राचें लक्षून। शक्ति दारुण हाणितली ॥ ३२ ॥ शक्ति भेदून हृदयासी। निघोनि गेली भूमीसी। अति विकळता सौमित्रासी। पडिला क्षितीं निचेष्टित ॥ ३३ ॥ वांचवावया सौमित्रासी। नेवों आलों ओषधींसी। सूर्य न ये पां उदयासी। मज त्वरेसीं जाणें असे ॥ ३४ ॥ सांगितलें सकळ वृत्त। तूं तपस्तेजें अति विख्यात। जाणोनी माझें मनोगत। शीघ्र कार्यार्थ साधावा ॥ ३५ ॥ विलंब न करावा सर्वथा। ओषधी सांगाव्या समस्ता। भास्कर उदया न येतां। मज तत्त्वतां जाणें असे ॥ ३६ ॥

पानीयं पातुमिच्छामि शीघ्रं भावय तस्य मे।
येन तृप्तिं गमिष्यामि तत्कुरुष्व महातपः ॥ १९ ॥

तव दर्शनें मुनिवरा। सुखानुकोटी मज कपींद्रा। करूं पाहसी पाहुणेरा। निरोप सत्वरा मज द्यावा ॥ ३७ ॥ सेवितां सज्जनगृहींचें उदक। अंतर पुनीत होय देख। प्राप्त होय जरी अन्नादिक। ब्रह्मसुख देख तो पावे ॥ ३८ ॥

याचयेच्छ्रोत्रियस्यान्नं तदभावे पिबेज्जलम् ॥ २० ॥

सज्जनाचे घरचें अन्न। घ्यावें बळेंचि मागोन। नाहीं तरी आपण। जीवन तरी मागावें ॥ ३९ ॥ आलियाही ब्रह्मादिक। सज्जनान्न न पवती देख। हें घडलें गा प्रत्यक्ष। गोपाळ सकळ काला करिती ॥ १४० ॥ म्हणोनि घ्यावें फळमूळांसी। तरी मी आलों रामकार्यासी। न जातां स्वामिकार्य सिद्धीसी। सर्वथा आहारासी न सेवूं ॥ ४१ ॥ सांडून स्वामिकार्यार्था। जो पुढें घालील उदरचिंता। तो महापापी तत्त्वतां। अधःपाता जाय वेगीं ॥ ४२ ॥ यालागीं स्वामिकार्य न होतां पूर्ण। न करीं फळमूळभोजन। तुझिया आदरालागीं जाण। उदकपान करीन ॥ ४३ ॥

तस्य तद्वचनं श्रुत्वा रक्षो वचनमब्रवीत्।
श्रूयतां वचनं सत्यं त्वया मे वानराधिप ॥ २१ ॥
इदं महत्सरो दिव्यं पानीयं पातुमर्हसि ॥ २२ ॥

ऐकोनि कपीच्या वचनासी। राक्षस सुखावला मानसीं। अनायासें पावेल मृत्यूसी। सरोवरउदकासी प्राशितां ॥ ४४ ॥ ऐसा निश्चय मानूनि पूर्ण। बोले कपीसी वचन। स्वामिकार्य न होतां जाण। आग्रह आपण करूं नये ॥ ४५ ॥ आश्रमासमीप सरोवर। अत्यंत पवित्र तेथींचें नीर। पान

१ आवडीनें. २ रिकामी पर्णकुटिका. ३ सेवक. ४ पृथ्वीवर. ५ अंतःकरण. ६ शुद्ध. ७ पाणी. ८ सज्जनाचे येथचें अन्न. ९ नरकवासाला. १० पाणी प्याल्यावर

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

करितां अल्पमात्र । ओषधी समग्र देखसी ॥ ४६ ॥ हनुमान अत्यंत विश्वासी । कपट सर्वथा नाहीं मानसीं । मानिलें त्याचिया वचनासी । निजमानसीं कपिनाथें ॥ ४७ ॥ साधुवचनीं विकल्प करी । तो नर महादुराचारी । यश न पावे तो संसारीं । चराचरीं अति निंद्य ॥ ४८ ॥ ऐसा निश्चय करोनि पूर्ण । मानोनि ऋषीचें वचन । मग दृष्टीं सरोवर लक्षून । उदकपान करूं आला ॥ ४९ ॥

पिबतस्तस्य पानीयं पद्मपत्रपुटेन तु ।
उदकाभ्यंतरे ग्राही पादं जग्राह दक्षिणम् ॥ २३ ॥
ततस्तां स महाबाहुर्हनुमान्मारुतात्मजः ।
जले नयंतीं दृष्ट्वा तु नखैस्तीक्ष्णैर्व्यदारयत् ॥ २४ ॥
निहता तत्क्षणे दिव्या आकाशेधिष्ठिताब्रवीत् ॥ २५॥

उदकपान हनुमंत । करावया उदकाआंत । रिघतांचि पाहीं तेथ । पायीं त्वरित धरियेला ॥ १५० ॥ ब्रह्मशापें सबळ ग्राही । हनुमान धरिला दक्षिण पायीं ।येरु निधडा वीर पाहीं । भय नाहीं कोणाचें ॥ ५१ ॥ स्वभावें निधडा हनुमान वीर । त्यावरी श्रीरामाचा किंकर । दमूं शके काळचक्र । ग्रह किंकर काय त्यापुढें ॥ ५२ ॥ करोनि श्रीरामनामें भुभुःकार । पाय आसुडितां सत्वर । कडे पडली वेगवत्तर । दिव्य शरीर लाधली ॥ ५३ ॥ कपटें-करोनि सर्वथा । श्रीरामभक्ताचे पाय धरितां । कळिकाळातें हाणोनि लाता । शापनिर्मुक्तता सत्संगें ॥५४॥ दंडकसुत उद्धरे[1] झाला । शापें राक्षसत्व पावला । तो अंगदथांपा[2] हाणितला । तत्काळ केला निर्मुक्त ॥ ५५ ॥ दक्षशाप नारदासी । दोन मुहूर्तें स्थिर न राहसी । तो द्वारके राहे वर्षानुवर्षीं । सत्संगासीं शाप न बाधे ॥ ५६ ॥ जळचर ग्राही शापदग्ध । लागतां हनुमंताचें पद । नखाग्रें झाली शुद्ध । सुख अगाध संतचरणीं ॥५७॥ लागतां कपीचें नखाग्र । सांडिलें शापजन्य शरीर । लाहोनि अवयव सुंदर । गगना सत्वर उसळली ॥ ५८ ॥ अंतरिक्ष गगनांतरीं । राहूनि बोलत सुंदरी । विजयी होईं कपिकेसरी[3] । निरंतरीं रामप्रेमें ॥ ५९ ॥

मां विजानीह्यप्सरसं विद्युन्मालेति विश्रुताम् ।
गच्छंत्याकाशमार्गेण स्वर्भानोर्दीप्तविग्रहा ॥ २६ ॥
इह मे वसतिर्भद्र वर्षाणामयुतं शतम् ।
उक्ता च तेन ऋषिणा दीप्तक्रोधेन मानद ॥ २७ ॥
अवज्ञातो मया शक्रस्तेनाहं पतिता भुवि ।
गच्छ ग्राही भवस्वेति शप्ताहं तेन वानर ॥ २८ ॥
यदा वीरं हनूमंतं गृहीष्यसि जलेचरा ।
तदा शापाद्विमोक्षस्ते भविष्यति न संशयः ॥ २९ ॥
दिष्ट्या त्वमिह संप्राप्तः शापाच्चैव विमोक्षिता ॥ ३० ॥

कर जोडोनियां वंदन ।करोनि विनवी हनुमान । मी विद्युन्मालिनी अप्सरा जाण । स्वर्गभूषण स्वर्गींचें ॥ १६० ॥ सूर्यप्रभेसम विमान । करोनि विचरतां गगन । भास्करें क्षोभोनियां जाण । ऋषिआश्रमीं विमान पाडिलें ॥ ६१ ॥ तेणें क्षोभले मुनीश्वर । क्रोधा चढले दुर्धर । न विचारिसी पात्रापात्र । कामाचार विचरसी ॥ ६२ ॥ महाग्राह जैसा कोणी । येवोनि झोंबे दाढुनी । तैसी आलीस धांवोनी । आश्रम लक्षोनी पापिणी ॥ ६३ ॥ ग्राहाऐसी धांवसी । ते तूं महाग्राही होसी । ऐसें शापिलें वेगेंसीं । तेणें ग्राहत्वासी पावलें ॥ ६४ ॥ त्यांसीं होवोनि शरणागत । म्यां प्रार्थिले ते महंत । रवीसीं म्यां केलें उद्धत । दंड तदर्थ मज झाला ॥ ६५ ॥ साधूसीं जो करी छळण । अथवा करी उद्धतपण । किंवा करी जो हेळण । तत्काळ पतन तो पावे ॥ ६६ ॥ नव्हती पुराणींच्या कथा । माझा अनुभव प्रत्यक्ष आतां । जे उपेक्षिती साधुसंतां । त्यांसी खरेंता रोकडी ॥ ६७ ॥ ऐसें विनवितां ऋषिजन । तिंहीं होवोनि प्रसन्न । मज दिधलें वरदान । तुझें उद्धरण हनुमंतें ॥ ६८ ॥ तूं राहोनि जळवासी । धरिसी कपीच्या पायांसी । स्पर्श होतां सज्जनासी । तेणें उद्धरसी सत्संगें ॥ ६९ ॥

न ह्यम्मयानि तीर्थानि न देवा मृच्छिलामयाः ।
ते पुनंत्युरुकालेन दर्शनादेव साधवः ॥ ३१ ॥

सत्संगास्तव पाहीं । संसार तरती ते देही । इतर शाप बापुडे कायी । मुक्त होइजे सत्संगें ॥ १७० ॥ तैंपासून मी येथ । वर्षें अयुत अयुत । होतें मी तुझी वाट पाहात । झालें निर्मुक्त तुझेनि आजि ॥ ७१ ॥ जन्ममरणावस्था । मज नाहीं गा सर्वथा । म्हणोनि कळिकाळा हाणोनि लाथा ।

१ गर्विष्ठ. २ अंगदाच्या मुष्टिप्रहारेंकरून. ३ वानर-श्रेष्ठा (मारुते). ४ सूर्याकडे. ५ दुःख.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

स्वरूपता पावलें ॥ ७२ ॥ आपुलें निजसुख पाहीं। निरोपावें सद्गुरुपायीं। तें मी लाधलें सर्वेही। झालें उतराई भवभ्रमा ॥ ७३ ॥ सद्गुरूची स्थिती ऐसी। स्वयें अनुभवणें ज्या सुखासी। तेंचि पावे शिष्यासी। न्यूनाधिकासी न करोनि ॥७४॥ पित्याचें समस्त वित्त। पुत्र स्वामित्वें अंगीकारित। तैसें सद्गुरुसुख समस्त। शिष्य आक्रमीत भावार्थें॥७५॥ अजातपक्ष्याची जाति पाहीं। नेणे माउलीवांचून कांहीं। मुख पसरोनि सर्वेही। ग्रास अवघाही झेलीत ॥ ७६ ॥ तेही तैसेचि प्रेमें तेणें। विसरोनि आपुलें खाणें। सगळा घांस बाळका देणें। बाळकाकारणें अवंचक ॥ ७७ ॥ तूंचि माझा ईश्वरू। तूंचि माझा सद्गुरू। मज दीना उद्धारू। केला साचारु तुवां एकें ॥ ७८ ॥ संसारसागरीं बुडतां। सद्गुरुवांचूनि तत्त्वतां। आॅन नाहीं सोडविता। सत्य वार्ता हे माझी ॥ ७९ ॥ तुवां एकलेनि एकें। उद्धरलीं ब्रह्मांडें अनेकें। तेथें मजसारिखीं रंकें। कोणे लेखें लेखावीं ॥ १८० ॥ भवसागरीं तारक। जगीं तूं एकला एक। तुजवांचूनि आणिक। न दिसे देख त्रिजगतीं ॥ ८१ ॥ एका जनार्दनाचे रंकें। अंध पंगु दीन मुकें। देखोनियां एकाएकें। सत्वर देख आलिंगी ॥ ८२ ॥ नाम एक रूप एक। वर्णाश्रमधर्म एक। जगीं जनार्दन एक। नाम तारक त्रिजगतीं ॥ ८३ ॥ एका जनार्दना शरण। करोनि अप्सरा स्तवन। सांगों पाहे पुढील चिन्ह। सावधान परिसावें ॥ ८४ ॥ सज्जनांचा स्वभाव पूर्ण। दीनदयाळु चातकघन। अनाथासी देखतां जाण। घेती धांवोन उचलोनी ॥ ८५ ॥ गोड लागे निजमानसीं। तें वंचोनि स्वगोत्रासी। नेदोनि स्त्रीपुत्रांसी। अनाथासी अर्पित ॥ ८६ ॥ यापरी मी अनाथ। भवदरिद्रें होतों पीडित। एका जनार्दनीं येथ। केला सनाथ त्रिजगतीं ॥ ८७ ॥ जालें अप्सराउद्धरण। पुढें काळनेमीचें मर्दन। एका जनार्दना शरण। गोड निरूपण उरलें असे ॥ १८८ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां अप्सराउद्धरणं नाम पंचचत्वारिंशोऽध्यायः ॥ ४५ ॥ ओंव्या ॥ १८८ ॥ श्लोक ॥ ३१ ॥

१ पंख फुटले नाहींत अशा पक्ष्याची. २ दुसरा. ३ न देऊन. ४ नाश. ५ आकाशसंचारी अप्सरा. ६ अति

अध्याय शेचाळिसावा

श्रीरामसद्गुरवे नमः॥ उद्धरोनियां ते खेचरी। विजयी झाला कपिकेसरी। येरी राहोनि गगनांतरीं। मधुर स्वरीं अनुवादे ॥ १ ॥ तुझिया उपकारा हनुमंता। काय म्यां उतरायी व्हावें आतां। कांहीं विनवीत तत्त्वतां। सावधानता परिसावें ॥ २ ॥ तूं अदट दाटुगा वीर होसी। कळिकाळातें दृष्टी नाणिसी। त्याहीवरी रामस्मरणेंसीं। अहर्निशीं डुल्लत ॥ ३ ॥ रामनामस्मरणापुढें। विघ्न कायसें बापुडें। आश्चर्य देखिलें वाडेंकोडें। तुजपुढें सांगेन ॥ ४ ॥ तूं भावार्थी श्रीरामभक्त। नेणसी कपटाची मात। निष्कपट तूं कपिनाथ। राम देखत सर्वत्र ॥ ५ ॥ विनवीत असें मी तुजप्रती। सावध ऐकें कपिपती। केवळ कपटाची कपटमूर्ती। तो हा राक्षस चित्तीं मानावा ॥ ६ ॥

भृशं प्रीतास्मि ते वीर राघवाज्ञां प्रकुर्वतः।
पापात्मा एष दुर्बुद्धिर्येन त्वं मन्यसे ऋषिम् ॥ १ ॥
जहि रक्षो महामायं विप्रवेषं महाबलम्।
एष राक्षसराजेन रावणेन दुरात्मना ॥ २ ॥
प्रेषितस्त्वद्विनाशाय कालनेमिर्निशाचरः।
इत्युक्त्वा वायुपुत्राय साप्सरा कामरूपिणी ॥ ३ ॥
अंतर्धानं गता तत्र दृश्यमाना हनूमता ॥ ४ ॥

तूं रामाचा निजभक्त। स्वामिकार्यालागीं उद्युक्त। अति संकटीं दूर पंथ। क्रमोनि येथ आलासी ॥ ७ ॥ ज्यासी म्हणती परम साधु। तो हा कपटी महामैंदु। जाण राक्षस दुर्बुद्धु। तुज छळवादु करूं आला ॥ ८ ॥ रावणाचा परम आप्त। प्रतिज्ञा करोनियां येथ। ठाकून आला द्रोणपर्वत। छळणार्थ तुजलागीं ॥ ९ ॥ हा काळनेमी राक्षस। ब्राह्मणरूपें तापस। धरोनि आला तापसवेष। अति दुर्धर्ष महापापी ॥ १० ॥ झणें याचा विश्वास धरिसी। छळण करील क्षणार्धेंसीं। छळछद्में याची मिरासी। बहु मायेसीं जाण तूं ॥ ११ ॥ जंव उदया ये सुभानु। तंव गोंवावा कपिनंदनु। कां मारावा सिंतरूनु। ऐसा पण करोनि आला ॥ १२ ॥ सत्य मानीं

बलाढ्य. ७ आवडीनें. ८ कदाचित्. ९ फसवून.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

माझें वचन । वधीं महापापी दुर्जन । न मारितां करील विघ्न । सत्य जाण कपिनाथा ॥ १३ ॥ ऐसें बोलोनि सुंदरी । गेली अंतरिक्ष गगनांतरीं । चाकाटला तो अंतरीं । कपिकेसरी अति विस्मित ॥ १४ ॥ गेली असतां स्वर्गांगना । आश्चर्य वर्तलें कपिनंदना । विचार आदरिला निजमना । दुष्टहेननालागोनी ॥ १५ ॥ सबाह्य स्मरोनि रघुनाथा । राक्षस दुष्ट अवलोकितां । समूळ उडाली कपटता । श्रीरामदूताचेनि भेणें ॥ १६ ॥ देखणा होवोनियां देहीं । पाहणें पाहतां ठायीं । दृश्यादृश्यत्वचि नाहीं । द्रष्टा तोही हारपे ॥ १७ ॥ द्रष्टा हारपलिया पाहीं । दर्शन नुरेचि कांहीं । भावनेसी ठाव नाहीं । वेगळें कांहीं दिसेना ॥ १८ ॥ द्रष्टा होय परिच्छिन्न । तरी भासे दृश्याचें भान । झालिया त्रिपुटीसी बोळवण । कपटचिन्ह तेथें कैंचें ॥ १९ ॥ एका श्रीरामनामासाठीं । उडती कपटाचिया कोटी । तो श्रीराम कपिसंनिष्ठीं । कपटगोष्टी तेथें कैंची ॥ २० ॥ निर्धारोनि पाहे तो कपींद्र । दिसे राक्षस भ्यासुर । महापापी दुराचार । यासी सत्वर मारीन ॥ २१ ॥ तेणें साधून पुरुषार्थ । करूं आला माझा घात । मी अतिबळी रामदूत । याचा निःपात करीन ॥ २२ ॥ ऐसें बोलोनि कपींद्र । आला राक्षसासमोर । बोल बोलोनि निष्ठुर । स्वयें वानर सरसावला ॥ २३ ॥ अरे पापिया निशाचरा । झणीं पळसी दुराचारा । तुझिया करीन मी संहारा । कपटाचारा सांडीं परतें ॥ २४ ॥ ऋषिरूप धरोनि तापस । करूं आलासी छळणास । आतां होईं सावकाश । करीं युद्धास निजबळें ॥ २५ ॥ माझेनि हातें त्वरित । आजि न वांचसी जीवें जीत । ऐसें जाणोनि निश्चित । करीं पुरुषार्थ निजबळें ॥ २६ ॥ ऐसें बोलतां मारुती । सरसावला राक्षसमूर्ती । रणीं जिंकावया कपीप्रती । साटोप चित्तीं मांडिला ॥ २७ ॥

तस्य तद्वचनं श्रुत्वा कालनेमिर्निशाचरः ।
रूपं विकुरुते घोरं दशकल्पप्रमाणतः ॥ ५ ॥
ऊर्ध्वं तु योजनं पंच धुन्वन्रूक्षशिरोरुहान् ।
अष्टौ दंष्ट्राः सुतीक्ष्णाग्राः सृक्किणी रपि संलिहन् ॥ ६ ॥
विवृते नयने घोरे मेघस्तनितनिःस्वनः ।
अर्धदग्धमलाते च प्रगृह्याभ्यपतद्धरिम् ॥ ७ ॥

ऐकोनि कपीचें उत्तर । काळनेमि निशाचर । धरीत विक्राळ शरीर । अति भ्यासुर भासत ॥ २८ ॥ दश योजनें वाढला उंच । आडवा योजनें पांच । माथांचे उभारले कैंच । जैसे वृक्ष शूळप्राय ॥ २९ ॥ आठही दाढा समसमित । मांसाचे चाकोळे आंत । चघळी अशुद्धें निथळत । कैसा भासत भ्यासुर ॥ ३० ॥ भोंवयांतळीं बुबुळें खोल । जैसे धगधगीत इंगळ । तैसे दिसती नेत्रगोळ । अति विक्राळ आकृती ॥ ३१ ॥ जैसा मेघ गडगडिला । तैसा निशाचर गर्जिन्नला । कोलीत घेवोनि धांविन्नला । हनुमान दृष्टी लक्षूनी ॥ ३२ ॥ प्रताप देखोनि निशाचरीं । वेगीं वाढला कपिकेसरी । दहा योजनें गगनांतरीं । उसळोनि दूरी चालिला ॥ ३३ ॥ जैसा तापला लोहगोळ । तैसा परतला गोळांगूळ । सवेग चालिला सबळ । जैसा कल्लोळ अग्नीचा ॥ ३४ ॥ लक्षोनियां निशाचर । उडी घातली सत्वर । झालें शतचूर्ण शरीर । कपिभार वरी पडतां ॥ ३५ ॥ तरी राक्षस आतुर्बळी । आक्रंदें दिधली आरोळी । कपि तुझी युद्धसमेळीं । मी रांगोळी करीन ॥ ३६ ॥ ऐसें बोलतां राक्षस । भूमीं आदळला कर्कश । निंधा उठिला बहुवस । पर्वतेश दणाणिला ॥ ३७ ॥ शब्द झाला अत्यद्भुत । गंधर्व होते निद्रिस्थ । ते उठोनियां तेथ । सैरा धांवत पर्वतीं ॥ ३८ ॥ दणका उठिला दुर्धर । जागे झाले सत्वर । घेवोनियां शस्त्रास्त्र । पर्वतेंद्र शोधिती ॥ ३९ ॥

तं निहत्य महानादं ननाद च महाकपिः ।
तेन नादेन गंधर्वाः प्रबुद्धाः शैलवासिनः ॥ ८ ॥

तंव देखिला कपिकेसरी । भंवता वेढिला समग्रीं । वर्षताती शस्त्रास्त्रीं । निशीमाजी चोरी केंवी करिसी ॥ ४० ॥ तूं कोण कैंचा कोण आहेसी । मध्यरात्रीं कां आलासी । पर्वतीं सैरा विचरसी । आज्ञा कोणासी पूसिली ॥ ४१ ॥ निशिमध्यान्हीं अंधारीं । तूं विचरसी गिरिशि-

१ चकित झाला. २ दुष्टाला मारण्याकरितां. ३ वानराच्या अंतःकरणपूर्वक भक्तींत. ४ केश. ५ गोळे. ६ रक्त.

७ प्रतिध्वनि. ८ जिकडेतिकडे, सैरावैरा. ९ वानरश्रेष्ठ.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

खरीं। पर्वताकारशरीरी। कोण धरेवरी पाडिला असे ॥ ४२ ॥ एक म्हणती पुसतां काय। धरा बांधा हात पाय । मध्यरात्रीं विचरत आहे। तस्कर होय सर्वथा ॥ ४३ ॥ ऐसा करिती कल्लोळ। मीनले सभोंवते सकळ। तें देखोनि गोळांगूळ। मधुर बोल बोलत ॥ ४४ ॥

गंधर्वाणां वचः श्रुत्वा हनूमान्वाक्यमब्रवीत् ।
श्रुता वा यदि किष्किंधा जंबुद्वीपसमाश्रया ॥ ९ ॥
वानराधिपतिस्तत्र सुग्रीवो नाम विश्रुतः ।
मित्रकार्यार्थमुद्युक्तो रावणेनाद्य विग्रहे ॥ १० ॥
मित्रभ्राता राक्षसेन शक्त्या च विनिपातितः ।
तदर्थं संप्रयातोहमोषधीः प्रार्थयाम्यहम् ॥ ११ ॥
विशल्यकरणीं नाम ज्ञात्वेह परमौषधिम् ।
विघ्नं नैव प्रकर्तव्यं प्रसादं कर्तुमर्हथ ॥ १२ ॥
अहं वानरराजस्य भृत्यस्तु परमैर्गुणैः ।
हनूमानिति विख्यातः स्वाम्यर्थे प्रार्थयाम्यहम् ॥ १३ ॥

जंबुद्वीपाचे दक्षिणकोनीं । किष्किंधा असे राजधानी। सुग्रीव राजचूडामणी। तये स्थानीं नांदत ॥ ४५ ॥ त्यासी सख्य श्रीरामेंसीं। स्वामी मानी श्रीरामासी। तन मन अर्पिलें भक्तीसीं। वानरांसीं अति प्रेम ॥ ४६ ॥ रामरावणांचें रण। युद्ध झालें अति दारुण । रावणें ब्रह्मशक्ति सोडून। बंधु लक्ष्मण पाडिला ॥ ४७ ॥ वांचववया सौमित्रासी। नेऊं आलों ओषधींसी। विघ्न न करावें आम्हांसी। नमन तुम्हांसी मी करितों ॥ ४८ ॥ उदया येतां गभस्ती । प्राण सांडील ऊर्मिलापती। म्हणोनि ओषधी मध्यरात्रीं। नेवों निश्चितीं मी आलों ॥ ४९ ॥ सुग्रीवेंसहित वानर। सकळ श्रीरामाचे किंकर। माझें नाम हनुमान वीर । मार्ग सत्वर मज द्यावा ॥ ५० ॥ स्वामिकार्य साधितां पूर्ण । सर्वथा करूं नये विघ्न। पुढिलांसी करितां छळण। श्रीरघुनंदन क्षोमेल ॥ ५१ ॥

हनूमद्वचनं श्रुत्वा गंधर्वास्ते महाबलाः ।
विचित्रवसनाः सर्वे नानाप्रहरणोद्यताः ॥ १४ ॥

ऐसें बोलतां कपिकेसरी। गंधर्व सरसावले भारी। केवढी रामसुग्रीवांची थोरी। ओषधि रात्रीं नेवों आला ॥ ५२ ॥ सकळ सैन्य सरसावलें। मारावया सिद्ध झालें। गदा परिघ तिखट भाले। वर्षों लागले समकाळें ॥ ५३ ॥ चौपासीं धांवती सैरा। होत गंधर्वां आडदरा। आकळावया वानरा। करिती खरा पुरुषार्थ ॥ ५४ ॥ गंधर्व मीनले चौदा सहस्र। एकला एक कपींद्र। क्रोधा चढला दुर्धर। करूं संहार आदरिला ॥ ५५ ॥ रूपें वाढला दारुण। रोमें थरकती संपूर्ण। भयानक दिसे चिन्ह। कपींद्र जाण खवळला ॥ ५६ ॥ एक मुष्टिघातें मारिले। एक दांतातळीं रगडिले। उरले ते पुच्छीं बांधिले। मग आपटिले खडकेंशीं ॥ ५७ ॥ एकचि वेळे सत्वर। मारिले चौदा सहस्र। केला रामनामें भुभुःकार। विजयी कपींद्र स्वयें झाला ॥ ५८ ॥ ज्याचे मुखीं नामस्मरण। विघ्न त्याचे वंदी चरण। कळिकाळ स्वयें आपण। नित्य नमन त्यासी करी ॥ ५९ ॥ ऐसा नामधारक वीर । विजयी झाला कपींद्र। नामें गर्जोनि सत्वर। ओषधिभार पाहतसे ॥ ६० ॥

हत्वा गंधर्ववीराणां सहस्राणि चतुर्दश ।
पर्यटन्स गिरिं सर्वं नापश्यत महौषधिम् ॥ १५ ॥
चिंतयामास हनुमान्कृते कर्मणि निष्फले ।
संगृह्य परिगच्छेयमुपहासो भविष्यति ॥ १६ ॥
सर्वं च पर्वतं दृष्ट्वा प्रयासे माविलंबत ।
तत्र ज्ञास्यति वैद्योऽसौ सुषेणः परमौषधिम् ॥ १७ ॥

पर्वताचें शिखराशिखर। पाहतां ओषधिभार। सहसा नव्हती गोचर। तेणें कपींद्र खवळला ॥ ६१ ॥ चाळे मांडिले पर्वतें। दिसों नेदी ओषधींतें। नेणे माझ्या पराक्रमातें। सामर्थ्य याचें पाहूं पां ॥ ६२ ॥ म्हणोनि खवळला मानसीं। तंव ओषधी देखिल्या पश्चिमेसी। धांवोनि गेला त्यांपासीं। तंव पूर्वेसीं देखिल्या ॥ ६३ ॥ उत्तर दक्षिण समस्त। अवघा पर्वत लखलखीत। वानर विस्मित जाला तेथ। काय येथ करावें ॥ ६४ ॥ ओषधी म्हणोनि धरूं जाय। तंव झाडोरा कैंचा काय। तो सांडोनि आणखी पाहे। तंव तेथेंही होय तैसेंचि ॥ ६५ ॥ ऐसा झाला खेदक्षीण। नव्हेचि ओषधींचें दर्शन। चिंतातुर अति उद्विग्न। काय आपण बोलत ॥ ६६ ॥ आजि जितुका पुरुषार्थ

१ चोर. २ वानर (मारुति). ३ लक्ष्मण. ४ एकाच वेळीं. ५ पळापळ. ६ वृष्टीस पर्वतेनात.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

केला । तितुका अवघा वायां गेला । कपटी राक्षस भेटला । तोही मारिला वायांचि ॥ ६७ ॥ दुष्कर कर्मे केलीं । तीं अवधींच वायां गेलीं । ओषधींनीं बुडी दिधली । शक्ति झाली तेही वृथा ॥ ६८ ॥ सुग्रीवा काय मुख दाखवूं । श्रीरामचरण कैसे पाहूं । अंगदा काय उत्तर देऊं । श्रीरघुराव क्षोभेल ॥ ६९ ॥ मीं निजाभिमान केला पाहीं । ओषधी आणीन अवघ्याही । श्रीराम न साहे हें कांहीं । अहंता सर्वेही घातक ॥ ७० ॥ अहंता कर्म सिद्धी न वचे । अहंता सुख न घडे स्वर्गीचें । अहंता सार न पावे वेदांचें । अहंता साच घातक ॥ ७१ ॥ अहंता न साधे स्वामिकार्य । अहंतेनें साधन हत होय । अहंता यश न लाहे । निंद्य होय अहंता ॥ ७२ ॥ अहंता नव्हे चित्तशुद्धी । अहंता नव्हे साधनसिद्धी । अहंता नव्हे सत्त्वशुद्धी । अहंता त्रिशुद्धी घातक ॥ ७३ ॥ ऐहिक सुख नव्हे देख । अथवा नव्हे पारत्रिक । अहंता भोगिजे नरक । अहंता घातक जगा झाली ॥ ७४ ॥ ते अहंता मी आपण । श्रीरामासंमुख केली जाण । तेणें नागवलों संपूर्ण । ओषधिदर्शन नव्हे मज ॥ ७५ ॥ म्हणती हनुमान पामर । नेणे ओषधिसंभार । किती आणिलें कतवार[१] । पालेखाइर मर्कट ॥ ७६ ॥ काय विचार करूं आतां । उपडोनी वनस्पति समस्ता । भारा बांधोनियां नेतां । उपहासता होईल ॥ ७७ ॥ धांव पाव गा श्रीरामा । माझा अपराध करीं क्षमा । पडिलों संकटीं दुर्गमा । सर्वोत्तमा पाव वेगीं ॥ ७८ ॥ मी तुझें निजबाळक । ज्ञानमूढ अति उत्संक[२] । क्षमा करोनि सकळिक । कृपा आवश्यक करीं मज ॥ ७९ ॥ ऐसी उत्कट[३] चिंता । करितां तया कपिनाथा । श्रीराम आठवला चित्ता । बुद्धिदाता निजभक्तां ॥ ८० ॥ जो कायावाचामनेंसीं । शरण रिघे श्री रामासी । क्षणार्धें सोडवी त्यासी । राम भक्तासीं कृपाळु ॥ ८१ ॥ बुद्धीची बुद्धि आपण । अंतरात्मा रघुनंदन । तेणें होवोनि प्रसन्न । कपिनंदन प्रबोधिला ॥ ८२ ॥

ददामि बुद्धियोगं तं येन मामुपयांति ते ।
तेषामेवानुकंपार्थमहमज्ञानजं तमः ॥ १८ ॥

गजेंद्र ग्राहें धरिला असतां । संकटीं स्मरला भगवंता । काकुळती उडी सत्वरतां । घालोनि तत्त्वतां उद्धरिला ॥ ८३ ॥ हनुमान अखंड नामधारक । नामें पावला रघुकुळटिळक । कपीस बुद्धि स्फुरली चोख । सत्वर देख सरसावला ॥ ८४ ॥ म्हणे एवढी कायसी चिंता । मी भ्रांत कां झालों आतां । सगळा पर्वतचि तत्त्वतां । नेऊं सर्वथा उचलोनी ॥ ८५ ॥ सुषेण वैद्यराज तेथें । ओळखील ओषधींतें । उठवील सौमित्रातें । अर्ध क्षण न लागतां ॥ ८६ ॥ जरी विलंब करूं येथ । उदया येईल भास्वत[५] । शक्ति वरद अद्भुत । कार्य समस्त नासेल ॥ ८७ ॥ पर्वतें मांडिलें सळ[६] । पाहों आदरिलें माझें बळ । ओषधी लपविल्या सकळ । मज केवळ गोंवावया ॥ ८८ ॥ हाही मीनला रावणासी । गोंवूं आदरिलें आम्हांसी । उपडोनि याच्या कंदासी । ओषधींसी नेईन ॥ ८९ ॥ ऐसा करोनि विचार । केला रामनामें भुभुःकार । कांपिन्नले सुरासुर । चराचर भयभीत ॥ ९० ॥

इति संचिंत्य बलवान्नानारत्नोपशोभितम् ।
सिंहव्याघ्रगजाकीर्णमुज्जहार महागिरिम् ॥ १९ ॥

पुच्छें गुंडाळिलें बुडखातें । शिखर कवळिलें हातें । आंदोलितां पर्वतातें । भूतें आकांतें कलकलती ॥ ९१ ॥ करोनियां रामस्मरण । वेगीं उपडितां गिरि द्रोण । दणाणलें त्रिभुवन । शेषफण तडकला ॥ ९२ ॥ दणाणिलें पाताळ । हडबडिले लोकपाळ । वनदेवतां खळबळ । केला कोल्हाळ सकळिकीं ॥ ९३ ॥ भेणें पळालीं वनचरें । तिंहीं लंघिलीं गिरिकंदरें । ससे म्हैसे तरस तगरें । चौफेरें कळकळिती ॥ ९४ ॥ अट्टहास्य मदगजांचे । आरड ते व्याघ्रांचे । सिंहनाद सिंहांचे । तेणें दचके यमलोक[७] ॥ ९५ ॥ आंदोळल्या द्रुमवल्ली । भूतें आकांतलीं सकळी । त्यांहीं दांतीं तृणें धरलीं । शरण आलीं कपीसी ॥ ९६ ॥ दिशा लंघिल्या पक्षिकुळीं । सर्प रिघाले पाताळीं । दिग्गजां बैसली टाळी । दांतखिळी कृतांता ॥ ९७ ॥ दश योजनें विस्तार । पंच योजनें उंची थोर । ऐसा पर्वत सविस्तर । कपींद्रें सत्वर उपडिला ॥ ९८ ॥

दशयोजनविस्तीर्णं पंचयोजनमायतम् ।
दोर्भ्यां संगृह्य तं शैलमुत्पपात विहायसा ॥ २० ॥

१ केरकचरा. २ खोडकर. ३ दांडगी, मोठी. ४ सुसरीनें. ५ सूर्य. ६ कपट. ७ यमाला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

बळें आकळोनि पाहीं । पर्वत उपडिला दोहीं बाहीं । गगना उसळला लवलाहीं । श्रम नाहीं अणुमात्र ॥ ९९ ॥ छत्राकें झेली बाळक । गज शुंडादंडें कमळ देख । तैसा चालिला कपिनायक । गिरि अलोलिक उपडोनी ॥ १०० ॥ तळीं अंधार पडे गडद । वरी प्रकाश अगाध । हेमच्छाया अति शुद्ध । कोंदलें नभ उजेडें ॥ १ ॥ तळीं अंधार प्रकाश माथां । नभीं सवेग उडत जातां । अयोध्येचा प्रदेश पावतां । भरतें तत्त्वतां देखिला ॥ २ ॥ अति विस्मित झाला मनीं । निबिड दाटली असतां रैंजनी । काय जात आहे गगनीं । लक्षितां चिन्हीं लक्षेना ॥ ३ ॥ इंद्र बैसला विमानीं । सवें अप्सरा घेऊनी । क्रीडा करिताहे गगनीं । लाज मनीं असेना ॥ ४ ॥ अंगत्राणें वात सुटला । तेणें ओषधिनाद उठिला । ध्वनि विचित्र उमटला । तो ऐकिला भरतानें ॥५॥ म्हणे केवढा हा उद्धतै । वाद्यें लावोनि अद्भुत । अप्सरांसह विमानांत । सैरा विचरत आकाशीं ॥ ६ ॥ स्वयें घेवोनि वाराङ्गना । विमान हिंडवी गगना । उल्लंघोनि साधुसज्जनां । करी अटण उन्मत्त ॥ ७ ॥ जो स्त्रीसवें निरत झाला । मद्यप्राशनीं मातला । जो धनलोभें भुलला । त्याचा गेला विवेक ॥ ८ ॥ वेश्यागमनीं जे रत । ते सर्वदा अतिउन्मत्त । नाठवे स्वार्थ परमार्थ । स्वेच्छा विचरत खर जैसा ॥ ९ ॥ खर नेणे मर्यादा । दिवसा देखतां जनपदा । वेश्याद्वारीं विचरे सदा । न सरे कदा माघारा ॥ ११० ॥ लाता हाणितां उरावरी । प्रीतीं धांवे संमुख खरी । पदाभिघात मुखावरी । आवडीं करीं झेलीत ॥ ११ ॥ तैसा पुरुष कामाचारी । सुखचि मानी निरंतरी । पाऊल जाऊं नेदी दुरी । हृदयावरी झेलीत ॥ १२ ॥ म्हणे जन्मांतरींचीं फळलीं भाग्यें । इचें पादकमळ हृदयीं लागे । दैवें दंडिलीं अभाग्यें । वृथा वैराग्यें कष्टती ॥ १३ ॥ स्त्रीकामाची ऐसी रीती । ऐक मद्यप्याची स्थिती । वेंचून पदरची संपत्ती । स्वयें होती जगनिंद्य ॥ १४ ॥ जेणें द्रव्यें ऐहिक भोग जोडे । सकाम कर्मे स्वर्ग आतुडे । निष्कामें तरी डोळ्यांपुढें । तिष्ठे रोकडें मोक्षसुख ॥ १५ ॥ वेंचूनियां ऐसें धन । करिताती मद्यपान । ते निजात्मघाती संपूर्ण । नरकसेवन आकल्प ॥ १६ ॥ धनलोभीं जे लुब्धक । स्वप्नीं न देखती सुख । जन्मादारभ्य देख । भोगिती नरक अनिवार ॥ १७ ॥ मरणान्त झटें घेतां । रुका न मिळे सर्वथा । तथापि सायास करितां । आळस चित्ता उपजेना ॥ १८ ॥ ऐसें ऐशा कष्टें मिळे । तें वाढवी उपायबळें । निजशरीर कष्टविलें । जेणें फळे निजमोक्ष ॥ १९ ॥ जेणें भोगिजे इहभोग । जेणें भोगिजे स्वर्गभोग । जेणें साधे महायोग । जीवशिवविभाग जेथ लाहे ॥ १२० ॥ एवढिये प्राप्तीचे दाते । ते कष्टती धनार्जनातें । इतरांसी कोण पुसे तेथें । दुःखी समस्तें संगतीचीं ॥ २१ ॥ देव धर्म नेणती कांहीं । पर्वकाळ ठाउका नाहीं । श्राद्धाची संभावना नाहीं । निराश पाहीं सदा पितर ॥ २२ ॥ जैं धनाचा वेंच होये । तैं प्राणचि जाऊं पाहे । सणावाराची नेणे सोये । अतिथि तेथें काय करील ॥ २३ ॥ कष्टें जोडिली संपत्ती । ते ठेविती अति निगुतीं । तोंडीं दगड माती घालिती । आपण मरती धुळी खात ॥ २४ ॥ ऐसी एक एकाची जाती । अधःपाता स्वयें नेती । तिन्ही एकत्र जेथें मिळती । तें दुःख किती सांगावें ॥ २५ ॥ ऐसा स्त्रीमदें मातला । विमानीं विचरत एकला । सज्जनांचा उलंघूँ केला । उन्मत्त छायेला पाडीतसे ॥ २६ ॥ आम्ही सूर्यवंशी राजे नियामक । आम्हां स्वधर्म हाचि देख । उद्धतासी लावणें सीकँ । विचार आणीक असेना ॥ २७ ॥ म्हणोनि रामनामांकित बाण । धगधगीत अति दारुण । चापीं सज्जिला आपण । दुष्टदळण करावया ॥ २८ ॥ करोनि रामनामस्मरण । धनुर्ष्यीं ओढी काढून । बाणासी आज्ञा करून । दुष्टदळण करावें ॥ २९ ॥ बाण श्रीनामांकित । हनुमान श्रीरामभक्त । जीवापरीस अत्यंत आप्त । राम स्मरत सर्वदा ॥ १३० ॥ सुटोनि शितीच्या कडकडाटीं । बाण पडिला अति संकटीं । कोणावरी करावी शरवृष्टी । अभक्त दृष्टी दिसेना ॥ ३१ ॥ परतोनि जावें जरी येथून । भरत दंडील संपूर्ण । कपीसी करावें कंदन । तरी यासी स्मरण श्रीरामाचें ॥ ३२ ॥ भरत श्रीरामाचा निजभक्त । कपि सप्रेम राम स्मरत । माझा न चले पुरुषार्थ । बाण विस्मित विचारी ॥ ३३ ॥ भरताची आज्ञा ऐसी । जे दंडावें

१ छत्री. २ रात्र. ३ अमर्याद. ४ जन्मापासून. ५ धन मिळविण्यासाठीं. ६ अतिक्रम. ७ शिक्षा. ८ दोरीच्या,

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

अति दुष्टासी । दुष्ट म्हणों न ये कपीसी । रामस्मरणेंसीं डुलत ॥ ३४ ॥ स्वामीच्या आज्ञेचें उल्लंघन न घडे । साधुअवज्ञा शिरीं न चढे । ऐसें विचारोनि वाडेंकोडें । चरणांकडे चालिला ॥ ३५ ॥ धरिलिया सज्जनांचे पाय । अपजय कधींच न होय । स्वामिकार्य सिद्धीस जाय । विजयी होय त्रैलोक्यीं ॥ ३६ ॥ ऐसा निश्चय करोनि पूर्ण । पायीं मिठी घाली बाण । स्वयें विस्मित कपिनंदन । बाण कोण कोणाचा ॥ ३७ ॥ ऐसें विचारितां मनीं । बाण अवलोकीत नयनीं । देखतां श्रीरामनामांकित चिन्हीं । वायुनंदना अति विस्मयो ॥ ३८ ॥ श्रीरामाचा बाण होय । अतिक्रम याचा करूं नये । साष्टांगें नमन करिता होये । रामस्नेहें भावार्थें ॥ ३९ ॥ कपि कांक्षी बाणाचें वचन । तंव तो बोलेना संपूर्ण । पाहूं आदरिलें त्याचें चिन्ह । तंव तळीं बाण ओढीत ॥ १४० ॥ उदया येईल दिवाकर[1] । म्हणोनि सौमित्रासी रघुवीर । धेवोनि आला मजसमोर । बाण सत्वर येथें ओढी ॥ ४१ ॥ कीं उठवोनि सौमित्र । वधोनियां दशशिर । करोनि बिभीषण राज्यधर । स्वयें सत्वर येथें आला ॥ ४२ ॥ मी नपुंसक सर्वथा । न पवेंचि स्वामिकार्यार्था । धिक् माझे जीवित्व वृथा । कोण अर्था जात असें ॥ ४३ ॥ ऐसा झाला अति दुःखी । सर्वेचि बाणातें अवलोकी । तंव तो ओढी अधोमुखीं । एकाएकीं सत्वर ॥ ४४ ॥ कार्य न साधेच माझेन । वेगें करीन देहपतन । म्हणोनि कृपाळु रघुनंदन । सत्वर बाण पाठविला ॥ ४५ ॥ आतां असो कांहीं भलतें । आज्ञा करणें निश्चितें । स्वयें अनुसरला बाणातें । विलंब येथें नये करूं ॥ ४६ ॥ हनुमान आज्ञेचा किंकर । आज्ञा नुल्लंघी अणुमात्र । टाकिलें बाणावरी शरीर । निघाला सत्वर बाणवेगें ॥ ४७ ॥ पातला अयोध्येचा आराम । पुढें देखिला नंदिग्राम । रचना अति मनोरम । भक्तोत्तम भरत जेथें ॥ ४८ ॥ एका जनार्दना शरण । दोघांची भेटी अति गहन । दोघे प्रेमळ संपूर्ण । दोघे दोनीपण विसरती ॥ ४९ ॥ एका जनार्दन कृपाळु जननी । गोड न खाय बाळावांचूनी । मुखींचा घांस काढोनी । माझ्या वदनीं घालीत ॥ १५० ॥ जें अत्यंत खावों नेणे । त्याचे मुखीं घांस देणें । न खातां पायांवरी बळें पाडणें । घांस कोंदणें[2] मुखामाजी ॥ ५१ ॥ वांझेसी हें न कळे चिन्ह । व्याली जाणे वेदन । कृपाळु एका जनार्दन । जिये अभिधानें[3] विश्वमाता ॥ ५२ ॥ ब्रह्मादिक पुत्र व्याली । जियें ब्रह्मांडें सृजिलीं । निजकर्में तृणें मानिलीं । मज ते चाली लक्षेना ॥ ५३ ॥ तान्हेल्या उदक द्यावें । कीं भुकेल्या जेवूं घालावें[4] । मज हें सर्वथा न संभवे । तेणें ओल्हावे माउली ॥ ५४ ॥ यासी काय करूं आतां । जन्मोनि झाला अकर्ता । किती याची करूं चिंता । कांहीं सर्वथा जाणेना ॥ ५५ ॥ घांस तोही घेवों नेणे । म्हणवूनि निजमुखींचें काढणें । माझ्या मुखीं कोंदणें । बाळाकारणें कृपाळु ॥ ५६ ॥ अति सुरस रामकथा । माउलीसी घांस गोड घेतां । आड मी आलों अवचितां । कांहीं सर्वथा जाणेंना ॥ ५७ ॥ तेही कृपाळु कैसी । तोंडींचें काढोनि वेगेंसीं । ओपितां माझिये मुखासीं । निजमानसीं सुखावे ॥ ५८ ॥ बाळकाच्या धर्णी धाईजे । कां शिष्याचेनि झालेपणें होइजे । आणिका हें न कळे सहजें । सद्गुरूनें जाणिजे कीं प्रसवतिया ॥ ५९ ॥ एका जनार्दना शरण । कपि रामाज्ञा धरून । बाणें आणिला आपण । गोड कथन पुढें असे ॥ १६० ॥ श्रोते कोपती झणें । सैराट भरला रानें । ओढिला एका जनार्दनें । कांहीं मनें स्मरेना ॥ १६१ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां हनुमंतनंदिग्रामगमनं नाम षट्चत्वारिंशोऽध्यायः ॥ ४६ ॥ ओंव्या ॥ १६१ ॥ श्लोक ॥ ॥ २० ॥

अध्याय सत्तेचाळिसावा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ हनुमान अत्यंत विश्वासी । अनुसरोनि बाणासी । आला नंदिग्रामासी । जेथें भरतासी निवास ॥ १ ॥ भरत श्रीरामाचा निजभक्त । भरतें भक्ति उल्लासित । आचार्य भक्तीचा भरत । भरतें निर्मुक्त चराचर ॥ २ ॥ भरतें भक्ति विस्तारली । भरतें भक्ति प्रकाशिली । भरतें भक्ति वाढविली । भरतें पाल्हाळिली[6] निजभक्ती ॥ ३ ॥ भरत भक्तीचा निजठेवा ।

---

१ सूर्य. २ कोंबणें. ३ नांव. ४ तृप्त व्हावें. ५ कदाचित्. ६ विस्तारली.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

भरत भक्तीचा विसांवा। भरत भक्तीचा ओलावा। भक्तीच्या गांवा रिगम भरता ॥ ४ ॥ भरतें सत्य सद्भावो। भरतें साचार अनुभवो। भरतें प्रकट रामरावो। सर्वत्र पहा हो सर्वांसी ॥ ५ ॥ भरतें आंपंगिली भक्ती। भरतें वाढविली विरक्ती। भरतें पाहिली निजशांती। भूतें भोगिती स्वानंद ॥ ६ ॥ मलयाद्रीच्या ठायीं। चंदनाची पैं झाडी पाहीं। तेणें डोंगर सर्वही। केला लवलाहीं चंदन ॥ ७ ॥ नाहीं आपण तेथें गेला। नाहीं उपडोनि आणिला। अंगवात वरूनि गेला। तेणें गिरि केला चंदन ॥ ८ ॥ एका वनस्पतीचा बडिवार। चंदन केला डोंगर। बहकतसे चौफेर। सुवास थोर आवरेना ॥ ९ ॥ माझ्याचि हृदयीं भगवंत। तो भगवंत मूर्तिमंत। तेणें काय नव्हे प्रात। सभाग्य संत त्रिजगतीं ॥ १० ॥

चित्ते मुकुंदो वदने मुकुंदो
दृष्टौ मुकुंदः श्रवणे मुकुंदः।
एवं सदा सर्वगतो मुकुंदः
ते मानवाः किं न मुकुंदतुल्याः ॥ १ ॥

दृष्टीं विषय समस्त। रामरूपें देखत भरत। दृश्य द्रष्टा दर्शन तेथ। सहज होत रामरूप ॥ ११ ॥ श्रवणीं शब्द पडतांचि जाण। शब्दार्थ श्रीराम आपण। श्राव्य श्रावक श्रवण। स्वयें चिद्धन होवोनि ठाके ॥ १२ ॥ घ्राणें घेतां वास। वासा सबाह्य परेश। घ्रेयँ घ्राता घ्राण समस्त। चिदाकाश होवोनि ठाके ॥ १३ ॥ त्वचा घेवों जाय स्पर्शासी। तंव दोहींतें राम प्रकाशी। त्वचा स्पर्श स्पर्शनासी। सहज समरसी श्रीराम ॥१४॥ रसना रातली आवडीं। घेतां रामरसाची गोडी। त्रिपुटी झाली देशोधडी। रसना ओसंडी रसातें ॥ १५ ॥ कर्मेंद्रियें याचि रीतीं। सेवितां श्रीराम चिच्छक्ती। उडाली कर्माची कर्मगती। स्वेच्छा वर्तती निष्काम ॥ १६ ॥ ऐसा भरत रामें कोंदला। तो देशचि राम झाला। हनुमान अत्यंत सुखावला। देखों लागला अपूर्व ॥ १७ ॥ नगरा बाह्य आराम। वृक्षध्वनी रामराम। रामरूप सकळ द्रुम। प्लवंगम विस्मित ॥ १८ ॥ दिशा दुमदुमित रामें। तृणें कोंदलीं रामनामें। वायु गर्जे रामनामें। व्योम रामें कोंदलें ॥ १९ ॥ सत्संग धर्रा सधरें। भूतें वागविते निरंतर। सांडून कठिनत्व प्रकार। मृदु अरुवारँ स्वयें झाली ॥ २० ॥ सत्संगती ओलावली। अति शांति धरेसी आली। एकात्मता विस्तारली। वर्तों लागली अविरुद्ध ॥ २१ ॥ सत्संगती झाली जीवना। विसरोनि अधोगमना। ऐक्यवृत्ति सकळ जनां। अति स्वादना मधुरत्वें ॥ २२ ॥ गाय देखोनि सज्जन। निववी देवोनि जीवन। व्याघ्र पापी म्हणोन। उपेक्षण न करीचि ॥ २३ ॥ तेजासी होतां सत्संगती। आकर्षून दाहक शक्ती। स्वयें प्रकाश सर्वभूतीं। त्रिजगतीमाजी विचरे ॥ २४ ॥ ज्यानें प्रकाशिलें निजगृहीं। त्यासी प्रकाशा उणें नाहीं। पारखा चोरूं आल्या पाहीं। प्रकाश त्यासही तैसाचि ॥ २५ ॥ वायु सत्संगा लाधला। चंचलत्व आपुलें विसरला। योगीश्वरा भेटों आला। निश्चळ झाला निजरूपीं ॥ २६ ॥ विचरे तरी सर्व देहीं। परी आसक्त नव्हे कांहीं। सुवास दुर्वास न म्हणे कांहीं। निःसंग पाहीं विचरत ॥ २७ ॥ सत्संगा लाधलें आकाश। खुपों नेणे पैं कोणास। विसरोनियां निरवकाश। विरक्त उदास सर्वत्र वसे ॥ २८ ॥ आपुल्या निजशरीरीं। शीत उष्ण पर्जन्यधारीं। न लिंपे एकही विकारीं। सत्संगथोरी एवढी ॥ २९ ॥ ऐसें नगर अवघेंचि संत। श्रीरामभजनीं निरत। धन्य भक्तिप्रतापें भरत। सौभाग्यवंत नांदत ॥ ३० ॥ कोणाही नाहीं दुर्दशा। कोणी नव्हती हीनमानसा। श्रीरामभजनें उल्लासा। सावकाश नांदती ॥ ३१ ॥ उदीम एकमोहँरा करणें। अक्षरांचें खरें नाणें। जैसें देणें तैसें घेणें। कोणाही उणें असेना ॥ ३२ ॥ एकचि वस्तु देतां घेतां। एका बोलाचीच कथा। एकावांचून सर्वथा। दुजी वार्ता असेना ॥ ३३ ॥ दुजेपणें दे दलाल। ठकूं पाहे तत्काळ। सर्वस्वें नेतां न लगे पळ। घेवोनि सबळ जातसे ॥ ३४ ॥ जेथें त्याची उडी पडे। सर्वस्वेंसीं जीवित बुडे। कांहीं उपाय न चले पुढें। पडे रोकडे अनर्थी ॥ ३५ ॥ अंगलुमंगळु नंदभाषा। सवेग निवडूं पाहे घसा। प्राणिया न कळे सहसा। दलाल ऐसा द्वैताचा ॥ ३६ ॥ भरतनगरीं लोक चतुर। स्वयें

१ रक्षिली. २ पसरतो. ३ वास घेण्यास योग्य. ४ पृथ्वी. ५ आधारयुक्त. ६ नाजूक. ७ सचोटीचा. ८ व्यापारांतील सांकेतिक शब्द.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

उदिमी एकांगवीर । होतां द्वैताचा संचार । वृत्ति सत्वर छेदिती ॥ ३७ ॥ एक एक उदीम ऐसा । आकळी सगळिया आकाशा । द्वैताची तेथें कोण दशा । परम परेशा विनटले ॥ ३८ ॥ हाटवटिया चौबारें । कथाकीर्तन चौफेरे । गातां रामकीर्ती गजरें । अंबर झरे तुषारीं ॥ ३९ ॥ आनंद भरताच्या मनीं । गेलें शून्यत्व बुडोनी । चैतन्यघन होउनी । निर्विकार जनीं सुस्थिर ॥ ४० ॥ गर्जतां रामनामें कल्लोळें । गगन अवघेंचि महुरलें । मोक्षफळीं लगडोनि आलें । ऐक्य झालें हरिरंगीं ॥ ४१ ॥ देखतां नगरवृत्तान्त । कपि स्वानंदें डुलत । पुढें देखिला भरत । अति विस्मित स्वयें झाला ॥ ४२ ॥ जटाधारी वल्कलांबर । तापसवेषी मनोहर । राजीवलोचन[2] श्यामसुंदर । अति मनोहर साजिरा ॥ ४३ ॥ ठाणमाण गुणलावण्य । कळाविन्यास[3] प्रसन्नवदन । देखतां कपि उद्विग्न । रघुनंदन येथें कां आला ॥ ४४ ॥ मनोमय करोनि नमन । रण-पुरुषार्थें क्षोभोन । काय बोलत कपिनंदन । कोण विघ्न तुज आलें ॥ ४५ ॥ म्हणवितोसी आत्माराम । दिससी दुःखाचा आराम । रणीं सांडिला युद्धधर्म । परम अधर्म तुवां केला ॥ ४६ ॥ धीर वीर परम उदार । रणप्रवीण महाशूर । पुराणें गर्जती अपार । तें समग्र लटिकेंचि ॥ ४७ ॥ लटिकें तुझें कुळ शीळ । लटिकें तुझें व्रत सकळ । लटिकें तुझें प्रताप-बळ । लटिकाच केवळ पुरुषार्थ ॥ ४८ ॥ तुज पुरुषत्वचि नाहीं कांहीं । स्त्रीत्वही तुजमाजी नाहीं । नपुंसकाहूनि पाहीं । वेष तोही लटिकाचि ॥ ४९ ॥ लटिकी तुझी धृती कीर्ती । लटिकी तुझी शौर्य-शक्ती । लटिकी तुझी स्थिती गती । लटिका निश्चितीं श्रीराम ॥ ५० ॥ वृथाचि वाढविलें नाम । वृथा तुझे नेमधर्म । वृथा तुझे धर्माधर्म । रघूत्तम वृथाचि ॥ ५१ ॥ जितुका पुरुषार्थ केला । तितुका वायांचि वाढविला । क्षात्रधर्मा बोल लाविला । रणीं सांडिला सौमित्र ॥ ५२ ॥ बिभीषण शरणागत । वानर सांडिले अनाथ । सुग्रीव सांडिला तेथ । रावणें घात करावया ॥ ५३ ॥ आम्ही एक एक गोळांगूळ । गिळूं शकूं ब्रह्मांडगोळ । कायसें रावणाचें बळ । रणीं सकळ जिंकावया ॥ ५४ ॥ धार्यीं तळमळी सौमित्र । रणीं सांडोनि सत्वर । पळालासी तूं रघुवीर । बाण समोर धाडिला ॥ ५५ ॥ मुहूर्त एक राहतासी तेथें । क्षणें आणितों औषधींतें । उठवोनियां सौमित्रातें । रावणातें मारितों ॥ ५६ ॥ श्रीरामा थोर अन्याय केला । विकळ बंधु रणीं सांडिला । ऐकतां भरत चकित जाला । पाहूं लागला आकाशीं ॥ ५७ ॥ कपि रूपें पर्वताकार । पुच्छीं बांधोनि डोंगर । गगनीं जातसे सत्वर । गर्जत थोर रामनामें ॥ ५८ ॥ दिसे अति बळें बळवंत । कळिकाळा दृष्टी नाणीत । बाण देखोनि नामांकित । सत्वर येथ पैं आला ॥ ५९ ॥ होय रामदूत साचार । युद्ध मांडलें घोरांदर । पर्वत घेवोनि सत्वर । करावया संहार जातसे ॥ ६० ॥ प्रसंगें येथें हा पातला । पुसों वृत्तान्त[4] वहिला । चौदा वर्षांपाठीं भेटला । रामें धाडिला कृपाळुत्वें ॥ ६१ ॥ श्रीराम दीनदयाळ । राम भावार्थभुकाळ । राम सप्रेम स्नेहाळ । प्रणतपाळ[5] श्रीराम ॥ ६२ ॥ राम जीवाचें जीवन[6] । राम जीवाचें अंजन । जीवीं जीवा समाधान । राम चिद्घन बोळला ॥ ६३ ॥ रामकथेवीण येथ । बहुत दिवस होतों पीडित । रामें कृपा करोनि त्वरित । कपिपर्वत पाठविला ॥ ६४ ॥ यासी पुसतां प्रवृत्ति[7] समग्र । रामकथा सविस्तर । आम्हां सांगेल वानर । अति चतुर दिसताहे ॥ ६५ ॥ ऐसें विचारोनि मनीं । भरत सादर रामश्रवणीं । पुसता झाला तत्क्षणीं । प्रेमें-करोनि कपीसी ॥ ६६ ॥ कोण कैंचा आलासी कोठोनी । पुच्छीं पर्वत काय म्हणोनी । रामभेटी तुज कैसेनी । कोपेंकरोनी बोलसी ॥ ६७ ॥ राम कैंचा कोठील कोण । तुज कोपाया काय कारण । कोठें पडिला लक्ष्मण । वानरगण ते कैंचे ॥ ६८ ॥ कैंचा बिभीषण शरणागत । कोठें रावणेंसीं झुंज होत । लक्ष्मण केंवी झाला मूर्च्छित । कोण हेतु युद्धासी ॥ ६९ ॥ कोण्या अर्था तूं गेलासी । पर्वत कैशालागीं नेतोसी । वेळोवेळां राम स्मरसी । रामीं तुम्हांसीं सख्य कैंचें ॥ ७० ॥ हा समूळ माझा संदेहो[9] । तुवां छेदावा महाबाहो । झणें उदास होसी पहा हो । कथान्वयो[10] सांगतां ॥ ७१ ॥ तुझे मुखीं रामस्मरण । म्हणोनि तुज आलों शरण । पुढती घालितों लोटांगण ।

१ पुष्कळ वीरांशीं लढणारा एकटा. २ कमलनेत्र. ३ कळांची उपस्थिति. ४ सत्वर. ५ शरणागतांचें रक्षण करणारा. ६ आधार. ७ वृत्तान्त. ८ युद्ध. ९ संशय, १० कथानुक्रम,

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

गण । रामकथन मज सांग ॥ ७२ ॥ भरत प्रेमाचा संपूर्ण । प्रेमें बांधिला कपिनंदन । न ओळखोनि भरतचिन्ह । राम म्हणोन उपहासी ॥ ७३ ॥ उपहासमिषें कपिनाथ । श्रीरामातें वर्णीत । सूक्ष्म सर्वगत अनंत । सदोदित सांगत ॥ ७४ ॥ किती नेणतेपण घेसी । लटिकाचि प्रेमा दाविसी । जगासी जैसा ठकवितोसी । तैसें मजसीं चालेना ॥ ७५ ॥ उघड सर्वत्र असमी । असोनि विश्वा वेड लाविसी । जगींच जगा न दिससी । पाहातां लपसी सूक्ष्मत्वें ॥ ७६ ॥ जे जे पहावया निघाले । ते ते उघडे नागवले । नागवे हळहळीत केले । हिंडविले दिगंतीं ॥ ७७ ॥ एकीं अन्नचि वर्जिलें । एक पाला खाऊं लागले । एकीं तृणरस सेविले । पाहूं लागले तुजलागीं ॥ ७८ ॥ एकां माथां जटाभार । एकीं वळविलें शरीर । एक सेविती उदक मात्र । एकीं नीरेंही सांडिलें ॥ ७९ ॥ एक झाले वल्कलांबर । एक चर्माच्छादनपर । एकां तृणाचें शेजार । एकां सविस्तर नखकेश ॥ ८० ॥ एक झाले जी बोडके । दंडी मुंडी भगवे सुडके । एकीं वेढिलें फडकें । एक बोलके अति चतुर ॥ ८१ ॥ ऐसे पाहती तुजलागीं । सर्वथा न दिससी जगीं । असोनि त्यांच्या सर्वांगीं । भ्रमण वेगीं करविसी ॥ ८२ ॥ तें मजसीं न चले मत । मी जाणतसें समस्त । लपलासी जेथ तेथ । मी समस्त सांगेन ॥ ८३ ॥ पाहत्याभेणें लपसी । बापुडीं वेडा लाविसी । शेखीं पाहणें होऊन राहसी । हें कोणासी लक्षेना ॥ ८४ ॥ निर्धारें माग काढितां । वेळ न लगे जळीं बुडतां । मत्स्याऐसा तळपतां । लाज सर्वथा असेना ॥८५॥ ओळखोनि धरितां येथ । रूप आणिकचि धरीत । हात पाय पोटीं घालून तेथ । पाठी करीत अति निबर ॥ ८६ ॥ पर्वत पडिल्या पाठीवरी । ओळखी न देसी तरी । तेथें धरितां निर्धारीं । रूपांतरीं लपतोसी ॥ ८७ ॥ धावण्या धांवतां मागेंसीं । भेणें भेणें शूकर होसी । वेगीं दांतीं भोय धरिसी । करुणा भाकिसी अनिवार ॥ ८८ ॥ तेथें ओळखितां निर्धारीं । जाभाडें पसरोनि भारी । गुरगुर करिसी खांबाभीतरीं । नर ना केसरी होऊन ठाकसी ॥ ८९ ॥ नख केश तिखट भारी । हातें धरोनि अंगावरी । उदर चिरोनि नखाग्रीं । करिसी बोहरी पाहत्याची ॥ ९० ॥ निर्धारितां निष्टंक । होसी बापुडा भिकारी रंक । दीन कुब्ज होवोनि देख । बळीपासीं भीक मागसी ॥ ९१ ॥ बळी राजा चतुर भारी । तेणें ओळखोनि निर्धारीं । धरोनि द्वारपाळ करी । अद्यापिवरी तिष्ठत ॥ ९२ ॥ तेथून लपतां लवडसवडें । माग न सांडिती मागाडे । मग आपुले मायेचें मडें । निजनिवाडें काढिसी ॥ ९३ ॥ लटकीच मोकलोनि धाये । रडसी ये माये ये माये । लोक म्हणती झालें काये । अपूर्व पाहें केवढें ॥ ९४ ॥ आतांचि पाहा पां रोकडें । किती मेळविलीं माकडें । सागरीं तारोनियां गुंडे । लंका कैवाडें घेतली ॥ ९५ ॥ करोनियां महारण । मारविला लक्ष्मण । शरणागत बिभीषण । तोही सांडून पळालासी ॥ ९६ ॥ तूं राम मी मारुती । लपणी न चले मजप्रती । ऊठ चाल शीघ्रगती । ऊर्मिलापती उठवावया ॥ ९७ ॥ घेवोनि मोहाची बुंथी । घेवोनियां दीनवृत्ती । कोण म्हणोनि मजप्रती । पुसों निश्चितीं आलासी ॥ ९८ ॥ एक उरलासे रावण । त्यासी मारितां न लगे क्षण । न येतां पुच्छीं बांधोनि नेईन । सत्य जाण श्रीरामा ॥ ९९ ॥ उठवीन लक्ष्मण । निर्दळीन रावण । अभिषेकीन बिभीषण । तरी मी दूत जाण रामाचा ॥ १०० ॥ सोडवीन सीता सुंदरी । सुर सोडवीन निजगजरीं । सुरवरांचे जयजयकारीं । अयोध्यानगरीं प्रवेशों ॥१॥ इतुकें केल्यावीण सर्वथा । तुज ढळों नेदीं मी श्रीरघुनाथा । वायां चुकवूं नको आतां । ऊठ तत्त्वतां जाऊं तेथें ॥ २ ॥ धूरलक्षण ऐसें नव्हे । जेणें स्वामित्वास बाधा पावे । ऐसें न करावें राघवें । वेगीं निघावें युद्धासी ॥ ३ ॥ तूं युद्धधर्म सांडिसी । दूषण लागे सूर्यवंशासी । आणि सकळांतें मारविसी । हत्या घेसी निजमाथां ॥४॥ पूर्वी शिष्टाईचे वेळे । झुंझों नेदिसी गोळांगुळें । एकाचेनि पापबळें । दीनें सकळें कैंवी मारूं ॥५॥ ऐशा कृपाळु रघुनाथा । न विसंबसी निजभक्तां । सकळ रणीं सांडितां । दयाळुता काय झाली ॥६॥ स्वर्गीं चिंतिती सुरवर । रावणा मारील रामचंद्र । बंध सोडवील समग्र । निरंतर वाट पाहती ॥७॥ ऋषिवाल्मीकाचें

१ पाणी. २ कातडें पांघरणारे. ३ कठिण. ४ सिंह. ५ नाश. ६ शोधक. ७ आवरण, पांघरूण, पडदा. ८ वानर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

भाष्य । अनागत अति सुरस । राम मारील रावणास । त्या बोलास साच करीं ॥ ८ ॥ प्रतिपाळावें वेदासी । संरक्षावें पुराणासी । नुलंघावें ऋषिवचनासी । प्रतिज्ञा ऐसी श्रीरामा ॥ ९ ॥ ते प्रतिज्ञा साच करीं । रावणातें जीवें मारीं । शरणागताचा कैवारी । निजभक्तां करीं उल्लास ॥ ११० ॥ अशोकवनिकेमाझारी । अडकली सीता सुंदरी । तिसी सोडवूनि झडकरी । अभिषेक करीं बिभीषणा ॥ ११ ॥ तुझी आण रघुनाथा । पाऊलही न घालवे सर्वथा । तुजवीण आम्ही सकळ वृथा । असारता भूमिभार ॥ १२ ॥ किती पाहसी निर्वाण । कासयासाठीं धरिसी मौन । तुजवीण न करीं गमन । येथेंचि प्राण आतां सांडीन ॥ १३ ॥ नमन तुझिया पायांसी । लोटांगण चरणांसी । बहुत झालों कासाविसी । रणीं युद्धासी न वचतां ॥ १४ ॥ अश्रु आले दोहीं डोळां । गात्रें कांपती चळचळां । सर्वांगीं स्वेदकल्लोळ चालिला । कपि विकळ जाऊं पाहे ॥ १५ ॥ देखतां कपीचें चिन्ह । श्रीरामीं प्रेम गहन । भरत झाला मूर्च्छापन्न । देहभावासी जाण विसरला ॥ १६ ॥ नाठवे देहगेहवृत्ती । नाठवे वर्णाश्रमजाती । नाठवे स्वजनसंतती । जडली वृत्ती श्रीरामीं ॥ १७ ॥ नाठवे क्रियाकर्म । नाठवे धर्माधर्म । नाठवे रूपनाम । भरत सप्रेम पडियेला ॥ १८ ॥ येरीकडे कपिनंदन । झाला अति विस्मयापन्न । श्रीराम न होवोनियां कोण । मज संपूर्ण लक्षेना ॥ १९ ॥ दिसे श्रीरामसादृश्य देहीं । एक अंश उणा नाहीं । रूपलावण्यगुण कांहीं । उणें नाहीं श्रीरामा ॥ २० ॥ ठाणमाण नेटका । मेघश्याम तनु देखा । कांसे पीतांबर सुरेखा । स्वरूप देखा साजिरें ॥ २१ ॥ कपि विचारी मनांत । तंव भरत झाला सावचित्त । घालोनि लोटांगण त्वरित । कपिनाथ विनविला ॥ २२ ॥ तूं रामाचा निजभक्त । सखा जिवलग हनुमंत । रामाज्ञेसी नित्यांकित[२] । राम सेवीत सर्वदा ॥ २३ ॥ मी श्रीरामाचा धाकटा बंधु । भजनहीन महामंदु । नायकें श्रीरामकथागंधु । अभाग्यसिंधु मी एक ॥ २४ ॥ नायकें श्रीरामाचें नाम । नाठवे श्रीरामाचें कर्म । न देखें श्रीरामाचें प्रेम । भजनाधम[३] मी एक ॥ २५ ॥ तूं सभाग्य कपिनंदना । सबाह्य वेंचिलें श्रीरामभजना । रामेंवीण नेणसी आना । प्रेमा गहन श्रीरामीं ॥ २६ ॥ सर्वेंद्रियांच्या ठायीं । राम कोंदला तुझे देहीं । रामावांचून नेणसी कांहीं । म्हणोनि पाहीं विनवीत ॥ २७ ॥ आजी चौदा वर्षांपाठीं । कपि तुझ्या वाक्पुटीं । ऐकिली श्रीरामाची गोष्टी । तेणें पोटीं अवस्था[४] ॥ २८ ॥ ऐकावया श्रीरामकथा । अंतरीं अनिवार अवस्था । भक्तोत्तमा कपिनाथा । उदासता नसावी ॥ २९ ॥ अहर्निशीं[५] हेंचि चिंतीत । जो कोणी सांगेल रामचरित । आजी तूं भेटलासी येथ । तरी साद्यंत मज सांग ॥ १३० ॥ उल्लंघोनि जासी येथ । तरी मज होईल प्राणान्त । तुज कोपेल रघुनाथ । उपेक्षिला भरत काय म्हणोनी ॥ ३१ ॥ तिकडे स्वामी क्षोभेल । इकडे माझा प्राण जाईल । उभय संकटीं शिणशील । विश्वंही[६] बोल तुज लावील ॥ ३२ ॥ सद्दढ मनीं विवंचून । मज द्यावें समाधान । ऐकोनियां कपिनंदन । लोटांगण घालीत ॥ ३३ ॥ मज सांगतां वृत्तान्त । विलंब लागों पाहे येथ । उदया येतांचि भास्वत[७] । होईल घात सौमित्रा ॥ ३४ ॥ ब्रह्मशक्ति महादारुण । वरी पडतां रविकिरण । सौमित्राचा जाईल प्राण । म्हणोन त्वरेनें जातसें ॥ ३५ ॥ जरी प्रीती सौमित्रासीं । श्रीरामातें पाहूं इच्छिसी । तरी गोवूं नको मजसी । ओषधींसी नेऊं दे ॥ ३६ ॥ तुज माझें लोटांगण । शीघ्र द्यावें आज्ञापन । विलंबीं होईल महाविघ्न । प्राण लक्ष्मण सोडील ॥ ३७ ॥ ऐकतां कपीची मात । भरत क्रोधें कृतान्त । उदया येतां भास्वत । करीन घात तयाचा ॥ ३८ ॥ वाहतों श्रीरामाची आण[८] । वृत्तान्त न सांगतां संपूर्ण । तत्काळ माझा जाईल प्राण । अर्ध क्षण न लागतां ॥ ३९ ॥ एका वांचवूं जातोसी । दुजियातें जीवें मारिसी । इतुकेनि सुख नव्हे श्रीरामासी । कपि जाणसी तें करीं ॥ १४० ॥ माझा प्राण जाईल येथ । शत्रुघ्न तत्काळ करील घात । तिघी माता त्वरित । प्राणघात करतील ॥ ४१ ॥ ऐकोनियां युद्धकथा । आकान्त होईल गा समस्तां । साद्यंत वृत्तान्त न सांगतां । करिशील घाता सर्वांच्या ॥ ४२ ॥ मग येथील चरित्र । श्रीरामासी सांग सविस्तर । मारोनि

१ पुढील. २ नित्य तत्पर. ३ भजन न करणारा. ४ उत्कंठा. ५ सर्वदा. ६ सारें जग. ७ सूर्य. ८ शपथ.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

माता सहोदर। येथें सत्वर मी आलों ॥ ४३ ॥ ऐकोनियां भरतवचन। हनुमान अत्यंत विस्मयापन्न। यासी न देतां समाधान। गमन आपण करूं नये ॥ ४४ ॥ उल्लंघितां भरतासी। राम क्षोभेल मानसीं। जगीं होईन अपेशी। सज्जनासी उल्लंघितां ॥ ४५ ॥ ओषधी मंदतेज होती। वेगें क्षोभेल रघुपती। हे चुकवावी अपकीर्ती। भरत चित्तीं सुखावूं ॥ ४६ ॥ उदया येतां गभस्ती। त्यासी मारीन निश्चितीं। रवि माझी जाणे शक्ती। बाळपणीं ख्याती केली जे ॥ ४७ ॥ आतां तरी झालों टणक। श्रीरामभजनीं अवंचक। रवि बापुडें कोण मशक। उदया देख यावया ॥ ४८ ॥ ऐसें विचारोनि मानसीं। छळणें पुसे भरतासी। उदया येतां रवीसी। अनर्थासी कारण ॥ ४९ ॥ ऐकोनि कपीचें उत्तर। पोळलें भरताचें अंतर। बोलों आदरिलें खडतर। कपि उत्तर ऐकत ॥ १५० ॥ न साधतां रामकार्यासी। उदय पावतां रवीसी। समूळ छेदीन मी त्यासी। बाणाग्रेंसीं क्षणार्धें ॥ ५१ ॥ तुज उशीर होईल जरी। तरी सपर्वत बाणाग्रीं। बैसवोनियां रामशरीं। क्षणमाझारीं पाववीन ॥ ५२ ॥ एका जनार्दना शरण। हनुमान देईल समाधान। अति गोड निरूपण। सावधान परिसावें ॥ ५३ ॥ चतुर एका जनार्दन। करितां निजगुणानुकथन। शब्दासी उपरति होऊन। निजरूपीं लीन तो झाला ॥ ५४ ॥ स्वयें निजरूपीं लीन झाला। तरी न राहे उगला। निजकथा गावया वहिला। राहून ठेला साक्षित्वें ॥ ५५ ॥ कदाचित चुकवूनि जायें। म्हणऊन आड उभा राहे। सरसाचि लागला आहे। परता नव्हे अणुमात्र ॥ ५६ ॥ तरी भरंवसा नाहीं पोटीं। म्हणऊन श्रीरामासीं मज गांठी। घालोनि ठेला अवचटीं। अति संकटीं सांडीना ॥ ५७ ॥ लागलासे जेथ जेथ। कांहींही न चले मत। शोधूनि अहंबुद्धि चित्त। क्षीणवृत्त मज केलें ॥ ५८ ॥ सबाह्य माझा करोनि गोळा। एकाएकीं पालटोनि ठेला। उपाय सर्वथा तुटला। पडल्या पडल्या गाववी ॥ ५९ ॥ झणें मी मौनी राहें। म्हणोनि वाचेसी स्वयें होये। निजकीर्ति स्वयें गाये। करूं काय मी आतां ॥ १६० ॥ कांहीं न चले सर्वथा। चौखरिलोंचि तत्त्वतां। शरण आलों साधुसंतां। विचार आतां मज सांगा ॥ ६१ ॥ नेणें प्रेमाचे बोल। प्रमेय उथळ कीं सखोल। नेणें योजूनि बोलें बोल। वक्ता केवळ श्रीराम ॥ ६२ ॥ नेणें पदबंधव्युत्पत्ती। रीघ नाहीं संस्कृतीं। लेखणी देवोनि हातीं। राम निजकीर्ती लिहवितो ॥ ६३ ॥ यालागीं जी स्वामिनाथा। मज बोल नाहीं सर्वथा। वरद हस्त माझे माथां। ठेवून आतां क्षमा कीजे ॥ ६४ ॥ तंव कृपाळु साधुजन। उभय हस्तें आलिंगून। स्वयें बोलते झाले वचन। अमृताहून सुखकारी ॥ ६५ ॥ तूं कां भाकितोसी करुणा। कासयासी होतोसि दीन। वक्ता एक जनार्दन। तेथें तूं कोण परिहारा ॥ ६६ ॥ तुझेनि मुखें हे कथा। आवडली श्रीरघुनाथा। वाचे वचन आणि वक्ता। स्वयें तत्त्वतां होवोनि ठेला ॥ ६७ ॥ फुंक भरोनि मसकेसी। आवडे स्वामीचिया मानसीं। ध्वनि वाजवी जैसी तैसी। संबंध मसकेसी असेना ॥ ६८ ॥ ऐसें निजकृपा साधुवचन। निवविला एका जनार्दन। उल्लास पावोन चौगुण। लोटांगणें विनवीत ॥ ६९ ॥ पुढील कथानुसंधान। भरतरामकथाश्रवण। करोनि कपीचें पूजन। बाणीं बैसवून बोळवील ॥ १७० ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां भरतहनूमद्दर्शनं नाम सप्तचत्वारिंशोऽध्यायः ॥ ४७ ॥ ओंव्या ॥ १७० ॥ श्लोक ॥ १ ॥

अध्याय अठ्ठेचाळिसावा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ देखोनि भरतप्रेमासी। नमन करोनि वेगेंसीं। सांगावया रामकथेसी। प्रेम कपीसी अनिवार ॥ १ ॥ आम्हां निश्चयमनें। स्वयें राम अनुभवणें। जगीं रामरूप देखणें। भरतोल्लंघन केंवी घडे ॥ २ ॥ बंधु धाकटा रामाचा। तोही आम्हां राम साचा। केंवी उल्लंघूं याची वाचा। लावीन कथेचा अन्वय ॥ ३ ॥ भरता ऐकें सावधान। चित्रकूटीं रघुनंदन। देवोनि तुम्हांसी समाधान। पुढारें गमन मांडिलें ॥ ४ ॥ घेवोनि अगस्तीची भेटी। सांगोनियां गुह्य गोष्टी। शरभंगऋषि जगजेठी।

१ निष्कपट. २ दुःख पावलें. ३ चौंहोंकडे बांधिला गेलों. ४ चामड्याच्या पिशवीस. ५ संबंध, वृत्तांत.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

उठाउठीं उद्धरिला ॥ ५ ॥ विराध येवोनि आडवा । सीता उचलोनि निघे तेधवां । रामें करोनि बाणलावा । महाबाहो मारिला ॥ ६ ॥ जटायूसीं सख्य पडिलें । येवोनि पंचवटीसी राहिले । आश्रम मनोरम रचिले । राखण ठेविलें जटायूसी ॥ ७ ॥ करितां वनविहारासी । सौमित्रें मारिलें शंबरासी । शूर्पणखा माता होय त्यासी । लक्ष्मणासी छळूं आली ॥ ८ ॥ सौमित्रें केलें विंदान । सवेग छेदिले नाक कान । खरदूषणां गेली शरण । रामलक्ष्मण मारावया ॥ ९ ॥ चौदा सहस्र रक्षोगणं[१] । त्रिशिरा आणि खर दूषण । श्रीराम लक्षोनि आपण । दारुण रण करूं आले ॥ १० ॥ एकलेनि रामें आपण । मारिले न लागतां क्षण । मुक्त करोनि जनस्थान । द्विजां दान दिधलें ॥ ११ ॥ ऐकोनियां ते मात । तळमळी लंकानाथ । सीताहरणासी उद्यत[२] । छळणार्थ करूं आला ॥ १२ ॥ मृगवेष दिधला मारीचासी । देखतां सीता उल्लासी । त्वचा मागे कांचोळीसी । श्रीराम त्यासी मारूं गेला ॥ १३ ॥ मायेचा मृग निघे बाहेरी । राम करोनि नेला दूरी । जटायु चरूं गेला वनांतरीं । सीता सुंदरी एकली ॥ १४ ॥ रक्षण ठेविला लक्ष्मण । ऐकोनि मायामृगवचन । त्याचें करोनियां छळण । दिला दवडोन सीतेनें ॥ १५ ॥ रावण येवोनि कपटेंकरीं । हरिली जानकी सुंदरी । जटायु धांवला झडकरी । त्यासी मारी रावण ॥ १६ ॥ राम आला धांवोन । तंव जटायूसी होतां प्राणोत्क्रमण । करोनि त्याचें उद्धरण । पुढें आपण चालिला ॥ १७ ॥ हातापायांवीण मोधळा[३] । कवंध गिळावया आला । रामें निजबाणें छेदिला । पाठविला वैकुंठा ॥ १८ ॥ पंपातीरीं महावीर । आम्ही भेटलों वानर । स्वामी मीनला[४] रामचंद्र । भाग्य थोर आमुचें ॥ १९ ॥ वालिसुग्रीवां वैर भारी । दारराज्य[५] हिरोनि झडकरी । आम्हां घालोनि बाहेरी । राज्य करी किष्किंधे ॥ २० ॥ शरण आलों रामासी । रामें कुंढाविलें[६] आम्हांसी । मारोनियां वाळीसी । सुग्रीवासी स्थापिलें ॥ २१ ॥ वालिसुत युवराजा । करोनि सीताशुद्धीचिये काजा । झडकरी पाठविला वोजा । सांगातें मज दिधलें ॥ २२ ॥ सीताशुद्धी आणिली तिहीं । मग निघाले लवलाहीं । कपिसैन्य चालवीत पाहीं । दोहीं बाहीं रघुराजा ॥ २३ ॥ बिभीषण शिकवी रावणासी । न मानी तो त्याच्या वचनासी । लाता हाणितल्या त्यासी । तो आला रामापासीं पैं शरण ॥ २४ ॥ वानरसैन्य अपरिमित । हातीं पर्वत झेलीत । सागरीं घालिती त्वरित । हेळाँचि सेतू बांधिला ॥ २५ ॥ करोनियां लंकालाग । वानर प्रवेशले दुर्ग । आगी लावोनि वस्तु सवेग । अनेकानेक जाळिल्या ॥ २६ ॥ राक्षससैन्य बहुसाल मरतां । कृपा उपजली भगवंता । एकाचिया अपराधता । लोकां समस्तां कैंवी मारूं ॥ २७ ॥ श्रीराम दीनदयाळ । श्रीराम स्वयें स्नेहाळ । श्रीराम कृपाकल्लोळ । प्रणतपाळ श्रीराम ॥ २८ ॥ राम कृपेचा कोंवळा । राम जीवींचा जिव्हाळा । राम कृपाळु कळवळा । लोकां सकळां देखोनी ॥ २९ ॥ रामें जगाची उत्पत्ती । रामें जगाची स्थितिगती । रामें जगाची विश्रांती । सच्चिन्मूर्ति श्रीराम ॥ ३० ॥ निरपराधें कैंवी मारूं । म्हणोनि मांडिला शिष्टाचारू । पाठविला अंगदवीरू । अति चतुर बोलका ॥ ३१ ॥ तेणें शिकविला बहुत रीतीं । तें न मानेचि लंकापती । मग मांडिली युद्धख्याती । केली शांती राक्षसां ॥ ३२ ॥ युद्ध झालें घोरांदर । मंत्री प्रहस्तादि महोदर । इंद्रजितादि महावीर । कुमरें कुमर मारिले ॥ ३३ ॥ महाबाहु कुंभकर्ण । उभा चिरिला विंधोनि बाण । आधीं नाक कान कापून । शिरःकमळ जाण छेदिलें ॥ ३४ ॥ बंधुपुत्रांचें दुःख भारी । दहाही मुखीं शंख करी । रावणा दुर्दशा थोरी । सुरासुरीं धाक त्याचा ॥ ३५ ॥ दुःखें आरंबळला बहुत । आतुर्बळी हा रघुनाथ । माझें कांहीं न चले मत । दांत खात करकरां ॥ ३६ ॥ अदट वीर कुंभकर्ण । रामें मारिला विंधोन बाण । इंद्रजित महावीर दारुण । सौमित्रें जाण निवटिला ॥ ३७ ॥ प्रधान मारिले आघवे । सैन्य सेनानी गेले जीवें । एकलें म्यां काय करावें । रणीं नागवें रघुनाथ ॥ ३८ ॥ दांत करकरां खात । डोळे

१ राक्षससमूह. २ तयार होऊन. ३ गोळा. ४ प्राप्त झाला. ५ स्त्री आणि राज्य. ६ आश्रय दिला. ७ लीलेनें, सहज. ८ शरणागतरक्षक. ९ आक्रोशला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

गरगरां भवंडीत । रागें दोनी हात चुरीत । शक्ति अद्भुत उचलिली ॥ ३९ ॥ शरणागत मारूं आपण । त्याकारणें सांडितील हे प्राण । लक्षूनियां बिभीषण । शक्ति जाण हाणितली ॥ ४० ॥ वेगीं लक्ष्मण धांविन्नला । पाठीसीं शरणागत घातला । शतधा शक्ति छेदून ठेला । गाढा दादुला सौमित्र ॥ ४१ ॥ मंत्रीं खिळिल्या अति निगुतीं । परततां न ये मागुती । ऐसें विचारोनि चित्तीं । आली काकुळती सौमित्रा ॥ ४२ ॥ मज खिळिलें अभिमंत्रून । क्षीण माझी आंगवण । मागें सरतां रावण । दंड संपूर्ण मज करील ॥ ४३ ॥ म्हणऊन तुज मी आलें शरण । तूं शरणागतशरण्यं । नुपेक्षावें मजलागून । कन्या पूर्ण मी तुझी ॥ ४४ ॥ कन्या होवोनि शरण झाली । तेणें अत्यंत कृपा आली । सौमित्र शरणागता माउली । अंगीकारिली ब्रह्मशक्ती ॥ ४५ ॥ कन्या झाली उपहत । जनक तिसी अंगीकारित । सौमित्र अत्यंत कृपाभरित । थारा देत निजहृदयीं ॥ ४६ ॥ जरी उपेक्षूं इयेसी । तरी जगीं होईन उपहासी । ब्रह्मवरद ये शक्तीसी । ब्राह्मण आम्हांसी निजपूज्य ॥ ४७ ॥ द्विजवचन उपेक्षितां । पूर्ण अपजयो बैसेल माथां । वधिलें जरी शरणागता । तरी अनर्थामाझारीं पडिजे ॥ ४८ ॥ जीवें जातां शरणागत । प्राण सांडील रघुनाथ । सुग्रीवादि कपि समस्त । प्राण निश्चित सांडितील ॥ ४९ ॥ मग माझें जिणें काय । वृथा भूमीसी भार होय । चुकवावया सकल अपाय । जीवें पाहें विनटला ॥ ५० ॥ संरक्षितां शरणागत । सुख वानरां समस्त । सुखावेल श्रीरघुनाथ । सुर समस्त सुखी होती ॥ ५१ ॥ राम वधील रावणा । अभिषेकील बिभीषणा । सिद्धी पावेल पूर्णपणा । वरदवचन रामाचें ॥ ५२ ॥ एकल्या माझ्या जीवासाठीं । उल्लासती ब्रह्मांडकोटी । राम विजयी सकळ सृष्टीं । मजसाठीं होईल ॥ ५३ ॥ ऐसें विचारोनि चित्तीं । पसरिली अंगाची वाखैती । हृदयीं झेलिली ब्रह्मशक्ती । केली ख्याती सौमित्रें ॥ ५४ ॥ शक्तीनें भेदितां लक्ष्मण । गर्जे सिंहनादें रावण । त्यावरी चालिला रघुनंदन । धनुष्यबाण सज्जूनी ॥ ५५ ॥ सोडूनियां निर्वाण बाण । तत्काळ मारावा रावण । येरें साधिलें विंदाण । पाठी देऊन पळाला ॥ ५६ ॥ पळाल्यावरी रामरावो । सर्वथा न करी घावो । ऐसा जाणोनि दृढ भावो । रावण पाठी देवोनि पळाला ॥ ५७ ॥ पळवोनियां रावण । विजयी झाला रघुनंदन । पाहूं आला लक्ष्मण । तंव मूर्च्छापन्न देखिला ॥ ५८ ॥ कुरवाळोनि अमृतहस्तीं । केली निर्वीर्य ते शक्ती । विशल्य न करीच रघुपती । ब्रह्मवचनापुरती राखिली ॥ ५९ ॥ ब्राह्मणाचा अतिक्रम । सर्वथा न करी रघूत्तम । आदरिला लौकिक धर्म । बंधूत्तम उठवावया ॥ ६० ॥ बोलावोनि सुषेण वैद्यराज । पुसता झाला रघुराज । वेगीं उपाव सांग मज । बंधुराज उठवावया ॥ ६१ ॥ सुषेण म्हणे सुबुद्धी । आणवाव्या दिव्यौषधी । शक्ति भेदली हृदयसंधीं । ते त्रिशुद्धी विरवावया ॥ ६२ ॥ सूर्योदय न होतां पहाहो । आणावा ओषधिसमुदावो । म्हणोनि मज धाडी रामरावो । महाबाहो परियेसीं ॥ ६३ ॥ मी आलों वेगवत्तर । नोळखें ओषधिभार । तेथें लागों पाहे उशीर । मग डोंगर उपडिला ॥ ६४ ॥ मार्गीं जातां त्वरान्वितें । तंव बाण रामनामांकित । देखोनि आलों येथ । तंव अद्भुत देखिलें ॥ ६५ ॥ रामरूपें भ्रमलें चित्त । बोल बोलिलों बहुत । ते क्षमा करो रघुनाथ । मर्कट उद्धत अविवेकी ॥ ६६ ॥ देखोनि तुझा आश्रम । अत्यंत झाला विश्राम । मनें विसरलों गमनधर्म । सर्वांही सम रामसुख ॥ ६७ ॥ पक्षी सिद्धान्त बोलत । तेणें लाजिला वेदान्त । सरस्वतीचित्त भ्रमित । बृहस्पति तेथ वेडावला ॥ ६८ ॥ सांडून सकळ मत्सर । भरताश्रमीं निरंतर । भूतें वर्तती एकत्र । निर्मत्सर रामनामें ॥ ६९ ॥ वर्णितां श्रीरामाचे गुण । कपीस नाठवे कपिपण । हनुमान झाला मूर्च्छापन्न । देहाचें भान विसरला ॥ ७० ॥ देखोनि कपीची अवस्था । भरत ओसंडला चित्ता । श्रीरामगुणकीर्ति ऐकतां । विस्मित चित्ता होऊनि ॥ ७१ ॥ मन बुद्धी चित्तवृत्ती । अहंकाराची अहंकृती । रामीं मिळाली निश्चितीं । बाह्य स्फूर्ती विसरला ॥ ७२ ॥ अंग झालें रोमांचित । वाचा झाली

१ शरण आलेल्यांना आश्रयस्थान असा. २ महासंकटांत पडलेली. ३ छातीचा खळगा. ४ त्वरेनें. ५ देवांचा गुरु. ६ गहिंवरला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

प्रेमसद्गदित । नेत्रीं आनंदाश्रु स्रवत । भरत मूर्च्छित पडियेला ॥ ७३ ॥ श्रवणीं ऐकतां श्रीरामचंद्रा । भरता लागली योगमुद्रा । विसरला तो निद्रा तंद्रा । कृपा रघुवीराची ऐसी ॥ ७४ ॥ नाठवे गेहदेहभान । रामरूपीं जडला पूर्ण । खुंटला बोल तुटलें मौन । भरतपण विसरला ॥ ७५ ॥ भरत विसरला भरतपण । हनुमान विसरला हनुमत्पण । दोघांस नाठवे दोनीपण । तटस्थ पूर्ण श्रीरामें ॥ ७६ ॥ दोघे विसरले दोनीपण । कार्या आठव करी कोण । बाप कृपालु रघुनंदन । चैतन्य पूर्ण चेतविलें ॥ ७७ ॥ जीवनकळा सावध केली । प्राणशक्ति परिचारिली । इंद्रियां पाटवतां झाली । झांपडी उघडली नेत्रांची ॥ ७८ ॥ चित्त चेतनेतें धरीत । मन पूर्वसंकल्प आठवीत । बुद्धि निश्चयातें अंगिकारीत । रामकार्यार्थ साधावया ॥ ७९ ॥ अकस्मात सावध होये । म्हणे मज झालें काये । उगाचि येथ तटस्थ आहें । आठव नोहे स्वामिकाजा ॥ ८० ॥ करूं पाहे उड्डाण । भरतें घातलें लोटांगण । मज सनाथ न करितां पूर्ण । कैंवी प्रयाण करूं पाहसी ॥ ८१ ॥ भोजन करावें येथें । तीर्थप्रसाद द्यावा मातें । उपेक्षूं नये आर्तातें । तुम्ही निजचित्तें कृपालु ॥ ८२ ॥ घरा आलिया श्रीरामभक्त । पूजा न करितां जाऊं देत । त्याच्या सकळ कर्मांचा घात । अधःपात तो भोगी ॥ ८३ ॥ ऐसी निजधर्मविवंचना । तूं जाणतोसी कपिनंदना । सर्वथा उदास न करीं मना । म्हणोनि चरणां लागलों ॥ ८४ ॥ येरें वारिला त्वरित । जैसा राम तैसा भरत । वेळोवेळां पायां लागत । हें अनुचित सर्वथा ॥ ८५ ॥ ऐकोनि कपीचें वचन । भरत झाला हास्यवदन । तुज सफळ धर्माचें निजज्ञान । मज चाळवण कां करिसी ॥ ८६ ॥

ब्राह्मणं कुलसम्पन्नं भक्तं विष्णोर्महात्मनः ।
आयांतं वीक्ष्य नोत्तिष्ठेत्स दुःखैः परिभूयते ॥ १ ॥

सर्वांसी अग्रजन्मा ब्राह्मण । कुळशीळसगुणगुण । वेदशास्त्रसंपन्न । आलिया आपण पूजावा ॥ ८७ ॥ भलतैसा हो कां भक्त । श्रीरामभजनीं रत । भगवद्बुद्धीनें पूजा करीत । तोचि संत सर्वज्ञ ॥ ८८ ॥ ज्ञानी आत्मा विश्वाचा । भगवंतचि स्वयें साचा । त्यासी पूजी तो दैवाचा । परमार्थाचा असेल भागी ॥ ८९ ॥ त्याचें करील जो उपेक्षण । तो महादुःखें दारुण । भोगी आकल्पान्त पूर्ण । ऊर्ध्वगमन असेना ॥ ९० ॥ तूं तंव भजनभक्तीचें । केवळ हृदय श्रीरामाचें । सबाह्य अभ्यंतर साचें । निश्चयाचें रामभजन ॥ ९१ ॥ ज्ञान तरी अत्यद्भुत । जग ब्रह्मरूप देखत । ब्रह्मानंदें सदा डुलत । ब्रह्मभूत कपिनाथ ॥ ९२ ॥ ऐसियासी देखोन । जो न करी पूजन नमन । तो महापापी पूर्ण । रामदर्शन त्यास कैंचें ॥ ९३ ॥ राम साधूचिये दृष्टीं । राम साधूचिये गांठीं । राम साधूचिये पोटीं । सज्जनभेटीं राम भेटे ॥ ९४ ॥ राम साधूचिये वृत्तीं । राम साधूचिये स्थितीं । राम साधूचिये भक्तीं । श्रीरामप्राप्ती सत्संगें ॥ ९५ ॥ राम सत्संगा आतुडला । राम सत्संगा विकला । राम सत्संगा लाधला । राम राहिला सत्संगें ॥ ९६ ॥ भक्तां सबाह्य श्रीरामरावो । कपि स्वयें भक्तरावो । भाग्यें भेटला महारावो । सभाग्य पहा हो केवढा मी ॥ ९७ ॥ ऐकोनि भरताचें उत्तर । हनुमान झाला चिंतातुर । भरता नमूनि सत्वर । काय कपींद्र बोलिला ॥ ९८ ॥ श्रीरामानुजा तुझें वचन । सर्वथा नुल्लंघवे पूर्ण । संकोचित अंतःकरण । तें सावधान अवधारीं ॥ ९९ ॥ सौमित्र पडिला विसंज्ञ । नाहीं घेतलें जीवन । येथें मी करितां भोजन । तेंचि दूषण रामभजनीं ॥ १०० ॥ श्रीराम बैसला सचिंत । वानरभार शोकाकुलित । बिभीषण दुःखें तळमळत । मजचि येथ आहार कैंवी ॥ १ ॥ स्वामी भरता विनंती ऐक । मज द्यावें चरणोदक । संभावनीं सकळिक । तेणें देख पावली ॥ २ ॥ तुझें चरणतीर्थ घेतां । विजयी होईन सर्वथा । सौमित्रा उठवीन तत्त्वतां । लंकानाथा जीवघात ॥ ३ ॥ उभवोनि रामराज्याची गुढी । तुटेल देवांची बांदवडी । सीता सोडवीन तांतडीं । येथें रोकडी आणीन ॥ ४ ॥ म्हणोनि चरणीं ठेविला माथा । तंव भरत म्हणे मागुता । कांहीं विनवीन कपिनाथा ।

१ सुस्ती. २ अभिव्यक्त केली. ३ पटुत्व. ४ फसवणें. ५ जन्मानें श्रेष्ठ. ६ प्राप्त झाला. ७ मूर्च्छित. ८ पाणी. ९ शोकानें व्यापलेला. १० सत्कार.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

तें तत्त्वतां ऐकावें ॥ ५ ॥ श्रीरामदर्शना चित्त । बहुत झालें उत्कंठित । आज्ञेस्तव आलों येथ । कांहीं मत चालेना ॥ ६ ॥ बाण तुज सवें देईन । त्यावरी करीं आरोहण । माझेवरचें लोटांगण । श्रीरामा आपण करावें ॥ ७ ॥ इतुकेनि कृतकृत्य । झालों तुझेनि सनाथ । तूं कृपाळु श्रीरामभक्त । मनोगत रक्षावें ॥ ८ ॥ श्रीरामनाम स्मरतां । तुज श्रम नाहीं सर्वथा । जाणोनि माझ्या मनोगता । वचनार्था संपादीं ॥ ९ ॥ ऐकोनि भरतवचन । हनुमंत विस्मयापन्न । कोण उल्लंघी तुझें वचन । म्हणोनि चरण वंदिले ॥ ११० ॥ वाचेसी पडिलें महामौन । राहिला दोन्ही कर जोडून । येरें चापीं सज्जोनियां गुण । सीतीं बाण लाविला ॥ ११ ॥

श्रुत्वेति तस्य वचनं भरतः शराग्रे
सादिं कपिं समधिरोप्य गुणेन योज्य ।
मोघं धनुर्झटिति कुंडलितं चकार
तुष्टाव तं परमविस्मयमागतस्य ॥ २ ॥

भरतप्रेम अद्भुत । प्रेमें बांधला कपिनाथ । सर्वथा कांहीं न चले मात । बैसे पर्वतसह बाणाग्रीं ॥ १२ ॥ करोनि प्रदक्षिणा नमन । घेतलें चरणतीर्थ मागोन । बाणीं करितां आरोहण । येरें संधान योजिलें ॥ १३ ॥ वोढी काढोनि कानाडी । वरी बैसविला परवडी । गुणीं जोडून झडाडी । बाण प्रौढीं सोडिला ॥ १४ ॥ करोनियां रामस्मरण । भरतें सोडिला निजबाण । कपि करोनियां रामस्मरण । गगनीं सबाण उसळला ॥ १५ ॥ हनुमान जातां गगनांत । गगन अवघें लखलखित । दिव्य तेज अद्भुत । तेजें भास्वत आच्छादे ॥ १६ ॥ दिव्य दुंदुभि सुरवरीं । स्वर्गी त्राहाटिल्या भेरी । पुष्पवृष्टी सुरवरीं । केली शिरीं कपीच्या ॥ १७ ॥ गंधर्वांचें गायन । सिद्धांचें जयजयकारें गर्जन । देवांगनांचें नर्तन । कपीचें गर्जन निजगजरें ॥ १८ ॥ विजयी झाला कपींद्र । आतां उठवील सौमित्र । निवटून राक्षसभार । दशशिर मारील ॥ १९ ॥ सुटेल देवांची बांधवडी । नृत्य करिती तांतडी । स्वर्गी उभविली गुढी । जयजयकारें गर्जताती ॥ १२० ॥ स्वर्गी हर्षित सुरगण । वेगीं जातसे वायुनंदन । आकाशमार्गें शोभायमान । क्षणें गमन दिगंता ॥ २१ ॥

येरीकडे रघुनंदन । झाला अत्यंत उद्विग्न । सावध परी असावधपण । मार्गनिरीक्षण मांडिलें ॥ २२ ॥ कां पां न येचि कपिनंदन । कां लागलें विलंबन । न कळे कांहीं झालें विघ्न । राक्षसीं छळून मारिला ॥ २३ ॥ कीं सगळा पर्वतचि चुकला । आणखी पर्वतांतरासी गेला । कीं जातां मार्गचि भुलला । वेडावला कपींद्र ॥ २४ ॥ कीं नीट तेथेंचि गेला । पर्वतही ठाकिला । ओषधी नोळखेचि वहिला । कीं डोळा लागला पर्वतीं ॥ २५ ॥ राक्षस कोणी मीनले तेथ । तिंहीं माया केली बहुत । गोंवून पाडिला आहे हनुमंत । कपिनाथ विटंबिला ॥ २६ ॥ तो नभीं राक्षसांसी । नाकळे सर्वथा मायेसी । जिंतून माया राक्षसी । निजकार्यासी लाधेल ॥ २७ ॥ ओषधीतें राखत । गंधर्व असती तेथ । तिंहीं देखिला कपिनाथ । ओषधी घेत पर्वतीं ॥ २८ ॥ तिंहीं कळी मांडिली तेथें । घेवों न देती ओषधींतें । बळें मिसळोनि युद्धातें । तिंहीं कपीतें गोविलें ॥ २९ ॥ हेंही न घडे कपीसीं । क्षणें मारील गंधर्वांसी । जगतीतळीं हनुमंतासीं । रणीं युद्धासी न भिडवे ॥ १३० ॥ चौदा सहस्र वनकर । ऐशीं सहस्र किंकर । मारिला अखयाकुमर । अर्दट वीर हनुमंत ॥ ३१ ॥ अमित राक्षसांच्या पंक्ती । क्षणें मारिल्या मारुतीं । तेथें गंधर्व बापुडे किती । क्षणें कपिपति निपटील ॥ ३२ ॥ न कळे काय पडली गुंती । लोटोनि गेली मध्यराती । हनुमान न येचि शीघ्रगतीं । ऐसा रघुपति सचिंत ॥ ३३ ॥ प्राणें वेंचल्या लक्ष्मण । ओषधीचें काय कारण । अश्रुपूर्ण झाले नयन । लक्ष्मण केंवी वांचेल ॥ ३४ ॥

हा वीरसुमहाबाहो प्रतिवाक्यं प्रयच्छ मे ।
न त्वमर्हसि सौमित्रे त्यक्तुं दुःखार्दितं हि माम् ॥ ३ ॥

अहा लक्ष्मणा काय केलें । रणीं युद्धातें सांडिलें । शक्तिभेदें शयन केलें । मज मोकलिलें संग्रामा ॥ ३५ ॥

त्वदीयाग्निसमुत्थेन शोकेनाहं विदाहितः ।
करोम्यराक्षसामुर्वीं त्रैलोक्यं दहाम्यहम् ॥ ४ ॥

करोनि अद्भुत पुरुषार्थ । वांचविला शरणागत । शक्ति केली प्रतिहत । शरणागत तुज आली ॥ ३६ ॥ शरणागता शरण । साच एक

१ दोरी. २ कानापर्यंत. ३ कौशल्यानें. ४ सूर्य. ५ थाट, पाहणें. ६ पोंचला. ७ त्वरोत्वर. ८ अलोट, दांडगा. ९ अडचण.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

लक्ष्मण । ब्रीद दाविलें साच करून । शक्ति झेलून निजहृदयीं ॥ ३७ ॥ बिभीषण घातला पाठीसीं । शक्ति धरिली पोटेंसीं । सौमित्रें ख्याति केली ऐसी । शरणागतासी शरण्यं ॥ ३८ ॥ येरयेरांच्या घाता वहिलीं । येरयेरें प्रवर्तलीं । येरयेरांच्या भयें भ्यालीं । दोनी आलीं तुज शरण ॥ ३९ ॥ बिभीषण पहिलें शरणार्थी । पाठीसीं घातला निश्चितीं । सवेंचि शरण आली शक्ती । ते ठेविली त्वरित हृदयेंसीं ॥ १४० ॥ प्राण जाईल सर्वथा । परी नुपेक्षावें शरणागता । सौमित्रें साच केलें आतां । प्राणान्त-व्यथा साहोनि ॥ ४१ ॥ बैसोनि लक्ष्मणाजवळी । हात पिटीत वक्षःस्थळीं । सौमित्रें मांडिली रांडोळी । मजसीं कां बोली बोलेना ॥ ४२ ॥ ये रे ये रे लक्ष्मणा । साद दे कां बंधुरत्ना । मज सांडिलें माजी रणा । निष्ठुर मना करोनि ॥ ४३ ॥ मज सांडोनि दुःखार्दित । रणीं निघालासी त्वरित । माझे अपराध बहुत । तुवां समस्त साहिले ॥ ४४ ॥ बहुसाल कष्टलासी वनीं । कष्ट करिसी अनुदिनीं । पोट आपुलें बांधोनी । फळें आणोनी मज देसी ॥ ४५ ॥ चरणक्षालन करिसी नित्य । चरण चुरिसी अहोरात्र । निद्रा न लगे अणुमात्र । सावचित्त रामभजनीं ॥ ४६ ॥ तुझे कष्ट आठवितां । मज होतसे दुःखावस्था । हृदयस्फोट होईल आतां । न देखतां सौमित्र ॥ ४७ ॥ म्हणऊनि घाली लोटांगणी । सवेंचि सावध झाला मनीं । मी भ्रांत काय म्हणोनी । कंदनालागोनी ऊठिला ॥ ४८ ॥ म्हणे काय झालें येथें । कवण नेईल सौमित्रातें । दमोनियां सकळ भूतें । लोकपाळांतें दमीन ॥ ४९ ॥ पृथूनें दमियेली धरित्री । दुहिल्या ओषधी समग्री । मी त्याहून दमीन बाणाग्रीं । सौमित्र शरीरीं उठी जंव ॥ १५० ॥ अगस्तिऋषीनें निश्चितीं । शोषियेला अंपांपती । मी त्याहून करीन ख्याती । त्रिजगती कोरडी ॥ ५१ ॥ सौमित्राची जीवनश्री । आणोनि देईल झडकरी । तंव करीन बोहरी । बाणधारीं आपांची ॥ ५२ ॥ तेजें तेजेंचि शोषीन । जंव सतेज होय लक्ष्मण । अन्यथा महावात प्रेरीन । निःशेष शोषीन तेजासी ॥ ५३ ॥ बाणें महाशून्य भरडीन । प्राशीन सकळ प्रभंजन । जंव लक्ष्मणाचा निजप्राण । स्वयें आपण आणून देई ॥ ५४ ॥ क्षोभवोनि चिदाकाश । घोटीन सगळेंचि आकाश । सौमित्राचें हृदयाकाश । सावकाश जंव होय ॥ ५५ ॥ दमोनियां सकळ देव । उड-वीन त्यांची माव । करिती सौमित्रासी सावयव । तें लाघव करीन ॥ ५६ ॥ दमूनि दिशांची पोकळी । भरीन चिदानंदकल्लोळीं । जंव सौमि-त्राचे कर्णबिळीं । आहाळेंबाहळी निघे शब्द ॥ ५७ ॥ बाणें पाडोनियां सूर्यासी । खंडोनी उदयास्तांसी । घेईन हिरोनि तेजासी । नेत्रीं लक्ष्मणासी भरीन ॥ ५८ ॥ अश्विनीदेव दोनी । निरोध केला आहे घ्राणीं । त्यांचा कंदचि खाणोनी । सौमित्रघ्राणीं ओपीन ॥५९॥ वरुणातें गाळून घाणा । जेणें नीरस केली रसना । गोडी हिरोनि आणीन जाणा । चेतवीन सौमित्राची ॥ १६० ॥ वायूनें मांडली घसघस । केला सौमित्र मंदस्पर्श । पिळोनि त्याचा प्राणांश । करीन सुस्पर्श सौमित्र ॥ ६१ ॥ इंद्रें मांडिलें बंड । निर्वीर्य केले बाहुदंड । ठेंचोनियां त्याचें तोंड । सबळ भुजदंड करीन ॥ ६२ ॥ यम संचरे अधोगती । क्षीण केली शरीरशक्ती । त्यासीं लावोनियां ख्याती । अक्षय निश्चितीं सौमित्र करीन ॥ ६३ ॥ ब्रह्मयानें केला निरोध । खुंटला रतिस्वानंद । त्याचा छेदोनियां बाध । अखंडा-नंद भरीन ॥ ६४ ॥ केली उपेंद्रें छळणोक्ती । खुंटली गमनागमनशक्ती । त्यासीं लावोनियां ख्याती । ऊर्मिलापती उठवीन ॥ ६५ ॥ बळीनें द्वारपाळ केला । वामन त्रिविक्रम भला । खिळीन सौमित्राच्या पाउला । चालवीन मग सुखें ॥ ६६ ॥ नभें मांडिलें द्वंद्व । निःशेष खुंटला शब्द । उड-वूनि त्याचा शून्यवाद । अनाहतशब्द काढीन ॥ ६७ ॥ चंद्र पीडला क्षयरोगें । तरी निश्चळ न राहे उगें । सौमित्राचें मन नेलें वेगें । मूर्च्छित करोनि राहिला ॥ ६८ ॥ ऐसें दंडीन मी त्यासी । स्वयें विसरोनि निजधर्मासी । सांडून संकल्प-विकल्पांसी । उठवीन सौमित्रासी निर्विकल्प

१ शरणागताचें हित करणारा. २ उत्तर. ३ दुःख-पीडित. ४ कासाविशी. ५ हृदयभेद. ६ संहारून. ७ समुद्र. ८ नाश. ९ वायु. १० अघळपघळ. ११ कलह. १२ आघातां-वांचून झालेला, नित्यशब्द.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ ६९ ॥ ब्रह्मयानें बुद्धि केली मंद । उडवीन त्याचें ब्रह्मपद । सौमित्रासी निर्विकल्प शुद्ध । स्वरूपावबोध जंव करी ॥ १७० ॥ रुद्रें अहंकार केला क्षीण । त्यासीं सोहंमार करीन । संवर्तका[1] संहारून । धरी स्वरूपाभिमान जंव सौमित्र ॥ ७१ ॥ विष्णु येवोनियां त्वरित । न करी सौमित्रा सावचित्त । तरी तो करीन पदच्युत । सर्वगत देशधडी ॥ ७२ ॥ लक्ष्मणाचे विरहें जाण । पूर्ण क्षोभला रघुनंदन । अंतका अंतक होऊन । धनुष्यबाण सज्जिले ॥ ७३ ॥ मारीन राक्षस सकळ । जाळीन हें जगतीतळ । झाला क्रोधाग्निकल्लोळ । काळा काळ रघुवीर ॥ ७४ ॥

एवमुक्त्वा महाबाहुः प्रगृहीतं च कार्मुकम् ।
ततः संत्रस्तमनसा वानरा भीमविक्रमाः ॥ ५ ॥
किमेतदिति भाषंतः ससुग्रीवविभीषणाः ।
प्राणिपत्याग्रतः स्थित्वा सर्वे प्रांजलयोऽब्रुवन् ॥ ६ ॥
एकस्यार्थे महाबाहो त्रैलोक्यं हंतुमिच्छसि ॥ ७ ॥

अकाळ मांडला युगान्त । लोकपाळ हडबडित । राम होतां क्रोधान्वित । डोळे झांकीत प्रळयरुद्र ॥ ७५ ॥ ब्रह्मा म्हणे काय जालें । काळेंवीण प्रळयान्त मांडिलें । दुंणे[2] कष्ट मज ओढवले । पुन्हां कैसें सकळ ब्रह्मांड रचूं ॥ ७६ ॥ होतां सकळां आडदर[3] । पळती मर्कटें सैरें[4] । तें देखोनि थोरथोर । वानरवीर पुढें झाले ॥ ७७ ॥ नळनीळादि जांबवंत । अंगद सुग्रीव कपिनाथ । बिभीषण शरणागत । श्रीरघुनाथ प्रार्थिती ॥ ७८ ॥ पूर्णावतार रामरावो । अकाळीं करूं नये प्रळयो । कांपतसे ब्रह्मदेवो । नवी सृष्टी पहाहो करवेना ॥ ७९ ॥ अकाळ प्रळयो करितां । बोल लागेल निजव्रता । तूं सकळांतें पाळिता । निरपराधें[5] घाता नये करूं ॥१८०॥ एकाचे अपराधासाठीं । संहारणें सकळ सृष्टी । ते प्रतिपालनाची गोष्टी । कैंवी जगजेठी बोलावी ॥ ८१ ॥ तूं जनक सकळांचा । पिता पितामहाचा । निरपराध निजबाळांचा । संहार कैसा करितोसी ॥ ८२ ॥ म्हणोनि धरिले दोनी चरण । नको प्रयोजूं गुणीं[6] बाण । तूं कृपाळु रघुनंदन । क्रोधोंपशमन[7] करीं रामा ॥ ८३ ॥ भक्तजनांचा कृपाळ । श्रीराम दीनदयाळ । बोलला कृपाकल्लोळ । प्रणतपाळ[8] श्रीराम ॥ ८४ ॥ तृषार्त दीन चातक । देखतांचि एकाएक । वर्षोनियां कृपापीयूख[9] । निववविले देख दयाळुत्वें ॥ ८५ ॥ निजभक्तांचें वचन । नुलंघीत रघुनंदन । केलें क्रोधाचें उपशमन । भक्तावगणन[10] न करीच ॥ ८६ ॥ एका एकपणाची दिठी । एका जनार्दनीं नाथिली[11] गोष्टी । घालितां श्रीरामीं मिठी । ब्रह्मत्वें सृष्टी हेलावे ॥ ८७ ॥ एका जनार्दना शरण । प्रार्थूनियां रघुनंदन । केलें क्रोधाचें उपशमन । निजजनकृपाळु ॥ १८८ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां रघुनाथक्रोधोपशमनं नाम अष्टचत्वारिंशोऽध्यायः ॥ ४८ ॥ ओंव्या ॥ ॥ १८८ ॥ श्लोक ॥ ७ ॥

अध्याय एकुणपन्नासावा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ श्रीरामा प्रार्थितां वानरगण । शरणागत बिभीषण । सृष्टिघाता कळवळोन । केलें उपशमन क्रोधाचें ॥ १ ॥ शांत करोनि कोपासी । आविष्टोनि[12] मोहावेशीं । काय बोलत सुग्रीवासी । सावकाशीं परियेसा ॥ २ ॥

प्रशांतिमगमत्कोपो राघवस्य महात्मनः ।
भूयः शोकसमाविष्टो रामो दशरथात्मजः ॥ १ ॥
अब्रवीद्राघवो दीनः सुग्रीवं वानरेश्वरम् ।
सुग्रीव गच्छ किष्किंधां सहवानरसेनया ॥ २ ॥
कृतं मित्रसहायं तु यदन्यैर्भुवि दुष्करम् ।
अहं चाद्य महाबाहो यत्करिष्यामि तच्छृणु ॥ ३ ॥

पुढें घेवोनि लक्ष्मण । सुग्रीवातें बोलावोन । अदीन[13] परी दीनवचन । दशरथनंदन बोलत ॥ ३ ॥ सुग्रीवा परीस विनंती । तूं अवंचक[14] मित्रकार्यार्थी । तुझे उपकार किती । म्यां वचनोक्तीं बोलावे ॥ ४ ॥ मज न बोलवे सर्वथा । काय तोंड दावूं समस्तां । कुंढावीन[15] शरणागता । वचन वृथा वल्गलों ॥ ५ ॥ माझें अंतकाळींचें वचन । तुवां नुलंघावें आपण । सर्वे घेवोन वानरगण । किष्किंधे गमन करावें ॥ ६ ॥ बिभी-

१ प्रलयकर्त्याला. २ दुप्पट. ३ भीति. ४ जिकडे तिकडे. ५ अपराधावांचून, अन्यायावांचून. ६ धनुष्याच्या दोरीला. ७ क्रोधाची शांति. ८ शरणागत जनांचें पालन करणारा.

९ कृपारूप अमृत. १० भक्तांचा अव्हेर. ११ मिथ्या. १२ शिरून. १३ थोर. १४ निष्कपटी. १५ संरक्षण करीन.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

षणही सर्वें न्यावा । सर्व प्रकारें संरक्षावा । रावण करोनियां मावा । घेईल जीवा याचिया ॥ ७ ॥ वृथा जल्पलों यासी । संहारीन रावणासी । अभिषेकीन बिभीषणासी । निजगजरेंसीं अति वोजा ॥ ८ ॥ वृथा गेला तो पण । न मारवेचि रावण । न कुढावितां बिभीषण । प्राणें लक्ष्मण वेंचला ॥ ९ ॥ सौमित्राचे निजबळें । छेदीन रावणाचें शिसाळें । तें अवघेंचि वृथा गेलें । रणीं मोकलिलें सौमित्रें ॥ १० ॥ रावण बापुडें किती । सौमित्रबळें त्रिजगती । नागवें मी रघुपती । ते शक्ति प्रतिहत झाली माझी ॥ ११ ॥ सौमित्र माझा निजप्राण । सौमित्र माझें जीवन । सौमित्रें मी सबळ जाण । क्षणीं त्रिभुवन आक्रमीं ॥ १२ ॥ सौमित्र माझी स्थिति गती । सौमित्र माझी धृति विरक्ती । सौमित्र माझी अढळ शांती । त्रिजगतीमाझारी ॥ १३ ॥ सौमित्र माझा निजांवा । सौमित्र माझा विसांवा । सौमित्र माझा बोलावा । सौमित्रेंवीण जीवा जीवपण कैंचें ॥ १४ ॥ सौमित्रें मोकलितां येथ । कांहीं नाहीं मी रघुनाथ । जळो जळो हें जीवित । अति निंदित लौकिकीं ॥ १५ ॥ बिभीषणाचा ऋणी । मी झालों सकळ जनीं । उत्तर न बोलवे वचनीं । लाज मनीं वाटत ॥ १६ ॥ तुज असेल सामर्थ्य । तरी निवटोनि लंकानाथ । अभिषेकीं शरणागत । मज ऋणमुक्त तूं करीं ॥ १७ ॥ इतुकेनि मी तुमचा । कृतोपकारी जन्माचा । ऋणी आहें सकळांचा । बहुत वाचा काय बोलूं ॥ १८ ॥ म्हणोनि घातलें लोटांगण । सुग्रीवा तुझे धरिले चरण । करावें किष्किंधागमन । बिभीषणसमवेत ॥ १९ ॥ कृपा करावी वानरांसी । सुख द्यावें प्रजेसी । भोगीं स्त्रीपुत्रराज्यासी । शरणागतासी कुढावीं ॥ २० ॥ सौमित्रावांचून जाण । माझे न वांचती प्राण । सौमित्र गेला मोकलून । उभ्यां उभ्यां प्राण सांडीन ॥ २१ ॥ चेतवूनि योगाग्नी । देह जाळीन तत्क्षणीं । लोकालोकीं झाडा घेवोनी । सौमित्रासी भेटेन ॥ २२ ॥ जेथें गेला लक्ष्मण । तेथें स्वयें जाईन । प्राण न राहती अर्ध क्षण । करीन गमन सांगातें ॥ २३ ॥ जेंवी शुष्क काष्ठ जळे । सर्वांग माझें तेंवी होरपळे । गात्रें विकळ झालीं सकळें । शरीर चळचळें कांपत ॥ २४ ॥

एवमुक्तस्तु रामेण सुग्रीवो वाक्यमब्रवीत् ।
किमर्थं मुह्यसे देव त्वादृशो नैव मुह्यति ॥ ४ ॥

सुग्रीव म्हणे रघुनाथा । हें बोलणें न घडे सर्वथा । तुजवीण राज्य भोगितां । महादोष माथां वाजती ॥ २५ ॥ तुजवीण जें राज्य भोगणें । तें जेंवी अभक्ष्य भक्षणें । तुजवीण स्त्री सेवणें । मातृगमन तो दोष ॥ २६ ॥ तुजवीण जो विषयभोग । तो जाणावा क्षयरोग । कैंचा संसारस्वर्ग । नरकभोग भोगावा ॥ २७ ॥ तुजवीण भोगणें सुख । त्याहून मरण भलें देख । सांडूनि जातां रघुकुळटिळक । आकल्प नरक भोगावा ॥ २८ ॥ तुज सांडितां रघुपती । तेव्हांचि आम्हां क्षीण शक्ती । रावण येवोनि शीघ्रगती । घात निश्चितीं करील ॥ २९ ॥ मरावें जैं रावणहस्तें । तैं येथेंचि सांडूं देहातें । अनुसरल्या श्रीरामातें । केंवी मागुतें परतावें ॥ ३० ॥ श्रीरामा ऐक सावधान । एकाएकीं निर्वाण । करूं नये गा आपण । तूं रघुनंदन विवेकी ॥ ३१ ॥ दृढ न विचारितां चित्तीं । निर्वाण न करावें निश्चितीं । गेला आहे मारुती । तो कार्यसिद्धीप्रती साधील ॥ ३२ ॥ संधी लोटली तीन प्रहर । रात्र उरली एक प्रहर । आतां येईल कपींद्र । ओषधिभार घेऊनी ॥ ३३ ॥ हनुमान येथोनि गेला । समाचार देखोनि राहिला । तेणें विलंब लाविला । तो रिता वहिला परतेना ॥ ३४ ॥ कांहीं पडली असेल गुंती । क्षणें उठवील मारुती । अतुळ तयाची शक्ती । त्रिजगतीं नाटोपे ॥ ३५ ॥ अदट दाटुगा महावीर । मुखीं रामनाम निरंतर । त्या कोण अर्थ दुस्तर । कार्य सत्वर साधील ॥ ३६ ॥ ब्रह्मादिकां दुर्धर शक्ती । तो रिता परतेल मारुती । ऐसें न मानावें रघुपती । शीघ्रगती येईल ॥ ३७ ॥

इति तेषां ब्रुवाणानां हनूमान्मारुतात्मजः ।
प्रदीप्त इव शैलेंद्रो गगने समदृश्यत ॥ ५ ॥
किमेतदिति संभ्रांताः कपयो जातविस्मयाः ॥ ६ ॥

तंव उत्तरेच्या दिशाभागीं । जैसी धगधगीत आगी । दिसताहे लागवेगीं । येत स्वमार्गीं देखि-

१ शिर, मस्तक, २ त्यागिलें, ३ नष्ट, नाहींशी, ४ त्रैलोक्यांत, ५ आप्त. ६ संरक्षण कर, ७ शिथिल, ८ अंत, शेवट,

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

येला ॥ ३८ ॥ आधींच हनुमान ढिसाळ[1]। पुच्छीं पर्वत सबळ। देखोनियां वानरपाळ[2]। एक सहेळ[3] पळाले ॥ ३९ ॥ एकीं लंघिलीं गिरिकंदरें । एकीं पर्वतशिखरें। एकीं समुद्राचीं तीरें । वेगवत्तर पळाले ॥ ४० ॥ एक रिघाले कपाटीं[4]। एक रिघाले दिक्पुटीं । एकीं झाडां घातली मिठी । एक संकटीं पडियेले ॥ ४१ ॥ एक भरले दशदिशां । एकांचा दाटला घसा। एकां बोलवेना सहसा। एकीं धिवसा[5] सांडिला ॥ ४२ ॥ एक सरसावले युद्धासी। एक वृक्षातें हातवसी[6] । एक घेवोनि पर्वतासी। संमुख रणासी चालिले ॥ ४३ ॥ एकीं वळियेल्या मुष्टी। दांत खाती करकराटीं। एकीं वळली पुच्छाटी। भ्यासुर दृष्टीं देखोनी ॥ ४४ ॥

आगच्छंतं प्रधावंति ऊर्ध्वपुच्छा इतस्ततः ।
मायावी राक्षसः कोऽयमस्मान्हंतुमुपागतः ॥ ७ ॥
इति तत्संभ्रमं दृष्ट्वा रामः सुग्रीवमब्रवीत् ।
वानराधिप मा भैषीरियं रक्षोबिभीषिका ॥ ८ ॥
निर्भीभव महाबाहो निहन्म्येनं पतत्रिभिः ॥ ९ ॥

वानर महाभयभीत। इतस्ततां[7] पळत। अंतरिक्षीं[8] काय दिसत । झाले विस्मित सकळिक ॥ ४५ ॥ देखोनि कपींचा आकान्त। क्रोधें झाला क्रोधान्वित। चाप करोनि सज्जित। काय बोलत रघुवीर ॥ ४६ ॥ सुग्रीव आणि बिभीषण। अंगदादि वानरगण । स्वस्थ करोनि अंतःकरण। माझें वचन परिसावें ॥ ४७ ॥ भेणें[9] पळती वानरगण। त्यांसी द्यावें अभयदान। मायावी राक्षस दारुण। येतो धांवोन आकाशीं ॥ ४८ ॥ रूप धरोनि ढिसाळ। जैसा दिसे अग्निकल्लोळ। मारूं आला गोळांगूळें[10]। रूपें विशाळ भासत ॥ ४९ ॥ भेडसावीतसे सर्वांसी। पळवीतसे वानरांसी। बाणीं निवटीन मी यासी। निमेषार्धेंसीं सत्वर ॥ ५० ॥ क्षोभोनियां श्रीरामचंद्र । करावा जंव संहार। चापीं सज्जितां शर। तंव कपींद्र ओळखिला ॥ ५१ ॥ सवें बाण पुच्छीं डोंगर। जैसा दिसे कालाग्निरुद्र । रूप धरोनि भयंकर। तेथें सत्वर पावला ॥ ५२ ॥

- एतस्मिन्नंतरे वीरः सोऽवतीर्य नभस्तलात् ।
निक्षिप्य पर्वतं भूमौ नानारत्नविभूषितम् ॥ १० ॥
विनीतः प्रांजलिर्भूत्वा राघवं वाक्यमब्रवीत् ।
विज्ञप्तिः श्रूयतां देव ससुग्रीवबिभीषण ॥ ११ ॥
ओषधिं नाधिगच्छामि विदित्वापि नरेश्वर ।
व्यतिक्रममवेहि त्वं क्षंतुमर्हसि सुव्रत ॥ १२ ॥
बहुविघ्नाश्च तत्रासन्येनाहं च विलंबितः ॥ १३ ॥

सैन्याचे मेळीकारीं। गिरि ठेवोनि पृथ्वीवरी। नमाया कपिकेसरी। वानरभारीं चालिला ॥ ५३ ॥ क्षेमें[11] सांगावें भरतासी। उठवीन या सौमित्रासी। निर्दळून रावणासी। अयोध्येसी शीघ्र येऊं ॥ ५४ ॥ आज्ञापीत भरतबाण। बाणें करोनियां नमन। गगना उसळळा जाण। अर्ध क्षण न लागतां ॥ ५५ ॥ बोळेंवितां[12] भरतबाणासी। बाण उसळला गगनासी। विजु तळपे आकाशीं। तेणें वेगेंसीं चालिला ॥ ५६ ॥ लखलखीत डोंगर। जैसा दिसे रत्नाकर । ठेवोनि मेळीकारीं सत्वर । दर्शना कपींद्र चालिला ॥ ५७ ॥ लोटांगण श्रीरामचरणां। पुढती पुढती करी नमना। नमन सुग्रीवा बिभीषणा। अंगदही जाणा नमियेला ॥ ५८ ॥ नळ नीळ जांबवंत। नमिले जुत्पति[13] समस्त। होवोनि अति विनीत। काय बोलत कपींद्र ॥ ५९ ॥ मज विलंब लागला तेथ। विघ्नें उठलीं बहुत। ओषधी आच्छादी पर्वत। वेडा निश्चित लाविलें ॥ ६० ॥ शक्ति झाली प्रतिहत[14]। कांहींच नाठवे मत। बहुत चुकुर जालों तेथ। मग रघुनाथ स्मरियेला ॥ ६१ ॥ अंतरात्मा श्रीरामचंद्र। बुद्धि दिधली खडतर। समूळ उपडोनि डोंगर। मग सत्वर चालिलों ॥ ६२ ॥ मार्गीं येतां सत्वर। आश्चर्य वर्तलें थोर। बाण पातला वेगवत्तर। अति सुंदर नामांकित ॥ ६३ ॥ बाणीं रामनाम देखतां। अति विस्मय झाला चित्ता। नामीं अनुसरोनि तत्त्वतां। गेलों रघुनाथा बाणसंगें ॥ ६४ ॥ मी अविवेकी पालेखाइर। मर्कट नेणें विचार। भुलविलें अंतरें[15]। गेलों सत्वर बाणासंगें ॥ ६५ ॥ नामीं चित्त वेधलें पाहीं। निजकार्याचा आठव नाहीं। पुढें अपूर्व देखिलें कांहीं। तें तुझे पायीं [16]निवेदूं ॥ ६६ ॥ बाणासवें पर्वतासहित। आलों नंदिग्रामा त्वरित। देखिला बंधु भरत। जैसा मूर्तिमंत श्रीराम ॥ ६७ ॥ रामभ्रमें भ्रमलें माझें चित्त। क्रोधावेश

१ मोठा. २ वानरांचे अधिपति. ३ सत्वर, एकदमच. ४ पर्वतदरींत. ५ धैर्य. ६ हात घाली. ७ इकडेतिकडे. ८ आकाशांत. ९ भयानें, भीतीनें. १० वानर. ११ खुशाली. १२ पाठविल्यावर. १३ वानरवीर. १४ क्षीण. १५ अंतःकरण. १६ सांगतों.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

आला तेथ । सौमित्र सांडोनि त्वरित । येथें रघुनाथ कां आला ॥ ६८ ॥ अविचारी मी वानर । बोल बोलिलों खडतर । अति तिखट वाग्वज्र । तें रघुवीर क्षमा करो ॥ ६९ ॥ भरतप्रेमा अद्भुत । प्रेमें लोभलेंसे चित्त । देह गेह न सांभाळीत । प्रेमें डुल्लत सर्वदा ॥ ७० ॥ धन्य भरताचें जीवित । धन्य भरताचें आचरित । धन्य भरताचें व्रत । राम सेवीत सर्वदा ॥ ७१ ॥ धन्य भरताचें जीवन । धन्य भरताचें भजन । धन्य भरताचें ज्ञान । राम चिद्घन सेवी सर्वदा ॥ ७२ ॥ धन्य भरताचा भावार्थ । धन्य भरताचा इत्यर्थ । धन्य भरताचा सिद्धार्थ । श्रीरघुनाथ सर्व कर्मी ॥ ७३ ॥ धन्य भरताचें कुळ । धन्य भरताचें शीळ । धन्य सूर्यवंशमाळ । अविकळ रामभजनीं ॥ ७४ ॥ भरत रामप्रेमा लोभला । भरत रामें कोंदला । भरत श्रीरामें धाला । सबाह्य भरला श्रीराम ॥ ७५ ॥ भरत देखोनि राघवा । मन लोभलें भरतभावा । भरतें गिळिलों आघवा । देहभावा विसरलों ॥ ७६ ॥ देखतां भरतप्रेमा गहन । नेत्रांची वृत्ति झाली क्षीण । देखणेपणें भरतें जाण । माझे नयन व्यापिले ॥ ७७ ॥ ऐकतां भरतकथानिरूपण । श्रवणीं कोंदले श्रवण । नभ झालें शब्दायमान । अनाहत गहन लागलें ॥ ७८ ॥ चाखतां भरतप्रेमगोडी । रसना रसातें ओसंडी । अद्वैतचवी घडफुडी । सप्रेम आवडी भरताची ॥ ७९ ॥ घेतां भरतभजनगंध । घ्राण विसरे गंधार्थबोध । घ्राणीं कोंदला परमानंद । प्रेममकरंद भरताचा ॥ ८० ॥ अवचट भरतसंगीं । वायु लागतां अंगीं । अंगत्व विसरलों निजांगीं । स्पर्शतां आंगीं प्रेमें वायु ॥ ८१ ॥ भरतप्रेम मनीं भरलें । संकल्पविकल्पा मुकलें । चंचलत्व हारपलें । निश्चळ झालें प्रेमभावें ॥ ८२ ॥ नाठवे देहगेहभान । नाठवे कार्याची आठवण । नाठवे भरता भरतपण । मज कपीसी कपिपण नाठवे ॥ ८३ ॥ भरतें आकर्षिली वृत्ती । मावळली उभयस्फूर्ती । कैंचा राम कैंचा मारुती । ऊर्मिलापति सरे कोण ॥ ८४ ॥ ऐसा गोंविलों सर्वशक्ती । मर्कट नेणें कार्यस्थिती । उशीर लागला रघुपती । क्षमा निश्चितीं मज करणें ॥ ८५ ॥ म्हणोनि घातलें लोटांगण । सुदृढ माथां धरिले चरण । मज क्षमा करो रघुनंदन । अविवेकी हीन मर्कट ॥ ८६ ॥ ऐकतां कपीचें वचन । तटस्थ झाला रघुनंदन । रामीं नाठवे रामपण । भरत संपूर्ण कोंदला ॥ ८७ ॥ प्रेमें भुलला रघुनाथ । पुढें देखे भरत । उठोनि आलिंगू धांवत । प्रेम अद्भुत भरताचें ॥ ८८ ॥ मजलागीं कष्टलासी । व्रतें तपें सायासीं । उग्रकर्में आचरलासी । उपवासी मजलागीं ॥ ८९ ॥ उठीं दोघे करूं भोजन । सुंदर षड्रसें राजान्न । सांडीं हें वल्कलाभरण । करीं परिधान दिव्य वस्त्रें ॥ ९० ॥ करीं अभ्यंगमज्जनें । सोडीं जटांचें बंधन । रत्नखचित मुकुटाभरण । सुंदर भूषण अंगीकारीं ॥ ९१ ॥ भरतभावें कपीसी । राम आलिंगी हृदयेंसीं । देखतां अंगदसुग्रीवांसी । प्रेम उत्कर्षीं न संटे ॥ ९२ ॥ जुत्पत्ति सकळ वानरगण । अवघे झाले मूर्च्छापन्न । भरतप्रेम अति गहन । रघुनंदन भुलविला ॥ ९३ ॥ सकळां टकमक झाली । शब्दांसी कुलुपें पडलीं । भरतप्रेमें उलथलीं । समाधि लागली सर्वांसी ॥ ९४ ॥ बिभीषण शरणागत । श्रीरामभजनीं सावचित्त । सत्त्वावस्था गिळोनि तेथ । काय बोलत रामासी ॥ ९५ ॥ श्रीरामा पाहें सावधान । विसरोनियां रामपण । आलिंगिला कपिनंदन । कार्या आठवण तुज नाहीं ॥ ९६ ॥ भरतप्रेमें भुललासी । भरत म्हणोनि कपीसी । आलिंगोनि राहिलासी । निजकार्यासी विसरोनी ॥ ९७ ॥ बिभीषणाचें वचन । ऐकोनि हनुमान जाण । स्वयें झाला सावधान । रघुनंदना विनवीतसे ॥ ९८ ॥ स्वामी ऐकें रघुनंदन । भरत नव्हें हनुमान जाण । आलों पर्वत घेऊन । ओषधि गहन जेथें असती ॥ ९९ ॥ वेडी जाती प्रेमाची । वेळ नेणें कार्याची । गोष्टी सांगितली भरताची । तेणें श्रीरामचि भूलला ॥ १०० ॥ शक्तिभेदें सौमित्र जाण । पडिलासे विसंज्ञ । यासी करावें सावधान । रावणकंदन करावया ॥ १ ॥ मर्कट पालेखाईर । नेणें कार्याकार्यांतर । बहुत लाविलासे उशीर । क्षमा रघुवीर मज करो ॥ २ ॥ ऐसें बोलोनि हनुमंत ।

१ ज्ञानपूर्ण. २ तत्पर, रत. ३ तृप्त झाला. ४ सुगंधाचें ज्ञान. ५ दोघांची आठवण, ६ लक्ष्मण, ७ तैलादिकांनीं मंगल स्नान. ८ उत्पन्न झालीं. ९ निश्चेष्ट होऊन.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

चरणां लागला त्वरित । सावध होवोनि रघुनाथ । काय बोलत कपीसी ॥ ३ ॥

हनूमतो वचः श्रुत्वा रामो वचनमब्रवीत् ।
साधु वीर महाबाहो यस्य चेदृक्पराक्रमः ॥ १४ ॥

ऐकतां भरतगोष्टी । प्रेम उथंळलें पोटीं । कांहीं न देखों दृष्टीं । तुजचि मिठी घातली ॥ ४ ॥ हा भरतप्रेमें भुलला । मी म्हणे भरतचि आला । म्हणोनि कपि आलिंगिला । भला चेवविला हनुमंतें ॥ ५ ॥ ब्रह्मादिकां न करवती । ऐसीं कर्मं निश्चितीं । तुवां साधिलीं मारुती । निमेषगती न लागतां ॥ ६ ॥ तुझ्या उपकारा तत्त्वतां । मी ऋणी झालों कपिनाथा । वाचा खुंटली सर्वथा । कांहीं तत्त्वतां न बोलवे ॥ ७ ॥ तुझ्या कर्माची कथा । काय सांगों हनुमंता । सीताशुद्धीची कथा । ऐकतां चित्ता चळकांप ॥ ८ ॥ इंद्रजितवधालागीं साङ्ग । तुवां ओढविलें सर्वांग । ते गोष्टी ऐकतां सवेग । होती उद्वेग चित्तासी ॥ ९ ॥ एकएका उपकारा उत्तीर्ण । जीवें न होइजे कपिनंदन । सर्वस्वेंसीं आपण । ऋणी संपूर्ण मी तुझा ॥ ११० ॥ कांहीं न बोलवे सर्वथा । म्हणोनि चरणीं ठेविला माथा । येरें वारोनि तत्त्वतां । चरण रघुनाथाचे वंदिले ॥ ११ ॥ राम-मारुतिवृत्तान्त । देखतां झाला विस्मित । सुषेण वैद्यराज तेथ । त्यासी बोलत सुग्रीव ॥१२॥ हे दोघेही प्रेमबोधले । निजकार्यातें विसरले । आपण जावोनि वहिले । ओषधिभार शोधावे ॥ १३ ॥ विशल्य होय लक्ष्मणा । तें कार्य साधीं सुषेणा । म्हणोनि लागला चरणां । कार्यसाधना साधावें ॥ १४ ॥ ऐकोनि सुग्रीवउत्तर । सुषेण निघाला सत्वर । सकळ वानरांचा भार । पर्वतशिखर वळंघले ॥ १५ ॥

सुग्रीवस्य वचः श्रुत्वा सुषेणोन्ये च वानराः ।
गिरिमारुह्य तं रम्यं नानाधातुविभूषितम् ॥ १५ ॥

सर्व वानरांचा भार । सुषेण वैद्यराज सत्वर । वळंघले पर्वतशिखर । ओषधिभार शोधावया ॥ १६ ॥ अति दीर्घ पर्वतशिखरें । रमणीय गिरिकंदरें । जळें पूर्ण सरोवरें । कमळें मनोहर शोभती ॥ १७ ॥ अगराचीं झाडें बहुत । चंदनडोंगर बहकत । पुन्नाग चांफे पारिजात । पर्वतीं बहुत पुष्पजाती ॥ १८ ॥ सरोवरीं कर्णिकारें । सेविती निरंतर चकारें । पक्षिकुळें विचित्रें । चौफेर किलकिलती ॥ १९ ॥ अति रम्य पर्वत । वानरें सैरा हिंडत । सुषेण वैद्यराज तेथ । ओषधि शोधीत अति वेगें ॥ १२० ॥ सरोनियां रघुनंदन । पर्वत पाहतां सावधान । झालें ओषधींचें दर्शन । वैद्य सुषेण हरिखेंत ॥ २१ ॥

तामोषधिं गृहीत्वासौ ह्यवतीर्य महीतले ।
शिलायां पेषयित्वा तु नस्यं तस्मै प्रयोजयत् ॥ १६ ॥
महौषध्याः प्रभावेण लक्ष्मणः परवीरहा ।
विशल्यो नीरुजश्चैव उत्थितः स महीतलात् ॥ १७ ॥

रामनामें सत्वर । उपटोनि ओषधिसंभार । करीत नामाचा गजर । वानरभार चालिला ॥ २२ ॥ उतरोनि पृथ्वीतळीं । ओषधि चूर्ण केल्या शिळीं । रस घेवोनि तत्काळीं । शक्तिबिळीं ओतला ॥ २३ ॥ रस घालितां सत्वर । सावध नव्हेचि सौमित्र । सुषेण झाला चिंतातुर । कांहीं विचार स्फुरेना ॥ २४ ॥ ब्रह्मादिकां अनुलंघ्य पूर्ण । एवढा प्रयत्न केला दारुण । शेखीं सावध लक्ष्मण । अद्यापि जाण होईना ॥ २५ ॥ पूर्वी सुग्रीवादेखतां । स्वामी रघुनाथ ऐकतां । वल्गलों मी इतरस्ततां । सौमित्रातें उठवीन ॥ २६ ॥ ऐसें बोलबोलून । पाठविला वायुनंदन । महाविघ्नें जिणोन । पर्वतचि जाण आणिला ॥ २७ ॥ ओषधिसंभार सगळा । अंगें पिळोनियां वहिला । घायीं रस ओतिला । तो वृथा झाला प्रयत्न ॥ २८ ॥ तरी वैद्यक लटिकें झालें । शास्त्र वृथा रचिलें । शिष्टाचारा दूषण आलें । काय झालें मज न कळे ॥ २९ ॥ नाहीं रसायन चुकलें । धातूसी अंतर नाहीं पडिलें । नाहीं अनुपान चुकलें । नाहीं सांडिलें क्रियेसी ॥ १३० ॥ काय झालें तत्त्वतां । मज न कळे सर्वथा । धांव पाव गा रघुनाथा । शास्त्रसंमता संरक्षीं ॥ ३१ ॥ तंव आवेशें वायुनंदनी । जो भक्तांमाजी चूडामणी । बोलता झाला हांसोनी । सुषेणा लक्षोनी अनुवादे ॥ ३२ ॥ सुषेणा चुकलासी मत्त । ज्याचेनि शास्त्रांसी शास्त्रार्थ । जो वेदीं वेदार्थ । शिष्ट सनाथ ज्याचेनि ॥ ३३ ॥ जेणें चिकित्सा पाहोंळी गेली । जेणें शास्त्रें बुझाविलीं । पुराणें वर्तों

१ उत्पन्न झालें. २ शुद्धीवर आणला. ३ क्षण देखील. ४ मुक्त. ५ समुदाय. ६ चढले. ७ सुवासानें भरलेले. ८ आनंद पावला. ९ बडबड केली. १० मनास वाटेल तसें. ११ विस्तारली.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

लागलीं । ज्याची चाली जाणोनी ॥ ३४ ॥ त्या विसरोनी रघुनाथा । स्वबुद्धी वैद्यक करितां । शीण पावलासी वृथा । कार्य तत्त्वता न साधे ॥३५॥ उगवतां दिनमणी । हरपे तत्काळ रजनी[३] । नक्षत्रें-सह चंद्र गगनीं । ठाकती होवोनी खद्योत ॥ ३६ ॥ तैंवी देखतां रघुनाथ । ओषधिभार समस्त । शक्ति झाली प्रतिहत । तुझें तेथ काय चाले ॥३७॥ ऐसें न करावें आपण । प्रार्थोनियां रघुनंदन । घ्यावें चरणतीर्थ मागोन । वांचेल लक्ष्मण तें करीं ॥ ३८॥ ओषधिरसामाजी देख । वेगीं घालोनि चरणोदक । रस देतां एकाएक । सकळ दुःख निरसेल ॥ ३९ ॥ कोणासी न कळे जनीं । नाम अमृतसंजीविनी । तो प्रत्यक्ष असतां अनुदिनीं । निजाभिमानीं कष्टती ॥ १४० ॥ आम्ही वैद्य चिकित्सक । क्षणमात्रें प्रतीति ते देख । दावूं लागतांचि निमेखें । तेणेंचि देख नाडिले ॥ ४१ ॥ सिद्धासी सिद्धिलाभ होतां । अभिमान उठला अवचितां । तरी अवघेंचि गेलें तत्त्वतां । कष्ट वृथाचि सोसिले ॥ ४२ ॥ सर्व दुःखांच्या आपदा । प्राप्त झाल्या प्रल्हादा । नाम स्मरतां सर्वदा । दुःखबाधा छेदिली ॥ ४३ ॥ तो श्रीराम प्रत्यक्ष असतां । तुझा अभिमान झाला वृथा । चरणीं ठेवोनियां माथा । चरणतीर्था मागावें ॥ ४४ ॥ तीर्थासमवेत ओषधी । घायीं घालितां त्रिशुद्धी । सौमित्र उठेल सत्त्वबुद्धी । युक्ति साधीं हे माझी ॥४५॥ ऐकोनि कपीचें वचन । संतोषला सुषेण । म्यां केला जो अभिमान । तो रघुनंदन क्षमा करो ॥ ४६ ॥ मर्कट नेणें मी सर्वथा । क्षमा करणें रघुनाथा । चरणीं ठेवोनियां माथा । चरणतीर्था घेतलें ॥ ४७ ॥ ओषधी तीर्थासमवेत । घायीं पिळितां समस्त । सौमित्र झाला सावचित्त । श्रीरघुनाथप्रसादें ॥ ४८ ॥ तीर्थें प्रोक्षितां शरीर । सत्वर उठिला सौमित्र । बाप कृपाळु रघुवीर । वानरभार हरिखला ॥ ४९ ॥ रामनामें भुभुःकार । करीत उठिले वानर । नादें कोंदलें अंबर । चराचर दुमदुमिलें ॥ १५० ॥ नामें कोंदला भूगोळ । नामें व्यापिलें अंतराळ । नामें भेदलें पाताळ । ब्रह्मांडगोळ कोंदला ॥५१॥ नामें हर्षित झालें चित्त । स्वशरीर न सांभाळीत । एक लोटांगण घालीत । एक झेलीत द्रुमवल्ली ॥ ५२ ॥ एक पर्वत झेलीत । एक पर्वतीं वळंघत । येर येरां धके देत । येर टाकीत येरावरी ॥ ५३ ॥ रामसंमुख बैसती एकें । तोंड करिती रडकें । सौमित्रें केलें नाहीं निंकें[१०] । मज सांडून देखें निघाला ॥ ५४ ॥ म्हणवोनि करीत रुदन । उपहासिती रघुनंदन । हरिखें नाचती वानरगण । विस्मित मन रामाचें ॥ ५५ ॥ स्वयें उठोनि आपण । आलिंगिला लक्ष्मण । सुग्रीव अंगद बिभीषण । आनंदें पूर्ण कोंदले ॥ ५६ ॥ नवा लक्ष्मण उपजला । येणें मानें सुखावला । उत्साह ऐसा कोंदला । विसरला राम आपणा ॥ ५७ ॥ उचलोनियां लक्ष्मण । नाचों लागला रघुनंदन । एका जनार्दना शरण । निजजनकृपाळु ॥ १५८ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां लक्ष्मणोत्थापनं नाम एकोनपंचाशत्तमोऽध्यायः ॥ ४९ ॥ ओंव्या ॥ १५८ ॥ श्लोक ॥ १७ ॥

अध्याय पन्नासावा

॥ श्रीरामचंद्राय नमः ॥ रामस्मरणें लक्ष्मण । सवेग उठोनियां जाण । नमियेला रघुनंदन । बिभीषण नमियेला ॥ १ ॥ नमस्कारिलें सुग्रीवासी । नमन केलें अंगदासी । नमन सकळ वानरांसी । सौमित्रें सकळांसी नमियेलें ॥ २ ॥

> साधु साध्विति सुप्रीतः सुषेणं प्रत्यपूजयत् ।
> उत्थितं भ्रातरं दृष्ट्वा रामो हर्षसमन्वितः ॥ १ ॥
> परिष्वज्य च सौमित्रिं सबाष्पस्वेदमब्रवीत् ॥ २ ॥

उठिला देखोनि लक्ष्मण । उल्लासे रघुनंदन । आलिंगोनि सुषेण । काय आपण बोलत ॥ ३ ॥ तुझिया उपकारा उत्तीर्ण । सर्वथा न होईजे गा आपण । सौमित्रासी जीवदान । दाता तूं सुषेण झालासी ॥ ४ ॥ ऐसा विनवोनि सुषेण । आलिंगिला आपण । सर्वेंचि धरोनि लक्ष्मण । हृदयीं जाण आलिंगी ॥ ५ ॥ कुरवाळितां अमृतहस्तीं । अंगीं घायेंवण न दिसती । अस्थि सांधल्या यथास्थिती । श्रीरघुपति स्पर्शतां ॥ ६ ॥ करोनि ओषधींचें मिष । वांचविलें सौमित्रास । स्वसामर्थ्यें पूर्ण परेश । परी कोणास कळेना ॥७॥ घेवोनि मोहाची बुंथी[१३] ।

[illegible]. २ [illegible]. ३ कांजवे. ४ प्रतिदिवशी. ५ अनुभव. ६ [illegible]. ७ बरोबर. ८ शिपडतांच. ९ चढले. १० नेटकें, चांगलें. ११ जखमा. १२ हाडें. १३ बुरखा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

बोलतसे सौमित्राप्रती । भेटलासी ऊर्मिलापती । त्रिजगतीं सभाग्य ॥ ८ ॥ तुझे आंगींचा घावो । देखतांचि महाबाहो । मज प्राणान्त झाला पहाहो । आठवितां देहो पुरेना ॥ ९ ॥ निजरूप देखोनि लक्ष्मणा । अति सुख झालें रघुनंदना । पौर्णिमेचा चंद्र जाणा । जैंवी पूर्ण सोळा कळीं ॥ १० ॥ सुषेणा तूं महाचतुर । आणि हनुमान वीर कपींद्र । झाला दोघांचा कृतोपकार । बंधु सौमित्र मज दिधला ॥ ११ ॥ वांचविला लक्ष्मण । मी वांचलों रघुनंदन । वांचले भरतशत्रुघ्न । सीता चिद्रत्न वांचली ॥ १२ ॥ बिभीषण शरणागत । अंगद सुग्रीव वानरनाथ । तिघी माता वांचल्या निश्चित । जन समस्त अयोध्येचे ॥ १३ ॥ हनुमान आणि सुषेण । याचि रीतीं आपण । स्तविता झाला लक्ष्मण । जीवदान तुम्हीं दिधलें ॥ १४ ॥

एवमुक्त्वा तु सौमित्रिं राघवस्तं महायशाः ।
परिष्वजत सौमित्रिं सुग्रीवः पवनात्मजः ॥ ३ ॥

ऐसें बोलतां रघुनंदन । आणि बंधु लक्ष्मण । येरीं वंदोनियां चरण । दोघां जणां आलिंगिलें ॥ १५ ॥ ऐकें स्वामी रघुनाथा । झणें उपकार घेसी माथां । आम्हीं मशकें तत्त्वतां । महिमा सर्वथा तीर्थाचा ॥१६॥ तुझें चरणतीर्थ न घेतां । प्रयत्नचि झाला वृथा । घेतां तुझ्या चरणतीर्था । सावधानता सौमित्रासी ॥ १७ ॥ सामर्थ्य आपुलें लोपविसी । आणि उपकार माथां घेसी । महत्त्व वानरां देसी । निजमानसीं कृपाळु ॥ १८ ॥ लोपवोनि स्वसामर्थ्या । महत्त्व देणें निजभक्तां । हें साजे एका रघुनाथा । दीना अनाथा कळे केंवी ॥ १९ ॥ ऐसें करोनियां स्तवन । घालोनियां लोटांगण । तंव सुग्रीव राजा आपण । रघुनंदना विनवीत ॥ २० ॥ चरणीं ठेवोनियां माथा । विनवीतसे रघुनाथा । अपूर्व देखोनि पर्वता । वानरां समस्तां उल्हास ॥ २१ ॥

अपूर्वं तं गिरिं दृष्ट्वा कौतूहलसमन्वितः ।
विज्ञापयति सुग्रीवो राघवं स च लक्ष्मणः ॥ ४ ॥
कौतूहलसमाविष्टः पर्वतारोहणं प्रति ।
दत्तानुज्ञा राघवेण सुग्रीवेणांगदेन च ॥ ५ ॥

पहावया पर्वतेंद्र[१] । वानरां आल्हाद थोर । आज्ञा देणें सत्वर । श्रीरामचंद्रा कृपाळुवा ॥ २२ ॥ ऐकोनि सुग्रीवाचें वचन । राम झाला हास्यवदन । तुझें आज्ञाउल्लंघन । शके कोण करावया ॥ २३ ॥ पर्वतावरी सुखें जावें । शिखरें शिखर पहावें । फळ जळ स्वीकारावें । तृप्त करावें वानरां ॥ २४ ॥ ऐसें रामें आज्ञापिलें । तंव सुग्रीवें मागुती विनविलें । देवें तेथें पाहिजे आलें । वचन मानिलें श्रीरामें ॥ २५ ॥

तं समारुरुहुः शैलं नानारत्नोपशोभितम् ॥ ६ ॥

श्रीरामचंद्रासमवेत । वानर वळंघले[२] पर्वत । नाना रत्नीं शोभत । जैसा दिसत रत्नाकर ॥ २६ ॥ विचित्र धातु शोभत । विचित्र दिसे जळस्रोत[३] । विचित्र सरोवर तेथ । कमळें शोभत विचित्र ॥ २७ ॥ विचित्र द्रुमवल्ली तेथ । विचित्र ओषधी अनंत । देखतां सौमित्र विस्मित । आश्चर्य मानीत श्रीराम ॥ २८ ॥ शोभा देखोनि पर्वतीं । सुग्रीव पुसे सुषेणाप्रती । दिव्यौषधी पर्वतीं । काय निमित्तीं राहिल्या ॥ २९ ॥ साद्यंत हा वृत्तान्त । सुषेणा सांगें इत्थंभूत । पुसता जाला वानरनाथ । ऐकोनि सांगत सुषेण ॥ ३० ॥

सुषेणोऽभ्यवदत्तांस्तु पूर्ववृत्तानि सूचयन् ।
इह विष्णुश्च ब्रह्मा च शक्रोऽग्निर्वरुणो यमः ॥ ७ ॥
लोकपालाश्च भगवान्कुबेरः सह राक्षसैः ।
एतद्रम्यं महास्थानं यत्र देवाः समागताः ॥ ८ ॥
संप्रीतैश्चाप्सरोभिश्च ऋषिभिश्च महाव्रतैः ।
अत्र राहोः शिरश्छिन्नं विष्णुना प्रभविष्णुना ॥ ९ ॥
जाता तत्रौषधिर्दिव्या विशल्यकरणी शुभा ।
इयं सा चेति दृष्ट्वा तां ददर्श परमौषधिम् ॥ १० ॥

ब्रह्मशाप इंद्रासी झाला । रत्नसमूह सागरीं पडला । म्हणोनि मंथनादर मांडिला । देवदैत्यमेळा मिळोनी ॥ ३१ ॥ लोकपाळ समस्त । यक्ष किन्नर समस्त । राक्षस पातले तेथ । ऋषि बहुत पाहूं आले ॥ ३२ ॥ देवांगना निजगजरीं । नृत्य करिती नानापरी । गंधर्व गाती सप्तस्वरीं । मंथन सागरीं पाहूं आले ॥ ३३ ॥ मंदर करोनियां रवी[६] । वासुकी[४] वीरंडी[५] बरवी । पुच्छ धरियेलें देवीं । मुख दैत्यीं धरियेलें ॥ ३४ ॥ मंदराद्रि जाईल रसातळा । म्हणोनि कूर्म तळीं राहिला । मंथनारंभ केला । अत्यादरें करोनियां ॥ ३५ ॥ आरंभींच हालाहल[७] ।

१ पर्वतश्रेष्ठ, द्रोणगिरी. २ चढले. ३ जलप्रवाह. ४ या नांवाचा सर्प, शेष. ५ दोरी. ६ मंदर पर्वत. ७ विष.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

उद्भवलें तत्काळ। जाळीत पृथ्वीतळ। लोक सकळ तळमळती ॥ ३६ ॥ जाळितां सकळ जनांसी। मग प्रार्थिलें शंकरासी। तेणें गिळिलें विषासी। जाळी त्यासी अनिवार ॥ ३७ ॥ शिव झाला कासाविसी। तो स्मरे भगवंतासी। येतां रामनाम मुखासी। झाली विषाची उपशांती ॥ ३८ ॥ पुढें मंथन आरंभिलें। रत्नांचे समूह निघाले। विभाग करूं आदरिले। तेथें लागलें भांडण ॥ ३९ ॥ मद्य दिधलें दैत्यांसी। लक्ष्मीकौस्तुभ विष्णूसी। येर पाठवी स्वर्गासी। आला दैत्यांसी अति क्रोध ॥४०॥ मंथन करितां कष्टलों आम्ही। अमृत घेवोनि जाल तुम्ही। म्हणोनि उठिले संग्रामीं। रणभूमीं रणमारें ॥ ४१ ॥ सहज दैत्य बळवंत। वरी मद्यपानें उन्मत्त। युद्धा मिसळले अद्भुत। देवांचा घात करीतचि ॥ ४२ ॥ मंथन करितां श्रमले। देव क्षीणशक्ति झाले। दैत्य झोडीत उठिले। पळते झाले दश दिशा ॥ ४३ ॥ एक आरडती ओरडती। मेणें[2] दश दिशा धांवती। धांव पाव गा श्रीपती। या आकांतीं संरक्षीं ॥ ४४ ॥ देखोनि देवांची करुणा। विष्णु कळवळिला मना। करिता झाला सूचना। दैत्यहननालागोनी ॥ ४५ ॥ रूपें जाहला तो मोहिनी। अति सुंदर त्रिभुवनीं। विश्व लाविलें ध्यानीं। दैत्य भुलवोनी मोहिले ॥ ४६ ॥ मिळोनि मोहिनीपासीं। वेढियेलें तियेसी। लागती वेळोवेळां पायांसी। तूं आम्हांसी अंगिकारीं[3] ॥ ४७ ॥ ते न पाहे कोणाकडे। दैत्यसमूह देखोनि रडे। फुंदफुंदों पायां पडे। आम्हांकडे पाहें पां ॥ ४८ ॥ अंगीकारीं आम्हांसी। करूं जें जें तूं सांगसी। तुलंघूं तुझिया वचनासी। घे भाकेसी आमुच्या ॥ ४९ ॥ ऐकोनि दैत्यांचें वचन। मोहिनी बोलिली आपण। परस्परें काय म्हणोन। तुम्हां भांडण लागलें ॥ ५० ॥ तो सैमूळ वृत्तान्त। मज सांगावा सांद्यंत। तुमचा कलह समस्त। मी त्वरित छेदीन ॥ ५१ ॥ ऐकतां तें वचन। अवघे गेले भुलोन। सांगते झाले आपण। अपूर्व कथन युद्धाचें ॥ ५२ ॥ मंथनीं निघालें अमृत। अवघे देव नेवों पाहत। म्हणोनि आम्ही भांडत। हिरोन अमृत घ्यावया ॥ ५३ ॥ देखोनियां तुझी मूर्ती। अति उल्हास झाला चित्तीं। जें सांगसी तें निश्चितीं। आम्हीं चित्तीं मानिलें ॥ ५४ ॥ तुलंघूं तुझें वचन। घे आमुचें भाष्य प्रमाण। तुझ्या वचनालागीं जाण। जीव प्राण वेंचूं पैं ॥ ५५ ॥ अनुसरलेती वचनासी। तरी बुंझावीन दोघांसी। मद्यामृत समरसीं। उभय सेनेसी वाढीन ॥ ५६ ॥ वेगळालिया पंक्ती। उभयसेना बैसावी निगुतीं। गेलिया येरें येरा पंक्तीं। दंड निश्चितीं मी करीन ॥ ५७ ॥ वचन मानलें सकळां। पंक्ती बैसल्या दोहीं पाळां। घट मायाकृत निर्मिला। लोकां सकळां अलक्ष ॥ ५८ ॥ भीतरीं केला पडदरा। उभय रस ओतिले सैरा। दैत्यां वाढिली सुरा। अमृतधारा देवांसी ॥ ५९ ॥ दैत्य सेविती कठोरा वृत्ती। येर गोडिया मिटिक्या देती। राहु धूर्त जाणे चित्तीं। आला गुप्तगतीं देवांमाजी ॥ ६० ॥ अमृत पडतां मुखांतरीं। चंद्रें दाविलें झडकरी। येरी सुदर्शन प्रेरी। कंठनाळ झडकरी छेदिलें ॥६१॥ चंद्रें दाखविलें राहूसी। राहु झोंबला चंद्रासी। अद्यापिवरी आकाशीं। राहुपर्व पौर्णिमेसी होत असे ॥ ६२ ॥ धड पडिलें धरेवरी। वाढत निघालें धरित्रीं। मोहिनी बैसूनि उरावरी। वास करी नेवासीं ॥६३॥ धड पडोनियां तळीं। वाढियेलें महीतळीं। घनवट ऐसी आख्या झाली। तये काळीं तये देशीं ॥ ६४ ॥ शिर उसळलें गगना। तें ग्रहचक्रीं बैसोनि जाणा। लागे शशिसुंभानां। करी ग्रहणा वेळोवेळां ॥ ६५ ॥ अमृतें देव तुष्ट पुष्ट झाले। दैत्य मद्यमदें मातले। निजयुद्धातें मिसळले। देवीं मारिलें क्षणमात्रें ॥ ६६ ॥ पूर्वविभागाचे स्थितीं। रत्नें नेमिलीं शीघ्रगतीं। राहूचें अमृत क्षितीं। मारितां निश्चितीं सांडलें ॥ ६७ ॥ तेथें ओषधिसंभार। होवोनि व्यापिला डोंगर। ऐकतां विस्मित सौमित्र। सुग्रीववीर विस्मित ॥ ६८ ॥ वानरवीर समस्त। सुग्रीवासी प्रार्थीत। अमृतसंजीविनी येथ। फळें त्वरित भक्षावीं ॥ ६९ ॥ प्रार्थोनियां हनुमंता। आज्ञा पुसावी रघुनाथा। वानर श्रमले युद्ध करितां। त्यांसी तृप्त्यर्था आज्ञापीं ॥ ७० ॥ सुग्रीवें प्रार्थिला हनुमंत। तेणें विनविला रघुनाथ। फळभोजनीं कपि समस्त। सोडी रघुनाथ सन्मानें

१ पृथ्वीतळ. २ भीतीनें. ३ स्वीकार कर. ४ शपथ, वचन. ५ मूळापासून सर्व. ६ समजावीन. ७ एक दुसऱ्या पंक्तींत गेल्यास. ८ बाजूंनीं. ९ पृथ्वीवर. १० चंद्रसूर्यांना.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ ७१ ॥ पर्वताचें शिखर शिखर । वानर हिंडती सैर । वृक्ष आसुडिती सत्वर । फळसंभार भक्षिती ॥ ७२ ॥ सकाम हिंवें पीडलीं एकें । क्रोधाग्नीनें जाळिलीं अनेकें । लोभवल्लीं गुंडाळलीं एकें । त्यांची वाढी देखें खुंटली ॥७३॥ सोहंसांदीं एक पडलीं । एक तृष्णाजळीं बुडालीं । आशाधारीं जीं टोंचिलीं । तीं किर्वनलीं झाडींचि ॥ ७४ ॥ विकल्पपक्षीं खादलीं एकें । अंतरत्वचे कोरलीं देखें । अभाववातें उडालीं एकें । आकल्प एकें भ्रमताती ॥ ७५ ॥ विषयझाडें झाडिलीं । कामिनीकुचकर्दमीं पडलीं । त्यांची निर्गति नव्हे वहिली । अधोद्वारा गेलीं अधोगती ॥ ७६ ॥ एकीं कर्मकांडीं पडलीं । तीं स्वर्गींचे दरडीं गुंतलीं । एकीं संधीं निष्ठलीं । सर्वेचि पडलीं भगमुखीं ॥ ७७ ॥ ऐसिया फळांचिया जाती । वानर हातीं न शिवती । कृपा वोळला रघुपती । वानरपंक्ती विवेकी ॥ ७८ ॥ जीं स्नेहदेठींचीं सुटलीं । वनिताहातीं जीं निष्ठलीं । जीं शांतितेजें मुरालीं । जीं पिकलीं निर्विकार ॥ ७९ ॥ जीं निराशे मघमघिलीं । शांती दान्ती अरुवारलीं । सुखरूपें साकारलीं । फळें सेविलीं वानरीं ॥ ८० ॥ निजात्मबोधें मघमघित । नित्यनैराश्य रस गळत । जेथें हंसशुक झेंपावत । तीं फळें सेवीत वानर ॥ ८१ ॥ अहंकोहंसोहंविहीन । ब्रह्मीं ब्रह्मत्व जेथें लीन । जेथें नाहीं मीतूंपण । ऐसी स्थिती पूर्ण सेविती ॥ ८२ ॥ बहुत दिवस आवरिले । श्रीरामें पर्वतीं सोडिले । नाना रस सेविते झाले । विटावूं लागले सुरसिद्धां ॥ ८३ ॥ विचित्र फळें सेवीत । विचित्र जळें प्राशीत । श्रीरामप्रेमें डुलत । विसरत देहभाव ॥ ८४ ॥ हरिखें विटाविती देवांसी । वांकुल्या दाविती ऋषींसी । वेगीं भजा श्रीरामासी । अच्युतफळासी पावाल ॥८५॥ न भजतां श्रीरामचंद्रा । कदा न चुकती येरझारा । उंकल नव्हे संसारा । दुःखसमुद्रामाजी पडणें ॥ ८६ ॥ नाना ओषधींचे रस । कपींनीं सेविले बहुवस । तृप्ति पावोनि मानस । अवघे तळास उतरले ॥ ८७ ॥

अथोवाच हनूमंतं रामः सुग्रीवसन्निधौ ।
पर्वतो नीयतां वीर मर्यादा चार्णवस्य तु ॥ ११ ॥

एवमुक्तस्तु हनुमान्कृतवेगो महाकपिः ।
दोर्भ्यां समुह्य तं शैलं प्रयातुमुपचक्रमे ॥ १२ ॥

रामासमवेत सुग्रीव वीर । सकळ वानरांचा भार । उतरोनि पर्वतशिखर । काय रघुवीर बोलिला ॥ ८८ ॥ महावीरा हनुमंता । पर्वत नेईं मागुता । स्थापोनियां स्वस्थता । अति शीघ्रता परतावें ॥ ८९ ॥ येथें ठेवितां पर्वत । शिष्टाचाराविरुद्ध होत । यालागीं नेवोनियां त्वरित । यथास्थित स्थापावा ॥ ९० ॥ ब्रह्मयानें सृष्टि निर्मिली जैसी । आपण संरक्षावी तैसी । करूं जातां अँनारिसी । शिष्टाचारासीं मिळेना ॥ ९१ ॥ सागर नुलंघी वेळेसी । तेंवी आम्हीं ब्रह्मसृष्टीसी । प्रतिपाळावें अति यत्नेंसीं । मर्यादेसी रक्षूनी ॥ ९२ ॥ ऐसें बोलतांचि रघुवीर । कपीनें केला नमस्कार । नामें करोनि भुभुःकार । शैल सत्वर उचलिला ॥ ९३ ॥

दिशश्च विमलाः सर्वा जाताश्च हिमपांडुराः ।
हनुमंतं सविक्रांतमुत्पत्य गगने स्थितम् ॥ १३ ॥

धरोनियां दोहीं बाहीं । उचलिला लवलाहीं । श्रीराम स्मरोनि हृदयीं । गगनीं पाहीं उसळला ॥ ९४ ॥ जैसा श्रीरामाचा बाण । धनुष्यींहूनि सुटतां गुण । गगनीं उसळेल संपूर्ण । रिपुदळण करीतचि ॥ ९५ ॥ मेळवोनि द्रव्य तीव्र । जेंवी सोडिजे अग्नियंत्र । तेंवी उडाला कपींद्र । दुष्टसंहार करीतचि ॥ ९६ ॥ तेजें उजळलें उखामंडळ । झाला अरुणोदय तत्काळ । नयन झाले जी निर्मळ । गोळांगूळें देखिला ॥ ९७ ॥ राक्षसां झाला आकान्त । तळमळी लंकानाथ । अनावर हा कपि समर्थ । नाहीं भीत कळिकाळा ॥ ९८ ॥ आम्हीं काळनेमी पाठविला । तोही तेणें मारिला । पर्वत घेवोनि आला । येणें उठविला सौमित्र ॥ ९९ ॥ सवेंचि पर्वत मागुता । घेवोनि जातो आतां । धरा मारा काय पाहतां । हिरोनि पर्वता घ्या वेगीं ॥ १०० ॥

अपश्यन्राक्षसाः सर्वे व्रजंतं सागरोपरि ।
रावणस्त्वब्रवीद्दृष्ट्वा समीपस्थान्निशाचरान् ॥ १४ ॥

१ क्षतयुक्त झालीं. २ सुटका. ३ स्त्रियांच्या हातून. ४ वांकुल्या दाखवूं लागले. ५ मुक्तता, सुटका. ६ वेगळी. ७ मर्यादेला. ८ तोफ. ९ पहांट, प्रभातकाळ. १० वानर (मारुति).

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

हस्तिकर्णं शंकुकर्णं मेघचित्रं च राक्षसम् ।
एते चान्येऽपि बहव आज्ञप्ता रावणेन तु ॥ १५ ॥
स्थूलजंघं महानादं महावक्त्रं महोरसम् ।
उल्कामुखं महावीर्यं चतुर्वक्त्रं च राक्षसम् ॥ १६ ॥
शीघ्रं मायाप्रभावेण हनूमान्गृह्यतामिति ।
यो निगृह्यनयेत्तूर्णं तस्य राज्यं ददाम्यहम् ॥ १७ ॥

स्थूळजंघा सावधान । महानादा ऐकें वचन । महावक्त्रा तुवां आपण । कपिनंदन आणावा ॥१॥ महोरसा उल्कामुखा । महावीर्या चतुर्मुखा । हस्तिकर्णा सुरेखा । कपिनायका आणा वेगीं ॥२॥ शंकुकर्णा विचित्रा । महावीरा मेघचित्रा । सावधान माझिया उत्तरा । ऐका समग्रा सुचित्त ॥ ३ ॥ पर्वतेंसहित कपींद्र । धरोनि आणील मजसमोर । त्यासी करीन राज्यधर । जैसा दशशिर तैसा तो ॥ ४ ॥ येथें आणिल्या पर्वत । राक्षस वांचती समस्त । घाय कोणाही न बाधीत । औषधि अद्भुत तेथें असती ॥ ५ ॥ राज्यदानाचें उत्तर । ऐकतांचि सत्वर । उठावला राक्षसभार[2] । वानरेंद्र धरावया ॥ ६ ॥ मरण देखतांही दृष्टी । उठावले कोट्यनुकोटी । धनलोभाची ममता मोठी । मरणान्त कष्टी सोडीना ॥ ७ ॥ उरीं आदळतां मरण । सर्वथा नव्हे उदासीन । मरेन कीं हें साधीन । प्रतिज्ञापण स्वयें करिती ॥८॥ जो मनोरथ करों बैसे । तो सावध असतांचि पिसें । देह विसरोनि आपैसें । नाचों बैसे मनोरथीं ॥ ९ ॥ राज्य देईन ऐसी गोष्टी । ऐकतांचि उठाउठी । उठल्या कोटींच्या कोटी । मरणसन्निष्टीं सन्नद्ध ॥ ११० ॥

श्रुत्वा तु राक्षसेन्द्रस्य वचस्ते त्वरयान्विताः ।
विचित्रकवचाः सर्वे नानाप्रहरणोद्यताः ॥ १८ ॥

रावणाज्ञा होतांचि पाहीं । वीर सिद्ध झाले ठायीं । कंगलटोप[3] लवलाहीं । कवचें तिहीं बाणेलीं[4] ॥११॥ नाना परींचीं अंगत्राणें[5] । विचित्रालंकार आभरणें । मायावेगें केलें धांवणें । कपिआंगवण लक्षूनी ॥ १२ ॥ सकळीं वेढिला कपींद्र । जैंवीं मेघीं दिवाकर[6] । आच्छादिजे प्रकाशकर । तैंवी वानर कवळिला ॥ १३ ॥ कैंचा रे तूं कोण वानर । वेगीं कवळोनि डोंगर । गगनीं जासी सत्वर । परम निष्ठुर युद्धासी ॥ १४ ॥ न भीसी तूं देवांसी । दानवांतें दृष्टीं न आणिसी । राक्षसांतें न गणिसी । स्वस्थ जातोसी आकाशीं ॥ १५ ॥

न त्वं बिभेषि देवानां दैत्यानां च महात्मनाम् ।
एवं तैर्निगृहीतस्तु विचिंत्येदं वचोऽब्रवीत् ॥ १९ ॥
यदि प्राप्ताश्रया लोका भवद्भिः सहिताः सुराः ।
ब्रह्माणमग्रतः कृत्वा न साम्यं मम केनचित् ॥ २० ॥

कोणातेंही दृष्टीं नाणिसी । गगनीं जातोसी वेगेंसीं । सांडीं सांडीं पर्वतासी । नाहीं तरी मरसी वानरा ॥ १६ ॥ ऐकोनियां राक्षसोत्तर । खवळला तो वानर । म्हणे आलियाही चराचर । मी कपींद्र नाटोपें ॥१७॥ त्रैलोक्यींचे वीर समग्र । आलियाही सुरासुर । दानव मानव समग्र । तरी मी कपींद्र नाटोपें ॥ १८ ॥ सृष्टिकर्ते समग्र । ब्रह्मा आणि हरिहर । येऊं न शकती मजसमोर । दूत साचार रामाचा ॥ १९ ॥ तेथें तुम्ही कायसीं बापुडीं । धांवतसां लवडसवडीं । वृथा मराल रोकडीं । अर्ध घडी न लागतां ॥ १२० ॥ ऐसें बोलोनि कपिनाथ । पुच्छ वाढविलें अद्भुत । जैसा काळपाश अकस्मात । धांवे कवळीत जीवांसी ॥ २१ ॥ हातीं कवळोनि पर्वत । पुच्छ युद्धासी मोकलीत[7] । तेणें कंदन[8] केलें तेथ । राक्षसान्त मांडिला ॥ २२ ॥ अरे हा वायुसुत महाबळी । यासीं न चले अहाच कळी । सत्वर मिळोनियां सकळीं । हातफळी मेळवावी ॥ २३ ॥ वेगळालें झुंझ करितां । रणीं नाटोपे सर्वथा । सकळ मिळोनियां तत्त्वतां । मारूं आतां कपीसी ॥ २४ ॥ ऐसें विचारोनि मनीं । मिसळले युद्धालागोनी । तंव पुच्छ आलें जी ठाकोनी । ख्याती रणीं लावीत ॥ २५ ॥ राक्षस करीत झुंजारीं । वर्षते झाले शस्त्रास्त्रीं । तितकीं निवटीत पुच्छाग्रीं । कपिकेसरी[9] बळवंत ॥ २६ ॥ जैसें अलक्ष काळचक्र । करी जीवांचा संहार । तैसें पुच्छ वेगवत्तर । राक्षसभार निवटीत ॥ २७ ॥ एक शिळा टाकीत । एक शस्त्रें वर्षत । एक अस्त्रें प्रेरीत । दारुण मंत्र मंत्रोनी ॥ २८ ॥ मंत्रोनियां महाशक्ती । हनुमंतावरी सोडिती । एक निधडा

१ राजा. २ राक्षसांचा समुदाय. ३ अश्वांचीं शिरस्त्राणें. ४ धारण केलीं. ५ कवचें. ६ सूर्य. ७ सोडीत, पाठवीत.

८ युद्ध. ९ वानरश्रेष्ठ.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

निश्चितीं । केली शांती सकळांची ॥ २९ ॥ शक्तीची निजशक्ती । श्रीराम स्वयें चिच्छक्ती । तो राम स्मरतां कपिपती । झाली प्रतिहती शक्तीची ॥ १३० ॥ मुखीं श्रीरामाचें नाम । हृदयीं श्रीरामाचें प्रेम । इंद्रियीं श्रीरामाचें कर्म । तया दुर्गम कोण अर्थ ॥ ३१ ॥ स्मरतां श्रीरघुनंदन । आलें सर्वांगीं स्फुरण । पुच्छें आदरिलें कंदन । राक्षसगण मारिले ॥ ३२ ॥ शक्ति केलिया प्रतिहत । पुच्छें शस्त्रें पीठ करीत । शिळा स्वयेंचि चूर होत । लागतां क्षय होय शस्त्रांचा ॥ ३३ ॥

एकद्वित्रिचतुर्विंशच्चत्वारिंशत्तथा शतम् ।
लांगूलाग्रेण तान्वेष्ट्य भ्रामयित्वा व्यचिक्षिपत् ॥ २१ ॥

अन्यांस्तु बलिनः शूरान्राक्षसान्भीमविक्रमान् ।
बध्वा लांगूलपाशेन पद्भ्यां संप्राहरत्कपिः ॥ २२ ॥

एक दोन तीन चारी । पांच सात शतवरी । मारिल्या राक्षसांच्या हारी । कपिकेसरिनिजपुच्छें ॥ ३४ ॥ महाभयानक क्रूर । रणयोद्धा महावीर । रामदूत महाशूर । केलें चरित्र तें ऐका ॥ ३५ ॥ एक बांधोनियां पुच्छासीं । आदळिले गिरिपृष्ठेंसीं । पीठ करोनि अस्थींसी । एक यमसदनासी पाठविले ॥ ३६ ॥ एक पायीं कवळिले । एक लाततळीं रगडिले । एक धाकेंचि निमाले । वीर पडिले असंख्य ॥ ३७ ॥ एकां पाहतां क्रूरदृष्टीं । धाकें करिती मूत्रवृष्टी । विकळ होऊनियां उठाउठीं । प्राण शेवटीं सांडिती ॥ ३८ ॥ एक भुभुःकारें भ्यालीं । निःशेष देहातें विसरलीं । एक दिक्पुटीं लागलीं । एक मुकलीं सर्वस्वा ॥ ३९ ॥

एवं सकंदनं कुर्वन्रक्षसां मेघवर्चसाम् ।
दिवाकर इव व्योम्नि सोऽगच्छद्वायुनंदनः ॥ २३ ॥

अति देवकृतं कर्म दृष्ट्वा तस्य तु देवताः ।
साधु साध्विति भाषंतः पुष्पवर्षैरवाकिरन् ॥ २४ ॥

हत्वा रक्षःसहस्राणि लांगूलचरणायुधैः ।
स्वस्थाने पर्वतं स्थाप्य रामस्याग्रे समागतः ॥ २५ ॥

प्रणिपत्य ततो रामं सुग्रीवं सहलक्ष्मणम् ।
आचचक्षे तथा वृत्तं यावत्पूर्वं च सांप्रतम् ॥ २६ ॥

जेंवी गगनीं रविमंडळ । मेघ आच्छादी सकळ । तेंवी येवोनि राक्षसदळ । गोळांगूळ आच्छादिला ॥ १४० ॥ तो रवि आपल्या निजकिरणीं । मेघांचें अंतर भेदूनी । स्वप्रकाशेंकरोनी । अवनी गगन प्रकाशी ॥ ४१ ॥ श्रीरामदळीं हनुमान वीर । जेंवी मूर्तिमंत दिवाकर । महामेघ राक्षसवीर । पाहती कपींद्र आच्छादूं ॥ ४२ ॥ बाप कपिकुळीं दिनमणी । पुच्छरूप निजकिरणीं । अंतरें सकळांचीं भेदूनी । ठेला करोनी वाताहत ॥ ४३ ॥ जेंवी सरोवरीं गज रिघे । कमळिणी निवटी वेगें । तेंवी कपीनें लागवेगें । राक्षस रागें मर्दिले ॥ ४४ ॥ पर्वतेंसहित युद्ध करीत । देखतां देव समस्त । होवोनि सकळ विस्मित । स्तुति करीत कपीची ॥ ४५ ॥ मानवोनि सुरासुरीं । पुष्पवृष्टि कपिशिरीं । करिते झाले निजगजरीं । जयजयकारीं हर्षित ॥ ४६ ॥ सुर जयजयकार करित । विजयी झाला कपिनाथ । ठेवोनी स्वस्थानीं पर्वत । आला रघुनाथवंदना ॥ ४७ ॥ लोटांगण श्रीरामचरणां । नमन केलें लक्ष्मणा । सुग्रीवासी केलें नमना । अंगदही जाणा नमियेला ॥ ४८ ॥ बिभीषण शरणागत । त्यासीही नमी हनुमंत । येरँ वानर समस्त । नमी कपिनाथ अति प्रीतीं ॥ ४९ ॥ श्रीरामें दिधलें आलिंगन । हृदयीं धरिला कवळून । सौमित्राचें जीवदान । तुवां जाण मज दिधलें ॥ १५० ॥ सौमित्रें आलिंगिलें हनुमंता । तूं आमुचा जीवदाता । सुखी केलें श्रीरघुनाथा । बहु आतां काय बोलूं ॥ ५१ ॥ आम्ही बंधु ते कुबंधु । तूं कांहीं नसोनि सुबंधु । आमचेनि रामा दुःखावबोधु । सुखावबोधु तुझेनि ॥ ५२ ॥ तुझ्या एक एक कर्मा । आठवितां प्लवंगमा । मन विसरे मनोधर्मा । वीरोत्तमा हनुमंता ॥ ५३ ॥ सीताशुद्धीची मातं । स्मरतां चित्त चकित । वधूं जातां इंद्रजित । जाहलों प्रतिहत आम्ही तेथें ॥ ५४ ॥ एकलेनि वीरें आपण । जुत्पती आणि वानरगण । शरणागत बिभीषण । तुवां आपण वांचविला ॥ ५५ ॥ जो अदट त्रैलोक्यासी । त्या मारविलें इंद्रजितासी । यश दिधलें मज सौमित्रासी । काय तुजपासीं तुझें सांगूं

१ नाश. २ कठीण. ३ समुदाय. ४ हाडांचें. ५ दाही दिशांस. ६ सूर्य. ७ इतर. ८ हे वानरा (मारुते).

९ हकीकत. १० कुंठित, पराजित. ११ अनिवार, दांडगा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ ५६ ॥ शोक करितां रामासी । तुवां पावोनि वेगेंसीं । सावध करोनि स्वामीसी । स्वस्वरूपासी प्रबोधिलें ॥ ५७ ॥ राम सकळ स्वरूपस्थिती । तो राम प्रबोधिला मारुती । दास्य करिसी अहोरातीं । ख्याती त्रिजगतीं रामदूता ॥ ५८ ॥ श्रीरामसुखप्रकाशक । हनुमान झाला सत्य एक । सुखाचेंही सोलींव सुख । कपिनायक मारुती ॥ ५९ ॥ ऐसा स्तवोनियां हनुमंत । सौमित्र चरणां लागत । येरें सुखावोनि त्वरित । चरण वंदीत सौमित्राचे ॥ १६० ॥ म्हणे सौमित्रा ऐक विनंती । जितुकी कपीची शक्ती । तितुकी रामनामाची ख्याती । नामेंवीण मारुति कांहीं नेणे ॥ ६१ ॥ जेव्हां संकट कांहीं पडत । तेव्हांचि रामनाम स्मरत । नामें विघ्न भस्म होत । विजयी कपिनाथ लटिकाचि ॥ ६२ ॥ श्रीरामनाम स्मरतां । द्वंद्वें नुधविती माथा । विघ्नें हाणोनियां लाता । कपि तत्त्वतां निजविजयी ॥ ६३ ॥ जितुकें कपीचें बळ । तितुकें नामचि केवळ । हें तूं जाणसी सकळ । अति अविकळ रामभजनें ॥ ६४ ॥ ऐसें विनवोनि सौमित्रासी । आलिंगिलें सुग्रीवासी । बिभीषणादि अंगदासी । वानरांसी आलिंगी ॥ ६५ ॥ सांगितलें सकळ वृत्त । जाहलीं युद्धें बहुत । रामें निवारिलीं समस्त । कपिनाथ रक्षिला ॥ ६६ ॥ पूर्वीं येथून जातेवेळां । रावणें राक्षस पाठविला । कपटाश्रम निर्मिला । गोंवूं लागला कपीसी ॥६७॥ श्रीराम स्मरतां चित्तीं । झाली कपटाची उपेहती । राक्षस मारिला निश्चितीं । प्रतापशक्ती नामाची ॥ ६८ ॥ जळसरोवराभीतरीं । शापदग्ध निशाचरी । गिळावया कपिकेसरी । पायीं झडकरी झोंबली ॥ ६९ ॥ पायीं झोंबतां कपीसी । राम स्मरोनि आवेशीं । मारूं आदरिलें राक्षसीसी । रामें तिसी उद्धरिलें ॥ १७० ॥ तिणें राक्षसाची मात । मज सांगितला वृत्तान्त । कपटी म्हणोनियां घात । करितां मुक्त रामें केला ॥ ७१ ॥ ओषधींतें रक्षिते । चौदा सहस्र गंधर्व तेथें । रणीं मिसळले युद्धातें । ते श्रीरामें निर्वटिले ॥ ७२ ॥ पुढें भरताची भेटी । ते सांगितली सकळ गोष्टी । पर्वत नेतां संकटीं । राक्षस कोटी उठावले ॥ ७३ ॥ हातीं असतां गिरिवर । युद्ध झालें घोरांदर । नामें निवटिले समग्र । क्षणमात्र न लागतां ॥ ७४ ॥ स्वस्थ ठेवोनि पर्वत । परतोनि आलों येथ । ऐकतां कपीचा वृत्तान्त । वानर समस्त सुखावले ॥ ७५ ॥ माथा वाहोनि पुच्छाटी । घालिती कोल्हाटें उफराटीं । हरिखल्या वानरकोटी । बाप जगजेठी हनुमंत ॥ ७६ ॥ एका जनार्दना शरण । राक्षस निर्दळूनि जाण । पर्वत स्वस्थानीं स्थापून । कपिनंदन निजविजयी ॥ १७७ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां हनुमद्गिरिस्थापनं नाम पंचाशत्तमोऽध्यायः ॥ ५० ॥ ओंव्या ॥ १७७ ॥ श्लोक ॥ २६ ॥

अध्याय एकावन्नावा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ स्वस्थानीं ठेवोनि पर्वत । विजयी झाला कपिनाथ । श्रीराम आनंदें डुल्लत । हरिखें नाचत कपिसैन्य ॥ १ ॥ शरणागत बिभीषण । राजा सुग्रीव आपण । सौमित्रातें जीवदान । हनुमंतें जाण दीधलें ॥ २ ॥ काळें तोंड लंकानाथा । ब्रह्मशक्ती झाली वृथा । पळोनि गेला न झुंजतां । तोंड मागुता न दाखवी ॥ ३ ॥ जरी येता झुंजासी । क्षणें मारितों रावणासी । वानर उडती आवेशीं । लंकेशासी मारावया ॥ ४ ॥ आज्ञा पुसती रामासी । वेगें निरोप दे आम्हांसी । अद्यापि याची भीड कायसी । लंकेशासी मारावया ॥ ५ ॥ पाडूं त्रिकूटाचे कडे । उचटूं दुर्गीचे धोंडे । नगर विध्वंसूं रोकडें । श्रीरामापुढें बोलत ॥ ६ ॥ तुवां कां धरिलें मौन । कां न देसी आज्ञापन । वानर करिती उड्डाण । लंकाकंदन करावया ॥ ७ ॥ ऐकोनि वानरांचें वचन । बोलता झाला रघुनंदन । रावण पळाला पाठ देऊन । पळत्या आपण नये मारूं ॥ ८ ॥ क्षात्रधर्म ऐसा आहे । जो संमुख रणीं उभा राहे । उशिण्याघायीं युद्ध बा हें । शास्त्रीं पाहें बोलिलें ॥ ९ ॥ संमुख रावण न येतां । कैंवी मारूं लंकानाथा । लंका दिधली शरणागता । ते विध्वंसितां महादोष ॥ १० ॥ ऐसें बोलोनि रघुनाथ । केले वानर स्वस्थ । येरीकडे लंकानाथ । झाला सचिंत निजगृहीं ॥ ११ ॥ सैन्य निमालें

---

१ सर्वविसस. २ नाश. ३ राक्षसी. ४ संहारिले. ५ भयंकर. ६ आनंद पावल्या. ७ समोरासमोर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

समस्त । प्रधानादि प्रहस्त । कुंभकर्णा केला घात । उभा बाणीं त्वरित फोडिला ॥ १२ ॥ खातां न पुरे त्रिभुवन । काळाचा घांस करी आपण । तो मारिला जाण । विंधोन बाण कुंभकर्ण ॥ १३ ॥ सुरवरां ज्याचा धाक । ज्यासी कांपती ब्रह्मादिक । चौदा वेळ सुरनायक[1] । आणिला देख बांधोनी ॥ १४ ॥ जाणे शस्त्रास्त्र संपूर्ण । मंत्र तंत्र क्रियाविधान । अभिचाराचें[2] जन्मस्थान । वीर दारुण इंद्रजित ॥ १५ ॥ ब्रह्मादिकां न कळे वहिला । ऐसा प्रयत्न दोनी वेळ केला । तो शरबंध वृथा गेला । वायां गेला खटाटोप ॥ १६ ॥ होम करोनि दारुण । केला शंकर प्रसन्न । अश्वसहित सशस्त्र स्यंदन[3] । काढिला आपण अग्नीमाजी ॥ १७ ॥ भोंवतीं आवरणें अत्युग्र । तीं निवटोनियां समग्र । होम विध्वंसिती वानर । केला घाबरा इंद्रजित ॥ १८ ॥ अत्युग्र मंत्रावरण । नभीं गुप्त शस्त्रावरण । भूतगणांचें आवरण । अति दारुण सभोंवतें ॥ १९ ॥ शाकिनी डाकिनी महाशक्ती । कात्यायनी सैन्यासहिती । चामुंडा होम राखिती । अहोरांतीं[4] निजबळें ॥ २० ॥ भैरवरक्षण दारुण । अति दारुण वेताळ जाण । झोटिंगांचें आवरण । सावधान राखीत ॥ २१ ॥ ऐसा अतिबळें बळवंत । अति निगुतीं होम करीत । अग्निकुंडीं रथ प्राप्त । होतां त्वरित धाडी आली ॥ २२ ॥ अदट वीर हनुमंत । कळिकाळा दृष्टीं नाणीत । रामनामें सदा गर्जत । अवचित तेथ पातला ॥ २३ ॥ नामें मंत्राची क्षीण शक्ती । नामें शस्त्रांची उपहती । नामें आकळिल्या शक्ती । भूतें होती शरणागत ॥ २४ ॥ भूतें शक्ति वेताळ । हनुमंतासी प्रसन्न सकळ । करोनियां रणकल्लोळ । होमज्वाळ विध्वंसिला ॥ २५ ॥ त्यासी कुरुठा[5] बिभीषण । चितावोन कपिनंदन । सवें आणिला लक्ष्मण । इंद्रजित आपण मारविला ॥ २६ ॥ पवनीं दहनीं गगनीं । अवनीं आणि जीवनीं[6] । जेथ जेथ जाय पळोनी । कपि धांवोनी पावे तेथ ॥ २७ ॥ पळून जातां मेघपृष्ठाआड । तंव तेथ पावे म्राकड । करोनियां खंडविखंड । रणीं प्रचंड पाडिला ॥ २८ ॥ सौमित्रा लागली शक्ती । तरी न वचे विकळ गती । शिर कापोनि हातोहातीं । श्रीरामाप्रती पाठविलें ॥ २९ ॥ शक्तिविकळ लक्ष्मण । तेथें लवलाहें सुषेण । सांठा ओषधींचा काढोन । सुमित्रानंदन उठविला ॥ ३० ॥ एकेक वीर बळवंत । रणयोद्धे रणोन्मत्त । वानरदळ अत्यद्भुत । संग्रामांत नागविती ॥ ३१ ॥ रामसौमित्र दोघे वीर । अतुळ बळाचे जुंझार । दुर्मू शकती काळचक्र । सुरासुर कांपती ॥ ३२ ॥ तेथें माझी कोण शक्ती । अनावर हा रघुपती । अत्यद्भुत ब्रह्मशक्ती । नेली भस्मांतीं सौमित्रें ॥ ३३ ॥ खड्ग लागे हृदयावरी । सौमित्र पडिला धरेवरी । दिव्यौषधी कपिकेसरीं । आणोनि झडकरी उठविला ॥ ३४ ॥ पर्वत नेतां स्वस्थाना । उठली राक्षससेना । तितुकी मारितां कपिनंदना । अर्ध क्षण न लागेचि ॥ ३५ ॥ हातीं असतां डोंगर । जुंझों आले राक्षसभार । पुच्छें निवटिले समग्र । क्षणमात्र न लागतां ॥ ३६ ॥ पुच्छाचिये संवसाटीं । मारिल्या राक्षसकोटी । दुजा वीर नाहीं सृष्टीं । बळ मर्कटीं अनिवार ॥ ३७ ॥ रणीं नाटोपे सहसा । सांडिला संग्रामाचा धिंवसा[11] । माझा प्राण वांचेल कैसा । चिंता लंकेशा अनिवार ॥ ३८ ॥ चिंतेचा अग्नि दुर्धर । रावणा लागला अनिवार । नाठवती भोगोपचार । दशशिर तळमळी ॥ ३९ ॥ भय सुटलें दुर्धर । विसरला कर्मतंत्र । कर्माकर्मीं रघुवीर । सत्य साचार लागला ॥ ४० ॥ बैसों जातां आसनीं । राम प्रकटे सुखासनीं । उठूं जातां तत्क्षणीं । सायुध नयनीं देखिजे ॥ ४१ ॥ अभ्यंग मार्जन करितां । स्नेहीं देखे रघुनाथा । खुंटली स्नेहाची वार्ता । श्रीरघुनाथाचेनि मेणें ॥ ४२ ॥ रामभय लागलें जीवीं । स्नेह तुटला सर्वभावीं । स्नान मार्जन भोगपदवी । राम भावी सर्वत्र ॥ ४३ ॥ बोणें[12] वाढिलें[13] भोजना । षड्रस अन्न ताटीं जाणा । घांस घेतां रावणा । रघुनंदना देखिलें ॥ ४४ ॥ ताट भोक्ता परवडी देख । अवघा झाला रघुकुळटिळक । वेडावला दशमुख । रघुनायक ग्रासीं दिसे ॥ ४५ ॥ ग्रास घ्यावया पुरता । अवकाश नाहीं रिता । नभ मीनलें[14] रघुनाथा ।

---

१ इंद्र. २ जारणमारणाचें. ३ रथ. ४ रात्रंदिवस. ५ आश्रय केलेला. ६ उदकांत. ७ लढवय्ये. ८ निवारे. ९ आवरण्यास कठीण, दुर्जेय. १० पृथ्वीवर. ११ धैर्य. १२ अन्न. १३ वाढिलें. १४ मिळालें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

चिदाभासता कोंदली ॥ ४६ ॥ हातवणी आणिलें कलशीं । तेथें देखे राघवासी । हाडपी देतां विडियांसी । रघुनाथासी देखिलें ॥ ४७ ॥ नापित दावी दर्पण । भीतरीं दिसे रघुनंदन । माझेंचि रूप झालें आन । रावणपण न दिसे ॥ ४८ ॥ न पाहतां पळों जाय । भूमिका तेही राम होय । सर्वथा न चालती पाय । गमन पाहें खुंटलें ॥ ४९ ॥ धाकें आला निद्रास्थाना । तेथें देखे रघुनंदना । भयें विस्मित झाला मना । दशानना अति चिंता ॥ ५० ॥ जवळी देखतां मंदोदरी । राम म्हणोनि हांका मारी । येरी हांसली झडकरी । दशशिरीं आकान्त ॥ ५१ ॥ घरें खांब उथाळें भिंती । अवघीं रामरूप भासती । रावण झालासे चकित चित्तीं । मूर्च्छागतीं पडियेला ॥ ५२ ॥

आसने शयने तिष्ठन्भुंजानः पर्यटन्महीम् ।
चिंतयानो हृषीकेशमपश्यत्तन्मयं जगत् ॥ १ ॥

उठणें बैसणें निजणें । खाणें जेवणें अवघ्राणणें । दखणें ऐकणें स्पर्शणें । सकळ देखणें श्रीराम ॥५३॥ वाचेची वचनोक्ती । इंद्रियांची क्रियाशक्ती । प्राणांची प्राणशक्ती । राम निश्चितीं होवोनि ठेला ॥ ५४ ॥ अहंकाराची अहंकृती । अंतःकरणाची आवरणशक्ती । सर्वभावें लंकापती । स्वयें रघुपतीं व्यापिला ॥ ५५ ॥ जवळी येवोनि मंदोदरी । सावध करी दशशिरी । भ्रांत झालासी कां शरीरीं । धीर निर्धारीं सांडिला ॥ ५६ ॥ दृष्टीं देखतां स्त्रीलिंग । योगिया होय योगभंग । तापसाचा तपोभंग । होय साङ्ग स्त्रीवाक्यें ॥ ५७ ॥ व्रतधारियाचा व्रतभंग । याज्ञिकाचा निजयाग । स्त्रीवाक्यें गेला साङ्ग । होय व्यंग स्त्रीवाक्यें ॥ ५८ ॥ कर्मठासी कर्मभ्रम । धर्मिष्ठासी क्षीण धर्म । नेमिष्ठाचा भ्रमे नेम । करी भस्म स्त्रीवाक्य ॥ ५९ ॥ उपासकाची उपासना । ध्यानस्थाचें ध्यान जाणा । ज्ञानियाच्या निजज्ञाना । करी उगाणा स्त्रीवाक्य ॥ ६० ॥ ऐकतां स्त्रीवाक्यासी । शुक नागवला तपासी । चढला अभिमान मानसीं । हरिहरांसी गणेना ॥ ६१ ॥ शिवें देखतां मोहिनी । ध्यान विसर्जिलें तत्क्षणीं । लंगोटीची दाणादाणी । शंकर मनीं वेडावला ॥ ६२ ॥ तेथें रावण बापुडें किती । क्षणें आणिला देहस्थिती । हडबडीत निजचित्तीं । लंकापति ऊठिला ॥ ६३ ॥ काय करूं मी निश्चितीं । कैसे माझे प्राण वांचती । सर्व कर्मीं रघुपती । लागला निश्चितीं मारावया ॥ ६४ ॥ काय विचारों मी मंत्र । तळमळी दशशिर । तंव आठवला विचार । हरिखें थोर वाटला ॥ ६५ ॥ दूत धाडूं पाताळासी । महिकावती नगरीसी । समाचार वेगेंसीं । अहिरावणासी जाणवूं ॥ ६६ ॥ अहिरावण महिरावण । सख्खे बंधु दोघे जण । रणयोद्धे अति दारुण । रामलक्ष्मण मारतील ॥ ६७ ॥ निश्चय मानोनि चित्तीं । हरिखला लंकापती । मारावया रघुपती । दूत निश्चितीं पाठवूं ॥ ६८ ॥ जीविताशा बलीयँसी । दूत धाडी पाताळासी । समाचार अहिरावणासी । महिरावणासी सांगत ॥ ६९ ॥ दूताप्रती रावण । सांगता झाला मधुरवचन । येथील वृत्तान्त आपण । यथार्थ जाण सांगावा ॥ ७० ॥ युद्ध झालें श्रीरामासीं । रामें मारिलें सैन्यासी । प्रधानादि प्रहस्तांसी । राक्षसांसी मारिलें ॥ ७१ ॥ इंद्रजित आणि अखया कुमर । पुत्र मारिले समग्र । उरला असे रावण मात्र । त्यासीही सत्वर मारिती ॥ ७२ ॥ म्हणवोनि तुम्हांपासीं । मज धाडिलें वेगेंसीं । सांगविलें युद्धकथेसी । आतां जाणसी तें करीं ॥ ७३ ॥ म्हणवोनि आज्ञापिला दूत । गेला पाताळा त्वरित । समाचार समस्त । रावणोक्त सांगीतला ॥ ७४ ॥ अहिरावण आदरेंसीं । पुसता झाला दूतासी । युद्ध रामरावणांसी । कोण हेतूसीं लागलें ॥ ७५ ॥ हा साद्यंत समाचार । मज सांग सविस्तर । मारितां रामसौमित्र । निमेषमात्र मज नलगे ॥७६॥ ऐकोनि अहिरावणमात । दूत आदरें सांगत । जनकराजा अत्यद्भुत । विदेहस्थ मिथुलेसी ॥ ७७॥ जानकी त्याचें कन्यारत्न । लावण्यगुणनिधान । तिचें स्वयंवर आपण । जनकें जाण मांडिलें ॥ ७८ ॥ मूळें पाठविलीं सकळ । देशोदेशींचे भूपाळ । नगरीं मीनले सकळ । जनकबाळ साधावया ॥ ७९ ॥ यक्षगण गंधर्व । सिद्ध मीनले जी सर्व । पाहों आले स्वर्गींचे देव । विमानीं धांव घेवोनि ॥ ८० ॥ रावणही तेथें गेला । राक्षसगणीं परिवारिला । जानकी देखोनि वहिला । होवोनि ठेला मूर्च्छित ॥ ८१ ॥ तेथें आली ऋषिमंडळी ।

१ पाणी. २ तांब्यांतून. ३ विडे देणारा. ४ हुंगणें. ५ नाश. ६ आनंद. ७ मोठी बळकट. ८ जमले. ९ वेष्टिलेला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

विश्वामित्रादि सकळी। राम सौमित्र त्यांजवळी। शिष्यमेळीं बैसले ॥ ८२ ॥ जनकाचा दुर्धर पण। भार्गवदत्त चाप गहन। जो चढवील तयासी गुणं। जानकी जाण तया वरी ॥ ८३ ॥ चाप दृष्टीं पाहतां। वीर मूर्च्छित तत्त्वतां। राजे चकित झाले चित्ता। जनकदुहिता लाभेना ॥ ८४ ॥ राजीं सांडिलें सामर्थ्य। देखोनियां जनक बोलत। निर्वीर उर्वीं समस्त। वीर निश्चित असेना ॥ ८५ ॥ जनकाचें वचन दारुण। ऐकोनि क्षोभला रावण। चापीं चढवावया गुण। स्वयें आपण सरसावला ॥ ८६ ॥ तंव विपरीत झालें तेथें। माथा राहिला भूमीतें। तळ धरिला हातें। गर्वोन्मत्तें रावणें ॥ ८७ ॥ गर्वाचिया उद्धतीं। सज्ज करितां चापाप्रती। झाली गर्वाची उपहती। गुण निश्चितीं चढेना ॥ ८८ ॥ फिरवितां त्या धनुष्यासी। घोळसिलें रावणासी। चंद्री लागली नेत्रांसी। तोंडा खरसी पैं आली ॥ ८९ ॥ उरावरी पडलें धनु। खुडुपे हातपाय रावणु। जनक आला जी धांवोनु। धनुष्य काढोन उठविला ॥ ९० ॥ बहुत अपमानला चित्तीं। पाहों लागला निश्चितीं। कोण चढवील गुण सीतीं। सभेप्रती धनुर्वाडा ॥ ९१ ॥ तंव उठिला रघुवीर। बाळ निमासुर सुंदर। ठाणमाण मनोहर। पीतांबर कांसेसी ॥ ९२ ॥ मदनमोहन सांवळा। टिळक रेखिला पिंवळा। कंठीं वैजयंती माळा। मुकुट बाणला रत्नांकित ॥ ९३ ॥ सज्ज धनुष्य तूणीर। पाठीसीं बंधु सौमित्र। रंगामाजी रघुवीर। रावणें समोर देखिला ॥ ९४ ॥ बाळ दिसतसे धाकुला। माथ्याचा जार नाहीं वाळला। मरणा धरणें कां बैसला। शिकविल्या नायके ॥ ९५ ॥ ऐकोनि रावणवचन। श्रीराम झाला हास्यवदन। घेवोनि गुरूचें आज्ञापन। धनुष्या जाण उचलिलें ॥ ९६ ॥ धनुष्या चढवोनियां गुण। वोढी काढितां रघुनंदन। मध्यें कडाडिलें जाण। गेलें मोडून तीं ठायीं ॥ ९७ ॥ सबळ देखोनि रघुनाथा। लाज लागली लंकानाथा। सर्वथा नुधवीच माथा। निघे मागुता अधोवदन ॥ ९८ ॥ श्रीरामें पर्णिली सीता। तैंपासून लंकानाथा। लागली अनिवार अवस्था। म्हणे जनकदुहिता केंवी साधे ॥ ९९ ॥ पितृवचनें रघुनाथ। वना निघाला त्वरित। सीतासौमित्रांसमवेत। वनें हिंडत दुर्गम ॥ १०० ॥ पुढें जनस्थाना पातले। खरदूषणांसीं युद्ध झालें। त्रिशिरादि राक्षस मर्दिले। रामें निवटिले बाणधारां ॥ १ ॥ चवदा सहस्र रक्षोगण। त्रिशिरादि खर दूषण। रामें विंधोनियां बाण। मारिले क्षण न लागतां ॥ २ ॥ शूर्पणखा नकटी केली। ती बोंब घेवोनि वहिली। रावणसभे सांगों आली। रामें गांजिली म्हणोनी ॥ ३ ॥ नकटें नाक घेवोनि पुढें। रावणा सांगे वाडेंकोडें। जानकीचें रूप गाढें। निजनिवाडें वानीत ॥ ४ ॥ बंधु मारिल्याचें दुःख। अणुमात्र नाहीं देख। स्वयें झाली निर्नासिक। तरीही हरिखं सीतेचा ॥ ५ ॥ शिकवोनियां नानायुक्ती। प्रबोधिला लंकापती। सीताहरणासी युक्ती। केली निश्चितीं ते ऐका ॥ ६ ॥ मृगवेष मारीचासी। देवोनि धाडी रामापासीं। सीता देखोनि वेगेंसीं। मागे कंचुकीसी मृगत्वचा ॥ ७ ॥ श्रीराम निघाला बाहेरी। मृगें काढोनि नेला दूरी। सौमित्रासी सीता सुंदरी। धाडी झडकरी रामामागें ॥ ८ ॥ गुंफेसी एकली सीता। जाणोनियां तत्त्वतां। भिक्षुकवेषें रावण सीता। हरावया सर्वथा तेथें आला ॥ ९ ॥ नकटीच्या बोला भुलला। राज्यपदातें विसरला। रंक भिकारी झाला। नकटीनें केला उपकार ॥ ११० ॥ मज भिक्षा दे वो माते। म्हणोनि मागे जानकीतें। येरीं पूजिला आतिथ्यें। निजचित्तें कृपाळु ॥ ११ ॥ ते भगवद्बुद्धीं पूजित। हा कपटें हात घालीत। उचलोनि खांदीं घेत। येरी स्मरत श्रीरामनाम ॥ १२ ॥ आक्रंदतां सीता सुंदरी। रावणें आणोनि झडकरी। अशोकवनिकेमाझारीं। ठेविली निर्धारीं दुःखित ॥ १३ ॥ त्या दिवसापासून जाण। विघ्नें उठलीं दारुण। शोकाकुलित रावण। केलें कंदन लंकेचें ॥ १४ ॥ सीताशुद्धीसीं वानर। आला जैसा पर्वताकार। नगर विध्वंसिलें समग्र। घरोघरें जाळिलीं ॥ १५ ॥ चौदा सहस्र बनकर। ऐशीं सहस्र किंकर। जंबुमाळी प्रधानपुत्र। अखयाकुमर मारिला ॥ १६ ॥ इंद्रजितासीं करोनि रण। धुळी मेळविला जाण। सभेमध्यें येवोनि आपण। राजा रावण गांजिला ॥ १७ ॥ आगी लावितां पुच्छासी।

१ धनुष्याची दोरी. २ पृथ्वी. ३ फेंस. ४ भाता.

५ वर करीना. ६ वरिष्ठी. ७ परोपरीनें. ८ हर्ष. ९ सेवक.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

जाळिलें दाढ्या मिशांसी। सर्वेचि उडोनि वेगेंसीं। माड्या गोपुरांसी जाळिलें ॥ १८॥ परतोनि गेला वानर। घेवोनि आला रघुवीर। शिळीं बुजोनि सागर। दुर्ग चौफेर वेढिले ॥ १९॥ बिभीषण शिकवी रावणा। न मानोनि त्याच्या वचना। लाता हाणितल्या जाणा। तो गेला शरण श्रीरामा ॥ १२०॥ पहिलें करितां रणकंदन। असंख्य सैन्य मारिलें जाण। कळवळोनि रघुनंदन। शिष्टाई आपण मांडिली ॥ २१॥ ते न मानीच रावण। दूतें निर्भर्त्सिला आपण। मारूं धांवे दशानन। येरु गगनीं उसळला ॥ २२॥ गगनीं उसळला वानर। मंडप उचलिला समग्र। नेला श्रीरामासमोर। बळियाढा वीर अंगद ॥ २३॥ मग खवळला रघुवीर। सकळ वानरांचा भार। सैन्य मारिलें समग्र। वानरवीर महाबळी ॥ २४॥ मारिले प्रधान समग्र। मारिले कुमरें कुमर। इंद्रजित जो महावीर। तोही सत्वर मारिला ॥ २५॥ कुंभकर्ण काळांतक। त्यासी मारी रघुकुळटिळक। शंख करी दशमुख। कांहीं विवेक स्फुरेना ॥ २६॥ समरांगणीं करितां रण। नागवेचि रघुनंदन। रावणें साधिलें विंदान। पाठी देवोन पळाला ॥ २७॥ रावण जरी न पळता। राम त्यासी जीवें मारिता। धर्मयुद्ध श्रीरघुनाथा। घावो पळतां न घालीच ॥ २८॥ शक्ति लागली लक्ष्मणा। त्यासी वांचवावया जाणा। करोनि हनुमंतें उड्डाणा। पर्वत द्रोण आणिला ॥ २९॥ पर्वतींच्या दिव्यौषधी। घायीं पिळोनि त्रिशुद्धी। उठवी सुषेण सुबुद्धीं। प्रखर बुद्धी वानरा ॥ १३०॥ कांहीं न चलेचि मत। दाहीं मुखीं शंख करीत। तळमळीत लंकानाथ। समाचार येथ पाठविला ॥ ३१॥ तुम्हीं करोनि धांवणें। रामसौमित्र मारणें। अन्यथा मरिजे रावणें। राक्षसीं होणें देशोधडी[२] ॥ ३२॥ मागुती तुम्ही येथें स्वस्थ। वांचोनि लाहा[३] जीवें जीत। न जिंकितां रघुनाथ। ऐसा आकान्त मांडेल ॥ ३३॥ म्हणवोनि तुम्ही जाणा। कुढवावें[४] रावणा। अन्यथा होईल कंदना। राक्षसगण निमतील ॥ ३४॥ ऐसें सांगतां दूतासीं। अहिरावण मानसीं। क्षोभला अति आवेशीं। काय दूतासी बोलत ॥ ३५॥ आजवरी तुम्हां काय झालें। सैन्य

अवघें मारविलें। पुत्र प्रधान जीवें गेले। कुंभकर्णाही वधियेलें बाणधारीं ॥ ३६॥ सकळ कुळा शांती केली। मग बोंब येथें पाठविली। मूर्खपणाची शीग झाली। काय बोलीं बोलावें ॥ ३७॥ दोघे माणूस ते किती। सर्वें वानरदळसंपत्ती। त्यासाठीं कुंथाकुंथी। वीर किती मारविले ॥ ३८॥ आम्हां राक्षसांचें भक्ष्य। देखा उघड माणूस। वानरें कोशिंबिरीस। राक्षसांस न पुरती ॥ ३९॥ अवघीं घालितां मुखाप्रती। हाडही न लागे दांतीं। तिहीं मारिल्या राक्षसपंक्ती। आश्चर्य किती सांगावें ॥ १४०॥ सकळ सैन्या केला घात। थोर शहाणा लंकानाथ। चिंता न करीं होईं स्वस्थ। राघवान्त मी करीन ॥ ४१॥ ऐसें बोलोनि वहिलें। दूता लंकेसी धाडिलें। रावणातें आश्वासिलें। अहिरावणें महिरावणें ॥ ४२॥ सर्वथा न करीं चिंता। सुखें असावें लंकानाथा। रामसौमित्रांच्या घाता। निश्चितार्थी करूं आम्ही ॥ ४३॥ ऐसें गर्जोनि हरिखें। दूत बोळविला कौतुकें। स्वयें नवसिती अंबिके। माते आवश्यकें कृपा करीं ॥ ४४॥ रामसौमित्र हाता। लागतांचि तत्त्वतां। दोघांचिया निजघाता। करूं सर्वथा तुजपुढें ॥ ४५॥ षोडशोपचारीं पूजा। करोनियां अति वोजा[५]। प्राप्त व्हावा रघुराजा। प्रसाद वोजा मागती ॥ ४६॥ प्राप्त झालिया प्रसादासी। आम्ही न भिवों कळिकाळासी। सर्वथा न होऊं उदासी। द्यावें प्रसादासी झडकरी ॥ ४७॥ बहुतांपरी विनविती। करुणा अनिवार भाकिती। विचित्रा स्तुती पढती। मग प्रार्थिती ते जगदंबे ॥ ४८॥ जगदंबा जाणे आपण। विश्वात्मा रघुनंदन। त्याच्या वधालागून। ईहीं प्रार्थन मांडिलें ॥ ४९॥ कपटी दुरात्मे राक्षस। करून राहिले पाताळवास। भेटी न होतां श्रीरामास। हे कोणास नागवती ॥ १५०॥ यांचा वध न होतां जाण। धराभार नुतरे पूर्ण। स्वामी कष्टेल रघुनंदन। मागुतेन मारावया ॥ ५१॥ श्रीरामाची दासी। साह्य होईन राघवासी। मारवीन या दुष्टांसी। श्रीरामासी सुखार्थ ॥ ५२॥ विश्वास व्हावया राक्षसांसी। मोकली[६] वामांगमाळेसी। प्रसाद येतां हातासी। अति उल्लासी[७] राक्षस ॥ ५३॥

१ माहीतर. २ देशांतरीं जाणें. ३ असा, रहा. ४ रक्षण करावें. ५ कमाल, कळस. ६ धैर्य दिलें. ७ आवडीनें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

महिरावण संकोचला । वामप्रसाद नव्हे भला । अहिरावणें निर्भर्त्सिला । प्रसादकळा तुज न कळे ॥ ५४ ॥ वामसव्यभाग पाहीं । देवा संकल्पविकल्प न ये कांहीं । मुख्यत्वें देहचि नाहीं । अवयव काथी कल्पिसी ॥ ५५ ॥ नाबदेचे नारळ गोमटे । सबाह्य गोडीचे सांठे । त्यांसीं काढूं जातां कवठें । स्वयेंचि करंटें होइजे ॥ ५६ ॥ सुवर्णाची केली मूर्ती । नख केश अवयव निगुतीं । सर्वांगीं पाहतां निश्चितीं । सुवर्णस्फूर्ती ढळेना ॥ ५७ ॥ गोडी सबाह्य साखरेसी । कां घृत जेंवी घटासी । थिजतां विघरतां तुपासी । पालटीसी अभावो ॥ ५८ ॥ तेंवी देवाची मूर्ति पाहीं । सगुण निर्गुण भेद नाहीं । अवयव कल्पूं नये कांहीं । वाम सव्य न पाहीं विभाग ॥ ५९ ॥ प्रसाद तैसाचि देख । जो आला तो आवश्यक । फळ देईल गा अचूक । जाण निष्टंक महीपति ॥ १६० ॥ प्रबोधोनि महिरावण । करिता जाला विवंचन । युक्ति सांगे महिरावण । रघुनंदन साधावया ॥ ६१ ॥ एका जनार्दना शरण । मात ऐकोनि अहिरावण । विचार करिता झाला पूर्ण । श्रोतीं अवधान मज द्यावें ॥ १६२ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां अहिरावणमहिरावणसंवादो नाम एकपंचाशत्तमोऽध्यायः ॥ ५१ ॥ ओंव्या ॥ १६२ ॥ श्लोक ॥ १ ॥

अध्याय बावन्नावा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ अहिरावण महिरावण । धरावया रघुनंदन । करिते झाले विवंचन । सावधान अवधारा ॥ १ ॥ पाताळ सांडोनि त्वरित । जाले रणभूमीसी प्राप्त । धरोनि न्यावया संधि पाहात । अहोरात्र सावध ॥ २ ॥ येरीकडे वानरभारीं । दळ सज्जी कपिकेसरी । सन्नद्धबद्ध द्रुमकरी । निजगजरीं हरिनामें ॥ ३ ॥ हनुमान वीर निजभक्त । रामभजनीं सावचित्त । करोनियां कुरवंडी जीवित । स्वामीस राखीत अहर्निशीं ॥ ४ ॥ राक्षस मायावी निश्चितीं । युद्धीं पावले उपहती । धूरें चोरिती अतर्क्यगती । म्हणोनि कपिपती राखीत ॥ ५ ॥ न म्हणे वेळ अवेळ । दिवस रात्र अक्षर पळ । घटिका मुहूर्त काळवेळ । नित्य अचळ रामभजनीं ॥ ६ ॥ सर्व शरीर सर्व संपत्ती । अंतर्बाह्य श्रीरामभक्ती । वेंचिली असे मारुतीं । साक्षेपस्थितीं अवधारा ॥ ७ ॥ एकलें मन श्रीरामभक्तीं । लावितांचि बाह्यवृत्ती । सहज अर्पिलें रघुपती । इंद्रियस्थिति श्रीराम ॥ ८ ॥ मनें वचनें कर्मस्थिती । राखिता झाला रघुपती । श्रोतीं अवधान द्यावें चित्तीं । कथासंगती सांगेन ॥ ९ ॥ मनें कवळोनियां ध्याना । मोकलूं न जाणे रघुनंदना । संकल्प विकल्प गमनागमना । रघुनंदनासरिसेंचि ॥ १० ॥ बुद्धिनिश्चयें जाण । सावधान रघुनंदन । राखिता झाला अनुदिन । क्षणें क्षण न विसंबे ॥ ११ ॥ चित्तचिंतनसमवेत । धरोनि राहिला रघुनाथ । अहर्निशीं राम राखीत । सावचित्त सर्वदा ॥ १२ ॥ निजाभिमानी कपिपती । रामोऽहमस्मि निजवृत्ती । धरोनि राहिला रघुपती । अहोरातीं सावध ॥ १३ ॥ अंतःकरणव्यापक पाहीं । राम राखे सर्वां ठायीं । बालाग्रमात्र सवडी नाहीं । राखण पाहीं हनुमंत ॥ १४ ॥ अंतरीं ऐसा हनुमंत । सर्वभावीं रघुनाथ । क्षणक्षणां सांभाळीत । बाह्यव्रत अवधारा ॥ १५ ॥ दृष्टिविषय रघुनंदन । दृश्यमात्रीं भरला जाण । राखता झाला अनुदिन । अनुसंधान अखंड ॥ १६ ॥ श्रवणद्वारीं शब्दविषयो । अर्थावबोधें रामरावो । राखीतसे महाबाहो । भक्तरावो हनुमंत ॥ १७ ॥ घ्राणद्वारें गंधावबोध । श्रीराम परम मकरंद । श्वासोच्छ्वासीं परमानंद । अगाध बोध कपीचा ॥ १८ ॥ रसनारसें विषयस्थिती । श्रीराम स्वयें चिच्छक्ती । गोडियेमाजी रघुपती । वीर मारुति न विसंबे ॥ १९ ॥ त्वचा आलिंगितां स्पर्शीं । उडवूनि शून्यत्व आकाशीं । मिठी घालोनि श्रीरामासी । चिदाकाशीं राखीत ॥ २० ॥ वाचेनें शब्दव्युत्पत्ती । गांठ घातली रघुपती । बोलतां व्यवहारवदंती । राम मारुति न विसंबे ॥ २१ ॥ हस्ताची क्रियाशक्ती । क्रियामात्र रघुपती । घेतां देतां अर्थजाती । राम मारुति न विसंबे ॥ २२ ॥ चरणांचें गमनागमन । आचरणेंचि राम जाण । पाऊलही न पडे शून्य । रघुनंदनावांचोनी ॥ २३ ॥ लिंगाची स्वानंदरती । तंव

---

१ करवंटी. २ घट्ट होतां. ३ वितुळतां. ४ विचार.

५ प्रमुख, धनी.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

ऊर्ध्वरेता मारुती । अखंडानंद रघुपती । सहजस्थितीं राखीत ॥ २४ ॥ गुदाचा स्वभाव क्षर । क्षरीं अक्षर रघुवीर । उडवोनि क्षराक्षर । राम कपींद्र राखीत ॥ २५ ॥ राम प्राणाचा पाळक । कपि रामाचाही रक्षक । होवोनियां एकाएक । रघुकुळटिळक राखीत ॥ २६ ॥ पुच्छदुर्ग करोनि कटकीं । द्वारमुखाचे अलोलिका । कर्णरंध्रीं निर्गम देखा । कपिनायक रचीतसे ॥ २७ ॥ उरलें पुच्छाचें जें अग्र । तें तळीं वरी निरंतर । भंवे जैसें विष्णुचक्र । अहोरात्र सावध ॥ २८ ॥ वारियासी रीघ नाहीं । तेथें राक्षसें बापुडीं कायी । भ्रमण करिती लवलाहीं । धुरा पाहीं चोरावया ॥ २९ ॥ फेरे केले लक्षान्त । तरी राम नोहे प्राप्त । भजनहीना रघुनाथ । नव्हे प्राप्त सर्वथा ॥ ३० ॥ बहुत झाले खेदक्षीण । प्राप्त नव्हे रघुनंदन । मग करूं आदरिलें स्तवन । कुळदेवता जाण कामाक्षी ॥ ३१ ॥ सकळ कामना संपूर्ण । स्मरतांचि करी आपण । म्हणवोनि तिसी अभिधान । कामाक्षी जाण बोलती ॥ ३२ ॥ बुद्धीची बुद्धी आपण । परमात्मा रघुनंदन । राक्षसां वोळला संपूर्ण । मोक्षदान द्यावया ॥ ३३ ॥ जंव नुपजे तीव्र अवस्था । शरण न रिघवे रघुनाथा । तंव कैंची मोक्षवार्ता । दुःखावर्तामाजी पडिजे ॥ ३४ ॥ राक्षस दोघे चिंताक्रांत । राघव साधावया तळमळित । तें जाणोनि श्रीरघुनाथ । बुद्धि प्रेरीत ते ऐका ॥ ३५ ॥ मांडिलें कामाक्षीस्तवन । तिचा प्रकाशक रघुनंदन । शक्तिरूपें संतोषोन । झाला प्रसन्न राक्षसां ॥३६॥ राक्षसांची करुणा । न सहावेचि रघुनंदना । बोलावोनि कपिनंदना । मधुर वचना बोलत ॥३७॥ हनुमंता तुझेनि नामें । विघ्नें दिक्पुटीं लागावें । भयें माथें नुधवावें । निर्भय व्हावें चराचर ॥ ३८ ॥ ऐकतां कपिनामोच्चार । भेणें कांपती सुरासुर । येवढा ज्याचा नामनिर्धार । तो भेणें दळभार राखीत ॥ ३९ ॥ ऐसी तुझी अपकीर्ती । विस्तारेल त्रिजगतीं । ऐसें न करीं मारुती । सांडीं निश्चितीं निजभय ॥ ४० ॥ काढीं पुच्छाचा पैं वेढा । करीं दारवंठा उघडा । स्वैर विचरूं दे माकडां । हुडाहुडां आल्हादें ॥४१॥ श्रीरामकटकीं अवरोध । हे गोष्टीच असंबद्ध । क्षात्रधर्मा पावे बाध । माथां अपवाद बैसेल ॥ ४२ ॥ देहभय दारुण । यत्न करावा जरी आपण । तरी सामर्थ्या आली नागवण । काळें वदन तयाचें ॥ ४३ ॥ देहभयें विषयसुख । सर्वथा प्राप्त नव्हे देख । अथवा नव्हे सांसारिक । परमार्थ देख तेथ कैंचा ॥ ४४ ॥ देहभयें साधन । सिद्धी न साधे गा जाण । देहभयें कर्माचरण । वृथा जाण जातसे ॥ ४५ ॥ देहभयें न साधे योग । देहभयें न साधे याग । देहभयें स्वर्गभोग । नव्हे साङ्ग निजप्राप्ति ॥ ४६ ॥ देहभयें सकळ दुःख । अणुमात्र नव्हे सुख । आकल्प भोगावे नरक । दुःख अलोलिक देहसंगें ॥ ४७ ॥ तें देहभय आम्हांप्रती । असतां कैंची वीरवृत्ती । सकळ धर्माची होय शांती । भयें निश्चितीं देहाच्या ॥ ४८ ॥ लोकापवाद बैसे माथां । देहभय रघुनाथा । तें चुकवावें हनुमंता । वेढा तत्त्वतां काढोनी ॥ ४९ ॥ ऐकोनियां रामवचन । हनुमान घाली लोटांगण । अगाधबोध रघुनंदन । आम्हां पामरां ज्ञान कैंचें ॥ ५० ॥ चरण वंदोनि तत्त्वतां । वेढा काढिला परता । कर जोडोनियां रघुनाथा । संमुखता राहिला ॥ ५१ ॥ सुग्रीवादि वानरभार । त्यांसी सांगे रघुवीर । सुखें निद्रा करा समग्र । भयमात्र धरूं नका ॥ ५२ ॥ लाहोनियां श्रीरामाज्ञा । वानर गेले निद्रास्थाना । लाज उपजली वायुनंदना । स्वयें विवंचना करीतसे ॥ ५३ ॥ श्रीराम सकळांसी राखिता । त्या सांभाळीतसें रघुनाथा । कोण माझी उद्धतता । कोणा अर्थी जीतसें ॥ ५४ ॥ श्रीराम राखे त्रैलोक्यासी । त्या मी राखीतसें रामासी । काळिमा लागली ज्ञानासी । मर्कटवेषी यथार्थ ॥ ५५ ॥ अगाधबोध रघुनाथा । प्रबोधिली यथार्थ वार्ता । मज एवढी कोण चिंता । स्वस्थ आतां सुखें निजों ॥ ५६ ॥ ऐसें जाणोनि कपिकेसरीं । वेढा काढिला झडकरी । आपुलाले मेळिकारीं । सुखें वानरीं निद्रा केली ॥ ५७ ॥ जाणोनियां पुढील कार्यार्थ । निद्रा करी रघुनाथ । राक्षस वेगें आले तेथ । चोरोनि नेत रघुनाथा ॥ ५८ ॥

निशि निद्रां समापन्नौ दाशरथी जह्रतुर्भृशम् ।
कुणपाद्यायुके पाशे यथा पातालमासुरैः ॥ १ ॥

पडली गडधूप अंधारी । मध्यरात्रीं निशाचरीं । येवोनियां झडकरी । केली चोरी धुरेची ॥ ५९ ॥

१ ज्याच्या वीर्याला पतन नाहीं असा, ब्रह्मचारी. २सैन्याला. ३ अनुकूल झाला. ४ वर करूं नये. ५ संपादून. ६ अविनयता, दांडगेपणा. ७ जीवंत आहें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

जैसे यमाचे यमपाश । न लक्षती कोणास । वेगें काढोनि प्राणास । नेती उदास निर्भय ॥ ६० ॥ सुहृदस्वजनांदेखतां । भूमीवरी सांडूनि प्रेता । प्राण हरिती तत्त्वतां । कोणाही सर्वथा लक्षेना ॥ ६१ ॥ तैसें प्रेतरूप वानरां । सांडोनियां मेळिकारां[1] । दोघां जणीं दोनी धुरा । पाताळद्वारा पळविल्या ॥ ६२ ॥ राम वानरांचें जीवन । राम वानरांचा जीवप्राण । रामेंवीण वानरगण । प्रेतवत् जाण सकळिक ॥ ६३ ॥ जरी रामें प्रबोधिला । तरी न राहे उगला । घरटीकार होवोनि वहिला । पाहे वेळोवेळां हनुमंत ॥ ६४ ॥ आलेंगेचा[2] आला जंव फेरा । तंव न देखे दोनी धुरा । होवोनि अत्यंत घाबरा । पाहे सैरा कटकांत ॥ ६५ ॥ मळमूत्रासी नाहीं गेला । वनविहारा न वचे वहिला । श्रीराम कोणीकडे गेला । वेडावला कपिनाथ ॥ ६६ ॥ युद्ध करितां भागला पूर्ण । गेला मेळिंकार सोडून । केलें अयोध्येसी गमन । वंचिलों पूर्ण श्रीरामें ॥ ६७ ॥ हेंही न घडे सर्वथा । तो न विसंबे शरणागता । दीन वानरां समस्तां । सांडी सर्वथा हें न घडे ॥ ६८ ॥ शरणागता कृपाळ । श्रीराम दीनदयाळ । एवढा ब्रीदाचा कल्लोळ । वानरमेळ सांडील कां ॥ ६९ ॥ बिभीषणा जाणवूं मात । आणि सुग्रीव वानरनाथ । गोष्टी फांकतां कटका[3]आंत । होईल आकान्त सकळिकांसी ॥ ७० ॥ गोष्टी जाईल लंकेसी । ठाउकें पडेल रावणासी । धांवोनि येईल वेगेंसीं । अंत सकळांसी करील ॥ ७१ ॥ रावण बापुडें तें किती । त्यासी मारावया जुत्पती । एकएकाची अद्भुत शक्ती । करितील शांती रावणाची ॥ ७२ ॥ तथापि राजनीतिविचार । आच्छादावा[4] समाचार । धुरेवरीच पडले चोर । जघन्यें[5] थोर वीरवृत्ती ॥ ७३ ॥ ऐसें विचारोनि कपिनाथ । बिभीषणा सावध करीत । आणि सुग्रीव वानरनाथ । वृत्तान्त सांगत तयां दोघां ॥ ७४ ॥ येरां समस्तां कळों न देतां । पाहों लागले रघुनाथा । कोठें न देखती सर्वथा । तिघां अति चिंता वर्तली ॥ ७५ ॥ बिभीषण सांगे तयांसी । व्यर्थ जाणें न घडे रामासी । कांहीं योजिलें कार्यासी । न पुसतां कोणासी मग गेला ॥ ७६ ॥ सर्वांगाचे दुर्ग करोनी । स्वामी राखितां अनुदिनीं । रामें हनुमंत निवारोनी । कार्यालागोनी स्वयें गेला ॥ ७७ ॥ आतां काय करणें विचार । म्हणोनि झाले चिंतातुर । तंव सरसावला कपींद्र । काय उत्तर बोलत ॥ ७८ ॥ तुम्ही सावध रहा येथें । कळों न द्यावें कोणातें । संरक्षावें सैन्यातें । अति सामर्थ्यें सावध ॥ ७९ ॥ मी जावोनि वेगेंसीं । झाडा घेईन त्रैलोक्यासी । शोधोनि श्रीरामासी । अति वेगेंसीं आणीन ॥ ८० ॥ सप्त पाताळांची चवंडी[6] । उल्लंघीन न लागतां घडी । खचीन पर्वतांच्या दरडी । पृथ्वी रोकडी वाटीन ॥ ८१ ॥ एकवीस स्वर्गांच्या उतरंडी । पाडीन न लागतां घडी । पीठ करोनि रोकडी । मिळवीन तांतडी अव्यक्तासीं ॥ ८२ ॥ मोडीन वैकुंठ कैलासासी । शीकँ[7] लावीन महेशासी । अनुग्रहिलें रावणासी । उद्धत त्यासी करविलें ॥ ८३ ॥ रावण बापुडें तें किती । क्षणें नेईन भस्मांतीं । लंकेची करीन शांती । त्रिकूट निश्चितीं खचवीन ॥ ८४ ॥ शोधीन विवरेंविवर । उल्लंघीन गिरिकंदर । तुम्ही दळभार रहा समग्र । अहोरात्र सावध ॥ ८५ ॥ मात गुप्त करोनि सत्वर । भारीं राहवोनि समग्र । निघता झाला कपींद्र । अति सत्वर रामकार्या ॥ ८६ ॥ निघोनि कटकाबाहेरी । चिंताक्रांत कपिकेसरी । काय करूं गा श्रीहरी । बुद्धि झडकरी मज देईं ॥ ८७ ॥ तूं अनाथांचा नाथ । निजभक्तां संरक्षीत । न विसंबसी शरणागत । तोही रणांत सांडिला ॥ ८८ ॥ शरणागतां वज्रपंजर । ऐसा ब्रीदाचा बडिवार । वाढविला अपार । तो साचार करीं रामा ॥ ८९ ॥ उपेक्षिसी शरणागतां । बोल लागेल निजव्रता । आणि विरुद्ध वेदशास्त्रार्थां । दीन अनाथां सांडितां ॥ ९० ॥ ऐसी तीव्र चिंता करितां । कृपा उपजली रघुनाथा । बुद्धि दिधली कपिनाथा । गेला तत्त्वतां यक्षिणीवटा ॥ ९१ ॥ यक्षिणीवटातळीं मारुती । स्तविता झाला आदिशक्ती । तुज गमन त्रिजगतीं । माझी विनंती परिसावी ॥ ९२ ॥ सांडोनि वानरभारा सकळा । रामसौमित्र कोठें गेला । याचा समाचार वहिला । मज सांगितला पाहिजे ॥ ९३ ॥ तुम्ही पूर्वी मज प्रसन्न । म्हणोनि तुम्हांसी आलों शरण । वेगीं सांगा रघुनंदन । केउतें[9] गमन केलेंसे ॥ ९४ ॥ मज वृत्तान्त न सांगतां ।

१ सोबत्यांना. २ गस्तीचा. ३ सैन्यामध्यें. ४ गुप्त ठेवावा. ५ निंद्य. ६ ढीग. ७ शिक्षा. ८ सत्वर. ९ कोठें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

क्षोभ वाटेल रघुनाथा । ऐसें जाणोनि सर्वथा । शुद्धि तत्त्वतां सांगात्री ॥ ९५ ॥ ऐकोनि कपीचे उत्तरा । हडबडिली ते सुंदरा । त्यासी न सांगितल्या समाचारा । करील संहारा सर्वांसी ॥ ९६ ॥ अद्भुतशक्ति कपिनाथ । नाहीं कळिकाळासी भीत । नित्य रामनामें गर्जत । राम सेवीत सर्वदा ॥ ९७ ॥ आम्हीं न सांगतांही वृत्तें । कार्य साधील निश्चित । आपण यश घेतल्या येथ । श्रीरघुनाथ सुखावे ॥ ९८ ॥ आम्ही न सांगों जरी । कार्य साधील तो तरी । मारील राक्षसांच्या हारी । चराचरीं निजविजयी ॥ ९९ ॥ क्षोभ आलिया कपीसी । जीवें मारील सकळांसी । म्हणोनि पहिलेंचि कपीसी । समाचारासी जाणवूं ॥ १०० ॥ गोष्टी सांगों जरी स्पष्ट । समाचार होईल प्रकट । क्षोभोनियां रावण दुष्ट । करील सपाट सर्वांचें ॥ १ ॥ काय करूं विचार । म्हणोनि झाली चिंतातुर । बुद्धि स्फुरली सत्वर । प्रकारांतर योजिलें ॥ २ ॥ गीध गीधी वृक्षावरी । बैसलीं असतां परस्परीं । पक्षिणीचे संचारोनि अंतरीं । कपिकेसरीतें वृत्त सांगे ॥ ३ ॥ गीधातें म्हणे गीधिनी । मज डोहळे होती मनीं । नरमांस पाहिजे भोजनीं । तें कोठोनी मेळविसी ॥ ४ ॥ तूं माझा प्राणपती । मी तुझी अर्धांगशक्ती । झणें उदास होसी चित्तीं । डोहळे निश्चितीं पुरवावे ॥ ५ ॥ गीध म्हणे गीधीप्रती । त्वरा न करावी सर्वार्थी । अनायासें मांसप्राप्ती । तुज निश्चितीं होईल ॥ ६ ॥ अहिरावण महिरावण । सखे बंधु दोघे जण । चोरोनियां राम लक्ष्मण । नेले जाण पाताळा ॥ ७ ॥ त्यांच्या धांवण्यासी त्वरित । जावोनियां कपिनाथ । करील सकळांचा घात । मांस बहुत मिळेल ॥ ८ ॥ ऐसें बोलतां तिहीं दोघीं । कपीनें ऐकिलें वेगीं । आनंद भरला सर्वांगीं । गर्जे सवेग रामनामें ॥ ९ ॥ भूमी हाणोनि लात । विवर केलें अत्यद्भुत । गेला पाताळा हनुमंत । राक्षसनाथ जेथ असे ॥ ११० ॥ येरीकडे ते राक्षस । घेवोनि आले दोघांस । पुरले नवसिले नवस । जगदंबेस पूजीत ॥ ११ ॥ पूजोपचारसामग्री । मेळविली बहुतांपरी । अति उल्लास राक्षसभारीं । निजगजरीं मांडिला ॥ १२ ॥ आतुबळी वानर । मार्ग काढील सत्वर । धांवण्या वेगवत्तर । येईल कपींद्र पैं येथें ॥ १३ ॥ मग कांहीं न चले मत । युद्ध करील त्वरित । सोडवील रघुनाथ । शक्ति अद्भुत कपीची ॥ १४ ॥ म्हणोनि नगरबाह्यप्रांतीं । राखणें ठेविलीं सभोंवतीं । मकरध्वज द्वाराप्रती । अद्भुतशक्ती राखण ॥ १५ ॥ चौदा सहस्र राक्षस । अद्भुतशक्ती दुर्धर्ष । द्वारीं सावध अनिमेष । मकरध्वजासमवेत ॥ १६ ॥ न लावितां पातया पातें । द्वार राखिती सावचित्तें । तंव हनुमान पावला तेथें । श्रीरामातें पहावया ॥ १७ ॥ कपिरूपें जातां भीतरीं । वळखी पडेल राक्षसभारीं । राम आच्छादोनि झडकरी । महामारीं उठतील ॥ १८ ॥ युद्धाचें भय नाहीं मज । परी न लाभे रघुराज । सिद्धी न पवे स्वामिकाज । ऐसी वोज नये करूं ॥ १९ ॥ साधावया स्वामिकार्यासी । झाला तापसी तीर्थवासी । तापसवेषें राजद्वारासीं । भीतरीं जावयासी पैं आला ॥ १२० ॥ अत्यंत चतुर कपिपती । रामप्रभावें स्तविली शक्ती । माया प्रेरिली निश्चितीं । लागली सुषुप्ती सर्वांसी ॥ २१ ॥ जो स्वामिकार्या सादर । त्यासी नव्हे माया साचार । सावध मकरध्वज वीर । निरंतर स्वामिकार्जी ॥ २२ ॥ माध्यान्हीं निशीं वेशीपासीं । देखिला अवचितां तापसी । भीतरीं जातां वर्जिलें त्यासी । जासी निशीं केउता ॥ २३ ॥ भिन्न असतां मध्यरात्र । कोठें जासी न पुसत । धरोनियां तापसव्रत । स्वेच्छा जात नगरांत ॥ २४ ॥ भिक्षुकाचा धर्म पाहीं । दिवसा अपराण्हसमयीं । गृहस्थ जेविल्या निजगृहीं । जावें तिहीं भिक्षेसी ॥ २५ ॥ यजमान सकळ तृप्त । घरींचा वैश्वानर शांत । भिक्षेसी काळ तोचि प्राप्त । यथोचित भिक्षुका ॥ २६ ॥ उचित काळ सांडोनियां जाण । अकाळीं करितां गमन । लागे स्वधर्मा दूषण । ऐसें आपण न करावें ॥ २७ ॥ तूं अकाळीं गमन करिसी । निजधर्मा बोल लाविसी । स्वामी क्षोभेल आम्हांसी । कोण निशीथीं विचरत ॥ २८ ॥ आणिकीं ठेवावें दूषण । तें आम्हीच करितों प्रार्थन । येथून परतावें आपण । करावें गमन स्वाश्रमा ॥ २९ ॥ ऐकोनि तयाचें बोलणें । तापस क्षोभला निजमनें ।

१ शोध. २ बातमी. ३ पंक्ति. ४ नाश. ५ दुसरीच युक्ती. ६ उदास होऊं नको. ७ अजिंक्य. ८ डोळ्यांचीं पातीं न हालवितां. ९ यात्रेकरू. १० गाढ झोंप. ११ मध्यरात्रीं.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

कांहीं धर्माधर्म नेणे । बैसविलें कोणें तुज येथें ॥ १३० ॥ आम्ही विरक्त तापसी । स्वेच्छें विचरूं अहर्निशीं । कोठेंही निर्बंध नाहीं आम्हांसी । तूं कां वारिसी निजमूर्खा ॥ ३१ ॥ निवारितां साधूसी । स्वयें अधःपाता जासी । बोल आम्हांसी ठेविसी । व्यर्थ तापसीं शापिलें ॥ ३२ ॥ ऐकोनि त्याचें बोलणें । मकराक्ष क्षोभला मनें । अकाळीं स्वेच्छा विचरणें । हें साधुत्व कोणें शिकविलें ॥ ३३ ॥ जरी वांचविणें निजशरीरा । तरी परतावें माघारा । मग होसील घाबिरा । धोत्रां वस्त्रां सांभाळीं ॥ ३४ ॥ ऐकोनि क्षोभें तापस बोले । तुज कां शाप देणें लागलें । थापा हाणोनि दोनी डोळे । पाडीन तत्काळ भूमीसी ॥ ३५ ॥ येरू क्षोभला तत्क्षणीं । मिसळले युद्धालागूनी । दोघे आले झोंटधरणी । निष्ठुर वचनीं बोलती ॥ ३६ ॥ थापा हाणिती येरयेरा । गुडघे कोंपर परस्परां । बुक्किया हाणिती सैरावैरा । दोहीं वीरां बळ सम ॥ ३७ ॥ परस्परें हाणिती थडका । परस्परें हाणिती झडका। परस्परें घालिती धडका । एकमेकां मेचेना ॥ ३८ ॥ युद्ध करितां दोघे जण । परस्परें खेदक्षीण । हनुमान विचारी आपण । हा कोण कैंचा पां येथें ॥ ३९ ॥ माझ्या घायाचेनि आघात । पीठ होताती पर्वत । अद्यापि वांचला जीवें जीत । कोण निश्चित पुसों पां ॥ १४० ॥ अरे कोण तूं काय आहेसी । माझ्या घायीं वांचलासी । वेगीं सांग मजपासीं । अन्यथा यमापासीं धाडीन ॥ ४१ ॥ ऐकोनि त्याचें बोलणें । मकराक्ष क्षोभला निजमनें । काय बोलत प्रतिवचनें । सावधानें अवधारा ॥ ४२ ॥ युद्ध करितां भागलासी । काकुळती येवोनि पुससी । तरी ऐक यथार्थेंसीं । मी तुजपासीं सांगेन ॥ ४३ ॥ सर्वेचि बोले वचन । तुज सांगोनि कार्य कोण । जाया दिधलें जीवदान । सुखें गमन करावें ॥ ४४ ॥ सुखरूप न करिसी गमन । तरी स्वर्गा तुज धाडीन । पुसतचि आहेसी तूं कोण । सावधान अवधारीं ॥ ४५ ॥ वायुसुत कपिराज । त्या हनुमंताचा आत्मज । माझें नांव मकरध्वज । बळ माझें पित्यासम ॥ ४६ ॥ अहिरावण महिरावण । हे सखे बंधु दोघे जण । तिहीं मज ठेविलें रक्षण । द्वारीं संपूर्ण आपुलिये ॥ ४७ ॥ त्यांचे कुळीं कुळस्वामिणी । कामाक्षी जाण यक्षिणी । तिसी बळिदानालागोनी । मानव दोनी आणिले ॥ ४८ ॥ त्यांच्या धांवण्यालागून । स्वर्गमृत्युलोकींहून । येईल कोणी धांवून । म्हणोन राखण ठेविलें ॥ ४९ ॥ आतां स्वस्ति असो तुजलागीं । सुखें जाय आले मार्गीं । अन्यथा वृथा जाशी वेगीं । ग्रासभागीं यमाचे ॥ १५० ॥ ऐकोनि त्याचें उत्तर । क्रोधें झाला कालाग्निरुद्र । नेत्र भवंडी गरगर । बोले कपींद्र तें ऐका ॥ ५१ ॥

रे रे वानर सावधानमनसा वार्ता क्षणं श्रूयतां
सोऽहं मारुत राघवस्य कृपया पत्नीभगं नेक्षितम् ।
मिथ्या जल्पसि वेषवानरतनुः कोणात्मजो लक्ष्यसे
एहि त्वं समरे निशाचरगणैः पुत्रांतकोऽहं किल ॥ २ ॥

हनुमान म्हणे तयासी । तूं राक्षस कपटवेषी । धरोनि वानरवेषासी । पुत्र म्हणविसी हनुम्याचा ॥ ५२ ॥ सांडोनि आपुला पिता । आणिकाचा पुत्र म्हणवितां । स्वयें जातोसी अधःपाता । लाज सर्वथा तुज नाहीं ॥५३॥ ज्याचा पुत्र म्हणविसी । तो हनुमान मी निश्चयेंसीं । जन्मादारभ्य तुज आम्हांसी । भेटी कैसी न झाली ॥ ५४ ॥ कोणीं देखिलें ना ऐकिलें । पुत्र म्हणविसी उगलें । लांछन पूर्वजां लाविलें । जोड जोडिलें अधःपाता ॥ ५५ ॥ श्रीरामकृपा मी हनुमंत । कौपीन लाधलों उदरस्थ । केव्हांही स्त्रीसंगाची मात । स्वप्नाआंतही न देखें ॥ ५६ ॥ जन्मादारभ्य पत्नीभोग । म्यां देखिलें नाहीं स्त्रीलिंग । कैंचा पुत्र झालासी सांग । मातेसी डाग लाविला ॥ ५७ ॥ राक्षसाचा पुत्र होसी । आणि आणिकाचा म्हणविसी । जीवें नाहीं मारिलासी । करुणा भाकिसी अनिवार ॥ ५८ ॥ तूं पुत्र आणिकाचा असतां । पिता म्हणविसी हनुमंता । व्यभिचारी केली निजमाता । देईन प्रायश्चित्ता तुज आजी ॥ ५९ ॥ मी स्त्रीमात्रीं सहोदर । मज कैंचा स्त्रीपुत्र । सांडीं परता कपटाचार । निघें सत्वर युद्धासी ॥ १६० ॥ राक्षसगणसमवेत । दावीं आपुला पुरुषार्थ । पुत्रांतक मी हनुमंत । जाण निश्चित आलों असें ॥ ६१ ॥ वचनें झाली संकोचता । मग पाचारिली निजमाता । पुसता झाला निजवृत्तान्ता । माझा पिता तो कोण ॥६२॥

१ रात्रंदिवस. २ धक्के. ३ पर्वा वाटली नाहीं. ४ बरोबर, खरेपणानें. ५ पुत्र. ६ सोडविण्याकरितां.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

मगरी म्हणे मकरध्वजा । नोळखिसी तूं पवनात्मजा । श्रमलासी कवण्या काजा । एक वोजा सांगेन ॥ ६३ ॥ ब्रह्मचारी पवनपुत्र । त्यासी कैंचे स्त्रीपुत्र । तुझ्या उत्पत्तीचें चरित्र । ऐक सविस्तर सांगेन ॥ ६४ ॥ सीताशुद्धीलागीं मारुती । आला होता लंकेप्रती । तेथें केली महाख्याती । लंकापती अपमानिला ॥ ६५ ॥ पुच्छीं लावोनि आगी । उपरी धवलारांलागीं । दुर्गी लाविली आगी । हुंडे[1] सवेग खचविले ॥ ६६ ॥ जाळोनियां सकळ नगरा । वेगीं आला समुद्रतीरा । विझवावया पुच्छाग्रा । मांडिली त्वरा सागरीं ॥ ६७ ॥ शरण आला समुद्र । तेणें विनविला कपींद्र । जळीं विझवितां पुच्छाग्र । जीव समग्र मरतील ॥ ६८ ॥ पुच्छ ठेवोनियां तीरीं । हळुच विझवीं लहरीं । ऐसें विनवितां सागरीं । वचन कपींद्रीं मानिलें ॥ ६९ ॥ पुच्छ तीरीं ठेवून । लहरीं विझविलें सानसान । स्वेदें सांडिला निपटून[2] । तो आपण गिळियेला ॥ १७० ॥ अमोघवीर्य[3] वायुनंदन । त्याहीवरी रामभजन । स्वेदें झालें गर्भाधान । गर्भ संपूर्ण वाढला ॥ ७१ ॥ त्या गर्भास्तव पाहीं । तूं झालासी माझ्या हृदयीं । पित्या पुत्रा दोघांही । भाग्यें पाहीं भेट झाली ॥ ७२ ॥ तुम्हां दोघां वैरभावो । सर्वथा नसावा पहाहो । सांडून युद्धाचा आविर्भावो । महाबाहो आलिंगीं ॥ ७३ ॥ ऐकोनि मातेचें वचन । मकराक्षें घातलें लोटांगण । येरें दिधलें आलिंगन । समाधान दोघांसी[4] ॥ ७४ ॥ एका जनार्दना शरण । झालें पितापुत्रदर्शन । आतां वधूं अहिरावण । महिरावणसमवेत ॥१७५॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां हनुमंतमकरध्वजदर्शनं नाम द्विपंचाशत्तमोऽध्यायः ॥ ५२ ॥ ओंव्या ॥ ॥ १७५ ॥ श्लोक ॥ २ ॥

अध्याय त्रेपन्नावा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ ऐकतां मगरीचें वचन । झालें हनुमंता समाधान । देवोनि पुत्रासी आलिंगन । निजविंवचन सांगत ॥ १ ॥ आमुचा स्वामी श्रीरघुनाथ । निद्राक्रांत कटकांत । वानर मेळिकारी निद्रिस्थ । राक्षसीं मैत्त[5] पैं केले ॥ २ ॥ मोहनास्त्र सावधानता । घालोनियां तत्त्वतां । मोहन केलें समस्तां । सुषुप्ति अवस्था लागली ॥ ३ ॥ कपटयोद्धे राक्षस । संमुख न येतीच संग्रामास । चोरोनियां श्रीरामास । पाताळास आणिलें ॥ ४ ॥ पृथ्वी पाहतां समस्ता । न सांपडती सर्वथा । पाताळासी आलों आतां । श्रीरघुनाथा पहावया ॥ ५ ॥ तंव येथें शुद्धि लागली । तुम्हांसी भेटी झाली । श्रीरामप्राप्तीची वहिली[6] । बुद्धि भली तुम्ही सांगा ॥ ६ ॥ तुमचे सोयरिकीचें सुख । आम्हांसी हेंचि अलोलिक । भेटवावा रघुकुळटिळक । आवश्यक तुम्ही आजी ॥ ७ ॥ तुम्हांसारिखे साधुसंत । पुत्रधर्म आचरत । ऋणत्रयापासून मुक्त । पितर करीत तें ऐका ॥ ८ ॥ देवपितरमनुष्यऋण । तिहीं गुंतले प्राणिगण । ऐक याचें लक्षण । विवंचून सांगेन ॥ ९ ॥ देवऋणें यागादिकीं । पितर मुक्त तिळोदकीं । मनुष्याचें ब्रह्मस्व कीं । फेडितां सुखी स्वयें होती ॥ १० ॥ मज भेटविल्या रघुनाथ । ऋणत्रयासीं तुम्ही निर्मुक्त । विभागरचना यथार्थ । ऐक सुनिश्चित सांगेन ॥ ११ ॥ देवांचा देव रघुनाथ । तो भेटला यथार्थ । देवऋणें नित्य निर्मुक्त । वेदशास्त्रार्थसंमत ॥ १२ ॥ मनुष्यनाट्यविडंबनें । रूप धरिलें रघुनंदनें । मनुष्यऋणें मुक्त स्वयें होणें । जाण दर्शनें तयाचेनि ॥ १३ ॥ सकळांचा जनक जाण । स्वयें श्रेष्ठ चतुँरानन[7] । त्याचाही जनक आपण । रघुनंदन साचार ॥ १४ ॥ त्या श्रीरामाची होतां भेटी । पूर्वज कोट्यनुकोटी । उद्धरती उठाउठीं । श्रीराम दृष्टीं देखिलिया ॥ १५ ॥ ऋणत्रय बापुडें तें किती । ब्रह्मांडकोटी उद्धरती । कर्माकर्माची होय शांती । श्रीराममूर्ती देखिल्या ॥ १६ ॥ ऐसें जाणोनि निश्चितीं । राम भेटवावा मजप्रती । तेणें आम्हां तुम्हां अति प्रीती । कल्पांतींही खंडेना ॥ १७ ॥ ऐकोनियां कपिवचन । मकरध्वज बोले संकोचून । सांगितलें विंवचन । धर्म जाण तो होय ॥ १८ ॥ परी एकी संकोचता । स्वधर्माची हनुमंता । तूं माझा निजपिता । म्हणोनि आतां सांगेन ॥ १९ ॥ राक्षसांचें वेतन । खावोनियां जाण । देह पोशिला आपण । त्यांचें

---

१ बुरुज. २ घाम पुसून. ३ ज्याचें वीर्य व्यर्थ जात नाहीं असा. ४ आपली चिंता. ५ मोहित. ६ सत्वर.

७ ब्रह्मदेव.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

हनन कैंची सांगूं ॥ २० ॥ तूं माझा निजपिता । म्हणोनि पुसतसें ताता । जेणें चुके अधःपाता । त्याचि अर्थ सांगावें ॥ २१ ॥ स्वामिद्रोह न लागे अंगीं । पित्रवधा न घडे जगीं । ऐसें विचारोनि वेगीं । कार्यालागीं प्रवर्तावें ॥ २२ ॥ ऐकोनि पुत्राचें वचन । संतोषला कपिनंदन । पुत्राचें स्वधर्मलक्षण । स्वयें आपण करिता झाला ॥ २३ ॥ श्रीराम आहे येथें । ऐसें कळलें निश्चितें । आतां काय पुसों यातें । बापुडें अनाथ कां गोंवूं ॥ २४ ॥ ऐसें विचारोनि कपींद्र । वेगें स्मरला श्रीरामचंद्र । बुद्धि स्फुरली सत्वर । झाला अगोचर हनुमंत ॥ २५ ॥ अदृश्य होवोनि हनुमंत । गेला देवालयाआंत । शक्ति देखिली अद्भुत । सुपूजित दिव्योपचारें ॥ २६ ॥ कर जोडोनि कपिनंदन । आदरिलें शक्तिस्तवन । तुवां कृपा पूर्वी करून । शुद्धि आपण सांगितली ॥ २७ ॥ यक्षिणीवटातळीं जाण । गीधद्वारा आपण । सुरस वाचा बोलोन । कपिनंदन प्रबोधिला ॥ २८ ॥ पावावया रघुनंदन । सांगीतलें विवंचन । वंदोनियां तें वचन । केलें आगमन तुजपासीं ॥ २९ ॥ प्रसन्न होवोनि तत्त्वतां । भेटवावें रघुनाथा । म्हणोनि चरणांवरी माथा । ठेवीत तत्त्वतां हनुमंत ॥ ३० ॥ ऐकोनियां कपिस्तवना । अंबा संतोषली जाणा । सांडोनियां निजासना । कपिनंदना ठाव दिधला ॥ ३१ ॥ त्यासी न देतां अभ्युत्थान । क्षणें उठवील दैवतपण । सुरासुरां नागवे जाण । यासी कोणें बोलावें ॥ ३२ ॥ श्रीरामाचा निजभक्त । स्वामिकार्या त्वरित । आला असे हनुमंत । याचा कार्यार्थ साधावा ॥ ३३ ॥ सकळ वीर राक्षसगण । क्षणें निर्दाळील जाण । मारोनियां अहिरावण । रघुनंदन नेईल ॥ ३४ ॥ एवढा होईल गजर । म्हणोनियां तो कपींद्र । पूजिती झाली खेचैर । अति सत्वर जगदंबा ॥ ३५ ॥ धर्ममर्यादा हेचि देख । घरा आलिया हरिसेवक । पूजावे जी आवश्यक । तेंही देख साधलें ॥ ३६ ॥ ऐसें विचारोनि चित्तीं । गेली जगदंबा परती । जाणोनियां मनोवृत्ती । बैसे मारुति आसनीं ॥ ३७ ॥ मध्यरात्रीची वेळ । झाला पूर्ण असुरेंकाळ । पूजोपचार सकळ । घेवोनि तत्काळ भीतरीं आले ॥ ३८ ॥ मग यथोक्तं बरवी पूजा । समर्पिली अति वोजा । नैवेद्य नानापरींच्या खाजा । राक्षसराजा आणीत ॥ ३९ ॥ आश्चर्य झालें वाडेंकोडें । हात दावीत मुखाकडे । तंव पसरलीं जाभाडें । अन्न निवाडें खावया ॥ ४० ॥ अहिरावण म्हणे नवल । अंबा पसरिते मुखकमळ । ताटें रिचंवा सकळ । प्रसन्नकाळ आजिचा ॥ ४१ ॥ पसरोनियां आपुलें मुख । बोणें घेत असे देख । शीघ्र आणा अन्न चोख । पात्रें असंख्य राहिलीं ॥ ४२ ॥ पूजा करूं आजिवरी । मुख कधींच न पसरी । आजि दिसे नवलपरी । कामेश्वरी प्रसन्न ॥ ४३ ॥ वडे मांडे फुगी पुरी । चोखट मैदाची तेलवरी । साखरें घोळलिया घारी । भात खिरी अति गोड ॥ ४४ ॥ साखरमांडे कोरवडे । आंबवडे चिंचवडे । दहींवडे दूधमांडे । वाडेंकोडें क्षीरधारी ॥ ४५ ॥ भात सोज्ज्वळ जिरेसाळिया । जैंवी मोगरियाच्या कळिया । वरी दाळी मुगाचिया । घातलिया पद्धती त्यावरी ॥ ४६ ॥ कढी ताकाची चोखट । वेळामिरें समसकट । फुरके घेतां पैं उद्भट । ब्रह्मांडकोटी गर्जत ॥ ४७ ॥ क्षीर चोखट वळवटाची । वरी पंचधार साखरेची । लोणी तावून अति सुरुची । वाटी तुपाची भरियेली ॥ ४८ ॥ वेळामिरें कापूर । शुंठीआदि सकळोपचार । करोनियां अति अरुवार । दहींभात सत्वर आणिला ॥ ४९ ॥ ऐशा ताटांचिया हारी । मुखीं घालितां कोटीवरी । तृप्त नव्हे ती खेचरी । विचार करी निजचित्तें ॥ ५० ॥ जितुकें रांधिलेंसे अन्न । तितुकेंही वेंचिलें संपूर्ण । मग मांडिलें फळभोजन । नाना जातिप्रकार ॥ ५१ ॥ तेंही सरलें पैं देख । मग आणिलें आणिक । पुढें ठेवितां एकाएक । गटका देख पैं केला ॥ ५२ ॥ रोटी पोळी गुळवरी । दिवसीं मुटकलें भारी । न लागतां दर्शनांतरीं । गटका करी जगदंबा ॥ ५३ ॥ बहुतां दिवसांची भुकेली । रामागमनें सुखी झाली । अन्न स्वीकारूं लागली । तृप्ति वहिली पैं नव्हे ॥ ५४ ॥ हनुमंताचा विचार

१ आदरसत्कार. २ सांपडत नाहीं, ताब्यांत आणतां येत नाहीं. ३ गगनांत संचार करणारी. ४ राक्षसवेळ.

५ यथाशास्त्र. ६ उत्तम प्रकारें. ७ खायें. ८ ओता. ९ अन्न. १० परोपरीनें. ११ दातांमध्यें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

पूर्ण । राक्षसां वोळला रघुनंदन । द्यावयासी मोक्षदान । येथें गमन पैं केलें ॥ ५५ ॥ श्रीरामाचा मी किंकर । मोक्ष देईल निर्धार । मागें राहतां अणुमात्र । वासना सत्वर ओढील ॥ ५६ ॥ राक्षसांचें सर्वस्व देखा । नार्पितां रघुकुळटिळका । न पावती मोक्षसुखा । म्हणोनि देखा गटकावी ॥ ५७ ॥ तंव बोलती रक्षोगण । अहिरावणा परिस वचन । अंबेसी तृतीलागीं जाण । रघुनंदन आणावा ॥ ५८ ॥ ऐकोनि राक्षसांच्या बोला । अहिरावण संतोषला । मान सकळां दिधला । अतिप्रीतीकरोनियां ॥ ५९ ॥ ज्यालागीं कष्टलों बहुत । तो साधला कार्यार्थ । वेगीं आणोनियां रघुनाथ । करूं तृप्त जगदंबा ॥ ६० ॥ म्हणोनि आज्ञापिले सेवक । वेगीं आणा रघुकुळटिळक । स्नान घालोनि विधिपूर्वक । सत्वर देख येथें पैं ॥ ६१ ॥ वेगीं लाहोनि शासन । आले कारागृहा ठाकून । जेथें होता रघुनंदन । दूत जाण तेथें आले ॥ ६२ ॥ करवून अभ्यंगस्नानें । लाविलें हळदीचें उटणें । घातलीं करवीरसुमनें । कंठाभरणें शोभती ॥ ६३ ॥ पाशबंधनीं बंधु दोघे । बाहेर काढिले वेगें । लागलीं वाजंत्रीं अनेगें । मिरवितां जगें देखिजे ॥ ६४ ॥ हाटवँटींचे लोक । नरनारी असंख्य । देखोनि रघुकुळटिळक । अलोलिक मानिती ॥ ६५ ॥ वृत्ति जडली रघुवीरीं । प्राशन केला नेत्रद्वारीं । नेवोनियां अभ्यंतरीं । नरनारी भोगिती ॥ ६६ ॥ बोलती नगरनागरिक । अवलोकितां रघुकुळटिळक । फिकें होत समाधिसुख । त्यासी देख घात करिती ॥ ६७ ॥ मदनमोहन श्रीराम । त्यासी मारूं नेती अधम । कृपा करो पुरुषोत्तम । होवो भस्म राक्षसां ॥ ६८ ॥ यांचा करूं जातां घात । पुरला राक्षसांचा अंत । सहकुळ मरतील निश्चित । भविष्य वदत वाग्देवी ॥ ६९ ॥ सत्य जनीं जनार्दन । वृथा नव्हे त्याचें वचन । मांडलें राक्षसांचें निर्धन । कपिनंदन मारील ॥ ७० ॥ बाप कृपाळु रघुनंदन । राक्षसां वोळला संपूर्ण । वैरियां द्यावया मोक्षदान । स्वयें अपमान साहतसे ॥ ७१ ॥ करितां वाद्यांचा गजर । देवीसंमुख रघुवीर । आणविला वेगवत्तर । देखतां कपींद्र विस्मित ॥ ७२ ॥ कोण कृपेचें विंदान । मूढ अविवेक राक्षसगण । त्यांसी द्यावया मोक्षदान । एवढा अपमान साहातसे ॥ ७३ ॥ प्रत्यक्ष करावें जरी नमन । तंव राहिलोंसें आच्छादून । प्रकट होतां न ये जाण । कार्य संपूर्ण जंव साधे ॥ ७४ ॥ करोनि मनोमय नमन । चरित्र पाहातसे आपण । तंव बोलिला अहिरावण । रघुनंदन ऐकत ॥ ७५ ॥ खड्गधारा करोनि सतेज । बोलतसे राक्षसराज । आतां वध करीन मी तुज । स्मरें निजगुज आपुलें ॥ ७६ ॥ तुझें आराध्यदैवत । त्यातें स्मरें पां त्वरित । मग झालिया तुझा घात । विस्मरणांत बुडसील ॥ ७७ ॥ तूं म्हणवितोसी आपणियातें । विश्व स्मरत आहे मातें । तो तूं बांधला आहेसी येथें । स्मरें निजचित्तें कुवासा ॥ ७८ ॥

आत्मा त्वं भुवनैकनायक रघो सूक्ष्मातिसूक्ष्मं जगुर्वेदैः सोपनिषत्पुराणगणकैर्बद्धोऽसि देव्यग्रतः ।
तच्छ्रुत्वा रघुवंशकेसरियुवा रौद्रीं तनुं चिंतयन्मुक्तः सानुजराघवस्य पुरतो दृष्टो हनूमान्कपिः ॥ १ ॥

आपणिया म्हणविसी रामा । जो मी विश्वाचा विश्वात्मा । वेदांसी न कळे महिमा । रूपनामा अतीत ॥ ७९ ॥ सूक्ष्माचेंही अति सूक्ष्म । लक्षालक्षातीत परम । उपनिषदांसी दुर्गम । मनोधर्म थोटावे ॥ ८० ॥ नेत्रीं देखिला न वचे । व्यवहार खुंटले शब्दांचे । क्षीणकर्म स्मरणाचें । श्रवणीं नवचे आकळिला ॥ ८१ ॥ जेथें मनाची मुरकुंडी । कल्पिला न वचे कडोविकडीं । वृत्ति झाली पैं वेडी । इंद्रियें बापुडीं काय करिती ॥ ८२ ॥ पुराणें काय करिती तेथ । वेडावला शास्त्रार्थ । तो म्यां देवीपुढें तेथ । श्रीरघुनाथ बांधिला ॥ ८३ ॥ सर्वथा व्यक्ती न येसी । अव्यक्तामाजी लपसी । तो नांवरूपा आलासी । देवीपाशीं मारावया ॥ ८४ ॥ सर्वातीत रघुनाथ । बंधुसमवेत येथ । म्यां बांधिलासी त्वरित । सुटका निश्चित चिंतीं पां ॥ ८५ ॥ विलंब कायसा येथ । जगदंबा क्षुधाक्रांत । स्मर आपुलें कुळ-

१ दूत. २ राक्षससमूह. ३ बाजारचे. ४ मरण. ५ करणी, कौतुक. ६ आश्रय. ७ वेगळा. ८ पाहिला जात नाहीं. ९ उघडकीला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

दैवत । शिरःपात करूं तुझा ॥ ८६ ॥ ऐकोनियां त्याचें वचन । स्वयें विचारी रघुनंदन । करूं कोणाचें स्मरण । विश्व चिंतन करी माझें ॥ ८७॥ प्राणिमात्रास संकट पडत । तितुके श्रीरामा स्मरत । तेणें पुरती मनोरथ । जग निर्मुक्त श्रीरामें ॥ ८८ ॥ मज वर्ण व्यक्ति नाहीं । ऐशियातें पाहीं । घाला घालोनियां लवलाहीं । धरिलें कांहीं चालेना ॥ ८९ ॥ ऐसें असतां सर्वथा । कोणातें स्मरों मी आतां । विचार करितां रघुनाथा । बुद्धि तत्त्वतां आठवली ॥ ९० ॥ अहंकारें घालोनि घाला । अव्यक्त व्यक्तीं आकळिला । जीवदशेसी आणिला । वेगीं बांधला कर्मपाशीं ॥ ९१ ॥ लटकेंचि क्रियमाण । करवून संचित जाण । वरते ते भोग दारुण । प्रारब्ध जाण तया म्हणती ॥ ९२ ॥ या त्रिविध कर्माच्या संगतीं । पडिजे जन्ममरणावर्ती[1] । भोगिजेती योनिपंक्ती । उसंत[2] चित्तीं असेना ॥ ९३ ॥ तें छेदावया कर्मबंधन । सबळ विरक्त भक्त जन । मी होवोनियां भजन । माझेंचि जाण करिताती ॥ ९४ ॥ अद्वैतभजनाचा संतोष । होती सर्वभावीं उदास । करोनि कुर्वंडी सर्वस्व । स्वयें सुखास भोगिती ॥ ९५ ॥ स्वयें स्वसुख भोगिती । उसंत नाहीं अहोरातीं । इतर कर्मबंधीं पडती । तेही येती तया शरण ॥ ९६ ॥ बाप कृपाळु दीनदयाळ । न म्हणती वेळ अवेळ । दीन देखोनि तत्काळ । करिती सकळ सोडवणें ॥ ९७ ॥ छेदोनि कामक्रोधांचे बंध । आणि कर्माकर्माचे भेद । खाणोनि विषयाचा कंद । स्वरूप शुद्ध प्रबोधिती ॥ ९८ ॥ देहमात्र झाला कृश । त्यासी उपचारिती सुरस । देवोनि अर्धमात्रारस । जन्ममरणास नासिती[3] ॥ ९९ ॥ एवढे असतां दीनोद्धारी । मज दीन केलें ईहीं किंकरीं । आतां स्मरोनि झडकरी[4] । करीन बोहरी सकळांची ॥ १०० ॥ ऐसा करोनि निर्धार । सरसावला रामचंद्र । स्मरला तो हनुमान वीर । रुद्रावतार प्रत्यक्ष ॥ १ ॥ ऐकतां श्रीरामवचन । पातला सवेग कपिनंदन । पाश छेदोनियां जाण । रघुनंदन सोडविला ॥ २ ॥ लक्ष्मणासमवेत । श्रीराम केला नित्यमुक्त । अगाधबोध हरिभक्त । नामें निर्मुक्त चराचर ॥ ३ ॥ जगा संकट पडलिया जाण । श्रीराम सोडवी आपण । त्या श्रीरामाचें पाशबंधन । निजभक्तें जाण सोडविलें ॥ ४ ॥ यालागीं श्रीरघुनाथ । झाला भक्ताचा अंकित । तो ज्याच्या माथां ठेवी हात । त्यासी मुक्त करी राम ॥ ५ ॥ मुक्तोपकार फेडावया । अवतार धरणें रघुराया । धांवतसे लवलाह्यां । राखावया निजभक्तां ॥ ६ ॥ अंबरीषाची जन्मकथा । न साहवेचि भगवंता । स्वयें झालाचि अंगीकारिता । उणें भक्ता येऊं नेदी ॥ ७ ॥ गज गांजितां पाणियेथडी । वैकुंठींहोनियां उडी । घालोनियां लवडसवडी । गज तांतडी सोडविला ॥ ८ ॥ दैत्यें पीडिलें प्रल्हादासी । न साहवे भगवंतासी । उतटूनियां कोरड्या खांबासी । निजरूपासी दाविलें ॥ ९ ॥ दैत्य धरोनि मांडीवरी । चिरियेला नखाग्रीं । भक्तकाजकैवारी । नरकेसरी[5] प्रल्हाद ॥ ११० ॥ निजभक्तांसी अटक[6] । जरी पडलें अलोलिक । तितुकेंही रघुकुळटिळक । स्वांगें देख निवारी ॥ ११ ॥ ऐसा भगवंताचा निर्धार । म्हणवोनि हरिभक्त निरंतर । न वचकती अणुमात्र । हनुमान वीर अग्रणी ॥ १२ ॥ पुढें देखोनि रघुवीरा । श्यामसुंदर मनोहरा । प्रेमें कांपत थरथरां । अश्रुधारा स्रवताती ॥ १३ ॥ अंगीं रोमांच रवरवित । स्वेदबिंदु डळमळित । कंठीं बाष्प पैं दाटत । सद्गदित पैं वाचा ॥ १४ ॥ सत्त्वभरितें न सांवरत । पडिला चरणांवरी मूर्च्छित । श्रीराम अति प्रीतीं उचलीत । आलिंगीत निजहृदयीं ॥ १५ ॥ आवरून सत्त्वावस्था । चरणांवरी ठेऊन माथा । झाला काय विनविता । सावधानता परिसावें ॥ १६ ॥

अप्यग्रणीरात्मभुवां कपींद्रो
जगाद देवं जयपूर्वशब्दैः ।
निःशेषकर्तुं हि निशाचराणा-
मस्मादृशां वा इह तर्जनाय ॥ २ ॥

जो भक्तांमाजी मुकुटमणी । ब्रह्मादिकां अग्रगणी । श्रेष्ठ सकळिकांच्या सर्जनीं[8] । आत्मभू[9] म्हणोनि त्यासी म्हणती ॥ १७ ॥ भगवंतापासून

१ जन्ममरणाच्या फेऱ्यांत. २. विश्रांति. ३. नाश. ४ त्वरेनें. ५ नरश्रेष्ठ. ६ प्रतिबंध. ७ श्रेष्ठ. ८ उत्पत्ती करण्यांत. ९ स्वयंभू, ब्रह्मदेव.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

ज्ञान । प्राप्त झाला चतुरानन । त्यासही लागलें लांछन । स्वकन्या देखोन भुलला ॥ १८ ॥ त्याहीपरीस विशुद्ध । कपिनाथ सावध । अद्वैत-ज्ञानें अगाधबोध । निजानंद भोगीत ॥ १९ ॥ वाती लावोनि पाहतां । दुजें न ये दृष्टीचे हाता । तेथें कैंची विषयवार्ता । पूज्य तत्त्वतां आत्मभूसी ॥ १२० ॥ भक्तांचा तरी मुकुटमणी । सबाह्य वेंचिलें श्रीरामभजनीं । उसंत नाहीं अर्धक्षणीं । मनादिकरणीं सर्वथा ॥ २१ ॥ सर्वप्राण सर्व-शक्ती । उसंत नाहीं श्रीरामभक्ती । तो उभा राहोन मारुती । श्रीरामाप्रती विनवीत ॥ २२ ॥ करोनि रामनामें भुभुःकार । जयजयकारें गर्जे थोर । श्रीरामासी उत्तर । काय कपींद्र बोलिला ॥ २३ ॥ तूं अकळ लाघवी रघुनाथा । सांडोनियां शरणागता । दीना वानरां समस्तां । कोणा न पुसतां आलासी ॥ २४ ॥ आम्हां गमतसे चित्तें । वंचोनियां निजभक्तांतें । स्वामी येणें केलें येथें । तें कळलें निश्चितें दातारा ॥ २५ ॥ मारिलिया रावणास । पाताळींही राक्षस । प्रबळ होतील बहुवस । मागुतें आपणास येणें घडेल ॥ २६ ॥ म्हणोनि श्रीरामा जाण । न मारितां रावण । येथें केलें आगमन । यांची बोळवण करावया ॥ २७ ॥ राक्षसांचा मनोगत । रावण मारील रघुनाथ । जाईल अयोध्ये त्वरित । आम्हांसी येथ सांडूनी ॥ २८ ॥ मग आम्हीं करावें काय । श्रीरामीं भेटी कैंची होय । म्हणोनि रचिले उपाय । तुज पाहें आणावया ॥ २९ ॥ तूं अजेय गा सर्वथा । रणीं नातुडसी झुंजतां । आपुलें पूर्वजन्म शोधितां । युक्ति तत्त्वतां आठवली ॥ १३० ॥ जन्मांतरीं निष्कामभजनीं । श्रीरामा तुज केलें ऋणी । यास्तव तिहीं पाशेंकरोनी । तुज बांधोनी आणिलें ॥ ३१ ॥ नाम स्मरतां श्रीरघुनाथ । महापापी उद्धरत । त्या तुज राक्षस बांधीत । असंभावित हे वार्ता ॥ ३२ ॥ इहलोकीं परलोकीं । ऋण फेडावें आवश्यकीं । हें जाणावया या लोकीं । पाश कौतुकीं साहिले ॥ ३३ ॥ हाचि तुझा निजविचार । श्रीरामा आहे साचार । कीं विचारिलें प्रकारांतर । वानरभार छळावया ॥ ३४ ॥ तुज राहिलिया गुप्तगतीं । वानरभार काय करिती । कोठें कोठें तुज पाहती । साधन करिती ते कोण ॥ ३५ ॥ तरी साधावया रघुनंदन । जें आचरावें तें बंधन । साधनीं रिघोन अभिमान । वृथाचि जाण धांवडीत ॥ ३६ ॥ ऐसें जाणोनि मर्कट । सांडिलें साधनकचाट । नाम स्मरती यथेष्ट । तेणें वाट दाविली ॥ ३७ ॥ नामीं अनुसरलों तत्त्वतां । शुद्धि लागली नाम स्मरतां । नामें भेटविलें रघुनाथा । उपाय अन्यथा नेणें मी ॥ ३८ ॥ ऐसा विनवोनियां रघुनंदन । पुसता झाला वीर वायुनंदन । देईं आज्ञा मजलागून । राक्षसनिधन करावया ॥ ३९ ॥ ऐकोनि कपीचें उत्तर । संतोषला रघुवीर । आलिंगिला पैं सत्वर । अति चतुर तूं होसी ॥ १४० ॥ अद्भुतशक्ति हनुमंता । वाचे न बोलवे सर्वथा । मज सोडविलें रघुनाथा । बहुत आतां काय बोलूं ॥ ४१ ॥ पुसणें काय विचार । करीं दुर्जनांचा संहार । वचन ऐकोनि कपींद्र । करूं संहार आदरिला ॥ ४२ ॥ पूर्वींच अतर्क्यगती । पुच्छाचा वेढा नगराप्रती । करोनि राहिला मारुती । होता निश्चितीं चिन्ह पाहत ॥ ४३ ॥ श्रीरामाचें आज्ञापन । लाहोनियां कपिनंदन । करिता झाला कंदर्न । सावधान अवधारा ॥ ४४ ॥ श्रीरामाचे पाश बहुत । स्वयेंचि तुटले समस्त । पुढें देखिला कपिनाथ । अति आकान्त राक्षसां ॥ ४५ ॥ एकाचे हातपाय गळाले । एकाचे प्राण कंठीं राहिले । एकां अधोवात सुटले । मुतों लागले उभ्यां उभ्यां ॥ ४६ ॥ एक आरडती ओरडती । एक पळाले मागुती । एक येती काकुळती । तृणें दांतीं धरोनी ॥ ४७ ॥ एकें लागलीं दिक्पुटीं । एकांची रुधली घांटी । तंव अवचित पुच्छाटी । वाजे पाठीं अनिवार ॥ ४८ ॥ देखोनि सकळांची करुणा । न साहवे महिरावणा । येवोनियां समरांगणा । वायुनंदना पाचारी ॥ ४९ ॥ येरू ठायींच सावध । श्रीरामप्रभावें विशुद्ध । करूं आदरिलें युद्ध । अति सुबद्ध झोटधरणी ॥ १५० ॥ मिसळले द्वंद्वयुद्धा । मागें न सरती कदा । येरयेरांचिये वधा । करिती सावध येरयेरां

१ ज्याचें कौशल्य समजत नाहीं असा. २ सांपडत नाहींसा. ३ राक्षसांचा अंत. ४ नाश. ५ सरण येऊन.

६ बंद झाली. ७ गळा. ८ पुच्छ.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ ५१ ॥ येरयेरां लाविती कळा । परस्परें चेपिती गळा। वर्मीं हाणिती सबळा। आणिती तळा परस्परें ॥ ५२ ॥ येरयेरां हाणिती धक्के । गुडघे कोंपर तिखट नखें । वोरबडे एकमेकें । अति तवकें काढिती ॥ ५३ ॥ हनुमान वज्रदेही वीर । अंगावरी न वचे चीरें । राक्षसाचें शरीर । नखीं सत्वर विदारिलें ॥ ५४ ॥ हनुमान विचारी निजचित्तें। विलंब कासया करूं येथें । हाणी आवेशें बहुतें। मुष्टिघातें मस्तकीं ॥ ५५ ॥ माथां लागतां आघात । मस्तक गेला कोथळांत । भडभडां रुधिर वमीत । प्राण निश्चित सांडिला ॥ ५६ ॥ देखतां श्रीरघुनाथा । हनुमंताचेनि हातें मरतां। चारी देहां हाणोनि लाता । श्रीरामीं तत्त्वतां मिळोनि गेला ॥ ५७ ॥ स्थूळ सांडी नश्वर म्हणोन । सूक्ष्म तें मनोजन्य । कल्पनामात्र तें कारण । स्वरूपाभिमान तें चौथें ॥ ५८ ॥ होतां श्रीरामदर्शन । अप्राप्तता निमाली पूर्ण । नित्यमुक्ततेची निजखूण । बाणली संपूर्ण राक्षसा ॥ ५९ ॥ पृथ्वी सदा चिंतीत । माझे माथां श्रीरघुनाथ । विचरत आहे अहोरात । कृतकृतार्थ तेणें मी ॥ १६० ॥ तेथें स्वरूपाभिमान । राहोनियां कार्य कोण । मग लाजोनियां जाण । झाली लीन श्रीरामीं ॥ ६१ ॥ ऐसें पृथ्वीचें अंतःकरण पूर्ण । तिचे नांवाचा महिरावण । दृष्टी देखतां रघुनंदन । झाला जाण नित्यमुक्त ॥ ६२ ॥ कृपाळु श्रीरघुनंदन । फेडावया पूर्वभजनऋण । येवोनि पाताळा आपण । राक्षस जाण उद्धरिला ॥ ६३ ॥ एका जनार्दना शरण । मारियला महिरावण । पुढें वधूं अहिरावण । सावधान अवधारा ॥ १६४ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां महिरावणवधो नाम त्रिपंचाशत्तमोऽध्यायः ॥ ५३ ॥ ओंव्या ॥ १६४ ॥ ॥ श्लोक ॥ २ ॥

अध्याय चौपन्नावा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ पूर्वप्रसंगीं निरूपण । श्रीहनुमंतें महिरावण । रणीं मारिला देखोन । अहिरावण क्षोभला ॥ १ ॥ हनुमंताच्या पुच्छांवर्ती । राक्षस पडिले नेणों किती । निधडे निधडे वीर पुढती । बळें लोटती संग्रामा ॥ २ ॥ आम्ही निधडे महावीर । राक्षसांचे भार अपार । एक वानर दोघे नर । करूं चकचूर क्षणार्धें ॥ ३ ॥ ऐकोनि राक्षसांच्या युक्ती । विनवी श्रीरामासी मारुती । मज आज्ञापीं श्रीरघुपती । यांची शांती करीन ॥ ४ ॥ श्रीराम म्हणे गा पवनात्मजा । सदा यशस्वी तुझिया भुजा । प्राणदाता तूं रघुराजा। कीर्तिध्वजा ब्रह्मांडीं ॥ ५ ॥ जानकीमनोरथाची वल्ली । प्रतापजीवनें त्वां जीवविली । मज रघुनाथा वेळ पडली । सांभाळिली त्वां एकें ॥ ६ ॥ तुझिया उपकारांचें ओझें । मस्तक उचलूं न शके माझें । तुझें कर्तृत्व तुजला साजे । केलीं काजें अतर्क्य ॥ ७ ॥ सीताशुद्धीपासूनि कर्मे । जीं जीं केलीं तीं तीं दुर्गमें । ऐसें बोलोनि रघूत्तमें । मिठी प्रेमें घातली ॥ ८ ॥ श्रीरामें देतां आलिंगन । हनुमान झाला सुखसंपन्न । ब्रह्मप्राप्तीहूनि गहन । समाधान पावला ॥ ९ ॥ आतां ऐकें वचन । तुवां मारिला महिरावण । माझा वांटा अहिरावण । कृपा करून मज द्यावा ॥ १० ॥ ऐसें बोलतां श्रीरघुनाथें । आवेश न धरवे हनुमंतातें । नमस्कारोनि श्रीरामातें । उभयतांतें उचलिलें ॥ ११ ॥ उभयस्कंधीं दोघे जण । घेवोनि श्रीरामलक्ष्मण । केलें हनुमंतें उड्डाण । बळें गर्जोन भुभुःकारें ॥ १२ ॥ तया भुभुःकाराच्या घोषें । कित्येक निमालीं राक्षसें । अहिरावणही निजमानसें । धाकें त्रासे कपीच्या ॥ १३ ॥ शेष विष्णु श्रीशंकर । तिन्ही झाले एकत्र । श्रीराम हनुमंत सौमित्र । अति विचित्र शोभती ॥ १४ ॥ असंख्य राक्षसांचें सैन्य । तिहीं वेढिले तिघे जण । युद्ध मांडलें दारुण । सावधान अवधारा ॥ १५ ॥ शक्ति शूळ गदा मुद्गर । फरश पट्टिश लहुडीचक्र । लक्षोनियां नर वानर । शस्त्रें अपार टाकिती ॥ १६ ॥ झणें लागती श्रीरामासी । म्हणोनि हनुमंत आकाशीं । उडोनि पुच्छें राक्षसांसी । अति आवेशीं ठोकीत ॥ १७ ॥ क्षणैक भासे भूमंडळीं । क्षणैक भासे नभोमंडळीं । पुच्छें राक्षसां रंवदळीं । आतुर्बळी करीतसे ॥ १८ ॥ धन्य त्या

---

१ मोठ्या आवेशानें. २ वस्त्र. ३ स्थूल, सूक्ष्म, कारण आणि महाकारण या चार देहांस. ४ पुच्छाच्या तडाक्यांत, फेऱ्यांत. ५ नाश. ६ मारुते. ७ मोठें. ८ मृत्यु पावलीं. ९ मोठा पराक्रमी.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

पुच्छाचा प्रताप । राक्षसांसी सुटला कंप । कंपामाजी मारी थाप । पाडी अमूप पदघातें ॥ १९ ॥ असो यापरी हनुमंतें । रणीं मारिलें राक्षसांतें । तें देखोनि श्रीरघुनाथें । आश्चर्यातें मानिलें ॥ २० ॥ अहिरावण जों पाहे नयनीं । पाठीराखा नाहीं कोणी । क्रोधें अधरोष्ठ चावूनी । धांवे रणीं साटोपें ॥ २१ ॥ घेवोनियां धनुष्यबाण । मांडिलें माहेश्वरी ठाण । अवलोकोनि रघुनंदन । काय आपण बोलत ॥ २२ ॥ जेंवी होतां सन्निपात । यद्वा तद्वा बडबडत । तैसा लक्षोनि रघुनाथ । अहा जल्पत अविचारें ॥ २३ ॥ जेंवी सुरापानी उन्मत्त । वेदश्रुतीतें निंदीत । किंवा अधर्मी अदत्त । साधुसंत उपहासी ॥ २४ ॥ तेंवी म्हणे रे रघुनंदना । तूं तंव कौसल्येचा तान्हा । केंवी आलासी समरांगणा । व्यर्थ प्राणां द्यावया ॥२५॥ नरमांसाची प्रीत मोठी । हें रावणें जाणोनि पोटीं । तुज पाठविलें उठाउठीं । आम्हांसाठीं आसत्वें ॥ २६ ॥ आतां पाहें रणकौतुक । बाणें छेदोनि मस्तक । तोरणें देवीच्या संमुख । बांधीन देख निर्धारें ॥ २७ ॥ ऐसें ऐकोनियां वचन । हास्य करोनि रघुनंदन । म्हणे कीटक हीन दीन । गिळीन गगन म्हणतसे ॥ २८ ॥ राक्षसांचा कुळांतक । दाशरथी मी रघुकुळटिळक । युद्ध करितां मज संमुख । क्षणें देख मरशील ॥ २९ ॥ निद्रिस्थ देखोनि केसरी । जंबुक त्याची चेष्टा करी । जिव्हा देखोनि मांसावरी । बळें बाहेरी वोढीत ॥ ३० ॥ जागृत होतां कुंजरारी । त्याचा एकचि ग्रास करी । तैसी तुजला झाली परी । दृढ विचारीं मानसीं ॥ ३१ ॥ वैर नसतां तुज आम्हांसीं । चोरोनि आणिलें दोघांसी । आतां केलें तें पावसी । होई युद्धासी सावध ॥ ३२ ॥ ऐसें बोलतां रघुनंदन । क्रोधें क्षोभला अहिरावण । धनुष्य सज्जोनियां पूर्ण । तीक्ष्ण बाण विंधिले ॥ ३३ ॥ तें देखोनि रामचंद्र । बाण सोडोनि दुर्धर । निवारोनि अति सत्वर । शर अपार वर्षला ॥ ३४ ॥ श्रीरामाचें बाणजाळ । तेणें व्यापिलें नभोमंडळ । अद्भुत राक्षसांचें बळ । तेणें सकल छेदिलें ॥३५॥ निवारोनि श्रीरामबाण । केलें राक्षसें विंदानें । शक्तिवरदाचा तीक्ष्ण । शर दारुण विंधिला ॥ ३६ ॥ परम योद्धा श्रीरघुनंदन । क्षणें चूर्ण करितां बाण । शक्तिवरदालागीं मान । स्वयें आपण देतसे ॥ ३७ ॥ बाण साहोनि श्रीरघुनाथें । राक्षस विंधिला बाणें शतें । तेणें निवारितां बाण त्यातें । कपाळातें खोंचले ॥ ३८ ॥ बाण लागतां भाळावरी । तेथें झाली नवलपरी । रक्तबिंदु व्रणद्वारीं । भूमीवरी पडतांचि ॥ ३९ ॥ जितुका रक्तबिंदु पडत । तितुका अहिरावण उठत । तें देखोनि श्रीरघुनाथ । बाण सोडीत आवेशें ॥ ४० ॥ वेगळाले शर विंधीत । लागतां रक्तबिंदु पडत । पडतांचि अहिरावण घडत । अति अद्भुत मांडलें ॥ ४१ ॥ एकापासून झाले शत । शतापासून लक्ष होत । लक्षांचे कोटीपर्यंत । अर्बुदान्त कोटीचे ॥ ४२ ॥ ऐसें गगन आणि मेदिनी । बाणीं व्यापिलें अहिरावणीं । ऐसें देखोनियां मनीं । कोदंडपाणी खवळला ॥ ४३ ॥ समस्त मिळोनि अहिरावण । गदा परिघ मुसळ बाण । घेवोनियां श्रीरघुनंदन । चहूंकडून वेढिला ॥ ४४ ॥ श्रीराम धनुर्वाडा चोखट । तितुकियांचे छेदिले कंठ । कंठ छेदितां उद्भट । चालिले लोट रक्ताचे ॥ ४५ ॥ तया रक्ताचे मागुती । रूपें घडती नेणों किती । गदा परिघ मुसळ हातीं । घेवोनि धांवती युद्धासी ॥ ४६ ॥ धन्य तयांचें तपश्चरण । धन्य शिवाचें वरदान । प्रतापी रघुनंदन । अणुप्रमाण ढळेना ॥ ४७ ॥ लावोनियां अग्निबाण । करोनि रक्ताचें शोषण । त्यांचा घ्यावयासी प्राण । अशक्य कोण श्रीरामा ॥ ४८ ॥ सहज संकल्पाची प्रौढी । रची ब्रह्मांडांच्या कोडी । घडोनि सवेंचि मोडी । घडी विघडी संकल्पें ॥ ४९ ॥ तेथें बापुडें अहिरावण । मारावया नवल कोण । परंतु शिवाचें वरदान । रघुनंदन प्रतिपाळी ॥ ५० ॥ शुद्ध ग्रंथाचा ग्रंथार्थ । पूर्णब्रह्म श्रीरघुनाथ । हाचि जाणावा भावार्थ । त्याचें सामर्थ्य विशेष ॥ ५१ ॥ लीलामात्रें अहिरावण । मारावयासी अशक्य कोण । परंतु भक्ताचें महिमान । स्वयें आपण वाढवी ॥ ५२ ॥ अहिरावणाच्या वधानुवृत्तीं ।

१ अनेक. २ नारळ, इत्यादिकांचीं देवादिकांवर. बांधितात ती माळ. ३ सिंह. ४ कोल्हा. ५ युक्ति. ६ क्षतापासून. ७ धनुर्धारी. ८ पुनः पुनः मारण्यानें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

देखोनियां अपार व्यक्ती । आश्चर्य करोनि रघुपती । काय चित्तीं विचारी ॥ ५३ ॥ बाण सोडितां रिपुवधार्थीं । वैरी अधिकचि वाढती । परम अद्भुत वर्तलें क्षितीं । काय याप्रती करावें ॥ ५४ ॥ मारितां न मरे एक जण । चिंतावला रघुनंदन । उगाचि राहिला आपण । घाय दारुण टाळीत ॥ ५५ ॥ श्रीरामें न सोडितां बाण । युद्धा पेटले अहिरावण । घाय हाणिती अवघे जण । श्रीरघुनंदन टाळीत ॥ ५६ ॥ ऐसें देखोनि हनुमंत । परम झाला चिंताक्रांत । उपाय कीजे कोण येथ । श्रीरघुनाथ वांचवावया ॥ ५७ ॥ येथें न चले रणव्युत्पत्ती । येथें न चले प्रतापशक्ती । मारितां अधिक उद्भवती । युक्ति कोणती करावी ॥ ५८॥ किंवा अवघे अहिरावण । पुच्छप्रतापें आवळून । इतुकियांचे घेऊं प्राण । कळ लावून कंठांसीं ॥ ५९ ॥ ऐसें विचारितां मारुती । युक्ति आठवली निजचित्तीं । जाऊन पुसूं पुत्राप्रती । तो हें निश्चितीं सांगेल ॥ ६० ॥ ऐसें चिंतोनियां जाण । केलें श्रीरामाचें स्मरण । हनुमंतें करोनियां उड्डाण । पुत्रसदन पावला ॥ ६१ ॥ तेणें नमस्कारिलें ताता । येणें सांगीतलें वृतान्ता । मकरें पाचारिली माता । समूळ वार्ता ते सांगे ॥ ६२ ॥ मगरी म्हणे प्रतापरुद्रा । वचन ऐकें गुणसमुद्रा । संकट पडिलें श्रीरामचंद्रा । त्या परिहारा सांगेन ॥ ६३ ॥ धर्मपत्नी अहिरावणा । तिचें निजनाम चंद्रसेना । तुम्हीं जावोनि तिच्या सदना । तियेसी जाणा पुसावें ॥ ६४ ॥ पतिव्रता ते सत्यवचनी । परम साध्वी तपस्विनी । तियेसी पुसतां तत्क्षणीं । तुजलागोनी सांगेल ॥ ६५ ॥ कैसें सांगेल भ्रतारमरण । ऐसी आशंका घेईल मन । तरी तेविषयीं निरूपण । सावधान अवधारा ॥६६। नागपाशीं श्रीरघुनंदना । बांधोनि आणितां राजसदना । तेथें आली चंद्रसेना । मनमोहना देखिलें ॥६७॥ सुंदर देखोनि रघुपती । चंद्रसेनेची मनोवृत्ती । श्रीरामीं वेधली निश्चितीं । ऐसा पती असावा ॥ ६८ ॥ श्रीरामीं गुंतलें तन मन । नाठवेचि प्रपंचस्फुरण । कान्त व्हावा रघुनंदन । ऐसें जाण वांछीत ॥ ६९ ॥ मी अनुचेरी[1] तियेची जाण । तेथें माझें गमनागमन । तिचें हृद्गत कळलें पूर्ण । तैंपासून मजलागीं ॥ ७० ॥ श्रीरामीं गुंतली वासना । त्यालागीं सांगेल कान्तमरणा । एतद्विषयीं अनुमाना । पवननंदना न करावें ॥ ७१ ॥ ऐसें ऐकोनियां वचन । हनुमान उल्लासला पूर्ण । म्हणे कृपालु रघुनंदन । मजलागून तुष्टला ॥ ७२ ॥ स्मरोनि श्रीरामपायांसी । तेथोनि उडाला वेगेंसीं । आला चंद्रसेनेपासीं । देखोनि तियेसी ध्यानस्थ ॥ ७३ ॥ जैसा श्रीराम देखिला नयनीं । तैसा बिंबला अंतःकरणीं । तेणें ध्यासें श्रीरामध्यानीं । बाह्यकरणीं तटस्थ ॥ ७४ ॥ डोळस सुंदर घनसांवळा । कांसे कसिला सोनसळा । आपाद वैजयंती माळा । कटिमेखळा शोभत ॥ ७५ ॥ मुकुट कुंडलें शोभायमान । श्यामसुंदर राजीवनयन । वदन सर्वानंदसदन[3] । कुंदरदन[4] साजिरा ॥ ७६ ॥ सुरेख भ्रुकुटी शुकनासिक । भाळीं कस्तूरीची रेख । ऐसा देखोनि रघुकुळटिळक । लागली देख समाधी ॥ ७७ ॥ कोटिमदनांचें सांडणें । श्रीरामावरोनि ओंवाळणें । चंद्रसेना आपले मनें । भोगी तेणें तटस्थ ॥ ७८ ॥ जैसा साधक हृदयभवनीं । आत्मस्वरूपातें लक्षूनी । तटस्थ राहे सहजासनीं । तेंवी कामिनी देखिली ॥ ७९ ॥ नातरी देखोनि सर्पासी । तटस्थता जेंवी अजेसी[5] । तेंवी देखोनि श्रीरामासी । चंद्रसेनेसी समाधी ॥ ८० ॥ हनुमान पाहे आत्मज्ञानीं । तंव ते वेधली श्रीरामध्यानीं । म्हणे धन्य इयेची जननी । इयेलागूनी प्रसवली ॥ ८१ ॥ राक्षसयोनीमाजी जनन । आणि इयेसी श्रीरामध्यान । श्रीरामाचें महिमान । होतां दर्शन समाधि ॥ ८२ ॥ अति चंचळत्वें मन विकारी । एकाग्र राहोनि निर्विकारी । त्याचिया भाग्याची थोरी । मज वैखरीं न वर्णवे ॥ ८३ ॥ मनें गोंविलें साधकातें । मनें भ्रमविलें ज्ञानियातें । मनें नाडिलें योगियातें । तापसातें दंडिलें ॥ ८४ ॥ ऐसें जें मन विकारवंत । चंद्रसेनेनें नेमस्त । करोनि हृदयीं श्रीरघुनाथ । असे भोगीत स्वानंदें ॥ ८५ ॥ धन्य इयेचा भावार्थ । धन्य इयेचा संचितार्थ । धन्य इयेचा परमार्थ । श्रीरघुनाथदर्शनें ॥ ८६ ॥ ज्याचे हृदयीं श्रीरघुनाथ । त्याचें भाग्य अति समर्थ । ऐसें बोलतां

१ पृथ्वीवर. २ दासी. ३ संपूर्ण आनंदाचें गृह. ४ कुंदपुष्पासारखे ज्याचे दांत असा. ५ शेळीला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

हनुमंत । सद्गदित जाहला ॥ ८७ ॥ आत्मप्रत्यं-याची गोष्टी । ऐकतां हर्ष होय पोटीं । नातरी प्रेमळ देखोनि दृष्टी । पडे मिठी प्रेमळा ॥ ८८ ॥ वस्तु देखोनि आवडती । कोणा एका उपजे प्रीती । तैसें देखोनियां सती । झाला मारुति तटस्थ ॥ ८९ ॥ हनुमंताची ध्यानमूर्ती । ब्रह्मानंदें श्रीरघुपती । ते देखोनि तिचे चित्तीं । झाला मारुति सद्गद ॥ ९० ॥ देहीं श्रीरामाचें उदेलें । नयनीं प्रेमाश्रु पातले । स्वेदकंपादि दाटले । पूर्ण झाले मनोरथ ॥ ९१ ॥ तेणें विसरला मीतूंपण । विसरला स्थूल लिंग देह कारण । विसरला विश्व तैजस प्राज्ञ । महाकारण विसरला ॥ ९२ ॥ विसरला अवस्था उन्मनी । परमानंद कोंदला मनीं । नेत्र राहिले उन्मळोनी । जनीं वनीं श्रीराम ॥ ९३ ॥ हनुमान विसरला देहस्फूर्ती । हृदयीं कोंदला श्रीरघुपती । ऐसें ऐकोनि निश्चितीं । आक्षेपिती जरी श्रोते ॥ ९४ ॥ दाशरथी श्रीरघुनंदन । पाहतां त्याची मूर्ति सगुण । त्याचें एवढें महिमान । फळ तें कोण निर्गुणाचें ॥ ९५ ॥ परवस्तूची होतां प्राप्ती । जैसी तियेची फळश्रुती । ते त्वां सगुणध्यानस्थितीं । तैसी निश्चितीं स्थापिली ॥ ९६ ॥ ऐसी श्रोतियांची युक्ती । ऐकोनि वक्ता करी विनंती । सावध होवोनियां चित्तीं । यथानिगुतीं ऐकावें ॥ ९७ ॥ अणूमाजी ब्रह्म पूर्ण । हें तों प्रसिद्ध वदे वचन । कांहीं रितें नाहीं जाण । जग संपूर्ण परब्रह्म ॥ ९८ ॥ आपुलें स्थान न सोडून । कार्यकारणीं होय उत्पन्न । मायामहत्तत्त्वादि त्रिगुण । ब्रह्मापासून जाहले ॥ ९९ ॥ धरणी आदि पंचभूतें । तेथूनि पावलीं जननातें । परंतु मुकलीं ब्रह्मातें । हें कोणातें न बोलवे ॥ १०० ॥ सुवर्णापासून नग जाला । तरी सुवर्णत्वा काय मुकला । त्यासी अधिक लाभ झाला । नाम पावला अलंकार ॥ १ ॥ तेंवी जें जें आलें व्यक्ती । तें तें ब्रह्मरूप निश्चितीं । मग पूर्णावतार श्रीरघुपती । ब्रह्ममूर्ति कैंवी नव्हे ॥ २ ॥ अणुही परी ब्रह्मत्वेंसीं । कांहीं नसतां प्रतापासी । हा तरी प्रतापाची राशी । ब्रह्मत्व यासी कैंवी नसे ॥ ३ ॥

ज्याचे गृहीं सर्व संपत्ती । आणि स्वामित्व लोकांप्रती । भगवद्गीतेंत श्रीपती । माझी विभूति ते म्हणे ॥ ४ ॥ ऐसिया राजियांच्या चंवथा । नित्य सेविती श्रीरघुनाथा । ज्याचा चतुरानन खेळता । वंदी माथां शंकर ॥ ५ ॥ श्रीराम चूडामणि रघुवीर । ज्यासी वंदिती नर सुरवर । पूर्णब्रह्म हा निर्धार । कैंवी साचार न मानावा ॥ ६ ॥ आणीकही दुसरा अर्थ । रावणभयें सुर समस्त । क्षीरसागरा जावोनि त्वरित । रमाकांत प्रार्थिला ॥ ७ ॥ त्यांचें ऐकोनियां स्तवन । शेषशायी श्रीनारायण । स्वयें झाला रघुनंदन । हें तों वचन वाल्मीकी ॥ ८ ॥ नारायण तो श्रीरघुनंदन । शेष तोचि लक्ष्मण । शंख चक्र भरत शत्रुघ्न । वाल्मीकिवचन प्रसिद्ध ॥ ९ ॥ पूर्णब्रह्म श्रीनारायण । तोचि झाला श्रीरघुनंदन । झाला म्हणणें हेंही गौण । तोचि आपण प्रकटला ॥ ११० ॥ जोचि देखिला वाराणसीं । तोचि भेटला अन्य देशीं । तरी काय भेद झाला त्यासी । देशकाळांसी भेदत्व ॥ ११ ॥ जैसा होता शेषशयनीं । तोचि झाला अयोध्याभवनीं । पूर्णब्रह्मत्व रघुनंदनीं । निश्चयेंकरोनी पैं असे ॥ १२ ॥ सगुण असतां श्रीनारायण । त्यासी ब्रह्मत्व कैसेन । ऐसें म्हणती त्यांचें ज्ञान । अति अज्ञान जाणावें ॥ १३ ॥ सगुण मानिती श्रीहरीतें । त्यांचें ज्ञान असो परतें । त्याहून आहे म्हणतां वरतें । सरतें पुरतें अज्ञान ॥ १४ ॥ असो हे भेदाची मात । पूर्णब्रह्म श्रीरघुनाथ । स्वलीला अवतार धरीत । नाना दावीत चरित्रें ॥ १५ ॥ ब्रह्म नसता रघुनंदन । तरी कैसेनि तरती पाषाण । जीवनात्मा श्रीराम आपण । स्वसत्तें जाण तारिले ॥ १६ ॥ आणीक दुसरा चमत्कार । लंकेपुढें घोरांदर । होतां मरती निशाचर । आणि वानर उठती ॥ १७ ॥ समुद्रीं पाषाण तरती । हे ईश्वरत्वाची प्रतीती । आत्मत्वाची दुजी ख्याती । कपि वांचती संग्रामीं ॥ १८ ॥ बाण फिरोनि भातां रिघती । हे व्यापकत्वाची प्रतीती । आणि स्वकर्मत्वाची ख्याती । कपि मारिती राक्षसां ॥ १९ ॥ हेचि आशंका पार्वतीसी । सीता होवोनि वनासी । छळों आली श्रीरामासी । श्रीरामें तिसी

१ आत्मानुभवाची. २ जागृति, स्वप्न, सुषुप्ति अवस्थांचे अभिमानी. ३ चवथा देह. ४ पांचवी अवस्था. ५ यथार्थतेनें, बरोबर. ६ रिकामें. ७ पृथ्वी. ८ अलंकार. ९ समुदाय. १० श्रेष्ठ. ११ भयंकर युद्ध.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

ओळखिलें ॥ १२० ॥ ब्रह्म नसता श्रीरघुपती । तरी कैसेनि ओळखता पार्वती । सर्वज्ञत्वाची हे प्रतीती । श्रीराम निश्चितीं परब्रह्म ॥ २१ ॥ ऐसें ईश्वरत्व आत्मत्व सर्वज्ञत्व । व्यापकत्व आणि सर्वकर्तृत्व । त्यासी न मानितां ब्रह्मत्व । अज्ञानत्व म्हणणें यासी ॥ २२ ॥ सच्चिदानंद आत्माराम । तो श्रीराम पूर्णकाम । ज्याचें सहज घेतां नाम । उडे परम अज्ञान ॥ २३ ॥ त्याचें भजन तेंचि साधन । त्याचें स्मरण तेंचि मनन । त्याची प्राप्ति तोचि जाण । ब्रह्म पूर्ण त्रिसत्य ॥ २४ ॥ ऐसिया-परी श्रीरघुनंदन । पूर्ण ब्रह्म सनातन । त्याचें हृदयीं करितां ध्यान । झाला लीन हनुमंत ॥ २५ ॥ ऐसें ऐकोनियां वचन । सुखावले श्रोतेजन । म्हणती वक्ता विचक्षण । समाधान पैं केलें ॥ २६ ॥ पूर्णब्रह्म श्रीरघुनंदन । आम्हां ठावें असे पूर्ण । तुझें पहावयासी ज्ञान । केला प्रश्न कौतुकीं ॥ २७ ॥ सद्गुरुकृपाघनतुषारें[१] । आनंदथिलीं मनमयूरें । झालें समाधान पुरें । चालवीं त्वरें कथेसी ॥ २८ ॥ श्रोतियांसी करोनि नमन । वक्ता म्हणे सावधान । समाधि पावला हनुमान । पुढील कथन अवधारा ॥ २९ ॥ सर्व वृत्तींचा निरास[२] । करोनि स्वरूपीं सावकाश । लीन असतां हनुमंतास । श्रीरामास अति चिंता ॥ १३० ॥ स्वरूपीं वेधला वायुकुमर । झाला मत्कार्याचा विसर । ऐसें जाणोनि रघुवीर । करी सत्वर सावध ॥ ३१ ॥ श्रीराम चैतन्याचें चित्त । श्रीराम आनंदाचें जीवित[३] । स्फुरणरूपेंसीं प्रकटत । सावध करीत हनुमंता ॥ ३२ ॥ महाका-रणीं प्रवेशोन । सावध करी रघुनंदन । येतां वृत्तीवरी[४] हनुमान । झालें स्मरण कार्याचें ॥ ३३ ॥ अवस्था जिरवूनि उदरीं । हनुमंत विचारी अंतरीं । श्रीराम सांडोनि संगरीं । काय करीं मी येथें ॥ ३४ ॥ आलों वर्म पुसावयासी । तें स्मरण नाहींच मानसीं । काय गुंतलों समाधीसी । वेगीं कार्यासी करावें ॥ ३५ ॥ श्रीराम सर्वांसी बुद्धि-दाता । श्रीराम चैतन्या चेतविता । तेणें चेतविलें हनुमंता । पुढील कथा अवधारा ॥ ३६ ॥ हनुमान उघडोनि पाहे नयना । तंव ते ध्यानस्थ चंद्रसेना । करोनि हरिनामें गर्जना । टाळी जाणा पिटिली ॥ ३७ ॥ ऐकतां हनुमंताची टाळी । तिची उघडली कर्णटाळी । सावध होवोनि नेत्रकमळीं । पाहे बाळी सचकित ॥ ३८ ॥ म्हणे नवल कैसें झालें । कैंचें वानर येथें आलें । यासी पुसोनि पाहों वहिलें । नमन केलें तंव तेणें ॥ ३९ ॥ देखोनि बोले राक्षसभार्या । कपि आलासी कोण्या कार्या । तेजें दिससी समान सूर्या । वानरवर्या[५] सांगावें ॥ १४० ॥ हनुमंत म्हणे चंद्रवदने । शुभलक्षणे कुंदरदने । गुणचातुर्यसौंदर्यसदने[६] । माझीं वचनें परिसावीं ॥ ४१ ॥ रावणें निजसामर्थ्येंसीं । बंदीं घातलें देवांसी । सुरवरीं प्रार्थिलें श्रीहरीसी । अति करु-णेसी भाकूनी ॥ ४२ ॥ त्यांचें ऐकोनियां स्तवन । स्वयें अवतरे नारायण । सूर्यवंशीं श्रीरघुनंदन । ब्रह्म पूर्ण प्रकटला ॥ ४३ ॥ त्याचा बंधु तो लक्ष्मण । तोचि जाण सहस्रवदन[७] । शंखचक्रावतार पूर्ण । भरतशत्रुघ्न जाणावे ॥ ४४ ॥ पुढें दशरथाचे वचनें । वना पातला श्रीरघुनंदन । सीता हरिली दशाननें । कपटभावेंकरोनी ॥ ४५ ॥ तिची करावया सोड-वण । मेळवोनि वानरसैन्य । लंके आला श्रीरघु-नंदन । समुद्रीं पाषाण घालोनी ॥ ४६ ॥ वानरीं करोनि घोरांदर[८] । रणीं मारिले निशाचर । राव-णाचे बंधुपुत्र । श्रीरामें समग्र मारिले ॥ ४७ ॥ तेणें दुःखें दशानन । अहिमही दोघे जण । त्यांसी जाणवी वर्तमान । साह्य पूर्ण करावें ॥ ४८ ॥ तिहीं ऐकिलें वचन । निद्रिस्थ श्रीरामलक्ष्मण । येथें आणिले चोरोन । त्यांचें हवन करावया ॥ ४९ ॥ ऐसें कळतां मज हनुमंता । वेगीं धांवोनि तत्त्वतां । केलें महिरावणाच्या घाता । श्रीरघुनाथा सोड-विलें ॥ १५० ॥ हें देखोनि अहिरावण । दुःखें क्षोभला दारुण । पेंडखळोनि[९] रघुनंदन । दुर्धर रण मांडिलें ॥ ५१ ॥ दुर्धर रणयोद्धा श्रीराम । केला अद्भुत संग्राम । तेथें कौतुक झालें परम । न कळे वर्म राक्षसी ॥ ५२ ॥ बाण लागतां शत्रुशरीरीं । रुधिर पडतां पृथ्वीवरी । बिंदुपासाव होती वैरी । नवलपरी हे माते ॥ ५३ ॥ चंद्रसेना सत्यवचनी । ऐसें ऐकोनियां कानीं । वर्म पुसावयासी जननी । तुजलागोनी मी आलों ॥ ५४ ॥ वैरी कैसेनि उद्भ-वती । त्यांची कैसी होईल शांती । हें मज सांगावें

१ सद्गुरुरूप दयामेघानें वृष्टी करून. २ नाश. ३ आश्रयस्थान. ४ देहभानावर. ५ वानरश्रेष्ठा (मारुते). ६ गुण, चातुर्य व सौंदर्य यांचें घर. ७ शेष. ८ भयंकर युद्ध. ९ आवेशानें चालून येऊन.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

निश्चितीं । श्रीरघुपतिसुखार्थ ॥ ५५ ॥ रणसंकटीं पडिला श्रीराम । त्याचा जेणें होय निर्गम । ऐसें सांगावें निजवर्म । मनोधर्म हा माझा ॥ ५६ ॥ निजधर्माचें संरक्षण । करावया साधूचें पाळण । मारावया दुष्टजन । रघुनंदन अवतरला ॥ ५७ ॥ श्रीराम भक्तांचें माहेर । श्रीराम ज्ञानाचें जिव्हार । श्रीराम विश्वाचा आधार । पूर्णावतार श्रीराम ॥ ५८ ॥ श्रीराम मुनिजनांचें ध्यान । श्रीराम योगियांचें भजन । श्रीराम सुरांचें देवतार्चन । मदनमोहन श्रीराम ॥ ५९ ॥ श्रीरामाऐसें निधान । राक्षसीं घेतलें वेष्टून । त्यासी उपाय कीजे कवण । कृपा करून सांगावा ॥ १६० ॥ ऐसें बोलतां हनुमंता । चंद्रसेनेसी परमावस्था । संकट ऐकोनि श्रीरघुनाथा । झाली तत्त्वतां विव्हळ ॥ ६१ ॥ श्रीराम सर्वांगसुकुमार । सुवर्णतनु सुंदर । राक्षसांचे शस्त्रप्रहार । कैंवी रघुवीर साहेल ॥ ६२ ॥ आणि असावा ऐसा भर्ता । पूर्वसंकल्प चित्तीं होता । ऐसिया बुद्धीची विकळता । सांगे तत्त्वतां पतिमरण ॥ ६३ ॥ म्हणे ऐकें श्रीरामदूता । परमसाधु परम भक्ता । माझिया पुरविसी मनोरथा । तरी मी तत्त्वतां सांगेन ॥ ६४ ॥ साच ऐकोनियां वचन । हृदयीं हर्षला हनुमान । म्हणे सांगसी मजलागून । तें पूर्ण करीन मी ॥ ६५ ॥ चंद्रसेना म्हणे त्यातें । सत्य मिथ्या न कळे मातें । जरी तूं देसील भाकेतें । तरी मी तूतें सांगेन ॥ ६६ ॥ आपुला साधावया कार्यार्थ । भाक देवोनि हनुमंत । म्हणे काय तो सांग त्वरित । मनोरथ मी कर्ता ॥ ६७ ॥ हर्षें बोले चंद्रसेना । म्हणे ऐकें पवननंदना । म्यां भोगावें श्रीरघुनंदना । मुख्य वासना हे माझी ॥ ६८ ॥ कान्तें व्हावा श्रीरघुपती । ऐसी वांच्छा आहे चित्तीं । पूर्ण करीं तूं मारुती । म्हणोनि सती वंदीत ॥ ६९ ॥ कान्त व्हावा श्रीरघुनंदन । म्हणोनि सांगतें पतिमरण । अवश्य हनुमंतें बोलोन । पुसे फिरोन ते गोष्टी ॥ १७० ॥ मग म्हणे गा ऐकें सत्य । अहिरावण जो माझा कान्त । तेणें तप केलें अद्भुत । तोही वृत्तान्त अवधारीं ॥ ७१ ॥ लोहकंटकीं एकनिष्ठ । येणें रोवोनि अंगुष्ठ । तप केलें अति उत्कृष्ट । श्रीनीलकंठप्रीत्यर्थ ॥ ७२ ॥ प्रसन्न होवोनि त्रिनयन । तेणें दिधलें वरदान । रक्तबिंदु पडतां जाण । अहिरावण जन्मावे ॥ ७३ ॥ भ्रमराळी शिवकंधरीं । तेचि धांवोनि एकसरीं । पाताळअमृत लवकरी । आणोनि रुधिरीं घालिती ॥ ७४ ॥ तेणें उठती अहिरावण । हें हनुमंता सत्य जाण । असत्य न वदे माझें वदन । पुढील कारण करावें ॥ ७५ ॥ ऐसें ऐकतां हनुमंत । चंद्रसेनेतें वंदीत । मज वोळला श्रीरघुनाथ । असे डुल्लत निजप्रेमें ॥ ७६ ॥ करोनियां श्रीरामस्मरण । केलें हनुमंतें उड्डाण । वेगीं पातला पाताळभुवन । जेथें स्थान अमृताचें ॥ ७७ ॥ सादरें पाहे हनुमंत । तंव भ्रमरीं झांकिलें अमृत । म्हणे सतीचें वचन सत्य । वर्म निश्चित सांगितलें ॥ ७८ ॥ त्या अमृतरुद्रातें रक्षण । लोकपाळ ठेविले जाण । येरें करोनि आंगवण । मारिले पूर्ण निमेषें ॥ ७९ ॥ पुढें येतां वायुसुत । भ्रमर देखिले अमृत नेत । एकामागें एक पळत । त्वरान्वित अति वेगें ॥ १८० ॥ तेणें क्षोभला हनुमंत । थापा हाणोनि समस्त । अवघ्यां करोनि प्राणान्त । निर्जीवित पाडिले ॥ ८१ ॥ कोणी उरले पांच सात । ते पळाले भयभीत । मुख्य जो कां भ्रमरनाथ । जाणवीत तयासी ॥ ८२ ॥ तो अति उग्र स्थूळशरीरी । मेरु भ्रमरमाळेवरी । गरुडाऐसा फडत्कारीं । आला सत्वरी धांवोनी ॥ ८३ ॥ वज्रप्राय चंचु कठीण । हाणी हनुमंता धांवोन । येरें दोनी पक्ष धरोन । पाडिला जाण भूतळीं ॥ ८४ ॥ पाय देवोनि वक्षांप्रती । पक्ष उपडितां दोहीं हातीं । येरु येवोनि काकुळती । म्हणे मारुति वांचवीं ॥ ८५ ॥ तुझिया उपकारा उत्तीर्ण । मी एकदां होईन जाण । जेव्हां माझें करिसी स्मरण । मी पावेन ते समयीं ॥ ८६ ॥ म्हणसील भ्रमर हीन दीन । होसी उतराई कैसेन । तरी कीटक समुद्रा उत्तीर्ण । झालें म्हणून ऐकिजे ॥ ८७ ॥ ऐसें ऐकोनि दीनवचन । कृपें कळवळिला हनुमान । त्यासी भाकें गोंवून । दिल्हा सोडून भ्रमरेंद्र ॥ ८८ ॥ तेथें बैसोनि हनुमंत । स्वेच्छा प्राशिलें अमृत । येरीकडे श्रीरघुनाथ । काय करीत तें ऐका ॥ ८९ ॥ सज्जोनियां चापशर । युद्ध मांडिलें घोरांदर । बाणीं निवटी राक्षसभार । श्रीरघुवीर दृढ योद्धा ॥ १९० ॥ तंव गर्जली

१ [illegible] २ अपूर्व ठेवा. ३ असह्य दुःख. ४ शपथ.

५ पति. ६ शंकर. ७ भ्रमरपंक्ती. ८ शिवमस्तकीं. ९ छातीवर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

आकाशवाणी । बाण सज्जीं कोदंडपाणी । तुझे शत्रु तुझिया बाणीं । येच क्षणीं निमतील ॥ ९१ ॥ शत्रु जेणें पावती जनन । तया उपाया पडिलें खान । अमृतवृष्टी सरली जाण । विजयी पूर्ण तूं होसी ॥९२॥ ऐसें अशरीरिणीचें वचन । ऐकोनि श्रीरघुनंदन । चापीं सज्जी अग्निबाण । घ्यावया प्राण शत्रूचा ॥९३॥ सबीज मंत्रें आव्हानिला । सुसाटध्वनीं शर सूटला । शत्रुकाननीं लागला । निघती ज्वाळा धडधडां ॥ ९४ ॥ बाणें शोषोनि रुधिर । अवघे करोनि एकत्र । कंठ छेदिले सर्वत्र । निमेषमात्र न लागतां ॥ ९५ ॥ जितुक्या झाल्या होत्या व्यक्ती । तितुक्यांची केली शांती । धन्य धनुर्वाडा रघुपती । निमेषगती न लागतां ॥ ९६ ॥ मुख्य जो कां अहिरावण । तयाचें शिर छेदून । बाणें वंदोनि रघुनंदन । निघे परतोन भात्यांत ॥ ९७ ॥ समुद्रीं नाना तरंग उठती । वायु त्यांची करी शांती । तेंवी निजबाणें श्रीरघुपती । राक्षसव्यक्ती निवटीत ॥ ९८ ॥ नातरी मनाचे संकल्प । साधक करी निर्विकल्प । तेंवी अहिरावण अमूप । रविकुळदीपक संहारी ॥ ९९ ॥ जेंवी नाना भूतकृती । असतां नाशे ब्रह्मसंपत्ती । तेंवी राक्षसांच्या व्यक्ती । श्रीरघुपति संहारी ॥ २०० ॥ भेदवाद्यांचे शब्दार्थ । जेंवी वेदान्त दूषित । तैसियावरी श्रीरघुनाथ । संहारीत राक्षसां ॥ १ ॥ जेंवी उगवतां सूर्यकिरणें । लोपोनि जाती तारागणें । ऐसियापरी श्रीरघुनंदनें । रणीं मारणें शत्रूंतें ॥ २ ॥ क्रोधावांचून संहार । काम नसतां कामाचार । लोभावांचूनि परिवार । श्रीरघुवीर संपादी ॥ ३ ॥ असो त्याची अतर्क्य गती । तोचि जाणे निश्चितीं । किंवा त्याचे भक्त जाणती । येरां प्रती टकमक ॥ ४ ॥ ऐसियापरी श्रीरघुनंदन । मारोनियां अहिरावण । विजयी झाला संपूर्ण । पुढील कथन अवधारा ॥ ५ ॥ अहिरावण पडिला रणीं । ऐसें देखोनियां नयनीं । पळों लागल्या राक्षसश्रेणी । जीव घेवोनि श्रीरामभयें ॥ ६ ॥ धर्मयोद्धा श्रीरघुनंदन । पळत्यावरी न घाली बाण । रणीं उभा रणप्रवीण । सहलक्ष्मण स्वानंदें ॥ ७ ॥ येरीकडे श्रीहनुमंत । उड्डाण करोनियां त्वरित । आला राक्षससैन्यांत । नाम गर्जत श्रीरामाचें ॥ ८ ॥ पुच्छ वाढविलें थोर । आवर्त घालोनि चौफेर । राक्षसांसी केला मार । अति दुर्धर तो ऐका ॥ ९ ॥ गज धरोनि हस्तकीं । हाणी गजाचे मस्तकीं । रथ घेवोनि एकाएकीं । बळें टाकी रथावरी ॥ २१० ॥ मोठा युद्धाचा आवेश । झोडी राक्षसेंराक्षस । पायीं मारिले बहुवस । सावकाश रणरंगीं ॥ ११ ॥ एक आकाशीं झुगारिले । एक सागरीं बुडविले । एक पायींच तुडविले । एक झोडिले कराघातें ॥ १२ ॥ पुच्छ पसरिलें दुर्धर । राक्षस आकळोनि समग्र । लोहार्गळा घेवोनि थोर । केला चूर अस्थींचा ॥ १३ ॥ भयें भ्रमविलें निशाचरां । पळों लागले सैरावैरा । एकीं घेवोनि भेदरा । रणीं थरथरां कांपती ॥ १४ ॥ एक पळती आकाशांत । भला सांपडला पंथ । ऐसें वदतां पुच्छकेत । पायीं धरीत अतर्क्यें ॥ १५ ॥ पुच्छ नव्हे हा काळकेत । लपोनि राहतां विवरांत । पुच्छ पातलें उमगीत । ओढोनि काढीत बाहेरी ॥ १६ ॥ ऐसी राक्षसां करोनि बोहरी । पुच्छें प्रवेश करोनि नगरीं । हनुमान मर्कटचेष्टा करी । नवलपरी ते ऐका ॥ १७ ॥ नगरीं वागती नगरलोक । तेथें पुच्छ आलें देख । पायीं धरोनि एकाएक । बळें सकळिक आपटिले ॥ १८ ॥ पळोनि जातां निजगृहांत । पुच्छ पातलें अकस्मात । महानाटकी हनुमंत । राक्षसान्त मांडिला ॥ १९ ॥ पुच्छ घालितां नासिकांत । राक्षस सटसटां शिंकत । नाकीं वदनीं सळसळित । बुळबुळित बृहतीमाजी ॥ २२० ॥ अधोद्वारा दाटीत । वदनद्वारीं काढीत । तेणें राक्षसां प्राणान्त । कळकळित कपिभयें ॥ २१ ॥ नगरीं मांडिला आकान्त । राक्षस ठायीं ठायीं लपत । सर्वदेखणा हनुमंत । पुच्छ धाडीत त्या ठाया ॥ २२ ॥ सर्वभूतीं श्रीरघुनाथ । त्यासी भजतां हनुमंत । झालें सर्वज्ञत्व प्राप्त । जाणे समस्त विश्वहृदय ॥ २३ ॥ सर्वभूतीं श्रीरघुनाथ । ऐसें जाणोनि हनुमंत । राक्षस मारिले किमर्थ । तोही वृत्तान्त अवधारा ॥ २४ ॥ श्रीराम सर्वांचा हृदयस्थ । हृदयीं असोनि साक्षीभूत ।

---

१ हे धनुर्धारी. २ शून्य. ३ आकाशवाणीचें. ४ द्वैतवाद्यांचे. ५ राक्षसांचे समुदाय. ६ वेढा. ७ लोखंडी पहार. ८ भय. ९ नाश. १० सर्वत्र पहाणारा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सर्वीं साक्षित्वें नांदत । नव्हे लिप्त पापपुण्य ॥२५॥ घटीं रविबिंब देखिलें । आणि घटासी फोडिलें । तरी काय सूर्यातें भेदिलें । बोलतां बोल मानेना ॥ २६ ॥ सहज फोडितां तरंगासी । काय फोडिलें समुद्रासी । तैसें मारितां इतरांसी । श्रीरामासी काय लागे ॥ २७ ॥ आणि प्रवृत्तिशास्त्रसंमत । देवद्रोही मदोन्मत्त । ब्रह्मद्वेषी अधर्मरत । त्यांचा घात करावा ॥ २८ ॥ आणिकही दुसरा अर्थ । मुक्त जें जें कर्म करीत । तें तें त्यासी अबाधत । न लागे निश्चित पापपुण्य ॥ २९ ॥ गोकुळामाजी श्रीअनंतें । भोगिलें नाना योषितांतें । पाप कोणतें जडलें त्यातें । हेंचि निश्चितें सांगावें ॥ २३० ॥ तयाचपरी श्रीहनुमंतें । रणीं मारिलें राक्षसांतें । नाहीं मानिलें हत्येतें । तन्मयत्वें संग्राम ॥ ३१ ॥ असो यापरी हनुमंत । निजात्मध्यासें युद्ध करीत । रणीं खवळला अत्यद्भुत । पुच्छकेत सोडिला ॥ ३२ ॥ आला आला रे पुच्छकेत । नगरीं मांडिला आकान्त । राक्षस शंखस्फुरणें करीत । सैरा धांवत दशदिशा ॥ ३३ ॥ पुच्छ येतां बाजारांत । चांटे दिंडांमाजी लपत । वाणी लपती पोत्यांत । पुच्छ ओढीत तेथूनी ॥३४॥ तेली लपती घाण्यांत । साळी दडती निजगतैंत । पानपसारे अटक्यांत । पुच्छ काढित तेथूनी ॥ ३५ ॥ विचारोनि युक्ति शूद्रीं । लपती कडब्यामाझारी । पुच्छ अवचितें पायीं धरी । काढी बाहेरी ओढोनी ॥३६॥ एक तळघरीं देती दडिया । एक समुद्रीं देती बुडिया । एक टाकिती पेंवीं उडिया । पुच्छ पायां सोडीना ॥ ३७ ॥ कोट्यनुकोटी राक्षसभार । मारिले हनुमंतें समग्र । नगरीं उठिला हाहाकार । रजनीचरें पळताती ॥ ३८ ॥ धांवत आले राजगृहासी । जाणविलें चंद्रसेनेसी । येरी जाणोनि मानसीं । निजयुक्तीसी सांगत ॥ ३९ ॥ पुच्छ जवळी येतां जाण । घाला जानकीची आण । तेचि युक्तीतें करोन । कित्येक जण वांचले ॥ २४० ॥ ऐसें करोनि चरित्र । उड्डाण करी वायुपुत्र । जेथें उभे श्रीराम सौमित्र । तिकडे सत्वर परतला ॥ ४१ ॥ अगाध हनुमंताची ख्याती । स्वर्गीं सुरवर वानिती । लिहितां न पुरे एवढी क्षिती । यथामती बोलतां ॥ ४२ ॥ येरीकडे श्रीरघुनंदन । अनुलक्षूनि लक्ष्मण । म्हणे युद्धाचें लक्षण । कैसें जाण भासलें ॥ ४३ ॥ वैरी कोठून उद्भवले । कैसेनि नाशातें पावले । हें तंव महाआश्चर्य झालें । कोणें केलें कळेना ॥ ४४ ॥ ऐकोनि बोले सुमित्रासुत । वाढ वेळ गेला हनुमंत । त्यावीण हा कार्यार्थ । नव्हे निश्चित दुजियाचा ॥ ४५ ॥ ऐसें दोघे संवादती । तंव आकाशपंथें मारुती । उतरोनियां शीघ्रगती । श्रीरघुपति नमियेला ॥ ४६ ॥ देवाभक्तां होतां भेटी । निजानंदें कोंदली सृष्टी । गगनीं केली पुष्पवृष्टी । सुखसंतुष्टी सुरवरीं ॥ ४७ ॥ हनुमंतासी श्रीरघुनंदन । म्हणे आम्हांतें सांडोन । कोठें केलें होतें गमन । मजलागून सांगावें ॥ ४८ ॥ ऐसें बोलतां श्रीरघुपती । वरतें न पाहे मारुती । म्लानवदन दीनवृत्ती । श्रीरामाप्रती अनुवादे ॥४९॥ दुर्धर देखोनि अहिरावणा । जावोनि प्रार्थिली चंद्रसेना । तुझ्या देवोनि अंतुरीपर्णा । जय आंदणा घेतला ॥ २५० ॥ तुझें एकपत्नीव्रत । हें तों घडेना निश्चित । अतएव माझा संचितार्थ । पैं विपरीत फळिन्नला ॥ ५१ ॥ तुझें नाम स्मरतां वदनीं । पापी वसती वैकुंठभुवनीं । माझे पूर्वज नरकायंतनीं । तुझेकारणीं पडियेले ॥ ५२ ॥ ऐसें बोलतां हनुमंत । कृपेनें कळवळला रघुनाथ । तूं तंव माझा परम आप्त । भला कार्यार्थ साधिला ॥ ५३ ॥ जैसें निवारिलें संकट । तैसें निवारीं हें दुर्घट । आम्हांसी अणुमात्र खटपट । नलगे स्पष्ट तव धर्मे ॥ ५४ ॥ ऐसें बोलतां श्रीरघुवीर । वेगें उडाला वायुकुमर । चंद्रसेनेचें मंदिर । अति सत्वर ठाकिलें ॥ ५५ ॥ तियेसी बोले हनुमंत । तुझे पुरवावया मनोरथ । येथें आणितों श्रीरघुनाथ । सावचित्त तूं ऐस ॥ ५६ ॥ श्रीराम सर्वात्मा सर्वज्ञ । श्रीराम त्रैलोक्यातें मान्य । त्याचें आतिथ्य करितां सामान्य । सत्य जाण महादोष ॥ ५७ ॥ ब्रह्मादिकां पडे दृष्टी । तो येतसे तुझे भेटी । भाग्य तुझें न वदवे होटीं । धन्य सृष्टीं तूं एक ॥ ५८ ॥ तरी ऐकें एक वचनार्थ । शेज करावी सुनिश्चित । अणुमात्र भंगल्या श्रीरघुनाथ । उठोनि त्वरित जाईल ॥ ५९ ॥ येरी

१ घटामध्यें, मडक्यांत. २ लोकव्यवहाराला मान्य. ३ [illegible]. ४ शंखध्वनि, ५ कापडवाले, ६ राक्षस, ७ पृथ्वी. ८ पत्नीत्व, ९ प्रारब्धकर्म, १० नरकांत,

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

बरें म्हणोनि पाहीं। शेज सांवरी लवलाहीं। हनुमंतानें तेचि समयीं। भ्रमर हृदयीं आठविला ॥ २६० ॥ तो स्मरतांचि पातला तेथें। नमस्कारिलें हनुमंतातें। काय आज्ञा करीं मातें। निजभावार्थें पूसत ॥ ६१ ॥ ऐकोनि बोलिजे हनुमंतें। चंद्रसेनेच्या मंदिरातें। तुवां जावोनि गुप्तपंथें। मंचकातें कोरावें ॥ ६२ ॥ पोंचट करावा मंचक। वरी बैसतां रघुकुळटिळक। भंगोनि जाय एकाएक। ऐसा देख करावा ॥ ६३ ॥ आज्ञा म्हणोनि मधुकर। वेगें पावला राजमंदिर। मंचक कोरूनि समग्र। किंचिन्मात्र रक्षिला ॥ ६४ ॥ कर्दळीपत्रप्रमाण। त्वचा रक्षोनियां जाण। वेगें करोनि उड्डाण। पवनंनदन वंदिला ॥ ६५ ॥ तुवां दिधलें जीवदान। त्याचें न होववे उत्तीर्ण। परंतु स्वल्प सेवा जाण। तुजलागून अर्पिली ॥ ६६ ॥ हनुमान येवोनि श्रीरामापासीं। भ्रमर भेटविला श्रीरामासी। श्रीरामें देवोनि आलिंगनासी। मधुकरासी गौरविलें ॥६७॥ भ्रमर म्हणे पवनात्मजा। तुवां उद्धार केला माझा। मज भेटविला श्रीरामराजा। झालों तुझा उपकारी ॥ ६८ ॥ ऐसें स्तवोनि उभयतांसी। भ्रमर गेला निजधामासी। हनुमंतानें श्रीरामासी। राजगृहासी चालविलें ॥६९॥ श्रीराम येतां निजमंदिरा। आडवी धांवोनि सुंदरा। नमस्कारोनि श्रीरघुवीरा। निजवोंवरा आणिलें ॥ २७० ॥ श्रीराम बैसतां मंचकावरी। झाली मंचका चकचूरी। तैंच उठोनि झडकरी। निघे बाहेरी श्रीराम ॥ ७१ ॥ कपट कळलें चंद्रसेनेसी। मग भरोनि क्रोधावेशीं। काय बोलिली हनुमंतासी। कपटी होसी तूं एक ॥ ७२ ॥ अरे कपटिया श्रीरामदूता। आपुलें कार्य साधिलें धूर्ता। मारवोनि माझ्या कांता। हितस्वार्था नागविलें ॥ ७३ ॥ अति भावार्थें पुसोनि वर्म। शेखीं केलें घातक कर्म। कोठें राहिला सत्य धर्म। महा अधर्म त्वां केला ॥ ७४ ॥ आतां शाप घेईं माझा। म्हणोनि बोलली राक्षसभाजा। कृपा आली राघवराजा। पवनात्मजाकारणें ॥ ७५ ॥ माझ्या कार्यालागीं जाण। येणें केलें हें विंदान। आणि शाप दारुण। किमर्थ आपण घालावा ॥ ७६ ॥ ऐसें विचारूनि पोटीं। आत्मज्ञानाचे परिपाटीं। चंद्रसेनेसी सांगे गोष्टी। कृपादृष्टीं कृपाळू ॥ ७७ ॥ मी सर्वात्मा सर्वदेशीं। व्यापक नव्हे एकदेशी। व्यापकता नाना आकारांसी। निजदेहासी व्यापक ॥ ७८ ॥ श्रीरामें धरली धरा राहे। श्रीरामें जीवन जीवताहे। श्रीरामप्रतापें वायु आहे। चाळविताहे सर्वांसी ॥ ७९ ॥ श्रीरामें दिधला अवकाश। म्हणोनि नांदताहे आकाश। श्रीरामें तेजासी प्रकाश। श्रीराम सर्वांसी व्यापक ॥ २८० ॥ श्रीराम बुद्धीसी बोधविता। श्रीराम चित्तासी चेतविता। अंतःकरणीं सर्व सत्ता। श्रीरघुनाथाचेनि धर्में ॥ ८१ ॥ श्रीरामें सबळ अहंकार। श्रीरामें मनाचा व्यापार। श्रीराम प्राणांसी परिचार। श्रीराम साचार सर्वगत ॥ ८२ ॥ श्रीरामें नयनांसी द्रष्टेपण। श्रीरामें श्रवणांसी होय श्रवण। श्रीरामें सुवास घेणें घ्राण। श्रीरामेंविण तें व्यर्थ ॥ ८३ ॥ श्रीरामें गोडी जाणे रसना। श्रीरामें बोले वदन वचना। श्रीरामें प्राणी मीतूंपणा। जाणे जाणा तत्त्वतां ॥८४॥ श्रीराम शरीर उठवी बैसवी। श्रीराम शरीर निजवी फिरवी। हें जाणते स्वानुभवी। येरां पदवी अतर्क्य ॥ ८५ ॥ श्रीराम प्राणांचाही प्राण। श्रीराम जीवाचें जीवन। श्रीराम मनाचें उन्मन। चैतन्यघन श्रीराम ॥ ८६ ॥ ऐसा श्रीराम तो सर्वगत। भोगीत राहें तूं निवान्त। सद्गुरुमुखें करोनि प्राप्त। आन किमर्थ वांछिसी ॥ ८७ ॥ म्हणसी सद्गुरूसी पुसों जातां। हातींचा जासील तूं आतां। तरी एतद्विषयीं ऐक कथा। तुज सर्वथा सांगेन ॥ ८८ ॥ सकळ सृष्टीचा मी कर्ता। ईक्षणमात्रें सृष्टीचा हर्ता। सर्वांमाजी आत्मसत्ता। तो मी तत्त्वतां उपदेशीं ॥ ८९ ॥ ब्रह्मा माझा नित्यांकित। शंकर माझें ध्यान करीत। विष्णु तो मी मूर्तिमंत। उपदेशीत तुजलागीं ॥ २९० ॥ म्यां बोलविल्या वेद बोले। म्यां चालविल्या सूर्य चाले। म्यां हालविल्या देह हाले। तो मी बोलें तूजसीं ॥ ९१ ॥ ईश्वराचा मी ईश्वरु। गुरूचाही आदिगुरु। मजहूनि परता सद्गुरु। कोण सधरु असेल ॥ ९२ ॥ यथा देव तथा गुरु। या श्रुति-

१ भ्रमर. २ मारुति. ३ आपल्या मंदिरामध्यें. ४ राक्षसपत्नी. ५ युक्ति. ६ संचार. ७ माया व अविद्या यांनीं रहित मनाची स्थिति. ८ दुसरें. ९ श्रेष्ठ.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वाक्याचा निर्धारु । तो मी स्वमुखें सद्गुरु । करीं सधरु उपदेश ॥ ९३ ॥ तुझ्या देहाचा चाळक । तो मी आत्माराम देख । त्यासी भोगितां हें चोख । आवश्यक अंतरीं ॥ ९४ ॥ तया भोगाचें लक्षण । तेंही ऐक सावधान । सर्वसाक्षी चैतन्यघन । तो मी पूर्ण हा ध्यास ॥ ९५ ॥ तया ध्यासाच्या परिपाठीं । दृश्य द्रष्टा दर्शन त्रिपुटी । समूळ मावळली हे गोष्टी । पाठीपोटीं श्रीराम ॥ ९६ ॥ द्वैताचा ठाव नाहीं जेथें । भोग्य भोक्ता कैंचा तेथें । मज भोगिजे श्रीरघुनाथें । हें कोणातें नाठवे ॥ ९७ ॥ असो ऐसिया निजात्मध्यासें । सांडीं दुजेपणाचें पिसें । हेंचि भोगीं निजमानसें । तुज म्यां जैसें सांगितलें ॥ ९८ ॥ तुझे आवडीचेनि भरें । श्रीराम भोगावा शरीरें । म्हणसी तरी या अवतारें । हें निर्धारें घडेना ॥ ९९ ॥ तथापि भक्तभावासाठीं । मज अवतरणें शुष्ककाष्ठीं । तुझिये प्रीतीस्तव गोरटी । करीन गोष्टी ते ऐक ॥ ३०० ॥ यादवकुळीं द्वापारांत । कृष्णरूपें श्रीरघुनाथ । तुजला वरील निश्चितार्थ । वचन सत्य हें जाण ॥ १ ॥ तेथें राजा सत्राजित । त्याचे उदरीं तूं जनित । सत्यभामा होसी सत्य । तुज मी तेथ वरीन ॥ २ ॥ अतिशयेंसीं भावार्थे । असे तुजपासीं नांदत । तुझा होईन मी अंकित । माझे भक्त मज प्रिय ॥ ३ ॥ भक्त जैसा मज नाचवीत । तैसा तैसा मी नाचत । आतां राहें तूं निवान्त । मज भोगीत अंतरीं ॥ ४ ॥ मातें गावें मजला ध्यावें । मातें पहावें मज स्मरावें । मद्रूप होवोनियां रहावें । ऐसेनि हरावें काळातें ॥ ५ ॥ ऐसें बोलतां श्रीरघुनंदना । तन्मय झाली चंद्रसेना । विसरली मीतूंपणा । श्रीरामवचना अनुसरली ॥ ६ ॥ बरवें म्हणोनि श्रीरामासी । नमस्कारिलें साष्टांगेंसीं । म्हणे उद्धरिलें दीनासी । धन्य होसी श्रीरामा ॥ ७ ॥ माझा सद्गुरु वायुकुमर[1] । तेणें भेटविला श्रीरघुवीर । त्याचा न वर्णवे उपकार । दासी किंकर मी त्याची ॥ ८ ॥ परम कृपाळु दशानन । वैकुंठासी करितां गमन । आमुचें त्यासी झालें स्मरण । श्रीरघुनंदन पाठविला ॥ ९ ॥ आपण गेलिया मोक्षासी । कोण उद्धरील त्यांसी । श्रीराम न येचि पाताळासी । म्हणोनि यासी धाडिलें ॥ ३१० ॥ येथें धाडोनि श्रीरघुनंदन । सकुळ तारिला अहिरावण । धन्य धन्य दशानन । वाटे पूर्ण कृपाळु ॥ ११ ॥ धन्य धन्य तो राक्षसराज । धन्य धन्य तो पवनात्मज । धन्य श्रीराम विजयध्वज । जेणें मज उद्धरिलें ॥ १२ ॥ ऐसें करोनियां स्तवन । केलें श्रीरामासी नमन । घालोनियां पद्मासन । बैसली जाण ध्यानस्थ ॥ १३ ॥ यानंतर श्रीरघुनाथ । मकरध्वज जो हनुमंतसुत । महिकावंतिये[2] अभिषेकीत । राजा करीत तयासी ॥ १४ ॥ आशीर्वाद वदे श्रीरघुनंदन । जोंवरी लंकेसी बिभीषण । तोंवरी राजसिंहासन । तुजलागोन पाताळीं ॥ १५ ॥ ऐसें देवोनि आशीर्वचन । श्रीराम हनुमंत लक्ष्मण । वेगें निघाले तेथून । लंकाभुवन पावावया ॥ १६ ॥ मग हनुमंतें दोघे जण । स्कंधीं बैसविले आपण । वेगें करोनि उड्डाण । आला जाण बिलद्वारा ॥ १७ ॥ विवरीं अवघा अंधकार । श्रीराम स्वयें प्रकाशकर । दर्शनें केला विवरोद्धार । पंथ दुर्धर क्रमियेला ॥ १८ ॥ आले एकाएकीं बाहेरी । वानरसैन्यामाझारी । अग्निशशांकसूर्यापरी । वानरवीरीं देखिले ॥ १९ ॥ तीन अहोरात्रें श्रीराम । कोठें होता पूर्णकाम । आतां आला विश्रामधाम । आल्हाद पूर्ण वानरां ॥ ३२० ॥ कोणी नमिती श्रीरामासी । कोणी भेटती लक्ष्मणासी । कोणी वंदिती हनुमंतासी । हरिनामेंसीं गर्जती ॥ २१ ॥ आला आला दीनदयाळ । आला आला भक्तवत्सल[3] । आला आला प्रणतपाळ[4] । पूर्ण कृपाळ श्रीराम ॥ २२ ॥ आला आला सत्यप्रतिज्ञ । आला आला हो सर्वज्ञ । आला आला रघुनंदन । दीनोद्धारण श्रीराम ॥ २३ ॥ आला आला भक्तकैवारी । आला आला अहल्योद्धारी । आला आला पौलस्त्यारी[5] । वानरभारीं आल्हाद ॥ २४ ॥ आला आला भक्तांतरंग[6] । आला आला सीतारंग । आला आला विश्वैतरंग[7] । अंतरंग जो आत्मा ॥ २५ ॥ ऐसिया प्रेमाचिया पैडिभारें[8] । गर्जों लागलीं वानरें । देखोनि श्रीरघुवीरें । अत्यादरें आलिंगिलीं ॥ २६ ॥ मग सुग्रीव बिभीषण ।

१ पवनपुत्र मारुति. २ महिकावती नगरींत. ३ भक्तांवर प्रेम करणारा. ४ शरणागतांचें रक्षण करणारा.

५ रावणशत्रु राम. ६ भक्तांच्या हृदयांत राहाणारा. ७ संपूर्ण जग लाटेप्रमाणें आहे ज्याचे ठायीं असा. ८ अधिकपणानें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

करीं धरोनि श्रीरघुनंदन । शिबिरामाजी नेले जाण । सुखसंपन्न बैसले ॥ २७ ॥ पुढील कथेचें अनुसंधान । रावणहोमविध्वंसन । एका जनार्दना शरण । रामायण अति रम्य ॥ २८ ॥ श्रोते म्हणती नवलकथा । श्रीरामकाव्यामाजी नसतां । कोठोनि काढिली ही कथा । ऐकोनि वक्ता बोलत ॥ २९ ॥ शतकोटी श्रीरामचरित्र । वदलें वाल्मीकाचें वक्त्र । कोठें कैसें चित्रविचित्र । कोणें समग्र शोधिलें ॥ ३३० ॥ परी प्रस्तुत अग्निपुराण । श्रोतीं पहावें शोधून । सेतुबंधनमाहात्म्यीं जाण । हें आख्यान सविस्तर ॥ ३१ ॥ आळस सांडोनियां चित्तें । क्षणभरी करोनि अवकाशातें । पहावें शोधून ग्रंथातें । आशंकेतें फेडावें ॥ ३२ ॥ एकनाथी रामायण । केलें सप्तकांडकथन । त्यांत अहिरावणाख्यान । काय म्हणोन विसरलें ॥ ३३ ॥ ऐसें न वदावें उत्तर । ते तंव विष्णूचा अवतार । त्यांसी स्वप्नीं नाहीं विसर । महाचतुर ग्रंथकर्ते ॥ ३४ ॥ परंतु झाले बहुत दिवस । मुखीं पाळितां ग्रंथास । गाहाळिलें ह्या अध्यायास । तिंहीं तयास काय कीजे ॥ ३५ ॥ मग साक्षेपें जयरामसुतें । करोनि घातलें अध्यायातें । हृदयीं रिघोनि एकनाथें । हें मजहातें करविलें ॥ ३६ ॥ माझें नव्हे हें ज्ञान । कांहीं नेणें मी व्याख्यान । माझे हृदयीं प्रवेशून । केलें कथन श्रीरामें ॥ ३७ ॥ श्रीराम नयनांचाही नयन । श्रीराम श्रवणांचाही श्रवण । श्रीराम मनाचें आदिमन । तेणें लेखन हें केलें ॥ ३८ ॥ श्रीराम सर्वां बुद्धिदाता । सर्वीं सर्वत्र त्याची सत्ता । हेंही करणें श्रीरघुनाथा । काय आतां मी सांगूं ॥ ३९ ॥ ऐसें श्रोत्यांसी प्रार्थून । जयरामात्मजें करोनि नमन । म्हणे पुढील अनुसंधान । सावधान परिसावें ॥ ३४० ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां अहिरावणवधश्रीरामगमनं नाम चतुःपंचाशत्तमोऽध्यायः ॥ ५४ ॥ ओंव्या ॥ ३४० ॥

अध्याय पंचावन्नावा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ आनंद झाला सर्वांसी । श्रीराम आला निजमेळिकारांसी[1] । लागले श्रीरामचरणांसी । रामें हृदयेंसीं आलिंगिले ॥ १ ॥ परियेसीं स्वामी श्रीरामा । दीन अनाथां प्लवंगमां । सांडोनि गेलासि आम्हां । सर्वोत्तमा काय केलें ॥ २ ॥ तुझ्या पोटीं होतें जाणें । एकासी तरी होतें सांगणें । न पुसतां घडलें जाणें । उचित करणें हें नव्हे ॥ ३ ॥ तंव बोलिला हनुमंत । तुम्हां वानरां न कळे मात । पूर्णावतार रघुनाथ । त्यासी सांगात काय करी ॥ ४ ॥ जो दुजियाची वाट पाहे । त्याचें कार्य कधीं न होये । यश कोठेंचि न लाहे । श्रीराम पाहें तैसा नव्हे ॥ ५ ॥ श्रीराम एकला एकांगवीर[2] । न धरी दुजियाचा आधार । तो वानरांसी विचार । पुसे साचार हें न घडे ॥ ६ ॥ जाणें होतें पाताळासी । कळों न देतां कोणासी । जावोनियां अति वेगेंसीं । अहिरावणासी मारिलें ॥ ७ ॥ अहिरावण महिरावण । सखे बंधु दोघे जण । त्यांसी वधावया जाण । श्रीराम आपण स्वयें गेला ॥ ८ ॥ मारिलिया रावणासी । अवकाश न पुरे जावयासी । वेढा काढवोनि वेगेंसीं । पाताळासी स्वयें गेला ॥ ९ ॥ जरी जावें पुसोनी । तरी निवारूं आम्ही कोणी । गेला न पुसतां म्हणोनी । प्रकट जनीं न करीच ॥ १० ॥ ऐकोनि तो विचार । हरिखेला वानरभार । श्रीराम एकांगवीर । युद्ध थोर पैं केलें ॥ ११ ॥ दुसरा कैंचा हनुमंत । म्हणोनि पुसे वानरनाथ । ऐकोनि तयाची मात । श्रीरघुनाथ स्वयें सांगे ॥ १२ ॥ वानरभार जैं निजेला । अहिरावणें घालोनि घाला । दोघां जणां धरोनि वहिला । गेला पाताळा घेऊनि ॥ १३ ॥ मार्ग काढोनि त्वरित । आला पाताळा हनुमंत । मकरध्वज द्वार राखीत । नगरांत रिघों नेदी ॥ १४ ॥ युद्ध झालें दोघांसी । न लोटती येरयेरांसी । हनुमान क्षोभोनि पुसे त्यासी । झाली दोघांसी ओळखी ॥ १५ ॥ हनुमंताचा स्वेदज[3] पुत्र । पुसतां निघाला वीर मकर । भेटोनियां पितापुत्र । मज सत्वर सोडविलें ॥ १६ ॥ मारोनियां राक्षसांसी । मुक्त करोनि पाताळासी । राज्य देतां मकरध्वजासी । भेटों तुम्हांसी येथें आलों ॥ १७ ॥ हनुमंताचा आत्मज[4] । अतिविख्यात मकरध्वज । ऐकोनि कपिसमाज । पुच्छध्वज

---

१ वानरांना, २ बहुत वीरांशीं एकटा युद्ध करणारा. ३ घामापासून झालेला, ४ मुलगा,

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

उभरिले ॥ १८ ॥ मग क्षेमें देती येरांयेर । येरयेरां करिती नमस्कार । होवोनियां आल्हादपर । श्रीरघुवीर नमियेला ॥ १९ ॥ झालें सकळां समाधान । हरिखें नाचती वानरगण । तंव रावणाचे दूत जाण । हेरपण करिती रामकटकीं ॥ २० ॥ वृत्तान्त ऐकोनि समग्र । गेले रावणासमोर । सांगितलें सविस्तर । रामचरित्र यथाश्रुत ॥ २१ ॥ अहिरावण महिरावण । यांचा वध ऐकोनि जाण । दहा मुखीं रावण । शंख आपण करीतसे ॥ २२ ॥ मनोरथ न वचती सिद्धी । झाली सकळांची अवधी । आतां काय करूं बुद्धी । लागली आधी रावणा ॥ २३ ॥ दुर्धर कष्ट करोनि जाण । आणिलें सीता चिद्रत्न । तेंही नव्हे भोगायतन । कोण प्रयत्न करूं आतां ॥ २४ ॥ प्रार्थोनियां मंदोदरीसी । वश्य करीन जनकदुहितेसी । भोगितां मैथिलीसी । केल्या कष्टांसी परिहार ॥ २५ ॥ धरावया मृगगणा । घरीं पाळिती भांड हरणा । स्वयातीसीं विश्वासोन जाणा । निजबंधन पावती ॥ २६ ॥ कामी पुरुष सकामासी । जार स्त्री पुंश्चळीसी । किंवा तस्कर तस्करासी । वश्य करी हेरासी पैं हेर ॥ २७ ॥ हरिभक्त हरिभक्तासी । दृष्टी पडतां येरयेरांसी । मिठी पडे अतिप्रीतीसीं । सेव्य दोघांसी परमात्मा ॥ २८ ॥ योगी आकळे योगबळें । ज्ञानिया निजज्ञानमेळें । निःसंगत्वें वैराग्यशीळें । सद्य आकळे परब्रह्म ॥ २९ ॥ तेंवी पतिव्रता पतिव्रतेसी । वश्य करी क्षणमात्रेंसीं । म्हणोनियां मंदोदरीसी । सीताप्राप्तीसी पैं प्रार्थी ॥ ३० ॥ ऐसें विचारोनि रावण । निजकार्या सावधान । अत्यंत प्रीति करून । निजकांता जाण पाचारी ॥ ३१ ॥ अत्यंत नम्र अति प्रीतीसीं । बोलता झाला मंदोदरीसी । तूं सती पतिव्रता होसी । माझ्या वचनासी नुपेक्षीं ॥ ३२ ॥ पतिव्रतेचा धर्म पूर्ण । नुल्लंघावें पतिवचन । ऐसें आहे वेदवचन । शास्त्रपुराणसंमत ॥ ३३ ॥ म्हणोनियां तुजप्रती । करीतसें मी विनंती । अनुसरोनि वचनस्थिती । कार्य निगुतीं साधावें ॥ ३४ ॥ जानकीभोगाची आस्था । अत्यंत लागलीसे चित्ता । ते कामना सिद्धी न वचतां । प्राणान्तव्यथा होतसे ॥ ३५ ॥ मांडलें अत्यंत निर्वाण । निमाले पुत्रादि प्रधान । सैन्य निमालें संपूर्ण । वीर दारुण रणयोद्धे ॥ ३६ ॥ अदट वीर कुंभकर्ण । तोही मारिला विटंबून । गोष्टी सांगावया पुरती जाण । सांगातें आन नुरेचि ॥ ३७ ॥ ऐसें सकळ कुळाचें निर्दळण । झालें असतां संपूर्ण । माझे हृदयींचें शल्य जाण । अर्ध क्षण न ढळेचि ॥ ३८ ॥ जेवितां रुचेना अन्न । चवी नेदी पैं जीवन । झोंप न ये केल्या शयन । अवस्था पूर्ण लागली ॥ ३९ ॥ सपुत्र सैन्य निमालें देख । त्याचें अणुमात्र नाहीं दुःख । परी भोगावया सीतासुख । आस्था अलोलिक लागली ॥ ४० ॥ त्या आस्थेचें निरसन । मंदोदरी तुझेनि जाण । मज होईल समाधान । म्हणोनि विनवण करीतसें ॥ ४१ ॥ तूं सती पतिव्रता । नुल्लंघिसी पतिवचनार्था । सांडोनियां निजमहत्त्वा । शरण तत्त्वतां तुज आलों ॥ ४२ ॥ कार्य साधावें संपूर्ण । म्हणोनि धरिले दोनी चरण । सांडोनियां राजचिन्ह । तुज विनवण करीतसें ॥ ४३ ॥ कामासी आतुंडला संपूर्ण । तो न पाहे मानापमान । स्त्रियेचे धरितां चरण । लज्जा रावण मानीना ॥ ४४ ॥ येरी निवारोनि वेगेंसीं । स्वयें लागली चरणांसी । भाग्य आलें जी फळासी । निजकार्यासी आज्ञापिलें ॥ ४५ ॥ जितुकें माझें युक्तिबळ । तितुकें वेंचोनि सकळ । प्रबोधीन जनकबाळ । परी प्राप्तिकाळ दैवाधीन ॥ ४६ ॥ ऐसें रावणासी एकांतीं । संवादोनि महासती । आली निजधामाप्रती । होतें चित्तीं तें झालें ॥ ४७ ॥ बाप कृपाळु भगवंत । निजभक्तांचें मनोगत । पुरवावया सावचित्त । अनाथनाथ श्रीराम ॥ ४८ ॥ होतें मंदोदरीच्या चित्तीं । जे भेटावी सीता सती । राम भोगी कोण्या स्थितीं । हें सीतेप्रती पुसावें ॥४९॥ श्रीराम कैसा किमात्मक । श्रीराम भोगी कैसें सुख । सविकल्प निर्विकल्प । हेंही सकळिक पुसावें ॥ ५० ॥ श्रीरामाचें ठाणमाण । रूपरेखा गुणलक्षण । सर्वगत कीं परिच्छिन्न । स्थिति संपूर्ण रामाची ॥५१॥ श्रीराम केवढा कैसा असे । कोठें असे कोठें वसे । पुसावया जीवीं उल्लासे । जानकीस अहर्निशीं

१ आलिंगन. २ आनंदानें. ३ समाप्ति, नाश. ४ मनो-[illegible]. ५ व्यभिचारिणीला. ६ तत्काल. ७ सल, दुःख. ८ उदक. ९ काळजी. १० स्वाधीन झाला. ११ उपदेशीन. १२ मर्यादित.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ ५२ ॥ ऐसी मंदोदरीच्या चित्ता । होती अनिवार अवस्था । कैं भेटेल जनकदुहिता । निजगुह्यार्था पुसेन ॥ ५३ ॥ अवचटें सीता सती । हातींची गेलिया निश्चितीं । कोणा पुसावी निजगुह्यस्थिती । चिंता चित्तीं अनिवार ॥ ५४ ॥ भाग्यें भेटल्या साधूसी । अवश्य पुसावें निजगुह्यासी । जाणोनि जो होय उदासी । पाप त्यापासीं खंतेलें ॥ ५५ ॥ बहुकाळ ज्यासी खता चढे । साहणे तोडितां तो न झडे । लोहापेसें कठिण गाढें । करी रोकडें मृत्तिका ॥ ५६ ॥ अभिमानाची जाति पाहीं । साधुसंतां न मानी कांहीं । ज्ञानगवें बुडाले तेही । शुद्धि नाहीं तयाची ॥ ५७ ॥ मनुष्यदेहाची निजप्राप्ती । शिणतां न पवे लक्षांतीं । येथेंही विकल्प चित्तीं । तोंडीं माती पडली ती ॥ ५८ ॥ एक नरदेह नेणोनि गेले । एकीं लटकें म्हणोनि उपेक्षिलें । एक ते गवें गिळिले । जे आम्ही जाणते सज्ञान ॥ ५९ ॥ एक ते साधनीं ठकले । आपमती सैरा भरले । एक करूं करूं म्हणतां गेले । करणें राहिलें तैसेंचि ॥ ६० ॥ पोटीं अनिवार विषयस्थिती । ज्ञान मिरविती लोकांप्रती । जीविका त्यावरी करिती । घात निश्चितीं स्वयेंचि केला ॥ ६१ ॥ जेणें व्हावी निजप्राप्ती । तें वेंचलें विषयासक्ती । स्वयेंचि नागवले निश्चितीं । भांडवल हातीं असेना ॥ ६२ ॥ स्वप्नीं जोडिली जे संपत्ती । ते वेंचितां न ये जागृतीं । विषयी आणि ब्रह्मनिष्ठ म्हणविती । भ्रम निश्चितीं या नांव ॥ ६३ ॥ जरी धांवणें नागवी आपण । तरी कोण करील सोडवण । अभिमानें यापरी जाण । सकळ जन नागविले ॥ ६४ ॥ जे ज्ञानगवें नागविले । ते काळातें न देखती वहिले । सिद्ध आयुष्य वायां गेलें । जें जोडितां न मिळे पुण्यकोटी ॥ ६५ ॥ झालिया नरदेहप्राप्ती । परमार्थ साधावा हातोहातीं । जेंवी कृषीवलाची स्थिती । मढें झांकिती पेरणीसीं ॥ ६६ ॥ आजि हें राहो करीन पाहें । म्हणतां काळ कृपाळु नोहे । क्षणक्षणां जात आहे । उत्तम आयुष्य घेवोनियां ॥ ६७ ॥ ऐसी काळाची काळसत्ता । जाणोनि मंदोदरीच्या चित्ता । लागली अनिवार अवस्था । जनकदुहिता भेटावया ॥ ६८ ॥ तंव आज्ञापिलें रावणें । उल्लासोनियां चौगुणें । करूं आदरिलें येणें । रामांगनेसी भेटावया ॥ ६९ ॥ अशोकवना येवोनी । पाहे मंदोदरी नयनीं । तंव देखिली जनकनंदिनी । रामानुसंधानीं आसनस्थ ॥ ७० ॥ श्रवणीं राम नयनीं राम । वाचेसी नित्य वदवी राम । ध्यानीं राम मनीं राम । अनुसंधानीं राम अखंड ॥ ७१ ॥ प्राणाचा निजसंचारी । राम न विसंबेचि सुंदरी । सकळ इंद्रियविकारीं । झाली अविकारी श्रीरामें ॥ ७२ ॥ चोर धरियेला राजद्वारीं । त्यासी निग्रहिती नानापरी । तेंवी इंद्रियवृत्ती समग्री । सीता सुंदरीं निग्रहिल्या ॥ ७३ ॥ ऐसी दृष्टीं देखतां जानकीसी । अति उल्लास मंदोदरीसी । विसरोनि गेली देहभावासी । मीनली प्रीतीसीं अहंत्यागें ॥ ७४ ॥ साधु देखतांचि दृष्टीं । जरी विरे अहंकाराची गांठी । पडे स्वानंदाची मिठी । उडे त्रिपुटी अभावें ॥ ७५ ॥ सांडोनियां मीतूंपण । सीतेसीं बोलावया जाण । साधूं आदरिलें विंदाण । ऐसी अति विचक्षण मंदोदरी ॥ ७६ ॥ अति चातुर्याचा प्रश्न । पुसती झाली विचक्षण । रावणाचें कार्य जाण । साधून विंदानस्वरूप पुसे ॥ ७७ ॥ शब्दें व्यापिलें गगन । निमालें शून्याचें शून्यपण । तेथें परादि वाचा पुसे कोण । अर्थ संपूर्ण आकर्षी ॥ ७८ ॥ अहाच दृष्टी पाहतां । येथींचा अर्थ न ये हाता । चित्त विनटलें तत्त्वतां । तैं शब्दार्था पाविजे ॥ ७९ ॥ यालागीं श्रोते सज्जन । निजहितीं कुशल पूर्ण । करोनि सर्वांगाचें अवधान । शब्दार्थ जाणा परिसावा ॥ ८० ॥ जीवामाजी घालोनि जीव । परिसतां हें अर्थगौरव । तैं सिद्धि पावे कार्य सर्व । भवभय निवारे ॥ ८१ ॥ असो आतां जानकीसी । मंदोदरी अति प्रीतीसीं । पुसती झाली वेगेंसीं । राम अनुभविसी तो कैसा ॥ ८२ ॥ राम व्यापक कीं एकदेशी । हें सांगावें मजपासीं । सकळ देहीं श्रीरामासी । स्थिति कैसी वस्तीची ॥ ८३ ॥ जरी म्हणसी परिच्छिन्न । तरी व्यापकत्वा पडिलें खान । आत्माराम हें अभिधान । न घडे जाण तयासी ॥ ८४ ॥ जरी त्यातें व्यापक म्हणसी । तरी तो सर्वभूतनिवासी । मग तेथें

१ उत्कंठा. २ चिकटून राहिलें. ३ फसले. ४ स्वच्छंदानें. ५ शेतकऱ्याची. ६ चौपट. ७ अटकेंत ठेवतात. ८ देहाभिमान टाकून. ९ नाहींशी होते. १० मर्यादित. ११ नाव.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

उपेक्षितां रावणासी । अद्वैतभजनासी अभावो ॥ ८५ ॥ ब्रह्मा धरोनि मुंगीवरी । राम व्यापक चराचरीं । तो रावणाचेही शरीरीं । इंद्रियव्यापारीं नांदत ॥ ८६ ॥ जरी रामानुसंधान रावणीं । तरी भजतां होय कोण हानी । हें सांगावें साजणी । प्रीती करोनि मजलागीं ॥ ८७ ॥ तंव हांसोनि सीता सुंदरी । उत्तर देती अतिंकुसरी । तें परिसोनि मंदोदरी । विश्रांति थोरी पावली ॥ ८८ ॥ सावध ऐकें साजणी । प्रवेशतां रामानुसंधानीं । चित्त चित्तपणा विसरोनी । रामाहूनि स्वयें राहे ॥ ८९ ॥ द्रष्टा परिच्छिन्न होये । तैं दृश्य दृश्यत्वें भासों लाहे । श्रीराम स्वयें तैसा नव्हे । परिस माये सांगेन ॥ ९० ॥ श्रीरामाहून व्याप्य एक । असतां श्रीरामें व्हावें व्यापक । त्रिपुटीचा अभावो देख । व्याप्य व्यापक तेथें कैंचें ॥ ९१ ॥ म्हणसी सर्वांच्या अंतरीं । राम असे चराचरीं । तो रावणाच्या शरीरीं । इंद्रियव्यापारीं वर्तत ॥ ९२ ॥ राम सर्वांच्या हृदयीं आहे । धरितां त्या हृदयस्थाची सोये । राम रावण कोठें आहे । सांग पां माये यथार्थ ॥ ९३ ॥ भोगितां निजहृदयस्थासी । अवकाश कैंचा भोक्तयासी । तेथें रावण कैंचा आणिसी । जे तयासी भोगावें ॥ ९४ ॥ दृश्याचिये भेटी । द्रष्टा दृश्यपणें उठी । होतां तेणेंसीं तुटी । तोही शेवटीं असेना ॥ ९५ ॥ आतां नाहींपणें असे । आणि असे तोचि दिसे । तरी रावणाचें काय पिसें । सांग सावकाशें साजणी ॥ ९६ ॥ ऐकोनि सीतेच्या उत्तरीं । पूर्णावस्था मंदोदरी । चढला स्वेद कंप शरीरीं । आनंदलहरी दाटली ॥ ९७ ॥ इंद्रियां विकळता झाली । चित्तचैतन्या मिठी पडली । अंतरीं सुखोर्मी दाटली । तेणें पडली मूर्च्छित ॥ ९८ ॥ बाप सद्गुरूचें सामर्थ्य । अलोलिक अत्यद्भुत । वचनमात्रें शक्तिपात । झाला निश्चित मंदोदरी ॥ ९९ ॥ नाहीं हस्तक मस्तक । कृपें कळवळोनि देख । वचनमात्रें दिधलें सुख । झाल्या कल्पान्त सरेना ॥ १०० ॥ छळणेंकरोनि बोलतां । तत्काळ झाली समाधिअवस्था । सद्भावें विनटतां संतां । न कळे तत्वतां काय केती ॥ १ ॥ जाणोनियां श्रोते सकळ । ज्यांसी निजप्रातीची कळवळ । तिंहीं सांडोनियां छळ । सेवावे अविकळ सज्जन ॥ २ ॥ परिस फोडावया जाण । सबळ बळें हाणिती घण । त्यासीं करितां सुवर्ण । न लगे क्षण तत्त्वतां ॥ ३ ॥ तरी परीस बापुडें तें किती । लोहाचे ठायीं सुवर्णस्फूर्ती । परीस न करीच निश्चितीं । निजस्थिती वंचिली ॥ ४ ॥ तैसा नव्हेचि चंदन । अंगवात झगटतांचि पूर्ण । उद्यान केलें आपणासमान । न्यून पूर्ण असेना ॥ ५ ॥ खैर धामोडे समग्र । बेहकळी टाकळी अत्युग्र । आदिकरोनि पांगार । झाले समग्र चंदन ॥ ६ ॥ आणीक गुण अलोलिक । जो छेदावया आला देख । त्यासी परिमळ अधिक । जाळित्या देख तयाहोनी ॥ ७ ॥ तेंवी सज्जनाचें लक्षण । छळें द्वेषभावें पूर्ण । जो आला तयापासीं जाण । त्यासी समाधान सारिखेंचि ॥ ८ ॥ यापरी सीता सती । मंदोदरीची छळणवृत्ती । छेदोनियां छळणयुक्तीं । समाधि निश्चितीं पावविली ॥ ९ ॥ बोलतां सीतेसीं बोलीं । आली वाट भुलविली । ऐसी जानकिया ख्याती केली । वचनें लाविली समाधी ॥ ११० ॥ कष्टें आली बाह्यवृत्ती । तरी न मोडे सहजस्थिती । मंदोदरी चवके चित्तीं । कांहीं निजचित्तीं स्फुरेना ॥ ११ ॥ मग कष्टीं म्हणे वो माये । देखिलिया तुझे पाये । जें सुख झालें आहे । तें बोलीं पाहें बोलवेना ॥ १२ ॥ परादि वाचा नव्हे सौरस । तेथें बोलासी कैंचा प्रवेश । ओसंडला अति उल्लास । राम परेश वोळला ॥ १३ ॥ ऐसें बोलतां बाष्प कंठीं । तंव मन मागुतें नुठी । इंद्रियां सुखसंतुष्टी । पडली मिठी चैतन्यीं ॥ १४ ॥ मग मौनेंचि लोटांगण । मंदोदरी स्वयें आपण । जानकीचे निजचरण । हृदयीं धरोन राहिली ॥ १५ ॥ तंव दुजी सन्नद्ध सहजासन । बैसली असतां सावधान । सहज निरसलें मन । रामरूपीं नयन निडोरले ॥ १६ ॥ तेथें पाहतां आत्मबिंब । उतटों पाहताहे नभ । मीतूंपणाची मिथ्या भोंब । दोघी स्वयंभ त्या झाल्या ॥ १७ ॥ एकाएकीं जनार्दनीं । दोघी दोनीपणा मुकोनी । मिळाल्या एक होऊनी । अशोकवनीं शोकातीत ॥ १८ ॥ तंव रावणें

१ ब्रह्मदेवापासून तों मुंगीपर्यंत. २ फार चातुर्यानें. ३ [illegible] ४ सुखाची लहरी=लाट. ५ अनुसरतां. ६ अविश्रांत. ७ गुप्त ठेविली. ८ बाग. ९ देहस्मृतीवर. १० अनुभव. ११ कंपायुक्त झाला. १२ पूर्ण दडले. १३ स्मरण.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

आपण । हेरपणें दासी जाण । मंदोदरीसवें देऊन । वृत्तान्त संपूर्ण आणविला ॥ १९ ॥ दासीमुखें वृत्त समग्र । ऐकोनियां सविस्तर । तळमळिता झाला थोर । दशशिर रावण ॥ १२० ॥ मंदोदरी आली तेथ । सांगितलें सकळ वृत्त । दशवदन चिंताक्रांत । कांहीं मत चालेना ॥ २१ ॥ अहिरावणादिचरित्र । सेतुमाहात्म्यीं समग्र । लिहिलें असे सविस्तर । नव्हे साचार कल्पित ॥ २२ ॥ संदेह असेल ज्यांचे मनीं । तिहीं अवकाश करोनी । सेतुमाहात्म्य अवलोकूनी । संदेह खाणोनी सांडावा ॥ २३ ॥ असो आतां तो विचार । किती सुचवूं परिहार । वक्ता एक एकांगवीर । मी कोण किंकर परिहारा ॥ २४ ॥ ग्रंथाचें नामाभिधान । शुद्ध भावार्थरामायण । तो भाव जडला पूर्ण । असतां वक्तेपण मज कैंचें ॥ २५ ॥ भावीं अनुसरोनि रघुनाथ । वक्ता झाला एकनाथ । माझेनि हातें ग्रंथ लिहिवित । कर्ता करविता तो एक ॥ २६ ॥ तेथें कैंची परिहारता । म्हणोनि श्रोते साधुसंतां । शरण आलों जी तत्त्वतां । क्षमा आतां मज कीजे ॥ २७ ॥ पांवा मधुरध्वनी वाजे । वाजवित्याचेनि गाजे । जनार्दनें तैसें कीजे । ग्रंथ लिहिविजे मज करीं ॥ २८ ॥ म्हणोनि श्रोते जन । सर्वथा न ठेवावें दूषण । करितों हेचि विनवण । कृपावलोकनीं मज सनाथ कीजे ॥ २९ ॥ क्षमा करा ऐसें म्हणतां । तरी हों पाहे काव्यकर्ता । म्हणोनि मौनेंचि आतां । लोटांगण तत्त्वतां साधूंसी ॥ १३० ॥ साधु कृपाळु जननी । जे अंतर जाणती तत्क्षणीं । तेथें परिहार कोणालागूनी । क्षणोक्षणीं सुचवावा ॥ ३१ ॥ एका जनार्दना शरण । झालें मंदोदरीआख्यान । आतां रावणाचा यज्ञ । अति विलक्षण परियेसा ॥ १३२ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां सीतामंदोदरीसंवादो नाम पंचपंचाशत्तमोऽध्यायः ॥ ५५ ॥ ओंव्या ॥ १३२ ॥

अध्याय छप्पन्नावा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ दूतवचनें रामचरित । अहिरावणाचा निजघात । ऐकोनियां लंकानाथ । तळमळित अति दुःखी ॥ १ ॥ मंदोदरी सीतेजवळी । पाठविली अति कुशळी । अतियुक्तीं प्रबोधिली । कांहीं केलें तरी वश नव्हे ॥ २ ॥ जरी युद्ध करूं समरांगणीं । तरी राम नाटोपे रणीं । मस्तक पिटितां दशाननीं । कांहीं करणी चालेना ॥ ३ ॥ ऐसा झाला चिंतातुर । काय करूं मी विचार । तंव आठवला महामंत्र । झाला शंकर प्रसन्न ॥ ४ ॥ पूर्वीं रावणासी वरद । शिवें दिधला प्रसिद्ध । तें आठवलें विशुद्ध । होम अगाध मांडिला ॥ ५ ॥ करोनि शुद्ध स्नान । शंकर करावया प्रसन्न । मांडिलें अत्युग्र स्तवन । सावधान अवधारा ॥ ६ ॥

अद्य रामाभिभूतोऽहं स्तुत्वा विषमलोचनम् ।
सर्वलोकहरं देवं त्रिपुरघ्नं त्रिसामगम् ॥ १ ॥

आसनीं भोजनीं शयनीं । श्रवणीं वदनीं नयनीं । श्रीरामें व्यापिलें अनुदिनीं । क्षणक्षणीं न विसंबे ॥ ७ ॥ धांव पाव गा शंकरा । त्रिपुरघ्ना त्रिनेत्रा । सामगायनगंभीरगिरा । गौरीहरा पाव वेगीं ॥ ८ ॥ ईशाना पंचानना वीरा । वरप्रभु वरखड्गधरा । नरनारीआदि चराचरा । विश्वंभरा व्यापका ॥ ९ ॥ वरशूळायुधधरा । वर सकलयोगीश्वरां । वर सुरां असुरां । आयुधप्रवरा धारका ॥ १० ॥ चरचरा निजनित्या । सकळलोकशाश्वता । यज्ञमूर्ति यज्ञभोक्ता । वरदात्या यज्ञांगा ॥ ११ ॥ सुराध्यक्षा गणाध्यक्षा । देवाध्यक्षा वेदाध्यक्षा । योगपते योगाध्यक्षा । सर्वाध्यक्षा शूळपाणे ॥ १२ ॥ शरणागता शरण्य । अभक्तासी करिसी दंडण । दक्षयज्ञविध्वंसन । स्वभक्तजनपाळका ॥ १३ ॥ पुष्पधनुष्यभंजना । भाळनेत्र भवविनाशना । रुद्रविश्वजितअभिधाना । आधारस्थान विश्वाचें ॥ १४ ॥ जय चिताभस्मोद्धूलना । जय पिनाकी वरासना । चंद्रचूडा विश्वभूषणा । शत्रुहनना शंकरा ॥ १५ ॥ त्रिशूळखट्वांगधरा । नागभूषणा विचित्रा । वरदात्या वरेण्यवरा । वरकार्मुकधारका ॥ १६ ॥ असतां स्त्रियेसमवेत । ब्रह्मचर्य नित्यव्रत । परम योग हा अद्भुत । नित्य शोभत वीरासनीं ॥ १७ ॥ गंगाधर वेगसौम्य ।

१ सत्य. २ माझे हातून, माझ्याकडून. ३ उपदेशिली. ४ वर. ५ त्रिपुरासुराला मारणाऱ्या. ६ स्थावरजंगमात्मक सृष्टीला. ७ रक्षण करणारा. ८ मदनाला जाळणाऱ्या.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

आजिष्णु अव्यय परम । अंधकांतक उग्रकर्म । मातृमंडलमध्यग ॥ १८ ॥ श्मशाननिलयरत । रुंडमाळ कपाळहस्त । अनंगांतक शत्रुप्रमथ । कालकालांतक दुरासदा ॥ १९ ॥ नीळकंठा दुर्धर्षा । वृषभध्वजा वीरेशा । वृषस्कंधा वृषभाक्षा । श्रीमहेशा शाश्वता ॥ २० ॥ वृषपते सर्वविजया । आनंद गिरिजाहृदया । कालचक्रप्रमेया । सुरवर्या सुरेशा ॥ २१ ॥ स्वामि शंकरा ऐक विनंती । सकळ कुळाची झाली शांती । मजही साधावया निश्चितीं । लागले आहेती सौमित्रराम ॥ २२ ॥ आसनीं भोजनीं शयनीं । गमनागमनीं कर्माचरणीं । राम लागला अनुदिनीं । क्षणक्षणीं सोडीना ॥ २३ ॥ श्रीरामबाणाचें भय पाहीं । मज लागलें सर्वा ठायीं । अहर्निशीं उसंत नाहीं । करूं कायी आतां मी ॥ २४ ॥ धांव पाव गा शंकरा । निजजनकरुणाकरा । मी पडिलों दुःखसागरा । धांव उदारा शूळपाणे ॥ २५ ॥ ऐकोनि रावणाची करुणा । कळवळला कैलासराणा । प्रत्यक्ष होवोनि जाणा । काय रावणा अनुवादे ॥ २६ ॥ शिव प्रत्यक्ष व्हावया जाण । अति खडतर रामानुसंधान । लागलेंसे बहुसाल जाण । भेटी त्रिनयना तेणें झाली ॥ २७ ॥ आश्वासोनि दशशिर । बोलता झाला शंकर । पहिलें प्रसन्न होवोनि सत्वर । दिधला वर तो ऐका ॥ २८ ॥ पूर्वी तुवां महावीरा । काढूनि सर्वांगाच्या शिरा । तुंबा मस्तकाचा बरा । सज्जिलें यंत्रीं अति युक्तीं ॥ २९ ॥

गांधर्वेण महाभाग कैलासे पर्वतोत्तमे ।
इदमाह महातेजाः शंकरो लोकपावनः ॥ २ ॥

गंधर्वयुक्तीं सामगायन । अति मधुर तुवां जाण । करून केलें मज प्रसन्न । वर संपूर्ण मागावया ॥ ३० ॥ युद्ध मांडिलिया समरांगणीं । वैरी जिणावया रणीं । प्रार्थिलें कैलासभुवनीं । विजयी त्रिभुवनीं व्हावया ॥ ३१ ॥ तेणें काळें वरदान । तुज म्यां दिधलें आपण । तें स्मरोनियां जाण । करीं हवन अव्यग्रें ॥ ३२ ॥ मजउद्देशें होम करितां । पावसी सकळ मनोरथा । झाली पाहिजे अविकळता । हेंचि कठिणता मांडली ॥ ३३ ॥ सिद्धि पावलिया अविकळ । तरी कार्य साधे तत्काळ । रथ पावसील प्रबळ । दिव्यतुरंगांसमवेत ॥ ३४ ॥

तत्र यो दृश्यते दिव्यो रथस्तुरगसंयुतः ।
ज्वलनार्कप्रतीकाशं कवचं च महाप्रभम् ॥ ३ ॥
धनुर्माहेश्वरं चैव दिव्यं त्रिदशपूजितम् ।
मामकान्यपि चास्त्राणि ससंहाराणि सर्वशः ॥ ४ ॥
प्राप्यन्ति तव दुर्धर्षं शरं करिकरोपमम् ।
तमारुह्य रथं दीप्तं सर्वास्त्रपरिवारितम् ॥ ५ ॥
हनिष्यसि रणे शत्रून्यदि विघ्नो न ते भवेत् ॥ ६ ॥

अग्निकुंडामाझारी देख । साश्वरथ अलोलिक । देखसी गा तात्काळिक । ज्वलनार्कसमप्रभ ॥ ३५ ॥ अमेद्य कवच अति अपूर्व । शस्त्रास्त्रसामग्री सर्व । माहेश्वर चाप दिव्य । पावसी सर्व मदनुग्रहें ॥ ३६ ॥ सुपूजितें माझीं निजास्त्रें । संहारकारकें विचित्रें । पावसी तूं परिकरें । शस्त्रास्त्रें दारुण ॥ ३७ ॥ त्या रथावरी बैसोनि वेगीं । शस्त्रास्त्रें संयोगीं । युद्ध करितां रणरंगीं । वैरी भंगीं जातील ॥ ३८ ॥ प्रेरिलिया वैरियावरी जाये । उपसंहारिल्या हातासी ये । ऐसीं शस्त्रास्त्रें पाहें । प्राप्त होती रथावरी ॥ ३९ ॥ होम निर्विघ्न सिद्धी जाय । तैं सिद्ध होय कार्य । कांहीं उठलिया अपाय । घात होय कर्त्याचा ॥ ४० ॥ ऐसें सांगोनि त्रिनयनें । झाला अदृश्य आपण । येरें नमस्करोनि जाण । मनीं रावण संतोषला ॥ ४१ ॥ आतां करोनियां याग । रथ पावेन अव्यंग । शस्त्रास्त्रें अनेग । सकळ साङ्ग पावेन ॥ ४२ ॥ कोणा मनीं न धरवे सर्वथा । ऐसीं घोर कर्मे आचरेन आतां । पराजय पावे रघुनाथा । तैशा अर्था साधीन ॥ ४३ ॥

एवमुक्त्वा महाबाहुः स्नात्वा जुहाव पावकम् ।
ब्राह्मणान्स्वस्तिवचनान्धनादिभिरतर्पयत् ॥ ७ ॥
मुक्त्वा शोकं च मानं च मोहदर्पौ मदं तथा ।
आर्जवीं बुद्धिमास्थाय जपन्ब्रह्म सनातनम् ॥ ८ ॥
रक्तसंवीतवसनो रक्तमाल्यानुलेपनः ।
रक्तयज्ञोपवीतश्च रक्तनेत्रकरस्तथा ॥ ९ ॥

---

१ [illegible]. २ निलय=स्थान. ३ मिळण्यास कठीण असा. ४ [illegible] ५ सोपला. ६ [illegible]. ७ चिंतारहित.

८ प्रदीप्त सूर्यासमान. ९ माझ्या कृपेनें. १० सुंदर. ११ शंकर. १२ परिपूर्ण.

CC-0. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

रम्यं शिवालयं पुण्यं प्रविवेशाथ रावणः ।
शिवमभ्यर्च्य मंत्रैस्तु तत्र कर्म समारभत् ॥ १० ॥

ऐसें बोलोनि महाबाहो । विध्युक्त स्नान केलें पहाहो । पूजोनि ब्राह्मणसमुदावो । स्वस्तिवचनलाहो पैं केला ॥ ४४ ॥ देवोनि धन्यधान्यसंपत्ती । नाना रत्नांचिया जाती । विचित्र वसनें द्विजांप्रती । लंकापती अर्पीतसे ॥ ४५ ॥ करोनियां स्वस्थांतःकरण । सांडोनियां मोह मान । पुत्रादिशोक दारुण । तोही जाण सांडिला ॥ ४६ ॥ रावण श्रीरामाचा भक्त । रामीं प्रेमा अत्यंत । अंतरीं अनुरागें अत्यद्भुत । तेणें आरक्त सबाह्य ॥ ४७ ॥ रक्तवस्त्रें परिकर । रक्तमाळा विचित्र । यज्ञोपवीत रक्तांबर । अत्युग्र आवरणपूजा ॥ ४८ ॥ रक्तचंदनाची उटी परिकर । रम्य शिवालय मनोहर । तेथें बैसोनि दशशिर । होम एकाग्र आरंभी ॥ ४९ ॥ रक्तांबरनेत्र दारुण । करोनियां शिवार्चन । दृढ स्मरे शिवचरण । होमविधान आरंभी ॥ ५० ॥ अति उग्र आवरणपूजा । यज्ञ राखावया वोजा । करिता झाला रावणराजा । बळसमाजा परिसा पां ॥ ५१ ॥ स्वस्थ रहावया अंतःकरण । समीप आनंदाचें आवरण । त्यामाजी मन घालितां जाण । विक्षेप आपण रिघों न शके ॥ ५२ ॥ सर्वेचि दुसरा परिघ पूर्ण । महामोहाचा दारुण । समीप पावतां पारिखे जन । मोहें निमग्न स्वयें होती ॥ ५३ ॥ जे आवरणीं प्रवेशतां । मार्ग भुलिजे स्वधर्मता । कार्याठव हरपे सर्वथा । मोहनिमग्नता स्वयें होय ॥ ५४ ॥ तिसरी संकल्पाची नदी । रावणें निर्मिली मंत्रसिद्धीं । जिच्या संकल्पाची अवधी । स्वयें विधि पावेना ॥ ५५ ॥ वैरिया रिगम कैंचा तेथ । बुडती संकल्पविकल्पांत । गमनागमन न कळे तेथ । युद्धमात विसरती ॥ ५६ ॥ ऐसें कठिण तिसरें आवरण । चौथा झंझामारुत जाण । अंगीं लागतांचि पूर्ण । अंगीं भग्न होय प्राणी ॥ ५७ ॥ लागतां तेथींचा वारा । पारख्या उडवी अंबरा । कोणा रिघों नेदी भीतरा । अद्भुत वारा आवरणीं ॥ ५८ ॥ पांचवें बाह्यावरण । त्याचें विपरीत चिन्ह । जो भेदूं पाहे विदारून । क्षुधा संपूर्ण व्यापिजे ॥ ५९ ॥ आवरणभेद धरितां पोटीं । अनिवार क्षुधा उठी । कांहीं विचार न पडे दृष्टी । पडे सृष्टीं मूर्च्छित ॥ ६० ॥ यज्ञ राखावयाकारणें । अति उग्र पंचावरणें । पंचकोश ज्यांतें म्हणणें । रचिले रावणें दुर्धर्षें ॥ ६१ ॥ हें पंचावरण जया भेदे । अहंरावण तया साधे । आणीक आवरणें विविधें । परिसा ह्रद्गत सांगेन ॥ ६२ ॥ मंत्रावरण शस्त्रावरण । महाविखारांचें सर्पावरण । भूत प्रेत वेताळ जाण । गुप्तावरण तयांचें ॥ ६३ ॥ बाहिर परिधी राक्षसांची । शस्त्रास्त्रीं बाणले कवची । अहर्निशीं शस्त्रें हातींचीं । कैसीं झळकती अंतरिक्षीं ॥ ६४ ॥ ऐसा अंतर्बाह्य निश्चित । राम साधावया सावचित्त । रावण होम असे करीत । समाहित मानसें ॥ ६५ ॥ येरीकडे दळभारीं । सन्नद्धदळें कपिकेसरी । सन्नद्धबद्ध द्रुमकरीं । रामनामगजरीं गर्जत ॥ ६६ ॥ विजयी झाला रघुराज । मारिला अहिरावण दुर्बीज । उभारिला लांगूलध्वज । कपिसमाज अति गजरें ॥ ६७ ॥ विजयी आमुचा कपिनाथ । मारोनियां पाताळनाथ । घेवोनि आला रघुनाथ । बळें अद्भुत हनुमंत ॥ ६८ ॥ करोनि कामाक्षी प्रसन्न । भेदोनि पाताळभुवन । मारोनियां राक्षसगण । श्रीरघुनंदन आणिला ॥ ६९ ॥ विजयी श्रीरामचंद्र । विजयी आमुचा हनुमान वीर । विजयी सकळ वानरभार । कपि समग्र नाचती ॥ ७० ॥ कायसा रावण महावीर । कायसें लंकादुर्ग दुस्तर । मारावया दशशिर । वानरभार उपरमेंती ॥ ७१ ॥ उठीं चाल रघुनाथा । अद्यापि कायसी उदासता । क्षणें मारूं लंकानाथा । आळस परता सांडीं स्वामी ॥ ७२ ॥ म्हणोनि घालिती लोटांगणीं । लागती श्रीरामाच्या चरणीं । रावणकपटें करोनी । झाली भंगाणी वानरां ॥ ७३ ॥ कपटें करीं वानर पडत । तुझ्या चरणरजें स्वयेंचि उठत । ऐसें क्षणोक्षणां घडत । तेणें बहुत दुःखरूप ॥ ७४ ॥ ऐसी गजबज करिती । अत्यंत येती काकुलती । युद्ध करावया रघुपती । प्रार्थिताती वानरें ॥ ७५ ॥ तंव उठिला सुमित्रानंदन । अत्यंत विनीत होऊन । प्रार्थिता झाला रघुनंदन । मधुर वचन बोलोनी ॥ ७६ ॥ ऐक स्वामी राघवा । तूं रघुकुलाचा ओलावा । निजभक्तजनविसांवा ।

१ वस्त्रें. २ प्रीति. ३ उल्लासानें, आवडीनें. ४ विकल्प. ५ आवरण. ६ झंझावायु. ७ आकाशांत. ८ ह्रदयांतील. ९ वेढा. १० एकाग्र. ११ हातांत वृक्ष घेऊन. १२ शेंपटाची ध्वजा. १३ आनंद पावतात. १४ नाश. १५ लक्ष्मण.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वचनगौरवा परिसावें ॥ ७७ ॥ भक्त पडतां जन्मावर्ती । निवारिता तूं रघुपती । तेथें कायसी युद्धख्याती । तूं त्रिजगती तारक ॥ ७८ ॥ तूं तारिसी नवल कोण । एकलें तुझें नाम जाण । उच्चारितां रघुनंदन । भवबंधन निवारे ॥ ७९ ॥ एवढा तुझा नाममहिमा । तो तूं जवळी असतां श्रीरामा । अत्यंत क्लेश प्लवंगमां । ते सर्वोत्तमा चुकवावे ॥ ८० ॥ नाम स्मरतां रघुनाथ । निवारे भवभ्रमाची मात । तो तूं जवळी रघुनाथ । वानरां आकान्त युद्धाचा ॥ ८१ ॥ एक एक गोळांगुळ । गिळूं शके ब्रह्मांडगोळ । तेथें कायसें रावणाचें बळ । युद्ध तुंबळ करावया ॥ ८२ ॥ तथापि कपटयोद्धा रावण । नाहीं युद्धधर्मी आंगवण । छळ छद्म करोनि जाण । वानरगण त्रासीत ॥ ८३ ॥ जारण मारण स्तंभन । मोहन उच्चाटन वशीकरण । दुश्चित वैरी असतां जाण । सितरूंन मारावे ॥ ८४ ॥ ऐसा कपटयोद्धा दुरात्मा । संमुख येतां संग्रामा । रावण वधावया श्रीरामा । प्लवंगमां सोडवीं ॥ ८५ ॥ दुष्टदळणीं साचार । सत्य एक श्रीरामचंद्र । स्वयें धरिला अवतार । रावण किंकर तें किती ॥ ८६ ॥ तुझें ब्रीद पूर्वापर । करोनियां दुष्टसंहार । स्थापावे भक्त ऋषीश्वर । धर्म निरंतर रक्षावा ॥ ८७ ॥ सुख द्यावें जी दीनजनां । प्रतिपाळावें गोब्राह्मणां । संरक्षावी भक्तसेना । रघुनंदना निजव्रता ॥ ८८ ॥

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥ ११ ॥
परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥ १२ ॥

तुझें निजव्रत श्रीरामा । दुष्ट प्रवर्तती अधर्मा । आच्छादिती स्वधर्मा । निंद्य कर्मा प्रवर्तती ॥ ८९ ॥ धर्मवाढी निःशेष मोडे । अधर्माची शींग चढे । सत्कर्माचा आवर्त पडे । सद्भक्ति बुडे सशेंडी ॥ ९० ॥ ठसा पडे विपरीत । तिळतुल्य सत्कर्म आचरत । तेणेंच फुगारा धरीत । त्रिदोषीं पडत निजकर्मैं ॥ ९१ ॥ अकर्माचा फुटे फांटा । अधर्माचा चढे ताठा । स्वैर करिती पापचेष्टा । गर्वाचा मोठा फुगारा ॥ ९२ ॥ तापलीं त्रिविध तापें । वोसणेंती विषयजल्पें । अहंममतेचे निजसंकल्पें । अति अमूपें पीडती ॥ ९३ ॥ विषयरसें ओलावती । स्वयेंचि वियोगें सोकेती । क्षणक्षणें काकुळती येती । पाणी मागती विषयाचें ॥ ९४ ॥ ते काळीं वैद्यरावो । अवतरसी रामरावो । ब्रह्मरसमात्रा देवोनि पहा हो । रोग स्वयमेवो झाडिसी ॥ ९५ ॥ युगायुगाप्रती रामा । अवतरोनि मेघश्यामा । झाडा करिसी अधर्मा । पुरुषोत्तमा श्रीपते ॥ ९६ ॥ अत्यंत रोगें पीडिलें देखसी । तेव्हां विधीचे डाग देसी । सत्कथेचें पथ्य लाविसी । अनुपान लाविसी सत्संग ॥ ९७ ॥ त्यासी दृढतेचें पथ्य । लाविसी सद्भक्तीसी नित्य । तेणें रोगाचें विगत । होय निश्चित क्षणें एकें ॥ ९८ ॥ ऐसे तुझे निजभक्त । अहंरावणरोगग्रस्त । त्यांसी करावया निर्मुक्त । सज्जीकृत करीं चाप ॥ ९९ ॥ देव घातले बांदवेंडीं । सुरासुर देशधडी । ऋषीश्वरें भ्यालीं बापुडीं । देवोनि बुडी लपलीं गिरिकंदरीं ॥ १०० ॥ नवग्रहांची केली पाउँटी । अग्नि धूतसे मळकटी । विघ्नहर घेवोनि काठी । रासँभांपाठी राखणा ॥ १ ॥ मल्हारीदेव दावी दर्पण । मुख्य चंडिका तेँराळी जाण । कुंजे झाडी प्रभंजनें । मेघ सडासंमार्जन करीतसे ॥ २ ॥ इंद्र फुलारी वरुण वाँरी । यम त्याचा नाटिकारी । चंद्र छत्रकार दाही शिरीं । दुर्दशा भारी देवांची ॥ ३ ॥ भोजन करावया रावण । पाक निपजवी हुताशन । किंचित् आस्वाद चुकल्या जाण । करिती कंडण अग्नीसी ॥ ४ ॥ एवढी दुर्दशा देवां । ऐकतां त्रास उपजे जीवां । शीघ्र कुढवेंवें देवां । भक्तां करावा उत्साहो ॥ ५ ॥ आमुची सीता माउली । गुंफेमाजी एकली । आक्रंदत धरोनि नेली । गूढ राखिली अशोकवनीं ॥ ६ ॥ एकवस्त्रा मलिन पाहीं । मलिन केश नाहणें नाहीं । दीनवदन भूमिशायी । धरिली कांहीं चालेना ॥ ७ ॥ आला देखोनि हनुमंता । चरणांवरी लोळे सीता । मज भेटवीं रघुनाथा । शरण आतां तुज आलें ॥ ८ ॥ ऐकतां तिचें करुणावचन । हृदयस्फोट होत जाण । मज द्यावें आज्ञापन । दशानन मारावया ॥ ९ ॥ दारुण शस्त्रें आम्हांपासीं । तेव्हांचि मारितों रावणासी । क्षण-

१ वानरांना. २ शक्ति. ३ फसवून. ४ वृद्धि. ५ भोंवरा. ६ अभिमान. ७ बडबडतात. ८ सुकतात. ९ नाश. १० बंधनांत. ११ पायरी. १२ गाढवांमागें. १३ आरसा. १४ भारवाही. १५ वायु. १६ छत्रधर. १७ संरक्षावें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

क्षणां तूं निवारिसी। बळ स्वामीसीं चालेना ॥ ११० ॥ आतां तरी धरून पुरुषार्थ। निर्दळीं हा लंकानाथ। नाहीं तरी होईल अनर्थ। कपटें घात करील ॥ ११ ॥ युगायुगाच्या ठायीं। श्रीराम अवतरोनि लवलाहीं। दुष्ट मारोनि सर्वेही। भक्त लवलाहीं स्थापावे ॥ १२ ॥ ऐसी प्रतिज्ञा पूर्ण। वेदतुल्य तुझें वचन। तो वधोनियां रावण। भक्तसोडवण करीं स्वामी ॥ १३ ॥ मारोनियां खरदूषण। मुक्त करोनि जनस्थान। ब्राह्मणां दिधलें दान। हर्षें ऋषिगण नांदती ॥ १४ ॥ वाळी मारिला दारुण। मुक्त केलें किष्किंधाभवन। सुग्रीवासी दिधलें दान। सुखें वानरगण नांदती॥ १५ ॥ ताटका पापिणी आपण। मार्ग रोधितां अति दारुण। ते विंधोनि मारिली बाण। मुक्तगमन मार्गस्थां ॥ १६ ॥ विश्वामित्रयागा जाण। केलें राक्षसीं रोधन। तेणें हर करोनि प्रसन्न। वरदान मागीतलें ॥१७॥ मानवी सूर्यवंशाप्रती। राम अवतरेल दाशरथी। तो राक्षसां करोनि शांती। याग निश्चितीं राखील ॥ १८ ॥ त्या शिववरदासाठीं। तुवां एकलेनि जगजेठी। मारोनि राक्षसकोटी। ऋषिइष्टी संपविली ॥ १९ ॥ जे जे तुज शरण आले। ते ते क्षणें कुढावीले। तैसें साह्य पाहिजे केलें। बिभीषणालागोनी ॥ १२० ॥ एक बिभीषण शरणागती। दुसरे शरण सुरपंक्ती। तिसरी माउली सीता सती। अति काकुळती येतसे ॥ २१ ॥ वानरभारेंसीं जुत्पती। तुज येताती काकुळती। आपणही करितों विनंती। लंकापती मारावा ॥ २२ ॥ तुझी प्रतिज्ञा रघुपती। रावण मारावा निजहस्तीं। ते आपली वचनोक्ती। साच निश्चितीं करावी ॥ २३ ॥ तुवां वाहिली असे आण। निजहस्तेंकरूनि रावण। स्वयें मारावा आपण। तें वचन आठवीं ॥ २४ ॥

तां प्रतिज्ञां प्रतिज्ञाय पुरा सत्यपराक्रमः।
लघुः कश्चिदिवासत्त्वो नैव त्यक्तुं त्वमर्हसि ॥ १३ ॥
न प्रतिज्ञां हि कुर्वन्ति वितथां सत्यवादिनः।
लक्षणं हि महत्त्वस्य प्रतिज्ञापरिपालनम् ॥ १४ ॥
तदलं मास्तु ते वीर नैराश्यमुपगम्यते।
वधेन रावणस्याद्य प्रतिज्ञामनुपालय ॥ १५ ॥
न जीवन्यास्यते राम तव बाणपथं गतः ॥ १६ ॥

सौमित्र म्हणे रघुनाथा। पूर्वप्रतिज्ञा आठवीं आतां। सत्यप्रतिज्ञा शाश्वता। होईं आतां सन्नद्ध ॥ २५ ॥ तुजसारिखे सत्त्वसंपन्न। अन्यथा न करिती प्रतिज्ञावचन। रावण बापुडें हीन दीन। त्यासी विलंबन कायसें ॥२६॥ तुझ्या सूर्यवंशांत। सत्यप्रतिज्ञ राजे बहुत। तयांमध्यें संकळित। नामें सुनिश्चित सांगेन ॥ २७ ॥ हरिश्चंद्र सूर्यवंशी। मिथ्या न करीच वचनासी। स्वप्नदान जागृतीसीं। देवोनि कैसी ख्याति केली ॥ २८ ॥ निजराज्या देवोनि लात। एकाकी स्त्रीपुत्रसमवेत। निघता झाला त्वरित। स्वप्नवचनार्थसत्यत्वा ॥ २९ ॥ स्वप्नदक्षिणेलागीं जाण। स्त्रीपुत्र दोघें विकून। डोंबाघरीं स्वयें आपण। जळवाहन करीतसे ॥ १३० ॥ एकादशीव्रतालागीं जाण। निजपुत्राचें शिर कापून। मोहिनीलागीं देई आपण। सत्यप्रतिज्ञ रुक्मांगद ॥ ३१ ॥ धर्मांगद त्याचा सुत। सत्यप्रतिज्ञ विख्यात। जनकभाकेलागीं उद्युक्त। शिर छेदवीत आपुलें ॥ ३२ ॥ स्वयें तुवांचि रघुनाथा। सत्यत्व यावया दशरथा। अंगीकारिलें महाव्रता। तीव्र आघाता साहोनी ॥ ३३ ॥ प्रार्थितां कौसल्या माता। उपेक्षोनि तिची कथा। वना निघालासी रघुनाथा। पितृवचनार्थालागूनी ॥ ३४ ॥ स्वहस्तें वसिष्ठ राज्य देतां। उपेक्षोनि गुरुवचनार्था। स्वराज्या हाणोनि लाता। वना तत्वतां आलासी ॥ ३५ ॥ अत्यंत करुणा भाकितां भरता। तुझें राज्य तुज देतां। उपेक्षोनि त्या प्रेमार्था। वना तत्त्वतां आलासी ॥ ३६ ॥ शिळीं बुजोनि सागर। उतरोनि आणिला वानरभार। वेगीं वधोनि दशशिर। करीं राज्यधर बिभीषण ॥ ३७ ॥ तुझ्या बाणसंधानापुढें। रावण मशक बापुडें। सुटतां तुझे कुऱ्हाडे। मरे रोकडें क्षणार्धें ॥ ३८ ॥ सिंह प्रवेशतां वनीं। होय मदगजां भंगाणी। तेंवी रिघोनि राक्षसगणीं। रावणा अवनीं पाडीं रामा ॥ ३९ ॥ उदया येतां दिवाकर। निशा हरपे सहित अंधार। त्रैलोक्यीं होय प्रकाशकर। स्वधर्माचार चालती ॥ १४० ॥ तेंवी रावणमोहनिशासुबद्ध। पडलें अधर्माचें गडद।

१ संरक्षिले. २ उद्युक्त. ३ थोडक्यांत. ४ पाणी वाहणें. ५ पित्याची प्रतिज्ञा शेवटास नेण्याच्या उद्देशानें. ६ दगडांनीं. ७ बाण. ८ नाश. ९ पृथ्वीवर. १० सूर्य. ११ काळोख, अंधार.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

त्याचा छेदोनियां कंद । स्वधर्म विशद प्रकाशीं ॥ ४१ ॥ आपुल्या निजबाणकिरणेंकरीं । निरसीं रावणमोहअंधारी । भक्तां नित्योदय करीं । स्वधर्मा करीं उद्धार ॥ ४२ ॥ ऐकोनि सौमित्रवचन । पोटां-तिल्या हर्षें पूर्ण । बोलता झाला आपण । राजा बिभीषण रामासी ॥ ४३ ॥ राजा म्हणावया हेंचि कारण । सौमित्रें प्रार्थिला रघुनंदन । तेंचि निवटूनियां रावण । लंके बिभीषण स्थापिला ॥ ४४ ॥

लक्ष्मणस्य तदा वाक्यं श्रुत्वा राजा बिभीषणः ।
उवाच हितमत्यंतं राघवं रघुनंदनम् ॥ १७ ॥
एवमेतन्महाबाहो यथा वदति लक्ष्मणः ।
न प्रतिज्ञां हि कुर्वंति वितथां साधवो जनाः ॥ १८ ॥

बिभीषणें घालोनि लोटांगण । विनविला रघुनंदन । जें बोलिला सुमित्रानंदन । यथार्थ वचन तें रामा ॥ ४५ ॥ जें बोलिला लक्ष्मण । श्रीरामा तें सत्यवचन । तुझें नाम सत्यप्रतिज्ञ । वेदवचन प्रसिद्ध ॥ ४६ ॥ श्रीराम सत्य वेदु । श्रीराम सत्य साधु । श्रीराम सत्य बोधु । भवबंधु जेथ नाहीं ॥ ४७ ॥ श्रीरामें सत्य शास्त्र । श्रीरामें सत्य मंत्र । श्रीरामें सत्य कर्मतंत्र । होय सर्वत्र अव्यंग ॥ ४८ ॥ श्रीरामें सत्य कीर्ती । श्रीरामें दृढ विरक्ती । श्रीरामें अढळ शांती । भक्त पावती भावार्थी ॥ ४९ ॥ श्रीरामें सत्य श्रुती । श्रीरामें सत्य स्मृती । श्रीरामें सत्य विश्रांती । भक्त पावती भावार्थी ॥ १५० ॥ तीर्थीं व्रतीं क्षेत्रीं जाण । कामनापरत्वें देवतागण । त्यांच्या ठायीं जें सत्यपण । ते कृपा संपूर्ण रामाची ॥ ५१ ॥ जगतीतळीं जें जें सत्त्व । श्रीरामसत्त्वें तें सत्त्ववंत । ऐसा सत्यप्रतिज्ञ रघुनाथ । निजप्रतिज्ञा सत्य करीं स्वामी ॥ ५२ ॥ सज्ज करोनि चापीं गुणें । गुणीं प्रयोजोनि बाण । वधीं दुरात्मा रावण । धर्मरोधन करीतसे ॥ ५३ ॥

विध्वंसय शरैस्तीक्ष्णैर्दिवा च यदि वर्तते ।
प्रतिज्ञां रघुशार्दूल सफलां कुरु मानद ॥ १९ ॥

अति तिखट बाणधारीं । रावणाचें देह विदारीं । जेंवी मदगजातें चिरी । क्रोधेंकरीं पंचानन ॥ ५४ ॥ इंद्र वृत्रातें विदारी । मुरुलागीं मुरारी । तेंवी रावणातें विदारीं । क्रोधेंकरीं श्रीरामा ॥ ५५ ॥ मधूलागीं मधुसूदन । हिरण्यकशिपूतें सिंहवदन । तैसा वधीं दशानन । क्रोधेंकरून श्रीरामा ॥ ५६ ॥ येच समयीं आजिचे दिवसीं । वेगीं धनुष्यातें हातवशीं । मारोनियां रावणासी । करीं सकळांसी उत्सावो ॥ ५७ ॥ ऐकोनि शरणागतवचन । आणि बंधूची विनवण । बोलता झाला रघुनंदन । निजजनकृपाळु ॥ ५८ ॥ एका जनार्दना शरण । सौमित्रा बिभीषणा जाण । देवोनियां समाधान । यागविध्वंसन करील ॥ ५९ ॥ राम शरणागता वत्सळु । राम निजजनस्नेहाळु । आर्तत्राणप्रतिपाळु । रणकल्लोळु श्रीराम ॥ १६० ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां सौमित्रबिभीषणविज्ञापनं नाम षट्पंचाशत्तमोऽध्यायः ॥ ओंव्या ॥ १६० ॥ श्लोक ॥ १९ ॥

अध्याय सत्तावन्नावा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ बहुतांपरी लक्ष्मण । विनविता झाला रघुनंदन । तैसेंचि बिभीषणही जाण । करी विनवण बहुतांपरी ॥ १ ॥ विनविला वानरीं । महावीर कपिकेसरीं । ऐकतां तिखट उत्तरीं । कोप रघुवीरीं पैं आला ॥ २ ॥ त्रिपुरवधालागीं झडकरीं । क्रोध आला त्रिपुरारी । त्याहूनि क्रोध रघुवीरीं । दशशिरा वधावया ॥ ३ ॥ मुरु दैत्य दुर्धर भारी । त्यालागीं खवळे मुरारी । त्याहूनियां कोप रघुवीरीं । दशशिरा मारावया ॥ ४ ॥ सृष्टिप्रळयाचे वेळे । संहारकाळ अति खवळे । तेंवी छेदावया रावणशिसाळें । क्रोध खवळे श्रीरामीं ॥ ५ ॥ ज्याची विक्षेपभ्रृकुटी । क्षणें विध्वंसी ब्रह्मांडकोटी । तो निवटावया दशकंठी । राम जगजेठी खवळला ॥ ६ ॥ अत्यंत कोपें कोपायमान । बोले बिभीषणासी वचन । कोठें आहे तो दशानन । वेगें शोधून मज सांगा ॥ ७ ॥ रणीं पळाला पाठी देऊन । तो रणा न येतां दशानन । केंवी मारावा आपण । लागे दूषण धर्मयुद्धा ॥ ८ ॥ आतां तुवां करावें एक । चार पाठवून आवश्यक । कोठें आहे दशमुख । वृत्त सकळिक आणावें ॥ ९ ॥

---

१ पूर्णपणें. २ दोरी. ३ मदोन्मत्त हत्तीला. ४ सिंह. ५ नृसिंह. ६ हातांत घे. ७ रावणमस्तकें. ८ वांकडी भुंवई. ९ मारण्यास. १० रावण. ११ हेर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

क्वासौ लंकेश्वरः क्षुद्रो रावणो दुर्मदः खलः ।
रणभूमिं परित्यज्य कुत्रास्ते किं च चेष्टितम् ॥ १ ॥
बोद्धव्यः स त्वया वीर शीघ्रमेव ममाज्ञया ।
राघवस्य वचः श्रुत्वा चारैरन्विष्य सर्वतः ॥ २ ॥

बिभीषण सर्वज्ञ । शिष्ट चार पाठवून । कोठें आहे तो रावण । काय आचरण करिताहे ॥ १० ॥ कपटी दुरात्मा रावण । अहंमतें मातला पूर्ण । शेखीं रणभूमी सांडून । जीव घेऊन पळाला ॥ ११ ॥ त्याचें समूळ ताळतंत्र । क्रियाविधानसमाचार । मानसीं आणून समग्र । सविस्तर मज सांगा ॥ १२ ॥ बिभीषणा अति त्वरेंसीं । वेगीं आणीव वृत्तांतासी । ऐसें सांगतां श्रीरामासीं । येरु मानसीं तोषला ॥ १३ ॥ तंव श्रीरामाज्ञेपूर्वी जाण । चार वेगीं पाठवून । लंकेमाजी झाडा घेऊन । वृत्तान्त पूर्ण आणविला ॥ १४ ॥ तें रावणाचें चेष्टितें । श्रीरामापुढें सांगत । विनविता झाला यथातथ्य । अति विनीत बिभीषण ॥ १५ ॥

उवाच वचनं धीमान राममेतद्बिभीषणः ।
शक्त्या निर्भिद्य सौमित्रिं क्रूरकर्मा स रावणः ॥ ३ ॥
स विवेश पुरीं तूर्णं लंकामेव सहानुगः ।
सोऽवतीर्य रथात्तूर्णं वधमिच्छति तेऽनघ ॥ ४ ॥
चिंतयामास काकुत्स्थो वरदानं महात्मनः ।
दत्तं स्वयंभुवा पूर्वं सर्वशत्रुविनाशनम् ॥ ५ ॥
अजेयं सप्तभिर्लोकैः ससुरासुरमानवैः ।
रथं सर्वायुधोपेतं दिव्यमद्भुतदर्शनम् ॥ ६ ॥
युक्तमस्त्रैर्महावेगैः कामगैः कामरूपिभिः ।
अभेद्यकवचं चापि सर्वास्त्रैरभिसंगतैः ॥ ७ ॥

घालोनियां लोटांगण । विनविता झाला बिभीषण । रावणचेष्टा संपूर्ण । श्रीरघुनंदन परिसत ॥ १६ ॥ कपटी क्रूरकर्मा रावण । सौमित्रासी शक्ति भेदून । युद्ध न करितां आपण । गेला पळोन लंकेमाजी ॥ १७ ॥ उतरोनि रथाखालता । तुझ्या ध्यानीं लंकानाथा । अति आक्रांत वर्तला चित्ता । श्रीरघुनाथा तें ऐक ॥ १८ ॥ करूं जातां भोजन । गोड न लागे तया अन्न । त्यासी दिसे रघुनंदन । अति दारुण शस्त्रपाणी ॥ १९ ॥ करूं जातां उदकपान । राम जीवना जीवनें । देखोनियां दशानन । चळकांपें जाण कांपत ॥ २० ॥ तांबूल घेतां लंकानाथा । सेवकांमाजीं देखे रघुनाथा । हातीं धनुष्य पाठीसीं भाता । झाला देखता रावण ॥ २१ ॥ स्त्रीगृहामाजी पाहीं । राम देखे सर्वा ठायीं । शयनशेजेतेंही । दिसे लवलाहीं श्रीराम ॥ २२ ॥ स्नान मार्जन सकळ भोग । गमनागमनवेग । कर्माकर्माचें अंग । भासे सवेग श्रीराम ॥ २३ ॥ भयेंकरोनि लंकानाथा । प्राण जावा सर्वथा । भाग्य फळासी आलें तत्त्वतां । शंकर चित्ता आठविला ॥ २४ ॥ रामभय अति खडतर । रावणा लागलें अति दुर्धर । तेणें आठवला शंकर । चित्तचमत्कार वचन ज्याचें ॥ २५ ॥ पूर्वी उग्र तप करून । रावणें हर केला प्रसन्न । मागितलें वरदान । शत्रुहनन करावया ॥ २६ ॥ तेंचि ये काळीं आतां । सांगितलें लंकानाथा । तेणें पावोनि उल्हासता । होम करिता पैं जाला ॥ २७ ॥ त्या होमामाजी रथ । साश्वशस्त्रास्त्रीं संयुत । अभेद्य कवच अद्भुत । समवेत दिव्यायुधें ॥ २८ ॥ विचित्र कामँग अस्त्रें । सकळलोकसंहारकरें । प्रेरिलिया वैरिसंहारें । येती उपसंहारें हातासीं ॥ २९ ॥ ऐसें शिवाचें वरदान । अनुसरोनि रावण । करिता झालासे हवँन । तुझें हनन करावया ॥ ३० ॥ परी त्याहीमाजी अतर्क्य चिन्ह । शिव सर्वात्मा सर्वज्ञ । प्रकट सांगितली खूण । मूर्ख रावण जाणेना ॥ ३१ ॥ अविकळ सिद्धि पावे होम । तैं वैरियाचें होय भस्म । अल्प विकळ होतां परम । अति दुर्गम कर्त्यासी ॥ ३२ ॥ विकळ होतां यागासी । समूळ घात कर्त्यासी । ऐसें सांगोनि रावणासी । गेला निजधामासी शंकर ॥ ३३ ॥ मूर्खा रावणा अहंबुद्धी । म्हणे अविकळ पाववीन सिद्धी । राम सौमित्र माझे द्वंद्वी । बाणवेधीं निवटीन ॥ ३४ ॥ ऐसा करोनि निर्धार । करीतसे कर्मतंत्र । अतिसावध एकाग्र । यज्ञोपचार घेवोनी ॥ ३५ ॥ अति उग्रें सप्तावरणें । रावणें रचिलीं दारुणें । कोणा न करवती गमनें । अति दारुणें परीस पां ॥ ३६ ॥ अहंबुद्धि रावण । आपणासी अति गूढ रक्षण । पंचकोश पंचावरण । रचिलें जाण श्रीरामा ॥ ३७ ॥ आणिकही महादारुण ।

१ दुष्ट. २ दुसरा (बिभीषण). ३ कृत्यें. ४ नम्रतेनें. ५ आधारस्थान. ६ इच्छिले स्थळीं जाणारीं. ७ होम. ८ वैरी.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

मंत्रावरण शस्त्रावरण। भूतप्रेत पिशाच जाण। अति दारुण किळकिळित ॥३८॥ शाकिनी डाकिनी महाशक्ती। अहर्निशीं सावचित्तीं। रावणाचा याग राखिती। महासर्प देती धुधुःकार ॥ ३९ ॥ ऐसा अति बळें बळवंत। रावण याग असे करीत। वधावया रघुनाथ। अति उद्यत सांक्षेपें ॥ ४० ॥ अविकळ सिद्धी गेलें हवन। तरी कोणासी नागवे रावण। वैरी निर्दळोनियां जाण। विजयी पूर्ण होईल ॥ ४१ ॥ ऐकें स्वामी रघुनाथा। होम करितां लंकानाथा। विघ्न करावें जाऊनि आतां। विलंब सर्वथा नये करूं ॥ ४२ ॥

तस्य होमस्य कालोऽयं देवायतनमास्थितः।
जुहोत्यग्निं समाधिस्थो रौद्रैर्मंत्रैर्महायशाः ॥ ८ ॥
तस्य पापस्य तत्कर्म न सिध्यति दुरात्मनः।
तस्य तावत्त्वया वीर विघ्नं कार्यं बलीयसा ॥ ९ ॥
अवध्यः स भवेत्तस्मिन् कृते कर्मणि राक्षसः ॥ १० ॥

आजि होमाचा होमकाळ। रावण साधीतसे अविकळ। आपण होवोनि निश्चळ। विघ्न तत्काळ करावें ॥ ४३ ॥ केवळ रुद्र क्रोधान्वित। ऐसें उग्र कर्म आचरत। रुद्रमंत्रें होम करीत। सावचित्त रावण ॥ ४४ ॥ होमाचा समीप काळ। आणि फळप्राप्तिवेळ। रावणा साधों आली सकळ। साश्वरथसंयुक्त ॥ ४५ ॥ येचि काळीं आपण। रावणासी करोनि विघ्न। विध्वंसिलिया हवन। निजकार्य जाण साधेल ॥ ४६ ॥ ऐसें न करितां आपण। जरी सिद्धी गेलें हवन। तरी सर्वथा अवध्य रावण। सत्य जाण रघुनाथा ॥ ४७ ॥ ऐकतां बिभीषणवचन। सर्वांगीं दाटलें स्फुरण। एकला आक्रमी त्रिभुवन। ऐसा रघुनंदन भासत ॥ ४८ ॥

विभीषणस्य तद्वाक्यं घोरं श्रुत्वा भयावहम्।
ततो रामो महातेजाः सबलं चापि वीक्ष्य च ॥ ११ ॥
माल्यवंतं सुषेणं च गवाक्षं गवयं तथा।
आज्ञापयामास तदा विघ्नार्थं दश यूथपान् ॥ १२ ॥
अंगदं च हनूमंतं शरभं गंधमादनम्।
ऋक्षं सेनापतिं चैव नीलं चापि महाबलम् ॥ १३ ॥
लब्धसंज्ञा महावीर्या यूथपाः कृतनिश्चयाः ॥ १४ ॥

सकळलोकभयकारक। रावणाचें कर्म देख। येतांचि रघुकुळटिळक। निजबाहुकौतुक पाहूं इच्छी ॥ ४९ ॥ उसण्यां घायीं रावणासीं। भिडावया निजमानसीं। अति उल्लास राघवासी। बाहेर त्यासी काढूं पाहे ॥ ५० ॥ बाहेर काढावया रावण। सेनापति दहा जण। अति बळियाढे वानरगण। श्रीरघुनंदन धाडीत ॥ ५१ ॥ ज्यांचा ऐकतां प्रताप। काळासी सुटे चळकांप। रावण बापुडें तें अल्प। त्याचा प्रताप तो किती ॥ ५२ ॥ जयांचा अंतका भेदरा। काम जयांचा तोडरा। यम कांपे थरथरां। ते दशशिरावरी चालले ॥ ५३ ॥ जे राक्षसांतें करिती अंत। जे दृष्टी दानवांतें नाणीत। भूतगण चळीं कांपत। शक्ति येत लोटांगणीं ॥ ५४ ॥ महावीरां दृष्टी नाणीत। तो निघाला माल्यवंत। ज्याचा लागतां घात। होय भस्मान्त राक्षसां ॥ ५५ ॥ देखोनियां महारण। रणमदें डुले आपण। युद्धीं सुखावे संपूर्ण। तो सुषेण निघाला ॥ ५६ ॥ दृष्टी पडतांचि अल्प। पळती गाईंचे कळप। ते केंवी साहती झडप। तो सिंहप्रताप गवाक्ष ॥ ५७ ॥ गवयही तैसाचि जाण। गायींचे परी वैरीगण। वळितां न लगे अर्ध क्षण। तोही आपण निघाला ॥ ५८ ॥ वानरसैन्याचें मंडण। तो युवराज आपण। जेणें अपमानिला रावण। तो अंगद जाण निघाला ॥ ५९ ॥ वणवा लागल्या डोंगरीं। जळती टोळांचिया हारी। तेंवी निवटिता राक्षसवैरी। शरभ निर्धारीं चालिला ॥ ६० ॥ ऋक्षसेना आणि वानर। उभयसेनेचे सेनाधर। नीळ आणि जांबवंत वीर। ज्यांचा धाक थोर रावणा ॥ ६१ ॥ सकळ वीरांमाजी मुखरणी। जो रणयोद्ध्यांचा अग्रगणी। जो राक्षसां करीतसे भंगाणी। मुख्य रावणीं धाक ज्याचा ॥ ६२ ॥ जो श्रीरामाचा लाडका। अत्यंत प्रिय रघुनायका। ज्याचा भेदरा दशमुखा। जो तिहीं लोकां निजपूज्य ॥ ६३ ॥ जो श्रीरामाचें अंगत्राणें। जो जानकीशोकविध्वंसन। जो वानरांचा निजप्राण। तो हनुमान जाण चालिला ॥ ६४ ॥ जो सौमित्रप्राणरक्षिता। जो बिभीषणा अभयदाता। जेणें घोळसिलें लंका-

१ उद्युक्त. २ प्रयत्नानें. ३ विघ्नरहित. ४ समोरासमोर भिडून. ५ भीति. ६ अंकित. ७ श्रेष्ठ, प्रमुख. ८ मोड, नाश. ९ अंगरक्षक.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

नाथा। तो हनुमान तत्त्वतां चालिला ॥ ६५ ॥ जेंवी साधनचतुष्टयसंपत्ती। अधिष्ठात्रीं वश्य होती। तेंवी बिभीषणसाह्यार्थी। दहाही सेनापती निघाले ॥ ६६ ॥ श्रीरामाज्ञा वंदोनि शिरीं। यूथप[1]सेना वानरहारीं। करावया रावणबोहरी। कपिकेसरी चालिले ॥ ६७ ॥ श्रीरामकार्जी निश्चय पूर्ण। धरूनियां वानरगण। निघते झाले आपण। गेलियाही प्राण न सरती ॥ ६८ ॥ जयजयकारें गर्जत। शिळा पर्वत झेलीत। रामनामें किराणे[2] देत। वीर उपरमैत[3] द्रुमपाणी[4] ॥ ६९ ॥ जेंवी अक्षोभ्य सागर। तेंवी अक्षोभ्य वानरभार। करीत रामनामाचा गजर। वानरभार चालिला ॥ ७० ॥ मर्यादें नेमिला सागर। अमर्याद वानरभार। सागरीं लहरी अपार। तेंवी उठावले थोर वानर ॥ ७१ ॥ सागरीं कांसवांचे भार। तेंवी वानरीं गिरिवर। सागरीं तळपती महानक्र। शिळाशिखरें वानरीं ॥ ७२ ॥ सागरीं तळपती महामीन। सैन्यसागरीं द्रुम जाण। वानरें देवोनि किराण। तळपती पूर्ण सैन्यांत ॥ ७३ ॥ ऐसा उद्भट सैन्यसमुद्र। गर्जत चालिले वानरभार। करीत नामाचा गजर। वानरवीर चालिले ॥ ७४ ॥ रामनामाचा कल्लोळ। तेणें व्यापिला भूगोळ। नादें कोंदलें अंतराळ। दिग्मंडळ गर्जत ॥ ७५ ॥ नाम भरतांचि गगनीं। गेलें शून्यत्व उडोनी। चैतन्यघन होउनी। आलें पिकोनी रामनाम ॥ ७६ ॥ स्वर्गपाताळांच्या ठायीं। नाम कोंदलें लवलाहीं। गेलें बुडोनि लोकत्रयीं। नाम पाहीं रामाचें ॥ ७७ ॥ श्रीरामाची निजशक्ती। वानरांअंतरीं रामनामकीर्ती। तेणें कळिकाळा न गणिती। करीत ख्याती निघाले ॥ ७८ ॥

क्षणात्संप्राप्य नगरीं लंकां रावणपालिताम् ।
प्राकारादथ चोत्पत्य विविशुस्ते प्लवंगमाः ॥ १५ ॥

श्रीरामबळें बळवंत। कळिकाळा दृष्टी नाणीत। निघाले नामें गर्जत। रावणा अंत करावया ॥ ७९ ॥ क्षणामाजी वानरगण। पावते झाले लंकाभवन। अतिशयें शोभायमान। देखतां मन विस्मित ॥ ८० ॥ जियेसीं न तुके[5] अमरावती। कुबेराची अलकावती। तेथें उपमा सांगों कोणती। विस्मित चित्तीं सुर सिद्ध ॥ ८१ ॥ इतरें कृति नाहीं केली। स्वयें विश्वकर्म्यानें रचिली। शंकरकृपें रूपा आली। ते केंवी बोलीं बोलवेल ॥ ८२ ॥ पताका पल्लव छत्रें। मुक्तघोसें परिकरें[6]। रत्नखचित गोपुरें। अति विचित्रें भासती ॥ ८३ ॥ चौबारे हाटवटिया[7]। पाचू पेरोजे मोहटिया। हिरे निबद्ध उथाळिया। खांब तयां गोमेदाचे ॥ ८४ ॥ माणिक पाचू हिरकणें। कांचननिबद्ध अंगणें। दोहीं बाहीं गुढिया तोरणें। तेणें दुकानें शोभती ॥ ८५ ॥ वर्णितां तेथींची महिमा। मन विसरे मनोधर्मा। स्वयें कर्ता विश्वकर्मा। तेथें उपमा काय द्यावी ॥ ८६ ॥ वरी कृपा शंकराची। अनुपम उपमा तेथींची। आणि वस्ती रावणाची। सीमा भाग्याची कोण जाणे ॥ ८७ ॥ एवढा भाग्याचा बडिवार। जेणें धिक्कारून कुबेर। वसविलें लंकापुर। प्रसन्न शंकर करोनी ॥ ८८ ॥ वरदमदें पूर्ण मातला। सेव्यासेव्यातें विसरला। निजमूळातें चुकला। तेणें तयातें क्षोभला शंकर ॥ ८९ ॥ माझा स्वामी श्रीरघुनाथ। त्याची कांता चोरोनि नेत। समूळ याचा करीन घात। म्हणोनि प्रेरीत वानर ॥ ९० ॥ जेथें परिघ[8] सागराचा। गूढ पर्वत त्रिकूटाचा। वरी कोट लंकेचा। तेथें वानरांचा प्रवेश ॥ ९१ ॥ रिघोनि लंकेभीतरीं। पताका फाडिल्या वानरीं। ध्वजा पाडिल्या झडकरीं। अपांपरी[9] तोरणां ॥ ९२ ॥ सांदींबिदीं मुक्ताघोंस। रत्नें विखुरलीं[10] असमसाहस[11]। वानर न पाहती त्यांस। विरक्त रत्नांस रामनामें ॥ ९३ ॥ श्रीरामभजनीं जे विमुख। त्यांसी द्रव्यदारेचें अति सुख। जिहीं सेविला रघुकुळटिळक। त्यांसी नित्य सुख श्रीरामें ॥ ९४ ॥ राजहंसापुढें शेण। तेंवी रामभक्तां द्रव्य जाण। त्यापुढें न पाहती ढुंकोन। तेथें अभिलाषण तें कैंचें ॥ ९५ ॥ जेंवी श्वान भक्षी वमनें[12]। देखतां कंटाळे मन। तेंवी न पाहती ढुंकोन धन। भक्तजन रामाचे ॥ ९६ ॥ त्याचपरी निश्चितीं। स्त्रीलोभाचीही गती। भक्त दृष्टी नाणिती। जडली वृत्ती श्रीरामीं ॥ ९७ ॥ यापरी भक्त जाण। महावीर वानरगण। दृष्टीं न पाहती ढुंकोन। करीत कंदन[13] निघाले ॥ ९८ ॥ तोरणें तोडिताती एक। एक

१ सेनापतींचा समुदाय. २ उड्या. ३ आनंद पावतात. ४ हातांत वृक्ष घेतलेले असे. ५ तुळे. ६ सुंदर. ७ बाजार. ८ वेढा. ९ नाश. १० पसरलीं. ११ जिकडेतिकडे. १२ ओकारी. १३ संहार.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

फाडिती पताक । ध्वजा उपडोनियां देख । मारीत लोक निघाले ॥ ९९ ॥ एक हाणोनियां लाताडें । फोडून सांडिती कवाडें । केले दारवंटे उघडे । आलीं माकडें मारीत ॥ १०० ॥ एक उपरमाया उडती । दुर्गीचे धोंडे उचटिती । पाडोनि सांडिल्या भिंती । अद्भुत शक्ती वानरां ॥ १ ॥ करीत आले महामारी । रोधोनि राहिले पाणबारी । आकांत होत नरनारी । दशशिर निमाला ॥ २ ॥ मारीत आलें वानरसैन्य । केलें नगरासी कंदन । बाहेर निघेना रावण । अद्यापि हवन तें कायी ॥ ३ ॥ बोंब सुटली घरोघरीं । स्त्रियां बाळां अपांपरी । देखोनियां निशाचरीं । वानरभारीं मिसळले ॥ ४ ॥ तंव अति बळी कपिकुंजर । पुढें करोनि पवनपुत्र । युद्धा मिसळले सत्वर । केला संहार राक्षसां ॥ ५ ॥

हनूमंतं पुरस्कृत्य सर्वे युद्धाय तस्थिरे ।
राक्षसाश्च महावीर्याः प्रासासिपरिघायुधाः ॥ १६ ॥
दंशितास्तस्थिरे सर्वे युद्धायामितविक्रमाः ।
बलेनान्योन्यमासाद्य युयुधुस्ते परस्परम् ॥ १७ ॥

परिघपट्टिशगदापाणी । लहुडीमुद्गलधनुर्बाणी । खड्ग त्रिशूळ तोमर घेउनी । राक्षसश्रेणी निघाल्या ॥ ६ ॥ परिघ हाणिती निशाचर । वृक्ष झेलिती वानरवीर । हात लचकोनि सत्वर । भूमीवर आदळले ॥ ७ ॥ वानर वृक्ष हाणिती । राक्षस मारिती परिघाप्रती । करोनि परिघाची उपहती । हात मोडिती राक्षसांचे ॥ ८ ॥ श्रीरामनामें उपरमती । राक्षसां संहार करिती । राक्षस गदा हाणिती । वानर झेलिती शिळाशिखरें ॥ ९ ॥ शिळाघातें गदा पाहें । पीठ होवोनियां जाये । वानर वांकुल्या दाविती स्वयें । न धरिती भय राक्षसांचें ॥ ११० ॥ एक चालिला शूळ घेउनी । वानर देखोनि शिळापाणी । हाणितांचि वानरगणीं । घेती हिसडोनी शूळातें ॥ ११ ॥ शिळा हाणितां अवचितीं । राक्षस अंगेंसहित अस्थी । मिळोनि जाती अव्यक्तीं । जाती व्यक्ती उरेना ॥ १२ ॥ एक घेवोनि येती भाले । खड्गतोमरेंसीं एक आले । कुठारहस्तीं एक चालिले । एकीं मांडिलें द्वंद्वयुद्ध ॥ १३ ॥ एक हाणिती मुसळें । वानर हाणिती शालताळें । तेथें घोरांदर मांडलें । कंदन झालें तुंबळ ॥ १४ ॥ भाले ओपिती निशाचर । अंगें भिडती वानर । घाय न मानोनि समग्र । करिती संहार राक्षसां ॥ १५ ॥ खड्ग हाणिती निशाचर । दुधडे होती वानर । प्रवाहे रुधिरधार । तें कपिकुंजर न गणिती ॥ १६ ॥ श्रीरामनामतेजेंकरीं । अतिप्रताप कपिकेसरी । दुर्धंड झाले शरीरीं । ते पुच्छेंकरीं गुंडिती ॥ १७ ॥ सवेंचि मिसळती युद्धासी । हिरोनि घेती खड्गांसी । तेणेंचि मारिती राक्षसांसी । वानरीं ऐसी ख्याति केली ॥ १८ ॥ मारोनियां निशाचर । नामें देती भुभुःकार । तेणें गर्जत अंबर । आकांत थोर राक्षसां ॥ १९ ॥ हाणितां भिंडिमाळां पांगोरे । गुंडे झेलिती वानरें । फिरवोनि तेणेंचि करें । निशाचरें मारिती ॥ १२० ॥ नानापरींचीं आयुधें । आणिक शस्त्रास्त्रें विविधें । मंत्रतंत्रादि सन्नद्धें । अति सुबद्धें वर्षती ॥ २१ ॥ वानरांच्या निजचित्तीं । श्रीरामतेजें दुर्धर शक्ती । तेणें कळिकाळा नागवती । केली शांती सकळांची ॥ २२ ॥ युद्धीं खवळले वानर । करीत उठिले संहार । निवटिले राक्षसभार । वाहे रुधिर भडभडां ॥ २३ ॥ एकांचे करचरण तुटले । एकांचे कटी भंगले । एकांचे ऊर फुटले । उघडे पडिले कोथळे ॥ २४ ॥ मल्लयुद्ध परस्परीं । झोंटधरणी महावीरीं । गुडघे कोंपर टोले शिरीं । महामारी राक्षसां ॥ २५ ॥ मुद्रिकांसाठीं बोटें मोडिती । अंगदांसाठीं बाहु तोडिती । कुंडलांसाठीं कान उपडिती । माथे तोडिती मुकुटांसाठीं ॥ २६ ॥ करोनियां घोरांदर । खवळले वानरेश्वर । मारिले निशाचर । रक्तनदी दुस्तर लोटली ॥ २७ ॥

निपेतुर्भूतले भिन्नाः केचिद्रुधिरकर्दमे ।
रक्षांसि च तथा पेतुर्वानरैर्भीमविक्रमैः ॥ १८ ॥
चूर्णिता विविधैः शैलैः पादपैर्मुष्टिभिस्तदा ।
दारिताश्च नखैस्तीक्ष्णैर्दंतैरपि सुदारुणैः ॥ १९ ॥
तत्र वृत्तं महायुद्धं कबंधीभूतसंकुलम् ।
शूराणां हर्षजननं भीरूणां च भयावहम् ॥ २० ॥
तर्षणं सुरनारीणां सर्वदुःखविमोक्षणम् ।
तस्मिन्युद्धे महाघोरे रक्षोवानरसंक्षये ॥ २१ ॥
प्रावर्तत नदी घोरा शोणितोदकवाहिनी ॥ २२ ॥

१ उल्लसित होण्यास. २ पाणवठे. ३ राक्षससमुदाय. ४ नाश, ५ आनंद पावतात, ६ भिन्नांग, ७ गोफणी. ८ नाश, ९ एकमेकांच्या शेंड्या धरून,

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वानरीं केलें महारण। कबंधीं दाटलें नभस्थान। नखीं केलें विदारण। मांसें रणांगण कोंदलें ॥ २८ ॥ दांतीं डसून गोळांगुळें। काढोनि घेती अन्त्रमाळें। तेणें ओंविती शिंसाळें। पाळिती लळे भूतांचे ॥ २९॥ वर्षतां शिळापाषाण। द्रुमांचे घाय दारुण। केलें राक्षसांचें चूर्ण। कर्दम पूर्ण रणांगणीं॥ १३० ॥ गजांचिया करवडी। त्याचि रणनदीसी दरडी। कर्दम दाटला बुडीं। मांसरक्तपरवडीमिश्रित ॥ ३१ ॥ रुधिर वाहे भडभडां। तो नदीस पूर गाढा। वोसणें दाटलीं दोहीं कडां। विचित्र युद्ध बहुवस ॥ ३२ ॥ सचक्र वाहती रथ। तेंचि तारूं नदीआंत। सपल्लव ध्वज शोभत। शीड तेथें तेंचि देखा ॥ ३३ ॥ गजकरवडी पडिल्या तळीं। त्याचि सुसरी विक्राळी। भयानक मुखें पसरिलीं। दिसती आवाळीं चाटीत ॥३४॥ सलंब भाले वाहती। ते महानक्र नदीप्रती। सपिच्छ बाण तळपती। तेचि निश्चितीं महामीन ॥ ३५ ॥ महावीरांचीं वोडणें। तींच कांसवें पैं दारुणें। अंबरें वाहती वितानें। तेणें फेणें दाटली नदी ॥ ३६ ॥ विकासलीं मुखकमळें। वाहती नरशिसाळें। तींच नदीमाजी उत्पळें। केश उभारले केशरप्राय ॥ ३७ ॥ जे पळोनि जाती रणीं। त्यांसी जैसी वैतरणी। भासतसे क्षणक्षणीं। भयवाहिनी दारुण ॥ ३८ ॥ श्रीरामभक्तांचे हातीं। जे समरांगणीं निमंती। त्यांसी सुरांगना वांनिती। ओंवाळिती आरत्या ॥ ३९ ॥ महापाप्यातें दुस्तर। निजकर्में उतरावया पार। तेथें तारूं श्रीरामचंद्र। नामें परपार पाववी ॥ १४० ॥ श्रीरामनामें निजनेटीं। वानरीं मारिल्या कोट्यनुकोटी। कोणी संमुख न राहती नेटीं। उठाउठीं पळाले ॥ ४१ ॥ निवटून राक्षसगण। विजयी झालें वानरसैन्य। भेदिलें वीरांचें आवरण। रणनदी पूर्ण वाहवोनी ॥ ४२ ॥ रण देखोनि घारी गीध। करिते झाले आल्हाद। भोजन मिळालें अगाध। मांस विविध भक्षिती ॥ ४३ ॥ ऐसें करोनियां रण। भेदोनि असुरांचें आवरण। पुढें चालिले वानरगण। तंव महादारुण ओढवलें ॥ ४४ ॥ नभीं गुप्त शस्त्रावरण। भूत प्रेत पिशाच जाण। भेदितील वानरगण। रघुनंदननिजकृपा ॥ ४५ ॥ एका जनार्दना शरण। दुर्धरक्रिया रावण। रची जितकी दारुण। तितकी श्रीरामगण भेदिती ॥ १४६ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां राक्षसावरणभेदो नाम सप्तपंचाशत्तमोऽध्यायः ॥ ५७ ॥ ओंव्या ॥ १४६ ॥ श्लोक ॥ २२ ॥

अध्याय अठ्ठावन्नावा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः। अति दुस्तर संकल्पावरण। जेणें व्यापिलें त्रिभुवन। तें निरसोनि हरिगणं। करीत किराणं चालिले ॥ १ ॥ सद्गुरूचे कृपेपुढें। संकल्प कायसें बापुडें। जेंवी रवीपुढें मेहुडें। तेंवी उडे अभावत्वें ॥ २ ॥ निरसून दुस्तर आवरण। करीत रामनामगर्जन। अति बळियांढे वानरगण। देत किराण चालिले ॥ ३ ॥ केउता आहे तो लंकापती। काळमुखा त्रिजगतीं। चोरोनि आणिली सीता सती। तेणेंचि शांती झाली त्याची ॥ ४ ॥ भस्म झालिया आवरणें। आतां काय करावें रावणें। जीव घेवोनि पळोन जाणें। अन्यथा जिणें दिसेना ॥ ५ ॥ वृक्ष झेलिती वानर। एक पर्वतशिखर। करीत रामनामाचा गजर। वीर वानर चालिले ॥ ६ ॥ तंव पुढें अति दारुण। महामोहाचें आवरण। त्यांत पडिले वानरगण। मोहनिमग्न होवोनि ठेले ॥ ७ ॥ पडली गडधूप अंधारी। न देखती परस्परीं। वृत्ति झाली पैं घाबिरी। अपांपरी वानरां ॥ ८ ॥ न दिसे स्वसैन्य परसैन्य। मोडलें सन्मार्गदर्शन। भ्रांत होवोनि ठेले मौन। गमनागमन सरेना ॥ ९ ॥ निजदेहो नाठवे सर्वथा। तेथें कोण जाणे सन्मार्गता। आचरावया कर्माची सामर्थ्यता। स्वधर्मता तेथें कैंची ॥ १० ॥ बुद्धि होवोनि ठेली[14] अंध। चित्त झालें पैं स्तब्ध। निजाभिमानें पडलें गडद। कार्यानुवाद नाठवे ॥ ११ ॥ आम्ही एक रामभक्त। आज्ञा घेवोनियां येथ। आलों मिळोनियां समस्त। तो कार्यार्थ विसरलों ॥ १२ ॥ होम विध्वंसोनि तत्त्वतां। बाहेर काढोनि लंकानाथा। भेटवावें रघुनाथा। हेंही सर्वथा विसरलों ॥ १३ ॥ आळसें व्यापिलें शरीरा। देती जांभया करकरां। चांचेंरी जाताती

---

१ आंतडीं. २ मस्तकें, डोकीं. ३ प्रेतें. ४ पुरांतील केरकचरा. ५ छतें. ६ कमळें. ७ मारतात. ८ वर्णिती.

९ वानरसमूह. १० उज्या. ११ क्षुद्र मेघ. १२ बळवान्. १३ कोठें. १४ राहिली. १५ झोंके.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सैरा। मोहें वानरां व्यापिलें ॥ १४ ॥ विसरले कारण। विसरले धर्माचरण। विसरले रघुनंदन। वानरगण आपणा विसरले ॥ १५ ॥ उभे उभ्या खाती झोंके। उभेचि घोरती एकें। निद्रा व्यापिलीं सकळिकें। वानरें असंख्यें पाडिलीं ॥ १६ ॥ मोहाचें बळ बहुवस। निजों न दे सावकाश। पडिल्याचि स्वप्नविलास। असंम साहस देखती ॥ १७ ॥ द्रव्यदाराममता फार। माझी स्त्री माझे पुत्र। स्वप्नीं मांडिती घराचार। पुत्रपौत्रविवाह ॥ १८ ॥ माझे व्याही माझे भाई। सोयरे धायरे जांवाई। ममता बहु लेंकीचे ठायीं। उचितें पाहीं दाटत ॥ १९ ॥ मी स्वगृहीं नांदत। उदीम व्यवसाय करीत। सोयरियांसीं उदासभूत। ते गृहस्थ पैं काय ॥ २० ॥ ऐसी उचितांची सांकडी। स्वप्नीं पडे अरंडीदरडी। जागृतीं कैंची उसंत घडी। मोह कडाडीं आदळला ॥ २१ ॥ चिंतासागरीं बुडाले। उचिताचे सांकडीं पडिले। सर्वेचि निद्रा व्यापिले। घोरों लागले घरघरां ॥ २२ ॥ एक उठोन वोसणती[3]। एक तयांसी दडपिती। तंव तेही मोहें व्यापिजेती। स्वयें बरळती मी माझें ॥ २३ ॥ त्या मोहाचा निवर्तक। वैराग्ययुक्त विवेक। तेणें हनुमान सबळ देख। मोह निःशेष उडविला ॥ २४ ॥ विवेकवैराग्यसमेळीं। देतां नामाची आरोळी। महामोहाची झाली होळी। वानर तत्काळीं सोडविले ॥ २५ ॥ गुरुकृपावलोकनें देख। वैराग्य झालें सत्त्वात्मक। विवेक उपजला निष्टंक। तेणें सकळिक सावधान ॥ २६ ॥ महामोहाचें मूळ तत्त्वतां। अहंता आणि ममता। तिच्या करावया घाता। सविवेकता वैराग्य ॥ २७ ॥ गुरुसंप्रदायें जाण। स्वस्थ बैसले हरिगण। स्वस्थ करोनि अंतःकरण। निजविवंचन स्वयें करिती ॥ २८ ॥ गुर्वाज्ञा पूर्ण ऐसी। जे देहातीत आपणासी। देखोनियां यथार्थैसीं। निजस्वहितासी विनटावें ॥ २९ ॥ तैं विसरोनि गुरुवचन। वृथा पडिले असावधान। पुढें ओढवल्या पतन। सोडवी कोण आम्हांसी ॥ ३० ॥ जो गुरुवचनासी विसरे। कामातुरें अति भरे। कां आळसें कांहीं न स्मरे। निद्राभरें अति भ्रांत ॥ ३१ ॥ गुरूसी न स्मरोनि जाण। विषयीं लुब्धला पूर्ण। तंव तंव नागवला जाण। नाहीं स्मरण गुरूचें ॥ ३२ ॥ कामातुरा नरक दारुण। निद्रिता उभय लोक शून्य। आळसी तो वृथा जाण। करी पोषण देहाचें ॥ ३३ ॥

आहारनिद्राभयमैथुनं च
समानमेतत्पशुभिर्नराणाम्।
ज्ञानं नराणामधिको विशेषो
ज्ञानेन हीनाः पशुभिः समानाः ॥ १ ॥

नेणे कर्माची वेळ। न म्हणे सकाळ सांजकाळ। निद्रा घोरले प्रबळ। अळुमाळ स्मरेना ॥ ३४ ॥ आहार निद्रा भय मैथुन। पशूंच्या ठायीं समसमान। तैसेचि देही पशु जाण। पुच्छेंवीण दाढीचे ॥ ३५ ॥ पशु भेडाविता परता पळे। विषयी नरकभयें न कंटाळे। घोर नरक अंगीं आदळे। तरी खवळे अधिकचि ॥ ३६ ॥ भोगिलिया विषयापाठीं। पशूसी अल्पही ममता नुठी। विषयीजनांची नवल-गोष्टी। घाली मिठी अधिकाधिक ॥ ३७ ॥ सकृद्विषयभोगेंकरून। पशु न पाहे परतोन। विषयिजनांचें नवल कोण। सगर्व जाण सोडीना ॥ ३८ ॥ पशु विषय भोगूं जाये। मागुता परतोनि न पाहे। विषयिजनांचें अपूर्व आहे। नवल काय सांगूं मी ॥ ३९ ॥ प्रीतीं जंव जंव भोग घडे। तंव तंव ममता अधिक वाढे। मोथंडबुथडभरी चुडे। अलंकारकोडें घडवीत ॥ ४० ॥ विषयीं संतति झाली। तरी अधिकेंचि गुंती पडली। ममता अधिक खवळली। सुदृढ जडली जन्मबेडी ॥ ४१ ॥ चित्ता सांकडी पडे। तेणें अधिकाधिक हांव चढे। ऋणामाजी सफाई बुडे। नरक पुढें अनिवार ॥ ४२ ॥ एका विषयाची ऐसी गती। अहंममता नागविती। आळसी निद्रिस्थाची स्थिती। तेही संकळितीं सांगेन ॥ ४३ ॥

आयुषः क्षण एकोपि न लभ्यो हेमकोटिभिः।
स चेद्विफलतां याति का हानिस्तु ततोधिका ॥ २ ॥

कोटि वेंचितां सुवर्ण। नरदेहींचें आयुष्य जाण। न मिळे न मिळे अर्धक्षण। नाना साधनें करितांही ॥ ४४ ॥ शिणतां नाना साधनीं। सहसा नरदेह या जनीं। न मिळे पैं त्रिभुवनीं। त्याची हानी होतसे ॥ ४५ ॥ स्वेच्छा वेंचे विषयसेवनीं। उसंत नाहीं क्षणोक्षणीं। विपायें उरे शेष म्हणोनी। तें ने

१ अनुपम. २ सर्वत्र ठायीं. ३ बडबडती. ४ एकवार विषयसुख भोगल्यावर. ५ नखशिखांत. ६ थोडक्यांत. ७ फुरसत.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

हिरोनी सुषुप्ती ॥ ४६ ॥ नेणे कर्माची वेळ । न म्हणे सकाळ संध्याकाळ । निद्रा घोरले प्रबळ । कांहीं अळुमाळ स्मरेना ॥ ४७ ॥ नाठवी गेल्या आयुष्या । नाठवी स्वधर्म सहसा । फुंपत पडे सर्प जैसा । नाठवे सहसा हृदयस्थ ॥ ४८ ॥ विपायें चुकल्या सुषुप्ती । तरी औनाडी भरे वृत्ती । स्वेच्छा सारिपाट खेळती । नातरी मांडिती बुद्धिबळें ॥ ४९ ॥ स्वर्गींचे चिंतिती सुरवर । कर्मभूमी नरशरीर । पावतां चुके येरझार । ऐसा थोर नरदेहो ॥ ५० ॥ ऐसी नरदेहाची योग्यता । दुर्लभ ब्रह्मादिकां समस्तां । तें देह पावोनि तत्त्वतां । विषयीं सर्वथा नाडले ॥ ५१ ॥ आम्ही श्रीरामाचे गण । सद्गुरु हनुमंताचे कृपेंकरून । पावलों आतां रघुनंदन । ते मोहनिमग्न कैंवी झालों ॥ ५२ ॥ अतर्क्य भगवंताची माया । विश्व संपूर्ण भुलविलें तयां । बापें रावणाची कपटचर्या । सेना वानरांचिया मोहीत ॥ ५३ ॥ तथापि भगवंताचें वरद । हरिभक्तां न बाधी द्वंद्व । निरसोनि मायेचा बाध । स्वरूप शुद्ध भोगिती ॥ ५४ ॥

मामेव ये प्रपद्यंते मायामेतां तरंति ते ॥ ३ ॥

माझ्या निजभक्तांकडे । न पडे मायेचें सांकडें । मी आपुल्यातें आपुल्याकडे । नेईं निवाडें निजपदा ॥ ५५ ॥ सूर्यासी उगवतां तम । अल्पही न पडे दुर्गम । तेंवी अभक्तां माया दुर्गम । अति सुगम हरिभक्तां ॥ ५६ ॥ सुगम म्हणतां साच दिसे । परी सत्यत्वें निःशेष नसे । निजभ्रमें तेथें आभासे । निद्रावशें स्वप्न जेंवी ॥ ५७ ॥ सूर्यकिरण न पडे दृष्टीं । तैं मृगजळाचा पूर दाटी । स्वस्वरूपीं विन्मुख होतां शेवटीं । भरत दाटी तमाची ॥ ५८ ॥ तेंवी रावणाचे कपटतमें जाण । क्षण एक मोहिले हरिगण । पडतां विवेकरविकिरण । उडालें पूर्ण अभावतम ॥ ५९ ॥ उदया येतां बोधार्क । अज्ञानतम निःशेख । उडोनि गेलें एकएक । ज्ञानउँखा देख उजळली ॥ ६० ॥ बोधार्काच्या किरणें देख । भ्रम उडाला निःशेख । सावध झाले सविवेक । अपूर्व आणीक पुढें झालें ॥ ६१ ॥ विज्ञानमय कोष जाण । केवळ तमाचें आवरण । भेदितांचि हरिगँण । पुढीलही जाण भेदिलें ॥ ६२ ॥ नामबळें असमसाहस । करितां विवेक सावकाश । झाला तमाचाही ऱ्हास । स्वप्रकाश त्रिजगतीं ॥ ६३ ॥ विवेकाच्या निजनेटीं । निजकारणेंसीं त्रिपुटी । उडोनि गेली उठाउठीं । जेंवी रविदृष्टीं मृगजळ ॥ ६४ ॥ द्रष्टा दृश्य दर्शन । ज्ञाता ज्ञेय निजज्ञान । कर्ता कार्य आणि कारण । यांचें भान उडालें ॥ ६५ ॥ भोग्य भोग भोक्ता । वाच्य वचन वदता । ध्येय ध्यान आणि ध्याता । अभावो सर्वथा त्रिपुटीचा ॥ ६६ ॥ बोधार्काचा उदय जाण । स्वप्रकाशी त्रिभुवन । सबाह्य झालें आनंदघन । वानरगण सुखरूप ॥ ६७ ॥ आनंदमय झाली वृत्ती । विसरले ते बाह्यस्फूर्ती । निघाले होते रावणघातीं । तेही स्थिती विसरले ॥ ६८ ॥ विसरले कार्यकारण । विसरले वैरी रावण । विसरले रघुनंदन । वानरपण विसरले ॥ ६९ ॥ निजकार्यालागीं जाण । रावण अति विचक्षण । रचिलें आनंदावरण । होम निर्विघ्न साधावया ॥ ७० ॥ परी तें नव्हे अखंड । भेदें केलें खंडविखंड । विषयाकारणें उदंड । अति प्रचंड विस्तार ॥ ७१ ॥ जे जे रसीं जो जो भरे । तेथोनि मागें न सरे । रावणें मोहिलीं वानरें । सुखोद्गारें डुल्लती ॥ ७२ ॥ सकळ रसाचें निजसार । ब्रह्मरस परिकर । विवेक पावले वानर । गुरुकृपासारनिजबळें ॥ ७३ ॥ त्याहीमाजीं अतर्क्य जाण । बैसला असे अहंरावण । तेणें साधोनि विंदाणें । करी हवन अति यत्नें ॥ ७४ ॥ त्यासी देखतांचि दृष्टीं । सरसावल्या वानरकोटी । निरसितां आवरणकोटी । रावण दृष्टीं देखिला ॥ ७५ ॥ जेंवी गुळामाजीं दगड । दिसे गुळाचिसारिखा गोड । तोंडीं घालितां अवघड । करी उँपाड दांतांचा ॥ ७६ ॥ अथवा आंब्याच्या पोटीं । असती रसाची कोटी । त्याहीमाजीं अति संकटीं । असे गांठी अति निबर ॥ ७७ ॥ तेंवी कर्म रावणाचें । बाह्यावरण आनंदाचें । अंतरीं भाव कपटाचे । घोर त्याचें आवरण ॥ ७८ ॥ अहंसुखी आनंदघन । ऐसें जेथें स्फुरे स्फुरण । तें जाणावें अभिमानजन्य । तेणें हरिगण मोहिजेती ॥ ७९ ॥ तंव ते निजनिष्ठा सावध । छेदोनी अहंसोहं यांचे बाध ।

१ ईश्वर. २ कदाचित्. ३ आडमार्गी. ४ तिनें. ५ अत्यंत मोठी. ६ ज्ञानरूप पहांट, उषःकाल. ७ वानरसमुदाय. ८ सुंदर. ९ मोठी युक्ति. १० पाडणें. ११ अभिमानापासून उत्पन्न झालेलें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

पावले ते अगाध बोध । अहंरावणकंद छेदावया ॥ ८० ॥ दृष्टीं देखतांचि रावण । सरसावले वानरगण । घृतीं खवळे हुताशन । तैंवी वानरगण खवळले ॥ ८१ ॥ माथां वाहोनि पुच्छाटी । प्रवेशले यज्ञवाटीं । रावण देखोनियां दृष्टीं । दोनी मुष्टी वळियेल्या ॥ ८२ ॥

तथान्ये चोदकं हव्यं दर्भान्पात्राणि चापरे ।
बलिं च निर्विकीर्याणाः खमुत्पत्य प्लवंगमाः ॥ ४ ॥

खवळलें वानरकटक । कुंड विझविती एक । प्रणीतां[1]पात्रीं भरिलें उदक । तें कुंडीं निःशेष रिचविलें ॥ ८३ ॥ इध्मा[2]बर्हि[3] परिस्तरण[4] । तें विखुरती वानरगण । होमद्रव्यें भरिलें भांण[5] । घेवोनि गगनीं उपरमती[6] ॥ ८४ ॥ रावण निजकार्यार्थी । सावधान अहोरातीं । आवरोनी बाह्यवृत्ती । श्रीरामघातीं मंत्र जपे ॥ ८५ ॥ वधावया रामसौमित्र । मंत्र जपतां अव्यग्र । मंत्रदेवता भयातुर । स्वयें विचार करीतसे ॥ ८६ ॥ मंत्राधीन माझी शक्ती । जापकांची[7] कार्यस्थिती । साधावया शीघ्र गती । जप करिती सावध ॥ ८७ ॥ भाग्यानुसार जाण । मंत्रदेवता प्रसन्न । रावणाचें विचित्र चिन्ह । श्रीरघुनंदनवधार्थ ॥८८॥ श्रीरामें जगाची उत्पत्ती। श्रीरामें जगाची स्थितिगती । जगाची निजविश्रांती । जाण निश्चितीं श्रीरामें ॥ ८९ ॥ मंत्रदेवता समस्ता । रामसामर्थ्यें सामर्थ्यवंता । कैसेनि होय त्याच्या घाता । मूर्ख तत्त्वतां रावण ॥ ९० ॥ राम जगाचें जीवन । त्याचें करितां हनन । भाग्य विमुख झालें जाण । स्वयें रावण मरेल ॥ ९१ ॥ आणिकाची असो गती । राम आमची जीवनस्थिती । केंवी प्रवर्तों त्याचे घातीं । लंकापती भ्रमलासे ॥ ९२ ॥ निजमूळातें छेदून । वृक्ष केंवी राहे आपण । तुटल्या तळ्याचें जीवन । वांचे मीन हें न घडे ॥ ९३ ॥ श्रीराम जगाचा पिता । त्या प्रवर्तला पितृघाता । यासी द्यावया प्रायश्चित्ता । याच्या घाता प्रवर्तावें ॥ ९४ ॥ पितृघातका प्रायश्चित्त । वेद बोलिला देहान्त । तोचि साधावया कार्यार्थ । करूं घात रावणाचा ॥ ९५ ॥ म्हणोनि खुंटली वचनावळी । नुच्चारे मंत्रशैली । स्वयेंचि बैसली दांतखिळी । दुःखें तळमळी रावण ॥ ९६ ॥ प्राप्तकाळ आला समीप । तंव विझोनि गेला वाग्दीप । वर्ण उच्चारेना स्वल्प । कोण पाप ओढवलें ॥ ९७ ॥ शंकरें होवोनि प्रसन्न । मज दिधलें वरदान । शेखीं उच्चारेना वर्ण । दारुण विघ्न ओढवलें ॥ ९८ ॥ होमपात्रें फोडिलीं समस्त । त्रिसंधानें[8] तोडिलीं तेथ । स्रुवा[9] हातींचा आसुडत । नामें गर्जत वानर ॥ ९९ ॥ पंचकोश पंचावरण । भेदोनियां अति दारुण । अंगीं आदळले[10] हरिगण । तरी रावण ढळेना[11] ॥ १०० ॥ अंतरीं निग्रेहिली[12] वृत्ती । येवों नेदी बाह्यस्थिती । वानर इतस्ततां ओढिती । तरी स्थिती ढळेना ॥ १ ॥ अंगीं आदळतां वानरांसी । रावण विचारी मानसीं । विघ्न उठिलें होमासी । सर्वथा त्यासी मी न मानीं ॥ २ ॥ आटक दुर्ग त्रिकूटाचे । उग्रावरण पंचकोशांचें । भोंवतें राखण महावीरांचें । भय तयांचें यमकाळा ॥ ३ ॥ त्याहीमाजी अतर्क्य स्थिती । शस्त्रें गुप्त नभोगती । सर्वथा कोणा न लक्षती । पारख्या[13] निवटिती क्षणमात्रें ॥ ४ ॥ येथें यावया वानरगण । सर्वथा नाहीं आंगवण । निमेषमात्रें सांडिती प्राण । अर्ध क्षण न लागतां ॥ ५ ॥ दिसतांही वानरकोटी । विघ्न उठलें यज्ञवाटीं । यांसी सर्वथा मी नाणीं दृष्टीं । म्हणोनि निमटी निजनयन ॥ ६ ॥ गर्वाचा ताठा अंतरीं । तेणें नेत्रांसी अंधारी । नेणे हरिगणांची थोरी । केली बोहरी निजगर्वें ॥ ७ ॥

सालस्यो गर्वितो निद्रः परहस्तेन लेखकः ।
अल्पविद्यो विवादी च षडेते चात्मघातकाः ॥ ५ ॥

कष्टीं तपश्चर्या करितां । प्राप्तकाळ समीप येतां । आळस उपजला चित्ता । तरी निजघाता स्वयें केलें ॥ ८ ॥ गर्वाचा ताठा चढला । तेणें विवेक बुडविला । त्रिमदें अति मातला । घात केला स्वयेंचि ॥ ९ ॥ धनमद पानपाद । अति मान्यतेचा राजमद । तेणें प्राणी होय अंध । कार्यानुवाद नाठवे ॥ ११० ॥ निद्रातुराच्या ठायीं । कार्य स्मरेना पाहीं । सकाळ सांजवेळ नेणे कांहीं । नाडला पाहीं निजहिता ॥ ११ ॥ उपजली

१ यज्ञपात्रविशेष. २ ओतिलें. ३ समिधा व दर्भ. ४ कुंडाच्या भोंवतालीं पसरलेले दर्भ. ५ भांडें. ६ आनंदती. ७ जपणाराची. ८ त्रिसंधान=दर्भांची दोरी. ९ यज्ञांतील पळीसारखें पात्र. १० भिडले. ११ हालेना. १२ निरोधिली. १३ परक्याला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

मंत्राची आर्ती । लेहूं जातां आणिका हातीं । व्यंग लिहिल्या वर्णव्यक्ती । विघ्नप्राप्ती होय सद्य ॥ १२ ॥ विद्येचें न साधतां ज्ञान । करूं जातां आराधन । मंत्रदेवता क्षोभून । सद्य विघ्न पैं करिती ॥ १३ ॥ ज्ञान नाहीं निश्चयात्मक । वाद करूं बैसती एक । निजघात तेणेंचि देख । विचार आणिक असेना ॥ १४ ॥ तैसा निजगर्वें भुलला । हरिगणांतें न गणी वहिला । निजगर्वें नागवला । होमाचा केला निःपात ॥ १५ ॥ इतस्ततां वानर । ओढिताती सैर । नेत्र उघडी दशशिर । म्हणे थोर विघ्न उठलें ॥ १६ ॥ होमकुंडाची झाली शांती । पात्रें नेलीं भस्मांतीं । यज्ञोपचार विध्वंसिती । परी लंकापती डंडळीना ॥ १७ ॥ घोरकर्मी रावण । सर्वथा डंडळीना मन । खुखावला तारानंदन । निधडी आंगवण लंकेशा ॥ १८ ॥ युद्धीं श्रीरामासंमुख । कैंवी जाय दशमुख । म्हणोनियां युवराजा देख । मंत्र अलोलिक योजिला ॥ १९ ॥ जवळी देखिली मंदोदरी । तीस पीडितां झडकरी । ध्यान सांडोनि दशशिरीं । महामारीं उठेल ॥ १२० ॥ काढोनि नेऊं रामापासीं । राम निवटील रावणासी । कार्य साधेल अनायासीं । म्हणोनि केशीं धरियेली ॥ २१ ॥

दृष्ट्वाथ रावणं सर्वमिदमाहांगदो वचः ।
इमां मंदोदरीं पार्श्वे नयामि तव पश्यतः ॥ ६ ॥
या ते शक्तिर्बलं वीर्यं तेन तिष्ठ त्वमग्रतः ।
कृत्वा शिरसि पादं ते नयाम्येनां स्त्रियं तव ॥ ७ ॥

वानर करितां आकर्षण । डंडळीना तो रावण । तेणें अंगद क्षोभून । केलें विंदान तें ऐका ॥ २२ ॥ हांका मारोनि वेगेंसीं । बोलता झाला रावणासी । मंदोदरी धरोनि केशीं । श्रीरामापासीं पैं नेतों ॥ २३ ॥ रावणा ऐकें तत्त्वतां । तुज देखतां तुझी कांता । धरोनि नेईन मी आतां । करीं साटोपता युद्धासी ॥ २४ ॥ श्यामवदन लंकापती । लांछन लागलें तुझे शक्ती । चोरोनि आणिली सीता सती । वीरवृत्ती न करवेचि ॥ २५ ॥ तैसें मी न करीं जाणा । तुज देखतां तुझी अंगना । नेईन करीत बिटंबना । श्रीरघुनंदनासमीप ॥२६॥ मी रामाचा दूत । निंद्य कर्म न करीं निश्चित । तुझ्या माथां देवोनि लाथ । नेईन ओढीत पैं आतां ॥ २७ ॥ सामर्थ्य असेल शरीरीं । तरी सोडवीं मंदोदरी । नाककानां करोनि बोहरी । नेतों अंतुरी मी तुझी ॥ २८ ॥ म्हणोनि केलें खस्तव्यस्त । झोंटीं धरोनि ओढीत । तेणें ते झाली दुःखित । आक्रंदत अति थोर ॥ २९ ॥

ततो मंदोदरी दीना रावणं वाक्यमब्रवीत् ।
किं न पश्यसि मां राजन्ननाथां त्वयि जीवति ॥ ८ ॥

वानर करितां खस्ताव्यस्त । मंदोदरी आक्रंदत । रावणाप्रति सांगत । कासया भ्रांत झालासी ॥ १३० ॥ जेंवी जळामाजील लता । गज रिघोनि मर्दी समस्ता । वानरें तेंवी करितां खस्ता । प्राण तत्त्वतां जाईल माझा ॥ ३१ ॥ जळो तुझी शौर्यशक्ती । जळो तुझी निजकीर्ती । जळो तुझी यज्ञस्थिती । झांकिसी किती निजनयनां ॥ ३२ ॥ वानरीं घेतलें घर । दुर्गी विचरती अति सैरँ । विध्वंसिले यज्ञोपचार । पात्रें समग्र फोडिलीं ॥ ३३ ॥ तुज करितां खस्ताव्यस्त । सावध नव्हे तुझें चित्त । रामविरोधें केलें भ्रांत । कांहीं स्वहित स्फुरेना ॥ ३४ ॥ चोरोनियां सीता सती । व्यर्थ द्वेषिला रघुपती । जीवित्वाची खुंटली गती । केली शांती निजकर्में ॥ ३५ ॥ पुत्र प्रधान मारविले । सैन्य सेनानी जीवें गेले । बंधूंसीं विटंबन केलें । जीवें घेतलें कुंभकर्णा ॥ ३६ ॥ दुर्धर बाणींकरून । तुज निवटितां रघुनंदन । न लगे रे अर्ध क्षण । आतां हवन तें काय ॥ ३७ ॥ असो तुझी मरणगोष्टी । मज वानरीं घातली मिठी । कोणाप्रति सांगों गोष्टी । कोण संकटीं सोडवील ॥ ३८ ॥ तूं जीत असतां शिरावरी । मज दीन केलें वानरीं । ओढिती धरोनि केशाग्रीं । पीडा भारी करिताती ॥ ३९ ॥ शिरावरी असतां कान्त । ज्याची अंगना अनाथ । जळो त्या पतीचें जीवित । अति निंदित लौकिकीं ॥ १४० ॥ जीत असता इंद्रजित । रणकंदन करिता येथ । दावोनि निजपुरुषार्थ । मज त्वरित सोडविता ॥ ४१ ॥ जीवें निमाला रावण । म्हणोनि मजलागीं जाण । पीडिताती वानरगण । अति गर्जोन आक्रंदे ॥ ४२ ॥ जरी असता जीवें जीत । तरी करोनि पुरुषार्थ । मज सोडविता येथ । रावण निश्चित निमाला ॥ ४३ ॥ म्हणोनि

१ नाश, २ विलक्षण, ३ स्त्री, ४ ओढाताण, ५ केंसांचे ठिकाणीं, ६ वेल, ७ स्वेच्छ, ८ सेनापति, ९ जीवंत, १० मेला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

आक्रंदे गोरटी । वानरीं बांधली शकुनगांठी । पतिव्रतेच्या वाक्पुटीं । निघाली गोष्टी ते सत्य ॥ ४४ ॥ म्हणोनि देती आरोळी । गर्जती नामाच्या कल्लोळीं । तेणें रावणाची दांतखिळी । उखळली तत्काळ ॥ ४५ ॥ स्त्रियांचे मोहक बोलीं । कोण कोणा न पडे भुली । सिद्ध मिळविले धुळी । विकल्पबोलीं स्त्रियेच्या ॥ ४६ ॥ भस्मासुरासी मोहिनी । भेटोनियां तत्क्षणीं । क्षणें मारिला मोहोनी । न मागतां पाणी निमाला ॥४७॥ श्रीशुकाची अगाध स्थिती । वचनमात्रें निश्चितीं । क्षणें नेली भस्मांतीं । निमेषगती न लागतां ॥४८॥ तेथें रावण बापुडें तें किती । क्षणें आणिलें बाह्यवृत्ती । मोकळी झाली वचनोक्ती । तेही स्थिती अवधारा ॥ ४९ ॥ रामनामाच्या कल्लोळीं । मंत्रदेवता मुक्त झाली । तिणें झोडिली वचनावळी । बोलावया बोली पैसें झाला ॥ १५० ॥ मग उठिला सत्वर । दांत खातसे करकर । नेत्र दिसती रक्तांबर । अति भ्यासुर भासती ॥ ५१ ॥ क्रोधें बोले अंगदासी । स्त्रियेसी धरोनियां केशीं । व्यर्थ कां रे ओढितोसी । अधम होसी वीरांत ॥ ५२ ॥ जेणें स्त्रियेसी दंडणें । त्यासी वीर कोण म्हणे । धिक् धिक् त्याचें जिणें । वृथा पीडणें स्त्रियेसी ॥ ५३ ॥ ऐकोनि त्याचिये गोष्टीसी । अंगद निर्भर्त्सी तयासी । मुख दाखवितां न लाजसी । उंच बोलसी नाकाडें[३] ॥ ५४ ॥ भिके-चेनि मिषें तत्त्वतां । चोरोनि नेतां पैं सीता । मार्गीं घोळसिलासी पैं येतां । लाज सर्वथा तुज नाहीं ॥ ५५ ॥ माता म्हणसी जियेसी । तिसी भोगूं पाहासी । पापें मेळविलें धुळीसी । पुत्रसैन्यासी मारविलें ॥ ५६ ॥ ऐशा अंगदाच्या उत्तरीं । रावण पोळला अंतरीं । धरिली देखतां मंदोदरी । क्रोध शरीरीं चढिन्नला ॥ ५७ ॥

तच्छ्रुत्वा रावणः क्रुद्धो दृष्ट्वा रुद्धां प्रियां तदा ।
अंगदं मुष्टिना जघ्ने मूर्ध्नि सद्यः पपात ह ॥ ९ ॥

मुष्टी वळोनि आवेशीं । धांव घेवोनि वेगेंसीं । माथां हाणितां अंगदासी । मूर्च्छा तयासी पैं आली ॥ ५८ ॥ तें देखोनि मारुती । अंतरिक्ष-नभोगती । तो येवोनियां लंकापती । भुजांतराप्रती ठोकिला ॥ ५९ ॥ तेणें गेला चांचरी । डोळियां आली अंधारी । आंग जातसे भंवेरी[४] । रावण धरेवरी पडों पाहे ॥ १६० ॥ मूर्च्छा भांजोनि[६] अंगद । तत्काळ झाला सावध । हृदयीं दाटला आनंद । कार्य सिद्ध पैं झालें ॥ ६१ ॥ विध्वंसिलें यागासी । उठविलें रावणासी । आतां नेल्या रामापासीं । क्षणार्धेसीं निवटील ॥ ६२ ॥ श्रीरामनामें गर्जत । अति बळियाढे रामभक्त । रावण केला सार्वचित्त । याग समस्त नासोनी ॥ ६३ ॥ एका जनार्दना शरण । विध्वंसिला रावणयज्ञ । करोनि मंदोदरीशांतवन । युद्धा रावण निघाला ॥ ६४ ॥ रसाळ कथानिरूपण । अति रम्य रामायण । एका विनवी जनार्दन । श्रोतीं अवधान मज द्यावें ॥ १६५ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां रावणयज्ञविध्वंसनं नाम अष्टपंचाशत्तमोऽध्यायः ॥ ५८ ॥ ओंव्या ॥ १६५ ॥ श्लोक ॥ ९ ॥

अध्याय एकुणसाठावा

॥ श्रीसद्गुरु रामचंद्राय नमः ॥ निजमूर्च्छा सांवरून । सावध झाला रावण । तंव पुढें विझालें हवन । रावणें आपण देखिलें ॥ १ ॥ सकळ यज्ञसामग्री । वानरीं केली बोहँरी । तें देखोनि दशशिरीं । क्रोध शरीरीं चढिन्नला ॥ २ ॥ मंदोदरी स्वयें रडत । देखोनियां लंकानाथ । स्वयें तीस शांतवीत । निजपुरुषार्थ बोलोन ॥ ३ ॥

साभिमानैर्वचोभिस्तां सांत्वयन्निदमब्रवीत् ।
किं रोदिषि शुभे दीनं मयि जीवति मानिनि ॥ १ ॥
न मे कश्चित्समो युद्धे त्रिषु लोकेषु भामिनि ।
सेंद्राः सुरगणाः सर्वे तिष्ठंति हि वशे मम ॥ २ ॥
किमल्पसारैः शक्योऽहं जेतुं वानरमानुषैः ॥ ३ ॥

निजाभिमानें दशानन । मंदोदरीप्रति वचन । करोनि तिचें शांतवन । स्वयें आपण बोलत ॥४॥ सुमंगले मंदोदरी । व्यर्थ रुदनातें न करीं । तुज खस्ता केली वानरीं । त्यांची बोहरी करीन मी ॥ ५ ॥ शुभानने परियेसीं । संग्रामीं संमुख मजसीं । रणा न येववे कोणासी । दैत्यदानवांसी कोण गणी ॥ ६ ॥ इंद्रादि सुर समस्त । बंदीगृहीं सेवा करीत । ब्रह्मा माझा नित्यांकित । नित्य पढत शांतिपाठ ॥ ७ ॥ तेथें अल्पशक्ति किंकर । मानव

१ तोंडांतून. २ अवकाश. ३ नाक वर करून. ४ भोंवळ आली. ५ उपहासाला. ६ सांवरून. ७ नाश.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

आणि वनचर । रणा येती मजसमोर । हें उत्तर घडेना ॥ ८ ॥ तुजदेखतां भामिनी । वानरमानवांच्या श्रेणी । क्षणें पाडीन मी रणीं । न्हाणीन धरणी अशुद्धें ॥ ९ ॥ माझे क्रोधदृष्टीपुढें । कैंवी राहती माकडें । आतां रणीं पाडीन लोंढे । निजनिवाडें पाहें तूं ॥१०॥ वानरमानवांच्या भूतळीं । शिरांची खेळेन चेंडूफळी । अशुद्धाचा[1] टिळा तत्काळीं । लावीन निढळीं पैं तुझ्या ॥ ११ ॥ जिंहीं हातीं निश्चित । तुज केलें खस्ताव्यस्त । ते उपडीन समस्त । तुज देखत भामिनी ॥ १२ ॥ हातांपायांचीं कोंडोरीं[2] । शिरांच्या वढवाळी[3] थोरी । तुजदेखतां करीन जरी । तरीच निर्धारीं मी रावण ॥ १३ ॥ निवटोनियां वानरगण । रामसौमित्रांच्या रुधिरें जाण । तुझ्या दुःखाचें क्षाळण[4] । करीन आपण सुंदरी ॥ १४ ॥

इति तां शोकसंतप्तां सांत्वयित्वा तु रावणः ।
रथमारुह्य वेगेन निर्जगाम रणं प्रति ॥ ४ ॥
स क्रुद्धः कवची खड्गी शरी धन्वी तथैव च ।
तस्य निष्क्रममाणस्य दग्धुकामस्य रोदसी ॥ ५ ॥

आजि पृथ्वी अरावण । कीं अराम देखसी जाण । म्हणोनि गर्जतां आपण । करी सांत्वन मंदोदरीचें ॥ १५ ॥ ऐसी दुःखसंतप्त मंदोदरी । तिसी रावणें बहुतांपरी । शांतवोनि अति कुसरीं । गिरागजरीं गर्जिन्नला ॥ १६ ॥ आजि श्रीरामातें रणीं । बाणेंकरीं भंगाणी । क्षणें भय धराल कोणी । पहा करणी करीन ते ॥ १७ ॥ कुचा भवंडिला सैन्यासी । सिद्ध व्हावें वेगेंसीं । उठा चला रणभूमीसी । रामसौमित्रांसी वधावया ॥ १८ ॥ घावो घातला निशाणा । वेगें पालाणा[5] पालाणा । आवेश आलासे रावणा । रणांगणा जावया ॥१९॥ दीपा अस्त होतां पाहें । प्रकाश अधिकाधिक होये । तैसें रावणा झालें आहे । गर्जताहे अति गर्वें ॥ २० ॥ पुष्पाचें जें विकासणें । तेंचि त्याचें सुकणें । तेंवी रावणाचें गर्जणें । जीवें मरणें तत्काळ ॥ २१ ॥ विजु प्रकाशातें पावणें । तोचि तिसी अस्त होणें । तैसें मांडिलें रावणें । निजमरणें गर्जत ॥ २२ ॥ काठीकार[6] सैरा धांवती । सैन्य सद्धन्नबद्ध करिती । रणा निघाला लंकापती । शीघ्रगती चालिला ॥ २३ ॥ म्हणोनियां त्वरित । सोटेमार करी दूत । तेणें नगरीं अति आकांत । कळकळित नरनारी ॥ २४ ॥ नगरीं होत रणवँळसा[7] । प्रिया झोंबती प्राणेशा । मागुती देखावया ऐसा । धीर सहसा उपजेना ॥ २५ ॥ आम्ही काय करूं आतां । आम्हांसी कोण निरूपिता । मरण आलें लंकानाथा । सांगाती तत्त्वतां करीतसे ॥ २६ ॥ आतां आम्हीं करणें कायी । तुम्हांसी पाहों कोणे ठायीं । म्हणोनि कंठीं झोंबती पाहीं । लोळणी तिहीं घातली ॥ २७ ॥ कांतेप्रति कान्त सांगत । देह पोशिला दिवस बहुत । रावणाचें वेतन खात । त्यासी रणांत सोडूं नये ॥ २८ ॥ जळो तयाचें वेतन । पोट भरूं भिक्षा करून । रणा नव जावें आपण । म्हणोनि चरण वंदिती ॥२९॥ तंव दूत हाणिती पाठीवरी । ओढून काढिती बाहेरी । शंखस्फुरण घरोघरीं । नरनारी कळकळिती ॥ ३० ॥ काळें तोंड लंकानाथा । चोरून आणिली सती सीता । आतां मरावया जातां । सवें समस्तां नेतसे ॥ ३१ ॥ तें ऐकोनि हरिगण । देती रामनामें किरार्ण । श्रीरामासंमुख दशानन । युद्धालागून निघाला ॥ ३२ ॥ आतां कायसी खटपट । कासया पडखळूं[9] दशकंठ । म्हणोनि हरिखले मर्कट । देती उद्भट किराण ॥ ३३ ॥ तंव रावणदळ समस्त । सन्नद्धबद्ध झालें तेथ । वाद्यें लागलीं अद्भुत । नादें गर्जत भूगोळ ॥ ३४ ॥ तुरें लागलीं विविधं[10] । अनुहताचा[11] निजनाद । ध्वनि उठल्या बहुविध । भाग्य विविध रावणाचें ॥ ३५ ॥ भेरी मृदंग निशाण । गुजबुजी गिडिबिडी जाण । काहळा चिनकाहळा दारुण । भोंगळा संत्राण[12] त्राहाटिल्या[13] ॥ ३६ ॥ वीणा वेणु झल्लरी । नाद उठिला अति गजरीं । विराणीं[14] वाजती एकसरीं । नादाभीतरीं मन निवे ॥ ३७ ॥ रणनोवरा दशशिरी । पर्णावया[15] मोक्षनारी । निघालासे झडकरी । अनुहतगजरी लावोनियां ॥ ३८ ॥ सन्नद्ध चतुरंगसेना । सवें सकळ युद्धरचना । शस्त्रास्त्रांची विवंचना । खडतर जाणा सांगातें ॥ ३९ ॥ विचित्र कवचांचे भार । खड्ग तोमर

१ रक्ताचा. २ तुकडे. ३ राशी. ४ परिमार्जन. ५ सिद्ध व्हा. ६ दूत. ७ रणकल्लोळ. ८ उज्ज्या. ९ घेरूं. १० नाना प्रकारची. ११ योगधारणेनें ऐकूं येणारा एक प्रकारचा ध्वनि. १२ जोरानें. १३ वाजविल्या. १४ वाद्यविशेष. १५ विवाह लावण्यास.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

लहुडीचक्र । गदा मुद्गल अपार । सर्वे गाढे भार चालिले ॥ ४० ॥ विचित्र शस्त्रांचिया जाती । त्रिशूळ चेंडु झेलिती किती । एक वीर परिघहाती । पागोरे पिटिती भिंडिमाळा ॥ ४१ ॥ गाडे भरोनि अपार शर । सुवर्णबंदी कोदंडभार । ज्यांचा ऐकतां टणत्कार । कांपे थरथर त्रिलोक ॥ ४२ ॥ अस्त्रदेवता समस्ती । मेणेंचि सवें चालती । विपर्यायें वांचला लंकापती । करील शांति सकळांची ॥ ४३ ॥ येणें भयेंकरोनि जाण । समंत्र अस्त्रदेवतागण । स्वयें चालवी दशानन । विचित्र विंदाण सेनेचें ॥ ४४ ॥ ध्वजा पताका अंबरीं । भाले झळकती चवरी । दिव्य छत्रें सैन्यावरी । राक्षसभारीं अति शोभा ॥ ४५ ॥ महामदें दाटले गजघट । वारूंचा वाजिन्नला साट । रथचक्रातळीं सपाट । होती पीठ पर्वत ॥४६॥ पुत्रप्रधानांचें दुःख । स्त्रियेची खस्ता अलोलिक । आठवोनि दशमुख । क्रोधें देख कांपत ॥ ४७ ॥ साधावया श्रीरामासी । रथीं बैसतां रावणासी । रूप वाढिन्नलें आकाशीं । देखतां लोकांसी पळ सुटे ॥ ४८ ॥ सैन्य चालिलें अति गजरीं । यावा दाविला स्वारीं । हो हो मा मा जीजीकारीं । वारू कुसरीं नाचती ॥ ४९ ॥ सैन्य चालिलें घनदाट । अश्वगजांचे पैं थाट । सैन्यरथांचे घडघडाट । रजें अंबर कोंदलें ॥ ५० ॥ दिविं भुवि अंतराळ । दिशांच्या पोकळ्या सकळ । रजें कोंदलें जगतीतळ । रविमंडळ झांकलें ॥ ५१ ॥ दिवसाच पडिला अंधार । रजें बुडाले पैं नेत्र । दुर्निमित्तें थोर थोर । तेथें सत्वर ऊठिलीं ॥ ५२ ॥

निमित्तानि च तत्रासन् भयशंसीनि सर्वतः ।
प्रतिलोमो ववौ वायुर्मंदरश्मिर्दिवाकरः ॥ ६ ॥
सागराश्चुक्षुभुश्चैव चकंपे च वसुंधरा ।
जानुभिः पेतुरश्वाश्च बाष्पबिंदूनथामुचन् ॥ ७ ॥
तानुत्पातानचिंत्यैव रावणः क्रोधमूर्च्छितः ।
सशरं धनुरादाय रणभूमिं विवेश ह ॥ ८ ॥

शिखाकेत अग्निकेत । गगनीं उठिले धूमकेत । तयांमाजी उल्कापात । अकस्मात ऊठिले ॥ ५३ ॥ नक्षत्रें पडती टळटळां । भूकंप होतसे वेळोवेळां । भालू भुंकती समकाळा । अग्निज्वाळा वमूनियां ॥ ५४ ॥ हनुमंतें पूर्वीं प्रबोधिला । तो आठव धरोनि वहिला । प्रतिकूळ वायु सुटला । उडवूं लागला राक्षसां ॥ ५५ ॥ वस्त्रें उडती आकाशा । वायु भरला राक्षसघसां । प्राण परतेना सहसा । थोर दुर्दशा रावणा ॥ ५६ ॥ धुळीं भरले डोळे । स्वसैन्य परसैन्य न कळे । पुढें पाऊलही न उचले । भुलविलें सकळांसी ॥ ५७ ॥ रवि मंदरश्मि झाला पाहीं । दिशा धुंदल्या सर्वेही । सागरींचें जळ तेंही । लवलाहीं उचंबळलें ॥ ५८ ॥ ऐसीं दुश्चिन्हें जितुकीं । सकळही रावणकटकीं । प्रवेशलीं एकाएकीं । तेणें दशमुखी सचिंत ॥ ५९ ॥ म्हणे शंकराचें वचन । मिथ्या करूं शके कोण । यज्ञा उठलिया विघ्न । घात संपूर्ण कर्त्याचा ॥ ६० ॥ तें आजि दिसतें फळ । दुर्निमित्तें जीं प्रबळ । येथें दिसताती सकळ । समग्र दळ व्यापिलें ॥ ६१ ॥ ऐसा झाला सचिंत । दुर्निमित्तें भ्रमीभूत । क्षण एक झाला लंकानाथ । अति आकान्त वर्तला ॥ ६२ ॥ सर्वेंचि सावध होवोनि पाहीं । विचारी आपुल्याच ठायीं । म्हणे दुश्चिन्हीं भय कायी । युद्धाच्या ठायीं शूरासी ॥ ६३ ॥ सुचिन्हामाजी शंकर । तो दुश्चिन्हीं काय गेला दूर । व्यर्थ पामराचा विचार । मी चिंतातुर लटकाचि ॥ ६४ ॥ रांडवे बायलेच्यापरी । चिंतातुर मी शरीरीं । जळो माझी सामर्थ्यथोरी । काय संसारीं जीतसें ॥ ६५ ॥ म्हणोनि झाला सावध । निजसैन्या करीत बोध । मिथ्या उठिलें हें द्वंद्व । त्याचा विषाद न मानावा ॥ ६६ ॥ शिवें पाहों आदरिलें व्रत । युद्धीं लागलिया आघात । रणीं दुश्चित कीं सावचित्त । निश्चितार्थ पाहावया ॥ ६७ ॥ ते शंकरकृपा आम्हांसी । आपेंआप फळली कैसी । आम्हांसंमुख विघ्नांसी । रहावयासी तोंड कैचें ॥ ६८ ॥ बाप कृपाळु शंकर । विघ्न निरसिलें समग्र । भिवों नका चला शीघ्र । नरवानर निवटावया ॥ ६९ ॥ ऐसें सांगोनि सैन्यासी । आश्वासोनि तयासी । संमुख जातां रणभूमीसी । रथ तोंडघसीं आदळला ॥ ७० ॥ विषमस्थळ नसतां

१ कदाचित्. २ आकाशांत. ३ घोड्यांचा. ४ आगमन. ५ सर्पीत. ६ त्वरित. ७ मंदकिरणांचा असा. ८ वांचलों. ९ लढाई. १० भय, दुःख. ११ मारावयास. १२ उंच-सखल.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

जाण । भूमि असतां समान । वारू चालतां स्यंदन । अडखळोन पडियेला ॥ ७१ ॥ आवरितां सारथ्यासी । वारू पडले तोंडघसीं । तेणें चिंता रावणासी । निजमानसीं वर्तली ॥ ७२ ॥ तथापि वीरवृत्ती करून । साटोप धरोनि रावण । वारू उठविले जाण । उदकसिंचन करोनियां ॥ ७३ ॥ अश्वांचिया नेत्रद्वारा । अश्रुबिंदु स्रवती सैरा । ते पुसोनि वेगवत्तरा । रहंवर संजोगिले ॥ ७४ ॥ वीर रावण जगजेठी । विघ्नें घालोनियां पोटीं । धनुष्यबाण धरोनि मुष्टीं । क्रोधें कडकडाटीं चालिला ॥ ७५ ॥ आठवोनि पुत्रांचें निधनें । धाकुटा बंधु कुंभकर्ण । प्रहस्तादि प्रधान । सकळ सैन्य निमालें ॥ ७६ ॥ करोनि तयांची आठवणी । क्रोधें झाला काळाग्नी । प्रवेशला रणांगणीं । देवोनि पाणी सर्वस्वा ॥ ७७ ॥ राज्याशा आणि जीविताशा । सांडूनि भोगाची भोगाशा । सांडूनि ऐश्वर्याची आशा । विरक्त सर्वस्वा रावण ॥ ७८ ॥ केवळ क्रोधाचें निजशरीर । तेणें रूपा आला दशशिर । जेंवी मध्यान्हीं अति उग्र । दिसे खडतर भास्वत ॥ ७९ ॥ माध्यान्हकाळींचा रवी । सहसा होय दुर्निरीक्ष्य जेंवी । तैसा अति क्रोधाविर्भावी । दशग्रीव भासतसे ॥ ८० ॥ अंतरींचें निजसामर्थ्य । तेणें करोनि प्रदीप्त । रणीं गर्जोनि लंकानाथ । काय बोलत रामासी ॥ ८१ ॥

राम त्वं तु समाश्वस्तः समाश्वस्तस्तथाप्यहम् ।
कुर्वे त्वया समं युद्धं तिष्ठेदानीं स्थिरो भव ॥ ९ ॥
वीरश्चास्मि सुसंवृत्तस्त्वत्सकाशादरिंदम ।
क्रमेण परिनिष्ठो ह्यस्तेनाहमपयातवान् ॥ १० ॥
नाहं बिभ्ये सुराणां हि समस्तानामपि प्रभो ।
किं पुनर्वानराणां तु येषामाश्रयिता भवान् ॥ ११ ॥

रामा तुझे पोटीं । युद्ध करणें कडकडाटीं । ते आजि साधिली गोष्टी । झणीं पाठी देवोनि पळसी ॥ ८२ ॥ बहुतां दिवसांची माझी । अँसोसी फळली आजी । राम सांपडला झुंजीं । पुण्यपुंजी फळा आली ॥ ८३ ॥ सावध ऐकें रघुनंदन । होऊं नको पलायमान । जितकी असे आंगवण । तैसें रण करीन आजि ॥ ८४ ॥ पूर्वी मजपासून पळाला । तो मागुतेनि रणा आला । आतांही पळवीन वहिला । ह्मणें या बोला भ्रमसील ॥ ८५ ॥ तरी एक वेळ ऐसें जाहलें । रथसारथी वारू मेले । म्हणोनि पलायन घडलें । तें सर्वथा पहिलें विसरावें ॥ ८६ ॥ मी न भियें देवांसी । दृष्टी नाणीं दानवांसी । तेथें कोण गणी तुम्हांसी । जिहीं वानरांसी आश्रयिलें ॥ ८७ ॥ पालेखाइरीं मर्कटें । रणा आलासी त्यांच्या नेटें । घाव घालतां अवचटें । अति संकटें मराल ॥ ८८ ॥ वीरवृत्तीचा गर्व बहुत । तुजमाजी असे नांदत । तेणें रणवीरां न गणीत । तो पुरुषार्थ आजि दावीं ॥ ८९ ॥ ऐसें बोलतां दशानन । उत्तर नेदी रघुनंदन । जेंवी वायसाचें वचन । सांडी उपेक्षोन राजहंस ॥ ९० ॥ सिंह देखोनि वाडेंकोडें । श्वान भुंके पुढें पुढें । तेंवी श्रीराम रावणाकडे । न पाहे कोडें हांसोनी ॥ ९१ ॥

काकुत्स्थोपि महातेजाः श्रुत्वा रावणभाषितम् ।
न किंचिदुक्त्वा धर्मात्मा तस्थौ संग्राममूर्धनि ॥ १२ ॥
लक्ष्मणः क्षोभयामास धिक्कृत्य तु दशाननम् ।
लक्ष्मणस्य वचः श्रुत्वा संपीडितमनास्तदा ॥ १३ ॥

रावणाच्या तिखट उत्तरीं । राम न भीच रणकेसरी । जेंवी सिंहापुढें कोल्हाळ करी । निजगजरीं शूकर ॥ ९२ ॥ तें देखोनि लक्ष्मण । क्रोधें झाला देदीप्यमान । निर्भर्त्सिला रावण । काळें वदन पैं तुझें ॥ ९३ ॥ निर्लज्जा न लाजसी दशकंठा । हीन दीन संग्रामनष्टा । वृथा वाढलासी मांसें मोठा । धर्मनष्टा दुराचारा ॥ ९४ ॥ वृथा बोल बोलसी किती । करोनि दावीं रणख्याती । जाणवेल तुझी शक्ती । शस्त्रप्रयुक्तिपर्यायो ॥ ९५ ॥ महाशूरांचें लक्षण । करोनि दाविती रणकंदन । वृथा वल्गोनि काय कारण । भुंके श्वान तैसा तूं ॥ ९६ ॥ ऐकोनि सौमित्रवचन । क्रोधें खवळला रावण । घृतें खवळे हुताशन । तेंवी दशानन क्षोभला ॥ ९७ ॥ नेत्र भवंडी गरगरां । दांत खात करकरां । मस्तक पिटी सैरां । या रघुवीरा काय करूं ॥ ९८ ॥ आतां काय करूं विंदान । माजवीन रणांगण । तृप्त करीन भूतगण । तैं रावण मी सत्य ॥ ९९ ॥ ऐसें बोलतां लंकानाथ । भूतें शकुन मानीत । रावणें भूतगण

१ रथ. २ गळती. ३ मरण. ४ भर दुपारीं ५ सूर्य. ६ पळूं नकोस. ७ आतुरता. ८ त्वरित. ९ कावळ्याचें. १० कौतुकानें. ११ कौशल्य. १२ अग्नि.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

तृप्त । भाष्य वदत वाग्देवी ॥ १०० ॥ क्रोधें खवळोनि रावण । धनुष्यमुष्टि सज्जून । वेगीं चढवोनियां गुण । सीतीं बाण लाविला ॥ १ ॥ बाण ओढोनियां कानाडी । गर्जोनियां हांक फोडी । श्रीरामा साहें माझी वोढी । रणनिर्वेडी पुरुषार्थ ॥ २ ॥ तंव उठावलें सकळ दळें । रणीं उठला हलकल्लोळ । भिडती राक्षस गोळांगूळें । युद्ध तुंबळ मांडलें ॥ ३ ॥ राक्षस बळें हाणिती काती । वानर हातें झेलिती । फिरवोनि तेचि ओपिती । लोळविती राक्षसां ॥४॥ राक्षस ओपिती भाले । फुटती वानरांचीं कपाळें । अशुद्धें दिसती बंबाळें । सर्वांग निथळे वानरांचें ॥ ५ ॥ गैरिकादिकें धात । ओहळतां शोभे पर्वत । तेंवी वानरसैन्याआंत । शोभा अद्भुत वानरां ॥ ६ ॥ तुटती वानरकपाळें । पुच्छें कवळोनि बळें । सर्वेंचि भिडती गोळांगुळें । श्रीरामबळें अनिवार ॥ ७ ॥ घावो लागे जेथ जेथ । श्रीरामचरणरज लाविती तेथ । तेणें कानपोनियां खत । नामें गर्जत मारिती ॥ ८ ॥ भाले त्रिशूळ मुद्गर काती । राक्षस निजबळें हाणिती । तें देखोनि जुत्पती । स्वयें विटाविती राक्षसां ॥ ९ ॥ वांकुल्या दावोनि तयांकडे । सर्वेंचि हाणिती पर्वतखडे । नामें गर्जती माकडें । भिडती निवाडें रणमारा ॥ ११० ॥ भिंडिमाळांचे पांगोरे । राक्षस हाणिती तोमरें । धोंडे गुंडे पर्वतशिखरें । घेवोनि वानरें ठोकिती ॥ ११ ॥ वीर खवळले अति क्रोधें । रणीं मातले रणमदें । एक नाचती युद्धछंदें । रणछंदें तळपती ॥ १२ ॥ थरक सरक उड्डाण । ओढणें धडकती तळपोन । वानर देवोनि किराण । नेती हिसडोन हातियेरें ॥ १३ ॥ घायीं पडती वानरगण । ते श्रीरामपदरजेंकरून । तत्काळ होती सावधान । करिती गर्जन रामनामें ॥ १४ ॥ राक्षस पडती घायीं । त्यांसी उठविता कोणी नाहीं । राक्षसांचें सैन्य सर्वेही । वानरीं पाहीं निवटिलें ॥ १५ ॥ श्रीरामाच्या दृष्टीपुढें । महावीर रणीं निधडे । घायीं पडले वाडेंकोडें । भाग्य केवढें सांगों मी ॥ १६ ॥ श्रीरामासंमुख रणांत । युद्धीं वीर ते पडत । त्यांच्या युद्धाचा निश्चितार्थ । सावचित्त परिसावा ॥ १७ ॥ घायीं शिर एक तुटलें । चढोनि इंद्रपदा गेलें । तेथील सुख नश्वर देखिलें । मग परतलें रामाकडे ॥ १८ ॥ श्रीरामदृष्टीपुढें । स्वर्गसुख तें बापुडें । श्रीरामचरणीं सुख गाढें । जन्ममरण पुढें असेना ॥ १९ ॥ एक शिर हो उसळलें । सत्यलोकापर्यंत गेलें । भोगक्षयें पतन देखिलें । मग परतलें रामाकडे ॥१२०॥ आब्रह्मभुवनलोक । भोग तितुका कामनात्मक । ऐसें गीतावचन देख । म्हणोनि शिर परतलें ॥ २१ ॥ शिर उसळलें तुटोन । वैकुंठपर्यंत गेलें उडोन । नावडे एकदेशी स्थान । धिक्कारून परतलें ॥ २२ ॥ सलोकसमीपस्वरूपता । वोसंडोनि सायुज्यता । श्रीरामचरणीं जीव अर्पितां । निजमुक्तता सहजचि ॥२३॥ शिरें तुटोनि झडकरी । उडोनि जाती लोकांतरीं । तेथूनि परतती माघारीं । रामचरणांवरी स्वयें पडती ॥ २४ ॥ श्रीरामचरणांपुढें । वैकुंठ कैलास नावडे । म्हणोनि हरिखें शिर मुरडे । चरणांवरी पडे श्रीरामाच्या ॥ २५ ॥ श्रीराम दृष्टी देखतां । भलत्याचेनि हातें मरतां । चहूं देहां देवोनि लाता । निजमुक्तता पावती ॥२६॥ स्थूळ लिंग आणि कारण । चवथा देह महाकारण । निरसूनि तयांचें भान । श्रीरामचरण सेविती ॥ २७ ॥ शिरें परतोनि मागुती । श्रीरामातें ओंवाळिती । येवोनि चरणांवरी पडती । उत्तीर्ण होती चहूं देहां ॥ २८ ॥ मागिले जन्माचें उसणें । वीर काढिती श्रीरामचरणें । उसण्याघायीं संमुख मरणें । जन्ममरणधरणें उठविती ॥ २९ ॥ तें देखोनि समस्तां । वीरां आवेश बहुतां । युद्ध करितां साटोपता । फाडावया खता जन्माच्या ॥ १३० ॥ युद्ध करितां महावीरीं । सरली शस्त्रास्त्रांची सामग्री । मग मल्लयुद्ध कुसरी । वीरीं वानरीं मांडिली ॥ ३१ ॥ सडका घालिती परस्परीं । थडका हाणिती येरयेरीं । उरीं शिरीं खांदीं कोपरीं । जानूंवरी ताडिती ॥ ३२ ॥ एक ते मागें सरती । छागयुद्धें सर्वेंचि भिडती । अंगींच्या रोमा पिंजारिती । मग मिसळती कुक्कुट जैसे ॥ ३३ ॥ युद्ध करिती विविधें । घारयुद्ध श्येनयुद्ध । महाखराचें खरयुद्ध । मार विविध पैं त्यांचा ॥ ३४ ॥ मागें

१. सैन्य. २ वानर. ३ अकूं लागले, फेंकूं लागले. ४ पावकूं लागलें. ५ काव, गेरु इत्यादि. ६ बरे होऊन.

७ वेडाविती. ८ गोफिणींचे. ९ उड्या. १० शूर. ११ मोठें. १२बोकडाचें युद्ध. १३ नानाप्रकारचें. १४ससाण्यांसारखें युद्ध.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

फिरती वाडेंकोडें । परतोनि हाणिती लाताडें । त्यांसी पायीं धरिती माकडें । भवंडोनि कोडें त्राहाटिती ॥ ३५ ॥ मरतां राक्षस बोलती । श्रीरामें थोर युद्धख्याती । युद्धीं परमानंदप्राप्ती । सायुज्यमुक्ती पावलों ॥३६॥ युद्ध नव्हे हा परमानंद । रण नव्हे आनंदकंद । राम ओळला सच्चिदानंद । अगाध बोध रणरंगीं ॥ ३७ ॥ राम परमामृतपुतळा । राम मुक्तीचा जिव्हाळा । राम आनंदाची कळा । पाळी लळा सकळांचा ॥ ३८ ॥ द्वेषबुद्धीं युद्ध करितां । वैरिया दे सायुज्यता । अगाध बोध रघुनाथा । परमानंदता अरिमित्रीं ॥ ३९ ॥ रावण रामाचा नव्हे वैरी । तारक आमुचा निर्धारीं । ज्याच्या द्वेषबुद्धिकरीं । राम तारी राक्षसां ॥ १४० ॥ वीरां वानरां रणीं । थोर झाली झोंटधरणी । राक्षस निमाले रणीं । रथचक्रश्रेणींसमवेत ॥४१॥ सैन्य निमालें अपरिमित । अश्वगजरथसमवेत । रणकर्दम[1] झाला तेथ । पूर वाहात रुधिराचा ॥ ४२ ॥ मज पाहतां निश्चितार्थ । रुधिर नव्हे तें परमामृत । तयामाजी जे लोटत । ते नित्यमुक्त स्वयें होती ॥ ४३ ॥ मोक्षाचिया आशा जाण । वीर बळेंचि देती प्राण । रणीं वोळला[2] रघुनंदन । निशाचरगणें[3] उद्धरिले ॥ ४४ ॥ बहुसाल सैन्य मरतां । क्रोध आला लंकानाथा । रणीं जिंकावया रघुनाथा । साटोपता चालिला ॥ ४५ ॥ जेंवी पतंग दीपावरी । गज जेंवी केसरीवरी[4] । तेंवी आवेशें दशशिरी । श्रीरामावरी चालिला ॥ ४६ ॥ कुचभाराचें उभारणें । तयाचि नांव पडणें । तेंवी मरावया रावणें । मांडिलें येणें समरंगणीं ॥ ४७ ॥ अति गर्वें गर्वोन्मत्ती । घेवोनि शस्त्रास्त्रसंपत्ती । रावण चालिला रामाप्रती । भेणें कांपती सुरवर ॥ ४८ ॥ सबळ बळें लंकापती । रावणाचा रथ लीलागती । राम एकला पदाती[5] । युद्धख्याती केंवी होय ॥ ४९ ॥ एकाकी भिडतां रावणाप्रती । साह्य न पाहे सांगाती[6] । एकांगवीर रघुपती । करील शांती रावणाची ॥ १५० ॥ संदेह नाहीं ये अर्थीं । राम धर्माची धर्ममूर्ती । सौमित्रा न सांगे सर्वार्थीं । करील ख्याती निजांगें ॥ ५१ ॥ राम कार्य साधील न चुके । रावण निवटील बाणें एकें । सुर सोडवील कौतुकें । भरेल हरिखें त्रैलोक्य ॥ ५२ ॥ कांहीं स्वहितालागीं जाणा । साह्य व्हावें रघुनंदना । म्हणोनियां सहस्रनयना[7] । अवस्था दुणी लागली ॥ ५३ ॥ आजवरी श्रीरामसेवा । अंश घडली नाहीं केव्हां । तेणें आतुडलों दशग्रीवा । घेत सेवा निजबळें ॥ ५४ ॥ तो सूड घ्यावयासी । साह्य होणें श्रीराघवासी । पाचारोनि सारथ्यासी । करवी रथासी सन्नद्ध ॥ ५५ ॥ संजोगोनियां स्यंदन । ठाकूनि जाय रघुनंदन । रथीं करोनि आरोहण । राम रावण निवटील ॥ ५६ ॥ एका जनार्दना शरण । श्रोतीं व्हावें सावधान । पुढील रामरावणांचें रण । अति दारुण परिसावें ॥१५७॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां रावणयुद्धागमनं नाम नवपंचाशत्तमोऽध्यायः ॥ ५९ ॥ ओंव्या ॥ ॥ १५७ ॥ श्लोक ॥ १३ ॥

अध्याय साठावा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ मातली सारथी विचक्षण । घातलें इंद्रा लोटांगण । येरें देतां आज्ञापन । करी संयोजन रथाचें ॥ १ ॥ रावण दुरात्मा चांडाळ । बंदीं घातले सुर सकळ । तेणें अत्यंत तळमळ । लागली प्रबळ मातलीसीं ॥ २ ॥ आपुला स्वामी सुरपती । सेवा घेतो त्याचे हातीं । तेथें येरांची कवण गती । लंकापती भला नव्हे ॥ ३ ॥ तेणें क्रोधें करोनि जाण । केलें रथसंयोजन । शस्त्रास्त्रें सकळ भरून । सामग्री दारुण घातली ॥ ४ ॥ कवचें खड्गें अत्यद्भुत । मंत्र तंत्र क्रियायुक्त । रणसामग्री समस्त । रथ त्वरित सिद्ध केला ॥ ५ ॥ आज्ञा पुसोनि इंद्रासी । मातली निघाला वेगेंसीं । ठाकूनि आला शीघ्रतेसीं । मृत्युलोकासी रणभूमीं ॥ ६ ॥ हातीं घेवोनि धनुष्यबाण । रणीं उभा रघुनंदन । तंव इंद्राचा रथ घेऊन । मातली आपण तेथें आला ॥ ७ ॥ देखोनि श्रीरामासी । सुख झालें मातलीसी । आनंद भरला सर्वांगासी । निजोल्लासीं डुल्लत[8] ॥ ८ ॥ पाहतां श्रीरामाकडे । यम काळ तें

१ युद्धांत झालेला चिखल. २ तुष्ट झाला. ३ राक्षससमुदाय. ४ सिंहावर. ५ पादचारी. ६ सोबती. ७ इंद्राला.
८ हुशार.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

बापुडें। रावण दहा तोंडांचें किडें । वाणझडाडें मरेल ॥ ९ ॥ हें निश्चित माझें वचन । तथापि स्वामीचें आज्ञापन । श्रीरामासी रथनिवेदन । करोनि रावण मारावा ॥ १० ॥ श्यामकर्ण अति शोभत । श्वेत वारुवीं जुंपिला रथ । विचित्राभरणीं अति मंडित । वारू गर्जत शत्रुनिधनें ॥ ११ ॥ चाकें नीळाचीं अति कठिन । सुवर्णबंदी शोभायमान । आंख वज्राचा सुलक्षण । रथचक्रीं पूर्ण बोलिला ॥ १२ ॥ धुरा वैडूर्याच्या सुरेखा । सांटा पाचुबंदी नेटका । मरकतांचा ध्वज देखा । लोलां पताका शोभती ॥ १३ ॥ ज्वाळमाळा किंकिणी । घंटा वाजती गजरेंकरोनी । खणाणिला रत्नाभरणीं । श्रीरामालागूनी आणिला ॥ १४ ॥

तं रथं समुपादाय मातलिः शक्रसारथिः ।
अभ्यद्रवत काकुत्स्थमवतीर्य त्रिविष्टपात् ॥ १ ॥
अब्रवीदग्रतो रामं सप्रतोदो रथे स्थितः ।
प्रांजलिर्मातलिर्वाक्यं सहस्राक्षस्य सारथिः ॥ २ ॥

सूर्यप्रभेसमान । सायुध रथ सांगत्राण । मातली घेवोनि आला जाण । रघुनंदन जेथें होता ॥ १५ ॥ हातीं आसूड वांगोरी असतां । रथाखालीं उतरतां । नमन केलें रघुनाथा । अति चतुरता सारथ्याची ॥ १६ ॥ सारथ्याचा धर्म ऐसा आहे । रणामाजी निघोनि पाहें । साश्वरथ सोडूं नये । नमिता होये वरूनचि ॥ १७ ॥ एक स्वामी रघुनाथा । तुझा अवतार सुरकार्यार्थी । वधावया लंकानाथा । रणा तत्त्वतां आलासी ॥ १८ ॥ देव घातले बांदवडीं । देखोनि त्यांची करुणा गाढी । धांविन्नलासी निजप्रौढी । अति कडाडीं रघुनाथा ॥ १९ ॥ रणामाजी लवडसवडी । निवटिल्या राक्षसकोडी । नाचविली रणधांगडी । अर्धघडी न लागतां ॥ २० ॥ आतां निवटिल्या रावण । मग आमुचें कार्य कोण । साह्य न होऊंचि रघुनंदन । सहस्रनयना अति लज्जा ॥ २१ ॥ म्हणोनि दास्यालागीं तत्त्वतां । रथ पाठविला रघुनाथा । यावरी बैसोनियां आतां । लंकानाथा निवटावें ॥ २२ ॥ रावण रथी राम पदाती । हें न साहेचि देवांप्रती । म्हणवोनियां रघुपती । रथ तुजप्रती पाठविला ॥ २३ ॥ तुज न लागे रथ सारथी । निजांगें करोनि ख्याती । निवटावया लंकानाथाप्रती । निमेषगती लागेना ॥ २४ ॥ ऐसें जाणतसों सकळिक । तरी इंद्र सेवेलागीं देख । रथ पाठवी सुरनायकें । बैसोनि दशमुख निवटावा ॥ २५ ॥ तुज विजयालागीं रघुपती । सकळ शस्त्रास्त्रसंपत्ती । पाठविली अमरपती । लंकापती निवटावया ॥ २६ ॥

इदमैंद्रं महाचापं कवचं चाग्निसन्निभम् ।
शराश्चादित्यसंकाशाः शक्तयो विमलाः सिताः ॥ ३ ॥
आरुह्य च रथं राम राक्षसं जहि रावणम् ।
मया सारथिना सार्द्धं महेंद्र इव दानवान् ॥ ४ ॥

हें घे इंद्राचें महाधनुष्य । शत्रुनिर्दळणीं कर्कश । ओढी काढोनि सावकाश । दशमुखास निवटावें ॥ २७ ॥ अग्निप्रभेसमान जाण । हें घे अंगत्राण । आंगीं घालोनि आपण । शत्रुनिर्दळण करावें ॥ २८ ॥ सूर्यप्रभेसमान शर । रुक्मपुंखी सपरिकर । चापीं सज्जोनि वेगवत्तर । दशवक्त्र निवटावा ॥ २९ ॥ अति मोहका विमलशक्ती । रणीं दुर्धर शत्रुघाती । तुज पाठविल्या अमरपती । रघुपती महावीरा ॥ ३० ॥ मजसमवेत रघुपती । बैसोनियां येचि रथीं । महेंद्र निवटी दानवपंक्ती । तेंवी लंकापती निवटावा ॥ ३१ ॥ ऐकतां मातलीचें वचन । हांसोनि बोले रघुनंदन । रथसारथियाचें कार्य कोण । मजलागून रणरंगीं ॥ ३२ ॥ रावण बापुडें मशक । दहा मुखांचें किडें देख । त्यासाठीं काय साधक । न लागतां निमेख निवटीन ॥ ३३ ॥ म्हणोनि राम हास्यवदन । तें जाणोनियां चिन्ह । पुढें झाला बिभीषण । अति विचक्षण बोलका ॥ ३४ ॥ जाणे श्रीरामाचें बळ । रणसंग्राम रणशीळ । न लागतां अर्ध पळ । राम निवटील रावणासी ॥ ३५ ॥ तरी इंद्राचें मनोगत । रक्षावें जी निश्चित । म्हणोनियां अति विनीत । स्वयें प्रार्थीत श्रीरामा ॥ ३६ ॥ करकमळ जोडूनि पाहीं । मस्तकांजळी लवलाहीं । लागला

१ सांगाडा. २ पाचेचा. ३ हालणाऱ्या. ४ अग्निज्वालेसमानें देदीप्यमान. ५ चाबूक. ६ कवचासह. ७ व्याम. ८ रणकल्लोळ केला. ९ क्षणभरही अवकाश. १० देवांचा राजा इंद्र. ११ कवच.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

श्रीरामाच्या पायीं । विनंती कांहीं परिसावी ॥ ३७ ॥ रथारूढ रघुपती । रणामाजी रणख्याती । करितां देखावा अति प्रीतीं । ऐसें चित्तीं बहुतांचे ॥ ३८ ॥ राम अलंकारा भूषण । राम रथा रथगति जाण । शस्त्रास्त्रांचें मारकपण । स्वयें आपण श्रीराम ॥ ३९ ॥ ज्यासी नाहीं नांवरूप । वेदांसी न कळे स्वरूप । तेणें आम्हांसाठीं धरोनि रूप । भक्तसंकल्प पुरवीत ॥ ४० ॥ निजभक्तांचें मनोगत । संरक्षावें यथातथ्य । हें श्रीरामाचें निजव्रत । निश्चितार्थ वेदवाणी ॥ ४१ ॥ आपुले निजच्छंदें । निजभक्त कल्पिती विनोदें । तितुकें अंगीकारी स्वानंदें । अद्वैतद्वंद्वें घेवोनी ॥ ४२ ॥ लाडकिया भक्तांची स्थिती । युक्तायुक्त नेणती । तरी अंगीकारी रघुपती । भक्तप्रीतीं भूलला ॥ ४३ ॥ अनावरासी अधिष्ठान । सर्वगतासी आवाहन । चिदंबरा प्रावरण । मूर्ख जन कल्पिती ॥ ४४ ॥ अधिष्ठानासी आसन । कल्पिती अबळ भक्तजन । तथापि लाजेना रघुनंदन । पीतवसन अंगीकारी ॥ ४५ ॥ श्रीराम सकळांचा शेवट । त्यासीही कल्पिती मुकुट । आभाळासी मळवट । श्रवणपाठ अश्रोत्रा ॥ ४६ ॥ विश्वमुखासी संख्यात्मक । वाणीचें कल्पिती मुख । एक्या अवदानें तृप्ति देख । मानिती आवश्यक नित्यतृप्ता ॥ ४७ ॥ विश्वबाहूसी परिमित हात । विश्वहृदय हृदयीं रिघत । स्रक्चंदनादि समस्त । भोग अर्पिती निजावडीं ॥ ४८ ॥ ज्यामाजी अनंत ब्रह्मांड खेळे । तो भक्तभावार्थमेखळे- । -माजी सकळां आकळे । निजभक्तलळे पाळीत ॥ ४९ ॥ श्रीराम सकळांची गुह्यराशी । झांकावया त्याच्या गुह्यासी । पीतांबर अर्पिती प्रेमेंसीं । येरू आवेशीं ओढीत ॥ ५० ॥ अचरणा कल्पिती चरण । जें त्रिवेणीचें जन्मस्थान । तेथें घालिती वाणीचें जीवन[३] । चरणक्षाळण करावया ॥ ५१ ॥ श्रीराम लेणियांचें लेणें । त्यासी देती रत्नभूषणें । त्यां अंगिकारिसी प्रेमें जेणें । रथ भावें तेणें अंगीकारीं ॥ ५२ ॥ म्हणोनि घातलें लोटांगण । देखोनि राम हास्यवदन । वेगें उठोनि आपण । हृदयीं धरोन आलिंगिला ॥ ५३ ॥ अति चतुर बोलका होसी । म्हणोनि धरिला पोटासीं । अंगीकारोनि वचनासी । आरोहणासी सरसावला ॥ ५४ ॥ तंव सुग्रीव राजा सुबुद्धी । अलंकार अर्पिले उदधी[५] । ते आणिले तेच संधीं । स्वामी हे आधीं अंगीकारीं ॥ ५५ ॥ तंव अंगदही उठावला । लोटांगण घालोनि वहिला[६] । श्रीराम स्वयें विनविला । ऐकावें बोला सकळांच्या ॥ ५६ ॥ तंव विनविलें मारुती । जे विनविताती जुत्पती । तें ऐकावें रघुपती । वचन मानिती श्रीराम ॥ ५७ ॥ अंगीकारोनि भूषणां । रथासी घालोनि प्रदक्षिणा । नमन करोनियां जाणा । केलें आरोहणा रथावरी ॥ ५८ ॥

इत्युक्त्वा स परिक्रम्य रथं तमभिवाद्य च ।
आरुरोह रथं रामस्तदा लक्ष्म्या विराजयन् ॥ ५ ॥
ततोऽभवन्महद्युद्धं सर्वेषां रोमहर्षणम् ।
राघवस्य महाबाहो रावणस्य च रक्षसः ॥ ६ ॥

सालंकार रघुपती । बैसतांचि इंद्ररथीं । बाणली वीरश्री पुरती । दुर्धर शक्ती भासत ॥ ५९ ॥ प्रकाश पडला सोज्ज्वळ । दिशा उजळल्या सकळ । उजळलें नभोमंडळ । सुर सकळ आनंदले ॥ ६० ॥ रथचक्रांचा घडघडाट । वारूँचा वाजिन्नला साट । हांक फुटली अचाट । रजें अंबर कोंदलें ॥ ६१ ॥ भारें मेदिनी दाटली । वराहाची दाढ तडकली । फडा शेषाची दडपली । लवविली मान कूर्में ॥ ६२ ॥ होतें सुरवरांचे चित्तीं । तें संपादिलें रघुपतीं । आनंदमय झाली वृत्ती । तेणें डुल्लती आनंदें ॥ ६३ ॥ रणीं विराजमान रघुपती । तेणें आनंदमय झाली वृत्ती । हनुमान येवोनि शीघ्रगतीं । जीवें रघुपती ओंवाळिला ॥ ६४ ॥ इटिमिटी घे बिभीषण । अंगदें केलें निंबलोण । सुग्रीवें येवोनियां जाण । श्रीरामचरण वंदिले ॥ ६५ ॥ नळ नीळ जांबवंत । जुत्पति हरिखले समस्त । पर्वत घेवोनि झेलीत । रावणघात करावया ॥ ६६ ॥ युद्धीं जिंकोनि परशुरामासी । रामें पाठवितां तपासी । क्रोध होता तयापासीं । तो श्रीरामासी अर्पिला ॥ ६७ ॥ श्रीराम शांतीचें कल्याण । त्यासी क्रोध कैंचा जाण । परशुरामें अर्पिला आपण । तेणें रघुनंदन सक्रोध ॥ ६८ ॥ जमदग्नीच्या तपःसामर्थ्यें । परशुरामाच्या पुरुषार्थें । अनुसरोनि श्रीरामातें । राक्षस-

१ अमर्याद अशाला. २ कर्णरहिताला. ३ पाणी. ४ चढण्याला. ५ समुद्रानें. ६ सत्वर. ७ घोड्यांचा. ८ आकाश.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

निधनातें खवळला॥६९॥ तेणें क्रोधें रघुवीर। दिसे जैसा काळाग्निरुद्र। तैसा भासत भयासुर। दशवक्त्र निवटावया॥७०॥ तैसाचि रावण महावीर। क्रोधें खवळला दशवक्त्र। सिंहनादें गर्जे थोर। रहंवर प्रेरिला॥ ७१॥ पाचारोनि श्रीरामासी। बाण वर्षला वेगेंसीं। मेघीं आच्छादिलें पर्वतासी। तैंवी श्रीरामासी झांकिलें॥७२॥ श्रीरामें करोनियां लाघव। बाणें बाण निवारिले सर्व। तेणें क्षोभोनि दशग्रीव। मानी अपूर्व लघुवेग॥७३॥ मग विचारिलें मानसीं। अहाच कळी न चले यासीं। मग समंत्र अस्त्रातें हातवसी। श्रीरामासीं भिडावया॥७४॥ अभिमंत्रोनि पन्नगास्त्र। रुक्मपुंख काढिले शर। संख्यारहित अनिवार। चापीं सत्वर सज्जिले॥७५॥ तें संधान देखोनि दुरोनी। श्रीराम नेटका विंदानी। गरुडास्त्र योजिलें गुणीं। केली भंगाणी पन्नगांची॥७६॥ निरसोनि पन्नगांचे भार। गरुडें गिळिले विखार। झडपूं लागला निशाचर। करीत संहार सैन्याचा॥७७॥ राक्षसमुंडें धरणीहूनी। गरुड खुडोनि ने गगनीं। चकित झाला दशाननी। अभिनव करणी देखोनी॥७८॥ अत्यंत क्षोभला लंकापती। अग्निशस्त्र काढिलें निगुतीं। अभिमंत्रोनि मंत्रोक्तीं। लाविलें सीतीं अति वेगें॥७९॥ गुणीं ओढोनि कानाडी। बाण सोडितां झडाडी। डोळियां पडली झांपडी। अग्नि धडाडी देखिला॥८०॥ भडके उठले प्रबळ। ज्वाळीं व्यापिलें अंतराळ। गरुड जाळिले सकळ। अग्नि प्रबळ खवळला॥८१॥ शिखा वाढल्या अलोलिक। जाळूं पाहती सत्यलोक। तें देखोनि रघुकुळटिळक। सत्वर देख सरसावला॥ ८२॥ भडभडां जळती वानर। ते स्मरती श्रीरामचंद्र। सैन्य निमालें समग्र। अझूनि विचार तो कायी॥८३॥ म्हणोनि खवळला रघुपती। कंकपत्री बाण निगुतीं। काढोनि लाविला सीतीं। मंत्रशक्तीसमवेत॥ ८४॥ बाणीं योजिलें पर्जन्यासी। क्षणें विझविलें अग्नीसी। त्याहीमाजी युक्ति कैसी। वानरांसी उल्हास॥८५॥ अमृतवृष्टि वानरां। तेचि राक्षसां वज्रधारा। श्रीराम लाघविया खरा। वानरभारा वांचविलें॥८६॥ एकेचि संधानें रघुपती। नवल केली युद्धख्याती। एका मुक्ति एका विश्रांती। समान प्राप्ती अरिमित्रीं॥८७॥ पर्जन्यवृष्टि वज्रधारा। तेणें मोक्ष निशाचरां। तेचि अमृतवृष्टी वानरां। नवल रघुवीराचें करणें॥ ८८॥ नाम स्मरतां रघुवीर। ताप निमाला समग्र। वानर विश्रांति बाह्यांतर। करीत भुभुःकार ऊठिले॥ ८९॥ भुभु या शब्दाचा अर्थ। पुनः पुनः रघुनाथ। अनिमेषें जे स्मरत। ते नित्यमुक्त संसारीं॥९०॥ त्यांसी वर्ततां देहगेहीं। संसारभय अणुमात्र नाहीं। सकळ विषयांच्या ठायीं। निर्विषय पाहीं विचरत॥९१॥ हा वानरांचा निश्चय पूर्ण। म्हणोनियां रामस्मरण। अहर्निशीं करितां जाण। क्षण क्षण सावध॥९२॥ वैरीकडे रावणकटक। पर्जन्यें निमालें सकळिक। वज्रप्राय थेंबुटा एकैक। लागतां देख निमताती॥९३॥ ऐसें बहुसाल सैन्य मरतां। अति चिंता लंकानाथा। जें तें शस्त्र जातें वृथा। श्रीरघुनाथा कैंवी जिंकों॥ ९४॥ अति वृष्टि व्हावया दूरी। रावण वाय्वस्त्र प्रेरी। हांक देवोनि दशशिरी। रणामाझारीं गर्जत॥९५॥ मेहुंडें उडालें तत्काळ। वायु सुटला प्रबळ। उडवीत आला वानरदळ। गोळांगूळ त्रासिले॥९६॥ दोहीं डोळां भरली धुळी। गात्रें कांपती चळचळीं। नेट न धरवे पायांतळीं। वानर अंतराळीं उडविले॥९७॥ आवर्तें सुटला भारी। वानर भ्रमती गगनांतरीं। तें देखोनि कपिकेसरी। कोपें करीं खवळला॥९८॥ करोनि नामाचा भुभुःकार। पुढें होवोनि हनुमान वीर। पितृस्नेहें कळवळिला थोर। काय उत्तर बोलत॥९९॥ वायु हनुमंताचा पिता। तेणें त्यासी तो म्हणे ताता। वैभव नेणतां रघुनाथा। निजघाता पावसी॥१००॥ श्रीरामें सोडोनियां बाण। उडविलें शून्याचें शून्यपण। तेथें तुम्हांसी वांचवी कोण। गमनागमनसंचारा॥१॥ तूं आमुचा निजपिता। म्हणवोनि भीड रघुनाथा। नाहीं तरी करिता तुझ्या घाता। क्षणही तत्त्वतां लागेना॥२॥ ताता पूर्वसंकल्प तुझा। जे सेवेलागीं रघुराजा। युद्धीं भिडतां राक्षससमाजा। प्रतिकूळ सहजा मी त्यांसीं॥ ३॥ तें तूं नाठविसी जरी। श्रीरा-

१ रथ. २ हातांत घेतलें, स्वीकार केला. ३ सपास्त्र. ४ सर्पांची. ५ सर्प. ६ ज्वाळा. ७ तरवारीची धार. ८ शत्रु आणि मित्रांना. ९ मेघ, पर्जन्य. १० वानर. ११ वाहुटळ.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

माच्या बाणधारीं । तुझी होईल बोहरी । क्षणामाझारीं प्रभंजना ॥ ४ ॥ ऐकतां हनुमंताचें उत्तर । मंत्रदेवता वेगवत्तर । येवोनि नमिला रघुवीर । फिरली सत्वर रावणावरी ॥ ५ ॥ सोडूनि वानर सकळ । आकळिलें राक्षसदळ । आवर्त सुटला सबळ । प्राणान्त केवळ मांडला ॥ ६ ॥ वायुबळें सबळ प्राण । तो वायु क्षोभला आपण । आतां राक्षसां राखे कोण । दशानन सचिंत ॥ ७ ॥ उफराटें झालें कोडें । माझींचि अस्त्रें मजकडे । फिरोनियां वाडेंकोडें । सैन्य निवाडें निवटीत ॥ ८ ॥ तें देखोनि श्रीरामासी । हांसों आलें निजउल्हासीं । अतर्क्य युक्ती हनुमंतासी । म्हणोनि पोटेंसीं धरियेला ॥ ९ ॥ येरीकडे वीर रावण । मरतां देखोनियां सैन्य । वायु निवारावया आपण । पर्वतास्त्र पूर्ण आड घाली ॥ ११० ॥ तेणें बुजोनि सांडिला वारा । सावध करितां निशाचरां । श्रीराम लाघविया खरा । योजिलें वज्रास्त्रा विनोदें ॥ ११ ॥ सोडूनि विषूचिकास्त्र । त्यांत योजिलें वज्रास्त्र । वज्रें पर्वत करोनि चूर । रणीं समग्र त्रासिले ॥ १२ ॥ विषूचिकेचें बळ दुर्धर । घोळसिला राक्षसभार । तरळा झालिया वेगवत्तर । वीरें वीर पडियेले ॥ १३ ॥ हागी ओगी सुटली रणीं । वीर सरती दोहीं वदनीं । वस्त्रें घाणती पोहणीं । उठली घोंगाणी रणरंगीं ॥ १४ ॥ एक गडबडां लोळती । एक डोळे वटारिती । एक हात पाय ताणिती । सकळ जुत्पती हांसती तेव्हां ॥ १५ ॥ हांसतसे बिभीषण । हांसतसे लक्ष्मण । हांसतसे वायुनंदन । नवल काय श्रीरामीं ॥ १६ ॥ हरिखल्या वानरकोडी । राम निजयोद्धा निजगडी । रणीं नाचविली रणधांदडी । राक्षसकोडी निवटिल्या ॥ १७ ॥ तेणें खळबळिला रावण । ते विषूचिका धांवोन । वेगीं आली ठाकून । दशानन जेथें होता ॥ १८ ॥ तेणें झाला वमनोद्गार । ताणताती वीसही नेत्र । वमनउसळीची धार । लागली थोर दशमुखा ॥ १९ ॥ विकळ होतां दशानन । वेगें स्मरला त्रिनयन । तेणें विषूचिका निरसोन । केलें सावधान रावणा ॥ १२० ॥ सर्वेचि खवळोनि दशशिर । एके वेळे शस्त्रसंभार । वर्षता झाला अपार । श्रीरघुवीर लक्षोनि ॥ २१ ॥ दंडास्त्र आणि खंडास्त्र । वितंडास्त्र आणि प्रचंडास्त्र । घातनास्त्र आणि पातनास्त्र । दशवक्त्र वर्षला ॥ २२ ॥ एके वेळे शस्त्रकल्लोळ । रणीं उठला हलकल्लोळ । खळबळिलें वानरदळ । प्रळयकाळ मांडला ॥ २३ ॥ शस्त्रें कडाडिलीं आकाशीं । अग्निज्वाळा दशदिशीं । प्रळय मांडिला सकळांसी । अंतकासी आकान्त ॥ २४ ॥ वानर पळती दशदिशा । एकाचा दाटला घसा । एकीं सांडियेला धिंवसा । रणीं लंकेशा देखोनी ॥ २५ ॥ घालिती येरयेरां मिठी । झोंबती हनुमंताचे कंठीं । आम्हां सोडवीं रणसंकटीं । प्राण कंठीं उरलासे ॥ २६ ॥ जरी प्रार्थूं श्रीरामासी । तरी भीड न वचे आम्हांसी । प्रार्थोनियां राघवासी । अस्त्रघातासी निवारीं ॥ २७ ॥ ऐसें बोलोनि वानरवीर । भयातुर झाले समग्र । मिळोनि जुत्पती थोर थोर । देती धीर कपींसी ॥ २८ ॥ तें देखोनि रघुनाथ । क्रोधें झाला पैं कृतान्त । निवारावया अस्त्रघात । लाघव करीत तें ऐका ॥ २९ ॥ संधानामाजी संधान । करिता झाला रघुनंदन । अस्त्रें अस्त्र निवारून । धनुष्य जाण छेदिलें ॥ १३० ॥ अदंडें दंडिलें दंडासी । अखंडें खंडिलें खंडासी । संजीवनें घातनासी । अस्त्रें अस्त्रासी दंडिलें ॥ ३१ ॥ रावणशस्त्रें अति अवघड । वितंडास्त्र आणि प्रचंड । त्यावरी घातलें अकांडकांड । केलें खंडविखंड पैं तेणें ॥ ३२ ॥ राम धनुर्वाडा विचक्षण । दारुणास्त्रें निवारून । रावणाचें धनुष्य जाण । न लागतां क्षण छेदिलें ॥ ३३ ॥ अद्वैत साधोनि विंदान । पातनासी केलें पतन । पतनीं पडावया जाण । रितें गगन असेना ॥ ३४ ॥ तेणें तळमळी रावण । वृथा गेलें अस्त्रसंधान । हातींचें छेदिलें धनुष्यबाण । राम दारुण रणयोद्धा ॥ ३५ ॥ रागें दोनी हात चुरी । आणिक धनुष्य सज्जिलें करीं । तें छेदिलें झडकरी । बाणधारीं श्रीरामें ॥ ३६ ॥ आणीक धनुष्य आणवीत । तेंही छेदी श्रीरघुनाथ । संख्या झाली शतें शत । धनुष्यें समस्त वेंचिलीं ॥ ३७ ॥ तेणें तळमळी दशाननी । वायां गेली उग्र करणी । शंख करी दशवदनी । राम रणीं नाटोपे

१ नाश. २ हे वायो. ३ योजलेली युक्ती. ४ विषूचिका=महामारी. ५ हगओकीचा विकार. ६ दुर्गंधीनें. ७ घों घों असा शब्द. ८ शंकर. ९ धैर्य. १० यम. ११ मोठा धनुर्धर. १२ खर्ची पडलीं.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ ३८ ॥ हरिखेला वानरभार । अवघे करिती भुभुःकार । स्वर्गी मिळोनि सुरवर । जयजयकार करिताती ॥ ३९ ॥ दुष्ट दुराचारी रावण । श्रीराम रणयोद्धा दारुण । अप्रतिम मल्ल दोघे जण । दोघे विचक्षण रणरंगीं ॥ १४० ॥ त्यांचें पहावया रण । यक्ष गंधर्व सिद्ध चारण । स्वर्गीं मिळाले सुरगण । पुष्पवृष्टी जाण तिहीं केली ॥ ४१ ॥ वानर नाचती पैं रणीं । उडती उलटया किराणीं । श्रीराम विजयी रणांगणीं । दशवदनी निवटिला ॥ ४२ ॥ अवघे करिती जयजयकार । नामें गर्जती वानर । तेणें दुखावला दशशिर । लाज थोर पैं झाली ॥ ४३ ॥ दांत करकरां खात । रागें दोनी हात चुरीत । परिघ घेतला गुरुदत्त । लक्षूनि रघुनाथ हाणावया ॥ ४४ ॥ तंव गुरूचाही निजगुरु । राम परात्पर सद्गुरु । तयावरी शस्त्रसंहारु । मूर्ख दशशिरु करूं पाहे ॥ ४५ ॥ तरी नीतीची नीति रघुनंदन । राम शास्त्रीं शास्त्रार्थ पूर्ण । गुरुनाम ऐकतां जाण । शस्त्रप्रहार आपण आवरिला ॥ ४६ ॥ जगद्गुरु जनीं जनार्दन । व्यापक गुरुनामें म्हणोन । तें ऐकतां रघुनंदन । अवज्ञा हेळण न करीच ॥ ४७ ॥ जेथें गुरुआज्ञापरिपाळण । तेथें सर्वदा विजय पूर्ण । गुरु संरक्षिता आपण । निजगणा विघ्न शिवों नेदी ॥४८॥ परिघ सोडितां रावण । कडाडिलें त्रिभुवन । आकान्तले सुरगण । विमानें तुटोन पडों पाहती ॥ ४९ ॥ उमा शंकरातें आकळी । दिग्गजांचीं बैसलीं टाळीं । प्रळयकाळा दांतखिळी । झांपडी पडली सुरसिद्धां ॥१५०॥ इतुकें देखोनि विंदान । उगाचि पाहतो रघुनंदन । गुरुअवज्ञा न करीच जाण । शस्त्रें दारुण असतांही ॥ ५१ ॥ परिघ येवोनि तत्त्वतां । ओंवाळोनि रघुनाथा । ध्वजीं आदळोनि अवचिता । पडिला खालता आज्ञाबळें ॥५२॥ परिघ ज्ञाता संपूर्ण । उभयआज्ञासंरक्षण । इंद्राचा ध्वज छेदून । तळीं आपण पडियेला ॥५३॥ तंव झाला हाहाकार । खळबळिला वानरभार । सुरवरां आकांत थोर । चिंतातुर सहस्राक्ष ॥५४॥ सकळीं संतोष मानिला होता । राम निवटील लंकानाथा । बंदीमोचन समस्तां । श्रीरघुनाथाचेनि घर्मे ॥५५॥ तें झालें वाताहत । परिघ पातला कंदन करीत । कैंवी वांचेल रघुनाथ । थोर आकान्त सकळिकां ॥५६॥ ध्वज तोडोनियां तरी । परिघ परतो हा झडकरी । श्रीराम वांचे जीवें जरी । तरी मारील रावणा ॥५७॥ श्रीराम रणदिवाकर । रणीं उगवता प्रकाशकर । रावणराहु वेगवत्तर । येवोनि सत्वर गिळियेला ॥ ५८ ॥ आमुची पुण्यसामग्री जितुकी । श्रीरामा पावो असकीं । राम पडिला रावणमुखीं । तो एकाएकीं सुटावा ॥५९॥ ऐसे झाले चिंतातुर । तंव परिघें वेगवत्तर । नमियेला श्रीरामचंद्र । अस्त्रा अस्त्र श्रीराम ॥१६०॥ राम शस्त्रास्त्रांचें निज । राम मंत्रांचें निजबीज । राम वीराधिराज । राम सहज परब्रह्म ॥६१॥ राम चैतन्याची मूर्ती । राम शस्त्राची मारक शक्ती । तो राम असतां रथीं । रावण तें किती बापुडें ॥ ६२ ॥ परी कृपाळु भक्तजना । खेळवीतसे रावणा । हावभरी करोनि जाणा । दशवदना निवटील ॥ ६३ ॥ एका जनार्दना शरण । श्रीरामरथींचा ध्वज जाण । वेगें छेदोनि रावण । करीत गर्जन ऊठिला ॥१६४॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां रघुनाथध्वजच्छेदनं नाम षष्टितमोऽध्यायः ॥ ६० ॥ ओंव्या ॥ १६४ ॥ श्लोक ॥ ६ ॥

अध्याय एकसष्ठावा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ परिघें नमिला रघुपती । तें न देखेच लंकापती । अति गर्वाची गर्वोन्मत्ती । अंधवृत्ती होवोनि ठेली ॥१॥ गर्वें गर्जत रावण । श्रीरामातें लक्षून । झणें करिसी पलायन । दशानन देखोनी ॥ २ ॥ वानरांचा आश्रय धरून । मजसीं करूं आलासी रण । त्यांसहित तुज निवटीन । अर्धक्षण न लागतां ॥३॥ आम्हां राक्षसांचें भक्ष । देखा मनुष्य प्रत्यक्ष । वानरभार सावकाश । कोशिंबिरीस न पुरती ॥ ४ ॥ ते तुम्ही आज मजसीं । रणीं भिडलां रणमारेंसीं । तैं उबगलेती जगासी । पाहूं आतां पुरुषार्था ॥५॥ स्त्रियें मारिलें ताटकेसी । मारिलें मारीच मृगासी । इतुक्यासाठीं आपणासी । संभावितोसी वीरवृत्ती ॥ ६ ॥ जुनें कीडखादलें कांबिट । ओढितां मोडलें अवचट । तेणें बळें वीर उद्भट । तुज मर्कट मानिती

---

१ आनंदला. २ उड्यांनीं. ३ शस्त्रविशेष. ४ पार्वती. ५ शाळिंगी. ६ इंद्र. ७ संपूर्ण. ८ वीरश्रेष्ठ. ९ कंटाळलेत.

१० समजतोस.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ ७ ॥ बापुडें परशुराम ब्राह्मण । त्यापुढें तुझी आंगवण । वनीं धाडिलें भेडसावून । तें विंदान येथें चालेना ॥ ८ ॥ युद्ध न करवेचि समरांगणीं । वाळी मारिला कपटेंकरोनी । तेणें निर्भर्त्सिलें ते क्षणीं । लाज मनीं असेना ॥ ९ ॥ नळाच्या हातीं तरती शिळा । तो सेतु रामें बांधिला । मूर्ख बोलती या बोला । ताठा चढला तुज तेणें ॥ १० ॥ आतां जाणवेल बळ । करोनि दावीं रणकल्लोळ । म्हणोनि गर्जत तोंडाळ । परी मनीं प्रबळ धुकधुक ॥११॥ जैंवी कां पुळियीचा कांटा । पुढें तिखट मागें पोंचटा । तैंवी रावण वीर लाठा । रणचौहटां गर्जत ॥ १२ ॥ येरीकडे रघुनंदन । ध्वज तुटला देखोन । तळीं उतरला आपण । रणकंदन करावया ॥१३॥ म्हणोनियां स्यंदन । स्वयें सोडी रघुनंदन । रथाचें मज कार्य कोण । करीन रण निजांगीं ॥ १४ ॥ आरूढोनि रथासी । जरी निवटीन रावणासी । लौकिकीं प्रथा होईल ऐसी । सामर्थ्य रामासी असेना ॥ १५ ॥ रथबळेंकरोनि जाण । रणीं निवटिला रावण । एवढी अपकीर्ति साहे कोण । म्हणोनि आपण उतरला ॥१६॥ तें देखोनि रावण । अधिक गर्जे संतोषोन । राम विरथी केला जाण । हांक फोडून गर्जत ॥ १७ ॥ अहंरावण निजमदेंसीं । सज्जोनि निर्वाणशस्त्रांसी । वेगीं चालिला क्रोधावेशीं । रणीं रामासीं भिडावया ॥ १८ ॥ निजाभिमानाची सामग्री । रावणें घेवोनि झडकरी । पतंग झेंपावे दीपावरी । तैंवी श्रीरामावरी चालिला ॥ १९ ॥ देखोनि रावणाच्या बळा । स्वर्गीं सुटला खळबळा । आकान्त सुरसिद्धां सकळां । जगतीतळा आकान्त ॥ २० ॥ दुर्धर देखोनि रावण । स्वर्गीं सुरसिद्धगण । मिळोनियां सकळ जन । विष्णूचें स्तवन आरंभिलें ॥ २१ ॥ धांव पाव गा अच्युता । भक्तवत्सला अनाथनाथा । पावावें सुरकार्यार्था । लंकानाथा निवटावया ॥ २२ ॥ साह्य होवोनि श्रीरामासी । निवटोनियां लंकेशासी । संरक्षावें निजभक्तांसी । बंदीमोचनासी करवोनी ॥ २३ ॥ राम वधीना रावण । तैं बंदीमोचन करी कोण । कष्टताती सुरगण । त्यांचें स्थापन करावें ॥ २४ ॥ ऐसी भाकितां करुणा । केलों सरली रघुनंदना । देवांचा देव रामराणा । सुखी सुरगणा करीतसे ॥२५॥ राम रणरंगधीर । सुखी करावया सुरवर । हातीं धरोनि धनुष्यशर । वधावया दशशिर तिष्ठत ॥ २६ ॥ विचित्र शस्त्रें विंदंधें । रावण हाणी निजमदें । राम छेदील निमेषार्धें । श्रोते आनंदें परिसोत ॥ २७ ॥ आत्माराम अहंरावण । दोघांचें युद्ध अति दारुण । अंतरक्रियेचें विंदान । सावधान परिसावें ॥ २८ ॥ महामायेचें करोनि लाघव । बंदीं घातले इंद्रादिदेव । सेवा घेतसे अपूर्व । नित्य विषय भरडणें ॥ २९ ॥ सेविलेंचि पुनःपुनः जाण । अहर्निशीं विषयसेवन । दळिलेंचि पिष्टपेषण । निजबळें जाण करवीत ॥ ३० ॥ काल भोगिलें ज्या विषयासी । सवेंचि भाज आणवी त्यासी । उसंत नाहीं अहर्निशीं । उबग चित्तासी उपजेना ॥ ३१ ॥ दशेंद्रियें अलोलिक । तेंचि रावणाचें दशमुख । केव्हांही न पवे तृप्तिसुख । जरी त्रैलोक्य चघळिलें ॥ ३२ ॥ विचित्र वासनेचें जुंबाड । तेचि अनावर बाहुदंड । कवळितां सगळें ब्रह्मांड । न पुरे कोड दशमुखा ॥ ३३ ॥ उघडी ममतेची दांताळी । चाटीत लोभाचीं आवाळीं । विकल्पाचे चाकळे चघळी । सदा काळीं समसमित ॥ ३४ ॥ ओढोनि कामाचा मेढा । संकल्पबाण धडफुडा । विंधावया रावण गाढा । श्रीरामापुढां चालिला ॥ ३५ ॥ निजहितीं कळवळा पूर्ण । ज्यांसी अत्यंत असेल जाण । त्यांहीं सर्वांगाचे कान । करूनि श्रवण करावें ॥ ३६ ॥ श्रीरामरावणांचें रण । वदावया मज कैंचें वदन । अंग पंगु मुकें दीन । अर्थज्ञान मज कैंचें ॥ ३७ ॥ ऐसिया मज अनाथासी । जनार्दनें निजावेशीं । आज्ञापिलें अति प्रीतीसीं । निजगुणासी गावया ॥ ३८ ॥

मूकं करोति वाचालं पंगुं लंघयते गिरिम् ।
यत्कृपा तमहं वन्दे परमानन्दमाधवम् ॥ १ ॥

भगवंताची कृपा घडे । तैं पांगुळही पर्वत चढे । मुकियासी वाचा जोडे । बोले होडें[11] बृहस्पतीसीं ॥ ३९ ॥ उपनिषदांचा मथितार्थ । त्याच्या जिव्हाग्रीं नित्य नाचत । वेद वोसंगीं[12] रिघत । सावचित्त वाचेसी ॥ ४० ॥ राजांक लागे

१ सामर्थ्य. २ रथ. ३ प्रसिद्धी. ४ मारून. ५ समजली. ६ तीक्ष्ण. ७ विश्रांति. ८ कंटाळा. ९ घांस. १० धनुष्य.

११ प्रतिज्ञेनें. १२ अंकीं, मांडीवर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

जियेसी। राजपदीं चढे ते दासी। राजवर्गी मानिती तिसी। समर्थाची ऐसी निजकृपा ॥४१॥ जनार्दनें तैसें केलें। रंक राजपदीं बैसविलें। रामचरित्र बोलविलें। मधुर बोलें मजकरवीं ॥४२॥ मजमाजी प्रवेशोन। माझे वदनीं घालोनि वदन। वक्ता एक जनार्दन। रसाळ रामायण वदवीत ॥४३॥ माझें जें कां मीपण। साचार एका जनार्दन। तेणें निजसामर्थ्यैंकरोन। निजनिरूपण चालत ॥४४॥ चतुराची कळा ऐसी। केवळ कोरड्या काष्ठासी। जवळी घेवोनि अति प्रीतीसीं। युक्तिविशेषीं कर्मावीत ॥४५॥ तंती लावोनि अद्भुत। रागोद्धार करी त्यांत। सज्जनांतें रिझवीत। ते कळा निश्चित कर्त्याची ॥४६॥ ऐकतां चतुर्विध जन। सकळ पावती समाधान। हें काष्ठसामर्थ्य नव्हे जाण। कळा संपूर्ण कर्त्याची ॥४७॥ त्या यंत्राचे परी जाण। माझेनि वदनें स्वयें आपण। वक्ता एक जनार्दन। श्रीरामगुण गातसे ॥४८॥ निजवैभव प्रकाशावयासी। मजहातें लिहविलें ग्रंथासी। संबंध नाहीं मजसीं। जेंवी साईखड्यासी सूत्रधार ॥४९॥ असो आतां परिहारता। परिहार नावडे श्रीगुरुनाथा। स्वयेंचि कर्ता करविता। या बोलाचाही वक्ता श्रीगुरु ॥५०॥ पुढें रामरावणवृत्तान्त। विषयाचा मेढा लंकानाथ। ओढी काढोनि उपरमंत। श्रीरघुनाथ विंधावया ॥५१॥ विचित्र संकल्पाचें अनुसंधान। परिसा त्याचेंही लक्षण। ममताभालीं अति दारुण। बळें रावण वर्षला ॥५२॥ तें देखोनि रघुपती। बाण सोडिला शूरवृत्ती। तेणें ममतेची केली शांती। तेही स्थिती अवधारा ॥५३॥ जरी असावें दुजेपण। ममता त्यासी करी कंदन। चराचरीं रघुनंदन। ममता पूर्ण निमाली ॥५४॥ ममतेच्या निजशरीरीं। राम व्यापक बाह्यांतरीं। तेणेंचि जाहली बोहरी। धनुष्य करीं छेदिलें ॥५५॥ दुजेपणाच्या निजनेटीं। सबळ रावणाची धनुर्वेटी। विवेकाची आगी मोठी। धनुष्य मुष्टीचें जाळिलें ॥५६॥ भेटी होतां विवेकमम-तेसीं। वैराग्यभडका वेगेंसीं। उठला तेणें आवेशीं। विषयधनुष्यासी जाळिलें ॥५७॥ निर्वाणींचें विषयधनुष्य। जळतां दुःख रावणास। घालोनियां श्वासोच्छ्वास। उद्विग्नमानस स्वयें झाला ॥५८॥ विशेष धनुष्याची सामग्री। संग्रहिली होती भारी। त्याची सांडी झाली पुरी। निःशेष करी श्रीराम ॥५९॥ आतां कायसी रथगती। म्हणोनि झाला पदाती। सक्रोध आला घेवोनि हातीं। स्वयें रघुपती हाणों आला ॥६०॥ निजरथा मागें सांडोन। पायीं धांवोनि रावण। लक्षोनियां रघुनंदन। हाणी दारुण धगधगित ॥६१॥ तें देखोनियां जाण। डळमळीना रघुनंदन। सबाह्य शांतीचें कल्याण। क्रोधाचरण तेथें न चले ॥६२॥ आधीं सहजचि रघुनाथा। सबाह्य शांतीचा परिघ होता। तेणें क्रोधा प्राणान्तव्यथा। निजसत्ता विसरला ॥६३॥ अप्राप्तकामें क्रोध उठी। श्रीरामातें पाहतां दृष्टीं। अप्राप्तीची कायसी गोष्टी। पूर्णकाम सृष्टीं श्रीराम ॥६४॥ श्रीरामाचें स्मरतां नाम। दृष्टी बोळंगती सकळ काम। भक्तकामकल्पद्रुम। तो क्रोधा श्रीराम कैंवी साधे ॥६५॥ देखतां श्रीरामाची मूर्ती। अप्राप्तता निमाली निश्चितीं। झाली क्रोधाची उपशांती। लंकापति थोंटावला ॥६६॥ तेणें आवेश दशशिरीं। मग प्रपंचकोशाभीतरीं। निजांगीं होती कामनासुरी। तिखट भारी आशाधार ॥६७॥ तेणें आवेश दशशिरीं जाण। रघुनंदन सोडी नैराश्याचा बाण। तेणें आशासुरी उठविली जाण। कामना संपूर्ण निवटिली ॥६८॥ सर्वेचि रावण अत्युग्र। अविद्येचें निजशस्त्र। सोडिलें वासनेचें वज्र। श्रीरघुवीर दंडावया ॥६९॥ श्रीराम धनुर्धारी नेटक। वज्र निवटावया देख। निर्वासनेचा तोमर चोख। एकाएक सोडिला ॥७०॥ राम धनुर्वाडा विचित्र। वज्रावरी योजिला तोमर। तेणें भेदोनि सत्वर। केला दशवक्त्र तटस्थ ॥७१॥ अंतर्बाह्य दोन्ही रणें। केलीं दारुण रावणें। तितुकीं निरसिलीं रघुनंदनें। अर्धक्षणेंकरोनियां ॥७२॥ बाह्यरण शस्त्रास्त्रीं। कामक्रोधादिक अंतरीं। सामर्थ्य होतें दशशिरीं। रामें क्षणमात्रें उडविलें ॥७३॥ द्वेषबुद्धि रावण। करितां श्रीरामाचें ध्यान। अंतर

१ उपयोगांत आणतात. २ तारा. ३ बाहुल्याला. ४ स्तुति. ५ सुखावतो, ६ नाश. ७ पादचारी, ८ वेष्टण. ९ इच्छा तृप्त न झाल्यानें. १० भक्तांच्या इच्छा परिपूर्ण करणारा कल्पवृक्षच. ११ कुंठित झाला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

क्षाळलें संपूर्ण। झाली बोळवण कामक्रोधां ॥ ७४ ॥ शुद्धांतःकरणें रावण। निंदेचे मिषें जाण। स्तविता झाला रघुनंदन। श्रोते सावधान परिसोत ॥ ७५ ॥ लौकिक योद्धे रणाप्रती। सरल्या शस्त्रास्त्रसंपत्ती। तोंडबळें बडबडती। वल्गैजती इतस्ततां ॥ ७६ ॥ साधावया मोक्षश्री। रावणा अवस्था भारी। निंदेमाजी स्तवन करी। निजगजरीं अति वोजा ॥ ७७ ॥ रावण अत्यंत विचक्षण। वरी वेदशास्त्रसंपन्न। करिता झाला वर्णन। रघुनंदनस्वरूप ॥ ७८ ॥ सूक्ष्मयुक्तिकुशळतेसीं। सोडोनियां वाच्यांशासी। अंगीकारोनि लक्ष्यांशासी। श्रीरामासी बोलत ॥ ७९ ॥ आधीं त्वंपद तो रावण। तें शोधोनियां जाण। आतां तत्पद श्रीरामाचें पूर्ण। स्वरूपवर्णन करीतसे ॥ ८० ॥ तत्पद आत्मारामीं जाण। शुद्ध श्रीरामाचें वर्णन। सूक्ष्म सर्वगत सनातन। पावावया जाण गर्जत ॥ ८१ ॥ निंदेचेनि मिषें जाण। शुद्ध श्रीरामाचें वर्णन। सूक्ष्म सर्वगत सनातन। स्वयें रावण अनुवादे ॥ ८२ ॥ रावण म्हणे श्रीरामासी। किती आतां कपट करिसी। ठकोनि मारिलें वाळीसी। तैसें मजसीं चालेना ॥ ८३ ॥ आणिक किती सांगों आतां। तुवां पूर्वी ठकविलें बहुतां। कोण म्हणोनि होसी पुसता। तेंही तत्त्वतां सांगेन ॥ ८४ ॥ तुज धरोनियां मानसीं। बहुत निघाले साधावयासी। शेखीं ठकवोनि तयांसी। दृश्य नव्हेसी सर्वथा ॥ ८५ ॥ लपोनि त्यांच्या सर्वांगीं। सर्वथा न दिससी जगीं। शिणतां साधनीं अनेगीं। तोंड वेगीं न दाविसी ॥ ८६ ॥ कपटविद्या करोनि गाढी। तीमाजी देसी बुडी। वेडा लाविलीं बापुडीं। वाळोनि कर्वडीं पैं केलीं ॥ ८७ ॥ चौंघी देवोनि श्रीरामा। आपणा म्हणविसी आत्मा। छळून घेसी भजनधर्मा। अति दुर्गमा साधनीं ॥ ८८ ॥ तुजलागीं मंत्र घेती। असंख्य पुरश्चरणें करिती। शेखीं तेही छळिले निश्चितीं। निजात्मप्राप्ती चुकविली ॥ ८९ ॥ तें मजसीं न चले मत। मी जाणतसें समस्त। मंत्रामाजी जो मंत्रार्थ। तो तूं निश्चित श्रीरामा ॥ ९० ॥ मंत्रमंत्रामाजी अक्षर। ॐनमो इत्यादि उच्चार। अक्षरीं अक्षर तूं रघुवीर। हें मी साचार जाणतसें ॥ ९१ ॥ पाठकें छळोनियां जाण। साधनीं लाविलें वेदपठण। कोरडी वाचेची ठणठण। लावूनि पूर्ण गोंविलें ॥ ९२ ॥ करितां दशग्रंथपठण। तेथेंचि छळिले संपूर्ण। उदात्त अनुदात्त स्वरित जाण। वाद विचक्षण घालिती ॥ ९३ ॥ ऐसें ठकवोनियां तयांसी। बापुडीं वेडा लाविलींसी। तैसें न चले मजसीं। मी तुझे लपैणीसी जाणत ॥ ९४ ॥ वेदमूळ तो ॐकार। तेथें तुझी लपणी थोर। अकार उकार मकार। त्रिमात्रा स्वर त्रिगुणातीत ॥ ९५ ॥ ऐसे पाठक ठकविले। तैसेचि पंडित नाडिले। बापुडियां कांहीं न कळे। गोंवून घातले विवादीं ॥ ९६ ॥ शास्त्रश्रवण साधन शुद्ध। त्यांसही छळिलें प्रसिद्ध। केले अभिमानाचे विरुद्ध। बहुविध बहुयुक्तीचे ॥ ९७ ॥ मजसीं न चले तें विंदान। मी जाणतसें संपूर्ण। शास्त्रांमाजील जाणपण। लपणी जाण ते तुझी ॥ ९८ ॥ तेही घातले आडवाटा। चढला जाणपणाचा ताठा। तेणें न मनीं पैं वरिष्ठा। फुगारा मोठा गर्वाचा ॥ ९९ ॥ पंडितां न कळे हे स्थिती। शास्त्रांमाजी जे जे युक्ती। जाणिवा तेथें तुझी वसती। हें सांगती आणिका ॥ १०० ॥ जेंवी गूळउंसाचा घाणा। मुर्खींचा रस भरे भाणा। शब्दसोपटीं आपण जाणा। रितेपणा करकरी ॥ १ ॥ शास्त्रांमाजी जे जे युक्ती। ते ते केवळ चैतन्यस्फूर्ती। तेही वंचोनि तयांप्रती। अहंमतीं भुलविलें ॥ २ ॥ भोळीं बापुडीं याज्ञिकें। यज्ञद्वारा भरलीं एकें। त्यांसी गोंविलें कौतुकें। स्वर्गसुखें दावोनियां ॥ ३ ॥ कुंड साधिती अति व्युत्पत्ती। मेखळा परिमित साधिती। वेदी साधिती अति निगुतीं। मंडपप्रीतीकरोनियां ॥ ४ ॥ इर्ध्मा बर्हि त्रिसंधान। विचित्र दर्भांचें परिस्तरण। त्याहीवरी पात्रासादन। युक्ति करोन मंडित ॥ ५ ॥ आणिती ओषधिसंभार। होमद्रव्य अति विचित्र। मेषश्येनादि परिकर। आणिती सत्वर यागासी ॥ ६ ॥ अति युक्ति साधूनि अरणीं। मंथन करिती कष्टेंकरोनी। तेथें प्रकटला जो अग्नि। तो कुंडीं

१ वडबडतात. २ हवें तसें. ३ उत्तम रीतीनें. ४ शब्दापासून होणाऱ्या अर्थावबोधास. ५ गर्भितार्थाला. ६ मढीं. ७ लपण्याला. ८ समिधा. ९ दर्भ. १० अग्नि उत्पन्न करण्याचें काष्ठ.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

आणोनि स्थापिती ॥ ७ ॥ तेथें ॐकार वषट्कार। मंत्रघोषाचे उच्चार । ऋत्विज करिती अपार । स्वाहास्वधाकारविनियोगें ॥ ८ ॥ होते पोते उद्गाते। सुस्नात सावधचित्त। आज्ञा पुसोनि यजमानातें । अवदानातें अर्पिती ॥ ९ ॥ 'न मम' म्हणतां यजमान । ऋत्विज सोडिती अवदान । तेणें बळें याज्ञिक जन । स्वर्गभुवन वांच्छिती ॥ ११० ॥ पुण्यक्षयें तेथूनि पडती। परी नैश्वर्य न मानिती । ऐसीं ठकलीं नेणों किती। तें मजप्रती चालेना ॥ ११ ॥ तेथील लपणीचें सूत्र। मी जाणतसें समग्र । कर्माकर्मीं सूक्ष्म सार। स्वरूपें साचार लपतोसी ॥ १२ ॥ अग्नि आज्य समिधा समग्र । कर्माकर्मीं सूक्ष्म तूं साचार । याज्ञिकां न कळे हें सूत्र । कर्मठपणें फार व्यापिले ॥ १३ ॥ यजमानाच्या क्रियाशक्ती। तेचि तुझी निजस्थिती । संन्यासीही त्याच रीतीं। छळणोक्तीं नाडिले ॥ १४ ॥ विरजाहोम करोनि एक । जाळिले म्हणती कामादिक । शेखीं तिळतांदूळ जाळिले देख। कामक्रोधादिक अनसूट ॥ १५ ॥ गुरूपासोनि महावाक्य। ज्याकारणें घेतलें देख । तें राहिलें सकळिक । पूज्यत्वें चोख भुलविलें ॥ १६ ॥ आम्ही पूज्य परमहंस। म्हणोनि भुलविलें त्यांस । विसरले महावाक्यास । पंचीकरणास विसरले ॥ १७ ॥ सांडोनि स्वानंदस्फूर्ती। पूज्यत्वें भुलविले यती। तैसेंचि केलें योग्यांप्रती । सांगूं किती कपटकर्म ॥ १८ ॥ एक ते पैं बापुडीं । तुज पहावया लवडसवडी । निघाले अति तांतडीं । ते घातले कडाडीं योगाचिये ॥१९॥ वारियावरी घालिसी। नानासिद्धींसीं गोंविसी । ऐसा ठकवोनियां लपसी। वेडा लाविसी योगियां ॥ १२० ॥ माग काढितां कडाडी। चढसी वैकुंठींचिया पहाडीं। नातरी शेषफडेबुडीं। निद्रामिषें लपतोसी ॥ २१ ॥ तेथोनि काढितां निर्धारीं । मेणें लपसी दशावतारीं। रूप धरितां सिंहशूकरीं। लाज निर्धारीं तुज नाहीं ॥ २२ ॥ साधितां न साधसी बहुतां । तो मज सांपडलासी आतां । झणें होसी तूं दुश्चिता । येथोनि आतां ढळों नेदीं ॥ २३ ॥

ऐसा सिंहनादें रावण । गर्जता झाला आपण। तंव सारथी अति विचक्षण । तेणें विंदान साधिलें ॥ २४ ॥ राम धनुष्य तोडितां जाण। सोहंभावाचा मेढा कठिण। ठेविला होता आच्छादून। तो आणोन दीधला ॥ २५ ॥ हातीं पडतां धनुष्यबाण। निष्कपट रणांगण । साधावया वीर रावण । काय आपण बोलत ॥ २६ ॥ श्रीरामें रणख्याती । करोनि सकळां दिधली मुक्ती । उरले जे तयांप्रती । लंकापति अनुवादे ॥ २७ ॥ आजीवरी म्यां केलें कपट। रामें त्याचें केलें सपाट । आतां झालों मी चोखट । दशकंठ अति शुद्ध ॥ २८ ॥ सकळ सैन्यासमवेत। युद्धीं नाटोपे रघुनाथ । तो मी एकांगी लंकानाथ । राम निश्चित साधीन ॥ २९ ॥ करोनि लोटांगण तुम्हांसी । विनवितों मी सकळांसी। जो खड्गातें हातवशी । तेणें शिवपूजेसी मेदिलें ॥ १३० ॥ तुम्हांसी शंकराची आण । कोणीं न करावें युद्धत्राण । साक्षी होवोनि आपण। आंगवण पहावी ॥ ३१ ॥ श्रीराम आणि रावण रणीं । युद्धीं भिडती निर्वाणबाणीं। जय अपजय दोन्ही । कोण कोणालागूनी पैं होतो ॥ ३२ ॥ ऐसी सकळां विनवण । करिता झाला रावण। तें ऐकोनि रघुनंदन । स्वसैन्यालागून विनवीत ॥ ३३ ॥ रावणाच्या निजमानसीं। बहुत दिवसें आधीं ऐसी। समरांगणीं श्रीरामासीं। निजांगेंसीं भिडावें ॥ ३४ ॥ ते रावणाचे मनोरथ। आजि फळले समस्त । रणीं भेटलों मी रघुनाथ। तेणें बहुत हरिखेल ॥ ३५ ॥ माझ्याही हेंचि मानसीं । रावणाच्या मनोरथासी। सिद्धि पाववीन रणभूमीसीं । मुक्ति रावणासी देऊनी ॥ ३६ ॥ यालागीं तुम्हीं समस्त। युद्धीं व्हावें निवान्त । राम आणि लंकानाथ। कैसे रणांत भिडतील ॥ ३७ ॥ साक्षी होवोनियां तुम्हीं । पहावी दोघांची रणभूमी । जाणोनि रिघे जो संग्रामीं। आण दुर्गमी तयासी ॥ ३८ ॥ जाणोनि निघेल युद्धासी । अदंडें दंडीन मी त्यासी। ऐसें बोलतां राघवासी। कांप सकळांसी पैं आला ॥ ३९ ॥ वेदतुल्य तुझी आज्ञा।

१ ऋत्विज. २ तूप. ३ संन्याससमयींचा होम. ४ सिंहसूकर आतां. ५ सडकारीला. ६ हातांत घेईल. ७ युद्धांत संरक्षण. ८ मनोव्यथा.

CC-0. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

कोण करूं शके अवज्ञा । लागले श्रीरामचरणां । तुझी वंद्य आज्ञा आम्हांसी ॥ १४० ॥ तंव रावण अति कडाडीं । गर्जोनियां हांक फोडी । बाण काढोनियां तांतडी । राम निर्वेडी विंधूं पाहे ॥ ४१ ॥ परम प्रीति लंकानाथा । रणीं श्रीरामासीं भिडतां। कोण बाणली अवस्था । सावध श्रोतां परिसावी ॥ ४२ ॥ भेदोनियां ब्रह्मांडासी। विश्वात्मक श्रीरामासी । देखतां रावण हर्षासीं । निजधर्मासी विसरला ॥ ४३ ॥ एका जनार्दना शरण । श्रीरामासीं करितां रण । स्वयें विसरोनि रावणपण । श्रीराम आपण होईल ॥ १४४ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां रामरावणयुद्धप्रसंगो नाम एकषष्टितमोऽध्यायः ॥ ६१ ॥ ॥ ओंव्या ॥ १४४ ॥ श्लोक ॥ १ ॥

अध्याय बासष्टावा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ सोहंभावाचा मेढा सुलक्षण । अनुसंधानाचा तीक्ष्ण बाण । लक्षूनियां रघुनंदन । स्वयें रावण विंधों पाहे ॥ १ ॥ तंव अवघा ब्रह्मांडगोळ । रामें व्यापिला दिसे सकळ । तेथें कायसें जगतीतळ । राम प्रबळ वाढिन्नला ॥ २ ॥ सप्तपाताळातळीं चरण । श्रीरामाचे देखे रावण । ऐका तयाचें लक्षण । सुलक्षण सुचिन्हीं ॥ ३ ॥ निजधैर्यशेषफडीवरी । श्रीरामचरण निर्धारीं । सुचिन्हें शोभती कवणेपरी । नवलपरी तेथींची ॥ ४ ॥ अनुपम चरणपंकज[3] । शोभे सायुज्याचा ध्वज । ऊर्ध्वरेखा ते सहज । दावी वोजें ऊर्ध्वगतीची ॥ ५ ॥ वज्र आणि अंकुश दोन्ही । भक्तसाह्यालागोनी । विपक्षीं अंकुश ओढोनी । भक्तरक्षणीं छेदी वज्रें ॥ ६ ॥ अनंतसूर्यांचीं किरणें । जैसीं मिरवती बाळपणें । त्यांतें आणोनियां उणें । अधिकगुणें चरणतळा ॥ ७ ॥ जैशा नभाचिया कळिाक । तैसी शोभा अंगुळिका । शोभताती अलोलिका । रसातळलोकापर्यंत ॥ ८ ॥ नखचंद्रीं चन्द्ररेखा । रमा रातली चरणपीयूखा । गंगेचें तें माहेर देखा । सकळ लोकां उद्धरी ॥ ९ ॥ कैशी घोंटियांची वरव । हे तंव निर्गुणाचे अवयव । वरी कळावियांची ठेव । सागरीं अपूर्व श्यामलहरी ॥ १० ॥ तळातळ लोक जाण । तेणें वसविलें संपूर्ण । वांकीतोडरांचें महिमान । वर्णावया वदन मज कैंचें ॥ ११ ॥ यमनियमांच्या कुसरीं । मनें मुरडिलीं माघारीं । जे सोहंभावाच्या गजरीं । वांकी निर्धारीं गर्जत ॥ १२ ॥ भवस्वर्गा प्रळयकाळ । नामें प्रळय घंघाळ । तोडर गर्जोनि केवळ । सांगे प्रबळ सायुज्यदान ॥ १३ ॥ सूर्यबिंबामाजी प्रभा । तैसी जानुचक्रीं शोभा । महातळींचा तो गाभा । दिसे उभा शोभत ॥ १४ ॥ ऊरूंची शोभा अद्भुत । सुतळलोक जेथें नांदत । बळिराजा नित्यांकित । राज्य करीत पैं तेथें ॥ १५ ॥ बळि चरणाचा अनुरक्त । केंवी राहिला सुतळांत । त्या बळीचा निश्चितार्थ । ऐका सुनिश्चित सांगेन ॥ १६ ॥ ऊर्ध्वलोका देवोनि लात । अधोवदनें नित्यव्रत । सुतळीं राहोनि निवान्त । चरण चिंतीत रामाचे ॥ १७ ॥ राहोनियां मध्यलोकीं । श्रीरामातें अवलोकी । सांडोनियां अधऊर्ध्वाची उंखी । मेळवीत एकीं श्रीरामीं ॥ १८ ॥ कटिप्रदेशीं नितळलोक । विस्तारला एकाएक । पाहतां तेथींचा आलोक[11] । लोकालोक हारपे ॥ १९ ॥ सर्वांमाजी तोचि मध्य । शोभा शोभे विद्वद । अतळलोक प्रसिद्ध । तये स्थानीं नांदत ॥ २० ॥ विजु देखोनि श्रीरामासी । विसरली उदयास्तांसी । झाली पीतांबर कांसेसी । माळ कंठींसीं मिरवत ॥ २१ ॥ श्रीराम आंकळे[12] सगळा । तेचि भक्तभावार्थमेखळा । उपनिषदांचा पाळा । येवोनि रिघाला किंकिणींमाजी ॥ २२ ॥ चिद्रत्नें कटिसूत्रकटीं । उपरी मिरवे माळगांठी । अनुहताच्या निजनेटीं । ध्वनि गोमटी क्षुद्रघंटा ॥ २३ ॥ झालिया स्वस्वरूपीं भेटी । जेंवी वृत्ति होय उफराटी । सांडोनियां मत्तचावटी । अधोदृष्टी सलज्ज ॥ २४ ॥ तेंवी अधोमुख घंटिका । पालवीं मुक्तलग[13] नेटका । कांसे लागलिया देखा । मुक्ति सकळिकां देत राम ॥ २५ ॥ उदर म्हणती दामोदर । परी तें जगदुदर साचार । त्रिलोकत्रिवळी सुंदर । वरी मनोहर रोम-

---

१ सत्वर. २ खरेपणानें. ३ पदकमळ. ४ तेज. ५ शत्रूवर. ६ रममाण झाली. ७ चरणामृताला. ८ सौंदर्य. ९ कौशल्यानें. १० विवेक. ११ प्रकाश. १२ सांपडे. १३ मोत्यांचा घोंस.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

रेखा ॥ २६ ॥ अनंतब्रह्मांडसाटोवा[1] । कीं विश्रांति सकळ जीवां । म्हणोनि दामोदर या नांवा । मिरवावया ख्याति झाली ॥ २७ ॥ नाभि सखोल निर्मळ । रजोरागें रातोत्पळ । सृष्टिकर्त्याचें केवळ । जन्म प्रबळ तये स्थानीं ॥ २८ ॥ भूर्लोकाचें अधिष्ठान । उदर श्रीरामाचें पूर्ण । तळीं सप्तपाताळें संपूर्ण । ऊर्ध्वलोकाचें रचन त्यावरी ॥ २९ ॥ हृदय शुद्ध अव्यंग । संकल्पविकल्पातीत साङ्ग । तेथें रंगले अंतरंग । अति सभाग्य साधुजन ॥ ३० ॥ दक्षिणांगीं विप्रपादेंकरीं । आपुल्या महिम्याची थोरी । वाढविली प्रीतीकरीं । लात उरावरी साहोनी ॥ ३१ ॥ केवळ सुखाचेंही सुख । गुणग्रंथिरहित देख । साधूनि रत्नजडित पदक । अलोलिक शोभत ॥ ३२ ॥ सोलींव सुखाचें निजसार । श्रीरामहृदयावरी पदकहार । सत्त्वगुणीं अति सुंदर । श्रीरघुवीर शोभत ॥ ३३ ॥ भक्तिवैराग्यशुद्धिसंपुटीं । मुक्तमोतियें जन्मलीं गोमटीं । तेंवी श्रीरामाचिये कंठीं । वैजयंती गोमटी सुरेखा ॥ ३४ ॥ चिंतात्यागें निर्मळ वृत्ती । तेचि अम्लान माळा शोभती । भूर्लोकाची तेथें वसती । लंकापति देखत ॥ ३५ ॥ अष्टपत्री निर्मळ । अंतरीं विकसित कमळ । अनन्यगतीच्या दृष्टी बहळें[2] । तुळसीदळमंडित ॥ ३६ ॥ सप्तावरणांहून उदंड । अति दीर्घ बाहुदंड । तन्मयाचें मिरवे कोदंड । अति प्रचंड साजिरें ॥ ३७ ॥ दुजे करीं निर्वाण । चहूं पुरुषार्थांचे बाण । देहअहंकृति रावण । वधावया जाण धरियेले ॥ ३८ ॥ दोहीं हातीं परिकरें[3] । दोन्ही आयुधें विचित्र । दशेंद्रियें दशवक्त्र । निवटावया सत्वर धरियेली ॥ ३९ ॥ ओंकार तोचि कंबुकंठ[4] । मात्रात्रयाचें[5] मूळपीठ । वेद तेथोनि प्रकट । झाला उद्भट त्रिकांडी ॥ ४० ॥ तें महर्लोकरचन । रचिता झाला रघुनंदन । त्याचे श्रवणाचें महिमान । दशानन विवंची ॥ ४१ ॥ समूळ चैतन्याचें आळें । तैसे रामाचे विशाळ डोळे । मनोगतें पैं सकळें । एके काळीं देखणें सदा ॥ ४२ ॥ पूर्वोत्तरमीमांसा दोन्ही । अहर्निशीं भजती भजनीं । म्हणोनियां श्रीरामश्रवणीं । कुंडलांलागूनि अधिकारु ॥ ४३ ॥ श्रीराम लेणियाचें लेणें । विश्व मुक्त त्याचेनि श्रवणें । श्रवणेंचि देखिला रावणें । नारदवचनेंकरोनी ॥ ४४ ॥ आनंदविश्रांतीस आलें । कीं निवोनि सुख मुसावलें[6] । तेंचि साचार शोभलें । वदनबिंब निमासुर ॥ ४५ ॥ त्या आनंदसागराचे तरंग । तेचि दशनँ[7] सुरंग । अधरीं उभय दिसे योग । जीवशिवभाग एकत्र ॥ ४६ ॥ श्रीरामाचें प्रसन्न वदन । तेथें जनांसी विश्रांति गहन । म्हणोनि स्वर्गादिकस्थ जन । करिती ध्यान रामाचें ॥ ४७ ॥ निजनैराश्यपरिकर । एकनिष्ठता मुनिवर । कां अविच्छिन्न तैलधार । तैसें नासिक सुंदर श्रीराममुखीं ॥ ४८ ॥ समूळ चैतन्याचें आळें । तैसे रामाचे विशाळ डोळे । श्रवणान्त पैं सकळे । एके काळें देखणे सदा ॥ ४९ ॥ रवि शशी निरंतर । तेजें झाले प्रकाशकर । तेचि सेविती स्वतंत्र । श्रीरामनेत्र होउनी ॥ ५० ॥ निजात्मबुद्धिउल्हासें । तपें केलीं खरपुंसें । म्हणोनि नेत्राचेनि प्रकाशें । वसे सावकाशें तपोलोक ॥ ५१ ॥ श्रवणान्त अति दीर्घता । द्वैतदृष्टी पैं होतां । न ये पाहतां सर्वथा । अतर्क्यता स्वभाव ज्याचा ॥ ५२ ॥ नवल तेथींचें निरीक्षण । करीत कामासीं कामन । डोळयां डोळेमोहन । आवडीं जाण पडतसे ॥ ५३ ॥ जेंवी गगनोदरीं धनुष्यरेखा । तैशा भोंवया सुरेखा । कीं वदनेंदूचिया पीयूखा । सेविती आर्त चकोर ॥ ५४ ॥ जैसें अधिष्ठान निर्मळ । तैसें विस्तीर्ण कपाळ । अखंड न खंडे त्रिकाळ । त्रिवळी प्रबळ तेचि निढळीं[10] ॥ ५५ ॥ संकल्पमृग वधिला लोभी । काढिला सोहंमृगनाभी । तोही अर्पिला पद्मनाभीं । निरालंबीं मळवट ॥ ५६ ॥ स्वस्वरूपें प्रबळ । सबाह्याभ्यंतर निर्मळ । पावोनियां श्रीरामभाळ । वसती सकळ सत्यलोकीं ॥ ५७ ॥ नभ शून्यत्वा उबगलें[11] । तें श्रीरामा शरण आलें । येवोनि मस्तकीं राहिलें । नीलालकीं[12] शोभत ॥ ५८ ॥ गजेंद्रदंताची भक्तिफणी । स्वभावें मस्तकीं धरोनी । तियें कुरळ केश विंचरोनी । वीरगुंठी दाटिली ॥ ५९ ॥ वरी शुद्ध मनाचीं सुमनें[13] । गुंफोनि अनुसंधानें । सुवासितें चैतन्यपणें । बांधितां ठेंगणें नभ रामा ॥ ६० ॥ वानूं मुकुटाचा महिमा । कैंची उपमा निरुपमा ।

१ अनंत ब्रह्मांडांना आश्रयभूत. २ पुष्कळ. ३ सुंदर. ४ शंखाकृति गळा. ५ अकार, उकार, मकार यांचें. ६ एकत्र झालें. ७ दांत. ८ एकसारखी. ९ पूर्ण. १० कपाळीं. ११ कंटाळलें. १२ निळ्या केंसांनीं. १३ पुष्पें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

तेणें रचना मनोरमा। वैकुंठा आणि कैलासा ॥६१॥ ऐसें चतुर्दशभुवन। वैकुंठकैलासादिकरून। प्रकाशिता रघुनंदन। देखोनि रावण तटस्थ ॥ ६२ ॥ अपरिमित चौपासीं। देखोनियां श्रीरामासी। रावण चढला आवेशीं। बाण सीतांसीं लाविला ॥ ६३ ॥ समरांगणीं निजकडाडीं। बाण ओढोनि कानाडी। निजाभिमानें हांक फोडी। लक्ष निर्वेडी भेदावया ॥ ६४ ॥ अनंतब्रह्मांडांचिया पंक्ती। ज्याचे कडवेंसां भासती। तो विंधावया रघुपती। लंकापति लक्ष्य पाहे ॥ ६५ ॥ तंव विपरीत झालें तेथें। स्थूळ सूक्ष्म जितुकीं भूतें। वेगळालीं पैं समस्तें। राम निश्चित देखतसे ॥ ६६ ॥ वानरसैन्याभीतरी। राम विंधावया बाणेंकरीं। पाहता झाला दशशिरी। तंव प्रतिशरीरीं श्रीराम ॥ ६७ ॥ गजाकडे जंव पाहात। तंव महावतासहित। गज देखिला रघुनाथ। सर्वेंचि पाहात रथाकडे ॥ ६८ ॥ तंव रथवारूंसहित। सारथिशस्त्रास्त्रांसमवेत। ध्वजापताकामंडित। देखे लंकानाथ श्रीराम ॥ ६९ ॥ सपर्वत वानरभार। द्रुम पाषाण परिकर। पृथक् पृथक् रघुवीर। दशवक्त्र देखत ॥ ७० ॥ सौमित्र बिभीषण तेथ। सुग्रीव अंगद जांबवंत। तार तरळादि समस्त। हनुम्यासहित श्रीराम ॥ ७१ ॥ निजसेनेचे राक्षस। रणयोद्धे रणकर्कश। त्यांचा लोपोनि राक्षसभास। सावकाश राम झाले ॥ ७२ ॥ फिरोनि पाहे लंकेकडे। रामरूप लंकेचे हुडे। गुप्तद्वारें जीं अवघडें। गूढें निगूढें राम झाला ॥ ७३ ॥ घरें चौबारें समस्त। महा सोपानें अद्भुत। दुर्गाची सामग्री समस्त। राम निश्चित होवोनि ठेला ॥ ७४ ॥ पाहतां यंत्रेंगोळांकडे। यंत्रद्रव्य जें अवघडें। दुर्धर शस्त्रें जीं अति प्रचंडें। निजनिंवाडें राम झाला ॥ ७५ ॥ आपला जो कां निजरथ। वारुसारथिध्वजांसहित। स्वयें झाला रघुनाथ। अति विस्मित रावण ॥ ७६ ॥ नेहटून पाहे जंव आपण। तंव निजहस्तींचें धनुष्यबाण। तेंही झाला रघुनंदन। स्वयें रावण विस्मित ॥ ७७ ॥ तळीं पृथ्वीकडे पाहे। तंव ती राम झाली आहे। जीवनाची रससोये। राम स्वयें होवोनि ठेला ॥ ७८ ॥ तेजाचें जें निजतेज। तें रामचि स्वयें सहज। वायूचें जें चळणंबोज। चाळक सहज श्रीराम ॥ ७९ ॥ श्रीराम न दिसे जेथें। नभ शून्यपणें भासे तेथें। देखिलिया श्रीरामातें। चिद्गगन तेथें राम झालें ॥ ८० ॥ पवनीं दहनीं अवनीं गगनीं। रामावीण न दिसे नयनीं। ठेला त्रैलोक्य व्यापूनी। दशाननीं अति विस्मयो ॥ ८१ ॥ सप्तपाताळांचें अंतर। ऊर्ध्व सप्तलोकांचे पदर। दिशांच्या पोकळीं समग्र। स्वयें रघुवीर कोंदला ॥ ८२ ॥ निजदेह पाहे रावण। हस्तपादादि अवयव पूर्ण। तोही झाला रघुनंदन। रावणपण खचों पाहे ॥ ८३ ॥ अस्थि चर्म मज्जा मांस। रामें भेदिले सप्तकोश। अंतरीं करोनि प्रवेश। निजहृदयास शोधीत ॥ ८४ ॥ मनाचे संकल्प सर्व। स्वयें झाले पैं राघव। विसरोनि निजस्वभाव। उन्मनभाव बाणला ॥ ८५ ॥ बुद्धि बोधेंसीं अवचितीं। राम झाली निश्चितीं। विसरोनि निजस्फूर्ती। समाधिस्थिती बाणली ॥ ८६ ॥ चित्तें चिंतितां रघुनंदन। स्वयें झाला चैतन्यघन। तेणें भयें अभिमान। निजचिन्हही विसरला ॥ ८७ ॥ अहंकार कांपिन्नला। तो श्रीरामा शरण आला। तद्रूपतेचा कौल घेतला। सोहं झाला श्रीराम ॥ ८८ ॥ अंतःकरणीं व्यापक धर्म। धरून होते प्रपंचधाम। तेणें देहें देखितां रघूत्तम। सर्वगत राम स्वयें झाले ॥ ८९ ॥ कायसी सुवेळा निकुंभिळा। राम झाला बोरीबाभळा। दशकंठ भ्रमित झाला। पाहूं लागला दशदिशा ॥ ९० ॥ जिकडे पाहे तिकडे हरी। रावण पडला भ्रमचक्रीं। भ्रमतसे चक्राकारीं। राम निर्धारीं लक्षेना ॥ ९१ ॥ येरीकडे रघुनंदन। तन्मयाचें कोदंड जाण। घेऊनि सायुज्यतेचा बाण। सीतीं पूर्ण सज्जिला ॥ ९२ ॥ पूर्ण कानाडी ओढोनि पाहीं। बाण सोडितां लवलाहीं। श्रीरामाच्या हस्तीं दोहीं। अपूर्व कांहीं वर्तलें ॥९३॥

आकृष्टे युधि कार्मुके रघुपतेर्वामोऽब्रवीद्दक्षिणं।
पुण्ये कर्मणि भोजने च भवतः प्रागल्भ्यमस्मिन्न किम् ॥
वामान्यः पुनरब्रवीत्तमपि रे पृच्छाम्यहं स्वामिनं।
छिंधां रावणमस्तकानि युगपच्चैकैकमादिश्यताम् ॥ १ ॥

१ धनुष्याचे दोरीवर. २ छायेमध्यें. ३ समग्र. ४ बुरूज. ५ पायऱ्या. ६ तोफांचे गोळे. ७ खरेपणानें, यथार्थतेनें.

८ लक्षपूर्वक. ९ चलनशक्ति. १० वायूमध्यें. ११अग्नीमध्यें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

श्रीरामाचे दोनी हस्त । परस्परें अनुवादत । तेणेंचि स्वामीच पुरुषार्थ । हर्षें सांगत जगासी ॥ ९४ ॥ श्रीराम अति आवेशीं । बाण लावोनि सीतासीं । ओढितां दक्षिणहस्तासीं । गेला कानापासीं कानाडी ॥ ९५ ॥ तंव वामें बोले दक्षिणाप्रती । युद्धीं भिडतां रघुपती । मागें सरलासी युद्धख्याती । वीरवृत्ती हे नोहे ॥ ९६ ॥ पुण्यकाळ देखोनियां पुढें । धांवोनि येसी लवडसवडें । दान करिसी वांडेंकोडें । श्रेयें निवाडें घ्यावया ॥ ९७ ॥ तैसाच सत्कर्माच्या ठायीं । पुढें धांवसी लवलाहीं । भोजनाच्याही समयीं । कवळ पाहीं घ्यावया ॥ ९८ ॥ जैसा तेथें पुढें होसी । तैसा आजि रणभूमीसी । पुढें होवोनि वेगेंसीं । पुरुषार्थासी दाखवीं ॥ ९९ ॥ जेणें बळें सत्कर्मासी । पुढें होसी आवेशीं । तेणें बळें रणभूमीसी । पुरुषार्थासी दाखवीं ॥ १०० ॥ आजिवरी समग्र वित्तँ । स्वामीचें भोगिलें समस्त । युद्धसमयीं मागें सरत । हें अनुचित सर्वथा ॥ १ ॥ ऐकोनि वामाचें बोलणें । दक्षिण हांसिन्नला सत्राणें । निर्बळासी पुढें करणें । लाजिरवाणें आपणासी ॥ २ ॥ धनुष्य देवोनि तुजप्रती । पुढें करितांचि काकुळती । येवोनि बोलिलासी छळणोक्ती । युद्धख्याती न करवे ॥ ३ ॥ पुढें जावोनि काय केलें । रणीं थोंटावलें राहिलें । संधान न करवे वहिलें । वल्गेंजेलें वृथाचि ॥ ४ ॥ रणीं पाठी नाहीं दिधली । जे तूं बोलसी छळणबोलीं । वीरवृत्तीची तुवां भली । नाहीं देखिली युद्धरचना ॥ ५ ॥ मागें सरोनि कानालीं । पुसतसें गुज स्वामीसी । कैसें निवटूं रावणासी । हें मजपासीं सांगावें ॥ ६ ॥ दहाही शिरें एकवट । कीं निवटूं वेगळाले कंठ । स्वामी सांगावें हें स्पष्ट । रावण दुष्ट वधावया ॥ ७ ॥ तव नीचाचा ऐसाचि स्वभावो । कीं फाटकियांत शिर बावा पावो । तुवां पुढें जावोनि पहा हो । कोण आवो साधिला ॥ ८ ॥ ऐसें निजहस्तांचें लाघव । ऐकोनि सुखावे रघुराव । तंव येरीकडे पहा हो । रावणें अपूर्व मांडिलें ॥ ९ ॥ त्या दोघांचिया रणासी । कैंचें सामर्थ्य उपमेसी । त्याची उपमा साजे त्यासी । ऐसें वैखरीसी असेना ॥ ११० ॥

गगनं गगनाकारं सागरः सागरोपमः ।
रामरावणयोर्युद्धं रामरावणयोरिव ॥ २ ॥

सगळें सांठवे गगन । ऐसें दुसरें कैंचें आन । तैसें रामरावणांचें रण । उपमा समान त्याची त्यासी ॥ ११ ॥ सागरासारिखा आन । दुजा सागर कैंचा भिन्न । म्हणोनि त्याचे उपमे समान । न दिसे चिन्ह आणिक ॥ १२ ॥ तैसें रामरावणांचें रण । त्यासी उपमा रामरावण । म्हणोनि उपमेसी पूर्ण । उपमावक्तेपण मज नाहीं ॥ १३ ॥ कोदंडपाणी[11] रघुनाथ । गगनभरी लखलखित । देखोनियां लंकानाथ । हर्षितचित्त पैं झाला ॥ १४ ॥ जन्मजन्मांतरीं बहुतां । नाना साधनीं कष्टतां । भेटी झाली श्रीरघुनाथा । म्हणोनि तत्त्वतां पूजीत ॥ १५ ॥ उभा रणांगणामाझारी । नाहीं पूजेची सामग्री । म्हणोनि रामातें बाणधारीं । रावण गजरीं पूजीत ॥ १६ ॥ करोनि बाणांच्या अक्षता । त्यांहीं श्रीरामातें पूजितां । उल्हास रावणाच्या चित्ता । अति सादरता पूजेची ॥ १७ ॥ पूजावया राघवेशा । रावण पाहे जंव आकाशा । तंव राम कोंदला दशदिशां । निजमानसा उल्हास ॥ १८ ॥ लक्षोनियां रघुनंदन । भलतेकडे टाकी बाण । नेणे स्वसैन्य परसैन्य । करी संधान अद्भुत ॥ १९ ॥ पुढें लक्षोनि रघुनंदन । जंव आवेशीं विंधी रावण । तंव पाठीसीं धनुष्यबाण । घेवोनि जाण उभा असे ॥ १२० ॥ मागें विंधों जाय रावण । तंव वामांगीं रघुनंदन । तिकडे करी जंव संधान । तंव दिसे दक्षिणांगीं[12] ॥ २१ ॥ अधऊर्ध्व[13]दिशा समस्त । कोंदला देखोनि रघुनाथ । बाणीं सर्वत्र पूजीत । तेणें हांसत सुरसिद्ध ॥ २२ ॥ राक्षस म्हणती रावण । भ्रमला अतिशयें दारुण । आम्हांसीच विंधितो बाण । रणकंदन मांडिलें ॥ २३ ॥ राम राहिला एकीकडे । रावणेंचि निजनिवाडें । आमुचे काढियेले मेढे[14] । कोणीकडे पळों आतां ॥ २४ ॥ स्वर्गीं हांसती सुरगण । सिद्ध हांसती संपूर्ण । गणगंधर्वादि चारण । खदखदून हांसती ॥ २५ ॥ वानर हांसती वाडेंकोडें । रावण रामें केलें वेडें । आपुलें पौरिखें[15] न दिसे पुढें । जिकडे तिकडे शर

१ डावा. २ उजव्या हाताला. ३ सत्वर. ४ आनंदानें. ५ पुण्य. ६ ग्रास, घांस, ७ धन. ८ स्तब्ध. ९ बडबडलें.

१० विस्तार. ११ धनुर्धारी. १२ उजव्या बाजूला. १३ खालींवर. १४ आश्रयस्थानें. १५ परकी.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

टाकी ॥ २६ ॥ न कळे कोणासी मात । रावणाचें अनुचरित । राम देखोनि सर्वगत । बाणीं पूजीत अति प्रीतीं ॥ २७ ॥ देखोनियां सर्वगत । भजे जो कां अनुरक्त । जन त्यासी म्हणती भ्रांत । अंतरवृत्त कळेना ॥ २८ ॥ विपरीत ठसा जनाचा । अतिशयें गुंता प्रपंचाचा । त्यासी म्हणताती दैवाचा । ऐसा लोकांचा निजबोध ॥ २९ ॥ जो उदास प्रपंचासी । निर्दैवी करंटा म्हणती त्यासी । अंतर न कळे कोणासी । सांगतां त्यांसी पैं न ये ॥ १३० ॥ गूळ गोड स्वभावतां । परी तो न माने सर्पग्रस्ता । अंतरीं ज्वरें व्यापिलें असतां । दुग्ध सर्वथा म्हणे कडू ॥ ३१ ॥ ऐसीच लौकिकाची स्थिती । न कळे हरिभक्तांची वृत्ती । सर्वत्र पूजितां रघुपती । भ्रम मानिती सकळिक ॥ ३२ ॥ रावणाची सर्वगतता । जाणोनियां रघुनाथा । कृपा उपजली चित्ता । होय सोडिता बाणातें ॥ ३३ ॥ बाह्य क्रोधाचें विंदान । अंतरीं कृपेचें आयतन । जेंवी मातेचा कोप दारुण । करीत ताडन दोषत्यागा ॥ ३४ ॥ देहदोषें अहंरावण । बहुसाल पीडिला देखोन । निजकृपा कळवळोन । स्वस्वरूप जाण देऊं पाहे ॥ ३५ ॥

ततः क्रुद्धो महाबाहू रघूणां कीर्तिवर्धनः ।
संधाय धनुषा रामो बाणमाशीविषोपमम् ॥ ३ ॥
तेन तस्य शिरश्छिन्नं श्रीमज्ज्वलितकुंडलम् ।
तच्छिरः पतितं भूमौ दृष्टं लोकैस्त्रिभिस्तदा ॥ ४ ॥
तस्यैव सदृशं चान्यद्रावणस्योच्छ्रितं शिरः ।
तत्क्षिप्रं क्षिप्रहस्तेन रामेणाक्लिष्टकर्मणा ॥ ५ ॥
द्वितीयं रावणशिरश्छिन्नं संयति सायकैः ।
छिन्नमात्रं ततः शीघ्रं पुनरन्यत्प्रदृश्यते ॥ ६ ॥
तदप्यशनिसंकाशैश्छिन्नं रामेण सायकैः ।
एवमेव शतं छिन्नं शिरसां तुल्यवर्चसाम् ॥ ७ ॥
न चैव रावणस्यांतो दृश्यते जीवितक्षये ॥ ८ ॥

सायुज्याचा निर्वाणबाण । निजकृपेचें संधान पूर्ण । करोनियां रघुनंदन । कंठनाळ जाण छेदिलें ॥ ३६ ॥ दिव्यतेजें अद्भुत । मुकुटकुंडलें समवेत । कंठ छेदितां रघुनाथ । आश्चर्य तेथ वर्तलें ॥ ३७ ॥ दहाही शिरें भूमीं पडतां । आणीक तैसींच तत्वतां । निघतीं झालीं लंकानाथा । सुरां समस्तां विस्मयो ॥ ३८ ॥ तंव श्रीरामाचा अमोघ बाण । संपूर्ण कार्य साधिल्यावीण । मागें सरों नेणे आपण । तेणें मागुतें निवटिलीं ॥ ३९ ॥ दहाही शिरें लंकानाथीं । पुनः पुनः प्रसवती । बाण सवेंचि निवटिती । अत्यद्भुत लाघव ॥ १४० ॥ शिरें पुनः पुनः निघती । बाण तितुकींही निवटिती । वानर जयजयकार गर्जती । विमानीं हांसती सुरसिद्ध ॥ ४१ ॥ अनंत शिरांचिया राशी । रावण प्रसवे आवेशीं । तितुकीं निवटितां बाणांसी । निजमानसीं आनंद ॥ ४२ ॥ बाण छेदीत क्षणक्षणां । तरी अति उल्लास रावणा । पूजावया रघुनंदना । शिरें जाणा प्रसवत ॥ ४३ ॥ रावणाचा भाव पूर्ण । सर्वगत श्रीरघुनंदन । देखोनियां आपण । करी निंबलोण निजशिरीं ॥ ४४ ॥ कंठीं लागतां श्रीरामबाण । अति आल्हादें रावण । पूजिता झाला रघुनंदन । सावधान अवधारा ॥ ४५ ॥ सर्वगत श्रीरामासी । देखोनि रावण उल्लासीं । निजशिरें अति प्रीतीसीं । राघवासी ओंवाळी ॥ ४६ ॥ अति उल्लासीं लंकानाथ । दहाही शिरें ओंवाळीत । तेणें धणी न माने चित्त । मग प्रसवत आणिक ॥ ४७ ॥ अल्प अर्पितां श्रीरामचरणीं । न पुरे रावणाची धणी । छेदोनि श्रीरामबाणीं । अर्पित चरणीं अति प्रीतीं ॥ ४८ ॥ अल्प अर्पितां श्रीरामचरणीं । अनंत विस्तार त्रिभुवनीं । ऐसा निश्चय कळावया जनीं । शिरें रामचरणीं अर्पीतसे ॥ ४९ ॥ निजशिरांची लक्षपूजा । रावणें केली रघुराजा । देह धरिला जया काजा । तें अति वोजाँ साधिलें ॥ १५० ॥ अनंत शिरांचिया राशी । अर्पितां श्रीरामचरणांसी । अति उल्लास रावणासी । निजहरिखेंसीं बोलत ॥ ५१ ॥ श्रीरामाचें निजसामर्थ्य । स्तविता झाला लंकानाथ । श्रोतीं अवधान द्यावें तेथ । अति विख्यात चरित्र ॥ ५२ ॥ श्रीरामरावणांचें श्रवण । श्रोता वक्ता अति पावन । एका जनार्दना शरण । श्रीरामकथन अवधारा ॥ १५३ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां रावणशिरश्छेदनं नाम द्विषष्टितमोऽध्यायः ॥ ६२ ॥ ओंव्या ॥ १५३ ॥ ॥ श्लोक ॥ ८ ॥

१ वर्तन. २ स्थान. ३ व्यर्थ न जाणारा. ४ उत्पन्न होऊं लागलीं. ५ कौशल्य. ६ तृप्ती. ७ आवडीनें. ८ मोठ्या आनंदानें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

अध्याय त्रेसष्टावा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ श्रीरामें रावण जाण। निजबोधबाणेंकरून। निवटितांचि संपूर्ण। काय दशानन बोलत ॥ १ ॥ ऐका गा हे सेनास्थित। नर वानर राक्षस बहुत। उभय सेनेचे समस्त। माझा वचनार्थ परिसावा ॥ २ ॥ ऐकोत देव दानव। यक्ष आणि गंधर्व। सिद्धचारणादि सर्व। श्रीरामवैभव परिसोत ॥ ३ ॥ श्रीराम माणूस नव्हे जाण। राम सर्वांतर्यामी पूर्ण। राम सर्वातीत सनातन। राम चिद्घन चिन्मूर्ति ॥ ४ ॥ राम सकळलोककर्ता। राम ब्रह्मादिकां पाळिता। राम काळाचा आकळिता। सकळांचे माथां श्रीराम ॥ ५ ॥ श्रीराम आदिहेतु उत्पत्ती। राम स्थितीची निजस्थिती। राम विश्रांतीची विश्रांती। गतीची गती श्रीराम ॥ ६ ॥ रामें बोलविल्या वेद बोले। रामें चालविल्या वायु चाले। रामें चाळिल्या प्राण चळे। जेणें रक्षिले देहमात्र ॥ ७ ॥ रामें प्रकाशिला भास्कर। झाला सकळां प्रकाशकर। रामें निववीला हिमकर। निववी साचार सकळांसी ॥ ८ ॥ रामें धरिली धरा राहे। राम जीवना जीववितािहे। श्रीरामतेजें पावक पाहें। देदीप्त होय पाचनीं ॥ ९ ॥ रामें मोकलितां सावकाश। गगनीं उदंड अवकाश। रामविस्मरणीं अहंकारास। अति उल्लास देहबुद्धी ॥ १० ॥ राम इंद्राचा आदिइंद्र। राम नरेंद्राचा नरेंद्र। राम यमाचा संहारकर। ईश्वरा ईश्वर श्रीराम ॥ ११ ॥ श्रीरामें चेतविलें पाहें। चित्त चेतनेतें धरिताहे। रामें अधिष्ठिला होये। बोध स्वयें बुद्धीसी ॥ १२ ॥ श्रीरामप्रभावें अल्प। मनीं स्फुरती संकल्प। त्या श्रीरामाचें स्वरूप। वाग्जल्प कैंवी जल्पे ॥ १३ ॥ श्रीराम रणीं रणकल्लोळ। राम कृपाळुवां कृपाळ। राम दीनांचा दयाळ। प्रणतपाळ श्रीराम ॥ १४ ॥ देहदरिद्रें पीडतां। देखोन मज लंकानाथा। कृपा उपजली रघुनाथा। वना तत्त्वतां तेणें आला ॥ १५ ॥ छळोनियां कैकेयी माता। वना धाडिलें श्रीरघुनाथा। उद्धरावया लंकानाथा। वना तत्त्वतां राम धाडी ॥ १६ ॥ श्रीरामाचा गुरु वसिष्ठ। तो माझा परम गुरु श्रेष्ठ। वसिष्ठें अनिष्टइष्ट। कळलें स्पष्ट आजि मज ॥ १७ ॥ प्रबोधोनि सकळांसी। सवें दिधलें जानकीसी। हें अद्यापि कोणासी। जनीं जनासी लक्षेना ॥ १८ ॥ उद्धरावया रावण। सद्गुरूसी कळवळा पूर्ण। तेणें जानकीसी देऊन। रघुनंदन पाठविला ॥ १९ ॥ श्रीरामाची निजशक्ती। सीता पतिव्रता महासती। अनुग्रहावया लंकापती। लंकेप्रती स्वयें आली ॥ २० ॥ रावण बापुडें अति दीन। तें कैंवी करी सीताहरण। स्वयेंचि येवोनि आपण। दशानन उद्धरिला ॥ २१ ॥ जाणे स्वामीचें मनोगत। निरपराधें न करी घात। करोनि अपराधी लंकानाथ। श्रीरामें घात करूं आली ॥ २२ ॥ श्रीरामाची निजशक्ति सीता। सतीशिरोमणी पतिव्रता। विश्वाची विश्वमाता। लंकानाथा कळवळिली ॥ २३ ॥ मिनधां कोप वरीवरी। माता कृपाळु अंतरीं। कृपें कोपोनि रावणावरी। सहपरिवारीं उद्धरिला ॥ २४ ॥ श्रीरामाचा नव्हे बाण। सायुज्याचा मुळ्हारी पूर्ण। छेदूनि माझें दशवदन। विश्वमुख पूर्ण मज केलें ॥ २५ ॥ जितुकें रामाचें पूर्णपण। तितुकी माझी व्याप्ति पूर्ण। लागतां श्रीरामाचा बाण। एवढी स्थिति जाण मज आली ॥ २६ ॥ अनंत ब्रह्मांडें ज्यामाजी जाण। तो मजमाजी रघुनंदन। सगळा बुडाला आपण। एवढें पूर्णपण मज आलें ॥ २७ ॥ श्रीरामें वधिला रावण। कीं रावणें राम गिळिला पूर्ण। दोघांचेंही दोन्हीपण। हरपोनी पूर्ण श्रीराम झालें ॥ २८ ॥ अवनी दहन जीवन जाण। पवनेंसहित गगन। श्रीरामाचें रामपण। स्वयें रावण होऊन ठेला ॥ २९ ॥ माझें रावणपण देख। राम झाला स्वयें एक। त्रिसप्त चौदा लोक। लोकालोक तेथें कैंचे ॥ ३० ॥ सकळ सुखांचें सोलींव सुख। स्वयें श्रीराम सम्यक। त्याचाही प्रकाशक। रावण देख मी झालों ॥ ३१ ॥ चंद्रकिरणींचें अमृत। जेंवी सोमकांतें द्रवत। तेंवी श्रीरामसुख समस्त। माझेनि प्रगटत जगामाजी ॥ ३२ ॥ ज्यां विरोधिलें नाहीं श्रीरामासी। उद्धरावया सकळ कुळासी। हिरोनि आणिलें जानकीसी। त्या भावार्थासी सांगेन ॥ ३३ ॥ जेथें जेथें अधिष्ठान।

१ सैनिक हो! २ स्वाधीन ठेवणारा. ३ जगाच्या उत्पत्तीचें मूळ कारण. ४ सूर्य. ५ चन्द्र. ६ पृथ्वी. ७ अग्नि. ८ प्रज्वलित. ९ वरवरचा. १० बोलावणेकरी. ११ अग्नि. १२ स्थान.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

श्रीरामाचें संपूर्ण । त्याचें करोनि निरोधन । कुळउद्धरण म्यां केलें ॥ ३४ ॥ श्रीरामकृपा सनातन । देवांवरी आहे पूर्ण । म्हणोनियां निरोधन । केलें आपण देवांचें ॥ ३५ ॥ सीता रामाची शक्ती । ते म्यां आणिली याचि प्रीतीं । धांवोनि येईल रघुपती । देईल मुक्ती सकळांसी ॥ ३६ ॥ आपुलें मागावया ठेवणें । बोलें धरिती शाहाणे । तैसें म्यां केलें रावणें । कोप झणें कोणी म्हणा ॥ ३७ ॥ उद्धरावया सकळ कुळासी । म्यां ओली धरली सीतेसी । त्या ओलीलागीं राघवासी । निजमानसीं कळवळा ॥ ३८ ॥ अति प्रीतीं श्रीरघुपती । ओल सोडवावया निश्चितीं । येथें येवोनि शीघ्रगती । सकुळ लंकापती उद्धरिला ॥ ३९ ॥ लागतां श्रीरामाचा बाण । चहूं देहांसी त्रिपुटीचें भान । एकाएकीं छेदूनि पूर्ण । चैतन्यघन मज केलें ॥ ४० ॥ श्रीरामाचा तो नव्हे शर । चैतन्याचा धांवणेकर । सकळ कुळेंसीं दशवक्त्र । केला चिन्मात्र निमेषार्धें ॥ ४१ ॥ दिवस मास न लागतां । संधान आवेशें करितां । उडाली शून्याची शून्यवार्ता । चिदाभासता कोंदली ॥ ४२ ॥ हेत मात दृष्टांत । न रिघे ज्याचे शिंवेआंत । तो पूर्णब्रह्म रघुनाथ । सदोदित कोंदला ॥ ४३ ॥ न दिसे रामाचें रामपण । सौमित्रादि सुग्रीव सहसैन्य । सहसैन्य बुडाला रावण । चैतन्यघन कोंदला ॥ ४४ ॥ जेथें परतल्या श्रुती । उपनिषदें मौनावती । शास्त्रें थोंटावलीं ठाती । रघुपती देखतां ॥ ४५ ॥ निजविश्वासें रावण । या रीतीं रघुनंदन । स्तवोनियां आपण । करी विनवण जिवलगा ॥ ४६ ॥

राग नीरागतां गच्छ द्वेष निर्द्वेषतां भज ।
भवद्भ्यां सुचिरं कालमिह प्रक्रीडितं मया ॥ १ ॥

रागादिक समुदायासी । माझें लोटांगण सकळांसी । विनवीत आहें तुम्हांसी । ते विनंतीसी परिसावें ॥ ४७ ॥ तुमचे संगतीस्तव जाण । तुमचेनि धर्मैंकरून । विविध भोग दारुण ! म्यां संपूर्ण भोगिले ॥ ४८ ॥ सज्जनांची ऐसी स्थिती । अवंचक मित्रकार्यार्थी । मज अनुग्रहिलें रघुपतीं । निजविश्रांती द्यावया ॥ ४९ ॥ माझे पुत्रपौत्रादि प्रधान । बंधुसहित सकळ सैन्य । मजहीआधीं माझे जन । श्रीरामें आपण उद्धरिले ॥ ५० ॥ सकळ कुळा देवोनि मुक्ती । मजही उद्धरावया निश्चितीं । राम उभा रणाप्रती । म्हणोनि तुम्हांप्रती प्रार्थीतों ॥ ५१ ॥ तुम्हांवेगळा मोक्ष घेतां । लागों पाहे वंचकता । म्हणोनियां तुम्ही आतां । भजा रघुनाथा सर्वभावें ॥ ५२ ॥ विनवीत असें कामासी । भजावें निष्काम रामासी । तेणें निजसुख पावसी । अनायासीं श्रीरामें ॥ ५३ ॥ द्वेषा तुज लोटांगण । निर्द्वेष रघुनंदन । तुवां भजूनि अविच्छिन्न । पावावें कल्याण शांतीचें ॥ ५४ ॥ वासनादिकां समस्तांसी । माझें लोटांगण सर्वांसी । निर्वासना श्रीरामासी । अविकळतेसीं भजावें ॥ ५५ ॥ तेणें तुम्हां निजसुख । वेगें पावाल आवश्यक । यालागीं मिळोनि सकळिक । रघुकुळटिळक भजावा ॥ ५६ ॥ ऐसें विनवितां रावण । तंव हांसिन्नले कामादिगण । तुझें तुज न कळे चिन्ह । श्रीरघुनंदननिजकृपा ॥ ५७ ॥ आमुची वस्ती अंतरीं । राम अंतर्यामीं निर्धारीं । तो पूर्वींच आम्हांवरी । अनुग्रह करी तुजहूनी ॥ ५८ ॥ पूर्वीं सर्वभावेंसीं । आम्ही अनुसरलों राघवासी । तरीच श्रीरामें रावणा तुजसी । अति प्रीतीसीं अंगीकारिलें ॥ ५९ ॥ आम्ही अनुसरलों नसतां । कृपा तया रघुनाथा । न ये न ये गा सर्वथा । जाण तत्त्वतां लंकेशा ॥ ६० ॥ तूं आमुचा निजसखा । तुझेनि धर्में सकळिकां । भेटी झाली रघुकुळटिळका । अनंत सुखा मेळविलें ॥ ६१ ॥ ऐसें परस्परें येर येर । कामादिक पैं समग्र । आणि स्वयें दशवक्त्र । येर येर स्तविताती ॥ ६२ ॥ तंव श्रीरामाचा निजबाण । करी शिरांचें छेदन । तरी पडेना दशानन । विस्मित बाण स्वयें झाला ॥ ६३ ॥ देखोनि बाणाचा विस्मयो । रावण बोलतसे पहा हो । श्रीरामाचा पूर्णानुग्रहो । तुज स्वयमेवो कळेना ॥ ६४ ॥ श्रीरामामृतकूपिका । अखंड माझे हृदयीं देखा । ते प्रसवत असे मुखां । तुझा आवांका तो किती ॥ ६५ ॥ प्रकाशावया निजमहिमान । शिरें प्रसवत रघुनंदन । लाजली तुझी आंगवण । नामामृत जाण अनिवार ॥ ६६ ॥ निग्रहो द्यावा तुम्हांसी । राम प्रसवत शिरांसी ।

१ विरोध. २ बदली. ३ ज्ञानपूर्ण. ४ वेद. ५ स्तब्ध झालीं. ६ कुंठित होऊन राहतात. ७ निष्कपट. ८ सतत.

९ एकनिष्ठतेनें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

अद्यापि न कळे तुम्हांसी। जरी अहर्निशीं जिवलग ॥ ६७ ॥ ऐकोनि रावणाचें वचन। लाजा संकोचला बाण। अलोट नामाचें महिमान। माझी आंगवण ते किती ॥ ६८ ॥ अहर्निशीं जवळी असतां। श्रीराममहिमा तत्त्वतां। न कळे न कळे सर्वथा। आलों वृथा संसारा ॥ ६९ ॥ गुळामाजील दगड। सर्वांगीं दिसे जैसा गोड। परिपाकीं दावी निवाड। अति अवघड कठिनत्वें ॥ ७० ॥ श्रीरामाचे निजभातां। आम्ही अहर्निशीं जवळी असतां। श्रीराम न कळे तत्त्वतां। काय आतां वल्गेजों ॥ ७१ ॥ श्रीरामवैभव नेणोन। स्वयें थोंटावला बाण। क्षीण माझी आंगवण। करूं कंदन राहिला ॥ ७२ ॥ तें देखोनि दशानन। नमिता झाला श्रीरामबाण। तुझेनि धर्मे आम्हां जाण। वैभवज्ञान रामाचें ॥ ७३ ॥ कंठीं लागतां तुझा घावो। हृदयीं झाला आविर्भावो। सर्वसाक्षी श्रीरामरावो। अद्वितीय अखंड ॥ ७४ ॥ अद्वितीय श्रीरघुनाथ। ऐसा बाणला इत्यर्थ। तेचि नामामृतकूपिका येथ। शिरें अनंत प्रसवती ॥ ७५ ॥ एकदेशी परिच्छिन्न। होतों करंटा दशवदन। तो सर्वगत सनातन। श्रीरघुनंदन स्वयें झालों ॥ ७६ ॥ तरी सज्जनांचा ऐसा महिमा। भेटलिया उत्तमाधमां। उडवोनि द्वंद्वधर्मा। निजधामा पावविती ॥ ७७ ॥ चोरटा वाल्मीक तत्त्वतां। नारद भेटला अवचितां। निरसोनि मागील दुरितां। अनागतवक्ता पैं केला ॥ ७८ ॥ तैसें तुझे आघातें येथ। निरसूनि माझें सकळ दुरित। पावविलों श्रीरघुनाथ। कृतकृत्य करूनी ॥ ७९ ॥ परस्परें दोघे जण। येरयेरांचें करितां स्तवन। शब्दासी उपरति होऊनि पूर्ण। समाधान पावले ॥ ८० ॥ उपरति होवोनि शब्दांसी। स्मरतां श्रीरामस्वरूपासी। बाहेर देहाची दशा कैसी। न कळतां भूमीसी उलंडले ॥ ८१ ॥ रावणाचीं पंचमहाभूतें। मीनलीं भूतात्म्या श्रीरामातें। इंद्रियचेष्टाही तेथें। चिन्मूर्तीतें विनटल्या ॥ ८२ ॥

स शरो रावणं हत्वा रुधिरार्द्रसुखच्छविः।
भृत्यवत्कर्मणि कृते स तूणं पुनरागतः ॥ २ ॥

भूमीवरी पडतां रावण। आनंदमय झाला बाण। कार्य साधिलें संपूर्ण। नमून रघुनंदन भातां रिघे ॥ ८३ ॥ जेंवी इतर सेवक। स्वामिकार्थ साधूनि देख। स्वयें परते एकाएक। विजयसुख सांगत ॥ ८४ ॥ जैसी स्वामीची आज्ञा होती। कार्य साधिलें त्याच रीतीं। ऐसें सांगोनि स्वामीप्रती। धरी उन्नती निजगर्वें ॥ ८५ ॥ तैसा नव्हे श्रीरामबाण। अजय त्रैलोक्यीं रावण। त्याचें करोनि निर्दळण। अणुही जाण गर्व नाहीं ॥ ८६ ॥ मौनेंचिकरीं श्रीरामासी। बाणें नमोनि वेगेंसीं। जाणोनि स्वामीच्या वैभवासी। रिघे पाठीसीं भात्यांत ॥ ८७ ॥ लौकिकीं प्रथा ऐसी। जे वधावया रावणासी। प्रसन्न करोनि सूर्यासी। रामें दशवक्त्रासी निवटिलें ॥ ८८ ॥ ज्याचेनि तेजें रविशशी। प्रकाशरूप जगासी। तो शरण जाईल आणिकासी। कदा काळेंसीं घडेना ॥ ८९ ॥ भूमीं पडतां दशकंठ। प्रवाहे रुधिराचा लोट। चिडांणी झाली उद्भट। झाला शेवट युद्धाचा ॥ ९० ॥ द्रुमशिखरेंसहित। जेंवी उलंडे पर्वत। तेंवी पडला लंकानाथ। अति विख्यात पुरुषार्थी ॥ ९१ ॥ भूमीं पडतां रावण। दणाणलें त्रिभुवन। कैलास झाला आंदोलायमान। सत्यलोक पूर्ण डळमळला ॥ ९२ ॥ विसां खांदियांचें दिंड। झाड उन्मूळिलें वितंड। तेंवी वीसही बाहु प्रचंड। रावण उदंड उलंडला ॥ ९३ ॥ सुवर्णबंदी कार्मुक। भूमीं लोळत असे देख। बाण पडिले रुक्मपुंख। शस्त्रें अनेक लोळती ॥ ९४ ॥ रत्नजडित मुकुट। भूमीं लोळत तेजिष्ठ। रणीं पडला लखलखाट। जडित उद्भट भूषणें ॥ ९५ ॥ महावीर रणकर्कश। रणयोद्धे अति दुर्धर्ष। रणीं पडले बहुवस। मोकळे केश लोळती ॥ ९६ ॥ बाहु लोळती सांगद। मस्तकें मुकुटेंसीं विविध। करचरणरहित कबंध। रणीं बहुविध लोळती ॥ ९७ ॥ कोटी सैन्य रणीं पडत। तैं एक कबंध उठत। ऐसीं कबंधें अनंत। सैरा रणांत धांवती ॥ ९८ ॥ असंख्य सैन्य पडिलें रणीं। रत्नखचित मुकुटाभरणीं। तेथें पातल्या पैंक्षिश्रेणी। विचित्र ध्वनीं बोलत

१ बोलों. २ प्रकटणें. ३ सर्वभूतमात्रांमध्यें साक्षीरूपानें राहणारा. ४ उंच आणि नीच यांना. ५ द्वैतभावाला. [illegible]. ७ [illegible]. ८ समरस झाली.

९ प्रसिद्धी. १० चिखल. ११ सकंप. १२ अंगदभूषणांसहित. १३ धडें. १४ पक्षीसमूह.

Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ ९९ ॥ घार गीध श्येन काक । गोमायु[1] पातले असंख्य । मांसभक्षणीं अति हरिख । रणीं सकळिक मानिती ॥ १०० ॥ भूतें पातलीं तत्क्षणीं । नव कोटी कात्यायनी । छप्पन्न कोटी दळ घेऊनी । चामुंडायणी पातली ॥ १ ॥ औट कोटी भूतावळी । घेवोनि आली कंकाळी । नाचों लागलीं गोंधळीं । मांस सकळीं सेवावया ॥ २ ॥ सेवावया मांस रुधिर । येरापुढें धांवे येर । दुजें म्हणे परतें सर । हांवे[2] फार भरलीस ॥ ३ ॥ एक म्हणतां आलों पहिलें । दुजें म्हणे नवल झालें । शेतीं राखण ठेविलें । त्यासी काय आलें धणीपण ॥ ४ ॥ पहिलें होतासी राखण । तरी भातें घे पां मोजून । अमूप[3] घ्यावया आंगवण । सर्वथा जाण तुज नाहीं ॥ ५ ॥ बळें घेऊं जाय आवेशीं । दुजें त्यातें सुबद्ध धुमैसी । बोंब सुटली रणभूमीसी । कलह भूतांसी लागला ॥ ६ ॥ सकळां श्रेष्ठ चामुंडायणी । तिणें देखोनि झोंटधरणी । सकळां समीप बोलावूनी । पुसे भांडणीं काय काज ॥ ७ ॥ तेही सांगती वृत्तान्त । येरी खदखदां हांसत । तुमचा कलह समस्त । लागला येथ तोडावा ॥ ८ ॥ श्रीरामरणामाझारी । पीक आलेंसे घुमरी । तुम्हांसी भांडण परस्परीं । भक्षावारीं लागलें ॥ ९ ॥ पूर्विले वेळे हनुमंतें । विभागून यथार्थें । समजावोनि सकळांतें । केलीं भूतें पैं तृप्त ॥ ११० ॥ त्याहूनि आतां येथें । तृप्ती होईल सकळांतें । संदेह न धरावा चित्तें । श्रीराम रणातें पावूनी ॥ ११ ॥ नाम स्मरतां रघुनाथ । महापापी उद्धरत । तो संमुख असतां रणाआंत । कोण अतृप्त राहूं शके ॥ १२ ॥ ज्याचे दासाचेनि सामर्थ्यें । तृप्ति झाली सकळ भूतांतें । तो श्रीराम असतां येथें । कैंवी अतृप्तें रहाल ॥ १३ ॥ 'सहिष्णुर्विजयी भवेत्' । ऐसें श्रुतिशास्त्र गर्जत । त्वरा न करावी तुम्हीं येथ । तृप्ति अद्भुत पावाल ॥ १४ ॥ ऐसें चंडेश्वरी बोलतां । आनंद झाला सकळ भूतां । कलह सांडूनि परता । भाग तत्त्वतां वांछिती ॥ १५ ॥ श्रीराम नेटका विंदानी । आज्ञापिलें बाणालागूनी । आदरिली भागवांटणी । सावधानीं अवधारा ॥ १६ ॥ श्रीरामबाण तो मापारी[4] । नरकपाल कुडवेंकरी । मैंविता झाला अति कुसरीं । खळेकरी भैरव ॥ १७ ॥ छप्पन्न कोटी भूतावळी । घेऊनि आली भद्रकाळी । मानिली भूतगणीं सकळीं । स्वामिणी भली राजभागा[5] ॥ १८ ॥ नवकोटी सैन्यासमवेत । कात्यायनी पातली तेथ । प्रजाभाग पैं समस्त । हातोहात तिणें नेला ॥ १९ ॥ सैन्य घेवोनि औटकोडी । चामुंडा आली लवडसवडी । शेषतळा उडाउडीं । अति तांतडीं घेऊनि गेली ॥ १२० ॥ निजसमुदायासकट । झाली कंकाळी प्रकट । पाडेवरीचे जे पाट । तेणें उद्भट सुखावली ॥ २१ ॥ बैलुतें काढिलें उभेरासी । मेसको घेवोनि गेली त्यासी । सुखावोनि निजमानसीं । श्रीरामासी ओंवाळिती ॥ २२ ॥ मेसकोची निजदासी । ते मारको आली आवेशीं । खळें मातेरें देवोनि तिसी । अति प्रीतीसीं समजावी ॥ २३ ॥ पाडव आणि मापारी । कराळी त्यांतें अंगीकारी । श्रीरामबाण जो मापारी । आपण करी दास्य त्याचें ॥ २४ ॥ भैरव वेताळ दोन्ही । देव ब्राह्मण त्यांलागूनी । देवोनि अति सन्मानीं । रणांगणीं सुखी केले ॥ २५ ॥ पिराणा आणि फकिराणा । मैळीमुकीलागोनि जाणा । देवोनियां अति सन्माना । रणामाजी गौरविलीं ॥ २६ ॥ रणामाजीं समस्तें । बाणें समजाविलीं भूतें । संतोष मानोनि चित्तें । निजभागातें पैं घेती ॥ २७ ॥ मुख्य काळीज तो राजभाग । काळिका घेवोनि गेली साङ्ग । मज्जा जो कां प्रजाभाग । कात्यायनी सवेग घेऊन गेली ॥ २८ ॥ मांसभाग चामुंडेसी । रुधिर तें कंकाळीसी । मेद दिधलें मेसकोसी । अस्थि मारकोसी पैं देखा ॥ २९ ॥ भाग वांटिती ते वेळे । मागत्याचे मिळती पाळे । म्हणोनि धर्मालागीं वहिलें । शिर काढिलें पैं देखा[6] ॥ १३० ॥ धर्मार्थ सार अर्पिती । ते उभयलोकीं सुख भोगिती । यालागीं उत्तमांगें निश्चितीं । धर्माप्रती अर्पिलीं ॥ ३१ ॥ तेणें भैरव वेताळ । दोघे पावले सुखकल्लोळ । त्वचा काढिली जे सकळ । ते नेली तत्काळ मैळयामुक्या ॥ ३२ ॥ खंकाळें जे आणिकीं भूतें । निःशेष विसरोनि रामातें । सैरा धांवती खोंखातें[7] । विषयभोगातें वांछूनि ॥ ३३ ॥ त्यांचे तृप्ती-

१ कोल्हे. २ ताडन करी. ३ अमूप, पुष्कळ. ४ मोजणारा. ५ नोकरीबद्दल दिलें जाणारें धान्य. ६ मस्तकें.

७ ओरडत.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuyan Vani Trust Donations

लागीं देख । लिंग काढूनि देती एक । तेणेंचि करोनि तृप्तिसुख । तेंही अशेख मानिलें ॥ ३४ ॥ एवं सकळां निजतृप्ती, । श्रीरामबाणें निश्चितीं । करोनियां शीघ्रगतीं । रणीं समस्तीं गौरविलें ॥३५॥ तेणें सुखावलीं समग्र । होवोनियां आल्हादपर । परस्परें पाहुणेर । अत्यादर मांडिला ॥३६॥ देखतांचि श्रीरघुनाथ । आनंद कोंदला बहुत । कलह तुटला समस्त । सुख अद्भुत उलथलें[1] ॥ ३७ ॥ पहिलीं झालीं जीं भांडणें । तीं विसरावयाकारणें । घालिती येरयेरां जेवणें । देती वाणें परस्परें ॥ ३८ ॥ अत्यंत होवोनियां नम्र । परस्परें अत्यादर । भोजन मांडिलें एकत्र । मांसरुधिरसमरसीं ॥ ३९ ॥ महावीरांचा रणमद । तेंचि भोजनीं घेती मद्य । मांस भक्षिती विविध । अति आल्हाद मांडिला ॥ १४० ॥ मेद आणि मद्यमांस । आवडीं सेवितां सावकाश । आनंद चढला भूतांस । रणभूमीसी नाचती ॥ ४१ ॥ विश्वजननी सीता सती । धरोनि आणिली लंकापतीं । ते सुटावया निश्चितीं । नवसी होती नवसिले[2] ॥ ४२ ॥ तो दुरात्मा रावण । श्रीरामबाणेंकरून । वधिला न लागतां क्षण । आनंद पूर्ण तेणें त्यांसी ॥ ४३ ॥ सिद्धी पावले नवस । तेणें आनंद भूतांस । मिळोनियां रणभूमीस । निज नवस उजविती ॥ ४४ ॥ आदिशक्ति सीता सती । तीलागीं सकळही भूतीं । मिळोनियां रणाप्रती । गोंधळ घातला स्वानंदें ॥ ४५ ॥ काळी कराळी कंकाळी । मारको मेसको भद्रकाळी । हरिखें लंकेच्या पावळीं । गोंधळ सकळीं मांडिला ॥ ४६ ॥ काहळा भोंवळा मांदळ । गिडबिडीं गुजबुजीं टाळ । सूक्ष्म वाद्यें चिनकाहळ । तुरें बंभाळ वाजविलीं ॥ ४७ ॥ रणीं यक्षिणी निजवेशीं । विसरोनि देहभावासी । नाचों लागल्या उल्लासीं । अति प्रीतीसीं स्वानंदें ॥ ४८॥ मेद मांस रुधिर । प्रीतीं वांटिती येरां येर । उन्मत्त झालीं अपार । करिती गजर आल्हादें ॥ ४९ ॥ तृप्ति झाली रणभूमीसी । तेणें आनंद भूतांसी । स्तविती झालीं श्रीरामासी । निजगजरेंसीं अति प्रीतीं ॥ १५० ॥ दुर्जय जो त्रैलोक्यासी । जेणें निग्रहिलें देवांसी । त्या निवटिलें रावणासी । श्रीरामें एसी ख्याति केली ॥५१॥ जन्मादारभ्य[3] आजिवरी । सकळ भूतां एकसरी । तृप्तिदाता संसारीं । कोणी धरेवरी नव्हताचि ॥ ५२ ॥ तीं आजि श्रीरघुनाथें । तृप्त केलीं सकळ भूतें । म्हणोनि गोंधळ ये रणभूमीतें । सावचित्तें माजविला ॥ ५३ ॥ तरी नवल नाहीं याचें । राम जीवन जगाचें । पाळण करावें सृष्टीचें । हेंचि श्रीरामाचें निजव्रत ॥ ५४ ॥ राम विश्वाचा विश्वात्मा । राम जीवाचा जीवात्मा । राम पराचा परमात्मा । राम परमात्मा निजाचा ॥ ५५ ॥ ऐसें करितां स्तवन । उडालें भूतांचें भूतपण । अवघीं झालीं चैतन्यघन । श्रीरघुनंदन निजकृपा ॥ ५६ ॥ वधोनियां अहंरावण । विजयी झाला रघुनंदन । एका जनार्दना शरण । सुखसमाधान श्रीरामें ॥ १५७ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां रावणवधो नाम त्रिषष्टितमोऽध्यायः ॥ ६३ ॥ ओंव्या ॥ १५७ ॥ श्लोक ॥ २ ॥

अध्याय चौसष्टावा

॥श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः॥ करोनियां रणकंदन । ससैन्य रणीं रावण । स्वयें पाडिला आपण । उरलें सैन्य देशोधडी ॥ १ ॥ एकीं दिगंतर लंघिलें । एकां कंठीं प्राण उरले । एकां गात्रां कंप सुटले । एक निमाले आपधाकें[4] ॥ २ ॥ एकें झालीं भ्रमित । एकां सुटला अधोवात । एकां मूत्रवृष्टि होत । प्राण सांडीत उभ्यांउभ्यां ॥ ३ ॥ एक होवोनि कासाविसी । रडत पडत रणभूमीसी । बोंब घेवोनि वेगेंसीं । आलीं लंकेसी सांगत ॥ ४ ॥ एक सांडिती लेणीं लुगडीं । एक तृण धरिती तोंडीं । एकांचि वळली बोबडी । पडली मुरकुंडी एकांची ॥ ५ ॥ एक येती काकुळती । मारूं नको रघुपती । शरण आलों तुजप्रती । करिसी किती संहार ॥ ६ ॥ एक म्हणती माजी रणा[5] । झुंजों आलों नाहीं जाणा । पहावया युद्धरचना । रामरावणरणामाजी ॥ ७ ॥ एक येवोनि काकुळती । श्रीरामातें विनविती । धरोनि आणिलें बहुतीं । रणख्याती नाहीं आलों ॥ ८ ॥ एक विनविती रामासी । व्यर्थ न मारीं आम्हांसी । सणा आलों दिवाळीसी । जामातें परियेसीं सासुरियां ॥ ९ ॥

---

१ उद्भवलें २ नवस बोलणारे. ३ जन्मापासून. ४ आपणच धास्ती घेऊन. ५ रणांगणामध्यें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

कोणी आला पाहुणा । कोणी आला दिवाळसणा । मारूं नको रघुनंदना । जीवदाना आम्हां देईं ॥ १० ॥ ऐसे येती काकुळती । भूमीं गडबडां लोळती । बाण गेला रामाप्रती । तरी बरळती आपधाकें ॥ ११ ॥ रामें वधिला रावण । देखोनियां राक्षसगण । सैरां पळती रानोरान । देहलोभेंकरून निजभयें ॥ १२ ॥

तं दृष्ट्वा निहता भूमौ हतशेषा निशाचराः ।
हतनाथा भयत्रस्ताः सर्वतो विप्रदुद्रुवुः ॥ १ ॥
सर्वतश्चाभिपेतुस्तान् वानरा द्रुमयोधिनः ।
दशग्रीववधं दृष्ट्वा विजयं राघवस्य च ॥ २ ॥

भूमीं पडतां रावण । दशदिशा रक्षोगण । रडत पडत पळती जाण । निशाचरगण अति दुःखी ॥ १३ ॥ तें देखोनि वानर । अवघे झाले आल्हादपर । नाचों लागले समग्र । करिती गजर नामाचा ॥ १४ ॥ एक झेलीत पर्वतशिखरें । एक झेलीत वृक्षाग्रें । हरिखें नाचती वानरें । रावण रघुवीरें निवटिला ॥ १५ ॥ नमन करिती येरयेरें । क्षेमें देती परस्परें । किरांणें देती अति आदरें । रावण रघुवीरें निवटिला ॥ १६ ॥ एक गर्जती भुभुःकारें । एक गर्जती नामोच्चारें । झालीं आनंदें निर्भरें । रावण रघुवीरें निवटिला ॥ १७ ॥ जो नागवे त्रैलोक्यासी । यम काळ कांपती ज्यासी । त्या निवटिलें रावणासी । निजबाणेंसीं श्रीरामें ॥ १८ ॥ जो न भिये शंकरासी । आंदोळिलें कैलासासी । त्या निवटिलें रावणासी । निजबाणेंसीं श्रीरामें ॥ १९ ॥ दंडोनियां लोकपाळांसी । बंदीं घातलें देवांसी । त्या निवटिलें रावणासी । निजबाणेंसीं श्रीरामें ॥ २० ॥ सकळ होवोनि उल्लासी । लागले श्रीरामचरणासी । रामें आलिंगिलें प्रीतीसीं । निजमानसीं स्वानंदें ॥ २१ ॥ निजमदें शिवापासीं । भोगूं मागे पार्वतीसी । त्या निवटिलें रावणासी । निजबाणेंसीं श्रीरामें ॥ २२ ॥ बिभीषण शरणागत । पुरले त्याचे मनोरथ । होवोनियां आनंदभरित । जीवें ओंवाळीत श्रीरामा ॥ २३ ॥ सुग्रीवराजा वानरनाथ । तेणें धरिलें होतें व्रत । न वधितां लंकानाथ । किष्किंधे निश्चित नाहीं जाणें ॥ २४ ॥ सिद्धि पावलें निजव्रत । रामें वधिला लंकानाथ । तेणें आनंदें उपरमत । येवोनि रघुनाथ नमियेला ॥ २५ ॥ वनें वन हिंडतां । अति श्रम शुद्धि करितां । झाला होता हनुमंता । जो लंकानाथा निजघाती ॥ २६ ॥ ते निरसिली सकळ व्यथा । वध झालिया लंकानाथा । श्रीरामा भेटेल सती सीता । सार्थकता कष्टांची ॥ २७ ॥ म्हणोनियां आल्हादपर । प्रेमें नाचे हनुमान वीर । करीत नामाचा गजर । श्रीरामचंद्र नमियेला ॥ २८ ॥ हनुमंताचा परम आप्त । अंगद युवराजा विख्यात । त्याचे पुरले मनोरथ । लंकानाथ निवटिला ॥ २९ ॥ तेणें हरिखें नाचत । श्रीरामप्रेमें डुल्लत । त्याचे पुरले मनोरथ । सावचित्त आनंदें ॥ ३० ॥ नळ नीळ जांबवंत । सुषेण वैद्यराज तेथ । तारतरळादि समस्त । हरिखें नाचत अति प्रेमें ॥ ३१ ॥ रामनामाच्या निजगजरीं । केला भुभुःकार दीर्घस्वरीं । श्रीरामचरण प्रीतीकरीं । वानरवीरीं वंदिले ॥ ३२ ॥ अवघे आनंदें नाचती । श्रीरामप्रेमें डुल्लती । श्रीरामगुणकीर्ति वर्णिती । गीतीं गाती श्रीरामा ॥ ३३ ॥ एक झाले नृत्यकारी । एक गर्जती कैवारीं । वेगें होवोनि नागारी । कीर्तिगजरीं वाखाणिती ॥ ३४ ॥ एक होवोनि वैष्णव । पदीं वर्णितां राघव । उथळले अष्ट प्रेमभाव । देहभाव विसरले ॥ ३५ ॥ एक तीं भावार्थें साबडीं । तोंडें करोनि वांकुडीं । धरिते झाले बागडी । निजनिर्वेडीं निजप्रेमें ॥ ३६ ॥ निजप्रेमाचेनि समाजें । हरिखें नाचती निजभोजें । विसरोनियां माझें तुझें । श्रीरघुराजें संतुष्ट ॥ ३७ ॥ तें देखोनियां स्वस्फूर्ती । विसरोनियां रघुपती । खांदीं घेवोनियां प्रीतीं । हरिखें नाचती श्रीरामनामें ॥ ३८ ॥ तें देखोनि सुरवर । स्वर्गीं झाले आल्हादपर । विजयी झाला श्रीरामचंद्र । दशवक्त्र निवटिला ॥ ३९ ॥ दिव्यसुमनें निजगजरीं । वर्षले श्रीरामाचे शिरीं । अवघे कटकें जयजयकारीं । पुष्पेंकरीं मंडित ॥ ४० ॥

अथांतरिक्षे व्यनदन् सौम्यस्त्रिदशदुंदुभिः ।
दिव्यगंधवहास्तत्र मारुताः सुसुखं ववुः ॥ ३ ॥
निपपातांतरिक्षाच्च पुष्पवृष्टिस्तथा भुवि ॥ ४ ॥

१ राक्षससमुदाय. २ आलिंगन. ३ उज्या. ४ उल्लास पावत. ५ गरुड. ६ उत्पन्न झाले. ७ बागडूं लागले. ८ आपल्या कौशल्यानें. ९ सैन्य.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

मंद सुगंध सुशीतळ । वेगें पातला मलयानिळ[1] । समस्तां श्रमस्वेदकल्लोळ[2] । तेणें तत्काळ निरसिला ॥ ४१ ॥ अंतरिक्षगगनींहूनी । प्रकट झाली आकाशवाणी । राम विजयी रणांगणीं । दशानन निवटिला ॥ ४२ ॥ चिरंजीवी रघुनाथा । निवटोनियां लंकानाथा । सुरां सोडविलें समस्तां । बंदीमोचनता पैं केली ॥ ४३ ॥ तेणें सकळ सुरगण । आनंदमय होऊनि पूर्ण । वर्णिती श्रीरामाचे गुण । दुष्ट दशानन निवटिला ॥ ४४ ॥ जो अजेय त्रैलोक्यासी । बंदीं घातलें सुरवरांसी । दासकाम घे आवेशीं । भय मानसीं असेना ॥४५॥ ते दुष्टसेवेपासूनि जाण । श्रीरामें सोडविले आपण । मिळोनियां गंधर्वगण । करिती गायन आनंदें ॥ ४६ ॥ नारद तुंबर दोघे जण । वसुधामा सुलोचन । चित्रांगदेंसहित जाण । सुस्वर गायन मांडिलें ॥ ४७ ॥

> एते गंधर्वराजानो ह्यंतरिक्षस्थिता जगुः ।
> उर्वशी मेनका रंभा घृताची च तिलोत्तमा ॥ ५ ॥
> अंतरिक्षे सुसंहृष्टा ननृतुश्चाप्सरोगणाः ॥ ६ ॥

गंधर्वराजे पांचही जाण । वीणा घेवोनि आपण । रागोद्धार करिती पूर्ण । सुस्वर गायन मांडिलें ॥ ४८ ॥ तंव पातल्या स्वर्गनायिका । रंभा उर्वशी मेनका । घृताची तिलोत्तमा देखा । हर्षात्मका नाचती ॥४९॥ निजानंदें स्वर्गसुन्दरी । नृत्य करितां चांचरी[3] । देहभाव सांडिला दूरी । राम अंतरीं धरोनियां ॥५०॥ देव गंधर्व सकळिक । देवांगना मिळोनि देख । अवघीं नाचती समसुख । रामें दशमुख निवटिला ॥ ५१ ॥ रावणतेजें दुर्धर । झांकोनियां दिवाकर[4] । पडिला होता अंधकार । तो रामें समग्र निवटिला ॥५२॥ श्रीरामतेजें भास्कर । उजळोनियां अति शीघ्र । झाला सकळप्रकाशकर । दिशा समग्र उजळल्या ॥ ५३ ॥ चन्द्र झाला होता प्रभाहीन । तो श्रीरामतेजेंकरून । उजळला न लागतां क्षण । विज्वर पूर्ण तो झाला ॥ ५४ ॥ इंद्र वरुण आणि कुबेर । नैर्ऋत्य ईशान आणि महारुद्र । अग्नियमादि समग्र । हरिखें थोर दाटले ॥ ५५ ॥ नष्ट दुरात्मा रावण । करोनि सकळांचें रोधनें[5] । सेवा घेतसे दारुण । रामें निर्दळण[6] केलें त्याचें ॥ ५६ ॥ म्हणोनियां आल्हादपर । नृत्य करिती समग्र । मांडिलासे अति गजर । जयजयकार आनंदें ॥ ५७ ॥ दिवि भुवि अंतरिक्ष । नभोमंडळीं सावकाश । अवघे झाले स्वप्रकाश । दुष्ट राक्षस निर्दळिला ॥ ५८ ॥ तेणें उजळलें जगतीतळ । सुर आनंदले सकळ । करिती नामाचा कल्लोळ । सुखसुकाळ माजविला ॥ ५९ ॥ फिटला द्वंद्वदुःखदुकाळ । पाहिला स्वसुखसुकाळ । श्रीराम वोळला[7] प्रबळ । स्वपदीं सकळ स्थापिले ॥ ६० ॥ ऐसा आनंद सुरवरीं । येरीकडे श्रीरामभारीं[8] । सौमित्रादिक महावीरीं[9] । पूजा प्रीतिकरीं मांडिली ॥ ६१ ॥ सौमित्र आणि हनुमंत । बिभीषण शरणागत । सुग्रीव अंगद जांबवंत । जुत्पति[10] समग्र आनंदले ॥ ६२ ॥

> ततस्तु सुग्रीवविभीषणादयः
> सुहृद्विशिष्टाः स च लक्ष्मणस्तदा ।
> समीक्ष्य हृष्टा विजयेन राघवं
> रणेऽभ्यनंदन्विधिवच्च पूजयन् ॥ ७ ॥
> स तु निहतरिपुः स्थिरप्रतिज्ञः
> स्वजनबलाभिवृतो रणे रराज ।
> रघुकुलनृपनंदनो महात्मा
> त्रिदशगणैरिव संवृतो महेंद्रः ॥ ८ ॥

मिळोनियां सकळ वीरीं । पूजोपचारसामग्री । तिंहीं मांडिली अति गजरीं । संक्षेपकैरीं सांगेन ॥ ६३ ॥ हनुमान होवोनि सिंहासन । वरी बैसला रघुनंदन । अति अंतरंग सुमित्रानंदन । पूजाविधान तो करी ॥ ६४ ॥ आनंदाश्रु जे स्रवत । तेंचि उदक जाण तेथ । आपाद क्षाळण पुरवीत । शरणागत बिभीषण ॥ ६५ ॥ सुग्रीव भावार्थाचें वासें[11] । पीतांबर राघवास । अर्पिता झाला सावकाश । अति उल्लास पूजेचा ॥ ६६ ॥ निजप्रेम शुद्ध चंदन । घेवोनि आला सुषेण । सौमित्रें घेवोनि आपण । केलें समर्पण रामभाळीं ॥ ६७ ॥ उरलें जें प्रेमचंदन । तेणें सर्वांगीं रघुनंदन । चर्चियेला संपूर्ण । अति विचक्षण सौमित्र ॥ ६८ ॥ अष्टही भाव सात्त्विक । तेंचि देखा जडित पदक । घेवोनियां

१ मलय पर्वतावरील सुगंधित वायु. २ श्रमानें आलेले घामाचे लोट. ३ भोंवळ आली. ४ सूर्य. ५ बंदींत घालून. ६ संहार. ७ कृपायुक्त झाला. ८ श्रीरामसैन्यांत. ९ योद्धे. १० योडक्यांत. ११ वस्त्र.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

एकाएक । जांबवंत देख पैं आला ॥ ६९ ॥ देतां सौमित्राचे हातीं । येरें घेवोनि अति प्रीतीं । कंठीं बांधलें रघुपती । सकळदीप्तिद्योतक ॥ ७० ॥ विविध प्रीतीचे अलंकार । जडित भावार्थें नागरें । भक्तिमेखळा अति परिकर । जेथें रघुवीर सांपडला ॥ ७१ ॥ हनुमंताचा शिष्य अंगद । श्रीरामीं प्रेमा अगाध । त्या प्रेमभावाचा मुकुट शुद्ध । बाणला विशदें रामासी ॥ ७२ ॥ सकळ मिळोनि वानरगणें । राम पूजिती जीवें प्राणें । चैतन्यदीपें ओंवाळणें । निंबलोण सर्वस्वें ॥ ७३ ॥ एकीं धरिलें तन्मयछत्र । एक झाले चामरधर । एक झाले विंझणेकर । भद्रीं रघुवीर शोभत ॥ ७४ ॥ करोनियां प्रदक्षिणा । सकळही श्रीरामचरणां । लागतां तया बिभीषणा । रावण मना आठवला ॥ ७५ ॥ वधिलें देखतां रावणासी । मोह उपजला बंधूसी । अश्रु आले जी नेत्रांसी । करी रुदनासी अति दुःखें ॥ ७६ ॥

भ्रातरं निहतं दृष्ट्वा शयानं निर्जितं रणे ।
शोकवेगपरीतांगो विललाप विभीषणः ॥ ९ ॥

बंधु धरोनि पोटेंसीं । विलाप करी दुःखावेशीं । बहु शिकविलें नायकसी । व्यर्थ रामासी विरोधिलें ॥ ७७ ॥ दैवानुसार बुद्धि होये । तेथें तुज बोल काये । जैसें प्राक्तन ओढिताहे । प्राणी वर्तताहे तेणें कर्में ॥ ७८ ॥

अथ खलु विषमः पुराकृतानां
फलति हि जंतुषु कर्मणां विपाकः ।
हरशिरसि शिरांसि यानि रेजु-
र्हरहर तानि लुठंति गृध्रपादे ॥ १० ॥

निजहस्तेंकरोनि जाण । निजशिरें छेदोनि पूर्ण । शिवासी अर्पी रावण । तिंहीं शिरीं रण वैसविलें ॥ ७९ ॥ जीं शोभती शिवमस्तकीं । मुकुटमंडित जडित माणिकीं । त्यांसी झडपिती पांखीं । निजकौतुकीं गीधधारी ॥ ८० ॥ जीं न खालावती ब्रह्मादिकां । जीं अजेय तिंहीं लोकां । तीं रणीं लोळती देखा । गोमायुकापायांतळीं ॥ ८१ ॥ निजप्रीतीच्या कल्लोळीं । शिवें धरियेलीं मौळीं । तीं लोळती पायांतळीं । गीधमंडळीमाझारीं ॥ ८२ ॥ प्रारब्धभोग बलवत्तर । त्यासी कांहीं न चाले सूत्र । रणीं लोळतो दशवक्त्र । कर्मतंत्र सोडीना ॥ ८३ ॥ शंकरवरदेंकरून । लंकेचा राजा रावण । त्याचीं शिरें धुळीमाजी जाण । रणांगणीं पूर्ण लोळती ॥ ८४ ॥ निजहस्तें छेदोनि वहिलीं । जीं शिवमस्तकीं अर्पिलीं । तीं दुष्टकर्में व्यापिलीं । गिर्धीं विदारिलीं घडे कैंवी ॥ ८५ ॥ तेचिविषयीं उत्तर । श्रोते परिसोत सादर । अति सूक्ष्म कर्मसूत्र । नव्हे गोचर सज्ञाना ॥ ८६ ॥ शिव सर्वस्वें सेविला । विष्णु सर्वस्वें द्वेषिला । तेणें भेदें नागवला । डोळ पडिला भजनासी ॥ ८७ ॥ विष्णु शिवाचें निजध्येय । शंकर विष्णूचें हृदय । उभयांसी जो भेद पाहे । दुर्दशा लाहे नवल कोण ॥ ८८ ॥

शिवस्य हृदयं विष्णुर्विष्णोश्च हृदयं शिवः ।
यथा शिवमयो विष्णुस्तथा विष्णुमयः शिवः ॥ ११ ॥
यथांतरं न पश्यामि तथा मे स्वस्ति चायुषि ॥ १२ ॥

ब्रह्मा धरोनि मुंगीवरी । शिव व्यापक चराचरीं । विष्णुशंकरां बाह्यांतरीं । दोघांमाझारीं भेद नाहीं ॥ ८९ ॥ विष्णु शिवाचें हृदय । शिव विष्णूचें अंतर्बाह्य । निजदेहासी पाहें निश्चय । भेदाची सोय सांडूनी ॥ ९० ॥ अनवच्छिन्न ऐसें पाहतां । त्यासी भय नाहीं सर्वथा । निरसोनियां भयाची वार्ता । अक्षयता सुखरूप ॥ ९१ ॥ तैसें न करीच रावणू । भेद वाढविला शिवविष्णू । वाढविला भजनाभिमानू । द्वेषिला विष्णु भेदबुद्धीं ॥ ९२ ॥ विष्णूची निजशक्ति तत्त्वतां । पतिव्रता माउली सीता । ते अभिलाषिली लंकानाथा । दुष्कर्मता आनें कोण ॥ ९३ ॥ श्रीराम जगद्गुरु तत्त्वतां । त्याची निजशक्ति सीता । अभिलाषितां लंकानाथा । गुरुतल्पगता सहजचि ॥ ९४ ॥ गुरुतल्पगतेपुढें आन । पाप कोण आहे दारुण । तेणें घोरकर्में रावण । गीधचरणीं पूर्ण लोळत ॥ ९५ ॥ भल्याचें शिकविलें नायके । तो सुखाचें मुख कैंवी देखे । अभिलाषितां रामनायिके । हरविलीं सुखें महाभोग ॥ ९६ ॥ मंचक कनकाचा संपूर्ण । जडितरत्नीं सुलक्षण । नवग्रहांची पाउटी जाण । तेथें दशानन शयनस्थ ॥ ९७ ॥ तें शरीर आजि येथ ।

१ सर्व तेजाचें प्रकाशक. २ सुंदर. ३ स्पष्ट. ४ वारा घालणारे. ५ सिंहासनावर. ६ रणभूमि. ७ अंगीकारिलें, शिरें रणभूमीवर पडलीं. ८ व्यंग. ९ भेदरहित, संपूर्णपणें. १० दुसरी. ११ रामपत्नी. १२ सुवर्णाचा. १३ निजलेला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सैरां रणभूमीसी लोळत । स्त्रक्चंदनें[1] जें मंडित । तें विदारिती घारी गीध ॥ ९८ ॥ जडित अंगदीं प्रचंड । जे मंडित बाहुदंड । त्यांचे झाले खंडविखंड । रणीं वितंड विखुरले[2] ॥ ९९ ॥ जिहीं भुजीं त्रिभुवन । बळें आकळिलें संपूर्ण । ते हे रणांगणीं आपण । इतस्ततां जाण विखुरले ॥ १०० ॥ सूर्यप्रभेसमान मुकुट । मस्तकीं घाली दशकंठ । त्याचें होवोनियां पीठ । रत्नें उद्भट[3] विखुरलीं ॥ १ ॥ महाराजे मंडलवर्ती । ज्या चरणां नित्य नमिती । ते तोडरेंसहित लोळती । रणाप्रती बंधुराया ॥ २ ॥ तुज सांगती शुकसारण । त्यांवरी कोपसी दारुण । तैंचि सांगे प्रहस्त प्रधान । कोप दारुण तयावरी ॥ ३ ॥ तुझा पुत्र इंद्रजित । सांगतां त्यासी मारूं धांवत । तैसेंच कुंभकर्ण विनवीत । त्यासी निर्भर्त्सित अति रागें ॥ ४ ॥ मंदोदरी निजकांता । न मानिसी तिच्या वचनार्था । तेथें माझी कायसी कथा । हाणितल्या लाता अति रागें ॥ ५ ॥ तितुकाही मानिला विषाद । परी न कळे तुझा बोध । रावण अद्वैतभक्त शुद्ध । निजानंद पावला ॥ ६ ॥ सकळ कुळा देवोनि मुक्ती । तुवां विरोधिला रघुपती । बंधो तुझी अतर्क्य युक्ती । कळली निश्चितीं आजि मज ॥ ७ ॥ तत्काळ साधावया निजमुक्ती । सायुज्य साधिला रघुपती । तें साधिलें अति निगुतीं । सकळ संपत्ती अर्पूनी ॥ ८ ॥ होऊनि सर्वस्वा विरक्त । समरांगणीं लंकानाथ । देखोनियां रघुनाथ । आनंदभरित झालासी ॥ ९ ॥ त्या आनंदाचे अति प्रीतीं । राम जाणसी सर्वां भूतीं । देह अर्पिला रघुपती । भूतसंतृप्तीलागूनी ॥ ११० ॥ 'समो नागेन समो मशकेन' । रावणा बाणलें संपूर्ण । देह केला रामार्पण । विश्वमुखें पूर्ण तृप्तीसी ॥ ११ ॥ करोनि देहाचें हविर्द्रव्य । विश्वमुखीं दशग्रीव । अर्पितांचि रघुराव । तृप्ति स्वयमेव पैं झाला ॥ १२ ॥ म्हणोनियां रावण । घारगीधमुखीं जाण । आपणा विदारवी आपण । श्रीरघुनंदनसुखार्थ ॥ १३ ॥ कुळ उद्धरिलें सकळिक । तेणें बिभीषणा हरिख । हर्षयुक्त करितां शोक । बोलों आणिक आदरिलें ॥ १४ ॥ पुष्पवाटिकेचें उद्यान[5] । क्षणें विध्वंसी पवन । तैंवी क्षणमात्रें रामें जाण । ससैन्य रावण निर्दाटिला ॥ १५ ॥ महार्मत्तमातंग[6] जैसा । कोणाही नागवे सहसा । रावण मत्त महागज तैसा । राघवेशा आतुडला ॥ १६ ॥ महामत्त वडवानळू । कोणी न शके आकळूं । त्यासी वर्षोनि घन सबळू । अग्निकल्लोळू करी शांत ॥ १७ ॥ तैंवी श्रीरामसेघेंकरून । रावणाग्नि विझविला पूर्ण । अष्टांगांचे कोळसे जाण । शोभती संपूर्ण रणांगणीं ॥ १८ ॥ ऐसे नानापरी बहुत । बंधु पुढें घेवोनि तेथ । बिभीषण विलाप करीत । हृदय पिटीत निजकरें ॥ १९ ॥ तें देखोनि रघुनंदन । संबोखीतसे आपण । शास्त्ररीतीं लौकिकवचन । शांतवन अति प्रीतीं ॥ १२० ॥ व्यर्थ न करीं शोकातें । न व्हावें झालें निरुतें । सावध होवोनि निजचित्तें । सांडीं परतें मोहासी ॥ २१ ॥ घटामाजी भरलें जळ । त्यांत बिंबलें चंद्रमंडळ । काळें वेंचल्या घटजळ । बिंब तत्काळ हरपलें ॥ २२ ॥ त्या बिंबालागीं आपण । शोक करितां दारुण । तेथें श्रमचि उरे जाण । बिंब पूर्ण न ये हाता ॥ २३ ॥ घटामाजी बिंब असतें । शोक करितां तें भेटतें । तैंवी धरिलिया प्रेतातें । रावण तेथें भेटेना ॥ २४ ॥ बिभीषणा ऐक विनंती । शोक करितां तुजप्रती । न भेटे गा लंकापती । सांडीं निश्चितीं भ्रमातें ॥ २५ ॥ तूं विवेकसंपन्न राजा । इतरां उपदेश व्हावा तुझा । तो तूं येथें मोहसमाजा । निमग्न कोंजा[8] पैं कवर्ण ॥ २६ ॥ ज्यासी होय अवगती । अवश्य त्याची करावी क्षिती[9] । उसण्याघायीं जे निमती । ते वंद्य होती सुरनरां ॥ २७ ॥ रावणें करोनि ख्याती । समरांगणीं सर्वशक्ती । तुच्छ करोनि देहस्थिती । ब्रह्मस्थिती साधिली ॥ २८ ॥ महायोगी कामक्रोध । जिणोनि साधी परमानंद । तैंवी रावणें निजपद । करोनि युद्ध साधिलें ॥ २९ ॥ वाणीचा होता दशमुख । तो झाला विश्वमुख । त्याचा करूं नये शोक । निजविवेक विचारीं ॥ १३० ॥ म्हणोनि शोका योग्य रावण । सर्वथा नव्हे नव्हे जाण । तूं बिभीषण सर्वज्ञ । व्यर्थ रुदन सांडीं परतें ॥ ३१ ॥ गेलियाचा शोक करितां । लागों पाहे मूर्खता । ते सांडोनियां सर्वथा । बंधुस्वधर्मता साधावी

१ पुष्पमाला, चंदन इत्यादींनीं. २ पसरले. ३ बहुमूल्य. ४ फाडून घेई. ५ बाग. ६ अति मदोन्मत्त हत्ती. ७ खरोखर. ८ कोणत्या कारणानें, कां म्हणून. ९ शोक.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ ३२ ॥ रावणाचें और्ध्वदेहिक । तुवां करावें आवश्यक । गोत्रज पुत्र निमाले देख । कर्ता आणिक दिसेना ॥३३॥ जो देवद्रोही वेदद्रोही । मुख्य ब्रह्मयाचा ब्रह्मद्रोही । त्याचा शोक सर्वथा पाहीं । शास्त्रें नाहीं बोलिला ॥३४ ॥ तूं बिभीषण सविवेक । सांडोनियां दुःखशोक । करीं बंधूचें और्ध्वदेहिक । व्यर्थ दुःख करोनि काय ॥ ३५ ॥

स तस्य वाक्यैः करुणैर्महात्मा
संबोधितः साधुविभीषणश्च ।
आज्ञापयामास नरेंद्रसूनुः
स्वर्गार्थमाधानमदीनसत्त्वम् ॥ १३ ॥

ऐसें सांवळेनि सुंदरें । बुद्धिबोधप्रबोधचंद्रें । सूर्यवंशप्रभाकरें । दशरथकुमरें बोलिलें ॥ ३६ ॥ जो ईश्वरा ईश्वर । जो योगियांचा योगेश्वर । जो नरेंद्रांचा नरेंद्र । तो रघुवीर बोलिला ॥३७॥ ज्याचें ऐकतां वचन । उपनिषदां पडे मौन । सद्य चित्त चमत्कारें पूर्ण । समाधान जीवशिवां ॥ ३८ ॥ तेणें श्रीरामें आज्ञापितां । मोह गेला न दिसे केउता । सावध होऊनि तत्त्वतां । झाला करिता उत्तरविधी ॥ ३९ ॥ सत्त्वाथिला अति सात्त्विक । बिभीषण परम धार्मिक । श्रीरामवचनें देख । मोह निःशेख सांडिला ॥ १४० ॥ जेंवी उगवतां दिनमणी । सचंद्र तारा हरपती रजनीं । तेंवी श्रीरामवचनेंकरूनी । मोह तत्क्षणीं पळाला ॥४१॥ सावध होऊनि मानसीं । अनुसरोनि रामवचनासी । आनंदमय रणभूमीसी । प्रेतदहनासी होय करिता ॥ ४२ ॥ स्वर्गादि क्रियेची संस्था । बिभीषण झाला करिता । तंव अंतःपुरीं कळतां वार्ता । आल्या वनिता रावणाच्या ॥ ४३ ॥

अंतःपुराद्विनिष्पेतू राक्षस्यः शोककर्शिताः ।
बहुशश्चेष्टमानास्ताः प्रदिग्धाः क्षितिपांसुभिः ॥ १४ ॥

एकी आराडती ओरडती । एकी वक्षःस्थळें पिटिती । एकी गडबडां लोळती । एकी करिती महाशब्द ॥ ४४ ॥ एकी केश तोडिती । एकी कान ओरबडती । आंग भूमीवरी टाकिती । मस्तक हाणिती भूमीसी ॥ ४५ ॥ बहुसाल करिती दुःख । हंबरडे हाणिती देख । जेंवी गाय वधितां श्वपार्क । अलौकिक आक्रंदे ॥ ४६ ॥ पति स्त्रियांचें जीवन । पति स्त्रियांचें सौभाग्य जाण । जीवें जीतां पतीवीण । प्रेतरूप जाण सर्वथा ॥ ४७ ॥ पति कांतेचें निजवित्त । पति कांतेचे भोग समस्त । पतीवीण ते उपहत । वृथा जीवित तियेचें ॥ ४८ ॥ पतीवीण वृथा आचार । पतीवीण वृथा विचार । पतीवीण वृथा शरीर । भोगोपचार ते वृथा ॥ ४९ ॥ पतीवीण वृथा योग । पतीवीण वृथा भोग । पतीवीण कैंचा संग । पतिदाघ अनिवार ॥ १५० ॥ पतीवीण कैंचें सुख । पतीवीण कैंचा हरिख । अल्पविषय स्फुरतां देख । आकल्प नरक भोगावे ॥ ५१ ॥ पतीवीण कवणेंसीं रती । पतीवीण कवणेंसीं प्रीती । पतीवीण नरकप्राप्ती । विषय चित्तीं आठवत ॥ ५२ ॥ ऐशापरी दुःखें दुःखिता । मृतप्राय समस्ता । मिळालिया रावणवनिता । तळमळित विलापें ॥ ५३ ॥ पुच्छ तुटलिया सापसुरळी । कांटा रुतल्या सर्पकपाळीं । जळावेगळी मासोळी । तेंवी सकळी तळमळती ॥ ५४ ॥

बहुमानं परिष्वज्य काचिदेनं रुरोद ह ।
चरणौ काचिदालिंग्य काचित्कंठेऽवलंब्य च ॥ १५ ॥
उद्धृत्य च भुजं काचिद्भूमौ संपरिवर्तते ।
हतस्य वदनं दृष्ट्वा काचिन्मोहमुपागता ॥ १६ ॥

पुष्पवाटिकेमाजी मातंग । रिघोनि वन विध्वंसी साङ्ग । तेंवी श्रीरामबाणें चांग । रावणअंग विध्वंसिलें ॥५५॥ रणीं धुळीमाजी लंकापती । पडिला देखोनि निश्चितीं । रावणांगना आक्रंदती । शोक करिती महादुःखें ॥ ५६ ॥ जें चुंबिती नित्य वदन । त्यातें देखोनि प्रेतवर्ण । निढळीं निढळ मेळवून । करीत चुंबन मुखाचें ॥ ५७ ॥ एकी देती आलिंगन । एकी कर उचलिती जाण । हृदयीं धरिती आलिंगून । करिती मर्दन निजकुचा ॥ ५८ ॥ एकी शेजारीं निजती । उशीं बाहु घालिती । मागुतेनि लंकापती । शयनस्थिती केंवी भेटे ॥ ५९ ॥ चरण चुरावया धांवती एक । पादसंवाहन करिती एक । युद्ध करितां दशमुख । रणरंगीं देख कष्टला ॥१६०॥ रणीं भिडतां श्रीरामासीं । बहुत श्रम

१ उत्तरक्रिया. २ तत्काल. ३ कोठें. ४ सूर्य. ५ रात्रीमध्यें. ६ स्त्रिया. ७ शंखध्वनि. ८ चांडाळ. ९ नाश झालेली. १० पतिवियोगाचा ताप. ११ आनंद. १२ नित्य. १३ हत्ती.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

रावणासी । म्हणोनि रडती कांतासी । नाहीं शोकासी मर्यादा ॥ ६१ ॥ पडिला देखोनि दशवदन । म्हणती चुड्यांसी पडिलें खान। ओढवलें मस्तकवपन । मोकळे कान दुर्दशा ॥ ६२ ॥ देहलोभें आक्रंदती । कानकेशांलागीं रडती । जेणें श्लाघ्य त्रिजगती । देह न वेंचिती त्यासवें ॥ ६३ ॥ दीर्घस्वरें आक्रंदोन । अट्टाहास्यें करिती रुदन । कानकेशां पडिलें खान । वैधव्य पूर्ण ओढवलें ॥ ६४ ॥ रणीं करोनि रणख्याती । सायुज्य लाधला रघुपती । आम्हां सांडोनि लंकापती । साधिली मुक्ती निजांगें ॥ ६५ ॥ मोकलोनियां सकळांसी । गमन केलें निजपदासी । आम्हां निरविलें वैधव्यासी । नापितापासीं बैसविलें ॥ ६६ ॥ पति निघोनि गेला पुढें । मागें कान केशां रडे । देहलोभाचें बळ गाढें । नाहीं धडफुडें वैराग्य ॥ ६७ ॥ जेणें सकळ भोग भोगिती । त्यासी देह देतां रडती । देहलोभाची ऐसी जाती । रांडवा होती देशभरी ॥ ६८ ॥ आपण स्वयें अमंगळ । प्रेतरूपी पैं केवळ । त्या मानिती ब्राह्मणविटाळ । दोष अमंगळ करिती पैं ॥ ६९ ॥ त्यांचेनि हातें पाचन । तें केवळ अमेध्य जाण । करिती जें सेवन । पवित्रपण तें व्यर्थ ॥ १५० ॥ ब्राह्मणहस्तीं जें झालें । तें तंव जनीं निंद्य केलें । प्रेतरूपें जें झालें । पवित्र मानिलें सर्वत्रीं ॥ ७१ ॥ ऐसी जनाची विपरीत गती । निंद्य तेंचि वंद्य करिती । सुवासिनीतें उपेक्षिती । शुचिर्भूती विधवांची ॥ ७२ ॥ आधींच अमंगळवृत्ती । आणि काशी द्वारका करिती । दुणा अभिमान वाढला चित्तीं । ते वंद्य होती कैसेनि ॥ ७३ ॥ हें मी बोलिलों प्रसंगता । क्षोभ न मानावा श्रोतां । धर्मशास्त्रीं हे कथा । सत्य सर्वथा ऐसी आहे ॥ ७४ ॥ ऐसिया रावणवनिता । पतिदुःखें अति दुःखिता । देहलोभें तळमळितां । नव्हे विरक्तता देहासी ॥ ७५ ॥ तंव पातली मंदोदरी । आक्रंदत दीर्घस्वरीं । पति धरोनि अंतरीं । आली सुंदरी जवळिकें ॥ ७६ ॥ एका जनार्दना शरण । श्रोतीं व्हावें सावधान । मंदोदरीचें सहगमन । कृपा करोनि परिसावें ॥ ७७ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां रावणवनिताविलपनं नाम चतुःषष्टितमोऽध्यायः ॥ ६४ ॥ ओंव्या ॥ १७७ ॥ श्लोक ॥ १६ ॥

अध्याय पांसष्टावा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ ऐशा रावणाच्या वनिता । अतिशोकाकुळिता । विलाप करिती समस्ता । दुःखाक्रांता रणरंगीं ॥ १ ॥ मंदोदरी आली तेथ । अति दुःखें दुःखार्दित । पडिला देखोनि निजकान्त । विलाप करीत आक्रोशें ॥ २ ॥

तासां विलपमानानां तदा रावणयोषिताम् ।
ज्येष्ठपत्नी प्रिया दीना भर्तारं समुदैक्षत ॥ १ ॥
दशग्रीवं हतं दृष्ट्वा रामेणाक्लिष्टकर्मणा ।
पतिं मंदोदरी तत्र कृपणं पर्यदेवयत् ॥ २ ॥

विष्णुसंभूत जे स्वयें । रचिली स्वहस्तें देवें । चराचर मोहातें पावें । रूप स्वभावें देखतां ॥ ३ ॥ जो त्रिकाळ आत्मज्ञानी । तो मोहला शूळपाणी । ओळखवेना निजपत्नी । शंकर मनीं वेडावला ॥ ४ ॥ अकळ भगवंताची माया । अनन्यरूपें रचिली तया । रावणातें भुलवावया । आणी जाया मंदोदरी ॥ ५ ॥ ते रावणाची ज्येष्ठ पत्नी । स्वयें सतीशिरोमणी । आली रणभूमि ठाकोनी । पति लक्षोनी मंदोदरी ॥ ६ ॥ निजपति रुधिरोक्षित । विसंज्ञ पडिला रणांत । देखोनियां विलाप करीत । प्रताप सूचवी पतीचा ॥ ७ ॥ जो अनुज कुबेराचा । पढियंता गण शिवाचा । त्रैलोक्यीं प्रताप जयाचा । तो बाणीं रामाच्या पडियेला ॥ ८ ॥ जेणें आंदोळिला कैलास । प्रसन्न केला महेश । तो रणीं पडला क्षितीश । सांडूनि आस रणरंगीं ॥ ९ ॥ आत्मलिंग मातेकारणें । निमेषगती आणिलें जेणें । तेणें शयन केलें रावणें । श्रीरामबाणेंकरोनियां ॥ १० ॥ करोनियां महाख्याती । बंदीं घातला सुरपती । मंडळवर्ती नित्य खालती । तो लंकापती रणीं पहुडला ॥ ११ ॥ नित्य ओळंगती सुरवर । चळीं कांपती ऋषीश्वर । भेणें सेविती गिरिकंदर । तो दशवक्त्र रणीं पहुडला ॥ १२ ॥ जिचेनि नांवें विश्व सुखी । जे विश्वमाता जानकी । ते हरिली एकाएकीं । झालासी लोकीं जगनिंद्य ॥ १३ ॥ या

---

१ शून्य. २ दुष्पट. ३ श्रोत्यांनीं. ४ रावणस्त्रिया. ५ सती आणि. ६ अगम्य. ७ रक्तबंबाळ. ८ धाकटा बंधु. ९ आवडता. १० शंकर. ११ इंद्र.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

कारणें समग्रीं । प्रहस्तादि मंदोदरीं । सकळ प्रधान थोरथोरीं । नानापरी शिकविलें ॥ १४ ॥ इंद्रजित तुझा ज्येष्ठ कुमर । बंधु कुंभकर्ण महावीर । मानिलें नाहीं त्यांचें उत्तर । बहुप्रकार शिकविती ॥ १५ ॥ धर्मात्मा बिभीषण । युवराजा बंधु जाण । हितोपदेश सांगतां पूर्ण । केलें ताडण लत्ताघातें ॥ १६ ॥ तेंचि हित झालें तयासी । शरण गेला तो रामासी । रामें आश्वासिलें प्रीतीसीं । राज्याभिषेकासी करोनियां ॥ १७ ॥ बंधु रामा शरण गेला । तो स्वराज्यें सुख पावला । तूं नायकसीच बोला । तेणेंचि झाला घात तुझा ॥ १८ ॥ जेणें देहें दशशिरी । कैलासमंदरमेरुशिखरीं । क्रीडत होता प्रीतीं थोरी । तो गीधघारीं उचलिला ॥ १९ ॥ चैतन्यवनीं नंदनवनीं । भोग भोगिले सुरभुवनीं । तें शरीर रणांगणीं । पक्षिश्रेणी लुंछिती ॥ २० ॥ नानापरी आक्रंदतां । न बोलसी तूं लंकानाथा । काय लागली सुषुप्तिअवस्था । कीं गेलासी तत्त्वतां शिवार्चना ॥ २१ ॥ श्रीरामाच्या निजबाणीं । करोनि देहाची भंगाणी । मोक्ष साधिला रणांगणीं । बळेंकरोनि लंकेशा ॥ २२ ॥ मी तुझी निजकांता । दुःखसागरीं तळमळतां । मज सांडोनि निजमोक्ष घेतां । तुज वंचकता लागेल ॥ २३ ॥ पुरुषार्थ चतुर्विध । त्यांत पहिले तीन प्रसिद्ध । स्त्रियेचा भाग विशुद्ध । असे सिद्ध शास्त्रामाजी ॥ २४ ॥ ऐसें न म्हणें लंकानाथा । अवंचक जे सर्वथा । त्यांसी उपेक्षोनियां जातां । परमार्थ तत्त्वतां हा नव्हे ॥ २५ ॥ तरी तूं आमुचा भ्रतारू । तूंचि आमुचा सद्गुरू । तूंचि आमुचा ईश्वरू । तुझेनि संसारू सुखरूप ॥ २६ ॥ तुझेनि आम्हां इहलोक । तुझेनि आम्हां परलोक । तुझेनि आम्हां मोक्षसुख । देहदुःख जेथें नाहीं ॥ २७ ॥ ऐसा विलाप बहुतां रीतीं । मंदोदरी आक्रंदती । तें देखोनि रघुपती । निजचित्तीं कळवळला ॥ २८ ॥ पाचारोनि बिभीषण । सांगतसे रघुनंदन । भ्रातृभार्येचें शांतवन । तुवां आपण करावें ॥ २९ ॥ महासती पतिव्रता । मंदोदरी अति दुःखिता । तिसी शांतवोनि आतां । करीं तत्त्वतां संस्कार ॥ ३० ॥

एतस्मिन्नंतरे रामो विभीषणमुवाच ह ।
संस्कारः क्रियतां भ्रातुः स्त्रियश्चैता निवर्तय ॥ ३ ॥
तमुवाच ततो धीमान् विभीषण इदं वचः ।
विमृश्य बुद्ध्या तत्त्वज्ञो धर्मार्थसहितं वचः ॥ ४ ॥

ऐसें श्रीरामाचें वचन । ऐकतांचि बिभीषण । भक्तांमाजी अग्रगणी जाण । तो तत्त्वज्ञ रामभजनें ॥ ३१ ॥ जो इहलोक परलोक । उभयसंस्था जाणे देख । तत्त्वज्ञान अति सुटंक । ज्ञानटिळक ज्ञानियाचा ॥ ३२ ॥ लाहोनि रामआज्ञापन । मंदोदरीसी विचक्षण । बोलता झाला आपण । सावधान अवधारा ॥ ३३ ॥ तूं सती पतिव्रता । मंदोदरी विष्णुसंभूता । व्यर्थ खेद करणें चित्ता । उचित सर्वथा हें नव्हे ॥ ३४ ॥ असलियाचा संतोष जनीं । गेलियाची हानी मानी । हे हर्ष शोक जनीं दोनी । ते ज्ञाते मनीं न धरिती ॥ ३५ ॥ प्राप्तविषयें सुख भोगावें । अप्राप्तविषयें दुःख पावावें । तरी ते प्राकृत जाणावे । न संभवे सतीत्वा ॥ ३६ ॥ तुझे सतीत्वाची ख्याती । विस्तारली त्रिजगतीं । ते तूं मढें घेवोनि हातीं । दुःखावर्ती निमग्न ॥ ३७ ॥ जेव्हां आदरिला शोक । तेव्हांचि सतीत्व गेलें देख । आकल्पवरी करितां दुःख । दशमुख तरी न ये ॥ ३८ ॥ रडत पडत शोक करीत । अपूर्ण कामें तळमळित । मढें धरोनि आगीं निघत । अधःपात दोघांसी ॥ ३९ ॥ प्रेत धरोनि आगीं रिघती । त्या प्रेतपिशाच होती । जे कां भोगीं अवतरती । मान मागती बहुविध ॥ ४० ॥ ऐसी असे एक गती । एक आणिकचि स्थिती । पति निमाला मध्यरातीं । त्या नेणती देहभ्रमें ॥ ४१ ॥ मध्यरात्रीं निमाला पती । दिवसा मढें सिरवे सती । पति गेला हातोहातीं । मढ्याप्रती आगीं रिघे ॥ ४२ ॥ जरी देहचि पति होये । तरी तो तैसाचि पडिला आहे । गेला गेला म्हणती काये । नेणती सोये तयाची ॥ ४३ ॥ एकी शुद्धसत्त्वात्मका । पतिचैतन्य जाणोनि देखा । सांडूनि देहाचा आवांका । सायुज्य देखा साधिती ॥ ४४ ॥ त्या त्रैलोक्यासी मंडणें । येरांसी दुःख दारुण । स्वयें भोगिती अधःपतन । करिती भ्रमण पिशाचत्वें ॥ ४५ ॥ शुद्धस्वरूप नेणे सती । मढें धरोनि बहुसाल मरती । त्यांत तुझी कवण गती । न कळे निश्चितीं आम्हांसी ॥ ४६ ॥ श्रीरामहस्तें मरतां । अवघ्या त्रैलोक्या देखतां । सायुज्य

१ पक्षीसमुदाय. २ तोडतात. ३ गाढ झोंप. ४ नाश. ५ कपट. ६ निर्मळ. ७ नरकवास. ८ मेला. ९ एकाएकीं.

१० भाव, लोभ. ११ भूषण.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

झालें लंकानाथा । कुळासहित उद्धरिला ॥ ४७ ॥ त्याचा शोक करितां देख । अवघें विश्व म्हणेल मूर्ख । तूंही पाहें निजविवेक । दशमुख कवण तो ॥ ४८ ॥ जरी देह म्हणसी रावण । तरी तो तैसाचि आहे जाण । म्हणसी त्याहूनि विलक्षण । त्याचें ज्ञान तुज नाहीं ॥ ४९ ॥ इंद्रियेंचि म्हणसी पती । स्वतां चैतन्य तीं नव्हेती । ज्याच्या ठायीं चाळक-शक्ती । तो निश्चितीं वेगळाचि ॥ ५० ॥ ऐसें स्थूळ सूक्ष्म कारण । चौथा देह महाकारण । चाळक त्याहूनि भिन्न । न कळे चिन्ह तयाचें ॥ ५१ ॥ याचिलागीं योग करिती । याचिलागीं याग अनुष्ठिती । उग्र पुरश्चरणें करिती । मंत्र जपती यालागीं ॥ ५२ ॥ व्रत तप आणि दान । याचिलागीं तीर्थाटन । नैष्ठिक ब्रह्मचर्य पूर्ण । यालागीं जाण आचरती ॥ ५३ ॥ याचिलागीं क्षेत्रवास । याचि-लागीं संन्यास । संसारावरी घालून कांसे । होती उदास यालागीं ॥ ५४ ॥ म्हणोनि चाळक तो नेणतां । सकळ साधनें होती वृथा । याकारणें तुवां आतां । चाळक तत्त्वतां लक्षावा ॥ ५५ ॥ लक्षिलिया निजचाळक । निःशेष नासे द्वंद्वदुःख । स्वयें ब्रह्मत्व ठसावे देख । अगाध सुख पाविजे ॥ ५६ ॥ आतां असोत या गोष्टी । तुज रावणाची अवस्था मोठी । तरी आतां उठाउठी । राम जगजेठी उठवील ॥५७॥ नेणसी रामाचें महिमान । वृथाचि करिसी विलपन । राम परमात्मा आपण । अलक्ष पूर्ण सुरसिद्धां ॥ ५८ ॥ राम स्रष्ट्यातें उपजविता । राम जीवातें जीवविता । राम काळाचा संहर्ता । राम सर्वथा अलक्ष ॥ ५९ ॥ राम इंद्रियां चेतविता । राम प्राणातें चाळिता । राम मनातें कल्पिता । राम बोद्धव्यता बुद्धीची ॥ ६० ॥ राम चित्ताचें चेतव्य । रामें अहंकारा अहंभाव । अंतःकरणीं आवरणभाव । जाण स्वयमेव श्रीरामें ॥ ६१ ॥ सप्तधातु सप्तकोश । रामें वाढती सावकाश । रामेंवीण सकळ ओस । हें कोणास कळेना ॥ ६२ ॥ मृत्तिकेवेगळा नाहीं घटु । तंतुवेगळा नाहीं पटु । अक्षरावीण न घडे पाठु । जाण स्पष्ट महासतिये ॥ ६३ ॥ जो जो घट निपजे । गगन त्या सबाह्य सहजें । तैंवी प्रतिमा रघुराजें । निजांगें व्यापिजे निपजतां ॥ ६४ ॥ जैंवी सुवर्णीं अलंकार । तैंवी श्रीरामीं चराचर । तो प्रत्यक्ष असतां रघुवीर । मोहें अपार आक्रंदसी ॥ ६५ ॥ ऐसें बिभीषणें सर्वज्ञें । सांगतां हितवचनें । तेंचि बाणलें तत्क्षणें । निजज्ञानें अति चतुर ॥ ६६ ॥ जैंवी मेघमुखींचें उदक । पडतांचि एकाएक । वरिच्यावरी चातक । झेलूनि देख पैं नेत ॥ ६७ ॥ उगवतां रजनीकर । ताप निरसोनि समग्र । परमामृतें चकोर । तृप्ती साचार पावती ॥ ६८ ॥ बिभीषणवचनेंकरीं । मधुर गिरा अति कुसरीं । प्रबोधिली मंदोदरी । दुःखसागरीं पैं बुडतां ॥ ६९ ॥ येरी होवोनि सावधान । नमियेला बिभीषण । भली दिधली आठवण । होसी सर्वज्ञ रामभक्त ॥ ७० ॥ तुझेनि बोलें मज आतां । आठवली पूर्वकथा । याचि रीतीं जनकदुहिता । श्रीरामसंस्था सांगितली ॥ ७१ ॥ परी मोहाचें बळ दुर्धर । आठवों नेदी विचार । तुझा जो कां वचनभास्कर । किरणें खडतर तयाचीं ॥ ७२ ॥ त्यांचा पडतांचि प्रकाश । मोहतमाचा ऱ्हास । झाला न लागतां निमेष । हृदयकोश उजळला ॥ ७३ ॥

रमंते योगिनो यत्र सत्यानंदे चिदात्मनि ।
इति रामपदेनासौ परब्रह्माभिधीयते ॥ ५ ॥

राम परमात्मा चिद्घन । ऐसें निश्चया आलें पूर्ण । चराचरीं रघुनंदन । अनवच्छिन्न साक्षित्वें ॥७४॥ याच रीतीं रावण । सर्वगत सनातन । जाणोनियां रघुनंदन । निजशिरींकरून पूजिला ॥ ७५ ॥ सायुज्याचा रघुराजा । निजशिर छेदोनि वोजा । करितां प्रीतीं लक्षपूजा । वीस भुजां उल्लास ॥ ७६ ॥ दुर्जय कष्टेंकरोनि जाण । सायुज्य साधिलें आपण । तो उठवितां दशानन । लागेल संपूर्ण स्वामिद्रोह ॥ ७७ ॥ निजदेहो रावण । करोनियां रामार्पण । सायुज्य पावला परिपूर्ण । तेंचि आपण साधावें ॥ ७८ ॥ जेणें मार्गें निजपतीं । साधियेली निजभक्ती । मीही साधीन त्याचि रीतीं । देह रघु-पतीं अर्पीन ॥ ७९ ॥ आतां उठविलिया रावण । मरण न चुके जाण । तेणें काळें रघुनंदन । सर्वथा जाण भेटेना ॥ ८० ॥ श्रीरामदृष्टीपुढें मरण । त्यापुढें

१ आचरतात. २ त्याग करून. ३ द्वैताची पीडा. ४ शोक. ५ मंत्र. ६ चंद्र. ७ कौशल्यानें. ८ उपदेशिली. ९ सीतेनें.

१० नाश. ११ परिच्छेदरहित. १२ युक्तीनें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

तुच्छ ब्रह्मसदन । स्वर्गादिकां पुसे कोण । तें आजि जाण सांपडलें ॥ ८१ ॥ श्रीरामदृष्टीपुढें देहपतन । ब्रह्मसायुज्य तेणें पूर्ण । तें सांडूनि वांछी आन । नरक दारुण तयासी ॥ ८२ ॥ सांडोनियां श्रीरघुनाथा । देहलोभें विषय भोगितां । अनिवार नरकावस्था । भोगितां कल्पांतीं सरेना ॥ ८३ ॥ म्हणोनियां पतिव्रता । अनुसरोनियां तत्त्वतां । देह त्यागोनियां आतां । निजकांता विनटेन ॥ ८४ ॥ ऐसा करोनि निर्धार । पुढें चालली सुंदर । नमूनि साष्टांगीं रघुवीर । आनखाग्रें पाहिला ॥ ८५ ॥ साङ्ग अवलोकोनि रूपडें । पुनः पुनः वाडेंकोडें । मनीं धरिलें प्रेम गाढें । निजनिवाडें सुंदरीं ॥ ८६ ॥ येथें झणें श्रोते कोपती । ज्यासी नाहीं वर्णव्यक्ती । तो अनिवार निश्चितीं । आनखाग्रस्थिती तेथें कैंची ॥ ८७ ॥ ऐसे आक्षेपीं उत्तर । श्रोते परिसोत चतुर । राम रूपातीत पर । तोचि अवतार धरीतसे ॥ ८८ ॥ अबळा भोळे नेणती । कैंवी अव्यक्तीं प्रवेशती । म्हणोनि राम आला व्यक्ती । चिदचिन्मूर्ती द्विबाहु ॥ ८९ ॥ त्यातें साङ्ग अवलोकून । केलें प्रदक्षिणा नमन । तीर्थ घेतलें प्रार्थून । पुसे आज्ञापन सतीत्वा ॥ ९० ॥ तंव श्रीरामतेजें विलक्षण । क्षणैक परतवूनि प्राण । बोलता झाला पैं रावण । स्वहितवचन निजकांते ॥ ९१ ॥ दुकाळिया बुभुक्षितासी । ओगं[१]रिलें असतां षड्रसांसी । जेंवी न पुसे कोणासी । घेत कवळांसी तांतडी ॥ ९२ ॥ तेंवी श्रीरामदृष्टीं चोखट । विस्तारिलें सायुज्यताट । तेथें आलीस अवचट । तरी यथेष्ट साधावें ॥ ९३ ॥ नश्वर देहाचियेसाठीं । कैवल्य येथें उठाउठीं । पडली स्वानंदमिठी । राम जगजेठी वोळला ॥ ९४ ॥ त्या आनंदातें अनुसरोन । श्रीरामातें धरून । अवि[२]लंबेंकरोनि जाण । स्वहित आपण मागावें ॥ ९५ ॥ चित्तासी अति चंचळता । बुद्धीसी नाहीं स्वस्थता । तूं सती पतिव्रता । विलंब सर्वथा न करावा ॥ ९६ ॥ बंधु रामासी शरण गेला । सुवर्णाचें नगर पावला । विरोधोनि म्यां वहिलें[३] । रामसायुज्य लाधलों ॥ ९७ ॥ मज उद्धरोनि रघुनाथें । दिधलें स्वसुखसाम्राज्यातें । तिष्ठत राहिलोंसें येथें । प्रतीक्षा करीत पैं तुझी ॥ ९८ ॥ तूं तंव अवंचक पतिव्रता । भगवद्बुद्धीं निजकांता । भजिन्नलीस यथार्थता । कृपा रघुनाथा तेणें आली ॥ ९९ ॥ ते कृपेचें आयतन । देहीं देहभाव सांडून । विदेहत्वेंकरोनि जाण । सायुज्य आपण साधावें ॥ १०० ॥ इतुकें बोलोनि रावण । निवान्त राहिला आपण । आनंदमय त्रिभुवन । साक्षी दशानन वदतांचि ॥ १ ॥ मंदोदरीचें सतीत्व । श्रीरामाचें निजवैभव । ऐकोनियां अति अपूर्व । त्रैलोक्यीं सर्व विस्मित ॥ २ ॥ रामनामाच्या दीर्घ स्वरें । खेचरें भूचरें वनचरें । दानवें मानवें समग्रें । जयजयकारें गर्जती ॥ ३ ॥ येरीकडे महासती । सहगमनाची आईती । करिती झाली अति प्रीतीं । आनंद चित्तीं अनिवार ॥ ४ ॥ सहस्रसंख्या संभार । चंदनकाष्ठें बिल्वागर । तुळसीकाष्ठें अति पवित्र । वेगवत्तर आणिलीं ॥ ५ ॥ देवोनि सतीत्वाचीं वाणें । श्रीराम कवळी निजध्यानें । करावया निजधामा पेणें । प्रेमानुसंधानें डुल्लत ॥ ६ ॥ दहनरचन अति वोजा । शयन करविलें वीस भुजां । शिरांचा विखुरला जो पुंजा । दशकंठभाजा एकवटी ॥ ७ ॥ तंव अपूर्व वर्तलें तेथें । निजशिरीं श्रीरामातें । लक्षपूजा पूजिलें होतें । तीं समस्तें न दिसती ॥ ८ ॥ विस्मित झाली मंदोदरी । शिरें न दिसतां सुंदरी । होऊनि अत्यंत घावरी । विचार करी शिरांचा ॥ ९ ॥ देखोनियां तिचें चिन्ह । हांसिन्नला बिभीषण । श्रीरामाचें महिमान । अद्यापि ज्ञान तुज नाहीं ॥ ११० ॥ जें अर्पिलें श्रीरामासी । तें कैंवी परते जळावयासी । मंदोदरी ऐसी कैसी । श्रीराममहिमेसीं अनोळख ॥ ११ ॥ जें श्रीरामासी मीनलें[४] । त्याचें नाम रूप तेव्हांचि गेलें । मग प्रयत्नीं शोधिलें । तरी परतलें दिसेना ॥ १२ ॥ अलंकार हरपे सुवर्णीं । तेंवी पतिशिरें रघुनंदनीं । सर्वथा गेलीं हारपोनी । तीं कैसेनि दिसतील ॥ १३ ॥ ऐकोनियां तें वचन । केलें बिभीषणासी नमन । करोनियां रामस्मरण । केलें शयन पतिसेजे ॥ १४ ॥ विधियुक्त उपासन । दक्षिणहस्तेंकरून । मंत्राग्नि चेतविला पूर्ण ।

१ मिळेन, प्राप्त होईन. २ नखाग्रापासून मस्तकापर्यंत. ३ वाढिलें. ४ ग्रासाला. ५ प्राप्त झाला. ६ सत्वर. ७ स्थान.

८ तयारी. ९ मिळालें, मिसळलें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

देदीप्यमान तेजस्वी ॥ १५ ॥ चैतन्याग्नि[1] अंतरींचा। बाह्य प्रदीप्त उपासनेचा । भडका उठिला अग्नीचा। प्रकाश दोहींचा एकचि ॥ १६ ॥ जेंवी अग्नीमाजी सुवर्ण। तद्रूपतेसीं देदीप्यमान । भासे अति सुलक्षण। मंदोदरी जाण तेंवी दिसे ॥ १७ ॥ पतिसंगें होतें शयन। ते वेगीं बैसली उठोन। बोलती झाली आपण। श्रीराममहिमान तें ऐका ॥ १८ ॥ निजानंदेंकरोनि वहिली। जनकदुहिता अनुवादली । प्रयाणकाळीं बोलली। पतिव्रता वहिली सुलोचना ॥ १९ ॥ हेंचि वदला बिभीषण। राम मानवी नव्हे जाण। राम परमात्मा आपण। राम चिद्घन चिन्मूर्ति ॥ १२० ॥ राम चैतन्याची कळा । राम जीवाचा जिव्हाळा। राम प्रेमाचा पुतळा। पावली कळा मज आतां ॥ २१ ॥ तीर्थ घेवोनि प्रदक्षिणा। करोनि चरण-अवलोकना। करितां सबाह्य ओतला जाणा। देहीं देहपणा हरपली ॥ २२ ॥ मुसेचें सांडूनि मेण। रस ओतिजे परिपूर्ण। तेंवी मज सबाह्य जाण। श्रीरघुनंदन ओतिला ॥ २३ ॥ माझे अंगींचे रोमकूप। श्रीरामतेजें[2] देदीप्य । अग्नीचा जो दाहक प्रताप। नाहीं अल्प बाधीत मज ॥ २४ ॥ हेंचि नवल सांगू काये। श्रीरामें धरिली धरा राहे। श्रीराम जीवें जीवन पाहें। जीववितारे सर्वांसी ॥ २५ ॥ श्रीरामतेजेंकरोनि जाण। स्वप्रकाशें देदीप्यमान। त्रिजगतीं हुताशन। करी पाचन नेमाचें ॥ २६ ॥ श्रीरामसामर्थ्यें वायु जाण। निजमर्यादा करी चळण । अंतरीं प्राणवृत्ती पूर्ण । बाह्य संचरण यथाकाळें ॥ २७ ॥ श्रीरामाचे कडवसां। शून्यत्वें ठावो आकाशा। जाणितलें राघवेशा। चिदाभासा चिद्घन ॥ २८ ॥ श्रीराम घ्राणाचें निजघ्रेय। तेंचि सुवासीं सौरभ्यें[3] होय। निजसौरभ्येंचि स्वयें पाहें। घेत आहे निजावडी ॥ २९ ॥ राम रसाचा अध्यक्षु। राम रसनेचा निजचक्षु । रसज्ञपणें अति दक्षु । अलौकिक रसभोक्ता ॥ १३० ॥ सकळ गोडियांचें जें गोड आहे। तें श्रीरामचि पैं स्वयें। जो सेवितां लवलाहें[4]। रसना होये सर्वांग ॥ ३१ ॥ श्रीरामातें अवलोकितां। रूपचि हारपे वस्तुतां । सकळ स्वरूपें प्रकाशिता। पारखी स्वतां स्वरूपाचा ॥ ३२ ॥ स्पर्शेंद्रियें आनंद। श्रीरामचळणें प्रसिद्ध। आनंदा निजानंद। स्पर्शनबोध श्रीराम ॥ ३३ ॥ प्रणवाचा आदिवेद। नादा भुलविता जो शब्द। निःशब्दा जो निजानंद । श्रवणावबोध श्रीरामें ॥ ३४ ॥ त्रिविध जो कां अहंकार। पंचीकरण-प्रकार। राम त्याचाही अंतर। तत्त्वविचार जेथें निमे ॥ ३५ ॥ गुणसाम्य ऐसी अवस्था। ती रामगुणेंचि वस्तुतां। महत्तत्त्वाच्या निजसत्त्वा। राम तत्त्वतां प्रकाशक ॥ ३६ ॥ ज्यातें म्हणती हिरण्यगर्भ। हें चराचर ज्याचा गर्भ। तो श्रीरामाचा निजगर्भ। अनुपम शोभा जयाची ॥ ३७ ॥ ऐसें बोलतां सुंदरी। पुष्पवृष्टि सुरवरीं। केली मंदोदरीचे शिरीं। अति गजरीं अति प्रीतीं ॥ ३८ ॥ त्राहाटिल्या[5] सुरदुंदुभी[6] । जयजयकार झाला नभीं। देवांगना निरालंबीं[7]। आनंदगर्भी नाचती ॥ ३९ ॥ येरीकडे सती आपण । अग्नीमाजी लोटांगण। श्रीरामासी करोनि जाण । मागुतें स्तवन आदरिलें ॥ १४० ॥ राम गतीची निजगती। राम चेतनेची चिच्छक्ती। राम विश्रांतीसी विश्रांती। अतर्क्यगती रामाची ॥ ४१ ॥ राम नादाचा अनादिनाद। राम शब्दाचा निजशब्द। राम आनंदाचा निजानंद । राम महाबोध बोधाचा ॥ ४२ ॥ राम चेतनाचें चक्षु । राम इंद्रियांचा अध्यक्षु । विषयसुखाचा मूळवृक्षु। राम चक्षु चक्षूंचा ॥ ४३ ॥ राम स्वर्गाचा आदिस्वर्ग। राम अपवर्गाचा[8] अपवर्ग। राम जीवशिवांचा योग। राम सुलभ सुलभत्वें ॥ ४४ ॥ राम सुखाचें सोलींव सुख । रामविस्मरणीं अगाध दुःख। ऐसें बोलतां एकाएक । निजदेह देख विसरली ॥ ४५ ॥ मौनेंचिंकरीं[9] महासती। लोटांगण रघुपती। घालोनियां अति प्रीतीं। सांडिलें निश्चितीं कलेवर[10] ॥ ४६ ॥ आगीं कापुरा योग होतां। तद्रूप होय एकात्मता। तेंवी देहत्यागें रावणकांता। झाली तत्त्वतां श्रीराम ॥ ४७ ॥ लोकीं प्रथा[11] ऐसी। सहगमन नाहीं मंदोदरीसी। सतीत्वाची ख्याति जिसी। ते वैधव्येंसीं कैंवी राहे ॥ ४८ ॥ अवघीं केला जयजयकार । वानरभारीं

१ अग्नि. २ छायेंत. ३ सुवास. ४ त्वरित. ५ वाजविता. ६ देवांचे नगारे. ७ आकाशांत. ८ मोक्षाचा. ९ मौन धारण करून. १० देह. ११ प्रसिद्धी.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

आल्हाद थोर । सती पतिव्रता पवित्र । केलें चरित्र जगद्वंद्य ॥ ४९ ॥ राक्षसांच्या कांता । आणि रावणाच्या वनिता । येरी येरीतें वाणें देतां । झाल्या प्रवेशल्या अग्नीमाजी ॥ १५० ॥ धर्मात्मा श्रीरामभक्त । बिभीषण अति विरक्त । उत्तरविधि साद्यंत । केला विधियुक्त बंधूसी ॥ ५१ ॥ सकलांचें मनोगत । सिद्धि पावलें समस्त । अवघे झाले आनंदभरित । नामें गर्जत अति गजरें ॥ ५२ ॥

रामोऽपि सह सैन्येन सुग्रीवः सहलक्ष्मणः ।
हर्षं भेजे रिपुं हत्वा वृत्रं वज्रधरो यथा ॥ ६ ॥

राम लक्ष्मण सुग्रीव जाण । अंगद जांबुवंत वायुनंदन । मुख्य अग्रणी हनुमंत जाण । चाळक संपूर्ण रामाचा ॥ ५३ ॥ अवघे झाले आनंदभरित । सुरकार्य झालें समस्त । निवटिला लंकानाथ । साधुसंतविरोधी ॥ ५४ ॥ एका जनार्दना शरण । मंदोदरीचें सहगमन । झालें अति गजरें-करून । ख्याति दारुण सतीत्वाची ॥ १५५ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकार-टीकायां मंदोदरीसहगमनं नाम पंचषष्टितमोऽध्यायः ॥ ६५ ॥ ओंव्या ॥ १५५ ॥ श्लोक ॥ ६ ॥

अध्याय सहासष्टावा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ जो सकळलोकघातक । सकळधर्मावरोधक । सत्कर्मविच्छेदक । तो रामें दशमुख निवटिला ॥ १ ॥ शेतीं केली वाफेधांवणी । जेंवी कृषीवळ सुखावे मनीं । तेंवी निवटूनि दशाननी । रघुनंदनीं उल्लास ॥ २ ॥ दीक्षित योग आचरती । दुःसाध्य यज्ञ संपादिती । साधोनि केली पूर्णाहुती । पावती विश्रांती निजसुखें ॥ ३ ॥ तेंवी रामें करोनि ख्याती । सेतु बांधोनि अर्पांपती । राक्षसांची करोनि शांती । लंकापती निवटिला ॥ ४ ॥ श्रीराम याज्ञिक चोखट । रणभूमि तेचि यज्ञवाट । काळानळ अति श्रेष्ठ । हव्यवाट आव्हानिला ॥ ५ ॥ सुग्रीवादि हनुमंत । ऋत्विज सेनापति समस्त । बिभीषण साक्षी तेथ । कर्म सांगत चुकलें तें ॥ ६ ॥ परिसमूहन सडा होत । परिस्तरण शस्त्रें अद्भुत । पर्युक्षण अस्त्रांचें तेथ । अति आरक्त रुधिराचा ॥ ७ ॥ श्रीराम नेटका यजमान । हविर्द्रव्य राक्षससैन्य । स्रुवा बाणाचा सुलक्षण । देत अवदान काळानळीं ॥ ८ ॥ तेथें यंत्रांचे मंत्रघोष । सारी मारी पाडी देख । 'न मम' म्हणतां रघुकुळटिळक । काळानळ देख स्वीकारी ॥ ९ ॥ हवीं होमिलें सकळिक । पूर्णाहुतीसीं दशमुख । रामें घालोनि एकाएक । याग देख संपविला ॥ १० ॥ संपवोनि रणयज्ञ । हातींचें ठेविलें चाप बाण । तेंचि अवभृथ झालें पूर्ण । राम विचक्षण याज्ञिक ॥ ११ ॥ ऋत्विजांसी निजदक्षिणा । देतां उल्लास रघुनंदना । एकां सायुज्य दिधलें जाणा । विदेहत्वदान एकांसी ॥ १२ ॥ एकां दिधलें अनंत सुख । एकां दिधलें कीर्तन देख । नामें गर्जतां हरिख । ब्रह्मांडलोक उद्धरती ॥ १३ ॥ ऐसें करोनि दक्षिणादान । रामें संपविला रणयज्ञ । ऋत्विज करोनियां प्रसन्न । श्रेयःसंपादन विजयश्री ॥ १४ ॥ कोणी करिती अश्वमेध । एक करिती नरमेध । रामें केला राक्षसमेध । अति विशुद्ध याज्ञिक ॥ १५ ॥

ततो विमुक्तं सशरं शरासनं
महेंद्रदत्तं कवचं रथं च ।
विमुच्य रोषं रिपुनिग्रहे कृतं
शशीव सौम्यत्वमुपागमत्पुनः ॥ १ ॥

निवटोनियां लंकापती । रणामाजी रणख्याती । करोनि हातींचें चाप रघुपती । ठेविलें क्षितीं बाणेंसीं ॥ १६ ॥ परशुरामदत्त क्रोध । करावया रावणवध । झाला होता उद्बुद्ध । तोही निजानंद पावला ॥ १७ ॥ अग्नि पेटविल्या पाहें । हविर्द्रव्य निःशेष खाये । सवेंचि उपरत होवोनि राहे । लीन होये निजरूपीं ॥ १८ ॥ तेंवी श्रीरामाचा क्रोध । करोनियां रावणाचा वध । कार्य साधिलें अगाध । अति आल्हाद पावला ॥ १९ ॥ पुढें कांहीं कार्यस्थिती । पुसावया स्वामीप्रती । विनवूं पाहे विनीतवृत्तीं । तंव निजचित्तीं आठवलें ॥ २० ॥ रामें पाहतां कृपादृष्टीं । ब्रह्मा स्रजी ब्रह्मांडकोटी । जयाची विक्षेपभृकुटी । सकळ सृष्टि संहारी

१ उत्तरकार्य. २ वाफसा करणें. ३ शेतकरी. ४ समुद्रावर. ५ अग्नि. ६ होमाचें द्रव्य. ७ यज्ञसमाप्तीच्या वेळीं करावयाचें स्नान. ८ कल्याणप्राप्ति. ९ जमिनीवर. १० जागृत. ११ शांत.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ २१ ॥ त्या श्रीरामाचें कार्य जाण । म्यां साधिलें आपण । ऐसी श्लाघ्यता करील कोण । श्रीरघुनंदनकृतकार्या ॥ २२ ॥ ऐसें विचारोनि चित्तीं । लाजिन्नला निजवृत्ती । सांडोनि देहाहंकृती । क्रोध निजशांती पावला ॥ २३ ॥ इंद्रें पाठविला रथ । त्यासी पूर्वींच रघुनाथ । आरूढला नाहीं तेथ । रावणघात पैं करितां ॥ २४ ॥ क्रोध नमूनि रघुपती । स्वयें पावला निजशांती । तेणें काळें श्रीराममूर्ती । शोभा अतिदीर्ती शोभत ॥ २५ ॥ शोभा अति देदीप्यमान । प्रभा नव्हे ते अत्यंत उष्ण । अति शीतळ नव्हे जाण । विलक्षण प्रकाश ॥ २६ ॥ त्या प्रकाशातें देखतां । अति उल्लास वाटे चित्ता । देहाचें भान सर्वथा । आठवितां नाठवे ॥ २७ ॥ प्रबोधचंद्र रघुपती । नित्यउदय त्रिजगतीं । उदय अस्त निश्चितीं । अस्त पावती निजतेजें ॥ २८ ॥

तं रावणवधं दृष्ट्वा देवगंधर्वदानवाः ।
जग्मुः स्वैस्वैर्विमानैस्तु कथयंतः शुभाः कथाः ॥ २ ॥
अनुरागं च वीर्यं च लक्ष्मणस्य च धीमतः ।
पातिव्रत्यं च सीताया हनूमतः पराक्रमम् ॥ ३ ॥
रावणस्य वधं घोरं रामस्य च पराक्रमम् ।
सुयुद्धं वानराणां तु सुग्रीवस्य च मंत्रितम् ॥ ४ ॥

ऐसिया रामातें देखून । भ्याला आतुर्बळी दशानन । ज्यासी कांपे त्रिभुवन । तो क्षणें रामें निवटिला ॥ २९ ॥ तेणें आनंदें सुरवर । विमानस्थ खेचर[1] । अवघे करिती जयजयकार । हर्षें निर्भर आकाशीं ॥ ३० ॥ देव दानव गंधर्व । अप्सरादि गणसमुदाव[2] । यक्षकिन्नरादि सर्व । महदाश्चर्य मानिती ॥ ३१ ॥ सकळमंगलदायक । सकळकलिमलविध्वंसक । श्रीरामकथा अलौकिक । वर्णिती देव अति प्रीतीं ॥ ३२ ॥ अतिघोरकर्मा रावण । त्रैलोक्या अजेय पूर्ण । तो वधिला न लागतां क्षण । विंधोनि बाण श्रीरामें ॥ ३३ ॥ तेथें वाळीची गोष्टी कायसी । कोण गणी हो कबंधासी । खर दूषण त्रिशिरा यांसी । वधितां त्यासी वेळु न लगे ॥ ३४ ॥ महाबाहु कुंभकर्ण । विशाळरूप अति दारुण । खातां न पुरे त्रिभुवन । वधिला तो बाण विंधोनी ॥ ३५ ॥ बंदीं घातली सुरमांदी । बंधूसह वधिला दुर्बुद्धी । देव सोडविले बंदीं । कीर्ति अगाध श्रीरामीं ॥ ३६ ॥ तैसाचि सौमित्र निजसखा । श्रीरामसेवेलागीं देखा । तुच्छ केलें शरीरसुखा । आहार तो निःशेख वर्जिला ॥ ३७ ॥ चौदा वर्षें निराहारी । चौदा वर्षें ब्रह्मचारी । अति नैष्ठिक[3]व्रतधारी । प्रीति थोरी रामसेवे ॥ ३८ ॥ अनिवार प्रेमाथिले[4] । निमेष रामसेवे न टळे । तेणें भजनें सामर्थ्य आलें । दुष्टा वधिलें इंद्रजिता ॥ ३९ ॥ चौदा वेळां सुरपती । बांधोनि आणिला निमेषगतीं । त्याची क्षणार्धें केली शांती । श्रीरामभक्तिप्रतापें[5] ॥ ४० ॥ तैसाचि सुग्रीव कपिपती । लक्ष्मणें स्थापिला अति प्रीतीं । लेणें जीवित्व रघुपतीं । अर्पितां चित्तीं संतोष ॥ ४१ ॥ जेणें वीर रावणासारिखा । खेदक्षीण केला देखा । आतुर्बळियाचा[6] आंवांका । छेदी नाका कुंभकर्णाच्या ॥ ४२ ॥ सकळांहूनि विचित्र । हनुमंताचें चरित्र । अमल कीर्ति अति सुंदर । जेणें पवित्र त्रिलोक ॥ ४३ ॥ जेणें गांजिलें दशवक्त्रा । लंकेमाजीं केलें क्षत्रा[7] । आश्वासिली सीता सुंदरा । युक्ति कपींद्रा अनिवार ॥ ४४ ॥ न लागतां निमेषमात्र । एकलेनि वीरें सत्वर । शिळीं बुजोनियां सागर । सैन्य परपार पावविलें ॥ ४५ ॥ आणोनियां द्रोणाद्री । वांचविला सौमित्री[8] । अहिरावणाची करोनि बोहरी । स्वामी झडकरी सोडविला ॥ ४६ ॥ अगाध हनुमंताची कीर्ती । जेणें पावन त्रिजगती । तैसेचि सकळ जुत्पती । अगाध कीर्ती श्रीरामीं ॥ ४७ ॥ युद्ध करितां समरांगणीं । शिरें दुधड होती रणीं । पुच्छ बांधितां वेंटाळूनी । सवेंचि रणीं मिसळती ॥ ४८ ॥ सीता माउली पतिव्रता । अवतार धरी सुरकार्यार्था । प्रबळ छळितां लंकानाथा । नाहीं चित्ता विक्षेपें[9] ॥ ४९ ॥ श्रीरामवियोगें व्रतस्थ । फळ मूळ जळ समस्त । सर्वथा नातळे चित्त । सावचित्त रामभजनीं ॥ ५० ॥ श्रवणीं नित्य रामकथा । एकरूप होतां श्रोता वक्ता । सबाह्य स्वानंदसुखावस्था । श्रवण करितां रामाचें ॥ ५१ ॥ वाचेसी नित्य रामगुण । वर्णितांचि आनंद पूर्ण । राक्षसींसी

१ आकाशसंचारी. २ देवसमुदाय. ३ निष्ठायुक्त व्रत करणारा. ४ प्रेमभावानें संपन्न. ५ पराक्रमी वीराचा. ६ शक्ति. ७ युद्धाल. ८ लक्ष्मण. ९ चंचलता.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

समाधान । देहाचें भान विसरल्या ॥ ५२ ॥ जानकीपासीं राखण असतां । विसरल्या निजक्रूरता । श्रीरामप्रेमें सदा डुल्लतां । समाधिअवस्था राक्षसींसी ॥ ५३ ॥ जानकीचे निजसंगतीं । तृणादि सकळ वनस्पती । आदिकरोनि पाषाणजाती । राम जपती अनिमेष ॥ ५४ ॥ जानकीचेनि धर्में तेथें । आन न दिसे सर्वार्थें । राम भासे जेथें तेथें । निजरूपें पाहतांचि ॥ ५५ ॥ ऐसी एकांएकांची ख्याती । नामें पावन त्रिजगती । एवढी रामभक्तांची कीर्ती । तो रघुपती केंवी वर्णवे ॥५६॥ ऐसी श्रीरामाची गुणकीर्ती । आणि रामसेवकांची ख्याती । स्वर्गीं वर्णीत सुरपती । निजधामाप्रती स्वयें गेले ॥ ५७ ॥ इंद्रसारथी विचक्षण । सुवर्णबंदी देदीप्यमान । रथाखालीं उतरोन । श्रीरघुनंदन नमियेला ॥५८॥ प्रांजळी होऊनि विनवीत । नमोनियां रघुनाथ । होवोनियां अति विनीत । आज्ञा पुसत स्वर्गगमना ॥ ५९ ॥ परिसोनियां रघुनंदन । अत्यादरें संतोषोन । गंभीर गिरा प्रसन्नवदन । मधुर वचन अनुवादे ॥ ६० ॥ काय कृपेसी आले कोंभ । कीं अमृता निघाली जीभ । लावण्याचें निजवालभ । तैसी शोभा शब्दांची ॥ ६१ ॥

राघवेणाभ्यनुज्ञाते मातलिः शक्रसारथिः ।
दिव्यं तु रथमास्थाय दिवमेवाभ्यपात ह ॥ ५ ॥

अत्यादरें रघुपती । पूजोनियां शक्रसारथी । इंद्राप्रति विनंती । अति प्रीतीं सांगत ॥ ६२ ॥ तूं लोकपाळांचा राजा । तुझेनि सुखी विश्व प्रजा । निवटावया राक्षसराजा । सांभाळ माझा तुवां केला ॥ ६३ ॥ तुवां पाठविला रथ । शस्त्रास्त्रांसीं समवेत । तेणें बळें लंकानाथ । निमेषार्धांत निवटिला ॥ ६४ ॥ तुम्ही अनुग्रह कराल ज्यासी । तो रंकही राज्यपदासी । सुखें चढे अनायासीं । सकळ भोगांसी भोगीत ॥ ६५ ॥ अनुग्रहाचें बळ दारुण । तेणें निवटिला दशानन । काय तुमचें व्हावें उत्तीर्ण । म्हणोनि लोटांगण मौनेंचि ॥ ६६ ॥ ऐसें सांगतां मातलीसी । येरू विस्मित मानसीं । राम स्तवितो इंद्रासी । जो या विश्वासी जीवन ॥६७॥ ज्याची विक्षेपभ्रुकुटी । तळा आणी सकळ सृष्टी । तो इंद्राचा उपकार पोटीं । कृपेसाठीं वाहतसे ॥ ६८ ॥ अत्यादरें मातलीसी । वस्त्रें भूषणें देवोनि त्यासी । बोळवितां अति प्रीतीसीं । येरें साष्टांगेंसीं नमियेला ॥ ६९ ॥

परिष्वज्य च सुग्रीवं लक्ष्मणेनाभिनंदितः ।
पूज्यमानो हरिगणैराजगाम सुरालयम् ॥ ६ ॥

करोनियां प्रदक्षिणा । मातली लागला रामचरणा । तैसेंचि नमिलें लक्ष्मणा । सुग्रीवही जाणा नमियेला ॥ ७० ॥ रावणाचे मुखें जाण । सर्वगत रघुनंदन । जाणोनियां संपूर्ण । नमी वानरगण रामरूपें ॥ ७१ ॥ हनुमान आदि समग्र । जुत्पती जे कां लहानथोर । नमूनियां वेगवत्तर । जयजयकार पैं केला ॥ ७२ ॥ नमन करोनि सकळांसी । आरूढोनियां रथासीं । हर्षें गर्जत नामेंसीं । स्वधामासी तो गेला ॥ ७३ ॥ इंद्र होवोनि शरणागत । श्रीरामा पाठविला रथ । तें देखोनि अत्यद्भुत । आश्चर्य मानीत सकळिक ॥ ७४ ॥ निवटिलिया रावण । खवळोनि वानरगण । विध्वंसावें लंकाभुवन । तंव रामशासन दुर्धर ॥ ७५ ॥ शिष्टाईचें वेळीं अंगदें येथें । मंडपातें आणिलें होतें । तो परतोनि मागुतें । श्रीरामें तेथें पाठविला ॥ ७६ ॥ येणेंचि भयें वानरगण । न पाहती लंकाभुवन । तंव देखोनियां बिभीषण । रघुनंदन बोलत ॥७७॥ ते श्रीरामाज्ञा असतां । वानरातें अनंवाळी करितां । क्रोधें झालिया दंडिता । मग राखिता पैं कैंचा ॥ ७८ ॥ ऐकें बापा लक्ष्मणा । दुष्टा निर्दाळिलें रावणा । आतां निजभक्ता बिभीषणा । लंकाभुवना अभिषेकीं ॥ ७९ ॥ जेणें त्रासिले महर्षी । बंदीं घातलें सुरवरांसी । त्या वधिलें रावणासी । आतां बिभीषणासी अभिषेकीं ॥ ८० ॥ जेणें हरिलें जानकीसी । आणि मारिलें जटायूसी । त्या वधिलें लंकेशासी । बिभीषणासी अभिषेकीं ॥ ८१ ॥ हित सांगतां प्रीतीसीं । लाता हाणितल्या बंधूसी । त्या निवटिलें रावणासी । बिभीषणासी अभिषेकीं ॥ ८२ ॥

सौमित्रिं सत्त्वसंपन्नं रामो लक्ष्मणमब्रवीत् ।
बिभीषणममुं सौम्य लंकायामभिषेचय ॥ ७ ॥
अनुरक्तं च भक्तं च तथा पूर्वोपकारिणम् ।
एष मे परमः कामो यदहं रावणानुजम् ॥ ८ ॥

१ एकसारखें. २ हस्त जोडून. ३ अंकुर. ४ आवडतेपण. ५ इंद्रसारथी मातली. ६ जगताला. ७ वक्र भिंवई. ८ रामाज्ञा. ९ कडक. १० अपराध.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

लंकायां सौम्य पश्येयमभिषिक्तं विभीषणम् ॥ ९ ॥

सौमित्रा बंधु लक्ष्मणा। सत्त्वसंपन्न बिभीषणा। करवोनियां मंगलस्नाना। सिंहासना अभिषेकीं ॥ ८३ ॥ आमचे मित्रत्वालागीं जाण। स्वकुळ निर्दाळिलें आपण । महामोहाचें आयतन । तो अहंरावण मारविला ॥ ८४ ॥ आमचे भक्तीलागीं वेंहिलें। जेणें सर्वस्व अर्पिलें आपुलें। तया बिभीषणा पहिलें। अभिषेकिलें पाहिजे ॥ ८५ ॥ हेंचि आम्हां निजव्रत । हेंचि परम आचरित। हेंचि अनुष्ठान समस्त। जें शरणागत स्थापावा॥८६॥ हाचि आम्हां पुरुषार्थ । हाचि आम्हां इत्यर्थ। हाचि आम्हां सिद्धयर्थ। जें शरणागत स्थापावा ॥ ८७ ॥ हाचि आम्हां परमार्थ। हाचि आम्हां भावार्थ। येणेंचि आमचा सत्यार्थ। जें शरणागत स्थापावा ॥ ८८ ॥ हा काळवरी नवस। नवसिले होते बहुवस। ते उजवावे सावकाश। बिभीषणा स्थापूनी ॥ ८९ ॥ माझ्या डोळियांची धणी। सौमित्रा पुरवीं झडकरोनी। बिभीषणा अभिषेचूनी। आरूढ सिंहासनीं मज दावीं ॥ ९० ॥ सिंहासनीं शरणागता । आरूढला म देखतां । मज होतसे परमावस्था। बोलीं सर्वथा न बोलवे ॥ ९१ ॥ ऐसें बोलतां रघुनाथ। अभिषेकालागीं त्वरित । सौमित्र सिद्ध झाला तेथ। हर्षयुक्त स्वानंदें ॥ ९२ ॥ तें देखोनि बिभीषण। झाला अत्यंत उद्विग्न। श्रीराम न येवोनि आपण। सांगे अभिषिंचन सौमित्रा॥ ९३ ॥ या शब्दाचा कवण हेत । म्हणोनि झाला चिंताक्रांत। अभिषेका न ये श्रीरघुनाथ। म्हणोनि स्फुंदत अति दुःखी॥९४॥ कोणासी पुसूं हा विचार। कोण जाणेल अंतर। क्षोभावया रघुवीर। काय विचार पैं झाला॥ ९५॥ सांडूनियां रघुनंदन । सर्वथा राज्य न करीं जाण। न पाहें मी लंकाभुवन। सुख कोण अभिषेका ॥ ९६॥ म्हणोनियां म्लानवदन। अत्यंत झाला बिभीषण। तें देखोनियां वायुनंदन। पुसे आपण अति प्रीतीं ॥ ९७ ॥ बिभीषणा सर्वज्ञा । समय आला अभिषिंचना । आणि दिसतोसी म्लानवदना। ही विवंचना लक्षेना ॥ ९८॥ ऐकोनियां त्याचें वचन । येरें घातलें लोटांगण। सद्गुरूवीण अंतरज्ञान । जाणता आन असेना ॥ ९९ ॥ ऐकें स्वामी वायुनंदना। रामें आज्ञापिलें लक्ष्मणा । जे अभिषेकावें बिभीषणा। तेणें मना अति चिंता ॥ १०० ॥ जरी प्रीति होती चित्तीं। तरी येवोनि रघुपती। अभिषेकीचना स्वहस्तीं। तेणें चित्तीं अति चिंता ॥ १ ॥ ऐसें ऐकोनि हनुमंता। अति विस्मय झाला चित्ता। पुसावया रघुनाथा। होय विचारिता मारुती ॥ २ ॥ अभिषेकालागीं जाण। त्वरा करितां लक्ष्मण। म्लान देखोनि बिभीषण । श्रीरघुनंदन पूसत ॥ ३ ॥ सौमित्रा विलंब कायसा येथ । वेगीं अभिषेकीं शरणागत । ऐकोनियां हनुमंत। काय बोलत तें ऐका ॥ ४ ॥ जो वोळगणा सर्वांगाचा । जो लाडका श्रीरामाचा। राम आज्ञाधारक ज्याचा। ऐकें त्याचा वचनार्थ ॥ ५ ॥ भजनाचेनि पडिभरें। सायुज्य जेथें न सरे। तो हनुमान अति निष्ठुरें। बोलत उत्तरें रामासीं ॥ ६ ॥ राज्याभिलाष तुझे पोटीं। आणि सौमित्रासी उठाउठीं। अभिषेकाची सांगसी गोष्टी । ते न मने सृष्टी श्रीरामा ॥ ७ ॥ अंतरीं लोभाचें ठाणें। बाह्य विरक्ती मिरवणें। लौकिकासी जोगावणें । समर्थ करणें कळेना ॥ ८ ॥ राज्याभिलाष बिभीषणा। सर्वथा नाहीं रघुनंदना। तूं आरूढोनि सिंहासना। लंकाभुवना अंगीकारीं ॥ ९ ॥ अनुसरोनि रामासी । जो राज्यातें अभिलाषी। तेणें बुडविलें धर्मासी । अधःपातासी स्वयें गेला ॥ ११० ॥ यालागीं गा रघुनाथा । लंका अंगीकारोनि आतां। चरणीं स्थापीं शरणागता । विचार अन्यथा न करावा ॥ ११ ॥ म्हणोनि घातलें लोटांगण। अंगीकारीं सिंहासन । अंगीकारीं राजभुवन। विचार आन न करावा ॥ १२ ॥ ऐसें विनवितां हनुमंता। आश्चर्य झालें रघुनाथा । सविस्तर वृत्तान्त न कळतां। कोण्या अर्था कोपसी ॥ १३ ॥ कैंवी माझा लोभ कळला। कोण्यां अर्थीं कोप आला। बिभीषण अव्हेरिला। या बोला मज न साहवे ॥ १४ ॥ प्राण जाईल जावो सुखें। परी बिभीषण असावा सुखें। म्हणोनि नवसियेलें अनेकें। मी निजहरिखें नवसित ॥१५॥ बिभीषणा सिंहासनीं। कैं देखेन

१ स्थान. २ लागलेंच. ३ आवड, तृप्ति. ४ अत्यंत खेद. ५ मारुति. ६ काळजी. ७ दुसरा. ८ पूर्णभक्त. ९ काय म्हणून. १० केव्हां एकदां.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

राजधानीं । ऐसें नवसीं अनुदिनीं । प्रतिक्षणीं चिंतीत ॥ १६ ॥ ते हनुमंता आजि समस्त । माझे पुरले मनोरथ । अभिषेकितां शरणागत । हर्षित चित्त पैं माझें ॥ १७ ॥

वाचादत्तं मनोदत्तं धारादत्तं न दीयते ।
अरण्ये निर्जले देशे दाता भवति सूकरः ॥ १० ॥

एक करिती धारादान । एक करिती मनोदान । एक करिती वाग्दान । ऐक लक्षण तयाचें ॥ १८ ॥ मनें कर्में आणि वचनें । दिधलें दान नेदीं म्हणे । सूकर होवोनि वसवी वनें । फळजळाविणें पैं देखा ॥ १९ ॥ आपण तरी प्रत्यक्षतें । प्राप्त न होतां लंकेतें । अभिषेकिलें बिभीषणातें । त्या वचनातें केंवी सांडों ॥ १२० ॥ ज्याची प्रतिज्ञा लटकी होय । धरा त्याचा भार न साहे । विजयश्री केंवी लाहे । निंद्य होये जगामाजी ॥ २१ ॥ अनृतवादी जे जन । अनृतत्वाचें जीवन । विजयश्री आपण । जाणें सांडून तेणें पापें ॥ २२ ॥ अनृतवादियाचे देहीं । तेज सर्वथा नाहीं । कळाहीन सदा पाहीं । जग तेंही निंदीत ॥ २३ ॥ अनृतवादियाचा प्राण । भाररूप वाहे पवन । जीवें जीतां प्रेतचिन्ह । भासे संपूर्ण जगासी ॥ २४ ॥ त्याचें जें कां हृदयाकाश । तमें वसविलें सावकाश । परमार्थाचें घर ओस । झालें निःशेष सर्वथा ॥ २५ ॥ सत्यप्रतिज्ञेचे जे नर । ते जैं सांडिती उत्तर । तैं स्वर्गस्थ त्यांचे पितर । ते सत्वर पैं खचती ॥ २६ ॥ पापाचें तें अधिष्ठान । नरकाचें तें निजभवन । तेथूनि त्यांसी नाहीं निर्गमन । स्वयेंचि जाण निजनरक ॥ २७ ॥ यालागीं वायुनंदन । सूर्यवंशी राजे जाण । एकनिष्ठ सत्यप्रतिज्ञ । धर्मभूषण वंशासी ॥ २८ ॥ ते वंशींचा दाशरथी । माझें नाम रघुपती । तो जैं सांडी वचनोक्ती । तैं अपकीर्ती जोडिली ॥ २९ ॥ तुम्हांसी संदेह निजचित्तीं । तोही कळला निश्चितीं । अभिषेका न येचि रघुपती । ऊर्मिलापती[3] पाठवितो ॥ १३० ॥ हाचि सकळांचा भावो । त्याचा ऐका अभिप्रावो । लंका दान दिधलें पहावो । सर्वथा जावों नये तयांत ॥ ३१ ॥ दाता निघे जैं दानांत । त्याचें श्रेयं गेलें वाताहत । नव्हे स्वार्थ ना परमार्थ । वृथा जीवित लौकिकीं ॥ ३२ ॥ यालागीं श्रीरघुनंदन । लंकेमाजी न ये जाण । बिभीषणाचें अभिषिंचन । केलें दर्शन होतांचि ॥ ३३ ॥ आतां यावें अभिषिंचना । तैं बाध आला प्रथमवचना । आन सर्वथा न करीं जाणा । लंकाभुवना न पाहें ॥ ३४ ॥ जीवाचा जीव तूं कपिनायका । सीताशुद्धि आणिल्या देखा । वाळूची करोनि दाविली लंका । बोल देखा गुंतली ते ॥ ३५ ॥ ज्यासीं बोल गुंतली राहे । वृथा त्याचें जिणें काये । यश कोठेंचि न लाहे । निंद्य होये लौकिकीं ॥ ३६ ॥ निजभक्ताचें क्रीडाभुवन । सर्वथा गुंतों नेदीं जाण । बोल सोडवावयालागून । स्वयें लक्ष्मण आज्ञापिला ॥ ३७ ॥ तंव विपरीत झालें तेथ । न कळतांही हा इत्यर्थ । क्षोभलासी तूं हनुमंत । शरणागतही क्षोभला ॥ ३८ ॥ सकळां माझें लोटांगण । क्षमा करावी आपण । सकळिकीं लंके जाऊन । बिभीषण अभिषेकावा ॥ ३९ ॥ ऐकोनियां तें वचन । तटस्थ झाले सकळ जन । अगाध श्रीरामाचें ज्ञान । अनवच्छिन्न निर्लोभ ॥ १४० ॥

तथेत्युक्त्वा सुसंहृष्टः सौवर्णं घटमाददे ।
कुंभेन तेन सौमित्रिरभ्यषिंचद्विभीषणम् ॥ ११ ॥

ऐकोनि श्रीरामाचें वचन । अति आल्हादें लक्ष्मण । मस्तकांजलि करोनि नमन । अभिषिंचन आरंभी ॥ ४१ ॥ आज्ञापितां हनुमंता । अति उल्लास झाला चित्ता । सामग्री अति आदरता । होय करिता स्वानंदें ॥ ४२ ॥ नगर शृंगारिलें कोडें । गुढिया मखरें कुंकुमसडे । मुक्ताफळांचे सुहाडे । चौक निवाडें शोभती ॥ ४३ ॥ सप्त मृत्तिका सत्वर । सप्त सागरींचें नीर । अष्ट पल्लव परिकर । अत्यादरें आणिले ॥ ४४ ॥ प्रेमाथिला[9] सुवर्णकुंभ । उदकें भरूनी स्वयंभ । तेचि सहस्रधारा प्रेमवालभ । अति सुलभ अभिषेक ॥ ४५ ॥ सद्विवेक परिकर । तेंचि भद्रपीठ औदुंबर । साधूनियां विरक्तिव्याघ्र-।-चर्म सनखाग्र अनाहत[10] पैं ॥ ४६ ॥ गादी बोधाची सुलक्षण । चैलें[11] विरंज[12] शोभायमान । आरूढावया बिभीषण । सिंहासनसामग्री ॥ ४७ ॥ सौमित्र येवोनि आपण । श्रीरामकृपेचें सिंचन जाण । अभिषेकोनि बिभीषण । सिंहासनीं पूर्ण

१ खोटें बोलणाराचे. २ सुटका, गति. ३ लक्ष्मणाला. ४ पुण्य. ५ तारण. ६ सुंदर. ७ प्रशस्त. ८ प्रेमसंपन्न. ९ प्रेमातिशय. १० अखंड, नवीन. ११ वस्त्र. १२ निर्मळ.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

बैसविला ॥ ४८ ॥ चिद्रत्नांचे अलंकार । ते लेववविले परिकर । चिदंबरें मनोहर । वस्त्रें परिकर शोभती ॥ ४९ ॥ अनन्यप्रीतीचीं सुमनें । गुंफोनियां अनुसंधानें । शृंगारिलें सुमित्रानंदनें । शरणागता शरण्य कृपाळू ॥ १५० ॥ सोहंभावाचें नीराजन । कुरवंडी बिभीषण । अति प्रीतीं सुमित्रानंदन । ओंवाळून सांडीत ॥ ५१ ॥ तेणें काळें बिभीषण । भेद्रीं अति विराजमान । देखोनियां वायुनंदन । करी निंबलोण सर्वस्वें ॥ ५२ ॥ दीपावळी नीराजनें । ओंवाळिती जीवप्राणें । हरिखलीं वानरगणें । देती किराणें रामनामें ॥ ५३ ॥ अनन्यगतीचे वाग्जल्प । वर्णितां श्रीरामप्रताप । नामें गर्जती अमूप । सत्यसंकल्प श्रीराम ॥ ५४ ॥ देहत्रिकूटनिवासी । वधूनि अहंरावणासी । मुक्त करोनि लंकेसी । शरणागतासी स्थापिलें ॥ ५५ ॥ राक्षसमंडळीमाझारीं । बिभीषण सहपरिवारीं । शोभता झाला निजगजरीं । कृपेंकरीं रामाचे ॥ ५६ ॥ राम कृपेचें जीवन । राम कृपेचें अधिष्ठान । रामकृपा सनातन । बिभीषण शोभत ॥ ५७ ॥ श्रीराम कृपेचा पुतळा । श्रीराम कृपेचा कोंवळा । श्रीराम कृपेचा वहिला । निजराज्य पावला बिभीषण ॥ ५८ ॥ अति प्रीतीं शरण आला । अति प्रीतीं आश्वासिला । स्वराज्य देखोनि वहिलें । स्वपदीं स्थापिला निजभक्त ॥ ५९ ॥ नगरनागरिकां समस्तां । अति प्रीती राक्षसवनितां । पूर्णकुंभ जळभरिता । दधि मधु अक्षता सुमन दूर्वा ॥ १६० ॥ लाजा घेवोनि अति प्रीतीं । राक्षसवनिता तेथें येती । श्रीरामाची अमल कीर्ती । ओंवाळिती बिभीषण ॥ ६१ ॥ एका जनार्दना शरण । शरणागत बिभीषण । स्वराज्यीं स्थापोनियां पूर्ण । कीर्ती पावन तिहीं लोकीं ॥ १६२ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां बिभीषणराज्याभिषेचनं नाम षट्षष्टितमोऽध्यायः ॥ ६६ ॥ ओंव्या ॥ १६२ ॥ श्लोक ॥ ११ ॥

अध्याय सदसष्टावा

श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ बिभीषण राज्यधर । देखोनि वानर निशाचर । अवघीं केला जयजयकार । नामें अपार गर्जती ॥ १ ॥ नामें कोंदलें पाताळ । नामें व्यापिलें जगतीतळ । नामें कोंदलें नभोमंडळ । ब्रह्मांडगोळ व्यापिला ॥ २ ॥ नामें गर्जती माकडें । वर्णिती रामाचे पवाडे । नाचती प्रेमें वाडेंकोडें । बिभीषणापुढें अति प्रीतीं ॥ ३ ॥ श्रीरामदत्त तेजाकार । रावणमुकुट परिकर । आणोनि बाणे सुग्रीव वीर । धरिलें छत्र रामदत्त ॥ ४ ॥ तेणें शोभा अत्यद्भुत । बिभीषण राज्यमंडित । तें देखोनि सुर समस्त । सुमनें वर्षत अति प्रीतीं ॥ ५ ॥ करोनियां जयजयकार । नामें गर्जती सुरवर । नभीं सिद्धांचा जयजयकार । रामचरित्र अनुपम ॥ ६ ॥ हनुमंतादि सुग्रीव वीर । सकळ वानरांचा भार । बिभीषण राज्यधर । निशाचरसमवेत ॥ ७ ॥ श्रीरामनमनालागीं जाणा । परम आल्हाद बिभीषणा । सर्वें वानरराक्षसांची सेना । घेऊनि वंदना चालिला ॥ ८ ॥ समीप ध्वजपताकामंडित । मत्तगज अश्व रथ । वीर चालिले असंख्यात । अति हरिखत रामनमना ॥ ९ ॥ गजस्कंधीं बिभीषण । पाठीसीं सखा सौमित्र जाण । हनुमान अति विचक्षण । दोहीं बाहीं सैन्य सज्जिलें ॥ १० ॥ यथाक्रमें परिकर । दोहीं भागीं विचित्र । दक्षिणांगीं सुग्रीव वीर । अति मनोहर वेत्रपाणी ॥ ११ ॥ वामांगीं चालत हनुमंत । जो श्रीरामाचा आप्त । श्रीराम आज्ञा तेथ । पुढें चालत जुत्पती ॥ १२ ॥ वाद्यें विचित्र अति गजरीं । भोंगळा काहळा निशाण भेरी । विरांणीं वाजती अति कुसरीं । ध्वनि विचित्र त्यांमाजी ॥ १३ ॥ वाद्यांचा नाद गंभीर । भाट गर्जती अपार । अवघे करिती जयजयकार । आले रघुवीरवंदना ॥ १४ ॥ राज्याभिषिक्त बिभीषण । देखोनियां रघुनंदन । आनंद उथळला पूर्ण । तेणें त्रिभुवन कोंदलें ॥ १५ ॥ हातीं धरोनि बिभीषण । पुढें झाला सुमित्रानंदन । श्रीरामचरणा वंदन । करवी आपण अत्यादरें ॥ १६ ॥

स तान्गृहीत्वा दुर्धर्षो राघवाय न्यवेदयत् ।
मांगल्यं मंगलं सर्वं लक्ष्मणाय च वीर्यवान् ॥ १ ॥
कृतकार्यं समृद्धार्थं दृष्ट्वा रामो बिभीषणम् ।
यावच्चंद्रश्च सूर्यश्च यावत्तिष्ठति मेदिनी ॥ २ ॥

१ पुष्पें. २ सिंहासनावर. ३ तत्काळ. ४ लाह्या. ५ पराक्रम. ६ हातांत काठी घेऊन. ७ वाद्यविशेष. ८ स्तुतिपाठक. ९ उपजला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

यावद्रामकथा लोके तावद्राज्यं बिभीषणे ।
प्रतिजग्राह तत्सर्वं तस्यैव प्रियकाम्यया ॥ ३ ॥
उवाचेदं वचो रामो हनूमंतं प्लवंगमम् ।
अनुज्ञाप्य महाराजमिमं सौम्य विभीषणम् ॥ ४ ॥
प्रविश्य नगरीं लंकां कुशलं ब्रूहि मैथिलीम् ॥ ५ ॥

जैसें श्रीरामाचें मनोगत । तैसें सुमंगल वेदोक्त । देखोनियां रघुनाथ । आनंदभरित पैं देखा ॥१७॥ अति दुर्धर रावण । क्षणें निवटोनियां जाण । अभिषेकिला बिभीषण । श्रीरघुनंदन सुखमय ॥ १८ ॥ राज्यालंकृत बिभीषण । देखोनियां रघुनंदन । अति आल्हाद पावोन । आशीर्वचन पैं देत ॥ १९ ॥ विपायें ऐसें घडों शके । जैं भानूतें तम जिंके । तरी बिभीषणा निकें[1] । अक्षयी सुखें राज्य भोगीं ॥ २० ॥ चंद्र संतप्त होय आगीं । अथवा प्रळय जावो भंगीं । तथापि बिभीषणा जगीं । अभंग भोगीं निजराज्य ॥ २१ ॥ बैसका[2] सांडी कुळाचळा । पृथ्वी जाय रसातळा । तरी जो श्रीरामें स्थापिला । तो अक्षयी झाला बिभीषण ॥ २२ ॥ जंववरी श्रीरामकीर्ती । शाश्वत आहे त्रिजगतीं । तंववरी सुखसंवित्ती । अक्षयस्थितीं राज्य करीं ॥ २३ ॥ जंववरी श्रीरामनामकीर्ती । जंववरी श्रीरामभक्ती । जंववरी श्रीरामाची ख्याती । तंव राज्यस्थिती बिभीषणा ॥ २४ ॥ ऐसे देवोनि आशीर्वचना । सवेंचि सांगे वायुनंदना । हनुमंता सर्वज्ञा । लंकाभुवना नेईं यासी ॥ २५ ॥ सप्राकार सतोरण । अति मंडित लंकाभवन । महोत्सवें वायुनंदन । राजा बिभीषण प्रवेशवीं ॥ २६ ॥ निर्दळूनि रावणासी । अभिषेकिलें बिभीषणासी । गुढी उभवोनि जानकीसी । हे वार्ता तिसी सांगावी ॥ २७ ॥ ऐकोनियां श्रीरामाज्ञा । उल्लास वायुनंदना । मस्तकीं वंदोनियां वचना । घाव निशाणा घातला ॥ २८ ॥ नळनीळादि जुत्पती । सुग्रीव राजा वानरपती । अंगदेंसहित मारुती । अति प्रीतीं निघाला ॥ २९ ॥ वाद्यें लागलीं विचित्रें । ध्वनि उठला अति गजरें । हरिखें नाचती वानरें । माथां पुच्छाग्रे उभवोनी ॥ ३० ॥ उपायनें बळिदानें । राक्षस आणिती सन्मानें । प्रीतीं घालिती लोटांगणें । बिभीषण संतुष्टे ॥ ३१ ॥ सुरासुरीं यथेष्ट । वानर होवोनियां भाट[3] । श्रीरामगुण उद्भट । कीर्ति अचाट वर्णिती ॥ ३२ ॥ अति गजरें राज्यमंडित । चौघे प्रधान समवेत । वानरमांदी अपरिमित । लंकेआंत प्रवेशले ॥ ३३ ॥ प्रवेशोनि लंकाभुवन । बिभीषण अति विचक्षण । रामांगनेलागीं नमन । करावया आपण चालिला ॥ ३४ ॥ प्रवेशोनि अशोकवनीं । देखोनियां जनकनंदिनी । नमन करावयालागूनी । सकळां मनीं उत्सावो ॥ ३५ ॥ पुढें देखोनि जानकीसी[4] । सुख दाटलें हनुमंतासी । लोटांगण अति प्रीतीसीं । घालोनि चरणांसी लागला ॥ ३६ ॥ देखोनियां हनुमंतासी । अति आल्हाद जानकीसी । उचलोनि अति प्रीतीसीं । सर्वभावें आलिंगिला ॥ ३७ ॥ महार्णवांतूनि बाळक । सुटोनियां एकाएक । मातेसी भेटतां आवश्यक । सप्रेम देख आलिंगी ॥ ३८ ॥ तेंवी पुत्रस्नेहें हनुमंता । आलिंगितां जनकदुहिता । आनंद दाटला चित्ता । सप्रेमता सद्गदित ॥ ३९ ॥ श्रीरामभक्तिसुखापुढें । पुत्रस्नेह तें बापुडें । जानकिया प्रेमपाडें । निजनिवाडें आलिंगिला ॥ ४० ॥ प्रेमाश्रू करोनि जाण । हनुमंतासी अभिषिंचन । जानकियें करोनि पूर्ण । अमृतहस्तेंकरोन कुरवाळी ॥ ४१ ॥ मग वंदोनियां चरण । दोन्ही करसंपुट जोडून । विनविता झाला आपण । प्रीतीकरून हनुमंत ॥ ४२ ॥ निर्दाळावया रावण । श्रीरामा आला शरण । श्रीरामभजनार्थ जाण । केलें निर्दळण स्वकुळाचें ॥ ४३ ॥ अति गूढ मारका युक्ती । सांगोनियां श्रीरामाप्रती । मारविला लंकापती । विजयी रघुपती जेणें केला ॥ ४४ ॥ तो हा राजा बिभीषण । श्रीरामें अभिषेकूनि आपण । तुज करावया नमन । प्रीतीकरोन पाठविला ॥ ४५ ॥ या बिभीषणाचे संगतीं । विजयी तुझा श्रीरघुपती । अक्षयी विजयस्थिती । ऊर्मिलापती[5] जाण माते ॥ ४६ ॥ बिजयी सुग्रीव कपिराजा । विजयी अंगद युवराजा । विजयी सेनापति वोजा । विजयी रघुराजा याचेनी ॥ ४७ ॥ नळनीळादि जांबवंत । वानरवीर विख्यात । रणयोद्धे रणोन्मत्त । विजयी समस्त याचेनी ॥ ४८ ॥ ऐसें बोलोनि हनुमंत जाण । हातीं धरोनि बिभीषण ।

१ खरोखर, २ बैठक, ३ स्तुतिपाठक, ४ जानकी, ५ लक्ष्मण,

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

नमस्कारिले श्रीचरण । प्रीतीकरोन जानकीचे ॥ ४९ ॥ येरी उचलोनि त्वरित । प्रीतीं मस्तक अवघ्राणित । प्रेमाश्रुसिंचनें तेथ । अभिषेकित बिभीषण ॥ ५० ॥ तैसाचि सुग्रीवराजा जाण । हनुमान भेटवी आपण । येरी प्रीती उठवोन । केलें अवघ्राण मस्तकीं ॥ ५१ ॥ तंव अंगद पुढें झाला । तोही प्रीतीनें आश्वासिला । नीळें नमस्कार केला । कुरवाळिला अमृतहस्तीं ॥ ५२ ॥ तंव पुढें झाला जांबुवंत । सुषेण दधिमुख तेथ । जानकीतें नमस्कारीत । अति विनीत रामप्रेमें ॥ ५३ ॥ येरी निजकृपा अवलोकन । सकळां देवोनि समाधान । हनुमंतासी आज्ञापन । केलें आपण जानकीयें ॥ ५४ ॥ श्रीरामें अभिषेकिला । निजराज्य हा पावला । अनुग्रहें विराजला । निजभुवना वहिला प्रवेशवीं ॥ ५५ ॥ लाहोनियां आज्ञापन । हनुमान अत्यंत सज्ञान । बिभीषणा आपण । राज्यभुवन प्रवेशविलें ॥ ५६ ॥ सिंहासनादि सकळ भोग । श्रीरामकृपा अव्यंग[३] । बिभीषण पावला साङ्ग । सुख अभंग उथळलें ॥ ५७ ॥ सर्वथा जें दुष्प्राप[२] राज्य । तें श्रीरामकृपा निज । बिभीषण पावोनि सहज । नाचत भोजें[४] आनंदें ॥ ५८ ॥ दुकाळिया जेवीं मिष्टान्न । अवर्षणीं वर्षे घन । सुकतया अंकुरा जाण । होय संपूर्ण अमृतवृष्टी ॥ ५९ ॥ गतायुषा जोडे आयुष्य । रंका इंद्रपद सावकाश । तैसें जालें बिभीषणास । श्रीरामास विनटतां ॥ ६० ॥ येरीकडे मारुती । विनविते जालें कपिपती । झाली सकळ कार्याची स्थिती । सीता सती नेवों आतां ॥ ६१ ॥ ऐकोनि तयांचें वचन । हनुमान नेदी प्रतिवचन । तेणें खवळले कपिगण । कोल्हाळ संपूर्ण आदरिला ॥ ६२ ॥ सकळ भोग आदिकरोनी । राजोपचारा देवोनि पाणी । पादत्राणही सांडूनी । एकली वनीं प्रवेशली ॥ ६३ ॥ श्रीरामसेवेलागीं देखा । सांडणें केलें शरीरसुखा । ते जानकी सत्वर देखा । रघुकुळटिळका भेटवावी ॥ ६४ ॥ आम्हीं विनवितां सकळ जन । तूं न देसी प्रतिवचन । काय तुझें आहे मनोज्ञ[८] । तें संपूर्ण चिन्ह लक्षेना ॥ ६५ ॥ तंव भावार्थाचा मेरू । जो आज्ञेचा किंकरू । श्रीरामहृत्कमलमधुकरू । हनुमान वीरू विनवीत ॥ ६६ ॥ स्वमुखें श्रीरघुनाथ । बोलिला नाहीं इत्थंभूत[६] । अथवा नाहीं संकेत । ते जानकी येथें आणावी ॥ ६७ ॥ याकरितां माझें चित्त । जालें अतिशयें भ्रमित । कांहीं योजेना निश्चितार्थ । राहिलों निवान्त म्हणवोनी ॥ ६८ ॥ नकळतां या अर्थासी । म्यां काय सांगावें तुम्हांसी । म्हणवोनि निवान्त मानसीं । तंव तुम्हांसी क्षोभ आला ॥ ६९ ॥ याकरितां ऐकोनि वचनार्थ । पुढें जाला जांबवंत । लक्षोनियां हनुमंत । स्वयें बोलत आवेशें ॥ ७० ॥ हनुमंता सकळाविखीं । तुज व्युत्पत्ति आहे निकी । स्त्रीपुरुषांची उंखीविखी । अनोळखी ते तुज ॥ ७१ ॥ स्वमुखें श्रीरघुपती । कैंवी सांगे तुम्हांप्रती । मज भेटवावी सीतासती । म्हणोनि काकुळती तंव न ये ॥ ७२ ॥ आपुलेठायीं आपण । विचार करावा पूर्ण । जानकीलागीं रघुनंदन । तनुसंकीर्ण पैं झाला ॥ ७३ ॥ जीलागीं वधिला विराधू । दूषण त्रिशिरा बंधू । त्यांचा क्षणें केला वधू । तो निजवधू कैंवी सांडी ॥ ७४ ॥ जीलागीं वधिलें मारीचासी । चर्म काढिलें कंचुकीसी । जिचेनि उद्धार जटायूसी । त्या जानकीसी कैंवी सांडी ॥ ७५ ॥ जीलागीं वनोवन । हिंडता झाला रघुनंदन । तीतें सांडील आपण । सर्वथा जाण हें न घडे ॥ ७६ ॥ वाळी वधोनियां देखा । सुग्रीव जीलागीं केला सखा । तें जानकीतें देखा । रघुकुळटिळकातें न सांडवे ॥ ७७ ॥ तुम्ही आम्ही सकळ वानर । जिचेनि व्याजें[११] श्रीरामकिंकर[१२] । ते सीता सती सुंदर । श्रीरघुवीर कैंवी सांडी ॥ ७८ ॥ जिचेनि शुद्धीसी रघुपती । तूतें पाठविलें मारुती । शोधितां लंका पालथी । केली निश्चिती जीलागीं ॥ ७९ ॥ जीलागीं सागर गांजिला । शिळासेतु बांधिला । लंकेचा निरोधु[१३] केला । रावण वधिला जीलागीं ॥ ८० ॥ जिचेनि सुर तेहतीस कोडी । त्यांची सुटली बांधवडी[१४] । निजराज्याची उभवोनि गुढी । स्थापिला निरवडी[१५] बिभीषण ॥ ८१ ॥ ते सती जनकदुहिता । सांडणें न घडे सर्वथा । सावध होईं हनुमंता । भेटवीं

१ मिळवून. २ पूर्ण. ३ दुर्मिळ. ४ सुखेंकरून. ५ उद्देश. ६ सर्व. ७ सर्वविषयीं. ८ चांगली. ९ गुह्यगोष्टी. १० शरीरानें कृश. ११ निमित्तानें. १२ रामदूत. १३ अटकाव. १४ बेडी. १५ पूर्णपणें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सीता श्रीरामा ॥ ८२ ॥ आमुचे सेवेचें पैं देख । हेंचि फळ अलौकिक । दोघां करावया मेळ एक । विचार आणिक असेना ॥ ८३ ॥ तिये वेळे निश्चित । स्वयें बोलिला श्रीरघुनाथ । जानकीये सांगावें हर्षित । जें लंकानाथ निवटिला ॥ ८४ ॥ याचे पोटीं ध्वनित । बोलोनि गेला रघुनाथ । सकळ झाला कार्यार्थ । भेटवा निश्चित जानकी ॥ ८५ ॥ हा अर्थ न कळे पैं तुज । स्वयें झालासी निर्बुज । भेटावया रघुराज । जनकात्मजा चालोंद्या ॥ ८६ ॥ ऐकोनियां तें वचन । हनुमान घाली लोटांगण । तुम्हांहूनि अधिक ज्ञान । सर्वथा जाण मज नाहीं ॥ ८७ ॥ बहुतांच्या मनासी आलें । तें मज सर्वथा मानलें । उचित पाहिजे केलें । तेंचि वहिलें करावें ॥ ८८ ॥ हनुमंताचेनि वचनें । हरिखलीं वानरगणें । देत नामांचीं किराणें । रामांगने नेवों पाहती ॥ ८९ ॥

विज्ञापयति वैदेहीं सुग्रीवोऽथ प्रणम्य च ।
द्रष्टुमिच्छति भर्ता त्वां रामो धर्मभृतां वरः ॥ ६ ॥
सुस्नातालंकृतामेव संयुक्तां प्रतिकर्मणा ॥ ७ ॥

सकळ वानरांचा वर । किष्किंधेचा राज्यधर । पुढें होवोनि सुग्रीव वीर । नमन सत्वर पैं केलें ॥ ९० ॥ अति विनीत अत्यंत प्रीती । लोटांगणीं पुढतपुढती । अति मधुर वचनोक्ती । जानकीप्रती विनवीत ॥ ९१ ॥ ऐकें जानकीये माते । श्रीरामवियोगें व्रतस्थे । जाळूनि सांडिलें देहभावातें । श्रीरामातें आठवितां ॥ ९२ ॥ त्यजिलें अन्न जीवन । त्यजिलें फळभोजन । त्यजिले भोग गहन । श्रीरघुनंदनवियोगें ॥ ९३ ॥ त्यजिले वस्त्रालंकार । त्यजिले अभ्यंगपरिकर । माथां वळला जटाभार । वल्कलांबरपरिधान ॥ ९४ ॥ रुधिर शोषलें समस्त । मांस आटलें जेथींचें तेथ । चर्म झालें अस्थिगत । श्रीरघुनाथवियोगें ॥ ९५ ॥ ऐसी उग्र तपश्चर्या । अतिअटकें सुरवर्या । तेणें तेजें रघुवर्या । संताप सबाह्य झाला असे ॥ ९६ ॥ जानकीवियोगविरहें पूर्ण । अति संतप्त रघुनंदन । करोनियां सेतुबंधन । वीर रावण निर्दाळिला ॥ ९७ ॥ राक्षसकुळनिर्दळण । तुजलागीं केलें जाण । लंके राजा बिभीषण । झाला संपूर्ण तुझेनि धर्में ॥ ९८ ॥ अति दुर्जय त्रिजगतीं । विस्तारली श्रीरामकीर्ती । तथापि श्रीराम विश्रांती । न पवे निश्चितीं तुजवीण ॥ ९९ ॥ बिभीषण राज्यधर । प्रवेशला लंकापुर । श्रीरामें आज्ञोत्तर । तुज सत्वर पाठविलें ॥ १०० ॥ माझे वियोगें गांजली । सीता अत्यंत कष्टली । अस्थिमात्र असे उरली । वेडी झाली मजलागीं ॥ १ ॥ म्हणवोनियां तुजपासीं । वेगें पाठविलें आम्हांसी । बिभीषण स्थापावा लंकेसी । आणि जानकीसी आणावें ॥ २ ॥ वंदोनि श्रीरामाज्ञापन । विलंब न करावा आपण । वेगीं घ्यावें रामदर्शन । म्हणोनि चरणां लागला ॥ ३ ॥ करावीं अभ्यंगमार्जनें । दिव्यवस्त्रें परिधानें । विचित्र अलंकाराभरणें । सुमनें चंदनें अंगीकारीं ॥ ४ ॥ स्वामीचिया दर्शनासी । मलिन वेषें केंवी जासी । अंगीकारावें विनंतीसी । म्हणोनि चरणांसी लागला ॥ ५ ॥ ऐकोनि त्याच्या वचनासी । हांसूं आलें जानकीसी । जवळी असोन अहर्निशीं । रामभजनासी अनोळख ॥ ६ ॥ श्रीरामेंवीण जें अन्न । तें केवळ विष्ठाभोजन । तांबूल तें रुधिरपान । साचार जाण सुग्रीवा ॥ ७ ॥ श्रीरामावीण उदकपान । तें मरणप्रद विष दारुण । जीवन त्यातें म्हणे कोण । सत्य जाण सुग्रीवा ॥ ८ ॥ श्रीरामवासावांचून । इतर वास परिधान । तेणें व्यभिचार घडला पूर्ण । व्यभिचारिणी ते नारी ॥ ९ ॥ श्रीरामतेजाहूनि इतर । अलंकार जे रत्नाकार । शरीरीं केवळ तो भार । खदिरांगार तैसे ते ॥ ११० ॥ सुमनमाळा परिकर । ते माळा नव्हती सूचिकाग्र । अभ्यंग चंदन परिकर । ते लेप साचार विष्ठेचे ॥ ११ ॥ ऐसें बोलतां जानकीसी । स्वेदाश्रु रोमांच सर्वांगासी । जानकीची निष्ठा कैसी । देहांन्त भोगासी आंतळतां ॥ १२ ॥ इतर जे रामसेवक । श्रीरामभजनीं अति दक्ष । जानकी त्यांचा आचार्य देख । निष्ठा अलोलिक दाखविली ॥ १३ ॥ देखोनि तिच्या निश्चयार्था । आनंद सकळांचिया चित्ता । लोटांगणीं सादरता । चरणीं माथा ठेविला ॥ १४ ॥ श्रीराम-

१ कष्टी. २ प्रतिबंध. ३ रामरूपी वस्त्रावांचून. ४ रत्नमय. ५ खैराच्या अग्नीचे निखारे. ६ सुईचें अग्र. ७ मरण. ८ स्पर्श केला तर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

महिमा अगाध । तैसीच जानकी अगाधबोध । निष्ठा अति विशुद्ध । सामर्थ्य शुद्ध जानकीचें ॥ १५ ॥ ऐसें करोनियां स्तवन । विनविते झाले सकळही जन । जैसें तुझें मनोज्ञ । तैसें निर्गमन करीं माते ॥ १६ ॥ कायसी आमुची युक्ती । जे विनंती करूं तुजप्रती । जैसी तुझी मनोवृत्ती । तैसिये स्थिती भेटें रामा ॥ १७ ॥ म्हणोनि राहिले निवान्त। तंव बिभीषण शरणागत। शिबिकेसहित आला तेथ। वदे आरोहण येथें करीं माते ॥ १८ ॥ देखोनि त्याच्या आदरासी । जानकी बोले प्रतीतीसी । तूं जाणता भजनधर्मासी । व्रत पाहसी तूं माझें ॥ १९ ॥ पारका पायीं राम सांपडे । तरी साधक कां शिणती बापुडे । ऐसें सर्वथा नघडे। जें राम सांपडे परके पायीं ॥ १२० ॥ प्रवहणांवरी यात्रा करीत । यात्रा श्रेय तें पैं नेत । कर्ता लटिकाचि वल्गत । अभिमान वसत लौकिकीं ॥ २१ ॥ श्रीरामाची निजप्राप्ती । प्रवहणाची नलगे गती । परपायीं रघुपती । न भेटे निश्चिती कोणाही ॥ २२ ॥ पुढिलाचेनि भोजनें। तृप्ती नपवे निजप्राणें। तेंवी जाण परचरणें । रघुनंदन भेटेना ॥ २३ ॥ श्रीरामाची अंतरस्थिती । तो केंवी गावे प्रवहणगती । म्हणोनियां मुनिपंक्ती । नातळती यानासी ॥ २४ ॥ ऐसें बोलोनियां सती । मस्तकांजली विनय वृत्ती । उठोनियां अति प्रीती । सहजस्थिती चालिली ॥ २५ ॥ पदसंचाराच्या ठायीं । धैरें सबाह्य राम पाही । देखोनियां लवलाहीं । देह देहीं नाठवे ॥ २६ ॥ जेंवी वायूचें चळण । सर्वत्र विचरे गगन । परी अंशही नव्हे भिन्न । गगनीं गगन होऊन राहे ॥ २७ ॥ जानकीच्या पाउलाची मोहर । लघुत्वें अति अरुवार । शून्यत्व सांडोनि साचार । पदसंचार श्रीरामें ॥ २८ ॥ अति अरुवार हंसगती । सर्वें हरिगणांची संपत्ती । शीघ्र आली सुवेळेप्रती । निकटवर्ती श्रीरामा ॥ २९ ॥ देखोनियां श्रीरामचरण । आलें जानकीसी स्फुरण । वेळोवेळां बाहुस्फुरण। रोमांचीं पूर्ण उभविली गुढी॥ १३० ॥ अंतरीं सुखोर्मी दाटली । ते बाह्य चिह्नें प्रकट झाली।अंगींची कांचोळी उतटली। पताकीं वहिली मंडित ॥ ३१॥ जेंवी सूर्योदयीं कमळिणी। त्यजोनियां संकोचरजनी । अति संतोष विकासनी । दिनमणी देखोनियां ॥ ३२ ॥ तेंवी सूर्यवंशदिनमणी । अर्द्धांब्जविकासिनी । श्रीराम देखोनियां नयनीं । जनकनंदिनी विकासत ॥ ३३ ॥ सुप्रसन्न मुखकमळ । मुखचंद्र अति निर्मळ । टवटवीत तनु सोज्ज्वळ । जनकबाळ सतेज ॥ ३४ ॥ होतां सूर्यासमोर । सूर्यकांतीं वैश्वानर । भासे सकळां गोचर । पचँनवेव्हार संपादी ॥ ३५ ॥ तेंवी देखतां रघूत्तम । जानकीची शोभा परम । भासे अति मनोरम । विश्रामधाम जगाचें ॥ ३६ ॥ पुढें देखोनि राघव । अति आवेशें भरला जीव । समर्पीन सर्व भाव । म्हणोनि हाव उथळली ॥ ३७ ॥ म्हणे भाग्य आलें फळा । षण्मासांचा वियोग गेला। नमावया घनसांवळा । जनकबाळा अभिमानली ॥ ३८ ॥ संमुख घालितां लोटांगण । न पाहेचि रघुनंदन । पूर्व सांडूनि अपूर्व जाण । करी वदन पश्चिमेकडे ॥ ३९ ॥ उठोनि पाहे रामवदन । संमुख न दिसे रघुनंदन । स्वयें दक्षिणेकडे होऊन । केलें नमन श्रीरामा ॥ १४० ॥ वाम सव्य दश दिशे । नमन करितां आवेशें । संमुख राम न दिसे । अति निःश्वासें स्फुंदत ॥ ४१ ॥

अथैतां बाष्परुद्धाक्षीं संमुखे नाभ्यलोकयत् ।
अथ सा भूमिजा दुःखस्वरेण महताऽरुदत् ॥ ८ ॥
बाष्पव्याकुलताम्राक्षी मध्ये तेषां वनौकसाम् ।
तस्या विलपितं दृष्ट्वा सर्वे ते हरियूथपाः ॥ ९ ॥
रुरुदुर्जातसंतापाः शोकव्याकुललोचनाः ।
मुखं वस्त्रेण संच्छाद्य सौमित्रिर्जातसंभ्रमः ॥ १० ॥

अतिदुःखेंकरूनि जाण । अश्रुपूर्ण आरक्त नयन । स्फुंदस्फुंदोनि करी रुदन । विमुख रघुनंदन मज झाला ॥ ४२ ॥ दीर्घस्वरें आक्रंदत । मज न पाहे रघुनाथ । वृथा वांचोनि काय येथ । निंद्य जीवित रामाविण ॥ ४३ ॥ जेव्हांच वियोग रामासी । तेव्हांच सांडावें देहासी । पापिणी मी ऐसी कैसी । देहभारेंसीं वांचलें ॥ ४४ ॥ पृथ्वीयेमाजी पाहीं । पापें आहेत जीं कांहीं । श्रीरामवियोगें सर्वही ।

१ वाहनांत, गाडींत बसून. २ पृथ्वीला ३ सुंदर, नाजूक. ४ वानरसमूहाची. ५ विशुद्ध ज्ञानेंकरून. ६ अमेदरूप कमलिनी. ७ पक्व करण्याचा व्यापार. ८ उपजली.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

माझ्या देहीं आदळलीं ॥ ४५ ॥ महापातकियाचें मुख । सर्वथा राम न पाहे देख । मी कैंवी आलें संमुख । प्राण निःशेख नव्हे माझा ॥ ४६ ॥ पापांमाजी महापातक । मज घडलें आत्यंतिक । सौमित्र शापिला देख । श्रीराम विमुख तेणें झाला ॥ ४७ ॥ अत्यंत अनुज आणि सखा । तो म्यां अभिशापिला देखा । कोण सुख रघुकुळटिळका । कासया मुखा अवलोकी ॥ ४८ ॥ म्हणोनियां दीर्घस्वरीं । आक्रंदतसे सुंदरी । स्वयें पडतां धरेवरी । केला वानरीं हाहाकार ॥ ४९ ॥ जीलागीं रघुनंदन । हिंडता झाला वनोवन । जीवीण न रुचे अन्नजीवन । समुद्रा पाळांण जीलागीं ॥ १५० ॥ लंकेलागीं करोनि पूर्ण । दारुण येथ रणकंदन । जीलागीं वधूनि रावण । राजा बिभीषण जीलागीं केला ॥ ५१ ॥ ते जवळी आलिया पाठीं । राम न पाहे दृष्टी । स्फुंदत पडलीसे गोरटी । श्रीराम पोटीं कठिण भारी ॥ ५२ ॥ देखोनि जानकीची अवस्था । सौमित्र वोसंडला चित्ता । निजपालवें तत्त्वता । होय झांकिता निजवदन ॥ ५३ ॥ पालवें झांकोनियां वदन । सौमित्र करीतसे स्फुंदन । अति कठिण रघुनंदन । अंतरचिन्ह कळों नेदी ॥ ५४ ॥ श्रीराम नेदी समाधान । तेणें आवेशें पैं जाण । विनवावया रघुनंदन । अवघेजण सरसावले ॥ ५५ ॥ अश्रू परिमार्जूनि हातें । जानकीचेनि पक्षें तेथें । सकळ दुखावले निजचित्तें । विनवूं पाहती श्रीरामा ॥ ५६ ॥ तंव स्वर्गींहूनि अवलीळा । आला सुरगणांचा पाळा । सिद्धगंधर्वयक्षमेळा । रघुकुळपाळा विनविती ॥ ५७ ॥ एका जनार्दना शरण । जानकी देखोनियां जाण । राम झाला उदासीन । कांहीं वचन बोलेना ॥ ५८ ॥ पुढें दिव्य[३] अद्भुत । जानकीये घेईल रघुनाथ । श्रोतीं अवधान द्यावें तेथ । कथा अद्भुत रामायणीं ॥ १५९ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां जानकीआगमनं नाम सतषष्टितमोऽध्यायः ॥ ६७ ॥ ओंव्या ॥ १५९ ॥ श्लोक ॥ १० ॥

अध्याय अडसष्ठावा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥

ततो वैश्रवणो राजा यमश्च पितृभिः सह ।
सहस्राक्षश्च देवेशो वरुणश्च जलेश्वरः ॥ १ ॥
त्रिशूलपाणिर्विश्वेशो महादेवो वृषध्वजः ।
कर्ता सर्वस्य लोकस्य ब्रह्मा च भगवान्प्रभुः ॥ २ ॥
स च राजा दशरथो विमानेनांतरिक्षगः ।
अभ्याजगाम तं देशं देवराजसमद्युतिः ॥ ३ ॥
एते सर्वे समागम्य विमानैः सूर्यसंनिभैः ।
अभ्यभाषंत काकुत्स्थं मधुरं वाक्यगौरवात् ॥ ४ ॥

वैश्रवण जो कुबेर । धनवंताचा राजा सधर । भगवंताचा भांडारघर । तेथें सत्वर पातला ॥ १ ॥ अर्यमा पितरसमवेत । यम पातला प्रेतनाथ । सहस्राक्ष देवनाथ । मरुद्गणेंसहित पातला ॥ २ ॥ अपांपती अति वोजा । वरुण आला अमृतराजा । विनवावया रघुराजा । सीताकाजा पैं आले ॥ ३ ॥ त्रिशूळपाणी वृषभ[५]ध्वज । गोक्षीर[६]धाम धवळ सहज । पिनाकयुक्त गणसमाज । साठी सहस्रांसमवेत ॥ ४ ॥ त्रिनेत्र पंचवक्त्र । दशभुजा अति परिकर । अर्धांगीं गिरिजा सुंदर । अति मनोहर तेथें आला ॥ ५ ॥ जो स्रजिता सकळांसी । पितामह म्हणती ज्यासी । तो सत्यलोकनिवासी । जानकीकाजासी ब्रह्मा आला ॥ ६ ॥ रावण पार्षद वैकुंठींचा । श्रीरामें वध केला त्याचा । अधिकार पावोनि निजाचा । गेला जेथींचा पैं तेथें ॥ ७ ॥ तंव तेथें दशरथ । वैकुंठीं देखिला नांदत । तेणें रावण आनंदभरित । ख्याती वानीत रामाची ॥ ८ ॥ सीताव्याजें करोनी । सागरीं शिळा तारोनी । रामें वधिला दशाननी । अभिनव करणी पैं केली ॥ ९ ॥ लंके अभिषेकिला बिभीषण । सोडविलें सीतानिधान । अतुलकीर्ती रघुनंदन । म्हणोनि गुण वर्णीतसे ॥ १० ॥ उद्धरोनि दशानना । पाठविलें वैकुंठभुवना । अमलकीर्ति रघुनंदना । दाता समान अरिमित्रां ॥ ११ ॥ रावणमुखें श्रीरामकथा । ऐकोनि आनंद दशरथा । पहावया श्रीरघुनाथा । सत्वर तेथें तो आला ॥ १२ ॥ शंकरादि देवांसमवेत । श्रीरामजनक दशरथ । ब्रह्मा इंद्र आले तेथ । जानकीचरित्र पहावया ॥ १३ ॥ सूर्यप्रभा समसमान । विमानें विमानीं पैं देदीप्यमान । अंतरिक्ष व्यापिलें गगन । श्रीराम आपण जेथें असे ॥ १४ ॥ ककुत्स्थकुळीं उत्पत्ती । म्हणोनि काकुत्स्थ रघुपती ।

१ आच्छादन, सेतु बांधणें. २ गर्हिवरला. ३ शपथ. ४ समर्थ. ५ बैलाचें ज्याच्या ध्वजावर चिन्ह आहे असा शंकर. ६ गाईच्या दुधाप्रमाणें शुभ्रवर्ण ज्याचें स्थान आहे असा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

नामनिर्देश निश्चिती । वेदश्रुतिपुराणें ॥ १५ ॥ ब्रह्मा जो कां लोकपती । मस्तकांजली विनयवृत्ती । सकळ देवेंसीं विनंती । सीताउद्देशें करीतसे ॥ १६ ॥ अति अक्षोभ्य सागर । शिळांनीं बुजोनि सत्वर । पराक्रमें वानरभार । क्षणें परपार पावविला ॥ १७ ॥ करोनियां महारण । इंद्रजित आणि कुंभकर्ण । रणीं निवटिला रावण । सकुळप्रधानसमवेत ॥ १८ ॥ बिभीषण लंकापती । जियेलागीं केला रघुपती । ते भेटलिया सीता सती । उपेक्षावृत्ती कां केली ॥ १९ ॥ राम भक्तजनवत्सल । ऐसा ब्रीदाचा कल्लोळ । तुझें अर्धांग जनकबाळ । उपेक्षाशीळ कैंवी रामा ॥ २० ॥ क्षमा करीं रघुनाथा । कृपाहस्त ठेवीं माथां । वेगीं उठवावी सीता । विचार अन्यथा न करावा ॥ २१ ॥ ऐसें ऐकोनियां वचन । उगाचि पाहात रघुनंदन । कांहीं नेदी प्रतिवचन । तेणें वानरगण खवळले ॥ २२ ॥ आधींच मर्कटें आल्हुकीं[1] । वरी संधि साधिली नेटकी । कोल्हाळ मांडिला सकळिकीं । कां हो जानकी उपेक्षिली ॥ २३ ॥ सुग्रीव राजा वानरनाथ । अंगद आणि जांबवंत । नळनीळादि बहुत । वानर समस्त बोलती ॥ २४ ॥ जिचेनि धर्में श्रीराम । स्वामी जोडला आम्हां । श्रीरामभक्ति प्लवंगमां । अगाध महिमा त्रैलोक्यीं ॥ २५ ॥ ते मुख्य सीता सती । जवळी असल्या रघुपती । उपेक्षिली निमेषगती । देवीं विनंती पैं करितां ॥ २६ ॥ तेणें वानरां भय संभवे । कैंवी करावें रामसेवे । जीव गेलियाही जीवें । धीर नव्हे भजनासी ॥ २७ ॥ उपेक्षिलें निजवधूसी । तो सेव्य कैंवी वानरांसी । श्रीरामसेवा करूं कैसी । वानरांसी भय भारी ॥ २८ ॥ थोर मांडिलें निर्वाण । हडबडिले[2] वानरगण । तें देखोनि बिभीषण । करोनि नमन विनवीत ॥ २९ ॥ उपेक्षितां जानकीसी । भय सुटलें सकळांसी । राम कृपाळु विश्वासी । हें पुराणांसी मंडण[3] ॥ ३० ॥ उभारोनियां निजहस्त । गर्जताती शास्त्रार्थ । राम कृपाळु निश्चित । वेदसंमत हे बोली ॥ ३१ ॥ तीं ब्रीदें अंगीकारीं । जानकीतें कृपा करीं । तंव सौमित्र ते संधीमाझारीं । विनंती करी मधुरवाणी ॥ ३२ ॥

विनविताहे शरणागत । तो मानावा वचनार्थ । तूं कृपाळु रघुनाथ । सर्वांचें मनोगत[4] रक्षावें ॥ ३३ ॥ ऐसें विनवितां समस्त । श्रीराम उगाचि तटस्थ । मग विनवी कपिनाथ । काय निवान्त पाहसी ॥ ३४ ॥ आकान्त होतसे सकळांसी । आणि तूं निवान्त मानसीं । निष्ठुर ऐसा कैसा होसी । जानकीसी प्राणान्त ॥ ३५ ॥ ऊठ चाल पाहसी काय । सीता मूर्च्छित पडली आहे । क्षणें तिचा प्राण जाये । करावें काय मग तेव्हां ॥ ३६ ॥ ऐकोनि त्याचा वचनार्थ । हनुमान उल्हासें असे बोलत । स्त्रीपुरुषांचा जो एकान्त[5] । त्याचा इत्यर्थ तुम्हीं कैंवी जाणां ॥ ३७ ॥ ऐसें बोलोनियां जाण । उठता जाला वायुनंदन । ज्याचें ऐकतां वचन । श्रीरघुनंदन संतुष्ट ॥ ३८ ॥ जो भक्तिसुखाचा सागरू । भजनधर्मासी सद्गुरु । निश्चयाचा महामेरु । धैर्य निर्धारु त्याचेनी ॥ ३९ ॥ अबलांचें तरी जीवन । साधकांसी साधन । सिद्धासी समाधान । अमृता जीवन वचन ज्याचें ॥ ४० ॥ प्रेमाचे उभांडे[6] देखा । देखोनि जानकीच्या दुःखा । जवळी येवोनि रघुकुळटिळका । सकळ लोकां देखतां ॥ ४१ ॥ प्रीतिप्रेमाचे आवेशीं । तीक्ष्ण उत्तरें श्रीरामासी । बोलता जाला कुशळतेसी । जानकीपक्षासी घेवोनी ॥ ४२ ॥ स्वामिसेवकांचें वचन । प्रीतिरोषयुक्त पूर्ण । प्रेमकलहाचें लक्षण । वदावया वदन मज कैंचें ॥ ४३ ॥ दोहींच्या अंतरीं प्रवेशावे । तैं दोहींचें हरिद्र[7] जाणवे । हें असंभाव्य कैंवी संभवे । अंतर वदवे स्वामिसेवकांचें ॥ ४४ ॥ परी सत्कुळाचें कुळवंत । पंचायतनींचें आदिदैवत । त्या सद्गुरूचें मनोगत । विचरे निश्चित मनामाजी ॥ ४५ ॥ त्याची कृपा उपायदानें । असंभाव्यही ये भावने । अचिंत्य आकळे चित्ताचिंतनें । निर्विकल्प मनें कल्पवे ॥ ४६ ॥ अलक्ष्य लक्षेंवीण दिसे । अमूर्तीची मूर्ति भासे । अवाच्यही शब्दासरिसें । सावकाशें बोलवे ॥ ४७ ॥ शंखासुर श्रीअनंतें । निवटिला स्वसामर्थ्यें । कलेवर[8] पिळूनि तेथें । निजहस्तें काढिलें ॥ ४८ ॥ सर्वेंचि प्रीतिपुरःसर । प्रसन्न होवोनि वेगवत्तर । हातीं घेऊनि कलेवर । ध्वनि

१ अस्थिर मनाचीं. २ खवळले. ३ शोभा देणारें. ४ मानसिक धर्म. ५ संकेत. ६ उमाळे. ७ मनांतील गुप्त गोष्ट. ८ शरीर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

विचित्र वाजवी ॥ ४९ ॥ तोचि मजलागीं पूर्ण । अवतरला एकाजनार्दन । निवटोनि ममाभिमान । कलेवर जाण अंगीकारिलें ॥ ५० ॥ मन बुद्धी चित्ताभिमान । स्वयेंचि होवोनि आपण । गिरे-माजी प्रवेशोन । निजगुणवर्णन करीतसे ॥ ५१ ॥ जेंवी शंखाचा उत्तम ध्वनी । संबंध नाहीं पांच-जन्यीं । निघालिया कर्कश ध्वनी । लाज मनीं नाहीं शंका ॥ ५२ ॥ तेंवी ग्रंथ सुरसविरसता । एकाजनार्दनाचे माथां । जैसें जैसें आवडे चित्ता । तैसी कथा वदतसे ॥ ५३ ॥ यालागीं श्रोते जन । न ठेवावें भूषण दूषण । वक्ता एकाजनार्दन । कथा-कीर्तन करीतसे ॥ ५४ ॥ असो आतां परिहार । परिहार तोचि अहंकार । वक्ता एक एकांगवीर । वाग्व्यापार चाळीत ॥ ५५ ॥ पुढें श्रीराममारुती । बोलते जाले कवणे स्थिती । श्रोतीं अवधान द्यावें चित्तीं । दोघांची स्थिती अनुपम ॥ ५६ ॥ उदास देखोनि रघूत्तम । खवळला तो प्लवंगम । बोला-वया उपक्रम । स्वयें सुवर्म चाळीत ॥ ५७ ॥ इंद्र शंकर ब्रह्मादिक । नर वानर सकळिक । मस्तकांजळी देख । करिती आवश्यक प्रार्थना ॥५८॥ अव्हेरूनि विनंतीसी । उपेक्षितां जानकीसी । बोल लागेल स्वधर्मासी । कठिणता अंगासी येईल ॥ ५९ ॥ सर्वांतर्यामी श्रीराम । अरि मित्र सदा सम । तेणें सांडिला स्वधर्म । परम अधर्म मांडिला ॥ ६० ॥ सती पतिव्रता जानकी । निष्पाप एक तिहीं लोकीं । श्रीरामें ते उपेक्षिली कीं । जघन्य लौकिकीं वाढेल ॥ ६१ ॥ जीलागीं होवो-नियां वेडें । सैरा वनोवन हिंडे । स्वयें वेंटाळून झाडें । वाडेंकोडें सीताभावें ॥ ६२ ॥ जीलागीं वनांत । सैरा धांवे रघुनाथ । पाषाणातें आलिंगीत । आतां होत उदास ॥ ६३ ॥ जियेचेनि वियोग-बळें । चंद्रकिरणीं श्रीराम पोळे । सुमनमाळा अंगीं सळे । जैसें रुपलें सूचिकाग्र ॥ ६४ ॥ चंद-नाचें उद्वर्तन । अग्निस्फुलिंगवत् जाण । वियोगें पूर्ण व्यापिलें मन । अवस्था दारुण जीलागीं ॥ ६५ ॥ सखा बंधु लक्ष्मण । त्यासी मारूं धांवे आपण । सीतामय झालें मन । वियोगें पूर्ण व्यापिला ॥६६॥ दुर्जन अपवाद देख । जगीं बोलती अनेक । ऐसें जघन्य अलौकिक । माथां निःशंक वाजेल ॥ ६७ ॥ आणीकही अपूर्व श्रीरामा । विनवितां या प्लवंगमां । त्यांसी उत्तर न देसी रामा । तेणें आम्हां भय भारी ॥ ६८ ॥ श्रीराम कृपेचा सागर । ऐसा ब्रीदाचा गजर । त्यावरी आला तमाचा पूर । कृपा समग्र वाहवली ॥ ६९ ॥ तरी हें आजि कळलें देखा । राम प्राकृत आम्हां-सारिखा । राम आतुडला विकल्पादिकां । ऐसें लोकां मानेल ॥ ७० ॥ निरसावया संसार । सेवावा श्रीरघुवीर । तो राहिला पैं विचार । ऐसें समग्र मानिती ॥ ७१ ॥ सर्वस्व त्यागूनि वहिले । पोटीं पाले बांधिले । रामसेवे जीवित्व वेंचिलें । तें फळा आलें रोकडेंचि ॥ ७२ ॥ सीताप्राप्तीलागीं येथ । बहुत कष्टला रघुनाथ । सैन्यासी आहार पुरवीत । भातें घालीत मोजमोजूं ॥ ७३ ॥ आपण मेळवावें फळ । सेवूनि भजावें अविकळ । अथवा सेवूनि असावें जळ । राम केवळ साधावया ॥ ७४ ॥ एकें बापुडीं वारिया-वरी । राहोनियां निर्धारीं । राम पाहती चराचरीं । भेटी तरी पैं नेदी ॥ ७५ ॥ श्रीराम ऐसा निष्ठुर । म्हणोनियां चराचर । भयातीत पैं समग्र । केंवी रघुवीर सेवावा ॥ ७६ ॥ यालागीं सकळ जना । भय संचलें रघुनंदना । जेणें उपेक्षिली निजांगना । तो अबळा जनां केंवी सेव्य ॥ ७७ ॥ ऐसें न करावें स्वामिनाथा । म्हणोनि चरणीं ठेविला माथा । आश्वासावी जनकदुहिता । निर्वाण आतां न पाहावें ॥ ७८ ॥ ऐकोनि त्याच्या वच-नार्था । आश्चर्य जालें रघुनाथा । निःस्पृहें वरी तत्त्वता । नचले सत्ता कोणाची ॥ ७९ ॥ जे उदास देहावरी । स्वामित्वाची आज्ञा करी । उत्तर नेदी सुरासुरीं । तो कपिकेसरीतें विनवीत ॥ ८० ॥ झणें कोपसी हनुमंता । म्हणोनि नमन होय करितां । आठवावें पूर्ववृत्तान्ता । कोप तत्त्वता सांडूनी ॥ ८१ ॥ तुवां सांगितली होती जैसी । आम्ही देखत नाहीं तैसी । विश्वासों नये गा स्त्रियांसी । जरी मार्दवेंसीं बोलत ॥ ८२ ॥ जो स्त्रियांचा विश्वास धरी । सद्यः अनर्थ त्याचे शिरीं । वाजोनियां क्षणाभीतरी । करी बोहरी व्रताची ॥ ८३ ॥ भगिनी अथवा दुहिता । एकांतीं न भेटावी सर्वथा । विपायें पैं भेटी होतां ।

१ आरंभ. २ गुह्य. ३ कमीपणा, निंदा. ४ उटी.
५ अग्नीच्या ठिणग्यांप्रमाणें. ६ स्पर्शला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

तेथेंही सर्वथा विकल्प वाढे ॥ ८४ ॥ जवळी असतां पतीसी । रिघोनि त्याच्या मानसीं । केव्हांचि विचरे आणिकासी । हें कोणासी लक्षेना ॥ ८५ ॥ मार्गी जातां पैं स्वभावें । व्यंकटकटाक्षासवें । क्षणें पुरुषातें लोळवावें । कामभावें क्षोभवोनी ॥ ८६ ॥

यां दृष्ट्वा चित्तवैकल्यं स्पृष्ट्वा सत्यांशसंक्षयः ।
संभोगे मरणं याति सा स्त्री प्रत्यक्षराक्षसी ॥ ५ ॥

दृष्टि पडतां अवचितीं । सुरासुर मोह पावती । ते भेटलिया एकांतीं । कवणा विरक्ती उपजेल ॥८७॥ उभयवर्गामाझारीं । कामक्षोभ एका तऱ्हीं । येरयेरांची वृत्ती हरी । निंद्यसंचारीं प्रवृत्ते ॥ ८८ ॥ स्वभावें जरी दृष्टि पडे । तरी विरक्तीही क्षोभा चढे । कामफांसा स्वयेंचि पडे । पडे सांकडें अनर्थी ॥ ८९ ॥ हें प्रत्यक्ष घडलें चंद्रचूडा । भिल्लिणी आली दृष्टीपुढां । महादेव झाला वेडा । केला उगाडा विरक्तीचा ॥ ९० ॥ पराशरें नावेभीतरी । देखोनि निषादकुमारी । दिवसा करोनि अंधारी । तपसामग्री वेंचिली ॥ ९१ ॥ आणीक ऐसें सांगों किती । नागवले तपस्थिती । स्त्री भेटल्या एकांतीं । नव्हे विरक्ती पैं कोणा ॥ ९२ ॥ ही तंव केवळ कामभावें । नेली होती दशग्रीवें । ती निःसंग कैंवी मानावें । रूपभावें मनोरम ॥ ९३ ॥ अति सुकुमार सुंदर । तरुणांगी लावण्यकर । कळा विन्यास परिकर । मनोहर पैं रूप ॥ ९४ ॥ आणीकही ऐक कपिनाथा । पूर्वी तुवांचि सांगितली कथा । अस्थिमात्र जनकदुहिता । असे तत्त्वता पैं उरली ॥ ९५ ॥ रुधिर शोषलें पैं समस्त । मांस आटलें जेथींचें तेथ । नामें वांचलेंसे जीवित । हर्षयुक्त सांगसी तूं ॥ ९६ ॥ तें न दिसे येथें कांहीं । अति विकसित दिसे पाहीं । रचिली असे ठायींच्याठायीं । अपूर्व कायी मी सांगों ॥ ९७ ॥ म्हणोनियां संदेहासी । कारण हनुमंता परियेसीं । तंव कोप तुझे मानसीं । अति आवेशीं पैं आला ॥ ९८ ॥ तुज माझें लोटांगण । करून कोपाचें उपशमन । सावध ऐकें माझें वचन । म्हणोनि विनवण करीतसें ॥ ९९ ॥ जनापवाद कठिण भारी । दुर्नाम वाजेल माझे शिरीं । म्हणतील राम अविचारी । घातली घरीं कामलोभें ॥ १०० ॥ तें चुकवावया हनुमंता । उपेक्षिली जनकदुहिता । तुम्ही सर्वज्ञ तत्त्वता । निजचित्ता विवंचा ॥ १ ॥ मुख्य सीता अग्निमुखीं । ऐसें जाणोनि रघुकुळटिळकीं । ते भेटावया जानकी । युक्ती निकी मांडिली ॥ २ ॥ कैंवी अपवाद चुकविजे । कोण योगें लोक समजे । हें विचारोनि कपिसमाजें । मग सांगिजे मजलागीं ॥ ३ ॥ अत्यंत कृपा सकळांसी । जें अंगीकारावें जानकीसी । तरी दिव्य सीतेपासी । सकळ समतेसी पैं मागा ॥ ४ ॥ सकळ लोकांदेखतां । दिव्य उतरलिया सीता । तरी मी अंगीकारीन तत्त्वता । विचार अन्यथा असेना ॥ ५ ॥ ऐकोनियां तें वचन । आंदोळलें त्रिभुवन । कठिण गिरा रघुनंदन । वाग्वज्रबाण मोकलिले ॥ ६ ॥ ऐकतां चळकांप चित्ता । भय सुटलें समस्तां । उपाय खुंटला सर्वथा । जनकदुहिता वांचेना ॥ ७ ॥ ऐसें मानोनि सकळिकीं । आशा सांडिली निःशेखीं । होवोनियां अधोमुखी । दुःखपंकीं निमग्न ॥ ८ ॥ कठिण ऐसें वाग्वज्र । ऐकोनियां हनुमान वीर । बोलों आदरिलें उत्तर । श्रीरघुवीर लक्षोनी ॥ ९ ॥ ऐकें स्वामी रघुनाथा । झणीं उपेक्षिसी सीता । पतिव्रतेचा विकल्प धरितां । निजव्रता बोल लागे ॥११०॥ सीतेचेनि तेजानळें । सहरावण पैं वहिलें । कटक अवघेंचि अहाळलें । प्रेतरूप आलें युद्धासी ॥ ११ ॥ ससैन्य लंकानाथा । आपण वधिलें तत्त्वतां । ऐसें न मानावें रघुनाथा । वल्गोनि वृथा कार्य नाहीं ॥ १२ ॥ सीतेनें मारिले नसतां । तुज न मरते रघुनाथा । मारिलेचि मारोनि तत्त्वता । जय सर्वथा तुम्हां लाधला ॥ १३ ॥ रावणवधाचिये ख्याती । त्रैलोक्यीं पावन कीर्ती । जिचेनि प्रतापें त्रिजगतीं । तुमचें तुम्हांप्रती लक्षेना ॥१४॥ जिचेनि तुझी शौर्यशक्ती । जिचेनि तुझी शौर्यकीर्ती । ते समूळ जानकी चिच्छक्ती । जाण निश्चितीं श्रीरामा ॥१५॥ जिचेनि तुज नामरूप । जिचेनि प्रौढ प्रताप । जिचेनि रणीं साटोप । धैर्य अमूप जिचेनी ॥ १६ ॥

१ बांकड्या कटाक्षांनीं. २ शंकराला. ३ नाश. ४ कोळ्याची कन्या. ५ विस्तार. ६ सुंदर. ७ निरसन, शांति. ८ हालले. ९ समग्र, निःशेष, सर्व. १० तेजाग्नीनें. ११ संपूर्ण, लागलेंच. १२ दग्ध झालें. १३ सामर्थ्य.

CC-0. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

ते तुझी निजशक्ति सीता। तुवां उपेक्षिली निजकांता। तेथें इतरांची कोण कथा। दीननाथा भजनमार्गीं ॥ १७ ॥ पूर्विलयाहूनि अनारिसी। तुवां देखिली सुंदरवेषीं। अनोळख भक्तिचिन्हांसीं। काय स्वामीसी म्हणावें ॥ १८ ॥ सूर्याचें सामर्थ्य गगनीं। स्वयें नेणे दिनमणी। ते जाणतसे कमळिणी। सुखविकासिनी पैं झाली ॥ १९ ॥ चुंबकाची चाळकशक्ती। स्वतां नेणे निजस्थिती। जडें लोहें सुखेंचि जाणती। ते चळण पावती दर्शनें ॥ १२० ॥ चंद्रकिरणींची अमृतधार। स्वतां नेणे हिमकर। सेवूनि जाणती चकोर। दर्शनें अपार नांदत ॥ २१ ॥ तैसी देखतां श्रीराममूर्ती। जरी उल्लास न बाणे चित्तीं। ते वज्राहूनि कठिण जाती। श्रीराममूर्ती अनोळख ॥ २२ ॥ स्वस्वरूपीं आराम। त्यातें बोलिजे श्रीराम। तें अंतरींचें निजप्रेम। सुखें परम ओतलें ॥ २३ ॥ अद्वैतीं सुखसंबंध। इंद्रियांवीण अगाध। विषयावीण परमानंद। तें स्वरूप शुद्ध तुझें स्वामी ॥ २४ ॥ त्या निजरूपातें देखतां। जरी उल्लास न बाणे चित्ता। इंद्रियें नव्हे पुष्टता। तरी ते वृथा पाषाणवत ॥ २५ ॥ तुझिया दर्शनाचें सुख। श्रीरामा तुज अनोळख। भक्त जाणती सात्त्विक। जे नैष्ठिक व्रतधारी ॥ २६ ॥ तुज देखतां रघुनाथा। अष्टौभाव सात्त्विकता। गुढी उभविली स्वानंदता। बाहेरी तत्त्वता ते आली ॥ २७ ॥ तेणें पुष्ट झाली सीता। ते देखतांचि रघुनाथा। विकल्प गमला तुझ्या चित्ता। अंतरवता नेणोनी ॥ २८ ॥ वेदपुराणसंमत। अंतर्यामी रघुनाथ। तें कांहीं न दिसे येथ। अंतरव्रत कां न कळे ॥ २९ ॥ तरी भाग्य आपुलेंचि हीनें। जे अंतर नेणे रघुनंदन। सकळांला मी जो सर्वज्ञ। तें वेदवचन काय झालें ॥ १३० ॥ आतां असोत या कथा। वर्म बोलतां रघुनाथा। प्रबळ शीण वाटेल चित्ता। आम्हां सीता काय होय ॥ ३१ ॥ जेणें सुख स्वामीसी। तेंचि करणें आम्हांसी। सीतेची भीड ते कायसी। दिव्य जानकीसी पैं मागूं ॥ ३२ ॥ दिव्य उतरल्या सीता सती। जरी अंगीकारीना रघुपती। तरी देहपात करणें समस्तीं। आणिक युक्ती असेना ॥ ३३ ॥ म्हणोनियां क्रोधावेशीं। आला जानकियेपासीं। ऊठ हो काय पडलीसी। दिव्य रामासी पैं देईं ॥ ३४ ॥ ऐकतां हनुमानाचें वचन। जानकी झाली आनंदघन। मज बोळला रघुनंदन। दिव्य आपण मागितलें ॥ ३५ ॥ दिव्य न घेतां पैं येथ। मज अंगीकारीना रघुनाथ। लौकिकीं होतें विपरीत। जे विषयलुब्ध श्रीराम ॥ ३६ ॥ अहंरावणाच्या घरीं। श्रीरामशक्ति सीता सुन्दरी। राखिली होती षण्मासवरी। ते ये काळीं घरीं घातली ॥ ३७ ॥ ऐसा जनापवाद होता। तो चुकविला हनुमंता। श्रीरामाची निर्विषयता। प्रकट तत्त्वता तुझेनि आजि ॥ ३८ ॥ जानकीची निष्पापता। तुझेनि झाली वायुसुता। दिव्य मागतां रघुनाथा। देईन तत्त्वता सर्वांगें ॥ ३९ ॥ दिव्य मागतां रघुनंदन। जेणें अंगें देईन जाण। तेंचि होईन पावन। निंद्य जाण पैं येर ॥ १४० ॥ याकारणें सर्वांगेंसी। मी दिव्य देईन श्रीरामासी। ऐसें बोलतां वेगेंसीं। हनुमंतचरणांसी लागली ॥ ४१ ॥ तुझेनि धर्में हनुमंता। आजि माझा उजळला माथा। विलंब न करीं सर्वथा। होईं योजिता सामग्री ॥ ४२ ॥ ऐकोनियां तें वचन। आलें हनुमंतासी स्फुरण। करोनि सर्वांगें निंबलोण। वंदिले चरण जानकीचे ॥ ४३ ॥ दिव्य मागतां रघुनाथ। जानकीचें हर्षित चित्त। तेणें सुखमय हनुमंत। सामग्री योजीत दिव्याची ॥ ४४ ॥ श्रीरामआज्ञा तत्त्वता। सर्वांगें दिव्य देवों पाहे सीता। तें संपादावया हनुमंता। विचार चित्ता आठवला ॥ ४५ ॥ विश्वाकार विषम कुंड। हनुमंतें पेटविलें प्रचंड। देखोनि खळबळिलें ब्रह्मांड। अकांड तांडव मांडिलें ॥ ४६ ॥ ज्वाळा लागती अंतराळीं। आकाश व्यापिलें ज्वाळीं। जवळी येवोनि जनकबाळी। कुंड न्याहाळी अति प्रीतीं ॥ ४७ ॥ तंव अपूर्व तेथें जालें। सबाह्य कुंड रामें व्यापिलें। तें देखोनि जनकबाळें। आश्चर्य वर्तलें निजचित्तीं ॥ ४८ ॥ अभिनव लीला रघुपती। दिव्य घेतां मजप्रती। कुंडामाजीं निजस्थिती। अंतरवृत्ती पाहूं आला ॥ ४९ ॥ येथें कायसा विचार आन। शुद्धभावार्थाचें प्रमाण। करोनियां अग्नीमाजी स्नान। श्रीरामचरण

१ भिन्न, वेगळी. २ चंद्र. ३ उणें. ४ कृपायुक्त झाला. ५ भयंकर. ६ सीता.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सेवावें ॥ १५० ॥ ऐसा निश्चय करोनि चित्तीं। रामांगना महासती । स्वयें प्रतिज्ञा झाली बोलती। सावध श्रोतीं परिसावें ॥ ५१ ॥

मनसि वचसि काये जागरे स्वप्नमार्गे
नहि वसति मनो मे राघवादन्यपुंसि ।
सपदि दह ममांगं पापकृत् पावकेदं
सुकृतदुरितभाजां त्वं हि नः कर्मसाक्षी ॥ ६ ॥

राहोनि कुंडासमीप। श्रीरामभजनप्रताप। बोलती झाली आपोआप । सुखरूप श्रीराम ॥ ५२॥ निजभजनमहिमान । निजस्थितीचें वर्णन । स्वयें बोलों नये आपण । परी न बोलतां जाण सरेना ॥ ५३ ॥ पुसतां श्रीरघुनंदन । वंचूंही नये आपण। दिव्यसमयीं उच्चारण । केल्याविण सरेना ॥ ५४ ॥ म्हणोनियां निजस्थिती । बोलती झाली सीतासती। अत्यंत नम्र अति प्रीती । अग्नीसी विनंती करीतसे ॥ ५५ ॥ स्वामि परियेसीं तेजोराशी । तूं साक्षी सर्वकर्मासी । अंतर सकळ जाणसी । जठरनिवासी जठराग्नी ॥ ५६ ॥ अत्यंत चपळ शीघ्रगती । जेथें जेथें जाय मनोवृत्ती । तेथें तेथें रघुपती । चाळक स्थिती सांगातें ॥ ५७ ॥ कल्पनेचेनि योगें । मन जेथें जाय वेगें । राम सरसा पुढें मागें । परतोनि निघे तेथेंचि ॥ ५८ ॥ राम सांडोनियां मना । विषय जरी ये ध्याना । तरी देह हुताशना । करीं दहन क्षणमात्रें ॥ ५९ ॥ व्यापार जे कां वाचिक। स्वर वर्ण उच्चारादिक। श्रीराम त्यांचाही चाळक। नुच्चारे देख रामेंवीण ॥ १६० ॥ वाचेसी वदविता राम । नित्य कथेसी मेघश्याम । रामेंवीण नाहीं उपशम। वाग्विश्राम श्रीराम ॥ ६१ ॥ वाचा भलतें अति वांवडे । परी रामेंवीण नवचे पुढें । श्रीरामेंवीण उघडें । निजनिवाडें वचन नाहीं ॥ ६२ ॥ तेथें सैराट देतां हांका । हांकेमाजी राम नेटका। अनारिसें होतां देखा । देवमुखा करीं भस्म ॥ ६३ ॥ हे काया जेथें आतळे । तेथेंचि श्रीराम मिळे । श्रीरामाहूनि वेगळें । नाहीं उरलें सर्वथा ॥ ६४ ॥ दिसताहे हा दिसे देहो । ऐसा बहुतांसी संदेहो । ते देहीं श्रीरामरावो । प्रकट पाहों दिसतसे ॥ ६५ ॥ राम अवघे श्वासोच्छ्वास । राम पळ निमेषोन्मेष । श्रीरामीं पैं सावकाश । निजवास रामपणें ॥ ६६ ॥ रामेंवीण शरीरा । क्षणही जाये आन मोहरा । तरी देह वैश्वानरा । क्षणमात्रें भस्म करीं ॥ ६७ ॥ शरीर वाचा मानस । त्रिविध प्राण सावकाश । तुजपुढें केला हुताश । श्रीराघवेश पावावया ॥ ६८ ॥ कायिक वाचिक मानसिक। त्रिविध व्यवहार संसारिक । याचें प्रमाण केलें देख। ऐक आणिक सांगेन ॥ ६९ ॥ जागृति सुषुप्ति आणि स्वप्न । त्यांची ते स्थिती संपूर्ण । याचा साक्षी तो रघुनंदन । ऐकें लक्षण पैं तेंही ॥ १७० ॥ जागृतीं जें जें भासत । त्याचा प्रकाशक रघुनाथ । दृश्य द्रष्टा दर्शन तेथ । सहजचि होत श्रीराम ॥ ७१ ॥ मावळोनियां जागृती । कल्पना वसे स्वप्नस्थिती । त्यातें भासविता रघुपती । जाण निश्चितीं जठरेशा ॥ ७२ ॥ निरसोनियां जागृती। उदैजतां स्वप्नस्थिती । मध्येंचि जे कां सुषुप्ती । जियेतें म्हणती गाढ मूढ ॥ ७३ ॥ परी मूढता नाहीं ऐसी । केवळ सुखमय सर्वांसी । जागृतीच्या ज्या श्रमरासी । त्या सुषुप्तीसी निरसिती ॥ ७४ ॥ नलगतां पैं सुषुप्ती । केवळ जे स्वप्नजागृती । ज्ञाते त्यातें दुखणें म्हणती । सुखसंवित्ती तेथें नाहीं ॥ ७५ ॥ म्हणोनि सुषुप्ति सुखमय देख । श्रीराम त्याचेंही सोलींव सुख । श्रीरामाहूनि आणिक । नाहीं निःशेख पैं उरलें ॥ ७६ ॥ श्रीरामासी प्रदक्षिण । करोनि नमिले देवब्राह्मण । करावया अग्नीमाजीं स्नान । पाहे रघुनंदन विश्वमूर्ति ॥ ७७ ॥ ऐसें परम प्रमाण सीता। बोलतांचि पैं तत्त्वता । सकळां झाली आश्चर्यता । परमावस्था हुताशीं ॥ ७८ ॥ सीता बोलतां प्रमाणासी । न साहवे जठराग्नीसी। साक्षी सांगावें सकळांसी। भेदोनि देहासी बाहेर आला ॥ ७९ ॥ मंत्रबळें आहुती । जेंवी प्रवेशे कुंडाप्रती । तेंवी निजसामर्थ्यें सीता सती। उडी घालिती पैं जाली ॥ १८० ॥ सीता स्मरोनि रघुनाथ। उडी घातली अग्नीआंत। आकांतले सुर समस्त । केला निजघात जानकियें ॥ ८१ ॥ तेथें बुजालीं वानरें। भ्यालीं सकळ निशाचरें। सुरवरादि खेचरें। झालीं समग्रें भयभीत ॥ ८२ ॥ कृपालु श्रीरघुनंदन। सकळां निश्चय होता पूर्ण। येव्हढें केलें निर्वाण। जीवावरी पूर्ण उठावला ॥ ८३ ॥ तंव आश्चर्य झालें तेथ। धगधगीत ज्वाळा

१ योग्य होत नाहीं. २ विश्रांति. ३ फिरे. ४ गडबडींत. ५ भलतेंच. ६ दुसऱ्यासमोर. ७ सुखाचा अनुभव.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

समस्त । इंगळ जे लखलखित । लोपोनि शोभत जानकी ॥ ८४ ॥ तेथें तम धूमाचे घोळ । आणि रजरक्त कल्लोळ । ते लोपोनि सकळ । जनकबाळ देदीप्य ॥ ८५ ॥ तेथें दहनदीप्तिरेखा । मूळ ते जानकी देखा । अग्नीचिया निजशिखा । त्याचि शाखा तया वृक्षा ॥ ८६ ॥ सीता निजतेजकल्लोळें । पावकपाप निःशेष पळे । रावणबंदीं जें घडलें । होतें चैलें पैं धुतां ॥ ८७ ॥ सीता पतिव्रता निर्दोष । अग्नि जाला पैं चोख । जयजयकारें करिती घोष । गर्जती अशेष हरिनामें ॥ ८८ ॥ तें देखोनि श्रीराघवा । आकळिलें अति कणवा । अवघेपणेंचि अघवा । आला खेंवा स्वानंदें ॥ ८९ ॥ ऐसी प्रकृतिपुरुषां भेटी । खेंवां पडोनि पडली मिठी । हरपली उठाउठी । जिराली पोटीं येरयेरां ॥१९०॥ तेथें योग वियोग कांहीं । स्मरणास्मरण तें नाहीं । बुझार्वण झालें दोहीं । लवलाहीं दोन्हीपणा ॥९१॥ श्रीरामरूपीं तत्त्वतां । मिळोनि गेली जनकदुहिता । न निवडे पैं सर्वथा । युक्ति विवरितां बहुविध ॥९२॥ तेथें अशोकाचा शोक । वियोगभावनेचें दुःख । हरवोनि जंव म्हणे सुख । तंव म्हणतें निःशेख हारपलें ॥९३॥ ऐसा जीवशक्तिसंयोग । अभ्यासेंवीण महायोग । निःशेष कल्पनेवीण भोग । अति अव्यंग भोगिती ॥९४॥ एकपणाचेनि आळें । सर्वथा तुरेचि वेगळें । श्रीरामरूपें सगळें । सामावलें एकाएकीं ॥ ९५ ॥ एकाएकीं जनार्दनीं । सहजीं सहजचि मिळणी । प्रकृतिसहित जनकनंदिनी । रामचरणीं सरती झाली ॥१९६॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां सीतादिव्यनिरूपणं नाम अष्टषष्टितमोऽध्यायः ॥ ६८ ॥ ॥ ओंव्या ॥ १९६ ॥ श्लोक ॥ ६ ॥

अध्याय एकुणसत्तरावा

॥श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः॥ जेंवी सुवर्ण आणि कांती । प्रभा आणि दीप्ती । तेंवी सीता आणि रघुपती । स्वयें शोभती निजतेजें ॥ १ ॥ कापूर आणि द्युती । प्रकाश आणि ज्योती । भानु आणि दीप्ती । तेंवी भासती एकरूप ॥ २ ॥ साकरेमाजी गोडी देखा । सागरीं लहरींच्या झुळुका । तेंवी माजी रघुकुळटिळका । जनकदुहिता शोभत ॥ ३ ॥ धात्यांआंगीं सावित्री । उमा शंकरजानूवरी । रमा समीप मुरारी । तेंवी रावणारीजवळी जनकात्मजा ॥ ४ ॥ जानकीयुक्त रघुनाथ । देखोनियां अति मंडित । सदैव त्रैलोक्यीं समस्त । आनंदभरित पैं जाले ॥ ५ ॥ दिव्या उतरली जानकी । तेणें आनंद सकळिकीं । वानर नाचती हरिखीं । पुच्छ मस्तकीं उभवोनी ॥ ६ ॥ घालिती उलटीं कोल्हांटें । वृक्ष झेलिती वांडेंकोडें । एक झेलिती पर्वतखडे । हरिखें माकडें नाचती ॥ ७ ॥ नळनीळादि जांबवंत । हनुमान आणि सुग्रीव तेथ । येवोनि नमिला रघुनाथ । आनंदभरित सकळिक । ॥८॥ बिभीषणादि प्रमुख । सकळीं नमिला रघुकुळटिळक । सुर नर आनंदले आवश्यक । पुष्पवृष्टि देख तिंहीं केली ॥ ९ ॥ वानरराक्षसांचिये स्थानीं । माजि श्रीराम चूडामणी । समवेत जनकनंदिनी । पुष्पींकरोनी मंडित ॥ १० ॥ सकळ सभा पुष्पमंडित । देखोनियां रघुनाथ । मस्तकांजुळी अति विनीत । स्तवन करीत देवांचें ॥ ११ ॥ लोटांगण अति प्रीतीसी । ब्रह्मया आणि शंकरासी । इंद्रादिकां सकळांसी । नमन सावकाशीं पैं केलें ॥ १२ ॥ लोटांगण दशरथासी । करूनि विनवी सकळांसी । क्षमा करावी मानसीं । सर्वथा उदासी न व्हावें ॥ १३ ॥ उल्लंघोनि तुमच्या वचनासी । दिव्य मागितलें जानकीसीं । कोप न करावा तद्विषीं । माझे विनंतीसी परिसावें ॥१४॥

> अनृतं साहसं माया मूर्खत्वमतिलोभता ।
> अशौचत्वं निर्दयत्वं स्त्रीणां दोषाः स्वभावजाः ॥ १ ॥

भलतिया स्त्रियेचे देहीं । करणी न करितां कांहीं । स्वाभाविक गुण पाहीं । ऐका तेही सांगेन ॥१५॥ अमृताची ओतिली राशी । सत्य येवों नेदी दृष्टीसी । रिघोनि पतीच्या मानसीं । स्वेच्छा आणिकांसीं विचरत ॥ १६ ॥ मनीं उद्यमाची ऐसी हांव । जे आकळीन ब्रह्मांड सर्व । तदर्थीचें युक्तिगौरव । अपार धांव मनाची ॥१७॥ साहस करणें बहुत । तदर्थीं शक्ति अद्भुत । इकडील तिकडे पर्वत । ठेवितां चित्त कष्टेना ॥१८॥ बैसका सांडावी पर्वतीं । उलथों शके क्षिती । तरी विषयो धरिला

---

१ निखारे. २ वृक्षाला. ३ ज्वाळा. ४ वस्त्रें. ५ व्यापिलें. ६ आलिंगनाला. ७ क्षेमालिंगन. ८ समजूत. ९ प्रकाश. १० वास. ११ ब्रह्मदेवाला. १२ गोलांट्या. १३ सहजीं. १४ व्यापाची, उद्योगाची १५ अचळपणा. १६ भूमि, पृथ्वी.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

चित्तीं । तो न सांडी भयलज्जा ॥१९॥ हिताहित-विचार । करणें नाहीं साचार । लोभें ओतिलें शरीर । क्रिया अपार मूर्खत्वाची ॥ २० ॥ ममतेचें तरी अधिष्ठान । आचार तितुका लोभजन्य । सहसा उपरति नाहीं जाण । अपार श्रवण जरी केलें ॥ २१ ॥ कल्पपर्यंत गंगेप्रती । असतां पाषाणाची स्थिती । तिळही न भिजे निश्चिती । तैंवी श्रवण-स्थिती स्त्रियांची ॥२२॥ शौच त्यांचें कैंवी सांगें । मद्याचा घट जैंवी गंगे । बुडवितांही सर्वांगें । नव्हे वेगें पैं शुद्ध ॥२३॥ बाह्य दाविती आचार । अंतरीं वासना विचित्र । अहर्निशीं कामाचार । वृत्ति अपार सैरा विचरे ॥२४॥ दयेचा तरी गंध नाहीं । कठिणताचि ओतिली देहीं । विषयविषाद होतां पाहीं । डसे लवलाहीं घंटीसीं ॥२५॥ माता पिता अथवा पुत्र । भ्रतार हो कां सहोदर । खुती चुकतां अणुमात्र । घात सत्वर करूं पाहे ॥२६॥ ऐसे स्त्रियेच्या देहीं । सहज गुण असती पाहीं । जनासीं विश्वास न मने कांहीं । बहु उपायीं झाडा देतां ॥ २७ ॥ जानकीची निष्पापस्थिती । मीच जाणतों अंतरवृत्ती । इतरांसी यावया प्रतीती । दिव्य निश्चिती घेतलें ॥२८॥ कपटबुद्धी दशग्रीवें । नेली होती कामभावें । तो परिहार कैंवी संभवे । म्हणोनि दिव्यें अंगीकारिलीं ॥२९॥ निष्पाप जाणावया जानकीसी । तुम्हींच प्रेरिलें दिव्यासी। अधिष्ठानत्रय अंतरवासी । निजव्रतासी प्रेरक ॥३०॥ तुमचे आज्ञेवांचून । नाहीं करीत उदकपान । कोप न करावा आपण । आज्ञापन हें तुमचें ॥३१॥ केव्हां आज्ञापिलें आम्हीं । तरी सांगेन ऐका स्वामी । इंद्रियांचे निर्गमागमीं । चाळक तुम्ही सर्वथा ॥ ३२ ॥ कार्य कारण कर्तव्यता । मज तों नाहीं सर्वथा । तुम्हीं प्रेरूनि तत्त्वता । जनकदुहिता शुद्ध केली ॥३३॥ पृथक् पृथक् सांगों नावें । तरी सर्वज्ञ तुम्ही स्वभावें । मज सर्वथा उपसाहावें । निज-गौरवें क्षमावंतीं ॥३४॥ ऐकोनि श्रीरामवचना । आश्चर्य जालें सुरगणा । घालोनियां लोटांगणा । रघुनंदना विनवीत ॥३५॥ जयजयाजी विशदबोधा। विमलकीर्ति विद्यारविंदा । विश्वात्म्या विश्ववृंदा । विश्वातीता विश्वेशा ॥ ३६ ॥ विद्याअविद्यातीत । सकळशास्त्रां आदिभूत । शास्त्रीं संपादितां अर्थ । तो तूं निश्चित श्रीराम ॥३७॥ सर्वांतर्यामी शाश्वत । सकळ जाणता अंतर्वर्त । जनापवाद इत्थंभूत । स्वामी यथार्थ संपादिला ॥ ३८ ॥ जिचेनि नांवें विश्व मुक्त । जे रामीं नित्य रत । प्रातःस्मरणीं नित्य स्मरत । तिचा भावार्थ प्रकट केला ॥३९॥ इतर सकळ साधकांसी । आचार्या जाली परियेसी । निष्ठेची परी आहे ऐसी । दृढत्वें जगासी उपदेश ॥४०॥ अमलकीर्ति श्रीरघुनाथ । निर्मळ जानकीचें आचरित । सृष्टींत तुम्ही दोघें मंडित । कीर्ति अद्भुत त्रैलोक्यीं ॥ ४१ ॥

सीता लक्ष्मीर्भवान्विष्णुर्देवश्चक्रायुधः प्रभुः ।
वधार्थे रावणस्येह प्रविष्टो मानुषीं तनुम् ॥ २ ॥
तदिदं नस्त्वया कार्यं कृतं धर्मभृतांवर ॥ ३ ॥

अस्मत्कार्यालागीं स्वामी । पूर्वीं प्रार्थिलें होतें आम्हीं । ते प्रार्थनेच्या उपक्रमीं । अवतार तुम्हीं दोघीं धरिला ॥ ४२ ॥ तें संपादावया इत्थंभूत । लक्ष्मी ते सीता निश्चित । आम्हांलागीं कष्टली बहुत । कर्म देहान्त आचरली ॥४३॥ मनीं न धरवे धरितां । चळकांप बोलतां चित्ता । तें कर्म जनकदुहिता । सुरकार्यार्थां आचरली ॥४४॥ तूं श्रीविष्णु परमात्मा । मनुष्यनाट्या रघूत्तमा । अवतरोनि मेघश्यामा । राक्षसाधमा निवटिलें ॥ ४५ ॥ राज्यभोगा देवोनि पाणी । दुस्तर निष्ठा अंगीकारुनी । वनवासी जालां वनीं । पावन अवनी करावया ॥ ४६ ॥ निजांगें साहोनि कष्ट । कर्म केलें पैं अचाट । निवटिला दशकंठ । सुर-संकट निरसिलें ॥ ४७ ॥ एतद्विषयीं दातारा । माथां घ्यावें उपकारा । सृष्टिरक्षणीं कळवळा पुरा । तुज रघुवीरा पहिलाचि ॥ ४८ ॥ तूं सकळांचा आदिकर्ता । तूं सकळां प्रतिपाळिता । सृष्टिघातका लंकानाथा । क्षणें रघुनाथा निवटिलें ॥ ४९ ॥ हें नवल नव्हे जगजेठी । तुझी विक्षेप भ्रुकुटी । क्षणें निवटील सकळ सृष्टी । मारितां दशकंठी नवल कोण ॥ ५० ॥ अनायासें रघुनाथा । कीर्ति केली जे तत्त्वता । उद्धरावया लोकां समस्तां । जाली सर्वथा जगद्वंद्य ॥ ५१ ॥

१ विरक्ति. २ पवित्रता ३ गळयाळा, मानेला. ४ बंधु. ५ अनवस्त्र. ६ निरास, निराकरण. ७ क्षमा करावी. ८ स्पष्ट, निर्मल. ९ संहारिलें. १० पृथ्वी.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

इममार्षं स्तवं दिव्यमितिहासं पुरातनम् ।
ये नराः कीर्तयिष्यंति नास्ति तेषां पराभवः ॥ ४ ॥

तुझा दास रघुनाथा । वाल्मीक अनागतवक्ता[1] । तेणें गायिली जे कां कथा । ते यथार्थता संपादिली ॥ ५२ ॥ रामकथेवीण जगतीतळ । जालें होतें शून्यमंडळ । तें बसविलें सकळ । कीर्ति मंगळ करोनियां ॥ ५३ ॥ श्रीरामकथा विशुद्ध । ज्याचे वाचेसी ये सिद्ध । तो पावे अगाध बोध । परमानंद श्रीरामें ॥ ५४ ॥ जो परिसे एकाग्रचित्तें । निमग्न होय निजअर्थें । श्रीराम स्वयें तयातें । निजनिश्चितें स्वयें उद्धरी ॥ ५५ ॥ उद्धरी हा उद्धार पाहों । स्वयें न साहे रामरावो । अर्थ सबाह्य स्वयमेवो । आविर्भावो रामाचा ॥ ५६ ॥ अर्थरूप रघुनंदन । श्रोता वक्ता सबाह्य पूर्ण । स्वयें कोंदे पैं आपण । स्वानंदघन[2] पूर्णत्वें ॥ ५७ ॥ असो श्रोत्यावक्त्यांची कथा । रामकथेचा आदर धरितां । कळिकाळातें हाणोनि लाता । निजमुक्तता पाविजे ॥ ५८ ॥ कथेच्या ठायीं आदर । तरी श्रोते वक्ते जे नर । त्यांसी अनुमोदितां साचार । स्वयें रघुवीर सोडवी ॥ ५९ ॥ ऐसें देवोनि आशीर्वचन । देवीं स्तविला रघुनंदन । रामें घालोनि लोटांगण । सकळ सुरगण वंदिले ॥ ६० ॥ करोनि सकळांचें स्तवन । सुखमय श्रीरघुनंदन । पुढें देखोनि हुताशन । करी विनवण तयाची ॥ ६१ ॥

भगवन् हव्यवाडीश लोकपावन पावक ।
शृणु मेऽस्याः परित्यागे कारणं त्वं विभावसो ॥ ५ ॥
जानाम्येनामहं साध्वीमनुरक्तां जितेंद्रियाम् ।
दृढव्रतसमाचारामात्मनः कर्मसंयताम् ॥ ६ ॥

जेंवी कोणी प्राकृत जन । येरयेरांच्या उपकारें पूर्ण । परस्परें करिती स्तवन । तेंवी रघुनंदन विनवीत ॥ ६२ ॥ ऐकें स्वामी हुताशा । सकळजठरनिवासा । कर्मसाक्षी कर्माध्यक्षा । सकळपाळका जठराग्नी ॥ ६३ ॥ सकळलोकपावना । ऐकें स्वामी हुताशना । जनकजेच्या महिमाना । सावधान परिसावें ॥ ६४ ॥ साध्वी परम पतिव्रता । अनुरक्त सती सीता । जितेंद्रिय पैं सर्वथा । हें मी तत्त्वता जाणतसें ॥ ६५ ॥ जानकीच्या सत्त्वेंकरून । पतिव्रता सतीत्व पूर्ण । निजसामर्थ्यें अति दारुण । स्वयें जाण आभासे[3] ॥ ६६ ॥ ते जानकीचा संदेहो । मज सर्वथा नाहीं पहा हो । लोकप्रतीतीचा निर्वाहो । निःसंदेहो पैं केला ॥ ६७ ॥ जानकी पतिव्रता पूर्ण । तथापि तुवां रक्षिली जाण । सर्वांगें उडी घालितां आपण । व्हावें दहन तेणें काळें ॥ ६८ ॥ तुवां रक्षिली साचार । तेणें वांचली सुंदर । मज भेटली सत्वर । हा उपकार पैं तुझा ॥ ६९ ॥ तुझेनि धर्में हुताशनीं । मज भेटली जनकनंदिनी । म्हणोनियां लोटांगणी । घाली आपण श्रीराम ॥ ७० ॥ तें देखतां हुताशन । आनंदमय होवोनि पूर्ण । लोटांगणीं रघुनंदन । स्वयें आपण विनवीत ॥ ७१ ॥ ऐकें स्वामी रघुनाथा । निष्पाप तुझी निजशक्ति सीता । तिचेनि धर्में तत्त्वता । नित्यमुक्तता मज आली ॥ ७२ ॥ सीतेचेनि स्पर्शें साङ्ग । त्रिविधताप[6] जाला भंग । निमाला माझा सकळ दाघ । सुख अभंग पावलों ॥ ७३ ॥ अहं दुष्ट रावणमेळें । रजोरागें अत्यंत काममेळें । विषयभोगीं दृढ काटले । जग भेदिलें दोहीं सवां ॥ ७४ ॥ तितुके विटाळाचे मेळे । धुतां अत्यंत कष्ट जाले । बोली नबोलवे बोलें । देह जाले जर्जर ॥ ७५ ॥ ते सकळ कष्ट स्वामी । जानकीच्या पदसंगमीं । सकळ निस्तरलों आम्ही । जे कृतश्रमी न वचती ॥ ७६ ॥ जानकीचे पाय देखतां । सकळ मळाची[7] क्षाळणता । स्वयें जाली रघुनाथा । बहुत आतां काय सांगूं ॥ ७७ ॥ माते जानकीचे संगतीं । सकळ मळाची जाली शांती । माझी उजळली निजदीप्ती । स्वप्रकाशस्थिती पावलों ॥ ७८ ॥ अभक्तांचा जठरपाक । करितां श्रमलों होतों देख । जानकीसंगें अलौकिक । विश्रांतिसुख पावलों ॥ ७९ ॥ ऐसी जानकीची स्तुती । करोनि नमिला रघुपती । तंव पुढें होवोनियां पशुपती[8] । स्वयें विनंती करीतसे ॥ ८० ॥

शंकरश्चापि भगवान्प्रहृष्टेनान्तरात्मना ।
पुष्कराक्ष महाबाहो कृतं कर्म महत्त्वया ॥ ७ ॥

१ भविष्य सांगणारा. २ निजानंदांत निमग्न. ३ विराजमान होते, शोभते. ४ सत्य. ५ आधिदैविक, आधिभौतिक, आध्यात्मिक. ६ दुःख. ७ मळे. ८ शंकर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

दिष्ट्या शत्रुर्हतः पापः सुराणां रावणस्त्वया ।
दिष्ट्या सर्वस्य लोकस्य प्रवृद्धं दारुणं तमः ॥ ८ ॥
त्वत्तेजसा विनिहतं राम रावणजं भयम् ।
आश्वास्य भरतादींश्च कौसल्याममिवाद्य च ॥ ९ ॥
कैकेयीं च सुमित्रां च देवीं लक्ष्मणमातरम् ।
प्राप्य राज्यं प्रियं देव्या नंदयित्वा सुहृज्जनम् ॥ १० ॥

शंकर म्हणे रघुनाथा । भाग्य फळासी आलें आतां । निवटिलें लंकानाथा । सुरां समस्तां सोडविलें ॥ ८१ ॥ मेघहुडे येवोनि दारुण । जेंवी आच्छादिती रविकिरण । तेंवी दुरात्मा रावण । सकळ सुरगण अवरोधी ॥ ८२ ॥ बंदीं घातली सुरमांदी । तो दुष्ट दुरात्मा दुर्बुद्धी । क्षणें वधिला बाणसंधीं । कृपानिधी रघुनाथा ॥ ८३ ॥ तुझ्या निजप्रतापकिरणें । उजळलीं सकळ भुवनें । उठविलें रावणाचें ठाणें । सुरगणा सोडविलें ॥ ८४ ॥ तेणें आनंद सकळां । स्वस्थ स्थापिलें सुरकुळा । आलिंगिली जनकबाळा । अभिनव लीळा दावूनी ॥ ८५ ॥ दिव्य घेवोनि रघुपती । विस्तारिली अभिनव कीर्ती । शेखीं विचारितां निश्चिती । अग्निदीप्ती तेही तूं ॥ ८६ ॥ चरित्र केलें अत्यद्भुत । यश जोडिलें ब्रह्मांडांत । आतां न रहावें येथ । जावें त्वरित अयोध्येसी ॥ ८७ ॥ तुझेनि व्रतें व्रतस्थ । बहु कष्टला भरत । जटा वळलिया अद्भुत । देह समस्त वाळविला ॥ ८८ ॥ तुझ्या पादुका रघुनाथा । नित्य वंदीत भरत माथां । चित्तीं चिंतितां रघुनाथा । उसंतें भरता असेना ॥ ८९ ॥ इंद्रियां नित्य दास्य परम । वाचेसी नित्य रामराम । हृदयीं श्रीरामाचें प्रेम । भक्तोत्तम पैं भरत ॥ ९० ॥ श्रवणीं नित्य रामकथा । नेत्रीं दृश्य तत्त्वता । न देखे वांचोनि रघुनाथा । उसंत भरता पैं नाहीं ॥ ९१ ॥ करीं पादुका पूजितां । अति उल्लास भरता । अहर्निशीं रघुनाथा । बहु आस्था भेटीची ॥ ९२ ॥ त्यासी द्यावें समाधान । तैसाचि दुसरा शत्रुघ्न । अवस्था भरताचे समान । समाधान द्यावें त्यासी ॥९३॥ माता कौसल्या सुमित्रा । कैकेयी परम पवित्रा । जिणें धाडोनि वनांतरा । दशशिरा मारविलें ॥ ९४ ॥ आणीकही दशरथकांता । तुजलागीं आस्थाभूता । त्यांसी भेटोनि रघुनाथा । सुख समस्तां पैं देयीं ॥ ९५ ॥ पितृदत्त निजराज्या । भोगीं अभंग रघुराजा । सिंहासनमंडित वोजा । निजभाजासमवेत ॥ ९६ ॥ अयोध्येचे जन समस्त । तुझेनि वियोगें संतप्त । अति दुःखें पैं दुःखित । आठवीत श्रीरामा ॥ ९७ ॥ भरतादि सकळ लोक । तुजलागीं त्यक्तोदक । जेंवी मेघालागीं चातक । तेंवी सकळिक तुजलागीं ॥ ९८ ॥ त्यांसी देवोनि समाधान । आनंदवावे सकळ जन । मधुर गिरा प्रसन्न वदन । ऐसें त्रिनयन बोलिला ॥ ९९ ॥ इक्ष्वाकुकुळवर्धना । सूर्यवंशनिजमंडना । तिघां मातांसी करोनि नमना । अश्वमेधयज्ञा संपादीं ॥ १०० ॥ करोनि सकळ दिग्विजयो । सुखी करीं समुदावो । अगाध दानें देवोनि पहा हो । सुखी भूदेवो स्वयें करीं ॥ १ ॥ राज्य करोनि अविच्छिन्न । सकळां द्यावें समाधान । नगरी विमानीं घालून । करावें गमन निजधामा ॥ २ ॥ जैसी केली विज्ञापना । तैशा स्थिती रघुनंदना । संपादोनि अविच्छिन्ना । यश त्रिभुवना संपादीं ॥ ३ ॥ पैल पिता दशरथ । तुझी भेटी आंकांक्षीत । अनुमोदोनि त्वरित । मनोगत संरक्षीं ॥ ४ ॥ तुझी निजकीर्ति ऐकतां । उत्तम लोक दशरथा । प्राप्त असतां रघुनाथा । सांडूनि तत्त्वता येथें आला ॥ ५ ॥ श्रीरामदर्शनापुढें । स्वर्गसुख तें बापुडें । परतलिया रामाकडे । सुख सुरवाडें भोगिजे ॥ ६ ॥ ऐकतां पुत्राची निजकीर्ती । आनंद दशरथाचे चित्तीं । राम सौमित्र सीता सती । पाहूं निश्चितीं तेणें आला ॥ ७ ॥ त्यासी करोनि नमन । द्यावें पित्यासी समाधान । ऐकोनि शंकरवचन । दशरथ आपण नमियेला ॥ ८ ॥ अंतरिक्ष गगनांतरीं । ना समीप ना दूरी । राम पित्यातें नमस्कारी । सीतासुंदरीसमवेत ॥ ९ ॥ सौमित्रें घातलें लोटांगण । तेणें दशरथा आनंद गहन । खोंचोनि अंतरिक्ष विमान । मधुरवचन अनुवादे ॥ ११० ॥

विमानशिखरस्थस्य प्रणाममकरोत्पितुः ।
दीप्यमानं स्वयं लक्ष्म्या दिवाकरमिवोदितम् ॥ ११ ॥

१ ढगांचे बुरुज. २ देवसमुदाय. ३ विलक्षण. ४ विश्रांति. ५ सगुण राममूर्ती. ६ अवकाश. ७ सुंदर. ८ ब्राह्मण. ९ संपूर्ण. १० इच्छितो. ११ अत्यंत सुखानें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

लक्ष्मणेन सह भ्रात्रा ददर्श पितरं प्रभुः ।
आसीनमासने दिव्ये दिव्याभरणभूषितम् ॥ १२ ॥
हर्षेण महताविष्टो विमानस्थो महीपतिः ॥ १३ ॥

देदीप्यमान विमानीं । मोक्षलक्ष्मी करोनी । दशरथ मंडित गगनीं । जैंवी दिनमणी आकाशीं ॥ ११ ॥ अर्धांगी सीतासमवेत । विराजमान रघुनाथ । बंधूही लक्ष्मण तेथ । नमन करीत पैं तिघं ॥ १२ ॥ तें देखोनि निजमानसीं । आनंद जाला दशरथासी । विमानीं नाचत हरिखेंसीं । निजपुत्रांसी देखिलिया ॥ १३ ॥ चिद्रत्नांचे अलंकार । विमानीं मंडित नृपवर । हरिखें नाचत सत्वर । निजशरीर विसरोनी ॥ १४ ॥ नाम स्मरतां श्रीरघुनाथ । देहत्यागें वैकुंठांत । निमेष न लागतां प्राप्त । जाले त्वरित श्रीरामें ॥ १५ ॥ ज्याचेनि नामें निर्मुक्त । तो पुत्रत्वें नित्य क्रीडत । माझे घरीं अहोरात्र । भाग्य अद्भुत पैं माझें ॥ १६ ॥ ब्रह्मादिकां लक्ष्य[१] न ये । तो पुत्रत्वें मजघरीं पाहें । निजानंदें क्रीडताहे । नवल काये सांगों मी ॥ १७ ॥ तथापि केवढें औद्धत्य । पुत्रत्वें आज्ञापोनि तेथ । वना धाडिला रघुनाथ । निंद्य जगांत पैं जालों ॥ १८ ॥ स्त्रियेचिया वचनासाठीं । राम लाविला दिक्पटीं[३] । लौकिकीं विस्तारिली गोष्टी । निंद्य ललाटीं पीटैलें ॥ १९ ॥ परी तें हित जालें बहुतां । संपादिलें सुरकार्यार्था । द्विजां जाली सुखावस्था । आल्हादें वसतां जनस्थानीं ॥ १२० ॥ राक्षस जे कां विश्वघातक । निवटोनियां सकळिक । देवांचा जो देवघातक । सकळघातक रावण ॥ २१ ॥ देवद्रोही विश्वद्रोही । ब्राह्मणांचा ब्रह्मद्रोही । तो रावण निवटोनि पाहीं । त्रैलोक्य सर्वेही सुखी केलें ॥ २२ ॥ सुखी केले सुरवर । सुखी केले यक्ष किन्नर । सुखी केले वीर वानर । दशवक्त्र निवटिला ॥ २३ ॥ कैकेयीचें वचन निष्ठुर । त्रैलोक्यासी उपकारकर । सकळां जालें सुख अपार । बंदी समग्र सोडविले ॥ २४ ॥ माझे हृदयीं होती गोष्टी । कैकेयी दुराचारिणी मोठी । राम लाविला दिक्पटीं । सीतागोरटीसमवेत ॥ २५ ॥ तें शैल्य माझ्या हृदयींचें । आजि निरसोन गेलें साचें । चरित्र देखोनि श्रीरामाचें । आलें त्रैलोक्यींचें गौरव ॥ २६ ॥ तुम्हां त्रिवर्गांतें देखोनि दृष्टी । आनंद उथळला पोटीं । एकला न माये सकळ सृष्टी । एवढी मज पुष्टी आलीसे ॥ २७ ॥ सीता सौमित्र श्रीरघुनाथ । विजयी त्रिवर्ग पैं येथ । देखतांचि अत्यद्भुत । आनंदभरित मी जालों ॥२८॥ कैकेयीवचन शल्यदुःखा-[५] । -पासूनि आजि सुटलों देखा । देखिलिया रघुकुळटिळका । अनंत सुखा पावलों ॥ २९ ॥ श्रीरामा ऐक सावधान । धन्य भ्राता सौमित्र जाण । तुझें निजदास्य करोन । कीर्ति पावन त्रैलोक्यीं ॥ १३० ॥ धन्य पतिव्रता सीता । तुझेनि दास्यें निष्पापता । तुझेनि धर्में रघुनाथा । जगद्वंद्य माता जगाची ॥ ३१ ॥ जितेंद्रिय सीता सती । निर्दोष यश त्रिजगतीं । अनुरक्त बंधु ऊर्मिलापती । स्वयें रघुपती घेवोनि जावें ॥ ३२ ॥ वेदमंत्रीं अभिषेक । आपण करोनि सावकाश । सुख द्यावें बंधु भरतास । शत्रुघ्नास सुख देईं ॥ ३३ ॥

भरतस्तु विनीतस्ते शत्रुघ्नो दयितो मम ।
भ्रातृभिः सह राज्यं च दीर्घमायुरवाप्नुहि ॥ १४ ॥
इति ब्रुवाणं पितरं रामः प्रांजलिरब्रवीत् ।
भोस्तातानुगृहीतोस्मि यत्प्रीतो मे भवान्गुरुः ॥ १५ ॥
इदमेकं त्विहेच्छामि भवतो हि वरं हितम् ।
दीयमानमभिप्रेतं ममानुग्रहकारणात् ॥ १६ ॥

भरत अत्यंत अनुरक्त । श्रीरामवियोगें व्रतस्थ । माथां जटाभार अद्भुत । प्रावरणें[६] निश्चित वल्कलें ॥ ३४ ॥ त्यजिला आहार विहार । सेजार केवळ वनचर । भूमिशयनी निरंतर । निजशरीर वाळविलें ॥ ३५ ॥ भक्तिप्रतापें अति अद्भुत । भक्त अनुरक्त[७] विरक्त । नित्य रामनाम स्मरत । वीर विख्यात पैं भरत ॥ ३६ ॥ श्रवणीं रामकथाचरित्र । रामरूप चराचर । नेत्रीं देखतां रघुवीर । वाग्व्यापार रामनामाचा ॥ ३७ ॥ श्रीरामवियोगें तापला । तपश्चर्या कृश जाला । तैसाचि शत्रुघ्न निविळलाँ । प्रियकर भला पैं माझा ॥ ३८ ॥ तैशाच तिघी तुझ्या माता । श्रीरामवियोगें व्रतस्था । बहुत शिणल्या रघुनाथा । भेटी तत्त्वता त्यांसी द्यावी ॥ ३९ ॥ अयोध्येचे सकळ जन । नित्य चिंतिती

१ सुशोभित. २ ध्यानांत. ३ दाही दिशांस. ४ आदळलें. ५ दुःख. ६ आच्छादन, पांघरूण. ७ शुद्ध अन्तःकरणाचा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

रघुनंदन । नाठवे अन्न जीवन । अवस्था पूर्ण लागली ॥ १४० ॥ जेंवी पर्जन्येंवीण धान्य । तृषित प्राणी जीवनेंवीण । क्षुधाक्रान्त स्मरे अन्न । तेंवी जन अयोध्येचे ॥ ४१ ॥ त्यांसी द्यावें समाधान । पुत्रवत्प्रजापालन । सुखें करावें आपण । बंधूसीं जाण समवेत ॥ ४२ ॥ निजराज्यभोगीं अक्षयी । ऐसें दशरथ बोलतां पाहीं । तिघे जालीं सुखमयी । नमिला पाहीं निजजनक ॥ ४३ ॥ घालोनियां लोटांगण । मस्तकांजली विनीत वचन । ताता तुझेनि धर्मेंकरून । सकळ कल्याण पावलों ॥ ४४ ॥ आमचें जें कां उत्कटाचरित । तो तुझा प्रताप निश्चित । तुझेनि धर्मे आम्ही सनाथ । ख्याती अद्भुत पावलों ॥ ४५ ॥ तूंचि आमचा निज पिता । सद्गुरु तूंचि तत्त्वता । तुझेनि सकळ कृतार्थता । बहुत आतां काय सांगूं ॥ ४६ ॥ स्वामींनीं आज्ञापिलें ज्या रीती । मी संपादीन त्याच स्थिती । चिंता न करावी निश्चिती । अनुज्ञास्थिती संपादीन ॥ ४७ ॥ हेंचि उत्तरोत्तर मागत । तुमच्या अनुग्रहें निश्चित । तेणें सकळार्थ संपादत । आमचें वृत्त तें किती ॥ ४८ ॥ सकळांचे निजानुमतें । संपादीन सावचित्तें । तुझें अंतरंग निश्चितें । तें सर्वार्थे निजपूज्य ॥ ४९ ॥ सखा विनीत बंधु भरत । शत्रुघ्न तुझा परम आप्त । राजपत्न्या तिघी तेथ । संतोषयुक्त करीन ॥ १५० ॥ चिंता न करावी जी ताता । आज्ञेप्रमाणें यथार्थता । संपादीन मी सर्वथा । न करीं चित्ता विक्षेप[१] ॥ ५१ ॥ पावोनियां उत्तम लोकासी । ममता नसावी मानसीं । तुम्हां शिष्टांचीं वचनें ऐसीं । सकळ लोकांसी उपदेश ॥ ५२ ॥ पावोनियां उत्तम लोक । अहंममता धरितां देख । पुण्य वेंचे निःशेख । आवश्यक भूतळा येती ॥ ५३ ॥ म्हणोनियां पुण्यश्लोक । अहंममता निःशेख । सांडोनियां उत्तम लोक । अक्षयी सुख भोगिती ॥ ५४ ॥ ज्यांसी गत्यंतराचें दुःख । तेही अहंममता निःशेख । सांडोनियां आवश्यक । ब्रह्मसुख भोगिती ॥ ५५ ॥ जेथें नाहीं मीतूंपण । लोकलोकांतर[२] नाहीं जाण । तेथें गत्यंतर[३] गणी कोण । गमनाभिमान सांडुनी ॥ ५६ ॥ यालागीं चतुरीं । अहंममता सांडोनि दूरी । स्वयें ब्रह्मसाक्षात्कारीं । पावती उरी नुरवोनी ॥ ५७ ॥ ऐकतां श्रीरामवचन । दशरथ जाला सुखायमान । सांडोनियां निजाभिमान । ममता पूर्ण सांडिली ॥ ५८ ॥ अहंममता सांडितां तेथ । पूर्णब्रह्म रघुनाथ । ऐसा बाणला निश्चितार्थ । आनंद अद्भुत उथळला[४] ॥५९॥ पुत्रस्नेह सांडोनि तेथ । बद्धांजली अति विनीत । सांगता जाला निजवृत्तान्त । हृद्गत जें होतें ॥ १६० ॥ पुत्रवियोगें रघुनाथा । तुझ्या नामाची दृढता । लागली अनिवार चित्ता । राम स्मरतां देहान्त ॥ ६१ ॥ नामाचें फळ अलौकिक । नामें पावे उत्तम लोक । भोग भोगितां सकळिक । नाम निःशेख न विसरें ॥ ६२ ॥ नामें जाला साक्षात्कार । प्रत्यक्ष भेटलासी तूं रघुवीर । ताप निमाला समग्र । नाम साचार परब्रह्म ॥ ६३ ॥ उत्तम लोकीं असतां । ममता होती रघुनाथा । पुत्र भेटावे तत्त्वता । ऐसी चिंता अनिवार ॥ ६४ ॥ नावडे वैकुंठ कैलास । स्वर्गभोग पैं निःशेष । ममता होती बहुवस । ते अशेष निमाली[५] ॥ ६५ ॥ देखतां श्रीरामाची मूर्ती । ममता निमाली निश्चिती । निःशेष हारपली प्रकृती । चैतन्यस्थिती बाणली ॥ ६६ ॥ निमालें मीतूंपण । मावळलें दशरथपण । मावळलें श्रीरामपण । ब्रह्म परिपूर्ण अद्वय ॥ ६७ ॥ एकाजनार्दना शरण । पितापुत्रांचें दर्शन । अहंममता सांडून । ब्रह्म परिपूर्ण प्रबोधिलें ॥ १६८ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां दशरथसमाधानं नाम एकोनसप्ततितमोऽध्यायः ॥ ६९ ॥ ओंव्या ॥ १६८ ॥ ॥ श्लोक ॥ १६ ॥

अध्याय सत्तरावा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ श्रीरामें विनवितां दशरथ । निश्चयें बाणला वचनार्थ । स्वयें मानोनि कृतार्थ । जाला विरक्त सर्वस्वा ॥ १ ॥ राज्यलोभ स्वर्गलोभ । पुत्रलोभ विषयलोभ । सांडूनि भुवनभोगलोभ । जाला निर्लोभ दशरथ ॥ २ ॥ अहंता आणि ममता । लोकलोकांतरवार्ता । गमनागमन पैं तत्त्वता । राया दशरथा नाठवे ॥ ३ ॥ नामरूपातीत । वर्णाश्रमधर्मातीत । जातिकुळगोत्रा-

१ सोठा प्रभाव. २ .अस्थिरता. ३ दुसरी स्थिति. ४ वाढला. ५. संपला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

तीत। स्वयें रघुनाथ जाणितला ॥ ४॥ श्रुतिशास्त्रातीत। पूर्ण ब्रह्म रघुनाथ। रायें करितांचि इत्यर्थ। स्वयें तो अर्थ ठसावला ॥ ५॥ लक्ष्मूं जातां गुणातीतता। स्वयें ठसावे ते अवस्था। लाभे आपुली निजमुक्तता। गुणातीतता गुणांमाजी ॥ ६॥ यालागीं मुमुक्षु सकळ। साधक जिज्ञासु प्रबळ। तेहीं सांडोनियां स्थूळ। मुक्त केवळ लक्षावा ॥७॥ सांडोनियां कपट। धूर्तवाद वटवट। संत सेवितां निर्दुष्ट। निजमुक्ति स्पष्ट लाहिजे ॥ ८॥ पुढील कथानुसंधान। मधुरवचनेंकरून। दशरथ ब्रह्मसंपन्न। केला आपण श्रीरामें ॥ ९॥ होवोनियां ब्रह्मसंपन्न। पुत्रस्नेह सांडोनि पूर्ण। परमार्थें पैं लक्ष्मण। दशरथें आपण प्रबोधिला॥ १०॥ अविकळ रघुनंदन। सेवितां कीर्ति पावन। पावला कीं अनवच्छिन्न। सुमित्र जाण यथार्थ ॥ ११॥ श्रीरामेंसीं सुष्ठु मैत्री। करितां उद्धरली धरित्री। कीर्ति वानिजे सुरवरीं। भजनधात्री झालासी ॥ १२॥ सकळ झाला सिद्धार्थ। मानूं जातां कृतार्थ। ऐसा न मानावा इत्यर्थ। अभिमानग्रस्त पैं होती॥ १३॥ अंतरंग निजभक्त। भजनधर्में सावचित्त। मजहूनि आन नाहीं आप्त। ऐसें संचरत मानसीं ॥ १४॥ ऐसा भाव उपजे चित्तीं। तेणें भजनाची होय शांती। धरी अहंकार उत्पत्ती। अधःपाती तो भावे ॥ १५॥ यालागीं साधुसंतीं। भजनीं न मानावी तृप्ती। पुनः पुनः रघुपती। सेवावा निश्चिती सर्वभावें॥ १६॥ तृप्ति न मानोनि भजनासी। अविचळ सेवितां रामपायांसी। जन्ममरणाची गोष्टी कायसी। ब्रह्मत्व अंगासी स्वयें ये ॥ १७॥ जेथें नाहीं मीतूंपण। तये स्वरूपीं ठेवोनि मन। सर्वकाळीं रघुनंदन। अनिमिष जाण सेवावा ॥ १८॥ ऐसें सांगोनि सौमित्रासी। स्वयेंचि सांगे जानकीसी। क्षोभ न मानावा मानसीं। रामें दिव्यासी घेतलें॥ १९॥

पुत्रि वैदेहि मन्युस्तु नैव कार्यस्त्वयानघे।
विशुद्धिरेषा सततं सर्वलोकेषु दर्शिता ॥ १॥
सुदुष्करमिदं पुत्रि तव चारित्रलक्षणम्।
कृतं यत्तेन सुभगे यशः सत्यं भविष्यति॥ २॥

विदेहाचें हृदयरत्न। वैदेही तुज अभिधान। देहभावाचा अणुरेण। सर्वथा जाण तुज नाहीं ॥ २०॥ तेणें विदेहभावेंकरून। सर्वकाळ अनवच्छिन्न। त्वां सेविला रघुनंदन। कीर्ति पावन जगद्वंद्य ॥ २१॥ देहीं नाहीं देहाभिमान। कर्मै नाहीं कर्माभिमान। विषयाच्या ठायीं ममताभिमान। सर्वथा जाण ज्यासी नाहीं॥ २२॥ त्यासी करावया दहन। अग्नि बापुडें मशक कोण। हें करावया प्रकट चिन्ह। दिव्य संपूर्ण घेतलें ॥ २३॥ विदेहत्वें मज भेटतां। अग्नि जाळूं न शके सर्वथा। ऐसें कळावया समस्तां। श्रीरामें तत्त्वतां घेतलें दिव्य ॥ २४॥ तूं रामाची निजशक्ती। प्रकाशावया आपली स्वरूपस्थिती। दिव्य घेतलें तुजहातीं। कोप सर्वार्थीं न मानावा ॥ २५॥ पुढें याहूनि उत्तरोत्तर। श्रीरामें ख्यात तुझें चरित्र। महत्त्व पावसी थोर। जगदुद्धार तुझेनी ॥ २६॥ साधकीं साधावया निश्चिती। सौमित्र आणि सीता सती। अंगीकारितां याचि स्थिती। साधक पावती श्रीरामा ॥ २७॥ असो आचरणस्थिती। तुमची वर्णितां गुणकीर्ती। स्वयें उद्धरी रघुपती। निजभक्तकीर्तीं भुलला असे ॥ २८॥ कीर्ति न वर्णवे सर्वथा। भक्तचरित्र श्रवण करितां। भक्ताआधीं उद्धरी श्रोता। जो सादरता कथा ऐके ॥ २९॥ त्याकारणें सर्वथैव। सर्वकाळ सर्वभाव। अनवच्छिन्न एकभाव। सर्वत्र राघव सेवावा॥ ३०॥ ऐसें सांगतां दशरथा। लोटांगण पैं तत्त्वता। विनविती झाली दशरथा। जनकदुहिता स्वानंदें ॥ ३१॥ सौमित्रेंसहित सीता जाण। कर जोडोनि आपण। दशरथासी विज्ञापन। जनकनंदिनी करीतसे॥३२॥ आज्ञापिलें स्वामिनाथा। त्या आचरणीं सामर्थ्यता। आम्हां कांहीं नाहीं सर्वथा। कर्ता करविता श्रीराम॥ ३३॥ पार्थिवाँची शरीराकृती। इंद्रियांची क्रियाशक्ती। मानसाची कल्पनावृत्ती। स्वयें रघुपती वर्तवी ॥ ३४॥ बुद्धीचा निश्चयो पूर्ण। अहंकाराचें अहंपण। स्वयें होवोनि रघुनंदन। करवी चळण आपणासी ॥३५॥ आमुच्याठायीं क्रियाशक्ती। अणुमात्र

१ अमर्याद. २ उत्तम प्रकारची. ३ भजनाचें पोषण करणारा. ४ अखंडित. ५ क्षणोक्षणीं. ६ सतत. ७ पृथ्वीसंबंधीं. ८ मनाची.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

नाहीं भूपती। अंतर्यामित्वें रघुपती। वर्तवी निश्चिती आमुतें ॥ ३६ ॥ जेंवी दारुयंत्र खांबावरी। विविधा परी नृत्य करी। तें सामर्थ्य त्याच्या शरीरीं। तिळभरी असेना ॥ ३७ ॥ सूत्रधाराचेनि छंदें। सुखें नृत्य करी विनोदें। ताल संगीत पदबंधें। अतिआनंदें कुसरी ॥ ३८ ॥ तेंवी आमुतें रघुपती। स्वतां चेतवी निजशक्ती। आमुच्या-ठायीं क्रियाशक्ती। अणुही चित्तीं असेना ॥ ३९ ॥ पुढेंही कर्ता करविता। श्रीरामचि तत्त्वता। तो ठेवील ज्या सत्ता। राहणें सर्वथा नृपवर्या ॥ ४० ॥ म्हणोनि घातलें लोटांगण। दोन्ही कर संपुट जोडून। तेणें दशरथ सुखायमान। रघुनंदन संतुष्ट ॥ ४१ ॥

विमानमास्थाय महानुभावः
श्रिया च संहृष्टतनुर्नृपोत्तमः।
आमंत्र्य पुत्रौ सहसीतया च
जगाम देवप्रवरस्य लोकम् ॥ ३ ॥

रामसौमित्रजानकीसी। संतोषें अनुमोदोन तिघांसी। नाम स्मरत संतोषीं। निघे विमानेंसीं निजभुवना ॥४२॥ सूर्यप्रभेसम विमान। निजकांती देदीप्यमान। मोक्षश्रिया विराजमान। स्वयें आपण दशरथ ॥ ४३ ॥ स्वयें होवोनि ब्रह्मभूत। ब्रह्मानंदें डुल्लत। विमानीं राजा दशरथ। निघे उपमर्तें निजधामा ॥ ४४ ॥ दशरथ स्वर्गभुवन। करितां इंद्रादि देवगण। मस्तकांजली आपण। केलें नमन श्रीरामा ॥ ४५ ॥ अति विनीतें तत्त्वता। विनविते जाले श्रीरघुनाथा। बहुत काय बोलूं आतां। बंदिमोचनता तुवां केली ॥ ४६ ॥ येवढिया उपकारा उत्तीर्ण। व्हावया आमुचें तोंड कोण। आम्हां योग्य आज्ञापन। कांहीं आपण करावें ॥ ४७ ॥

प्रतियाते तु काकुत्स्थे महेंद्रः पाकशासनः।
अब्रवीत्परमप्रीतो राघवं प्रांजलिं स्थितम् ॥ ४ ॥
एतस्मिन् तव किं कार्यं करोमि त्वत्प्रिये स्थितः ॥५॥

स्वामी नरवीरपंचानना। कमलापति कमलनयना। आम्हां होवोनियां प्रसन्ना। बंदिमोचना तुवां केलें ॥ ४८ ॥ ऐसियासीं आम्ही प्रसन्न। जालों म्हणों हेंचि दूषण। तथापि ऐकोनि विज्ञापन। कांहीं आज्ञापन करावें ॥ ४९ ॥ जेणें सुख तुज उपजे। आम्ही लागों भजनवोजे। ऐसें कार्य विचारिजे। जें रघुराजें कृपाळुवें ॥ ५० ॥ इंद्र वायु कुबेर चंद्र। अग्नि नैर्ऋत यमादि समग्र। लोटांगणीं अति तत्पर। श्रीरघुवीर विनविला ॥ ५१ ॥ कांहीं आज्ञापीं आम्हांसी। म्हणोनि लागले चरणांसी। तेणें सुख रामासी। अति आवेशीं उथळलें ॥ ५२ ॥ अमरां देवोनि सन्मान। लोटांगणीं रघुनंदन। विनविता जाला आपण। सावधान अवधारा ॥ ५३ ॥ स्वामी तुमचे कृपेस्तव। दुष्ट निर्दळिला दशग्रीव। तुमचे प्रसन्नतेचें वैभव। अति अपूर्व काय सांगूं ॥ ५४ ॥ तुमचेनि नामें स्वामिया। यम काळ लागती पायां। त्या तुम्हांतें सोडवावया। कोण साह्या येवों शके ॥ ५५ ॥ स्वयें करोनि लाघव। मारविला दशग्रीव। अधिष्ठाते तुम्ही सर्व। व्यर्थ राघव रूढविता ॥ ५६ ॥ तुमची करणी समस्त। तुम्हीच उपकार मानीत। प्रसन्न होवोनियां समस्त। मागा म्हणत मज स्वामी ॥ ५७ ॥ इतर सकळ पदार्थ। तुमच्या कृपें पूर्ण भरित। ऐसें आपुलें निजसामर्थ्य। मागा म्हणत मज स्वामी ॥ ५८ ॥ जो आपुले निजसामर्थ्यें। अनंत कोटि रची ब्रह्मांडांतें। तेथें उठवावया वानरांतें। श्रीरामातें अटक कोण ॥ ५९ ॥ महत्त्व द्यावया सुरवरां। श्रीरामासी कळवळा पुरा। म्हणोनि इंद्रादिकां सुरां। अत्यादरा प्रार्थीतसे ॥ ६० ॥

मम हेतोः पराक्रांता गता ये यमसादनम्।
ते सर्वे जीवितं प्राप्य समुत्तिष्ठंतु वानराः ॥ ६ ॥
विरुजान्निर्व्रणांश्चैव संपन्नबलपौरुषान्।
गोलांगूलांस्तथा ऋक्षान्द्रष्टुकामः सुरेश्वरः ॥ ७ ॥
अकाले चापि पुष्पाणि मूलानि च फलानि च।
नद्यश्च विमलास्तत्र तिष्ठेयुर्यत्र वानराः ॥ ८ ॥
श्रुत्वा तु वचनं तस्य राघवस्य महात्मनः।
महेंद्रः प्रत्युवाचेदं वचनं प्रीतिसंयुतम् ॥ ९ ॥
महानयं वरस्तात यस्त्वयोक्तो रघूत्तम।
तद्युक्तमनुरूपं च कौसल्यानंदवर्धन ॥ १० ॥

१ लांकडाची पुतळी. २ कौशल्यानें. ३ प्रकाशावितो. ४ तत्काळ, ५ फार नम्र, ६ उतराई, उपकाराची फेड. ७ भजनमार्गाला. ८ अधिकारी. ९ स्तवितां, प्रमुखता देतां. १० संकट, अडचण.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

मिळोनियां सुरगण। सकळ जालेति प्रसन्न। तरी ऐका विनवण। सावधान अति प्रीती॥६१॥ रावणासीं युद्ध करितां। वानरीं वेंचिलें जीविता। ते उठवावे मागुती आतां। स्वस्थावस्था निजशक्ती॥६२॥ युद्ध करितां समरांगणीं। जाली वानरांची अंगाणी। धडें मुंडें विखुरलीं रणीं। करचरणीं समवेत॥६३॥ रीस वानर गोळांगुळ। रणीं पडियेले बहळ। ते उठवोनियां तत्काळ। मज सकळ भेटवावे॥६४॥ हेचि तुमची प्रसन्नता। पडलिया वानरां समस्तां। वेगें उठवोनि तत्त्वतां। मज मागुती भेटवावें॥६५॥ माझीं मज वानरें। भेटती जेणें प्रकारें। तेंचि करावें दातारें। सर्व प्रकारें मज तुम्हीं॥६६॥ मज माझे वानरगण। तुम्हीं भेटविल्या आपण। पावली सकळ संभावन। कृतकल्याण मी झालों॥६७॥ ऐसें विनवितां रघुनंदन। विस्मित झाले सुरगण। पूर्णब्रह्म रघुनंदन। आच्छादोन राहिलासे॥६८॥ त्याचा दास हनुमंत। चरित्र केलें अत्यद्भुत। आवरणभेदीं समस्त। वानर मृत उठविले॥६९॥ करितां श्रीरामाचें ध्यान। दृष्टी अमृत स्रवोन। उठविले वानरगण। अर्धक्षण न लागतां॥७०॥ तो येथें श्रीराम आपण। उठवावया वानरगण। प्रार्थीतसे सुरगण। भाग्य कोण आमुचें॥७१॥ म्हणोनियां सुरपंक्ती-। -सहित तेथें अमरपती। मस्तकांजलि रघुपती। झाले विनंती पैं करिते॥७२॥ सकळजनचाळका। सकळलोकप्रतिपाळका। सुरवरसंस्थापका। रघुकुळटिळका परियेसीं॥७३॥ अवचटें नाम पडतां कानीं। यम तयासी न पाहे नयनीं। तें नाम जपतां अनुदिनीं। यमदंडणी केंवी साहती॥७४॥ नामापासीं भुक्ति मुक्ती। नामें जन्ममृत्यु नासती। तुझ्या नामीं नित्य विश्रांती। प्राणी पावती श्रीरामा॥७५॥ एवढें तुझें नाममहिमान। तो तूं प्रत्यक्ष रघुनंदन। हरिगण निवटाया असतां बापुडें काळ कोण। हरिगण निवटाया॥७६॥ तथापि तुझें आज्ञापन। कोण करूं शके आन। सकळ उठती वानरगण। अर्धक्षण न लागतां॥७७॥ आज्ञेप्रमाणें सकळ। सिद्धि पावेल अविकळ। सर्वकाळ फळ जळ। वानरदळ सुखमय॥७८॥ अंगीं न दिसे घाववण। नाठवे तयां युद्धत्राण। सुषुप्ती उठे शयनींहून। तेंवी वानरगण उठतील॥७९॥ म्हणोनि सरसावले सर्वेही। निज अवयवांचे ठायीं। प्रवेशोनि लवलाहीं। वानर पाहीं उठविले॥८०॥ अवयव भिन्न भिन्न झाले। करचरण विघडविले। ते आपेंआप वहिले। लागों लागले जेथींचे तेथें॥८१॥ पुच्छ उसळोनि देखा। लागों पाहे जंव एका। तंव दुजा करी आवांका। कोठें जासी देखा म्हणवोनी॥८२॥ एकीकडे ओढी एक। दुजेकडे ओढती अनेक। तिजा म्हणे उजू ओळख। तें पुच्छ देख पैं माझें॥८३॥ एकाचे तुटले चरण। ते स्वयें उमगितां जाण। मध्येंचि हिरोन ने आन। येर थोटवोनें पैं राहे॥८४॥ आपुले घ्यावया पैं जाण। छिन्नपाद नाहीं आंगवण। श्वासोच्छ्वास घालोनि पूर्ण। थोटवोन पैं राहे॥८५॥ मस्तक उथळलें रणभूमीं। निज कबंधें जंव आक्रमी। तंव तें पडे अति दुर्गमीं। अति विषमीं पाडिजे॥८६॥ केश धरोनि ओढी एक। कान धरोनि ओढी आणिक। शिर मध्येंचि लोंबे देख। एक एका वानरें॥८७॥ एक म्हणती माझें शिर। दुजा म्हणे परता सर। तिजा म्हणताहे मर मर। आपपर नोळखसी॥८८॥ एक एकाचा ओढी कर। एक एकाचें ओढी शिर। येरयेरांचे अपार। चरण सत्वर ओढिती॥८९॥ येरयेरांचें पुच्छ आसुडिती। आपुलाले दुंगीं कोंदिती। तें देखोनि रघुपती। स्वयें हांसती स्वानंदें॥९०॥ सौमित्र आणि सीता सती। सुग्रीव जांबवंत मारुती। अंगदादि सकळ जुत्पती। अवघे हांसती गदगदां॥९१॥ अकळ श्रीरामाचें चरित्र। शरण येवोनि सुरवर। स्वयेंचि उठविती वानर। आपुलें अंतर कळों नेदी॥९२॥ ऐसा करितां गदारोळ। गात्रें सांधिलीं सकळ। घायवण न दिसे अळुमाळ। सैन्य सकळ उठविलें॥९३॥ अंगीं घाव न दुखतां। वणही न दिसे सर्वथा। सांडोनियां सुषुप्तावस्था। उठती तत्त्वतां ऐसें जालें॥९४॥ लाहोनि अविकळ शरीर। रामनामें अपार। देती

१ नाश. २ पसरलीं. ३ पुष्कळ. ४ स्वागत, देणगी. ५ सहजीं. ६ नाश करण्याला. ७ भरपूर. ८ थोटा होऊन. ९ मस्तक तुटलेलीं धडें. १० ओढिती. ११ किंचित. १२ गाढ निद्रेंतून उठल्याप्रमाणें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

किरणें वानर। येवोनि रघुवीर नमिताती ॥९५॥ श्रीराम देतां आलिंगन। वानरां आनंद गहन। नाठवे तेथें निजस्मरण। धाववण नाठवे ॥ ९६॥ नाठवे वानरां वानरपण। नाठवे श्रीरामा रामपण। श्रीराम वोळला चिद्घन। स्वानंदपूर्ण वानरां ॥ ९७॥ प्रयासें सुटली मिठी। परी दोघां दोंपणाची गोष्टी। अल्पही स्फुरेना पोटीं। अकळ गोष्टी रामाची ॥ ९८॥ केव्हां मारिलें दशवक्त्रें। केव्हां उठविलें रघुवीरें। दोन्ही नेणती वानरें। अकळ चरित्रें रामाचीं ॥ ९९॥ येरीकडे सुरगण। ब्रह्मादि त्रिनयन। सकळ लोकपाळ मिळोन। करिती विनवण श्रीरामाचें ॥ १००॥ बंदीमोचन करोनि वहिलें। रावणमुखींचें काढिलें। आम्हां स्वपदीं स्थापिलें। सुखी केलें श्रीरामा ॥ १॥ अहंरावणग्रस्त। देहदरिद्रें पीडित। होतों बहुसाल कष्टत। केलें निर्मुक्त तेथूनी ॥ २॥ सुखी केलें आम्हांसी। तैसेंचि तुझ्या अंतरंगासी। वेगीं जावोनि अयोध्येसी। सुखी सकळांसी करीं स्वामी ॥ ३॥

मैथिलीं सांत्वयस्वैनामनुरक्तां यशस्विनीम्।
भरतं भ्रातरं प्राज्ञं शत्रुघ्नं च महाबलम् ॥ ११ ॥
समेत्य पितृवद्बालं त्वं लालयितुमर्हसि।
कृतकर्मा परिश्रांतः सुखं प्राप्नोतु लक्ष्मणः ॥ १२ ॥
समासवनवासस्त्वमात्मानमभिषेचय।
एवमुक्त्वा समामंत्र्य रामं सौमित्रिणा सह ॥ १३ ॥
विमानैः सूर्यसंकाशैर्जग्मुर्हृष्टाः सुरा दिवम्।
अभिवाद्य च काकुत्स्थः सर्वांस्तान्त्रिदशेश्वरान्॥१४॥

हे तुझी निजशक्ती। साध्वी अनुरक्त महासती। केवळ तपाची तपोमूर्ती। तुझी ख्याती जिचेनि ॥ ४॥ समाधान दे सीतेसी। स्वयें सुख द्यावें तिसी। तैसेंचि बंधु सौमित्रासी। अति प्रीतीसीं सुख देईं ॥ ५॥ अति कष्टला वनांतरीं। अति प्रीतीं निराहारी। अनिमिष तुझी सेवा करी। ब्रह्मचारी नैष्ठिक ॥ ६ ॥ नेणे आहार सेजार। श्रीरामसेवेसी तत्पर। परी राक्षसांचा संहार। प्रताप साचार पैं तुझा ॥ ७॥ अति कष्ट करोनि जाण। अत्यंत कष्टला लक्ष्मण। त्यासी द्यावें समाधान। प्रीती करून श्रीरामा ॥ ८॥ तैसेंचि भरत शत्रुघ्न। श्रीरामभजनीं प्रेमा पूर्ण। दृढव्रत तुजलागून। अनवच्छिन्न करिताती ॥ ९॥ तुझे वियोगें रघुनाथा। तुच्छ केली शरीरावस्था। सुखावीं त्या शत्रुघ्नभरतां। श्रीरघुनाथा अत्यादरें ॥ ११०॥ समस्ताही तुझ्या माता। प्रधाना सुमंता। अयोध्याजनां समस्तां। परमावस्था पैं तुझी ॥ ११॥ पितृवत् प्रजापालन। स्वामी करावें आपण। आपणा करोनि अभिषिंचन। व्रतविसर्जन वनवासा ॥ १२॥ ऐसें विनवोनि सुरगण। श्रीरामासी प्रदक्षिण। सकळीं घालोनि लोटांगण। निजधामा आपण निघाले ॥ १३॥ सूर्यप्रभेसमान। विमानीं बैसोनि देदीप्यमान। श्रीरामाचें गुणवर्णन। करीत आपण निघाले ॥ १४॥ वचनीं श्रीरामवर्णन। मनीं श्रीरामाचें ध्यान। सर्वां भूतीं रघुनंदन। देखतां सुरगण सुखमय ॥ १५॥ करितां रामकथाश्रवण। नित्य तृप्त सुरगण। श्रीरघुनाथें सुखसंपन्न। निजधामा आपण सुखें गेले ॥ १६॥ येरीकडे श्रीरामचंद्र। राक्षसादि महावीर। वैरी निरसोनि समग्र। सकळांसी सुखी केलें ॥१७॥ शरत्काळींचा निशाकर। सवेग निरसोनि घनाकार। निर्मळत्वें जें अंबर। अति परिकर शोभवी ॥ १८॥ राक्षसमेघांचिया हारी। निरसोनि क्षणाभीतरीं। श्रीरामचंद्र सैन्यामाझारीं। अति कुसरीं शोभत ॥ १९॥ जवळी बोलावोनि सीता गोरटी। हातीं धरोनि हनुवटी। शांतवनाच्या मधुर गोष्टी। राम जगजेठी संबोखी[११] ॥१२०॥ विषाद[१२] न मानावा सुंदरी। तुझें चरित्र जगदुद्धारी। जे दाविली भजनपरी। ते उद्धरी जगातें ॥ २१॥ जिहीं देखिलें तुझें चरित्र। ते उद्धरले साचार। पुढें ऐकती उत्तरोत्तर। ते संसारपार पावती ॥ २२॥ दिव्य घेतां तुजपासीं। उभयतां निंद्य जगासी। तें चुकलें अनायासीं। कोप मानसीं न मानावा ॥ २३॥ जैंपासोनि वियोग तुझा। तैंपासोनि देह माझा। कांहीं केल्या न ये काजा। एवढा तुझा वियोग ॥ २४॥ उदकपान पैं करितां। घोटामाजीं आठवे सीता। फळ भोजन करूं जातां।

१ उड्या. २ कृपायुक्त झाला. ३ शंकर. ४ तावडतोब. ५ शयन. ६ एकसारखें. ७ अत्यंत काळजी. ८ चंद्र. ९ मेघाकृती. १० आकाश. ११ आश्वासी. १२ दुःख.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

जनकदुहिता ग्रासीं दिसे ॥ २५ ॥ जागृति स्वप्न सुषुप्तीं। सीतामय झाली वृत्ती। हें सांगितलें असेल मारुतीं। बहुत किती अनुवादों ॥ २६ ॥ म्हणोनियां अति प्रीतीं। आलिंगिली सीता सती। तंव सीतेमाजी रघुपती। निजस्थिती हारपला ॥ २७ ॥ श्रीरामा नाठवे रामपण। तंव येरीकडे झालें आन। सदेह जानकी आपण। श्रीरामीं जाण बुडाली ॥ २८ ॥ लवणजळा होतां भेटी। हारपती येरयेरां पोटीं। तेंवी श्रीराम जगजेठी-। -माजी गोरटी हारपली ॥ २९ ॥ दोनी दीप एक होती। दोनीपण जावोनि एकदीती। तेंवी सीता आणि रघुपती। एकत्वें शोभती देदीप्य ॥ १३० ॥ न होवोनियां दुजेपण। दोन्ही दोंपणीं होती भिन्न। तेंवी सीता आणि रघुनंदन। आलिंगन सूटलें ॥ ३१ ॥ सुटोनियां आलिंगनीं। जानकीयें श्रीरामचरणीं। मौनेंचि मस्तक ठेवोनी। मधुर वाणीं अनुवादे ॥ ३२ ॥ प्रीतीकरोनि लज्जान्वित। विनविती झाली रघुनाथ। अंतर्यामीं तूं निश्चित। कर्ता करविता तूंचि तूं ॥ ३३ ॥ सकळ इंद्रियां चाळकता। तुझेनि स्वामी रघुनाथा। अंतर्बाह्य तुझी सत्ता। कर्ता करविता तूंचि तूं ॥ ३४ ॥ ऐसें बोलोनि सुंदरी। लोटांगण चरणावरी। घातलें अतिथोरी। नामें वानरीं गर्जिजे ॥ ३५ ॥ सुखमय सभा सकळ। बिभीषण सुग्रीव वानरदळ। रीस आणि गोळांगुळ। नामें प्रबळ गर्जती ॥ ३६ ॥ नामें कोंदला भूगोळ। नामें कोंदलें पाताळ। रामें संबोखिली जनकबाळ। आनंदकल्लोळ सकळांसी ॥ ३७ ॥ आनंदमय रघुपती। आनंदमय सीता सती। आनंदमय जुत्पती। सकळीं रात्र क्रमियेली ॥ ३८ ॥ तंव उजळलें उखामंडळ। प्राची झाली पैं निर्मळ। निजकर्मी लोक सकळ। अधिकारशीळ लागले ॥ ३९ ॥ दिशा चोखाळल्या समस्त। झाले पांथिक मार्गस्थ। सदाचारकर्मीं प्रवर्तत। उद्धरण करीत अग्निहोत्री ॥ १४० ॥ उपासक बैसले पूजनीं। योगी प्रवर्तले ध्यानीं। उठले वैष्णव गजरेंकरोनी। नामसंकीर्तनीं गीतवाद्यें ॥ ४१ ॥ वानर उठले समग्र। करीत नामाचा गजर। भुभुःकारें गर्जे अंबरें। प्रभाकर उगवला ॥ ४२ ॥ राक्षसराजा बिभीषण। निजानंदें परिपूर्ण। पूजावया रघुनंदन। पूजोपचार घेऊन पैं आला ॥ ४३ ॥

तां रात्रिमुषितं रामं तथैव व्रतमास्थितम्।
अब्रवीत्प्रांजलिर्वाक्यं जयं दृष्ट्वा विभीषणः ॥ १५ ॥

वनवासाचें दृढव्रत। संपादावया सुरकार्यार्थ। धरिलें होतें अति नियतें। तो कार्यार्थ साधिला ॥ ४४ ॥ मस्तकांजलि अति विनीत। लोटांगण घालोनि तेथ। बिभीषण शरणागत। श्रीरघुनाथ विनविला ॥ ४५ ॥ निवटोनियां लंकानाथ। बंदी सोडविले समस्त। आतां विसर्जावें व्रत। अत्यद्भुत धरिलें जें ॥ ४६ ॥ सौमित्र गांजला अन्नेंवीण। उपवासीं अति खिन्न। महासती जानकी जाण। अति क्षीण पैं झाली ॥ ४७ ॥ विसर्जावें वनवासव्रत। जटाबंधनें करावीं मुक्त। लोटांगणीं श्रीरघुनाथ। निजस्त्रीसमवेत नमियेला ॥ ४८ ॥ बिभीषणाच्या स्त्रिया। पूजासामग्री घेवोनियां। पूजूं आलिया श्रीरघुराया। निजभर्त्यासमवेत ॥ ४९ ॥ तिहीं घालितां लोटांगण। उचलोनियां रघुनंदन। अति प्रीतींकरोनि पूर्ण। समाधान दीधलें ॥ १५० ॥ सकळ झालें निष्कंटकें। लंकेचें राज्य अलौकिक। निजपतीसहित देख। तुम्हीं आवश्यक भोगावें ॥ ५१ ॥ म्हणोनि माथां ठेविला हात। जंववरी शशिभास्वत। गगनीं असे वर्तत। तंव लंकेआंत राज्य करावें ॥ ५२ ॥ ऐसें देतां वरदान। येरी म्हणती वंदूनि चरण। विनविताहे बिभीषण। तें विज्ञापन मानावें ॥ ५३ ॥ परिस स्वामी श्रीरामा। बिभीषण शरण आला तुम्हां। तेव्हांचि अक्षयी राज्य आम्हां। श्रीरामधर्मा विनटल्या ॥ ५४ ॥ शरण जातां श्रीरामासी। अक्षयी राज्य बिभीषणासी। अक्षयी चुडेदान आम्हांसी। तुझें तुजपासीं काय सांगूं ॥ ५५ ॥ लोटांगण श्रीरघुनाथा। विनवितातीं लंकेशवनिता। बहुत कष्टली सती सीता। अभ्यंगार्थी आज्ञापीं ॥ ५६ ॥ बिभीषणें त्याच रीतीं। विनविला श्रीरघुपती। स्वामी परिसावी विनंती। व्रतसमाप्ती करावी ॥ ५७ ॥ ऐसें प्रार्थितां बिभीषण। संतोषला रघुनंदन। मृदु मंजुळ मधुर वचन। भक्तशांतवन करीतसे ॥ ५८ ॥ एकापकीं मधुरवाणी। धर्मशास्त्रार्थ-

१ पूर्व, २ आकाश, ३ सूर्य. ४ तत्परतेनें. ५ टाकावें. ६ व्यथित. ७ शत्रुरहित. ८ चंद्रसूर्य.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

नीतिवचनी । श्रीरामें बिभीषणालागोनी । लंकाभुवनीं पाठविला ॥ ५९ ॥ एकाएकीं जनार्दनीं । धन्य कथा रामायणी । धन्य भाग्याची मांडणी । ऐकतां श्रवणीं रामकथा ॥ १६० ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां देवभक्तआनंदयोगो नाम सप्ततितमोऽध्यायः ॥ ७० ॥ ॥ ओंव्या ॥ १६० ॥ श्लोक ॥ १५ ॥

अध्याय एकाहत्तरावा

श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः

प्रतिगृण्हीष्व तत्सर्वं मदनुग्रहकांक्षया ।
मुनिवेषं समुत्सृज्य राज्यार्थमनुभूयताम् ॥ १ ॥
एवमुक्तस्तु काकुत्स्थः प्रत्युवाच विभीषणम् ।
धर्मज्ञं धर्मविद्वाक्यं न्यायज्ञो न्यायकोविदम् ॥ २ ॥

लोटांगणीं बिभीषणें । विचित्रालंकार भूषणें[1] । विचित्र रत्नें विचित्र वसनें[2] । आणिलीं आपण पूजेसीं ॥ १ ॥ विचित्र पूजेची सामग्री । घेवोनि बिभीषण विनंती करी । सहित जानकी सुंदरी । पूजा अंगीकारीं मत्प्रीतीं ॥ २ ॥ मजवरी अनुग्रह[3] पूर्ण । त्याचें फळ हेंचि जाण । यथासामर्थ्यें पूजाविधान । आणिलें प्रीतीनें अंगीकारीं ॥ ३ ॥ सांडोनि मुनिवेषासी । अंगीकारीं राजचिन्हांसी । जेणें सुख होय आम्हांसी । तें प्रीतीसीं आचरावें ॥ ४ ॥ निजभक्ताचें मनोगत । संरक्षावें यथातथ्य । हेंचि तुझें निजव्रत । तें साद्यंत सांभाळीं ॥ ५ ॥ म्हणोनि घातलें लोटांगण । दृढ धरिले दोन्ही चरण । तेणें कळवळला रघुनंदन । काय आपण अनुवादे ॥ ६ ॥ लौकिकनीतिशास्त्रप्रयुक्तीं । मंजुळ वचनें रघुपती । स्वयें बिभीषणाप्रती । काय विनंती करीतसे ॥ ७ ॥

उपपन्नमिदं राजन् मयि कल्याणचेतसि ।
सौहार्दे वर्तमानस्य ग्राह्यश्च प्रणयान् मया ॥ ३ ॥
मामनुव्रतचारी च भरतः कैकयीसुतः ।
शत्रुघ्नसहितो विद्वान् मदाराधनलालसः ॥ ४ ॥
राज्यश्रियं परित्यज्य मुनिवेषधरः किल ।
तपस्तप्स्यति मे भ्राता नंदिग्रामकृतालयः ॥ ५ ॥

ऐक लंकाधिपति नृपवरा । तूं मज निजाचा सोयरा । तुझेनि धर्में दशशिरा । बाणधारा निवटिलें ॥ ८ ॥ जो अजेय त्रैलोक्यासी । बंदीं घातलें सुरवरांसी । अदट[4] कर्म जयापासीं । तो बाणें एकेंसीं निवटिला ॥ ९ ॥ एवढें कर्म दारुण । तुझेनि धर्में साधिलें पूर्ण । त्या तुझें निजवचन । कैंवी उलंघन करूं शकें ॥ १० ॥ परंतु तुवांचि निजचित्तीं । विचारावें यथानिगुतीं । भरत सांडोनि अयोध्येप्रती । व्रतसमाप्ती कैंवी करणें ॥ ११ ॥ सांडोनि आहारविहार । तुच्छ करोनि राज्य समग्र । भूमिशायी[5] वल्कलांबर । व्रत घोर अंगीकारिलें ॥ १२ ॥ सांडोनि आस्तरणप्रावरण । राज्यभोग पैं संपूर्ण । अयोध्ये न वचे मजवीण । सिंहासन न पाहे ॥ १३ ॥ कैकेयी माता अति प्रीतीं । शिकवितांही नाना युक्तीं । राज्या न शिवेचि हातीं । धैर्यमूर्ति पैं भरत ॥ १४ ॥ चित्रकूटाच्या ठायीं । शिकविला बहुसाल मींही । राज्य देतां लवलाहीं । प्राणावरी पाहीं उठावला ॥ १५ ॥ प्राण त्यागितां भरतासी । तेथें आला वाल्मीक ऋषी । समजावितां आम्हां दोघांसी । वाल्मीकासी अति कष्ट ॥ १६ ॥ मी न सांडीं वनवास । भरत अंगीकारीना राज्यभारास । तेणें काळें अनागॅत भाष्य । ऋषीनें भरतास सांगितलें ॥ १७ ॥ वनवासींचें सकळ चरित्र । भरता सांगितलें समग्र । तेणें काळें महावीर । दुःखें तत्पर परतला ॥ १८ ॥ करोनियां अति निर्वाण । भरतें वाहिली आण । श्रीरामावांचूनि आपण । राज्यभुवन न पाहें ॥ १९ ॥ मागोनि माझ्या पादुका । मस्तकीं बांधिल्या देखा । अयोध्ये न येतां रघुकुळटिळका । सर्वथा देखा उतरींना ॥ २० ॥ माझीं वनवासाचीं व्रतें । तितुकीं अंगीकारिलीं भरतें । शत्रुघ्नही तैसींच तेथें । कठिण व्रतें आचरत ॥ २१ ॥ तिघी आॅगळया शतें सात । माझ्या माता तळमळत । अयोध्येचे जन समस्त । आर्तभूत मजलागीं ॥ २२ ॥ राजधानी सांडूनि वहिला । भरत नंदिग्रामीं राहिला । त्यासी उपेक्षोनि मला । अभिषेक भला कैंवी मानें[10] ॥ २३ ॥ धर्मनीति नव्हे ऐसी । जगीं होईल उपहासीं[11] ।

१ दागिने. २ वस्त्रें. ३ कृपा. ४ भयंकर. ५ बरोबर जमिनीवर निजणारा. ७ पुढील. ८ अधिक. ९ ६ कष्टी.

१० मान्य होईल. ११ निंदा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

म्हणोनि विनवितों तुम्हांसी । दुर्निमित्तासी चुकवावें ॥ २४ ॥ जें मज अपेश जघन्य । तें तुम्हांसी नव्हे मान्य । याकारणें तुम्हीं आपण । हें जघन्य सांडावें ॥ २५ ॥ म्हणोनि घातलें लोटांगण । क्षमा करावी मज संपूर्ण । आम्हांसी द्यावें आज्ञापन । करावें गमन लंकेसी ॥ २६ ॥ सुख द्यावें प्रजांसी । सुख द्यावें विश्वजनांसी । सुख देवोनि कलत्रेंपुत्रांसी । निजराज्यासी भोगावें ॥ २७ ॥ माझें मन उत्कंठित । बंधु माता सुहृद समस्त । गुरुदर्शनालागीं बहुत । उत्कंठित मन माझें ॥२८॥ मज दिधलिया आज्ञापन । सकळ पावलें पूजाविधान । स्वयें मानोनि समाधान । क्षमा आपण करावी ॥ २९ ॥

अनुजानीहि मां सौम्य पूजितोऽहं विभीषण ।
मन्युः खलु न कर्तव्यस्त्वरितं चानुमानय ॥ ६ ॥

कोप सांडोनि तत्त्वतां । आज्ञा पावें लंकानाथा । विलंब न करावा सर्वथा । उदासता न करावी ॥ ३० ॥ आपण जावें लंकेसी । आनंदवावें सर्वांसी । त्रिजटा सखी जानकीसी । अत्यादरें तिसी पूजावें ॥ ३१ ॥ जैसी माझ्या ठायीं प्रीती । त्रिजटा पूजावी त्याच स्थितीं । तिचेनि संगें सीता सती । तरली निश्चितीं दुर्गम ॥ ३२ ॥ रावणाचा कडकडाड । तीव्र कामें दुर्धराट । त्याचें करावया सपाट । संगती निर्दुष्ट त्रिजटेची ॥३३॥ येईल तरी आणीं भेटीसी । परी प्रीती करावी बहु तिसीं । तेणें अति सुख आम्हांसी । मद्भक्तांसी पूजिलिया ॥ ३४ ॥

वैदेह्याश्च सखी तत्र त्रिजटा नाम राक्षसी ।
अस्यास्तु प्रियहेतोस्त्वमनुज्ञां दातुमर्हसि ॥ ७ ॥

जानकीच्या सुखाकारणें । अवश्य त्रिजटेसी पूजणें । मद्भक्त पूजिले जेणें । तेणें अनंत गुणें मज पूजिलें ॥ ३५ ॥ ऐकोनि श्रीरामवचन । लोटांगणीं विभीषण । विनविता झाला आपण । रघुनंदन वंदूनी ॥ ३६ ॥ आज्ञापिलें स्वामिनाथा । तें मज वंद्य निजमाथां । लंकें नें वँचें मी सर्वथा । येईन भरताचे भेटीसी ॥३७॥ त्रिजटेची प्रीति गहनें । तरी क्षणही न लागतां जाण । येथें घेवोनि येईन नमनालागून स्वामीच्या ॥ ३८ ॥ श्रीराम सांडोनियां वनीं । विषयविलासभोगालागूनी । जो प्रवेशे राजभुवनीं । श्यामवदनी तो पापी ॥ ३९ ॥ दासाचा धर्म पूर्ण । निजस्वामी सुखसंपन्न । प्रवेशल्या राजभुवन । तेंचि आज्ञापन सेवका ॥ ४० ॥ यालागीं स्वामिनाथा । लंके न वचें सर्वथा । सवें येईन जी तत्त्वतां । बंधुभरता भेटीसी ॥ ४१ ॥ झणीं अव्हेरूं करिसी माझा । मी सवें येईन रघुराजा । निजभक्तकैवारी हा तुझा । निजपैजा बंडिवार ॥ ४२ ॥ नुपेक्षिसी विज्ञापन । म्हणोनि केलें प्रार्थन । मज सांडोनि जातां पूर्ण । प्राणोत्क्रमण होईल माझें ॥ ४३ ॥ ऐकोनियां तें वचन । प्रीतीं आलिंगिला बिभीषण । बाप कृपाळु रघुनंदन । अंतर पूर्ण जाणता ॥ ४४ ॥ निजभक्ताचें मनोगत । संरक्षावें यथातथ्य । जाणता एक रघुनाथ । आणिका हें वृत्त कळेना ॥ ४५ ॥ अंतर जाणता श्रीराम । जो कां भक्तकामकल्पद्रुम । भक्तलळे अति निःसीम । पाळावे नेम तयांचे ॥ ४६ ॥ रामें अति प्रीतीं आलिंगिला । तेणें बिभीषण सुखावला । ब्रह्मसुखा विटावूं लागला । ऐसा झाला आनंद ॥ ४७ ॥ तेणें आनंदें नाचत । निजदेह न सांभाळीत । रामरूपें सकळां नमीत । हर्षयुक्त लोटांगणीं ॥ ४८ ॥ बोलावूनि निजगण । सांगता झाला बिभीषण । लंकेमाजी जावोनि आपण । द्यावें दर्शन त्रिजटेचें ॥ ४९ ॥ जिवलग सखी जानकीची । अनिवार प्रीति राघवाची । तेणेंचि तियेचे भेटीची । श्रीरामासीं उत्कंठा ॥ ५० ॥ जे अनिमेष चिंतिती रामासी । राम चिंतीत तयांसी । स्मरणाची महिमा ऐसी । देव भक्तासी ध्यातसे ॥ ५१ ॥ देवासी ध्यान भक्ताचें । काय वानूं भाग्य त्याचें । दर्शन द्यावया त्रिजटेचें । मन रामाचें उत्कंठित ॥ ५२ ॥ श्रीरामाचे प्रियकर । ते वंद्य आम्हां साचार । विमानीं घालोनि सत्वर । आणावी रघुवीरदर्शना ॥ ५३ ॥ कुवेरापासोनि विमान । घेतलें रावणें हिरोन । तें घेवोनि यावें आपण । श्रीरघुनंदन-आरोहणा ॥ ५४ ॥ ऐसें आज्ञापितां दूतांसी । आज्ञेप्रमाणें लंकेसी । जाऊनि भेटले त्रिजटेसी ।

१.हीन, वाईट. २ स्त्रीपुत्रांला. ३ पवित्र. ४ जाणार नाहीं. ५ मोठी. ६ काळतोंड्या. ७ उपेक्षा करूं नकोस. ८ मोठेपणा. ९ अव्हेर करणार नाहींस.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

लोटांगणेंसीं अति प्रीतीं ॥ ५५ ॥ माते त्रिजटे परिसें विनंती । बिभीषणें पाठविलें तुजप्रती । तुझे भेटीची श्रीरघुपती । आस्था चित्तीं लागलीसे ॥ ५६ ॥ जरी मानेल तुझिया मना । तरी आरूढ होवोनियां विमाना । भेटावया रघुनंदना । शीघ्रत्वें जाण चलावें ॥ ५७ ॥ ऐकोनियां आज्ञापन । त्रिजटा घाली लोटांगण । श्रीरामें केली आठवण । भाग्य गहन पैं माझें ॥ ५८ ॥ आज्ञेप्रमाणें त्वरित । तेथें येईन डोई चालत । विमानाचें कार्य येथ । मज सर्वथा असेना ॥ ५९ ॥ माझा गुरु सीता सती । विमाना नातळेचि ते सर्वार्थी । भेटावया रघुपती । गेली चालत निजचरणीं ॥ ६० ॥ जियें वर्जिलें फळ मूळ । मांस जिरालें सकळ । अशुद्ध नाहीं अळुमाळ । अस्थिचर्म केवळ एक झालें ॥ ६१ ॥ ते भेटावया रघुपती । गेली चरणीं चालती । तिसी न पाहेचि रघुपती । कठिण वृत्तीं दिव्य मागे ॥ ६२ ॥ तेथें इतरांची गति कायसी । जे राम भेटेल विषयविलासीं । ज्यासी विषयेच्छा मानसीं । श्रीराम त्यासी केंवी भेटे ॥ ६३ ॥ यालागीं मी आपण । सर्वथा नातळें विमान । गुरुसंप्रदायेंकरोन । श्रीरामचरण सेवीन ॥ ६४ ॥ जो लाजे संप्रदायासी । अथवा कां विषयविलासी । तो कैंवी पावे रामासी । जाय निजनरकासी निजकर्में ॥ ६५ ॥ विषयांचिये संगतीं । नरका गेले नेणों किती । अद्यापि कायसी विषयस्थिती । निजांगें रघुपती सेवावा ॥ ६६ ॥ म्हणोनि उठली सुंदर । रामदर्शनीं आल्हादपर । चरणीं चालत वेगवत्तर । श्रीरामचंद्रनमनासी ॥ ६७ ॥ सीता गेली ज्या रीतीं । आठवोनियां ते स्थिती । अति हळुवार लघुगती । पदगतीं संचार ॥ ६८ ॥ अति सांटोपें देह चालतां । सर्वथा चळण नाहीं चित्ता । चित्त जडलें श्रीरघुनाथा । श्रीरामकांतानुग्रहें ॥ ६९ ॥ अनुग्रहाचें बळ दारुण । सर्वत्र जो अपरिच्छिन्न । रहितदेशकाळवर्तमान । चित्त निमग्न तेथें झालें ॥ ७० ॥ तेणें अनुसंधानें चालतां । धरा न दिसे पाऊल ठेवितां । दृश्य न ये दृष्टीचे हाता । शब्दीं निःशब्दता शब्दार्थें ॥ ७१ ॥ निग्रहोनि सर्वेंद्रियवृत्ती । श्रीराम धरोनियां चित्तीं । भेटावया रघुपती । आनंदभरित चालिली ॥ ७२ ॥ अंतरींचिया निजवृत्तीं । त्रिजटा चालतां सहजस्थितीं । पुढें देखिला रघुपती । सीतासतीसमवेत ॥ ७३ ॥ जेंवी सागरीं लहरी । क्रीडे त्याची त्यावरी । श्रीरामें सीता सुंदरी । तैसियापरी शोभत ॥ ७४ ॥ सूर्याचे ठायीं जैसी दीप्ती । कीं कर्पूराचे ठायीं द्युती । कनकाच्या ठायीं कांती । श्रीरामीं शोभती तेंवी सीता ॥ ७५ ॥ रामरूपीं जगज्जननी । देखोनियां जनकनंदिनी । हरिखली राक्षसभगिनी । लोटांगण घालीत ॥ ७६ ॥ चुकलिया बाळका माता । भेटलिया आनंद चित्ता । तेंवी देखोनि जनकदुहिता । त्रिजटेच्या चित्ता अति हरिख ॥ ७७ ॥ मुकिया जोडे वाक्यसिद्धी । कीं निर्दैवा लाभे महानिधी । पुरश्चरणें मंत्रसिद्धी । जेंवी समाधि योगिया ॥ ७८ ॥ जिज्ञासुया ब्रह्मज्ञान । तेंवी जानकीरघुनंदन । देखोनियां त्रिजटा पूर्ण । आनंदमग्न पैं झाली ॥ ७९ ॥ ते देखोनि श्रीरामासी । अति अवस्था झाली कैसी । देखोनियां निजवत्सासी । धांवे प्रीतीसीं माउली ॥ ८० ॥ चुकलिया बाळका माता । भेटलिया आलिंगी तत्त्वतां । तैसें झालें श्रीरघुनाथा । सप्रेमता आलिंगी ॥ ८१ ॥ आलिंगितां रघुनंदन । त्रिजटा आनंदमग्न । सागरीं मिळे जेंवी लवण । तैसी दशा पूर्ण पैं झाली ॥ ८२ ॥ अलंकार हारपे सुवर्णीं । तेंवी त्रिजटा रघुनंदनीं । स्वयें गेली पैं बुडोनी । सर्वथा जनीं अलक्ष ॥ ८३ ॥ आलिंगनाचे मिषें पूर्ण । स्वरूपीं समावेश करून । हळुच सोडिली आलिंगून । त्रिजटा आपण श्रीरामें ॥ ८४ ॥ नसोनियां दोनीपण । प्रतिबिंब भासे पूर्ण । तेंवी सुटलें आलिंगन । दोनीपण नुरवोनी ॥ ८५ ॥ चरणीं ठेवोनि मस्तक । उथळलें निजसुख । तेणेंकरोनि रघुकुळटिळक । त्रिजटा देख प्रार्थीत ॥ ८६ ॥ श्रीरामस्वामी सावधान । परिसावें माझें विज्ञापन । तुझे संगतीहूनि जाण । संगति गहन दासांची ॥ ८७ ॥ तुझ्या आलिंगनीं देख । देसी जें निजात्मसुख । तें देणें अलोलिक । वचनमात्रें निजभक्तीं ॥ ८८ ॥ वेदशास्त्रां नेणवसी । साध-

१ हुरहुर. २ स्पर्श करणार नाहीं. ३ रक्त. ४ किंचित्. ५ दक्षतेनें. ६ परिपूर्ण. ७ पृथ्वी. ८ ताब्यांत ठेवून. ९ सुवास. १० मोठें ठेवणें. ११ निमित्तानें. १२ श्रेष्ठ.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

कासी नातुडसी। तो कैंवी येरां आतुडसी। दर्शनासी धांडोळितां ॥ ८९ ॥ तीर्थोतीर्थी फिरों जातां। सर्वथा न लभे तुझी वार्ता। अधोमुखें धूम्र घेतां। तूं सर्वथा नातुडसी ॥ ९० ॥ पात करितां पर्वतीं। देह देतां कर्वतीं। सर्वथा नव्हे तुझी प्राप्ती। सत्संगतीवांचूनी ॥ ९१ ॥ उग्र तपीं जो नातुडसी। तो श्रवणकीर्तनापासीं। सत्संगतीसीं पैं तिष्ठसी। अहर्निशीं श्रीरामा ॥ ९२ ॥ सत्संगतीं कथाश्रवण। सद्भावें करितां संपूर्ण। साकल्यें सांपडसी पूर्ण। श्रवणें जाण अनायासें ॥ ९३ ॥ अथवा कां हरिकीर्तन। विलज्ज करितां जाण। नामें ओसरला येसी आपण। वत्सालागून धेनु जैसी ॥ ९४ ॥ सत्संगें नामकीर्तन। निःशंक करितां संपूर्ण। न पाचारितां येसी धांवोन। समाधान कीर्तनीं ॥ ९५ ॥ भक्त विरक्त जरी चित्तीं। तरी ओळंगती चारी मुक्ती। जरी भक्त न धरी हातीं। दाटोनि निंघती घर त्याचें ॥ ९६ ॥ मुक्ती होवोनि अंकिता। नित्य ओळंगती तुझिया भक्ता। कृपेनें हात ठेवितां माथां। स्वयें रघुनाथा भेटसी ॥ ९७ ॥ सप्रेमबुद्धी तुजपासीं। सर्वस्वें भजती अहर्निशीं। त्यांसीच तूं प्रसन्न होसी। बुद्धि ऐसी लाचुंगी ॥ ९८ ॥ परी अभक्ताच्या घरासी। विसरोनियांही न वचसी। तैसें नाहीं तुझ्या भक्तासी। नाहीं मानसीं अरिमित्र ॥ ९९ ॥ निजहितीं चाड ज्यांसी। तिहीं सांडोनि इतर संगासी। दृढ धरितां सत्संगासी। निजसुखासी पाविजे ॥ १०० ॥ नव्हती आणिकांच्या कथा। माझा अनुभव प्रत्यक्ष आतां। भेटलिया जनकदुहिता। श्रीराम तत्त्वतां भेटला ॥ १ ॥ कर्म विचारितां राक्षसी। मनुष्याचा आहार आम्हांसी। भेटी होतां जानकीसी। निजकर्मासी विसरलें ॥ २ ॥ सत्संगें स्मरतां नाम। नामें झालें नित्य निष्काम। प्रत्यक्ष भेटला श्रीराम। विश्रामधाम जगाचें ॥ ३ ॥ दुष्टकर्मी हाडखायेर। त्यासी भेटला रघुवीर। हा सत्संगाचा बडिवार। वदावया वक्त्र सरेना ॥ ४ ॥ कोण तो संत म्हणसी। जेणें भेट होय श्रीरामासी। ऐक त्याच्या चिन्हांसी। यथामतीसीं सांगेन ॥ ५ ॥ स्वस्वरूपीं अवधान। करी तो मुख्य साधु पूर्ण। त्या सद्गुरूपरता जाण। साधु आन असेना ॥ ६ ॥ मुख्य साधुत्व सद्गुरूसी। स्वयें सेवितां तयासी। लात देवोनि संसारासी। ब्रह्मत्व अंगासी स्वयें घडे ॥ ७ ॥ सकळ साधनां श्रेष्ठ पूर्ण। मुख्यत्वें गुरुसेवन। गुरुदास्यापरतें जाण। साधन आन असेना ॥ ८ ॥ निष्काम पुण्याचिये जोडी। केल्या होती जन्मकोडी। तैं लाहिजे रोकडी। निजावडी गुरुचरणीं ॥ ९ ॥ नाना साधनीं बहुत। कदा काळें नव्हे प्राप्त। तो गुरुदास्यास्तव येथ। होय प्राप्त निजात्मा ॥ ११० ॥ तीर्थातीर्थाचिया प्रदक्षिणा। क्षम नुपजे ज्ञानध्याना। तेणें गुरुवचनासाठीं जाणा। आत्मदर्शन लाहिजे ॥ ११ ॥ योगयागादि नाना व्रतें। स्वतां सामर्थ्य नाहीं त्यातें। देखिलिया सद्गुरूतें। मुरडती समस्तें लाजोनी ॥ १२ ॥ याकारणें भलतेणें। उठावया संसारधरणें। दृढ गुरुदास्य करणें। येर साधनें काज नाहीं ॥ १३ ॥ मुखीं सद्गुरुनामस्मरण। मनीं गुरुमूर्तीचें ध्यान। श्रवणीं गुरुचरित्रश्रवण। करी पूजन पादसेवा ॥ १४ ॥ पायीं नित्य प्रदक्षिण। अथवा कां दर्शनागमन। बुद्धीचा निश्चयो पूर्ण। आज्ञा प्रमाण संप्रदायें ॥ १५ ॥ ऐसें सांगतां सांगतां। पूर्ण भरतें दाटलें चित्ता। न सांभाळे प्रेमावस्था। पडली तत्त्वता मूर्च्छित ॥ १६ ॥ तें देखोनियां समग्र। अवघीं केला जयजयकार। गुरुमाहात्म्यचरित्र। अति पवित्र महामहिमा ॥ १७ ॥ साचार श्रीरामाची प्राप्ती। गुरुवचनीं असे तिष्ठती। येवढी गुरुदास्याची स्थिती। त्रिजटा ख्याती अनुवादली ॥ १८ ॥ सौमित्रादि बिभीषण। सुग्रीव आणि हनुमान जाण। मूर्च्छित सकळ वानरगण। चरित्र पावन ऐकोनी ॥ १९ ॥ तें देखतांचि राघवा। जाकळिलें अति कर्णवा। विसरला निजस्वभावा। उठाउठीं खेंवा मिठी घाली ॥ १२० ॥ प्रयासीं सुटलें आलिंगन। परी दोघांही नाहीं दोनीपण। बाप कृपाळु रघुनंदन। आनंदला पूर्ण भक्तकीर्ती ॥ २१ ॥ आपुलें प्रतिबिंब पूर्ण। ते हे साधु

१ प्राप्त होत नाहींस. २ प्रवेश करितात. ३ स्वाधीन. ४ लांच घेणारी. ५ विश्रांतीचें स्थळ. ६ संसारबंधन. ७ व्यापलें. ८ कृपेनें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सज्जन । ऐसें जाणोनि आपण । त्रिजटा देखोन सुखावे ॥ २२ ॥ लोटांगण घालोनि सकळांसी । त्रिजटा बोले अति प्रीतीसीं । भावें भजतां सज्जनांसी । भेट अनायासीं श्रीरामाची ॥ २३ ॥ हेळणा कां द्वेषण । सज्जनांचें करितां संपूर्ण । उभयलोकीं निंद्य जाण । नरक दारुण तयासी ॥ २४ ॥ इहलोकीं जननिंद्य । पुढें दारुण नरकबाध । वार्ता नव्हे अर्थवाद । प्रत्यक्ष संबंध घडलासे ॥ २५ ॥ माझी भगिनी शूर्पणखा । विरोधितां रामनायिका स्वयें मुकली काना नाका । निंद्य लौकिका पैं झाली ॥ २६ ॥ म्यां सेविली सीता सती । तेणें मज श्रीरामप्राप्ती । विरोधितां जानकीपती । नरकप्राप्ती शूर्पणखे ॥ २७ ॥ इहलोक ना परलोक । स्वयें निंदिती नीच लोक । ऐसी दशा अलौकिक । विरोधितां देख सज्जन ॥ २८ ॥ त्रिजटा निजप्रतीती । अनुवादतां अतिप्रीतीं । आनंदली त्रिजगती । सुर वर्षती सुमनभार ॥ २९ ॥ जानकीसी लोटांगण । घालूनि दिधलें आलिंगन । तैसाचि सौमित्र जाण । प्रेमेंकरोन आलिंगिला ॥ १३० ॥ देखोनियां बिभीषण । हरिखें घाली लोटांगण । तुझेनि धर्मेंकरोनि जाण । वंशोद्धरण श्रीरामें ॥ ३१ ॥ शरण जाऊनि श्रीरामासी । उद्धरिलें सकळ कुळासी । कीर्ति पावन सकळ जगासी । हाडखाइरासी रामभजन ॥ ३२ ॥ सुग्रीव अंगद जांबवंत । जुत्पती[३] मीनले[४] समस्त । येरी अत्यादरें तेथ । नमन करीत सर्वांसी ॥ ३३ ॥ पुढें देखोनि मारुती । आनंद उथळला चित्तीं । लोटांगण अति प्रीतीं । मिठी घालिती हनुमंता ॥ ३४ ॥ तुझें नाम मारुती । तूं प्राण सकळांचा निश्चितीं । तुझेनि सकळां स्थितिगती । चाळक श्रीरघुपतीचा होसी ॥ ३५ ॥ प्राणें प्राण्यां निजगती । प्राणें प्राण्यां नित्यविश्रांती । प्राणें प्राण्यां जीवनस्थिती । प्राणी वर्तती निजप्राणें ॥ ३६ ॥ असो आणिकांची स्थिती । जानकीचा प्राण तूं निश्चितीं । घेवोनि येऊनि श्रीरघुपती । लंकापती निवटिला[५] ॥ ३७ ॥ सोडविल्या सुरपंक्ती । बिभीषणा राज्यप्राप्ती । भेटवोनि सीते रघुपती । राक्षसपंक्ती उद्धरिली ॥ ३८ ॥ नमन करितां सीता सती । न पाहेचि रघुपती । सुग्रीवादि सकळ जुत्पती । करितां विनंती पाहेना ॥ ३९ ॥ बिभीषण आणि सौमित्र । सकळ सुरवरांचा भार[८] । विनवितां अति तत्पर । चरित्र पावन त्रिलोकीं ॥ १४० ॥ ते काळीं तुवां आपण । प्रबोधोनि रघुनंदन । ख्याति केली दारुण । पावन चरित्र त्रिलोकीं ॥ ४१ ॥ दिव्या उतरोनि सीतेसी । प्रसन्न केलें स्वामीसी । अति प्रीतीं ऐक्यतेसीं । प्रकृति पुरुषासी भेटविली ॥ ४२ ॥ तुझिया उपकाराचे स्वामी । अवघे जाण ऋणी आम्ही । ते प्रकृति सरँती श्रीरामीं । तुझ्या धर्मी पैं झाली ॥ ४३ ॥ प्रकृतिपुरुषां एकात्मता । तुझ्या हातीं गा हनुमंता । देहो श्रीरामीं सरता । होय तत्त्वता तुझेनि ॥ ४४ ॥ ऐसें करितां विनवण । हनुमान घाली लोटांगण । प्राणांचा चाळक रघुनंदन । सकळ पावन त्याचेनि ॥ ४५ ॥ बहुत बोलोनि कार्य कोण । सकळीं स्मरावा रघुनंदन । तेणें त्रैलोक्य पावन । सकळोद्धरण श्रीरामें ॥ ४६ ॥ ऐसें श्रीराममहिमान । परस्परें भक्तजन । करिते झाले वर्णन । श्रीरामध्यानसंनिष्ठ ॥ ४७ ॥ ऐकतां निजभक्तकथा । परमानंद श्रीरघुनाथा । विस्मित होवोनि तत्त्वतां । भक्तचरित्रा पाहातसे ॥ ४८ ॥ तंव शरणागत बिभीषण । घेवोनि कामग विमान । लोटांगणीं रघुनंदन । प्रीतीकरून विनविला ॥ ४९ ॥ कुबेरापासोनि विमान । रावणें हरितलें आपण । तें निवेदोनि बिभीषण । करी विनवण श्रीरामा ॥ १५० ॥ जानकीसहित आपण । सवें सुमित्रानंदन । येथें करावें आरोहण । करावया गमन अयोध्ये ॥ ५१ ॥ अति रमणीय कामग । संकल्पमात्रें सवेग । अपेक्षित स्थळ अव्यंग । न लागतां निमेष पाविजे ॥ ५२ ॥ ज्वाळमाळाकिंकिणी[९] । सुवर्णमयरत्नाभरणी । पाचपेरोजांची मांडणी । तेजें दिनमणी[१०] आच्छादी ॥ ५३ ॥ पताका झळकती अंबरीं । मुक्तघोषांचिया[११] हारी । हिरे माणिकें विचित्रपरी । अतिकुसरीं[१२] खेवणिलीं[१३] ॥ ५४ ॥ ऐसें अति मंडित विमान । पुढें ठेवोनि बिभीषण । करोनि चरणांसी नमन । कर जोडून राहिला

१ निंदा. २ स्वानुभव. ३ वानरवीर. ४ जमले. ५ संहारिला. ६ समाज. ७ मान्य. ८ न्यूनतारहित.

९ तेजस्वी घागऱ्या. १० सूर्य. ११ मोत्यांच्या घोंसांच्या. १२ अति कौशल्यानें. १३ जडविलीं.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ ५५ ॥ तें देखोनियां रघुपती । संतोषला निजचित्तीं । अति मंजुळ मधुरवृत्तीं । बिभीषणाप्रती अनुवादे ॥ ५६ ॥ जितकें रावणाचें वैभव । तुज दिधलें म्यां सर्व । तुवां बैसोनियां स्वयमेव । सुखगौरव भोगावें ॥ ५७ ॥ जेव्हां निवटिला दशाननी । तेव्हांचि तुझी राजधानी । ऐसें सर्वथा जन मानी । परभोग पतनीं घालिती ॥ ५८ ॥ परभुक्त जो विषये । सर्वथा नातळती योगिये । कदाचित इच्छा जाये । तैं व्यभिचार पाहें पैं केला ॥ ५९ ॥ बिभीषणा झणें भाविसी चित्तीं । ज्यांसी नातळे रघुपती । ते आपणासी भोग्य न होती । ऐसें सर्वार्थी न म्हणावें ॥ १६० ॥ लंकेचें राज्य समस्त । तुम्हां भोग्य परंपरागत । म्हणोनि अधिकार येथ । भोगीं साद्यंत असे तुम्हां ॥ ६१ ॥ ऐसें बोलतां रघुनंदन । तटस्थ झाला बिभीषण । एका जनार्दना शरण । रामायण अति रम्य ॥ १६२ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां त्रिजटादर्शनं नाम एकसप्ततितमोऽध्यायः ॥७१॥ ओंव्या ॥१६२॥ श्लोक ॥७॥

अध्याय बहात्तरावा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ त्रिगुणांची जटा शिरीं । सर्वथा नुगवे सुरासुरीं । स्वयें त्याची केली बोहरी । भजनेंकरीं रामाच्या ॥ १ ॥ लागोनियां भजनवाटा । सोडिला त्रिगुणांचा कुरुठा । नांवें साचार त्रिजटा । भजननिष्ठा उगवली ॥ २ ॥ ऐसी त्रिजटेची ख्याती । चरित्र पावन त्रिजगतीं । बिभीषणें करोनि विनंती । विमान रघुपती अर्पिलें ॥ ३ ॥ तें न घेच रघुनाथ । तेणें बिभीषण सचिंत । विमाना न शिवे रघुनाथ । भाग्यहत मी करंटा ॥ ४ ॥ विमानेंकरोनि तत्त्वतां । कांहीं सेवा रघुनाथा । माझी पावेल अल्पता । सकळ वृथा तें झालें ॥ ५ ॥ तरी ऐसें केंवी घडे । जे बाह्य पदार्थी सेवा जोडे । बाह्य सर्वथा रामा नावडे । वृथा वेडे शिणताती ॥ ६ ॥ ऐसा निश्चय मानोनि चित्तीं । मौनें नमिला रघुपती । तंव झाली नवलगती । आला निश्चितीं विश्वकर्मा ॥ ७ ॥ घालोनियां लोटांगण । विनविला रघुनंदन । करावया अयोध्यागमन । नवें विमान करीन मी ॥ ८ ॥ विश्वकर्मा अति निगुतीं । रचिता झाला विमानस्थिती । आजन्म कष्टांची विश्रांती । श्रीरघुपती सेविलिया ॥ ९ ॥ येणें संतोषेंकरोनि जाण । निर्मिता झाला विमान । संकल्पमात्रें करी गमन । म्हणोनि अभिधान कामग ॥ १० ॥ अति प्रचंड पर्वताकार । रचिलें अति मनोहर । तेथील खणांचा विचार । संक्षेपाकार सांगेन ॥ ११ ॥ कोणी म्हणती एक खण । कोणी भाविती त्रिखण । कोणी भाविती पंचखण । कोणी दशखण भाविती ॥ १२ ॥ एक भाविती षोडश । एक सांगती एकवीस । एक सांगती पंचवीस । स्वमतें असोसें बोलती ॥ १३ ॥ निश्चय पाहतां संपूर्ण । एकीं अनेक भाविती खण । एक अनेक हे वणवण । नाहीं जाण दुखण्यासी ॥ १४ ॥ अठ्ठावीस छत्तीस म्हणती । ते जाणावी अवघी भ्रांती । एकीं अनेकांची स्थिती । स्वमतें बोलती बहुविध ॥ १५ ॥ तळींहून चढती खण । शेवटिल्या खणा जातां पूर्ण । हरपे खणांची खणखण । ऐसें विंदानें साधिलें ॥ १६ ॥ सात पौळी अति सुटंका । दहा गवाक्षें पैं देखा । पंचप्रकारीं रचिलें चोखा । गाडोरा सुरेख त्रिगुणांचा ॥ १७ ॥ किंकिणी ज्वाळमाळांचे परी । पन्नास आगळ्या दोनी वरी । तयांमाजी मुख्य चारी । निरंतरीं वाजत ॥ १८ ॥ इतर माळांचिया हारी । शोभताती नानापरी । गुंफिलिया त्रिप्रकारीं । नादाची परी अलोलिक ॥ १९ ॥ जे जे काळीं प्रीत जैसी । ध्वनि उमटे तैसी तैसी । दहा चाळक मुख्य त्यासी । इतर नादांसी नाहीं संख्या ॥ २० ॥ नित्य प्रकाशालागूनी । दीपशिखाँ पैं धरोनी । शशिसूर्य अनुदिनीं । दिवारजनीं तिष्ठत ॥ २१ ॥ नवलक्ष दीपावळी । नित्य शोभती अंतराळीं । औटकोटी भूमंडळीं । पताकाओळी मंडित ॥ २२ ॥ मध्यखणीं हुताशन । नित्य करीतसे पाचन । क्रियाशक्तिसंपादन । पाकशासन करीतसे ॥ २३ ॥ अरुचि उपजेल भोजनीं । म्हणोनि वैद्यराज दोनी । अश्विनीदेव अनुदिनीं । ओषधि घेवोनि वोळंगती ॥ २४ ॥ भक्तिज्ञान वैराग्य चोखट । अति सुरस

१ आश्रय. २ थोडक्यांत. ३ यथेच्छ. ४ युक्ति. ५ फार सुंदर. ६ खिडक्या. ७ दीपज्वाळा. ८ दिवसा आणि रात्रीं. ९ अग्नि. १० सेवेला तत्पर असतात.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

त्रिकूट । यथाकाळें एकनिष्ठ । अति निर्दुष्ट पुरविती ॥ २५ ॥ दशधा वायूचे पदर । तेचि दशदिशा अलंकार । जावों न देती सैर । मर्यादापर वागविती ॥ २६ ॥ चाळक तयासी मारुती । संकल्पमात्रें गमनस्थिती । नित्य वर्तवी मनोवृत्ती । श्रीरघुपतिनिजमतें ॥ २७ ॥ आज्ञाशासन निरंतर । कर्ता स्वामी सौमित्र । त्याचेनि अनुमतें साचार । गगनसंचार विमाना ॥ २८ ॥ अति जिवलग पूर्ण । शुद्धभावार्थी बिभीषण । वागवावया विमान । आज्ञापन त्यासी केलें ॥ २९ ॥ बिभीषणासी सखा जाण । सुष्ठुबुद्धि सुग्रीव पूर्ण । विवेक वैराग्य समान । निजविमान वागविती ॥ ३० ॥ ऐसी निजकळा नागर। धौत्यानें रचिलें विचित्र । जेथें साक्षी श्रीरामचंद्र । असे अगोचर होऊनी ॥ ३१ ॥ ऐसें साधोनि विंदान । विश्वकर्मा आपण । पुढें ठेवोनि विमान । रघुनंदन नमियेला ॥ ३२ ॥ येरीकडे लंकाभुवनीं । बिभीषणाची जननी । श्रीरामगमन ऐकोनी । झाली मनीं अति दुःखी ॥ ३३ ॥ ऐसें होतें निजमानसीं । राम प्रवेशेल लंकेसी । तेणें काळें अति प्रीतीसीं । यथासामर्थ्यैसीं पूजीन ॥ ३४ ॥ रूप पाहेन डोळेभरी । गोष्टी सांगेन तोंडभरी । वचन ऐकेन कानभरी । तैसेंच अंतरीं पैं ध्यान ॥ ३५ ॥ अनंत जन्मांचें कल्मष पूर्ण । जें पुढेंही करीन दुराचरण । त्याचें करावया क्षाळण । श्रीरामागमन वांछित ॥३६॥ श्रीरामभजनीं प्रीती गाढी । तेणें सर्वसंसारबेडी । तुटे न लागतां अर्धघडी । योनिसांकडी पैं निरसे ॥ ३७ ॥ याचि आशा उत्कंठित । श्रीरामाची वाट पाहात । तंव ऐकिलें विपरीत । राम गमनस्थ अयोध्ये ॥ ३८ ॥ तरी आपुलेंचि भाग्य हीन । उत्कंठा न होतां पूर्ण । आम्हांसी न देतां दर्शन । अयोध्यागमन मांडिलें ॥ ३९ ॥ श्रीरामचरणीं नव्हेचि भेटी । वज्र पडो ये ललाटीं । भाग्यें अतिशयें करंटी । फुंदे गोरटी अति दुःखीं ॥ ४० ॥ करें पिटी ललाट । हृदयावरी हाणी चपेट । रामें उद्धरिला दशकंठ । उपेक्षी निष्टंकें आम्हांसी ॥४१॥ चोरोनि आणिली निजभाज । तो उद्धरिला राक्षसराज । आम्हां मोकलोनि रघुराज । केंवी प्रयाणवोज करीतसे ॥ ४२ ॥ धन्य मंदोदरी पतिव्रता । निजांगेंचि तत्त्वतां । भेटोनियां श्रीरघुनाथा । संसारखता फाडिलें ॥ ४३ ॥ श्रीरामतेजें आपण । पतीसवें सहगमन । करोनियां जन्ममरण । क्षणें जाण निरसिलें ॥ ४४ ॥ करोनियां निजख्याती । सायुज्यिला रघुपती । तैसीच सुलोचना सती । निजमुक्ती साधिली ॥ ४५ ॥ मंदभाग्य मी करंटी । निजांगेंचि उठाउठीं । श्रीरामाची निजभेटी । कडकडाटीं न घेंचि ॥ ४६ ॥ म्हणोनियां अति उद्विग्न । उकसाबुकसीं स्फुंदन । स्वयें करीतसे आपण । तेणें राम पूर्ण कळवळला ॥ ४७ ॥ अंतर्यामीं श्रीरघुनाथ । तेणें जाणोनि अवचित । स्वयें बिभीषणा सांगत । तुमची माता येथें न येचि भेटी ॥ ४८ ॥ तुम्हांसी स्मरण नाहीं निश्चित । आम्ही निजकार्यी दुश्चित । मातेची भेटी न घेत । केंवी निघत अयोध्ये ॥ ४९ ॥ येरु मस्तक ठेवोनि चरणां । स्वयें विनवी रघुनंदना । स्वामीचिया निजदर्शना । उत्कंठा मना मातेसीं ॥ ५० ॥ स्वामीनें स्मरण न करितां । केंवी आणूं न पुसतां । यालागीं रघुनाथा । नाहीं माता आणिली ॥ ५१ ॥ आज्ञेप्रमाणें आतां । घेऊनि येईन निजमाता । म्हणोनि ठेवी चरणावरी माथा । धाडी सत्वरता दूतासी ॥ ५२ ॥ आज्ञाविलें रघुनंदनीं । भेटों आणीं निजजननी । तुम्हीं सवेग जाऊनी । भेटीलागोनी आणावी ॥ ५३ ॥ माझें सांगोनि लोटांगण । श्रीरामभेटीलागून । स्वयें आणावी आपण । अविलंबेंकरून जाण येथें ॥५४॥ वंदोनियां तें वचन । लंकेमाजी येऊन । माते कैकसीलागून । केलें नमन सेवकीं ॥ ५५ ॥ अयोध्येसी प्रयाण करितां । तुझे भेटीलागीं यथार्थता राहणें झालें रघुनाथा । मूळ तत्त्वतां धाडिलें तुज ॥ ५६ ॥ अंगीकारोनि श्रीरामाज्ञा । वेगीं बैसोनि विमाना । शीघ्र करावें प्रयाणा । श्रीरामदर्शनालागूनी ॥ ५७ ॥ ऐकोनियां तो वचनार्थ । झाली पूर्ण आनंदभरित । पूर्वार्जित जे मनोरथ । ते समस्त आजि फळले ॥ ५८ ॥ श्रीरामदर्शना चित्त । होतें अत्यंत उत्कंठित । बाप कृपाळु रघुनाथ । अंतरवृत्त जाणता ॥ ५९ ॥ भेटावया रघुपती ।

१ सुंदर. २ विश्वकर्म्यानें. ३ दोष, पाप. ४ निरसुन. ५ जन्ममरणदुःख. ६ हयगय करतो. ७ संपूर्ण. ७ स्वपत्नी (सीता). ९ गमनप्रकार. १० बोलावणें, आमंत्रण.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

न चले [१]यानांची निजगती । यानारूढ विषयस्थिती । सर्वथा रघुपती भेटेना ॥ ६० ॥ भाग्य फळा आलें माझें । जें स्मरण केलें रघुराजें । चरणीं चालत निजवोजें । भेटी जाइजे हेंचि भलें ॥ ६१ ॥ म्हणोनियां राजमाता । चरणीं चालली तत्त्वतां । भेटावया रघुनाथा । हर्षितचित्ता निघाली ॥ ६२ ॥ निघोनि नगराबाहेरी । आली रामसैन्याभीतरी । पुढें येवोनि झडकरी । धरिली करीं बिभीषणें ॥ ६३ ॥ नेतां श्रीरामासंमुख । आनंदभरित रघुकुळटिळक । माता देखोनि एकाएक । आलिंगी देख निजप्रेमें ॥ ६४ ॥ आलिंगितां देख एकाएक । कैकसी सुखाची झाली देख । जन्म मृत्यु जरा [३]अशेख । स्वयें निःशेख विसरली ॥६५॥ विसरली ते पुत्रशोक । विसरली ते द्वंद्वदुःख । इहलोक परलोक । लोकालोक विसरली ॥ ६६ ॥ श्रीरामीं देतां आलिंगन । विसरली देहाचें भान । विरोनि गेली स्वयें आपण । जेंवी लवॅण जीवनीं ॥ ६७ ॥ श्रीराम भेटलिया तत्त्वतां । तुच्छ त्यापुढें समाधिअवस्था । सलोकता सरूपता । सायुज्यता सरेना ॥ ६८ ॥ ऐसें पडिलें आलिंगन । ते स्वरूपीं सामावे संपूर्ण । युक्ती सोडवूनि रघुनंदन । मनोहर आपण वचन बोले ॥ ६९ ॥ रावण आणि कुंभकर्ण । तुझे पुनीत संतान । वधिता झाला रघुनंदन । ऐसें आपण न म्हणावें ॥ ७० ॥ अभिलाषितां पतिव्रता । सकुळ रावणा क्षोभली सीता । तिणें करविलें त्याच्या घाता । बोल वृथा आम्हांसी ॥ ७१ ॥ जो अभिलाषी परनारी । पतिव्रता त्याहीवरी । त्यासी ठाव नेदी धरित्री । पॅचे अघोरीं कल्पकोटी ॥ ७२ ॥ सीता जन्मली धरेभीतरीं । ते अभिलाषी कपटेंकरीं । म्हणोनि क्षोभली धरित्री । केली वोहँरी कुळेंसीं ॥ ७३ ॥ धरा परदारगामी नर । त्याचा भार अति दुर्धर । धरा साहों न शके अणुमात्र । जाय सत्वर रसातळा ॥७४॥ महापर्वत पाषाण । चतुर्विध सृष्टि संपूर्ण । त्याचा भार अणुप्रमाण । नाहीं जाण धरेसी ॥ ७५ ॥ विषयी विषयलुब्ध देख । परदारगामी विशेख । पतिव्रते विक्षेपर्क । भार देख धरेसी ॥ ७६ ॥ तेणें अधर्में दाटली । धरा अतिशयें क्षोभली । सकुळ समाप्ति केली । रावण धुळी मेळविला ॥ ७७ ॥ एका क्षोभली जनकबाळी । सर्वथा न घडे हेही बोली । विश्वद्रोहाची इंगळी । समूळ मूळीं पडिलीसे ॥ ७८ ॥ ब्राह्मणांचें वृत्तिहरण । स्वधर्माचें विच्छेदन । बंदीं घातले सुरगण । विरोध पूर्ण त्रैलोक्या ॥ ७९ ॥ मुख्य ध्येय श्रीशंकर । ज्याचेनि सकळ दुस्तर । निरसोनि पाविजे परात्पर । जो सुखसार निजभक्ता ॥ ८० ॥ त्याचे ठायीं उन्मादता । सेव्यासेव्य न विचारितां । भोगूं मागे स्वामीची कांता । गुरु[९]तल्पगता रावणा ॥ ८१ ॥ उमॅा क्षोभली अति क्रोधेंसीं । सकुळसैन्यपुत्रेंसीं । भस्म केलें रावणासी । बोल आम्हांसीं न ठेवावा ॥ ८२ ॥ देवद्रोही ब्रह्मद्रोही । विश्वाचा तो विश्वद्रोही । जगद्गुरु शंकराचा पाहीं । गुरुद्रोही रावण ॥ ८३ ॥ सकळ पापांहूनि विशेषतां । मुख्य पाप गुरुतल्पगता । सकुळ तेणें पावला घाता । जाण तत्त्वतां कैकसी ॥ ८४ ॥ निजपापेंकरोनि पूर्ण । जावा अधःपाता रावण । शुद्ध धर्मात्मा बिभीषण । तेणें तो जाण उद्धरिला ॥ ८५ ॥ बंधूच्या सख्यत्वें पूर्ण । श्रीशंकरें कृपा करून । केला निष्पाप रावण । अपराधी पूर्ण जाणतांही ॥ ८६ ॥ रावणाची सगर्वता । कळों आली पैं समस्तां । क्रोधें हाणितल्या ज्यासी लाता । तेणेंचि तत्त्वतां उद्धरिलें ॥ ८७ ॥ सावध ऐकें कैकसी । धन्य धन्य तुझी कुसी । बिभीषणातें प्रसविलीसी । सकळ कुळासी उद्धरण ॥ ८८ ॥ रावणाच्या पापें त्वरित । नरका जावें कुळासहित । धन्य भाग्याचा हा हरिभक्त । सकळ कुळ निश्चित उद्धरिलें ॥ ८९ ॥ दोहींची स्थिती निश्चितीं । प्रत्यक्ष दिसे हातोहातीं । असत्पुत्रें नरकप्राप्ती । उद्धारगती सत्पुत्रें ॥ ९० ॥ रावणाचेनि दुराचरणें । जग निंदी मातेकारणें । बिभीषणाचेनि साधुपणें । जनें वानणें तुजलागीं ॥ ९१ ॥

कुलं पवित्रं जननी कृतार्था
वसुंधरा पुण्यवती च तेन ।

१ वाहनाची. २ मोठ्या आनंदानें. ३ संपूर्ण. ४ मीठ. ५ उदकांत. ६ शिजे. ७ संहार. ८ अडथळा करणारा. ९ गुरुपत्नीकडे कामदृष्टीनें पाहणें. १० पार्वती.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

अपारसंवित्सुखसागरेस्मिन्
लीनं परे ब्रह्मणि यस्य चेतः ॥ १ ॥

हरिभक्त ब्रह्मसंपन्न । ज्याच्या कुळीं होय उत्पन्न । तेणें सकळ कुळ पावन । ब्रह्मसंपन्न पैं होत ॥ ९२ ॥ हरिभक्त जन्मे जिचे कुसीं। अवघें त्रैलोक्य वंदी तिसी । तें प्रत्यक्ष घडलें कयाधूसी । झाली जगासी अतिवंद्य ॥ ९३ ॥ प्रल्हाद नुपजतांचि पूर्वी । नारद मानी सर्वभावीं । बंदिमोचन इंद्रादि देवीं । प्रसूति भावी ऐकतां ॥ ९४ ॥ जेथें राहती भगवद्भक्त । तें भूमंडळ होय पुनीत । कीर्तनसुखें डुल्लत । जग उद्धरत ज्यांचेनि ॥ ९५ ॥

वाग्गद्गदा द्रवते यस्य चित्तं
रुदत्यभीक्ष्णं हसति क्वचिच्च ।
विलज्ज उद्गायति नृत्यते च
मद्भक्तियुक्तो भुवनं पुनाति ॥ २ ॥

ज्याचेनि भूमंडळ पावन । ऐक त्या भक्ताचें लक्षण । स्वयें बोलिला भगवान । जडउद्धरण ज्याचेनि ॥ ९६ ॥ आनंदें करिती हरिकीर्तन । नामें सर्व गर्जे गगन । श्रोतिया वक्तयाचें अंतरक्षाळण । न लागतां क्षण पैं होय ॥ ९७ ॥ क्षाळलेनि अंतरें । परमानंद अंतरीं भरे । चित्त चित्तपणा विसरे । न देखे दुसरें जगामाजी ॥ ९८ ॥ जगाचे ठायीं विषमता । चित्तपणें भासे चित्ता । तेणें श्रवण कीर्तन करितां । स्वयें भगवंता रातले ॥ ९९ ॥ तेणें अंतर सुखावे तत्त्वतां । विषम जगामाजी पाहतां । बुडाली विषमाची वार्ता । चिदाभासता सर्वत्र ॥ १०० ॥ जेथें दुजेपणाचें भान । तेंचि लाजेसी आयतन । हारपलें द्वैतभान । लज्जा पूर्ण निमाली ॥ १ ॥ उन्मत्ताचे परी जाण । निर्लज्ज करी कीर्तन । तेणें कीर्तनें सदा आपण । करी नर्तन तालच्छंदें ॥२॥ जो मोलें घेऊनि मद्यासी । स्वयें होय विषयविलासी । तो विसरे देहभावासी । द्वैत त्यासी भासेना ॥ ३ ॥ उन्मादरस विचित्र । मेळवूनि केलें एकत्र । त्याचा एवढा बडिवार । क्षणें संसार विसरवी ॥ ४ ॥ सकळ रसांचें रसपान । जे गोडियेमाजी होती निमग्न । तो ब्रह्मरस सेविलिया जाण । संसारभान कैंवी उरे ॥ ५ ॥ ऐसे ब्रह्मरसमहायोगें । जगीं मद्भक्त दाटुगे । कलिकाळातें जिणोनि वेगें । नामबळें जग उद्धरती ॥ ६ ॥ एवढें भक्ताचें महिमान । तो तुझा पुत्र बिभीषण । भगवद्भजनें अति पावन । जग उद्धरणें याचेनि ॥ ७ ॥ हरिभक्तांची नाममाळा । प्रातास्मरणीं स्मरतां अबळा । महापातकांचा पाळा । एके हेळां भस्म होत ॥ ८ ॥

बलिर्बिभीषणो भीष्मः प्रह्लादो नारदो ध्रुवः ।
षडेते वैष्णवा ज्ञेयाः स्मरणं पापनाशनम् ॥३॥

महाविष्णूचें वरद ऐसें । भक्तस्मरणें पाप नासे । तुझें भाग्य उत्कट कैसें । पुत्र बैसे भक्तओळी ॥९॥ ऐसें मातेचें शांतवन । स्वयें करी रघुनंदन । येरी घालोनि लोटांगण । करी विनवण स्वामीचें ॥११०॥ ऐकें स्वामी रघुनंदन । तुझ्या निजभजनें सकळ कल्याण । भजनास्तव कुसवा धन्य । धन्य संतान तुझेनि ॥११॥ धन्य रावण कुंभकर्ण । तुवां निजहस्तें विंधोनि बाण । पुत्रां दिधलें सायुज्यसदन । भाग्य कोण त्याहूनी ॥ १२ ॥ एकल्या न देतां मुक्ती । उद्धरिली सकुळ संतती । अगाध रामभजनाची ख्याती । राक्षसां मुक्ति हटेंतटें ॥ १३ ॥ विरोधें पावले मुक्तीसी । न कळे भजे त्या काय देसी । काय वानूं बिभीषणासी । म्हणोनि चरणांसी लागली ॥१४॥ उठोनियां वेगेंसीं । श्रीरामें धरिली हृदयेंसीं । धन्य धन्य ते कैकसी । श्रीरामभजनासी विनटली ॥१५॥ श्रोते विषम मानिती पोटीं । मूळीं देखिली नाहीं दृष्टी । कैकसी श्रीरामाची भेटी । नवी गोष्टी हे कैंची ॥ १६ ॥ तरी ज्याचे पोटीं असेल आशंका । तेणें क्रौंचरामायण पहावें देखा । तेथील हा भाव निका । असेल ठाउका ज्ञात्यांसी ॥ १७ ॥ तरी शरण येतां रामासी । माता तुष्टली बिभीषणासी । श्रीरामीं प्रेमा कैकसीसी । तेणें भेटीसी सुचविलें ॥ १८ ॥ अनंत कथा रामायणी । शतकोटि वदली वाल्मीकाची वाणी । सकळ कथा आलोडोनी । कोणी शोध न करूं शके ॥१९॥ माझें लोटांगण तत्त्वतां । कोप न मानावा श्रोतां । एका जनार्दनी वक्ता । तोचि वाक्यार्थी चाळीत ॥१२०॥ असो आतां परिहारता । सैराट तरी रामकथा । पावन करी

१ पोटीं. २ प्रल्हादाच्या मातेला. ३ पुढील. ४ पवित्र. ५ चैतन्यस्थिति. ६ स्थान. ७ बलाढ्य. ८ समूह. ९ एकाच वेळीं. १० विरोधानें. ११ शंकासमाधान. १२ विस्तृत.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

श्रोता वक्ता । नित्यमुक्तता श्रीरामें ॥ २१ ॥ यालागीं श्रोतेजन । आप्त इतर परिपूर्ण । त्यांसी माझें लोटांगण । क्षमा आपण करावी ॥ २२ ॥ श्रीरामें पावन श्रोता । श्रीरामें पावन वक्ता । श्रीरामकथा अनुमोदितां । उद्धरी तत्त्वतां श्रीराम ॥ २३ ॥ पुढील कथानुसंधान । सवडी पाहोनि पूर्ण । सांडूनि श्रीरामअंकासन । जनकनंदिनी ऊठली ॥ २४ ॥ होतां इतर संवादांसी । उठतां न येचि जानकीसी । उच्छृंखळता नाहीं तिसी । मर्यादेसी मंडन ॥ २५ ॥ भेटावया सौमित्रासी । आज्ञा पुसोनि राघवासी । जवळी येवोनि वेगेंसीं । लागली चरणांसी अति प्रीतीं ॥२६॥ क्षमा करावी निश्चित । मी तुझें निजअपत्य । नेणतां दोघांचें महत्त्व । वचन दुरुक्त बोललें ॥ २७ ॥ श्रीरामाचा जिवलग । त्यासी छळितां सवेग । महापापिणी निजडागें[1] । मज सवेग लागला ॥ २८ ॥ महापाप तें अल्प । भक्तच्छळण तें वज्रपाप । निरय[2] भोगिजे आकल्प । नाहीं अल्प उद्धार ॥२९॥ तेणें पापें त्वरित । मज धरोनियां लंकानाथ । वेगें नेलें लंकेआंत । श्रीरघुनाथ अंतरला ॥ १३० ॥ नित्यछळण रावणाचें । राखण क्रूर राक्षसींचें । खाऊं गिळूं भाषण त्यांचें । दुर्ग लंकेचें सभोंवतें ॥ ३१ ॥ सकृत्[3] छळितां लक्ष्मण । पूर्ण क्षोभला रघुनंदन । नित्य रावणाचें छळण । सोशिलें पूर्ण षण्मास ॥ ३२ ॥ श्रीराम भक्तांचा अंकित । श्रीराम भक्तांचा विक्रीत । भक्तां सबाह्य श्रीरघुनाथ । नित्य नांदत सर्वदा ॥ ३३ ॥ म्हणोनियां यथार्थ । जेणें पूजिले रामभक्त । तेणें पूजिला रघुनाथ । उपचारयुक्त षोडश ॥ ३४ ॥ घृतप्लुत अवदानीं । भक्त सुखावले भोजनीं । तेणें षड्रसें करोनी । केला रघुनंदनीं नैवेद्य ॥ ३५ ॥ जेणें विरोधिले रामभक्त । तेणें विरोधिला रघुनाथ । अमूर्त[4] होवोनियां मूर्त[5] । क्षणें घात करी त्याचा ॥ ३६ ॥ दुर्धर आयुधें अलोलिक । सुदर्शन गदादिक । अक्षयी भाते कोदंड[6] देख । रघुकुळटिळक वागवी ॥ ३७ ॥ भक्तविरोधी दारुण जाणा । तोचि वैरी रघुनंदना । त्याच्या करावया हनना । करी प्रेरणा शस्त्रांची ॥ ३८ ॥ प्रल्हादासी विरोधितां । मरण पावला त्याचा पिता । भगवद्भक्तांचा द्वेष करितां । विघ्नघाता वरँपडा होय ॥ ३९ ॥ इतरांच्या कायशा गोष्टी । सौमित्र छळिलियासाठीं । राम लागोनि माझे पाठीं । क्षणें दिक्पटीं लाविलें ॥ १४० ॥ रामसेवेलागीं तत्त्वतां । वनवास घेतला माथां । ते नायकें श्रीरामकथा । ऐसी अवस्था मज झाली ॥ ४१ ॥ भक्तद्वेषी महापापिणी । अंतरलें रघुनंदनीं । तें उपसाहावें म्हणोनी । लोटांगण घातलें ॥ ४२ ॥ सौमित्रचरणीं माथा । ठेवोनियां जनकदुहिता । उकसाबुकसीं स्फुंदतां । अति अवस्था पैं झाली ॥४३॥ तें देखोनि सुमित्रानंदन । घालोनि सीतेसी लोटांगण । अश्रुपूर्ण झाले नयन । करी रुदन अट्टाहास्यें ॥ ४४ ॥ तुझेनि वियोगें तत्त्वतां । अति अवस्था रघुनाथा । अंगिकारोनि पिशाचता । होय हिंडता वनोवनीं ॥ ४५ ॥ एवढिया विघ्नासी कारण । मुख्य माझें अधैर्यपण । न साहवेचि एक वचन । महापापी पूर्ण मी एक ॥ ४६ ॥ सीता लाविली दिक्पटीं । राम पाडिला अति संकटीं । विवरद्वारा उठाउठीं । नेती जगजेठी बांधोनी ॥ ४७ ॥ दुर्दशा श्रीरघुपती । मारावया उभा करिती । दैवें पातला मारुती । राक्षसपंक्ती निवटिल्या ॥ ४८ ॥ संदिसें तेथोनि निघतां बाहेरी । सवेंचि युद्ध महामारी । रावणेंसीं झुंजारी । शरधारीं वर्षती ॥ ४९ ॥ आणीक सांगों तें किती । शरबंधनीं रघुपती । विसंज्ञ पडिला क्षितीं । हेही ख्याती पैं माझी ॥ १५० ॥ रावणें केलें तुझें छळण । श्रीरामासी दृढ बंधन । इतुकियासी मूळ मी पापी पूर्ण । सत्य जाण जानकिये ॥ ५१ ॥ ऐसें परस्पर दोघें जण । येरयेरांचा[10] गळा धरून । निजापराधीं[11] अति उद्विग्नें[12] । करिती रुदन अट्टाहास्यें ॥ ५२ ॥ तंव आश्चर्य झालें तेथ । श्रीरामचरण अवचित । दृष्टी पडतां निश्चित । शोक समस्त निमाला ॥ ५३ ॥ घालोनियां लोटांगण । विनविता झाला लक्ष्मण । मानूं नको याचें दूषण । रघुनंदन लाघवी ॥ ५४ ॥ पूर्ण त्याचें मनोगत । राक्षस प्रबळले बहुत । त्यांचा करावया घात । विंदान[13] येथ रचियेलें ॥ ५५ ॥ सर्वांतर्यामी श्रीरघु-

१ कलंक. २ नरक. ३ एकवार. ४ निराकार. ५ साकार. ६ धनुष्य. ७ वश. ८ क्षमा करावी. ९ लगेच, ताबडतोब.

१० एकमेकांचा. ११ आपण अपराधी म्हणून. १२ फार दुःखी. १३ युक्ती.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

नाथ । सकळ लाघव त्याचें येथ । तेणें संचरोनि हृदयांत । उभयवृत्त संपादिलें ॥ ५६ ॥ तुझे छळणबुद्धीसी कारण । मुख्य परमात्मा रघुनंदन । माझ्या अधैर्यासी मूळ पूर्ण । तोचि जाण जानकिये ॥ ५७ ॥ शब्दें घाय वण नाहीं होत । शब्दें प्राण नाहीं जात । शब्दें नव्हे देहपात । हें मी जाणत सर्वदा ॥५८॥ तेणें म्यां आपण । तुज शब्दासाठीं जावें सोडून । हें माझें अधैर्य नव्हे जाण । केलें विंदाण श्रीरामें ॥ ५९ ॥ अति दुरात्मा रावण । केलें सकळांचें अवरोधन । त्यासी वधावया जाण । करविलें छळण तुजकरवीं ॥ १६० ॥ श्रीरामशक्ती तत्त्वतां । ते तूं बोलसी छळणवार्ता । त्यासी मूळ श्रीराम कर्ता । विषाद सर्वथा न मानावा ॥ ६१ ॥ म्हणोनि घातलें लोटांगण । वंदिले जानकीचे चरण । मजवरी कृपा करावी पूर्ण । विषाद आपण न मानावा ॥ ६२ ॥ ऐसी परस्परें विनवण । करिती येरयेरांची आपण । तेणें विस्मित बिभीषण । वानरगण विस्मित ॥ ६३ ॥ लाघव करोनि अद्भुत । निजापराधें पायां पडत । आपण साक्षी होवोनि तेथ । चरित्र पाहात दोघांचें ॥ ६४ ॥ स्मरतां श्रीरघुनाथ । महापातकी उद्धरत । यांचा अपराध किती तेथ । नित्यमुक्त श्रीरामें ॥ ६५ ॥ श्रीरामें पावन वक्ता । श्रीरामें पावन श्रोता । श्रीरामें पावन कथा । जगदुद्धारता श्रीरामें ॥ ६६ ॥ श्रीरामें पावन वदन । श्रीरामें पावन श्रवण । श्रीरामें कर पावन । करितां पूजन चराचर ॥ ६७ ॥ करितां श्रीरामाचें ध्यान । श्रीरामें पावन होय मन । श्रीरामें चित्त पावन । करितां चिंतन रामाचें ॥ ६८ ॥ सांडूनि प्रपंचआधी । श्रीरामीं निश्चयें धरितां बुद्धी । तेथें झाली विपरीत विधी । स्वयें समाधी होवोनि ठाके ॥ ६९ ॥ तेथें अभिमानाचें चिन्ह । स्वयेंचि पालटे आपण । सांडोनियां देहाभिमान । स्वयें रघुनंदन होऊनि ठाके ॥ १७० ॥ अगाध श्रीराममहिमान । मनचि होवोनि उन्मन । चित्त होय चैतन्यघन । बुद्धि ते जाण समाधी ॥ ७१ ॥ अहं तेंचि आपण । होवोनि ठाके सोहं पूर्ण । एका जनार्दना शरण । लाघवी पूर्ण श्रीराम ॥ ७२ ॥ पुढें अयोध्येचें गमन । श्रीरामाचें अभिषिंचन । सुरस कथा अति गहन । श्रोतीं अवधान मज द्यावें ॥ ७३ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां सौमित्रिजानकीसमाधानं नाम द्विसप्ततितमोऽध्यायः ॥ ७२ ॥ ओंव्या ॥ १७३ ॥ श्लोक ॥ ३ ॥

अध्याय त्र्याहात्तरावा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ पुढें ठेवोनि विमान । विश्वकर्मा आणि बिभीषण । लोटांगण घालोनि पूर्ण । संमुख रघुनंदना राहिले ॥ १ ॥ कर जोडोनियां देख । विमानेंसहित सेवक । पुढें देखतां रघुकुळटिळक । अनंत सुखा पावला ॥२॥

तत्पुष्पकं कामगमं विमान-
मुपस्थितं प्रेक्ष्य हि दिव्यरूपम् ।
रामः प्रहृष्टः सह लक्ष्मणेन
पुरा यथा वृत्रवधे महेंद्रः ॥ १ ॥

दिव्य तेजांचिया कोटी । अनंतसूर्य कोट्यनुकोटी । पडतां श्रीरामाची दृष्टी । प्रकाश उठी विमाना ॥ ३ ॥ दिव्यतेजें देदीप्यमान । लखलखीत अवघें गगन । देखतांचि रघुनंदन । सुखसंपन्न पैं झाला ॥ ४ ॥ आच्छादोनि निजप्रकाशासी । विमानद्वारा तो प्रकाशी । स्वयें देखोनि तयासी । अति संतोषी होतसे ॥ ५ ॥ बोलतां जयाचा प्रकाशमहिमा । वेद पावला उपरमा[1] । कोण वर्णी तयाची सीमा । निरुपमता रामाची ॥ ६ ॥ देखतां जयाचे प्रकाशासी । अनंत सूर्यांचिया राशी । बुडोनियां जाती निजतेजेंसीं । कोणे देशीं नाढळती ॥ ७ ॥ जयातें देखतांचि दृष्टीं । सचंद्र नक्षत्रांचिया कोटी । करपोनि जाती उठाउठीं । तें वैखरीसाठीं केंवी वर्णवे ॥ ८ ॥ जेथें परेसी सौरस नसे । पश्यंती मध्यमा कोण पुसे । बापुडी वैखरी ते कायसे । स्वरूपांश वर्णावया ॥ ९ ॥ एवढा प्रकाशाचा उमाळा । स्वयें आच्छादोनि स्वलीळा । विमान देखतां सांवळा । संतोषला अति प्रीतीं ॥ १० ॥ देखोनियां विमानस्थिती । सौमित्र आणि रघुपती । अत्यंत संतोषले चित्तीं । जेंवी सुरपति[5] वृत्रजयें ॥ ११ ॥ वधोनियां वृत्रासुर । मरुद्गणेंसीं[6] अमरेंद्र । विजयश्री मनोहर । अति सुंदर शोभत ॥ १२ ॥ तेंवी वधोनियां दशशिर । सहितवानर-

---

१ युक्ती. २ प्रपंचाची काळजी. ३ स्तब्धतेला पावला, मौन धरलें. ४ चौथी वाणी. ५ इंद्र. ६ देवांसह.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

निशाचर । अति सुंदर मनोहर । स्वयें रघुवीर शोभत ॥ १३ ॥ वानरीं निशाचरीं वहिला । श्रीराम सौमित्र परिवारला । पुढें बिभीषण देखिला । पाचारिला समीप ॥ १४ ॥ अति प्रीती करोनि जाणा । सुग्रीव आणि बिभीषणा । सांगता झाला रामराणा । वानरसेना पुढें लावीं ॥ १५ ॥

अनुजानामि वः सर्वान्यथेष्टं गम्यतामिति ।
तेनैव सेतुना तीर्त्वा वानरा मकरालयम् ॥ २
सुग्रीवश्च मया सार्द्धं विमानेनागमिष्यति ।
समेतो युवराजेन तथा मुख्यैश्च वानरैः ॥ ३ ॥
इत्युक्तास्ते महाकाया वानराः कामरूपिणः ।
प्रदक्षिणमवर्तंत प्रहृष्टाः सहलक्ष्मणम् ॥ ४ ॥
सुग्रीवमंगदं चैव राजानं च विभीषणम् ।
प्रणम्य च शिरोभिस्ते निर्गता हरियूथपाः ॥ ५ ॥
यथोत्साहं यथाप्रीत्या यथागतमरिंदम ।
करतालान्विमुंचंतः सिंहनादांश्च पुष्कलान् ॥ ६ ॥

लक्षोनियां वानरसैन्य । बोलता झाला रघुनंदन । दुर्जय करोनियां रण । वैरी रावण निवटिला ॥ १६ ॥ युद्धीं बहुसाल कष्टलेती । केली राक्षसांची शांती । आतां पावावया विश्रांती । निजनगराप्रती चलावें ॥ १७ ॥ सकळ वानरांचिया श्रेणी । बैसतां न येती विमानीं । बिभीषण करितो विनवणी । बैसा विमानीं म्हणवोनी ॥ १८ ॥ ऐसियासी काय युक्ती । ते सांगावी मजप्रती । बिभीषणाची चित्तवृत्ती । संतोषस्थिती जेणें पावे ॥ १९ ॥ ऐसें करोनि विवंचन । मज सांगावें आपण । ऐकतां श्रीरामाचें वचन । वानरगण तटस्थ ॥ २० ॥ ऐकें स्वामी रघूत्तमा । तूं विश्वाचा विश्वात्मा । मान देतोसी प्लवंगमां[1] । स्वभक्तमहिमा वाढवूनी ॥ २१ ॥ मर्कटां विमानें कायसीं । स्मरतां तुझिया नामासी । वानरां गति आकाशीं । वैकुंठासी आकळिती ॥ २२ ॥ सैरा[2] उडती गोळांगुळें । ते विमानीं कोंडले । ऐसें न म्हणावें रा[3]उळें । रामबळें अनिवार ॥ २३ ॥ ऐकोनियां वानरवचन । संतोषला रघुनंदन । एकलें[4] बैसतां न ये जाण । करी विवंचन आरूढावया ॥ २४ ॥ सुग्रीवराजा वानरनाथ । युवराजा अंगदासहित । सेनापति सर्वें अमात्य । संख्या नि[5]यत पैं दहा ॥ २५ ॥ मुख्य नीळ सेनापती । प्रधान जांबवंत महामती । दुसरा प्रधान प्रखरयुक्ती । वीर निश्चितीं पैं नळ ॥ २६ ॥ सुषेण वैद्यराज सुबुद्धी । जेणें वांचविली वानरमांदी । प्रधानांमाजी तीक्ष्णबुद्धी । दारुण युद्धीं महावीर ॥ २७ ॥ उग्रकर्मा दधिमुख । संग्रामीं चपळ अति दक्ष । तैसाचि गंधमादन देख । अति आवश्यक रामाचा ॥ २८ ॥ ज्याच्या देखोनि सुगंधासी । कुंभकर्णें निजांगासीं । मर्दिला अति प्रीतीसीं । केलें अस्थींसी पैं चूर्ण ॥ २९ ॥ अस्थिमांसत्वचेसहित । अशुद्ध तेंही सुवासित । पीठ करोनियां तेथ । अंगीं मर्दीत कुंभकर्ण ॥ ३० ॥ तेथें कृपाळु श्रीरघुनाथ । लाघव करोनि अद्भुत । निःशेष झालें जें अव्यक्त । तें आणिलें निश्चित व्यक्तीसी ॥ ३१ ॥ पृथ्वीनें उभारिले पार्थिव । आपें अशुद्धादि रस सर्व । तेजें रेतादिक भाव । दृष्टिगौरव नेत्रांसी ॥ ३२ ॥ वायूनें चेतविला प्राण । नभें अवकाश दिल्हा पूर्ण । हृदयाकाश सुप्रसन्न । रघुनंदननिजकृपा ॥ ३३ ॥ इंद्रियाधिष्ठाते देव । राक्षसधाकें स्वयमेव । पळाले होते पैं सर्व । तिंहीं निजावयव अंगीकारिले ॥ ३४ ॥ ब्रह्मा विष्णु आणि शंकर । बुद्धि चित्त अहंकार । तेथें प्रवेशले सत्वर । श्रीरघुवीरनिजकृपा ॥ ३५ ॥ मृत्यू तेथें धांवोनी । आला गतायुष्य घेवोनी । नवल श्रीरामाची करणी । विस्मित मनीं सुरसिद्ध ॥ ३६ ॥ श्रीरामप्रभावेंकरून । स्वयें रचला गंधमादन । तोही स्वयें निघे आपण । आरूढोन विमाना ॥ ३७ ॥ नरवीर अति बळियाढा । संग्रामीं शूर निधडा । परसैन्य देखोनि पुढां । करी धडमुंडांकित धरणी ॥ ३८ ॥ तैसाचि तरळही जाण । निधडी जयाची आंगवण । गवय गवाक्ष दोघे जण । वीर दारुण अति योद्धे ॥ ३९ ॥ दशेंद्रियांचे अधिपती । जेंवी दहाही देव निश्चितीं । तैसे दहाही सेनापती । विमानस्थितीं चालावें ॥ ४० ॥ वरकड वानरवीर पाहीं । सेतुबंधें लवलाहीं । पायवाटे चालावें तिंहीं । ऐकतां सर्वेही सुखमय ॥ ४१ ॥ माथा धरोनि आज्ञापन । लोटांगणीं रघुनंदन । नमूनियां सकळ जन । केलें गर्जन रामनामें ॥४२॥ अति प्रीतीचेनि पडि[6]भरें । हँ[7]रिखें

१ वानरांला. २ स्वच्छंदानें. ३ रामचंद्रानें. ४ मोजकी. ५ अदृश्य. ६ आधिक्यानें. ७ आनंदानें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

नाचती वानरें । सिंहनाद दीर्घस्वरें । एक भुभुःकारें गर्जती ॥ ४३ ॥ परस्परें वाजाविती टाळी । क्षेमालिंगन प्रीतिकल्लोळीं । रावण वधोनि महाबळी । मेळविला धुळी श्रीरामें ॥ ४४ ॥ सोडवोनि जनकात्मजा । अयोध्येसी रघुराजा । निघाला गजरें वोजा । वानरफौजा चालती ॥ ४५ ॥ सोडविली देवांची बांधवडी[२] । तोडिली नवग्रहांची बेडी । सीता सोडविली तांतडीं । वानरकोडी नाचती ॥ ४६ ॥ होवोनियां आनंदभरित । येवोनि नमिला रघुनाथ । स्वामी बैसल्या विमानांत । होती गगनस्थ वानरें ॥ ४७ ॥

आरुरोह ततो रामो विमानमभिपूजयन् ।
अंकेनादाय वैदेहीं श्रियं नारायणो यथा ॥ ७ ॥
तथारुरोह तं राजा सुग्रीवः सह मंत्रिभिः ।
लक्ष्मणश्च महाबाहुर्युवराजोऽगदस्तथा ॥ ८ ॥

आदिकरोनि कैकसी । त्रिजटेसहित लंकानिवासी । आज्ञा पुसोनि सकळांसी । विमानापासीं राम आले ॥ ४८ ॥ विधियुक्त पूजोनि विमान । करोनि प्रदक्षिणा नमन । आरोहण करितां रघुनंदन । तेजें त्रिभुवन उजळलें ॥ ४९ ॥ विमानीं बैसतां रघुवीर । त्रैलोक्य आनंदनिर्भर । स्वर्गीं आनंदले सुरवर । सुमनें[३]संभार वर्षले ॥ ५० ॥ यक्षगणादि किन्नर । नभीं सिद्धांचा जयजयकार । ऋषी करिती मंत्रस्वर । नादें अंबर दुमदुमित ॥ ५१ ॥ सुमंगल वेदध्वनी । मंगल आदरिलें वानरगणीं । मंगल आरंभिलें ब्राह्मणीं । नामें करोनी गर्जत ॥ ५२ ॥ श्रीरामाचे मांडीवरी । शोभे जानकी सुंदरी । जेंवी गिरिजात्रिपुरारी । तैशापरी शोभत ॥ ५३ ॥ अनुपम शोभाशोभित । सत्यलोकीं लोकनाथ[४] । सावित्रीसहित शोभत । तेंवी रघुनाथजानकी ॥ ५४ ॥ जेंवी लक्ष्मी नारायणीं । शोभे वैकुंठभुवनीं । तेंवी सीता जनकनंदिनी । रघुनंदनीं शोभत ॥ ५५ ॥ श्रीराम सीता बाह्य जगीं । सीता रामाच्या अंगसंगीं । सृष्टी शोभत इंहीं दोघीं । न दिसे जगीं तीसरें । ॥ ५६ ॥ धनुर्धारीदीक्षागुरु । विमानीं बैसलासे सौमित्र । आनंदला वानरभार । जयजयकार पैं केला ॥ ५७ ॥ आज्ञा देवोनि इतरांसी । सेनापती आणि प्रधानांसी । सुग्रीवासहित अंगदेंसीं । श्रीरामआज्ञेसीं बैसले ॥ ५८ ॥

उवाच चैनं काकुत्स्थः प्रियं मे राक्षसेश्वर ।
स त्वमेव गुणी विद्वान् कार्यं निश्चित्य तत्त्ववित् ॥९॥
क्षिप्रमारोहतु भवान्सामात्यः सपुरोहितः ।
पुरे प्रतिनिधिं कृत्वा कर्तव्यमिति मे मतिः ॥ १० ॥
ततो विभीषणो राजा विधाय नगरे विधिम् ।
आज्ञाप्य मातरं धीमान् संदिश्य च समुद्विजन् ॥ ११ ॥

अत्यंत जिवलग आप्त । विरक्त अनुरक्त भावार्थ । गुणी असोनि गुणातीत । श्रीरघुनाथनिजभजनें ॥ ५९ ॥ जीवनीं जन्मे मुक्ताफळ । तें उपजतांचि आटे जळ । तथापि परीक्षक कुशळ । म्हणती अतिढाळ पाणी आहे ॥ ६० ॥ तैसें श्रीरामभजन करितां । गुणविकारीं वर्ततां । विभीषण भोगी गुणातीतता । श्रीरघुनाथाचे निजभजनें ॥ ६१ ॥ अति सात्त्विक बुद्धि करून । निष्कर्में सेवितां रघुनंदन । यालागीं सत्त्वगुणीं संपन्न । स्वयें रघुनंदन पाचारी ॥ ६२ ॥ विरोधें हाणितां लाता । सर्वथा विषाद नाहीं चित्ता । अमर्याद शांति तत्त्वतां । विद्वान् या अर्था म्हणे राम ॥ ६३ ॥ तत्त्वज्ञानें संपन्ना । ऐक सत्त्वमूर्ति बिभीषणा । नगरस्थांची संभावना । करोनि विमाना बैसावें ॥ ६४ ॥ प्रतिनिधि करोनि नगरासी । सर्वे देवोनि मातेसी । पाठवावें निजधामासी । निजगजरेंसीं अति प्रीतीं ॥ ६५ ॥ त्रिजटा आणि सरमेसी । निरवावें[५] कैकसीसी । सुखी करावें तियेसी । सख्यत्वेंसीं त्रिजटेच्या ॥ ६६ ॥ त्या दोघींसी अति प्रीतीं । कृपा करावी निश्चितीं । बहुंडवावे[६] सेनापती । सैन्यसंपत्तीसमवेत ॥ ६७ ॥ ऐकोनि रामाचें वचन । मातेसी करोनि नमन । प्रतिनिधि करोनि आपण । निजनगरा जाण बोळविलें ॥ ६८ ॥ सवें देवोनि त्रिजटेसी । बोळविली कैकसी । आज्ञा पुसोनि सकळांसी । श्रीरामापासीं स्वयें आला ॥ ६९ ॥ श्रीरामआज्ञेकरून । चौघे प्रधान घेऊन । राजा बिभीषण आपण । स्वयें विमान आरूढला ॥ ७० ॥ श्रीराम म्हणे हनुमंता । संपादिली सकळ व्यवस्था । विमानारोहण करीं आतां । सकळ

१ आनंदानें. २ बंधन. ३ पुष्पसमूह. ४ ब्रह्मदेव.
५ स्वाधीन करावें. ६ मागें पाठवावे.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वृथा तुजविण ॥ ७१ ॥ जैसें प्राणेंवीण शरीर । तेंवी तुजवीण आम्ही समग्र । तुवां बैसोनि सत्वर । गमनसंचार संपादीं ॥ ७२ ॥ आम्हां सकळांचा चाळक । सत्य साचार तूं एक । तुझेनि मंडित सकळिक । वेगीं पुष्पक अंगीकारीं ॥ ७३ ॥ ऐकतां श्रीरामाज्ञापन । हनुमान घाली लोटांगण । वंदूनि श्रीरामचरण । केलें आरोहण विमानीं ॥ ७४ ॥ विश्वकर्मा येवोनि पुढें । श्रीराम नमिला वाडेंकोडें । अति प्रेमाचेनि सुरवाडें । पडिलें झांपडें नेत्रांसी ॥ ७५ ॥ अर्धोन्मीलित झाली दृष्टी । बाष्प दाटलें पैं कंठीं । श्वास दाटला असे पोटीं । न ये वास्पुटीं पैं शब्द ॥ ७६ ॥ अति प्रेमें देखोनि त्यासी । कृपा उपजली राघवासी । स्वयें उचलोनि वेगेंसीं । निजहृदयासीं आलिंगिलें ॥ ७७ ॥ कृपेनें आलिंगितां रघुपती । त्रिविध तापा झाली शांती । पावला परम विश्रांती । झाली निर्मुक्ती भवश्रमा ॥ ७८ ॥ प्रेम देखोनि अद्भुत । आणि विमानाचें कुशळित । तेणें भजनें रघुनाथ । स्वयें वदत वरदासी ॥ ७९ ॥ निजकर्मे आचरतां व्युत्पत्ती । तुझी मलिन नव्हे वृत्ती । अकर्तात्मक बोधस्थिती । सुखसंस्फूर्ति स्वानंदें ॥ ८० ॥ सकळ सृष्टीचें संपादन । करितां न बाधी अभिमान । सहजस्थिती समाधान । सच्चिदानंदघनस्वरूप ॥ ८१ ॥ कुलाल भांडें निपजवीत । परी गगन न करी घटाकृत । तें जेंवी करणीरहित । तेंवी तूं अलिप्त निजकर्मे ॥८२॥ ऐसें देतां आशीर्वचन । विश्वकर्मा सुखसंपन्न । छेदोनि त्रिपुटीचें भान । कर्मबंधन छेदिलें ॥ ८३ ॥ कर्मामाजी निष्कर्मता । सर्व कर्मी श्रीरघुनाथा । स्वयें झाला देखता । स्वयें वर्ततां निजकर्मी ॥ ८४ ॥ आज्ञा पुसोनि सकळांसी । विमान न्यावया मोक्षपुरीसी । अति त्वरा राघवासी । करी सकळांसी पैं वेग ॥ ८५ ॥

धर्मार्थकुशलैर्वीररारूढं तद्यथाविधि।
तेष्वारूढेषु सर्वेषु सुखासीनेषु भागशः ॥ १२ ॥
राघवेणाभ्यनुज्ञातं विमानं दिवमुत्पतत्।
खेचरेण विमानेन प्रदीप्तेन विराजता ॥ १३ ॥

सप्तपुरींमाझारीं । पहिली मोक्षाची अयोध्यापुरी । विमान न्यावया तेथवरी । कळवळला भारी श्रीराम ॥ ८६ ॥ सुंदर कामग विमान । संकल्पमात्रें करी गमन । पावावया मोक्षभुवन । अधिकारिया पूर्ण आज्ञापी ॥ ८७ ॥ श्रीरामाज्ञें करून । स्वधर्मनिष्ठा हरिगण । स्वाधिकारेंकरोन । स्वस्थानीं पूर्ण बैसले ॥ ८८ ॥ श्रीरामाज्ञें स्वस्थ । स्वाधिकारें नेमस्त । निजासनीं बैसले समस्त । श्रीरघुनाथ सुखमय ॥ ८९ ॥ श्रीराम बैसतां विमानीं । आनंद कोंदला त्रिभुवनीं । लागल्या वाजंत्रांच्या ध्वनी । विचित्र स्तवनी त्यांमाजी ॥ ९० ॥ विचित्र नादांचा उपक्रम । ऐकतां मन पावे उपरम । सामगायन मनोरम । बृहत्साम रथंतर ॥ ९१ ॥ वानरांचा भुभुःकार । रामनामाचा गजर । सुरवरांचा जयजयकार । नभीं खेचर गर्जती ॥ ९२ ॥ रामनामाचा गंभीर ध्वनी । गेला सत्यलोक भेदूनी । दिशांच्या पोकळी भरोनी । श्रीरामध्वनी कोंदला ॥ ९३ ॥ नाम भरतांचि गगनीं । वोसंर चालिला तेथोनी । वर्षों लागला अमृतकणीं । तेणें अवनी तिंवळी ॥ ९४ ॥ अमृतसिंचन धरेसीं । तेणें विसरली कठिनत्वासी । स्वयें मृदु झाली कैसी । नवनीतासी लाजवी ॥ ९५ ॥ श्रीरामें सुखावली धरा । दुभों लागली ऋषीश्वरां । फळमूळधान्यद्वारा । सुखी द्विजवरां करीतसे ॥ ९६ ॥ नामें भेदलें पाताळ । जाळीत पन्नगांची गरळ । निर्विष झाले व्याळ । नामबळ अनिवार ॥ ९७ ॥ श्रीरामनामाचा गजर । करीत त्रैलोक्याचा उद्धार । स्वयें चालिला रघुवीर । निजनगरप्रवेशा ॥ ९८ ॥ विमान उसळतां गगनीं । तळीं दिसे सकळ अवनी । तेणें संतोष रघुनंदनीं । सीतेलागूनी वृत्त सांगे ॥ ९९ ॥

अब्रवीन्मैथिलीं सीतां रामश्चंद्रनिभाननाम् ।
कैलासशिखराकारे त्रिकूटशिखरे स्थिताम् ॥ १४ ॥
अवेहि लंकां वैदेहि निर्मितां विश्वकर्मणा ।
एतदायोधनं पश्य मांसशोणितकर्दमम् ॥ १५ ॥

चंद्रवदना गोरटी । अंकीं बैसवी जगजेठी । हातीं धरोनि हनुवटी । श्रीराम गोष्टी सांगत ॥ १०० ॥ सावध ऐकें सीतासुंदरी । तुजकारणें वानरीं । ख्याति केली त्रिकूटशिखरीं । महामारी राक्षसां ॥ १ ॥ अमरावतीसमान । रावणाचें

१ पुष्पकनामक विमान. २ वानरगण. ३ शांति. ४ भरला. ५ वर्षाव. ६ पृथ्वी. ७ भिजली. ८ विष. ९ सर्प.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

लंकाभुवन। विश्वकर्म्यानें आपण। रचिलें अनेक कुसरीं ॥ २॥ क्षणमात्रें तिचें दहन। हनुमंतें केलेंसे आपण। तेचि सुवर्णमय ओतिली जाण। प्रताप पूर्ण हनुम्याचा ॥ ३ ॥ तये लंकेचे चौबारां। मारिल्या थोर थोर धुरां। नद्या रुधिराच्या अपारा। कर्दमें थोर मांसाचा ॥ ४ ॥ वीरां वानरां झोंटधरणी। रणनदी वाहविली रणीं। वानर दुधड घायेंकरोनी। पुच्छें कवळोनी मिसकळती ॥ ५ ॥ मारिले रावण कुंभकर्ण। इंद्रजित अखया-पुत्र दारुण। मारिले सेनानी प्रधान। सकळ सैन्य निर्दळिलें ॥ ६ ॥ तुझेनि कैवारें सुंदरी। रांडा झाल्या कोटिवरी। शंखस्फुरण घरोघरीं। शस्त्राधारीं झोडिले ॥ ७ ॥ राज्य देवोनि बिभीषणासी। तुज सोडविलें परियेसीं। इतकें सांगतां राघवासी। विमान वेगेंसीं चालिलें ॥ ८ ॥

एषो हि दृश्यते देवि समुद्रः सरितां पतिः ।
पूर्वजो ज्ञातिरस्माकं येन सख्यं कृतं मया ॥ १६ ॥

पुढें देखोनि सागर। सांगता झाला रघुवीर। हा आमचा परम मित्र। कृतोपकार आम्हां याचा ॥ ९ ॥ आमुच्या पूर्वजीं स्थापिला। तो उपकार स्मरोनि वहिला। सेतुबंधाचा विचार भला। सागरें वहिला सांगितला ॥ ११० ॥ सुग्रीवाचा सेनापती। त्या नळाचेनि पाषाण तरती। सेतु बांधोनि त्याचे हातीं। लंकेप्रती सुखें जावें ॥ ११ ॥ ऐकोनि सुमित्रानंदन। स्वयें झाला हास्यवदन। श्रीराम आपुलें महिमान। गौण करोन सांगत ॥ १२ ॥ ऐकें जानकिये माते। उतरावया वानरांतें। मार्ग मागतां सागरातें। श्रीरामातें भेटेना ॥ १३ ॥ तेणें क्षोभला रघुनंदन। शोषावया सागरजीवन। सीतीं सज्जिला अग्निबाण। अंपांपति तेणें भयभीत ॥ १४ ॥ स्त्रीपुत्रांसमवेत। श्रीरामा झाला शरणागत। पूजोपचार अद्भुत। घेवोनि त्वरित पुढें आला ॥ १५ ॥ विचित्राकृति वचन। स्वयें करोनि आपण। सुप्रसन्न रघुनंदन। सागरें जाण पैं केला ॥ १६ ॥ अति संकट पडिलें तेथ। मारूं नये शरणागत। सत्यप्रतिज्ञ रघुनाथ। बाण निश्चित परतेना ॥ १७ ॥ ऐसें संकट पडिलें भारी। बाण घालूं कोणावरी। तंव आठवलें झडकरी। मरुदैत्यावरी सोडावा ॥ १८ ॥ मरुदैत्य मारवाडांत। प्रजा पीडीत समस्त। बाण सोडोनियां त्वरित। केला घात पैं त्याचा ॥ १९ ॥ वधूनियां तयासी। बाण भेदला भूमीसी। अग्निबाणाची आगी कैसी। जळ ते देशीं तुटलें ॥ १२० ॥ तेथेंही केलें विंदान। अग्नीच बोळला संपूर्ण। गाई दुभती गहन। तृष्णा जाण निमाली ॥ २१ ॥ उदक मार्गों येती अंतीत। त्यांसी क्षीरपान करवीत। कृपा बोळला रघुनाथ। केला अद्भुत पवाडा ॥ २२ ॥ ऐसें सांगतां जानकीसी। तंव लंघिलें सागरासी। जेथें भेटी बिभीषणासीं। त्या ठायासी पैं आलें ॥ २३ ॥ सीते तुजलागीं जाण। बहु कष्टला बिभीषण। नानापरी रावण। शिकवितां जाण नायके ॥ २४ ॥ निग्रहोनि सांगतां त्यासी। लत्ताघातें बिभीषणासी। हाणितां अति आवेशीं। आला श्रीरामासी पैं शरण ॥ २५ ॥ तेणेंचि काळें रघुनाथें। अभिषेकिलें बिभीषणातें। निवटोनि रावणातें। मग तूतें सोडविलें ॥ २६ ॥ तुजलागीं सेतुबंधन। केलें तें अक्षयी पूर्ण। मीनलिया सुरसिद्धगण। अन्यथा कोण करूं शके ॥ २७ ॥

देवदैत्यमनुष्येषु नैतदन्यः करिष्यति ।
पश्य सागरमक्षोभ्यं वैदेहि वरुणालयम् ॥ १७ ॥

अति अक्षोभ्य सागरीं। नाना श्वापदांचिया थोरी। जो न कल्पवे मनेंकरीं। तो क्षणाभीतरीं बांधिला ॥ २८ ॥ देवदैत्यादि दानव। पन्नग आणि मानव। मिळाल्या त्रैलोक्य सर्व। न करवे स्वयमेव अन्यथा ॥ २९ ॥ एकल्या हनुमंतें पूर्ण। सप्त पर्वत आणोनि जाण। एक उणें पन्नास योजन। सेतुबंधन संपविलें ॥ १३० ॥ इतर वानरीं समस्तीं। अर्ध बांधिला अंपांपती। अर्ध उरला तो मारुतीं। सेतुसमाप्ती पैं केली ॥ ३१ ॥ ते हे सेतुबंधनख्याती। अगाध श्रीरामाची कीर्ती। युगायुगीं वाखाणिती। जड उद्धरती श्रीरामचरित्रें ॥ ३२ ॥ ऐसें सांगतां चरित्र। पुढें देखिला रामेश्वर। तेथील माहात्म्य अपार। वदावया वक्त्र मज कैंचें ॥ ३३ ॥ ब्रह्महत्यांचिया कोटी। दर्शनीं जळती उठाउठीं। त्याच्या माहात्म्याची गोष्टी।

१ युक्तीनें. २ आसमंतांत, आसपास. ३ प्रमुख. ४ चिखल. ५ सेनापति ६ धनुष्याच्या दोरीला. ७ समुद्र. ८ युक्ति, कौतुक. ९ पांथस्थ. १० कीर्ति, पराक्रम. ११ निक्षून. १२ सर्प. १३ समुद्र. १४

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

कैंवी वाक्पुटीं बोलवे ॥ ३४ ॥ परी कृपाळु जनार्दन । जो अवतरला रघुनंदन । तो मनामाजी प्रवेशोन । चरित्र पूर्ण वदवीतसे ॥ ३५ ॥ राम मनाचें अमन मन । राम चित्ताचें निजचिंतन । बुद्धिबोधाचा निश्चयो पूर्ण । स्वयें आपण श्रीराम ॥ ३६ ॥ श्रीराम अभिमानाचा अभिमान । स्वयें सोहं सिद्ध करून । दांडोरा पिटी चरित्रकथन । आपुलें आपण करीतसे ॥ ३७ ॥ न लिही म्हणतां हें चरित्र । श्रीराम हृदयीं हृदयस्थ । तो राहूं नेदी निवान्त । अंतरीं करीत महामार ॥ ३८ ॥ देहगेहाची आवडी । सांडवोनि स्त्रीपुत्रांची गोडी । निजचरित्र अति आवडीं । निजनिर्वेडीं चालवीत ॥ ३९ ॥ जेथें जेथें ममता जात । तेथें तेथें पावोनि रघुनाथ । समूळ ममतेचा निःपात । तत्काळ करीत श्रीराम ॥ १४० ॥ लोभें जाय ममताद्वारीं । तंव राम स्मरोनि झडकरी । समूळ त्याची करोनि बोहरी । वदवी निर्धारीं रामकथा ॥ ४१ ॥ शरण एकी एकनाथा । जनार्दना सर्वगता । माझें कांहीं न चले आतां । कर्ता करविता तूं स्वामी ॥ ४२ ॥ एका जनार्दना शरण । दांडोरा पिटी ग्रंथकथन । चालवी एका जनार्दन । रामेश्वरकथन अवधारा ॥ १४३ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां पुष्पकारूढगमनं नाम त्रिसप्ततितमोऽध्यायः ॥ ७३ ॥ ॥ ओंव्या ॥ १४३ ॥ श्लोक ॥ १७ ॥

अध्याय चौऱ्याहत्तरावा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ श्रीरामाचें निजचरित्र गहन । सांगतां सौमित्र विचक्षण । ऐकती जानकी सावधान । सर्वांगश्रवण करोनी ॥ १ ॥ धन्य श्रवणार्थी सादर सीता । धन्य धन्य तो सौमित्र वक्ता । धन्य चरित्र रामकथा । अनागतवक्ता वाल्मीकि ॥ २ ॥ कलियुगीं धन्य जन ते । अखंड गाती रामचरित्रातें । धन्य धन्य ते सादर श्रोते । कथामृत सेविती ॥ ३ ॥ श्रवणद्वारें कथामृत । सेवितां अंतर निर्धूत । प्रकटोनियां रघुनाथ । उद्धरीत जड जीवां ॥ ४ ॥ श्रीरामाचें चरित्र गहन । क्रमें संपलें सेतुबंधन । पुढें रामेश्वराचें आख्यान । वर्णी कोण सोंकलयें ॥ ५ ॥ अनंत कथा सेतुमाहात्म्यीं असती । तितुकी आकळावया कैंची मती । किंचित सांगेन कथासंगती । क्षमा श्रोतीं करावी ॥ ६ ॥ क्षमा करा म्हणावयालागीं । सामर्थ्य कैंचें माझ्या अंगीं । जनार्दनकृपा सत्संगीं । केलों जगीं पैं सरता ॥ ७ ॥ तेणें एका एकपणा । पैठा जालों संतचरणां । तये धीटवेकरोनि जाणा । निःशंक विनवणा करीतसें ॥ ८ ॥ किष्किंधेहूनि निघे श्रीरघुवीर । सवें वानरांचा भार । नामें गर्जती अपार । भुभुःकार गोळांगुळीं ॥ ९ ॥ भुभुःकार जयकारध्वनी । वानरांच्या उड्डाणकिराणीं । राम निघाला गजरेंकरोनी । खांदीं बैसोनी हनुमंताच्या ॥ १० ॥ हनुमंत झाला श्रीरामवाहन । मज अंगदें उचलोन । खांदीं घेतलें प्रीतिकरून । आले ठाकून समुद्रतीरा ॥ ११ ॥ अपूर्व झालें तये ठायीं । श्रीरामा शिवदर्शनाचा नेम पाहीं । समुद्रतीरी तें नाहीं । न चले कांहीं सर्वथा ॥ १२ ॥ गुंती पडली फळआहारा । तटस्थता सर्वही वानरां । संमुख येती रघुवीरा । वाग्व्यापारा न करवे ॥ १३ ॥ शिवदर्शनेंवीण जाण । श्रीराम न करी फळभोजन । गुंती पडली दारुण । कांहीं विंदाण चालेना ॥ १४ ॥ जरी स्वयें आत्माराम । तरी स्थापावया भजनधर्म । शिवदर्शनाचा नित्य नेम । अति निःसीम चालविता ॥ १५ ॥ सकळ तीर शोधितां पाहीं । प्रतिमालिंग न दिसे कांहीं । तेणें सचिंत होवोनि अवघेही । करणी कांहीं चालेना ॥ १६ ॥ जरी स्वयें आत्माराम । तरी स्थापावा भजनधर्म । स्वयें करिताहे कर्म । पुरुषोत्तम आपण ॥ १७ ॥ सचिंत होवोनि अघवे । विचार करिती निजभावें । स्वतां युक्ती न संभवे । हें पुसों जावें श्रीरामा ॥ १८ ॥ कैसेनि होईल लिंगप्राप्ती । कोण उपाव कैशा स्थितीं । हें न पुसतां रघुपती । आगीक युक्ती स्फुरेना ॥ १९ ॥ पुसावया श्रीरघुनंदना । येवढी आंगवण कोणा । तुजवांचून वायुनंदना । अणिका वदन पैं कैंचें ॥ २० ॥ मिळोनियां सकळ जुत्पैंती । विनविते झाले मारुती । आहारासीं पडली गुंती । विचार रघुपती पुसें वेगीं ॥ २१ ॥ ऐकोनियां तें वचन ।

---

१ निजानंदानें. २ संहार, नाश. ३ भविष्य कथन करणारा. ४ पवित्र. ५ संपूर्णपणें. ६ मान्य. ७ वानरवीर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

पुढें झाला वायुनंदन । लोटांगणीं रघुनंदन । कर जोडून विनविला ॥ २२ ॥ ऐकें स्वामी रघुनाथा । अवघे वीर विचारितां । शिवलिंग नाहीं सर्वथा । त्यासी आतां काय करणें ॥ २३ ॥ खुंटल्या वानरांच्या युक्ती । बुद्धि न स्फुरे लिंगार्थी । स्वामी सांगती जया स्थितीं । त्याच रीतीं साधेल ॥२४॥ गुरुमुखें तत्त्वतां । वस्तुनिश्चय दृढ न होतां । कोटि जन्मफेरे खातां । न पवे सर्वथा कल्पांतीं ॥ २५ ॥ ऐसें विनवितां हनुमंता । अति संतोष रघुनाथा । हृदयीं आलिंगोनि तत्त्वतां । होय सांगता लिंगप्राप्ति ॥ २६ ॥ सेतुबंधाची ख्याती । विस्तारावया त्रिजगतीं । जडजीवां उद्धारगती । करावया युक्ती योजिली ॥ २७ ॥ नाहीं वेदशास्त्रव्युत्पत्ती । गांठीं नाहीं तपःसंपत्ती । गंध नाहीं सत्संगती । त्यांसी गती कैसेनि ॥ २८ ॥ ऐसी पुढिलांची चिंता । उपजली श्रीरघुनाथा । तये कृपेस्तव तत्त्वतां । होय योजिता उपाव ॥ २९ ॥ अति प्रीतीं हनुमंताप्रती । सांगता होय रघुपती । अति कठिण लिंगप्राप्ती । दुर्गम स्थिति तयाची ॥ ३० ॥ स्थावर लिंगासी चळण । सर्वथा करों नये जाण । म्हणोनि मांडिलें कठिण । दुर्गम जाण लिंगप्राप्ति ॥ ३१ ॥ तुम्हीं समस्तीं रहावें येथें । मी जाईन शिवदर्शनातें । पूजोनियां सदाशिवातें । शीघ्र येथें येईन ॥ ३२ ॥ ऐकतां श्रीरामवचन । हनुमान झाला मूर्च्छापन्न । हातींचा गेलिया रघुनंदन । वृथा जीवोन भूमिभार ॥ ३३ ॥ कठिण ऐकतां वचनार्थ । सुग्रीवादि समस्त । वानर झाले मूर्च्छाभूत । मजही तेथ मूर्च्छा आली ॥ ३४ ॥ कांहीं न चले विवंचनें[१] । सकळ झाले मूर्च्छापन्न । तें देखोनियां रघुनंदन । स्वयें आपण कळवळला ॥ ३५ ॥ कुरवाळूनि अमृतहस्तीं[३] । रामें उठविला मारुती । लिंगप्राप्तीसी एक युक्ती । माझ्या चित्तीं स्फुरलीसे ॥ ३६ ॥ परी ते कष्ट तुम्हांसी । म्हणोनि शंका मानसीं । काल आणिलें सीताशुद्धीसी[४] । अति कष्टेंसीं रणमारें ॥ ३७ ॥ सर्वेचि आजि दुसरें । संकट घालावें एकसरें । म्हणोनि सांगतां न सरे । मन घाबिरें होतसे ॥ ३८ ॥ ऐकोनियां तें वचन । हनुमान घाली लोटांगण । देह तुझे कृपेंकरून । वर्तत जाण श्रीरामा ॥ ३९ ॥ तुझिया नामस्मरणापुढें । संकट कायसें बापुडें । फोडूनि काळाचें दाभाडें । नामें मार्कंडें अनिवार ॥ ४० ॥ वैकुंठ कैलास सत्यलोक । पाटां वाटीन मृत्युलोक । लिंगप्राप्तीलागीं देख । पाताळलोक भेदीन ॥ ४१ ॥ आज्ञा करितां रघुपती । जैशा रीतीं होय प्राप्ती । तैसी तैसी साधीन युक्ती । नामें मारुती गर्जत ॥ ४२ ॥ पाडूनि काळाचे दांत । ख्याती करीन त्रैलोक्यांत । आज्ञा करितां श्रीरघुनाथ । शोधीन समस्त ब्रह्मांड ॥४३॥ तुझे नामें रघुपती । कोण दुष्कर त्रिजगतीं । आज्ञा द्यावी शीघ्रगती । लिंगप्राप्ती होय कैसी ॥ ४४ ॥ ऐकोनियां तें वचन । संतोषला रघुनंदन । हृदयीं धरिला आलिंगून । दुर्लंघ्य कोण तुजलागीं ॥ ४५ ॥ आनंदवन महाश्मशान । अविमुक्त वाराणसीस्थान । मोक्षपुरींमध्यें[८] मणि जाण । वेदपुराणसंमत ॥ ४६ ॥ तये काशीपुरीमाझारीं । कृपाळु राजा त्रिपुरारी । तारक ब्रह्माच्या निजगजरीं । जन उद्धरी चतुर्विध ॥ ४७ ॥ अंडज जारज स्वेदज पूर्ण । चौथें उद्भिज्ज पैं जाण । तितुकें शिवकृपेंकरून । मोक्षसदनें पावतें ॥ ४८ ॥ महापापें हो कां पतितें[९] । देह ठेवितां काशीआंत । यमयातने देवोनि लात । नित्य निर्मुक्त स्वयें होती ॥ ४९ ॥ अगाध वाराणसीची थोरी । शिवें धरिली त्रिशूळावरी । लागली दिसताहे वसुंधरीं[१०] । अलिप्त निर्धारीं धरेसीं ॥ ५० ॥ देव पदाभिमानें शिणले । ते मोक्ष पावावया वहिले[११] । शंकरासी शरण गेले । धरणें केलें आनंदवनीं ॥ ५१ ॥ ब्रह्मा विष्णु मरुद्गणें[१२] । लोकपाळेंसीं पाकशासनें[१३] । सनकादि सिद्ध जाण । ऋषिगण वसिष्ठादि ॥ ५२ ॥ यक्ष किन्नर सिद्ध चारण । वाराणसीचे किंकर[१४] जाण । शोभा कैलासाहूनि गहन । वैकुंठ जाण पुढें सरेना ॥ ५३ ॥ क्षेत्रपाळांचें नित्य रक्षण । अहर्निशीं सावधान । विघ्नांसी प्रवेश तेथें कैसेन । दारुण शासन दंडपाणीचें ॥ ५४ ॥ येथें जावोनि आपण । सदाशिवासी लोटांगण । अति प्रीतीं घालोनि पूर्ण । माझें विनवण सांगावें ॥ ५५ ॥ सीताशुद्धीचे

१ प्राप्त होत नाहीं. २ विचार. ३ कृपाहस्तांनीं. ४ सीतेच्या शोधाला. ५ लगेच. ६ अवघड. ७ शंकर. ८ मोक्षाचें स्थान. ९ पापी. १० पृथ्वीला. ११ तत्काळ. १२ देवसमुदाय. १३ इंद्र. १४ सेवक.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

कार्यार्थ। साधावया श्रीरघुनाथ। वानरसैन्यासमवेत। आला त्वरित समुद्रतीरा ॥ ५६ ॥ शिवदर्शनावीण तत्त्वतां। फळ मूळ श्रीरघुनाथा। नाहीं घेणें सर्वथा। तरी पाहतां शिवलिंग न मिळे ॥ ५७ ॥ म्हणोनियां स्वामीप्रती। मज पाठविलें लिंगप्राती। ऐसें सांगतां शिवाप्रती। लिंग निश्चित देईल ॥ ५८ ॥ ऐसें जरी योजेल। तरी लिंगप्राप्ति होईल। अन्यथा श्रमचि उरेल। परी न होईल लिंगप्राप्ति ॥ ५९ ॥ ऐसें सांगतां रघुनाथा। आवेश आला हनुमंता। नमन करोनियां तत्त्वतां। होय विनविता श्रीरामा ॥ ६० ॥ तुझेनि प्रतापें रघुनाथा। कोणे पदार्थी दुर्गमता। आम्हां नाहीं गा सर्वथा। जाईन आतां क्षणमात्रें ॥ ६१ ॥ कोणीकडे तें काशीपुर। मज सांगावें सत्वर। कृपा करोनि रघुवीर। आज्ञा सत्वर मज देईं ॥ ६२ ॥ ऐकतां हनुम्याचें वचन। संतोषला रघुनंदन। अति प्रीतीं आलिंगून। निजविंवचनें सांगत ॥ ६३ ॥ येथोनि थेट उत्तरेसी। विंध्याद्रीचे पैलदेशीं। अति विशाळ नगर काशी। तेथें विश्वेश्वरासी निवास ॥ ६४ ॥ अयोध्येचा निजप्रदेश। अंतर त्यासी योजनें वीस। ऐकतांच वानरेश। केलें सावेश उड्डाण ॥ ६५ ॥ नमन करितां तये वेळीं। पिंजारल्या रोमावळी। मस्तक नेला मुंडपातळीं। विचित्र शैली नेत्रांची ॥ ६६ ॥ भुभुःकार देतां वानरें। बैसलीं काळांचीं दांतेरें। दिग्गज झाले पैं घाबरे। टाळी एकसरें बैसली ॥ ६७ ॥ ऐकतांचि भुभुःकारासी। धाकें शौरें आलें मेघांसी। दांतखिळी बैसली त्यांसी। गडगर्जनेसी विसरले ॥ ६८ ॥ वळोनि पुच्छाचा आंकोडा। उडतां आवेश माकडा। सागर खळबळिला गाढा। पडिला तडा पृथ्वीसी ॥ ६९ ॥ जवळी होता रघुनाथ। म्हणोनि भ्याला अंगवात। तेणें वानर जीवें जीत। राहिले स्वस्थ रामबळें ॥ ७० ॥ वृक्षां लागतां तो वारा। वेगें उडाले अंबरा। भ्रमण करितां गरगरां। विस्मयो रघुवीरा उड्डाणें ॥ ७१ ॥ मागें सांडोनि चंद्र। गगना उसळला कपींद्र। लोकपतीचेंही नगर। अति सत्वर डावलिलें ॥ ७२ ॥ शेषाद्रि आणि श्रीशैलगिरी। किष्किंधाद्रि प्रस्रवणगिरी। मागें सांडोनियां सह्याद्री। ब्रह्मगिरी ओलांडिला ॥ ७३ ॥ विंध्याद्रिआदि सकळ गिरी। क्षणमात्रें कपिकेसरी। लंघोनियां झडकरी। काशीपुरी पावला ॥ ७४ ॥ रामनामाचे कल्लोळ। ऐकतां तटस्थ झाले रक्षपाळ। देखतांचि गोळांगुळ। आश्चर्य सकळ मानिती ॥ ७५ ॥ श्रीरामनाम ऐकतां। निषेध न करवे सर्वथा। सकळां झाली तटस्थता। कपि देखतां विस्मित ॥ ७६ ॥ पाहतां दिसे वानर। मुखीं रामनामोच्चार। पराक्रमें महावीर। कालाग्निरुद्र दिसताहे ॥ ७७ ॥ आमुच्या स्वामीचें ध्येय जाण। याच्या मुखीं त्याचें स्मरण। यासी निषेधितां आपण। शिव संपूर्ण क्षोभेल ॥ ७८ ॥ ऐसें जाणोनि समस्त। उगेच राहिले तटस्थ। हनुमान निघाला नगरांत। श्रीविश्वनाथदर्शना ॥ ७९ ॥ हाटवटिया चौवारे। सप्तखणांचीं दामोदरें। पंचप्रकारें विचित्रें। रचिलीं शंकरें त्रिशूळावरी ॥ ८० ॥ प्रतिराउळीं परिकरीं। कोठडिया बाह्यांतरीं। प्रतिहारिका नवनारी। निगमागम साचारीं द्वारें नव ॥ ८१ ॥ सुंदर उभवणी चिंतामणींची। घरीं दुभतीं कामधेनूचीं। वनें उद्यानें कल्पतरूंचीं। शोभा नगरींची अनुपम ॥ ८२ ॥ तेथींचे जे निजजन। त्यां अखंड शंकराचें ध्यान। रुद्राक्षांचें आभरण। भस्मोद्धूलन सर्वांगीं ॥ ८३ ॥ शिवनामाची मुद्रा सार। सुखरूपचि व्यवहार। शिवनामें निरंतर। गर्जती नर सर्वदा ॥ ८४ ॥ तेथें राजा श्रीशंकर। मथूनियां श्रुतिसागर। उपनिषद्‌नवनीतसार। वेगवत्तर काढिलें ॥ ८५ ॥ तेंचि उपनिषद्‌नवनीत। बोधाग्नी करोनि तप्त। रामनाम सार घृत। परमामृत जीवांसी ॥ ८६ ॥

पायं पायं श्रुतिचुलकितं रामनामामृतं य-
द्ध्यायं ध्यायं मनसि सततं ब्रह्म तत्तारकाख्यम्।
जापं जापं प्रकृतिविकृतौ प्राणिनां कर्णमूले
वीथ्यां वीथ्यामटति जटिलः कोपि काशीनिवासी ॥१॥

जटाधरी दिगंबर। उमाकांत कर्पूरगौर। काशीपुरीं श्रीशंकर। राजा निरंतर नांदत ॥ ८७ ॥ तेणें रामनाम परमामृत। श्रुतीच्या चुळीं प्राशूनि प्रीतियुक्त। काशीच्या बिदोबिदीं धांवत। पुकारीत डांगोरा ॥ ८८ ॥ श्रीराम परम कल्याण। पूर्णब्रह्म चैतन्यघन। माझे जीवींचें निजगुह्य

१ दुष्प्राप्यता. २ आपला विचार. ३ कांपरें. ४ अत्यंत. ५ मागें टाकिलें. ६ गर्जना. ७ वानर. ८ बाजार. ९ घरें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

पूर्ण । समाधान मज तेणें ॥ ८९ ॥ श्रीरामें जीवा जीवपण । श्रीरामें शिवा शिवपण । जीवशिवांची बोळवण । चैतन्यघन श्रीराम ॥ ९० ॥ तें माझें निजगुह्य पूर्ण । निजकृपेंकरोन जाण । सांगतसे हांक फोडून । अति प्रीतीनें निजभक्तां ॥ ९१ ॥ [1]प्रकृतित्यागाचे अंतीं । श्रवणीं उपदेशी एकांतीं । ब्रह्म तारक ज्यातें म्हणती । तें हें निश्चितीं रामनाम ॥ ९२ ॥ श्रवणद्वारें करितां प्राशन । चित्ताचें होय चैतन्यघन । मन तेंचि उन्मन जाण । अहं तें सोहं संपूर्ण श्रीरामें ॥ ९३ ॥ बुद्धि तेंचि समाधिघन । इंद्रियांचें मोडलें भान । अनुभवितां पैं चिद्घन । परिच्छिन्नपण मग कैंचें ॥ ९४ ॥ एवढा उपदेशाचा बडिवार । देहचतुष्टयाचा संहार । वचनमात्रें साक्षात्कार । चिदचिन्मात्र स्वयें होणें ॥ ९५ ॥ कृमिकीटकपतंगादि पहाहो । काशीमाजीं सांडितां देहो । सांडोनियां देहभावो । परब्रह्म पहाहो स्वयें होती ॥ ९६ ॥ अगाध स्मरणाचा बडिवार । देखतांचि तो वानर । करितां रामनामाचा भुभुःकार । दर्शना सत्वर चालिला ॥ ९७ ॥ श्रीरामभजनीं अति आदर । नित्य सावधान शंकर । पळें पळें एकाकार । ध्यान निरंतर रामाचें ॥ ९८ ॥ बापै ध्यानाचा बडिवार । येरें वेधियेला येर । ध्यानबळें पैं साचार । वर्ण सत्वर पालटले ॥ ९९ ॥ महादेव तमोगुण । मेघश्याम त्याचा वर्ण । श्रीरामाचें करितां ध्यान । झाला पूर्ण कर्पूरगौर ॥ १०० ॥ श्रीराम शुद्ध सत्त्वात्मक निर्मळ । तो शंकरध्यानें प्रबळ । मेघश्यामता अविकळ । बाणली तत्काळ श्रीरामा ॥ १ ॥ तैसा श्रीरामध्यानें प्रबळ । शिव गोक्षीरधाम[6]धवळ । पंचवक्त्रै जटाविशाळ । दीप्ति प्रबळ त्रिनेत्रा ॥ २ ॥ दशभुजा अति विस्तीर्ण । स्मशानरजउधळण । सर्वांगीं पन्नगभूषण । त्याचेंही लक्षण अवधारीं ॥ ३ ॥ विषयत्यागें जीं साचार । सर्वेंद्रियें निर्विकार । तेचि शिवाअंगीं अलंकार । अति परिकर शोभत ॥ ४ ॥ निवटूनि अहं गजासुर । सोहं चर्म सनखाग्र । काढोनि प्रीतिपुरःसर । बहिर्वस्त्र प्रावरणा ॥ ५ ॥ सिद्धा साधका नागवे पूर्ण । क्षणें नागवती तपोधन । तो निवटोनि क्रोधपंचानन । शांतिचर्म जाण काढिलें ॥ ६ ॥ सबाह्याभ्यंतरीं अढळ शांती । सनख चर्म निश्चितीं । तेंचि प्रावरण पशुपती । अंतरस्थिती अंतरवास ॥ ७ ॥ दशभुजांसीं परिकर । दशायुधें अति विचित्र । नांवें सांगेन सविस्तर । श्रोते सादर परिसोत ॥ ८ ॥ त्रिगुण त्रिपुर अति दारुण । त्यासी निवटितां संपूर्ण । बोधाचा त्रिशूळ जाण । अति तीक्ष्ण तिधारा ॥ ९ ॥ मूळ वेद तोचि डमरु । अनुहताचा नाद गंभीरु । सात्त्विकाचें निज अंतरु । प्रीतिपुरःसरु जागवीत ॥ ११० ॥ समूळ आशा छेदी सत्वर । द्वैतदळणी सतेज धार । असिलता मुष्टीसीं परिकर । सुरासुर कांपती ॥ ११ ॥ स्वानुभवाचें वोडण जाण । सर्वेंद्रियीं सावधान । अन्य भासों नेदी भान । संरक्षण निजबळें ॥ १२ ॥ आच्छादोनि स्वपक्षासी । शोधोनि निरासी द्वैतासी । वोडणखड्गांची कळा ऐसी । विपक्षासी उरों नेदी ॥ १३ ॥ पाषांडी सैरा भरती रान । त्यांसी भक्तिपाशीं आकळून । स्वधर्मा आणोनि पूर्ण । भावफरशें खंडन तर्कांचें ॥ १४ ॥ सायुज्याचा मेढा संपूर्ण । अनुसंधानाचा तीक्ष्ण बाण । निजसामर्थ्येंकरोनि जाण । करीत कंदन अनंगांचें ॥ १५ ॥ [11]प्रमादें अधःपातासीं । जातां कृपेच्या अंकुशासीं । ओढून आणी निजपदासी । छेदी दोषांसी खट्वांगें ॥ १६ ॥ मनोहर दिगंबरशैली । अर्धांगीं शैलबाळी । नंदिकेश्वर दृष्टीतळीं । मेढा वळी आसनस्थ ॥ १७ ॥ चंडीशादि भृंगी बाण । सकळां मुख्य गजवदन । महाविघ्नांचें निवारण । नामस्मरण केलिया ॥ १८ ॥ ऐसें देखतां हनुमंतासी । आल्हाद झाला निजमानसीं । गर्जोनियां जयजयकारासीं । लोटांगणासी घातलें ॥ १९ ॥ शिवें जाणोनि निजव्रत । उठोनि आलिंगिला हनुमंत । होय साचार रामदूत । [12]हृद्गत सर्व कळलें तें ॥ १२० ॥ माझा स्वामी रघुनाथ । तेणें पाठविला दूत । म्हणोनि आलिंगिला हनुमंत । प्रेमा अद्भुत श्रीरामीं ॥ २१ ॥ हनुमान सहज श्रीरामभक्त । शंकरा सबाह्य रघुनाथ । दोघांही प्रेम अद्भुत । दोघेही मूर्च्छित पडियेले ॥ २२ ॥ हनुमान रुद्राचा अवतार । स्वयें तोचि

१ देहत्यागाचे. २ अविद्यामायारहित शुद्ध परमात्मस्वरूपी. ३ चित्स्वरूप. ४ वेगळेपण. ५ अत्यंत मोठा. ६ गाईच्या दुधाच्या प्रमाणें शुभ्र. ७ शंकर. ८ तरवार.

९ ढाल. १० कामाचें, मदनाचें. ११ चुकीनें, तमोगुणानें. १२ मनांतील भाव.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

श्रीशंकर । उभयध्येय श्रीरामचंद्र । रूपें साचार अद्वय ॥ २३ ॥ आपआपणां खेंवं पडिलें । आपुलेनि सुखें सुखावले । आपआपणां विसरले । बुडोनि गेले निजरूपीं ॥ २४ ॥ गूळ भेटे गोडीसीं । दीप आलिंगी प्रभेसीं । कनकाअंगीं कांती जैसी । भेटी तैसी दोघांसी ॥ २५ ॥ येरयेरां विसरले । गण-समुदाय तटस्थ ठेले । कोणी कोणासी न बोले । अवघे राहिले चित्ररूप ॥ २६ ॥ देखोनियां निज-चिन्ह । गिळून समाधि उत्थान । शंकर नित्य-सावधान । प्रभावेंकरून रामाच्या ॥ २७ ॥ तेणें चेतविली चेतना । सावध केलें वायुनंदना । करोनियां पूजाविधाना । विवंचना होय पूसता ॥ २८ ॥ कोठोनि येणें जालें स्वामी । कवण देश कवण भूमी । कवण तुमचा निजस्वामी । कवणे हेतू तुम्हीं बीजें[3] केलें ॥ २९ ॥ तनु दिसताहे वानर । मुखीं रामनामोच्चार । तुम्ही वनचर तो परात्पर । कैंवी उच्चार नामाचा ॥ १३० ॥ ऐकतां श्रीशंकरवचन । हनुमान घाली लोटांगण । माथां वंदोनि आज्ञापन । यथामति जाण सांगत ॥ ३१ ॥ जो सृष्टीपूर्वी सनातन । सृष्टिरूपें जो आपण । सृष्टीच्या अवसानीं अनवच्छिन्न । उरे परिपूर्ण अद्वय ॥ ३२ ॥ जो नामरूपातीत । पूर्णब्रह्म सदोदित । तोचि झाला मूर्तिमंत । निजभक्त-कैवारा ॥ ३३ ॥ पौलस्तीचा रावण । लंकापति दारुण । राक्षसी तनु उन्मत्त पूर्ण । बंदीं सुरगण घातले ॥ ३४ ॥ विरोध केला सकळांसीं । उच्छेदिलें गोब्राह्मणांसी । पीडों आदरिलें अवनीसी । शरण रामासी ते आली ॥ ३५ ॥ जो सच्चिदानंदघन । जो अरूप अपार निर्गुण । ज्यातें ध्याती योगीजन । त्याचें अभिधान श्रीराम ॥ ३६ ॥ जो सच्चिदानंदघन दुर्गम । ज्यासीं निजरूपीं आराम । ज्ञानरूप ज्ञान-गम्य । त्यातें श्रीराम बोलती ॥ ३७ ॥ तो भक्त-कामकल्पद्रुम । नियत करोनि वैकुंठधाम । नांदतसे आत्माराम । अविश्रम रमेसहित ॥ ३८ ॥ मिळोनियां सुरगण । त्यासी आले अनन्य शरण । सकळां अपराधी रावण । त्याचें निर्दळण करावया ॥ ३९ ॥ अत्यंत भाकितां करुणा । कृपा उपजली रघुनंदना । आश्वासिलें सुरगणां । वध रावणा मी करीन ॥ १४० ॥ तुम्हीं सकळ सुरवर । रूपें व्हावें वानर । मूळमाया कलहसूत्र । जानकी सत्वर होईल ॥ ४१ ॥ मी स्वयें सूर्यवंशाप्रती । नामें श्रीराम दाशरथी । अवतरेन शीघ्रगतीं । निमेषगती न लागतां ॥ ४२ ॥ रावण करील सीताहरण । तोचि अपराध ठेवोनि जाण । क्षणें निवटीन रावण । ऐकतां वचन सर्व सुखमय ॥ ४३ ॥ जो व्यक्ताव्यक्तातीत । पूर्णब्रह्म सदोदित । तो अवतरला रघुनाथ । सूर्यवंशांत दाशरथी ॥ ४४ ॥ पितृआज्ञे-करोनि जाण । दंडकारण्या वनप्रयाण । तेथें त्रिशिरा खर दूषण । विंधोनि बाण निवटिले ॥ ४५ ॥ मुक्त करोनि जनस्थान । श्रीरामें द्विजां दिधलें दान । तेणें तळमळला रावण । करोनि छळण सीता नेली ॥ ४६ ॥ श्रीरामाचे दृष्टी पडता । तरी क्षणें निवटिता लंकानाथा । संन्यासिरूपें परोक्षता । चोरोनि सीता पैं नेली ॥ ४७ ॥ श्रीरामापासीं दुर्धर बाण । परंतु एकला न मारीच रावण । करावें सकळनिर्दळण । म्हणोनि प्राण राखिले ॥ ४८ ॥ दर्भशिखेमेणें देखा । काक हिंडविला तिहीं लोकां । तेथें मारितां दशमुखा । रघुकुळटिळका काय नवल ॥ ४९ ॥ मारिलिया लंकानाथ । सकळ खंडेल वनवासव्रत । म्हणोनि राखिला हात । बहुत कार्यार्थ वनवासीं ॥ १५० ॥ सीताशुद्धीचेनि मिषें जाण । सकळ उद्धरावें दंड-कारण्य । म्हणोनि चालिला रघुनंदन । जगदुद्धरण करावया ॥ ५१ ॥ जटायु उद्धरिला पक्षी । वनस्पति अनेकी । गुल्मलता सकळिकी । तृणपाषाण शेखीं उद्धरिले ॥ ५२ ॥ शरभंग आणि शबरी पहाहो । रामें उद्धरिला ऋषिसमुदावो । ब्रह्मराक्षसांचा क्रूर भावो । तेही रामरावो उद्धरी ॥ ५३ ॥ सीतेचेनि स्पर्शें विराध । त्याचा श्रीरामें केला वध । ताटिका सकळमार्गरोध । करोनी वध उद्ध-रिली ॥ ५४ ॥ पायीं उद्धरिली शिळा । गुरूचा याग सिद्धी नेला । हनुमान सांगतां भुलला । जांश्वनीळा देखूनी ॥ ५५ ॥ जो राम तोचि शंकर । तेणें हनुमंता प्रेमा थोर । सांगतां विसरला चरित्र । पूर्वापर नाठवेचि ॥ ५६ ॥ स्वस्थ करोनियां चित्ता । सिंहावलोकनें[11] रामकथा । सांगतां उल्लास हनु-

१ आलिंगन. २ एकमेकांस. ३ आगमन. ४ दिग्देश-कालादि मर्यादारहित. ५ पृथ्वीला. ६ नांव. ७ साकार आणि निराकाराहून भिन्न. ८ मागाहून. ९ शेवटीं. १० संकराला. ११ थोडक्यांत.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

मंता। होय सांगता मागुतेनि ॥ ५७॥ तुझें चाप त्रिपुरारी । भार्गवें ठेविलें जनकमंदिरीं । जानकीच्या स्वयंवरीं। पण निर्धारीं हाचि राया ॥५८॥ भार्गवआज्ञेकरोनि पहाहो । स्वयंवर मांडी जनकरावो । मूळें पाठविलीं पहा वो । दिग्मंडळींचे रावभूपाळां ॥ ५९ ॥ स्वयंवर मांडिलें कोडें । पणास चाप आणविलें पुढें । ज्याचेनि हातें यासी गुण चढे । जानकी रोकडें वरील त्यासी ॥ १६० ॥ विश्वामित्राची प्रीति थोरी । जनक त्यासी मूळ करी । तोही पातला झडकरी । समयावसरीं ठाकोनी ॥ ६१ ॥ परिवारला ऋषिगणीं । शिष्यवर्गाची मांडणी । त्यामाजी बंधु हे दोन्ही । राम आणि सौमित्र ॥ ६२ ॥ तेथें पातला रावण । गर्वनिधी अति दारुण । पुसोनि धनुष्याचा पण । स्वयें आपण सज्जूं पाहे ॥६३॥ आणविली नोवरी। गजस्कंधीं सालंकारीं । देखतां विस्मयें[३]सुखकरी । रावण धरी अभिलाष ॥६४॥ खेचर भूचर विखार। जानकीवरणीं तत्पर । रावण दुरात्मा दुराचार। विषयबुद्धीं पामर अभिलाषी ॥ ६५ ॥ जानकीभांगींचा वहिला । शेंदुरचर्चित तीक्ष्ण भाला । रावणहृदयीं खोंचला । तेणें तो झाला विव्हळ ॥ ६६ ॥ विश्वार्चित विश्वमाता । विषयबुद्धीं अभिलाषितां । दुर्दशा आली लंकानाथा । भ्रम तत्त्वतां चढिन्नला ॥ ६७ ॥ भ्रमाचे मदें जाण । चापीं चढवूं जाय गुण । तेणें क्षोभला त्रिनयन। विपरीत चिन्ह पैं झालें ॥ ६८ ॥ माथा राहिला तळवटीं । तळ धरिला वरिले सुष्टीं । कोपें क्षोभला धूर्जटी । गर्वें दृष्टी अंध झाली ॥ ६९ ॥ अभिलाषितां विश्वमाता । विमुख झाली इंद्रियदेवता । धनुष्य बळें फिरवूं जातां । पडिलें तत्त्वतां उरावरी ॥ १७० ॥ चंद्री लागली नेत्रीं विसी । खरसी आली दशमुखांसी। प्राण रोधिला कंठदेशीं। दुःख कोणासी न सांगवे ॥ ७१ ॥ कृपालु जनक चक्रवर्ती । तेणें काढविलें शीघ्रगतीं । उठवोनि लंकापती । उदक सिंपिती मुखावरी ॥ ७२ ॥ दुर्दशा देखोनि लंकापती । राजे माथा तळीं करिती । अभिलाषितां सीता सती। घात निश्चितीं दिसतसे ॥ ७३ ॥ रायांकडे पाहे नृपती । तंव ते माथा नुंधविती । तेणें उद्वेगला भूपती । वीर निश्चितीं दिसेना ॥ ७४॥ निर्वीर हें उर्वीतळ । ऐसें बोलतां भूपाळ । आवेशला घननीळ । स्फुरण प्रबळ चालिलें ॥ ७५ ॥ बाहु थरकती आवेशीं । रोम उभारिले वेगेंसीं । आज्ञा पुसोनि गुरूसी । होय धनुष्यासी उचलिता ॥ ७६ ॥ आधींच शिवहस्तें पुनीत । वरी धरिता झाला रघुनाथ । तेणें होवोनि कृतार्थ । जीवन्मुक्त पैं झालें ॥ ७७ ॥ हातीं धरोनि रघुनंदन । धनुष्या चढवितां गुण । स्वयें मोडलें कडकडोन । नादें त्रिभुवन गर्जिन्नलें ॥ ७८ ॥ संतोष झाला सकळां । कुढाविलें भूपाळा । जनक स्वयें संतोषला । जनकबाळा आनंदली ॥ ७९ ॥ गज पेलोनि पुढारां । माळ घातली रघुवीरा । आनंद झाला सुरवरां । सुमनसंभारा वर्षती ॥ १८० ॥ जनकनंदिनी साधोन । विजयी झाला रघुनंदन । तें देखतांचि रावण । हृदयीं बाण खोंचला ॥८१॥ झाला अत्यंत लज्जायमान । नुघडीच काळें वदन। अधोवदनें केलें गमन । हृदयीं बाण खोंचले ॥ ८२ ॥ तें देखोनि संतापला । रावणा संनिपात झाला । कामाभिलाषें भुलला । बरळों लागला सीते सीते ॥ ८३ ॥ तिये देखोनि अहर्निशीं । आधि लागली रावणासी । आले ऐकोनि पंचवटीसी । करी कपटासी साक्षेपें ॥ ८४ ॥ निजमातुळा मारीचासी । मृगवेष देवोनि त्यासी। सीता त्वचा मागे कंचुकीसी । श्रीराम त्यासी मारूं गेला ॥ ८५ ॥ सौमित्र गेला श्रीरामापासीं । सीता एकली गुंफेसीं । रावण येवोनि संन्यासवेषीं । बळें जानकीसी घेवोनि गेला ॥ ८६ ॥ जानकीहरणादि वृत्तान्त। सांगीतला कबंधवधपर्यंत। पुढें वाळीचा केला निःपात । तोही वृत्तान्त अवधारीं ॥ ८७ ॥ वाळी सुग्रीव बंधु वानर । राज्यलोभें दोघां वैर। सुग्रीवाची हरोनि दार। राज्यभ्रष्ट पैं केला ॥८८॥ स्त्रीराज्याचेनि दुःखें देखा । शरण आला रघुकुळटिळका । पावला देखोनि अति दुःखा । कृपापीयूखा शिंपिलें ॥ ८९ ॥ विलिंग मरण वाळीचें । विषम ताल कूर्मपृष्ठींचे । छेदिलिया मरण त्याचें । ऐसें वरदाचें महिमान ॥ १९० ॥ तितुके छेदोनि राघवें । वाळी निवटिला बाण-

१ परशुरामानें. २ आमंत्रणें. ३ आश्चर्य व आनंद उत्पन्न करणारी. ४ फेंस. ५ वर केला नाहीं. ६ रक्षिलें.

७ पुढें नेऊन. ८ चिंता. ९ स्त्री. १० कृपारूपी अमृतानें. ११ विलक्षण.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

लाघवें। सुग्रीव स्वदारेंशीं राज्य पावे। कृपा-वैभवें रामाच्या ॥ ९१ ॥ तेणें झाला कृतोपकार। ससैन्य सुग्रीव वीर। झालों श्रीरामाचे किंकर। हनुमान वीर नाम माझें ॥ ९२ ॥ तेथोनि सीता-शुद्धिविचार। युवराजा वालिकुमर। पाठविला अंगद वीर। सवें वानर देवोनी ॥ ९३ ॥ वेगीं शुद्धि आणिली तिंहीं। मग चालिले लवलाहीं। समुद्रतीरा येवोनि पाहीं। उपाव कांहीं योजिला ॥ ९४ ॥ काढोनियां अग्निबाण। सागर शोषावा संपूर्ण। चरणचालीं वानरगण। समुद्रलंघन करावया ॥ ९५ ॥ म्हणोनि क्षोभला श्रीरघुवीर। तंव शरण आला सागर। सेतुबंधनप्रकार। सविस्तर सांगितला ॥ ९६ ॥ शिळीं बांधला सेत। ऐकतां सुखावे रघुनाथ। वानरीं आणोनि पर्वत। निमेषें सेतु बांधिला ॥ ९७ ॥ पुढें करोनियां फळाहार। उतरावया परपार। शिवपूजेलागीं सादर। श्रीरघुवीर पैं झाला ॥ ९८ ॥ शोधितां उभय तीरांतें। स्थावर लिंग न दिसे तेथें। अवघीं झालीं सचिंतें। राम फळाहारातें नेघे ॥ ९९ ॥ शिवदर्शनालागीं जाण। श्रीराम करूं पाहे गमन। तेणें गजबजिले वानरगण। वचनें प्राण जाऊं पाहे ॥ २०० ॥ सुग्रीवादि सकळ वानरगण। शरणागत बिभीषण। घालोनियां लोटांगण। रघुनंदन प्रार्थिला ॥ १ ॥ कोणेपरी लिंगप्राप्ती। होय ते सांगावी स्थिती। उपाय योजूं तदर्थी। कृपामूर्ती श्रीरामा ॥ २ ॥ तेणें कळवळोनि मानसीं। सांगीतलें उपायासी। जावोनियां वाराणसीसी। विश्वेश्वरासी भेटावें ॥ ३ ॥ होवोनियां वानरवेषी। भाग्य उद्भट आम्हांसी। श्रीरामसेवा आली फळासी। शिवचरणासी पावलों ॥ ४ ॥ फळाहारालागीं रघुनाथ। बैसला असे तिष्ठत। विचारोनियां कार्यार्थ। आज्ञा त्वरित मज द्यावी ॥ ५ ॥ म्हणोनि घाली लोटांगणा। शीघ्र करावी सूचना। विलंब करितां नये जाणा। रघुनंदन जाणा तिष्ठत ॥ ६ ॥ ऐकोनि तें वचन। संतोषला त्रिनयन। आलिंगोनि वायुनंदन। प्रीतीकरोन पूजिला ॥ ७ ॥ नित्य करीत ज्याचें स्मरण। आला देखोनि त्याचा गण। आनंद उथळला पूर्ण। उचलोन नाचत ॥ ८ ॥ विसरोनि देहभावासी। नाचतां देखोनि शंकरासी। हर्षे दाटला गणांसी। ते प्रीतीसीं नाचती ॥ ९ ॥ प्रेम उथळलें उमेसी। तेही नाचों लागली कैसी। विसरोनि देहभावासी। उल्लासेंसीं नाचत ॥ २१० ॥ गणांसी नाठवे गणपण। उमा विसरली उमापण। शिव भुलला शिवपण। रघुनंदननिजनामें ॥ ११ ॥ अगाध स्थिती सदाशिवाची। अगाध प्रीति पार्वतीची। अगाध भक्ति हनुमंताची। कीर्ति रामाची वानितां ॥ १२ ॥ एका शरण जनार्दनासी। तिघे विसरले तीनपणासी। अद्वैतबोधें झालीं पिसीं। एकत्वेंसीं डुलत ॥ २१३ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां हनुमंतशंकरदर्शनं नाम चतुःसप्ततितमोऽध्यायः ॥ ७४ ॥ ॥ ओंव्या ॥ २१३ ॥ श्लोक ॥ १ ॥

अध्याय पंचाहत्तरावा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ मुक्त करोनि जनस्थान। ब्राह्मणां दिधलें दान। सुग्रीवासी किष्किंधाभुवन। सेतुबंधन सागरीं ॥ १ ॥ अगाधबोध रघुनाथा। हें हनुमंतवचन ऐकतां। संतोष झाला उमाकांता। होय सांगता पूर्ववृत्त ॥ २ ॥ ब्रह्मपुत्र श्रीनारद। सर्वेंद्रियब्रह्मबोध। ब्रह्मवीणासुस्वरनाद। नित्य आनंद ब्रह्मपदीं ॥ ३ ॥ ब्रह्मानंदें डुलत। ब्रह्मसृष्टीं विचरत। भुवनें भुवन हिंडत। अधिकारियां देत परब्रह्म ॥ ४ ॥ उन्मत्तांसी करोनि दंड। स्वेच्छा विचरत ब्रह्मांड। देखोनि विंध्याद्रि प्रचंड। आला नारद भेटीसी ॥ ५ ॥ येरू उठोनि अति प्रीतीं। लोटांगण घातलें क्षितीं। पूजा करोनि नम्रवृत्तीं। स्वयें विनंती करीतसे ॥ ६ ॥ कोठोनि येणें झालें स्वामी। काय अपूर्व कोण भूमीं। कोणाच्या ठायीं कोण लक्ष्मी। बाहुल्यें तुम्हीं देखिली ॥ ७ ॥ कोण कोण पर्वत। कोण ऐश्वर्यें वर्तत। सांगावें मज इत्थंभूत। कृपान्वित स्वामिया ॥ ८ ॥ तुम्हांसी सर्वत्र गमन। म्हणोनि केलें विज्ञापन। तुम्हांसी त्रैलोक्यीं वर्तन। कृपा करोन सांगावें ॥ ९ ॥ ऐकतां विंध्याद्रीची वाणी। हांसिन्नला नारदमुनी। यासी गर्व बहुसाल मनीं। समर्थपणीं वर्तत ॥ १० ॥ रत्नें प्रवाळनिकर। नाना धातु विचित्र। जळस्रोत परिकर। औषधि

---

१ शोध. २ श्रेष्ठ. ३ ब्रह्मज्ञानबोधानें. ४ सर्व इंद्रियांना ब्रह्मज्ञानबोध झाला आहे असा. ५ सुंदर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

विचित्र पर्वतीं ॥ ११ ॥ चंपक चंदन मांदार । कल्पतरूंचें आगर । चिंतामणि सविस्तर । पर्वतीं अपार पसरले ॥ १२ ॥ खिल्लारें कामधेनूंचीं । पर्वतीं हिंडती सैराची । तेणें दृष्टि फिरली बुद्धीची । वाढला उंची अति गर्वें ॥ १३ ॥ जेथें धनधान्य-समृद्धी । तेथें विषयीं घोर बुद्धी । विषाहूनि विष-यबुद्धी । अधिक त्रिशुद्धी घातक ॥ १४ ॥ विष खादलिया एकदां मरे । विषयें कोट्यनुकोटी फेरे । भोगिताती योनिद्वारें । परी माघारें न सरती ॥ १५ ॥ ऐसी विषयमद्यजाती । ते चढ-लीसे पर्वतीं । याची झडे गर्वस्थिती । तैसी युक्ती करावी ॥ १६ ॥ ऐसें नेमूनि मानसीं । स्तवूं आदरिलें मेरूसी । समृद्धि सांगों तुझिया ऐसी । अधिक त्यासी कोटिगुणें ॥ १७ ॥ सतऋषि त्यासी जाण । नित्य करिती प्रदक्षिण । वैकुंठकैलासाहूनि गहन । संपत्ति जाण मेरूची ॥ १८ ॥ याचकांचे इच्छेवरी । मेरूच्या दातृत्वाची थोरी । पार नाहीं त्याचे गंभीरी । सुरासुरीं वानिजे ॥ १९ ॥ ब्रह्मा विष्णु उमाकांत । त्याची आज्ञा शिरीं वाहत । इंद्र त्याचा शरणागत । समृद्धि मागत तयापासीं ॥ २० ॥ या ब्रह्मांडामाझारीं । मेरुपर्वतासम सरी । सभाग्य नाहीं चराचरीं । अगाध थोरी मेरूची ॥ २१ ॥ ऐसें सांगूनि नारदमुनी । स्वयें निघाला तत्क्षणीं । ब्रह्मवीणा झणत्कारूनी । स्वेच्छागमनीं चमकला ॥ २२ ॥ ऐकतां नारदाची मात । विंध्याद्रि झाला चिंताक्रांत । चढला अभिमान पोटांत । वाढला अद्भुत आकाशीं ॥ २३ ॥ गति खुंटली रविशशी । ग्रहगणें झालीं पिशीं । नक्षत्रांची गति कायसी । कासाविसी सुरसिद्धां ॥ २४ ॥ खुंटलें सकळ दिनमान । गडद पडलें दारुण । खुंटलें याजन[२] यजन । सत्कर्म जाण खुंटलें ॥ २५ ॥ क्षुधा पीडिले सुरवर । याग खुंटले समग्र । कासावीस ऋषीश्वर । कर्ममात्र स्फुरेना ॥ २६ ॥ खुंटली दिनमानाची गती । उदय अस्त न कळे सर्वार्थीं । सकळ लोक तळ-मळती । कांहीं युक्ती स्फुरेना ॥ २७ ॥ पडिला घोर अंधकार । खुंटला सकळ व्यवहार । ब्रह्मा हरि हर इंद्र चंद्र । चिंतातुर पैं झाले ॥ २८ ॥ मिळोनी सकळ समुदायेंसीं । ठाकोनि आले काशीपुरासी । लोटांगणीं अति प्रीतीसीं । चंद्र-चूडांसी[३] भेटले ॥ २९ ॥ करोनियां विचित्र स्तवन । सांगते झाले विवंचन । गिरी वाढोन असाधारण । केलें रोधन सकळांसी ॥ ३० ॥ खुंटली सकळांची गती । उदय अस्त न दिसती । सर्वथा न कळे दिनराती । कर्म सर्वार्थीं राहिलें ॥ ३१ ॥ राहिली यागादि क्रिया । लंघन पडिलें सुरवर्या[४] । वेगीं करोनि कुढाविया । स्वामिया प्राण संरक्षीं ॥ ३२ ॥ ऐसी करितां विनवण । मजही चिंता दारुण । वर्तली पैं असाधारण । युक्ति हो जाण खुंटली ॥ ३३ ॥ तंव नारद पातला तेथ । तेणें सांगितलें सकळ वृत्त । ऐकोनि मेरूचें आचरित । गर्वें पर्वत वाढला ॥ ३४ ॥ त्या गर्वपरिहारासी । प्रार्थोनियां अगस्तीसी । पाठवितां दक्षिणेसी । तो पर्वतासी दंडील ॥ ३५ ॥ मार्ग मागोनियां पर्वता । त्यासी घालील पालथा । तेणें निर्मुक्ति समस्तां । शशि-भास्वतां सुखें गमन ॥ ३६ ॥ गर्वहरण पर्वतासी । निर्मुक्ति सकळ कर्मांसी । संपादन यागादिकांसी । तृप्ति सकळांसी होईल ॥ ३७ ॥ ऐसें नारदें सांगतां । सकळांचिया मानलें चित्ता । बुद्धी योजिली तत्त्वतां । आनंद चित्ता पैं झाला ॥ ३८ ॥ एका कार्यें दोनी अर्थ । संपादती इत्थंभूत । दंड-कारण्य समस्त । अगस्ती निश्चित वसवील ॥ ३९ ॥ ऐसा करोनि निर्धार । विनविला तो मुनिवर । स्तुति करोनि विचित्र । प्रसन्नवक्त्र पैं केला ॥ ४० ॥ प्रसन्न करोनियां ऋषी । विनविते झाले प्रीतीसीं । तुम्हीं जावें दक्षिणेसी । दंडका-रण्यासी वसवावया ॥ ४१ ॥ दंडकाच्या शापें दारुण । उद्वस झालें तें वन । राक्षस येवोनि आपण । केलें रोधन वनाचें ॥ ४२ ॥ राक्षसांच्या भयें पूर्ण । राहिलें दक्षिणतीर्थाटन । तुम्हीं तेथें केल्या गमन । सुखें तें वन वसेल ॥ ४३ ॥ जेथें राहिले साधुसंत । तें स्थळ अति पुनीत । भूत प्रेत पिशाच तेथ । राक्षस समस्त पळतील ॥ ४४ ॥ दंडावया[५] राक्षसांसी । परब्रह्मअनुग्रह तुम्हांसी । देखतांचि तयांसी । प्राणान्त त्यांसी सहजचि ॥ ४५ ॥ जेथें ब्रह्मनिष्ठ राहती । तेथें सजीव निर्जीव पंक्ती । त्यांसी अनायासें नित्य मुक्ती । सत्संगतीपासाव ॥ ४६ ॥ राक्षसांची

१ तुळलेला. २ यज्ञ करविणें. ३ शंकराला. ४ इंद्राला. ५ रक्षणाला. ६ सुटका. ७ चंद्रसूर्यांना. ८ संपूर्ण. ९ ओसाड.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

क्रूरता । आणि भूतांची विषमता । दृष्टी पडतां साधुसंतां । नित्यमुक्तता जडजीवां ॥ ४७ ॥ ऐसें साधूंचें सामर्थ्य । ते स्वयें तुम्ही वसतां तेथ । दंडकारण्य अत्यद्भुत । नित्यमुक्त होईल ॥ ४८ ॥ राक्षस उद्धरती समस्त । पांथिकां मार्ग निर्मुक्त । तीर्थवासी तीर्थ पावत । उद्धार समस्त जडजीवां ॥ ४९ ॥ ऐसें सांगतां तयासी । मूर्च्छा आली अगस्तीसी । भूमीं आदळला वेगेंसीं । अति दुःखासी पावला ॥ ५० ॥ निर्दैव निजलिया पाहें । स्वप्नीं सांपडे धनलोहे[1] । जागा होतां हातींचें जाये । तैसें पाहें मज झालें ॥ ५१ ॥ कोणें भाग्यें अनायासीं । मज प्राप्त झाली काशी । सर्वेचि ओढवल्या पापराशी । दुःख कोणासी मी सांगों ॥ ५२ ॥ न लागतां तपसायास । योग याग व्रत उपवास । करितां वाराणसीवास । मोक्षसुखास पाविजे ॥ ५३ ॥ पात न करितां पडणीं । करवत न भेदितां मूर्ध्नी[2] । वास करितां महाश्मशानीं । सुख-समाधानीं महामोक्ष ॥ ५४ ॥ अंध पंगु मुकें पाहीं । ज्यांसी साधनाचा गंध नाहीं । काशीवास करितां तिंहीं । सुखें पाहीं निजमोक्ष ॥ ५५ ॥ ऐसें वाराण-सीचें महिमान । म्हणोनि विश्वास धरोन । राहिलों होतों वास करून । तंव महाविघ्न ओढवलें ॥ ५६ ॥ मज सांडितां काशीभुवन । तेचि काळीं देहपतन । विश्वेश्वरदर्शनावांचून । न वांचती प्राण सर्वथा ॥ ५७ ॥ नित्य मणिकर्णिकेचें स्नान । विश्वेश्वराचें दर्शन । सांडूनि माझें न निघे मन । क्षणें प्राण जातील ॥ ५८ ॥ म्हणोनि चालिलें स्फुंदन । कंठीं बाष्प[3] दाटलें पूर्ण । नेत्रीं चालिलें जीवन । तेणें दृश्यभान लोपलें ॥ ५९ ॥ वाचा झाली सद्गदित । प्राण पांगुळला जेथींचा तेथ । टकमकीत समस्त । जेथींच्या तेथ पैं झालें ॥ ६० ॥ कैंचा ओढवला रावण । कैंचें रोधिलें अरण्य । काशीत्यागाचें वचन । तें दारुण विघ्न मजकडे ॥ ६१ ॥ काशीत्यागाची वार्ता । ऐकतां अग-स्तीच्या चित्ता । जाहली परमावस्था । प्राण तत्त्वतां जाऊं पाहे ॥ ६२ ॥ ते काळीं सुरवर । झाले सकळ चिंतातुर । अँलुमाळ न स्फुरे विचार । कार्य समग्र राहिलें ॥ ६३ ॥ विंध्याद्रि नावरे कांहीं । रविचंद्रां गति नाहीं । दंडकार-ण्याचे ठायीं । गमन तेंही पैं न्व्हे ॥ ६४ ॥ न सांडवे क्षेत्र काशी । वियोग न साहवे विश्वेशाशीं । त्यागोनि जातां मणिकर्णिकेसी । दुःख अगस्तीसी अनिवार ॥ ६५ ॥ त्या काळीं स्यां आपण । उभय संकट जाणोन । अगस्तीसी विनवण । प्रीतीकरोन पैं केली ॥ ६६ ॥ ऐक अगस्ती मुनिनाथा । चिंता न करावी सर्वथा । तुझ्या वियोगाची व्यथा । सकळ तत्त्वतां निरसेल ॥ ६७ ॥ विंध्याद्रि वाढला बहुवस । निरोधिलें उदयास्तास । सत्कर्म तेणें पडिलें ओस । याग अशेष राहिले ॥ ६८ ॥ तेणें पीडिले सुरगण । क्षुधेनें जाऊं पाहे प्राण । कांहीं न चले विंदाण[4] । म्हणोनि विनवण करूं आले ॥ ६९ ॥ निग्रहावया विंध्याद्रीसी । वसवावया दंड-कारण्यासी । सामर्थ्य नाहीं आणिकांसी । शरण तुम्हांसी ते आले ॥ ७० ॥ तरी शरणागतां शरण्य । साचार तुम्ही साधु सज्जन । सेवितां तुमचे श्रीचरण । भवबंधन लागेना ॥ ७१ ॥ तेथें इतर संकट बापुडें । कैंवी राहे सत्संगापुढें । तुमचे कृपादृष्टीपुढें । भवसांकडें[6] राहेना ॥ ७२ ॥ इतरीं दंडावें पर्वतासी । तरी स्वधर्मनिष्ठ अहर्निशीं । सत्ता न चले स्वधर्म-निष्ठासीं । युक्तीनें[5] त्यासी आवरावें ॥ ७३ ॥ धर्मि-ष्ठाचा निश्चयो जाणा । विश्वासावें साधुसज्जनां । सर्वस्व अर्पितां सज्जनां । निजमनाचा उल्लास ॥ ७४ ॥ याकारणें स्वामी आपण । सत्वर करो-नियां गमन । पर्वताचें आकर्षण । युक्ति करोन साधावें ॥ ७५ ॥ मार्ग मागोनि तयासीं । गमन करावें दक्षिणेसी । जातां आज्ञा करावी ऐसी । पुनरागमनेंसीं ऊठिजे ॥ ७६ ॥ दक्षिणे करोनि गमन । वसवावें दंडकारण्य । रुद्रगयादि तीर्थ-दर्शन । दिनांसी आपण करावें ॥ ७७ ॥ वाराण-सीच्या वियोगासी । सर्वथा न धरावें मानसीं । ब्रह्मरूप आचरतां कर्मासी । मुक्ति तुम्हांसी अँोळं-गती[7] ॥ ७८ ॥ कोण तें म्हणसी ब्रह्म । ब्रह्मरूप तें कैसें कर्म । मुक्तीचें तें कैसें वर्म । ऐक सुगम सांगेन ॥ ७९ ॥

शांतं ब्रह्मवपुर्भूत्वा कर्म ब्रह्ममयं कुरु ।
ब्रह्मार्पणसमाचारो ब्रह्मीभवसि तत्क्षणात् ॥ १ ॥

१ द्रव्याचा हांडा. २ मस्तकाचे ठिकाणीं. ३ गहिंवर. ४ किंचितही. ५ युक्ति. ६ जन्ममरणाचें संकट. ७ प्राप्त होतील.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

काम क्रोध सलोभता । जेथें निःशेष नातळे चित्ता । त्या नांव ब्रह्मशांतता । जाण सर्वेथा ऋषिवरा ॥ ८० ॥ कामक्रोधलोभरहित । सर्वकाळीं सर्वगत । अंतर्बाह्य सदोदित । असे व्याप्त आ[1]नखाग्र ॥ ८१ ॥ भेदोनि सप्तपाताळांसी । वैकुंठादिक कैलासासी । रिता अवकाश नाहीं ज्यासी । शांतब्रह्म त्यासी पैं म्हणती ॥ ८२ ॥ तयें व्यापकीं होवोनि निमग्न । आचरतां सकळ कर्माचरण । सर्वथा न बाधी मानाभिमान । कर्मबंधन तेथें कैंचें ॥ ८३ ॥ मुख्य बद्धतेचें आयतन[2] । अहंता आणि ममता जाण । असावें जरी परिच्छिन्न[3] । तरी बाधा पूर्ण तयांची ॥ ८४ ॥ जेथें परिच्छिन्नासी नाहीं ठावो । तेथें अहंममता समूळ वावो । बद्धतेचा अभावो । विरमे पहा हो मुक्तिही ॥ ८५ ॥ जेथें बद्धता समूळ नाहीं । तेथें मुक्तता कैंची कायी । ब्रह्मरूप कर्माच्या ठायीं । ऐसा लाभ पाहीं साधका ॥ ८६ ॥ जेंवी सागराच्या लहरी । अद्वैतें क्रीडती सागरीं । स्फुरण नाहीं तिळभरी । ब्रह्मामाझारीं कर्म तैसें ॥ ८७ ॥ जेंवी रत्नांचें रत्न[4]कीळ । रत्नापुढें अति चपळ । अद्वैतशोभा अति प्रबळ । ब्रह्मीं केवळ कर्म तैसें ॥ ८८ ॥ येणें अनुसंधानें तत्त्वतां । सकळ कर्मीं वर्ततां । स्फुरण नाहीं सर्वथा । ब्रह्मरूपता सहजचि ॥ ८९ ॥ देहांतीं काशीचे ठायीं । जें मी उपदेशीं लवलाहीं । तये निष्ठेचे ठायीं । अनायासें पाहीं निजप्राप्ति ॥ ९० ॥ काशीक्षेत्र एकदेशी । ब्रह्म सर्वगत सर्वदेशी । तूं स्वयें तद्रूपचि आहेसी । संदेह मानसीं न धरावा ॥ ९१ ॥ ऐसें ऐकतां माझें वचन । न मानी अगस्तीचें मन । अति युक्तीं केला तेणें प्रश्न । ऐक सावधान सांगेन ॥ ९२ ॥ ऐकें स्वामी विश्वनाथा । जे सांगितली ब्रह्मसंस्था । तेणें अनुसंधानें असतां । मुक्ति अंकिता[5] पैं होती ॥ ९३ ॥ हें मी जाणतों य[6]थार्थता । येथें संदेह नाहीं सर्वथा । परंतु ऐसिये स्थितीचा वक्ता । अधिक तत्त्वतां त्याहूनि तो ॥ ९४ ॥ ज्याचेनि वचनें ब्रह्मस्थिती । काय सांगों त्याची महती । वेदां न वर्णवे निश्चितीं । वेडावती शास्त्रार्थ ॥ ९५ ॥ ऐकतां त्याच्या वियोगासी । स्वहितीं कळवळा ज्यासी । प्राणान्त हों पाहे त्यासी । ते वृत्तीसी ठाव कैंचा ॥ ९६ ॥ चहूं वाचांसी[7] उपरम[8] । मनासी कल्पितां दुर्गम । तये वस्तूची सुगम । मूस परम ओतली ॥ ९७ ॥ जे असे सर्वदा अगोचर । ते असतां इंद्रियगोचर । सांडूनि जाय तो पामर । संसारपार कैंवी पावे ॥ ९८ ॥ म्हणोनियां स्वामिनाथा । तुझा वियोग तत्त्वतां । मज न साहवे सर्वथा । बहुत आतां काय सांगूं ॥ ९९ ॥ याउपरी विनवितां । क्षोभ स्वामीचिया चित्ता । येईल पैं याकरितां । युक्ति सर्वथा योजेना ॥ १०० ॥ जैसें मानेल स्वामीसी । तैसी आज्ञा करीं आम्हांसी । म्हणोनि लागला चरणांसी । उकसाबुकसीं स्फुंदत ॥ १ ॥ संकट पडिलें सर्वांसी । अगस्ति न सांडी वाराणसी । कोण निग्रही[9] विंध्याद्रीसी । उदयअस्तांसी गति कैंची ॥ २ ॥ ते काळीं मी आपण । बहुतां युक्ती करून । अगस्तीसी समाधान । दिधलें जाण अति प्रीतीं ॥ ३ ॥ तुज शिवदर्शनाची आवडी । तद्विषयीं धडफुडी । युक्ति सांगेन चोखडी । ऐक निर्वेडी[10] बुद्धि त्याची ॥ ४ ॥ श्रीरामदर्शनीं अवस्था[11] । अत्यंत आहे माझ्या चित्ता । उभयकार्यसंस्था । साधे तत्त्वतां जाण पैं ॥ ५ ॥ ऐसी सांगेन मी युक्ती । उभयार्थ संपादती । सुरवरांची उगवे गुंती[12] । अवस्थानिवृत्ती सत्यत्वें ॥ ६ ॥ पूर्ण ब्रह्म सदोदित । दाशरथी श्रीरघुनाथ । जनस्थान करोनि मुक्त । रावणघात करूं येईल ॥ ७ ॥ त्रिशिरा आणि खर दूषण । यांसी करोनि निर्दळण । दक्षिणे येवोनि रघुनंदन । समुद्रीं पाळींण[13] पर्वतीं ॥ ८ ॥ निशाचरां करोनि घात । लंकेशाचा निःपात । सुरवरांसी बंदिमुक्त । क्षणें रघुनाथ करील ॥ ९ ॥ त्रैलोक्यासी विजयोत्सवो । स्वयें परतेल रामरावो । तेणें काळें आम्ही पहाहो । येवों स्वयमेवो दर्शना ॥ ११० ॥

काशीविरहमापन्नो मा भैस्त्वं कलशोद्भव ।
भवदर्थे करिष्यामि आवासं पूर्वसागरे ॥ २ ॥

१ पायांच्या नखांपासून मस्तकापर्यंत. २ स्थान. ३ एकदेशी. ४ रत्नांची प्रभा. ५ स्वाधीन. ६ खरेपणानें. ७ परा, पश्यंती, मध्यमा व वैखरी या चार वाचा.

८ शांति. ९ आवरील. १० खरोखर. ११ उत्सुकता. १२ संकट. १३ समुद्रावर सेतु बांधणें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

कलशोद्भवा मुनिवरा । काशीविरहें विरहातुरा । तुजलागीं पूर्वसागरा । वास निर्धारा करीन मी ॥ ११ ॥ सकळांचें पूर्वे श्रीरघुनाथ । दक्षिणे येईल रावणवधार्थ । म्हणोनियां विश्वनाथ । पूर्वे म्हणत तिये दिशे ॥ १२ ॥ श्रीरामदर्शनाचे मिषें । मी येईन तिये दिशे । तुवां जावें सावकाशें । चिंता मानसें न करावी ॥ १३ ॥

श्रीरामनामाक्षरमंत्रबीजं
जाप्यं मदीयं परमामृतं मे ।
समुद्रजातं गरलं वृथा कृतं
ध्येयं मदीयं स तु रामचंद्रः ॥ ३ ॥

श्रीरामनामावांचूनि पाहीं । मज आन प्रिय नाहीं । तुज सांगेन मी तेंही । सावध पाहीं परियेसीं ॥ १४ ॥ रामनाम युग्म अक्षर । वाचेसी येतां एकवार । सर्वांगीं अमृताचा पूर । वेगवत्तर चालिला ॥ १५ ॥ त्या अमृताचेनि तेजें देख । करपोनि गेलें व्याळविखें[२] । पन्नगें[३] झाले निर्विख । अळंकारें देख बाधतीना ॥ १६ ॥ अल्प पन्नगाची गरळें[४] । त्याहूनि विशेष हळाहळ । समुद्रमथनीं तत्काळ । उठलें जगतीतळ जाळीत ॥ १७ ॥ पीडित सकळ सुरगण । यक्ष किन्नर सिद्ध चारण । ऋषि आदि दीनजन । भूमंडळ जाण जाळीत ॥ १८ ॥ तेणें काळें म्यां आपण । श्रीरामनामाच्या बळें जाण । न लागतां अर्ध क्षण । कंठीं जाण धरियेलें ॥ १९ ॥ अल्पही त्याची बाधा नाहीं । त्याहूनि अपूर्व आणीक कांहीं । प्रळयानळातें गिळीं लवलाहीं । प्रतापें पाहीं रामाच्या ॥ १२० ॥ प्रळयकाळीं प्रळयानळ । उठतां जाळी जगतीतळ । तितुकाही[५] प्राशितां सकळ । मज अळुमाळ बाधीना ॥२१॥ ऐसा श्रीरामनामप्रताप । जेणें विषहळाहळताप । भस्म झाला आपोआप । तें परम जाप्य[६] जाण माझें ॥ २२ ॥ वदनीं जप श्रीराम पूर्ण । मनीं रामाचें निजध्यान । निःसीम इंद्रियाचरण । रघुनंदननिजसेवा ॥ २३ ॥ तो मूर्तिमंत रघुनंदन । भूमंडळीं अवतरेल पूर्ण । त्याचें घ्यावया दर्शन । अवश्य जाण येईन मी ॥ २४ ॥ न घेतां श्रीरामदर्शन । भूमिभार वृथा जीवन[७] । यालागीं मी आपण । येईन जाण भेटीसी ॥ २५ ॥ तुम्हां आम्हां दर्शन । तेणें काळें होईल जाण । सकळ भाग्याचें मंडन । आर्तनिरसन श्रीरामें ॥ २६ ॥ तंववरी जनस्थान जाण । तुम्हीं वसवावें आपण । देवकार्यसंपादन । पर्वतरोधन करावें ॥ २७ ॥ येणें लोभें अगस्तीसी । पाठवूं पाहे दक्षिणेसी । निग्रहोनि पर्वतासी । जनस्थानासी वसवावया ॥ २८ ॥ परी बोधितां बहुतां रीतीं । वियोग न साहावे ऋषीप्रती । म्हणे केधवां रघुपती । वनाप्रती येईल ॥ २९ ॥ कधीं होईल सेतुबंधन । कैं मरेल तो रावण । कैं सुटती सुरगण । रघुनंदन भेटेल कैं ॥ १३० ॥ ग्लानी भाकितां दारुण । न करी दक्षिणे गमन । ते काळीं मागुतेन । त्यासी आश्वासन दीधलें ॥ ३१ ॥ न करितां रावणवधासी । पहिलेंचि रामदर्शनासी । मी येईन निश्चयेंसीं । म्हणोनि त्यासी भाक[९] दीधली ॥ ३२ ॥ येणेंचि कार्यें तत्त्वतां । तूं न सुटसी सर्वथा । उत्तरोत्तर सुरकार्यार्था । असे स्वस्थता तुझेनि हातें ॥ ३३ ॥ पुढील कल्प जो भावी । तुज तेथें व्यासपदवी । अनायासें निजस्वभावीं । निजगौरवीं होईल ॥ ३४ ॥ ऐसें शांतवोनि तयासी । पाठविलें दक्षिणेसी । निरोधोनि पर्वतासी । सत्कर्मासी निर्मुक्ति ॥ ३५ ॥ हें कार्य साधलें तें गौण । पुढें महत्कृत्य दारुण । येवोनियां रघुनंदन । दशानन निवटील ॥ ३६ ॥ ऐसा केला इत्यर्थ । तो फळासी आला सिद्ध्यर्थ । राम येवोनि दक्षिणेआंत । केलें निर्मुक्त जनस्थान ॥ ३७ ॥ निवटूनि राक्षसगण । द्विजां दिधलें जनस्थान । संपविलें सेतुबंधन । आतां दशानन निवटेल ॥ ३८ ॥ याकारणें परियेसीं । लिंगरूपें रामदर्शनासी । मीच येतों श्रीरामापासीं । ऐसें हनुमंतासी सांगितलें ॥ ३९ ॥ येणें रूपें भेटीसी । सांडोनि येतां वाराणसी । आकान्त होईल सकळांसी । कोणी नगरीसी न राहे ॥ १४० ॥ ऐसें शंकराचें वचन । ऐकतां वायुनंदन । सुखें झाला सुखैकघन । आनंद पूर्ण उथळला[१०] ॥ ४१ ॥ लागोनियां शिवचरणां । विनविता झाला जाणा । शीघ्र द्यावें आज्ञापना । श्रीरामदर्शना

१ अगस्त्य ऋषे. २ सर्पविष. ३ सर्प. ४ विष. ५ किंचितही. ६ जप करण्यास योग्य. ७ जगणें, आयुष्य. ८ पीडितांचें संकटनिवारण. ९ वचन, शपथ. १० उचंबळला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

लागोनी ॥ ४२ ॥ ऐसें हनुमंताचें विनवण। ऐकतांचि शंकरें पूर्ण। निजात्मतेज आकर्षून। लिंग निर्माण पैं केलें ॥ ४३ ॥ देतां हनुमंताचे हातीं। आनंद दाटला चित्तीं। वानरा आत्मलिंगप्राप्ती। अगाध ख्याती रामाची ॥ ४४ ॥ तरी हें नवल नव्हे येथ। जड जाड्याचा सांगातें। धरितांचि त्वरित। मस्तकीं बैसत महंताच्या ॥ ४५ ॥

उत्तमानां प्रसंगेन साधवो यांति गौरवम्।
पुष्पमालाप्रसंगेन सूत्रं शिरसि धार्यते ॥ ४ ॥

तेहीविषींचा वृत्तान्त। अति जड सूत्रतंत। जडा सुमनाचा सांगात। धरितां चढत राजमुकुटीं ॥ ४६ ॥ सुमनमाळा कंठीं शिरीं। श्रीमंत मिरविती हारीं। तेंवी आम्ही रामसेवेकरीं। वंद्य चराचरीं पैं झालों ॥ ४७ ॥ विचारितां दोनी जडें। संगें श्रीमंतमुकुटीं चढे। चढोनि मिरविती कोडें। निर्जनिवाडें निजभक्तीं ॥ ४८ ॥ तैसा नव्हे रघुनंदन। चिदानंदैकघन पूर्ण। त्याचे सेवितां श्रीचरण। दुष्प्राप्य कोण आम्हांसी ॥ ४९ ॥ ऐसी श्रीरामभजनें तत्त्वतां। स्वयें मानोनि कृतार्थता। लिंग घेवोनि होय निघता। श्रीरामदर्शनालागोनी ॥ १५० ॥ विश्वनाथा करोनि नमन। नमिले समस्त शिवगण। स्वयें आज्ञा पुसोन। केलें उड्डाण रामनामें ॥ ५१ ॥ सबाह्य स्मरोनि रघुनंदन। भुभुःकार केला दारुण। तेणें दणाणलें त्रिभुवन। कुळाचळ पूर्ण गडाडले ॥ ५२ ॥ दिंवि भुंवि अंतरिक्ष उमोपें। जीवमात्रां सुटला कंप। देखतां मारुतिप्रताप। शिव अमूप गजबजिला ॥ ५३ ॥ शिवगणें कांपिन्नलीं। उमा शंकरा मिठी घाली। सकळ सृष्टि गजबजली। पडिली दांतखिळी कृतांता ॥ ५४ ॥ उड्डाणसमयीं हनुमान वीर। देखिला अतिशयें उग्र। नेत्र जैसे खदिरांगार। माथां पुच्छाग्र वाहिलें ॥ ५५ ॥ पिंजारल्या रोमावळी। बुबुळें गेलीं भंवयांतळीं। दिसे विक्राळ दांताळी। जैसा प्रळयकाळीं महारुद्र ॥ ५६ ॥ देखतां हनुमंताचें चिन्ह। अति भयभीत शिवगण। येरें स्मरोनि रघुनंदन। केलें उड्डाण आकाशीं ॥ ५७ ॥ संधानमात्र श्रीरामबाण। क्षणें आक्रमी गगन। तैसा निघाला वायुनंदन। लाजवी उड्डाण गरुडाचें ॥ ५८ ॥ अति विस्मय सदाशिवासी। उमा विस्मित होय मानसीं। परमाश्चर्य शिवगणांसी। पवनात्मजासी देखोनी ॥ ५९ ॥ तटस्थ झाली काशीपुरी। जयजयकार करोनि खेचरीं। पुष्पवृष्टी कपीचे शिरीं। केली गजरीं अति प्रीतीं ॥ १६० ॥ स्वर्गीं वंदिती सुरगण। श्रीरामभक्ताची आंगवण। जें चरित्र केलें अति पावन। ख्याति गहन त्रिलोकीं ॥६१॥ एका जनार्दना शरण। आत्मलिंग स्वयें आणून। हनुमंतें नमिला रघुनंदन। श्रोते अवधान देत स्वयें ॥ १६२ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां आत्मलिंगानयनं नाम पंचसप्ततितमोऽध्यायः ॥ ७५ ॥ ओंव्या ॥ १६२ ॥ श्लोक ॥ ४ ॥

अध्याय शहात्तरावा

श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ विश्वेश्वरदत्त लिंग। हनुमान घेवोनि सवेग। उड्डाण केलें अति चांग। गगन सांङ्ग आक्रमिलें ॥ १ ॥ येरीकडे रघुनंदन। झाला अत्यंत उद्विग्न। कां पां न येचि वायुनंदन। काय विघ्न पडिलेंसे ॥ २ ॥ उपवासी वानरवीर। खेदक्षीण क्षुधातुर। आम्हांसी न घेतां फळाहार। वानर आहार न सेविती ॥ ३ ॥ बापुडे हे गोळांगूळ। आहारेंवीण झाले विकळ। गात्रें जाहलीं बेंबळें। भ्रमती डोळे गरगरां ॥ ४ ॥ यांसी आहार न देतां। सकळां होईल प्राणान्तव्यथा। रामाचा नेम आम्हांभोंवता। वानरां समस्तां मारिलें क्षुधा ॥ ५ ॥ ऐसी विस्तरेल ख्याती। जगीं होईल अपकीर्ती। श्रीरामसेवा सुखार्थी। दुःखप्राप्ती तेथें झाली ॥ ६ ॥ सकळ निरसावया विघ्न। सेवावा श्रीरघुनंदन। तेणेंचि मांडिलें निर्वाण। क्षुधेनें प्राण जाऊं पाहे ॥ ७ ॥ भजनाभिमान वाढवितां देख। दुरपवाद बोलती लोक। सेवितां श्रीरघुकुळटिळक। जीवें निःशेखें मारिले ॥ ८ ॥ जो आग्रहें गुंतला स्वयें। तो अन्यातें सोडील काये। लहान थोर लोक पाहें। अपवाद स्वयें

१ सोबत. २ निश्चयेंकरून. ३ स्वर्गीं. ४ पृथ्वीवर. ५ पुष्कळ. ६ यमाला. ७ खैराचे निखारे. ८ आकाशांत संचार करणारांनीं. ९ संपूर्ण. १० दुसरीकडे. ११ वानर. १२ निर्जीव, कमजोर. १३ दूषण. १४ समग्र.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

बोलती ॥ ९ ॥ आणीक सिद्धान्त नव्हे ऐसा । एकदेशी विश्वेशा । भावूं नये गा सहसा । भजनठसा हा नव्हे ॥ १० ॥ जो सर्वगत सनातन । ज्यासी विश्वात्मा हें अभिधान । तो प्रतिमेच्या ठायीं पूर्ण । भावितां जाण क्षोभेल ॥ ११ ॥ शिवपूजेचें महिमान । सद्गुरुवसिष्ठमुखें जाण । म्यां ऐकिलें आपण । विश्वमूर्ति पूर्ण शंकर ॥ १२ ॥ त्याचें पूजेचें आयतन । प्राणिमात्रां सुख जाण । म्यांचि ऐकिलें आपण । स्वशक्तिकरोन सर्वथा ॥ १३ ॥ ऐसा असतां निर्धार । क्षुधा पीडतां वानर । स्वयें क्षोभेल शंकर । भजन साचार हें नव्हे ॥ १४ ॥

येन केनाप्युपायेन यस्य कस्यापि देहिनः।
सन्तोषं जनयेत्प्राज्ञस्तदेवेश्वरपूजनम् ॥ १ ॥

ज्ञानाचें मुख्य लक्षण । सर्वां भूतीं श्रीभगवान । स्वयें सेवावा अनवच्छिन्न । श्रुतिवचन गर्जत ॥ १५ ॥ यथासामर्थ्यें यथावित्तें । चित्तें भावार्थें जीवितें । सुख द्यावें प्राणिमात्रातें । हेंचि निश्चितें निजभजन ॥ १६ ॥ भलते याती भलते योनी । भलतेनि प्रकारेंकरोनी । सुख प्राणिमात्रालागूनी । द्यावें अनुदिनीं हेंचि भजन ॥ १७ ॥ मेळवोनि षोडशोपचार । प्रतिमा पूजितां साचार । स्वयें सुखावेना शंकर । जेंवी चराचर पूजिलिया ॥ १८ ॥ विश्वमूर्ति विष्वक्सेन । गर्जताहे श्रुतिपुराण । तेथें प्रतिमेचें पूजन । तें गौण जाण श्रुतिवाक्यें ॥ १९ ॥ यालागीं विश्वमूर्ती । शंकर पूजावा सर्वां भूतीं । तेथें वानरांची उपेक्षा चित्तीं । करितां निश्चितीं अधर्म ॥ २० ॥ मजलागीं आर्तभूतें । चित्तें वित्तें जीवितें । तीं सांडोनि तळमळितें । आमुचीं व्रतें तीं किती ॥ २१ ॥ मुख्य पूजेचें आयतन । प्राणिमात्रा सुखदान । बाह्य विधीचें प्रतिपालन । प्रतिमा जाण लौकिकी ॥ २२ ॥ ऐसा करोनि निर्धार । तृप्त करावया वानर । सरसावला रघुवीर । विधि साचार लक्षोनी ॥ २३ ॥ लिंगपूजेवांचूनि जाण । करितां न ये फळभोजन । लौकिक वाढला संपूर्ण । लिंग निर्माण करूं येथें ॥ २४ ॥ समुद्रतीरीं वाळुवेचें । लिंग निर्माण करोनि साचें । पूजन करोनि तयाचें । करूं वानरांचें क्षुधाहरण ॥ २५ ॥ म्हणोनियां श्रीरामचंद्र । वाळुकालिंग सत्वर । करोनियां पूजोपचार । तेथें रघुवीर प्रतिष्ठी ॥ २६ ॥ प्रतिमेसीं आवाहन । स्वयें करितां रघुनंदन । तंव आश्चर्य वर्तलें गहन । सावधान अवधारा ॥ २७ ॥ जाणवलें शंकरासी । तो खळबळिला मानसीं । क्षोभ वाटेल राघवासी । आतां जिण्यासी ठाव कैंचा ॥ २८ ॥ मारुतीसीं बोलतां । विलंब लागला सर्वथा । तंव इकडे श्रीरघुनाथा । दर्शनार्थी वंचलों ॥ २९ ॥ सांडोनियां निजानुसंधान । वाग्व्यापार करितां पूर्ण । निजात्मा जो अंतरङ्ग । तो सर्वथा जाण दुरावे ॥ ३० ॥ वृथा करितां तोंडपिटी । कायसी साधनांची गोष्टी । तैं साध्यासी कैंची भेटी । वृथा वटवटी नागवण ॥ ३१ ॥ साध्य आकळे संपूर्ण । तंव सज्ञानासी करावा प्रश्न । पावलिया निजखूण । वाग्व्यापार जाण न करावा ॥ ३२ ॥ आणिकाची कथा कोण । माझी बुद्धि ठकली पूर्ण । भेटतांचि वायुनंदन । घ्यावें दर्शन उठाउठीं ॥ ३३ ॥ कायसी पर्वताची कथा । सांगावया गुंतलों मारुता । तंव क्षोभ आला रघुनाथा । उपेक्षा तत्त्वतां केली माझी ॥ ३४ ॥ प्रसन्न व्हावया रघुवीर । काय करणें विचार । वाळुकालिंग व्यवहारमात्र । केलें सत्वर श्रीरामें ॥ ३५ ॥ तेथें प्रवेशोनि आपण । घ्यावें श्रीरामदर्शन । इतुकेनि विकोपाचें विसर्जन । सहजचि जाण होईल ॥ ३६ ॥ झालिया साक्षात्कार । मग कोपासी कैंचा थार । आणि श्रीरामाचें चरित्र । तें वंद्य साचार आम्हांसी ॥ ३७ ॥ लीलेनें अंगीकारी श्रीरघुनाथ । तें आम्हां वंद्य यथार्थ । म्हणोनि वाळुकालिंगाआंत । स्वयें तेथ आपण प्रवेशावें ॥ ३८ ॥ ऐसा करोनि निर्धार । मागें सांडूनि हनुमान वीर । स्वयें येवोनि शंकर । प्रवेशे सत्वर लिंगामाजी ॥ ३९ ॥ श्रीरामें करोनि प्रतिष्ठापन । स्वयें केलें फळभोजन । तृप्त केले वानरगण । क्षुधा संपूर्ण निरसली ॥ ४० ॥ तृप्त झाले हो वानर । करीत रामनामें भुभुःकार । बाप कृपाळू रघुवीर । क्षुधा सत्वर निरसिली ॥ ४१ ॥ निजतेजें श्रीशंकर । पुढें आला वेगवत्तर । मागें उरली प्रतिमा मात्र । आला कपींद्र तेणेंसीं ॥ ४२ ॥

१ स्थान. २ एकाग्रचित्तानें. ३ सतत. ४ हयगय. ५ पीडित. ६ नागवलों. ७ बडबड. ८ घालविली.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

तंव आश्चर्य देखिलें तेथें । लिंग प्रतिष्ठोनि रघुनाथें । संपादिलें फळाहारातें । तृत समस्त वानर ॥ ४३ ॥ मज पाठवोनि काशीतें । लिंग आणविलें रघुनाथें । शेखीं[1] वाळूचें प्रतिष्ठिलें येथें । निजकार्यातें संपादिलें ॥ ४४ ॥ आम्ही कष्टें कार्य साधीत । श्रीराम करी वार्ताहत[2] । तरी आमचें काय जीवित । वृथा निंदित लौकिकीं ॥ ४५ ॥ आतां मी ऐसें करीन । श्रीरामें केलें लिंगस्थापन । तें उपडोनियां सांडीन । प्रतिष्ठीन निजलिंग ॥ ४६ ॥ म्हणोनि अभिमानला मारुती । पुच्छें कवळोनि लिंगाप्रती । लिंग उपडावया निश्चितीं । साटोप मारुतीं मांडिला ॥ ४७ ॥ व्यर्थ करोनि श्रीरामाज्ञेसी । निजाभिमानें लिंगासी । उत्थापूं[3] पाहे आवेशीं । तें श्रीरामासी केंवी साहे ॥ ४८ ॥ लिंग उपडितां वायुनंदन । उगाचि पहात रघुनंदन । हनुमान क्षोभला आपण । त्यासी प्रतिवचन काय बोलों ॥ ४९ ॥ म्हणोनि उगाचि रघुवीर । परी कोणाही न कळे विचार । मौनाचें काय अंतर । न कळे साचार सुरसिद्धां ॥ ५० ॥ अभिमानाचें निजबळ । दृष्टी आच्छादिली सकळ । अवघें ब्रह्मांड शून्यमंडळ । राम केवळ भासेना ॥ ५१ ॥ जो क्षणही न विसंबे जाण । तो जवळी असतां रघुनंदन । स्वयें न देखे वायुनंदन । देखणेपण बुडालें ॥ ५२ ॥ राम नाहीं जंव तेथें । तंव उपडूनि सांडूं लिंगातें । प्रतिष्ठूनि स्यां आणिलें तें । मग श्रीरामातें पैं भेटों ॥ ५३ ॥ नवल अभिमानाची गती । जवळी असतां श्रीरघुपती । सिद्ध संमुख न देखे मारुती । निजाभिमानेंकरूनी ॥ ५४ ॥ वेंटाळूनि पुच्छेंकरीं । लिंग उपडितां कपिकेसरी । लांगूल[4] तुटलें झडकरी । पडिला धरेवरी[5] मूर्च्छित ॥ ५५ ॥ प्रळयकाळींचेनि सत्राणें[6] । बळ केलें हनुमंतानें । तितुकें वृथा गेलें अभिमानें । धिक् जिणें अभिमानिया ॥ ५६ ॥ वज्रदेही मारुती । ऐसें पुराणें गर्जती । त्याची झाली सकळ शांती । नवल करिती सुरसिद्ध ॥५७॥ ज्ञानाभिमानें निश्चितीं । सर्वांगीं भँगें अमर[8]पती । स्वयें झालीं निमेषगती । सांगों किती नवलावो ॥ ५८ ॥ ज्ञानाभिमानें दुर्वासऋषी । छळूं गेला अंबरीषासी । कोलितें ख्याति लाविली त्यासी । त्रैलोक्यासी हिंडविलें ॥ ५९ ॥ मग सांडोनि अभिमानस्थिती । शरण आला अंबरीषाप्रती । तेणें वांचविला निमेषगती । निरभिमानस्थिती अगाध ॥ ६० ॥ परोक्ष जे अभिमानस्थिती । तिची ऐसी कठिण गती । अपरोक्ष असतां श्रीरघुपती । न चले निश्चितीं अभिमान ॥ ६१ ॥ न विचारितां राममहिमान । स्वयें केला अभिमान । तेणें पडिला उलथोन । लज्जायमान अति दुःखी ॥ ६२ ॥ सुटले रुधिराचे[9] पाझर । मूर्च्छा आली अति दुर्धर । भयभीत वानर वीर । हाहाकार वर्तला ॥ ६३ ॥ खुंटल्या सकळांच्या वृत्ती । न चले कोणाची विनंती । कठिण भारी रघुपती । कांहीं युक्ती चालेना ॥ ६४ ॥ तेणें काळें विश्वनाथ । प्रत्यक्ष होवोनि त्वरित । विनविता झाला रघुनाथ । अति विनीत होवोनियां ॥ ६५ ॥ त्राहें[10] त्राहें जी श्रीरामा । भक्तकामकल्पद्रुमा । विश्वाचा तूं विश्वात्मा । मेघश्यामा कृपा करीं ॥ ६६ ॥ जन्मजन्मांतरीं अनवच्छिन्न । आम्हीं केलें आराधन । श्रीरामा तेणें समाधान । तुझें दर्शन आजि झालें ॥ ६७ ॥ अनवच्छिन्न अखंडता । सर्वां भूतीं तूतें पाहतां । तुझी भेटी झाली आतां । ऐक तत्त्वतां सांगेन ॥ ६८ ॥ सनकादिकांचें ध्येय पूर्ण । ते तुझे ध्येय श्रीचरण । मनीं करितां नित्य चिंतन । प्रत्यक्ष जाण भेटलासी ॥ ६९ ॥ नारदादिक भक्तवृंद[11] । तुझी चरणकीर्ति अगाध । आवडी गातां पदबंध । झाले निर्द्वंद्व[12] सर्वभावें ॥ ७० ॥ तेणें संप्रदायें कीर्ति गातां । संसारभया हाणोनि लाता । तुजसीं भेटी श्रीरघुनाथा । झाली तत्त्वतां निश्चयें ॥ ७१ ॥ सर्वां भूतीं तुझे श्रीचरण । सांडोनियां मानाभिमान । हर्षें नमन करितां जाण । स्वयें आपण भेटलासी ॥ ७२ ॥ सर्वेंद्रियें सर्वभावेंसीं । तुज भजिन्नलों अति प्रीतीसीं । तें आजि आलें अति फळासी । श्रीचरणासी पावलों ॥ ७३ ॥ आजिचें जन्म सफळ । आजिचेनि सफळ कुळ । येणें देहें रघुकुळपाळ । स्वयें अविकळ[13] देखिलासी ॥ ७४ ॥ शास्त्रव्युत्पत्ती[14] व्याख्यान । चिरकाळ साधिलें जाण । तें फळा आलें संपूर्ण ।

१ अंतीं. २ व्यर्थ. ३ उपटूं. ४ शेंपूट. ५ भूमीवर. ६ जोरानें. ७ छिद्रें. ८ इंद्राला. ९ रक्ताचे. १० संरक्षण कर.

११ भक्तसमुदाय. १२ सुखदुःखादि भावरहित. १३ सुखरूप. १४ शास्त्रज्ञान.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

तुझे श्रीचरण देखिले ॥ ७५ ॥ ज्ञानाचें फळ विज्ञान । तेथें त्रिपुटीचें निर्दळण । तेणें तुझें रूप संपूर्ण । सच्चिद्घन श्रीरामा ॥ ७६ ॥ जें नामरूपगुणातीत । निगमं परतले नेति म्हणत । तें रूपा आलें मूर्तिमंत । भक्तकार्यार्थ श्रीराम ॥ ७७ ॥ भक्तकाजकैवारी । ऐसें गर्जत श्रुतिशास्त्रीं । तो तूं कोपसी आम्हांवरी । तें कैसेनि उरी उरे स्वामिया ॥ ७८ ॥ हनुमान नव्हे अभक्त । अथवा नाहीं केलें उद्धंत । प्रकाशावया तुझें चरित । करणी निश्चित हे माझी ॥ ७९ ॥ दक्षिणे येवोनि रघुनंदन । पाषाणीं करोनि सेतुबंधन । श्रीरामें केलें न लागतां क्षण । चरित्र पावन जगद्वंद्य ॥ ८० ॥ श्रीरामाचा प्रताप । प्रकाशावया तीर्थरूप । हनुमंतहातीं सांटोप । करावया अल्प बुद्धि माझी ॥ ८१ ॥ तंव झालें विपरीत । झाला अभिमानाचा घात । नेणोनि श्रीरामाचें सामर्थ्य । मूर्खें मिरवीत अभिमान ॥ ८२ ॥ तथापि कृपाळू रघुनाथ । उत्संखळ होवों नेदी भक्त । लांगूल छेदोनियां त्वरित । पडिला हनुमंत धरेवरी ॥ ८३ ॥ तेणें माझा अंतराभिमान । हनुमंताचा बळाभिमान । करोनि दोहींचें उपमर्दन । केलें शिक्षण इतरांसी ॥ ८४ ॥ आमुचा प्रताप किती । जे विस्तारूं श्रीरामकीर्ती । आपुली आपण निजख्याती । स्वयें रघुपती विस्तारी ॥ ८५ ॥ ते कीर्तीचें महिमान । श्रीरामा ऐक सावधान । साकल्यें सांगावया पूर्ण । सर्वथा ज्ञान मज नाहीं ॥ ८६ ॥

क्षेत्रं राममिदं विद्धि द्वितीयमविमुक्तकम् ।
विश्वेश्वरो वयं साक्षाद्धनूमांश्च वयं तथा ॥ २ ॥
मा कुरुष्वात्र संदेहं त्वमहं विद्धि सर्वशः ।
शिवशिवेति वचो ब्रूयाद्रामः शिवपदं गतः ॥ ३ ॥

हें रामक्षेत्र विख्यात । दुसरें जाण अविमुक्त । दर्शनें मुक्ति पतिता होत । ख्याति अद्भुत तिहीं लोकीं ॥ ८७ ॥ तुझे अंशावतार रघुपती । ब्रह्मा विष्णु रुद्रमूर्ती । तेथें आमुची कवण गती । तरी अंश निश्चितीं तुझे आम्ही ॥ ८८ ॥ पूर्वपरंपरास्थिती । तुझें वचन रघुपती । माझे एके अंशें निश्चितीं । अवघें जग चिन्मूर्ती पैं माझी ॥ ८९ ॥ त्यांत आम्हीही साचार । हनुमान आणि मी विश्वेश्वर । केवळ तुझे अंशावतार । जाण साचार श्रीरामा ॥ ९० ॥ ये अर्थीं संदेहस्थिती । सर्वथा नाहीं रघुपती । उपरंत करोनियां वृत्ती । पाहें निश्चितीं सावध ॥ ९१ ॥ सावध व्हावें श्रीरघुनाथा । ऐसें आम्हीं तुज सांगतां । लागताहे उद्धतता । क्षमा त्या अर्था करीं स्वामी ॥ ९२ ॥ कृपा करोनि रघुनाथा । आतां उठवावें कपिनाथा । ऐकतां शिववचनार्था । पावली तत्त्वतां निजखूण ॥ ९३ ॥ शिव शिव म्हणतां जाण । झाला शिवपदीं लीन । जेथें नाहीं मीतूंपण । ध्येय ध्यान जेथें नाहीं ॥ ९४ ॥ केवळ जें सच्चिद्घन । सुखमय सनातन । स्वयें तेथें झाला निमग्न । जेंवी लवण सागरीं ॥ ९५ ॥ शिव शिव म्हणतांचि रघुनाथ । झाला शिवपदीं लयंगत । तेणें सकळ झाले विस्मित । विश्वनाथ आदिकरोनी ॥ ९६ ॥ खुंटली सकळांची युक्ती । ध्यानस्थ झाला रघुपती । हडबडिल्या वानरपंक्ती । कार्यस्थिती नासली ॥ ९७ ॥ समाधि लागली रघुपती । कोण वधील लंकापती । केंवी सुटे सीता सती । आली ग्रहगती सकळांची ॥ ९८ ॥ मेलों आणितां पाषाण । कष्टें केलें सेतुबंधन । तें वृथा गेलें संपूर्ण । दुस्तर विघ्न ओढवलें ॥ ९९ ॥ कैंचें मांडलें फळभोजन । कैंचें ओढवलें शिवदर्शन । कोठें पाठविला वायुनंदन । दुस्तर विघ्न ओढवलें ॥ १०० ॥ परमात्मा श्रीरघुनंदन । त्यासी कां लागलें शिवदर्शन । लोकसंग्रहार्थ विधिपाळण । करितां विघ्न केवढें ॥ १ ॥ जो वज्रदेही मारुती । तो मूर्च्छित पडिला क्षितीं । पुच्छ तुटलें निमेषगती । कार्यस्थिती नासली ॥ २ ॥ समाधि लागली श्रीरामासी । कोण सावध करी त्यासी । कोण सोडवील जानकीसी । वधील रावणासी पैं कोण ॥ ३ ॥ जवळी बैसला विश्वनाथ । तेणेंचि नाशिला कार्यार्थ । श्रीराम केला समाधिस्थ । पडिला हनुमंत मूर्च्छित ॥ ४ ॥ मूर्च्छित करोनि कपींद्रा । भुलविलें श्रीरामचंद्रा । आपण होवोनि घाबिरा । निवान्त म्हातारा बैसलासे ॥ ५ ॥ म्हणोनि करिती कोल्हाळ । कासावीस गोळांगूळ । सुटली सकळां तळमळ । कार्य सकळ नासलें

१ वेद, श्रुती. २ दांडगाई. ३ प्रयत्न. ४ पुच्छ. ५ शांत. ६ हनुमंताला. ७ पूर्ण मग्न. ८ भ्याल्या. ९ जमिनीवर. १० वानर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ ६ ॥ देखोनि सकळांचें चेष्टित[1]। शंकर झाला अति सचिंत । होवोनि ठेलें विपरीत । झाला समाधिस्थ श्रीराम ॥ ७ ॥ सावध न करितां रामासी । आकान्त होईल सर्वांसी । कोण उठवील हनुमंतासी । वधील रावणासी पैं कोण ॥ ८ ॥ सावध न होतां रघुनाथा । कैंवी सुटे जनकदुहिता । सकळ वनवास होईल वृथा । बोल अनागतां[2] लागेल ॥ ९ ॥ आमुचीही न उरे उरी[3]। उपहास होईल चराचरीं । म्हणोनि साटोप धरी त्रिपुरारी । समाधि निर्धारीं उतरावया ॥ ११० ॥ श्रीरामसुखाच्या अंतरीं । प्रवेशोनि झडकरी । लोकरक्षणाच्या उत्तरीं । झाला कामारी विनविता ॥ ११॥

राम राम महाबाहो महापुरुष चिन्मय ।
नायं विश्रांतिकालो हि लोकानंदमयो भव ॥ ४ ॥

चैतन्याचेनि प्रभावें वहिली । जीवकळा सावध केली । प्राणशक्ती परिचारिली । इंद्रियां आली टवटवी ॥ १२॥ श्रीरामाच्या निजशरीरीं । जीवित्व नाहींच निर्धारीं । मिथ्याच लोकोपकारीं । जीवित धरी श्रीराम ॥ १३ ॥ सावध होतांचि रघुनाथ । विनविता झाला विश्वनाथ । अकाळीं होतां समाधिस्थ । होईल आकान्त सकळांसी ॥ १४ ॥ तुज होतां समाधिस्थ । मृषा भाष्य अनागत । तुझे वियोगें अत्यंत । अति दुःखित जानकी ॥ १५ ॥ तिसी द्यावया समाधान । वेगीं सोडूनियां बाण । निवटोनियां दशानन । बंदिमोचन करीं सुरगणांचें ॥ १६ ॥ सोडवीं देवांचिया कोडी । तोडीं नवग्रहांची बेडी । सीता सोडवूनि तांतडीं । उभवीं गुढी रामराज्याची ॥ १७ ॥ निवटोनि दुष्ट राक्षसगण । स्थापीं धर्मात्मा बिभीषण । चित्तें वित्तें जीवितें-करोन । अनन्य शरण तुजलागीं ॥ १८ ॥ अवघ्या त्रैलोकीं तुजवीण । झालीं मृतप्राय पूर्ण । त्यांसी न देतां समाधान । समाधि जाण अति निंद्य ॥ १९॥ समाधिउत्थानापरता पूर्ण । परमात्मा तूं रघुनंदन । तेणें समाधिस्थ होऊन । काय अधिकपण साधावें ॥ १२० ॥ सावध ऐकें कृपानिधी । श्रीरामा समाधि ते उपाधी । सांडीं परती आहाच बुद्धी । होईं त्रिशुद्धीं सावध ॥ २१ ॥ तूं प्रकृतिपुरुषांहूनि भिन्न । चिन्मात्रैक चैतन्यघन । महापुरुष हें अभिधान । यालागीं जाण तुज म्हणती ॥ २२ ॥ अवतारनाम्य रघुपती । जैसें घेतलें तैशा रीतीं । संपादावें यथानिगुतीं । सांडीं परती समाधि ॥ २३ ॥ करोनि कृपावलोकन । सकळ अपराध क्षमा करून । उठवावा वायुनंदन । दशानन निवटावा ॥ २४ ॥ ऐसी शंकराची विनवण । ऐकतांचि रघुनंदन । आनंदें उथळला पूर्ण । करोनि लोटांगण शिव विनविला ॥ २५ ॥ सांडोनियां समाधिअवस्था । विनविता झाला विश्वनाथा । तुझी आज्ञा यथार्थता । वंद्य तत्त्वतां मजलागीं ॥ २६ ॥ नव्हे अपराधी हनुमंत । नाहीं केलें उद्धत । क्षेत्रमहिमा अत्यद्भुत । हनुमंतें साद्यंत प्रकाशिला ॥ २७ ॥ व्हावी सेतुबंधख्याती । पतित उद्धरावे निश्चितीं । अल्प नव्हे तपःस्थिती । मोक्ष सर्वांसी द्यावया ॥ २८ ॥

शिवरामाभिधं लिंगं स्थापितं विधिवच्छुभम् ।
सेतौ रामेश्वरं लिंगं केवलं ब्रह्म उच्यते ॥ ५ ॥

ऐकें स्वामी विश्वनाथा । सेतुबंधमाहात्म्यकथा । तुज सांगेन साधारणता । साकल्यतां[9] कोण वर्णी ॥ २९ ॥ या सेतुबंधाचे तीरीं । दोन्ही लिंगांची अभिनव परी । जें आणिलें कपिकेसरीं । तो निर्धारीं विश्वनाथ ॥ १३० ॥ स्वामी शंकर आपण । ज्योतिर्मय प्रकाशोन । जेथें प्रत्यक्ष झालासी जाण । ज्योतिर्लिंग पूर्ण हें स्वामी ॥ ३१ ॥ कल्पाचिये आदीं निश्चित । शिव सनातन सर्वगत । तो तूं आजि प्रगटलासी येथ । कृपायुक्त पैं स्वामी ॥३२॥ याकारणें अनादी । ज्योतिर्लिंग पैं त्रिशुद्धी । विश्वोद्धाराचिये विधीं[10]। कृपानिधी आलासी ॥३३॥ माझें निजध्येय संपूर्ण । तें हें ज्योतिर्लिंग जाण । म्हणोनि माझें अधिष्ठान । निरंतर जाण पैं येथें ॥ ३४ ॥ शिव रामात्मक सत्य । जो राम तो ईश्वर नित्य । सुखें अभेदत्वें नांदत । रामेश्वर निश्चित म्हणोनि ॥ ३५ ॥ ख्याति अद्भुत करून । हनुमंतें आणिलें प्रार्थून । विश्वेश्वर तो सत्य जाण । नामनिर्वचन उभयतां ॥ ३६ ॥ शिवरामात्मक क्षेत्र । सेतुबंधरामेश्वर । अनायासें प्राणिमात्र ।

१ वर्तन. २ भविष्यकथनास. ३ स्थिति. ४ खोटें. ५ यथास्थित. ६ दांडगाई. ७ पूर्णपणें. ८ विलक्षण. ९ खरोखर. १० करितां.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

उद्धरी साचार तें ऐका ॥ ३७ ॥ भलतेन प्रकारें पाहीं । रथ्यांतरीं पडतां देही । अथवा मूत्रपुरीषाचे ठायीं । श्मशानभूमीमाझारीं ॥ ३८ ॥ योनीमाजी नीच पाहीं । सेव्यासेव्य विभाग नाहीं । देह सांडितां चांडाळगेहीं । अवसान जिहीं साधिलें ॥ ३९ ॥ भलते योनी भलता प्राणी । कृमिकीटपतंगादि योनी । रामक्षेत्रीं प्रयत्नेंकरोनी । अथवा काशीमाजी सहजगती ॥ १४० ॥ निश्चयेंसीं देहांतीं । प्राणिमात्रा लाभे मुक्ती । संदेह नाहीं यदर्थीं । वेदशास्त्रार्थीं सिद्धान्त ॥ ४१ ॥ ज्यासी नव्हे योगयाग । तपश्चर्या व्रत साङ्ग । तीर्थाटन दानप्रसंग । साधनभाग कांहीं नेणे ॥ ४२ ॥ न करितां कष्ट प्रयास । देह त्यागिल्या सेतुबंधास । लात देवोनि संसारास । मोक्षपदास पावती ॥४३॥ असो देहावसानगोष्टी । रामेश्वर देखतां दृष्टीं । उद्धरती कोट्यनुकोटी । ज्यांचीं खोटीं आचरणें ॥ ४४ ॥ ज्यांतें देखतां निर्धारीं । सदाचार पळे दूरी । ऐसे पापी दुराचारी । दर्शनमात्रें उद्धरती ॥ ४५ ॥ ब्राह्मण क्षत्रिय वैश्य त्रिविध । सकळांमाजी वर्ण शुद्ध । त्यांहीहोनि जे विविध । वर्णसंकर सुबद्ध झाले ॥ ४६ ॥ ते ब्राह्मणादि सकळ लोक । लिंगदर्शनें एकाएक । चतुर्देह निरसोनि देख । राम सम्यक पावती ॥ ४७॥ परमामृत परब्रह्म। गुणातीत श्रीराम । तेथें पावती आराम । रूप नाम हारपोनी ॥ ४८ ॥ संकरयोनि नीच जन । ते उद्धरती नवल कोण । महापापी पतित दुर्जन । तेही दर्शनेंकरोन उद्धरती ॥ ४९ ॥ महापातकियाचें लक्षण । ब्रह्महत्या मद्यपान । सुवर्णस्तेयी गुरुदारगमन । तत्संसर्गी पांचवा ॥ १५० ॥ हे पंचमहापातकी पूर्ण । त्यांचें वेगळालें चिन्ह । तुज मी साकल्यें सांगेन । सावधान अवधारीं ॥ ५१ ॥ ब्राह्मणातें जिंती वादीं । कां निर्भर्त्सी सभेमधीं । अथवा करी परस्त्रबुद्धी । घात त्रिशुद्धीं जेणें होय ॥ ५२ ॥ शस्त्रघाताहूनि दारुण । हे घात अधिक जाण । शस्त्रघातें एकासी मरण । छळणें जाण कुटुंबघात ॥ ५३ ॥ ऐसी ब्रह्महत्येची गती । एक मद्यपानाची स्थिती । सांगेन मी संकळितीं । क्षमा श्रोतीं करावी ॥ ५४ ॥ लौकिकीं प्रसिद्ध पानमद । त्याहूनि कठिण अगाध । विषयाचा विषयमद । आणि धनमद पैं जाण ॥ ५५ ॥ मद्यपान केलिया पाहीं । क्षणें उतरे लवलाहीं । विषयमद्याची नवायी । कल्पांतींही उतरेना ॥ ५६ ॥ कोटिजन्म फेरे खातां । विषय खवळे अधिकता । उतार नव्हे सर्वथा । स्वहितवार्ता नाठवे ॥ ५७ ॥ घृतीं खवळे हुताशन । तेंवी करितां विषयसेवन । अधिकाधिक खवळे मन । उतार जाण असेना ॥ ५८ ॥ त्याहूनियां अनंत अधिक । धनाचा मद आत्यंतिक । अंध होऊनि ठाके विवेक । हिताहित नाठवे ॥ ५९ ॥ धनमदाची जाती पाहीं । माता पिता दृष्टी नाहीं । आदिकरोनि गुरु तोही । दृष्टी नाहीं सर्वथा ॥ १६० ॥ तेथें अतीतासी पुसे कोण । व्रत तप तीर्थ जाण । त्यांची कैंची आठवण । मद दारुण द्रव्याचा ॥ ६१ ॥ सुवर्णस्तेयी जे कां जन । ऐक सांगों त्यांचें चिन्ह । स्वहस्तें चोरिल्या सुवर्ण । स्तेयी जाण नवल नव्हे ॥ ६२ ॥ मार्गी द्रव्य पडिलें असतां । कोणी माझें न म्हणतां । म्हणोनि स्वयें घेवों जातां । चोरी सर्वथा अंगीं लागे ॥६३॥ जरी चोरी नव्हे सर्वथा । तरी भय कां उपजे घेवों जातां । झांकोनि घेवोनि तत्त्वतां । कोणा न देखतां पुढें पळे ॥ ६४ ॥ द्रव्यलोभाची वस्ती अंतरीं । तो लोभचि जाण यथार्थ चोरी । करवी अनर्थाच्या हारी । नरकद्वारीं बांधोनि घाली ॥ ६५ ॥ लोभ तो तस्कर पूर्ण । बळें नरकाने बांधोन । आतां गुरुतल्पगाचें लक्षण । सावधान अवधारीं ॥ ६६ ॥ केवळ जें गुरुदारगमन । तें प्रत्यक्ष वज्रपाप दारुण । त्याहूनि आणिक गहन । त्याचें चिन्ह अवधारीं ॥ ६७ ॥ पुढिलाचें चोरितां धन । सुवर्णस्तेयीं पाप दारुण । न्यायें मिळविलें आपण । त्याचेंही चिन्ह अवधारीं ॥ ६८ ॥ न्यायोपार्जित संपत्ती । त्याचा व्यय धर्मस्थितीं । अणुमात्र लोभ धरितां चित्तीं । पाप निश्चितीं गुरुतल्पग ॥ ६९ ॥

लक्ष्मीर्विश्वगुरोर्भार्या स्वयमालिंग्य तिष्ठति ।
न देयं नोपभोग्यं च स एव गुरुतल्पगः ॥ ६ ॥

१ सत्य. २ रस्त्यांत. ३ मूत्र व नरक यांत. ४ ज्याविषयीं. ५ शांति. ६ सोनें चोरणारा. ७ गुप्त मसलत. ८ नवलाची गोष्ट. ९ क्षमि.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वेदवक्ता स्वयें नारायण । वर्णविभागें करी शासन । वेदरूप स्वयें आपण । विश्वगुरु जाण या हेतू ॥ १७० ॥ त्या विश्वगुरूची भार्या निश्चितीं । लक्ष्मीरूपें जे संपत्ती । स्वेच्छा पोटेंसीं धरिती । स्वयें नार्पिती ज्याची त्यासी ॥ ७१ ॥ लक्ष्मी देखोनियां जाण । जो तो करी अभिलाषण । विचार न करिती संपूर्ण । मी कैंचा कोण हे कैंची ॥ ७२ ॥ मी जैं आलों जन्मातें । तैं लक्ष्मी नव्हती सांगातें । देहावसानें निश्चितें । मज सांगातें पैं न ये ॥ ७३ ॥ भगवंत कृपान्वित । मज देखोनि अनाथ । प्रसन्न होवोनि त्वरित । लक्ष्मी अद्भुत मज दिधली ॥ ७४ ॥ विश्वात्मा विश्वमूर्ती । त्याची त्यासी अर्पावी संपत्ती । हें न करोनि निश्चिती । अभिलाषिती लोभेंसीं ॥ ७५ ॥ विश्वगुरूची निजपत्नी । त्याची त्यासी पैं नार्पूनी । अभिलाषी जो लोभें करोनी । गुरुतल्पग कोणी याहूनि नाहीं ॥ ७६ ॥ एकेकाची जाती ऐसी । स्वयें नेती अधःपातासी । तेथोनि निर्गमें नाहीं त्यासी । जेंवी अथावीं पाथर ॥७७॥ सर्वथा निर्गती नव्हे त्यासी । नवल नाहीं या अर्थासी । त्याची संगती घडेल ज्यासी । दशा तैसी त्याचीही ॥ ७८ ॥ ऐक संगाचें महिमान । ज्यासी संगती घडे पूर्ण । तरी त्याचेंही घेऊनि उठे चिन्ह । आपुला निजगुण आच्छादी ॥ ७९ ॥ संगतीचे योगें जाण । शेळियांमाजी असतां श्वान । लोम वाढे संपूर्ण । भासे जाण तद्रूप ॥ १८० ॥ सबाह्य भासे तद्रूपता । नवल नाहीं या अर्था । अंतर भेदोनि तत्त्वतां । संग सर्वथा अंगीं वाजे ॥ ८१ ॥ आळें करोनि कस्तूरीचें । रोप लाविलें पलांडूचें । सुवास आच्छादोनि साचें । दुर्गंधीचें बळ वाढे ॥ ८२ ॥ श्वानखापरीमाजी देख । गोधूमें पेरितां सुरेख । शुद्धत्व हरपे एकाएक । अशेख होत लसूणचि ॥ ८३ ॥ तैंवी दुर्जनाच्या संगें जाण । बुडोनि आपला सद्गुण । त्याचा लागे असद्गुण । तदाचारीं जाण प्रवर्ते ॥ ८४ ॥ तैसीच सत्संगाची स्थिती । नीच पावती महंती । घुरे ते चंदन होती । जाण संगतीं चंदनाचे ॥ ८५ ॥ उंडणी चढों नेणे भिंती । तिसी भयें होतां भृंगीत्वप्राप्ती । पालटोनि देहस्थिती । गगनीं उडती देहेंसीं ॥ ८६ ॥ तैसे अकिंचन भावार्थी । भावें धरितां सत्संगती । साधुत्वासी स्वयें येती । ऐक तदर्थीं सांगेन ॥ ८७ ॥ निंद्य आचरण वाल्मीकाचें । दर्शन होतां नारदाचें । जगद्वंद्य अनागत ज्याचें । चरित्र रामाचें प्रसिद्ध ॥ ८८ ॥ आणिक किती सांगों नर । खग द्रुम मृग निशाचर । नामें सांगतां सविस्तर । कथा अपार वाढेल ॥८९॥ म्हणोनि मनसा वाचा कर्मणा । सत्संगती सांडोनि जाणा । असत्संगति करितां पूर्णा । नरक दारुण अंगीं वाजे ॥ १९० ॥ महापातकियाचे संगतीं । महापातकी स्वयें होती । त्यांसी नाहीं ऊर्ध्वगती । उभयतां निश्चितीं पतित होती ॥९१॥ ज्यासी नाहीं ऊर्ध्वगती । ऐसे दुराचारी निश्चितीं । तेही रामेश्वरा जरी येती । दर्शनें मुक्ती तयांसी ॥ ९२ ॥ दर्शनें होय पापमोचन । ये अर्थी नवल कोण । रामेश्वरस्मरणेंकरोन । देहपतन जरी होय ॥ ९३ ॥ तरी महापातका देवोनि लात । स्वयें होती नित्य मुक्त । सर्वथा संदेह नाहीं येथ । त्रिसत्य सत्य ते वाणी ॥ ९४ ॥ आणिक ऐक पशुपती । तुज मणिकर्णिकेची अति प्रीति । वास करितां सेतूप्रती । अवस्था चित्तीं लागेल ॥ ९५ ॥ यालागीं मी आपण । नित्य मणिकर्णिकेचें जीवन । तुज स्नानासी पुरवीन । स्वयें जाण विश्वनाथा ॥ ९६ ॥ हेंचि माझें नित्यव्रत । मणिकर्णिकेचें नीरें नित्य । पुरविती तेही नित्यमुक्त । अंश निश्चित पैं माझे ॥ ९७ ॥ भलता प्राणी भलते याती । स्वयें जावोनि वाराणसीप्रती । मणिकर्णिका तीर्थ आणिती । अभिषेकिती रामेश्वरा ॥ ९८ ॥ ते सकळ कुळेंसहित । स्वयें होती नित्यमुक्त । ऐसें ऐकतां विश्वनाथ । हर्षितचित्त स्वयें झाला ॥ ९९ ॥ घालोनियां लोटांगण । विनविला रघुनंदन । मनोरथ झाले संपूर्ण । क्षेत्रमहिमान वाढविलें ॥ २०० ॥ आतां उठवावें हनुमंता । पुच्छ सांधावें स्वामिनाथा । कृपाळुवा रघुनाथा । निजभक्ता कृपा करीं ॥ १ ॥ म्हणोनि धरिले दोन्ही चरण । वेगें उठवीं वायुनंदन । तेणें संतोषला रघुनंदन । तुझी आज्ञा कोण उल्लंघी ॥ २ ॥

१ चार वर्ण स्थापन करून. २ सुटका. ३ खळग्यांत ४ त्यासारखाच. ५ दुर्गंधियुक्त वनस्पतिविशेष, लसूण. ६ गंहू. ७ आळी, कीड. ८ दरिद्री. ९ भविष्य. १० उदक.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

जवळी येवोनि रघुनाथ। उचलोनि पोटीं धरीत। अमृतहस्त तेथें फिरवीत। झाला सावचित्त हनुमंत ॥ ३ ॥ लांगूल लावितां जेथींचें तेथें। स्वयें सांधलें यथास्थित। बाप कृपाळू रघुनाथ। अति विख्यात पवाडा ॥ ४ ॥ हनुमान झाला सावचित्त। तंव श्रीरामाचे वोसंगीं देखत। तेणें झाला लज्जान्वित। अति विख्यात पवाडा ॥ ५ ॥ माझी करणी मजचि फळली। शीक्षै नेटकी लाविली। श्रीरामाची अवज्ञा केली। तेणें धुळी मेळविलें ॥ ६ ॥ मी एक भक्त अनुरक्त। वरी वज्रदेही विख्यात। ऐसा फुगारा पोटांत। होता नांदत निजबळें ॥ ७ ॥ त्याची करोनि भंगाणी। संस्थापिलें श्रीरामचरणीं। कृपेची ख्याती त्रिभुवनीं। पावन करणी जगद्वंद्य ॥ ८ ॥ जरी दंड मज न होता। तरी निजकर्में रघुनाथा। स्वयें जातों अधःपाता। कोण सोडविता मज तेव्हां ॥ ९ ॥ निजकृपेची महिमा ऐसी। चुकविलें अधःपातासी। श्रीरामें ख्याति केली ऐसी। उणें भक्तासी येवों नेदी ॥ २१० ॥ जरी झालीं उद्धतें। तरी दंडोनियां स्वहस्तें। स्वचरणीं स्थापावें निश्चितें। पाहों आणिकांतें नाहीं देणें ॥ ११ ॥ ऐसें विनवोनि आपण। हनुमान घाली लोटांगण। तेणें संतोषला रघुनंदन। काय वचन बोलत ॥ १२ ॥ चिंता न करीं हनुमंता। तुजपासोनि न घडे अन्यथा। क्षेत्रमहिमेलागीं तत्त्वतां। केलें सर्वथा विश्वेशें ॥ १३ ॥ तुज होतां हे अवस्था। स्वयें झाला विनविता। स्वामीचें वैभव नेणतां। केली उद्धतता मर्कटपणें ॥ १४ ॥ तुज न होतां हे अवस्था। क्षेत्रमहिमा कोण सांगता। संवाद करितां विश्वनाथा। महिमा तत्त्वतां प्रकाशला॥१५

ज्योतिर्मे स्थापितं चात्र ज्योतिर्लिंगं भविष्यति ।
शतकल्पाधिकं ज्योती राम इत्यक्षरद्वयम् ॥ ७ ॥

चैतन्यज्योति विश्वनाथें। प्रतिष्ठिंली माझेनि हातें। म्हणोनि ज्योतिर्लिंग ऐसें त्यातें। निजनिश्चितें अभिधानें ॥ १६ ॥ सनातन आत्मज्योती। त्यावरी कल्पकोटी होती जाती। म्हणोनि कल्पादि यातें म्हणती। निजनिश्चितीं ज्योतिर्लिंग ॥ १७ ॥

रामेश्वरं तु मल्लिंगं सेतुबंधे विराजते ।
सेतुबंधादिकाख्यानं भक्त्या यः श्रुणुते नरः ॥ ८ ॥
यात्राफलं स प्राप्नोति गत्वा च परमां गतिम् ॥ ९ ॥

ज्योतिर्मय निजनित्य। ज्योतिर्लिंग शिवरामयुक्त। रामेश्वर म्हणोनि म्हणत। जाण निश्चित हनुमंता ॥ १८ ॥ तें हें रामेश्वरलिंग जाण। सेतुबंधीं विराजमान। तेथींची यात्रा दर्शन। उद्धरी पूर्ण नवल नव्हे ॥ १९ ॥ तुम्ही आम्ही आणि शिवेश्वर। संवाद केला जो साचार। तें हें सेतुमाहात्म्यचरित्र। परिसें एकाग्र निजचित्तें ॥ २२० ॥ सबाह्याभ्यंतर सावधानता। तल्लीन होवोनियां श्रोता। सेतुमाहात्म्य श्रवण करितां। निजमुक्तता पाविजे ॥ २१ ॥ कावडी भरोनि मणिकर्णिकेसीं। प्रीतीं आणोनि सेतुबंधासी। अभिषेकितां रामेश्वरासी। रामरूपासीं स्वयें होय ॥ २२ ॥ तेंचि फळ निजनिर्धारीं। सुचित्तचित्तें श्रवण करी। यात्राकर्त्याचे निजशिरीं। निजगजरीं मोक्ष पावे ॥ २३ ॥ ऐसें ऐकतां विश्वनाथ। पुढें होवोनि त्वरित। उठिला देखोनि हनुमंत। स्वयें वर्णीत साटोपें ॥ २४ ॥

रामतीर्थे नरः स्नात्वा दृष्ट्वा रामेश्वरं शिवम् ।
कैवल्यं पुरुषः साक्षादवाप्नोति न संशयः ॥ १० ॥
काश्यामपि मृतस्यांतस्तारकं ब्रह्म कथ्यते ।
तदेव परमं साक्षाद्राम इत्यक्षरद्वयम् ॥ ११ ॥

श्रीरामें बांधिला पाहीं। त्या सेतुसमुद्राचे ठायीं। स्नान करोनि लवलाहीं। रामेश्वर जिहीं देखिला ॥ २५ ॥ काय सांगों त्यांचें महिमान। ते स्वशरीरें कैवल्यघन। अणुमात्र संदेह नाहीं जाण। निश्चयें वचन हें माझें ॥ २६ ॥ आनंदवनीं काशीपुरीं। देहांतीं जो उपदेश करी। दोंचि अक्षरीं जग उद्धरी। तो मूर्त निर्धारीं रामेश्वर ॥ २७ ॥ श्रीरामनाम युग्माक्षर। क्षराक्षरातीत पर। वचनें करितां उच्चार। ब्रह्म परात्पर स्वयें पावे ॥ २८ ॥ त्याचेनि दर्शनें त्वरित। कोण नुद्धरे यथार्थ। परब्रह्म मूर्तिमंत। लोकोपकारार्थ अवतरलें ॥ २९ ॥ ऐसें वर्णितां विश्वनाथा। ऐकोनि आनंद समस्तां। श्रीरामनामें तत्त्वतां। होय

१ अंकीं, मांडीवर. २ कीर्ति. ३ शिक्षा. ४ मोड. ५ नरकवासाला. ६ स्थापिली. ७ नांव. ८ आवेशानें. ९ मुक्तिस्वरूप. १० किंचितही.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

गर्जता दळभार ॥ २३० ॥ अगाध श्रीरामाचें महिमान । अगाध सेतुबंधाख्यान । अगाध विश्वेश्वराचें ध्यान । भक्ति गहन हनुमंताची ॥३१॥ ऐसें सकळ वानरगण । श्रीरामाचें करिती स्तवन । तंव विश्वेश्वर मागुतेन । पुढें होवोन बोलत ॥ ३२ ॥ सेतुबंधा आला रघुपती । त्या सेतुबंधसागराप्रती । स्नान करिती रामतीर्थी । दर्शन घेती रामेश्वराचें ॥ ३३ ॥ ते पुरुषांमाजी पंचानन[१] । कैवल्यपुरुष पुरातन । माझें स्वरूप जें चिद्धन । तेंचि ते जाण स्वयें होती ॥ ३४ ॥ निष्कर्म माझें स्वरूप परम । तें हें प्रत्यक्ष श्रीराम । त्याचा ज्यांसी दर्शननेम । ते परब्रह्म मूर्तिमंत ॥ ३५ ॥ ये अर्थी संदेहता । सर्वथा न मानावी चित्ता । त्रिसत्य सत्य माझी वार्ता । मनसा वाचा कर्मणा ॥ ३६ ॥ हनुमानादि वानरगण । सौमित्रिसहित बिभीषण । सकळ ऐका माझें वचन । सावधान मानसें ॥ ३७ ॥ म्हणाल बोललों पुनरुक्त । तरी तें जाणा यथार्थ । श्रीराममहिमा वर्णितां चित्त । नव्हे तृप्त सर्वथा ॥ ३८ ॥ श्रीरामनामेंवीण तोंड । तें प्रत्यक्ष चर्मकुंड । माझी जिव्हा चामखंड[२] । दुरपवादें काटली[३] ॥ ३९ ॥ आनंदवन काशीच्या ठायीं । प्रकृतित्याग[४] करितां देही । श्रवणीं उपदेशी लवलाहीं । तारकमंत्र पाहीं परब्रह्म ॥ २४० ॥ तें हें साक्षात् निज नित्य । राम ऐसें युग्माक्षर सत्य । जिव्हा जपमाळ निश्चित । करोनि जपत सर्वदा ॥ ४१ ॥ त्यासी काशीं कां कीकटाच्या[५] ठायीं । अथवा कां चांडाळगेहीं । देह सांडितां लवलाहीं । गति पाहीं समान ॥ ४२ ॥

योगी पततु वा काश्यां चांडालस्य गृहेऽपि वा ।
ज्ञानप्राप्तिः समस्तस्य गतोऽसौ विगताशयः ॥ १२ ॥

तुझेनि योगें येवढी ख्याती । स्वयें प्रकाशिली रघुपती । ऐसें ऐकतांचि सीता सती । घाली अति प्रीतीं लोटांगण ॥ ४२ ॥ मी सर्वांसी सोडवण । परी जग सोडवणें संपूर्ण । यालागीं श्रीरघुनंदन । वना आपण स्वयें आला ॥ ४४ ॥ जड मूढ प्राणी दीन जन । जे व्रततपदानहीन । ज्यांसी नाहीं तीर्थदर्शन । त्यांचें उद्धरण कैंवी होय ॥ ४५ ॥ ऐसी कृपा श्रीरघुनाथा । दाटली अत्यंत चित्ता । म्हणोनि उद्धरावया अनाथां । वना तत्त्वतां श्रीराम आला ॥ ४६ ॥ योगी पडतां काशीच्या ठायीं । अथवा चांडाळाच्या गृहीं । अथवा पडतां कीकटींही । रामस्मरणें पाहीं निजमोक्ष ॥ ४७ ॥ ऐसें बोलतां गोरटी[६] । अंगीं स्वेद बाष्प कंठीं । प्रेमाश्रूं[७] झांकली दृष्टी । न निघे वाक्पुटीं पैं शब्द ॥ ४८ ॥ एका जनार्दना शरण । अति रम्य रामायण । उठवोनियां जनकनंदिन[८] । रामेश्वरदर्शन घेईल राम ॥ २४९ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां रामेश्वरमहिमाकथनं नाम षट्सप्ततितमोऽध्यायः ॥ ७६ ॥ ओंव्या ॥ २४९ ॥ श्लोक ॥ १२ ॥

अध्याय सत्याहत्तरावा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ जानकीची प्रेमावस्था । देखोनियां रघुनाथा । हर्ष दाटला निजचित्ता । उचलोनि तत्त्वतां आलिंगिली ॥ १ ॥ उठवोनियां जानकीसी । रामेश्वरदर्शन घ्यावयासी । राम चालिला अतिप्रीतीसीं । विमान भूमीसी उतरलें ॥ २ ॥ भूमीं उतरतां विमान । रामदर्शनालागून । आली ऋषिमंडळी धांवोन । केलें नमन अति प्रीतीं ॥ ३ ॥ अगस्तिलोपामुद्रासमवेत । ऋषी पातले समस्त । त्यांतें देखोनियां रघुनाथ । नमन करीत लोटांगणीं ॥ ४ ॥ भूमीं उतरतां विमान । श्रीरामदर्शनालागून । तिंहीं करोनियां उठवण । रघुनंदन नमियेला ॥ ५ ॥ तेथें ऋषींचा जयजयकार । वानरवीरांचा भुभुःकार । नादें कोंदलें अंबर । दिशा समग्र दुमदुमिल्या ॥ ६ ॥ रावण निवटूनियां सकुळी । सोडविली सुरमंडळी । नवग्रहांची बेडी तुटली । संस्थापिलीं ऋषिकुळें ॥७॥ श्रीरामें नमिले ऋषिगण । ऋषींनीं नमिला रघुनंदन । तुझेनि धर्में जनस्थान । वसतिस्थान मुनिवरां ॥ ८ ॥ हेंचि नवल सांगों किती । तुवां स्थापिली त्रिजगती । सृष्टि प्रतिपाळावया रघुपती । अवतार निश्चितीं पैं तुझा[९] ॥ ९ ॥ ऐसा ऋषीश्वरांचा भार । स्तविते झाले रघुवीर । तंव अग-

१ सिंह, श्रेष्ठ. २ चामड्याचा तुकडा. ३ मलिन झाली. ४ देहत्याग. ५ कीकटनामक दुष्ट देशांत. ६ सीता सुंदरी.

७ प्रेमाश्रूंनीं. ८ जनककन्या (सीता). ९ आकारा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

स्तिलोपामुद्रा चतुर । स्तवन सत्वर करितीं झालीं ॥ १० ॥ जय जय सकळकल्याणा । सकळमंगलनिधाना । सज्जनवनचंदना । सत्समाधाना कैवल्यनिधे ॥ ११ ॥ जयजयाजी दुष्टनिर्दळणा । दुःखघ्ना द्वैतभंजना । द्वैताद्वैतदेखणा । देखणेपणा श्रीरामा ॥ १२ ॥ जय भवजाळनिरसना । मत्तभवइभभंजना । भक्तजनसंरक्षणा । प्रेमपरिपूर्णा अनुग्रहशीळा ॥ १३ ॥ सुरसंकटनिरसना । सुरवरसंस्थापना । निवटोनियां दशानना । केलें त्रिभुवना संतुष्ट ॥ १४ ॥ ऋषि वाल्मीकाचें भाष्य । अनागेत अति सुरस । तें आणिलें सत्यास । केलें सकळांस संतुष्ट ॥ १५ ॥ पूर्वी मज श्रीशंकरें । सांगीतलें अत्यादरें । श्रीराम भेटेल निर्धारें । जाय सत्वरें दक्षिणेसी ॥ १६ ॥ काशीविरहें अत्यंत । मी झालों अति दुःखित । तेणें काळें मज समस्त । चरित्र अनागत सांगितलें ॥ १७ ॥ जें ध्येय श्रीशंकराचें । निर्गुण ब्रह्म साचें । आजि दर्शन झालें त्याचें । फळलें आमुचें भाग्य जें ॥ १८ ॥ निजभाग्याचा परम सोहळा । जो परब्रह्माचा पुतळा । तो श्रीराम घनसांवळा । स्वयें निजडोळां देखिला ॥ १९ ॥ ऐसें अगस्तीचें वचन । ऐकतांचि रघुनंदन । स्वयें झाला हास्यवदन । कृतकल्याण तुझेनि आम्ही ॥ २० ॥ घेवोनि स्वामीचें दर्शन । पुढारें करितां गमन । तुझे अनुग्रहें जाण । सकळ विघ्न निरसलें ॥ २१ ॥ तुझे निजकृपेंकरोन । आपैंआप दशवदन । निवटला न लागतां क्षण । ससैन्य जाण स्वामिया ॥ २२ ॥ तुझेनि धर्मे कृपानिधी । सुखें सुटली सुरमांदी । स्वयें बैसले निजपदीं । निजानंदीं गर्जत ॥ २३ ॥ तुम्हीं वसविलें दंडकारण्य । तैंच निमाला रावण । तैं सुटले सुरगण । रघुनंदन निमित्तमात्र ॥ २४ ॥ ऐसें अगस्तीचें स्तवन । आच्छादोनि अवतारचिन्ह । करिता झाला रघुनंदन । तेणें ऋषिगण सुखरूप ॥ २५ ॥ रघुनाथ म्हणे जानकीसी । लोपामुद्रा पुसेल कीर्तीसी । तरी न सांगावें सेतुबंधासी । सांगतां छळणासी पावसील ॥ २६ ॥ पुढील कथानुसंधान । रामेश्वरतीर्थविधान । सारावया रघुनंदन । सहित ऋषिगण चालिले ॥ २७ ॥ विधियुक्त स्नानतर्पण । तीर्थविधी पिंडदान । सकळीं संपादिलें संपूर्ण । श्रीरघुनंदन निजनिष्ठा ॥ २८ ॥

> वैदेहि याहि कलशोद्भवधर्मपत्नीं
> तस्याः पुरः कथय पूर्वकथाः समस्ताः ।
> पृष्टापि मा वद पयोनिधिबंधनं त-
> त्सा वै पुनश्चुलकितांबुनिधेः कलत्रम् ॥ १ ॥
>
> ये मज्जंति निमज्जयंति च परांस्ते प्रस्तरा दुस्तरे
> वार्द्धौ वीर तरंति वानरभटान् संतारयंतेपि च ।
> नैते ग्रावगुणा न वारिधिगुणा नो वानराणां गुणाः
> श्रीमद्दाशरथेः प्रतापमहिमा सोऽयं समुज्जृंभते ॥ २ ॥

येरीकडे जानकीसी । लोपामुद्रा अति प्रीतीसीं । क्षेमालिंगन निजानंदेसीं । महासायासीं भेटी झाली ॥ २९ ॥ भेटोनि येर येरीप्रती । लोपामुद्रा अतिप्रीतीं । पुसती झाली श्रीरामकीर्ती । रावणघातीं केली जे ॥ ३० ॥ श्रीरामें करोनि वनाभिगमन । चरित्र केलें कोण कोण । हें मज अतिप्रीतीकरून । स्वयें आपण सांगावें ॥ ३१ ॥ ऐकतां लोपामुद्रेचें वचन । जानकी झाली आनंदघन । भावार्थाचें निजजीवन । नेणे छळण सर्वथा ॥ ३२ ॥ भावार्थें सीता सती । सकळ श्रीरामाची कीर्ती । सांगती झाली अति प्रीतीं । विशेष ख्याती सेतुबंधाची ॥ ३३ ॥ रावणवधाचेनि मिषें जाण । वाळी वधोनि रघुनंदनें । सुग्रीवा केलें राज्याभिषिंचन । तारिले पाषाण सागरीं ॥ ३४ ॥ समरांगणीं करोनि रण । ससैन्य सपुत्रप्रधान । निवटोनियां दशानन । केला बिभीषण लंकापति ॥ ३५ ॥ ऐकोनि जानकीची वचनोक्ती । येरी हांसिन्नली चित्तीं । विचार न करितां निश्चितीं । वानिसी कीर्ती रामाची ॥ ३६ ॥ स्त्रीराज्यलोभेंकरून । वाळी निमाला आपण । तुझ्या निजकोपाग्नीनें जाण । भस्म रावण पैं झाला ॥ ३७ ॥ एक लोभें जळाला । दुसरा क्रोधाग्नीं आहाळला । त्याचा प्राण सहजचि गेला । रामें वध केला तो काय ॥ ३८ ॥ वानिसी सेतुबंधनाची ख्याती । पाषाणीं बांधिला अपांपती । स्वयें कष्टला रघुपती । तो केला अगस्तीनें आचमन ॥ ३९ ॥ अगाधजल सागरा ।

१ प्रपंचरूपी माजलेल्या हत्तीचा नाश करणाऱ्या. २ पुढील. ३ वध करून. ४ दग्ध झाला. ५ समुद्र.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

शोषितां तया ऋषीश्वरा । जीवनहीन झाली धरा । जळचरां आकान्त ॥ ४० ॥ स्थळींचें आटतां जीवन । ब्राह्मणांचें संध्यास्नान । सत्कर्में राहिलीं पूर्ण । क्षुधा सुरगण पीडिले ॥ ४१ ॥ मग मिळोनियां समस्तीं । विनविलें ऋषीप्रती । सोडोनि मूत्रद्वारें निश्चितीं । अंपांपती क्षार केला ॥ ४२ ॥ ऐसी लोपामुद्रेची वचनोक्ती । ऐकोनि हांसली सीता सती । आपुल्या निजपतीची ख्याती । अगाध कीर्ती सांगसी ॥ ४३ ॥ घालोनियां लोटांगणीं । उपहासें बोले जनकनंदिनी । अगाध ऋषीची करणी । विश्वालागूनी दुःखजनक ॥ ४४ ॥ देव पीडिले क्षुधावर्ती । ऋषी सांडवले धर्मस्थिती । प्राणी आहारेंवीण पीडती । तळमळती जीवनेंवीण ॥ ४५ ॥ गायी हंबरडा हाणिती । जळचरां प्राणान्तवृत्ती । प्राणिमात्रां दुःखप्राप्ती । त्रिजगती हाहाभूत ॥ ४६ ॥ कष्टीं प्रार्थितां सुरवर । मुक्त केला तो सागर । तो करोनि सांडिला क्षार । झाला सर्वत्र असेव्य ॥ ४७ ॥ असतांही समुद्रतीरीं । तृषा पीडितां शरीरीं । घेवों न ये चूळभरी । करी बोहँरी जीविताची ॥ ४८ ॥ ऐसी ऋषीश्वराची ख्याती । अल्पासाठीं तपःसंपत्ती । स्वयें वेंचोनि निमेषगती । स्वयें उरती अभिमानग्रस्त ॥ ४९ ॥ आतां श्रीरामाची कथा । जे बोललीस यथार्थता । श्रीराम सर्वथा अकर्ता । कर्तव्यता त्या नाहीं ॥ ५० ॥ जैसें जैसें ज्याचें प्राचीन । त्या त्या कर्मानुरूप जाण । फळदाता रघुनंदन । स्वयें कर्तेपण त्या नाहीं ॥ ५१ ॥ आणिक एक अद्भुत । श्रीरामाचें आचरित । साधुआज्ञा शिरीं वंदीत । ख्याति विख्यात त्रिलोकीं ॥ ५२ ॥ तुझ्या स्वामीचें निजमूत्र । जगीं होईल अपवित्र । यालागीं कृपाळु रघुवीर । केलें साचार जगद्वंद्य ॥ ५३ ॥ सेतुबंधीं रामतीर्थीं । सकृत् स्नानमात्रें मुक्ती । मनें स्मरण जे करिती । ते ते होती नित्यमुक्त ॥ ५४ ॥ तुझ्या स्वामीचे मूत्रमहिमे । वंद्य केलें श्रीरामें । ऐकतांचि अगस्तिरमे । विस्मयो परम वर्तला ॥ ५५ ॥ तें ऐकतां रघुनाथ । जानकीतें निवारीत । सज्जनापुढें निजकृत । नये निश्चित पैं सांगों ॥ ५६ ॥ महंतापुढें निजख्याती । बोलणें हेचि अपकीर्ती । अवले नेणसी निश्चितीं । मौनस्थितीं पैं राहें ॥ ५७ ॥ श्रीरामाचें महिमान । जें तूं वानिसी गहन । तें सत्कृपेस्तव जाण । संदेह आन असेना ॥ ५८ ॥ पूर्वी मज नेणे कोणी । सज्जनांचे कृपेंकरोनी । वंद्य झालों त्रिभुवनीं । विश्व चिंतनीं लागलें ॥ ५९ ॥ मज नाहीं रूप नांव । तो मी सत्कृपेस्तव । स्वयें झालों सावयव । चतुर्बाहु मेघश्याम ॥ ६० ॥ मज नांवें हृषीकेशादिक । संतीं ठेविलीं सम्यक । अलंकार कौस्तुभादिक । अर्पिले देख अति प्रीतीं ॥ ६१ ॥ मज ठाव नाहीं एके ठायीं । म्हणोनि वैकुंठ रचिलें तिहीं । सिंहासनादि पदवी पाहीं । संतीं तिहीं अर्पिली ॥ ६२ ॥

विप्रप्रसादाद्धरणीधरोहं विप्रप्रसादात्कमलावरोहम् ।
विप्रप्रसादाद्विजयो जयोहं विप्रप्रसादान्मम रामनाम ॥३॥

रमा मुख्य महासिद्धी । संतीं अर्पिल्या भजनविधी । अष्टभोगादि समृद्धी । भोगविधी अर्पिले ॥ ६३ ॥ जगीं व्हावया निजमान्य । सज्जनांचा दक्षिण चरण । तेंचि माझें निजभूषण । निजचिन्ह श्रीवत्स ॥ ६४ ॥ इतरीं करितां भजनासी । सर्वस्व आपुलें अर्पी त्यांसी । शेखीं अर्पी निजरूपासी । परी श्रीवत्सासी न देववे ॥ ६५ ॥ तें नाहीं मजअधीन । जो ब्राह्मणाचा अनन्यशरण । त्यासीच प्राप्ती होय जाण । पदरजें स्नान नित्य करितां ॥ ६६ ॥ म्हणोनि जानकिये आपण । ज्याचेनि रजें होवों पावन । त्यापुढें निजकीर्तिवर्णन । सर्वथा जाण नये करूं ॥ ६७ ॥ ऐसें गुह्य निजप्रीतीसीं । श्रीरामें सांगीतलें जानकीसी । तेणें उल्लास झाला तिसी । संतमहिमेसी ऐकोनी ॥ ६८ ॥ लोपामुद्रा संतोषली । तिणें जानकी आलिंगिली । तुझेनि धर्मैंकरोनि वहिली । महिमा ऐकिली रामाची ॥ ६९ ॥ लोटांगणीं अति प्रीतीसीं । रामें विनविला अगस्ति ऋषी । तुझेनि धर्मैं विश्वनाथासी । दक्षिणेसी येणें झालें ॥ ७० ॥ तेणें प्रसंगें जगासी । दर्शन झालें ज्योतिर्लिंगासी । जें अलक्ष बहुकाळेंसीं । तेंचि जगासी प्रत्यक्ष ॥ ७१ ॥ नव्हे आजकालचें स्थापन । वाळुकालिंग नव्हे जाण । ज्योतिर्लिंग पुरातन ।

१ पृथ्वी. २ उदक. ३ समुद्र. ४ नाश. ५ पूर्वसंचित, पूर्वकर्म. ६ लोपामुद्रेला. ७ पदधूलीनें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

अनुग्रह करोन प्रकट केलें ॥ ७२ ॥ रावण शिवाचा निजगण । त्याचें देखोनि उग्र भजन । तेणें होवोन प्रसन्न । निजज्योति जाण अर्पिली ॥ ७३ ॥ तें हें रावणानुग्रहें पूर्ण । ज्योतिर्लिंग पुरातन । श्रीशंकरें आपण । जगदुद्धरणा प्रकटिलें ॥ ७४ ॥ व्रतहीन तपोहीन । तीर्थहीन दानहीन । स्वधर्मच्युत कर्महीन । होती पावन[1] रामेश्वरीं ॥ ७५ ॥ महापापी दुराचारी । केवळ पतितें[2] संसारीं । त्यांचा उद्धार रामेश्वरीं । दर्शन करितां एकवार ॥ ७६ ॥ तुझे कृपेस्तव तत्त्वतां । येणें झालें श्रीविश्वनाथा । करूनि सेतुबंध सरता[3]। जगदुद्धारता तुझेनि ॥ ७७ ॥ तुवां वसविलें दंडकारण्य । म्हणोनि झालें अति पावन। राक्षसविरोधापासून । केलें मोचन[4] तीर्थाचें ॥ ७८ ॥ तुझेनि धर्मेंकरोनि जाण । दंडकारण्य अति पावन । सकळविरोधी रावण । तुझे कृपेंकरोन निवटिला ॥ ७९ ॥ ऐसें स्तवोनि अगस्तीसी । आज्ञा पुसतां तयासी । येरीं नमिलें लोटांगणेंसीं । बोलावया आम्हांसी वदन कैंचें ॥ ८० ॥ तुझेनि आमुचें उद्धरण । तुझेनि पावन दंडकारण्य । तुझेनि तीर्थां पावनपण । जगदुद्धरण तुझेनि ॥ ८१ ॥ लिंगाचें जें पावनपण । तें तुझेनि नामेंकरोन । नामें तीर्थ पावन । जग पावन तुझेनि ॥ ८२ ॥ श्रीरामा तुझे नामापरतें । आन पावन नाहीं सरतें । नामें उद्धरती पतितें । जे तीर्थांचेनि बापें न सुटती ॥ ८३ ॥ सकळ धर्मांचे शेवटीं । कुंटणी वर्णामाजी ओखटी[5]। सकुंडी[6] बैसविली वैकुंठीं । पक्ष्यासाठीं श्रीरामा ॥ ८४ ॥ विश्वेश्वर काशीप्रती । जें उपदेशी देहांतीं । चतुर्विध जनां मुक्ती । नामें निश्चितीं पैं तुझ्या ॥ ८५ ॥ ता तूं प्रत्यक्ष घनसांवळा । आजि देखिलासे डोळां । सकळ भाग्य आलें फळा । रघुकुळपाळा श्रीरामा ॥ ८६ ॥ ऐसें परस्परें जाण । येरयेरांचें करोनि स्तवन । श्रीरामें मागोनि आज्ञापन । केलें प्रदक्षिण लिंगासी ॥८७॥ जनस्थानीं मुनिवरां । वसवावया रघुवीरा । मानसीं कळवळा पुरा । करी विचारा निर्वाहीं ॥ ८८ ॥ दंडकारण्यीं ऋषिगण । अति साधु गोब्राह्मण । मननशील ब्रह्मसंपन्न । आहारेंवीण पीडती ॥ ८९ ॥ मागों नेणती सर्वथा । अयाँचितां[7] कैंचा दाता । त्यांच्या अन्नाची संस्था । करावी तत्त्वतां आजीचि ॥ ९० ॥ म्हणोनि निजनामें नगर । रामें वसवोनि रामपुर । ब्राह्मणां दिधलें अग्रहार[8]। ऋषीश्वरनिर्वाहो ॥ ९१ ॥ तें श्रीरामाचें आज्ञोत्तर । ब्राह्मणांचें वृत्तिक्षेत्र । राजीं पाळिलें उत्तरोत्तर । अवधि द्वापरापर्यंत ॥ ९२ ॥ पुढें कलियुगाचे नृपतीं । श्रीरामआज्ञा बहुतीं । स्वयें पाळिली यथास्थितीं । कोणाएकाची वृत्ती क्षोभली ॥ ९३ ॥ विकल्प धरोनियां मना । राजभाग ब्राह्मणां । मागों आदरिलें जाणा । न देतां दंडणा करूं पाहे ॥ ९४ ॥ शीघ्र आणा करभार । अथवा दाखवावें पत्र । तुम्हांसी कोणीं अग्रहार । दिलें सत्वर सांगावें ॥ ९५ ॥ अन्यथा करोनि दंडन । पूर्वी भक्षिलें आणवीन । वचन ऐकतां ब्राह्मण । झाले उद्विग्न अति दुःखी ॥ ९६ ॥ परंपरागत अग्रहार । आम्ही खातों उत्तरोत्तर । वडिलीं कोठें ठेविलें पत्र । नाहीं गोचर आम्हांसी ॥ ९७ ॥ आम्हांसी अन्न श्रीरामदत्त । वार्ता ऐकों दिवस बहुत । पत्राचा काय जो झाला अर्थ । आम्ही निश्चित जाणूंना ॥ ९८ ॥ म्हणोनि झाले चिंतातुर । तंव दूत ओढिती सत्वर । तेणें आकान्त झाला थोर । द्विजवर अति दुःखी ॥ ९९ ॥ श्रीरामकृत सरोवर । नगराबाहेर सविस्तर । तेथें जावोनि समग्र । मरणा तत्पर बैसले ॥ १०० ॥ मागील दिवसांचा समग्र । किती द्यावा करभार । पुढें केंवी भरे दुंर्भर । मरणा तत्पर यालागीं ॥ १ ॥ विषप्रयोग करोनि देख । प्राण सांडणें आवश्यक । म्हणोनि मीनले सकळिक । विचार आणिक असेना ॥ २ ॥ अंध पंगु मुके दीन । दरिद्रदोषें आचारहीन । ऐसियांतें रघुनंदन । सर्वथा जाण नुपेक्षी ॥ ३ ॥ तो आम्हांलागीं उदासभूत । कां झाला रघुनाथ । कां उपेक्षिलें निजव्रत । म्हणोनि अनाथ सांडिलों ॥ ४ ॥ जेणें वेदांचा उद्धार केला । ग्राहग्रस्त[11] गज सोडविला । अंबरीषालागीं पावला । त्याचा सोशिला जन्मभार ॥ ५ ॥ हिरण्याक्षें अवनी । नेतां आणिली तो निवटोनी । प्रल्हादाच्या व्यथा देखोनी । स्तंभ फोडूनी प्रकटला ॥ ६ ॥ सहस्रार्जुन होवोनि

१ पवित्र. २ पापी. ३ श्रेष्ठ. ४ मुक्तता. ५ नीच. ६ देहासहित. ७ न मागणाऱ्यांना. ८ इनाम गांव. ९ ठाऊक. १० पोट. ११ मगरानें ग्रासलेला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

प्रबळ । गोब्राह्मणादि सकळ । पीडिता झाला बहुकाळ । तो निवटी तत्काळ परशुधर ॥ ७ ॥ रावण होवोनि प्रबळ । बंदीं घातले सुर सकळ । त्यांची देखोनि कळवळ । रघुकुळपाळ पावला ॥ ८ ॥ वेगीं येवोनि वनांतरा । संहार केला निशाचरां । शिळीं बुजोनि सागरा । केलें वानरां जगद्वंद्य ॥ ९ ॥ निवटोनि लंकानाथ । सुर सोडविले समस्त । संस्थापिला शरणागत । कीर्ति अद्भुत तिहीं लोकीं ॥ ११० ॥ ऐसीं अनंत चरित्रें । ज्याचीं पुराण वाखाणितें । तेणें मोकलिलें रघुनाथें । निजअंकितें विसरला ॥ ११ ॥ कैंचें आम्ही दावूं पत्र । कोठोनि देऊं करभार । दीनदयाळ रघुवीर । तीं ब्रीदें[१] समग्र काय झालीं ॥ १२ ॥ धांव पाव गा रघुवीरा । म्हणोनि आक्रंदती सैरां । नेत्रीं अश्रूंचिया धारा । दीर्घस्वरें रुदन करिती ॥ १३ ॥ तें न साहेचि वायुसुता । श्रीरामाज्ञा उल्लंघितां । त्याच्या करीन मी निःपाता । म्हणोनि हनुमंत पातला ॥ १४ ॥ लहानथोर देखतां जन । आधीं पत्र देवों काढून । तें न मानी तरी दंड करीन । निःसंतान होय जेणें ॥ १५ ॥ ब्राह्मणांच्या वृत्तीचें[२] हरण । त्यावरी श्रीरामदत्त जाण । श्रीरामाचे कृपेंकरोन । करीन शासन मी त्यांसी ॥ १६ ॥ अधर्मशीळ नृपवर । ते केवळ पैं तस्कर । मी श्रीरामाचा किंकर । दंड साचार करीन ॥ १७ ॥ म्हणोनि सकळां लोकांदेखत । क्रोधें पातला हनुमंत । ब्राह्मणां आश्वासोनि तेथ । उडी सरोवरांत घातली ॥ १८ ॥ पवनपुत्र आतुर्बळी[३] । उडी घालोनि तत्काळीं । महाशिळा बाहेर काढिली । टाकूनि दिधली द्विजांपुढें ॥ १९ ॥ तेणें चमत्कारले सकळिक । कैंचा वानर एकाएक । येवोनि बुडी दिधली देख । शिळा अलोलिक काढिली ॥ १२० ॥ ऐसे मिळोनि समग्र । अवघे झाले आश्चर्यपर । एक म्हणती कायसा विचार । शिळा सत्वर पैं शोधा ॥ २१ ॥ म्हणोनियां सकळीं । शिळा धुवोनि शुद्ध केली । तंव तेथें अक्षरें भलीं । वरी देखिलीं नागरें[४] ॥ २२ ॥ तंव हरिखले सत्वर । श्रीरामें पाठविला वानर । काढूनि दिधलें शासनपत्र । श्रीरघुवीर कृपाळु ॥ २३ ॥ त्याचें करोनि प्रतिलेखन । करावया राजदर्शन । सकळ निघाले मिळोन । श्रीरघुनंदनप्रतापें ॥ २४ ॥ रामें वांचविलें आम्हांसी । म्हणोनि आनंद सकळांसी । निघाले अति आनंदेंसीं । वृत्त रायासी सांगावया ॥ २५ ॥ पत्राचेनि अति हरिखें । येवोनि रायाजवळिकें । पत्र दाविती कौतुकें । पहावें विवेकेंकरोनि ॥ २६ ॥ परंपरा श्रीरामदत्त । आम्ही सेवितों काळ बहुत । तें पत्र पुसतां स्वामिनाथ । वेगीं हनुमंत पातला ॥ २७ ॥ घालोनि सरोवरीं उडी । शासनपत्र तांतडीं । काढोनियां लवडसवडी[५] । अति निर्वडीं[६] पाठविलें ॥ २८ ॥ ऐसें द्विजांचें उत्तर । ऐकतांचि नृपवर । झाला अत्यंत आल्हादपर । मस्तकीं पत्र वंदिलें ॥ २९ ॥ मन ठेवोनि श्रीरामभक्तीं । अति नम्र अत्यंत प्रीतीं । पत्र वाची नृपती । सावध श्रोतीं परिसावें ॥ १३० ॥

> सामान्योऽयं धर्मसेतुर्नराणां
> काले काले पालनीयो महद्भिः ।
> सर्वानेतान्भाविनः पार्थिवेंद्रान्
> भूयो भूयो याचते रामचंद्रः ॥ ४ ॥

भूमंडळींचे नृपवर । युगानुयुगीं उत्तरोत्तर । त्यांसी माझा नमस्कार । प्रीतिपुरस्कार विनंतीसीं ॥ ३१ ॥ माझें नांव दाशरथी । सूर्यवंशीं रघुपती । सकळीं मिळोनि माझी विनंती । भावें नृपतीं पाळावी ॥ ३२ ॥ सकळावरोधी दशशिरी । पीडूं आदरिली धरित्री[७] । यासी निवटावया झडकरी । सेतु सागरीं बांधिला ॥ ३३ ॥ आणोनियां महापाषाण । सेतु बांधिला निमेषेंकरोन । सोडवोनियां सुरगण । दशानन निवटिला ॥ ३४ ॥ तेणें काळें चराचर । सकळ त्रैलोक्यीं सुख निर्भर । सेतुबंधीं रामेश्वर । जगदुद्धार करीतसे ॥ ३५ ॥ त्याहूनि हा पावन । धर्मसेतु अति गहन । ब्राह्मणांसी क्षेत्रदान । निर्वाहार्थ जाण दीधलें ॥ ३६ ॥ तेथील भक्षोनियां अन्न । द्विज करिती वेदाध्ययन । वेदघोषें जन पावन । श्रीनारायण संतुष्ट ॥ ३७ ॥ क्षत्रियांचा धर्म नव्हे । जे याच्ञा करावी स्वयें । तरी द्विजकार्यालागीं पाहें । याचिताहें तुम्हांप्रति

१ कीर्ति. २ उपजीविकेचें. ३ पराक्रमी. ४ सुंदर. ५ सत्वर. ६ निश्चयानें. ७ पृथ्वी. ८ पुष्कळ.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ ३८ ॥ जें ब्राह्मणांचें वृत्तिहरण। सर्वथा न करावें आपण। तेणें सकळ कुळा कल्याण। सुख गहन पावती ॥ ३९ ॥ तेचि धन्य नृपवर। ज्यांसी द्विजसेवा निरंतर। त्यांच्या निर्वाहीं तत्पर। अत्यादर जयांसी ॥ १४० ॥ देखतां द्विजसंकटासी। सर्वांग ओढवी उल्हासीं। पार नाहीं त्याच्या भाग्यासी। हें निश्चयेंसीं अवधारा ॥ ४१ ॥ हेंचि भगवंताचें व्रत। द्विजसेवा इत्थंभूत। त्यांचा निर्वाहो निश्चित। स्वयें करीत निजांगें ॥ ४२ ॥ याचिलागीं अवतारमाळा। स्वयें धरणें घननीळा। दुष्ट निवटोनि सकळा। द्विजकुळा रक्षावें ॥ ४३ ॥ जो द्विजद्वेष करी। तोचि भगवंताचा वैरी। त्यासी निवटावया निर्धारीं। आयुधें धरी चक्रादि ॥ ४४ ॥ जो करी द्विजवृत्तिहरण। दंडी अभिशापेंकरोन। धूर्तवादें ठकून। नागवी ब्राह्मण धनलोभें ॥ ४५ ॥ त्याचें सकळ निःसंतान। स्वयें करी भगवान। स्वर्गस्थ जे पितर जाण। त्यांसीही पतन तत्काळ ॥ ४६ ॥ वाचा मनें धरादान। स्वयें दिधलें आपण। त्याचें करितां अभिलाषण। स्वयें भगवान क्षोभेल ॥ ४७ ॥ अथवा जें कां परदत्त। आपुला संबंध नाहीं जेथ। त्याचेनि अभिलाषें निश्चित। होईल घात नवल काय ॥ ४८ ॥ याकारणें पुढतपुढती। भावी जे कां भूपती। विनवीत असें त्यां अतिप्रीतीं। पुढील निश्चितीं होतील जे ॥ ४९ ॥ तिहीं परिसोनि विनंती। स्वयें मानावी निश्चितीं। सांडूनि लोभाची आसक्ती। ब्राह्मणभक्ती करावी ॥ १५० ॥ लोभें ऐहिकीं न मानी कोणी। लोभें निंद्य होइजे जनीं। लोभें परलोकाची हानी। निंद्य पतनीं पडे लोभें ॥ ५१ ॥ वंचोनि उत्तम लोकासी। लोभें होइजे नरकवासी। म्हणोनि निर्लोभ मानसीं। द्विजसेवेसी करावें ॥ ५२ ॥ निर्विकल्प निर्लोभ पूर्ण। तोचि माझा पढियंता जाण। ऐसें श्रीरामाचें वचन। पत्रावरून परिसिलें ॥ ५३ ॥ देखतांचि पत्राक्षरें। आश्चर्यवंत समग्रें। कृपा केली रघुवीरें। राखिलें द्विजवरें आकांतीं ॥ ५४ ॥ शिरीं वंदोनियां पत्रासी। आज्ञा दिधली द्विजांसी। सुखें जावें निजनगरासी। श्रीरामदत्तासी सुखें भोगा ॥ ५५ ॥ कोणी करील विपरीत। त्याचा मी करीन घात। ऐसें बोलतां नृपनाथ। ब्राह्मण हर्षयुक्त निघाले ॥ ५६ ॥ संकटीं सोडविलें आकांतासीं। म्हणोनि आनंद सकळांसी। आतां जावोनि नगरासी। हनुमंतासी करूं पूजा ॥ ५७ ॥ सकळ वृत्तान्त पुसों त्यासी। तुझा वास कोणे देशीं। पुनरपि ओढवल्या विघ्नासी। कैंवी भेटसी स्वामिया ॥ ५८ ॥ ऐसा करोनि संप्रधार। द्विज निघाले वेगवत्तर। ठाकोनि आले सरोवर। हनुमान वीर न देखती ॥ ५९ ॥ अवळें ब्राह्मणें निश्चितीं। न भेटतांचि शीघ्रगती। भुलोनि गेलीं विषयप्रीतीं। नोळखिती सज्जना ॥ १६० ॥ द्रव्यलोभें जो भुलला। अथवा कामातुर झाला। विषयविघातें पडला। निमग्न झाला चिंतेसीं ॥ ६१ ॥ त्याची बुद्धि अंध झाली। हिताहित न देखे वहिली। विषयगतीं बुडोनि गेली कांहीं केल्या उपडेना ॥ ६२ ॥ स्वस्थ असावें बुद्धीसीं। तरी जाणावें निजहितासी। कोण ओळखे निजसज्जनासी। हनुमंतासी कोण पुसे ॥ ६३ ॥ पत्र देखोनि तांतडीं। संतोषाची उभवोनि गुढी। राजभेटी लवडसवडी। द्विजवर पैं गेले ॥ ६४ ॥ मागें सरोवरीं हनुमंतें। प्रकाशावया तीर्थमहिमेतें। प्रतिष्ठिलें राममूर्तीतें। त्याच्या नामातें परिसावें ॥ ६५ ॥ दानउदार रघुपती। याचक देखतां निश्चितीं। देतां बहु न मने चित्तीं। अद्भुतशक्ती पैं देणें ॥ ६६ ॥ म्हणोनि नामगौरव। हनुमान म्हणे उदार राघव। तेंचि अभिधान स्वयमेव। उत्तरोत्तर चिंतिती ॥ ६७ ॥ ब्राह्मणांचे हृदयीं जाण। चिंतातापअति दारुण। सबळ वाढला होता संपूर्ण। त्याचें निरसन पैं झालें ॥ ६८ ॥ म्हणोनि यासी अभिधान। सरोवर हृदयतापनाशन। तीर्थ विख्यात पावन। अद्यापि जाण वर्णिती ॥ ६९ ॥ तेथें करोनियां स्नान। उदार रामाचें दर्शन। सद्भावें करितां संपूर्ण। निश्चळ मन पैं होय ॥ १७० ॥ द्वंद्वदुःख पैं त्रिशुद्धी। निरसोनियां आधिव्याधी। समाधान निजानंदीं। कीर्ति अगाधी हनुमानाची ॥ ७१ ॥ येरीकडे रघुनंदन। नमोनि सकळ ऋषिगण। विमानीं करोनि आरोहण। सत्वर जाण चालिला ॥ ७२ ॥ अति प्रीतीकरोनि नमन। श्रीराम आरुढतां

---

१ पूर्णपणें. २ इच्छा. ३ आवडता. ४ ऐकिलें. ५ निश्चय. ६ दुर्बळ. ७ नांव. ८ निवारण. ९ खरेपणानें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

विमान । जयजयकार जाहला पूर्ण । नादें त्रिभुवन कोंदलें ॥ ७३ ॥ पूर्वानुक्रमें रघुपती । विमानीं बैसतां निश्चितीं । विमान उसळलें अंतरिक्षस्थितीं । शीघ्रगतीं आकाशीं ॥७४॥ विमानासरसीं किरोणें । देत उडालीं वानरगणें । भार चालिले पैं गगनें । लाजिला पवन उड्डानासीं ॥ ७५ ॥ भुभुःकार वानरांचे । माजी उच्चारण नामाचें । जयजयकार सिद्धांचे । चरित्र रामाचें वर्णिती ॥ ७६ ॥ गगनीं चालतां विमान । मागुतेनि रघुनंदन । जानकीतें हातीं धरून । निजचरित्र जाण सांगत ॥ ७७ ॥ तूं ऐकें जानकी सुंदरी । तुझेनि वियोगें दुःख भारी । मी हिंडलों गिरिकंदरीं । निजनिर्धारीं तें ऐक ॥ ७८ ॥

एष विंध्याभिधः शैलो नदीनदसमन्वितः ।
एषा मे दृश्यते सीते किष्किंधा चित्रकानना ॥ ५ ॥
सुग्रीवनगरी रम्या वाली यत्र हतो मया ।
एतन्मालयवतः शृंगं किष्किंधोपरि भास्वरम् ॥ ६ ॥

पैल किष्किंधाभवन । फळीं पुष्पीं मंडित वन । वाळी बळियाढा दारुण । त्याचें भवन जानकिये ॥ ७९ ॥ बंधूची हिरोनि कामिनी । राज्य करी किष्किंधाभवनीं । वरमदें उन्मत्त होवोनी । बंधूलागोनि दवडिलें ॥ १८० ॥ विध्वंसोनि त्या वरदासी । बाणें निवटोनि वाळीसी । दारेसहित राज्यासी । क्षणार्धेंसीं हरितलें ॥ ८१ ॥ सोडविली सुग्रीवपत्नी । हरितली वाळीची राणी । दोन्ही सुग्रीवासी देवोनी । राज्याभिषिंचनीं गौरविला ॥ ८२ ॥ तेणें उपकारें दाटला । वानरभार घेवोनि आला । मातें सर्वस्वें विनटला । वर्तों लागला ममाज्ञा ॥ ८३ ॥ व्रतें धरोनि दुर्धर्ष । राहिलों प्रस्रवणगिरीस । स्वयें देखतां पर्वतास । येथें चातुर्मास्य क्रमियेलें ॥८४॥ पुढें पाहें पंपासरोवर । जेथें भेटले वानरवीर । पुढें शबरीस्थान पवित्र । जे म्यां सत्वर उद्धरिली ॥ ८५ ॥ पैल शरभंग ऋषीची पर्णकुटी । जे तुवांही देखिली दृष्टीं । धिकारोनि ब्रह्मसृष्टी । उठाउठीं उद्धरिला ॥ ८६ ॥ आमुचा आश्रम पंचवटीं । जेथें येवोनि रावण कपटी । तुज वाहोनियां पाठीं । हरण गोष्टी पैं केलें ॥ ८७ ॥ ऐसें अति प्रीतीं रावणारी । सांगतां जानकी सुंदरी । तंव विमान गगनांतरीं । त्वरेंकरीं चालिलें ॥ ८८ ॥ सांडूनि मलयाद्रिशेषाद्री । प्रस्रवणादि सिंहाद्री । महादेवाचा ब्रह्माद्री । आनंदगिरी ओलांडिला ॥ ८९ ॥ जेथें अत्रि आणि अनसूया । स्वयें भेटलीं रघुराया । अनुग्रहिली रामजाया । जाणोनियां भविष्य ॥ १९० ॥ तो सांडोनि आनंदगिरी । विमान चालिलें झडकरी । क्षणें ओलांडिला विंध्याद्री । अति मनोहरी शोभा ज्याची ॥ ९१ ॥

असौ सुतनु शैलेन्द्रश्चित्रकूटः प्रकाशते ।
यत्र मां कैकयीपुत्रः प्रमोदयितुमागतः ॥ ७ ॥

सुमध्यमे सुमंगले । ऐक जानकिये वेल्हाळे । आम्हां भेटावया प्रेमळे । दोघेही आले कैकयीपुत्र ॥ ९२ ॥ करोनि पितृकार्य पिंडदान । कष्टीं बोळविले दोघे जण । तो हा चित्रकूटपर्वत जाण । निवासस्थान आमुचें ॥ ९३ ॥ पैल मंदाकिनी पुर्ण्यसरिता । वंद्य ब्रह्मादिकां समस्तां । जियेचा शिंतोडा लागतां । उद्धार तत्त्वतां जड जीवां ॥ ९४ ॥ अंतरिक्ष असतां विमानीं । तळीं दिसे सकळ अवनी । देखोनियां राजधानी । जानकीलागूनी सांगत ॥ ९५ ॥ आमुचे आप्त अत्यंतर । वाल्मीक भरद्वाज मुनिवर । यांचे आश्रम मनोहर । पैल सुंदर शोभती ॥ ९६ ॥ गंगा यमुना अति विख्यात । माजी सरस्वती अति गुप्त । गुहक आमुचा निजभक्त । नगर विख्यात दिसे त्याचें ॥ ९७ ॥ जेथें एक रात्र राहून । बोळविला सुमंत प्रधान । तें हें गुहकनगर जाण । अति पावन जानकिये ॥ ९८ ॥

एषा सा दृश्यते सीते राजधानी पितुर्मम ।
अयोध्या कुरु वैदेहि प्रणामं पुनरागता ॥ ८ ॥
ततस्ते वानराः सर्वे राक्षसाः सबिभीषणाः ।
उत्प्लुत्योत्प्लुत्य ददृशुस्तां पुरीं शुभकाननाम् ॥ ९ ॥

त्याहूनि पुढें अलोलिक । राजधानी अति सम्यक । पैल दिसत असे देख । आमुचा जनक जेथ होता ॥ ९९ ॥ ते हे देखतां अयोध्या नगरी । अति मंडित माड्यागोपुरीं । पताका तोरणें चौफेरीं । अति कुसरीं शोभत ॥ २०० ॥ पैल देख

१ आकाशमार्गानें. २ उड्या. ३ समूह. ४ कठीण. ५ श्रीराम. ६ उपदेशिली. ७ जानकी. ८ पुण्यकारक नदी. ९ आपलें नगर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

राजभुवन । अति मंडित सिंहासन । नित्य जेथें दशरथारोहण । करीं नमन तयासी ॥ १ ॥ ऐकोनि श्रीरामवचन । जानकी झाली आनंदघन । केलें साष्टांगीं नमन । करसंपुट जाण जोडोनी ॥ २ ॥ तें देखोनि सौमित्र । झाला अत्यंत आल्हादपर । केला साष्टांग नमस्कार । हर्ष थोर उथळला ॥ ३ ॥ देखोनियां सिंहासन । श्रीरामें घातलें लोटांगण । आनंद उथळला संपूर्ण । वानरगण हरिखले ॥ ४ ॥ अयोध्येचे १आराम गहन । वनें २उपवनें विश्रामस्थान । देखोनियां वानरगण । करिती गर्जन रामनामें ॥ ५ ॥ देती उलटीं ३किराणें । नामें गर्जती दीर्घस्वनें । नाचताती वानरगणें । बिभीषणासमवेत ॥ ६ ॥ येरयेरां क्षेमें देती । येरयेरां नमस्कारिती । विजयी होवोनि रघुपती । अयोध्येप्रती स्वयें आला ॥ ७ ॥ एका जनार्दना शरण । पुढें कथा अति गहन । श्रीरामभरताचें दर्शन । श्रोतें अवधान देती स्वयें ॥ २०८ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां श्रीरामअयोध्यादर्शनं नाम सप्तसप्ततितमोऽध्यायः ॥ ७७ ॥ ओंव्या ॥ ॥ २०८ ॥ श्लोक ॥ ९ ॥

अध्याय अठ्याहत्तरावा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ विमानीं बैसोनि रघुनाथा । अति त्वरान्वित जातां । तळीं भरद्वाज अवचितां । आश्रमीं असतां देखिला ॥ १ ॥ आश्रमीं असतां भरद्वाज ऋषी । आश्चर्य देखिलें आकाशीं । हेमच्छाया दशदिशीं । चौपासीं पसरली ॥ २ ॥ रविचंद्रांतें लाजवीत । प्रकाश शीतोष्णातीत । गगनीं काय असे जात । ऋषि मनांत विचारी ॥ ३ ॥ निर्धारोनि पाहे नयनीं । तंव परिवारला वानरगणीं । श्रीराम देखिला विमानीं । जनकनंदिनी अंकावरी ॥ ४ ॥ सौमित्रासहित राम होये । सवें वानर कैंचे हो हे । राक्षसगणही दिसती पाहें । श्रीराम होये सर्वथा ॥ ५ ॥ माझ्या श्रीगुरूच्या अनागता । श्रीराम न करी अन्यथा । निवटूनियां लंकानाथा । शरणागता स्थापिलें ॥ ६ ॥ होय तो शरणागत पूर्ण । राक्षसांमाजी बिभीषण । हनुम्यासहित सुग्रीव जाण । वानरगणसमवेत ॥ ७ ॥ ऐसें श्रीरामाचें निजविमान । निजगुरूच्या भाष्यावरून । परीक्षा करोनियां पूर्ण । गुर्णाकार पूर्ण पाहिला ॥ ८ ॥

> पूर्णे चतुर्दशे वर्षे पंचम्यां भरताग्रजः ।
> भरद्वाजाश्रमं प्राप्य ववंदे नयतो मुनिम् ॥ १ ॥
> गोत्रं नाम समुच्चार्य राघवः सहलक्ष्मणः ।
> प्रणतं राघवं दृष्ट्वा सानुजं पुनरब्रवीत् ॥ २ ॥

माघ शुद्ध पंचमीपासून । वर्ताळा करितां लेखन । तंव चौदा वर्षें जाहलीं पूर्ण । व्रत संपूर्ण पैं झालें ॥ ९ ॥ ऐसा निश्चय मानोनि मनीं । रामसौमित्र लक्ष्मणी । लोटांगण घालूनी । अति प्रीतीकरोनी विनवीत ॥ १० ॥ भरद्वाजगोत्रोत्पन्न । भारद्वाज माझें अभिधान । श्रीरामा तुज अभिवंदन । दीनवचन परिसावें ॥ ११ ॥ स्वस्तिक्षेम विजययात्रा । केली निवटोनि दशवक्त्रा । तेणें करोनि रघुवीरा । चराचरां आनंद ॥ १२ ॥ परम भाग्याचे आम्ही पूर्ण । जे पुनरागमनीं रघुनंदन । नयनीं देखिला संपूर्ण । सकळानुष्ठान फळा आलें ॥ १३ ॥ तूं दीनाची माउली । आर्तश्रांताची सांउली । निजजनां कल्पवल्ली । कृपा ओलावली तुझेनि ॥ १४ ॥ तूं शरणागता शरण्य । आर्तबंधु आर्तत्राण । मी तुझें निजदीन । करीं पावन आश्रम माझा ॥ १५ ॥ आश्रमा तुझें आगमन । तेणें सकळ कृतकल्याण । धर्मानुष्ठानाचें फळ पूर्ण । तुझे श्रीचरण देखोनी ॥ १६ ॥ तुझेनि पावन आश्रम । तुझेनि पावन स्वधर्म । तुझेनि पावन स्वकर्म । सर्वोत्तम तुझेनि आम्ही ॥ १७ ॥ घालोनियां लोटांगण । अत्यंत प्रीतीं रघुनंदन । विनवितांचि स्वयें जाण । आला ठाकून प्रेमभावें ॥ १८ ॥ श्रीराम प्रेमाचा पाहुणा । राम प्रेमाचा अंकित जाणा । प्रेमाचे पडिभरें पूर्ण । न म्हणे आपणा कुळजाती ॥ १९ ॥ हा तरी द्विजवर श्रेष्ठ । ऋषीश्वरांमाजी वरिष्ठ । भजनयुक्त स्वधर्मनिष्ठ । प्रेम उद्भट त्याहीवरी ॥ २० ॥ ऐसियाचें उपेक्षण । सर्वथा न करी रघुनंदन । तळीं उतरिलें विमान । सेवकजनसमवेत ॥ २१ ॥ येरें घातलें लोटांगण । केलें साष्टांग नमन । वेगें श्रीराम उचलोन । धरी आलिंगून हृदयेंसीं ॥ २२ ॥ श्रीरामें

---

१ विश्रांतिस्थानें. २ बगीचे. ३ उड्या. ४ मोठ्या आवाजानें. ५ आलिंगन. ६ सुवर्णाची सांवली. ७ वेष्टिलेला. ८ हिशेब. ९ नांव. १० पीडितांचा रक्षणकर्ता. ११ आसक्तीनें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

देतां आलिंगन । उडालें शून्याचें शून्यपण । देह झाला चैतन्यघन । जीवशिवपण नाठवे ॥ २३ ॥ तैसेंचि श्रीरामासी पूर्ण । देतां ऋषीसी आलिंगन । श्रीरामा नाठवे रामपण । आनंद पूर्ण उथळला ॥ २४ ॥ गूळ भेटे गोडियेसी । ऋषिरामांची भेटी तैसी । येरामाजी येरू परियेसीं । निजउल्लासीं निमग्न ॥ २५ ॥ तया सुखाचे जाणते । दुजेपण कैंचें पाहते । टकमक झाली सकळांतें । चेतवी तेथें कोण कोणा ॥ २६ ॥ तेणें काळें रघुनाथ । आपण आपणा सावध करीत । एकाकी न रमते स द्वितीयमैच्छत । सत्य श्रुत्यर्थ केला रामें ॥२७॥ आपल्या आपण भक्तिसुख । स्वयें भोगावें सम्यक । देव भक्त होवोनि एक । आलिंगन देख सोडिलें ॥ २८ ॥ सुटतां दोघांचें आलिंगन । सर्वथा नाहीं दोन्हीपण । तेणेंचि भावें श्रीरामगण । बिभीषणादि नमियेले ॥ २९ ॥ जें सुख श्रीरामभेटीसी । इतरां आलिंगन तेणेंचि भावेंसीं । सर्वदा भेद मानसीं । न दिसे बुद्धीसी एकत्वें ॥ ३० ॥ श्रीराम आणि सौमित्र जाण । सुग्रीवादि बिभीषण । हनुम्यासहित वानरगण । आलिंगिले श्रीरामभावें ॥ ३१ ॥ मांडिलें प्रीतीं पूजाविधान । विष्टरयुक्त वरासन । बैसवोनि रघुनंदन । षोडशोपचारीं पूजिला ॥ ३२ ॥ तैसेचि सकळ सेवक । बिभीषणादि प्रमुख । भरद्वाजें एकाएक । अति सम्यक पूजिले ॥ ३३ ॥ पुसे भोजना आज्ञापन । तें न मानीच रघुनंदन । कांहीं नेदीच प्रतिवचन । तेणें ऋषिवर जाण सचिंत ॥ ३४ ॥ ऋषि देखोनि चिंताक्रांत । बिनविता झाला रघुनाथ । क्षमा करावी भोजनार्थ । प्रसन्नचित्त होवोनियां ॥ ३५ ॥ भरत उपवासी मजवीण । त्यजिला आहार जीवन । व्रत अंगीकारोनि दारुण । वनवास पूर्ण घेतला ॥ ३६ ॥ राजधानी सांडोनियां दूरी । वल्कलांबर जटाधारी । भूमिशायी निरंतरी । व्रतधारी पैं झाला ॥ ३७ ॥ त्यासी सांडोनि आपण । चौदा वर्षेंपर्यंत जाण । सर्वथा नाहीं घेतलें अन्न । आजीच भोजन कैंवी करणें ॥ ३८ ॥ तुम्ही साधु सर्वज्ञ । निजचित्तीं विवंचून । मज द्यावें आज्ञापन । तेंचि वचन मज वद्य ॥ ३९ ॥ म्हणोनि श्रीरामें आपण । ऋषीस घातलें लोटांगण । तेणें ऋषि विस्मयापन्न । स्वयें रघुनंदन नमियेला ॥४०॥ पूर्णब्रह्म रघुनंदन । स्वयें असोन आपण । वाढवीत भक्तमहिमान । दीनजनकृपाळु ॥ ४१ ॥ अहं भक्तपराधीन । ऐसें श्रुतिशास्त्रपुराण । तें दाविलें सांच करोन । भक्तमहिमान वाढविलें ॥४२॥ राम भक्तांचा अंकिला । राम भक्तांचा विकला । राम भक्तांचा केला । सत्यत्व या बोला आणिलें रामें ॥ ४३ ॥ ऐसी करोनियां विनवण । ऋषीनें प्रार्थिला रघुनंदन । फळाहारा आज्ञापन । द्यावें आपण पैं स्वामी ॥ ४४ ॥ म्हणोनि विनविला रघुपती । तेणें संतोषला निश्चितीं । स्वयें मानोनियां विनंती । निजचित्तीं विवंची ॥ ४५ ॥ विरक्त ब्राह्मण तपोधन । कष्टी फलाहारालागून । होऊं पाहे खेदक्षीण । याचें सूचन करावें ॥४६॥ ऐसें निजचित्तीं राघवें। धरितांचि निजस्वभावें। वनस्पती सर्वभावें। जीवें भावें बोळल्या ॥४७॥ सर्वऋतु सर्व काळ । एके वेळे बोळले सकळ । वनस्पति फळ मूळ । रसकल्लोळ बोळला ॥ ४८ ॥ शुष्कें बोळलीं रसभारें । अफळें दाटलीं फळसंभारें । खाकरें होतीं जीं निःसारें । तीं कोमळांकुरें लसलसलीं ॥ ४९ ॥ सजीव निर्जीव तरुवर । अमृतरसें पैं समग्र । अवघे बोळले एकत्र । बाप रघुवीर कृपाळु ॥ ५० ॥ सरसें विरसें नीरसें । अवघीं बोळलीं ब्रह्मरसें । लाघव केलें राघवेशें । मुनि संतोषें वसावया ॥५१॥ हा अर्थ नेणोनि मुनी । राम विनविला फळभोजनीं । ऋषिवचना संतोषोनी । मस्तकीं मानी श्रीराम ॥ ५२ ॥

अर्घ्यं च प्रतिगृह्णीष्व श्वोऽयोध्यायां गमिष्यसि ।

तस्य तच्छिरसा वाक्यं प्रत्यगृह्णात्स राघवः ॥ ३ ॥

स्वामी श्रीरामा परियेसीं । आतां गेलिया अयोध्येसी । मागुता निजप्रीतीं देखिजेसी । ऐसें कोणासी भाग्य आहे ॥ ५३ ॥ हातींचा श्रीराम गेलिया । पुनरपि भेटेल गोष्टी वायां । संतोष मानी तो गिळिला माया । निजात्मघात स्वयें केला ॥ ५४ ॥ यालागीं रघुनंदना । कृपा करावी दीनजनां । यथाशक्ति पाद्यार्घ्य जाणा । केलें तें प्रीतीनें अंगीकारीं ॥ ५५ ॥ ऐसी प्रतिपूर्वक विनवण । ऐकोनियां रघुनंदन । अंगीकारिली प्रीति-

१ उखवला. २ दर्भासन. ३ भक्तांच्या स्वाधीन. ४ सत्य.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

करोन । दीनजनकृपाळु ॥ ५६ ॥ फळें आणावया ऋषीश्वर । शिष्य धाडी जंव सत्वर । तंव आश्रम मनोहर । पुष्पीं अपार लगडला ॥ ५७ ॥ सजीव निर्जीव वनस्पती । अमृतरसें वर्षताती । पाषाण तेही द्रवती । श्रीरघुपतिनिजकृपा ॥ ५८ ॥ तेणें अति संतोष मानसीं । श्रीरामें कृपा केली ऐसी । आश्रमचि रामपूजेसी । सकळ सिद्धीसीं वोळला ॥ ५९ ॥ फळें तोडोनि अति प्रीतीं । ऋषीनें आणिलीं शीघ्रगती । सहित वानरांच्या पंक्ती । श्रीरघुपती सुखावला ॥ ६० ॥ विधियुक्त फळभोजन । ऋषीनें संपादिलें पूर्ण । तेणें संतोषला रघुनंदन । माग वरदान म्हणे द्विजा ॥ ६१ ॥ ऐकोनि वरदाचें वचन । ऋषि संतोषीं निमग्न । घालोनियां लोटांगण । काय आपण विनवीत ॥ ६२ ॥ ऐकें स्वामी रघुनाथा । तंवचि वासनेची वार्ता । तंवचि मागणियाची कथा । जंव भेटी तत्त्वतां नाहीं तुझी ॥ ६३ ॥ तंवचि आटाआटी साधनांची । तंवचि खटपट[1] तीर्थांची । तंवचि उठाउठी व्रताची । भेटी रामाची जंव नाहीं ॥ ६४ ॥ तंवचि वासना अनिवार । तंवचि मनाचा महामार । तंवचि इंद्रियें दुर्निवार । जंव रघुवीर न देखती ॥ ६५ ॥ तंवचि विषय दारुण । तंवचि ऐकिजे अधःपतन[2] । तंवचि बाधा जन्ममरण । जंव रघुनंदन न देखिजे ॥ ६६ ॥ दृष्टीं देखतां रघूत्तम । सर्वांगीं वोळंगती[3] सकळ काम[4] । मागणें निमालें निःसीम । पूर्णकाम मनोरथ ॥ ६७ ॥ असो दर्शनाची कथा । श्रीरामनाम आठवितां । पूर्णकाम मनोरथां । श्रीरघुनाथा तुझेनि नामें ॥ ६८ ॥ भक्तकामकल्पद्रुम[5] । तो भेटतां रघूत्तम । आन इच्छी मनोधर्म । ऐसा अधम कोण आहे ॥ ६९ ॥ सावध ऐक कृपानिधी । होतां तुझी आगमनविधी । आश्रमीं वोळंगती सकळ सिद्धी । मागणें बुद्धि विसरली ॥ ७० ॥ प्रसन्न होऊनि निश्चितीं । माग म्हणतां रघुपती । हेंचि मागणें पुढतपुढती । जें विषय चित्तीं स्फुरों नेदीं ॥ ७१ ॥ निर्विषय निरभिमान । निर्विकल्प तुझें भजन । सर्वां भूतीं समसमान । द्यावें अनवच्छिन्न[6] सर्वकाळ ॥ ७२ ॥ कृपाळुवा रघुनाथा । आणीक न मागें जी सर्वथा । म्हणोनि चरणीं ठेविला माथा । अति अवस्था मुनिवरा ॥ ७३ ॥ तें देखोनि रघुनाथ । उचलोनि हृदयीं आलिंगीत । तेणें निर्विषय झालें चित्त । सुख अद्भुत उथळलें ॥ ७४ ॥ आधींच तपोधन ऋषी । श्रीरामीं प्रेमा अहर्निशीं । वरी देतां आलिंगनासी । निर्विषयसुखासी पावला ॥ ७५ ॥ सुख पावतां मुनिवर । अवघे झाले आल्हादपर । बाप कृपाळु रघुवीर । नामें वानर गर्जती ॥ ७६ ॥ देवोनियां ऋषीस वरदान । अस्तु म्हणे रघुनंदन । तेणें ऋषि सुखसंपन्न । केलें नमन साष्टांगीं ॥ ७७ ॥ करावया अयोध्यागमन । श्रीराम करी विवंचन । चौदा वर्षें लोटलीं पूर्ण । झालें उल्लंघन मर्यादे ॥ ७८ ॥ माझेनि वियोगें भरता । होत असेल अति चिंता । मर्यादा लोटली तत्त्वतां । सांडील सर्वथा देहासी ॥ ७९ ॥ यालागोनि पैं पहिलें । वृत्त पाहिजे पाठविलें । हनुमंतासी पाचारिलें । आज्ञापिलें अति शीघ्र ॥ ८० ॥

मतिमंतं हनूमंतमिदं वचनमब्रवीत् ।
अयोध्यामद्य एव त्वं गच्छ तूर्णं वनेचर ॥ ४ ॥
शृंगवेरपुरं प्राप्य गुहं गहनगोचरम् ।
वृत्तं निषादपतये वक्तव्यं वचनान्मम ॥ ५ ॥

जो बुद्धीचा सागरू । भावार्थाचा महामेरू । आज्ञेचा तरी किंकरू । महावीरू हनुमंत ॥ ८१ ॥ तयासी बोलावोनि रघुपती । सांगता झाला अति प्रीतीं । तुवां जावोनि अयोध्येप्रती । आगमनस्थिती सांगावी ॥ ८२ ॥ वनवासींचा समाचार । रावणवधाचें चरित्र । बंदिमुक्त सुरवर । वृत्त समग्र सांगावें ॥ ८३ ॥ गुहक आमुचा निजमित्र । मार्गीं त्याचें आहे नगर । नामें शृंगवेरपुर । त्यासी सत्वर भेटावें ॥ ८४ ॥ सांगतां आमुचें आगमन । होईल सुखें संपन्न[7] । पावोनियां समाधान । तुझें पूजन करील ॥ ८५ ॥ तेथोनि पुढारें गमन । अतिवेगें करोनि जाण । घ्यावें भरताचें दर्शन । वृत्त संपूर्ण सांगावें ॥ ८६ ॥ भरत आमुचा अनुरक्त । सर्वथा संदेह नाहीं येथ । तरी राजनीतिलौकिकार्थ । पहावें व्रत भरताचें ॥ ८७ ॥

१ खटपट. २ नरकवास. ३ प्राप्त होतात. ४ वासना, इच्छा, ५ भक्तांचे काम पुरविणारा कल्पवृक्षच. ६ सतत.

७ उत्पन्न झालें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

ज्ञेयाः सर्वे च वृत्तांता भरतस्येंगितानि च ।
सत्त्वेन मुखवर्णेन दृष्टिव्याभाषितेन च ॥ ६ ॥

राज्यलोभाची जाती पाहीं । धर्माधर्म नाठवे कांहीं । ज्येष्ठाचा तेथें पाड कायी । अंध लवलाहीं बुद्धि होय ॥ ८८ ॥ राज्यभोग देखतां पुढें । मन होवोनि ठाके वेडें । साखरेवरोनि माशी नुडे । तैंवी जडे विषयार्थी ॥ ८९ ॥ भरताचें पित्रार्जितं[१] । राज्य आहे पितृदत्त[२] । जरी झाला लोलुप्त[३] । तरी निश्चित देऊं त्यासी ॥ ९० ॥ धर्ममर्यादा आहे ऐसी । जेथें जेथें प्रीति जयासी । तें तें अर्पावें तयासी । हेंचि साधूंचें निजव्रत ॥ ९१ ॥ राज्यलोभ तत्त्वतां । आम्हांसी नाहीं सर्वथा । चिन्ह पाहोनियां भरता । राज्य निश्चित देवों त्यासी ॥ ९२ ॥ धर्ममर्यादा ऐसी जाण । शीघ्र पाहोनि यावें चिन्ह । काय तें चिन्हाचें लक्षण । ऐक सांगेन संकेतें ॥ ९३ ॥ दृष्टीं देखतांचि प्रियासी । हर्ष दाटे सर्वांगासी । रोमांच उभवोनि उल्लासीं । गुढी चौपासीं उभविती ॥ ९४ ॥ शीघ्र जावोनि आपण । काय तें ओळखावें चिन्ह । आमुचेंही आगमन । करीं निवेदन भरतासी ॥ ९५ ॥ अंतरींचिया प्रेमावस्था । कंठीं बाष्प दाटतां । देह नावरे सर्वथा । पडे तत्त्वतां मूर्च्छित ॥ ९६ ॥ अंतरीं प्रेमा अनिवार जाण । तरी हें बाह्य प्रकटे चिन्ह । अंतरीं प्रीति नसतां पूर्ण । बाह्य चिन्ह प्रकटेना ॥ ९७ ॥ ऐसी पाहोनि विवंचना । शीघ्र यावें वायुनंदना । तदनुसार अयोध्ये जाणा । करूं गमना अति प्रीतीं ॥ ९८ ॥

इति प्रीतिसमादिष्टो हनूमान् मारुतात्मजः ।
अथोत्पपात वेगेन बलवान् कपिकुंजरः ॥ ७ ॥

ऐकोनियां श्रीरामवचन । अनायासें प्रेमचिन्ह । श्रीराममुखेंकरून । हनुमंतें आपण ऐकिलें ॥ ९९ ॥ म्हणोनि घातलें लोटांगण । करोनि प्रदक्षिणा नमन । भरतदर्शनीं प्रेम गहन । केलें उड्डाण अति वेगें ॥ १०० ॥ गरुडवेग पवनवेग । लाजवीत मनोवेग । हनुमान चालिला सवेग । अतिबळवेग मारुती[४] ॥ १ ॥

शृङ्गवेरपुरं प्राप्य गुहमासाद्य वीर्यवान् ।
वाचा तं शुभया हर्षाद्धनूमानिदमब्रवीत् ॥ ८ ॥

नामबळें अनिवार । उड्डाण केलें वेगवत्तर । गगन आक्रमिलें समग्र । शृंगवेरपुर पावला ॥ २ ॥ गुहकद्वारीं कपिकुंजर । रामनामें भुभुःकार । हनुमंतें केला वेगवत्तर । तेणें समग्र गजबजिलें ॥ ३ ॥ अति दीर्घ रामनामध्वनी । कोणा भाग्यपुरुषाची वाणी । गर्जिन्नली दीर्घस्वरेंकरोनी । नादें अवनी दुमदुमली ॥ ४ ॥ ज्याचे मुखीं नामोच्चारण । तो जाण श्रीरामासमान । येविषयीं श्रुतिपुराण । बाहु उभवोन गर्जती ॥ ५ ॥

हृदि रूपं मुखे नाम नैवेद्यमुदरे हरेः ।
पादोदकं च निर्माल्यं मस्तके यस्य सोऽच्युतः ॥ ९ ॥

पार्थिवशरीरेंसीं[६] जाण । जे झाले श्रीरामासमान । ऐक त्या भक्तांचें लक्षण । सावधान सुचिन्हीं ॥ ६ ॥ मनीं सतत भरली मूर्ती । चित्तें चिंतन अहोरात्रीं । बुद्धीचा निश्चय रघुपती । संसारस्फूर्ती सांडोनियां ॥ ७ ॥ देहाचे ठायीं अहंकार । झाला होता दृढोत्तर । त्यासी गुरुवचन निजसार । पावतां सत्वर परतला ॥ ८ ॥ देहाचे ठायीं त्रिशुद्धी । दृढ होती अहंबुद्धी । तीतें जाळोनि सोहंसिद्धी । निजानंदीं प्रकटली ॥ ९ ॥ नित्य निर्माल्य सिरवे शिरीं । चरणतीर्थ अभ्यंतरीं । हरिप्रसाद त्याच्या उदरीं । तो मूर्तिधारी श्रीराम ॥ ११० ॥ त्यासी दृश्यमात्रीं पूर्ण । सहजीं भासे रघुनंदन । ज्याचें अंतर जेथें निमग्न । तेंचि भान तयासी दिसेल ॥ ११ ॥ अतिशयें उल्हासेंसीं । नाम गर्जत आवेशेंसीं । रामरूप तो निश्चयेंसीं । चला भेटीसी जाऊं तया ॥ १२ ॥ ऐकोनि रामनामाची ध्वनी । अद्यापि न वचों भेटीलागूनी । अधम ऐसे आम्हांहोनी । आन कोणी असतीना ॥ १३ ॥ ऐसा करोनि विचार । श्रीरामप्रेमें वेगवत्तर । बाहेरी आले जी समग्र । तंव कपींद्र देखिला ॥ १४ ॥ वानर होवोनि मनुष्याची वाणी । श्रीरामनाम त्याच्या वदनीं । अति प्रचंड दिसे नयनीं । श्रीरामगुणीं भरलासे ॥ १५ ॥ अति प्रचंड विख्यात । श्रीरामप्रेमें ओतिला दिसत । तेणें गुहक हर्षभरित । प्रीतीं घालीत लोटांगण ॥ १६ ॥ प्रेमयुक्त अंतःकरण । ऐकोनियां नामस्मरण । करोनि साष्टांगीं नमन । पुसे चिन्ह कपीसी

---

१ पित्यानें मिळविलेलें. २ पित्यानें दिलेलें. ३ लोभी. ४ थोडक्यांत. ५ हे पवनपुत्रा (मारुते). ६ ज्यांचीं स्थूल शरीरें रामाप्रमाणेंच बनलीं. ७ मी शिवच आहें असा साक्षात्कार.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ १७ ॥ स्वामी तुम्ही कोठील कोण । मुखीं नामाचें उच्चारण । वानरी तनु काय कारण । येणें कोठून झालें स्वामी ॥ १८ ॥ ऐकोनि प्रीतिमंजुळ वचन । श्रीरामीं प्रेमा गहन । तेणें हनुमान सुखैं-कथन । लोटांगणें विनवीत ॥१९॥ संपवोनि वन-वासव्रत । करोनि राक्षसांचा निःपात । जनस्थान करोनि मुक्त । द्विजदानार्थ दिधलें रामें ॥१२०॥ वधूनि रावण कुंभकर्ण । विजयी झाला रघुनंदन । सुरवरांचें बंदिमोचन । न लागतां क्षण पैं केलें ॥ २१ ॥ सुख देवोनि त्रिभुवना । सहित जानकी-लक्ष्मणा । करोनि विमानीं रोहणा । पैल जाणा येताती ॥ २२ ॥ शरणागत दोघे जण । सुग्रीव आणि बिभीषण । अपरिमित वानरसैन्य । नामें त्रिभुवन गर्जत ॥२३॥ राक्षसांसी देवोनि मुक्ती । रामें उद्धरिली त्रिजगती ।नामें महापातकियां गती। अगाध कीर्ति रामाची ॥२४॥ वानर वनचर पाले-खाईर । केवळ श्रीरामाचे किंकर । माझें नाम हनुमान वीर । गुढी सत्वर घेवोनि आलों ॥ २५॥ तुम्ही श्रीरामाचे निजगण । म्हणोनि श्रीरामें आपण । कळवावया निजागमन । गुढी देवोन पाठविलें ॥ २६ ॥ आतां स्वस्ति असो तुम्हांसी । येतां भेटी श्रीरामासी । मज जाणें अयोध्येसी । गुढी भरतासी सांगावया ॥ २७ ॥ ऐकोनि हनुमं-ताचें वचन । गुहकें घातलें लोटांगण । वृत्त न सांगतां संपूर्ण । केंवी प्रयाण करा स्वामी ॥ २८ ॥

एवमुक्तस्तु स गुहः संपरिष्वज्य तं कपिम् ।
हर्षेण महताविष्टस्तं हरिं पर्यपृच्छत ॥ १० ॥

क्व रामः क्व च वैदेही बुद्धिमांश्च क्व लक्ष्मणः ।
ह्लादितोऽस्मि त्वया सार्द्धं जलौघेनेव मेदिनी ॥ ११ ॥

घालोनियां लोटांगण । विधियुक्त करोनियां पूजन । करिता झाला विनवण । रामलक्ष्मण कोठें स्वामी ॥ २९ ॥ काय सांगों त्यांची महंती । निराहारी रघुपती । स्वयें निघाला वनाप्रती । सांडोनि निश्चितीं पादत्राण ॥ १३० ॥ कोठें आहे रघुपती । लवकरी सांगें मजप्रती । सखा सौमित्र तदनुवृत्ती । अनुपम ख्याती तयाची ॥ ३१ ॥ श्रीरामसेवेच्या आदरा ।वीरें त्यजिली निद्रातंद्रा। तुच्छ करोनियां शरीरा । निःशेष आहारा त्यजि-येलें ॥ ३२॥ कोठें आहे ती जानकी माता । श्रीराम-सेवेलागीं तत्त्वतां । बाळपणीं तापसता । अति निष्ठुरता धरियेली ॥३३॥ विमान देखिलें अंबरीं । आम्हांसी न दिसे अद्यापिवरी । सांग काय झालें परी । दीर्घस्वरीं आक्रंदे ॥ ३४ ॥ देखोनि त्याचा प्रेमभावो । हनुमंत उचंबळला पहाहो । गुहका शांत होवोनि महाबाहो । रामागमन सांगत ॥ ३५ ॥ मार्गीं येतां विमान । भरद्वाज अनन्य-शरण । होवोनियां रघुनंदन । अति प्रीतीकरून प्रार्थिला ॥ ३६ ॥ तेथें क्रमोनियां आजिची राती । सर्वथा आतां विमानस्थितीं । सहित सौमित्र सीता सती । येईल रघुपती येणें मार्गें ॥ ३७ ॥ सौमित्रें अद्यापिही जाण । स्पर्शिलें नाहीं अन्न । अस्थिमात्र जानकी जाण । स्वयें आषण उरलीसे ॥ ३८ ॥ श्रीरामाची गोष्टी पाहें । सर्वथा मज सांगतां न ये। ऐशा रीतीं आलीं पाहें। त्रैलोक्यीं विजय करोनियां ॥ ३९ ॥ तुमच्या भाग्याची सीमा। सर्वथा करितां न ये आम्हां। नित्य स्मरण रघूत्तमा । तुमचा प्रेमा अनुवादे ॥ १४०॥ श्रीरा-माचें करिती स्मरण । ते आम्हांसी पूज्य जाण । म्हणोनि घातलें लोटांगण । स्वयें उड्डाण करिता झाला ॥ ४१ ॥

स गतः शीघ्रमध्वानं महात्मा कपिकुंजरः ।
आससाद द्रुमान् फुल्लान् नंदिग्रामे समंततः ॥ १२ ॥

हनुमंताचें उड्डाण । गुहकें स्वयें देखोनि जाण । करोनि साष्टांगें नमन । आनंदमग्न पैं झाला ॥ ४२ ॥ श्रीरामागमनसुख जाण । त्यापुढें तुच्छ ब्रह्मसदन । येणें हरिखें अवघे जण । निषादगण नाचती ॥ ४३ ॥ येरीकडे हनुमंत । पवना मना-तेंही लाजवीत । वेगें चालिला त्वरित । आक्रमीत गगनातें ॥ ४४ ॥ अति बळियाढा कपिकुंजर । मार्ग क्रमोनि सत्वर । पातला नंदिग्राम नगर । महावीर भरत जेथें ॥४५ ॥ श्रीरामागमनवसंत। मूर्त पातला हनुमंत । तेणें वनश्री शोभत । अति अद्भुत पुष्पीं फळीं॥४६॥ अफळें आलीं फळासी। निरंकुरें अंकुरासी । नीरसें आलीं रसासी । निर्जीव जीवेंसीं ऊठलीं ॥ ४७ ॥ आला जाणोनि

१ अतिसंतुष्ट. २ चढणें. ३ दूत. ४ कल्याण. ५ मोठे-पणा. ६ त्याच स्थितीचा. ७ आकाशांत. ८ आनंदानें. ९ भिल्लांचा समूह. १० दुसरीकडे. ११ मूर्तिमंत, साक्षात.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

रघुनाथ । अष्टमहासिद्धि धांवत । सत्वर पातलिया तेथ । हर्षें नाचत येवोनि पुढें ॥ ४८ ॥ तेणें मंडित नगर । सकळ लोक भजनपर । श्रीरामध्यानीं अति तत्पर । इंद्रियाचार तद्रूपें ॥ ४९ ॥ एक करिती हरिकीर्तन । अर्थमय होवोनि पूर्ण । गातां श्रीरामाचे गुण । प्रेमा जाण नावरे ॥ १५०॥ प्रेमें युक्त अंतःकरण । पदीं गातां रघुनंदन । अंतरीं ठसावे चिन्ह । होती जाण तद्रूप ॥ ५१ ॥ अलोट कीर्तनाचें सुख । अवघे होती तदात्मक । एक होती रघुकुळटिळक । एक दशमुख पैं होती ॥ ५२ ॥ छेदोनियां श्रीरामाच्या वाणीं । शिरें अर्पित श्रीरामचरणीं । तंव तंव उल्लास अंतःकरणीं । प्रेमेंकरोनि डुल्लत ॥५३॥ ऐका श्रोते पैं सर्वज्ञ । करिती श्रीरामनामश्रवण । अर्थामाजी होवोनि निमग्न । करिती गर्जन रामनामें ॥ ५४ ॥ पदव्युत्पत्ती कीर्तन । कळा विन्यास ठाणमाण । देखतां ठसावे ज्ञान । तटस्थ पूर्ण तेणें होती ॥ ५५ ॥ ऐसे श्रीरामाचे भक्त । अवघें नगर समवेत । धन्य आचार्य भरत । श्रीरघुनाथनिजभजनें ॥ ५६ ॥ तें देखोनि हनुमान जाण । झाला अत्यंत सुखसंपन्न । एका जनार्दना शरण । अमृतपान रामकथा ॥ १५७ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां हनुमंतनंदिग्रामाभिगमनं नाम अष्टसप्ततितमोऽध्यायः ॥ ७८ ॥ ओंव्या ॥ १५७ ॥ श्लोक ॥ १२ ॥

अध्याय एकुणऐंशीवा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥

क्रोशमात्रमयोध्यायाश्चीरकृष्णाजिनाम्बरम् ।
ददर्श भरतं दीनमृषिभिः सह वासिनम् ॥ १ ॥
जटिलं मलदिग्धांगं भ्रातृव्यसनकर्षितम् ॥ २ ॥

अयोध्येहूनि क्रोशमात्र । नंदिग्राम भरतनगर । तेथें येवोनि कपिकुंजर । पातला घर भरताचें ॥ १ ॥ तंव वसिष्ठादि ऋषीश्वर । भरतासमीप थोर थोर । व्रतस्थ झाले समग्र । वल्कलांबर कृष्णाजिनीं ॥ २ ॥ तापसवेषी वनचर । कंदमूळफळाहार । व्रतें धरियेलीं दुर्धर । कृशोदर पैं भरत ॥ ३ ॥ अस्थि चर्म झालें एक । मांस आटलें सकळिक । रुधिर शोषलें निःशेख । पंजर देख उरलासे ॥ ४ ॥ श्रीरामाचेनि स्मरणें जाण । भरतदेह वांचला पूर्ण । तेणें भासे देदीप्यमान । जीवन आन असेना ॥ ५ ॥ श्रीराम स्वयें वना गेला । विषयभोग सहज चुकला । विषयीं असोनि त्याग केला । धैर्याथिला महामेरू ॥ ६ ॥ राज्यभोग पैं समस्त । असतां सर्वथा नातळे चित्त । भोगीं असोनि भोगातीत । अति विरक्त देहभावा ॥ ७ ॥ सकळ भोगा देवोनि पाणी । देहा तुच्छत्वें मानोनी । अहर्निशीं रामचिंतनीं । ख्याति त्रिभुवनीं भरताची ॥ ८ ॥ सर्वथा ज्यासी न मिळे भोग । त्यासी सहजचि झाला त्याग । भोगीं असोनियां विराग । अभिनव भाग्य भरताचें ॥ ९ ॥ जेंवी चंदनाच्या संगतीं । सकळ वनींच्या वनस्पती । अवघ्याचि चंदन होती । बहुत शोभती चौफेर ॥ १० ॥ तैसें भरतें केलें पूर्ण । सकळां श्रीरामभजन । सांडोनियां मानाभिमान । श्रीरामगुण वर्णिती ॥ ११ ॥ एक झाले ते वीतरंग । एकीं निःशेष केला त्याग । एक ध्यानस्थ अभंग । कीर्तन चांग पैं एकां ॥ १२ ॥ नगरींचे सकळ लोक । श्रीरामालागीं त्यक्तोदक । भरतनमनालागीं देख । आले सकळिक समकाळें ॥ १३ ॥ तंव भरत चिंताक्रांत । श्रीरामवियोगें संतप्त । अति दुःखें विलाप करीत । श्रीरघुनाथ कां न ये ॥ १४ ॥ पादुका पूजोनि अति निगुतीं । सकळ ऋषिवरांप्रती । भरत पुसतसे प्रीतीं । श्रीरघुपती कां न ये ॥ १५॥ चवदा वर्षें लोटलीं पुरीं । दोन दिवस अधिक वरी । श्रीराम न येचि निर्धारीं । केली खरी उदासता ॥ १६ ॥ श्रीराम पहिलेंचि विरक्त । राज्यभोगा उदासभूत । वरी वनवास झाला प्राप्त । सुख अद्भुत तेणें त्यासी ॥ १७ ॥ आत्माराम पैं निश्चित । सुचिंतनेनें नित्य तृप्त । कायसा राज्य राज्यार्थ । विषय तेथ अति मिथ्या ॥ १८ ॥ मिथ्या पदार्थी रघुपती । नातळे सर्वथा निश्चितीं । आम्हांसी लागली आहे भ्रांती । वांछूं चित्तीं रामभेटी ॥ १९ ॥ काय आम्हीं केली भक्ती । कोण आचरलों तपःस्थिती ।

---

१ तत्समान. २ विया. ३ हावभाव. ४ ठेवण. ५ कोसभर. ६ अन्य. ७ धैर्यसंपन्न. ८ स्पर्श करीत नाहीं.

९ विलक्षण. १० विषयप्रीति सोडलेले. ११ पाणी वर्ज केलेले.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

अथवा नव्हों अंतरवृत्ती । सहोदर निश्चितीं रामाचे ॥ २० ॥ तिळ एक भासे भेदभान । तेथ सर्वथा न मनी मन । आम्हीं तरी केवळ सापत्न । कैंवी रघुनंदन भेटेल ॥ २१ ॥ पूर्वीं विषयलोभें ठकलों । मायामातुळें नागवलों । श्रीरामासी अंतरलों । भोगबुद्धीकरोनी ॥ २२ ॥ तेथोनि येतां पैं प्रयागी । सद्गुरूचि मातें उपहासी । अंगीकारीं तूं राज्यासीं । अभिषेकासी करूं दे ॥ २३ ॥ मज-सन्मुख सकळ जन । बोलती अभिशाप दारुण । मारूं जातो रघुनंदन । म्हणोनि जग निंदिती ॥ २४ ॥ भेटों गेलों वनवासीं । तेथेंही झालों अपेशी । सौमित्र मारूं धांवे वेगेंसीं । राज्याभिलाषी म्हणवोनी ॥ २५ ॥ श्रीराम स्वयें आपण । वचन बोलिला अति कठिण । तुज करूं अभिषेचन । म्हणोनि आपण सरसावला ॥ २६ ॥ तेचि काळें देहपात । माझा व्हावा त्वरित । कां वांचला जीत्रें जीत । पाषाणवत भूमिभार ॥२७॥ पुढें अर्थही तैसाचि झाला । विषयाभिलाषें वहिला । राज्य घेवोनि परतला । दृढत्वें कळला लोभ रामा ॥ २८ ॥ हनुमंत ओषधींसमवेत । गगनीं जातां मार्गस्थ । त्यासींही केलें उद्धंत । बाण अवचित सोडिला ॥ २९ ॥ श्रीरामभक्तावरी संधान । दृढ न विचारितां केलें जाण । महापापी आन कोण । मजहून पैं आहे ॥ ३० ॥ अगाध हनुम्याचा बडिवार । विषाद न मानीच अणुमात्र । समाधान वेगवत्तर । मज सत्वर दीधलें ॥ ३१ ॥ ऐसें जाणतांही तत्त्वतां । कोण माझी विषयासक्तता । सर्वे न वेंचेंचि हनुमंता । लोभें सर्वथा नाडिलों ॥ ३२ ॥ नाहीं वैराग्य कडाडी । निजांगें घालोनियां उडी । भेटी न घेंचि तांतडी । धरिली गोडी विषयांची ॥ ३३ ॥ महापातकाचें फळ दारुण । निश्चयेंसीं हेंचि जाण । विषयगोडी पुनःपुन । सर्वथा मन सांडीना ॥ ३४ ॥ महापातकी विषयीपण । म्हणोनियां रघुनंदन । निश्चयें झाला उदासीन । सर्वथा वदन न पाहे ॥ ३५ ॥ कशासी आहें जीवें जीतें । इये पृथ्वीसी भारभूत । वृथा जीवोनि काय येथ । अति निंदित लौकिकीं ॥ ३६ ॥ उदास होवोनि श्रीराम पाहे । ज्याचें हृदय सांडूनि जाये । जळो त्याचें जीवितव्य काये । भार न साहे धरित्री ॥ ३७ ॥ आम्ही तरी अत्यंत आत । बंधु रामाचे म्हणवीत । त्यासी न पाहे रघुनाथ । गेला निश्चित सांडूनी ॥ ३८ ॥ म्हणोनियां शोकाकुलित । विलाप करी दुःखाक्रांत । नेत्रीं अश्रुधारा स्रवत । पडिला मूर्च्छित धरेवरी ॥ ३९ ॥ शोकें जाळिलें अंतर । प्राण जावों पाहे सत्वर । तैसाचि शत्रुघ्न महावीर । दुःखें तत्पर रामविरहें ॥ ४० ॥ ऋषीश्वरां तेचि अवस्था । श्रीरामवियोगें भरतें चित्ता । नेत्रीं जलबिंदु स्रवतां । रोमांचितता शरीरीं ॥ ४१ ॥ कंठीं बाष्पें पैं दाटती । गात्रें चळचळां कांपती । अनावर प्रेमस्थिती । ऋषी लोळती गडबडां ॥ ४२ ॥ नागरिक लोक समस्त । श्रीरामवियोगें संतप्त । देहभाव न सांभाळीत । अवघे मूर्च्छित पडियेले ॥ ४३ ॥ देखोनि भरताची अवस्था । प्रेम न साहेचि हनुमंता । मूर्च्छित पडिला तत्त्वतां । होय आवरिता विवेकें ॥ ४४ ॥ सत्त्वावस्था आवरोनि तेथ । अगोचर हनुमंत । येवोनि पहातसे वृत्त । तंव अद्भुत आणिक झालें ॥४५॥ सकळ दशरथाच्या कामिनी । सर्वे कैकेयी सुमित्रा दोनी । कौसल्या ज्येष्ठपत्नी । त्वरेंकरोनी पातल्या ॥ ४६ ॥ तंव तेथें वेगवत्तर । माता देखती विचित्र । भरत पाहतां रघुवीर । दिसे गोचर सकळांसी ॥ ४७ ॥ तेणें झाल्या हाहाभूत । काय झाला तो भरत । कोण्या योगें रघुनाथ । येथें मूर्च्छित पडियेला ॥ ४८ ॥ काय झाला तो लक्ष्मण । कोठें गेली जनकनंदिन । रामें तयांतें सांडून । केलें आगमन एकलें ॥ ४९ ॥ म्हणोनि अवघीं दुःखाक्रांत । करकमळीं ललाट पिटीत । सकळ हंबरडा हाणीत । देहपात होऊं पाहे ॥ ५० ॥ रामरूपें भरतासी । माता धरोनि पोटासीं । रुदन करी आक्रोशीं । झणें मोकलिसी श्रीरामा ॥ ५१ ॥ रायासवें सहगमन । करितां तुझे भेटीलागून । अति युक्ति करोनि जाण । सद्गुरूनें आपण राहविलें ॥ ५२ ॥ रामाचे भेटीपुढें । सहगमन तें बापुडें । म्हणोनियां वाडेंकोडें । निजनिवाडें राहविलें ॥ ५३ ॥ यालागूनि मुखचुंबन । माता करीतसे जाण । कां बा न देसी प्रतिवचन । कायसें मौन

१ आत्मचिंतनांत गढून गेलेले. २ सत्वर. ३ दांडगाई. ४ मोठेपणा, ५ जात नाहीं. ६ जीवंत, ७ ओझें झालेला.

८ पृथ्वी. ९ स्त्रिया. १० त्याग करूं नकोस,

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

धरियेलें ॥ ५४ ॥ धन्य भाग्य तें भरताचें । ध्यान करितां श्रीरामाचें । सबाह्य तद्रूप झालें साचें । ऐसें ध्यानाचें महिमान ॥ ५५ ॥ श्रीरामरूप देखोनि माता । अति आक्रोशें विलाप करितां । भरत सावध झाला चित्ता । दुःखित माता देखिली ॥ ५६ ॥ येरी पाहे सावधान । तंव राम नव्हे भरत जाण । तेणें अत्यंत उद्विग्न । रघुनंदन न देखे ॥ ५७ ॥ राम आतां येथें होता । तूतें देखिलें नाहीं भरता । ऐसे बोल बोलतां । झाली माता विव्हळ ॥ ५८ ॥ तेणें भरत अत्यंत । सर्वें झाला दुःखाक्रांत । कां पां न येचि रघुनाथ । काय ऋषिभाषित लटिकेंचि ॥ ५९ ॥ अनागत[1] रामायणीं । वदली वाल्मीकाची वाणी । ते लटकी झाली कैसेनी । श्रीराम अझूनी न येचि ॥ ६० ॥ हनुमान येवोनियां येथ । स्वयें बोलिला पुरुषार्थ । शीघ्र आणीन रघुनाथ । तेंही भाषित लटिकें काय ॥ ६१ ॥ असो हनुमंताची गोष्टी । असो ऋषीची चावटी[2] । श्रीराम स्वयें वाक्पुटीं । बोलिला गोष्टी तेही लटिकी ॥ ६२ ॥ पितृआज्ञा पैं नेमस्त । चौदा वर्षें वनवासव्रत । संपादोनि इत्थंभूत[3] । येईं निश्चित नेमांतीं ॥ ६३ ॥ श्रीरामाचीं वचनें ऐसीं । तींही वृथा झालीं कैसीं । आतां ठेवोनि काय देहासी । जीवघातासी करीन ॥ ६४ ॥ रामावांचूनि धडफुडी । देहहाडाची कोरडी । कोण सोशील जन्मबेडी । घालूं कडाडीं देहपाता ॥ ६५ ॥ तें देखोनि हनुमंत । झाला अत्यंत भयभीत । कठिण भारी रघुनाथ । चिन्ह पाहवीत काय याचें ॥ ६६ ॥ याहीउपरी पाहतां चिन्ह । याचें होईल प्राणोत्क्रमण । ऐसें दिसताहे निर्वाण[4] । रामागमन नायकतां ॥ ६७ ॥ म्हणोनि हनुमान लंवडसवडी[5] । आठां भावांची परवडी । उभवोनि स्वानंदाची गुढी । हांक फोडी रामनामें ॥ ६८ ॥

अनुशोचति काकुत्स्थे हनूमान् वाक्यमब्रवीत् ।
प्रियमाख्यामि ते वीर शोकं जहि सुदारुणम् ॥ ३ ॥
अस्मिन् मुहूर्ते रामेण भ्रात्रा त्वं संगमिष्यसि ।
निहत्य रावणं रामो प्रियां लब्ध्य च मैथिलीम् ॥ ४ ॥

सत्त्वमूर्ती राया भरता । सांडूं नको गा जीविता । घेवोनि आलों रघुनाथा । सौमित्रसीतासमेत ॥ ६९ ॥ उठवोनियां लक्ष्मण । क्षणें निवटिला रावण । बंदींचे सोडविले सुरगण[6] । राज्यीं बिभीषण स्थापिला ॥ ७० ॥ सोडवोनि जनकनंदिनी । राया दशरथा भेटोनी । विजयी झाला राम त्रिभुवनीं । येत विमानीं अति वेगें ॥ ७१ ॥ मार्गी भरद्वाजें प्रार्थून । राहविला रघुनंदन । प्रेमें दिधलें फळभोजन । तेथें जाण गुंतले ॥ ७२ ॥ तुज होत असेल चिंता । म्हणोनि कळवळा रघुनाथा । याचिलागीं तत्त्वतां । पुढें मज आतां पाठविलें ॥ ७३ ॥ तंव तैसेंचि देखों येथ । श्रीरामवियोगें समस्त । अवघेही दिसतां दुःखाक्रांत । जैसीं प्रेतें जीवहीन ॥ ७४ ॥ शोक सांडोनि निश्चितीं । व्हावें सावध समस्तीं । पैल आला रघुपती । भाक निगुती ही माझी ॥ ७५ ॥ ऐकतांचि तो वचनार्थ । अवघे झाले सावचित्त । येवोनि नमिती हनुमंत । आनंदभरित ते सकळी ॥ ७६ ॥ प्राणोत्क्रमणसंकटीं । जेंवी होय अमृतवृष्टी । तेंवी श्रीरामागमनगोष्टी । कपिवार्क्पुटीं[8] ऐकिली ॥ ७७ ॥ दुकाळिया जेंवी मिष्टान्न । कीं अवर्षणीं वर्षे घन । तेंवी हनुमंताचें वचन । आलें जीवन घेवोनी ॥ ७८ ॥ देखोनियां हनुमंतातें । मिठी घालोनियां भरतें । आलिंगोनि ठेविला तेथें । झालीं समस्तें सजीव ॥ ७९ ॥ भ्रमबुद्धी हरपे रत्न । तें स्वबुद्धीं पाहतां न लभे जाण । दीपागमन होतांचि पूर्ण । सांपडे क्षण न लागतां ॥ ८० ॥ तेंवी रामागमनसुखाचा । हनुमान दीप हर्षाचा । मोहांधकारीं बुडतां साचा । झाला प्रकाशाचा सुकाळ ॥ ८१ ॥ निरसोनियां मोहांधकार । उजळलें सकळांचें अंतर । अंतरीं प्रकाशला रघुवीर । दुःख समग्र निरसिलें ॥ ८२ ॥ दुःख निरसोनि सुखदाता । श्रीरामासीं भेटी करिता । ऐसिया सद्गुरूसी तत्त्वतां । उत्तीर्णता[9] कैंवी घडे ॥ ८३ ॥ चिंतामणि दे चिंतितार्था । कल्पतरु कल्पिलें देता । सद्गुरु दे निर्विकल्पता । त्यासी आतां काय द्यावें ॥ ८४ ॥ कामधेनूची दुभणी । कामनारूप त्याची देणी । अचिंत्य देणें सद्गुरुवचनीं । उत्तीर्ण त्यालागूनी कैंवी होय ॥ ८५ ॥ देऊं परिस धातु अर्थ । अर्थ तितुकाही अनर्थ । तेणें न घडेचि उत्तीर्णत्व । अगाध दातृत्व सद्गुरूचें

१ पुढील भविष्य. २ बोलणें, भाषण. ३ बरोबर. ४ शेवट. ५ मोठ्या तांतडीनें. ६ देवसमुदाय. ७ वचन. ८ हनुमंताचे मुखानें. ९ उतराई.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ ८६ ॥ देहें उतराई होऊं सद्गुरूसी । तरी नैश्वर्य देहासी । नैश्वर्यें पैं अनैश्वर्यासी । उत्तीर्ण त्यासी घडेना ॥ ८७ ॥ आतां एकचि विवंचन । तनुमन-सहित धन । कीजे सद्गुरूसी निवेदन । तरी उत्तीर्ण कांहींएक ॥ ८८ ॥ त्याहूनि वेगळा आणिक । न दिसे पदार्थ असंख्य । सर्वस्वें अर्पोनियां देख । चरणीं मस्तक ठेवणें ॥ ८९ ॥ ऐसा करोनि निर्धार । चरणीं माथा पैं सत्वर । ठेवोनि नमिला कपींद्र । मौनेंकरोनि सत्वर पैं भरतें ॥ ९० ॥ कौसल्यादि माता अशेष । सुमंतादि प्रधान देख । आनंदभरित होवोनि लोक । कपिनायक नमियेला ॥ ९१ ॥ दुःख निरसलें सकळिक । आनंद झाला अलौकिक । नामें गर्जती एकएक । रघुनायक निजविजयी ॥ ९२ ॥ येरयेरां[1] क्षेमें देती । येरयेरां आलिंगिती । खांदीं घेवोनि मारुती । नाचताती आनंदें ॥ ९३ ॥ दीपावली नीराजनें । हनुमंतासी अक्षय वाणें[3] । जीवभावाचीं बळिदानें । सांडिती पवनपुत्रावरूनी ॥ ९४ ॥ त्राहाटिल्या[4] निशाणभेरी । गगन गर्जे मंगलतुरीं । गुढिया तोरणें घरोघरीं । प्रीतीं थोर उत्साहो ॥ ९५ ॥ घरोघरीं मंगलार्चनें । प्रीतीं मांडिलीं कीर्तनें । मृदंग श्रुतिमधुर गाणें । टाळ चिपळयांसमवेत ॥ ९६ ॥ उपांगें वाजती अतिगहिर[5] । तुळसीमाळा परिकर[6] । सुमनवृष्टि[7] अति सादर । होती अपार कीर्तनें ॥ ९७ ॥ तें देखोनि हनुमंत । अत्यंत झाला आनंदभरित । प्रधान बोलावोनि सुमंत । स्वयें सांगत तयासी ॥ ९८ ॥ निवान्त काय होसी मानसीं । जाणें श्रीरामभेटीसी । करावया सामग्रीसी । दळभारेंसीं संजोगा ॥ ९९ ॥ प्रेमें विकळ भरत । शत्रुघ्न तैसाचि तेथ । तुम्ही संपादोनि समस्त । चला रघुनाथदर्शना ॥ १०० ॥ ऐकोनियां ते वाणी । भरत उठला तत्क्षणीं । लागला हनुमंताच्या चरणीं । भली आठवण दीधली ॥ १ ॥ नाहीं तरी आम्ही येथ । पडिलों असतों तटस्थ । कोण करिता सावचित्त । श्रीरघुनाथदर्शना ॥ २ ॥ ऐकोनि भरताचें वचन । हनुमान घाली लोटांगण । करीत अति प्रीतीं विनवण । सावधान परियेसीं ॥ ३ ॥ प्रेमा म्हणिजे सत्त्वावस्था । राम तिहीं गुणांपरता । गुणीं पहातां तत्त्वतां । राम सर्वथा भेटेना ॥ ४ ॥ म्हणोनियां अति सावधान । निःशेष रज तम त्यागून । सत्त्वावस्था उठली जाण । तीही आपण जिरवावी ॥ ५ ॥ प्रेमावस्थामूर्च्छितवृत्ती । येथें श्रवण कोणाप्रती । कोण पावे अर्थप्राप्ती । श्रोते निश्चितीं तटस्थ ॥ ६ ॥ जेथें गुणाचें आवरण । तेथें कैंचें रामदर्शन । म्हणोनि साधकें आपण । सर्वथा गुण जिंकावे ॥ ७ ॥ निःशेष गुणांचा निरास[8] । तैं मोक्षपुरीसी होय वास । तुम्ही तरी तेथींचे क्षितीशं[9] । आणि अनुजें[10] रामाचे ॥ ८ ॥ म्हणोनि तुम्ही तत्त्वतां । गिळोनियां सत्त्वावस्था । चला भेटूं रघुनाथा । अति सत्वरता निघावें ॥ ९ ॥ पाक जरी आला निगुतीं । तरी वाफ जिरों देती । बाहेर निघाल्या शीघ्रगतीं । राहे निश्चितीं अपक्क ॥ ११० ॥ तेंवी रजतमाचे निरास । सत्त्व वाढलें असमसाहस[11] । तेंही जिरतां सावकाश । राघवेश तैं भेटे ॥ ११ ॥ विषयेंद्रियगुणग्राम[12] -।- रहित स्वसुख-आराम । तैं बोलिजे श्रीराम । सिद्धान्त परम उपनिषदीं ॥ १२ ॥ ऐसी श्रीरामसंस्था । आम्ही ऐकों परंपरता । तरी हे उफराटी वार्ता । तुजप्रति कथा आम्ही सांगों ॥ १३ ॥ तूं आमचा माता पिता । स्वामी गुरु कुळदेवता । जैसा राम तैसा तूं भरता । अति उद्धतता म्यां केली ॥ १४ ॥ म्हणोनि घातलें लोटांगण । क्षमा करावी आपण । आणीक एक ऐकें चिन्ह । अधिकार पूर्ण असे आम्हां ॥ १५ ॥ बाळका बोलों शिकवी माता । तीपुढें तें वाचाळता । करितां सुखावे माता । परी सर्वथा क्षोभेना ॥ १६ ॥ तेंवी तुमचीं बाळें आम्ही । म्हणोनि वल्गेजों[13] निजधर्मीं । न विचारितां सेवकस्वामी । निजकृपा तुम्ही संतोषा ॥ १७ ॥ ऐकोनि हनुमंताचें वचन । भरत झाला सुखायमान । हृदयीं धरिला आलिंगून । तूं जिवलग पूर्ण रामाचा ॥ १८ ॥ आम्ही म्हणवूं सहोदर । परी राम नेणों साचार । वृथा वाहों शरीरभार । देवोनि आहार नाशित ॥ १९ ॥ रामविस्मरणें आहार देख । जठराग्नि त्याचा शुद्ध पाक । सर्वथा न करी देख । करोनि पैं नरक सांडी ॥ १२० ॥ अग्नि क्षोभलियाचें लक्षण । अहर्निशीं विषयचिंतन । अवस्था उन्मत्त पूर्ण । नरकलक्षण

---

१ एकमेकांना. २ आलिंगन. ३ वायनें. ४ वाजविल्या. ५ अति गंभीर. ६ सुंदर. ७ पुष्पवृष्टी. ८ नाश. ९ राजे.

१० कनिष्ठ बंधु. ११ अमर्याद. १२ विषय, इंद्रियें यांचा समुदाय. १३ बडबडतों.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

या नांव ॥ २१ ॥ शुद्ध पाकाचें लक्षण । सर्वेंद्रियें सावधान । अनिमेष रामस्मरण । होवोनि प्रसन्न अग्नि करी ॥ २२ ॥ आपुली निजतेजदीप्ती । श्रीरामभक्तांच्या हातीं । अग्नि देत संतोषस्थितीं । तेणें शोभती देदीप्यमान ॥ २३ ॥ हें तुझ्या ठायीं प्रत्यक्ष । हनुमंता दिसे सावकाश । श्रीरामतेजें स्वप्रकाश । त्रैलोक्यास मंडन ॥ २४ ॥ आतां असोत या व्युत्पत्ती । असदारोपण म्हणजे स्तुती । तरी ते न घडे निश्चितीं । तुझी ख्याती अनिवार ॥ २५ ॥ जितकी श्रीरामाची कीर्ती । तितकी तुझी ख्याति मारुती । म्हणोनि माथा चरणाप्रती । ठेवोनि कपिपति नमियेला ॥ २६ ॥

प्रत्याख्यानं न मे वीर वदामि वद किं प्रियम् ।
गवां शतसहस्रं वा ग्रामाणां च शतं वरम् ॥ ५ ॥

प्रेमाचेनि पडिभरें । योग्यायोग्य पैं न सरे । हनुमंतासी अत्यादरें । नृपवरें विनविलें ॥ २७ ॥ अति प्रिय रामकथा । विजययात्रा हनुमंता । तूं सांगितली तत्त्वतां । काय आतां तुज देऊं ॥ २८ ॥ प्रीतिपूर्वक परियेसीं । जे अपेक्षा असेल मानसीं ते सांगावी मजपासीं । शंका मानसीं न धरावी ॥ २९ ॥ देऊं गाईंचीं शतसहस्रें । देश नगरें अपारें । किंवा धान्याचीं कोठारें । धनभांडारें असंख्यात ॥ १३० ॥ इंद्रपद लोकपाळेंसीं । पाताळपन्नग अमृतेंसीं । सत्यलोक पैं मागसी । कैलासवैकुंठासी देईन ॥ ३१ ॥ काय अपेक्षित तुझ्या चित्ता । शीघ्र आज्ञापीं पवनसुता । तेणें आश्चर्य हनुमंता । भरतप्रताप देखोनी ॥ ३२ ॥ अतिशयें सुखावोनि चित्तीं । हनुमान विनवीत भरताप्रती । अगाध तुझी उदारशक्ती । बंधु निश्चितीं रामाचा ॥ ३३ ॥ जैसी श्रीरामाची निजख्याती । तैसीच तुझी प्रतापशक्ती । दानीं देतां त्रिजगती । अटक निश्चितीं नाहीं तुम्हां ॥ ३४ ॥ आम्ही तुमचे अनुचर । केवळ श्रीरामाचे किंकर । श्रीरामभजनें चराचर । नाहीं दुस्तर हरिभक्ता ॥ ३५ ॥ श्रीरामाचें ध्यान करितां । ब्रह्मादिकां दुस्तर चिंता । आमुचें पद ध्यावया तत्त्वतां । ध्यान रघुनाथाचें करितात ॥ ३६ ॥ म्हणोनि ब्रह्मादि अमरकोडी । विघ्नें उठविती कडाडीं । दावोनि नाना विषयगोडी । पाडिती मुरकुंडी मनाच्या ॥ ३७ ॥ तथापि निश्चयाचे भक्त । सर्वथा न होती ध्यानच्युत । ते विषयींचा श्लोकार्थ । सावचित्त परियेसीं ॥ ३८ ॥

त्रिभुवनविभवहेतवेऽप्यकुंठस्मृति-
रजितात्मसुरादिभिर्विमृग्यात् ।
न चलति भगवत्पदारविंदा-
ल्लवनिमिषार्धमपि यः स वैष्णवाग्र्यः ॥ ६ ॥

सुरासुरांचिया पंक्ती । ज्यालागीं नाना साधनें करिती । तरी ज्यांसी नव्हे प्राप्ती । दुष्प्राप्य निश्चितीं त्रिलोकीं ॥ ३९ ॥ तेंवी त्रिलोकींचें राज्य सर्वेही । महासिद्धींसमवेत पाहीं । हात जोडोनि भक्ताच्या ठायीं । तिष्ठत लवलाहीं दासत्वें ॥ १४० ॥ भगवच्चरणारविंदाहून । जरी क्षण एक काढी मन । तरी तितुकेंही त्यासी देऊन । म्हणवोनि जाण तिष्ठती ॥ ४१ ॥ परी हा निष्टंक दादुला । दुस्तर धैर्यार्थिला । चरणध्याना वहिला । क्षणही मनाला काढीना ॥ ४२ ॥ चरणध्यानाचा तो क्षण । त्रिभुवनविभव त्यावरून । सिद्धींसहित ओंवाळून । निंबलोण सांडीत ॥ ४३ ॥ भक्त जिज्ञासु साधक ज्ञानी । तयांमाजी अग्रगणी । लवनिमिषार्धही चरणींहूनी । लोभें मन काढीना ॥ ४४ ॥ कोणते म्हणसी चरण । ऐक त्यांचेंही लक्षण । आदिकरोनि त्रिनयन । करिती ध्यान जयांचें ॥ ४५ ॥ ब्रह्मा जो कां सृष्टिकर्ता । त्रैलोक्यासी सर्जनें करिता । सत्यलोकराज्यभोक्ता । वेद मूर्तिमंत तये स्थानीं ॥ ४६ ॥ जेथें सत्य मूर्तिमंत । तप मूर्तिमंत तेथ । महासिद्धी होवोनि मूर्त । नित्य नांदत जये स्थानीं ॥ ४७ ॥ ऐसिया भोगांची विश्रांती । ब्रह्मयासी न मनेचि सर्वार्थी । मग बैसोनि एकांतीं । चरण चिंती हरीचे ॥ ४८ ॥ तरी सहसा नव्हे प्राप्ती । मग लाजोनि प्रजापती । पोटा आला लक्ष्मीपती । चरणप्राप्ती तरी नव्हे ॥ ४९ ॥ तैसाच जाण शूळपाणी । त्रिनयन कैलासभुवनीं । उमेसारिखी कामिनी । अनुदिनीं भोगासी ॥ १५० ॥ नंदी भृंगी आदि महागण । विद्यानिधि हृदयरत्न । तेणें न पवेचि समाधान । मग त्यागून निघाला

१ मिथ्या आरोप करणें. २ अधिकतेनें. ३ इच्छा. ४ सेवक. ५ स्थावरजंगमात्मक सृष्टि. ६ देवांचे समुदाय. ७ ध्यानापासून भ्रष्ट. ८ धैर्यसंपन्न. ९ त्रैलोक्याचें ऐश्वर्य. १० उत्पत्ति. ११ शंकर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ ५१ ॥ सर्वस्वें त्यागोनि शूळपाणी । हातीं पायीं राख लावोनी । ध्यानस्थ बैसला श्मशानीं । चरणचिंतनीं रामाच्या ॥ ५२ ॥ हृदयीं ध्यान चरणांचें । मुखीं नाम श्रीरामाचें । मुकुटीं भूषण निष्कर्माचें । तीर्थ रामाचें परिकर ॥ ५३ ॥ तोही ठकिला हरिमाया । सांडोनि श्रीरामाच्या पायां । आला मोहिनी पुसावया । द्रवोनि वीर्या पडिला तो ॥ ५४ ॥ तेथें इंद्र वरुण कुबेर जाण । यांची गणना करी कोण । पावावया हरिचरण । सामर्थ्य जाण तयां नाहीं ॥ ५५ ॥ ऐसे दुष्प्राप्य श्रीरामचरण । ते भक्तां लाधले संपूर्ण । ते सांडूनि इच्छी आन[१] । ऐसा अभागी कोण त्रिजगतीं ॥ ५६ ॥ तूं सूर्यवंशी नृपती । आणि अनुज[३] रघुपती । याजकें याचितां तुजप्रती । स्वयें त्रिजगती अर्पिसी ॥ ५७ ॥ मी किंकर तुझें साचार । हेंचि मागें उत्तरोत्तर । श्रीरामचरणांहूनि अन्यत्र । वांच्छा कोठें न[४] वचांवी ॥ ५८ ॥ म्हणोनि घातलें लोटांगण । तेणें भरत सुखायमान । श्रीरामाचें यथार्थ ज्ञान । तुजसी जाण कळलेंसे ॥ ५९ ॥ श्रीराम सांडोनि आन । जो जो कां वांछी धन मान । त्यासी श्रीरामाचें ज्ञान । सर्वथा जाण दुर्लभ ॥ १६० ॥ नमन करोनि कपीसी । आलिंगिला अति प्रीतीसीं । दान उच्चारिलें वाचेसीं । तें तें याचकांसी देता झाला ॥ ६१ ॥ दिधलें गाईंचें सहस्र । धान्यकोठारें अपार । अश्व गज दानांचे भार । भरतें अपार वांटिले ॥ ६२ ॥ दिधलीं धनाचीं भांडारें । देश पुरें नगरें । भरतें वांटिलीं परिकरें । आशा दानभरें निमाली ॥ ६३ ॥ श्रीरामागमनें विशुद्ध । याचकांसी झाला परमानंद । पेलॅलें[५] संतृप्तीचें दोंद । आनंदकंद श्रीराम ॥ ६४ ॥ भरत वांटीत प्रीतिकरीं । याचकांचे इच्छेवरी । तंव याचकांचा दुकाळ भारी । रामागमनें करी संतृप्त ॥ ६५ ॥ ऐसें याचकां देवोनियां दान । भरत आनंदीं निमग्न । तंव विनवी वायुनंदन । चला रघुनंदनदर्शना ॥ ६६ ॥ येथेंचि विलंब लागला पाहें । श्रीराम येईल लवलाहें । मग पुढें जावोनि काये । चला लवलाहें दर्शना ॥ ६७ ॥ ऐकोनि हनुमंताचें उत्तर । अवघे उठले वेगवत्तर । सिद्ध होवोनि समग्र । जाती रघुवीरदर्शना ॥ ६८ ॥ शरण एका जनार्दना । भरत आणि रघुनंदना । सप्रेम भेटी दोघां जणां । त्या निरूपणा राम वदवी ॥ १६९ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां भरतहनूमंतदर्शनं नाम एकोनाशीतितमोऽध्यायः ॥ ७९ ॥ ओंव्या ॥ १६९ ॥ श्लोक ॥ ६ ॥

अध्याय ऐशींवा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ सुमंता आज्ञापी मारुती । शीघ्र संजोगा सैन्यसंपत्ती । येरें ऐकतां अति प्रीतीं । आनंद चित्तीं उंथळला ॥ १ ॥ तेणें आनंदेंकरोनि जाण । घातलें मारुतीसी लोटांगण । सेनापतीसी आज्ञापन । केलें आपण सुमंतें ॥ २ ॥ आपुलाले दळभार । सिद्ध करा अति सत्वर । भरत निघाला वेगवत्तर । श्रीरघुवीरदर्शना ॥ ३ ॥ तंव भरतें करोनियां दान । सुखी केले दीनजन । आनंदमय प्रसन्नवदन । काय गर्जोन बोलत ॥ ४ ॥ भवशत्रुविनाशना । ऐकें सुबंधो शत्रुघ्ना । सेनापतीसी करोनि आज्ञा । सहित प्रधानां सिद्ध करवीं ॥ ५ ॥

श्रुत्वा तस्य तदा वाक्यं भरतः सत्यविक्रमः ।
क्षिप्रमाज्ञापयामास शत्रुघ्नं परवीरहा ॥ १ ॥
दैवतानि च चैत्यानि वेश्मानि नगरस्य च ।
विचित्रैर्गंधमाल्यैश्चाभ्यर्च्यतामिति सर्वशः ॥ २ ॥
भरतस्य वचः श्रुत्वा शत्रुघ्नः परवीरहा ।
तदादिश्य सहस्राणि चोदयामास वीर्यवान् ॥३॥

मारुतिवचनें भरत । रामागमनें हर्षयुक्त । तेणें आनंद अत्यद्भुत । पोटीं अत्यंत उंथळला[६] ॥ ६ ॥ तेणें पूर्णानंदेंकरून । आज्ञापिला शत्रुघ्न । नगर शृंगारावें संपूर्ण । जेणें रघुनंदन सुखावे ॥ ७ ॥ ऐकोनि भरताचें वचन । अति आल्हादें शत्रुघ्न । सेनापतीस आज्ञापन । करोनि सैन्य सिद्ध केलें ॥ ८ ॥ नगर शृंगारिलें प्रीतीं । देवसदनें अति निगुतीं । मुक्तघोष[९] पैं झळकती । देखतां निश्चितीं मन निवे ॥ ९ ॥ यंत्रपाठीं आवरणें जैसीं । कीं ध्यानस्थ सिद्धांची वोळी कैसी । नक्षत्रमाळांपरी

---

१ उत्तम. २ इतर. ३ धाकटा बंधु. ४ जाऊं नये. ५ बोल्ला. ६ वाढलें. ७ सत्वर. ८ उत्पन्न झाला.

९ मोत्यांचे घोंस.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

तैसीं । चिद्रत्नें सीं झळकती ॥ १० ॥ स्वर्गभोगाची जे गोडी । तेचि झाली दृढ बेडी । ते छेदावया लवडसवडी । दृढ आवडी श्रीरामीं ॥ ११ ॥ भेटावया श्रीरघुपती । धरूं भरताची संगती । म्हणोनियां शीघ्रगती । नक्षत्रें प्रवेशती माळेमाजी ॥ १२ ॥ मध्यपीठ अति शुद्ध । वरी श्रीरामपादुका विशुद्ध । दर्शनमात्रें महाबोध । परमानंद उपासकां ॥ १३ ॥ वर्णितां तेथींचा महिमा । सरस्वतीसीं लाजे ब्रह्मा । भरताचिया भजनधर्मा । वेदां सीमा न करवे ॥ १४ ॥ सभामंडपीं पडशाळा । शृंगारिलिया सुमनमाळां । सुखी व्हावया जनकबाळा । अति सोहळा पैं केला ॥ १५ ॥ निजगृहीं स्त्रीशाळा । शृंगारिल्या कुशळकळा । भांडारगृहें चित्रशाळा । शेजारशाळा सोज्ज्वळ ॥ १६ ॥ वनवासींचा श्रम समस्त । देखतांचि पैं साद्यंत । सकळ निरसोनि जाय तेथ । ऐसें अद्भुत रचियेलें ॥ १७॥ अश्वशाळा गजशाळा । कापडेंगृहें शस्त्रशाळा । कंडणीपेषणीपाकशाळा । जळशाळा मनोहर ॥ १८ ॥ नगर शृंगारिलें कोडें । श्रीरामकीर्तीचे हुडे । ध्वज उभारिले चहूंकडे । देखतां उडे भवभय ॥ १९ ॥ पताकाइतिहास अंबरीं । देखतां ऐकतां श्रवणांतरीं । आनंद होतसे बहुतांपरी । चिदंबरीं रहिवास ॥ २० ॥ मुक्त अभिमानें शिणले । ते श्रीरामभेटी आले । नगरीं अनुष्ठान मांडिलें । अधोमुख मुक्तघोषेंसीं ॥ २१ ॥ श्रीरामदर्शनें त्वरित । मुक्तीसी मोक्ष निश्चित । येणें निश्चयें सतत । ओळंबत दर्शना ॥ २२ ॥ भक्तिपल्लव परिकर । श्रीरामप्रेमें सार्द्र । पालविती वेगवत्तर । श्रीरघुवीरदर्शना ॥ २३ ॥ माडिया गोपुरांचिया परी । सांगतां अनुपम्य भारी । कांहीं सांगेन संक्षेपाकारीं । श्रोतीं समग्रीं क्षमा कीजे ॥ २४ ॥ प्रथम मोक्षाची पुरी । जे दुर्लभ सुरासुरीं । आत्माराम राज्य करी । तेथींची थोरी केंवी वर्णवे ॥ २५ ॥ मुळीं अधिष्ठान श्रीराम एक । चैतन्य गाडोरा सुरेख । त्यावरी नगर रचिलें देख । विराजे सुरेख मोक्षश्रिया ॥ २६ ॥ शुद्धाच्या ठायीं सहजस्थिती । अहमात्मैक उठे स्फूर्ती । तैसा पाया गृहाप्रती । बांधिलीं जोतीं नेमस्त ॥ २७ ॥ जेंवी त्रिगुणांची उभवणी । तेंवी जोतियां मेखा तिन्ही । मुक्तीच्या चैतन्यखेवणी । निश्चयेंकरोनी बैसविल्या ॥ २८ ॥ पाचूंचे खांबांचे परिकर । प्रतिगृहीं मनोहर । जेंवी पंचभूतप्रकार । धरी भार चराचर ॥ २९ ॥ उथाळीं पौळियांचीं शोभत । जेंवी नेमस्त धातु सात । त्या चिद्रत्नीं भिंती जडित । अति मंडित निजतेजें ॥ ३० ॥ दहा गवाक्षें निजनिर्वेडीं । दाविती नाना परवडी । परी ते एका प्रकाशाची ओढी । दाविती गोडी एकत्वें ॥ ३१ ॥ सकळां प्रावरण वस्तूचें । तैसे शेकार गृहाचे । निवासस्थान आत्मयाचें । श्रीरामाचें निजनगर ॥ ३२ ॥ चुकोनि मुळींचें एकपण । द्वैतदुखणां भरलें पूर्ण । त्यासीं बहुसाल भासती खण । नुगवे जाण सर्वथा ॥ ३३ ॥ तळीं वरी येतां जातां । कोटी कोटी फेरे खातां । मूळ न सांपडे सर्वथा । सबाह्य पाहतां भरलेंसे ॥ ३४ ॥ मोक्षपुरी अयोध्याभुवन । अनुपम्य तेथींचें रचन । वरी शृंगारिता शत्रुघ्न । अति विचक्षण श्रीरामभ्राता ॥ ३५ ॥ भवशत्रूचा संहार करी । नित्य विराजे मोक्षपुरीं । म्हणोनियां नाम निर्धारीं । अति कुसरीं शत्रुघ्न ॥ ३६ ॥ तेणें नगराचें रचन । शृंगारिलें प्रीतीकरोन । अलौकिक तेथींचें महिमान । श्रीरघुनंदनसुखार्थ ॥ ३७ ॥ रथ्यांतरीं वाडेंकोडें । विजु पिळोनि घातले सडे । प्रकाश पडिला निजनिवाडें । मशक त्यापुढें सत्यलोक ॥ ३८ ॥ नवल अयोध्येची परी । चिंतामणीची चिंता हरी । कल्पतरूची कल्पना वारी । परिसाची निवारी जडत्वकाळिमा ॥ ३९ ॥ दशेचें दैन्य दवडी । अमृताची साल काढी । स्वानंदाची निजगोडी । नांदे उघडी अयोध्येमाजी ॥ ४० ॥ नगरा बाह्यप्रदेशीं । श्रीराम नित्य जीवशिवांसी । सर्वकाळीं वसंतासी । अयोध्येसीं विश्रांति ॥ ४१ ॥ प्रेमोत्फुल्ल कमळें शुद्ध । गुंजारवती कृष्ण षट्पद । ऐकोनि गंधर्व झाले स्तब्ध । सामवेद मौनावे ॥ ४२ ॥ प्रबोध पारवे घुमघुमत । तेणें शारदा चवकत । देवगुरु विस्मित तेथ । पडे ताटस्थ्य सुरसिद्धां ॥ ४३ ॥ डोलत द्राक्षांचे पैं घड । मुक्तपरिपाकें अति गोड । सकळ कामाचें पुरवीत कोड ।

---

१ सत्वर. २ मध्य स्थान. ३ पुष्पमालांनीं. ४ तंबू. ५ कांडणें, दळणें व पाक करणें यांच्या जागा. ६ बुरूज. ७ पताकांची गोष्ट. ८ खिडक्या. ९ निश्चयेंकरून. १० रस्त्यांमधून. ११ रीत. १२ विश्रांति. १३ भ्रमर. १४ बृहस्पति.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

गोडिया गोड ते गोडी ॥ ४४ ॥ चूतवृक्षाचे ठायीं जाण । अच्युतफळें परिपक्व पूर्ण । रस स्रवती उलोन । गोडी गहन तयांची ॥ ४५ ॥ दाळिंबें उललीं मदभारें । बीजें झळकती तेजाकारें । ज्ञान-कर्मउपासनाद्वारें । रस रघुवीरें सेवावया ॥ ४६ ॥ वनामाजी अति प्रीतीं । श्रीरामाची गुण-कीर्ती । कोकिळा पंचमें कूजती । तेणें मौनावती सामवेद ॥ ४७ ॥ शुक बोलती सिद्धान्त । तेणें लाजला वेदान्त । श्रीरामागमनें वसंत । पातला ऋतु मारुती ॥ ४८ ॥ ऐकतांचि श्रीरामागमन । सिद्धि पातल्या धांवोन । अयोध्येच्या बिंदी[1] जाण । स्वयें आपण झाडिती ॥ ४९ ॥ ऋद्धि सिद्धि करिती मार्जन । रमा रंगमाळालेखन । स्वयें करीतसे आपण । श्रीरामागमनसंतोषें ॥ ५० ॥ येरीकडे[2] वीर भरत । श्रीरामदर्शना उदित[3] । निघाला अति त्वरान्वित । सैन्यासमवेत गजरेंसीं ॥ ५१ ॥

अपरे मुक्तपुष्पैश्च सवर्णैः पंचवर्णकैः ।
राजमार्गं सुसम्बद्धं स्तुवीत शतशो नराः ॥ ४ ॥
राजदारास्तथामात्याः सैन्यश्रेण्यस्तथाश्रमाः ।
त्वरमाणा विनिर्याता रथैः सह महारथाः ॥ ५ ॥
द्विजातिमुख्यैर्धर्मज्ञैः श्रेणीमुख्यैश्च नैगमैः ।
मालामोदकहस्तैश्च मन्त्रिभिर्भरतो वृतः ॥ ६ ॥
शंखभेरीनिनादैश्च बन्दिभिश्चाभिवन्दितः ।
पादुके च पुरस्कृत्य शिरसा धर्मकोविदः ॥ ७ ॥

सुमंतादि प्रधान । सेनापति अति दारुण । गजरथ सहिताभरण । निघालें सैन्य अति गजरें ॥ ५२ ॥ जेंवी मुमुक्षु अति प्रीतीं । साधनचतुष्टय[4]-संपत्ती । घेवोनि निघे आत्मप्राप्ती । भरत चक्रवर्ती तेंवी निघे ॥ ५३ ॥ कौसल्या सुमित्रा दोनी । दशरथाच्या प्रियकामिनी । श्रीरामाच्या माता उल्लासोनी । प्रीतिकरोनी निघाल्या ॥ ५४ ॥ जिचेनि वचनमात्रेंकरूनी । राज्यादिभोगां देवोनि पाणी । पादत्राणही त्यागूनी । झाला वनीं वनस्थ राम ॥ ५५ ॥ जिचेनि धर्में सुरमोचन । जिचेनि निवटिला रावण । त्रैलोक्यासी आनंद पूर्ण । विजयी रघुनंदन जिचेनि ॥ ५६ ॥ ते कैकेयी श्रीराममाता । भेटों निघाली रघुनाथा । आणिक काांहीं दशरथकांता । आनंदभरिता निघाल्या ॥ ५७ ॥ सुमंतादि प्रधान । मातांसी करिती विनवण । तुमचे भेटीसी रघुनंदन । येईल आपण लोटांगणीं ॥ ५८ ॥ ऐकोनि सुमंतवचन । कौसल्या सुमित्रा आपण । काय बोलती प्रतिवचन । विवेक-संपन्न प्रेमळा ॥ ५९ ॥ पहिलें विश्वासिलें तुज । जे घेवोनि येसी रघुराज । शेखीं कळली तुझी वोज[5] । रिता रथ मागें आणिला ॥ ६० ॥ हातींचा सांडोनि रघुनाथ । रिता घेवोनि आलासी रथ । श्रीराम-वियोगें दशरथ । झाला स्वर्गस्थ देहत्यागें ॥ ६१ ॥ राम वनवासी होतां वनीं । रायें सांडिली राज-धानी । भरतें भोगां देवोनि पाणी । फळभोजनीं भूमिशायी ॥ ६२ ॥ आकान्त सकळ राज्यासी । दुःखनिमग्न अयोध्यावासी । ऐकतां त्याच्या आग-मनासी । कैंवी मनासी राहवेल ॥ ६३ ॥ आणि-काची असो कथा । श्रीरामातें सांडोनि येतां । हतश्री तूंचि सुमंता । दिससी तत्त्वतां मृतप्राय ॥ ६४ ॥ श्रीराम सकळांचें जीवन । प्रेतरूप सकळ तेणेंवीण । त्याचें ऐकतां आगमन । सर्वथा मन न राहे ॥ ६५ ॥ श्रीरामागमनगोष्टी । सकृत् ऐकतां कर्णपुटीं । भेटी न घे उठाउठीं । तो जाण सृष्टीं महापापी ॥ ६६ ॥ यालागीं गा सुमंता । सर्वभावेंसीं सर्वथा । भेटी येऊं रघुनाथा । विचार अन्यथा असेना ॥ ६७ ॥ ऐकोनि मातांचें वचन । सुमंतें घातलें लोटांगण । सकळ जयजयकारें जाण । निघाले दर्शना रघुनाथाचे ॥ ६८ ॥ राम ज्यांच्या वचनाधीन । श्रीराम ज्यांचा अनन्यशरण । ज्यांचेनि बोलें होय सगुण । ते ऋषिगण निघाले ॥ ६९ ॥ श्रीराम साधूंचा केला । श्रीराम साधूं-लागीं झाला । त्यासी भेटावया वहिला[6] । गजरें निघाला ऋषिसमुदाय ॥ ७० ॥ कश्यप अत्रि वामदेव ऋषी । जाबाली गौतम परियेसीं । वसिष्ठ सद्गुरु सूर्यवंशीं । शिष्यसमुदायेंसीं निघाले ॥ ७१ ॥ इत्यादि सकळ ऋषी । जे मनें कल्पिती ब्रह्मांडासी । ते ऋषिवर वेदघोषेंसीं । श्रीरामभेटीसी निघाले ॥ ७२ ॥ श्रीरामवियोगें संतप्त । नागरिक लोक समस्त । आला ऐकोनि रघुनाथ । उतावेळ चित्तें[7] निघाले ॥ ७३ ॥ चाटे भाटे सोवनी सोनार । गणिक

१ रस्ते. २ इकडे. ३ उत्कंठित. ४ वस्तुविवेक, वैराग्य, शमादि (शम, दम, उपरति, तितिक्षा, श्रद्धा, समाधान) आणि मुमुक्षुत्व. ५ खडावा इ०. ६ रीति. ७ आवडता. ८ त्वरित.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

रजक सुतार। तेली माळी कुंभार। अति सत्वर निघाले ॥ ७४ ॥ तांबोळी अति हरिखें उडविती पानें। फुलारी करिती सुमनसिंचनें। रंगारी सुखावले निजमनें। रावलगीं रंगणें उडविती ॥ ७५ ॥ श्रीरामभेटी अति हरिख। एकापुढें धांवे एक। स्त्रीपुत्रादि बाळक। एकींएक निघाले ॥ ७६ ॥ आदिकरोनि दासदासी। निघाले श्रीरामभेटीसी। वेश्या ज्या कां नगरवासी। हरिखें भेटीसी निघाल्या ॥ ७७ ॥ श्रीरामनगरीं अळुमाळ। सर्वथा नाहीं कर्मचांडाळ। नगरप्रांतीं अधिकारशीळ। तेही तत्काळ निघाले ॥ ७८ ॥ सर्वस्व त्यागोनि संन्यासी। जे विरक्त देहभावासी। तेही श्रीरामभेटीसी। अति त्वरेंसीं निघाले ॥ ७९ ॥ श्रीरामदर्शना भरत। पुढें गेला त्वरान्वित। म्हणोनि लोक नगरस्थ। स्वयें धांवत अति शीघ्र ॥ ८० ॥ स्त्रीपुत्रादिसुहृदसंग। श्रीरामभेटीसी विघ्न साङ्ग[३]। त्यांचा निःशेष होय त्याग। राम अव्यंग[३] तैं भेटे ॥ ८१ ॥ ऐसें जाणोनि निर्धारीं। रामदर्शनीं प्रीति थोरी। कोणी कोणाचा संग न धरी। आनंद भारी रामभेटी ॥ ८२ ॥ येरीकडे वीर भरत। श्रीरामभेटीसी उदित। निघाले अति त्वरान्वित। समवेत दळभारें ॥ ८३ ॥ अनुभवगजांचिया हारी। गुढार[४] घातलें तयांवरी। पताका झळकती चिद्‌बरीं। द्वैत चकचुरी करिती पाहें ॥ ८४ ॥ निजबोध महावत[६] वरी। विवेकांकुश झळकती करीं। मर्यादा चुकल्या हाणिती शिरीं। करोनि किरकिरी येती ठायां ॥ ८५ ॥ साधनचतुष्टयसंपत्ती। अति कुशळ तीक्ष्णयुक्तीं। तैसे वारू नाचती। चौताळती रामभेटी ॥८६॥ तयांवरी वळंघले वीर। रणशौर्यें अति उद्भट। वारुवां वाजती सा[८]टे। त्राणें अंबुट कवळती ॥ ८७ ॥ रथ ध्वजपताकीं मंडित। चालती विमानीं जेंवी मुक्त। तेथें बैसतां सुख अद्भुत। लाजवीत सुरवरां ॥ ८८ ॥ वोडंण खड्ग तळपोनियां पाहीं। तुळवे नाचती लवलाहीं। मल्ल झोंबती दोहीं बाहीं। देखतां तो देही काळ कांपे ॥ ८९ ॥ तयांमागें असिवारी। यावा दावियेला स्वारीं। नाचती तींच पायांवरी। आली शारी कृतांता ॥ ९० ॥ तयांमागें चालती रथ। वारु जुंपिले हिंसत। चक्रवाटातळीं पर्वत। पीठ होत कर्माचें ॥ ९१ ॥ दोहीं बाहीं कुंजरथाट। गळदंडी गजघंट। गजी गज समलगट। घडघडाट चालती ॥ ९२ ॥ स्तोमींस्तोमीं[१२] वाद्य विचित्र। ध्वनि उठला अति गंभीर। जेंवी अनुहताचा गजर। दशधा प्रकार वाजती ॥ ९३ ॥ सवें श्वेतातपत्र। कनकदंडी युग्मचामर। राजचिन्हें पैं समग्र। अति त्वरित चालती ॥ ९४ ॥ भाट गर्जती कैवाडें। श्रीरामाचे पैं पवाडे। तेणें वेदान्त झाले वेडे। लाजिले स्वयें नेतिशब्दें ॥ ९५ ॥ सवें ऋषीश्वर असंख्य। उच्चारिती वेदघोष। माता घेऊनि देख। भरत समवेत निघाला ॥ ९६ ॥ भेटावया रघुकुळटिळका। माथां ठेवोनि पादुका। आनंदमग्न होवोनि देखा। शत्रुघ्न सखा समवेत ॥ ९७ ॥ सहित माता ऋषिपंक्ती। भरत शत्रुघ्न निश्चितीं। सुमंतादि प्रधानपंक्ती। चरणीं चालती सकळिक ॥ ९८ ॥ श्रीरामशकुनालागीं तेथ। पूर्णकुंभ हेमयुक्त। दधिमधुअक्षताभरित। दूर्वासहित पूर्ण जळें ॥९९॥ मागें पालखियांची हारी। कोणी न बैसे तयांवरी। श्रीरामदर्शनीं प्रीति थोरी। हर्षें गजरीं चालती ॥ १०० ॥ उपवासें अति संकटीं। उदर बैसलें अति खपाटीं। माथां जटांची वीरगुंठी। कृष्णाजिनगांठी प्रावरण ॥ १ ॥ मागें सांडोनि नगर। पुढें चालिले वेगवत्तर। मार्ग अवलोकितां समग्र। श्रीरघुवीर दिसेना ॥२॥ दशदिशांसहित गगन। स्वबुद्धी पाहतां जाण। सर्वथा न दिसे रघुनंदन। भरत उद्विग्न स्वयें झाला ॥ ३ ॥ सांगितलें हनुमंतें। पैल तें गा विमान येतें। आणि अद्यापि न दिसे मातें। अभाग्य अद्भुत मी करंटा ॥ ४ ॥ तरी आतां कळलें चिन्ह। कोटिधा[१३] होतां पुराणश्रवण। सर्वथा नव्हे समाधान। वचनारूढ मन जंव नव्हे ॥ ५ ॥ जेणें काळें हनुमंतें। सांगितलें रामागमनातें। तेणें काळें दुश्चित चित्तें। पामर निश्चितें मी एक ॥ ६ ॥ वचनसमयीं दुश्चित्तता। गुंतलों लौकिकार्था। तेणें सुनॉट[१४] केली वार्ता। भेटी रघुनाथा वंचलों[१५] ॥ ७ ॥ लोकांसीं मज संबंध काय। दळभार मज काय होये। वचन वृथा गेलें स्वयें। वळीत[१६] आहें

१ धोबी. २ किंचितही. ३ पूर्ण. ४ तयार. ५ हौदे. ६ महात. ७ वीर. ८ घोड्यांना. ९ चाबुक. १० ढाल. ११ शहारे, भय. १२ समूहांमध्यें. १३ कोटी प्रकारांनीं. १४ निष्फळ. १५ फसलों. १६ बडबडत.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

कोरडाचि ॥ ८ ॥ स्वरूपप्राप्तीची ज्यांसी आर्ती। तिंहीं सांडोनि लौकिकस्थिती । अनन्य शरण रघुपती । जावोनि एकांतीं पुसावें ॥ ९ ॥ तैसें न करींच मी तत्त्वतां । लौकिकी पुसिली वार्ता । तेणेंचि वंचलों सर्वथा । भेटी रघुनाथा नव्हेचि ॥ ११० ॥ तेणें अत्यंत उद्विग्न । न भेटेचि रघुनंदन । मारुतीच्या चरणांलागून । भरत मागुतेन पुसतसे ॥ ११ ॥

न हि पश्यामि काकुत्स्थं राममार्यं परंतप ।
अथैवमुक्ते वचने हनूमानिदमब्रवीत् ॥ ८ ॥

अथ विज्ञापयन्नेवं भरतं सत्यविक्रमम् ।
सद्यः फलान् कुसुमितान् पश्य वृक्षान्मधुच्युतान्॥९॥

अत्यंत प्रीतिपुरस्सर । भरत होवोनियां नम्र । हनुमंतासी पुसे उत्तर । श्रीरघुवीर कां न ये ॥ १२॥ हें गा येतें विमान । म्हणोनि बोलिलासी वचन । अद्यापि त्याचें नव्हे भान । कां विलंबन लागलें ॥ १३ ॥ ऐकोनियां भरतवचन । बोलता झाला वायुनंदन । यथार्थ आला रघुनंदन । पाहें चिन्ह सावकाशीं ॥ १४ ॥ ऐक भरता सत्त्वमूर्ती । साचार आला रघुपती । संदेह नाहीं ये अर्थी । वोळल्या वनस्पती रसभावें ॥ १५ ॥ निर्जीवासी जीव आले । निरंकुरासी अंकुर फुटले । अपल्लव ते पालवले । अफळ आले फळासी ॥ १६ ॥ सजीव निर्जीव वनस्पती । अमृतरस पैं स्रवती । पुष्पीं फळीं पैं शोभती । मघमघिती चौफेर ॥ १७॥ असो वनस्पतींचा भाव । तुझे अंतरींचा उत्साव । तोचि श्रीरामाचा आविर्भाव । नाहीं संदेह ये अर्थी ॥ १८ ॥ अवस्था[१] शिणवी मना । ते निश्चयेंसीं रघुनंदना । भेटवोनि समाधाना । पाठवी मना तत्काळ ॥ १९ ॥ आतां येईल रघुपती । संदेह नाहीं ये अर्थी । मार्गी येतां शीघ्रगतीं । गुहकाप्रती सांगितलें ॥ १२० ॥ त्यासी भेटोनियां जाण । आतां येईल रघुनंदन । सर्वथा उदास न करीं मन । सत्य वचन हें माझें ॥ २१ ॥ शनैः शनैः अभ्यास करितां । अबळासही ये योग्यता । तेंवी श्रीरामपंथीं चालतां । निश्चयें रघुनाथा भेटसी ॥ २२ ॥ ऐशा वचनीं हनुमान । भरता देवोनि समाधान । स्वयें मार्गस्थ केला आपण । श्रीरघुनंदनदर्शना ॥ २३ ॥ येरीकडे रघुपती । भरद्वाजाश्रमीं क्रमोनि राती । ऋषींसहित विमानस्थितीं । शीघ्रगतीं निघाले ॥ २४ ॥ सुखवोनियां ऋषींसी । भरताचिया भेटीसी । राम निघाला शीघ्रतेसीं । जयजयकारेंसीं गगन गर्जे ॥ २५ ॥ वानरांचें उड्डाण । जयजयकारें गडगर्जन । तेणें नादें त्रिभुवन । सहित गगन कोंदलें ॥ २६ ॥ रीस वानर गोळांगूळ । नामें गर्जोनियां सकळ । आक्रमिलें नभोमंडळ । विमान बळें सांडोनि मागें ॥ २७ ॥ निजनगरा राघवासी । जातां वानर उल्लासी । तें देखोनि श्रीरामासी । निजमानसीं आनंद ॥ २८ ॥ करीत नामाचा कल्लोळ । विमान चालत अंतराळ । गुहकें देखोनि तत्काळ । गर्जला प्रबळ रामनामें ॥ २९ ॥ देखोनियां रघुकुळटिळक । जयजयकारें गर्जोनि देख । लोटांगणीं एकएक । अत्यंत हरिखें नामाचा ॥ १३० ॥ गुहक भाग्याचा संपूर्ण । श्रीरामासी ज्याची आठवण । तेणें करोनियां नमन । करूं स्तवन आदरिलें ॥ ३१ ॥ जयजयाजी अव्यक्तव्यक्ता । उत्पत्तिस्थितिप्रळयातीता । स्वयें करोनि अकर्ता । होसी तत्त्वतां स्वामिया ॥ ३२ ॥ तूं सर्वातीत[२] सनातन । सर्वसाक्षी चैतन्यघन । सकळ जीवांचें जीवन । सनातन परब्रह्म ॥ ३३ ॥ तूं सर्वदा सम । कदा नव्हसी विषम । तो तूं अभक्तां दुर्गम । सदा सुगम निजभक्तां ॥ ३४ ॥ अणुमात्र करितां भजन । सर्वस्वें होसी भक्ताधीन । तुज चिंतिती भक्तजन । तुज चिंतन तयांचें ॥ ३५ ॥ नीच कुट्टिणी अनायासें । तूतें स्मरली पक्ष्याचेनि मिसें । तिसी निजपद दिधलें कैसें । तें साधनीं असोसें नव्हे प्राप्त ॥ ३६ ॥ ब्रह्मादिकां असाध्य पूर्ण । तें तियेसी दिधलें स्थान । विचारितां निंद्य कर्माचरण । माझें गहन अति भाग्य ॥ ३७ ॥ जातिहीन किरात देख । कर्म तरी निजघातक । त्या मज भेटला रघुकुळटिळक । भाग्य अलोलिक पैं माझें ॥ ३८ ॥ ब्रह्मादिकां न पुससी पूर्ण । त्या तुज माझी आठवण । पाठविला वायुनंदन । समाधानगुढीसीं ॥ ३९ ॥ तेणें विजयवार्ता

१ आवड. २ काळजी. ३ हर्ष. ४ सर्वांहून वेगळा. ५ शाश्वत. ६ सुलभ. ७ कष्टानें. ८ हलक्या जातीचा. ९ भिल्ल. १० मोठें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सांगतां । अति आल्हाद झाला चित्ता । अमृतवृष्टि होय मरतां । तेंवी रघुनाथा आम्हां झालें ॥ १४० ॥ राहवितां अति प्रेमयुक्त । येथें न राहेचि हनुमंत । भरत असेल चिंताक्रांत । त्वरान्वित मग गेला ॥ ४१ ॥ त्या काळापासोनि येथ । उभे असों वाट पाहात । तंव विमान देखिलें जात । त्वरान्वित अयोध्येसी ॥ ४२ ॥ ऐसें गुहकें स्तवितां पूर्ण । जवळी येवोनि विमान । श्रीरामें उचलोनि आपण । हृदयीं जाण आलिंगिला ॥ ४३ ॥ श्रीरामीं देतां आलिंगन । उडालें शून्याचें शून्यपण । चिदाभासता कोंदली पूर्ण । चैतन्यघन श्रीरामें ॥ ४४ ॥ नाठवे देहगेहस्फूर्ती । नाठवे वर्णाश्रमजाती । नाठवे कर्माकर्मगती । भेटी रघुपती होतांचि ॥ ४५ ॥ आत्मया श्रीरामाचें श्रेष्ठपण । नाठवे आपुलें नीचपण । बोळला श्रीराम आनंदघन । समाधान जीवशिवां ॥ ४६ ॥ गुहकाचें प्रेम गहन । प्रेमें भेटला रघुनंदन । प्रेमें पावला समाधान । प्रेम गहन भक्ताचें ॥ ४७ ॥ प्रेमें सुटला गजेंद्रु । प्रेमें अढळ केला ध्रुरु । उपमन्यासी क्षीरसागरु । देखोनि प्रेमादरु दीधला ॥ ४८ ॥ प्रेम तेथें भाव पूर्ण । प्रेम तेथें वैराग्य गहन । प्रेमें निरसे जन्ममरण । प्रेमेंवीण ज्ञान वांझोटें ॥ ४९ ॥ प्रेम तेथें उपजे भक्ती । प्रेम तेथें नित्य विरक्ती । प्रेम तेथें अढळ शांती । प्रेमळां मुक्ती वोळंगण्या ॥ १५० ॥ यालागीं भक्त साधक सज्ञान । आर्त जिज्ञासु अर्थार्थी जाण । तिंहीं प्रेम वाढवावें पूर्ण । क्षणोक्षणां अति आवडीं ॥ ५१ ॥ प्रेमाची पुढें निजकथा । भेटी भरता रघुनाथा । प्रेमाचा रसाळ वक्ता । सत्य सर्वथा जनार्दन ॥ ५२ ॥ एकाएकीं प्रेम पूर्ण । प्रेमें वोळंगला जनार्दन । एका जनार्दना शरण । प्रेम अविच्छिन्न मज द्यावें ॥ १५३ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां श्रीरामगुहकदर्शनं नाम अशीतितमोऽध्यायः ॥ ८० ॥ ओंव्या ॥ १५३ ॥ श्लोक ॥ ९ ॥

अध्याय एक्यायशींवा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ गुहकाचा भाव पूर्ण । भावें भेटला रघुनंदन । भाव तेथें तिष्ठे ज्ञान । विज्ञानेंसीं जाण सर्वदा ॥ १ ॥

न काष्ठे विद्यते देवो न पाषाणे च मृण्मये ।
भावे हि विद्यते देवस्तस्माद्भावो हि कारणम् ॥ १ ॥

भावार्थीं प्रेम आगळें । भावार्थें तत्त्व आकळे । वैकुंठींचे भाव बळें । सर्वकाळें भेटती ॥ २ ॥ भावावीण व्यर्थ श्रवण । भावावीण व्यर्थ कीर्तन । अर्थावबोध नाहीं पूर्ण । चित्त वळवे रान विषयाचें ॥ ३ ॥ भावार्थावीण व्यर्थ ज्ञान । भावार्थावीण व्यर्थ ध्यान । अंतरीं विकल्प नांदतां पूर्ण । ज्ञान ध्यान लटिकेंचि ॥ ४ ॥ भावार्थावीण वृथा भक्ती । भावार्थावीण वृथा कीर्ती । भावार्थावीण विरक्ती । बाह्य मिरविती लटिकीचि ॥ ५ ॥ भावावीण वृथा विचार । भावावीण वृथा आचार । भावावीण कर्माचार । जाण समग्र लटिकाचि ॥ ६ ॥ तो भावार्थ मूर्तिमंत । सत्य जाण बंधु भरत । श्रीरामभेटीसी प्रेमयुक्त । ऋषींसमवेत निघाला ॥ ७ ॥ हनुमंतें दिधलें समाधान । तरी भरता अवस्था पूर्ण । सर्वथा स्थिर नव्हे मन । विना रघुनंदन देखिलिया ॥ ८ ॥ परम अवस्था भरतासी । अंग टाकीतसे भूमीसीं । श्रीरामें मोकलिलें आम्हांसी । गति कायसी जिण्याची ॥ ९ ॥ श्रीराम आठवूनि मनीं । पदोपदीं घाली लोळणी । रुदन करी आक्रंदोनी । राम अझूनी दिसेना ॥ १० ॥ राम माझीं माता पिता । बंधु कुळगुरु तत्त्वतां । रामावीण सकळ वृथा । जिणें सर्वथा भूमिभार ॥ ११ ॥ राम माझें निजधन । राम नयनींचें अंजन । राम इंद्रियांचा चाळक पूर्ण । तयावीण तीं विकळ ॥ १२ ॥ पडे उठे विकळ होय । गात्रकंपें चांचरी जाये । तेणें आम्हां वंचिलें पाहें । करूं काये हनुमंता ॥ १३ ॥ माझा विषयलोभ दारुण । राज्याभिलाषी मी निंद्य पूर्ण । जाणोनियां रघुनंदन । येतां जाण परतला ॥ १४ ॥ काय करूं गा हनुमंता । वेगें करूं देहपाता । भेटी केंवी रघुनाथा । विचार तत्त्वतां मज सांग ॥ १५ ॥ ऐसा होतसे खेदक्षीण । हनुमंतासी केलें नमन । चरणीं मिठी घातली पूर्ण । रघुनंदन भेटवीं ॥ १६ ॥ येरें उठवोनि भरतासी । आलिंगिलें हृदयेंसीं । करूं नको देहपातासी । तेणें श्रीरामासी नव्हे भेटी ॥ १७ ॥ देहपातें होय भेटी । तरी कां साधक रिघती कपाटीं ।

१ मोठ्या घाईनें. २ चैतन्यस्वरूपप्रकाश. ३ शरीर, घर इ० स्फुरण. ४ फसविलें. ५ गिरिकंदरांत.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

योगी चढती योगपीठीं । श्रीरामभेटीलागूनी ॥ १८ ॥ मरणें भेटतां रघुपती । तरी यमपुरी कासया वसती । कोण पावता अधोगती । मरणें मुक्ती जरी होत ॥ १९ ॥ सांडीं दुर्बुद्धि परती । सावध होईं निश्चितीं । पैल आला रघुपती । सहित कपिपती गर्जत ॥ २० ॥ रीस वानर गोळांगूळ । करीत नामाचा कल्लोळ । व्यापिलें दिसे नभोमंडळ । आलें तत्काळ विमान ॥ २१ ॥ सवें बिभीषण लंकापती । सुग्रीव अंगद वानरपती । अमित वानरांच्या पंक्ती । अंकाप्रति जनकजा ॥ २२ ॥

एतस्मिन् भ्रातरौ वीरौ वैदेह्याः सह राघवौ ।
सुग्रीवश्च महातेजा राक्षसश्च विभीषणः ॥ २ ॥
स्त्रीबालयुववृद्धानां रामोऽयमिति कीर्तनम् ।
हर्षेण महताविष्टो निःस्वनो दिवमस्पृशत् ॥ ३ ॥
तं विमानगतं दृष्ट्वा सोमं नभसि वै यथा ।
प्रांजलिर्भरतो भूत्वा प्रहृष्टो राघवोन्मुखः ॥ ४ ॥
ददर्श ब्रह्मणा सृष्टे विमाने भरताग्रजम् ॥ ५ ॥

सौमित्रसीतासमवेत । महावीरीं विराजित । विमानीं देखिला रघुनाथ । नामें गर्जत वानर ॥ २३ ॥ भुभुःकार जयजयकार । नादें गर्जत अंबर । विमानस्थ रघुवीर । येतां सत्वर देखिला ॥ २४ ॥ नक्षत्रेश रजनीपती । गगनीं शोभे स्वप्रकाशस्थितीं । तैंवी विमानीं रघुपती । वानरपंक्तीसमवेत ॥ २५ ॥ चंद्रासवें नक्षत्रपाळें । तैंवी रामासवें गोळांगूळें । गर्जत नामाच्या कल्लोळें । आले जवळी अयोध्येच्या ॥ २६ ॥ अयोध्येच्या आरामवनीं । वानरीं टाकिल्या सेलाणी । द्रुम आसंडिती सत्राणीं । फळभक्षणीं आनंद ॥ २७ ॥ फळें खाती गटगटां । सिटक्या देती मटमटां । गोष्टी सांगती चटचटां । सुखें वरिष्ठां विटाविती ॥ २८ ॥ एकमेकां वांकुलिया । एकमेकां गुदगुलिया । एकमेकां करिती रेळिया । श्रीरामरायाचेनि धर्में ॥ २९ ॥ वाळी मारिला बाणेंकरीं । राजचिन्हें सुग्रीवा शिरीं । शिळा तारोनियां सागरीं । वानर परपारीं उतरले ॥ ३० ॥ पाडोनि त्रिकूटाचे कडे । खंदक बुजोनि धडफुडे । लंकादुर्गी चहूंकडे । सैरा माकडें गर्जती ॥ ३१ ॥ धांडोळोनि घरोघर । कुंभकर्णा केला चूर । इंद्रजितासी थोर मार । करोनि सत्वर निवटिला ॥ ३२ ॥ सीतेचा सूड घ्यावयासी । अद्भुत शक्ति मारुतीसी । विध्वंसिलें रावणयागासी । आवरणांसी भेदिलें ॥ ३३ ॥ जावोनियां कुंडापासीं । मूत्रपुरीषें विझविलें त्यासी । पात्रें फोडोनि वेगेंसीं । रावणासी गांजिलें ॥ ३४ ॥ तरी तो नव्हे सावधान । अंगदें साधोनि विंदान । मंदोदरीचें केशग्रहण । करोनि जाण गांजिली ॥ ३५ ॥ आक्रंदतां ते सुंदरी । रावण पोळला अंतरीं । नेत्र उघडोनि पाहे बाहेरी । तंव बोहरी यागाची ॥ ३६ ॥ तेणें खवळला दारुण । युद्धा निघाला सत्राण । लक्षोनियां रघुनंदन । निर्वाण रण करूं आला ॥ ३७ ॥ रामें एकेचि बाणेंकरीं । रावण उडविला अंबरीं । शिरें छेदोनि लक्षांतरीं । क्षणामाझारीं निवटिला ॥ ३८ ॥ रामें रावण कुंभकर्ण । इंद्रजितासी लक्ष्मण । उरले राक्षस दारुण । ते हनुमंतें निवटिले ॥ ३९ ॥ राज्यासीं स्थापोनि बिभीषण । सोडविली जानकी जाण । सुरवरांचें बंदिमोचन । रघुनंदन निजविजयी ॥ ४० ॥ भेटोनियां दशरथासी । संस्थापना रामेश्वरासी । आनंद होवोनि त्रैलोक्यासी । राम अयोध्येसी पातला ॥ ४१ ॥ ऐसें गर्जती अद्भुत । वानर आनंदें नाचत । तें देखोनि भरत । सुखें अद्भुत उथळला ॥ ४२ ॥ चातका मेघाचें सिंचन । चकोरा चंद्रामृतपान । मृता जेंवी अमृतप्राशन । घनगर्जन मयूरा ॥ ४३ ॥ चुकल्या बाळकासी माता । पतिव्रता भेटे निजकांता । निधि सांपडे तत्त्वतां । जेंवी अवचिता भणंगासी ॥ ४४ ॥ मुकिया जोडे वाक्सिद्धी । अंधासी रत्नपरीक्षेची बुद्धी । श्रीराम देखतां त्रिशुद्धी । हर्षानंदी होय भरत ॥ ४५ ॥ सवेग उठोनि घातली कैंव । आकाशावरी घेतली धांव । शून्य सारोनि स्वयमेव । स्वयें राघव वंदिला ॥ ४६ ॥ कोणाचें न ऐकतां श्रवण । न देखतां कोणाचें नयन । नेणतां कोणाचें महिमान । रघुनंदन नमियेला ॥ ४७ ॥ सांडोनि मीतूंपणाची स्फूर्ती । जागी न होतां चित्तवृत्ती । मिठी घातली रघुनाथीं । अभि-

१ नरकवासाला. २ पलीकडे. ३ मांडीवर. ४ चंद्र. ५ नक्षत्रांचे समूह. ६ बागांत. ७ उड्या. ८ बळानें. ९ चेष्टा. १० वेष्टणांना. ११ नाश. १२ भरला. १३ शिंपडणें. १४ मेघाची गर्जना. १५ ठेवा. १६ भिकाऱ्याला. १७ मिठी.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

नव ख्याती भरताची ॥ ४८ ॥ उठतां मनाची स्फूर्ती । नायकतां बुद्धीची वृत्ती । निःशेष त्यागोनि अहंकृती । श्रीरघुपती नमियेला ॥४९॥ भरतराम-आलिंगनीं । रामीं हारपले दोनी । तटस्थल्या अवस्था तीनी । सुरसिद्ध मनीं विस्मित ॥ ५० ॥ तैसाचि शत्रुघ्नही जाण । अहंकोहंसोहंविहीन । भेटतांचि रघुनंदन । येरयेरां जाण गिळियेलें ॥ ५१ ॥ गंगा-सागरीं मिळणी जैसी । श्रीरामभरतां भेटी तैसी । स्वादासी आणि साखरेसी । भेटी जैसी अभेद ॥ ५२ ॥ तैसीच भेटी सौमित्रेंसीं । भरत आणि शत्रुघ्नेंसीं । भेटी झाली एकत्वासी । त्रिधा भेदासी सांडूनी ॥ ५३ ॥ सच्चिदानंदपदें देख । त्रिधा भेद वस्तु एक । तेंवी वेगळे देखतां आणिक । रघुकुळ-टिळक वस्तुतां ॥ ५४ ॥ द्रुति[१] मार्दव पिवळी । त्रिधा भेदें चांपेकळी । तेंवी श्रीरामस्वरूपमेळीं । तिघे तत्काळीं अद्वय ॥ ५५ ॥ मूळीं एकत्वें एक ॐकार । तोचि झाला त्रिधा प्रकार । अकार उकार मकार । तेंवी रघुवीर बंधूंसीं ॥ ५६ ॥ पन्नास[२] आंगळया दोनीवरी । प्रणवीं[३] मात्रांची उभारी । तेचि गुंफोनि श्रुतिशास्त्रीं । अर्थाकारीं विराजे ॥ ५७ ॥ तेंवी श्रीरामाचें सैन्य देख । नरवानरादि अशेख । अयोध्येचे नागरिक । एक एक तद्रूप ॥ ५८ ॥ जेंवी न लक्षितां कोणासी । ऐक्यता जैसी जीवशिवांसी । तेंवी भेटी बंधुबंधूंसी । अलक्ष्यतेसीं पैं झाली ॥ ५९ ॥ पुढें सकळ सैनिकांसी । माता गुरु प्रधानांसी । राम आळवील आलिंगनेंसीं । निजउल्लासीं निजस्वरूपें ॥ ६० ॥ अति अद्भुत गुह्य ज्ञान । सकळीं सकळ रघुनंदन । अभेदत्वें आलिंगन । देवोनि जाण निववील ॥ ६१ ॥ अति सखोल निरूपण । बोलावया मज कैंचें वदन । वक्ता एका जनार्दन । निरूपण चालविता ॥ ६२ ॥ जनार्दन वदनीं वक्ता । गुह्य-ज्ञान रामकथा । निजनिरूपण चालविता । वचनवदता होवोनियां ॥ ६३ ॥ जनार्दनें डोळस नयन । जनार्दन निजअंजन । देखणें दावी देखणा होऊन । रघुनंदन विश्वमूर्ति ॥ ६४ ॥ मनाचें जें निजमन । स्वयें एका जनार्दन । निरसोनि मनाचें मनपण । श्रीरामकथन स्फुरवीत ॥ ६५ ॥ मनीं कर्मीं वचनीं पूर्ण । चाळक एका जनार्दन । निजकथा रामायण । प्रीतीकरोन चालवीत ॥ ६६ ॥ ते ग्रंथकथनअहंता । मज द्यावया तत्त्वतां । संबंध नाहीं सर्वथा । कर्ता करविता तो एक ॥ ६७ ॥ यालागीं सकळ श्रोते जन । तयांसी माझें लोटांगण । सावध करोनियां मन । श्रीरामकथन परिसावें ॥ ६८ ॥ श्रोतियांसी सावध म्हणतां । लागों पाहे उद्धतता । त्यांसी नित्यसावधानता । बोलिलों वार्ता बाळत्वें ॥ ६९ ॥ क्षमा करोनि अपराधासी । श्रीरामें सुखाविलें सर्वांसी । भेटोनि अयोध्येच्या लोकांसी । त्या निरूपणासी परिसावें ॥ ७० ॥ तंव कृपाळू निजसज्जन । संतोषयुक्त अभयवचन । बोलते झाले आपण । अमृताहून सुखकारी ॥ ७१ ॥ आम्हां रामकथेचा आदर । रसाळ निरूपण साचार । सुचूं नको परिहार । कथा सत्वर चालवीं ॥ ७२ ॥ ऐकोनि संतांचें वचन । उल्लासला चौगुणें[४] । जेंवी ऐकतां घनगर्जन[७] । आनंद पूर्ण मयूरा ॥ ७३ ॥ आज्ञापिलें संतोषें । तरी ऐका स्वामी सावकाशें । सकळां भेटोनि राघवेशें । सुख कैसें दीधलें ॥ ७४ ॥ भरत आणि शत्रुघ्न । वसिष्ठमुख्य[८] ऋषिगण । श्रीराम-माता स्वयें घेऊन । आले आपण भेटीसी ॥ ७५ ॥ सुमंतादि प्रधान मुख्य । आले सकळही सैनिक[९] । जनपद नागरिक । आले असंख्य भेटीसी ॥ ७६ ॥ चतुराश्रम चतुर्वर्ण । षड्दर्शनी[१०] आले गहन । अखिल जातींचे जन । आले रघुनंदनभेटीसी ॥ ७७ ॥ देखतांचि रघुवीर । निःशेष विसरले संसार । पुढें केंवी चाले व्यवहार । हाही विचार विसरले ॥ ७८ ॥ देखतांचि रघुनाथा । धाकें निःशेष निमाली चिंता । कार्यकारणकर्तव्यता । निःशेष चित्ता नाठवे ॥ ७९ ॥ न देखतांचि राघवासी । दंड लागला संन्याशांसी । तेही देखतां श्रीरामासी । निजदंडासी उबगले ॥ ८० ॥ देखतां श्रीरामासी । ओंवाळूनि सांडिलें दंडासी । निष्कर्मता बाणली कैसी । देहभावासी विसरले ॥ ८१ ॥ विसरोनि श्रीरामासी । वनस्थ वनीं झाले पिशी । आश्रमाभिमानें गिळिलें त्यांसी । नित्यकर्मासी आचरतां ॥ ८२ ॥ तेहीं देखतां

१ सुगंध. २ बावन्न. ३ ओंकाराचे ठिकाणीं. ४ कथेस. ५ अडथळा. ६ चौपट. ७ मेघगर्जना. ८ वसिष्ठादिक. ९ लष्करी लोक. १० न्याय, वैशेषिक, सांख्य, योग, मीमांसा आणि वेदान्त जाणणारे.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

रघुपती । आश्रमाभिमान शीघ्रगतीं । केव्हां गेला नेणों केउंती । सुखसंवित्ती श्रीराम ॥ ८३ ॥ विसरोनियां रघूत्तम । गृहस्थां होता गृहधर्म । शिश्नोदरव्यवसाय परम । व्यवसायकर्म सर्वदा ॥ ८४ ॥ तिहीं देखतां रघुरावो । गृहधर्म झाला वावो । विषयेंद्रियांचा झाला अभावो । निजानंद पहा हो कोंदला ॥ ८५ ॥ नाममात्र ब्रह्मचारी । ब्रह्मत्व नाहीं इंद्रियांवरी । राम देखतां निर्धारीं । सत्यत्वें थोरी ब्रह्मचर्या ॥ ८६ ॥ इतुकियासी मूळ कारण । मुख्यत्वें सत्संगचि प्रमाण । सत्संगें रघुनंदन । वोळगणा पूर्ण सर्वांगें ॥ ८७ ॥ सत्संगें साधन केलें । सत्संगें तत्त्व आकळलें । सत्संगाचेनि भावबळें । परब्रह्म लोळे दोंदावरी ॥ ८८ ॥ सत्संगें साधनसिद्धी । सत्संगें अढळ बुद्धी । चालतां बोलतां समाधी । जाण त्रिशुद्धी सत्संगें ॥ ८९ ॥ तो सत्संग मूर्तिमंत । श्रीरामभ्राता राव भरत । त्याचेनि संगें यथार्थ । श्रीरघुनाथ भेटला ॥ ९० ॥ रामनामाच्या दीर्घध्वनीं । आनंदें पूर्ण झाली अवनी । नाद न समाये गगनीं । सकळां मनीं उत्साहो ॥ ९१ ॥ स्त्रीशूद्रादि चांडाळ । भरतसंगतीं तत्काळ । देखोनि रघुकुळपाळ । झाले सकळ सुखमय ॥ ९२ ॥ रंगारीं उडविलीं रावलगें । पाटवीं पटावें अनेगें । सोनारीं सुवर्णसुमनें । वेगें हर्षयोगें उडविलीं ॥ ९३ ॥ वैराळ मोत्यांच्या झालरी । रत्नें उडविती जोहारी । सर्व स्वयें कुरवंडी निर्धारीं । करिती गजरीं रामावरी ॥ ९४ ॥ देखोनियां रघुनाथा । सर्वस्वाचा त्याग करितां । उल्लास जनांचिया चित्ता । लोभ सर्वथा नाहीं कोणा ॥ ९५ ॥ सकळीं सकळ संपत्ती । ओंवाळिली श्रीरघुपती । तरी अधिक आनंद चित्तीं । भेटीची स्थिती अवधारा ॥ ९६ ॥ देखोनियां ऋषिवरांसी । विमान सांडोनि वेगेंसीं । उडी घातली आवेशीं । ऋषिनमनासी श्रीरामें ॥ ९७ ॥ परमात्मा स्वयें श्रीराम । तो ऋषिनमना सकाम । निष्कर्माचें निजरूप परम । द्विजोत्तम रामाचें ॥ ९८ ॥ आपण आपणासी करावी प्रीती । आपुली आपणा निजभक्ती । वाढविती अति निगुतीं । म्हणोनि रघुपती द्विज नमी ॥ ९९ ॥

गुरुदास्येंवीण तत्त्वतां । ठाव नाहीं परमार्था । ऐसें जाणोनि वस्तुतां । ठेविला माथा गुरुचरणीं ॥ १०० ॥ गंगा निजओघें सर्वस्वेंसीं । येवोनि भेटे सागरासी । तेंवी रामें अति प्रीतीसीं । वसिष्ठासी नमियेलें ॥ १ ॥ हेत ठेवोनि अर्थस्वार्थीं । तीर्थव्रतादि भजन करिती । ते जाणावी अवघी रीती । फळप्राप्ती तयां नव्हे ॥ २ ॥ चित्तें वित्तेंसीं जीविता । गुरुचरणीं पैं अर्पितां । अति उल्लास ज्याच्या चित्ता । तेंचि रघुनाथाचें स्वरूप ॥ ३ ॥ येणें भावें वसिष्ठासी । रामें नमियेलें अति प्रीतीसीं । वसिष्ठें उचलोनि वेगेंसीं । निजहृदयेंसीं आलिंगिला ॥ ४ ॥ श्रीरामहृदया हृदय मीनलें । एकत्वें सुख पूर्ण झालें । जेंवी दीप एक झाले । भांडारें उघडलें प्रकाशाचें ॥ ५ ॥ सुवर्ण आणि अलंकारा । भेटी एकत्वें उभारा । तेंवी वसिष्ठरघुवीरा । मिठी एकाकारा पडियेली ॥ ६ ॥ जैसी प्रीती सद्गुरूसी । तेणें भावें सकळ ऋषी । रामें नमिले अति प्रीतीसीं । अद्वयेंसीं ब्रह्मत्वें ॥ ७ ॥ कैकेयी माता भरतासी । रामें आधीं नमिलें तिसी । येरीं आलिंगिला अति प्रीतीसीं । कोप मानसीं नेघें रामा ॥ ८ ॥ म्यां तुजसीं वैर केलें । परी त्वां रामा मनीं नाहीं धरिलें । ऐसें तुझें महिमान आगळें । सुखी केलें मजलागीं ॥ ९ ॥

उपकारिषु यः साधुः साधुत्वे तस्य को गुणः ।
अपकारिषु यः साधुः स साधुः सद्भिरुच्यते ॥ ६ ॥

वनवासा धाडिलें तुज । जग निंदी म्हणोनि मज । तोंड दावितां लोकलाज । रघुराजद्वेषिणी ॥ ११० ॥ अतीत अनागत वर्तमान । सर्वज्ञ ज्ञाता तूं रघुनंदन । बाह्येंद्रियें क्रियाचरण । वर्तविता आन कोणी नसे ॥ ११ ॥ प्राण्याच्या माथां निमित्त जाण । वृथा ठेविती आबाल जन । चाळक वर्तवी वर्तन । कर्में जाण तेंवी होती ॥ १२ ॥ श्रीरामराज्यासी विघ्न । करावया मी मशक कोण । राम परमात्मा परिपूर्ण । क्रिया संपूर्ण करवीत ॥ १३ ॥

जानामि धर्मं न च मे प्रवृत्ति-
र्जानाम्यधर्मं न च मे निवृत्तिः ।
केनापि देवेन हृदि स्थितेन
यथा नियुक्तोऽस्मि तथा करोमि ॥ ७ ॥

१ कोठें. २ उंची वस्त्रें. ३ ओंवाळणी. ४ कोठार. ५ एकत्वानें, ६ मोठेपण. ७ अधिक, थोर. ८ रामाचा द्वेष करणारी. ९ होऊन गेलेलें. १० पुढें होणारें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

श्रीरामराज्यासी विघ्न । सर्वथा करूं नये आपण । ऐसें जाणतजाणतां पूर्ण । उपरति मन पैं नेघे ॥ १४ ॥ स्वधर्म जाणोनि प्रवृत्ती । अधर्म जाणोनि निवृत्ती । सर्वथा न करवे निश्चितीं । याची स्थिति परियेसीं ॥ १५ ॥ अंतरवासी कोणी एक । भविष्य जाणोनियां देख । प्राचीनसूत्र अलौकिक । निजलाघवें देख नाचविता ॥ १६ ॥ त्या सूत्राचेनि बळें जाण । उत्तम मध्यम अधम जन । निजसत्ता नाचवी पूर्ण । होय वर्तन तदनुरूप ॥१७॥ प्राचीनाची चाळकता । कर्म कार्य कर्तव्यता । तुजअधीन रघुनाथा । कर्ता करविता तूंचि तूं ॥ १८ ॥ ब्रह्मा धरोनि भुंगीवरी । राम चाळक चराचरीं । तो माझे दुष्टाचारीं । कैंवी निर्धारीं आन होईल ॥ १९ ॥ राम चाळक इंद्रियांचा । राम वाचक वाचेचा । राम कल्पक मनाचा । बोध बुद्धीचा श्रीराम ॥ १२० ॥ राम चित्ताचें चेतव्य । राम अहंकारा अहंभाव । प्राणमर्यादेची धांव । स्वयें स्वयमेव श्रीराम ॥ २१ ॥ तेथें सत्कर्म असत्कर्म । कर्ता स्वयें श्रीराम । जेथें निपजे जो धर्माधर्म । सुखदुःखादि परम परिपाक ॥ २२ ॥ भोग्य भोग आणि भोक्ता । स्वयें श्रीरामचि तत्त्वतां । तेथें आमुचे माथां कर्तव्यता । कैंवी रघुनाथा येईल ॥ २३ ॥ कर्ता कार्य कर्माचरण । स्वयें तूंचि तूं आपण । वनवासासी बुद्धि दारुण । तुवांचि जाण प्रेरिली ॥ २४ ॥ जावोनियां वनवासासी । निर्दाळावें राक्षसांसी । सोडवावें सुरवरांसी । नवग्रहांसी सोडवावें ॥ २५ ॥ दंडकारण्य करोनि मुक्त । द्विजवरां सुख अद्भुत । संस्थापोनि शरणागत । त्रैलोक्यांत निजविजयी ॥ २६ ॥ इतुकें चरित्र तत्त्वतां । तुज करणें होतें रघुनाथा । वृथा अपराध माझे माथां । जगनिंद्यता कां केली ॥ २७ ॥ समर्थ करीतसे बरवें । त्यासी काय कोणें म्हणावें । अपेश कैकेयीनें भोगावें । कीर्ति राघवें विजयाची ॥ २८ ॥ ऐसें बोलतां कैकेयीसी । निजखूण पावली रामासी । घालोनि लोटांगण मातेसी । निजहृदयेंसीं आलिंगिली ॥ २९ ॥ तूं आमची निजमाता । तुझेनि कीर्ति रघुनाथा । जगदुद्धाराची कथा । जाण तत्त्वतां तुझेनि ॥ १३० ॥ आपणावेगळें आम्हांसी । जरी न करिसी परियेसीं । तरी कोण पुसतें आम्हांसी । कीर्ति रामासी तैं कैंची ॥ ३१ ॥ तुवां देवोनि आशीर्वचन । करविलें वनप्रयाण । तेणें झालें परम पावन । कीर्ति गहन तिहीं लोकीं ॥ ३२ ॥ तुझेनि मुक्त दंडकारण्य । तुझेनि वधिले रक्षोगण । तुझेनि निवटिला रावण । सुरमोचन तुझेनि ॥ ३३ ॥ तुझी प्रीति आम्हांवरी । सापत्नभावें लोकाचारीं । कृपेनें धाडितां वनांतरीं । ब्रह्मांडभरी कीर्ति माझी ॥ ३४ ॥ मज मानिती सकळ जन । ते तुझी कृपा पूर्ण । तयां दोघांचा संवाद जाण । निजबोध गहन जगासी ॥ ३५ ॥ रामें घालोनि लोटांगण । कैकेयी आलिंगिली पूर्ण । यश जोडलें संपूर्ण । रघुनंदन जगद्वंद्य ॥ ३६ ॥ कैकेयी श्रीरामाचें वचन । ऐकतांचि तत्क्षण । उडालें कर्मकर्तेपण । निरभिमान निजबोध ॥ ३७ ॥ ऐसा बाणला वचनार्थ । धर्मचाळक रघुनाथ । वृथाभिमान धरितां येथ । नरकपात अभिमानें ॥३८॥ कैकेयीवचनें तत्त्वतां । सर्व कर्मीं निष्कर्मता । स्वयें बाणली सर्वथा । श्रीरघुनाथाचेनि धर्में ॥ ३९ ॥ पुढें होवोनि रघुनंदन । कौसल्येसी केलें नमन । येरीं आलिंगोनि पूर्ण । केलें अवघ्राण मस्तकीं ॥ १४० ॥

कौसल्यां च सुमित्रां च कैकेयीमभ्यवादयत् ।
मूर्धन्याघ्राय कौसल्या तावुभौ रामलक्ष्मणौ ॥ ८ ॥
अंके सीतां समारोप्य बाष्पमानंदहर्षजम् ॥ ९ ॥

परमप्रिय दशरथासी । जिचेनि कीर्ति श्रीरामासी । आधीं नमूनि ते कैकेयीसी । मग कौसल्येसी नमियेलें ॥ ४१ ॥ तैसेंचि सुमित्रेसी आदरें । स्वयें नमिलें रघुवीरें । जानकी आणि सौमित्रें । माता सत्वर नमियेल्या ॥ ४२ ॥ श्रीरामासी देतां आलिंगन । वियोगदुःखक्लेश दारुण । निःशेष गेले हारपोन । समाधान जीवशिवां ॥ ४३ ॥ कौसल्येनें जानकी । प्रीतीं बैसविली अंकीं । अवघ्राण मस्तकीं । केलें तिघांसी कौसल्या ॥ ४४ ॥ सकळ जन अयोध्यावासी । प्रीतीं भेटों आले श्रीरामासी । श्रीरामें त्यांचिये भेटीसी । युक्ती कैसी योजिली ॥ ४५ ॥ मजलागीं आर्तभूत । भरतसंगतीं निश्चित । सकळ झाले व्रतस्थ । सुखी त्यांतें करावें ॥ ४६ ॥ त्यांसी न देतां आलिंगन ।

१ विरक्ति. २ पूर्वार्जित दैव. ३ राक्षससमुदाय. ४ देवांची बंधनमुक्तता. ५ सवतीमत्सरानें. ६ वास घेणें. ७ सर्व.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सकळ होती दुःखमग्न । पृथक् पृथक् देतां पूर्ण । अति विलंबन लागेल ॥ ४७ ॥ एकेंचि काळें सकळांसी । आनंदवात्रें उल्लासीं । तरीच सुख वाटेल त्यांसी । दुःखराशी अन्यथा ॥ ४८ ॥ यांसी न देतां आलिंगन । व्यापकत्वा पडे खोन । आर्तबंधु हें अभिधान । वृथाचि जाण होऊं पाहें ॥ ४९ ॥ श्रीराम लाघवी निर्धारीं । प्रकाशोनि सकळांतरीं । कैसी केली नवलपरी । निजनिर्धारीं परिसावें ॥ १५० ॥ अंतरीं प्रवेशोनि आपण । मनचि राम झालें पूर्ण । मग जें जें दिसे दृश्य भान । तें तें जाण श्रीराम ॥ ५१ ॥ सकळांतरीं प्रवेशोन । सकळरूपें झाला आपण । जो ज्यासी दे आलिंगन । तेथेंचि जाण श्रीराम ॥ ५२ ॥ भरत शत्रुघ्न ऋषीश्वर । नागरिक जन समग्र । एक वेळे लहानथोर । स्वयें रघुवीर दिसतसे ॥ ५३ ॥ पामर जो कां चांडाळादिक । सदाचार आणि श्वपाचकें । राम दिसे एकाएक । अलोलिक लाघव ॥ ५४ ॥ अयोध्येच्या तृणचरा गायी । श्रीराम दिसे त्यांच्या ठायीं । व्याघ्र सर्प क्रूर पाहीं । त्यांच्या ठायीं श्रीराम ॥ ५५ ॥ वृक जंबुकादि वृश्चिक । पक्षिआदि श्येन काक । कृमिकीटक पतंगादिक । एक एक राम झाले ॥ ५६ ॥ द्रुम पर्वत पाषाण । गिरिकंदरें वन कानन । स्थावर जंगम संपूर्ण । रघुनंदन स्वयें दिसे ॥ ५७ ॥ दृश्यमात्रीं रघुनंदन । देखतां दृश्याचें भान । सर्वथा उडालें संपूर्ण । चैतन्यघन कोंदलें ॥ ५८ ॥ श्रीरामरूपें आलिंगन । परस्परें देती आपण । विश्वरूप जाहला पूर्ण । सर्वांतरीं आपण प्रगटोनी ॥ ५९ ॥ माता भेटे पुत्रासी । राम म्हणोनि आलिंगी त्यासी । माता न देखोनि पुत्रासी । अति प्रीतीसीं आलिंगीत ॥ १६० ॥ बंधु देखोनि भगिनी । प्रीतीं आलिंगी राम भाँवूनी । येरें बंधुपण विसरोनी । रघुनंदनीं आलिंगन ॥ ६१ ॥ पिता पुत्रासी पुत्र पित्यासी । कन्या मातापितरांसी । विसरोनि अहंममतेसी । श्रीरामासी आलिंगीत ॥ ६२ ॥ स्त्रीतें आलिंगीत निजभर्ता । श्रीराम भासे तत्त्वतां । प्रियातें आलिंगितां कांता । श्रीरघुनाथा भेटी होय ॥ ६३ ॥ सासरा आणि जांवई । अति प्रीतीं लवलाहीं । रामरूपें भेटती पाहीं । लज्जा ठायीं निमाली ॥ ६४ ॥ सासू देखोनि जांवयासी । राम म्हणोनि निजावेशीं । प्रीतीं मिठी घातली तिसी । लाज मानसीं येवों न शके ॥ ६५ ॥ आदिकरोनि दासदासी । रामरूपें आलिंगन त्यांसी । रामें विसरविलें देहासी । स्वामिसेवकांसीं श्रीराम ॥ ६६ ॥ पशु जे कां तृणचर । तिर्यगादि योनि समग्र । कृमिकीटकादि विचित्र । भेटीं रघुवीर सुखावे ॥ ६७ ॥ आलिंगनें परस्परीं । श्रीरामरूपें निर्धारीं । देते झाले अत्यादरीं । प्रीती थोरी श्रीरामीं ॥ ६८ ॥ राम म्हणोनि परस्परीं । खांदां घेती अत्यादरीं । नृत्य करिती हर्षें थोरीं । देहविसरी स्वानंदें ॥ ६९ ॥ द्विज सुखावले अवघे । झेलिती गोपीचंदनरवे । धोत्रें झेलिती घंडीपालवें । बंदी राघवें सोडविले ॥ १७० ॥ नागरिक जन समस्त । त्यांसी भेटला रघुनाथ । होवोनियां आनंदभरित । सकळीं नृत्य मांडिलें ॥ ७१ ॥ हर्ष दाटला सकळांसी । कोणी नोळखे कोणासी । श्रीरामें अवघीं केलीं पिसीं । आपआपलीं कैसीं नाचती ॥ ७२ ॥ वानर मानव समग्र । अवघे झाले एकत्र । अवघीं केला जयजयकार । श्रीरघुवीर निजविजयी ॥ ७३ ॥ राम सौमित्र सीता सती । तिघें भेटलीं एकस्थितीं । आनंदविलें सकळांप्रती । श्रीरघुपती कृपाळु ॥ ७४ ॥ सुग्रीव आणि बिभीषण । श्रीरामें हातीं धरोनि जाण । करविलें वसिष्ठनमन । येरें आलिंगन दीधलें ॥ ७५ ॥ तैसेंचि सकळ ऋषिगण । त्यांसी करोनियां नमन । मातांसी घालोनि लोटांगण । भरता आलिंगन दीधलें ॥ ७६ ॥ नळ नीळ अंगद जांबवंत । सुषेण दधिमुखादि समस्त । हातीं धरोनियां रघुनाथ । भेटवीत भरतासी ॥ ७७ ॥ भरत लागला पायांसी । तुम्ही साहाकारी श्रीरामासी । निवटोनियां लंकेशासी । निजविजयासी दीधलें ॥ ७८ ॥ तुमचेनि श्रीरामासी कीर्ती । तुमचेनि अमरां बंदिमुक्ती । सोडवोनियां सीता सती । श्रीरघुपती भेटविली ॥ ७९ ॥ ऐकोनि भरताचें बोलणें । सकळीं घातलीं लोटांगणें । त्रैलोक्य पावन रघुनंदनें । विजयी होणें त्याचेनि

१ उणेपण. २ दीनबंधु. ३ कुतऱ्याचें मांस शिजविणारा. ४ लांडगे. ५ कोल्हे वगैरे. ६ ससाणा. ७ कल्पून. ८ आपल्या पतीला. ९ स्त्री, पत्नी. १० पशुपक्षी वगैरे. ११ घडीचे पदराचीं. १२ देवांना.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ १८० ॥ श्रीरामें पावन तीर्थ । श्रीरामें पावन व्रत । श्रीरामें याग पुनीत[१] । येरवीं पूर्ण व्रत अपायीं ॥ ८१ ॥ श्रीरामें क्षेत्र पावन । श्रीरामें पावन ध्यान । श्रीरामें पावन दान । येरवीं पूर्ण अपायी ॥ ८२ ॥ चुकोनियां[३] श्रीरघुनंदन । जें जें कीजे कर्माचरण । तें तें निश्चयें अनर्थी जाण । राखता कोण तयासी ॥ ८३ ॥ श्रीरामेंवीण क्रिया घडे । तेथें अपाय रोकडे । चुके ठके विकळ पडे । पतन गाढें तयासी ॥ ८४ ॥ ऐसें परस्परें जाण । अंतरप्रीतीं आलिंगन । देवोनियां स्तविती रघुनंदन । प्रेम गहन श्रीरामीं ॥ ८५ ॥ तेणें डोलत रघुनंदन । होवोनियां सुखैकघन । निजभक्तांचा प्रेमा गहन । प्रेमें पूर्ण प्रीति रामा ॥ ८६ ॥ पुढील कथानुसंधान । श्रीरामाचें अभिषिंचन । अत्यंत गोड निरूपण । एका जनार्दना विनवीत ॥ ८७ ॥ जनीं जनार्दन देख । जनार्दनीं सकळ लोक । ऐसा निश्चय जो सम्यक । जाणे निःशेख आपणासी ॥ ८८ ॥ त्यासी कथा रामामृत । निश्चयें कळलें यथार्थ । त्याचा भोक्ता तोचि एक । जो कथामृतचवी जाणे ॥ १८९ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां श्रीरामभरतदर्शनं नाम एकाशीतितमोऽध्यायः ॥ ८१ ॥ ओंव्या ॥ १८९ ॥ ॥ श्लोक ॥ ९ ॥

अध्याय ब्यायशींवा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ भेटोनियां सकळांसी । भरत आला रामापासीं । करोनि साष्टांग नमनासी । लोटांगणेंसीं राम वंदिला ॥ १ ॥ बद्धांजलि[४] विनयवृत्ती[६] । भरत सत्त्वें सत्त्वमूर्ती । विनविता झाला श्रीरघुपती । मधुरोक्तीं[७] नम्रत्वें ॥ २ ॥ श्रीरामा तुजवीण । झालों होतों अति दीन । मृतप्राय कळाहीन । जीवनेंवीण जेंवी धान्य ॥ ३ ॥ भ्रतारेंवीण जेंवी कांता । उपहत जैसी सर्वथा । शृंगारभोग सकळ वृथा । तेंवी रघुनाथा तुजवीण ॥ ४ ॥ मातृहीन पैं बाळक । मृतप्राय दिसे देख । नाहीं बाळसें कैंचें सुख । स्तनपान निःशेख असेना ॥ ५ ॥ तुजवांचोनियां रघुनंदन । तैसी आमुची दशा पूर्ण । केवळ भूमिभार जाण । मागों मरण तरी न ये ॥ ६ ॥ जितां जीववेना रामेंवीण । काळावांचोनि न ये मरण । सर्वांगीं तळमळ पूर्ण । जेवितां अन्न रुचेना ॥ ७ ॥ केवळ माझीच नव्हे अवस्था । आदिकरोनि तुझ्या माता । अयोध्येच्या जनां समस्तां । दुःखावस्था अनिवार ॥ ८ ॥ त्या दुःखाचा परिहार । आजि झाला समग्र । देखोनियां रघुवीर । आनंदपूर लोटला ॥ ९ ॥

> अद्य मे सफलं जन्म सफलश्च मनोरथः ।
> यत्त्वां पश्यामि राजानमयोध्यां पुनरागतम् ॥ १ ॥

श्रीरामदर्शनेंकरून । वियोगदुःख गेलें पूर्ण । प्रेमाश्रुपूर्ण झाले नयन । कंठ बाष्पेंकरून दाटला ॥ १० ॥ त्यांतें आवरोनि तत्त्वतां । जिरवोनियां सत्त्वावस्था । चरणीं ठेवोनियां माथा । श्रीरघुनाथा विनवीत ॥ ११ ॥ अमितां[१३] जन्मांचें दुःख । जननीजठरीं येवोनि देख । निमोनि गेलें सकळिक । रघुकुळटिळक देखिलिया ॥ १२ ॥ सकळ जन्मांची सार्थकता । आजि झाली गा तत्त्वतां । तुज देखोनियां रघुनाथा । उत्तीर्णता[११] जन्माची ॥ १३ ॥ श्रीरामाचें विस्मरण । तेथें प्रतिपदीं मरण । तो देखतां रघुनंदन । सर्वथा मरण निमालें ॥ १४ ॥ मृत्यूचा मृत्यु रघुनंदन । त्यासी देखतां निमालें मरण । येणें जन्में जन्मनिवारण । निजात्मा रघुनंदन देखिला ॥ १५ ॥ रामदर्शनें जन्म सफळ । रामदर्शनें सफळ कुळ । रामदर्शनें पावन सकळ । व्रत सुशीळ श्रीरामें ॥ १६ ॥ श्रीरामेंसीं नव्हे भेटी । तंवचि व्रताची आटाआटी[१२] । तंवचि पुरश्चरणें कोटी । श्रीराम दृष्टी जंव न पडे ॥ १७ ॥ विसरोनियां रघुराया । जे जे केली तपश्चर्या । साधनाभिमानें गिळिले माया । श्रमचि वायां वाढविला ॥ १८ ॥ अनिमिष[१३] जें रामस्मरण । तें उग्र तप दारुण । स्मरणापरतें निजसाधन । सर्वथा आन असेना ॥ १९ ॥ स्मरणाविरहित साधनभक्ती । ते जाणावी अवघी भ्रांती । नटाचेपरी वृथा नटती । जीविकावृत्ति[१४]साधनें ॥ २० ॥ जेथें वस्तूचें स्मरण । त्यातें साधन मानी कोण । जपतपादि व्रत दान । स्मरणें

---

१ पवित्र, शुद्ध. २ विघ्नांनीं युक्त. ३ रामावांचून. ४ [illegible] त जोडून. ६ नम्र, ७ गोड वाणीनें. ८ हतभाग्य. ९ निरास. १० पुष्कळ. ११ उतराई. १२ खटाटोप, १३ अखंड. १४ जीविकेच्या साधनानें,

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

जाण सार्थक ॥ २१ ॥ तीं आमुचीं सकळ व्रतें। श्रीरामस्मरणें सनाथें। प्रसन्न होवोनि समस्तें। श्रीरामातें भेटविलें ॥ २२ ॥ निवटोनियां लंकानाथ। त्रैलोक्यविजयी रघुनाथ। आम्हीं देखिला अयोध्येआंत। व्रतें समस्त आजि फळलीं ॥ २३॥ स्मरण कीर्तन रघुनाथा। अनिमिष तुझें ध्यान करितां। जना अखंड सुखावस्था। तिन्ही अवस्था नासती ॥ २४ ॥ श्रीरामकीर्ति[१]मकरंद। झेंपावले कृष्णषट्पद[२]। गुंजारत अति साल्हाद। निजानंद सेविती ॥ २५ ॥ श्रीरामा तुझ्या कीर्तीपासीं। संत भ्रमर दूरवासी। तेही ऐकोनि वेगेंसीं। उडी आवेंसीं घालिती ॥ २६ ॥ स्वर्गमृत्युपाताळवासी। साधु जे कां अति तापसी। तेही सांडूनि तपश्चर्येसी। रामकीर्तीसीं ठाकूनि आले ॥ २७ ॥

अवेक्ष्य तु भवान् कोशं गोष्ठागारं तु पुष्कलम्।
भवतस्तेजसा सर्वं कृतं च द्विगुणं मया ॥ २ ॥
तथा ब्रुवाणं भरतं दृष्ट्वा तं भक्तिवत्सलम्।
मुमुचुर्वानरा नादं नागराश्च जनास्तदा ॥ ३ ॥
ततः प्रहृष्टं भरतमंकमारोप्य राघवः।
ययौ तेन विमानेन ससैन्यो भरताश्रमम् ॥ ४ ॥

श्रीरामकीर्ति अत्यद्भुत। साधुसंतसमवेत। अयोध्यानगरीं अत्यंत। अपरिमित वस्ती झाली ॥ २८ ॥ पहावें स्वामी रघुपती। पहिली अयोध्या होती किती। आतां किती जाहली वस्ती। श्रीरामकीर्ती ख्याति केली ॥ २९ ॥ श्रीरामकीर्तीचें महिमान। ऐकोनियां भरतवचन। हरिखेले[३] वानरगण। भुभुःकारें पूर्ण गर्जिन्नले ॥३०॥ भुभुःकार जयजयकार। माजि रामनामाचा उच्चार। किरोणें देती अपार। श्रीरघुवीरजयजयकीर्ती ॥ ३१ ॥ तें देखोनि अलोलिक। अयोध्यावासी एकएक। नामें गर्जिन्नले असंख्य। श्रीरघुकुळटिळक विस्मित ॥३२॥ देखोनि भरताच्या प्रेमासी। सुख उथळलें श्रीरामासी। जेंवी चंद्रोदयीं आकाशीं। सागरासी ये भरतें ॥ ३३ ॥ सागर एकदेशी जाण। तँरिया दाटती तेणें भरतेन। श्रीराम स्वयें चैतन्यघन। ब्रह्मांड पूर्ण सुखें धालें ॥ ३४ ॥ श्रीराम स्वयें सुखैकघन। तथापि प्रेम अति गहन। हृदयीं धरोनि भरता जाण। श्रीरामें आपण आलिंगिला ॥ ३५ ॥ वसिष्ठादिक ऋषींसमवेत। विमानीं बैसोनि रघुनाथ। अंकीं बैसविला भरत। प्रेम अद्भुत भक्तीचें ॥ ३६ ॥ वामांकीं जानकी सुंदरी। भरत विराजे दक्षिण अंकावरी। समस्त माता रघुवीरीं। विमानाभीतरीं बैसविल्या ॥३७॥ सेनापति आदिप्रधान। त्यांतें आज्ञापी रघुनंदन। निजवहनीं आरोहण। स्वयें आपण करावें ॥ ३८ ॥ ऐकोनि रामाचें वचन। अवघे झाले सुखैकघन। जयजयकारें गर्जोनि पूर्ण। केलें आरोहण निजवहनीं ॥ ३९ ॥ गज रथ वाजी बहनें। आपुलालीं आरोहणें। सौमित्रासहित शत्रुघ्नें। विमानीं रघुनंदनें विराजिजे ॥ ४० ॥ सांडोनि देहत्रिकूट। चौथें पेणें घडघडाट। मोक्षपुरी अयोध्यापीठ। झाले प्रविष्ट पैं तेथें ॥ ४१ ॥ श्रवण मनन निदिध्यासन। चौथा साक्षात्कार पूर्ण। हींचि चारी पेणीं[१०]पूर्ण। ऐका वि वंचन तयांचें ॥४२॥ पहिलें पेणें रामेश्वरीं। दुसरें अग्रहार रामनगरीं। तिसरें भरद्वाजाश्रमाभीतरीं। मोक्षपुरी पैं चौथी ॥ ४३ ॥ आत्माराम सर्वे असतां। श्रवण मनन कोण्या अर्था। ऐसा आशंकेचा ठाव आतां। परी सर्वथा न धरावा ॥ ४४ ॥ जीवा आत्मयासीं वेगळीक। कल्पांतींही नाहीं देख। निजभ्रमें भेद आवश्यक। एकाएक पैं भासे ॥ ४५ ॥ जेंवी विसरोनि जागृतीसी। स्वप्नभ्रमें कासाविसी। स्वयें होय अनायासीं। सावध त्यासी केलिया नव्हे ॥ ४६ ॥ तेंवी जीवा आत्मयाची एकात्मता। स्वतःसिद्ध स्वयें असतां। श्रवण मनन न करितां। भ्रम सर्वथा निरसेना ॥ ४७॥ चौथें पेणें रघुनंदन। स्वयें पावला निजभवन। बंधुबंधूं आलिंगन। जीवशिव पूर्ण जेंवी भेटती ॥ ४८ ॥ आपुलाले निजवहनीं। आरूढोनि तत्क्षणीं। रामनामाचे दीर्घध्वनीं। करीत गर्जन चालिले ॥ ४९ ॥ आले भरतआश्रमासी। तेथें उतरिले विमानेंसीं। आश्रम देखतां राघवासी। प्रेम मानसीं नें[११] संडे ॥ ५० ॥ देखे दर्भांचीं आसनें। तृणशेजा शयनस्थानें। प्रावरणासी कृष्णाजिनें[१२]। आणि वल्कलें बहुवस ॥ ५१ ॥ फळमूळांचे संभार। देखे

१ मध. २ काळे भुंगे. ३ आनंदित झाले. ४ उड्या. ५ उत्पन्न झालें. ६ अल्पव्यापी. ७ नौका. ८ सुखरूप, सुखपूर्ण. ९ घोडे. १० मुक्काम. ११ न सांवरे. १२ हरिणांचीं कातडीं.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

आश्रमीं अपार । उदंड मीनले ऋषीश्वर । त्यांसी फळाहार करावया ॥ ५२ ॥ भरतमुखें रामकथा । अत्यंत प्रेमें श्रवण करितां । धणी न पुरे ऋषी समस्तां । आश्रमीं त्या अर्था मीनले ॥ ५३ ॥ देशोदेशींचे ऋषी जाण । निजाश्रम त्यागूनि पूर्ण । भरतापासीं आले ठाकून । करावया श्रवण रामकथा ॥ ५४ ॥ भरताश्रम रघुनाथा । स्वयें देखतांचि तत्त्वतां । अति उल्लास झाला चित्ता । प्रेमावस्था अनिवार ॥ ५५ ॥ वनवासीं जीं जीं व्रतें । होतीं धरिलीं रघुनाथें । तीं तीं समस्तें भरतें । प्रेमें अद्भुतें अंगीकारिलीं ॥ ५६ ॥ माथां दृढ जटाभार । पादुकामंडित परिकर । खपाटीं लागलें उदर । वल्कलांबरपरिधान ॥ ५७ ॥ निजवृत्तिअलंकृत । श्रीरामें देखोनियां भरत । सुख झालें अत्यद्भुत । निजहृदयांत आलिंगी ॥ ५८ ॥ श्रीरामाचेनि आलिंगनें । सुख उथळलें चौगुणें । सर्वस्वें ओंवाळिलें तेणें । निंबलोणें कुरवंडिया ॥ ५९ ॥ भरताश्रमा येवोनि निरुतें । सुखावले निजचित्तें । आज्ञापिलें श्रीरघुनाथें । सावधचित्तें परिसावें ॥ ६० ॥

अब्रवीच्च तदा रामस्तद्विमानमनुत्तमम् ।
वह वैश्रवणं देवमनुजानामि गम्यताम् ॥ ५ ॥

निवटोनियां लंकानाथ । सुर सोडविले समस्त । निजवैभवासमवेत । झालें प्राप्त निजभवन ॥ ६१ ॥ कुबेराचें निजविमान । कामग अति शोभायमान । रावणें आणिलें हिरोन । दुःखीं निमग्न तेणें तो ॥ ६२ ॥ निवटोनियां लंकेशासी । संस्थापिलें सकळांसी । मुक्त केलें नवग्रहांसी । परी आपणासी उपेक्षिलें ॥ ६३ ॥ माझें कामग विमान । मज देता रघुनंदन । तरी मी जाणतों संपूर्ण । कृपाळुपण रामाचें ॥ ६४ ॥ ज्याचा जेथें अतिशयो पूर्ण । तें त्यासी न पावतां जाण । स्वयें होवोनि दुःखनिमग्न । बोले पैशुन्यें सर्वदा ॥ ६५ ॥ जेथें दृढत्वें लोभाची वस्ती । तेथें कैंची विवेकस्थिती । अंध होवोनि ठाके वृत्ती । दृढ विषयार्थी लोभिष्ठ ॥ ६६ ॥ लोभ तेथें कैंचें ज्ञान । लोभ तेथें कैंचें ध्यान । लोभ तेथें समाधान । सर्वथा जाण पैं नाहीं ॥ ६७ ॥ लोभ तेथें कैंची भक्ती । लोभ तेथें कैंची मुक्ती । जेथें लोभ तेथें विरक्ती । नाहीं निश्चितीं सर्वथा ॥ ६८ ॥ लोभाचें ठाणें अंतरीं असतां । समूळ साधनें होती वृथा । गुरूसी चाळी विकल्पता । ज्याचेनि तत्त्वतां मोक्ष लाभे ॥ ६९ ॥ माता पिता इतर जन । त्यांची कथा गणी कोण । हें लोभाचें स्वाभाविक चिन्ह । कुबेर जाण नव्हे तैसा ॥ ७० ॥ तथापि ज्याची वस्तु त्यासी । पाववितां श्रेय आम्हांसी । विमान अर्पावें कुबेरासी । हेंचि आम्हांसी निजमंडन ॥ ७१ ॥ कुबेराचें निजविमान । शरणागता दिधलें दान । आमुचें कामग सुलक्षण । करावें अर्पण धनदासी ॥ ७२ ॥ आज्ञापितां रघुनाथ । भरतें वंदिला वचनार्थ । निर्लोभ शुद्धशास्त्रार्थ । निजसिद्धार्थ श्रीरामा ॥ ७३ ॥ भरताचेनि भजनें पूर्ण । दूता त्रिलोकीं गमन । त्यासी करोनि आज्ञापन । धाडिलें विमान कुबेरासी ॥ ७४ ॥ उत्तरेचा लोकपाळ । अलकावती नगर विशाळ । श्रीरामभांडार सकळ । राखे अविकळ कुबेर ॥ ७५ ॥ तेथें जावोनियां दूत । सांगितलें श्रीरामवृत्त । विमान अर्पोनियां त्वरित । आज्ञा पुसत कुबेरा ॥ ७६ ॥ देखोनि श्रीरामगण । येरें घातलें लोटांगण । देखतां श्रीरामविमान । आनंदमग्न पैं झाला ॥ ७७ ॥ श्रीरामरूपें रामगणासी । षोडशोपचारीं परियेसीं । पूजोनियां अति प्रीतीसीं । काय तयासी बोलत ॥ ७८ ॥ श्रीराम सकळांची माउली । आर्तश्रांतांची साउली । आश्रितजनां कल्पवल्ली । ख्याति केली अवतारीं ॥ ७९ ॥ निवटोनियां दुष्ट रावण । गौरविले सकळ सुरगण । मजलागोनि स्वविमान । अर्पिलें आपण रघुनाथें ॥ ८० ॥ भक्तजनां कृपाळ । ऐसा ब्रीदाचा कल्लोळ । साच करोनि दावी तत्काळ । निजभक्त सकळ गौरविले ॥ ८१ ॥ ऐसें करोनि स्तवनासी । पूजोनियां अति प्रीतीसीं । बोळविलें श्रीरामगणासी । कुबेर मानसीं सुखमय ॥ ८२ ॥ येरीकडे रघुनंदन । प्रवेशोनि स्वभुवन । दशरथाचें सिंहासन । नमावया जाण निघाला ॥ ८३ ॥ तुरें लागलीं घनदाट । उठला नाद अचाट । नादें गर्जती सुभट । कीर्ति

१ अनेक. २ वल्कलें नेसणें. ३ चौपट. ४ खरोखर. ५ [illegible] जाणारें. ६ प्रीति. ७ हीन. ८ कल्याण. ९ मोठें भूषण. १० कुबेराला. ११ परिपूर्ण. १२ दुःखी. १३ थकलेल्यांची. १४ कीर्तीचा. १५ वाद्यें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

निर्दुष्ट रामाची ॥ ८४ ॥ विचित्र वाद्यांचा ध्वनी। रामनामाच्या दीर्घ श्रेणी। नाद कोंदला गगनीं। वीर तेथोनि चालिले ॥ ८५ ॥ निराळ बोळलें नामेंकरोनी। वर्षो लागलें अमृतकणीं। हर्षें तिर्वली अवनी। सुखसमाधानी श्रीराम ॥ ८६ ॥ हर्षाचेनि गदारोळें। नगरवनितांहीं मंगल केलें। दधिमधुअक्षतादूर्वामेळें। दीप प्रबळें ओंवाळिती ॥ ८७ ॥ ऐसे पातले राजभवन। गजरें-करोनि ससैन्य। करोनियां नीराजन। सिंहासन नमियेलें ॥ ८८ ॥

पितुर्भवनमासाद्य प्रसाद्य सुमहद्यशः।
कौसल्यां च सुमित्रां च कैकेयीमभ्यवादयत् ॥ ६ ॥

प्रसन्नोन्मुख तिघी माता। श्रीरामें नमिल्या तत्त्वतां। सहित सौमित्र आणि सीता। आनंद समस्तां उथळला ॥ ८९ ॥ श्रीराम प्रवेशतां राजभवन। तुरें वाद्यें गर्जे गगन। नामें कोंदलें त्रिभुवन। जयजयकार पूर्ण प्रवर्तला ॥ ९० ॥ नागरिक जनां सकळां। नरनारी अबळां बाळां। तृणचरादि सकळां। देखोनि घननीळा आनंद ॥ ९१ ॥ सकळ जन नगरवासी। आदिकरोनि दासदासी। राज्याभिषेक राघवासी। पहावयासी इच्छिती ॥ ९२ ॥ ऐसें सकळांचें मनोगत। त्याहूनि भरताचें अत्यंत। राज्याभिषेकीं रघुनाथ। देखों इच्छीत अत्यादरें ॥ ९३ ॥

अथाब्रवीद्राजपुत्रो भरतं धर्मिणां वरम्।
अर्थोपहितया वाचा मधुरं रघुनन्दनः ॥ ७ ॥

सत्त्वोंथिला अति सात्त्विक। परमधर्में अति धार्मिक। श्रीरामभजनविश्वासक। निजरंक राम-भजनीं ॥ ९४ ॥ सकळांसमवेत हर्षनिर्भर। होवोनि अत्यंत नम्र। लोटांगण अत्यादर। भरतें रघुवीर विनविला ॥ ९५ ॥ वनवासाचीं सकळ व्रतें। स्वामी विसर्जावीं समस्तें। जटाबंधनें करोनि मुक्तें। मंगलस्नानातें करावें ॥ ९६ ॥ करोनि व्रत-विसर्जन। राज्याभिषेक घेवोनि पूर्ण। अंगी-कारावें सिंहासन। राजचिन्ह छत्रादि ॥ ९७ ॥ अति सुकुमार जानकी माता। उपवासें गांजली तत्त्वतां। मलिन अंग मलिन माथा। अस्थिपंज-रता उरलीसे ॥ ९८ ॥ मलिन वस्त्र कृशोदर। तांबूलहीन म्लान वक्त्र। श्रमेंकरूनि लागले नेत्र। बहुत सुंदरी गांजली ॥ ९९ ॥ दुरात्म्या राव-णाच्या घरीं। अत्यंत गांजली सुंदरी। मंगलस्नानीं आज्ञा करीं। दीनोद्धारी नाम तुझें ॥ १०० ॥ तैसाचि सौमित्र भ्राता। बहु कष्टला रघुनाथा। आहार नातळे सर्वथा। तुज तत्त्वतां सेविलें ॥ १ ॥ त्या श्रमाचा परिहार। कर्ता तूं एक रघुवीर। अंगीकारोनि राज्यभार। सुख सत्वर यासी द्यावें ॥ २ ॥ आणिक एक विज्ञापन। स्वामींनीं ऐकावें सावधान। तुझे आज्ञेप्रमाणें पूर्ण। राज्यशासन पैं केलें ॥ ३ ॥ पितृआज्ञा तुझें व्रत। झालीं चौदा वर्षें नियंत। तितुकियांत कीर्ति अद्भुत। त्रैलोक्यांत विस्फा-रली ॥ ४ ॥ निवटोनियां रक्षोगण। मुक्त करो-नियां जनस्थान। ब्राह्मणां दिधलें दान। न लागतां क्षण श्रीरामा ॥ ५ ॥ जो नागवे सुरासुरीं। कांखे सूदला दशशिरी। त्या वाळीची केली बोहरी। एकें बाणेंकरीं श्रीरामा ॥ ६ ॥ मुक्त करोनि किष्किंधाभवन। तेथें राज्याभिषिंचन। सुग्रीवासी केलें जाण। निमिषेंकरोन श्रीरामा ॥ ७ ॥ सागरीं तारोनि पाषाण। क्षणें उतरिलें वानरसैन्य। लंकेमाजी घालोनि खांण। सकुळ रावण निर्दाळिला ॥ ८ ॥ मुक्त करोनि सुरमांदी। संस्थापिले निजपदीं। नवग्रह हर्षानंदीं। स्थापिले त्रिशुद्धीं ग्रहचक्रीं ॥ ९ ॥ अलोलिक लंकाभवन। क्षणें हिरोनियां जाण। बिभीषणा दिधलें दान। संपत्ति गहन समवेत ॥ ११० ॥ निर्लोभी कळा ऐसी। आचार्यत्व दृढ जगासी। संस्थापिलें निज-भजनासी। कृपाळुत्वेंसीं श्रीरामा ॥ ११ ॥ त्या तुज राज्याची आस्था। सर्वथा नाहीं रघुनाथा। आमुचे कृपेलागीं तत्त्वतां। राज्यभार आतां अंगीकारीं ॥ १२ ॥ सिंहासनीं सचिन्ह देख। सालंकृत रघुकुळटिळक। आमुचे नेत्र आत्यं-तिक। देखावया भुकेले ॥ १३ ॥ आमच्या नेत्रांचें पारणें। स्वामी फेडावें कृपाळूपणें। मी तुझें निजतान्हें। लळे पाळणें पैं माझे ॥ १४ ॥ राज्य-लोभ राघवासी। नाहीं सर्वथा मानसीं। निश्चयें

१ दोषरहित. २ आकाश. ३ व्यापलें. ४ भिजली. ५ सत्त्वगुणानें पूर्ण. ६ स्पर्श करीत नाहीं. ७ ठरलेली. ८ पसरली. ९ घातला. १० खणती, संहार. ११ देवसमूह. १२ हौस. १३ लाड, कोड,

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

कळलें आम्हांसी । संदेह ह्यासी असेना ॥ १५ ॥ परी लळे पाळावे भक्तांचे । हेंचि व्रत श्रीरामाचें । तेथें काय विज्ञापन आमुचें । वृथा करील श्रीराम ॥ १६ ॥ म्हणोनि घातलें लोटांगण । सुदृढ माथां धरिले चरण । प्रेमें चालिलें स्फुंदन । करी रुदन अट्टहासें ॥ १७ ॥ जेंवी भरताची अवस्था । तैसीच शत्रुघ्नाची तत्त्वतां । सौमित्र सीतासहित माता । प्रेमावस्था नावरे ॥ १८ ॥ सुग्रीव बिभीषण वानरगण । सुमंत सेनानी प्रधान । अयोध्येचे सकळ जन । प्रेमें स्फुंदन चालविलें ॥ १९ ॥ ऋषिवरांही दशा तैसी । प्रेमें स्फुंदती आवेशीं । तें देखोनि हनुमंतासी । आवेश मानसीं पैं आला ॥ १२० ॥ करोनियां साष्टांग नमन । मृदु मंजुळ मधुर वचन । विनविला श्रीरघुनंदन । भरतवचन मानावें ॥ २१ ॥ तुजलागीं आर्तभूत । तुझीं व्रतें जीं समस्त । असोनि राज्यभोगाआंत । स्वयें भरत आचरला ॥ २२ ॥ तुम्हीं असतां वनांतरीं । सहज भोग केले दूरी । भोगीं असोनि अलिप्त परी । ख्याती थोरी भरताची ॥ २३ ॥ तुजलागीं आर्तभूत । भोग भोगोनि त्यजी समस्त । झाला वनवासी व्रतस्थ । वल्कलयुक्त जटाधारी ॥ २४ ॥ आहार सांडोनि निःशेख । श्रीराम भेटावया देख । फळभोजनीं अति हरिख । ऋषि सकळिक समवेत ॥ २५ ॥ त्रिकाळ पादुका पूजितां । क्षण अवकाश नाहीं भरता । श्रीरामकीर्ती वाखाणितां । नाहीं तत्त्वतां अवकाश । ॥ २६ ॥ श्रवण कीर्तन पूजन । सत्संगती कथा गहन । अखंड श्रीरामाचें ध्यान । समाधान तेणें त्यासी ॥ २७ ॥ ऐसी असोनि अवस्था । लोटांगणीं विनवितां । उत्तर न देसी रघुनाथा । हें सर्वथा अनुचित ॥ २८ ॥ राज्यलोभ पैं भरतासी । सर्वथा नाहीं मानसीं । कळलें निश्चयें आम्हांसी । प्रमाणासी तुझे चरण ॥ २९ ॥ ऐकोनि मारुतीचें वचन । संतोषला रघुनंदन । भरत उठोनियां जाण । हृदयीं पूर्ण आलिंगिला ॥ १३० ॥ हृदयीं आलिंगोनि पूर्ण । कांहीं नेदी प्रतिवचन । सद्गुरूसी कळलें चिन्ह । माझें वचन पाहातसे ॥ ३१ ॥ श्रीराम मर्यादेचा मेरू । राम भावार्थसागरू । राम आज्ञेचा किंकरू । पूर्णावतारू श्रीराम ॥ ३२ ॥ राम गुणांचें मंडन । राम प्रेमाचें जीवन । गुरूचा निजगुरु आपण । देतो मान गुरुत्वा ॥ ३३ ॥ गुरुमर्यादा पाळितां । विजय आला रघुनाथा । उत्तरोत्तर होती कथा । स्वधर्मता स्थापिली ॥ ३४ ॥ जें जें आचरती श्रेष्ठ । आबाळां तोचि पडे पाठ । राम अवतार श्रेष्ठ । पुराणपाठ श्रीराम ॥ ३५ ॥ पितृआज्ञाप्रतिपाळण । तुझें वनवासा गमन । चौदा वर्षें नियत पूर्ण । राज्यशासन तेंचि भरता ॥ ३६ ॥ होता दोघांचा जो नेम । सिद्धि पावला सर्वोत्तम । आज्ञा पाळावी निःसीम । भरत सप्रेम सुखावीं ॥ ३७ ॥ अंगीकारोनि राज्यासी । ब्राह्मणदास्यें अहर्निशीं । सुख द्यावें गोविप्रांसी । स्वधर्मासी संरक्षीं ॥ ३८ ॥ संरक्षावे गोब्राह्मण । पितृवत् प्रजापाळण । धरा आनंदवावी पूर्ण । स्वधर्मैकरोन श्रीरामा ॥ ३९ ॥ अश्वमेधादि महा यज्ञ । तेणें गौरवीं अमरगण । वसुधारा दंडायमान । हव्यवाट जाण सुखी करीं ॥ १४० ॥ ऐसें वसिष्ठआज्ञापन । हनुमंताचा संदेश पूर्ण । भरताचें प्रेम गहन । तेणें रघुनंदन सुखमय ॥ ४१ ॥ सद्गुरूचें आज्ञापन । माथां वंदोनि आपण । बोलता झाला रघुनंदन । आज्ञा कोण उल्लंघी ॥ ४२ ॥ ऐकोनि श्रीरामवचन । भरत झाला सुखैकघन । अंगद गर्जिन्नला पूर्ण । रघुनंदननिजराज्य ॥ ४३ ॥ अयोध्येचे सकळ जन । आणि सकळ वानरगण । शरणागत बिभीषण । करीत गर्जन ऊठिले ॥ ४४ ॥ एका जनार्दना शरण । श्रीरामाचें राज्याभिषिंचन । श्रोतीं द्यावें अवधान । निजनिरूपण राम वदवी ॥ १४५ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां श्रीरामाभिषिंचननिर्णयो नाम द्व्यशीतितमोऽध्यायः ॥ ८२ ॥ ॥ ओंव्या ॥ १४५ ॥ श्लोक ॥ ७ ॥

अध्याय त्र्यायशींवा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ धन्य धन्य तो वाल्मीकिमुनिजन । धन्य धन्य त्याचें वचन । अनागत रामायण । केलें निरूपण शतकोटी ॥ १ ॥ धन्य तें अयोध्या भुवन । धन्य धन्य तेथींचे जन । धन्य तयांचे नयन । नित्य रघुनंदन देखती ॥ २ ॥ धन्य भाग्य त्या भरताचें । नित्य चिंतन श्रीरा-

[illegible] २ उत्कंठित. ३ लहानांपासून मोठ्यांपर्यंत, ४ पृथ्वी, ५ अग्नि, ६ निरोप,

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

माचें । प्रेम देखोनि निष्कर्षांचें। झालें स्वामीचें आगमन ॥ ३ ॥ त्याच्या राज्याचा उत्साहो । अभिषेकीं कळवळलाहो । भरतें मांडिला पहा हो। ऋषिसमुदावो मेळवोनी ॥ ४ ॥ श्रीरामराज्याभिषिंचन । पाहूं आले सुरगण । मरुद्गणेंसीं पाकशासन। स्वयें आपण तेथें आला ॥ ५ ॥ देवगुरु बृहस्पती । तेथें आला शीघ्रगतीं। सनकादिक मुनिपंक्ती । उडी अवचितीं तेथ आली ॥ ६ ॥ शुक वामदेव नारद । दत्तात्रेयादि महासिद्ध । ध्रुव उपमन्यु प्रल्हाद । भक्तवृंद पातले ॥ ७ ॥ तुंबुरादिक गंधर्व । तेथें पातले स्वयमेव । अष्टनायिका घेवोनि धांव । नृत्यगौरव मांडिले ॥ ८ ॥ नित्य लोकपाळ समुदायेंसीं । भेटीं आले उपायनेंसीं । यक्ष गंधर्व चारणेंसीं । थाट अयोध्येसी दाटले ॥ ९ ॥ अष्टमहासिद्धींसमवेत । सुस्वर सामवेद गर्जत । घेवोनि ब्रह्मा आला तेथ । श्रीरघुनाथ पहावया ॥ १० ॥ निजध्येय श्रीरघुनंदन । ऐकोनि त्याचें अभिषिंचन । गणसमुदायेंसीं धांवोन । त्रिनयन तेथें आला ॥ ११ ॥ सांडोनियां शेषशयन । विचित्र रत्नें बळिदान । घेवोनि आला जनार्दन । श्रीरघुनंदनदर्शना ॥ १२ ॥ जलचर स्थळचर खेचर । दानव मानव वनचर । त्रैलोक्यांतील चराचर । पाहूं रघुवीर पातले ॥ १३ ॥ श्रीराम तीर्थां तीर्थपीठ । त्यासी होतां राज्यपट । पाहूं आले तेथींचा थाट । त्यांहीं शरयूतट वसविलें ॥ १४ ॥ वक्री अतिचार होवोनि पूर्ण । सत्वर पातले ग्रहगण । श्रीरामराज्याभिषिंचन । पहावया जाण आनंदें ॥ १५ ॥ रावणाच्या पायांतळीं । होते लोळत मंचकाजवळी । रामें सोडविले तत्काळीं । त्याची राज्यशैली पाहों आले ॥ १६ ॥ अयोध्येच्या चौपासीं । विमानें दाटलीं आकाशीं । नगरीं ठाव नाहीं वस्तीसी । थाटें ऐसीं दाटलीं ॥ १७ ॥ मंदार कल्पतरु संतान । घरोघरीं त्यांचेंचि वन । सुरवर सुमनसिंचन । विदोबिदीं जाण घालिती ॥ १८ ॥ घरोघरीं मंगलार्चनें । दीपावळी नीराजनें । गुढिया मखरें तोरणें । श्रीरघुनंदननिजोत्सवा ॥ १९ ॥ हाटहटवटिया चौबारें । कथाकीर्तन चौफेरें । गात रामकीर्तन गजरें । अंबर झरे तुषारीं ॥ २० ॥ वसिल्या भक्तीच्या पेठा । आनंदकीर्तन चौहटां । सांदीबिदीं राजवाटा । सुकाळ मोठा नामाचा ॥ २१ ॥ शेठ महाजन वेव्हारे । श्रीरामागमनसुखभरें । उदीम करिती अत्यादरें । लाभ निर्धारें श्रीराम ॥ २२ ॥ राम टके खरें नाणें । एकीमोहरा देणें घेणें। अक्षरं रसाचें त्याचें निजकेणें । सवदा करणें निजसत्ता ॥ २३ ॥ द्वैत दलालाची ओढी । नाहीं मापारियाची सांकडी । आपुलाल्या निजावडीं । द्यावया गाढी निजवस्तु ॥ २४ ॥ राममुद्रावस्तूवरी । आंख घालोनि साटीकेरीं । देतां घेतां सुखचि वरी । उदीम भारी चालत ॥ २५ ॥ येरीकडे वीर भरत । श्रीरामप्रेमें अत्यद्भुत । सद्गुरूसी शरणागत । होवोनि पुसत सामग्री ॥ २६ ॥ श्रीरामाभिषेकसामग्री । स्वामी सांगावी झडकरी । कोण पदार्थ कैसिये परी । निजनिर्धारीं आज्ञापीं ॥ २७ ॥ देखोनि भरताच्या प्रेमासी । अत्यंत सुख वसिष्ठासी । प्रीतीं धरोनि पोटेंसीं । निजहृदयेंसीं आलिंगिला ॥ २८ ॥ भरता तुझें भाग्य गहन । भरता तुझी भक्ति धन्य । भरता तुझें प्रेम धन्य । भाव धन्य तुझा भरता ॥ २९ ॥ श्रीरामाचें भजनसुख । तुवांचि सेविलें सम्यक । भजनमर्यादा अति नेटक । आचार्यत्वें देख प्रकाशिली ॥ ३० ॥ भरत भक्तीचें भांडार । भरत भक्तीचें निजसार । भरत भक्तीचें माहेर । भरतें उद्धार भक्तीचा ॥ ३१ ॥ म्हणोनि दिधलें आलिंगन । प्रीतीकरोनि मुखचुंबन । शास्त्रविधी निजलक्षण । सामग्री पूर्ण अभिषेका ॥ ३२ ॥ सर्वज्ञ ज्ञाता तूं होसी । विधिपाळण करूं आलासी । तरी पूर्वींच रामसिद्धीसी । तुजपासीं उपदेशिलें ॥ ३३ ॥ तेणें अनुक्रमें जाण । तुवां करितां आराधन । अंतर्योग सुलक्षण । जेणें रघुनंदन भेटला ॥ ३४ ॥ जे केले मानसोपचार । तेचि प्रत्यक्ष साचार । मेळवोनि वेगवत्तर । श्रीरघुवीर अभिषेकीं ॥ ३५ ॥ लाहोनि सद्गुरुआज्ञापन । करोनि साष्टांगीं नमन । जेथें सुग्रीव बिभीषण । तेथें ठाकून पैं आला ॥ ३६ ॥

१ पराकाष्ठेचें. २ इंद्र. ३ नजराणे घेऊन. ४ शीघ्र, गतियुक्त. ५ रस्तोरस्तीं. ६ बाजार. ७ चवाठे. ८ व्यवहारी लोक. ९ अविनाशी. १० आपला माल. ११ साटें ठरवून. १२ बरोबर. १३ मिळवून.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

तस्य तद्वचनं श्रुत्वा भरतः सत्यविक्रमः ।
पाणौ जग्राह सुग्रीवं प्रविवेश ततो गृहम् ॥ १ ॥

श्रीरामाचे निजगण । सुग्रीवादि बिभीषण । श्रीरामभवनासमान । स्थानें नेमूनि तयां दिधलीं ॥ ३७ ॥ ज्यांचिया निजभवनांसी । सत्यकीर्ति सत्त्वराशी । भरत रामाभिषेकासी । पुसों विचारासी तेथें आला ॥ ३८ ॥ धरोनि सुग्रीवाचा हात । प्रवेशला भवनाआंत । एकासनीं आसनस्थ । निजवृत्तान्त सांगत ॥ ३९ ॥ पित्राज्ञा अति दुस्तर । पाळावया रघुवीर । व्रतें धरिलीं दुर्धर । जीं दुस्तर सुरसिद्धां ॥ ४० ॥ धरितां न धरवती मानसीं । ऐकतां चळकांप चित्तासी । तीं आचरला वनवासीं । झालीं जगासी सुखकारी ॥ ४१ ॥ निवटोनियां रक्षोगण । मुक्त केलें जनस्थान । दुष्ट निवटोनि रावण । सुरगण सोडविले ॥ ४२ ॥ कर्म आचरोनि अद्भुत । संपादिला सुरकार्यार्थ । वनीं श्रमला रघुनाथ । व्रत समाप्त पैं करावें ॥ ४३ ॥ तुम्ही प्रियकर रामाचे । तुमचें वचन मानी साचें । सुमुहूर्तें अभिषेकाचें । तुम्ही साचें संपादा ॥ ४४ ॥ म्हणोनि धरिले दोनी चरण । येरू घाली लोटांगण । आम्ही तुझे किंकर जाण । आज्ञापन करीं आम्हां ॥ ४५ ॥ सुग्रीवादि बिभीषण । अंगदादि मारुति जाण । भरतें नमिले वानरगण । मृदु वचनें विनवोनी ॥ ४६ ॥ सुग्रीवासी अति प्रीतीं । भरत करीतसे विनंती । अभिषेकावया रघुपती । आज्ञा दूतीं करावी ॥ ४७ ॥

अभिषेकाय रामस्य दूतानाज्ञापयत्स्वयम् ।
तच्छ्रुत्वा वानरेन्द्रश्च सौवर्णांश्चतुरो घटान् ॥ २ ॥
चतुर्णां कपिमुख्यानां ददौ रत्नविभूषितान् ॥ ३ ॥

श्रीराम अभिषेकावया साङ्ग । प्रभाते मुहूर्त अति अव्यंग । गुरुपुष्य अमृतसिद्धियोग । पाहिजे अति वेग पैं केला ॥ ४८ ॥ इतर पदार्थां नाहीं अटक । पाहिजे चतुःसमुद्रींचें उदक । तें तुम्हीं आवश्यक । पाहिजे सम्यक आणिलें ॥ ४९ ॥ ऐकोनि भरतवचन । जोडल्या करीं वानरगण । सुग्रीवासी विनवण । करोनि जाण पूसत ॥ ५० ॥ कोणे दिशेप्रती कोण । जाणें नेमूनि आपण । शीघ्र द्यावें आज्ञापन । आणावया पूर्ण समुद्रजळ ॥ ५१ ॥ ऐकोनि जुत्पत्तींचें वचन । सुग्रीव झाला सुखैकघन । दिशा नेमूनि संपूर्ण । केलें आज्ञापन सेवकां ॥ ५२ ॥ हेमकुंभ रत्नाभरणी । भरतें आणिले तत्क्षणीं । सुग्रीवें अति प्रीतीकरोनी । दिधले वांटूनि जुत्पती ॥ ५३ ॥ उत्तर दिशा अतिदुरंत । हनुमान पाठविला तेथ । दक्षिणे ऋषभ विख्यात । कुंभेंसहित निघाला ॥ ५४ ॥ नळ पश्चिम समुद्रासी । वेगें निघाला हेमकुंभेंसीं । अति उल्हासें निश्चयेंसीं । पूर्वे अंगदासी नेमिलें ॥ ५५ ॥ युवराजा अति पवित्र । अति बळियाढा अंगद वीर । लक्षूनि गेला पूर्वसमुद्र । वेगवत्तर हेमकुंभें ॥ ५६ ॥ चहूं दिशां चौघे जण । अति बळियाढे वानरगण । वेगें करोनि उड्डाण । क्षणें गगन आक्रमिलें ॥ ५७ ॥ वेगें जावोनि सिंधूपासीं । रत्नजडित हेमकुंभेंसीं । शुद्ध प्रक्षाळूनि वेगेंसीं । समुद्रोदकासी भरियेलें ॥ ५८ ॥ सूर्योदय न होतां पूर्ण । घेवोनि आले समुद्रजीवन । वसिष्ठापुढें ठेवोनि जाण । लोटांगण घातलें ॥ ५९ ॥ देखोनि वानरांचा प्रताप । उड्डाण किराण साटोप । वसिष्ठ सुखावला अमूप । प्रीतिपूर्वक आलिंगी ॥ ६० ॥ श्रीरामभजनपरिपाटीं । वानरांची नित्य पुष्टितुष्टी । अहंसोहं सुटल्या गांठी । सद्गुरुभेटी निश्चितीं ॥ ६१ ॥ देखोनियां समुद्रजीवन । सुग्रीव आणि बिभीषण । सुख उथळलें गहन । श्रीरघुनंदनअभिषेका ॥ ६२ ॥ भरत येवोनि आपण । धरिले वसिष्ठाचे चरण । स्वामींनीं केलें आज्ञापन । श्रीरघुनंदनअभिषेका ॥ ६३ ॥ तरी श्रीरामाभिषिंचन । करावया मी मशक कोण । स्वामींनीं निजहस्तेंकरोन । अभिषिंचन करावें ॥ ६४ ॥ सद्गुरुहस्तें अभिषेक होतां । अक्षय राज्य रघुनाथा । आम्हां सकळां अति श्लाघ्यता । जाण तत्त्वतां स्वामिया ॥ ६५ ॥ आणि श्रीरामाचें मनोगत । ऐसेंचि आहे जाण । जें गुरुहस्तें अभिषिंचन । तें अक्षय पूर्ण स्वामिया ॥ ६६ ॥ यालागीं तुम्हीं निजहस्तें । अभिषेकावें श्रीरामातें ।

१ दोषरहित. २ वानरवीरांचें. ३ सुखपरिपूर्ण. ४ सुवर्णाच्या घागरी. ५ रत्नखचित. ६ अत्यंत दूर. ७ समुद्राचें पाणी. ८ उड्या. ९ श्रीरामभजन सतत केल्यामुळें. १० भूषण. ११ मनांतील हेतु.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

ऐकोनि भरतवचनातें । वसिष्ठ चित्तें सुखावला ॥ ६७ ॥

अभिषेकाय रामस्य शत्रुघ्नः सचिवैर्वृतः ।
पुरोहिताय श्रेष्ठाय वसिष्ठाय न्यवेदयत् ॥ ४ ॥
शास्त्रदृष्टेन विधिना महद्भिर्विदितेन च ॥ ५ ॥

भरत आणि शत्रुघ्न । सुग्रीवादि बिभीषण । सकळीं वसिष्ठ प्रार्थून । केला प्रसन्न अभिषेका ॥ ६८ ॥ सुमंत आणि हनुमान वीर । सकळ प्रधानांचा भार । रत्नकुंभ जलसागर । अति सत्वर निवेदिलें ॥ ६९ ॥ देखोनि समुद्रजीवन । वरी भरताचें आज्ञापन । तेणें वसिष्ठ सुखायमान । केलें नमन ऋषिवरां ॥ ७० ॥ सकळ भूमंडळींचे ऋषीश्वर । सनकादि सिद्ध समग्र । नारदादि भक्तवर । सकळ रघुवीरअभिषेका ॥ ७१ ॥ ब्रह्मा जो कां निजपिता । तोही बोलाविला तत्त्वतां । अभिषेकावया रघुनाथा । आला धातां लोकपाळांसीं ॥ ७२ ॥ यक्ष गंधर्व चारण । निजगणेंसीं त्रिनयन । सिद्ध पातले धांवोन । श्रीरघुनंदन-अभिषेका ॥ ७३ ॥ जलचर स्थळचर । दानव मानव पाताळचर । अयोध्ये दाटले समग्र । पहावया रघुवीरअभिषेका ॥ ७४ ॥ नभ दाटलें विमानीं । पृथ्वी दाटली नृपयानीं । तेणें सुखावली अवनी । रामाभिषिंचनीं आनंद ॥ ७५ ॥ वसिष्ठ सद्गुरु धर्मज्ञ । केलें सकळां विज्ञापन । तुम्ही निजवैभवेंकरून । रघुनंदन अभिषेका ॥ ७६ ॥ मंडळवर्ती आले भूपाळ । त्यांसी आज्ञापिलें तत्काळ । उपायनें आणा सकळ । रघुकुळपाळअभिषेका ॥ ७७ ॥ त्रैलोक्यविजयी रघुपती । आला ऐकोनि अयोध्येप्रती । राजे पातले भूपती । अभिषेकार्थी सत्वर ॥ ७८ ॥ पूर्वपश्चिमनृपती । उत्तरेचे नेणों किती । दक्षिणदिशेचे भूपती । आले गडपती गडपाळ ॥ ७९ ॥ पर्वतवासी जे भूपती । म्लेच्छ राजे नेणों किती । गौडबंगाल असंख्यस्थितीं । आले रघुपतिअभिषेका ॥ ८० ॥ जितुकें जयाचें सामर्थ्य । तितुकेनिसीं रघुनाथ । स्वयें पूजावा यथोचित । वसिष्ठें तेथ आज्ञापिलें ॥ ८१ ॥ ऐकतां वसिष्ठवचन । अवघे झाले सुखैकघन । यथासामर्थ्यें करोनि जाण । पूजाविधान मांडिलें ॥ ८२ ॥ मुक्त करोनि जटाबंधन । सौमित्रजानकींसहित जाण । श्रीरामें करोनि मंगलस्नान । उपोषण पूर्वदिवसीं ॥ ८३ ॥ श्रीरामा सहजचि उपोषण । चौदा वर्षें व्रत गहन । राज्याभिषेकीं विधिपाळण । फळभोजन न करीचि ॥ ८४ ॥ प्रभातीं गुरुपुष्यकरीं । वसिष्ठ रामासी अभिषेक करी । परिसा तेथींची नवलपरी । संक्षेपाकारीं सांगेन ॥ ८५ ॥ श्रीरामाचें अभिषिंचन । सकळ आकळूं शके कोण । वक्ता एक जनार्दन । निजनिरूपण चालवीत ॥ ८६ ॥ तेथें संकोच साकल्यता । सुचूं परिहार केउंता । स्वयें श्रीराम वदनीं वक्ता । कर्ता करविता तोचि तो ॥ ८७ ॥ श्रीराम आणि जनार्दन । स्वरूप एक नामें भिन्न । जना सबाह्य असोनि पूर्ण । करवी चळण इंद्रियांचें ॥ ८८ ॥ जनार्दन वदतां वदनीं । अर्थमय शब्दश्रेणी । उघडीत प्रेमाची खाणी । निजात्मगुणीं विनवोनी ॥ ८९ ॥ नयनीं देखता जनार्दन । जनार्दन वदवी वचन । रसनें रसज्ञ आपण । घ्राणीं अवघ्राण सुवास तो ॥ ९० ॥ त्वगिंद्रियस्पर्शानानंद । तो जनार्दनें केला बोध । बुद्धीचा निश्चयो शुद्ध । अति विशुद्ध जनार्दनें ॥ ९१ ॥ चेतवोनि अहंकार । दाटोवाटी निजचरित्र । चालवीत अति सत्वर । इतर व्यापार सांडोनी ॥ ९२ ॥ असो परिहाराचा अतिशयो । कर्ता करविता रामरावो । तेथें कायसा संदेहो । निजनिर्वाहो श्रीरामें ॥ ९३ ॥ अभिषेक श्रीरघुनाथा । सर्वज्ञ वसिष्ठ स्वयें कर्ता । अवधान द्यावें श्रोतां । साधकां तत्त्वतां उपयोगी ॥ ९४ ॥ सर्वदा पूर्णमनोरथ । तोचि औदुंबर सदाफळित । भद्रपीठ अति मंडित । तेज अद्भुत झळके कीं ॥ ९५ ॥ दुजें पीठ देदीप्यमान । सूर्यमंडळासमान पूर्ण । द्वादशकळामंडित जाण । श्रीरघुनंदनअभिषेका ॥ ९६ ॥ त्यावरी पीठ तिजें । षोडशोपचारीं विराजे । चंद्र देखोनि त्यातें लाजे । दडी मारिजे आसनातळीं ॥ ९७ ॥ एवं सूर्य अग्नि चंद्रमा । आसनातळीं दाटती रामा । त्या श्रीरामाचा महिमा । वाग्धर्मा अनिर्वाच्यें ॥ ९८ ॥ क्रोधव्याघ्राचें शोधूनि अंतर । क्रूरचारट सांडोनि दूर । शांतिचर्म अति परिकर । श्रीरघुवीरवरासना

१ ब्रह्मदेव. २ राजे. ३ थोडक्यांत. ४ त्याग. ५ कोणता. ६ जिभेला. ७ नाकांत. ८ त्वचा इंद्रियाला स्पर्शसुख. ९ बळेंच. १० बोलण्यास कठीण. ११ सुंदर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ ९९ ॥ हेमकुंभ शतानुशत । दीर्घ वोसंडे वृषभ श्वेत । सुवर्णभृंगार[1] क्षीरयुक्त । अति मंडित अभिषेका ॥ १०० ॥ अनिर्वाच्य त्यांचें महिमान । जिहीं रामाभिषेकीं क्षीर जीवन । हृदयीं धरिलें सावधान । भाग्य गहन तयांचें ॥ १ ॥ वस्त्रें सपुर[2] विरंजांबरें[3] । अत्यंत भावार्थपरिकरें । वेढावया श्रीरघुवीरें । आणिलीं पवित्रें पूजेसी ॥ २ ॥ प्रेमजळें पूर्ण परम । सिंधुसंगम शुद्धसंगम । गंगायमुनात्रिवेणीसंगम । आणिलीं परम पवित्रजळें ॥ ३ ॥ सप्तधातू ते शोधित देखा । आणिले सप्त कुश सप्त मृत्तिका । सप्त ऋषी आणिले ऐका । रघुकुळटिळकअभिषेकीं ॥ ४ ॥ संकल्पविकल्पातीत । चैतन्य प्रभवे वेगयुक्त । मनोवेगातें जिणोनि जात । तैसा वारुवीं रथ जुंपिला ॥ ५ ॥ असंभावना विपरीत ज्ञान । हेचि मत्त पंचानन । त्यांतें विदारिते शार्दूल गहन । रथीं जुंपोन आणिले ॥ ६ ॥ शुद्धसत्त्वें अति मंडित । चंद्रोपम छत्र श्वेत । श्वेत चामरें रत्नदंडयुक्त । सुवासित भक्तिव्यजनें ॥ ७ ॥ रामाभिषेकीं मंगल पूर्ण । शांतिगौचें गोरोचन । नामें हरिद्रा सुरंगपूर्ण । सौभाग्यमंडन सर्वदा ॥ ८ ॥ भक्तिप्रेमें लवलव । क्षीरपल्लव पद्मपल्लव । तोरणें बांधिलीं अपूर्व । श्रीरघुरावअभिषेका ॥ ९ ॥ दधिमधुघृताक्षतायुक्त । पूर्णकलशेंसीं साळंकृत । अष्टौ कन्या पैं दानार्थ । उभ्या तिष्ठत अभिषेका ॥ ११० ॥ मुकुट कुंडलें कटिमेखळा । बाहुअंगदें सुमनमाळा । सिद्ध सामग्रिया सकळा । ब्राह्मणमेळा तिष्ठत ॥ ११ ॥

ततः पुरोहितो वृद्धो वसिष्ठो ब्राह्मणैः सह ।
रामं रत्नमये पीठे ससितं संन्यवेशयत् ॥ ६ ॥
वसिष्ठो वामदेवश्च जाबालिरथ काश्यपः ।
कात्यायनो भरद्वाजो विजयः सहगौतमः ॥ ७ ॥
अभ्यषिंचन्नरव्याघ्रं प्रसन्नेन सुगंधिना ।
सलिलेन सहस्राक्षं वसवो वासवं यथा ॥ ८ ॥

षड्गुणैश्वर्यसंपन्न । वृद्ध कुळगुरु सनातन । श्रीवसिष्ठ ज्ञानघन । श्रीरघुनंदनअभिषेका ॥ १२ ॥ आणिकही विख्यात ऋषिजन । ब्रह्मादि देवां नित्य मान्य । ज्यांचेनि नामें पापमोचन । जे भवतारण प्रतापें ॥ १३ ॥ ऐका त्यांचें अभिधान । वामदेव जाबालि कश्यप जाण । कात्यायन भरद्वाज गहन । नामें पावन महीतळीं ॥ १४ ॥ आणीकही ऋषि बहुत । जे पृथ्वीचे स्तंभ मूर्त । अभिषेकावया श्रीरघुनाथ । आले शीघ्रवत समकाळें[5] ॥ १५ ॥

अयोध्यानगरे रम्ये रत्नमंडपमध्यगे ।
स्मृता कल्पतरोर्मूले रत्नसिंहासने शुभम् ॥ ९ ॥
तन्मध्येऽष्टदलं पद्मं नानारत्नप्रवेष्टितम् ।
तत्र रामं च ऋषयो ध्यायंतेऽजं परात्परम् ॥ १० ॥

ऐसें ऋषिवरीं सकळिकीं । श्रीरामासहित जानकी । रत्नमंडपीं बैसवोनि निकी । अभिषेकीं सुमुहूर्तें ॥ १६ ॥ पुण्यपूज्य ऋषिश्वर । करिती वेदघोषउच्चार । दीर्घस्वरें मंत्रोच्चार । श्रीरघुवीरअभिषेकीं ॥ १७ ॥ सुमंगलें सुवासित । पुण्यजळें अति विख्यात । आणिलीं होतीं पुण्योचित । तिहीं रघुनाथ अभिषेकिला ॥ १८ ॥ श्रुतिस्वरांचे उच्चार । पुराणोक्त मंत्र अपार । जयजयकारें अंबर । गर्जे सत्वर रामनामें ॥ १९ ॥ सकळ सुरवर स्वर्गस्थ । देवगुरुसमवेत । जेंवी इंद्रातें अभिषेकीत । तेंवी रघुनाथ अभिषेकिला ॥ १२० ॥ ज्यासी जेथें जेथें अधिकार । तेणेंकरोनि रघुवीर । अभिषेकिला अति सत्वर । निजउद्धार व्हावया ॥ २१ ॥ पदाभिमानें संतप्त । हर्षविषादीं दुःखित । तेथोनि व्हावया निर्मुक्त । आर्तें[6] रघुनाथ अभिषेकिती ॥ २२ ॥ तया अभिषेकाचें लक्षण । यथामति निवेदीन । साधु श्रोते स्वामी सर्वज्ञ । द्यावें अवधान कूर्मावलोकनें[7] ॥ २३ ॥

ऋत्विग्भिर्ब्राह्मणैः सार्द्धं कन्याभिर्मंत्रिभिस्तदा ।
बलमुख्यैश्च संहृष्टैः सोऽभिषिक्तश्च नैगमैः ॥ ११ ॥
सर्वौषधिरसैश्चैव दैवतैर्नभसि स्थितैः ।
चतुर्भिर्लोकपालैश्च समेतैः सर्वदैवतैः ॥ १२ ॥

नित्यानित्यविवंचन । तेणें वेद श्रमला पूर्ण । देखोनियां रघुनंदन । केलें अभिषिंचन नेतिशब्दें ॥ २४ ॥ ऋत्विज जे कां अभिषेकार्थी । कर्मकलापक्रियायुक्ती । देखोनियां श्रीराममूर्ती । निष्कर्मस्थितीं अभिषेक ॥ २५ ॥ अष्टनायिका सौंदर्यबल । तिहीं देखोनि रघुकुळपाळ । निजावयवीं विटोनि

१ सोन्याची झारी. २ भरपूर. ३ बहुमोल स्वच्छ वस्त्रें. ४ शरस ५ एकाच वेळीं. ६ अत्यंत उत्सुकतेनें. ७ कृपायुक्त होऊन.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सकळ । लाजिल्या प्रबळ अभिषेकीं ॥ २६ ॥ मंत्री प्रधान सेनानी । सामर्थ्यें बुद्धिबळेंकरोनी । तेही श्रीरामातें देखोनी । अभिषिंचनीं लाजिले ॥ २७॥ वनस्पतींचा राजा सोम । ओषधिरस सर्वोत्तम । अभिषिंचिता रघूत्तम । सुरसोत्तम ओषधीं ॥ २८॥ चतुर्दिशांचे दिक्पाळ । देवगंधर्वादि सकळ । स्वर्ग मृत्यु आणि पाताळ । श्रीराम तत्काळ अभिषेकिती ॥ २९ ॥ अमर अमृत सेविती । परी मरणार्णवा न चुकविती । अमृताभिषेकीं रघुपती । अमृतप्राप्ती अमरांसी ॥ १३० ॥ मानवीं सिंचन प्रेमामृतें । पन्नगीं सिंचन परमामृतें । गंधर्वी श्रीरामातें । नादामृतें अभिषेकिलें ॥ ३१ ॥ हरिदासीं नामामृतें । अट्टाहास्यें आनंदयुक्तें । अभिषेकिलें श्रीरामातें । केलें त्रैलोक्यातें पावन ॥ ३२ ॥ अयोध्येच्या जनीं समस्तें । चित्तें वित्तें जीवितें । अभिषेकिलें श्रीरामातें । उल्लासितें निजमनें ॥ ३३ ॥ भरतें अभिषेकिलें भावार्थें । श्रीराममाता पुत्रस्नेहार्थें । सौमित्र शत्रुघ्नें हर्षें तेथें । केला स्वामीतें अभिषेक ॥ ३४ ॥ स्थावर जंगम चराचर । जीवमात्र लहान थोर । त्यांहीं राजा श्रीरामचंद्र । सर्वस्वें साचार अभिषिंचिला ॥ ३५ ॥

छत्रं तस्य तु जग्राह शत्रुघ्नः पांडुरं महत् ।
श्वेतं च वालव्यजनं सुग्रीवो वानरेश्वरः ॥ १३ ॥
अमरं चंद्रसंकाशं वालव्यजनमुत्तमम् ।
हृष्टो रामस्य जग्राह राक्षसेंद्रो विभीषणः ॥ १४ ॥
मालां ज्वलन्तीं वपुषा कांचनीं शतपुष्कराम् ।
राघवाय ददौ वायुर्वासवेन प्रचोदितः ॥ १५ ॥
रत्नाध्यक्षः समुद्रस्तु मणिरत्नपरिष्कृतम् ।
मुक्ताहारं समादाय प्रादाच्छक्रप्रचोदितः ॥ १६ ॥

भावार्थाचें वास³ परिकर । पीतांबर अति मनोहर । भरतें आणोनि सत्वर । श्रीरामचंद्र पूजिला ॥ ३६ ॥ सद्गुरू वसिष्ठें आपण । चिद्रत्नाचें जडित भूषण । शीघ्र आणोनियां जाण । श्रीरघुनंदन अलंकारिला ॥ ३७ ॥ छत्र शुद्ध श्वेतांबर । चंद्रप्रभासम परिकर । श्रीरामावरी प्रीतिपुरःसर । शत्रुघ्नें सत्वर धरियेलें ॥ ३८ ॥ कनकदंडें रत्नाकारें । शुभ्र व्यँजनें परिकरें । दोघां जणीं युग्मचामरें । अति सत्वरें धरियेलीं ॥ ३९ ॥ सुग्रीव आणि बिभीषण । चामरधारी दोघे जण । स्वयें होवोनि आपण । श्रीरघुनंदन वीजिती ॥ १४० ॥ इंद्रा अति गौरव । तेणें अमरावतीचें वैभव । आणोनि पूजिला राघव । सुखें स्वयमेव वंदिमोचनें ॥ ४१ ॥ देखोनि इंद्राची पूजन कळा । आनंद सकळां लोकपाळां । वायूनें येवोनि तत्काळा । घनसांवळा पूजिला ॥ ४२ ॥ कांचनयुक्त रत्नमाळा । विचित्रगुणी विचित्रकळा । आणोनियां तत्काळा । घनसांवळा पूजिला ॥ ४३ ॥ जावोनि शेषशयनींहूनी । रामें निवटिला दशाननी । क्षीरसागरें संतोषोनी । भेटी रामालागोनी आणिली ॥ ४४ ॥ स्वयें रत्नांचा निकर । विचित्र रत्नें परिकर । मुक्तघोषीं मंडित हार । गुंफोनि सत्वर आणिला ॥ ४५ ॥ श्रीरामें देखोनियां दृष्टीं । बाणिला जनकात्मजाकंठीं । तेणें शोभली गोरटी । श्रीराम नेहटीं अंकस्थ ॥ ४६ ॥

प्रकृत्या सीतया सार्धं सूर्यवत्तिग्मतेजसम् ।
चतुर्भुजं शंखचक्रगदापंकजधारिणम् ॥ १७ ॥
किरीटहारकेयूररत्नकुंडलशोभितम् ।
देवैः सह मुनींद्रैश्च योगिवृंदैश्च सेवितम् ॥ १८ ॥

क्षीरसिंधूची दुहिता । जनकात्मजा सती सीता । संतोषावया तिच्या चित्ता । श्रीरामें सीता पूजिली ॥ ४७ ॥ इतरही जे जे लोकपाळ । यथासामर्थ्यें अविकळ । पूजिते झाले पैं सकळ । रघुकुळपाळ निजराजा ॥ ४८ ॥ यथासामर्थ्यें यथाचित्तें । वित्तें जीवितें भावार्थें । पूजिते झाले श्रीरामातें । उल्लासित मानसीं ॥ ४९ ॥ श्रीरामाचा राज्याभिषेक । पाहूं आले तिन्ही लोक । तिंहीं यथासामर्थ्यें देख । रघुकुळटिळक पूजिला ॥ १५० ॥ सिंहासनीं श्रीरामचंद्र । शोभा शोभली विचित्र । लाजिन्नले रविचंद्र । प्रकाश मनोहर सुखमय ॥ ५१ ॥ ते काळींच्या रूपासी । सीमा न करवे शास्त्रांसी । मौन पडलें उपनिषदांसी । नेति वादेंसीं वेद परते ॥ ५२ ॥ तया रूपाचें वर्णन । वदावया मी अल्प दीन । कृपाळु एका

१ चंद्र. २ मरणरूपी समुद्राला. ३ वस्त्र. ४ चैतन्यरूपी रत्नाचें. ५ शुभ्रवस्त्रयुक्त. ६ सुंदर. ७ पंखे. ८ चवऱ्यांची जोडी. ९ वारा घालितात. १० बसवी. ११ कन्या.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

जनार्दन । निजात्मवर्णन सांगत ॥ ५३ ॥ श्रुतीसी रिघतां जेथें सांकडें । परेसी सर्वथा नातुडे । तेथें वैखरी सैरा वावडे । हें सामर्थ्य घडे गुरुकृपेसीं ॥ ५४ ॥ गुरुकृपेचे निजपक्षें । अलक्ष लक्षेवीण लक्षे । निर्विकल्पीं सावकाशें । स्वयें प्रकाशे मन बुद्धि ॥ ५५ ॥ तो जगद्गुरु जनार्दन । एकाएकीं बोळला पूर्ण । श्रीरामस्वरूपाचें वर्णन । आपल्या आपण सांगत ॥ ५६ ॥ त्या श्रीरामाचें स्वरूपवर्णन । श्रोते परिसोत सावधान । एका विनवी जनार्दन । स्वानंदघन श्रीराम ॥ १५७ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां श्रीरामराज्याभिषेको नाम त्र्यशीतितमोऽध्यायः॥८३॥ ओंव्या ॥ १५७ ॥ श्लोक ॥ १८ ॥

अध्याय चौऱ्यायशींवा.

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ जयजयाजी श्रीजनार्दना । एकानेका परिपूर्णा । जनीं असोनि अभिन्ना । अलिप्तता जगासी ॥ १ ॥ जनीं आहेसी तत्त्वतां । म्हणोनि तेथें भाव धरितां । ते तुझी माया गा अच्युता । तेथें सर्वथा तूं नससी ॥ २ ॥ जैंवी उदकाचा निखळ[३] फेन । तो फेन पितां न वंचे[४] तहान । तेंवी तुजपासूनि जाहाले जन । ते जनां जाण न भेटसी ॥ ३ ॥ फेन निरसोनि उदक घेणें । जन निरसोनि तूतें देखणें । सोनटकाहूनि सोनें पहाणें । अन्यथा शिणणें वायांचि ॥ ४ ॥ हे अभेददर्शनहातवटी । तूंचि गुरुत्वें कृपादृष्टीं । अवलोकिसी सर्वसाटीं[५] । तैं दिठी पैठी तुजमाजी ॥ ५ ॥ त्या तुझें स्वरूप चिद्धन । नामरूपें अवतारचिन्ह । धरिलें त्याचें निजवर्णन । कर्ता जाण तूं स्वामी ॥ ६ ॥ देव साक्षात् नारायण । ऐसा सांगताही वेदचि जाण । तैसें माझेनि वदनें जाण । कर्ता जाण तूंचि तूं ॥ ७ ॥ निवटोनि अहंरावण । राज्याभिषेकविराजमान । सिंहासनीं रघुनंदन । शोभायमान निजतेजें ॥ ८ ॥ सकळां श्रीरामीं प्रीति गहन । निजाधिकारें देखिला जाण । परिस तयाचें लक्षण । एका जनार्दन वदवीत ॥ ९ ॥ सनकादिक मुनिवृंद । वसिष्ठादि मुनि प्रसिद्ध । नारदादि महासिद्ध । आत्मत्वें शुद्ध जाणितला ॥ १० ॥ सृष्टीपूर्वी जें सनातन । सृष्टिरूपें विराजमान । जेथें सृष्टीसी लयो जाण । तेंही रघुनंदना स्वरूप ॥ ११ ॥ दुःख न रिघे अळुमाळ । जेथें सुखमयचि केवळ । उत्पत्तिस्थितिप्रळयकाळ । जेथें सकळ मृगजळत्वें ॥ १२ ॥ जेथें दृश्य द्रष्टा दर्शन । ध्येय ध्याता आणि ध्यान । ज्ञेय ज्ञाता निजज्ञान । अभाव पूर्ण त्रिपुटीचा ॥ १३ ॥ जें शुद्ध चैतन्य एकवट । जें अंतर्बाह्य निघोट । आदि मध्य आणि शेवट । न कळे स्पष्ट जयाचा ॥ १४ ॥ तें हें श्रीरामाचें रूपडें । सिद्धीं देखिलें वाडेंकोडें । दृष्टी पाहतां जयाकडे । सुखसुरवाडें बुडाली ॥ १५ ॥ अवलोकितां रघुनंदन । देखणे झाले नयन । देखणें देखती देखणे होऊन । देखणे नयन श्रीरामीं ॥ १६ ॥ ब्रह्मादि इंद्रप्रमुख । तिंहीं विराटमूर्ति अशेख । स्वयें देखिला रघुकुळटिळक । ऐका विवेक तयाचा ॥ १७ ॥ भूलोकादि सप्तपाताळ । ते रामाचे चरण कोमळ । भुवर्लोक जघनयुगुल[९] । साङ्ग सकळ विराजे ॥ १८ ॥ स्वर्लोक तें रामजघन । तेथें विराजे स्वर्गभुवन । महर्लोक नाभिस्थान । जाण संपूर्ण रामाचें ॥ १९ ॥ जनलोक हृदय देख । कंठीं विराजे तपोलोक । श्रीरामाचा मुखमयंक[१०] । तेथें सत्यलोक विराजे ॥ २० ॥ असो किती सांगों भिन्न भिन्न । ॐ तत्सत् ऐसें वचन । तें सर्वात्मक रघुनंदन । अनवच्छिन्न[११] एकत्वें ॥ २१ ॥ जेंवी सूत्रीं मणिगण । ओतप्रोत संपूर्ण । तेंवी चराचरीं रघुनंदन । विबुधीं[१२] जाण देखिला ॥ २२ ॥ कौसल्यादि माता समस्तीं । जन्मकाळीं चैतन्यमूर्ती । पूर्वी जैसी देखिली होती । त्याच स्थितीं देखिली ॥ २३ ॥ चैतन्यघन अतिलावण्य । पाहोनि मदनमोहन । जानकी झाली लज्जायमान । रघुनंदन देखती ॥ २४ ॥ भरत श्रीरामाचा भक्त । विरक्त आणि अनुरक्त । नित्यानुवर्ती[१३] प्रेमयुक्त । कैसा रघुनाथ देखिला तेणें ॥ २५ ॥ भरत देखणा विचक्षण । श्रीरामाचें देखणेपण । सर्वस्वेंसीं आकळून[१४] । देखणेन देखणें श्रीराम ॥ २६ ॥ स्वप्रकाशें स्वलीला । दिव्य तेजाचा उमाळा । निजतेजीं अति सोज्ज्वळा । भरतें डोळां देखिला ॥ २७ ॥

---

१ प्राप्त होत नाहीं. २ चवथी वाचा. ३ निवळ. ४ भागत नाहीं. ५ कृपेनें. ६ किंचितही. ७ संपूर्ण. ८ सुखातिशयांत. ९ दोन्ही कटिप्रदेश. १० मुखचंद्र. ११ परिच्छेदशून्य, अमर्याद. १२ ज्ञात्यांनीं. १३ सर्वदा आज्ञाधारक. १४ जाणून.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

तेणें निजतेजें विलासे। मीतूंपणाचा ठाव पुसे। जग आत्मत्वें प्रकाशे। अति उल्लासे निजानंदें ॥ २८ ॥ ज्या तेजाचेनि निर्धारें। अहंसोहं समूळ विरे। ब्रह्मत्वें त्रैलोक्य अवतरे। सर्वांगीं भरे स्वानंदकंद ॥ २९॥ ज्या तेजाचेनि निजनिष्ठें। विषयांचें विषयत्व आटे। बंधमोक्षांचें बिरडें फिटे। स्वसुखें कोंदाटे आब्रह्म भुवन ॥ ३० ॥ ज्या तेजाचिये दीप्ती। रवि चंद्र स्वयें हरपती। जेणें प्रकाशे ब्रह्मस्फूर्ती। निर्विषयस्थितीं सुख कोंदे ॥ ३१ ॥ ऐसें स्वाभाविक सहज। तेजाचें जें निजतेज। त्याची चिन्मूर्ति पैं द्विभुज। भक्तराज देखे भरत ॥ ३२ ॥ श्रीरामाची निजस्थिती। चिन्मात्रैकचैतन्यमूर्ती। अव्यक्त आला व्यक्ती। भक्तभावार्थी साकार ॥ ३३ ॥ ऐसा श्रीराम स्वभावेंसीं। आला साकार दशेसी। सगुण मूर्ति भासे कैसी। चिद्विलासी श्रीराम ॥ ३४ ॥ जन्मला कौसल्येच्या उदरीं। ऐसी लोकवदंतीची परी। त्या श्रीरामाच्या उदरीं। भरत निर्धारीं विश्व देखे ॥ ३५ ॥ श्रीरामाचें पूर्णपण। भक्त जाणती अकिंचन। जे भावार्थें परिपूर्ण। ते स्वरूप जाण जाणती ॥ ३६ ॥ श्रीरामाची निजमूर्ती। वर्णितां मौनावल्या श्रुती। शास्त्रें थोंटावलीं ठाती। राम शब्दार्थी अर्थवेना ॥ ३७ ॥ चाटु[3] नाना रस मधुर वाढी। तो चाटु चाखतां न लभे गोडी। तेंवी सांडोनि शब्दार्थओढी। पहावी निर्वेडी श्रीराममूर्ति ॥ ३८ ॥ आकाश बांधतां मोटेंसीं। चौपालवी ये बांधे त्यासी। शब्दें वर्णितां श्रीरामासी। वैखरीसी दशा तैसी ॥ ३९ ॥ राम सगुण तोचि निर्गुण। राम परमात्मा परिपूर्ण। चिन्मात्रैक चैतन्यघन। विश्वविश्राम[6] जाण श्रीराम ॥ ४० ॥ त्या श्रीरामाचें वर्णन। वर्णावया मी अति दीन। कृपाळु एका जनार्दन। अर्थवी कथन यथार्थ ॥ ४१ ॥ धन्य भाग्य त्या भरताचें। स्वरूप देखत श्रीरामाचें। श्रुतिशास्त्रां गुह्य ज्याचें। भरत त्याचें चिन्ह लक्षी ॥ ४२ ॥ राम सर्वांगीं निर्मळ। ते निर्मळीं बिंबलें नभ सुनीळ। यालागीं श्यामता सुनीळ। भासे निर्मळ श्रीरामीं ॥ ४३ ॥ राम श्यामता मेघश्याम। त्या श्यामता गजेवी आब्रह्म। यालागीं राम मेघश्याम। बोलती परम श्रुतिशास्त्रें ॥ ४४ ॥ राम निर्मळ परात्पर परम। हेंचि श्रुतिशास्त्रां न कळे वर्म। अंगीं बिंबलें देखोनि व्योम। मेघश्याम राम म्हणती ॥ ४५ ॥ यापरी स्वयें श्रीराम। शोभा शोभवी मेघश्याम। त्याच्या पदींचा पदाक्रम[8]। त्रिविक्रम आक्रमे[9] ॥ ४६ ॥ सहस्र जिव्हा शेषासी। तेणें बळें निजावेशीं। प्रवर्तला चरणवर्णनासी। शीकें[10] त्यासी लागली ॥४७॥ वर्णितां अचिंत्याच्या रूपासी। जिव्हा चिरली क्षणार्धेसीं। लाजां दडाला शेजेसीं। श्रीरामचरणासी न वर्णवे ॥ ४८ ॥ त्या श्रीरामाचे श्रीचरण। वर्णावया कैंचें वदन। साधु कृपाळु दीन जन। त्यांचें अवधान बोलवीत ॥ ४९ ॥ चरणांतळीं शोभा आरक्त। बाळादित्यातें[11] लाजवीत। क्षणें जगातें भुलवीत। ते चरणीं निश्चित भुलली रमा ॥ ५० ॥ सुरासुरां अतर्क्य माया। जे श्रुतिशास्त्रीं न ये आया। ते रमा माया लवलाह्यां। श्रीरामपायां भुललीसे ॥ ५१ ॥ लक्ष्मीचें चपळ लक्षण। नित्य चित्त भोगायतन। चरणीं सुख अत्यंत गहन। रमेसी मोहन नवल नव्हे ॥ ५२ ॥ सनकादिकां अति विरक्ती। देहसंगें[12] न धरिती हातीं। तेही भुलले अत्यंत प्रीतीं। क्षणही न [13]विसंबती श्रीरामचरणां ॥ ५३ ॥ सनकादिक महासज्जन। भ्रमर होवोनियां जाण। चरणकमलीं आमोदसेवन। अहर्निशीं जाण करिताती ॥ ५४ ॥ चरणींचियां सामुद्रिका। न वर्णवे वेदा शेषा। ध्वजवज्रांकुश ऊर्ध्व रेखा। पद्म देखा यवांकित ॥ ५५ ॥ तया चिन्हांचें महिमान। श्रोते परिसोत सावधान। अलक्ष्य तयांचें लक्षण। कांहीं सांगेन संक्षेपें ॥ ५६ ॥ चहूं मुक्ती देवोनि लाज। चरणीं शोभे भक्तीचा ध्वज। वज्रें निर्दळी कर्मबीज। स्मरणाचा सहज नित्यांकुश ॥ ५७ ॥ शोधितसत्त्वाचेनि आक्रमें। युग्मचरणीं तळपती पद्में। पादतळें अनुरागप्रेमें। त्या शोभा कुंकुमें लाजिजे ॥ ५८ ॥ तळीं आरक्त श्यामता देख।

१ बंधन. २ निर्धन. ३ लांकडाची पळी. ४ लक्ष लावून. ५ चौपदरी. ६ जगाला विश्रांती देणारा. ७ अर्थयुक्त करी. ८ पायाचें व्यापणें. ९ तीन पावलांनीं ब्रह्मांड व्यापणारा. १० शिक्षा. ११ सकाळच्या नूतन सूर्याला. १२ देहाभिमान. १३ सोडीत नाहींत.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

जेंवी नभीं इंद्रधनुष्य। शोभा शोभवी अलौकिक। रघुकुळटिळकनिजचरणीं ॥ ५९ ॥ क्षयरोगें नित्य पीडिला । त्या श्रीरामचरणां शरण आला । नखचंद्रीं जडोनि ठेला । अक्षयी झाला चंद्रमा ॥ ६० ॥ नखचंद्रींचे जे चंद्रकर । सनक सनंदन सनत्कुमार । भक्त होवोनि सत्वर । नित्य चरणामृतसार सेविती ॥ ६१ ॥ नखीं भेदलें आवरणजीवन । गंगेचें तें जन्मस्थान । त्रिपथगामी हें अभिधान । विश्व पावन जियेचेनि ॥ ६२ ॥ त्रिगुण जडजाड्या उबगले । श्रीरामचरणां शरण आले । त्रिकोणघोटी होवोनि ठेले । चरणीं सुकले जीवभावा ॥ ६३ ॥ जैसें शुद्ध उपासनायंत्र । तैसी घोटी त्रिकोणसुंदर । कळाविया अति मनोहर । चित्कळा सार भासती ॥ ६४ ॥ श्रुति आणि स्मृती । दोहीं बाहीं वांकी वाजती । अंदुवा जाण निश्चितीं । उपवेदस्थितिविभागें ॥ ६५ ॥ भक्ताची ते जीवनकळा । साधकाचा निजजिव्हाळा । तोडराचा नाद आगळा । प्रळयघंगाळ नाम ज्याचें ॥ ६६ ॥ वेदान्त शुद्ध शास्त्र । चरणीं गर्जती तोडर । धन्य धन्य दैत्यांचें शरीर । तोडर निरंतर रुळती चरणीं ॥ ६७ ॥ तोडरांची नादशैली । ऐकतां कळिकाळ कांपे चळीं । पोटरियांची नव्हाळी । अति कोंवळी सुकुमार ॥ ६८ ॥ यंत्रपीठीं वर्ण प्रबळ । तेंवी पोटरिया सरळ । अक्षररसें त्या मांसल । अति निर्मळ निजतेजें ॥ ६९ ॥ जानुचक्र अति वर्तुळ । जैसे आरिसे निजनिर्मळ । निजात्मतेजें स्वरूप तत्काळ । तेथें सकळ आभासे ॥ ७० ॥ अथवा आणिक एक भावो । मज गमताहे पाहाहो । ऐका तेथींचा नवलावो । अभिप्रावो तो ऐसा ॥ ७१ ॥ चक्र शिणलें कंदन करितां । तें शरण आलें रघुनाथा । जानुचक्रीं जडोनि जातां । वंद्य तत्त्वतां सुरसिद्धां ॥ ७२ ॥ श्रीरामजानुचक्र देखतां । काळचक्र वंदी हरिभक्तां । रामचरणांची सामर्थ्यता । श्रुतिशास्त्रां न वर्णवे ॥ ७३ ॥ लागतां श्रीरामचरणीं । शिळा उद्धरली तत्क्षणीं । सद्भावें सेवितां अनुदिनीं । लागती चरणीं कळिकाळ ॥ ७४ ॥ श्रीरामाचा चरणमहिमा । शास्त्रां न करवे सीमा । श्रुति पावल्या उपरमा । त्या श्रीरामा कैंवी वर्णवे ॥ ७५ ॥ ऊरु मृदु सरळशोभा । तेणें लाजविलें कर्दळीस्तंभा । तिच्या पोटीं वक्रगाभा । अवक्र शोभा रामांकीं ॥ ७६ ॥ गगनाहूनि अति सुकुमार । श्रीराममांडिया अरुवार । लागलिया खुपती चंद्रकर । सुकुमारा सुकुमार श्रीरामचंद्र ॥ ७७ ॥ जगाचें गुह्य श्रीरघुनाथ । पावावया तयाचा गुह्यार्थ । इतरां कैंचें सामर्थ्य । भावार्थें सेवीत जानकी ॥७८॥ त्यजोनि वासनावासासी । जे निर्बुजले लोकलाजेसी । ते पावती श्रीराम गुह्यासी । अहर्निशीं सुखरूप ॥ ७९ ॥ स्वयें अच्छिद्रत्वें मनोहर । आणि पुढिलाचें आच्छादी छिद्र । तोचि कांसे पीतांबर । तेज दुर्धर देदीप्य ॥ ८० ॥ उदयअस्तें विजु शिणली । ते श्रीरामा शरण आली । पीतांबरत्वें कांसे जडली । त्यजोनि वहिली उदयास्त ॥ ८१ ॥ कांस कसिली सुरेख । पालेंवीं मुक्तलग देख । लागतां कांसे एकाएक । भवभय देख होय वाव ॥ ८२ ॥ श्रीराम सांपडे सगळा । ते भक्तिभावार्थमेखळा । मध्यें शोभे घननीळा । अलोलिक कळा तेजाची ॥ ८३ ॥ किंकिणी आणि ज्वाळमाळा । ऋद्धि सिद्धि झाल्या सकळा । क्षुद्रघंटिकांचा मेळा । सद्विद्या तत्काळ पैं होती ॥ ८४ ॥ अति सूक्ष्म मध्य सानां । होता अभिमान पंचानना । देखोनि राममध्यरचना । लाजा राना तो गेला ॥ ८५ ॥ सावकाश श्रीरामासी । पहावया अवस्था पंचाननासी । येवोनि जडले रामकांसेसी । मित्रत्वेंसीं मेखळे ॥ ८६ ॥ लागतां श्रीरामकांसेसी । विसरले गमनागमनासी । श्रीरामाची ख्याति ऐसी । कांसे लागे त्यासी उद्धार ॥ ८७ ॥ निजभक्तांच्या आर्तीच्या ठायीं । अखंड रामासी रमणें पाहीं । आर्तीवेगळें सर्वथा कांहीं । जाणें नाहीं श्रीरामा ॥ ८८ ॥ आर्ती सर्वेन्द्रियांचा अर्थ । भक्त श्रीरामीं अर्पित । श्रीरामा एकपत्नीव्रत । आर्ती रमत स्वधर्मे ॥ ८९ ॥ म्हणोनि भक्तांसी निश्चित । प्राप्त श्रीरामगुह्यार्थ । आर्तीवेगळा रघुनाथ । नव्हे प्राप्त सुरसिद्धां ॥ ९० ॥ लेखणी चुकी पडली मोठी । सांडोनि श्रीरामगोष्टी । पीतांबरीं बैसली

१ तीन मार्गांनीं जाणारी. २ नांव. ३ त्रासले. ४ नवलाई. ५ वेदशास्त्रांना. ६ नाजुक. ७ चंद्रकिरण. ८ वासनारूपी वस्त्राला. ९ कंटाळले. १० पदराला. ११ कंबर. १२ बारीक. १३ सिंहाला. १४ आवडीच्या.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

दृष्टी । संतीं कृपादृष्टीं सहावें ॥ ९१ ॥ सखोल श्रीरामाची नाभि जाण । ब्रह्मा सहस्त्राब्द[1] बुडतां आपण । ठाव न लागे अणुप्रमाण । झाला खेदक्षीण निजमनीं ॥ ९२ ॥ तेणें कृपा आली रघुनाथा । देवोनि नाभीकारता । नाभिकमळीं राखिला धाता । लोककर्ता करोनियां ॥ ९३ ॥ उपदेशिलें गुह्यज्ञान । ऐका तयाचें लक्षण । सकळ लोक स्रजितां पूर्ण । न ये कर्माभिमान सर्वथा ॥ ९४ ॥ उदरीं त्रैलोक्यसांठोवा । विश्रांति या सकळ जीवां । जेंवी मातृकांचा सांठोवा । दिसे अघवा प्रणवोदरीं ॥ ९५ ॥ ज्ञेय ज्ञाता ज्ञानन्हाळी । हेचि उदरीं त्रिवळी । सत्कर्में रेखिलया रोमावळी । हृदयकमळीं शोभती ॥ ९६ ॥ श्रीरामाचे हृदयावकाशीं । आकाश लोपलें स्वकार्येंसीं[3] । घनानंद निरवकाशीं । सज्जनांसी विश्रांति ॥ ९७ ॥ निवान्त समाधीचें सुख । तैसें श्रीरामहृदयीं पदक । संत माणकुळीं[4] सुरेख । अलौकिक झळकती ॥ ९८ ॥ सत्कोंदणें अलौकिकी । संत चिद्रत्नें जडलीं पदकीं । कौस्तुभाची शोभा निकी[5] । लोकालोकीं[6] दुर्लभ ॥ ९९ ॥ उदयअस्तें सूर्य शिणला । तो श्रीरामा शरण आला । कौस्तुभ होवोनि कंठीं जडला । मुक्त झाला त्रिविध तापा ॥ १०० ॥ अनन्यगतीच्या सद्वृत्ती । तेचि रामीं वैजयंती । सुमनमनाच्या निजवृत्ती । माळा शोभती समिश्रतुळसी ॥ १ ॥ श्रीरामाचा कंबुकंठ[7] । वेदाचें तें मूळ पीठ । स्वरवर्णांची ते वाहती वाट । तेथोनि प्रकट त्रिकांडीं ॥ २ ॥ मुख्यत्वें श्रीराम अबाहु । तेथेंचि शोभती आजानुबाहु । बाहूंचा पराक्रम बहु । द्वैताचा ठाऊ[8] उरों नेदिती ॥ ३ ॥ अहंरावण महाबळी । त्याची केली रांगोळी । वैर नाहीं जगतीतळीं । आयुधें ठेविलीं यालागीं ॥ ४ ॥ श्रीरामाचें शुद्ध ज्ञान । निजहृदयीं असे संपूर्ण । तेथें न होवोनि निमग्न । वृथा अज्ञान भ्रमताती ॥ ५ ॥ निरसोनि बाह्य साधन । हृदयीं घ्यावया समाधान । ज्ञानमुद्रा दावी आपण । दक्षिणें[10] हस्तें श्रीराम ॥ ६ ॥ अलिप्तपणें धरी आपुली माया आपुल्यावरी । अलिप्तपणें धरी हरी । राम पाहतां निर्धारीं । बाधा न करी हरिमाया ॥ ७ ॥ ऐसें करावया निर्धारीं । निजमाया निजकरीं । वामांकीं जानकी सुंदरी । दक्षिणकरीं धरियेली ॥ ८ ॥ शुद्ध चैतन्याचे सुघटे । अहं सोहं निःशेषें[11] आटे । श्रीरामाचे वाहुवटे । कीर्तिमुख चोखटें उपनिषदें ॥ ९ ॥ वीर्यधैर्या धैर्य जेणें । श्रीरामाचीं वीरकंकणें । करीं बाणलीं पूर्णपणें । लेणियां[12] लेणें श्रीराम ॥ ११० ॥ श्रीराममुद्रा बाणलिया हातीं । तो वंद्य होय त्रिजगतीं । कळिकाळ पायां लागती । चारी मुक्ती आंदण्या[13] ॥ ११ ॥ ऐशा दशांगुळीं दशमुद्रा । करीं प्रतिपाळी दशावतारा । हस्तीं धरिली सीता सुंदरा । दशशिरा निर्दाळूनी ॥ १२ ॥ गाळींव आनंदाची मूस देख । कीं सोलींव सुखाचेंही सुख । तें श्रीरामाचें श्रीमुख । नित्य निर्दोष देखिजे ॥ १३ ॥ श्रीरामाचा मुखमयंक[14] । पूर्णत्वें नित्य निष्कलंक । देखोनियां शशांक[15] । लाजा अधोमुख तो झाला ॥ १४ ॥ पक्षीं वाढे पक्षीं मोडे । हें चंद्रासी दुःख गाढें[16] । तेणें दुःखें अंगुष्ठीं जडे । जग पायां पडे नखचंद्रीं ॥ १५ ॥ जडतां श्रीरामअंगुष्ठीं । चंद्रासी झाली पुष्टितुष्टी । रामचरणीं सुखाच्या कोटी । देखतां दृष्टी आल्हाद ॥ १६ ॥ करितां राममुखावलोकन । निःशेष द्वंद्वदुःखा बोळवण । परमानंदतृप्ति गहन । हरिखें पूर्ण कोंदाटे ॥ १७ ॥ अकार उकार मकारस्थितीं । ॐकारीं कर्म निष्कर्मप्राप्तीं । तैशा मुखीं दोंभागीं दंतपंक्ती । चतुर्वेदस्थिती चौक मिरवे ॥ १८ ॥ जगाचा आधार ते अधर । श्रीरामअधरें ते सधर । परमामृतासी निजमाहेर । निजजिव्हार सीतेचें ॥ १९ ॥ श्रीरामाची हनुवटी । देखतां सुख [17]वोसंडे सृष्टीं । धन्य देखत्याची दृष्टी । ते जाणे हातवटी हनुमंत ॥ १२० ॥ देखोनि गंडस्थळांची प्रभा । लाजा सूर्य लोपला उभा । तेथें उदयअस्तांची वालभा । उदय स्वयंभ गंडस्थळीं ॥ २१ ॥ श्रवणीं कुंडलें मकराकार । हा लौकिक बाह्यविचार । तीं आकारीं शुद्ध निर्विकार । श्रवणें विकार निर्दाळिती ॥ २२ ॥ नवल शोभा त्या श्रवणासीं ।

१ हजार वर्षें. २ वर्णाचा. ३ शब्दांसह. ४ लहान माणिकें. ५ उत्तम. ६ उदयास्तमर्यादादर्शक पर्वतांवर. ७ शंखाकृति कंठ. ८ ठिकाण, मागमूस. ९ नाहींसें करून.

१० उजव्या हातानें. ११ पूर्णपणें. १२ भूषणांना. १३ दासी. १४ मुखचंद्र. १५ चंद्र. १६ मोठें. १७ प्राप्त होतें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

नित्य मिळणी निजात्मअंशीं । श्रवणें देखणें देखण्यासी । अंशाअंशीं समरसे ॥ २३ ॥ निःशेष निरसोनि नास्तिक । अवक्र जें कां आस्तिक । निरपेक्ष शुद्ध चोख । तेंचि नासिक राममुखीं ॥ २४ ॥ अल्प अपेक्षा धरितां देख । साधन तितुकें निर्नासिक । नकटा झाला तो साधक । राम सन्मुख भेटेना ॥२५॥ चळता जितुका वायु जाण । तो श्रीरामाचा मुख्य प्राण । श्रीरामाच्या प्राणें जाण । जगाचा प्राण जीतसे ॥ २६ ॥ श्रीरामाचा निजप्राण । तेणें वसंता समाधान । सुवासासी निजजीवन । विश्वजीवन श्रीराम ॥ २७ ॥ चैतन्याचें देखणेपण । श्रीरामनेत्रां आलें शरण । सबाह्य देखणें होवोनि पूर्ण । आपण आपणा देखत ॥ २८ ॥ देखतां श्रीरामाची दृष्टी । अक्षयानंदें जीव उठी । दृश्य द्रष्टा न दिसे त्रिपुटी । हेलावे सृष्टी निजानंदें ॥ २९ ॥ दीपामागें पडसाई । तैसी डोळयांमागें भिंवई । व्यंकटी सांडोनियां पाहीं । श्रीरामदेहीं विनटल्या ॥ १३० ॥ श्रीरामाची भ्रुकुटी । रची ब्रह्मांडाच्या कोटी । भ्रूविक्षेप केलिया काळ घोंटी । छेदी गांठी चौदेहां ॥ ३१ ॥ जैसें अधिष्ठान निर्मळ । तैसें श्रीरामाचें विशाळ भाळ । सच्चिदानंदपद केवळ । त्रिवळी प्रबळ ललाटीं ॥ ३२ ॥ उगाळोनि अहं कठिण । सोहं काढिलें शुद्ध चंदन । तेंही केलें रामार्पण । गंधार्चन रामभाळीं ॥ ३३ ॥ प्रेमकेशरसमेळा । टिळक रेखिला पिंवळा । अनुराग अक्षतारंग बहळा । श्रीरामनिढळा शोभत ॥ ३४ ॥ मुकुटवर्धनां मुकुटमणी । राम शिरोरत्न राजस्थानीं । श्रीरामाचा मुकुट वर्णी । ऐसा त्रिभुवनीं कोणी असेना ॥ ३५ ॥ श्रीराममस्तकावरतें । कांहीं रितें उरलें असतें । तरी मुकुट वानावया पुरतें । अवकाश वाचेतें पैं होता ॥ ३६ ॥ श्रीरामाचें स्वरूपवर्णन । करितां चौं वाचां पडिलें मौन । वेद परतले नेति म्हणोन । तेथें मशक मी कोण वर्णावया ॥ ३७ ॥ ऐसा साकार तोचि निराकार । निराकार तोचि साकार । रूपासी आला रघुवीर । भासे चराचर निजतेजें ॥ ३८ ॥ त्या रामाच्या स्वरूपीं देख । तद्रूपचि अलोलिक । चिद्रत्नमंडित विराजे सुरेख । श्रीरामअंका आरूढोनि ॥ ३९ ॥ जैसी नाथिलीचि व्योमा । भिन्न भासे नीळिमा । तेंवी रामांकीं विराजे रमा । नहोनि श्रीरामावेगळी ॥ १४० ॥ जेंवी स्वाद आणि साकर । दीप्ति आणि कापूर । रस आणि जैसें नीर । सीता सुन्दर तेंवी रामीं ॥ ४१ ॥ जेंवी कनक आणि कांती । कीं प्रभा आणि ज्योती । भानु आणि दीप्ती । सीता सती तेंवी रामीं ॥ ४२ ॥ राम आत्मा हे आत्मज्योती । राम चैतन्य हे चिच्छक्ती । राम पर हे प्रकृती । अभिन्नस्थिती पैं दोघें ॥ ४३ ॥ राम स्रष्टा हे सृष्टिस्थिती । राम कर्ता हे कार्यवृत्ती । राम वक्ता हे वचनोक्ती । अर्थप्राप्तीसमवेत ॥ ४४ ॥ ऐसें विचारितां तत्त्वतां । विचार ठाके पैं मागुता । परा वैखरीसी वर्णितां । श्रीरामीं सर्वथा बुडाला ॥ ४५ ॥ सीता आणि रघुनंदन । स्वरूप एक नामें भिन्न । तैसाचि बंधु लक्ष्मण । तदात्मक पूर्ण श्रीरामें ॥ ४६ ॥ जैसा अभिषेक रामासी । राज्योपचार आनंदेंसीं । तैसाचि केला सौमित्रासी । व्रतविसर्जनेंसीं आल्हादें ॥ ४७ ॥ श्रीरामाचें धनुष्यबाण । स्वयें घेवोनि आपण । पाठीसी उभा लक्ष्मण । सन्नद्ध जाण सर्वदा ॥ ४८ ॥ कनकदंड छत्रचामर । सहित जानकी सुंदर । भद्रीं विराजित रघुवीर । जोडोनि कर सन्मुख ॥ ४९ ॥ राज्याभिषेकीं अति मंडित । भद्रीं देखोनि रघुनाथ । आनंदभरित पैं समस्त । त्रैलोक्यांत उत्साहो ॥ १५० ॥

ऋषिसंघैस्तदाकाशे देवैश्च समरुद्गणैः ।
स्तूयमानस्य रामस्य शुश्रुवे मधुरध्वनिः ॥ १ ॥
प्रजगुर्देवगंधर्वा ननृतुश्चाप्सरोगणाः ।
अभिषेकं तदर्हस्य रामस्याक्लिष्टकर्मणः ॥ २ ॥

वेदोक्त मंत्रघोषण । ऋषीश्वरीं मांडिलें स्तवन । श्रीरामराज्य सुखैकघन । करिती गर्जन जयशब्दीं ॥ ५१ ॥ स्वर्गीं आनंदले सुरगण । मिळोनियां सहित मरुद्गण । सुरदुंदुभि त्राहाटिल्या पूर्ण । पुष्पवृष्टि जाण तिहीं केली ॥ ५२ ॥ गंधर्व मिळोनि समग्र । मृदु मंजुळ मधुर स्वर । गायन मांडिलें

१ उंचबळते. २ वांकडी भिंवई. ३ प्रेमा. ४ फार. ५ राजांमध्यें. ६ न इति=असें नव्हे, आम्हांला रामस्वरूप समजत नाहीं असें म्हणून. ७ नसलेली. ८ सुवास.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

परिकर। श्रीरघुवीरनिजराज्यें ॥ ५३ ॥ रंभा मेनका तिलोत्तमा जाण। उर्वशीसहित अप्सरागण। श्रीरामराज्यें आनंदमग्न। येवोनि नर्तन मांडिलें ॥ ५४ ॥ श्रीरामाचें अभिषिंचन। पहावया अति प्रीतीकरून। मंडळपति[1] राजे जाण। आले त्वरेनें समकाळें ॥ ५५ ॥ नानाविध उंपायन[2]। आणोनि पूजिला रघुनंदन। घालोनियां लोटांगण। श्रीरामचरण वंदिले ॥ ५६ ॥ विजयकार जयजयकार। ऋषिवरांचे मंत्रस्वर। वैष्णवांचा नामोच्चार। झणत्कार दुंदुभींचा ॥ ५७ ॥ वानरांचा भुभुःकार। गंधर्वांचा उच्च स्वर। अप्सरांचा आलापस्वर। नादें अंबर कोंदलें ॥ ५८ ॥ नभ झालें सुखैकघन। दिशा दुमदुमती संपूर्ण। नादें कोंदलें त्रिभुवन। सुख संपूर्ण सर्वांसी ॥ ५९ ॥ शून्यत्व सांडोनि गगन। झालें चिदानंदैकघन[3]। परमामृताचे रजःकण। वृष्टी रघुनंदननिजसुखें ॥ १६० ॥ श्रीरामाच्या राज्यसुखें। आकाश वोळलें चिदाकाशें। वसवूनि सकळांचीं मानसें। अलिप्त सर्वांसी सर्वदा ॥ ६१ ॥ घटाकाश मठाकाश। प्राणिमात्राचें हृदयाकाश। वसवूनि सर्वत्र उदास। अलिप्त आकाश श्रीरामें ॥ ६२ ॥ श्रीरामीं सुखावला पवन। सर्वांतरीं प्रवेशोनि पूर्ण। प्राणवृत्ती करी चळण। आसक्त नव्हे जाण सर्वथा ॥ ६३ ॥ परस्परें प्राणिमात्र। जीवघातें करिती वैर। चाळोनि तयांचें अंतर। प्राणी निर्वैर सर्वदा ॥ ६४ ॥ गाईव्याघ्रां सदा वैर। गजसिंहां वैराकार[4]। नकुळसर्पांसी खडतर। स्वाभाविक वैर सर्वदा ॥ ६५ ॥ मूषकबिडालांसी वैर। श्येनबकांसीं वैराकार। ऐसें सांगतां अपार। सर्वत्र वैर प्राणिमात्रां ॥ ६६ ॥ जीवशिवांचा आहार। येणें सकळां बद्धवैर। तितुकीं चाळोनि सर्वत्र। प्राणी निर्वैर सर्वदा ॥ ६७ ॥ श्रीरामराज्यें वायूसी। निर्वैरता आली त्यासी। मंद शीतळ सुखस्पर्शासीं। बाह्य जगासी निववीत ॥ ६८ ॥ श्रीरामराज्यतेजासीं। निर्विकारता बाणली कैसी। सांडोनि अहंममतेसी। स्वप्रकाशीं देदीप्य ॥ ६९ ॥ स्नेहसूत्रअधिष्ठान। गृहीं प्रयासें मेळवोन[5]। अमर्याद जाण जेणें दीप उजळिला आपण। प्रकाश त्यासी ॥ १७० ॥ हे प्रयास कांहीं न करितां। चोर सुखें चोरी करितां। त्यासीही प्रकाश आइता। स्वभावतां निजतेजें ॥ ७१ ॥ स्वामी यत्न करी निजवित्ता। चोर सिंतरोनि[6] स्वयें नेतां। दीपरूपें साक्षी पहातां। न म्हणे तत्त्वतां माझें तुझें ॥ ७२ ॥ आणिक श्रीरामराज्यासीं। तेजासी कळा बाणली कैसी। जे जे भेटों येती त्यांसी। करी आपणाऐसीं तत्काळ ॥ ७३ ॥ सर्व्यें येवोनि भेटे चंदन। अपसव्यें घुरे आपण। दोहींचा वास निरसोनि पूर्ण। देदीप्यमान करी अग्नि ॥ ७४ ॥ श्रीरामराज्यें जीवँन[7]। स्वयें झालें सुखैकघन[8]। सर्वां भूतीं रघुनंदन। निजभजन करीतसे ॥ ७५ ॥ भूतां परस्परें वैर। वैर स्वभावतां निरंतर। असतां आपण निर्वैर। जीवन करी सर्वांतें ॥ ७६ ॥ श्रीरामराज्येंकरोनि जाणा। अति संतोष झाला जीवना। विसरोनि अधोगमना। सुखस्वादना जग निववी ॥ ७७ ॥

> भूमिः सत्यवती चैव फलवंतश्च पादपाः।
> गंधवंति च माल्यानि बभूवू राघवोत्सवे ॥ ३ ॥

श्रीरामाचें अभिषिंचन। देखतां धरा सुखैकघन। ऐका त्याचेंही लक्षण। निजलक्षण धरेचें ॥ ७८ ॥ येथोनि हे भोयं[9] माझी। तेथोनि ते मर्यादा तुझी। सीमाभेदें झुंझती झुंझीं। निजपैजीं दिव्य करिती ॥ ७९ ॥ दिव्य उतरोनि सुखी होती। एक असत्य ते दिव्य भरिती[10]। तितुकें करोनि अभेदस्थिती। धरा वर्तती अखंडत्वें ॥ १८० ॥ विषमत्व सांडोनि चित्ता। संपादी दोहींच्या अर्था। माझी माझी म्हणतां भूतां। न मोडे अखंडता धरेची ॥ ८१ ॥ हें श्रीरामराज्याचें सुख। धरेसी बाणलें आत्यंतिक। वनस्पति वोळल्या देख। अलोलिक रसभारें ॥ ८२ ॥ सुवासित पुष्पीं सुपक्व फळीं। वृक्ष लँगडले तत्काळीं। जीवमात्रीं सुख सकळीं। रसकल्लोळीं वोळली मही ॥ ८३ ॥ श्रीरामराज्य ऐसें देख। सकळ सुख अलोलिक। भाट गर्जती असंख्य। रघुनायक निजराजा ॥ ८४ ॥ मंत्रस्वर जयजयकार। वानरांचा भुभुःकार। माजी नामाचा उच्चार। श्रीरघुवीर निजविजयी ॥ ८५ ॥ नामें प्रायश्चित्ता धाक। यमलोक ओस निःशेख। श्रीरामराज्यें-

१ मांडलिक राजे. २ नजराणे. ३ चैतन्यस्वरूपाच्या आनंदेंकरून परिपूर्ण. ४ वैरभाव. ५ फसवून. ६ उजवीकडून. ७ उदक. ८ सुखपूर्ण. ९ भूमि. १० भरून आले.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

करोनि देख । यमप्रमुख[1] कांपती चळीं ॥ ८६ ॥ एका जनार्दना शरण । श्रीरामाचें अभिषिंचन । आणि स्वरूपाचें वर्णन । आपलें आपण संपविलें ॥ ८७ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां श्रीरामस्वरूपवर्णनं नाम चतुरशीतितमोऽध्यायः ॥ ८४ ॥ ओंव्या ॥ १८७ ॥ श्लोक ॥ ३ ॥

अध्याय पंचायशींवा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ श्रीरामाचें अभिषिंचन । आनंदमय त्रिभुवन । भक्तवृंद[2] सुखैकघन । आनंदें पूर्ण गर्जती ॥ १ ॥ भद्रीं बैसला रघुनाथ । ब्रह्मांड सुखें दुमदुमित । विनोदें श्रीरामाचे भक्त । रामसुखार्थ दाविती क्रिया ॥ २ ॥ श्रीरामसुखें संपन्न । संतोषावया रघुनंदन । अग्निक्रीडा[3] मांडिली पूर्ण । औषध भरून रज तम ॥ ३ ॥ तीव्र रजतमांचीं औषधें । करोनि अग्नियंत्रें सन्नद्धें[4] । श्रीरामभक्तिआनंदें । क्रीडा विनोदें मांडिली ॥ ४ ॥ सूक्ष्म ममतेची हवाई । पहिली आणियेली पाहीं । वैराग्यवाती लावितां ठायीं । चिद्गगनीं तेही उसळली ॥ ५ ॥ गुरुवाक्यें प्रज्वाळिली । सद्विवेकें आंबुथिली । लागतां हवाई जळाली । क्षणें उडाली चिद्गगनीं ॥ ६ ॥ अहंकाराचा बाण कठिण । गुरुवचनें प्रज्वाळितां पूर्ण । उतटला न लागतां क्षण । आब्रह्मभुवन प्रकाशलें ॥ ७ ॥ सुटतां अहंकाराचा बाण । सोहं जाळिलें चिद्गगन । देखोनियां रघुनंदन । सुखैकघन स्वयें झाला ॥ ८ ॥ तंव आणिक नवलपरी । आशातृष्णेच्या चिचुंदरी । भरूनि आणिल्या झडकरी । पीडिले भारी लोक तिन्ही ॥ ९ ॥ विसरोनि रघुकुळटिळक । पाहूं लागले कौतुक । त्यांसी जाळीत उठल्या देख । एक एक शोधूं शोधूं ॥ १० ॥ वेगें जाळीत उरीं शिरीं । भडका उठला हृदयावरी । खांडमिशा तोंडावरी । वस्त्रामाझारीं घुसती ॥ ११ ॥ श्रीरामविमुख विषयेंकरोनी । त्यांची होतसे भंगाणी । सोंवळ्या धोत्रां दाणादाणी । उघडीं पाडोनि जाळिती ॥ १२ ॥ देखोनि तयांचें कौतुक । भक्त हांसती अलोलिक । सात्त्विक उपहासिती देख । रघुकुळटिळक तटस्थ ॥ १३ ॥ विचित्र संकल्पाच्या फुलवाती । रम्यसुमनाकार भासती । निर्धार करितां निगुतीं । रक्षा निश्चितीं प्रत्यक्ष ॥ १४ ॥ रामभक्ताच्या निरीक्षणयुक्ती । लावोनि अनुसंधानाच्या वाती । श्रीरामदृष्टीं भस्म करिती । क्षणही निश्चितीं न लागतां ॥ १५ ॥ कामक्रोधांचे अति उद्धट । भुईनळे पैं घनदाट । माजी अभिनव काळकर्कोट । धूम निघत मदमत्सरांचा ॥ १६ ॥ व्यापीत चालिला गगन । आच्छादीत जननयन । अविवेकया पीडा गहन । खवट घाण घसां भरे ॥ १७ ॥ देखोनियां श्रीरामभक्त । खवळले अत्यद्भुत । अनुभवाचा हत्ती मस्त । स्वंदळिंत सोडिला ॥ १८ ॥ अहंममतेचा नाद क्रूर । त्यातें आच्छादोनि सत्वर । स्वानंदें गर्जोनियां थोर । केला चूर तयाचा ॥ १९ ॥ निजबोधचंद्रज्योति पूर्ण । तेणें उजळिलें त्रिभुवन । प्रकाश दाटला पूर्ण । मीतूंपण असेना ॥ २० ॥ ऐसा निजभक्ताचा अद्भुत । देखोनियां पुरुषार्थ । संतोषला श्रीरघुनाथ । आलिंगीत हृदयेंसीं ॥ २१ ॥ श्रीरामहृदया हृदय मीनलें । तेणें रामहृद्गत सगळें । निजहृदया तत्काळ आलें । सुख कोंदलें अगाध ॥ २२ ॥ निजराज्यें सुखैकघन । स्वयें होवोनि रघुनंदन । भीनले जे ऋषिजन । मांडिलें संभावन तयांचें ॥ २३ ॥

सहस्रशतमश्वानां धेनूनां च गवां शतम् ।
ददौ शतवृषान् पूर्वद्विजेभ्यो मनुजेश्वरः ॥ १ ॥
त्रिंशत्कोटीर्हिरण्यस्य ब्राह्मणेभ्यो ददौ पुनः ।
नानाभरणवस्त्राणि महार्हाणि च राघवः ॥ २ ॥

वसिष्ठादि प्रमुख । ऋषिमंडळी अलोलिक । श्रीरामासी अभिषेक । मंत्रोक्त देख जिहीं केला ॥ २४ ॥ वेदोक्त विधिपाळण । करोनि होम प्रधान । लोकपाळां संतोषवून । रघुनंदन अभिषेकिला ॥ २५ ॥ तयां ऋषीश्वरांची पूजा । करिता झाला रघुराजा । वसिष्ठ निजगुरु वोजा । प्रथम पूजा तयाची ॥ २६ ॥ कामधेनूचीं शतसहस्रें । सुवर्णशृंगी रौप्यखुरें । सवृषभ युग्में[11] परिकरें[12] । द्रव्यें अपारें कोटिसंख्या ॥ २७ ॥ धान्यकोठारें

१ यमादिक. २ भक्तसमुदाय. ३ दारूकाम. ४ तयार. ५ भुईनळा. ६ शिंपिली. ७ उडाला. ८ सुंदर पुष्पांच्या आकाराच्या. ९ नाश करीत. १० आवडीनें. ११ जोड्या. १२ सुंदर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

असंख्य पूर्ण । श्रीरामें सद्गुरु पूजिला जाण । तैसेचि ऋषी इतर जन । श्रीरामें आपण पूजिले ॥ २८ ॥ रोड दुर्बळ दीन याचक । श्रीरामदर्शनें सकळां सुख । सांगणें मागणें ठेलें निःशेखें । मनोवृत्ति देख नित्यतृप्त ॥ २९ ॥ देखतां श्रीराम-श्रीमुख । याचकांसी झालें परम सुख । तृप्तीचीं दोंदें पेलंलीं देख । हरिखें हरिख दाटला ॥ ३० ॥ श्रीराम दानें देतां प्रबळ । नगरीं मागत्यांचा दुकाळ । सकळां स्वसुखाचा कल्लोळ । निजानंद केवळ श्रीरामें ॥ ३१ ॥ निष्ठा देखोनि अद्भुत । कृपेनें बोळला श्रीरघुनाथ । न मागतांचि अंभर करीत । द्वारीं वोळंगत महासिद्धि ॥ ३२ ॥ वस्त्रें भूषणें सुमन चंदन । सुवासित माळा गहन । वसिष्ठा सद्गुरुसहित जाण । रामें ब्राह्मण सुखी केले ॥ ३३ ॥ ऐसें ब्राह्मणांचें पूजन । श्रीरामें केलें आपण । मंडळवर्ती राजे जाण । त्यांचेंही पूजन तैसेंचि ॥ ३४ ॥ वस्त्रें भूषणें टिळेमाळा । मंडळवर्ती भूपाळां । पूजिता झाला घनसांवळा । सन्मान सकळां देवोनी ॥ ३५ ॥ ब्रह्मा इंद्र ईशान । मरुद्गणेंसीं अमरेंद्र जाण । दानव मानव पन्नगँ पूर्ण । स्वयें रघुनंदन पूजीत ॥ ३६ ॥ सकळीं आणिलीं उर्पायनें । त्याहूनि अधिक कोटिगुणें । स्वयें देवूनि रघुनंदनें । सकळ सुरगण गौरविले ॥ ३७ ॥ त्याहूनि अनंत अधिक । श्रीरामें देवोनि निजसुख । सुखी केले सकळ लोक । द्वंद्व-दुःख जेथें न रिघत ॥ ३८ ॥ जेथें न रिघे मीतूंपण । पावों न शके देहाभिमान । दृश्य द्रष्टा आणि दर्शन । त्रिपुटीचें भान जेथ नाहीं ॥ ३९ ॥ देखतां श्रीरामसुख । एवढें पावले निजसुख । राम कृपाळु नेटक । आत्मत्वें देख निववले ॥ ४० ॥ निकटवर्ती निजगण । सुग्रीवादि बिभीषण । त्यांची पूजा रघुनंदन । स्वयें आपण करिता झाला ॥ ४१ ॥ पूजावया निजगण । स्वयें बोलावी रघुनंदन । तेणें काळें भरत जाण । स्वयें आपण पुढें झाला ॥ ४२ ॥ बिभीषण सुग्रीव हनुमंत । अंगदेंसीं अति विनवीत । भरतें विनविला रघुनाथ । धर्मयुक्त नीतिवचनें ॥ ४३ ॥ पितृआज्ञा निज नेमस्त । चौदा वर्षें वनवासव्रत । स्वामींनीं संपादिलें यथार्थ । बंधूसहित स्त्रियेंसीं ॥ ४४ ॥ तैसें निजराज्याचें शासन । तुझे आज्ञेकरोनि जाण । केलें राज्यपरिपालन । किंकर दीन मी तुझें ॥ ४५ ॥ पितृआज्ञानिजनेमांतीं । राज्याभिषेक जया रीतीं । तुम्हीं अंगीकारिला रघुपती । सौमित्र त्या स्थितीं अभिषेका ॥ ४६ ॥ सांडोनि आहार विहार । तुच्छ करोनियां शरीर । श्रीरामसेवे नित्य तत्पर । आठी प्रहर सावध ॥ ४७ ॥ श्रीराम-सेवेचें महिमान । ख्याति वर्णी त्रिभुवन । सौमित्रें जग पावन । सौमित्रें व्रत साच केलें ॥ ४८ ॥ देहावरी आल्या आघात[12] । श्रीरामभजनीं नव्हे च्युत[13] । ऐसें शास्त्र गर्जत । तें केलें यथार्थ सौमित्रें ॥ ४९ ॥ सांडोनि क्षुधेतृषेची आस । कळिकाळावरी घालोनि कांस । श्रीराम सेविला सावकाश । भाग्य असोसें[14] सौमित्राचें ॥ ५० ॥ यौवराज्याभिषिंचन । त्यासी करावें आपण । करोनि श्रमाचें परिहरण । सुखसंपन्न निजराज्यें ॥ ५१ ॥ जैसें भरताचें विनवण । तैसें सुग्रीव बिभीषण । अंगदासहित वानरगण । हनुमान आपण विनवीत ॥ ५२ ॥ जिंकोनियां निद्रातंद्रा । निःशेष त्यजोनियां आहारा । सौमित्रें सेविलें रामभद्रा । जन्मोद्धारालागोनी ॥ ५३ ॥ श्रीरामभजनाची पदवी । आचार्यत्व निजगौरवीं । दीक्षा दाखविली बरवी । ख्याति देवीं वानिजे ॥ ५४ ॥ त्या सौमित्राचे अभिषिंचना । यौवराज्य देवोनियां जाणा । संतोषवावें रघुनंदना । तूंचि निजजनां कृपाळु ॥ ५५ ॥ भरतआदि निजगण । ऐकोनि तयांचें वचन । संतोषला रघुनंदन । सौमित्र आपण बोलाविला ॥ ५६ ॥ कृपापूर्ण रामरावो । सौमित्र बोलावोनि पहाहो । सांगता झाला अन्वयो । श्लोकपर्यायो अवधारा ॥ ५७ ॥

नित्यानुरक्तं मेधावी लक्ष्मणं वाक्यमब्रवीत् ॥ ३ ॥

आतिष्ठ धर्मज्ञ मया सहेमां
गां पूर्वराजाध्युषितां बलेन ।
तुल्यं यथा त्वं पितृभिः पुरस्ता-
त्तैर्यौवराज्ये धुरमुद्वहस्व ॥ ४ ॥

सौमित्रा सुमित्रानंदना । निजमैत्रीच्या अधिष्ठाना । बंधुपणाची अवज्ञा । अणुमात्र जाण तुज

१ पूर्ण. २ भरून आलीं. ३ याचकांचा अभाव. ४ तृप्त. ५ देवांसह. ६ इंद्र. ७ सर्प. ८ नजराणे. ९ जवळचे. १० प्रतिपाळण. ११ दास. १२ दुःख. १३ भ्रष्ट. १४ मोठें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

नाहीं ॥५८॥ मी एक बंधु अंतरंग । ऐसा अणुमात्र नाहीं दावें । नीचसेवेसी सर्वांग । तुवां सांग वेंचिलें ॥ ५९ ॥ सांडोनि बंधुत्वअभिमान । नीच दासाचेपरी जाण । माझे सेवेसी वेंचिला प्राण । अंगीं बाण साहोनी ॥ ६० ॥ सांडोनि आहारविहार । श्रीरामभजनीं नित्य तत्पर । निद्रा नाहीं अहोरात्र । निरंतर सावध ॥ ६१ ॥ मस्तकीं काष्ठाचे संभारे । जीवनें वाहिलें निरंतर । बांधोनियां निजउदर । आम्हां फळाहार पुरविला ॥ ६२ ॥ त्रिकाळीं चरणक्षाळण । दोघांचें चरणसंवाहन[६] । उसंत नाहीं क्षण । तत्प्रवीण अहर्निशीं[३] ॥ ६३ ॥ एक एक दिवसींची सेवा । आठवितां बंधुदेवा । कांप येतसे जीवा । देहभावा उरी कैंची ॥ ६४ ॥ सीतेलागीं होवोनि भ्रांत । आप आपणा विसरत । तुज मारूं धांवें लात । ते तूं निवान्त साहिली ॥ ६५ ॥ मी भ्रांत तैं सावध करिसी । मज भागल्या श्रम हरिसी । मज शोकाकुलिताचा फेडिसी । सावकाशीं सकळ श्रम ॥ ६६ ॥ तो आठवितां पाहें । हृदय फुटोनि ठिकरिया होये । बहुत बोलावें म्यां काये । शिवतले पाहें चरण तुझे ॥ ६७ ॥ तुझिया भजनाचें अंकिलें । जीवें सर्वस्व विकिलें । यावरी तें काय बोलें । मौन पडिलें चहूं वाचां ॥ ६८ ॥ निजपित्याचें राज्य आहे । तें दोघे चालवूं समन्वयें । पितृआज्ञा ऐसीच आहे । तें तूं स्वयें अंगीकारीं ॥ ६९ ॥ चौदा वर्षें नेमस्त । पितृआज्ञा राज्यीं भरत । तैसेंचि आम्हां नेमस्त । वनवासव्रत तितुकेंचि ॥ ७० ॥ पाळोनि पितृआज्ञेसी । आम्ही आलों निजराज्यासी । वसिष्ठें अभिषेकिलें आम्हांसी । तूं यौवराज्यासी अंगीकारीं ॥ ७१ ॥ म्हणोनि निजकृपापूर्वक । आज्ञापितां रघुकुळटिळक । येरू झाला पैं साशंक । विघ्न अलोलिक मज आलें ॥ ७२ ॥ यौवराज्याभिषिंचन । करावया रघुनंदन । स्वयें करी आज्ञापन । येरू उद्विग्न स्वयें झाला ॥ ७३ ॥ सौमित्र मर्यादेसी मंडन । स्वामीसी न देववे प्रतिवचन । अति संकोचित झालें मन । घाली लोटांगण हरिचरणीं ॥ ७४ ॥ अश्रु पूर्ण आले नयनीं । कंठ दाटला बाष्पेंकरोनी । भ्रमित झाला हृदयभुवनीं । गिरा वचनीं पांगुळली ॥ ७५ ॥ प्रेमें उकसाबुकसीं रडे । स्फुंदस्फुंदोनि पायां पडे । विघ्न आलें मज रोकडें । कोणीकडे जाऊं आतां ॥ ७६ ॥ कां क्षोभला रघुनंदन । कांहीं अपराध घडला पूर्ण । त्याचें हेंचि दिसे चिन्ह । राज्याभिषिंचन सौमित्रा ॥ ७७ ॥ श्रीरामासी सकळ सुमित्र । तेणें तो सकळांचा कुमित्र । मजसीं मांडिला वैराकार । राज्यभार देऊं पाहती ॥ ७८ ॥ श्रीरामराज्यें सकळां सुख । तेंचि मज ओढवलें दुःख । पूर्ण क्षोभला रघुकुळटिळक । गिळिलों अशेखें महापापें ॥ ७९ ॥ वनवासीं एकाएकी असतां । अपराध घडला न कळतां । तेणें क्षोभ आला रघुनाथा । राज्याभिषेक मज करी ॥ ८० ॥ राज्यामाजी परम सुख । ऐसा जनवाद[११] असे देख । पुण्यफळ अलोलिक । ऐसें लोक बोलती ॥ ८१ ॥ पुण्य नव्हे पातक । माझी प्रतीति[१२] निर्धकें[१३] । ऐक तयाचा विवेक । मतिविशेष सांगेन ॥ ८२ ॥ राज्यमद चढल्या देहीं । राम सर्वथा नाठवे पाहीं । सर्वेंद्रियें अंध पाहीं । कार्यकारण कांहीं स्फुरेना ॥८३॥ अंतरीं संचरल्या भोगकाम[१४] । कोणाची सेवा कैंचा राम । सर्वथा नाठवे धर्माधर्म । पडे भ्रमें अति अंध ॥ ८४ ॥ सर्प लागलिया जाणा । बुद्धि पालटे तत्क्षणां । कटुमधुराचिया ज्ञाना । विवंचना[१५] कळेना ॥ ८५ ॥ अत्यंत कटु निंब कैसा । गोड म्हणोनि खाये घसघसां । गूळ टाकी निंब जैसा । भ्रम मानसा दृढत्वें ॥ ८६ ॥ भ्रम चढत अंतःकरणीं । तेचि इंद्रियां विपरीत करणी । विषयसेवन अनुदिनीं । आणिक मनीं नाठवे ॥ ८७ ॥ विषय म्हणों विषासमान । यांसंगें अधःपतन[१६] । ऐका तयाचें लक्षण । निजचिन्ह नित्यत्वें ॥ ८८ ॥

विषं समानं विषयो यकाराद्विषयोऽधिकः ।
विषमेकाकिनं हंति विषयाश्च पुनः पुनः ॥ ५ ॥

विषय म्हणों विषासमान । तरी विषाहूनि विषय गहन । विषभक्षणें एकदां मरण । पुनःपुन्हां पतन विषयार्थी ॥ ८९ ॥ स्वभावें विषय दृष्टी पडतां । तत्काळ मोह उपजे चित्ता । ऐका त्यान्तीही

१ अहंकार. २ खर्चिलें. ३ रात्रंदिवस. ४ मोळ्या. ५ पाणी. ६ पाय चेपणें. ७ विश्रांति. ८ एकमेकांच्या विचारानें. ९ मुखानें बोलवेना. १० संपूर्ण. ११ लोकांचें म्हणणें. १२ अनुभव. १३ खरोखर. १४ विषयेच्छा. १५ विचार. १६ नरकवास.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

व्यवस्था । घातकता वृत्तीची ॥ ९० ॥ लसुणाचे संगतीं जाण । कस्तूरीचें आच्छादे सुवासपण । दुर्गंधीचें बळ दारुण । सुवास जाण गिळोनि जाय ॥ ९१ ॥ राज्यभोगविषयो पूर्ण । अखंड भोगाचें अधिष्ठान[1] । स्रक्चंदनादि[2] गहन । भोग दाटून पुढें येती ॥ ९२ ॥ भोग आदळल्या अंगेंसीं । दाटोनि प्रवेशती मानसीं । क्षणें भुलविती प्राण्यासी । सावधानतेसी ठाव कैंचा ॥ ९३ ॥ अणुमात्र विषयस्थिती । हिताहित[3] कोण चिंती । विषय तो परमघाती । नरकप्राप्ती आकल्प ॥ ९४ ॥ तेथें कैंचा रघुनंदन । कोण स्मरे श्रीरामभजन । कैंचा परमार्थ कैंचें ज्ञान । भ्रमित मन होवोनि ठाके ॥ ९५ ॥ कैंचा जप कैंचें ध्यान । कैंचा यज्ञ कैंचें ज्ञान । कोण स्मरे रघुनंदन । विषयबंधन अनिवार ॥ ९६ ॥ विसरोनियां रघुनाथा । नरकीं बुडिजे तत्त्वतां । एवढी अंगीं वाजे अवस्था । अति बाधकता विषयांची ॥ ९७ ॥ वनवासीं असतां पूर्ण । अखंडता[4] रामानुसंधान । वना जाय फळांलागून । तेथेंही ध्यान खंडेना ॥ ९८ ॥ आसनीं भोजनीं शयनीं । स्नानीं दानीं गमनागमनीं । जागृतिसुषुप्तिस्वप्नीं । अखंड चिंतनीं श्रीराम ॥ ९९ ॥ श्रवणीं राम नयनीं राम । वाचेसी वदनीं नित्य राम । अखंड हृदयीं चिंतनीं राम । ध्यानीं राम सर्वदा ॥ १०० ॥ करीं चरणसंवाहन । चरणीं नित्य प्रदक्षिण । आलोडोनियां[5] सकळ वन । फळभोजना फळें आणीं ॥ १ ॥ रात्रीं होवोनि जागरी । फेरे घालीं निरंतरीं । ऐसी श्रीरामसेवा अहोरात्रीं । सर्वोपरी करीतसें ॥ २ ॥ चरणक्षाळणा आणीं जीवन[6] । त्रिकाळ करीं पादक्षाळण । त्रिकाळ करीं नीराजन । मुखावलोकन त्रिकाळ ॥ ३ ॥ श्रीरामहोमालागून । नित्य माथां वाहें इंधन[7] । तेणें मी सुखैकघन । आनंदमग्न सर्वदा ॥ ४ ॥ श्रीरामसेवा करितां पूर्ण । जिंतोनियां मानाभिमान । छेदिलें मी देहबंधन । स्वरूप चिद्घन पावावया ॥ ५ ॥ तेथें अंगीकारितां राज्यासी । अत्यंत होईन विषयविलासी । राम नाठवे मानसीं । अधःपातासी जाईन तेणें ॥ ६ ॥ म्हणाल राज्यीं श्रीरघुनाथ । असतां होई ना विषयासक्त । तरी विषयबाधा अद्भुत । तुजही निश्चित न होईल ॥ ७ ॥ राम निर्विषय तुज कां विषय । ऐसा सुचला जरी अन्वय । तेही विषयींचा अभिप्राय । सावधान परिसावा ॥ ८ ॥ राम अवतारा अवतारी । राम व्यापक चराचरीं । रामीं मिथ्या नरनारी । विषयउरी तेथें कैंची ॥ ९ ॥ पूर्णब्रह्म रघुनंदन । तेथें मिथ्या राज्यभान । राम नित्य सावधान । ऐका चिन्ह सांगेन ॥ ११० ॥ विश्वामित्रयागाप्रती । अनिद्र राहोनि सात रातीं । राक्षसांची जाति व्यक्ती । केली शांत श्रीरामें ॥ ११ ॥ सुबाहु वधिला बाणधारा । मारीच उडविला अंबरा । साह्य व्हावया दशवक्त्रा । ठेविला पुरा तद्वध ॥ १२ ॥ देखतां ऋषिवरांचा पाळा । चरणीं उद्धरली शिळा । पर्णावया जनकबाळा । यागा आला जनकाच्या ॥ १३ ॥ धनुष्या चढवितां गुण । धुळीं मेळविला रावण । तें भंगिलें न लागतां क्षण । जनकनंदिनी पर्णिली[10] ॥ १४ ॥ वडवानळ क्षात्रकुळासी । एकवीस वेळां धरित्रीसी । केलें निःक्षत्री वेगेंसीं । त्या भार्गवासी[11] गांजिलें ॥ १५ ॥ सांडोनियां क्षात्रदर्प । वना धाडियेलें तपा । त्या श्रीरामप्रतापा । वाग्जल्पा केंवी वर्णवे ॥ १६ ॥ त्यागोनियां निजराज्यासी । झाला वनस्थ वनवासी । विषयलोभ श्रीरामासी । नाहीं मानसीं सर्वथा ॥ १७ ॥ स्वयें वर्जितां दशरथ । न सांडी वनवासव्रत । येवोनियां भरत । अति निर्घात[12] मांडिला ॥ १८ ॥ त्याचा न करोनि अंगीकार । बोळविला भरत वीर । होवोनियां वनवासी वनचर । ख्यातिचरित्रें पैं केलीं ॥ १९ ॥ म्हणाल असेल प्रतिष्ठाकाम । अथवा विषयी असेल राम । सुखें वनीं विषयाराम । होत असे परम सीतेसीं ॥ १२० ॥ दशग्रीवें नेतां सीता । स्वयें दाविली तेचि अवस्था । झाडा खोडा खेंवें[13] देतां । होय गर्जता सीते सीते ॥ २१ ॥ आम्ही म्हणों विषयी राम । सीतेसाठीं चढला भ्रम । तंव तो सर्वथा निष्काम । परब्रह्म श्रीराम ॥ २२ ॥ भ्रांत देखोनि रघुनाथा । छळूं आली शिवकांता । अति सुंदर होवोनि सीता ।

१ स्थान. २ पुष्पमाला, चंदन वगैरे. ३ बरेंवाईट. ४ सतत. ५ फिरून. ६ पाणी. ७ लांकडें. ८ नाहींशी. ९ समुदाय. १० वरिली. ११ परशुरामाला. १२ अति आकांत. १३ आलिंगन.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

श्रीरघुनाथापुढें ठेली ॥ २३ ॥ राम बोभाये सीता सीता । उमा ओ दे रघुनाथा । तीतें सांडोनि तत्त्वतां । होय आळविता आनौतें ॥ २४ ॥ राम धांवे आणिकीकडे । उमा राहे येवोनि पुढें । रामें ओळखिली निवाडें । आम्ही पुढें जाणों ना ॥ २५ ॥ मी सांगें पुढें सीता । राम न मानी सर्वथा । करूं धांवे माझ्या घाता । कैंची सीता म्हणोनी ॥ २६ ॥ टक देवांदानवांसी । टक पडली सुर-सिद्धांसी । पुढें देखतां सीतेसी । राम तिसी नोळखे ॥ २७ ॥ हातीं धरितां श्रीरामासी । राम निर्खंदी तियेसी । आई कां वो झोंबसी । शंकरासी त्यजूनियां ॥ २८ ॥ स्वामी सांडोनि कैलासीं । परपुरुषा कां हो छळिसी । तुझ्या लागतों चर-णांसी । सोडीं आम्हांसी जननीये ॥ २९ ॥ नाहीं कामाचा अंकुर । क्रोध नाहीं अणुमात्र । नित्य सावध श्रीरामचंद्र । उमा सत्वर नमियेली ॥ १३० ॥ तेणें खोंचली जिव्हारीं । उमा श्रीराम-चरण धरी । म्हणे वृथा भ्रमसी कामाचारी । कोणे परी श्रीरामा ॥ ३१ ॥ राम म्हणे शिवापासीं । पुसों जायें वो वेगेंसीं । स्वमुखें पैं निजकीर्तीसी । कोणासीही नये सांगूं ॥ ३२ ॥ सांडोनियां कपट-च्छळण । उमा झाली अनन्य शरण । तिसी देवोनि समाधान । केली बोळवण कैलासा ॥ ३३ ॥ ऐसा श्रीराम निष्काम । तेथें कैंचा रिघे काम । ऐकतां श्रीरामाचें नाम । होय भस्म कामाचें ॥ ३४ ॥ श्रीरामाची सावधानता । श्रीरामचि जाणे तत्त्वतां । तें न ये आणिकाचे हाता । अवतारसामर्थ्यता रामाची ॥ ३५ ॥ श्रीरामें अवतारा अवतार-सत्ता । श्रीराम प्रकृतिपुरुषांचा कर्ता । त्या श्रीरा-माची सामर्थ्यता । न ये हाता आणिकांच्या ॥ ३६ ॥ असो श्रीरामाची कथा । अनुसरोनि भरतव्रता । अंगीकारोनि युवराजता । आज्ञा रघुनाथाची पाळावी ॥ ३७ ॥ तेही विषयींचा वृत्तान्त । सावध ऐका सुनिश्चित । संपादावया वनवासव्रत । केलें अद्भुत श्रीरामें ॥ ३८ ॥ वधोनियां लंकानाथ । संस्थापिला शरणागत । बंदी सोडवोनि देव समस्त । स्थापिले निश्चित स्वपदीं ॥ ३९ ॥ मुक्त करोनि जनस्थान । ब्राह्मणांसी द्यावें दान । म्हणो-नियां रघुनंदन । भरत आपण अनुग्रहिला ॥ १४० ॥ राज्यीं असोनि निर्लोभता । देहीं असोनि विदेहता । भोगीं असोनि अभोक्ता । श्रीरघुनाथा-चेनि धर्में ॥ ४१ ॥ मिषें करोनि पादुकांचें । अंतरीं प्रवेशला त्याचे । तेणें सामर्थ्य भरताचें । वंदी साचें त्रैलोक्य ॥ ४२ ॥ श्रीराम आणि रावण । अलौकिक युद्धत्राण । आणिका गोष्टी न करवे जाण । थरकांप पूर्ण चित्तासी ॥ ४३ ॥ तैसा राम देव भरत भक्त । हें त्याचें त्यासीच साजे व्रत । येर शब्दावरी श्लाघत । परी शब्दार्थ लाभेना ॥ ४४ ॥ म्हणोनि देवपण रघुनाथीं । भक्तपण साजे भरतीं । येरां न साधेचि युक्ती । विषय-गतीं आदळिजे ॥ ४५ ॥ स्मरतां श्रीरामनाम । सर्व विषय होती भस्म । तेथें करितां भजनधर्म । विषय दुर्गम कोणासी ॥ ४६ ॥ ऐसा आहे निश्चिं-तार्थ । श्रुतिशास्त्रें साक्षी वेदान्त । तरी राज्या शिवेना माझें चित्त । आण निश्चित श्रीरामाची ॥ ४७ ॥ स्वामी वसिष्ठा सत्य जाण । शिवतले जी तुझे चरण । राज्या न शिवें आपण । श्रीराम-चरण सांडूनि ॥ ४८ ॥ मनसा वाचा कर्मणा । राज्यलोभ नाहीं जाणा । संदेह न व्हावा आपणा । सत्य प्रमाण हें माझें ॥ ४९ ॥ राज्यीं असोनि भरत । तपें कष्टला अद्भुत । सकळ भोगेंविरक्त । होवोनि रघुनाथ सेविला ॥ १५० ॥ त्यासी करोनि अभिषिंचन । भरत सुखावीं पूर्ण । तेणें मज सुख गहन । भरता अभिषिंचन देखिलिया ॥ ५१ ॥ आणि राज्यभारहस्तक्रिया । मज नाहीं जी गुरुवर्या । भरत युक्ति राज्याचिया । निःसंदेह जाणत ॥ ५२ ॥ चौदा वर्षें अलिप्तपणें । श्रीरामाहूनि अधिक गुणें । राज्यपाळण भरतें येणें । सुखसंपन्नें नांदती प्रजा ॥ ५३ ॥ श्रीरामें सुख सकळांसी । त्याहूनि भरता विशेषीं । वर्णितां श्रीरामगुणांसी । सुखैकराशी समस्तां ॥ ५४ ॥ देशोदेशींचे भूपती । भरतमुखें श्रीरामकीर्ती । ऐकावया अति प्रीतीं । भरता येती लोटांगणीं ॥ ५५ ॥ असो भूपाळांचें वृत्त । महाऋषि जे विख्यात । सदा ब्रह्मानंदें तृप्त । तेही येत भरतापाशीं ॥ ५६ ॥ सांडोनियां निजाश्रम । श्रीरामकीर्तीसी सप्रेम । येवोनियां

१ हांका मारी. २ अन्यत्र, दुसऱ्याला. ३ भ्रांति. ४ तिरस्कार करी. ५ मर्मावर. ६ बंदींत असलेले. ७ निमित्त. ८ युद्धसामर्थ्य. ९ निश्चित गोष्ट. १० भोगांपासून निराळा. ११ राज्य चालविण्याची कला. १२ निरिच्छतेनें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

ऋषिसत्तम । आल्हादें परम श्रवण करिती ॥ ५७ ॥ श्रीरामकीर्तीचिया प्रीतीं । अयोध्येसी अद्भुत वस्ती । धन्य भरताची संगती । श्रीरामकीर्ती सुख सर्वां ॥ ५८ ॥ म्हणोनि भरतासी आपण । यौवराज्यीं अभिषेचून । सुखी करावे सकळ जन । कीर्ति पावन श्रीरामें ॥ ५९ ॥ म्हणोनि सौमित्रें आपण । घालोनि गुरूसी लोटांगण । धरिले श्रीरामाचे चरण । करावें अभिषिंचन भरतासी ॥ १६० ॥ गुरूचे शिवोनियां चरण । सौमित्रें वाहिली आण । देखोनि त्याचें निर्वाण । श्रीरघुनंदन तटस्थ ॥ ६१ ॥ सभा झाली तटस्थभूत । सुर सिद्ध अति विस्मित । ब्रह्मादिक चाकाटत[1] । लोकपाळ तेथ वेडावले ॥ ६२ ॥ देखोनियां सौमित्राची विरक्ती । सुमनें[2] वर्षल्या सुरपंक्ती । जय जय गर्जे त्रिजगती । सभाग्य निश्चितीं सौमित्र ॥ ६३ ॥ सर्वस्व त्यजोनि वहिला । श्रीरामसेवे वना गेला । सर्वभावें राम सेविला । त्यजूनि दादुलां[3] आहारातें ॥ ६४ ॥ परतोनि आलिया राज्यासी । राज्यलोभ नाहीं मानसीं । सौमित्राच्या भाग्यासी । सीमा वेदांसी न करवे ॥ ६५ ॥ सौमित्र न घे अभिषेकासी । यौवराज्याची स्थिती कैसी । अभिषेक करावा कोणासी । श्रीवसिष्ठासी राम पुसे ॥ ६६ ॥ सौमित्राची निर्विषयता । येणें संतोष वसिष्ठचित्ता । सौमित्र आलिंगूनि तत्त्वतां । होय बोलता रामासी ॥ ६७ ॥ तूं अंतर्यामी रघुवीर । जाणसी सकळांचें अंतर । आम्हांसी पुसणें विचार । हा वृद्धाचार राखिसी ॥ ६८ ॥ तुझें नाम अंतर्यामी । अंतर जाणता तूं स्वामी । काय विचार सांगणें आम्हीं । तुमचें तुम्ही विचारा ॥ ६९ ॥ ज्याची जैसी अंतर्वृत्ती । जो भजे जैसिया रीतीं । त्याचिया मनोरथाप्रती । निजविश्रांती तूं दाता ॥ १७० ॥ सांडोनि तुझें चरणसेवन । सौमित्रासी राज्याभिषिंचन । सर्वथा नाहीं नाहीं जाण । वाहून आण सांगतसें ॥ ७१ ॥ ज्यासी तुझ्या चरणीं प्रीती । त्यासी बळेंचि रघुपती । राज्य देणें न घडे निश्चितीं । नये वृत्तीसी खेद करूं ॥ ७२ ॥ आणि राज्यनीतिविचार । ज्यासी जेथें नाहीं आदर । त्यावरी करितां बलात्कार । विकळ समग्र होऊं पाहे ॥ ७३ ॥ सौमित्र राज्यीं उदासीन । तो कैंवी करी राज्यशासन[4] । तूं श्रीराम सर्वज्ञ । योग्यायोग्य पूर्ण जाणसी ॥ ७४ ॥ भरत सर्वार्थीं सावधान । ज्ञानें विरक्ती श्रीरामभजन । सकळार्थीं कुशल पूर्ण । करीं अभिषिंचन भरतासी ॥ ७५ ॥ ऐकोनि श्रीवसिष्ठवचन । श्रीराम झाला सुखैकघन । स्वयें उठोनि आपण । सौमित्र धरोनि आलिंगिला ॥ ७६ ॥ श्रीरामहृदया हृदय मीनलें । दुणें वैराग्यपुट[5] झालें । सबाह्य स्वरूप कोंदलें । अहाळबहाळ[6] रामाचें ॥ ७७ ॥ चरणांवरी ठेवोनि माथा । सौमित्र विनवी रघुनाथा । मनोरथ पूर्ण करिता । कृपावंता श्रीरामा ॥ ७८ ॥ तूं अनाथाची माउली । आर्तश्रांतांची[7] साउली । निजजनां कल्पवल्ली । श्रुतीची बोली ऐकिजे ॥ ७९ ॥ तें आजि आलें फळा । प्रसन्न झालासी घननीळा । सोडविलें सकळां । घोर दुःखापासूनी ॥ १८० ॥ आजि भाग्य आलें फळासी । चुकोनियां राज्यभ्रमासी । अधिकार लाधलों सेवेसी । निजहरिखेंसीं नाचत ॥ ८१ ॥ यौवराज्याभिषिंचन । भरता करील रघुनंदन । शत्रुघ्ना सेनानीपण[10] । सकळ जन सुखमय ॥ ८२ ॥ ते अतिकथा गहन । श्रोतीं द्यावें अवधान । एका जनार्दना शरण । रामायण अति रम्य ॥ १८३ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां सौमित्रविरक्तिकथनं नाम पंचाशीतितमोऽध्यायः ॥ ८५ ॥ ओंव्या ॥ १८३ ॥ श्लोक ॥ ५ ॥

अध्याय शायशींवा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ रामें प्रार्थितां बहुत रीतीं । राज्य न घेचि ऊर्मिलापती । तेणें तटस्थ सुरपंक्ती[11] । वानर चित्तीं विस्मित ॥ १ ॥

सर्वात्मना पर्यनुनीयमानो
यदा न सौमित्रिरुपैति योगम् ।
नियुज्यमानो भुवि यौवराज्ये
ततोऽभ्यषिंचद्भरतं महात्मा ॥ १ ॥

भरत शत्रुघ्न बिभीषण । सुग्रीवादि वानरगण । इंद्रब्रह्मादि सुरगण । प्रार्थितां लक्ष्मण राज्य न

१ चकित झाले. २ पुष्पें. ३ समर्थ. ४ राज्याचें प्रतिपालन. ५ वैराग्याचें कवच. ६ अघळपघळ. ७ पीडितांची. ८ दमलेल्यांची. ९ वेदाची. १० सेनापतीचा अधिकार. ११ देवसमुदाय.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

घे ॥ २ ॥ वसिष्ठादि रघुपती । तिहीं प्रार्थिला बहुत रीतीं । राज्य न घे ऊर्मिलापती । विस्मित चित्तीं सुरसिद्ध ॥ ३ ॥ तेणें काळें भरतासी । सकळीं प्रार्थिलें प्रीतीसीं । सौमित्र न घे यौवराज्यासी । तूं विनंतीसी अंगीकारीं ॥ ४ ॥ ऐकोनि सकळांचें वचन । भरत विवंची आपण । अति कुशल सुमित्रानंदन । राज्यग्रहण न करीचि ॥ ५ ॥ राज्यीं असतां निमेषगती । अंध होवोनि ठाके वृत्ती । कैंचा राम कोण भक्ती । उन्मत्त स्थिती राज्यमद ॥ ६ ॥ याचि कारणें लक्ष्मण । स्वयें न घे अभिषिंचन । वाप सौमित्राचें ज्ञान । अनवच्छिन्न निर्लोभ ॥ ७ ॥ ऐसें विचारोनि मनांत । भरत राहिला तटस्थ । युक्ति खुंटल्या समस्त । निश्चितार्थ योजेना ॥ ८ ॥ कांहीं न देववे प्रत्युत्तर । निवान्त राहिला भरतवीर । तेणें काळें रघुवीर । पाहे सत्वर सद्गुरूकडे ॥ ९ ॥ जाणोनि श्रीरामाचें मनोज्ञ । सद्गुरु बोलती आपण । भरता ऐकें सावधान । राज्यशासनकर्तव्यता ॥ १० ॥ जेणें कारणें तटस्थ । तूं राहिलासी निवान्त । तें सकळ मनोगत । आम्हां साद्यंत कळों आलें ॥ ११ ॥ अंगीकारितां राज्यस्थिती । अंध होवोनि ठाके वृत्ती । सर्वथा नाठवे रघुपती । निमग्न वृत्ती मोहपंकीं ॥ १२ ॥ तेचिविशीं श्रीरामकृपा । सावध ऐकें भरत बापा । श्रीरामनामेंचि पहा पां । भस्म पापाचें होय ॥ १३ ॥ मोह निजपापाचें फळ । सेवितां रघुकुळपाळ । कैंवी राहती पापमळ । नामेंचि केवळ भस्म होती ॥ १४ ॥ ज्याचेनि नामें पाप पळे । त्याचेनि भजनें वृत्ति मळे । ऐसें न मानावें राउळें । निजभजनबळें उद्धरी ॥ १५ ॥ निजभजनाचिया प्रीतीं । भक्त उद्धरी रघुपती । तेच श्रीरामाची वचनोक्ती । सावधचित्तीं परियेसीं ॥ १६

सर्वकर्माण्यपि सदा कुर्वाणो मद्व्यपाश्रयः ।
मत्प्रसादादवाप्नोति शाश्वतं पदमव्ययम् ॥ २ ॥

श्रीरामाचें वचन । भक्ताप्रति सनातन । भरता ऐकें सावधान । अति गहन निजनिष्ठा ॥ १७ ॥ माझ्या ठायीं ठेऊनि मन । सर्वकर्मीं वर्ततां जाण । माझें स्वरूप सनातन । न लागतां क्षण तेथें पावे ॥ १८ ॥ स्वधर्माच्या चोखोळीं । सर्वात्मक मूर्ति भली । निजप्रीतीच्या कल्लोळीं । सर्व काळीं पूजीत ॥ १९ ॥ जेवढी माझी व्याप्ती । तेवढी करोनि चित्तवृत्ती । नित्य नवी चढती प्रीती । मातें भजती मी होउनी ॥ २० ॥ माझा आश्रयो मी होऊन । ऐक तयाचें लक्षण । सांडोनियां आपुलेपण । आश्रय लवण जळीं जेंवी ॥ २१ ॥ कां सर्वत्र प्रभंजन । गगनीं विचरे आपण । भागोनि जेथें होय लीन । गगनीं गगन होवोनियां ॥ २२ ॥ तैसा कायें मनें वाचा । माझ्या निजात्मस्वरूपाचा । निश्चयो करोनि साचा । मद्भजनाचा आदर ॥ २३ ॥ तो मज आंतबाहेरी । मी तया सबाह्याभ्यंतरीं । त्यासीही गत्यंतराची परी । बोलतां निर्धारीं जीभ तुटे ॥ २४ ॥ त्यासी बाध्यबाधकसंबंध । कैंचा विधि कैंचा निषेध । सबाह्य सच्चिदानंद । स्वरूप शुद्ध स्वयें होती ॥ २५ ॥ ऐसे मी होवोनि मातें भजती । ते देहांतीं मातें पावती । इतुका विलंब कोणाप्रती । मुळींच असती मद्रूप ॥ २६ ॥ तो आमुचें देवतार्चन । आम्ही त्याचें करूं पूजन । तो आमुचें ध्येय पूर्ण । करूं ध्यान आम्ही त्याचें ॥ २७ ॥ ऐसा निजभक्तां रघुनाथ । सर्व कर्मीं संरक्षीत । तुज भय काय येथ । आज्ञा निश्चित अंगीकारीं ॥ २८ ॥ ऐसें श्रीरामाचें मनोज्ञ । सद्गुरुमुखें निरूपण । भरत जाणोनि संपूर्ण । मस्तकीं वचनार्थ वंदिला ॥ २९ ॥ जैसा श्रीरामा अभिषेक । त्याहूनि भरता केला विशेख । अभिषेकितां रघुकुळटिळक । अलोलिक निजसोहळा ॥ ३० ॥ सुमनें चंदनें गंधार्चनें । टिळेमाळा विचित्राभरणें । चिदंबराचीं प्रावरणें । अलंकार चिद्रत्नें जडित ॥ ३१ ॥ भावार्थाचें सिंहासन । चैतन्य मृदोलियां सुलक्षण । आनंदाचें वोठांगणें । भरता रघुनंदन अर्पीतसे ॥ ३२ ॥ सिंहासनीं अति सत्वर । भरता बैसवी श्रीरामचंद्र । तन्मयाचें धरी छत्र । व्यजनें चामर बोधाचें ॥ ३३ ॥ चिद्रत्नांची नित्य दीप्ती । भरता उदयप्रकाशस्थिती । स्वयें अर्पिली रघुपतीं । अगाध स्थिती भाग्याची ॥ ३४ ॥ सच्चिदानंद पदें तिन्ही । भरतीं सांडिलीं निंबलोणीं ।

१ क्षणभर. २ अमर्याद. ३ अभिप्राय. ४ समर्थानें. ५ शुद्धीनें. ६ मीठ. ७ पाण्याला. ८ वायु. ९ गिरद्या. १० टेंकण, तक्या. ११ आत्मस्वरूपमय. १२ पंखा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

तेहीविषींची विनवणी । सावधानीं अवधारा ॥ ३५ ॥ असताचें निराकरणें । निजवस्तूसी सत् म्हणणें । जडाच्या विंवचनें । चिद् म्हणणें वस्तूतें ॥ ३६ ॥ सुखाची करितां व्यांवृत्ती । आनंदमय वस्तूसी म्हणती । एवं त्रिपदाची स्थिती । अपवादभ्रांती वस्तूची ॥ ३७ ॥ त्रिगुण त्रिमात्रातीत पर । त्रिपदें निरसोनि साचार । अभिषेकिला भरतवीर । कृपा अपार भक्ताची ॥ ३८ ॥ ऐसें अभिषेकितां भरता । कार्यकारणकर्तव्यता । जितुकी श्रीरामाची सत्ता । आली हाता भरताच्या ॥ ३९ ॥ न सांगतां रघुनंदन । राज्यभारकार्यकारण । भरत संपादी संपूर्ण । नित्य सावधान श्रीरामीं ॥ ४० ॥ ऐसा श्रीरामें अभिषेकितां । मंत्रस्वरमंत्राक्षता । ऋषीं अभिषेकिलें भरता । विबुधीं तत्त्वतां सुमनाभिषेक ॥ ४१ ॥ त्राहाटिल्या सुरदुंदुभी । जयजयकार झाला नभीं । सिद्ध नाचती निजलाभीं । पद्मनाभीं निजराज्य ॥ ४२ ॥ श्रीराम देव भरत भक्त । दोनी अभिषेकांची मात । अति अद्भुत चरितार्थ । त्रैलोक्यांत उत्सावो ॥ ४३ ॥ जयजयकार सिद्धांचा । दुंदुभिनाद विबुधांचा । मंत्रोच्चार द्विजांचा । धन्य भाग्याचा वीर भरत ॥ ४४ ॥ भुभुःकार वानरांचा । नादस्वर गंधर्वांचा । नृत्यगजर अप्सरांचा । श्रीरामाच्या निजराज्यीं ॥ ४५ ॥ देवभक्तांच्या अभिषेकीं । सुर - सिद्ध - नागलोकीं । आनंदमय त्रिलोकीं । सत्यलोकीं आनंद ॥ ४६ ॥ रामनामाच्या निजगजरीं । नाद कोंदला अंबरीं । कैलासीं सत्यलोकवरी । वैकुंठावरी नाद भरला ॥ ४७ ॥ ब्रह्मांडीं नाद भरला पूर्ण । नादें भरलें आवरण । चालिलें स्वानंदजीवन । अभिषेक पूर्ण तेणें केला ॥ ४८ ॥ श्रीराम स्वानंदाची मूर्ती । स्वानंदाभिषेक रघुपती । स्वानंदमय त्रिजगती । श्रीरघुपतिनिजराज्यें ॥ ४९ ॥ दुरात्मा अहंरावण । बंदीं घातले सुरगण । तो एकेंचि बाणें निर्दाळून । सुरगण सोडविले ॥ ५० ॥ तेणें आनंदें पूर्ण भरित । विबुध आले धांवत । श्रीरामाभिषेका त्वरित । स्वस्थानीं रघुनाथ त्यांसी धाडी ॥ ५१ ॥ अहंरावणवंदींतून । रामें सोडविले सुरगण । स्वपदीं स्थापिले संपूर्ण । ऐका लक्षण तयाचें ॥ ५२ ॥ ब्रह्मा पूर्ण वेदपीठ । वेदीं स्वानंद यथेष्ट । रावणें हरोनियां स्पष्ट । शांतिपाठ नित्य पढवी ॥ ५३ ॥ स्वानंद हरितला रावणें । म्हणोनि लोलंगतें झालीं ब्राह्मणें । करिती नीचाचीं याजनें । पोट भरणें तरी नव्हे ॥ ५४ ॥ श्रेय देतां गायत्रीचें । तरी दुर्भर न भरे साचें । हेंचि रावणबंदींचें । लागलें पिसें द्विजांसी ॥ ५५ ॥ बुद्धीच्या ठायीं ब्रह्मयाची वस्ती । रावणें त्याची बोधशक्ती । हरूनि केली अंधवृत्ती । बुद्धि आत्महितीं नाठवे ॥ ५६ ॥ सांडोनि चिदानंदस्फूर्ती । ब्रह्मा उपाँर्जी लंकापती । स्वसुखत्यागें रावणाप्रती । नित्य पढती शांतिपाठ ॥ ५७ ॥ न मागतां देती आशीर्वचन । करिती नीचाचें सेवन । हाता यावया उपाध्येपण । द्वारीं संमार्जन यजमानाच्या ॥ ५८ ॥ तो निवटोनि दुर्बुद्धी । ब्रह्मा स्थापितां निजपदीं । नित्यानंदचिदानंदीं । नित्य समाधी पावला ॥ ५९ ॥ मनीं चंद्रम्याची वस्ती । नित्य असावें निर्विकल्पस्थितीं । तें हरितलें लंकापती । चंचळवृत्ती तळमळी ॥ ६० ॥ आपुलें निजानंद अमृत । चंद्र भोगूं न शके मनांत । तुषार सेवी लंकानाथ । फळलें व्रत क्षयरोगीं ॥ ६१ ॥ नित्यानंदपरिपूर्ण । पूर्णचंद्राचें लक्षण । तें हरितां दशानन । क्षयरोगें पूर्ण जन्ममृत्यु ॥ ६२ ॥ त्या निवटूनि लंकानाथा । चंद्र निजपदीं स्थापितां । मनीं वाणली उन्मनी अवस्था । नित्यमुक्तता श्रीरामें ॥ ६३ ॥ अहंकारीं रुद्राची वस्ती । शिव कल्याण ज्यातें म्हणती । वचनें जडजीवां मुक्ती । पुराणें गर्जती आनंदवनीं ॥ ६४ ॥ तें हरितां लंकापती । क्षणें झाली विपरीत वृत्ती । बुडाली निजानंदस्थिती । वाढली स्फूर्ति अहंदेहो ॥ ६५ ॥ निजात्मत्व विसरोनि कोडें । अहंदेहो हेंचि वाढे । विषयभोगीं हांव चढे । तंव तें उडे अहंभोगें ॥ ६६ ॥ कोटिवेळां विषयस्थिती । विविध भोग भोगिजती । कदा काळें नव्हे तृप्ती । न मनीं निश्चितीं हें मिथ्या ॥ ६७ ॥ मागे मृगजळ प्राशना । हांव बांधे गगनसुमना । स्वप्नींचे षड्रस जाणा । मागे भोजना कांसवघृत ॥ ६८ ॥ ऐसें केलें लंकापतीं । त्यासी

१ विवेचन. २ देवांनीं. ३ स्वप्रेमकरून. ४ देवांचा. ५ लोभी. ६ यज्ञ करवणें. ७ आराधना करूं लागला.

८ जागृति, स्वप्न, सुषुप्ति, तुरीया यांहून वेगळी, पांचवी अवस्था.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

निवटोनि श्रीरघुपतीं। स्वयें स्थापिला निजस्थिती झाली प्रतीती अहंआत्मा ॥ ६९ ॥ इंद्रयमादि कुबेर। रावणबंदीं समग्र। तळमळती निरंतर। दुष्ट दशवक्त्रनिजसेवा ॥७०॥ सकळ भोग सकळ समृद्धी। नित्य वोळंगती सकळ सिद्धी। अपार वैभव इंद्रपदीं। बोलतां शब्दीं अनिर्वाच्य ॥ ७१ ॥ कल्पतरु चिंतामणी। कामधेनूचीं दुभणीं। तें सकळही विसरोनी। करी याचणी यागाची ॥ ७२ ॥ रावणाचें पं[1]रिचारकपण। बंदीपणें वोळगे जाण। विश्रांति नाहीं अर्धक्षण। नित्य वणवण शमेना ॥ ७३ ॥ तो निवटोनियां लंकापती। रामें सोडविला अमरपती। स्वपदीं स्थपितां निश्चितीं। पावला विश्रांती निजानंदें ॥ ७४ ॥ वायु पीडिला रावणें। मंद सुशीतळ अनुदिनें। भोगीं श्रम निवारणें। पुंजे झाडणें विषयांचे ॥ ७५ ॥ गं[2]दळल्या बिदी राहतां। रावण दंडी सुबद्धता। तो रामें वधोनि तत्त्वतां। निजमुक्तता वायूसी ॥ ७६ ॥ सोडविला प्रभंजन। तेणें झाला सुखसंपन्न। सेवावया रघुनंदन। आला शरण वेगिया ॥ ७७ ॥ शिवादिक सिद्ध पाहीं। अखंड राम त्यांचे हृदयीं। वायु जडोनि तये ठायीं। श्रीरामपायीं विनटला ॥ ७८ ॥ स्वभावें प्राण अंगुळें बारा। निर्गमा[3]गमसंचारा। अखंड पिडे नासिकाद्वारा। तेणें रघुवीरा सेविलें ॥ ७९ ॥ जडोनि सिद्धांच्या हृदयीं। निर्गमागमसं[3]-संचार पाहीं। सांडोनियां लवलाहीं। श्रीरामपायीं सुस्थिर ॥ ८० ॥ कुबेर संपन्न निजधनें। त्यासी दंडोनियां रावणें। कां[4]मग विमान नेलें तेणें। राखिला प्राणें बंधुत्वें ॥ ८१ ॥ त्या निवटोनि रावणासी। विमान देवोनि दिव्य त्यासी। स्वपदीं स्थापिलें धनदा[5]सी। ख्याति ऐसी रामाची ॥ ८२ ॥ देवगुरु बृहस्पती। धरोनि आणिले लंकापतीं। उ[6]पन्यास नित्य करिती। युक्तिप्रयुं[7]क्तिपर्यायें ॥ ८३ ॥ न विचारितां काळाकाळ। युक्ति वाढवितां प्रबळ। रावण त्यासी दंडी सबळ। कां युक्तिजाळ बरळसी ॥ ८४ ॥ ब्रह्मांडीं श्रेष्ठ गुरूची युक्ती। ते न मानी लंकापती। विषयोन्मत्त झाली वृत्ती। अपमानिती गुरूसी ॥ ८५ ॥ तो निवटोनि अहंरावण। स्वपदीं देवगुरु[8] स्थापून। प्रकाशे देदीप्यमान। मान्य वचन त्रिलोकीं ॥ ८६ ॥ सकळ सिद्धींचा दाता। विघ्नहं[9]र रां[10]सभें राखतां। विषयाभिलाषाचिया लाता। बहु सोशितां शिणला ॥ ८७ ॥ गणेशाची आत्मसिद्धी। रावणें हरिली त्रिशुद्धी। म्हणोनि श्रीरामें कृपानिधी। निजानंदीं उद्धरिला ॥ ८८ ॥ आत्मसिद्धी हिरोनि पूर्ण। जीवें जीतां रावण। विषयरासभें राखवी पूर्ण। श्रम दारुण तेणें झाला ॥ ८९ ॥ जे जे काळीं इच्छा जैसी। ते ते पावतां वेगेंसीं। रावण त्यातें सुबुद्ध घुमसी। कासाविसी बहु तेणें ॥ ९० ॥ चिंतामणि मोरेश्वरा। तुज आणिलें लंकापुरा। माझ्या नगरींच्या समग्रां। अपेक्षित वरां सिद्धि देईं ॥ ९१ ॥ ऐसें अहंरावणवचन। ऐकतांचि संकोचमन। बहुत पीडिला गजानन। विषयाभिलाषण करोनियां ॥ ९२ ॥ बाईल दे गा मोरया। बैल शेतालागोनियां। जा[11]त्यश्व पैं बैसावया। लवलाह्या दे आम्हां ॥ ९३ ॥ आवारें[12]भरी असावे कण। कोट्यनुकोटी असंख्य धन। पुत्रपौत्रादि संतान। संतति गहन दे आम्हांसी ॥ ९४ ॥ ऐशा विषयलाता अद्भुत। तेणें पीडिला गणनाथ। तो निवटोनि लंकानाथ। शंकरसुत सोडविला ॥ ९५ ॥ देवोनियां निजात्मसिद्धी। स्वयें स्थापिला निजपदीं। तेणें प्रकाशली आत्मबुद्धी। निजानंदीं जग निववी ॥ ९६ ॥ काळ आतु[13]डला रावणासी। त्रिकाळ वोळं[14]गत समयासी। काळांतरींच्या कर्मासी। अकाळेंसीं करीतसे ॥ ९७ ॥ प्रत्यवा[15]याचें भय नाहीं। दोषा दंडितां यम पाहीं। तराळ झाली त्याच्या ठायीं। दंड तो कायी कोणासी ॥ ९८ ॥ काळाचा काळ तो रघुनाथ। काळें वधोनि लंकानाथ। काळ सोडविला त्वरित। सुखें वर्तत यथाकाळें ॥ ९९ ॥ यम नियंता सकळ जगा। कर्मभोगें दंडी पैं जगा। त्यासी रावण दंडी वेगा। वाहवी टोणगा जीवन ॥ १०० ॥ तुटतां विषयाचें जीवन। यमासी दंडी क्षणक्षण। तो निवटोनियां रावण। धर्मसंस्थापन निजपदीं ॥ १ ॥ रावणबंदीं अग्नि पूर्ण। स्वप्रकाशतेज आच्छादून। मळ धूतसे आपण। रजरागें पूर्ण कवळिजे ॥ २ ॥

१ चाकरी. २ केरानें भरलेल्या. ३ आंतबाहेर जाण्यायेण्याची क्रिया. ४ इच्छिल्या ठिकाणीं जाणारें. ५ कुबेराला. ६ प्रवचन. ७ युक्तायुक्त गोष्टी सांगून. ८ देवांचा गुरु बृहस्पती. ९ गणपति. १० गाढवें. ११ जातिवंत घोडा. १२ कोठारांत परिपूर्ण. १३ सांपडला. १४ चाकरी करीत. १५ अडथळ्याचें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

रावणवनिता कामें उन्मत्त। पक्षपक्षा रजा स्रवत। तितुकें अग्नि शुद्ध करीत। डाग फेडीत काटाचे ॥ ३ ॥ अल्प डाग राहतां। सोटे वाजती अग्नीचे माथां। त्या निवटोनि लंकानाथा। अग्नि तत्त्वतां सोडविला ॥ ४ ॥ देवोनियां निजतेजदीप्ती। अग्नि स्थापिला स्वपदाप्रती। बाप कृपाळु रघुपती। बंदिमुक्ती सुरवरां ॥ ५ ॥ रावणबंदीं असतां वरुण। सेवा करी अनुदिन। विषप्राय विषय पूर्ण। सुरस करोन त्यास पुरवी ॥ ६ ॥ वरुण रसांचा अधिष्ठाता। रावण उन्मत्त भोगीं असतां। जो जो रस आवडे चित्ता। तो न पावतां दंडिजे ॥ ७ ॥ त्यासी निवटोनि रघुनाथें। निजपदीं वरुणातें। तृप्ति करोनियां परमामृतें। निजनिश्चितें स्थापिलें ॥ ८ ॥ काम भुलवी चराचरां। तो आतुडला दशवक्त्रा। वेगें करोनि कामारा। निजसेजारा झाडवी ॥ ९ ॥ विविध भोग भोगिजेती। सर्वेचि क्षणें सरोनि जाती। कदाकाळें नव्हे तृप्ती। वणवण चित्तीं निजबंदीं ॥ ११० ॥ रामें निवटोनि रावण। कामा निष्कामीं स्थापन। स्वयें करोनि आपण। समाधान पावविला ॥ ११ ॥ वसंत रावणकारागृहीं। नित्य नूतन वन शृंगारी। पुष्पें फळें कामाचारीं। न पावतां भारी दंडिजे ॥ १२ ॥ त्याचें करोनि निःसंतान। निजानंदेंकरोनि पूर्ण। निजपदीं संस्थापून। केला सुखसंपन्न वसंत ॥ १३ ॥ तेणें हरिखें दोघेही जण। सेवावया रघुनंदन। काम वसंत आपण। अयोध्याभुवन वसविलें ॥ १४ ॥ श्रीरामभक्त नित्य निष्काम। त्यांसी अनुसरोनि काम। सेवावया रघूत्तम। भजनधर्म वाढवीत ॥ १५ ॥ विषयकर्दमीं शिणला। तृप्ति न पवेचि वहिला। श्रीरामभक्तांसी विनटला। सुख पावला श्रीरामें ॥ १६ ॥ श्रीराम नित्यानंदें निर्दोष। क्रियामात्र न रिघे देख। भक्त झाले तदात्मक। रघुकुळटिळकनिजभजनें ॥ १७ ॥ तेथें कामें नवलपरी। रिघोनि भक्तांचे अंतरीं। भजन करीत नानापरी। निजनिर्धारीं परियेसीं ॥ १८ ॥ अनावरा आवरीत। अमूर्ताची मूर्ति घडीत। अगोचरातें पाहात। संभावीत असंभाव्या ॥ १९ ॥ अचिंत्याचें नित्य चिंतन। अध्येयाचें नित्य ध्यान। अनाम्याचें नामकीर्तन। गुणवर्णन अगुणाचें ॥ १२० ॥ अनर्च्यातें नित्य अर्चीत। चिदंबरा पांघरवीत। सर्वालंकारा अलंकारीत। संभावीत असंभाव्या ॥ २१ ॥ चित्सच्चिदासी ओंवाळणी। सर्व मंगळा मंगळश्रेणी। विचित्र पूजांचिया भरणीं। प्रीति करोनि अर्पीतसे ॥ २२ ॥ संतोषावया श्रीराघव। ऐसा कामें योजिला भाव। तंव वर्तलें अपूर्व। निजलाघव रामाचें ॥ २३ ॥ सेवा करितां पैं हरिखें। म्हणे उत्तँराई कवतुकें। कांहीं झालों यथासुखें। तंव आपुलें देखे मूर्खत्व ॥ २४ ॥ जेथें मनाची नखी नलगे। चित्त चिंतितां दाटीं उबगे। बुद्धि बोधामागें रिघे। अहं उगें थोंटावे ॥ २५ ॥ रिघतां इंद्रियां सांकडें। तेथेंही म्यां निजानंदमूढें। अखंडाचीं करोनि खंडें। पूजाबंडें वाढविलीं ॥ २६ ॥ ऐसी निजकर्माची खंती। कामें मानोनियां चित्तीं। स्वयें पावोनियां उपरती। विरे रघुपतीमाझारीं ॥ २७ ॥ लंकाबंदींचा वसंत। रामें सोडविला त्वरित। सेवावया रघुनाथ। आला धांवत अयोध्येसी ॥ २८ ॥ श्रीरामाराम मूर्त। वसंत पावला तेथ। एके काळें सकळ ऋतु। आले त्वरित पूर्वींच ॥ २९ ॥ नीरसें वोळलीं रसभारें। उलोनि स्रवती रसधारे। सकळ सारांचें निजसार। गोडी अपार अनिर्वाच्य ॥ १३० ॥ केवळ शुष्क निरंकुरें। ते पाल्हेजती भजनांकुरें। लसलसीत प्रेमभरें। मनोहरें देखतां ॥ ३१ ॥ श्रीरामआवडीचें फळ। जन्मांतरीं नेणती अबळ। तींही फुलों आलीं सकळ। आमोद बहळ प्रेमाचा ॥ ३२ ॥ श्रीरामभजनाचें फळ। कल्पांतीं नेणती अबळ। श्रीरामागमनें पैं सकळ। अफळ ते सफळ होवोनि ठेले ॥ ३३ ॥ धर्म-अर्थ-कामसेवा प्रबळ। चौथें मोक्षफळ केवळ। तें निवटूनियां सकळ। आनंदफळ रामराज्यें ॥ ३४ ॥ बंधमोक्षातीत। श्रीरामफळ सेवितां भक्त। चहूं फळांसी विटावीत। वांकुल्या दावीत सुरसिद्धां ॥ ३५ ॥ ऐसें देखोनियां वसंता। लाज आली निजव्रता। तेथें मी काय सेवा करिता। जडला तत्त्वतां चरण-

१ दोषाचे. २ आश्रयस्थान. ३ दास, सेवक. ४ विषयरूप चिखलांत. ५ आवरला न जाणारा त्याला. ६ कल्याणकर गोष्टींचा समुदाय. ७ उपकारांतून मुक्त. ८ स्पर्श. ९ बोलतां न येणारी.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

कमळीं ॥ ३६ ॥ ऐसे कामवसंतादि जाण । सकळ सुरवर आपण । श्रीरामराज्यसुखसंपन्न । श्रीरामें पूर्ण गौरविले ॥ ३७ ॥ वस्त्रें भूषणें परिकर । देवोनियां सुंदर । रामें गौरविले समग्र । धाडी समग्र निजपदा ॥ ३८ ॥ तेथें मिळोनियां सुरमांदी[1] । विचार करिती निजात्मबुद्धीं । आम्हां गौरविलें निजपदीं । परी शेष नेदी श्रीराम ॥ ३९ ॥ श्रीरामशेष न येतां हाता । स्वपद न राहे सर्वथा । क्षणें जाईल विकल्पता[2] । होंय विचारिता पैं ब्रह्मा ॥ १४० ॥ भक्तां गौरविलें रघुपतीं । शेष देईल तयांप्रती । युक्ति साधूं त्याचिया पांती[3] । प्रजापतीं नेमिलें ॥ ४१ ॥ द्यावया स्वामीचें शेष । एक अंगवला[4] सेवक । कां लडिवाळ बाळक । अंकस्थ[5] देख धाकुटें ॥ ४२ ॥ या बुद्धी चतुरानन । भक्तांमाजी रिघोनि जाण । श्रीरामशेषालागून । स्वयें विंदान साधिलें ॥ ४३ ॥ भरत शत्रुघ्न बिभीषण । सुग्रीव अंगद वायुनंदन । जांबवंतादि वानरगण । गौरव पूर्ण पाहूं यांचा ॥ ४४ ॥ भरत पुढें होवोनि जाण । घालोनियां लोटांगण । विनविला रघुनंदन । स्वामी विनवण परिसावी ॥ ४५ ॥ राउळें[6] केलें वनाभिगमन । तेंचि मज व्रतग्रहण । तुमचें राज्यपरिपाळण । शत्रुघ्नें आपण स्वयें केलें ॥ ४६ ॥ निद्रालस्य सांडोनि दूरी । रामभजनीं प्रीति भारी । सत्सेवेसी निरंतरीं । सांडणें करी जीवित्वाचें ॥ ४७ ॥ राज्यलोभ नातळे चित्ता । सत्संगति रामकथा । शत्रुघ्नासी उल्लास चित्ता । अतिसावधता उभयार्थी ॥ ४८ ॥ नित्य यौवराज्यपालन । तेणें माझें राखे मन । स्वहितार्थी कुशल पूर्ण । सावधान सेवेसी ॥ ४९ ॥ श्रीरामआज्ञेनें राज्यशासन । तें श्रीरामाचें भजन । ऐसा निश्चय मानोनि पूर्ण । सावधान सेवेसी ॥ १५० ॥ सर्वकाळ सर्वावस्थीं । स्मरे शत्रुघ्न रघुपती । कर्माकर्माच्या निश्चितीं । चित्तवृत्ति भेदेना ॥ ५१ ॥ स्वामी आलिया निजराज्यासी । अति उल्हास शत्रुघ्नासी । अति कुशळ भजनासी । करावें यासी सेनानी[7] ॥ ५२ ॥ ऐसी ऐकोनि भरतवाणी । राम संतोषला मनीं । हृदयीं धरिला आलिंगोनी । होतें मनीं तेंचि झालें ॥ ५३ ॥ श्रीरामाचें मनोगत । युवराजा पैं भरत । शत्रुघ्न सेनानी निश्चित । आणि सुमंत प्रधान ॥ ५४ ॥ तेंचि भरतें सांगितलें । सकळांचे मनास आलें । वसिष्ठेंही आज्ञापिलें । भरतबोलें वर्तावें ॥ ५५ ॥ सकळांचीं मनोगतें । सेनानीपण शत्रुघ्नातें । प्रधानत्व सुमंतातें । श्रीरघुनाथें अभिषेकिलें ॥ ५६ ॥ जैसी भरताची पूजा । तैसिया रीतीं पूजिलें वोजा[8] । बाप कृपाळु रघुराजा । निजगणां वोजा पूजीत ॥ ५७ ॥ सात शतें निजमाता । रामें गौरविल्या समस्ता । कैकेयी कौसल्या सुमित्रा । समानता गौरविल्या ॥ ५८ ॥ सकळ सैन्य अति प्रीतीसीं । आदिकरोनि दासदासी । गौरवितां निजमानसीं । श्रीरामासी आल्हाद ॥ ५९ ॥ आनंद श्रीरघुनाथा । निजदासांतें पूजितां । आश्चर्य सुरवरां समस्तां । वर्षती माथां सुमनभार ॥ १६० ॥ भरतादि बंधु जाण । सुमंतादि सकळ प्रधान । दीन जे कां अकिंचन[9] । रामें संपूर्ण गौरविले ॥ ६१ ॥ एका जनार्दना शरण । झाली सकळांची गौरवण । सुग्रीव आणि बिभीषण । कपिसैन्य विसरला ॥ ६२ ॥ ऐसें न मानावें श्रोतां । राम न विसरे सर्वथा । निजभक्तांची पूजा करितां । उल्हास चित्ता रामाच्या ॥ ६३ ॥ तें अति गोड निरूपण । सकळ तृप्तीचें कारण । भोजनीं जेंवी दध्योदन[10] । तेंवी पूजन भक्तांचें ॥ ६४ ॥ भक्तांमाजी मुखरी[11] । हनुमंताची प्रीति थोरी । त्याच्या पूजनाची आवडी भारी । प्रीति रघुवीरीं अतिशय ॥ ६५ ॥ अति गोड निरूपण । देवां भक्तां प्रेम पूर्ण । एका जनार्दना शरण । जगदुद्धरण रामकथा ॥ १६६ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां भरताभिषेको नाम षडशीतितमोऽध्यायः ॥ ८६ ॥ ओंव्या ॥ १६६ ॥ श्लोक ॥ २ ॥

अध्याय सत्त्यायशींवा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ ब्रह्मादि लोकपाळांसी । रामें गौरविलें सकळांसी । पुढें बिभीषणसुग्रीवादिकांसी । राम निजगणांसी पूजीत ॥ १ ॥

---

१ देवसमुदाय. २ संशयानें. ३ पंक्तीला. ४ पात्र झाला. ५ मांडीवर बसलेलें. ६ देवानें. ७ सेनापति. ८ प्रेमानें. ९ दरिद्री. १० दहींभात. ११ मुख्य, श्रेष्ठ.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

निजगणांची प्रीति पूर्ण । आवडीं त्यांचें पूजाविधान । स्वयें करीत रघुनंदन । ऐका विवंचन तयाचें ॥ २ ॥ देवभक्तांचें प्रेम गहन । त्यांचें पूजेचें विधान । वदावया मज कैंचें वदन । हीन दीन मतिमंद ॥ ३ ॥ तथापि श्रीरामकृपेची ख्याती । वनचर मर्कट हातीं । धरोनियां अपांपती । बांधिला निश्चितीं पाषाणीं ॥ ४ ॥ निरायुधें माकडें । तीं पाडिती लंकेचे हुडे । दशमुख केलें वेडें । घेतलें कैवाडें त्रिकूट क्षणें ॥ ५ ॥ सागरीं दगड तरती । पालेखाईर सुरकार्यार्थी । तिंहीं राक्षस नेले भस्मांतीं । त्रिजगतीं उत्सावो ॥ ६ ॥ तोचि मजलागीं कळवळोन । अवतरला एका जनार्दन । दुर्लभ जें रामायण । तें सुगम करोन दाविलें ॥ ७ ॥ अति सूक्ष्म भावार्थ । अति गुह्य जो सिद्धान्त । करतळामळकवत । कृपान्वित दाविला ॥ ८ ॥ बाळकाची अति प्रीती । माउली शौचाशौच न विचारिती । प्रेमें उचलोनि खांदीं घेती । मळ क्षाळिती निजकरीं ॥ ९ ॥ जननीजनकें धुतलें मळ । बालक पुनरपि होय कश्मळ । परी सज्जनांचें करकमळ । अंतर्बाह्य मळ क्षाळीत ॥ १० ॥ सज्जनांचा हात माथां । पडतां झाली पवित्रता । ब्रह्मादिक निजमाथां । वंदिती तत्त्वतां पूज्यत्वें ॥ ११ ॥ भावार्थें धरितां सत्संगती । कोणे अर्थाची अप्राप्ती । सर्वथा नुरे निश्चितीं । दृष्टी वोळंगती सकळार्थ ॥ १२ ॥ असो आतां कवितार्थ । झणें कोपतील संत । सांडोनियां निजकार्यार्थ । स्तुतिवादार्था काय काज ॥ १३ ॥ ऐका स्वामी सावधान । तुम्हांसी न साहे स्तवन । तरी माझें लोटांगण । रामकथन अवधारा ॥ १४ ॥ सुग्रीव जो कां वानरनाथ । बिभीषण लंकानाथ । प्रीतीं बोलावोनि रघुनाथ । पूजा करीत निजप्रेमें ॥ १५ ॥ वस्त्रें भूषणें अलंकार । चिद्रत्नांचे मनोहर । ब्रह्मदत्त माळा परिकर । बाणली सत्वर बिभीषणा ॥ १६ ॥ येरें घातलें लोटांगण । श्रीरामें धरिला आलिंगून । आनंद उथळला पूर्ण । रघुनंदननिजकृपा ॥ १७ ॥ तैसीच सुग्रीवाची पूजा । श्रीरामें केली अति वोजा । बाप कृपाळु रघुराजा । निजगणफौजा गौरवीत ॥ १८ ॥ ब्रह्मयाचा पणतू बिभीषण । ब्रह्मदत्त माळा जाण । त्यासी अर्पी रघुनंदन । चतुराननसुखमय ॥ १९ ॥ सुग्रीव सूर्याचा पुत्र । सूर्यदत्त विचित्र हार । स्वयें अर्पितां रघुवीर । तेणें दिनकर सुखमय ॥ २० ॥

अर्करश्मिप्रतीकाशां कांचनीं मणिभूषिताम् ।
सुग्रीवाय स्रजं दिव्यां प्रायच्छद्रघुपुंगवः ॥ १ ॥

सूर्यप्रकाशाची घडली । विचित्र रत्नीं परिवारिली । हेममणींमाजी ओंविली । तेणें माळ शोभली अनुपम्य ॥ २१ ॥ वस्त्रें भूषणें परिकर । चिद्रत्नें तेजाकार । रामें पूजिला सुग्रीव वीर । सूर्यदत्त हार देवोनि ॥ २२ ॥ तेणें सुग्रीव शोभला । ब्रह्मादिकांपरीस वहिला । श्रीरामें प्रीतीं आलिंगिला । निमग्न झाला निजानंदीं ॥ २३ ॥ तैसेच इतर वानरवीर । पूजिता झाला रामचंद्र । वस्त्रें भूषणें अति परिकर । आश्वासन पैं केलें ॥ २४ ॥ कंगळटोपँ राघावळी । रामें लेवविले गोळांगूळीं । सुरसिद्ध विस्मित सकळी । वानरदळीं अति शोभा ॥ २५ ॥ ते पुसाल कोण म्हणोन । तितुके सांगों शके कोण । संक्षेपें नांवें सांगेन । कृपा करून परिसावें ॥ २६ ॥

ततो द्विविदनीलाभ्यां भूषणानि परंतपः ।
सर्वान्वानरमुख्यांश्च प्रददौ वसुधाधिपः ॥ २ ॥
सर्वे वानरवृद्धाश्च ये चान्ये वानरोत्तमाः ।
वासांसि भूषणैश्चैव यथार्हं प्रतिपूजिताः ॥ ३ ॥

नळ नीळ जांबवंत । मैंद द्विविद विख्यात । सुषेणदधिमुखादि तेथ । वानर समस्त गौरविले ॥ २७ ॥ लहान थोर वृद्ध बाळ । पुरुषार्थी रणशार्दूळ । सर्वस्वेंसीं रघुकुळपाळ । निजांगें अढळ सेविला ॥ २८ ॥ विचित्र भूषणें विचित्र माळा । विचित्र वस्त्रें विचित्र लीळा । रामें पूजिला वानरपाळा । सुरां सकळां देखतां ॥ २९ ॥ सर्वस्वेंसीं भजलेति मातें । तुमचा ऋणी मी निश्चितें । काय उत्तीर्ण होऊं मी येथें । कांहीं वरातें अंगीकारा ॥ ३० ॥ कोणेही काळीं निश्चित । हीन दीन नव्हे चित्त । सदा पूर्ण मनोरथ । नित्य तृप्त सर्वदा ॥ ३१ ॥ जेथें असती वानरवीर । सुपक्व फळें निर्झरनीर । सांद्र पल्लव कोमलांकुर । सुखनिर्भर सर्वदा ॥ ३२ ॥ संभोंविलें पैं सकळांसी । अंगद

---

१ समुद्र. २ बुरुज. ३ युक्तीनें. ४ हातावरच्या आंवळ्याप्रमाणें. ५ मलिन. ६ ब्रह्मदेव. ७ शिरस्त्राणें. ८ जाळीदार कपडे. ९ वानरांना. १० पराक्रमी. ११ वानरसमुदाय. १२ उतराई. १३ दाट. १४ सत्कारिलें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

आणि हनुमंतासी । राम विसरला मानसीं । ह्मणे चित्तासी मानाल ॥ ३३ ॥ तया दोघांचें पूजन । अति प्रेमाचें कारण । सुखातीत सुख जोडे पूर्ण । समाधान जीवशिवां ॥ ३४ ॥ गौरवोनियां सकळांसी । राम पुसे अति प्रीतीसीं । कांहीं उत्कंठा मानसीं । सकळांपासीं मागतसें ॥ ३५ ॥ अंगद हनुमंत दोघे जण । यांचें करावें पूजन । यांच्या उपकारा जाण । ऋणी संपूर्ण आहें मी ॥ ३६ ॥ याकारणें या दोघांसी । अंकीं बैसवावें अति प्रीतीसीं । तेणें उत्तीर्ण कांहीं यांसी । निजमानसीं वाटेल ॥ ३७ ॥ तुम्हां सकळांचें आज्ञापन । जरी होईल कृपेंकरून । तरी मी ऐसेंचि करीन । सुखसंपन्न जरी तुम्ही ॥ ३८ ॥ श्रीरामाचें निजवचन । ऐकतांच सकळ जन । होवोनियां सुखसंपन्न । लोटांगण घालिती ॥ ३९ ॥ हनुमंताचेनि धर्में पूर्ण । आम्हां स्वामी रघुनंदन । रामें पावन वानरगण । ख्याति पावन त्रिलोकीं ॥ ४० ॥ वाळीचे भेणें पळतां । कोठें नाहीं विश्रांतता । हनुमान भेटोनि रघुनाथा । निर्भयता केली आम्हां ॥ ४१ ॥ देवां वाळी दैत्यां वाळी । असुरां सुरदानवां वाळी । रावण ज्यातें कांपे चळीं । तेणें होळी केली त्याची ॥ ४२ ॥ क्षणें वधूनियां वाळीसी । दुःख निरसोनि स्त्रीपुत्रांसी । भेटविलें ऐक्यतेसी । निजराज्यासी देवोनी ॥ ४३ ॥ सीताशुद्धीची दुर्घट कथा । समुद्रउल्लंघनाची वार्ता । लंका जाळोनि तत्त्वतां । लंकानाथा गांजिलें ॥ ४४ ॥ पुत्र प्रधान समग्र । मारोनियां वीरें वीर । हनुमान अंगद झुंजार । सीता सुंदर संबोखिली ॥ ४५ ॥ सीताशुद्धि पैं आणून । अंगद विजयी केला पूर्ण । प्रीति मानी रघुनंदन । यासी कारण हनुमंत ॥ ४६ ॥ हनुमंतें अंगदाची कीर्ती । हनुमंतें अंगदाची ख्याती । हनुमंतें आम्ही रामीं सरतीं । बहुत किती अनुवादों ॥ ४७ ॥ आम्हांसी स्थिति गति हनुमंतें । आम्ही जीवंत वायुसुतें । पावन वनचरें समस्तें । कीर्तिमंतें त्रिलोकीं ॥ ४८ ॥ आम्हां गति मति शरण । स्वामी जो कां रघुनंदन । हनुमंताच्या धर्में जाण । सद्गुरु जाण हनुमंत ॥ ४९ ॥ ज्याचेनि पाविजे रघुपती । ज्याचेनि त्रैलोक्यांत ख्याती । त्याचे पूजेचें विषम चिंती । तो आत्मघाती निश्चित ॥ ५० ॥ अंगद आम्हां निजजीवन । अंगद आम्हां निजप्राण । अंगदें सकळिक पावन । आम्ही धन्य अंगदें ॥ ५१ ॥ कुळींचा पैं भलता कोणी । जरी विनटे रामचरणीं । पतित पितर यमयातनीं । ते त्याचेनि पैं सुटती ॥ ५२ ॥ अंगद आवडता श्रीरामीं । त्याचेनि पावन सकळ आम्ही । त्याची पूजा करितां स्वामी । सुखसंगमीं संतुष्ट ॥ ५३ ॥ सुग्रीवादि सकळ जन । निजहरिखें रघुनंदन । विनवितांचि आनंदमग्न । भक्तपूजन करी राम ॥ ५४ ॥ हनुमंताचा परम आप्त । भक्त अनुरक्त विख्यात । अंगद वीर परम दैवत । बैसवी रघुनाथ दक्षिणांकीं ॥ ५५ ॥ तें देखोनि जनकदुहिता । जाणोनि स्वामीच्या मनोगता । रामांक सांडोनि सीता । तळीं तत्त्वतां उतरली ॥ ५६ ॥ बैसावया हनुमंता । ठाव दिधला जनकदुहिता । तेणें आनंद रघुनाथा । अंकीं तत्त्वतां बैसविला ॥ ५७ ॥ दोघे आलिंगोनि प्रीतीं । अंकीं बैसवितां रघुपती । आनंदल्या सुरपंक्ती । कपिपती आनंद ॥ ५८ ॥ वस्त्रें भूषणें परिकर । चिद्रत्नांचे अलंकार । निजहस्तें रघुवीर । दोघे वीर गौरविले ॥ ५९ ॥ अंगद हनुमंताचा शिष्य । त्याचे पूजेचा संतोष । अतिशयें हनुमंतास । हें राघवेश जाणतसे ॥ ६० ॥ कुबेरदत्त रत्नमाळा । अतिशयेंसीं सुढाळा । अति प्रीतीं घननीळा । घाली गळां अंगदाच्या ॥ ६१ ॥

वैदूर्यमणिसंबद्धे वररत्नपरिष्कृते ।
प्रायच्छद्वालिपुत्राय चांगदायांगदे विभुः ॥ ४ ॥

वैडूर्यादि विचित्र रत्नें । मध्यें मध्यें मणिकांचनें । प्रभा फांकतसे गगनें । सविता तेणें लाजिला ॥ ६२ ॥ निजबाहूंचीं वीरकंकणें । प्रीती करोनि रघुनंदनें । दिधलीं अंगदाकारणें । शोभे तेणें अनुपम्य ॥ ६३ ॥ करीं कंकणें बाणलीं । कंठीं माळा पैं घातली । श्रीरामअंकावरी भली । शोभा आली अंगदा ॥ ६४ ॥ तैसीचि हनुम्याची पूजा । रामें केली अति वोजा । बाप कृपाळु रघुराजा । भक्तफौजा गौरवीत ॥ ६५ ॥ तें देखोनि जानकीसी ।

१ समाधान दिलें. २ आवडतीं. ३ सांगों. ४ तत्पर होतो. ५ मोठ्या आनंदानें. ६ अति तेजस्वी. ७ आकाशामध्यें. ८ परम प्रेमानें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

प्रीति दाटली मानसीं । पूजावया हनुमंतासी । अति प्रीतीसीं विचारी ॥ ६६ ॥ रत्नमाळा वायुदत्ता । रामें पूजिली जनकदुहिता । तिणें पूजावया हनुमंता । आज्ञा इच्छीत रामाची ॥ ६७ ॥

अवमुच्यात्मनः कंठाद्धारं जनकनंदिनी ।
वानरान्प्रेक्ष्य तान्सर्वान्भर्तारं च पुनः पुनः ॥ ५ ॥
तामिंगितज्ञः संप्रेक्ष्य बभाषे जनकात्मजाम् ।
ददस्व सुभगे हारं यस्य तुष्टासि भामिनि ॥ ६ ॥
एवमुक्त्वा तु वैदेही राघवेण महात्मना ।
प्रददौ वायुपुत्राय तं हारमसितेक्षणा ॥ ७ ॥

कंठींचा काढोनि हार । हातीं घेवोनि वेगवत्तर । चंद्रवदना मृगनेत्र । पाहे वक्त्र रामाचें ॥ ६८ ॥ सीता मर्यादेची राशी । उच्छृंखळता नाहीं तिसी । सुरवानरसभेसी । केंवी रामासी पुसावें ॥ ६९ ॥ अंतरात्मा रघुनंदन । चिन्ह तियेचें जाणोन । निजकृपा कळवळोन । काय आपण बोलत ॥ ७० ॥ हार काढोनियां हातीं । तुवां घेतला अतिप्रीतीं । कोणावरी तुझी स्नेहस्थिती । त्यासी निश्चितीं अर्पावा ॥ ७१ ॥ शंका न धरावी मानसीं । हार अर्पी आवडे त्यासी । ऐकोनि रामाज्ञेसी । निजमानसीं हरिखेली ॥ ७२ ॥ प्रीतीं उचलोनियां माळा । घाली हनुमंताचिया गळां । तैं आनंद सुरां सकळां । घनसांवळा सुखमय ॥ ७३ ॥ जानकी अतिप्रीतीसीं । माळ देतां हनुमंतासी । आनंद झाला श्रीरामासी । पुष्पवृष्टीसी सुर करिती ॥ ७४ ॥ तें जाणोनि वायुनंदन । झाला अत्यंत उद्विग्न[1] । बाह्यपूजा तें मज विघ्न । अभिमान जनघातकी ॥ ७५ ॥ ऐसें विचारोनि पूर्ण । आदरिलें वानरचिन्ह । तेणें विस्मित सुरगण । रघुनंदन विस्मित ॥ ७६ ॥ ऐसें साधोनि विंदान । वेगें उडाला आपण । वृक्षीं बैसला वळंघोन । मर्कटचिन्ह निजचेष्टा ॥ ७७ ॥ मर्कटचेष्टा वाडेंकोडें । डोळे घुलकावी सीतेकडे । वांकुल्या दावी सौमित्राकडे । झडनाचे उडे तडतडां ॥ ७८ ॥ माळ काढोनि झडकरी । रत्नें तोडीत तडकरी । वेगें घालोनि मुखाभीतरीं । टाकी दुरी चावोनी ॥ ७९ ॥ तें तंव लागे अति कठिण । चावितां न ये संपूर्ण । आणिक पाहे तोडून । तंव तेंही जाण तैसेंचि ॥ ८० ॥ देखोनि हनुमंताचें चिन्ह । आवेशले वानरगण । करूं आदरिलें त्राण । तंव अश्वगण पैं उडती ॥ ८१ ॥ डहाळें धरोनि वृक्षासीं । झोंबूं धांवती फळांसी । घोडीं गोविलें वानरांसी । हात फळांसी पावेना ॥ ८२ ॥ तेणें क्रोध वानरांसी । खावों न लाहों फळांसी । घोडीं गोविलें आम्हांसी । धरोनि पुच्छीं झुगारिती ॥ ८३ ॥ करितां उलटें किंराण । अत्यंत तडतडी अंगत्राण । मग तोडतोडों जाण । वानरगण टाकिती ॥ ८४ ॥ बरें गौरविलें रघुनंदनें । गोंवोनि सांडिलीं वानरगणें । करूं न लाहती किराणें । फळ खाणें अंतरलें ॥ ८५ ॥ या अंगत्राणा पैं हातीं । हाली चाली खुंटली गती । कायसा कृपाळु रघुपती । वानरपंक्ती खिळिलिया ॥ ८६ ॥ पायीं घोडीं बेडी जोडली । अंगें अंगत्राणें खिळिलीं । उड्डाणाची गति खुंटली । भलीं गौरविलीं रघुनाथें ॥ ८७ ॥ तेणें हांसती सुरगण । वसिष्ठादि ऋषिजन । सुमंतादिक प्रधान । अट्टाहास्यें पूर्ण हांसती ॥ ८८ ॥ अंगद सुग्रीव बिभीषण । हांसते झालें गदगदोन । मुखीं पालव धरोन । रघुनंदन हांसत ॥ ८९ ॥ जंव जंव सकळही हांसती । तंव तंव वानर अधिकें उडती । चेष्टा करीत अपरिमिती । विटाऊं लागती सुरसिद्धां ॥ ९० ॥ तें देखोनि अनुचरित । सौमित्र आदरें पूसत । सकळां अग्रणी हनुमान भक्त । काय अद्भुत मांडिलें ॥ ९१ ॥ श्रीरामभजनप्रीतीसीं । तुझी दीक्षा सकळांसी । राम ऋणी तुझिया भजनासी । उत्तीर्णता त्यासी दिसेना ॥ ९२ ॥ यालागीं श्रीरघुपती । अंकीं बैसवोनि अति प्रीतीं । आदरें तुझी पूजा करिती । ते तुझ्या चित्तीं मानेना ॥ ९३ ॥ एक एक रत्नासी । द्वीपांतरींचें मोल परियेसीं । उपायनें श्रीरामासी । अति प्रीतीसीं आणिलीं ॥ ९४ ॥ तेणेंकरीं तुझें पूजन । स्वयें करीत रघुनंदन । तेंही न माने तुजलागून । हें अंतर गहन कळेना ॥ ९५ ॥ अंगीकारोनि वानरवृत्त । स्वयें दाविसी अनुचरित । रत्नें तोडतोडूं टाकीत । आणि उपमत द्रुमशिखरीं ॥ ९६ ॥ याचा काय अभिप्राय । राउळें सांगावा स्वयमेव । पुसतसे बंधुराव ।

---

१ मुख. २ हर्ष पावली. ३ दुःखी, कष्टी. ४ युक्ति. ५ चढून. ६ आवेश, दांडगाई, ७ उडी, ८ कवच, चिलखत. ९ पदर. १० वर्तन, वागणूक. ११ उड्या मारीत. १२ त्वां समर्थानें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

महाबाहो हनुमंता ॥ ९७ ॥ ऐकोनि सौमित्रिवचन । मर्कटचेष्टा अंगीकारून । विटावण दाखवून । बोले वचन तें ऐका ॥ ९८ ॥ आम्ही मर्कट वनचरें । अंकीं बैसविलें प्रेमें थोरें । जेणेंकरोनि पोट भरे । ऐसें आदरें देईल ॥ ९९ ॥ ऐसी धरोनि थोर आस । अंकीं बैसलों सावकाश । तंव ते झाली निराश । अंतर राघवेश जाणेना ॥ १०० ॥ अंतरीं तळमळ गहन । बाह्य पूजेचें कार्य कोण । अंतर तृप्त न होतां पूर्ण । विटंबन बाह्यपूजा ॥ १ ॥ चुकवोनियां निजमुखासी । क्षीरलेप देतां सर्वांगासी । नव्हे क्षुधानिवारणासी । तळमळ कैसी जाईल ॥ २ ॥ अंतरीं न विझेचि तळमळ । वरी गोड गार्णी प्रबळ । गात्रें जाती विकळ । कृपाकळवळ ते ऐसी ॥ ३ ॥ टक पडिलें सुरसिद्धांसी । टक पडिलें नरवानरांसी । अंकीं बैसवोनि हनुम्यासी । श्रीराम त्यासी काय देईल ॥ ४ ॥ तंव गारविलें रघुनाथें । वरिवरी अलंकारीं बहुतें । अंतर अवघें तैसेंचि रितें । जेंवी कां प्रेतें कानड्यांचीं ॥ ५ ॥ मांडी घालोनि प्रेतातें । अलंकारिती प्रेमें बहुतें । तैसेंचि केलें रघुनाथें । बाह्य आमुतें पूजोनी ॥ ६ ॥ श्रीरामाचें कृपादान । दगडाहूनि अति कठिण । खातां पडतील दशन । क्षुधाहरण तेथें कैचें ॥ ७ ॥ रत्नें सुंढाळें दिसती । खातां बहु गोड असती । म्हणोनि तोडोनियां प्रीतीं । मुखाप्रती घातलीं ॥ ८ ॥ फोडोनि पाहिलें एकएक । तंव तीं अवघीं तैसींचि देख । मग म्यां सांडिलीं निःशेख । मर्कटवेशें साचार ॥ ९ ॥

रामरत्नमहं वंदे कौसल्याकुक्षिसंभवम् ।
जानकीलक्ष्मणोपेतं जटामुकुटमंडितम् ॥ ८ ॥

तुमचीं अनर्घ्य रत्नें स्वामी । त्यांतें दगड मानूं आम्ही । हे अति उच्छृंखळता दुर्गमीं । क्षमा तुम्हीं करावी ॥ ११० ॥ ऐकतां हनुम्याचें उत्तर । सौमित्र झाला विस्मयपर । कांहीं न देववे प्रत्युत्तर । सकळ सुर तटस्थ ॥ ११ ॥ यक्ष किन्नर गंधर्वगण । सिद्ध चारण मुनिजन । ब्रह्मादिक सुरगण । आश्चर्यें पूर्ण हांसती ॥ १२ ॥ देखोनि हनुम्याची चर्या । सकळ वानरीं तेचि क्रिया । अश्व झुगारिती पुच्छीं धरूनियां । त्रांणें तोडोनियां सांडिती ॥ १३ ॥ माळा तोडिती तडतडां । मणि फोडिती कडकडां । आवेश आलासे माकडां । उडती झाडां आवेशें ॥ १४ ॥ हातीं धरोनियां पुच्छीं । अश्व झुगारिती आवेशीं । भीति नाहीं कन्हीयांसी । शिबिका सुखासनांसी त्यागिती ॥ १५ ॥ एक वानर आनंदतें । कांखे घेवोनि गजातें । एक कांखे घेती कन्हीयातें । एक अश्वातें घेवोनि फळें खाती ॥ १६ ॥ सकळ सभा पैं हांसत । वसिष्ठ राम आश्चर्य करीत । समस्त देव पाहात । विपरीतार्थ वानरांचा ॥ १७ ॥ हांसतां मुरकुंडी वळती । एक एकाकडे पाहती । ऐसियाची सहजस्थिती । बाप रघुपति कृपाळु ॥ १८ ॥ तें देखोनि रघुनंदन । झाला अति उद्विग्न । हनुमंतासी समाधान । उपाय कोण तदर्थीं ॥ १९ ॥ संतोषावया वानरा । अंकीं बैसविलें आदरा । तें न माने याचिया विचारा । रघुवीरा अति चिंता ॥ १२० ॥ देश दुर्ग देऊं यासी । तेंही न माने हनुमंतासी । निःस्पृह सर्वथा मानसीं । देशदुर्गासी पैं न घे ॥ २१ ॥ माझ्या अंकावरी पूजन । स्वयें न मानी वायुनंदन । रत्नें टाकीतसे तोडून । माळा जाण विखुरल्या ॥ २२ ॥ आतां यासी उपाय एक । सवें जेवोनि आवश्यक । घ्यावें हनुमंताचें शेष । उपाय आणिक दिसेना ॥ २३ ॥ ऐसा करोनि विचार । कृपापूर्वक रघुवीर । बोलावोनि हनुमान वीर । काय उत्तर बोलत ॥ २४ ॥ पवनात्मजा परिस विनंती । तुझी पूजा निजनिश्चितीं । स्वयें नेणेंचि मी मूढमती । क्षमा ये अर्थीं करावी ॥ २५ ॥ क्षमा करोनि सकळिक । जेणें तुज वाटे सुख । तेंचि सांगावें आवश्यक । करणें निःशेख तें मज ॥ २६ ॥ म्हणोनि वंदोनियां चरण । हृदयीं धरिला आलिंगून । हृद्गत सांगावें संपूर्ण । करणें जाण तेंचि मज ॥ २७ ॥ येचविषयीं सर्वथा । आन करणें नाहीं चित्ता । मज आन नाहीं पढियंता । आण तत्त्वतां पैं तुझी ॥ २८ ॥ तुझी आण वाहिली जाण । हें परमात्म्यावरील प्रमाण । अन्यथा न मानावें आपण । आत्मा जाण तूं माझा ॥ २९ ॥ ऐकोनि श्रीरामाचें वचन । हनुमान घाली लोटांगण । श्रीरामवचन अप्रमाण । मानी तो पूर्ण आत्मघाती ॥ १३० ॥ राम अवतारीं अवतारु ।

१ दूध चोपडणें. २ दांत. ३ अति तेजस्वी. ४ कवचें. ५ लहान मुलांस. ६ पालखी. ७ त्यासंबंधीं. ८ किल्ला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

तोचि जगाचा जगद्गुरु । त्याचे वचनीं विकल्प थोरु । धरी तो नरु आत्मघाती ॥ ३१ ॥ गुरुवचनीं विकल्पात्मक । न चुकती त्याचे आकल्प नरक । आत्मघाती तो आवश्यक । सुटका देख त्या कैंची ॥ ३२ ॥ आतां एक विज्ञापन । जरी दिधलें अभयदान । तरी जें आम्ही घेऊं मागोन । कृपा करोन तें द्यावें ॥ ३३ ॥ द्वारा याचक आले असतां । न व्हावें पराङ्मुख सर्वथा । औदार्यें तूं अगाध दाता । दीन मागता मी तुझा ॥ ३४ ॥ तूं स्वामी अर्थसंपन्न । मी याचक मागता दीन । जें मागेन प्रीतीकरोन । तें आपण अर्पावें ॥ ३५ ॥ ऐकोनि हनुमंताचें वचन । श्रीराम झाला सुखैकघन। संकट निरसलें हनुमेन । मागेल आपण तें देऊं ॥ ३६ ॥ आम्हांसी होती परम चिंता । काय अर्पावें हनुमंता । तें निरसलें तत्त्वतां । झाला मागता स्वयेंचि ॥३७॥ ऐसें विचारोनि निश्चयेंसीं । आज्ञा केली हनुमंतासी । जे जे अपेक्षा मानसीं । तें प्रीतीसीं मागावें ॥ ३८ ॥ ऐकोनि श्रीरामवचन । हनुमान आनंदघन । दिधलें अभयवरदान । तरी ऐक मागेन तें स्वामी ॥ ३९ ॥ तुम्ही असतां वनांतरीं । उपवासी फळाहारी । पारणाविधीची परी । आम्हीं डोळेभरी पहावी ॥ १४० ॥ पारणाविधीचें शेख । आम्हां पावल्या आवश्यक । संभावना सकळिक । एक एक पावली ॥ ४१ ॥ येविषयीं शिष्टांचें । वचन ऐकिलें साचें । बळ धरोनियां त्याचें । करूं याचनेतें स्वामिया ॥ ४२ ॥ येचविषयींचा श्लोकार्थ । स्वामी ऐका सावचित्त । निजप्रेमें कृपायुक्त । ऐका निश्चित कृपानिधी ॥ ४३ ॥

महाप्रसाद इत्युक्त्वा ग्राह्यमंजलिभिर्बुधैः ।
पादोदकं च निर्माल्यं नैवेद्यं च विशेषतः ॥ ९ ॥

झालिया पूजाविधान । तीर्थ प्रसाद निर्माल्य जाण । स्वामीपासीं प्रार्थन । करोनि आपण मागावें ॥ ४४ ॥ प्राप्त होय नैवेद्यशेख । तरी भाग्य अलोलिक । आगमीं निर्वचन देख । श्रुति सम्यक गर्जती ॥ ४५ ॥ निजदासाचा धर्म पूर्ण । शेष मागावें प्रार्थून । तें हाता आलिया जाण । सकळ संभावना पावली ॥ ४६ ॥ होतें श्रीरामाचे मनीं । तेंचि मागितलें हनुमेनी । ऐकें अन्वयें वर्तती दोनी । देव भक्त होवोनि श्रीराम ॥ ४७ ॥ तें अपूर्व निरूपण । निजभक्तासी आपण । निजशेष देवोनि पूर्ण । रघुनंदन सुखावेल ॥ ४८ ॥ एका जनार्दना शरण । निजभक्ताचें प्रेम पूर्ण । कृपापूर्वक सावधान । निजनिरूपण परिसावें ॥ १४९ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां हनुमद्विनोदचरितं नाम सप्ताशीतितमोऽध्यायः ॥ ८७ ॥ ओंव्या ॥ १४९ ॥ श्लोक ॥ ९ ॥

अध्याय अठ्यायशींवा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ पूर्वप्रसंगीं हनुमंतें । विनविलें श्रीरामातें । सारोनि पारणाविधीतें । प्रसाद आमुतें द्यावा स्वामी ॥ १ ॥ सौमित्र आणि भरत । जानकीमातेसमवेत । पारणें सारोनि निश्चित । करावें तृप्त सकळांसी ॥ २ ॥ ब्रह्मादि सुरपंक्ती । प्रसादाची वाट पाहती । निजसेनेचे सेनापती । आकांक्षिती सुमंतादिक । ॥ ३ ॥ बिभीषणसुग्रीवादि जाण । अंगद युवराजा आपण । नळनीळादि कपिगण । प्रसाद पूर्ण वांछिती ॥ ४ ॥ जांबवंत सुषेण दधिमुख । श्रीरामप्रसादा सकळिक । अवघे असती साकांक्ष । त्यांसी आवश्यक सुखावीं ॥ ५ ॥ म्हणोनि घातलें लोटांगण । तें देखोनि सकळ जन । स्वयें झाले सुखैकघन । हनुमंतें विंदान साधिलें ॥ ६ ॥ आम्ही म्हणों श्रीरामचंद्र । वस्त्रें भूषणें अलंकार । देवोनि बोळविले सत्वर । निजशेष सादर न देचि ॥ ७ ॥ ते आमची सकळ चिंता । भली निरसिली हनुमंता । प्रसन्न करोनि रघुनाथा । शेष तत्त्वतां मागितलें ॥ ८ ॥ म्हणोनि हुंकरिखले समग्र । आनंदें करोनि जयजयकार । नामें गर्जिन्नले अपार । चराचर दुमदुमिलें ॥ ९ ॥ देखोनि सकळांचा उत्सावो । संतोषला रामरावो । सकळां शेषीं आदर पहा हो । सुरसमुदावो ब्रह्मादि ॥ १० ॥ वानरें तरी आलुकीं । लुलुे करीत प्रसादाविखीं । त्यांसी न करितां पैं सुखी । अत्यंत दुःखी होतील ॥ ११ ॥ लौकिक अपवाद गहन । श्रीरामकार्यालागीं जाण । जीवित्व तुच्छ करोनि

---

१ कल्पपर्यंत. २ इच्छा. ३ शिल्लक. ४ मागणी. ५ शास्त्रांत. ६ देवसमुदाय. ७ इच्छितात. ८ इच्छा करणारे. ९ युक्ति केली. १० आनंद पावले. ११ भुकेलेलीं, बुभुक्षित. १२ लोभ. १३ प्रसादाकरितां.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

पूर्ण । निज प्राण वेंचिले ॥ १२ ॥ त्यांसी भुकें तळमळित । प्रसाद नेदी रघुनाथ । बोळविले निजभक्त । हीनवृत्त धरोनियां ॥ १३ ॥ ऐसे लोकांचे अपवाद । माथां बैसती अगाध । विचार करोनियां शुद्ध । भक्तवृंद सुखावूं ॥ १४ ॥ ऐसें करोनि निश्चित । माता कौसल्या त्वरित । बोलावोनि रघुनाथ । विचार करित तियेसीं ॥ १५ ॥ मी[1]नले सुरवरांचे भार । लोकपाळादि समग्र । ब्रह्मा आणि पैं शंकर । सिद्ध चारण गंधर्व ॥ १६ ॥ चित्तें वित्तें जीवितें । अनुसरोनि निश्चितें । वानरीं आम्हां केलें सरतें । निजविजयातें देउनी ॥ १७ ॥ त्रैलोक्यांत माझी ख्याती । व्हावया कारण मुख्य जु[3]त्पती । त्यांसी द्यावया निजतृप्ती । पाकनिष्पत्ती करावी ॥ १८ ॥ ऐसें सांगतां रघुपती । माता सुखावली निश्चितीं । जें म्यां धरिलें होतें चित्तीं । तेंचि रघुपतीं योजिलें ॥ १९ ॥ ब्रह्मा शिव सुरगणां । लोकपाळेंसीं पाकशासना । पाहुणेर रघुनंदना । निजानंदें जाण करावा ॥ २० ॥ श्रीरामाचे आवडते । वानर जीवाहूनि पढियंते । साह्य झाले श्रीरामातें । आवडीं त्यांतें वाढीन ॥ २१ ॥ भोंवत्या सुरवरांच्या पंक्ती । मुनि सिद्ध ऋषि निश्चितीं । मध्यें माझा रघुपती । जेंवी उडु[5]गणपति आकाशीं ॥ २२ ॥ वृत्रवधीं इंद्रपूजा । सुरवर करिती जैशा वोजा । तेंवी भोजनीं रघुराजा । निजवोजा पूजीन ॥ २३ ॥ हेंचि माझें निजपूजन । षड्रस निपजवीन सदन्न । ऐक तयांचें लक्षण । निजविवंचन सांगेन ॥ २४ ॥ लेह्य[6] पेयँ[7] चोर्ष्य[8] खाद्य । याचें नांव चतुर्विध । भक्ष्य भोज्य जें विविध । जाण षड्विध येणेंसीं ॥ २५ ॥ चाटूनि घेइजे पूर्ण । तया नांव लेह्य जाण । प्राशन कीजे घटघटून । पेय संपूर्ण त्या नांव ॥ २६ ॥ चोखून घेइजे रस । थुंकून सांडिजे बाकस[9] । तया नांव बोलिजे चोष्य । खाद्यविलास तो ऐका ॥ २७ ॥ कंडन[10]पेषणादि समस्त । पाक न करितां निश्चित । जें खावयास उपयुक्त । खाद्य बोलत तयासी ॥ २८ ॥ विचित्र कोरकियाची परी । रोटी पोळी आदि उखरी । यातें बोलिजे चतुरीं । निजनिर्धारीं पैं भक्ष्य ॥ २९ ॥ क्षिप्रा[11] आणि ओदनें[12] । भोज्य म्हणती विचक्षण । एवं षड्रसांचें चिन्ह । निजविवंचन सांगितलें ॥ ३० ॥ त्या रसांचें पाकविधान । करिती राममाता सर्वज्ञ । ऐक तयाचें लक्षण । निजविवंचन अवधारीं ॥ ३१ ॥ पंक्ती बैसल्या भूचर । जळचर यक्ष किन्नर । सिद्ध चारण मुनीश्वर । सुरवर आदिकरोनी ॥ ३२ ॥ खेचर भूचर जळचर । दानव मानव विखारें[13] । राहिले होते समग्र । श्रीरामचंद्रशेषासी ॥ ३३ ॥ ब्रह्माआदि ईशान । लोकपाळ सकळ जन । श्रीरामशेषालागून । प्रीति करोन राहिले ॥ ३४ ॥ निजप्रधानासीं बिभीषण । सुग्रीवासहित वानरगण । पंक्ती बैसविल्या सावधान । मध्यें रघुनंदन शोभत ॥ ३५ ॥ नभीं तारागणांची पंक्ती । मध्यें शोभे निशापती । तेंवी सुरखेचरपंक्ती । मध्यें रघुपति शोभत ॥ ३६ ॥ मध्यें श्रीराम केवळ । आवरणपंक्ती लोकपाळ । प्रकाशे दीप प्रबळ । राम घननीळ चिज्ज्योति ॥ ३७ ॥ कौसल्येचें भाग्य गैं[14]हन । जिचा पुत्र रघुनंदन । जेणें त्रैलोक्य पावन । निजजीवन विश्वाचें ॥ ३८ ॥ ऐका कौसल्येची परी । पारणाविधी श्रीरामचंद्रीं । वाढीत कौसल्या सुंदरी । निजनिर्धारीं परियेसीं ॥ ३९ ॥ चैतन्यतेजें अति चोखटें । समभावें सुवर्णताटें । आनंदरसें पूर्ण वाटे । अपूर्ण कोठें असेना ॥ ४० ॥ प्रथम शाकांचिया परी । वाढी कौसल्या सुंदरी । पंक्ती बैसल्या एकसरी । निजनिर्धारीं निजयुक्त ॥ ४१ ॥ एकी शाखा त्या खंडिवा । एकी केवळ खुडिवा । एकी सदेंठी तोडिवा । एकी सोलिंवा सुवास ॥ ४२ ॥ एकी कडुवटा खणुवाळी । एकी अति तिखट तोंडाळी । एक सलंब पैं सरळी । एक वाटोळी गडबडती ॥ ४३ ॥ एक हिरवी करकरित । एकी जारसी कचकचित । एकी बहुबीज बुचबुचित । एकी हसहसित कोरडी ॥ ४४ ॥ एकी अत्यंत आंबट । एकी सबाह्य तिखट । एकी सर्वांगीं कडुवट । एक तुरट समसमित ॥ ४५ ॥ एक वाढोनि जारठलीं । एक मुरडीं मुरकुटलीं । एक सुपुष्पें सारठलीं । एकीं तुटलीं अनुं[15]वायें ॥ ४६ ॥ ऐशा फळवल्लीफळभारें । केलें समरस सांबारें । अवघ्या

१ मिळाले. २ सर्वमान्य. ३ वानरवीर. ४ इंद्राला. ५ चंद्र. ६ चाटावयाचें. ७ प्यावयाचें. ८ चोखून खाण्यासारखें. ९ चोथा. १० कांडलेलें, दळलेलें. ११ खीर. १२ भात. १३ सर्प. १४ मोठें. १५ संबंधानें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वाघारु वाघारें । निजथारें श्रीरामें ॥ ४७ ॥ ऐशा नानापरींच्या शाका । परवडी केल्या रघुकुळटिळका । एकेचि स्वादें जेवीत देखा । अति नेटकें जेवणारा ॥ ४८ ॥ एकें परिपाकें उतटलीं । एक स्नेहदेठींहूनि सुटलीं । वनिताहातींहूनि निसटलीं । स्वादा आलीं शिखरणी ॥ ४९ ॥ झाडीं पिकलें देठकेणें । तरी आंबे आम्लपणें । शेजे मुराल्या एकांतपणें । न चाखतां घ्राणें चवी फांके ॥ ५० ॥ रूप दृष्टीतें बुझावी । वासें घ्राणातें समजावी । वाचा श्रवणें बाप म्हणवी । स्पर्शें निववी त्वचेतें ॥ ५१ ॥ रसना सेवितां रसमात्र । गोडिया विनवी अंतर । सेवितां श्रीरामचरित्र । सबाह्याभ्यंतर सुखरूप ॥ ५२ ॥ एकलें एक चयूतफळ । निववी इंद्रियें सकळ । श्रीरामपंक्ती अच्युतफळ । जग जें सकळ सुखरूप ॥ ५३ ॥ वैराग्यतापें तापलिया । त्याचि संतापकाचरिया । अनुतापतैलें तळिलिया । चवी आलिया श्रीरामें ॥ ५४ ॥ एक भोजनीं अविचारितें । सेविती निंदेचें रायतें । चवी चाखतां कुसमुसितें । कपाळ हातें पिटीत ॥ ५५ ॥ नाकीं तोंडीं धूर उठी । तळमळोनि कपाळ पिटी । श्रीराम त्यातें न पाहे दृष्टीं । परवडी खोटी भोजनाची ॥ ५६ ॥ लोणचीं वाढिन्नलीं अनेगें । रंगलीं भक्तिप्रेमरंगें । एक सलवण सर्वांगें । स्वाद श्रीरंगें सेवावा । ॥ ५७ ॥ अहं कडुवट कुहिरी । सोहलोणचीं रंगलीं खारीं । वैराग्यभोकरें खारलीं खारीं । त्याहीमाझारीं मुरले मिरघोंस ॥ ५८ ॥ स्वबोधभोकरीवेलेसीं आंवळा । जेवितां चवीनें अति आगळा । मूळींच्या मूळीं गोडिया आला । स्वयें सेविला श्रीरामें ॥ ५९ ॥ त्रिगुणगुणांचें निजत्रिकूट । निजनिर्गुणें भरिलें बोट । मघमघीत अति उद्भट । अति स्वादिष्ठ श्रीरामें ॥ ६० ॥ ऐसीं लोणचीं नेणों किती । मुख्य स्मरण आलें नेणती । तो स्वाद जाणे रघुपती । बैसले पंक्तीं ते धन्य ॥ ६१ ॥ सूक्ष्म सेवेच्या शेवया । मोट्टं नेदितां सगळिया । क्षीरसाकरेशीं आळलिया । स्वयें सेविल्या श्रीरामें ॥ ६२ ॥ पोकळे वळवेटी सरळीं । एक वाटोळीं लांबोळीं । सेवेमाजी अवघीं आलीं । ठायीं पावलीं श्रीरामा ॥ ६३ ॥ परम स्वादाची साखर । पंचरस पंचधार । घृतें वाढिलें सर्वसार । स्वादें श्रीरामचंद्र डुल्लत ॥ ६४ ॥ अनुतापें सद्यस्तप्त । निजसाराचें सारांश घृत । अखंड धारा स्वयें वाढीत । श्रीरघुनाथ निजभोक्ता ॥ ६५ ॥ शास्त्रपडिपाडें पापड । नानायुक्ती अति तडफड । जळजळेचे आले फोड । तेणें कडकड मोडती ॥ ६६ ॥ यालागीं होते मागें । ते ओढोनि भजनमार्गें । निरवोनियां सर्वांगें । श्रीरामभोगें स्वादिष्ठ ॥ ६७ ॥ मीतूंपण सांडणें ठायीं । तेचि शुद्ध सांडयी । श्रीरामठायां येतां पाहीं । सांडी मांडी नाहीं सर्वथा ॥ ६८ ॥ स्वयें तप्ततैलीं कुरवडी । स्वयें नुगवेचि बापुडी । शांतिदांतीं केली कुडकुडी । आली रोकडी राममुखा ॥ ६९ ॥ विषयलालसेचे लाडू । विवेकें वाढिले फोडूंफोडूं । तेणें पडिपाडें तिळव्या जोडू । स्वाद गोडू श्रीरामें ॥ ७० ॥ वैराग्यकढें कढली कढी । तीमाजी माया मुगवडी । विरोनि आली स्वादा गाढी । तिची गोडी राम जाणे ॥ ७१ ॥ त्यामाजी जिरें मिरें कापुरा । तेणें सुवास चढे अंबरा । रस सेविती फरफरां । श्रीरामचंद्राचेनि धर्मे ॥ ७२ ॥ भजनभावाच्या इडुरिया । क्षीरसागरींच्या क्षीरघारिया । सबाह्य गोड गुळवरिया । पूर्ण पुरिया परिपूर्ण ॥ ७३ ॥ भजनभेदें सफेत फेणी । प्रेमशर्करा भरली भरणी । अमृतफळातें लाजवोनी । वाढिले आयणी आंबवडे ॥ ७४ ॥ नुसधी गोडियेची घडली । तैसी खांडवी वाढली । चंद्रबिंबींची काढिली । घडी मांडिली मांडियांची ॥ ७५ ॥ मांडियांची नवलपरी । चतुर्वेद घडिया चारी । कर्मकानवटी उत्तरी । श्रीरामचंद्रीं निजस्वाद ॥ ७६ ॥ विवेकसांडणी अति सोज्वळ । उभयभागीं निजतेजाळ । तांदुळ वेळिले भावबळें । अति सोज्ज्वळे अरुवार ॥ ७७ ॥ सोहं ओगराळें सनाथ । अलिप्तपणें भरिला भात । ठायीं वाढिला न फुटत । श्रीरघुनाथ निजभोक्ता ॥ ७८ ॥ अन्नीं वरान्नश्रेष्ठता । सबाह्य कोंडा झाडिला परता । चढला मध्यनायकाच्या माथा । प्रिय रघुनाथा यालागीं ॥ ७९ ॥ सर्व स्वादांचें कारण । स्वयें श्रीराम

१ भाज्या. २ प्रकार. ३ चांगला. ४ स्त्रियांच्या हातांतून. ५ आंबा. ६ श्रेष्ठ. ७ तूप. ८ ताजें कढविलेलें, साजूक तूप. ९ विषयवासनेचे. १० फोडून फोडून. ११ वरणाची थोरवी.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

आपण । यालागीं वरी वाढिलें लवणें[1] । अपूर्ण तें पूर्ण श्रीराम करी ॥ ८० ॥ श्रीरामपंक्ती रसपीयूखें[2] । ज्यासी श्रद्धेची असे भूक । ग्रासोग्रासीं चढतें सुख । हे परवडी देख त्यालागीं ॥ ८१ ॥ न्यून नाहीं श्रीरामपंक्ती । जेवितां जेविते चवी जाणती । रुचलेपणें जाण वाढिती । अति सुमति कौसल्या ॥ ८२ ॥ राममाता सावधान । जाणे तृषिताचें लक्षण । सबाह्य निववीत संपूर्ण । जीवा जीवन देतसे ॥ ८३ ॥ कौसल्या स्वयें खुणाविती । चारी मुक्ती तेथें राबती । जें जें ज्याचे मनोगतीं । तें तें देती त्या ठायीं ॥८४॥ पहिलें नवजणी वाढत्या । चौघीजणी पूर्ण कर्त्या । जे पंक्ती श्रीराम भोक्ता । अतृप्तता तेथें कैंची ॥ ८५ ॥ एवं तृप्तीचा ढेंकर । देती स्वानंदें उद्गार । स्वादें कोंदले जेवणार । श्रीरामचंद्र निजपंक्ती ॥ ८६ ॥ कौसल्या सावधान वाढी । सुरवर खेचरें[3] परवडी । ब्राह्मणतृप्ति झाली गाढी । धोत्रें बुर्डी ढिलावतीं[4] ॥ ८७ ॥ ऐसी सकळां आनंदतृप्ती । झाली असे श्रीरामपंक्ती । ज्यालागीं योजिलें रघुपती । अभिनव कीर्ति सांगणें असे ॥ ८८ ॥ अति प्रेमाचिये प्रीतीं । हनुमान आवडता रघुपतीं । त्याकारणें कौसल्येहातीं । पाकनिष्पत्ती करविली ॥ ८९ ॥ ताट विस्तारोनि परिकरें । हनुमंतासी अति आदरें । बोलावोनि रघुवीरें । मधुर उत्तरें अनुवादे[5] ॥ ९० ॥ हनुमंता सर्वज्ञा । तुवां पूर्वी केली आज्ञा । सारूनि विधिपारणा । अपेक्षा[6] मना शेषाची ॥ ९१ ॥ तेणें[7] अन्वयें कौसल्या जननी । षड्रसपाकांची मांडणी । संपादिली तुजलागूनी । तारें विस्तारोनि तिष्ठत ॥ ९२ ॥ तुम्ही आम्ही झडकरी । सवें जनकजा[8] सुंदरी । भरत शत्रुघ्न आदरी । प्रीति थोरी सौमित्रा ॥ ९३ ॥ सकळ बैसोनि सांगातें । संपादूं पारणाविधीतें । आज्ञापितां श्रीरघुनाथें । येरु निश्चितें अति कुशल ॥ ९४ ॥ आज्ञापितां रघुनाथ । माथां वंदोनि वचनार्थ । युक्तायुक्त न विचारीत । बैसे त्वरित सांगातें ॥ ९५ ॥ राम सुरवरां वर । नीच आपण वनचर । ऐसा करितां विचार । शेष सत्वर न ये हाता ॥ ९६ ॥ सवें[9] बैसावया सम्यक । आणिक उपाय असे एक । होतां अंगस्थ बाळक । श्रीरामशेष तैं लाभे ॥ ९७ ॥ श्रीराम कृपाळु जननी । भक्तीं प्रीति बाळाहूनी । भक्तापरी रघुनंदनीं । नाहीं त्रिभुवनीं आवडतें ॥ ९८ ॥ ऐसें जाणोनि निश्चित । सवें बैसला हनुमंत । श्रीराम सकळां वेगें म्हणत । घ्याव्या निश्चित प्राणाहुति ॥ ९९ ॥ सुरनरादि खेचर । सिद्ध[10] चारण मुनीश्वर । नाग यक्ष पैं किन्नर । घ्या हो समग्र प्राणाहुति ॥ १०० ॥ दानव मानव समग्र । वसिष्ठादि ऋषीश्वर । सुग्रीवादि वानरभार । राक्षसभार बिभीषणादि ॥ १ ॥ आज्ञापितां रघुनंदन । रामनामें गडगर्जन । सकळीं जयजयकार करोन । आपोशनें घेतलीं ॥ २ ॥ अति प्रीतीं रामराणा । कवळ उचलोनि जाणा । देता झाला वायुनंदना । येरु चरणां लागला ॥ ३ ॥ स्वामी कृपाळु रघुपती । भक्तप्रीति तुझ्या चित्तीं । ग्रास घालिसी मुखाप्रती । निजस्फूर्ती विसरोनी ॥ ४ ॥ परंतु एक विज्ञापन । कृपापूर्वक रघुनंदन । स्वामी परिसावें आपण । तरी मी वचन बोलेन ॥ ५ ॥ म्हणोनि चरणीं ठेविला माथा । तेणें संतोष रघुनाथा । स्वयें आज्ञापी हनुमंता । आवडे चित्ता तें सांग ॥ ६ ॥ ऐकोनियां तें वचन । हनुमान जाला सुखैकघन[11] । विनविला रघुनंदन । आधीं आपण ग्रास घेणें ॥ ७ ॥ सवेंचि घेईल लक्ष्मण । पाठीं भरत शत्रुघ्न । जनकनंदिनी ग्रास घेऊन । अधिकार पूर्ण मग माझा ॥ ८ ॥ ऐसें विनवितां हनुमंता । झालें आश्चर्य रघुनाथा । हनुमान नाटोपे सर्वथा । विचार आतां काय करूं ॥ ९ ॥ ग्रास न घेतां आपण । हनुमान सर्वथा न घे जाण । शेष दुसरिया ग्रासेंकरून । घेऊं छळून हनुम्याचें ॥ ११० ॥ ऐसा करोनि निर्धार[12] । ग्रास घेत रघुवीर । विनविलीं सीता सौमित्र । घेई सत्वर कवळातें[13] ॥ ११ ॥ श्रीरामाचे अनुमतें । सीतेनें घेतलें कवळातें[13] । सौमित्रही प्रेमें बहुतें । घेत कवळातें मर्यादा ॥ १२ ॥ भरत शत्रुघ्न दोघे जण । तिंहीं कवळ घेतां पूर्ण । हनुमान विनवी रघुनंदन । ग्रास आपण सवें घ्यावा ॥ १३ ॥ ऐसें सांगतां रामासी । हनुमान लागोनि चरणांसी । श्रीरामासहित सकळांसी । पुसे भोजनासी पैं आज्ञा ॥ १४ ॥ निरोप आहे जी आम्हांसी ।

१ मीठ. २ पीयूख=अमृत. ३ आकाशसंचारी. ४ सैल करतात. ५ बोले. ६ इच्छा. ७ त्यासाठीं. ८ सीता.

९ बरोबर. १० देवयोनिविशेष. ११ अति संतुष्ट. १२ निश्चय. १३ ग्रास.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

क्षोभ न यावा कोणासी । कृपा असेल मानसीं । तरी वेगेंसीं आज्ञापिजे ॥ १५ ॥ ऐकोनि हनुम्याचें वचन । हांसिन्नले सकळ जन । रामें देतां आज्ञापन । विषाद कोण मानील ॥ १६ ॥ श्रीरामआज्ञा उलंघन । करी ऐसा पापी आहे कोण । त्यासी जाण पां अधःपतन । नरक दारुण पैं होती ॥ १७ ॥ सवें सांगे रघुनंदन । म्यां देतां आज्ञापन । विषाद मानूं शके कोण । ग्रास आपण सवें घ्यावा ॥ १८ ॥ सकळ तुजलागीं तटस्थ । बैसले असती वाट पाहात । विलंब न करावा निश्चित । घ्यावें त्वरित कवळातें ॥ १९ ॥ आज्ञापितां रघुनंदन । येरें घालोनि लोटांगण । ताट उचलोनियां जाण । केलें उड्डाण आकाशीं ॥ १२० ॥ देखोनि तयाचें लाघवें । स्वयें हांसतसे राघव । कैसा साधिला अभिप्राव । धन्य गौरव हनुम्याचें ॥ २१ ॥ आम्ही ठकवोनि घेवों पाहों शेष । तंव येणेंचि ठकविलें आम्हांस । ऐसें विचारोनि राघवेश । हनुमंतास पूसत ॥ २२ ॥ काय केलें वायुनंदना । तीक्ष्णबुद्धि विचक्षणा । तुझ्या शेषालागीं जाणा । आम्ही संगातें बैसलों ॥ २३ ॥ तंव त्वां विंदानें साधिलें । सकळ आसावलें सांडिलें । अवघें ताट उचलोनियां नेलें । वेडाविलें आम्हांसी ॥ २४ ॥ ऐसें पुसतां रामरावो । येरु हांसोनि लवलाहो । लोटांगण घालोनि पहा हो । स्वयमेवो विनवीत ॥ २५ ॥ ऐकें स्वामी रघुनंदना । तूं कृपाळु दीनजनां । तुझ्या शेषालागीं जाणा । भक्तजनां अति प्रीति ॥ २६ ॥ नाना व्रतें यज्ञ दान । पुरश्चरणें अति कठिण । तुझ्या प्रसादालागून । भक्तजन करिताती ॥ २७ ॥ योग याग पैं दारुण । पर्वतपात करितां पूर्ण । तुझा प्रसाद न ये जाण । तो मजलागून पावला ॥ २८ ॥ ऐसें उफराटें घडे केंवी । जें भक्तशेष श्रीराम सेवी । ऐसें न मानावें गोसावी । मिठी सुटावी कीं भक्ताची ॥ २९ ॥ निजभक्ताचें निजशेख । स्वयें सेवी रघुकुळटिळक । तें विपरीत झालें देख । ऐसें निःशेख घडेना ॥ १३० ॥ चंद्र निजकळा विसरोन । चंद्रामृतालागीं पूर्ण । चकोराचे परी जाण । साकांक्षण अमृता ॥ ३१ ॥ सूर्य निजतेजा भुलला । प्रकाशातें शोधूं गेला । दरांदरकुटीं रिघाला । कोठडिया लपाला अंधारीं ॥ ३२ ॥ महासिंधु तृषित जाहला । क्षुद्र नदिये मागों गेला । तेंवी भक्तशेषालागीं वहिला । राम भुकेला काय सांगों ॥ ३३ ॥ म्हणोनि मांडिल्या मर्कटचेष्टा । घांस घेतसे घटघटां । मिटक्या देतसे मटमटां । सुरश्रेष्ठां विटावोनी ॥ ३४ ॥ वांकुल्या दावी सौमित्रासी । भरता देखोनि खाजवी कुसी । डोळे घुलकावी सीतेसी । शत्रुघ्नासी दावी अंगुष्ठ ॥ ३५ ॥ देखोनियां बिभीषणा । कांखा खाजवीत जाणा । अंगद सुग्रीवा दोघांजणा । पुच्छेंकरोनि जाणा हेळसी ॥ ३६ ॥ शेषें मातला वानर । दृष्टि नाणी सुरासुर । दावीत मर्कटविचार । आपपर नाठवे ॥ ३७ ॥ प्रेम न सरे माकडा । लोळतसे गडबडां । पुच्छ नाचवी रामापुढां । वसिष्ठापुढां कोल्हाटे ॥ ३८ ॥ देखोनि हनुम्याचे विकार । वसिष्ठादि ऋषीश्वर । ब्रह्मादिक पैं सुरवर । श्रीरघुवीर हांसत ॥ ३९ ॥ सौमित्र भरत शत्रुघ्न । हांसतसे सीता तें देखोन । वसिष्ठादि ऋषिगण । सिद्ध चारण हांसती ॥ १४० ॥ ब्रह्मादि सुरपंक्ती । बिभीषण लंकापती । सुग्रीवादि सकळ जुत्पंती । हांसताती विस्मयें ॥ ४१ ॥ ऐसा करितां गदारोळ । श्रीरामपंक्तीं सकळ । तृप्ति पावले बहुंळ । आनंदकल्लोळ श्रीरामें ॥ ४२ ॥ सकळिकांसी झाली तृप्ती । श्रीरामपंक्ती विश्रांती । हनुम्याचे प्रत्युपकारार्थी । कांहीं युक्ती स्फुरेना ॥ ४३ ॥ आतां एक विचार । प्रार्थूनि हनुमान वीर । काय अपेक्षित तुझें अंतर । तो वर मागावा ॥ ४४ ॥ त्रैलोक्या दुर्धर पाहीं । मागतां अटक जें कांहीं । तें तें देईन सर्वही । माग लवलाहीं मारुती ॥ ४५ ॥ हनुम्याचे भजनें भुलला । राम वरा उदित झाला । कृपेचा मेघ बोळला । भाग्यें आथिलें हनुमंत ॥ ४६ ॥ चातकाचे आळवणासाठीं । जगतीतळीं पहा होय वृष्टी । स्वसुकाळें कोंदे सृष्टी । क्षुधा उठाउठीं पैं निरसे ॥ ४७ ॥ तेंवी मारुतीचेनि भजनें । कृपा वोळोनि रघुनंदनें । जग निववी वरदानें । हीन जनें उद्धरती ॥ ४८ ॥ देखोनि वत्साचे क्षुधेतें । धेनु दुभे घरापुरतें । तेंवी हनुम्याचे वरदार्थें । निववी जगातें श्रीराम ॥ ४९ ॥

१ संताप, क्रोध. २ नरकवास. ३ युक्ति. ४ हिरावून नेलें, फसविलें. ५ त्वरित. ६ स्वतः. ७ दऱ्याखोऱ्यांत. ८ मिचकावी. ९ वानरवीर. १० पुष्कळ. ११ इच्छित. १२ सत्वर. १३ प्राप्त झाला. १४ परिपूर्ण. १५ याचनेमुळें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

ऐसा अपूर्व प्रस्तावो । कृपा वोळोनि रामरावो । पुढिले प्रसंगीं वदेल पहा हो । अभिनव भावो तेथींचा ॥ १५० ॥ एका जनार्दना शरण । कृपा वोळला रघुनंदन । हनुमंतासी वरदान । स्वयें आपण देतसे ॥ ५१ ॥ तें वदावया वरदान । श्रोते साधु संत सज्जन । कृपापूर्वक पसायदान । प्रीति करोन मज द्यावें ॥ ५२ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां श्रीरामशेषहनुमत्प्राप्तिनिरूपणं नाम अष्टाशीतितमोऽध्यायः ॥ ८८ ॥ ओंव्या ॥ १५२ ॥

अध्याय एकुणनव्वदावा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ धन्य हनुम्याचा भावार्थ । धन्य हनुम्याचा पुरुषार्थ । धन्य हनुम्याचा सिद्धार्थ । जेणें रघुनाथ वोळला ॥ १ ॥ न मागतांही निश्चयेंसीं । माग म्हणे आवडीसीं । निजदासीं कृपा ऐसी । हर्षें त्यासी माग म्हणे ॥ २ ॥

प्रसन्नो हि हनूमंतमुवाच रघुनंदनः ।
वरं वृणीष्व चाद्य त्वं महत्कार्यं कृतं त्वया ॥ १ ॥

तुझिया महत्कार्याची कथा । वाचे न बोलवे सर्वथा । तुझा ऋणी मी हनुमंता । जाण तत्त्वतां निश्चयें ॥ ३ ॥ काय अपेक्षी तुझें चित्त । जें दुष्प्राप्य त्रैलोक्यांत । तें तें मागावें निश्चित । कृपा रघुनाथ वोळला ॥ ४ ॥

एवमुक्तोऽब्रवीद्रामं हर्षपर्याकुलेक्षणः ।
यावद्रामकथा देव पृथिव्यां विचरिष्यति ॥ २ ॥
तावदेव मयि प्राणास्तिष्ठंतु वरदोसि मे ।
यावद्रामकथा लोके चंद्रसूर्यौ ग्रहादयः ॥ ३ ॥

देखोनि कृपेचा उत्कर्ष । हनुमान झाला हर्षमानस । प्रेमाश्रु चालिले नेत्रांस । कंप गात्रांस पैं आला ॥ ५ ॥ अंगीं रोमांच बाष्प कंठासी । स्वेदें चालिला सर्वांगासी । लोटांगण अति प्रीतीसीं । मिठी चरणांसी घातली ॥ ६ ॥ प्रेमा जिरवोनियां पोटीं । गद्गदें बोले वाक्पुटीं । स्वामी बोललेति कृपादृष्टीं । सभाग्य सृष्टीं मी एक ॥ ७ ॥ कृपा वोळली रघुनाथा । तरी ऐसें करावें स्वामिनाथा । जंव पृथ्वीवरी रामकथा । तंववरी असावे तत्त्वतां प्राण माझे ॥ ८ ॥ जेथें जेथें रामकथन । तेथें तेथें मस्तकांजली पूर्ण । असावें माझें अधिष्ठान । हेंचि वरदान मज द्यावें ॥ ९ ॥ जिणयाचें फळ तत्त्वतां । नित्य श्रवणीं रामकथा । वाचेसी रामगुण वर्णितां । उसंत चित्ता नसावी ॥ १० ॥ ऐसी नामाची काय प्रीती । स्वामी ऐकावें तदर्थीं । तुझ्या नामाची निजख्याती । यथानिगुतीं सांगेन ॥ ११ ॥

आकृष्टिः कृतचेतसां सुमहता-
मुच्चाटनं चांहसा- ।
माचांडालममूकमात्रसुलभो
वश्यश्च मोक्षश्रियः ।
नोदीक्षां न च दक्षिणां न च पुर-
श्चर्यामनागिष्यते
मंत्रोयं रसनास्पृगेव फलति
श्रीरामनामात्मकः ॥ ४ ॥

वैरी उच्चाटावया पूर्ण । लोभें करिती अभिचारर्ण । तें उच्चाटन गौण जाण । ऐक लक्षण तयाचें ॥ १२ ॥ साङ्ग झालें कर्माचरण । तेणें एका शत्रूचें होय हनन । तरी वैर न खंडे जाण । आणिक पूर्ण उठती शत्रु ॥ १३ ॥ कामक्रोधादि वैरी क्रूर । व्यापूनि ठेले अंतर । ते क्षणोक्षणां करिती मार । योनि अघोर भोगविती ॥ १४ ॥ विषयलोभें करोनि पूर्ण । जे करिती दुराचरण । त्यां भोगविती अधःपतन । बांधोनि जाण श्रीरामा ॥ १५ ॥ जें त्या विषयाचरणारहित । तें पापाचें खाणोनि खत । कामक्रोधांचा निजघात । कर्तें निश्चित नाम तुझें ॥ १६ ॥ म्हणसी पाहिजे अधिकार । ऐक तयाचा विचार । नलगे शास्त्रांचा संभार । श्रुतिउपचार पैं नलगे ॥ १७ ॥ नलगे काव्यनाटकव्युत्पत्ती । पुरश्चरणाची कायसी स्थिती । तीर्थांची कायसी गती । योगवृत्ति जे नव्हे ॥ १८ ॥ त्या कल्मषांचा महाकंद । खाणावया अति अगाध । द्विअक्षर मंत्र प्रसिद्ध । द्वेषद्वंद्वदाहक ॥ १९ ॥ राम ऐसें वर्णद्वय । रसनेसीं स्पर्श होतां पाहें । मुक्ति वोळंगती स्वयें । दास्यत्वेंसीं तत्त्वतां ॥ २० ॥ न लगे दीक्षा न लगे दान । योग याग पुरश्चरण । मंत्र तंत्र तीर्थाटण । व्रतादि

१ इच्छीत आहे. २ मिळण्याला कठीण. ३ घाम. ४ कंठ भरून येऊन. ५ फुरसत, विश्रांति. ६ नीचदेवतापूजन. ७ वेदविहित विधि. ८ पापाचा. ९ जिव्हेला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

जाण कांहीं न लगे ॥ २१ ॥ रामनामाक्षरद्वयासी। भेटी होतांचि रसनेसीं । जाळोनि कल्मषांच्या राशी। मोक्षश्रियेसी वरी स्वयें ॥ २२ ॥ हें तुझ्या नामाचें महिमान। सांगितलें अत्यंत गौण। त्याहूनि नाममहिमान। सांगतां वचन सरेना ॥ २३ ॥ तथापि कांहीं संकेताकारें। नाममहिमा प्रेमभरें। सांगेन तेथें रघुवीरें। अत्यादरें कृपा करणें ॥ २४ ॥ तेचिविषयींचा श्लोकार्थ। स्वामी परिसा सावचित्त। नाममहिमा अत्यद्भुत। श्रोते परिसोत अत्यादरें ॥ २५ ॥

वेपंते दुरितानि मोहमहिमा संमोहमालंबते
सातंकं नखरं जनं कलयति श्रीचित्रगुप्तः कृती।
स्वानंदं मधुपर्कसंभृतिविधा बध्वा करोत्युद्यमं (?)
वक्तुंनाम्नि तवेश्वराभिलषिते ब्रूमः किमन्यत्परम्॥ ५ ॥

तुझिया नामाची आवडी। जीवीं उपजतां रोकडी। कोण कोणा पडे सांकडी[1]। ऐक निर्वेडीं[2] श्रीरामा ॥ २६ ॥ तुझे नामोच्चारीं आदर। ऐक तयांचा बडिवार। महापातकांचा संभार[3]। कांपे थरथर निजधाकें ॥ २७ ॥ वाचे उच्चारावया तुझें नाम। जीवीं धरिलें असे प्रेम। क्षणें आमुचें करील भस्म। भय दुर्गम[4] नामाचें ॥ २८ ॥ नाम उच्चारिलें नाहीं येणें। तंव तें स्थळ टाकोनि जाणें। अन्यथा नुरिजे जीवें प्राणें। निश्चय करणें महापापीं ॥२९॥ जेणें श्रमें उपजे पातक। तो श्रमचि श्रमातें पावे देख। नामोच्चारीं आवडी चोख। करी निःशेख निर्मोह ॥ ३० ॥ पाप लिहिती चित्रविचित्र। त्यांसी अलोट पडे विचार। हा करूं पाहे नामोच्चार। पापाचार कैंवी राहे ॥ ३१ ॥ म्हणोनि खुंटलें लेखन। लेखनी सर्वथा न चाले जाण। वर्णाक्षरउच्चारण। निश्चयें पूर्ण नाठवे ॥ ३२ ॥ असो या क्षुद्रांची गती। मुख्य ब्रह्मा लोकपती। त्यासीही पडे विचार चित्तीं। दूतांप्रती करी आज्ञा ॥ ३३ ॥ आनंदमय होवोनि पूर्ण। दूतां आज्ञापी चतुराननन। पैल करूं पाहे नामस्मरण। पूजाविधान सिद्ध करा ॥ ३४ ॥ विधिपूर्वक अभिषेक। मधुपर्कविधि पूजा देख। करोनि पावावया ब्रह्मलोक। चतुर्मुख तिष्ठत ॥ ३५ ॥ नामोच्चारीं आवडी धरितां। ऐसी पदवी रघुनाथा। तें सर्वदा नाम जपतां। कोण अर्थी न पाविजे ॥ ३६ ॥ यालागीं स्वामी रघुपती। जेथें जेथें तुझी नामकीर्ती। [6]निमेष असेल होती। तेथें मारुतीनें असावें ॥ ३७ ॥ जेथें श्रीरामसंकीर्तन। तेथें म्यां मस्तकांजलि संपूर्ण। तिष्ठत असावें अँनवच्छिन्न। हें वरदान मज द्यावें ॥ ३८ ॥ श्रवणीं श्रवणाची आवडी। वाचेसी हेचि नित्य गोडी। नाम गर्जतां अति प्रौढीं। उद्धरी कोडी पतितांच्या ॥ ३९ ॥ तुझ्या निजनामेंकरून। महापापांचें करोनि कंदन। प्रायश्चित्ता बोळवण। जगउद्धरण श्रीरामें ॥ ४० ॥ केवळ नव्हे माझी अवस्था। ज्यासी नामीं आवड चित्ता। त्याचेनि जगासी पावनता। नित्य मुक्तता श्रीरामें ॥ ४१ ॥ माझें मागणें हेंचि परम। उत्तममध्यमादि अधम। सकळीं स्मरावा श्रीराम। मरणजन्मच्छेदक ॥ ४२ ॥ वेदशास्त्रीं अधिकारता। ज्यासी नाहीं तत्त्वतां। त्यासी नाम द्यावें रघुनाथा। उद्धारता श्रीरामें ॥ ४३ ॥ स्त्रीशूद्रादि केवळ। नीचयोनीचे चांडाळ। महापतित अमंगळ। नामें सकळ उद्धरावे ॥ ४४ ॥ जे एकवार जपती नाम। ते करावे नित्य निष्काम। जे नाम ऐकती सप्रेम। सर्वोत्तम करावे ते ॥ ४५ ॥ श्रोत्यां वक्त्यांतें देखोन। संतोष पावे ज्यांचें मन। त्यांहीं पावावें कल्याण। रघुनंदननिजकृपा ॥ ४६ ॥ नामधारकांतें निर्भर्त्सिती। द्वेषिती त्रासिती उपहासिती[9]। नानापवाद घालिती। उपद्रविती दुष्टत्वें ॥ ४७ ॥ त्यांची जावोनि दुष्टवृत्ती। शुद्ध निर्विकल्प स्थिती। पावोनियां निश्चितीं। श्रीरघुपती उद्धरावें ॥४८॥ विकल्पाचा विकल्प तोडीं। अधर्माचें दौरात्म्यें[10] मोडीं। संदेहाचा संदेह फेडीं। निजप्रौढी श्रीरामा ॥४९॥ सकळ जन स्वानंदमग्न। सकळ जन संकल्प निरसोन। नामें करावे सुखसंपन्न। हेंचि वरदान मज द्यावें ॥ ५० ॥

सर्वेपि सुखिनः संतु सर्वे संतु निरामयाः।
सर्वे भद्राणि पश्यंतु मा कश्चिद्दुःखमाप्नुयात् ॥ ६ ॥

जे जपहीन तपोहीन। व्रतपुरश्चरणदानविहीन। योगयागतीर्थाटन। कांहीं साधन जाणती ना

१ संकट. २ निश्चित. ३ समुदाय. ४ कठिण. ५ ब्रह्मदेव. ६ क्षणभर. ७ अखंड, सदोदित. ८ पाठवणी.

९ थट्टा करितात. १० दुष्टपणा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ ५१ ॥ सत्संगाचें नेणती सुख । वैराग्याचा गंध निःशेख । श्रवणाचें न देखती मुख । ते सकळिक उद्धरावे ॥ ५२ ॥ संसाररोग अति दुर्धर । पापभोगांची यातना क्रूर । पीडिजेती जीवमात्र । भोगिती अघोर नीचयोनी ॥ ५३ ॥ त्यांसी रामनामरससार । देवोनि उपचारावे सत्वर । मोडोनि भवरोगाचा थार । नित्य अक्षरें करावें ॥ ५४ ॥ निरसोनियां द्वेषद्वंद्व । करावे निर्विकल्प शुद्ध । भोगावया परमानंद । सदानंद श्रीरामें ॥ ५५ ॥ विश्व अवघें सुखसंपन्न । सदा असावें स्वानंदमग्न । हेंचि द्यावें वरदान । म्हणोनि लोटांगण घातलें ॥ ५६ ॥ ऐकोनि हनुम्याचें वरदान । सकळ झाले आनंदमग्न । हनुम्यानें संदेह फेडिला पूर्ण । दीन जन उद्धरिले ॥ ५७ ॥ श्रीरामाची प्रसन्नता । हनुमंतीं बाणली तत्त्वतां । विश्व उद्धरिलें सर्वथा । श्रीरघुनाथाचेनि धर्में ॥ ५८ ॥ म्हणोनियां देव दानव । यक्ष किन्नर गंधर्व । सिद्धचारणादि सर्व । पन्नगमानवादिकरोनी ॥ ५९ ॥ खेचर भूचर जलचर । बिभीषणादि निशाचर । नामें गर्जती वानर । जयजयकार प्रवर्तला ॥ ६० ॥ तुझेनि नामें सार्चार । म्यां उद्धरावें चराचर । हनुम्यानें मागतां ऐसा वर । पूर्ण चराचर सुखमय ॥ ६१ ॥ बहुकाळ प्राण वांचणें । म्यां मागितलें याचिकारणें । ऐसें मागतां वायुनंदनें । श्रीरघुनंदनें अंगिकारिलें ॥ ६२ ॥ जग उद्धरावया साचें । अचाट मागणें हनुमंताचें । अचाट देणें श्रीरामाचें । प्रेम भक्ताचें अति गहन ॥ ६३ ॥ हनुम्याच्या प्रेमावेशीं । राम बोळला प्रीतीसीं । स्वयें देतां वरदानासी । कृपा मानसीं अनिवार ॥ ६४ ॥

ततस्तु राघवः प्रीतः परिष्वज्यांजनासुतम् ।
एवं भवतु भद्रं ते यावद्भूमिर्धरिष्यति ॥ ७ ॥
पर्वताश्च समुद्राश्च तावदायुरवाप्नुहि ।
मैथिल्यपि तदा चैव प्रददौ वरमुत्तमम् ॥ ८ ॥
उपस्थास्यंति भोगास्त्वां स्वयमेव जिता हरे ।
देवदानवगंधर्वास्तथैवाप्सरसां गणाः ॥ ९ ॥
यत्र तिष्ठसि तत्रैव सेविष्यंति तथामरम् ।
एवमस्त्विति चोक्त्वा वै प्रययौ साश्रुलोचनः ॥ १० ॥

चित्तस्नेहाच्या निजावेशीं । राम बोळला वरदेसीं । आलिंगोनि अति प्रीतीसीं । काय त्यासी बोलत ॥ ६५ ॥ कुरवाळोनि अमृतहस्तीं । प्रेमाचिया अति प्रीतीं । बोलतसे रघुपती । ऐक मारुती सावध ॥ ६६ ॥ तुवां मागितलें वरदान । तेथें तुझें नाहीं कारण । विश्वोद्धारा कळवळोन । वरद संपूर्ण मागितलें ॥ ६७ ॥ हें माझें अवतारकार्य जाणा । तुवां संपादिलें वायुनंदना । कळवळोनि दीनजनां । विश्वोद्धारणा तुवां केलें ॥ ६८ ॥ जैसें मागितलें वरदासी । त्याहूनि विशेष पावसी । वर देवोनि हनुम्यासी । कर मस्तकासीं ठेविला ॥ ६९ ॥ तुझेनि नामें काळ कांपे । कामक्रोध उभाचि करपे । तुझिया नामाचेनि दर्पें । द्वंद्वें निर्ष्पापें स्वयें होती ॥ ७० ॥ काळ काम भवभ्रम । तुझेनि नामें होय भस्म । प्राणी होवोनि निष्काम । विश्रामधाम पावती ॥ ७१ ॥ तुझेनि सनाथ रामकथा । तुझेनि सनाथ अवतारता । तुझेनि श्रीराम सर्वथा । जाण तत्त्वतां मारुती ॥ ७२ ॥ तुझेनि विख्यात माझें नाम । तुझेनि विख्यात माझें कर्म । तुझेनि संरता श्रीराम । विश्रामधाम जगाचें ॥ ७३ ॥ अहिरावणें धरोनि नेलें । दोघां बंधूंसी विटंबिलें । शिरच्छेदासी उभें केलें । सामर्थ्य हरिलें आमुचें ॥ ७४ ॥ आम्हां करोनि कृपण । म्हणती तुमचा बळिया कोण । वेगीं करा त्याचें स्मरण । शिरःपतन जाण करावया ॥ ७५ ॥ स्मरण करितांचि मारुती । तुझी उडी आली अवचितीं । येवोनि केली बंधमुक्ती । केली शांती निशाचरां ॥ ७६ ॥ मज सोडवोनि रघुनाथा । निवटोनियां राक्षसनाथा । सपरिवारें लंकानाथा । शरणागता स्थापिलें ॥ ७७ ॥ सोडवोनि सीता सुंदरी । विकल्प निरसोनि निर्धारीं । दिव्यीं उतरोनि झडकरी । प्रीती थोरी भेटविली ॥ ७८ ॥ अयोध्ये आणोनि वेगेंसीं । भेटवोनियां भरतासी । अभिषेकोनि आम्हांसी । रामचरितासी संपविलें ॥ ७९ ॥ तेथें कायसें माझें वरद । तुझा प्रताप अति अगाध । भक्तिप्रतापें अगाधबोध । परमानंद जगासी ॥ ८० ॥ तुझेनि सनाथ रामकथा । तुझेनि श्रवणें उद्धरे श्रोता । तुझेनि संगें नाम पढतां । उद्धरे वक्ता

१ असह्य. २ उपाय योजावा. ३ नाशरहित. ४ आकाशांत संचार करणारे. ५ राक्षस. ६ खरोखर. ७ वर देऊन. ८ पापरहित. ९ विश्रांतिस्थान. १० श्रेष्ठ. ११ दीन. १२ अग्नीवरून चालणें, इत्यादि क्रियांनीं.

CC-0. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

तत्काळ ॥ ८१ ॥ असो श्रोतयां वक्तयांची कथा । तुझेनि भजनीं आदर धरितां । निष्काम होवोनि तत्त्वतां । नित्यमुक्तता तो पावे ॥ ८२ ॥ जंव पृथ्वी वाहे सकळ भूतें । जीवन जीववी जगातें । वायु चाळवी विश्वातें । चंद्रार्क असती निश्चितें गगनीं ॥ ८३ ॥ सुस्थिर बैसका कुळाचळां । तंववरी तुझें आयुष्य गोळांगूळा । चिरंजीवियांमाजि आगळा । प्रताप सोज्ज्वळ पैं तुझा ॥ ८४ ॥ त्रुटि लव निमेष पळ । घटिका मुहूर्त काळ । श्रीरामभजनें अचंचळ । लोक सकळ उद्धरसी ॥ ८५ ॥ तुझेनि स्मरणें मारुती । भयभीता प्रतापशक्ती । अविरक्तासी विरक्ती । होय निश्चितीं सर्वथा ॥ ८६ ॥ संदेहपणाचा संदेह । तुझेनि होय निःसंदेह । विकल्प निर्विकल्पभाव । नामनिर्वाह करी तुझा ॥ ८७ ॥ कुतर्क्यांचे कुतर्क मारुती । तुझेनि नामें भस्म होती । शठकपटियांच्या वृत्ती । निष्कपट होती तुझेनि ॥ ८८ ॥ नास्तिकांचे शून्यवाद[2] । दांभिकांचे दंभभेद । तुझेनि नामें निर्द्वंद्व । महाबोध पावती ॥ ८९ ॥ कामक्रोधलोभादिक । महापिशाच दुर्जय देख । तुझेनि नामें एकाएक । भस्म निःशेख पैं होती ॥ ९० ॥ इतर पिशाचांच्या कोण कथा । भस्म होती क्षणार्धता । तुझेनि नामें वायुसुता । निर्मुक्तता जगासी ॥ ९१ ॥ वरद वदतां रघुनाथा । येरें चरणीं ठेविला माथा । स्यां प्रार्थिलें कोण्या अर्था । कोण कथा येथें झाली ॥ ९२ ॥ तुझेनि नामें रघुपती । चराचरा व्हावी मुक्ती । ऐसें मागतां स्वामीप्रती । झाली वरदोक्ती विपरीत ॥ ९३ ॥ सांडोनि स्वामीचें नाम । आड घालणें प्लवंगम[3] । ऐसा नव्हे भजनधर्म । लोकही विषम मानिती ॥ ९४ ॥ ऐसें न करावें स्वामिनाथा । म्हणोनि लोटांगण घालितां । तंव हास्यवदनें तत्त्वतां । झाला वदता श्रीराम ॥ ९५ ॥ श्रीराम आणि हनुमान जाण । स्वरूप एक नामें भिन्न । भेद नाहीं अणुप्रमाण । ऐक विवंचन सांगेन ॥ ९६ ॥ विचारितां वस्तुविचारें[4] । मज रूप नाहीं निर्धारें । नाम तेथें कोठें सरे । भ्रममोहिरें[5] नामरूप ॥ ९७ ॥ ऐसिया नामरूपातीतासी[6] । भक्तीं आणोनियां रूपासी । स्वामित्व देवोनि प्रीतीसीं । वैकुंठवासी मज केलें ॥ ९८ ॥ लक्ष्मीऐसी अनुचर ।

कौस्तुभादि अलंकार । भक्तीं देवोनि अपार । राज्यधर मज केलें ॥ ९९ ॥ हृषीकेशादिक नांवें । भक्तीं अर्पिलीं निजगौरवें । नामें विश्व उद्धरावें । हेंही करावें निजभक्ती ॥ १०० ॥ असो इतर भक्तांची हे कथा । पूर्वीं मज रघुनाथा । सर्वथा कोणी जाणत नव्हता । वनीं फिरतां अनाथत्वें ॥ १ ॥ सीतावियोगें दुःखातुर । दोघे बंधु जैसे किंकर । झालों होतों वनचर । नेदी आधार पैं कोणी ॥ २ ॥ तुवां भेटोनि कपिनाथा । सुग्रीव सखा मज रघुनाथा । तुवां करोनि दिला तत्त्वतां । वाळिघाता करविलें ॥ ३ ॥ निर्दाळोनि राक्षसमांदी । तुवां आणिली सीताशुद्धी । महापाषाणीं जळनिधी । निमेषार्धीं बांधिला ॥ ४ ॥ विश्वेश्वरासी भेटोन । निमेषार्धें लिंग आणोन । सेतुबंधमाहात्म्य गहन । जगदुद्धार तुझेनि ॥ ५ ॥ विध्वंसोनि लंकाभवन । सकळ सैन्य प्रधान । निवटिला दशानन । अर्धक्षण न लागतां ॥ ६ ॥ सुरवरांचे बंदिमोचनीं । शरणागता संस्थापूनी । सोडवोनि जनकनंदिनी । समाधान जनीं दीधलें ॥ ७ ॥ गुढी आणोनि प्रीतीसीं । भेटविलें भरतासी । सुरवरांच्या गडगर्जेसीं । अयोध्यानगरासी प्रवेश ॥ ८ ॥ अद्भुत ख्याति करोनि जाण । अभिषेक केला मजलागून । जगद्वंद्य केलें पूर्ण । तुवां एकलेनि हनुमंता ॥ ९ ॥ एवढा तुझा कृतोपकारी । हेंही सांगितलें संक्षेपाकारीं । याहूनि तुझी अगाध थोरी । केंवी वैखरी बोलों शके ॥ ११० ॥ सत्यत्व मानीं माझिया बोला । मी श्रीराम तुझा केला । तुझेनि जगद्वंद्य झाला । प्रताप वाखाणिला तुझेनि ॥ ११ ॥ तुझेनि माझी शौर्यशक्ती । तुझेनि माझी प्रतापख्याती । नामें महापापी उद्धरती । हेंही वरदोक्ती तुझेनि ॥ १२ ॥ यालागीं निजनिर्धारीं । मी तुझ्या सबाह्याभ्यंतरीं । तुझ्या इंद्रियांचे व्यापारीं । निरंतरीं मी वर्तें ॥ १३ ॥ याचें नवल नव्हे मारुती । जे तुझें नाम स्मरती । त्यांपासीं मी रघुपती । तिष्ठें निश्चितीं सर्वदा ॥ १४ ॥ मजपरीस हनुमंता । सर्वस्वें भजतां माझ्या भक्ता । अति आल्हाद मज रघुनाथा । तें सुख सर्वथा न बोलवे ॥ १५ ॥ जेंवी पूजिल्या निज-

१ हे वानरा. २ निरीश्वरवाद. ३ वानर. ४ खऱ्या प्रकारें. ५ मिथ्या. ६ नामरूपापलीकडील. ७ उपकारबद्ध.

८ थोडक्यांत. ९ अंकित.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

बाळक । माता सुखावे आत्यंतिक । तेंवी मद्भक्त पूजिल्या देख । सुख अलोलिक मज तेणें ॥ १६ ॥ मद्भक्तांचे झालिया भक्त । त्यांचे सकळ मनोरथ । म्यां पुरवोनियां कृतकृत्य । नित्य निर्मुक्त करीं त्यांसी ॥ १७ ॥ माझी आवडी ज्यांचे चित्तीं । तिंहीं सांडोनि इतर संगाप्रती । करितां भगवद्भक्तसंगती । चारी मुक्ती वोळंगण्या ॥ १८ ॥ सांडोनि इतर संगती । महापापियां नित्यमुक्ती । सनकादिकांच्या निजख्याती । स्वयें गर्जती पुराणें ॥ १९ ॥ ब्रह्मयाची निजांधवृत्ती । उत्तर न देववे पुत्रांप्रती । हंसगीता दावोनि युक्ती । आत्मस्थिती आणिला ॥ १२० ॥ चोरटा वाल्मीक नारदवचनें । जगद्वंद्य रामभजनें । प्रल्हाद वंदिजे पुराणें । अंगीं द्वंद्वें साहणें मी त्याचीं ॥ २१ ॥ गर्भीं ऐकतां वचनासी । अगाध स्थिती बाणली त्यासी । तुवांचि उद्धरिलें संपातीसी । मधुरवचनेंसीं क्षणमात्रें ॥ २२ ॥ अति गूढ विवरामधीं । हेमा पडली होती बंदीं । तिसी भेटोनि त्रिशुद्धी । निजानंदीं उद्धरिली ॥ २३ ॥ ऐसें आणिक सांगों किती । जग निर्मुक्त सत्संगती । ऐसीं श्रुतिशास्त्रें गर्जती । आणि प्रतीती प्रत्यक्ष ॥ २४ ॥ ऐसें सांगतां रघुनाथा । प्रेम न सांवरे हनुमंता । चरणीं ठेवोनियां माथा । मूर्च्छावस्था पडियेला ॥ २५ ॥ सत्संगाची निजस्तुती । स्वमुखें करितां रघुपती । आनंदमय त्रिजगती । नित्यनिर्मुक्ती जडजीवां ॥ २६ ॥ आनंद उथळला सर्वांसी । नामें गर्जती अट्टाहासीं । नित्यमुक्ति सत्संगासी । अनायासीं जडजीवां ॥ २७ ॥ योग याग तप साधन । कृच्छ्रू अतिकृच्छ्रू चांद्रायण । पर्वतपात नलगे जाण । कर्वतभेदन निजमाथां ॥ २८ ॥ ऐशा दुर्जयसाधनस्थितीं । सकळ सांडोनि निश्चितीं । भावें धरितां सत्संगती । जगनिर्मुक्ती सत्संगें ॥ २९ ॥ ऐसें वरदवचनेंकरून । रामें केलें मारुतिपूजन । तेणें जडजीवां उद्धरण । झालें पूर्ण अनायासें ॥ १३० ॥ याचि रीतीं बिभीषण । अनिवार प्रेम दारुण । श्रीराम त्याची बोळेंवण । स्वानंदें पूर्ण पैं करील ॥ ३१ ॥ तें अति गोड निरूपण । देवभक्तांचें प्रेम पूर्ण । एका जनार्दना शरण । रामायण राम वदवी ॥ ३२ ॥ धन्य भक्ति बिभीषणाची । धन्य प्रीति श्रीरामाची । बोळवण करितां भक्ताची । प्रेम रामासी अनिवार ॥ ३३ ॥ आज्ञा देवोनि समस्तांसी । रामराज्य अयोध्येसी । अंतीं अवघीं नेलीं वैकुंठासी । सुख सर्वांसी दीधलें ॥ ३४ ॥ शरण एकीं एकनाथा । जनार्दन कृपावंता । रसाळ रामायणी कथा । तुझा वक्ता तूं स्वामी ॥ १३५ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां हनुमत्प्रेमवर्णनं नाम नवाशीतितमोऽध्यायः ॥ ८९ ॥ ओंव्या ॥ १३५ ॥ श्लोक ॥ १० ॥

अध्याय नव्वदावा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ तदुपरी दुसरे दिवशीं । सारोनियां नित्यकर्मासी । बैसोनि अंतरसभेसी । बिभीषणासी बोलाविलें ॥ १ ॥ सीता आणि त्रिवर्गबंधु । उभे राहिले अति स्तब्धु । मग मांडिला उद्बोधु । बिभीषणालागूनी ॥ २ ॥ बिभीषणासी म्हणे श्रीरघुपती । मज कळली तुझी मनोवृत्ती । आतां असावें अयोध्येप्रती । माझ्या स्नेहालागोनियां ॥ ३ ॥ तरी लौकिकीं माझी वार्ता । लंका दिधली शरणागता । ते हिरोनि सलोभता । बिभीषण अयोध्ये ठेविला ॥ ४ ॥ तरी हें थोर जघन्य । सूर्यवंशा येईल ऊन । स्वर्गीं हरिश्चंद्रादि आपण । अधःपतन पावतील ॥ ५ ॥ म्हणोनि वचनाकारणें । पूर्वजीं प्राणान्त करणें । परी अन्यथा होऊं न देणें । वचन आपुलें सर्वथा ॥ ६ ॥ यालागीं म्यां आपण । सोसिलें कष्ट दारुण । चौदा वर्षें वनप्रयाण । तिघीं आम्हीं भोगिलें ॥ ७ ॥ आतांही तैसेंचि घडेल । परी वचन अन्यथा न होईल । स्वयें ब्रह्मांडही खचेल । तरी अन्यथा करूं न शकें ॥ ८ ॥ याचिलागीं पैं जाण । स्वयें शंकरें आपण । करोनियां कोप शमन । त्रैलोक्य जाण रक्षिलें ॥ ९ ॥ लंकेश म्हणे श्रीरामासी । कैसें घडलें न कळे मजसी । कृपा करोनि विस्तारेंसीं । मज प्रीतीसीं सांगिजे ॥ १० ॥ श्रीराम म्हणे रावण-

---

१ दासी. २ अनुभव. ३ प्रायश्चित्तविशेष. ४ पाठवणी. ५ स्थानेतर. ६ करून, संपवून. ७ उपदेश. ८ नीचकृत्य.

९ उणें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वधांतीं । माझ्या कोपें जळेल त्रिजगती । तंव देव येवोनि काकुळती । श्रीउमापति प्रार्थिला ॥ ११ ॥ तेणें येवोनि ते अवसरीं । स्तवोनि कोपातें आवरी । ते वेळीं लक्ष्मण चरण धरी । म्हणे आठवीं वचन आपुलें ॥ १२ ॥ स्वामीनें शरणागता । लंकाराज्य दिधलें तत्त्वतां । तें होऊं पाहे अन्यथा । विश्व प्रळयीं निमाल्या ॥ १३ ॥ मग कैंची लंका कैंचा बिभीषण । देवांसी मग रक्षील कोण । कृपाब्धि हें वचन । सांग कैसेनि उरेल ॥ १४ ॥ याचि वचनासाठीं । तुजनिमित्तें ब्रह्मसृष्टी । हें जाणोनि राक्षसकिरीटी । लंकागमन करावें ॥ १५ ॥ बिभीषण म्हणे श्रीरामासी । आज्ञा वंदोनियां शिरीं । मी जाईन लंकेसी । प्रयाणवचनासीं स्वामीचिया ॥ १६ ॥ ऐकोनि श्रीराम संतोषला । स्नेहेंकरोनि उचंबळला । बिभीषण पोटेंसीं धरिला । परम भक्त म्हणोनी ॥ १७ ॥ करोनि विश्वकर्म्याचें स्मरण । येरू पातला धरी चरण । श्रीराम म्हणे लंकेशालागून । करीं उपवनें पूर्विल्याऐसीं ॥ १८ ॥ त्रैलोक्याची संपत्ती । आणोनि ठेवीं लंकेप्रती । सांप्रत उद्वस जाहली होती । ते करीं पुन्हां यथास्थित ॥ १९ ॥ दुर्गा करोनि उभवणी । रत्नखचित करीं सुवर्णी । हाट विदिया चौबारांनीं । शोभायमान अपूर्व ॥ २० ॥ राजमंदिरें सर्व । प्रधानादि गृहें अपूर्व । पूर्विल्याहूनि गौरव । शोभावैभव अति रम्य ॥ २१ ॥ अशोकवन करीं बरवें । पुष्पकविमान निर्मावें । मागेल तें पुरवावें । बिभीषणालागूनी ॥ २२ ॥ सुवेळेपुढें रणांगण । रावणासहित रक्षोगण । यांचें झालें पूर्ण कंदन । रक्तमांस धरेवरी ॥ २३ ॥ अस्थींचे झाले डोंगर । वनें झालीं बीभत्साकार । तीं करावीं मनोहर । जैसीं पूर्वी होतीं तैसीं ॥ २४ ॥ बोलावोनि लोकपाळांसी । तुम्हीं सख्य करावें बिभीषणासीं । रावणाघरीं संपत्ती जैसी । त्याहूनि विशेषीं पुरवावी ॥ २५ ॥ बोलावोनि अष्टमहासिद्धी । तुम्हीं साह्य व्हावें बिभीषणा आधीं । तुम्हांसी सांगतों सद्बुद्धी । स्वहित सिद्ध करावें ॥ २६ ॥ सर्वेचि पाचारिले ऋषिगण । तुम्हीं आशीर्वाद द्यावा संपूर्ण । निकुंभिळेसी करील होम जाण । तो सिद्धीतें पावावा ॥ २७ ॥ गणपति दुर्गा क्षेत्रपाळांसी । श्रीराम सांगे आदरेंसीं । मनोरथ पुरवावे बिभीषणासी । कल्पतरुकामधेनूंसीं समृद्धि ॥ २८ ॥ प्रार्थोनियां ब्रह्मदेवासी । तुम्हीं कल्पावें राक्षसांसी । पुत्रसुहृदसंबंधासी । पूर्विल्यापेक्षांही करावें ॥ २९ ॥ रथ गज वाजी अनेक । चतुरंगसेना सकळिक । नाना वाद्यें अलोलिक । लंकेशातें पुरवावीं ॥ ३० ॥ धनधान्यें खिल्लारें वस्त्रें । उत्तम वास परिकरें । तांबूलसुगंधादि सहपरिवारें । बिभीषणासी पुरवावीं ॥ ३१ ॥ रावण गेलियानंतर । उणें न दिसावें अणुमात्र । सुख द्यावें सर्वत्र । लंकापुरवासियां ॥ ३२ ॥ श्रीराम म्हणे बिभीषणासी । रावणें पीडिलें त्रैलोक्यासी । तैसें न करावें विश्वासीं । करीं जगासी सुखरूप ॥ ३३ ॥ हिंसा न करावी सर्वथा । विधिप्राप्त यज्ञ करीं तत्त्वतां । मानोनियां शास्त्रसंता । साचारता वर्तावें ॥ ३४ ॥ करोनि श्रीशंकरार्चन । देवीचें करावें पूजन । स्मरोनियां नारायण । नित्यावर्ती जाण वर्तावें ॥ ३५ ॥ तुज म्हणती राक्षसजाती । परी तुझी नव्हे तैसी मती । जाणोनि माझी प्रकृती । तैसी वर्तणूक करावी ॥ ३६ ॥ न करीं अभिचारी कर्म । नाचरावे दुष्ट धर्म । उचित काळ राजधर्म । नित्यावर्ती बर्तावें ॥ ३७ ॥ राज्यीं न घडे अभिचार । अल्पायुषी नव्हती नारी नर । धन्य होती समग्र । मदनुग्रहेंकरोनी ॥ ३८ ॥ उदार होईं सर्वशक्तीं । शरण आलिया रक्षीं निश्चितीं । समरांगणीं शौर्यवृत्ती । हें हो तुजप्रती असों दे ॥ ३९ ॥ चौदा विद्या चौसष्टी कळा । ज्ञान व्हावें राक्षसपाळा । हेंही पावसी आतां स्वलीळा । ममाज्ञा करोनियां ॥ ४० ॥ करोनि सकळांसी प्रार्थना । पाठविलें स्वस्थाना । देवोनि मंत्रबीजखुणा । सर्व शक्ति जाणा दीधल्या ॥ ४१ ॥ मागुती म्हणे बिभीषणासी । प्रतिवर्षी भरवीं यात्रेसी । करोनियां महोत्साहासी । माझे स्थानासी पूजावें ॥ ४२ ॥ प्रति इंदुवारीं आपण । घ्यावें रामेश्वरदर्शन । पूजा करोनि संपूर्ण ।

---

१ शंकर. २ उलट. ३ हे राक्षसराजा. ४ ओसाड. ५ बाजार. ६ राक्षस. ७ पृथ्वीवर. ८ वस्त्रें. ९ शास्त्रमत. १० दररोजच्या क्रमानें. ११ जारणमारण.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

माझें ध्यान करावें ॥ ४३ ॥ ऐशा नानापरींच्या युक्ती । शिकवोनि लंकापती । पुढती सांगे अतिनिगुतीं । स्वात्महितीं रघुवीर ॥ ४४ ॥ रावणाचिये घरीं । तुवां रहावें निर्धारीं । स्वपुत्र ठेवावा गृहाभीतरीं । यौवराज्य देवोनियां ॥ ४५ ॥ उर्वरित रावणाचिया अंतुरी । त्या ठेवाव्या इंद्रजिताचे घरीं । सर्वस्व सांभाळावें बरवेपरी । आपुल्या अपत्यासमान ॥ ४६ ॥ शुद्ध करोनि कुंभकर्णमंदिर । तेथें ठेवावे माझे चाप शर । त्यांची पूजा करोनि परिकर । नित्य कीर्तनगजर करावा ॥ ४७ ॥ शतकोटी रामायण । करावें हें नित्य श्रवण । आपण करोनि माझें मूर्तिपूजन । विश्व लावावें स्वधर्मा ॥ ४८ ॥ करावें षडक्षरपुरश्चरण । भूतशुद्धि प्राणप्रतिष्ठा करून । केशवादि मातृका संपूर्ण । दशविध न्यास करावे ॥ ४९ ॥ जें बोलिलें अगस्तिसंहितेसी । आणि अथर्वण उत्तरतापिनीसी । करोनियां यंत्रोद्धारासी । ममार्चनासी करावें ॥ ५० ॥ सिद्धियुक्त चातुर्मास्यादि व्रत । तें बोलिलें वराहसंमत । शयनी बोधिनी व्रतत्रय व्रत । विप्रदीक्षा प्रकटावी ॥ ५१ ॥ न करावी निंदा कोणाची । स्तुति येऊं नेदीं इच्छेची । वार्ता नाणीं परांगनेची । स्वप्नीं मातें न विसरावें ॥ ५२ ॥ श्रीरामें धरोनियां पोटेंसीं । बैसविला आपणांपासीं । पाचारोनि शुक्रासी । मग मुहूर्तासी पूसिलें ॥ ५३ ॥ येरू म्हणे सुनिश्चित । उदयिक आहे सुमुहूर्त । साधोनियां अभिजित । भोजनयुक्त धाडावा ॥ ५४ ॥ याउपरी श्रीरामें । प्रधान बोलाविले अनुक्रमें । लंकेसमीप द्वीपें उत्तमें । बिभीषणालागीं दीधलीं ॥ ५५ ॥ शत रथ सहस्र हस्ती । तुरंग उत्तम सालंकृती । लंकेशासी विधियुक्तीं । अति प्रीतीं दीधले ॥ ५६ ॥ जानकीस पाचारोनि रघुनंदन । कानीं सांगोनि वचन । पूजा करोनि संपूर्ण । बिभीषणपत्नी पाठवावी ॥ ५७ ॥ आज्ञा वंदोनि शिरीं । पूजा करोनि यथोपचारीं । वस्त्रालंकारपरिकरीं । शिबिकारूढ पाठविली ॥ ५८ ॥ ऐसे रीतीं रघुपती । सिद्ध करोनि लंकापती । सर्वें देवोनि प्रधान सुमती । लंकेप्रती गमन करवी ॥ ५९ ॥ येरीकडे विश्वकर्मा आपण । करोनि लंकेसी गमन । आज्ञेप्रमाणें रचोनि पूर्ण । श्रीरामचरण वंदिले ॥ ६० ॥ आज्ञेप्रमाणें आपण । ब्रह्मा रची सृष्टि संपूर्ण । लोक भरोनि विविधजन । अष्टादशवर्ण नांदवी ॥ ६१ ॥ तैसेंचि मागुते येती सकळ । समृद्ध करोनि लंकामंडळ । वंदोनियां भूपाळ । स्वस्थानासी निघाले ॥ ६२ ॥ पाचारोनि सकळ ऋषी । श्रीराम नम्रत्वें बोले तयांसी । तुम्हीं जावोनि लंकेसी । बिभीषणासी स्थापावें ॥ ६३ ॥ माझा बिभीषण आपण । तें माझें निजस्थान । अग्रगणी वैष्णव पूर्ण । मी तयाधीन सर्वस्वें ॥ ६४ ॥ ऐसे राहविले एक मास । प्रत्यहीं आदराचा विलास । आनंदें करोनि समरस । परस्परें स्नेहेंकरोनी ॥ ६५ ॥ प्रातःकाळीं श्रीरामचरण । देखती डोळेभरी पूर्ण । माध्यान्हीं करोनि शरयूस्नान । पंक्तीं भोजन यथारुचि ॥ ६६ ॥ सायंकाळीं रघुनंदन । देखतां आनंदें नीराजन । भाट गर्जती संपूर्ण । श्रीरामगुण वाखाणिती ॥ ६७ ॥ प्राप्त झालिया निशीं । यथाविधि सुमनचंदनासी । शय्याविधीची उपमा कैसी । ब्रह्मसदनासीं समानत्वें ॥ ६८ ॥ एके दिवशीं वनक्रीडेसी । जाऊनि करिती सहपरिवारेंसीं । तैसेंचि राजगृहीं संभ्रमेंसीं । अति आनंदेंसीं भोगिती ॥ ६९ ॥ सर्वेंचि येती गोपुरासी । मग पाहती गजयुद्धासी । रचूनि सकळ सैन्यासी । निशीं अग्नियंत्रासी दाविती ॥ ७० ॥ राजगृहीं तांबूलसन्मान । मग पावती आपुलें स्थान । भोग भोगिती संपूर्ण । जे रघुनंदनें निर्मिले ॥ ७१ ॥ गंधर्व येती घरासी । नानापरी दाविती कर्मासी । लाहोनि यथोचितासी । मग सेजेसीं पहुडती ॥ ७२ ॥ तेथें येवोनि उर्वशींचें शत । सेवेलागीं तिष्ठत । परी त्यांचें मन नव्हेचि कामासक्त । कीं हरिभक्त म्हणोनी ॥ ७३ ॥ ऐसा करितां गदारोळ । आनंदें भरिला भूगोळ । कीर्ति स्फुटों पाहे दिङ्मंडळ । रामरायाचेनि धर्में ॥ ७४ ॥ सुखरत सर्व अहोरात्र । काळ पळे झांकोनि नेत्र । इतराचा लेखा किंमात्र । श्रीरामराज्य करितां स्वामी ॥ ७५ ॥ देव येवोनि तेहतीस कोडी । करीं धरोनि कुरवंडी । गावोनि रामरायाची प्रौढी । मग ओंवाळोनि सांडिती

१ फार काळजीनें. २ उरलेल्या. ३ स्त्रिया. ४ राजे. ५ प्रतिदिवशीं. ६ रात्र. ७ निद्रा करितात. ८ पृथ्वी. ९ पाड.

CC-0. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ ७६ ॥ होतां अरुणोदय प्राप्त । स्तुतिवादें बोधिती श्रीरघुनाथ । प्रतिपाळीं विश्व समस्त । प्रातर्बोध करिते झाले ॥ ७७ ॥ मग उठोनि सकळांसी । शौचविधी यथान्वयेंसीं । घालोनियां मृदासनासी । मूर्ति ध्यानासी आणिती ॥ ७८ ॥ येवोनि सकळ जन । घेती श्रीरामदर्शन । मग करोनि शरयूस्नान । संध्याहोम संपादिती ॥ ७९ ॥ करोनि देवतार्चन । घेवोनि वस्त्रें भूषण । परस्परें अर्पोनि सुमन चंदन । राजद्वारा जाण स्वयें येती ॥ ८० ॥ काय वानूं हाटवटिया । जाणों मूर्तिमंत निधी ठेलिया । किंवा बोळंगणे आलिया । सकळ संपत्ती समवेत ॥ ८१ ॥ अंतरसभा विसर्जून । बाहेरी आला रघुनंदन । तंव वानिती वंदिजन । अति पुरुषार्थ चार ते ॥ ८२ ॥ ऐसा नित्यानित्य उत्साव । करिता झाला रामराव । आनंदाचा गौरव । ब्रह्मादिकां दुर्लभ ॥ ८३ ॥ यापरी बिभीषण एकांतीं । प्रबोधोनि बहुतां युक्ती । आणोनि कौसल्येप्रती । चरणावरी घातला ॥ ८४ ॥ माता म्हणे बिभीषणासी । तूं माझ्या रामाचा सखा होसी । मग देवोनि आशीर्वचनासी । सुमित्रे कैकयीसी भेटविला ॥ ८५ ॥ सात शतें माता समस्त । डोळां पाहती सुग्रीव लंकानाथ । सकळांसहित हनुमंत । त्रिजगतींत तत्सम असेना ॥ ८६ ॥ चौघी सुना येवोनि ते वेळीं । पाहती बिभीषण वानरमंडळी । हाडपियां[२] करीं तांबोली । देवोनियां धाडिले ॥ ८७ ॥ सभेसी येती ऋषिगण । देवोनि वेदोक्त आशीर्वचन । येरीं देवोनि सन्मान । समीप जाण बैसविले ॥ ८८ ॥ श्रीराम पुसे तयांसी । विनंती आहे मानसीं । मज सांगावें निश्चयेंसीं । धर्मनीतीसी अनुकूल ॥ ८९ ॥ आम्हीं मारिला रावण । तरी हें तंव देवकार्य जाण । तो पावला कृतकल्याण । परी दूषण तें आम्हां ॥ ९० ॥ हा विधात्याचा[३] पणतू । पौलस्तीचा सुतू । ब्राह्मणोत्तम निश्चितू । सकळ वेदार्थू जाणता ॥ ९१ ॥ यासी मारिलें समरांगणीं । दोष नाहीं क्षात्रधर्मालागूनी । तथापि स्वामींच्या वचनीं । अति विश्वास आमुचा ॥ ९२ ॥ तरी आतां यथार्थ । वदावें जी प्रायश्चित्त । तें करोनि विधियुक्त । धर्मस्थापन करावें ॥ ९३ ॥ तंव बोलती ऋषीश्वर । पुससी गौरवोनि विचार । तूं सकळांचा ईश्वर । कृपाकर आमुतें ॥ ९४ ॥ तरी आतां ऐसें कीजे । स्थलमात्रीं लिंग प्रतिष्ठिजे । तीर्थस्थापन करविजे । संपादिजे शिवार्चा ॥ ९५ ॥ कृष्णा गोदा भागीरथी । उभयतीरीं लिंगप्रतिष्ठा निश्चितीं । येणें ब्रह्महत्येची निर्मुक्ती । वेदप्रयुक्ती बोलिली जे ॥ ९६ ॥ आणिक एक असे कारण । ब्राह्मणांसी द्यावें अग्रहार[४] दान । पत्र द्यावें वर्षासन । पृथ्वी शशि सूर्य जंव आहे ॥ ९७ ॥ वंदोनि ऋषींचे चरण । करोनि चरणक्षाळण । भक्तियुक्त करोनि पूजन । मग स्वाश्रमा जाण धाडिले ॥ ९८ ॥ आज्ञा करोनि प्रधानासी । एक भाग देवांसी । दुजा भाग द्विजांसी । तिजा राज्यासी चालवीं ॥ ९९ ॥ आज्ञेप्रमाणें शिवालयें । लिंगप्रतिष्ठा यथान्वयें । संपादोनि शीघ्र मजप्रती ये । सुखवार्ता सांगावया ॥ १०० ॥ आज्ञा वंदोनि शिर्सीं । वंदोनियां भरतासी । मुद्रा[५] लाहोनि पत्रासी । मग दूतासी धाडिलें ॥ १ ॥ चमत्कारें करोनि नमन । आज्ञेप्रमाणें संपादून । त्रिमासांत पातले गण । श्रीरामचरण वंदावया ॥ २ ॥ तँडीतापडी[६] संन्यासी । योगी[७] बैसले योगाभ्यासीं । त्यांची वार्ता आणोनि मानसीं । यथोपचारांसी पाठविलें ॥ ३ ॥ अंध पंगु हीन अंगें । दरिद्रें पीडिले वातयोगें । गृहअन्नवस्त्रसंयोगें । अति स्नेहें रक्षिले ॥ ४ ॥ भरतासी म्हणे श्रीराम । राज्यभार चालवीं निःसीम । जें असेल दुर्जय दुर्गम । तें मजप्रती नेमें सांगावें ॥ ५ ॥ त्यानंतर सभाविसर्जन । सवें बिभीषणात्मज घेऊन । मग पातला जानकीभुवन[८] । परिचारकजनसमवेत ॥ ६ ॥ अंतरगृहा नेवोनि त्यासी । भेटविलें जानकीसी । तिणें अर्पूनि कंठाभरणासी । स्वाश्रमासी धाडिलें ॥ ७ ॥ भरतें येवोनि भद्रासीं[९] । पाचारोनि सर्व प्रधानांसी । आज्ञा नेमी समस्तांसी । प्रति सभेसी शीघ्र यावें ॥ ८ ॥ उदयीक सकळांसी प्रयाण । स्वयें करवील रघुनंदन । सदन्नें करोनि निर्माण । सिद्ध करणें उपचारांतें ॥ ९ ॥ श्रीराम संकेतलाघवता । निर्माण करावें चौं पुरुषार्थां । जे जे अपेक्षा[१०] ज्याचे चित्ता ।

१ शरण. २ विडा देणाऱ्यांच्या. ३ ब्रह्मदेवाचा. ४ इनामें. ५ मोहोर. ६ करवून. ७ जोगी, गोसावी. ८ सीतेच्या मंदिरांत. ९ सिंहानावर. १० इच्छा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative.

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

त्या त्या पदार्थां पुरवावें ॥ ११० ॥ एका जनार्दना शरण । झालें बिभीषणा समाधान । पावोनियां रामवरदान । राजनीति जाण संपादिली ॥ ११ ॥ हें बिभीषणआख्यान । कर्ता श्रीगुरु आपण । तेणेंचि संपवूनि निरूपण । अकर्तेपणें राहिला ॥ ११२ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां बिभीषणप्रयाणं नाम नवतितमोऽध्यायः ॥ ९० ॥ ओंव्या ॥ ११२ ॥

अध्याय एक्याण्णवावा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ तदुपरी[1] दुसरे दिवशीं । करोनियां प्रातःस्नानासी । वंदोनियां महेशासी । भद्रपीठासी श्रीराम आला ॥ १ ॥ सभा झाली घनदाट । प्रत्यया न ये वैकुंठ । येथींचा महिमा उद्भट[2] । डोळां स्पष्ट विश्व देखे ॥ २ ॥ अंकीं बैसवोनि जानकीसी । आपण बैसला सिंहासनासी । घेवोनि भरत प्रधानासी । बंधुत्रयेंसीं नमिता झाला ॥ ३ ॥ सुमंत धरी छत्रातें । राष्ट्रवर्धन धरी व्यजनातें[3] । धर्मपाळ आर्तपत्रातें[4] । धरिता झाला ते काळीं ॥ ४ ॥ भरत चरणीं निकट । यौवराज्य लाहोनि उत्कृष्ट । नम्रपणें बोले चोखट । राजनीतिलागूनी ॥ ५ ॥ धनुष्य खड्ग हातीं धरून । सव्यभागीं[5] लक्ष्मण । उभा राहोनि विचक्षण । स्वामिआज्ञापन वंदिता झाला ॥ ६ ॥ शत्रुघ्न आपण सेनानी[6] । हातीं वेत्र धरोनि अनुदिनीं । रामसंकेतालागूनी । नमस्कारा तिष्ठत ॥ ७ ॥ ब्रह्मादिक देवगण । आरूढोनि दिव्य विमान । समीप बैसले ऋषिगण । जे भविष्यार्थ जाणते ॥ ८ ॥ ऐसी सभेची थोरी । राबती अष्टमहासिद्धि द्वारीं । कल्पतरु-चिंतामणींच्या हारी । आदिकरोनी तिष्टती ॥ ९ ॥ गंधाक्षता सुमनमाळा । अर्पिती अपूर्व परिमळा । क्षणाक्षणां देती तांबूला । दिव्य सोहळा काय वानूं ॥ १० ॥ श्रीराम सालंकृत । कृपादृष्टीं पाहे भरत । नेत्रसंकेत मनोगत । जाणोनि यथोक्त आरंभिलें ॥ ११ ॥ षोडशदानें द्विजांसी । वस्त्रें दिधलीं भाटांसी । उर्वशीआदि कामिनींसी । अतिउल्लासीं पूजिलें ॥ १२ ॥ नारद तुंबर आणि गंधर्व । नागरिक लोक अपूर्व । चौसष्टी कळालाघव । अति मनोहर दाविते झाले ॥ १३ ॥ चारी वेद मूर्तिमंत । सहाही शास्त्रें बोलत । अष्टादश पुराणें वल्गेजत । उपपुराणें गर्जत नानापरी ॥ १४ ॥ सकळ सभा आनंदेंसीं । देखती झाली श्रीरामासी । संकेत करोनि बिभीषणासी । मग तयासी पुढें केलें ॥ १५ ॥ तयाउपरी राजे समस्त । नमस्कारा उमे सभेआंत । कर जोडोनि तटस्थ । विनीतवत बोलती ॥ १६ ॥ वानर म्हणती श्रीराघवा । आनंदें भूगोल भरला आघवा । जैसा उदेलिया शशी[9] बरवा । भरितें[10] भरे समुद्रातें ॥ १७ ॥ हा दृष्टांत एकदेशी । बोलतां न ये उपमेसी । तूं अंतरात्मा होसी । सर्व जाणसी मनोगत ॥ १८ ॥ ऐसें परिसोनि कपींचें उत्तर । सर्वथा संतोषला श्रीरघुवीर । मग बोलिला प्रत्युत्तर । समस्तांसी सभेप्रति ॥ १९ ॥ म्हणे मी तुमचे उपकारऋणें । बांधिलों अवतारीं येणें । उत्तीर्णतापदार्थ[11] जेणें । व्हावया सर्वथा न दिसे ॥ २० ॥ तरी तुम्हीं काया वाचा मनसा । स्त्रीपुत्रांची धरिली नाहीं दुराशा । सांडोनि जीवाची आशा । साह्य सहसा झालेति मज ॥ २१ ॥ ऐकोनि श्रीरामवचनासी । आनंद झाला सकळांसी । जीवें ओंवाळोनि मानसीं । प्रीतिवचनासी मांडिलें ॥ २२ ॥ दाटलें बाष्प जळ लोचनीं । सद्गद बोलती वचनीं । तया प्रेमालागूनी । ब्रह्मपद ओंवाळिजे ॥ २३ ॥ तुझिया चरणांपरतें । न लगे आम्हां सायुज्य तें । परी न भोगितां प्रारब्धातें । कैंवी येथें राहूं शकों ॥ २४ ॥ स्वामीवांचोनि अन्यथा । तिळभरी जरी दूर होतां । प्राण जाऊं पाहे तत्त्वतां । वचन सर्वथा मानिजे ॥ २५ ॥ आत्मा सकळांही जाण । आदिकरोनि दानपुण्य । परी तुझ्या वियोगाचें दुःख दारुण । सर्वथा जाण सोसवेना ॥ २६ ॥ श्रीराम म्हणे सकळांसी । मी आहें तुम्हांपाशीं । तिळभरी न विसंबें अहर्निशीं । वचन सकळांसी मानलें ॥ २७ ॥ आपण सकळांचा आत्मा । म्हणोनि मस्तकीं ठेवी हस्तपद्मा[12] । निरसोनियां आम्हां तुम्हां । जाणवी निजखुणा लाघवी ॥ २८ ॥ सुग्रीव राजा आपण । प्रार्थी श्रीरामा कर जोडून । आज्ञा झाल्या संपूर्ण । स्वराज्या आपण जाऊं स्वामी ॥ २९ ॥

---

१ त्यानंतर. २ अति श्रेष्ठ. ३ छत्र. ४ अबदागीर. ५ उजव्या बाजूला ६ सेनापति. ७ नम्रतेनें. ८ सर्व.

९ चंद्र. १० भरती. ११ उपकाराच्या फेडीची गोष्ट. १२ वरदहस्त.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

आतां स्वामींनीं राज्य कीजे। आम्हां रंकांलागीं आज्ञा दीजे। ऐसें ऐकतां रघुराजें। तांबूल अर्पिजे समस्तां॥ ३०॥ श्रीराम म्हणे सकळांसी। दध्योदन करोनि भोजनासी। मग जावें स्वराज्यासी। अक्षय सुखासी पाविजे॥ ३१॥ आज्ञा वंदोनि माथां। माध्यान्हिक सारोनि तत्त्वतां। बिभीषण सुग्रीव वाळिसुता। पंक्तीं तत्त्वतां बैसविलें॥ ३२॥ वसिष्ठादि ऋषिगण। आपण बंधु सहप्रधान। तिघी माता गुणसंपन्न। समीप आणून बैसविल्या॥ ३३॥ वाढिती झाली कुशध्वजसुता। घृत वाढी सुमेधा पतिव्रता। दधि वाढी सौमित्रकांता। आदरें तत्त्वतां जानकी पाहे॥ ३४॥ नाना अन्नें परवडी। काय वानूं तेथींची गोडी। ब्रह्मादिक वर्णिती प्रौढी। शंकरादिकां दुर्लभ॥ ३५॥ पवित्र शरयूचें जळ। माजी मिश्रित सुपरिमळ। तें सेवितां सुख केवळ। पावे सुकाळ स्वानंदाचा॥ ३६॥ याउपरी श्रीरघुवीर। बोलिला प्रीतीचें उत्तर। म्हणे ज्यासी जो इच्छाआदर। तो मागणें प्रकार[1] ममाज्ञा॥ ३७॥ तंव बोलती मधुरवाणी। आर्जीची तृप्ति अनंतगुणी। परी उरी[2] असे किंचित मनीं। ते परिसा श्रवणीं स्वामिनाथा॥ ३८॥ दधिभात स्वइच्छेकरीं। भोजन करावें यमुनातीरीं। कां जें अवतरणें द्वापरीं। कृष्णावतारीं स्वामिया॥ ३९॥ वचन ऐकोनि श्रवणीं। हांसे आलें जानकीलागूनी। कोण भूषण गौळपणीं। वत्सें[3]राखणी स्वामीतें॥ ४०॥ भक्तां क्षणक्षणाधीन देव। स्वामित्वाचें हेंचि लाघव। ऐसा जाणोनि मनोभाव। श्रीरामराव हांसले॥ ४१॥ श्रीराम म्हणे तथास्तु। पुरती तुमचे मनोरथु। तुमचे पंक्तीं मी कृतार्थु। बहु काय अर्थु अनुवादों[4]॥ ४२॥ असो ऐसीं भोजनें झालीं। सकळीं उत्तरापोशनें घेतलीं। उष्णोदकें सिद्ध होतीं ठेविलीं। तेणें सकळ आंचवले॥ ४३॥ शुद्धाचमनें झालीं सकळांसी। शीतळोदकें देवोनि प्राशनासी। मग तुळसी देवोनि सर्वांसी। मुखशुद्धीसी दीधलें॥ ४४॥ देवोनि गंध सुमन। राजोपचार परिमळपूर्ण। तांबूल देवोनि संपूर्ण। सभेस जाण बैसविलें॥ ४५॥ वीणासंकीर्तनगजरें। भाट गर्जती कैवारें। स्वानंदें लागलीं मंगळतुरें[5]। उपमे न सरे सत्यलोक॥ ४६॥ तदुपरी श्रीराम आपण। मुकुट सुग्रीवासी देऊन। बहुत करोनि सन्मान। किष्किंधेसी जाण धाडिला॥ ४७॥ ते समयीं सुग्रीवें आपण। दृढ धरिले श्रीरामचरण। मस्तकीं लाहोनि[6] वरदहस्त पूर्ण। प्रीतिकरोन अति नम्र॥ ४८॥ श्रीराम म्हणे तुझ्या उपकारा उत्तीर्ण। तुळितां[7] मेरुमांदार तृण। क्षणक्षणां आठवीं तुझे गुण। सखा संपूर्ण तूं माझा॥ ४९॥ सव्य घालोनि सर्व सभेसी। सुग्रीव निघे वानरभारेंसीं। श्रीराम म्हणे स्मरण मानसीं। असों द्यावें सर्व काळ॥ ५०॥ उपरी अंगद कर जोडूनी। सन्मुख उभा राहूनी। बोलता झाला प्रीतिकरोनी। मधुरवचनीं अनुवादे॥ ५१॥ म्हणे स्वामी तुझे कृपेंकरून। जन्ममरणावेगळें होणें। त्या तुज विसरोनि काय जिणें। निंद्य होणें जगामाजी॥ ५२॥ ऐसें अनुतापाचें बोलणें। संतोष मानिला रघुनंदनें। मग अर्पूनियां भूषणें। अंगद पूर्ण शोभता झाला॥ ५३॥ तुज न विसरिजे हें सुख। तुज विसरिजे तें दुःख। भोगावया कोण मूर्ख। जो जन्मांध देख पृथ्वीवरी॥ ५४॥ श्रीराम म्हणे वालिआत्मजा[8]। तूं आलासी माझिया काजा। आतां जाइजे निजवोजा। युवराजा किष्किंधे॥ ५५॥ ऐसी रघुराज आज्ञा देत। अष्टादशक्षोणींसमवेत। सव्य घालोनि वैदेहीकान्त। नामें गर्जत चालिला॥ ५६॥ यानंतरें ऋक्षाधिपती। जांबवंत करी विनंती। म्हणे स्वामी बहुतां रीतीं। सांभाळिलें मजलागीं॥ ५७॥ आतां आज्ञा वंदोनि शिरीं। प्रयाण करूं सहपरिवारीं। श्रीरामें तये अवसरीं। बहु सन्मान दिधला॥ ५८॥ रत्नखचित कवच। आणोनि अर्पिलें साच। येरु म्हणे संतोष झाला उंच। मेरूपरीस सन्मानें॥ ५९॥ परस्परें संकेत। श्रीराम म्हणे फळती मनोरथ[9]। स्यमंतहरणीं पावसी निश्चित। द्वापरें[10] प्राप्त झालिया॥ ६०॥ ऐसी श्रीरामाची आज्ञा। मानिली जांबवंतें सुज्ञा। मग मस्तकीं वंदोनि आज्ञा। कोटि ऋक्षेंसीं[11] निघाला॥ ६१॥ पुढें कुमुदनामा वानर। श्रीरा-

१ प्रकार. २ बाकी, शिल्लक. ३ गाई-वासरें राखणें. ४ बोलूं. ५ वाजंत्रें. ६ घेऊन. ७ तुलना करतां. ८ वालिपुत्रा. ९ इच्छा तृप्त होतील. १० द्वापरनामक तिसऱ्या युगांत. ११ अस्वलांसह.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

मासी करी नमस्कार। येरीं हृदयीं धरोनि गौरव थोर। वीरामांजी अतिश्रेष्ठ ॥ ६२ ॥ संतोषोनि श्रीराम। जो अवाप्तपूर्णकाम। उचिता येवोनि उचितोत्तम। हार मुक्तलग दिधला ॥ ६३ ॥ उचित देखोनि तत्त्वतां। न माये गगनीं सर्वोत्कर्षता। सव्य घालोनि सीताकांता। शतसहस्रें कोटींसीं निघाला ॥ ६४ ॥ विंध्याचळीं वास्तव्य ज्याचें। रंभ ऐसें नाम जयाचें। तेणें स्तुति करोनि रघुनाथाचें। मन अत्यंत तोषविलें ॥ ६५ ॥ उचिता येवोनि रघुनायक। दिधला रत्नखचित टिळक। माथां ठेवोनि अभयहस्तक। अति संतोषें धाडिला ॥ ६६ ॥ येरु हर्षें उचंबळला। सव्य घालोनियां भूपाळा। सरिसा सपरिवार चालिला। त्रिदशकोटींसमवेत ॥ ६७ ॥ यापरी कपि शरभु। स्तविता झाला अयोध्याप्रभु। उचिता येवोनि कौस्तुभु। प्रीतीकरोनि दिधला ॥ ६८ ॥ उचितानंदाचा सोहळा। सुख भरलें भूपाळा। सवें नव लक्ष गोळांगूळां। निघाला सव्य घालोनी ॥ ६९ ॥ विनीत वानर याउपरी। श्रीरामाची स्तुति करी। म्हणे परा पश्यंती मध्यमा वैखरी। बोलतां वाचा पारुषली[१] ॥ ७० ॥ तो तूं अमूर्त मूर्तिमंत। भक्तजनांलागीं कृपावंत। ऐसें बोलतां विनीत। स्वयें रघुनाथ तोषला ॥ ७१ ॥ बहु भूषणें रत्नखचित। विनीतासी अर्पी सीताकांत। सव्य घालोनी हर्षयुक्त। साठी शतसहस्रेंसीं निघाला ॥ ७२ ॥ कृच्छ्र कपि अगाध बळी। रामासन्मुख बद्धांजळी। स्तुति परिसोनि ते काळीं। आत्माराम संतोषला ॥ ७३ ॥ पदक काढोनि घातलें कंठीं। येरु सव्य घालोनि उठी। घेवोनि वानर तीन कोटी। उठाउठीं चालिला ॥ ७४ ॥ पुढें प्रमाथिनामा महामारी। तेणें स्तविला श्रीराम भारी। उचित दिधलें अवधारीं। कटिसूत्र जडिताचें ॥ ७५ ॥ तेणें उचिताचेनि हर्षें। गर्जत नामाचेनि घोषें। पन्नास सहस्र एक लक्षें। सहपरिवार चालिला ॥ ७६ ॥ याउपरी गवयनामा। स्तुतीं तोषविलें श्रीरामा। उचिता दिधलें प्लवंगमा[३]। जडित उत्तरी कंठींची ॥ ७७ ॥ उचितें हर्ष झाला थोरू। सव्य घालूनि श्रीरघुवीरू। सप्तकोटी परिवारू। कपींसमवेत चालिला ॥ ७८ ॥ यानंतरें वानर गज। तेणें स्तविला रघुराज। उचित दे महाराज। जो आत्मज कौसल्येचा ॥ ७९ ॥ कंकण जडित हातींचें। काढूनि त्वरित दिधलें साचें। श्रीराम बोले निजवाचे। आतां न विसरें मजलागीं ॥ ८० ॥ येरु मस्तक ठेवोनि भूमीसीं। म्हणे तुज न विसंबें जीवेंसीं। वानर तीन लक्षेंसीं। सव्य घालोनि निघाला ॥ ८१ ॥ ऋक्षयातीचा प्रघसनामा। तेणें स्तविलें गुणग्रामा। कंठींची मेखळा उत्तमोत्तमा। तया दिधली संतोषें ॥ ८२ ॥ याउपरी सनातन कपी। दोघे बळी दीर्घप्रतापी। तिहीं स्तविला धर्मरूपी। मधुर स्तुती करोनियां ॥ ८३ ॥ स्तुति ऐकोनियां तत्त्वतां। पायींचा तोडर दिधला उचिता। येरु चालिला सत्त्वरता। सव्य घालोनि श्रीरामा ॥ ८४ ॥ ऋषभनामा बळवंत। कर जोडोनि स्तवन करीत। उचित देवोनि सीताकांत। वांकी देत चरणींची ॥ ८५ ॥ दुर्मुखनामा याउपरी। स्तवोनि संतोषविला रावणारी[४]। उचित दिधलें झडकरी। जडित कमळ हातींचें ॥ ८६ ॥ सुमुख कपि यानंतर। स्तुतिअनुवादें जोडोनि कर। म्हणे चाड[५] नाहीं अलंकार। स्मरण देईं आपुलें ॥ ८७ ॥ विचार पडला रघुनायका। मग उचिता दिधल्या रत्नपादुका। येरें ठेवोनि मस्तका। सव्य घालोनि निघाला ॥ ८८ ॥ उचितें आनंद न समाये जगीं। सव्य घालोनि श्रीरामा वेगीं। निघता झाला ऊर्ध्वमार्गीं। सभालोकीं संतोषिजे ॥ ८९ ॥ हें ऐकोनि श्रीरामा। उचिता दे अंगुष्ठमुद्रा उत्तमा। सर्वदा देखसी मज समा। प्रपंचोन्मुख[६] असतांही ॥ ९० ॥ मग तुकांवोनि[७] माथा। कोटिदळेंसीं उत्तरपंथा। सव्य घालोनि रघुनाथा। त्वरान्वित चालिला ॥ ९१ ॥ याउपरी गवाक्षज झाला बोलता। कृपा असों दे रघुनाथा। सेवा लाहोनि पूर्णता। जे ब्रह्मादिकां दुर्लभ ॥ ९२ ॥ याउपरी सर्वोत्तमें। उचिता देणें श्लाघ्यधर्में। जें जें आहे परम दुर्गम। जें देणें लागे दशमुद्रे ॥ ९३ ॥ तेणेंकरोनि जाण। पावलें श्रीरामाचें ध्यान। मग

१ सर्व इच्छा पूर्ण झालेला असा. २ अडखळली. ३ वानराला. ४ रावणाचा शत्रु (रामचंद्र). ५ आवड, इच्छा. ६ प्रपंचांत असूनही. ७ हालवून.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

करोनियां नमन । पूर्वमार्गीं चालिला ॥ ९४ ॥ याउपरी कपि नळ । तेणें स्तविला घननीळ । उचित देवोनि अंदुखळाळ[1] । स्नेहानंदें गौरविला ॥ ९५ ॥ नळें वंदोनि झडकरी । मस्तक ठेविला पायांवरी । अति हर्षें निजगजरीं । अग्निदिशे[2] चालिला ॥ ९६ ॥ सवें एक पद्म दळ । घेवोनि चालिला आतुर्बळ[3] । सव्य घालोनि नृपाळ । जो भूपाळ अयोध्येचा ॥ ९७ ॥ यानंतरें नीळ मधुरोत्तरीं । नरेंद्राची स्तुति करी । येरें काढोनि भागवती करीं । त्याचे हातीं दिधली ॥ ९८ ॥ सव्य घालोनि सभास्थान । गर्जत चालिला त्वरेन । सवें घेवोनि सर्व सैन्य । श्रीरामगुण वर्णीत ॥ ९९ ॥ यानंतरें सुषेण । वंदोनि श्रीरामचरण । होवोनियां हर्षायमान । नामगर्जन करीत ॥ १०० ॥ श्रीराम म्हणे तूं प्राणदाता । उचित न दिसे पदार्था । कवण्या द्यावें अर्था । लक्ष्या सर्वथा न येचि ॥ १ ॥ तथापि एक असे मनीं । म्हणोनि काढिला कंठींचा मणी । देवोनि सुषेणालागूनी । अति प्रीतीनें धाडिला ॥ २ ॥ एक खर्व सेना घेऊन । सुषेण चालिला आपण । वंदोनियां सीतारमण । अति हर्षोन चालिला ॥ ३ ॥ म्हणे तुझे दृष्टीपुढें । मृत्यु पळेल बापुडें । रोगिया गणना केंवी घडे । ऐसें वदे रोकडें श्रीराम ॥ ४ ॥ यानंतरें मैंद कपि जाण । स्तविता झाला रघुनंदन । येरू म्हणे तूं सखा पूर्ण । येथें अनुमान असेना ॥ ५ ॥ उचिता येवोनि आपण । अर्पिलें तुजलागीं सिंहासन । हेंचि करीं माझें पूजन । सर्वेही श्रेयें जाण पावसी ॥ ६ ॥ एक शंख घेवोनि सेना । वंदोनियां रघुनंदना । सव्य घालोनियां जाणा । करीत गर्जना चालिला ॥ ७ ॥ हिमवंत करी स्तुती । सार्वभौमा मंगलमूर्ती । तेणें आनंदला रघुपती । देवोनि रत्नमूर्ति गौरविला ॥ ८ ॥ मग घेवोनि दहा क्षोणी सेना । सव्य घालोनि रघुनंदना । त्वरें चालिला जाणा । वायव्यकोणालागूनी ॥ ९ ॥ ज्योतिर्मुख याउपरी । श्रीरामाची स्तुति करी । उचित तया झडकरी । रत्नप्रावरण दिधलें ॥ ११० ॥ नमस्कारोनि राघवातें । सेना घेवोनि एक कोटीतें । सव्य घेवोनि रघुनाथातें । उल्लासित चालिला ॥ ११ ॥ केसरी नाम कपि जाण । येवोनि घाली लोटांगण । त्यासी देवोनि बाहुभूषण । अति गौरवून धाडिला ॥ १२ ॥ सवें घेवोनियां निजसेना । अक्षौहिणी गणना । वंदोनियां श्रीरामचरणां । करीत गर्जना चालिला ॥ १३ ॥ हेमकूट त्यानंतर । स्तुती करोनि अत्यादर । चुंबोनि श्रीरामचरण परिकर । निढळीं सत्वर लाविले ॥ १४ ॥ तये समयीं उचित । पावला कौस्तुभ झळझळित । वंदोनियां सीताकान्त । शतकोटी कपींसहित चालिला ॥ १५ ॥ याउपरी वानर खेद नाम । स्तुति वदे सर्वोत्तम । संतोषोनि देवोत्तम । दे क्षुद्रघंटिका कंठींची ॥ १६ ॥ आज्ञा देतां सीतारमण । सवें घेवोनि सात क्षोणी सैन्य । सव्य घालोनि रघुनंदन । हास्यवदन चालिला ॥ १७ ॥ गंधमादन आणि दधिमुख । उभे राहिले श्रीरामासन्मुख । जीवें ओंवाळूनि श्रीमुख । मस्तक चरणीं ठेविती ॥ १८ ॥ अभयहस्त ठेवोनि माथां । देत आशीर्वाद तत्त्वतां । विजयी तुम्ही अक्षयता । श्रीरघुनाथाचेनि धर्मैं ॥ १९ ॥ समस्तांसी श्रीरघुवीर । कोणा अलंकार कोणा वस्त्र । गौरवोनियां वानर । अति त्वरें बोळवीत ॥ १२० ॥ ऐसें बोळवोनि वानरगण । सुख पावोनि संपूर्ण । एका जनार्दना शरण । रम्य रामायण अति गोड ॥ १२१ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां वानरनिर्याणं नाम एकनवतितमोऽध्यायः ॥ ९१ ॥ ओंव्या ॥ १२१ ॥

अध्याय ब्याण्णवावा

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥ यानंतरें दुसरे दिवशीं । करोनियां प्रातःस्नानासी । वंदोनियां महर्षींसी । भद्रपीठासीं श्रीराम आला ॥ १ ॥ सभा बैसली घनदाट । दुजें उपमेसी वैकुंठ । तेथींचा महिमा उत्कट । अति श्रेष्ठ रामसभा ॥ २ ॥ अंकीं घेवोनि जनकनंदिनी । श्रीराम बैसला सिंहासनीं । येवोनि भरतादि प्रधानीं । लोटांगणीं वंदिला ॥ ३ ॥ छत्र[5] धरिलें सुमंतें । अकोपन धरी चामरातें । राष्ट्रवर्धन धरी व्यजनातें[6] । आतपत्रातें[7] धर्मपाल ॥ ४ ॥ रामचरणांनिकट भरत । उभा राहे जोडोनि हात । तो युवराजा अति विख्यात । नम्र विनीत

---

१ भूषणविशेष. २. आग्नेयीला. ३ बलवान्. ४ कल्याण.

५ अति श्रेष्ठ. ६ छत्र. ७ अबदागिर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

भावार्थी ॥ ५ ॥ हातीं धरोनि धनुष्यबाण । सव्य भागीं लक्ष्मण । उभा राहोनि विचक्षण । श्रीरामचरण लक्षीत ॥ ६ ॥ शत्रुघ्न आणि सेनानी । वेत्रं निजहस्तें धरोनी । उभे राहिले रघुनंदनीं । लक्ष ठेवोनी निजचित्तें ॥ ७ ॥ सुग्रीवादि बिभीषण । उभे राहिले कर जोडून । सन्मुख तिष्ठे वायुनंदन । जिवलग पूर्ण श्रीरामाचा ॥ ८ ॥ वेद होवोनियां भाटं । वर्णीत श्रीरामप्रताप श्रेष्ठ । साही शास्त्रें घडघडाट । स्तुति उद्भट वानिती ॥ ९ ॥ एक म्हणती राम सगुण । एक म्हणती राम निर्गुण । दुजा म्हणे न कळे खूण । राम चिद्घन एकला ॥ १० ॥ तिजा म्हणे राम एकला । तरी कां बहुरूपें भासला । चौथा म्हणे न कळे तुला । तोचि झाला निजांगें ॥ ११ ॥ ऐसें ऐकोनियां वचन । एक म्हणे हें बहुभाषण । राम अविकारी निर्गुण । त्यासी आनं न म्हणावें ॥ १२ ॥ रामें विश्वाभास केला । आम्ही मानूं या बोला । परी रामचि विश्व झाला । यया बोला न मानूं ॥ १३ ॥ गारुडी युक्ती मंत्रकळा । करोनि वादीचा सर्प केला । कीं गारुडी सर्प झाला । म्हणतां जनाला मानेल ॥ १४ ॥ घट कुलालें निर्मिला । कीं कुलालचि घट झाला । तैसा रामें प्रपंच रचिला । कीं रामचि झाला प्रपंच ॥ १५ ॥ माळियें देवोनि जीवन । स्वयें वाढविलें उपवन । कीं तो जाहला आपण । ऐसें सांगोन मज द्यावें ॥ १६ ॥ तुम्हांसी नाहीं पूर्ण ज्ञान । वृथा बोलाचें वल्गन । निर्गुणातें म्हणां सगुण । राम बहुभूषण राहों द्या ॥ १७ ॥ राम अविकारी निर्मळ । राम निरंजन निश्चळ । राम निर्धर्म निष्फळ । नलगे मळ तयासी ॥ १८ ॥ राम परंज्योति अमळ । राम परंधाम सोज्ज्वळ । राम अद्वयानंद केवळ । न लगे मळ तयासी ॥ १९ ॥ राम अरूप आद्यं अखिल । राम परमानंद बहळ । राम अनाम अगोत्र अचळ । नलगे मळ तयासी ॥ २० ॥ राम अद्वयानंद गहन । तोचि अंगें झाला जन । ऐसें म्हणतां अवघे जण । मज हें ज्ञान मानेना ॥ २१ ॥ ऐसी ऐकोनि वदंती । गर्जोनि उठिला वेदांती । म्हणे एकडोळा जगतीं । डोळस त्याप्रति न म्हणावें ॥ २२ ॥ निर्गुण म्हणसी श्रीरामातें । साधूनि नाना दृष्टांतातें । त्या दृष्टांतांचें कारण येथें । न दिसे मातें जाण पां ॥ २३ ॥ अणोरणीयान् आदिश्रुती । ऐक्य संपादूं वर्तती । तुझ्या दृष्टांतांची गणती । कोण निश्चितीं धरील ॥ २४ ॥ म्हणसी कुलाल नव्हे घट । परी हे बोलचि वटवट । व्यर्थ युक्तीची खटपट । अंतर्निष्ठ न मानिती ॥ २५ ॥ मृत्तिका विजाती कुलाला । म्हणोनि घट तियेचा केला । तैसा श्रीरामावेगळा । प्रपंच झाला काशाचा ॥ २६ ॥ म्हणसी राम निर्विकार । तैं काय होत आकार । त्याचा केला विश्वाकार । हें साचार सांगावें ॥ २७ ॥ आकाश पृथ्वी आप पवन । तेज आदि पांचै जाण । केलीं काशाचीं घडून । मजलागून सांगावें ॥ २८ ॥ रामावेगळें काय होतें । मा त्याचीं केलीं पंचभूतें । ऐसें ज्ञान न कळे तूतें । काय दृष्टांतें सांगसी ॥ २९ ॥ तुझे पूर्वोक्त दृष्टांत । ते न होती समयोचित्त । रामस्वरूप इत्थंभूत । तुज साद्यंतं सांगतों ॥ ३० ॥ बीजामाजी वृक्षाकार । सुवर्णी जेंवी अलंकार । तेंवी श्रीरामीं संसार । मज साचार भासत ॥ ३१ ॥ जेंवी बीजचि झाला तरुवर । सुवर्ण झाला अलंकार । तेंवी श्रीरामचि निर्विकार । स्वयें साकार जाहला ॥ ३२ ॥ राम म्हणावा निर्विकार । तंव तो भासतो साकार । साकार ना निराकार । परात्पर श्रीराम ॥ ३३ ॥ राम म्हणावा जरी निर्गुण । तरी तो प्रत्यक्ष भासे सगुण । एवं सगुण ना निर्गुण । आनंदघन श्रीराम ॥ ३४ ॥ ऐसी ऐकोनियां मात । वेद राहिले निवान्त । अवघे वेदांतियासी नमीत । धन्य म्हणत तत्त्वज्ञ ॥ ३५ ॥ हें ऐकोनि हनुमंत । अवघियांसी नमस्कारीत । म्हणे माझेंही हृद्गत । तुम्हीं समस्त परिसावें ॥ ३६ ॥ तुम्ही बोलिलां जो अर्थ । तो तंव शुद्धत्वें परमार्थ । श्रीरामाचें इत्थंभूत । स्वरूप निश्चित सांगितलें ॥ ३७ ॥ परंतु ऐका वेडें प्रेम । सुंदर सांवळा श्रीराम । हेंचि माझें अद्वय ब्रह्म । न कळे वर्म आणिक ॥ ३८ ॥ हातीं घेवोनि धनुष्यबाण । जेणें मर्दिला रावण । तें हें सांवळें ब्रह्म पूर्ण । निवती नयन पाहतां ॥ ३९ ॥ दासांसाठीं अवतार धरीत ।

१ राजदंड. २ स्तुतिपाठक. ३ अन्य. ४ कुंभारानें. ५ बडबडणें, ६ सर्वांचा आदि, ७ अतिशय. ८ उदक. ९ बरोबर. १० सर्व. ११ सत्य.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वानरांचा तरी अंकित। तो हा माझा श्रीरघुनाथ। ब्रह्म निश्चित मज वाटे ॥ ४० ॥ राम ज्ञानाचें निजज्ञान। राम ध्यानाचें निजध्यान। राम समाधी समाधान। चैतन्यघन श्रीराम ॥ ४१ ॥ राम भक्तांचें माहेर। राम ज्ञानाचें जिव्हार। राम साराचें निजसार। हा निर्धार पैं माझा ॥ ४२ ॥ रामावांचूनि ब्रह्मज्ञान। आम्हांसी नलगे नलगे जाण। आमुचें ब्रह्म रघुनंदन। बोले गर्जोन हनुमंत ॥ ४३ ॥ राम सर्वदा मुखीं गाऊं। राम सर्वदा नित्य ध्याऊं। राम सर्वदा नेत्रीं पाहूं। तरोनि जाऊं भवासिंधु ॥ ४४ ॥ ऐसिया हनुमंताचे वचनीं। गर्जों लागल्या संतश्रेणी। भला भला रे इंहीं वचनीं। झाली गगनीं पुष्पवृष्टि ॥ ४५ ॥ ऋषिवरांचा जयजयकार। वानरांचा भुभुःकार। मंगळवाद्यांचा गजर। नादें अंबर कोंदलें ॥ ४६ ॥ परमानंदें रघुनाथ। हनुमंतासी आलिंगीत। स्वयें उचलोनि आनंदभरित। बैसवीत निजासनीं ॥ ४७ ॥ राम वोळला परमानंद। झाला त्रैलोक्यीं आनंद। एका जनार्दनीं स्वानंद। नित्यानंद रामायणीं ॥ ४८ ॥ येथूनि संपलें युद्धकांड। पुढें ऐका उत्तरकांड। जनार्दनकृपा अखंड। कांडें कांड अर्थवी ॥ ४९ ॥ श्रीरामें जावोनि सुवेळेसी। दुर्गीं देखोनि रावणासी। बाणें छेदोनि छत्रासी। युद्धकांडासी संपविलें ॥ ५० ॥ शिष्ट धाडोनि अंगदासी। सैभे गांजूनि दशमुखासी। प्रथम करोनि महारणासी। युद्धकांडासी संपविलें ॥ ५१ ॥ प्रहस्तादि प्रधानांसी। अतिकायादि कुमारांसी। मारोनियां रणाभिवेषीं। युद्धकांडासी संपविलें ॥ ५२ ॥ उठवोनि कुंभकर्णासी। रावण धाडी रणभूमीसी। रामें निवटोनियां त्यासी। युद्धकांडासी संपविलें ॥ ५३ ॥ होम करितां निकुंभिळेसीं। तेथें धाडोनि लक्ष्मणासी। रणीं मारोनि इंद्रजितासी। युद्धकांडासी संपविलें ॥ ५४ ॥ द्विवाँर आणोनि द्रोणाद्रीसी। उठविलें लक्ष्मणा वानरांसी। यश देवोनि हनुमंतासी। युद्धकांडासी संपविलें ॥ ५५ ॥ अहिमहि वीर प्रचंड। हाते पाताळीं वितंड। त्यांतें करोनि खंडविखंड। युद्धकांड संपविलें ॥ ५६ ॥ होम करितां अति वितंड। वानर पाठवोनि प्रचंड। युद्धा आणोनि दशमुंड। युद्धकांड संपविलें ॥ ५७ ॥ रावण योद्धा अति प्रचंड। शिरें प्रसवला उदंड। रामें ठेंचोनि त्याचें तोंड। युद्धकांड संपविलें ॥ ५८ ॥ बाण सोडोनि प्रचंड। रावणाचें गर्वबंड। क्षणें करोनि खंडविखंड। युद्धकांड संपविलें ॥ ५९ ॥ रावणासी करोनि दंड। देव सोडविले उदंड। बिभीषण स्थापोनि अखंड। युद्धकांड संपविलें ॥ ६० ॥ मुक्ति देवोनि रावणासी। भेटोनि दशरथासी। दिव्य घेवोनि सीतेसी। युद्धकांडासी संपविलें ॥ ६१ ॥ विमानीं बैसोनि त्वरेंसीं। केलें रामेश्वरनमनासी। भेटोनियां अगस्तीसी। युद्धकांडासी संपविलें ॥ ६२ ॥ भेटोनि भरद्वाजासी। सर्वेंचि भेटोनि गुहकासी। देवोनियां समाधानासी। युद्धकांडासी संपविलें ॥ ६३ ॥ चौदा वर्षें निराहारेंसीं। भरत राहिला नंदिग्रामासी। भेटोनियां स्वबंधूसी। युद्धकांडासी संपविलें ॥ ६४ ॥ रामें भेटोनि निजमातांसी। केलें व्रतविसर्जनासी। अंगीकरोनि निजराज्यासी। युद्धकांडासी संपविलें ॥ ६५ ॥ यौवराज्य देवोनि भरतासी। सेनानीपण शत्रुघ्नासी। सुखी केलें कैकेयीसी। युद्धकांडासी संपविलें ॥ ६६ ॥ सुखी केलें दासदासींसी। सुखी केलें निजप्रजेसी। आनंदवोनि निजवाक्येंसीं। युद्धकांडासी संपविलें ॥ ६७ ॥ संपलें युद्धकांडनिरूपण। पुढें उत्तरकांडकथा गहन। एका विनवी जनार्दन। श्रोते सज्ञान परिसोत ॥ ६८ ॥ माझी मिरासी मूर्खपण। नेणें पदबंधव्याख्यान। माथां हात ठेवोनि जनार्दन। वदवी रामायण निजसत्ता ॥ ६९ ॥ जनार्दनाची कृपा ऐसी। मूर्खाहातीं रामायणासी। वदविलें रामकथेसी। कृपा ऐशी संतांची ॥ ७० ॥ सद्गुरूची कृपा घडे। तैं पांगुळा पर्वत चढे। एकनाथें तेणें पाँडें। केलें रोकडें मज सरतें ॥ ७१ ॥ एका जनार्दना शरण। झालें युद्धकांडनिरूपण। श्रीरामकथा अति गहन। करी पावन महापापी ॥ ७२ ॥ कथा शतकोटिविस्तार। त्यांतील एकैक अक्षर। पडतां कानीं शुद्ध पापी नर। श्रीरामकथाक्षर पुण्यपावन ॥ ७३ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे युद्धकांडे एकाकारटीकायां श्रीरामचरितकथनं नाम द्विनवतितमोऽध्यायः ॥ ९२ ॥ ॥ ओंव्या ॥ ७३ ॥ श्रीसीतारामचंद्रार्पणमस्तु ॥

१ आकाश. २ कृपायुक्त झाला. ३ समेमध्यें. ४ दोन वेळां. ५ पुष्कळ, अनेक. ६ आहार न घेतां. ७ त्याप्रमाणें. ८ श्रेष्ठ.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

श्रीएकनाथ महाराजकृत

श्रीभावार्थरामायण

उत्तरकांड

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

रामराज्याभिषेक.

सीतावनवास.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations



श्रीसद्गुरवे रामचंद्राय नमः

श्रीएकनाथ महाराजकृत

श्रीभावार्थरामायण

उत्तरकांड

अध्याय पहिला

॥ॐ नमः सच्चिदानंदाय ॥ ॐ नमो सद्गुरो जनार्दना । जनीं वनीं समान परिपूर्णा । सच्चिदानंदा चिद्घना । सेव्य सज्जनां सुरवर्या ॥ १ ॥ तूतें गुरुत्वें वंदूं जातां । तंव जनीं वनीं देखें तद्रूपता । कार्यकारणकर्तृत्वता । तेही तत्त्वतां न देखें ॥ २ ॥ ऐसें निजस्वरूप[1] अगाध । शंकले उपनिषदादि वेद । शेष श्रमला करितां वाद । शास्त्रानुवाद[2] खुंटला ॥ ३ ॥ परादि वाचा चारी । शिणोनि थोकल्या[3] दुरी । तेथें मंदमति नरीं । कवणे परी वर्णावें ॥ ४ ॥ तुझ्या स्वरूपा नाहीं अंत । अनंत म्हणतां मति भीत । द्वैतस्थानीं मुख्य अद्वैत । बोल बोलत सज्ञान ॥ ५ ॥ जैसें धर्म करितां जनीं । प्रतिष्ठेच्या पारडां बैसोनी । परलोक पावावा म्हणोनी । यागालागूनी प्रवर्तती ॥ ६ ॥ मुख बांधोनि मारितां पशु । अवदानीं संतृप्त हुताशु[4] । त्यातेंही ठकवूनि अमरेशु[5] । नेत यागांशु[6] निजबळें ॥ ७ ॥ यालागीं जी परात्परा । गुणातीता निर्विकारा । तुझ्या स्वरूपाच्या आकारा । न देखों विचारा शास्त्रमतें ॥ ८ ॥ तरूपासाव तरूची उपमा । काय कारण सांग आम्हां । हें वचन ऐकोनि म्हणे क्षमा । सज्जन हो तुम्हीं करावी ॥ ९ ॥ तुम्ही सुखार्णवाचे पार । ब्रह्मया राष्ट्र आधार । ब्रह्मीं ब्रह्म हे तुम्ही सधर[9] । ब्रह्म हा उद्धार पैं तुमचा ॥ १० ॥ अमृतपान करितां सुरवर । तृप्त होवोनि देती ढेंकर । तेंवी देतसें सुखोद्गार । स्वरूप अपार तुमचें ॥ ११ ॥ तुमचेनि कृपावलोकनें । सुखस्वानंदीं बैसे ठाणें । परब्रह्मींचें भरिजे केणें । अक्षर नाणें स्वरूप जें ॥ १२ ॥ स्वरूपासी तरूची उपमा घडे । ऐसें वदावया सामर्थ्य थोकडें । परी तुमचे कृपाउजियेडें । शब्द बोबडे बोलतसें ॥ १३ ॥ तरूच्या ठायीं मूळ शाखा त्वचा जळ । तो विस्तार मायेचा सकळ । उंखरीं[10] भासे मृगजळ । तें सकळ सूर्यरश्मीचें ॥ १४ ॥ जैसें वटबीज अणुप्रमाण । वृक्ष विस्तारला व्यापूनि गगन । तैसें ब्रह्म सूक्ष्म सान । ब्रह्म सनातन पैं असे ॥ १५ ॥ धिटीवें[11] करितां तुम्हांप्रती । मी तरी केवळ मंदमती । जनका बाळभाषणीं प्रीती । म्हणोनि विनंती करीतसें ॥ १६ ॥ शिवगणांमध्यें अग्रगण्य । जया नांव गजवदन । सद्गुरु विनायक नाहीं भिन्न । तथापि नमन तयासी ॥ १७ ॥ मूषकवाहन एकदशन[12] । शैलजामानसचंदन । उदर उरगें कवळून । विघ्ना निर्विघ्न करीतसे ॥ १८ ॥ आतां

१ आत्मस्वरूप. २ शास्त्रांचे तर्क. ३ स्तब्ध राहिल्या. ४ अग्नि. ५ इन्द्र. ६ यज्ञभाग. ७ श्रेष्ठ. ८ माल, जिन्नस.

९ अविनाशी. १० माळजमिनीवर. ११ अभिमान. १२ एकदंत, गणपति.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वंदूं शारदा जननी । जीतें बोलती हंसवाहिनी । वीणापुस्तकधारिणी। सज्जनांलागूनी कृपाळू ॥१९॥ जिचिये कृपादृष्टीं होये । मूकही वाचेतें लाहे । पांगूळ पर्वत लंघिताहे । यदर्थीं संदेह असेचिना ॥ २० ॥ आतां वंदिजे सद्गुरू । जो कां मेघापेक्षां उदारू । ज्याचेनि स्मरणें संसारू । स्वप्नीं साचारू दिसेना ॥ २१ ॥ तयातें वर्णावया वाणी । वेदें मूग आरोगूनी । शास्त्रें नेति नेति म्हणोनी । म्लानवदनीं परतलीं ॥ २२ ॥ आतां परिसा रामाचें चरित । वाल्मीक वदला अनागत । तेंचि देशभाषा प्राकृत । श्रोतीं चित्त पैं दीजे ॥ २३ ॥ रजनीचर समस्त । प्रबळ झाले जी बहुत । त्यांच्या वधालागीं तेथ । विबुधं विनवीत विष्णूसी ॥ २४ ॥ ऐक गा ये लक्ष्मीकांता । राक्षस करिती उत्पाता । त्यांचिया वधाची चिंता । युक्ति आतां विचारिजे ॥२५॥ मग बोले रमारमण । मी रविकुळीं अवतरेन । तुम्हीं व्हावें वानरगण । राक्षसदळण करावया ॥ २६ ॥ ऐसा करोनियां विचार । तंव आठवलें पूर्वउत्तर । होईन कौसल्याकुमर । ऐसा निर्धार पैं केला ॥ २७ ॥ मग उपजूनि सूर्यवंशीं । ख्याति केली अतिशयेंसीं । तें सांगेन संकळितेंसीं । सावकाशीं अवधारा ॥ २८ ॥ गुरुयाग सिद्धी नेला । ताटका सुबाहु मारिला । मारीच बाणपिच्छें उडविला । ब्रह्मतनयेचा केला उद्धार ॥ २९ ॥ शिवचाप भंगिलें । जनकाचें मन निःसंदेह केलें । जानकीतें पर्णिलें । मानविलें भार्गवातें ॥ ३० ॥ पुढें वनवास सेविला । त्रिशिरा खर दूषण मारिला । शूर्पणखे अपमान केला । मावेचा वधिला मृग तेथें ॥ ३१ ॥ जगज्जननी जनकनंदिनी । ते चोरिली राक्षसें येवोनी । तिचे शुद्धीलागीं बंधु दोनी । वनोपवना लंघिते झाले ॥ ३२ ॥ पुढें वायुपुत्र भेटला । तेणें सुग्रीव मित्र केला । मग बाणें एकें वाळी वधिला । राज्यीं स्थापिला सुग्रीव ॥ ३३ ॥ मग सीताशुद्धीलागीं वानर । पाठविला वायुकुमर । तेणें लंका जाळूनि सत्वर । राक्षसमार पैं केला ॥ ३४ ॥ अरिबंधु शरण आला । तयाचा अंगीकार केला । शिळीं सेतु बांधिला । मग पावला सुवेळागिरी ॥ ३५ ॥ शिष्टाई पाठविला वानर । लंकेश न मानीच उत्तर । मग कोपारूढ रघुवीर । काय विचार करिता झाला ॥ ३६ ॥ समस्त प्रधान मारिले । इंद्रजितादि सुत संहारिले । कुंभकर्णासी निर्दाटिलें । रावणा वधिलें कुळासहित ॥ ३७ ॥ राज्य दिधलें अरिबंधूसी । आपण निघाले अयोध्येसी । जानकीलक्ष्मणवानरेंसीं । पितृपुरीसी पावले ॥ ३८ ॥ भेटले बंधु भरतासी । सुखी केलें समस्तांसी । अयोध्याजन मानसीं । थोर उल्लास पावले ॥ ३९ ॥ समस्तांचे मनीं होतें । वसिष्ठाचेनि अनुमतें । राज्य अंगीकारिलें रघुनाथें । धर्मस्थापनेतें करावया ॥ ४० ॥ मग वानरां समस्तां आज्ञा झाली । बिभीषण सुग्रीवा बहुँडावणी दिधली । मग हनुमंताप्रति मंजुळीं । बोले मैथिलीकांत तो ॥ ४१ ॥ वायुपुत्रा तुझा उपकारू । मज श्रीरामा झाला थोरू । तो न फिटे साचारू । नानावतारू धरितांही ॥ ४२ ॥ तुझा आठवितां महिमा । मज श्रम होतसे श्रीरामा । तेथें इतरांची कायसी सीमा । अगा उत्तमा वायुपुत्रा ॥ ४३ ॥ वायुपुत्रा तुझी थोरी । उपमे वीर नाहीं धरित्रीं । विरिंचिअंडामाझारीं । तुळणे सरी न पवे ॥ ४४ ॥ ऐसा तूं गा अगाध । तुज मज नाहीं भेद । याही बोलाचा विषाद । वाटे सुबद्ध माझे मनीं ॥ ४५ ॥ तूं साक्षात् रुद्राचा अवतार । ब्रह्मादिकां न कळे पार । परी कांहीं तुज कार्यप्रकार । असे साचार सांगणें ॥ ४६ ॥ तंव हनुमंत म्हणे श्रीरामा । तुज सांगणें उरलें आम्हां । परी एक अपेक्षा पुरुषोत्तमा । असे ते महिमा सांगेन ॥ ४७ ॥ रघुनाथकथा श्रवणीं । रघुनाथनाम वदनीं । रघुनाथमूर्ति ध्यानीं । चित्त रघुनंदनीं असावें ॥ ४८ ॥ रघुनंदनीं असावें मन । रघुनंदनीं इंद्रियप्राण । रघुनाथ आत्मा होऊन । परिपूर्ण जाण असावें ॥ ४९ ॥ जेथें होईल श्रीरामकीर्तन । तेथें व्हावें माझें आगमन । हेंचि मागणें जाण । कृपा करून मज द्यावें ॥ ५० ॥ ऐसा अंजनीगर्भरत्नें । राम प्रार्थिला मंजुळवचनें । पुढती म्हणे हेंचि देणें । कृपा करणें कृपाळुवा ॥ ५१ ॥ मग हांसोनि बोलिजे सीतारमणें । हें काय घेतलें तुझेनि मनें । आतां निजस्थाना

१ ज्याविषयीं. २ गिळून (मूग गिळून=मौन स्वीकारून). ३ देव. ४ शोधासाठीं. ५ बिभीषण. ६ मारिलें. ७ निरोप, परवानगी. ८ ब्रह्मांडामध्यें. ९ अंजनीपुत्रानें (मारुतीनें).

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

जाणें । केलें पावणें अवश्य ॥ ५२ ॥ मग हनुमंतें ते अवसरीं । प्रदक्षिणा करोनि जोडल्या करीं । मस्तक ठेवूनि चरणांवरी । अति सत्वरीं निघाला ॥ ५३ ॥ परतोनि पाहे कपिवीर । तंव श्रीराम बोले उत्तर । एक आठवलें कार्य थोर । तें सादर अवधारीं ॥ ५४ ॥ पूर्वी तया दशाननें । तप केलें राज्याकारणें । मग शंकर प्रसन्नपणें । बोले वचन तयाप्रति ॥ ५५ ॥ माग माग रे ये समयीं । जे इच्छा असेल ते देईन पाहीं । ऐसें ऐकोनि ते समयीं । बोले लंवलाहीं रावण ॥ ५६ ॥ प्रसन्न झालासी विश्वनाथा । तरी अक्षयी राज्य द्यावें तत्त्वतां । पुत्र बंधु सुहृद पूर्णता । इतुकें आतां मज देईं ॥ ५७ ॥ मरण न यावें विबुधांहातीं । आज्ञा वंदावी समस्तीं । सुवर्णाचें नगर वस्ती । द्यावें कृपामूर्ति कृपाळुवा ॥ ५८ ॥ ऐसें ऐकोनि राक्षसवचन । संतोषला उमारमण । हें तुज दिधलें संपूर्ण । परी मरण चुकेना ॥ ५९ ॥ शिरः-कमळीं पूजिला चंद्रमौळी । म्हणोनि पावला दहा सिसाळीं । आश्चर्य नरीं भूमंडळीं । दुसरा बळी असेना ॥ ६० ॥ सुरारि पुसे जगन्नाथा । माझा कोण प्राणहंता । तो सांगावा जी आतां । संदेह तत्त्वतां न धरावा ॥ ६१ ॥ शरीर असे प्रारब्धा-धीन । सुखदुःख भोगी प्रारब्धेंकरून । ब्रह्मादिकां न सुटे जाण । प्रारब्ध पूर्ण बळवंत ॥ ६२ ॥ प्रारब्धें इंद्र भगांकित । प्रारब्धें अहल्ये जडत्व प्राप्त । प्रारब्धें शुक नग्नभूत । पृथ्वी हिंडत स्वइच्छा ॥ ६३ ॥ प्रारब्धें हरिश्चंद्रें सूर्यवंशीं । दान दिधलें विश्वामित्रासी । तारामतीसहित आपणासी । तेणें डोंबासी विकिलें ॥ ६४ ॥ प्रारब्धें दमयंती नळा । तेणें भोगिली अवकळा । प्रारब्धें बळी भूपाळा । नेलें पाताळा वामनें ॥ ६५ ॥ प्रारब्धें श्रीवामनासी । खुजटपण परियेसीं । प्रारब्धें नीचत्व त्यासी । याचीं भूमीसी तीन पाउलें ॥ ६६ ॥ प्रारब्धाचा थोर आघात । सृष्टिकर्त्या न सोडीत । सरस्वतीसी देखोनि भ्रांत । प्राकृत तेथ कवणीकडे ॥ ६७ ॥ यालागीं शैलजानाथा । प्रारब्ध बळवंत समस्तां । त्या प्रारब्धाची महिमा वर्णितां । शेषाही सर्वथा न वर्णवे ॥ ६८ ॥ न कळे विष्णूचे अवतार । न कळे समुद्राचा पार । न कळे आकाशाचा विस्तार । न कळे ईश्वरमहिमा ॥ ६९ ॥ न कळे शंभूचें तप । न कळे विष्णूचा प्रताप । न कळती योगीश्वर अरूप । कोण कोठें विचरती ॥ ७० ॥ न कळे ध्रुवाची थोरी । न कळे पंडिताची चातुरी । न कळे हा काम वैरी । कोणे अवसरीं उकीलें ॥ ७१ ॥ न कळे अहीचें थोरपण । न कळे मीनाचें चळण । न कळे विहंगमउड्डाण । स्थूल सान नेणवे ॥ ७२ ॥ न कळे स्त्रियेचें चित्त । न कळे कर्म बळवंत । न कळे ब्रह्मरेखालिखित । होत जात ललाटींचें ॥ ७३ ॥ न कळे श्रीरामाचा महिमा । न कळे हे हनुमंतप्रतापसीमा । न कळे नारद कोण्या कर्मा । घेवोनि वीणा हिंडतसे ॥ ७४ ॥ न कळे श्रीगुरु आनंदसागर । न कळे मेघ कृपण कीं उदार । न कळे शेषें भूमिभार । काय निमित्त घेतला ॥ ७५ ॥ यालागीं दयासागरा । मरण सांगा जी उदारा । तरीच मानेल वर निर्धारा । करुणाकरा कृपानिधे ॥ ७६ ॥ मग हांसोनि बोले शूळपाणी । रावणा ऐक सत्यवचनीं । मरण पुससी मजलागूनी । तरी ऐक श्रवणीं लंकेशा ॥ ७७ ॥ वाराणसीच्या उत्तर-पारीं । अयोध्या नामें महानगरी । येथें अजाचिये उदरीं । होईल क्षत्री दशरथ ॥ ७८ ॥ त्यासी तिघी जाया प्रसिद्धा । ज्येष्ठ कौसल्या सद्विद्या । दुसरी सुमित्रा साधुवंद्या । कैकेयी अविद्या तिसरी ॥ ७९ ॥ ते कौसल्याउदरीं श्रीराम । अवतरेल पूर्णब्रह्म । सुमित्रेउदरीं शेष परम । पुरुषोत्तम जन्मेल ॥ ८० ॥ कैकेयीउदरीं भरत शत्रुघ्न । दोघे पुत्र सुलक्षण । चवघे कीर्तिवंत गहन । पुण्यपावन त्यांची कथा ॥ ८१ ॥ त्या रामहस्तें तुझा घात । होईल जाण निश्चित । हें ऐकोनि तटस्थ । चिंता-क्रांत रावण ॥ ८२ ॥ ऐसा तो राक्षस संहारिला । सहपरिवारें निर्दळिला । सिद्धी झाली देव-कार्याला । आनंदें भरिला सागर ॥ ८३ ॥ तरी तुम्हीं आतां ऐकिजे । स्त्रीराज्यांत आपण जाइजे । तयांचें संगोपन कीजे । सावचित्तें बरवियापरी ॥ ८४ ॥ तेथें संचार न होऊं द्यावा पुरुषाचा । राज्यधर्म रक्षावा तयांचा । षण्मासांच्या अति भुभुःकाराच्या । गजरें पुरुषाचा गर्भपात ॥ ८५ ॥

१ सत्वर. २ देवांच्या हातानें. ३ शंकर. ४ शिरें. ५ रावण. ६ दुःखावस्था. ७ याचना करतो. ८ अनेक. ९ फसवील. १० पक्ष्याचें उडणें. ११ स्त्रिया. १२ संरक्षण.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

ऐसें तेथें रक्षण असावें। कार्य पडलिया येथें यावें। येणें उत्तरें राघवें। हनुमान गौरवें आज्ञापिला ॥ ८६ ॥ यालागीं गा वायुसुता। कार्य असावें सादरता। षण्मासांअंतीं तत्त्वतां। भुभुःकारता तेथें द्यावी ॥ ८७ ॥ तया भुभुःकारेंकरून। सिद्ध-कार्य होईल जाण। ऐसा श्रीरामें वर देऊन। हनुमानालागून बहुडाविलें ॥ ८८ ॥ ऐसी आज्ञा केली सीतारमणें। ते शिरीं वंदिली वायुनंदनें। पुढें कथा वर्तेली ते वचनें। सावधानें परिसावी ॥ ८९ ॥ अनागतभाष्य रामायण। वदला वाल्मीक आपण। संख्या शतकोटिप्रमाण। तें कथानुसंधान अवधारा ॥ ९० ॥ वाल्मीक थोर उपकारी झाला। आपण तरोनि जन तारिला। रामनामाचा सुकाळ केला। जन लाविला मोक्षपंथें ॥ ९१ ॥ आपण तरोनि इतर तारी। तोचि धन्य संसारीं। तया वंदिजे सुरवरीं। स्वयें श्रीहरी संनिध ॥ ९२ ॥ एका जनार्दनाचे रंकाचें रंक। त्या बाळकाचे वाचे अच्युत देख। म्हणोनि गुरुमहिमा अधिक। तेणें निर्दोख पैं वाणी ॥ ९३ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां हनुमंतश्रीराज्यप्रेरणं नाम प्रथमोऽध्यायः ॥ १ ॥ ओंव्या ॥ ९३ ॥

अध्याय दुसरा

॥ श्रीसच्चिदानंदाय नमः ॥ भद्रासनीं दशरथकुमर। बैसलासे करुणाकर। दक्षिणे शेषावतार। वामे भरतशत्रुघ्न ॥ १ ॥ कुळगुरु वसिष्ठ सन्मुख। परिवेष्टित प्रधान लोक। चर्चा करिती धर्मकर्मादिक। तर्कवितर्क बोलती ॥ २ ॥ एक सांगती पुराण। एक करिती रामकीर्तन। एक करिती गायन। होऊन लीन स्वात्मपदीं ॥ ३ ॥ एक पढती चतुर्वेद। एक म्हणती प्रबंध। एक करिती विवाद। गद्यपद्यशास्त्रांचे ॥ ४ ॥ ऐसी सभा प्रसन्नवदन। देखोनि वंदिती बंदिजन। एक म्हणती हा रघुनंदन। ब्रह्मीं जीवन मूर्तिमंत ॥ ५ ॥ एक म्हणती हा रघुनंदन। अवतार धरावया एक कारण। एक म्हणती धरा भारें पीडोन। श्रीरामा शरण गेली ते ॥ ६ ॥ तिचिया कैवारा राघव। सगुण होवोनि सावयव। मारोनियां दशग्रीव। बंदींचे देव सोडविले ॥ ७ ॥ श्रीराम भक्तजनवत्सल। नानावतारीं खेळे खेळ। ब्रह्मादिकां महिमा अकळ। मूर्ख केवळ नेणती ॥ ८ ॥ ऐसे नानापरींचे वाद। करिती परस्परें विवाद। नानामतप्रबंध। छंद भेद शास्त्रांचे ॥ ९ ॥ युद्धकांड येतां अंतीं। राक्षसांची झाली समाप्ती। अवनिजेसीं रघुपती। अयोध्ये क्रीडती स्वानंदें ॥ १० ॥ राज्य करितां श्रीरामचंद्र। कोणा नाहीं दुःख दरिद्र। स्वप्नीं नाहीं द्वंद्वबाध। सुखस्वानंद सर्वांसी ॥ ११ ॥ रजनीचर निर्दाळिले। त्रैलोक्य आनंदें भरिलें। हें ऐकोनि ऋषि चालिले। भेटी आले श्रीरामा ॥ १२ ॥ अत्रि आला निजशिष्येंसीं। जेणें दुष्काळीं वांचविले ऋषी। जयाची राणी अनसूया ऐसी। पतिव्रतांसी वंद्यत्वें ॥ १३ ॥ जे अनसूयेच्या घरीं। ब्रह्मा विष्णु त्रिपुरारी। बाळपणें एक संवत्सरीं। स्तनपान करिती त्रिमूर्ति ॥ १४ ॥ ज्या अगस्तीनें समुद्र शोषिला। वातापी इल्वल उदरीं पचिला। विंध्याचळाचा गर्व हरिला। तो कुंभज आला भेटीसी ॥ १५ ॥ तप करोनि भूमंडळीं। प्रसन्न केला चंद्रमौळी। गंगा मागोनि महीतळीं। ऋषिमंडळी निवविली ॥ १६ ॥ उभयतट गोदावरी। पंचक्रोशीभीतरीं। जड जीव तरती तो परिवारीं। शिष्यांमाझारी गौतम आला ॥ १७ ॥ कण्व भरद्वाज च्यवन। अंगिरागुरु कौंडिन्य। घ्यावया श्रीरामदर्शन। कश्यप आपण स्वयें आला ॥ १८ ॥ जेणें सृष्टि निर्माण केली। ख्याति त्रिभुवनीं मिरवली। ज्यांसी झाली गोत्रभुली। ते लाविले स्वगोत्रीं ॥ १९ ॥ दत्तात्रेय महाऋषी। असित जमदग्नि परियेसीं। विश्वामित्र शिष्येंसीं। आणिक तापसी पैं आले ॥ २० ॥ गायत्रीमंत्रबळें जाण। दुजी सृष्टि केली निर्माण। ऐसे ऋषि तपोधन। देदीप्यमान तेजस्वी ॥ २१ ॥ श्रीराम येवोनि सामोरा। सन्मान केला द्विजवरां। अर्घ्य पाद्य षोडशोपचारां। करूनि हाकारा भोजनें केलीं ॥ २२ ॥ समस्तां झालीं भोजनें। कर्पूरमिश्रित पूगीपानें। नानापरींचीं वस्त्रें भूषणें। रघुनंदनें दिधलीं ॥ २३ ॥ श्रीरामें

१ पाठविलें. २ भविष्यकथन. ३ सवंगाई, स्वस्ताई. ४ लक्ष्मण. ५ भाट. ६ पृथ्वी. ७ रावण. (दहा मस्तकांचा). ८ अगम्य. ९ सीतेसह. १० राक्षस. ११ शंकर. १२ अगस्ती.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

साष्टांग नमन घालून । दोनी कर जोडून । मृदु मंजुळ वचनेंकरून । करी प्रार्थन ऋषींचें ॥ २४ ॥ श्रीराम म्हणे ऋषि तुम्ही । न भेटां करितां तप आश्रमीं । भाग्यें माझिये आश्रमीं । अनकळत तुम्ही आलेती ॥ २५ ॥ कीं आजि दोषांचा ऱ्हास झाला । भाग्योदय पूर्ण बिंबला । कीं अकस्मात मेघ वोळला । वर्षाव झाला स्वानंदें ॥ २६ ॥ ऐसें आजि झालें स्वामी । कृपा करोनि आलेति तुम्ही । जे न भेटाल कृतश्रमीं । पावन मी आजि जाहलों ॥ २७ ॥ कवणा कार्याची उत्कंठा असे । ते सिद्धी जाईल अनायासें । मी तुमचा अंकित शिष्यवेशें । आज्ञा संतोषें करावी ॥ २८ ॥ तंव अगस्ति म्हणे श्रीरामा । न वर्णवे तुझा महिमा । सृष्टिकरिता जो ब्रह्मा । त्यासीही महिमा न कळे तुझी ॥ २९ ॥ तूं परात्पर निर्गुण परम । तूं साक्षात् पूर्ण ब्रह्म । तुज नाहीं रूप नाम । वेदां अगम्य स्वरूप तुझें ॥ ३० ॥ तुज वर्णितां वेदश्रुती । थोंटावल्या मागें किती । साही दर्शनें वेदश्रुती । इतरांची युक्ती तेथें न चले ॥ ३१ ॥ ऐसा तूं निर्गुण निरुपम । तुज ठेविती रूप नाम । तुझ्या अंगीं लाविती कर्म । ते ज्ञानाधम म्हणावे ॥ ३२ ॥ न कळे त्याचा मनोरथ । न कळे चतुराचें चित्त । न कळे कवितार्थ । रवि न देखे तें कवि देखे ॥ ३३ ॥ तूं अजन्मा जन्म धरिसी । तूं अकर्मा कर्म करिसी । तूं अकर्ता सृष्टीसी । उत्पत्ति स्थिति संहार ॥ ३४ ॥ तुझाचि आधार तया । यालागीं ज्ञानें म्हणती वायां । ऐसें असोनि श्रीरघुराया । थोर आश्चर्य ऐकिलें ॥ ३५ ॥ सापत्नमातेच्या वचनीं । सांडिली अयोध्या राजधानी । वास केला दंडकारण्यीं । राक्षस रणीं निर्दळिले ॥ ३६ ॥ शूर्पणखा विटंबून । मारिले त्रिशिरा खर दूषण । इंद्रजित रावण कुंभकर्ण । सप्रधान मारिले ॥ ३७ ॥ अरिबंधु बिभीषण । त्यासी दिधलें लंकाभुवन । बंदीं ग्रह सुरगण । त्यांचें मोचन तुवां केलें ॥ ३८ ॥ भार्याबंधूंसहित । अयोध्ये आला रघुनाथ । रामराज्य त्रिभुवनांत । ऐसें श्रुत आम्हां झालें ॥ ३९ ॥ म्हणोनि घ्यावया तुझी भेटी । येथें आलों गा जगजेठी । हेचि इच्छा ऋषींचे पोटीं । श्रीराम दृष्टीं पहावा ॥ ४० ॥ अपूर्व एक रघुनाथा । लक्ष्मणें वधिलें इंद्रजिता । हें आश्चर्य वाटे चित्ता । या समस्तां ऋषीश्वरां ॥ ४१ ॥ राम म्हणे अगस्तिमुनी । रावण कुंभकर्ण दोनी । म्यां मारिले समरांगणीं । द्रुमपाणी प्रहस्तादि ॥ ४२ ॥ कुमार अक्ष जंबुमाळी । विरूपाक्ष अकंपन बळी । कुंभ निकुंभ वीरमंडळी । राक्षस समूळीं मारिले ॥ ४३ ॥ आणिक असंख्य राक्षस । नांवानिगे रणकर्कश । जे तृणवत मानिती काळास । तेही त्रास पावले ॥ ४४ ॥ इतुके निशाचर सबळ । त्यांहूनि शक्रजिताचें बळ । तुम्ही वानीतसां प्रबळ । मज केवळ कळेना ॥ ४५ ॥ शक्रजिताची महाथोरी । तुम्ही वानीतसां भारी । मज वाटे नवलपरी । तें निर्धारीं सांगावें ॥ ४६ ॥ इंद्रजिताचा पराक्रम पूर्ण । त्यासी वर देता कोण । हें सांगावें कृपा करून । मजलागून ते कथा ॥ ४७ ॥ कुंभोद्भव म्हणे श्रीरामा । ऐक त्याचा प्रतापमहिमा । तूं सकळांचा आत्मा । कां पुरुषोत्तमा नेणसी ॥ ४८ ॥ रावणाची उत्पत्तिस्थिती । तुज सांगेन अवनिजापती । वर देता तयाप्रती । तो यथानिगुतीं अवधारीं ॥ ४९ ॥ पूर्वी कृतयुगामाजी जाण । प्रजापतिसुत पुलस्त्य पावन । पुण्यशील अगाधगुण । धर्मपरायण तिहीं लोकीं ॥ ५० ॥ वेदसंपन्न शास्त्रीं निपुण । सर्वभूतीं भगवद्भजन । शांति दया सुशीलपण । तपें दारुण तपस्वी ॥ ५१ ॥ पितयाचे धर्मंकरीं । अपेक्षा नाहीं तिळभरी । तंव कोणे एके अवसरीं । मेरुपाठारीं प्रवेशला ॥ ५२ ॥ तेथें तृणबिंदूचा आश्रम । अति रमणीय परम । भोंवतीं उद्यानें गहन । सरोवरीं जीवन अक्षोभ्य ॥ ५३ ॥ नाना जातींचे वृक्ष सफळ । नानापुष्पीं सुवासित बहळ । मधुर शब्दें हंस कोकिळ । रुंजी अलिकुळ करिताती ॥ ५४ ॥ तेथें ऋषि तप करी । भस्म चर्चूनि शरीरीं । रुद्राक्षमाळा कंठीं शिरीं । श्रीराम अंतरीं जप करी ॥ ५५ ॥ नेमस्त आहार इंद्रियें निग्रहुनी । वेदाध्ययन अनुदिनीं । तंव कोणे एके समयीं त्या वनीं । आल्या मिळोनी राजकन्या ॥ ५६ ॥

१ वर्षला. २ स्तब्ध झाल्या. ३ योग, सांख्य, न्याय, वैशेषिक, मीमांसा आणि वेदान्त. ४ कैदेंतील. ५ मुक्तता. ६ नामांकित. ७ इंद्रजिताचें. ८ अगस्तिऋषि. ९ सीतापति. १० इच्छा. ११ भ्रमरसमुदाय.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

देखोनि ऋषिआश्रमासी । कन्या क्रीडती आनंदेंसी । भोंवत्या पाहती तंव ऋषी । तेजोराशी देखिला ॥ ५७ ॥ पुलस्त्य म्हणे राजकुमारी । येथोनि तुम्हीं जावें झडकरी । माझी वेदध्वनि पडतां कर्णद्वारीं । तुम्ही गरोदरी व्हाल सर्वे ॥ ५८ ॥ ऐसें ऐकोनि राजबाळा । शीघ्र गेलिया त्या वेळा । तंव कोणे एके काळीं स्वलीळा । तृणबिंदुबाळा पाहूं आली ॥ ५९ ॥ सखिया न दिसती नयनीं । ऋषीची वेदध्वनि पडली कानीं । तेणें झाली श्वेतवर्णी । वपु तत्क्षणीं पालटली ॥ ६० ॥ उदरीं गर्भ संभवला तियेसीं । मग आली जनकभुवनासी । तृणबिंदु म्हणे कुमारीसी । शुभ्रता वपूसी कां आली ॥ ६१ ॥ चिन्ह तुझें पालटलें । आत्मजे कोठें काय झालें । कोण्या स्थळा गमन केलें । तें शीघ्रकाळें सांग पां ॥ ६२ ॥ येरी म्हणे अहो जी ताता । मज सखिया शोधन करितां । वना गेलें जी शीघ्रता । तेथें ऋषि पढत होता वेदश्रुती ॥ ६३ ॥ मग कन्या धरोनि निजकरीं । तृणबिंदु आला त्या आश्रमामाझारीं । कर जोडूनि विनंती करी । म्हणे अवधारीं मुनिराया ॥ ६४ ॥ माझी कन्या या आश्रमाप्रती । आली सखियाशोधनार्थी । तिसी ऐसी झाली स्थिती । काय गती हे न कळे ॥ ६५ ॥ येरू म्हणे अगा हे ऋषी । हे आली गेली श्रुत नाहीं आम्हांसी । कवण जाणे या अर्थासी । हें आपणासी नेणवे ॥ ६६ ॥ मग तो ऋषि विचारी ज्ञानीं । म्हणे पूर्वी शाप वदला होता मुनी । कन्यामात्र माझ्या वेदध्वनीं । ते गुर्विणी होईल ॥ ६७ ॥ तंव तृणबिंदु विचारी चित्तीं । हे अर्पावी ऋषीप्रती । ऐसी विचारोनि युक्ती । ऋषीप्रती वदता झाला ॥ ६८ ॥ अहो जी पुलस्ती महामुनी । विनंती करितों सलगी करोनी । हे कन्या अंगीकारावी सेवेलागूनी । दास्य अनुदिनीं करील ॥ ६९ ॥ पुलस्ती म्हणे ऋषिवर्या । आम्हां तापसां कोण कार्या । काय सेवा आचरावया । इसी कासया देतोसी ॥ ७० ॥ तृणबिंदु म्हणे अकल्पित आलें । त्यासी अंगीकारिती साधु भले । कल्पिलें सहसा न फळे । इतें भावबळें अंगीकारिजे ॥ ७१ ॥ पुलस्ती म्हणे बरवें आतां । नुल्लंघीं तुझिया वचनार्था । येरें चरणीं ठेविला माथा । कन्या तत्त्वतां देता झाला ॥ ७२ ॥ शुभ दिन पाहूनि लग्न । तृणबिंदूनें केलें कन्यादान । पुढें दोघें सुखसंपन्न । स्वाश्रमीं जाण विचरती ॥ ७३ ॥ भ्रताराची सेवा करी । त्यासी मानी आत्मसाक्षात्कारी । भ्रतार सांडूनि तिळभरी । दुरी सुंदरी ते न वचे ॥ ७४ ॥ तिची देखोनि उत्कृष्ट सेवा । संतोष झाला ऋषीच्या जीवा । म्हणे तुज पुत्र होईल बरवा । सर्वभावा अनुकूल ॥ ७५ ॥ मजसमान होतील गुण । मजसमान तपोधन । मजसमान देदीप्यमान । तप अनुष्ठान करील ॥ ७६ ॥ पुलस्तीपासूनि जो निर्माण । तया नांव पौलस्ती जाण । ऐसें ऐकोनि प्रीतिवचन । आनंदें मन निवालें ॥ ७७ ॥ त्याउपरी त्या अबळेसी । प्रसूति झाली सकाळेंसीं । पुत्रमुख पाहे ऋषी । विधिकर्मासी पैं केलें ॥ ७८ ॥ पूर्ण जातक वर्तविलें । पौलस्ती नांव ठेविलें । वेद श्रवणीं पडिले । विश्रवा झालें दुजें नाम ॥ ७९ ॥ यालागीं पुलस्तीचा पौलस्ती । विश्रवा त्यासी म्हणती । वाल्मीकिरामायणाप्रती । कथा संतीं पहावी ॥ ८० ॥ मूळीं वाल्मीकि कवि कर्ता । तयाचा आधार कवित्वा समस्ता । यालागीं रामकथा वदतां । संदेह सर्वथा न धरावा ॥ ८१ ॥ वाल्मीकीचें वाग्रत्न । ते हे कथा रामायण । सज्जनांचें अंतःकरण । भावीं पूर्ण भावार्थ ॥ ८२ ॥ एका जनार्दना शरण । म्हणतां गेलें एकपण । अच्युत चित्तीं जनार्दन । तो जन वन व्यापूनि असे ॥ ८३ ॥ अच्युत नाम जयाचे वाक्पुटीं । तयासी विषयासी पडे तुटी । संसाराचें धरणें उठी । परब्रह्मभेटी पैं होय ॥ ८४ ॥ अच्युत नाम जयाचे वाचे । तया भय नाहीं संसाराचें । यश लाहे तोचि साचें । कळिकाळ त्याचे तोडरीं ॥ ८५ ॥ एका जनार्दनीं भेटी । द्वंद्वदुःखा पडली तुटी । संसाराचें धरणें उठी । स्वानंदपुष्टी पूर्णत्वें ॥ ८६ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां पौलस्त्यजन्मकथनं नाम द्वितीयोऽध्यायः ॥ २ ॥

१ शरीर. २ कन्ये. ३ ठाऊक. ४ कोणतीही कन्या, प्रत्येक कन्या. ५ वाणी. ६ मानी. ७ अखंड. ८ मिळवितो.

९ स्वाधीन.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

अध्याय तिसरा

॥ श्रीसच्चिदानंदाय नमः ॥ मग तो पुलस्त्यनंदन । विराम परम पावन । तेजें जैसा सहस्रकिरण । धर्मपरायण पवित्र ॥ १ ॥ कर्माचरणीं अति प्रसन्न । चहूं वेदांचें अध्ययन । शास्त्रांविषयीं महाप्रवीण । भगवद्भजन अहर्निशीं ॥ २ ॥ शांति दया सुशीळव्रत । गुरुसेवेसी रतचित्त । परोपकारीं वेंची जीवित । पितृभक्त अतिशयें ॥ ३ ॥ सर्वभूतीं समता देखे । साधुजनां आत्मत्वें ओळखे । पराचा गुण दोष न देखे । ऐसा सुखें तो असे ॥ ४ ॥ अष्टांगयोग साधूनी । प्राणापान जिंणोनी । मुद्रा खेचरी अगोचरी तिन्ही । लंघूनि ब्रह्मस्थानीं पावला ॥ ५ ॥ ऐसा योगनिष्ठ तपोनिष्ठ धर्मनिष्ठ ऋषी । आचरे आश्रमविहित कर्मासी । नुलंघी मातृपितृवचनासी । द्वेष तयासीं असेना ॥ ६ ॥ जाणोनि तयाचें तप श्रेष्ठ । भरद्वाज आला तपोनिष्ठ । बोलता झाला येवोनि निकट । म्हणे अति संतुष्ट मी झालों ॥ ७ ॥ माझें देवँवर्णनीय कन्यारत्न । तें मी तुज देतों दान । बरवा पाहूनि सुदिन । कन्यादान तेणें केलें ॥ ८ ॥ गृहाश्रमीं स्वधर्मी रक्षण । स्त्रियेवांचूनि नव्हे जाण । अग्निहोत्र यज्ञाचरण । स्त्रियेवांचून चालेना ॥ ९ ॥ अतीतभोजन पंचमहायज्ञ । देवतार्चन पितृतर्पण । कामरक्षण पुत्रसंतान । स्त्रियेवांचून तें नव्हे ॥ १० ॥ पतिवचनीं निजरत । तेचि पतिव्रता निश्चित । पतिवचनीं जे उदासभूत । ते जाण निश्चित समवेश्या ॥ ११ ॥ ज्या स्त्रिया पति वंचिती । ज्या पतीतें निखंदिती । ज्या पतीतें द्वेषिती । त्या निश्चितीं समवेश्या ॥ १२ ॥ असो तो विश्रवा ऋषी । संतोषला स्त्रीगुणांसी । वदता झाला तियेसी । अतिप्रेमेंसीं सत्वर ॥ १३ ॥ म्हणे अवो प्रिये कांते । तुज पुत्र देईन निश्चितें । जयाची कीर्ति त्रिभुवनातें । विस्तारातें पाववी ॥ १४ ॥ मग ते भरद्वाजनंदिनी । भ्रतारवचनें संतोषोनी । सवेंचि ऋतुस्नात होउनी । गर्भें गर्भिणी ते झाली ॥ १५ ॥ यथाकाळें झाली प्रसूती । महातेजें झाली तेजोदीप्ती । ऋषि येवोनि पुत्रमुखाप्रती । आनंदस्थितीं न्याहाळीत ॥ १६ ॥ कर्म करोनि विधिपूर्वकेंसीं । नाम ठेविलें वैश्रवण त्यासी । दिवसें मासें अति त्वरेंसीं । पुत्र वृद्धीसी पावला ॥ १७ ॥ विश्रव्यापासूनि वैश्रवण । तयासीच म्हणती कुबेर जाण । झाला पितयासमान । देदीप्यमान तेजस्वी ॥ १८ ॥ शांत दान्त उदारपूर्ण । शीळसंपन्न उत्तमगुण । चतुरानन सहितगण । स्वानंदें पूर्ण तेथें आला ॥ १९ ॥ अवलोकोनि बाळकासी । स्रष्टा आनंदें मानसीं । धनद कुबेर नाम त्यासी । स्वइच्छेसीं ठेविलें ॥ २० ॥ हुताँशन आहुतिबळें वाढे । वैश्रवण तेणेंचिं पँडें । मातापित्यांच्या सुरवाडें । वाडेंकोडें वाढिन्नला ॥ २१ ॥ पित्याचे वृत्तीसी अवलंबून । करिता झाला अनुष्ठान । शतसहस्र वर्षें जाण । जलपान करून तो असे ॥ २२ ॥ शतसहस्र वर्षेंवरी । निराहारी तप करी । त्याचिया तपाची थोरी । चराचरीं अनुपम्य ॥ २३ ॥ निर्वैरी समदर्शन । सर्वभूतीं समता पूर्ण । बाह्यांतर इंद्रियनिग्रहण । तें तप जाण पैं श्रेष्ठ ॥ २४ ॥ तप करोनि तापस । शांतीचा नाहीं लवलेश । वृथा दंडमुंडणवेष । परान्नास सोकले ॥ २५ ॥ परान्नीं ठेवोनियां चित्त । वैराग्य दाविती मिथ्याभूत । बाह्य शांत अंतरीं तप्त । ते जाण निश्चित असाधु ॥ २६ ॥ तैसा नव्हे वैश्रवण ऋषी । तपचि धन थोर जयासी । इंद्र आला सुरगणेंसीं । चतुराननेंसीं त्यापासीं ॥ २७ ॥ म्हणती तुझें तप देखोन । संतोषले देवगण । वर मागसी तो आपण । मी ब्रह्मा जाण पैं देतों ॥ २८ ॥ मग बोले वैश्रवण । मज जरी झालेति प्रसन्न । तरी लोकपालत्व मागतों आपण । कृपा करोन मज दीजे ॥ २९ ॥ तदनंतर चँतुरानन । बोले मधुर वचन । माझ्या मनीं होतें जाण । तें त्वां पूर्ण मागितलें ॥ ३० ॥ तरी यम इंद्र वरुण । कुबेर तूं चौथा जाण । निश्चयेंसीं दिक्पाळपण । तुज संपूर्ण दीधलें ॥ ३१ ॥ क्रीडार्थ विमान पुष्पक । देता झाला सत्यलोकँनायक । ज्या विमानाची प्रभा समअर्क । त्रिभुवनीं देख असेना ॥ ३२ ॥ ऐसें देवोनि वरासी । ब्रह्मा इंद्र सुरगणेंसीं । जावोनियां निजलोकासी । आनंदेंसीं क्रीडती ॥ ३३

१ सूर्य. २ जिंकून. ३ देवांनीं वर्णावयास योग्य. ४ वेश्येसमान. ५ निंदितात. ६ ब्रह्मदेव. ७ अग्नि. ८ त्याच प्रकारें. ९ सुखानें. १० संन्याशाचा वेष.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

मग तो धनेश आपण। ब्रह्मयाप्रति करी विनवण। मज वसावया पाहिजे भवन। कोणाचें हिरोन न द्यावें॥ ३४॥ परासी न द्यावें दुःख। परपीडेपरीस नाहीं पातक। यालागीं साधु सज्ञान लोक। प्राणांतीं दुःख न देती॥ ३५॥ याकारणें स्वामिनाथा। कृपाळुवा कृपावंता। मज भोगार्थ नगर तत्त्वतां। आपण आतां पैं द्यावें॥ ३६॥ ऐकोनि पुत्राचें वचन। संतोषोनि बोले चतुराननन। म्हणे मयासुरें केलें निर्माण। लंकाभवन अति रम्य॥ ३७॥ तेथें राक्षस होते निवासी। ते विष्णुभयें त्यजूनि पुरीसी। गेले असती पाताळासी। नगररक्षणासी कोणी नाहीं॥ ३८॥ ते स्थळीं जावोनि आपण। करावें त्रिकूटाचें रक्षण। जे लंकेसी परिघ जाण। समुद्र पूर्ण पैं असे॥ ३९॥ ऐसिये लंकेप्रती। विचरावें स्वानंदस्थितीं। मग तो कुबेर शीघ्रगतीं। त्रिकूटीं वस्ती करिता झाला॥ ४०॥ जरी लंकेसी देऊं आणिक उपमा। अमरावती न शके सीमा। जिणें ठेंगणें केलें व्योमा[1]। उंचपणें महिमा न वर्णवे॥ ४१॥ ते लंकेसी नांदे वैश्रवण[2]। विमानीं बैसोनि आपण। गंधर्व करिती गायन। अप्सरा नर्तन करिताती॥ ४२॥ बंदीजन[3] कीर्ति वर्णिती। सेवकजन वेत्र घेऊनि हातीं। कळिकाळाच्या माथां टोले देती। दुर्धर शक्ती आंगीं॥ ४३॥ ऐसा तो वैश्रवण। पुष्पकविमानीं बैसोन। मातृपितृदर्शनालागून। नित्य लंकेहून येतसे॥ ४४॥ रसाळ कथा रामायण। वाल्मीकमुखींचें निरूपण। श्रोतीं देवोनि अवधान। कथानुसंधान परिसावें॥ ४५॥ एका जनार्दना शरण। झालें वैश्रवणाख्यान। पुढें गोड असे कथन। कृपा करून पहावें॥ ४६॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां वैश्रवणाख्यानं नाम तृतीयोऽध्यायः॥ ३॥ ओंव्या॥ ४६॥

अध्याय चौथा

॥ ॐ नमः सच्चिदानंदाय॥ ऐकोनि अगस्तीचें वचन। कर जोडोनि रघुनंदन। विनीतवृत्तीं[4] करोनि नमन। काय आपण बोलत॥ १॥ अगा ये अगस्ति महामुनी। पूर्वीं लंकादुर्गभवनीं। राक्षस वसती हें तुमच्या वचनीं। आजि स्यां श्रवणीं ऐकिलें॥ २॥ ब्रह्मादिकांचा नियंता। चराचर वर्ते ज्याचिये सत्ता। यज्ञरूप जो अयोनिजेचा[5] भर्ता। डोलवी माथा ऋषिवाक्यें॥ ३॥ कुंभोद्भवाच्या वचनासी। ऐकोनि विस्मय श्रीरामासी। म्हणे स्वामी मांसभक्षक कपटवेषी। राक्षस लंकेसी वर्तती॥ ४॥ पुलस्तिवंशीं राक्षस झाले। हें तुमचेनि मुखें ऐकिलें। रावणकुंभकर्ण जन्मले। प्रहस्तादि विकटादिक॥ ५॥ आणि रावणाचे सुत। होते पराक्रमवंत। याहूनि ते राक्षस बळवंत। किंवा अशक्त सांगावें॥ ६॥ अगा स्वामी महामुनी। तुम्हीं समुद्र प्राशिला आचमनीं। तयांचें नाम तयांची करणी। मजलागूनी सांगावी॥ ७॥ तयां पूर्वज कोण। वर देता काय देखोन। तया विष्णूच वधी काय कारण। तें समूळ निरूपण मज सांगा॥ ८॥ हे कथा ऐकावयासी। उल्लास उपजतो मानसीं। कृपा करोनि तुम्ही ऋषी। मजपासीं[9] सांगावें॥ ९॥ ऐकोनि श्रीरामवचन। अगस्ति झाला विस्मयापन्न। म्हणे वेदांसी न कळे महिमा जाण। तो तूं ब्रह्म पूर्ण श्रीरामा॥ १०॥ तूं चिदाकाशींचा चिद्धन। तूं योगियांमानसींचें चिद्रत्न। तूं सुखसागरींचें सुधापान। तूं निजजीवन संतांचें॥ ११॥ श्रीरामा तूं आदीचा आदी। तूं मोक्षाची मोक्षसिद्धी। तूं निधीचा परमनिधी। तूं समाधि श्रीरामा॥ १२॥ तूं तपाचें परम तप। तूं भक्तांचा परम दीप। तूं सदाशिवहृदयींचा जप। तूं सुखस्वरूप सर्वांसी॥ १३॥ ध्येय ध्याता आणि ध्यान। तयांहूनि असंसी भिन्न। सच्चिदानंद हें अरुतें[8] जाण। तूं परेहून परात्पर॥ १४॥ निर्गुण होत्साता अवतार धरिसी। तूं अकर्मा होऊनि कर्में करिसी। अभोक्ता भोग भोगिसी। तुझे निजमायेसी हें न कळे॥ १५॥ ऐसें असोनि रघुनाथा। आमुचे मुखींहूनि इच्छिसी कथा। तुझा महिमा न कळे तत्त्वतां। परी वचन सर्वथा तुलंघीं तुझें॥ १६॥ पूर्वीं विष्णूचे नाभिकमळीं। ब्रह्मा उपजला कमळदळीं। तेणें सृष्टिसर्जनांचे[10]

१ आकाशाला. २ कुबेर. ३ भाट. ४ मोठी. ५ नम्रतेनें. ६ सीतेचा. ७ अमृतप्राशन. ८ मोठा सांठा. ९ अलीकडे.

१० सृष्टीच्या उत्पत्तीच्या वेळीं.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

काळीं । भूतें निर्मिलीं अनेक ॥ १७ ॥ तयां म्हणे चतुरानन । तुम्ही सृष्टीचें करा रक्षण । एक म्हणती करूं रक्षण । ते रक्षोगण पैं केले ॥ १८ ॥

प्रजापतिस्तु तानाह सत्त्वांस्तु प्रहसन्निव ।
बभाष वाचा यत्नेन रक्षध्वमिति मानवाः ॥ १ ॥

प्रजापति म्हणे भूतांसी । तुम्हीं रक्षावें सृष्टीसी । येर म्हणती आज्ञा शिरसीं । रक्षूं सृष्टीसी स्वामिनाथा ॥ १९ ॥ जे बोलिले करूं रक्षण । तयांचेनि मुखें तयांसी जाण । नाम ठेविलें रक्षोगण । भूतांचें रक्षण करिते झाले ॥ २० ॥

रक्षाम इति यैरुक्तं राक्षसास्ते भवंति वै ।
यक्षाम इति यैरुक्तं ते यक्षाः संभवंति वै ॥ २ ॥

सृष्टि रक्षूं म्हणोनि बोलिले । तेणें नांवें ते राक्षस झाले । तयांचें बोलणें तयां फळलें । करूं लागले निजकर्मा ॥ २१ ॥ 'यक्षाम' गेले बोलून । ते झाले यक्षगण । चतुराननवचन प्रमाण । यक्ष अभिधानं[1] तयां झालें ॥ २२ ॥ तेथें हेति प्रहेति राक्षस । दोघे बंधु अति कर्कश । तयांचे कुळीं मधुकैटभांस । जन्मप्रकाश पैं झाला ॥ २३ ॥ प्रहेति अति धार्मिक तेथ । महावैराग्यउदासभूत । दांर[2] गृह नांगिकारीत । परमेश्वररत पैं झाला ॥२४॥ दुसरा हेति दारागृहार्थी । अत्यंत आसक्ति तयाचे चित्तीं । प्रश्न करी ये काकुळती । ऋषिमुनींप्रती मागे कन्या ॥ २५ ॥ मग काळाची भगिनी राक्षसी । भया नामें अतिकर्कशी । तिणें आपुली कन्या हेतीसी । विधिपूर्वक दीधली ॥ २६ ॥ हेति राक्षस स्त्रीसमवेत । कामीं होऊनि आसक्त । गृहाश्रमीं असे वर्तत । तंव एक सुत तया झाला ॥ २७ ॥ विद्युत्केश नामें प्रख्यात । अत्यंत तेजस्वी बळवंत । अग्नीसारिखा उग्र भासत । दिवसेंदिवस तेथें वाढिन्नला ॥ २८ ॥ दिसे अत्यंत तरुण । रूपरेखागुणलक्षण । ठाणमाणगुणलक्षण । शोभा संपूर्ण शोभत ॥ २९ ॥ मग हेति देखोनि पुत्रासी । झाला अत्यंत संतोषी । करावया पुत्रविवाहासी । कन्याविचारणेसी लागला ॥ ३० ॥ तंव संध्या नामें राक्षसी । जाऊन तिचिया गृहासी । कन्या मागे निजपुत्रासी । अवश्यतेसीं दीधली ॥ ३१ ॥ संध्येची कन्या अति सुंदर । संध्यारागासारिखें शरीर । तियेसी विद्युत्केश वर । लग्न सत्वर लाविलें ॥ ३२ ॥ मग तीं दोघें जणें । क्रीडा करिती वनोपवनें । जैसें शचीसहित[3] सहस्रनयनें[4] । नाना स्थानीं विचरिजे ॥ ३३ ॥ ऐसे बहुत दिवस लोटले । तंव पुढें काय वर्तलें । एके दिवशीं क्रीडेसी गेले । मंदरागिरिपर्वतीं ॥ ३४ ॥ तेथें ऋतुस्नात झाली । भर्तारा व्यवस्था कळों आली । क्रमिलें दिनत्रय ते काळीं । ऋतु दिधला चवथे दिवसीं ॥ ३५ ॥ उदरीं प्रवेशतां रेत । गोठोनियां शुक्रशोणित । गर्भ संभवला त्वरित । प्रसवली सुत तत्काळ ॥ ३६ ॥ पर्जन्य वर्षे जळधारीं । तोय प्रसवे सागरीं । पुनरपि मेघमुखेंकरीं । पृथ्वीवरी वर्षत ॥ ३७ ॥ तैसें तियेसी झालें । विद्युत्केशवीर्यातें धरिलें । पुनरपि तें त्यागिलें । मंदरागिरीं श्रीरामा ॥ ३८ ॥ तें बाळक शैलशिखरीं[5] । अंगुष्ठ घालोनि मुखामाझारीं । चोखी चुरचुरां रुदन करी । जेंवी अंबरीं[6] घन गर्जे ॥ ३९ ॥ तंव भवानीसहित त्रिपुरारी[7] । आरूढोनि गोर्वाहनावरी[8] । क्रीडा करितां वनांतरीं । बाळकावरी दृष्टि पडली ॥ ४० ॥ उमा विनवी महेशासी । बाळक अपूर्व तेजोराशी । कोणें त्यागिलें अवगुणेंसीं । कीं पुत्र मूळेंसीं लागला ॥ ४१ ॥ किंवा जननीस झालें भारी । म्हणोनि त्यागिलें वनांतरीं । याच्या त्यागाची नवलपरी । मज त्रिपुरारी वाटते ॥ ४२ ॥ उचलोनि उत्संगांवरी[9] घेतलें । उमेनें तया चुंबन केलें । स्तन पाजूनि करें कुरवाळिलें । कृपेनें पाहिलें निजदृष्टीं ॥ ४३ ॥ अमर करोनियां त्यासी । महादेवें दिधलें वरासी । वाढता झाला अति वेगेंसी । दिवसेंदिवसीं पैं अधिक ॥ ४४ ॥ मग तो त्र्यंबक त्रिपुरारी । वसविता झाला गगनोदरीं । गंधर्वनामें भ्रमत नगरी । राक्षसात्मजाकारणें ॥ ४५ ॥ उमा म्हणे राक्षसात्मजा । जैसा तूं वाढलासी वोजां[10] । तैशाचि होतील तुझ्या प्रजा । ऐसा शैलजा[11] वर दिधला ॥ ४६ ॥ विद्युत्केशापासूनि उत्पन्न । म्हणोनि सुकेश त्याचें नामधारण । शिवसेवे नित्य साव-

१ नांव. २ स्त्री. ३ इंद्राणी (इंद्रपत्नी) सह. ४ इंद्रानें. ५ पर्वतशिखरावर. ६ आकाशांत. ७ शंकर. ८ नंदीवर. ९ मांडीवर. १० सुखानें, प्रेमानें. ११ पार्वतीनें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

धान । राक्षस जाण पैं असे ॥ ४७ ॥ हिंडे त्रैलोक्याभीतरीं । क्रीडा करी वनांतरीं । मागुता येत जेथें त्रिपुरारी । दर्शनगजरीं राक्षस ॥ ४८ ॥ जैसा अमरेश शचीसहित । वनोपवनीं क्रीडा करीत । तैसा तो राक्षस हिंडत । मागुता येत जेथें पिनाकपाणि ॥ ४९ ॥ श्रीरामायणीं ऋषिनिर्मित । उत्तरकांडकथामृत । सज्जनीं सेवावें सावचित्त । श्रवणद्वारेंकरोनी ॥ ५० ॥ श्रीरामकथा द्रुम केवळ । त्यावरी आरूढे वाल्मीक कविकोकिळ । टाहो करीतसे रसाळ । श्रीराम येणें शब्दकल्लोळें ॥ ५१ ॥ एका जनार्दना शरण । पुढें गोड आहे निरूपण । श्रीरामकथा परम पावन । श्रोतीं अवधान पैं दीजे ॥ ५२ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां सुकेशजन्मकथनं नाम चतुर्थोऽध्यायः ॥ ४ ॥ ओंव्या ॥ ५२ ॥ श्लोक ॥ २ ॥

अध्याय पांचवा

॥ श्रीरघुनंदनाय नमः ॥ रावणारि म्हणे अगस्ती । तुझेनि मुखें सुकेशउत्पत्ती । वर लाधला शैलात्मजापती । महादेवें प्रीतीं पाळिला ॥ १ ॥ तयाकारणें वस्तीसी । गंधर्वलोक यमपुरासी । राज्यीं स्थापोनि तयासी । पुढें काय ऋषी वर्तलें ॥ २ ॥ तें सांगावें आम्हांप्रती । तूं कृपाळु कृपामूर्ती । तुजसमान नाहीं त्रिजगतीं । तुझी कीर्ती न वर्णवे ॥ ३ ॥ तुवां प्राशिला अपांपती । तुझेनि विंध्याद्रीसी निद्रास्थिती । तुझेनि सूर्यास मार्गप्राप्ती । तुवां इल्वलवातापी मारिला ॥ ४ ॥ ऐसा तुझा अगाध महिमा । वाचा वर्णूं न शके ब्रह्मा । परादि वाचा शिणल्या मज रामा । वर्णिलें तुम्हां न वचे ॥ ५ ॥ यालागीं जी ऋषिवर्या । मज झालें परमाश्चर्या । राक्षसवंश महाऔदार्या । शिववरद पावावया किंनिमित्त ॥ ६ ॥ मग तो सुकेश आपण । गिरिजापतीचा वर लाहोन । स्वकर्मस्वधर्मीं सावधान । पुढील निरूपण मज सांगा ॥ ७ ॥ अगस्ति म्हणे कमलोद्भवजनकां । नीरपुरीनायकाच्या प्राणघातका । आम्हां पुससी हें अपूर्व देखा । वाटतसे दातारा ॥ ८ ॥ सुकेश धार्मिक जाणोन । ग्रामणी नामें गंधर्व आपण । तपस्तेजें तो दारुण । दुसरा जाण विश्वावसु ॥ ९ ॥ तयाचे घरीं कन्या सुन्दरी । जैसी कर्पूरगौरांची गौरी । नातरी लक्ष्मी विष्णूचे घरीं । तैसी कुमरी तयाची ॥ १० ॥ देव वानिती तियेचे गुण । ते ग्रामणी गंधर्वें आपण । सुकेशासी प्रीतीं दिधली दान । विधिविधान पैं केलें ॥ ११ ॥ मग तीं दोघें शिववरदेंकरीं । ऐश्वर्य भोगिती निरंतरीं । स्वर्ग अप्राप्त इतरां भारी । तें सुख गजरीं भोगिती ॥ १२ ॥ स्वर्गीं दोघें क्रीडा करिती । गगनीं जेंवी निशापती । किंवा विमानीं शचीपती । तेंवी विचरती पैं दोघें ॥ १३ ॥ तद्नंतरें देववतीसी । गर्भ संभवला तियेसी । तीन पुत्र समान त्रिनेत्रेंसीं । तियेचे कुशीं जन्मले ॥ १४ ॥ त्यांचे केलें जातककर्मासी । तयांचीं नांवें तूं परियेसीं । सुमाळी माल्यवंत माळी ऐसीं । तुजपासीं सांगितलीं ॥ १५ ॥ दक्षिणाग्नि गार्हपत्य आहवनी । तैसे तेजें शोभती तीन्ही । दिवसेंदिवस थोर होवोनी । पितृभजनीं सादर ॥ १६ ॥ पितृआज्ञें तिघे जण । मेरुशिखरीं तप आचरोन । तपें संतुष्ट चतुरानन । येवोनि आपण बोलत ॥ १७ ॥ तुम्हीं तप केलें निर्घोर । तेणें हर्ष मज झाला थोर । आतां काय मागाल तो वर । तुम्हां सत्वर देईन ॥ १८ ॥ हात जोडोनि तयांप्रती । मग तिघे राक्षस विनविती । आम्हीं तिघीं वसावें एकत्रीं । अपार संपत्ती भोगीत ॥ १९ ॥ आयुष्य व्हावें आत्यंतिक । वैरी व्हावे आमुचे रंक । आणि प्रताप अधिकाधिक । इतुकें आवश्यक दे आम्हां ॥ २० ॥ ऐकोनि तयांचें वचन । हांसोनि बोले चतुरानन । जे इच्छा तें दिधलें जाण । सत्य भाषण पैं माझें ॥ २१ ॥ इतुकें बोलोनि प्रजापती । विमानारूढ सत्यलोकाप्रती । गेलियामागें अवनिजापती । काय करिती ते राक्षस ॥ २२ ॥ शिल्पशास्त्रीं अति प्रवीण । ऐसा जो विश्वकर्मा जाण । तयाच्या भवनाप्रति जावोन । करिती स्तवन तयाचें ॥ २३ ॥ सुकेशपुत्र म्हणती विश्वकर्म्यासी । तुझा महिमा न बोलवे आम्हांसी । तूं केवळ सृष्टिकर्ता सत्य-

१ पिनाकधनुष्यधारी शंकर. २ वृक्ष. ३ समुद्र. ४ ब्रह्मदेवाच्या जनका, रामा. ५ रावणाच्या. ६ शंकराची.

७ इंद्र. ८ अतिभयंकर. ९ रामचंद्रा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

त्वेंशीं । निर्माण करिसी भवनांतें ॥ २४ ॥ तुवां सुरवरांकारणें । रचिलीं नानापरी भवनें । नाना मंदिरें नाना पट्टणें । गुह्यस्थानें निर्मिलीं ॥ २५ ॥ तरी आम्हांकारणें समर्था । मंदिर पाहिजे सर्वथा । मेरु मांदार अथवा हिमपर्वता । यांच्या आश्रयानें करावें ॥ २६ ॥ ऐकोनि तयांची वाणी । विश्वकर्मा विचरे मेदिनीं । दक्षिण-समुद्रामाजी दोनी । पर्वत नयनीं देखिले ॥ २७ ॥ पर्वतेंसीं पर्वत समीप जाण । त्रिकूट ऐसें त्यां अभिधान । उंच तीस योजनें विस्तीर्ण । तोयें परिपूर्ण सरोवरीं ॥ २८ ॥ मग तो विश्वकर्मा तेथ । लंकानगरी निर्माण करीत । भोंवते दुर्ग शोभिवंत । परिघ[3] विचित्र समुद्राचा ॥ २९ ॥ नगरी शोभे हाटकवर्ण[4] । हाटवटिया शोभायमान । बुरुजे[5] अटोळिया[6] सत्तखण । माजी दुखणें बहुवस ॥ ३० ॥ चहूं दिशांसी चार दारवंटे । आगडँा सांखळ्या वज्रकपाटें । परवीरांचें हृदय फुटे । देखोनि नेटें ते काळीं ॥ ३१ ॥ तोरणें मखरें बहुवस । माजी शोभती मुक्तघोंस । द्राक्षामंडपछाया मार्गस्थांस । विश्रांतीस पैं देखा ॥ ३२ ॥ देखोनियां लंकेची थोरी । लाजे अमरावती हात चुरी । भोगावती दडाली पाताळविवरीं । कैलासही सरी[8] ते न पवे ॥ ३३ ॥ करावें लंकेचें वर्णन । कथा विस्तारेल अति गहन । त्याहीमाजी मी अपुरतें दीन । बुद्धिहीन पैं असें ॥ ३४ ॥ यालागीं जी करावी क्षमा । जैसें बालक नेणे शुभाशुभ कर्मा । तयावरी जनकजननीचा प्रेमा । तया सुखासी सीमा पैं नाहीं ॥ ३५ ॥ मग तो विश्वकर्मा तयांप्रती । सांगता झाला श्रीरघुपती । तुम्हीं करावी तेथें वसती । लंका नाम नगरीसी ॥ ३६ ॥ याउपरी रजनीचर तिघे जण । वसविते झाले लंकाभवन । नर्मदा नामें गंधर्वी जाण । तिघी कन्या तिये घरीं ॥ ३७ ॥ ऱ्ही श्री कीर्ति तिघी बहिणी । नर्मदा गंधर्वी त्यांची जननी । देती झाली राक्षसांलागोनी । अनुक्रमेंकरोनी राघवा ॥ ३८ ॥ तिघे गृहस्थ होऊन । तिघी स्त्रियांसीं विराजमान । क्रीडती वनोपवन । जेंवी मघवा अप्सरांसीं ॥ ३९ ॥ आतां तयां तिघांची वंशोत्पत्ती । सांगेन तुज जानकीपती[10] । माल्यवंताची स्त्री सुकृती । तिसी सहा पुत्र एक कन्या ॥ ४० ॥ वज्रमुष्टि विरूपाक्ष दुर्मुख । चवथा सुतघ्न पांचवा यज्ञकोप देख । मधुमंत ऐसें षट्क । सातवी कन्या अनळा पैं ॥ ४१ ॥ आतां सुमाळीपासाव उत्पत्ती । ऐकें गा ये धरणिजापती । तयाची भार्या कुसुमावती । चंद्रासारिखें मुख जिचें ॥ ४२ ॥ सुमाळीवीर्यें जाणा । तियेचे उदरीं संताना । तेरा पुत्र तिघी कन्या । त्यांच्या नामाभिधाना[11] अवधारीं[12] ॥ ४३ ॥ प्रहस्त अकंपन विकट । कंकपत्र धूम्राक्ष कालिकामुख । सुपार्श्व महामती देख । घस प्रघस भासकर्ण ॥ ४४ ॥ पुण्योत्कट बळाहक । कैकसी शुचिस्मित एक । कुंभीनसी तिसरी देख । त्रयोदश पुत्र तिघी कन्या ॥ ४५ ॥ आतां माळीचे संताना । सांगतसें पद्मिनीरमणा । तयाची स्त्री वसुमती नाम्ना । देखोनि वदना शशी[13] विटे ॥ ४६ ॥ माळीचेनि वीर्यें संभूत । सुमतीस झाले चवघे सुत । तयांचीं नामें विख्यात । अनळ अनिळ हंस संपाती ॥ ४७ ॥ हे चवघे राक्षसपुत्र । बिभीषणाचे मंत्री पुण्यवंत । यांसही झाले बहुसाल पुत्र । एकैकशत एकैका ॥ ४८ ॥ यांचे भयेंकरीं जाण । काळ तोही कंपायमान । शचीपति तेथें बापुडें दीन । दुर्धर अंगवण पैं यांची ॥ ४९ ॥ हे अवलोकिती ऊर्ध्वदृष्टी[14] । तंव हिमकर धाक धरी पोटीं । भेणें दिग्गज लंघिती द्वीपांच्या शेवटीं । यांशेवटीं वीर नाहीं ॥ ५० ॥ ययांचे भयेंकरून । मुनि ऋषी कंपायमान । विध्वंसिती महायज्ञ । जप ध्यान तेथें कैंचें ॥ ५१ ॥ ब्रह्मवरदें होवोनि उन्मत्त । सुरासुरां त्रास देत । यांचे दृष्टीस जो वीर पडत । तो पावत यमपुरा ॥ ५२ ॥ हे आपुले भुजबळेंसीं । स्वइच्छे हिंडती पृथ्वीसी । ययांचिये अंगवणेंसीं[15] । इंद्र तुळणेसी न पावे ॥ ५३ ॥ पुढिले अध्यायीं निरूपण । समस्त सुरगण मिळोन । प्रार्थितील शैलजारमण[16] । दीनवदन होऊनी ॥ ५४ ॥ एका जनार्दना शरण । श्रीरामें रम्य रामायण । वदनीं वदविता श्रीजनार्दन । पुढील निरूपण अति रम्य ॥ ५५ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां

१ राजवाडे. २ उदक. ३ घेर. ४ सोन्याच्या कांतीनें. ५ बुरूज. ६ उपरमाड्या. ७ [illegible]दक. ८ तुलना. ९ इंद्र. १० सीतापते. ११ ठेवलेलीं नांवें. १२ ऐक. १३ चंद्र. १४ वर दृष्टी करून. १५ सामर्थ्याशीं. १६ शंकर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सुमालिमाल्यवंतमालिजन्मकथनं नाम पंचमोऽध्यायः ॥ ५ ॥ ओंव्या ॥ ५५ ॥

अध्याय सहावा

॥श्रीधरणिजापतये नमः॥ इल्वलारी म्हणे जामदग्निजिता । कमलोद्भवजनका ऐकें पूर्वकथा । वर देता तयांसी सृष्टिकर्ता । त्यासही तत्त्वतां न गणिती ॥ १ ॥ वरदें उन्मत्त होवोन । करिते झाले अन्योन्यें । ऋषींस दुःख देऊन । यागविध्वंसन पैं करिती ॥ २ ॥ ऐसे राक्षसभयेंकरीं । विप्रीं कडे कुमर हातीं कोरी । यज्ञपात्रें स्त्रियांचे शिरीं । कैलासपुरी ठाकिली ॥ ३ ॥ आले वृद्ध थोर थोर । सपत्नीक अपत्नीक विधुर । तपें जर्जर झालें शरीर । ब्रह्मचारी थोर तेथें आले ॥ ४ ॥ आले मौनी दिगंबर । माथां जटा वल्कलांबर । तपोधन थोर थोर । भगवी कापडी येते झाले ॥ ५ ॥ राक्षसभयेंकरोनि ऋषी । येते झाले महेशापाशीं । विनविती स्वामी शरणगतासी । रक्षीं रक्षीं म्हणोनियां ॥ ६ ॥ कंपर्दिना त्रिलोचना । कामारि त्रिपुरदहना । गंगाधरा पंचवदना । दीनजनां रक्षावें ॥ ७ ॥ गजमुखजनका शैलजापती । शशिशेखरा सर्वांगविभूती । नंदिवाहना वासुकी शोभती । भक्तांप्रती कृपाळुवा ॥ ८ ॥ हात जोडोनियां तुजप्रती । आम्ही करीतसों विनंती । ब्रह्मवरदें राक्षस मंदमती । दुःख देती ब्राह्मणां ॥ ९ ॥ भक्तपति पार्वतीरमण । प्रजांतें करिताती दंडन । निरपराध्यांतें अपराध ठेवून । त्यांतें ताडन पैं करिती ॥ १० ॥ हिरोनि इंद्राचे अधिकार । स्वर्गीं क्रीडती जैसे इंद्र । म्हणती आम्हीच ब्रह्मा विष्णु रुद्र । यम कुबेर पैं आम्ही ॥ ११ ॥ ऐसे माळी सुमाल्यवंत । वरदें होवोनि उन्मत्त । संग्रामीं बोलती पुरुषार्थ । अति गर्वित अभिमानें ॥ १२ ॥ तुजवांचोनि गंगाधरा । आम्हां सोयरा नाहीं दुसरा । आमुच्या विपत्ति सांगतां चतुरा । लज्जा अंतरा येतसे ॥ १३ ॥ आतां आम्हां अभय द्यावें । राक्षसभय निवारावें । गाई ब्राह्मणां स्वस्थ करावें । यश मिरवावें तिहीं लोकीं ॥ १४ ॥ ऐकोनियां तयांचें वचन । संतोषला शैलजारमण । मृदु मंजुळ शब्देंकरून । काय आपण बोलत ॥ १५ ॥ मी न मारीं तयांसी । माझेनि मृत्यु नाहीं तयांसी । जरी मज पुसतां तुम्ही ऋषी । तरी उपाय यासी सांगेन ॥ १६ ॥ ऐकोनि महादेवाचें वचन । आनंदले तपोधन । जी स्वामी कृपा करून । दीनजन रक्षावे ॥ १७ ॥ शिव म्हणे तयांसी । तुम्हीं जावें विष्णूपासीं । सकळ सांगावें वृत्तांतासी । तो तुम्हांसी रक्षील ॥ १८ ॥ जैसे रोगी रोगें पीडिले । उपरी धन्वंतरीचें दर्शन झालें । तेणें शब्दरसायनें हरिलें । कुपथ्यभय देहींचें ॥ १९ ॥ शिववचनीं संतोषोन । मिळोनि सकळही ऋषिजन । जयजयशब्दें गर्जोन । ऊर्ध्वगमन तिहीं केलें ॥ २० ॥ जैसा उगवोनि तमारी । निशी पळे भयेंकरीं । तैसें ऋषींस भय भारी । तें कामारिर्वचनें निरसिलें ॥ २१ ॥ आले विष्णूसी शरण । करिते झाले साष्टांग नमन । स्तवन आदरिलें गुणवर्णन । कर जोडून ते काळीं ॥ २२ ॥ जयजयाजी जगद्गुरू । जयजयाजी निर्विकल्पतरू । जयजयाजी तुझा पारू । नेणे विधाता श्रुतिशास्त्रें ॥ २३ ॥ जयजयाजी गुणातीता । जयजयाजी श्रीअनंता । जयजयाजी सद्गुरु अच्युता । देशकाळता तुज नाहीं ॥ २४ ॥ तूं निर्गुण निराकार । तूं निष्कर्म निरुपचार । तो तूं होवोनि साकार । नाना अवतार धरितोसी ॥२५॥ निजसामर्थ्यें सृष्टि करी । सृजी पाळी संहारी । तो तूं मेघश्यामरूपेंकरीं । नंदाघरीं अवतरसी ॥ २६ ॥ धरोनियां नाना वेष । खेळ खेळसी असमसाहस । तूं पूर्णब्रह्म अवतारपुरुष । योगिमानस मोहक ॥ २७ ॥ शंख चक्र गदा धरोनि करीं । घेवोनि पीतांबराची उत्तरी । वैजयंती रुळे वक्षःस्थळावरी । द्विजपाद उरीं वाहसी ॥ २८ ॥ सुंदर सरळ नासापुट । शोभती बाहू बाहुवट । चरणीं नूपुरांचा बोभाट । अंदू नेटें पैं गर्जे ॥ २९ ॥ ऐसी सांवळी सुनीळ मूर्ती । देखोनि ऋषि दंडवत करिती । म्हणती स्वामी लक्ष्मीपती । राक्षसीं थोर गांजिलें ॥ ३० ॥ रजनीचर म्हणसी कोण । सुकेश सुमाळीचें संतान । ब्रह्मवरदें उन्मत्त होऊन । अन्योन्य पैं करिताती ॥३१॥ ऋषींचे आश्रम भंगिले । यज्ञादि-

१ अगस्ति ऋषी. २ अनुचित गोष्टी. ३ यज्ञाचा नाश. ४ मुलगी. ५ मोठमोठे तपस्वी, ६ शंकरा, ७ सूर्य. ८ मदनाचा शत्रु शंकर त्याच्या भाषणानें, ९ पैंजणांचा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

क्रिया विध्वंसूं लागले । ऋषीश्वर त्रासिते झाले । अतिभयेंकरोनियां ॥ ३२ ॥ तेणें भयेंकरीं जाण । आम्ही आलों तुज शरण । शरणागतां अभयदान । कृपा करोन पैं दीजे ॥ ३३ ॥ आणिक एक कमळापती । राक्षस वसती लंकेप्रती । दुर्गबळें त्रास देती । उच्छेदिती देवांसी ॥ ३४ ॥ लंकादुर्ग अति गूढ । भोंवता समुद्राचा आगंड । बुरजोबुरजीं यंत्रांचा जोड । परदळा अवघड पैं लंका ॥ ३५ ॥ ऐसिये लंकेमाझारी । सुकेशपुत्र दुराचारी । वरदें उन्मत्त तयांवरी । कवणाचें कांहीं न चालेचि ॥ ३६ ॥ तयांच्या [2]भेणें आम्ही समस्त । महादेवापासीं गेलों त्वरित । तो म्हणे मी राक्षसां प्रतिपाळीत । माझेनि मृत्यु त्यां नाहीं ॥ ३७ ॥ मी सांगतों उपायासी । तुम्ही शरण जा विष्णूसी । तेणें वचनें आम्ही तुजपासीं । यथार्थेंसीं पैं आलों ॥ ३८ ॥ तुजवांचोनि तारिता । आणिक नाहीं जगन्नाथा । तुवां अभय देवोनि आतां । राक्षसांतें मारावें ॥ ३९ ॥ आपुले चक्रें करोनी । राक्षसांचीं शिरें छेदोनी । पाठवावीं यमपुरीलागूनी । रहावया अनुदिनीं पैं तेथें ॥४०॥ तुझेनि प्रतापकिरणेंकरीं । राक्षस[3]निशी पळेल दूरी । तुजवीण न दिसे कैवारी । शरणागतांवरी कृपा करीं ॥ ४१ ॥ ऐकोनि ऋषींचें वचन । संतोषला श्रीजनार्दन । तयांप्रति काय आपण । बोलता झाला ते काळीं ॥ ४२ ॥ ऋषि हो तुम्ही श्रमलेती । राक्षसीं बहु गांजिलेती । भय सांडोनि आश्रमाप्रती । सुखें वस्ती करावी ॥ ४३ ॥ सुकेशपुत्रांतें मी जाणें । तयां वर दिधला चतुरा[4]ननें । तिंहीं मरणा दिधलें आवं[5]तणें । तपोधन दुःखी करोनी ॥४४॥ स्थानभ्रष्ट केलें देवांसी । तिंहीं दंडिलें प्रजांसी । विध्वंसिलें [6]यागांसी । मोडिलें आश्रमांसी ब्राह्मणांच्या ॥४५॥ तयांच्या वधाकारणें । मज अजन्म्या जन्म घेणें । अकर्म्यासी कर्म करणें । निर्गुणासी होणें सगुण पैं ॥ ४६ ॥ तुम्हीं जावें आश्रमाप्रती । स्वधर्मकर्म करा मजप्रीत्यर्थीं । सर्वभूतीं दया शांती । येणें यशकीर्ती होय तुम्हां ॥ ४७ ॥ ऐकोनि श्रीविष्णूचें वचन । ऋषि शिरीं वंदोनि जाण । जयजयशब्दें प्रदक्षिण । गर्जना करोन निघाले ॥ ४८ ॥ तेथें गुप्त होते राक्षस दूत । ते माल्यवंताप्रती सांगत । माल्यवंतें बंधु त्वरित । तयांसी वृत्तान्त जाणविला ॥ ४९ ॥ ऐका बंधु स्वजन हो । देवऋषींचा मिळोनि समुदावो । तिंहीं प्रार्थिला कैलास[8]रावो । त्रिनेत्र[9] महादेवो गिरिजापति ॥ ५० ॥ ऋषी म्हणती महादेवासी । राक्षसभयें क्षिती झाली क्लेशी । तुम्हीं वधावें तयांसी । म्हणोनि पायांसी लागले ॥ ५१ ॥ महादेव म्हणे तयांप्रती । माझे स्थापित राक्षस असती । माझेनि हातें न मरती । शीघ्र विष्णूप्रती तुम्हीं जावें ॥५२॥ तुम्हीं विष्णूसी जावें शरण । तो जाणे भविष्य वर्तमान । हें जग तया अधीन । तो स्वामी पूर्ण विश्वाचा ॥ ५३ ॥ समस्त मिळोनि आलेति येथ । तैसेंचि तुम्हीं जावें तेथ । तो भक्तकृपाळु अनंत । अभय देत भक्तांसी ॥५४॥ सकळही मिळोनि ऋषी । ते गेले श्रीविष्णूपासीं । म्हणती सुकेशपुत्रीं आम्हांसी । अति त्रासासी दीधलें ॥ ५५ ॥ तयांचें वचन ऐकोन । विष्णु बोले हास्यवदन । मज ठावें तयांचें उद्धटपण । करीन निर्दळण तयांचें ॥ ५६ ॥ तिंहीं मर्यादा सांडिली । ब्रह्मवरदें[8] भुली पडली । मी करीन तयांची रांगोळी । तुम्हीं सुखसमेळीं नांदावें ॥ ५७ ॥ विष्णुआज्ञा घेवोनी । देवऋषी समस्त मिळोनी । प्रवेशते झाले स्वस्थानीं । ऐसी करणी केली देवीं ॥ ५८ ॥ यासी काय कीजे उपाव । जेणें वश्य होतील देव । मिळोनि राक्षससमुदाव । विचार स्वयमेव करिते झाले ॥५९॥ आम्हां भय नाहीं त्रिपु[9]रारीचें । ब्रह्मा कांहीं करूं न शके आमुचें । एक भय त्या विष्णूचें । त्याप्रति कोणाचें कांहीं न चाले ॥ ६० ॥ पडिलें समर्थासीं वैर । विष्णु मायालाघवी चतुर । तयातें जिंकिजेल ऐसा प्रकार । अणुमात्र दिसेना ॥ ६१ ॥ हरी जयातें अंगीकारी । तयाचा घाव यमशिरीं । श्रीहरी जयातें अव्हेरी । ते संसारीं जीत मेले ॥ ६२ ॥ हरिनाम प्रल्हाद स्मरे । तयातें दैत्य पीडी बहु प्रकारें । अरिष्टें रचिलीं महाघोरें । तीं नाममात्रें निरसलीं ॥ ६३ ॥ अग्नि विष पर्वतपात । बुडवूं गेले समुद्रांत । शस्त्रें मारितां अंगातें ।

---

१ वेष्टन. २ भीतीनें. ३ राक्षसरूपी रात्र. ४ चार मुखांच्या ब्रह्मदेवानें. ५ आमंत्रण. ६ यज्ञ. ७ श्रीशंकर.

८ ब्रह्मदेवाच्या वरानें. ९ शंकराचें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

कोठें पुसत श्रीहरि तो ॥ ६४ ॥ प्रल्हाद भक्तचूडामणी । म्हणे जळीं स्थळीं काष्ठीं पाषाणीं । श्रीहरि व्यापक जनीं वनीं । अवनीं गगनीं सदोदित ॥ ६५ ॥ असुर पुत्राकडे पाहे । ये म्हणे खांबीं आहे । येरु म्हणे जेथें जेथें पाहें । तेथें तेथें आहे श्रीहरी ॥ ६६ ॥ दैत्यें गदा काढोन । खांबा हाणिली क्रोधेंकरून । तंव प्रकटला सिंहवदन[1] । असुराचा प्राण घ्यावया ॥ ६७ ॥ असुर धरोनि जानूंवरी[2] । रागें उदर तयाचें विदारी । अंत्रमाळा[3] कंठीं धरी । भक्तकैवारी विष्णु तो ॥ ६८ ॥ ऐसें माल्यवंताचें वचन । सुमाळी माळी ऐकोन । करिते झाले विचारण । मुख्य नारायण आम्हां वैरी ॥ ६९ ॥ येणें देव घातले पाठीसीं । वैर करीतसे आम्हांसीं । आम्हां संमुख रहावयासी । पुरुषार्थासी न देखों ॥७०॥ बहुसाल मिळती खद्योत । तरी न जिंकवे रवि एक । मार्जार काय व्याघ्रासन्मुख । ठाण मांडोनि राहेल ॥ ७१ ॥ पतंग आपुले प्रभेकरून । काय गिळूं शकेल हुताशन । पहा हो धेनूचा नंदन । मदगजासीं भिडेल ॥ ७२ ॥ कद्रुतनय[4] बहुतेक । विनतातनय[5] तो एक । त्यांतें काय ते मशक । पराभवितील संग्रामीं ॥ ७३ ॥ आतां विबुधांतें पराभविजे । विष्णु भेटला तरी सहजें । त्यातेंही रणीं जिंकिजे । हेंचि कीजे विचारण ॥ ७४ ॥ मग मेळवोनि समस्त । विचार करोनि निश्चित । युद्धा निघावें त्वरित । दूत सांगत घरोघरीं ॥ ७५ ॥ युद्धा निघती रजनीचर । जैसे वन्हीचे स्फुलिंग[6] अपार । यावरी माधव शरतुंषार[7] । अति गंभीर वर्षेल ॥ ७६ ॥

स्यंदनैर्वारणेंद्रैश्च हयैश्च गिरिसन्निभैः ।
खरैर्गोभिरथोष्ट्रैश्च शिशुमारैर्भुजंगमैः ॥ १ ॥
मकरैः कच्छपैर्मीनैर्विहंगैर्गरुडोपमैः ।
सिंहैर्व्याघ्रैर्वराहैश्च चामरैः सामरैरपि ॥ २ ॥
रथोत्तमैरुह्यमानाः शतशोऽथ सहस्रशः ।
प्रयाता राक्षसा नूनं देवलोकं जिगीषवः ॥ ३ ॥

तेथें राक्षस मिळोनी । असेना संख्य सज्जूनी । विबुध जिंतावे रणमेदिनीं । यालागोनी चालिले ॥ ७७ ॥ तेथें रथांसी नाहीं मिती । रत्नजडित ध्वज शोभती । कोट्यनुकोटी भद्रजाती[8] । मद गळती उन्मत्तपणें ॥ ७८ ॥ जैसे महापर्वत । तैसे हस्ती शोभावंत । दांतीं सुवर्णबिंदु रत्नजडित । वरी आरूढ होत रजनीचर ॥ ७९ ॥ नाना वर्णांचे उन्मत्त घोडे । त्यांतें देखोनि श्यामकर्ण दडे । पाखंरा[9] झळकती तेणें उजेडें । दश दिशा गाढें तेज फांकलें ॥ ८० ॥ खेचरांसी नाहीं मिती । बैल कोण जाणे किती । उष्ट्रीं आरूढले ते न गणवती । लक्षानुलक्ष राक्षस ॥ ८१ ॥ शिंशुमारीं[10] एक वळंघोन[11] । एकांसी सर्प वाहन । एक मगरीं आरूढ जाण । एकां वाहन कच्छप ॥ ८२ ॥ एकीं मीन पालाणिले । एक पक्षियांवरी वळंघले । एक सिंहीं सरसावले । एक बैसले वाघांवरी ॥ ८३ ॥ एकांचें वाहन सूकर । एकां रानबैल अपार । एकांचें वाहन सामर । गणनाविचार शतसहस्रीं ॥ ८४ ॥ देवांतें जिंकावयालागून । त्यजिते झाले लंकाभवन । अंगीं बळाचा अभिमान । राक्षसगण निघाले ॥ ८५ ॥ रथांचेनि घडघडाटें । भौममातेचें[12] उदर फुटे । नदनायक[13] अंदोळे नेटें । सरिता तडागें शोषलीं ॥ ८६ ॥ गर्वें ते रजनीचर । हातीं कात्या त्रिशूळ तोमर । एकीं घेतलें लहुडीचक्र । एकांचे कट्यार पैं करीं ॥ ८७ ॥ एकां हातीं धनुष्यबाण । एकीं पर्वत शिळा पाषाण । एकीं पादपा[14] उपडोन । एकीं गोफणा घेतल्या ॥ ८८ ॥ रणोन्मदें ते सुरारी । चालिले लंकेबाहेरी । एक उडाले अंबरीं । एक अंतराळीं चालिले ॥ ८९ ॥ लंका सांडोनि माघारीं । राक्षस आले नगराबाहेरी । गर्जना केली निशाचरीं । नाद अंबरीं न समाये ॥ ९० ॥ हर्षेंकरोनि रजनीचर । चालिले पवनवेगाहूनि थोर । तंव पुढें अपशकुन घोर । वीर दुर्धर देखते झाले ॥ ९१ ॥ लंकेसारिखी दुसरी लंका । माड्या गोपुरें अट्टालिका[15] । व्योममार्गीं विशाळ देखा । रूप भयानक देखिलें ॥ ९२ ॥ भूमी अंतरिक्ष व्यापिलें दिसे । काळासारिखी मूर्ति उग्र भासे । माथां शिर तिये नसे । हातें वेष्टीतसे भुजांतें ॥ ९३ ॥ उत्पात होती दारुण । तप्त रक्तें पडे पर्जन्य । माजी अस्थींचा[16]

१ नृसिंह. २ मांडीवर. ३ आंतडीं. ४ सर्प. ५ गरुड. ६ ठिणग्या. ७ बाणरूप जलकण. ८ हत्ती. ९ झुली.

१० एक जलचर. ११ बसून. १२ पृथ्वीचें. १३ समुद्र. १४ वृक्षाला. १५ उपरमाड्या. १६ हाडांचा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वर्षाव जाण । मेघ दारुण बोळला ॥ ९४ ॥ अर्णवें सांडी मर्यादेतें । महेंद्र डोलविती माथे । भूतळ होऊं पाहे उलथेंपालथें । कळिकाळ तेथें चळीं कांपे ॥ ९५ ॥ आँट कोटी भूतावळी । मिळालिया तया काळीं । एक आरोळी तये वेळीं । मेघासारिख्या पैं देती ॥ ९६ ॥ एक रणगोंधळीं नाचती । एक विकट मुख पसरिती । एक खावें पैं म्हणती । एक दाविती वांकुल्या ॥ ९७ ॥ दिवाभीतें मस्तकावरी । फिरती चक्राचिये परी । ज्वाळा वमिती मुखोद्वारीं । तें निशाचरीं देखिलें ॥ ९८ ॥ राक्षस बळगर्वेंकरीं । अपशकुन लेखिती तृणावारी । जो नपुंसक ये संसारीं । तया भय भारी अपशकुनांचें ॥ ९९ ॥ काळपाशेंकरीं विबुधारी । बांधिले पशु दावणीभीतरीं । पतंग जैसा दीपावरी । मरणोन्मत्त होवोनियां ॥ १०० ॥ माल्यवंत सुमाळी माळी । मरण विसरोनि ते काळीं । सेनासमुदार्यीं राक्षस बळी । गर्जन करिते पैं झाले ॥ १ ॥ राक्षसेंद्र झाला पुढें । मागें पुढें दळ गाढें । जैसें समर्थाश्रयें भ्याडें । मार्ग पडिपाडें क्रमिताती ॥२॥ जैसा दाता याचकें वेष्टित । तैसा राक्षस परिवारसहित । मृतप्राणी यमपुरा जात । तद्‌वाय राक्षसां ॥ ३ ॥ ऐसें उपराउपरी । मार्गीं सिंहनादकरीं । क्रमिला मार्ग क्षणामाझारी । विश्वात्मा हरि तेथें आला ॥ ४ ॥ दूत सांगती विष्णूसी । राक्षस आले युद्धासी । ऐकोनि तोषला हृषीकेशी । आनंद मानसीं वोसंडे ॥ ५ ॥ श्रीहरि त्वरित उठला । अभेद्य कवच अंगीं ल्याला । तेजें दिनमणि लोपला । दशदिशां पडिला उजियेड ॥ ६ ॥ अचूक घेवोनियां बाण । जैसे काळाचे क्रूरगण । भातां भरोनि संपूर्ण । धनुष्य टणत्कारोन सज्जिलें ॥ ७ ॥ सुवर्णखड्ग घेवोनि हातीं । अवलोकिता जाहला लक्ष्मीपती । कमळासारिखे नेत्र शोभती । मुखीं दंतपक्ती हिंरियांच्या ॥ ८ ॥ शंखचक्रगदाधर । श्यामसुंदर राजीवनेत्र । गळां वैजयंतीचे हार । कांसे पीतांबर विद्युत्प्राय ॥ ९ ॥ अंगीं अहिप्रियँविलेपन । कस्तूरीचा मळवट पूर्ण । श्यामसुंदर विराजमान । मनमोहन तो विष्णु ॥ ११० ॥ जैसा कनकाचा गिरी । तैसा संमुख सर्पारी । वरी आरूढोनि श्रीहरी । त्वरेंकरीं चालिला ॥ ११ ॥ गरुडपाखांचेनि वातें । पीतांबर आंदोळे तेथें । जैसें समुद्रीं लाटांचें भरितें । उपराउपरी येतसे ॥ १२ ॥ राक्षस वधावयाकारणें । अवतार धरिला नारायणें । देवांचें भय निवारणें । सुखी करणें त्रैलोक्य ॥ १३ ॥ स्वर्गीं देव आनंदत । एक पुष्पवर्षाव करीत । एक पवाडे गात । एक नाचत स्वानंदें ॥ १४ ॥ ऐसा तो राक्षसारी । निघाला अतित्वरेंकरीं । तें रूप देखोनि निशाचरी । रानभरी पैं झाले ॥ १५ ॥ एक भयें थरथरां कांपत । एक सरसें सरसावत । एक धैर्य धरोनि राहत । शस्त्रें वर्षत अमित पैं ॥ १६ ॥ राक्षसशस्त्रें अति तीक्ष्ण । मेदमांसें आरक्त जाण । जैसें वसंतीं पलाशपुष्पेंकरून । तैसे बाण वर्षले ॥ १७ ॥ अगणित सोडोनि बाण । श्रीहरि वेढिला जैसा पर्वत पर्जन्य । लागवेग करितां दारुण । वेगें गर्जन करिताती ॥ १८ ॥ सिंहनादें देती आरोळी । हात घांसिती भूतळीं । म्हणती बळियेरे बळी । भिडा ये काळीं अवघेही ॥ १९ ॥ राक्षसीं श्रीहरि वेढिला । एक म्हणती पुरा झाला । एक म्हणती अझूनि याला । उरी कोठें असेल ॥ १२० ॥ पुढें कथानिरूपण परम । श्रीहरीचें चरित्रनाम । अगस्ति सांगे ऐके श्रीराम । कथाधर्म अवधारा ॥ २१ ॥ एका जनार्दना शरण । श्रीरामें उत्तरकांड पावन । वदनीं वक्ता श्रीजनार्दन । कथानुसंधान अति रम्य ॥ १२२ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां राक्षसविष्णुयुद्धं नाम षष्ठोऽध्यायः ॥ ६ ॥ ओंव्या ॥ १२२ ॥ श्लोक ॥ ३ ॥

अध्याय सातवा

॥ श्रीअवनिजापतये नमः ॥ पूर्वप्रसंगीं रजनीचरीं । वेढियला तो श्रीहरी । पुढें वर्तलें तें चतुरीं । सावधान ऐकावें ॥ १ ॥ श्रीहरि पर्वतासमान । राक्षस तेथें मेहुंडे जाण । श्रीहरि सुटलिया प्रभंजन । दाणादाण राक्षसमेघां ॥ २ ॥ अवकाळींचा पर्जन्य । बळेंविण करी गर्जन । तैसे राक्षस

---

१ समुद्र. २ तुच्छ. ३ देवशत्रु राक्षस. ४ क्रमानें. ५ सूर्य. ६ कमललोचन. ७ सर्पांना प्रिय अशा चंदनाचें विलेपन. ८ गरुड. ९ राक्षस. १० मेघ. ११ वायु.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

बळहीन। संग्रामा जाण प्रवर्तले ॥ ३ ॥ जैसे टोळ आकाशीं । पसरती दशदिशीं । ते टोळ वृक्ष देखोनि मानसीं । उल्लासेंसीं वेढिती ॥ ४ ॥ जेंवी मशक पर्वतमाथां । असंख्य बैसती तत्त्वतां । परी तो भार पर्वतचित्ता । अणुमात्र उपजेना ॥ ५ ॥ जैसे मत्स्य सागरीं । क्रीडताती सहपरिवारीं । ते पारधी आकळी जाळियाभीतरीं । तैसें श्रीहरी करूं पाहे ॥ ६ ॥ त्या राक्षसांचे अमोघ[1] बाण । वज्राऐसे अति कठिण । जैसा प्रळयींचा प्रभंजन । भूतगण पैं व्यापी ॥ ७ ॥ राक्षसबाणांचा शिरावा । वेढिता झाला त्या माधवा । पुढें जें वर्तलें श्रीराघवा । सांगेन तें मी अवधारीं ॥ ८ ॥ वैष्णवी माया अकळ । घातलें भ्रांतीचें पटळ । रणीं मांडिला कोल्हाळ । वीरीं सकळीं परस्परें ॥ ९ ॥ रथ लोटिती रथावरी । कुंजर[2] आदळले कुंजरीं । असिवार[3] असिवारीं । सैन्यसागरीं आवर्त ॥ १० ॥ ते राक्षस पर्वताकार । हाणिते झाले शस्त्रसंभार । जैसा वर्णांमाजी द्विजवर । प्राणायामबळेंकरीं ॥ ११ ॥ शर दाटले भूमंडळीं । तेणें दशदिशां अंधारी पडली । वीरां वीर तये काळीं । हाणिते झाले आपआपणियांतें ॥ १२ ॥ आपुलें सैन्य आपण । मारिते झाले राक्षसगण । सर्वेचि करिती गाढ गर्जन । आपणा आपण मानवती ॥ १३ ॥ शस्त्रें सणसणां वाजत । जैसा प्रळयकाळींचा वात । दोही दळां संघाट[4] होत । वीर गर्जत वाढिवा ॥ १४ ॥ मग निशाचरांवरी । रागें क्षोभला श्रीहरी । शार्ङ्ग धनुष्य टणत्कारी । नाद अंबरीं न समाये ॥ १५ ॥ राक्षसांच्या शिरांतें । तोडिता झाला क्रोधें बहुतें । जैसा योगेश्वर मायेतें । आतमज्ञानें निरसी पैं ॥ १६ ॥ सर्वांतक बाण घेऊनि करीं । क्रोधें सोडिला दैत्यांवरी । तेणें क्षणमात्राभीतरी । केली बोहरी राक्षसांची ॥ १७ ॥ निशाचर पाडोनि भूमंडळीं । बाण भेदोनि गेला पाताळीं । शेष कांपतसे चळचळीं । कूर्म कळकळी पैं धाकें ॥ १८ ॥ सर्वेचि पांचजन्य त्राहाटिला । तेणें नादें काळ कांपला । दिग्गजांच्या श्रवणबिळां । बधिरता पैं आली ॥ १९ ॥ शशिसूर्य कंपायमान । नक्षत्रें पडती गळोन । मेरुमस्तक आंदोळून । समुद्रजीवन उचंबळलें ॥ २० ॥ नादें राक्षसें झालीं वेडीं । समरांगणीं पडलीं उबडीं । एकां झाली हडबड गाढी । एक रोकडीं निमालीं ॥ २१ ॥ सैन्य मारिलें समसकट । रथचक्रांचें झालें पीठ । घुरघुरितसे कंठ । प्राण त्यागीत रणरंगीं ॥ २२ ॥ जैसें सिंहाचें गर्जन । कुंजरांचा[10] पळे प्राण । तैसें प्राणहत राक्षससैन्य । पांचजन्यनादेंकरीं ॥ २३ ॥ रणनदी वाहे अशुद्धगाढी । राक्षसेंकरवडें[11] यांची दरडी । समरांगणीं झुंझती कडोविकडीं । तेचि परथडी पावले ॥ २४ ॥ रणवसंत माजला । वीरें वीर रुधिरें न्हाला । तोचि पळस फुलावला । आरक्ततेकरोनी ॥ २५ ॥ रण पडिलें असंख्यात । वीर घायाळ झाले बहुत । तोचि कोकिळांचा रव होत । आलापीत पंचमस्वरीं ॥ २६ ॥ रवि रजनी खंडित । अति वातें समुद्र हेलावत । तैसा श्रीहरि मर्दीत । अरिवीरसैन्यातें ॥ २७ ॥

शरभेण यथा सिंहः सिंहेन द्विरदो यथा ।
द्विरदेन यथा व्याघ्रो व्याघ्रेण द्वीपिनो यथा ॥ १ ॥
द्वीपिना च यथा श्वानः शुना मार्जारका यथा ।
मार्जारेण यथा सर्पाः सर्पेण च यथा प्लवाः ॥ २ ॥
तथा ते राक्षसाः सर्वे विष्णुना प्रभविष्णुना ॥ ३ ॥

शार्ङ्गधनुष्यापासूनि शर । मनोवेगापरीस थोर । सुटले तेणें निशाचर । रणभूमीवर पाडिले हो ॥ २८ ॥ शरभ जैसा सिंह विदारी । सिंह गजातें विदारी । गज देखोनि व्याघ्र दूरी । व्याघ्राचें भय चित्त्यासी ॥ २९ ॥ चित्त्या श्वाना वैर थोर । तेथ श्वानांचा होतसे संहार । श्वानासी भीतसे मार्जार । सर्पा[12] मांजर पैं भक्षी ॥ ३० ॥ उरगें भेकांतें[13] गिळी जाण । तैसे श्रीहरीचे शर दारुण । राक्षससैन्य करोनि भग्न । वीर दारुण पाडियेले ॥ ३१ ॥ वीर पाडिले रणमंडळीं । जैसा प्राणी सुषुप्तिकाळीं । नाकीं तोंडीं पडे धुळी । त्याचें तया स्मरण नाहीं ॥ ३२ ॥ कोट्यनुकोटी राक्षस । मारोनि विष्णु पावला यश । उरले तिहीं घेतला त्रास[14] । लंकाप्रवेश तिहीं केला ॥ ३३ ॥ शंखराजाची ध्वनि भारी । तेणें राक्षसें घाबरीं । पळोनि प्रवेशलीं

१ निष्फळ न होणारे. २ हत्ती. ३ घोडेस्वार. ४ मोठें संकट. ५ मेट, ६ आवेशानें, ७ विष्णूचा शंख, ८ वाजविला. ९ अनाथ. १० हत्तींचा. ११ राक्षसांचीं प्रेतें. १२ सर्प, १३ बेडकाला. १४ भय,

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

पुरीं । एकीं मार्गीं प्राण सांडिले ॥ ३४ ॥ राक्षस-सैन्य भंगलें । कित्येक रणीं पडिलें। हें सुमाळीनें देखिलें। क्रोधाचें आलें भरतें तया ॥ ३५ ॥ मग तो सुमाळी रजनीचर । विष्णूस येवोनि समोर । बोलता झाला साहें माझे शर । तरी मी वीर तुज म्हणेन ॥ ३६ ॥ विष्णूतें हाणीत शर । विष्णु निवारी योद्धा चतुर । मग म्हणे तूं राक्षस थोर । संग्रामीं धीर धरीं आतां ॥ ३७॥ श्रीविष्णूनें चाप सज्जिलें। गुणीं शर लाविले । जयां बाणांवरी खेळे । पुट तेजाळ अग्नीचें ॥ ३८ ॥ विष्णूचे येतां अग्निमय बाण । राक्षसें केलें खंडण । सोडोनियां आपुले बाण । रवि विष्णु आच्छादिला ॥ ३९ ॥ मांडलें रण अति कठिण । राक्षसें सोडिले निर्वाण-बाण । रणरंगीं विष्णूस आवरून । आपण गर्जन करिता झाला ॥ ४० ॥ सुमाळियें दिधली आरोळी। जेंवी विजु तडके मेघमंडळीं। श्रीहरीनें देखोनि ते काळीं । बाण तयावरी सोडिले ॥ ४१ ॥ बाण आदळले रथेंसीं । छेदिलें रथांच्या वारु-वांसीं[१] । वाहटुळीमाजि पत्रें जैसीं । आकाश-पोंकळीं भोंवत ॥ ४२ ॥ सुमाळी होवोनियां भ्रांत । रणामाजी परिभ्रमत । जैसा अटवीं[२] अंध फिरत । जाजावत[३] प्राणी पैं ॥ ४३ ॥ रणीं सारथि भंगला । सुमाळी विरथ झाला । श्रीविष्णु यश पावला । देवीं केली पुष्पवृष्टि ॥ ४४ ॥ सुमाळी रणीं विमुख । देखोनि माळी कोपला अधिक । बाण घेतला काळांतक । क्रोधें सोडिता जाहला ॥ ४५ ॥ तो बाण अति तेजाळ । सूर्यतेजाह्नि सोज्ज्वळ । माळी संधान करी सबळ । तये काळीं अवधारा ॥ ४६ ॥ वैरियाचा तेजाळ बाण । विष्णु मध्यें करी खंडण । जैसा पंडित छेदी पांखांड-[४]कथन । तेंवी तो बाण तोडिला ॥ ४७ ॥ तदनंतरें श्रीहरी। काय करिता झाला ते अवसरीं । संधान करी राक्षसांवरी । जेंवी अंबरीं घन वर्षे ॥ ४८ ॥ कीं ते काळाचेचि दूत । प्रेरिलिया स्थळासी जात । तैसे चालिले गर्जत । राक्षसअंत करावया ॥ ४९ ॥ माळीच्या देहीं भेदले । रुधिरातें प्राशन करिते झाले । सर्प सुधापानीं[५] बैसले । चाट्टू[६] निघाले सुरासुरां ॥ ५० ॥ माळी झाला मूर्च्छा-भूत । रथ सारथि अश्व तेथ । न लागतांचि क्षण-मात्र । हतोहत[७] पैं झाले ॥ ५१ ॥ चाप बाण पडिले रणीं । सैन्या झाली भंगाणी । रजनीचर[८] मूर्च्छा सांवरोनी । तत्क्षणीं ऊठिला ॥ ५२ ॥ हातीं वस-वोनियां गदा। करिता झाला महाशब्दा । जैसा सिंह कांपे क्रोधें गदगदां । तेंवी गोविंदा हाणीत ॥ ५३ ॥ ते गदा गरुडाचे ललाटीं । बैसे जैसा दरिद्री कपाळ पिटी । रुद्र प्रळयकाळीं घोंटी । मायामय सृष्टिरूपातें ॥ ५४ ॥ राक्षसगदा अति कठिण । लागतां गरुड मूर्च्छापन्न । रणीं विमुख नारायण । राक्षसगण हरिखले[९] ॥ ५५ ॥ देव रणीं पराभविले । श्रीविष्णूसी विमुख केलें । गरुडा गदेनें हाणितलें । राक्षसां झालें महासुख ॥ ५६ ॥ एक आनंदें नाचती । एक माळीसी वर्णिती । एक भला भला म्हणती । थोर ख्याती त्वां केली ॥५७॥ बंधूचें उसनें घेतलें। विष्णूतें विमुख केलें। समरांगणीं यश आलें । पराभविलें देवांतें ॥५८॥ राक्षस समस्त एकवटूनी । आनंदें गर्जती मेघ-ध्वनी । हें ऐकोनि विष्णूनें कानीं । कृपावलोकनीं उठविलें गरुडा ॥ ५९ ॥ श्रीहरीची कृपा जयावरी। तयाचें कोण काय करी । हात उंतरितां[१०] श्रीहरी । बळ शरीरीं बाणलें ॥ ६० ॥ गरुडावरी वेंळंघोनि[११] जाण । हातीं सुदर्शन चक्र दारुण । जयाचें तेज कोटिसूर्यगण । खद्योत[१२] होवोन राहिले ॥ ६१ ॥ चक्राभेणें कळिकाळ । चळचळां कांपे होवोनि निर्बळ । चक्रातें देखोनि समुद्रजळ । मर्यादेतें नुलंघी ॥ ६२ ॥ ऐसें चक्र अति दुर्धर । राक्षसाचें छेदोनि शिर । गगनीं भोंवे चक्राकार । देखोनि भास्कर कोपला ॥ ६३ ॥ पर्वणी सांडोनि अव-काळीं। राहू येतो आम्हांजवळी । मग राक्षसशिर अंतराळीं । भोंवोनि खालीं पडियेलें ॥६४॥ स्वर्गीं देव आनंदले । पुष्पवर्षाव करिते झाले । एक आनंदें नाचूं लागले । एक गाते झाले हरिनाम ॥ ६५ ॥ येरीकडे रजनीचर । निमाला देखोनि माळी वीर । दुःखें पिटिती करें शिर । पाषाणें उदर पीटिती ॥ ६६ ॥ म्हणती अपशकुनाचें झालें फळ । मारिलें आमचें असंख्य दळ । बंधु निर्दळिला सबळ । सेना सकळ पळाली ॥ ६७ ॥ आमुचें

१ घोड्यांना. २ अरण्यांत. ३ कष्ट पावतो. ४ नास्तिकवाद. ५ अमृत पिण्याकरितां. ६ नष्ट. ७ नाश. ८ माळी राक्षस. ९ आनंद पावले. १० अंगावरून फिरविला असतां. ११ बसून. १२ काजवे.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

कांहीं न चले येथ । म्हणोनि सुमाळी माल्यवंत । विमुख होवोनि रणाआंत । पुरीं प्रवेशते पैं झाले ॥ ६८ ॥ कित्येक सैन्य पळालें । किंचित जें कांहीं उरलें । तें पक्षवातें गरुडें संहारिलें । चक्रें तोडिलें शिरांतें ॥ ६९ ॥ गदेनें कित्येक निमाले । तोमरें कित्येक निवटिले । कांहीं थोडेबहुत उरले । ते मारिले शस्त्रेंकरीं ॥ ७० ॥ कित्येक बाणें निर्दळून । रणीं पाडिले असंख्य जाण । तेथें भूतावळी[1] मिळोन । मांसभक्षण करिताती ॥७१॥ आनंदें नाचती क्षेत्रपाळ । वाद्यें वाजविती वेताळ । शाकिनी डाकिनी करिती गोंधळ । मांसाचा सुकाळ पैं तेथें ॥ ७२ ॥ पात्रें भरोनि रुधिरें[2] पिती । एकमेकांस प्रीतीनें देती । एकमेकांस हांसती । तिरस्कारिती एकमेकां ॥ ७३ ॥ ऐसा संग्राम अत्यद्भुत । श्रीहरि झाला विजयान्वित[3] । पुढें परिसावें सावचित्त । वाल्मीकवाग्रतातें ॥ ७४ ॥ वाल्मीककृत रामायण । एकैक अक्षर परम पावन । श्रवणें ब्रह्महत्यादि दोष दहन । कलिमलनाशन रामकथा ॥ ७५ ॥ एका जनार्दना शरण । म्हणतां कैंचें दुजेपण । श्रीरामप्रिय रामायण । नाम तारण भवदोषां ॥ ७६ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां माळीराक्षसवधो नाम सप्तमोऽध्यायः ॥ ७ ॥ ओंव्या ॥ ७६ ॥ श्लोक ॥ ३ ॥

अध्याय आठवा

॥ श्रीकमलोद्भवजनकाय नमः ॥ अवनिजापति[4] रघुनंदन । जोडूनि पाणी करी प्रश्न । अगस्ति तुझेनि मुखें आपण । माळीमरण आयकिलें ॥ १ ॥ पुढें उरले दोघे बंधु । त्यांचा कैसा जाहला वधु । त्यांतें वधिता गोविंदु । किंवा आणिक पैं असे ॥ २ ॥ अगस्ति म्हणे श्रीरघुपती । तयां राक्षसां मृत्यु विष्णुहातीं । विष्णुहातें ते मरती । आणिकाप्रती नाटोपती ॥ ३ ॥ माळी मारिला एकोन । राक्षस मोडले देखोन । माल्यवंत क्रोधायमान । गिरा गर्जोन चालिला ॥ ४ ॥ अग्निकुंडासारिखे नेत्र । रागें धनुष्या गुण[6] चढवीत । जैसा समुद्र वेळा[5] लंघीत । तैसा धांवत राक्षस ॥ ५ ॥ दूरी देखोनि विष्णूसी । रागें फोडी आरोळीसी । जेंवी कां मेघ आकाशीं । वर्षाकाळीं पैं गर्जे ॥ ६ ॥ अगा पद्मनाभा परियेसीं । नीति सांगतों तुजपासीं । तूं धर्मयोद्धा नव्हेसी । ठकवोनि मारिसी वीरांतें ॥ ७ ॥ तूं नेणसी शूरधर्म । तुज नाहीं कर्माकर्म । तुज कैंचा संग्रामधर्म[8] । विमुख वीर मारिसी ॥ ८ ॥ विमुख मारितां वीर । तेणें तयासी पाप अपार । तया दोषांचे होती डोंगर । अपेश थोर तो जोडी ॥ ९ ॥ स्वर्गीं पितृगण कोपती । द्विज देव विमुख होती । कीर्ति होय अपकीर्ती[9] । जाण निश्चितीं गोविंदा ॥ १० ॥ अपेशें नव्हे स्वर्गगमन । अपेशें होय अधःपतन । अपेश तेंचि पाप दारुण । अपेशें कल्याण न पवेचि ॥ ११ ॥ तें अपेश तुज आलें । तुवां पळतां राक्षस वधिले । जे रणापासोनि चेवले । त्यांतें मारिलें संग्रामीं ॥ १२ ॥ गरुड पळतां तूं पाठीं । बैसला होतासी वळंघोनि पृष्ठीं । फिरोनि चक्र हाणिलें क्रोधदृष्टीं । हे कामांठीं तुझी नव्हे ॥ १३ ॥ तुज युद्धाचें असे आर्त[10] । तरी तूं साहें माझा शरसंपात । आतां धीर धरीं युद्धांत । सावचित्त राहें उभा ॥ १४ ॥ मी माल्यवंत कैसा । पाहें उभा गिरि जैसा । माझे दृष्टीसंमुख सहसा । काळ उभा राहेना ॥ १५ ॥ मी ऊर्ध्व अवलोकीं व्योमें[12] । तंव भयभीत रविसोम । मज चळीं कांपतसे यम । माझा पराक्रम अद्भुत ॥ १६ ॥ अगा ये शैलारिअनुजा[13] । आतां पुरुषार्थ पाहें माझा । मी माल्यवंत भेटल्या जुंझा । गर्व तुझा राहेना ॥ १७ ॥ ऐसें ऐकोनियां वचन । काय बोलिला नारायण । म्यां अवतार धरिला याचि कारण । तुमचें दमन करावें ॥ १८ ॥ तुम्ही दुष्ट दुराचारी । तुम्ही नोळखां परनारी । तुम्हीं पीडिले देव भारी । त्यांची उसणवारी मी घेतों ॥ १९ ॥ तुम्ही वरदें झालेति उन्मत्त । नोळखां साधु संत महंत । तुम्ही पाप आचारलेति बहुत । मी प्रायश्चित्त देतसें ॥ २० ॥ संग्राम तेंचि सुक्षेत्र । शरधारा तेंचि महातीर्थ । येथें माधव मी दानपात्र । तुम्हीं जीव देतां न सरावें ॥ २१ ॥ मी देवांचा आज्ञाधारी । त्यांचें वचन माझे शिरीं । मी त्यांचेनि बोलें राक्षस

१ भूतांचा जमाव. २ रक्त. ३ यशस्वी. ४ सीतापते. ५ हात. ६ दोरी. ७ विष्णो. ८ युद्धनीति. ९ भ्रष्ट झाले. १० पराक्रम. ११ इच्छा. १२ आकाश. १३ इंद्राचा कनिष्ठ बंधु विष्णु.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

मारीं । मी सुखी करीं तयांतें ॥ २२ ॥ मज नाहीं विमुखपण । सकळां संमुख मी जाण । विन्मुखा विन्मुख पूर्ण । मजपासीं मीतूंपण असेना ॥ २३ ॥ माझ्या साधूंचा करिती द्वेष । तयांतें मी निर्दळीं परेश । यालागीं तुम्ही राक्षस । परम क्लेश पावाल ॥ २४ ॥ ऐकोनि विष्णूचें वचन । माल्यवंत झाला क्रोधायमान । अग्निकुंडासारिखे नयन । शक्ति दारुण घेतली ॥ २५ ॥ ते शक्ति अत्यंत दारुण । काढितां कडकडली कडाडून । घंटावळी[१] तेंचि आभरण । नादें गगन कोंदलें ॥ २६ ॥ ते राक्षसें मंत्रोनि टाकिली । ते विष्णूच्या हृदयीं भेदली । जैसी पर्वतीं वीज खडतरली । तैसी लागली हरिअंगीं ॥ २७ ॥ तये शक्तीचेनि घायें । देव मूर्च्छित होऊं पाहे । परी आवरोनि धैर्यें । उसणें घेवों आदरिलें ॥ २८ ॥ तयाउपरी श्रीहरी । शक्ति आव्हानी बीजाक्षरीं[३] । जियेचे आंतबाहेरी । सहस्रनामें विष्णूचीं ॥ २९ ॥ ऐसी शक्ति अति दारुण । सुटली घोषें गर्जे गगन । निधडे वीर कंपायमान । देवगण भयभीत ॥ ३० ॥ ते शक्ति राक्षसावरी । टाकिली अति क्रोधेंकरीं । राक्षसें शक्तीतें तोडूनि अंबरीं । धरणीवरी पाडिली ॥ ३१ ॥ कित्येक शक्तिघायें निमाले । कित्येक वीरीं[४] प्राण सांडिले । कित्येक जीव घेवोनि पळाले । लंकापुरी लक्षोनी ॥ ३२ ॥ पुनरपि माल्यवंतें । काळतुल्य शूळातें । घेवोनि हाणिलें विष्णूतें । तो शूळ जनार्दनातें लागला ॥ ३३ ॥ हरिहृदयीं शूळ भेदला । तयावरी मुष्टिघाव झाला । महाशब्द् करूं लागला । समरांगणीं राक्षस ॥ ३४ ॥ अरुणानुजासी[५] शूळ । राक्षस मारिता झाला तत्काळ । ते वेळीं कोपला विनताबाळ[६] । पक्षवात प्रबळ सोडिला ॥ ३५ ॥ गरुडपक्षवातेंकरीं । कित्येक गतप्राण झाले अरी । कित्येक पडले रणसागरीं । कित्येकां बोहरी[७] पैं झाली ॥ ३६ ॥ सैन्य देखोनि भंगलें । थोर थोर वीर पडिले । माल्यवंत सुमाळी काय करिते झाले । तये काळीं अवधारा ॥ ३७ ॥ मागें पुढें रण पाहती । तंव नाहीं रथ सारथी । सर्वांची झाली शांती । पक्षवातीं निवारिलें ॥ ३८ ॥ माल्यवंत सुमाळी रणभ्रष्ट झाले । संग्राम सोडूनि पळों लागले । धाक धरोनि प्रवेशले । लंकापुरीभीतरीं ॥ ३९ ॥ ऐसे ते नक्तंचर्र[८] । रणीं पाडिले थोर थोर । जयांतें धाकती सुरवर । चरणांतें शरण येती ॥ ४० ॥ अगस्ति म्हणे श्रीरामा । राक्षस मारावया पुरुषोत्तमा । तूं अवतरलासी आम्हां । अत्यंत सुख द्यावया ॥ ४१ ॥ विष्णुधाकें ते निशाचर । लंका सांडोनि पाताळविवर । प्रवेशले सहपरिवार । माल्यवंत सुमाळी राक्षस ॥ ४२ ॥ पौलस्तीचा वंश राक्षस । झालें रण अतिकर्कश । तेचि कुळीं रावण दशशीर्ष । बळनिधि जन्मला ॥ ४३ ॥ ऐसी राक्षसांची उत्पत्ती । ऐकें स्वामी श्रीरघुपती । यांच्या वधाकारणें रमापती । आपण अवतार धरिता झाला ॥ ४४ ॥ पुढें कथा अति रसाळ । वाल्मीकमुखींचें नाम केवळ । श्रोते हो तुम्ही परिसा सकळ । सावधान होउनी ॥ ४५ ॥ एका जनार्दनासी विनवीत । श्रोतीं व्हावें दत्तचित्त । पुढील कथानामामृत । सेविजे निर्मुक्त होवोनी ॥ ४६॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां राक्षसपातालगमनं नाम अष्टमोऽध्यायः ॥ ८ ॥ ओंव्या ॥ ४६ ॥

अध्याय नववा

॥ श्रीरमाकांताय नमः ॥ श्रीराम म्हणे मुनिवरा । माल्यवंत सुमाळी पाताळविवरा । प्रवेशले तयावरी चतुरा । कथा पुढारां सांगावी ॥ १ ॥ अगस्ति विनवी श्रीरामा । तूं अंतर्यामी साक्षी आम्हां । ऐसें असोनि हा महिमा । आमुचा थोर वाढविसी ॥ २ ॥ पुढें ते रजनीचर । पाताळीं प्रवेशले सहपरिवार । लपोनि राहिले धाक थोर । भय दुस्तर देवांचें ॥ ३ ॥ कोणे एके समयीं । राक्षस विचरती महीं[९] । रसातळमृत्युलोकीं पाहीं । स्वइच्छेनें हिंडती ॥ ४ ॥ अंगकांति अति सुंदर । शोभा शोभे शशिशक्र । सुवर्णकुंडलें मकराकार । विशाल नेत्र आकर्ण ॥ ५ ॥ ऐसा सुमाळी राक्षस । महीं विचरत सावकाश । तंव एके समयीं कुबेरास । देखता झाला दुरोनी ॥ ६ ॥ कुबेर पुष्पकविमानीं । बैसोनि जातां

---

१ घागऱ्यांचा समूह. २ स्थापना करी. ३ मूळमातृकांनीं. ४ शूर. ५ गरुडास. ६ गरुड. ७ नाश.

८ रात्रीं संचार करणारे, राक्षस. ९ पृथ्वीवर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

गगनीं । राक्षसीं देखिला नयनीं । भय मनीं धरियेलें ॥ ७ ॥ पाताळा गेला पुनरपि जाण । स्वगृहीं असतां सावधान । तंव कन्या देखिली रूपयौवन । राक्षसाचें मन कळवळिलें ॥ ८ ॥ माल्यवंत म्हणे कन्येप्रती । ऐक वो एक माझी विनंती । तूं रूपयौवनें गुणवती । वर निश्चितीं तुज पाहिजे ॥ ९ ॥ जयाचे घरीं कन्यारत्न । तया चिंता अति दारुण । कोणे काळीं सुस्थिर मन । तया प्राणियाचें पैं नाहीं ॥ १० ॥ कन्येची होतां उत्पत्ती । माता पिता चिंता वाहती । तैसी तूं नव्हेसि गुणवंती । लक्ष्मीची स्थिती तुजपाशीं ॥ ११ ॥ माता पिता काय करिती । कन्येसी योग्य वर पाहती । विधिपूर्वक लग्न लाविती । तयांच्या पुण्या मिती नाहीं ॥ १२ ॥ तिन्ही कुळांचें विचारण । शोध करिती ज्ञाते जन । घटित[1] गोत्र नसतां ज्ञान । लग्न तेथें न लाविती ॥ १३ ॥ तरी कन्ये तूं अवधारीं । प्रजापतीचे उदरीं । पुलस्त्यनामा श्रेष्ठ भारी । पुत्र तयाचा पौलस्ति ॥ १४ ॥ पुलस्त्याचा नंदन । पौलस्तिनामा प्रसिद्ध जाण । तयासी त्वां वरावें आपण । पुत्रसंतान तुज होईल ॥ १५ ॥ त्या पुत्राचें महिमान । तेजें जैसा शोभे भान[2] । अथवा अग्निसमान । प्रतापें पूर्ण बळवंत ॥ १६ ॥ पितृआज्ञा वंदोनि शिर्सीं[3] । आनंदें निघाली कैकसी । पौलस्ति जेथें तपोराशी । त्या आश्रमासी पैं आली ॥ १७ ॥ जोडोनियां दोनी कर । उभी ठेली तयासमोर । तंव तो तपस्वी द्विजवर । काय उत्तर बोलिला ॥ १८ ॥ भयभीत होवोनि मानसीं । उभी ठेली अधोदृष्टीसीं[4] । तंव तियेसी देखोनि ऋषी । बहुत मानसीं संतोषला ॥ १९ ॥ तो विश्रवा ब्राह्मण । तेजें तपें ज्ञानें पूर्ण । मृदु मंजुळ वचन । संतोषोन बोलिला ॥ २० ॥ अवो भद्रे तूं कोणाची कोण । कोण पिता काय अभिधान[5] । तुज येथें यावया काय कारण । समूळ कथन मज सांगें ॥ २१ ॥ ऐसें ऐकोनि ऋषिवचन । कैकसी दोनी कर जोडून । म्हणे स्वामी तूं सर्वज्ञ । आत्मप्रभावें गुण जाणसी ॥ २२ ॥ वचन ऐकोनि पितयाचें । मज येणें झालें साचें । कैकसी नाम या देहाचें । तुम्ही सर्वज्ञ जीवींचें जाणतसां ॥ २३ ॥ ऐकोनि तियेचा शब्द । मुनि ध्यानस्थ झाला स्तब्ध । जाणोनि तियेचा भाव शुद्ध । काय आपण बोलतसे ॥ २४ ॥ अवो चंद्रानने अवधारीं । तुज पुत्र पाहिजे तरी । तूं आलीस हे वेळा आसुरी । राक्षस पुत्र तुज होतील ॥ २५ ॥ ते बळियाढे[6] दुर्वृत्ती । देवां अत्यंत त्रास देती । क्रूररूपें उन्मत्त होती । जाण निश्चितीं कैकसी ॥ २६ ॥ ऐकोनि द्विजाचें वचन । हात जोडोनि करी विनवण । स्वामी तुम्हांसारिखे नंदन । माझे उदरीं जन्मावे ॥ २७ ॥ तुम्ही शांत दान्त संपूर्ण । तपें तेजें अति दारुण । सर्व भूतीं दया संपूर्ण । ऐसें संतान मज देईं ॥ २८ ॥ दुराचारी पुत्र होती । तेणें पितृगण नरकीं बुडती । तयांतें जे पुत्र म्हणती । ते निश्चितीं मंदबुद्धी ॥ २९ ॥ ऐकोनि तियेचें वचन । संतोषला तपोधन । मजसारिखें धर्मिष्ठ जाण । पुत्रनिधान पावसी ॥ ३० ॥ ऋषिवचन वंदोनि शिरीं । तेथेंचि राहिली सुंदरी । कायावाचामनेंकरीं । सेवा तिळभरी न सांडी ॥ ३१ ॥ सेवा देखोनि दारुण । पुत्र जन्मविता झाला आपण । तये काळीं झालें जनन । सावधान अवधारा ॥ ३२ ॥ दशशीर्ष विंशति[7] भुजा जाण । दाढा विक्राळ विशाळ वदन । ओष्ठ वीस आरक्तवर्ण । काया जैसी काजळगिरी ॥ ३३ ॥ स्कंधावरी दिसती शिरें । जैसीं पर्वताचीं शिखरें । तींही अत्यंत भयासुरें । अति उग्र तेज पैं ॥ ३४ ॥ ऐसा जन्मतां ते क्षणीं । माता देखती झाली त्यालागोनी । भयानक गजबजोनी । सावधान होऊनि पहातसे ॥ ३५ ॥

जातमात्रे ततस्तस्मिन् जज्वाल कठिनः शिवः ।
क्रव्यादाश्चापसव्यानि मंडलानि प्रचक्रिरे ॥ १ ॥
ववर्षू रुधिरं मेघा
रटंतो भैरवान् स्वनान् ।
न प्रकाशति खे सूर्यो
महोल्काश्चापि खेऽपतन् ॥ २ ॥
अथ नामाकरोत्तस्य पितामहसमः पिता ॥ ३ ॥

कैकसी ते प्रसूत झाली । भयानक पुत्र प्रसवली । पुढें काय कथा वर्तली । सावधान अवधारा ॥ ३६ ॥ जन्म पावतांच राक्षस । तेथें उत्पात

१ वधूवरांची जन्मपत्रिका पाहून गुण पाहणें. २ सूर्य. ३ मस्तकीं. ४ खालीं पहात. ५ नांव. ६ बलाढ्य. ७ वीस

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

झाले बहुवस । भालुवा भुंकती अरण्य उद्वस । तैसें नगर दिसतें झालें ॥ ३७ ॥ दश दिशा ज्वाळाकुळित । गीधमंडळी अपसव्य फिरत । पर्जन्य रुधिरें वर्षत । मेघ गर्जत भयानक ॥ ३८ ॥ खमंडळीं अद्भुत ध्वनी । सूर्य न प्रकाशे गगनीं । नक्षत्रें पडती च्यवोनी । कंप मेदिनी होतसे ॥ ३९ ॥ यानंतरें चतुरानन । पहावया तेथें आला जाण । देखतां दशशीर्ष वीस नयन । जातक आपण करविता झाला ॥ ४० ॥ पंचद्वय शीर्ष दशद्वय नयन । विंशति भुजा तेजस्वी जाण । तयाचें दशग्रीव अभिधान । आतां कुंभकर्णजनन अवधारा ॥ ४१ ॥ तदनंतरें जन्मला कुंभकर्ण । जयाच्या बळा न करवे वर्णन । आणिक दृष्टांत नाहीं जाण । पुढें ऐसा न होईल पैं ॥ ४२ ॥ तयाउपरी एक कुमरी । जन्मली शूर्पणखा विक्राळ भारी । जियेच्या मुखाची वर्णूं थोरी । तरी ते प्रथमचि भयानक ॥ ४३ ॥ तदनंतरें एक पुत्र । धर्मपरायण अति पवित्र । सर्वां भूतीं हितरत । नाम तयाचें बिभीषण ॥ ४४ ॥ तयाउपरी ते कैकसी । तिघे पुत्र एक कन्येसी । वसवोनियां वनवासीं । वाढविती झाली पुत्रांप्रति ॥ ४५ ॥ ज्येष्ठ पुत्र रावण । अत्यंत क्रूर कपटी जाण । दुसरा तो कुंभकर्ण । त्रैलोक्यीं पीडन करिता झाला ॥ ४६ ॥ त्याचेनि भयें ऋषी । लपताती दशदिशीं । मारूनि तो ब्राह्मणांसी । भक्षित विचरे वनामध्यें ॥ ४७ ॥ बिभीषण धर्मात्मा जाण । करिता झाला वेदपठण । इंद्रियनेमस्त सज्ञान । पुण्यपावन तो झाला ॥ ४८ ॥ कोणे एके काळीं धनेश । विचरत आला सावकाश । पितया पहावयाचा उद्देश । तया काळीं तो आला ॥ ४९ ॥ आरूढोनि पुष्पकावरी । कुबेर येत तया अवसरीं । चालिला जैसा वज्रधारी । चित्रवनीं क्रीडेतें ॥ ५० ॥ तया देखोनि कैकसी । झाली अत्यंत उल्लासी । मग म्हणे रावणासी । हा बंधु कुबेर तुझा ॥ ५१ ॥ ऐक गा ये दशग्रीवा । काय सांगूं याच्या वैभवा । वंशीं पुत्र ऐसा व्हावा । भाग्यें ऐश्वर्यैंकरोनी ॥ ५२ ॥ एक वंशीं पुत्र होती । ते पूर्वजांतें तारिती । एक लेंक म्हणविती । अधःपाता नेती पूर्वजां ॥ ५३ ॥ ऐकोनि मातेचें वचन । हृदयीं खोंचला रावण । म्हणे माते मी आपण । कीर्ति करीन अगणित ॥ ५४ ॥ वैश्रवणांहूनि विशेषेंसीं । ऐश्वर्य भोगीन स्वबळेंसीं । तरीच जन्मलों तुझिये कुसी । संशय मानसीं धरूं नको ॥ ५५ ॥ आपुलेनि जाण वैभवें । स्वर्गींचे देव लावीन सेवे । यदर्थीं सत्य मानावें । मनीं न म्हणावें हें मिथ्या ॥ ५६ ॥ कुबेरासारिखें तत्काळीं । भोगीन संपत्तीचें फळ । हें माझें वाक्य अचळ । अढळ जाण केवळ जननीये ॥ ५७ ॥ मग वंदोनि मातेप्रती । तिघे निघाले शीघ्रगती । गोकर्णनाम आश्रमस्थिती । तया स्थळाप्रती पैं आले ॥ ५८ ॥ गोकर्णनामें आश्रम । परम पवित्र विश्राम । जेथें सिद्ध योगीश्वर मनोरम । चारण जेथें वसताती ॥ ५९ ॥ तिघे बंधु समवेत । तेथें स्वस्थ करोनि चित्त । करिते झाले तो कार्यार्थ । सावचित्त अवधारा ॥ ६० ॥ इति श्रीवाल्मीकिकृत । रामायण उत्तम ग्रंथ । तें हें उत्तरकांडकथामृत । सज्जन संत रिझोत ॥ ६१ ॥ श्रीरामकथेचा महिमा । जाणे ज्याची स्त्री उमा । एका जनार्दन एकनामा । भिन्न भाव मुळींच नाहीं ॥ ६२ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां रावणकुंभकर्णशूर्पणखाबिभीषणउत्पत्तिर्नाम नवमोऽध्यायः ॥ ९ ॥ ओंव्या ॥ ६२ ॥ श्लोक ॥ ३ ॥

अध्याय दहावा

॥ श्रीगजाननाय नमः ॥ तदनंतरें अयोध्यापती । ऐकोनि रावणकुंभकर्णउत्पत्ती । अत्यंत सुखावोनि चित्तीं । मुनीप्रती पुसता झाला ॥ १ ॥ ऐकें स्वामी अगस्तिमुनी । तुवां समुद्र प्राशिला आचमनीं । दंडकारण्य वसे तुझेनी । विंध्याद्रि धरणीं निजविला ॥ २ ॥ वातापी इल्वल महाराक्षस । मारोनि ऋषी केले ससंतोष । ऐसे तुझे उपकार बहुवस । तूं महापुरुष ईश्वरू ॥ ३ ॥ कृपा करोनि दीनावरी । कथा सांगावी पुढारीं । मग बिभीषण रावण घटश्रोत्री । काय करिते पैं झाले ॥ ४ ॥ कोण तप तयांचें फळलें । काय नेम करिते झाले । कोण

१ ओसाड. २ आकाशांत. ३ गळून. ४ मूल जन्मल्यावरचा संस्कार. ५ दहा. ६ वीस. ७ हिताविषयीं जपणारा. ८ कुबेर. ९ इंद्र. १० कुबेराहून. ११ ज्याविषयीं. १२ कधीही खोटें न होणारें. १३ पार्वती. १४ जमिनीवर. १५ कुंभकर्ण. १६ फलद्रूप झालें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

व्रत आचरले। कैसेनि पावले ऐश्वर्या ॥ ५ ॥ आधींच कथा रामायण। त्यावरी तुमच्या मुखें निरूपण। आजि श्रवणाचें भाग्य गहन। धणी-वरी पान करीन मी ॥ ६ ॥ विबुधजितजनकारीचें वचन। ऐकोनि अगस्ति संतोषोन। वाक्पुष्प-माळा गुंफोन। रामार्पण करिता झाला ॥ ७ ॥ श्रीराघवा तूं अवधारीं। जयालागीं गिरिकंदरीं। बसते झाले जटाशिरी। फळाहारी होवोनियां ॥ ८ ॥ एक झाले बोडके। ढुंगीं लावोनि फडकें। तीथें हिंडती अनेकें। भिक्षान्नें खावोनियां ॥ ९ ॥ एक मुखीं लावोनि कोळसा। वेष घेती अनारिसा। एक नग्न पिशाचदशा। हिंडती पुरीं पाटणीं ॥१०॥ एकीं आश्रम त्यागोन। सेविलेंसे महावन। एक पंचाग्नी धूम्रपान। जळशयन एक करिती ॥ ११ ॥ एक कान फाडोनि मुद्रा ल्याले। आलेख म्हणोनि हिंडों लागले। लक्ष नेणती चुकले। भिके लाविले प्रारब्धें ॥ १२ ॥ एक मस्तक लुंचिती। चालतां क्षिती झाडिती। झाडावरी बैसोनि देहकर्म करिती। देहातें देव म्हणोनी ॥ १३ ॥ ऐसें अनेक मतांतर। धुंडाळिते झाले नर। परंतु न कळेचि तुझा पार। न पावती ते कदाकाळें ॥१४॥ तरी अवधारीं राजेंद्रा। इंद्राच्या आदिइंद्रा। क्षयो आहे इंद्रचंद्रां। तूं नरेंद्रा अक्षयी ॥ १५ ॥ तो तूं धरणिजेचा पती। अव-तरलासी नानाव्यक्ती। ऐसा तूं आम्हां मूढां-प्रती। नाना कथा पुसतोसी ॥ १६ ॥ तिघे बंधु गोकर्णप्रती। येवोनि काय करिते झाले स्थिती। ते कथा अवधारिजे श्रोतीं। सावधान चित्तीं होवोनी ॥ १७ ॥ कुंभकर्ण नित्य नेमस्त। अल्प-आहार एकाग्रचित्त। इंद्रियां दमूनि वैराग्ययुक्त। परियेसा तप करीतसे ॥ १८ ॥ उष्णकाळीं पंचाग्नि जाण। वर्षाकाळीं मस्तकीं घे पर्जन्य। शीतकाळीं जळआश्रयण। तप दारुण करीतसे ॥ १९ ॥ बाणांवरी घालोनि आसन। तप करीतसे दारुण। ऐसीं दहा सहस्र वर्षें क्रमण। केलीं जाण श्रीरामा ॥ २० ॥ स्वधर्मकर्मी रत। सर्व भूतीं दया शुचिष्मंत। ऐसा बिभीषण पुण्यपवित्र। धर्मपरा-यण परोपकारी ॥ २१ ॥ परोपकाराएवढें तप नाहीं श्रीरामा निश्चित। जे पराविया तें पीडा करीत। पाप अद्भुत अंत नाहीं ॥ २२ ॥ ऐसा बिभीषण पुण्यमूर्ती। पांच सहस्र वर्षें तपःस्थिती। एका पायावरी निगुतीं। श्रीरघुपती क्रमियेलें ॥ २३ ॥ तप देखोनि दारुण। स्वर्गीं देवां भयाचें भान। तेथें अप्सरा येवोन। नृत्य करित्या पैं झाल्या ॥ २४ ॥ बिभीषणाची तपःस्थिती। देखोनि देव पुष्पें वर्षती। तदनंतरें सूर्यउपस्थिती। करी सुमती राक्षस ॥ २५ ॥ ऊर्ध्वशिर ऊर्ध्वकर। नयन ऊर्ध्वें अवलोकी भास्कर। मुखें सूर्यसूक्त जपे वीर। ऐसीं पांच सहस्र वर्षें क्रमिलीं ॥ २६ ॥ एवं दहा सहस्रवरी। बिभीषणतपाची अगाध थोरी। तदनंतरें श्रीरामा तुझा वैरी। त्याच्या तपाची थोरी तूं ऐकें ॥२७॥ दहा सहस्र वर्षेंपर्यंत। निराहारी तप करीत। एक सहस्र वर्षें होतां तेथ। अग्नींत होमित शिर एक ॥ २८ ॥ ऐसीं नव सहस्र वर्षें क्रमिलीं। नव शिरें अग्नींत हविलीं। एक शिर उरलें मौळीं। दहावें सहस्र प्रवर्तलें ॥ २९ ॥ तेंही शिर छेदीन। वैश्वानर तृप्त करीन। ऐसें विवंचीं रावण। तंव चतुराननं तेथें आला ॥ ३० ॥ इंद्रादि देवांसहित। पितामह आला तेथ। म्हणे रावणा तुझें तप अद्भुत। मज संतोष पैं झाला ॥ ३१ ॥ तुझिया तपाची थोरी। न वर्णवे वाचेकरीं। तुज प्रसन्न झालों झडकरी। माग इच्छा तें देईन ॥ ३२ ॥ पितामहाचें ऐकोनि वचन। दोन्ही कर जोडोनि रावण। करिता झाला साष्टांग नमन। मधुर वचन बोलिला ॥ ३३ ॥

> भगवन्प्राणिनां नित्यं नान्यत्र मरणाद्भयम् ।
> नास्ति मृत्युसमः शत्रुरमरत्वमहं वृणे ॥ १ ॥
> सुपर्णयक्षनागानां दैत्यदानवरक्षसाम् ।
> अवध्योऽहं प्रजाध्यक्षो
> देवतानां च शाश्वतम् ॥ २ ॥
> तृणभूता हि ते मन्ये
> प्राणिनो मानुषादयः ॥ ३ ॥

रावण म्हणे गा प्रजापती। तुम्हांप्रति करितों विनंती। मरणभयाहूनि निश्चितीं। प्राणियां भय असेना ॥ ३४ ॥ मृत्यूसारिखा दुसरा वैरी। आन

१ इंद्रजितपिता रावण त्याचा शत्रु राम, त्याचें. २ विचित्र. ३केंस उपटिती. ४सीतेचा. ५सूर्याची उपासना. ६ अग्नि. ७ विचार करी. ८ ब्रह्मदेव.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

नाहीं ये संसारीं । मृत्यु प्राणियां संहारी । मृत्यूनें केलें देवाचें न चले ॥३५॥ बाल्य तारुण्य वयसा । मृत्यु करी आयुष्य[२]र्‍हासा । जनातें बांधी मरण-फांसा । मृत्यूचा सहसा न कळे महिमा ॥ ३६ ॥ जरी प्रसन्न झालेति देवा । अमरत्व मज वर द्यावा । सुपर्ण[३] नाग दैत्य दानवा । यांचेनि मृत्यु मज न हो ॥ ३७ ॥ निशाचरांचेनि हातें । मज मरण न यावें निश्चितें । आणिकें देवदैवतें । तींही मातें न मारोत जी ॥ ३८ ॥ देवांचेनि हातेंकरीं । माझा मृत्यु न व्हावा अवधारीं । मनुष्य मज तृणासरी[४] । गणना न करीं तयांची ॥ ३९ ॥ मानवें तृणासमान । तीं माझे दृष्टीसी मशकें दीन । तयांचें भय नाहीं जाण । अमर आपण मज कीजे ॥ ४० ॥ मनुष्यादि-करोनि भूतें । नाणीं मी दृष्टीस त्यांतें । त्या मनुष्यांची चिंता नाहीं मातें । जाण निश्चितें प्रजापती ॥ ४१ ॥ जरी प्रसन्न झालासी मजवरी । अमर होईं ऐसी कृपा करीं । ब्रह्मा म्हणे होईल निर्धारीं । चिंतिलें पावशील रावणा ॥ ४२ ॥ इतुकियांचे हातें तत्त्वतां । मरण तुज नव्हे लंका-नाथा । सत्य मानीं मम वाक्यार्था । अमर तत्त्वतां तुज केलें॥ ४३ ॥अगस्ति म्हणे श्रीरघुनाथा । प्रजापतीनें विदाण[५] करूनि तत्त्वतां । वर दिधला लंकानाथा । भविष्यता जाणोनी ॥ ४४ ॥ पुनरपि बोले प्रजापती । ऐक ये गा लंकापती । तुवां शिरें हविलीं अग्नीप्रती । तीं मागुती तुज दिधलीं ॥ ४५ ॥ पूर्विल्यापरी राक्षसास । सुंदरता बाणली बहुवस । तदनंतर बिभीषणास । बोलता झाला चतुरानन ॥ ४६ ॥ बिभीषणा तूं धन्य सुमती । बिभीषणा तुझी अगाध कीर्ती । बिभीषणा तुझी शुद्ध तपःस्थिती । अत्यंत चित्तीं सुखावलों ॥ ४७ ॥ बिभीषणा तुझें निष्काम[६] तप । बिभीषणा तुझा धन्य जप । बिभीषणा तूं निर्विकल्प । सुख अमूप[७] मज झालें ॥ ४८ ॥ जो वर मागसी ये समयीं । तो मी देईन जाण निश्चयीं । बिभीषणें मस्तक ठेविला पायीं । काय ते समयीं बोलत ॥ ४९ ॥ सकळ गुणीं संपन्न । ऐसा बिभीषण धर्मज्ञ । मृदु मंजुळ वाचेकरून । चतुरानन प्रार्थिला ॥ ५० ॥ प्रजाध्यक्ष प्रजापती । सकळ देव तुज आश्रयिती । परी एक माझी विनंती । सावित्री-पति ऐकिंजे ॥ ५१ ॥ आजि आपण धन्य धन्य । आजि फळलें सकळ पुण्य । जो त्रैलोक्यगुरु चतुरानन । स्वयें आपण वर देतो ॥ ५२ ॥ संतो-षोनि प्रजापती । जरी वर देतोसी मजप्रती । तरी मागणें सुनिश्चितीं । सावधानवृत्ती अवधारीं ॥ ५३ ॥ मज राज्याची चाड नाहीं । ऐश्वर्य मज न लगे पाहीं । मज साधुसमागम देईं । आणिक नाहीं मज इच्छा ॥ ५४ ॥ अखंड माझी चित्तवृत्ती । लागो संतांचे संगतीं । आणीक मजला भगवद्भक्ती । कृपामूर्ति देइंजे ॥ ५५ ॥ जेणें होय परमपद प्राप्त । ऐसें ज्ञान दीजे निश्चित । यावेगळे नश्वर पदार्थ । स्वामी निश्चित मज नलगती ॥ ५६ ॥ बिभीषणाचें ऐकोनि बोलणें । विरिंचि आनंदला मनें । म्हणे वत्सा धन्य मागणें । अवश्य जाण तुज दिधलें ॥ ५७ ॥ बिभीषण म्हणे स्वामिनाथा । ज्या ज्या आश्रमीं मज वर्ततां । तेथें तेथें बुद्धि सर्वथा । धर्मपंथा पैं लागो ॥ ५८ ॥ गुरूवेगळी ब्रह्मप्राप्ती । होय ऐसी कृपा करीं निश्चितीं । माझा गुरु तूंचि प्रजापती । मी मंदमती अज्ञान ॥ ५९ ॥ परम उदारा चतुरानना । माझी बुद्धी सद्वासना । लागो श्रीहरीच्या भजना । आणिक मना नावडे ॥ ६० ॥ पुनरपि तो प्रजापती । ऐकोनि बिभीषण-वचनोक्ती । आनंदें वोसंडला[९] चित्तीं । काय मागुती बोलत ॥ ६१ ॥ अगा ये वत्सा अवधारीं । जें चिंतिसील मनामाझारीं । तें तें पावसील मद्वर-देंकरीं । जाण निर्धारीं मद्वाक्यें ॥ ६२ ॥ अमरत्व तूं पावसी । वैरियांतें त्रास देसी । स्वधर्मकर्मी रत होसी । प्रतिपाळिसी आश्रमधर्म ॥ ६३ ॥ तदनंतरें चतुरानन । मिळोनि समस्त देवगण । जेथें होता कुंभकर्ण । तेथें आले समस्तही ॥ ६४ ॥ प्रजापती कुंभकर्णालागून । वर देतो ऐसें जाणोन । सकळ सुरवर कर जोडोन । प्रार्थूं लागले ब्रह्मयासी ॥ ६५ ॥ अगा चतुर्वक्त्रा अष्टनेत्रा । विचारिंजे पात्रापात्रा । तूं तरी सकळांचा अधिष्ठात्रा[११] । भूत-[१२]भविष्या जाणसी ॥ ६६ ॥ हा राक्षस दुष्ट दुर्मती । वर न द्यावा ययाप्रती । येणें भक्षिले प्राणी नेणों किती । ऋषींसहित असंख्य ॥ ६७ ॥ येणें तपोधन

१ म्हातारपण. २ आयुष्याचा नाश. ३ गरुड. ४ गवताप्रमाणें क्षुद्र. ५ युक्ति. ६ वासनारहित. ७ पुष्कळ. ८ ब्रह्मदेवा. ९ ब्रह्मदेव. १० परिपूर्ण झाला. ११ अधिपति. १२ पूर्वी झालेलें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

भक्षिले। येणें देवांसी त्रास दिधले। याचेनि देश उद्वस झाले। मार्ग खुंटले मार्गस्थांचे ॥ ६८ ॥ हा अधर्मी महापातकी। यातें वर न द्यावा हे बुद्धि निकी[1]। प्रलोभावा माव[3] करूनि निकी[2]। जेणें विघ्न टळे त्रैलोक्याचें ॥ ६९ ॥ ऐकोनि देवांची विनवण। चिंतातुर चतुरानन। कांहीं बुद्धि न चले जाण। तंव सरस्वती आपण तेथें आली ॥ ७० ॥ मग जोडोनि कर ब्रह्मतनया[4]। बोले स्वामी अहो विधातया। तुम्हां कोण चिंता कवण कार्या। ते मजप्रती सांगिजे ॥ ७१ ॥ तुमची मी आज्ञाधारी। जें सांगाल तें वंदीन शिरीं। तंव बोले विधाता ते अवसरीं। अवो सारजे[5] परियेसीं ॥ ७२ ॥ कुंभकर्णाचे जिव्हेवरी। तुवां बैसावें कुमारी। देवांचे मनोरथ पूर्ण करीं। जिव्हा धरीं तयाची ॥ ७३ ॥ विरिंचीचें[6] शब्दरत्न। शिरीं धरोनि सरस्वती आपण। राक्षसजिव्हाग्रीं प्रवेशोन। पुढील कथन अवधारा ॥ ७४ ॥ ब्रह्मा म्हणे पुलस्त्यकुमारा। महाबाहो महाशूरा। वर देतों माग चतुरा। कां शरीरा पीडितोसी ॥ ७५ ॥ ब्रह्मयाचें ऐकोनि वचन। संतोषला कुंभकर्ण। अनेक वर्षें निद्रा दारुण। कृपा करोन मज दीजे ॥ ७६ ॥ भविष्यस्थितीं वचनें येणें। चतुरानन बोलिला हांसोनि मनें। सुरवर आनंदले तेणें। तपोधन संतोषले ॥ ७७ ॥ राक्षसमुखांतूनि सरस्वती। गेली आपुल्या आश्रमाप्रती। पुढें देवांसह प्रजापती। गगनोदरीं प्रवेशले ॥ ७८ ॥ तदनंतरें कुंभकर्ण। मनामाजी करी विचारण। प्रसन्न झाला चतुरानन। काय म्यां आपण मागीतलें ॥ ७९ ॥ दीर्घ निद्रा मागितली। मज ते समयीं भुली पडली। किंवा देवीं मोहिनी प्रेरिली। काय झाली गति न कळे ॥ ८० ॥ वृथा तप मज झालें। माझे कष्ट वायां गेले। माझें पूर्वकर्म फळासी आलें। तेणें झालें विपरीत हें ॥ ८१ ॥ माझिये बुद्धीसी भ्रंश झाला। मज विधाता ठकोनि गेला। बोल आपुल्या कपाळाला। थोर तळमळा पैं देत ॥ ८२ ॥ एवं बंधु तिघे जण। वरद पावोनि संपूर्ण। तीन्ही त्रेताग्नीसमान। श्लेष्मांतकवना जाते झाले ॥ ८३ ॥ श्लेष्मांतकवन कैसें। जेथें भोंकरीं[7] बहुवसें। फळीं फुलीं क्रीडती वायसें। तया प्रदेशीं राहते झाले ॥ ८४ ॥ एका जनार्दना शरण। तया वनीं रावण कुंभकर्ण। बिभीषणासमवेत जाण। सुखसंपन्न क्रीडते झाले ॥ ८५ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां रावणादिवरप्रदानं नाम दशमोऽध्यायः ॥ १० ॥ ओंव्या ॥ ८५ ॥ श्लोक ॥ ३ ॥

अध्याय अकरावा

॥ श्रीराम प्रसन्न ॥ पूर्वप्रसंगीं श्रीरघुपती। रावणासी झाली वरदोक्ती। तें जाणोनि सुमाळी निश्चितीं। अभय चित्तीं समाधान ॥ १ ॥ उठोनि समस्त रजनीचर[8]। मारीच प्रहस्त विरूपाक्ष महोदर। आणिक प्रधान थोर थोर। येते झाले समस्तही ॥ २ ॥ सुमाळी समस्त राक्षसेंसीं। येता झाला रावणापासीं। काय बोलिला तयासी। सावधानेंसीं अवधारा ॥ ३ ॥ अगा दशग्रीवा महावीरा। तपोबळेंकरूनि चतुरा। पावलासी चिंतिल्या प्रकारा। परमोदारा रावणा ॥ ४ ॥ तूं त्रिभुवनीं श्रेष्ठ राक्षस। पावलासी उत्तम वरास। विष्णुभयें पावलों त्रास। लंका त्यजूनि रसातळा गेलों ॥ ५ ॥ महाबाहो तेथें गेलों। तेथें असतां विष्णुभय पावलों। थोर संग्रामीं भग्न झालों। सांडवलों आश्रमापासूनी ॥ ६ ॥ सुहृद सोयरे समवेत। प्रवेशलों रसातळांत। तुज झालें वरद प्राप्त। म्हणोनि आम्ही धांवत येथें आलों ॥ ७ ॥ आम्हांसी वसावया जाण। धनेशें[9] दिधलें लंकाभवन। कुबेर तुझा ज्येष्ठ बंधु त्यानें। लंकापुरी वसविली ॥ ८ ॥ आतां याहीउपरी। वैरियें नेलें तें झडकरी। येईल जाण निर्धारीं। सामें दामें भेदें युद्धें ॥ ९ ॥ पैंरावें जें हरियेलें। तें पावों संग्रामबळें। अथवा करोनि नानाछळें। वैरीं[10] नेलें तें आणवूं ॥ १० ॥ एक रावणा याहीवरी। तूं लंकेचें राज्य करीं। तूं लंकेश्वर निर्धारीं। काया वाचा मानसें ॥ ११ ॥ सर्व राक्षसांच्या ईशा। होईं गा तूं महापुरुषा। हें सत्य मानोनि लंकेशा। लंकाराज्य तूं करीं ॥ १२ ॥ रावण म्हणे सुमाळीसी। धनेश[11] ज्येष्ठ बंधु आम्हांसी। आपण तयावांचोनि राज्यासी। अंगी-

---

१ ओसाड. २ चांगली. ३ कपट. ४ सरस्वती. ५ हे सरस्वति. ६ ब्रह्मदेवाचें. ७ कावळे. ८ राक्षस. ९ कुबेरानें.

१० शत्रूनें. ११ कुबेर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

कारासी न करावें ॥ १३ ॥ जाणोनि रावणाच्या वचनासी । सुमाळी राहिला तटस्थेंसीं । तदनंतरें श्रीरामा परियेसीं । सावधान होवोनियां ॥ १४ ॥ कोणे एके काळीं रावण । राक्षसांसमवेत जाण । बैसला असतां विराजमान । प्रहस्त प्रधान बोलता झाला ॥ १५ ॥ महाबाहो परियेसीं कथेसी । देवदैत्य असुरांसीं । वैर पूर्वींपासोनि तयांसी । गोत्रसंबंधासी राजेंद्रा ॥ १६ ॥ तरी बंधु कैसे म्हणसी । येविशीं ऐक इतिहासासी । पूर्वी एक कश्यपऋषी । तेरा स्त्रिया त्यासी असती ॥ १७ ॥

अदितिश्च दितिश्चैव भगिन्यौ सहिते उभे ।
भार्ये परमरूपिण्यौ कश्यपस्य प्रजापतेः ॥ १ ॥
अदितिर्जनयामास देवांस्त्रिभुवनेश्वर ।
दितिस्त्वजनयद्दैत्यान्कश्यपस्यात्मसम्भवान् ॥ २ ॥
दैत्यानां किल धर्मज्ञ पुरीयं बत सार्णवा ।
सपर्वता महावीर तेऽभवन्प्रभविष्णवः ॥ ३ ॥
निहत्य तांस्तु समरे विष्णुना प्रभविष्णुना ।
देवानां वशमानीतं त्रैलोक्यमिदमव्ययम् ॥ ४ ॥

अदिती दिती दोघी बहिणी । रूपें तरी चंद्राननी । तयांच्या स्वरूपा अप्सरा लाजोनी । स्वर्गांगना होत्या झाला ॥ १८ ॥ कश्यपऋषितपेंकरीं । दक्षप्रजाप्रतीच्या त्या कुमरी । तया घरीं सुंदरी । भर्तृसेवा करीत होत्या ॥ १९ ॥ अदिती देवांसी जन्मविती । जे त्रिभुवनीं नांदती । दितिउदरीं दैत्य जन्मती । कश्यपसंतती उभयतां ॥ २० ॥ दैत्यांकारणें श्रीरामा । पर्वताग्रीं विश्वकर्मा । लंका निर्माण करवी व्योमा- । -समान जीचें उच्चत्व ॥ २१ ॥ भोंवता अंबुनिधिपरिघ पूर्ण । लंका सुवर्णाची तेजें गगन । लखलखीत दशदिशा जाण । पताका तोरणें सुवर्णाचीं ॥ २२ ॥ ते राक्षसांची लंकापुरी । विष्णु समरांगणीं राक्षसमारीं । हरोनि तो दैत्यारी । देवां वश करिता झाला ॥ २३ ॥ देवीं त्रैलोक्य वश केलें । राक्षसांतें परभविलें । म्हणोनि आम्हीं पाताळें । विष्णुभयें वसविलीं ॥ २४ ॥ असो ऐसें पूर्वील कथन । देवां दैत्यां वैर दारुण । देवीं विपरीत करोन । त्रैलोक्यीं वसते जाहले ॥ २५ ॥ ऐकोनि प्रहस्ताचें वचन । रावणें अंतर्दृष्टि लावोन । मुहूर्त एक चिंता करून । थोर उद्विग्न पैं झाला ॥ २६ ॥ स्वस्थ न वाटे तयाचे चित्तीं । नावडे वैभव संपत्ती । मुखें कोमलीं मनोवृत्ती । चंचळ झाली तयाची ॥ २७ ॥ समस्त राक्षस मिळोन । वनीं विचरतां रावण । लंकेप्रति पाठवावया गण । प्रहस्त प्रधान बोलाविला ॥ २८ ॥ अगा प्रहस्ता गुणनिधी । तूं बुद्धिवंत जैसा क्षीराब्धी । धैर्याचा मेरु त्रिशुद्धी । मज एक बुद्धी आठवली ॥२९॥ तुवां शीघ्र त्रिकूटाचळासी । जावोनि तया कुबेरापाशीं । भेटावें माझिये वाक्येंसीं । तयापासीं सांगावें ॥ ३० ॥ माझें जें कां शब्दरत्न । तयासी करावें निवेदन । सामोपचारेंकरोन । वित्तेशें आपण बोधावा ॥ ३१ ॥ म्हणावें हे लंकापुरी । तुवां वसविली राक्षस वसावया खरी । तुझिया प्रतापाची थोरी । सुरासुरीं वर्णिजे ॥ ३२ ॥ तुवां हें लंकाभवन । मज द्यावें प्रीतीकरून । तूं ज्येष्ठ बंधु पितयासमान । माझें वचन मानावें ॥ ३३ ॥ मग तो प्रहस्त झडकरी । प्रवेशला जेथें वित्तेश राज्य करी । ते लंकेची वर्णू थोरी । तरी अमरपुरी तुकीं न ये ॥ ३४ ॥ ऐसिये लंकेप्रती जाण । धनेश राज्य करी सुखसंपन्न । तेथें प्रहस्त रावणप्रधान । येता झाला ते समयीं ॥ ३५ ॥ करोनि कुबेरासी नमस्कार । काय बोले प्रहस्त चतुर । स्वामी एक विनंती आदर । करोनियां आयकिजे ॥ ३६ ॥ तुमचा कनिष्ठ बंधु रावण । त्यानें मज पाठविलें जाण । तुम्हांपासीं एक वचन । विज्ञापन करूं आलों ॥ ३७ ॥ शस्त्रधरांमध्यें परम श्रेष्ठा । परमउदारा परमनिष्ठा । दशग्रीवा एक उत्कंठा । म्हणोनि मजला पाठविलें ॥ ३८ ॥ धनेशा हे लंकापुरी । रम्य इजसमान नाहीं दुसरी । सुमालिप्रमुख निशाचरीं । पूर्वी निजपराक्रमें वसविली ॥ ३९ ॥ हें लंकापुरीभवन । पूर्वी राक्षसीं भोगिलें जाण । हें नगर राक्षसांलागोन । द्यावें तुम्हीं वैश्रवणा ॥ ४० ॥ तरी मी करितों विनंती । लंका देई रावणाप्रती । तरी वाढेल यश कीर्ती । जे बंधुवचन मानितां ॥ ४१ ॥ ऐकोनि प्रहस्ताचें वचन । मग काय उत्तर देता झाला वैश्रवण । मज हे लंका

१ ऐक. २ आकाशासारखें. ३ समुद्राचा वेढा. ४ दोन घटिका. ५ खरोखर. ६ कुबेर. ७ तुळनेला, ८ रावणाला. ९ सुमाळी वगैरे. १० राक्षसांनीं. ११ हे कुबेरा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

विश्रवा पित्यानें। शून्य होती म्हणोन दिधली ॥ ४२ ॥ राक्षसीं त्यजली लंका। विष्णुभयें गेले पाताळलोका। ते म्यां वसविली आयका। दान-मानगुणेंकरोनी ॥ ४३ ॥ आतां प्रहस्ता झडकरीं। तूं जावोनि रावणा आज्ञा करीं। जे हे लंका महा-नगरी। येथें राज्य करीं निष्कंटक ॥ ४४ ॥ तुज हें लंकाभवन। पितयानें दिधलें जाण। मज दिधलें वित्तरक्षण। तें आपण मी रक्षितों ॥ ४५ ॥ ऐसें बोलोनि वैश्रवण। पुष्पकारूढ होऊन। जेथें होता पिता विश्रवा जाण। तेथें आला कुबेर ॥ ४६ ॥ दोन्ही कर जोडोन। पित्यासी करी साष्टांग नमन। बोले मृदु मंजुळ वचन। साव-धान ऐकें श्रीरामा ॥ ४७ ॥ अगा ये ताता परि-येसीं। रावणें लंका मागावयासी। पाठविलें प्रहस्त प्रधानासी। मजपासीं शिष्टाई ॥ ४८ ॥ म्यां ऐकोनि प्रहस्तवचन। रावणा दिधलें लंका-भवन। पूर्वी राक्षस होते म्हणोन। आतांही राक्षस वसतील ॥ ४९ ॥ मजकारणें स्वामिनाथा। अनुच्छिष्ट[1] नगर देईं आतां। ऐकोनियां पुत्र-कथा। काय झाला बोलता विश्रवा ॥ ५० ॥ हात जोडोनि पुत्राप्रती। विश्रवा करी विनंती। माझें वचन सावधवृत्तीं। ऐकें बा रे कुबेरा ॥ ५१ ॥ मजसन्निध येऊन। दशग्रीव बोले छेळवचन[2]। मज अत्यंत निर्भर्त्सून। दुर्मति पुनः पुनः क्रोधें बोले ॥ ५२ ॥ तरी कुबेरा मी तुजप्रती। बोलतों स्वध-र्माची युक्ती। जेणें होय यश कीर्ती। स्वर्गीं वानिती सुरसिद्ध ॥ ५३ ॥ वरप्रदानेंकरून। रावण नेणे मानापमान। त्याहीवरी शाप दारुण। मूढ प्रकृती जाहली ॥ ५४ ॥

तस्माद्गच्छ महाबाहो कैलासधरणीधरम्।
निवेशय निवेशार्थं त्यक्त्वा लंकां सहानुगाम् ॥ ५ ॥
तत्र मंदाकिनी रम्या नदीनामुत्तमा नदी।
कांचनैः सूर्यसंकाशैः पंकजैः संवृतोदका ॥ ६ ॥
कुमुदैरुत्पलैश्चैव अनेकैश्च सुगंधिभिः।
तत्र देवाः सगंधर्वाश्चाप्सरोरगकिन्नराः ॥ ७ ॥

विश्रवा म्हणे महाबाहो झडकरीं। कुबेरा जाईं जेथें कैलासगिरी। धरणीतें धरिलें ज्याची थोरी। त्या पर्वतावरी जाईं वेगीं ॥ ५५ ॥ समस्त सुहृदां-सहित। तुवां वसावें तेथ। लंका त्यजूनियां त्वरित। सुखें स्वस्थ रहावें पुत्रा ॥ ५६ ॥ कैलास-गिरीचे पाठारीं। मंदाकिनीचे पुण्यतीरीं। तुवां वसवावी नगरी। सपरिवारीं रहावें तेथें ॥ ५७ ॥ तरी तें मंदाकिनीचें वर्णन। करावें ऐसी मति नाहीं जाण। जिचें होतांचि स्मरण। पाप दारुण धाकें पळे ॥ ५८ ॥ जे मंदाकिनी देखती दृष्टीं। तयां नरांचीं पातकें गिरिकपाटीं। लंघितांही सकळ सृष्टी। बसावया ठाव पैं नाहीं ॥ ५९ ॥ धन्य मंदाकिनीचें जीवन[3]। जे नर करिती स्नान आचमन। तयांचे पुण्याचें गणन। सर्वथा जाण न करवे ॥ ६० ॥ मंदाकिनीसी जे करिती स्नान। तयां कोण गति हें शास्त्रां मौन। न बोलवे वेदांसी जाण। तेथें आपण काय जाणों ॥ ६१ ॥ मंदाकिनी स्वर्गभूषण। मंदाकिनीसी विष्णुचरणीं जनन। मंदाकिनी महेशें जाण। मस्तकीं भूषण म्हणोन धरियेली ॥ ६२ ॥ तिये मंदाकिनीचे तीरीं। जो स्नान दान तर्पण करी। तयाचे पूर्वज अंबरीं[4]। सुखरूप होवोनि राहती ॥ ६३ ॥ ते मंदा-किनी अति पावन। कांठीं सुवर्णकमळें विकास-मान। सूर्यतेजासम जाण। कुमुदें[5] उत्फुल्ल[6] साजिरीं ॥ ६४ ॥ अनेक सुगंधी पुष्पजाती। कोटयनुकोटी नेणों किती। देव गंधर्व क्रीडा करिती। उरगँ[7]-किन्नरादिकरोनी ॥ ६५ ॥ क्रीडा करिती संतत। राहोनि त्या तटाकांत। आनंदें निर्भर मनांत। आश्रयोनि तेथ असती ॥ ६६ ॥ आयकें कुबेरा अवधारीं। तुम्ही जाणतां चराचरीं। राक्षस निष्ठुर भारी। लाधले उत्तम वरांतें ॥ ६७ ॥ त्यांहूनि कोण आहे श्रेष्ठ। जे तप करोनि उत्कृष्ट। तरी तूं जाणता धर्मिष्ठ। माझें वचन करावें ॥ ६८ ॥ ऐसें विश्रवा बोलतां। कुबेर चित्तीं उल्हासता। पितृ-वचन गौरवोनि माथां। काय करिता जाहला। ॥ ६९ ॥ स्त्रीपुत्र आणि प्रधान। घेवोनि आपुलें निजसैन्य। निजवाहनीं आरूढोन। जाता झाला कैलासा ॥ ७० ॥ शून्य झाली लंकापुरी। तीस योजनें लांब दूरी। मनुष्य नाहीं तियेभीतरीं। उद्वर्स[8] दिसे श्रीरामा ॥ ७१ ॥ तदनंतरें जावोनि

१ दुसऱ्यानें न भोगिलेलें. २ कपटवचन. ३ उदक. ४ आकाशांत, स्वर्गीं. ५ चंद्रविकासी कमळें. ६ प्रफुल्लित. ७ सर्प, गंधर्व वगैरे. ८ ओसाड.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

प्रहस्त। रावणाप्रति सांगे वृत्तान्त। तुम्ही रावण राक्षसांसहित। राज्यधर्म करा लंकेमध्यें ॥ ७२ ॥ ऐसें ऐकोनि प्रहस्तवचन। बंधूंसमवेत सेनाप्रधान। प्रवेशोनि लंकाभवन। काय रावण करिता झाला ॥ ७३ ॥ जैसा स्वर्गीं शचीपती। आरूढोनि विमानाप्रती। तैसा उंच लंकापती। वेंघोनि दिशा अवलोकी ॥ ७४ ॥

स चाभिषिक्तः क्षणदाचरैस्तदा
निवेशयामास पुरीं दशाननः।
निकामपूर्णा च बभूव सा पुरी
निशाचरैर्नीलबलाहकोपमैः ॥ ८ ॥

तेव्हां ते समस्त राक्षस। राज्याभिषेक सावकाश। करूनि रावणा राज्याधीश। लंकाभवनीं स्थापिला ॥ ७५ ॥ मनःकामना पूर्ण झाली। लंकेसारिखी नगरी आली। तेथें राक्षस महाबळी। नानावर्णीचे राहिले ॥ ७६ ॥ जैसें आकाशीं अभ्र घन। निबिड दाटे आच्छादे गगन। तैसे राक्षस नीळवर्ण। वसले संपूर्ण लंकापुरीं ॥ ७७ ॥ तदनंतरें श्रीरघुपती। धनेशें पितृवाक्यउत्साहस्थितीं। वसता झाला अलकेप्रती। ते अलकेची स्थिती अवधारा ॥ ७८ ॥ चंद्रासारिखी शुभ्र निर्मळा। तैसी अलका शोभे गा भूपाळा। सुवर्णअलंकार विचित्रमाळा। मुक्ताफळांचीं तोरणें ॥ ७९ ॥ जैसा इंद्र अमरावतीं। क्रीडता होय निर्भयचित्तीं। तैसा कुबेर अलकेप्रती। सुखरूपस्थितीं राहिला ॥ ८० ॥ एका जनार्दना शरण। रावणा प्राप्त लंकाभवन। कुबेर अलकेप्रति जाण। सुखसंपन्न राहिला ॥ ८१ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां रावणलंकाप्राप्तिर्नाम एकादशोऽध्यायः ॥ ११ ॥ ओंव्या ॥ ८१ ॥ श्लोक ॥ ८ ॥

अध्याय बारावा

॥ श्रीजानकीवल्लभाय नमः ॥ तिघां बंधूंसमवेत। दशग्रीवा लंकाराज्य प्राप्त। नांदत असतां सुखस्वस्थ। पुढील कथार्थ अवधारा ॥ १ ॥ तदनंतरें शूर्पणखा भगिनी। देखिली यौवनेंकरोनी। रावणासी चिंता मनीं। हे कोणास पैं द्यावी ॥ २ ॥ ते शूर्पणखा कैसी। सुपासारिखीं नखें जीसी। म्हणोनि शूर्पणखा नांव तियेसी। श्रीरामा ऐसी जाणिजे ॥ ३ ॥ दनूपासूनि संभव। यालागीं तो दानव। विद्युज्जिव्ह ऐसें नांव। रावण तया भगिनी देता झाला ॥ ४ ॥ जेंवी विद्युल्लता अंबरीं। तैसी जिव्हा मुखाबाहेरी। म्हणोनि विद्युज्जिव्ह नामाधिकारी। महाभयंकर दानव ॥ ५ ॥ विधिपूर्वक कन्यादानासीं। शूर्पणखा दिधली त्यासी। दशग्रीव आपण पारधीसी। मृगें मारावयासी हिंडता झाला ॥ ६ ॥ तेथें दशग्रीव विचरतां। दृष्टी देखिलें दितिसुता। मय ऐसें नाम प्रसिद्धता। सवें दुहिता स्वरूपिणी ॥ ७ ॥ कन्येसहित मयासुरासी। विचरतां ते वनप्रदेशीं। दशग्रीव देखोनि तयासी। थोर आश्चर्यासी पावला ॥ ८ ॥ म्हणे हें निर्मानुष वन। या वनीं नाहीं मृगपक्षिगण। तूं कोण कोणाचा कोठील किंकारण। सवें कन्यारत्न किमर्थ असे ॥ ९ ॥ सांग ते हे मृगनयनी। अत्यंत सुकुमार कन्या कीं भगिनी। हिंडतसां इये वनीं। कोण कार्यालागूनी मज सांगा ॥ १० ॥ ऐकोन रावणाचें वचन। मय बोलिला आपण। ऐक माझें समूळ कथन। सावधान राक्षसेंद्रा ॥ ११ ॥ हेमानामें अप्सरेतें। ऐकिलें असेल पूर्वी तीतें। ते देवीं दिधली होती मातें। सुखसंभोगाकारणें ॥ १२ ॥ ते हेमा अत्यंत सुंदरी। मी तिसीं क्रीडें विषयेंकरीं। जैसा शचीसीं वृत्रारी। नंदनवनीं क्रीडतसे ॥ १३ ॥ तिसीं मग सक्त होवोन। सहस्र वर्षेंपर्यंत जाण। मज ते देवकार्यालागून। दीन करूनि निघाली ॥ १४ ॥ तियेकारणें दशग्रीवा जाण। म्यां केलें मायामय हें भवन। सर्व नगर हेमवर्ण। विचित्र रचन पैं केलें ॥ १५ ॥ वज्रवैडूर्यरत्नभित्ती। पाचूबद्ध शोभे क्षिती। अवघी मायामय स्थिती। ते मी किती वर्णूं आतां ॥ १६ ॥ हेमेवीण येथें आपण। वसता झालों अति दीन। हेमा होती माझा प्राण। ते सोडोन मज गेली ॥ १७ ॥ आम्ही तिचेनि दुःखेंकरीं। दोघें झालों रानभरी। हे कन्या धरोनि करीं। वनाभीतरीं मी आलों ॥ १८ ॥ हे होय माझी कुमारी। हेमेच्या कुशीं जन्मली निर्धारीं। इसी रूपें गुणें वयेंकरीं। वर-

१ शची=इंद्राणी, शचीपति=इंद्र. २ कुबेर. ३ पित्याच्या भाषणानें आनंदित होत्साता. ४ वीज, ५ कोणत्या कारणानें. ६ इंद्राणीसह. ७ वृत्रनामक दैत्याचा शत्रु, इंद्र. ८ जमीन. ९ वयानें (योग्य).

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

विचारणीं मज चिंता ॥ १९ ॥ कन्येचें पितयासी बहु दुःख । कन्या राखतांही परम क्लेश । उभयतां कुळ पाहिजे चोख । तरीच देख शुद्ध पुण्य ॥ २० ॥ याहीपूर्वी माझिये घरीं । होती गुणवंती नारी । दोघे पुत्र तियेचे उदरीं । मायावीदुंदुभिनामें जन्मले ॥ २१ ॥ मायावी प्रथम पुत्र जाण । दुसरियाचें दुंदुभि नामकरण । हें प्रथम स्त्रियेचें संतान । हेमेची हे मंदोदरी ॥ २२ ॥ ऐसा माझा वृत्तान्त । तुजप्रति सांगितला यथोक्त । तूं कोण कोणाचा या वनांत । किंनिमित्त आलासी ॥ २३ ॥ कृपा करोनि मजवरी । आपुला वृत्तान्त झडकरी । आम्हांप्रती श्रुत करीं । ऐसें मयासुर बोलिला ॥ २४ ॥ ऐकोनि मयासुराचें वचन । मग तो राक्षसेंद्र आपण । म्हणे मी पौलस्तिनंदन । दशग्रीव जाण नाम माझें ॥ २५ ॥ वैश्रवणासमवेत । आम्ही चौघे पौलस्तिसुत । आमुचा पूर्वज ब्रह्मा निश्चित । ऐकें गा दानवेंद्रा ॥ २६ ॥ अगस्ति म्हणे श्रीरामासी । ऐसें रावण बोलिला दानवेंद्रासी । तेचि कथा मी तुजपासीं । सांगतसें रावणारी ॥ २७ ॥ रावण पौलस्तिनंदन । ऐसें दानवेंद्रें ऐकोन । करीं धरोनि कन्यारत्न । रावणासी देता झाला ॥ २८ ॥ तदनंतर मयासुर रावणासी । बोले माझी कन्या हे परियेसीं । हेमेपासोनि जन्म इसी । मंदोदरी इसी नाम साचें ॥ २९ ॥ 'प्रतिगृह्यताम्'[३] वचनेंकरीं । दान देता झाला कुमारी । येरें 'प्रतिगृण्हामि' झडकरी । बोलोनि हातीं सुंदरी धरियेली ॥ ३० ॥ प्रीत्यर्थ हे तुजप्रती । मी देतों गा लंकापती । येरें बहु बरें म्हणोनि चित्तीं । बोलता झाला रावण ॥ ३१ ॥ तेथें अग्नि प्रज्वळून । करिता झाला लाजाहवन[४] । सोमसूर्य साक्षी करून । विवाहहोम संपादिला ॥ ३२ ॥ तदनंतरें मयासुरासी । ठाऊक नाहीं जे शाप रावणासी । पूर्वी वदला महाऋषी । तें नेणेचि मयासुर ॥ ३३ ॥ प्रजापतिवंशीं उत्पत्ती । म्हणोनि मंदोदरी रावणाप्रती । आणिक मयनामें शक्ती । देता झाला मयासुर ॥ ३४ ॥ ते शक्ति अत्यंत दारुण । मेणें सुरासुर कंपायमान । जे शक्तीनें भेदिला लक्ष्मण । जैं द्रोणाद्रि आणिला हनुमंतें ॥ ३५ ॥ या प्रकारें श्रीरघुपती । स्त्रियेसहित लंकापती । राज्य करीत पुढील स्थिती । सावधान श्रोतीं अवधारिजे ॥ ३६ ॥ कोणे एके दिवसीं लंकापती । जाता झाला वनाप्रती । भ्रातृलग्नचिंता चित्तीं । तंव दोघी कन्या देखिल्या ॥ ३७ ॥ त्या कन्यांचें आख्यान । सांगतसें श्रीरामा जाण । एक वैरोचनकन्येचें कन्यारत्न । वज्रसारा नाम जीचें ॥ ३८ ॥ ते भार्या कुंभकर्णासी । रावण करिता झाला समकाळेंसीं । दुसरी गंधर्वकन्या सरमानामेंसीं । बिभीषणासी ते नेमिली ॥ ३९ ॥ ते गंधर्वराजकन्येसी । सरमा नाम झालें काशानसीं[८] । सांगावें मुनि मजपासीं । विस्तारेंसीं कथेसी त्या ॥ ४० ॥ ऐकोनि राघवाचें वचन । काय बोले अगस्ति आपण । म्हणे श्रीरामा तूं ब्रह्म पूर्ण । आमचा मान वाढविसी ॥ ४१ ॥ तरी आइकें जी श्रीरामा । तियेसी नाम कां झालें सरमा । येविषयीं पृच्छा आम्हां । पुससी तूं श्रीरघुवीरा ॥ ४२ ॥ तरी मानसनाम सरोवर । माजि कमळिणी मनोहर । तेणें तडाग अति सुंदर । सरमा मातेसहित तेथें होती ॥ ४३ ॥ तेथें पर्जन्य वर्षला । तेणें सरोवरासी पूर आला । सरमा भिऊन शब्द केला । माते धांव बुडालें ॥ ४४ ॥ ऐकोनि कन्येचें वचन । माता झाली उद्विग्न । सरोवराप्रति दीन वदन । बोलती झाली ते काळीं ॥ ४५ ॥ अगा सरोवरा महाजळेंसीं । वाढों नको वचन परियेसीं । ऐकतां लागली तटप्रदेशीं । सरमा नाम तयास्तव ॥ ४६ ॥ सरमा गंधर्वनंदिनी । रूपें तरी मृगनयनी । ते स्त्री बिभीषणालागूनी । करिता झाला रावण ॥ ४७ ॥ एवं तिघे बंधू लंकेप्रती । आपुलाले भार्येंसीं राज्य करिती । जैसे स्वर्गीं गंधर्व क्रीडती । तैसे राहती राक्षस ते ॥ ४८ ॥ तयाउपरी मंदोदरीसी । पुत्र झाला मेघनाद नामेंसीं । शक्रजित म्हणती ज्यासी । प्रतापें बळें आगळा ॥ ४९ ॥ श्रीराम म्हणे अगस्ति मुनी । मेघनाद ऐसें काशानी । म्हणती इंद्रजितालागोनी । तें मज मुनि सांगावें ॥ ५० ॥ ऐकोनियां श्रीरामाचें वचन । अगस्ति बोले सुखसंपन्न । मंदोदरी प्रसूत झाली जाण । बाळकें दीर्घ रुदन पैं केलें ॥ ५१ ॥ मेघासारिखें गर्जन । बाळकें ते समयीं केलें जाण ।

१ वर पहाण्याची. २ हे रामचंद्रा. ३ स्वीकार करावा. ४ लाजाहोम. ५ एकाच वेळीं. ६ कशानें. ७ प्रश्न. ८ सरोवर. ९ इंद्रजित. १० श्रेष्ठ.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

तेणें लंकावासी बधिर जन । भयेंकरोन पैं झाले ॥५२॥ रावण येवोनि ते समयीं । मेघनाद ऐसें नाम पाहीं । ठेवोनि बाळक ते गृहीं । अंतःपुरीं[1] वाढतें जाहलें ॥ ५३ ॥ रावणातें रंजवीत । मातेचें मन मोहीत । स्त्रियांमाजी पुत्रापत्य । असे वाढत महाबाहो ॥ ५४ ॥ मंदोदरीसी बहु हर्ष । रावणासी परम संतोष । राक्षसांसी परम सुख । दीर्घ दुःख देवांसी ॥ ५५ ॥ एक पुत्र गुणवंत सगुण । निर्गुण संतानाचें किंप्रयोजन । एक शशी[2] जगाचा प्रकाश पूर्ण । नवलक्ष तारांगणीं काय काज ॥५६ ॥ जैसा कां पुरिला हुताशनें[3] । प्रज्वाळी देदीप्यमान । तैसा तो राक्षसनंदन । अंतःपुरीं वाढता झाला ॥ ५७॥ एका जनार्दना शरण । राक्षसांचें पाणिग्रहण । इंद्रजिताचें जन्मकथन । सांग संपूर्ण पैं झालें ॥ ५८ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां रावणादिपाणिग्रहणं इंद्रजिज्जन्मकथनं नाम द्वादशोऽध्यायः ॥ १२ ॥ ओंव्या ॥५८॥

अध्याय तेरावा

॥ श्रीरामचंद्र प्रसन्न ॥ तदनंतरें ब्रह्मलोकगुरू[4] । रावणासी देवोनि वरू । केला लंकेचा ईश्वरू । दोघां बंधूंसमवेत ॥ १ ॥ तिघांसी पाणिग्रहण झालें । रावणासी राज्य लाधलें । मेघनादाचें जनन सांगितलें । पुढील कथा अवधारा ॥ २ ॥ राज्य करितां विबुधारिजनक[5] । प्रजालोक स्वस्थ सकळिक । कोणी एके काळीं घटश्रोत्र[6] देख । विनविता झाला बंधूसी ॥ ३ ॥ अहो जी नृपति अवधारीं । तुम्ही ज्येष्ठ बंधु आम्हां शिरीं । मज निद्रा बाधी भारी । काळकूटासमान ॥ ४ ॥ निद्रा बाधीतसे राजेंद्रा । आवडी नाहीं भोगोपचारां । मजकारणें धाम करा । सुखशयन करावया ॥ ५ ॥ ऐकोनि अनुजाचें वचन । रावण हांसिला खदखदून । विश्वकर्मा मग पाचारोन । तया आज्ञा देता झाला ॥ ६ ॥ कुंभकर्णालागीं मंदिर । करावें उत्तम सँपरिकर[7] । तेणें आज्ञापिले शिल्पकार । ते मंदिर करिते जाहले ॥ ७ ॥ लांब रुंद दीर्घ बहुत । अति रमणीय मन निवे तेथ । अग्निबाधा तस्कराघात । नाहीं तया मंदिरीं ॥ ८ ॥ स्फटिकांचे खांब विचित्र । सुवर्णेंकरोनि लिहिलें चित्र । वैडूर्यशोभा सुंदर । किंकिणीज्वाळा लाविल्या ॥ ९ ॥ मुक्ताफळांचीं तोरणें । लाविलीं असती गहनें । पाहतां उंच गगन ठेंगणें । ऐशा मानें निर्मिलें ॥ १० ॥ देखतां सर्व सुख पाविजे जेथें । राक्षसाचें मन निवे तेथें । देखतां श्रमांपासूनि सुटिजे । निर्मिलें मेरुसमान गृहातें ॥ ११ ॥ देखोनि मनोहर स्वधाम । तेथें कुंभकर्ण करी विश्राम । बहुत वर्षें निद्रा परम । जागृति नोहे कदाकाळीं ॥ १२ ॥ कुंभकर्ण निद्राभिभूत[8] । देखोनि दशानन काय करीत । तें अवधारिजे सावचित्त । श्रोतृजनीं सादर ॥ १३ ॥ श्रोता उदास कथेसी । ते कथा होय विरसी । जीवनेंवीण धान्यें जैसीं । सुकोनि जाती आपसया ॥ १४ ॥ श्रोता कथेसी सादर । तरी वक्त्यासी उल्लास थोर । ते कथा नव्हे क्षीरसागर । स्वाद विचित्र तेथींचा ॥ १५ ॥ देव ऋषि यक्ष गंधर्व । सिद्ध चारण मानव । यांसी त्रासिता झाला दशग्रीव । वारिता नाहीं पैं कोणी ॥ १६ ॥ आपुले स्वइच्छेसीं । क्रीडे उद्यानादि विचित्र वनांसी । नंदनवनीं जळक्रीडेसी । करी बळेंसीं रावण ॥ १७ ॥ जेंवी नदीमध्यें गजपती । किंवा वायु झडपे वृक्षाप्रती । कीं वज्र झगटे पर्वतीं । तैसा राक्षस विध्वंसीत ॥ १८ ॥ हें ऐकोनि कुबेर जाण । दूत पाचारिला अति सज्ञान । तयासी म्हणे तूं जाऊन । रावणालागून सांगावें[9] ॥ १९ ॥ स्वधर्म अनुकूळ रायासी । दूता सांगशील क्षात्रधर्मासी । जेणें पूर्वज होती संतोषी । त्या प्रकारासी सांगावें ॥ २० ॥ ऐकोनि वैश्रवणवचन । दूतें मस्तक खालावून । प्रवेशला लंकाभवन । प्रथम बिभीषण भेटला ॥ २१ ॥ बिभीषण म्हणे दूतासी । तूं कोठींचा कोण कोणा कार्यासी । आलासि हें आम्हांसी । किंनिमित्त सांगिजे ॥ २२ ॥ दूत म्हणे बिभीषणा । मज वैश्रवणें पाठविलें जाणा । बिभीषण म्हणे धर्मज्ञा । सकळ कुशळ आहेत कीं ॥ २३ ॥ बिभीषण म्हणे दूतासी । पैल रावण पाहें सिंहासनासीं । येरें देखोनि जयजयशब्देंसीं । रावणासी स्तविलें हो ॥ २४ ॥ राजाधि-

---

१ जनानखान्यांत. २ चंद्र. ३ अग्नि. ४ सत्यलोकनायक ब्रह्मदेव. ५ रावण. ६ कुंभकर्ण. ७ सर्व सामग्रीसह.

८ निद्रेनें व्याप्त. ९ कुबेराचें भाषण.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

राज लंकापती । यशस्वी भुजा तुझ्या होती । वैरी अपधाकें पळती । इतुकें बोलोनि लीन राहिला ॥ २५ ॥ हेमपर्यंक रत्नजडित । वरी पासोडा क्षीरोदकें शोभत । वरी दशग्रीव बैसला तेथ । दूत बोलता झाला ते वेळीं ॥ २६ ॥ अहो जी ऐकें लंकेश्वरा । मी सांगतों सर्व समाचारा । तुमचा ज्येष्ठ बंधु निर्धारा । नांव कुबेर जयाचें ॥ २७ ॥ तयानें मजला पाठविलें । मुखवचनें निरूपिलें । तें अवधारिजे भूपाळें । उभयकुळधर्मार्था ॥ २८ ॥ रायें स्वधर्मातें पाळावें । दुष्टांतें दिगंतराबाहेरी घालावें । साधुसज्जनांतें सेवावें । भावबळेंकरोनी ॥ २९ ॥ पुण्याचा संग्रह कीजे । पातकातें न स्पर्शिजे । गाईब्राह्मणां प्रतिपाळिजे । क्षात्रधर्मा न टाळिजे प्राण गेलिया ॥ ३० ॥ तुम्ही दोघे ऐश्वर्यें समान । तुम्हां दोघां एक व्रत नेम । तुमचें कुळ पूज्य परम । तपोनुष्ठान अधिक तुमचें ॥ ३१ ॥ कुबेरें जें ऐकिलें । तें मजहातीं सांगविलें । तें अवधारिजे भूपाळें । सावधान होउनी ॥ ३२ ॥ नंदनवना करोनि भग्न । ऋषीश्वरांतें मारून । देवांचे अधिकार हिरोन । राक्षसांलागून वांटिले त्वां ॥ ३३ ॥ सुहृद सोयरे लहानथोर । बंधु आणि महावीर । हे तों घालूनि बाहेर । बहु अपूर्व त्वां केलें ॥ ३४ ॥ परी एक असे नीती । बंधु ज्येष्ठ कनिष्ठ असती । तयांतें रक्षावें भूपती । सुहृदस्थिति या नांवें ॥ ३५ ॥ मी तुझे आज्ञेकरून । गेलों हिमाद्रिपर्वता जाण । तेथें नित्यनेम अनुष्ठान । इंद्रियनिग्रहण म्यां केलें ॥ ३६ ॥ सदाशिवासमीप संतत । आचरिता झालों तप व्रत । करोनियां एकाग्र चित्त । कित्येक दिवस क्रमियेले ॥ ३७ ॥ पुढें कर्मानुसार बुद्धी । भ्रम झाला मज ते संधीं । पार्वती रूपें अनुपम निधी । शिवासहित क्रीडत होती ॥ ३८ ॥ रुद्राणीच्या रूपाची सीमा । वर्णूं न शके स्वयें ब्रह्मा । जियेतें देखोनि सुरांगना व्योमा । लाजोनि उर्ध्वपंथें गेलिया ॥ ३९ ॥ जिच्या स्वरूपाचे प्रभावीं । चंद्र सूर्य झाले दिवीं । उमेसी वर्णी ऐसा कवी । कोण कोठें असेल ॥ ४० ॥ आपण सव्य नेत्रकरीं । तिये काळीं अवलोकीं गौरी । ते गौरीचे प्रभावें-करीं । सव्य नेत्र तळीं पडला ॥ ४१ ॥ पार्वतीचें अवलोकन मात्र । माझा भस्म झाला सव्य नेत्र । वडस वाढला पिंगळाकारँ । काणा सत्वर मी झालों ॥ ४२ ॥ तया गिरीच्या पाठारीं । मग मी जावोनि तप करीं । आठ शत वर्षें होतां पुरीं । तंव महादेव गौरीसहित आला ॥ ४३ ॥ माझें देखोनि तप दारुण । कृपाळु तो उमारमण । म्हणे झालों मी सुप्रसन्न । वैश्रवणा जाण ये समयीं ॥ ४४ ॥ तुझी देखोनि तपःस्थिती । मी सुखावलों बहुत चित्तीं । तूं माझा सखा निश्चितीं । तुजवरी प्रीती मज बहु ॥ ४५ ॥ उमेचे क्रोधेंकरीं । तुझ्या नेत्राची झाली बोरहरी । दृष्टि देतों तया नेत्रीं । चराचर देखावया ॥ ४६ ॥ उमेसी देखिलें नेत्रेंकरीं । तें तुझें नाम एकाक्ष निर्धारीं । पिंगळेक्षण चराचरीं । दुसरें नाम पैं तुझें ॥ ४७ ॥ ऐसें शंकरासीं सख्यत्व । करोनि कुबेर नगरा येत । तंव मार्गीं झालें श्रुत । रावण पाप आचरला ॥ ४८ ॥ नंदनवन करोनि भग्न । मारिले ऋषी तपोधन । ऋषीश्वरांतें त्रास देवोन । बंधुजन दवडिले ॥ ४९ ॥ तुझिया मरणाचा उपाय । चिंतिताती सुरसमुदाय । तुज येथोनि नाहीं जय । सत्य जाण शक्रजिज्जनका ॥ ५० ॥ दूताच्या मुखींचें वचन । ऐकोनि रावण क्रोधायमान । दांत खाय करकरून । काय आपण बोलिला ॥ ५१ ॥ क्रोधेंकरूनि आरक्त नयन । ओष्ठ चावोनि रावण । दूताप्रति कठिण वचन । काय आपण बोलिला ॥ ५२ ॥ दूतासी म्हणे रावण । तूं बोलिलासी जयाचें वचन । तया आणिक दूत न मिळे जाण । तुज नपुंसका पाठविलें ॥ ५३ ॥ तूं नपुंसकाहूनि हीन । तुज ज्यानें पाठविलें तो अज्ञान । तें तुम्ही माझें अहित लक्षोन । आनेंआन बडबडितां ॥ ५४ ॥ ज्येष्ठ बंधु वैश्रवण । तया मारितां न लगे क्षण । होईल शब्द कुळदूषण । सत्य जाण पैं दूता ॥ ५५ ॥ शिवासहित अंसुरारी । मी मारीन क्षणामाझारीं । स्वर्गमृत्युपाताळाभीतरीं । निर्वैर सृष्टि करीन मी ॥ ५६ ॥ हें करितां मज अर्ध क्षण । न लगे दूता सत्य जाण । तुज मी मारीन रावण । राक्षस भक्षण करिती तुझें

१ सोन्याचा पलंग. २ उंची रेशमी वस्त्र. ३ ऐकावें. ४ पार्वतीच्या. ५ स्वर्गी, ६ दिवटीप्रमाणें, क्षुल्लक. ७ पिंगट वर्णाचा. ८ नाश. ९ रावणा. १० विष्णु.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ ५७ ॥ आणि हे अष्टौ लोकपाळ । करीन किंकर मी सकळ । हें मज करितां न लगे वेळ । कोपें प्रबळ चालिला ॥ ५८ ॥ आठवोनि दूताचें वचन। रावण अत्यंत कोपायमान । करीं खड्ग[1] घेवोनि जाण । घायें दूत मारिला ॥ ५९ ॥ राक्षसांसी म्हणे रावण । याच्या अस्थि मांस करा भक्षण । तदनंतरें काय आपण । करिता झाला अवधारा ॥ ६० ॥ पाचारोनि सारथियासी । रथ संजोगोनि[2] वेगेंसीं । जाणें आहे अलकावती नगरीसी । जेथें वैश्रवण पैं असे ॥ ६१ ॥ मग सज्जोनियां रथ। वरी आरूढला लंकानाथ । शस्त्रसामग्री घेवोनि त्वरित । अलकावतीये चालिला ॥ ६२ ॥ एका विनवी जनार्दन । पुढें गोड निरूपण । वाल्मीकीचें वाग्रत्न । सावधान अवधारा ॥ ६३ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां रावणअलकावतीगमनं नाम त्रयोदशोऽध्यायः ॥ १३ ॥ ओंव्या ॥ ६३ ॥

अध्याय चौदावा

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥ पूर्वप्रसंगीं रावण । रथावरी आरूढोन । सवें सेना प्रधान । जेथें वैश्रवण[3] तेथें आला ॥ १ ॥ तदनंतरें विबुधारी[4] । चालिला अतिक्रोधेंकरीं । समवेत प्रधान साही भारी । ब्रह्मांड उलथिती पैं ऐसे ॥ २ ॥ तयांचीं नांवें कोण कोण । मारीच महोदर प्रहस्त शुक सारण । सहावा धूम्राक्ष ऐसे जाण । संग्रामीं बळ दारुण ज्यांचें ॥ ३ ॥ जयांच्या पुरुषार्थापुढें । रावण कोणासी नातुडे[5] । जैसे साही ऋतु गाढे । आपुलेनि काळें शोभती ॥ ४ ॥ तेही साही प्रधान कैसे । क्रोधें सृष्टि जाळिती ऐसे । चालिले अति आवेशें । नद्या पर्वत उल्लंघिती ॥ ५ ॥ पुरें पाटणें ग्राम नगरें । लंघीत वनें उपवनें थोरें । एका मुहूर्तें अति त्वरें । कैलासाप्रती येते झाले ॥ ६ ॥ अति पापिष्ठ रजनीचर । पावोनि कैलासपाठार । वेढिते झाले अलकानगर । तें कुबेरदूतीं देखिलें ॥ ७ ॥ दूत म्हणती कुबेरबंधु । रावण आला करावया युद्धु । तेणें सांडोनि सुहृदसंबंधु । यासीं आम्हीं झगडों नये ॥ ८ ॥ राया जाणवूं हे मात । म्हणोनि दूत निघाले त्वरित । शीघ्र वैश्रवणा जाणवीत । लंकानाथ युद्धा आला ॥ ९ ॥ ऐकोनि दूतांचें वचन । कुबेर झाला क्रोधायमान । वेगीं म्हणे सैन्यालागून । करा म्हणे संग्राम ॥ १० ॥ ऐकोनि धनेशाची वचनावळी । वीर चालिले आतुर्बळी । जैसी सागराची नव्हाळी । तैसे ते काळीं चालिले ॥ ११ ॥ अश्वीं चढले एक वीर । एकीं पालाणिले कुंजर । एकीं सज्जिले रहँवर[6] । पाँयांचे[7] मोगँर धांवती ॥ १२ ॥ दोहीं सैन्यां झाली मिळणी । जैशा दोनी एक होती पुष्करिणी । वर्षती उभयतां बाणीं । वीरश्रेणी लक्षोनियां ॥ १३ ॥ यक्षीं केला थोर मार । जैसा गगनीं वर्षे जळधर । रावणाचे प्रधान थोर थोर । रणीं घायाळ पाडिले ॥ १४ ॥ आणीक राक्षस पडिले रणीं । हें दशमुखें देखोनि नयनीं । क्रोधें नेत्र आरक्त करूनी । परवीरांवरी लोटला ॥ १५ ॥ गर्जना करोनि अत्यंत गाढी । पाताळीं शेष हडबडी । वराहाची दाढ तडतडी । कूर्म करी गाढी पृष्ठीतें ॥ १६ ॥ गगनीं नक्षत्रें कळकळिती । शशिसूर्य चळचळां कांपती । दिग्गजांच्या कर्णाप्रती । बधिरता पैं आली ॥ १७ ॥ गर्जनेचा नाद थोर । भेणें कांपती सुरासुर । ते काळीं प्रधानवीर । समस्त जाण एकवटले ॥ १८ ॥ कुबेरें रणीं मिसळले । घोरांदर युद्ध करिते झाले । एकैक सहस्रेंसीं भिडते झाले । रणमंडळीं ते काळीं ॥ १९ ॥ गदा परिघ शक्ति तोमर । देखोनियां दशशिर । करिता झाला विकट मार । परवीरांतें देखोनी ॥ २० ॥ रावण रणीं खवळला । कुबेरसैन्या मारिता झाला । कित्येक वीरां निःपात केला । कित्येक निर्जीव केले रणभूमीं ॥ २१ ॥ जेवी वर्षे मर्घवा[8] । तेंवी करोनि शरलाघवा । व्यथाभूत करोनि सर्वां । वीरां वीर आटिला ॥ २२ ॥ यक्षनायकाचें[9] सैन्य । रणमंडळीं होवोनि भग्न । जैसा वन्हिं[10] करी दहन । काष्ठांलागोन पर्वतीं ॥ २३ ॥ मारुत वन्हीसी सहाकारी । झालिया सृष्टि भस्म करी । तेंवीचि तो राघववैरी । यक्षसैन्य मारिलें ॥ २४ ॥ समस्त प्रधानेंसीं रावण । कुबेरसैन्या करीत भग्न । कित्येक भग्नांग होऊन । समरांगणीं

---

१ तरवार. २ सज्ज करून. ३ कुबेर. ४ देवशत्रु रावण. ५ पराभव पावत नसे. ६ रथ. ७ पायदळ. ८ इंद्र, पर्जन्य. ९ कुबेराचें. १० अग्नि.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

उलंडले ॥ २५ ॥ कित्येक होटांसहित दांत। पडोनि रणीं कुंथत। एक भयेंकरोनि जीव देत। एक तळमळत मस्तकघातें॥ २६ ॥ एकांचे तुटले कर। एकांचें फुटलें शिर। एकांचें घायाळ शरीर। चेंदाचेंद होवोनि ठेली ॥ २७ ॥ एकांसी भय अद्भुत। धांवोनि प्रेतांमाजी लपत। एक ते फळफळां मुतत। राक्षसमार देखोनी ॥ २८ ॥ एकांची गेली शस्त्रसंपत्ती। एक मेलीं मढीं होवोनि ठाती। ऐसी रावणें केली ख्याती। सीतापति अवधारिजे ॥ २९ ॥ शेषसैन्य जें उरलें। तें हळुहळु संग्राम करितें झालें। त्यांमध्यें कित्येक पळाले। नगरामाजि श्रीरामा ॥ ३० ॥ यक्षसैन्या झाली भंगाणी। उरले वीर रणमेदिनीं। सांडोनि प्रवेशले पुरीं तत्क्षणीं। कुबेरा मात जाणविली ॥ ३१ ॥ स्वसैन्य भंगलें ऐकोन। कुबेर झाला क्रोधायमान। संयुगंकटक[1] बोलावून। तयातें संग्रामा पाठविलें ॥३२॥ संयुगकटकें रणभूमीसी। मारीचास भेदिलें वर्मांगासीं। बाणीं भेदोनियां त्यासी। रणभूमीसी पाडिलें ॥ ३३ ॥ मुरारीनें मुरं[2] मारिला। षडाननें[3] तारकासुर वधिला। शक्रें वृत्र निःपातिला। तैसा यक्षें पाडिला मारीच ॥ ३४ ॥ मारीच पडला रणमेदिनीं। जैसा स्वर्गीहूनि पडे च्यवोनी। पुण्यक्षयें मृत्युलोकीं प्राणी। तैसा प्रधान पाडिला ॥ ३५ ॥ मारीच मूर्च्छित दखोन। राक्षसेंद्र कोपायमान। वर्षता झाला शर दारुण। संयुगकटका घायाळ केलें ॥ ३६ ॥ रक्तें डवरला यक्ष। दिसे जैसा वसंतींचा पळस। रण सांडोनि पुरीं प्रवेश। पाठी देवोनि पळाला ॥ ३७ ॥ पाठी लागले राक्षसगण। नगरद्वारासमीप येऊन। पुढें झाला रावण। तंव द्वारपाळें देखिलें ॥ ३८ ॥ श्रीरामचंद्रा अवधारीं। रावण प्रवेशतां अलकापुरीं। समवेत राक्षस सुरारी। ते द्वारपाळानें निवारिले ॥ ३९ ॥ द्वारपाळ तो कैसा म्हणसी। ज्यासी यम कांपे चळचळीसीं। तेजें तरी सूर्यसदृशी। रावणासीं भिडता झाला ॥ ४० ॥ ते द्वारींचें तोरण तोडून। सूर्यभानुनामें द्वारपाळ जाण। झोडिता झाला राक्षसेंद्रालागून। रावण पळोन पैं[5] गेला ॥ ४१ ॥ सूर्यभानु द्वारपाळ। रावणासी मारितां तत्काळ। ब्रह्मवचन होईल निष्फळ। म्हणोनि जीतँ सोडिला ॥ ४२ ॥ द्वारपाळमारामेण। राक्षससैन्या दाणादाण। पळाले जीव घेवोन। पर्वतपाठारीं रिघाले ॥ ४३ ॥ एक विवरीं प्रवेशले। एक गिरिकंदरीं रिघाले। एक नदी उतरोनि गेले। आपुलिया स्वस्थळाप्रति ॥ ४४ ॥ एक वृक्षीं वळंघले। एक वृक्षबुडांत रिघाले। एक पर्वतकडे बैसले। धाक घेवोनि राक्षस ॥ ४५ ॥ रावणें देवोनि पाठी। तेथोनि पळाला उठाउठीं। पुढील कथा सुरस गोमटी। भवबंधच्छेदक ॥ ४६ ॥ एका विनवी जनार्दनीं। जनार्दनाची एकपणीं। सुरस कथा रामायणी। सावधान संतीं परिसावी ॥ ४७ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां रावणसैन्यभंगो नाम चतुर्दशोऽध्यायः ॥ १४ ॥ ओंव्या ४७ ॥

अध्याय पंधरावा

॥ श्रीसीतावल्लभाय नमः ॥ तदनंतर अवनिजापती। प्रीतीं सांगतसे अगस्ती। म्हणे स्वामी ब्रह्मांडाच्या पंक्ती। उतरिसी रचिसी हेळांमात्रें ॥ १ ॥ तूं ईश्वराचा ईश्वर। तूं सुरवरांचा आदिइंद्र। तूंचि नटनाट्यलीलावतार। दावितोसी विनोदें ॥ २ ॥ तूंचि प्रकृति आणि पुरुष। तूं ब्रह्मादिकांचा ईश। तूं अवतार अयोध्याधीश। तूं कथा आम्हांस पुसतोसी ॥ ३ ॥ आमुचा वाढवोनि मान। आम्हांप्रति करितोसी प्रश्न। हेंचि आम्हां थोर भूषण। तूं परब्रह्म वंदिसी ॥ ४ ॥ आतां अवधारीं धरणिजारमणा। यक्षेंसीं संग्राम करितां रावणा। रक्षोगण आणिले रणांगणा। मग रावणा काय झालें ॥ ५ ॥ द्वारपाळें तोरणावरी। झोडिलां[10] रावण पळे दूरी। तदनंतरें श्रीरामा अवधारीं। कथेचिया निरूपणा ॥ ६ ॥ यक्षगण मोडिले रणीं। शतसहस्र पाडिले मेदिनीं। धनाध्यक्षें[11] देखोनि नयनीं। आपण संग्रामा निघाला ॥ ७ ॥ तेथें मणिभद्रनामें यक्ष। प्रतापें अत्यंत दक्ष। सांगातें[12] वीर सहस्र लक्ष। अतियोद्धे पराक्रमी ॥ ८ ॥ गदा मुद्गल शक्ति तोमर। शूळ मुसळ लहुडी चक्र। यक्ष करिते झाले मार। रणीं राक्षस लक्षोनी ॥ ९ ॥ तेव्हां प्रहस्तें काय

---

१ लढाई करणारें खासें सैन्य. २ मुरनामक दैत्य. ३ कार्तिकस्वामीनें. ४ भरला. ५ ऐक. ६ देवशत्रु. ७ जीवंत. ८ चढले. ९ अनायासें, लीलेनें. १० पराभव पावला. ११ कुबेरानें. १२ बरोबर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

केलें । रणीं सहस्रांतें मारिलें । गदा घेवोनि निवटिलें । महोदरें सहस्रांतें ॥ १० ॥ श्रीरामा सावधान अवधारीं । धूम्राक्ष राक्षस दुराचारी । निमेष न भरतां दोनी सहस्रवरी । रणीं यक्ष पाडिले ॥ ११ ॥ धूम्राक्षेंसीं मणिभद्र रण । करिते झाले दोघे जण । धूम्राक्षें मुसळ तोलून । मणिभद्र वक्षःस्थळीं हाणिला ॥ १२ ॥ लागतां मुसळाचा घावो । तेणें नुलंडेचि महाबाहो । तदनंतरें मणिभद्रें गदा पहा हो । आवो साधोनि मारिली ॥ १३ ॥ धूम्राक्षाच्या मस्तकावरी । गदा बैसली जैसी वीज शिखरीं । अचेतन धरणीवरी । पडला रक्त वाहातसे ॥ १४ ॥ धूम्राक्ष रणीं पडिला । देखोनि रावण क्रोधा चढला । रणमेदिनीसी धांवता झाला । युगांतींचा[1] अग्नि जैसा ॥ १५ ॥ रणीं मारिता झाला शक्तिकरूनी । मणिभद्रयक्षालागोनी । झळफळित गदा यक्षें घेवोनी । राक्षसेंद्रा हाणितली ॥१६॥ यक्षगदेच्या घायीं । रावणमुकुट पडिला भुईं । सर्वेचि यक्ष पाठीसीं पाहीं । रावणाच्या राहिला ॥ १७ ॥ रावण गदाघातेंकरीं । मुकुट पडलियाचें भय न धरी । मणिभद्र यक्ष पाठीसीं निर्धारीं । उभा तिष्ठत राहिला ॥ १८ ॥ यक्षांहीं सिंहनाद केला । श्रीरामा पर्वत दुमदुमिला । दुरोनि धनाधिपें[2] देखिला । मणिभद्राचा पराक्रम ॥ १९ ॥ मणिभद्र महाशूर । योद्धयांमाजी परम वीर । कुबेरें देखोनि सत्वर । काय बोलता पैं झाला ॥ २० ॥ म्हणे ब्राह्मणाच्या शापोक्ती[3] । रावणाची यशःकीर्ती । आणि ऐश्वर्यसंपत्ती । भस्म झाली द्विजशापें ॥ २१ ॥ कुबेर दीर्घवचनें बोले । रावणें कुळा लांछन लाविलें । देवां द्विजां दुःख दिधलें । तें भोगीं रे निजकर्म ॥ २२ ॥ दुष्टा नष्टा चांडाळा । तुवां भक्षिलें ऋषिकुळा । देवांतें त्रास दिधला । तें भोगीं रे निजकर्म ॥ २३ ॥ निरपराधें वनांतरीं । तुवां द्विज भक्षिले यथेष्टवरी । तया पापाची सामग्री । तूं अघोरीं पडसील ॥ २४ ॥ उपजोनियां ब्रह्मवंशीं । लाज लाविली कुळासी । तुजसारिखा पापिष्ठ सृष्टीसीं । म्यां नाहीं रे देखिला ॥ २५ ॥ तूं झालासी नरकाचा पाहुणा । तुजविण नरक नाहीं दुणा । नरका जावें नलगे रावणा । नरकप्राय तूंचि तूं ॥ २६ ॥ जो आवडीनें विष प्याला । तो परिपाकीं जाण निमाला । तैसें रावणा झालें तुजला । ब्राह्मणाचे शापेंकरीं ॥ २७ ॥ मूढ आरूढोनि वृक्षावरी । बैसला ते फांदी कुठारेंकरीं[4] । तोडितां पडे भूमीवरी । तैसें रावणा तुज झालें ॥ २८ ॥ बाजिगिराचें[5] वानर जैसें । तो नाचवी नाचे तैसें । तुझे प्रधान अजाण तैसे । त्यांचेनि वचनें वर्तसी ॥ २९ ॥ जो स्वधर्माचा त्याग करी । पापियाचें व्रत अंगीकारी । तयासी यमराज आपुले स्वपुरीं । यमपाशीं बांधोनि ने ॥ ३० ॥ ज्येष्ठांतें न वंदिती । हेळण करोनि निर्भर्त्सिती । ते नर यमा वश होती । जाण निश्चितीं रावणा ॥ ३१ ॥ नाशवंत शरीर । याचे ठायीं आदर फार । न करोनि वंचिती परोपकार । यमाधीन पैं होती ॥ ३२ ॥ नाशवंत हा संसार । जाणोनि न करी भजनसार । मूढबुद्धि ऐसा पामर । नरक घोर तो भोगी ॥३३॥ ऐकोनि वैश्रवणाचें वचन । कोपें आरक्त पूर्ण नयन । कुबेराप्रति दशानन । संग्रामासी मिसळला ॥ ३४॥ प्रधान विमुख झाले होते । तेही घेतले सांगातें । भग्न झाला रावण पुनरपि तेथें । संग्रामातें करिता झाला ॥ ३५ ॥ मणिभद्रें भग्न केला । माथींचा मुकुट पाडिला । तो रावण नाहीं श्रांतला[6] । नाहीं श्रमला संग्रामीं ॥ ३६ ॥ श्रीराम म्हणे जी अगस्ती । संग्राम करितां मणिभद्राप्रती । शिरींचा मुकुट पाडिला क्षितीं[7] । श्रम कां चित्तीं नाहीं झाला ॥ ३७ ॥ अगस्ति म्हणे श्रीरामा । यासी वर देता ब्रह्मा । वरबळें पुरुषोत्तमा । यक्ष गंधर्व न गणीच ॥ ३८ ॥ मग रावण पुढती । युद्ध करी बंधूप्रती । तें अवधारीं धरणिजापती । आश्चर्य थोर होईल ॥ ३९ ॥ येरीकडे कुबेर जाण । अग्न्यस्त्र सोडिलें दारुण । राक्षस झाले कंपायमान । अग्नि जाळीत उरीं शिरीं ॥ ४० ॥ जैसा प्रळयींचा अग्नी । पसरे त्रैलोक्य व्यापूनी । तैसी कुबेरास्त्रापासूनी । अग्निमयी रणभूमी ॥ ४१ ॥ रावणें वरुणास्त्र घातलें । क्षणामाजी अग्नीतें शांत केलें । पृथ्वी परिपूर्ण झाली जळें । सरोवर नद्या भरियेल्या ॥ ४२ ॥ रावणें राक्षसी माव केली । अदृश्य झाला तये काळीं । मागूनि बंधूचे हृदयकमळीं । येवोनि गदा हाणितली ॥ ४३ ॥ दशग्रीव कपटी क्रूर । दुरात्मा

१ प्रलयकालींचा. २ कुबेरानें. ३ शापवचनें. ४ कुऱ्हाडीनें. ५ डोंबाऱ्याचें. ६ श्रम पावला. ७ पृथ्वीवर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

महा मावकार । समरांगणीं सत्वर । अदृश्य झाला ते काळीं ॥ ४४ ॥ अदृश्य येवोनि तये काळीं । धनेशाचे हृदयकमळीं । गदा हाणितली तेणें भूमंडळीं । पाडिला जैसा पर्वत ॥ ४५ ॥ वसंतीं पलाशे आरक्त । पुष्पीं फळीं वन शोभत । तैसा कुबेर रुधिरांकित । रणमेदिनीं उलंडला ॥ ४६ ॥ अशोकवृक्ष मूळेंसीं । उलंडोनि पडे भूमीसी । तैसा कुबेर रणभूमीसी । पडला तरु पैं जैसा ॥ ४७ ॥ तदनंतरें प्रधान मिळोन । नंदनवनासी कुबेर नेऊन । परस्परीं विचारून । उपचार करिते झाले ते काळीं ॥ ४८ ॥ आरोग्य व्हावया शरीरीं । जैसा धन्वंतरी उपचार करी । तैसे प्रधानीं थोरथोरीं । उपचार कुबेरीं मांडिले ॥ ४९ ॥ येरीकडे श्रीरामा । रावण तो पापकर्मा । मग प्रवर्तला अधर्मा । पुष्पक विमाना हरिता झाला ॥ ५० ॥ पुष्पक विमानाची स्थिती । ऐक योगियांच्या ध्येयमूर्ती । चिंतिल्या स्थळासी शीघ्रगती । मनोवेगेंकरोनि जातसे ॥ ५१ ॥ मनोवेगातें सांडोनि मागें । विमान जाय अति वेगें । म्हणोनि कामँग ऐसें निजांगें । ज्ञाते पंडित बोलती ॥ ५२ ॥ तया विमानावरी । आरूढोनि श्रीरामा तुझा वैरी । आनंदें गर्जत ते अवसरीं । कैलासाप्रती चालिला ॥ ५३ ॥ कुबेरातें जिंतोनि राक्षस । येता झाला कैलासास । पुढील कथा अति सुरस । सावध श्रोतीं परिसिजे ॥ ५४ ॥ वाल्मीकाच्या ग्रंथाधारें । संतांचेनि कृपाभरें । कथा चालिली पुढारें । गोड निरूपण पैं आहे ॥ ५५ ॥ एका विनवी संतजनां । तुमच्या प्रसादाचा पान्हा । तेणें बदलों बोबड्या वचना । बाळपणा लक्षोनी ॥ ५६ ॥ एका जनार्दना शरण । पुढें रम्य सुरस गहन । कथा ऐका रामायण । दत्तचित्तें होवोनी ॥ ५७ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां वैश्रवणभंगो नाम पंचदशोऽध्यायः ॥ १५ ॥ ओंव्या ॥ ५७ ॥

अध्याय सोळावा

॥ श्रीसीतापतये नमः ॥ मागिले प्रसंगीं वैश्रवण । रणभूमीसी झाला भग्न । मागें रावणें पुष्पक हिरोन । वरी आरूढोन निघाला ॥ १ ॥ सर्वे प्रधान थोर थोर । मारीच प्रहस्त महोदर । विमानीं आरूढोनि वनें घोर । लंघिते झाले ते काळीं ॥ २ ॥ षडाननाचें जन्मस्थान । तें देखिलें शरवण वन । तेथें शर होती उत्पन्न । यालागीं शरवण बोलिजे ॥ ३ ॥ तदनंतरें पौलस्तिकुमर । देखता झाला वन सुंदर । वृक्ष वल्ली अपार । अति मनोहर देखिलें ॥ ४ ॥ तेजें अत्यंत साजिरें । सुवर्णमयचि साकारें । उपमा देतां भास्करें । किरणजाळ सोडिलें ॥ ५ ॥ तया वनप्रदेशीं कैलासगिरी । असे जैसा मेरु धरित्रीं । त्याच भागीं शोभा साजिरी । पुष्पक तेथें येतें झालें ॥ ६ ॥ पुष्पकें देखिला कैलास । पुढें न चाले राहिलें सावकाश । गति खुंटली देखोनि राक्षस । थोर आश्चर्य पावला ॥ ७ ॥ अत्यंत प्रतापी रावण । चिंताक्रांत म्लानवदन । प्रधानाप्रति काय वचन । बोलता झाला ते समयीं ॥ ८ ॥ हें पुष्पक विमान । न चाले गति खुंटोन । येथें राहिलें कोण कारण । निर्धार पूर्ण लक्षेना ॥ ९ ॥ पर्वतासारिखें पुष्पकविमान । पर्वतमाथां राहिलें जाण । कोण कर्म वैभव कोण । काय कारण राहिलें ॥ १० ॥ दशग्रीव ऐसें बोलिल्यावरी । ऐकोनि मारीच सारांश उत्तरीं । बोलता झाला शब्दचातुरीं । म्हणे अवधारा लंकेशा ॥ ११ ॥ हें जें पुष्पक विमान । निष्कारण कां पतन । पर्वतमाथां वळंघोनं । कोणें कर्में राहिलें म्हणसी ॥ १२ ॥ निश्चितेंसीं राजचूडामणी । पुष्पक कुबेराचें म्हणोनी । पुढें न चाले मार्ग खुंटोनी । राहिलें हें पर्वतमाथां ॥ १३ ॥ कुबेराचें विमान । तेथें आरूढे वैश्रवण । तयावीण न चाले जाण । रहावया मूळ हेंचि यासी ॥ १४ ॥

इति वाक्यांतरे तस्य करालः कृष्णपिंगलः ।
वामनो विकटो मुंडी दंडी ह्रस्वभुजो बली ॥ १ ॥
ततः पार्श्वमुपागम्य भवस्यानुचरोऽब्रवीत् ।
नंदीश्वरो वचश्चैनं राक्षसेंद्रमशंकितः ॥ २ ॥

इतुकें मारीच बोलिल्यावरी । तंव गगनमार्गीं एकसरी । हांक फुटली तेणेंकरीं । रावण थोर

१ मायावी. २ पळस. ३ रक्तानें माखलेला. ४ इच्छेनुसार जाणारें. ५ सावधान मनानें. ६ कार्तिकस्वामीचें. ७ पृथ्वीवर. ८चढून. ९राजश्रेष्ठा. १० कुबेर. ११एकदम.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

गजबजिला ॥ १५ ॥ ऊर्ध्व अवलोकिती राक्षसगण । तंव अकराळ विकराळ वदन । प्रभा कृष्ण पिंगळ पूर्ण । स्वरूप भयानक देखिलें ॥ १६ ॥ खुजट शरीर विकट[1] वदन । मस्तकीं बोडका हातीं दंड जाण । भुजा लहान पराक्रम गहन । येवोनि गर्जन तेणें केलें ॥ १७ ॥ तदनंतरें ईश्वरसेवक[2] । पार्श्वभागीं आला एक । नंदिकेश्वरनामें देख । बोलता झाला ते वेळीं ॥ १८ ॥ नंदिकेश्वराचें वचन ऐकोन । दशग्रीव शंकित होवोन । पुढें काय बोलिला ईश्वरगण । श्रोतीं सावधान अवधारिजे ॥ १९ ॥

निवर्तस्व दशग्रीव शैले क्रीडति शंकरः ।
सुपर्णनागयक्षाणां देवगंधर्वरक्षसाम् ॥ ३ ॥
सर्वेषामेव भूतानामगम्यः पर्वतः कृतः ॥ ४ ॥

वदता झाला नंदिकेश्वर । रावणा येथोनि परता सर । पर्वतीं क्रीडती श्रीशंकर । सवें भवानी[3] पैं असे ॥ २० ॥ उमेसहित चंद्रमौळी[4] । आनंदें क्रीडती ये शैलीं । तूं येथोनि शीघ्रकाळीं । जाय आणिके स्थळाप्रति ॥ २१ ॥ गरुडयक्षसर्पांसी । देवगंधर्वराक्षसांसी । आणिक भूतें भूमंडळवासी । त्यांसही पर्वत हा वर्जिला ॥ २२ ॥ नंदिकेश्वराचें वचन । ऐकोनि दशग्रीव कोपायमान । क्रोधें मस्तक डोलवोन । कानींचीं कुंडलें झळकती ॥ २३ ॥ क्रोधें थरथरां कांपत । नेत्र करोनि आरक्त । पुष्पकावरोनि बोलत । कोण शंकर कैंचा रे ॥ २४ ॥ कैंचा शंकर कोण उमा । शैलीं कां क्रीडतसे अधमा । तयांचें भय दाविसी आम्हां । इये पर्वतपाठारीं ॥ २५ ॥ दुरुक्ती रावणाचें वचन । तेणें नंदिकेश्वरें ऐकोन । दिव्य शूळ करीं घेवोन । क्रोधें नयन वटारी ॥ २६ ॥ ऐशियातें रजनीचर । देखोनि म्हणती हें वानर । आम्हांसी भेडसावितें थोर । म्हणोनि हेळणा मांडिली ॥ २७ ॥ पहा हो कैसें आश्चर्य वाटे । आम्हांसी भेडसाविलें मर्कटें । याचें मुखावलोकन पहांटे । करितां प्राणी कष्टी होय ॥ २८ ॥ ऐकोनि दशग्रीवाचें वचन । क्रोधें नंदिकेश्वर आपण । श्रवण कीजे सादरें बोलता झाला सावधान ॥ २९ ॥ तूं माझी हेळणा करिसी । नेणसी माझ्या प्रतापासी । मारितां तुज या समयासी । मद्धक्तीसी उचित पैं नाहीं ॥ ३० ॥ तुझ्या वधालागीं दशानना । मजसारिखे मुख्य जाणा । बळें पालथें करिती त्रिभुवना । येद्वीर्या[5] सरी नसे कोठें ॥ ३१ ॥ बळरूप पराक्रम जाण । वानर होती अति दारुण । ते तुझिया कुळाचें नाशन । निमेषें पूर्ण करितील ॥ ३२ ॥ नख दंष्ट्रा[6] हातियेर । संग्रामीं मदोन्मत्त थोर । एकैक वानर पर्वताकार । अगणित वीर उपजती ॥ ३३ ॥ ते वानर बळेंकरीं । तुझिया कुळाची बोहँरी[7] । करितील क्षणामाझारीं । राक्षसां उरी नुरेल ॥ ३४ ॥ मज मारितां तुम्हांसी । अशक्य नाहीं निश्चयेंसीं । परी ये समर्यीं मी न मारीं तुम्हांसी । कार्यकारण पुढें असे ॥ ३५ ॥ स्वर्गीं देवविमानपंक्ती । नंदिकेश्वराच्या वचना मानवती । पुष्पवर्षाव सुरवर करिती । नाना शब्दें स्तवोनियां ॥ ३६ ॥ नंदी म्हणे दशानन । तुझें पूर्वकर्म जाण । मारिलें असतां मी आपण । बोल लागेल भविष्या ॥ ३७ ॥ नंदीचें वचन ऐकोन । कोपें खवळला रावण । मग केलें गडगर्जन । नादें पर्वत दुमदुमिला ॥ ३८ ॥ मज जातां आकाशपंथें । खुंटविलें माझ्या विमानातें । तरी मी या पर्वतातें । मूळासहित उपडीन ॥ ३९ ॥ पर्वत उपडोनि सागरीं । निमग्न करीन निर्धारीं । काय कारण त्रिपुरारी । नृपासारिखा क्रीडतसे ॥ ४० ॥ राक्षसांसी हें भयानक स्थान । तें मी निर्भय करीन जाण । ऐसें बोलोनियां आपण । काय करिता जाहला ॥ ४१ ॥ रावणभुजबळाची थोरी । विसां भुजीं कैलासगिरी । वेढिला तेणें आंदोळेंकरीं । एकवीस स्वर्गें डळमळलीं ॥ ४२ ॥ भुजाबळेंकरोनि दशानन । कैलास हालविला पराक्रमें जाण । देव झाले कंपायमान । कोण विघ्न ओढवलें ॥ ४३ ॥ ऋषीश्वरां सुटला पळ । म्हणती ओढवला प्रळयकाळ । पालथा होऊं पाहे ब्रह्मांडगोळ । भंगा भूगोळ जाऊं पाहे ॥ ४४ ॥ उमा झोंबे नीळकंठा । रमा थापटी वैकुंठा । कोणें मांडिलें संकटा । सुरश्रेष्ठा चिंतामणे ॥ ४५ ॥ तदनंतरें श्रीरघुपती । काय करिता झाला कैलासपती ।

१ भयंकर. २ शंकराचा सेवक. ३ पार्वती. ४ शंकर.

५ ज्यांच्या पराक्रमाला. ६ दाढा. ७ नाश.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

अंगुष्ठ चेपूनि पर्वतीं। निवारण करी सुरव्यथा ॥ ४६ ॥ लीलेंकरोनि महेश। अंगुष्ठें चेपितां पर्वतास। रावण झाला कासावीस। मेटें बळलीं तयाचीं ॥ ४७ ॥ रावण भुजा परत्या करी। तंव त्या जडल्या बळें भारी। सुटका नव्हे कवणेपरी। दांत चावी राक्षस ॥ ४८ ॥ भुजा न सुटती तेथ। सर्व शक्ति जाहली व्यर्थ। दशानन अति आक्रंदत। ओरडत अति दुःखें ॥ ४९ ॥ हांक फोडितां लंकापती। त्रैलोक्य भयभीत चित्तीं। हांक ऐकोनि प्रधान भीती। मांडला म्हणती प्रळय आजी ॥ ५० ॥ हांक ऐकोनि दुर्धर। आसन सांडोनि देवेंद्र। म्हणे फुगला समुद्र। मर्यादा सांडूं पाहातसे ॥ ५१ ॥ पर्वताचें हृदय तडाडलें। वायुमंडळ स्तब्ध झालें। कळिकाळ कांपे चळचळें। नभीं अभ्रें दाटलीं ॥ ५२ ॥ मंगळांची जननी थरारली। नभींचीं नक्षत्रें च्यवलीं। दिग्गजांचीं दोंदें तडाडलीं। कांपों लागले शशिसूर्य ॥ ५३ ॥ यक्ष आणि विद्याधर। सिद्ध चारण किन्नर। बोलते झाले प्रळय थोर। चंद्रशेखर निवारिता ॥ ५४ ॥ समस्त करिताती स्तवन। गिरिजापति तुज अनन्यशरण। आम्हांसी रक्षिता तूंचि जाण। कायावाचामनेंसीं ॥ ५५ ॥ कृपाळुवा उमाकांता। त्रिपुरांतका विश्वनाथा। तुजवांचोनि आम्हां तारिता। नाहीं दुजा भूमंडळीं ॥ ५६ ॥ प्रधान म्हणती दशानना। तूं जाय शिवासी शरणा। तो हे निवारील विघ्ना। अनमाना नको करूं ॥ ५७ ॥ येरीकडे दशानन। करिता झाला शिवस्तवन। नाना स्तोत्रें मंत्रें जाण। शिव प्रसन्न तेणें केला ॥ ५८ ॥ प्रेमसिंधु गिरिजापती। कैलासींचा भोळा चक्रवर्ती। ऐकोनि रावणाची स्तुती। तत्काळ उडी घातली ॥ ५९ ॥ मस्तकीं जटाजूट साजिरा। तया तळीं नेत्र तिसरा। जेणें जाळिलें रतिवरा। जो योगीश्वरां निजवंद्य ॥ ६० ॥ मुकुटीं मंदाकिनी पापनाशिनी। जे जन्मली विष्णूच्या चरणीं। जिचें नाम घेतां वदनीं। पापें दिशा लंघिती ॥ ६१ ॥ भाळीं विभूतिलेपन। तयावरी चंद्र विराजमान। शोभे हातीं नरकपाळ घेऊन। रुंडमाळा कंठीं रुळे ॥ ६२ ॥ अंगीं भस्म चर्चिलें। वरी रुद्राक्ष मिरवले। व्याघ्रांबर परिधान केलें। तत्काळ आला समीप ॥ ६३ ॥ रावणें देखोनि उमापती। प्रणिपात करी नम्रवृत्ती। म्हणे स्वामी कृपामूर्ती। त्राहि त्राहि महादेवा ॥ ६४ ॥ सहस्र वर्षेंपर्यंत। रडत होता दशानन तेथ। महादेव होवोनि विस्मित। थोर आश्चर्य मानिलें ॥ ६५ ॥ महादेव म्हणे तुझें स्तवन। ऐकोनि झालों सुप्रसन्न। या पर्वतापासोनि मुक्त जाण। भुजा तुझ्या होतील ॥ ६६ ॥ तुवां केला दीर्घ रवं दारुण। त्रैलोक्य झालें कंपायमान। तस्मात् तुझें नांव रावण। देवयक्षगण म्हणतील ॥ ६७ ॥ शीघ्र येथोनि लंकापती। जाईं आपुल्या स्वस्थळाप्रती। जे वांच्छा असेल चित्तीं। ते पावसी शीघ्रकाळें ॥ ६८ ॥ ऐसें महेश बोलिल्यानंतरें। रावण म्हणे जी दातारें। कृपा केली तरी माझीं वचनोत्तरें। सावकाश ऐकावीं ॥ ६९ ॥ प्रसन्न झालासी महादेवा। तरी मज बरवा वर द्यावा। पूर्वीं म्यां तपोबळें ब्रह्मदेवा। अवध्यता मागितली ॥ ७० ॥ चतुराननें वरदान। मज दिधलें जें यक्षगण। विद्याधर देव राक्षस दारुण। यांचेनि तुज मृत्यु नाहीं ॥ ७१ ॥ दीर्घ आयुष्य मज झालें। तें भोगितां चित्त उबगलें। आतां कांहीं असेल जें उरलें। लाविलें मीं तुझ्या ध्यानीं ॥ ७२ ॥ ऐसें रावणाचें वचन। ऐकोनियां शैलजारमण। चंद्रहास्य खड्ग दारुण। रावणालागीं दीधलें ॥ ७३ ॥ आयुष्याचे अंतीं जाण। तुज विष्णुहस्तें मरण। तेधवां माझ्या समीप स्थान। तूं पावशील लंकापति ॥ ७४ ॥ याउपरी त्रिपुरांतकें जाण। दशानना नाम रावण। ठेवोनि चंद्रहास्य खड्ग देवोन। आपण कैलासाप्रति गेला ॥ ७५ ॥ रावण आरूढोनि विमानावरी। चंद्रहास्य खड्ग घेवोनि करीं। विचरता झाला सवें मंत्री। प्रहस्तादिक मारीच ॥ ७६ ॥ अगस्ति म्हणे श्रीरामा। मग तो रावण पापकर्मा। प्रवर्तला थोर अधर्मा। क्षत्रियांतें जिंकिता जाहला ॥ ७७ ॥ क्षत्रिय राजे थोर थोर। तयां बाधा करी दशशिर। कोणी भयेंकरोनि देशांतर। करिते झाले

१ देवांचें दुःख. २ भयंकर ३ पृथ्वी. ४ गळलीं. ५ शंकर. ६ मदनाला. ७ गंगा. ८ रक्षण कर. ९ आक्रोश. १० तरवार. ११ शंकरानें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

रावणधाकें ॥ ७८ ॥ कोणी म्हणती रावण । आम्ही तुम्हां सेवकांसमान । ऐसी सृष्टि जिंकीत रावण । पुढें पुढें चालिला ॥ ७९ ॥ एका जनार्दना शरण । पुढें वेदवतीआख्यान । रसाळ आणि रम्य जाण । सावधान अवधारा ॥ ८० ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां रावणशिववरदो नाम षोडशोऽध्यायः ॥ १६ ॥ ॥ ओंव्या ८० ॥ श्लोक ॥ ४ ॥

अध्याय सतरावा

॥ श्रीरामाय नमः ॥ अगस्ति जो महामुनी । कथा सांगे श्रीरामालागूनी । ते कथा सुरस भवनाशिनी । सावधान श्रवणीं ऐकावी ॥ १ ॥ रावण विचरतां महीतळीं । हिमाद्रीच्या वनस्थळीं । समवेत प्रधान बळी । राक्षस न्याहाळी[1] भूमंडळ ॥ २ ॥ प्रधानांसमवेत दशानन । पुष्पकावरी आरूढोन । उल्लंघितां वनोपवन । हिमवंतासमीप[2] पातला ॥ ३ ॥ पुढें देखिलें कन्यारत्न । सुरस सुकुमार कमलनयन । मस्तकीं जटा कृष्णाजिन । तापसवेषें शोभली ॥ ४ ॥ विधिपूर्वक अनुष्ठान । जैसें करिती ऋषि देवगण । तैसी ते सुंदरी पूर्ण । तपें दारुण तपतसे ॥ ५ ॥ रावणें देखतां कन्यारत्न । सुशील सुव्रत गुणसंपन्न । काममोहित भ्रांत होऊन । हास्यवदनें पुसता झाला ॥ ६ ॥ अवो भद्रे[3] अवधारीं । तूं एकली या वनांतरीं । रूप तरी देवांगना तुज सरी[4] । न पावती पाहातां ॥ ७ ॥ कोण कोणाची काय कारण । तुज योग्य तप नव्हे जाण । तूं कां करिसी अनुष्ठान । याचें कार्य काहीं नाहीं ॥ ८ ॥ कासयाकारणें सुंदरी । तूं एकली या वनांतरीं । तुझा भ्रतार या विजनामाझारी[5] । आहे कीं नाहीं हें सांगें ॥ ९ ॥ तुझें रूप यौवन । जो भोगी तो भाग्याचा गहन । त्याच्या पुण्या मर्यादा जाण । केली न वचे राजबाळे ॥ १० ॥ ऐकोनि रावणाचें वचन । मग ते वेदवती आदरेंकरून । रावणाचें आतिथ्य जाण । करोनि कथन सांगतसे ॥ ११ ॥ देवगुरु जयातें म्हणती । तयाचा सुत कुशध्वज नृपती । बुद्धिवंत दुसरा बृहस्पती । तपें तेजें आगळा[6] ॥ १२ ॥ वेदाभ्यास शास्त्रव्याख्यान । आणि अग्निहोत्र पंचमहायज्ञ । देवतार्चन पितृतर्पण । भगवद्भजन सर्वभूतीं ॥ १३ ॥ कुशध्वज वेदाभ्यास करी । तो माझा पिता निर्धारीं । मी वाढलें तयाचे घरीं । नाम वेदवती प्रसिद्ध ॥ १४ ॥ माझा देखोनि यौवनभर । पिता वरविचारणीं तत्पर । तैं आले यक्ष विद्याधर । आणि दैत्य राक्षस ॥ १५ ॥ आले सिद्ध ऋषीश्वर । आले पृथ्वीचे नृपवर । आले पाताळींचे विखारँ । गंधर्व किन्नर येते झाले ॥ १६ ॥ सभा दाटली राजभवनीं । माझा पिता पाहे न्याहाळूनी । कोणी वर न बैसे मनीं । विष्णूवांचोनि तयाचे ॥ १७ ॥ समस्तां अभिप्राय कळला । म्हणती कोणा नेदी हे बाळा । आतां वधूं या भूपाळा । कन्या तत्काळा घेवोनि जावूं ॥ १८ ॥ ऐसें एकमेक संवादले । संग्रामातें प्रवर्तले । युद्ध करितां परस्पर मेले । सांगों काय राजेंद्रा ॥ १९ ॥ शुंभनामें दैत्यें काय केलें । माझिया पित्या निद्रित देखिलें । रात्रीं येवोनि चांडाळें । रायातें भक्षिलें ते काळीं ॥ २० ॥ पिता निमाला ऐकोन । माझे मातेनें केलें सहगमन । मी उत्कंठा पित्याची जाणून । विष्णुचिंतन करीतसें ॥ २१ ॥ पितयाच्या मनीं होतें । जे कन्या द्यावी विष्णूतें । हें जाणोनि मी येथें । अनुष्ठान करीतसें ॥ २२ ॥ इतुके सायास विष्णुप्रीत्यर्थी । मी करीतसें अतिथी । हा देह विष्णुभाग निश्चितीं । त्याचें त्यास समर्पण ॥ २३ ॥ जनकप्रतिज्ञा जाणोन । मी करितें अनुष्ठान । कायावाचामनेंकरून । श्रीरमारमण पावावया ॥ २४ ॥ व्रतनेमउपवासीं । वनीं विचरतें मी ऐसी । पितयाची उत्कंठा पावावयासी । ये पर्णकुटीसी राहिलें ॥ २५ ॥ ऐसें माझें कथन । तुजप्रती केलें निवेदन । अगा पौलस्त्यात्मजा शीघ्र गमन । येथोनियां तूं करीं ॥ २६ ॥ रावण म्हणे कन्येसी । म्यां जाणितलें तुझिया स्वधर्मासी । एकली तूं वनवासीं । रहावयासी योग्य नव्हे ॥ २७ ॥ जयाकारणें करिसी तप । तो विष्णु अति अल्प । तया नाहीं नांवरूप । सत्य संकल्प हा माझा ॥ २८ ॥ विष्णु काय बापुडें दीन । तया गांठीं नाहीं धन । आणि असे पराधीन । सत्य जाण सुंदरी ॥ २९ ॥ अवो भद्रे अवधारीं । मी जाणतों तुझ्या तपाची

[1] पाही. [2] हिमालयपर्वतापाशीं. [3] सुलक्षणी स्त्रिये. [4] तुलना. [5] अरण्यामध्यें. [6] श्रेष्ठ. [7] सर्प.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

थोरी। तुजसारिखी आणिक नारी। नाहीं दुसरी कनकप्रभे ॥ ३० ॥ आता तूं वो झडकरीं। वेगीं आरूढें विमानावरी। कंदर्प मज पीडितो भारी। तुझें रूप देखोनी ॥ ३१ ॥ तुझिया रूपाची पदवी। तेजें लोपला चंद्र माधवी। आणिक उपमा तुज द्यावी। वृथा वाणी श्रम होय ॥ ३२ ॥ तुझे अंगीं तरुणपण। तुज तप अयोग्य जाण। जयांचीं इंद्रियें विकळ वार्धक्यपण। तिहीं अनुष्ठान करावें ॥ ३३ ॥ मी लंकेचा आहें राजा। तूं माझी होय भाजा। विविध भोग भोगीं माझा। सुखसंतोष पावूं दोघें ॥ ३४ ॥ तूं अत्यंत सुकुमार। अंगीं खुपती चंद्रकर। तूं मृगनयना सत्वर। विमानावर आरूढें ॥३५॥ आधींच तूं राजबाळ। त्याहीवरी सुकुमार वेल्हाळ। तुझिया तपाचा हा काळ। नव्हे प्रबळ यौवन तुझें ॥ ३६ ॥ या त्रैलोक्यामाझारी। रूपयौवनकटाक्षकरीं। पाहतां नाहीं दुसरी। म्यां आपुले नयनीं देखिलीसे ॥ ३७ ॥ तुझिया रूपाचें लावण्य। त्यापुढें विष्णु बापुडें दीन। तूं करीं वो माझें वर्णे। समपाड जाण तुज मज असे ॥ ३८ ॥ मी तंव ब्रह्मयाचा नातू। पौलस्तिमुनीचा सुतू। आणि लंकेचा नाथू। सेवेसी रतू शिवाचे ॥ ३९ ॥ ऐकोनि रावणाचे वचना। वेदवती बोले झणें या वचना। बोलतां तुज उरी दशानना। नुरे जाण शीघ्रकाळें ॥ ४० ॥ ऐसें वदली वेदवती। ऐकोनि रावणा क्रोध चित्तीं। वेणी धरोनि ते सती। बळें आसुडिता जाहला ॥ ४१ ॥ ऐसें करोनि लंकापती। करीं धरिली वेदवती। बलात्कारें पुष्पकाप्रती। वाहता झाला ते समयीं ॥ ४२ ॥ रावणें हातीं धरितां जाण। वेदवती क्रोधायमान। नेत्रींहूनि निघतां हुताशन। काय वचन बोलिली ॥ ४३ ॥ शब्दें करूं पाहे दहन। रागें रावणाकडे पाहोन। बोलती झाली कोपायमान। सावधान अवधारा ॥४४॥ अरे नष्टा चांडाळा। त्वां बोल लाविला ब्रह्मकुळा। मज धरिलें त्वां बरळा। मरण कुळा आणिलें ॥ ४५ ॥ मी तप करीत होतें। तुवां पापदृष्टीं पाहिलें मातें। माझेनि शापें वंशातें। नाश होईल रावणा ॥ ४६ ॥ विष्णुप्रीत्यर्थी तप करीत होतें। तुवां विघ्न केलें मातें। तरी मी भस्म करितें तपःसामर्थ्यें। मग पुढें जन्म घेईन मी ॥ ४७ ॥ आतां मी अग्नीभीतरीं। उडी घालितें निर्धारीं। आपुलेनि सामर्थ्यंकरीं। राक्षसबोहरी करीन मी ॥ ४८ ॥ यालागीं रे रावणा। तुझिया वधाकारणें जाणा। अवतरेन मी पुन्हां। राक्षसगणा वधावया ॥ ४९ ॥ तुज वधावया झडकरी। मी कां वेंचूं तपाची थोरी। पुढें जन्मोनि तुझी बोहरी। जाण निर्धारीं करीन ॥५०॥ मी अयोनिजा कुमारी। त्वां मज पापदृष्टीं करीं। धरिलें त्याचें फळ पुढारी। जाणवेल लंकेशा ॥ ५१ ॥ पुढें धार्मिकाचे घरीं। अवतरेन जाण निर्धारीं। तो कोण म्हणसी जाण तरी। मिथिलापुरीचा नृपवर ॥ ५२ ॥ जो राज्य करोनि विदेही। जो ज्ञानाचा सागर पाहीं। जो प्रतिपाळी ब्राह्मण गाई। तयाच्या गृहीं अवतरेन ॥ ५३ ॥ ऐसें बोलोनि वेदवती। प्रवेशली जातवेदाप्रती। स्वर्गीं देवविमानपंक्ती। पुष्पवर्षाव तिहीं केला ॥ ५४ ॥ ते वेदवती कुमारी। विदेही जनकाचे घरीं। पुढती जन्मली सुंदरी। जानकी नाम जियेचें ॥ ५५ ॥ ते तुझी भार्या श्रीरघुपती। श्रीरामा तूं जाण निश्चितीं। ते जनकाघरीं वाढली सती। जानकी ऐसें नाम जिचें ॥ ५६ ॥ ऐकोनि जानकीचें कथन। श्रीरामें आश्चर्य पावोन। म्हणे आपुली प्रिया धन्य धन्य। कष्ट दारुण देखिले ॥ ५७ ॥ अगस्ति म्हणे श्रीरामा। तूंचि केवळ विष्णु सर्वोत्तमा। पूर्वक्रोधें राक्षसाधमां। वैरभावें मारिलें ॥ ५८ ॥ पुढें ते वेदवती कुमारी। दुसरा जन्म धरिला निर्धारीं। सांपडली शेताभीतरीं। सीता नाम म्हणवुनी ॥ ५९ ॥ कृतयुगींचे कुशध्वजउदरीं। जे वेदवती प्रसिद्ध थोरी। पुढें तेचि त्रेतायुगाभीतरीं। शेतामाजी सांपडली ॥ ६० ॥ इतुकें झालें जनकपुरीं। विदेही जनकाचिये घरीं। नाम पावली जानकी सुंदरी। ते तुझी नारी श्रीरामा ॥ ६१ ॥ त्रेतायुगीं विदेहाघरीं। अजन्में जन्मोनि सुंदरी। राक्षसां मारविलें पूर्ववैरेंकरीं। जाण निर्धारीं श्रीरामा ॥ ६२ ॥ हे जानकीची उत्पत्ती। बोलिला वाल्मीक महामती। हेचि कथा आणिके ग्रंथीं। विपरी-

१ कनकाप्रमाणें शोभणाऱ्ये. २ काम. ३ शरदृतूंतील. ४ पाणिग्रहण. ५ अग्नि. ६ शुक्र व शोणित यांपासून न झालेली. ७ अग्नीमध्यें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

ताथैं पैं असे ॥ ६३ ॥ जयानें जैसें देखिलें । तयानें तेंचि निरूपिलें । आपण अवधारिजे भावबळें । कल्मषावेगळें व्हावया ॥ ६४ ॥ एका जनार्दना शरण । म्हणतां गेलें एकपण । एका आणि जनार्दन । नामें भिन्न स्वरूप एक ॥ ६५ ॥ जनार्दन तोचि एक । एक तोचि होय व्यापक । व्यापकत्वें पाहतां एक । एकाहूनि देख दुसरें नाहीं ॥ ६६ ॥ यालागीं एका आणि जनार्दन । मुळींच पाहतां अभिन्न जाण । म्हणोनियां नांवें अनन्य शरण । संतसज्ञान पैं होती ॥ ६७ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां वेदवत्याख्यानं नाम सप्तदशोऽध्यायः ॥ १७ ॥ ओंव्या ॥ ६७ ॥

अध्याय अठरावा

॥ श्रीजगद्गुरवे नमः ॥ वेदवतीचें अग्निप्रवेशन । तें देखोनि दशानन । पुष्पकीं आरूढोनि पर्यटन । करिता झाला मेदिनीतें ॥ १ ॥ तदनंतरें मरुत्त भूपती । यज्ञ करीत होता उशीरपर्वतीं । मिळाले ऋषि देवपंक्ती । मंत्राहुती घालीत होते ॥ २ ॥ देवगुरूचा बंधु जाण । संवर्तनामें तो ब्राह्मण । जयाचें ज्ञान बृहस्पतीसमान । आचार्य पूर्ण यज्ञींचा ॥ ३ ॥ समस्त द्विजांसहित । होम करी राजा मरुत्त । तंव रावण देखिला येत । वरदोन्मत्त होवोनी ॥ ४ ॥ वरदानाचेनि बळें । त्रैलोक्य जिंतीत चालिला सकळें । तें देखोनि द्विजदेवकुळें । अत्यंत भय पावलीं ॥ ५ ॥ तदनंतरें श्रीरघुपती । देव आणिक योनी प्रवेशती । ते कोण कोण जन्म धरिती । तें श्लोकार्थी सांगेन ॥ ६ ॥

इंद्रो मयूरः संवृत्तो धर्मराजस्तु वायसः ।
कृकलासो धनाध्यक्षो हंसो वै वरुणोऽभवत् ॥ १ ॥

शचीपति[1] झाला मयूर । धर्मराजें[3] वायसशरीर[4] । कृकलास होवोनि कुबेर । हंसरूप वरुण झाला ॥ ७ ॥ राक्षसभयेंकरून । देवीं वेष पालटोन । भयेंकरीं राहिले लपोन । तंव रावण काय करी ॥ ८ ॥ रावण म्हणे रायासी । तूं युद्ध करीं आम्हांसीं । नाहीं तरी हारविलें ऐसे वचनासी । उच्चारोनि बोलिंजे ॥ ९ ॥ देखोनि रावणाची स्थिती । मग तो मरुत्त भूपती । तूं कोण म्हणोनि रावणाप्रती । अट्टहासें पुसता जाहला ॥ १० ॥ तूं कोणाचा कोठील कोण । येथें यावया काय कारण । आम्हांसीं वांछितोसी रण । तेणें संतुष्ट मन झालें ॥ ११ ॥ मरुत्ताचें गंभीर वचन । ऐकोनि संतोषला रावण । म्हणे तुवां केलें गिरागर्जन । आनंदें मन उल्लासे ॥ १२ ॥ राया मी झालों सुप्रसन्न । मज कोण म्हणसी तरी ऐक सावधान । माझा ज्येष्ठ बंधु वैश्रवण । नाम रावण प्रसिद्ध माझें ॥ १३ ॥ माझेनि धाकें जाण । सुरासुर कंपायमान । देव दांतीं धरिती तृण । मानी कोण मजपुढें ॥ १४ ॥ आपुलेनि सामर्थ्यैंकरून । म्यां रणीं जिंतिला वैश्रवण । घेवोनि पुष्पक हिरोन । विराजमान विचरतसें ॥ १५ ॥ ऐकोनि रावणाचें वचन । मग तो मरुत्त इक्ष्वाकुनंदन[6] । रावणाप्रति काय वचन । निर्भर्त्सून[7] बोलतसे ॥ १६ ॥ धन्य धन्य तूं दशानना । तुजसारिखा योद्धा या त्रिभुवना -।- माजि पाहतां बंधूतें रणा । आणिला ऐसा न देखिला ॥ १७ ॥ या त्रिभुवनामाझारीं । ज्येष्ठ बंधु [पितृयासरी[8] । त्यातें जिंतोनि संपत्ति हरी । ऐसा नाहीं देखिला ॥ १८ ॥ बंधु बंधूनें जिंतिले । ऐसें नाहीं पुराणीं ऐकिलें । तें तुवां साच केलें । रणीं पाडिलें अग्रजातें[9] ॥ १९ ॥ इतुक्या करोनि अधर्मा । पुढती श्लाघतोसी[10] अधमा । तुजपरता पापात्मा । आणिक आम्हां दिसेना ॥ २० ॥ पूर्वी योद्धे अनेक । झाले ते ऐकिले सकळिक । बंधूस जिंतिलें हें तुझेनि मुखें । आजि आपण ऐकिलें ॥ २१ ॥ इतुकें वदोनि भूपती । चाप घेतलें अति निगुतीं । बाण लाविलासे सिंतीं[11] । संग्रामाप्रती निघाला ॥ २२ ॥ मरुत्त जातां संग्रामासी । संवर्त बोले मरुत्तासी । म्हणे राया रणभूमीसीं । अधिकार नाहीं जावया ॥ २३ ॥ धर्मकार्य अवलंबून । त्यासी सांडोनि करिसी रण । तरी सर्वथा नसे जयो जाण । सत्य वचन हें माझें ॥ २४ ॥ घरीं माहेश्वरयज्ञ । अवलंबिल्या करावा पूर्ण । पूर्णाहुति न होतां निंद्य रण । ऐसें जाणोन नवजावें ॥ २५ ॥ यज्ञीं न होतां पूर्णाहुती । सांडोनि गृहस्थ विमुख होती ।

---

१ पापविमुक्त. २ इंद्र. ३ यमराज. ४ कावळा. ५ सरडा. ६ इक्ष्वाकुपुत्र. ७ निंदून. ८ पितृतुल्य.

९ वडील बंधूला. १० प्रौढी मिरवितोस. ११ दोरीवर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

तयांच्या वंशा होय शांती । जाण नृपती मरुत्ता ॥ २६ ॥

दीक्षितस्य कुतो युद्धं क्रूरत्वं दीक्षिते कुतः ।
संशयश्च रणे नित्यं राक्षसश्चैव दुर्जयः ॥ २ ॥

दीक्षितासी युद्ध कोणीकडे । दीक्षितासी क्रूरत्व कोठें घडे । दीक्षितें मन होमाकडे । निजनिर्वाडें[1] लावावें ॥ २७ ॥ दीक्षितें उठोनि प्रातःकाळीं । स्नानसंध्या सारोनि कुंडाजवळी । बैसावें मग मंत्रमेळीं । अग्नि तृप्त करावा ॥ २८ ॥ ऐकोनि गुरूचें वचन । राजा सांडी धनुष्यबाण । अग्नीपासीं येवोनि आपण । सावधान बैसला ॥ २९ ॥ तें देखोनि लंकानाथ । जिंतिलें म्हणोनि आनंदत । शुकसारणादि प्रधान समस्त । अवघे म्हणत जयो स्वामी ॥ ३० ॥ जिंतिलें म्हणोनि गर्जन । करिते झाले राक्षसगण । आपुले ठायीं श्लाघोन । उल्लास जाण पावले ॥ ३१ ॥ यज्ञीं होते ब्राह्मण । तयांतें राक्षसीं भक्षून । तेथें आनेंआन करून । तृप्त होवोन चालिले ॥ ३२ ॥ होते[3] पोते[3] उद्गाते । आचार्य ब्रह्मौ[3] भक्षिलें त्यांतें । रक्त पिवोनि खाती मांसातें । निशाचर तृप्तीतें पावले ॥ ३३ ॥ राजियातें जिंतोन । जयो पावला दशानन । मग पुष्पकीं आरूढोन । अवनिपर्यटन करिता झाला ॥ ३४ ॥ रावण गेला देखोन । इंद्रादिक देवगण । निजरूप धरिते झाले जाण । सावधान अवधारा ॥ ३५ ॥ अमरेंद्र निजरूप धरोन । मयूराप्रति बोले वचन । म्हणे मी झालों सुप्रसन्न । वरदान तुज देतों ॥ ३६ ॥ हे माझे सहस्र नेत्र । ते तुझे पांखीं भासती निश्चित । ते तुज दिधले स्वतंत्र । अगा भुजंगारे विहंगमा ॥ ३७ ॥ माझे नेत्र सहस्रवरी । तुझे बर्हे[6] होती निर्धारीं । आणि मी वर्षेन जळधारीं । तुज आनंद भारी होईल ॥ ३८ ॥ पूर्वी मयूराचे पांखं नीळवर्ण । त्यावरी इंद्राचें वरदान । नीळवर्णी विचित्र पूर्ण । रंग जाण भासला ॥ ३९ ॥ तदनंतरें श्रीरघुपति । वरुण वदे हंसाप्रति । अगा ये पक्षिराजा धर्ममूर्ति । प्रसन्न झालों मी येथें ॥ ४० ॥ वरुण म्हणे हंसासी जाण । तुझें गंगातीरीं क्रीडन । तुझें शरीर तोयासमान । अंगीं प्रभा पूर्ण भासेल ॥ ४१ ॥ ऐक माझी प्रसन्नता । पत्ररथं हंसनाथा । तुझा वर्ण मनोहर सौम्यता । शशीसारिखा निर्मळ ॥ ४२ ॥ जैसा व्योमीं समीरण । विचरतसे स्वेच्छेंकरून । तैसें तुझें उड्डाणें गगन । शोभा गहन पावेल ॥ ४३ ॥ माझिया देहासमान । प्रभा होईल तोयचरा पूर्ण । जें जें ईप्सितें तुझें मन । ते मनोरथ जाण पावसी ॥ ४४ ॥ उदका तुज अति प्रीती । होईल विहंगमा निश्चितीं । प्रीतीचें लक्षण ज्ञाते जाणती । प्रीतीनें प्रीती वाढतसे ॥ ४५ ॥ हंसा पूर्वीं श्रीरघुनाथा । पांढरा वर्ण सर्व नव्हता । पक्षीं निळा अग्रीं श्वेतता । कटिबंधअग्र पांढरें ॥ ४६ ॥ मुनि म्हणे श्रीरघुनाथा । ऐक श्रावणारिसुता । वैश्रवण कृकलास वर देतां । प्रत्युत्तरीं पैं वदला ॥ ४७ ॥ कुबेर म्हणे कृकलासाप्रती । प्रसन्न झालों जाण निश्चितीं । तुझें शरीर सुवर्णकांती । मी संतोषोन तुज देतों ॥ ४८ ॥ आणिक कृकलासा ऐक । तुझे मस्तकीं शिखा देख । होईल जाण निःशेख । किंचित श्यामता शरीरीं ॥ ४९ ॥ तदनंतरें धरणिजापती । यमराज हर्षानंदें चित्तीं । कागांप्रति वदे वरदोक्ती । सुनिश्चितीं अवधारा ॥ ५० ॥ यम म्हणे कागासी । तुज मी प्रसन्न निश्चयेंसीं । प्रीतीनें ऐक माझिया वचनासी । सावधान होवोनी ॥ ५१ ॥ दशाहाचा[11] पिंड जाण । जे नर देती तुजलागोन । तयांसी होय स्वर्गगमन । अन्यथा जाण पैं नव्हे ॥ ५२ ॥ जे नर मरण पावती । त्यांचे दहा दिवसांचे अंतीं । बळिप्रदान तुज देती । ते पावती स्वर्गासी ॥ ५३ ॥ आणिक तुज वरदान । देतों मी धर्मराज आपण । तुज होईल अमरपण । अमरत्वाचें लक्षण अवधारीं ॥ ५४ ॥ शरीरीं पीडा उपजोन । अनेक मरती प्राणिजन । तैसें तुज नाहीं जाण । देहआरोग्य सदा तुझें ॥ ५५ ॥ परहस्तें तुज मरण । होईल हें सत्य जाण । स्वइच्छेनें तुज मरण । नाहीं जाण पक्षिराजा ॥ ५६ ॥

एवं दत्वा वरांस्तेभ्यस्तस्मिन्यज्ञाश्रमे सुराः ।
निवृत्ते यज्ञसमये पुनः स्वविषयं गताः ॥ ३ ॥

१ निश्चयपूर्वक. २ अनन्वित कृत्य. ३ ऋत्विजविशेष. ४ मयूरा. ५ पिसारा. ६ पंख. ७ हे पक्ष्या. ८ इच्छितें. ९ पक्ष्या. १० कावळ्याला. ११ दहाव्या दिवसाचा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

ऐसे वर देवोनि तयांतें। यज्ञाश्रमीं सुर जे होते। यज्ञसमाप्ति करोनि स्वकार्यतें। जाते झाले देवगण ॥ ५७ ॥ ते म्हणाल कोण कोण। तयांचीं नांवें मी सांगेन। इंद्र यम कुबेर वरुण। हे मुख्य जाण चवघेही ॥ ५८ ॥ रावणाच्या भयेंकरीं। रूपें पालटलीं होतीं सुरीं। तीं निजरूपें धरोनि निर्धारीं। आपुलालिया लोका पैं गेले ॥ ५९ ॥ एका जनार्दना शरण। मी नेणें मूळींचें निरूपण। नेणें श्लोक पद अन्वय जाण। शास्त्रव्याख्यान मी नेणें ॥ ६० ॥ मी नेणें कळाकुसरी। मी नेणें साहित्याची भरोभरी। नेणें सुगंधचातुरी। एका जनार्दनावांचूनी ॥ ६१ ॥ नेणें श्लोकींचा श्लोकार्थ। नेणें नवरस कासिया म्हणत। नेणें प्रबंधरचना येथ। एका जनार्दनावांचूनी ॥ ६२ ॥ मी संतांचें लळिवाड[1]। संत माझें पुरविती कोडें[2]। संतांवांचूनि भवें[3] अवघड। कोणाचेनि न निवारे ॥ ६३ ॥ एका जनार्दना शरण। पुढें गोड निरूपण। पृथ्वीजयो पावेल दशानन। श्रोतीं सावधान ऐकिजे ॥ ६४ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां मरुत्तयज्ञगमनं नाम अष्टादशोऽध्यायः ॥ १८ ॥ ॥ ओव्या ॥ ६४ ॥ ॥ श्लोक ॥ ३ ॥

अध्याय एकोणिसावा

॥ श्रीआत्मारामाय नमः ॥ मागील प्रसंग संपतेअंतीं। मरुत्तातें जिंकोनि लंकापती। पुढें येतां अनेक भूपती। पृथ्वीवरी जिंतीत ॥ १ ॥ दुष्टात्मा तो रावण। जिंतीत निघाला आपण। इंद्रासारिखी जयांची आंगवर्णे। तयां रायांप्रती येता झाला ॥ २ ॥ रावण क्रोधें म्हणे तयांसी। मी मागतों संग्रामासी। जरी बळ असेल तुम्हांसी। तरी युद्धासी पैं यावें ॥ ३ ॥ नाहीं तरी पराभविलें म्हणोन। वदावें मजप्रति वचन। वृथा बोलाल तरी झणें। सुटका नाहीं तुम्हांसी ॥ ४ ॥ लंकेश्वराचें ऐकोनि वचन। राजे मनांत जाणोन। म्हणती यासी सदाशिव प्रसन्न। दिधलें वरदान जिंतवे ना ॥ ५ ॥ ऐसा करोनि विचार। मग बोलते झाले नृपवर। ते कोण कोण तरी साचार। श्रोतीं सादर परिसावें ॥ ६ ॥ नामें सांगतां अपार। कथा वाढेल विस्तार। म्हणोनि संकळितें नृपवर। ऐका सादर सांगेन ॥ ७ ॥ दुष्कृत आणि सुरथ। तिसरा गाधी चवथा जय तेथ। पांचवा पुरूरवा निश्चित। इतुके रघुनाथा बोलते झाले ॥ ८ ॥ हे सर्वही मिळोन। रावणाप्रति मधुर वचन। म्हणती आम्ही अशक्त दीन। तुजसमान नाहीं योद्धा ॥ ९ ॥ ऐकोनि तयांच्या वचनासी। रावण संतोषोनि मानसीं। म्हणे आपणासमान पृथ्वीसीं। योद्धा नाहीं निश्चित ॥ १० ॥ ऐसें जाणोनि दशानन। पुष्पकीं आरूढोनि पर्यटन। करिता झाला तंव अयोध्याभवन। दूरोनियां देखिलें ॥ ११ ॥ सुवर्णकळसांचिया हारी। तेणें शोभली अयोध्यानगरी। रत्नदीप घरोघरीं। उत्तम मध्यम पुरुषांचे ॥ १२ ॥ अयोध्येमाजी घरें। तिखणी पांचखणी निर्धारें। दुखणी सहस्र प्रकारें। पाहतां पाहतां नयनीं दिसेना ॥ १३ ॥ हाटवँटिया चौवारें। तोरणें नवरत्नांचीं मंदिरें। दोहीं भागीं चांदवे विचित्राकारें। नाना चित्रें त्यांमाजी ॥ १४ ॥ घरोघरीं वेदपठन। ब्राह्मण करिती अग्निहोत्र यज्ञ। कोणासी नाहीं दुःखदैन्य। स्वानंदें पूर्ण विचरती ॥ १५ ॥ ऐसिये अयोध्येप्रती। देखता झाला लंकापती। वनश्री जैसी इंद्राची अमरावती। त्याहूनि अधिक गती इयेची ॥ १६ ॥ ऐसिये अयोध्येप्रती जाण। राज्य करी पुरुष[10]पंचानन। बळें शक्रें[11] किंचित न्यून। त्याहूनियां अधिक पैं ॥ १७ ॥ याचें नाम अवधारिजे। यासी अनरण्य बोलिजे। तयाप्रति येवोनि विंशतिभुजें[12]। संग्रामातें मागितलें ॥ १८ ॥ तो सूर्यवंशी भूपती। अति उदार अगाधकीर्ती। तयातें म्हणे लंकापती। संग्रामातें मज दीजे ॥ १९ ॥ ऐकोनि रावणाचें वचन। राजा झाला क्रोधायमान। म्हणे रावणा स्थिर मजसीं रण। करावया तूं अशक्त ॥ २० ॥ तथापि संग्रामाच्या ठायीं। आम्ही तुम्ही भिडूं उसण्याघायीं। म्हणोनि राजा सैनिकां पाहीं। आज्ञापिता पैं झाला ॥ २१ ॥ सैन्य पाळोणा[13] रे पालाणा। करा वेगीं सिद्ध

---

१ लाडकें. २ मनोरथ. ३ संसार. ४ पराक्रम. ५ थोडक्यांत. ६ रांगा. ७ बाजार. ८ छतें. ९ गरीबी. १० नरश्रेष्ठ. ११ इंद्र. १२ रावणानें. १३ सज्ज करा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सेना। रथ कुंजर अश्व जाणा। क्षणामाजी सजिले ॥ २२ ॥ गजदळातें नाहीं मिती। घोडे कोण जाणे किती। रथांची संख्या अयुतायुतीं। केली निगुती नवजाय ॥ २३ ॥ सैन्य न माय भूमंडळीं। वीर सिंहनादें करिती आरोळी। ऐसे येते झाले रणभूतळीं। ते रावणें देखिले ॥ २४ ॥ अमित सैन्यातें देखिलें। रावणें बाण सोडिले। एक एक मारिले। कोण उरले पैं नाहीं ॥ २५ ॥ जैसें वैश्वानर मुखीं। पडिलें तें सर्वेही भक्षी। तैसें अनरण्यसैन्य रावणमुखीं। बाणीं निःशेष निवटिलें ॥ २६ ॥ जैशा नद्या समुद्राप्रती। मिळालिया समुद्र होती। तैसें सैन्य रावणाचे हातीं। सांपडलें तें भंगलें ॥ २७ ॥ सैन्य भंगलें देखोन। अनरण्य कोपायमान। रागें धनुष्या वाहिला गुण। शरसंधान तेणें केलें ॥ २८ ॥ रावणमस्तकावरी बाण। पडतां नव्हेचि पैं भग्न। जैसा पर्वतीं वर्षे पर्जन्य। तैसें संधान पैं झालें ॥ २९ ॥ रावणातें न रुपती शर। छिन्न भिन्न नव्हे शरीर। देखोनि अनरण्य चिंतातुर। म्हणे वरदबळ यासी भय नाहीं ॥ ३० ॥ तदनंतरें श्रीरघुपती। सावधान करोनि वृत्ती। पुढें काय वर्तलें तुजप्रती। यथानिगुतीं सांगतसें ॥ ३१ ॥ मग तो राक्षस लंकापती। अनरण्यातें लक्षोनि निगुतीं। चडकणां[१] हाणोनियां क्षितीं-[३]। -वरी पाडिला लोळत ॥ ३२ ॥ अनरण्य राजा पडिला मेदिनीं। विकळअंग कंपायमान होउनी। जैसा अग्निदग्ध साळ वनीं। उन्मळोनि पडे तैसा ॥ ३३ ॥ पडिला ऐकोनि अनरण्य भूपती। हांसोनि लंकेश तयाप्रती। म्हणे तुज काय झाली प्राप्ती। मजसीं युद्ध करितां राया ॥ ३४ ॥ स्वर्ग मृत्यु पाताळीं। युद्ध करी मजसीं ऐसा नाहीं बळी। राया विषयभोगें जीं लुब्धलीं। नेणती माझा पराक्रम ॥ ३५ ॥ रावणाचें ऐकोनि वचन। बोलता झाला अनरण्य। म्हणे राक्षसा मज कोण अशक्यपण। तुजसीं संग्राम पैं करितां ॥ ३६ ॥ परी हा काल विपरीत। तुज यश मज अपेश प्रात। मज काळें जिंतिलें येथ। तूं निमित्त-मात्र झालासी ॥ ३७ ॥ मजसारिखे राजे रणीं। तुवां जिंतिले रणमेदिनीं। काळसाह्याची ऐसी करणी। काळाधीन प्राणी पैं असे ॥ ३८ ॥ काळपाशीं त्रिजगती। बांधिली लंकेशा निश्चितीं। हरि हर ब्रह्मा आणि सुरपती[४]। ते प्रारब्धें वर्तती राक्षसा ॥ ३९ ॥ हरि वृंदेच्या श्मशानीं। बैसता झाला तीलागूनी। सदाशिव जो शूळपाणी। त्याची करणी अवधारीं ॥ ४० ॥ मोहिनीनें मोहिला। लाज सांडोनि पाठीं लागला। सर्वेचि वीर्यतें द्रवला। मोहिनीरूप देखोनि ॥ ४१ ॥ महेशासी लिंगपतन[५]। इंद्र भगांकित होऊन। चंद्रातें लांछन झालें जाण। गुरुतल्पगाचें[६] ॥ ४२ ॥ प्रारब्ध विधात्याचें गाढें। जन सृजी कोण्या चाडे। पडिलासे तो घडामोडे। थोर कष्ट पावत ॥ ४३ ॥ जैसें कुलाल[८] चक्रावरी। एक मोडी एक नवें करी। थापटोनि आकारीं। बरव्यापरी आणीतसे ॥ ४४ ॥ यालागीं जन प्रारब्धाधीन। प्रारब्ध बळवंत पूर्ण। तयातें घालितों लोटांगण। जेणें व्यसन पावलों ॥ ४५ ॥ आतां रावणा अवधारीं। जरी म्यां आराधिला असेल हरी। भगवद्भावें द्विज जरी। पूजोनि भोजन दिधलें असेल ॥ ४६ ॥ वापी कूप आराम। श्रीहरिप्रीत्यर्थ दानहोम। जरी केला असेल तरी पुरुषोत्तम। माझें वाक्य सत्य करो ॥ ४७ ॥ प्रजापालन बरव्यापरी। गाई-ब्राह्मणां दया भारी। केली असेल तरी श्रीहरी। माझिये वंशीं जन्मेल ॥ ४८ ॥ श्रीगुरु तो परब्रह्म। ऐसा म्यां केला असेल नेम। तरी माझे वंशीं पुरुषोत्तम। आत्माराम अवतरेल ॥ ४९ ॥ म्हण-वील इक्ष्वाकुनंदन। तो लंकेशा तुझ्या वधार्थ जाण। अवतरेल श्रीजनार्दन। अयोनिज पूर्ण राघव ॥ ५० ॥ चरणीं उद्धरील शिळा। पर्णील[९] जनकाची बाळा। सोडवील देवां सकळां। तुज वधोनि रावणा ॥ ५१ ॥ ऐसें रावणा शापिलें। ऐकोनि स्वर्गीं देव आनंदले। दुंदुभिवाद्यें वाज-विते झाले। देव पुष्पें वर्षती ॥ ५२ ॥ तदनंतरें तो नृपती। देह त्यागोनि स्वर्गाप्रती। जाता झाला मग लंकापती। तेथोनि पुढती निघाला ॥ ५३ ॥ एका जनार्दना शरण। रावणा अर्जुना

१ दोरी. २ थप्पड. ३ भूमीवर. ४ देवराज इंद्र. ५ वीर्यपतन. ६ गुरुपत्नीगमनाचें. ७ उत्पन्न करी.

८ कुंभार. ९ वरील, पाणिग्रहण करील.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

युद्ध दारुण । तेचि कथा परम पावन । सावधान अवधारिजे ॥ ५४ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां अनरण्यनृपस्वर्गगमनं नाम एकोनविंशतितमोऽध्यायः ॥ १९ ॥ ओंव्या ॥ ५४ ॥

अध्याय विसावा

॥ श्रीरघुपतये नमः ॥ तदनंतरें श्रावणारिनंदन[1] । अगस्तीप्रति कर जोडून । म्हणता झाला स्वामीनें निरूपण । रावणाचें सांगितलें ॥ १ ॥ दशानन विचरत क्षितीं[2] । पृथ्वीचे भूप शरण येती । तयांतें जिंकोनि लंकापती । पुढारां चाले जिंतीत ॥ २ ॥ ऐसें जिंतिलें भूमंडळ । राजे जिंतिले ज्यांचा पराक्रम प्रबळ । ऐसा दशानन अति सबळ । कोठें नाहीं पराभविला ॥ ३ ॥ निर्वीर होती तैं सृष्टी । ऐसें गमतें माझे पोटीं । यदर्थी[3] आशंका थोर मोठी । माझे जीवीं वाटतसे ॥ ४ ॥ बलाढ्य राजे अवनीं नव्हते । ऐसें वाटतें माझेनि मतें । तैं पाशुपतादिक होतीं शस्त्रें । त्यांचें कांहीं न चलेचि ॥ ५ ॥ ऐसें श्रीरामाचें वचन । ऐकोनियां हास्यवदन । बोलता झाला तूं ब्रह्म पूर्ण । जाणोनि प्रश्न आम्हां करिसी ॥ ६ ॥ तूं ये सृष्टीचा कर्ता । तुझा कुमर हा विधाता[4] । मायेसी तुझेनि प्रबळता[5] । त्रैलोक्यातें मोहावया ॥ ७ ॥ तूं ईश्वराचा ईश्वर । तुझा योगियां न कळे पार । तूं स्वलीलेनें हा अवतार । घेतला कार्याकारणें[6] ॥ ८ ॥ तो तूं श्रीरामा आम्हांप्रती । कथा पुससी अति निगुतीं[8] । हें आश्चर्य वाटे आमुचे चित्तीं । कृपामूर्ति कृपाळुवा ॥ ९ ॥ आमुचा वाढवोनियां मान । आम्हांसी देतोसी भूषण । तरी तुझिये कृपेनें जाण । पुढील निरूपण सांगतसें ॥ १० ॥ जिंतोनि चालिला विचरावणें अनरण्य भूपती । जिंतोनि चालिला विचरत क्षितीं । तदनंतरें श्रीरामा नगरी माहिष्मती । अपूर्व पुढें देखिली ॥ ११ ॥ माहिष्मतीनामें नगरी । तिची सरी न पवे स्वर्गपुरी । तोरणें पताका घरोघरीं । अति साजिरीं अनुपम्य ॥ १२ ॥ तिये नगरीसमीप । येवोनि पौलस्तिकुळदीप । सवें प्रधान ज्यांचा अगणित प्रताप । ऐसे तेथें येते झाले ॥ १३ ॥ रावणें पृथ्वीपति जिंतिले । थोर थोर भूपां दुःख दिधलें । ऐसें करितां पुढें देखिलें । नगर राया अर्जुनाचें ॥ १४ ॥ तया नगरीचा भूपती । प्रतापतेजें अद्भुतकीर्ती । अग्नीसारिखी दिसे दीप्ती । नामें अर्जुन विख्यात ॥ १५ ॥ तो सहस्रार्जुन ते दिवशीं । स्त्रियांसहित नर्मदेसी । गेला असतां जळक्रीडेसी । मागें रावण पैं आला ॥ १६ ॥ सवें प्रधान थोर थोर । ऐसा आला दशशिर । अर्जुनाच्या प्रधानांसी उत्तर । बोलता झाला रावण ॥ १७ ॥ अगा ये मंत्री हो तुमचा नृपती । कोठें आहे तो सांगा निश्चितीं । मी आलों असें त्यासीं युद्धार्थी[7] । वेगीं भूपती पाचारा ॥ १८ ॥ मी लंकेश दशानन । आलों रायासीं युद्धालागून । सांगा तयाप्रति त्वरेंकरून । युद्धा रावण पाचारी ॥ १९ ॥ ऐकोनि राक्षसाचें वचन । प्रधान झाले कंपायमान । म्हणती राक्षसाधिपा जाण । राजा नाहीं नगरीमध्यें ॥ २० ॥ ऐकोनि नगरवासियांची मात । पुढें चालिला लंकानाथ । तंव देखिला विंध्यपर्वत । अति उन्नत गगनोपम ॥ २१ ॥ सहस्र शिखरें पर्वतासी । सिंह शार्दूळ[9] तया वनप्रदेशीं । सरितातोय[10] गर्जे खळाळेंसीं । तेणें नादें अंबर गर्जे ॥ २२ ॥ देव दानव गंधर्व । किन्नर अप्सरा मानव । आणि ऋषींचे समुदाव । आनंदें स्वयमेव क्रीडा करिती ॥ २३ ॥ जैसे देव अमरावती । संतोषें क्रीडा करिती । तैसे त्या विंध्यपर्वतीं । आनंदें वसती सुर सिद्ध ॥ २४ ॥ उल्कावंत दरीवंत । हिमवंतासमान तो पर्वत । देखोनियां लंकानाथ । नर्मदातीराप्रति आला ॥ २५ ॥ तया पर्वताचे शिरीं । नर्मदा नांवें नदी निर्धारीं । जिचेनि दर्शनें पातका उरी[11] । नुरे ऐसा जिचा महिमा ॥ २६ ॥ तिये नर्मदेच्या दक्षिणभागीं सागर । जो सकळ नद्यांचा ईश्वर । तयाप्रति ते चतुर । हर्षें निर्भर मीनली पैं ॥ २७ ॥ तिये रेवेचिया तीरीं । श्वापदें पक्षी नानापरी । वसती तेणें साजिरी । वनस्थळी शोभत ॥ २८ ॥ रानगाई सिंह शार्दूळ । उन्मत्त गज विशाळ । म्हैसे उष्ट्र[12] व्याघ्र सायाळ । प्राशावया जळ वास तीरीं ॥ २९ ॥ मृगमृगींचे थवे ।

---

१ दशरथाचा पुत्र राम. २ पृथ्वीवर. ३ ज्यासंबंधीं. ४ ब्रह्मदेव. ५ तुलना. ६ युद्धाकरितां. ७ राक्षसराजा. ८ हकीकत. ९ वाघ. १० नद्यांचें उदक. ११ ठाव, ठिकाण. १२ उंट.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

चितळे इत्यादिक सेवोनि रेवे । आणिक श्वापदें तीर बरवें । वनफळें सेवोनि वसताती ॥ ३० ॥ चक्रवाकें हंस अनेक । जळकुक्कुट सारसमयूरादिक । कोकिळा कूजती तेणें तटाक । अति रमणीय शोभलें ॥ ३१ ॥ नानापरींच्या वृक्षयाती । अनेक प्रकारच्या कुसुमजाती । भ्रमरसंघ रुणझुण करिती । पांथिकां विश्रांती व्हावया ॥ ३२ ॥ शनैः शनैः मलयानिळ । तेणें मार्गस्थां सुखकल्लोळ । घालिती आनंदाचा गोंधळ । सुखी सकळ म्हणोनी ॥ ३३ ॥ तदनंतरें तिये तीरीं । नर्मदा अक्षोभ अमूप[१] वारी । शोभती झाली ते अवधारीं । श्रीरामचंद्रा दयाळुवा ॥ ३४ ॥ कुमुदें[२] विकासलीं सुमनीं । तेचि माथां शोभे वेणी । चक्रवाकें कुच दोनी । वनिता म्हणोनी वर्णिजे ॥ ३५ ॥ विस्तीर्ण वाळुवंट सुंदर । तोचि माज[३] सुकुमार । हंसावळी मेखळा साचार । लहरी तें मुक्ताफळ शोभे नाकीं ॥ ३६ ॥ पुष्पें तीरींचीं ते चंदनउटी । कुमुदें तेचि शोभे धटी । जळप्रवाह त्वचा गोमटी । उत्पल जें तेंचि नयन ॥ ३७ ॥ तीर अत्यंत विशाळ । माजि मीन मग[४]रांचा उल्हाळ । तेचि गळां मुक्तामाळ । सुंदर वेल्हाळ शोभली ॥ ३८ ॥ ऐसें देखोनि नर्मदारत्न । पुष्पकींहूनि उतरला दशानन । करावया अवगाहन । तिये ठायीं ते काळीं ॥ ३९ ॥ त्या नर्मदेच्या रम्यतीरीं । रम्य पुष्पवाटिका साजिरी । मंत्रियांसहित वैश्र[५]वणारी । सुखें तेथें बैसला ॥ ४० ॥ उदक भरोनि हेमपात्रीं[६] । करचरण प्रक्षाळी भूपती । आचमन करोनि मस्तकीं गात्रीं । शिंपी पुण्यतोय म्हणोनी ॥ ४१ ॥ लाहोनि नर्मदादर्शन । संतोषला दशानन । शुकसारणांप्रति मधुर वचन । बोलता झाला ते काळीं ॥ ४२ ॥ रावण म्हणे सुरारि हो । ज्याचा अरि केतुराहो । तो मध्यान्हीं आला पहा हो । मद्भयें शीतळ किरणें केलीं ॥ ४३ ॥ ज्याचे सहस्र रश्मीं[७]करून । जग धवळिलें दिसे कांचन । तीक्ष्ण उष्णें तपतसे भान । मध्यान्हकाळीं विश्व[८] पीडी ॥ ४४ ॥ तो सूर्य माझेनि भयेंसीं । शशीसारिखे[९] शीतळतेसीं । तपता झाला आजिच्या दिवसीं । त्यावरी नर्मदासुगंधोदकें ॥ ४५ ॥ श्रमहरितां[१०] अनिळु[११] । तोही वाहतो हळुहळु । विशेष हें नर्मदाजळु । मद्भयें शीतळु पैं झालें ॥ ४६ ॥ जैसी योषितें[१२] लावण्यकरीं । अवयव आच्छादी सलज्ज भारी । तैसी ही नर्मदा नारी । मीन लहरीनें झांकीतसे ॥ ४७ ॥ रावण म्हणे मंत्रियांप्रती । वैरियांचे शस्त्रास्त्रीं । रुधिरोक्षित[१३] सर्व गात्रीं । रायांसीं युद्ध करितां हो ॥ ४८ ॥ जैसें अहिप्रियें[१४]लेपन । सर्वांगीं लाविती सभाग्य जन । तैसी तुमची वपु शोणितेंकरून । अत्यंत आरक्त पैं झाली ॥ ४९ ॥ ते तुम्ही सर्व प्रधान । करा नर्मदेचें स्नान । तेणें व्हाल पुण्यपावन । दोष दारुण नासती ॥ ५० ॥ जैसी दंडकारण्यीं गोदावरी । प्राणिमात्रांतें पुनीत करी । तैसी ही नर्मदा स्नानानें उद्धरी । तापत्रयापासूनी ॥ ५१ ॥ पाहतां गंगा भरतखंडीं । प्राणियांच्या दोषां दंडी । तैसे तुम्ही मुंडमुंडी । मज्जनें पापावेगळें होइजे ॥ ५२ ॥ आणीक तुम्ही सकळ जन । पुष्पें आणा रे संपूर्ण । येथें पूजूं उमारमण[१५] । सुख संपन्न भोगावया ॥ ५३ ॥ प्रेमसिंधु गिरिजापती । पूजिलिया होय भुक्ति मुक्ती । तयाचे पूजेलागीं पुष्पयाती । आणावी तुम्हीं सकळिकीं ॥ ५४ ॥ ऐकोनि रावणाचें वचन । समस्त प्रधान मिळोन । ते कोण कोण म्हणाल नामाभिधान । सावधान अवधारीं ॥ ५५ ॥ शुक सारण महोदर । धूम्राक्ष प्रहस्त अकंपन वीर । आणीकही थोर थोर । अनेक नामें तयांचीं ॥ ५६ ॥ उतरोनि नदीभीतरीं । स्नान करितां महावीरीं । उदक चढे दोहीं तीरीं । पूर आल्यासारिखें ॥ ५७ ॥ उन्मत्त गज रिघोनि जळीं । बुडे फिरे दे आरोळी । तैसे राक्षस मिळोनि सकळीं । जळक्रीडा पैं केली ॥ ५८ ॥ समस्त राक्षस मिळोन । करिते झाले नर्मदास्नान । सर्वेचि नाना जातींचीं पुष्पें तोडून । अचळें[१६] केला तयांचा ॥ ५९ ॥ पुष्पें देखोनियां दृष्टीं । रावणा हर्ष न माये पोटीं । स्नान करोनि उठाउठीं । विध्युक्त संध्या सारिली ॥ ६० ॥ पितृतर्पण ब्रह्मयज्ञ । जप होम अनुष्ठान । तदनंतर हात जोडून । प्रधानां म्हणे गायन करा ॥ ६१ ॥ रावणाची ऐकोनि विनंती । प्रधान सुस्वरें गायन करिती । एक टाळ

१ पुष्कळ. २ कमळिणी. ३ कमर. ४ सुसरींचा. ५ रावण. ६ सोन्याचे पात्रांत. ७ किरणांनीं, ८ पृथ्वी, ९ चंद्रासारख्या. १० श्रम हरण करणारा. ११ वारा. १२ स्त्री. १३ रक्तबंबाळ, १४ चंदनाची उटी, १५ शंकर, १६ पर्वत,

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

मृदंग वाहती । एक धरिती सुरातें ॥ ६२ ॥ एक नृत्य पैं करीत । एक थैथैकार दावीत । एक वीणा वाजवीत । एक आळवीत उपराग ॥ ६३ ॥ जेथें नामाचा उच्चार । तेथें सदाशिव निरंतर । ऐसें जाणोनि राक्षसेश्वर । पूजा करावया बैसला ॥ ६४ ॥ सुवर्णमय रत्नजडित । शिवलिंगातें वागवीत । पृथ्वी विचरतां लंकानाथ । असे सतत लिंग सेवें ॥ ६५ ॥ तया नर्मदेचिया तीरीं । शिवपूजेचा आरंभ करी । बिल्वदळांचिया राशि थोरी । पूजेलागीं आणिल्या ॥ ६६ ॥ कुसुमांचा झाला पर्वत । सुवर्णपात्रीं पंचामृत । मधाच्या कावडी भरोनि तेथ । संख्येरहित जळकुंभ ॥ ६७ ॥ क्षीरकुंभां नाहीं मिती । धूप दीप पंचारती । नानापरींच्या आरत्या नेणों किती । वाद्यें वाजती विचित्र ॥ ६८ ॥ श्वेत पीत आरक्त । नानापरींचीं वस्त्रें पूजार्थ । नामें शिवाचीं अष्टोत्तरशत । घेता झाला रावण ॥ ६९ ॥ अभिषेकपात्र धरोनि करीं । स्तवन करिता झाला सुरारी[१] । पंचामृत घालोनि वरी । पूर्णाभिषेक पैं केला ॥ ७० ॥ तदनंतर लंकापती । वस्त्रें अर्पोन शीघ्रगती । वाळुवंटींच्या वेदिकेप्रती । लिंगस्थापना पैं केली ॥ ७१ ॥ भोळा पार्वतीरमण[३] । झालासे भक्ताधीन । जो मनोभावें करील पूजन । त्यासी सर्वस्व देतसे ॥ ७२ ॥ जे अर्चिती महेशातें[३] । ते पावती सकळ कल्याणातें । जे अवगणितील[४] शिवातें । मृत्यु त्यांतें सोडीना ॥ ७३ ॥ ज्ञानी पंडित बुध जन । विधियुक्त करिती कर्माचरण । रावण महामूढधी जाण । विधिविधान पैं नेणे ॥ ७४ ॥ वाळुवंटींच्या ओट्यावरी । तेथें स्थापिला त्रिपुरारी[५] । करीं घेवोनि सर्व सामग्री । सदाशिवासी वाहिली ॥ ७५ ॥ तदनंतर दशशिर । पूजोनियां चंद्रशेखर[६] । मग साष्टांगीं नमस्कार । भुजा पसरोनि घातला ॥ ७६ ॥ पुढिले प्रसंगीं श्रीरघुपती । रावणा अर्जुना युद्धप्राप्ती । होईल ते कथा सावध श्रोतीं । श्रवणद्वारें ऐकिजे ॥७७॥ एका जनार्दना शरण । रावणा सहस्रार्जुना युद्ध दारुण । बोलिला वाल्मीकि ऋषि सुजाण । सावधान अवधारिजे ॥ ७८ ॥ स्वस्ति श्रीभावार्थ-रामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां रावण-रेवातीरगमनं नाम विंशतितमोऽध्यायः ॥ २० ॥ ओंव्या ॥ ७८ ॥

अध्याय एकविसावा

॥ श्रीवक्रतुंडाय नमः ॥ रम्य नर्मदेचिया तीरीं । राक्षसेंद्र पंचद्वयशिरी । पुष्पोपहारें अर्चितां त्रिपुरारी । काय तेथें वर्तलें ॥ १ ॥ येरीकडे सहस्रार्जुन भूपाळ । माहिष्मतीचा नृपशार्दूळ[६] । श्रीरेवेमाजी स्त्रियांसहित केवळ । क्रीडा जळीं करीत होता ॥ २ ॥ स्त्रियांसहित अर्जुन । क्रीडतसे आनंदें पूर्ण । सहस्रहस्तिनींसीं एकला जाण । ऐरावती खेळे जैसा ॥ ३ ॥ जाणावया भुजबळाची थोरी । स्वभुजा पसरोनि भीतरीं । अवरोधूनि रेवा तीरीं । स्तब्धता झाली ते काळीं ॥ ४ ॥ सहस्रबाहूंच्या बळीं । नर्मदारोधन झालें ते काळीं । समुद्रासारिखी वाढली । चढती झाली उदकेंसीं ॥ ५ ॥ देखोनियां आत्मजातें[७] । उदधीसी दाटे भरितें । जाणोनि अर्जुनाचे विक्रमातें[८] । नर्मदा तेथें वाढली ॥ ६ ॥ कार्तवीर्यभुजींकरोन । सेतूसारिखें दिसे जीवन[९] । अवलोकितां दिशांचें भान । अणुप्रमाण लक्षेना ॥ ७ ॥ वैश्रवणारि पूजा करीत होता । तयासी वाटली अपूर्वता । म्हणे अवकाळीं सरिता । पर्जन्य नसतां दाटली ॥ ८ ॥ होते पूजेचे संभार । वाहों लागले दाटलें नीर[९] । तेणें गजबजिला लंकेश्वर । म्हणे विघ्न थोर ओढवलें ॥ ९ ॥ मीन नक्र मगर दुर्धर । आणीकही जळचरें अपार । दाटलीं तेणें दशशिर । कासावीस पैं झाला ॥ १० ॥ नाकीं तोंडीं भरलें पाणी । प्रधान गजबजिले देखोनी । म्हणती समुद्र मर्यादा टाकूनी । आजिचे दिनीं वाढला ॥ ११ ॥ विसर्जून शिवपूजेतें । नित्यनेम कैंचा तेथें । हृदयीं दाटलें भयाचें भरितें । कांहीं त्यातें सरेना ॥ १२ ॥ जेंवी रुसली योषितां[१०] पतीसी । अवरोध करी गृहकृत्यासी । तैसें झालें रावणासी । चहूंकडेसी पाहातसे ॥ १३ ॥ तंव देखे जैसा सागर । तैसें दाटलें नर्मदानीर । रावण प्रधानांप्रति सत्वर । बोलता झाला ते समयीं ॥ १४ ॥ नर्मदेचा उगम पूर्वेहून । तेथें वर्षला नाहीं घन । पाणी चढलें

---

१ बरोबर. २ देवशत्रु रावण. ३ शंकर. ४ तिरस्कार करितील. ५ पूजिता. ६ राजश्रेष्ठ. ७ पुत्राला. ८ पराक्रमाला.

९ पाणी. १० स्त्री.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

पश्चिमेकडून । काय कारण पहावें ॥ १५ ॥ ऐकोनि रावणाची गोष्टी । प्रधानीं आकाशीं उठाउठीं । अर्ध योजनें क्रमूनि सृष्टी । पुढें आश्चर्य दृष्टी देखिलें ॥ १६ ॥ कोणी एक पुरुषपंचानन । जळीं क्रीडे स्त्रियांसहवर्तमान । सहस्रभुजांचे बळें-करून । नदी तेणें अवरोधिली ॥ १७ ॥ साळईच्या वृक्षासमान । अंगकांति तैसी जाण । पर्वतमाथां शिखर पूर्ण । स्कंधावरी शिर तैसें शोभे ॥ १८ ॥ नेत्र अग्नीसारिखे आरक्त । मुखीं जिव्हा लळलळित । उदकीं सहस्र पसरोनि हात । ओघ कोंडिला भुजबळें ॥ १९ ॥ ऐसें देखोनि शुकसारण । रावणाप्रति बोलती वचन । म्हणे राया अपूर्व कथन । सांगतां आश्चर्य वाटतें ॥ २० ॥ साळ-ईच्या वृक्षासमान । कोणी एक पुरुष बळवान । पिंगट केंस आरक्त नयन । जिव्हा जाण विद्युल्ल-तासी ॥ २१ ॥ समवेत योषितांसी नाहीं मिती । त्यांसह क्रीडतो जळाप्रती । हस्तिनींमध्यें जैसा हस्ती । तैसा नृपती खेळतसे ॥ २२ ॥ सहस्र-भुजांचा भूपती । तेणें अवरोधिली नदी निश्चितीं । ऐसें ऐकोनि मंदोदरीपती । क्रोध चित्तीं उद्भवला ॥ २३ ॥ ऐकोनि प्रधानमुखींचें वचन । क्रोधें खवळला रावण । म्हणे न लागतां अर्ध क्षण । निर्दळीन अर्जुनातें ॥ २४ ॥ इतुकें बोलोनि लंका-पती । सर्वे प्रधान शस्त्रें हातीं । संग्रामोत्कंठा धरोनि चित्तीं । प्रयाणें करिती लवलाहें ॥ २५ ॥ ते समयीं अर्जुनासन्मुख । प्रयाण करी दशमुख राक्षस देते झाले हांक । जैसे मेघ गर्जत अंबरीं ॥ २६ ॥ महोदर शुक सारण । महापार्श्व धूम्राक्ष जाण । परिवेष्टित पौलस्तिनंदन । जेथ अर्जुन तेथें आले ॥ २७ ॥ अति शीघ्र तये काळीं । राक्षसेंद्र महाबळी । येता झाला अर्जुनाजवळी । जो भया-नक डोहीं क्रीडतसे ॥ २८ ॥ जिया डोहींचें शाश्वत जीवनें । श्यामवर्ण माजी मगर मीन । शोभे तीरीं रम्य वन । फळपुष्प पूर्ण तया ठायीं ॥ २९ ॥ तया डोहाभीतरीं । रावो क्रीडत परि वेष्टित नारी । गीत नृत्य नानापरी । मृदंगझल्लरी रुणझुणती ॥ ३० ॥ नरेंद्र क्रीडतां ऐशियापरी । तें देखोनि वैश्रवणारी । आरक्तनयन ते अवसरीं । बळें उन्मत्त डुल्लत ॥ ३१ ॥ ऐसा तो लंकानाथ । गंभीर वाणीनें गर्जत । कार्तवीर्याचे प्रधानां म्हणत । भय अद्भुत दावोनी ॥ ३२ ॥ प्रधान हो त्वरेंकरून । राया करा जाणवण । युद्धार्थी आलासे रावण । शीघ्र आपण पैं यावें ॥ ३३ ॥ ऐकोनि दशग्रीवाचें वचन । अर्जुनप्रधान सन्नद्ध होऊन । म्हणती रावणा अर्ध क्षण । सावधान अवधारीं ॥ ३४ ॥ दुश्चित उन्मत्त स्त्रीसीं रत । अथवा मारूं नये निद्रिस्त । ऐशियातें वधितां दोष अद्भुत । स्वर्गी क्षोभत पितृगण ॥ ३५ ॥ म्हणती वंशीं झाला दुराचारी । स्वधर्म सांडूनि अधर्म करी । तयासी विमुख त्रिपुरारी । नाना अघोरीं पडेल ॥ ३६ ॥ जंव होय सावधान । अर्जुन जळीं क्रीडतां आपण । तंववरी क्षमा करोनि मनें । धैर्य धरोन रहावें ॥ ३७ ॥ सावध होईल नृपती । मग तुमची पुरवील मनोवृत्ती । तंवपरियंत लंकापती । स्वस्थ चित्तीं राहावें ॥ ३८ ॥ रावणप्रधानीं काय केलें । रायाच्या प्रधानांसी त्रासिलें । क्षुधित होते तिंहीं कित्येक भक्षिले । कित्येक पळाले जीव घेऊनी ॥ ३९ ॥ सिंहनाद करिती निशाचर । संग्राम करिते झाले दुर्धर । बाण तोमर आणि वज्र । शूळ दुर्धर टाकिती ॥ ४० ॥ कित्येक रावणें मारिले संग्रामीं । कित्येक पळाले सांडोनि रण-भूमी । कित्येक रायापाशीं येऊनी । मात जाण-विते जाहले ॥ ४१ ॥ समुद्र सांडोनि क्षोभे वेळ । मीनमगरां प्रळयकाळ । तैसे रावणाचे प्रधान सकळ । मिळोनि दळें त्रासिलें आमुचें ॥ ४२ ॥ दूतमुखींचें ऐकोनि वचन । कार्तवीर्य कोपायमान । क्रोधें नेत्र आरक्त करून । काय वचन बोलिला ॥ ४३ ॥ कार्तवीर्य दूतांप्रती । बोले तुम्हीं न भिणें कोणे अर्थी । जळाबाहेर निघाला हस्ती । तैसा राजा चालिला ॥ ४४ ॥ क्रोधें नेत्र आरक्त करून । अग्नीसारिखा देदीप्यमान । जैसा कुंडीं हुताशन । तैसा राजा भासला ॥ ४५ ॥ धडधडित अग्नि प्रळयकाळीं । संहारी भूतसृष्टि ज्वाळामाळी । तैसा रावो तये वेळीं । थोर आवेशा पेटला ॥ ४६ ॥ वेगीं सुवर्णमय गदा घेऊन । जियेतें कांपे कां भानु । सोडिली राक्षसा निर्दळण ।

१ विजेसमान. २ रावण. ३ गमन. ४ आकाशांत. ५ पाणी. ६ मासे. ७ तयार. ८ त्रिपुरासुराचा शत्रु शंकर. ९ सैन्य. १० अग्नि. ११ सूर्य.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

करावया ते काळीं ॥ ४७ ॥ जैसें रवीच्या प्रकाशीं । अंधकारेंसीं जाय निशी । तैसें रायें राक्षसांसी । गदेकरोनि त्रासिलें ॥ ४८ ॥ होतां खगेश्वरांचें आगमन । उरगे[3] पळती धाकेंकरून । तैसें नृपनाथें राक्षससैन्य । रणांगणीं निवटिलें ॥४९॥ सहस्रार्जुनाचे गदेकरोनी । राक्षस त्रासले रणमेदिनीं । हें प्रहस्त देखोनि नयनीं । मार्ग रोधूनी राहिला ॥ ५० ॥ जैसा विंध्याद्रि वाढे अचळ । तेणें मार्गरोधें न चले भानुमंडळ । तैसें प्रहस्त घेवोनि मुसळ । पर्वतापरी उभा ठेला ॥ ५१ ॥ तदनंतरें तो भूपति जाण । गदा फिरवोनि दारुण । प्रहस्ताचे मस्तकीं न लागतां क्षण । घाव सुबद्ध हाणिला ॥ ५२ ॥ गदाघातें तत्क्षणीं । प्रहस्त पडिला रणमेदिनीं । हें देखोनि रावण मनीं । विचारी पुढें काय कीजे ॥ ५३ ॥ प्रहस्त रणसागरीं पडिला । देखोनि शुकसारणां पळ सुटला । राक्षसांचा मोड झाला । पुढील कथा अवधारा ॥ ५४ ॥ रावणें धनुष्या वाहिला मेंढा । उभा राहिला सहस्रार्जुनापुढां । कार्तवीर्य वीर गाढा । रावणासीं युद्धा मिसळला ॥ ५५ ॥ एक राक्षसेंद्र एक नृपवर । संग्राम करिती दुर्धर । जैसा प्रळयीं क्षोभे सागर । तैसे वीर मिसळले ॥ ५६ ॥ दोघे पर्वतासमान । उन्मत्त दोघे गज जाण । भिडती जयो इच्छून । सावधान पुरुषार्थी ॥ ५७॥ जैसे दोनी सूर्य आकाशीं । भिडती आपुले स्वशक्तीसीं । किंवा दोन अग्नि आपुले तेजेंसीं । एकमेकांसी भस्म करिती ॥ ५८ ॥ दोघे मेघांसारिखें करिती गर्जन । पराक्रमें दोघे सिंहचि जाण । दोघे उग्र व्याळांसमान । कार्तवीर्य रावण पैं देखा ॥ ५९ ॥ शचीसहित सुरपती । शंकरें घेवोनि पार्वती । सावित्रीसहित प्रजापती । युद्ध पाहती दोघांचें ॥ ६० ॥ गरुडपृष्ठीसीं भगवान । अर्धांगीं अब्धीचें कन्यारत्न । आणीकही सकळ देवगण । युद्ध पाहती दोघांचें ॥ ६१ ॥ यक्षगण आणि गंधर्व । विद्याधर उरग मानव । सिद्ध चारण ऋषि सर्व । युद्ध पाहती दोघांचें ॥ ६२ ॥ परस्पर गदा हाणिती । एकमेकां निखंदिती । एकमेकांसी निंदिती । समान शक्ती दोघांची ॥ ६३ ॥ एकमेकांवरी गदा टाकीत । एकमेकांतें हांसत । एकमेकांतें म्हणत । शस्त्रीं सामर्थ्य पैं नाहीं ॥ ६४ ॥ प्रळयमेघ करिती गर्जन । तयांपरी दोघे जण । हांक देती तेणें गगन । अत्यंत गर्जनें गर्जत ॥ ६५ ॥ सिंहावरी सिंह जैसे । लोटताती बळें आवेशें । तैसे नरराक्षसाधीश । करिते झाले युद्धासी ॥ ६६ ॥ काळासारिखे दोघे उग्र । नरपति आणि दशशिर । परस्परें गदामार । करिते झाले शीघ्रवत ॥ ६७ ॥ गदा मारितां एकमेकांसी । तेणें पडसाद[10] उठे आकाशीं । युद्ध करितां एकमेकांसीं । जयो कोणासी पैं नाहीं ॥ ६८ ॥ अर्जुनाची गदा सुटली । ते राक्षसा उरीं बैसली । तेणें नाहीं पावला भुली । पराक्रमी राक्षस ॥ ६९ ॥ राक्षसाच्या गदाघातें । खेद न होय अर्जुनातें । दोघे समान वीर तेथें । कोणी कोणातें गणी ना ॥ ७० ॥ पूर्वी बळी आणि सुरेंद्रातें । युद्ध झालें आवेशें बहुतें । कोण न पवेचि जयातें । विजय दोघांतें पैं नाहीं ॥ ७१ ॥ जैसे वृषभें[11] शृंगेंकरीं । भिडताती परस्परीं । गज जैसे दंतकरीं । मारिती एकमेकांतें ॥ ७२ ॥ एक राक्षस लंकेश्वर । दुजा तो हैहयाधीश वीर । युद्ध करिती घोरांदर । स्वर्गीं सुरवर पाहती ॥ ७३ ॥ तंव अर्जुनें काय केलें । हेममय गदेतें मोकलिलें । रावणाचें मस्तक भेदिलें । वरदबळें भुली न पवे ॥ ७४ ॥ वज्रापरीस कठिण भारी । लागली रावणाचे शिरीं । गदा चूर्ण होवोनि पृथ्वीवरी । पडोनि शतभग्न जाहली ॥ ७५ ॥ अर्जुनाचे गदेंकरून । किंचित विव्हळ झाला दशानन । मागें सरला धनुष्यप्रमाण[12] । तंव नृपराजें जाणीतलें ॥ ७६ ॥ सहस्रभुजांचे बळेंकरीं । अर्जुनें धरिला विबुधारी । जैसा विनतातनयो[13] आपुले वैरी । निजसामर्थ्यें कवळीतसे ॥ ७७ ॥ पंचद्वयशतभुज[14] । ऐसा तो हैहयाधिराज[15] । गळां बांधी पौलस्त्यात्मज । जेंवी बळीनें नारायण ॥ ७८ ॥ दशग्रीवा गळां बांधोन । स्वर्गीं देखोनि सुरगण । म्हणती भला भला हा अर्जुन । मंगळशब्द बोलती ॥ ७९ ॥ मग करोनि पुष्पवृष्टी । स्वर्गीं देवां आनंदकोटी । म्हणती धन्य धन्य हा क्षत्रिय सृष्टीं । क्षात्रधर्में आगळा

१ रात्र. २ गरुडाचें. ३ सर्प. ४ पर्वत. ५ दोरी. ६ सर्पांसारखे. ७ इंद्रस्त्रीसह. ८ लक्ष्मी. ९ वर्में काढून बोलती. १० प्रतिध्वनि. ११ बैल. १२ चार हात. १३ विनतापुत्र गरुड. १४ सहस्र भुजा ज्याला तो. १५ हैहय देशाचा राजा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ ८० ॥ अर्जुनें रावण कैसा धरिला । जैसा बळीनें विष्णु द्वारपाळ केला । तैसा गळां बांधोनि परतला । आला आपुलिया नगरीसी ॥ ८१ ॥ गर्जना करोनि अर्जुन । रावणातें गळां बांधोन । जैसा पारधियानें श्वान । तैसा दशानन पैं नेला ॥८२॥ प्रहस्त रणीं पडिला होता । तो पावोनि स्वस्थता । चहूंकडे अवलोकी लंकानाथा । तंव अर्जुनें गळां बांधिलासे ॥ ८३ ॥ देखोनि रावणा गळबंधन । प्रहस्तादि राक्षस मिळोन । क्रोधें संग्राम दारुण । करिते झाले रायासीं ॥ ८४ ॥ म्हणती अर्जुना भूपती । रावण गळां बांधिला हें सुख चित्तीं । न धरावें जाण युद्धाप्रती । धीर धरोनि रहावें ॥ ८५ ॥ राक्षस म्हणती मुसळ साहें । पळों नको उभा राहें । आतां तुज कोण राखेल माये । वल्गोनियां गर्जती ॥ ८६ ॥ तंव अर्जुनें काय केलें । रणीं राक्षसां मारिलें । कित्येक ते पळोनि गेले । घायवट होवोनी ॥ ८७ ॥ रणीं राक्षसमोड झाला । कार्तवीर्य जयो पावला । देवीं पुष्पवर्षाव केला । भाट गर्जती पवाडे ॥ ८८ ॥ मारूनियां दैत्यांसी । इंद्र पावे जयासी । तैसें राजेंद्रें त्या समयासी । राक्षसांतें जिंतिलें ॥ ८९ ॥ अर्जुन झाला जयवंत । गळां बांधोनि लंकानाथ । सवें घेवोनि प्रधान समस्त । पुरीं प्रवेशला आपले ॥ ९० ॥ बळीस जिंतोनि शचीपती । नगर प्रवेशे अमरावती । तैसा रायें जिणोनि लंकापती । आपुले नगरीं प्रवेशला ॥ ९१ ॥ पुढिले प्रसंगीं निरूपण । पौलस्ति येवोनि सोडवील रावण । श्रोतीं होवोनि सावधान । श्रवण कीजे कथेतें ॥ ९२ ॥ एका जनार्दनीं करी विनंती । पुढील कथा परिसिजे संतीं । जिचेनि श्रवणें अघें नासती । स्वानंदस्थिती पाविजे ॥ ९३ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां रावणबंधनं नाम एकविंशतितमोऽध्यायः ॥ २१ ॥ ओंव्या ॥ ९३ ॥

अध्याय बाविसावा

॥ श्रीराम प्रसन्न ॥ माहिष्मतीनामें नगरी । तेथें सहस्रार्जुन राज्य करी । तयाचे बंदीं श्रीराघवारी । कित्येक दिवस पडियेला ॥ १ ॥ श्वानावाणी शूकरावाणी । जाई मागें खरावाणी । दाही शिरीं वाहे पाणी । अन्नालागोनी रावण ॥ २ ॥ ऐसा कित्येक दिवसपर्यंत । माहिष्मतीनगरीं भीक मागत । विसांहातीं कांती सूत । उदरार्थ दशानन ॥३॥ तंव येरीकडे प्रहस्त प्रधान । पौलस्तिमुनीसी स्वर्गीं जाऊन । सांगितलें स्वामी रावणालागून । केलें बंधन सहस्रार्जुनें ॥४॥ माहिष्मतीनगराआंत । रावण असे भीक मागत । नगराबाहेर येवों नेदीत । कोंडोनि तेथ राखिला ॥ ५ ॥ ऐकोनि रावणासी बंधन । कोपें खवळला ब्रह्मनंदन । पुत्रस्नेहें कळवळोन । वायुवेगें चालिला ॥ ६ ॥ मनोवेग सांडोनि मागें । त्वरें चालिला बहुत रागें । माहिष्मतीप्रांतासी वेगें । येवोनि नगर देखिलें ॥७॥ दुरोनि देखिली नगरी । जैसी इंद्राची अमरपुरी । जेथें अर्जुन[२] वसे महाक्षत्री । सहपरिवारीं मिळोनी ॥ ८ ॥ नगरीं नाहीं दुःखदैन्य । नगरीं नाहींत दरिद्री जन । लोक वसती धार्मिक संपन्न । स्वप्नीं अधर्म पैं नाहीं ॥ ९ ॥ पौलस्ति ब्रह्मयाचा नंदन[३] । तपस्तेजें देदीप्यमान । जैसा गगनीं सहस्रकिरण[४] । पुरीं प्रवेश पैं केला ॥ १० ॥ आला महाद्वारासंमुख । द्वारपाळां जाणवी मुनिटिळक । म्हणे रायासी सांगा आवश्यक । पौलस्ति ऋषि आलासे ॥ ११ ॥ द्वाररक्षकें नृपनाथा । जाणविली ते व्यवस्था । म्हणे राया पौलस्ति तत्त्वतां । आला असे महाद्वारीं ॥ १२ ॥ द्वारपाळमुखें वचन । रायें ऐकोनि तेचि क्षण । पाचारोनि[५] पुरोहित ब्राह्मण । सवें सामुग्रीसीं निघाला ॥ १३ ॥ सवें पूजेचा संभार[६] । रायें जोडोनि दोन्ही कर । निघालासे ऋषीसमोर । अति नम्र होवोनी ॥ १४ ॥ पुढें पुरोहित मागें नृपती । शीघ्र आले ऋषीप्रती । साष्टांगें नमूनि पौलस्ती । मग पूजा पैं केली ॥१५॥ ब्राह्मणा दिधलें गोदान । मंगलतुरें वाद्यें लावून । पुढें पौलस्ति मुनि करून । राजमंदिरीं प्रवेशला ॥ १६ ॥ पुनरपि मंदिरीं मागुतीं । पूजा केली अति निगुतीं । स्नानें करवोनि विप्रपंक्ती । समस्तां भोजन पैं झालें ॥ १७ ॥ हात जोडोनि पौलस्तीप्रती । अर्जुन करीतसे विनंती । म्हणे स्वामी तुम्ही आलेती । म्हणोनि चरणांप्रती लागला ॥ १८ ॥ आजि माझें सफळ जन्म । आजि माझें सफळ कर्म । आजि माझें सफळ धाम । स्वामीनें आग-

१. पातकसमुदाय. २ राजा सहस्रार्जुन. ३ मुलगा. ४ सूर्य. ५ बोलावून. ६ साहित्य.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

मन पैं केलें ॥ १९ ॥ आजि माझी सफळ नगरी। आजि मी सफळ संसारीं। तुम्ही आलेति येथवरी। जे नाना तपीं न भेटां ॥ २० ॥ राजा म्हणे ऋषीप्रती। हें राज्य ऐश्वर्य पुत्र संपत्ती। सर्व स्वामीचेंचि निश्चितीं। मी आज्ञाधार किंकर ॥ २१ ॥ ऐकोनि रायाचें धर्मवचन। नगरीं देखोनि सज्जन जन। काय बोलिला ब्राह्मण। तें सावधान अवधारिजे ॥ २२ ॥ मुनि म्हणे नृपसत्तमासी। राया कमळनयना परियेसीं। तुझ्या तुळणे न पावती रविशशी। पराक्रमियांमाजी पंचानन ॥२३॥ ऐक राया सावधान। तुझ्या पराक्रमासी ठेंगणें गगन। यक्ष गंधर्व सिद्ध चारण। आज्ञाधारक जयाचे ॥ २४ ॥ जेणें वरदबळें सृष्टीं जाण। जिंतिले सकळही नृपगण। जयाचे बंदी सुरगण। इंद्र आदिकरोनियां ॥ २५ ॥ ऐसा पराक्रमी दशानन। तुवां जिंतिला न लागतां क्षण। तुझी कीर्ति मी ऐकोन। तुझिये भेटीस पैं आलों ॥ २६ ॥ माझें मागणें नाहीं अर्थ। माझें मागणें एक लंकानाथ। तो द्यावा मजलागीं त्वरित। उदार चित्त करोनियां ॥ २७ ॥ ऐकोनि ऋषीचें वचन। रायें आदरें सोडिला दशानन। रत्नजडित मुकुट देवोन। सर्वालंकारीं शृंगारिला ॥ २८ ॥ मैत्री करोनि रावणासीं। ब्राह्मण देव अग्नि साक्षीसीं। करोनि रायें सोडिलें त्यासी। श्रीरामा ऐसी कथा झाली ॥ २९ ॥ मग पौलस्ति मुनिवर। आलिंगूनि दशशिर। म्हणे बा रे श्रमलासी थोर। नगरीं विपत्ति फार भोगूनी ॥ ३० ॥ ऐकोनि पित्याचें वचन। लाजिला तो दशानन। म्हणे वांचल्याचें फळ कोण। याहूनि मरण पैं भलें ॥ ३१ ॥ पौलस्तीनें यया रीतीं। सोडवोनि लंकापती। आपण गेला ब्रह्मलोकाप्रती। सावध वृत्ती करोनियां ॥ ३२ ॥ दशइंद्रियीं जो अति समर्थ। तयासी म्हणती लंकानाथ। तो पौलस्तीनें करोनि मुक्त। आपण ब्रह्मलोका पैं गेला ॥ ३३ ॥ याउपरी तो लंकापती। मागुतेन विचरता झाला क्षितीं। पुढें कथा वर्तली ते श्रोतीं। सावधवृत्तीं अवधारा ॥ ३४ ॥ एका जनार्दना शरण। पुढें वालिगृहीं दशानन। भोगील विपत्ति दारुण। सावधान श्रवण कीजे ॥ ३५ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां रावणबंधमुक्तिर्नाम द्वाविंशतितमोऽध्यायः ॥ २२ ॥ ओंव्या ॥ ३५ ॥

१ सेवक. २ सूर्यचंद्र. ३ सिंहासारखा श्रेष्ठ. ४ देव.

अध्याय तेविसावा

श्रीसीतारामचंद्राय नमः ॥ रणीं धरोनि रावण। सहस्रार्जुनें केलें बंधन। तेथें पुलस्ति मुनि येऊन। मागोनि दशानन सोडविला ॥ १ ॥ पुलस्ति गेला स्वर्गासी। मागें रावण विचरे अवनीसी। जे जे राजे जे जे देशीं। त्या त्या स्थळासी आपण जाय ॥ २ ॥ तयांतें जिंती रावण। राक्षस अथवा राजे जाण। अथवा देव सिद्ध चारण। अधिक बळ ऐकोन संग्राम करी ॥ ३ ॥ तदनंतरें लंकानाथ। हिंडत असतां प्रधानांसमवेत। तंव पुढें किष्किंधेचा प्रांत। देखोनि त्वरित तेथ आला ॥ ४ ॥ ते किष्किंधा नगरी कैसी। दुसरी अमरावती ऐसी। पुरंदरात्मज पाळी जियेसी। वर्णना तिसी न करवे ॥ ५ ॥ भोंवतीं नाना परींचीं वनें। सरोवरें भरलीं शीतळ जीवनें। देखोनि मार्गस्थांचीं मनें। थोर विश्रांति पावती ॥ ६ ॥ पंपासरोवराचे तीरीं। ब्रह्मयानें वसविली नगरी। इंद्रादिकां अटक भारी। तेथें राज्य करी शक्रसुत ॥ ७ ॥ देवां वाळी दैत्यां वाळी। सिद्ध चारण कांपती चळीं। इंद्रवरदमाळा जवळी। बळें वाळी अजिंक्य देवां ॥ ८ ॥ ऐशा वाळीच्या पुरासी। रावण आला दशशिसी। नगरद्वारीं प्रवेशतां प्रधानासी। वाळीचिया देखिलें ॥ ९ ॥ रावण म्हणे गा मंत्रिया तारा। जाणवीं आपुलिये वानरेश्वरा। युद्धाकारणें दशशिरा। येथें येणें पैं झालें ॥ १० ॥ जरी सामर्थ्य असेल तुम्हांसी। तरी युद्ध करावें मजसीं। नाहीं तरी शरण रावणासी। शीघ्रकाळेंसीं पैं यावें ॥ ११ ॥ ऐसें रावणाचें वचन। तारप्रधानें ऐकोनि जाण। प्रत्युत्तर छळणेंकरून। तयाप्रती बोलतसे ॥ १२ ॥ तारापति वाळीसीं रण। करूं इच्छतोसी रावण। तरी धीर धरीं एक क्षण। शक्रसुत येईल आतां ॥ १३ ॥ राजा वाळी तो स्नानासी। गेला असे समुद्रासीं। संध्या सारोनि तुम्हांपासीं। येईल युद्धासी करावया ॥ १४ ॥ सहजस्थितीं किष्किंधानाथ। नित्य चतुःसमुद्रीं स्नानसंध्या करीत। तो ये तंवपर्यंत।

५ पृथ्वीवर. ६ जिंकी. ७ वाळी. ८ पाप्यानें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

स्वस्थचित्तें असावें ॥ १५ ॥ ऐकें लंकेशा सावधान। तुवां जरी केलें अमृतपान। तरी वाळिहस्तें तुझा प्राण। क्षणार्धें जाण जाईल ॥ १६ ॥ जरी तूं झालासी वज्रशरीरी। तरी वाळीपुढें तुझी नुरेचि उरी। निमेषामाजी समुद्र चारी। स्नान करोनि जो येतो ॥ १७ ॥ देवां दानवां मागतां रण। तिंहीं पाठविला वाळीपासीं जाण। तो दुंदुभि समरांगण। वानरेंसीं करूं पाहे ॥ १८ ॥ ऐसा दुंदुभि समर्थ। वाळीनें मारिला निमेषांत। पैल पडिलासे कलेवर[2]पर्वत। मंदराचळ दूसरा ॥ १९ ॥ जरी तुज प्रसन्न त्रिपुरारी[3]। तुवां जिंतिले राजे पृथ्वीवरी। तरी वाळीदर्शनें तुझी उरी। नुरे निर्धारीं जाणतों मी ॥ २० ॥ अथवा तांतडी असेल तुझे पोटीं। तरी जाय दक्षिणसमुद्राचे तटीं। रायासीं तुज होईल भेटी। संग्रामीं सुखी करील ॥ २१ ॥ दक्षिणसागरीं करोनि स्नान। बैसलासे कपि दुसरा भानु[4]। तेजें अत्यंत विराजमान। देखोनि मन निवेल तुझें ॥ २२ ॥ वाळी आहे समुद्रतीरीं। ऐसें ऐकोनि सुरारी। चालिला जैसा कज्जलगिरी। बहु क्रोधेंकरीं उचंबळत ॥ २३ ॥ दुरोनि देखिला ताराकांत। ध्यानस्थ बैसला जैसा पुण्यपंडित। तयासी धरावया निशाचरनाथ। पुष्पकावरोनि उतरला ॥ २४ ॥ बक जैसा गंगातीरीं। हळूच पावलीं मत्स्य धरी। सांचोळ नव्हतां तस्कर घरीं। लक्ष्मीवंताचे पैं रिघे ॥ २५ ॥ तैसा रावण हळूच पाउलीं। चालिला पापी धरावया वाळी। तंव तो शक्रसुत नेत्रकमळीं। रावणातें अवलोकी ॥ २६ ॥ विसांही भुजींकरून। धरूं गेला जों रावण। तंव वाळीनें हात उचलोन। कांखेतळीं दडपिला ॥ २७ ॥ दहा शिरें लंकानाथा। कांखेखालें झाला दडपिता। पुनरपि तो समुद्रीं तत्त्वतां। स्नानाकारणें जाता झाला ॥ २८ ॥ रावण असोनि कांखेतळीं। करितां समुद्रीं आंघोळी। नाकीं तोंडीं क्षारजळीं। कासावीस रुदन करी ॥ २९ ॥ वाळी अवलोकी नावेकें। तंव दहा तोंडें काळें मुख। दाही मस्तकीं मुकुट देख। भुजा विंशति[6] लोंबती ॥ ३० ॥ शरीर दीर्घ लंबायमान। कांखेंतूनि लोंबती चरण। जैसा खगेश्वरें[7] पन्नग[8] धरून। नेतसे तैसा वाळीही ॥ ३१ ॥ ऐसा चहूं समुद्रीं संध्यातर्पण। करोनि अमरेशनंदन। श्रमरहित वीर जाण। नगरप्रांतालागोन पैं आला ॥ ३२ ॥ म्हणे म्यां घालोनि कांखेतळीं। केलिया समुद्रीं आंघोळी। तरी कोण दशा तया झाली। विचारोनि भली पाहों पां ॥ ३३ ॥ ऐसें विचारूनि ताराकांत। मग दोन्ही उचलिले हात। तंव कांखेंतूनि लंकानाथ। सुटोनि पुढें पडियेला ॥ ३४ ॥ वाळी म्हणे तूं कोणाचा कोण। दक्षिणसमुद्रीं यावया काय कारण। मज धरीत होतासी किंनिमित्त जाण। समूळ कथन सांग आतां ॥ ३५ ॥ वाळी हांसोनि ते काळीं। विस्मयो पूर्ण हृदयकमळीं। तंव राक्षसेंद्र बद्धांजळी[9]। विनविता झाला ते समयीं ॥ ३६ ॥ शक्रसुता[10] तुझ्या बळाची थोरी। उपमा देवों तरी या त्रिभुवनामाझारी। वीर देखिले परी तुझी सरी। कल्पांतीं ते न पावती ॥ ३७ ॥ म्यां आपुलेनि बळें मही। जिंतिली चतुःसमुद्र पाहीं। परी तुझ्या बळा समता नाहीं। माझ्या दृष्टीं पडिली आजवरी ॥ ३८ ॥ मी आलों युद्धाकारणें। त्वां मज धरोनि चतुःसमुद्रीं स्नानें। केलीं आतां मज रक्षणें। जीवदान झणें देवोनी ॥ ३९ ॥ श्रम न पावतां वाळी। तुवां मज घालोनि कांखेतळीं। केल्या समुद्रीं आंघोळी। तूं आतुर्बळी[11] त्रिभुवनीं ॥ ४० ॥ आतां वानरेशा अवधारीं। तुवां मजसीं करावी मैत्री। आम्हां तुम्हां साक्षी अग्नि धरित्री[12]। आणि साक्षी द्विजदेव ॥ ४१ ॥ माझें स्त्री पुत्र ऐश्वर्य। आणिकही जे पदार्थ तव सर्व। तुज मज वेगळीकभाव। नाहीं गौरव हा मैत्रीचा ॥ ४२ ॥ तुमचें आमचें इष्टपण। हें त्रैलोक्यीं होय भूषण। मी तुझा मित्र हे देवगण। थोर भयातें पावती ॥ ४३ ॥ मिळोनियां दोघीं जणीं। मित्रत्व करूं साक्षी अग्नी। मग प्रवेशले किष्किंधा भवनीं। राक्षसेश्वर आणि हरिपुंगव[13] ॥ ४४ ॥ अमरेंद्रसुत पौलस्तितनयो। एक होऊनि वीरबाहो। किष्किंधा प्रवेशले सोमसूर्यो। मंडळीं पहा हो गगनाचिये ॥ ४५ ॥ कीं सिंह प्रवेशे पर्वतदरीं। कीं व्याघ्र बैसे झाळीभीतरीं। कीं गुहेसी वसिजे योगीश्वरीं। तयापरी

१ टिकाव. २ प्रेतांचा ढीग. ३ शंकर. ४ सूर्य. ५ क्षणभर. ६ वीस. ७ गरुड. ८ सर्प. ९ हस्त जोडून. १० वाळी. ११ पराक्रमी. १२ पृथ्वी. १३ वानरश्रेष्ठ वाळी.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

नगरीं स्थिरावले ॥४६॥ एकमासपर्यंत राघवारी। राहिला होता किष्किंधापुरीं। मग प्रधानांसमवेत सुरारी। त्रैलोक्यीं विचरता झाला पैं ॥४७॥ ऐसे पूर्वी थोर थोर। ते रावणें केले किंकर। तया रावणातें कपीश्वर। कांखे असोनि हिंडिन्नला ॥ ४८॥ ऐसा शक्रसुताचा पराक्रम। देवां दानवां दुर्घट परम। तया निर्दळिता तो तूं श्रीराम। पूर्णब्रह्म अवतार ॥४९॥ पतंग जैसा दीपावरी। बुडोनि मरे स्नेहाभीतरीं। तैसे तुवां आपुले वैरी। रणसागरीं मारिले ॥ ५०॥ एका जनार्दना शरण। श्रीरामकथा भवतारण। पुढील कथानुसंधान। तें निरूपण अति गोड ॥ ५१॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां रावणवालिमित्रत्वं नाम त्रयोविंशतितमोऽध्यायः ॥ २३ ॥ ओंव्या ॥ ५१ ॥

अध्याय चोविसावा

॥ श्रीशंकराय नमः ॥ गतकथा झाली ऐसी। जे कां कलिकल्मष[1] नाशी। तदनंतरें विचरतां नारदासी। राक्षसेश्वरें देखिलें ॥ १ ॥ नारद जातां गगनीं। रावणें देखिला दुरोनी। म्हणे देवऋषि कृपा करूनी। नावेक[2] येथवरी येइंजे ॥ २॥ म्हणोनि केलें नमन। दोन्ही कर जोडोन। स्वामी क्षेम कुशळ कल्याण। हें तुम्हांसी पुसणें न लगे ॥ ३॥ तुमचेनि भूतमात्र प्राणी। स्वानंदें वर्तती निजस्थानीं। तुम्ही विचरां[3] परोपकारालागोनी। तुमच्या दर्शनीं मी धन्य ॥४॥ ऐकोनि विबुधारि[4]जनकाचें वचन। मग बोले नारद भगवान। म्हणे राया तुझें वैभव देखोन। आनंदें पूर्ण निवालों ॥५॥ तुज पुष्पकासारिखें विमान। इंद्रजिताऐसें पुत्रनिधान[5]। जयाचे आहारा न पुरे त्रिभुवन। तो बंधु कुंभकर्ण पैं तुझा ॥ ६ ॥ प्रताप सकळांहूनि आगळा। जिणिलें त्वां क्षितिपाळां[6]। तुझे ठायीं भावो भूपाळा। देखोनियां निवालों ॥७॥ राक्षसाधिपा तुझी थोरी। न देखों त्रिभुवनामाझारी। सदाशिव आज्ञाधारी। विष्णूसी तेथें कवण पुसे ॥ ८ ॥ देव दैत्य गंधर्व। सिद्ध चारण मुनिपुंगव[7]। आणीक पृथ्वीपति सर्व। समरांगणीं जिंतिले ॥ ९ ॥ ऐसा पराक्रम दारुण। देखोनि मी तुष्टमान। परी कांहींएक वचन। हितालागोन सांगतसें ॥ १० ॥ राक्षसेंद्रा अवधारीं। माझिया वचनाची थोरी। तुवां जिंतिले ते सामान्य अरी। जे काळचक्रीं पडिले असती ॥ ११ ॥ जे संसारीं गांजिले। ते मृत्यूनें मारिले। जे प्रारब्धीं घातले। ते मेले आपुलेनि कर्में ॥ १२ ॥ जे संसारबांदवडीं[8] पडिले। जे मी माझें म्हणत गेले। जे विधिनिषेधीं नाडिले। ते पडिले काळचक्रीं ॥ १३ ॥ माझी स्त्री माझे पुत्र। माझें धन माझें गोत। जयांचें भ्रांत झालें चित्त। तयां ग्रासिलें कळिकाळें ॥ १४ ॥ तुवां मारिले गांजिले हे वदंती[9]। मिथ्यात्वें भासे माझे चित्तीं। ऐसें ऐकोनि लंकापती। नारदाप्रती बोलिला ॥ १५ ॥ अहो जी ऐका नारदमुनी। आतां रसातळा जातों दैत्यमर्दनीं। आपुले करें तयां जिंतोनी। समरांगणीं भिडोनियां ॥ १६ ॥ मग समस्त जिंतिल्यावरी। ज्यांचे त्यांस करीन अधिकारी। पुढें समुद्र मथीन त्याउपरी। अमृतपानाकारणें ॥ १७ ॥ ऐसें रावण बोलिल्यावरी। ऐकोनि नारद ते अवसरीं। प्रत्युत्तरशब्दचातुरीं। बोलतसे रावणेंसीं ॥ १८॥ तुज रसातळासी जातां। आम्हांसी सुख न वाटे सर्वथा। मी सांगतों त्या मार्गें लंकानाथा। समस्तां सुख होईल ॥ १९ ॥ अति दुर्गम कठिण। ब्रह्मादिकां न कळे जाण। त्या मार्गीं करावें गमन। प्रेतराज तेथें असे ॥ २० ॥ वैरी त्रासूनि तूं उद्भट। इये मार्गीं जाय स्पष्ट। यमराज बळें अचाट। त्यातें रणीं जिंकिजे ॥ २१ ॥ जया यमाचा सर्वां दंड। जेणें दंडिले प्राणी उदंड। जया दंडाभेणें जन अखंड। शरण हरीसी पैं जाती ॥ २२॥ प्रेतराज तो पापियां यम। साधुजनांतें तोचि धर्म। सांगतां त्याचा पराक्रम परम। त्यासी दशानन पुरवसी ॥ २३ ॥ मुनीची ऐकोनि गोष्टी। राक्षसें हांक मारिली मोठी। जैसा मेघ कडकडाटीं। गर्जतसे पर्जन्यकाळीं ॥ २४ ॥ कुंभकर्णानुज म्हणे नारदमुनी। माझें वचन ऐकें सावधानीं। यमराज मारिला हे सत्य वाणी। तुम्हीं असत्य न म्हणावी ॥२५॥ मी जातों दक्षिणदिशेसी। जेथें

१ कलीसंबंधी पाप. २ क्षणभर. ३ फिरतां. ४ देवशत्रु इंद्रजित त्याच्या पित्याचें-रावणाचें. ५ पुत्ररत्न. ६ राजांस. ७ मुनिश्रेष्ठ. ८ संसारपाशांत. ९ वार्ता, गोष्ट. १० मोठे.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

रविसुत करी राज्यासी। माझेही नारदा मानसीं। क्रोध अत्यंत उचंबळत ॥ २६ ॥ प्रत्युत्तर माझें ऐक वचन। मी तयातें मुनि दंडीन। छेदीन तयाचा अभिमान। जेणें प्राणिगण दंडिले ॥ २७ ॥ ऐसें बोलोनि मंदोदरीकांत। मुनीसी करोनि दंडवत। येता झाला लंकानाथ। प्रधानांसमवेत दक्षिणे ॥ २८ ॥ मग तो नारद महाऋषी। जयाच्या तेजें कळाहीन रविशशी। जयाचें वचन देवां दैत्यांसी। अतिप्रीतीसीं रुचतसे ॥ २९ ॥ ब्रह्मनिष्ठेचा जो सागर। ब्रह्मदृष्टीं देखे चराचर। ब्रह्मयाचा मानसकुमर। ब्रह्मादिकां पार न कळे ॥ ३० ॥ ब्रह्मवीणा वाजवीत। ब्रह्मानंदें डुलत। ब्रह्मपदें मुखीं गात। गात नाचत ब्रह्मानंदें ॥ ३१ ॥ ऐसा तो नारद महामुनी। रावणाचें वचन ऐकोनी। क्षणैक विचारिता झाला मनीं। जैसा अग्नि तैसा ऋषी ॥ ३२ ॥ माझे वचनें हा रावण। यमरायासीं करील रण। तरी मी यमासी सांगेन। येतो रावण युद्धातें ॥ ३३ ॥ प्रेतराज दंडपाणी। तयातें प्रार्थीन युद्धालागूनी। जयाचेनि धाकें प्राणी जनीं। श्रीहरिभजनीं प्रवेशती ॥ ३४ ॥ तरी आपला हाचि विचार। म्हणोनि उठिला ब्रह्मकुंमर। चालिलासे अति सत्वर। मनोवेग टाकोनि मागें ॥ ३५ ॥ ऐसा तो ब्रह्मर्षी। आला प्रेतराजनगरासी। नगरी देखोनि हर्ष मानसीं। जैसी दुसरी अमरावती ॥ ३६ ॥ प्रेतराज रायाचें नाम। यमधर्म दुसरें परम। प्राणियांचे दोषधर्म। जाणोनि तैसें दंडीत ॥ ३७ ॥ जयांसी भगवद्भजनीं नाहीं भक्ती। अधर्मटोले माथां वाजती। ज्यांसी गृहाश्रमीं अत्यासक्ती। ते दंड पावती प्रेतरायाचा ॥ ३८ ॥ ऐसा तो नारद महामुनी। आला प्रेतपुरीलागूनी। म्हणे कलहो पावोनि पुरे धणी। म्हणोनि पाय अवनीं आफळीत ॥ ३९ ॥ माथेची शेंडी तडाडी। कलहाची थोर आवडी। म्हणोनि तो लवडसवडीं। प्रेतराजनगरा पैं आला ॥ ४० ॥ एका जनार्दना शरण। राक्षसां यमासीं युद्ध दारुण। होईल तें परिसा सावधान। निज अवधान देवोनी ॥ ४१ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां नारदप्रेतपुरीआगमनं नाम चतुर्विंशतितमोऽध्यायः ॥ २४ ॥ ॥ ओंव्या ॥ ४१ ॥

अध्याय पंचविसावा

॥ श्रीशंकराय नमः ॥ ऐसें विचारोनि ब्रह्मकुमर। प्रेतपुरीस आला सत्वर। जेथें प्रेतराज सहपरिवार। परिवेष्टित बैसलासे ॥ १ ॥ नारदें यम देखिला। जैसा हुताशन प्रज्वळिला। आपण मध्यें मिरवला। खमंडळीं कश्यपसुत ॥ २ ॥ प्राणियांचें जैसें कर्म देखे। तयां दंड करी कर्मासारिखे। ऐसें करितां अकस्मात देखे। पातला विरिंचिसुत नारद ॥ ३ ॥ आला देखोनि नारदमुनी। यमराव हरिखेला मनीं। षोडशोपचारीं पूजूनी। मधुरवाणीं बोलिला ॥ ४ ॥ अहो जी मुनिचक्रचूडामणी। क्षेम असे तुम्हांलागोनी। स्वधर्म रक्षीतसां अनुदिनीं। किंप्रयोजनीं आगमन ॥ ५ ॥ सकळ सुर आणि सुरपती। देव गंधर्व ऋषिपंक्ती। आणि असुरही सेविती। तो तूं आलासी कोणे अर्थी ॥ ६ ॥ कोणा कार्याचे विधी। तूं आलासी कोणे बुद्धीं। तें मज सांगावें कृपानिधी। ऐसें प्रेतराजें प्रार्थिलें ॥ ७ ॥ ऐकोनि धर्मरायाचें वचन। बोलता झाला नारद आपण। माझिया आगमनाचें लक्षण। सावधान अवधारीं ॥ ८ ॥ वर्तलें तें आईक राया। ब्रह्मवरदें उन्मत्त होवोनियां। रावण ऐसें नाम जया। सा चारी शिरें मस्तकीं ॥ ९ ॥ तो राक्षस पुष्पकीं आरूढोन। मंत्रियांसहवर्तमान। तुज जिंतावया आपण। येतो म्हणोन मी सांगों आलों ॥ १० ॥ तुझे दंडाची दुर्धर शक्ती। स्वप्नीं प्राणी भय वाहती। तया तुज आजि कोण गती। होईल तें न कळे ॥ ११ ॥ ऐसें बोलतां नारदमुनी। तंव अकस्मात सूर्यासारिखें गगनीं। देखिलें येतां तेज नयनीं। आणि दशदिशा उजळल्या ॥ १२ ॥ दिगंतराबाहेर ते समयीं। तिमिरें गेलें नव्हतेंच पाहीं। बोलतां देखतां समीप लवलाहीं। येतें झालें विमान ॥ १३ ॥ तया पुष्पकविमानावरी। बैसलासे सुधापानियांचा अरी। पीडित प्राणी होते ते क्षणामाझारी। भुजबळें सोडविले ॥ १४ ॥ पापी

---

१ यम. २ नारद. ३ यमपुरीला. ४ तृप्ति, आवड. ५ पृथ्वीवर. ६ लक्ष्य. ७ अग्नि. ८ आकाशांत. ९ सूर्य.

१० मुनिश्रेष्ठ. ११ कल्याण. १२ ब्रह्मदेवाच्या वरानें. १३ सहा आणि चार, दहा. १४ काळोख. १५ देवांचा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

पुरुष सोडविले कैसे । रौद्ररूप भयानक घोर ऐसे । बांधिले होते ते यमफांसें । देहीं कृशत्व पावले ॥ १५ ॥ एक देती दीर्घ हांक । एक आरडती पावोनि दुःख । एकां कृमिकीटकादिक । मांस तोडोनि भक्षिती ॥ १६ ॥ एकांतें श्वान तडतडां तोडी । एकांतें करिती ओढाओढी । एकांतें म्हणती पाडीं पाडीं । कडोविकडी गांजिती यमदूत ॥ १७ ॥ पुढें वैतरणी[1] शोणितोदकें[2] । दोन्ही तीरीं पाहें पूर देखें । तियेंत प्राणी कित्येकें । बुचकळ्या देती निजकर्मे ॥ १८ ॥ सप्तवालुकेंत कित्येक प्राणी । उभे राहिले निजकर्म भोगोनी । कित्येक अधर्मी असिपत्रवनीं[3] । वृक्षपर्णी शयन करिती ॥ १९ ॥ शस्त्रधारा अति तीक्ष्ण । तैसींच आहेत पर्णे जाण । तेथें करविती पापियां शयन । सर्वांग छिन्नभिन्न होतसे ॥ २० ॥ रौरव आणि क्षारनदीप्रती । प्राणियांतें लोटोनि देती । खालते जाती वरते येती । येती काकुळती हा कर्मा ॥ २१ ॥ एक क्षुधित होऊन । करितां निजकर्मभक्षण । एक संसारतृषेनें पीडोन । विवर्ण[4]मुख पैं झाले ॥ २२ ॥ वाल्मीकिरामायणाप्रती । पातकी बोलिले बहु असती । तितुके सांगतां कथा विस्ताराप्रती । जाईल निश्चितीं जाणिजे ॥ २३ ॥ न सांगतां दोष दारुण । वाल्मीकिग्रंथासी विरुद्धपण । येईल म्हणोनि संकलित जाण । निरूपण पैं केलें ॥ २४ ॥ यालागीं मी संतांप्रती । येतसें काकुळती । तयावरी नेणें शास्त्रव्युत्पत्ती । क्षमा श्रोतीं मज कीजे ॥ २५ ॥ अबद्ध सुबद्ध दाशरथीकथन । करितां तुटे संसारबंधन । ते नर होती पुण्यपावन । ऐसें भगवान बोलिलासे ॥ २६ ॥ ऐसे पापी आणि गुरुद्रोही । विश्वासघातकी हिंसक पाहीं । ते रावणें सोडविले लवलाहीं । पळते झाले दशदिशां ॥ २७ ॥ कित्येक गायन करीत । कित्येक आनंदें नाचत । कित्येक स्वधर्मी रत । तयांतेंही देखत रावण ॥ २८ ॥ कित्येक गुरुभजनीं तत्पर । कित्येक शास्त्रीं चतुर । कित्येक दानधर्मी शूर । याचकां देहो पैं देती ॥ २९ ॥ कित्येक गोदानी पुरुष । ते भोगिती स्वानंदगोरस । कित्येकां अन्नदानीं हर्ष । ते निजानंद परेश सेविती ॥ ३० ॥ स्वानंदें भक्ति करोन । जिहीं पूजिला शैलजारमण[5] । ते नर पुण्यपावन । भोग भोगून अभोक्ते ॥ ३१ ॥ ऐशिया धार्मिकांतें देखोन । संतोषला दशानन । म्हणे धन्य धन्य साधुजन । जे नगरीस राहिले ॥ ३२ ॥ पापियांतें करोनि मुक्त । पुढें चालिला लंकानाथ । हें देखोनि यमराजदूत । क्रोधें रावणावरी त्वरित धांवले ॥ ३३ ॥ परिघ पट्टिश मुसळ । शक्ति तोमर आणि शूळ । पुष्पक वेढोनियां सकळ । घोरांदर मांडिलें ॥ ३४ ॥ आसनें तोरणें पताका । पुष्पकीं होत्या वेदिका । विमाना ताडातोडी केली देखा । निमेषा एका न लावितां ॥ ३५ ॥ जैसें ब्रह्मगिरीसी भ्रमर । शिखरीं प्रवेशतां करिती जर्जर । प्रेतराजसैनिकीं दशशिर । तद्वत वेढोनि सत्वर घेतला ॥ ३६ ॥ रावणा केला अपमान । प्रेतराजसैनिकीं जाण । आणि रावणाचे प्रधान । तेही रणीं शक्तिहीन झाले ॥ ३७ ॥ कित्येक झाले घायाळ । कित्येकांचें फुटलें कपाळ । कित्येकांसी सुटला पळ । कित्येकीं रणमंडळ सांडिलें ॥ ३८ ॥ कित्येक जर्जरीभूत झाले । कित्येक मूर्च्छित पडियेले । कित्येक रणीं निवटिले । महादारुण दादुले योद्धे ॥ ३९ ॥ जैसे पळस वसंतीं । फुलले शोभा वना देती । तैसे राक्षस रणपंथीं । असृग्द्धें[6]करीं अति डवरले ॥ ४० ॥ यमसैन्यें केली ख्याती । रावणाचें कवच भेदोनि क्षितीं । रावण केलासे विरथी । भूमीवरी निगुतीं आणिला ॥ ४१ ॥ मग रावणें काय केलें । माहेश्वरी ठाण मांडिलें । कार्मुकीं[7] बाण चढविले । सवें ओढिलें कर्णान्त ॥ ४२ ॥ अरिसैनिकांतें म्हणे रहा सहा रणीं । पळों नका सोडूनि धरणी[8] । ऐसें बोलोनि रावणें तत्क्षणीं । कार्मुकीं बाण झणीं लाविला ॥ ४३ ॥ तो बाण पाशुपतमंत्र जपोन । जोडिला क्रोधेंकरोन । करोनि अग्निआवाहन । सज्जूनि त्वरें सोडिला ॥ ४४ ॥ तो अग्निमयचि बाण । निघाला गर्जत गगन । तेणें दशदिशांचे श्रवण[9] । बधिर झाले जाण ते समयीं ॥ ४५ ॥ त्या पाशुपताचें गर्जन मोटें । चालिलें थोर नेटेंपाटें । तेणें कळिकाळा शीरें[10] खटखटे । दंत दाढा

१ यमपुरींतील नदी. २ रक्तरूप उदकानें. ३ तरवारींच्या वनांत. ४ निस्तेज तोंडाचे. ५ पार्वतीपति शंकर. ६ रक्तानें.

७ धनुष्यावर. ८ पृथ्वी. ९ कान. १० कंप.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वाजवीत ॥ ४६ ॥ खमंडळींहूनि नक्षत्रें च्यवती । चंद्रसूर्य भयभीत चित्तीं । दिग्गज थरथरां कांपती । अवनी पालथी होऊं पाहे ॥ ४७ ॥ अब्धि मर्यादा सांडूं पाहती । कूर्म दचकलासे चित्तीं । सदाशिवासी झोंबे पार्वती । कंठीं मिठी घातली ॥ ४८ ॥ सावित्री म्हणे ब्रह्मयातें । ब्रह्मांड होऊं पाहे पालथें । तंव लक्ष्मीनें आपुले कांतातें । थापटोनि विष्णूतें उठविलें ॥ ४९ ॥ रमा म्हणे जी जगन्नाथा । भय वाटे माझिया चित्ता । तूं प्राणियां अभय देता । भवव्यथा निवारिसी ॥ ५० ॥ तुझे कृपेचेनि पडिपाडें । हें त्रैलोक्य नांदे सुरवाडें । तुझिया जी दृष्टीपुढें । हें जग राहे नासे जी ॥ ५१ ॥ तूं ब्रह्मा स्रजिता विधाता । तूं प्रतिपाळिसी जी तत्त्वतां । तूंचि शिव संहार करिता । तुज नेणती तत्त्वतां मतिमंद ॥ ५२ ॥ देवा हे अचाट ध्वनी । पडिली माझिये श्रवणीं । ईपासोनि कृपा करोनी । निजजनांतें रक्षावें ॥ ५३ ॥ ऐकोनि लक्ष्मीचीं वचनें । अभय दिधलें जनार्दनें । पुढें त्या पुलस्तिकुळभूषणें । काय केलें अवधारा ॥ ५४ ॥ पाशुपतास्त्र अरिसैन्यावरी । पाडिलें हुताशन[1] भस्म करी । जैसा वणवा लागे डोंगरीं । वन जाळी असंख्य ॥ ५५ ॥ वैवस्वत[6]सैन्य रणीं । भस्म होवोनि पडिलें धरणीं । ऐसें राक्षसीं देखोनी । रावणेंसीं गर्जती सर्व ॥ ५६ ॥ एका जनार्दना शरण । विजयी झाला रावण । पुढील रसाळ निरूपण । श्रोतीं सावधान ऐकावें ॥ ५७ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां रावणयमसैन्यविध्वंसो नाम पंचविंशतितमोऽध्यायः ॥ २५ ॥ ओंव्या ॥ ५७ ॥

अध्याय सव्विसावा

॥ श्रीरामचंद्राय नमः ॥ मागिले प्रसंगीं पाशुपतास्त्र । रावणें सोडूनि भस्मीभूत । यमराजसैन्या केला अंत । तेणें हर्षें गर्जत राक्षस ॥ १ ॥ विजयो पावला दशानन । म्हणोनि करिती गर्जन । तें वैवस्वत ऐकोन । क्रोधें दारुण उचंबळत ॥ २ ॥ नेत्र आरक्त करोन । आपुलें सैन्य पडिलें जाणोन । सारथियासी म्हणे शीघ्र स्यंदन[7] । आणीं युद्धा जावया ॥ ३ ॥ सारथियानें आणिला दिव्य रथ । वरी आरूढला प्रेतराज रणपंडित । त्या रथाच्या घडघडाटश्रवणांत । दिग्गजांचीं टाळीं बैसलीं ॥ ४ ॥ हातीं घेतला मुद्गर । मृत्यूसारिखा तो उग्र । काळदंड घेवोनि कठोर । जाणों संहार करील ब्रह्मांडाचा ॥ ५ ॥ ऐसा तो विवस्वतात्मज । रथीं आरूढला वीरराज । परिवेष्टित काळतुल्य सहज । बैसविलें गणांतें ॥ ६ ॥ मनीं थोर उल्लास । करीन राक्षसांचा विध्वंस । ऐसा यम वीरश्रियेचा सौरस । भोगावया चालिला ॥ ७ ॥ यमराजाचें आगमन । देखोनि राक्षस कंपायमान । म्हणती हा प्रळय दारुण । आजि असे मांडला ॥ ८ ॥ रथ घडघडाटें रणक्षितीं । सिंहनादें गर्जना करिती । आला तो राक्षससैन्याप्रती । जेथें लंकापती[10] उभा असे ॥ ९ ॥ एका मुहूर्तामध्यें जाण । आले रणांगणा घोडे दारुण । उपमा देतां उच्चैःश्रवा[11] न्यून । रथींचे वारू[12] जाण तैसे ते ॥ १० ॥ राक्षस देखोनियां भारी । अश्व हिंसती नानापरी । पाय न ठेविती पृथ्वीवरी । चंचलता मनापरीस अधिक ॥ ११ ॥ ऐसा आरक्त वारुवांचा रथ । वरी आरूढला प्रेतनाथ । देखोनि राक्षस भयभीत । धाकें थोर पळते जाहले ॥ १२ ॥ रावणाचे प्रधानगण । तेही भयभीत दारुण । आणीकही स्थूळ सूक्ष्म जन । द्विजऋषिमुनिगण पळाले ॥ १३ ॥ लोक भयातुर देखोन । दोघे करूं लागले रणकंदन । सोडिती शक्ति दारुण । वर्म लक्षोन हाणिती ॥ १४ ॥ यम आणि तो रावण । सोडिती शक्ति तोमर दारुण । वीर वीरांचें वर्म लक्षोन । क्रोधेंकरून उचंबळती ॥ १५ ॥ दोघे झुंझती उसण्याघायीं । येरयेरांचीं[13] वर्में लक्षिती पाहीं । तंव रावणें केलें काय ते समयीं । शर वर्षला दारुण ॥ १६ ॥ जेंवी मेघांच्या धारा । वर्षोनि लोपविती गिरिवरा । तेंवी रावणें वैवस्वतरहंवरा[14]- । -वरी बाण टाकिले ॥ १७ ॥ त्या समयीं तो वीरराज । राया विवस्वताचा[15] आत्मज ।

---

१ आकाशांतून. २ पडती. ३ पृथ्वी. ४ सामर्थ्यानें. ५ अग्नि. ६ यमाचें सैन्य. ७ रथ. ८ यमराज. ९ समरांगणावर. १० रावण. ११ इंद्राचा घोडा. १२ घोडे. १३ परस्परांचीं. १४ यमाच्या रथावर. १५ सूर्यपुत्र (यम).

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

संधान करोनि रिपुबाणसमाज । रणरंगीं तोडिले ॥ १८ ॥ खंमंडळीं जीमूतांचें[1] पडळ । तोडी जैसा वायु प्रबळ । तेंवी वैरियाचें शरजाळ । सम रांगणीं सकळ तोडिलें ॥ १९ ॥ सतरात्रीपर्यंत । युद्ध केलें असंख्यात । दोघे समान रणपंडित । श्रम न पावत पैं दोघे ॥ २० ॥ देव गंधर्व सिद्ध ऋषी । पिशाच गुह्यक तापसी । आणि महंत संन्यासी । थोर आश्चर्यासी पावले ॥ २१ ॥ तदनंतर दशानन । रिपूचें समान बळ देखोन । करिता झाला संधान । तें सावधान अवधारा ॥ २२ ॥ चौं बाणीं सारथी सत्तरीं रथी । एक सहस्र बाणीं यमाप्रती । वर्मांग लक्षोनि निशाचरपती । विंधिता झाला ते समयीं ॥ २३ ॥ येतां रिपूचे बाण । यमराजें तोडिले न लागतां क्षण । जैसें सूर्योदयीं तमाचें ठाण । नव्हतेंचि जाण गगनीं हो ॥ २४ ॥ययाउपरी वैवस्वत । क्रोधाच्या उकळया सांडीत । भासता झाला पावकवत[3] । सुरनरांच्या नेत्रांसी ॥ २५ ॥ क्रोध आलिया यमासी । तंव मृत्यु उभा संमुख करी विनंतीसी । म्हणे राया मजलागीं आज्ञेसी । दीजे युद्धासी करावया ॥ २६ ॥ माझी पडलिया दृष्टी । हे आटेल सकळ सृष्टी । मज न लगे युद्धाची आटाटी । माझी गोष्टी अवधारा ॥ २७ ॥ मज सोडावें लवकरी । रिपु मारीन रणसागरीं । नरकासुर क्षणाभीतरीं । म्यां वधिला भारी निजांगें ॥ २८ ॥ माझें स्वरूप हें हरिहर[4] । माझें स्वरूप ब्रह्मा इंद्र । माझें स्वरूप श्रीरामचंद्र । राक्षससमुद्र शोषूं पाहे ॥ २९ ॥ हे समस्तही निमित्तधारी । मी मृत्यु जगाचा संहारकारी । जे जन्मले प्राणी संसारीं । त्यांतें त्वरेंकरीं मारीन ॥ ३० ॥ शंबर वृत्र आणि शुंभ । सहस्रार्जुन निशुंभ । नमुचि विरोचन मधुकैटभ । यांचे प्रतापाची बोंब त्रिभुवनीं ॥ ३१ ॥ हे मारिले आणिकही बहुत । निर्दळिले म्यां संख्येरहित । यादव कौरव हे समस्त । माझेनीच निश्चित निमाले ॥ ३२ ॥ मजसारिखा सेवक । तुज चिंता कायसी एक । मज सोडिल्या निमेष एक । न लागतां सकटक[6] रिपु मारीन ॥ ३३ ॥ माझिये दृष्टीं पडिले प्राणी ते न वांचती सत्यवाणी । मज सोडितां तेचि क्षणीं । संहारीन ब्रह्मांड ॥ ३४ ॥ ऐसें मृत्यूचें वचन । धर्मराजें ऐकोन । म्हणे मृत्यु तूं नको मीच मारीन । पुढील निरूपण ऐकावें ॥ ३५ ॥ तदनंतर प्रेतनाथ । करूनि नेत्र आरक्त । काळदंड घेवोनि त्वरित । तोलिता झाला अद्भुत करतळीं ॥ ३६ ॥ जयाच्या पृष्ठभागीं असती । भाते भरले बाणीं वज्रतुल्य निगुतीं । पावकसमान[3] मुद्गर अरिमर्दनार्थी । प्रतिष्ठिला अति घोर ॥ ३७ ॥ जयाचिये रथीं जाण । चाप ठेविलें काळासमान । पुटपावकाचे तेजें गगन । दशदिशा धवळल्या ॥ ३८ ॥ जयाचिये रथीं संमुख । मुद्गरें[7] ठेविला काळांतक । दर्शनें जीवमात्र देख । अपधाकें मरताती ॥ ३९ ॥ दर्शनें प्राणी संहारी । तो सोडिला जरी जीवांवरी । तरी तयांची काय उरेल उरी । देखोनि वैरी कांपिजे ॥ ४० ॥ तो परिघ घेतां करीं । तयाची दीप्ति फांके अंबरीं । ज्वाळा वेष्टित सहपरिवारीं । दर्शनें वैरी मद गाळीत ॥ ४१ ॥ ऐसा परिघ अति दारुण । यमराज स्पर्शूनि जाण । सोडी तंव राक्षससैन्य । त्वरान्वित पळतें झालें ॥ ४२ ॥ सुरासुर भयभीत । पृथ्वीचे जन चळीं कांपत । त्या दंडाचें प्रेरण करूनि हात । ऊर्ध्व टाकिला रावणावरी ॥ ४३ ॥ तया समयीं वैवस्वत । दंड प्रेरितां उठे अनर्थ । हा प्रळय अकल्पित । ओढवला म्हणत जनलोक ॥ ४४ ॥ तेचि अवसरीं प्रजापती । बोलता झाला गा महामूर्ती । अहो जी प्रेतराज दक्षिणपती । वचन माझें निश्चितीं ऐकावें ॥ ४५ ॥ ब्रह्मा म्हणे प्रेतपती । ऐक माझी वचनोक्ती । तुझेनि दंडें निशाचरपती । क्षणें भस्मांतीं जाईल ॥ ४६ ॥ पैल पाहें रणा उजु । दहा शिरें वीस भुजु । तोचि जाण लंकेचा नृपराजु । ठाण मांडोनि उभा असे ॥ ४७ ॥ पूर्वी तया रावणासी । म्यां वर दिधला निश्चयेंसीं । माझेनि वरदें सुरासुरांसी । त्रासिलें येणें राक्षसें ॥ ४८ ॥ आतां यमा मुद्गरेंकरून । नको करूं रावणाचें हनन । माझें वचन अप्रमाण । हा मरतां होऊं पाहे ॥ ४९ ॥ आणि भविष्य वाल्मीकाचें । असत्य होऊं पाहे सांचें[9] । तरी आतां ये काळींचें ।

१ आकाशांत. २ मेघांचें. ३ अग्नीसारखा. ४ विष्णु व शंकर. ५ मृत्यु पावले. ६ सैन्यासहवर्तमान. ७ आयुधविशेष. ८ रावण. ९ सत्य, खरोखर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वाक्य आमुचें तुवां मानावें ॥ ५० ॥ मुद्गर मजपासोनि जनित । तो तुज दिधला युद्धार्थ । तेणें करोनि लंकानाथ । न मारीं ये रणमंडळीं ॥ ५१ ॥ ऐसें ऐकोनि ब्रह्मवचन । प्रतिउत्तर दे धर्मराज आपण । म्हणे स्वामी न करितां हनन । हा उगा कैसा राहेल ॥ ५२ ॥ यासी वधीन क्षणाभीतरीं । परी आज्ञा तुमची शिरीं । म्हणोनि मुद्गरातें सांवरी । ते समयीं प्रेतराज ॥ ५३ ॥ ऐसें बोलोनि प्रजापतीप्रती । सवें घेवोनि रथ सारथी । नारदासहित ऊर्ध्वगती । स्वर्गपंथीं निघाला ॥ ५४ ॥ तंव येरीकडे दशानन । यमराज गेला देखोन । जिंतिलें म्हणोनि श्लाघ्यवचनें । करी गर्जना आनंदें ॥ ५५ ॥ पुष्पकीं आरूढोनि लंकापती । यमसदनींहूनि पुढती । चालिलासे रसातळाप्रती । तें सावध श्रोतीं अवधारिजे ॥ ५६ ॥ एका जनार्दना शरण । म्हणतां गेलें एकपण । एका एकपणावांचून । रामायण लिहिलेंसे ॥ ५७ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां यमविधातृसंवादो नाम षड्विंशतितमोऽध्यायः ॥ २६ ॥ ओंव्या ॥ ५७ ॥

अध्याय सत्ताविसावा

॥ श्रीगणपतये नमः ॥ पूर्वकथानुसंधान । धर्मराजा शीघ्र स्वर्गगमन । समागमें नारद भगवान । देवसदन पावला ॥ १ ॥ येरीकडे पुरंदरारिजनक । राक्षसांमाजी श्रेष्ठ नायक । पुष्पकीं आरूढोनि लोकालोक । क्रमूनि रसातळा येता झाला ॥ २ ॥ घायीं राक्षस जर्जरीभूत। मार्गी एकमेकां उपचारीत। देवांमाजी बळी प्रेतनाथ । जिंतोनि त्यातें चालिला ॥ ३ ॥ सवें प्रधान शुकसारण । मारीच अकंपन प्रहस्त जाण । आणीकही बळियाढे गहन । देवदर्पहरण राक्षस ॥ ४ ॥ ऐशा प्रधानांसहित । पुष्पकारूढ लंकानाथ । तंव पुढें रसातळ विख्यात । देखते झाले राक्षस ॥ ५ ॥ तया रसातळामाझारीं । वरुण नाग सहपरिवारीं । आणिक दैत्य नानापरी । वसती तया नगरीं हो ॥ ६ ॥ तया नगरीचें अभिधान । भोगावती नामें गहन । अति रम्य विश्रांतिस्थान । ऋषि मुनिगण वसती जेथें ॥ ७ ॥ सुवर्णभित्ती आणि मंदिरें । सुवर्णाचिया आटोळ्या गोपुरें । सर्व नरां सुवर्णाचीं घरें । तोरणें मखरें घरोघरीं ॥ ८ ॥ हाटें हटवटिया चौबारें । तेथें नांदिजे धनवत्तरें । घरोघरीं मंगळतुरें । नाना वाद्यें वाजती ॥ ९ ॥ ऐसिया नगराप्रती । येता झाला लंकापती । सवें प्रधान भद्रजाती । दृष्टीं नाणिती काळातें ॥ १० ॥ तया नगरींचे वीर । निवातकवचनामें दुर्धर । जयांचा धाक वाहे सुरेंद्र । सामान्य इतर कोणीकडे ॥ ११ ॥ ऐसिया वीरांप्रती । समरांगणीं राक्षस भिडती । उभयतां शस्त्रें वर्षती । एकमेकां लक्षूनि ॥ १२ ॥ एकमेकांवरी वर्षती बाण । एकमेकांवरी सांडिती पाषाण । एक ते शस्त्रें नाना दारुण । वैरी लक्षोन विंधिती ॥ १३ ॥ ऐसें करिती घोरांदर । राक्षस आणि ते विखारें । समरांगणीं समान वीर । हार जिंत न घेती ॥ १४ ॥ एक संवत्सरपर्यंत वीर । युद्ध करिती अति दुर्धर । शिणले नाहींत परस्पर । जयो इच्छिती आपणिया ॥ १५ ॥ निवातकवच आणि रजनीचर । युद्ध करिताती घोरांदर । तें निवारावया सावित्रीवर । ऐकोनि येता जाहला ॥ १६ ॥ विमानारूढ सावित्रीरमण । त्रैलोक्याचा स्वामी आपण । जेथें राक्षसां विखारां समरांगण । तेथें येता झाला प्रजापति ॥ १७ ॥ विधाता म्हणे तयांसी । तुम्ही युद्धीं अशक्त राक्षसांसीं । समरांगणीं भिडतां तुम्हांसी । राक्षस मारिती निजबळें ॥ १८ ॥ वरदबळें हे रजनीचर । उन्मत्त झाले महाथोर । इंहीं जिंतोनि सुरासुर । निधडे वीर मारिले ॥ १९ ॥ रावणेंसीं मैत्री कीजे । माझिया बोला मान दीजे । तरीच तुम्ही कल्याण पाविजे । नातरी जाइजे मरणमार्गें ॥ २० ॥ ऐकोनि ब्रह्मयाचें वचन । निवातकवच वीर मिळोन । रावणासीं मैत्री जाण । न लागतां क्षण पैं केली ॥ २१ ॥ साक्षी अग्नि ब्राह्मण । सुर असुर देवगण । राक्षस विखार एक होऊन । सुखसंपन्न राहिले ॥ २२ ॥ तदनंतर पौलस्तिसुत । पूजा तयांची घेवोनि तेथ । राहिला एक वर्षपर्यंत । सुखें स्वस्थ होऊनी ॥ २३ ॥ माया कपटविद्या

---

१ विधाता=ब्रह्मदेव. २ यमराजाला. ३ इंद्रजिताचा जनक (रावण). ४ पराक्रमी. ५ नांव. ६ बाजार. ७ चवाठे. ८ हत्ती. ९ निर्वाणीचें युद्ध. १० सर्प. ११ जय. १२ राक्षस. १३ ब्रह्मदेव.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

पूर्ण । जारण मारण मोहन स्तंभन । उच्चाटनादि कपटमंत्र दारुण । एक शत पूर्ण अभ्यास करी ॥ २४ ॥ मग तो राक्षसचूडामणी[1]। चालिला पाताळ शोधोनी । तंव विशाल देखिलें नयनीं । वरुणाचें निजनगर ॥ २५ ॥ अति रम्य महा सुंदर । सुवर्णाचें तें नगर । तया नाम अश्मपुर । तेथें विखार नांदती ॥ २६ ॥ काळयाचे ते जाती । विखार आपुलेनि बळें नांदती । तयांतें मारोनि लंकापती । पुढें चालिला सत्वर ॥ २७ ॥ तयावरी शूर्पणखेचा भ्रतार । तयासीं युद्ध केलें थोर । तयातें मारोनि सत्वर । मग पुढारां चालिला ॥ २८ ॥ तेथें खळ आणि बळवंत । तिसरा विद्युज्जिव्ह चवथा बळोत्कट । आणीकही बलाढ्य चार शत । दैत्य तेथ मारिले ॥ २९ ॥ तदनंतर लंकापती । पुढें चालिला तंव शुभ्रदीप्ती । कैलाससम श्वेतज्योती । वरुणालय देखिलें ॥ ३० ॥ तया मंदिरासी उपमा पूर्ण । द्यावयासी एक कैलास समान । अति दिव्य शोभे गहन । वरुण आपण नांदे तेथें ॥ ३१ ॥ तया वरुणाचे मंदिरीं । कामधेनु बांधिली स्रवे[2] क्षीरीं । तया क्षीराचा प्रवाह सागरीं । म्हणोनि क्षीरसागर बोलिजे ॥ ३२ ॥ त्या धेनूचें स्रवतां क्षीर । तयाचा झाला क्षीरसागर । धेनु देखोनि आनंद थोर । लंकेश्वरा जाहला ॥ ३३ ॥ जया धेनूचें वाहतां क्षीर । तयाचा झाला क्षीरसागर । तेथें जन्मला हिमकर[3] । आर्त[4] चकोरां निववीत ॥ ३४ ॥ तेथोनि जन्मलें अमृत । तेणें सुरवर तृप्त होत । म्हणोनि सुरभी[5] ऐसें म्हणत । ज्ञाते पंडित तियेसी ॥ ३५ ॥ कामधेनु कां म्हणती । ऐसें आक्षेपिजेल[6] श्रोतीं । तरी आयका तेचि अर्थी । सावधान श्रोतीं होइजे ॥ ३६ ॥ कामिकाचे पुरवी कामँ[7] । तियेचेनि देवां तृप्ति परम । म्हणोनि कामधेनु ऐसें नाम । तियेसीच पैं साजे ॥ ३७ ॥ सकळ देव जिचेनि जिती । सकळांचें जीवन जे निश्चितीं । म्हणोनि कामधेनु ऐसें बोलती । याचि कारणालागूनी ॥ ३८ ॥ ऐसिये धेनूतें देखोनी । रावणें प्रदक्षिणा करोनी । साष्टांग नमनें अभिवंदोनी । पुच्छ नेत्रीं लाविलें ॥ ३९ ॥ पुढें तो मंदोदरीकांत । चालिलासे त्वरान्वित । वरुणाचें गृह सुशोभित । वीर बळवंत देखिले तेथें ॥ ४० ॥ तयांतें गांजोनि म्हणे रावण । जा रे सांगा वरुणाप्रती जाऊन । अजित वीर दशानन । युद्धालागून आलासे ॥ ४१ ॥ तयासीं युद्ध कीजे । नाहीं तरी हरविलें म्हणिजे । ऐसें सांगोनि राक्षसराजें । वरुणाच्या दूतां पाठविलें ॥ ४२ ॥ दूत आला वरुणपुत्रापासीं । म्हणे गांजिलें राया राक्षसीं । युद्धा पाचारितो तुम्हांसी । शीघ्रतेसीं जाइजे ॥ ४३ ॥ दूताचें ऐकोनि वचन । कोपा चढला वरुणनंदन । म्हणता झाला पालाणा रे सैन्य । युद्धा रावण आलासे ॥ ४४ ॥ मग त्या वरुणाचे पुत्र पौत्र । तिंहीं पालाणिले आपुले रथ । एक वृषभीं आरूढ होत । एक चालत पैं पायीं ॥ ४५ ॥ वरुणसैन्य समस्त मिळोन । करितें झालें घोर रण । रावणें समस्तां त्रासून । बळक्षीण पैं केलें ॥ ४६ ॥ रावणाचे प्रधानीं तिहीं । संग्राम केला तिये ठायीं । वरुणसैन्य त्रासिलें पाहीं । समरांगणामाझारीं ॥ ४७ ॥ सलिलेंद्रसैन्य[8] विकल पडिलें । रथेंसीं आकाशांत पळतें झालें । तेथोनि संग्राम करूं लागलें । रावणावरी शस्त्रवृष्टी ॥ ४८ ॥ रावणाच्या रथावरी । शस्त्रवृष्टी झाली भारी । जैशा [10]अंबुधारा शैलावरी । तैसा राक्षस वेढिला ॥ ४९ ॥ जैशा बहुत मिळती पिंपीलिका[11] । वेढिती उरगनायकां[12] । तैसें तोयेंद्रसैनिकीं दशमुखा । रथेंसहित वेढिलें ॥ ५० ॥ देती हांका करिती गर्जन । म्हणती जिंतिला दशानन । हें देखोनि महोदरें जाण । काय केलें ते समयीं ॥ ५१ ॥ तया महोदरें ते समयीं । गदा घेतली काळतुल्य पाहीं । मिसळला संग्रामाच्या ठायीं । वरुणसैन्य मारीत ॥ ५२ ॥ वरुणसैन्य पाडोनि रणीं । सिंहनाद करी गर्जोनी । वैरी विरथ पाडिले मेदिनीं । अशुद्ध[13] वाहे भडभडां ॥ ५३ ॥ असो अद्भुत संग्राम झाला । वीरें वीर रणा आला । सर्व संपत्तीतें मुकला । जयो पावला महोदर ॥ ५४ ॥ तंव त्या वरुणाचे पुत्र । आकाशींहूनि पाहात । सैन्य देखोनि हताहत । मग तंवका[14] चढले हो ॥ ५५ ॥ अनेकशस्त्रसंभार । टाकिते झाले लक्षोनि निशाचर । मग कोपला राक्षसेंद्र ।

१ राक्षसश्रेष्ठ. २ दूध देत असे. ३ चंद्र. ४ पीडित. ५ कामधेनु. ६ शंका घेतील, ७ इच्छा, मनोरथ, ८ तयार करा. ९ वरुणसैन्य. १० पर्जन्यधारा. ११ मुंग्या. १२ सर्पराजाला. १३ रक्त. १४ आवेशाला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

शर अपार वर्षला ॥ ५६ ॥ न माती आकाशपृथ्वी-वरी। ऐसे शर वर्षला वैश्रवणारी। वर्म लक्षोनियां वैरी। भूमीवरी पाडिले ॥ ५७ ॥ कित्येक मुसळें-करून। कित्येक पट्टिशें[1] जाण। कित्येक शक्ति सोडोन। वरुणनंदन मारिले ॥ ५८ ॥ मारोनियां वरुणपुत्रांतें। विजयी झाला रावण तेथें। प्रधान करिती सिंहनादातें। जैसा प्रळयीं मेघ गर्जे ॥ ५९ ॥ तदनंतर दशानन। वरुणालयाप्रति जाण। येवोनि बोलता झाला आपण। सावधान अवधारा ॥ ६० ॥ रावण वरुणप्रधानासी। म्हणे सांग प्रहासा वरुणापासीं। राक्षसेंद्रें मारिलें तुझ्या पुत्रांसी। आतां तुजसीं युद्ध करूं पाहें ॥ ६१ ॥ तंव तो प्रहास प्रधान। ऐकोनि रावणाचें वचन। म्हणता झाला येथें नाहीं वरुण। ब्रह्म-लोका गेलासे ॥ ६२ ॥ जळेश्वर[2] ब्रह्मलोकाप्रती। गेलासे जाण निश्चितीं। बलिष्ठ होते ते समातींसी[3]। तुझेनि हातें पावले ॥ ६३ ॥ प्रहास प्रधान मधुर वाचा। बोधविला तेणें राजा लंकेचा। पुढील अन्वय[4] कथेचा। सावधान ऐकिजे ॥ ६४ ॥ ऐकोनि प्रहासाचें वचन। मग तो पौलस्तिनंदन। पुष्पकीं आरूढोनि जाण। बळिभुवना जाता झाला ॥ ६५ ॥ श्रीदाशरथी म्हणे महामुनी। तुमचे प्रसादें पुण्यपावनी। कथा ऐकिली रामा-यणी। भवतारणी निजगंगा ॥ ६६ ॥ जैसा गौत-माचा कृपाप्रसाद। त्रैलोक्यें भोगिजे सायुज्यपद[5]। जेंवी शिबीचें पुण्य अगाध। ग्रामस्थांसी उत्तम गति ॥ ६७ ॥ जेंवी समर्थाचेनि लग्नीं। मिष्टान्न अकिंचनीं[6]। तेंवी तुमचे वचनीं। माधुर्यता काय सांगूं ॥ ६८ ॥ पुढील कथानुसंधान। काय करिता झाला रावण। तें मजप्रती समूळ कथन। साङ्ग संपूर्ण निवेदिंजे ॥ ६९ ॥ ऐसीं श्रीरामाचीं शब्द-कुसुमें। श्रवणीं लेवोनि द्विजसत्तमें। आनंदें उल्हा-सोनि परम। काय वचन बोलिला ॥ ७० ॥ कुंभो[7]-द्भव म्हणे अवनिजापती। तूं देवाधिदेव वर्णिला श्रुतीं। अष्टादश पुराणें तुज नेणती। तेथें मी किती बापुडें ॥ ७१ ॥ जननीवोसंगा बाळक वाढे। तेणें मातेचा महिमा नेणिजे मूढें। तैसे आम्ही ब्राह्मण वेडे। तुज मानव म्हणतसों ॥ ७२ ॥ पद्मिनीसन्निद्ध बिढार। येवोनि राहिला दर्दुर[9]। सुवास नेणेचि पामर। भोक्ता मधुकर[10] तेथींचा ॥ ७३ ॥ अंधागृहीं लाविल्या दीपकोटी। नपुंसका पद्मिनी गोमटी। नारी जोडली तरी शेवटीं। उप-योगासी पैं नव्हे ॥ ७४ ॥ तैसें श्रीरामा तुझें चरित्र। नेणती मतिमंद अपवित्र। तो तूं आम्हांपुढें विचित्र। कथा पुससी राजेंद्रा ॥ ७५ ॥ तरी अव-धारीं गुणसंपन्ना। रावण जिंतोनियां वरुणा। प्रवेशला पाताळभुवना। प्रहस्त प्रधानासमवेत ॥ ७६ ॥ सुतळीं रावण प्रधानासहित। चालिला पुढें अपूर्व अद्भुत। नगर देखोनियां विस्मित। प्रधानासी बोलिला ॥ ७७ ॥ जेंवी देवेंद्र गुरूप्रती। प्रश्न करी एकांतीं। तेंवी रावण प्रधानासी युक्तीं। बोलता झाला ते समयीं ॥ ७८ ॥ रावण म्हणे गा प्रधाना। देखोनि नगरीची रचना। अपूर्व वाटलें माझिया मना। येथील राजा कोण असे ॥ ७९ ॥ कैसी या नगरीची रचना। उणें आणिलें शचीप-तिभुवना[11]। सत्यलोक ईपुढें ठेंगणा। माझिया दृष्टीसी भासत ॥ ८० ॥ अलका आणि द्वारका। पाहतां इच्या न ये तुका। जेथें वास कैलासना-यका। त्याहूनिही अपूर्व ॥ ८१ ॥ नगरी परिवेष्टित सतयोजनें। कल्पतरूंची उद्यानें[12] वनें। सरोवर-गणना करिजे कोणें। देउळांतें मिती नाहीं ॥ ८२ ॥ ठायीं ठायीं आम्रवनें। स्थळोस्थळीं शिवस्थानें। नानापरींच्या वाटिका[12] सुमनें[13]। मार्गस्थांतें सुवास देती ॥ ८३ ॥ जैसी यौवनें सुंदरी। तरुणपणें न माय अंबरीं। तैशा वल्ली नानापरी। दिव्यौषधींच्या शोभती ॥ ८४ ॥ रत्नकळस विराजमान। ठायीं ठायीं पताका गहन। नगरीं लोक पुण्यपावन। धार्मिक जन वसती तेथें ॥ ८५ ॥ हे कोणें पाळिली नगरी। प्रहस्ता आंत जावोनि झडकरी। अभि-प्राव मनामाझारी। आणोनियां मज सांगें ॥ ८६ ॥ त्र्यंबक जेंवी तारकारीप्रती[14]। सांगे महत्प्रयोज-नाची वदंती। तेंवी ते समयीं मंदोदरीपती। आज्ञापीत प्रधाना ॥ ८७ ॥ रावणाचें प्रत्युत्तर-वचन। ऐकोनि प्रहस्त प्रधान। नगरामाजी प्रवे-शतां गर्जन। निजानंदें पैं केलें ॥ ८८ ॥ प्रधान प्रवेशतां नगरीं। प्रथमद्वारीं ब्रह्मचारी। देखिला

१ पट्टिश=आयुधविशेष. २ वरुण. ३ मृत्यु. ४ संबंध. ५ मोक्ष. ६ दारिद्र्याला. ७ अगस्तिमुनि. ८ हे रामा.

९ बेडूक. १० भ्रमर. ११ अमरावतीला. १२ बागा. १३ पुष्पें. १४ कार्तिकस्वामीला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वामन सालंकारी । सुवर्णमाळा कंठीं असे ॥ ८९ ॥ श्यामसुंदर विराजमान । माथां मुकुट तेज गहन । तयाचे दीप्ती पाताळभुवन । प्रकाशपूर्ण भासत ॥ ९० ॥ भाळीं मृगनाभि ललाटीं । मलयजचंदनाची शोभे उटी । आजानुबाहु जगजेठी । कुंडलें गोमटीं झळकती तेजें ॥ ९१ ॥ शोभे पीतांबर वसन । दक्षिणांगीं द्विजचरण । सकलालंकारांचें मंडण । ऋषि मुनि वंदिती ज्यातें ॥ ९२ ॥ ऐसा पुरुष प्रथमद्वारीं । प्रहस्त देखोनि प्रश्न करी । म्हणे हे कोणीं पाळिली नगरी । येथील राजा कोण असे ॥ ९३ ॥ सांगा तयाचें अभिधान । ऐसें प्रहस्तमुखींचें वचन । ऐकोनि बोलिला श्रीवामन । सावधान निजवृत्ती ॥ ९४ ॥ वामन म्हणे गा रजनीचरा । ऐकें सावधान चतुरा । ये सुतळीं वास दैत्येश्वरा । अभिधान राजा बळी असे ॥ ९५ ॥ येथें वसती धार्मिक जन । येथील राजा बळी बळवान । जयासी भीती सुरासुरगण । द्वारीं भगवान जयाच्या ॥ ९६ ॥ महापुरुषाची ऐकोनि मात । धांवोनियां प्रधान प्रहस्त । जेथें होता लंकानाथ । तया वृत्तान्त जाणविला ॥ ९७ ॥ अपूर्व प्रधानमुखींचीं उत्तरें । परिसोनियां लंकेश्वरें । हात जोडूनि पुढारें । प्रथमद्वारा पैं आला ॥ ९८ ॥ जेंवी निर्धनासन्निध विवसी । मांत्रिकापुढें भूतें जैसीं । तैसा रावण प्रधानेंसीं । वामनापासीं पैं आला ॥ ९९ ॥ राक्षसें देखोनि वामन । न करी प्रणिपात नमन । जैसा दरिद्री निधान । डावलोन जातसे ॥ १०० ॥ जयविजय सनत्कुमारांसी । नोळखतां झाले परमक्लेशी । च्यवोनियां दैत्ययोनीसीं । जन्मोनि मरणासी पावले ॥ १ ॥ तैसा रावण ते समयीं । प्रणिपात न करोनि कांहीं । बोलता झाला युद्धालागीं पाहीं । त्रैलोक्य जिंतोनि मी आलों ॥ २ ॥ द्वारीं उभा असें तिष्ठत । बळीसी वेगीं जाणवीं मात । युद्धा पाचारितों त्वरित । ऐसा वृत्तान्त जाणवीं ॥ ३ ॥ वामन म्हणे रावणासी । तुम्हींच जावें बळीपासीं । हे वार्ता जाणवा तयासी । निजमुखेंकरोनियां ॥ ४ ॥ मी असें तयाचा द्वारपाळ । येथें बैसोनियां सकळ । रक्षीतसें क्षितिमंडळ । आज्ञाधारक मी त्याचा ॥ ५ ॥ वामनमुखींचें ऐकोनि वचन । भीतरीं प्रवेशला दशानन । सप्तद्वारें उल्लंघोन । राजद्वारा पैं आला ॥ ६ ॥ भद्रासनीं बळी भूपती । अर्धांगीं विंध्यावळी सती । परिवेष्टित सेनासंपत्ती । तंव रावणातें देखिलें ॥ ७ ॥ देखोनि रावण दशमुखांचा । समस्त अवलोकोन बोलती वाचा । म्हणती हा बहु आननांचा । काठोनि कैंचा येथें आला ॥ ८ ॥ कीं हें दशमुखांचें किडें । कीं हें दशानन श्वापद गाढें । कीं हें दशग्रीवांचें पक्षी चोखडें । राजभेटी आणिलें कोणीं ॥ ९ ॥ ऐसे तर्क नानापरी । करितां जनीं ते अवसरीं । पुढें तो रावण राजसदनाभीतरी । येता झाला तत्काळ ॥ ११० ॥ येवोनि बळिराया समीप । उभा रावण धरोनि कोप । मनीं विचारी बळीचा गर्व दर्प । झाडणी करीन समस्तां देखतां ॥ ११ ॥ मज नेदीच मान्यता मान । न बोलावें ऐसें बोले वचन । याचे अंगीं बलाभिमान । मजकडे नयनें न पाहे ॥ १२ ॥ ऐसी रावणहृदयींची व्यवस्था । कळों सरली सुतळनाथा । सरिसाच राजा बोलता । झाला तया राक्षसासी ॥ १३ ॥ बैसा अहो जी राक्षसेश्वरा । तुम्ही कोण कोणाचे समाचारा । येथें यावयाचे कारणविस्तरा । मजप्रति सांगावें ॥ १४ ॥ रावण म्हणे मी पौलस्तिकुळदीपक । सकळ राक्षसांचा नायक । जिंतोनियां तिन्ही लोक । येथें युद्धासी देख पैं आलों ॥ १५ ॥ मजसीं करावा संग्राम । म्या जिंतिले सुरासुर परम । शचीपतीचें हिरोनि धाम । राक्षसांसी दीधलें ॥ १६ ॥ बळी म्हणे राक्षसनाथा । परिसें माझी राज्यकथा । मजसीं युद्ध न घडे सर्वथा । परी उपाय आतां सांगतों ॥ १७ ॥ प्रथमद्वारीं पुरुषपंचानन । तयासीं युद्ध करावें आपण । येरू म्हणे द्वारपाळ दीन । तयासी युद्ध काय करूं ॥ १८ ॥ जेथें पंचाननाचें गर्जन । तेथें ऐरावतीचे फडफडती कान । कोणे उपमे योग्य कोण । नेमितोसी अरे राया ॥ १९ ॥ जरी गर्दभ उन्मत्त बहुसाल । तरी काय युद्धीं शार्दूळें । जिंतील हा विपरीत काळ । कैसा घडेल राजेंद्रा ॥ १२० ॥ कमळको-

१ कस्तूरी. २ मलयपर्वतावरील चंदनाची. ३ वस्त्र. ४ नांव. ५ हे राक्षसा ! ६ ठेव्यापाशीं, ७ टाकून. ८. भ्रष्ट होऊन. ९ सर्व पृथ्वी. १० सिंहासनीं. ११ पुरुषश्रेष्ठ. १२ वाघ.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

शींचा षट्पदं[1] । काय उपडील मेरूचा कंद । ऊर्णनाभितंतुरुद्धं[2] । गज काय गुंतोनि राहील ॥ २१ ॥ जरी झाला मशक थोर । तरी काय ग्रासील वैश्वानॅर[3] । पिंपीलिकेनें[4] गिरिवर । कैंवी माथां धरवेल ॥ २२ ॥ अंधाचा महा अंध सुत । स्वयें अडखळोनि कूपीं पडत । तेणें धरोनि मार्गस्थाचा हात । पंथीं लावील निजनेटें ॥ २३ ॥ हें कैंवी घडे जें न घडे । मशकपांखीं मेरु उडे । दां[5]नवें उभारोनि फडे । शेषासी वाद करूं आलें ॥ २४ ॥ तें द्वारपाळ बापुडें दीन । मी लंकेचा राजा रावण । वधिलिया पराक्रम कोण । माझा होईल बळिराजा ॥ २५ ॥ ऐसें हें कैसें घडेल राया । मजसीं युद्धा द्वारपाळा तया । प्रेरितोसी हा विचार वायां । साच कैसा घडेल ॥ २६ ॥ दशमुखींची वचनावळी । ऐकोनियां राजा बळी । बोलता झाला तये काळीं । मूर्खाप्रती सुबुद्धी जैसा ॥ २७ ॥ ऐक वत्सा दशानना । तूं नेणसी त्याच्या महिमाना । ऐकसी तरी सावधमना[6] । समूळ कथना सांगतों मी ॥ २८ ॥ तयाचिया सत्तामात्रें । सृजंती[7] अंडर्ज[8] जारजादि[9] भूतें । सृष्टिकर्ता विधाता त्यातें । पुत्र केला पोटींचा ॥ २९ ॥ सकळ सृष्टीचा जो कर्ता । तो आत्मज त्याचा विधाता । तो अवतारपुरुष तत्त्वतां । सत्य लंकानाथा मानावें ॥१३०॥ चतुर्दशभुवनांचा ईश्वर । कर्ता संहर्ता सर्वेश्वर । तेणें मानवरूपें अवतार । धरिला असे गा पौलस्तिसुता ॥ ३१ ॥ धरा भारें पीडोनी । शरण गेली त्यालागोनी । मग तो आपण शार्ङ्गपाणी । अवतार धरिता पैं झाला ॥ ३२ ॥ वेदानिमित्त विधात्यानें । प्रार्थना केली दीनवदनें । मग मत्स्यावतार धरोनि तेणें । शंखासुर निर्दळिला ॥ ३३ ॥ दैत्यें पृथ्वी नेली पाताळा । तैं सुरीं प्रार्थिलें घननीळा । तिच्या कैवारा अवतरला । कूर्मरूपें जनार्दन ॥ ३४ ॥ पृथ्वी धरी पृष्ठीवरी । म्हणोनि कूर्म म्हणती अद्यापवरी । सवेंचि वराहरूपें श्रीहरी । हिरण्याक्षा मर्दिलें ॥ ३५ ॥ दैत्यें गांजिलें पुत्रातें । त्याच्या कैवारा अवतरला तेथें । स्तंभ भेदोनि हिरण्यकशिपूतें । विदारिलें जानूवरी[10] ॥ ३६ ॥ माझ्या अभिमानें मज केवळ । नाडिलें गा करोनि छळ । दातेपणाच्या थोरीनें प्रबळ । न मायेचि तिहीं लोकीं ॥ ३७ ॥ माझ्या अभिमानाची देखोनि थोरी । मग हा वामनरूपें झाला हरी । छळणा करोनि कपटकरीं । यज्ञद्वारा पैं आला ॥ ३८ ॥ बटुवेष धरोनि जाण । मज मागितली भूमि पाद तीन । पाठीवरी देवोनि चरण । पाताळभुवनीं लोटिलें ॥ ३९ ॥ कपटभाव त्यासी फळला । माझे घरीं द्वारपाळ झाला । गळा बांधोनियां राहिला । अद्यापवरी द्वारासीं ॥ १४० ॥ पुढील त्याचा कैसा पवाडा[11] । कामधेनूनिमित्त केला झाडा । सहस्रार्जुनाचे बाहूंचा सडा । रणांगणीं घातला तेणें ॥ ४१ ॥ तोचि पुरुष सूर्यवंशीं । अवतरेल राक्षसकुळान्त करावयासी । पौलस्तीचे कुळवल्लीसी । भस्म करावयालागूनि ॥ ४२ ॥ तोचि अवतरोनि गवळ्याघरीं । पूतना शोषोनि काक बक मारी । रिठासुरासी दाढेभीतरी । चघळिलें पूगीफळ[12] जैसें ॥ ४३ ॥ तेणें दावाग्नि प्राशिला । धेनुक वत्स उपटिला । विमलार्जुन उन्मळिला । रांगत रांगत बाळरूपें ॥ ४४ ॥ जरासंध काळयवन । दंतवक्त्रशिशुपाळादि जाण । मुष्टिक चाणूर मल्ल मर्दून । कंसनिर्दळण मामाचें ॥ ४५ ॥ यम कुबेर वायु ईशान । हे त्याचे वंदिती चरण । तो हा आदिपुरुष नारायण । द्वार रक्षोन बैसलासे ॥ ४६ ॥ काळासी जयाचा महाधाक । जयाचे तेजें सूर्यशशांक[13] । अष्ट दिक्पाळ सेवक । सेवन करिती जयाचें ॥ ४७ ॥ त्यासीं युद्ध जाय करीं । बळीनें आज्ञापिलें ते अवसरीं । हें ऐकोनि तो सुरारी । काय बोलता जाहला ॥ ४८ ॥ जो हा काळरूप यम जाण । दंडें त्रैलोक्या करी दमन । त्यासीं युद्ध आपण । अवश्यमेव करावें ॥ ४९ ॥ निजदंडें पातक्या दंडी । तयावरी म्यां घातली धाडी । राज्यासहित देशोधडी । म्यां केला बळिराया ॥ १५० ॥ ऐसी रावणाची वचनावळी । ऐकोनियां राजा बळी । उपेक्षा करोनि तयेकाळीं । सारीपाट आणविला ॥ ५१ ॥ रत्नमंचकावरी जाण । विंध्यावळी राजा दोघे जण । सारीपाट खेळती पार्श्वभागीं रावण । परम कोपें खवळला ॥ ५२ ॥ बळी न मानीच तयासी । जेंवी ज्ञाता पाखांडियासी ।

१ भ्रमर. २ कोळ्याच्या सुतानें बांधिला गेलेला. ३ अग्नि. ४ मुंगीनें. ५ काढू. ६ लक्ष्यपूर्वक. ७ उत्पन्न होतात. ८ पक्षिसर्पादि. ९ मनुष्यादि. १० मांडीवर घेऊन. ११ पराक्रम. १२ सुपारी. १३ सूर्यचंद्र.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

रवि जैंवी शर्वरीसी । तैसें झालें रावणा ॥ ५३ ॥ राजहंस नातळे शेणा । तापसी न पाहे स्त्रीरत्ना । निष्कामासी धनतृष्णा । तैंवी उपेक्षा रायें केली ॥ ५४ ॥ गंगेनें त्यजिलें पाप । ज्ञाता सांडी हृदय-कोप । निष्पत्र जाणोनियां पादप । पक्षियें वर्जिला पैं जैसा ॥ ५५ ॥ साधु जैंवी त्यजिती निंदा । ब्रह्मचारी नातळे प्रमदा । ब्रह्मनिष्ठ हर्षविषादा । न येतीच कल्पांतीं ॥ ५६ ॥ चातक नातळे आणिक जीवन । चकोर न सेवी अमृतावांचून । दुर्भिक्षें पीडिला शार्दूळ तृण । न सेवी हो देहत्यागें ॥ ५७ ॥ ऐसियापरी दैत्यनाथें । उपेक्षोनियां राव-णातें । खेळतां स्तब्ध झाला चित्तें । देहभावार्थ विसरोनी ॥ ५८ ॥ सारीपाट खेळतां दोघां जणां । फांसा निसटला तो आणीं रावणा । ऐसें ऐकोनि दशानना । कोप परम उद्भवला ॥ ५९ ॥ म्यां जिंतिले सुर समस्त । बाहूनें आंदोळिला कैलास पर्वत । त्या मज बळी फांसा मागत । अपूर्व येथ देखिलें ॥ १६० ॥ फांसा देईन ये काळीं । मग यातें मुष्टिघातातळीं । मारोनियां नेईन धुळी । ऐसा आवांका धरियेला ॥ ६१ ॥ ऐसें भावोनि लंकानाथें । फांसा उचलितां दोहीं हातें । नुचलेचि तो मग विसां भुजांतें । पसरिता झाला ते समयीं ॥ ६२ ॥ फांसा धरितां विसां हातीं । नुचले रावणा क्षीण शक्ती । प्रयासें उचलितां तंव प्रारब्धगती । भूमीं पडिला रावण ॥ ६३ ॥ फांसा लोटला कपाळावरी । पडोनि अशुद्ध ते अवसरीं । वाहूं लागलें तंव राजनारी । न्या न्या दूरी म्हणतसे ॥ ६४ ॥ दशमुख आणि विंशति कर । करंटें कोणें आणिलें समोर । याचें अशुद्ध देखों नये सत्वर । काढा काढा लव-करी ॥ ६५ ॥ बहुतां मुखांचें अपवित्र । शृंगारिलें जैसें कां प्रेत । त्याचें देखों नये रक्त । म्हणोनि दूर घातला ॥ ६६ ॥ बाहेर येवोनि रावण । चिंतातुर परम दीन । म्हणे नगराप्रति करूं गमन । येथें धड-गती पैं नाहीं ॥ ६७ ॥ तंव वेढिला दैत्यगणीं । मुकुट हिरोनि नग्न करोनी । करिते झाले वस्त्रहरणी । नागवोनि सोडिला ॥ ६८ ॥ रावण कुंथत अति बळेंसीं । आलों होतों युद्धासी । पुरुषार्थी निव-डिला गति ऐसी । आतां विटंबनेसी अवधारा ॥ ६९ ॥ रावणा नग्नीकरण होत । ऐसा झाला पैं वृत्तान्त । म्हणे आतां लंका प्राप्त । कोणे काळीं होईल ॥ १७० ॥ ऐसें विचारोनि रावण । नगरद्वारा आला जाण । तंव पुढें देखिला वामन । देदीप्य-मान तेजस्वी ॥ ७१ ॥ रावणासी म्हणे वामन । बाहेर नको करूं गमन । राजाज्ञा अति दारुण । मज असे रे राक्षसा ॥ ७२ ॥ मी रायाचा आज्ञाधारी । राजाज्ञे-विण न सोडीं बाहेरी । रावणें ऐकोनि ते अवसरीं । चिंतातुर पैं झाला ॥ ७३ ॥ क्षुधेनें पीडिला लंका-नाथ । घरोघरीं भीक मागत । वामनें जठराग्नी चेतविला तेथ । पोट न धाँतें कवणेपरी ॥ ७४ ॥ मागेंपुढें नाहीं सुडका । अवदशेनें वरिलें लंका-नायका । दावी लिंग नगरींच्या लोकां । संपत्ति देखा दावीत ॥ ७५ ॥ मग काय करी लंकापती । जावोनि अश्वशाळे करी विनंती । मुष्टि मुष्टि चणे द्या मजप्रती । क्षुधानिवृत्ति करावया ॥ ७६ ॥ अश्ववाहक म्हणती लंकानाथा । लिदीच्या पाट्या घेईं माथां । बाहेर सांडूं नये तत्त्वतां । मग चणे क्षुधार्थी देऊं तुज ॥ ७७ ॥ दहा मुकुटीं जडित दहा माथे । लिदीच्या पांट्या ठेवोनि तेथें । पोट न भरे विसां हातें । चणे खातां रावणा ॥ ७८ ॥ ऐसा कोंडला रावण । कांहीं युक्ति न चले जाण । चित्तीं पाहे विचारोन । सुटिका पूर्ण नव्हेचि ॥ ७९ ॥ वामनें पुर-विली पाठी । लंके जावयाची खुंटली गोष्टी । उंब-गोनि दशानन शेवटीं । राहता तेथें पैं झाला ॥ १८० ॥ ठकवोनियां दाशरथी । हरून नेईल सीता सती । येणें क्रोधें कश्यपी मूर्ती । थोर विपत्ति भोगवी ॥ ८१ ॥ वामनातें ठकवोन । अदृश्यगती करी गमन । पळोन जातां दशानन । पुढें वामन देखिला ॥ ८२ ॥ सेणें पळे लंकापती । सवेंचि चाले पाताळगती । धराधारक खुजट मूर्ती । देखोनि परती करीतसे ॥ ८३ ॥ रावण म्हणे जी वामना । मज सोडोनि द्यावें जीवदाना । येरू म्हणे राजाज्ञा- । -वीण रावरंका निर्गमें नाहीं ॥ ८४ ॥ पळों जातां दशदिशीं । तेथेंही व्यापकत्व वामनासी । देखोनि रावण अति भयेंसीं । खेचरगतीसींही चालेना ॥ ८५ ॥ जैसा दरिद्रियाचा उदीम । फळ नेदी क्लेश परम । पापि-यामुखीं श्रीराम । न ये जैसा कल्पांतीं ॥ ८६ ॥ अँशु-

१ रात्रीला. २ मुळांनीं जल पिणारा, वृक्ष. ३ स्त्री. ४ उदक. ५ दारिद्र्यानें. ६ वाघ. ७ रक्त. ८ वीस हात. ९ पराक्रमी. १० भरेना. ११ कंटाळून. १२ वामन. १३ सुटका. १३ अपवित्राला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

चिया जैसा जप । कुलहीना जैसें तप । निंदकासी जैसें पाप । फळ नेदी पुण्याचें ॥ ८७ ॥ तैसें झालें दशानना । सायास वृथा गेले जाणा । पुढें क्षुधेनें केला दीनवाणा । भीक रावणा लाविली ॥ ८८ ॥ नगरस्त्रियांसी करी विनंती । मी सूत कांतीन बहुतां हस्तीं । दहा रहाट दहा पंक्तीं । अन्ननिश्चिती करावी ॥ ८९ ॥ कापूस वोढितां दशानन । तोंडघसीं पडला जाण । मुखीं सरक्या भरोन । अति लज्जा पावला ॥ १९० ॥ चुकोनियां मुळींचा तंतु । कांतूं बैसला लंकानाथु । निजधर्माचा मोडे चातु । स्त्रिया मारीत टोले वरी ॥ ९१ ॥ पुढें खंडेरायाचा होवोनि श्वान । भुंकों लागला मागे अन्न । परिवेष्टित लहान सहान । मुलीं वेढोन घेतला ॥९२॥ कोणी टाकिती खापरें । म्हणती कोणी मर मरें । एक म्हणती मागें सरें । आपदा थोर पावला ॥ ९३ ॥ पोटालागीं नाचे दारोदारीं । वीस हात नाचवी नानापरी । जंबुकगर्दभस्वरेंकरीं । तुकडे घरोघरीं मागत ॥ ९४ ॥ ऐसी दशा रावणासी । हांक गेली पौलस्तीपासीं । तेणें येऊनि वेगेंसीं । पुत्रशुद्धी पैं केली ॥९५॥ सोडवावया निजपुत्रासी । सुतळीं प्रवेशे पौलस्ति ऋषी । येवोनि बळीच्या नगरासी । पुत्रशुद्धीसी करीतसे ॥ ९६ ॥ तंव देखिला दुरोनि दशानन । खंडेरायाचा होवोनि श्वान । भिक्षा मागे पोटालागून । ऋषि लज्जा पावला ॥ ९७ ॥ ऋषि जात बळीपासीं । तेणें सन्मानें पूजोनि त्यासी । पुसता झाला कोणीकडे ऋषी । आगमन झालें तुमचें ॥ ९८ ॥ सांभाळावया चकोरासी । निजमंडळ सांडी शशी । तैसें तुमचें आगमन ऋषी । दीनजनांसी उद्धरावया ॥ ९९ ॥ आळसियावरी अनुग्रहार्थ । उद्धरावया शिवजटेचें तीर्थ । तैसें तुमचें आगमन येथ । कृपायुक्त आलेती ॥ २०० ॥ कोणे कार्यालागीं ऋषी । तुम्ही आलेती या ठायासी । येरु म्हणे त्वां रावणासी । कोंडोनि कां राखिलें ॥ १ ॥ सुतळाधिपतीनें वाहिली आण । म्हणे माझ्या नगरीं बंदिवान । नाहीं रोग उपद्रव जाण । दरिद्रपण असेना ॥ २ ॥ कोणे ठायीं कोणे नगरीं । कोणें राखिला दशशिरी । शोधोनि आणा ये अवसरीं । सन्मानेंकरीं सोडीन ॥ ३ ॥ पाहूं जातां पौलस्तिमुनी । लिदीच्या पांढ्या माथां घेवोनी । तुकडे खात चाले मेदिनीं । येतां दुरोनी देखिला ॥ ४ ॥ पौलस्ति देखतां पौलस्तिनंदन । भुकिन्नला होवोनि श्वान । पुढें चाले तंव दर्शन । पितया देखोन लाजला ॥ ५ ॥ पौलस्त्य म्हणे निजतनया । एवढ्या आपदा भोगावया । राखिलें असे काय राया । जावों नेदी बळिराज ॥ ६ ॥ कोंडोनि राखिलें वामनें । एसें बोलतां दशाननें । मग काय केलें पौलस्तीनें । सावधान मनें अवधारा ॥ ७ ॥ करीं धरोनि दशशिर । पौलस्ति येवोनि वामनासमोर । आज्ञा द्यावी हा लंकेश्वर । निजराज्यास जाईल ॥ ८ ॥ पौलस्ति देखोनि वामन । घातलें साष्टांग लोटांगण । मस्तकीं वंदोनियां चरण । धर्मवचन अनुवादे ॥ ९ ॥ बळिरायाचा मी सेवक । द्वारपाळ द्वाररक्षक । आज्ञेवेगळे राव रंक । एकाएक जाऊं नेदीं ॥ २१० ॥ राजाज्ञा घेतल्यावरी । अवश्य न्यावा जी बाहेरी । रोकडे सुटकेची ऐका परी । निर्गमन व्हावया ॥ ११ ॥ मुनि म्हणे कैसे चिन्हा । आनंदें सांगावें वामना । पंचकद्वयशिरां वपना । आणि मुंडणा खांडमिशा ॥ १२ ॥ श्याम करोनियां वदन । दशनासिकीं कवड्या बांधून । मुखीं श्वेत पीत लेपन । ये चिन्हें निर्गमन मुनिराजा ॥ १३ ॥ पुलस्तितनय म्हणे निजपुत्रासी । तुज नेईन रायापासीं । सन्मान देईल मुद्रिकेसीं । जावयासी रावणा ॥ १४ ॥ येरु म्हणे अहो जी ताता । मुख न दाखवीं बळीस आतां । राया फांशासी आणूनि देतां । दांतघसीं पडलों मी ॥ १५ ॥ युद्धा आलों अति सत्राणें । मज झालें लाजिरवाणें । येथेंचि आतां प्राण देणें । परी नाहीं येणें बळीपासीं ॥ १६ ॥ ऋषि म्हणे निषिद्ध राजवपन । येरु म्हणे कैंचें राजलक्षण । सुडका लागला अतिदीन । मुंडन केलिया भय काय ॥ १७ ॥ जे जे होती बंदिनिर्मुक्त । त्यांसी पाहिजे प्रायश्चित्त । मज आजीच आला सिंहस्थ । निषेधार्थ न वदावा ॥ १८ ॥ वामनापासीं निर्मुक्ती । कदा नव्हे कल्पांतीं । माझेनि भाग्यें वपनाकृती । बोलिला

१ दुःख. २ मुळाचा शोध. ३ कल्याणार्थ. ४ सन्मानपूर्वक. ५ पांढरा. ६ पिंवळा. ७ पौलस्तिमुनि. ८ आवेशानें.

९ राजाचें वपन करविणें. १० केशवपनास योग्य वेळ. ११ सुटका. १२ मुंडन.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

निर्मुक्ती वामन ॥ १९ ॥ ऐसें बोलोनि दशवदन । खांडमिशा मस्तकवपन । काळें करोनियां वदन । आला आपण अति शीघ्र ॥ २२० ॥ देखोनि रावणाचें चिन्ह । लाजवीत सकळ जन । गोमयपिंडीं अभिषेकून । दिधला सोडून वामनें ॥ २१ ॥ याउपरी पौलस्तिनंदन । पुष्पकविमानीं आरूढोन । आक्रमिता झाला गगन । लंके उंजू चालिला ॥ २२ ॥ एका जनार्दना शरण । अगस्ति सांगे बळीचें कथन । आतां पुढिले प्रसंगीं जाण । सांगेल आपण घटोद्भव ॥ २२३ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां प्रेतराजदशाननयुद्धबलिराजनगरे रावणवपनविटंबनं नाम सप्तविंशतितमोऽध्यायः ॥ २७ ॥ ओंव्या ॥ २२३ ॥

अध्याय अठ्ठाविसावा

॥ श्रीदाशरथये नमः ॥ दाशरथी वीरचूडामणी। कथा पुसे कुंभोद्भवालागूनी । म्हणे वरुणपुत्रांतें जिंतोनी । रावणें पुढें काय केलें ॥ १ ॥ अगस्ति म्हणे वीरशार्दूळा । जनकजामाता अयोध्याभूपाळा । पूर्णब्रह्म अवतारखेळा । खेळतोसी नटनाट्यें ॥ २ ॥ निर्विकल्प ब्रह्म तूं सनातन । विरिंचि हा तुझा नंदन । जयानें सृष्टि केली निर्माण । ब्रह्मसृष्टि जाण म्हणिजे ते ॥ ३ ॥ तुझी आज्ञा वंदी कळिकाळ । तुझी माया हे लोकां सबळ । तो तूं आम्हांप्रति कुशळ । कथा ऐकों इच्छिसी ॥ ४ ॥ तरी ऐकें गा श्रीरामचंद्रा । निर्गुणा जी गुणसमुद्रा । तुझिये आज्ञेनें नरेंद्रा । वाचा चारी वदती शब्द ॥ ५ ॥ पुढें त्या पौलस्तिनंदनें । वरुणलोक जिंतोनि तेणें । महावीर मारोनि सेने । त्यांच्या स्त्रिया देखिल्या ॥ ६ ॥ सुंदरा आणि अति सुकुमारा । राजकन्या गंधर्वकन्या अपारा । आणि ऋषिकन्या थोरथोरा । हरिता झाला लंकेश ॥ ७ ॥ पन्नग यक्ष सुरगण । दैत्य आणि सिद्ध चारण । त्या समस्तांतें मारून । स्त्रिया जाण हरिता झाला ॥ ८ ॥ स्त्रिया वाहोनि विमानीं । रावण परतला घेवोनी । मार्ग क्रमितां योषिता जनीं । खेद करिती आक्रंदें ॥ ९ ॥ म्हणती पूर्वी काय पाप केलें । राक्षसें आमुच्या भ्रतारां मारिलें । गणगोतां निःसंतान केलें । पुढें आमुतें भक्षील हा ॥ १० ॥ अदृष्ट आमुचें बळवंत । म्हणोनि रावणा झालों प्राप्त । विमानीं भरोनि स्त्रिया समस्त । असे नेत लंकेसीं ॥ ११ ॥ नदिया समुद्रीं जेंवी भरती । तेणें पूर्ण अंपांपती । तैशा विमानीं स्त्रिया नेणों किती । लंकेप्रती चालविल्या ॥ १२ ॥ मार्गीं स्त्रिया शोक करिती । एक रडती आक्रंदती । एक कानकेश तोडिती । एकी चरफडती अति दुःखें ॥ १३ ॥ अधोमुखें एकी करिती । एकी भूमीवरी उदकें लिहिती । जे रावणकुळा हो समाप्ती । ऐसें म्हणती पैं एकी ॥ १४ ॥ या स्त्रियांचें वर्णितां रूप । देखोनि लाजे कंदर्प । अष्टनायिकाही त्यांपुढें अल्प । लाजें समीप येवों न शकती ॥ १५ ॥ एकीचे केश लंबायमान । एकी चंद्रवदना संपूर्ण । एकींचे मृगांसारिखे नयन । एकी तरुण षोडशवर्षा ॥ १६ ॥ बाला प्रौढा मुग्धा नारी । शोक करिती नानापरी । म्हणती अगा ये त्रिपुरारी । कोण कर्म आमुचें ॥ १७ ॥ तया शोकेंकरोनि जाण । काळवंडलें तें विमान । जेंवी अग्निहोत्राच्या धुरें जाण । गृह काळिमा पावत ॥ १८ ॥ श्वासोच्छ्वास टाकिती । एकी पूर्वस्थिती आठविती । आम्हांवीण आमुचे पती । कोण गती पावतील ॥ १९ ॥ आमुचे पुत्र आम्हांवीण । सांडितील आपुला प्राण । सासू सासरे दीर भावे जाण । कोण गती करितील ॥ २० ॥ आम्ही पतिव्रता पतीवीण । येथें सांडूं पाहों प्राण । परी हा राक्षस दुर्जन । न लागतां क्षण मारील ॥ २१ ॥ रावणहातें मृत्यु होतां । आम्हीं जावें अधःपाता । अथवा स्वबुद्धी प्राण त्यागितां । नरकपाता पाविजे ॥ २२ ॥ पूर्वजन्मीं कोण आचरण । केलें असेल दारुण । तेणें पापें रावणें धरून । लंकाभिगमन करवितो ॥ २३ ॥ प्रारब्ध बळवंत सृष्टीं । तें भोगवितें दुःखकोटी । विधात्या दुष्टें लिहिलें ललाटीं । कर्म आपुलें देखोनी ॥ २४ ॥ अदृष्ट आमुचें बळवंत । तेणें बंधन झालें प्राप्त । आम्हां सोडविता नाहीं येथ । एका अच्युतावांचोनी ॥ २५ ॥ आमुचें रावणें

१ शेणाच्या गोळ्यांनीं. २ सरळ. ३ अगस्त्यऋषीला. ४ मुलगा. ५ स्त्रिया. ६ समुद्र. ७ खालीं तोंडें. ८ मदन. ९ नुकत्याच वयांत आलेल्या. १० ब्रह्मदेवानें, दैवानें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

केलें ग्रहण । दुष्ट दुरात्मा निंद्य जाण । पुढें स्त्रियांचें करितां ग्रहण । अवश्य मरण पावेल ॥ २६ ॥ ऐसा शाप वदती कन्यका । पुढें परदार धरितां दशमुखा । मरण पावेल सकुळीं देखा । आमुचेनि दुःखेंकरोनी ॥ २७ ॥ तदनंतर लंकापती । प्रवेशला लंकेप्रती । समस्त राक्षस पूजिती । राजा म्हणोनि लंकेचा ॥ २८ ॥ इतुकियावरी काय वर्तलें । शूर्पणखेनें काय केलें । येवोनि रायापुढें उघडिलें । दुःखार्णवाचें भांडार ॥ २९ ॥ रावणाच्या पायांवरी पडे । अति आक्रंदोनि दीर्घ रडे । अंग टाकी चहूंकडे । ललाट करें पिटीत ॥ ३० ॥ मग रावण म्हणे तियेसी । काय झालें सांग आम्हांसी । कवणें तूं गांजिलीसी । शोक करिसी कासया ॥ ३१ ॥ वक्रदृष्टीनें तूतें । कोणीं पाहिलें सांग मातें । कीं कोणें दाविलें भयातें । त्याच्या प्राणातें घेईन ॥ ३२ ॥ बंधूचें ऐकोनि वचन । शूर्पणखा बोले आपण । म्हणे राया माझ्या प्राणपतीचें हनन । तुवां संग्रामीं केलें पैं ॥ ३३ ॥ अगा ये बंधो अवधारीं । तुझेनि वैधव्य माझे शिरीं । ऐसी तुझ्या बळाची थोरी । सचराचरीं वानिजे ॥ ३४ ॥ शालेंक रणीं मारून । भगिनीस वैधव्य भूषण । तुझी कीर्ति जगीं पावन । बंदीजेन वाखाणिती ॥ ३५ ॥ तूं निलाजिरा लंकानाथा । शालकवधाची तुज हत्या । येरू म्हणे तुझा भर्ता । कोणे काळीं वधिला म्यां ॥ ३६ ॥ येरी म्हणे कालिकेय दैत्य । मारिला तैंच माझा कांत । तूंचि वैरी तयासी अन्यत्र । नाहीं वधाकारणें ॥ ३७ ॥ तुवां वैर करून । कालिकेय मारिले दैत्यगण । तयांत माझें पतिनिधान । तुवां तस्करें हरिलें रे ॥ ३८ ॥ रावण म्हणे भगिनीप्रती । म्यां युद्ध केलें अगाधख्याती । रणमद चढला तेणें भ्रांतीं । आपपर नेणेंचि ॥ ३९ ॥ भद्रे मज करितां रण । नाठवेचि मीतूंपण । यालागीं तूं आपण । दुःख दारुण न करावें ॥ ४० ॥ अवो वत्से भय सांडीं । दुःखा करीं देशोधडी । भोगीं निजसुख आवडीं । बंधूचेनि प्रसादें ॥ ४१ ॥ मी तुज देतों मान दान । आणिक करावया संरक्षण । तुझे पाठीसी ठेवितों खरदूषण । बंधूचेनि प्रसादें ॥ ४२ ॥ दंडकारण्य जनस्थानीं । ब्रह्मगिरी समीप तेथोनी । गोदा अरुणा वरुणा त्रिवेणी । ओघ पूर्ण ते ठायीं ॥ ४३ ॥ पद्मपुरनाम नगर । दूषणेंसीं तुम्हीं वसावें सत्वर । शाप वदला भृगुमुनिवर । जे दंडकीं राक्षस असतील ॥ ४४ ॥ मान देवोनि मुनीच्या वचना । तुम्हीं तेथें करावें गमना । चवदा सहस्र राक्षससैन्या । घेवोनि तुम्हीं पैं जावें ॥ ४५ ॥ तेथें होईल तुमची कीर्ती । खरदूषणांहीं शीघ्रगतीं । जावें वेगीं पद्मपुराप्रती । ऐसें नृपती बोलिला ॥ ४६ ॥ ऐकोनि रावणाचें वचन । शूर्पणखा बंधुसहित ससैन्य । वेगीं विमानीं आरूढोन । दंडकारण्य पावली ॥ ४७ ॥ खरदूषणां पद्मपुरींचें । राज्य दिधलें रावणें साचें । शूर्पणखेसी प्रधानत्व तेथींचें । लंकानायकें पैं दिधलें ॥ ४८ ॥ शूर्पणखेचें प्रीतीकरून । रावण वसवी दंडकारण्य । एका जनार्दना शरण । रामायण अति रम्य ॥ ४९ ॥

स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां शूर्पणखाखरदूषणदंडकारण्यप्रवेशो नाम अष्टाविंशतितमोऽध्यायः ॥ २८ ॥ ॥ ओंव्या ॥ ४९ ॥

अध्याय एकोणतिसावा

॥ श्रीरामचंद्र प्रसन्न ॥ राक्षसाधीश रावण । खरदूषणांसह जनस्थान । जें घोर अति दारुण । शूर्पणखेलागून दीधलें ॥ १ ॥ मग पाहतांचि निजमंदिर । प्रवेशला दशशिर । कनकप्रभा तेज अपार । रत्नवैदूर्य खांबोखांबीं ॥ २ ॥ सुवर्णभित्ती[9] अति कुसरी[10] । चित्रें लिहिलीं नानापरी । माजि देवांगनेसारिखी मंदोदरी । देखोनी सुख पावला ॥ ३ ॥ देवकन्या गंधर्वकन्या जिच्या दासी । अष्टनायिका लाजती देखोनि रूपासी । ऐसी मंदोदरी देखोनि मानसीं । रावण सुखासी पावला ॥ ४ ॥ कनकाचिया मंचकावरी । शेजे[11] रचली सुमनेंकरीं[12] । विंजणा वीजिती[13] एकी नारी । एकी विडिया पैं देती ॥ ५ ॥ एकी चरण प्रक्षाळिती । एकी संवाहन करिती । एकी अंगीं चंदन चर्चिती । एकी दाविती दर्पण[14] ॥ ६ ॥ ऐसें मयासुराचें दुहितारत्न । रावणाचें गृहमंडन । देखोनि सुखावला दशानन । नावेक[15] तेथें क्रमियेलें ॥ ७ ॥ तदनंतर राक्षसराजू ।

१ परस्त्री. २ वध. ३ मेहुणा. ४ भाटमंडळी. ५ पति. ६ मी तूं हा भाव. ७ देशपार, नाहींसें. ८ दूषणदैत्यासह.

९ सोन्याच्या भिंती. १० अति कुशलतेनें. ११ शय्या. १२ पुष्पांनीं. १३ वारा घालतात. १४ आरसा. १५ क्षणभर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

निघाला निकुंभिळे उजू । पहावया ज्येष्ठ आत्मजू । मेघनाद नाम ज्याचें ॥ ८ ॥ तंव येरीकडे इंद्रजितें। मांडिलें अभिचारहोमातें । शुक्राचार्य गुरु तेथें । यज्ञक्रियेतें संपादी ॥ ९ ॥ समस्त यज्ञ संपूर्ण झाला । पूर्णाहुतीचा समय आला । तंव अकस्मात रावण प्रवेशला । तया भवनामाझारीं ॥ १० ॥ पाहत पाहत दशानन । पुढें देखिला महायज्ञ । तेथें बैसला इंद्रजित आपण । देदीप्यमान तेजस्वी ॥ ११ ॥ चीरकृष्णाजिनांबर। कमंडलु माथां जटाभार । भस्मचर्चित सर्व शरीर । नेत्र आरक्त जाज्वल्य ॥ १२ ॥ ऐसें देखोनि स्वसुतातें । रावण बोलता झाला त्यातें । अगा ये वत्सा कोणे कर्मातें। काय कारणें आरंभिलें ॥ १३ ॥ कवण उत्कंठा मनीं । वर्ततसे तुजलागोनी । सांगावी गा येच क्षणीं । कायावाचामानसें ॥ १४ ॥ ऐसें वचन लंकेश वदला । मग शुक्राचार्य सांगता झाला । ऐकें राया यज्ञ आरंभिला । महत्कार्य साधावया ॥ १५ ॥ सहा यज्ञ पूर्ण झाले । सातव्या माहेश्वर यज्ञातें सिद्धी पावविलें । संपतेसमयीं आगमन केलें । तुवां राक्षसचूडामणे ॥ १६ ॥ सात यज्ञ कोणते म्हणसी । तुझे पुत्रें केले त्यांसी । मी सांगतसें जी परियेसीं। अनुक्रमें नामें त्यांचीं॥१७॥

> अग्निष्टोमश्च मेधश्च यज्ञो बहुसुवर्णकः ।
> राजसूयस्तथा यज्ञो गोमेधो वैष्णवस्तथा ॥ १ ॥
> माहेश्वरे प्रवृत्ते तु यज्ञे पुंभिः सुदुर्लभे ॥ २ ॥

अग्निष्टोम अश्वमेध। बहुसुवर्णयज्ञ प्रसिद्ध । याचकांसी नाहीं अवरोध। भूरिदक्षिणा ते समयीं ॥१८॥ राजसूय चवथा जाण। पांचवा गोमेध यज्ञ। सहावा वैष्णव यज्ञ। माहेश्वर सातवा ॥१९॥ माहेश्वराची समाती । प्राकृत नव्हे गा नृपती । तुझी वाट पाहतां भूपती । तंव तूं आलासी ये समयीं ॥२०॥ वरद पावला तुझा सुत। यासी प्रसन्न उमाकांत। दिधला महा दिव्य रथ। अंतरिक्षीं विचरेसा ॥ २१ ॥ माया लाधला तामसी । जिचेनि अंधार अरिदृष्टीसी । राया बळिया याचे समतेसीं। नाहीं ब्रह्मांडगोलकांत ॥ २२ ॥ याचें विंदान सुरांसुरां । न कळे गा राक्षसेश्वरा । अक्षयी भाता बाण दुर्धरा । क्षय नाहीं रणांगणीं ॥ २३ ॥ अरिमर्दनीं वज्रचाप । शस्त्रें वज्रप्राय अमूप । अरि विध्वंसोनि महाप्रताप । तुझा पुत्र लाधला ॥ २४ ॥ इतुकिया समस्त वरांतें । यज्ञीं साधिलें इंद्रजितें । तुझी वाट पहात होते । येथें यज्ञमंडपामाझारीं ॥ २५ ॥ ऐकोनि उशनाचें वचन । काय बोलिला दशानन। म्हणे पुत्रें केलें प्रमाण । परी अनुचित घडलें तुज ॥ २६ ॥ यज्ञीं वैरी तृप्त केले । इंद्रादिकां तुवां पूजिलें । हेंचि एक अनुचित घडलें । आतां चाल उठीं मंदिरा ॥ २७ ॥ तदनंतर तो पौलस्तिसुत। पुत्रबंधूसहित मंदिराप्रत । प्रवेशला सुखानंदस्थित । यावरी काय वर्तलें ॥ २८ ॥ देवगंधर्वसुरकन्यका। विमानीं घातल्या होत्या देखा। त्या उतरोनि महादुःखा । करित्या झाल्या ते समयीं ॥ २९ ॥ तयांचें देखोनि आक्रंदन । धर्मात्मा तो बिभीषण । रावणाप्रती काय वचन । बोलता झाला ते काळीं ॥ ३० ॥ अग्रजा हें कर्माचरण । येणें कुळासी निःसंतान । येणें पूर्वजां होय पतन । वंशा दूषण हेंचि पैं ॥ ३१ ॥ तूं वरदबळें झालासी उन्मत्त । शुभाशुभ नेणसी कृत्य । योषिता धरोनि आणिल्या येथ । अधर्म राज्यांत प्रवेशला ॥ ३२ ॥ तूं नसतां लंकाभवनीं । कुंभीनसी आमुची बहिणी । ते नेली राक्षसें हिरोनी । अपकीर्ति जनीं पैं झाली ॥ ३३ ॥ बिभीषणासी बोले रावण । कोणीं नेली ते मज नाहीं ज्ञान । तूं सांग गा विस्तारून । समूळ विवंचन मजप्रती ॥ ३४ ॥ बिभीषण होवोनि कोपायमान । रावणाप्रती बोले वचन । म्हणे राया पापाचें फळ ठाकून । आम्हांप्रति पैं आलें ॥ ३५ ॥ आमुचा मातामह माल्यवंत । त्याचा ज्येष्ठ बंधु सुमाळी विख्यात । ऋषींमध्यें बुद्धिवंत । तपोधन ज्ञानराशि ॥३६॥ त्याची कुंभीनसी नाती । मावसबहीण आम्हांप्रती । तिची अग्नीपासूनि संभूती । सत्य नृपती पैं झाली ॥ ३७ ॥ ऐकें अग्रजा मावसभगिनीतें । हिरोनि नेलें मधूनें आपुले नगरातें । मारोनि आमुच्या सैन्यातें । बळवंतें पैं नेली ॥ ३८ ॥ यज्ञ करीत होता इंद्रजित । कुंभकर्ण निद्राभिभूत । मी उदकीं होतों ध्यानस्थ । मजही श्रुत नाहीं झालें । ॥ ३९ ॥ कुंभीनसी होती अंतःपुरीं । तेथें प्रवेशला

१ आपल्या पुत्राला. २ शंकर. ३ आकाशांत. ४ कुशलता. ५ पुष्कळ. ६ शुक्राचार्याचें. ७ हे ज्येष्ठ बंधो. ८ स्त्रिया. ९ आईचा पिता (आजोबा). १० जन्म.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

तो दुराचारी । धरोनि नेली करोनि मारी । प्रळय नगरीं पैं झाला ॥ ४० ॥ राया लौकिकीं ऐसें झालें । अपकीर्तीचें भरतें आलें । ऐकोनि क्रोधें उचंबळलें । दशग्रीवाचें मानस ॥ ४१ ॥ क्रोधें आरक्त झाले नयन । आतां सिद्ध करा सैन्य । रथ आणा शीघ्र गमन । करावया अरिवध ॥ ४२ ॥ वेगीं सैन्या हांकार केला । कुंभकर्ण इंद्रजित सवें घेतला । नाना शस्त्रांचा समूह एकवटला । युद्धा निघाला रावण ॥ ४३ ॥ मंदोदरीकांत मनीं विचारी । आधीं मधूची करीन बोहेरी[2] । मग सुरलोका जाईन निर्धारीं । त्रैलोक्यींचे भोग भोगिती जेथें ॥ ४४ ॥ सवें सैन्य चारी सहस्र । आणिक चार अधिक वीर । जे पालथें करिती ब्रह्मांडोदर । सप्त सागर शोषिते जे ॥ ४५ ॥ अष्टलोकांची बांधिती मोळी[3] । स्वर्गाच्या उलथिती डिखळी । सुरासुर देखोनि कांपती चळीं । ऐसे आतुर्बळी[4] राक्षस ॥ ४६ ॥ जयांचे शस्त्रांचें सामर्थ्य । रणीं देवदानव चळचळां कांपत । पातळादिलोक भयभीत । रणरंगीं भिडतां पैं ॥ ४७ ॥ ऐसे राक्षस निघाले भारी । त्यांपुढें शक्रजित[5] रणकेसरी[6] । पृष्ठभागीं कुंभकर्ण दीर्घशरीरी । मध्यें रावण शोभत ॥ ४८ ॥ लंके ठेविला बिभीषण । जो कां धर्मपरायण । करावया त्रिकूटाचें रक्षण । प्रजापाळणनिमित्तें हो ॥ ४९ ॥ उरले सैन्येंसीं दशानन । मधुपुराप्रति करी गमन । एक महाखरीं वळंघोन[7] । एक चढला उंटावरी ॥ ५० ॥ एकीं अश्व पालाणिले[8] । एक कुंजरीं[9] आरूढले । एक तुरंगीं[10] चढिन्नले । एकांचें वहन शिशुमार ॥ ५१ ॥ ऐसा दशानन सहपरिवारीं । चालिलासे राक्षसभारीं । वीर दाटले अंबरीं । दिशा चारी कोंदल्या ॥ ५२ ॥ जळीं स्थळीं रजनीचर । कोंदले राक्षसांचे भार । मनोवेगाहूनि सत्वर । मधुपुरातें पावले ॥ ५३ ॥ नगरीं पाहतां वैरियातें । परी तो न दिसेचि तेथें । तंव देखिलें भगिनीतें । राक्षसराजें ते काळीं ॥ ५४ ॥ मग ते कुंभीनसी हात जोडून । दोनी चरणां लोटांगण । रावणासी विज्ञापन । दीनवाणीकरोनि करी ॥ ५५ ॥ राक्षसराजचूडामणी । तुमच्या भुजा यशस्वी रणीं । मी अनाथ तुमची भगिनी । आणिलें धरोनि मधूनें ॥ ५६ ॥ कुंभकर्ण तिजसीं बोलत । अवो भगिनी तुज भय नाहीं निश्चित । आमुचा वैरी त्याचें वधार्थ । आम्ही येथें आलों असों ॥ ५७ ॥ म्हणे राया अभय दिधलें । तें वचन पाहिजे सांभाळिलें । प्रसन्न झालासी तरी भ्रतारा राखिलें । पाहिजे माझ्या ये काळीं ॥ ५८ ॥ वाचा सत्य आपुली कीजे । माझें वैधव्य चुकविजे । वैधव्यापरीस भय दुजें । मज नाहीं राक्षसेंद्रा ॥ ५९ ॥ माझा प्राणपती राखोन । आपुलें सत्य करा वचन । ऐसें ऐकोनि रावण । बोलता झाला तियेसी ॥ ६० ॥ अवो वत्से एक वचन । तुझा भ्रतार आहे कोण । तो मज सांगें न लागतां क्षण । नामाभिधान तयाचें ॥ ६१ ॥ सांगातें मी घेवोनि त्यासी । जाईन सुरलोक जिंकावयासी । तुझी करुणा देखोनि मानसीं । मी त्यासी न वधीं हो ॥ ६२ ॥ इतुकें ऐकोनि रावणवचन । कुंभीनसी तत्काळ उठोन । भय सांडोनि निर्भयमन । भ्रतार निजला तेथें आली ॥ ६३ ॥ मग म्हणे भ्रतारासी । निद्रा सांडूनि उठा वेगेंसीं । ऐका माझिया वचनासी । सावधतेसी होवोनी ॥ ६४ ॥ माझा बंधु दशानन । आलासे तुमच्या भेटीलागून । समागमें कुंभकर्ण इंद्रजित जाण । आणि प्रधानसैन्येंसीं ॥ ६५ ॥ सुरलोकांच्या जयार्थ । आलासे तुमच्या भेटीची धरूनि आर्त[11] । भेटी घेवोनि तुम्ही त्वरित । युद्धा साह्य त्यासी व्हावें ॥ ६६ ॥ पृथ्वीजयो तेणें केला । आपुला पुरुषार्थ मिरविला । अरिवीरां धाक सुटला । नाम त्याचें ऐकोनि ॥ ६७ ॥ ऐसा बळी राक्षसराज । तयासी तुमचे भेटीचें काज । तो येथें आला असे सहज । तुम्हीं त्यासी भेटावें ॥ ६८ ॥ ऐकोनि प्रियेचें वचन । मधु उठिला तत्काळ जाण । रायासी भेटोनि आलिंगन । अर्घ्यपूजन पैं केलें ॥ ६९ ॥ पूजा करोनि राजोपचार । देखोनि संतोषला दशशिर । तदनंतर अस्ता भास्कर[12] । गेला निशा प्रवर्तली ॥ ७० ॥ सैन्यासहित दशानन । पुत्रबंधूसहवर्तमान । संतोषें निशा तेथें क्रमोन । पूर्वे भान[12] उगवला ॥ ७१ ॥ उदय होतांचि सहस्रकिरण[12] । स्नान-

१ बोलावणें. २ नाश. ३ गठडी. ४ बलाढ्य. ५ इंद्रजित. ६ रणशूर. ७ बसून. ८ सज्ज केले. ९ हत्तीवर. १० घोड्यांवर. ११ इच्छा. १२ सूर्य.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

संध्या तेथें सारून । सर्वेंचि निघाला मधूसहवर्तमान । कैलासासी लक्षून चालिला ॥ ७२ ॥ एका जनार्दना शरण । रम्य रामें रामायण । श्रवणें भवदोषां खंडण । करी निर्दळण कामक्रोधां ॥ ७३ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां मधुरावणदर्शनं नाम एकोनत्रिंशत्तमोऽध्यायः ॥२९॥ ओंव्या ॥७३॥ श्लोक ॥२॥

अध्याय तिसावा

॥श्रीरमाकांताय नमः॥ पौलस्तितनयचूडामणी। निशी[1] मधुपुरीस क्रमोनी । तदनंतरें कैलासाचे उपवनीं । अलकावतीसमीप आला ॥ १ ॥ देखोनि अग्रजाचें नगर । तेथें राहिला सहित निशाचर । तंव अस्तमाना गेला भास्कर । प्रकट झाली शर्वरी ॥ २ ॥ क्षीराब्धिसुतें उदय केलियावरी । चांदणें प्रकटलें अंबरीं । दिशा धवळिल्या तेजेंकरीं । कैलासगिरी शोभला ॥ ३ ॥ राक्षसवीर आतुर्बळी । शस्त्रें उसां घालोनि निद्रासमेळीं । तंववरी सुरारि इकडे ते काळीं । वन न्याहाळीत पैं होता ॥ ४ ॥ शैलपाठारींचें उपवन । आनंदवनाहूनि गहन । चैत्रनंदन अशोकवन । त्या समान पैं नव्हती ॥ ५ ॥ नाना तरूंच्या याती । कण्हेर नाना वर्णांचे शोभती । कदंब कुसुमें लागले असती । नानापरींच्या कमळिणी ॥ ६ ॥ रम्य मंदाकिनीचें तीर । चंपकवृक्ष मनोहर । अशोक पुन्नाग मांदार । गगनचुंबित वाढले ॥ ७ ॥ आंबे पाटली लोध्राचे वृक्ष । केतकी अर्जुनवृक्ष असंख्य । केळी नारळी पळस अनेक । जांबळी रायआंवळी ॥ ८ ॥ हरीतकी आणि चंदन । खैर धामोडे बिल्ववृक्ष गहन । ताड माड सिंदी गगन । स्पर्धा करिती उंचपणें ॥ ९ ॥ आणिक वृक्षांसी नाहीं मिती । सांगितले आहेत अनेकीं ग्रंथीं । तितुके सांगतां विस्ताराप्रती । कथा जाईल ज्ञाते हो ॥ १० ॥ ऐसें सुशोभित वन । तेथें किन्नर करिती गायन । मधुर नाना मूर्च्छन । सारीगमादि पैं गाती ॥ ११ ॥ जयांचें ऐकतां गायन । मनासी सुख वाटे गहन । तेथें विद्याधर मद्य सेवोन । आरक्तलोचन करोन डुल्लत ॥ १२ ॥ योषिता तेथें नेणों किती । नाना परींचें शिंपणें शिंपिती । हर्षें उल्लासें क्रीडती । चांदणे रातीं वसती सदा ॥ १३ ॥ एकी वीणा वाजविती । एकी मोहरींत आलाप करिती । एकी नाना वाद्यीं व्युत्पत्ती । दाविती त्या धनदालयीं ॥ १४ ॥ मंद सुशीतळ पवन । मधुमाधव ऋतु जाण । वसंत शरद आदिकरून । तये पर्वतीं वसती सदा ॥१५॥ नानापरींच्या पुष्पयाती । तयांचे सुगंध वायु येती । तेणें लंकेश सुखावोनि चित्तीं । मदनाकार वृत्ती पैं झाली ॥ १६ ॥ गायन अत्यंत सुस्वर । आणि पुष्पांचा सुवास मधुर । मंद करुनि आकाशसंचार । स्पर्श करीत प्राणियां ॥ १७ ॥ तेचि समयीं अब्धिनंदनें । गगनीं पसरिलीं किरणें । दिशा धवळिल्या निर्मळ चांदणें । कामिकांचीं मनें मोहती ॥ १८ ॥ ऐसियापरी तो लंकापती । कामासी झाला वशवर्ती । भ्रांत होवोनि दिशांगनांप्रती । पुनः पुनः अवलोकी ॥ १९ ॥ इतुकें वर्तलेंसे तेथ । तंव दिव्याभरणभूषित । कटिमेखळा विद्युत्प्राय झळकत । स्तन शोभत पैं दोन्ही ॥ २० ॥ सर्वे अप्सरांमाजी जाण । श्रेष्ठ रंभा चंद्रवदन । अंगीं उटी दिव्यचंदन । कुसुमें शोभती वेणीसीं ॥ २१ ॥ अत्यंत शोभती दोनी जघन । पोटरिया जैसे मीनँ । कटिभाग सिंहीं देखोन । लाजोनि वन सेविलें ॥ २२ ॥ नीळवस्त्रपरिधान । करीं शोभती जडित कंकण । मस्तकीं मुक्ताफळांची जाळी तेण । तारागण लोपले ॥ २३ ॥ चरण अत्यंत सुकुमार । हंसगती चाले सुंदर । सैन्य डावलोनि ते मनोहर । स्वधामींप्रति जातसे ॥ २४ ॥ रावणें देखिलें तियेसी । धांवोनि धरिली करें त्वरेंसीं । म्हणें तूं कोण कोठें जासी । झाली निशी यामान्त ॥ २५ ॥ तुझें रूप अति सुंदर । कोठें जातेसी वो सत्वर । कोण तुझा भ्रतार । मूर्ख तुज विसंबला ॥ २६ ॥ आतां तूं मजसीं अनुसर । भोग भोगीं नाना उपचार । मी जाण वो लंकेश्वर । देवां दुर्धर धाक माझा ॥ २७ ॥ तुझी सुंदर अत्यंत तन । कोण भोगिता भाग्यगहन । तूं मज अनुसरतां मी त्याहून । सुख देईन तुज प्रिये ॥ २८ ॥ स्वर्गींचें

---

१ रात्र. २ चंद्रानें. ३ तेजामुळें. ४ पहात. ५ गंगेचें. ६ मर्यादा. ७ मासे. ८ मोत्यांची. ९ टाकून. १० आपल्या मंदिराकडे. ११ एक प्रहर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

करीं अमृतपान । लेईं वो उत्तम आभरण । मज अनुसरतां कीर्ति गहन । लोकीं पावन होसील ॥ २९ ॥ मी बेळियाढा लंकानाथ । सुरासुर माझे आज्ञांकित । तो मी तुजपुढें याचक म्हणवीत । वचन त्वरित मानीं माझें ॥ ३० ॥ पुरुषांमाजी पंचानन । सृष्टीचा विधाता मी जाण । मी ब्रह्मकुळींचा ब्राह्मण । रावण अभिधान जाण माझें ॥ ३१ ॥ ऐकोनि दशाननाची मात । रंभा बोले लज्जान्वित । म्हणे तूं आम्हां पूर्वज गुरु येथ । निंद्य वचन बोलूं नये ॥ ३२ ॥ अन्यत्र करितां मज बंधन । तूं सोडवावया योग्य दशानन । मी तुझी सून राया जाण । धर्मता वचन बोलतसें ॥ ३३ ॥ राया तूं पूज्य आम्हांसी । तूं श्वशुर पितयासम होसी । आज्ञा देईं स्वभवनासी । जावयासी लंकेशा ॥ ३४ ॥ रावण म्हणे काय तूं मत्पुत्रभार्या । ते म्हणे सत्यचि जाण राया । तुझे अग्रजात्मजाची जाया । राक्षसराया सत्य मानीं ॥ ३५ ॥ राया करितें विनवण । मज सोडावें त्वरेंकरून । याकारणें साष्टांग नमन । चरणवंदन करितें तुझें ॥ ३६ ॥ नळकूबरेंशीं संकेत । केला असे राया जाण निश्चित । वाट पाहत असेल तिष्ठत । वेगीं मुक्त करीं मातें ॥ ३७ ॥ एकादा बलात्कार करितां मजवरी । तेथें तूं सोडविसी सुरारी । स्वधर्में भोगावी आपुली नारी । दुःख भारी परस्त्रियेचें ॥ ३८ ॥ ऐसें रंभेचें विनीत वचन । उपक्षोनि तो दशानन । जैसें पंडिताचें शब्दरत्न । सांडी हेळसून मूर्ख जो ॥ ३९ ॥ जैसें पापिया नावडे सत्य । रोगिया नावडे पथ्य । तस्करा नावडे ताराकांत। मूर्खा पंडित नावडे ॥ ४० ॥ वेदबाह्य जो त्या नावडे वेद । अज्ञानिया नावडे ज्ञानबोध । दुर्जना नावडे मित्रसंवाद । कृपणा आत्मवाद नावडे ॥ ४१ ॥ मूर्खासी नावडे ज्ञान । अभक्ता नावडे हरिकीर्तन । आळशिया नावडे स्वधर्माचरण । पाखांडिया दानधर्म नावडे ॥ ४२ ॥ ऐशिया हो लंकानाथा । नावडे स्वहिताची कथा । रंभेसी करूनि बलात्कारता । झाला पीडिता भ्रमोनी ॥ ४३ ॥ रंभेसी पाडोनि शैलातळीं । बळेंचि भोगिली ते काळीं । भ्रष्ट आभरणें कांचोळी । माथेची जाळी तूटली ॥ ४४ ॥ रंभा विनवी कर जोडून । सोडीं लंकेशा मी जाईन । मग ती रावणें मुक्त करून । निजभवना चालिली ॥ ४५ ॥ मार्गीं जातां ते सुंदरी । माथेचे केश सांवरी । डोईचा पालव निजकरीं । सरसा सुंदरीयें पैं केला ॥ ४६ ॥ ऐसी लज्जित भीत अंगना । निघाली पतिभवना । मार्गीं करीत विवंचना । काय कैसें होईल ॥ ४७ ॥ ऐसें चिंतीत आपण । पावली पतीचें भवन । दोनी चरणां करोनि नमन । लज्जायमान होवोनि ठेली ॥ ४८ ॥ नळकूबर म्हणे तियेसी । काय वर्तलें भद्रे सांग मजपासीं । येरी म्हणे स्वामी येतां निजभवनासी । रावणें मजसीं देखिलें ॥ ४९ ॥ सैन्यासहित दशानन । पर्वतपाठारीं उतरला जाण । तेणें मजला बलात्कार करून । रात्रीं मैथुन संपादिलें ॥ ५० ॥ अगाध बळें लंकापती । मी सुकुमार योषिताजाती । म्यां विनविला नाना उपपत्ती । अति काकुळती पैं आलें ॥ ५१ ॥ गुरु श्वशुरा पितयासमान । ऐसीं वचनें हेळसून । मजसीं रमला दशानन । पापात्मा पूर्ण जाणिजे ॥ ५२ ॥ रंभेचें ऐकोनि वचन । चित्तें संतप्त नळकूबर जाण । अत्यंत झाला क्रोधायमान । लाक्षारंगासमान नेत्र केले ॥ ५३ ॥ क्षण एक धरोनि ध्यानस्थिती । ध्यानीं आणिला गिरिजापती । सर्वेचि तोय घेवोनियां हातीं । मंत्रिता झाला ते काळीं ॥ ५४ ॥ करीं घेवोनि उदकातें । शापिता झाला रावणातें । म्हणे रंभेवेगळे जे स्त्रियेतें । धरितां निश्चयें मरसील ॥ ५५ ॥ रंभेवेगळी जे नारी । धरितां मृत्यु पावे सुरारी । ऐसा शाप देवोनि ते अवसरीं । उदक करींचें सांडिलें ॥ ५६ ॥ नळकूबरें देतां शाप । देवांसी सुख झालें अमूप । आकाशींहूनि वर्षती पुष्प । दुंदुभिवाद्यें वाजती ॥ ५७ ॥ ग्रह आदिकरोनि सुरगण । करिते झाले आनंदें गर्जन । म्हणती झालें आमुचें कारण । म्हणोनि टाळिया पीटती ॥ ५८ ॥ एका जनार्दना शरण । श्रीरामकथा पुण्यपावन । धन्य ऐकती तयांचे श्रवण । धन्य वदन वदतियांचें ॥ ५९ ॥

स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां रावणरंभासंगमनलकूबरशापो नाम त्रिंशत्तमोऽध्यायः ॥ ३० ॥ ओंव्या ॥ ५९ ॥

१ पराक्रमी. २ नांव. ३ चंद्र. ४ पर्वताच्या पायथ्याशीं. ५ अलंकार. ६ पदर. ७ युक्तींनीं. ८ तिरस्कारून.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

अध्याय एकतिसावा

॥ श्रीरामकृष्णाभ्यां नमः ॥ निशी क्रमितां कैलासीं । रंभासंयोगें शाप रावणासी । देवोनि नळकूबरें त्यासी । पुढें कथा कैसी वर्तली ॥ १ ॥ राक्षसें सांडोनि कैलास । ससैन्य सपुत्रबंधु स्वर्गास । चालिला मार्गीं अमरपुरास । ठाकोनि आला ते वेळीं ॥ २ ॥ येवोनि अमरपुराबाहेरी । राक्षस गर्जना करिती थोरी । घोष ऐकोनि वृत्रारी । कंपायमान पैं झाला ॥ ३ ॥ आला ऐकोनि रावण । इंद्र झाला चलितासन । बोले देवांप्रति आपण । सिद्ध सैन्य करा वेगीं ॥ ४ ॥ आदित्य बारा वसु आठ । अकरा रुद्र व्हावे एकवट । सिद्ध विश्वेदेव मरुद्गण सगट । करा उद्भट युद्धातें ॥ ५ ॥ सन्नद्ध करा सैन्यसंपत्ती । आजि युद्धीं जिंतों लंकापती । इंद्रवचन मानोनि समस्तीं । युद्धालागीं सिद्ध झाले ॥ ६ ॥ वरदबळें न जिंके रावण । जो कां प्रतापें महेंद्रासमान । जेणें पृथ्वीतळ अवघें जिंकोन । स्वर्ग घ्यावयालागून पैं आला ॥ ७ ॥ ऐसें इंद्रें मनीं विचारून । आपणासी न पुरवे रणांगण । धांवत विष्णूपासीं आला जाण । सकळ वर्तमान सांगितलें ॥ ८ ॥ इंद्र म्हणे विष्णूसी । काय करूं अमरपुरीसी । वेढोनि सकळ राक्षसीं । युद्धा रावण पैं आला ॥ ९ ॥ सैन्य शस्त्रें वरदेंकरून । अति बळिष्ठ दशानन । तो न जिंतवे आम्हां दुःख दारुण । ओढवलें जी स्वामिया ॥ १० ॥ तूं आपुलें वचन सत्य करीं । पूर्वीं मारिले नाना वैरी । नमुचि वृत्र बळी नरकेसरी । तुवां मारिला हिरण्यकशिपू ॥ ११ ॥ हे समस्तही तुवां वधिले । तैसें पाहिजे रावणा केलें । हा अन्यत्र न मरे तुजवेगळें । मरण नाहीं रावणा ॥ १२ ॥ तुजवेगळा नारायणा । मृत्यु नाहीं या रावणा । तरी सत्य करा आपुलिया वचना । मी तरी दीन पैं तुझें ॥ १३ ॥ ऐकोनि इंद्राचें वचन । विष्णु झाला सुखसंपन्न । म्हणे सुरपते सावधान । वचन प्रमाण मानीं माझें ॥ १४ ॥ वरदबळें दशशिरें । जिंतिलीं देवदैत्यांचीं पुरें । यासी निघतां रणीं त्यां त्वरें । मारिलें पाहिजे या काळीं ॥ १५ ॥ हा बळियाढा लंकानाथ । शिववरदें झाला उन्मत्त । यासी मारीन न लागतां क्षणांत । समयोचित पैं नव्हे ॥ १६ ॥ जरी करीन मी याचें हनन । तरी हा काळ नव्हे जाण । ब्रह्मवचना लागे दूषण । संत सज्जन अनुचित म्हणती ॥ १७ ॥ यथाकाळीं लंकापतीसी । मारीन इंद्रा सहसंपत्तीसीं । संतोषवीन सुरवरांसी । भार पृथ्वीचा फेडीन ॥ १८ ॥ सबंधु सपुत्र दशानन । मारीन पुढें यथाकाळीं जाण । इतुकें विष्णु बोले तंव राक्षसगण । युद्धालागून प्रवर्तले ॥ १९ ॥ चहूंकडे धांवती राक्षस । आनेंआन करिती बहुवँस । तंव अमरराजसैन्य कर्कश । हाणिती शस्त्रें परस्परें ॥ २० ॥ देव आणि राक्षसगण । मिसळले संग्रामा दारुण । करिते झाले तेणें गगन । वाणेंकरोन भरियेलें ॥ २१ ॥ राक्षसांमाजी बळियाढे वीर । देवांमध्यें परम शूर । करिते झाले घोरांदर । नाना शस्त्रें प्रेरूनी ॥ २२ ॥ रावणाचे आज्ञेवरून । राक्षस धांवले कोण कोण । ऐका तयांचीं नामाभिधानें । संकळितें मागें सांगतसें ॥ २३ ॥ मारीच प्रहस्त महोदर । महापार्श्व अकंपन निकुंभ वीर । शुक सारण त्रिशिरा खर । सुहृद धूमकेत नांवाचे ॥ २४ ॥ महादंष्ट्र महामुख । जंबुमाळी विरूपाक्ष देख । शतघ्न यज्ञकोप दुर्मुख । दूषण करवीर सूर्यशत्रु ॥ २५ ॥ महाकाय अतिकाय देवांतक । सुमाळी आणि नरांतक । सकळ राक्षस होवोनि एक । नाना शस्त्रें देख प्रेरिती ॥ २६ ॥ देव दैत्य एकवटले । परस्परें युद्धा प्रवर्तले । शस्त्रास्त्रें वर्षते झाले । एकमेकां लक्षोनी ॥ २७ ॥ तयाउपरी सुमाळी राक्षस । क्रोधा चढला बहुवस । संग्राम करितां देवां त्रास । अत्यंत तेणें दीधला ॥ २८ ॥ अमरसैन्य भंगा गेलें । त्रासोनियां पळतें झालें । तें अष्टवसूंनीं देखिलें । आश्वासिलें वीरांसी ॥ २९ ॥ पळूं नका रहा स्थिर । रणभूमीसी धरा धीर । मज कोपलिया कोण वीर । समरांगणीं राहेल ॥ ३० ॥ ऐसें सवित्रवसु बोलिला । पळतयां वीरां नाभीकार दिधला ।

---

१ इंद्र. २ सज्ज. ३ जिंकूं. ४ नरश्रेष्ठ. ५ दुसऱ्यांकडून. ६ अनन्वित. ७ बहुत प्रकारांनी. ८ इंद्रसैन्य. ९ निर्वाण युद्ध, भयंकर निकराची लढाई. १० थोडक्यांत. ११ अभयवचन.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

समरांगणीं उभा ठेला । नाना शस्त्रें प्रेरीत ॥ ३१ ॥ शस्त्रांवरी शस्त्रें वर्षत । बाणांवरी बाण सोडीत । वैरिसैन्य त्रासोनि तेथ । पळतें झालें चहूंकडे ॥ ३२ ॥ क्षुद्रां[१] मृगां पंचानन । विभांडी आपुले पराक्रमेंकरून । तैसें सवित्रवसूनें राक्षससैन्य । समरांगणीं मारिलें ॥ ३३ ॥ राक्षससैन्य पावलें त्रास । देखोनि सुमाळी राक्षस । पुढें झाला रुद्रावेश[२] । दंत दाढा रगडीत ॥ ३४ ॥ सुमाळी सवित्रवसू रणांगणीं । बाण सोडिती एकमेकां लक्षोनी । एकमेकांचें वर्म भेदोनी । हाणिताती परस्परें ॥ ३५ ॥ तदनंतर दोघे जण । संग्राम करिती दारुण । दोघे वीर बळसंपन्न । पराक्रम गहन दोघांचा ॥ ३६ ॥ वसुवीर बळियाढा । चढवोनियां धनुष्या मेढा[३] । बाणशतक लाविलें तेणें धडाडा । सारथि रथ भंगिला ॥ ३७ ॥ न लागतां अर्ध क्षण । सारथि रथ झाला चूर्ण । कित्येक राक्षस गतप्राण । शरजाळें पैं झाले ॥ ३८ ॥ ऐसी वसूनें करोनि ख्याती । मग सुमाळी वधावयाचे अर्थीं । गदा घेतली रविनिशापती[४] । कालिमा पावती कोळसे जैसे ॥ ३९ ॥ करीं धरोनि गदा जाण । कठिण काळदंडासमान । लागतां भूगोळ झाला भग्न । तेज दारुण पैं जिचें ॥ ४० ॥ ते गदा तुळोनि निजकरीं । टाकिली सुमाळिमस्तकावरी । शिर तुटोनियां अंबरीं । उसळलें ते काळीं ॥ ४१ ॥ चंद्रसूर्य चिंतातुर मनीं । म्हणती नाहीं आजि पर्वणी । राहु येतो आम्हांलागूनी । भक्षावया अकाळीं ॥ ४२ ॥ शिर पडोनि धरणीवरी । गदा बैसोनि रक्तप्राशन करी । शोभती झाली जैसी अंबरीं । विद्युल्लता प्रमेकरीं ॥ ४३ ॥ सुमाळीचा वध झाला । सुरसमुदाय जय पावला । राक्षसांसी पळ सुटला । धीर न धरवे ते काळीं ॥ ४४ ॥ जैसें कां तडागींचें[५] जळ । फुटल्या धांवे अति चंचळ । तैसें त्या राक्षसांचें दळ । भयेंकरोनि पळालें ॥ ४५ ॥ सुमाळी रणीं पडिला । अस्थिमांसाचा ठाव पुसिला । कीं भूतगणीं भक्षिला । हें न कळे ते वेळीं ॥ ४६ ॥ ऐकतां हरिनामाचा ध्वनी । पातकें पळती दिशा लंघूनी । तैसे ते राक्षस समरांगणीं । धीर न धरितां पळाले ॥ ४७ ॥ एका जनार्दना शरण । पुढें मेघनादा शक्रा[६] युद्ध दारुण । होईल तें सज्जनीं सावधान । श्रवण केलें पाहिजे ॥ ४८ ॥ सुरस कथा रामायणी । वदली वाल्मीकाची वाणी । अक्षरें महादोषां खंडणी । पवित्र अवनी पैं करी ॥ ४९ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां सुमालिवधो नाम एकत्रिंशोऽध्यायः ॥ ३१ ॥ ओंव्या ॥ ४९ ॥

अध्याय बत्तिसावा

॥ श्रीरामचंद्राय नमः ॥ सवित्रवसूनें सुमाळी । मारिलासे रणकल्लोळीं । अस्थिमांसाची झाली होळी । मेळविला धुळीं राक्षसांसहित ॥ १ ॥ ऐकोनि रावणाचा ज्येष्ठ सुत । क्रोधा चढलासे बहुत । नेत्र करोनि आरक्त । युद्धा प्रवर्तत ते समयीं ॥ २ ॥ पळत्यां देवोनि नाभीकार[७] । आपण रणांगणीं राहिला स्थिर । कनकरथीं जडित धुर । पोंवळ्यांचीं चाकें हो ॥ ३ ॥ रथीं जुंपिले वारू । पवनातें म्हणती स्थिरू । स्वइच्छेनें चराचरू । चरणातळीं दडपिती ॥ ४ ॥ आधींच ते श्यामकर्ण । पांखरिले[८] भूषणेंकरून । पताकीं झांकोळलें गगन । तेजें लोपोन जाय हो ॥ ५ ॥ ऐसिया कनकदिव्यरथीं । आरूढला सुलोचनांपती[९] । दिव्य शस्त्रें घेवोनि हातीं । गर्जना करीत निघाला ॥ ६ ॥ ऐसा देखोनि रिपुंकुमर । पळाले दश दिशांसी सुर । समरांगणीं धरितां धीर । थरथरां वीर कांपती ॥ ७ ॥ शैलारीनें[१०] ऐसें देखोन । सैन्यातें देतसे आश्वासन । भिऊं नका या शब्देंकरून । पळतयांतें स्थिरावलें ॥ ८ ॥ वज्रपाणि म्हणे वीरांसी । पुत्र करितो संग्रामासी । तुम्हीं रहावें त्याचे पाठीसीं । निमेषेंसीं रिपु पराभवील ॥ ९ ॥ तदनंतरें ते अवसरीं । शक्रसुत जयंत नामेंकरीं । बैसला कनकरथावरी । धुरेसी सारथि अति कुशळ ॥ १० ॥ त्वरेंकरोनि रथ प्रेरिला । जेथें मेघनाथ तेथें आला । राक्षसपुत्र देखोनि प्रवर्तला । राजपुत्रासीं समरांगणीं ॥ ११ ॥ एकावरी एक वर्षती बाण । एका-

१ सिंह. २ शंकराप्रमाणें क्रोधाविष्ट होऊन. ३ दोरी. ४ सूर्यचंद्र. ५ तळावाचें. ६ इंद्राला. ७ अभय. ८ झुलीघालून सजविले. ९ इंद्रजित. १० इंद्रानें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वरी एक शस्त्रें सोडिती दारुण। एकाचे एक निवारोनि पूर्ण। पुनरपि संधान पैं करिती ॥ १२॥ शक्रपुत्राचें सुटतां बाणजाळ। भेदलें समग्र राक्षसदळ। कित्येक खोंचले बंबाळ। रक्ताचे पूर चालिले ॥ १३ ॥ शक्रसुतें काय केलें। सैन्य एकवटोनि आपुलें। अमोघ शस्त्रांतें सोडिलें। अवकाश नाहीं अंबरीं ॥ १४ ॥ शतघ्नी तोमर बाण। गदा खड्ग मुद्गल दारुण। शृंगें शिखरें पादप पाषाण। मेघनादावरी टाकिले ॥ १५॥ देवसैन्याचा थोर मार। राक्षस खोंचती वाहे रुधिर। जिकडे पळती रजनीचर। तिकडे अमरेंद्रपुत्र मारीतसे ॥ १६ ॥ मनोवेगाहूनि बहुत। इंद्रपुत्र फिरवी रथ। राक्षससैन्य भस्म करीत। चौताळत दशदिशा ॥ १७॥ सुरेंद्रपुत्रें आनेंआन केलें। शत्रुसैन्य पराभविलें। तदनंतरें पुलोमदैत्यें वेळे। रणीं धरिलें इंद्रपुत्रा ॥ १८॥ वेगीं वाहोनि खांद्यावरी। अकस्मात निघाला सागरीं। हें देखोनि उभयतां वीरीं। थोर आश्चर्य पैं केलें॥१९॥ तो आजा होय शक्रसुतासी। शचीचा पिता श्वशुर इंद्रासी। तेणें नेलें जयंतासी। देखोनि देव दुःखी झाले ॥ २० ॥ राजपुत्र धरोनि नेला। सुरसैन्या पळ सुटला। मेघनादें पळतिया वीरांला। अति सुबद्ध गांजिलें ॥ २१॥ देवसैन्य पुढें पळत। राक्षस मागें शस्त्रें मारीत। पळत पुढें हांका देत। धांव धांव देवेंद्रा॥२२॥ राक्षस विजयी जाहले। स्वपुत्रातें धरोनि नेलें। ऐसें देखोनि इंद्रा चढलें। कोपाचें भरितें अनिवार ॥ २३ ॥ सारथियासी म्हणे शचीपती। रथ आणीं गा शीघ्रगतीं। तंव मातलीनें तेचि समयाप्रती। स्यंदन आणिला रत्नजडित ॥ २४ ॥ रथीं आरूढोनि इंद्र आपण। केलें मेघासारिखें गर्जन। पुढें जातां अपशकुन। अमरावतीस पैं झाले ॥ २५ ॥ वैरियावरील पवन। लागला वज्राऐसा कठिण। पुढें जातां रथाचे वारू मेटें वळून। भूमीलागून बैसले ॥ २६ ॥ मनीं शंकला अमरपती। पुढें चालिला शीघ्रगतीं। सवें आदित्यरुद्रवसुगण अमिती। शस्त्रें झळकती सतेज ॥ २७ ॥ शस्त्रें झोडीत वज्रपाणी। प्रवेशला रणांगणीं। तंव येरीकडे मेघनादजनक तेचि क्षणीं। रथावरी बैसला ॥ २८ ॥ जया रथा निर्माण करिता। कर्माविश्व जाण तत्त्वतां। तयाची वर्णितां सुंदरता। तरी सुवर्णमय तो असे ॥ २९॥ रथीं राक्षसचूडामणी। परिवेष्टित पन्नगसैन्यीं। जयाचे गर्जनें अवनी। उलंडों पाहे तळावरी ॥ ३० ॥ दैत्यनिशाचरपरिवेष्टित। रथीं आरूढोनि रणपंडित। आवेशें वैरियासमोर येत। जैसा भास्कर पूर्वदिशे ॥३१॥ मेघनादाहूनि मागिलेकडे। स्वयें ठाण मांडोनि पुढें। धनुष्या चढवोनियां मेढे। अनेक बाण टाकिले ॥ ३२ ॥ देव राक्षस परस्परीं। युद्ध करिती रणसागरीं। शस्त्रें वर्षती जैसे अंबरीं। मेघ दाटले अकाळींचे ॥ ३३ ॥ तदनंतर कुंभकर्ण। दुरात्मा अति दुर्जन। नाना शस्त्रांचें प्रेरण। करिता झाला कोणा न कळतां ॥ ३४॥ कुंभकर्णाचें घोर संधान। बाणें तोडिता झाला करचरण। कित्येक सुर निर्गतप्राण। रणमंडळीं पडियेले ॥ ३५ ॥ मग ते रुद्र आदित्य निशाचर। कोपा चढले परस्पर। करिते झाले दुर्धर मार। एकमेकांचीं वर्में लक्षोनी ॥ ३६ ॥ याउपरी सुरवरीं। राक्षसां केली घेघेमारी। पळतां न पळवे राक्षसवीरीं। धाकें प्राण सांडिले ॥ ३७॥ कित्येक गतप्राण पडिले। कित्येकां सर्वांगीं बाण लागले। कित्येक भूमीवरी केश मोकळे। लोळताती रणांगणीं ॥ ३८ ॥ कित्येक धाकें पळत। कित्येक योद्धे नव्हे म्हणत। कित्येक बोलती आम्ही मार्गस्थ। तीर्थयात्रे हिंडतों ॥ ३९ ॥ राक्षस रणीं पडिले जाण। सहित वारू गजगण। शस्त्रें पोटीं कवटाळून। बीभत्स वीर पडियेले ॥ ४० ॥ बाबरझोंटी विशाळ मुख। दंत दाढा विक्राळ देख। हात पाय पसरोनि संमुख। रणांगणीं पडियेले ॥४१॥ अमरगण जय पावले। निशाचर रणीं भंगले। हें देखोनि दशग्रीवा भरलें। कोपाचें भरितें अनिवार॥ ४२ ॥ आपुले राक्षस समरांगणीं। पडिले देखे प्रेतें होवोनी। तयांच्या शोणितांचा पूर लोटोनी। दोहीं तीरीं वाहतसे ॥ ४३ ॥ रणीं मीनले गीध घार। मांस भक्षिती तोडिती शरीर। मस्तकावरी खगवर। चंचूनें

१ व्यर्थ न जाणाऱ्या. २ जयंताला. ३ इंद्राणीचा. ४ इंद्र. ५ रथ. ६ रावण. ७ दोरी. ८ प्राण जाऊन. ९ रक्ताचा.

१० मोठमोठे पक्षी.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

तोडिती नेत्रांतें ॥ ४४ ॥ ऐसें रावणें देखोन । उरले सैन्येंसीं युद्ध दारुण । करिता झाला आपण । पाचारोन देवांतें ॥ ४५ ॥ येरीकडे अमरपती । उत्तम धनुष्य घेवोनि हातीं । ओढितां नादें त्रिजगती । पालथी होऊं शके क्षणमात्रें ॥ ४६ ॥ शक्रें धनुर्ष्यी चढविला गुण । अग्निवर्ण हेमपुंख[2] बाण । टाकिला रावणाच्या मस्तकीं जाण । तो भूमीलागोन पडियेला ॥ ४७ ॥ तदनंतरें लंकापती । जयाच्या बळाची त्रिजगीं कीर्ती । तो धनुर्ष्यी बाण लावी शीघ्रगतीं । शक्रधनुष्य छेदिलें ॥ ४८ ॥ इंद्राच्या रथावरी अमित बाण । सोडिता झाला दशानन । तेणें अंधार पडिला जाण । शक्रा कांहीं न कळेचि ॥ ४९ ॥ शक्ररावणांचें युद्ध । घोरांदर होईल प्रसिद्ध । एका जनार्दनीं प्रबोध । परमानंद प्रकटेल ॥ ५० ॥ रणीं राक्षसांसी मुक्ती । अनेकां करीं देतो रघुपती । दीनजन उद्धरावया काकुळती । अवतार धरी श्रीराम ॥ ५१ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां इंद्ररावणयुद्धप्रारंभो नाम द्वात्रिंशोऽध्यायः ॥ ३२ ॥ ॥ ओंव्या ॥ ५१ ॥

अध्याय तेहतिसावा

॥ श्रीरामचंद्राय नमः ॥ राक्षसां देवां संग्राम घोर । हा रामा तुझ्या मायेचा बडिवार[3] । राक्षसदेवांच्या शरीं अंबर[4] । भरूनि अंधकार दाटला ॥ १ ॥ कोणा कोणी न दिसे स्पष्ट । तम दाटलें अति उत्कृष्ट । वीरें वीर पावले कष्ट । तयांत तिघे सावध ॥ २ ॥ एक रावण दुजा राजकुमर । तिजा इंद्र धनुर्वाडा दुर्धर । परस्परें करिती रणमार । घाय दुर्धर हाणिती ॥ ३ ॥ सारथिया म्हणे रावण । ऐकें गा तूं एक वचन । माझे सकळ राक्षसगण । विबुधीं[5] रणीं पाडिले ॥ ४ ॥ आजि माझ्या क्रोधेंकरून । करीन त्रैलोक्याचें दहन । सारथिया शीघ्र स्यंदन । नेईं सैन्याचे आदिअंतवरी ॥ ५ ॥ शीघ्र आजि समरांगणीं । शत्रूंचीं धडें लोळवीन रणीं । माझिया प्रतापाची करणी । अस्त पावती शत्रुनक्षत्रें ॥ ६ ॥ मी ऊर्ध्व उचलीन हात । तंव आकाशास भय बहुत । माझेनि धाकें वायु त्वरित । इकडील तिकडे नव जाय ॥ ७ ॥ तरी सारथिया चिंता न करीं । माझा रथ ने तेथवरी । जेथें उदय होय तमारी[7] । तेथपर्यंत चालवीं ॥ ८ ॥ ऐकोनि रावणाचें वचन । तो सारथि गुणनिधान । मनोवेगातें मागें टाकून । वारुंसीं रथ मध्यें आणिला ॥ ९ ॥ ऐसें जाणोनि त्रिदशपती[8] । रथावरून देवांप्रती । म्हणता झाला तो सावधवृत्ती । ऐका माझे मनींचें हो ॥ १० ॥ आजचि या संग्रामांत । रावण दळें बळें झाला उन्मत्त । यासी न मारूनि जीवें जीत । धरून नगराप्रत न्यावें ॥ ११ ॥ ऐसें बोलोनि अमरचूडामणी । प्रवेशला तो रणांगणीं । नाना आयुधें नाना बाणीं । रिपुदळणीं[9] घेतलीं ॥ १२ ॥ रावणाचे दक्षिणभागीं । उभा दीक्षित शतक्रतु यागी । उभयतां सेना शतयोजन रणरंगीं । शस्त्रयुद्धीं सज्ज असे ॥ १३ ॥ देवांचें सैन्य अगाध । तयामाजी इंद्र प्रवुद्ध । बाण सोडिले तेजोमय विविध । रावणसारथिरथ भंगिला ॥ १४ ॥ एकला रावण रणभूमीसी । सांपडला हो देवांसी । भ्रांत झाला न स्मरे मानसीं । हें देखोनि राक्षसीं हांक दिधली ॥ १५ ॥ हा हा करिती निशाचर । म्हणती मेला गेला दशशिर । कीं भस्म केला देवीं समग्र । कीं रणसागरीं बुडविला ॥ १६ ॥ तदनंतर मेघनाद । ऐकोनि राक्षसांचा शब्द । पिता धरिला हें वचन सुबद्ध । हृदयवर्मीं आदळलें ॥ १७ ॥ क्रोधें झाला मूर्च्छापन्न । दोनी खात दाढा दशनें[10] । हात चुरी दोनी चरण । पृथ्वीवरी घांशीतसे ॥ १८ ॥ नेत्र झाले क्रोधें आरक्त । चळचळां सर्वांग कांपत । म्हणे ब्रह्मांडाच्या उतरंडी येथ । पालथ्या करोनि सांडीन ॥ १९ ॥ म्हणे सोमसूर्य फुंकोन पाडूं । कीं नक्षत्रांसहित गगन तोडूं । कीं या विरिंचीचा[11] खेळ मोडूं । कीं ध्रुव पाडूं आकाशींचा ॥ २० ॥ कीं या चराचराची बांधूं मोळी । कीं एकवीस स्वर्ग समुद्रजळीं । कीं मेरूसहित दिग्गज[12] पायांतळीं । रगडोनि रांगोळी करूं आजी

---

१ इंद्रानें. २ सुवर्णपंखाचा. ३ महिमा, माहात्म्य. ४ आकाश. ५ देवांनीं. ६ वर. ७ सूर्य. ८ इंद्र. ९ शत्रूंचा नाश करण्यासाठीं. १० दांत. ११ ब्रह्मदेवाचा. १२ ऐरावत, पुंडरीक, वामन, कुमुद, अंजन, पुष्पदंत, सार्वभौम, सुप्रतीक.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ २१ ॥ कीं मंगळमातेचें उदर चिरूं । कीं सप्तसागरांचा घोंट भरूं । कीं कूर्माची पाठी शतकूट करूं । हे अवनी धरिली म्हणोनी ॥ २२ ॥ रुद्रावेशें राजकुमर । युद्धा प्रवर्तला दुर्धर । शुक्रें दिधली होती माया घोर । ते घातली वैरियावरी ॥ २३ ॥ ते मायेचें सांगतां विंदान । अथवा करितांही वर्णन । तरी ते मुळींच लटिकी जाण । तिसी सत्यपण असेना ॥ २४ ॥ ऐसिया मायेतें विबुधारी । घेवोनियां मग गर्जना करी । प्रेरिता झाला वैरियावरी । तेणें वृत्रारि मोहिला ॥ २५ ॥ मेघनादें सोडोनि सर्व सैन्य । जेथें मरुद्गणसिंह होता मेघवाहन । तेथें येवोनि पिता रावण । रिपूपासोन मुक्त केला ॥ २६ ॥ अमरनाथ न गणी रिपुपुत्रासी । जैंवी पंडित पाखांडियासी । तंव मेघनादें त्या समयासी । थोर आश्चर्यासी पैं केलें ॥ २७ ॥ सुवर्णपुंखी तीक्ष्ण शर । सोडिता झाला दशाननकुमर । तेणें इंद्ररथाचे वारू चूर । रथ मोडोनि दूर पाडिला ॥ २८ ॥ इंद्र झाला ते काळीं विरथ । सवेंचि ऐरावतीं आरूढ होत । अति मायावी रावणसुत । काय सांगूं रघुराजा ॥ २९ ॥ कृपाळुवा अवनिजापती । तुझी अतर्क्य माया अतर्क्य स्थिती । तुवां अवताराची घेवोनि बुंथी । नाना खेळें खेळसी ॥ ३० ॥ या ब्रह्मांडातें सृजिता । तो कुमरू तुझा तत्त्वतां । जेणें हे मही घेतली माथां । तो तुझ्या अंगाखालता दडाला ॥ ३१ ॥ योगियांचा मुकुटमणी । ज्यातें म्हणती शूळपाणी । तो तुझे पायांचें पायवणी । वंदोनि नाम स्मरतसे ॥ ३२ ॥ कुंभोद्भव म्हणे श्रीरघुनाथा । वेदशास्त्रां न कळे तुझी कथा । साही दर्शनें विवादतां । तुझिया अंता न पावती ॥ ३३ ॥ करोनि मायेचे विंदाना । इंद्र भुलविला रणांगणा । शर वर्षे तें न दिसे जाणा । खेदातें मन पावलें ॥ ३४ ॥ क्षतें क्षीण देखोनि देवेंद्र । ते समयीं धांवला राजकुमर । अवचिता धरोनि अमरेंद्र । गळां बंधन पैं केलें ॥ ३५ ॥ आपणा धरिलें होतें म्हणून । ते संधि रावणें साधून । करिता झाला शस्त्रप्रेरण । मरुद्गण लक्षोनी ॥ ३६ ॥ राक्षसीं इंद्र रणीं धरिला । भेणें सुरां पळ सुटला । कित्येकांचा संहार रावणें केला । उरले ते पुरीं प्रवेशले ॥ ३७ ॥ रथावरोनि शक्रजित । पितयासी येथोनि चला म्हणत । आम्हांसी झाला जय प्राप्त । कोणे कार्या येथें रहावें ॥ ३८ ॥ मेघनाद म्हणे पितयासी । हा ज्वर होता माझे मानसीं । तो निरसला शिवकृपेंसीं । इंद्रराव धरितांचि ॥ ३९ ॥ मी देवांचा दर्पहरण । त्रैलोक्य माझेनि कंपायमान । इंद्रा धरोनि मनोरथ पूर्ण । आजि माझे पैं झाले ॥ ४० ॥ आजिपासोनि त्रैलोक्य । आम्ही भोगूं आवश्यक । आतां युद्धाची उत्कंठा देख । आम्हांसी नाहीं राजेंद्रा ॥ ४१ ॥ ऐसें पुत्राचें वचन । ऐकोनियां दशानन । पुनरपि म्हणे पुत्रा दृढ बंधन । करीं दक्षिणपुरीस नेतां ॥ ४२ ॥ ययासि लंकेसी पैं नेतां । देव येतील सोडवावया तत्त्वतां । हेंही न घडे परी रक्षितां । आळस न कीजे मेघनादा ॥ ४३ ॥ अमरपुरीस इतकें करून । इंद्रासी गळां बांधोन । विदारोनि देवसैन्य । स्वसैन्येंसीं निघाले ॥ ४४ ॥ वाजंत्रांच्या नाना ध्वनी । गुढिया मखरें उभवोनी । पुरीं प्रवेशले स्वभवनीं । राक्षसेंद्र पैं आला ॥ ४५ ॥ गृहीं प्रवेशोनि रावण । समस्तां आज्ञा दिधली जाण । श्रमलेति युद्ध करितां दारुण । विश्रांति घ्यावी निजमंदिरीं ॥ ४६ ॥ ऐसें राक्षसराज बोलिला । समस्तां आज्ञा देवोनि प्रवेशला । नगरजनां उत्साह झाला । मंगळतुरें वाजती ॥ ४७ ॥ एका जनार्दना शरण । रावण प्रवेशला लंकाभवन । इंद्रातें करोनि बंधन । संरक्षण करविलें ॥ ४८ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां रावणइंद्रबंधनलंकाप्रवेशो नाम त्रयस्त्रिंशोऽध्यायः ॥ ३३ ॥ ओंव्या ॥ ४८ ॥

अध्याय चौतिसावा

॥ श्रीपतितपावनाय नमः ॥ पूर्वप्रसंगीं दशाननपुत्रें । धरोनि नेलें इंद्रातें । तें देखोनि सुरवर दुःखातें । पावले बहुत संग्रामीं ॥ १ ॥ समस्त सुरवर मिळोन । येवोनि प्रार्थिला चतुराननें । म्हणती भ्रष्ट झालें अमरसदन । इंद्र धरून नेला

१ पृथ्वीचें. २ खोल. ३ तीर्थ. ४ देवसमूह. ५ भयानें. ६ इंद्रजित. ७ शंकराच्या कृपेनें, ८ गर्व हरण करणारा. ९ लंकेला. १० ब्रह्मदेव.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

लंकेसी ॥ २ ॥ तुझिये वरदें राक्षस । उन्मत्त झाले बहुवस । तेणें मेघनादें आम्हांसी देवोनि त्रास । लंके अमरेश धरून नेला ॥ ३ ॥ ऐकोनि देवांचें वचन । आश्चर्य पावला चतुरानन । मग समस्त देव मिळोन । लंकाभवन पावले ॥ ४ ॥ ब्रह्मा आला ऐकोनि वाणी । राक्षसराज सामोरा येवोनी । पूजा अभिवंदनें करोनी । मग ब्रह्मा नेला मंदिरासी ॥ ५ ॥ रावण म्हणे जी स्वामिनाथा । कोणीकडे आलेति समर्था । येरू म्हणे तुझ्या पुत्राची प्रशंसता । ऐकोनि येथें पैं आलों ॥ ६ ॥ तुझिया पुत्राचा पराक्रम । ऐकोनि सुख झालें परम । याचे तुळणेसी वीरीं विक्रम । ब्रह्मांडामाजी पैं नाहीं ॥ ७ ॥ येणें जिंतोनि त्रिभुवन । केलें सर्व आपणाअधीन । प्रतिज्ञा येणें सत्य करून । इंद्रा बांधोन आणिलें ॥ ८ ॥ याच्या देवोनि पुरुषार्थातें । मी प्रसन्न झालों जाण येथें । जो मागसी त्या वरातें । ये काळीं मी देईन ॥ ९ ॥ इंद्र आणिला जिंतोन । यास्तव इंद्रजित हें अभिधान । मग म्हणे दशानना जाण । तुझा पुत्र परम भाग्याचा ॥ १० ॥ या इंद्रातें करोनि मुक्त । स्थापीं आपुला आज्ञांकित । देवांसहित हा अंकित । झाला असे समरांगणीं ॥ ११ ॥ ऐकोनि प्रपितामहाचें वचन । काय बोलिला मेघनाद आपण । म्हणे स्वामी झालासी प्रसन्न । तरी अमरपण मज देईं ॥१२॥ जरी मज अमरत्व देसी । तरी मी सोडीन इंद्रासी । मी आणीक तुजपासीं । मागत नाहीं पदार्थ ॥ १३ ॥ मेघनादमुखींचें वचन । ऐकोनि ब्रह्मा हास्यवदन । काय बोलिला तें सावधान । श्रोतृजनीं परिसावें ॥ १४ ॥ ब्रह्मा म्हणे इंद्रजिता अवधारीं । जो जन्मला जननीजठरीं । तयासी काळ लागला पैं मारी । अमरत्व कैसेनि लाधेल ॥ १५ ॥ जो आकारातें आला । तो जाण नाशातें पावला । जो जननीजठरीं नाहीं आला । तो अमर झाला सर्वस्वें ॥ १६ ॥ नादबिंदा होतां भेटी । तो गर्भ वाढे मातेच्या पोटीं । जातक वर्तविती शेवटीं । तो जाईल निश्चितीं जाणिजे ॥ १७ ॥ मार्कंडेय भृशुंडी रोमहर्षण । हंस कूर्म बहु आयुष्याचे जाण । परी ते काळें जर्जर करून । मरणमार्गी लाविले ॥ १८ ॥ आणि स्थावर जंगम चराचर भूतें । हींही पावती लयातें । मी सृष्टिस्रजिता परी मातें । काळ न सोडी जाणावें ॥ १९ ॥ मरण चुकावें म्हणोन । हिरण्यकशिपें केला प्रयत्न । परी शेवटीं तो निधन । यथाकाळीं पावला ॥ २० ॥ याकारणें गा राजकुमरा । प्रारब्धीं लिहिलें न चुके चतुरा । चतुष्पद द्विपद तेही मरणद्वारा । काळाच्या घरा जातील ॥ २१ ॥ ऐकोनि चतुराननाचें वचन । इंद्रजित म्हणे ऐका विज्ञापन । तुमच्या बोलें इंद्रा सोडीन । परी मागेन तें द्यावें ॥ २२ ॥ वैरियासीं युद्ध करितां समरांगणीं । संकट मांडल्या मज रणीं । होम करीन मंत्र जपोनी । अवदानें अग्नि संतुष्ट ॥ २३ ॥ होम करीन शत्रुविजयार्थ । तेथोनि निघावा अश्वासहित रथ । त्यावरी बैसतां मज अमरत्व । सहज होईल ते काळीं ॥ २४ ॥ ऐसा माझा मनोरथु । सिद्धि पावावया तूं समर्थु । ब्रह्मा म्हणे तथास्तु । चिंतिलें पावसी राजपुत्रा ॥ २५ ॥ तदनंतरें मेघनादें । इंद्रा सोडिलें अति आल्हादें । सकळ देवांसीं सुरेंद्रें । अमरावतीस गमन केलें ॥ २६ ॥ तयाउपरी श्रीरघुपती । ऐकें येवोनि स्वलोकाप्रती । चिंतातुर होवोनि श्रमांतीं । मुख अत्यंत कोमाइलें ॥ २७ ॥ लज्जान्वित चिंतातुर मन । ते समयीं चतुरानन । म्हणता झाला पूर्वदुष्कृतस्मरण । आठवीं गा अमरेंद्रा ॥ २८ ॥ म्यां विधात्यानें पुरंदरा । रचिलें या चराचरा । नरांसदृश केलें नरां । स्त्रियांसारिख्या स्त्रिया केल्या ॥ २९ ॥ कोणी न देखेचि सुंदर । मग झालों चिंतातुर । मग म्यां भूतें केलीं नानाकार । जंगमादिस्थावरपर्यंत ॥ ३० ॥ या समस्तांचें सुंदरपण । एकवटिलें न लागतां क्षण । तयाचें करीन कन्यारत्न । निश्चय पूर्ण मनीं केला ॥ ३१ ॥ विधाता म्हणे ते अवसरीं । सौंदर्याची निर्मिली कुमरी । नाम अहल्या सुंदरी । पुढें कैसी झाली परी तें ऐका ॥ ३२ ॥ अहल्येची यापरी उत्पत्ती । झालीसे गा अवनिजापती । तिचा पिता विधाता म्हणती । प्रसिद्ध शास्त्रीं बोलिजे ॥ ३३ ॥ धरणिजापति म्हणे इल्वं-

१ नांव. २ स्वाधीन. ३ मातेच्या पोटीं. ४ ग्रहांचें शुभाशुभ फल. ५ सृष्टिकर्ता. ६ मरण. ७ इंद्र. ८ स्थिति. ९ सीतापति रामचंद्रा. १० हे अगस्ती.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

लारी । तुवां उदधि प्राशिला आचमनेंकरीं । विंध्याद्रि निजविला पृथ्वीवरी । अद्यापवरी देखतसों ॥ ३४ ॥ यास्तव मागें महामुनी । अहल्येची उत्पत्ति ऐकिली कानीं । परंतु पुनः तुझ्या मुखेंकरूनी । ऐकावी म्हणोनी पुसतसें ॥ ३५ ॥ अगस्ति म्हणे अयोध्यापती । दिवसेंदिवस झाली वाढती । वर मिळाले पृथ्वीपती । देवगंधर्व ऋषीश्वर ॥ ३६ ॥ ऐसे समस्त मीनले । चंद्र इंद्र यम सूर्य आले । तपोधनेंही तेथें मिळाले । कन्याशा मनीं धरोनी ॥ ३७ ॥ ऐसें जाणोनि चतुरानन । करिता झाला एक पण । म्हणे प्रथम येईल मेरुप्रदक्षिणा करून । त्यासी देईन अहल्या ॥ ३८ ॥ ऐकोनि ब्रह्मयाची वचनोक्ती । समस्त चालिले प्रदक्षिणार्थी । इंद्र चढोनि ऐरावतीं । लाँहेंलाहें निघाला ॥ ३९ ॥ वरकड समस्त ऋषीश्वर । प्रदक्षिणेसी निघाले सत्वर । मागें गौतमें काय केलें चतुर । पंडित जनीं अवधारिजे ॥ ४० ॥ गोप्रसूतिकाळ देखोन । उभयतोमुखीतें प्रदक्षिणून । आला चतुराननें जाणोन । कन्यादान गौतमा केलें ॥४१॥ प्रदक्षिणा करोनि सकळ सुरवर । तयांपुढें आला इंद्र । तंव अहल्येसी सांगे गौतम भ्रतार । देखोनि इंद्र कोपला ॥ ४२ ॥ इंद्र म्हणे ब्रह्मयासी । आम्हांहूनि शक्ति गौतमासी । आधीं आला म्हणोनि अहल्येसी । कन्यादानासी पैं केलें ॥ ४३ ॥ चतुरानन म्हणे अमरनाथा । गोप्रसूतिकाळीं येणें तत्त्वतां । प्रदक्षिणा केली ती मेरूसीं समता । म्हणोनि दुहिता तया दिधली ॥ ४४ ॥ उभयतोमुखींची प्रदक्षिण । ते मेरुप्रदक्षिणेसमान । ऐसें जाणोनि कन्यारत्न । गौतमालागोन दीधलें ॥ ४५ ॥ यापरी अहल्यापाणिग्रहण । गौतमासी झालें जाण । तो राग इंद्रें मनीं धरून । कपटें छळण मांडिलें ॥ ४६ ॥ अहल्येसीं गौतमें जाण । सूर्यग्रहणीं केलें स्नान । पुढें अहल्या आश्रमीं एकटी जाण । ते संधीं इंद्र प्रवेशला ॥ ४७ ॥ स्नान करोनि अहल्या मंदिरीं । एकली असतां इंद्र पापाचारी । गौतमवेष धरोनि ते अवसरीं । कामसंचारीं प्रवेशला ॥ ४८ ॥ रति मागोनि तियेसीं । इंद्र विचरतां अर्धमासी । तंव द्वारीं येवोनि उभा ऋषी । दोहींच्या संयोगासी देखिलें ॥ ४९ ॥ देखोनि दोहींचें पापाचरण । ऋषीनें दोघां शाप दारुण । देवोनि तपा निघाला जाण । त्याचें शापलक्षण अवधारा ॥ ५० ॥ अहल्या विनवी कर जोडून । इंद्र तुमचे वेषें रमोन । मज न कळेचि कपटपण । क्षमा संपूर्ण मज कीजे ॥ ५१ ॥ ऐकोनि अहल्येचें वचन । तत्काळ द्रवला तो कृपाघन । म्हणे इक्ष्वाकुकुळीं रघुनंदन । स्वयंवरा जातां उद्धरील स्पर्शें ॥ ५२ ॥ परद्वारिणी परम नष्टे । परपुरुषासीं रमलीस भ्रष्टे । शीघ्र शिळा होईं पापिष्टे । या आश्रमामाझारीं ॥ ५३ ॥ अहल्या जाहली शिळा । भगें आलीं इंद्राच्या कपाळा । यालागीं कोणी कोणाचे छळा । न प्रवर्तावें देवेंद्रा ॥ ५४ ॥ शिळारूपें तपःस्थिती । केली अहल्येनें नेमस्ती । उत्कृष्ट तप जाणोनि रघुपतीं । चरणस्पर्शें उद्धरिली ॥ ५५ ॥ पुनीत झाली देखोनि अंगना । गौतमें अंगीकारिली जाणा । पुढें इंद्रा तुझ्या कथना । सावधाना अवधारीं ॥ ५६ ॥ ऋषिशापें गेली कळा । हीनत्व आलें वीर्यबळा । मुकलासी ऐश्वर्या सकळा । बांधोनि गळां राक्षसीं नेला ॥ ५७ ॥ तया पापाचें फळ । तुज प्राप्त झालें प्रबळ । जैसी निर्दैवाला अवदशा केवळ । ठाकोनि ये घर पुसत ॥ ५८ ॥ जैसी निर्दैवाची संपत्ती । विषयासक्ताची तपःस्थिती । नपुंसकाची घरवादप्रीती । अंधाप्रती दीप जैसा ॥ ५९ ॥ परांगनास्पर्शाचेनि पापें । तुझी संपत्ति यश हरपे । क्रियाभिमान तुझा करपे । दुःखें अमूपें भोगिसी ॥ ६० ॥ तुझें राज्य न होईल स्थिर । तूं हिंडसी देशदेशांतर । मनुष्यलोकीं तुज स्थिर । वास नोहे रहावया ॥ ६१ ॥ ब्रह्मा म्हणे इंद्राप्रती । तूं याग करीं विष्णुप्रीत्यर्थीं । तेणें तुज यश कीर्ती आणि श्रीमंती पावसी ॥ ६२ ॥ विष्णुप्रीत्यर्थ करीं यज्ञ । संतृप्त होती देवब्राह्मण । तेणें तुज होय कल्याण । हितवचन मी सांगतों ॥ ६३ ॥ तुझा पुत्र धरोनि नेला । तो क्षीरसागरीं स्वस्थ राखिला । तयाची ग्लानि वेळोवेळां । निजमानसीं धरूं नको ॥ ६४ ॥ इतुकें ब्रह्मयाचें ऐकोनि वचन । इंद्रें याग आरंभिला प्रीत्यर्थ भगवान । आचार्या

१ आचमन करून. २ राजे. ३ तपस्वी. ४ जलदीजलदीनें. ५ कन्या. ६ प्रवृत्त झाला असतां. ७ पापकर्मीला. ८ क्षतें. ९ पुष्कळ.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

अध्वर्या पाचारून । दीक्षाग्रहण पैं केलें ॥ ६५ ॥ गार्हपत्य दक्षिण आहवनी । तिन्ही अग्नि स्थापिले तिहीं स्थानीं । आचार्य ब्रह्मा मिळोनी । यापरी याग साधिला ॥ ६६ ॥ इंद्रें करोनि अवभृथस्नाना[1] । ब्राह्मणां दिधलें कोटिगोदानां । सुखी केलें विश्वजनां[2] । श्रीभगवानाप्रीत्यर्थ ॥ ६७ ॥ यापरी यज्ञ सिद्धी पावला । सकळां देवां संतोष झाला । तदनंतरें पुष्पवर्षाव केला । महावाद्यें वाजविलीं ॥ ६८ ॥ येरीकडे श्रीरघुपती । थोर विस्मयो झाला चित्तीं । म्हणे अगा ये स्वामी अगस्ती । हरीची माया दुर्धर ॥ ६९ ॥ मायेनें इंद्रा छळिलें । पराशराचें तप ढाळिलें । शंकराहातीं नरकपाळ दिधलें । भिक्षा मागे घरोघरीं ॥ ७० ॥ चंद्रासी कळंक लाविला थोर । शापें भस्म केले सगर[3] । सरस्वतीपाठीं लागला पितर । जो चराचरांचा पैं कर्ता ॥ ७१ ॥ पांडवां देशवटा[4] भारी । हिंडती दीनें वनांतरीं । भृगूची पुलोमा सुंदरी । मायावी दैत्य नेत होता ॥ ७२ ॥ द्रौपदी पतिव्रताशिरोरत्न[5] । तीसही कष्ट झाले गहन । चांडाळ कौरवीं वस्त्रें हिरोन । सभेमध्यें उभी केली ॥ ७३ ॥ ऐसें मायेचें विंदान । सुरवरां न कळेचि लक्षण । तेथें आम्ही रंक दीन । काय जाणों मायेतें ॥ ७४ ॥ ऐसें बोलिला श्रीरघुपती । तया उत्तर दे अगस्ती । पुढिले अध्यायीं तयाची स्थिती । रामाप्रती सांगेल ॥ ७५ ॥ एका जनार्दना शरण । इंद्रअहल्येचें आख्यान । सांग जाहलें संपूर्ण । जनार्दननिजकृपा ॥ ७६ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां इंद्रअहल्याख्यानं नाम चतुस्त्रिंशोऽध्यायः ॥ ३४ ॥ ओंव्या ॥ ७६ ॥

अध्याय पस्तिसावा

॥ श्रीदीनोद्धारणाय नमः ॥ मागिले प्रसंगीं शक्रजितें । मैत्री करोनि सोडिलें इंद्रातें । तदनंतरें सीताकान्तें । अगस्तीतें विनविलें ॥ १ ॥ श्रीराम दोनी कर जोडून । अगस्तीस विनवी नम्र होऊन । म्हणे स्वामी वाळिरावणांचे बळासमान । भूमंडळीं आन[6] असेना ॥ २ ॥ या दोघांच्या बळाहूनि अधिक । वायुपुत्र असे देख । तयाचा पराक्रम सम्यक । मज ठाऊक असे जी ॥ ३ ॥ हनुमंताच्या प्रसादेंकरून । प्राप्त लंका सीता लक्ष्मण । येणें सुग्रीवेंसीं सख्य जाण । अगणित बळ पैं याचें ॥ ४ ॥ शुद्धीस जातां सहित वानरेंसीं । समुद्र देखोनि कपि चिंतातुर मानसीं । तो शत योजनें येणें पराक्रमेंसीं । उतरोनि लंका पावला ॥ ५ ॥ सीतेसी करोनि एकान्त । वन उपडोनि किंकरप्रधानपुत्रघात । आणि लाडका जो अखया सुत । त्याचा निःपात येणें केला ॥ ६ ॥ सीताशुद्धी येणें केली । वन उपडोनि राक्षसें मारिलीं । ब्रह्मशापें बांधों देवोनि बळी । केली होळी लंकेची ॥ ७ ॥ इंद्रजितजनकें शक्ति टाकिली । तेणें लक्ष्मण पडिला भूतळीं । येणें द्रोणगिरी आणोनि त्यावेळीं । सौमित्रातें वांचविलें ॥ ८ ॥ याचेनि सुग्रीवासी सख्य झालें । अठरा पद्में वानर मेळविले । याचेनि मजला रूप आलें । ऐसे उपकार केले हनुमंतें ॥ ९ ॥ याचे ऐसे उपकार । मजवरी झाले मुनि अपार । परी येणें वाळीवानर । किंनिमित्त वधिला नाहीं ॥ १० ॥ ऐसें याचें बळ अद्भुत । देवां दानवां अतुळित । परी येणें नाहीं मारिला शक्रसुत[9] । काय कारण मुनिवर्या ॥ ११ ॥ ऐसी आशंका माझे चित्तीं । वसत आहे गा मुनि अगस्ती । सुग्रीवकार्यासी मारुती । कांहीं नाहीं प्रवर्तला ॥ १२ ॥ ऐसें श्रीरामाचें उत्तर । ऐकोनि अगस्ति चतुर । काय बोलिला तें सविस्तर । श्रोतीं सादर ऐकिजे ॥ १३ ॥ अगस्ति म्हणे श्रीरघुपती । बाळपणीं याची अद्भुत ख्याती । ते मी सांगेन तुजप्रती । अद्भुत शक्ती हनुमंता ॥ १४ ॥ ब्रह्मचर्याची अति गोमटी । हनुमंतासी गर्भकांसोटी । अंजनीमाता न देखे दृष्टीं । कां राम जगजेठी देखेल ॥ १५ ॥ हनुमंताचें लिंगदर्शन । मुख्य माता न देखे जाण । मग इतर देखों शके कवण । ब्रह्मचारी पूर्ण वायुकुमर ॥ १६ ॥ हनुमान पुसे बाळभावें । माते म्यां क्षुधेसी काय खावें । आरक्त फळ जें देखावें । तें भक्षावें म्हणे माता ॥ १७ ॥ जन्मतांचि हनुमंत । अग्नितेजें देदीप्त । बालार्कप्रभासम भासत । दीप्तिमंत मारुती ॥ १८ ॥

---

१ यज्ञाच्या शेवटीं करतात त्या स्नानाला. २ सर्व लोकांना. ३ सगरराजाचे साठ हजार पुत्र. ४ वनवास. ५ पतिव्रतांमध्यें श्रेष्ठ. ६ दुसरा. ७ सीतेचा शोध. ८ द्रोणाचल. ९ वाळी.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सूर्योदय नव्हतां तेथ । सेजे निजवोनि हनुमंत । अंजनी गेली वनांत । फळें त्वरित आणावया ॥ १९ ॥ मातृविहीन हनुमंत । रुदन करी अति क्षुधित । देखोनि बालार्क¹ आरक्त । फळ भक्षावयार्थ उडाला ॥ २० ॥ क्षुधेनें पीडिला प्रबळ । बाळसूर्य अति वर्तुळ । भक्षावया स्वयें तत्काळ । उडे चपळ स्वभावें ॥२१॥ हनुमंताची उड्डाणशक्ती । ते गति न ये खगेश्वराप्रती² । वायुसुताच्या शीघ्रगतीं । मनोवृत्ती टेंणकल्या³ ॥ २२ ॥ भक्षावया बालार्कासी । दुर्धर गति हनुमंतासी । देखोनि विस्मय सुरवरांसी । देव ऋषि विस्मित ॥ २३ ॥ धैर्य शौर्य महावीर्य । शीघ्र गमन गतिगांभीर्य । हनुमंताचें परमौदार्य । सुरासुर वानिती ॥ २४ ॥ हनुमंताच्या समान शक्ती । कोणा नाहीं त्रिजगतीं । बाळभावें शीघ्रगती । सूर्यभक्षार्थी धांवत ॥ २५ ॥ मनोगती सांडोनि मागें । हनुमान चालिला वेगें । सूर्यकिरणाचेनि योगें । होईल सर्वांग भस्मान्त ॥ २६ ॥ ऐसें जाणोनि वायुपिता । निजपुत्रातें संरक्षिता । हिमांबुकणीं⁴ निववित । होय चालता शिशूमागें ॥ २७ ॥ वायु धरूं पाहे हनुमंतासी । तंव तो नाटोपे वायूसी । वेगें जातां सूर्यापासीं । फळभावेंसीं भक्षावया ॥ २८ ॥ हनुमंत आला बिंबापासीं । रविराहुग्रहण ते दिवसीं । राहु ग्रासितां सूर्यासी । हनुमंतासी कोप आला ॥ २९ ॥ माझ्या गोड ग्रासाआड । येथें कोण आला मूढ । राहूचें फोडिलें जाभाड । पुच्छें सदृढ गांजिला ॥ ३० ॥ पुच्छें हाणितां वानरा । घायें राहु झाला घाबरा । नाकीं मुखीं रुधिरधारा । थरथरां कांपत ॥ ३१ ॥ धाकें थरथरां कांपत । गगनीं गरगरां भोंवत । राहु पडतां अति मूर्च्छित । तरी धांवोनि केत धरी त्यासी ॥ ३२ ॥ राहू केतू अति आसता⁵ । दोघां देहीं एकात्मता । केतु येवोनि राहुसाह्यार्था । कोपें हनुमंताकडे पाहे ॥ ३३ ॥ सकोप केतु देखोनि दृष्टीं । रागें हनुमान हाणी मुष्टी । दोघां पळतां पाय पोटीं । बोंब उठी ग्रहचक्रीं ॥ ३४ ॥ ग्रह सांगती सिंहिकासुता । पुच्छकेतु आला तुम्हांभोंवता । इंद्र अधिकारी नियंता । त्यासी तत्त्वतां तुम्ही सांगा ॥ ३५ ॥ राहु जो कां सिंहिकासुत । वानरघायें रुधिरोक्षित । इंद्रापासीं आला त्वरित । शंख करीत सांगावया ॥ ३६ ॥ माझी जीविका जीवनवृत्ती । चंद्रसूर्यग्रहणस्थिती । आजिचे ग्रहणकाळाप्रती । रविग्रहणार्थी मी गेलों ॥ ३७ ॥ तंव मजहूनि बळवंत । पुच्छराहु येवोनि तेथ । घाय करोनि रुधिरोक्षित । धाडिलों येथ बोंबेंसीं ॥ ३८ ॥ तूं नियंता देवाधिदेवो । माझा न देखतां अन्यावो । तुवां धाडिला पुच्छरावो । तेणें मज पहाहो गांजिलें ॥ ३९ ॥ शेखीं मजही न सांगतां । त्वां करणी केली गुप्त घाता । म्यां काय करावें आतां । मज तत्त्वतां तूं सांगें ॥ ४० ॥ पुच्छराहु येवोनि तेथ । सूर्य आकळिला समस्त । माझा करूं धांवे घात । आलों रडत सांगावया ॥ ४१ ॥ ऐकोनि राहूचा वचनार्थ । इंद्रादि देव झाले विस्मित । ग्रहचक्रांत म्हणती हें विपरीत । कर्ता येथ तो कोण ॥ ४२ ॥ कोणें केला नवा राहो । त्यासी निर्दळावया पहाहो । घेवोनि सुरसेनासमुदावो । इंद्र स्वयमेवो पैं आला ॥ ४३ ॥ इंद्रें राहु पुढें करून । नवा राहु दाखवीं म्हणोन । जेणें तुज गांजिलें संपूर्ण । त्याचें निर्दळण करीन मी ॥४४॥ दाखवितां हनुमंतासी । थरथरां कंप सुटला राहूसी । दडोनि ऐरावतीचे पाठीसीं । दावी इंद्रासी दुरोनी ॥ ४५ ॥ येरीकडे हनुमंत । धांवला रवि ग्रासावया क्षुधित । तेणें सूर्य चळीं कांपत । अति अनर्थ ओढवला ॥ ४६ ॥ दिनमान सांडोनि नभःपथा । पळों न लाहे सविता । निवारूं न शके हनुमंता । अति आकांता पावला ॥ ४७ ॥ तेचि संधीं इंद्रापासीं । वानर देखोनि राहूसी । रागें निर्दळावया त्यासी । अति आवेशीं धांवला ॥ ४८ ॥ मज क्षुधिताच्या आहारासी । राहू ओढवला विवसी⁸ । धरोनि इंद्राच्या बळासी । माझ्या ग्रासासी घेऊं आला ॥ ४९ ॥ ऐसें बोलोनि हनुमंत । सूर्यग्रासाची सांडोनि मात । राहूचा करूं धांवे घात । येरू बोभातें⁹ इंद्रासी ॥ ५० ॥ राहु पळे इंद्राकडे । तंव हनुमंताची उडी पडे । येरू अति आक्रोशें रडे । इंद्रापुढें सांगत ॥ ५१ ॥ राहु म्हणे मातें मर्दीत । इंद्र इंद्र नामें

१ बालसूर्य. २ गरुडाला. ३ थकल्या. ४ थंड पाण्याच्या बिंदूंनीं. ५ मैत्री. ६ रक्तबंबाळ. ७ शेवटीं. ८ राक्षसी. ९ हांका मारी.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

आक्रंदत। वानरें पुरविला अंत। आरंबळत आक्रोशें[1] ॥ ५२ ॥ ऐकोनि राहूचा आकांत। इंद्र नाभीकार देत। भिवों नको धरीं पुरुषार्थ। याचा घात मी करीन ॥ ५३ ॥ ऐसें बोलोनि अमरपती[2]। वेगीं प्रेरिला ऐरावती। त्यावरी धांवला मारुती। हस्तें हस्ती उपटावया ॥ ५४ ॥ वानर ऐरावती आकळी। त्यातें पुच्छें ठोकिला कुंभस्थळीं। गज आक्रंदोनि किंकाळी। चळचळीं कांपत ॥ ५५ ॥ पुच्छ नव्हे तो वज्राघात। घायें विमुख ऐरावत। इंद्र बळें आवरीत। तरी युद्धाआंत परतेना ॥ ५६ ॥ पुच्छें हाणितां वानरें। गजें घेतलें घायवारें। शक्रशक्तीतें नावरे। केलें घाबरें इंद्रासी ॥ ५७ ॥ इंद्र देवांमाजी बळी। करितां हनुमंतासीं कळी। वानरें मुकुट पाडिला तळीं। झोंटी[3] मोकळी सूटली ॥ ५८ ॥ मुकुट घ्यावया आपणासी। बाळभावें न कळे त्यासी। इंद्र केला कासाविसी। मरुद्गणेंसीं मर्दूनी ॥ ५९ ॥ इंद्र गांजिला कपींद्रें। यम धांविन्नला कैवारें। दंडें हाणी सत्वरें। केलें वानरें विपरीत ॥ ६० ॥ यम जंव हाणी दंडासी। हनुमान आदळला अंगासीं। थापा हाणोनियां त्यासी। तोंडघसीं पाडिला ॥ ६१ ॥ घाय हाणोनि प्रचंड। सांडवोनि दंड-बंड। यमाचें ठेंचिलें तोंड। बळ वितंड वानरा ॥ ६२ ॥ यमें गांजिलें जगासी। हनुमंतें गांजिलें तयासी। घायें मिळविला धुळीसी। उठावयासी बळ नाहीं ॥ ६३ ॥ यम गांजिला दारुण। भेणें पळाला वरुण। कुबेर घाली लोटांगण। चरणां शरण कपिराजा ॥ ६४ ॥ हनुमंतें अर्धक्षणीं। सुरवरसैन्या केली भंगाणी। अवघ्यां केली दाणादाणी। महापळणी देवांसी ॥ ६५ ॥ हनुमंताच्या वेगापुढें। आम्हीं पळावें कोणीकडे। येरामागें येरु दडे। जीवा सांकडें देवांसी ॥ ६६ ॥ सगज उपडावया इंद्रासी। ऐरावत धरोनि पुच्छासीं। वानरें भोवंडिला आकाशीं। सदेव ऋषी गजबजिले ॥ ६७ ॥ हनुमंतें देखोनियां दृष्टीं। इंद्र उपडिला सृष्टीं। जगीं एकचि बोंब उठी। महाहटी वानर ॥ ६८ ॥ लघु लाघवें सुरपंतीं। वज्रें हाणितला मारुती। घाव लागला हनुमंताप्रती। पडियेला क्षितीं मूर्च्छित ॥ ६९ ॥ मेरुशिखरपाठारांत। हनुमान पडिला मूर्च्छित। वायु पिता येवोनि त्वरित। निजसुत उचलिला ॥ ७० ॥ क्षुधिता माझिया तान्हयासी। इंद्रें हाणोनि वज्रासी। मूर्च्छित पाडिलें भूमीसीं। वायु मानसीं क्षोभला ॥ ७१ ॥ वायु क्षोभला संपूर्ण। आकर्षिला जगाचा प्राण। ब्रह्मादिकां संकट पूर्ण। ऋषिभूतगण तळमळती ॥ ७२ ॥ वायु क्षोभोनि सक्रोध। अंतरीं केला प्राणरोध। प्राणापान ठेले स्तब्ध। अति विरुद्ध देवांसी ॥ ७३ ॥ प्राणनिरोधाची स्थिती। ठेली भूतांची नित्यगती। कोणा नाहीं सुखप्राप्ती। तळमळ करिती अति दुःखें ॥ ७४ ॥ यक्षराक्षसगणगंधर्व। सिद्धचारणादि मानव। सत्यलोका येवोनि सर्व। पितामह वंदिला ॥ ७५ ॥ एका जनार्दना शरण। सकळ देवांचा वैर लाहोन। वज्रदेही होईल हनुमान पूर्ण। सावधान अवधारा ॥ ७६ ॥

स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकार-टीकायां हनुमंतप्रतापवर्णनं नाम पंचत्रिं-शोऽध्यायः ॥ ३५ ॥ ओंव्या ॥ ७६ ॥ श्रीसीता-रामचंद्रार्पणमस्तु ॥

अध्याय छतिसावा

॥ श्रीगणपतये नमः ॥ समस्तदेवऋषिपंक्ती। प्राणरोधें तळमळती। येवोनि प्रार्थिला प्रजापती। देव विनंती करिते झाले ॥ १ ॥ प्राणनिरोधाचे कष्ट। ऋषी सांगती श्रेष्ठ श्रेष्ठ। तंव ब्रह्मयाचें फुगलें पोट। अति संकट देवांसी ॥ २ ॥ गगनीं लागलें पोट। बोल बोलतां होती कष्ट। मळमूत्रा तेथें कैंची वाट। अति संकट देवांसी ॥ ३ ॥ ब्रह्मा स्वयें सांगे समस्तां। इंद्रें हाणोनि वज्राघाता। मूर्च्छित पाडिलें हनुमंता। वायु पुत्रार्थी[11] क्षोभला ॥ ४ ॥ राहूचे कैवारें अमरनाथें। वज्र हाणिलें वायुसुतातें[12]। पुत्र पडतांचि मूर्च्छित। वायु प्राणान्त क्षोभला ॥ ५ ॥ प्राणवृत्ति चाळिता वायु। तो तंव जगाचा जगदायु। पुत्रलोभें क्षोभोनि बहु। भूतां आकान्त मांडिला ॥ ६ ॥ प्राणा-

---

१ ओरडत. २ इंद्र. ३ केश. ४ भिडला. ५ नाश. ६ संकट. ७ इंद्रानें. ८ पृथ्वीवर. ९ ब्रह्मदेव. १० आशीर्वाद.

११ मुलाकरतां. १२ मारुतीला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

पानीं नित्य सुख। प्राणें प्राण्या नित्य हरिख। प्राण जातां निःशेख। परम दुःख प्राणियां ॥ ७ ॥ प्राण गेलिया निघोनी । काष्ठप्राय प्राणी जनीं । दृष्टी पाहतांचि सचैलस्नानीं । विटाळ मानी जग त्याचा ॥ ८ ॥ यालागीं प्राणें पवित्रता । प्राणें प्रीति प्रीतिवंता । प्राण गेलिया तत्त्वतां। प्रिया प्रियकांता स्पर्शेना ॥ ९ ॥ पत्नी प्रिया परम आप्त नित्य । एकांतीं भोगी जीवित । प्राण गेलिया मानी प्रेत । पतीस भूत म्हणे पत्नी ॥ १० ॥ प्राण प्रिय समस्तां । तो क्षोभोनि जाईल आतां । यालागीं वांचवावें हनुमंता । वैकुंठनाथा सांगोनी ॥ ११ ॥ प्राणें पीडला शूळपाणी[1] । वायूची करावया बुझावणी । तोही आला तत्क्षणीं । वांचवावया हनुमंता ॥ १२ ॥ शिव शक्रें[2] चतुरानन। तिंहीं प्रार्थिला जनार्दन । हनुमंता द्यावया जीवदान । अवघे जण निघाले ॥ १३ ॥ ब्रह्मा हरि हर तिघे जण । सवें इंद्रादि देवगण । ऋषिश्रेष्ठ प्रजा पूर्ण । अवघे जण तेथें आले ॥ १४ ॥ तंव तेथें घेवोनि हनुमंत । वायु बैसलासे रडत । प्राणरोधें क्रोधयुक्त । आले समस्त त्या ठाया ॥ १५ ॥ देखोनि ब्रह्मा हरि हर । वायु उठोनियां सत्वर । कडिये घेवोनि कुमर । केला नमस्कार सद्भावें ॥ १६ ॥ एकपुत्रघाताकारणें । अवघें जगचि निर्दळणें । ऐसें न करावें आपणें । क्षमा करणें प्राणनाथा ॥ १७ ॥ वायु बोले क्षोभकर्ता । माझा हनुमंत हा न उठतां । करीन इंद्रियांच्या घाता । जाण तत्त्वतां प्रजापते[3] ॥ १८ ॥ ऐकोनि वायूचें वचन । हास्य करी श्रीजनार्दन । हनुमंताच्या भाग्यें पूर्ण । जन्ममरण या नाहीं ॥ १९ ॥ श्रीरामभागाच्या द्विगुणितें[4] । भाग्य पावला हनुमंत । त्यासी स्वप्नीं नाहीं मृत्य । चिरंजीव मारुती ॥ २० ॥ वरद वदला जनार्दन । तें ऐकोनि त्रिनयन[1] । वरद वदे संतोषोन । सावधान अवधारा ॥ २१ ॥ माझिया तृतीयनेत्रींचा वन्ही[5] । जाळों न शके तयालागूनी। त्रिशूळ न शके जाया भेदोनी । वरदवाणी शिवाची ॥ २२ ॥ विष्णु वरद वदे तत्पर । गदा बाण दुर्धर चक्र । तेणें न भंगे याचें शरीर। अजरामर[6] मारुती ॥ २३ ॥ ब्रह्मा वदे निजवरदासी । ब्रह्मदंड ब्रह्मशापासीं । बाधूं न शके मारुतीसी । सकळ द्वंद्वांसीं निर्मुक्त ॥ २४ ॥ इंद्र वदे निजवरदासी । माझें वज्र लागलें हनुमंतासी । तेणें वज्रांग नांव ययासी । होईल सर्वांसीं विख्यात ॥ २५ ॥ माझें वज्र न बाधी पाहीं । हा होईल वज्रदेही । सुरासुरां नागवे पाहीं । ख्याति तिहीं लोकीं याची ॥ २६ ॥ हृषीकेशीकमळमाळा । सुकों नेणे कदा काळा । इंद्रें उल्लासें तया वेळां । घातली गळां हनुमंताचे ॥ २७ ॥ निजवरद वदे सविता । मजहूनि शताधिकता[7] । तेजोवृद्धि होईल वायुसुता । राक्षसघाता करावया ॥ २८ ॥ हा वांछील सज्ञानता । तरी सकळ वेदशास्त्रार्थां । मी देईन अति योग्यता । होईल व्याख्याता परमार्थी ॥ २९ ॥ वरुण वदे वरदान । वरुणजळें निमग्न । होतां हनुमंता न ये मरण । शापबंधन कदा न बाधी ॥ ३० ॥ यम वरद वदे वितंड । सुख पावसी तूं प्रचंड । तुज बाधी ना यमकाळदंड । आरोग्य अखंड अजरत्वें ॥ ३१ ॥ धनेश वदे निजवरदासी । युद्ध करितां वर्षानुवर्षीं । कदाकाळीं श्रम न पावसी । शस्त्रबाधेसी बाधवेना ॥ ३२ ॥ विश्वकर्मा वदे वरदान । म्यां शस्त्रें केलीं निर्माण । तिंहीं हनुमंतासीं युद्धी जाण । शस्त्रबंधन न बाधी ॥ ३३ ॥ माझें शिल्पशास्त्रज्ञान । तें तूं पावसी संपूर्ण । ऐसें बोलोनि आपण । दे आलिंगन हनुमंता ॥ ३४ ॥ ब्रह्मा जगद्गुरु सर्वांसी । संतोषोनियां वेगेंसीं । म्हणे हमुमंत भाग्याची राशी । सकळ देव त्यासी तुष्टले ॥ ३५ ॥ धीर वीर महाशूर । पराक्रमी हा वज्रशरीर । बाधूं न शके शस्त्रसंभार । वायो तुझा पुत्र सभाग्य ॥ ३६ ॥ थोर भाग्य हनुमंता । भेटोनि सुखी करील सीता । गांजोनियां लंकानाथा । सुखी रघुनाथा करील ॥ ३७ ॥ परम भाग्य हनुमंता । भेटोनि सुखी करील सीता । शुद्धि आणोनियां तत्त्वतां । श्रीरघुनाथाही सुखी करील ॥ ३८ ॥ तुझा पुत्र हा आतुर्बळी । घेईल इंद्रजितासीं फळी । करोनि राक्षसां रवंदळी[8] । लंकाहोळी करील ॥ ३९ ॥ श्रीरामाच्या कटकांत। अदट दाटुगा हनुमंत। सेवाबळें परम आप्त । श्रीरघुनाथ मानील या ॥ ४० ॥ भविष्य हनुमंताची ख्याती । स्वयें सांगतां प्रजापती । उल्लास

१ शंकर. २ इंद्र. ३ हे ब्रह्मदेवा. ४ दुपटीनें. ५ अग्नि.

६ जरामरणरहित. ७ शतपटीहूनही अधिक. ८ संहार.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वायूचे चित्तीं । पुत्रकीर्ती ऐकोनि ॥ ४१ ॥ वरद लाहोनि हनुमंता । वायु अति उल्लासता । मुक्त केली प्राणरोधता । सुख समस्तां तेणें झालें ॥ ४२ ॥ सुखी झाले सुरवर । सुखी झाले ऋषीश्वर । सुखी झालें चराचर । जयजयकार तिहीं लोकीं ॥ ४३ ॥ वरद देवोनि हनुमंतासी । सुरवर गेले निजधामासी । वायूनें आणोनि हनुमंतासी । अंजनीपासीं[1] दीधलें ॥ ४४ ॥ हनुमंताची बाळकीर्ती । विस्तारली त्रिजगतीं । फळार्थ आकळिला गभस्ती[2] । लाविली ख्याती सुरवरां ॥ ४५ ॥ मारुतीचें सामर्थ्य सिद्ध । तेंचि देवीं दिधलें वरद । हनुमंतकीर्ति अति अगाध । जेणें आल्हाद श्रीरामा ॥ ४६ ॥ जें सामर्थ्य श्रीरामासी । तेंचि सामर्थ्य हनुमंतासी । एकात्मता अहर्निशीं । लोकक्रियेसीं देवभक्त ॥ ४७ ॥ लोकक्रियासंग्रहार्थ । श्रीराम देव हनुमान भक्त । तोचि श्रीरामायणी ग्रंथ । भक्तसामर्थ्य हनुमंत ॥ ४८ ॥ डोंगरीं दावाग्नीची[3] ख्याती । घरीं दीपाची दीप्ती । दोहीं एकचि दाहकशक्ती । तेंवी देवभक्तीं सामर्थ्य ॥ ४९ ॥ हनुमान असतां मातेप्रती । अंगीं अद्भुत सामर्थ्यशक्ती । करीत बळानें उद्धती । ऋषीं हितोक्तीं शापिला ॥ ५० ॥ गंगातीरीं ऋषींची वस्ती । अवघे आश्रम उचलोनि हातीं । हनुमान ठेवी दूर पर्वतीं । जळ न पावती स्नानपाना ॥ ५१ ॥ ऋषी आपुले तपःसामर्थ्यीं । पुढती गंगातीरा येती । हनुमान उचलोनि मागुती । घाली पर्वतीं अति दूर ॥ ५२ ॥ पुण्यपर्वतीं ऋषी वसत । सगळे उचलोनि पर्वत । हनुमान घाली उखरां[4]आंत । ऋषी तळमळीत जळफळा ॥ ५३ ॥ बाळभावाच्या परवडीं[5] । ऋषींचीं यज्ञपात्रें फोडी । कुशासनें अजिनें फाडी । जानवीं तोडी बटूंचीं[6] ॥ ५४ ॥ बटु ब्रह्मचारी कवळूनि पुसीं । हनुमान उडे स्वयें आकाशीं । लेंकरें करिती कोल्हाळासी । ऋषिपत्न्यांसी तळमळ ॥ ५५ ॥ मारोनियां गजकँरवडें[7] । ऋषींचे आश्रमीं सांडी मढें । काढितां शिष्य समुद्राकडे । उपाव पुढें चालेना ॥ ५६ ॥ ब्रह्मवरदाची वरदोक्ती । शाप न चले हनुमंतीं । अवघे ऐसे ब्रह्मयाप्रती । बुद्धि पुसती विधातिया ॥ ५७ ॥ ब्रह्मा सांगे ऋषींप्रती । शाप द्यावा अतिहितोक्तीं । मारुति भेटे जंव रघुपती । तंव तुझी शक्ती लीन[8] राहो ॥ ५८ ॥ जेंवी आलिया तारुण्यता । यौवनें मुसमुसी वनिता[9] । तेंवी भेटल्या रघुनाथा । निजसामर्थ्यता पावसी ॥ ५९ ॥ ऐसें ऋषीश्वर शापिती । झाली हनुमंता लीन[8] शक्ती । मग राहिला साधुवृत्तीं । ऋषींप्रती अति नम्र ॥ ६० ॥ द्रव्यमद तारुण्यमद । अंगीं बळाचा बळमद । तेणें पुरुष होय स्तब्ध । करी विरुद्ध अवमानें ॥ ६१ ॥ व्यापार झालिया व्यापारी । नाना आनेंआनें[10] करी । तोचि झालिया अनधिकारी । मग विचारी पुण्यपाप ॥ ६२ ॥ कैसी संध्या कैसें स्नान । कैंवी उपजे निजज्ञान । अधिकार झालिया क्षीण । विवेक पूर्ण प्राण्यासी ॥ ६३ ॥ तैसें झालें हनुमंता । निजबलाढ्यता लीन होतां । म्यां पावावें परमार्था । साधुसंतां भजावें ॥ ६४ ॥ पूर्वी सूर्याचें वरदान । जेव्हां हनुमान वांछील ज्ञान । तेव्हांचि होवोनि सुप्रसन्न । ज्ञानसंपन्न मी करीन ॥ ६५ ॥ ज्ञान मारुति वांछितां । अंतरीं उगवोनि चित्सविता[11] । ज्ञान विज्ञान[12] लीनता । देहीं विदेहता श्रीरामभक्तीं ॥ ६६ ॥ ज्ञान विज्ञान संतृप्ती । देहीं असोनि विदेहस्थिती । श्रीरामाच्या अनन्यभक्तीं । झाला मारुती जगद्वंद्य ॥ ६७ ॥ वालिसुग्रीवकलहाआंत । शापें हनुमंतशक्ति गुप्त । यालागीं वाळीचा न करीच घात । जाण निश्चित श्रीरामा ॥ ६८ ॥ सुग्रीव हनुमंताचा आप्त । परी शापें शक्ति होती गुप्त । यालागीं वाळीचा न करीच घात । जाण निश्चित श्रीरामा ॥ ६९ ॥ ऐसी हनुमंताची ख्याती । ऐकोनि सुखावला श्रीरघुपती । प्रीतीनें आलिंगिला मारुती । हा प्राणसखा निश्चितीं पैं माझा ॥ ७० ॥ मुनीसी म्हणे श्रीराम । धन्य धन्य याचा पराक्रम । धन्य धन्य याचा जन्म । माझ्या अवतारा नाम याचेनि ॥ ७१ ॥ तदनंतर श्रीरघुपती । समस्तां ऋषींसहित अगस्ती । तयाप्रती करी विनंती । ऐका वचनोक्ती पैं माझी ॥ ७२ ॥ म्यां वधिले राक्षस थोर । तेणें पातक झालें अपार । तया प्रायश्चित्ता अध्वर[13] । अयोध्याभवनीं करूं पाहतों

१ अंजनी=मारुतीची माता. २ सूर्य. ३ वणव्याची. ४ ओसाड माळावर. ५ प्रकारानें. ६ मुलांचीं. ७ हत्तींचीं शरीरें. ८ गुप्त. ९ स्त्री. १० अनन्वित. ११ ज्ञानसूर्य. १२ अनुभवज्ञान. १३ यज्ञ.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ ७३ ॥ माझिया यज्ञाचे सिद्धयर्थी[1] । तुम्हीं साह्य व्हावें ऋषी समस्तीं । याकारणें करितों विनंती । कृपामूर्ति मुनिराजा ॥ ७४ ॥ ऐकोनि श्रीरामाचें वचन । ऋषि म्हणती धन्य धन्य । मग श्रीरामाची आज्ञा घेऊन । निजाश्रमा ऋषी गेले ॥ ७५ ॥ तदनंतर श्रीरघुपती । सभा विसर्जून मंदिराप्रती । प्रवेशला जैसा गभस्ती[2] । जंबुद्वीपा आड जाये ॥ ७६ ॥ सर्वेचि प्रवर्तली शर्वरी[3] । श्रीरघुनाथ गेला भवनामाझारीं । गोधनें दोहती घरोघरीं । नगरनारी आनंदें ॥ ७७ ॥ एका जनार्दना शरण । पुढें गोड निरूपण । श्रीराम भक्तजनभवभंजन । नाना लीला खेळतसे ॥७८॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां हनुमंतवरदो नाम षट्त्रिंशोऽध्यायः ॥ ३६ ॥ ॥ ओंव्या ॥ ७८ ॥

अध्याय सदतिसावा

॥ श्रीरामचंद्राय नमः ॥ सुखनिद्रित भास्करवंशभूषण[4] । जेंवी शेषशयनीं नारायण । तृतीयभाग निशी क्रमोनि भृगुनंदन[5] । पूर्वे आगमन पैं केलें ॥ १ ॥ सुरगुरु[6] मावळला । तृतीयभाग रात्रीचा क्रमिला । पुण्यपुरुषां चेवो[7] झाला । प्रातःस्मरामि करिते झाले ॥ २ ॥ सकळ जनां चेइरें झालें । रतिसुखापासोनि सुटले । मार्गस्थ मार्गी लागले । तीर्थयात्रा करावया ॥ ३ ॥ विप्र वेदाध्ययन करिती । गाई घरोघरीं दुभती । एकी त्या दधिमथनीं प्रवर्तती । सारासार निवडोनी ॥ ४ ॥ कागपक्षी चेइरे झाले । तमेंसीं निशीनें[8] प्रयाण केलें । ऐसें जाणोनि गंधर्व आले । श्रीरामातें उठवावया ॥ ५ ॥ करिती सुस्वरें गायन । वीणा वेणु वाद्यें गहन । आलाप मूर्च्छना तान मान । सुरस गायन मांडिलें ॥ ६ ॥ सर्व किन्नरांची गायनध्वनी । ऐकिली श्रीरामें शयनस्थानीं । अति आनंदला मनीं । श्रीराम कीर्तनीं तुष्टला ॥ ७ ॥ पर्यंकींहूनि श्रीरघुपती । उठलियावरी समस्तीं । आपुलाले प्रयोजनीं सावधान चित्तीं । होते झाले ते काळीं ॥ ८ ॥ एक पादुका पुढें ठेवोन । एक परिमळमिश्रित जीवन[9] । सुवर्णपात्रीं भरोनि पूर्ण । समीप तिष्ठत राहिले ॥ ९ ॥ एकें दंतकाष्ठ आणिलें । श्रीरामें मुख प्रक्षाळिलें[10] । सर्वेचि स्नानतर्पण सारोनि तये वेळे । सेवकांसहित बाहेर आला ॥ १० ॥ आधींच तो श्रीरघुनंदन । कोटी मदनांचा गाभा पूर्ण । पूर्णावतार गुणनिधान । भक्तजीवन श्रीराम ॥ ११ ॥ कौसल्यानंदवर्धन । नगरजनां सुखवर्धन । भक्तचकोरां चंद्र पूर्ण । षोडश कळां शोभला ॥ १२ ॥ पराक्रमें विष्णूसमान । रूप अश्विनीदेवांसम जाण । बुद्धि बृहस्पतीहूनि गहन । श्रेष्ठपण स्रष्ट्याऐसें[11] ॥ १३ ॥ पृथ्वीसारिखी क्षमा पूर्ण । तेजें दुसरा सूर्य जाण । वेगें पाहतां मागें पवन । ठाके कोण त्यापुढें ॥ १४ ॥ समुद्रासारिखा गंभीरू । धैर्यें जैसा पर्वत मेरू । कांति चंद्राहूनि अपारू । नृपति किंकरू जयाचे ॥ १५ ॥ ऐसा तो अवनिजापती[12] । सर्वे ऋषिमुनि जयांची अगाध कीर्ती । भद्रासनीं येवोनि श्रीरघुपती । समस्तेंसीं बैसला ॥ १६ ॥ दोहींकडे उभे प्रधान । आणि नगरनागरिक जन । बैसले असती गुणसंपन्न । सभा सघन घनवटली ॥ १७ ॥ इक्ष्वाकुकुळींचा भूपती । क्षत्रियांमध्यें अगाधकीर्ती । ऐशा श्रीरामाभंवत्या ऋषिपंक्ती । तपोधनांच्या बैसल्या ॥ १८ ॥ जैसा स्वर्गी सुरवर । सुधापानियांमध्यें[13] इंद्र । तैसाचि श्रीरामचंद्र । शेष[14] शत्रुघ्न भरत उभे समीप ॥ १९ ॥ शत्रुघ्न भरत लक्ष्मण । सेवा करिती संमुख उभे ठाकोन । जैसा अध्वरीं[15] हुताशन[16] । नाना अवदानें[17] घेतसे ॥ २० ॥ किंकर सुभट सेवक । सेवा करिती प्रफुल्लितमुख । हात जोडोनि संमुख । भाट ब्रीदें वर्णिती ॥ २१ ॥ श्रीरामाचे पार्श्वभागीं । बैसले महानुभाव योगी । वानर बळियाढे वीर ते प्रसंगीं । सुग्रीवादि अनुसरले ॥ २२ ॥ चौघां प्रधानांसहवर्तमान । सेवेसी तिष्ठत बिभीषण । जैसे कुबेरासी गुह्यक जाण । नाना पदार्थ सेविती ॥ २३ ॥ वेदशास्त्रें संपन्न । आणि वयोवृद्ध ब्राह्मण । तयांतें सज्ञान देती मान । तैसा श्रीरघुनंदन सेविती ॥ २४ ॥ ऐसा तो श्रीरामचंद्र । सेवितातीऋषिवृंद । एक नाना करिती वाद । एक प्रबंध पैं

१ सिद्धीस जाण्याकरितां. २ सूर्य. ३ रात्र. ४ सूर्यवंशाला भूषणभूत. ५ शुक्र. ६ बृहस्पति. ७ जागृत. ८ रात्रीनें.

९ उदक. १० धुतलें. ११ ब्रह्मदेव. १२ श्रीराम. १३ देवांमध्यें. १४ लक्ष्मण. १५ यज्ञांत. १६ अग्नि. १७ आहुति.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

गाती ॥ २५ ॥ एक करिती हरिकीर्तन । एक मंजुळ गाती गायन । एक सांगती पुराण । रामायणादि-कथा हो ॥ २६ ॥ ऐसा भक्तजनमनोरंजन । लीला-विग्रही श्रीरघुनंदन । अवतारनटनाढ्य जनार्दन । स्वयें आपण दावीतसे ॥ २७ ॥ स्वस्ति श्रीभावार्थ-रामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां श्रीरामगुण-वर्णनं नाम सप्तत्रिंशोऽध्यायः ॥३७॥ ओंव्या ॥ ॥२७॥

अध्याय अडतिसावा

॥ श्रीरामचंद्राय नमः ॥ यापरिकारें अयोनि-जारमणें । भरत आणि शत्रुघ्न लक्ष्मण । सद्गुरू वसि-ष्ठाचें करोनि सेवन । राज्यकार्य चालविती ॥ १ ॥ राज्य करितां श्रीरघुनाथा । कोणा नाहीं दैन्यवार्ता । कोणा नाहीं दैन्य चिंता । राज्यीं असतां श्रीराम ॥ २ ॥ राज्यकार्य प्रजापाळण । रात्रंदिवस करी रघुनंदन । तंव कोणे एके काळीं विदेह[1] पूर्ण । श्रीरामदर्शना पैं आला ॥ ३ ॥ नाम-विदेही रूपविदेही । देहीं पाहतां तोही विदेही । विदेहासी देहचि नाहीं । वैदेही[2] पाहीं कन्या ज्याची ॥४॥ ऐसा तो विदेही जनक । आला ऐकोनि वैदेहीनायक[3] । पुढें येवोनि नमस्कार सम्यक[4] । अति आदरें[5] श्रीरामें केला ॥ ५ ॥ श्रीराम म्हणे जी विदेहनृपती । तुमचेनि आम्हां यश कीर्ती । तुमचेनि उग्रतेजें क्षितिपती । रावणादिक मारिले म्यां ॥ ६ ॥ तुमचेनि कृपेंकरून । अलभ्य लाभ पावती जन । मी तरी तुमचा स्थापित दीन । परी एक वचन अवधारिंजे ॥ ७ ॥ मी करीन तुमची पूजा । ते अंगीकारावी जनकराजा । रत्नाभरणें सुवर्ण वोजा[6] । मम प्रीतीं घेइंजे ॥ ८ ॥ तंव जनक म्हणे देवाधिदेवा । आम्हीं करावी तुझी सेवा । तो तूं पूजितोसि मूळींच्या भावा । लक्षोनियां राजेंद्रा ॥ ९ ॥ तुझे दर्शनें तृप्त झालों । अकल्पित फळ पावलों । येथवरी येवोनि कृतार्थ झालों । सकळ लाधलों पूजेतें ॥ १० ॥ तुवां केली आभरणीं पूजा । ते म्यां दोघी कन्येसीं वोजा । देतसें गा गरुडध्वजा । ऐकोनि श्रीरामराजा संतोषला ॥ ११ ॥ विदेहाचें करोनि पूजन । कित्येक दिवस अयोध्येसी राहवून । मग विदेह निघाला मिथिलेसी जाण । आज्ञा घेवोन चालिला ॥ १२ ॥ श्रीराम म्हणे विदेहासी । प्रयाण करावें आपुले नगरासी । सवें भरत बोळवील तुम्हांसी । नगरापर्यंत दीधला ॥ १३ ॥ ऐकोनि श्रीरामाचे वचना । जनकें श्रीरामासी करोनि प्रदक्षिणा । चालिला आपुल्या मिथिलाभवना । अति आनंदें गर्जनेंसीं ॥ १४ ॥ तंव येरीकडे केकयीचा ज्येष्ठ बंधु । केकयदेशाचा प्रभु प्रसिध्दु । श्रीरामासी मातुलसंबंधु । श्रीरामदर्शना पैं आला ॥ १५ ॥ मातुळ आला ऐकोन । श्रीराम सामोरा होऊन । आदरें करोनि साष्टांग नमन । दिधलें क्षेमा[7]-लिंगन परस्परें ॥ १६ ॥ श्रीराम म्हणे अहो जी नृपती । आम्ही चौघे बंधु सँहितीं । हें राज्य आणि संपत्ती । तुमचेनि प्रसादें भोगीतसों ॥ १७ ॥ इतुकें बोलोनि रघुराजें । मग आरंभिलें तयाचे पूजे । रत्नाभरणीं उपचार जे जे । ते मातुलासी समर्पिले ॥ १८ ॥ धूप दीप चंदन । नाना परिमळें[8] पूजोन । सवेंचि म्हणे श्रीरघुनंदन । आपुल्या नगरा प्रयाण कीजे ॥ १९ ॥ वृद्ध असे नगरीं पिता । क्षोभ होईल त्याच्या चित्ता । रत्नाभरणें लक्ष्मणेंसीं त्वरिता । आपुले राज्या चालिला ॥ २० ॥ केकयेश्वरें करोनि प्रदक्षिणा । नमस्कार करोनि सवेंचि प्रयाणा । सांगातें[9] घेवोनि लक्ष्मणा । आपुले नगरा निघाला ॥ २१ ॥ येरीकडे प्रतर्दन काशीपती । दिवोदासाचा कुमर[10] निश्चितीं । आला ऐकोनि सीतापती । गेला चारी पाउलें सामोरा ॥ २२ ॥ काशीपतीसी देवोनि सन्मान । करोनि आलिंगन नमन । नाना उप-चारीं पूजोन । श्रीरघुनंदन बोलतसे ॥ २३ ॥ श्रीराम म्हणे काशीपती । तुझेनि दर्शनें आम्हां परम प्रीती । तुवां येवोनि सांभाळिलें हे प्रीती । मोठी आम्हां तुज वाढली ॥ २४ ॥ आतां एक करावें । रत्नाभरणां सवें घ्यावें । तुवां आपुल्या नगरा जावें । जें अमरादिकां दुर्लभ ॥ २५ ॥ सुवर्णकलशांचिया हारी[11] । महादेवें धरिली शूळावरी । अति रमणीय मणिकर्णिकातीरीं । गिरीशें[12] करी राज्य जीचें ॥ २६ ॥ ऐसी वरुणा[13]

---

१ जीवन्मुक्त (जनकराजा). २ सीता. ३ राम. ४ योग्य रीतीनें. ५ आवडीनें. ६ आलिंगन. ७ एकत्र. ८ सुगंधी द्रव्यांनीं. ९ बरोबर. १० पुत्र. ११ रांगा. १२ शंकर. १३ वरुणानदीतीरीं.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

माझारी । शिवें वसविली ते पुरी । म्हणोनि वाराणसी चतुरीं । तिये नांव बोलिजे ॥ २७ ॥ ऐसी रमणीय काशीपुरी । तेथें जावें नृपकेसरी । येरें आज्ञा वंदोनि शिरीं । स्वसैन्येंसीं निघाला ॥ २८ ॥ मागिलीकडे श्रीरघुनंदन । तीन शत राजे आले ऐकोन । करोनि यथाविधी पूजन । वस्त्राभरणें अर्पिलीं ॥ २९ ॥ रायांसी म्हणे श्रीरघुपती । तुमचे कृपेनें पापमूर्ती । मरण पावला लंकापती । माझी कीर्ती करून ॥ ३० ॥ तुमचे कटाक्षें रावण । मरण पावला सत्य वचन । परी मजवरी निमित्त ठेवून । लोक म्हणती श्रीरामें वधिला ॥ ३१ ॥ रावण मारिला रणसागरीं । सहकुटुंबप्रधानपुत्रीं । अराक्षसी लंकापुरी । बिभीषणावेगळी पैं केली ॥ ३२ ॥ जानकीचें हरण केलें । तियेनिमित्त इतुकें करणें पडिलें । ऐकोनि राजे बोलते झाले । श्रीरामेंसीं ते समर्यीं ॥ ३३ ॥ राजे म्हणती श्रीरघुनंदना । तुवां मारिलें रावणा । राज्यीं स्थापिलें बिभीषणा । जानकी घेवोनि आलासी ॥ ३४ ॥ तुवां देवकार्य सिद्धीस नेलें । अवतारचरित्र प्रकटिलें । तुझिये कीर्तीनें भरलें । भूमंडळ उचंबळत ॥ ३५ ॥ विजयो हो तुझ्या भुजांसी । विजयी झालासी सूर्यवंशीं । वैदेहवीरा आतां दे आज्ञेसी । निजदेशासी जावया ॥ ३६ ॥ इतुकें ऐकोनि रायांचें वचन । बरवें म्हणोनि श्रीरघुनंदन । पुनरपि नृपांतें पूजोन । वस्त्राभरणें दीधलीं ॥ ३७ ॥ हस्ती घोडे रथ संपत्ती । पृथक् पृथक् देवोनि रायांप्रती । बोळविता झाला तयांप्रती । आदरें अति करोनी ॥ ३८ ॥ ऐसा तो श्रीरामचंद्र । पुढें काय करिता झाला नरेंद्र । नृप बोलावून गुणसमुद्र । तें सावध श्रोतीं परिसावें ॥ ३९ ॥ आर्धींच रम्य रामायण । त्यावरी श्रीरामचरित्र गहन । परिसतां भवबंधखंडन । पुण्य पावन पैं करी ॥ ४० ॥ एका जनार्दनी विनती । विनवीतसें संतांप्रती । मी नेणें संस्कृतव्युत्पत्ती । कथासंगतिवांचोनी ॥ ४१ ॥ जेंवी अंध अंधारीं जाय । तयासी न कळे मार्गाची सोय । तैसा मी तुम्हांमाजी पाहें । तुमचे सोयी चालतों ॥ ४२ ॥ अबद्ध सुबद्ध रामायण । भवरोगासी करी छेदन । जैंवी पुरिला हुताशनें । नाना वनें पैं जाळी ॥ ४३ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां रामनृपदर्शनोत्सवो नाम अष्टत्रिंशोऽध्यायः ॥ ३८ ॥ ओंव्या ॥ ४३ ॥

अध्याय एकुणचाळिसावा

॥श्रीरघुनाथाय नमः॥ श्रीराम सच्चिदानंदघन । लीलावतार परम पावन । खेळ खेळे विचित्र विंदान । विधात्या महिमान न कळे ज्याचें ॥ १ ॥ ऐसा तो रघुपती । भद्रासनीं अयोध्येप्रती । बैसला जैसा नक्षत्रें भोंवतीं । मध्यें चंद्र विराजे ॥ २ ॥ भोंवते राजे तपोधन । तेणें सभा प्रसन्नवदन । बंदीजन करिती गुणवर्णन । गंधर्व गायन करिताती ॥ ३ ॥ तदनंतर पूर्वीं भरतें । राजे बोलाविले होते रणसाह्यार्थें । ते विनविते झाले रघुपतीतें । स्वदेशातें जावया ॥ ४ ॥ श्रीराम म्हणे रायांसी । तुम्हांसी भरतें रणसाह्यासी । पाचारिलें परी तुमच्या प्रसादेंसीं । आर्धींच रावण मारिला ॥ ५ ॥ तरी आतां स्वदेशा जावें । मज मनीं आठवावें । म्हणोनि प्रीतिपूर्वक गौरवें । राजयांची पूजा केली ॥ ६ ॥ ऐशी करोनियां पूजा । नृपां श्रीराम बोले वोजा । तरी आतां शीघ्र स्वदेशा जा । आनंदनिर्भर होवोनी ॥ ७ ॥ ऐकोनि श्रीरामाचें वचन । समस्तीं राजीं मिळोन । श्रीरघुपतीसी करोनि वाम प्रदक्षिण । स्वराष्ट्रातें निघाले ॥ ८ ॥ मार्गीं करिती अनुवादातें । म्हणती व्यर्थ बोलाविलें भरतें । पूर्वीं कार्य केलें श्रीरघुनाथें । मग अयोध्येतें आम्हीं गेलों ॥ ९ ॥ भरत आम्ही सहपरिवारीं । पुढें जावें लंकेवरी । तंव श्रीरामलक्ष्मण मारोनि वैरी । अयोध्येभीतरीं पैं आले ॥ १० ॥ आमुचें आगमन वृथा झालें । परी रघुनाथें आम्हां सन्मानिलें । ऐसें म्हणत म्हणतां पावले । आपुल्याला नगरांतें ॥ ११ ॥ तंव येरीकडे भरतलक्ष्मण । रायां बोळवोनि स्वस्थानीं जाण । मग प्रवेशते झाले अयोध्याभवन । बहुविध धन आणोनी ॥ १२ ॥ रायीं श्रीरामाकारणें । पाठविलीं नानापरींचीं भूषणें । अश्व रथ गज गोधनें । नाना उष्ट्रें पाठविलीं ॥ १३ ॥ शेळियांचे उदंड कळप । नाना व्याघ्र

---

१ सशास्त्र. २ राक्षसविरहित. ३ अग्नि. ४ ब्रह्मदेवाला.

५ सिंहासनावर. ६ भाट. ७ प्रेमानें. ८ उंट.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

हरिणें सर्प । नाना जातींचे पक्षी अमूप । श्रीराम सुखरूप व्हावया ॥ १४ ॥ चंदन पारिजात केशरपरिमळ । नानापरींचीं परिमळें बहळ[1] । दिव्य वस्त्रें सुपरिमळ । श्रीरामासी दीधलीं ॥ १५ ॥ ऐसें रायांचें बळिदांन[2] । घेवोनि आले भरत लक्ष्मण । प्रवेशले अयोध्याभवन । जेथें परब्रह्म आपण असे ॥ १६ ॥ श्रीरामा जाणविली मात । स्वामी आले लक्ष्मणभरत । राजयांचे भेटींसहित । तुमच्या दर्शना येताती ॥ १७ ॥ इतुकें बोलतां ते समयीं । रत्नाभरणेंसीं सभाठायीं । आले दोघे बंधु पाहीं । श्रीरामासी भेटले ॥ १८ ॥ श्रीरामें देवोनि आलिंगन । पुढें ठेविलें राजयांचें धन । तें श्रीरामें समस्त देखोन । वांटिता झाला ते समयीं ॥ १९ ॥ सुग्रीवादि-करोनि वानर । बिभीषणासहित निशाचर । श्रीरामें केले अभरे[3] । रत्नालंकार देवोनी ॥ २० ॥ दिधलीं समस्तां ॠक्षांप्रती । संतुष्ट केल्या वानरपंक्ती । एकीं आभरणें बांधोनि हातीं । एकीं गळां बांधिलीं ॥ २१ ॥ एक मस्तकीं हिरे खोंविती । एक करीं मुद्रा घालिती । एक ते दिव्याभरणें वेढिती । एक गाती नाचती श्रीरामापुढें ॥ २२ ॥ एक श्रीरामापुढें पिलंगेती । एक श्रीरामा वांकुल्या दाविती । एक ते कुसी खांजविती । दांत विचकिती श्रीरामापुढें ॥ २३ ॥ ऐसे संतुष्ट ऋक्ष वानर । श्रीरामापुढें करिती गजर । तें देखोनि श्रीरामचंद्र । आनंदें थोर डुलतसे ॥ २४ ॥ एकें परिमळद्रव्य घेवोनि हातीं । एकमेकांतें लाविती । भोक्ता श्रीराम एक म्हणती । ग्रासोग्रासीं वानर ॥ २५ ॥ ऐसे एक मासपर्यंत । सुखें वसते झाले अयोध्येंत । युग घटिकेसमान जात । श्रीरघुनाथासन्निध ॥ २६ ॥ ऐसा क्रमला प्रथम मास । दुसरा मास प्रवर्तला वानरांस । दिवसेंदिवस अति उल्हास । श्रीरामभक्तांस जातसे ॥ २७ ॥ हृष्ट पुष्ट ऋक्ष[4] वानर । आणि बिभीषणाचे रजनीचर । मागील विसरले गृह पुत्र दार । श्रीरघुवीर सेवितां ॥ २८ ॥ एका जनार्दना शरण । वानरेंशीं श्रीरघुनंदन । अयोध्येसी सुखसंपन्न । विराजमान पैं असे ॥ २९ ॥ पुढील कथा अति रसाळ जाण । वानरां राक्षसांलागून । आज्ञा देईल रघुनंदन । स्वभवना जावया ॥ ३० ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां वानरराक्षससुखसंपन्नतानाम एकोनचत्वारिंशोऽध्यायः ॥ ३९ ॥ ॥ ओंव्या ॥ ३० ॥

अध्याय चाळिसावा

॥ श्रीराधाकृष्णाय नमः ॥ तदनंतर ऋक्ष वानर राक्षस । अयोध्येसी आनंदें बहुवस । क्रमिला तेथें एक मास । सुखउल्हास सर्वांसी ॥ १ ॥ वानररावो जो भूपती । तयाप्रति बोले श्रीरघुपती । तुझे उपकार आठवितां चित्तीं । थोर सुख होतसे ॥ २ ॥ तुझेनि संगें वानर । मिळाले गा अपरंपार । तुझेनि मज सीता सुंदर । प्राप्त झाली किष्किंधेशा ॥ ३ ॥ तरी आतां आपुले नगरासी । वेगीं जावें किष्किंधेसी । जे कां अटक देवां दैत्यांसी । काळाचें तिसी न चले कांहीं ॥ ४ ॥ ऐसिया किष्किंधेप्रती । राज्य करीं गा वानरपती । पाळीं प्रधान सेना संपत्ती । निष्कंटकें राज्य करीं ॥ ५ ॥ महाबाहो किष्किंधानाथा । परम प्रीतीनें पाहें तारासुता । जैसा पिता तैसा चुलता । पुत्रत्वें पाळीं तयातें ॥ ६ ॥ अंगद वीर धीर परम शूर । सज्ञान ज्ञाता विवेकी चतुर । त्यावरी कृपा करीं अपार । हा गुणसागर अंगद ॥ ७ ॥ हनुमंतातें परम प्रीतीं । तूं प्रधानत्वें पाळीं गा नृपती । जयाची वानितां गुणकीर्ती । दुसरा क्षितीं ऐसा नाहीं ॥ ८ ॥ मारुतीची मारुतीस उपमा । आन नाहीं गा वानरोत्तमा । याकारणें वर्णावया आम्हां । उत्कंठा होत नाहीं ॥ ९ ॥ सुषेण तुझा श्वशुर । तारेचा पिता महाशूर । आणीक तार वानर । परमधीर संग्रामीं ॥ १० ॥ कुमुद महादुर्धर्ष[9] । नीळ वानर रणकर्कश । शतबळीनामा शूर बहुवस । नामेंच त्रास परवीरां[10] ॥ ११ ॥ मैंद द्विविद गंधमादन । गज गवाक्ष गवय शरभ जाण । हेमकूट तपन ध्वज वैद्य सुषेण । प्रतपन केसरी तरु तराळ ॥ १२ ॥ नळ जो शिळातारक । विश्वकर्मा जयाचा जनक । सेतुकार्या निपुण अधिक । राक्षसां धाक

---

१ पुष्कळ. २ कर देणें. ३ संपन्न. ४ अस्वलांस. ५ मुरडती. ६ अस्वलें. ७ हे सुग्रीवा. ८ प्रतिवेध.

९ निर्भयपणें. १० पृथ्वीवर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

बहु त्याचा ॥ १३ ॥ जांबवंतादि ऋक्षगण । मजकारणें कष्टले दारुण । मजलागीं इहीं त्यजिला प्राण । प्रिया पुत्र धन सांडोनी ॥ १४ ॥ या समस्तांतें पाळीं प्रीति करून । अन्यथा न करीं माझें वचन । माझें स्वरूप सनातन । तेथें मन ठेवोनी ॥ १५ ॥ माझे स्वरूपीं ठेवोनि मनासी । राज्य करीं सुखसंतोषीं । ऐसें आज्ञापोनि सुग्रीवासी । परम प्रीतीसी करोनि ॥ १६ ॥ तदनंतर श्रीरघुपती । बिभीषणेंसीं अति युक्तीं । मधुराक्षरीं अक्षरपंक्ती । बोलता झाला श्रीराम ॥ १७ ॥ कीं चकोराचें देखोनि आर्त[१] । हृदयीं जाणोनि अति क्षुधित । तयासी इंदु[२] सुधा[३] देत । तैसा श्रीरघुनाथ बोलता झाला ॥ १८ ॥ श्रीराम म्हणे बिभीषणा । तूं आमुचा बंधु सुहृद[४] प्राणा । तुझे उपकार वर्णावया मज रघुनंदना । वाचे वेळण[५] पडतसे ॥ १९ ॥ अगा धर्मज्ञा लंकापती । राक्षसकुळीं तूं धर्ममूर्ती । आतां शीघ्र स्वपुरीप्रती । जाई जियेप्रती परिघ सागरू ॥ २० ॥ पूर्वी कुबेरापासून । हरिलें लंकाभवन । बंधूसी देवोनि अपमान । अनुचित दारुण रावणें केलें ॥ २१ ॥ जरी स्वधर्मे राज्य करिता । सर्वभूतीं दया समता । तयाच्या राज्या क्षयो कल्पांता । न येता तत्त्वतां निर्धारें ॥ २२ ॥ जनकादिक केवळ मुक्त । असोनि प्रपंचीं वर्तत । जगत् ब्रह्मस्वरूप देखत । मुळींचे अन्वयेंकरोनी ॥ २३ ॥ तरी बिभीषणा अवधारीं । तूं राज्य ब्रह्मत्वें करीं । अधर्माचा लेश पुरी- । -माजि प्रवेशों न द्यावा ॥ २४ ॥ बंधु ज्येष्ठ तुझा कुबेर । तयाचा करावा आदर । आणीक वृद्ध थोर थोर । ते ब्रह्मदृष्टीं पहावे ॥ २५ ॥ मज तुम्ही दोघे जण । परम प्रीतिपात्र[६] पढियंते पूर्ण । तुमचें मी अहर्निशीं स्मरण । मनामाजीं करीतसें ॥ २६ ॥ आतां तुम्हीं दोघे जण । स्वसैन्येंसीं करावें गमन । सांडा हृदयींचें दुःख दारुण । परमानंदें पूर्ण पैं जावें ॥ २७ ॥ ऐकोनि श्रीरघुनाथाचें वचन । ऋक्ष वानर राक्षसगण । म्हणते झाले धन्य धन्य । सूर्यवंशाभरण[७] श्रीराम ॥ २८ ॥ समस्त म्हणती रावणारी[८] । तुझिया वचनामृताची तरी । भरली आमुच्या हृदयसागरीं । मर्यादेवेगळी मिसळली ॥ २९ ॥ तुझें वचन ब्रह्मलिखित । तूं विधात्याचा विधाता निश्चित । तूं ब्रह्म सदोदित । श्रुतीतें[९] अंत न कळे तुझा ॥ ३० ॥ तदनंतर मारुती । स्वामीप्रति करी विनंती । म्हणे प्रसन्न झालेती रघुपती । तरी मी एक मागतसें ॥ ३१ ॥ तुझी कृपा मजवरी । जरी आहे गा रावणारी । तरी तुझी भक्ति मम हृदयाभीतरीं । चिरकाळ राहो दातारा ॥ ३२ ॥ जंववरी तुझें चरित्र । भूमंडळीं राहे निश्चित । तंववरी माझ्या शरीरांत । प्राण राहो दातारा ॥ ३३ ॥ तुझे कथेची आर्ती[१०] । अखंड राहो माझ्या चित्तीं । आणीक मी न मागें रघुपती । इतुकें देईं दातारा ॥ ३४ ॥ ऐकोनि हनुमंतमुखींची गोष्टी । श्रीरामासी आनंद पोटीं । धांवोनि खेंवां[११] दिधली मिठी । पाठी थापटी श्रीराम ॥ ३५ ॥ श्रीराम म्हणे गा मारुती । संतोषलों तुझिये भक्ती । जे जे अपेक्षा तुझे चित्तीं । ते ते त्रिशुद्धी[१२] पावसी ॥ ३६ ॥ लोकालोक जंवपर्यंत । जंवपर्यंत माझें चरित्र । जोंपर्यंत जन स्वधर्मी रत । तंवपर्यंत कथा असे ॥ ३७ ॥ माझी कथा हे भूमंडळीं । तंववरी तुझे हृदयस्थळीं । असतील जंव अंतराळीं । शशी सूर्य भ्रमण करीत ॥ ३८ ॥ दिव्य रत्नांचा हार । चंद्रासारिखा मनोहर । श्रीरामें काढोनि सत्वर । हनुम्याकंठीं घातला ॥ ३९ ॥ हनुमान लागला पायीं । सवेंचि आलिंगिला दोहीं बाहीं । श्रीरामप्रदक्षिणा करोनि वज्रदेही । निजस्थळासी निघाला ॥ ४० ॥ सुग्रीवें करोनि प्रदक्षिण । अंगदासहित वंदोनि चरण । निघते झाले स्वराज्या जाण । आज्ञा घेवोन रामाची ॥ ४१ ॥ बिभीषणेंही तैसेचि परी । नमस्कारिला निजबंधूचा अरी । समस्तां अश्रु आले ते अवसरीं । सद्गदित कंठ पैं झाले ॥ ४२ ॥ जैसें मूर्खाचें भ्रमे चित्त । भ्रांत होय न स्मरे हित । तैसे श्रीरामवियोगें अति दुःखित । आपुलाले दिशे चालिले ॥ ४३ ॥ जैसा कृपणाचा जाय ठेवा । आणि भ्रांति उपजे त्याच्या जीवा । तैसें समस्तां झालें तेव्हां । श्रीरामाच्या वियोगें ॥ ४४ ॥ श्रीरामसन्निधानेंकरून । पावन झाले ऋक्षवानरगण । बिभीषणादि राक्षस जाण । झाले पावन तिहीं लोकीं ॥ ४५ ॥ एका जनार्दना शरण । वानरीं स्वदेशा केलें

१ उत्सुकता. २ चंद्र. ३ अमृत. ४ मित्र. ५ वेढा. ६ प्रिय. ७ सूर्यवंशाला भूषणभूत. ८ हे रामचंद्रा.

९ वेदांना. १० आवड. ११ आलिंगन. १२ खरोखर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

गमन । मागें श्रीरामें सभा विसर्जून । केलें माध्यान्हभोजन ॥ ४६ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां समस्तवानरादिस्वदेशगमनं नाम चत्वारिंशोऽध्यायः ॥ ४० ॥ ॥ ओंव्या ॥ ४६ ॥

अध्याय एकेचाळिसावा

॥ श्रीअवनिजापतये नमः ॥ गेले ऋक्ष राक्षस वानर । मागें बंधूंसहित श्रीरघुवीर । बैसले असती सुखें अपार । आनंदें निर्भर ते समयीं ॥ १ ॥ तेव्हां माध्यान्हकाळ प्रवर्तला । स्नानसंध्याविधी सर्व केला । भोजन सारोनि ऋषि सकळां । बंधूंसहित राघवें ॥ २ ॥ तंव अकस्मात मधुर वाणी । आकाशींहूनि श्रीरामश्रवणीं । पडली तये सभास्थानीं । पाहें गगनीं मज श्रीरामा ॥ ३ ॥ कृपेंकरोनि राघवा । मज पाहें कृपार्णवा । मी पुष्पक कैलासाहूनि देवा । धनेशें मज पाठविलें ॥ ४ ॥ बोलिलें मंजुळ उत्तरें । तें अवधारावें राजीवनेत्रें । म्हणे पुष्पकावरी श्रीरामचंद्रें । पूर्वी आरोहण पैं केलें ॥ ५ ॥ मी तुझे आज्ञेनें रघुपती । गेलों होतों धनेशाप्रती । तेणें मज पुनरपि नरपती । तुझे सेवेसी पाठविलें ॥ ६ ॥ ज्यावरी आरूढला श्रीरघुनाथ । तें पूज्य मज पूजित । मी त्यावरी न आरूढें निश्चित । हा संकल्प कृत पैं माझा ॥ ७ ॥ अगा पुष्पका अवधारीं । श्रीरामें मारिले दुराचारी । रावण वधिला सहपरिवारीं । जो कां करी निंद्य कर्म ॥ ८ ॥ मज झालें परम सुख । त्रैलोक्यासी अति हरिखें । दुरात्मा वधूनि दशमुख । प्रधानेंसीं देख रणांगणीं ॥ ९ ॥ अगा पुष्पका रघुनाथातें । तुवां वहावें माझे आज्ञेतें । ऐसें निरोपोनि धनेशें येथें । तुमचे सेवेतें पाठविलें ॥ १० ॥ ऐकोनि श्रीरामें त्याची मात । मनीं संतोषला जनकजामात । बरवें म्हणोनि अंगीकारीत । कुबेराच्या विमाना ॥ ११ ॥ तदनंतरें श्रीरघुपती । पुष्पका पूजी अति निगुतीं । धूप दीप पंचारती । नाना सुगंधीं पूजिलें ॥ १२ ॥ पुष्पका म्हणे श्रीराम । तूं अदृश्यगतीं विचरें व्योमं । जैसे सिद्ध साधु भक्त परम । अदृश्यगतीं विचरती ॥ १३ ॥ तैशी तुवां पुष्पकेंही । स्वइच्छेनें विचरावी मही । मी स्मरण करीन जे काळीं पाहीं । तेव्हां त्वरित पैं यावें ॥ १४ ॥ ऐकोनि श्रीरामाचें वचन । पुष्पकें करोनि प्रदक्षिण । श्रीरामा माथा खालवून । सुखें गमन करितें झालें ॥ १५ ॥ ऐसें पुष्पक विमान । कोणा दुःख नेदितां गगन । विचरे पुरें पाटणें आणि उद्यान । अदृश्य होवोन ते काळीं ॥ १६ ॥ तंव येरीकडे कैकेयीसुत । जितजामदग्न्या विनवीत । स्वामी आश्चर्य थोर येथ । देखतसें राजेंद्रा ॥ १७ ॥ श्रीरामराज्यमहिमान । कोणा नाहीं दुःख दैन्य । कोणा नाहीं मीतूंपण । सुखसंपन्न पुरवासी ॥ १८ ॥ कोणा नाहीं जरेची वार्ता । कोणा नाहीं हृदयीं चिंता । कोणा नाहीं देहीं कृशता । स्वानंदता पुरवासी ॥ १९ ॥ मृत्यूचें भय नाहीं कोणासी । राम राज्य करितां जनासी । सुखी स्वानंदें पुरवासी । अहर्निशीं रामभजन ॥ २० ॥ राज्यीं असतां सीताकांत । सर्व जन सुखी स्वस्थ । राज्य करिती आनंदभरित । पूर्ण मनोरथ सर्वांचे ॥ २१ ॥ श्रीरामाज्ञेकरून । मृत्यु भक्तांचे वंदी चरण । अयोध्यावासी स्वधर्माचरण । नित्यमेव करिताती ॥ २२ ॥ बाळत्व तारुण्य जरा । न बाधी श्रीरामाच्या किंकरा । सर्वां सुख देतसे वारा । सर्वांतरीं राहून ॥ २३ ॥ यथाकाळीं पर्जन्य । वर्षाव करी श्रीरामाज्ञेकरून । तेणें पिके विविध धान्य । सुकाळ पूर्ण अयोध्येसी ॥ २४ ॥ जे जे काळीं जो जो ऋतु । तो तो यथाकाळीं प्रवर्ततु । सूर्य खडतर नाहीं तपतु । श्रीरामाज्ञेकरोनी ॥ २५ ॥ समुद्र नुल्लंघीच मर्यादा । साधु न प्रवर्तती निंद्य वादा । वेदशास्त्रांच्या संवादा । अन्यथा भाषण न करिती ॥ २६ ॥ घरोघरीं वेदाध्ययन । पुराण आणि हरिकीर्तन । अखंड वाचे नामस्मरण । कोणा विस्मरण पैं नाहीं ॥ २७ ॥ ऐसा श्रीराम सच्चिदानंदघन । जो कां योगीश्वरांचें हृदयरत्न । जो कां भक्तजननिजजीवन । तो स्वानंदें पूर्ण लीला दावी ॥ २८ ॥ जो चिदाकाशींचें गगन । जो भक्तजनवनींचा

---

१ दुपारचें जेवण. २ रामाच्या कानांत. ३ कृपासमुद्रा. ४ कुबेरानें. ५ आनंद. ६ फिरें, चाल. ७ आकाश. ८ फिरावी. ९ न देतां. १० बाग. ११ रामाला. १२ भक्तांचें आश्रयस्थान.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

चंदन । जो कां आर्तचकोरां निजजीवन । तो स्वानंदें पूर्ण लीला दावी ॥ २९ ॥ जो भक्तसागरींची नौका । जो योग्यां हृदयीं चित्कलिका । तो श्रीराम अकिंचनसखा । ज्याचे नामें देखा पातकें हरती ॥ ३० ॥ एकचि एक जयाचें नाम । महादोषां करी भस्म । कलियुगीं साधनांचें नाहीं काम । रामनामावांचोनी ॥ ३१ ॥ कलियुगीं मुख्य साधन । श्रीरामाचें नाम जाण । पार्वतीप्रति मदनारी आपण । नाममहिमान सांगतसे ॥ ३२ ॥ नामें भुक्ति नामें मुक्ती । नामें यश नामें कीर्ती । नामें होय परमपदप्राप्ती । नामें हरती महादोष ॥ ३३ ॥ अबद्धँ करितां वेदपठण । अवश्य निषेध बाधी जाण । अबद्ध म्हणतां श्रीराम नारायण । अगणित पुण्य स्मर्त्यातें ॥ ३४ ॥ अबद्ध मंत्र उच्चारिती । जापँक चळती नेणों किती । अबद्ध नाम नित्य जपती । ते पावती सायुज्य ॥ ३५ ॥ नामें कळिकाळा सीकें । नामें पातकां महाधाक । नामें यमादिकां हांक । नामें प्राप्त सायुज्य ॥ ३६ ॥ नामें उद्धरिली कुट्टिनी । नामें गणिका चढली विमानीं । नामें पावन हे अवनी । नामें त्रिभुवनीं आनंद ॥ ३७ ॥ नामें वाल्मीक चोरटा । कळिकाळें घेत झटा । नामें मुक्तीच्या पिकल्या पेंठा । नामें दशवटा भवदोषां ॥ ३८ ॥

गोकोटिदानं ग्रहणेषु काशी-
प्रयागगंगायुतकल्पवासः ।
यज्ञायुतं मेरुसुवर्णदानं
गोविंदनामस्मरणेन तुल्यम् ॥ १ ॥

गोविंदनामाच्या तुळणेसी । न येती पुण्याचिया राशी । ग्रहणकाळीं कोटिधेनूंसी । जरी दिधलिया शृंगारून ॥ ३९ ॥ सुवर्णशृंगी रौप्यखुरी । सवत्सा आभरणेंसीं कोटिवरी । दिधल्या फळ नामाबरोबरी । न ये निर्धारीं तुळितांही ॥ ४० ॥ अथवा दश सहस्र वर्षेंपर्यंत । त्रिवेणीतीर आश्रयोनि तेथ । राहिल्या पुण्य अगणित । नामतुळणेसी पैं न ये ॥ ४१ ॥ एक अयुत महायज्ञ सांगोपांग करोनि जाण । अथवा मेरूइतुकें सुवर्णदान । दिधल्या नाममहिमान अधिक ॥ ४२ ॥ इतुकीं पुण्यें एकीकडे । घालितां नामाच्या पारडे । तुळणेसी न पावे चंद्रचूडें । म्हणोनि हृदयीं धरियेलें ॥ ४३ ॥ आधींच तो पिनाकपाणी । सकळ देवांचा मुकुटमणी । तोही राहिला नामसंजीवनीं । उपासक होवोनि नामाचा ॥ ४४ ॥ ऐसी भरतें स्तुति करून । ऐकोनि श्रीराम दे आलिंगन । देवोनि दोघां समाधान । वेगळेपण दिसेना ॥ ४५ ॥ अग्रजानुजां खेंवा पडली मिठी । जैंवी गगना गगनीं होय भेटी । ऐसी आलिंगनसुखसंतुष्टी । येरयेरां पैं झाली ॥ ४६ ॥ रविसोम मासाअंतीं । समँ मंडळा जैंवी येती । तैंवी मांर्डवीकांत आणि जानकीपती । समसाम्य भेटले ॥ ४७ ॥ एका जनार्दना शरण । अवघे बंधू जानकीरमण । करिता झाला चरित्रकथन । तें सावधान अवधारा ॥ ४८ ॥ मागील कथेची संगती । राजे बोळवोनि श्रीरघुपती । पुष्पक पूजोनि अति निगुतीं । तें विचरावया क्षितीं पाठविलें ॥ ४९ ॥ तदुपरी भरताचें स्तवन । ऐकोनि श्रीराम सुखसंपन्न । भरत भक्तराज म्हणोन । आलिंगन देवोन सुखी केला ॥ ५० ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां भरतस्तवनं नाम एकचत्वारिंशोऽध्यायः ॥ ४१ ॥ ओंव्या ॥ ५० ॥ श्लोक ॥ १ ॥

अध्याय बेचाळिसावा

॥ श्रीरघुवीराय नमः ॥ गतकथा झाली ऐसी । जे राजे जावोनि स्वदेशासी । मागें श्रीराम बंधूसहपरिवारेंसीं । राज्य करीत अयोध्ये ॥ १ ॥ भरतें करोनियां स्तवन । संतोषला रघुनंदन । देवोनि क्षेम आलिंगन । दोघे सुखसंपन्न पैं असती ॥ २ ॥ तयाउपरी जनकजामात । जानकीसहित सुखें वर्तत । इच्छा उपजली वनवाटिकेंत । सीतायुक्त क्रीडा करणें ॥ ३ ॥ धरणिजेसह वर्तमान । राजीवनेत्र श्रीरघुनंदन । तयाचें करावया वर्णन । मी अपुरतें दीन काय वर्णूं ॥ ४ ॥ अत्यंत सुंदर तें वन । क्रीडा करावया वाटिके जाण । सेवकांसहित श्रीरघुनंदन । येता झाला

१ निर्धनांचा मित्र. २ शंकर. ३ अव्यवस्थित, कसेंतरी. ४ जप करणारे. ५ शिक्षा. ६ पूर्णपणें. ७ एकाच. ८ भरत. ९ पृथ्वीवर. १० बागेंत. ११ सीतेसह.

CC-0. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वनातें ॥ ५ ॥ तया वनीं वृक्षजाती । नानापरींच्या अनुपम्य[1] असती । तितुक्या सांगतां विस्तराप्रती । कथा निगुतीं जाईल ॥ ६ ॥ तरी सांगों संकळित[2] । जे श्रोतयां संतोष होत । आणि पुढारां चालेल ग्रंथ । श्रीरघुनाथगुणांनीं ॥ ७ ॥ चंदन अगर धूप वृक्ष । देवदारु पाटल पलाश । चंपक नागकेशर लक्षानुलक्ष । मधूक फणस अपार ॥ ८ ॥ पारिजातक मघमघीत । भ्रमर तेथें सुवास घेत । अर्जुनसादडे अगणित । सप्तपर्ण वृक्ष असंख्य ॥ ९ ॥ मांदारकर्दळींची दाटी । इंगुदी कदंब कोट्यनुकोटी । जांबुळी दाळिंबियांच्या थाटी[3] । मार्ग दृष्टी लक्षेना ॥ १० ॥ कोविदार वट पिंपळ । निंबें नारिंगें नारिकेळ । जंबीर कविठ बेलपरिमळ । औदुंबर स्थूळ गगनचुंबित ॥ ११ ॥ भोंकरी करवंदी रायआंवळी । चौरें बोरें टेंबरें कायफळी । लगडी लिंबोरे नानावळी । परिमळ अत्यंत ॥ १२ ॥ आम्रवृक्ष अति घनदाट । वरी पक्षियांचे बैसले थाट । हंस कोकिळा शुक सरळ पाठ । श्रीरामनामें आलापिती ॥ १३ ॥ आतां सांगों पुष्पयाती । मालती मोगरे शेवंती । जाई जुई परिमळें घुमती । श्रीरघुपतिसुखार्थ ॥ १४ ॥ वापी[4] कारंजीं पोखरणी[5] । माजी भरलें निर्मळ पाणी । तयांचे पायऱ्यां नवरत्नमणी । ठायीं ठायीं जडियेले ॥ १५ ॥ माजी कमळिणी चतुर्विधा । अंजनी आरक्त पीत सुधा । भ्रमर रुणझुणिती नादा । दश दिशा व्यापिलिया ॥ १६ ॥ भ्रमर ते रामभक्त । पुष्पें सुवासरूपें अच्युत । तेथें लोभले होवोनि विरक्त । देहभावातें नाठविती ॥ १७ ॥ तंव येरीकडे रवि अस्तमानीं । जातां पुष्पें जाती मिळोनी । माजी भ्रमर गुंतोनी । मेला म्हणती मूर्खत्वें ॥ १८ ॥ तया सरोवराचे तीरीं । हंस बक सारसें कुक्कुट नानापरी । चक्रवाकें सहित नारी । जळक्रीडा करिताती ॥ १९ ॥ तया वाटिकेसीं चौफेर । दुर्गदारवंटे दुर्धर । काळासही तेथें सत्वर । प्रवेश नाहीं जावया ॥ २० ॥ ठायीं ठायीं नवरत्नांचे । बुरूज केले श्रीमंतें कनकाचे । तयांच्या प्रमे रविसोमांचें । तेज कोणीकडे कळेना ॥ २१ ॥ पुष्पतरूंसीं झगडतां पवनें[6] । तळीं पुष्पें पडती तेणें । शोभायमान जेंवी नक्षत्रीं नगन । अत्यंत साजिरें पैं दिसे ॥ २२ ॥ अमरावतीसी नंदनवन । तें सँरी[7] न पावे यासीं जाण । वैश्रवर्णाचें[8] चैत्रवन । लज्जायमान यापुढें ॥ २३ ॥ ऐसें वन शोभायमान । तें पाहता झाला जानकीजीवन । अशोकवृक्ष मर्यादेवीण जाण । त्या वनीं गगनचुंबित ॥ २४ ॥ अशोक जेथें बहुत असती । तया अशोकवाटिका म्हणती । तेथें प्रवेशला श्रीरघुपती । वनक्रीडेकारणें ॥ २५ ॥ वना येतो श्रीरघुनंदन । म्हणोनि वनपाळीं सज्जिलें पूर्ण । कुशासनें व्याघ्रांबरें कृष्णाजिनें । नानापरींचीं साजिरीं ॥ २६ ॥ जानकीचा धरोनि हात । श्रीराम रसप्राशन करवीत । आपणही घेवोनि त्वरित । स्वानंदें डुल्लत पैं असे ॥ २७ ॥ नवल त्या रसाचें महिमान । इतर रस त्यापुढें तृण । ऐसा ब्रह्मानंदरस सेवून । डुल्लतीं झालीं पैं दोघें ॥ २८ ॥ शचीसहित सुरपती[9] । अमृतप्राशना जेंवी बैसती । तेंवी जाण तो रघुपती । जानकीसहित रस प्याला ॥ २९ ॥ नानापरींचीं मधुर फळें । सेविलीं जानकीसहित घननीळें । सुखस्वानंदें तये वेळे । वरासनीं दोघें बैसलीं ॥ ३० ॥ नगरवास पुत्रदारांसहित । तेही मद्य घेवोनि झाले उन्मत्त । पुढें गंधर्व येवोनि गीत नृत्य । श्रीरामसुखार्थ पैं करिती ॥ ३१ ॥ जानकीसहित रघुनंदन । रमत असतां सुखसंपन्न । दहा सहस्र वर्षें क्रमिलीं जाण । पुढील कथन अवधारा ॥ ३२ ॥ जानकीउदरीं गर्भचिन्ह । तेणें वपुं[10] झाली शुभ्रवर्ण । तें देखोनि रघुनंदन । अति उल्हाससंपन्न पैं जाहला ॥ ३३ ॥ पुत्रकामाची चिंता होती । तंव भार्या देखिली गर्भवती । शास्त्राज्ञेनें श्रीरघुपती । जानकीस पुसता झाला ॥ ३४ ॥ आधींच सुंदर वेल्हाळ । गर्भें टवटवीत मुखकमळ । ऐसें देखोनि घननीळ । जानकीसी बोलतसे ॥ ३५ ॥ चापशरपाणि पुसे सीतेतें । काय आवडी आवडे तूतें । तें माग वो पतिव्रते । आणोनि तुजला देईन ॥ ३६ ॥ हांसोनि म्हणे जनकात्मजा । अहो जी स्वामी गरुडध्वजा । तुझिये प्रसादें श्रीरघुराजा । कांहीं वासना नुरलीसे ॥ ३७ ॥ तुमचेनि प्रसादें श्रीरघुपती । म्यां भोगिली सर्व संपत्ती । कांहीं इच्छा माझे चित्तीं । मागावयाची पैं नाहीं

१ निरुपम. २ संक्षेपानें. ३ समूह. ४ विहिरी. ५ तळीं. ६ वायु. ७ तुलना. ८ कुबेराचें. ९ इंद्र. १० शरीर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ ३८ ॥ कल्पवृक्ष जयाचे मंदिरीं । कामधेनूचीं खिल्लारें जया घरीं । त्या नरा कोणे पदार्थाची उंरी । उरली असेल राजेंद्रा ॥ ३९ ॥ चिंतामणि अंगणींचे खडे । परीस जयाचे घरीं लोळत पडे । तया नरा कोण सांकडें । काय मागण्याचें उरलेंसे ॥ ४० ॥ परी वर्ते जीवीं एक वीरचूडामणी । जे तपोवनें पुण्यस्थानीं । पहावीं ऐसी इच्छा मनीं । वर्ततसे राजेंद्रा ॥ ४१ ॥ उभय जे गंगातीर । आश्रयोनि राहिले ऋषीश्वर । तयांचे सन्निधें फळमूळाहार । करोनियां वसावें ॥ ४२ ॥ ऐसें थोडेचि दिवसवरी । वसावें जी मुनिशेजारीं । हेंचि मागणें श्रीहरी । कृपा करोनि सिद्धी न्यावें ॥ ४३ ॥ ऐकोनि जानकीचें वचन । खुणेसी पावला श्रीरघुनंदन । म्हणे शीघ्र काळें मनोरथ पूर्ण । आत्माराम पुरवील ॥ ४४ ॥ इतुकें बोलोनि श्रीरघुपती । शब्दें बुंझाविली सीता सती । मग गृहा येवोनि सभेप्रती । बंधूंसहित बैसला ॥ ४५ ॥ राज्य करितां श्रीरघुपती । असत्य नाहीं जनांप्रती । पुरवासी आपुले स्वधर्मस्थितीं । नगरीं वसती स्वानंदें ॥ ४६ ॥ यथाकाळीं पर्जन्य पडे । घरोघरीं गोधनांचे वाडे । घरोघरीं मुंजी वॅऱ्हाडें । कुमरकुमारींचे जन करिती ॥ ४७ ॥ एका जनार्दना शरण । श्रीरामें गोड रामायण । पुढें सीते वनासी गमन । सावधान अवधारा ॥ ४८ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां अशोकवाटिकावर्णनं नाम द्विचत्वारिंशोऽध्यायः ॥ ४२ ॥ ओंव्या ॥ ४८ ॥

अध्याय त्रेचाळिसावा

॥ श्रीदशरथात्मजाय नमः ॥

तत्रोपविष्टं राजानमुपासंते विचक्षणाः ।
कथयंतः कथा नानाहास्यकाराः समंततः ॥ १ ॥
विजयो मधुमंतश्च कश्यपो मंगलाकुलः ।
पुराजित्कालियो भद्रो दंतवक्रः सुमागधः ॥ २ ॥
एते कथा बहुविधाः परिहाससमन्विताः ॥ ३ ॥

भद्रासनीं चापशरपाणी । तेथें बैसले संत चतुर ज्ञानी । पंडित ऋषी महामुनी । श्रीरामातें उपासिती ॥ १ ॥ नानापरींच्या कथा पुराणें । धर्मचर्चा हरिकीर्तनें । विनोद हास्य गीत गायनें । सकळ मिळोन तेथें करिती ॥ २ ॥ कोण कोण ते सभेप्रती । श्रीरामासन्निधँ तेथें असती । तयांचीं नामें संकळितीं । यथानिगुतीं सांगेन ॥ ३ ॥ विजयो दुसरा मधुमंत । कश्यप मंगळ चौथा तेथ । पुराजित् कालिय दंतवक्त्र । भद्र जाण आठवा ॥ ४ ॥ नवमाचें सुमागध नाम । हे नवविध सभानायक परम । यांचा विश्वास मानी श्रीराम । अति चतुर म्हणोनी ॥ ५ ॥ हे इतुके श्रीरघुपती । आपुलेनि प्रताप सांगती । नानापरींचे विनोद करिती । धरणिजापतिसुखार्थ ॥ ६ ॥ ऐसें ऐकोनि तयांचें गीतगायन । विनोद उपहास नृत्य जाण । तयांप्रति बोले श्रीरघुनंदन । सावधान अवधारा ॥ ७ ॥ तयांमध्यें भद्र श्रेष्ठ । विवेकी ज्ञाता आत्मनिष्ठ । तयाप्रति रावणारी प्रतापतेजिष्ठ । बोलता झाला ते समयीं ॥ ८ ॥ अगा भद्रा विचक्षणा । सभेंत योग्य अति शहाणा । युक्तिप्रयुक्तीं तूं विचक्षणा । तुझ्या गुणां तुळणा नाहीं ॥ ९ ॥ पुरवासी देशवासी जन । वसताती आपुले घरीं जाण । काय वदती श्रीरघुनंदन । नवा राजा अयोध्येचा ॥ १० ॥ कीं आणिकाही निंदा करिती । कीं भरता बोल ठेविती । कीं शत्रुघ्न सौमित्र यांची स्थिती । निंदा करिती देखोनी ॥ ११ ॥ कैकेयीमाता वनवासासी । आम्हां धाडिलें दंडकारण्यासी । किंवा बोलती सीतेसी । रावणें हरिलें म्हणोनी ॥ १२ ॥ नगरवासियांचें वर्तमान । भद्रा ऐकिलें असेल जाण । तें मजप्रति निवेदन । ये काळीं करावें तुवां ॥ १३ ॥ श्रीरामाचे मुखपद्म जाण । ऐसें भद्रें ऐकोन । पुढती श्रीरामासी मधुर वचन । बोलता झाला ते समयीं ॥ १४ ॥ म्हणे भास्करवंशभूषणा नरेंचूडामणी । लोक पुरीं पेंठणीं गृहीं वनीं । मार्गी चालतां वचनीं । स्तवन करिती पैं तुझें ॥ १५ ॥ श्रीराम धर्मिष्ठ राजा । आणि पतिव्रता जनकात्मजा । लक्ष्मणें वनवासीं अग्रजा । बहुत सुख दिधलें पैं ॥ १६ ॥ वधिले

---

१ कळप. २ बाकी. ३ संकट. ४ जवळ. ५ समजाविली. ६ लग्नविधी. ७ रामाजवळ. ८ थोडक्यांत.

९ रामचंद्र. १० नरश्रेष्ठा. ११ शहरांत.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

रावण कुंभकर्ण । सहित सैन्यपुत्रप्रधान । राज्यीं स्थापोनि बिभीषण । बंधुसीतेसीं येथें आला ॥ १७॥ अयोध्येसी धर्मनीती । नवा राजा होवोनि रघुपती। प्रजापाळक परम प्रीतीं । विजयी व्हावा श्रीराम ॥ १८ ॥ ऐसें भद्रें बोलिल्यावरी । पुनरपि श्रीराम प्रश्न करी । भद्रा बरवें वाईट या दोहींभीतरी । जन सूत्रीं बांधले ॥ १९ ॥ सुख दुःख पुण्य पाप । ऐसे जनाचे संकल्प । सत्य असत्य हा खटाटोप । मी माझें देख सकळांसी ॥ २० ॥ मी श्रेष्ठ कुलवंत । येर ते अवघे अकुळवंत । मी ज्ञाता महापंडित । येर अज्ञान अपंडित जाणावे ॥ २१ ॥ ऐसें त्रिगुणांचेनि पाशें । सकळही जग बांधिलें असे । त्या अशुभ शुभ वार्ता पैं असे । गुणानुरूपें निघताती ॥ २२ ॥ भद्रा नगरवासी जन । जें वदत असती तें आपण । यथानिगुतीं करीं निवेदन । शंका झणीं धरिसील ॥ २३ ॥ आपणासी शुभ कर्तव्यता । हें भद्रा जाण तत्त्वता । अशुभ त्यागोनि उत्तमार्था । म्यां श्रीरघुनाथा आचरावें ॥ २४ ॥ ऐसा सीतापति बोलोनि सरे । तदनंतरें भद्रें वीरें । नगरीचा वृत्तान्त सत्वरें । श्रीरामासी सांगितला ॥ २५ ॥ अहो जी दयानिधि रावणारी । पुरीं पाटणीं नगरीं । हाटबिदीं चौहाटीं घरोघरीं । ठायीं ठायीं बोलती ॥ २६ ॥ रावणें सीता बळेंकरून । हरोनि लंके नेली जाण । भोंवतीं ठेविले राक्षसगण । अशोकवनाभीतरीं ॥ २७ ॥ जानकी सौंदर्याची खाणी । अभिलाषें ठेविली अशोकवनीं । तेथें राक्षस घोरदर्शनी । तियेभोंवतीं ठेविले ॥ २८ ॥ तुझी कीर्ति अद्भुत लाठी । वानर मेळविले कोट्यनुकोटी । शिळीं सेतु बांधोनि समुद्रतटीं । लंका नेटीं उतरलासी॥ २९ ॥ वधिले रावण कुंभकर्ण । राज्यीं स्थापिला बिभीषण । सीता सोडवोनि अयोध्ये गमन । प्रतापें पूर्ण तुम्हीं केलें ॥ ३० ॥ पैशा तुमच्या कीर्तीसी । रावणें कळंक लाविला हरूनि सीतेसी । तिसी न पुसतां गृहीं कैसी । एकाएकीं घातली ॥ ३१ ॥ न करितां पृच्छा शोधन । जानकीस गृहीं घालोन । कैसा वर्ततो रघुनंदन । लोकलाज सोडोनी ॥ ३२ ॥ आमुच्या स्त्रिया ऐसें करिती । उचकणें सीतेचें आम्हां देती । याकारणें लोक ऐसें बोलती । श्रीरघुपति सत्य जाण ॥ ३३ ॥ राक्षसां वश झाली सीता । नाना भोग भोगी जनकदुहिता । तिये न पुसतां श्रीरघुनाथा । घरामध्यें घातली ॥ ३४ ॥ जें आचरली सीता सती । तैसेंचि आमुच्या स्त्रिया वर्तती । तुझ्या आधारें आम्हां न मानिती । ऐसी वदंती जनाची ॥ ३५ ॥ राजा प्रवर्ते अधर्मासी । तेथें नीति कोणीं कोणासी । शिकवावी रघुपती कायसी । या स्थितीसी देखोनी ॥ ३६ ॥ यापरी बहुविध जन । नगरीं करिती विवंचन । हें सत्य श्रीरामा जाण । नाहीं अनुमान यदर्थी ॥ ३७ ॥ ऐकोनि भद्राचें वचन । परमार्थबुद्धि श्रीरघुनंदन । सर्वां सुहृदांप्रति बोले जाण । हे कथा सत्यत्वें मानते तुम्हां ॥ ३८ ॥ सभाजन म्हणती श्रीरघुनाथा । भद्र वदला जे कां कथा । ते सत्य स्वामी या अर्था । आम्हीं ऐसेंच ऐकिलें ॥ ३९ ॥ सर्वेही प्रणिपात करून । श्रीरामाप्रति बोलती जाण । म्हणती राजेंद्रा असत्यपण । भद्रवचना पैं नाहीं ॥ ४० ॥ ऐसी सर्वांची वचनावळी । ऐकोनि कृपाळु ते काळीं । सभा विसर्जून हृदयकमळीं । रावणारि विचार करीतसे ॥ ४१ ॥ पुढिले प्रसंगीं सौमित्ररघुपती । संवाद एकांतीं बैसोनि करिती । एका जनार्दनीं विनंती । सावध श्रोतीं परिसावें ॥ ४२ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां श्रीरामभद्रसंवादो नाम त्रिचत्वारिंशोऽध्यायः ॥ ४३ ॥ ओंव्या ॥ ४२ ॥ ॥ श्लोक ॥ ३ ॥

अध्याय चव्वेचाळिसावा

॥ श्रीरामाय नमः ॥ विसर्जूनि सभेचे जन । बुद्धिनिश्चित श्रीरघुनंदन । समीप द्वारपाळासी जाण । आज्ञा करिता पैं झाला ॥ १ ॥ अगा द्वारपाळा सज्ञाना । लक्ष्मणभरतशत्रुघ्नां । वेगीं पाचारीं मम दर्शना । कार्यकारण पैं असे ॥ २ ॥ येरें प्रणिपात करोनि स्वामीसी । निघाला सौमित्रभवनासी । मार्गीं न करोनि विलंबासी । अति

१ धरूं नकोस. २ चवाठ्यावर. ३ मोठी. ४ विचारपूस. ५ उदाहरण. ६ म्हणणें. ७ संशय. ८ ह्याविषयीं.

९ बोलावून आण.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

त्वरेंसीं चालिला ॥ ३ ॥ वेगीं प्रवेशला सौमित्र-मंदिरीं। तंव संमुख लक्ष्मण ते अवसरीं। देखोनियां जोडले करीं। नमस्कार पैं केला ॥ ४ ॥ तुमचिया भेटीकारणें। बोलावूं पाठविलें रघुनंदनें। ऐसें ऐकतां लक्ष्मणें। रथारूढ पैं झाला ॥ ५ ॥ रत्नजडित स्यंदनावरी। आरूढोनि सौमित्र ते अवसरीं। चालिला जेथें कनकमृगारी। बैसलासे तिष्ठत ॥ ६ ॥ लक्ष्मण चालिला देखोन। दूत प्रवेशला भरतभवन। संमुख देखोनि कैकेयीनंदन। दोनी कर जोडोन नमन केलें ॥ ७ ॥ विनंती अवधारीं राजेंद्रा। तुमचे भेटीची उत्कंठा श्रीरामचंद्रा। बोलावूं पाठविलें गुणसमुद्रा। तुम्हांकारणें मजलागीं ॥ ८ ॥ दूतमुखींचें ऐकोनि वचन। वेगीं उठिला कैकेयीनंदन। महापराक्रमी चरणचालीं गमन। अग्रजभेटी निघाला ॥ ९ ॥ भरत निघाल्याउपरी। दूत प्रवेशला शत्रुघ्नमंदिरीं। विनीत होवोनि जोडिल्या करीं। शत्रुघ्नासी नमस्कारिलें ॥ १० ॥ दूत म्हणे जी शत्रुघ्ना। तुमचे भेटीचें आर्त श्रीरघुनंदना। भरत लक्ष्मण अग्रजभवना। भेटावया पैं गेले ॥ ११ ॥ तुम्हांसी बोलवावयालागून। मज पाठवी श्रीरघुनंदन। तरी आतां शीघ्रगमन। श्रीरामभेटी निघावें ॥ १२ ॥ दूतमुखींची ऐकोनि गोष्टी। शत्रुघ्न तेव्हां उठाउठीं। निघाला श्रीरामाचे भेटी। चरणचालीं सत्वर ॥ १३ ॥ सर्वेचि दूत पुढें येवोन। श्रीरामासी करोनि नमन। म्हणे स्वामी आलेती भरत शत्रुघ्न। लक्ष्मण द्वारीं उभे असती ॥ १४ ॥ श्रीराम चिंतातुर मानसीं। दूतासी म्हणे तिघां बंधूंसी। पाचारीं मज समीपेंसीं। त्वरेंकरोनि येथवरी ॥ १५ ॥ सर्वेचि दूत द्वारा पैं आला। म्हणे राजपुत्र हो भीतरीं चला। तुमचे भेटीस उताविळा। श्रीराम बैसलासे ॥ १६ ॥ तिघे बंधु समीप येवोन। तिघीं वंदिला रघुनंदन। मुख कोमाइलें कळाहीन। जैसा शशी ग्रहणाचा ॥ १७ ॥ तिंहीं राम देखिला कैसा। संध्याकाळींचा सूर्य जैसा। अति दीनमुख चंद्र कळा-षोडशा। उतरोनि जैसा द्वितीयेचा ॥ १८ ॥ हतशोभा मुखकमळीं। जैसी कमळिणी सुके जळीं। हृदयीं चिंतेची काजळी। तयातें जाणों सरली पैं ॥ १९ ॥ ऐसा श्रीराम कळाहीन। देखोनि तिघे बंधु जाण। श्रीरामचरणीं मस्तक ठेवोन। दीर्घ नमस्कार तिंहीं केला ॥ २० ॥ तयांचा देखोनि अति आदर। वेगीं उठवी धरणिजावर। दोहीं बाहीं आलिंगूनि सत्वर। तिघे बंधु सुखी केले ॥ २१ ॥ बैसवोनि तिघे बंधु। तयांसी बोलिला कृपासिंधु। तुम्ही माझे सखे सुहृदु। प्राणाहूनि पँढियंते ॥ २२ ॥ तुमचे आज्ञेकरून। मी राज्य करितों श्रीरघुनंदन। तुम्ही कुशल ज्ञाते शास्त्रज्ञ। स्वधर्मी निपुण पैं तुम्ही ॥ २३ ॥ तुम्ही मजलागीं करितां स्वकर्म। तुम्ही मजलागीं करितां स्वधर्म। तुम्ही मजलागीं करितां व्रतनेम। धर्मपरायण पैं तुम्ही ॥ २४ ॥ ऐसें श्रीरामाचें वचन। ऐकोनि तिघे बंधु जाण। हृदयीं निवाले परी मुख देखोन। झाले आपण चिंतातुर ॥ २५ ॥ एका जनार्दना शरण। पुढें बंधूंसीं संवाद होईल जाण। मग सीतावनप्रयाण। लक्ष्मण जाऊन करील ॥ २६ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां श्रीरामबंधुदर्शनं नाम चतुश्चत्वारिंशत्तमोऽध्यायः ॥ ४४ ॥ ओंव्या ॥ २६ ॥

अध्याय पंचेचाळिसावा

॥ श्रीरामचंद्राय नमः ॥ समीप करोनि तिघे बंधु। तयांप्रति बोले कृपासिंधु। मुख कोमाइलें नयनीं बिंदु। अंबकाचे पडताती ॥ १ ॥ अंग चळचळां कांपत। आकुळ व्याकुळ होय चित्त। बोलतां तोंड कोरडें पडत। अवस्था आकळित राघवा ॥ २ ॥ अंतरीं राम चैतन्यघन। बाह्य चिंतातुर दीन। अंतरीं राम सुखसंपन्न। बाह्य उद्वेगें मन व्यापिलें दिसे ॥ ३ ॥ अंतरीं रामा नैराश्य। बाह्य दाखवी आशापाश। अंतरीं श्रीराम सर्वज्ञ परेश। बाह्य विचार पुसतसे ॥ ४ ॥ अंतरीं श्रीराम सुखसागरू। बाह्य दिसे व्यवहारी अति चतुरू। अंतरीं श्रीराम सद्गुरू।

---

१ मारीचशत्रु रामचंद्र. २ ज्येष्ठ बंधूच्या भेटीला. ३ आवड. ४ सत्वर. ५ चंद्र. ६ श्रीराम. ७ आवडते. ८ उदकाचे. ९ चिंता. १० स्वप्रकाशरूप.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

बाह्य नरावतारू भासत ॥ ५ ॥ ऐसा श्रीराम लीलाविग्रही । नानावतार धरी पैं देहीं । देहबुद्धि तयां नाहीं । व्यापकपणें करोनियां ॥ ६ ॥ कनकमृगारी सर्वांप्रती । बोलतसे ऐका निश्चितीं । तुमचें कल्याण हो आणि श्रीमंती । यश कीर्ती वृद्धी पावो ॥ ७ ॥ ऐका होवोनि सावधान । नगरीं वृत्तान्त वर्तला अति गहन । पुरीं पाटणीं वसती जन । त्यांचें वर्तमान अवधारा ॥ ८ ॥ माझे सीतेची निंदा करिती । नाना अपवाद इसी ठेविती । घरोघरीं हेंचि वदती । लोक बोलती जानकीसी ॥ ९ ॥ अधर्म माझे वदती जन । तेणें चिंतातुर मी गहन । याकारणें तुम्हांसी पाचारून । काय त्यां आपण करावें ॥ १० ॥ आम्ही इक्ष्वाकुकुळींचे भूपती । आमुचे पूर्वजीं केली कीर्ती । जिहीं प्रार्थूनि उमापती । मागितली भागीरथी स्नानार्थ ॥ ११ ॥ मिथिलाभवनीं विदेहजनक । शास्त्रीं पुराणीं प्रसिद्ध एक । धर्मपरायण पुण्यश्लोक । ज्ञान सुभट जयाचें ॥ १२ ॥ तयाची जानकी कुमारी । इचें कुळ प्रसिद्ध चराचरीं । उभय कुळें वंद्य सुरासुरीं । प्रसिद्ध प्रौढी तैसीच ॥ १३ ॥ जाणतसां दंडकारण्यीं । वसती केली आम्हीं तिघां जणीं । तेथें रावण दुरात्मा येवोनी । जानकीसी हरिलें तेणें ॥ १४ ॥ त्यां रावणासी मारून । जानकी सोडविली हें सत्य जाण । तेव्हांचि त्यां केलें अव्हेरण । लोकलाजेसी भिवोनी ॥ १५ ॥ जानकी मज संमुख येवोनी । इसी मी विमुख होवोनी । ते काळीं सर्वेही सुरगणीं । थोर आश्चर्य पाविजेलें ॥ १६ ॥ मग जानकी सुंदरी । दिव्य देती झाली ते अवसरीं । देवां देखतां वैश्वानरीं । प्रवेशली ते काळीं ॥ १७ ॥ सीतेनें दिव्य दिधलें । इंद्रें माझें प्रार्थन केलें । तेव्हां लक्ष्मणें विनविलें । जानकीतें अंगीकारा ॥ १८ ॥ मान देवोनि समस्तांच्या वचना । त्यां अंगिकारिली हे शुभानना । माझिया हृदयींची भावना । निष्पाप देखोनि अंगीकारिली ॥ १९ ॥ आकाशपथीं पंच भूतें । तींही म्हणती निष्पाप जानकीतें । अंगीकारावें समर्थें । कृपा करोनि श्रीरामा ॥ २० ॥ शशिसूर्यमहेंद्रीं मजप्रती । करीं ओपिली जानकी सती । यासी साक्ष प्रत्यक्ष सौमित्री । त्या काळीं जवळी होता ॥ २१ ॥ ऐसा शुद्ध समाचार । लंकाद्वीपीं देखतां सुरवर । वर्तला हा सत्य साचार । तुम्हीं सकळीं जाणिजे ॥ २२ ॥ मग हे जानकी सुंदरी । सहित प्रवेशलों पितृपुरीं । ऐसें असतां जन घरोघरीं । नानापरींचें बोलती ॥ २३ ॥ यालागीं आतां क्षणक्षण । होतो माझा विकळ प्राण । नगरलोकांसी भिवोन । प्राणत्याग करावा ॥ २४ ॥ अपकीर्तीचें जें जिणें । लोकांमध्यें लाजिरवाणें । याहीपरीस भलें जीव देणें । परी जिणें न ये कामा ॥ २५ ॥ अपकीर्ती निंदिजे जनीं । कीर्ति वंदिजे वेदीं पुराणीं । कीर्ति आपुली ऐकोनी । सर्वांसी उत्साह होतसे ॥ २६ ॥ कीर्तीकारणें जे जन । करिताती व्रतें तपें दान । कीर्तीकारणें यज्ञाचरण । स्वयें जाण आचरिती ॥ २७ ॥ कीर्तीकारणें तुळापुरुषदान । कीर्तीकारणें यजनयाजन । कीर्तीकारणें अन्नदान । घरोघरीं जन करिताती ॥ २८ ॥ कीर्तीकारणें शास्त्रपठन । कीर्तीकारणें तर्कव्याख्यान । कीर्तीकारणें करिती छळण । वादीं ब्राह्मण एकमेकां ॥ २९ ॥ कीर्तीकारणें विजनीं पाणी । पाजिताती पोही घालोनी । कीर्तीकारणें पंचाग्निसाधनीं । धूम्रपानीं प्रवर्तती ॥ ३० ॥ ऐसें जाणा कीर्तीचें सुख । अपकीर्तीचें परम दुःख । तरी आतां तूं सौमित्रा आइक । एक विचार सांगतों ॥ ३१ ॥ हा मध्यरात्रीचा भर । निशाअंतीं उगवे दिनकर । सुमंतें अधिष्ठिला जो रहंवर । त्यावरी जानकी बैसवीं ॥ ३२ ॥ गंगेचे परपारीं आपण । वाल्मीकाश्रम परम पावन । गंगातमसांचा संगम । तेथें वन गहन पैं आहे ॥ ३३ ॥ तया वनीं वृक्ष दीर्घ । वसताती जंबुक व्याघ्र । आणि क्रूर जीव अनेग । वन आश्रयोनि राहिले ॥ ३४ ॥ शीघ्र करावें या कार्यासी । विलंब झणीं येथें करिसी । अथवा मनींही विचारिसी । तरी अनर्थ होईल ॥ ३५ ॥ तेथें नेवोनि हे सुंदरी । सोडावी त्या विप्राभीतरीं । हे माझी आज्ञा अवश्य करीं । मज सुख व्हावया ॥ ३६ ॥ हें

---

१ लीलेनें शरीर धारण करणारा. २ दूषणें. ३ शंकर. ४ अग्नीमध्यें. ५ सुंदर मुखाची. ६ दिली. ७ अयोध्यानगरीमध्यें. ८ जगणें. ९ निर्जनस्थलीं. १० पाणपोई. ११ सारथ्य-स्वीकार केला. १२ रथ.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

जानकीसी कळों न द्यावें । आणि कोणा न सांगावें । शीघ्र विलंबा न करावें । झडकरी जावें निजगृहा ॥ ३७ ॥ श्रीरामाज्ञा वंदोनि शिर्सीं । लक्ष्मण निघाला स्वभुवनासी । मार्गी चिंतातुर अति क्लेशी । सुख मानसीं पैं नाहीं ॥ ३८ ॥ येरीकडे बंधूंसह रघुनंदन । बाष्पकंठीं करी रुदन । नयनीं अश्रूंचे पूर जाण । मुख कोमेजून पैं गेलें ॥ ३९ ॥ अनुजांसहवर्तमान । प्रवेशला निजभवन । पुढील सीतावनाभिगमन । सावधान अवधारा ॥४०॥ एका जनार्दना शरण । रामें गोड रामायण । श्रीराम तारक ब्रह्म पूर्ण । सच्चिदानंदघन श्रीराम ॥ ४१ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां श्रीरामसहबंधुविचारो नाम पंचचत्वारिंशोऽध्यायः ॥ ४५ ॥ ॥ ओंव्या ॥ ४१ ॥

अध्याय शेचाळिसावा

॥ श्रीसीतापतये नमः ॥ तदनंतर सुमित्रात्मज । रजनी क्रमोनि गभस्ती तेजःपुंज । उदयो होतां जें वदला अग्रज । तया कार्या करीतसे ॥ १ ॥ सुमंताप्रति बोले वचन । मुख कोमाइलें दिसे विवर्ण । सारथियासहित रथ उत्तम जाण । येथें शीघ्र आणावा ॥ २ ॥ श्रीरामाची आज्ञा ऐसी । रथीं वाहोनि जानकीसी । सीतेचेही आवडी मानसीं । ऋषिआश्रम पहावे ॥ ३ ॥ मी नेतों वैदेहीतें । पहावया ऋषिआश्रम पुण्यतीर्थें । तरी सुमंता शीघ्र रथातें । आणावें आज्ञेकरोनी ॥ ४ ॥ ऐकोनि लक्ष्मणाचें वचन । तत्काळ सुमंतें उठोन । रथ आणिला रत्नखचित सुवर्णवर्ण । देदीप्यमान तेजस्वी ॥ ५ ॥ सुमंत म्हणे सुमित्रात्मजा । रथ आणिला कुळज्जा । आतां करावें योजिलें काजा । महाराजा शक्रारिहंत्या ॥ ६ ॥ ऐसें सुमंतमुखींचें वचन । ऐकोनि सुमित्रानंदन । प्रवेशला जेथें जनकाचें कन्यारत्न । परम पावन पतिव्रता ॥ ७ ॥ मग तो पुरुषपंचानन । जानकीप्रति अग्रजाचें वचन । बोलता झाला माते तुजलागोन । श्रीरामें रथ पाठविला ॥ ८ ॥ रथीं आरूढोनियां भद्रे । तुम्हां वन पहावया श्रीरामचंद्रें । पाठविलें वो गुणसमुद्रे । गंगेचिये पैलतीरा ॥ ९ ॥ मजबरोबरी वो शुभानने । रथीं बैसोनियां वनें उपवनें । पाहें ऋषिआश्रम सिद्धस्थानें । तपोधन जेथें वसती ॥ १० ॥ शीघ्र चाल वो झडकरी । श्रीरामाज्ञा वंदोनि शिरीं । तुझे मनोरथ वनाभीतरीं । पाहतां पूर्ण करीन पैं ॥ ११ ॥ तुवां श्रीरघुनाथा मागितलें । तें तुज श्रीरामें दिधलें । आतां चालिजे शीघ्र काळें । वनवासासी जनकात्मजे ॥ १२ ॥ ऐसें सौमित्र बोलिल्यावरी । जानकी संतोषोनि ते अवसरीं । वना जावयाचा उल्हास भारी । हृदयमंदिरीं उचंबळला ॥ १३ ॥ वनवासी ऋषींकारणें । सर्वें घेतलीं दिव्य वस्त्रें भूषणें । नानापरींचीं रत्नें धनें । फळें मिष्टान्नें घेतलीं ॥ १४ ॥ विजनीं मुनिपत्न्या सती । तयां द्यावया भूषणें सीता सती । घेती झाली होती आइतीं । नानाविध वस्त्रेंही ॥ १५ ॥ वैदेही म्हणे सुमित्रासुता । मोटा बांधोनि घालिजे रथा । वनीं वसती ऋषींच्या कांता । त्यांसी द्यावयाकारणें ॥ १६ ॥ पुनरपि बोले मैथिली । लक्ष्मणा मी तुजजवळी । विनंती करितें ये काळीं । सावध होवोनि अवधारिजे ॥ १७ ॥ मी पाहीन ऋषिआश्रमांतें । अशुभचिन्ह मज कां होतें । वामनेत्राचें लवतें पातें । सर्वांगीं कंप होतसे ॥ १८ ॥ शरीरीं अँवस्था वाटत । हृदयीं चिंता वर्तती बहुत । धारणा माझी चंचळ होत । वनवासासी जावया ॥ १९ ॥ लक्ष्मणा आजि हे पृथ्वी । उद्वस वाटते माझे जीवीं । दिशा दाटल्या बहुत धुंई । कळाहीन सूर्य दिसतसे ॥ २० ॥ माझा भ्रतार माझे दीर । सासू सुहृद आणि सहोदर । श्रीरामभक्त श्रीरामकिंकर । पुरवासी जन सुखी असो ॥ २१ ॥ ऐसें जानकी वदोन । स्तुति करी देवता प्रार्थून । अहो अंबिके हा रघुनंदन । सुहृदेंसीं कल्याण असो ॥ २२ ॥ ऐसें जानकी वदल्यावरी । लक्ष्मण विनीत जोडिल्या करीं । म्हणे माते तुझ्या उत्तरीं । सर्वांसी क्षेम होईल ॥ २३ ॥ धरणिजे तुझे आशीर्वादें । माझे मनोदेवतेसी निघालीं दोंदें । तुवां चिंतिलीं कल्याणशब्दें । तरी सर्वांसी कल्याण पैं असे ॥ २४ ॥ तदनंतर आरूढोनि रथीं । प्रयाण

---

१ मस्तकीं. २ तेजोहीन. ३ महाकुलीना. ४ इंद्रजितास मारणाऱ्या. ५ अरण्यांत. ६ जानकी. ७ अस्वस्थता.

८ बुद्धि. ९ उदास. १० धुक्यानें. ११ हे सीते !

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

करी वनाप्रती । नगर सांडोनि प्रथम वस्ती । गोमतीतीरीं पैं केली ॥ २५ ॥ गोमतीचें तीर पावन । तिचे उत्तरे नैमिषारण्य । जेथें सदाशिव आपण । पार्वतीसहित पैं असे ॥ २६ ॥ तया क्षेत्रीं अद्यापि जाण । वाळूच्या लिंगाचें दर्शन । करिती जन पुण्यपावन । अभक्तां सहसा लिंगदर्शन नाहीं ॥ २७ ॥ ऐसिये गोमतीप्रती । प्रथमदिवशीं केली वस्ती । उदय होतांचि गभस्ती[1] । सारथ्यासी म्हणे लक्ष्मण ॥ २८ ॥ शीघ्र संजोगीं[2] रे रथ । आजि भागीरथीतीरीं सुस्नात । स्नान तर्पण करूं तेथ । माध्यान्हिक कर्मातें ॥ २९ ॥ आजि भागीरथीचें पाणी । मस्तकीं धरूं सुस्नात होवोनी । जैसें ईश्वरें मौळीचिये[3] स्थानीं । विष्णुपादोदक धरियेलें ॥ ३० ॥ शक्रारिअरीचें[4] ऐकोनि वचन । सारथियानें शीघ्रचि जाण । रथ संजोगिला मनाह्वन । वेग बहुत वारूंचा ॥ ३१ ॥ आरूढोनि रथावरी । सीतेसहित रावणात्मजारी । पावले पंचदश घटिकांभीतरीं । भागीरथीच्या तीरातें ॥ ३२ ॥ तेथें करोनि संध्यास्नान । पितृतर्पण ब्राह्मणपूजन । माध्यान्हिक क्रिया सारून । उद्वेगी मन सुमित्राचें ॥ ३३ ॥ आठविली अग्रजाची[5] मात । जे सीता त्यागीं वनाआंत । तो काळ समीप जाणोनि सौमित्र । स्फुंदस्फुंदोनि रडतसे ॥ ३४ ॥ लक्ष्मणाचें देखोनि रुदन । धर्मज्ञ जानकी बोले वचन । तुम्ही रडतां काय कारण । जान्हवीतीर पाहोनियां ॥ ३५ ॥ जान्हवीतीर पुण्यपावन । इचे दर्शनें कल्मषदहन[6] । इचा महिमा चतुरानन । वर्णूं न शके स्ववाचा ॥ ३६ ॥ हा माझा हर्षकाळ । ईस देखोनि सुखकल्लोळ । तुम्ही रुदन करावया काय मूळ । तें मजप्रती सांगिजे ॥ ३७ ॥ श्रीरामासमीप पार्श्वभागीं । वस्ती लक्ष्मणा तुम्हांलागीं । त्या वियोगदुःखें तुम्ही फुंदां आंगीं । शोकसागरीं पडतां हो ॥ ३८ ॥ मजसारिखी प्रीति तुजवरी । अधिक लक्ष्मणा श्रीराम करी । शोक सांडोनि ये अवसरीं । मज परपारीं उतरावें ॥ ३९ ॥ परपारीं आम्ही उतरोन । तेथें वसती मुनिगण । तयांचें करूं दर्शन पूजन । अलंकारभूषणें देवोनी ॥ ४० ॥ तेथें एक रात्री करूं वस्ती । प्रभाते अयोध्यापुरीप्रती । गमन कीजे श्रीरघुपती । जेथें राज्य करीतसे ॥ ४१ ॥ शीघ्र लक्ष्मणा ये समयीं बरवी । विस्तीर्ण सुंदर नाव आणवीं । पैलतीरीं उतरोनि गोसावी । महानुभावांसी भेटणें ॥ ४२ ॥ हें ऋषिरामायण । उत्तरकांड कल्मषदहन । एका जनार्दनीं विनंती पूर्ण । संत सज्जन परिसा तुम्ही ॥ ४३ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां सीतालक्ष्मणवनाभिगमनं नाम षट्चत्वारिंशोऽध्यायः ॥ ४६ ॥ ओंव्या ॥ ४३ ॥

अध्याय सत्तेचाळिसावा

॥ श्रीजनकनंदिनीपतये नमः ॥ अयोनिजेच्या मुखकमळें । ऐसें वदतां सुमित्रेच्या बाळें । नावाडी पाचारिला कुशळें । सुंदर नौका आणविली ॥ १ ॥ कैवँतें[7] नौका सुंदर पूर्ण । आणोनि म्हणे करा जी आरोहण[8] । धरणिजेसहित ऊर्मिलारमण[9] । नावेवरी बैसला ॥ २ ॥ रथासहित तेधवां सूत । ऐलतीरीं राहोनि त्वरित । पैलतीरीं दोघें उतरोनि तेथ । स्नानसंध्या सारिली ॥ ३ ॥ शोकें संतप्त लक्ष्मण । बोले जानकीप्रति सद्गद वचन । म्हणे माते निमित्तधारी जाण । जनासारिखें श्रीराम आचरला ॥ ४ ॥ मज जरी येथें येतें मरण । तरी पावतों कृतकल्याण । हें माझेनि दुःख न देखवे जाण । काय आपण करावें ॥ ५ ॥ जरी मज मरण येतें । तरी मी पावतों महायशातें । अपेशपात्र झालों सुहृदांतें । मुख कैसें दाखवूं ॥ ६ ॥ हें मज योग्य नव्हे काम । सांगता झाला आत्माराम । बिभीषणा सुग्रीवा योग्य परम । ते हें तत्क्षणीं करिते हो ॥ ७ ॥ पूर्वी आचरलों होतों पाप । तें माझें मज फळलें सद्रूप । निंद्य लोकीं तें मजकरवीं भूप । ऐसे प्रयोजनीं प्रेरीत ॥ ८ ॥ ऐसें करितां दीर्घ रुदन । मूर्च्छापन्न पडे लक्ष्मण । सवेंचि मूर्च्छा सांवरून । आक्रंदोन पैं उठे ॥ ९ ॥ ऐसें सौमित्राचें रुदनदुःख । ऐकोनि जानकी कळवळली देख । लक्ष्मणासी म्हणे महाबाहो ऐक । काय कारण रुदन करिसी ॥ १० ॥ या काळीं लक्ष्मणा । कां करिसी तूं रुदना । काय तुज अग्रजांहीं वाग्बाणा । हाणोनि भेदलें हृदय तुझें

---

१ सूर्य. २ जोडीं. ३ मस्तकीं. ४ लक्ष्मणाचें. ५ वडील बंधूची. ६ पापनाशन. ७ नावाड्यानें. ८ चढणें. ९ लक्ष्मण.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ ११ ॥ काय चुकलासी श्रीरामाचें। कोण कर्म घडलें तुज साचें। किंवा अपवाद श्रीरघुपतीचे। तुवां केले लक्ष्मणा ॥ १२ ॥ कीं श्रीरामें शापिलें। कीं कोण दुःख तुज ओढवलें। तें सत्य मजप्रती ये काळें। विशद करूनि सांगावें ॥ १३ ॥ माझी आज्ञा तुज सौमित्रा। सांगें सकळही वृत्तांता। कांहीं वंचिसी तरी आण आतां। माझी तुज पैं असे ॥ १४ ॥ ऐकोनि जानकीचें वचन। लक्ष्मण अधोमुख दीन होवोन। कंठीं बाष्प सद्गदित मन। बोलता झाला ते समयीं ॥ १५ ॥ अहो धरणिजे अवधारीं। तुझी निंदा करिती जन नगरीं। पाटणीं विजनीं घरोघरीं। हाट चौहटा बैसोनियां ॥ १६ ॥ रावणें सीता हरिली। ते नेवोनि लंकेसी ठेविली। अशोकवनीं राक्षस बळी। तिजपासीं ठेविले ॥ १७ ॥ तिचा ऐसा समाचार। पापिष्ठां राक्षसां नाहीं विचार। मग त्या रावणा मारोनि श्रीरघुवीर। अयोध्येसी घेवोनि आला ॥ १८ ॥ एकाएकीं न पुसत। जानकी गृहीं घाली श्रीरघुनाथ। ऐसें श्रीरामें अधर्मकृत्य। सूर्यवंशीं पैं केलें ॥ १९ ॥ तेणें जानकी भयभीत। श्रीराम झाला भयचकित। तयाचें हृदय झालें तप्त। अति दुःखित लोकलज्जे ॥ २० ॥ ऐसें श्रीराम मजजवळी। वदलासे सत्य ये काळीं। नगरअपवाद हृदयकमळीं। सकळांमाजी बैसले ॥ २१ ॥ माझी पतिव्रता जानकी। परम पावन त्रैलोक्यीं। परी मज निंदिलें ये लोकीं। पुरपाटणीं घरोघरीं ॥ २२ ॥ तरी आतां तूं लक्ष्मणा। वनासी नेईं पद्मनयना। गंगातीरीं तपोधन नाना। तदाश्रमाप्रती सोडावी ॥ २३ ॥ करूं नये स्त्रियेचें हनन। त्यावरी गरोदर जाण। भरले षण्मास पूर्ण। वधितां दारुण पातक ॥ २४ ॥ इजसीं रथीं बैसवोन। सौमित्रा वेगीं करीं गमन। भागीरथीपरपारीं तपोधन। तेथें नेवोन सोडावी ॥ २५ ॥ ऐसें जानकी वर्तमान। यथार्थ वदला रघुनंदन। तेणें दुःखें माझें मन। खेदें क्षीण होतसे ॥२६॥ तरी धरणिजे तीर पावन। येथें वसती पवित्र जन। या वनाचें नाम तपोवन। साधु सज्जन रहावया ॥ २७ ॥ तरी जानकिये अवधारीं। तुवां रहावें या वनाभीतरीं। येथें वाल्मीक तप करी। तो मित्र राया दशरथाचा ॥ २८ ॥ तयाचे चरण आश्रयून। करावें फळमूळभक्षण। श्रीरामीं अखंड अनुसंधान। लावावें जाण जानकिये ॥ २९ ॥ श्रीरामीं ज्याची चित्तवृत्ती। तो नर वंद्य त्रिजगतीं। श्रीरामीं ज्याची अभक्ती। त्या नरकीं वस्ती आकल्पवरी ॥ ३० ॥ ऐसी करितां श्रीरामभक्ती। तैं चारी मुक्ति पायां लागती। सकळ स्वार्थ घरीं रिघती। पुरुषार्थ होती कामारे ॥ ३१ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां जानकीवनाभिगमनं नाम सप्तचत्वारिंशोऽध्यायः ॥४७॥ ओंव्या ॥ ३१ ॥

अध्याय अठ्ठेचाळिसावा

श्रीशिवरामाय नमः ॥ लक्ष्मणाचें निष्ठुर वचन। ऐकोनि जानकी खेदें खिन्न। थोर विषाद पावोन। मूर्च्छागत पैं झाली ॥ १ ॥ सुकुमार जैसी कर्पूरजननी। अनिळ झगटे येवोनी। मग ती डोले हादरोनी। तैसें अवनिजेसी जाहलें ॥ २ ॥ ते पडे धरणीं मूर्च्छागत। भ्रमें व्याकुळ झालें चित्त। क्षण एक होवोनि सावचित्त। लक्ष्मणा बोले दीन वचनें ॥ ३ ॥ जनकात्मजा म्हणे सुमित्रासुतां। माझें शरीर दुःखातें तत्त्वतां। ऐसें जाणोनि कीं विधाता। दुःखासी पात्र मज केलें ॥ ४ ॥ पूर्वीं जैसें आपण केलें। कोणा स्त्रीपुरुषां असे विघडिलें। मज तरी हें प्राप्त झालें। वनवासासी सांडिलें श्रीरामें ॥ ५ ॥ ऐसा जाणोनियां वृत्तान्त। वनीं मज त्यागी श्रीरघुनाथ। माझें पाप मजचि फळत। वियोग होत श्रीरामीं ॥ ६ ॥ जन्मापासोनियां जाणा। हेंचि मज प्राप्त ऊर्मिलारमणा। तरी अदृष्टचि प्रमाणा। बोल कवणा ठेवावा ॥ ७ ॥ पूर्वीं मी श्रीरामभवनीं। करीत असतां सेवा चरणीं। मज गृहीं अनुदिनीं। दुःख थोर जाहलें ॥ ८ ॥ पुढें आतां ऋषिआश्रमस्थानीं। वसतां मज पुसतील मुनी। काय कारण तुजलागोनी। श्रीरामें वनीं सांडिलें ॥ ९ ॥ मज पुसतील ऋषीश्वर। काय कारणें तुज रघुवीर। वनीं सांडी हें प्रश्नोत्तर।

---

१ स्पष्ट. २ खालीं तोंड करून. ३ शहरांत. ४ बाजारांत. ५ चवाठ्यांवर. ६ दास ७ दुःख. ८ देवकेळ. ९ वायु.

१० सीतेला. ११ लक्ष्मणा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

आम्हांप्रति सांगिजे ॥ १० ॥ तुज कोण्या दुःखास्तव श्रीरामें । त्यजिलें वनीं अवो रामे । काय दुष्कर्म कोण्या अधर्मैं । तुज वनीं सांडिलें ॥ ११ ॥ काय सांगूं मुनींप्रती । जरी मुनिपत्न्या मज पुसती । तूं सुंदर सुकुमार श्रीरघुपतीं । कां वो तुज सांडिलें ॥ १२ ॥ निश्चयें जाण लक्ष्मणा । जान्हवीतीरीं आपुले प्राणां । त्यजीन मी आतां वांचेंना । कांहीं कारण मज नाहीं ॥ १३ ॥ मज सांडोनियां सुमित्रासुता । करीं रघुनाथाज्ञेतें तत्वतां । मज दुःखी वनस्थळीं सांडोनि आतां । अयोध्येसी गमन करावें ॥ १४ ॥ आतां लक्ष्मणा माझें वचन । तुवां करावें अवश्य जाण । माझिया सासवांसी विशेषेंकरून । नमन माझें सांगावें ॥ १५ ॥ तुमचें दीन वनवासीं । वास करितें तुमचे आज्ञेसीं । जळावेगळी शफरी जैसी । तैसी वनवासीं तुम्हांवीण ॥ १६ ॥ दोनी करकमळें जोडून । श्रीरामा माझें साष्टांग नमन । जाणसी तैसी लक्ष्मणा आपण । विनंती माझी सांगावी ॥ १७ ॥ तुझिया चरणांचा वियोग । तोचि माझा प्राणभंग । जैसा चातक मेघउद्वेग । जळ असोनि पैं करी ॥ १८ ॥ भक्तकृपाळू श्रावणारिनंदनें । मज सांडिलें लोकलज्जेमेणें । लौकिकासारिखें वर्तिजे जेणें । तोचि एक पुरुषार्थी ॥ १९ ॥ पिता राज्यीं स्थापितां जेणें । सापत्न मातेचेनि वचनें । राज्य सांडोनि वना जाणें । तोचि एक पुरुषार्थी ॥ २० ॥ अहंकामादिक राक्षस । मारोनि पावला जो यश । सुरवर पूजिती जयास । तोचि एक पुरुषार्थी ॥ २१ ॥ लोकलज्जेसी भिवोनी । ममता योषितेसी सांडिली ज्यांनीं । ये जनीं वनीं त्रिभुवनीं । तोचि एक पुरुषार्थी ॥ २२ ॥ सर्व कर्मीं कुशळपण । समता दया सेवी जयाची आंगवण । जया अहं ममता नाहीं जाण । तोचि एक पुरुषार्थी ॥ २३ ॥ सद्गुरुवचनीं दृढ भाव । गुरु म्हणे तें करी निःसंदेह । म्हणोनि भजनीं जयाचा उत्सव । तोचि एक पुरुषार्थी ॥ २४ ॥ गृहकृत्यीं उदासभूत । तयांत असोनि जो अलिप्त । कामिनीकामातें नातळत । तोचि एक पुरुषार्थी ॥ २५ ॥ ऐसिया श्रीरामासी जाण । करितें मी साष्टांग नमन । हें लक्ष्मणा अवश्य सांगोन । कृपा कीजे मजवरी ॥ २६ ॥ पौरजनांची बरवी मात । ऐकोनि मज त्यागी श्रीरघुनाथ । ऐसें जाणोनियां मी येथ । शोक न करीं सर्वथा ॥ २७ ॥ पुरवासियांचें मनोगत । जाणोनि राजा तैसें वर्तत । याकारणें मी शोक येथ । काय कारणें पैं करूं ॥ २८ ॥ भ्रताराच्या जें मनींचें । तेंचि स्त्रियेनें कीजे साचें । आनें करितां दोष पृथ्वीचे । बैसतील मज माथां ॥ २९ ॥ इतुकें हें माझें वचन । सांगावें श्रीरामासी आपण । दयासागर तूं ऊर्मिलारमण । यदर्थीं आळस न करावा ॥ ३० ॥ ऐसी जानकीची करुणामात । अति पराक्रमी सुमित्रासुत । ऐकोनि प्रदक्षिणा करीत । दीर्घस्वरें रुदन करोनी ॥ ३१ ॥ क्षणैक सौमित्रें धरोनि ध्यान । माते तुज पाहतां न ये जाण । पूर्वी तुझे देखिले चरण । रूप नाहीं देखिलें ॥ ३२ ॥ श्रीराम नसतां येथें जाण । केंवी मी पाहूं तुझें वदन । म्हणोनि अधोमुखें आपण । चरणध्यान केलेंसे ॥ ३३ ॥ करोनि धरणिजेसी नमस्कारू । नावे बैसला शत्रुजितशत्रू । नावाडियासी म्हणे सत्वरू । उत्तरपारीं पाववीं ॥ ३४ ॥ ऐसा उतरोनि पैलपारीं । शोकें संतप्त हृदयाभीतरीं । भ्रांत होवोनि रथावरी । बैसता झाला ते काळीं ॥ ३५ ॥ पुन्हां फिरोनि पाहे लक्ष्मण । परतीरीं सीता दीनवदन । सीताही अवलोकी लक्ष्मण । कळाहीन देखिला ॥ ३६ ॥ परतीरींहूनि जोंपर्यंत । सीता पाहे रथ दिसत । रथ न देखतां मूर्च्छागत । धरणिजा धरणीवरी पडली ॥ ३७ ॥ ते सीता दुःखेंकरून । अत्यंत आरंबळे त्यजूं पाहे प्राण । सर्वेचि मूर्च्छा सांवरून । रुदनधर्म मांडिला ॥ ३८ ॥

सा दुःखभारावनता यशस्विनी
यशोधना नाथमपश्यती सती ।
रुरोद सा बर्हिणनादिते वने
महास्वरं दुःखपरा च जानकी ॥ १ ॥

ते जानकी पतिव्रता यशस्विनी । दुःखभारें वनीं आक्रंदोनी । धराधर श्रीरामालागूनी । पाहातसे ते सती ॥ ३९ ॥ अनाथबंधो अनाथनाथा । अनाथा जना तूं रघुनाथा । कां न पावसी कृपा-

१ सुंदर स्त्रिये. २ मासोळी. ३ श्रावणशत्रु (दशरथ) याच्या पुत्रानें=रामानें. ४ स्त्रीविषयीं. ५ इतर, अन्य. ६ खालीं तोंड करून. ७ आक्रोशानें. ८ राजा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

नाथा। मज ये वनीं सांडोनी ॥ ४० ॥ म्हणोनि करितें रुदन। हें भयानक अत्यंतवन। मयूरगर्जना करिती गहन। तेणें भय दुःख वाटतसे ॥ ४१ ॥ काय म्यां तुमचा अपराध केला। कोणें माझा अन्याय देखिला। काय कारणें त्यागूनि गेला। वनवासीं सौमित्र ॥ ४२ ॥ कां स्वामी मज सांडिलें। मीं काय अन्याय आचरलें। कीं माझी अभक्ति देखोनि अव्हेरिलें। वनवासीं निरंजनीं ॥ ४३ ॥ कीं पंचवटिकेमाजी लक्ष्मणा। अति दुरुक्ती केलें छळणा। तेणें रागें श्रीरघुनंदना। मज वनवासीं सांडिलें ॥ ४४ ॥ ऐसा शोक अत्यद्भुत। वनीं जनकात्मजा असे करीत। तिच्या शोकाची वर्णना येथ। काय म्हणोनि करावी ॥ ४५ ॥ मुळींच शोक मिथ्या जाण। तयाचें मिथ्या करितां वर्णन। जानकी अशोक आपण। शोकरुदन लौकिकीं ॥ ४६ ॥ एका जनार्दना शरण। सीता शोकें अति दीन। वनींचे पक्षी करिती रुदन। धरणिजादुःख देखोनी ॥ ४७ ॥ पुढें वाल्मीकमुनि येवोनी। करील सीतेची संबोखिणी। तें परिसावें संतसज्जनीं। दत्तचित्त होवोनी ॥ ४८ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां सीताशोकनिरूपणं नाम अष्टचत्वारिंशोऽध्यायः ॥ ४८ ॥ ओंव्या ॥ ४८ ॥ श्लोक ॥ १ ॥

अध्याय एकुणपन्नासावा

॥ श्रीसच्चिदानंदाय नमः ॥ सीता वनीं हिंडतां एकली। शोक करितां ऋषिपुत्रीं देखिली। ते समस्त येवोनि वाल्मीकाजवळी। नमस्कार करिते पैं झाले ॥ १ ॥ समस्त वदती मधुरवचनीं। अहो जी ब्रह्मात्मजशिष्य वाल्मीकमुनी। अपूर्व एक देखिलें नयनीं। एक स्त्री रुदन करीतसे ॥ २ ॥ रूपें तरी मन्मथजननी। सुंदर सुकुमार दीर्घस्वनीं। रुदन करीतसे वनीं। अभिप्राय मुनि न कळे तिचा ॥ ३ ॥

नैव देवी न गंधर्वी नासुरी न च किन्नरी।
एवंरूपा मया नारी दृष्टपूर्वा महीतले ॥ १ ॥

नव्हे देवांची देवता। नव्हे गंधर्वांची कांता। नव्हे असुरांची वनिता। किन्नरयोषिता ते नव्हे ॥ ४ ॥ नव्हे जळींची जळदेवता। नव्हे ऋषींची ऋषिकांता। ऐसिया रूपाची देखिली योषिता। महीतळामाझारी ॥ ५ ॥ तरी स्वामी आपुले नयनीं। पहावी तेथवरी कष्टोनी। तिचा अभिप्राय देखतां मुनी। सर्वथा कळेल तुम्हांसी ॥ ६ ॥ गंगातीरीं करी रुदन। जैसी अनाथ कोणी नाहीं दीन। तियेची काकुळती न देखवे म्हणोन। कृपाळुवा तुम्हां श्रुत केलें ॥ ७ ॥ शोका योग्य नव्हे ते सती। परी बहुत दुःखें करी ग्लांती। यालागीं स्वामींनीं शीघ्रगतीं। तीतें दृष्टीं पहावें ॥ ८ ॥ तिचें करावें पूजन। तरी तुम्हां योग्य अगणित पुण्य। त्याहीवरी तुम्ही धर्मपरायण। मानेल तैसें करावें ॥ ९ ॥ तुमच्या निकट ना दुरी। रुदन करीतसे सुंदरी। मज तारिता नाहीं म्हणोनि शरीरीं। अत्यंत दुःख करीतसे ॥ १० ॥ तुम्हांसी आली शरणागत। हें स्वामींनीं जाणिजे निश्चित। ऐसी ऐकोनि तयांची मात। धर्मनीति जाणता ऋषि ॥ ११ ॥ तो जो वाल्मीक महाऋषी। तपस्तेजें तपोराशी। जेथें मैथिली होती त्या प्रदेशीं। पूजा घेवोनि पैं आला ॥ १२ ॥ सवें ऋषी शिष्यपरिवारित। घेऊनि वाल्मीक धांवत। जेथें जानकी होती तेथ। शिष्यांसहित पैं आला ॥ १३ ॥ देखिली सीता तत्क्षणीं। म्हणे होय हे राघवपत्नी। कैसी जानकी देखिली नयनीं। तें सावधान अवधारा ॥ १४ ॥ जैसी वणव्यानें आहाळली वल्ली। कीं जीवनेंवीण धान्यें करपलीं। कीं जळावेगळी मासोळी। तैसी तळमळी पैं सीता ॥ १५ ॥ ऐसें देखोनि सीतेसी। मधुरवचनीं वाल्मीक महाऋषी। म्हणे माते तूं श्रीरामाची जाया होसी। अजात्मजांची ज्येष्ठ सून तूं ॥ १६ ॥ मिथिलाभूमीचा जनक राजा। तयाची सत्य तूं आत्मजा। या पतिव्रतांहूनि तुझा। धर्म आगळा धरणिजे ॥ १७ ॥ तूं आलीस ज्या कार्यालागूनी। तें मज कळलें जाण मनीं। त्रैलोक्यीं वर्ततें तें तपेंकरूनी। मज ठाउकें असे सीते ॥ १८ ॥ तूं निष्पाप पतिव्रते। ऐसें ठाउकें आहे मातें।

---

१ अरण्यांत. २ शोकरहित. ३ समजूत. ४ नारदशिष्य. ५ स्त्री. ६ दुःख. ७ सीता. ८ पोळली. ९ उदकावांचून. १० अजपुत्र दशरथाची. ११ कन्या. १२ विशेष.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

आतां माझिया पूजेतें । दुःख सांडोनि अंगीकारीं ॥ १९ ॥ जैसी आपुले गृहीं वससी । तैसीचि राहें माझे आश्रमसन्निधीसीं । मग पूजोनियां ऋषीं । स्वाश्रमासी सीता नेली ॥ २० ॥ मग तो वाल्मीक महामुनी । त्यासवें सीता देखोनी । ऋषिपत्न्या आणि तपस्विनी । सामोऱ्या येत्या पैं झाल्या ॥ २१ ॥ ऋषि सीतेसहित आला देखोन । मुनिपत्न्यांहीं करूनि नमन । म्हणती स्वामी आलेती सीता घेवोन । थोर सुख आम्हां झालें ॥ २२ ॥ हे सुंदर चांफेगोरटी । दुःख करितां श्रमली मोठी । सवेंचि वाल्मीक जगजेठी । बोलतसे ऋषिपत्न्यांसी ॥ २३ ॥ हे सीता म्हणाल कोण । वना यावया काय कारण । भ्रतारें कां सांडिली अवगुण । काय इचा देखिला ॥ २४ ॥ तरी सावकाश करोनि चित्त । ऐका धरणिजेचा वृत्तान्त । इचा भ्रतार श्रीरघुनाथ । जेणें रावणान्तें समूळ केला ॥ २५ ॥ हे राया दशरथाची सून । जनक विदेहाचें कन्यारत्न । निष्पाप पतिव्रता जाण । कांहीं कार्य लक्षोन वना आली ॥ २६ ॥ तें कोण कार्य म्हणाल चित्तीं । तरी मी सांगतों तुम्हांप्रती । पुढील भविष्य जाणोनि सत्यार्थीं । करावया हे आली ॥ २७ ॥ इचेनि माझें वचन सत्य । इचेनि माझें तप सफळित । इणें मज करोनि अनुग्रह[३] येथ । वनवासासी पैं आली ॥२८॥ हें मिथ्या वाटे लोकांप्रती । हे आदिमाया चिच्छक्ती । इचा महिमा नेणती । ब्रह्मा आदिकरोनी ॥ २९ ॥ इसीं तुम्हीं स्नेह करून । आपुल्या समीप राहवून । क्षणक्षणां इचें समाधान । ब्रह्मत्वें पूर्ण करावें ॥ ३० ॥ गौरवोनि मुनिपत्न्यांसी । मग तो वाल्मीक महाऋषी । शिष्यांसहित निजाश्रमासी । अतिसंतोषीं पैं आला ॥ ३१ ॥ पुढील कथानुसंधान । लक्ष्मण करितां अयोध्यागमन । मार्गी सारथि जो सज्ञान । त्याप्रति विलपोनें दुःख सांगे ॥ ३२ ॥ एका जनार्दना शरण । कथा रम्य रामायण । समूळ तोडी भवबंधनें[६] । करितां श्रवण एकचित्तें ॥ ३३ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां सीतावाल्मीकदर्शनं नाम नवचत्वारिंशोऽध्यायः ॥ ४९ ॥ ओंव्या ॥ ३३ ॥

१ लगेच. २ रावणाचा वध. ३ कृपा. ४ स्वप्रकाशरूप शक्ति. ५ शोक करून. ६ संसारपाश. ७ रामाचा.

अध्याय पन्नासावा

॥ श्रीपरब्रह्मणे नमः ॥ येरीकडे कथासंबंधु । रावणारीचा कनिष्ठ बंधु । नामें लक्ष्मण प्रतापी प्रसिद्ध । राक्षसांचा कंदु छेदक ॥१॥ ऋषिआश्रमीं मैथिली । प्रवेशली दुःखित ते काळीं । तिचेनि शोकें आतुर्बळी । महा दुःख पावला ॥ २ ॥ हीन दीन मुखकमळ । कोमाइलें जैसें कर्दळीफळ । सीतेचा देखोनि शोक सबळ । अति तळमळ करीतसे ॥ ३ ॥ श्रीरामसारथ्या पाहें येथ । श्रीरामासी हें दुःख होईल प्राप्त । सीता पतिव्रता जाण निश्चित । वृथा ज्येष्ठें त्यागिली ॥ ४ ॥ श्रीराम येथें असता । तयासी सीतेचा शोक कळता । राघवावीण एवढ्या अनर्था । आजि म्यां दृष्टीं देखिलें ॥ ५ ॥ सुमंता प्रारब्धाचा महिमा । यासी अन्यथा करूं न शके ब्रह्मा । जे सीतेकारणें श्रीरामा । केवढा सायास प्राप्त झाला ॥ ६ ॥ मेळवोनि लतामृगांचे[८] भार । शिळीं बांधोनि सागर । रणीं दैत्य राक्षस घोर । क्रोधेंकरोन निवटिले ॥ ७ ॥ याहीपूर्वीं रामें रणकर्कशें । पितयाचे वचनीं चवदा वर्षें । वनीं क्रमिलीं सीतेसरसें । थोर क्लेश पावला ॥ ८ ॥ वधोनि समस्त राक्षस । जानकीसहित पावला यश । तैं सकळां सुरवरां हर्ष । लंकाप्रांतीं पैं झाला ॥ ९ ॥ सीतेचें तेथें दिव्य[९] झालें । पतिव्रता सर्वांसी जाणविलें । जानकीतें दिधलें । देवीं श्रीरामाचे पैं हातीं ॥ १० ॥ ते धरणिजेसहित रघुनंदन । प्रवेशला अयोध्याभवन । नगरींच्या लोकां हर्ष गहन । श्रीराम आला म्हणोनी ॥ ११ ॥ नगरासी येतां श्रीरघुनाथा । सवेंचि केली पट्टाभिषेकता । जानकीसहित भुवननाथ । राज्य सुखें करिता झाला ॥ १२ ॥ सवेंचि पुरवासी जनीं । अपवादें[१०] ठेविला रघुनंदनीं । म्हणती राक्षसें हरिली पत्नी । ते गृहीं कैंवी घातली ॥ १३ ॥ लक्ष्मणाचें ऐकोनि वचन । सुमंत सारथि बोले आपण । म्हणे लक्ष्मणा हें काय कारण । शोकातें बहुत करितोसी ॥ १४ ॥ शोक सांडोनि राहें स्वस्थ । श्रीरामाचें अकळ चरित्र । लीलाविग्रही[११] धरणिजाकान्त । संदेह येथ न धरावा ॥ १५ ॥ पूर्वीं दुर्वास मुनि-

८ वानरांचे. ९ अग्निप्रवेश इत्यादिकांनीं सत्त्वपरीक्षा दाखविणें. १० दूषण. ११ लीलेनें देह धारण करणारा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

श्रेष्ठ। तापसांमाजी तपोनिष्ठ। तो अयोध्ये येवोनि दशरथानिकट। कथा एक वदूं पाहे ॥ १६ ॥ राजा आणि वसिष्ठ मुनी। मीही होतों तये स्थानीं। कथा वदला जो मुनी। ते रायें गुप्त करविली ॥ १७॥ याकारणें लक्ष्मणा। ते मज सांगतां न ये जाणा। जरी ऐकावी वाटतसे मना। तरी तुजप्रति सांगेन ॥ १८॥ हे प्रकट न करावी मात। जरी पुसेल शत्रुघ्न भरत। तयांसी न सांगावी निश्चित। जिव्हारीं दृढ धरावी ॥ १९ ॥ हें गुह्य अवतारचरित्र। प्रकट न करावें लौकिकांत। जें मी सांगेन तें हृदयांत। सावधान धरावें ॥ २० ॥ पुढिले प्रसंगीं दुर्वासऋषी। संवाद करील दशरथासीं। ते मी कथा सांगेन तुजपासीं। सविस्तरें अवधारीं ॥ २१ ॥ एका जनार्दना शरण। पुढें दुर्वास-रायांचें संवादकथन। सर्वांचें सार जाण। रामकथाचरित्र ॥ २२ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां सुमंतसारथिसंवादो नाम पंचाशत्तमोऽध्यायः ॥ ५० ॥ ओंव्या ॥ २२ ॥

अध्याय एकावन्नावा

॥ श्रीमहाविष्णवे नमः ॥ तदनंतर सारथि सुमंत। सौमित्राप्रति ऋषिभाषित[1]। सांगता झाला आनंदित। जें ऐकिलें पूर्वी होतें ॥ १ ॥ पूर्वी दुर्वास महाऋषी। अत्रिपुत्र अनसूयेच्या कुशीं। जन्म पावला तपःसामर्थ्यैसीं। तो दशरथभेटीसी अयोध्ये आला ॥ २ ॥ राजा वसिष्ठ सामोरे गेले। अति सन्मानें दुर्वासा आणिलें। अर्घ्यपाद्यादिकीं[2] पूजन केलें। भोजन झालें तयावरी ॥ ३ ॥ वसिष्ठाचा आश्रम पुनीत। तेथें ऋषी वसावयार्थ। ठाव दिधला हर्षयुक्त। मुनींसमीप राहविला ॥ ४ ॥ जो दुर्वास महामुनी। तापसांमाजी शिरोमणी। जयाच्या शापें शार्ङ्गपाणी। निजस्त्रियेसीं दुरावला[5] ॥ ५ ॥ ऐसा तो दुर्वास ऋषी। वसिष्ठाश्रमीं एकवर्षी। राहिला असतां दशरथ सूर्यवंशी। वसिष्ठगृहासी पैं आला ॥ ६ ॥ श्रीगुरूसी नमस्कार केला। सवेंचि दुर्वास वंदिला। दशरथ म्हणे दयाळा। कथा एकी सांगिजे ॥ ७ ॥ माझीं जीं पुत्रसंतानें। तयांचीं सांगावीं लक्षणें। तयांचें आयुष्य तेजें गहनें। तें वर्तमान सांगावें ॥ ८ ॥ माध्यान्हीं गेला आदित्य। ते समयीं कोणी नाहीं तेथ। वसिष्ठ दुर्वास दशरथ। चवथा तेथ मी सारथि ॥ ९ ॥ अत्रिपुत्र महाऋषी। ऐकोनि दशरथवचनासी। होवोनियां अतिसंतोषी। कथा एक सांगतसे ॥ १० ॥ दुर्वास म्हणे भूपाळा। प्रौढा प्रबुद्धा धर्मशीळा। ऐक इतिहास तुज प्रांजळा। ये काळीं मी सांगेन ॥ ११ ॥ पूर्वी देवां दैत्यां युद्धकाळीं। असुरांसीं युद्ध करितां वनमाळी। दैत्य पळाले भृगुआश्रमाजवळी। पुलोमेनें पाठीं घातले ॥ १२ ॥ पुलोमेनें दैत्य पाठीसी घातले। हें श्रीविष्णूसी कळलें। करीं चक्र घेवोनि मारिलें। पुलोमेसी ते काळीं ॥ १३ ॥ शिर तुटोनि पडिलें भूमीसी। सवेंचि आश्रमा आला ऋषी। म्हणे कोणें माझिया स्त्रियेसी। आश्रमासीं मारिलें ॥ १४ ॥ ऐसें अकृत्य गेला करून। तो मनुष्यलोकीं जन्मेल जाण। ऐसा शाप ऋषि देवोन। मग ध्यानस्थ पैं झाला ॥ १५ ॥ ध्यानीं आव्हांनूनि मूर्ती। तिणें सांगितलें तुझी सती। विष्णूनें मारिली निश्चितीं। चक्रेंकरोनि ऋषिवर्या ॥ १६ ॥ हरीनें स्त्रियेसी मारिलें। ऐसें ऋषीलागोनि कळलें। पुनरपि शाप तया काळें। मागुता दुसरा पैं दिधला ॥ १७॥ माझे स्त्रियेतें मज विघडिलें। तोही ऐसेंचि पावेल कोणे काळें। ऐसें ऋषीच्या मुखें निघालें। शापवचन ते काळीं ॥ १८॥ सवेंचि ऋषि धर्मपरायण। म्हणे मी शाप वदलों तप वेंचून[6]। तरी आतां करूं विष्णुपूजन। जेणें भगवान संतोषे ॥ १९ ॥ षोडशोपचारीं करोनि पूजा। ऋषि म्हणे जी गरुडध्वजा। थोर अन्याय झाला माझा। जें तुज म्यां शापिलें ॥ २० ॥ हरि म्हणे भविष्य प्रमाण। तें ऋषिवर्या न चुके जाण। यालागीं खेदें खिन्न आपण। न व्हावें जी कोणेविशीं ॥ २१ ॥ दुर्वास म्हणे राया दशरथा। ऐसी हे असे पूर्वकथा। तो विष्णु तुझा पुत्र होवोनि तत्त्वतां[7]। श्रीरामरूपें अवतरला ॥ २२ ॥ तो श्रीलक्ष्मीनारायण। घेतलें श्रीरामाचें नामा-

---

१ ऋषीचें वचन. २ अर्घ्य (पूजाद्रव्यें) व पाद्य (पाय धुवावयाचें पाणी) यांनीं. ३ ज्ञानवंता. ४ आणून. ५ वियोग करविला. ६ खर्चीं घालून. ७ खरोखर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

भिधान । पाठीचा शेष तो लक्ष्मण । भरत शत्रुघ्न तदंश॑ ॥ २३ ॥ दहा सहस्र वर्षेंवरी । राज्य करील अयोध्यानगरीं । तयाची भार्या रावण वैरी । दंडकारण्यीं हरील ॥ २४ ॥ पुनरपि वना जाईल । दोघां पुत्रां जन्मवील । अयोध्येचें राज्य करील । सत्य जाण राजेंद्रा ॥ २५ ॥ ऐसें तुझ्या पुत्राचें कथन । दशरथा होईल सत्य जाण । कोणा न सांगावें हें वचन । हृदयीं गुप्त राखावें ॥ २६ ॥ ऐसी सौमित्रा पूर्वकथा । ऋषिमुखीं ऐकिली तत्त्वतां । ते निरूपिली तुज आतां । शोकशमनाकारणें ॥ २७ ॥ ऐसें हें पूर्वकथन । सारथियामुखें ऐकोन । शोक सोडोनि लक्ष्मण । मार्ग क्रमिता पैं झाला ॥ २८ ॥ तंव सूर्य गेला अस्तमानीं । प्रात झालीसे रजनी । केशिन्या नामें नगरीसी येऊनी । वस्तीसी तेथें राहिले ॥ २९ ॥ केशिन्येसी क्रमोनि रजनी । प्रभात होतांचि दोघे जणीं । रथारूढ होवोनी । अयोध्याभवनीं प्रवेशले ॥ ३० ॥ एका विनवी जनार्दना । पुढील गोड निरूपणा । संवाद होईल श्रीरामलक्ष्मणां । तो सावध श्रोतीं ऐकिजे ॥ ३१ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां लक्ष्मणसारथिसंवादो नाम एकपंचाशत्तमोऽध्यायः ॥ ५१ ॥ ओंव्या ॥ ३१ ॥

अध्याय बावन्नावा

॥ श्रीसीतापतये नमः ॥ प्रभाते उठोनि सौमित्री । समवेत सुमंत सारथी । रथासहित अयोध्येप्रती । दीन वदन होवोनि आले ॥ १ ॥ भद्रासनीं जनकजामात । प्रधानलोक परिवेष्टित । कैसी सभा दिसे तेथ । हृष्ट पुष्ट जनेंसीं ॥ २ ॥ सौमित्र होवोनि परम दीन । मुख कोमाइलें कळाहीन । श्रीरामासमीप येवोन । साष्टांग नमन पैं केलें ॥ ३ ॥ नेत्रीं अश्रूंचिया धारा । अंग कांपतसे थरथरां । अधोमुख होवोनि श्रीरामचंद्रा । सर्व वृत्तान्त जाणविला ॥ ४ ॥ स्वामीची आज्ञा घेऊन । प्रवेशलों तिघे जण । गंगातीरीं जानकी विसर्जून॑ । पुढील कथन अवधारा ॥ ५ ॥ गंगेच्या पैलतीरीं । दुःखित सीता सांडोनि दुरी । आम्ही उतरलों ऐलतीरीं । मग तेथोनि काय देखिलें ॥ ६ ॥

जानकी पतिव्रता सुंदरी । रुदन करितां पैलतीरीं । तिचिया शोकाची नवलपरी । सांगतां न ये श्रीरामा ॥ ७ ॥ तदनंतरें मुनिपुत्र । तेथें येवोनि समस्त । घेवोनि जानकीचा वृत्तान्त । वाल्मीकासी जाणविलें ॥ ८ ॥ वाल्मीकें आश्रमा नेली । बरवेपरी तेथें ठेविली । ऐसी श्रीरामा कथा वर्तली । काय सांगूं राजेंद्रा ॥ ९ ॥ श्रीरामा तुम्हीं लोकलज्जेभेण । केलें जानकीचें उपेक्षण॑ । परी ते परम पतिव्रता दारुण । शोक बहुत वनीं केला ॥ १० ॥ तिचें देखोनि रुदन । माझा निघों पाहे प्राण । परी तुझी कृपा होती म्हणोन । पुन्हां हे चरण देखिले ॥ ११ ॥ सीतेचा शोक ऐकोन । वनींचे पक्षी श्वापदें चारा सांडून । तींही झालीं अति दीन । दुःख दारुण पैं तिचें ॥ १२ ॥ ऐसी दुःखित ते सीता । वनीं सांडूनि श्रीरघुनाथा । मी अयोध्येसी आलों तत्त्वतां । चरण तुझे पहावया ॥ १३ ॥ तुझिया चरणांचेनि दर्शनें । उठे संसाराचें धरणें । अहंममतेचें खत फाटणें । वेगीं पावणें परब्रह्म ॥ १४ ॥ ऐसिया जी श्रीरघुनाथा । जानकीची न करावी चिंता । जें लिहूनि गेला विधाता । तें सर्वथा न चुकेचि ॥ १५ ॥ भूत भविष्य वर्तमान । या तिहींचा तूं साक्षी पूर्ण । ध्येय ध्याता आणि ध्यान । यांहूनि भिन्न तूं श्रीरामा ॥ १६ ॥ गृह स्त्री पुत्र धन । यांची आसक्ति ज्ञानियासी नाहीं जाण । भोग भोगूनि अभोक्ता पूर्ण । वैराग्यीं मन दृढ ज्याचें ॥ १७ ॥ उडणीं चढे भिंतीसीं । चढणेंचि होय पतन तिसी । संयोग तोचि वियोगासी । कारण जाण श्रीरामा ॥ १८ ॥ जो प्राणी जन्मा आला । तो गर्भींच जाण मेला । याकारणें साधुमेळा । निःसंग होउनी रहातसे ॥ १९ ॥ भलतेनें आपुलें करावें हित । न करावें तें वृथा जीवित । आयुष्य जाऊं न द्यावें व्यर्थ । सावचित्त होवोनी ॥ २० ॥ तस्मात् श्रीरघुपती । जानकीची न करावी खंती । दयाळुवा दयामूर्ती । भक्तपती कृपाळुवा ॥ २१ ॥ ऐकोनि लक्ष्मणाचें वचन । अति संतोषला श्रीरघुनंदन । पुढती काय आपण । बोलता झाला सौमित्रासी ॥ २२ ॥ अगा ये महाबाहो लक्ष्मणा । पुरुषांमाजी पंचानना ।

१ विष्णुअंश. २ सोडून. ३ त्याग. ४ बंधन. ५ ब्रह्मदेव.

६ पक्षिणी. ७ शोक, खेद. ८ पुरुषश्रेष्ठा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

ज्ञानियांमध्यें ज्ञाननिधाना। पराक्रमगहना विवेकिया ॥ २३ ॥ तूं वदलासी जें वचन । तें सत्यचि असे प्रमाण । परी माझिया कार्यालागोनि जाण। प्रवर्तलासी ये समयीं ॥ २४ ॥ माझी आज्ञा तुळंघितां। वना गेलासी घेवोनि सीता। तेथें सांडूनि तूं मागुता। अयोध्येसी आलासी ॥ २५ ॥ तुजसारिखा नाहीं आप्त । तुवां केलें माझें हित। चुकविला थोर अनर्थ। लोकापवादाएवढा ॥ २६ ॥ तुझिया भुजांसी कल्याण। चिरकाळ होईल जाण। जनापवादभयापासून। मज तुवां गा सोडविलें ॥ २७ ॥ माझिये मनासारिखा। तूं रहाटलासी महापुरुषा। त्रैलोक्यीं थोर जोडिलें यशा। जनापवादा चुकवोनी ॥ २८ ॥ एका जनार्दना शरण। पुढें नृगभूपतीचें कथन। समूळ सांगेल रघुनंदन। इतिहास पुरातन जुनाट ॥ २९ ॥ ते कथा रसाळ गाढी। श्रोतीं द्यावी तेथें बुडी। तरी पाविजे परपारथडी। श्रद्धा दृढ धरोनी ॥ ३० ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां श्रीरामलक्ष्मणदर्शनसंवादो नाम द्विपंचाशत्तमोऽध्यायः ॥

अध्याय त्रेपन्नावा

॥ श्रीमहाविष्णवे नमः ॥ श्रीराम धरणिजाकांत। लक्ष्मणवचनें हर्षयुक्त। होवोनि स्वानंदें डुल्लत। कथा सांगत अनेका ॥ १ ॥ श्रीराम म्हणे लक्ष्मणा। तुज गेलें असतां वना। मागें चार दिवस राजकारणा। मन नाहीं प्रवर्तलें ॥ २ ॥ तरी आतां नगरीचे जन। बोलावीं शेटे महाजन। आणि पुरोहित प्रधान। राजकारणालागूनी ॥ ३ ॥ जो देशींचा भूपती। होवोनि न करी राजनीती। तो जाईल अधःपातीं। नृगरायासारिखें होईल ॥ ४ ॥ लक्ष्मण म्हणे श्रीरघुनाथा। नृग हा कोण कां अधःपाता। गेला काय कारण सर्वथा। तें मजप्रति सांगिजे ॥ ५ ॥ नृग कोण देशींचा भूपती। कोणाचा पुत्र रघुपती। काय चुकला म्हणोनि अधःपातीं। कोणें कर्में जी गेला ॥ ६ ॥ ऐकोनि लक्ष्मणाचें वचन। श्रीराम सच्चिदानंदघन। नृगरायाचें समूळ कथन। सांगता झाला संकेळित ॥ ७ ॥ ऐकें सौमित्रा पूर्वील कथन। नृगराय धर्मपरायण। ब्राह्मणभक्त करी प्रजापाळण। इक्ष्वाकुनंदन तो नृप ॥ ८ ॥ नित्य गायी कोट्यनुकोटी। सवत्स ब्राह्मणां दे जगजेठी। सुवर्णभूषणें शोभती पाठीं। नित्य वांटी गायींतें ॥ ९ ॥ पुष्करतीर्थींचा ब्राह्मण। अत्यंत दरिद्री अकिंचन। उंच्छवृत्तीनें वेंची कण। उदरपोषण तेणें करी ॥ १० ॥ त्या ब्राह्मणें घेवोनि गोदान। स्वगृहीं नेतां मार्गी जाण। चुकली धेनु पुनरपि भवन। राजियाचें पैं शिरली ॥ ११ ॥ दुसरे दिवशीं राजियानें। सवेंचि केलीं कोटिगोदानें। त्यांमध्यें ते धेनु आणिक्या ब्राह्मणें। संकल्पोनि घेतली ॥ १२ ॥ ब्राह्मणें घेवोनि धेनूसी। नेली आपुल्या नगरासी। तंव येरीकडे पुष्करवासी। स्वधेनूसी पाहता झाला ॥ १३ ॥ म्हणे मज रायानें धेनु दिधली। ते माझ्या प्रारब्धानें नेली। तरी कोणे ठायीं असेल गेली। ती शोधूनि पाहूं पां ॥ १४ ॥ उपवासी तो द्विजवर। हिंडता झाला नगरें नगर। उपवासी पीडिला एक संवत्सर। धेनूची शुद्धि न लभेचि ॥ १५ ॥ अत्यंत क्लेशी होऊन। कनखलतीर्था आला जाण। तंव ते धेनु विप्रगृहीं देखोन। बोलता झाला द्विजवर ॥ १६ ॥ न्याहाळूनि पाहे धेनूसी। तंव ते ओळखिली निश्चयेंसीं। मग सांद करोनि तियेसी। शबले येई म्हणोनियां ॥ १७ ॥ ऐकोनि ब्राह्मणाच्या वचनासी। धेनु लागली पाठीसी। तंव तो कनखलतीर्थवासी। चरित्र पाहात तियेचें ॥ १८ ॥ विप्राचिया पाठीं लागे। धेनु चालली मागें मागें। तंव तो येरु बोलिला रागें। कोणाची धेनु नेतोसी ॥ १९ ॥ अगा धेनुचोरा कोठील वासी। माझी गाय चालवोनि नेसी। तुज दंडीन राजसभेसी। परस्परें कलहासी पेटले ॥ २० ॥ परस्परें करिती वाद। परस्पर करिती संवाद। एकमेकांसी वर्मांगशब्द। भेदोनियां बोलती ॥ २१ ॥ ऐसे भांडत भांडत दोघे जण। नृगरायाचे नगरा आले जाण। अति श्रमले क्षुधेंकरून। राजदर्शन नव्हे सहसा ॥ २२ ॥ दोन चार दिवसपर्यंत। रायाचें दर्शन नव्हे प्राप्त। क्षोभले विप्र शाप देत।

---

१ वागलास. २ लोकदूषणाला. ३ अत्यंत. ४ सीतापति. ५ संक्षेपानें. ६ दरिद्री. ७ उंच्छवृत्ति=शेतांत गळून पडलेल्या धान्यानें उपजीविका. ८ वाडा. ९ वर्षे. १० हांक मारून.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

तत्काळ नृगभूपतीसी ॥ २३ ॥ क्रोधें अत्यंत तप्त होऊन । शाप देते झाले ब्राह्मण । म्हणती राया तुज कृकलपण । शीघ्रकाळें येईल ॥ २४ ॥ कार्याची उत्कंठा मोठी । म्हणोनि आलों तुझे भेटी । तूं दर्शन नेदिसी शेवटीं । अवश्य सरड पैं होसी ॥ २५ ॥ बहुत सहस्र वर्षें शत । तूं कृकल होसील निश्चित । विवरामाजी होसील गुप्त । दुःखफळ भोगिसील ॥ २६ ॥ ऐकोनि विप्रांचा शाप । राजा झाला अति संतप्त । मग ब्राह्मण बोलावोनि समीप । प्रार्थिता आपण पैं झाला ॥ २७ ॥ राजा म्हणे ब्राह्मणांसी । धेनूच्या प्रतिनिधी घ्या धेनूसी । ब्राह्मण म्हणती राया परियेसीं । आणिका धेनूचें कोण काम ॥ २८ ॥ मग राजा झाला शरण । स्वामी मज द्यावें उःशापवचन । मग ते ब्राह्मण गतक्रोध होऊन । वचन बोलते पैं झाले ॥ २९ ॥ यदुकुळीं उत्पन्नभूत । वासुदेवनामें विष्णु साक्षात । जयाचें नाम स्मरतां अंत । महापातकां होतसे ॥ ३० ॥ लीलाविग्रही श्रीनारायण । अवतरेल यदुकुळीं जाण । तयाची कथा परम पावन । शापापासून सोडवील ॥ ३१ ॥ वासुदेव परमात्मा आपण । राया सोडवील शापापासून । मग ते दोघेही ब्राह्मण । थोर सुख पावले ॥ ३२ ॥ ते धेनु दोघीं जणीं । दिधली आणिका ब्राह्मणालागूनी । पुढें काय वर्तलें चापशरपाणी । सावधान अवधारिंजे ॥ ३३ ॥ ऐसा रायासी शाप झाला । राजनीतीसी चुकला । याकारणें लक्ष्मणा वेहिला । कार्याकारणा न चुकिजे ॥ ३४ ॥ राजा राजनीति न करी । एवढीं व्यसनें तयाचे शिरीं । वाजती सौमित्रा निर्धारीं । येदर्थी संदेह न धरावा ॥ ३५ ॥ एका जनार्दना शरण । पुढें गोड आहे निरूपण । नृगरायाचें कथन । सावधान अवधारा ॥ ३६ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां नृगराजकथनं नाम त्रिपंचाशत्तमोऽध्यायः ॥ ५३ ॥ ओंव्या ॥ ३६ ॥

अध्याय चौपन्नावा

॥ श्रीभार्गवजेत्रे नमः ॥ ऐसी पवित्र आणि परिकरें । रामायणी कथा सार । एकैक श्रवणीं पडतां उत्तर । भवदोषावेगळें होइजे ॥ १ ॥ ऐसें श्रीरामाचें चरित्र । धन्य गाती तयांचें वक्त्र । धन्य ऐकोनि घेती त्यांचे श्रोत्रें । परम पवित्र ते नर ॥ २ ॥ श्रीराममुखींची ऐकोनि कथा । बोलता जाहला शर्क्रारिहंता । पुढें नृगरायाची समूळ कथा । ते मजप्रति सांगिजे ॥ ३ ॥ श्रीराम म्हणे लक्ष्मणा । पुढें नृगरायाचे आख्याना । मी सांगतों सावधाना । श्रवणीं अवधारिंजे ॥ ४ ॥ येरीकडे नृगराजभूपती । जाणोनि ब्राह्मणाची शापोक्ती । थोर दुःखी झाला चित्तीं । ब्राह्मणाप्रती न चले कांहीं ॥ ५ ॥ मंत्री पुरोहित नगरजन । थोर थोर बोलावोनि ब्राह्मण । शिल्पकार गृहकर्ते जाण । तेथें तेही बोलाविले ॥ ६ ॥ तयांप्रति नृगभूपती । सांगता झाला विप्रशापोक्ती । यासी कांहीं उपाव न चलती । ऐसें निश्चितीं मज कळलें ॥ ७ ॥ कोणे एके काळीं नारद पर्वत । मम दर्शना आले होते येथ । तिंहीं भय दाखविलें अद्भुत । अधःपात होईल म्हणोनी ॥ ८ ॥ नारद पर्वत दोघे जण । मिथ्या नव्हे त्यांचें वचन । पुनरपि अदृश्य होऊन । त्रैलोक्यीं गमन तिंहीं केलें ॥ ९ ॥ तरी आतां शीघ्रकाळें । शिल्पकारांहातीं विवरें प्रबळें । तीन करावीं शीत उष्ण जळें । पीडा नव्हे जयांमध्यें ॥ १० ॥ शीतकाळीं शीत न वाटे । उष्णकाळीं शीतळ गोमटें । पर्जन्यामाजी जळथेंबुटे । जयामाजी न पडती ॥ ११ ॥ ऐसीं विवरें तीं प्रकारचीं । करावीं शीघ्र तत्काळचीं । सुंदर शोभा बहुत उंची । रत्नवैडूर्यपाचसंयुक्त ॥ १२ ॥ तयांभोंवतें उद्यानें । नाना पुष्पांचे परिमळें भरे गगन । नाना प्रकारचे वृक्ष गहन । तयां भोंवते लावावे ॥ १३ ॥ जंवपर्यंत शापमोचन । तंवपर्यंत सरड होवोन । तया वनीं क्रीडा करीन । सावकाश आनंदें ॥ १४ ॥ तदनंतर वसुपुत्र । अत्यंत धार्मिक पवित्र । तया बोलावोनि मस्तकीं छत्र । धरोनि राज्य तया दिधलें ॥ १५ ॥ अगा ये वसु परियेसीं । प्रजा पाळीं स्वधर्मैसीं । नाहींतरी गति माझिया- ऐसी । पावसील तत्काळ ॥ १६ ॥ प्रत्यक्षासी प्रमाण । मज घडलें शापबंधन । तरी तुवां सावध होवोन । सावचित्त असावें ॥ १७ ॥ मज शाप झाला

१ सरडेपण. २ धनुष्यबाणधारी लक्ष्मणा. ३ सत्वर. ४ ज्याविषयीं. ५ सुंदर. ६ मुख. ७ कान. ८ इंद्रजिताला मारणारा (लक्ष्मण). ९ कारागीर. १० नरकवास. ११ बाग.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

म्हणोन। खेद न करावा आपण। धर्मनीतीचें संरक्षण। सावधान करावें ॥ १८ ॥ माझेविषयींची चिंता। कांहीं न करावी तुवां पुत्रा। सुखदुःखलाभअलाभता। काळाधीन पैं असे ॥ १९ ॥ माझा काळ समीप आला। शीघ्र तुम्ही येथोनि चला। ऐसें म्हणोनि प्रवेशला। गुहाद्वारीं तत्काळ ॥ २० ॥ ऐसें नृगरायाचें कथन। जयासी होय भक्तीनें श्रवण। तो महापातक दारुण। तयापासून मुक्त होय ॥ २१ ॥ एका जनार्दना शरण। झालें नृगरायाचें आख्यान। पुढें निमीचें आख्यान। श्रीरघुनंदन सांगेल ॥ २२ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां नृगराजशापसमयो नाम चतुःपंचाशत्तमोऽध्यायः ॥ ५४ ॥ ओंव्या ॥ २२ ॥

अध्याय पंचावन्नावा

॥ श्रीवेदव्यासाय नमः ॥ मागिले प्रसंगीं नृगकथन। श्रीरामें लक्ष्मणासी सांगोन। पुढें लक्ष्मण कर जोडून। अभिवंदन करिता झाला ॥ १ ॥ स्वामींनीं कथा सांगतां। तृप्ति नव्हे माझिया चित्ता। आश्चर्य वाटे धरणिजा³कांता। पुनरपि कथा ऐकावी ॥ २ ॥ ऐसें लक्ष्मणाचें देखोनि आर्त⁴। पुनरपि जनकजामात। कथा सांगावया उपक्रम⁵ करीत। स्नेहें त्वरित श्रीराम ॥ ३ ॥ पूर्वी राजा इक्ष्वाकुनंदन। तयाचा सुत निमि जाण। अति धर्मिष्ठ प्रजापाळण। बरवेपरी करीतसे ॥ ४ ॥ तयासी झाले बारा पुत्र। तेही पितयासारिखे पवित्र। तयांमध्यें कनिष्ठ गुणवंत। पित्या आवडत बहु⁶साल ॥ ५ ॥ निमि राजा धर्मपरायण। अति पराक्रमी पुरुषार्थी जाण। अमरपुरीसारिखें पाटण। पुत्राकारणें करूं पाहे ॥ ६ ॥ पुत्र वसावयालागून। गौतमाश्रमासमीप नगर जाण। केलें अति शोभायमान। विचित्र वनें भोंवतालीं ॥ ७ ॥ नाना सरोवरें निर्मळ पाणी। माजी दोहीं तीरीं कमळिणी। चक्रवाकें हंसहंसिणी। क्रीडताती जळीं सुखें ॥ ८ ॥ नगरा नाम जयंतपुर। सुशोभित मनोहर। तेथें निमीचा राहिला कुमर। इक्ष्वाकुकुळींचा भूपती ॥ ९ ॥ पितृसंतोषाकारणें। अश्वमेध मांडिला तेणें। पितयाप्रति विचारून। ऋषीश्वरां बोलावूं⁷ पाठविलें ॥ १० ॥ तापसांमाजी मुकुटमणी। ज्ञानियांच्या शिरोरत्नीं। ऐसा वसिष्ठ आत्मज्ञानी। बोलावूनी आणिला ॥ ११ ॥ जयाची छाटी आकाशीं। तपतसे तेजोराशी। रविवंशादिराजयांसी। गुरुत्वें पूज्य जो कां होय ॥ १२ ॥ ऐसा वसिष्ठ महामुनी। बोलाविला यागालागोनी। आणि थोर थोर ब्राह्मण येवोनी। यागाकारणें राहिले ॥ १३ ॥ अत्रि आंगिरस भृगु गौतम। आणिक तपोधन परम। आले जयांचा पराक्रम। तपोबळें आगळा ॥ १४ ॥ वसिष्ठ म्हणे निमीसी। मज आंवंतिलें इंद्रें यागासी। त्याचा याग न्यावया समातीसी। मी जातों राजेंद्रा ॥ १५ ॥ ऐसें वसिष्ठ बोलोन। गेला इंद्राच्या यागालागून। मागें निमीनें गौतमा पाचारून। पूजाविधान मांडिलें ॥ १६ ॥ प्रयोग देवोनि गौतमासी। चालतें केलें यागासी। गौतमें बैसोनि हौत्रासी⁸। आरंभ करिता जाहला ॥ १७ ॥ येरीकडे शचीपतियाग संपवून। सवेंचि वसिष्ठ तपोधन। निमीच्या यागासी येऊन। गौतम हौत्रीं देखिला ॥ १८ ॥ गौतमें करितां हौत्रासी। वसिष्ठ क्रोधला मानसीं। मग म्हणे निमिरायासी। भला झालासी सूर्यवंशीं ॥ १९ ॥ आम्हां करोनि अपमान। आम्ही नसतां याग आरंभून। गौतमासी हौत्र देऊन। भला याग आरंभिला ॥ २० ॥ हिमवंताचे पार्श्वभागीं जाण। नूतन नगरासमीप उद्यानें¹¹। पंच सहस्र वर्षें यज्ञ। करीत असतां तुम्ही वनीं ॥ २१ ॥ मी सूर्यवंशींचा गुरू। माझा करोनि अनादरू। तुम्ही करीतसां अध्वरू⁹। येथें विघ्न होईल ॥ २२ ॥ ऐसें वसिष्ठें कोपेंसीं। शापिलें ते समयीं रायासी। निमि तूं वायुरूप होसी। कित्येक काळपर्यंत ॥ २३ ॥ ऋषीचा शाप झाला जाणोन। राजा बाहेर येवोन। वसिष्ठासी करोनि नमन। बोलता झाला दीनवाणी ॥ २४ ॥ अहो जी स्वामी वसिष्ठमुनी। तुम्ही तापसांमाजी मुकुटमणी। मी होतों निद्रास्थानीं। वृथा शाप दीधला ॥ २५ ॥ यमाचा जैसा दंड। तैसा तुमचा शाप प्रचंड। अन्याय नसतां मजला दृढ। वृथा शाप दीधला ॥ २६ ॥ निमिराजा कोपें-

१ कालाच्या स्वाधीन. २ निमिनामक राजाचें. ३ हे सीतापते (श्रीरामा). ४ इच्छा. ५ आरंभ. ६ अत्यंत. ७ बोलाविलें. ८ यज्ञाधिकार. ९ यज्ञाला. १० जवळ. ११ बगीचा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

करून। वसिष्ठासी शापिता झाला जाण। म्हणे महाऋषि अचेतन। देह धरिसी वसिष्ठा ॥ २७ ॥ परस्परें शाप झाले। ऋषीनें रायासी शापिलें। नृपतीनें ऋषीस कठिण बोलें। शाप दिधला तत्काळ ॥ २८ ॥ दोघे झाले शापाभिभूत। परस्परें झाले विचारित। तंव वसिष्ठें विचारोनि जेथें विधि[1] तांत[2]। आला तेथें सत्वरी ॥ २९ ॥ विधात्यासी करोनि नमन। वसिष्ठ बोले दीनवदन। मज निमीनें शापोन। थोर दुःख दीधलें ॥ ३० ॥ आतां या शापापासून। सुटें ऐसी कृपा करून। मज द्यावें जीवदान। सत्यलोकनायका चतुरानना ॥ ३१ ॥ वसिष्ठाचें ऐकोनि वचन। म्हणता झाला चतुरानन। वसिष्ठा तुवां आपण। मित्रावरुणापासीं जावें ॥ ३२॥ तो मित्रावरुण महाऋषी। तपें अत्यंत तपोराशी। तेथें जावें शीघ्रकाळेंसीं। विलंब न करीं मानसपुत्रा ॥ ३३ ॥ तयाचे तपेंकरून। तूं अयोनि जन्म धरिसी जाण। पुढती पावसी माझें स्थान। सत्य जाण वसिष्ठा ॥ ३४॥ ऐसा वसिष्ठ महाऋषी। धरोनि वायूच्या देहासी। आला मित्रावरुणापासीं। वरुणदेहीं प्रवेशला ॥ ३५ ॥ शापेंकरोन वसिष्ठमुनी। वरुणहृदयीं प्रवेशूनी। तंव येरीकडे उर्वशी समुद्रनंदिनी। वरुणाश्रमा पैं आली ॥ ३६ ॥ वरुणें देखोनि उर्वशीसी। अत्यंत लावण्याची राशी। मदनें[3] भ्रांत होवोनि ऋषी। तियेप्रती बोलता झाला ॥ ३७ ॥ अवो भद्रे चंद्रानने। मज पीडिलें थोर मदनें। तुवां मज आतां देणें। रतिदान ये समयीं ॥ ३८ ॥ उर्वशी म्हणे वरुणासी। मित्रें[4] मज वरिलें परिसा ऋषी। तयासी सांडोनि तुम्हांपासीं। रमतां न ये मज स्वामी ॥ ३९ ॥ मग वरुणें कुंभाप्रती। वीर्य निक्षेपिलें[5] निश्चितीं। तूं येविषयीं चिंता चित्तीं। धरूं नको देवांगने ॥ ४० ॥ ऐसें म्हणोनियां ऋषी। विचारिता झाला उर्वशीसी। वीर्य निक्षेपोनि घटीं तिसी। आज्ञा दिधली जावया ॥ ४१ ॥ तेथें प्रेमेंकरून। झालें जें अमोघ रेतःस्खलन। तें कुंभीं भरून ठेवून। गेली आपण उर्वशी ॥ ४२ ॥ अंगीं झाली भयभीत। शरीर चळचळां कांपत। मित्रापासीं येवोनि तेथ। नमस्कार करिती झाली ॥ ४३ ॥ मित्र म्हणे उर्वशीसी। म्यां वरिलें असतां वरुणापासीं। गेलीस केलें व्यभिचारासी। अति निंद्य कर्मातें ॥ ४४ ॥ तुवां निंद्य कर्म आचरोन। राहसी मजपासीं येवोन। पापिष्ठ तूं मान[6]वीजनन। पावसील शीघ्रकाळें ॥ ४५ ॥ मानवी पुरुष तुजसीं रती। करील उर्वशी जाण निश्चितीं। बुधाचा पुरूरवा नंदन[7] तयाप्रती। साच संग करशील ॥ ४६ ॥ कित्येक काळ काशिराजघरीं। गृहिणी होवोनि विचरसी सुंदरी। ऐसी तूं मृत्युलोकामाझारी। बहुत दिवस राहसील ॥ ४७ ॥ एका जनार्दना शरण। वसिष्ठउर्वशीआख्यान। पुढें गोड निरूपण। जनार्दन वदविता ॥ ४८ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां निमिनृपवसिष्ठशापोक्तिनाम पंचपंचाशत्तमोऽध्यायः ॥ ५५ ॥ ओंव्या ॥ ४८ ॥

अध्याय छप्पन्नावा

॥ श्रीकमलापतये नमः ॥ वसिष्ठनिमीचें कथन। एकोनियां लक्ष्मण। म्हणे कैसें शापमोचन। झालें जी रघुनंदना ॥ १ ॥ श्रीराम म्हणे गा सौमित्रा। पुढील अपूर्व रसाळ कथा। ते सांगेन सावधान श्रोतां। दृढ चित्ता देइंजे ॥ २ ॥ वसिष्ठनिमीचें आख्यान। इतिहास पुरातन। वरुणवीर्य अति दारुण। घटामाजी निक्षेपिलें ॥ ३ ॥ दिवसेंदिवस वाढोन। तयाचा झाला मैत्रावरुण। तयासी अगस्ति ऐसें अभिधान। कुंभोद्भव म्हणती पंडित ॥४॥ आतां निमिरायाची स्थिती। सावधान ऐकें ऊर्मिलाप[11]ती। शाप झाला कैसा मागुती। उःशापातें पावला ॥ ५ ॥ वसिष्ठाचे शापेंकरून। निमीनें देह न सांडितां जाण। आणिक देहीं प्रवेशोन। नयनीं प्राण ठेविले ॥ ६ ॥ वंशाचें करावया हित। काय करी प्रतापवंत। यज्ञ करोनि समस्त। सकळ देवां पूजिलें ॥ ७ ॥ षोडशोपचारीं पूजा। वस्त्रें नानापरींचीं देवोनि वोजा[12]। ब्राह्मण तोषले महाराजा। आशीर्वाद देते झाले ॥ ८ ॥ समस्त ब्राह्मण मिळोन। रायासी झाले सुप्रसन्न। म्हणती मागसी तें देऊं दान। सत्य जाण राजेंद्रा ॥ ९ ॥ ऐसें देवद्विजांचें वचन। ऐकोनि संतोषला राजा

१ ब्रह्मदेव. २ पिता. ३ कामानें पीडित. ४ सूर्यानें. ५ घातलें. ६ मनुष्यजन्म. ७ मुलगा. ८ खरोखर. ९ राहशील. १० नांव. ११ लक्ष्मण. १२ आवडीनें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

जाण । म्हणे प्रसन्न झालेति मी नेत्रीं राहीन । तुम्हां समस्तां जनांचे ॥ १० ॥ देव म्हणती महा बरवें । तुवां नेत्रीं असावें । वायुरूप होवोनि विचरावें । दोहीं डोळ्यांभीतरी ॥ ११ ॥ समस्त देवांचे नेत्रांअंतीं । राहिला तो निमिभूपती । तेणें पातिया पातीं न हालती । हेचि खूण तयांची ॥ १२ ॥ यज्ञींचे देव स्वर्गाप्रती । सुखस्वानंदें वर देवोनि जाती । मागें ऋषीश्वर काय स्थिती । करिते झाले राजदेहातें ॥ १३ ॥ निमिरायाचें देह-मथन । करिते झाले ऋषिब्राह्मण । यज्ञींच्या अरणी[1] आणोन । आयास थोर मांडिला ॥ १४ ॥ मथितां रायाचें शरीर । झालें मिथिलानामें नगर । तदंशें जन्मला जो नृपवर । तयासी जनक बोलिजे ॥ १५ ॥ पूर्वीं देही नव्हता । म्हणोनि विदेही तत्त्वतां[2] । ऐसी लक्ष्मणा झाली कथा । मिथिलेशा जनकाची ॥ १६ ॥ ऐसें रघुनाथाचें शब्दरत्न । ऐकोनि सुमित्रानंदन । थोर विस्मय पावोन । सुखसंपन्न पैं झाला ॥ १७ ॥ लक्ष्मण म्हणे श्रीरामासी । भार्गवें[3]जेत्या कथा सुरसी । ऐकोनि आश्चर्य वाटे मानसीं । पुनरपि श्रवण करावें ॥ १८॥ राजा ऋषि दोघे अशान्त । परस्परें शापूनि पावले अंत । पुनरपि तयांचें जन्म अद्भुत । अति विपरीत पैं झालें ॥ १९ ॥ पुढील कथेचें अनुसंधानें[4] । तें मज सांगावें कृपा करून । लक्ष्मणाचें आर्त[5] देखोन । रघुनंदन बोलता झाला ॥ २० ॥ पूर्वीं नहुषराजा सूर्यवंशी । तयाचा पुत्र ययाति नामेंसीं । प्रजापाळणीं संतोष ज्यासी । गोब्राह्मणांसी कृपा करीत ॥ २१ ॥ दोघी स्त्रिया त्यालागून । अति प्रसिद्धा रूपें गुणेंकरून । तयांचीं नामें सौमित्रा जाण । सावकाशीं अवधारीं ॥ २२ ॥ शर्मिष्ठा नामें ज्येष्ठ पत्नी । वृषपर्व्याची नंदिनी[6] । कनिष्ठ जे देवयानी । दैत्यगुरूची कन्या होय ॥ २३ ॥ ज्येष्ठ शर्मिष्ठेसी झाला पुत्र । पूरु नामें सुंदर गुणवंत । देवयानीसी एक सुत । यदुनामें पैं झाला ॥ २४ ॥ दोघी असती सम-त्सर । ययातीसी शर्मिष्ठा प्रियकर । तिचे दोघे आवडती कुमर । देवयानी नावडे पुत्रेंसीं ॥ २५ ॥ ऐसें यदूनें जाणोन । मातेचा केला अपमान । देवयानीप्रती कर जोडून । यदु पुत्र बोलता झाला ॥ २६ ॥ म्हणे माते अवधारीं । पिता तुझा माझा अपमान करी । तरी मी वांचेंना संसारीं । जीव देईन आपुला ॥ २७ ॥ मी करीन विषपान । अथवा अग्निकाष्ठें भक्षीन । सर्वथा प्राण सांडीन । हें दुःख माझेनि न देखवे ॥ २८ ॥ ऐकोनि पुत्राचें वचन । देवयानी झाली उद्विग्न । तैसीच पितृगृहा येऊन । काय करिती पैं झाली ॥ २९ ॥ ते दैत्य-गुरूची नंदिनी । प्रवेशली पितृभवनीं । संमुख पित्यासी देखोनी । साष्टांग नमन पैं केलें ॥ ३० ॥ अति दीन चिंतातुर । म्लानवदन कृशशरीर । ऐसें देखोनियां शुक्र । कन्येप्रति बोलिला ॥ ३१ ॥ आजि तुझें मुख कोमाइलें । चिंतेचें भरितें हृदयीं दाटलें । शरीर अत्यंत कृश झालें । काय कारणें कन्यके ॥ ३२ ॥ कोणें केला अपमान । तें सांगावें मज विस्तारोन । ऐकोनि पितयाचें वचन । देवयानी बोलिली ॥ ३३ ॥ अहो जी ताता अव-धारीं । माझा अपमान भ्रतार करी । मज हेळसूनि आणिके घरीं । पुत्रासहित दवडिलें ॥ ३४ ॥ माझा न करीच अंगीकार । सवतीही चालवी मत्सर । ऐसें दुःख देवोनि अपार । आम्हां बाहेर घातलें ॥ ३५ ॥ ऐकोनि कन्येचें वचन । भार्गव[8] झाला क्रोधायमान । म्हणे माझ्या कन्येचा अपमान । करोनि शर्मिष्ठा भोगीत ॥ ३६ ॥ तेचि क्षणीं दैत्य-गुरू । कोपें कोपला जैसा रुद्रू[9] । म्हणे सृष्टीचा संहार करूं । कीं समुद्र शोषूं सातही ॥ ३७ ॥ क्रोधें थरथरां कांपत । जेथें होता जामात । तेथें शुक्र येवोनि त्वरित । शाप तत्काळ दीधला ॥ ३८ ॥ अगा ययाति महावीरा । राज्यमदें उन्मत्त झालासी खरा । विषयबुद्धीं भ्रमलासी पुरा । तारुण्येंकरोनि मातलासी ॥ ३९ ॥ नेणसी तूं आपपर । न करिसी स्वहिताचा विचार । ऐसा तूं पावसी जरा शीघ्र । आजीचिये काळीं ॥ ४० ॥ माझ्या कन्येचा करोनि अपमान । ज्येष्ठस्त्रीभोगीं आसक्त मन । तुझ्या तारुण्या होईल हांन[10] । सत्य जाण ये काळीं ॥ ४१ ॥ ऐसें शापोनि जामातासी । शुक्र निघाला स्वभवनासी । आश्वा-सोनि दौहित्रींसी[11] । तये काळीं लक्ष्मणा ॥ ४२ ॥

१ यज्ञांत अग्नि पाडावयाचें पात्रविशेष. २ खरोखर. ३ रामचंद्रा. ४ संबंध. ५ इच्छा. ६ कन्या. ७ उपेक्षा करून. ८ भृगुकुलोत्पन्न शुक्र. ९ शंकर. १० नाश. ११ नातवास.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

रावणारीचें ऐसें वचन । ऐकोनि सुमित्रानंदन । म्हणे स्वामी भार्गवें शापून । निजधामा गमन केलें ॥ ४३ ॥ तदनंतरें श्रीरघुपती । शाप पावोनि ययाती । पुढें काय करिता झाला तें मजप्रती । सविस्तरें सांगावें ॥ ४४ ॥ श्रीराम म्हणे गा लक्ष्मण । पुढील ऐक पां कथन । ययाति जरा पावोन । थोर कष्ट पावला ॥ ४५ ॥ पाचारोनि पुत्रा यदूसी । ययाति म्हणे पुत्रा परियेसीं । जरेनें मी होतों बहुत क्लेशी । ते जरा तूं अंगीकारीं ॥ ४६ ॥ मजसंतोषार्थ हे जरा । तूं अंगीकारीं गा कुमरा । धर्मिष्ठ सज्ञान चतुरा । यया कार्या शीघ्र करावें ॥ ४७ ॥ जरेकरोनि जर्जरीभूत । परी माझें भोगीं आसक्त चित्त । याकारणें तूं गुणवंत । अवश्य जरा अंगीकारीं ॥ ४८ ॥ ययातीचें करुणावचन । ऐकोनि यदु कोपायमान । काय बोलिला तें सावधान । श्रोतीं सादरें श्रवण कीजे ॥ ४९ ॥ राया तुझा आवडता पूरु । तया देईं जराभारु । तयासी यदर्थीं अधिकारु । ज्येष्ठ म्हणोनि राजेंद्रा ॥ ५० ॥ जयावीण न करिसी भोजन । जयावीण न करिसी उदकपान । तो जरा अंगीकारील जाण । जयासी राज्याचा अधिकार ॥ ५१ ॥ विशेषही आवडता । प्राणाहूनि पढियंता । तयासी जरा देईंजे ताता । कांहीं विचारा करूं नको ॥ ५२ ॥ मी कनिष्ठ नावडता पुत्र । मज अधिकार नाहीं येथ । ऐकोनि यदूचा वचनार्थ । थोर क्रोध पावला ॥ ५३ ॥ मग पाचारोनि ज्येष्ठ पुत्र । पूरुनाम गुणवंत । तयासी राजा बोलत । सावचित्त करोनि ॥ ५४ ॥ अगा पूरो महाबाहो वीरा । मजप्रीत्यर्थ अंगीकारीं जरा । तिचेनि धाकें सुरवरां । थोर हडबड होतसे ॥ ५५ ॥ माझें विषयभोगीं मन आसक्त । वियोग होतां दुःखी होत । याकारणें तुवां त्वरित । जरा माझी अंगीकारावी ॥ ५६ ॥ ऐकोनि पितयाचें वचन । कर जोडोनि पूरु करी विनवण । म्हणे स्वामी भाग्य गहन । मजवरी तुष्टलेती ॥ ५७ ॥ म्हणे आजि मी धन्य भाग्याचा । अवश्य करीन अंगीकार जरेचा । पूरुवचन ऐकोनि पुत्र[3] नहुषाचा[3] । काय करिता पैं झाला ॥ ५८ ॥ आपुले शरीराची जरा । पुत्रासी दिधली ते अवसरां । आपण नूतन झाला सौमित्रा । विषयभोगाकारणें ॥ ५९ ॥ नूतन झाला राजा ययाती । नानापरींचे याग[4] विप्रांहातीं । करवीतसे तो नृपती । स्वधर्में पाळी क्षितीतें ॥ ६० ॥ राज्य करी स्वधर्मता । नगरीं नाहीं अधर्मवार्ता । ऐशीं सहस्र वर्षें क्रमिलीं असतां । पुढें अनुताप[6] उपजला ॥ ६१ ॥ विषयीं उदास झालें चित्त । मग पाचारोनि पूरु सुत । तयासी बोले नृपनाथ । माझी जरा मज देईंजे ॥ ६२ ॥ अगा ये पुत्रा गुणवंता । माझी जरा मज दीजे आतां । ते मी अंगीकारीन हितार्था । आपुलियाकारणें ॥ ६३ ॥ विषयीं उदास झालें चित्त । माझी जरा मज दीजे शीघ्रवत[7] । पितृवचन ऐकोनि पूरु सुत । जरा जनकास देता झाला ॥ ६४ ॥ राजा अति संतोषला । पुत्रासी राज्याभिषेक केला । कनिष्ठपुत्रा शाप दिधला । देवयानीच्या आत्मजा ॥ ६५ ॥ माझें वचन अपमानोन । तूं राक्षसी क्षत्रिय होसी दुर्जन । प्रजेचें तुझेनि पाळण । सर्वथा नव्हे पापिष्ठा ॥ ६६ ॥ मी तुझा पिता गुरूसमान । तुवां माझा केला अपमान । तुझे पोटीं यातुधान[9] । कर्कश दारुण जन्मती ॥ ६७ ॥ ऐसा कनिष्ठ पुत्रा शाप देवोन । ज्येष्ठासी राज्यीं स्थापून । आपण तपश्चर्येलागीं जाण । वनप्रयाण पैं केलें ॥ ६८ ॥ वना जावोनि राजऋषी । सर्वेंचि त्यजोनि देहासी । विमानीं आरूढोनि स्वर्गासी । जाता झाला ययाती ॥ ६९ ॥ मागें पूरु धर्मनीतीं । प्रजापाळणीं परम प्रीती । प्रतिष्ठान नामें नगराप्रती । राज्य करिता पैं झाला ॥ ७० ॥ वाराणसीचे[10] पूर्वदिशे । प्रतिष्ठान नामें नगर असे । तेथील राज्य सुखसंतोषें । करिता झाला ययातिपुत्र ॥ ७१ ॥ पुढें कनिष्ठ यदूचें कथन । जो भार्गवात्मजेचा[11] नंदन । पितयाचे शापेंकरून । अतिचिंतातुर पैं झाला ॥ ७२ ॥ शाप झाला दौहित्रासी[12] । ऐसें ऋषीनें जाणोनि मानसीं । शापापासोनि नातवासी । क्षणमात्रें मुक्त केलें ॥ ७३ ॥ क्रौंचवनादि नाना वनीं । यदु क्रीडा करी स्वइच्छेंकरोनी । पुढें काय वर्तलें तें वाल्मीकमुनी । कथा अनुपम्य

१ वृद्धपणानें. २ म्हातारपण. ३ नहुषपुत्र ययाति. ४ यज्ञ. ५ पृथ्वीला. ६ पश्चात्ताप. ७ त्वरित. ८ पुत्राला. ९ राक्षस. १० काशीचे. ११ देवयानीचा. १२ नातवाला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सांगेल ॥ ७४ ॥ यालागीं लक्ष्मणा परम । राजानें न सांडावा राजधर्म । न करितां नृगा शाप दारुण परम । ऋषिशापें सरड झाला ॥ ७५ ॥ एका जनार्दना शरण । ययातीस झालें स्वर्गगमन । पूरूसी देवोनि राज्यासन । पुढें श्रवण करावें ॥ ७६ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां ययातिकथनं नाम षट्पंचाशत्तमोऽध्यायः ॥ ५६ ॥ ओंव्या ॥ ७६ ॥

अध्याय सत्तावन्नावा

॥ श्रीसीताकांताय नमः ॥ श्रीरामचंद्र राजीवनयन । कथा सांगतां लक्ष्मण । थोर आश्चर्य पावलें मन । ब्रह्मानंदें डुल्लत ॥ १ ॥ आधींच कथा रामायणी । जे कां वदला वाल्मीक मुनी । सुरस आणि जगतारिणी । प्रवेशतां श्रवणीं भंव[१]दोष खंडी ॥ २ ॥ ऐसे श्रीरामलक्ष्मण । चर्चा करितां निशी क्रमोन । प्रभात होय रविकिरण । सर्वत्र अवनीं प्रगटले ॥ ३ ॥ दोघे बंधु श्रीरामलक्ष्मण । करोनियां संध्यास्नान । भद्रासनीं[२] येवोनि जाण । राजनीती करिते झाले ॥ ४ ॥ तंव सुमंत प्रधान आला । श्रीरामा नमस्कार केला । म्हणे स्वामी ऋषींचा मेळा । द्वारीं उभा दर्शनार्थी ॥ ५ ॥ यमुनातीरींचे ऋषीश्वर । भार्गवच्यवनादि थोर थोर । तुमचे भेटीलागीं द्वार । धरोनि उभे असती पैं ॥ ६ ॥ ऐकोनि प्रधानाची मात । काय बोलिला काकुत्स्थ[३] । वेगीं पाचारीं गा त्वरित । भार्गवच्यवनादि ऋषींसी ॥ ७ ॥ श्रीरामाज्ञा वंदोनि शिरीं । मग त्या सुमंतें झडकरी । द्वारा येवोनि विनीतोत्तरीं । ऋषीश्वरांप्रति प्रार्थिलें ॥ ८ ॥ सुमंत म्हणे ऋषीश्वर हो । दर्शनाकारणें जानकीनाहो । उद्यत बैसलासे पहा हो । जैसा चंद्रालागीं चकोर ॥ ९ ॥ तरी प्रवेशावें राजभवन । भेटीस तिष्ठे रघुनंदन । ऐसें ऐकोनि सुमंतवचन । ऋषी भवनीं प्रवेशले ॥ १० ॥ ऋषींस देखोनि रघुनंदन । करोनियां अभिवंदन । नानापरींचीं आसनें देवोन । सभेमध्यें बैसविले ॥ ११ ॥ श्रीराम म्हणे जी ऋषी । तुमचे दर्शनें अभीष्ट आम्हांसी । तरी कोण कार्याचे उद्देशीं । तुम्हीं आगमन पैं केलें ॥ १२ ॥ ऐकोनियां श्रीरामवचन । पूर्णकलशीं तोयें पूर्ण । आणि फळें मूळें तूर्ण[४] । श्रीरामासी समर्पिलीं ॥ १३ ॥ ऋषींची देखोनि अति प्रीती । सर्वे अंगीकारूनी धरणिजापती । पुनरपि म्हणे कोण कार्यार्थी । तुमचें आगमन पैं झालें ॥ १४ ॥ मी तुमचा आज्ञाधर । आणि सेवकाचा किंकर । तुमच्या कार्यालागीं अवतार । सूर्यवंशीं धरिलासे ॥ १५ ॥ राज्य आणि सकळ जीवित । हें वेंचीन प्रियकार्यार्थ । माझें वचन मानावें सत्य । कायावाचामानसें ॥ १६ ॥ कोण उत्कंठा असे चित्तीं । ते मज सांगा जी निश्चितीं । मी प्रवर्तेन त्या अर्थीं । तुमचे सेवेलागोनी ॥ १७ ॥ श्रीरामाचें ऐकोनि वचन । म्हणती भला गा धन्य धन्य । तूं सूर्यवंशीं शिखारत्न[९] । शिवहृदयींचें ध्यान तूंचि पैं ॥ १८ ॥ तुज देखोनि श्रीरामा । थोर सुख झालें आम्हां । जैसा चकोर चंद्रम्या । तैसा तूं आम्हां कृपाळु ॥ १९ ॥ बहुत राजे पृथ्वीपती । नानापरींचे धरणीवरी असती । तयांमध्यें तूं श्रेष्ठ श्रीरघुपती । अगाध कीर्ती पैं तुझी ॥ २० ॥ तूं त्रैलोक्याचा ईश्वर । ब्रह्मा तुझा निजकुमर । फेडावया भूमिभार । अवतरलासी श्रीरामा ॥ २१ ॥ तूं जगाचा ईश्वर । सुरकार्यालागीं अवतार । धरोनि फेडिसी धराभार । दशरथकुमर होवोनी ॥ २२ ॥ येथें संदेह नाहीं श्रीरघुपती । कार्य करिसी हें निश्चितीं । ऋषींचें कार्य निरसावयार्थी । तुज असे अधिकार ॥ २३ ॥ ऋषि म्हणती श्रीरामा जाण । कोणे कार्यालागीं ब्राह्मण । आले असती हें विचारून । मग करीन ऐसें वदावें ॥ २४ ॥ न जाणतां कार्याची स्थिती । न म्हणावें करीन श्रीरघुपती । ऐसी असे राजनीती । विनंती यदर्थी[१०] आम्हीं केली ॥ २५ ॥ ऋषींमध्यें भार्गवमुनी । जो अत्यंत सधर्म अनुष्ठानीं । तो ऋषिभय श्रीरामालागोनी । सांगता झाला ते काळीं ॥ २६ ॥ पूर्वी कृतयुगीं जाण । गोळपुत्र ज्येष्ठ मधु नामाभिधान । दैत्यांमध्यें परम पावन । धर्मनिष्ठ अत्यंत ॥ २७ ॥ गायीब्राह्मणां हितकारी । परम

---

१ संसारसंबंधी दोष. २ सिंहासनीं. ३ श्रीराम. ४ कल्याण. ५ उदक. ६ त्वरेनें. ७ सीतापति श्रीराम. ८ खर्वीन. ९ चूडामणि, श्रेष्ठ. १० ज्याबद्दल.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

उदार पृथ्वीवरी । वीर्यसंपन्न दुष्टां संहारी । कृपा करी द्विजदेवां ॥ २८ ॥ ऐसा स्वधर्मनिष्ठ गोळनंदन । मधुनामें प्रसिद्ध जाण । तयासी रुद्र झाला प्रसन्न । अद्भुत वरदान पैं दिधलें ॥ २९ ॥ निजशूळापासोनि जो निश्चित । निर्माण करी शैलजाकांत । परम प्रीतीनें रुद्रें तेथ । तो शूळ तयासी दिधला ॥ ३० ॥ अगा मधु तुझी उत्तम भक्ती । आणि सर्व जीवांसी प्रिय निश्चितीं । ऐसें जाणोनि मी उमापती । प्रसाद शूळ दीधला ॥ ३१ ॥ जंव स्वधर्मे पाळिसी जन । तंवपर्यंत शूळ राहेल जाण । जेव्हां ऋषींसी करिसी विरुद्धपण । तेव्हां शूळ जाईल निजस्थानासी ॥ ३२ ॥ या शूळानें दैत्यवधार्थी । तूं जय पावसी निश्चितीं । जेव्हां तुझी फिरेल मती । तेव्हां शूळ घाता प्रवर्तेल तुझ्या ॥ ३३ ॥ ऐसा रुद्रवर लाहोन । गोळपुत्रें प्रणिपात करून । पुनरपि महादेवाप्रति वचन । बोलता झाला ते काळीं ॥ ३४ ॥ अहो जी महेशा पार्वतीपती । माझ्या वंशा हो शूळप्राप्ती । तुम्ही प्रेमसिंधु सर्वांगीं विभूती । माथां जटाजूट शोभती ॥ ३५ ॥ चंद्रशेखर त्रिपुरदहन । कामांतक वृषभवाहन । पिनाकपाणि त्रिलोचन । पंचवदन परमेश्वर ॥ ३६ ॥ ऐसी तया मधूची स्तुती । ऐकोनियां पशुपती । पुनरपि वदे दैत्याप्रती । तव असेल चित्तीं तें पावसील ॥ ३७ ॥ माझिये वरदेंकरोनि मधु । निश्चित भोगीं तूं सुख आनंदु । तुझिया पुत्रा शूळ शुद्धु । प्राप्त होईल हा जाण ॥ ३८ ॥ ऐसा मधु वर लाहोनें । प्रेमें झाला सुखसंपन्न । पुढील श्रीरामा निरूपण । भार्गवें जाण सांगता झाला ॥ ३९ ॥ ऐकें श्रीरामा धरणिजापती । मधूची कुंभीनसीनामें सती । विश्वावसूची दुहिता निश्चितीं । सुंदर गुणवंत पतिव्रता ॥ ४० ॥ तियेच्या उदरीं लवणासुर । जन्मला अत्यंत पराक्रमी शूर । बाळपणापासोनि कर्में घोर । पापाचार करीतसे ॥ ४१ ॥ पुत्र दुष्टात्मा देखोन । मधूसी चिंता अति गहन । म्हणे हा पापिष्ठ दारुण । वेगीं निधन पावो पैं ॥ ४२ ॥ पुत्रातें म्हणे मधु दैत्य । तूं विचरें वरुणालय जेथ । हा शूळ घेवोनियां त्वरित । मजपासोनि पैं जावें ॥ ४३ ॥ या शूळाचा महिमा अगाध । देवां दैत्यांसीं करितां युद्ध । जवळी शूळ असतां न पाविजे खेद । परी देवां ऋषींस विरुद्ध करूं नये ॥ ४४ ॥ तेणें ऐकोनि पितयाचें वचन । झडकरी शूळ करीं घेवोन जाण । विचरतां दुःख दारुण । देता झाला ऋषींतें ॥ ४५ ॥ तयाचे भयें श्रीरामा । येथवरी येणें झालें आम्हां । तुजवांचोनि तो दुष्टात्मा । वधिला न जाय इतरांसी ॥ ४६ ॥ अनेक पृथ्वीपति असती । तयांचेनि लवणासुर दुष्टमती । वधिला न जाय श्रीरघुपती । आमची भयनिवृत्ती तुवां कीजे ॥ ४७ ॥ रावणाऐसा दुराचारी । तुवां वधिला सहपरिवारीं । तुजपुढें लवण मशकापरी । तुझे दृष्टीनें नुरेल ॥ ४८ ॥ एका जनार्दना शरण । पुढें लवणासुर वधावयालागून । सहपरिवारीं जाईल शत्रुघ्न । सावधान अवधारा ॥ ४९ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां लवणासुराख्यानं नाम सप्तपंचाशत्तमोऽध्यायः ॥ ५७ ॥ ॥ ओंव्या ॥ ॥ ४९ ॥

अध्याय अठ्ठावन्नावा

॥ श्रीजानकीकांताय नमः ॥ श्रीराम म्हणे भार्गवासी । मधूचा पुत्र लवणासुर नामेंसीं । कोण कर्म करी कोठें क्रीडेसीं । कोणे देशीं विचरतसे ॥ १ ॥ ऐकोनि श्रीरामाचें वचन । आनंदयुक्त समस्त जन । तयांत भार्गव समूळ कथन । सांगता होय ते समयीं ॥ २ ॥ लवणासुराची समूळ विवंचना । ऐकें गा पद्माक्षीरमणा । मधुकुळीं जन्मोनि जाणा । नाना प्राणी भक्षितो ॥ ३ ॥ विशेषेंकरोनि तापस । लवणासुर भक्षितो सावकाश । रुद्रकर्म तोचि आचार त्यास । नित्य क्रीडेसी मधुवन ॥ ४ ॥ सहस्रें सहस्र मारोनी । व्याघ्रमृगादिक प्राणी । मानवें भक्षोनि आव्हानी । कर्मक्रिया करीतसे ॥ ५ ॥ जैसा प्रळयकाळींचा काळ । भक्षीतसे जीवजाळें । तैसा लवणासुर केवळ । प्राणिमात्रां अंतक ॥ ६ ॥ ऐसें ऋषींचें मधुर वचन । ऐकोनियां श्रीरघुनंदन । म्हणे स्वामी तपोधन । बहुत दुःख पावले ॥ ७ ॥ लव-

१ शंकर. २ भस्म. ३ जटासमूह. ४ मिळवून. ५ च्यवनभार्गव ऋषि. ६ कन्या. ७ मरण. ८ सीतापते. रामा. ९ तपस्वी मुनि. १० क्रूर कर्म. ११ देवतांस उद्देशून यज्ञ करी. १२ प्राणिसमूह.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

णासुरासी मारीन । मी तंव न लागतां क्षण । तुमचे हृदयींचें दुःख दारुण । निर्दळीन निमेषें एका ॥ ८ ॥ ऐसी प्रतिज्ञा रामें करून । ऋषींसमवेत बंधुजन । बैसले असतां सावधान । सीतारमण बोलता झाला ॥ ९ ॥ कोण मारील लवणासुरासी । ऐसें श्रीराम बोले बंधूंसी । कोणाचा वांटा तें मजपासीं । शीघ्रवत सांगावें ॥ १० ॥ भरत आणि शत्रुघ्न । लक्ष्मण आणि तपोधन । त्यांत श्रीराम ऐसें बोलिल्यावरून । भरत आपण विनविता झाला ॥ ११ ॥ ऐकें नरवीरचूडामणी । ममांश तो दैत्य मधुवनीं । जेणें भक्षिले तापस अनेक प्राणी । तयाचे निर्दळणीं मी असें ॥ १२ ॥ ऐसें भरताचें वचन । ऐकोनि शत्रुघ्न टाकोनि आसन । श्रीरामासंमुख उभा राहोन । विनंति करिता पैं झाला ॥ १३ ॥ तो शत्रुघ्न म्हणाल कैसा । शत्रुनिर्दळणीं सिंह जैसा । जयाचे धाकें वैरिमानसा । धडकी[2] लागे दारुण ॥ १४ ॥ ऐसा शत्रुघ्न वीरपंचानन[3] । बोलता झाला सभा लक्षोन । म्हणे लवणासुर माझा वांटा जाण । तो मज स्वामी देइंजे ॥ १५ ॥ भरतें शून्य नगरी । मागें रक्षिली अयोध्यापुरी । आणि तप करोनि भारी । थोर श्रम पावला ॥ १६ ॥ चीरकृष्णाजिनधर[4] । मस्तकीं वाहे जटाभार । करूनि वनफळांचा आहार । भूमिशयन येणें केलें ॥ १७ ॥ चतुर्दश वर्षेंपर्यंत । नंदिग्रामीं राहिला भरत । अनुभविलें दुःख बहुत । याचा वांटा पावला ॥ १८ ॥ आतां माझा वांटा लवणासुर । तो मज देइंजे सत्वर । ऐसी कृपा करो रघुवीर । मज किंकरांवर[5] ये काळीं ॥ १९ ॥ माझा लाड पुरवावा । मज लवणासुर वांटा द्यावा । ऐसी कृपा करावी राघवा । कृपाळुवा कृपानिधे ॥ २० ॥ मज पाठवावें मधुपुरा । मी मारीन मधुकुमरा । जेणें भक्षिलें मुनिवरां । तयाचा सूड घेईन ॥ २१ ॥ ऐसी शत्रुघ्नाची मधुर गिरा । ऐकोनि सुख श्रीरामचंद्रा । म्हणे ऐक भरतवीरा । तुझा पराक्रम अद्भुत ॥ २२ ॥ तूं मारिसील लवणासुरा । यद्विषयीं[6] निःसंदेह कैकेयीकुमरा[7] । परी पाठवावें शत्रुघ्नवीरा । तयासी हें कृत्य पैं दीजे ॥ २३ ॥ शत्रुघ्नासी लवणासुर । वांटा देइंजे सत्वर । ऐसें बोलोनि श्रीरघुवीर । पुनरपि बोलता पैं झाला ॥ २४ ॥ लवणासुराचें निर्दळण । करील शत्रुघ्न निश्चयें जाण । तेथील शत्रुघ्ना राज्य देईन । मी तोषोन निश्चयेंसीं ॥ २५ ॥ शत्रुघ्नासी राज्य मधुपुरीचें । लवणांतीं देईन साचें । ऐसें मुखकमळ श्रीरामाचें । वदतें झालें ते काळीं ॥ २६ ॥ लवणासुर वधिलियाउपरी । तेथील राज्य शत्रुघ्ना करीं । अति रमणीय मधुपुरी । यमुनातीरीं वसली जे ॥ २७ ॥ जेथील जन पुण्यवंत । नित्य नेमें अनुष्ठान करीत । जयांचें दानीं उदार चित्त । जे संग्रामीं शूर पराक्रमी ॥ २८ ॥ श्रीराम म्हणे शत्रुघ्नासी । असुर वधोनि तेथील राज्यासी । अंगीकारीं माझ्या वचनासी । मान देवोनि ये समयीं ॥ २९ ॥ कनिष्ठें ज्येष्ठवचन । अवश्य करावें शास्त्रप्रमाण । वसिष्ठादि ऋषि पाचारून । तयांसी आज्ञा करिता झाला ॥ ३० ॥ ऐसें रघुनाथ बोलिल्यावरी । मग तो शत्रुघ्न दैत्यारी । श्रीरामाप्रति मंद उत्तरीं । प्रार्थिता झाला ते वेळीं ॥ ३१ ॥ ऐकें नरवीरचूडामणी । राज्य ज्येष्ठ भरतावांचोनी । मज करितां अधर्म जनीं । यशा हानि होईल ॥ ३२ ॥ सोडोनियां ज्येष्ठ बंधु । कनिष्ठा राज्यपट अबद्धु । ऐसें असतां कृपासिंधु । राजा मज करूं नये ॥ ३३ ॥ मी लवणासुरातें वधीन । राज्यीं स्थापावा मांडवीरमण[8] । राज्य मधुपुरीचें भरता आपण । कृपा करोन देइंजे ॥ ३४ ॥ लवणासुर घोरकर्मी । तुमचे आज्ञेनें वधीन संग्रामीं । भरतासी अधिकार राज्यधर्मी । मजलागोनि पैं नाहीं ॥ ३५ ॥ तुमचे आज्ञेसारिखे जन । वर्तताती स्वधर्मैंकरून । तैसेंच मी जैं न करीन । तैं दोष दारुण मज स्वामी ॥ ३६ ॥ शिर सांडोनि धडासी जाण । कोण पूजीतसे रघुनंदन । ऐसें मज करितां परलोक शून्य । सत्य रामा होईल ॥ ३७ ॥ मी स्वामीचा आज्ञाधर । आणि सेवेचा किंकर । परी हें अधर्माचें उत्तर । मज सहावेना नरव्याघ्रा ॥ ३८ ॥ ऐसा शत्रुघ्नवचनानंतरें । कृपाळुवें श्रीरघुवीरें । संतोषोनि भरतलक्ष्मणांसामोरें । आणि ऋषीश्वरां ऐकतां ॥ ३९ ॥ श्रीराम म्हणे भरतासी । वेगीं आणावें सर्व सामग्रीसी । राज्याभिषेक

१ त्वरित. २ भीति. ३ वीरश्रेष्ठ. ४ वल्कल, हरिणाचें कातडें इत्यादि परिधान करणारा. ५ सेवकावर. ६ ज्याविषयीं. ७ भरत. ८ सेवक.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

शत्रुघ्नासी । लवणवधासी मग धाडूं ॥ ४० ॥ पाचारोनि ऋत्विज ब्राह्मण । ऋषि वसिष्ठादि-करून । आणि प्रधान सेवकजन । श्रीरामाज्ञा करिते झाले ॥ ४१ ॥ जाणोनि श्रीरामाज्ञेसी । करिते झाले समारंभासी । जैसें देवीं इंद्रासी । तैसें राम करीतसे ॥ ४२ ॥ इंद्रभवनासमान । सुरुचिर गृहीं प्रवेशोन । शत्रुघ्नासी अभिषिंचन । करिते झाले ते समयीं ॥ ४३ ॥ चंद्रशेखर गंगाधर । स्कंदा[1] अभिषेकी तत्पर । तैसा श्रीराम धरणीधर । अभिषेक केला शत्रुघ्नासी ॥ ४४ ॥ नगरवासी प्रजाजन । आणि पंडित मुनिगण । तिघी माता सुखसंपन्न । थोर संतोष पावल्या ॥ ४५ ॥ नगरस्त्रिया माणि पुरवासी । बहुत झाले अति संतोषी । म्हणती धन्य श्रीराम शत्रुघ्नासी । मधुपुरीचें राज्य देतो ॥ ४६ ॥ ऐसी नगरजनांची वार्ता ऐकोन । मग तो धरणिजांपति[3] आपण । शत्रुघ्नासी अभिषेक करून । वरदबाण देता झाला ॥ ४७ ॥ श्रीराम म्हणे शत्रुघ्नासी । या बाणाचा महिमा परियेसीं । हा शर धरित्या पुरुषासी । सदा यश कल्याण देतसे ॥ ४८ ॥ या बाणें निश्चयेंसीं ज़ाण । करिशील लवणासुराचें हनन । पुरुषव्याघ्रां संदेह न धरून । कार्यसिद्धि करीं वेगीं ॥ ४९ ॥ पूर्वी विधात्यानें हा बाण । निर्मिला दैत्यवधालागून । संग्राम करितां वैरियांसी जाण । अदृश्य बाण लक्षेना ॥ ५० ॥ ब्रह्मदेवें क्रोधेंकरून । करावया दुष्टांचें निर्दळण । प्रतिपाळावया साधुजन । हा शर निर्माण पैं केला ॥ ५१ ॥ या शराचा पराक्रम थोर । येणें मारिले दैत्यदानव दुर्धर । हा शर घेवोनियां सत्वर । मधुपुरीस शत्रुघ्ना जाइंजे ॥ ५२ ॥ पूर्वी रावणवधार्थी । हा शर मोकलिला नाहीं निश्चितीं । अनसूंट[4] असे याची शक्ती । लवणासुरवधार्थी मी देतों ॥ ५३ ॥ तो शर मी तुजप्रती । देतों लवणासुरवधार्थी । आणिकही सांगूं युक्ती । सावधवृत्तीं अवधारीं ॥ ५४ ॥ त्वां जावें मधुपुराबाहेरी । प्रवेशावें ना नगरीं । दुरी राहोनि तो द्विजारी[5] । युद्धालागीं पाचारिंजे ॥ ५५ ॥ तयासी शिवाचें वरदान । शिवें शूळ तया दिधला जाण । तो बळें तापसां कर्दन[6] । शूळ घेवोनियां करीतसे ॥ ५६ ॥ तुवां जावोनि नगरद्वारीं । शर धरोनि युद्धा पाचारीं । अवश्य मरण पावेल वैरी । सत्य जाण शत्रुघ्ना ॥ ५७ ॥ ऐसें करोनि शत्रुघ्ना । जय पावसी नाहीं अनुमाना । श्रीरामें करोनि प्रतिज्ञा । प्रयाण शत्रुघ्ना करविता झाला ॥ ५८ ॥ एका जनार्दना शरण । पुढील रसाळ निरूपण । श्रीरामें गोड रामायण । चरित्र गहन शतकोटी ॥ ५९ ॥ स्वस्ति श्रीभावार्थ-रामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां मधुपुरी-शत्रुघ्नराज्याभिषेको नाम अष्टपंचाशत्तमोऽध्यायः ॥ ५८ ॥ ओंव्या ॥ ५९ ॥

अध्याय एकुणसाठावा

॥ श्रीकोदंडपाणये नमः ॥ मागितले प्रसंगीं शत्रुघ्नासी । अभिषेकोनि मधुपुरीसी । पाठवीतसे लवणासुरासी । वधावयाकारणें ॥ १ ॥ श्रीराम म्हणे शत्रुघ्ना । सवें घेईं असंख्य धना । धान्याचा संग्रह करोनि जाणा । मार्गक्रमणा करावी ॥ २ ॥ अश्व उत्तम अनेक । सवें घेईं असंख्य । रथ कुंजर सेना सेवक । नृत्यकारक तेही नेईं ॥ ३ ॥ जे मार्गीं चालतां श्रमलियासी । गीत विनोद करिती संतोषीं । आप्तवर्गसेवकांसी । धन बहुत पैं द्यावें ॥ ४ ॥ मार्गीं वैरियासी कळों न द्यावें । हळू हळू सैन्य पाठवावें । आपण स्थिर होवोनि जावें । उत्तम मार्ग पाहोनी ॥ ५ ॥ एकाएकीं मधुपुरीसी जाण । धाडी घालोनि आपण । करीं लवणासुराचें निर्दळण । अन्यहस्तें मरण त्यासी नाहीं ॥ ६ ॥ आपण जावोनि मधुपुरीसी । कळों न द्यावें त्या दैत्यासी । एकाएकीं पाचारीं संग्रामासी । सावध मानसीं होवोनि ॥ ७ ॥ जान्हवीचे[8] तीरीं । सेना नेईं बा झडकरी । एक मास मार्ग क्रमोनि वैरी । दुश्चित करोनि मारावा ॥ ८ ॥ वरदबळें तो अति लाठा । तया कळों नेदीं[7] वीरसुभटा । मग एकाएकीं मोक्षपुरीचा वांटा । रणरंगीं लावावा ॥ ९ ॥ ऐकोनियां श्रीरामवचन । शत्रुघ्नें वंदोनि श्रीरामचरण । रघुनाथा करोनि प्रदक्षिण । माता जाण वंदिल्या ॥ १० ॥ सद्गुरु जो कां वसिष्ठ । तयासी

---

१ कार्तिकस्वामीला. २ राजा. ३ श्रीराम. ४ राखून ठेविलेली. ५ ब्राह्मणशत्रु लवणासुर. ६ नाश. ७ बोलावीं. ८ गंगेचे.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वंदोनियां स्पष्ट । लक्ष्मण आणि भरत ज्येष्ठ । तयां नमन पैं केलें ॥ ११ ॥ श्रीरामाज्ञा वंदोनि शिरीं । शत्रुघ्नें तया अवसरीं । प्रयाण करोनि पुरीबाहेरी । सेनासहित उतरला ॥ १२ ॥ तो शत्रुघ्न वीर कैसा । वैरितमनाशनीं सूर्य जैसा । पुढें चालिला धरोनि जयाशा । लवणासुरवधाची ॥ १३ ॥ सन्नद्धें सेना दळभार । सवें सैनिकवीर अपार । तयां पुढें करोनि शत्रुघ्न वीर । मागें आपण चालिला ॥ १४ ॥ सेना करोनि पुढारी । शत्रुघ्नें मार्ग क्रमोनि मासवरी । सवेंचि सत्वर दों दिवसांभीतरीं । मधुपुरीसी येता झाला ॥ १५ ॥ तंव त्या मार्गीं वाल्मीकाश्रम । तेथें आला ज्येष्ठ बंधु जयाचा राम । सवें सेवक आज्ञाधर परम । पराक्रम जयाचा ॥ १६ ॥ ऐसा वीर दाशरथी । वाल्मीकाच्या आश्रमाप्रती । येवोनि ऋषींस विनंती । कर जोडूनि पैं केली ॥ १७ ॥ अगा ये स्वामी वाल्मीकमुनी । तुम्ही परोपकारी जनांलागोनी । तुमच्या दर्शनें कृतार्थ प्राणी । जे यमनियमीं शिणताती ॥ १८ ॥ तुमचे आश्रमीं आजि निशी । क्रमोनि उदयीक प्राचीदिशेसी । जाणें आहे कर्तव्यकार्यासी । म्हणोनि तुमच्या दर्शनें सुखी झालों ॥ १९ ॥ ऐकोनि शत्रुघ्नाचें वचन । सुखावला ऋषि संतोषोन । प्रेमें दिधलें आलिंगन । उल्हासे मन ऋषीचें ॥ २० ॥ ऋषि म्हणे शत्रुघ्नासी । जे जे नृप सूर्यवंशी । तयांचिये वस्तीसी । या आश्रमासी निर्मिलें ॥ २१ ॥ वाल्मीक म्हणे दशरथात्मजा । माझी अंगीकारिजे पूजा । मग अर्पिलीं फळें मूळें वोजा । श्रीरामराजसुखार्थ ॥ २२ ॥ करोनि मुनीचें पूजन । मग बोलता झाला शत्रुघ्न । दोनी करकमळ जोडून । वाल्मीकासी ते काळीं ॥ २३ ॥ पूर्वील यज्ञींच्या विभूती । वाल्मीकमुनि कोठें असती । ऐकोनि वाल्मीक शत्रुघ्नाप्रती । बोलता झाला ते समयीं ॥ २४ ॥ अगा शत्रुघ्ना अवधारीं । सौदासपूर्वीं येथें याग केला नवलपरी । सौदासनामें राजा पृथ्वीवरी । तयाचे पुत्राचें वीर्यजस हो नाम ॥ २५ ॥ वीर्यजस सौदासाचा पुत्र । अति धार्मिक गुणवंत । प्रतापें परवीरा अंत । भुजबळें करी ऐसा ॥ २६ ॥ सौदासपुत्र शौर्यसंपन्न । निघाला पारधीलागून । तंव दोघे राक्षस दारुण । मृग मारितां देखिले ॥ २७ ॥ शार्दूलरूपें राक्षस घोर । देखोनि सौदासपुत्रा क्रोध थोर । त्यांसीं युद्ध करोनि घोर । राक्षस एक मारिला ॥ २८ ॥ मुष्टिघातेंकरोनि जाण । सौदासपुत्रें असुराचा घेतला प्राण । तयाचे साह्यालागोन । दुसरा राक्षस धांविन्नला ॥ २९ ॥ तो राक्षस म्हणे वीर्यजसासी । निरपराधें माझे बंधूसी । मारोनि तूं कोठें जासी । तुझ्या प्राणासी मी घेईन ॥ ३० ॥ माझे बंधूसीं करोनि रण । निरपराधें घेतला प्राण । त्याचा सूड मी घेईन । अवकाशकाळें राजेंद्रा ॥ ३१ ॥ ऐसें राक्षस बोलिल्यावरी । मग सौदासपुत्र नृपकेसरी । येवोनि माझे आश्रमाअरवारीं । अश्वमेध मांडिला ॥ ३२ ॥ अश्वमेध महायज्ञ । आरंभिला वसिष्ठा पाचारून । रायें यज्ञदीक्षा घेवोन । बहु सहस्र वर्षें पैं झालीं ॥ ३३ ॥ यज्ञसमाप्तीचे अंतीं । पूर्व वैर स्मरोनि राक्षस निश्चितीं । येता झाला वसिष्ठरूपाची बुंथी । घेवोनियां ते काळीं ॥ ३४ ॥ वसिष्ठाचें रूप धरोन । आला राक्षस कपटी जाण । रायासी म्हणता झाला आपण । मांसभोजन मज दीजे ॥ ३५ ॥ यज्ञसमाप्तीचे अंतीं । मांसभोजनें मज करीं तृप्ती । ऐसें वचन ऐकोनि नृपती । पाककर्त्या आज्ञा केली ॥ ३६ ॥ आजि वसिष्ठतृप्त्यर्थीं । करीं मांसाची पाकनिष्पत्ती । येरें आज्ञा वंदोनि शीघ्रगतीं । विचार करिता पैं झाला ॥ ३७ ॥ येरीकडे राक्षस मायावी जाण । भाणवसां गेला नरमांस घेऊन । सवेग पाकनिष्पत्ति करून । रायाजवळी देता झाला ॥ ३८ ॥ अहो जी राया मांस मिष्टान्न । याचा स्वाद अति गहन । वसिष्ठा देवोनि तृप्तिभोजन । आशीर्वचन पैं घ्यावें ॥ ३९ ॥ ऐसें करोनि रजनीचर । सवेंचि प्रवेशला वन घोर । येरीकडे नृपें सत्वर । वसिष्ठा भोजना पाचारिलें ॥ ४० ॥ वसिष्ठासी करोनि आदर । भोजनीं बैसवी नृपवर । ऋषीनें जाणोनि नरमांसविचार । रायासी शापिता पैं झाला ॥ ४१ ॥ सक्रोध उचंबळोनी । म्हणे भला रे राया मजलागूनी । नरमांस देतोसी भोजनीं । म्हणोनि शाप दीधला ॥ ४२ ॥ मज करविसी नरमांस-

१ शत्रुरूप अंधकार नाहींसा करण्याविषयीं. २ तयार. ३ पूर्वदिशेला. ४ आवडीनें. ५ यज्ञ. ६ व्याघ्ररूपानें. ७ आश्रमासमीप. ८ बोलावून. ९ सोंग. १० कपटी. ११ पाकशाळेंत.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

भोजन । तो तूं होसी मांसभक्षक जाण । ऐसा रायें शाप ऐकोन । स्त्रियेसहित विनविता झाला ॥ ४३ ॥ म्हणे स्वामी वसिष्ठमुनी । तुमचे आज्ञे-करूनी । मांस मागीतलें म्हणोनी । ब्रह्मऋषे म्यां दीधलें ॥ ४४ ॥ ऐकोनि रायाचें विनीत वचन । क्षण एक वसिष्ठ धरोनि ध्यान । कळों सरलें राक्षस मायावी येऊन । येवढें विंदान पैं केलें ॥ ४५ ॥ तंव वसिष्ठ म्हणे रायासी । द्वादश वर्षें क्रमिलिया शापासी । निंष्कृति होईल तुझ्या देहासी । आनंदातें पावसील ॥ ४६ ॥ पूर्वील शापास्तव कर्म जाण । तयाची तुज न होईल आठवण । शापापासोनि राया सुटोन । प्रजापाळण स्वधर्मं करिसी ॥ ४७ ॥ ऐसा वसिष्ठशापें भूपती । शाप पावला शत्रुघ्ना तुजप्रती । म्यां कथा सांगितली संकळितीं । तयाचें पैं हें यज्ञस्थळ ॥ ४८ ॥ माझ्या आश्रमासमीप जाण । येथें करीत होता यज्ञ । तंव तो राक्षस येऊन । विघ्न केलें शेवटीं ॥ ४९ ॥ ऐसा वीर दाशरथी । कथा ऐकोनि सुखावला चित्तीं । सर्वेंचि अस्ता गेला गभस्ती । निशाप्राप्ती पैं झाली ॥ ५० ॥ पर्णशाळेसी शत्रुघ्न । केलें असतां सुखें शयन । प्रहरद्वय शर्वरी क्रमिल्या जाण । तंव वाल्मीकाश्रमीं नवल झालें ॥ ५१ ॥ सीता होती गर्भवती । तियेसी झाली प्रसूती । पुत्रद्वय उपजले राती । बाळचंद्रासारिखे ॥ ५२ ॥ ऋषिपुत्रें मिळोनि जाण । वाल्मीकासी जाणवून । तंव सत्वर वाल्मीकें येऊन । जातकर्म करिता झाला ॥ ५३ ॥ वाल्मीकें कुश घेवोन । जातकर्मातें करोन । पहिल्या पुत्रा नामाभिधान । कुश ऐसें ठेविलें ॥ ५४ ॥ दुसऱ्या नाम लव ऐसें । ठेविलें ऋषीं परमपुरुषें । वर देता झाला तुमचीं यशें । भुवनत्रयीं विकासती ॥ ५५ ॥ रक्षा करोनि बाळकांसी । सर्वेंचि जाणविलें शत्रुघ्नासी । येरें येवोनि उल्हासेंसीं । बाळकांसी पाहिलें ॥ ५६ ॥ तेथें क्रमोनियां निशी । उदय होतां गरुडाग्रजासी । पूर्वाण्हिकें करोनि वाल्मीकासी । नमस्कारोनि निघाला ॥ ५७ ॥ तो शत्रुघ्न यमुनातीरीं । सप्त रात्री क्रमोनि मार्गीं । ऋषिआश्रमीं तया प्रसंगीं । हळू हळू काळ क्रमीतसे ॥ ५८ ॥ तंव देखिला च्यवनाश्रम । अति रमणीय पावन परम । तेथें वसती ऋषिसत्तम । तपोधन तेजस्वी ॥ ५९ ॥ च्यवनाश्रमीं करोनि वस्ती । ऋषींस नमन साष्टांगें करी विनंती । लवणासुराची बळशक्ती । मजप्रती सांगावी ॥ ६० ॥ ऐकोनि दाशरथीचें वचन । बोलता झाला ऋषि च्यवन । म्हणे शत्रुघ्ना सावधान । लवणाख्यान अवधारीं ॥ ६१ ॥ तेणें शूळबळेंकरून । मारिले ऋषि तपोधन । निवटिले राक्षस दारुण । प्राणिजन पीडिले ॥ ६२ ॥ पूर्वी अयोध्यानगरीचे ठायीं । इक्ष्वाकुकुळींचा युवनाश्व पाहीं । तयाचा पुत्र मांधाता लोकत्रयीं । विख्यात अति प्रसिद्ध ॥ ६३ ॥ तेणें पृथ्वी वश करून । राज्य करिता झाला आपण । कोणे एके काळीं स्वर्गा गमन । सुरलोक घ्यावया निघाला ॥ ६४ ॥ सर्व सेना असंख्य वीर । कोट्यनुकोटी कुंजर । अगणित घेतले रहंवर । इंद्रलोकअभिलाषार्थ ॥ ६५ ॥ शचीपतीचें राज्य घेईन । ऐसी उत्कंठा मनीं धरून । पातला अमरावतीसी जाण । इंद्रासनीं बैसावया ॥ ६६ ॥ तें पाकशासनें जाणोन । बुद्ध्याच मांधात्या प्रतिवचन । बोलता झाला गुणसंपन्न । सावकाश अवधारा ॥ ६७ ॥ अहो जी रविवंशनृपती । तुमची मृत्युलोकीं वस्ती । तें वश न करितां स्वर्गाप्रती । काय कारणें आलांती ॥ ६८ ॥ आधीं मृत्युलोक वश करून । मग घ्यावें सुरसदन । ऐसें ऐकोनि मांधाता जाण । क्रोधें संपूर्ण खवळला ॥ ६९ ॥ म्हणे अगा ये शचीपती । मज कोण वश नाहीं नृपती । तें मज सांगें गा शीघ्रगतीं । नाहीं तरी दंड करीन ॥ ७० ॥ इंद्र म्हणे लवणासुर । जेणें बळकाविलें मधुपुर । तुमच्या देशासमीप नगर । त्यासीं कांहीं न चले तुमचें ॥ ७१ ॥ तो नाहीं तुमच्या आधीन । तो न जिंतितां इच्छितां स्वर्गभुवन । तंव मांधाता लज्जायमान । होवोनि समौन तटस्थ ॥ ७२ ॥ लवणासुराचे शिक्षेसी । मांधाता धाडी दूतांसी । असुरें भक्षिलें तयांसी । ऐकोनि क्रोधासी मांधाता चढला ॥ ७३ ॥ तैसाचि उठोनि सूर्यवंशी वीर । प्रवेशता झाला मधुपुर । युद्धा पाचारोनि लवणासुर । संग्राम घोर मांडिला ॥ ७४ ॥ मांधाता आणि लवणासुर । संग्राम

१ मुक्तता. २ थोडक्यांत. ३ सूर्य. ४ रात्र. ५ संस्कार, ६ दर्भ, ७ रक्षणाचा उपाय, ८ अरुणाला. ९ पहिल्या प्रहरांतील कर्तव्य. १० हत्ती. ११ रथ. १२ इंद्रानें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

करिते झाले घोर । लवणें शूळ टाकोनि सत्वर । मांधाता जीवें मारिला ॥ ७५ ॥ राजा निवटिला रणीं । सैन्य पडिलें रणमेदिनीं । लवणासुर विजयी होवोनी । मधुपुरीसी प्रवेशला ॥ ७६ ॥ शत्रुघ्ना शूळेंकरून । तेणें मारिले वीर दारुण । आतांच युद्धालागीं जाण । मधुपुरीसी नव जावें ॥ ७७ ॥ शूळ नाहीं लवणकरीं । ऐसें जाणोनि युद्धा पाचारीं । मग तया जिंतोनि विजयकरीं । गुढी उभवीं राजकुमरा ॥ ७८ ॥ रुद्रहस्तींचा शूळ कठोर । मधूनें प्रसन्न केला कर्पूरगौर[1] । तयाचा शूळ आणि वर । प्राप्त झाला मधूसी ॥ ७९ ॥ तो शूळ मधूनें लवणासुरातें । दिधला शत्रुघ्ना निश्चितें । त्याचा मृत्यु तुझेनि हातें । जाण उदयिक होईल ॥ ८० ॥ शत्रुघ्नें तेथें क्रमोनि निशी[2] । उदय होतां गभस्तीसी[3] । नमस्कारोनि च्यवनासी । प्रयाण करिता पैं झाला ॥ ८१ ॥ जे उतरोनि यमुनातीर । मार्गीं चालतां शत्रुघ्न वीर । लोटले जी दोन प्रहर । ते समयीं मधुपुर पावला ॥ ८२ ॥ मग येवोनि नगरद्वारीं । शस्त्रेंसीं शत्रुघ्न ते अवसरीं । तिष्ठत राहिल्याउपरी । येरीकडे काय वर्तलें ॥ ८३ ॥ मधुपुत्रें काय केलें । प्रातःकाळीं उठोन वन सेविलें । पारधी खेळतां मारिले चितळे । मृग व्याघ्र असंख्यात ॥ ८४ ॥ मारोनि श्वापदांच्या थाटी । वनीं भक्षी उठाउठीं । कित्येकांचा भारा बांधोनि पाठीं । नगरा उजु मुरडला ॥ ८५ ॥ रुधिरें डवरिला असुर । जैसा सेंदुराचा गिरिवर । खांदीं कावडी सजीव क्रूर । मारोनि मांस घेतलेंसे ॥ ८६ ॥ जैसा काळ प्रळयकाळीं । जीवमात्राची करी रांगोळी । होट[4] न लावितां सगळेंचि गिळी । चाटी अँवाळी पुनरपि ॥ ८७ ॥ ऐसा राक्षस महाक्रूर । खांदीं मांस चिथळत रुधिर । प्रवेशतां नगरद्वार । तंव शत्रुघ्नें देखिला ॥ ८८ ॥ जैसा कुठारें[5] धरोनि करीं । उभ्या पादपाची[6] करी कांडोरी । तैसा लवण राक्षसारी[7] । देखता झाला ते समयीं ॥ ८९ ॥ लवण म्हणे धनुर्धरा[8] । अनेक शस्त्रांचा करोनि भारा । उभा राहिलासी चतुरा । आपुले वृत्तान्ता सांगावें ॥ ९० ॥ म्यां भक्षिले अनेक प्राणी । न सांगतां गिळीन तुजलागोनी । अगा नराधमा झडकरोनी । आपला समाचार सांगावा ॥ ९१ ॥ शत्रुघ्न ऐकोनि राक्षसवचन । बोलता झाला वीरपंचानन । म्हणे राक्षसा तुझा घ्यावया प्राण । मी आलों जाण दशरथात्मज ॥ ९२ ॥ जेणें मारिले रावण कुंभकर्ण । राज्यीं स्थापिला बिभीषण । तो श्रीराम माझा अग्रज[9] जाण । मी तुझा प्राण घेऊं आलों ॥ ९३ ॥ शत्रुघ्न नाम पैं माझें । आलों असें युद्धाचे व्याजें[10] । तुवां थांबोनि युद्ध कीजे । आंतें[11] पुरविजे पैं माझें ॥ ९४ ॥ शत्रुघ्नाचें कठिन वचन । ऐकोनि हांसे राक्षस जाण । म्हणे माझा मातुळ रावण । मजसीं युद्ध करूं न शके ॥ ९५ ॥ त्या रावणासी रामें मारिलें । हें अपूर्व श्रवणीं ऐकिलें । क्रोधाचें भरितें असे दाटलें । तयाच्या वधाकारणें ॥ ९६ ॥ तरी प्रथम तुझा वध करणें । मग श्रीरामासी मारणें । मातुळाचा सूड घेणें । दिनकरवंश निर्दाळूनी ॥ ९७ ॥ तरी तिष्ठत राहें क्षणभरी । मी शस्त्रें आणीन तंववरी । येरू म्हणे सांपडल्या वैरी । हातींचा कैसा सोडावा ॥ ९८ ॥ आतां कैसा जासी मजपासून । निमेषें[12] एका घेईन प्राण । ऐसें शत्रुघ्नें बोलोन । बाण गुणीं चढविला ॥ ९९ ॥ तुवां मारिले ऋषीश्वर । तापस भक्षिले अपार । त्याचा सूड घ्यावया शत्रुघ्नवीर । जाण निर्धार आलासे ॥ १०० ॥ तुज मारोनियां जाण । सुखी करावे मुनिजन । मग येथील राज्यासन । रघुनंदन मज देईल ॥ १ ॥ एका जनार्दना शरण । पुढिले प्रसंगीं लवणमरण । तेणें देव सुखी होतील जाण । आणि तपोधन[13] सुखावती ॥ १०२ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां शत्रुघ्नलवणपुरीप्रवेशो नाम नवपंचाशत्तमोऽध्यायः ॥ ५९ ॥ ओंव्या ॥ ॥ १०२ ॥

अध्याय साठावा

॥ श्रीअहल्योद्धारणाय नमः ॥ दाशरथि युद्धा प्रवर्तला । हें देखोनि लवण क्रोधें उचंबळला । दंतदाढा रगडूं लागला । हात चुरी कडकडां

---

१ कर्पूराप्रमाणें शुभ्रवर्ण (शंकर). २ रात्र. ३ सूर्याला. ४ ओंठ, जबडा. ५ कुऱ्हाड. ६ वृक्षाची. ७ शत्रुघ्न. ८ वीरश्रेष्ठ. ९ वडील बंधु. १० निमित्तानें. ११ आवड. १२ क्षणांत. १३ तपस्वी. १४ क्रोधानें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

करूनी ॥ १ ॥ लवणासुर म्हणे शत्रुघ्नासी । आतां मजपासोनि कोठें जासी । कोणे मायेचे पोटीं रिघसी । केउता पळसी मंदबुद्धि ॥ २ ॥ द्विजारीचें ऐकोनि वचन । मग तो दाशरथि वीर दारुण । काय करिता झाला आपण । शत्रुघ्न लक्षोनि ते काळीं ॥ ३ ॥ माझ्या भुजांचा पराक्रम गहन । आणि वज्रासारिखा बाण । घायें तुझा घेईन प्राण । तंव राक्षसें ताळ घेतला ॥ ४ ॥ तो टाकिला शत्रुघ्नावरी । ताळ येतां देखोनि अंबरीं । दाशरथी वीर धनुर्धारी । बाणें शतखंड वृक्ष केला ॥ ५ ॥ सवेंचि दुसरा पादप घेतला । शत्रुघ्नावरी टाकिता झाला । अकस्मात येवोनि उरीं बैसला । वीर पडला मूर्च्छित ॥ ६ ॥ बाणें खंडन जंव करी । तंव वृक्ष आदळला उरीं । शत्रुघ्न पडोनि धरणीवरी । नावेक मूर्च्छेनें दाटला ॥ ७ ॥ शत्रुघ्न पडतांचि मूर्च्छित । देव झाले हाहाभूत । ऋषीश्वर चळचळ कांपत । म्हणती कोण पुरुषार्थ राक्षसाचा ॥ ८ ॥ शत्रुघ्नासारिखा वीर रणीं । मूर्च्छित पाडिला रणमेदिनीं । राक्षस विजयी होवोनी । गर्जोनि उभा ठाकला ॥ ९ ॥ राक्षस म्हणे शस्त्रायुधाचें । प्रयोजन नाहीं येथें साचें । मनुष्यमात्र आहार आमुचें । तयावरी शस्त्र कायसें ॥ १० ॥ शत्रुघ्न मूर्च्छित देखोन । राक्षस आनंदला । गहन ऐसें निमेष एक क्रमिलें जाण । वीर रामानुज ऊठिला ॥ ११ ॥ तदनंतरें दिव्य अमोघ शर । करीं घेवोनि शत्रुघ्न वीर । त्या शराचे तेजें अंबर । देदीप्यमान होऊनि ठेलें ॥ १२ ॥ वज्रासारिखें मुख जाण । वज्राहूनि वेग गहन । मेरुमांदारासारिखा कठिन । समरीं वैरी निर्दळीतसे ॥ १३ ॥ शराअंगीं अहिप्रियलेपन । शशीऐसें शोभे वदन । वरी रावणारीचें झळकत नाम । तेणें व्योम लखलखित ॥ १४ ॥ काळदंडासमान शर । तेणें शशिसूर्य भयातुर । गगनीं नक्षत्रें ग्रह क्रूर । धाकें थरथर कांपती ॥ १५ ॥ बाणाची ध्वनि अति गाढी । धरणी गेली तिरढोविरढी । कूर्माची पाठी तडाडी । वृक्षपानझडी तेणें झाली ॥ १६ ॥ देखोनियां सर्व जीवजंत । धाकें हाहाकार करीत । सिद्ध चारण महानुभाव संत । अप्सरा कांपत चळचळीं ॥ १७ ॥ ऐसे सकळही देव मिळोन । तिहीं प्रार्थिला चतुरानन । बोलते झाले भय दारुण । युगांतासारिखें ओढवलें ॥ १८ ॥ आजि होईल प्रळयकाळ । ऐसें ओढवलें जगड्व्याळ । पूर्वीं ऐसें भय सबळ । देखिलें नाहीं पितामहा ॥ १९ ॥ ऐकोनि तयांचें वचन । बोलता झाला चतुरानन । ऐका समस्तही मिळोन । सावधान मानसीं ॥ २० ॥ लवणासुरवधाकारणें । ठाण मांडोनि शत्रुघ्नें । गुणीं शर चढविला तेणें । सकळांचीं मनें भ्रांत झालीं ॥ २१ ॥ लवणासुरवधीं तुम्हांसी सुख । देईल दाशरथी वीर देखा । यालागीं मिळोनि सकळिक । सावधवृत्तीं रहावें ॥ २२ ॥ सकळां देवांसहित । ब्रह्मदेव आला तेथ । जेथें दाशरथी वीर चढवोनि सीतं । ठाण माहेश्वरी मांडिलें ॥ २३ ॥ आकर्ण ओढोनि कानाडी । बाण सोडिला कडाडीं । जावोनि लवणासुराचे हृदयपरवडी । भेदोनि रसातळ प्रवेशला ॥ २४ ॥ सवेंचि येवोनियां बाण । शत्रुघ्नभातां प्रवेशला जाण । येरीकडे हृदय विदारून । दैत्य भूमीं पडियेला ॥ २५ ॥ दैत्य पडतांचि भूमीवरी । स्वर्गीहूनियां सुरवरीं । पुष्पवृष्टि करोनि ते अवसरीं । गंधर्वीं नृत्य आरंभिलें ॥ २६ ॥ अप्सरा नाचती उल्हासें थोर । ऋषींचें फिटलें भयशार । त्रैलोक्यीं आनंदगजर । जयजयकार पैं केला ॥ २७ ॥ येरीकडे लवणाचा शूळ । प्रवेशता झाला गगनमंडळ । क्रमोनि लोकालोक प्रबळ । कैलासासी पैं गेला ॥ २८ ॥ सकळ सुरवरां देखत । शूळ प्रवेशला जेथें पार्वतीकांत । श्रीरामानुज विजयान्वित । उल्हास अद्भुत सैन्या झाला ॥ २९ ॥ हर्षें वांटिती साखर । आनंदें नाचती ऋषीश्वर । एक पडतां लवणासुर । त्रैलोक्यीं जयजयकार पैं झाला ॥ ३० ॥ लवणासुर रणीं पडिला । वीरीं देवीं कैसा देखिला । पर्वतकडा लोटला । कीं उन्मळिला तरुवर ॥ ३१ ॥ माथां केश बाबरझोटी । भयानक रूप रुधिर वाहे सृष्टीं । देखोनि देवांच्या झांकल्या दृष्टी । भ्यासुर मोठी तनु त्याची ॥ ३२ ॥ सकळ मिळोनि सुरवर । बोलते झाले शत्रुघ्नासमोर । म्हणती आश्चर्य

१ कोठें. २ तालवृक्ष. ३ वृक्ष. ४ क्षणभर. ५ चंदनाची उटी. ६ रामाचें. ७ डळमळून. ८ देवयोनिविशेष. ९ धनुष्याचे दोरीवर. १० शिवाचें. ११ छातीमध्यें. १२ भयकंप. १३ शरीर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

देखिलें थोर । आजिचे पैं समरांगणीं ॥ ३३ ॥ भाग्येंकरोनि लवणासुर । तुवां निवटिला दुर्धर । आजि आमचें पुण्य थोर । राक्षस घोर मारिला ॥ ३४ ॥ इंद्रासहित सुरगण । आम्ही सकळही सुप्रसन्न । तुज देतों वरदान । महाबाहो राघवानुजा ॥ ३५ ॥ विजयी होईं सर्वां ठायीं । शत्रुदमनीं शक्ति घोर पाहीं । देवांचें वचन ऐकोनि ते समयीं । दाशरथी बोलता झाला ॥ ३६ ॥ हेचि मधुपुरी नगरी । अति रमणीय यमुनातीरीं । दैत्यें उद्वस[1] करोनि बहुत काळवरी । मनुष्यें भक्षोनि राहिला ॥ ३७ ॥ आतां वसे हें नगर । ऐसी कृपा करोनि सत्वर । मजही रहावया तुम्ही वर । दिधला पाहिजे स्वामी हो ॥ ३८ ॥ राघवानुं[3]जाचें ऐकोनि वचन । ऋषी संतोषले जाण । बरवें म्हणोनि वरदान । देते झाले ते समयीं ॥ ३९ ॥ जे जे हृदयींची उत्कंठा[4] । ते ते पावसी नरश्रेष्ठा । तुवां राक्षसां दिधला देशवटा । उपकार मोठा तुवां केला ॥ ४० ॥ सर्व सेनेसहवर्तमान । तूं प्रवेशें राजभवन । देवां द्विजांचें करीं पाळण । सुखसंपन्न होउनी ॥ ४१ ॥ ऐसें वदोनि शत्रुघ्नासी । देव निघाले स्वर्गासी । मागें लवणारीनें[3] सर्व सैन्यासीं । प्रवेश केला नगरीं त्या ॥ ४२ ॥ नगरीं प्रवेशला शत्रुघ्न । वधिला लवणासुर दारुण । हें ऐकोनि देशांतरींचे जन । गेले होते ते आले ॥ ४३ ॥ लोकांसी देवोनियां अभय । मग तो दशरथतनय । गृहमंदिरें उभवोनि सुवर्णमय । ब्राह्मणांसी देता झाला ॥ ४४ ॥ लवणासुराचें जें वसतिस्थान । तें शत्रुघ्नें केलें नूतन । हाट[5] हटवटिया[6] बिंदी जाण । वाणी व्यवहारी सधन राहिले ॥ ४५ ॥ चहूं वर्णांचे लोक । चौं वेदांचे वेदपाठक । चहूं आश्रमांचे जन अनेक । वस्तिसुख पावते झाले ॥ ४६ ॥ नगराभोंवतीं उद्यानें[7] । नानापरींचीं पुष्पें वनें । आम्रवनें मधुवनें । नारिकेळीवनें असंख्य ॥ ४७ ॥ रंभा[8] आणि द्राक्षामंडप । जांबळी खर्जूरी चंपक । फणस आंवळी कपित्थक । वट अशोक अगणित ॥ ४८ ॥ ऐसिये रम्य नगरीं । स्वधर्में राघवानुज राज्य करी । द्वादश वर्षें लागतां अंतरीं । रघुनाथभेटी इच्छिता झाला ॥ ४९ ॥ अयोध्या सोडोनि आपणास । क्रमिलीं येथें वर्षें एकादश । बारावें प्रवर्तलें अग्रजभेटीस । जाऊं आतां येथोनी ॥ ५० ॥ ऐसा करोनि निश्चय । काय करी कैकेयीतनय । कितेक सेना घेवोनि जो कौसल्यातनय । तयाचे भेटी निघाला ॥ ५१ ॥ उर्वरितें[9] जें सैन्य । तें मधुपुरीस ठेवोनि रक्षण । आपण निघाला भेटीलागून । श्रीरामाचे ते काळीं ॥ ५२ ॥ तदनंतरें तो लवणारी । चालिला जेथ श्रीराम पाळीत पुरी । बारा वर्षें प्रवर्तल्यानंतरीं । थोर उत्साहें निघाला ॥ ५३ ॥ सवें घेवोनि अल्प सैन्य । अल्प अश्व अल्प सेवकजन । अल्प सवें घेवोनि वारणें[10] । किंचित रथ घेतले ॥ ५४ ॥ अल्प सैन्येंसहित । दाशरथी मार्ग क्रमीत । तंव वाल्मीकाश्रम अकस्मात । देखिला मार्गीं ते समयीं ॥ ५५ ॥ ऋषिआश्रम देखोन । संतोषला दशरथनंदन । प्रवेशला वाल्मीकभवन । तयाचिया दर्शना ॥ ५६ ॥ वाल्मीका करोनि नमस्कार । तद्दिनीं[11] तेथें होवोनि स्थिर । मुनीची पूजा घेवोनि नृपवर । स्वस्थासनीं बैसला ॥ ५७ ॥ तया समयीं वाल्मीकमुनी । कथा सांगता झाला दाशरथीलागुनी । शत सहस्त्र अगणित वाणी । श्रीरामाचीं चरित्रें ॥ ५८ ॥ वाल्मीय म्हणे दाशरथीसी । त्वां वधिलें लवणासुरासी । हें ऐकोनि संतोष मानसीं । बहुसाल मज झाला ॥ ५९ ॥ मधुवनीं तो लवणासुर । वसतां भक्षिले प्राणी अपार । विशेषें भक्षिलें ऋषीश्वर । तो त्वां सहज निर्दळिला ॥ ६० ॥ जगत्त्रयाचें भय नाशिलें । लवणासुरा वधोनि सुखी केलें । युद्ध करितां त्यां देखिलें । इंद्रापासीं बैसोनी ॥ ६१ ॥ संतुष्टलों तुझिया गुणां । म्हणोनि मूर्धि[12] अवघ्राणोनि[13] जाणा । इतुकें बोलोनि फळें नाना । विचित्रें आणिलीं ते काळीं ॥ ६२ ॥ नानापरींचीं शत्रुघ्नासी । फळें अर्पोनियां ऋषी । मग आरंभिलें गायनासी । ते समयीं गायकीं ॥ ६३ ॥ वीणा मृदंग टाळ मोहरी[14] । वाद्यें वाजताती नानापरी । श्रीरामचरित्रें ते अवसरीं । गाते झाले गंधर्व ॥ ६४ ॥ अयोध्येहूनि केलें प्रयाण । श्रीरामें वनवास सेविला

१ शत्रूचा नाश करण्याकरितां. २ ओसाड. ३ शत्रुघ्नानें. ४ इच्छा. ५ बाजार. ६ रस्ते. ७ बगीचे. ८ केळी. ९ शिलक उरलेलें. १० हत्ती. ११ त्या दिवशीं. १२ मस्तकाचे ठिकाणीं. १३ हुंगून. १४ वाद्यविशेष.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

जाण। तेथोन वधूनि रावण । जानकी घेवोन अयोध्ये आला ॥ ६५॥ ऐसें श्रीरामाचें चरित्र। ऐकोनि शत्रुघ्न मूर्च्छागत। क्षणैक होवोनि साव-चित्त। पुनरपि ऐकत पैं ठेला ॥ ६६ ॥ श्रीरामाचें चरित्र पावन । कोटि ब्रह्महत्या करी दहन। ऐसें ऐकतेक्षणीं प्रेम। शत्रुघ्नासी दाटलें ॥ ६७ ॥ सर्वे सैनिक वीर होते। तयांसी प्रेम दाटलें तेथें। प्रेमें अवघे झाले नाचते। श्रीरामचरित्र ऐकोनी ॥ ६८ ॥ रावणारीचें चरित्र ऐकोन। प्रेमें वीर झाले मग्न । इतुकें वर्तल्यावरी कथानुसंधान। साव-धान अवधारिजे ॥ ६९ ॥ क्रमोनियां ते शर्वरी। सेना सज्जोनि ते अवसरीं । नमस्कार करोनि लवणारी । मुनीस पुसोनि निघाला ॥ ७० ॥ श्रीरामदर्शनाची उत्कंठा । मार्गी चालतां दडद-डाटा। इंद्रियनाथाहूनि वेग मोठा। अयोध्येचे शेवटा येते झाले ॥ ७१ ॥ ते अयोध्या देखिली कैसी । अमरपुरीहूनि विशेषी । कैलास जिचे उपमेसीं। तुळणेसी पैं न ये ॥ ७२ ॥ सुवर्णकळ-सांचिया हारीं। रत्नदीप घरोघरीं। उत्तममध्यमीं हाटक घरीं । सुखसंभारीं असिजे हो ॥ ७३ ॥ कोणा नाहीं दुःख दैन्य । घरोघरीं श्रीराम-कीर्तन । श्रीरामकथा श्रीरामगायन । स्वानंदीं मग्न जन वसती ॥ ७४ ॥ सूर्यवंशी नृपकेसरी। जयाचे स्मरणें संसार दुरी। सकळ जन सह-परिवारीं । रावणारी वसे जेथें ॥ ७५ ॥ ऐसिये अयोध्येभीतरीं । प्रवेशला तो लवणारी। सदना उजू येवोनि ते अवसरीं । श्रीरामासी देखिलें ॥ ७६ ॥ करोनियां साष्टांग नमन। चरणांवरी माथा ठेवोन । अग्रजें दिधलें आलिंगन। समा-धान येरयेरां ॥ ७७ ॥ लवणारी म्हणे रावणा-रीस। तुमचे आज्ञेनें मधुपुरीस। प्रवेश न करितां पुरद्वारीं राक्षस। पारधीहूनि जैं आला ॥ ७८ ॥ तुमचे कृपेंकरून । नगरद्वारीं देखिला लवण। युद्धीं त्यासी मोक्ष देवोन। पुरीस प्रवेशन पैं केलें ॥ ७९ ॥ दैत्यभयेंकरोनि पुरी। उद्वस होती मधु-नगरी। ते वसवोनि द्वादश वर्षांवरी। तुम्हांवीण तेथें राहिलों ॥ ८० ॥ तुजवीण रघुनाथा। नावडे मज राज्यपदार्था । तुजवीण भोग भोगितां।

१ सत्र. २ शत्रुघ्न. ३ मनाहून. ४ सांगा. ५ सुवर्ण. ६ श्रीराम. ७ ओसाड. ८ दीन. ९ वाट. १० पोहोंचवीत.

तें अधःपाताचें मूळ ॥ ८१ ॥ जैसें जननीवेगळें बाळक । तैसें तेथें मी होतों रंक। चंद्राविगळें चकोर देख । पडे उपवास न देखतां ॥ ८२ ॥ जैसे रविउपासक जन। न होतां सूर्याचें दर्शन। तयांसी पडे लंघन जाण। तैसें तुजवीण श्रीरामा ॥ ८३ ॥ तुझिये आज्ञेकरून। केलें प्रजेचें पाळण। रात्रंदिवस तुझें ध्यान । करितों जाण श्रीरामा ॥ ८४ ॥ नित्य अनुदिनीं सावकाश। पाहें अयो-ध्येची वास । युगासमान एक दिवस । ऐसीं वर्षें द्वादश कंठिलीं ॥ ८५ ॥ माझा तूं आत्मा माझा तूं प्राण । माझी मातापिता रघुनंदन। माझे गणगोत जानकीरमण। तेथें संशय जाण असेना ॥ ८६ ॥ ऐसें शत्रुघ्नाचें ऐकोनि वचन। मग काय बोलिला धरणिजारमण। माझे आज्ञेनें दुष्टदळण । करोनि यश पावलासी ॥ ८७ ॥ विप्रजनां सुख दिधलें। सकळ सुरवरां संतुष्ट केलें । पुनरपि माझें दर्शन घेतलें। यश जोडिलें त्रैलोक्यीं ॥ ८८ ॥ माझें दर्शन झाल्याउपरी। अयोध्ये राहीं सप्त रात्री। पुनरपि तूं मधुनगरीं। जावोनि राज्य करावें ॥ ८९ ॥ पद्माक्षीरमणाचें ऐकोनि वचन । मग शत्रुघ्नें सप्त रात्री क्रमून। श्रीराममाता अभिवंदून । वसिष्ठा नमन पैं केलें ॥ ९० ॥ वंदोनि भरतलक्ष्मण। शत्रुघ्नें रथीं आरू-ढोन। मधुपुरीस केलें गमन। श्रीरामाज्ञा वंदोनी ॥ ९१ ॥ भरतलक्ष्मण बोळंवीत गेले। ते पुनरपि मुरडोनि अयोध्ये आले। तदनंतर काय वर्तलें। तें अवधारिजे श्रोते हो ॥ ९२ ॥ एका विनवी श्रोते जनार्दना । मी तुमचे दासाचा दास पोसणा। सलगी करितसें चरणां। लागोनियां तुमचिये ॥ ९३ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां श्रीरघुनाथशत्रुघ्नदर्शनलवणा-सुरवधो नाम षष्टितमोऽध्यायः ॥ ६० ॥ ओंव्या ॥ ९३ ॥

अध्याय एकसष्टावा

॥ श्रीरघुपतये नमः ॥ शत्रुघ्न गेला मधुपुरीसी। मागें श्रीराम भरतलक्ष्मणेंसीं। राज्य करितां अयो-ध्येसी । पुढें काय वर्तलें ॥ १ ॥ कोणी एक द्विज

१ १ मैत्री.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

पुण्य पवित्र । अग्निहोत्री महापंडित । चारी वेद मुखोद्गत । धर्मी तत्पर स्वधर्मे ॥ २ ॥ ऐसा तो गुणसंपन्न । तयाचें बाळक पांचसात वर्षांचें जाण । तें अकाळीं पावलें मरण । दुःख दारुण विप्रासी ॥ ३ ॥ तेणें द्विजें घेवोनि बाळक । महाद्वारा आला करीत शोक । स्नेहें रुदन करी देख । नाना विलापें कपाळ पिटी ॥ ४ ॥ म्हणे मी नाहीं आचरलों अधर्म । स्यां नाहीं केलें निंद्य कर्म । वादीं छळिले नाहींत ब्राह्मण । स्वधर्मा जाण चुकलों नाहीं ॥ ५ ॥ स्यां कोणाचा न केला अपराध । स्यां कोणासीं न केला विवाद । मी अबद्धं[2] जपलों नाहीं वेद । कोणाचा नाहीं अपवाद[3] उच्चारिला ॥ ६ ॥ पंचवार्षिक माझें बाळ । तारुण्य जरा न येतां केवळ । साधूनियां काळ वेळ । माझें तान्हें बाळ हरिलें कैसें ॥ ७ ॥ रघुनाथराज्यीं पूर्ण आयुष्य । काळाचा तेथें नाहीं प्रवेश । अधर्माचा नाहीं लेश । तरी मी कां क्लेश पावलों ॥ ८ ॥ माझें एकुलतें तान्हें जाण । कोणें पापें पावलें मरण । तयासवें आम्ही प्राण । श्रीरामद्वारीं देह सांडूं ॥ ९ ॥ ऐसें पूर्वी नाहीं ऐकिलें । श्रीरामराज्यीं अपूर्व झालें । याबरोबर आम्ही सकळें । आपुले देह पैं त्यागूं ॥ १० ॥ श्रीरामाचे अधर्मेंकरून । माझें बाळक पावलें मरण । यदर्थी कांहीं संदेह जाण । अणुप्रमाण असेना ॥ ११ ॥ ऐसी द्विजोत्तमाची करुणा । ऐकोनियां जानकीरमणा । बाळकदुःखें तया जाणा । थोर खेद जाहला ॥ १२ ॥ श्रीरामें बाळ देखोन । अत्यंत करुणा उचंबळोन । सभे बैसले तेही जन । थोर आश्चर्य पावले ॥ १३ ॥ मग बोलावोनि ऋषीश्वर । वसिष्ठ वामदेव थोर थोर । गौतम जावाली अत्रि आणिक मुनिवर । सभे येवोनि बैसले ॥ १४ ॥ तयांसी करोनि नमन । अभिवंदन आणि पूजन । आसनें उत्तम देवोन । तपोधन बैसविले ॥ १५ ॥ नारदही तेथें आला । श्रीरामें आलिंगूनि पूजिला । वरासनीं बैसविला । तपोधनांजवळी हो ॥ १६ ॥ श्रीरामें सांगितलें मृतबाळकाच्या वृत्तान्ता । धर्मशास्त्रसमस्तां । तंव नारद झाला बोलता । नीतीतें ॥ १७ ॥ ऐकें गा श्रीरघुपती । बाळक निमालें जे अर्थी । पूर्वी कृतयुगाप्रती । ब्राह्मण तप करीत होते ॥ १८ ॥ विप्रावेगळे तपीं तत्पर । इतरांसी नाहीं अधिकार । त्रेतायुगाचे ठायीं राजन्यां अधिकार । तपीं असे राजेंद्रा ॥ १९ ॥ आणिक कृतत्रेतायुगींचे जन । आपुले स्वधर्मी असती जाण । तेथें नाहीं अकाळ मरण । दोहीं युगांचा हा महिमा ॥ २० ॥ त्रेतायुगीं करोनि नेम । स्थापिले चारी वर्ण उत्तम । अनधिकारी तप करोनि अधर्म । एक चरणीं चालता झाला ॥ २१ ॥ अधर्माचा प्रथम चरण । श्रीरामा प्रवर्तला जाण । जे राष्ट्रीं अनधिकारी साधन । करिताती जाण तें मृत्यु पावे ॥ २२ ॥ अनधिकारी करितां तप । अनधिकारी करितां जप । अनधिकारी पूजापडपं । घेती ते जनां मृत्युपीडा ॥ २३ ॥ त्रेतायुगाभीतरीं । तप करिती वैश्यशूद्र अनधिकारी । तयांचे पापें पीडा भारी । रायासी होय राजेंद्रा ॥ २४ ॥ तयांचे अधर्में अँनृतेंकरोन । प्रजेसी पीडा न वर्षे पर्जन्य । बहुकाळ पडे अवर्षण । राज्यपद जाण स्थिर नव्हे ॥ २५ ॥ द्वापरीं तप त्रिवर्णांसी । ब्राह्मण क्षत्रिय वैश्यांसी । शूद्रें न करावें तपासी । निजकर्म आचरावें ॥ २६ ॥ तयाच्या पापेंकरून । द्विजबाळक पावलें मरण । यदर्थी संदेह नाहीं जाण । पृथ्वीशोधन करावें ॥ २७ ॥ राजा होत्साता जाण । जो न करी पापपुण्यविवेचन । तयासी होय अधःपतन । संदेह जाण असेना ॥ २८ ॥ ऐसी असे धर्मनीती । हे शीघ्र विचारोनि जानकीपती । पुढील कार्याची उत्कंठा चित्तीं । धरोनि राहटी करावी ॥ २९ ॥ ऐसें नारदाचें वचन । ऐकोनियां श्रीरघुनंदन । वेगीं पाचारोनि लक्ष्मण । काय बोलता पैं झाला ॥ ३० ॥ ऐकें सौमित्रा झडकरी । द्विजा आश्वासोनि मधुरोत्तरीं । बाळकाचें शरीर स्नेहाभीतरीं । तळोनियां राखावें ॥ ३१ ॥ बाळकाची वपु तैलीं तळून । द्रोणीमाजि ठेवावी करोनि यत्न । नानापरींचे सुगंध पाळून । संस्थापन करावें ॥ ३२ ॥ ऐकोनि श्रीरामाचें वचन । सौमित्रें विप्रा आश्वासून । बाळकाचें शरीर तैलीं तळून । मग द्रोणीं स्थापून सभे आला ॥ ३३ ॥ श्रीरामें क्षण एक धरोनि ध्यान । केलें पुष्पकाचें

१ आक्रोश करून. २ अयोग्य. ३ दोष. ४ नमस्कार. ५ क्षत्रियांना. ६ पूजेची आवड. ७ खोट्या वर्तनामुळें. ८ नरकवास. ९ तेलामध्यें. १० शरीर. ११ कढईत. १२ पुष्पक विमानाला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

आवाहन । तत्काळ पुष्पक येवोनि जाण । कर जोडून राहिलें ॥ ३४ ॥ पुष्पक म्हणे श्रीरामा । तुमची आज्ञा प्रमाण पुरुषोत्तमा । तूंचि माझा निजात्मा । सत्य मी किंकर स्वामीचा ॥ ३५ ॥ ऐकोनि पुष्पकाचें वचन । संतोषोनि रघुनंदन । ऋषींसी करोनियां नमन । विमानारूढ पैं झाला ॥ ३६ ॥ नगरीं स्थापोनि भरतलक्ष्मण । आपण करिता झाला प्रयाण । नाना वनें उल्लंघोनि जाण । पश्चिमदिशे पैं आला ॥ ३७ ॥ श्रीराम चापशरपाणी । ये शुद्ध पश्चिम देखोनी । अधर्माची वार्ता कानीं । ते दिवशीं न पडली ॥ ३८ ॥ तदनंतरें उत्तर दिशेसी । श्रीराम निघाला शोधनासी । हिमाचळाचे प्रदेशीं । तापसी स्वधर्मे अनुष्ठान करिती ॥ ३९ ॥ तेथें नाहीं पापाचा लवलेश । शुद्ध सात्त्विक जन बहुवस । सदा भगवद्भजनीं उल्हास । आशापाश सांडोनी ॥ ४० ॥ तयाउपरी पूर्व दिशेसी । श्रीराम निघे शुद्धीसी । जगन्नाथपर्यंत पहातां त्यासी । अधर्म दृष्टीसी दिसेना ॥ ४१ ॥ नीळकंठ नेपाळ वैजनाथ । पूर्वबंगाल वोडसा समस्त । कैकट मागध गया तेथ । देश त्वरित शोधिले ॥ ४२ ॥ सर्वां ठायीं भगवद्भजन । ब्राह्मणक्षत्रियवैश्यशूद्र जन । आपुलाले स्वधर्मीं होवोनि लीन । श्रीरामकीर्तन पैं करिती ॥ ४३ ॥ तयाउपरी दक्षिणदिशेसी । श्रीराम निघाला शोधावयासी । शेषाचळाचे उत्तरपार्श्वीं । सरोवर एक देखिलें ॥ ४४ ॥ अति रमणीय तोयपूर्ण । परिवेष्टित कमळिणी जाण । तयाचे तीरीं तापस धूम्रपान । अधोमुखें करीतसे ॥ ४५ ॥ अधःशिर ऊर्ध्व चरण । मुखीं नळिका लावोनि जाण । करीतसे धूम्रपान । तया रघुनंदन देखता झाला ॥ ४६ ॥ श्रीराम समीप येवोनी । बोलता झाला मधुर वचनीं । म्हणे धन्य धन्य तूं मुनी । देखोनि नयनीं सुख झालें ॥ ४७ ॥ कोण याति कोण वर्ण । कोण ग्राम कोण अभिधान । तप करावया काय कारण । कोण इच्छा हृदयीं असे ॥ ४८ ॥ विनोदार्थ महामुनी । हें मज सांगें विस्तारोनी । स्वर्गप्राप्तीलागीं धूम्रपानीं । प्रवर्तलासी तापसा ॥ ४९ ॥ एवढे

१ बोलावणें. २ खाली मस्तक. ३ वर. ४ ज्ञाति, जाती. ५ नांव. ६ तरवार. ७ पृथ्वीवर. ८ सत्वर. ९ अवेळीं.

करोनि सायास । कोण कार्या चिंतितोस । येरें ऐकोनि श्रीरामवचनास । उत्तर देता पैं झाला ॥ ५० ॥ म्हणे ऐकें गा ये शरचापपाणी । मी प्रवर्तलों धूम्रपानीं । त्या फळाची इच्छा तुजलागोनी । आणिक स्वयातिही प्रकट करीन ॥ ५१ ॥ ब्राह्मण क्षत्रिय वैश्य जाण । या तीन्ही याति नाहींत मजलागून । केवळ शूद्र मी अनुष्ठान । कार्या कारण करीतसें ॥ ५२ ॥ येणें शरीरें देवत्व प्राप्त व्हावया तप करितों निश्चित । पूज्य व्हावें लोकांत । मान महत्त्व पावावया ॥ ५३ ॥ ऐकोनि तापसाचें वचन । श्रीरामें खड्ग घेवोनि जाण । मस्तकीं हाणोनि शिर छेदून । धरणीवरी पाडिलें ॥ ५४ ॥ शिर पडतां धरणीवरी । स्वर्गीं देव जयजयकारीं । इंद्रादिक सामोरे येवोनि ते अवसरीं । श्रीरामासी स्तविते झाले ॥ ५५ ॥ भला भला गा धरणिजापती । म्हणोनि पुष्पवर्षाव करिती । देवकार्यालागोनि रघुपती । अवतरलासी रविवंशीं ॥ ५६ ॥ हा दुरात्मा भला मारिला । त्रैलोक्यासी आनंद झाला । देव म्हणती वर माग वहिला । प्रसन्न झालों तुजलागीं ॥ ५७ ॥ जें मागसी तें ये समयीं । श्रीरामा सत्य देऊं पाहीं । ऐसें बोलोनि ते सर्वही । थोर आनंद पावले ॥ ५८ ॥ सुरांचे मुखीं बळीचें वचन । ऐकोनियां श्रीरघुनंदन । म्हणे स्वामी झालेति प्रसन्न । तरी मृतबाळका उठवावें ॥ ५९ ॥ अयोध्येमाजी वृद्ध द्विजाचें बाळ । मृत्यु पावलें अकाळ । उठवोनि तुम्हीं प्रबळ । यश मज पैं द्यावें ॥ ६० ॥ देव म्हणती श्रीरामा । हा वधिला दुष्टात्मा । तेव्हांच त्या बाळकाचा आत्मा । कुडीमांजी प्रवेशला ॥ ६१ ॥ जे काळीं शिर छेदिलें । तेव्हांच तयाचे प्राण आले । त्याच्या मातापित्यांसी सुख झालें । सुहृदस्वजनगोत्रांसी ॥ ६२ ॥ देवऋषी म्हणती श्रीरामा । आम्ही जातों अगस्त्याश्रमा । दीक्षा घेतलीसे पुरुषोत्तमा । जळीं वास अगस्तीनें केला ॥ ६३ ॥ द्वादशवर्षपर्यंत । जळीं शय्या करी अगस्ति तेथ । तयाचे व्रतपरिपूर्णार्थ । जाऊं तेथ श्रीरामा ॥ ६४ ॥ तुम्हींही तेथवरी यावें । अगस्तीचें दर्शन घ्यावें । तयाचें व्रत श्रीराघवें । परिपूर्ण आघवें करावें

१० शरीरामध्यें. ११ सर्व.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ ६५ ॥ ऐकोनि देवांचें वचन । पुष्पकीं आरूढोनि रघुनंदन । देवांसहित आला जाण । अगस्तिआश्रमा ते काळीं ॥ ६६ ॥ देव भेटले अगस्तीसी । घेवोनि पूजा षोडशोपचारेंसीं । श्रीरामें वृत्तान्त अगस्तीसी । विस्तरेंसीं सांगितला ॥ ६७ ॥ नमन करोनि अगस्तीसी । देव निघाले निजाश्रमासी । तयाउपरी श्रीरामें कुंभोद्भवासी । नमन साष्टांगेंसीं पैं केलें ॥ ६८ ॥ ऋषीस केला नमस्कार । अगस्तीनें केला आदर । फळ मूळ घेवोनि रघुवीर । सुख अपार पावला ॥ ६९ ॥ अगस्ति म्हणे श्रीरामासी । थोर भाग्यें आश्रमा आलासी । तुझिये प्रातीलागीं ऋषी । नाना सायास करिताती ॥ ७० ॥ तुझिये प्रातीलागून । एकीं सेविलेंसे वन । एक करिती धूम्रपान । एक पंचाग्निसाधन साधिती ॥ ७१ ॥ एक झाले निराहारी । एक झाले चीरकृष्णाजिनजटाधारी । एक ते झाले फळाहारी । निराहारी पैं एक ॥ ७२ ॥ ऐसे तुझे प्रातीकारण । करिताती नाना साधन । तो तूं स्वभावें दर्शन । आम्हांलागून देतोसी ॥ ७३ ॥ श्रीरामा माझ्या प्रीतीलागीं । हीं उत्तम आभरणें[३] लेईं अंगीं । जयांचें तेज त्रिजगीं । बाणलिया प्रकाशे ॥ ७४ ॥ हीं उत्तम आभरणें जाण । विश्वकर्म्यानें केलीं निर्माण । तीं अंगीकारोनि आपण । विराजमान पैं व्हावें ॥ ७५ ॥ ऋषीची देखोनि परम प्रीती । संतोषोनियां श्रीरघुपती । आभरणें लेतां गगनीं दीप्ती[४] । तया तेजाची फांकली ॥७६॥ श्रीराम म्हणे कुंभोद्भवा । हीं आभरणें कोणाचीं कोणीं दिधलीं केव्हां । सविस्तर सांगें मुनिपुंगवा । थोर आनंदेंकरोनी ॥ ७७ ॥ ऐकोनि दाशरथीचें वचन । बोलता झाला अगस्ति जाण । पूर्वीं त्रेतायुगींचें कथन । ऐक सावधान श्रीरामा ॥ ७८ ॥ एका जनार्दना शरण । अगस्तिश्रीरामसंवादकथन । श्रोते होवोनि सावधान । रामायण अवधारा ॥ ७९ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां श्रीरामअगस्त्याश्रमगमनं नाम एकषष्टितमोऽध्यायः ॥ ६१ ॥ ओंव्या ॥ ७९ ॥

१ अगस्ती ऋषीला. २ सहज. ३ भूषणें. ४ प्रकाश, तेज. ५ मुनिश्रेष्ठा. ६ परशुरामाचा पराभव करणाऱ्या श्रीरामचंद्राला. ७ पोपट. ८ कोंबडे. ९ प्रेत.

अध्याय बासष्टावा

॥ श्रीमहाविष्णवे नमः ॥ कुंभोद्भव म्हणे जामदग्न्यजेत्यासी । पूर्वीं त्रेतायुगाची कथा ऐसी । जे वर्तली ते तुजपासीं । विस्तरेंसीं सांगेन ॥ १ ॥ पूर्वीं त्रेतायुगामाझारीं । शतयोजनें वनविस्तारीं । पशु पक्षी नाहीं त्या वनांतरीं । त्यजोनि दुरी गेले मानव ॥ २ ॥ तया वनाभीतरीं । एक तापस उत्तम तप करी । मीही रामा हिंडत तेथवरी । तया वना प्रवेशलों ॥ ३ ॥ फळें मूळें सुस्वादिष्ट । भक्षितां प्राणी होय संतुष्ट । मार्गीं श्रमलियाचे कष्ट । तया वनीं निवारती ॥ ४ ॥ अनेक वृक्ष बहुत जातींचे जाण । तयांचें कोण करील वर्णन । तयांमध्यें एक सरोवर विस्तीर्ण । एकयोजनपर्यंत ॥ ५ ॥ तया सरोवराभीतरीं । नानापरींच्या कमळिणी भ्रमरी । रुणझुण करिती नाना स्वरीं । मंजुळ शब्देंकरोनी ॥ ६ ॥ हंस सारस चक्रवाक । मयूर साळया आणिक शुकँ । तित्तिर लाव्हे कुर्कुट बक । कारंडक अनेक हो ॥ ७ ॥ तया वनींचें फळ । अत्यंत स्वादिष्ट रसाळ । आणि तेथील निर्मळ जळ । सेविल्या अपूर्व सुख होय ॥ ८ ॥ ते समयीं सरोवराभीतरीं । शव एक देखिलें तनु साजिरी । सरोवरातीरीं आश्रम रावणारी । उत्तम सुंदर देखिला ॥ ९ ॥ शव देखोनि आश्चर्य वाटलें । मग तेथें क्षण एक मन स्थिर केलें । तंव तत्क्षणीं अद्भुत वर्तलें । तें अवधारीं श्रीरामा ॥ १० ॥ तंव एक स्वर्गींहून । उतरतां देखिलें विमान । घंटावळी रत्नखचित जाण । तेजें संपूर्ण लखलखित ॥ ११ ॥ तया विमानाभीतरीं । गंधर्वगायन सुस्वरीं । अप्सरानृत्यताल गजरेंकरीं । माजी सुंदर पुरुष बैसलासे ॥ १२ ॥ तया पुरुषें तेथें उतरोन । करोनि करचरणप्रक्षाळण । शंव भक्षिता झाला आपण । तें म्यां दृष्टीं देखिलें ॥ १३ ॥ सवेंचि पुरुष विमानीं । आरूढ होतां तेच क्षणीं । म्यां पुसिलें तूं कोण म्हणोनी । शव कां भक्षिलें विमानस्था ॥ १४ ॥ अति निंद्य शवभक्षण । तुवां करावया काय कारण । तें मज सांगें विस्तारून । कृपा करोन

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

ये समयीं ॥ १५ ॥ तूं अत्यंत सुंदर पुरुष । आणि भक्षिलें तुवां मांस । हें आश्चर्य देखिलिया मनास । पुसों इच्छितों तुजलागीं ॥ १६ ॥ ऐकोनियां माझें वचन । विमानस्थ पुरुष बोलिला जाण । म्हणे मुनि होवोनि सावधान । सविस्तर कथन अवधारीं ॥ १७ ॥ पूर्वी विदर्भदेशींचा भूपती । वसुदेव नामें महाख्याती । तयासी दोघी स्त्रिया निश्चितीं । दोघी पुत्रवती पैं झाल्या ॥ १८ ॥ तो आमुचा पिता जाण । आम्ही दोघे बंधु धर्मपरायण । माझें श्वेत नामाभिधान । सुरस कनिष्ठ बंधु माझा ॥ १९ ॥ राज्य करितां वसुदेवास । बहुत काळ लोटला मुनि परियेस । मज राज्यीं स्थापोनि राजा स्वर्गास । मरण पावोनि पैं गेला ॥ २० ॥ पित्यामागें म्यां श्वेतें । राज्य केलें वर्षें बहुतें । मग उबगलों विषयभोगांतें । उदास चित्तें होवोनी ॥ २१ ॥ राज्यीं स्थापूनि कनिष्ठ बंधूसी । मी आलों या वनासी । तप केलें तीन वर्षें ऋषी । मग मी स्वर्गासी विमानारूढ होवोनि गेलों ॥ २२ ॥ गेलियावरी ब्रह्मलोकातें । क्षुधेतृषेनें बाधिलें तेथें । मग म्यां विनवोनि ब्रह्मयातें । पुसता झालों ते काळीं ॥ २३ ॥ मग ब्रह्मा म्हणे महापुरुषा । तप करोनि अति सायासा । परी दान धर्म दया सहसा । घडली नाहीं तुजलागीं ॥ २४ ॥ तुवां तप केलें अद्भुत । परी पूजिले नाहींत अतीत³ । यालागीं क्षुधा तृषा बाधीत । ये लोकीं जाण तापसा ॥ २५ ॥ दानधर्मदयेवीण । मम लोका आलिया होय विघ्न । यालागीं भले साधुजन । अन्नदान करिताती ॥ २६ ॥ तापसी म्हणे ब्रह्मयासी । मज भक्षावया काय देतोसी । येरू म्हणे तुझें शरीर पडलें भूमीसी । तें भक्षावें स्वादिष्ट ॥ २७ ॥ मग विमानीं आरूढोन । या सरोवरा आलों जाण । स्वशरीर केलें भक्षण । तुजदेखतां अगस्तिमुनी ॥ २८ ॥ आपुलें शरीर केलें भक्षण । येथें तृप्ति पावलों जाण । यावरी तुमचें झालें दर्शन । तृषेसी बोळवण⁴ पैं झाली ॥ २९ ॥ आतां अहो जी अगस्तिमुनी । मज कृपा करावी दीनालागूनी । म्हणोनि माथा ठेविला चरणीं । काय विनवणी करिता झाला ॥ ३० ॥ अहो कुंभोद्भवा इल्वलारी⁵ । हीं हेमाभरणें⁶ अंगीकारीं । कृपा करोनि मजवरी । दीन म्हणोनि उद्धरावें ॥ ३१ ॥ हेमाभरणें अंगीकारून । तया दिधलें आशीर्वचन । म्हणे तूं स्वर्गा करीं गमन । क्षुधा तृषा जाण बाधेना ॥ ३२ ॥ मग माझे आशीर्वादेंकरीं । प्रवेशता झाला स्वर्गपुरी । त्याचीं आभरणें हीं रावणारी⁷ । तुज म्यां दिधलीं ये काळीं ॥ ३३ ॥ तो पुरुष स्वर्गासी । पूर्वदेह सांडोनि वनप्रदेशीं । दिव्यदेहें ब्रह्मलोकासी । विमानारूढ होवोनि गेला ॥ ३४ ॥ ऐकोनि अगस्तीचें वचन । संतोषला श्रीरघुनंदन । म्हणे स्वामी कृपा करून । तयाचें कथन सविस्तरीं सांगावें ॥ ३५ ॥ श्रीराम म्हणे अगस्तीसी । श्वेतराज वनप्रदेशीं । तप करितां सायासीं । वस्ती मनुष्यासी नव्हती तेथें ॥ ३६ ॥ ऐसें झालें उद्वस⁸ वन । मृगपक्षिविवर्जित जन । महा विक्राळ दारुण । तेथें तप कैसें केलें ॥ ३७ ॥ भार्गवजेत्याचें ऐसें वचन । ऐकोनि अगस्ति आनंदोन । पूर्वील इतिहास पुरातन⁹ । संतोषोन सांगता झाला ॥ ३८ ॥ पूर्वी कृतयुगामाझारीं । मनुनामें प्रसिद्ध निर्धारीं । तया पुत्र इक्ष्वाकु नृपकेसरी¹⁰ । पितयाचे आज्ञे-अधीन असे ॥ ३९ ॥ मनु धर्मात्मा धर्मपरायण । पुत्रासी राज्यीं स्थापून । म्हणता झाला स्वधर्मेंकरून । राज्यपाळण करावें ॥ ४० ॥ अदंड्या¹¹ दंड न करावा । न करीं अधर्माचा ठेवा । गोब्राह्मण आणिक जीवां । प्रतिपाळण करावें ॥ ४१ ॥ ऐसें बोलोनि मनूनें जाण । केलें स्वर्गाप्रति गमन । मागें इक्ष्वाकु प्रतापेंकरून । राज्य करिता पैं झाला ॥ ४२ ॥ पृथ्वीचे राजे जिंतिले । आपुले करोनि स्थापिले । पुढें चिंतातुर मानस झालें । पुत्रसंततीकारणें ॥ ४३ ॥ म्हणे म्यां पृथ्वी जिंतिली । स्वधर्मेंकरोनि प्रतिपाळिली । परी आपणासी संतति पाहिजे झाली । यदर्थीं¹² विचार करीतसे ॥ ४४ ॥ स्वधर्मकर्मेंकरीं जाण । पुत्राचें करीता झाला जनन । तंव एकशत पुत्र झाले निर्माण । धर्मपरायण तेजस्वी ॥ ४५ ॥ सर्वांहूनि धाकटा पुत्र । दंडकनामें अति विख्यात । मूढ झाला अपंडित । अनर्थ अद्भुत करिता झाला ॥ ४६ ॥ दुर्बुद्धि पुत्र

१ नांव. २ कंटाळलों. ३ अतिथी. ४ तृप्ति. ५ अगस्तिमुने. ६ सुवर्णालंकार. ७ रामचंद्रा. ८ ओसाड. ९ फार जुना. १० राजश्रेष्ठ. ११ निरपराध्याला. १२ ज्याकरितां.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

देखोन । इक्ष्वाकूनें शाप दिधला दारुण । दंडक झाला अति उद्विग्न । सांडोनि उद्धटपण शांतीतें पावला ॥ ४७ ॥ करी पित्याचे सेवेसी । संतोष मानसीं अहर्निशीं । तंव पिता संतोषोनि एके दिवसीं । काय करिता पैं झाला ॥ ४८ ॥ विंध्याद्रिशैलाभीतरीं जाण । इक्ष्वाकूनें दंडका राज्य देऊन । येरें शुक्राचार्य गुरु करोन । राज्यभार चालविला ॥ ४९ ॥ तया पर्वताचे पाठारीं। दंडकें वसविली मधुमंतपुरी । जियेचे रचने त्रिभुवनामाझारीं । उपमेसी नाहीं आणिक ॥ ५० ॥ तया नगरीचे ठायीं । वास करिता झाला पाहीं। पुढील कथेची नवायी । सावध होवोनि अवधारिजे ॥ ५१ ॥ कोणे एके काळीं दंडक जाण। पारधी निघाला मृग लक्षोन । तंव भार्गवकन्या देखिली जाण । वनविहरण करीतसे ॥ ५२ ॥ ती लावण्याची पुतळी । कीं स्वर्गीची देवांगना सजली । उपमेलागीं भूमंडळीं । दुसरी नाहीं तिजसारखी ॥ ५३ ॥ ऐसी सुंदर सुकुमार । अनंतगुणगंभीर । हंसगती चालतां चरणीं भ्रमर। परिवेष्टित भोंवतीं ॥ ५४ ॥ ऐसें तें दैत्यगुरूचें कन्यारत्न । देखोनि दंडका चेतला मदन । म्हणे तीस तूं कोणाची कोण । काय कारणें वनीं हिंडसी ॥ ५५ ॥ माझा मंदनें जातो प्राण । अवो माझें करीं वरण । येरी म्हणे राया मी पितयाअधीन । स्वतंत्रपण मज नाहीं ॥ ५६ ॥ या वनाचे प्रदेशीं राया । माझा पिता शुक्राचार्य । अनुष्ठान करितो त्याची तनया । अरजा ऐसें नाम माझें ॥ ५७॥ तो माझा पिता तुझा गुरु जाण । तूं तया मागें कन्यादान । न मागतां करिसी माझें ग्रहण । तैं अनर्थ दारुण भोगिसी ॥ ५८ ॥ ऐकोनि तियेचें वचन । मंदबुद्धि दंडक जाण। बळें देवोनि आलिंगन। संभोगून सोडिली ॥ ५९ ॥ संभोगून तियेसी। दंडक आला निजनगरीसी। येरी मागें उकसाबुकसीं। रुदन वनवासीं करिती झाली ॥ ६० ॥ तंव झाला माध्यान्हकाळ। शुक्रें शिष्यांचा घेवोनि मेळ । क्षुधार्थी होवोनि प्रबळ। वनफळें भक्षावया येता झाला ॥ ६१ ॥ मार्गी रुदन करितां कन्येसी। देखता झाला दैत्यऋषी । म्हणे तूं कोणें गांजिलीसी । कां शोक करिसी सांग मज ॥ ६२॥ येरीनें सांगतां वृत्तान्त। शुक्रें ऐकोनि क्रोधें उचंबळत । म्हणे दुष्टात्म्यानें करोनि अक्रंत । निजकन्येसी गांजिलें ॥ ६३ ॥ शुक्र शाप ते काळीं दारुण । देता झाला दंडका जाण। सप्त दिवसां सहराज्य आपण । निजसैन्येंसीं भस्मेल ॥ ६४ ॥ हें जें दंडकारण्य । धुंई दाटोन होईल दहनें ! पर्जन्य येथें न पडे जाण। बहुकाळ अवर्षणें जन पीडती ॥ ६५ ॥ ये वनीं कोणीं न करावी वस्ती। जाणोनि रहावें देशींच्या प्रांतीं। ऐसें ऐकोनि जनीं समस्तीं। त्या स्थळाचा त्याग केला ॥ ६६ ॥ कवीनें संबोखोनि कन्येसी । दंडकारण्यीं स्थापून तिसी । देता झाला वरदानासी । आत्मजेसी ते काळीं ॥ ६७ ॥ अवो आत्मजे ये वनाभीतरीं । तुझ्या आश्रमा शाप न बाधी निर्धारीं । तूं येथें राहें आनंदें निर्भरीं। वनफळें सेवोनियां ॥ ६८ ॥ शुक्रें वनीं स्थापोनि कन्यारत्न। आपण निजाश्रमा करी गमन। ऐसें अगस्तिमुखीं श्रीरामें ऐकोन। तंव सायंकाळ प्रवर्तला ॥ ६९ ॥ श्रीरामासहित अगस्तिमुनी ! प्रवर्तले संध्यावंदनीं। निजकर्में करितां रजनी । तिये काळीं पैं झाली ॥ ७० ॥ एका जनार्दना शरण । श्रीरामें करोनि संध्यावंदन। मग करिते झाले भोजन। ते कथा पावन अवधारा ॥ ७१ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां अगस्तिश्रीरामसंवादो नाम द्विषष्टितमोऽध्यायः ॥ ६२ ॥ ओंव्या ॥ ७१ ॥ श्रीरामचंद्रार्पणमस्तु ॥

अध्याय त्रेसष्टावा

॥ श्रीपरमात्मने नमः ॥ ऋषीची संज्ञा जाणोन। श्रीरामें स्नानसंध्या सारून । नंतर करावया भोजन। ऋषि राम प्रवर्तले ॥ १ ॥ श्रीरामभोजनाकारणें । नानापरींचीं फळें तेणें। उत्तम शाका अगस्तीनें। श्रीरामालागीं आणिल्या ॥ २ ॥ उत्तम फळें रुचिकर। भोजनीं प्रवर्तला राजेश्वर। भोजन करोनि श्रीरघुवीर । निजासनीं बैसला ॥ ३ ॥

---

१ रात्रंदिवस. २ पृष्ठभागावर. ३ नवल. ४ वनक्रीडा. ५ कामपीडेनें. ६ विवाह कर. ७ शुक्र. ८ वाईट कर्म. ९ धूळ. १० भस्म. ११ समजावून. १२ रात्र.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

तृणपर्णकुटिकेमाझारी । श्रीरामें निद्रा करोनि तमारी । उदय होतां नृपकेसरी । स्नानसंध्या संपादिली ॥ ४ ॥ ऋषींस करोनि नमस्कार । हात जोडोनि श्रीरघुवीर । म्हणता झाला आजि भाग्य अपार । चरण तुमचे देखिले ॥ ५ ॥ आजि धन्य माझें कुळ । धन्य माझें भाग्य सफळ । जन्मोजन्मींचे तपाचें फळ । चरणयुगुल देखिलें ॥ ६ ॥ आतां निजनगरा जावयासी । आज्ञा दिधली पाहिजे ऋषी । ऐसे श्रीराममधुरवचनासी । ऐकोनि कुंभोद्भव बोलिला ॥ ७ ॥ आचमनीं प्राशिला अपांपती । विंध्याद्रि निजविला क्षिती । ऐसा कुंभोद्भव रामाप्रती । काय बोलता जाहला ॥ ८ ॥ अगस्ति म्हणे श्रीरामा । तुवां वधोनि दुष्टात्मा । सुखसंतोष दिधला आम्हां । पावन अवनी तुवां केली ॥ ९ ॥ सर्व भूतांचे दुःखकंद । जयांचे बंदीं सुर पावले बंध । ऐशा रावणकुंभकर्णांचा कुळासह वध । करोनि अमर सोडविले ॥ १० ॥ तुझा उपकार महापुरुषा । सहसा वर्णवेना शेषा । साही दर्शनां विवाद आपैसा । अद्यापि तुटला पैं नाहीं ॥ ११ ॥ ऐकोनि अगस्तीचें स्तवन । संतोषला धरणिजारमण । ऋषीस करोनि नमन । विमानारूढ पैं झाला ॥ १२ ॥ हेममय पुष्पकविमानीं । आरूढोनि श्रीराम गगनीं । आज्ञा करितां पुष्पक अवनीं । अयोध्येचे उतरलें ॥ १३ ॥ ज्ञानकर्मेंद्रियांचा नाथ । तयाचा वेग राहिला तेथ । अंजनीभ्रतार लज्जान्वित । पुष्पकापुढें होवोनि ठेला ॥ १४ श्रीराम आरूढोनि विमानीं । माध्यान्ह होतां अयोध्याभुवनीं । प्रवेशतां पुष्पका आज्ञापोनी । निजस्थानीं पाठविलें ॥ १५ ॥ श्रीराम येवोनि सदना उजु । बैसोनि पाचारिले अनुजु । भरतलक्ष्मण आनंदभोजु । अग्रजासी भेटले ॥ १६ ॥ अग्रजानुजां झाली भेटी । स्वानंदें हेलावली सृष्टी । मग श्रीरामें बंधूंप्रति गोष्टी । सांगितली स्वकृत ते ॥ १७ ॥ शूद्रजातीचा तापस । दक्षिणदिशे करी धूम्रपानास । तयातें वधोनि ब्राह्मणा संतोष । बाळ वांचवोनि दीधला ॥ १८ ॥ आतां पुढील कर्तव्यता । ते तुम्ही ऐका एकाग्रचित्ता । आम्हीं केलें राक्षसांच्या घाता । हत्या बहुत घडल्या आम्हां ॥ १९ ॥ करावया पातकाचें निर्दळण । करूं धर्माचें संरक्षण । आतां करूं अश्वमेधयज्ञ । राज्यरक्षण करावया ॥ २० ॥ ऋषिजनसुखसंतोषार्थ । मी अश्वमेधयज्ञ करीन येथ । ऐसें श्रीरामाचें मनोगत । जाणोनि भरत बोलता झाला ॥ २१ ॥ भरत म्हणे श्रीरामासी । पूर्वीं कोणें केलें यज्ञासी । तें मजप्रति सांगिजे विस्तारेंसीं । फलश्रुतीसीं रघुवीरा ॥ २२ ॥ ऐकोनि कनिष्ठ बंधूचें वचन । बोलता झाला श्रीरघुनंदन । पूर्वीं मित्रें राजसूय यज्ञ करून वरुणलोक पावला ॥ २३ ॥ चंद्रें करोनि राजसूय यज्ञ । त्रैलोक्यींचें उत्तम स्थान । तें पावला शाश्वत स्थान । यालागीं कीं धर्मपालन करावें ॥ २४ ॥ ऐकोनि श्रीरामाचें वचन । भरतें उपक्रम करून । बोलता झाला स्वयें आपण । निजलक्षण धर्माचें ॥ २५ ॥ भरत बोले श्रीरामासी । तूं त्रैलोक्याचा ईश होसी । स्वधर्मा प्रतिपाळ करावयासी । तुजहून आन पैं नाहीं ॥ २६ ॥ ब्रह्मा तुझे पोटींचें बाळ । इंद्रादि किंकरें प्रबळ । तुझी आज्ञा वंदी काळ । तूं दीनदयाळ श्रीरामा ॥ २७ ॥ करितोसी अश्वमेध यज्ञ । यदर्थीं अशक्य नाहीं जाण । परी विचारिंजे कार्यकारण । जीवां पीडण होय बहुत ॥ २८ ॥ पृथ्वीतळींचे नृपवर । तयांसीं संग्राम करितां घोर । जीवमात्राची हिंसा अपार । यज्ञ करितां होईल ॥ २९ ॥ अमृतोपम भरताचें वचन । ऐकोनियां धरणिजारमण । हांसोनि बोलता झाला आपण । स्वधर्मपाळण उत्तम जें ॥ ३० ॥ भला भला राया भरता । तुजहूनि आन न देखें ज्ञाता । अश्वमेध करणें सर्वथा । माझ्या चित्ता गमतसे ॥ ३१ ॥ दंडकारण्यीं लंकाभवनीं । अगणित राक्षस पडिले रणीं । तया पापाची करावया खंडणी । अश्वमेध यज्ञीं प्रवर्तावें ॥ ३२ ॥ पूर्वीं देवेंद्रें वृत्रासुर मारिला । ब्रह्महत्येचा डाग बैसला । अश्वमेध यज्ञ करिता झाला । पवित्र इंद्र तिहीं लोकीं ॥ ३३ ॥ श्रीरामभरतांचें वचन । ऐकोनिय लक्ष्मण । बोलता झाला सुखसंपन्न । वृत्राख्यान

१ सूर्य. २ समुद्र. ३ पृथ्वी. ४ दुःख देणारे. ५ पातंजल, सांख्य, वैशेषिक, न्याय, मीमांसा, वेदांत. ६ श्रीराम. ७ वायु. ८ धाकटे बंधु. ९ आनंदानें.

१० उद्देश. ११ सूर्यानें. १२ प्रारंभ. १३ दुसरा. १४ सेवक. १५ ज्यासंबंधीं. १६ परिहार.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सविस्तर ॥ ३४ ॥ लक्ष्मण म्हणे बंधूंसी । पूर्वील इतिहास तुम्हांपासीं । सांगतसें विस्तरेंसीं । निजधर्मासी संरक्षण ॥ ३५ ॥ वृत्रासुर यातीचा¹ ब्राह्मण । तीन शत योजनें शरीर उंच जाण । आडवें शतयोजन प्रमाण । लंबायमान दीर्घ जें ॥ ३६ ॥ ऐसा वृत्रासुर दीर्घशरीरी । परी स्वधर्मे प्रजापाळण करी । अधर्म नाहीं राज्याभीतरीं । दीनां कैवारी कृपाळु ॥ ३७ ॥ यथाकाळीं² वर्षे पर्जन्य । पृथ्वी धनधान्यें परिपूर्ण । उदक सरोवरीं निर्मळ जाण । न आटे कदा कल्पांतीं ॥ ३८ ॥ राज्य करितां वृत्रासुरासी । कोणे एके काळीं अनुताप³ त्यासी । उपजोनियां निजराज्यासी । पुत्र अधिकारी पैं केला ॥ ३९ ॥ तया पुत्राचें नाम मधुरेश्वर । अत्यंत तपी सज्ञान धर्मिष्ठ चतुर । राज्यीं स्थापोनि तो निजकुमार । आपण तपा निघाला ॥ ४० ॥ उत्तम तप करून । जिंतीन मी देवसदन । ऐसें कल्पोनियां वना प्रयाण । करिता झाला वृत्रासुर ॥ ४१ ॥ वनीं करोनि उग्र तपासी । हाहाभूत⁴ इंद्र अमरगणेंसीं⁵ । चिंतातुर होवोनि मानसीं । काय करिता पैं झाला ॥ ४२ ॥ सकळ सुरांसहित । इंद्र आला विष्णु जेथ । तयासी करोनि दंडवत । हात जोडोनि उभा ठेला ॥ ४३ ॥ इंद्र म्हणे विष्णूसी । कृपाळुवा वाक्य परियेसीं । वृत्रासुर दैत्यवंशीं । उग्र तप करीतसे ॥ ४४ ॥ तयाचे तपेंकरून । हाहाभूत अमरगण । तेणें वश केले भूमंडळींचे जन । स्वर्गलोक घेऊं पाहतो ॥ ४५ ॥ तप करोनि उत्कृष्ट । प्राणिजना होताती कष्ट । मजही पडलें भयसंकट । निवारिता श्रेष्ठ आहेसि तूं ॥ ४६ ॥ संसारभवगजापासून । सोडविता तूं जनार्दन । आणि उच्चारितां नामस्मरण । पातक भग्न होतसे ॥ ४७ ॥ तुझ्या भृकुटीचेनि प्रभावें । उत्पत्ति स्थिति होय स्वभावें । त्रैलोक्य उदरीं धरिलें देवें । थोर उदर करोनी ॥ ४८ ॥ तूं निर्गुण निराकार । निष्कर्म निरुपचार । अज⁶ अव्ययँ⁷ अक्षर⁸ । श्रुतीसी पार न कळे तुझा ॥ ४९ ॥ या भूतसृष्टीची चिंता । तुजचि असे गा जगन्नाथा । आम्हां देवां तूंचि स्थापिता । उच्छेदिता तूंचि पैं ॥ ५० ॥ वृत्रवधाचिया कारणें । तुवां साह्य व्हावें जनार्दनें । ऐसीं करुणेचीं ऐकोनि वचनें । करुणाघनें पाहिलें ॥ ५१ ॥ सकळ देवांसहवर्तमान । इंद्राप्रति श्रीनारायण । बोलता झाला मधुर वचन । सावधान अवधारा ॥ ५२ ॥ विष्णु म्हणे देवांसी । माझा भक्त वृत्रासुर निश्चयेंसीं । माझे हस्तें मृत्यु नाहीं जाण त्यासी । परी उपायासी सांगेन ॥ ५३ ॥ इंद्रहस्तें होय मृत्य । ऐसा उपाय करीन सत्य । माझें सामर्थ्य जें गुणातीत । त्याचा त्रिंधा⁹ भाग करीन ॥ ५४ ॥ एक अंश शरीरीं । दुसरा अंश वज्राभीतरीं । तिसरा अंश पृथ्वीवरी । शक्ति ये प्रकारीं विभागीन ॥ ५५ ॥ वृत्रवधालागून । मी त्रिधा होतों जाण । परी इंद्राचे हातें पावेल मरण । मी न मारींच तयातें ॥ ५६ ॥ ऐसें ऐकोनि विष्णूचें वचन । वृत्रवधालागीं सिद्ध सुरगण । सकळांसहित इंद्र आपण । युद्धालागून प्रवर्तला ॥ ५७ ॥ पर्वतारीनें¹⁰ वज्र घेवोनि करीं । जेथें वृत्र तप करी तेथवरी । येवोनि युद्धा पाचारिला वैरी । येरू गजरीं निघाला ॥ ५८ ॥ इंद्र आणि वृत्रासुर । युद्ध करिती घोरांदर । स्वर्गीं सकळ सुरवर । कौतुक पाहती दोघांचें ॥ ५९ ॥ दोघे झुंजती उसण्याघायीं । एकमेकांसी लोटती पाहीं । इंद्र वज्र घेवोनि ते समयीं । शिर दैत्याचें तोडिलें ॥ ६० ॥ दैत्य पडोनि धरणीवरी । जैसा स्वर्गीचा कोसळला गिरी । रुधिर वाहे प्रवाह भारी । नदीसारिखा लोटला ॥ ६१ ॥ ऐसा होतां वृत्रासुरवध । झाला सकळांसी आनंद । परी इंद्रासी ब्रह्महत्येचा बाध । अति विरुद्ध लागला ॥ ६२ ॥ हीन दीन गेली कळा । मुकला वीर्यशौर्यमहाबळा । म्हणे ब्रह्महत्या आली माझिये कपाळा । थोर अवकळा¹¹ इंद्रासी ॥ ६३ ॥ देशींचा गेला पर्जन्य । बहुकाळ पडिलें अवर्षण । भूतगणांसी न मिळे अन्न । प्राणिगण मरते झाले ॥ ६४ ॥ इंद्र चंद्र पदापासून । च्यवोनि¹² झाले अति दीन । सकळही सुरवर मिळोन । श्रीजनार्दन प्रार्थिला ॥ ६५ ॥ देव म्हणती पुरुषोत्तमा । तुझेनि वरदें¹³ वधिलें अधमा । परी ब्रह्महत्या लागली न सोडी कर्मा । इंद्रालागीं स्वामिया ॥ ६६ ॥ इंद्र तंव निमित्तधारी । सृष्टीचा

१ जातीचा. २ योग्य समयीं. ३ पश्चात्ताप. ४ भयग्रस्त. ५ देवांसह. ६ जन्मरहित. ७ विकारशून्य. ८ अविनाशी. ९ तीन प्रकारचा. १० इंद्रानें. ११ अवदशा. १२ भ्रष्ट होऊन. १३ वरानें.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

प्रतिपाळ तुझा तूंचि करीं । तूंचि एक चराचरीं । त्रैलोक्यासी आधार ॥ ६७ ॥ इंद्र ब्रह्महत्येपासून । सोडवावा कृपा करून । ऐसें देवांचें ऐकोनि वचन । काय करिता जाहला विष्णु ॥ ६८ ॥ विष्णु म्हणे देवांसी । ब्रह्महत्या नासे त्या उपायासी । इंद्रें करावें अश्वमेधासी । मजप्रीत्यर्थ जाण पां ॥ ६९ ॥ मजप्रीत्यर्थ करील यज्ञ । तरी पावेल निजस्थान । ब्रह्महत्येचें होईल दहन । पुण्यपावन तिहीं लोकीं ॥ ७० ॥ ऐकोनियां विष्णूचें वचन । सकळ सुरवर मिळोन । जेथें इंद्र होता आपण । तया वना पातले ॥ ७१ ॥ देवीं शचीपति देखिला कैसा । हीन दीन पिशाच जैसा । इंद्रा सावध करोनि सहसा । अमरावतीये आणिला ॥ ७२ ॥ इंद्र आणोनि अमरावतीसी । देवीं करोनि अश्वमेधासी । यज्ञ संपविलिया समयासी । ब्रह्महत्या पुढें उभी राहिली ॥ ७३ ॥ ब्रह्महत्या म्हणे देव हो । मज कोठें वस्तीसी नेमिला ठावो । मी इंद्रा सोडूनि कोठें राहों । कोणकोणत्या स्थळाप्रती ॥ ७४ ॥ देव म्हणती ब्रह्महत्येसी । तुवां व्हावें चतुर्भागेंसीं । मग विभागिते झाले देव ऋषी । तें सर्वही अवधारा ॥ ७५ ॥ चतुर्मासीं पडे पर्जन्य । तेणें नदी उचंबळे पूर्ण । तें जाण तुझें राहतें स्थान । दुसरें स्थळ अवधारीं ॥ ७६ ॥ तारुण्ययौवनें मुसमुसी कांता । तेथें त्वां रहावें दिनत्रय सर्वथा । रजोदर्शनीं ब्रह्महत्या । दुसरा ठाव हा तुझा ॥ ७७ ॥ तिसरे वस्तीचें स्थान । भूमीवरी उखिरडीं राहून । सर्वकाळीं सर्वदेशीं जाण । भूमि सोडून नव जावें ॥ ७८ ॥ चवथी वस्ती पापिष्ठांचे ठायीं । जे कां विमुख नामीं पाहीं । नरदेहा येवोनि भुलले विषयीं । सर्व काळ वस्ती तेथें तुझी ॥ ७९ ॥ ऐसी ब्रह्महत्या चहूं प्रकारीं । वांटोनियां सुरवरीं । इंद्रासी करोनि राज्याधिकारी । अमरावतीसी स्थापिला ॥ ८० ॥ शैलारी अमरपदीं विराजमान । राज्य करी सुखसंपन्न । पुढें वर्तलें तें कथानुसंधान । श्रोते जन अवधारा ॥ ८१ ॥ एका जनार्दना शरण । इंद्रासी देवोनि इंद्रासन । देव झाले स्वानंदें पूर्ण । पुढील चरित्र गोड असे ॥ ८२ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां वृत्रासुरवधो नाम त्रिषष्टितमोऽध्यायः ॥ ६३ ॥ ओंव्या ॥ ८२ ॥

१ इंद्र. २ चार प्रकारांनीं. ३ माळजमिनीवर. ४ कथासंबंध. ५ लक्ष्मणाची. ६ मुलगा. ७ अरण्य.

अध्याय चौसष्टावा

॥ श्रीकमलाकांताय नमः ॥ ऐसी शक्रा रिहंत्याची कथा । अति आश्चर्य अपूर्वता । ऐकोनियां समस्तां । झाला बोलता श्रीराम ॥ १ ॥ श्रीराम होवोनि आनंदभरित । बोलावयाचा उपक्रम करीत । पूर्वी कर्दम प्रजापतीचा सुत । ऐलनामें प्रसिद्ध ॥ २ ॥ तेणें भुजबळेंकरून । पृथ्वीचे नृप जिंतोन । स्वधर्में राज्य करी जाण । प्रजापाळण पुत्रापरी ॥ ३ ॥ आंगवण सुरेशाहूनि आगळी । उदारते न तुळती कर्ण बळी । दैत्य दानवें भेणें पाताळीं । लंघोनि गेलीं तळातळा ॥ ४ ॥ नाना गंधर्व असुर । भेणें पूजिती नृपेश्वर । रायाचा पराक्रम देखोनि थोर । चरणा शरण अरि येती ॥ ५ ॥ तो कोणे एके काळीं पारधीलागून । ससैन्य अटवी प्रवेशोन । मृगां मारोनि लक्षावधि जाण । आणी श्वापदें नेणों किती ॥ ६ ॥ जिकडे जाय सेनासैन्य । तिकडे होय रणकंदन । पारधी खेळतां उर्मारमण । त्या स्थळाप्रति आले ॥ ७ ॥ तया वनाचे प्रदेशीं । कर्पूरगौर पार्वतीसीं । विचरतां देखोनि राजसैन्यासी । शाप महेशें दीधला ॥ ८ ॥ या वनाचे ठायीं जाण । पार्वतीमहेशांवेगळेंकरून । वनीं विचरती प्राणी भूतगण । पुरुष स्त्रीदेही पैं होती ॥ ९ ॥ ऐसा शाप त्या वनासी । होतां कर्दमपुत्र सैन्येंसीं । स्त्रीरूप झाला पालट अवयवांसी । निश्चयेंसीं देखते झाले ॥ १० ॥ स्त्रीरूप सकळ सैन्य । देखोनि राजा दुःखित जाण । जेथें पार्वतीसहित त्रिनयन । तेथें कर्दमपुत्र स्वयें आला ॥ ११ ॥ करोनि कामांतकाची स्तुती । अति नम्र विनीतवृत्ती । प्रसन्न झाला उमापती । बोलतसे ते समयीं ॥ १२ ॥ अगा ये कर्दमसुता तुजलागोन । मी प्रसन्न झालों माग वरदान । तंव येरें पार्वतीचें स्तवन । साष्टांग नमनीं पैं केलें ॥ १३ ॥ दोघें झालिया प्रसन्नभूत । राजा वंदोनि बोलत । तुमचें हें वन होय सत्य । मज पुरुषत्व प्राप्त होवो ॥ १४ ॥ एक मास स्त्री एक मास पुरुष जाण ।

८ पार्वतीपति शंकर. ९ मदनांतक शंकराची. १० नम्रतापूर्वक.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

ऐसा वर द्यावा कृपा करून । मग महेश म्हणे धन्य धन्य । उत्तम वरदान मागितलें ॥ १५ ॥ अर्ध वरद महेशाचें । अर्ध वरदान पार्वतीचें । हें तुज दिधलें सत्य साचें । अनुमानातें धरूं नको ॥ १६ ॥ ऐसें देवोनि वरदान । पुन्हां बोले उमा वचन । मागील नव्हे आठवण । सत्य जाण राजेंद्रा ॥ १७ ॥ कर्दमपुत्रा मासपर्यंत । पुरुषत्व झालें प्राप्त । दुसरे मासीं योषिता[१] अद्भुत । लावण्यें महा साजिरी ॥ १८ ॥ श्रीराम म्हणे लक्ष्मणभरतांसी । कर्दमपुत्राची कथा ऐसी । वनीं विचरतां शाप त्यासी । महेशाचा पैं झाला ॥ १९ ॥ ऐसें हें दिव्य आख्यान । ऐकोनि बुद्धि विस्मय पावोन । श्रीरामाप्रति कर जोडून । विनंती करिते झाले दोघे ॥ २० ॥ पुढें कर्दमसुताचें वर्तमान । श्रीरामा अधिक विस्तरोन । सांगावें जी कृपा करून । पुढती नमन करिते झाले ॥ २१ ॥ ऐलराजा स्त्रीदेह पावोन । वर्तत कैसा वनोवन । ऐसें हें उत्तम कथन । सविस्तर श्रीरामा सांगावें ॥ २२ ॥ ऐकोनि भरतलक्ष्मणांचा प्रश्न । सांगता झाला ऐलाख्यान । श्रोते होवोनि सावधान । रम्य रामायण अवधारा ॥ २३ ॥ ऐलराजा प्रथममासीं । पावोनियां स्त्रीदेहासी । सवें सेना स्त्रीरूपेंसीं । विचरतसे वनोवन ॥ २४ ॥ तया अरण्याभीतरीं । राजा होवोनि सुंदरी । तिच्या लावण्याची पैरी[३] । श्रोतीं सावध ऐकावी ॥ २५ ॥ मुखकमळ अति सुंदर । कमळदळासारिखे नेत्र । कुच अवयव देखोनि ऋषीश्वर । मदनें मुरकुंड्या पडिल्या पैं ॥ २६ ॥ सेना स्त्रीरूपेंसीं समस्त । हस्तीवरी आरूढोनि तेथ । ऐल विचरतां विपिनां[४]आंत । तंव सोमसुत बुध तेथें असे ॥ २७ ॥ चंद्रसुत बुध अनुष्ठान । तये वनीं करी जाण । तयाचे आश्रमासमीप येतां पूर्ण । एक सरोवर देखिलें ॥ २८ ॥ सेनेसहित सरोवरीं । ऐल प्रवेशला उदकाभीतरीं । क्रीडा करोनि बाहेरी । किंचित्सेवेंकेंसीं[५] निघाला ॥ २९ ॥ करीं शोभे धनुष्यबाण । सवें सेवक चवघे जण । ऐसें बुधें देखोनि आपण । मदनें विव्हळ पैं झाला ॥ ३० ॥ बुध म्हणे तियेच्या सखियांसी । तुम्हांत ही सुंदर कोण रूपयौवनेंसीं । लावण्य पाहतां पृथ्वीसी । हीसमान दुजी नाहीं ॥ ३१ ॥ हिचें देखोनि लावण्य । सुरनरकिन्नरां काम गहन । इचा भ्रतार आहे कोण । काय कारण विसंबला ॥ ३२ ॥ ऐसें ऐकोनि बुधाचें वचन । ऐलरायाच्या दूतीं जाण । सांगों आदरिलें समूळ कथन । सावधान अवधारा ॥ ३३ ॥ अहो आमुचा प्रभु निश्चितीं । याची सेना सेवक संपत्ती । सर्वां शापें पावली स्त्रीत्वप्राप्ती । हें नवल मुनि येथें झालें ॥ ३४ ॥ अहो जी मुनि या वनाभीतरीं । पुरुष आहेत कीं नाहींत निर्धारीं । आमचे प्रारब्धाची नवलपरी । स्त्रीरूप होवोनियां ठेलों ॥ ३५ ॥ या पर्वताच्या माथां जाण । बहुसाल पुरुष असती जन । परी आमचें प्रारब्ध असे हीन । योषिता करोन ठेविलें ॥ ३६ ॥ मुनि म्हणे तयांसी । तुम्ही विचरा या वनप्रदेशीं । कीं पुरुष त्यांचे सेवेसी । करोनि सावकाशीं वसावें ॥ ३७ ॥ ऐसें सोमसुतें[६] बोलोन । तंव समीप ऐला आली जाण । बुधासी साष्टांगें करोनि नमन । कर जोडोन उभी असे ॥ ३८ ॥ इंदुसुतें म्हणे कमलनयने । सुभगे सुंदरे चंद्रानने । तुज देखिल्या भूकतहाने । सर्व विसरिजे राजबाळे ॥ ३९ ॥ मी चंद्राचा सुत जाण । मज वरावें स्वइच्छेंकरून । ऐसें ऐकोनि बुधाचें वचन । ऐला काय बोलली ॥ ४० ॥ चहूंकडे पाहे सखीजनांसी । तंव कोणी न दिसे निर्भयेंसीं । निःशंक निर्लज्ज होवोनि मानसीं । वचन त्या बुधासी बोलती झाली ॥ ४१ ॥ अगा ये सुंदरा सोमसुता । अत्यंत सज्ञाना गुणवंता । मज अभय देईं आतां । मी तुझी कांता होतसें ॥ ४२ ॥ ऐकोनि तियेचें वचन । संतोषला सोमनंदन । तये वनीं किंचिद्दिन[७] । उभयतां क्रीडा करीत होतीं ॥ ४३ ॥ तंव कोणे एके समयीं माधव[८] मास । घेवोनि सुंदर ऐलेस । बुध क्रीडतां होवोनि संतोष । आनंदा दोघें पावलीं ॥ ४४ ॥ ऐला ही त्या मासांतीं । पुरुषत्व पावोनि भूपती । बुधासी म्हणता झाला सेनासंपत्ती । कोठें गेली माझी मुने ॥ ४५ ॥ तंव इंदुसुत म्हणे रायासी । ऐकें सावध परियेसीं । तुम्ही निद्रित असतां सेजेसीं । अपार मेघ वर्षला ॥ ४६ ॥ पर्जन्य वर्षला शिळाधारीं । तव सैन्या झाली चकचुरी । तुज असतां मम आश्रमाभीतरी ।

[१] संशय. [२] स्त्री. [३] प्रकार. [४] अरण्यांत. [५] थोड्या दूतांसह. [६] बुधानें. [७] कांहीं दिवस. [८] वैशाख महिना.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

प्राण वांचला राजेंद्रा ॥ ४७ ॥ राजा म्हणे बुधासी। माझा पुत्र शशिबिंदु नामेंसीं। राज्य करितो आपुले देशीं। मी सैन्येंसीं भ्रष्टलों ॥ ४८ ॥ आतां त्यजीन आपुला प्राण । एकला वांचल्या फळ कोण । राज्यासी जातां सैन्येंवीण । दुःख दारुण होतसे ॥ ४९ ॥ येरु म्हणे तुवां रहावें स्वस्थचित्तें। सांडोनि सैन्यचिंता येथें। फळमूळ भक्षोनि दिवस किंचितें। पुढें हित करीन तुझें ॥ ५० ॥ ऐकोनि सोमसुताचें वचन । राजा ऐल आश्रमीं राहोन । पूर्णमास भरतां जाण । स्त्रीरूप धरिता जाहला ॥ ५१ ॥ धरोनियां स्त्रीरूपासी । बुध ऐल क्रीडतां वनासी। पुत्र झाला पुरूरवा नामेंसीं। अति प्रसिद्ध धर्मात्मा ॥ ५२ ॥ सोमसुतापासोनि संभूत। ऐलेसी पुरूरवा झाला सुत। पुढील कथा सुनिश्चित। सावचित्त ऐकावी ॥ ५३ ॥ एका जनार्दना शरण। पुढील कथा अति गोड निरूपण। श्रोता वक्ता श्रीजनार्दन। श्रीरामरामायण जाण तेथें ॥ ५४ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां ऐलाख्याने चतुःषष्टितमोऽध्यायः ॥ ६४ ॥ ओंव्या ॥ ॥ ५४ ॥

अध्याय पांसष्टावा

॥ श्रीमहाविष्णवे नमः ॥ श्रीराम म्हणे लक्ष्मणभरतांसी । कर्दमपुत्रकथा ऐसी। पुढें वर्तलें तें सावकाशीं। अवधानेंसीं अवधारा ॥ १ ॥ ऐलबुधांपासून। पुरूरवा पुत्र झाला जनन। तदनंतर बुध सज्ञान। काय करिता पैं झाला ॥ २ ॥ पाचारोनि सर्व मुनी। च्यवन भृगु तपोधनी। पुलस्त्यादि श्रेष्ठ ब्राह्मणीं। ॐकार वषट्कार पैं आले ॥ ३ ॥ सोमसुत म्हणे ऋषींसी। परिसा कर्दमऋषीच्या पुत्रकथेसी। ऐलनामें स्वधर्मेंसीं। राज्य करीत पराक्रमें ॥ ४ ॥ तो आला या वना पारधीसी। सैन्येंसहित महादेवें शाप त्यासी। दिधला असतां त्याच्या हितासी। तुम्ही समस्तीं विचारा ॥ ५ ॥ ऐकोनि सोमसुताचें वचन। ऋषीश्वरां संतोष अति गहन। समस्त एकवट मिळोन। बोलावया उपक्रम करिते झाले ॥ ६ ॥ ऋषी म्हणती बुधासी। पार्थिवाचे उःशापासी। करावें अश्वमेध यज्ञासी। तृप्त सुरवरांसी करूनी ॥ ७ ॥ हेचि एक कर्तव्यता। अवश्य करावें चंद्रसुता। या पुण्यासी नाहीं समता। विचारितां त्रैलोक्यीं ॥ ८ ॥ ऐसें ऋषीश्वरांचें मधुर भाषण। ऐकोनि समस्तीं संतोषोन। महादेवाप्रीत्यर्थ यज्ञ। करिते झाले ते काळीं ॥ ९ ॥ संवर्तकादि मुनिश्रेष्ठ। अति सज्ञान कर्मनिष्ठ। तयांतें पाचारोनि स्पष्ट। यज्ञ वरिष्ठ आरंभिला ॥ १० ॥ यज्ञसमाप्तीचे अंतीं। येवोनियां गिरिजापती। म्हणता झाला सोमसुताप्रती। धन्य धन्य हिमकरात्मजा ॥ ११ ॥ धन्य येथींचे ब्राह्मण। धन्य बुधाश्रमासमीप यज्ञस्थान। धन्य तुमचा भावार्थ देखोन। प्रीतिप्रसन्न मी झालों ॥ १२ ॥ प्रसन्न झालीं पार्वतीपरमेश्वर। सोमसुत मागता झाला वर। कर्दमप्रजापतीचा ऐल कुमर। शापावेगळा करावा ॥ १३ ॥ ऐल हा कर्दमसुत। शापापासोनि करावा मुक्त। महादेव म्हणे सत्य सत्य। शापनिर्मुक्त नृप केला ॥ १४ ॥ शापावेगळा झाला पृथ्वीपती। आपुलिया निजस्थाना जाती। समस्त ऋषी आणि पार्वतीपती। मागें बुधें काय केलें ॥ १५ ॥ प्रतिष्ठान नामें नगर। कर्दमसुतासी वस्तीसी थोर। वसवोनियां राजेश्वर। राज्यीं ऐल स्थापिला ॥ १६ ॥ ऐसें कर्दमसुताचें आख्यान। श्रीरामें बंधूंसी सांगोन। लक्ष्मणाप्रति पुनरपि वचन। बोलता झाला रावणारी ॥ १७ ॥ वसिष्ठ वामदेव जाबाली। कश्यपादिकरोनि ऋषिमंडळी। पाचारीं बा शीघ्रकाळीं। आणि नृपवर पृथ्वीचे ॥ १८ ॥ घोडा आणावा सुंदरवदन। सर्वांग शुभ्र श्यामकर्ण। सुलक्षणीं विराजमान। देखतां मन निवे जनांचें ॥ १९ ॥ ऐसें राघवें बोलिल्यावरी। शीघ्र लक्ष्मणें ते अवसरीं। दूत पाठवोनि त्वरेंकरीं। समस्त ऋषी पाचारिले ॥ २० ॥ आले कोण कोण ऋषीश्वर। तयांचीं नामें सविस्तर। श्रोते होवोनि सादर। सावधान परिसावीं ॥ २१ ॥ ज्याच्री आज्ञा परम मोठी। रविमंडळीं तपे लंगोटी। धाकें कृतान्त न उघडी दृष्टी। तो वसिष्ठ जगजेठी स्वयें आला ॥ २२ ॥ तदनंतरें वामदेव। आला जयाचा सर्वभूतीं भगवद्भाव। आत्मत्वें सृष्टि

१ उत्पन्न. २ तपस्वी. ३ देवताविशेष. ४ राजाचे. ५ बुधाला. ६ भक्ति. ७ प्रीतीनें संतुष्ट. ८ श्रीराम. ९ बोलावीं. १० मोठी. ११ लंगोटी. १२ यम.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

न्याहाळी सर्वे । चराचरीं देखे हरिरूप ॥ २३ ॥ जाबाली महातपोधन । वेदशास्त्रीं महानिपुण । तोही श्रीरामदर्शनालागून । शिष्यांसहित पैं आला ॥ २४ ॥ कश्यपें नवी सृष्टि केली । अत्रीनें दुष्काळीं प्राणिरक्षा केली । अगस्तीची ख्याति आगळी । अनागतें भाष्य वदला जो ॥ २५ ॥ विश्वामित्रासि गायत्री प्रसन्न । तपोबळें सृष्टि करी निर्माण । नारदही तेथें आला जाण । ब्रह्मवीणा घेवोनि खांदीं ॥ २६ ॥ आणिक अगणित ऋषीश्वर । आले ॐकार वषट्कार । आणि पृथ्वीचे राजे थोर । श्रीरामदर्शना पैं आले ॥ २७ ॥ तदनंतरें हरिवाहिनी । शीघ्र आली आज्ञेकरोनी । तयांचीं नामें परिसावीं कानीं । ऐसें श्रोतेजनां वाटतसे ॥ २८ ॥ सुग्रीव अंगद नळ नीळ । पनस केसरी तरस तरळ । हेमकूट गज गवाक्ष प्रबळ । अरिदळणीं समर्थ जे ॥ २९ ॥ आला हनुमंत वायुसुत । बिभीषण राक्षसपंडित । सनातन जांबवंत । निजदळेंसीं तो आला ॥ ३० ॥ आला सुषेण वैद्यराज । जो कां चतुराननाचा आत्मज । अयोध्येसी राघवानुज । आला निजचमूसीं ॥ ३१ ॥ आले भट्ट पौराणिक । शास्त्रज्ञ पंडित ज्योतिषी गणक । आले नटनाटक । मंत्रधारक ॐकार ॥ ३२ ॥ आले भाट नागरी । आले देशमुख चौधरी । जे ब्राह्मण राष्ट्राभीतरीं । तेही आले अश्वमेधा ॥ ३३ ॥ श्रीरामें समस्तां देवोनि मान । केलें अर्घ्यपाद्यादिपूजाविधान । वस्त्रें भूषणें नाना देऊन । निजासनीं बैसविलें ॥ ३४ ॥ तदनंतर श्यामकर्ण वारू । पृथ्वीवरी नव्हे स्थिरू । मनोवेगाचा लंघोनि पारू । सगुण सुंदरू आणिला ॥ ३५ ॥ तया अश्वाचें करितां वर्णन । चतुरानना पडे मौन । तेथें मी बापुडें अपुरतें दीन । कैंवी मज वर्णन करवेल ॥ ३६ ॥ करोनियां दीक्षास्नान । वारूसी पूजी रघुनंदन । तया वारूवापुढें पवन । लज्जायमान शंकित ॥ ३७ ॥ रत्नमेखळा वारूचे कंठीं । कस्तूरी चंदन ललाटीं । केशराची शोभे उटी । देखतां दृष्टी मन निवे ॥ ३८ ॥ कंठीं नवरत्नांचें भूषण । पीतांबर पांघरूण । चरणीं नूपुरें करिती गर्जन । देखतां मन पैं निवे ॥ ३९ ॥ क्षराक्षरातीत अक्षरीं । पत्रिका लिहिली साजिरी । जो क्षत्रिय होईल तेणें निर्धारीं । वारू धरोनि युद्ध कीजे ॥ ४० ॥ दिसे वारू वोतींव । मान कळायुक्त कांतींव । रोमें मृदु अति अपूर्व । देहीं बिंबें उमटती ॥ ४१ ॥ ऐसा श्यामकर्ण वारू । तेजें जैसा हिमकरू । अलांछन अति सुंदरू । पाय स्थिरू नव्हे ज्याचा ॥ ४२ ॥ इंद्रनीळाहूनि आगळें । दिसती अंबेकांचीं बुबुळें । माणिक रंगावरी सोज्ज्वळें । ऐसीं रत्नें जडियेलीं ॥ ४३ ॥ ऐसे तयाचे नयन । सप्तविंशति भोंवरे पूर्ण । अश्वाचा वर्ण कोण । सावधान अवधारा ॥ ४४ ॥ सर्वांगवर्ण माणिकाचा । अंजनवर्ण श्रवणाचा । इंदुश्वेत ललाटींचा । तेजें दशदिशा उजळल्या ॥ ४५ ॥ आननीं श्रीजांबूनदांची । परिवेष्टित प्रभावळी हिऱ्यांची । आंदुवांवरी नवरत्नांची । चरणीं घागऱ्या वाजती ॥ ४६ ॥ चरणीं पंधरयांचीं नूपुरें । डोलतां वाजती अति गजरें । हय आपुले नटकारें । आकाशपुत्रें स्थिर करी ॥ ४७ ॥ आपुली भाषा वदे वारू । हिंसे तेणें नाद थोरू । गर्जू लागती सातही समुद्र । ऐसा अश्व रावणारीचा ॥ ४८ ॥ पालाणिला अपूर्व भारी । रत्नें जडलीं हारोहारीं । गळां नवरत्नांची सरी । मुकुटीं बांधिली पत्रिका ॥ ४९ ॥ पत्रिके ऐसें लिहिलें ऐका । जो धनुर्धर असेल निका । तेणें वाचोनियां पत्रिका । मग वारू धरावा ॥ ५० ॥ अश्व धरावा बळियाढें । संग्राम करोनि सोडूं पुढें । ऐसा वारू देखोनि तपोधन गाढे । बहुत सुख पावले ॥ ५१ ॥ सवें धनाचिया मांदुसा । तिळजवांचे पर्वत सहस्रशा । घृताच्या कावडी अगणित सहसा । वस्त्रें अनुपम्य आणिलीं ॥ ५२ ॥ कोट्यनुकोटि गोधनें । तेल उडीद परिमळद्रव्यें गहनें । पूगीफळें दिव्यें पानें । आणिक सामग्री नेणों किती ॥ ५३ ॥ सामग्री देखोनि श्रीरघुवीर । भरतलक्ष्मणां आनंद थोर । यज्ञ करावया स्थळविचार । करिते झाले ते काळीं ॥ ५४ ॥ सुवर्णाची मूर्ति जानकी । दीक्षेकारणें केली निकी । तें देखोनि आठवली पद्माक्षी । श्रीरामासी ते काळीं ॥ ५५ ॥ मोहें कळवळलें मन । सद्गदित झाला रघुनंदन । तंव ऋषीश्वरां जाण-

१ पाही. २ मोठी. ३ पुढील. ४ वानरसेना. ५ शत्रुघ्न. ६ घोड्याला. ७ केश. ८ अधिकतेनें. ९ नेत्रींचीं. १० सत्तावीस. ११ सोन्याची. १२ वायु. १३ शृंगारिला. १४ वीरानें. १५ पेट्या. १६ सुपाऱ्या. १७ कमलनयना (सीता)

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वली खूण । आशीर्वाद देते झाले ॥ ५६ ॥ जानकी आणि पुत्रांसहित । अयोध्येसी राज्य कराल सत्य । हें ऐकोनि ऋषिभाषित । संतोषयुक्त श्रीराम ॥ ५७ ॥ यज्ञभूमि पहावया रघुनंदन । निघाला सवें तपोधन । आणि सेनासहित बंधुजन । नटनाटक निघाले ॥ ५८ ॥ भाट नगरीं नृत्यकारी । वीणा वेणु वाद्यें नानापरी । प्रवेशले नैमिषारण्य-क्षेत्रीं । गोमतीतीरीं स्थळ नेमिलें ॥ ५९ ॥ सांगातें तिघी जणी माता । अंतःपुरस्त्रिया समस्ता । आणि नगरयोषिता । नैमिषारण्या आणिल्या ॥ ६० ॥ श्रीराम म्हणे भरतासी । याचकाचे इच्छेनिर्सी । जें जें पाहिजे जयासी । या समयासी तें दीजे ॥ ६१ ॥ याचकाची इच्छा पूर्ण । तितुकें आपण घावें धन । मग काय करिता झाला रघुनंदन । तें सावधान परियेसा ॥ ६२ ॥ तंव राष्ट्रींचे भूपाळ । घेवोनि आपुलालें दळ । नैमिषारण्या आले सकळ । अश्वमेध पहावया ॥ ६३ ॥ श्रीरामें पूजोनि ब्राह्मणभूपाळ । वस्त्रें भूषणें देवोनि सकळ । सुखी केलें त्रैलोक्य प्रबळ । स्वानंदें ऋषी बोलते झाले ॥ ६४ ॥ ऋषी म्हणती पूर्वी यज्ञ । ऐसा कोणीं न केला जाण । देवोनियां बहुत धन । बंदीजन सुखी केले ॥ ६५ ॥ लक्ष्मणाचे सांभाळीं करूनि वारू । भरताचे स्वाधीन राजोपचारू । आणि दातव्य धन वस्त्रें अलंकारू । यांचें आधिपत्य पैं केलें ॥ ६६ ॥ शत्रुघ्नासी सांगितलें कार्य थोर । राजे ऋषी ब्राह्मण यांचा आदर । गंधाक्षता तांबूल इतर उपचार । अन्नपान पैं दीजे ॥ ६७ ॥ ऐसा नैमिषारण्यीं सोहळा । करी श्रीराम घनसांवळा । सुखें असतां त्रैलोक्या सकळा । पुढें काय वर्तलें ॥ ६८ ॥ नैमिषारण्यींच्या क्षेत्रीं । श्रीराम ऋषींसहित आनंदस्थितीं । यज्ञ करितो ऐसें वाल्मीकाप्रती । जाणवलें ते काळीं ॥ ६९ ॥ सवें घेवोनि दोघे कुमार । सुलक्षणी सुंदर रूपधर । येता झाला वाल्मीक ऋषीश्वर । फळसंभारें घेवोनी ॥ ७० ॥ येतां दुरोनि देखिला यज्ञ । अद्भुत जयाचें पुण्य गहन । करितां ब्रह्महत्या होय दहन । दर्शनें जन उद्धरती ॥ ७१ ॥ तया नैमिषारण्याचे एकांतस्थळीं । वाल्मीक राहिला गुप्त जवळी । तया बाळकांप्रति ते काळीं । संवाद करिता पैं झाला ॥ ७२ ॥ तुम्ही दोघे मिळोन । जावें जेथें होतो यज्ञ । तेथें ऋषींप्रति शतकोटि गहन । रामायण वाचावें ॥ ७३ ॥ गावें ऋषींचे आश्रम-स्थळीं । गावें जेथें तेथें भूपांजवळी । गावें जेथें ब्राह्मणमंडळी । ऋत्विजांसमीप पैं गावें ॥ ७४ ॥ गावें श्रीरामाचे भवनीं । गावें राया भरताचे सदनीं । गावें जेथें बहुत मिळणी । योषितांची असेल ॥ ७५ ॥ सवें फळेंमूळें घेऊन । भक्षण करोनि करा गायन । कोणाचें द्रव्य न घ्यावें आपण । वनवासीं प्रयोजन नाहीं त्यासी ॥ ७६ ॥ द्रव्यलोभ न करून । निर्लोभ दोघे करा कीर्तन । श्रीराम पुसेल तुम्ही कोण । सांगा शिष्य वाल्मीकाचे ॥ ७७ ॥ स्वरयुक्त करा कीर्तन । मूर्च्छना मंजुळ कंपित गायन । आलाप भार्यासहवर्तमान । ताल-नृत्यसहित पैं ॥ ७८ ॥ इतुकें करावें प्रातःकाळीं । येरीं आज्ञा वंदोनि निढळीं । वाल्मीक म्हणे तयां-जवळी । श्रीराम जनक जगाचा ॥ ७९ ॥ उत्पत्ति स्थिति प्रळय जाण । हें जग श्रीरामापासून । लय पावतां श्रीरामीं मग्न । सत्य स्वयें मी जाणें ॥ ८० ॥ ऐकोनि वाल्मीकाचें वचन । संतोषले दोघे जण । हर्षयुक्त झालें मन । आज्ञा वंदोनी गुरूची ॥ ८१ ॥ नैमिषारण्या समीपतेसीं । वाल्मीकासहित क्रमिली निशी । प्रभाते उठोन स्नानसंध्येसी । दोघे वीर करिते झाले ॥ ८२ ॥ करोनियां संध्यास्नाना । वाल्मीका करोनि प्रद-क्षिणा । दोघे कैसे शोभले जाणा । चंद्रसूर्यांसारिखे ॥ ८३ ॥ चंद्रगिरी द्रोणगिरी । जैसे शोभती दुग्धार्णवतीरीं । तैसी शोभा दोघां कुमरीं । धगधगीत हुताश जैसे ॥ ८४ ॥ आधींच सूर्यवंशी वीर । दोघे प्रतापाचे सागर । दोघे दिनकरवंशींचे कुमर । वीरशृंगार करिते झाले ॥ ८५ ॥ आंग्या ल्याले दोघे अंगीं । विजारा शोभती दोघांलागीं । कुसुंबी पागोटीं ते प्रसंगीं । डोईं बांधिलीं कुसरीनें ॥ ८६ ॥ हेमकटिबंध तयावरी । बाहुभूषणें उरीं शिरीं । रत्नजडित कंकणें करीं । तेज अंबरीं फांकत ॥ ८७ ॥ रत्नजडित चरणीं पादुका । तयांवरी नूपुरें शोभती देखा । कटिभागीं क्षुद्रघंटिका । कांसे

१ बरोबर. २ हवालीं. ३ फलसामग्री. ४ सूक्ष्म [illegible]. ५ रागिणींसह. ६ मस्तकीं. ७ रात्र.

८ क्षीरसमुद्रतीरीं. ९ अग्नि.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

पीतांबर कसिलासे ॥ ८८ ॥ ललाटीं कस्तूरीचा टिळा । तयावरी अक्षता अति सोज्ज्वळा । नवरत्नजडित गळां माळा । वोपें गंडस्थळां फांकत ॥ ८९ ॥ श्रवणीं रत्नजडित कुंडलें सुरेख । तयांवरी नागोत्तर ल्याले देख । करांगुळीं मुद्रिका लखलख । तेणें दशदिशा शोभती ॥ ९० ॥ खांदीं वाहोनि रुद्रवीणा । गुरूसी करोनि प्रदक्षिणा । निघाले पहावया लीलारचना । श्रीरामाच्या यज्ञाची ॥ ९१ ॥ येवोनि श्रीरामाच्या भवनासी । सभा देखिली सहित ऋषी । पुराणिक वैदिक ज्योतिषी । नटनाटकी बैसले ॥ ९२ ॥ बैसले पृथ्वीचे भूपाळ । बैसले पंडित शास्त्रज्ञ प्रबळ । बैसले विद्वांस ज्ञानकुशळ । आध्यात्मिक चर्चा करिताती ॥ ९२ ॥ बैसले देशींचे नागरिक जन । बैसले अग्निहोत्री ब्राह्मण । बैसले हरिदासकीर्तन । श्रीरामगुण वर्णीत ॥९४॥ ऐसी सभा प्रसन्नवदन । श्रीराम करीतसे संध्यातर्पण । समीप उभे भरत-शत्रुघ्न लक्ष्मण । देखोन गायन मांडिलें कुमारीं ॥ ९५ ॥ सप्तस्वर मूर्च्छनायुक्त । आलाप भार्यांस-हित कंपित । तारें[2] मंद्रें घोर आहेंत प्रत्याहेंत । हीं लक्षणें प्रसंगीं बोलिलीं ॥ ९६ ॥ ऐसे लक्षणीं युक्त रुद्रवीणा । करिती सुस्वर गायना । ध्रुवपाठाची प्रबंधरचना । सप्ततालीं गाती दोघे ॥ ९७ ॥ हाव-भाव कटाक्षप्रदेशीं । नृत्य करिती देखोनि श्रीरा-मासी । अनागेत[3] भाष्य वदला ऋषी । त्या रामा-यणासी पैं गाती ॥ ९८ ॥ अनागत भाष्य रामायण । श्रीरामाचें जन्मकथन । आणि रावणाची उत्पत्ति निधन[4] । जानकीवन-प्रयाण गाइलें ॥ ९९ ॥ वनीं दोघे पुत्र झाले । तेंही तेथें संपूर्ण गाइलें । ऐकोनि सभालोक आनंदले । श्रीरामचरित्र ऐकतां ॥ १०० ॥ श्रीरामें नित्यनेम सारून । ऋषिसभा प्रसन्नवदन । कुमारांचें ऐकोनि गायन । उल्हासे मन रामाचें ॥ १ ॥ तंव खांदीं घेवोनि ब्रह्मवीणा । नारद आला रामदर्शना । रामें देखोनि ब्रह्मनंदना । पूजाविधानें पूजिलें ॥ २ ॥ आश्चर्य झालें समस्तांसी । आश्चर्य करिती महा-ऋषी । आश्चर्य देशिकां नगरवासियांसी । श्रीरा-मासी आश्चर्य ॥ ३ ॥ मधुर गायन कुमारांचें । ऐकोनि मन तोषलें श्रीरामाचें । म्हणे हे अल्प-वयाचे । धन्य यांचे जननीजनक ॥ ४ ॥ श्रीराम म्हणे भरतासी । सुवर्ण बहुसाल द्यावें यांसी । मग भरतें तत्काळ दूतांसी । भांडारगृहासी पाठ-विलें ॥ ५ ॥ आणिलें बहुसाल धन । कुमारांसी जवळ पाचारून । म्हणे हें अल्प सुवर्ण । अंगीकार पूर्ण करावा ॥ ६ ॥ तंव ते म्हणती दोघे जण । नाहीं सुवर्णी प्रयोजन । आम्ही वनवासी तापस पूर्ण । वनफळें भक्षून वसतसों ॥ ७ ॥ न घेऊं सुवर्ण श्रीरघुनाथा । आम्हां वनवासियां न सुव-र्णकथा । धन होय हें मूळ अनर्था । त्या पंथा आम्ही न[5] वचों ॥ ८ ॥ देहगेहदारासक्ती । यांसीं होय पुनरावृत्ती । ऐसे अनर्थ द्रव्याप्रती । सत्य श्रीरघुपति सर्वज्ञा ॥ ९ ॥ ऐसें वैराग्ययुक्त बोलणें । कुमारांचें ऐकोनि रघुनंदनें । आनंदलीं पुरजनांचीं मनें । बाळकवचनें सुखावलीं ॥ ११० ॥ श्रीराम म्हणे यांचें गायन । ऐकोनि सुख झालें गहन[6] । परी हे कोणाचे कोण । समूळ कथन पुसों इच्छी ॥ ११ ॥ तयांतें म्हणे श्रीरघुपती । तुम्ही कोणाचे कोठील तुमची वस्ती । काव्यकर्ता कोणे देशाप्रती । वसे तें निगुतीं सांगा आम्हां ॥ १२ ॥ कुमार म्हणती अहो भूपाळा । वाल्मीकमुनीनें हे काव्यकळा । केली कोटिशत स्वर्गमाळा । अना-गत भाष्य रामायण ॥ १३ ॥ हें केलें परोप-कारार्थ । श्रवणमात्रें जग होय पुनीत[8] । कामिकांचें पुरे आर्त । श्रीरामचरित ऐकोनी ॥ १४ ॥ ऐसें बोलोनियां बाळक । आज्ञा घेवोनि जेथें वाल्मीक । तेथें आले क्षणामाजी देख । ऋषिसंमुख उभे ठेले ॥ १५ ॥ सांगितला सर्व वृत्तान्त । वर्तला जो चरि-तार्थ । तें ऐकोनि ऋषि विस्मित । उल्हास बहुत पैं झाला ॥ १६ ॥ एका जनार्दना शरण । पुढें गोड निरूपण । होईल श्रीरामाचें आगमन । ऋषिदर्शन घ्यावया ॥ ११७ ॥ स्वस्ति श्रीभावा-र्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां अश्वमेध-प्रकरणं नाम पंचषष्टितमोऽध्यायः ॥ ६५ ॥ ओंव्या ॥ ११७ ॥

अध्याय सहासष्टावा

॥ श्रीरविवंशभूषणाय नमः ॥ येरीकडे श्रीरामाचा वारू । निघाला भूमीवरी स्थिरू । चालतां हेलावे

१ तेज. २ हे स्वरप्रकार आहेत. ३ पुढील. ४ मरण. ५ नारदाला. ६ जात नाहीं. ७ मोठें. ८ पवित्र. ९ इच्छा. १० घोडा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सागरू । तेजें दिनकरू लोपला ॥ १ ॥ तेजें हीन दिशेचा प्रांत । वारुतेजें लखलखित । अंगभारें गजगती चालत । जेंवी आदित्य पूर्वेसी ॥ २ ॥ मागें दळभार अगणित । सांगातें वीर अपरिमित । शत्रुघ्न आणि भरत । समवेत निघाले ॥ ३ ॥ मार्गीं राखितां ठायीं ठायीं । उल्लंघिले देश नाना पाहीं । ऐसें क्रमोनि वनें घोर महीं । वाल्मीकाश्रमा वारू आला ॥ ४ ॥ तेथें झाला चमत्कार । वना गेला होता कुश कुमर । आश्रमीं लहु परम शूर । मातेजवळी खेळत असे ॥ ५ ॥ तेथें जाहली नवलपरी । लहु खेळतां निघाला बाहेरी । तंव वारू आश्रमाचे परिसरीं । येतां देखिला तयानें ॥ ६ ॥ घोड्याभोंवताले पाहे । खालतें वरतें देखत आहे । हास्य करोनि म्हणे सुंदर हें । घोडें कोणाचें येथें आलें ॥ ७ ॥ शिरींची सोडिली पत्रिका । कुंकुममंडित सुरेखा । वाचितां तया बाळका । अर्थ तेथींचा अवधारा ॥ ८ ॥ सूर्यवंशीं श्रीरघुनाथ । जयाचा पिता श्रीदशरथ । तिघां बंधूंसमवेत । करीत राज्य अयोध्येचें ॥ ९ ॥ तयाचा हा जाणा वारू । पृथ्वीवरी सोडिला अति सुंदरू । जो असेल वीर शूरू । तयानें हा राखावा ॥ १० ॥ याच्या सोडवण्याकारण । सवें असे अमित सैन्य । तें जिंतिल्या मग श्रीरघुनंदन । तदनंतरें सोडवील ॥ ११ ॥ वाचून लहूनें पत्रिका । हांसोनियां फाडिली देखा । त्याउपरी तया बाळका । काय बुद्धी आठवली ॥ १२ ॥ वारूचे कंठींची रत्नमाळा । घालोनियां आपुले गळां । आनंदला तये वेळां । वारु शेंडिये धरोनी ॥ १३ ॥ गळां घालोनी अंगोस्तर । अश्व कर्दळीवनां ने कुमर । तेथें बांधोनि सुकुमार । युद्धालागीं सिद्ध झाला ॥ १४ ॥ तंव आले रक्षकगण । म्हणती वारु हरिता कवण । विचारिते झाले बळवान । लहुवा पुढें देखिलें ॥ १५ ॥ म्हणती हें दहा वर्षांचें बाळक । श्रीसीतेसारिखें रूप सुरेख । ठाणमाण अलोलिक । पाहती कौतुक तयाचें ॥ १६ ॥ मुनींनीं जाणविला सीते वृत्तान्त । माते तुझ्या लहूनें केला अनर्थ । घोडा चोरोनि कर्दळीवनांत । ठेवोनि तेथ उभा असे ॥ १७ ॥ तया वारूचे सोडवणे । आलें वीरांचें धांवणें । अश्व गज अगणित सैन्यें । तिंहीं आश्रम वेढिला ॥ १८ ॥ आम्हीं सांगीतलें लहूसी । अश्व सोडीं म्हणितलें त्यासी । नायके आमुचिया बोलासी । म्हणोनि तुजपासीं निरूपिलें ॥ १९ ॥ येणें अन्याय मोठा केला । वारु कैंचा येणें धरिला । आतां दळभारें चालिला । नेणों कैसें होईल ॥ २० ॥ कुश गेला वना फळांसी । आतां सीते कैसें करिसी । अवधि पुरली आमुच्या जिण्यासी । पुढें कांहीं सुचेना ॥ २१ ॥ याचा अन्याय परम मोठा । वारु चोरोनि बांधिला खांबटा । पत्रिका फाडोनि हार कंठा । आपुलिये घातला ॥ २२ ॥ बाळबुद्धि आपण होऊन । येणें शत्रु केला श्रीरघुनंदन । आश्रम सांडून वन । सेवूं आम्ही जानकिये ॥ २३ ॥ श्रीरामचंद्राचिये कटका । धरितो युद्धाचा आवांका । उभी राहोनि नावेका । आपुले नयनीं पहावें ॥ २४ ॥ अवो सीते अवधारीं । म्हणती वारु धरिला ऋषीश्वरीं । युद्ध मांडिलें महामारी । तापसां भय ओढवलें ॥ २५ ॥ तापसांचीं स्त्रियाबाळें । धरोनि नेतील वो सकळें । ऐसीं गजबजलीं द्विजकुळें । हडबड थोर मांडली ॥ २६ ॥ एक म्हणती उठा पळा । भोंवतें देखती उदंड दळा । तंव पोरें करिती कोल्हाळा । ऋषिपत्न्या आक्रंदती ॥ २७ ॥ एक ऐसें म्हणती ऋषी । हीं तिघें द्यावीं तयांपासीं । एक म्हणती भीड कायसी । यांची तुम्हां पडलीसे ॥ २८ ॥ मग म्हणे जनकदुहिता । तुम्ही किती काय बोलतां वृथा । मातें देवोनि तयांच्या हाता । आपण निसुर राहिजे ॥ २९ ॥ मज द्यावें तयांसी । आपण स्वस्थ रहावें ऋषी । आम्ही भोगूं निजकर्मासी । आनंदेंसीं रहावें तुम्हीं ॥ ३० ॥ निवारेल तुमचें अरिष्ट । सकळां होईल सुखसंतुष्ट । विचार न दिसे दुसरा स्पष्ट । दोघां कुमरांसगट मज द्यावें ॥ ३१ ॥ ऐसी श्रीरामाची अंतुरी । पडली चिंतेचे सागरीं । रुदन करी नानापरी । तें लहूनें देखिलें ॥ ३२ ॥ मातेसी देवोनि आश्वासन । म्हणे नको करूं वो रुदन । या मशकांचा पाड कोण । दळ विभांडीन क्षणमात्रें ॥ ३३ ॥ इतुकें बोलतां ते अवसरीं ।

१ सूर्य. २ प्रांतामध्यें, ३ आंगवस्त्र. ४ केळींच्या रानांत. ५ सैन्यसमुदाय. ६ खांबाला. ७ सैन्याशीं. ८ महाभयंकर. ९ ब्राह्मणमंडळी. १० पुष्कळ. ११ निर्भय. १२ स्त्री.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सैनिक आले आश्रमाभीतरीं । हडबड झाली ऋषीश्वरीं । आसनें चंचळ पैं केलीं ॥ ३४ ॥ लहु म्हणे ऋषिराजा । जरी होसी श्रीगुरु माझा । तरी ऐक माझे पैजा । मी जिंकीन नरवीर ॥ ३५ ॥ मी जाणें या सैन्यातें । तुम्हीं शंका न मानावी चित्तें। ऐसें बोलतां वाद्यध्वनीतें । ऋषीश्वरीं आयकिलें ॥ ३६ ॥ तयां वाजंत्रांची ध्वनी । दिशा दुमदुमिल्या तये क्षणीं । ढोल टिमक्या निशाणीं। नादें मेदिनी थरारली ॥ ३७ ॥ एकांपुढें एक वीर। सैन्य दाटलें अपार । भारापुढें चालिले भार। जैसे मेघ अंबरीं ॥ ३८ ॥ जैसे विद्युल्लतेचे थाट । अंबरीं दाटती कडकडाट । राघवसैन्य तैसें अचाट । आश्रमाभोंवतें पसरलें ॥ ३९ ॥ असिवार[1] नेणों किती । संख्या नाहीं भद्रजाती[2] । कोट्यनुकोटी रथ घडघडती । वीर पदाती अगणित ॥ ४० ॥ घोडियां बाणली मोहाळी । कंगरटोपा[4] राघावळी। आरसे बांधिले तयांतळीं । पांखरा तेजाळी अनुपम्य ॥ ४१ ॥ वीरां बाणलीं कवचें पूर्ण । सम्यक संजोगूनि निशाणें। आवांका धरोनि चौदा भुवनें। पाटा वाटूनि सांडूं म्हणती ॥ ४२ ॥ ऐसी राघवसैन्यसंपत्ती । वीर भुभुःकारें गर्जती । धाकें रसातळा क्षिती । जाऊं पाहे ते समयीं ॥ ४३ ॥ दाशरथी वीर निधडे । एक निघती एकापुढें । शत्रुघ्न राखे चहूंकडे । मागें पुढें सांभाळून ॥ ४४ ॥ पराक्रमें गति गहन। सेनापति झाला शत्रुघ्न । वाल्मीक ऋषीनें देखोन । मग लहुवासी बोलाविलें ॥ ४५ ॥ आरता येईं राघवकुमरा। अरे लहुवा परम शूरा । उठावल्या महावीरा। युद्ध करीं समरांगणीं ॥ ४६ ॥ नाहींतरी वारू तयांचा। सोडून दे करीं माझी वाचा। आला लाग परवीरांचा । तो साहिला पाहिजे ॥ ४७ ॥ ऐकोनि वाल्मीकाचें वचन । आवेशें बोले लहुवा जाण। म्हणे रविवंशाचा सत्य मी नंदन। तरी हें सैन्य मारीन ॥ ४८ ॥ आमुचा जन्म सूर्यवंशीं । आणि सामर्थ्य तुमच्या विद्येसी । जरी याचें भय धरीन मानसीं । तरी स्वर्गीं दव निर्भर्त्सिती ॥ ४९ ॥ मी जी तुमचा सेवक । बोलतसें गोष्ट एक। अश्व सोडितां विबुधाँदिक । तुम्हांसी काय म्हणतील ॥ ५० ॥ देखोनि चतुरंग दळभारू । भेणें ऋषीनें सोडिला वारू । ऐसी अपकीर्तीची लाज थोरू । होईल तुम्हां जी मुने ॥ ५१ ॥ पुरुषार्थें धरिला श्यामकर्ण। पूर्वींच म्यां जीवीं विचारून । आतां समरांगणीं मांडोनि ठाण । युद्ध करीन सत्राणें ॥ ५२ ॥ ऋषि म्हणे येणें धरिला धीर । पितयासारिखा परम शूर । परी एक भय उपजे उत्तर। बाळकाप्रति बोलिला ॥ ५३ ॥ अरे लहुवा सैन्य दुर्धर । तूं तरी बाळक सुकुमार । सोडीं अश्व परता सत्वर । समरांगणीं धीर न धरवे तुज ॥ ५४ ॥ सैन्य पेटलें महामारी । तुज कोणी नाहीं साहाकारी । कुश गेला वना तो झडकरी । ये अवसरीं न येचि ॥ ५५ ॥ लहु म्हणे ऋषि ताता। तुमची कृपा मज असतां । सैन्य विभांडीन पळ न भरतां । माझ्या पुरुषार्था पहावें ॥ ५६ ॥ दुजियाची जो इच्छा करी । जळो जळो तो संसारीं । तयाच्या जननीस लज्जा भारी । पूर्वजां उणें येईल ॥ ५७ ॥ धिक्धिक् तयाचा पुरुषार्थ । धिक्धिक् जिणें तयाचें व्यर्थ । धिक्धिक् तयाचें गोत। युद्धीं परते तो निंद्य ॥ ५८ ॥ धिग्धिग् तो मातेच्या कुशीं । वियोनि वंध्या म्हणती तिसी । लाज तयाचे वंशासी । ओझें पृथ्वीसी त्या नराचें ॥ ५९ ॥ तो मनुष्यरूपें केवळ श्वान । रासभाहूनि तो नर हीन। जयाचे वाटिवे मेडपण । वृथा वचन तयाचें ॥ ६० ॥ बोलासारिखें जो न करी । पुरुषार्थ मिरवी शब्दें करीं । तया नराचा जन्म संसारीं। पाषाणापरी जाणावा ॥ ६१ ॥ स्वयें न बोले वींढिवेसी । शत्रुनिर्दळणीं उल्हास मानसीं । आपपर नेणे रणभूमीसी । तोचि एक पुरुषार्थी ॥ ६२ ॥ क्षात्रधर्मी निधडा[9] पूर्ण। तृणप्राय देखे निजजीवन । रिपु निर्दळी थोर सान। न म्हणे तोचि पुरुषार्थी ॥ ६३ ॥ सर्व भूतीं दया पूर्ण । स्वकर्मविषयीं सावधान । गुरुभजनीं उदित मन। तोचि एक पुरुषार्थी ॥ ६४ ॥ जो न सांडी निजधर्मासी । स्वामिकाजीं नव्हे आळसी । मातृपितृभक्ति जयासी । तोचि एक पुरुषार्थी ॥ ६५ ॥ ऐसिया पुरुषाचें जें जिणें । तेंचि धन्य लहुवा

१ घोडेस्वार. २ हत्तींना. ३ मोहोरकी. ४ शिरस्त्राण. ५ घोड्यांचीं कवचें. ६ झुली. ७ देवादिक. ८ आसम ठोकून.

९ आवेशानें. १० शूरपणाला. ११ छातीचा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

म्हणे। त्यां जरी वारू सोडोनि देणें। लाजिरवाणें मम कुळा ॥ ६६ ॥ जे जे आले वीर उद्भट[2]। तयांचें करीन समसकट[3]। भरतलक्ष्मणादिक योद्धे श्रेष्ठ। गळां बांधोनि आणीन ॥ ६७॥ ऐकोनि बाळकाच्या बोला। ऋषीश्वरा आनंद झाला। जैसा समुद्र उचंबळला। पूर्ण चंद्रासी देखोनि ॥ ६८॥ शिष्य देखोनि स्वरूपज्ञानी। तेणें सुखावे श्रीगुरुजननी। तैसें ऋषीश्वराचे मनीं। आनंद-भरितें दाटलें ॥ ६९ ॥ ऋषि म्हणे रावणारिसुता। विजयी होईं युद्ध करितां। येरें चरणीं ठेविला माथा। मग पुढारां निघाला ॥ ७० ॥ आधींच धरणिजेचा बाळ। चालिला जैसा पर्वत विशाळ। यावा देखोनि सैन्या पळ। राघवाचे सूटला ॥७१॥ उदय होतां तमारी। अंधकार लंघी दिशा चारी। नातरी देखोनि सर्पारी। कद्रुसुतां आकान्त ॥ ७२ ॥ हांक दिधली वीरें जे। तेणें नादें अंबर गर्जे। ऐकोनि सैन्यें कांपिजे। दाशरथी वीर हो ॥ ७३ ॥ ऐसा सामोरा चालिला। शत्रुघ्नें पडँख-ळिला। म्हणे धीर धरीं लहुबाळा। रणीं उतावळा होऊं नको ॥ ७४ ॥ अरे तूं कोणाचा कोण। कोण जननी पिता कवण। वय तरी दिसतें सामान्य। पुरुषार्थ कठीण दिसताहे ॥ ७५ ॥ मग म्हणे जानकीचा बाळ। सूक्ष्म कैसा वडवानळ। हनुमेनें वेढिला द्रोणाचळ। तो वानर काय म्हणावा ॥ ७६ ॥ परिसा काय पाषाणपण। खुजट म्हणों न ये वामन। तारकारिपित्याचें वहन। तया काय चतुष्पद म्हणावें ॥ ७७॥ चिंतामणीस म्हणों न ये पाषाणखडा। कल्पत-रूच्या वृक्ष पडिपाडा। सुधारसासी कांजी जोडा। ज्ञाते पंडित न करिती ॥ ७८ ॥ इल्वलारीसी द्विज साधारण। कामधेनूस पशुसमान। सद्गुरु जो चैतन्यघन। तया मानणें मानव ऐसें ॥ ७९ ॥ हे चतुराची नव्हे युक्ती। ज्ञाते पंडित मिथ्या मानिती। मज बाळ ऐसें संग्रामाप्रती। न म्हणें सुमति वीरराजा ॥ ८० ॥ ऐकोनि लहुवाचें वचन। संतोषला कैकेयीनंदन। म्हणे बाळकाचा अभि-मान। वारू येणें एकलेनि नेला ॥ ८१ ॥ आणि सुरांसारिखी दाखवी प्रौढी। पुढील पाय मागें न पाडी। पहा हो याची धिटीव केवढी। शब्दीं अपरवंडी येऊं नेदी ॥ ८२ ॥ यासीं मज युद्ध करितां। लौकिकीं येईल पैं लघुता। म्हणतां शत्रुघ्नें बाळकावरता। रणीं मेढा चढविला ॥८३॥ सरों न ये याच्या घायीं। आपण विंधों नये पाहीं। ययातें जिंकिलियाही। कीर्ति नाहीं पैं माझी ॥ ८४ ॥ ऐसा विचारीं पडे लवणारी। तंव बोले लहुवा अवसरीं। म्हणे तूं जुंझार होसी जरी। माझा बाण सहावा ॥ ८५ ॥ धनुष्यीं चढ-विला बाण। वोढी काढोनि आकर्ण। शरीं बीजाक्षर आव्हानून। श्रीराम जयराम ऐसें ॥ ८६ ॥ ठाण मांडोनि देवढें। शत्रुघ्ना सांभाळीं आतां पुढें। बाण निघाला कडाडें। वीरां झोपडें पडियेलें ॥ ८७ ॥ बाण भरतांचि गगनीं। बाणमय दश दिशा मेदिनीं। जैसा मेघ दणाणी। गड-गडाट जेंवी हस्तींचा ॥ ८८ ॥ जेंवी पर्जन्याच्या धारा। तेंवी बाणीं खिळिलें अंबरा। हें देखोनि कैकेयीकुमरा। हडबड गाढी पैं झाली ॥ ८९ ॥ हा सामान्य नव्हे वीरराज। ऐसें बोलिला कैकेयी-आत्मज[11]। याचा गुरु निधडा सहज। जेणें ऐसी विद्या दावियली ॥ ९० ॥ यासी प्रसन्न शस्त्रदेवता। याचा गुरु असे पुरता। म्हणोनि झाला विंधिता। शत्रुघ्न वीर ते काळीं ॥ ९१ ॥ दाशरथी वीरें सोडोनि बाण। एकें विस्तारिलें गगन। लक्ष कोडी प्रसवोन। शरीं अंबर खिळियेलें ॥ ९२ ॥ एक एकातें निवारी। एक बाण पडती पृथ्वीवरी। परस्परें गगनोदरीं। उभयतां युद्धीं मिसळती ॥ ९३ ॥ मग दोघे वीर सावध। परस्परें हाणिती म्हणती शब्द। तंव शत्रुघ्नवीरें त्रिशूळी बाण भयद। लहुवावरी मोकलिले ॥ ९४ ॥ शत्रुघ्न म्हणे लहुवा वीरा। जरी तुझा गुरु असेल पुरा। तरी समरांगणीं धरिजे धीरा। माझीं शस्त्रें सांभाळीं ॥ ९५ ॥ येरु साधक वीररावो। अंगा लागूं नेदी घावो। पराक्रमी महाबाहो। रविवंशींचा लघुबाळ ॥ ९६ ॥ कैकेयीकुमरें स्मरिलें मार्तंडास्त्र[12]। प्रकटले कोटि दिनकर। लहुवा स्मरे वरुणास्त्र। अभ्रें दिनकर लोपले ॥ ९७ ॥ अवघें अंतराळ[13] व्यापिलें। कोटिसूर्य झांकोळले। शत्रुघ्न स्मरे ते

१ घोडा. २ मोठे शूर. ३ राखरांगोळी. ४ सूर्योला. ५ गरुडाला. ६ सर्पांना. ७ गांठिला. ८ षडाननपित्या शंकराचें. ९ अगस्तीला. १० अयोग्यपणा. ११ कैकेयीपुत्र शत्रुघ्न १२ सूर्यास्त्र. १३ आकाश.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वेळे । मोहनास्त्र परियेसा ॥ ९८ ॥ मोहनास्त्र येतां गगनोदरीं । तें न लगे श्रीरामपुत्रीं । रामनाम जपे बीजाक्षरीं । कवणासी उरी तेथें ॥ ९९ ॥ रामनामाचा कडकडाट । तेथें मोह ममते वारा वाट । शत्रुघ्न विचारी स्पष्ट । मोहनास्त्र वृथा गेलें ॥ १०० ॥ हा वीर कैसेनि आतुडे । मोहनास्त्र न चले यापुढें । हा यश घेईल गाढें । ऐसें मज वाटतें ॥ १ ॥ तंव शत्रुघ्न म्हणे भरता । मोकलीं आतां निर्वाणअस्त्रा । येरें शक्तिमंत्रें आव्हानूनि शरा । लहुवा लक्षोनि टाकिला ॥ २ ॥ शत्रुघ्न म्हणे अगा वीरा । जरी तुझा गुरु असेल पुरा । तरी सांभाळीं माझिया शरा । धरीं धीरा समरांगणीं ॥ ३ ॥ शर निघाला गर्जत गगनीं । तें लहु वीरें देखोनी । मध्येंचि तोडिला टाकोनी । क्षात्रत्वेंकरोनी लाघवें ॥ ४ ॥ द्वादशत्र्यंविद्यांचे साधक । परस्परें नाटोपती एकमेक । घाय हाणिती तेणें पाताळलोक । दणाणीत ते समयीं ॥ ५ ॥ मग मिसळले मल्लयुद्धीं । झोंबती हाणिती घायीं सुबद्धीं । मारीं सांपडविती उरीं खांदीं । एकमेकां लक्षोनी ॥ ६ ॥ तंव शत्रुघ्नें चमत्कार केला । मागूनि लहुवा आकळिला । सर्वेचि रथावरी बांधिला । मग सांडिली रणभूमी ॥ ७ ॥ दोघे अयोध्ये निघाले । रथीं बाळकासी बांधिलें । मनीं थोर उल्हासले । पुरुषार्थ देखोनि लहुवाचा ॥ ८ ॥ म्हणती सिंहें सिंह धरिला । शार्दूळें शार्दूळ बांधिला । पुरुषार्थियानें पुरुषार्थ केला । पुरुषार्थी जिंकिला रणमंडळीं ॥ ९ ॥ एका जनार्दना शरण । लहुवा पावला बंधन । संतोषोनि भरत शत्रुघ्न । निजनगरासी निघाले ॥ ११० ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां लहुबंधनं नाम षट्षष्टितमोऽध्यायः ॥ ६६ ॥ ओंव्या ॥ ११० ॥

अध्याय सदसष्टावा

॥ श्रीरामचंद्राय नमः ॥ शत्रुघ्न घेवोनि गेला लहुया । बांधोनि जानकीच्या कनिष्ठ तनया । ऐसें ऐकोनि जनकतनया । शोकार्णवीं बुडाली ॥ १ ॥ ऋषिकुमर सांगती सीते । लहूनें युद्ध केलें पुरुषार्थें । संतोषविलें पितृव्यातें । आपुलेनि भुजबळें ॥ २ ॥ शेवटीं बंधन पावूनी । आम्हां देखतां रथीं वाहूनी । पुत्र नेला वो सुलक्षणी । ऐकोनि विकळ सुंदरी ॥ ३ ॥ मूर्च्छा सांवरोनि ते अवसरीं । जानकी शोकातें आदरी । कपाळ पिटी निजकरीं । धांवें त्रिपुरारी आकांतीं ये ॥ ४ ॥ धरणिजा म्हणे ऋषि ताता । मी काय करूं जी आतां । वेगीं सोडवा माझ्या सुता । पुत्रदानता करावी ॥ ५ ॥ माझा वनवासींचा सांगाती । याचेनि होतें वनाप्रती । काय कोपला शैलजापती । आतां सांगूं कवणातें ॥ ६ ॥ येरे माझ्या लहुवा बाळा । गोजिरिया रे वेल्हाळा । सुंदरा डोळसा कुशळा । परदेशींचिया सांगात्या ॥ ७ ॥ सहोदर सोडोनि आपुला । खेळावया लहु कोठें गेला । अथवा संग्राम करितां एकला । तुज वैरियें साधिलें ॥ ८ ॥ पाठीसी न देखतां सहोदर । तुज कोप आला थोर । तेणें वैरियासी मारितां मार । भागलासी पुत्रराया ॥ ९ ॥ आतां मेळवा माझें वांसरूं । तयावीण न धरवे धीरू । ऐकोनि वाल्मीकासी गहिंवरू । ऋषिभार्या गजबजिल्या ॥ १० ॥ इतुकें बोलतां रावणारीची पत्नी । तेणें दुःखें फुटों पाहे अवनी । ऐसें ऐकोनि ऋषि मुनी । थोर दुःखा पावले ॥ ११ ॥ मुनि म्हणे रघुराजकांते । सर्वथा भय नाहीं त्यातें । कुश येवोनि त्या सैन्यातें । जिंकोनि बंधु सोडवील ॥१२॥ पितृव्यातें बांधोन । तुझे लहुकुश येतील जाण । आणि समस्त रायां गळबंधन । करितील जाण पुत्र तुझे ॥ १३ ॥ पूर्वी मी वदलों भविष्य । मानीं माझ्या शब्दाचा विश्वास । हे निधडे जाण पुरुष । बाळक यांतें म्हणों नये ॥१४॥ सत्य जाण दूषणारिप्रिये । सूर्यवंशींचे निधडे वीर हे । यांचिये पुरुषार्थाची उपमा न ये । आणिकासी देतां हो ॥ १५॥ इतुकें बोलतां वाल्मीकी । तंव कुश आला आश्रमाचे तटाकीं । त्यातें देखोनियां जानकी । दुर्घट दुःख सांगत ॥ १६ ॥ अरे कुशा लहुवातें । बांधोनि नेलें शत्रुघ्नभरतें । रथीं वाहोनियां अयोध्यापथें । गमन केलें दोघीं जणीं ॥१७॥ कुशा आतां काय करूं ।

१ कौशल्यानें. २ छत्तीस. ३ वाघानें. ४ चुलत्याला. ५ शंकरा. ६ सीता. ७ सोबती. ८ सीते. ९ हे रामकांते सीते. १० आश्रमासन्निध.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

कोण सोडवील माझें वांसरूं । केव्हां देखेन निज-कुमरू । रणरंगधीरु संग्रामींचा ॥ १८ ॥ ऐकोनि लहुवाचें हरण । तेव्हांच माझा त्यासवें प्राण । गेला कुशा सत्य जाण । नाहीं अनमान येविषयीं ॥ १९ ॥ करुणा ऐकोनि मातेची । कुशें गुढी उभविली प्रतापाची। म्हणे माते चिंता लहुवाची। तुजकारणें पैं नलगे ॥ २० ॥ पाताळा नेला असेल बाळू । तरी सोडवीन शेषाची मर्दोनि टाळू । नाहीं तरी हा अवघा भूगोळू । पालथा करीन जननिये ॥ २१ ॥ शोषीन अंब्धीचें पाणी । आकाश पाडीन खोंचोनी । नातरी प्रळयकाळींचा वन्ही । शीतळ करीन क्षणार्धें ॥ २२ ॥ मेरु उप-डीन भुजबळें । शोधीन सप्त द्वीप कुळाचळें । घरधांडोळी घेवोनि पाताळें । नागकुळें मारीन ॥ २३ ॥ वैकुंठ कैलास सत्यलोक । भूमंडळ शोधीन सम्यक । दिक्पालादि स्वर्ग लोक । दमीन त्रैलोक्य निमेषार्धें ॥ २४ ॥ घेवोनि येईन तुझा कुमरू । तरीच मी सूर्यवंशींचा वीरू । सत्य असेल श्रीगुरू । माझिया मस्तकावरी ॥ २५ ॥ तेथें कायसें रावणारीचें सैन्य । एके बाणें सर्वे खिळीन । जीतं बांधोनि भरतशत्रुघ्न । सहलक्ष्मण हनुमंतेंसीं ॥ २६ ॥ म्हणोनि वंदिले मातेचे चरण। श्रीगुरूसी करोनि साष्टांग नमन । मग प्रदक्षिणा दोघां करून । आज्ञा मातेसी पुसतसे ॥ २७ ॥ जनकजा म्हणे कुशासी । जीवें न मारावें राम-सैन्याचे वीरांसी । धरून आणावें थोरथोरांसी । वारुवापासीं बांधावें ॥ २८ ॥ आशीर्वाद घेवोनि निघाला । सिंहनादें गर्जिन्नला । बाण धनुष्यीं चढविला । अंगीं बाणला पुरुषार्थ ॥ २९ ॥ चालतां पुढारां पाउलें । शीघ्र रणभूमीसी गांठिलें । तंव एके रथीं बंधूसी देखिलें । सवें भरतशत्रुघ्नांसीं ॥ ३० ॥ तेचि रथीं लहु वीर । कुशास देखोनि आनंद थोर । म्हणे सोडवूं आला दादोजी सत्वर । हर्ष न माये पृथ्वीवरी ॥ ३१ ॥ कुशें लहुवा बंधनेंसीं । देखियेला पितृव्याचे रथासीं । क्रोधें भडका उठला मानसीं । सृष्टि निर्दळीन म्हणे आतांचि ॥ ३२ ॥ क्रोध कुशाचा देखोन । मेणें कांपे त्रिनयन । भयभीत श्रीजनार्दन । ब्रह्मादि देवगणां चळकांप ॥ ३३ ॥ कीं गजावरी केसरी । कीं तमावरी जैसा तमारी । कीं स्तंभीं प्रकटे हिरण्यकश्यपारी । तयेपरी कुश क्षोभे ॥ ३४ ॥ कीं आकाशसुत मेघपटळा । कीं दितिसुतावरी मेघें सांवळा । कीं कद्रुसुतावरी प्रताप आगळा । मिरवी जैसा विनतांबाळ ॥ ३५ ॥ कीं प्रळयकाळीं दक्षजामात । सृष्टीचा संहार करीत । तैसा शक्र-जितारिअग्रजाचा सुत । वेगवंत रणमंडळीं ॥ ३६ ॥ हातीं घेवोनि धनुष्यबाण । जैसा चाले पंचानन । हृदयीं श्रीगुरु स्मरोन । मग शत्रुघ्न पाचारिला ॥ ३७ ॥ अरे कैकेयीच्या लघु बाळा । प्रताप दावोनि आगळा । संतोषविलें अग्रजा आणि दळा । आतां मजसीं कुशाळा युद्ध करीं ॥ ३८ ॥ बांधोनि माझा सहोदर । तुज झाला जैतबडिवार । तुमचा पूर्वापर विचार । तुम्हीं नाहीं आयकिला ॥ ३९ ॥ श्रीरामाकारणें झालेति योगी । श्रीरामालागीं झालेति वीतरागी । आतां आलेति युद्धालागीं । हें अपूर्व वाटतें ॥४०॥ तुम्हीं करावें अनुष्ठान । तुम्हीं करावें तपःसाधन । आतां धरोनि आंगवण । युद्ध दारुण करूं आलेती ॥ ४१ ॥ श्रीरामाकारणें सोडूनि राज्यभोग । तुम्हीं नंदिग्रामीं साधिला योग । मस्तकीं जटा धरोनि ऋषिमार्ग । आश्रयोनि होतेती ॥ ४२ ॥ आतां संग्रामाच्या चाडा । युद्ध करूं आलेति पुढां । श्रीरामकटकीं दुकाळ गाढा । महावीरांचा पडिला हो ॥ ४३ ॥ कोणी न दिसे वीर झुंझार । तुम्ही नावानिगे परम शूर । म्हणोनि धाडी श्रीरामचंद्र । युद्धाकारणें तुम्हांतें ॥ ४४ ॥ जानकीचा ज्येष्ठ कुमर । शत्रु-घ्नासी होवोनि समोर । काय बोलतसे उत्तर । सावधान अवधारा ॥ ४५ ॥ उणें आलें तुझिया नामासी । तुवां संग्राम केला कोणासीं । आतां साहें माझ्या बाणासी । म्हणोनि शरासी सोडिलें ॥ ४६ ॥ नारायणास्त्र जानकीकुमरें । बीजाक्षरें जपोनि सोडिलें त्वरें । सर्व सैन्यीं नारायण अव-तरे । दशदिशां भरे चतुर्भुज ॥ ४७ ॥ नारायण धरित्रीं पाताळीं । नारायण आकाशीं अंतराळीं । नारायण नभोमंडळीं । कुळाचळीं नारायण ॥४८॥

१ ध्वजा. २ समुद्राचें. ३ अग्नि. ४ उपटीन. ५ पूर्ण-पणें. ६ जीवंत. ७ चुलत्याचे. ८ रथांत. ९ सिंह. १० सूर्य. ११ वायु. १२ श्रीकृष्ण. १३ सर्पावर. १४ मोठा. १५ गरुड. १६ शंकर. १७ रामाचा. १८ पृथ्वीवर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सैन्य अवघें नारायणें । व्यापिलें देखोनि शत्रुघ्नें । गजबजोनियां मनें । संग्राम करूं विसरला ॥ ४९ ॥ जैसा एकादा प्राणी । स्वप्नीं तस्कर देखे नयनीं । जागृत जंव होय उठोनी । तंव घरभरी तस्कर देखिजे ॥ ५० ॥ तैसें झालें शत्रुघ्ना । नारायणरूप देखोनि मना । विस्मयो झाला अंतःकरणा । संग्राम करूं विसरला ॥ ५१ ॥ सवेंचि कुशें परम सत्वर । बाणीं विंधोनि पाडिला कैकेयीकुमर । चरणीं धरोनि बांधिला वीर । रथातळीं उतरविला ॥ ५२ ॥ रथ मोडिला चपेटघातें । लहुवा सोडोनि घेतला तेथें । सवेंचि पाचारिलें भरतातें । तुम्हीं यावें संग्रामा ॥ ५३ ॥ कुश म्हणे भरतातें । तुम्हीं पादुका पूजाव्या घरातें । अथवा परभारें नंदीग्रामातें । अनुष्ठानालागीं जावें ॥ ५४ ॥ वचन ऐकोनि भरतें तेच क्षणीं । क्रोधें प्रज्वळिला जैसा वंन्ही[1] । म्हणे बाळका समरांगणीं । माझा शर साहें रे ॥ ५५ ॥ तूं तरी बाळकाकार । माथेचा वाळला नाहीं जार । आतां साहें माझा शर । नाहीं तरी ऋषीस शरण जावें ॥ ५६ ॥ मग टाकिला काळदंड । एकचि बाण परी झाले उदंड[2] । रावणारिकुमर साधक वितंड । वरच्यावरी तोडिले ॥ ५७ ॥ लहुवाअग्रजें वीरें कुशें । घातले शरांचे फांसे । रामानुजें[3] कासाविसें । संग्राम करूं विसरला ॥ ५८ ॥ भरत भुलला रणीं । मागेंपुढें पाठीराखा न दिसे कोणी । तंव अवचितें कुशें बांधोनी । रथातळीं पाडिला ॥ ५९ ॥ दोघे बांधोनियां रणीं । परतला निजाश्रमालागोनी । भरत शत्रुघ्न एकत्र दोन्ही । ऐसे आणिले ऋषिआश्रमा ॥ ६० ॥ बांधोनि खरदूषणारीचे[4] अनुज । मातेची सत्य करोनि पैज । दोघे संतोषें रामात्मजें[5] । आश्रमा उजू पैं आले ॥ ६१ ॥ सवें दोघे भरत शत्रुघ्न । एके रथीं बांधिले जाण । सीतेनें दुरोन देखोन । ऋषीप्रति बोलली ॥ ६२ ॥ धरणिजा म्हणे अहो ऋषी । दोघे नाणावे माझ्या दृष्टीसी । मज देखोनि लाजें प्राणांसी । त्याग करितील निश्चयें ॥ ६३ ॥ मग ऋषीनें शिष्यां खुणाविलें । कर्दळीवनासी पाठविलें । जेथें असे अश्व बांधलें । तेथें दोघे राखावे ॥ ६४ ॥ जानकीकुमर विजयी रणीं । दोघे आले गुरुदर्शनीं । साष्टांगें नमस्कारूनि मुनी । मग मातेसी वंदिलें ॥ ६५ ॥ मातेनें करोनि निंबलोण । धन धान्य ओंवाळून । दोघां हृदयीं आलिंगून । समाधान पावली ॥ ६६ ॥ पुढील कथा अति रसाळ । श्रवण करितां मुखा येतसे लाळ । मनाची जिव्हा करी तळमळ । युद्ध तुंबळ करूं इच्छी ॥ ६७ ॥ पुढें पित्यापुत्रां होईल रण । असंभाव्य अति दारुण । तेथें श्रोते हो व्हावें सावधान । रामायण अति गोड ॥ ६८ ॥ वाल्मीकाचीं वाग्रत्नें । तीं प्राप्त केलीं जनार्दनें । एका जनार्दनाचें तान्हें । संतांचें पोसणें म्हणोनी ॥ ६९ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां भरतशत्रुघ्नबंधनं नाम सप्तषष्ठितमोऽध्यायः ॥६७॥ ओंव्या ॥ ६९ ॥

अध्याय अडसष्टावा

॥ श्रीरघुपतये नमः ॥ गतप्रसंगीं अनुसंधान । ऐसें असे निरूपण । भरतशत्रुघ्नांसी बांधोन । कुशें जाण युद्ध केलें ॥ १ ॥ उरल्या सैन्या करोनि मार । विजयी दोघे राजकुमर । भरतशत्रुघ्न बांधोनि वीर । अश्वापासीं राखिले ॥ २ ॥ येरीकडे रणीं पडिले । ते सावध होवोनि बैसले । मागें पुढें पाहात ठेले । तंव कोणी नाहीं युद्ध करीत ॥ ३ ॥ ऐसें देखोनि घायाळ वीरीं । कण्हत कुंथत साकेतपुरीं[6] । प्रवेशतां मार्गीं एके पुरीं । करिती गजरीं महाशब्द ॥ ४ ॥ एकांचें फुटलें शिर । एकांचे उँखळले[7] कर । एक सर्वांगें जर्जर । एक अशुद्धें डँवरले[8] ॥ ५ ॥ एक रडत पडत । एक कटिभंगें येती लोळत । एकांचीं लोंबतीं आंतें[9] । घायीं शस्त्र अडकले ॥ ६ ॥ एकांचें धाकें फुटलें पोट । एकांचा घरघरा वाजे कंठ । एकांचे कान नाक सपाट । एक चटपटें दुःख करिती ॥ ७ ॥ एक हृदयीं भेदले । एकांचे कंठ भंगले । एक भयें वोसणँले[10] । म्हणती मारूं नको कुशा वीरा ॥ ८ ॥ ऐसियापरी घायाळ वीरीं । प्रवेशिजेती अयोध्यापुरी । तंव भद्रासनीं[11] दूषणारी[12] । तयासमोर पैं आले ॥ ९ ॥ सिंहासनीं जनकजामात । बैसला जैसा काय अब्धिसुत[13] । सभोंवते

---

१ अग्नि. २ अनेक. ३ भरत. ४ श्रीरामाचे. ५ रामपुत्र. ६ अयोध्यानगरांत. ७ ढिले झाले. ८ भरले.

९ आंतडीं. १० बडबडले. ११ सिंहासनीं. १२ श्रीरामचंद्र. १३ चंद्र.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

तारागणें तैसे प्रधान समस्त। अनुंज सौमित्र
बैसला ॥ १० ॥ राजवर्ग सभानायक । भोंवतीं
राजे मांडलिक। वसिष्ठविश्वामित्रादि ऋषी स-
म्यक। सेना सैनिक शोभत ॥ ११ ॥ तंव घायाळ
पुढें देखिले। तयांसी लक्ष्मणें पुसों आदरिलें।
कोण कोठें युद्ध झालें । कोणें गांजिलें तुम्हांसी
॥ १२ ॥ तंव घायाळ म्हणती शंकारिअरी । दोघे
कुमर वनांतरीं । द्वादशवर्षांचिये वीरीं । सेना
सैनिक मारिले ॥ १३ ॥ तिहीं दोघीं पराक्रम ।
करोनि साधिला संग्राम । तयांमधील कनिष्ठ
परम। तेणें युद्ध पूर्वी केलें ॥ १४ ॥ शत्रुघ्नें तयासी
जिंतिलें। धरोनि रथीं बांधिलें। तयाचे सोडवणे
ज्येष्ठें युद्ध केलें। तें राजेंद्रा अभिनव ॥ १५ ॥ वा-
ल्मीकाचिया आश्रमीं। दोघे कुमर पराक्रमी। गौर
श्याम एका सादृश्य श्रीरामीं । जानकीसारिखा
एक असे ॥ १६ ॥ दोघे दोघांसारिखे। करीं शर
आणि चाप कांखे। धनुर्विद्येचे अति नेटके । युद्ध
न ठाके तयांसीं ॥ १७ ॥ एकें तुमचा वारू ध-
रिला। सैन्यें शत्रुघ्नेंसीं झगटला। पराक्रम थोर
केला। तो धरोनि आणिला भरताचुजें ॥ १८ ॥
तयाचे सोडवण्याकारणें । ज्येष्ठा झालें युद्धा
येणें। युद्धीं वीरां केलें ठेंगणें । आकाश बाणीं
व्यापिलें ॥ १९ ॥ तेणें घालोनि मोहनास्त्र। धरोनि
नेले दोघे राजकुमर । आम्हां वाटतें ते वीर।
अयोध्येचें राज्य घेतील ॥ २० ॥ भरत शत्रुघ्न
पाडाऊ झाले। दोघे रथासीं बांधिले। आम्हांसी
मारोनि निघाले। वाल्मीकाच्या आश्रमा॥ २१ ॥
करोनियां श्रीरामस्मरण । तेणें आमुचे वांचले
प्राण। सांगतां लज्जा दारुण । वाटतसे हो राजेंद्रा
॥ २२ ॥ सैनिकांचें ऐकोनि वचन। हांसोनि बोले
रघुनंदन। आश्चर्य करी ऊर्मिलारमण । म्हणती
नवल वर्तलें ॥ २३ ॥ विनोदें बोले रघुनंदन । ते
धाकुटे वय सामान्य । तिहीं कैसें मारिलें सैन्य।
मुख्य नायक धरिले कसे ॥ २४ ॥ तंव श्रीगुरु
म्हणे रावणारी। युद्धीं सामान्य न म्हणावे अरी।
त्यांचा पुरुषार्थ नृपकेसरी । आम्हां विदित पैं
आहे ॥ २५ ॥ कोणी एका क्षत्रियाचे कुमर।
विद्या शिकवी वाल्मीक ऋषीश्वर। ते महा बळि-
याढे वीर। अपूर्व कांहीं न मानावें ॥ २६ ॥ यावरी
बोले ऊर्मिलारमण। मज आज्ञा दीजे कृपा करून।
जीत दोघे आणीन धरून । निजबंधु सोडवून
श्रीरामा ॥ २७ ॥ श्रीरामें पैजेचा देवोनि विडा।
मग तो लक्ष्मण धनुर्वाडा । निजपुरुषार्थाचा
पवाडा। अग्रजासमोर बोलतसे ॥ २८ ॥ दोघे
बंधु सोडवीन। ते दोघे बंधु जीत धरीन। तरीच
तुमचा सेवक जाण। विजयी होईन तिहीं लोकीं
॥ २९ ॥ म्हणे रथ पालाणा रे पालाणा । सन्नद्ध
करा चतुरंग सेना। घाव घातला निशाणां। केली
गर्जना महावीरीं ॥ ३० ॥ वीर चढले अश्वांवरी।
एक बैसले रथावरी। एक आरूढले कुंजरीं। एक
पायीं निघाले ॥ ३१ ॥ सवें जुत्पती निघाले। नळ
नीळ जांबवंत पातले। गंधमादन अंगद आले।
वायुसुत येता झाला ॥ ३२ ॥ संवत्सरलक्ष नृप-
वर। पुराणसंख्यापद्म वानर । सप्त दशकांवरी
दोन कोटि वीर । गोळांगूळें चाललीं ॥ ३३ ॥
साकेतपुराबाहेरी । निघाले आपुलाले भारीं।
पल्लव छत्रें शृंगारीं। मयूरपत्रें झळकती ॥ ३४ ॥
रामानुज वीररावो। रिपुदळणीं महाबाहो। फुटों
पाहे ब्रह्मकटाहो। सेना अगणित चालली ॥ ३५ ॥
लागली वाजंत्रांची एक घाई। कानीं पडलें नाय-
कवे कांहीं। मुक्तामाळा वारुवां पाहीं। टके पताका
नीळवर्ण ॥ ३६ ॥ निशाणावरी श्रीरामनाम ।
ढाला पताका नामांकित परम । देखतां रिपूचा
पराक्रम। ठेंगणा होय संग्रामीं ॥ ३७ ॥ ऐसे मार्गी
चालले। तंव अपशकुन झाले। कागपक्षी डावे
गेले। आपुलिये भारेंसीं ॥ ३८ ॥ सवेंचि पुढें
निर्नासिक। केंस सुटले उघडा मस्तक । समोर
द्विज आला एक । तेणें वीर थरारले ॥ ३९ ॥
म्हणती झाला अपशकुन। मागें फिरतां हांसती
जन। पुढें होतां जीवदान। न उरती निश्चयेंसीं
॥ ४० ॥ एक म्हणती सरा मागें । एक म्हणती
रहा उगे। धैर्य धरोनि लक्ष्मणें वेगें। पुढें सेना
चालविली ॥ ४१ ॥ ऐसे चालिले महावीर। मनीं
धाक परम थोर। म्हणती काय करील श्रीशंकर।
तें न चुके कल्पांतीं ॥ ४२ ॥ ऐसें न मानितां
चालिले। ऋषिआश्रमासी पातले। भार रचोनि

१ कनिष्ठ बंधु. २ हे लक्ष्मणा. ३ शत्रुघ्नानें. ४ पराजित. ५ शत्रु. ६ सज करा. ७ तयार. ८ वानरवीर. ९ साठ लक्ष. १० अठरा पद्म. ११ बानर. १२ नकटा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

राहिले । म्हणती कुमर पैं दोघे ॥ ४३ ॥ उभयतां वीरांच्या युद्धाकारणें । स्वर्गीं देवां उत्साह मनें । पहावया दाटलीं विमानें । विबुध[1] वरोनि पाहती ॥ ४४ ॥ नारद खांदीं घेवोनि वीणा । पाहूं आला युद्धरचना । उल्हासें करीतसे गर्जना । श्रीराम नारायण म्हणोनी ॥ ४५ ॥ हांसे नाचे नारद । पाहोनि सूर्यवंशींच्या वीरांचें युद्ध । शेंडी तडतडी राम गोविंद । मुखें नाम उच्चारी ॥ ४६ ॥ येरीकडे लहु कुश वीरें । सेना देखिली उल्हासें थोरें । म्हणती कृपा केली शार्ङ्गधरें[2] । मातेसी आज्ञा पुसताती ॥ ४७ ॥ कर जोडोनि दोघे वीर । उभे राहिले जानकीसमोर । म्हणती माते आज्ञा सत्वर । अनुग्रह[3] करोनि पैं द्यावी ॥ ४८ ॥ जैनकजा[4] पाहे दुरोन । तंव देखे सुमित्रानंदन[5] । म्हणे आलें रावणारिसैन्य । आतां काय करूं माये ॥ ४९ ॥ जानकी म्हणे आज दिवसवरी । पडलें दुःखाच्या सागरीं । दोघीं बाळकें वनींचीं सोयरीं । यांसी संकट मांडलें ॥ ५० ॥ आतां काय करावें । किंवा धरणीमध्यें जावें । किंवा कुमर पळवावे । आणखिया वनांतरा ॥ ५१ ॥ तंव कुश म्हणे अवो माये । चिंता करूं नको जननीये । सेना अवघी मारीन पाहें । सैनिक राजे जीत धरीन ॥ ५२ ॥ रणीं नाचवीन रणधेंडा । ओंवाळणी वीरांच्या मुंडा । तृप्त करोनि चामुंडा । रुधिरें सडा घालीन ॥ ५३ ॥ तृप्त करोनि भूतगण । मारीन राघवाचें सैन्य । तरीच तुझे कुशींचा जाण । तरीच शिष्य वाल्मीकाचा ॥ ५४ ॥ त्रिसत्य सत्य मम भाषण । हा माझा गुरूसीं अभिमान । हें मन पूर्वेजां निजभूषण । नाहीं तरी पाषाण जन्मलों दोघे ॥ ५५ ॥ ऐसें ऐकोनि पुत्राचें वचन । जानकीचें निवालें मन । दोघां हर्षें दिधलें चुंबन । धन धान्य ओंवाळोनि सांडी ॥ ५६ ॥ दशरथस्नुषा बोले वचन । अवघे आणावे धरून । कोणाचा न घ्यावा जीव प्राण । बंधन करून राखावे ॥ ५७ ॥ करोनि मातेसी नमन । दोघीं केल्या प्रदक्षिण । नमस्कारोनि गुरुचरण । धनुष्यबाण घेतले ॥ ५८ ॥ दोघे जैसे दोनी पर्वत । चालिले पुढें सैन्य लक्षीत । माथा तुकावोनि धनुर्ष्यी सीतें ।

चढविते झाले ते समयीं ॥ ५९ ॥ ऐसे चालिले रणमेदिनीं । पुढें अंगद देखिला नयनीं । तया कुशें हटकोनी । युद्धालागीं पाचारिलें ॥ ६० ॥ अरे मर्कटसुता महावीरा । धांवूं नको सैरावरा । रार्घवारीचे मंडपाचे बारा । खांब आणिले तैसें नव्हे ॥ ६१ ॥ लहुवा राहें साहें म्हणत । तंव अंगदें टाकिला पर्वत । येरु शरधारें तोडीत । मग म्हणत तारातनयातें[9] ॥ ६२ ॥ तें येथें न चले आम्हांसीं । आतां साहें माझ्या बाणांसी । म्हणोनि विंधिलें अंगदासी । रणीं मूर्च्छेसीं पाडिला ॥ ६३ ॥ मग सावध करोनि वालिसुत । लहुवा तयासी बांधीत । जेथें होते शत्रुघ्न भरत । तेथें नेवोनि घातला ॥ ६४ ॥ अंगदा ऐसी दशा देखोन । मग बोलिला भास्करनंदन[10] । यासीं युद्ध करितां दारुण । अनर्थ दिसे वानर हो ॥ ६५ ॥ इंहीं वालिसुत नेला धरोन । आमुचा झाला मूळींच अपमान । आतां काय काज वांचोन । स्वर्गीं देव हांसती ॥ ६६ ॥ म्हणोनि कपिपंति चालिला । म्हणे राहें साहें बाळा । तुझे माथेचा जार नाहीं वाळला । काय युद्ध करशील ॥ ६७ ॥ सुग्रीव म्हणे तुमची जननी । विसंबली कैसी तुम्हांलागूनी । तुम्ही मातेचे लाडके दोनी । कैसे युद्धा आलेति ॥ ६८ ॥ ऐकोनि कुशा आलें हांसें । म्हणे तूं पालेखाइरें[11] पिसें । उडावें वृक्षावरी जैसें तैसें । फळें खावयालागूनी ॥ ६९ ॥ तुम्हांसीं संग्राम करूं काय । म्हणती वानर मारिलें पाहें । तेणें माझी कीर्ति न होय । न वाखाणिजे वीरमुखीं ॥ ७० ॥ ऐसें बोलोनि कुशें जाण । पुन्हां बोलता झाला वचन । म्हणे तूं नपुंसक दारुण । श्रीरामा शरण गेलासी ॥ ७१ ॥ ज्येष्ठ बंधूनें हरिली कांता । तियेचे दुःखें वनी वसतां । भाग्यें भेटलासी रघुनाथा । दोघे सारिखे मिळालेती ॥ ७२ ॥ कपटें करोनि वालिवध । तुजही दिधलें राज्यपद । तो तूं करूं आलासी युद्ध । हें मज अपूर्व वाटतसे ॥ ७३ ॥ आतां करीं मजसीं रण । म्हणोनि कुशें श्रीगुरु स्मरोन । सीतीं बाण चढवोन । बीजाक्षरें जपता झाला ॥ ७४ ॥ जपोनियां बीजाक्षर । शक्ति

१ देव. २ श्रीहरीनें. ३ कृपा. ४ सीता. ५ लक्ष्मण. ६ हालवून. ७ धनुष्याची दोरी. ८ रामशत्रु रावणाचे.

९ अंगदाला. १० सुग्रीव. ११ पालेखाऊ.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

टाकिली महाघोर । तेणें कडकडाटें अंबर । पडों पाहे अवनीवरी ॥ ७५ ॥ महा धुंधाट सुटला । वानरां प्रळय आरंभिला । म्हणती रघुनाथ कोपला । संहार झाला सकळांचा ॥ ७६ ॥ शर लागती झणझणां । कपि सोडूं पाहती प्राणां । म्हणती रक्षीं रक्षीं सुमित्रानंदना । म्हणोनि पाठीं रिघताती ॥ ७७ ॥ नभीं भोंवती पिसारे । आंवतीं पडलीं वनचरें । निघती आंतें तयांचे भारें । हाहाकार प्रवर्तला ॥ ७८ ॥ सुधापानी भयातुर गगनीं । विमानें पडती खचोनी । देव पळाले तेथूनी । बाण लागती म्हणोनियां ॥ ७९ ॥ एक शाखामृग म्हणती । कोपिन्नला श्रीरघुपती । साद्दश्य पुढां देखती । जाणों दुसरा श्रीराम ॥८०॥ एक श्याम राजीवलोचन । दुसरा शोभे गौरवर्ण । म्हणती हाचि रघुनंदन । तटस्थ होवोनि पडियेले ॥ ८१ ॥ पडिले अष्टादश जुत्पती । मूर्च्छित पडिले नाहीं शक्ती । मग लहुवें बांधिलें निगुतीं । तयांचीं नामें अवधारा ॥ ८२ ॥ नळ नीळ जांबवंत । सुग्रीव सुषेण दधिमुख वीर्यवंत । द्विविद कुमुद तारासुत । गंधमादन दहावा ॥८३॥ तार त्नरश हेमकूट । पनस केसरी सुभट । गज गवाक्ष गवय धीट । अठरा जुत्पती ऐसे हे ॥ ८४ ॥ जेथें होते रामानुज । तेथें नेला कपिसमाज । बांधोनि पुन्हां वीरराज । सावध असे रणभूमीं ॥ ८५ ॥ येरीकडे शक्रारिहंता । म्हणे काय करावें वायुसुता । अपकीर्ति बैसली माथां । उपाय पुढां न दिसेचि ॥ ८६ ॥ आमचे महाकपि वीर । संग्रामीं जिहीं जिंकिले निशाचर । तयांतें बांधोनि हे कुमर । नेती द्वादश वर्षांचे बलाढ्य ॥ ८७ ॥ काय हे स्रष्ट्यानें रचिले । किंवा अवनीपासाव झाले । कीं अकरा रुद्र एकवटले । द्वैतरूप धरोनी ॥ ८८ ॥ किंवा दोन रूपें हे कळिकाळ । किंवा दोघे हे कुळाचळ । कीं दोघेही श्रीराम प्रबळ । गर्वहरणार्थ निर्मिले ॥ ८९ ॥ कीं ग्रहांत केतु राहो । किंवा विष्णु महादेवो । किंवा शशिसूर्य पहा हो । रिपुरूप अवतरले ॥ ९० ॥ किंवा रावणारीच्या हत्या । एकीभूत होवोनि समस्ता । द्वैतरूपें अंजनीसुता । आम्हांवरी चालिल्या ॥ ९१ ॥ कीं जानकीहृदयींचा कोपाग्नी । प्रकटला धरोनि रूपें दोनी । पुढारला शोषावयालागूनी । तैसे दोघे दिसताती ॥ ९२ ॥ किंवा अवनिजा म्यां सांडिली वनीं । ते होती गा तैं मासैत्रयगुर्विणी । तिचे हे आत्मज दोनी । असित गौर दिसताती ॥ ९३ ॥ लहु रावणारीसारिखा । कुश धरणिजे साद्दश्य देखा । हनुमंता तुज असे ठाउका । हा वृत्तान्त गुप्त करीं ॥ ९४ ॥ जरी हे धाकुटे म्हणावे कुमर । तरी शक्ति सुरेशाहूनि थोर । धरोनि आमुचे वीरें वीर । लाज थोर लाविली इंहीं ॥ ९५ ॥ पुढें काय युद्ध करावें । युद्ध करितां घेतील जीवें । फिरोनि जातां हांसिजेल राघवें । वीर नपुंसक म्हणोनी ॥९६॥ इतुकें ऐकोनि वायुसुत । सौमित्राप्रति झाला बोलत । जैसा श्रीराम तैसे तुम्ही आम्हां येथ । माझा पुरुषार्थ पहावा ॥ ९७ ॥ रुद्रावेशें रुद्र जाणा । पुच्छ वाहोनियां गगना । आरक्त करोनियां नयना । केली गर्जना विटंकें ॥९८॥ हनुमान म्हणे अरे वीरा । मागें सरूं नको धरीं धीरा । तुज म्हणों तरी एकसरा । सावध पैं होइजे ॥ ९९ ॥ कुश बोले ते समयीं । अरे मर्कटा मुख आपुलें दर्पणीं पाहीं । काळें झालें ये समयीं । काय दाविसी पामरा ॥ १०० ॥ लंका जाळिली तये वेळे । मुख तुझें झालें काळें । सिंतरोनि राक्षसें निर्बळें । रणरंगीं मारिलीं ॥ १ ॥ कुश म्हणे अंजनीसुता । ऐक तुझ्या स्वामीची कथा । जेणें घरची दवडिली कांता । तयाची कथा कायसी ॥ २ ॥ नांदती स्त्री दवडिली । तयाची वीरश्री काय चांगली । आतां तुम्हां भुली पडली । युद्ध करूं आलेती ॥ ३ ॥ ऐसें वर्तलें तुमचे घरीं । ज्याची शक्ति झाली रानभरी । तो पुरुष यशवंत या संसारीं । कोणे समयीं होईल ॥ ४ ॥ उणें स्वामीचें ऐकोन । खवळला अंजनीनंदन । जया शैलावरी शोभे बहु वन । घेवोनि गगनीं उडाला ॥ ५ ॥ सर्वेचि आणिक पर्वत चारी । घेता झाला अशोकवनारी । एक उरीं एक शिरीं । कीं दोनी दो कांखे ॥ ६ ॥ पंच पर्वतेंसीं वायुसुत । येतां जयाचा पिता रघुनाथ । मग तेणें वीरें वज्रास्त्र ।

१ संकटांत. २ आंतडीं. ३ देव. ४ वानर. ५ वीर. ६ लक्ष्मण. ७ राक्षस. ८ ब्रह्मदेवानें. ९ शंकर. १० तीन महिन्यांची गरोदर. ११ मुलगे. १२ शुभ्र. १३ मारुती. १४ मोठी. १५ आरशांत. १६ ठकवून.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

जपोनि गुणीं लाविलें ॥ ७॥ पुरती कानाडी ओढून। अभिमंत्रोनि सोडिला बाण। वरिचेवरी शैलखंडण। हृदयीं बाण भेदला ॥ ८॥ पंचकद्वय अयुतें दुरी। हनुमान पिटिला ते अवसरीं। सप्तसमुद्रांच्या पारीं। अवनीवरी आफळला ॥ ९॥ देहाची वळली मुरकुंडी। मान झालीसे वांकडी। अशुद्ध वाहों सरलें तोंडीं। गतप्राण ऐसें झालें ॥ ११० ॥ मग सावध होवोनि हनुमंत। तटस्थ राहिला निवान्त। तंव वायु आलासे धांवत। बुझावीत निजपुत्रा ॥ ११ ॥ वायु म्हणे गा हनुमंता। तूं नेणसी त्यांच्या वृत्तान्ता। ते राघवाचे पुत्र तत्त्वतां। पितयासारिखे पुरुषार्थी ॥ १२॥ लहु कुश दोघे कुमर। बळाचे दोघे गिरिवर। तयांत कुशवीरें हे थोर। युद्धीं प्रौढी दाखविली ॥ १३ ॥ हें वचन प्रकट न करावें। हृदयीं गुप्त असों द्यावें। पुढील कर्तव्य लक्षावें। वेगीं जावें रामकार्या ॥१४॥ ऐकोनि पित्याचें वचन। हनुमान खालती घाली मान। हृदयीं स्मरे श्रीरामचरण। माझें स्मरण असों द्यावें ॥ १५ ॥ ऐसा तो श्रीहनुमंत। हृदयीं स्मरोनि श्रीरघुनाथ। हळु हळु निजकटकांत। येता झाला लाजेनें ॥ १६ ॥ वज्रदेही बळियाढा। एवढे भोगिलें दुर्वाडा। तेथें कायसें इतरांच्या पाडा। वानरां मूढां कोण पुसे ॥ १७॥ ऐसियापरी श्रीरामस्मरण। देखे हनुमान आपुलें सैन्य। लाजा प्राण जाय तंव लक्ष्मणें। दुरोनि येतां देखिला ॥ १८ ॥ सौमित्र म्हणे गा कपिवीरा। थोर कष्टलासी परम शूरा। आतां स्थिर राहें मी या कुमरां। सींकें लावीन रणमारें ॥ १९ ॥ मग चालिला रामानुज। जयाचा रथ दिव्य तेजःपुंज। वारुवा सांटें देवोनि वोज। निजभारेंसीं लोटला ॥ १२० ॥ धनुर्ष्यीं चढवोनियां गुण। बोलता झाला लक्ष्मण। अरे वीर हो श्रीरामा शरण। येतां प्राण राखीन तुमचे ॥ २१ ॥ ऐसें न माने तुमच्या चित्ता। तरी प्राण घेईन आतां। पळूं नका धीर धरा पुरता। सोडा संग्रामाचा सांटोप ॥ २२ ॥ तुम्हीं वारू आमुचा धरिला। हाचि अन्याय मोठा केला। दुसरा अपराध वीरें वीर धरिला। शत्रुघ्नभरतादिकरोनि ॥ २३ ॥ तयांचा सूड मी घेईन। तुम्हां दोघां धरूनि नेईन। वारु आपुला सोडवीन। निजवीरांसमवेत ॥ २४ ॥ ऐसें शक्रारिरिपूचें वचन। ऐकोनि कुश बोलिला आपण। तुमचा ठाउका अभिमान। पूर्वींच आम्हीं आयकिला ॥२५ ॥ तुमची कीर्ति तुम्हांप्रती। सांगतों ऐका एकाग्रचित्तीं। जैं रावणें घातली शक्ती। तैं भूमिशयन तुम्हीं केलें ॥ २६ ॥ तेथें निवडला पुरुषार्थ। दैवें होता हनुमंत। घेवोनि आला वल्लीचा पर्वत। उपचारार्थ योजिला ॥ २७ ॥ तूं पूर्वींच रावणभगिनी। शूर्पणखा नामें जनस्थानीं। तियेचे नासिककानीं। पुरुषार्थ थोर मिरविला ॥ २८ ॥ विटंबोनियां तियेतें। थोर मिरविलें पुरुषार्थातें। कहाणी सांगतां मातें। तें अनुभवा येईल ॥ २९ ॥ स्त्रियेतें जे विटंबिती। तयांची थोर उपतिष्ठे कीर्ती। तेचि तुम्ही येथें मुख्य पुरुषार्थी। युद्धालागीं आले असां ॥ १३० ॥ ब्रह्मचर्य धरोनि व्रत। वधिला रणीं इंद्रजित। तें कांहीं न चले येथ। आतां आपणा सांभाळीं ॥ ३१ ॥ या लतांमृगांचे बळें। बंधु सोडवूं आलेति सबळें। भरत शत्रुघ्न वानरपाळें। पहा दशा भोगिताती ॥ ३२ ॥ आतां तुम्हां तेचि गती। विमुख झाला श्रीरघुपती। अवघी तुमची गेली शक्ती। हें निश्चितीं जाणा पां ॥ ३३ ॥ ऐसीं कुशाचीं ऐकोनि वचनें। रथ प्रेरिला लक्ष्मणें। दृढ कार्मुक सत्राणें। कर्णपर्यंत ओढिलें ॥ ३४ ॥ सौमित्रिकरींचा बाण। सुटला करीत गर्जन। तयाचे पोटीं लक्षकोटी बाण। बाणां बाण प्रसवले ॥ ३५ ॥ जैशीं मुखांतूनि अक्षरें। निघती नानावर्णउच्चारें। तैसें सौमित्राचेनि शरें। शरांतें शर प्रसवत ॥ ३६ ॥ जैशा पर्जन्याच्या धारा। आच्छादिती गिरिवरा। तैशा सौमित्राच्या शरधारा। गगन बाणीं व्यापिलें ॥ ३७ ॥ संधान सौमित्राचें अद्भुत। देखोनि काय करी जानकीसुत। नवमुख बाण घेवोनि त्वरित। परदळावरी मोकलिला ॥ ३८ ॥ शरें शरां खंडणा झाली। जैशी पंडितें मूर्खपृच्छा खंडिली। हें देखोनि म्हणे ज्याची माउली। श्रीरामवंद्य सुमित्रादेवी ॥ ३९ ॥ लक्ष्मण म्हणे अरे वीरा। धन्य

१ धनुष्याची दोरी. २ आदळला. ३ रक्त. ४ पर्वत. ५ आपल्या सैन्यांत. ६ शिक्षा. ७ चाबुक. ८ खटपट. ९ लक्ष्मणाचें. १० कथा. ११ वानरांचे. १२ वानरसमूह. १३ धनुष्य. १४ आवेशानें. १५ सोडला. १६ मूर्खाचा प्रश्न.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

धन्य तुझा गुरु पुरा। कोणे जननीचे उदरा। येवोनि वंशीं कीर्ति केली ॥ १४० ॥ धन्य तुझे जननीजनक। वंशीं जन्मलासी कुळटिळक। संधान करितां अचूक। हें अपूर्व देखिलें ॥ ४१ ॥ माझें जें शरसंधान। वरिच्यावरी केलें खंडन। कायसें आतां रणकंदन। आश्चर्य लक्ष्मण करिता झाला ॥ ४२ ॥ पुनरपि सुमित्रेचा बाळ। सोडिता झाला शरकल्लोळ। वरिचेवरी छेदी कुश कुशळ। परम कोपा चढलासे ॥ ४३ ॥ कुश पेटला महामारीं। बोहरी करी वरिच्यावरी। गजा मारी गजेंकरीं। अश्वें अश्व ठोकीत ॥ ४४ ॥ कुश सौमित्रासीं भिडत। लहु सैन्यासी मार देत। दोघीं केला प्रळयअंत। देव कौतुक पाहती ॥४५॥ कुशवीरें तये वेळे। भैरवास्त्र मोकलिलें। अष्ट भैरव पातले। तें अपूर्व परियेसा ॥ ४६ ॥ अष्टभुज करीं डौरें। अवनीं लागती जटाभार। हातीं त्रिशूळ करीं तोमर। अश्व कुंजर पळताती ॥ ४७ ॥ अद्भुत देखोनि संधाना। त्रिशूळ लागती लक्ष्मणा। न निवारे देखोनि वायुनंदना। स्फुरण आलें ते समयीं ॥४८॥ आवेशें करीत गर्जना। धाकें भैरव-घेवोनि प्राणा। पळाले लंघोनि दिशा नाना। दिग्गजांआड लपाले ॥ ४९ ॥ ऐसें देखोनि कुशवीरें। मोहनास्त्र जपोनि बीजाक्षरें। प्रेरिलें नेणें प्रतापकरें। पडे अंधारें लक्ष्मणासी ॥ १५० ॥ घूर्मी दाटली समस्त वीरां। हातींचीं गळालीं शस्त्रें झरारां। चाकाटले पाहती अंबरा। एक नेत्र झांकिती ॥ ५१ ॥ एकीं दीर्घ शयन केलें। एक विस्मयातें पावले। संग्राम करूं विसरले। मौन पडलें समस्तां ॥ ५२ ॥ ऐसें वर्तलें रणमंडळीं। मग दोघे बंधु तये वेळीं। काय करिते झाले ते काळीं। सुरवरीं पाहूं आदरिलें ॥ ५३ ॥ पुच्छीं धरोनि हनुमंत। कुश फरफरां ओढोनि नेत। लहूनें धरोनि सुमित्रासुत। विनोदें वनांत आणिला ॥ ५४ ॥ तयांसी बंधन पैं केलें। हनुमंतासी पुच्छीं बांधिलें। मग दोघे निघते झाले। गुरुदर्शनालागोनी ॥ ५५ ॥ सद्गुरूसी करोनि नमन। सांगितला वृत्तान्त संपूर्ण। ऐकोनि हांसे मुनिगण। समस्त ऋषिजन सुखावले ॥ ५६ ॥

१ डमरु. २ अंधारी. ३ रामाच्या पुत्रांनीं (लहुकुशांनीं). ४ सिंहासनावर. ५ सूर्य. ६ रक्तानें, ७ भरले. ८ आकाशांत,

सीतेसी करोनि नमस्कार। आनंदें दोघे झाले निर्भर। टाळिया पिटिती द्विजवर। म्हणती अपूर्व वर्तलें ॥ ५७ ॥ पुढें पित्या पुत्रासीं। युद्ध होईल परमावेशीं। ऐक्य होवोनि समरसीं। चवघे जण मिळतील ॥ ५८ ॥ एका जनार्दना शरण। पुढील रसाळ निरूपण। श्रोते होवोनि सावधान। परिसा रामायण अति गोड ॥ १५९ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकार-टीकायां लक्ष्मणहनुमंतजुत्पतीबंधनं नाम अष्टषष्टितमोऽध्यायः ॥ ६८ ॥ ओंव्या ॥ १५९ ॥

अध्याय एकुणसत्तरावा

॥ श्रीजगद्गुरवे नमः ॥ दूषणारिपुत्रीं दोघीं जणीं। नर वानर समरांगणीं। जीत बांधिले कित्येक मेदिनीं। गतप्राण होवोनि ठेले ॥ १ ॥ अश्व गज वना आले। तेही गतप्राण होवोनि ठेले। किंचित घायाळ उरले। ते प्रवेशले अयोध्यापुरीं ॥ २ ॥ भद्रासनीं जनकजामात। जैसा नभीं शोभे भास्वंत। भोंवते ऋषी परम ज्ञानवंत। सुमंतादिक प्रधान ॥ ३ ॥ बैसले सभानायक। नगरपंडित पुराणिक। चहूं वेदांचे वेदपाठक। ज्योतिषी गायक गंधर्व ॥ ४ ॥ ऐसी सभा प्रसन्नवदन। एक करिती गायन। एक करिती शास्त्रव्याख्यान। एक जन रंजविती ॥ ५ ॥ येरीकडे रणींचे वीर। अशुद्धें डवँरिले जैसे गिरिवर। येवोनि श्रीरामासमोर। वृत्तान्त सविस्तर सांगते झाले ॥ ६ ॥ म्हणती जी स्वामिनाथा। संग्रामाची परिसा कथा। शत्रुघ्नलक्ष्मण भरतां। दों कुमरीं बांधोनि नेलें ॥ ७ ॥ कपिवीर थोर थोर। तेही बंधन पावले समग्र। कित्येक घायीं झाले जर्जर। जिहीं रण सेविलें ॥८॥ वज्रदेही वायुकुमरा। बाणें उडविलें अंबरा। मूर्च्छित पडतांचि फरफरां। पुच्छीं महावीरा वोढीत नेलें ॥ ९ ॥ उरले कण्हत कुंथत। कित्येक मार्गीं झाले प्रेत। किंचित उरले ते येथ। भाग्यें-करोन पावले ॥१०॥ वयें तरी संख्या रविकळा। रूप तरी मदनपुतळा। प्रतापें तरी या ब्रह्मगोळा। पालथें करिती स्वभावें ॥ ११ ॥ ऐसे दोघे वीर-राणे। नेणों निर्माण केले कोणें। दातारा त्यांचेनि

९ बारा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

स्मरणें । जीवें प्राणें न उरिजे ॥ १२ ॥ धन्य धन्य त्यांचीं मातापिता । धन्य धन्य त्यांची प्रौढता । धन्य तयांसी विद्यादाता । कोण तत्त्वतां कळेना ॥ १३ ॥ वय तरी दिसे लहान । करीं शोभती धनुष्यबाण । गौर श्याम सुंदर सगुण । श्रीरामजानकींसारिखे ॥ १४ ॥ घायाळमुखींची[1] ऐकोनि कथा । हर्ष झाला श्रीरामाचे चित्ता । खुणावोनि सद्गुरूसी बोलता । म्हणे सैन्य समर्था मारिलें । ॥ १५ ॥ दाशरथी म्हणे सद्गुरूसी । आट[2] केला जी सैन्यासी । आतां चलावें वेगेंसीं । म्हणोनि सभा विसर्जिली ॥ १६ ॥ प्रधानां केला हाकारा । म्हणे पालाणा[3] रथकुंजरां । आणि देशोदेशींचे नृपवरां । ऋषीश्वरां सर्वं घ्यावें ॥ १७ ॥ रथीं आरूढोनि[4] श्रीरघुपती । समीप वसिष्ठ दुसरे[5] रथीं । शस्त्रसामग्रीसी नाहीं मिती । वेगें भूपती निघाला ॥ १८ ॥ रथारूढ घनसांवळा । दुसरे रथीं जवळा । विश्वामित्र तोही भूपाळा- । -समीप पृथक् रथीं बैसे ॥ १९ ॥ आधींच राम घनसांवळा । कोटिलावण्याचा पुतळा । कांसे पीतांबर पिंवळा । कौस्तुभमाळा वैजयंती ॥ २० ॥ अंगीं अहिप्रियाची[6] उटी । तिलक मृगनाभींचा ललाटीं । कर्णीं कुंडलें अतिगोमटीं । रवि कोटी प्रकाशले ॥ २१ ॥ शुद्ध राजीवलोचन । मुकुटीं शोभती रत्नकिरण । हिरे माणिकें तेजें पूर्ण । ठायीं ठायीं शोभती ॥ २२ ॥ ऐसा रथीं कौसल्यानंदन । करीं घेतलें धनुष्यबाण । मस्तकीं छत्र नीळवर्ण । कनकदंडें ढाळिती ॥ २३ ॥ पुढें तरी वेत्रपाणी । मदगज पुढारले आभरणीं । सैन्य निघालें कोदंडपाणी । तयामध्यें शोभत ॥ २४ ॥ रथ चालिले घडघडाट । नादें तडाडिलें अवनीचें पोट । गिरी पर्वत होती एकवट । ऐसे नगराबाहेर आले ॥ २५ ॥ शकुन झाले ते अवसरीं । बाळकें घेवोनि कडेवरी । वनिता[7] थोर मानालंकारीं । पुढें येत्या देखिल्या ॥ २६ ॥ कागपक्षी[8] दक्षिणे गेले । नकुळ[9] भारद्वाजीं[11] डावलिलें[10] । तासे वामभागीं गेले । उजवे झाले मृगगण ॥ २७ ॥ अपसव्य गेल्या कुरंगिणी[12] । दोघे गुरु संतोषले मनीं । म्हणती स्तोत्रमंत्रध्वनी । शब्द गगनीं न समाती ॥ २८ ॥ कनकमृगारी[13] म्हणे स्वामी । नेत्र लवती उल्हासें दोनी । दक्षिण बाहु स्फुरत मनीं । आनंद थोर होतसे ॥ २९ ॥ तरी कवण लाभ होईल । कोण सखा भेटेल । कीं युद्धीं जय येईल । हें मजप्रति सांगावें ॥ ३० ॥ तंव सद्गुरु म्हणे अवनिजापती । महिमा न कळे श्रुति नेति नेति म्हणती । तो तूं सर्वात्मा मंगळमूर्ति । आनंद चित्तीं अखंड तुझ्या ॥ ३१ ॥ ऐसे पथीं चालत । मार्ग क्रमोनियां त्वरित । आश्रमीं ऋषीश्वर वाल्मीक जेथ । तया स्थळासी पावले ॥ ३२ ॥ येरीकडे कथानुसंधान । लहु कुश दोघे जण । मातेप्रति प्रतापवचन । काय बोलते पैं झाले ॥ ३३ ॥ मातेसी म्हणती दोघे कुमर । युद्धा आला श्रीरघुवीर । सैन्य सज्जोनि अपार । बंधु सोडवण्याकारणें ॥ ३४ ॥ आतां यासीं युद्ध करूं । श्रीरामातें जीत धरूं । वरकड सैन्य जीवें मारूं । हाचि आमुचा निश्चय ॥ ३५ ॥ ऐसी प्रतिज्ञा करून । शृंगारले दोघे जण । करीं घेवोनि धनुष्यबाण । जानकीस प्रदक्षिण पैं केलें ॥ ३६ ॥ वंदोनियां श्रीगुरूसी । आज्ञा पुसोनि मातेसी । वाल्मीक म्हणे तयांसी । निर्वाण येथें करावें ॥ ३७ ॥ शंभु म्हणे दाक्षायणीसी[14] । अपूर्व कथा परियेसीं । जें वर्तलें नाहीं सृष्टीसी । देखिलें ना ऐकिलें ॥ ३८ ॥ युद्ध पित्यापुत्रांसी जाण । सूर्यवंशीं होईल दारुण । तें पाहूं चला हो विद्वान । वाल्मीकाचे आश्रमीं ॥ ३९ ॥ पुढें श्रीरामा पुत्रां होईल भेटी । ऐसी हे कथा सुरस मोठी । तंव पार्वती म्हणे जी धूर्जटी । कोणे समयीं स्वामिया ॥ ४० ॥ श्रीराम कोण कैंचा पुत्र । कोण वंश कोण गोत्र । तुम्ही जपतसां जो श्रीराममंत्र । तोचि कीं काय स्वामिया ॥ ४१ ॥ त्रिपुरारी म्हणे तोचि जाण । जयाचें आम्हां अखंड ध्यान । तोचि श्रीराम ब्रह्म पूर्ण । कार्याकारणें अवतरला ॥ ४२ ॥ याहूनि सार दुसरें । नाहीं म्हणोनि म्यां धरिलें हरें । तंव गिरिजा म्हणे दातारें । पुढें कथा सांगावी ॥ ४३ ॥ पार्वती म्हणे महादेवो । चला विमानीं बैसों पाहों । मग तो योगियांचा रावो । चरित्र पाहूं तेथें आला ॥ ४४ ॥ श्रीरामा पुत्रां कैसी भेटी । पुत्रांसहित सीता गोरटी । श्रीरामीं ऐक्य ते कथाकसवटी ।

---

१ जखमी झालेल्या वीरांच्या तोंडून. २ नाश. ३ सज्ज करा. ४ बसून, ५ दुसऱ्या, ६ चंदनाची, ७ स्त्रिया, ८ कावळे. ९ मुंगुस. १० डावे गेले. ११ चाष पक्षी. १२ हरिणी. १३ मारीचशत्रु रामचंद्र. १४ पार्वतीला,

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

मजप्रती सांगावी ॥ ४५ ॥ तंव येरीकडे लहुकुश चालिले । सिंहनादें गर्जिन्नले । शरकार्मुक[1] टणत्कारिलें । तंव दोघे देखिले श्रीरामें ॥ ४६ ॥ अवलोकोनि दोघां जणां । विस्मित झाला रामराणा । कैसें धरिलें इतुकिया सैन्या । हे तरी दोघे बाळक ॥ ४७ ॥ सुंदर अति राजसे । यांचे बाण रुतले कैसे । बंधु धरिले ते सरसे । हें आश्चर्य वाटतसे ॥ ४८ ॥ यांसीं युद्ध आपण करणें । तें होय लौकिकीं लाजिरवाणें । युद्धीं आपण विमुख होणें । तरी सुटका नव्हे बंधूंसीं ॥ ४९ ॥ मग रथ प्रेरिला सामोरा । वेगळें केलें येरां वीरां । कोप आला श्रीरामचंद्रा । भेणें वसुंधरा[2] थरारली ॥ ५० ॥ वरोनि सुधापानी[3] पाहती । एकमेकां परस्परें बोलती । कोपलिया अवनिजापती । कैसे वांचती दोघे कुमर ॥ ५१ ॥ तंव गुरु बृहस्पति बोलत । दोघां भय नाहीं निभ्रांत । राया राघवाचे सुत । अति महाबळियाढे ॥ ५२ ॥ घंटश्रोत्रारीनें[4] धनुष्य वाहिलें । म्हणे सावध व्हा रे वहिले । तुम्हीं पुरुषार्थ थोर दाखविले । ते आतां कळले रणरंगीं ॥ ५३ ॥ कपटी वाल्मीक ऋषीश्वर । येणेंचि महा चालविलें वैर । येरवीं कैंचे कोठील वीर । यांसी कोण गणिताहे ॥ ५४ ॥ सहोदर माझे धरोनि जाण । आणि वानरां केलें बंधन । यासी मूळ वाल्मीक ब्राह्मण । आतां लुटीन आश्रम याचा ॥ ५५ ॥ वाल्मीकीनें हे संग्रहिले । शस्त्रास्त्रविद्ये निपुण केले । चेष्टवोनि बंधू धरविले । या बाळकांकरोनी ॥ ५६ ॥ आतां बंधूंचें उसणें घेईन । तुम्हां दोघां धरूनि नेईन । ऋषिआश्रम भंगीन । अवघे करीन निष्कंटक ॥ ५७ ॥ चापशरपाणीचें ऐकोनि वचन । कुश बोलता झाला जाण । तुमचा प्रताप दारुण । आम्हां श्रुत झालासे ॥ ५८ ॥ तो ऐकावा रघुराजें । घरच्या सांडोनियां भाजे[5] । लोकीं यश मिरविजे । हेंचि आश्चर्य वाटतें ॥ ५९ ॥ बापुडी ताटका मारिली । रावणभगिनी विटंबिली । ऐसी तुमची कीर्ति ऐकिली । जगामध्यें प्रसिद्ध ॥ ६० ॥ ऐसे तुम्ही वडील दारुण । आम्हां दिसतसां पित्यासमान । यालागीं राखितों महिमान । आतां वाल्मीका शरण तुम्हीं यावें ॥ ६१ ॥ सद्गुरूसी न रिघतां शरण । कदा न तुटे देहबंधन । तया नरा अधःपतन । पापिया पूर्ण तो सृष्टीं ॥ ६२ ॥ माझा सद्गुरु प्रसिद्ध । जो कां विबुधादिकां वंद्य । तयाचा प्राप्त प्रसाद । त्याचेनि युद्ध करितों आम्ही ॥ ६३ ॥ मग बोलिला दूषणारी[6] । आतां माझा यावा[7] सांवरीं । नाहींतर पळसी ऋषींभीतरीं । सांडोनियां धनुष्यबाण ॥ ६४ ॥ ऐसें बोले श्रीरघुपती । धनुष्य चढवोनियां सीतीं । बाण सोडिले अमित क्षितीं । शर शरांतें प्रसवले ॥ ६५ ॥ बाणमय झालें भूमंडळ । अष्ट दिशा कुळाचळ । आणि जेवढा ब्रह्मांडगोळ । बाणें जळस्थळ कोंदलें ॥ ६६ ॥ ऐसे अद्भुत येतां बाण । वरिच्यावरी तोडिले कुशें जाण । उदय होतां रविकिरण । उडुर्गण लोपती आपसया[9] ॥ ६७ ॥ बाण तोडिले देखोनि श्रीरामें । विष्णुशस्त्र घेतलें नेमें । जपोनियां बीजें उत्तमें । कुशावरी मोकलिलें ॥ ६८ ॥ पृथ्वी झाली विष्णुमय । विष्णुमय झालें भुवनत्रय । शंख चक्र गदा अभय । चतुर्भुज प्रगटले ॥ ६९ ॥ विष्णुमय देखोनि अवनी । कुशवीरें तये क्षणीं । लक्ष्मीअस्त्र लाविलें गुणीं । रमामय मेदिनी पैं केली ॥ ७० ॥ कमलामय अवघी सृष्टी । कमलामय नभाचे पोटीं । कमलामय पर्वताच्या पृष्ठीं । कनकताटीं आरतिया ॥ ७१ ॥ त्या ओंवाळिती विष्णूसी । शंभूसी पार्वती जैसी । कीं शचीं[10] ओंवाळी वृत्रारीसी[11] । ऐसें तेथें वर्तलें ॥ ७२ ॥ ओंवाळोनियां विष्णूसी । रमेसहित वैकुंठासी । गेले विष्णु देखोनि रामासी । अति आश्चर्य वाटलें ॥ ७३ ॥ मग बोले श्रीरामराणा । धन्य धन्य तुझा पुरुषार्थपणा । जेणें विद्या शिकविली तोही धन्या । या भूगोळामाझारीं ॥ ७४ ॥ श्रीराम म्हणे कुशासी । मज निववविलें करोनि युद्धासी । नमस्कार तुझिया गुरूसी । तूं ब्रह्मबीज नव्हेसी निर्धारें ॥ ७५ ॥ कोण तुझा जनक जननी । हें मज सांगें त्वरेंकरोनी । तूं क्षत्रियाचा निश्चयेनी । मज मानसीं गमताहे ॥ ७६ ॥ तंव कुश बोले तये वेळीं । आम्ही काय जाणों कुळवल्ली । आणि सांगों नये

१ धनुष्यबाण. २ पृथ्वी. ३ अमृत प्राशन करणारे (देव). ४ कुंभकर्णशत्रूनें (रामचंद्रानें). ५ स्त्रीला.

६ श्रीराम. ७ आवेश. ८ पक्षी. ९ आपोआप. १० इंद्राणी. ११ इंद्राला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

काळीं । युद्धामाजी विचरतां ॥ ७७ ॥ जातिकुळीं काय चाड तुम्हां । युद्ध करावें जी श्रीरामा । आतां पहा आमच्या पराक्रमा । आणि विद्या वाल्मीकाची ॥ ७८ ॥ तुमचा पराक्रम अति प्रसिद्ध । ठकोनि वाळीचा केला वध । सुग्रीवा देवोनि राजपद । अपकीर्तीतें जोडिलें ॥ ७९ ॥ सिद्धी नेला गुरूचा याग । तुमचा सहोदर[१] निसुग । क्षणें क्षत्री क्षणें जोग । क्षणें तापसी जटाधारी ॥ ८० ॥ तुमचा होता भरंवसा । त्या वीरीं धरिली होती आशा । युद्ध करितां झाली निराशा । श्रीराम सोडवी ना म्हणोनी ॥ ८१ ॥ आम्ही म्हणतों क्षत्री श्रीराम । तंव हा फिटला अवघा भ्रम । मागील यशाचा वीरधर्म । याचपरी कळला जी ॥ ८२ ॥ ऐसें कुश बोलतां । हांसें आलें श्रीरघुनाथा । निको[२] क्षत्री होसील आतां । तरी हा बाण सांभाळीं ॥ ८३ ॥ बीजाक्षर जपोनि राजीवनयनें । व्याघ्रास्त्र सोडिलें कोपें दारुणें । येरें सिंहास्त्र सोडोनि तत्क्षणें । व्याघ्रास्त्र अवघें निवारिलें ॥ ८४ ॥ सवेंचि कोपोनि श्रीरघुपती । शर सोडिले नेणों किती । कुशा आलिंगोनि रघुनाथभातीं । प्रवेशती ते काळीं ॥ ८५ ॥ कुशाचे करींचे सुटती बाण । श्रीरामासी करिती नमन । सवेंचि येती परतोन । कुशाचे भातीं ते रिघती ॥ ८६ ॥ शर सोडी रामचंद्र । तयांचे कुशास अलंकार । पुत्राचे शर श्रीरघुवीर । ओंवाळोनि नमस्कारिती ॥ ८७ ॥ ऐसें देखोनि सकळ ऋषी । आश्चर्य करिती मानसीं । ते समयीं विश्वामित्र रायासी । बोलता झाला कांहींएक ॥ ८८ ॥ ऋषि म्हणे श्रीरघुनाथा । संग्राम नको करूं आतां । येरू म्हणे जी ताता । बंधू कैसेनि सुटतील ॥ ८९ ॥ बंधु आणि अश्व वानर । त्यांचे सुटकेचा कोण प्रकार । तंव वसिष्ठ ऋषीश्वर । हास्यवदनें बोलला ॥ ९० ॥ वसिष्ठ म्हणे वाल्मीकासी । बोलावोनि आणा या ठायासी । तो सांगेल निश्चयेंसीं । त्या कार्यासी करावें ॥ ९१ ॥ ऐकोनि श्रीगुरूचें वचन । श्रीरामें ठेविलें धनुष्यबाण । वाल्मीक ऋषि पाचारून । सभास्थानीं बैसविला ॥ ९२ ॥ वाल्मीकें खुणाविलें कुमरां । सोडविलें भरतशत्रुघ्नादि वीरां । अश्व सोडोनियां वनचरां[३] । समस्तांतें मुक्त केलें ॥ ९३ ॥ वाल्मीक ऋषि म्हणे श्रीरामासी । हे तुझे दोघे पुत्र परियेसीं । येरू म्हणे ठाव नाहीं भार्येसी । कैसें यांसी पुत्रत्व ॥ ९४ ॥ आधीं असलिया स्त्रीरत्न । तंव देखावें पुत्रनिधान । ते समयीं ब्रह्मनंदन[४] । नारद जाण तेथें पातला ॥ ९५ ॥ हांसोनियां नारद मुनी । म्हणे श्रीरामालागूनी । लटिकें वैराग्य चापशरपाणी । आम्हां मूढांसी दाविसी ॥ ९६ ॥ तंव कुंभोद्भव[५] म्हणे श्रीरामा । पुराणपुरुषा मेघश्यामा । पुत्र तुझे हे पुरुषोत्तमा । हें सौमित्रा पुसावें ॥ ९७ ॥ राजीवनेत्रें[६] सौमित्रातें । पुसों आदरिलें भावार्थें । तंव येरू गहिंवरोनि चित्तें । सद्गदकंठ दाटला ॥ ९८ ॥ सौमित्र होवोनि सावधान । बोलता झाला पूर्वकथन । स्वामीनें आज्ञा देवोन । सीता वना पाठविली ॥ ९९ ॥ ते नेवोनियां वनवासीं । सोडितां जानकी मजसीं । बोलिली गर्भिणी तीनमासी । सौमित्रा तुम्हीं जाणावें ॥ १०० ॥ अवनिजेचें[७] ऐकोनि वचन । मग राखिले तिचे प्राण । हृदयीं थोर दुःख पावोन । स्वामिचरणाजवळी आलों ॥ १ ॥ याउपरी वाल्मीकें बोलिलें । माझे शिष्य वनफळां गेले । तिंहीं सीतेसी देखिलें । आक्रंदतां वनवासीं ॥ २ ॥ तदुपरी आश्रमा आणिली । आम्हीं जानकी ओळखिली । सवेंचि मजसीं बोलिली । म्हणे मुनि मी गर्भवती ॥ ३ ॥ माझे आश्रमीं पूर्ण दिवस । क्रमोनि भरले नवमास । प्रसूतिकाळीं लहु कुश । पुत्र दोघे जन्मले ॥ ४ ॥ पुत्र झाले सुलक्षण । दिवसेंदिवस थोर होवोन । धनुर्विद्या अभ्यासून । सीतेसहित होते येथें ॥ ५ ॥ तुमचे पुत्र निपुण केले । आतां सांभाळिजे आपुले । म्हणोनि दोघां भेटविलें । श्रीरामासी ते समयीं ॥ ६ ॥ श्रीराघवें दिधलें आलिंगन । सजळ[८] दोनी झाले नयन । क्षण एक तटस्थ होवोन । मग मांडिये बैसविलें ॥ ७ ॥ आनंद झाला श्रीरामासी । देखोनियां लहुकुशांसी । पुनरपि चुंबन देवोनि त्यांसी । करें कुरवाळी मस्तक ॥ ८ ॥ भरत शत्रुघ्न लक्ष्मण । आणि सकल वानरसैन्य । लंकाधिपती बिभीषण । समस्त तयांसी भेट-

१ बंधु (भरत). २ खरा. ३ वानरांना. ४ ब्रह्मदेवाचा पुत्र (नारद). ५ अगस्ति. ६ कमलनेत्र रामानें. ७ सीतेचें.

८ आनंदाश्रूंनीं भरले.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

विले ॥ ९ ॥ हनुमंत सुग्रीव जांबवंत । आनंदें लहुकुश भेटत । आणि ऋषी वसिष्ठादि महंत । तयां नमस्कार केला पुत्रीं ॥ ११० ॥ नारद म्हणे वाल्मीकासी । वेगीं आणवीं जानकीसी । मोतियांचा चौक वसिष्ठ ऋषी । घालिता झाला ते वेळीं ॥ ११ ॥ आणविली जनकबाळा । आसवें आलीं तिच्या डोळां । येरी लागली चरणकमळा । वसिष्ठादि ऋषींचे ॥ १२ ॥ मग नमस्कारोनि श्रीरघुपती । वामांगीं बैसली सीता सती । ऋषी जयजयकारें गर्जती । विजयी रघुपती तिहीं लोकीं ॥ १३ ॥ जैसा कैलासीं त्रिपुरारी । अर्धांगीं घेवोनियां बैसे गौरी । गणेश आणि तारकारी । दक्षिणांगीं शोभत ॥ १४ ॥ ऐसा झाला महोत्सव । भार्यापुत्रांसहित देवाधिदेव । विजयी झाला ऋषिसमुदाव । जयजयकारें गर्जिन्नले ॥ १५ ॥ देव करिताती स्तुती । नानापरींचीं वाद्यें वाजती । विमानीं होत्या सुरांच्या पंक्ती । पुष्पवर्षाव तिहीं केला ॥ १६ ॥ मग लक्ष्मणभरतशत्रुघ्नांसी । गहिंवर न धरवे मानसीं । सत्वर उठोनि जानकीसी । साष्टांगेंसीं नमस्कारिलें ॥ १७ ॥ मग पाहोनियां सुमुहूर्त । रथ पालाणिले त्वरित । रथीं बैसोनि ऋषी समस्त । अयोध्यापंथें निघाले ॥ १८ ॥ समस्त परिवारेंसीं जाण । रथीं आरूढले श्रीराम जाण । एके दिवशीं अयोध्याभवन । निजसैन्येंसीं प्रवेशले ॥ १९ ॥ भवनीं प्रवेशली सीता । कौसल्यादिकरोनि समस्ता । जानकीस आलिंगन झाल्या देत्या । म्हणती कष्टली सीता वनवासीं ॥ १२० ॥ कौसल्या आरती घेवोनि करीं । तिघां जणांतें लोण उतरी । हर्ष न समाये अंबरीं । लहुकुशांतें देखोनी ॥ २१ ॥ येरीकडे श्रीरामराणा । आज्ञा देवोनि समस्त जनां । पाठविले निजस्थानां । ऋषी राजे सकळिक ॥ २२ ॥ आज्ञा देवोनि कपिगणांतें । पाठविले निजस्थानांतें । विभीषणें नमस्कारोनि राघवातें । निजनगरातें निघाला ॥ २३ ॥ बंधुभार्यापुत्रांसहित । अयोध्येसी श्रीरघुनाथ । राज्य करितां सुखें स्वस्थ । पुढील चरित्र अवधारा ॥ २४ ॥ एका जनार्दना शरण । पुढील कथा अति पावन । जिचें करितां स्मरण । भवबंधन स्वप्नीं नाहीं ॥ १२५ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां श्रीरामजानकीपुत्रदर्शनं नाम एकोनसप्ततितमोऽध्यायः ॥ ६९ ॥ ओंव्या ॥ १२५ ॥

१ कार्तिकस्वामी. २ सज्ज केले. ३ दृष्ट काढली. ४ मावेना. ५ निजानंदसुखांत. ६ धर्मन्यायमार्गानें.

अध्याय सत्तरावा

॥ श्रीसच्चिदानंदाय नमः ॥ जानकीसहित श्रीरघुपती । सुखें स्वानंदें अयोध्येप्रती । राज्य करितां स्वधर्मस्थिती । पापवदंती राज्यीं नाहीं ॥ १ ॥ देशींचे लोक पुण्यशील । स्वधर्मी रत द्विज सकळ । अग्निहोत्रें करोनियां काळ । श्रीरामनामीं कंठिती ॥ २ ॥ घरोघरीं तुळसीवृंदावनें । नित्य करिती हरिकीर्तनें । ठायीं ठायीं होती पुराणें । शास्त्रव्याख्यानें घरोघरीं ॥ ३ ॥ आणिक जे इतर लोक । तेही नगरीं स्वधर्मरक्षक । भूतदयायुत दीनपाळक । उपकारी अत्यंत पुढिलांसी ॥ ४ ॥ भरत शत्रुघ्न कैकेयीनंदन । सुमित्रेचा लक्ष्मण । श्रीरामसेवे अनुदिन । आसक्त जाण मन त्यांचें ॥ ५ ॥ प्रधानवर्ग सकळिक । नगरींचे नगरलोक । बंदीजन सर्व सेवक । श्रीरामउपासक अनुदिनीं ॥ ६ ॥ अष्टदळकमळकळिकेमाझारीं । जानकीसमवेत कनकशृंगारी । नीळवर्ण छत्र शोभे शिरीं । बंधु परिवारीं उभे तेथें ॥ ७ ॥ ऐसा सुंदर राजीवलोचन । श्यामसुंदर धनुष्यबाण । ठाण मांडोनि विराजमान । त्याचें ध्यान करिताती ॥ ८ ॥ योगी दिगंबर तापसी । सिद्ध साधक महंत ऋषी । आश्रयोनि श्रीरामासी । अयोध्येसी राहिले ॥ ९ ॥ ऐसिये अयोध्याभवनीं । दुःख दारिद्र्य न देखिजे स्वप्नीं । पाप कैसें तें नेणती मनीं । समाधानी चित्तसुखें ॥ १० ॥ कित्येक काळपर्यंत । राज्य करी श्रीरघुनाथ । पुढें कथा वर्तली अद्भुत । सावधानचित्त अवधारा ॥ ११ ॥ कैकेयी म्हणे श्रीरामासी । रावणाची लंका आहे कैसी । ते मज सांगावी परियेसीं । समुद्राचा जिसी परिघ असे ॥ १२ ॥ लंका कैसी सुवर्णाची । कैसा त्रिकूट किती उंची । लांब रुंद गृहें राक्षसांचीं । कोणेपरींचीं आहेत कैसीं ॥ १३ ॥ निकुंभिळा शोभायमान । जेथें वसे रावणनंदन । जेणें विबुध केले दीन । शचीपति इंद्रपदाहून उतरविला

७ पापाची वार्ता. ८ भाटमंडळी. ९ मारीचशत्रु रामचंद्र. १० इंद्रजित. ११ देव.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ १४ ॥ सुवेळेसी कैसी रचना । जेथें होतासी रघुनंदना । जेथोनि पहातां लंकाभवना । सर्व रचना दिसे स्पष्ट ॥ १५ ॥ कैसें तें संग्रामस्थळ । जेथें रावणादि राक्षस प्रबळ । दीर्घ विकटमुखाचे विशाळ । कुंभकर्णादि थोर थोर ॥ १६ ॥ अशोकवनाची रचना । जेथें होती पद्मनयना । परिवारित राक्षससेना । त्रिजटा आदिकरोनि ॥ १७ ॥ ते लंका पाहों निजदृष्टी । ऐसी कैकेयीसी उत्कंठा मोठी । हें श्रीरामें जाणोनियां पोटीं । मातेप्रति बोलता झाला ॥ १८ ॥ अवो जननीये अवधारीं । लंका पहावया उत्कंठा थोरी । वर्ततसे तुमचे जिव्हारीं[1] । तरी प्रधानांसमवेत जाइंजे ॥ १९ ॥ पाहोनियां लंकाभवन । शीघ्रवत यावें आपण । ऐसें श्रीरामें आज्ञापून । पुष्पकावरी[2] बैसविली ॥ २० ॥ सर्वे देवोनि नाना मंत्री । लंके निघाली कैकेयपुत्री । घेतली मंथरा अपवित्री । कलहकारिणी पुनरपि ॥ २१ ॥ मायेसवें पूर्ण अविद्या । तेंवी कैकेयीपासीं मंथरा कुविद्या । जेंवी अधमा आवडे अविद्या[3] । परापवादालागूनी ॥ २२ ॥ तेंवी कैकेयी निजविमानीं । पाहों चालली लंकाभवनीं । मार्गीं आकाश पाहे नयनीं । दश दिशा अवलोकीत ॥ २३ ॥ ऐसें चालत विमान । नाना देश दुर्गें लंघून । पुढें देखिलें लंकाभवन । कनककळशीं विराजित ॥ २४ ॥ देखोनियां लंकाभवना । पारणें झालें कैकेयीनयनां । म्हणे धन्य धन्य दशानना । नांदणूक ये ठायीं ॥ २५ ॥ प्रसन्न करोनि उमापती[4] । शिरीं पूजिला कैलासपती । धन्य धन्य रावणाची भक्ती । उपमा त्रिजगतीं असेना ॥ २६ ॥ धन्य रावणाचें तप । धन्य रावणाचा जप । धन्य रावणाचा प्रताप । बंदी सुरवर जयाचे ॥ २७ ॥ धन्य रावणाची संपत्ती । धन्य रावणाची संतती । जेणें समरांगणीं शचीपती[6] । जिंतोनि कामारा[7] पैं केला ॥ २८ ॥ ऐसें आश्चर्य करी श्रीराममाता । संज्ञेनें पाठविलें दूता । मात जाणविली लंकानाथा । दशरथवनिता आलीसे ॥ २९ ॥ भ्रूलतासंज्ञेनें सेवक । प्रवेशले जेथें लंकानायक । भोंवतें राक्षसांचें कटक । रत्नसिंहासनीं बिभीषण ॥ ३० ॥ दूतीं बिभीषण कैसा देखिला । जैसा शशी गगनीं मिरवला । कीं उत्तानचरणाचा तान्हुला । अढळ पदीं शोभतसे ॥ ३१ ॥ कीं पातलिया वसंत । वनश्रीमाजी विराजत । श्रीरामाचा शरणागत । सिंहासनीं शोभतसे ॥ ३२ ॥ कीं गगनामध्यें दिनकरू । कीं कुळाचळांमध्यें मेरू । कीं पक्षियांमाजी खगेश्वरू । तैसा लंकेश्वरू राजसांमध्यें ॥ ३३ ॥ कीं तारागणामाजी ध्रुरू[8] । अब्धिमाजी क्षीरसागरू । कीं दैत्यांमाजी कश्यपकुमरू । तैसा नैर्ऋतेश्वरू[9] तयांमाजी ॥ ३४ ॥ ऐसा बिभीषण धर्ममूर्ती । दूतीं देखोनि प्रणिपात विनंती । कर जोडोनि आदरें स्तुती । करिते झाले मुखकमळीं ॥ ३५ ॥ म्हणे राजाधिराजा लंकापती । अति श्रेष्ठ धर्ममूर्ती । कैकेयीनें पाठविलें तुम्हांप्रती । आशीर्वाद देवोनि ॥ ३६ ॥ कैकेयी म्हणाल आहे कोण स्थळीं । तरी प्रधानांसहित नगराचे पाळीं । तिणें पाठविलें तुम्हांजवळी । बोलवावया तुम्हांतें ॥ ३७ ॥ दूतमुखींचें ऐकोनि वचन । बिभीषणाचें उल्हासे मन । सर्वे सेनासेवक राक्षसजन । कैकेयीभेटी निघाला ॥ ३८ ॥ सहपरिवारें शरणागत । भरतमातेच्या भेटी उल्हासत । चालिला जैसा आनंदभरित । चकोर चंद्राचिये प्रीतीं ॥ ३९ ॥ ऐसियेपरी बिभीषण । श्रीराममातेसी भेटोन । करोनि साष्टांग नमन । आनंदें पूर्ण निवाला ॥ ४० ॥ बिभीषण जोडल्या करीं । कैकेयीस प्रणिपात करी । म्हणे स्वामिनी मज दीनावरी । येवोनि कृपा थोर केली ॥ ४१ ॥ आतां चलावें मंदिरा । मज दीनावरी कृपा करा । ऐसी प्रार्थोनि नृपसुंदरा[10] । परिवारेंसीं गृहा नेली ॥ ४२ ॥ दीर्घ उपचार करोनी । पूजिली ते भरतजननी । समस्तें भोजन सारोनी । विडे दिधले सकर्पूर ॥ ४३ ॥ कैकेयीसी देवोनि दिव्यांबरें । मग प्रार्थिली मधुरोत्तरें । म्हणे माते कोण कार्यार्थ श्रीरघुवीरें । तुम्हां येथें पाठविलें ॥ ४४ ॥ किंनिमित्त आगमन । तें मजप्रति कृपा करोन । विदित करावें स्वामिनीनें । शरणागत म्हणोनी ॥ ४५ ॥ ऐकोनि बिभीषणाची विनंती । कैकेयी बोले तयाप्रती । म्हणे समस्त लंका पहावयार्थी । येथें येणें

१ अंतःकरणांत, मनांत. २ पुष्पक विमानांत. ३ कुतर्क. ४ शंकर. ५ स्तुतिपाठक. ६ इंद्र. ७ दास. ८ ध्रुव.

९ राक्षसराज (बिभीषण). १० कैकेयी.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

राजेंद्रा ॥ ४६ ॥ मारोनि रावण कुंभकर्ण । लंका तुज दिधली दान । ऐसें ऐकोनि उत्कंठित मन । पहावया आलें लंकेतें ॥ ४७ ॥ कैकेयीची ऐकोनि वचनावळी । बिभीषण सांगे प्रधानांजवळी । भरतमातेतें लंका समूळीं । दाखवा सकळ भवनादिक ॥ ४८ ॥ निकुंभळा सुवेळा पडलंका । त्रिकूटादिकरोनि दावा लंका । जेथें मारिलें रावणादि सैनिकां । तींही स्थळें दावावीं ॥ ४९ ॥ समस्त प्रधानांचीं भवनें । आणि निद्रा केली कुंभकर्णें । तीं स्थळें आणि नाना उपवनें । अशोकवनें दाखवावीं ॥ ५० ॥ बिभीषणआज्ञा वंदोनि शिरीं । बैसे विमानीं जिचा पुत्र लवणारी । लंकादि स्थळें पहावया ते अवसरीं । निघती झाली ते काळीं ॥ ५१ ॥ प्रधान म्हणती राजमाते । पडलंका पाहें जाण निरुतें । प्रथम क्रौंचा हनुमंतें । ये स्थळीं मारिली ॥ ५२ ॥ तेथोनि प्रवेशला लंकापुरीं । वळघला गृहांवरी । तें हें राजभवन निर्धारीं । राघवारी वसे येथें ॥ ५३ ॥ हें रावणाचें होमस्थान । तेथें करीत होता शयन । हें सभास्थळ हें सिंहासन । विराजमान येथ राक्षसेंसीं ॥ ५४ ॥ हीं प्रहस्तादि प्रधानांचीं मंदिरें । येथें नाना जोशी भट वेव्हारें । हीं अग्निहोत्र्यांचीं होमस्थळें अपारें । हे हाटबाजार लंकेचे ॥ ५५ ॥ दाखविली शक्रजिताची पुरी । जेथें होम करीत होता शक्रारी । सौमित्रें साधोनि रणचत्वरीं । मारिला पशूसारिखा ॥ ५६ ॥ तेथोनि पुढें चालिलें विमान । देखिलें सुवेळेचें वन । कैकेयी म्हणे शिखर मनोरमण । याचें नाम काय असे ॥ ५७ ॥ प्रधान म्हणती राजमाते । वानरांसहित श्रीराम येथें । राहोनियां राक्षसांतें । निर्दळिलें समरांगणीं ॥ ५८ ॥ पैल रुद्रकूटपर्वत । येथोनि उडाला वायुसुत । लंका जाळोनि अशोकवनांत । पादपें उपडोनि पैं गेला ॥ ५९ ॥ ऐसीं पाहोनि स्थळांतर । मागुती प्रवेशली लंकापुर । तंव देखिलें मंदिर । कुंभकर्णवीराचें ॥ ६० ॥ प्रधान म्हणती राजबाळे । येथें शयन केलें कुंभकर्णें विशाळें । हें तयाचें अंतःपुर स्त्रिया बाळें । ये भवनीं वसती माते ॥ ६१ ॥ मग ते दशरथसुंदरी । प्रवेशली कुंभकर्णमंदिरीं । तंव त्या कुंभकर्णाची अंतुरी । कैकेयीदर्शना पैं आली ॥ ६२ ॥ भेटोनियां कैकेयीतें । अति सन्मानिलें आदरें बहुतें । भरतमाता म्हणे वज्रसारेतें । कैसा काळ प्रवर्तला ॥ ६३ ॥ विपरीत समयो पातला । तैं जंबुकीं सिंह साधिला । कीं पिपीलिकीं वेढिला । कद्रुतनयो साहसें ॥ ६४ ॥ तैसें झालें लंकेआंत । श्रीरामें वेधिला तुझा कांत । इतुकियासी मूळ शरणागत । राक्षसां अंत त्याचेनि ॥ ६५ ॥ श्रीरामा भेटोनि बिभीषण । मारविले राक्षस दारुण । बंधुपुत्रांसहित दशानन । समरांगणीं पाडिला ॥ ६६ ॥ आपण झाला राज्याधिकारी । निराक्षस केली पुरी । तंव बोलतां ते अवसरीं । अष्टशतवर्षी कुमार आला ॥ ६७ ॥ तयासी देखोनि कैकेयी । वज्रसारेसी पुसे पाहीं । हा कुमार कोणाचा ये समयीं । अतिसुंदर दिसताहे ॥ ६८ ॥ रूपें ठाणें अति सुंदर गुण । पराक्रमें दिसे पंचानन । याचीं जननीजनक कोण । मजप्रती संपूर्ण सांगावें ॥ ६९ ॥ ऐकोनि कैकेयीच्या वचनासी । वज्रसारा सांगे सर्व वृत्तान्तासी । सांगों आदरिलें परियेसीं । सावकाशीं अवधारिजे ॥ ७० ॥ वज्रसारा म्हणे कैकेयीमाते । ऐकें याचिया कथनातें । मूळकासुर नाम यातें । प्रसिद्ध सर्वांतें विदित असे ॥ ७१ ॥ हा पितयाचे मूळीं लागला । म्हणोनि याचा त्याग केला । परी बाहेर वाढिन्नला । येरां पोरांचिये घरीं ॥ ७२ ॥ मूळीं लागोनि पितयातें । मरण झालें राघवहस्तें । क्षयो झाला सर्व राज्यातें । रावणादिकरोनी ॥ ७३ ॥ मूळनक्षत्रें शांति केली । राक्षस सेना निर्दाळिली । रावणाची कुळवल्ली । आंहाळली राघवाग्नीनें ॥ ७४ ॥ इतुकियासी कारण हा मूळकासुर । हा जाणिजे माझा कुमर । यासी देखतां तप्त शरीर । होत आहे साजणी ॥ ७५ ॥ वंशा झाली सर्व शांती । मूळ नक्षत्राची ऐसी गती । हें होणार अनादि निश्चितीं । भविष्य वाल्मीकी वदलासे ॥ ७६ ॥ भरतमाता म्हणे कुंभकर्णप्रिये । यासी तपा पाठवावें सये । तप केलिया फळ प्राप्त होये । लंकेचिया राज्याचें ॥ ७७ ॥ प्रसन्न केलिया कैलासपती । लंकाराज्य

१ बागा. २ लवणशत्रु शत्रुघ्न. ३ चढला. ४ इंद्रजित. ५ वृक्ष. ६ स्त्री. ७ कोल्ह्यांनीं. ८ मुंग्यांनीं. ९ सर्प. १० जळाली. ११ श्रीशंकर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

ऐश्वर्यसंपत्ती । बिभीषणाचियाप्रती । देईल निश्चितीं साजणी ॥ ७८ ॥ नाहीं तरी संतोषोनि विश्वनाथ । सामर्थ्य देईल अद्भुत । आपुले बळें लंका प्राप्त । होईल निश्चित साजणी ॥ ७९ ॥ ऐसें संवादोनि कैकेयी । निघाली बिभीषणमंदिरा पाहीं । बिभीषणें भेटोनि ते समयीं । अति आदरें पूजिली ॥ ८० ॥ पूजोनियां श्रीराममाते । समर्पिलीं नाना वस्त्रें । कैकेयी म्हणे बिभीषणातें । अशोकवन पाहूं पां ॥ ८१ ॥ बिभीषणासमवेत कैकेयी । प्रवेशली अशोकवनाचे ठायीं । पाहती झाली ते समयीं । नाना परींच्या वृक्षांतें ॥ ८२ ॥ कैलासींच्या संपत्तीतें । रावणें मागोनि आणिलें येथें । इंद्र गांजोनि नंदनवनींच्या वृक्षांतें । बळें लंकानाथें आणिलें ॥ ८३ ॥ नाना परींच्या वापी पोखरणी । जेथील अमूप नाटोपे पाणी । देवालयें गोपुरें ऊर्ध्व गगनीं । उंच ऐसीं रत्नकळशीं ॥ ८४ ॥ बिभीषण म्हणे रावणारिमाते । या वृक्षातळीं रावणें सीतेतें । भोंवतीं राक्षसी ठेविल्या होत्या येथें । एकवस्त्रेंसीं षण्मास ॥८५॥ भोंवत्या राक्षसी दारुण । सीतेसी करिती रक्षण । हनुमंत या वृक्षावरून । जानकीस भेटला ॥ ८६॥ ऐसी विवंचना लंकानाथें । सांगितली कैकेयीतें । सुखावोनि अत्यंत चित्तें । परमानंद पावली ॥ ८७ ॥ कैकेयी म्हणे बिभीषणा । मी जाईन अयोध्याभवना । तुम्हीं क्षेम कल्याण लंकाभवना । राज्य करावें स्वस्थानीं ॥ ८८ ॥ आज्ञा घेवोनि बिभीषणाची । अयोध्ये निघाली जननी भरताची । पुढील कथा सुरस रुची । वाढवी मनाची करूनि सेवा ॥ ८९ ॥ एका जनार्दना शरण । अवलोकूनि लंकाभवन । कैकेयी प्रवेशली अयोध्ये जाण । श्रीरघुनंदन जेथें वसे ॥ ९० ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां कैकेयीलंकावलोकनं अयोध्यागमनं नाम सप्ततितमोऽध्यायः ॥ ७० ॥ ओंव्या ॥ ९० ॥

अध्याय एकाहत्तरावा

॥ श्रीशिवाय गुरवे नमः ॥ येरीकडे अनुसंधान । रम्य रामायण पावन । श्रवणें भवदोषखंडण । श्रवणमात्र केलिया ॥ १ ॥ कैकेयीनें प्रबोधोनि कुंभकर्णपत्नीतें । आपण गेली अयोध्येतें । मागें वर्तलें तें सावचितें । श्रोतृजनीं अवधारिजे ॥ २ ॥ वज्रसारानामें कुंभकर्णजाया । निखंदोनि बोले निजतनया । म्हणे पुत्रा तुझा जन्म वायां । भूमिभार झालासी ॥ ३ ॥ मूळीं लागोनि सर्व शांती । केली आपुल्या पित्याचे संपत्ती । अभाग्यें उरलासी क्षितीं । आम्हां दुःख दावावया ॥ ४ ॥ जरी जन्मतासी पाषाण । तरी सार्थक होतें जाण । तुज विवोनि वंध्यापण । माझें न चुके पापिष्ठा ॥ ५ ॥ जाय शिरीं घालीं पर्वत । नातरी करीं पर्वतपात । विष भक्षोनि प्राण निश्चित । सोडोनि देईं पापिष्ठा ॥ ६ ॥ तुझिया पितृव्यांची राज्यसंपत्ती । तुज जन्मतां गेली भस्मांतीं । ऐसा अधम वंशाप्रती । जन्मलासी पापिष्ठा ॥ ७ ॥ राज्य हिरोनि बिभीषणें । भोगी सुख स्वानंदमनें । तुझें जन्म उवगंवाणें । झालें असे पापिष्ठा ॥ ८ ॥ मातेचें ऐकोनि वचन । पुत्र करिता झाला प्रश्न । म्हणे माते पूर्वकथन । सांग संपूर्ण मजलागीं ॥ ९ ॥ वज्रसारा म्हणे मूळकासुरासी । पूर्वीं श्रीराम पंचवटिकेसी । वनवासीं असतां कपटासी । शूर्पणखेनें मांडिलें ॥ १० ॥ पाप तिचें तीस फळलें । तिच्या कैवारें रावणें जानकीस हरिलें । रावणाचें राज्य बुडालें । श्रीरामाच्या कोपेंकरून ॥ ११ ॥ रावणकुंभकर्ण निर्दाळिले । शक्रजितादि पुत्र मारिले । राज्यीं बिभीषणा स्थापिलें । घर घेतलें श्रीरामें ॥ १२ ॥ बिभीषणें भेद सांगितला । राक्षसांसी संहार झाला । तुझ्या मूळें ऑट केला । लंकेचिया राज्यासी ॥ १३ ॥ मूळकासुरें ऐकोनि वचन । अत्यंत अनुताप झाला पूर्ण । पुढें माते उपाव कोण । कार्य कारण सांगावा ॥ १४ ॥ माता म्हणे निजात्मजासी । तूं जाईं रे वनांतरासी । प्रसन्न करोनि सदाशिवासी । राज्य मागें लंकेचें ॥ १५ ॥ प्रसन्न करोनि चंद्रचूड । वर मागें सुदृढ । जेणें पुरे माझें कोड । महिमा वाढे तेणें तुझा ॥ १६ ॥ आज्ञा लाहोनि मातेची जाण । मूळकासुर निघाला तपालागून । जेंवी विनताज्ञेनें सुपर्ण । अमृतहरणा निघाला ॥ १७ ॥ तैसा तो कुंभकर्ण-

१ विहिरी. २ पायऱ्यांच्या विहिरी. ३ पुष्कळ. ४ दोष देऊन. ५ पृथ्वीवर. ६ चुलत्याची. ७ व्यर्थ. ८ नाश.

९ शंकर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

कुमर । सेविता झाला अटव्य[1] थोर । लंघोनि पर्वताचें शिखर । हिमाद्रीस पावला ॥ १८ ॥ आश्रयोनि हिमवंतगिरी । तप करिता झाला पूर्वजांपरी । तया अनुष्ठानाची थोरी । सविस्तरीं अवधारा ॥ १९ ॥ निरन्न निरुदक होऊन । भूमिशयनें[2] वस्त्रविहीन । तप करिता झाला दारुण । एक सहस्र वर्षेंवरी ॥ २० ॥ तदनंतर जातवेदासी[3] । प्रज्वाळूनि घृतादिअवदानेंसीं[4] । मग हविता झाला निजमांसासी । कुंभकर्णाचा नंदन ॥ २१ ॥ तप आचरोनि घोर । तृप्त केला वैश्वानर । तेणेंकरूनि अंबर । दाटलेंसे बहुसाल मांसगंधें ॥ २२ ॥ खवट घाण उठिली गगनीं । तेणें तटस्थ झाले सुधापानी[5] । धूम्रें व्यापिली अवनी । हाहाकार करिते झाले ॥ २३ ॥ भयभीत झाला शचीपती[6] । तेणें विघ्न केलें अति युक्तीं । उर्वशी पाठविली राक्षसाप्रती । छळणेनें[7] छळावया ॥ २४ ॥ उर्वशी येवोनि आपण । कटाक्ष दावोनि बोले वचन । म्हणे तापसिया तुजलागून । तप दुर्धर म्यां केलें ॥ २५ ॥ तुजऐसा पावावया पती । तप केलें निजात्मशक्ती । येरू म्हणे तुझे उदराप्रती । कुमर होवोनि जन्मावें ॥ २६ ॥ ऐकोनि मूळकासुराचें वचन । उर्वशी निघाली जेथें शचीरमण । वृत्तान्त तया जाणवूण । स्वस्थानीं ते राहिली ॥ २७ ॥ छळण न चले राक्षसाप्रती । देवेंद्रें जाणोनि निगुतीं । तयाउपरी कैलासपती[8] । चतुराननेंसीं येता झाला ॥ २८ ॥ जेथें तप करी दशग्रीवानुजकुमर । तेथें येवोनि गंगाधर । म्हणे झालें तुझें तप दुर्धर । देखोनियां तोषलों ॥ २९ ॥ माग तुज झालों प्रसन्न । जें देवा दुर्धर न देववे जाण । तें मी कृपेनें देईन दान । निजसंतोषें बाळका ॥३०॥ ऐसें वदला धूर्जटी । ऐकोनि मूळकें करसंपुटीं । विनविला म्हणे कृपादृष्टीं । मजकडे स्वामी पहावें ॥ ३१ ॥ मज अमर करावें । देवदैत्यांच्या हातें न मारावें । यक्षराक्षसगंधर्वें । तिंहीं न वधावें मजलागीं ॥ ३२ ॥ पिशाच चारण असुर । मानवादि करोनि नर । आणि वनींचीं श्वापदें दुर्धर । तयांचेनि मज मृत्यु न येवो ॥ ३३ ॥ ऐकोनि राक्षसाचें वचन । हांसोनियां त्रिनयन । म्हणता झाला मूळका जाण । जें बोलिलासी तें सत्य रे ॥ ३४ ॥ इतुकियांचेनि मृत्य । तुज न होईल जाण निश्चित । हें ऐकोनि राक्षससुत । सानंदचित्त पैं झाला ॥ ३५ ॥ म्हणे स्वामी दुर्धर शक्ती । द्यावी मजला युद्धार्थी । वैरी सन्मुख मजप्रती । सहसा धीर न धरिती ॥ ३६ ॥ बाळकाची ऐकोनि वचनावळी । संतोषला चंद्रमौळी । पाशुपत देवोनि ते काळीं । कर मस्तकीं ठेविला ॥ ३७ ॥ ब्रह्मा म्हणे राजकुमरा । माझें ब्रह्मास्त्र घे युद्धीं चतुरा । निवटावें[9] रिपुसंभारा । आतां निजनगरा जाय वेगीं ॥ ३८ ॥ जे योनिद्वारें जन्मती । तयांचेनि नव्हे मृत्युप्राप्ती । हें ऐकोनि राक्षस चित्तीं । सुखप्राप्ती पावला ॥ ३९ ॥ वर देवोनि राक्षसपुत्रासी । ब्रह्मा महेश कैलासासी । निघाले मागें ब्रह्मऋषी[10] । वीणा वाजवीत पैं आला ॥ ४० ॥ नारदाचें ऐकोनि गायन । राक्षसपुत्र करोनि नमन । म्हणता झाला माझें मरण । कोणाचेनि हातें होय मुने ॥ ४१ ॥ मुनि तुम्हां त्रैलोक्यीं गमन । जाणतां भूतभविष्यवर्तमान । सांगावें माझें कोणाचेनि मरण । विदित संपूर्ण करावें ॥ ४२ ॥ मूळकासुराचें ऐकोनि वचन । नारद हांसे खदखदोन । म्हणता झाला महेशें वर देवोन । अमर पूर्ण तुज केलें ॥ ४३ ॥ कैंचा मृत्यु राक्षसपुत्रा । तुज काळत्रयीं भय नाहीं सर्वथा । जन्मला प्राणी अमर हे वृथा । निजश्लाघ्यता[11] भोगिती रे ॥ ४४ ॥ जननीजठरा जे आले । ते काळाचें खाजें[12] झाले । प्रळयानळाचे तोंडीं पडिले । जाण वहिलें[13] कुमारा ॥ ४५ ॥ हिरण्यकश्यपादि थोर थोर । रावणादि रजनीचर । तेही अमरत्वाचा बडिवार । सत्य साचार मानीत होते ॥ ४६ ॥ तेही गेले मरणमार्गें । काळसूत्रीं पडिले निजांगें । अमरत्व म्हणती हें वाउगें[14] । पडले प्रसंगें जाणवेल ॥ ४७ ॥ विबुधादिक[15] सुधापानी । दैत्य अमर समस्त मिळोनी । बैसले अमृतभोजनीं । मरणें तेथोनी मारिलें ॥ ४८ ॥ सुधादान करितां राहो । त्याचे मस्तकीं मृत्यूचा घावो । प्रथम वाजिन्नला पहाहो । शरीर भागद्वय झालें ॥ ४९ ॥ ऐसी मृत्यूची निजकथा । सत्य जाण घटश्रोत्रपुत्रा[16] । तुझ्या पित्यानें पूर्वीं

१ रान. २ भूमीवर निजणारा. ३ अग्नीला. ४ तुपादिकांच्या आहुतींनीं. ५ देव. ६ इंद्र. ७ कपटानें. ८ शंकर.

९ वधावें. १० नारद. ११ आपली प्रौढी. १२ भक्ष्य. १३ ताबडतोब. १४ खोटें. १५ देव वगैरे. १६ मूळकाला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

तत्त्वतां । तुजसारिखें पूसिलें ॥ ५० ॥ तेंचि तूं जरी पुससी । तरी सत्य मानीं माझ्या वचनासी । जें सांगें तें भावार्थेंसीं । निजमानसीं धरावें ॥ ५१ ॥ जो राज्य करोनि विदेही । देह असतां देहबुद्धि नाहीं । जया शुकादि वंदिती पाहीं । दृष्टांतीं कवी ज्यातें स्मरती ॥ ५२ ॥ तया विदेहनृपाचे घरीं । जन्मली अयोनिजा कुमारी । नामें जाण सीता सुंदरी । तुझ्या पितरींची[1] निजभार्या ॥ ५३ ॥ तिचेनि हस्तें तुज मृत्य । राक्षसपुत्रा जाण निश्चित । ऐसें नारदमुखें भाषित । सविस्तर वृत्तान्त आयकिला ॥ ५४ ॥ आज्ञा घेवोनि ब्रह्मऋषी । जाता झाला कैलासासी । मागें मूळक निजमानसीं । विवंचना करिता पैं झाला ॥ ५५ ॥ म्हणे नारदें काय कथिलें । असंभाव्य श्रुत केलें । न घडे ते केंवी घडे वहिलें[2] । मिथ्या येणें बोलें दिसताहे ॥ ५६ ॥ कमळमृणाळाचेनि[3] तंतें । केंवी बांधवेल मतंगातें[4] । केंवी कटिभंग आळिकेचेनि[5] सूत्रें । केंवी मेरू वेंघवेल ॥ ५७ ॥ धेनूचें वत्स निजशृंगेंकरीं । हिमालयाचें हृदय विदारी । मशक सागरा प्राशन करी । हें कैसेनि घडों शके ॥ ५८ ॥ महाअंधाचेनि निजपुत्रें । भेदिजे पिपीलिकेचीं नेत्रें । चरणविहीन पर्वत- । -मस्तका केंवी वळंघेल ॥ ५९ ॥ हें अघटित घडे एकादे ठायीं । परी मज मारूं न शके वैदेही । जें नारद वदला तें सर्वेही । मानसीं सत्य न वाटे ॥ ६० ॥ शुक्तिकेमाजील[6] किडा । केंवी जिंकूं शकेल गरुडा । ऐसें जाणोनि नारद वेडा । मजसीं मिथ्या बोलिला ॥ ६१ ॥ सीतेचेनि हातें मज मृत्य । हें काळत्रयीं नव्हे सत्य । जें वदला उमाकांत । तें कैसें मिथ्या होईल ॥ ६२ ॥ ऐसें मनीं भावोन । निजप्रतापें कुंभकर्णनंदन । निजनगराचे प्रांतीं येवोन । राक्षसां मात जाणविली ॥ ६३ ॥ राक्षसां म्हणे मूळकासुर । तुम्ही बिभीषणा जाणवा उत्तर । कुंभकर्णाचा निजकुमर । युद्धालागीं बोलावितो ॥ ६४ ॥ जरी सामर्थ्य असेल तुम्हांसी । तरी युद्ध करावें तयासीं । नाहीं तरी निजराज्यासी । सोडोनि वनासी पैं जावें ॥ ६५ ॥ मार्गस्थ ऐकती त्याची वचनावळी । उपहास करोनि हांसिजे सकळीं । म्हणती हें पितयाच्या मूळीं । पूर्वी जन्म पावलें ॥ ६६ ॥ मूळींचेनि नक्षत्रें लंकेची होळी । झाली लंकानाथाची सकुळीं । आतां फिरोनि आपुले मूळीं । नेणतां हें लागलें ॥ ६७ ॥ जेंवी वंशांपासोनि[7] संभूत । तो अग्नि वना दाहो करीत । वंशदाहो नव्हे शांत । तेंवी हा पुत्र राक्षसमूळीं ॥ ६८ ॥ कोणी न मानिती तयाचें वचन । सर्वही करिती उपेक्षण । जेंवी मूर्खाचें वल्गन । ज्ञाता खंडी शब्देंच एकें ॥ ६९ ॥ नवलक्ष तारा जरी । उदेल्या रवि तेज हरी । तेंवी तयाच्या वचनाची उपेक्षा करी । मार्गीं जो कां भेटत ॥ ७० ॥ मार्गस्थ म्हणती राजकुमरा । नको प्रवर्तूं बिभीषणासीं वैरा । मंदबुद्धी सांडोनि चतुरा । आत्महिता विचारावें ॥ ७१ ॥ पुरुषें स्वहित विचारावें । बळाबळ शोधोनि पहावें । अविवेकातें सांडावें । जेणें संभवे आत्मघात ॥ ७२ ॥ ऐकोनि मार्गस्थांची वचनावळी । क्रोधें राजपुत्र खवळला बळी । म्हणे बिभीषणासहित पाताळीं । लंका पालथी करीन ॥ ७३ ॥ राक्षससेना निर्दाळीन । काळमुखीं सामावीन[8] । सातही समुद्र लोटीन । आपुलेनि भुजबळें ॥ ७४ ॥ मेरुमांदार उलथीन । ब्रह्मगोळ पालथा करीन । देवदानवां संहारीन । ऐसा क्रोध धरियेला ॥ ७५ ॥ इतुकें भावोनि ते समयीं । जवळी होते त्यां निजघातें पाहीं । मारोनि लोळविलें भुई । नव्हते ऐसे केले ते ॥ ७६ ॥ दुरोनि देखोनि कंदना । उर्वरितें[9] धांवोनि बिभीषणा । वार्ता जाणविती एके बाळकें रणा । मारोनि लोकां सांडिलें ॥ ७७ ॥ वयें तरी दिसे धाकुटा । परी पराक्रम सुरेशांपरीस[10] मोठा । राक्षस मारोनि नगरींच्या वाटा । राजद्वारीं उभा असे ॥ ७८ ॥ म्हणतसे राया जाणवा मात । मी कुंभकर्णाचा निजसुत । प्रसन्न करोनि विश्वनाथ । निजराज्य घ्यावया पैं आलों ॥ ७९ ॥ लंकाराज्य मज दीजे । नातरी मजसीं युद्ध कीजे । बहुत बोलतसे पैजे । पराक्रम आपुला ॥ ८० ॥ नगरवासियांचें ऐकोनि वचन । कोपा चढला बिभीषण । म्हणे हें कालचें बालक लहान । केवढें विंदान येणें केलें ॥ ८१ ॥ आतां त्यासीं युद्ध करूं ।

१ रामाची. २ सत्वर. ३ कमळाच्या देंठाच्या तंतूनें. ४ हत्तीला. ५ कोळ्याचे. ६ शिंपींतील. ७ वेळूपासून. ८ समावेश करीन. ९ बाकीचे. १० इंद्रापेक्षां.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

हाचि निर्धारींचा विचारू । ऐसें बोलोनि प्रधान वीरू । सेना सन्नद्ध करिता झाला ॥ ८२ ॥ मंत्री पाचारोनि आणिला संपाती । जो कां प्रतापें मही पालथी । करीत तसे तयाप्रती । निजहित सांगता झाला ॥ ८३ ॥ युद्धालागीं तुम्हीं जावें । कुंभकर्णपुत्रासी जीत[1] धरावें । न मारोनि येथें आणावें । सभामंडपामाझारीं ॥८४॥ बिभीषणाचें ऐकोनि वचन । युद्धालागीं निघाले प्रधान । सन्नद्ध[2] करोनियां सैन्य । घाव निशाणीं घातला ॥ ८५ ॥ लागली वाजंत्रांची ध्वनी । दिग्गजां टाळी बैसली कर्णीं । आंदोळली भौमाची[3] जननी । दशदिशा दाटल्या ॥ ८६ ॥ कुंजर निघाले अगणित । जैसे चौं चरणांचे पर्वत । असिवार[4] अपरिमित । सेनावेष्टित चालिले ॥ ८७ ॥ रहंवरां[5]चेनि घडघडाटें । पृथ्वीचें हृदय फुटे । थरारिलें कूर्मपृष्ठ । शेषें माथा डोलविला ॥ ८८ ॥ पायदळाची गणना करितां । मोजूं न शके विधाता । विरंचिअंड[6] पालथा । घालितील सुभटपणें[7] ॥ ८९ ॥ पताका मंडिता रामनामेंकरीं । देखोनि शनीचा[8] अग्रज पळे दुरी । शरणागताची[9] सेना ऐसिये परी । पूर्वद्वारें निघाली ॥ ९० ॥ रामनामें गर्जती वीर । जैसे वर्षाकाळींचे मयूर । मूळकें देखोनि वमनोद्गार । अग्निज्वाळा मुखीं सांडी ॥ ९१ ॥ नेत्र करोनि आरक्त । क्रोधें थरथरां कांपत । हृदयीं भडका सुटत । दंतें चावीत अधरोष्ठ ॥ ९२ ॥ देखोनि लंकेशसैन्यातें । गर्जना केली वज्रसारासुतें । म्हणे हीं वृथा मरणातें । कां बापुडीं येथें आलीं ॥ ९३ ॥ मृत्यु समीप तैं पिपीलिकां[10]कुळा । पक्ष फुटती दाविती बळा । तैसे रजनीचर मजजवळा । युद्धा उतावेळ घालिती झडा ॥ ९४ ॥ आतां या सैन्या युद्धप्रसंगें । लावीन यमपुरीचे मार्गें । ऐसें बोलोनि शरयोगें । कार्मुक योजिता जाहला ॥ ९५ ॥ धनुष्य टणत्कारिलें ते वेळा । बाण घेतला तेजाळा । बीजाक्षरें जपोनि आदरिला । प्रतापें टाकिला ते समयीं ॥ ९६ ॥ तया बाणाचेनि घोषें । भ्रमित झालीं दिग्गजांचीं मानसें । प्रळय सुटला रविशशी आकाशें । सांडोनि दिशा लंघिती ॥ ९७ ॥ तो बाण आला अरिदळावरी । पडतेक्षणीं संपाती सांवरी । निजशरें तोडोनि वरचे वरी । सेने परता सांडिला ॥ ९८ ॥ अचतुराचें जैसें वचन । पंडित विवेकें करी खंडन । तैसा मूळकासुराचा बाण । निजशरें छेदिला ॥ ९९ ॥ संपाती प्रधानांमाजी बळी । संधान आरंभिलें ते काळीं । शर सोडिला मंत्रावळी । जपोनि रामनामाच्या ॥ १०० ॥ रामनामें मंडित शर । सुटले गर्जत घोषवीत अंबर । देखोनि मूळकें सत्वर । शिववरद बाण सोडिला ॥ १ ॥ परस्परें बाणां पडली मिठी । जैसे व्याळ व्याळकंठीं । झगटोनि एकएकांचे पोटीं । सामावोनि पैं गेले ॥ २ ॥ उपरी मूळकें अधिक दाविलें । एके बाणें त्रैलोक्य व्यापिलें । शरमय गगन झालें । रवि लोपला ते काळीं ॥ ३ ॥ सायंकाळ प्रवर्तला । पक्षियांसी प्रळय झाला । पशु परतले दीप लागला । गृहीं गृहीं राक्षसांचे ॥ ४ ॥ माव केली मूळकें ते समयीं । प्रधानादिक राक्षस ठायींचे ठायीं । बांधोनि वस्त्राभरणें पाहीं । हिरोनि नग्न पैं केलें ॥ ५ ॥ तयावरी काय केलें । राक्षसां एकवट बांधिलें । मग बिभीषणाकडे पाठविलें । मार्गस्थांस ते काळीं ॥ ६ ॥ राया जाणविला वृत्तान्त । कित्येक सैन्या केला अंत । प्रधानादि कित्येक जीवंत । धरोनियां राखिले ॥ ७ ॥ वार्तिकें[11] सांगती वार्ता । अहो जी ऐका लंकानाथा । मूळकासुरें प्रधानादि समस्तां । रणीं व्यथाभूत केलें पैं ॥ ८ ॥ वार्तिकांची ऐकोनि वचनावळी । क्रोधें बिभीषण ते काळीं । किंचित उर्वरित[12] राक्षसबळी । त्यांसमवेत युद्धा निघाला ॥ ९ ॥ मार्गीं झाले अपशकुन । डावें वायस करिती गमन । दक्षिणे भारद्वाज हरिण । चाष मयूरें पैं गेलीं ॥ ११० ॥ पुढें घायाळ भेटले । तिंहीं राया जाणविलें । सैनिक बांधोनि राखिले । नावांनिगे[13] प्रधान ॥ ११ ॥ ऐकोनियां तयांची मात । बिभीषण श्रीरामनामें गर्जत । निर्भय होवोनि निजदळासहित । रणभूमीस पैं आले ॥ १२ ॥ रामनामें करोनि भुभुःकार । नामें गर्जत चालिले वीर । मोहनी पळोनि सत्वर । नामासमोर न राहे

१ जीवंत. २ तयार. ३ पृथ्वी. ४ घोडेस्वार. ५ रथांच्या. ६ ब्रह्मांड. ७ शौर्येंकरून. ८ यम. ९ बिभीषणाची. १० मुंग्यांना. ११ हेर. १२ बाकीचे. १३ नामांकित.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ १३ ॥ एकच एक श्रीरामनाम । सकळ पातकां करी भस्म । नामें तुटे भवबंधश्रम । तैसे बांधिले वीर सुटले ॥ १४ ॥ सोडवोनि निजप्रधानां । पुढें आरंभिलें रणा । बिभीषणें सोडोनि अमित बाणां । पृथ्वी गगना व्यापिलें ॥ १५ ॥ मूळकासुरें देखोनि पितृव्यशर । तयांवरी सोडी काळदंडाहूनि कठोर । जो लागतां भेदी जिव्हार । हिमालय पर्वताचें ॥ १६ ॥ तो शर येतां गगनीं । लंकेशबाणां झाली खंडणी । मग तो राक्षस गर्जोनी । बिभीषणासी बोलिला ॥ १७ ॥ अगा ये बिभीषणा ख्याति थोर । राक्षसकुळीं केली अपार । झालासी श्रीरामाचा किंकर । मर्कटेंसीं सख्य करोनि ॥ १८ ॥ शाखांमृग जे पर्णभक्षक । ते रामाचे दळीं मुख्य नायक । तयांमाजी तूंही रंक । प्रधानत्व मिरविसी ॥ १९ ॥ तुज आणि त्या रामातें । पाठवीन यमपुरीतें । तरीच वज्रसारेच्या हृदयातें । जन्मलों मी हें जाण पां ॥ १२० ॥ जरी पुत्र होईन कुंभकर्णाचा । तरी सूड घेईन पितृव्याचा । नाहीं तरी पाषाण मी साचा । तुजसारिखा जन्मलों ॥ २१ ॥ ऐसें बोलोनि पंच बाण । सोडिले अति दिव्य दारुण । ते बिभीषणें वरचेवरी खंडून । भूमीवरी पाडिले ॥ २२ ॥ विवेकसंपन्न वैरागी । पंचविषयां दमवी निजांगीं । तैसे बिभीषणें शर मार्गीं । कूट करोनि पाडिले ॥ २३ ॥ बिभीषणाची संधानठेव । देखोनि मूळकें बाण नव । सोडिले ज्यांचें भय अपूर्व । अवनी नवखंड होऊं पाहे ॥ २४ ॥ नव बाण येतां लंकेशावरी । ते नव शर ते अवसरीं । खंडोनि पाडिले पृथ्वीवरी । नव गिरींचीं शिखरें जैसीं ॥ २५ ॥ तदनंतरें कुंभकर्णसुतें । कार्मुकीं योजिलें एकादश बाणांतें । पुंखांपासोनि शर गगनातें । पक्षियांऐसे सूटले ॥ २६ ॥ ते एकादश नव्हती शर । केवळ ईश्वराचे अवतार । पृथ्वी व्यापोनि अंबर । दशदिशा प्रकटले ॥ २७ ॥ करीं त्रिशूळ डमरु । पिंगट जटा भयंकरु । रुंडमाळा भस्मधरु । ऐसीं रूपें प्रकटलीं ॥ २८ ॥ आश्चर्य देखोनि गदापाणी । भस्मासुर आव्हानिला बाणीं । देखोनि रुद्ररूपें तत्क्षणीं । नेणों कोणीकडे गेलीं ॥ २९ ॥ रुद्रावेशें मूळकासुरें । कोपोनियां अति गजरें । कार्मुक घेवोनियां ईश्वरें । दिधले ते बाण सोडिले ॥ १३० ॥ ते येतां द्वादश शर । देखोनि स्वर्गीं भयातुर । इंद्रादि देव म्हणती घोर । कर्म येणें आरंभिलें ॥ ३१ ॥ या द्वादश शरांच्या घायीं । द्वादश सूर्य पडती ठायीं । बापुडें बिभीषण निवारील कायी । शिवाचे हे वरद बाण ॥ ३२ ॥ बिभीषण गदेनें खंडन करी । तंव अकस्मात पडिले वरी । सहा बाणीं रथा चकाचुरी । चारी आंखां लागले ॥ ३३ ॥ उर्वरित दोनी शर । ते बिभीषणाचें जिव्हारँ । भेदोनि पलीकडे सत्वर । पाताळभुवनीं प्रवेशले ॥ ३४ ॥ बिभीषणाचें हृदय भेदोनी । निश्चेष्टित रणमेदिनीं । पडला पादप जैसा वायूनीं । उलंडला शाखेसहित ॥ ३५ ॥ घटिका द्वादशपर्यंत । रणीं बिभीषण मूर्च्छित । ऐसें देखोनि कुंभकर्णसुत । नगरामाजी प्रवेशला ॥ ३६ ॥ बोलावोनि सेना सैनिक । आपणासी केला पट्टाभिषेक । मस्तकीं छत्रशशांक । राज्य धरूं बैसला ॥ ३७ ॥ मूळकें मातेपासीं येऊन । साष्टांगेसीं केलें नमन । जोडिले हस्तीं संपूर्ण । सर्व वृत्तान्त जाणविला ॥ ३८ ॥ एका जनार्दना शरण । झालें मूळकासुरकथन । पुढिले प्रसंगीं बिभीषण । श्रीरामा शरण जाईल ॥१३९॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां बिभीषणपराभवमूळकासुरलंकाराज्यपटप्राप्तिर्नाम एकसप्ततितमोऽध्यायः ॥ ॥ ७१ ॥ ओंव्या ॥ १३९ ॥

अध्याय बहात्तरावा

॥ श्रीसांबसदाशिवाय नमः ॥ रणीं बिभीषण पडिला । तो प्रधानें सावध केला । जैसा नदीस बुडतां काढिला । थडीचिया जनीं हो ॥ १ ॥ रावणानुज होवोनि सावधान । प्रधानांप्रति बोले वचन । आतां कर्तव्य काय आपण । इये समयीं करावें ॥ २ ॥ प्रधान म्हणती राजाधिराजा । शरण जावें श्रीरघुराजा । सिंहाचे प्रसादें अजा । गजमस्तकीं आरूढली ॥ ३ ॥ गदापाणि म्हणे धन्य जिणें । आजि राघवासी भेटणें । हाचि निश्चय

---

१ वानर. २ चुलत्याचा. ३ धनुष्यावर. ४ बाणाच्या पिसाऱ्यापासून. ५ बिभीषण. ६ रथाच्या कण्यांना. ७ मर्मस्थान. ८ वृक्ष. ९ फांदीसह.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

करोनि मनें । प्रधानांसीं निघाला ॥ ४ ॥ चवघां-
चिया समवेत । बिभीषण मार्गीं जात । म्हणे
आजि भेटेल जानकीकांत । दीनानाथ कृपालु ॥५॥
आजि भेटेल गरुडध्वज । क्षेमें देईल उचलोनि
भुज । सांगेन जीवींचें निजगुज । अधोक्षज
देखिलिया ॥ ६ ॥ नेत्रां होईल पारणें । धणीवरी
सुख घेईन मनें । पूर्णिमा देखोनि चकोर वदनें ।
चंद्राकारणें पसरिती जैसें ॥ ७ ॥ ऐसा मार्ग क्रमीत
मेदिनीं । उल्लास न माये अंतःकरणीं । तंव पुढें
देखिली राजधानी । रघूत्तमरायाची ॥ ८ ॥ सुवर्ण-
कळश रत्नजडित । पताका अंबरीं रामनामांकित ।
काळ धाकें न राहे तेथ । पुरी साकेत शोभे ऐसी
॥ ९ ॥ अयोध्यानगरींचे जन । करिती श्रीराम-
कीर्तन । घरोघरीं वेदाध्ययन । पुराण व्याख्यान
ठायीं ठायीं ॥ १० ॥ जनीं अयोध्येसी वसतां ।
नेणती जन्ममरणवार्ता । नाहीं दरिद्राची कथा ।
नित्य स्मरतां रामनाम ॥ ११ ॥ शरयूतीर अति
पावन । सेवितां राहिले मुनिजन । पायवाट
स्वर्गा गमन । करावयालागूनी ॥ १२ ॥ अयोध्येचे
स्मरणमात्रें । मोक्ष वोळंगे प्राणियातें । इतर इज-
समान नव्हेत तीर्थें । काशी आदिकरोनी ॥ १३ ॥
काशी हृदयीं परम कृपण । मरणान्तीं मुक्ति दे
दान । अयोध्या ईहूनि उदार गहन । स्मरणें पावन
मोक्ष दे ॥ १४ ॥ यालागीं वाल्मीकादि कवीश्वरीं ।
वर्णिली अयोध्या प्रथम पुरी । मोक्षदानीं अति
उदारी । निजथोरी जियेची ॥ १५ ॥ ऐसिये
अयोध्येमाजी रघुनाथ । राज्य करी बंधूंसमवेत ।
तेथें बिभीषण शरणागत । राजसदना उजू आला
॥ १६ ॥ भद्रासनीं रविवंशभूषण । दक्षिणे वसिष्ठ
ब्रह्म पूर्ण । परिवेष्टित बंधू आदि लक्ष्मण । सेवे
सावधान तिष्ठती ॥ १७ ॥ दुरोनि देखिला श्रीरघु-
नाथ । बिभीषणें घातला दंडवत । जोडले करीं
प्रणिपात । श्रीरामासी पैं केला ॥ १८ ॥ श्रीरामें
उठोनि ते समयीं । शरणागता धरोनि हृदयीं ।
आलिंगिला दोहीं बाहीं । जैंवी माता बाळका
॥ १९ ॥ बैसकेस दे रत्नजडित पाट । देवोनि
बैसविला निकट । म्हणे शरणागता बहुत कष्ट ।
झाले ऐसें दिसतसे ॥ २० ॥ चंद्राच्या तुटती
जैंवी कळा । तैंवी तुझे देखोनि मुखकमळा । वोहट
पडिला हर्षकळा । आनंदजिव्हाळा न देखों
॥ २१ ॥ जीवनेंवीण वल्ली । सुकोन शुष्क जाहली ।
तैसी हृदयींची काजळी । दिसतसे मुखावरी
॥ २२ ॥ कोण हृदयींची चिंता । ते मज निवेदीं
पौलस्तिसुता । श्रीरामाची देखोनि आदरता ।
सुख झालें बिभीषणा ॥२३॥ बिभीषण म्हणे कम-
लोद्भवजनका । स्वर्गगमनपुरीच्या नायका ।
दिनमणिकुळदीपका । अपूर्व एक देखिलें ॥ २४ ॥
वारिमृणालाचा तंतु । त्यामाजि गुंतला ऐरावतु ।
मशकें भूगोळ मुखांतु । दंतदाढा रगडिला ॥ २५ ॥
मर्कटें समुद्र शोषिला । मृगजळीं वंध्यापुत्र
बुडाला । जंबुकें सिंह विदारिला । सशानें भेड-
साविला शार्दूळ ॥ २६ ॥ छायेनें पुरुष गिळोन ।
उरगें गरुडावरी केलें आरोहण । पिपीलिकेचा
जो नंदन । तेणें मेरु उपटिला ॥ २७ ॥ ऐसें वर्तलें
नृपचूडामणी । जंबुकें सिंहाचा कवळ नेला
हिरोनी । ऐसें झालें मजलागूनी । देवाधिदेवा
विधिजनका ॥ २८ ॥ ऐसियासि ऐका वृत्तान्त ।
कुंभकर्णाचा जो मूळक सुत । तेणें प्रसन्न करोनि
उमाकांत । अद्भुत वर पावला ॥२९॥ वरदबळें-
करून । युद्ध केलें अति दारुण । समस्त मारोनि
राक्षससैन्य । माझें राज्य हरितलें ॥ ३० ॥ श्रीराम
म्हणे गा गदापाणी । केली रावणकुळा खंडणी ।
पुत्रासहित रणीं । निद्राप्रिय मारिला ॥ ३१ ॥ हा
तैं काय नव्हता । किंवा अन्यत्र स्थळीं गेला होता ।
याची सांगें समूळ कथा । जे ऐकतां सुख होय
॥ ३२ ॥ ऐसें बोलिलें नलिनीदळनेत्रें । तें परि-
सोनि बिभीषणें पवित्रें । सांगों आदरिलें चरित्र ।
निजाग्रजसुताचें ॥ ३३ ॥ गदापाणि म्हणे कनक-
मृगारी । याचे मातेचिया उदरीं । पूर्वीं पुत्रद्वय
जन्मले सुरारीं- । -माजी रणपंडित ॥ ३४ ॥ कुंभ
निकुंभ नामें प्रसिद्ध । काळावरी जयांचें बिरुद ।
तयांमागें हा मतिमंद । पित्याचे मूळीं लागला
॥ ३५ ॥ जन्मतां सांडिला बाहेरी । निशा राक्ष-
सीनें वाढविला घरीं । याचे मुळें सर्वां बोहरी ।
देवाधिदेवें श्रीरामें केली ॥ ३६ ॥ सर्व कुळाचा
झाला नाश । कुंभकर्णस्त्रियेनें नगरास । आणोनि

---

१ आलिंगन. २ श्रीविष्णु. ३ अयोध्या. ४ पायीं लागे.
५ अयोध्या मथुरा माया काशी कांची अवंतिका ॥ पुरी
द्वारावती चैव सप्तैता मोक्षदायकाः ॥ ६ कमळाचा. ७ वाघ.
८ सर्पानें. ९ मुंगीचा. १० दैत्यांत. ११ नाश.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

वाढविला कोणास । कळों नाहीं दीधलें ॥ ३७ ॥ जैंवी पुरिला अग्निहोत्रींचा वन्ही । प्रकट परी न देखे कोणी । ऐसा वाढला लंकाभवनीं । पुढें तपा निघाला ॥ ३८ ॥ प्रसन्न करोनि चंद्रमौळी । वर मागितला तये वेळीं । अमर करीं भूमंडळीं । देवीं दैत्यीं न मारावें ॥ ३९ ॥ मानवादि गंधर्व विद्याधर । किंपुरुष चारण असुर । पक्षी श्वापदें जीव क्रूर । मज वधीं तत्पर न व्हावें ॥ ४० ॥ होय म्हणोनि अंधकरिपु[१] । म्हणे मनींचा सिध्द संकल्पु । या इतुकियांचे हातें वपु । मरण न पावे संग्रामीं ॥ ४१ ॥ मग उपदेशून मंत्रावळी । कैलासा गेला इंदुमौळी । मागें मूळकासुरें भूमंडळीं । आम्हां दुःख दीधलें ॥ ४२ ॥ शरणागत ऐसें बोलिल्यावरी । स्वामीची मनोदेवता आश्चर्य करी । क्षण एक निवान्त दूषणारी[२] । निजासनीं बैसला ॥ ४३ ॥ क्षणैक ध्यानस्थ गौतमश्वशुर । मग बोलता झाला उत्तर । याचे वधाचा प्रकार । समस्तांप्रति पुसतसे ॥ ४४ ॥ तंव वसिष्ठ म्हणे श्रीरघुनाथा । याची ऐसी मरणाची कथा । यासी वधील जनकदुहिता । नारदें मज सांगितलें ॥ ४५ ॥ सद्गुरुमुखींचें ऐसें वचन । श्रीरामचंद्रें परिसोन । प्रधान पाचारिले सज्ञान । सुमंतादि थोर थोर ॥ ४६ ॥ आज्ञा केली श्रीरघुवीरें । सुग्रीवादि येवोनि वानरें । सेना सज्जोनि वाद्यें तुरें । नानापरींचीं वाजिन्नलीं ॥ ४७ ॥ जानकीस पुरुषवेष दिधला । अलंकारभूषणीं मिरविला । तंव बिभीषण बोलता झाला । पारणें कीजे राजेंद्रा ॥ ४८ ॥ आजि कार्तिकद्वादशी । पारणें सारोनि प्रयाणासी । मग करावें लंकेसी । राक्षसवधाकारणें ॥ ४९ ॥ तंव बोलिला रघुनंदन । आधीं मूळकासुर मारून । मग करूं भोजन । हे प्रतिज्ञा निश्चित ॥ ५० ॥ तुज राज्य दिधल्यावीण शरणागता । आम्हां भोजनीं नाहीं अर्हता[३] । ऐसें वदोनि श्रीरघुनाथा । स्फुरणें बाहु वाढत ॥ ५१ ॥ पुरुषवेष सालंकारीं । शृंगारिली जानकी सुंदरी । निजधनुष्य घेवोनि करीं । अश्वावरी बैसविली ॥ ५२ ॥ प्रधान सेना सैनिक । परिवेष्टित कपिकटक । मध्यें शोभे रघुनायक । जानकी सम्यक पृष्ठभागीं ॥ ५३ ॥ मग श्रीरामें काय केलें । पुष्प-

१ शंकर. २ रामचंद्र. ३ योग्यता, मोठेपणा. ४ भ्रमर. ५ अनेक. ६ तीरीं. ७ वानर. ८ देवशत्रु (मूळकासुर).

कासी पाचारिलें । त्यावरी बैसोनि सहदळें । लंकापुर पावले ॥ ५४ ॥ ऐसें चालतां निजभारीं । पंचघटिका भरतां पुरीं । प्रवेशला जैसे पुष्पावरी । षट्पद[४] बहुसाल[५] ॥ ५५ ॥ तडागाचे निकट पाळीं[६] । पक्षी जैसे पावती सकुळीं । तैसा निजसैन्येंसीं आतुर्बळी । लंकाप्रदेशीं पावला ॥ ५६ ॥ देखोनियां निजलंका । लतांमृग[७] चढले तवका । शिळा पाषाण तरु अनेका । करीं घेवोनि चालिले ॥ ५७ ॥ त्रिकूट वेढिला वानरीं । देखोनियां सुरारी[८] । आश्चर्य करी ते अवसरीं । चिंतातुर जाहला निजगृहीं ॥ ५८ ॥ वार्ता ऐकोनि मूळकासुर । किंचित सेना सज्जोनि सत्वर । पश्चिमद्वारें चालिला थोर । अपशकुन पैं झाले ॥ ५९ ॥ निजरथाच्या ध्वजावरी । वायस येवोनि शब्द करी । पुढें एक द्विज मोकळे शिरीं । मार्गी येतां देखिला ॥ ६० ॥ अशुद्धांचा[९] शिंरवा पडे । रथींचा वारू चालतां अडे । आंख मोडोनि दुखंडें । धुरेचीं[१०] पैं होती ॥ ६१ ॥ सारथि उलंडला धरणीं । मूळकासुरें उडी टाकोनी । दुसरे रथीं आरूढोनी । संग्रामासी निघाला ॥ ६२ ॥ अपशकुनें भयभीत सैन्य । तयासी अभय देवोन । क्रिता झाला तुंबळ रण । वानरेंसीं भिडोनियां ॥ ६३ ॥ वानर टाकिते झाले शिळा । राक्षस तोडिती शरजाळा । अद्भुत संग्राम मांडला । वीरें वीर पडखंळिले[११] ॥ ६४ ॥ तंव हनुमंतें रुद्रावेशें । सोडिलीं पर्वताचीं शिसें । देखोनि तोडिलीं रजनीचरेशें । उपरी काय आरंभिलें ॥ ६५ ॥ ईशानदत्तें[१२] वरद बाण । कार्मुकीं योजिले मंत्र जपून । ते वानरसेनेवरी येतां रघुनंदन । देखोनि धनुष्य घेतलें ॥ ६६ ॥ कार्मुकीं बाण रघुराजें । योजिला जपोनि मंत्रबीजें । जयाचेनि निजदिव्यतेजें । दशदिशांमाजि बिंबती ॥ ६७ ॥ ऐसे श्रीरामाचे शर । यमदंडाहूनि कठोर । सुटले तेणें अंबर । व्यापिलें दिसे ते समयीं ॥ ६८ ॥ बाणें बाणां निवारिलें । आकाश निर्मळ जाहलें । वर्षाकाळ गेलिया आगमन केलें । शरदृतूनें पैं जैसें ॥ ६९ ॥ देखोनि श्रीराघवाचें संधान । राक्षसें आश्चर्य मानोन । काय बोलता झाला वचन । बिभीषणासी परियेसा

९ रक्ताचा. १० सडा. ११ भिडले. १२ शंकरानें दिलेला.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ ७० ॥ अगा ये पूर्वजा बिभीषणा । तुवां साह्य आणिलें श्रीरघुनंदना । तरी मज त्याची नाहीं गणना । शिवप्रसादेंकरोनी ॥ ७१ ॥ माझा मृत्यु याचेनि हस्तें । नाहीं जाण तूं निभ्रांतें । साटोप धरोनि युद्धातें । वृथा मरावया आलेती ॥ ७२ ॥ पूर्वीं श्रीरामें कपट केलें । छळोनि वालीसी वधिलें । तें मत येथें कांहीं न चाले । मज मूळकासमोर ॥ ७३ ॥ ऐसे राक्षसाचे वचनीं । श्रीरघुराजें विचारोनि मनीं । धनुर्ष्यीं बाण लावोनी । पुढारला पैं होय ॥ ७४ ॥ मूळकासुरा हटकोन । श्रीराम करिता झाला संधान । मागें जानकी सरसावोन । पाठीसीं उभी राहिली ॥ ७५ ॥ श्रीराम मूळकासुर परस्परें । युद्धीं भिडती आवेशें थोरें । मागोनी जानकीनें त्वरें । धनुष्या हात घातला ॥ ७६ ॥ शिंतीं लावोनि श्रीरामदत्त बाण । वोढी काढोनि आकर्ण । मनीं स्मरोनि श्रीरामचरण । काय आठविती पैं झाली ॥ ७७ ॥ म्हणे अहो जी सदाशिवा । म्यां जरी एकाग्रचित्तें सेवा । करोनि भजलें असेन राघवा । तरी हा बाण मूळका वधो ॥ ७८ ॥ माझा पिता विदेही जनक । राज्यराष्ट्रपाळक । सत्य असेल तरी हा अचूक । राक्षसा बाण भेदील ॥ ७९ ॥ श्रीराम एकपत्नीव्रतधारी । हें सत्य असेल जरी । तरी या माझ्या निजशरीं । कुंभकर्णपुत्र मरेल ॥८०॥ अनसूया जे पतिव्रता । तिणें मज अनुग्रहिलें वनीं वसतां । तियेचे प्रसादें राक्षससुता । मरण होवो या शरें ॥ ८१ ॥ वसिष्ठ सद्गुरु ब्रह्म पूर्ण । जरी एकबुद्धी केलें असेल भजन । लक्ष्मण शेषावतार सत्य जाण । तरी येणें बाणें मरण राक्षस पावो ॥ ८२ ॥ ऐसें भावोनियां मानसीं । शर सोडिला घोषीं आकाशीं । प्रळय झाला दिग्गजांसी । चंद्रसूर्यें भूमि सेविली ॥ ८३ ॥ नक्षत्रें खचलीं पृथ्वीवरी । पर्वत उलंडले सागरीं । मर्यादा सांडूं पाहती भारी । संकट येवोनि पडिलें वीरां ॥८४॥ वानरदळीं केला गजर । राक्षससैन्यीं हाहाकार । नभोमार्गें शर । मूळकासुरावर येवों सरला ॥ ८५ ॥ राक्षसपुत्र करी निवारण । तंव अकस्मात येवोनि बाण । शिर छेदोनि रणीं जाण । सीतेच्या भातां रिघाला ॥ ८६ ॥ मूळकासुर पडिला रणीं । जेंवी पर्वत खचे मेदिनीं । उरलें सैन्य वानरगणीं । शिळावारीं कूट केलें ॥ ८७ ॥ जेंवी तडागीं तुंबळ । फुटतां पसरे चहूंकडे जळ । तेंवी कुंभकर्णपुत्राचें दळ । दशदिशा लंघितें झालें ॥ ८८ ॥ जानकीचेनि हस्तें जाण । मूळकासुर पावला मरण । ऐसें देखोनि सुरगण । पुष्पवर्षाव करिता झाला ॥ ८९ ॥ विजयी झाला श्रीरघुनाथ । विजयी कपि आनंदभरित । विजयी बिभीषण शरणागत । निजराज्यीं स्थापिला ॥ ९० ॥ याउपरी पुष्पकविमानीं । बैसोनि जानकीसह कोदंडपाणी । बंधुवर्गेंसीं अयोध्याभवनीं । प्रवेशता पैं झाला ॥ ९१ ॥ वानरां आज्ञा देऊन । निजस्थाना पाठविलें जाण । यावरी वर्तलें तें सावधान । श्रोतृजन परिसोत ॥ ९२ ॥ म्हणाल हें मूळींचें नव्हे निरूपण । वाल्मीकें कथिलें जाण । तरी हे कथा अप्रमाण । ऐसें संतीं न म्हणावें ॥ ९३ ॥ वाल्मीकें शतकोटि केलें । तें एक महेशें पाहिलें । भागत्रय करोनि वांटिलें । हें प्रसिद्ध जाणतां ॥ ९४ ॥ मृत्युलोकीं जो भाग । तो युगानुयुगीं झाला भंग । कांहीं एक उर्वरित कथाभाग । लोकोद्धारणा राहिला ॥ ९५ ॥ याकारणें वाल्मीक ऋषी । वदला नाहीं कथा ऐसी । म्हणतां कुष्ठ लागे वाचेसीं । ऐसें पंडित जाणती ॥९६॥ अबद्ध सुबद्ध रामायण । श्रीरामाचें चरित्र गहन । श्रवणें भवदोषखंडन । सादरें जरी ऐकिजे ॥ ९७ ॥ पक्षियाचे उच्चारें गणिका । विमानीं बैसोनि वैकुंठलोका । गेली हा तुम्हांसि ठाउका । नाममहिमा रामाचा ॥ ९८ ॥ श्रीरामकथासागर । याचा कोणा कळेल पार । भोक्ता एक श्रीशंकर । जेणें शतकोटि विभागिलें ॥ ९९ ॥ एका जनार्दना शरण । जानकीसहित श्रीरघुनंदन । अयोध्येसी सुखसंपन्न । येवोनि राज्यभार चालवीत ॥ १०० ॥

स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां मूळकासुरवधो नाम द्विसप्ततितमोऽध्यायः ॥ ७२ ॥ ओंव्या ॥ १०० ॥

अध्याय त्र्याहात्तरावा

॥ श्रीसीतावल्लभाय नमः ॥ वानरसेनेसीं श्रीरघुनाथ । विजयी झाला आनंदभरित । अयोध्ये

---

१ धनुष्यदोरीवर. २ कृपा केली. ३ कल्पून. ४ गळून पडलीं. ५ सरोवरामध्यें. ६ सैन्य. ७ शिलकीचा.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

येवोनि कार्यार्थ। पुढें काय वर्तला ॥ १ ॥ मारोनियां कुंभकर्णपुत्र। विजयी झाला श्रीराम जानकीसहित। ऐसें ऐकोनि महंत । थोर थोर येते झाले ॥ २ ॥ आले विबुध[1] सुधापानी। आला शिष्येंसीं वाल्मीक मुनी। आला अगस्ति ज्याची जननी । उर्वशी नामें प्रसिद्ध ॥ ३ ॥ ऐसिये शरयूतीरपुराभीतरी। सभासदनीं पौलस्त्यारी[2] । बंधुपुत्रवेष्टित ऋषीश्वरीं। बैसिजेल निजस्थानीं ॥ ४ ॥ कौसल्यादि माता जाण। पुरवासी नागरिक प्रधान । श्रीगुरु वसिष्ठ पावन। यांहीं विराजमान शोभत ॥ ५ ॥ जेंवी इंदुमंडळा पुढें मागें । परिवेष्टित तारागणें अनेगें। तैसें समस्तांसहित श्रीरंगें । सभासदनीं शोभिजे ॥ ६ ॥ जेंवी मानससरोवरीं । पक्षिये मुक्ताफळांहारी[3]। जेंवी सुधापानियांमाजी शैलारी। तैसा राजेश्वरीं शोभे श्रीराम ॥ ७ ॥ कुळाचळांमध्यें हिमगिरी । कीं समुद्रांमध्यें पयोधारी । समस्त धातूंच्या शिरीं । शोभे सुवर्ण पैं जैसें ॥ ८ ॥ कीं श्वापदांमाजी शार्दूळ। कीं लतामृगीं[6]माजी अंजनीबाळ। कीं अवतारांमध्यें विशाळ। त्रिविक्रम पैं जैसा ॥ ९ ॥ कीं तापसियांमाजी धूर्जटी। कीं ऋषींमाजी तपे ज्याची काठी । कीं जापकांमाजी दुजा सृष्टी-। -कर्ता विश्वामित्र ॥१०॥ कीं मुनींमाजी नारद । कीं पांडवांमाजी धर्म अगाध । कीं मुक्तींमाजी सायुज्यपद । तैसा अगाध शोभे श्रीराम ॥ ११ ॥ ऐसिये सभामंडळी-। मध्यें कैकेयी बोलली ते काळीं। तें अवधारावें सकळीं। आश्चर्य एक वाटतसे ॥ १२ ॥ जानकीचे रूपयौवनें । भुललीं कनकाचीं हरिणें । राज्य त्यागून रावणें । भिक्षुक होवोनि हरूं आला ॥ १३ ॥ एवढें इचें सौंदर्य साजिरें। पक्षी भुलले कटाक्षरें । ती जानकी वल्कलांबरें । वेढोनि अशोकीं कैसी होती ॥ १४ ॥ परिवेष्टित विशाळ क्रूरें। रक्षणें ठेविलीं दशकंधरें। तेथें इणें निजसामर्थ्यद्वारें। निजसत्त्व कैसें राखिलें ॥ १५ ॥ जे तारुण्यें मुसमुसी वनिता । परदेशीं दुष्टसंगें असतां। तिचा पतिव्रताधर्म राहता । हें थोर आश्चर्य होतसे ॥ १६ ॥ ऐसें कैकेयीचें कुरसवचन। ऐकोनियां समस्त जन। विस्मय पावोनि अधोवदन। जानकी पैं बैसली ॥ १७ ॥ सापत्न सासूचे वाग्बाणीं। हृदयीं खोंचली जनकनंदिनी। जेंवी अनिळें कर्पूरजननी। थरारूं लागे निजांगें ॥ १८ ॥ जेंवी कुवांयूचेनि प्रसंगें । समुद्रीं नौका बुडूं लागे। नातरी दुर्जनवचनें भंगे। चित्तवृत्ती साधूंची ॥ १९ ॥ हरिकथेचा मांडिला रंग । तेथें कुवार्ता येतां रसभंग। तैसें कैकेयीवाग्बाणें जग। जानकीसहित भेदिलें ॥ २० ॥ कीं तापसियांवरी कामबाण। कीं पंडितांपुढें दुर्जन । तैसे कैकेयीशब्दें जन । जानकीसहित दुखावले ॥ २१ ॥ उरगमाथां कांटा नेहटे। कीं पालीचें पुच्छ तुटे। कीं पतिवियोगें फुटे। वनितेचें हृदय जैसें ॥ २२ ॥ यापरीच ती राजबाळा। अधोवदन निस्तेजमुखकमळा। वोहट पडला सुखकल्लोळा । अंमांतीं चंद्र जैसा ॥ २३ ॥ सरोवरीं शोषलिया जीवन। कमळिणी जाय सुकोन । तैसें जानकीचें हृदय गहन। चिंतासर्पिणीनें चाटिलें ॥ २४ ॥ म्हणे आतां काय करणें। किती वेळां दिव्य देणें। मी जरी शुद्ध अंतःकरणें। तरी या लोकां विपरीत वाटतसे ॥ २५ ॥ सत्यवादी पहा जन। सोपहास मिथ्या वदोन। असंभाव्य देवोनि मान । सत्य भाषण म्हणती त्यातें ॥ २६ ॥ तैसिया लोकांची वर्तती स्थिती। त्यासी निंदणें हेचि अयुक्ती । आपलें प्रारब्ध भोगगती । अवश्यभावें भोगावें ॥ २७ ॥ प्रारब्धें दमयंतीनळां। प्रारब्धें हरिश्चंद्रभूपाळा। प्रारब्धें पांडुपुत्रां सकळां। विवरद्वारें पैं नेलें ॥ २८ ॥ बंधु जियेचा श्रीहरी । ऐसी ते द्रौपदी सुंदरी। वस्त्रें हरोनि दुराचारी। सभेमाजी नग्न करिते झाले ॥ २९ ॥ तरी आतां प्रारब्ध प्रमाण। अवश्य भोगणें पडिलें जाण । कैकेयी बापुडें तें कोण। मजसी कठिण बोलावया ॥ ३० ॥ ऐसें विचारोनि सीता देवी। मनातें विवेकमार्गीं लावी। पुढील कथा ते परिसावी। चतुर पंडितादिकीं ॥ ३१ ॥ जानकी म्हणे अवो धरणी माये। पुढें म्यां आतां काय करावें। तुवां मज होवोनि साह्य। द्यावा ठाव निजहृदयीं ॥ ३२ ॥ जन्मलें मी तुझ्या उदरीं। वाढलें विदेहाचे घरीं। नांदलें निजभाग्येंकरीं। श्रीरामाची सेवा करून ॥ ३३ ॥

१ देव. २ रावणारी (रामचंद्र). ३ मोत्यें खाणारे. ४ इंद्र. ५ क्षीरसागर. ६ वानरांत, ७ केळ, ८ प्रचंड वादळाच्या. ९ अमावास्या संपून.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

काया वाचा निजमानसें जाण । आराधिला असेल श्रीरघुनंदन । तरी मज देईं वस्तीसी स्थान । आपुलिये हृदयकमळीं ॥ ३४ ॥ पूर्वी म्यां लंकेच्या प्रदेशीं । दिव्य दिधलें देखतां जगासी । तैं मिळाले होते महाऋषी । आणि इंद्रादि देवगण ॥ ३५ ॥ ब्रह्मा शिव आणि सुधापानी । आणि मिळाली होती कपिवाहिनी । या समस्तां देखतां प्रवेशोनि अग्नीं । दिव्य दिधलें श्रीरामा ॥ ३६ ॥ तरी आतां तेचि असती समस्त । तयांसी कळेल माझें मनोगत । परी न सोडी प्रारब्ध बळवंत । ठाकोनियां पुढें आलें ॥ ३७ ॥ जैसा दरिद्री आयास करी । उदीम न करी श्रमचि उरी । तैसी मी निष्पाप जरी । तरी प्रारब्धभोग पुढें पावे ॥ ३८ ॥ निर्दैवें साधितां निधान । पुढें ठाके एकादें विघ्न । तैसें माझें दिव्य दारुण । मिथ्या गेलें जनवाणी ॥ ३९ ॥ कुरांडितां नारिकेळासी । चंचु चिरोनी झाली कैसी । तो शुक पुन्हां त्या वृक्षासी । कल्पांतींही न शिवे ॥ ४० ॥ तरी या समस्तां देखतां जाण । माये धरणीचें हृदय प्रवेशून । साहिला न वचे निंदापमान । मिथ्यापवाद जनाचा ॥ ४१ ॥ ऐसें विचारोनि राघवसुंदरी । करुणावचनीं प्रार्थना करी । म्हणे माये अवनिये उदरीं । ठाव देईं मजलागीं ॥ ४२ ॥ मी वो तुझें अपत्य तान्हें । कृपा करीं मज उदार मनें । तुवां धरिलीं चतुर्दश भुवनें । अगाधपणें निजहृदयीं ॥ ४३ ॥ तुवां हृदयींची परम वाड । उदरीं धरिला विरंचिअंड । सप्तसागर गिरी प्रचंड । तुझिये कुक्षीमाजी वसती ॥ ४४ ॥ अठरा भार वनस्पती । आणि विरंचीची प्रपंचस्थिती । या सकळां तूं जीवविती । ऐसी तुझी थोरीव ॥ ४५ ॥ ऐसें तुझें अगाधपण । तुझे ठायीं शांति दया पूर्ण । नाहीं मान्यता मानापमान । हें थोरपण तुज ऐसें साजे ॥ ४६ ॥ तुजलागीं जाळिती पोळिती । चिरोनियां विदारिती । तयांतें तूं मिष्टान्नदाती । होतेसी उदारपणें ॥ ४७ ॥ तुजवरी एकीं स्वधर्माचरण । केलें त्याचा नाहीं अभिमान । दुजियानें करोनि आनेंआन । तयाचा खेद न वाहसी ॥ ४८ ॥ एक तुजलागीं अंतें पूजिती । दुजे लातांवरी तुडविती । त्यांचा न मानिसी विषमभाव चित्तीं । न धरिसी गंगेसारिखा ॥ ४९ ॥ तरी मी तुझें हृदयींचें बाळ । तूं माता परम दयाळ । मज हृदयीं राख ये वेळ । अपत्य दीन म्हणोनी ॥ ५० ॥ जरी म्यां निर्मळ मनें श्रीरघुनाथ । आराधिला असेल सत्य । तरी तूं ठाव देईं कृपायुक्त । निजअपत्य म्हणोनी ॥ ५१ ॥ लक्ष्मण ब्रह्मचारी । शेषावतार निर्धारीं । हें सत्य असेल निश्चयें तरी । निजोदरीं मज सांठवीं ॥ ५२ ॥ पांचाळी जे द्रुपदतनया । जे कां पांचां पांडवांची जाया । सत्य पतिव्रता म्हणती तिया । प्रातःस्मरणीं योगीश्वर ॥ ५३ ॥ पतिव्रता अनसूया निर्धारें । पतिचरण प्रक्षाळोनि उरलेनि नीरें । ब्रह्मा विष्णु महेश लेंकुरें । पायांवरी न्हाणिलीं ॥ ५४ ॥ ते अनसूया आदिशक्ती । तिचे पुण्यें मज धरित्री । ठाव देईल काकुळती । देखोनि ग्लांती पैं माझी ॥ ५५ ॥ नैष्ठिक बटु अंजनीतनुज । कपिवाहिनीचा दक्षिणभुज । सत्य तरी तूं मज । निजहृदयीं राखावें ॥ ५६ ॥ ब्रह्मतनया अहल्या जाण । जें कां गौतमगृहींचें मंडण । इंद्रें भोगिली करोनि छळण । ऋषिशापें पाषाण पैं झाली ॥ ५७ ॥ ते पतिव्रता म्हणती पुराणीं । वदतसे व्यासादिकांची वाणी । तियेचे पुण्यें हे धरणी । निजहृदयीं सांठवो मातें ॥ ५८ ॥ सद्गुरु वसिष्ठ ब्रह्म पूर्ण । ऐसें बोले वेदपुराण । जरी म्यां केलें असेल भजन । तरी मार्गदान मज दीजे ॥ ५९ ॥ गुरु माता गुरु पिता । सद्गुरूवांचोनि नाहीं दुजा तारिता । ऐसी सत्य वाचा असेल तरी आतां । पृथ्वी मार्ग देईल ॥ ६० ॥ ऐसें जानकीमुखींचें वचन । ऐकोनि धरा उल्हासोन । भागद्वय झाली कारण । देखोनियां सीतेचें ॥ ६१ ॥ जेंवी स्वातीचे जळतुषारें । भागद्वय शिंपला अति आदरें । होवोनियां उदरीं नीरें । सामावीत वर्षाकाळीं ॥ ६२ ॥ जेंवी गौतमभगीरथसामर्थ्यें । भागद्वय गंगा आणिली येथें । पुढें पूर्वसमुद्रातें । मिश्रित होवोनि मिनलिया ॥ ६३ ॥ तैसी दों ठायीं झाली धरणी । ऐसें देखोनि श्रीरामपत्नी । नमस्कार करोनि सभासदनीं । श्रीगुरु मनीं चिंतिला ॥ ६४ ॥ हृदयीं धरोनि श्रीरामध्यान । नमस्कारोनि सिंहासन । धरणिये करोनि नमन । पुढें

१ अमृत पिणारे देव, २ वानरसेना, ३ साल काढितां, ४ हे पृथ्वी. ५ आवडीनें, ६ पत्नी, ७ उदकानें, ८ ब्रह्मचारी,

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

काय देखती झाली ॥ ६५ ॥ अवलोकोनि पृथ्वींत पाहे । तों रत्नजडित सिंहासन माथां आहे । ऐसा एक पुरुष गमताहे । जानकीस ते समयीं ॥ ६६ ॥ माथां घेवोनि सिंहासन । तिष्ठत उभा राहोन । जेंवी स्वामिकार्यार्थ लक्षोन । सेवेकारण भृत्य[1] राहे ॥ ६७ ॥ पूजावया कैलासपती । पूजासंभार सेवका हातीं । घेवोनि निघे सहित पार्वती । जैसी पाताळभुवनातें ॥६८॥ पाताळीं वसे हाटकेश्वर । तयाचे पूजेलागीं विद्यांधर[2] । सेवकमाथां नाना उपचार । देवोनियां जात जैसें ॥ ६९ ॥ किंवा शेष घेवोनि पृथ्वीभार । कीं कूर्में पृष्ठ करोनि कठोर । तैसें माथां सिंहासन सुंदर । पुरुष एक उभा असे ॥ ७० ॥ ऐसा अवनीच्या जठरीं । रत्नसिंहासन घेवोनि शिरीं । उभा तिष्ठत प्रतीक्षा[3] करी । तें जानकीनें देखिलें ॥७१॥ संतोष झाला अति मनीं । म्हणे मज हे तुष्टली अवनी । शेषमाथां सिंहासन देवोनी । मज मूळ[4] पाठविलें ॥ ७२ ॥ ऐसें भावोनि[5] ते समयीं । जानकी सिंहासनीं बैसली पाहीं । मग प्रवेशती झाली हृदयीं । पृथ्वीचिये ते काळीं ॥ ७३ ॥ भागद्वय अवनी एक झाली । जैसीं स्वातीजळें शिंपीमुखें मिळालीं । याउपरी कथा वर्तली । ते श्रोतीं सादर ऐकिजे ॥ ७४ ॥ समस्तां झालें आश्चर्य । तटस्थ ठेले ऋषिवर्य । स्वर्गवासी देव सर्व । पुष्पवर्षाव करिते झाले ॥ ७५ ॥ वानरां झाले परम क्लेश । हनुमंता खेद बहुवस । दुःखें दाटला जगदीश । जानकीच्या गमनें हो ॥ ७६ ॥ चिंतातुर समस्त माता । सुख पावली कैकेयदुहिता । देव म्हणती चतुर सीता । किती अपवाद सोसील ॥ ७७ ॥ ऐसें वर्तलें ते समयीं । देखोनि श्रीराम शोकार्णवांत पाहीं । शोक करिता झाला वैदेही । हातींची गेली म्हणोनी ॥ ७८ ॥ अवो प्रिये तुजकारण । खडतर सेविलें अरण्य । पादपां[6] पाषाणां आलिंगन । भ्रमोनियां देत होतों ॥ ७९ ॥ श्वापदां पुसें सीता कोठें । उल्लंघीं खेटें[7] खर्वटें[8] । पायीं मोडती दीर्घ कांटे । पडें उठें मूर्च्छित ॥ ८० ॥ सीता सीता आक्रंदोनी । दश दिशा हिंडें मेदिनीं । मार्गीं भेटे तयालागोनी । पुसें जानकी कोणीं देखिली ॥ ८१ ॥ तुजलागीं वानरांसीं सख्य केलें । तुजलागीं समुद्र शिळीं बुजिले । तुजलागीं अराक्षसी केलें । रावण वधोनि लंकेसी ॥ ८२ ॥ विराधें हरिलें जे काळीं । तैं अवेक्षितां[9] वनस्थळीं । राक्षस वधोनियां धुळी । क्षणामाजी मेळविला ॥ ८३ ॥ चित्रकूटीं काकें क्षतविक्षत केलें । तयावरी म्यां ईषिकेतें[10] मोकलिलें । पुढें काग मागें ईषिका पाताळें । हिंडोनियां स्वर्गा गेली ॥ ८४ ॥ नारदवचनें तुज शरण । काग म्हणे ईषिका निवारीं दारुण । ग्लांति देखोनि माझें स्तवन । तयालागीं त्वां केलें ॥ ८५ ॥ तुझेनि वचनें तया न मारून । वामनेत्रास त्याच्या केलें छेदन । ऐसी आज्ञा प्रमाण । म्यां नाहीं उल्लंघिली ॥ ८६ ॥ ते तूं आजि कां वो रुसलीस । मज सांडोनि पाताळा गेलीस । तरी तुज काय पातलें यश । पतिवचनास उल्लंघूनी ॥ ८७ ॥ मी काय तुझें चुकलों । कोणे अन्याया आचरलों । पूर्वीं लोकलाजे भ्यालों । वना पाठविलें म्हणोनी ॥ ८८ ॥ अवो अवनिये अवधारीं । माझी सीता तुझे उदरीं । जन्मली तूं माझी सासू खरी । जानकी पाठवीं मजपासीं ॥ ८९ ॥ तुझे उदरीं उत्पन्न । झाली सीता निश्चयें जाण । तरी आतां पुनरपि दान । देईं वो तूं मजलागीं ॥ ९० ॥ ऐसी करुणा करितां राजीवनयनें । दुखावलीं समस्तांचीं मनें । गाई दांतीं न धरिती तृणें । न पीती जीवनें[11] सीताविरहें ॥ ९१ ॥ क्रोधा चढला कार्मुकपाणी । अग्निबाण लावोनि गुणीं । म्हणे पूर्वीं सांडिली दाहोनी । पुनरपि दग्ध करीन ॥ ९२ ॥ माझी प्रिया हरिली इणें । न बोले मजसीं धरोनि मौनें । नवखंड करीन एक्या बाणें । रुद्रावेशें कोपला ॥ ९३ ॥ कोपला देखोनि चापशरपाणी । देव चिंतातुर मनीं । तंव विधाता पुढें होवोनी । बोलता झाला श्रीरामासी ॥ ९४ ॥ ब्रह्मा म्हणे श्रीरामचंद्रा । अरिदळणीं प्रतापरुद्रा । कल्याणवंता भुजंगशयना राजेंद्रा । वचन गुणसमुद्रा अवधारीं ॥ ९५ ॥ अनंतब्रह्मांडांचा नायक । भास्करकुळीं कुळदीपक । पुण्यश्लोक[12] त्र्यंबक । तुज ध्यात

१ सेवक. २ देवजातिविशेष. ३ वाट पहाणें. ४ आमंत्रण. ५ कल्पून. ६ वृक्षांना. ७ खेडीं. ८ गांवें. ९ पाहतां.

१० दर्भ. ११ पाणी. १२ स्तवन करण्यास योग्य.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

हृदयकमळीं ॥ ९६ ॥ तूं या चराचरभूतां प्रति-
पाळिता । तूं या सकळां भूतां स्रजविता । प्रळ-
यांतीं संहार करिता । कळिकाळा माथां आज्ञा
तुझी ॥ ९७ ॥ तो तूं लीलासूत्रधारी । अवतार
धरिसी नानापरी । विरंचिअंडांची[1] माळ तुझ्या
उदरीं । रोमरंध्रीं भासत ॥ ९८ ॥ ऐसा तूं त्रैलो-
क्यनायक । अवतरोनि मायाकौतुक । खेळ
खेळसी वाल्मीक । वदला होता पूर्वी जें ॥ ९९ ॥
अनागत भाष्य ऋषीश्वरें । वाल्मीकें कथिलें
ब्रह्मवरें । शोधोनि पाहिलें विभागद्वारें । तीन
अंश पैं केले ॥ १०० ॥ ती हे कथा येथपर्यंत ।
वाल्मीकमुखींची झाली सत्य । पुढें आतां उरली
किंचित । ते अनुपम्य पैं असे ॥ १ ॥ ते श्रवण
करावया अधिकारी । नाहींत जीव पृथ्वीवरी ।
श्रीरामकथा अमृतलहरी । ऐकावया पुण्य पाहिजे
॥ २ ॥ ऐसे शब्द चतुराननें । वदत असतां
मार्गगगनें । वाणी झाली ती रघुनंदनें । परिसिली
विधात्यासहित ॥ ३ ॥ ते वाणीचें रूप कैसें ।
तीस देह शिर वाचा नसे । अव्यक्त परी व्यक्त
जैसें । वदे एकादा आगळें ॥ ४ ॥ आप्त एकादे
अवसरीं । संकटीं हितोपदेश करी । तैसी ते
समयीं वाचा अशरीरी । काय म्हणती पैं झाली
॥ ५ ॥ वाणी नव्हे ती गंधर्वनगरींची देवता ।
दुःखित देखोनि जामदग्न्यजेता । संबोखूं आली
आप्तता । निजदुहितेच्या पतीतें ॥ ६ ॥ वाणी
नव्हे ती कुळस्वामिनी । दुःखित श्रीरघुनाथ
देखोनी । संबोखोनी हितवचनीं । काय बोलती
पैं झाली ॥ ७ ॥ वाणी नव्हे हे काळरात्री । संबो-
खावया श्रीरघुपती । आश्वासनातें झाली देती ।
हितोपदेशवचनेंकरोनी ॥ ८ ॥ वाणी म्हणे श्री-
रघुनंदना । पूर्ण ब्रह्म सनातना । योगियांच्या
विश्रामस्थाना । कैलासरमणा प्रियकरा ॥ ९ ॥
भक्तजनभयभंगा । महेशाच्या प्राणलिंगा । भर-
तादिबंधुवर्गा । प्रियकरा श्रीरामा ॥ ११० ॥
मदनाचिया तूं जनका । वैदेहीच्या प्राणनायका ।
मिथ्या सांडीं या शोका । उरग त्वचा पैं जैसी
॥ ११ ॥ वाल्मीकमुखींचें हें निरूपण । संपूर्ण
कथिलें रामायण । तें हें झालें सत्य जाण ।
किंचित शेष उरलेंसे ॥ १२ ॥ तें आकर्णिजे रवि-
कुळभूषणा । अनागत भाष्य रामायणा । अधि-
कार नाहीं इतर जना । श्रवण करावया तेथींचें
॥ १३ ॥ उर्वरित कथेचे अधिकारी । ऐकावया
नाहीं ये चराचरीं । पुत्रांसमवेत रावणारी ।
एकांतीं श्रवण पैं कीजे ॥ १४ ॥ जानकीच्या
वियोगें गहन । दीर्घ दुःख करणें मिथ्या जाण ।
तूं परमात्मा श्रीनारायण । लीला दाविसी नाना-
परी ॥ १५ ॥ लक्ष्मीलागीं ये लोकीं । पुरश्चरणें
साधकीं । करिजेताती ते लक्ष्मी निकी । वैकुंठीं
पैं वसताहे ॥ १६ ॥ घेवोनि मायेची बुंथी । बहु-
रूपी सोंगें संपादिती । तैसी तुझी अवतारस्थिती ।
नाना चरित्रें दाखविसी ॥ १७ ॥ तुझी भार्या
हरिली रावणें । हें मिथ्या बोलावयाकारणें ।
लटकें जगीं मिरवणें । ऐसा खेळ खेळसी ॥ १८ ॥
वृक्षापासोनियां छाया । हरिली हें बोलणें वाया ।
तैसी रावणें हरिली जाया । हें लौकिकीं उरलेंसे
॥ १९ ॥ अमृतापासोनि गोडी । कोण चतुर
बाहेर दवडी । सुवर्णाची कीळ काढी । ऐसें काय
घडेल ॥ १२० ॥ मक्षिका सर्व रस चाखे । अग्नि
भक्षितां मरण ठाके । उन्मत्त झालेनि जंबुकें ।
सिंहा काय जिंतवेल ॥ २१ ॥ ऐसी लंकेशें तुझी
भार्या । हरिली मिथ्या रघुराया । आपुलें पूर्णत्व
शोधोनियां । निजस्थिती राहें उगा ॥ २२ ॥
आकाशवाणीचीं ऐसीं उत्तरें । परिसोनियां श्री-
रघुवीरें । सभा विसर्जून दोनी पुत्र करें । धरोनी
देवगृहीं प्रवेशला ॥ २३ ॥ सद्गुरु वसिष्ठासमवेत ।
देवगृहीं प्रवेशला श्रीरघुनाथ । एका जनार्दना
विनवीत । सावचित्त परिसावें ॥ १२४ ॥ स्वस्ति
श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां
जानकीपातालगमनं नाम त्रिसप्ततितमोऽध्यायः
॥ ७३ ॥ ओंव्या ॥ १२४ ॥

अध्याय चौऱ्याहत्तरावा

॥ श्रीआत्मारामाय नमः ॥ आकाशवाणीचें
उत्तर । ऐकोनियां रघुवीर । करीं धरोनियां कुमर ।
यज्ञशाळे प्रवेशला ॥ १ ॥ क्रमोनियां तेथें शर्वरी ।
प्रातःकाळीं दूषणारी । स्नानसंध्या करोनि ते अव-

---

१ ब्रह्मांडांची. २ श्रीरामचंद्राला. ३ समाधान कर-
ण्याला. ४ सर्प. ५ कातडी. ६ ऐकावें. ७ बाकीच्या.

८ खरोखर. ९ पांघरूण. १० स्त्री. ११ तेज. १२ कोल्ह्या-
च्यानें. १३ रात्र.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सरीं। ऋषींसहित बैसला॥ २॥ सभामंडळीं थोर थोर। मिळाले राक्षस वानर। प्रधान सेनानायक ऋषीश्वर। नगरींचे नागरिक लोक॥ ३॥ आज्ञा देवोनि लहुकुशांतें। श्रीरामें आरंभिलें रामकथेतें। ऐकतां सुख न वाटे चित्तें। परम व्याकुळ पैं झाला ॥ ४॥ पाहूं लागला चहूंकडे। न देखे जानकीचें रूपडें। म्हणे दिशा दृष्टी उद्वस पडे। अंधकार दाटुनी ॥ ५॥ माझिये जानकीवीण। उद्वस अवघें विरिंचिभुवन। मज राज्याची चाड कोण। सभा विसर्जून ऊठिला॥ ६॥ नावडे राज्यभोगोपचार। नावडे छत्रचामर। नावडे गायन सुस्वर। अवस्था थोर सीतेची ॥ ७॥ नावडे शास्त्रव्याख्यान। नावडे ध्रुवपदश्रवण। नावडे हरिकथाकीर्तन। चिंता गहन सीतेची ॥ ८॥ नावडे पारधी वनविहार। नावडे राज्यपदींचा दळभार। नावडे इष्ट बंधु सहोदर। नावडती प्रकार वाद्यांचे ॥ ९॥ सीतेची गौरवर्ण तन। निंबलोणा ओंवाळिजे कोटि मदन। जीतें देखोनि कनकहरण। पक्षिगण भूलले॥१०॥ जानकीचेनि सुंदरपणें। उदरा येईजे मदनें। तें रूप श्रीरघुनंदनें। ध्यानमुद्रेस आणिलें॥ ११॥ ध्यानीं आणोनियां सीता। हृदयीं धरोनि झाला ध्याता। पुढें काय वर्तली कथा। ते सावधान श्रोते अवधारा॥ १२॥

यज्ञे यज्ञे प्रकुरुते सीता यत्र हिरण्मयी ।
दशवर्षसहस्राणि वाजपेयमुपागमत् ॥ १ ॥
वाजपेया दशशता बहुसौवर्णदक्षिणाः ।
अग्निष्टोमातिरात्राभ्यां गोसवैश्च ग्रहासवैः ॥ २ ॥
ईजे क्रतुशतैरन्यैः स श्रीरामः सदक्षिणैः ।
एवं स कालः सुमहान् राघवस्य महात्मनः ॥ ३ ॥

यज्ञ करी श्रीरघुनाथ। दहा सहस्र वर्षेंपर्यंत। सीता सुवर्णाची केली होती तीसहित। यागादि कर्मै संपादी॥ १३॥ दहा सहस्र वर्षेंवरी। याग करितां रावणारी। सुवर्णदक्षिणा भारी। ऋषींलागीं देतसे॥ १४॥ तरी ते याग कोण कोण। सांगेन तयांचें नामाभिधान। यज्ञामागें जो जो यज्ञ। अनुक्रमें परियेसा॥ १५॥ वाजपेय ज्योतिष्टोम। तिजा अतिरात्र होम। गोसवें ऐसा चतुर्थ परम। ग्रहासव पंचम अवधारा॥ १६॥ अश्वमेध नाम सहाव्याचें। चैत्य सप्तम जाणा साचें। आणिकही नानापरींचे। याग साचे बहुविध केले॥ १७॥ ऐसिये प्रकारें सकळ यज्ञ। करी श्रीराम रविकुळभूषण। द्विजां देवोनि बहु सुवर्ण। काळ क्रमी यापरी॥ १८॥ राज्य करितां श्रीरघुनाथा। त्रैलोक्यींचे भूप वंदिती माथां। ऋक्षां आणि कपींतें समस्तां। श्रीरामाज्ञा प्रमाण॥ १९॥

काले वर्षतु पर्जन्यः सुभिक्षं विमला दिशः ।
हृष्टपुष्टजनाकीर्णं पुरंदरपदं यथा ॥ ४ ॥
न बालो म्रियते कश्चिद्रामे राज्यं प्रशासति ।
नाधर्मो विद्यते कश्चिन्न व्याधिः प्राणिनां क्वचित् ॥५॥

श्रीरामाज्ञा काळाचे शिरीं। यथाकाळीं मेघ वृष्टी करी। तेणें धान्यें महीवरी। उत्पन्न होती बहुसालँ॥ २०॥ सदाकाळ सुभिक्ष। पातकाचें परम दुर्भिक्ष। चंद्र आणि दिनेश। सौम्यतेजें तपताती॥ २१॥ दिशा विमला प्रकाशकरा। नाहीं अभ्र धुई वारा। धष्ट पुष्ट नगरा-। -माजी वास करिताती॥ २२॥ जैसी पुरंदराची नगरी। तीहूनि विशेष साकेतपुरी। मृत्यूचें भय स्वप्नजागरीं। बाळकांतें नाहीं कल्पांतीं॥ २३॥ श्रीरामाचे आज्ञेकरून। काळ वंदी श्रीरामचरण। श्रीरामराज्याचा धाक गहन। दूत लोटांगण यमाचे करिती॥ २४॥ अधर्माची नाहीं वार्ता। घरोघरीं श्रीरामकथा। व्याधि रोग जरा व्यथा। रामराज्यीं पैं नाहीं॥ २५॥ ऐसें बहुकाळवरी श्रीरामें। पुत्रपौत्रांसहित नेमें। राज्य केलें परम धर्मे। बंधुसुहृदांसहित पैं॥ २६॥ पुढील कथा कौतुकलहरी। वाल्मीकमुखींची वागीश्वरी। कवित्व तारूं भवसागरीं। उतरावया जना घातलें॥ २७॥ या तारुवाचें जो स्मरण करी। तया भय नाहीं संसारीं। याचें जो श्रवण करी। तया श्रीहरि सन्निध॥ २८॥ या तारुवाचा जो भोक्ता। कैलासनाथचि तत्त्वतां। पार्वतीसहित एकांता-। -माजी कथा श्रीरामाच्या॥ २९॥ कथेसि झाली आडकथा। पैस न म्हणावें श्रोतां। रंगीं नृत्य

१ ब्रह्मांड. २ यज्ञ. ३ यज्ञविशेष. ४ गाईचा यज्ञ (हा कलींत वर्ज्य). ५ अनेक प्रकारचे. ६ आस्वलांना.
७ अनेक प्रकारचीं. ८ सवंगाई. ९ दुष्काळ. १० सूर्य. ११ अयोध्या.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

करितकरितां । त्याग येवोनियां पडे ॥ ३० ॥ अध्ययनाचेनि प्रसंगें । अनध्याय तो पडे मार्गें । तैसें कथेचेनि रंगें । दृष्टान्त पुढें येऊं ठाके ॥ ३१ ॥ तंव श्रोते म्हणती वक्तया । पुढील कथा सांगावया । सद्गुरु स्मरोनि लवलाह्या । कथामार्ग चालवीं ॥ ३२ ॥ ऐकोनि श्रोतयांचें वचन । आनंदें निवाला एका जनार्दन । म्हणे स्वामी तुमचें मनोदेवतेचें प्रसन्नपण । मजलागीं पैं व्हावें ॥ ३३ ॥ तुमची कृपाकटाक्षनदी । तेथें मी तरेन पदोपदीं । आतां पुढील निरूपणसिद्धी । सावकाशीं अवधारा ॥ ३४ ॥ रामें राज्य करितां अयोध्येसी । बहुकाळ क्रमिला स्वधर्मैसीं । पुढें माता वार्धक्य¹तेसीं । देहान्तसमयो पावल्या ॥ ३५ ॥ जैसें घटींचें जीवन² आटतां । प्रतिबिंबीं न भासे सविता । तैंवी वार्धक्यें तिघी माता । देहान्ता पावल्या ॥ ३६ ॥ तिघां बंधूंसमवेत । उत्तरक्रिया विधानोक्त । दानें देवोनि द्विज तृप्त । द्वादशविधी पैं केला ॥ ३७ ॥ चवघांजणीं पिंडदाना । करोनियां गयावर्जना³ । माता उद्धरोनि स्वर्गभुवना । दशरथापासीं पाठविल्या ॥ ३८ ॥ स्वर्गीं स्थापोनियां माता । स्वधर्में असतां श्रीरघुनाथा । तंव भरतमातुलाच्या पुरोहिता । आगमन अयोध्ये पैं झालें ॥ ३९ ॥ राजहेरीं श्रीरामासी । वार्ता जाणविली स्वामी परियेसीं । पुरोहित भरतमातुलाचा गर्गऋषी । तुमचे भेटीस पैं आला ॥ ४० ॥ अनुजांसहित रघुनंदन । सामोरा येवोनि स्वयें जाण । मातामहपुरोहिता देवोनि मान । राजसदना आणिला ॥ ४१ ॥ दीर्घ उपचारें करोनि पूजन । स्वपंक्तीसी सारोनि भोजन । दिव्य वस्त्रें अलंकारभूषणें । गर्गऋषीसी अर्पिलीं ॥ ४२ ॥ श्रीराम म्हणे जी गर्गऋषी । वृद्धपरंपरा राजगुरु कैकेयभूपासी । जैसा वसिष्ठ⁴ सूर्यवंशीं । तैसे तयासी निजपूज्य ॥ ४३ ॥ ऐसे तुम्ही पूज्य थोर । विवेकवैराग्यें चतुर । करावया आमचा उद्धार । कृपेनें आलेति येथवरी ॥ ४४ ॥ भाग्य थोर आजि आमुचें । म्हणोनि येणें झालें तुमचें । कुशलत्व यजमानस्वामीचें । परिवारें क्षेम असती कीं ॥ ४५ ॥ गर्ग म्हणे श्रीरघुराजा । क्षेमवंत तुझिया भुजा । प्रतापाची उभवोनि ध्वजा । दशदिशा तेजें झळकत ॥ ४६ ॥ अरिरायांवरी तोडरीं । काळ आज्ञा वंदी शिरीं । जयाची काठी तपे अंबरीं । तो सद्गुरु गृहामाजी ॥ ४७ ॥ कल्पवृक्ष गृहीं ज्याचे । चिंतामणी पाषाण नानापरींचे । नित्य दुभतें कामधेनूचें । त्या पुरुषाचें भाग्य काय वानूं ॥ ४८ ॥ चारी वेद बंदिजनें⁵ । सहाही शास्त्रें⁶ गुणवर्णन । अठरा पुराणें करिती स्तवन । निरंतर जयाचें ॥ ४९ ॥ तो तूं पूर्णब्रह्म श्रीरघुनाथ । द्विजांचें वाढविसी महत्त्व । देवां अकळ तुझें चरित्र । महापुरुषा श्रीरामा ॥ ५० ॥ परी कांहींएक किंचित तुम्हांकारणें । कैकेयाधिपें पाठविलें तें अंगीकारणें । जैसें कल्पतरूसी पूंगीफल⁷ ठेवणें । आपुलिया यथानुशक्ती ॥ ५१ ॥ म्हणोनि भेटीस उत्तम वारू । जे श्यामकर्णाहूनि सुंदरू । हां हां म्हणतांचि सत्वरू । पूर्वेचे पश्चिमे येती ॥ ५२ ॥ हकारांतील अकार । वाचे करितां उच्चार । तंव पूर्वींच अक्षरोत्तर । चिंतिले ठायासी जातसे ॥ ५३ ॥ हकार अकारा होतां भेटी । तंव पूर्वींच दिशांचे शेवटीं । मनोवेगचपळते उठाउठीं । उणीव होय वारूंपुढें⁸ ॥ ५४ ॥ ऐसे वारू दहा सहस्र । पृथ्वीस न लाविती खुर । रत्नाभरणीं सालंकार । श्रीरामापुढें उभे केले ॥ ५५ ॥ तदुपरी कुंजरभार⁹ । जैसे चौंचरणींचे गिरिवर । चौंदतमंडित सालंकार । शुंडा सुंदर जयांची ॥ ५६ ॥ दोहीं कर्णीं भूषणें विचित्रें । जैसीं शोभती रंभापत्रें¹⁰ । तयांवरी श्वेतचामरें । दोहीं कर्णीं बांधिलीं ॥ ५७ ॥ गुढारिले नाना अंबरीं । जैसें मेघडंबर गिरिवरीं । तैसेचि रथ अयुतेंवरी¹² । शृंगारोनि¹¹ आणिले ॥ ५८ ॥ अनेक वस्त्रें दिव्यांबरें । नाना रंगांचीं रुचिरें । मुक्ताफळें पाच वैडूर्य हिरे । श्रीरामासी समर्पिले ॥ ५९ ॥ दिव्य रत्नांचिया माळा । समर्पिल्या घननीळा । अनेक जातींचिया पक्षिकुळा । भेटी श्रीरामासी दीधली ॥ ६० ॥ हे भेटी समर्पोनि श्रीरामासी । आसनीं बैसलासे ऋषी । श्रीराम म्हणे गर्गासी । अपूर्व आम्हांसी पाठविलें ॥ ६१ ॥ आम्हीं पूर्वीं नाहीं आयकिलें । तें मातुळें प्रीतीनें पाठविलें । विशेष तुमचीं पाउलें । दृष्टी देखिलीं गर्गमुने ॥ ६२ ॥

१ वृद्धावस्था होऊन. २ उदक. ३ गयाश्राद्धादि कर्में. ४ वसिष्ठ. ५ भाट, स्तुतिपाठक. ६ व्याकरण, न्यायादि. ७ सुपारी. ८ घोड्यांपुढें. ९ हत्तींचे समुदाय. १० केळीचीं पानें. ११ शोभिवंत वस्त्रांनीं. १२ दहा हजारांवर.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

रामस्य भाषित श्रुत्वा महर्षिः कार्यविस्तरम् ।
वक्तुमुद्भूतांतरात्मा राघवयोपचक्रमे ॥ ६ ॥
युधाजित्प्रीतिसंयुक्तः श्रूयतां यदि रोचते ।
अथ गंधर्वरचितः फलमूलोपशोभितः ॥ ७ ॥
सिंधोरुभयतः पार्श्वे देशः परमशोभनः ।
तं तु रक्षंति गंधर्वाः सायुधा युद्धकांक्षिणः ॥ ८ ॥
शैलूषस्य सुता वीरास्तिस्रः कोव्यो महाबलाः ।
तांस्तु निर्जित्य काकुत्स्थ गंधर्वनगरं शुभम् ॥ ९ ॥
निवेशय महाराज पुरे द्वे सुसमाहितः ।
अन्यस्य न गतिस्तत्र देशश्चायं सुशोभनः ॥ १० ॥
रोचतां ते महाबाहो न हि वः सदृशं भवेत् ॥ ११ ॥

दाशरथीचें ऐकोनि वचन । हृदयीं निवाला ब्राह्मण । जैसें वसंतीं कोकिळालापन । निववी मन पांथिकांचें ॥ ६३ ॥ ऐसियापरी गर्गऋषी । सविस्तर सांगे श्रीरामासी । म्हणे तुमच्या मातुळें महत्कार्यासी । पाठविलें राजेंद्रा ॥ ६४ ॥ तें कोण कार्य किंलक्षण । युधाजित कैकेयनंदन । जो कां तुम्हां मातुल जाण । प्रिय बहु भरतासी ॥ ६५ ॥ तुमच्या ठायीं त्याची प्रीती । बहुत आर्त जी रघुपती । जैसी धेनु वत्सा चिंती । चकोर चिंती चंद्रातें ॥ ६६ ॥ युधाजितें तुम्हांलागून । रुचे ऐसें माझ्या मुखें कथन । करविलें तें सावधान । बंधूंसमवेत अवधारा ॥ ६७ ॥ सिंधुनदीचे उभय तीरीं । पुष्पीं फळीं अति साजिरी । गंधर्वीं वसविली नगरी । जे सुरासुरीं अतर्क्य ॥ ६८ ॥ तेथील राजे गंधर्व जाण । सिंधुदेशाचें करिती पाळण । तयांचें तीस कोटी सैन्य । युद्धीं आंगवण बहुसाल तयां ॥ ६९ ॥ श्रीरामा जिंतोनि त्यांतें । नगरें दोन वसवावीं तेथें । ऐसें सांगोनि युधाजितें । मजलागीं पाठविलें ॥ ७० ॥ काळासी प्रवेश नाहीं तेथ । अन्यत्र साधारणाची कोण मात । तूं काळाचा काळात्मा श्रीरघुनाथ । युद्धीं गंधर्व विभांडीं ॥ ७१ ॥ जरी येईल तुझिया मना । तरी विलंब न करीं श्रीरघुनंदना । जैसें वृद्धविवाहीं लग्ना । अति त्वरा करावी ॥ ७२ ॥

१ आवड. २ पराभूत कर. ३ शुद्धज्ञानरूपी आकाशांत. ४ ज्ञानरूप सूर्य. ५ ध्रुव (तारा). ६ भरताचे

तच्छ्रुत्वा राघवः प्रीतो महर्षेरतुलं वचः ।
उवाच बाढमित्येव भरतं चान्ववैक्षत ॥ १२ ॥
सोऽब्रवीद्राघवो हृष्टः प्रांजलिप्रग्रहो द्विजम् ।
इमौ कुमारौ विप्रर्षे तं देशं विजयिष्यतः ॥ १३ ॥
भरतस्यात्मजौ वीरौ तक्षः पुष्कर एव च ।
मातुलेन च गुप्तौ वै धर्मेण सुसमाहितौ ॥ १४ ॥
भरतस्त्वग्रतः कृत्वा कुमारौ च पदानुगौ ।
निहत्य गंधर्वसुतान्पुरे द्वे तु करिष्यति ॥ १५ ॥
निवेश्यते पुरे रम्ये स्वात्मजौ विनिवेश्य च ।
आगमिष्यति मे ब्रह्मन्समीपे स तु धार्मिकः ॥ १६ ॥
एवमुक्त्वा तु ब्रह्मर्षिं भरतं सबलानुगम् ।
आज्ञापयामास ततः कुमारावभ्यषिंचयत् ॥ १७ ॥
नक्षत्रेण च सौम्येन पुरस्कृत्यांगिरससुतम् ।
भरतः सेनया सार्धं कुमारौ च विसर्जितौ ॥ १८ ॥

युधाजित् पुरोहिताचें वचन । ऐकोनियां श्रीरघुनंदन । संतोषें न माये गगन । ऐसा उल्हास पैं झाला ॥ ७३ ॥ तें वचन तरी विचारितां कैसें । वैराग्यसिंधूचें भरितें जैसें । कीं आनंदवनींचे हंस । कीं मानसें योगियांचीं ॥ ७४ ॥ कीं चिदाकाशीं बोधदिनकरू । कीं धैर्यगगनींचा अढळ धुरू । कीं नवविधभक्तीचा शृंगारू । शब्दरूपें प्रकटला ॥ ७५ ॥ ऐसें वचन गर्गमुनीचें । परिसोनि हृदय श्रीरामाचें । निवालें मग म्हणे सुखाचे । बरवें वदलेति ऋषिराजा ॥ ७६ ॥ आजि संतोष माझिया चित्ता । झाला जी मातुलपुरोहिता । हे भरतात्मज दोघे तत्त्वतां । गंधर्वदेशीं राज्य करोत ॥ ७७ ॥ हे दोघे भरतनंदन । तक्ष पुष्कर यांचें अभिधान । मातामहाचे प्रिय पूर्ण । पर्ढियंते जाण मातुलासी ॥ ७८ ॥ या दोघां पुत्रांसहित । पुढें करोनियां भरत । पायदळसेना अमित । युद्धालागीं नेइजे ॥ ७९ ॥ सेनेसहित राजा भरत । युद्धीं जिंतील गंधर्व समस्त । पुरें दोनी वसवोनि तेथ । पुत्रां राज्य देईल ॥ ८० ॥ नूतन वसवोनि पुरद्वयासी । राज्यीं स्थापील निजपुत्रांसी । विजयी होवोनि भेटीसी । माझिये येईल मुनिराया ॥ ८१ ॥ ऐसें बोलोनि पुरोहिताप्रती । भरतासी आज्ञा

पुत्र. ७ नांव. ८ आवडते.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

देवोनि श्रीरघुपती। म्हणे निजपुत्रां हर्षें अती। पट्टाभिषेक करावा ॥ ८२ ॥ माझिये दृष्टीपुढें। राज्याभिषेक करीं वाडेंकोडें। निवेल हृदय सुख गाढें। मजलागीं होईल ॥ ८३ ॥ ऐसी आज्ञा श्रीरघुपतीची। होतांचि माता कैकेयी ज्याची। तेणें भरतें सामग्री पट्टाभिषेकाची। तत्काळ जाण आणविली ॥ ८४ ॥ अभिषेकोनि दोघां पुत्रांतें। श्रीरामें दिधलीं दोनी छत्रें। चामरें शिबिका तयांतें। दोघांलागीं दीधलीं ॥ ८५ ॥ श्रीरामाज्ञा लाहून। निजपुत्रेंसीं कैकेयीनंदन। सेनासमवेत बळवाहन[२]। नगराबाहेर निघाला ॥ ८६ ॥ पैंला-णिले[३] भद्रजाती। वारु कोट्यनुकोटी नेणों किती। रथ घडघडाटें हे क्षिती। उलथूं पाहती ते समयीं ॥ ८७ ॥ पायदळ आलंगाइत। सोळी सांबळी बाणाइत। तुबक तिरताज अगणित। श्रीरामनामें गर्जती ॥ ८८ ॥ छप्पन्न कोटी चामुंडा। पत्रें घेवोनि धांवती पुढां। गंधर्वांच्या अशुद्धें[४] सडा। भरत गाढा घालील ॥ ८९ ॥ श्रीरामबळें वीर गाढे। एक गर्जती एकापुढें। भूतें प्रेतें राक्षसें मूढें। मांसभक्षणा निघालीं ॥ ९० ॥ भूतगणेंसीं वेताळ। आनंदाचा गोंधळ। टाकोनि मागें भर-तदळ। नवदुर्गाही निघाल्या ॥ ९१ ॥ जैसे सम-र्थाचे विवाहीं। वऱ्हाडी वऱ्हाडिणी लवलाहीं। तैसे भूतगण पाहीं। अवघियांपुढें निघाले ॥ ९२ ॥ ऐसिया प्रकारें श्रीरामानुजू। चालिला गंधर्वनगरा उजू। मार्ग क्रमोनि सेनासमाजू। मातामहदेशा पैं आला ॥ ९३ ॥ तद्दिनीं तेथें करोनि वस्ती। सैन्यासहित दाशरथी। कैकेयाधिपें पूजोनि प्रीतीं। पुत्रासी संगें दीधलें ॥ ९४ ॥ मातुलपुत्रा-सहित भरत। प्रतापें प्रयाण करीत। प्रहर दोनी न भरतां तेथ। सिंधुदेशा पावला ॥ ९५ ॥ सिंधुनदीच्या उभयतीरीं। गंधर्वीं वसविली नगरी। शोभा तिची अति साजिरी। अमरपुरीहूनि अधिक ॥ ९६ ॥ तेथें वसती गंधर्व जाण। तिहीं ऐकिलें सेना दारुण। घेवोनि आला कैकेयीनंदन। युद्धा-लागीं करावया ॥ ९७ ॥

श्रुत्वा तु भरतं प्राप्तं गंधार्वास्ते समागताः।
योद्धुकामास्ततः सर्वे गर्जंति स्म समंततः ॥ १९ ॥
तेषां समभवद्युद्धं तुमुलं रोमहर्षणम्।
सप्तरात्रं तदासीद्धि न च प्राप्तस्तयोर्जयः ॥ २० ॥
ततो रामानुजः क्रुद्धः कालचक्रं सुदारुणम्।
संवर्तं नाम तच्छस्त्रं गंधर्वेषु प्रयुक्तवान् ॥ २१ ॥
ते विद्धाः कालचक्रेण संवर्तेन विदारिताः।
क्षणमात्रेण हि हतास्तिस्रः कोट्यो महाबलाः ॥ २२ ॥
हतेषु तेषु वीरेषु भरतः कैकयीसुतः।
निवेशयामास ततः समृद्धे द्वे पुरे तदा ॥ २३ ॥
पुष्करं पुष्करावत्यां तक्षं तक्षशिलां प्रति।
स्थापयामास तौ पुत्रौ भरतस्य महात्मनः ॥ २४ ॥

आला ऐकोनि भरत। गंधर्व होवोनि एकीभूत। विचार करोनि समस्त। समरांगणा पैं आले ॥ ९८ ॥ युद्धेच्छा धरोनि मनीं। गर्जते झाले रण-मेदिनीं। तेणें नादें फुटे अवनी। दिग्गजां कर्णीं बधिरत्व आलें ॥ ९९ ॥ समस्त एकवट मिळोन। उल्हासें वीरां येतसे स्फुरण। युद्धीं जयाशा धरोन। रणमंडळा पातले ॥ १०० ॥ कवचें खड्गें गदापाणी। परिघ मुसळ तरुपाषाणीं। परस्परें भिडते झाले रणीं। उभयदळींचे वीरनायक ॥१॥ एक वर्षते झाले शर। एकीं टाकिले गिरि-वर। एकीं गदाघातें मार। शस्त्रसंभार वर्षती ॥ २ ॥ दोहीं दळीं वीर निधडे। कृतांताहूनि बळ गाढे। कोणी कोणाचेनि पुढें। न लोटती माघारे ॥ ३ ॥ वर्षाकाळीं जीमूतधारा[५]। तैसे वर्षती पाषा-णतरुवरां। झोंटधरणी[६] होय वीरां। दोन्ही दळें एक झालीं ॥ ४ ॥ जैसीं दोनी एकवटती सरोवरें। तैसे दोन्ही दळींचे भेसळले वीर। पर-स्परें करिते झाले मार। हार जीत पैं नाहीं ॥ ५ ॥ ऐसें गंधर्वीं देखिलें। मग गंधर्वजाळ प्रेरिले झाले। आकाश अवनींमध्यें भरिले। चहूंकडे गंधर्व ॥ ६ ॥ भुली पडली भरतदळाचे वीरां। भयभीत झाले सैरावैरा। तंव गंधर्व एकसरां। युद्धीं लाग बहु केला ॥७॥ सोडोनियां अमित बाण। एकीं टाकिले पाषाण। एकीं गदामुद्गलीं जाण। असंख्य सैन्य मारिलें ॥८॥ भरतदळींचे थोर थोर वीर। कित्येक झाले रणीं चूर। कित्येक घायवट भग्नशिर। अशुद्धें डवरिले[७] पैं असती ॥ ९ ॥ एक

१ चांगल्या रीतीनें. २ बळ (सैन्य) वाहन ज्याचें तो. ३ सज्ज केले. ४ रक्तानें. ५ मेघधारा. ६ परस्परांचे केश ओढणें. ७ भरले.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

म्हणती राया भरता । गंधर्वीं दाविली अधिकता । तंव कोप आला कैकेयीसुता । झाला ताडिता गंधर्वां ॥ ११० ॥ रामानुज वीर बळी । गंधर्वांची फोडोनि फळी । सीत चढवोनि ते काळीं । धनुष्य धरी वामकरें ॥११॥ तूणीरांतूनि काढोनि शर तेजाळ । सुवर्णपुंखांहीं सोज्ज्वळ । जयांचे भाळांमाजी सकळ । बिंबलें हें ब्रह्मांड ॥ १२ ॥ गुणीं चढवोनियां बाण । काळदंडाहूनि कठिण । वोढी काढोनि आकर्ण । परवीरांवरी सोडिला ॥ १३ ॥ बाण जातांचि सत्वरें । कित्येकांचीं छेदिलीं शिरें । सप्तरात्र युद्ध वीरें । रामानुजें पैं केलें ॥ १४ ॥ सात दिवसवरी । युद्ध राजा भरत करी । परी न ये जयहारी । क्रोधा भारी पैं चढला ॥ १५ ॥ काळशस्त्र सुदारुण । बीजाक्षरें जपोनि पूर्ण । गंधर्व संवर्त लक्षोन । भरतवीरें सोडिलें ॥ १६ ॥ संवर्त गंधर्वांमाजी श्रेष्ठ । तयाचा काळशस्त्रें छेदोनि कंठ । उडविला आकाशा उजू स्पष्ट । कविठफळ जैसें कां ॥ १७ ॥ तदनंतरें कैकेयीसुतें । तीस कोटी गंधर्वांतें । मारोनि टाकिलीं प्रेतें । रणसागरामाझारीं ॥ १८ ॥ तंव मिळालिया वनदेवता । मांस भक्षोनि पिती शोणिता । आनंदें म्हणती भरता । विजयी होय पुत्रांसहित ॥ १९ ॥ तदनंतरें राया भरतें । पुरें दोनी वसविलीं तेथें । तयां नामें ऐका श्रोते । सावधान होऊनी ॥ १२० ॥ पुष्करावती नाम एकाचें । तक्षशिला दुसरियाचें । दोघां पुत्रां दों नगरांचें । राज्य दिधलें ते काळीं ॥ २१ ॥ तक्षकातें तक्षकावती । पुष्करा पुष्कर नगराप्रती । स्थापोनियां भरत सुमती । निजसैन्येंसीं ठेविलें ॥ २२ ॥ राज्यीं स्थापोनि दोघे कुमर । गंधर्वांचे पद पदार्थ अपार । रत्नमणिमुक्ताफळें मनोहर । निजपुत्रांसी दीधलीं ॥ २३ ॥ रथ अश्व भद्रजाती । रहंवरांसी नाहीं मिती । आणिकही राज्यसंपत्ती । पुत्रांलागीं दीधली ॥ २४ ॥ ते देशींचे जे लोक । ते केले आपुले आज्ञाधारक । पुढें भरत रघुनायक- । -भेटी निघाला ते काळीं ॥ २५ ॥ एका जनार्दना शरण । भरतें गंधर्वदेश जिंतोन । श्रीरामभेटीसी आगमन । करिता झाला ते काळीं ॥ २६ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां भरतगंधर्वविजयो नाम चतुःसप्ततितमोऽध्यायः ॥ ७४ ॥ ओंव्या ॥ १२६ ॥ ॥ श्लोक ॥ २४ ॥

१ भात्यांतून. २ सुवर्णाच्या पिसाऱ्यांनीं. ३ जय किंवा पराभव. ४ वडील बंधूला. ५ सूर्य. ६ कमलिनी. ७ गरुड.

अध्याय पंचाहत्तरावा

॥ श्रीविश्वात्मने नमः ॥ निजपुत्रांसी स्थापोनि सिंधुप्रदेशीं । भरत निघाला श्रीरामभेटीसी । येवोनियां अयोध्येसी । अग्रजासी वंदिलें ॥ १ ॥ सांगितला सविस्तर वृत्तान्त । ऐकोनि संतोषला श्रीरघुनाथ । चंद्रा देखोनि उचंबळत । क्षीरार्णव जैसा हो ॥ २ ॥ उदित होतां दिनकर । कुमुदिनी उल्हासे थोर । भरत भेटलिया श्रीरघुवीर । आनंदातें पावला ॥ ३ ॥ अरुणानुज अमरावतिये । अमृतहरणीं पावला जय । तेणें वंदिली विनता माय । तैसा भरत भेटला ॥ ४ ॥ याउपरी काय वर्तलें । तें श्रोतीं पाहिजे परिसलें । तेंचि आतां संक्षेपें वहिलें । सांगों आदरिलें श्रीरामकथे ॥ ५ ॥

उभौ कुमारौ सौमित्रे तव धर्मविशारदौ ।
अंगदश्चंद्रकेतुश्च समर्थौ दृढधन्विनौ ॥ १ ॥
इमौ राज्येऽभिषेक्ष्यामि देशः साधु विधीयताम् ।
रमणीयो ह्यसंबाधो रमेतां यत्र धन्विनौ ॥ २ ॥
न राज्ञां यत्र पीडा स्यान्न चैवाश्रमवासिनाम् ।
स देशो दृश्यतां सौम्य नापराध्यामहे यथा ॥ ३ ॥

श्रीराम म्हणे ते काळीं । हे सुमित्रात्मज अतुबळी । धार्मिक सुशीलता आगळी । धनुर्विद्या पैं यांची ॥ ६ ॥ नामें अंगद चंद्रकेत । पितयासारिखा पुरुषार्थ । अति समर्थ बळवंत । दोघे अश्विनीकुमार जैसे ॥ ७ ॥ यांतें उत्तम देश पाहूनी । दोघे स्थापावे दों स्थानीं । माझे दृष्टीपुढें अभिषिंचूनी । राज्य दोघां पैं द्यावें ॥ ८ ॥ उत्तम देश उत्तमस्थानीं । भरत लक्ष्मण हो स्थापादोनी । जेथें सुभिक्ष सुकाळ अनुदिनीं । ज्या प्रांतीं मुनि सिद्ध असती ॥ ९ ॥ ऐसें उत्तम राष्ट्र पाहोन । तेथें स्थापावे सौमित्रनंदन । ऐसें बोलिला श्रीरघुनंदन । तें भरतें परिसिलें आदरें ॥ १० ॥ हो जी म्हणोनि दयाळा । कैकेयीकुमर

८ पराक्रमी. ९ सुकाळ. १० सदोदित.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

तये वेळां । बोलता झाला तया काळा । तें परिसावें सावधानें ॥ ११ ॥

तथोक्तवति रामे तु भरतः प्रत्युवाच ह ।
अयं कारुपथोद्देशो रमणीयो निरामयः ॥ ४ ॥
निवेश्यतां तत्र पुरमंगदस्य महात्मनः ।
चंद्रकेतोश्च सुचिरं चंद्रकांतं निरामयम् ॥ ५ ॥
तद्वाक्यं भरतेनोक्तं प्रतिजग्राह राघवः ।
तं च कृत्वा वशे देशमंगदस्य न्यवेशयत् ॥ ६ ॥
अंगदीया पुरी रम्या ह्यंगदस्य निवेशिता ।
रमणीया सुगुप्ता च रामेणाक्लिष्टकर्मणा ॥ ७ ॥
चंद्रकेतोश्च मल्लस्य मल्लभूम्यां निवेशिता ।
चंद्रकांतेति विख्याता दिव्या स्वर्गपुरी यथा ॥ ८ ॥

ऐसें श्रीराम बोलिल्यावरी । भरत म्हणे ते अवसरीं । उत्तम देश उत्तरेच्या पारीं । विचारिलासे राजेंद्रा ॥ १२ ॥ उत्तरदेशाच्या ठार्यी । पुण्यस्थळें बहुविध पाहीं । हरिद्वार कुरुक्षेत्र इतरही । तीर्थें वसती श्रीरामा ॥ १३ ॥ ज्वालामुखी नगरकोट । चीन महाचीन भोट । आणि मानससरोवराचें तट । समीप असे राजेंद्रा ॥ १४ ॥ तया देशाचे ठार्यी । उत्तम नदी गंगादि आणिकही । शरयू मंदाकिनीही । तेचि प्रांतीं आहेत जी ॥ १५ ॥ तेथें स्थापावा अंगदकुमर । त्याचेनि नामें वसवूं नगर । हें ऐकोनि श्रीरघुवीर । म्हणे भलें विचारिलें भरता तुवां ॥ १६ ॥ जें भरता तुवां विचारिलें चित्तीं । तेंचि करीं मांडवीपती । अंगदपुत्रातें अंगदपुरीप्रती । अभिषिंचूनि स्थापावें ॥ १७ ॥ चंद्रकेत ऊर्मिलाकुमर । जो कां बलाढ्य महावीर । चंद्रावती नामें नगर । वसवोनि त्यातें राज्य द्यावें ॥ १८ ॥ चंद्रावती नामें नगरी । वसवीं जैसी अमरपुरी । ऐसी आज्ञा भरतें शिरीं । सौमित्रासहित वंदिली ॥ १९ ॥ दोघां पुत्रां अभिषिंचून । सवें घेवोनि अनेक सैन्य । अंगद पुढारां करून । लक्ष्मण वीर निघाला ॥ २० ॥ चंद्रकेतूसी धरोनि करीं । भरत निघे ते अवसरीं । चंद्रावतीनामें पुरी । उत्तरदिशे वसविली ॥ २१ ॥ तेथें स्थापोनि चंद्रकेत । वर्षपर्यंत राहिला भरत । राजे करोनि आज्ञांकित । सुनिश्चित राज्य केलें ॥ २२ ॥ सबळ देखोनि चंद्रकेत । श्रीरामभेटी निघाला भरत । तैसें अंगदा सुमित्रासुत । मग स्थापिता झाला ॥ २३ ॥ अंगद नामें वसवोनि पुर । तेथें स्थापिला अंगद वीर । लक्ष्मण राहोनि एक संवत्सर । पुत्राचिया पैं राज्यीं ॥ २४ ॥ अंगद देखोनि प्रतापें पुरा । संतोष झाला लक्ष्मणवीरा । तेथोनि चालिला श्रीरघुवीरा । भेटावयाकारणें ॥ २५ ॥ लक्ष्मण भेटला श्रीरामासी । निरूपिलें सर्व वृत्तांतासी । सवेंचि भरतें अग्रजासी । येवोनियां नमस्कारिलें ॥ २६ ॥ जाणविला सर्व वृत्तान्त । ऐकोनि तोषला श्रीरघुनाथ । दोघां बंधूंसी आलिंगीत । उल्हास चित्तीं न समाये ॥ २७ ॥ भरत आणि लक्ष्मण । श्रीरामसेवे सुखसंपन्न । असतां कित्येक वर्षें क्रमोन । बहुकाळ लोटला ॥ २८ ॥ चौघे बंधु अति प्रीतीं । स्वधर्में करिती राजनीती । अधर्म द्वंद्व देशाप्रती । जन नेणती स्वप्नींही ॥ २९ ॥ घरोघरीं नित्य नवा सोहळा । दरिद्र नेणती कोणे काळा । सुखस्वानंद लोकां सकळां । राज्यीं असतां श्रीराम ॥ ३० ॥

ततः काले तु कस्मिंश्चिद्रामे धर्मपरे स्थिते ।
कालस्तापसरूपेण रामं द्रष्टुमुपागतः ॥ ९ ॥
सोऽब्रवील्लक्ष्मणं वाक्यं धृतिमंतं मनस्विनम् ।
निवेदयस्व रामाय संप्राप्तं कार्यगौरवात् ॥ १० ॥
दूतो ह्यतिबलस्याहं महर्षेरमितौजसः ।
दिदृक्षुरागतो रामं त्वरितं मां निवेदय ॥ ११ ॥
तस्य तद्वचनं श्रुत्वा सौमित्रिस्त्वरयान्वितः ।
आचचक्षे स रामाय तं संप्राप्तं तपोधनम् ॥ १२ ॥

श्रीराम स्वधर्मस्थिती । रत असतां द्वारीं लक्ष्मणाप्रती । दूत येवोनि निजस्थिती । सांगता झाला ते समयीं ॥ ३१ ॥ श्रीरामदर्शनालागून । येथें झालें माझें आगमन । आणिक असे कार्यकारण । मी बळवान पैं आलों ॥ ३२ ॥ मी तापसी बुद्धिमंत । श्रीरामभेटीचें परम आर्त । लक्ष्मणा जाणवावी मात । श्रीरघूत्तमरायासी ॥ ३३ ॥ मी आलों असें कार्यार्थी । लक्ष्मणा जाण निश्चितीं । मात जाणवीं श्रीरघुपती । जेथें असेल तेथें जाईं ॥ ३४ ॥ ऐसें मुनीचेनि मुखानिळें । वचन परि-

१ योजिला. २ हे भरता. ३ ऊर्मिला=लक्ष्मणाची स्त्री. ४ वडील बंधूला (रामाला). ५ कलह. ६ इच्छा. ७ कार्य योजून. ८ तोंडून (अनिल=वायु).

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

सोनि सुमित्राबाळें । शीघ्रवत चालिला जेथें भूपाळें । श्रीरामचंद्रें असिजे पैं ॥ ३५ ॥ प्रणिपात करोनि श्रीरघुपतीसी । जाणविलें सर्व वृत्तान्तासी । द्वारीं दूत तुमचे भेटीसी । तिष्ठतसे राजेंद्रा ॥ ३६ ॥ धरोनियां मुनीचा वेष । द्वारीं तिष्ठतसे तापस । तुमच्या दर्शनाची आसं । पहातसे श्रीरामा ॥ ३७ ॥ सौमित्र ऐसें बोलिल्यावरी । ऐकोनि श्रीराम आज्ञा करी । म्हणे जावोनि झडकरी । दूत पाचारीं भेटीसी ॥ ३८ ॥ अग्रजंमुखींचें होतां वचन । परिसोनि सुमित्रानंदन । वेगीं द्वारासी येऊन । भीतरीं दूतासी पैं नेलें ॥ ३९ ॥

तेजसा तपसा चैव ज्वलंतमिव पावकम् ।
सोऽभिगम्य नरश्रेष्ठं दीप्यमानं स्वतेजसा ॥ १३ ॥

तो दूत म्हणाला कैसा । कीं तेजाचा सूर्य जैसा । कीं तापसांमाजी सहसा । अग्नीसारिखा भासतसे ॥ ४० ॥ आपुलिया प्रभेकरून । पुढें न्यून झाला तपॅन । ऐसा श्रीरामासंमुख येऊन । श्रीरामें देखिलें तयातें ॥ ४१ ॥ परस्परें देवोनि आलिंगन । कुशल उभयतां पुसोन । श्रीराम करिता झाला प्रश्न । कोठोनि येणें मुनिराजा ॥४२॥ कोणे कार्यालागूनि मुनी । आलेति मज कृपा करोनी । जीवींचें सांगावें वचनीं । आलेति कोठोनि द्विजवर्या ॥ ४३ ॥ मृदु मंजुळ श्रीरामवाणी । परिसोनि बोलता झाला मुनी । म्हणे राया ज्या कार्यालागूनी । आलों असें महापुरुषा ॥४४ ॥ तें गुह्य आहे कथन । एकांतीं करावें श्रवण । ऐसें ऐकोनि रघुनंदन । सौमित्रा आज्ञापिता जाहला ॥ ४५ ॥

द्वारे तिष्ठ महाबाहो प्रतिहारं विसर्जय ।
स मे वध्यः खलु भवेद्वाच्यं वां
शृणुयाच्च यः ॥ १४ ॥

द्वारीं बैसोनि लक्ष्मणा । पुरुषांमाजी पंचानना । द्वारपाळां आज्ञापोनि सुजाणा । आपण तेथें बैसावें ॥ ४६ ॥ भीतरीं न येवों द्यावें कोणी । आपण सावध बैसोनी । जंवपर्यंत हा मुनी । मजसीं संवाद करीतसे ॥ ४७ ॥ मुनीची आज्ञा संवादकथा । एकांतीं बैसोनि करूं वार्ता । तंवपर्यंत सुमित्रासुता । कोणा भीतरीं येवों नेदीं ॥ ४८ ॥ द्वारीं बैसवोनि लक्ष्मण । मुनि आणि श्रीरघुनंदन । कथिते झाले पूर्वकथन । सावधानें करोनी ॥ ४९ ॥

शृणु राजन्यथा सत्यं यदर्थमहमागतः ।
पितामहेन देवेन प्रेषितोऽस्मि तवांतिकम् ॥ १५ ॥
अहं हि पूर्वके भावे पुत्रस्तव परंतप ।
मायासंभावितो वीरः कालः सर्वहरः परः ॥ १६ ॥
पितामहस्त्वां भगवानाह लोकपतिः प्रभुः ।
समर्थस्ते महाराज लोकान् स परिरक्षितुम् ॥ १७ ॥

सौमित्र बैसोनि महाद्वारीं । श्रीराम आणि मुनि भीतरीं । विचार करिते झाले ते अवसरीं । शैलारि गुरूसीं जैसा ॥ ५० ॥ काळपुरुष म्हणे राजचूडामणी । मी आलों ज्या कार्यालागूनी । तें सत्य जाणा आपुले मनीं । विचारोनी विवेकें ॥ ५१ ॥ त्रैलोक्यपिता चतुरानन । मज पाठविलें तेणें जाण । तुजपासीं तद्वचन । निवेदीन राजेंद्रा ॥ ५२ ॥ पूर्वी मी तुझा पुत्र । महाराजा जाण सत्य । माझा पराक्रम अद्भुत । सावचित्त अवधारीं ॥ ५३ ॥ काळ ऐसें माझें अभिधान । तूं काळात्मा जाण सनातन । काळानुसारें जैं प्राणिजन । तयांचा संहारकर्ता मी असें ॥ ५४ ॥ मी सूर्याचा निजकुमर । तूं सूर्यवंशींचा नृपवर । आणि सकळ सृष्टीचा ईश्वर । सृजन पाळण संहार तूं कर्ता ॥ ५५ ॥ पितामह जो विधाता । तुज पूजितो श्रीरघुनाथा । आणि देवगुरु जी समर्था । ध्येय तूं म्हणोनियां ॥ ५६ ॥ ब्रह्मादिकांचा जो ईश । तो तूं श्रीराम परमपुरुष । तुझिये मायेचा विलास । अनंत ब्रह्मांडें घडीमोडी ॥ ५७ ॥ जैसा ऊर्णांचा सूक्ष्मतंत । तया क्रीडे स्वेच्छाभूत । खेळ सरलिया ग्रासीत । तंतूतें पैं जैसा ॥ ५८ ॥ तैसी तुझे मायेची अपूर्वता । ब्रह्मांडादि रची भूतां । संहारकाळीं समर्था । जग तुजमाजी सामावे ॥ ५९ ॥ जैसा रवि जीमूतद्वारें । वार्षिकीं अपार वर्षे नीरें । ग्रीष्मीं शोषी किरणें थोरें । पसरोनियां

१ इच्छा. २ वडील बंधूच्या तोंडून. ३ सूर्य. ४ पुरुषश्रेष्ठा. ५ हे बुद्धिवंता (लक्ष्मणा). ६ इंद्र. ७ बृहस्पतीशीं. ८ ब्रह्मदेव. ९ नांव. १० उत्पत्ति. ११ कोळ्याचा. १२ मेघाकडून. १३ पावसाळ्यांत.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

पृथ्वीवरी ॥ ६० ॥ तैसा अनंत ब्रह्मांडांचा ईश्वर । लीलेनें धरिला रामावतार । फेडोनियां पृथ्वीचा भार । रावणादिक वधोनी ॥ ६१ ॥ यापूर्वी मधुकैटभासुर । शुंभ निशुंभ कोल्हासुर । लवणासुरादि थोर थोर । मारोनि सुर सुखी केले ॥ ६२ ॥ अकरा सहस्र वर्षेंपर्यंत । राज्य केलें स्वस्थचित्त । आतां समयीं वाट पाहत । स्वर्गी देव असती जी ॥ ६३ ॥ तुमच्या दर्शनाची उत्कंठा । थोर लागली नीळकंठा । चतुर्मुख जो स्रष्टा[1] । तोही वाट पाहातसे ॥ ६४ ॥ इंद्रादि देव सुरगण । सिद्ध गंधर्व विद्याधर चारण । समस्त सुर मिळोन । विवंचना करिती भेटीची ॥ ६५ ॥ जरी राज्याची इच्छा असेल मनीं । तरी सुखें राहावें कोदंडपाणी । स्वर्गींचे देव तुजवांचोनी । शोभत नाहींत महाराजा ॥ ६६ ॥ हा काळपर्यंत राजेश्वरा । हे प्रतिपाळिली वसुंधरा[2] । आतां स्वर्गी येवोनि किंकरां[3] । निजदासांतें तारावें ॥ ६७ ॥ सुरवरांच्या कार्यालागून । तुझें येथें झालें आगमन । ऐसें बोलोनि चतुरानन । विवंचन करीतसे ॥ ६८ ॥ ऐसें काळमुखींचें उत्तर । परिसोनियां श्रीरघुवीर । हास्य करोनियां स्थिर । दूतासी बोलता झाला ॥ ६९ ॥ श्रीराम म्हणे गा रविसुता[4] । पराक्रमिया गुणवंता । तुवां जावोनियां विधाता । बरवेपरी बोधावा ॥ ७० ॥ त्वरित जावें ब्रह्मलोकासी । ऐसें वसे माझे मानसीं । किंचित कार्यकर्तव्यासी । करणें आहे मजलागीं ॥ ७१ ॥ तें कार्य संपादोनि जाण । अवश्य स्वर्गासी येईन । मी देवांचा आज्ञाधारक पूर्ण । वर्तें चित्तासारिखा ॥ ७२ ॥ तंव येरीकडे दुर्वासमुनी । महाद्वाराजवळी येऊनी । जेथें लक्ष्मण होता त्याप्रति वचनीं । बोलता झाला ते समयीं ॥ ७३ ॥ श्रीरामदर्शनालागून । सौमित्रा मी आलों जाण । वेगीं जाणीव दे जावोन । रघुनंदन जे स्थानीं ॥ ७४ ॥ दुर्वास ऐसें बोलिल्यावरी । लक्ष्मण म्हणे स्वामी क्षणभरी[5] । स्थिर व्हावें रावणारी । भेटी येईल तुमचिये ॥ ७५ ॥ अवसर नाहीं श्रीरघुवीरा । एकांतीं करिती विचारा । तुम्ही बैसोनि क्षणैक धीर धरा । कृपा करा मजवरी ॥ ७६ ॥ एकांतीं श्रीराम आणि ऋषी । संवाद करिती परस्परेंसीं । तेथें मज जातां कोप रामासी । क्षणामाजी येईल ॥ ७७ ॥ तुम्हीं नावेकें स्वस्थ चित्त कीजे । उपरी भेटी देईजेल रघुराजें । ऐसें ऐकोनि अत्रितनुज[6] । लक्ष्मणासी क्रोधें वदे ॥ ७८ ॥

तं श्रुत्वा मुनिशार्दूलः क्रोधेन कलुषीकृतः ।
उवाच लक्ष्मणं वाक्यं निर्दहन्निव चक्षुषा ॥ १८ ॥
अस्मिन्क्षणे तु सौमित्रे रामं मा दर्शयिष्यसि ।
विषयं च पुरं चैतद्दहिष्ये राघवं तथा ॥ १९ ॥
भरतं वा च सौमित्रे युष्माकं चैव संततिम् ॥ २० ॥

लक्ष्मणाचें वचन परिसोनी । उद्विग्न झाला दुर्वासमुनी । क्रोधें थरथरां कांपे मेदिनी । भरतें आलें तमाचें ॥ ७९ ॥ नेत्र करोनि आरक्त । हातें हात असे घांसीत । दंतें ओष्ठ चावीत । गात्रें कांपत सक्रोध ॥ ८० ॥ ऐकें सुमित्रानंदना । येचि क्षणीं भेटवीं श्रीरघुनंदना । नाहीं तरी अयोध्याभुवना । क्षणामाजि जाळीन ॥ ८१ ॥ तदनंतर श्रीरघुनाथ । जाळीन तुजहीसमवेत । आणिकही शत्रुघ्न भरत । हेही दाहीन निमिषार्धें ॥ ८२ ॥ करीन ब्रह्मांडाची होळी । सूर्यवंश मेळवीन धुळी । पुत्रपौत्रांसहित ये काळीं । भस्म करीन श्रीरामा ॥ ८३ ॥ ऐसें दुर्वास बोलिल्यावरी । लक्ष्मण दीर्घ चिंता करी । म्हणे मरण दोहींपरी । मजलागीं ओढवलें ॥ ८४ ॥ येरीकडे[9] अग्निमहाप्रळय । उभा एकीकडे शार्दूळ[10] । तैसें मज झालें केवळ । ऋषि कोपें उभा असे ॥ ८५ ॥ श्रीरामा न जाणवितां मात । ऋषि करील भस्मीभूत । सूर्यवंश होईल शांत[11] । ऐसा अनर्थ ओढवला ॥ ८६ ॥ गेलिया श्रीरामाजवळी । क्रोधें श्रीराम करील होळी । तरी मी एकलाचि महीतळीं । त्यागोनि स्वर्गा जाईन ॥ ८७ ॥ चुकलें सर्वांचें महाविघ्न । मी एकाकी पावेन मरण । ऐसा निश्चय करोनि नंदन[12] । सुमित्रेचा निघाला ॥ ८८ ॥ येवोनियां श्रीरामाजवळी । प्रणिपात करोनि बद्धांजळी । जोडोनि कर ते काळीं । श्रीरामासी विनविता झाला ॥ ८९ ॥

१ ब्रह्मदेव. २ पृथ्वी. ३ सेवक अशा. ४ यमा. ५ क्षणभर. ६ दुर्वासऋषि. ७ हे लक्ष्मणा ! ८ जाळून टाकीन.

९ एकीकडे. १० वाघ. ११ नष्ट. १२ सौमित्र (लक्ष्मण).

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

लक्ष्मण म्हणे जी भूपाळा । द्वारीं दुर्वास तिष्ठत या काळा । तुमचे भेटीलागीं दयाळा । येवोनियां उभा असे ॥ ९० ॥ अत्रिपुत्र दुर्वासमुनी । तिष्ठत दर्शनालागूनी । मज पाठविलें त्वरेंकरोनी । तुम्हां श्रुत करावया ॥ ९१ ॥ लक्ष्मण ऐसें बोलिल्यानंतरें । काळासी विसर्जोनि रघुवीरें । अर्घ्यपात्र घेवोनि करें । द्वाराजवळी पैं आला ॥ ९२ ॥ ऋषीस श्रीरामा झाली भेटी । आनंद न समाये सृष्टीं । मग पूजा करोनि जगजेठी । ऋषि भवनासी आणिले ॥ ९३ ॥ देवोनियां वरासन । श्रीराम करिता झाला विनवण । म्हणे स्वामी कृपा करून । कोणीकडे आलेती ॥९४॥ काय अपूर्व वाटलें चित्ता । म्हणोनि आलेत्ति ऋषिसमर्था । तें आज्ञापिजे मज रघुनाथा । कृपा करोनि मुनिराया ॥ ९५ ॥ दाशरथीचें ऐसें उत्तर । अमृताहूनि अधिक मधुर । ऐकोनि दुर्वास ऋषीश्वर । संतोष थोर पावला ॥ ९६ ॥ म्हणे श्रीरघुनंदना । धन्य रविवंशीं कुळभूषणा । मी मागों आलों भोजना । क्षुधातुर होवोनी ॥ ९७ ॥ क्षुधा बाधीत मज भारी । ऐसें जाण नृपकेसरी । तंव श्रीराम म्हणे स्नान झडकरी । सारोनि भोजन करावें ॥ ९८ ॥ झालासे माध्यान्हसमयो । मग स्नान करोनि महाबाहो । संध्या करोनि वैश्वदेवो । देवपूजा संपादिली ॥ ९९ ॥ पंक्ती दुर्वास बैसवोनी । भोजन सारिलें चौघां जणीं । तांबूल देवोनि नाना आभरणीं । ऋषीश्वर पूजिला ॥ १०० ॥ ऋषीश्वराचें झालें भोजन । वस्त्रें अलंकार भूषण । समर्पोनि श्रीरघुनंदनें । सुखासनीं बैसविला ॥ १ ॥ अवतारसमाप्तीचें कथनचरित्र । आठवोनि श्रीरघुनाथ । मुनि आज्ञापोनि त्वरित । चिंतातुर पैं झाला ॥ २ ॥ हीन दीन गेली कळा । हृदयीं बंधुवियोग आगळा । कांहीं न स्मरे तया वेळा । तेणें संतप्त मानस ॥ ३ ॥ जेंवी अमावास्येचे दिनीं । कळे तुटे चंद्र गगनीं । तैसा राम शरासनपाणी । निवान्त राहिला ते समयीं ॥ ४ ॥ जेंवी ग्रीष्मऋतूच्या आगमनीं । सरिता शोषे आटे पाणी । तैसा श्रीराम चिंतातुर मनीं । अधोदृष्टी राहिला ॥५॥ ऐसा देखोनि श्रीरघुनाथ । पुढें उभा ठाकला सुमित्रासुत । बोलता झाला स्वामी किमर्थ । चिंतातुर तुम्ही असां ॥ ६ ॥ किमर्थ चिंतातुर तुम्ही । तेणें उद्विग्न होतों आम्ही । जो जो अवतार जे जे कामीं । तें तें कार्य संपादित ॥ ७ ॥ जेंवी बहुरूपी सोंग संपादी । हावभाव नाना विनोदीं । रंजवोनि जनांची मांदी । आपण वेगळा पैं असे ॥ ८ ॥ तैसा तूं योगियांचा ईश्वरू । त्रैलोक्याचा आदिगुरू । तूं कार्यकर्ता लीलावतारू । सुरकार्यालागीं वरिसी पैं ॥ ९ ॥ घेवोनि मायेचें पांघरूण । दाविसी लोकांलागून । परी तूं सत्य श्रीरघुनंदन । मायें खेद करितोसी ॥ ११० ॥ सत्यप्रतिज्ञ म्हणविता । अंतर पडलें या वचनार्था । ऐसें जाणोनि श्रीरघुनाथा । शंका चित्ता स्पर्शों नेदीं ॥ ११ ॥ प्रारब्धाधीन वर्ते प्राणी । तयाचें कर्तृत्व मिथ्या मानीं । आणि जें वदला वाल्मीकमुनी । तया वचना तुळंघीं ॥ १२ ॥ जननीचिया जठरीं । जो जन्मला देहधारी । तो काळाधीन वर्ते उपरी । कार्यकर्तृत्व त्या मायेचें ॥ १३ ॥ यालागीं श्रीरामा । अवतारपुरुषा गुणधामा । आज्ञा देवोनि कांहीं आम्हां । कार्या निवेदन करावें ॥ १४ ॥ मज स्वामी आज्ञा दीजे । प्रतिज्ञा आपुली सत्य कीजे । आपुलें पूर्णपण प्रकटिजे । उद्वेगरहित होवोनी ॥ १५ ॥

लक्ष्मणेनैवमुक्तस्तु रामः प्रचलितेंद्रियः ।
मंत्रिणः समुपानीय वसिष्ठं च पुरोहितम् ॥ २१ ॥

ऐसें लक्ष्मण बोलिल्यावरी । ऐकोनि श्रीराम ते अवसरीं । चिंतातुर व्याकुळ भारी । अंग कांपे थरथरां ॥ १६ ॥ नेत्रीं अश्रु लोटत । अंगीं बाष्प कंठ सद्गदित । बोलतां वाचा वळत । प्रधानांसी आज्ञा देता झाला ॥ १७ ॥ अगा सुमंत प्रधाना । जावोनि श्रीगुरूच्या भवनां । निवेदावें माझिया वचना । श्रीरामचंद्रें बोलाविलें ॥ १८ ॥ राघवाज्ञा वंदोनि शिरीं । सुमंतें जावोनि झडकरी । वसिष्ठासी नमस्कारोनि राजेश्वरीं । भेटीलागीं पाचारिलें सांगे ॥ १९ ॥ प्रधान ऐसें बोलिल्यानंतरें । खुणे पावोनि ऋषीश्वरें । तत्काळ येवोनियां चतुरें । श्रीरामासी देखिलें ॥ १२० ॥ दाशरथी देखिला कैसा । दुःखाचा ओंतीव मेरु जैसा । कां चिंतेचा चितारिला ठसा । नयनीं भासला ऋषिवर्या

---

१ उच्च आसन. २ हातीं धनुष्य असा. ३ नदी. ४ खालीं पहात. ५ काय म्हणून. ६ समुदाय. ७ उल्लंघूं नको. ८ प्राणी. ९ आश्रमाला. १० बोलाविलें. ११ मूर्तिमंत.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥ २१ ॥ बाह्य देखिला ऐसिये दृष्टी । अंतरींची देखणी परिपाटी । श्रीरामें पूर्ण कोंदली सृष्टी । तेजें जगजेठी हेलावत ॥ २२ ॥ बाह्य नेत्रीं अश्रूंचा पूर । अंतरीं आनंदाचा निर्भर । बाह्यबुद्धी वियोगशर । भेदले दिसती सर्वांगीं ॥ २३ ॥ अंतरीं राम दिसे कर्ता । बाह्य दाखवी चरित्रा । ऐसें देखोनि वसिष्ठचित्ता । आश्चर्यता वाटली ॥ २४ ॥ वसिष्ठ म्हणे श्रीरघुनंदना । आठवीं आठवीं आपुली पूर्वप्रतिज्ञा । अवताराचे आधींची संज्ञा । विसरलासी दिसतसे ॥ २५ ॥ संसार म्हणिजे गंधर्वजाळ[1] । विचारितां दिसे मृगजळ । जैसें कां वंध्येचें बाळ । काय कोठें भेटलें ॥ २६ ॥ यदर्थीं[2] एक ऐक कथा । सांगतों या संसारदृष्टांता । बागूलगृहीं गर्भिणी पोसितां । वंध्या नामें पैं होती ॥ २७ ॥ तियेचे उदरीं जन्मला पुत्र । अतिलक्षणिक गुणवंत । पितयासारिखा पराक्रमी बहुत । दिवसेंदिवस वाढला ॥ २८ ॥ शुक्तीच्या[3] रजताचीं[4] भूषणें । गगनींची कमळमाळा तेणें । घालोनि गळां अति सत्राणें[5] । जननीतें श्रमविलें ॥ २९ ॥ घेवोनि मातेच्या आज्ञेतें । पारधी निघाला वनातें । तंव० सशाचें शिंग तयातें । प्राप्त झालें श्रीरामा ॥ १३० ॥ तेंचि शस्त्र घेवोनि करीं । पुढें येतां ते अवसरीं । मृगजळाचे सरोवरीं । पारधीलागूनि गुंतला ॥ ३१ ॥ ऊर्णतंतूंचें[6] जाळें घेवोनि करीं । रिघाला तया सरोवरीं । मीन धरोनि नानापरी । बाहेर येत पैं होता ॥ ३२ ॥ तंव तेथें झालें विपरीत । सुसरीनें गिळिला वांझेचा सुत । तयाचे जे पुत्रपौत्र । शुद्धीलागीं[7] निघाले ॥ ३३ ॥ आले तया सरोवरासी । पुढें देखिलें दिगंबरआश्रमासी । शुद्धि पुसते झाले त्यासी । ऐकोनि मुनि कोपला ॥ ३४ ॥ परस्परें झाला संग्राम । भिडते झाले क्रोधें परम । घायीं पडले पावोनि श्रम । गतप्राण पैं झाले ॥ ३५ ॥ तयांचें वांझेसी झालें दुःख । रुदन करी दीर्घ शोक । तैसा हा संसार मायिक । काय सत्य मानिजे ॥ ३६ ॥ यालागीं जी रघुनाथा । बंधुवियोगाची न करीं चिंता । सत्यप्रतिज्ञ या वचनार्था । मान दीजे राजेंद्रा ॥ ३७ ॥ ऐकोनि श्रीगुरूची गोष्टी । श्रीरामा सुख झालें पोटीं । भ्रूलतासंकेतें[8] धूर्जटी[9] । लक्ष्मणासी आज्ञा देता झाला ॥ ३८ ॥ श्रीराम म्हणे लक्ष्मणा । वधायोग्य देखिलें अवगुणा । तरी वधूं नये बंधुजना । धर्मशास्त्र पैं असे ॥ ३९ ॥ माझी अंवज्ञा[10] करून । भीतरीं आलासी दुर्वास आला म्हणोन । ऐसिया अपराधातें द्यावा जी प्राण । मुख मज न दाखवीं ॥ १४० ॥ भ्रूलतासंज्ञेची जाणोनि खूण । काय करिता झाला लक्ष्मण । श्रीरामासी नमस्कारून । प्रदक्षिणा पैं केली ॥ ४१ ॥ नमन करोनि श्रीगुरूसी । आज्ञा पुसोनि समस्तांसी । येवोनि शरयूचे तीरासी । स्नानसंध्या सारिली ॥ ४२ ॥ घालोनियां पद्मासन[11] । हृदयीं धरोनि श्रीरघुनंदन । आकर्षोनि पंचप्राण । निजदेह विसर्जिला[12] ॥ ४३ ॥ जैसें कवच सांडी भुजंग[13] । कीं हंस त्यजी तडागें[14] । तैसा सुमित्रेचा गर्भ लिंग- । -देह त्यागिता पैं झाला ॥ ४४ ॥ सौमित्र त्यजी निजदेहो । गेला पाताळासी पहा हो । जेथें कद्रु[15]सुतांचा समुदावो । तया लोका पावला ॥ ४५ ॥ लक्ष्मण केवळ शेषावतार । श्रीरामाच्या कार्या तत्पर । होवोनियां लीला थोर । समस्तांसी दाविली ॥ ४६ ॥ जैसी स्वामीची आज्ञा लाहोनी[16] । भृत्य प्रवेशे निजभवनीं । तैसा सौमित्र निजस्थानीं । श्रीरामवचनें पैं गेला ॥ ४७ ॥ एका जनार्दना शरण । पाताळीं प्रवेशला लक्ष्मण । पुढील अवतारसमाप्तीचें कथन । सादर श्रवण करावें ॥ ४८ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां लक्ष्मणपातालगमनं नाम पंचसप्ततितमोऽध्यायः ॥ ७५ ॥ ॥ ओंव्या ॥ ॥ १४८ ॥ श्लोक ॥ २१ ॥

अध्याय शहात्तरावा

॥ श्रीविश्वजीवनाय नमः ॥

विसृज्य लक्ष्मणं रामस्तीव्रशोकसमन्वितः ।
वसिष्ठं मंत्रिणं चैव नैगमांश्चेदमब्रवीत् ॥ १ ॥
अद्य राज्येऽभिषेक्ष्यामि भरतं भ्रातृवत्सलम् ।
अयोध्यायाः पतिं वीरं ततो यास्याम्यहं वनम् ॥ २ ॥

लक्ष्मणें सांडोनि इहलोक । पाताळ सेविता झाला देख । तें देखोनि रघुनायक । शोकार्णवीं

१ मिथ्याभास. २ ज्यासंबंधीं. ३ शिंपीच्या. ४ रुप्याचीं. ५ आवेशानें. ६ कोळ्याचें. ७ शोध. ८ भिंवईच्या खुणेनें. ९ योगी. १० अपमान. ११ आसनविशेष. १२ टाकिला. १३ सर्प. १४ सरोवर. १५ सर्पांचा. १६ संपादून.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

बुडाला ॥ १ ॥ श्रीराम म्हणे लक्ष्मणा । मज सांडोनि गेलासी गुणनिधाना । काय अपराध देखोनि मना- । -माजी निष्ठुर झालासी ॥ २ ॥ लक्ष्मणा काय मी चुकलों । कोण अपराध आचरलों । किंवा निष्ठुर बोलिलों । म्हणोनि रुसलासी सौमित्रा ॥ ३ ॥ मजबरोबरी वनांतरीं । हिंडतां श्रमलासी बा भारी । द्वादश वर्षें निराहारी । अन्न उदक त्यजियेलें ॥ ४ ॥ म्हणोनि कोपलासी वेल्हाळा[१] । सुमित्रेच्या लघु बाळा । आतां मुख दाखवीं एक वेळा । मज दुःखिता देखोनी ॥ ५ ॥ जैं शक्ति घातली रावणें । तैं दुखविलासी निजप्राणें । तो राग धरोनियां मनें । मज त्यागून गेलासी ॥ ६ ॥ आतां काय करूं बंधुराया । माझ्या जीवींच्या विसांव्या । मज एकलें सांडोनियां । केउता[२] गेलासी वनवासा ॥ ७ ॥ जानकीनें पंचवटिकेसी । छळिलें म्हणोनि कोपलासी । यालागीं निष्ठुर झालासी । मजवरी बंधुराया ॥ ८ ॥ तुवां इंद्रजित मारिला । त्रैलोक्यासी आनंद झाला । तो तूं रागें सांडोनि मजला । देह त्यागूनि गेलासी ॥ ९ ॥ ऐसी श्रीरामाची करुणवाणी । तेणें दुःखें फुटे अवनी । पक्षी चारा न घेती नयनीं । अश्रूंचे पूर लोटले ॥ १० ॥ स्तब्ध अयोध्येचे जन । स्तब्ध सेना सैनिक प्रधान । कोणा कांहीं न स्मरे जाण । लक्ष्मणवियोगाकारणें ॥ ११ ॥ श्रीराम म्हणे गुरूसी । आणि मंत्रियां समस्तांसी । आजी अभिषेक भरतासी । अयोध्येचा पैं कीजे ॥ १२ ॥ भरता राज्यीं बैसवीन । मीही करीन येथूनि गमन । जेणें मार्गें लक्ष्मण । गेला असेल ते ठायीं ॥ १३ ॥ लक्ष्मणावांचोनि माझे प्राण । सर्वथा न राहती निश्चयें जाण । ऐसें ऐकोनि सभाजन । मूर्च्छागत झाले भरतेंसीं ॥ १४ ॥ मूर्च्छित झाले सभालोक । मूर्च्छित भरत झाला देख । त्याउपरी सावधान नावेक[३] । होवोनि ठेला ते समयीं ॥ १५ ॥ भरत म्हणे श्रीरामा । राज्यीं चाड नाहीं आम्हां । तुजमागें संसारधर्मा । पडे तो जाण आत्मघाती ॥ १६ ॥ तुजवीण विषयभोग । तोचि प्राणियासी क्षयरोग । जे तुजसीं विमुख करिती भोग । तोचि रोग तयांसी ॥ १७ ॥ तुज त्यागोनि राज्य करणें । हेंचि मूळ नरका जाणें । वेगळें मागें राहणें । उबगवाणें संसारीं ॥ १८ ॥ तुझिये चरणाचे प्राती- । -कारणें योगी योग साधिती । त्या तुज त्यागूनि श्रीरघुपती । कोण अभागी राहील ॥ १९ ॥ लक्ष्मणामागें तूं जासी । आम्ही त्यागूं निजप्राणांसी । नाहीं तरी आपुले कांसेसी । लावोनियां सवें न्यावें ॥ २० ॥ तूं लक्ष्मणवियोगें झालासी दीन । उभयतांचे वियोगेंकरून । न राहती श्रीरामा सत्य प्राण । न सोडूं जाण तुजलागीं ॥ २१ ॥ जिकडे तूं करिसी गमन । तिकडे आम्ही येऊं जाण । आम्हां राज्याची चाड कोण । तुजवेगळें सर्व नैश्वर्य[६] ॥ २२ ॥ ऐसा भरताचा निश्चय । जाणता झाला जानकीप्रिय । आणि नगरजनांचें हृदय । कळों सरलें राजेंद्रा ॥२३॥ भरत म्हणे श्रीरामा जाण । तूं जरी स्वर्गा करिसी गमन । तरी आम्ही तेथें करूं प्रयाण । निश्चय पूर्ण जाणावा ॥ २४ ॥ हे लहु कुश दोघे कुमार । अभिषिंचोनि करावे राज्यधर । कोशलनामें वसवोनि नगर । तेथें कुश स्थापावा ॥ २५ ॥ उत्तरे स्थापावा लहु कुमर । जो युद्धीं परम शूर । अरिरायाँवरी तोडँर । जेणें बांधिला बिरुदेंशीं[७] ॥ २६ ॥ ऐसें भरत बोलिल्यावरी । दूत पाचारिला रामें ते अवसरीं । म्हणे तूं जाय मधुपुरीं । शत्रुघ्नासी भेटावें ॥ २७ ॥ आमुचें महाप्रस्थान । करितों स्वर्गाप्रति गमन । तरी ऐसें समस्त निवेदोन । आणीं शत्रुघ्न भेटीसी ॥ २८ ॥ ऐसें श्रीरामें निवेदिल्यावरी । दूत आज्ञा वंदोनि शिरीं । नमस्कारोनि दूषणारी । शीघ्रवत निघाला ॥ २९ ॥ मनीं धरोनि श्रीरामवचन । दूत मधुपुरा करितां गमन । मागें काय वर्तलें तें सावधान । श्रवण कीजे श्रोते हो ॥ ३० ॥ श्रीरामाचें गमनकार्य । हें ऐकोनि जनसमुदाय । मूर्च्छित झाले राजे आणि ऋषिवर्य । थोर दुःख पावले ॥ ३१ ॥ प्रधान म्हणती श्रीरघुनाथा । ऐकें नगरींच्या जनांची कथा । म्हणती श्रीराम स्वर्गा जातां । आमुचें राहूनि कोण कार्य ॥ ३२ ॥ श्रीरामामागें अयोध्यापुरी- । -माजी वसेल तो दुराचारी । ऐसा निश्चय रावणारी । थोरथोरीं केला असे ॥ ३३ ॥ तुवां येथें प्रतिपाळिले । प्रतापेंकरोनि रक्षिले । कृपादृष्टीनें अवलोकिले । अयोध्यावासी

१ हे सुंदरा. २ कोठें. ३ क्षणभर. ४ आवड. ५ दुःखकारक. ६ अशाश्वत. ७ शत्रूवर जय. ८ कीर्तिपूर्वक.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

जन सर्व ॥ ३४ ॥ ते अयोध्येसी रामेंवीण । सर्वथा आम्ही न राहूं जाण । ऐसे समस्त नगरींचे जन । निश्चय करोन राहिले ॥ ३५ ॥ ऐसी श्रीरामें प्रधानमुखींची गोष्टी । ऐकोनियां सुखसंतुष्टी । निश्चय जाणोनियां पोटीं । भरतासी बोलता झाला ॥ ३६ ॥ श्रीराम म्हणे राया भरता । धर्मवंता उदारचित्ता । कुश लहु अभिषिंचोनि शीघ्रता । विलंब सर्वथा करूं नको ॥ ३७ ॥ यज्ञशेष करितां भोजन । कैकेयी मातेसी झालें विघ्न । तैसा समय ओढवला जाण । व्यवधान न साहे ॥ ३८ ॥ ऐसें श्रीरामसुखींचें वचन । भरतें माथां वंदोनि जाण । तत्काळ पुत्रां अभिषिंचून । राज्य देता पैं झाला ॥ ३९ ॥ कुश उत्तरे कोशलेप्रती । जे कां विंध्यशैलाचिये प्रांतीं । कुशवती नामें त्रिजगतीं । विख्यात असे प्रसिद्ध ॥ ४० ॥ लहुवाकारणें रम्य जाण । श्रीवतीनामें प्रसिद्ध पूर्ण । तेथें स्थापिला देवोनि सैन्य । अगणित धन दीधलें ॥ ४१ ॥ ऐसे दोघे कुमर । श्रीरामें केले राज्यधर । सैनिकसेनापरिवार । प्रधान चतुर सर्वें देऊनी ॥ ४२ ॥ येरीकडे तो निघाला दूत । मार्गीं क्रमोनि त्रिरात्र । पुढें प्रवेशला शत्रुघ्न जेथ । राज्य करीत मधुपुरीचें ॥४३॥ दूत मधुपुरीं प्रवेशला । शत्रुघ्नरायासी भेटला । वृत्तान्त अवघा जाणविला । श्रीरामाचा परियेसा ॥ ४४ ॥ ऐकोनि शत्रुघ्न ते समयीं । परम दुःखित झाला पाहीं । म्हणे विधातिया तुवां कांहीं । निर्माण केलें चरित्र हें ॥ ४५ ॥ म्हणे कुळक्षयो आरंभिला । सूर्यवंशा अंत झाला । रामावतार संपला । मज ऐसें वाटतें ॥४६॥ कीं अवधि पुरली अयोध्येची । कीं ध्यानसिद्धी संपली शिवाची । कीं कुळवल्ली रविवंशाची । निदानफळा पैं आली ॥ ४७ ॥ कीं जनांचें अभाग्य जाणोन । श्रीराम करिता झाला गमन । कीं स्वर्गीच्या देवां उत्कंठा दारुण । श्रीरामदर्शनालागूनी ॥ ४८ ॥ कीं लक्ष्मणजानकीवियोगें । श्रीराम श्रमला दुःखमार्गें । म्हणोनि स्वर्गा जाणें प्रसंगें । ओढवलें श्रीरामा ॥ ४९ ॥ कीं अभक्ति बंधूंची देखिली । म्हणोनि श्रीरामें अयोध्या त्यागिली । कीं अयोध्येचे जनीं अभिशापिली । जानकी ते निदानें ॥ ५० ॥ ऐसें जाणोनि श्रीरघुनाथ । स्वर्गाप्रति असे जात । तरी आपुला निश्चयहेत । श्रीरामदर्शना पैं जावें ॥ ५१ ॥ ऐसें शत्रुघ्नें भावोनि मानसीं । वांटा केला निजराज्यासी । दों ठायीं दों पुत्रांसी । राज्य देता पैं झाला ॥ ५२ ॥ सुबाहुनामें ज्येष्ठ सुत । तया मधुपुराचें राज्य देत । वैदेशीं कनिष्ठ सुत । शत्रुहंती स्थापिला ॥ ५३ ॥ शत्रुहंती आणि सुबाहु । दों ठायीं स्थापिले दोघे भाऊ । धनधान्य परिवार देवोनि बहु । प्रजापाळणीं ठेविले ॥ ५४ ॥ आपण आरूढोनि दिव्यरथीं । रथ प्रेरिला शीघ्रगतीं । येवोनियां तीन रातीं । अयोध्येप्रती प्रवेशला ॥ ५५ ॥ आला श्रीरामभवना उजु । पुढें देखिला रघुराजु । अतिदिव्य तेजःपुंजु । पीतांबरधारी बैसला ॥ ५६ ॥ घालोनियां पद्मासन । परिवेष्टित मुनिगण । ऐसा देखोनि रघुनंदन । साष्टांग नमन पैं केलें ॥ ५७ ॥ कर जोडोनि शत्रुघ्न । करिता झाला निजराज्यकथन । म्हणे स्वामी दोघे नंदन । राज्य देवोन स्थापिले ॥ ५८ ॥ तुमचा महाप्रयाणसमय । ऐकोनि वाटलें आश्चर्य । माझा ऐसा असे निश्चय । तुम्हांबरोबरी सेवेसि यावें ॥५९॥ सदासर्वदा निशिंदिन । न विसंबावे तुझे चरण । अखंड वाचे नामस्मरण । करीत कीर्तन असावें ॥ ६० ॥ ऐसें बोलतां लवणारी । तंव वानर ऋक्ष ते अवसरीं । येते झाले त्रिशिरारि- । -प्रयाणकाळ देखोनी ॥ ६१ ॥ आले लंकावासी निशाचर । आले देशोदेशींचे वानर । देव गंधर्व विद्याधर । सुर किन्नर पैं आले ॥ ६२ ॥ श्रीरामाचें महाप्रयाण । जाणोनियां राष्ट्रींचे जन । येते झाले परिवारून । कुटुंबेंसीं ते काळीं ॥ ६३ ॥ वानर म्हणती श्रीरघुराजा । प्रयाणसमयो हा तुझा । होतो म्हणोनि वानरफौजा । निजदर्शना पैं आल्या ॥ ६४ ॥ तुमचें स्वर्गाप्रति गमन । ऐसें वानरीं ऐकोन । आणि राक्षसेंसीं बिभीषण । भेटी घ्यावया आलासे ॥ ६५ ॥ ऐकोनि वानरांची वाणी । बोलता झाला कोदंडपाणी । म्हणे बिभीषणा तुजलागोनी । एक कारण सांगतों ॥ ६६ ॥ प्रजापाळण करावें । श्रीरामस्मरण असों द्यावें । चिरंजीव होवोनि रहावें । चंद्रसूर्यपर्यंत ॥६७॥ रविशशी जंववरी गगनीं । विचरती मेरुप्रदक्षिणेलागूनी । तंवपर्यंत राजधानी । लंके राज्य करावें

१ विलंब, २ हे ब्रह्मदेवा ! ३ शेवट, ४ योजून, ५ सरळ.

६ पुत्र. ७ रात्रंदिवस, ८ सोडावे, ९ शत्रुघ्न. १० राम,

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

॥६८॥ बिभीषणासी देवोनि वर । मस्तकीं ठेविला अभयकर । मग पाचारिला कुमर । अंजनीचा परियेसा ॥ ६९ ॥ श्रीराम म्हणे गा हनुमंता । तूं आमुचा प्राणदाता । उपकार तुझे आठवितां । न गणवती असंख्य ॥ ७० ॥ तुवां रहावें या लोकीं जाण । जंवपर्यंत जीव धरिती प्राण । तंव करीं कथाश्रवण । रामायण अनुपम्य ॥ ७१ ॥ तूं वज्र-देही चिरंजीवी । राहें स्वरूपीं अनुभवीं । काळ-क्रमणा ऐसी करावी । मम आज्ञेकरोनी ॥ ७२ ॥ ऐसा मारुतीस देवोनि वर । मग पाचारिला मैंद वानर । तया अमृत पाजोनि अपार । अमर केला रघुराजें ॥ ७३ ॥ अमर होवोनि मैंदें रहावें । स्वेच्छा पृथ्वी विचरावें । माझ्या पुत्रां प्रतिपाळावें । कृपा करोनि वानरा ॥ ७४ ॥ जांबवंतासी म्हणे श्रीरघुपती । तुमची पुढें पुरवीन आर्ती । मग पाचारिला कपिपती । वानरांचा निजस्वामी ॥७५॥ सुग्रीवासी म्हणे रघुराज । तुझा अंगद जो कां आत्मज । तयासहित करीं राज्य । किष्किंधेचें निजबळें ॥७६॥ उर्वरित वानर बोलाविले । आज्ञा देवोनि पाठविले । मग वसिष्ठासी विनविलें । अग्निहोत्र सिद्ध कीजे ॥७७॥ वसिष्ठें करोनि अग्नि-होत्र सिद्ध । प्रज्वाळिला जातवेद । यज्ञपात्रांस-हित शुद्ध । पुढें केला श्रीरामाज्ञेनें ॥ ७८ ॥ श्रीरामें करोनि संध्यास्नान । ब्रह्मचर्यव्रत अवलंबून । हातीं कुश[३] विभूति लावोन । दिव्य वस्त्रें नेसला ॥ ७९ ॥ यज्ञोपवीत कंठीं उत्तरी । बैसोनियां उत्त-मासनावरी । नाहीं मोह माया शरीरीं । पुत्रपौत्र-राज्याची ॥ ८० ॥ नाहीं ममता राज्याचा मान । नाहीं कर्मठता अभिमान । जैसा शरत्[४]काळींचा चंद्र जाण । निजतेजें शोभतसे ॥ ८१ ॥ ऐसा निष्कर्म तो रघुपती । आसन घालोनि स्वर्गगम-नार्थी । दक्षिणांगीं बैसवोनि शक्ती । कनकमय योषिता ॥ ८२ ॥ जवळी ठेवोनि शस्त्रसंभार । धनुष्यें रत्नजडित अपार । पुढें करोनि ॐकार वषट्कार । आणि थोर थोर ऋषिमंडळी ॥ ८३ ॥ द्वारीं उभे द्विजवर । सवें स्त्रिया कन्या कुमर । वृद्ध तापसी दिगंबर । गमनालागीं उद्यत[६] ॥ ८४ ॥ पंडित जोशी वेव्हारे[७] । वेदपाठक अग्निहोत्री सप-रिवारें । चांटे सोवनी शिपी रंगारे । सोनार सुतार रजक[९] पैं ॥ ८५ ॥ नापित कुलाल साळी । भुसारी वाणी तांबोळी । मणियार रथकार तेली । आणि गवळी निघाले ॥ ८६ ॥ माहार डोहर चर्मक । कोळी भिल्ल नाळिक । इतर जातींचेही लोक । श्रीरामसंगें निघाले ॥ ८७ ॥ कांसार लोहार धनुर्धर । योगी तापसी मुनीश्वर । सपत्नीक अप-त्नीक विधुर । लहान थोर निघाले ॥ ८८ ॥ कोणा नाहीं मागिला मोहो । कोणी कोणाचा न धरी स्नेहो । कोणी कोणा न पुसती पहा हो । श्रीरामासंगें निघाले ॥ ८९ ॥ कोणा नाहीं कुटुंबाची चिंता । कोणा नाहीं दरिद्रता । कोणा नाहीं कामकामता । श्रीरामाचे संगतीं हो ॥ ९० ॥ हृष्ट पुष्ट नगरींचे जन । कोणा नाहीं दुःख दैन्य । ऐसें देखोनि भरत शत्रुघ्न । श्रीरामा मात जाणविली ॥९१॥ भरत म्हणे श्रीरामचंद्रा । योगिमानसमोहन गुण-समुद्रा । पुत्रस्त्रियांसहित नरेंद्रा । अयोध्याजन द्वारीं आले ॥ ९२ ॥ तुम्हांसवें करावें गमन । म्हणोनि उभे द्वारीं जन । आनंदें निर्भर[१०] होवोन । तुमचा संग इच्छिती ॥ ९३ ॥ स्वर्गगमनाकारणें । लोक बैसले धरोनि धरणें । तरी कृपा करोनि राजीवनयनें । या समस्तांसी पैं न्यावें ॥ ९४ ॥ हे चराचर जीव अवघे । कृपाळुवें सवें न्यावे । ऐसें ऐकोनि श्रीराघवें । नगरासहित निघता झाला ॥९५॥ अयोध्या सांडोनि अर्ध योजन । शरयूतीरीं केलें प्रस्थान । एका विनवी जनार्दन । सावधान अवधारा ॥९६॥ पुढिले प्रसंगीं चतुरानन । श्रीरा-मास सामोरा येईल जाण । परिवारेंसीं श्रीरघुनं-दन । न्यावयालागीं स्वर्गातें ॥ ९७ ॥ पुढील पुण्य-पावन कथा । अलभ्य लाभ होईल श्रोतां । श्रीरा-माचें प्रयाण ऐकतां । कलिकल्मषें[११] नासती ॥ ९८ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकार-टीकायां श्रीरामशरयूतीरप्रस्थानं नाम षट्सप्तति-तमोऽध्यायः ॥ ७६ ॥ ओंव्या ॥९८॥ श्लोक ॥ २ ॥

अध्याय सत्त्याहत्तरावा

॥ श्रीसीतापतये नमः ॥ अयोध्या सांडोनि अर्ध योजन । पुढें निघाला श्रीरघुनंदन । देखोनि तीर

१ पुत्र. २ अग्नि. ३ दर्भ. ४ शरदृतूंतील. ५ स्त्री. ६ तयार. ७ व्यवहार करणारे. ८ व्यापारी. ९ धोबी. १० परिपूर्ण. ११ कलीसंबंधीं, पातकसमूह.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

शरयूचें पावन । तेथें वस्तीसी राहिला ॥१॥ त्या शरयूचा महिमा कैसा । जो देवांसी अगम्य सहसा । जीतें वर्णितां महेशा । पार न कळे निर्धारीं ॥२॥ मानससरोवरीं जन्मली । उत्तरेची दक्षिणे चालिली । भागीरथीसी मिळती झाली । आपुलेनि पूर्वपुण्यें ॥३॥ ऐसें शरयूतीर मनोहर । स्नानें निष्पाप होती नर । तया तीरीं श्रीरघुवीर । प्रस्थानासी उतरला ॥ ४ ॥ तंव येरीकडे चतुरानन । समस्त देवांसीं परिवारोन । दिव्य विमानीं सुरगण । आपुलाल्या बैसले ॥५॥ जैसे हंस आपुलाल्या मेळीं । उडोनि बैसती तडागांचे पाळीं । तैसे देव तये काळीं । परिवारेंसीं मिरवले ॥ ६ ॥ गगनीं विमानांची दाटी । ऋषी मिळाले कोट्यनुकोटी । पाहती अंतरीं लक्षोनि जगजेठी । श्रीरामातें ते काळीं ॥ ७ ॥ विमानाचे ज्योतीचेनि प्रभावें । दशदिशा तेज हेलावे । तयामाजी ब्रह्मदेवें । पुष्पवृष्टि करिजेली ॥ ८ ॥ अंजलि भरोनि कुसुमेंकरीं । टाकिते झाले श्रीरामावरी । तयाचे सुवासें पवन अंबरीं । पांगुळला सुगंधें हो ॥ ९ ॥ अप्सरा नृत्य करिती गगनीं । गंधर्व सुस्वरें गाती गाणीं । तंव ब्रह्मा तये क्षणीं । श्रीरामासी बोलता झाला ॥ १० ॥ विधाता म्हणे श्रीरामचंद्रा । भाग्यें देखिलासी गुणसमुद्रा । परिवारेंसीं या नरेंद्रा । भक्तजनां सुख द्यावें ॥ ११ ॥ तूं वैकुंठाचा नायक । तुज नेणती मतिमंद लोक । तूं यज्ञभोक्ता पुण्यश्लोक । अचिंत्य अव्यक्त स्वरूप तुझें ॥ १२ ॥ तूं गुणातीत निर्विकार । तूं निष्कर्म निरुपचार । श्रुतिशास्त्रांसी न कळे पार । तूं अगोचर निजवेदा ॥ १३ ॥ तुज नाहीं जन्ममरणवार्ता । तूं सर्वसाक्षी सर्वभर्ता । तुझें ध्यान कैलासनाथा । रात्रंदिवस हेंचि पैं ॥ १४ ॥ स्वस्वरूपीं समाधान । निजदेह होय मिथ्या जाण । ऐसेपरीचे साधुजन । आत्मनिष्ठे राहती ॥ १५ ॥ जैसा बहुरूपिया नाना सोंगें धरी । त्यागितां एकदेहधारी । तैसा तूं रामा हेंही करीं । आत्मसाक्षात्कारीं राहून ॥ १६ ॥ भुजंगें सांडी त्वचेतें । काय हानि होय देहातें । तैसें श्रीरामा मानीं निजस्वरूपातें । ठायीं ठेवीं देवाधिदेवा ॥ १७ ॥ ऐसें ब्रह्मा बोलिल्यावरी । मग श्रीराम रणकेसरी । स्नानें करोनि दिव्यशरीरी । बंधूंसहित पैं झाला ॥ १८ ॥ शरयूचें करोनि स्नान । बंधूंसमवेत श्रीरघुनंदन । दिव्य देह शोभायमान । धरिला जाण श्रीरामें ॥ १९ ॥ तें शरीर धरिलें कैसें । जया देहीं देहत्व नसे । जाणोनियां देवीं ऐसें । पूजाविधान पैं केलें ॥ २० ॥ दिव्य देह श्रीरामाचा । देखोनि सकळ बोलती वाचा । म्हणती आजि दिन दैवाचा । उदय झाला बहु दिवसां ॥ २१ ॥ सिद्ध गंधर्व किन्नर । ऋषी तापस विद्याधर । पन्नगें देव राक्षस वानर । उल्हास थोर पावले ॥ २२ ॥ सर्वांचे झाले पूर्ण मनोरथ । दिव्यदेही देखिला श्रीरघुनाथ । भला भला म्हणों लागले तेथ । श्रीरामासी ते काळीं ॥ २३ ॥ तदनंतर श्रीरघुनंदन । विधात्याप्रति बोले वचन । म्हणे सत्यलोकनायका हे जन । मजसमागमें स्वर्गा येताती ॥ २४ ॥ यांसी तुम्हीं उद्धरावें । मनोरथ पूर्ण करावे । सामोपचारें स्वर्गा न्यावें । भोग भोगावया तेथींचे ॥ २५ ॥ हे मजबरोबरी श्रमले वनवासीं । अन्नउदकेंवीण झाले क्लेशी । आतां सुख होय जेणें प्रकारेंसीं । तेंचि यांसी करावें ॥ २६ ॥ ब्रह्मा म्हणे रावणारी । हे युक्ती विचारिली बरी । तूं भक्तकाजकैवारी । ऐसीं श्रुतिपुराणें गर्जती ॥ २७ ॥ ऐसें सृष्ट्याचें वचन । सुधारसापरीस गोड गहन । समस्तीं जनीं ऐकोन । शरयूस्नान पैं केलें ॥ २८ ॥ पूर्व देह त्यागितां । कोणा नाहीं दैन्यचिंता । उल्हासोनि श्रीरघुनाथा । अंतकाळीं स्मरती हो ॥ २९ ॥ दिव्य देह धरोनि समस्तीं । विमानीं बैसोनि शोभती । चतुष्पादादि पक्षियाती । स्वर्गाप्रती निघाले ॥ ३० ॥ पर्वत वृक्ष अयोध्येचे जाण । सर्वेही विमानीं आरूढोन । श्रीरामासवें करिती गमन । जाते झाले ते समयीं ॥ ३१ ॥ श्रीरामासवें बैसोनि विमानीं । जाते झाले स्वर्गालागूनी । पुढें जया जे लोक नेमिले तेथोनी । आपुलाले स्थळा पावले ॥ ३२ ॥ जैंवी विहंगमें एक होऊन । उडाले आकाशीं करिती गमन । पुढें पसरले दश दिशां जाण । तैसे वानरगण निजलोका गेले ॥ ३३ ॥

१ वेष्टित होत्साता. २ सरोवराचे कांठीं. ३ आकाशांत. ४ सर्प. ५ ब्रह्मदेवाला. ६ हे ब्रह्मदेवा ! ७ हे रावणशत्रो (रामा !) ८ ब्रह्मदेवाचें. ९ पक्षी.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

जनोलोक तपोलोक । आणि वैकुंठ कैलास सत्यलोक । यांचे अधिकारी जे जे देख । ते त्या त्या स्थळा पैं गेले ॥ ३४ ॥ श्रीराम वैकुंठासी गेला । सर्वें अयोध्येचा लोक नेला । नगरीं कोणी नाहीं राखिला । पक्षिआदिकरोनी ॥ ३५ ॥ रविसुत[1] रविलोकीं । जावोनि राहिला सुखीं । इतर तापस राक्षस ऋषी । सत्यलोकीं राहिले ॥ ३६ ॥ करितां श्रीरामस्मरण । स्वर्गीं राहिले लोकगण । वाल्मीकें इतुकें कथिलें जाण । रामायण साजिरें ॥ ३७ ॥ श्रीराम वैकुंठा करितां गमन । मार्गीं भेटले पुरंदरादि[2] देवगण । तयांची पूजा घेवोन । निजधामा चालिला ॥ ३८ ॥ वैकुंठा जातां श्रीरामासी । मार्गीं उद्धरिले देवऋषी । जयांची इच्छा होती जैसी । मनोरथ पूर्ण केले त्यांचे ॥ ३९ ॥ ऐसा लीलाविग्रही श्रीरघुनाथ । खेळ खेळूनि उद्धरिला भक्त । नाममात्रें मोक्ष देत । एक वेळ आठवलिया ॥ ४० ॥ ब्रह्मचर्य धरोनि व्रत । वैकुंठा गेला जानकीकान्त । ऐसें ऐकोनि श्रोते आक्षेपीत[3] । म्हणते झाले वक्तया ॥ ४१ ॥ ब्रह्मचर्यव्रत धरोन । निजधामा गेला श्रीरघुनंदन । हा नेम धरावया कारण । काय असे सांगिजे ॥ ४२ ॥ व्रत धरावया श्रीरघुपती । काय कारण वाटे चित्तीं । तें सांगिजे आम्हांप्रती । संदेहनिवृत्तीकारणें ॥ ४३ ॥ ऐसें ऐकोनि श्रोतयांचें वचन । अंगें निवाला एका जनार्दन । म्हणे तुमच्या प्रश्नाचें खंडन । मधुरा वाणीं करीतसें ॥ ४४ ॥ ब्रह्मचर्य धरावया व्रत । काय कारण श्रीरघुनाथ । सावध होवोनि तुम्हीं संत । अनन्यभावें ऐकावें ॥ ४५ ॥ पुढिले श्रीकृष्ण अवतारीं । पूर्ण ब्रह्म प्रकटावया श्रीहरी । भोगोनि सोळा सहस्र नारी । ब्रह्मचारी म्हणविणें ॥ ४६ ॥ भोगोनि भोग अभोक्ता । ऐसी प्रकट करावया कथा । उल्हास थोर अच्युता । दाखवितां निजमहिमा ॥ ४७ ॥ याकारणें ब्रह्मचर्यव्रत । धरिता झाला श्रीरघुनाथ । पुढील रसाळ चरित्र । प्रकट करावयालागूनी ॥ ४८ ॥ तंव श्रोते म्हणती कवीश्वरा । रामावतारीं स्त्रिया अपारा । दान दिधल्या काय कारण चतुरा । सुवर्णाच्या अग्निहोत्रीं ॥ ४९ ॥ होम करितां प्रतिदिनीं । सुवर्णस्त्री देतसे दानीं । तयाचें फळ आम्हांलागूनी । काय असे तें सांगावें ॥ ५० ॥ वक्ता म्हणे अहो जी स्वामी । तुमचे प्रश्ननदीचे संगमीं । रामकथासिंधु मिळालों मी । ऐसें भावीतसें मानसीं ॥ ५१ ॥ तुमचे प्रश्नकथेची वृद्धी । तुमचे वचनलोभें समाधी । तुमचे कृपेनें कैवल्यपदीं । पाविजे हो दातारा ॥ ५२ ॥ तुमचेनि प्रश्नें श्रीरामस्मरण । होतसे अधिकाधिक जाण । तुमचे प्रश्नें भवदोषदहन । ब्रह्म पूर्ण होइजे ॥ ५३ ॥ तुमचे प्रश्नाचें उत्तर । द्यावया मी कोण किंकर । परी सलगी करोनि सादर । तुम्हांप्रति सांगतसें ॥ ५४ ॥ रामावतारीं स्त्रिया दान । केल्या म्हणोनि पावला श्रीकृष्ण । पूर्वसंचित अवश्य जाण । भोगणें पडे देवादिकां ॥ ५५ ॥ पूर्वीं स्त्रिया देवोनि दान । त्या कृष्णावतारीं पावला जाण । यालागीं श्रुतिप्रमाण । दिधल्यावांचोनि न पाविजे ॥ ५६ ॥ 'नादत्तमुपतिष्ठतु'। याचा ऐसा असे अर्थु । स्वमुखें बोलिला श्रीअच्युतु । पूर्वदत्त पाविजे ॥ ५७ ॥ यापरी श्रोतयांचें आक्षेपउत्तर । कवीनें देवोनि त्याचें प्रत्युत्तर । पुढें कथासमाप्तीचा विचार । आरंभिला जाणावा ॥ ५८ ॥ सर्वेंचि आठवलें माझिया चित्ता । तें परिसावें जी श्रोतां । जानकीवियोगें श्रीरघुनाथा । कष्ट अपार पैं झाले ॥ ५९ ॥ एकपत्नीव्रताचे नेमें । क्लेश भोगिले श्रीरामें । आणि वनफळें भक्षिलीं उत्तमें । तेणेंकरोनि श्रम झाला ॥ ६० ॥ ऐसीं दोनी व्रतें अति दुस्तरें । धरिलीं होतीं श्रीरघुवीरें । तीं श्रमरूप जाणोनि चतुरें । कृष्णावतारीं त्यागिलीं ॥ ६१ ॥ व्रतनेमाचा धरोनि वीट । अवतार धरिला अति श्रेष्ठ । करावया पूर्णत्व प्रकट । ऐसी लीला धरियेली ॥ ६२ ॥ घेवोनि कृष्णरूपाची बुंथी । लीलाविग्रही श्रीपती । आसक्त होवोनि वनितीं । चोरावया हिंडतसे ॥ ६३ ॥ भोगी गौळियांच्या नारी । दहीं चोरी घरोघरीं । दांवीं बांधितां सुंदरी । यशोदा आश्चर्य पावली ॥ ६४ ॥ ऐसा लीलाविग्रही जनार्दन । तोचि दाशरथी रघुनंदन । प्रकट करोनि पूर्णपण । खेळ खेळे नानापरी ॥ ६५ ॥ रामायणींचा एक श्लोक । भवबंधच्छेदक समर्थ देख । कथूनि गेला वाल्मीक । शतकोटि संख्या हो ॥ ६६ ॥

१ यम. २ इंद्र वगैरे. ३ शंका घेत. ४ भक्तिपूर्वक.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

श्लोकार्ध अथवा एक चरण । जो नर सादर करी श्रवण । तो पढियंता श्रीरामा पूर्ण । मुमुक्षांमाजि आगळा ॥ ६७ ॥ श्रीरामउच्चारें गणिका । तत्काळ गेली वैकुंठलोका । हा निश्चय होता कैलासनायका । ध्येयमूर्ति म्हणोनी ॥ ६८ ॥ उत्तरकांड संपतेअंतीं । वैकुंठा गेला लक्ष्मीपती । ऐसें चरित्र ठेवोनि त्रिजगतीं । उद्धरावयाकारणें ॥ ६९ ॥ एका जनार्दना शरण । झालें उत्तरकांड संपूर्ण । पुढें श्रोतीं करावें श्रीरामस्मरण । राम राम म्हणावें ॥ ७० ॥ आदिपासोनि अंतींवरी । श्रीरामकथा अमृतलहरी । सादर जो श्रवण करी । तोचि संसारीं धन्य होय ॥ ७१ ॥ स्वस्ति श्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे एकाकारटीकायां श्रीरामअयोध्याजनसमवेतवैकुंठप्रवेशो नाम सप्तसप्ततितमोऽध्यायः ॥ ७७ ॥ ओंव्या ॥ ७१ ॥

॥ समाप्तं उत्तरकांडम् ॥

श्रीभावार्थरामायण समाप्त.

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

CC-O. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative

Vinay Avasthi Sahib Bhuvan Vani Trust Donations

CC-0. Nanaji Deshmukh Library, BJP, Jammu. An eGangotri Initiative